# पवित्र शास्त्र

ह्मणजे

# प्राचीन व नवा करार

मूलभाषांतून उतरून घेतलें

पवित्रशास्त्रप्रसारक मंडळीच्या मुंबईतल्या सहायकारक मंडळीसाठीं

अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिलें.

१८५५

---

# THE HOLY BIBLE

IN THE

## MARÁṬHÍ LANGUAGE.

---

BOMBAY:

PRINTED FOR THE BOMBAY AUXILIARY BIBLE SOCIETY

AT THE AMERICAN MISSION PRESS.

1855.

## प्राचीन करारांतील पुस्तकांचीं नांवें.

# नव्या करारांतील पुस्तकांचीं नांवें.

# मोश्याने लिहिलेलें पहिलें पुस्तक;

## ह्मणजे

# उत्पत्ति.

### अध्याय १.

प्रारंभीं देवाने आकाश व पृथ्वी यांस उत्पन्न
केलें. २ तेव्हां पृथ्वी अस्ताव्यस्त व शून्य
होती, आणि जलमयाच्या पाठिवर काळोख होता,
आणि देवाचा आत्मा पाण्याच्या पाठिवर हालत
होता. ३ तेव्हा देव बोलला कीं, उजेड होवो,
मग उजेड झाला. ४ आणि देवाने पाहिलें
कीं उजेड उत्तम आहे, आणि देवाने उजेड
व काळोख यांस वेगळें वेगळें केलें. ५ मग
देवाने उजेडाला दिवस ह्मटला, आणि काळो-
खाला रात्रि ह्मटली; याप्रमाणें सायंकाळ व
सकाळ होऊन पहिला दिवस समाप्त झाला
६ मग देव बोलला कीं, पाण्याच्या मध्यें अंतराळ
होवो, आणि तें पाण्यापासून पाणी वेगळें करो.
७ तसें देवाने अंतराळ उत्पन्न केलें, आणि अंत-
राळाखालील जें पाणी आणि अंतराळावरील जें
पाणी त्यांस वेगळें वेगळें केलें, मग तसें राहिलें.
८ तेव्हां देवाने अंतराळाला आकाश ह्मटलें;
याप्रमाणें सायंकाळ व सकाळ होऊन दुसरा
दिवस समाप्त झाला.

९ मग देव बोलला कीं, आकाशाखालील पाणी
एका जाग्यांत सांचोत आणि कोरडी भूमि दिसो;
तेव्हां तसें झालें. १० नंतर देवाने कोरड्या
भूमीस पृथ्वी ह्मटली, आणि पाण्यांच्या संचयाला
समुद्र ह्मटलें; आणि देवाने पाहिलें कीं उत्तम
आहे. ११ मग देव बोलला कीं, बीज देणारें
गवत व हिरवळ, आणि फळझाड आपल्या जाती-
प्रमाणें फळ देणारें ज्याचें बीज आपल्यांत पृथ्वी-
वर होईल यांस पृथ्वी उपजवो. १२ तेव्हां
तसें झालें, ह्मणजे गवत व हिरवळ आपल्या
जातीप्रमाणें बीज देणारें आणि फळ देणारें झाड
ज्याचें बीज आपल्या जातीप्रमाणें आपल्यावर
असतें, यांस पृथ्वीने उपजविलें; तेव्हां देवाने
पाहिलें कीं उत्तम आहे. १३ याप्रमाणें सायंकाळ
व सकाळ होऊन तिसरा दिवस समाप्त झाला.

१४ मग देव बोलला कीं, दिवस व रात्री
यांस वेगळें वेगळें करायासाठीं आकाशमंडळांत
ज्योती होवोत, आणि खुणा व नेमकाळ व दिवस
व वर्षें यांसाठीं होवोत. १५ आणि पृथ्वी-
वर प्रकाशायासाठीं आकाशमंडळांत ज्योती असे
होवोत; तेव्हां तसें झालें. १६ ह्मणजे देवाने
दोन मोठ्या ज्योती केल्या, जी मोठी ज्योति ती
दिवस चालवायासाठीं आणि जी लाहन ज्योति
ती रात्रि चालवायासाठीं केली, आणि तारेहि
केले. १७–१८ तेव्हां पृथ्वीवर उजेड द्याया-
साठीं, आणि दिवस व रात्रि चालवायासाठीं आणि
उजेड व काळोख यांस वेगळें वेगळें करायासाठीं
देवाने त्यांस आकाशमंडळांत ठेविलें; तेव्हां
देवाने पाहिलें कीं उत्तम आहे. १९ याप्र-
माणें सायंकाळ व सकाळ होऊन चवथा दिवस
समाप्त झाला. २० मग देव बोलला कीं,
श्वासवान् जीव जंतु यांस पाणी फार उपजवो,
आणि पांखरेंहि पृथ्वीवरतें आकाशमंडळाच्या अं-
तराळांत उडोत. २१ तेव्हां मोठे मासे आणि
प्रत्येक जिवंत वळवळणारा जंतु जीं पाण्यापासून
फार उपजलीं त्यांस त्यांच्या जातीप्रमाणें आणि
प्रत्येक सपक्ष पांखराला त्या त्याच्या जातीप्रमाणें
देवाने उत्पन्न केलें, आणि देवाने पाहिलें कीं
उत्तम आहे. २२ तेव्हां देवाने त्यांस असा
आशीर्वाद दिल्हा कीं, तुह्मी सफळ होऊन वाढा
आणि समुद्रांतील पाण्यांत वृद्धिंगत व्हा, आणि
पृथ्वीवर पांखरें वाढोत. २३ आणि सायंकाळ
व सकाळ होऊन पांचवा दिवस समाप्त झाला.

२४ मग देव बोलला कीं, एकएक जातीं-
तील श्वासवान् जीव, ह्मणजे एकएक जातींतील
ग्रामपशू व वळवळणारे व वनपशू यांस पृथ्वी
उपजवो. २५ तेव्हां तसें झालें, ह्मणजे देवाने
एकएक जातींतील वनपशू व एकएक जातींतील

ग्रामपशू व एकएक जातींतील भूमीवरील सर्व
वळवळणारीं यांस उत्पन्न केलें; आणि देवानें
पाहिलें कीं उत्तम आहे. २६ नंतर देव बो-
लला कीं, आह्मी आपल्या प्रतिछायेप्रमाणें आ-
पल्या प्रतिमेसारिखें माणूस उत्पन्न करूं; आणि
तीं समुद्रांतील मास्यांवर व आकाशांतील पांख-
रांवर व पशूंवर व सर्व पृथ्वीवर व पृथ्वीवरल्या
प्रत्येक वळवळणाऱ्या जंतूंवर धनीपण करोत.
२७ तसें देवानें आपल्या प्रतिछायेप्रमाणें मा-
णसाला उत्पन्न केलें, देवाच्या प्रतिछायेप्रमाणें
त्यानें त्याला उत्पन्न केलें; पुरुष आणि स्त्री
असीं त्यांस उत्पन्न केलीं. २८ तेव्हां देवानें
त्यांस आशीर्वाद दिल्हा, आणि देवानें त्यांस ह्म-
टलें कीं, तुह्मी सफळ होऊन वाढा आणि पृथ्वी
भरा, आणि तिला जिंकून समुद्रांतील मास्यांवर
व आकाशांतील पांखरांवर व पृथ्वीवरल्या सर्व
फिरणाऱ्या जिवांवर धनीपण करा. २९ आणि
देव बोलला, पाहा संपूर्ण पृथ्वीच्या पाठीवर जी
बीज देणारी अवघी हिरवळ, आणि बीज देणाऱ्या
ज्या सर्व झाडांवर झाडाचें फळ आहे तें म्या तु-
ह्मास दिल्हें आहे, खाण्यासाठीं तुमचें होईल.
३० आणि पृथ्वीवरच्या सर्व पशूंला व आका-
शांतल्या सर्व पांखरांला व पृथ्वीवर सर्व वळवळ-
णारीं ज्यांत श्वासरूप जीव आहे त्यांस अवघी
कोंवळी हिरवळ खाण्यासाठीं दिल्ही आहे आ-
णि तसें झालें. ३१ तेव्हां देवानें जें अवघें
उत्पन्न केलें त्याला न्याहाळिलें, आणि पाहा, तें
फार उत्तम होतें, आणि सायंकाळ व सकाळ हो-
ऊन साहावा दिवस समाप्त झाला.

## अध्याय २.

तसें आकाश व पृथ्वी व यांतील सर्व समुदाय,
हीं समाप्त झालीं. २ मग देवानें आप-
लें जें काम केलें होतें त्यापासून तो सातव्या दि-
वसीं थांबला, आणि आपलें सर्व जें काम आपण
केलें होतें त्यापासून सातव्या दिवसीं स्वस्थ रा-
हिला. ३ आणि देवानें सातव्या दिवसाला
आशीर्वाद दिल्हा आणि त्याला पवित्र केलें, का-
रण कीं त्यांत आपलें सर्व जें उत्पत्तीचें काम त्या-
पासून स्वस्थ राहिला.

४ आकाश व पृथ्वी यांच्या उत्पत्तीमध्यें
त्यांचीं उपजणीं असीं, ५ ह्मणजे ज्या काळीं
परमेश्वर देव यानें पृथ्वी व आकाश, आणि
पृथ्वीवर झाल्यापूर्वी असें भूमीवरलें प्रत्येक झुडप
आणि उगवल्यापूर्वी असी प्रत्येक हिरवळ, यांस
उत्पन्न केलें; कां तर परमेश्वर देव यानें पृथ्वी-
वर पाऊस पाडला नव्हता, आणि भूमीची चाक-
री करायास माणूस नव्हता. ६ तेव्हां पृथ्वी-
पासून धुकें वरतें गेलें, आणि त्यानें भूमीची सर्व
पाठ शिंपिली. ७ तेव्हां परमेश्वर देव यानें
भूमींतील मातीचा माणूस घडिला आणि त्याच्या
नाकपुड्यांमध्यें जिवाचा श्वास फुंकिला, मग मा-
णूस श्वासवान जीव झाला.

८ तेव्हां परमेश्वर देव यानें एदेनांत पूर्वे-
कडे बाग लाविला, आणि ज्या माणसाला त्यानें
घडिलें होतें त्याला तेथें ठेविलें. ९ आणि दृ-
ष्टीस सुंदर व खाण्यांस चांगलें, असें प्रत्येक
झाड व बागामध्यें जीवनाचें झाड आणि बरें व
वाईट जाणण्याचें झाड, हें परमेश्वर देव यानें
भूमींतून वाढविलें. १० तेव्हां एदेनांतून एक
नदी बागाचें शिंपणें करायासाठीं निघाली, आणि
तेथून फुटून चार मुळें असीं झालीं. ११ पहि-
ल्या नदीचें नाम फिशोन; ती संपूर्ण हवीला दे-
शाला वेढिती. १२ तेथें सोनें आहे, आणि
त्या देशांतील सोनें उत्तम आहे; तेथें बदेलाह
आणि शोहामपाषाण आहे. १३ आणि दु-
सऱ्या नदीचें नाम गीहोन; ती संपूर्ण कुश-
देशाला वेढा घालती. १४ आणि तिसऱ्या
नदीचें नाम हिद्देकेल, ती आश्शूराच्या पूर्वे-
कडे वाहती; आणि जी चवथी नदी, ती फ-
राथ आहे.

१५ तर परमेश्वर देव यानें त्या माणसा-
ला घेऊन एदेनांतील बागाची चाकरी करायास
आणि त्याचें रक्षण करायास त्यांत ठेविलें.
१६ तेव्हां परमेश्वर देव यानें त्या माणसाला
असी आज्ञा दिल्ही कीं, बागांतील प्रत्येक झाडा-
वरचें तूं खात जा. १७ परंतु बरें व वाईट
जाणण्याच्या झाडावरचें तूं खाऊं नको, कां तर
तूं त्यावरचे खासील त्या दिवसीं तूं मरसीलच
मरसील.

१८ आणि परमेश्वर देव बोलला कीं,
हा माणूस एकला असणें हें बरें नाहीं, मी ह्या-
च्यासाठीं ह्याच्या योग्य सहायकरी उत्पन्न करीन.
१९ जेव्हां परमेश्वर देव याने भूमींतून भूं-
यीवरील प्रत्येक पशूला आणि आकाशांतील प्र-
त्येक पांखरांला घडिलें होतें, तेव्हां त्याने आ-
दाम त्यास कोणतीं नांवें ठेवील हें पाहावें ह्मणून
त्याजवळ आणिलें; आणि आदामाने एकएकाला
श्वासवान जिवाला जें कांहीं ह्मटलें, तें त्याचें नांव
झालें. २० तसें आदामाने प्रत्येक ग्रामपशूला
व आकांतील पांखरांला व प्रत्येक वनपशूला नांवें
दिल्हीं; परंतु आदामाला आपल्या योग्य सहा-
यकरी मिळाला नव्हता. २१ तेव्हां परमेश्वर
देव याने आदामावर गाढ झोंप लोटिली; आणि
तो झोंपेंत राहिला तेव्हां त्याच्या फांसोळ्यांतील
एक घेऊन तिच्या ठिकाणीं मांस भरिलें. २२
आणि परमेश्वर देव याने जी फांसोळी त्या
माणसांतून घेतली तिची स्त्री केली गेली; मग
तिला त्या माणसाजवळ आणिलें. २३ ते-
व्हां आदाम बोलला, ह्या वेळेस ही माझ्या
हाडांतील हाड आणि माझ्या मांसांतील मांस
झाली आहे, हिला इशी ह्मणजे स्त्री असी
ह्मणावी, कां तर ही इश ह्मणजे पुरुष यांतून
घेतली गेली. २४ ह्यावरून पुरुष आपल्या
बापाला व आपल्या आईला सोडून आपल्या
स्त्रीसीं जडेल, आणि तीं एक देहरूप हो-
तील. २५ तेव्हां तो माणूस आणि त्याची
स्त्री तीं दोघें नागवीं होतीं, परंतु लाजलीं
नव्हतीं.

## अध्याय ३.

तेव्हां भूयीवर जे सर्व पशू परमेश्वर देव
याने उत्पन्न केले होते त्यांपेक्षां साप धूर्त होता
आणि तो त्या स्त्रिला बोलला कीं, बागांतील सर्व
झाडांवरचें तुह्मी खाऊं नका, असें देवाने तुह्मास
सांगितलें, हें खरें कीं काय? २ मग स्त्री सा-
पाला बोलली कीं, आह्मी बागांतील झाडांच्या फ-
ळांतून खावें; ३ परंतु बागामधील जें झाड
त्याच्या फळाविषयीं देवाने असें ह्मटलें आहे कीं,
त्याजवरचें तुह्मी खाऊं नका आणि त्याला शिवूं
नका, नाहीं तर मराल. ४ मग साप स्त्रिला
बोलला कीं, तुह्मी मरालच मराल, असें नव्हे;
५ कां तर देव असें जाणतो कीं ज्या दिवशीं
तुह्मी त्यावरचें खाल त्यांत तुमचे डोळे उघडतील,
आणि तुह्मी बरें व वाईट जाणून देवासारिखीं
व्हाल. ६ तेव्हां त्या स्त्रिला असें दिसलें कीं
त्या झाडावरचें खाणें चांगलें आणि दृष्टीस सुंदर
आणि शाहाणें करण्यासाठीं आवडतें झाड; तेव्हां
तिने त्याचें कांहीं फळ घेऊन खाल्लें, आणि आ-
पल्याजवळ आपला नवरा यालाहि दिल्हें आणि
त्याने खाल्लें. ७ तेव्हां त्या दोघांचे डोळे उघ-
डले गेले, आणि आपण नागवीं असें त्यांस कळलें;
मग त्यानी अंजिराचीं पानें शिवून आपणासाठीं
वस्त्रपट्ट्या केल्या. ८ नंतर दिवसांतील वा-
ऱ्याच्या वेळेस परमेश्वर देव बागांत चालत
असतां त्याचा शब्द त्यानी ऐकिला; तेव्हां आदाम
व त्याची बायको हीं परमेश्वर देव याच्या
दृष्टीपासून बागांतील झाडांमध्यें लपालीं. ९
परंतु परमेश्वर देव आदामाला हाक मारून
त्याला बोलला, तूं कोठें आहेस? १० तेव्हां
तो बोलला कीं, म्या बागामध्यें तुझा शब्द ऐकिला
आणि मी नागवा यास्तव भ्यालों आणि लपालों.
११ मग तो बोलला, तूं नागवा असें तुला कोणी
सांगितलें? ज्या झाडावरचें तूं खाऊं नको ह्मणून
म्या तुला आज्ञा दिल्ही, त्यावरचें त्वां खाल्लें आहे
कीं काय? १२ मग तो माणूस बोलला कीं,
माझ्याजवळ जी स्त्री त्वां देऊन ठेविली, तिने
त्या झाडावरचें मला दिल्हें, यास्तव म्या खाल्लें.
१३ तेव्हां परमेश्वर देव स्त्रिला बोलला कीं,
हें त्वां कां केलें आहे? मग स्त्री बोलली कीं, सा-
पाने मला भुलविलें यास्तव म्या खाल्लें.

१४ तेव्हां परमेश्वर देव सापाला बोलला,
त्वां हें केलें आहे यास्तव सर्व ग्रामपशूंपेक्षां आणि
सर्व वनपशूंपेक्षां तूं शापित आहेस; तूं आपल्या
पोटाने चालसील, आणि आपल्या आयुष्यांतील
अवघ्या दिवसांत माती खासील. १५ आणि
मी तुझ्या व स्त्रिच्या मध्यें परस्परें आणि तुझें संतान
व तिचें संतान यांमध्यें परस्परें वैर ठेवीन; तें तुझें
मस्तक फोडील आणि तूं त्याचीं टांच फोडसील.
१६ स्त्रिला तो बोलला कीं, मी तुझें दुःख आणि

गरोदरपणाचें दुःख वाढवीनच वाढवीन; तूं दुःखानें
लेंकरांस प्रसवसील, आणि तुझी इच्छा तुझ्या नव-
ऱ्याच्या स्वाधीन होऊन तो तुजवर धनीपण करील.
१७ आणि आदामाला तो बोलला, त्वां आपल्या
स्त्रियेची गोष्ट मानून ज्या झाडाविषयीं म्या तुला
असी आज्ञा दिल्ही कीं, तूं त्यावरचें खाऊं नको,
त्यावरचें त्वां खाल्लें आहे, यास्तव तुझ्यामुळें भूमि
शापित आहे; तीजपासून तूं आपल्या आयुष्यांतील
सर्व दिवसांत दुःखानें खासील. १८ ती तुझ्या-
साठीं कांटळ व कुसळ वाढवील, आणि तूं भूयी-
वरील हिरवळ खासील. १९ तूं भूमींत परतून
जासील तोंपर्यंत तूं आपल्या तोंडाच्या घामानें
अन्न खासील, कां कीं तींतून तूं घेतलेला आहेस,
यास्तव तूं माती आहेस आणि मातींत परत जा-
सील.

२० आणि आदामानें आपल्या स्त्रियेचें नांव
हव्वा असें ठेविलें, कां कीं ती अवघ्या माणसांची
आई होती. २१ तेव्हां परमेश्वर देव यानें
आदामासाठीं आणि त्याच्या बायकोसाठीं कात-
ड्याचीं वस्त्रें केलीं आणि त्यांस नेसविलें.

२२ मग परमेश्वर देव बोलला कीं, पाहा,
तो माणूस बरें आणि वाईट जाणण्यानें आम्हां-
मधील एकासारिखा झाला आहे; तर आतां
कदाचित् तो आपला हात लांबवून जीवनाच्या झा-
डावरचेंहि तोडून खाईल, आणि सर्वकाळ जगेल.
२३ यास्तव ज्या भूमींतून तो घेतलेला होता
तिची चाकरी करायासाठीं त्याला परमेश्वर
देव यानें एदेनबागांतून लाविलें. २४ तसें
त्यानें त्या माणसाला बाहेर घालविलें, आणि
जीवनी झाडाकडली वाट राखायासाठीं एदेन
बागाच्या पूर्वेकडे करूब असे आणि फिरती
तरवार ठेविली.

## अध्याय ४.

आणि आदामानें आपली स्त्री हव्वा इला अ-
नुभाविलें, मग ती गर्व्हार होऊन काईनाला
प्रसवली; तेव्हां ती बोलली कीं, परमेश्वराकडून
मला पुरुष मिळाला आहे. २ आणखी त्याचा
भाऊ हाबेल याला ती प्रसवली; हाबेल तर मेंढ-
रांचा पाळणारा होता, परंतु काईन शेतकरी होता.
३ आणि असें झालें कीं दिवसांच्या समाप्तीस
काईनानें परमेश्वरासाठीं भूमीच्या उपजांतील अ-
र्पण आणिलें. ४ आणि हाबेल यानेंहि आपल्या
मेंढरांतील प्रथम उपज व त्यांतील पुष्ट यांतून अ-
र्पण आणिलें. ५ तेव्हां परमेश्वरानें हाबेलाला
व त्याच्या अर्पणाला मानिलें, परंतु काईनाला व
त्याच्या अर्पणाला मानिलें नाहीं; यास्तव काईना-
ला फार राग आला आणि त्याचें तोंड उतरलें.
६ तेव्हां परमेश्वर काईनाला बोलला कीं, तुला
राग कां आला? आणि तुझें तोंड कां उतरलें?
७ जर तूं बरें करितोस तर मान्यता नाहीं कीं
काय? परंतु जरी बरें करीत नाहींस तरी दारासीं
पाप राहिलें आहे; मग त्याची इच्छा तुझ्या स्वा-
धीन होईल आणि तूं त्याजवर अधिकार करसील.
८ आणि काईन आपला भाऊ हाबेल याला
बोलता झाला; मग असें झालें कीं ते वावरांत
होते, तेव्हां काईनानें आपला भाऊ हाबेल या-
वर उठून त्याला जिवें मारिलें. ९ नंतर पर-
मेश्वर काईनाला बोलला कीं, तुझा भाऊ हाबेल
कोठें आहे? तेव्हां तो बोलला, मला ठाऊक नाहीं;
मी आपल्या भावाचा राखणारा कीं काय? मग
तो बोलला, त्वां काय केलें आहे? १० तुझ्या
भावाच्या रक्तधारांचा शब्द भूमींतून मजकडे ओ-
रडतो. ११ तर आतां तुझ्या भावाच्या रक्त-
धारा तुझ्या हातांतून घ्यायास ज्या भूमीनें आ-
पलें तोंड उघाडिलें, तिजविषयीं तूं शापित आहेस.
१२ जेव्हां तूं भूमीचें काम करितोस तेव्हां ती
आपलें सत्व आतांपासून तुला देणार नाहीं; पृ-
थ्वीवर तूं परागंदा व भडक्या होसील. १३ मग
काईन परमेश्वराला बोलला कीं, माझा दंड
सोसण्यापेक्षां मोठा आहे, १४ पाहा, आज त्वां
मला भूमीच्या पाठीवरून घालविलें आहे, आणि
तुझ्या दृष्टीपासून मी घालविला जाईन, आणि पृ-
थ्वीवर मी परागंदा व भडक्या होईन, आणि असें
होईल कीं जो कोणी मला पाहतो तो मला जिवें
मारील. १५ तेव्हां त्याविषयीं परमेश्वर त्याला
बोलला कीं, कोणी काईनाला जिवें मारिल्यास
त्याचा सूड सातपट घेतला जाईल; तेव्हां त्याला
कोणी पाहून न मारावें म्हणून परमेश्वरानें
काईनाला खूण ठेविली.

१६ नंतर काइन परमेश्वराच्या दृष्टीपासून
निघाला, आणि एदेनाच्या पूर्वेस नोद देशांत रा-
हिला. १७ मग काइनानें आपल्या स्त्रीला अ-
नुभविलें, आणि ती गर्व्हार होऊन हनोखाला प्रस-
वली; तेव्हां तो नगर बांधीत होता, आणि त्या न-
गराचें नांव आपल्या पुत्राच्या नांवाप्रमाणें हनोख
असें त्यानें ठेविलें. १८ मग हनोखाला ईराद
झाला, मग ईरादानें महूयाएलाला जन्मविलें, मग
महूयाएलानें मथूशाएलाला जन्मविलें, मग मथू-
शाएलानें लामेखाला जन्मविलें. १९ मग ला-
मेखानें आपल्यासाठीं दोन बायका करून घे-
तल्या, एकीचें नांव आदा आणि दुसरीचें नांव
जिल्ला. २० मग आदा याबालाला प्रसवली;
तो राहोटींत राहणाऱ्यांचा व पशुपाळकांचा पूर्वज
झाला. २१ आणि त्याच्या भावाचें नांव युबाल;
तो तंतुवाद्य व वायुवाद्य वाजविणाऱ्या सर्वांचा पूर्वज
झाला. २२ आणि जिल्ला तीहि तूबालकाइ-
नाला प्रसवली; तो तांबें व लोखंड यांच्या सर्व
कारागिरांचा शिकविणारा झाला; आणि तूबाल-
काइनाची बहीण नामा होती. २३ तेव्हां लामे-
खानें आपल्या बायका आदा व जिल्ला यांस सां-
गितलें कीं, अहो लामेखाच्या बायका, तुह्मी माझा
शब्द ऐका आणि माझ्या गोष्टीकडे कान लावा;
कां तर माझ्या घायासाठीं म्यां माणसाला ह्मणजे
माझ्या ठेंचण्यासाठीं म्यां तरुणाला जिवें मारिलें
आहे; २४ वास्तव काइनाचा सूड सातपट
घेतल्यास, लामेखाचा सत्याहत्तरपट घेतला जा-
ईल. २५ आणि आदामानें आपल्या बायकोला
फिरून अनुभविलें, तेव्हां ती पुत्राला प्रसवली
आणि तिनें त्याचें नाव शेथ ठेविलें; कां तर तिनें
ह्मटलें कीं, काइनानें हाबेलाला जिवें मारिलें,
यास्तव देवानें त्याच्या ठिकाणीं मजसाठीं दुस-
रें संतान नेमिलें आहे. २६ मग शेथ या-
लाहि पुत्र झाला आणि त्यानें त्याचें नांव अनोश
ठेविलें; तेव्हां परमेश्वराच्या नामानें हाक मा-
रणें हें होऊं लागलें.

## अध्याय ५.

हें आदामाच्या वंशावळीचें कथन; देवानें माण-
साला उत्पन्न केलें, त्या दिवशीं त्यानें त्याला
देवाच्या प्रतिमेप्रमाणें केलें. २ पुरुष व स्त्री
असें त्यानें त्यांस उत्पन्न केलें; तेव्हां त्यानें त्यांस
आशीर्वाद दिल्हा, आणि त्यांच्या उत्पत्तीच्या दि-
वसांत त्यांचें नांव आदाम ठेविलें. ३ तर आ-
दामाच्या आयुष्यांत एकशें तीस वर्षें झाल्यावर
त्यानें आपल्या प्रतिमेप्रमाणें आपल्या प्रतिछायेसा-
रिखा पुत्राला जन्मविलें, आणि त्याचें नांव शेथ
असें ठेविलें. ४ मग त्यानें शेथाला जन्मवि-
ल्या नंतर आदामाचें आयुष्य आठशें वर्षें झालें,
आणि त्यानें पुत्रांस व कन्यांस जन्मविलें. ५ तसें
आदामाचे सर्व दिवस ज्यांत तो जगला ते नऊशें
तीस वर्षें झालीं, नंतर तो मेला. ६ आणि शेथ
एकशें पांच वर्षांचा झाला, तेव्हां त्यानें अनोशाला
जन्मविलें. ७ आणि अनोशाला जन्मविल्यानं-
तर शेथ आठशें सात वर्षें जगला, आणि त्यानें
पुत्रास व कन्यांस जन्मविलें. ८ तसें शेथाचे
सर्व दिवस नऊशें बारा वर्षें झालीं, मग तो मेला.
९ आणि अनोश नव्वद वर्षांचा झाला, तेव्हां
त्यानें केनानाला जन्मविलें. १० आणि केनाना-
ला जन्मविल्यानंतर अनोश आठशें पंधरा वर्षें ज-
गला, आणि त्यानें पुत्रांस व कन्यांस जन्मविलें.
११ तसें अनोशाचे सर्व दिवस नऊशें पांच वर्षें
झालीं, मग तो मेला. १२ आणि केनान सत्तर
वर्षांचा झाला, तेव्हां त्यानें माहलालेला जन्मविलें.
१३ आणि माहलालेलास जन्मविल्यानंतर केनान
आठशें चाळीस वर्षें जगला, आणि त्यानें पुत्रांस
व कन्यांस जन्मविलें. १४ तसें केनानाचे सर्व
दिवस नऊशें दाहा वर्षें झालीं, मग तो मेला.
१५ आणि माहलालेल पांसष्ट वर्षांचा झाला,
तेव्हां त्यानें यारेदाला जन्मविलें. १६ आणि
यारेदाला जन्मविल्यानंतर माहलेल आठशें तीस
वर्षें जगला, आणि त्यानें पुत्रांस व कन्यांस जन्म-
विलें. १७ तसें माहलालेलाचे सर्व दिवस आ-
ठशें पंचाण्णव वर्षें झालीं, मग तो मेला. १८ आ-
णि यारेद एकशें बासष्ट वर्षांचा झाला, तेव्हां
त्यानें हनोखाला जन्मविलें. १९ आणि हनो-
खाला जन्मविल्यानंतर यारेद आठशें वर्षें जगला,
आणि त्यानें पुत्रांस व कन्यांस जन्मविलें. २० तसें
यारेदाचे सर्व दिवस नऊशें बासष्ट वर्षें झालीं, मग
तो मेला. २१ आणि हनोख पांसष्ट वर्षांचा

झाला, तेव्हां त्याने **मथु**शालाहास जन्मविलें आ-
णि **मथु**शालाहास जन्मविल्यानंतर **ह**नोख तीनशें
वर्षें **देवाच्या**संगतीं चालला, आणि त्याने पु-
त्रांस व कन्यांस जन्मविलें. २३ **तसें ह**नोखाचे
सर्व दिवस तीनशें पांसष्ट वर्षें झालीं. २४ **आणि
ह**नोख **देवाच्या**संगतीं चालला, मग तो नाहीं
असा झाला, कां कीं **देवाने** त्याला नेलें. २५ **आ-
णि मथु**शालाह एकशें सत्याऐंशी वर्षांचा झाला,
तेव्हां त्याने **ला**मेखाला जन्मविलें. २६ **आणि
ला**मेखाला जन्मविल्यानंतर **मथू**शालाह सातशें
ब्याऐंशी वर्षें जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस
जन्मविलें. २७ **तसें म**थूशालाहाचे सर्व दिवस
नऊशें एकुणहात्तर वर्षें झालीं, मग तो मेला. २८
**आणि लामेख** एकशें ब्याऐंशीं वर्षांचा झाला, ते-
व्हां त्याने पुत्राला जन्मविलें. २९ **आणि** त्याने
त्याचें नांव **नो**हा ठेवून ह्मटलें कीं, ज्या भूमीला
**परमेश्वराने** शापिलें, तिजविषयीं आमचें काम
व आमच्या हातांचा श्रम यांपासून हा आह्मास
विसावा देईल. ३० **आणि ला**मेखाने **नो**हाला
जन्मविल्यानंतर तो पांचशें पंचाण्णव वर्षें जगला,
आणि त्याने पुत्रांस व कन्यांस जन्मविलें. ३१
**तसें ला**मेखाचे सर्व दिवस सातशें सत्याहात्तर
वर्षें झालीं, मग तो मेला. ३२ जेव्हां **नो**हा
पांचशें वर्षांचा झाला, तेव्हां **नो**हाने **शे**म व
**हा**म व **या**फेथ यांस जन्मविलें होतें.

## अध्याय ६.

**आ**णि जेव्हां माणसें भूमीच्या पाठीवर बहुत
होऊं लागलीं आणि त्यांस कन्या झाल्या;
२ तेव्हां असें झालें कीं **देवाच्या** पुत्रानी माण-
सांच्या कन्यांस पाहिलें कीं त्या सुंदर आहेत आ-
णि सर्वांमधून ज्यांस त्यानी इच्छिलें त्यांस त्यानी
आपल्यासाठीं बायका करून घेतल्या. ३ तेव्हां
**परमेश्वर** बोलला कीं, माझा आत्मा माणसासीं
यत्न सर्वकाळ करणार नाहीं, यास्तव कीं तोहि मास
आहे,तथापि त्याचे दिवस एकशें वीस वर्षें होतील.
४ **त्या** दिवसांत अणखी त्यानंतर पृथ्वीवर जब-
रदस्त होते, कारण कीं **देवाचे** पुत्र माणसांच्या
कन्यांपासीं गेले, आणि ह्या त्यांसाठीं पुत्रांस प्रस-
वल्या; जीं पूर्वकालीं नामांकित माणसें तीं हेच होते.

५ **आणि परमेश्वराने** पाहिलें कीं माणसाचें
पाप पृथ्वीमध्यें मोठें, आणि त्याच्या हृदयाच्या वि-
चारांतील प्रत्येक भावना सर्व दिवसांमध्यें केवळ
वाईट आहेत. ६ तेव्हां **परमेश्वराने** माणसाला
पृथ्वीवर उत्पन्न केलें होतें त्यामुळें त्याला पश्चात्ताप
झाला, आणि तो आपल्या अंतःकरणांत दुःखित
झाला. ७ **मग परमेश्वराने** ह्मटलें कीं, ज्या
माणसाला म्या उत्पन्न केलें त्याला मी भूमीच्या
पाठीवरून पुसून टाकीन, माणसासुद्धां पशूलाहि.
अणखी वळवळणाऱ्याला व आकाशांतील पांखरा-
लाहि, कां कीं म्या त्यांस उत्पन्न केलें यावरून
मला पश्चात्ताप झाला आहे. ८ **परंतु** नोहा
**परमेश्वराच्या** दृष्टींत कृपा पावला.

९ ही **नो**हाची वंशावळी; **नो**हा आपल्या
काळांतील लोकांमध्यें यथार्थिक व धार्मिक माणूस
होता; १० **नोहा देवाच्या**संगतीं चालला आणि
**नो**हाने तीन पुत्र **शे**म व **हा**म व **या**फेथ यांस
जन्मविलें. ११ **परंतु देवाच्या** दृष्टींत पृथ्वी नास-
ली, आणि पृथ्वी बळात्काराने भरली. १२ तेव्हां
**देवाने** पृथ्वीस न्याहाळिलें, आणि पाहा ती नास-
ली, कां तर पृथ्वीवर सर्व प्राण्यानी आपली चाल
नासविली होती.

१३ **मग देव नो**हाला बोलला कीं, सर्व प्रा-
ण्यांचा शेवट माझ्या दृष्टींत आला आहे, कां तर
त्यांच्या योगाने पृथ्वी बळात्काराने भरली आहे;
यास्तव पाहा पृथ्वीसुद्धां त्यांचा नाश मी करीन.
१४ **तूं** आपल्यासाठीं गोफेरलांकडाचें तारूं कर;
त्या तारवांत खोल्या कर, आणि त्याच्या आंतून व
बाहेरून डामर चोपड. १५ **आणि** त्वां तें या
प्रकारें करावें कीं तारवाची लांबी तीनशें हात, त्या-
ची रुंदी पन्नास हात, व त्याची उंची तीस हात.
१६ **तूं** तारवाला खिडकी कर आणि त्याला व-
रील भाग हातभरपर्यंत उतरता कर; अणखी ता-
रवाचा दरवाजा त्याच्या बाजूमध्यें ठेव, खालील
व दुसरे व तिसरे मजले तूं कर. १७ **आणि**
पाहा, ज्या सर्व प्राणीमात्रांला जीवनाचा श्वास
आहे आकाशाखालून तिचा नाश करायासाठीं
मी स्वतां पृथ्वीवर पाण्याचा प्रलय आणितों, आणि
पृथ्वीवर जें कांहीं तें प्राण सोडील. १८ **परंतु**
तुजसीं मी आपला करार स्थापीन आणि तूं तार-

र्षांत जासील, तुझे पुत्रहि व तुझी बायको व तुझ्या
पुत्राच्या बायका तुझ्या संगतीं जातील. १९ आणि
सर्व जिवांतील सर्व जातींतून दोघें दोघें सर्वांतून तूं
आपल्यासंगतीं जगवायासाठीं तारवांत ने; तीं नर व
मादी असावीं. २० एक एक जातींतल्या पांख-
रांतून, आणि एक एक जातींतल्या पशूंमधून, आणि
एक एक जातींतलीं भूमीवरचीं सर्व वळवळणारीं
यांतून, ह्मणजे सर्वांतून दोघें दोघें तुजकडे येतील,
त्वां त्यांस जगवावें ह्मणून. २१ आणि जें कांहीं अन्न
खाल्लें जातें त्यांतील तूं आपल्यासाठीं मिळवून आ-
पल्याजवळ ठेव, मग तें तुझ्या आणि त्यांच्या खा-
ण्यासाठीं होईल. २२ तेव्हां नोहाने तसें केलें;
देवाने त्याला जी प्रत्येक आज्ञा दिल्ही तिज-
प्रमाणें त्याने केलें.

### अध्याय ७.

नंतर परमेश्वराने नोहाला सांगितलें कीं, तूं आ-
पल्या सर्व कुटुंबासुद्धां तारवांत जा, कां कीं ह्या
काळांतील लोकांमध्यें तुला मजविषयीं यथार्थ असें
म्या पाहिलें आहे. २ सर्व शुद्ध पशूंमधून नर
व त्याची मादी सात सात, आणि जे अशुद्ध पशू
त्यांतून नर व त्याची मादी दोघें दोघें; ३ अणखी
आकाशांतील पांखरें यांतून नर व त्याची मादी सात
सात, असीं सर्व पृथ्वीच्या पाठीवर बीज वांचवा-
यास तूं आपल्याजवळ घे. ४ कां तर अणखी
सात दिवसांनंतर मी चाळीस दिवस व चाळीस
रात्रीं पृथ्वीवर पाऊस पाडीन, आणि जें प्रत्येक
असणारें म्या उत्पन्न केलें त्याला भूमीच्या पाठी-
वरून पुसून टाकीन. ५ तेव्हां परमेश्वराने नो-
हाला ज्या आज्ञा दिल्ह्या त्या सर्वांप्रमाणें त्याने
केलें. ६ आणि जेव्हां पाण्याचा प्रलय पृथ्वीवर
झाला तेव्हां नोहा साहाशें वर्षांचा होता. ७
तेव्हां नोहा आणि आपल्यासंगतीं आपले पुत्र व
आपली बायको व आपल्या पुत्रांच्या बायका, हीं
प्रलयाच्या पाण्यापुढून तारवांत गेला. ८ शुद्ध
पशूंमधून, आणि जे पशु शुद्ध नव्हते त्यांमधून व
पांखरांमधून, आणि सर्व जीं भूमीवर वळवळतात
त्यांमधून. ९ दोघें दोघें नर व मादी, जसें पर-
मेश्वराने नोहाला आज्ञा दिल्ही, तसें तीं नोहा-
जवळ तारवांत गेलीं. १० तेव्हां असें झालें कीं
सात दिवसांनंतर त्या प्रलयाचें पाणी पृथ्वीवर
झालें.

११ नोहाच्या आयुष्यांतील साहाश्याव्या व-
र्षांत दुसऱ्या महिन्यांतील सत्राव्या मितींत त्या
दिवशीं मोठ्या जलमयाचे सर्व झरे फुटले गेले
आणि आकाशीं दारें मोकळीं झालीं. १२ तेव्हां
चाळीस दिवस व चाळीस रात्री पावसाने झोड
पृथ्वीवर लाविली. १३ त्याच दिवसाच्या भ-
रांत, नोहा आणि नोहाचे पुत्र शेम व हाम व
याफेथ, आणि नोहाची बायको आणि त्याच्या
पुत्रांसहित यांच्या तीन बायका तारवांत गेल्या.
१४ तीं आणि आपापल्या जातींतील प्रत्येक वन-
पशु, आणि आपापल्या जातींतील प्रत्येक ग्रामपशु
आणि आपापल्या जातींतील प्रत्येक जंतु जो पृथ्वी-
वर वळवळतो, आणि प्रत्येक पंखाचीं सर्व पांखरें,
आपापल्या जातींतील प्रत्येक उडणारें, हीं गेलीं.
१५ ह्मणजे संपूर्ण जातींतील ज्यांत जीवनी श्वास
होता त्यांमधून दोघें दोघें नोहाजवळ तारवांत
गेलीं. १६ आणि जीं आंत गेलीं तीं सर्व प्रा-
णीमात्रांतून नर व मादी, जसी देवाने त्याला
आज्ञा दिल्ही तसीं गेलीं, नंतर परमेश्वराने
त्याला आंत कोंडिलें. १७ आणि पृथ्वीवर चा-
ळीस दिवस प्रलय होता, तेव्हां पाण्याने वाढून
तारवाला तरविलें, तसें तें पृथ्वीवरतें उंच झालें.
१८ तेव्हां पाणी बळावलें आणि पृथ्वीवर फार
वाढलें, परंतु तारूं पाण्याच्या पाठीवर चाललें.
१९ तेव्हां पृथ्वीवर पाणी असें फार फार बळावलें
कीं संपूर्ण आकाशाखालील सर्व उंच डोंगर झांकिले
गेले. २० पाणी पंधरा हात वरतें बळावलें, तसें डों-
गर झांकिले गेले. २१ तेव्हां पांखरें व ग्रामपशु व
वनपशु प्रत्येक जंतु जो पृथ्वीवर वळवळतो यांतील
प्राण्यांचें जें कांहीं पृथ्वीवर फिरतें त्याने आणि
प्रत्येक माणसाने प्राण सोडिला. २२ कोरड्या
ठिकाणीं जें कांहीं होतें त्यांतील ज्या सर्वांच्या
नाकपुड्यांत जीवनी श्वासोश्वास होते, तीं मेलीं,
२३ ह्मणजे भूमीच्या पाठीवर जें प्रत्येक असणारें
तें धुपून टाकलें गेलें; मनुष्य, अणखी पशु, अणखी
वळवळणारे, व आकाशांतील पांखरूंहि, तीं पृथ्वी-
वरून धुपून टाकलींच गेलीं, आणि नोहा व त्या-
च्यासंगतीं जीं तारवांत होतीं तीं मात्र राहिलीं.

२४ आणि दीडशें दिवसांपर्यंत पाणी पृथ्वीवर
बळावलें.

## अध्याय ८.

परंतु नोहा आणि त्याच्यासंगतीं तारवांत जे
सर्व पशू, त्यांची आठवण देवाने केली;
आणि देवाने पृथ्वीवर वारा वाहविला, मग पाणी
शमलें. २ तेव्हां जलदींचे झरे व आकाशाचीं
दारें बंद झालीं, आणि पावसाची झोड आटोपली.
३ आणि पाणी जाऊन व फिरून पृथ्वीवरून
माघारें गेलें; तसें दीडशें दिवसांच्या समाप्तीपासून
पाणी वसरलें. ४ आणि सातव्या महिन्यांतील
सत्राव्या मितीस तारूं अराराटडोंगरांवर बसलें.
५ मग दाहाव्या महिन्यापर्यंत पाणी जात व वस-
रत होतें; दाहाव्या महिन्यांतील पहिल्या दिवशीं
डोंगरांचे माथे दिसले. ६ मग असें झालें कीं
चाळीस दिवसांच्या समाप्तीस नोहाने तारवाची
खिडकी जी आपण केली होती ती उघडली. ७
आणि त्याने कावळ्याला सोडिलें, तेव्हां तो निघून
पृथ्वीवरून पाणी आटलें तोंपर्यंत जात येत होता.
८ आणि भूमीच्या पाठीवरून पाणी नमलें किंवा
नाहीं, हें पाहायास त्याने आपल्यापासून पारवा
पाठविला. ९ परंतु पारव्याला आपल्या पाय-
तळासाठीं आधार मिळाला नाहीं, यास्तव तो
त्याजवळ तारवांत माघारें आला, कां तर सगळ्या
पृथ्वीच्या पाठीवर पाणी होतें, तेव्हां त्याने आ-
पला हात बाहेर काढिला, आणि त्याला धरून
आपणाजवळ तारवांत घेतलें. १० नंतर तो
अणखी दुसऱ्या दिवसांचें सात्रेंभर राहिला, मग
त्याने फिरून पारवा तारवांतून सोडिला. ११
मग संध्याकाळीं तो पारवा त्याजवळ आला, तेव्हां
पाहा त्याच्या चोंचींत जाईत झाडाचें तोडलेलें
पान होतें; यास्तव नोहा समजला कीं पृथ्वीवरून
पाणी नमलें होतें. १२ मग तो अणखी दुसऱ्या
दिवसांचें सात्रेंभर राहिला, नंतर त्याने पारवा
सोडिला, परंतु तो त्याजवळ कधीं फिरून आला
नाहीं. १३ आणि असें झालें कीं साहाशें
एकाव्या वर्षांतील पहिल्या महिन्याच्या प्रतिपदेस
पृथ्वीवरून पाणी क्षयास गेलें, तेव्हां नोहाने तार-
वाचें झांकण काढून अवलोकन केलें, आणि पाहा,
भूमीची पाठ सुकी झाली होती. १४ मग
दुसऱ्या महिन्यांतील सत्ताविसाव्या दिवशीं पृथ्वी
वाळली.

१५ मग देवाने नोहाला सांगितलें कीं, १६
तूं आणि तुझ्यासंगतीं तुझी बायको व तुझे पुत्र
आणि तुझ्या पुत्रांच्या बायका, तारवांतून जा. १७
पांखरें व पशू आणि प्रत्येक जंतु जो पृथ्वीवर
वळवळतो, ह्या सर्व जातींतील प्रत्येक जीव जो
तुझ्यासहित, त्यांस आपल्यासंगतीं बाहेर काढ,
आणि ते पृथ्वीवर उपजोत, आणि सफळ होऊन
पृथ्वीवर बहुत होवोत. १८ मग नोहा आणि
त्याच्यासंगतीं त्याचे पुत्र व त्याची बायको व
त्याच्या पुत्रांच्या बायका, हीं निघालीं. १९ प्र-
त्येक जीव, प्रत्येक जंतु व प्रत्येक पांखरूं, ह्मणजे
पृथ्वीवर प्रत्येक फिरणारें हीं आपापल्या जातीं-
प्रमाणें तारवांतून निघालीं. २० नंतर नोहाने
परमेश्वरासाठीं वेदी बांधिली, आणि सर्व शुद्ध
पशूंमधून व सर्व शुद्ध पांखरांमधून कांहीं घेऊन
वेदीवर होम केले. २१ तेव्हां परमेश्वराने शां-
तिकारक वास घेतला, आणि परमेश्वराने आपल्या
मनांत ह्मटलें कीं, माणसाच्या कारणास्तव मी
भूमीस अणखी शाप देणार नाहीं; जरीं माण-
साच्या मनांतील भावना त्याच्या बाळपणापासून
वाईट आहे, तथापि जसें म्या केलें आहे तसें
मी फिरून सर्व जिवांस कधीं मारणार नाहीं.
२२ पृथ्वीच्या अवघ्या दिवसांपर्यंत पेरणी व
कापणी, आणि थंडी व ऊन, आणि उन्हाळा व
हिंवाळा, आणि दिवस व रात्र, हीं खुंटणार
नाहींत.

## अध्याय ९.

नंतर देवाने नोहाला व त्याच्या पुत्रांला
आशीर्वाद दिल्हा; तेव्हां त्यांस असें सांगि-
तलें कीं, तुह्मी सफळ व्हा, आणि बहुत होऊन
पृथ्वी पूर्ण करा. २ आणि पृथ्वींतील अवघ्या
पशूंवर व आकाशांतील सर्व पांखरांवर, भूमीवर
सर्व जीं वळवळतात त्यांवर, आणि समुद्रांतील
सर्व मास्यांवर, तुमचें भय व धाक होईल; तीं
तुमच्या हातांत ठेवलेलीं आहेत. ३ प्रत्येक
जंतु जो जगतो, तो तुमचें खाणें कसें व्हावा;

बसी कोंवळी हिरवळ, तसीं म्या तुह्मास अवघीं
दिल्हीं आहेत. ४ तथापि तुह्मी कशाचा जीव
ह्मणजे त्याचें रक्त यासुद्धां मास खाऊं नका.
५ आणि तुमच्या जिवासाठीं तुमच्या रक्ताचा
झाडा मी निश्चयें घेईन, प्रत्येक पशूजवळ मी
त्याचा झाडा घेईन, आणि माणसांजवळ प्रत्ये-
काच्या भावाजवळ माणसाच्या जिवाचा झाडा
घेईन. ६ जो माणसाचा रक्तपात करितो त्या-
चा रक्तपात माणसाकडून केला जावा; का कीं
देवानें आपल्या प्रतिछायेप्रमाणें माणसाला उत्पन्न
केलें होतें. ७ आणि तुह्मी सफळ होऊन व
वाढून पृथ्वीवर प्रजा भरा, आणि तिजवर धनी
असा.

८ तेव्हां देवानें नोहाला व त्यासहित
त्याच्या पुत्रांला असें सांगितलें कीं, ९ पाहा,
तुह्मासीं व तुमच्यामागें तुमच्या संतानासीं मी
स्वतां आपला करार स्थापितों. १० आणि
पाखरें व पशू यांतला, आणि तुमच्यासहित
पृथ्वीवरील सर्व जीव यांतला, जो तुह्मासहित
प्रत्येक श्वासवान् जंतु, ह्मणजे तारवांतून सर्व जे
निघाले त्यांपासून पृथ्वीवरील प्रत्येक जिवापर्यंत
यांसासीहि. ११ ह्मणजे मी तुह्मासीं आपला
करार असा स्थापीन कीं सर्व मांसजात प्रलयाच्या
पाण्याकडून फिरून काढून टाकली जाणार नाहीं,
आणि पृथ्वीचा नाश करायाचा जलप्रलय आणखी
होणार नाहीं. १२ आणि देवानें ह्मटलें कीं,
जो करार मी आपल्यामध्यें व तुह्मामध्यें, आणि
तुह्मासहित जो प्रत्येक श्वासवान् जीव यामध्यें
परंपरा पिढ्यांपर्यंत करितों, त्याची खूण हीच;
१३ म्या आपलें धनुष्य ढगांमध्यें ठेविलें आहे,
आणि तें मजमधील व पृथ्वीमधील जो करार
त्याची खूण होईल. १४ आणि असें होईल
कीं मी पृथ्वीवरतें ढग करितों त्या वेळेस तें धनुष्य
ढगामध्यें दिसेल. १५ तेव्हां माझ्यामध्यें व
तुमच्यामध्यें, आणि सर्व जातींतील प्रत्येक श्वास-
वान् जीव यामध्यें जो माझा करार त्याची आठ-
वण मी करीन, आणि पाणी सर्व जातीचा नाश
करायास प्रलयरूप असें फिरून होणार नाहीं.
१६ तर तें धनुष्य ढगामध्यें होत आईल, आणि
मी त्यावर अशास पाहीन कीं जो सर्वकाळ करार
देवामध्यें आणि पृथ्वीवरील सर्व जातींतल्या प्रत्येक
श्वासवान् जिवामध्यें, त्याची आठवण म्या करावी.
१७ तसें देवानें नोहाला सांगितलें कीं, मज-
मध्यें आणि जी पृथ्वीवर सर्व जात तिजमध्यें जो
करार म्या स्थापिला आहे, त्याची खूण तेंच
आहे.

१८ तर नोहाचे पुत्र तारवांतून निघाले, ते
शेम व हाम व याफेथ होते; आणि हाम तो
खनानाचा बाप होता. १९ हे नोहाचे तीन
पुत्र, आणि यांपासून सर्व पृथ्वी व्यापली. २०
नोहा तर शेतकरी होऊं लागला, आणि त्यानें
द्राक्षमळा लाविला. २१ मग तो कांहीं द्राक्षा-
रस प्याला आणि माजून राहोटीमध्यें उघडा
झाला. २२ तेव्हां हाम खनानाचा बाप यानें
आपल्या बापाचें नागवेपण पाहिलें, मग जे बाहेर
आपले दोघे भाऊ त्यांस सांगितलें. २३ तेव्हां
शेम व याफेथ यांनी वस्त्र घेऊन आपल्या
दोघांच्या खांद्यावर ठेविलें, आणि पाठमोरे जाऊन
आपल्या बापाचें नागवेपण झांकिलें; तसीं त्यांचीं
तोंडें मागें होतीं, ह्मणून त्यांनी आपल्या बापा-
चें नागवेपण पाहिलें नाहीं. २४ नंतर नोहा
आपल्या द्राक्षारसापासून सावध झाला, आणि
त्याच्या धाकट्या पुत्रानें त्याला जें केलें होतें तें
तो समजला. २५ मग त्यानें ह्मटलें कीं,
खनान शापित असो; तो आपल्या भावांजवळ
चाकरांचा चाकर होईल. २६ आणि त्यानें
ह्मटलें कीं, स्तुत्य शेमाचा देव जो परमेश्वर,
आणि त्याचा चाकर खनान होईल. २७ देव
याफेथाचा विस्तार करील, आणि हा शेमाच्या
राहोट्यांमध्यें राहील आणि याचा चाकर खनान
होईल. २८ तेव्हां नोहा जलप्रलयानंतर साडे-
तीनशें वर्षें जगला. २९ तसें नोहाचे सर्व
दिवस साडेनऊशें वर्षें झालीं, मग तो मेला.

## अध्याय १०.

तर नोहाचे पुत्र, शेम, हाम व याफेथ, यांची
वंशावळी हीच; ह्मणजे जलप्रलयानंतर
त्यांचे हे पुत्र जन्मले. २ याफेथाचे पुत्र, गोमेर
व मागोग, व मादाय, व यावान, व थुबाल, व
मेशेख, व थीरास. ३ आणि गोमेराचे पुत्र,

आष्कनाज, व रीफाथ, व तोगार्मा. ४ आणि
यावानाचे पुत्र, अलोशा, व तार्शीश, कित्ती, व
दोदानी. ५ याकडून राष्ट्रांचीं ठिकाणें, त्यां-
च्या देशांमध्यें, प्रत्येक आपापल्या भाषेप्रमाणें,
आपापल्या राष्ट्रांतील कुटुंबांप्रमाणें, असीं वांट-
लेलीं झालीं. ६ आणि हामाचे पुत्र, कूश, व
मिज्राईम, व फुट, व खनान. ७ आणि
कूशाचे पुत्र सबा, व हवीला, व साप्ता, व
रामा, व साब्तखा; आणि रामाचे पुत्र, शबा
व ददान. ८ आणि कूशानें निम्रोदाला जन्म-
विलें; तो पृथ्वीमध्यें बळवान् होऊं लागला. ९
तो परमेश्वरासमोर बळवान् पारधी झाला;
यास्तव असें ह्मटलें जातें कीं, निम्रोदासारिखा
परमेश्वरासमोर बळवान् पारधी. १० आ-
णि त्याच्या राज्याचा प्रारंभ, बाबेल, व एरखे,
व आक्काद, व खाल्ने, असा शिनार देशांत
झाला. ११ त्याच देशांतून आश्शूर गेला,
आणि त्यानें नीनवे, व रहोबोथनगर, व कालाह;
१२ आणि नीनवेच्या व कालाहाच्या मध्यें
रेसेन हें मोठें नगर, हीं बांधिलीं. १३ आणि
मिज्राईमानें लूदी, व अनामी, व लहाबी, व
नाप्तुहीं, १४ व पाथरुसी, व कास्लुही,
ज्यापासून पलिस्ती निघाले, आणि काफ्तोरी,
यांस जन्मविलें.

१५ आणि खनानानें आपला प्रथम पुत्र
जीदोन, मग हेथ, १६ व यबूसी, व आमोरी,
व गिर्गाशी, १७ व हिव्वी, व आर्की, व
सीनी, १८ व आर्वादी, व जमारी, व हामाथी
यांस जन्मविलें; आणि त्यानंतर खनानी जे,
त्यांचीं कुटुंबें पसरलीं गेलीं. १९ आणि खना-
न्यांची सीमा जीदोनापासून नगरास जातांना
गाज्यापर्यंत आणि सदोम व गमोरा व आद्म
व जबोईम व यांकडे जातांना लाश्यापर्यंत होती.
२० हे आपापल्या कुटुंबांप्रमाणें, आपापल्या भाषां-
प्रमाणें, आपापल्या देशांतल्या आपापल्या प्रजे-
कडून हामाचीं संतानें आहेत. २१ आणि
शेमालाहि संतान झालें; २२ तोच सर्व एबेर
वंशस्थांचा पूर्वपुरुष, आणि त्याचा वडील भाऊ
याफेथ होता; शेमाचे पुत्र हे एलाम, व आश्शूर,
व आर्फाक्षाद, व लूद, व आराम. २३ आणि
आरामाचे पुत्र ऊज, व गेथेर, व माश; २४
आणि आर्फाक्षादानें शालाहास जन्मविलें, मग
शालाहानें एबेराला जन्मविलें. २५ आणि ए-
बेराचे दोन पुत्र जन्मले, एकाचें नांव फालेग,
कां तर त्याच्या दिवसांत पृथ्वी विभागली गेली;
आणि त्याच्या भावाचें नांव यक्टान. २६ मग
यक्टानानें यांस जन्मविलें, कीं आल्मोदाद, व
शालेफ, व हजार्मावेथ, व याराह; २७ व
हदोराम, व ऊजाल, व दिक्ला; २८ व
ओबाल, व अबीमाएल, व शबा; २९ व
ओफीर, व हवीला, व योबाब, हे सर्व यक्टानाचे
पुत्र होते. ३० आणि त्यांची वस्ती मेश्शा-
पासून पूर्वेकडील सफारडोंगर तेथें जातांना होती.
३१ हे शेमाचे पुत्र, आपापल्या कुटुंबांप्रमाणें,
आपापल्या भाषांप्रमाणें, आपापल्या देशांत आपा-
पल्या प्रजांप्रमाणें, असे आहेत; ३२ हीं नो-
हाच्या पुत्रांचीं कुटुंबें आपापल्या वंशावळ्यांप्रमाणें,
आपापल्या प्रजांमध्यें, आणि यांपासून जलप्रलया-
नंतर पृथ्वींत प्रजा विस्तारल्या गेल्या.

## अध्याय ११.

तेव्हां सर्व पृथ्वीवर एक भाषा व बोलणीं एक-
रूपीं, असीं होतीं. २ आणि असें झालें
कीं ते पूर्वेपासून जात असतां शिनार देशां-
मध्यें सपाटी पावले, आणि तेथें राहिले. ३
मग त्यांनी एकमेकांस ह्मटलें कीं, चला, आपण
विटा करूं, आणि त्यांस पक्कें भाजूं. तेव्हां दग-
डांच्या ठिकाणीं त्यांस विटा होत्या, आणि रद्दा
याच्या ठिकाणीं चिकोटा होता. ४ तर त्यांनी
ह्मटलें कीं, चला, आह्मी सर्व पृथ्वीच्या पाठीवर
पांगलेले न जावें ह्मणून आपल्यासाठीं नगर
बांधूं व बुरूजहि, आणि याचें मस्तक आकाशा-
पर्यंत होवो, तसें आपलें नांव करूं. ५ मग जें
नगर व जो बुरूज मनुष्यसंतान बांधितें झालें,
त्यांस पाहायासाठीं परमेश्वर उतरला. ६ मग
परमेश्वरानें ह्मटलें कीं, पाहा, लोक एकच
आणि त्या सर्वांस एक भाषा, आणि ते हें करूं
लागतात; तर आतां ते जें कांहीं करायास योज-
तील, तें त्यांपासून आकळलें जाणार नाहीं. ७
चला, आपण उतरूं आणि त्यांनी एकमेकांची

भाषा न समजावी ह्मणून तेथें आह्मी त्यांच्या
भाषेचा भेळमेळ करूं. ८ त्याप्रमाणें परमेश्वर
देव याने त्यांस तेथून सर्व पृथ्वीच्या पाठीवर
पसरिलें; तसें त्यानी तें नगर बांधणें सोडिलें.
९ यास्तव त्याचें नांव बाबेल ह्मटलेलें आहे,
कां कीं परमेश्वराने तेथें सर्व पृथ्वीच्या भाषेचा
भेळमेळ केला, आणि परमेश्वराने त्यांस तेथून
सर्व पृथ्वीच्या पाठीवर पसरिलें.

१० ही शेमाची वंशावळी; शेम एकशें वर्षां-
चा होता, तेव्हां जलप्रलयानंतर दोन वर्षें झाल्या-
वर त्याने आर्फाक्षादाला जन्मविलें. ११ मग
आर्फाक्षादाला जन्मविल्यानंतर शेम पांचशें वर्षें
जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस जन्मविलें.
१२ आणि आर्फाक्षाद पस्तीस वर्षांचा झाला,
तेव्हां त्याने शालाहास जन्मविलें. १३ आणि
शालाहास जन्मविल्यावर आर्फाक्षाद चारशें
तीन वर्षें जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस
जन्मविलें. १४ आणि शालाह तीस वर्षांचा
झाला, तेव्हां त्याने एबेराला जन्मविलें. १५
आणि एबेराला जन्मविल्यावर शालाह चारशें
तीस वर्षें जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस
जन्मविलें. १६ आणि एबेर चौतीस वर्षांचा
झाला, तेव्हां त्याने फालेगाला जन्मविलें. १७
आणि फालेगाला जन्मविल्यावर एबेर चारशें
तीस वर्षें जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस
जन्मविलें. १८ आणि फालेग तीस वर्षांचा
झाला, तेव्हां त्याने रगूला जन्मविलें. १९ आणि
रगूला जन्मविल्यावर फालेग दोनशें नऊ वर्षें
जगला, आणि त्याने पुत्रांस व कन्यांस जन्मविलें.
२० आणि रगू बत्तीस वर्षांचा झाला, तेव्हां
त्याने सरूगाला जन्मविलें. २१ आणि सरू-
गाला जन्मविल्यावर रगू दोनशें सात वर्षें जगला,
आणि त्याने पुत्रांस व कन्यांस जन्मविलें. २२
आणि सरूग तीस वर्षांचा झाला, तेव्हां त्याने
नाहोराला जन्मविलें. २३ आणि नाहोराला
जन्मविल्यावर सरूग दोनशें वर्षें जगला, आणि
त्याने पुत्रांस व कन्यांस जन्मविलें. २४ आणि
नाहोर एकुणतीस वर्षांचा झाला, तेव्हां त्याने था-
राहाला जन्मविलें. २५ आणि थाराहाला ज-
न्मविल्यावर नाहोर एकशें एकुणीस वर्षें जगला,
आणि त्याने पुत्रांस व कन्यांस जन्माविलें. २६
आणि थाराह सत्तर वर्षांचा झाला, तेव्हां त्याने
आब्राम व नाहोर व हारान यांस जन्माविलें.

२७ तर ही थाराहाची वंशावळी; थाराहाने
आब्राम व नाहोर व हारान यांस जन्मविलें, आ-
णि हारानाने लोटाला जन्मविलें. २८ मग हा-
रान आपला बाप थाराह याच्यापूर्वी खासद्यांच्या
ऊरगांवांत आपल्या जन्मस्थानीं मेला. २९ आणि
आब्राम व नाहोर यानी आपल्यांस बायका करून
घेतल्या; आब्रामाच्या बायकोचें नांव साराय्, आ-
णि नाहोराच्या बायकोचें नांव मिल्का, जी हारा-
नाची कन्या होती, जो मिल्केचा बाप व इस्केचा-
हि बाप होता. ३० परंतु साराय् वांझ होती,
तिला लेंकरूं झालें नाहीं. ३१ तेव्हां थाराहानें
आपला पुत्र आब्राम, व आपला नातु लोट जो
हारानाचा पुत्र, आणि आपली सून साराय् जी
आपला पुत्र आब्राम याची बायको, यांस घेतलें,
आणि ते त्यासंगतीं खासद्यांच्या ऊरगांवापासून
खनान देशास जायास निघाले. ३२ मग ते
हारानापर्यंत येऊन तेथें राहिले; आणि थारा-
हाचे दिवस दोनशें पांच वर्षें झालीं, मग थाराह
हारानांत मेला.

## अध्याय १२.

तेव्हां परमेश्वराने आब्रामाला सांगितलें होतें
कीं, तूं आपण आपला देश आणि आपलें
कूळ आणि आपल्या बापाचें घर यांपासून निघून जो
देश मी तुला दाखवीन, त्यांत जा. २ मग मी तु-
ला मोठी प्रजा करीन, आणि तुला आशीर्वाद देईन,
आणि तुझें नांव असें मोठें करीन कीं तें आशीर्वाद
रूप होईल; ३ आणि जे तुला आशीर्वाद देतात
त्यांस मी आशीर्वाद देईन, आणि जो तुला शाप दे-
तो त्याला मी शाप देईन, आणि तुजकडून पृथ्वीं-
तील सर्व वंश आशीर्वाद पावतील. ४ तेव्हां जसें
परमेश्वराने आब्रामाला सांगितलें होतें तसें तो
गेला, लोटहि त्यासंगतीं गेला; आणि जेव्हां
आब्राम हारानापासून निघाला, तेव्हां तो पंचा-
हात्तर वर्षांचा होता; ५ तसें आब्रामाने आपली
बायको साराय् व आपल्या भावाचा पुत्र लोट
यांस, आणि त्यांची सर्व संपत्ति जितकी त्यानी

मिळविली होती, व हारानांत जितकीं माणसें त्यां-
स माप्त झालीं त्यांस घेतल्यावर ते खनान देशांत
जायास निघाले, आणि खनान देशास पावले.
६ मग आब्राम त्या देशांत शखेमजाग्याप-
र्यंत एलोनमोरे तेथवर गेला; तेव्हां खनानी देशांत
होते. ७ मग परमेश्वराने आब्रामाला दर्शन
देऊन ह्मटलें कीं, मी हाच देश तुझ्या संतानाला
देईन. आणि त्याने आपणाला दर्शन देणारा जो
परमेश्वर त्यासाठीं तेथें वेदी बांधिली. ८ मग
तेथून निघून बेथेलाच्या पूर्वेकडील डोंगरास गेला,
मग त्याने राहोटी दिल्ही; तेथून पश्चिमेकडे बेथेल
व पूर्वेकडे आय होतें, आणि त्याने तेथें परमेश्वरा-
साठीं वेदी बांधिली, आणि परमेश्वराचें नांव घे-
ऊन मार्थना केली. ९ नंतर आब्राम निघून जातां
जातां दक्षिणेकडे गेला.

१० तेव्हां देशांत महागाई झाली, आणि आ-
ब्राम मिसरांत राहायास तेथें उतरला, कां तर
त्या देशांत महागाई भारी झाली. ११ आणि
तो मिसरांत जाण्यास जवळ पावल्यावर असें
झालें कीं आपली बायको साराय् इला बोलला,
अगे पाहा मी जाणतों कीं तूं सुंदर स्वरूपाची स्त्री
आहेस. १२ यास्तव जेव्हां मिसरी तुला पा-
हतील तेव्हां असें होईल कीं ते ह्मणतील, ही
त्याची बायको; मग ते मला वधितील आणि तुला
वांचवितील. १३ आतां मी त्याची बहीण, असें
तूं सांग, ह्मणजे तुझ्याने माझें बरें होईल आणि
तुजकडून माझा जीव वांचेल. १४ मग आब्राम
मिसरांत पोहंचला; तेव्हां असें झालें कीं मिस-
ऱ्यानी त्या स्त्रिला पाहिलें कीं ती फार सुंदर आहे;
१५ फारोच्या अधिकाऱ्यानीहि तिला पाहिलें आ-
णि फारोजवळ तिचें वर्णन केलें, आणि ती स्त्री
फारोच्या घरीं घेतली गेली. १६ मग त्याने तिज-
मुळें आब्रामाचें बरें केलें; आणि याला शेरडें, व
गुरें, व गाढव, आणि चाकर व चाकरिणी, आणि
गाढव्या व उंट होते. १७ परंतु परमेश्वराने
आब्रामाची बायको साराय् इच्या कारणास्तव
फारोला आणि त्याच्या घराला मोठ्या पीडां-
कडून पीडिलें. १८ तेव्हां फारोने आब्रामाला
बोलावून ह्मटलें, त्वां मला हें काय केलें? १९ ती
माझी बायको, असें त्वां मला कां सांगितलें नाहीं?
ती माझी बहीण, असें तूं कां बोललास? अज्ञाने
म्या तिला आपली बायको करून घेतलें असतें;
तर आतां पाहा तुझी बायको घेऊन जा. २०
मग फारोने आपल्या माणसांस त्याविषयीं आज्ञा
केली, आणि त्यानी त्याला व त्याच्या बायकोला
व जें त्याचें होतें त्या अवघ्याला रवाना केलें.

## अध्याय १३.

तेव्हां आब्राम आपण आपली बायको व आप-
लें जें अवघें यांसुद्धां मिसरांतून खनान देशा-
च्या दक्षिणेस चढला; लोटहि त्यासंगतीं गेला.
२ आणि पशू व रुपें व सोनें यांविषयीं आब्राम
फार धनवान् होता. ३ मग तो आपल्या वाटेने
दक्षिणेपासून गेला, आणि बेथएल व आय यां-
च्या मध्यें ज्या ठिकाणीं त्याची राहोटी पूर्वी
होती; ४ जेथें त्याने पहिल्याने वेदी केली होती,
त्या ठिकाणापर्यंत आला, आणि तेथें आब्रामाने
परमेश्वराचें नांव घेऊन मार्थना केली. ५ आणि
लोट जो आब्रामाच्यासंगतीं गेला, त्यालाहि शे-
रडें व गुरें व राहोट्या होत्या. ६ आणि त्यानी
एकवट राहावें असें त्या देशाला सोसवलें नाहीं,
कां त्याची संपत्ति एवढी मोठी झाली कीं ते एकत्र
राहूं न शकले. ७ आणि आब्रामाच्या पशूंचे
चारणारे व लोटाच्या पशूंचे चारणारे यांमध्यें प-
रस्परें भांडण झालें; आणि त्या वेळेस खनानी व
परिज्झी त्या देशांत राहत होते. ८ तेव्हां आब्राम
लोटास बोलला, माझ्यामध्यें व तुझ्यामध्यें आणि
माझे चारणारे व तुझे चारणारे यांमध्यें वाद अग-
त्य नसावा, कां तर आपण भाऊजन आहों. ९
अवघा देश तुजपुढें नाहीं कीं काय? आतां मजपा-
सून तूं वेगळा हो; जर तूं डाव्याकडे जासील तर
मी उजव्याकडे जाईन, आणि जर तूं उजव्याकडे
जासील तर मी डाव्याकडे जाईन. १० तेव्हां
परमेश्वराने सदोम व गमोरा यांचा नाश के-
ल्यापूर्वी लोटाने आपले डोळे वर करून जवारा-
च्या वाटेस यार्देनेची अवघी सपाटी पाहिली कीं
ती परमेश्वराच्या बागासारिखी व मिसर देशा-
सारिखी संपूर्ण ओलसर आहे. ११ यास्तव लो-
टाने आपल्यासाठीं यार्देनेची अवघी सपाटी निव-
डिली; तसें लोट पूर्वेस गेला, आणि ते एकमेका-

पासून वेगळे झाले. १२ आब्राम खनान देशांत
राहिला, आणि लोट सपाटींतील नगरांमध्यें रा-
हिला; मग त्याने सदोमाकडे राहोटी दिल्ही. १३
परंतु सदोमांतील माणसें दुष्ट आणि परमेश्वरा-
समोर अति पापिष्ठ होतीं.
१४ तेव्हां आब्रामापासून लोट वेगळा झा-
ल्यावर परमेश्वर त्याला बोलला कीं, तूं आतां
आपले डोळे वर कर, आणि जेथें तूं आहेस त्या
जाग्यापासून उत्तरेकडे व दक्षिणेकडे व पूर्वेकडे व
पश्चिमेकडे पाहा. १५ कां तर जो अवघा देश तूं
पाहतोस तो मी तुला आणि तुझ्या संतानाला परं-
परापर्यंत देईन. १६ आणि मी तुझें संतान पृ-
थ्वीच्या रजांइतकें करीन, असें कीं जर कोणाच्याने
पृथ्वीचे रज मोजवतील तर तुझें संतानहि मोजलें
जाईल. १७ तूं उठून देशाच्या लांबीवरून व त्या-
च्या रुंदीवरून चाल, कां कीं तो मी तुला देईन.
१८ तेव्हां आब्राम राहोटी घेऊन हेब्रोनांत जें ए-
लोनमाम्रे तेथें येऊन राहिला, आणि तेथें त्याने
परमेश्वरासाठीं वेदी बांधिली.

## अध्याय १४.

तेव्हां शिनाराचा राजा आम्राफेल, व एला-
साराचा राजा आर्योख, व एलाम्चा राजा
कदर्लाओमेर, व राष्ट्रांचा राजा थीदाल यांच्या
दिवसांत असें झालें कीं, २ यांनी सदोमाचा
राजा बेरा, व गमोऱ्याचा राजा बिर्षा, व आद्-
माचा राजा शिनाब, व त्सबोईमाचा राजा शेमे-
बेर, व बेला म्हणजे त्सोवार याचा राजा, यांसीं
लढाई केली. ३ हे सर्व शिद्दीमांतल्या म्हणजे
क्षारसमुद्राजवळच्या खिंडींत एकवट झाले. ४
बारा वर्षे त्यांनी कदर्लाओमेराची सेवा केली, आ-
णि तेराव्या वर्षी ते फितले. ५ आणि चौदाव्या
वर्षी कदर्लाओमेर आणि त्याकडील जे राजे, त्या-
नी येऊन आष्टरोथ कर्णाईमांतील रफाई यांस
व हमांतील जूजी यांस, आणि शावेकिर्याथाई-
मांतील एमी यांस, ६ आणि जे आपल्या से-
ईर पर्वतांत होरी यांस, रानाजवळ जे एल्पारान
तेथपर्यंत मारिले. ७ मग ते फिरले, आणि ए-
न्मिश्पाट म्हणजे कादेश, तेथें येऊन अमालेकी
यांचा अवघा देश, अणखी हज्जोनतामरांतील रा-
हणारे अमोरी यांसहि त्यांनी मारिलें. ८ तेव्हां
सदोमाचा राजा, व गमोऱ्याचा राजा, व आद्-
म्याचा राजा, व त्सबोईमाचा राजा, आणि बेला
म्हणजे त्सोवार याचा राजा, हे निघून सिद्दीम-
खिंडींत त्यांसीं लढायास सिद्ध झाले; ९ म्हणजे
एलाम्चा राजा कदर्लाओमेर, व राष्ट्रांचा राजा
थीदाल, व शिनाराचा राजा आम्राफेल, व ए-
लासाराचा राजा आर्योख यांसीं; चार राजे त्या
पांचांसीं लागले. १० तेव्हां सिद्दीमखिंडींत गा-
ळाचीं फार डबकें होतीं, आणि सदोम व गमोरा
यांचे राजे पळून तेथें पडले, आणि जे राहिले
ते डोंगराकडे पळाले. ११ मग सदोमकरांची
व गमोराकरांची अवघी संपत्ति आणि त्यांचें सर्व
भक्षण ते घेऊन गेले. १२ आणि आब्रामाचा
पुतण्या लोट तो सदोमांत राहत असतांना त्या-
ला व त्याची संपत्ति घेऊन गेले. १३ तेव्हां को-
णी निभावलेला याने येऊन आब्राम जो इब्री त्या-
ला सांगितलें: तेव्हां तो एष्कोल व आनेर यांचा
भाऊ माम्रे जो अमोरी त्याच्या एलोव्यांत राहत
होता, आणि हे आब्रामाचे करारी होते. १४ ते-
व्हां आब्राम आपला भाऊ हरण करून नेला, अ-
सें ऐकून आपलीं शिक्षित माणसें तीनशें अठरा
जीं त्याच्या घरीं जन्मलेलीं त्यांस काढून दानाप-
र्यंत पाठीस लागला. १५ आणि त्याने व त्याच्या
चाकरानी रात्रीं त्यांवर वांटणी करून त्यांस मा-
रिलें, आणि दाम्मासेकाच्या डाव्याकडील होबा
तेथवर त्यांच्या पाठीस तो लागला. १६ आणि
त्याने अवघी संपत्ति माघारें आणिली, आणि आ-
पला भाऊ लोट यालाहि आणि त्याची संपत्ति
अणखी बायका व लोक यांस माघारें आणि-
लें. १७ मग तो कदर्लाओमेर व त्यासहित जे
राजा होते, त्यांस मारून परत आल्यावर त्याला
भेटायास सदोमाचा राजा शावेखिंडीपर्यंत, म्ह-
णजे राजाच्या खिंडीपर्यंत बाहेर गेला. १८ शा-
लेमाचा राजाहि मल्खीजेदेक याने भाकरी व द्रा-
क्षारस बाहेर आणिला; तर हा परात्पर देवा-
चा याजक होता. १९ आणि याने त्याला
आशीर्वाद देण्याने म्हटलें, परात्पर देव जो आ-
काशाचा व पृथ्वीचा धनी, त्याकडून आब्राम आ-
शीर्वादित होवो. २० आणि परात्पर देव ज्याने

शत्रु तुझ्या हातांत दिल्हे, त्याची स्तुति असो; मग
याला त्याने अवघ्यांचा दाहावा भाग दिल्हा. २१
तेव्हां सदोमाचा राजा आब्रामाला बोलला कीं,
मनुष्यें मला दे, आणि संपत्ति तूं आपल्याजवळ घे.
२२ परंतु आब्राम सदोमाच्या राजाला बोलला,
परमेश्वर परात्पर देव, जो आकाशाचा व
पृथ्वीचा धनी, त्याजवळ मी आपला हात उचलून
बोललों कीं, २३ एक सूत अथवा वाहाणेचा
बंदहि मी घेणार नाहीं, जें तुझें त्यांतून कांहीं
घेणारच नाहीं, ह्मणजे त्वां न ह्मणावें कीं म्या
आब्रामाला धनवान केलें आहे. २४ तरण्यानी
जें खालें तें मात्र, आणि आनेर व एष्कोल व
मम्रे जीं माणसें माझ्यासंगतीं गेलीं, त्यांचा
वांटा ते आपला वांटा घेवोत.

## अध्याय १५.

या गोष्टींनंवर परमेश्वराचा शब्द साक्षात्का-
राने आब्रामास असा झाला कीं, आब्रामा,
भिऊं नको; मी तुझी ढाल, आणि तुझें फार मोठें
उतराई आहें. २ तेव्हां आब्राम बोलला, हे
प्रभू परमेश्वरा, तूं मला काय देसील? कां मी
निसंतान जावों, आणि माझ्या घरचा कारभारी हा
दाम्मासेकांतील अलियेजेर याचा पुत्र आहे. ३
आणि आब्राम बोलला, पाहा त्वां मला संतान
दिल्हें नाहीं; तर पाहा, माझ्या घरचा पुत्र जो तो
माझा वारीसदार होईल. ४ तेव्हां पाहा पर-
मेश्वराचा शब्द त्याला असा झाला कीं, हा
तुझा वारीसदार होणार नाहीं, परंतु जो तुझ्या पो-
टांतून निघेल वोच तुझा वारीसदार निश्चयें होईल.
५ मग परमेश्वराने त्याला बाहेर आणिलें आ-
णि सांगितलें कीं, आतां तूं आकाशाकडे पाहा,
आणि जर तुझ्याने तारे मोजवतील तर त्यांस मो-
ज; आणि त्याला ह्मटलें, तसें तुझें संतान होईल.
६ तेव्हां त्याने परमेश्वरावर विश्वास ठेविला,
आणि ह्याने तो त्याला पुण्य मोजिला. ७ मग
त्याला ह्मटलें, त्वां या देशाचें वतन पावावें ह्मणून
हा तुला द्यायास ज्याने तुला खास्द्यांच्या ऊरगा-
वांतून आणिलें तोच मी परमेश्वर आहें. ८
तेव्हां तो बोलला, हे प्रभू परमेश्वरा, मी याचें
वतन पावेन हें मी कशावरून जाणेन? ९ मग
त्याने त्याला सांगितलें, तूं तीन वर्षांची गाय, तीन
वर्षांची शेळी, व तीन वर्षांचा मेंढा; व एक होला व
पारव्याचें एक पिलूं हीं मजसाठीं घे. १० तेव्हां
त्याने आपल्याजवळ हीं अवघीं घेतलीं, आणि त्यांस
मध्यें चिरलें, नंतर एकएक तुकडा आपापल्या जो-
डीच्यासमोर ठेविला, परंतु पांखरें चिरलीं नव्हतीं.
११ मग त्या प्रेतांवर टोंचणारे पक्षी उतरले अ-
सतां आब्रामाने त्यांस उडविलें. १२ नंतर सूर्य
मावळता झाला तेव्हां आब्रामाला गाढ झोंप ला-
गली, आणि पाहा मोठें अंधारभय त्याला लागलें.
१३ मग आब्रामाला तो बोलला, तूं निश्चयें जाण
कीं तुझें संतान, त्याचा नाहीं जो देश त्यांत विदे-
शी होऊन तेथल्यांची सेवा करील, आणि ते चार-
शें वर्षांपर्यंत त्यांस पीडितील. १४ तथापि ज्या
राष्ट्राची सेवा वीं करितील त्याचाहि न्याय मी
करीन, आणि त्यानंतर तीं बहुत संपत्ति घेऊन
निघतील. १५ आणि तूं आपल्या वाडवडिलां-
जवळ सुखरूप जासील, तूं चांगल्या ह्मातारपणीं
पुरला जासील. १६ मग चौथ्या पिढीचे इकडे
माघारें येतील, कां तर अमोरी यांचें पाप अद्याप
पूर्ण नाहीं. १७ मग सूर्य मावळल्यावर आणि
काळोख झाला असतां, तेव्हां असें झालें पाहा
धुमसत भटी व जळत दिवा हीं त्या तुकड्यांमधून
चालत गेलीं. १८ त्याच दिवशीं परमेश्वराने
आब्रामाशीं असा करार केला कीं, मिसरांतील न-
दीपासन फराथ जी महानदी त्या नदीपर्यंत हाच
देश म्या तुझ्या संतानाला दिल्हा आहे; १९ ह्म-
णजे केनी व कनिज्जी, २० आणि काद्मोनी,
व हित्ती, व परिज्जी, व रफाई, २१ आणि अमो-
री व खनानी, व गिर्गाशी, व यबूसी यांचा देश.

## अध्याय १६.

तेव्हां आब्रामाची बायको साराय् त्यापासून
प्रसवली नाहीं; आणि तिला एक मिसरकरीण
दासी होती, आणि हिचें नांव हागार. २ तेव्हां
साराय् आब्रामाला बोलली, आतां पाहा परमे-
श्वराने मला प्रसवण्याविषयीं निवारण केलें आहे;
आतां माझ्या दासीजवळ जा, कदाचित् तिजकडून
मला संतान होईल; तेव्हां आब्रामाने सारायीची
गोष्ट मानिली. ३ तसें आब्राम खनानदेशांत

दाहा वर्षे राहिल्यावर, आब्रामाची बायको सा-
राय् इने आपली दासी मिसरकरीण हागार इ-
ला घेऊन आपला भतार आब्राम याला याची
बायको होण्याकरितां दिल्हें· ४ मग तो हा-
गारीजवळ गेला, आणि ती गरोदर झाली; तेव्हां
आपण गरोदर असें तिने पाहिल्यावर तिच्या
दृष्टींत तिची धनीण तुच्छ झाली· ५ मग सा-
राय् आब्रामाला बोलली, मजवरचा बलात्कार
तुजवर असो, म्यां आपली दासी तुझ्या उरांत
ठेविली, मग तिने आपण गर्भ धरिला, असें पाहि-
ल्यावर मी तिच्या दृष्टींत तुच्छ झालें; माझ्या व
तुझ्यामध्यें परमेश्वर निवाडा करो· ६ तेव्हां
आब्राम सारायीस बोलला, पाहा तुझी दासी तुझ्या
हातीं आहे, जें तुझ्या दृष्टींत बरें तें तिचें कर; मग
सारायीने तिला गांजिलें, यास्तव तिच्यासमोरून ती
पळाली· ७ नंतर रानांतील पाण्याच्या झऱ्याज-
वळ ह्मणजे शूराच्या वाटेवरील झऱ्याजवळ, ती
परमेश्वराच्या दूताला सांपडली· ८ तेव्हां तो
बोलला, अगे सारायीच्या दासी हागार, तूं को-
ठून आलीस, आणि कोणींकडे जातीस? नंतर ती
बोलली, मी आपली धनीण साराय् इच्यासमोरून
पळत आहें· ९ मग परमेश्वराचा दूत तिला
बोलला, तूं आपल्या धनिणीजवळ परत जा, आणि
तिच्या हाताखालीं सोसून घे· १० अणखी प-
रमेश्वराचा दूत तिला बोलला कीं, मी तुझें सं-
तान फारच वाढवीन, असें कीं तें पुष्कळपणामुळें
मोजलें जाणार नाहीं· ११ आणि परमेश्वराचा
दूत तिला बोलला, पाहा, तूं गरोदर आहेस, आ-
णि पुत्र प्रसवसील; आणि त्याचें नांव इश्माएल
ठेवसील ; कां कीं परमेश्वराने तुझें दुःख ऐकून
घेतलें आहे. १२ परंतु तो रांठ माणूस होईल ;
त्याचा हात सर्वांविरुद्ध आणि सर्वांचा हात त्यां-
विरुद्ध असें होईल; तथापि तो आपल्या सर्व भा-
वांच्यासमोर राहील· १३ नंतर परमेश्वर जो
तिला बोलला, त्याचें नांव तिने असें ठेविलें कीं,
हे देवा, तूं मला पाहतोस, कां कीं तिने ह्मटलें,
त्याने मला पाहिल्यानंतर म्यां एथें त्याला पाहि-
लेंच काय! १४ यास्तव त्या झऱ्यास बेरलाहाय्-
रोई, असें ह्मटलें आहे; पाहा, ती कादेश आणि
बारेद यांमध्यें आहे· १५ नंतर हागार आ-
ब्रामाचा पुत्र प्रसवली; आणि आब्रामाने आपला
जो पुत्र हागार प्रसवली, त्याचें नांव इश्माएल
ठेविलें· १६ आणि हागार आब्रामासाठीं इश्मा-
एलास प्रसवली, तेव्हां आब्राम शाऐंशीं वर्षांचा
होता·

## अध्याय १७.

जेव्हां आब्राम नव्याण्णव वर्षांचा झाला, तेव्हां
परमेश्वराने आब्रामाला दर्शन देऊन त्याला
ह्मटलें कीं, मी सर्वसमर्थ देव आहें; तूं माझ्या-
समोर चालून पूर्ण अस. २ आणि मी आपला
करार मजमध्यें व तुजमध्यें करीन, आणि तुला
फार फार वाढवीन· ३ तेव्हां आब्रामाने आपलें
तोंड भूमीस लावून नमला, आणि त्यासीं देवाने
बोलून सांगितलें कीं, ४ मी आहें, पाहा माझा
करार तुजसीं आहे, आणि तूं राष्ट्रांच्या समुदायाचा
बाप होसील· ५ तर आतांपासून तुझें नांव आब्राम
ह्मटलें जाणार नाहीं, परंतु तुझें नांव आब्राहाम
होईल; कां कीं म्यां तुला राष्ट्रांच्या समुदायाचा
बाप, असें केलें आहे· ६ आणि मी तुला फार
सफळ करीन; तुला राष्ट्रेंहि करीन, आणि तुजपासून
राजे उत्पन्न होतील· ७ आणि तुझा व तुझ्या मरणा-
नंतर तुझ्या संतानाचा देव असा होण्यास मी आ-
पला करार मजमध्यें व तुजमध्यें, आणि तुझ्यानंतर
तुझ्या संतानामध्यें त्यांच्या पिढ्यांत सर्वकाळ करार
असा स्थापीन· ८ आणि तुझ्या प्रवासाचा देश ह्म-
णजे अवघा खनानदेश मी तुला आणि तुझ्या म-
रणानंतर तुझ्या संतानाला सर्वकाळ वतनासाठीं दे-
ईन, आणि मी त्यांचा देव होईन· ९ अणखी देवाने
आब्राहामाला सांगितलें कीं, तूं तर माझा करार पा-
ळ; त्वां आणि तुझ्या मरणानंतर तुझें संतान त्यांच्या
पिढ्यांतून पाळील. १० मजमध्यें व तुझ्यामध्यें
व तुझ्यानंतर तुझ्या संतानामध्यें जो माझा करार
तुह्मी पाळाल, तो हाच कीं, तुह्मामधील प्रत्येक पु-
रुषाची सुंता करावी· ११ तुह्मी आपलें भ्रष्ट मां-
स कापून टाका, तसी माझ्यामध्यें व तुह्मामध्यें क-
राराची खूण होईल· १२ ह्मणजे आठ दिवसांचा
तुमचा प्रत्येक पुरुष तुमच्या पिढ्यांतून घरांत जन्म-
लेला, आणि जो तुझ्या संतानांतील नव्हे सर्व अन्य
प्रजांपासून पैक्याने विकत घेतलेला, त्याची सुंता

केली जावी. १३ जो तुझ्या घरीं जन्मलेला, आ-
णि तुझ्या पैक्याने विकत घेतलेला त्याची सुंता हो-
वोच होवो; तशाने माझा करार तुमच्या मांसांत
सर्वकाळ असा होईल. १४ आणि सुंताविरहित
बालक ज्याची सुंता केली जाणार नाहीं, तो प्राणी
आपल्या लोकांतून छेदलाच जाईल; त्याने माझा
करार मोडिला आहे.

१५ अणखी देवाने आब्राहामाला सांगितलें
कीं, तुझी बायको साराय् इचें नांव साराय् असें
तूं ह्मणूं नको, कां कीं तिचें नांव सारा होईल.
१६ आणि मी तिला आशीर्वाद देईन, आणि तु-
ला तिजपासूनहि पुत्र देईन; मी तिला असा आ-
शीर्वाद देईन कीं ती राष्ट्रें असें होईल, तिजपासून
लोकांचे राजे होतील. १७ तेव्हां आब्राहामाने
आपल्या तोंडाशीं नमस्कार केला, आणि हांसून
आपल्या मनांत ह्मटलें, काय? शंभर वर्षांचा त्या
ला लेंक होईल? आणि सारा जी नव्वद वर्षां-
ची ती देखील प्रसवेल कीं काय? १८ मग
आब्राहाम देवाला बोलला कीं, इश्माएल तुझ्या-
समोर अगत्य जगावा. १९ तेव्हां देव बोलला,
तुझी बायको सारा तुजपासून पुत्र निश्चयें प्रसवेल,
आणि तूं त्याचें नांव इझाक ठेव, मग त्याशीं आ-
णि त्यानंतर त्याच्या संतानाशीं मी आपला करार,
सर्वकालिक करार, असा स्थापीन. २० आणि इ-
श्माएलाविषयीं तुझें ऐकिलें आहे; पाहा, म्या त्या-
ला आशीर्वाद दिल्हा आहे, आणि मी त्याला स-
फळ करून त्याला फार फार वाढवीन; तो बारा
अधिकाऱ्यांस जन्मवील, आणि मी त्याला मोठें
राष्ट्र असें करीन. २१ परंतु इझाक ज्याला सारा
पुढील वर्षांतल्या याच नेमांत तुजपासून प्रसवेल,
त्याशीं मी आपला करार स्थापीन. २२ नंतर देव
त्यापाशीं बोलणें संपवून आब्राहामापासून वरतें
गेला. २३ मग आब्राहामाने आपला पुत्र इश्मा-
एल याला आणि सर्व जे त्याच्या घरीं जन्मलेले
त्यांस, आणि सर्व जे त्याच्या पैक्याने विकत घेत-
लेले त्यांस, ह्मणजे आब्राहामाच्या घरच्या माण-
सांतील प्रत्येक पुरुषाला घेऊन, जसें देवाने त्या-
ला सांगितलें होतें तसें त्याच दिवशीं त्यांची सुंता
केली. २४ तसें जेव्हां आब्राहामाची सुंता झाली,
तेव्हां तो नव्याण्णव वर्षांचा होता. २५ आणि
जेव्हां त्याचा पुत्र इश्माएल याची सुंता झाली,
तेव्हां तो तेरा वर्षांचा होता. २६ त्याच दिवशीं
आब्राहाम व त्याचा पुत्र इश्माएल यांची सुंता
झाली. २७ आणि त्याच्या घरचे सर्व मनुष्य, घरीं
जन्मलेले आणि जे अन्य प्रजेपासून पैक्याने विकत
घेतलेले, त्यांची सुंता त्याच्याबराबर झाली.

## अध्याय १८.

आणि परमेश्वराने एलोनेमाम्र्यांत त्याला
दर्शन दिल्हें, तेव्हां तो दिवसांतील उष्ण-
काळीं राहोटीच्या दाराशीं बसला होता. २
आणि त्याने आपले डोळे वर करून पाहिलें;
तेव्हां पाहा, तीन पुरुष त्याजवळ उभे राहिले,
मग तो पाहून त्यांस भेटायास राहोटीच्या दारा-
पासून धांवला आणि भूमीकडे लवला. ३ तेव्हां
तो बोलला, हे माझ्या प्रभू, आतां तुझ्या दृष्टींत
जर मी कृपा पावलों; तर मागतों कीं तूं आपल्या
दासाजवळून जाऊं नको. ४ आतां थोडें पाणी
आणूं द्या, आणि तुह्मी आपले पाय धुऊन ह्या
झाडाच्या खालीं विसांवा घ्या. ५ मी भाकरीचा
तुकडाहि आणीन, आणि तुह्मी आपल्या मनांस
आधार करा, मग पुढें जावें; तर अशास तुह्मी
आपल्या दासाजवळ आलां आहां; तेव्हां ते
बोलले, जसें तूं बोललास तसें कर. ६ मग
आब्राहाम राहोटींत सारेकडे धांवून बोलला, तूं
तीन मापांचें बारीक पीठ लवकर सिद्ध करून
मळ आणि पोळ्या कर. ७ नंतर आब्राहाम
गुरांकडे धांवला आणि त्याने कोवळें व चांगलें
वासरूं घेऊन पोऱ्याच्या स्वाधीन केलें, मग याने
त्याचा पाक करायास त्वरा केली. ८ नंतर
त्याने लोणी व दूध व वासरूं ज्याचा पाक केला
होता तें आणून त्यांपुढें ठेविलें; तेव्हां आपण
त्यांजवळ त्या झाडाखालीं उभा राहिला, आणि
त्यांनी खाल्लें. ९ मग ते त्याला बोलले कीं,
तुझी स्त्री सारा कोठें आहे? तेव्हां तो बोलला,
एथें राहोटीमध्यें. १० मग एक बोलला कीं,
सुमारें जननाच्या वेळाने मी माघारें तुझ्याजवळ
येईनच येईन, आणि पाहा तुझी स्त्री सारा इला
पुत्र होईल; तेव्हां त्याच्यामागें राहोटीचें दार
होतें, यास्तव सारेने तेथें ऐकिलें. ११ आणि

आब्राहाम व सारा वडील होऊन आयुष्यांत
चाललीं असतां, सारेला स्त्रियांच्या चालीप्रमाणें
होणें संपलें. १२ यास्तव सारेनें आपणासीं
हांसून ह्मटलें, मी जर्जर झालें, आणि माझा धनी
ह्मातारा, यानंतर मला सुख होईल कीं काय?
१३ तेव्हां परमेश्वर आब्राहामाला बोलला,
सारेनें हांसून ह्मटलें कीं, मी ह्मातारी असतां
निश्चयें प्रसवेनच कीं काय? हें कशास्तव? १४
कांहीं आश्चर्य परमेश्वराच्या अनाधीन आहे
कीं काय? वायद्याप्रमाणें सुमारें जननाच्या वेळानें
मी तुझ्याजवळ परत येईन, आणि सारेला पुत्र
होईल. १५ तेव्हां सारा नाकारीत बोलली कीं,
मी हांसलें नाहीं, कां तर ती भ्याली; मग तो
बोलला, नाहीं, तूं हांसलीस खरें. १६ नंतर
त्या माणसांनी उठून तेथून सदोमाकडे तोंडें ला-
विलीं, आणि आब्राहाम त्यांस बोळवायास त्यां-
संगतीं गेला.

१७ तेव्हां परमेश्वरानें ह्मटलें, जें मी
करितों तें आब्राहामापासून लपवीन कीं काय?
१८ कारण कीं आब्राहामापासून मोठें आणि
समर्थ राष्ट्र होईल, आणि त्याकडून पृथ्वींतील
सर्व राष्ट्रें आशीर्वाद पावतील. १९ कां तर मी
त्याला याविषयीं जाणतों कीं तो आपलीं लेंकरें व
आपला परिवार आपल्यामागें यांस आज्ञा असें
देईल कीं ते नीति व न्याय करितांना परमेश्वराचा
मार्ग पाळितील; अशानें परमेश्वरानें आब्राहा-
माविषयीं जें सांगितलें तें त्याला प्राप्त करावें. २०
मग परमेश्वर बोलला, सदोम व गमोरा यांचा
बोभाट मोठा आणि त्यांचें पाप अतिभारी यास्तव.
२१ आतां मी उतरेन, आणि त्याचा जो बोभाट
मजकडे आला अगदीं त्याप्रमाणें त्यांनी केलें आहे
किंवा नाहीं, हें मी पाहीन, आणि जर नसलें तर
मी जाणेन. २२ मग तीं माणसें तेथून फिरलीं
आणि सदोमाकडे चाललीं, परंतु आब्राहाम पर-
मेश्वरासमोर अणखी उभा राहिला. २३ तेव्हां
आब्राहाम जवळ येऊन बोलला, पाप्यांसंगतीं
नीतिवंतांचा नाश तूं करसील, हें खरें कीं काय?
२४ कदाचित त्या नगरांत पन्नास नीतिवंत अस-
तील, तर काय? नाश करसीलच, आणि त्यांत
जे पन्नास नीतिवंत त्यांकरितां जाग्याचें सहन न
करसील कीं काय? २५ या गोष्टीप्रमाणें करणें
तुजपासून तुला दूर असो; पाप्यांसंगतीं नीति-
वंतांस असें मारणें कीं जसा पापी तसा नीतिवंत
व्हावा हें तुजपासून दूर असो; सर्व पृथ्वीचा जो
न्यायाधीश तो न्याय न करील कीं काय? २६
मग परमेश्वर बोलला, जर सदोमांत नगरा-
मध्यें पन्नास नीतिवंत मला मिळतील, तर त्यांसाठीं
त्या सर्व जाग्याचें सहन करीन. २७ तेव्हां आ-
ब्राहाम उत्तर करीत बोलला, पाहा आतां मी धूळ
व राख असतांहि प्रभूजवळ बोलूं लागलों. २८
कदाचित पन्नास नीतिवंतांमध्यें पांच उणे होतील,
तर पांचांसाठीं तूं त्या सर्व नगराचा नाश करसील
कीं काय? तेव्हां तो बोलला, जर तेथें पंचेताळीस
मला मिळतील, तर मी नाश करणार नाहीं.
२९ मग यानें त्याजवळ अणखी गोष्टी करून
ह्मटलें, कदाचित् तेथें चाळीस मिळतील; तेव्हां
तो बोलला, चाळिसांसाठीं न करीन. ३० मग
हा बोलला, आतां प्रभूला राग न यावा ह्मणजे
मी बोलेन, कदाचित् तेथें तीस मिळतील; तेव्हां
तो बोलला, जर तेथें तीस मला मिळतील, तर न
करीन. ३१ मग हा बोलला, पाहा आतां मी
प्रभूला बोलूं लागलों; कदाचित् तेथें वीस मिळ-
तील; तेव्हां तो बोलला, विसांसाठीं मी नाश
करणार नाहीं. ३२ मग हा बोलला, आतां प्र-
भूला राग न यावा ह्मणजे मी केवळ या वेळेस
बोलेन, कदाचित् तेथें दाहा मिळतील; तेव्हां तो
बोलला, दाहा यांसाठीं मी नाश करणार नाहीं.
३३ तेव्हां परमेश्वर आब्राहामासीं बोलणें
समाप्त करून गेला, आणि आब्राहाम आपल्या
ठिकाणीं परत आला.

## अध्याय १९.

नंतर संध्याकाळीं ते दोन दूत सदोमास आले;
तेव्हां लोट सदोमाच्या वेसीजवळ बसला
होता आणि लोट पाहून त्यांस भेटायास उठला
आणि तोंड भूमीस लावून नमला. २ मग तो
बोलला, अहो माझे धनी, पाहा, आतां तुह्मी
आपल्या दासाच्या घराकडे वळून उतरा आणि
आपले पाय धुवा, मग मोठ्या सकाळीं उठून
आपल्या वाटेनें जावें; परंतु ते बोलले, असें नाहीं.

कां आह्मी आडआग्यांत वस्ती करूं· ३ तेव्हां
त्याने त्यांस फार आग्रह केला, यास्तव ते त्याकडे
वळून त्याच्या घरीं आले; मग याने त्यांच्यासाठीं
असें जेवण केलें कीं न फुगलेल्या भाकरी भाजल्या,
आणि त्याने खालें· ४ परंतु ते निजल्यापूर्वी
नगरांतील माणसें ह्मणजे सदोमांतील माणसें
पोरापासून ह्मातार्‍यापर्यंत सीमेंतून अवघे लोक
यानी घरास वेढिलें· ५ आणि लोटाला हाक
मारून त्याला ह्मटलें, जीं माणसें या रात्रीं तुज-
कडे आलीं, तीं कोठें? त्यांस आह्माजवळ बाहेर
आण, ह्मणजे आह्मी त्यांस जाणूं· ६ मग
लोट त्यांजवळ दाराबाहेर गेला, आणि त्याने
आपल्या मागून कवाड लाविलें· ७ नंतर त्याने
त्यांस ह्मटलें, अहो भाऊ, तुह्मी दुष्टाई करूं
नका· ८ आतां पाहा, मला दोन कन्या आहेत,
त्यानी पुरुषाला जाणिलें नाहीं; अहो, मी त्यांस
तुह्माजवळ बाहेर काढीन, मग जसें तुमच्या दृष्टींत
बरें तसें त्यांसीं करा, केवळ या माणसांसीं कांहीं
करूं नका, कां तर अशास ते माझ्या पाख्याच्या
सावलींत आले आहेत· ९ मग ते बोलले, दूर
हो; आणि ह्मणाले, हा एक माणूस प्रवास करा-
यास आला, आणि तो न्याय ठरवीलच ठरवील;
आतां आह्मी त्यापेक्षां तुझें वाईट करूं; नंतर
त्यानी त्या माणसावर ह्मणजे लोटावर फार बळा-
त्कार केला, आणि कवाड फोडायास ते जवळ
आले· १० तेव्हां त्या आंतल्या माणसानी आ-
पला हात बाहेर काढिला, आणि लोटाला आ-
पल्याजवळ घरांत ओढून कवाड बंद केलें· ११
नंतर घराच्या दाराजवळ जीं माणसें लाहनापासून
मोठ्यापर्यंत त्यांस आंधळेपणाने मारिलें, यास्तव
ते दार शोधण्याने थकले गेले· १२ मग तीं
आंतलीं माणसें लोटाला बोललीं, तुझें अणखी
एथें कोण आहे? जावई व तुझे पुत्र व तुझ्या कन्या
आणि नगरांत जें अवघें तुझें असेल, तें या ठिका-
णांतून काढ· १३ यास्तव कीं आह्मी या ठिका-
णाचा नाश करितों, कां तर त्याचा बोभाट परमे-
श्वरापुढें मोठा झाला आहे, आणि त्याचा नाश
करायास परमेश्वराने आह्मास पाठविलें आहे·
१४ मग लोट बाहेर आऊन ज्यानी त्याच्या
कन्यांस वऱ्हाडून घेतलें त्या आपल्या जांवयांसीं
बोलून ह्मणाला, उठा, या ठिकाणांतून निघा,
कां तर परमेश्वर या नगराचा नाश करितो;
परंतु तो आपल्या जांवयांस विनोद करणारा
तसा दिसला· १५ मग सकाळ उजाडली, तें-
व्हां त्या दूतानी लोटाला घाई करवून सांगितलें,
ऊठ, आपली बायको व आपल्या दोन्ही कन्या
ज्या मिळाल्या त्यास ने; नाहीं तर या नगराच्या
पापाने तुझा विनाश होईल. १६ तेव्हां तो
खोळंबा करीत असतां त्याजवर परमेश्वराची
करुणा होती, तेणेंकडून त्या माणसानी त्याचा
हात व त्याच्या बायकोचा हात व त्याच्या दो-
घी कन्यांचा हात धरिला, आणि त्याला काढून
त्याला नगराबाहेर ठेविलें· १७ मग त्यांस बा-
हेर काढल्यानंतर असें झालें कीं तो बोलला, तूं
आपल्या जिवासाठीं पळ, आपल्या पाठीमागें पा-
हूं नको, आणि कोठेंहि सपाटींत उभा राहूं न-
को, डोंगराकडे पळ, नाहीं तर तुझा विनाश हो-
ईल· १८ तेव्हां लोट त्यांस बोलला, हे मा-
झ्या प्रभू, असें नको· १९ आतां पाहा, तुझ्या
दासाला तुझ्या दृष्टींत कृपा मिळाली आहे, आणि
तुझी दया जी माझा जीव वांचवायास त्वां
मजवर केली ती मोठी केली आहे, परंतु माझ्याने
डोंगराकडे पळवत नाहीं; कदाचित् मला कांहीं
वाईट लागेल आणि मी मरेन. २० आतां पाहा
हें नगर, इकडे पळायास जवळ आहे, आणि तें
लाहन; अहो मी इकडे पळेन; तें लाहन नाहीं कीं
काय? मग माझा जीव वांचेल· २१ तेव्हां तो
त्याला बोलला, पाहा या गोष्टीविषयींहि म्या
तुला मानिलें आहे, ह्मणजे ज्याविषयीं तूं बोललास
त्या नगराचा नाश करणार नाहीं· २२ उतावळी
करून तिकडे पळ, कां कीं तूं तेथें पोहंचसील
तोंपर्यंत माझ्याने कांहीं करवत नाहीं; यावरून
त्या नगराचें नांव जवार ह्मटलें गेलें· २३ पृथ्वी-
वर सूर्य उगवला, तेव्हां लोट जवारांत पावला·
२४ तेव्हां परमेश्वराने सदोम व गमोरा यांज-
वर गंधक व अग्नि परमेश्वरापासून आकाशांतून
वर्षिला· २५ आणि त्याने तीं नगरें, आणि अ-
वघी सपाटी, आणि त्या नगरांतील सर्व राहणारे
आणि भूमींतून जें उगवलेलें, त्याचा नाश केला·
२६ तेव्हां त्याच्या बायकोने त्याच्यामागून पा-

हिलें, आणि ती मिठाचा खांब झाली. २७ ते-
व्हां **आब्राहाम** जेथें आपण **परमेश्वरा**पुढें उभा
राहिला होता, तेथें मोठ्या सकाळीं गेला. २८
आणि त्यानें **सदोम** व **गमोरा** यांच्या घेऱ्याकडे
आणि सपाटींतील भूमीच्या अवघ्या घेऱ्याकडे
अवलोकून पाहिलें, तेव्हां पाहा भट्टीच्या धुरासा-
रिखा त्या देशाचा धूर चढला. २९ आणि
जेव्हां **देवानें** सपाटींतील नगरांचा नाश केला,
तेव्हां असें झालें कीं **देवानें** **आब्राहामा**ची आठ-
वण केली, आणि जेथें **लोट** राहिला, त्या नगरां-
चा नाश करित्या वेळेस **लोटा**ला त्या नाशांतून
पाठविलें.

३० नंतर **लोट** जवारांतून चढून आपल्या
दोघी कन्यांसुद्धां डोंगरांत राहिला, कां तर जवा-
रांत राहायास भ्याला; आणि तो व आपल्या
दोघी कन्या गुहेंत राहिलीं. ३१ तेव्हां वडील
धाकटीस बोलली कीं, आपला बाप म्हातारा आ-
हे, आणि सर्व पृथ्वीच्या रीतीप्रमाणें आह्माजवळ
येण्यास पुरुष पृथ्वीवर नाहीं: ३२ ये, आपण
आपल्या बापाला द्राक्षारस पाजूं, मग त्यासीं
आपण निजूं, आणि आपल्या बापापासून संतान
राखूं. ३३ तसें त्यांनी आपल्या बापाला त्या
रात्रीं द्राक्षारस पाजिला, मग वडील जाऊन
आपल्या बापासीं निजली; परंतु ती केव्हां निजली
आणि केव्हां उठली तें तो समजला नाहीं. ३४
मग दुसऱ्या दिवसीं असें झालें कीं वडील धाक-
टीस बोलली, पाहा, काल रात्रीं मी आपल्या
बापासीं निजलें, या रात्रींहि आपण त्याला द्राक्षा-
रस पाजूं, आणि तूं जाऊन त्यासीं नीज; तसें
आपण आपल्या बापापासून संतान राखूं. ३५
तेव्हां त्यांनी त्या रात्रींहि आपल्या बापाला द्राक्षा-
रस पाजिला, आणि धाकटी उठून त्यासीं निजली,
परंतु ती केव्हां निजली आणि केव्हां उठली, तें
तो समजला नाहीं. ३६ तसें लोटाच्या दोघी
कन्या आपल्या बापापासून गरोदर झाल्या. ३७
मग वडील पुत्र प्रसवली, आणि त्याचें नांव **मो-
वाब** ठेविलें; तो आजपर्यंत जे **मोवाब** लोक
त्यांचा पूर्वज झाला. ३८ आणि धाकटी तीहि
पुत्राला प्रसवली आणि तिनें त्याचें नांव **बेनाम्मी**
ठेविलें; तो आजपर्यंत जे **आम्मोन**लोक त्यांचा
पूर्वज झाला.

## अध्याय २०.

तेव्हां **आब्राहाम** तेथून दक्षिण देशाकडे गेला,
आणि **कादेश** व **शूर** यांमध्यें राहून **गरारा**त
प्रवासी झाला. २ तेव्हां **आब्राहाम** आपली
बायको **सारा** इजविषयीं बोलला कीं, ही माझी
बहीण; मग **अबीमेलेख** **गरारा**चा राजा यानें
पाठवून **सारे**ला घेतलें. ३ तेव्हां **देव** **अबीमे-
लेखा**जवळ स्वप्नांत रात्रीं आला, आणि त्याला
बोलला, पाहा जी स्त्री त्वां घेतली आहे तिजक-
रितां तूं मेलास, कां कीं ती नवऱ्याची नवरी आहे.
४ परंतु **अबीमेलेख** तिच्याजवळ गेला नव्हता;
मग हा बोलला, हे **प्रभू**, तूं नीतिवंत राष्ट्राचाहि
घात करसील कीं काय? ५ ती माझी बहीण,
असें तो मला बोलला नाहीं कीं काय? आणि
तीहि आपण बोलली कीं, तो माझा भाऊ; म्यां
आपल्या मनाच्या शुद्धपणानें व आपल्या हातांच्या
निर्दोषतेनें हें केलें आहे. ६ मग **देव** त्याला
स्वप्नांत बोलला, होय मी जाणतों कीं त्वां आपल्या
मनाच्या शुद्धपणानें हें केलें आहे, अणखी म्यां
तुला मजविरुद्ध पाप करण्यापासून असें आकळिलें
कीं तुला तिचा स्पर्श करूं दिल्हा नाहीं. ७ तर
आतां त्या माणसाची बायको परत दे, कां कीं तो
भविष्यवादी आहे, आणि तो तुजकरितां प्रार्थना
करील, मग तूं वांचसील; परंतु जर परत देणार
नाहींस, तर जाण कीं तूं मरसीलच मरसील;
आणि तुझें जें अवघें तेंहि. ८ मग **अबीमेले-
खानें** मोठ्या सकाळीं उठून आपल्या सर्व चाक-
रांस बोलाविलें, आणि त्यांच्या कानीं या सर्व
गोष्टी सांगितल्या; तेव्हां तीं माणसें फार भ्यालीं.
९ नंतर **अबीमेलेखानें** **आब्राहामा**ला बोलावून
त्याला ह्मटलें, त्वां आह्माजवळ काय केलें आहे?
आणि म्यां तुजसीं काय पाप केलें कीं त्वां मजवर
आणि माझ्या राज्यावर मोठें पाप आणिलें? जीं
कामें न करावीं असीं त्वां मजसीं केलीं आहेत.
१० आणि **अबीमेलेख** **आब्राहामा**ला बोलला,
त्वां ही गोष्ट करावी ह्मणून काय पाहिलें? ११
तेव्हां **आब्राहाम** बोलला, यासाठीं केली कीं म्यां

ह्मटलें, या ठिकाणीं निश्चयें **देवाचें** भय नाहीं,
आणि माझ्या बायकोमुळें ते मला जिवें मारितील.
१२ **अणखी** ती तर माझी बहीण खरी, माझ्या
बापाची कन्या परंतु माझ्या आईची कन्या नव्हे,
आणि ती माझी बायको झाली. १३ **आणि**
जेव्हां **देवानें** मला आपल्या बापाच्या घरापासून
फिरतें केलें, तेव्हां असें झालें कीं मी तिला बो-
ललों, ज्या सर्व जाग्यांत आपण जाऊं तेथें मजवि-
षयीं तूं बोल कीं, हा माझा भाऊ आहे, ही कृपा
तूं मजवर कर. १४ **तेव्हां अबीमेलेखानें** शे-
रडें, व गुरें, व दास, व दासी, घेऊन **आब्राहामाला**
दिल्हा, आणि त्याची बायको **सारा** ही त्याला प-
रत दिल्ही. १५ **आणि अबीमेलेख** बोलला, पाहा
माझा देश तुझ्यासमोर आहे, तुला बरें दिसेल तेथें
राहा. १६ **आणि सारेला** तो बोलला, पाहा
म्या तुझ्या भावाला हजार मुद्रा इतकें रुपें दिल्हें
आहे; पाहा, जे अवघे तुझ्यासंगतीं त्यांविषयीं
अणखी सर्वांविषयीं ते तुला डोळ्यांच्या पडद्या-
साठीं असोत; असा तिचा निषेध झाला. १७
**नंतर आब्राहामानें देवाची** प्रार्थना केली, मग
**देवाने** अबीमेलेखाला व त्याच्या बायकोला व
त्याच्या दासी यांस बरें केलें, नंतर त्या प्रसवल्या.
१८ **कां कीं परमेश्वरानें आब्राहामाची** बायको
**सारा** इजमुळें अबीमेलेखाच्या घरचीं अवघीं
गर्भस्थानें आकळून बंद केलीं होतीं.

## अध्याय २१.

**आ**णि **परमेश्वराने** जसें सांगितलें होतें, तसें
**सारेची** भेट घेतली, आणि **परमेश्वराने**
जें वचन दिल्हें होतें त्याप्रमाणें **सारेसाठीं** केलें
२ **कां कीं सारा** गरोदर होऊन जो काळ देवाने
**आब्राहामाला** सांगितला होता, त्यांत त्याच्या
ह्मातारपणीं पुत्र प्रसवली. ३ **तेव्हां आब्राहामानें**
आपला पुत्र जो झाला, ज्याला आपल्यापासून
**सारा** प्रसवली, त्याचें नांव **इझाक** ठेविलें. ४
**आणि आब्राहामाचा** पुत्र **इझाक** आठ दिवसांचा
झाल्यावर त्याने त्याची सुंता जसी **देवाने** त्याला
आज्ञा दिल्ही होती तसी केली. ५ **आणि आब्रा-
हाम**, जेव्हां त्याचा पुत्र **इझाक** झाला, तेव्हां
शंभर वर्षांचा होता. ६ **आणि सारा** बोलली,
**देवानें** मला हांसविलें, जो कोणी ऐकेल तो
माझ्यासहित हांसेल. ७ **आणि** ती **बोलली**,
**सारा** पुत्रांस स्तन पाजील, असें **आब्राहामाला**
कोण बोलला असता? कां कीं त्याच्या ह्मातार-
पणांत मी पुत्र प्रसवलें आहें. ८ **मग** त्या बाळ-
कानें वाढून थान सोडिलें, आणि **इझाकानें** थान
सोडिलें त्या दिवशीं **आब्राहामानें** मोठें भोजन
केलें. ९ **तेव्हां मिसरकरीण** जी **हागार** ती जो
पुत्र **आब्राहामापासून** प्रसवली, तो हास्य करीत
असतां **सारेनें** पाहिला. १० **मग** ती **आब्राहामा-
ला** बोलली, या चाकरणीला आणि इच्या पुत्राला
घालीव; कां कीं या चाकरणीचा पुत्र माझा पुत्र
**इझाक** याच्यासंगतीं वतन पावणार नाहीं. ११ प-
रंतु ही गोष्ट **आब्राहामाच्या** दृष्टीस आपल्या पु-
त्राच्या कारणास्तव फार वाईट होती. १२ **तेव्हां**
**देव आब्राहामाला** बोलला, तो मुलगा व तुझी
चाकरीण यांकरितां हें तुझ्या दृष्टींत वाईट नसो;
अवघें जें **सारा** तुला सांगेल त्यांत तूं तिचें ह्मणणें
ऐक, कां कीं **इझाकावरून** तुझें संतान ह्मटलें जा-
ईल. १३ **अणखी** चाकरणीच्या पुत्रापासून राष्ट्र
उत्पन्न होईल असें मी करीन, कां तर तो तुझें सं-
तान आहे. १४ **नंतर आब्राहामानें** सकाळीं उ-
ठून भाकरी व पाण्याचें भांडें घेतलें, आणि **हागा-
रीला** देऊन तिच्या खांद्यावर ठेविलें, आणि लेंकरूं
देऊन तिला रवाना केलें; तेव्हां ती निघाली, आणि
बेरशेबा रानामध्यें फिरत गेली. १५ **मग** भांड्यां-
तील पाणी सरलें, तेव्हां तिनें लेंकरूं एका झुडपा-
खालीं ठेविलें. १६ **आणि** आपण बाणाच्या टप्याइ-
तकी दूर जाऊन समोर बसली, कां तर तिनें ह्मटलें,
मी लेंकराचें मरण न पाहीन; तसी ती पुढें बसून हाक
फोडून रडली. १७ **परंतु देवानें** मुलग्याचा शब्द
ऐकिला; तेव्हां **देवाच्या** दूतानें आकाशांतून **हा-
गारीला** हाक मारिली, आणि तिला ह्मटलें, अगे
**हागार**, तुला काय झालें? तूं भिऊं नको, कां तर
जेथें मुलगा आहे तेथून **देवानें** त्याचा शब्द ऐ-
किला आहे. १८ **तूं** ऊठ, मुलग्याला उचल, आ-
णि त्याला आपल्या हातीं धर, कां तर त्यापासून
मोठें राष्ट्र उत्पन्न होईल, असें मी करीन. १९ **मग**
**देवानें** तिचे डोळे असे उघडले कीं तिनें पाण्याची
विहीर पाहिली, नंतर तिनें जाऊन भांड्यांत पाणी

भरिलें आणि मुलग्याला पाजिलें. २० तेव्हां देव
त्या मुलग्याला अनुकूळ होता, आणि तो वाढला
आणि रानांत राहून धनुष्यशूर झाला. २१ मग
तो पारानरानांत राहिला, आणि त्याच्या आईने
त्याच्यासाठीं मिसर देशाहून नवरी आणिली.
२२ आणि त्या वेळेस असें झालें कीं अबीमे-
लेख व त्याचा सेनापति फीकोल आब्राहामाला
बोलला कीं, जें अवघें तूं करितोस त्याविषयीं देव
तुला अनुकूळ आहे. २३ तर आतां एथें मजजवळ
तूं देवाची शपथ असी कर कीं मजसीं आणि मा-
झ्या लेकासीं व माझा नातु यासीं तूं लबाडी न
करितोस; असी म्या तुजवर कृपा केली आहे त्या-
प्रमाणें तूं मजवर, आणि जेथें तूं प्रवासी राहिला
आहेस या देशावर कृपा कर. २४ तेव्हां आब्राहाम
बोलला, मी शपथ करीन. २५ परंतु अबीमेले-
खाच्या चाकरानी पाण्याची विहिर हिरावली हो-
ती, या कारणावरून आब्राहामाने अबीमेलेखाला
निषेधिलें; २६ मग अबीमेलेख बोलला, हें काम
कोणी केलें हें मला कळलें नाहीं, आणि त्वांहि म-
ला सांगितलें नाहीं, अणखी म्या केवळ आजच
ऐकिलें आहे. २७ तेव्हां आब्राहामाने शेरडें व
गुरें घेऊन अबीमेलेखाला दिल्हीं, आणि त्या दो-
घानी करार केला. २८ आणि आब्राहामाने शे-
रड्यांतील सात करड्या वेगळ्या ठेविल्या. २९ ते-
व्हां अबीमेलेख आब्राहामाला बोलला, ह्या सात
करड्या ज्या त्वां वेगळ्या ठेविल्या त्या काय? ३०
मग हा असें बोलला कीं, त्वां ह्या सात करड्या
माझ्या हातून घ्याव्या, ह्मणजे माझी साक्ष व्हावी कीं
म्या ही विहिर खणिली आहे. ३१ यास्तव त्याने
त्या जाग्याचें नांव बेरशेबा ठेविलें, कां कीं तेथें त्या
दोघानी शपथ केली. ३२ तसें त्यानी बेरशेब्या-
मध्यें करार केल्यावर अबीमेलेख आणि त्याचा
सेनापति फीकोल उठला, आणि ते पलिष्ट्यांच्या
देशांत परत गेले. ३३ तेव्हां आब्राहामाने बेर-
शेब्यामध्यें वन लाविलें आणि निरंतर देव पर-
मेश्वर याचें नांव घेऊन प्रार्थना केली. ३४ मग
आब्रामाम पलिष्ट्यांच्या देशांत बहुत दिवस प्रवा-
सीं राहिला.

## अध्याय २२.

आणि या गोष्टींनंतर असें झालें कीं देवाने
आब्राहामाची परीक्षा घेतली, तेव्हां त्याला
ह्मटलें, हे आब्राहामा, मग हा बोलला, मी एथें
आहें. २ आणि तो बोलला, आतां तुझा पुत्र तुझा
एकुलता, ज्यावर तूं प्रीति करितोस ह्मणजे इझाक,
त्याला तूं घेऊन आपण मोरीया देशास जा, आणि
तेथील डोंगरांमधील एक जो मी तुला सांगेन त्या-
वर त्याला होमरूप समर्पण कर. ३ मग सकाळीं
आब्राहाम सिद्ध झाला, तेव्हां त्याने आपलें गाढव
आंवळलें, आणि आपल्या दोन पोरग्यांस, व आ-
पला पुत्र इझाक याला आपल्याबराबर घेतलें, आ-
णि होमाचीं लांकडें फोडलीं; मग तो उठून जो
जागा देवाने त्याला सांगितला होता, त्याकडे चा-
लला. ४ तेव्हां तिसऱ्या दिवसीं आब्राहामाने
आपले डोळे वर करून तो जागा दुरून पाहिला.
५ मग आब्राहाम आपल्या पोरग्यांस बोलला, तुह्मी
एथें गाढवाजवळ बसा, आणि मी व मुलगा तिकडे
जाऊं, आणि भजन करून माघारें तुह्माजवळ येऊं.
६ मग आब्राहामाने होमाचीं लांकडें घेऊन आ-
पला पुत्र इझाक यावर ठेविलीं; आणि त्याने आपल्या
हातीं विस्तव आणि सुरा घेतला; मग ते दोघे ब-
राबर गेले. ७ तेव्हां इझाकाने आपला बाप आ-
ब्राहाम याला बोलून ह्मटलें, हे माझ्या बापा; आ-
णि हा बोलला, माझ्या पुत्रा, मी एथें आहें; मग
तो बोलला, पाहा, विस्तव आणि लांकडें आहेत
परंतु होमासाठीं शेरडूं कोठें आहे? ८ तेव्हां आ-
ब्राहाम बोलला, माझ्या पुत्रा, देव आपल्यासाठीं
होमाचें शेरडूं पाहून मिळवील; तसें ते दोघे संगतीं
चालले. ९ आणि जो जागा देवाने त्याला सां-
गितला होता, तेथें ते पावले; मग आब्राहामाने तेथें
वेदी बांधिली आणि लांकडें लाविलीं, नंतर आपला
पुत्र इझाक याला बंद केलें आणि वेदीवरच्या लां-
कडांवर त्याला ठेविलें. १० मग आब्राहामाने
आपला हात लावून आपला पुत्र वधायासाठीं सुरा
घेतला. ११ तेव्हां परमेश्वराचा दूत आकाशां-
तून त्याला हाक मारून बोलला, हे आब्राहामा,
आब्राहामा; मग हा बोलला, मी एथें आहें. १२
मग तो बोलला, तूं आपला हात मुलग्यावर टाकूं

नको, आणि त्याला कांहींच करूं नको, कां तर
आतां मी जाणतों कीं तूं देवाला भितोस, कारण
कीं त्वां आपला एकुलता याला मजपासून राखिलें
नाहीं. १३ तेव्हां **आब्राहामाने** आपले डोळे वर
करून पाहिलें, आणि पाहा, मागें मेंढा झुडपामध्यें
आपल्या शिंगानीं गुंतलेला होता, मग **आब्राहामाने**
जाऊन तो मेंढा घेतला, आणि आपल्या पुत्राच्या
ठिकाणीं त्याला होमरूप समर्पिलें. १४ नंतर
**आब्राहामाने** त्या जाग्याचें नांव यहोवायिरए
असें ठेविलें; यास्तव आजपर्यंत असें ह्मटलें
जातें कीं **परमेश्वराच्या** डोंगरावर पाहिलें जा-
ईल. १५ मग **परमेश्वराच्या** दूताने आ-
काशांतून **आब्राहामाला** दुसऱ्याने हाक मारिली;
१६ आणि ह्मटलें कीं, **परमेश्वर** असें बोलतो,
म्यां आपलीच शपथ केली आहे कीं, त्वां ही गोष्ट
केली, ह्मणजे तुझा एकुलता याला राखिलें नाहीं;
१७ यास्तव मी तुला आशीर्वाद देईनच देईन,
आणि तुझें संतान आकाशांतील ताऱ्यांसारिखें व
समुद्राच्या कांठावरील रेतीसारिखें वाढवीनच वा-
ढवीन; १८ आणि तुझें संतान आपल्या वैऱ्यांचा
दरवाजा असें वतन पावेल, अणखी तुझ्या संताना-
कडून पृथ्वींतील सर्व राष्ट्रें आशीर्वाद पावतील,
कारण कीं त्वां माझी गोष्ट ऐकिली आहे. १९
मग **आब्राहाम** आपल्या पोरग्यांजवळ माघारें
आला, आणि ते उठून **बेरशेब्यास** संगतीं गेले,
कां कीं **आब्राहाम** **बेरशेब्यांत** राहत होता.

२० आणि या गोष्टीनंतर असें झालें कीं **आ-
ब्राहामाला** असें वर्त्तमान सांगितलें गेलें कीं, पाहा
तुझा भाऊ **नाहोर** यापासून **मिल्काहि** पुत्रांस
प्रसवली आहे. २१ त्याचा वडील पुत्र ऊज व
याचा भाऊ बुज, व **काबुयलहि** हा **आरामाचा**
बाप. २२ आणि केसेद, व हजो, व पिल्दाश,
व इदलाफ, व बथुवेल. २३ मग बथुवेलाने रि-
ब्केला जन्मविलें; **नाहोर** **आब्राहामाचा** भाऊ या-
पासून **मिल्का** या आठांस प्रसवली. २४ आणि
त्याची उपपत्नी जिचें नांव रऊमा तीहि टेबाह, व
गाहाम, व ताहाश, व माखा, यांस प्रसवली.

## अध्याय २३.

तर **सारेच्या** वयांत एकशें सत्तावीस वर्षें, इतकीं
वर्षें **सारेच्या** वयास झालीं. २ मग किर्यार्थ
आर्बा ह्मणजे हेब्रोन तेथें कनान देशांत **सारा** मेली;
आणि **आब्राहाम** **सारेसाठीं** शोक करायास आणि
तिच्यासाठीं रडायास आला. ३ तेव्हां **आब्राहाम**
आपल्या मेलेलीच्या पुढून उठला, आणि हेथाच्या
पुत्रांस असें बोलला कीं, मीं प्रवासी व तुह्मामध्यें
राहणारा आहें; ४ तुह्मी आपल्याजवळ मसण-
वटीचें वतन मला द्या, मग मी आपल्यासमोरून
आपल्या मेलेलीला पुरीन. ५ तेव्हां हेथाचे पुत्र
**आब्राहामाला** उत्तर देतां त्याला असें बोलले, ६
हे महाराज, आमचें ऐक, आह्मामध्यें तूं थोर सर-
दार आहेस, आमच्या मसणवटयांतील जी आव-
डती तींत तूं आपल्या मेलेलीला पूर; त्वां आपली
मेलेली न पुरावी असें आह्मामधील एकहि आप-
ली मसणवटी तुजपासून राखणार नाहीं. ७ मग
**आब्राहामाने** उठून त्या देशांतील लोकांस ह्मणजे
हेथाच्या पुत्रांस नमस्कार घातला. ८ आणि त्यांस
असें ह्मटलें की, म्या आपल्यासमोरून आपल्या
मेलेलीला पुरावें, असें जर तुमच्या मनांत आहे
तर तुह्मी माझें असें ऐका कीं, एफ्रोन जो जोह-
राचा पुत्र त्याजवळ मजसाठीं विनंती असी करा,
९ कीं त्याची जी माखपेला गुहा त्याच्या भूमी-
च्या सीमेंत ती पूर्ण किमतीने मला द्यावी. १०
तेव्हां एफ्रोन हेथाच्या पुत्रांमध्यें राहत होता, आ-
णि त्याच्या नगराच्या वेसींतून जाणारीं, जें सर्व हे-
थाचें संतान, तीं ऐकत असतां एफ्रोन जो हित्ती
त्याने **आब्राहामाला** असें उत्तर दिल्हें कीं, ११
हे महाराज, असें नव्हे, माझें ऐक, मी ती भूमि
तुला देतों आणि तींत जी गुहा आहे तीहि तुला
देतों, माझ्या लोकांच्या पुत्रांच्या देखत मी ती तुला
देतों, तुझ्या मेलेलीला पूर. १२ तेव्हां **आब्राहा-
माने** त्या देशांतील लोकांपुढें नमस्कार घातला.
१३ आणि त्या देशांतील लोक ऐकत असतां तो
एफ्रोनाला बोलला कीं, तरीं तूं अवश्य माझें ऐक,
त्या शेतासाठीं मी तुला पैका देईन, मजपासून घे,
मग मी आपल्या मेलेलीला तेथें पुरीन. १४ तेव्हां
एफ्रोन **आब्राहामास** उत्तर देतां त्याला बोलला.
१५ हे महाराज, माझें ऐक, ती भूमि चारशें शे-
केल रुपें आहे, मजमध्यें व तुजमध्यें तें काय? तर
तुझ्या मेलेलीला पूर. १६ तेव्हां **आब्राहामाने**
एफ्रोनाचें ऐकिलें, आणि **आब्राहामाने** एफ्रोनाला

हेथाचे पुत्र ऐकत असतां जितके त्याने सांगितलें
होतें, ह्मणजे व्यापार चलनी चारशें शेकेल रुपें
तितका पैका तोलून दिल्हा· १७ आणि एफ्रोनाने
ही भूमि माम्रीसमोर माख्पेलांत होती, ती भूमि
व तिजमध्यें जी गुहा आणि त्या भूमीवरच्या च-
हुंकडील सीमेंत जीं सर्व झाडें, १८ हीं आपल्या
नगराच्या वेसींतून जे सर्व जाणारे यांसहित हेथा-
च्या पुत्रांदेखत आब्राहामाला वतनासाठीं विकत
दिल्हीं· १९ आणि त्यानंतर खनानदेशांत मामे
ह्मणजे हेब्रोन त्यासमोर माख्पेल्यांतील भूमींतल्या
गुहेंत आब्राहामानें आपली बायको सारा इला
पुरिलें· २० असें ती भूमि आणि तींत जी गुहा
हीं मसणवटीचें वतन होण्यासाठीं हेथाच्या पुत्रां-
कडून आब्राहामाचीं असीं स्थापित झालीं·

## अध्याय २४.

तेव्हां आब्राहाम दिवसांच्या गतीने वडील झाला,
आणि अवघ्यांविषयीं परमेश्वराने आब्राहा-
माला आशीर्वाद दिल्हा होता· २ तेव्हां आब्रा-
हामाने आपल्या घरचा आपला वडील चाकर आ-
पल्या अवघ्यांचा अधिकारी जो होता त्याला सां-
गितलें कीं, आतां तुझा हात माझ्या मांडीखालीं
ठेव· ३ मग परमेश्वर जो आकाशाचा देव
व पृथ्वीचा देव त्याची शपथ मी तुला असी घा-
लितों कीं, खनानी ज्यांमध्यें मी प्रवासी राहतों त्यां-
च्या कन्यांतून त्वां माझ्या पुत्रासाठीं नवरी घेऊं
नको· ४ परंतु माझ्या देशास व माझ्या गोत्र-
बांपासीं तूं जाऊन माझा पुत्र इझाक यासाठीं नव-
री करून घे· ५ मग चाकर त्याला बोलला, क-
दाचित् असी स्त्री माझ्यामागें या देशास याव-
यास मान्य होणार नाहीं, तर जेथून तूं आलास
त्या देशास म्या तुझ्या पुत्राला परत न्यावें कीं काय?
६ तेव्हां आब्राहाम त्याला बोलला, त्वां माझ्या
पुत्राला तिकडे परत न न्यावें ह्मणून तूं आपणाला
संभाळ· ७ आकाशाचा देव परमेश्वर, ज्याने मा-
झ्या बापाच्या घराहून व माझ्या जन्माच्या देशाहून
मला आणिलें, आणि मला सांगितलें व मजपासीं अ-
सी शपथ केली कीं, मी हा देश तुझ्या संतानाला
देईन, तो आपल्या दूताला तुझ्यापुढें पाठवील आणि
तूं तेथून माझ्या पुत्रासाठीं नवरी आणसील· ८ आ-
णि जर असी स्त्री तुझ्यामागें येण्यास मान्य होत
नाहीं तर या माझ्या शपथापासून तूं सुटा होसील;
केवळ माझ्या पुत्राला तिकडे परत नेऊं नको· ९
तेव्हां त्या चाकराने आपला धनी आब्राहाम या-
च्या मांडीखालीं आपला हात ठेविला, आणि त्या
गोष्टीविषयीं त्याजवळ शपथ केली· १० मग त्या
चाकरानें जायास आपल्या धन्याच्या उंटांमधून दाहा
उंट घेतले, कां कीं त्याच्या धन्याचा अवघा माल
त्याच्या हातीं होता; तेव्हां तो उठून नाहराइमांतील
अराम तेथें नाहोराच्या नगरास गेला· ११ आणि
संध्याकाळीं ज्या वेळेस पाणी काढणाऱ्या निघतात,
तेव्हां त्याने नगरांच्या बाहेर पाण्याच्या विहिरीज-
वळ आपल्या उंटाचे गुडघे टेंकविले· १२ नंतर तो
बोलला, हे परमेश्वर माझा धनी आब्राहाम या-
च्या देवा, मी विनंती करितों कीं तूं आज सौभाग्य
मला होऊं दे, आणि माझा धनी आब्राहाम या-
जवर कृपा कर· १३ पाहा मी पाण्याच्या विहि-
रीजवळ उभा राहतों, आणि नगरांतील माणसां-
च्या कन्या पाणी काढायासाठीं बाहेर येतात· १४
आतां ज्या मुलीला मी ह्मणेन कीं, म्या प्यावें ह्म-
णून कृपेकरून तुझी घागर उतर; आणि ती ह्मणेल,
पी, आणि तुझ्या उंटांसाहि मी पाजीन, तीच जी
त्वां आपला चाकर इझाक यासाठीं नेमिली आहे
ती होवो; आणि तेणेंकडून मी जाणेन कीं त्वां मा-
झ्या धन्यावर कृपा केली आहे· १५ आणि त्याने
बोलणें संपविल्यापूर्वी असें झालें कीं पाहा, आब्रा-
हामाचा भाऊ नाहोर याची बायको मिल्का इ-
चा पुत्र बथुवेल यापासून जन्मलेली जी रिबका
ती निघाली, आणि तिच्या खांद्यावर तिची घागर
होती· १६ तेव्हां ती मुलगी दिसण्यांत फार
चांगली कुमारी होती; आणि तिला पुरुषाने अनु-
भविलें नव्हतें; मग ती विहिरीस उतरली आ-
णि आपली घागर भरून चढली· १७ तेव्हां
तो चाकर तिला भेटायास धांवून बोलला, कृ-
पेने तुझ्या घागरींतून थोडें पाणी मला पिऊं दे·
१८ मग ती बोलली, हे माझ्या धनी पी; आणि
तिने उतावळी करून आपली घागर आपल्या हा-
तावर उतरली आणि त्याला पिऊं दिल्हें· १९
आणि त्याला पुरें पिऊं दिल्यावर तिनें ह्मटलें, तु-
झ्या उंटांसाठींहि ते पुरें पितील तोंपर्यंत मी पाणी

काढीन. २० **मग** तिने उतावळी करून आपली
घागर कुंडींत रिचविली आणि फिरून काढायास
विहिरीकडे धांवली; तसें तिने त्याच्या सगळ्या
उंटांसाठीं काढिलें. २१ तेव्हां तो माणूस तिज-
विषयीं दंग झाला; परंतु **परमेश्वराने** त्याचा मार्ग
सफळ केला होता किंवा नाहीं, हें जाणायास तो
उगाच राहिला. २२ **आणि** असें झालें कीं उंटांनी
पिणें संपविलें, तेव्हां त्या माणसाने अर्ध शेकेल सो-
न्याची नथ, आणि तिच्या हातांसाठीं दाहा शेकेल
सोन्याच्या दोन बांगड्या काढिल्या. २३ **मग** त्या-
ने ह्मटलें, तूं कोणाची कन्या? हें कृपेने मला सांग;
तुझ्या बापाच्या घरीं आह्मासाठीं उतरायाचा जा-
गा आहे कीं काय? २४ तेव्हां ती त्याला बोलली,
मी बथुवेलाची कन्या, **मिल्केच्या** ज्या पुत्राला ती
नाहोरापासून प्रसवली, तोच तो. २५ अणखी
ती त्याला बोलली, आह्मापासीं पेंढा व वैरणहि
फार, आणि उतरायास जागा आहे. २६ तेव्हां
त्या माणसाने लवून **परमेश्वराचें** भजन केलें. २७
**आणि** त्याने ह्मटलें, माझा धनी **आब्राहाम** याचा
**देव परमेश्वर** याची स्तुति असो; त्याने आपली
दया व आपली सत्यता माझ्या धन्यावरून सोडि-
ली नाहीं; मी वाटेंत असतां **परमेश्वराने** माझ्या
धन्याच्या भावाच्या घरीं मला आणिलें. २८ तेव्हां
त्या मुलगीने धांवून आपल्या आईच्या घरीं या गो-
ष्टीप्रमाणें सांगितलें. २९ **तर** रिब्केला एक भाऊ
होता आणि त्याचें नांव **लाबान**; तेव्हां **लाबान** बाहेर
विहिरीजवळ त्या माणसाकडे धांवला; ३० **कां** तर
त्याने ती नथ आणि आपल्या बहिणीच्या हातांत त्या
बांगड्या पाहिल्या, आणि आपली बहीण रिब्का
इच्या गोष्टी ऐकिल्या कीं, तो माणूस याप्रमाणें मला
बोलला; तेव्हां असें झालें कीं तो त्या माणसाज-
वळ गेला, आणि पाहा तो उंटांसीं विहिरीजवळ
उभा राहिलेला होता. ३१ **आणि** तो बोलला,
**परमेश्वराचा** आशीर्वादित आंत ये, बाहेर
कशाला उभा राहतोस? कां कीं म्या घर व
उंटासाठीं जागा पाहून ठेविला आहे.

३२ **मग** तो माणूस घरास आला आणि त्या-
ने उंटांस सोडिलें, नंतर उंटांसाठीं पेंढा व वैरण
त्याने दिल्ही, आणि त्याचे पाय आणि त्याच्याब-
राबर जीं माणसें त्यांचे पाय धुवायासाठीं पाणी
दिल्हें. ३३ **मग** त्याच्यापुढें खायास वाढिलें;
परंतु तो बोलला, मी आपली गोष्ट सांगेन तोंपर्यंत
जेवणार नाहीं. ३४ **मग** हा बोलला, **सांग**.
३५ तेव्हां तो बोलला, मी **आब्राहामाचा चाकर**;
आणि **परमेश्वराने** माझ्या धन्याचें फार कल्याण
केलें आहे; तसें तो वाढला आहे, आणि त्याला
शेरडें व गुरें, आणि रुपें व सोनें, आणि दास व
दासी आणि उंट व गाढवें त्याने दिल्हीं आहेत.
३६ **आणि** माझ्या धन्याची स्त्री **सारा** ती ह्मा-
तारी झाल्यावर माझ्या धन्यापासून पुत्राला प्रसव-
ली, आणि त्याला त्याने आपलें जें अवघें तें दिल्हें
आहे. ३७ **आणि** माझ्या धन्याने मजकडून असी
शपथ वाहविली कीं, **खनानी** लोक, ज्यांच्या दे-
शांत मी राहत आहें, त्यांच्या कन्यांतून माझ्या पु-
त्रासाठीं नवरी घेऊं नको. ३८ **परंतु** निश्चयें मा-
झ्या बापाच्या घरास आणि माझ्या नात्यांत जाऊन
माझ्या पुत्रासाठीं नवरी आण. ३९ **तेव्हां** मी
आपल्या धन्याला बोललों, कदाचित् कोणी स्त्री
माझ्यामागें न येईल. ४० **मग** तो मला बोलला,
**परमेश्वर** ज्यासमोर मी चाललों आहें, तो आ-
पल्या दूताला तुझ्यासंगतीं पाठवील, आणि तुझा
मार्ग असा सफळ करील कीं तूं माझ्या नात्यां-
तून आणि माझ्या बापाच्या घराण्यांतून माझ्या
पुत्रासाठीं नवरी आणसील. ४१ तूं माझ्या श-
पथापासून असा मोकळा होसील, जेव्हां मा-
झ्या नात्यापासीं येसील तेव्हां जर ते तुला न-
देतील, तर तूं माझ्या शपथापासून मोकळा हो-
सील. ४२ **तर** मी आज विहिरीजवळ पाव-
लों आणि बोललों, हे **परमेश्वरा**, माझा धनी
**आब्राहाम** याच्या **देवा**, जर तूं कृपेने माझ्या
ज्या मार्गांत मी चाललों तो सफळ करीत आ-
हेस; ४३ तर पाहा, मी पाण्याच्या विहिरी-
जवळ उभा राहतों, आणि जी मुलगी पाणी काढा-
यास बाहेर येईल आणि जिला मी सांगेन, तूं
कृपेने तुझ्या घागरींतून थोडें पाणी मला पाज;
४४ **आणि** जी मला ह्मणेल, तूं पी, आणि तुझ्या
उंटांसाठींहि मी काढीन, ती, जी स्त्री माझ्या
धन्याच्या पुत्रासाठीं **परमेश्वराने** नेमिली आहे,
तीच होवो. ४५ **तेव्हां** म्या आपल्या मनांत
बोलणें संपविल्यापूर्वीं पाहा, रिब्का निघाली,

आणि तिची घागर तिच्या खांद्यावर असतां तिने
विहिरीस उतरून पाणी काढिलें; मग मी तिला
बोललों, तूं कृपेने मला पाज. ४६ तेव्हां तिने
उतावळी करून आपली घागर आपणावरून उत-
रली आणि ह्मटलें, तूं पी, आणि तुझ्या उंटांसहि
मी पाजीन; तेव्हां मी प्यालों आणि तिने उंटांसहि
पाजिलें. ४७ मग म्या तिला विचारून ह्मटलें,
तूं कोणाची कन्या? आणि ती बोलली, नाहोरा-
पासून ज्या पुत्राला मिल्का प्रसवली असा जो
बथुवेल त्याची; तेव्हां म्या तिच्या नाकांत नथ,
आणि तिच्या हातांत बांगड्या घातल्या. ४८
मग म्या लवून परमेश्वराचें भजन केलें, आणि
माझा धनी आब्राहाम याचा देव परमेश्वर
याची स्तुति केली, कारण कीं त्याने माझ्या ध-
न्याच्या भावाची कन्या त्याच्या पुत्रासाठीं घेण्या-
करितां अशा नीट मार्गाने मला आणिलें. ४९
आणि आतां जर तुह्मी माझ्या धन्यावर दया व
सत्यता करणारे आहां, तर मला सांगा; आणि
जर नाहीं, तर मला सांगा, ह्मणजे मी उजव्याकडे
अथवा डाव्याकडे फिरेन. ५० तेव्हां लाबान
व बथुवेल उत्तर करीत बोलले, ही गोष्ट पर-
मेश्वरापासून निघाली आहे, आमच्याने तुला
वाईट अथवा बरें सांगवत नाहीं. ५१ पाहा,
रिब्का, तुझ्यापुढें आहे, तिला घेऊन जा, आणि
परमेश्वराने सांगितल्याप्रमाणें ती तुझ्या धन्या-
च्या पुत्राची बायको होवो. ५२ तेव्हां आब्रा-
हामाच्या चाकराने त्याच्या गोष्टी ऐकिल्यावर असें
झालें कीं त्याने भूमीकडे लवून परमेश्वराचें
भजन केलें. ५३ मग त्या चाकराने रुप्याचे
डागिने, व सोन्याचे डागिणे, व वस्त्रें काढून रिब्-
केला दिल्हीं, आणि तिचा भाऊ व तिची आई
यांस उंच वस्तू दिल्या. ५४ तेव्हां त्याने आणि
त्याच्या संगतीच्या माणसानी खाणें पिणें घेतलें,
आणि ते रात्रीं राहून सकाळीं उठले, मग तो
बोलला, माझ्या धन्याजवळ मला पाठीव. ५५
तेव्हां तिचा भाऊ व तिची आई बोलली, मुलगी
आमच्याजवळ दाहा दिवस अवश्य राहावी, नंतर
ती जाईल. ५६ परंतु तो त्यांस बोलला, मला
उशीर करूं नका, कां कीं परमेश्वराने माझी
वाट सफळ केली आहे; तर तुह्मी मला रवाना
करा, ह्मणजे मी आपल्या धन्याजवळ जाईन. ५७
मग ते बोलले, आह्मी मुलगीला बोलावूं आणि
तिला तिच्या तोंडीं विचारूं. ५८ नंतर त्यानी
रिब्केला बोलाविलें आणि तिला ह्मटलें, तूं या
माणसासंगतीं जासील कीं काय? तेव्हां ती बोलली,
मी जाईन. ५९ मग त्यानी आपली बहीण
रिब्का व तिची दाई, आणि आब्राहामाचा चा-
कर व त्याचीं माणसें, यांस रवाना केलें. ६०
आणि त्यानी रिब्केला आशीर्वाद देऊन तिला
ह्मटलें, तूं आमची बहीण बहुत हजार असी हो,
आणि तुझें संतान आपल्या वैऱ्यांच्या दरवाज्यांचें
वतन पावो. ६१ तेव्हां रिब्का व तिच्या तरण्या
उठल्या, आणि उंटांवर बसून त्या माणसाच्या
पाठीमागें चालल्या; तसें तो चाकर रिब्केला घे-
ऊन गेला. ६२ तेव्हां इझाक लाहायरोई विहि-
राच्या वाटेवरून आला, कां कीं तो दक्षिणदेशांत
राहत होता. ६३ तर इझाक संध्याकाळच्या
वेळेस ध्यान करायासाठीं शेतमळ्यांत गेला; तेव्हां
त्याने आपले डोळे वर केले, आणि पाहा, उंटांस
येतां पाहिलें. ६४ रिब्केनेहि आपले डोळे वर
केले, आणि ती इझाकाला पाहून उंटावरून उत-
रली. ६५ तेव्हां ती त्या चाकराला बोलली,
जो आह्मास भेटायास शेतमळ्यांत चालतो, तो
माणूस कोण? मग चाकर बोलला, तो माझा धनी
आहे, नंतर तिने पडदा घेऊन आपल्याला झांकिलें.
६६ तेव्हां त्या चाकराने आपण जें केलें होतें, तें
सर्व इझाकाला निवेदन केलें. ६७ मग इझा-
काने तिला आपली आई सारा इच्या राहोटींत
आणिलें; तेव्हां त्याने रिब्केला घेतलें आणि ती
त्याची बायको असें झाली, आणि त्याने तिजवर
प्रीति केली; तसा इझाक आपली आई मेल्या-
नंतर शांतवन पावला.

## अध्याय २५.

तेव्हां आब्राहामाने दुसरी बायको करून घेतली,
आणि तिचें नांव कठूरा. २ मग ती त्याපा-
सून जिम्रान, व यक्षान, व मदान, व मिद्यान, व
इश्बाक, व शूहा, यांस प्रसवली. ३ आणि
यक्षानाने शबा व ददान, यांस जन्मविलें, मग
ददानाचें संतान, आश्शूरी, व लटूशी, व लउम्मी

होते. ४ आणि मिद्यानाचे पुत्र, एफा, व एफेर,
व हनोख, व अबीदा, व एल्दा, हे होते, हे सर्व
कटूरेचीं संतानें. ५ तेव्हां आब्राहामानें आपलें
जें अवघें तें इझाकाला दिल्हें. ६ परंतु आब्रा-
हामाच्या ज्या उपपत्नी त्यांच्या पुत्रांस आब्राहा-
माने दानें दिल्हीं, आणि आपण जिवंत असतां
त्यांस आपला पुत्र इझाक यापासून पूर्वेकडे पूर्व-
देशास पाठविलें. ७ तर आब्राहाम ज्या आयु-
ष्यांत तो जगला त्या वर्षांतील दिवस पावणे
दोनशें वर्षे. ८ तेव्हां आब्राहाम वडील व
पुरा होऊन चांगल्या म्हातारपणीं प्राण सोडून
मेला, आणि आपल्या लोकांसीं मिळाला. ९ नं-
तर त्याचे पुत्र इझाक व इश्माएल यानी त्याला
पुरिलें; जोहार जो हित्ती त्याचा पुत्र एफ्रोन या-
च्या भूमींत माम्रे पुढील जी माखपेला गुहा तींत
पुरिलें. १० जी भूमि आब्राहामानें हेथाच्या
संतानापासून विकत घेतली तीच ती; तेथें आब्रा-
हाम व त्याची स्त्री सारा पुरली गेली. ११
आणि आब्राहामाच्या मरणानंतर असें झालें कीं
देवाने त्याचा पुत्र इझाक याला आशीर्वाद दि-
ल्हा; तेव्हां इझाक लाहायरोई विहिराजवळ
राहिला.

१२ तर आब्राहामाच्या ज्या पुत्राला मिसर-
करीण हागार सारेची दासी ती आब्राहामापासून
प्रसवली, म्हणजे इश्माएल याची ही वंशावळी.
१३ तसें इश्माएलाच्या संतानांचीं नांवें आपा-
पल्या वंशावळींत आपापल्या नांवानी हीं; इश्मा-
एलाचा प्रथम पुत्र नबायोथ. १४ नंतर केदार
व आद्बैल व मिब्साम्या. १५ आणि मिश्मा
व दूमा व मास्सा, हदार व थेमा, यटूर, नाफी-
श व केदमा. १६ हे इश्माएलाचे पुत्र, आणि
आपापल्या गांवांमध्यें व आपापल्या गढ्यांमध्यें हीं
त्यांचीं नांवें; हे आपल्या लोकांचे बारा अधिकारी
झाले. १७ तर इश्माएलाच्या आयुष्यांचीं वर्षे
एकशें सततीस, नंतर तो प्राण सोडून मेला आणि
आपल्या लोकांसीं मिळाला. १८ आणि त्या-
च्या संतानानी हवीलापासून आश्शूरास जातांना
जें मिसरासमोर शूर तेथपर्यंत वस्ति केली; ती
वस्ति आपल्या सर्व भावांसमोर पडली.

१९ आब्राहामाचा पुत्र इझाक त्याची ही
वंशावळी; आब्राहामानें इझाकाला जन्मविलें. २०
आणि इझाकाने जेव्हां अरामी लाबान याची ब-
हीण जी पादानअरामांतील अरामी बथुवेल या-
ची कन्या रिब्का इला आपल्यासाठीं बायको क-
रून घेतलें, तेव्हां तो चाळीस वर्षांचा होता. २१
नंतर इझाकाने आपल्या स्त्रीमुळें परमेश्वरापाशीं
काकुळती केली, कां तर ती वांझ होती; तेव्हां प-
रमेश्वराने त्याची काकुळती मानिली, आणि
त्याची बायको रिब्का गरोदर झाली. २२ मग
लेंकरें तिच्यामध्यें हिसळलीं, आणि ती बोलली,
असें जर आहे तर मी असी कशाला! मंतर ती
परमेश्वराजवळ विचारायास गेली. २३ तेव्हां
परमेश्वर तिला बोलला, तुझ्या पोटांत दोन राष्ट्रें
आहेत, आणि तुझ्या उदरापासून दोन लोक वेगळे
होतील, आणि एक लोक दुसऱ्या लोकांपेक्षा समर्थ
होईल, असें कीं मोठा धाकट्याची सेवा करील.
२४ नंतर प्रसवण्यापर्यंत तिचे दिवस पूर्ण झाले,
तेव्हां पाहा, तिच्या पोटांत जावळे होते. २५
आणि पहिला संपूर्ण तांबूस केसांच्या झग्यासा-
रिखा निघाला, आणि त्यानी त्याचें नांव एसाव
ठेविलें. २६ आणि त्यानंतर त्याचा भाऊ निघा-
ला आणि त्याच्या हाताने एसावाची टांच धरिली,
यास्तव लोकानी त्याचें नांव याकोब ठेविलें; आ-
णि जेव्हां ती त्यांस प्रसवली, तेव्हां इझाक साठ
वर्षांचा होता. २७ मग तीं लेंकरें वाढिलीं, आ-
णि एसाव धूर्त्त पारधी आणि वनमनुष्य झाला,
परंतु याकोब साधारण माणूस राहोट्यांत रह-
णारा झाला. २८ तेव्हां इझाकाने एसावावर
प्रीति केली, कां तर पारध त्याच्या खाण्यास होती,
परंतु रिबेकेने याकोबावर प्रीति केली. २९ तेव्हां
याकोब पाक शिजवीत होता, आणि एसाव वनांतून
येऊन थकलेला होता. ३० आणि एसाव या-
कोबाला बोलला कीं, तूं कृपेने तें तांबडें तांबडें
यांतून मला गिळूं दे, कां कीं मी थकलेला आहें;
त्याप्रमाणें लोकानी त्याचें नांव अदोम ठेविलें.
३१ तेव्हां याकोब बोलला, आजच तूं आपलें
ज्येष्ठपण मला विकत दे. ३२ मग एसाव बो-
लला, पाहा मी मरायास टेंकलों, आणि मला
हें ज्येष्ठपण कशास्तव! ३३ तेव्हां याकोब
बोलला, तूं आजच माझ्याजवळ शपथ कर; मग

त्याने त्याजवळ शपथ करून आपलें ज्येष्ठपण
याकोबाला विकत दिल्हें. ३४ तेव्हां याकोबाने
एसावाला भाकर व काठणांचा पाक दिल्हा; आणि
तो जेवला व प्याला, मग उठून गेला; तसें एसा-
वाने आपलें ज्येष्ठपण तुच्छ केलें.

## अध्याय २६.

आणि त्या देशांत पहिला जो दुकाळ आब्रा-
हामाच्या दिवसांत झाला, त्यानंतर दुसरा
दुकाळ झाला; आणि इझाक पलिष्ट्यांचा राजा
जो अबीमेलेख त्याजवळ गराराास गेला. २
आणि परमेश्वराने त्याला दर्शन देऊन सांगि-
तलें होतें कीं, तूं मिसरदेशांत उतरूं नको, जो
देश मी तुला सांगेन त्यांत राहा. ३ या देशांत
तूं प्रवासी राहा, मग मी तुझ्यासहित होईन आणि
तुला आशीर्वाद देईन, कां कीं तुला व तुझ्या सं-
तानाला हे सर्व देश मी देईन, आणि तुझा बाप
आब्राहाम याजवळ जी शपथ म्या केली ती स्था-
पीन; ४ आणखी जसें आकाशांतील तारे तसें
मी तुझ्या संतानाला वाढवीन, आणि हे सर्व देश
तुझ्या संतानाला देईन; आणखी पृथ्वींतील सर्व
राष्ट्रें तुझ्या संतानाकडून आशीर्वाद पावतील.
५ कारण कीं आब्राहामाने माझी वाणी ऐकिली,
आणि माझी सांगणी, माझ्या आज्ञा, माझ्या नेम-
णुकी, व माझीं शास्त्रें पाळिलीं. ६ यास्तव इ-
झाक गरारामध्यें राहिला. ७ तेव्हां त्या जाग्यां-
तील माणसानी त्याच्या बायकोविषयीं त्याला वि-
चारिलें, आणि तो बोलला कीं, ती माझी बहीण,
कां तर माझी बायको ह्मणायास तो भ्याला; त्याने
ह्मटलें कीं, कदाचित या जाग्यांतील माणसें रिब्-
केसाठीं मला जिवें मारितील, कारण कीं ती सुंदर
होती. ८ तेव्हां असें झालें कीं त्याला तेथें ब-
हुत दिवस लागले, आणि पलिष्ट्यांचा राजा अ-
बीमेलेख याने खिडक्यांतून डोकावून पाहिलें कीं
पाहा, इझाक आपली बायको रिब्का इजसीं हा-
सत आहे. ९ तेव्हां अबीमेलेखाने इझाकाला
बोलाविलें आणि सांगितलें, पाहा निश्चयें ती तुझी
बायको आहे; तर ती माझी बहीण, हें तूं कसें
बोललास? मग इझाक त्याला बोलला, म्या ह्म-
टलें, कदाचित् तिजकरितां मी मरेन, यासाठीं. १०
तेव्हां अबीमेलेख बोलला, त्वां आह्मांसीं हें कां
केलें? थोडक्याने लोकांतील कोणी तुझ्या बायको-
जवळ निजला, आणि त्वां आह्मावर दोष आणिला
असता. ११ मग अबीमेलेखाने अवघ्या लोकांस
आज्ञा केली कीं, या माणसाला अथवा याच्या
बायकोला कोणी हात लावील तो मरेलच मरेल.
१२ मग इझाकाने त्या देशांत पेरिलें आणि त्या-
च वर्षी त्याला शंभरपट मिळालें; असें परमे-
श्वराने त्याला आशीर्वाद दिल्हा. १३ यास्तव
तो माणूस वाढत जातां जातां फार मोठा होई तों-
पर्यंत वाढिला. १४ आणि शेरडाचें धन, व गुरा-
चें धन, आणि अनेक चाकर त्यास होते, यास्तव
पलिष्ट्यानी त्याचा हेवा धरिला. १५ आणि
त्याचा बाप आब्राहाम याच्या दिवसांत ज्या सर्व
विहिरी त्याच्या बापाच्या चाकरानी खणिल्या हो-
त्या त्यांत पलिष्ट्यानी माती भरून बुजविल्या.
१६ आणखी अबीमेलेख इझाकाला बोलला, तूं
आह्माजवळून जा, कां तर तूं आमच्यापेक्षां फार
समर्थ आहेस. १७ मग इझाक तेथून गेला
आणि गराराच्या खिडींत उतरून तेथें राहिला.
१८ तेव्हां त्याचा बाप आब्राहाम याच्या दिव-
सांत पाण्याच्या ज्या विहिरी त्यानी खणिल्या, आ-
णि आब्राहामाच्या मरणानंतर पलिष्ट्यानी बुज-
विल्या होत्या त्या इझाकाने फिरून खणिल्या, आ-
णि त्यांचीं जीं नांवें आपल्या बापाने ठेविलीं होतीं
तींच त्यांचीं नांवें त्याने ठेविलीं. १९ तेव्हां इ-
झाकाच्या चाकरानी खिडीमध्यें खणिलें, आणि ते-
थें त्यांस जिवंत पाण्याची विहीर मिळाली. २०
नंतर गरारांतील चारणारे यानी हें पाणी आमचें,
असें बोलून इझाकाच्या चारणाऱ्यांसीं भांडण केलें;
मग त्याने त्या विहिरीचें नांव एसेक ठेविलें, कां
कीं ते त्यांसीं झगडले. २१ नंतर त्यानी दुसरी
विहीर खणिली आणि तिच्यासाठींहि त्यानी भांडण
केलें; मग त्याने तिचें नांव सिट्ना ठेविलें. २२
मग तो तेथून ढळला, आणि त्याने दुसरी विहीर
खणिली; तेव्हां तिजकरितां त्यानी भांडण केलें
नाहीं, यास्तव त्याने तिचें नांव रहोबोथ ठेविलें,
कां तर त्याने ह्मटलें कीं, आतां परमेश्वराने
आह्मास जागा दिल्हा आहे आणि आह्मी देशा-
मध्यें सफळ होऊं. २३ नंतर तो तेथून बेरशे-

बास मडला, २४ आणि त्याच रात्रीं परमेश्व-
रानें त्याला दर्शन देऊन ह्मटलें कीं, मी तुझा
बाप आब्राहाम याचा देव आहें, तूं भिऊं नको,
कां तर मी तुझ्यासहित आहें, आणि माझा चाकर
आब्राहाम यासाठीं मी तुझें कल्याण करीन; आ-
णि मी तुझें संतान वाढवीन. २५ मग त्यानें
तेथें वेदी बांधिली; आणि परमेश्वराचें नाम घे-
ऊन प्रार्थना केली; तेथेंहि त्यानें आपली राहोटी
ताणिली, आणि तेथें इझाकाच्या चाकरानीं विहीर
खणिली. २६ तेव्हां अबीमेलेख व आपल्या
मित्रांतील अहुज्जाथ व आपला सेनापति फीकोल
हे गरारापासून त्याजवळ आले. २७ मग इझा-
क त्यांस बोलला, तुह्मी माझा द्वेष करून आपल्या
पासून मला दूर केलें, तर तुह्मी मजकडे कां आ-
लां आहां? २८ तेव्हां ते बोलले, आह्मी पाहून
जाणलें कीं परमेश्वर तुझ्यासहित आहे, आणि
आह्मी ह्मटलें कीं, आतां आह्मा स्वतांमध्यें व
तुझ्यामध्यें आण असावी, ह्मणजे आह्मी तुजसीं
करार करूं कीं, २९ जसें आह्मी तुला त्रासिलें
नाहीं आणि जसें आह्मी तुजसीं केवळ बरें केलें
आणि तुला सुखरूप रवाना केलें आहे, त्याप्रमाणें
त्वां आह्मासीं वाईट न करावें; आतां परमेश्व-
राचा आशीर्वाद तुजवर आहे. ३० तेव्हां त्यानें
त्यांसाठीं जेवण केलें, आणि ते जेवले व प्याले.
३१ नंतर त्यांनी सकाळीं सिद्ध होऊन एकमेकांसीं
शपथ केली; मग इझाकानें त्यांस रवाना केलें,
आणि ते त्याजपासून सुखरूप गेले. ३२ तेव्हां
त्याच दिवसीं असें झालें कीं इझाकाच्या चाकरानीं
जी विहीर खणिली होती तिचें वर्त्तमान त्यांनी ये-
ऊन सांगितलें आणि ह्मटलें कीं, आह्मी पाणी पा-
वलों आहों. ३३ आणि त्यानें तिला शिबा ह्मटलें,
यास्तव त्या नगराचें नांव आजपर्यंत बेरशेबा आहे.
३४ तेव्हां एसाव चाळीस वर्षांचा झाल्यावर
त्यानें बेरी जो हित्ती याची कन्या यहूदीथ इला,
आणि एलोन जो हित्ती याची कन्या बाशमाथ
इला बायको करून घेतलें; ३५ आणि इझाक
व रिब्का यांस आत्म्यांतील कडूपण त्या होत्या.

## अध्याय २७.

आणि तेव्हां इझाक ह्मातारा झाला आणि त्या-
ला दिसेना असे त्याचे डोळे मंद झाले,
तेव्हां असें झालें कीं त्यानें आपला वडील पुत्र ए-
साव याला बोलाविलें आणि त्याला ह्मटलें, माझ्या
पुत्रा, मग हा त्याला बोलला, मी एथें आहें. २
तेव्हां तो बोलला, पाहा, आतां मी ह्मातारा झालों,
माझ्या मरणाचा दिवस मला कळला नाहीं. ३
यास्तव तूं आतां कृपेकरून आपलीं साहित्यें, आप-
ला भाता, आणि आपलें धनुष्य घेऊन रानांत जा,
आणि मजसाठीं पारध धर. ४ मग असें मला
आवडतें तसें रुचिकर खाणें मजसाठीं करून म-
जवळ आण; नंतर मी खाईन, ह्मणजे माझ्या म-
रणापूर्वी माझा प्राण तुला आशीर्वाद देईल. ५
तेव्हां इझाक आपला पुत्र एसाव याला बोलत
असतां रिब्कनें ऐकिलें; मग एसाव पारध धरून
आणायास रानांत गेला. ६ आणि रिब्का आ-
पला पुत्र याकोब याला बोलली कीं, पाहा तुझा
भाऊ एसाव याला तुझा बाप असें बोलतां म्या
ऐकिलें कीं, ७ तूं मजसाठीं पारध आण, आणि
माझ्यासाठीं रुचिकर खाणें कर, नंतर मी खाईन
आणि माझ्या मरणापूर्वी परमेश्वरापुढें तुला आ-
शीर्वाद देईन ८ तर आतां माझ्या पुत्रा, मी
तुला आज्ञा देतें; त्याप्रमाणें तूं माझी वाणी ऐक.
९ आतां तूं शेरडांजवळ जाऊन त्यांतील शेळ्यां-
चीं दोन चांगलीं बकरीं मजजवळ आण, मग मी
त्यांतून तुझ्या बापासाठीं रुचिकर खाणें जसें त्या-
ला आवडतें तसें करीन. १० नंतर तूं तें आ-
पल्या बापाजवळ ने, मग तो खाईल, ह्मणजे त्याच्या
मरणापूर्वी तो तुला आशीर्वाद देईल. ११ तेव्हां
याकोब आपली आई रिब्का इला बोलला, पाहा
माझा भाऊ एसाव केंसाळ माणूस, आणि मी गुर-
ळीत माणूस आहें. १२ कदाचित् माझा बाप
मला चांचपील, मग मी त्याला ठकविणारा असा
दिसेन, आणि मी आपणावर आशीर्वाद नाहीं,
परंतु शाप आणीन. १३ तेव्हां त्याची आई
त्याला बोलली, माझ्या पुत्रा, तुझा शाप मजवर
असो, केवळ माझी वाणी तूं ऐक आणि जाऊन म-
जजवळ आण. १४ मग त्यानें जाऊन घेतलें
आणि आपल्या आईजवळ आणिलें; तेव्हां त्याच्या
बापाला जसें आवडत होतें, तसें त्याच्या आईनें
रुचिकर खाणें केलें. १५ नंतर रिब्कनें आपला
वडील पुत्र एसाव याचीं निवडक वस्त्रें, जीं घरांत

घिच्याजवळ होतीं, तीं घेऊन आपला धाकटा पुत्र
याकोब याच्या आंगीं घातलीं. १६ आणि त्या-
च्या हातात व त्याच्या मानेच्या सुरळीत ठिकाणीं
तिने शेळ्यांच्या बकऱ्यांचीं कातडीं घातलीं. १७
आणि रुचिकर खाणें व भाकर जीं तिने केलीं हो-
तीं, तीं आपला पुत्र याकोब याच्या हातांत दिल्हीं.
१८ मग तो आपल्या बापाजवळ गेला आणि बो-
लला, हे माझ्या बापा, तेव्हां हा बोलला, मी एथें
आहें, माझ्या पुत्रा, तूं कोण? १९ आणि याकोब आ-
पल्या बापाला बोलला, मी एसाव तुझा प्रथम पुत्र;
असें त्वां मला सांगितलें तसें म्यां केलें आहे; कृ-
पा करून उठून बैस आणि माझी पारध खा, ह्म-
णजे तुझ्या जिवाने मला आशीर्वाद द्यावा. २०
मग इझाक आपल्या पुत्राला बोलला, माझ्या पुत्रा,
तुला इतकें लवकर मिळाली हें काय? तेव्हां हा
बोलला, यासाठीं कीं तुझा देव परमेश्वर याने
माझ्या हातीं लागूं असें केलें. २१ मग इझाक
याकोबाला बोलला, माझ्या पुत्रा, आतां जवळ ये,
तूं माझा पुत्र एसावच आहेस किंवा नाहींस हें
जाणायास ह्मणून मी तुला चांचपीन. २२ मग
याकोब आपला बाप इझाक याजवळ आला, आ-
णि याने त्याला चांचपिलें आणि ह्मटलें, स्वर,
तो याकोबाचा स्वर, परंतु हात ते एसावाचे हात
आहेत. २३ आणि त्याचे हात त्याचा भाऊ
एसाव याच्या हातासारिखे केंसाळ होते, यास्तव
त्याने त्याला ओळखिलें नाहीं आणि त्याने त्या-
ला आशीर्वाद दिल्हा. २४ तेव्हां त्याने ह्मटलें,
तूं माझा पुत्र एसावच कीं काय? तेव्हां हा बो-
लला, मी आहें. २५ आणि तो बोलला, मा-
झ्याजवळ आण आणि मी आपल्या पुत्राची पा-
रध खाईन, ह्मणजे माझा जीव तुला आशीर्वाद
देईल; तेव्हां त्याने त्याजवळ आणिली आणि
त्याने खाली, मग त्याने त्यासाठीं द्राक्षरस आणि-
ला आणि तो प्याला. २६ नंतर त्याला त्याचा
बाप इझाक बोलला, माझ्या पुत्रा, आतां जवळ ये,
आणि माझें चुंबन घे. २७ तेव्हां त्याने जवळ
येऊन त्याचें चुंबन घेतलें आणि त्याने त्याच्या
वस्त्रांचा वास घेतला, आणि त्याला आशीर्वाद
देतांना ह्मटलें, पाहा, ज्या शेताला परमेश्वराने
आशीर्वाद दिल्हा त्याच्या वासासारिखा माझ्या
पुत्राचा वास आहे. २८ तर आकाशांतील दंव
व भूमीचीं पुष्टपणें आणि पुष्कळ धान्य व द्रा-
क्षांचा नवा रस, हीं देव तुला देवो. २९ लोक
तुझी सेवा करोत आणि प्रजा तुला नमन करोत;
तूं आपल्या भावांचा स्वामी हो, आणि तुझ्या आ-
ईचीं संतानें तुला नमन करोत; तुझे शाप देणारे
प्रत्येक शापग्रस्त होवो, आणि तुझे आशीर्वाद
देणारे प्रत्येक आशीर्वादित होवो. ३० तेव्हां इझा-
काने याकोबाला आशीर्वाद देणें संपाविल्यावर आणि
याकोब आपला बाप इझाक यासमोरून केवळ
गेल्यावरच, असें झालें कीं त्याचा भाऊ एसाव
आपली पारध धरून आला. ३१ आणि त्यानेहि
रुचिकर खाणें करून आपल्या बापाजवळ आणिलें
होतें; तेव्हां त्याने आपल्या बापाला ह्मटलें, मा-
झ्या बापाने उठावें, आणि आपल्या पुत्राची पारध
खावी, ह्मणजे तुझ्या जिवाने मला आशीर्वाद द्या-
वा. ३२ मग त्याचा बाप इझाक त्याला बोल-
ला, तूं कोण? आणि हा बोलला, मी तुझा पुत्र
तुझा प्रथम पुत्र एसाव. ३३ तेव्हां इझाक फा-
रच थरथरां कांपला आणि बोलला, ज्याने पारध
धरिली आणि माझ्याजवळ आणिली, आणि त्या-
ला आशीर्वाद दिल्हा आहे, आणि तो आशी-
र्वादितच होईल, तो कोण कोठें? ३४ तेव्हां
एसाव आपल्या बापाच्या गोष्टी ऐकून मोठा आ-
णि फारच कठीण आकांत करून रडला आणि
आपल्या बापाला बोलला, हे माझ्या बापा, म-
लाहि आशीर्वाद दे. ३५ परंतु हा बोलला,
तुझा भाऊ कपटाने आला आणि त्याने तुझा आ-
शीर्वाद घेतला आहे. ३६ तेव्हां तो बोलला,
त्याचें नांव याकोब ठीक ठेविलें नाहीं कीं काय?
का तर त्याने या दोन वेळा मला फसविलें; त्याने
माझें ज्येष्टपण घेतलें, आणि आतां पाहा मजवरचा
आशीर्वाद घेतला आहे; मग तो बोलला, त्वां
मजसाठीं आशीर्वाद ठेविला नाहीं कीं काय?
३७ तेव्हां इझाक उत्तर करून एसावाला बो-
लला, पाहा, म्यां त्याला तुझा स्वामी करून ठे-
विला आहे, आणि त्याचे सर्व भाऊ त्याला चा-
करासाठीं दिल्हे आहेत, आणि धान्य व द्राक्षा-
चा नवा रस यांचा त्याला आश्रय दिल्हा आहे;
आणि माझ्या पुत्रा, मी तुजसाठीं कसें काय करूं?

३८ तेव्हां एसाव आपल्या बापाला बोलला, हे
माझ्या बापा, तुजपाशीं हा एकच आशीर्वाद कीं
काय! हे माझ्या बापा, मलाहि आशीर्वाद दे;
आणि एसाव आपला स्वर काढून रडला. ३९
मग त्याचा बाप इझाक उत्तर करून त्याला बो-
लला, पाहा, भूमीचीं पुष्टपणें आणि वरून आका-
शांतील दंव यांमध्यें तुझी वस्ति होईल. ४०
आणि तूं आपल्या तरवारीने जगसील आणि आ-
पल्या भावाची सेवा करसील; परंतु जेव्हां तूं धनी-
पण पावसील, तेव्हां असें होईल कीं आपल्या मा-
नेवरून त्याचें जूं मोडसील. ४१ तेव्हां याको-
बाला त्याच्या बापाने जो आशीर्वाद दिल्हा होता
त्या आशीर्वादामुळें एसावाने याकोबाचें वैर धरि-
लें आणि एसावाने आपल्या मनांत म्हटलें, मा-
झ्या बापाकरितां शोकाचे दिवस जवळ आहेत,
तेव्हां मी आपला भाऊ याकोब याला जिवें मा-
रीन. ४२ मग रिब्केला तिचा वडील पुत्र ए-
साव याच्या गोष्टी कळविल्या गेल्या; आणि तिने
पाठवून आपला धाकटा पुत्र याकोब याला बोला-
विलें आणि त्याला सांगितलें, पाहा तुझा भाऊ ए-
साव तुला जिवें मारण्यासाठीं तुजविषयीं शांति
पावत आहे. ४३ तर आतां माझ्या पुत्रा, माझी
वाणी ऐक, आणि उठून माझा भाऊ लाबान या
जवळ हारानास पळत जा. ४४ आणि तुझ्या
भावाचा संताप फिरेल तोंपर्यंत थोडे दिवस त्या-
जवळ राहा. ४५ तुझ्या भावाचा राग तुजवरून
फिरेल, आणि त्वां जें त्याला केलें आहे तें तो वि-
सरेल तोंपर्यंत तेथें राहा, नंतर मी पाठवून तुला
तेथून आणवीन; मी एकच दिवशीं तुम्हा दोघांस-
हि कां गमावीन? ४६ तेव्हां रिबका इझाकाला
बोलली, हेथाच्या कन्यामुळें मला वांचण्याचा कं-
टाळा आहे; जर याकोब हेथाच्या कन्यांसारिखी
या देशांतील कन्यांतून नवरी घेतो, तर जीव मला
कशास व्हावा?

## अध्याय २८.

तेव्हां इझाकाने याकोबाला बोलावून त्याला आ-
शीर्वाद दिल्हा, आणि त्याला आज्ञा देऊन सां-
गितलें, तूं खनानांतील कन्यांमधून नवरी घेऊं नको.
२ उठून पाद्दानअरामास तुझ्या आईचा बाप
बथुवेल याच्या घरास जा, आणि तेथून तुझ्या
आईचा भाऊ लाबान याच्या कन्यांतून आप-
ल्यासाठीं नवरी घे. ३ आणि सर्वसमर्थ देव
तुला आशीर्वाद देवो, आणि तुला सफळ करून
असें वाढवो कीं त्वां राष्ट्रांचा समुदाय व्हावा. ४
आणि तुला आब्राहामाचा आशीर्वाद देवो; तुला
आणि तुझ्यासुद्धां तुझ्या संतानाला असें कीं तुझा
प्रवासाचा जो देश देवाने आब्राहामाला दिल्हा
त्याचें वतन त्वां पावावें. ५ असें इझाकाने या-
कोबाला पाठविलें, आणि याकोब व एसाव यांची
आई रिब्का इचा भाऊ अरामी बथुवेलाचा पुत्र
लाबान याजवळ पाद्दानअरामास तो गेला.

६ तेव्हां एसावाने पाहिलें कीं इझाकाने या-
कोबाला आशीर्वाद दिल्हा, आणि त्याला आशी-
र्वाद देऊन पाद्दानअरामांतून नवरी करून घ्याव्या-
स तेथें पाठविलें, आणि त्याला आज्ञा केली कीं,
खनानांतल्या कन्यांतून तूं नवरी घेऊं नको. ७ आ-
णखी याकोब आपला बाप व आपली आई यांस
मानून पाद्दानअरामास गेला होता. ८ असें ए-
सावाने पाहिलें कीं आपला बाप इझाक याच्या दृ-
ष्टींत खनानांतील कन्या वाईट. ९ तेव्हां एसा-
वाने इश्माएलाजवळ जाऊन आब्राहामाचा पुत्र
इश्माएल याची कन्या माहालाथ नबायोथाची
बहीण इला आपल्या बायकांखेरीज बायको करून
घेतली.

१० याकोब तर बेरशेब्याहून हारानास जा-
यास निघाला; आणि तो एका ठिकाणीं पोहंचला.
११ तेव्हां सूर्य मावळला यास्तव तो तेथें उतरला,
आणि तो त्या जाग्यांतील धोंड्यांतून घेऊन आप-
ल्या उश्यासाठीं ठेवून त्या ठिकाणीं निजला. १२
आणि त्याला असें स्वप्न झालें कीं, पाहा, एक शि-
डी पृथ्वीवर उभी केलेली होती, आणि तिचा मस्त-
क आकाशापर्यंत पोहंचला, आणि पाहा, तिजवरून
देवाचे दूत चढत व उतरत होते. १३ आणि
पाहा, तिच्यावरतीं परमेश्वर उभा राहिला आ-
णि बोलला, मी परमेश्वर तुझा बाप आब्राहाम
याचा देव, आणि इझाकाचा देव; ज्या भूमिवर
तूं निजला आहेस ती तुला आणि तुझ्या संतानाला
मी देईन. १४ आणि पृथ्वीच्या रजा इतकें तुझें सं-
तान होईल, आणि पश्चिम व पूर्व व उत्तर व दक्षिण

माकडे तूं पसरला असील, आणि तुझकडून आणि
तुझ्या संतानाकडून पृथ्वींतील अवघीं गोत्रें आशी-
र्वाद पावतील. १५ आणि पाहा, मी तुझ्यासहित
आहें, आणि जेथें जेथें तूं जासील त्या सर्व ठिका-
णीं मी तुला राखीन, आणि मी तुला या देशांत
परत आणीन, कां तर जें म्या तुला सांगितलें आ-
हे, तें मी करीनच तोंपर्यंत तुला सोडणार नाहीं.
१६ तेव्हां याकोब आपल्या झोंपेंतून जागा झाला
आणि बोलला, निश्चयें परमेश्वर या ठिकाणीं
आहे, तथापि म्या जाणलें नाहीं. १७ आणि तो
भिऊन बोलला, ही जागा किती भयंकर; हें दे-
वाचें घरच आहे, दुसरें नव्हे, आणि हा आका-
शाचा दरवाजा आहे. १८ नंतर याकोब सकाळीं
उठला, आणि जो धोंडा त्याने आपल्या उश्या-
साठीं ठेविला होता, तो त्याने घेऊन खांब-
रूप ठेविला आणि त्याच्या मस्तकावर तेल ओ-
तिलें. १९ मग त्याने त्या जाग्याचें नांव बेथएल
ठेविलें, तथापि त्या नगराचें नांव पहिलें लूज होतें.
२० तेव्हां याकोबाने असा नवस केला कीं, जर
देव मजसीं असत जाईल आणि ज्या वाटेने मी
जातों त्यांत मला राखील, आणि मला अन्न खा-
यास व वस्त्र ल्यावयास देईल; २१ आणि मी
आपल्या बापाच्या घरीं सुखरूप परत येईन, तर
परमेश्वर माझा देव असा होईल. २२ आणि
हा धोंडा जो म्या खांबरूप ठेविला आहे तो दे-
वाचें घर होईल, आणि जें अवघें तूं मला देसील
त्यांतील दाहावा भाग मी काढून तुला देईन.

## अध्याय २९.

तेव्हां याकोब आपले पाय उचलून पूर्वेकडल्या
लोकांच्या देशास गेला. २ आणि त्याने अ-
वलोकन केलें तेव्हां पाहा शिवारांत विहीर, आणि
पाहा तेथें तिच्याजवळ शेरडांचीं तीन खिलारें
बसलेलीं, कां तर त्या विहिरींतून लोक खिलारांस
पाजीत होते; आणि विहिरीच्या तोंडावर मोठा धोंडा
होता. ३ जेव्हां अवघीं खिलारें तेथें एकवटत
होतीं, तेव्हां लोक विहिरीच्या तोंडावरून धोंडा
लोटून शेरडांस पाजीत असत; नंतर विहिरीच्या
तोंडावर धोंडा आपल्या ठिकाणीं ठेवीत असत. ४
तेव्हां याकोब त्यांस बोलला, अहो माझे भाऊ,
तुह्मी कोठले? मग ते बोलले, आह्मी हारानांतील
आहों. ५ नंतर तो त्यांस बोलला, नाहोराचा
पुत्र लाबान याला तुह्मी ओळखितां कीं काय?
आणि ते बोलले, आह्मी त्याला ओळखितों. ६
मग तो त्यांस बोलला, तो सुखरूप आहे कीं का-
य? तेव्हां ते बोलले, सुखरूप आहे, आणि पाहा,
त्याची कन्या राहेल शेरडांसुद्धां येत आहे. ७
मग तो बोलला, पाहा अद्याप दिवस पुष्कळ; आ-
णि ढोरें एकवट करण्याची वेळ नाहीं, तुह्मी शे-
रडांस पाजा, नंतर जाऊन चारा. ८ तेव्हां ते
बोलले, सर्व खिलारें एकवट होतील आणि विहि-
रीच्या तोंडावरून धोंडा लोटतील तोंपर्यंत आम-
च्याने होत नाहीं, नंतर आह्मी शेरडांस पाजितों.
९ तेव्हां तो त्यांसीं बोलत होता तितक्यांत रा-
हेल आपल्या बापाच्या शेरड्यांसुद्धां आली, कां
तर ती त्यांस चारीत होती. १० आणि याकोबाने
आपल्या आईचा भाऊ, लाबान याची कन्या रा-
हेल आणि आपल्या आईचा भाऊ लाबान याच्या
शेरडांस पाहिलें; तेव्हां असें झालें कीं याकोबाने
जवळ येऊन विहिरीच्या तोंडावरून धोंडा लोटि-
ला, आणि आपल्या आईचा भाऊ लाबान याच्या
शेरडांस पाजिलें. ११ तेव्हां याकोब राहेलीचें
चुंबन घेऊन आपला स्वर काढून रडला. १२
आणि आपण तिच्या बापाचा बंधु आणि रिबकेचा
पुत्र, असें याकोबाने राहेलीला सांगितलें; मग
तिने धांवून आपल्या बापाला सांगितलें. १३ आ-
णि जेव्हां लाबानाने आपल्या बहिणीचा पुत्र या-
कोब याचें वर्त्तमान ऐकिलें, तेव्हां असें झालें कीं
तो त्याला भेटायास धांवला: मग त्याने त्याला
आलिंगन करून त्याचें चुंबन घेतलें आणि त्याला
आपल्या घरीं आणिलें, नंतर त्याने लाबानाला या
अवघ्या गोष्टी सांगितल्या. १४ मग लाबान त्या-
ला बोलला, निश्चयें तूं माझ्या हाडाचा व मांसा-
चा आहेस; तेव्हां हा त्याजवळ एक महिना
राहिला.

१५ मग लाबान याकोबाला बोलला, तूं मा-
झा भाऊ, यासाठीं त्वां माझी चाकरी फुकट करा-
वी कीं काय? तुझें वेतन काय? हें मला सांग.
१६ तर लाबानाच्या दोन कन्या होत्या, वडिलीचें
नांव लेआ, आणि धाकटीचें नांव राहेल. १७ आ-

णि ल्येचे डोळे कोंवळे होते, परंतु राहेल सु-
रूप व सुंदर होती. १८ आणि याकोबाने राहे-
लीवर प्रीति केली; यास्तव त्याने ह्मटलें, तुझी
धाकटी कन्या राहेल इच्यासाठीं मी तुझी चाकरी
सात वर्षे करीन. १९ तेव्हा लाबान बोलला,
म्या ती दुसऱ्या माणसाला यावी त्यापेक्षा ती तुला
यावी, हें बरें आहे; तूं माझ्याजवळ राहा. २०
तसें याकोबाने राहेलीसाठीं सात वर्षे चाकरी के-
ली, आणि त्याच्या तिजवरील प्रीतीमुळें तीं त्याला
थोडक्या दिवसासारिखीं वाटलीं. २१ नंतर या-
कोब लाबानाला बोलला, माझे दिवस भरले या-
स्तव माझी नवरी दे, ह्मणजे मी तिच्याजवळ जा-
ईन. २२ मग लाबानाने त्या जाग्यातील सर्व
माणसांस मिळून जेवण केलें. २३ तेव्हा संध्या-
काळीं असें झालें कीं त्याने आपली कन्या ल्या
इला घेऊन त्याजवळ आणिलें, आणि तो तिच्या
जवळ गेला. २४ आणि लाबानाने आपली दासी
झिल्पा आपली कन्या ल्या इला इच्या दासीसाठीं
दिल्ही. २५ मग सकाळीं असें झालें कीं पाहा, ही
ल्या आहे; तेव्हा तो लाबानाला बोलला, हें त्वां म-
ला काय केलें! म्या राहेलीसाठीं तुजपासीं चाकरी
केली नाहीं कीं काय? तर त्वां मला कां फसविलें?
२६ मग लाबान बोलला, वडिलीच्यापूर्वी धाक-
टी यावी; असें आमच्या प्रांतांत करायाचें नाहीं.
२७ हिचें सप्तक पूर्ण कर, ह्मणजे अणखी दुसरीं
सात वर्षे मजपासीं जी चाकरी तूं करसील, तिज-
मुळें आह्मी हीहि तुला देऊं. २८ तेव्हा याको-
बाने तसें केलें, ह्मणजे हिचें सप्तक पूर्ण केलें; नं-
तर त्याने आपली कन्या राहेल त्याची बायको
होण्यासाठीं त्याला दिल्ही. २९ आणि लाबाना-
ने आपली दासी बिल्हा आपली कन्या राहेल इला
इची दासी होण्यासाठीं दिल्ही. ३० तेव्हा राहे-
लीजवळहि तो गेला आणि ल्येपेक्षा राहेलीवर
प्रीति केली; मग त्याने अणखी दुसरीं सात वर्षे
त्यापासीं चाकरी केली. ३१ तेव्हा परमेश्वराने
पाहिलें कीं ल्येचा द्वेष झाला, यास्तव त्याने तिची
कूस वाहती केली, परंतु राहेल वांझ होती. ३२
ल्या तर गरोदर झाली आणि पुत्र प्रसवली; तेव्हा
तिने त्याचें नांव रऊबेन ठेविलें; का कीं तिने ह्मटलें,
परमेश्वराने माझें दुःख निश्चयें पाहिलें आहे ह्म-
णून आता माझा नवरा मजवर प्रीति करील. ३३
अणखी ती गरोदर होऊन पुत्र प्रसवली, आणि
बोलली, मी द्वेषलेली, ह्मणून परमेश्वराने ऐकि-
लें, यास्तव त्याने हाहि मला दिल्हा आहे; तेव्हा
तिने त्याचें नांव शिमोन ठेविलें. ३४ अणखी ती
गरोदर होऊन पुत्र प्रसवली, आणि बोलली, आ-
तां या वेळेस माझा नवरा मला जडेल, का कीं
मी त्यापासून तीन पुत्र प्रसवलें; त्यावरून त्याचें
नांव लेवी ठेविलें गेलें. ३५ अणखी ती गरोदर हो-
ऊन पुत्र प्रसवली, आणि बोलली, आतां मी परमे-
श्वराची स्तुति करीन; यावरून तिने त्याचें नांव
यहूदा ठेविलें, नंतर ती प्रसवण्यापासून राहिली.

## अध्याय ३०.

तेव्हा राहेलीने पाहिलें कीं आपण याकोबापासून
प्रसवलें नाहीं, यास्तव राहेलीने आपल्या ब-
हिणीचा हेवा केला, आणि याकोबाला ह्मटलें, त्वां
मला लेंकरूं यावें, नाहीं तर मी मरतें. २ तेव्हा
याकोब राहेलीवर रागें भरला, आणि बोलला,
मी देवाच्या ठिकाणीं कीं काय? त्याने पोटाचें फळ
तुला होऊं दिल्हें नाहीं. ३ मग ती बोलली, पाहा
माझी चाकरीण बिल्हा आहे; तूं तिच्याजवळ जा,
मग ती माझ्या मांडीवर प्रसवेल, आणि तिजपासून
मलाहि संतान होईल. ४ तेव्हा तिने आपली
दासी बिल्हा त्याला बायको होण्यासाठीं दिल्ही,
नंतर याकोब तिच्याजवळ गेला. ५ आणि बि-
ल्हा गरोदर होऊन याकोबापासून पुत्र प्रसवली.
६ मग राहेल बोलली, देवाने माझा न्याय केला
आहे, अणखी माझी प्रार्थना ऐकून मला पुत्र दि-
ल्हा आहे; यावरून तिने त्याचें नांव दान ठेविलें.
७ नंतर राहेलीची दासी बिल्हा फिरून गरोदर
झाली आणि याकोबापासून दुसरा पुत्र प्रसवली.
८ तेव्हा राहेल बोलली, म्या पराकाष्टेच्या झों-
ब्यानी आपल्या बहिणीसीं झोंबी केली, होय जिंक-
लें आहे; यास्तव तिने त्याचें नांव नाफ्ताली ठेविलें.
९ मग ल्येने पाहिलें कीं आपण बाळंतपणापासून
राहिलें तेव्हा तिने आपली दासी झिल्पा इला
घेऊन याकोबाला बायको होण्यासाठीं दिल्हें. १०
नंतर ल्येची दासी झिल्पा याकोबापासून पुत्र
प्रसवली. ११ मग ल्या बोलली, गर्दी आली;

यास्तव तिने त्याचें नांव गाद ठेविलें. १२ नंतर
ल्येची दासी जिल्पा याकोबापासून दुसरा पुत्र
प्रसवली. १३ मग ल्या बोलली, मजवर आशी-
र्वाद, कां तर कन्या मला आशीर्वाद देतील; या-
स्तव तिने त्याचें नांव आशेर ठेविलें. १४ तेव्हां
गहूं कापण्याच्या दिवसीं रऊबेन शिवारांत गेला,
आणि त्याला दूदे मिळाल्यावर त्याने ते आपली
आई ल्या इच्याजवळ आणिलें; मग राहेल ल्ये-
ला बोलली, कृपेकरून तुझ्या पुत्राचे कांहीं दूदे
मला दे. १५ तेव्हां ती तिला बोलली, त्वां माझ्या
नवऱ्याला घेतलें हें थोडकें कीं काय? आणि माझ्या
पुत्राचे दूदेहि घेतीस कीं काय! मग राहेल बोलली,
तर तो तुझ्या पुत्राच्या दूदांकरितां या रात्रीं तु-
झ्याजवळ निजेल. १६ नंतर याकोब संध्याकाळीं
शेतांतून येत असतां ल्या त्याला भेटायास बाहेर
गेली आणि बोलली, त्वां माझ्याजवळ यावें, कां
तर म्या आपल्या पुत्राच्या दूदांकडून तुला भा-
ड्याने घेतलें आहे; मग तो त्या रात्रीं तिच्या-
जवळ निजला. १७ आणि देवाने ल्येचें ऐकिलें,
तसें ती गरोदर होऊन याकोबापासून पांचवा
पुत्र प्रसवली. १८ तेव्हां ल्या बोलली, दे-
वाने माझें भाडें दिल्हें आहे, कां कीं म्या
आपली दासी आपल्या नवऱ्याला दिल्ही आहे;
यास्तव तिने त्याचें नांव इस्साखार ठेविलें. १९
मग ल्या फिरून गरोदर झाली आणि याकोबापा-
सून साहावा पुत्र प्रसवली. २० तेव्हां ल्या
बोलली, देवाने मला उत्तम दान दिल्हें आहे;
आतां माझा नवरा मजसीं सहवास करील, कां कीं
मी त्यापासून साहा पुत्र प्रसवलें आहें; यास्तव
तिने त्याचें नांव जबूलुन ठेविलें. २१ मग ती
कन्याहि प्रसवली, आणि तिने तिचें नांव दीना ठे-
विलें. २२ तेव्हां देवाने राहेलीची आठवण
केली, आणि देवाने तिचें ऐकून तिची कूस वाहती
केली. २३ तसें ती गरोदर होऊन पुत्र प्रसवली;
आणि बोलली, देवाने माझा अपमान निवारिला
आहे. २४ तेव्हां तिने त्याचें नांव योसेफ ठेविलें;
कां कीं तिने असें ह्मटलें, परमेश्वर मला अणखी
दुसरा पुत्र देईल.

२५ आणि जेव्हां राहेल योसेफाला प्रसवली
होती, तेव्हां असें झालें कीं याकोब लाबानाला
बोलला, तूं मला रवाना कर, ह्मणजे मी आपल्या
ठिकाणास व आपल्या देशास जाईन. २६ मा-
झ्या बायका व माझीं लेंकरें ज्यांसाठीं म्या तुझी
चाकरी केली आहे तीं मला दे, ह्मणजे मी जाईन;
कां तर म्या आपल्या ज्या श्रमाने तुझी चाकरी के-
ली तें तूं जाणतोस. २७ तेव्हां लाबान त्याला
बोलला, आतां जर तुझ्या दृष्टींत मला कृपा मि-
ळाली आहे तर तूं राहा; परमेश्वराने तुजकरितां
मला आशीर्वाद दिल्हा, असें म्या अनुभविलें आ-
हे. २८ तेव्हां तो बोलला, तुझें वेतन मजपासीं
ठराव, मग मी देईन. २९ नंतर हा त्याला बो-
लला, म्या तुझी चाकरी कसी केली आहे, आणि
तुझीं ढोरें माझ्याजवळ कसीं होतीं हें तूं जाणतोस,
कां कीं माझ्यापूर्वी जें तुझें होतें तें थोडें. ३०
परंतु आतां तें बहुत वाढिलें आहे; तसें माझ्या
येण्यापासून परमेश्वराने तुझें कल्याण केलें आहे;
तर आतां मी आपल्या घरासाठींहि केव्हां मिळ-
वीन? तेव्हां तो बोलला, मी तुला काय देऊं? ३१
मग याकोब बोलला, तूं मला कांहीं देऊं नको,
जर तूं माझ्यासाठीं ही गोष्ट करसील, तर मी
फिरून तुझीं शेरडें चारीन व पाळीन. ३२ आ-
ज मी तुझ्या सर्व शेरडांतून जाऊन त्यांमधून प्रत्ये-
क बुट्टेदार व विचित्र शेरडूं ह्मणजे मेंढरांतील प्र-
त्येक उदी शेरडूं आणि शेळ्यांतील विचित्र व बु-
ट्टेदार यांस मी काढीन, आणि हीं माझें वेतन हो-
तील. ३३ तसें पुढील दिवसीं माझी भलाई
मजविषयीं उत्तर देईल, कां कीं ती माझ्या वेतना-
साठीं तुझ्या पुढून येईल; शेळ्यांमधील प्रत्येक जें
बुट्टेदार व विचित्र नव्हे आणि मेंढरांमधील उदी
नव्हे, तें माझ्याजवळ चोरीचें होईल. ३४ तेव्हां
लाबान बोलला, पाहा तुझ्या सांगण्याप्रमाणें अव-
श्य होवो. ३५ मग त्याने त्याच दिवसीं जे पट्टे-
दार व विचित्र बोकड त्यांस, आणि अवघ्या बुट्टे-
दार व विचित्र शेळ्या, प्रत्येक ज्याला कांहीं पांढरें
त्याला, आणि मेंढरांमधील प्रत्येक जें उदी त्याला
काढिलें, आणि त्याच्या पुत्रांच्या स्वाधीन केलें.
३६ आणि त्याने आपणामध्यें व याकोबामध्यें
तीन दिवसांची वाट ठेविली; मग लाबानाचीं
उरलेलीं शेरडें याकोबाने चारिलीं. ३७ नंतर
याकोबाने ओलें लिब्ने व लूज व आमोनें झाडें

याच्या छड्या घेऊन त्यांत पांढरे पट्टे सोलिले;
तसें छड्यांवर जें पांढरें तें उघडें केलें. ३८ मग
जेथें शेरडें प्यायास आलीं, तेथें त्यानें ज्या छड्या
सोलिल्या त्या शेरड्यांपुढें पाण्याच्या ओघळ्यांत व
कुंड्यांत ठेविल्या, ह्मणजे प्यायास येतांना त्यांस
गर्भ संभवावा. ३९ तसें त्या छड्यांपासीं शेरड्या
गर्भ संभवल्या, आणि पट्टेदार व बुट्टेदार व विचित्र
अशांस शेरड्या व्याल्या. ४० मग याकोबानें
लाहन मेंढरें वेगळीं केलीं, आणि लाबानाच्या
शेरडांतील पट्टेदार व सर्व उदी यांकडे शेरड्यांचीं
तोंडें लाविलीं; तसें त्यानें आपलीं खिलारें वेगळीं
ठेविलीं, आणि लाबानाच्या शेरडांत तीं ठेविलीं
नाहींत. ४१ आणि जेव्हां सर्व बळकट शेरडें
गर्भ संभवीत होतीं, तेव्हां असें झालें कीं तीं छ-
ड्यांमध्यें गर्भ संभवावीं, ह्मणून याकोबानें त्या
छड्या शेरडांच्या दृष्टीस ओघळ्यांमध्यें ठेविल्या.
४२ परंतु अशक्त शेरडांजवळ त्यानें ठेविल्या
नाहींत, तसें जीं अशक्त तीं लाबानाचीं आणि जीं
बळकट तीं याकोबाचीं झालीं. ४३ तसें तो मा-
णूस फार फार वाढिला, आणि त्याचीं बहुत शेरडें
आणि दासी व दास, आणि उंटें व गाढवें होतीं.

## अध्याय ३१.

परंतु त्यानें लाबानाच्या पुत्रांच्या गोष्टी अशा ऐ-
किल्या कीं, आमच्या बापाचें जें कांहीं होतें तें
याकोबानें घेतलें आहे, आणि जें आमच्या बापाचें
त्यांतून त्यानें हें सर्व गौरव मिळविलें आहे. २
आणि याकोबानें लाबानाचें तोंड पाहिलें कीं, पाहा
जसें पूर्व दिवसीं तसें आपल्यासीं नाहीं. ३ ते-
व्हां परमेश्वरानें याकोबाला सांगितलें कीं, तूं
आपल्या वाडवडिलांच्या देशास आणि आपल्या
नात्यांजवळ परत जा, आणि मी तुझ्यासंगतीं अ-
सत जाईन. ४ तेव्हां याकोबानें पाठवून राहेल
व ल्या यांस शिवारांत आपल्या शेरडांजवळ बो-
लाविलें. ५ मग तो त्यांस बोलला, मी तुमच्या
बापाचें तोंड पाहतों कीं, जसें पूर्व दिवसांत तसें
मजकडे नाहीं, परंतु माझ्या बापाचा देव मजसं-
गतीं असतो. ६ आणि तुह्मास कळलें कीं म्या
आपल्या सर्व सामर्थ्यानें तुमच्या बापाची चाकरी
केली आहे. ७ परंतु तुमच्या बापानें मला चा-
ळविलें आणि माझें वेतन दाहा वेळां पालटिलें
आहे, तथापि देवानें त्याला माझा उपद्रव करूं
दिल्हा नाहीं. ८ जेव्हां तो असें बोलला, बुट्टे-
दार तुझें वेतन होतील, तेव्हां सर्व शेरडें बुट्टेदार
व्यालीं; आणि जेव्हां तो असें बोलला, पट्टेदार तुझें
वेतन होतील, तेव्हां सर्व शेरडें पट्टेदार व्यालीं. ९
तसें देवानें तुमच्या बापाचीं ढोरें हरिलीं आणि
मला दिल्हीं आहेत. १० आणि शेरडांस गर्भ
संभवल्या वेळेस असें झालें कीं म्या आपले डोळे
वर करून स्वप्नांत पाहिलें, तेव्हां पाहा शेरडांवर
चढणारे जे बोकड, ते पट्टेदार व बुट्टेदार व कणी-
दार होते. ११ आणि देवाचा दूत मला स्व-
प्नांत बोलला, हे याकोब; तेव्हां मी बोललों, मी
एथें. १२ मग त्यानें ह्मटलें, आतां तुझे डोळे
वर करून पाहा, शेरडांवर जे सर्व बोकड चढतात,
ते पट्टेदार व बुट्टेदार व कणीदार आहेत, कां कीं
लाबानानें जें सर्व तुला केलें तें म्या पाहिलें आहे.
१३ मी बेथएलांतला देव, जेथें त्वां खांबाला
अभिषेक केला तेथला, जेथें त्वां मला नवसला ते-
थला; आतां तूं उठून या देशांतून नीघ, आणि
तुझ्या जन्माच्या देशांत परत जा. १४ तेव्हां
राहेल व ल्या उत्तर करून त्याला बोलल्या, आ-
मच्या बापाच्या घरीं आह्मास वांटा अथवा वतन
अणखी आहे कीं काय? १५ त्याच्या विचारांत
आह्मी परक्या नव्हों कीं काय? कां तर त्यानें
आह्मास विकिलें आणि आमचा पैकाहि खाऊन
टाकिला. १६ कां कीं जें सर्व द्रव्य देवानें आ-
मच्या बापापासून हरिलें आहे, तें आमचें व
आमच्या लेंकरांचें; तर आतां देवानें जें कांहीं
तुला सांगितलें आहे, तें तूं कर. १७ तेव्हां या-
कोबानें उठून आपलीं लेंकरें व आपल्या बायका
यांस उंटांवर बसविलें. १८ आणि आपला बाप
इझाक याकडे कनान देशास जायासाठीं त्यानें
आपलीं अवघीं ढोरें, आणि आपली सर्व संपत्ति
जी आपण मिळविली, तीं ढोरें आपली मिळकत
जी पादान अरामांत मिळविली होती, तीं नेलीं.
१९ तेव्हां लाबान आपल्या शेरडांची लोंह-
कर कापायास गेला होता, आणि राहेलीनें आ-
पल्या बापाच्या ज्या मूर्त्ति त्या चोरिल्या. २०
आणि याकोबानें लाबान अरामी याची दृष्टि

चोरिली, ह्मणजे आपण पळणों, असें त्याने त्याला
कळूं दिल्हें नाहीं. २१ तसा तो उठून आपल्या
अवघ्यासुद्धां पळत असतां नदीच्या पलिकडे गेला,
आणि गिलाद डोंगराकडे आपलें तोंड लाविलें.
२२ मग तिसऱ्या दिवशीं लाबानाला कळविलें
गेलें कीं याकोब पळाला. २३ तेव्हां त्याने आ-
पल्याबरोबर आपले बंधू घेऊन सात दिवसांची
वाट त्याच्या पाठीस लागून गिलाद डोंगरावर त्या-
ला आटोपिलें. २४ परंतु देव लाबान अरामी
याजवळ रात्रीं स्वप्नांत आला आणि त्याला बो-
लला, त्वां याकोबाशीं बरें अथवा वाईटहि न बो-
लावें, ह्मणून आपल्याला संभाळ. २५ तर ला-
बानाने याकोबाला आटोपिलें, तेव्हां याकोबाने डों-
गरावर आपली राहोटी ताणिली होती, लाबानाने
हि आपल्या बंधूसुद्धां गिलाद डोंगरावर ताणिली.
२६ तेव्हां लाबान याकोबाला बोलला, त्वां काय
केलें? तसें माझें मन फसविलें आणि तरवारीच्या
धाडेव अशा माझ्या कन्या नेल्या. २७ तूं लपून-
छपून पळालास आणि मला फसवून मला कळ-
विलें नाहीं; मला कळविलें असतां तर म्यां आनंद
व गायन व डफ व तंतुवाद्य यांकडून तुला रवाना
केलें असतें. २८ परंतु माझे पुत्र व माझ्या कन्या
यांचें चुंबन करायाचा अवकाश मला नव्हता; आतां
ह्या करण्याने तुला मूर्खपण घडलें आहे. २९ तु-
मचें वाईट करायास माझ्या हातांत सामर्थ्य आहे,
परंतु तुमच्या बापाच्या देवाने काल मला असें
सांगितलें कीं, तूं याकोबाशीं बरें किंवा वाईटहि
बोलणें यांपासून आपल्याला राख. ३० आणि
आतां तूं जाऊं इच्छितोस, कां कीं त्वां आपल्या
बापाच्या घराची उत्कंठा धरिली आहे, परंतु त्वां
माझे देव कां चोरिले? ३१ तेव्हां याकोब उत्तर
करून लाबानाला बोलला, यासाठीं मी भ्यालों,
कां तर म्यां ह्मटलें, कदाचित् तूं आपल्या कन्या
मजपासून हिरावसील. ३२ ज्याजवळ तुझे देव
तुला सांपडतील तो न जगो, माझ्याजवळ जें कांहीं
तुझें तें आमच्या बंधूपुढें तूं ओळख, आणि आप-
ल्याशीं घे, याकोबाला तर ठाऊक नव्हतें कीं राहे-
लीने ते चोरिले. ३३ तेव्हां लाबान याकोबाच्या
राहोटींत व लेयेच्या राहोटींत आणि दोघी दासी
यांच्या राहोटींत गेला, परंतु त्याला सांपडले नाहींत;
मग तो लेयेच्या राहोटींतून गेला आणि राहेलीच्या
राहोटींत आला. ३४ तेव्हां राहेलीने मूर्त्ति घे-
ऊन उंटाच्या गोणींत ठेविल्या आणि ती त्यांवर
बसली होती, यास्तव लाबानाने सगळ्या राहोटी-
चा झाडा घेतला परंतु त्याला सांपडल्या नाहींत.
३५ मग ती आपल्या बापाला बोलली, माझ्याने
तुझ्यासमोर उठवत नाहीं हें माझ्या प्रभूच्या दृष्टीस
राग कारण नसो, कां तर स्त्रियांची रीत मला
प्राप्त आहे; तसें त्याने शोध काढिला, परंतु त्या-
ला मूर्त्ति सांपडल्या नाहींत.

३६ मग याकोबाला राग आला, आणि त्याने
लाबानाशीं विवाद केला; तसें याकोब उत्तर दे-
तांना लाबानाला बोलला, माझें उल्लंघन काय?
आणि माझें पाप काय? ह्मणून तूं माझ्यामागें जळत
आलास. ३७ त्वां तर माझ्या अवघ्या वस्तांचा
झाडा घेतला आहे, आणि तुझ्या घराच्या अवघ्या
वस्तांतील तुला काय सांपडलें? एथें माझ्या तुझ्या
बंधूपुढें ठेव, मग ते आह्मा दोघांमध्यें निवाडा क-
रोत. ३८ हीं वीस वर्षें मी तुझ्याजवळ राहिलों;
तुझ्या मेंढ्यानीं व तुझ्या शेळ्यानी गर्भपात केला
नाहीं; आणि म्यां तुझ्या शेरडांतील मेंढे खाल्ले
नाहींत. ३९ विदारिलेलें म्यां तुझ्याजवळ आ-
णिलें नाहीं, तें म्यां सोसिलें; दिवसां चोरिलेलें
किंवा रात्रीं चोरिलेलें तें माझ्या हातापासून त्वां
मागितलें. ४० मी असा होतों; दिवसां उन्हानें
व रात्रीं गारठ्याने मला खाल्लें, आणि माझ्या डो-
ळ्यापासून माझी झोंप उडाली. ४१ याप्रमाणें
मला तुझ्या घरीं वीस वर्षें झालीं; तुझ्या दोघी क-
न्यासाठीं चौदा वर्षें व तुझ्या शेरडांसाठीं साहा
वर्षें म्यां तुझी चाकरी केली, आणि त्वां माझें वेतन
दाहा वेळां पालटिलें आहे. ४२ माझ्या बापा-
चा देव ह्मणजे आब्राहामाचा देव आणि इस्हा-
काचें भय जर मजसीं नसतें, तर निश्चयें त्वां
मला आतां रिकामें जाऊं दिल्हें असतें; देवाने
माझी हेळणा व माझ्या हातांचे कष्ट पाहिले आ-
हेत, आणि काल तुला निषेधिलें.

४३ तेव्हा लाबान उत्तर करून याकोबाला
बोलला, ह्या कन्या माझ्या कन्या, आणि हीं लेंकरें
माझीं लेंकरें, आणि हीं शेरडें माझीं शेरडें, आणि
जें सर्व तूं पाहतोस तें माझें आहे, आणि आज ह्या

माझ्या कन्याविषयीं अथवा जीं लेंकरें त्या प्रसवल्या
त्यांस मी काय करूं? ४४ तर आतां चल, मी
आणि तूं आपण करार करूं, मग तो माझ्यामध्यें
व तुझ्यामध्यें साक्ष असी होईल. ४५ तेव्हां
याकोबानें धोंडा घेऊन खांबरूप उभा केला. ४६
आणि याकोब आपल्या बंधूस बोलला कीं, धोंडे
गोळा करा, तेव्हां त्यानी धोंडे घेऊन ढीग केला,
मग त्याने तेथें त्या ढिगावर खाल्लें. ४७ आणि
लाबानाने त्याला यगारसाहदूथा ह्मटलें, परंतु या-
कोबाने त्याला गालेद ह्मटलें. ४८ तेव्हां ला-
बान बोलला, माझ्यामध्यें व तुझ्यामध्यें हा ढीग
आज साक्ष आहे; यास्तव त्याने त्याचें नांव गा-
लेद. ४९ आणि मिज्पा ठेविलें, कां तर जेव्हां
आह्मी एकमेकापासून गुप्त होऊं, तेव्हां माझ्यामध्यें
व तुझ्यामध्यें परमेश्वर जपो, असें तो बोलला.
५० जर तूं माझ्या कन्यांस दुःख देसील, किंवा
माझ्या कन्यांवांचून दुसऱ्या बायका घेसील, तर
आमच्यासहित माणूस नसतां, पाहा, माझ्यामध्यें
व तुझ्यामध्यें देव साक्षी आहे. ५१ आणि
लाबान याकोबाला बोलला, पाहा, हा ढीग, आ-
णि पाहा, हा खांब जो माझ्यामध्यें व तुझ्यामध्यें
म्या घातला, हा ढीग साक्ष आणि हा खांब साक्ष
होवो; ५२ कीं मी तुजकडे हा ढीग वल्हांड-
णार नाहीं, आणि त्वां मजकडे वाईटासाठीं हा
ढीग आणि हा खांब न वल्हांडावा. ५३ आ-
ब्राहामाचा देव आणि नाहोराचा देव त्यांच्या
बापाचा देव, तो आह्मामध्यें न्याय करो; मग या-
कोबाने आपला बाप इझाक याच्या भयाची शपथ
केली. ५४ तेव्हां याकोबाने डोंगरावर यज्ञ के-
ला, आणि भाकरी खायाला आपल्या बंधूस बो-
लाविलें; तसें त्यानी भाकरी खाल्ल्या, मग ते
डोंगरावर रात्रीं राहिले. ५५ नंतर मोठ्या सका-
ळीं लाबान उठला आणि त्याने आपल्या लेंकांचें
व आपल्या कन्यांचें चुंबन घेऊन त्यांस आशी-
र्वाद दिल्हा; तेव्हां लाबान निघाला आणि आ-
पल्या ठिकाणीं परत गेला.

## अध्याय ३२.

याकोबहि आपल्या वाटेने गेला, आणि देवाचे
दूत त्याला भेटले. २ तेव्हां याकोब त्यांस
पाहून बोलला, हा देवाचें सैन्य, यास्तव त्याने
त्या जाग्याचें नांव माहानाईम ठेविलें.
३ मग याकोबाने आपला भाऊ एसाव याकडे
सेईर देशास ह्मणजे अदोम प्रांतास आपल्यापुढें
दूत पाठविले. ४ तेव्हां त्याने त्यांस असी आज्ञा
दिल्ही कीं, माझा प्रभु एसाव याला तुह्मी असें
ह्मणावें, तुझा सेवक याकोब असें ह्मणतो, मी
पूर्वीपासून आतांपावेतों लाबानाजवळ प्रवासी रा-
हिलों आहें. ५ आणि मला गुरें, व गाढवें, व
शेरडें, आणि दास, व दासी आहेत; तर म्या
तुझ्या दर्शनांत कृपा पावावी ह्मणून आपल्या प्रभू-
ला कळवायास पाठविलें आहे. ६ नंतर ते दूत
याकोबाजवळ परत येऊन बोलले, आह्मी तुझा
भाऊ एसाव याजवळ पोंहचलों, आणि तोहि तुला
भेटायास येत आहे, आणि त्याजवळ चारशें मा-
णसें आहेत. ७ तेव्हां याकोब फार भ्याला,
आणि त्याला संकट लागलें; मग त्याने आपल्यास-
हित जे लोक, व शेरडें, व गुरें व उंट, यांस विभा-
गून दोन गोट असें केलें. ८ आणि ह्मटलें, जरी
एसाव एका गोटाजवळ येऊन त्याला मारितो,
तरीं राहिलेला गोट निभावण्यास होईल. ९
तेव्हां याकोब बोलला, माझा पिता आब्राहाम या-
च्या देवा, व माझा बाप इझाक याच्या देवा, हे
परमेश्वरा, तो तूं मला बोललास कीं, तूं आपल्या
देशास व आपल्या नात्याजवळ परत जा, आणि
मी तुझें बरें करीन. १० ज्या सर्व दया आणि
सर्व सत्यता त्वां आपल्या दासावर केल्या आहेत,
त्यांस मी अयोग्य आहें, कां तर मी आपली का-
ठी घेऊन ही यार्देन उतरलों, आणि आतां दोन
गोट झालों. ११ तूं कृपा करून माझा भाऊ जो
एसाव त्याच्या हातांतून मला सोडीव, कां कीं मी
त्याला भितों, कदाचित् तो येईल आणि मला
माय लेंकरांसुद्धां हाणील. १२ परंतु तूं बोल-
लास कीं, मी तुझें बरें करनिच करीन, आणि समु-
द्राच्या कांठींची रेती जी पुष्कळपणामुळें मोजवत
नाहीं, तसें तुझें संतान करीन. १३ तेव्हां तो
त्या रात्रीं तेथें राहिला, आणि जें आपल्या हातीं
आलें, त्यांतून त्याने आपला भाऊ एसाव यासाठीं
भेट घेतली; १४ ह्मणजे शेळ्या दोनशें व
बोकड वीस, मेंढ्या दोनशें व एडके वीस,

१५ दुभत्या उंटिणी तीस व त्यांचे छावे, गायी चा-
ळीस व पोळ दाहा, गाढवी वीस व शिंगरें दाहा.
१६ आणि त्याने आपल्या चाकरांच्या हातीं खि-
लारांचें खिलार एकटें दिल्हें, आणि आपल्या चा-
करांस सांगितलें, तुह्मी माझ्यापुढें पलिकडे जा,
आणि खिलाराच्या खिलारामध्यें अंतर ठेवा. १७
तेव्हां त्याने पहिल्याला असी आज्ञा दिल्ही कीं,
जेव्हां माझा भाऊ एसाव तुला भेटेल आणि तुला
पुसेल कीं, तूं कोणाचा? आणि कोणीकडे जातोस?
आणि हीं जीं तुझ्यापुढें आहेत तीं कोणाचीं? १८
तेव्हां तूं असें बोल, तुझा सेवक याकोब याचीं, ती
माझा धनी एसाव याजवळ भेट पाठविली आहे,
आणि पाहा तोहि आमच्यामागें आहे. १९ अण-
खी दुसरा व तिसराहि, आणि खिलारांमागें सर्व
जाणारे, यांस त्याने असी आज्ञा केली कीं, तुह्मी
एसावाला भेटल्यावर त्याला या शब्दांप्रमाणें
सांगा. २० अणखी तुह्मी ह्मणाल, पाहा तुझा
चाकर याकोब आमच्यामागें आहे; कारण कीं त्याने
ह्मटलें, जी भेट माझ्यापुढें जात आहे, तिजकडून
मी त्याच्या दृष्टीची शांति करीन आणि त्यानंतर
त्यांचें तोंड पाहीन, कदाचित् तो मला अंगिकारील
२१ तेव्हां त्याच्यापुढें भेट पार गेली, परंतु तो त्या
रात्रीं तळावर राहिला. २२ मग त्या रात्रीं तो
उठला, आणि आपल्या दोन बायका व आपल्या
दोन दासी आणि आपलीं अकरा लेंकरें, यांस
घेऊन याब्बोक उतारापलिकडे गेला. २३ तसें
त्याने त्यांस घेऊन त्या नदीच्या पलिकडे जाऊं
दिल्हें आणि त्याचें जें तेंहि पार जाऊं दिल्हें.
२४ मग याकोब एकला राहिला, आणि पांहाट
उगवे तोंपर्यंत कोणी त्यासीं झोंबी केली. २५
आणि त्याला जिंकलें नाहीं असें पाहून तो त्या-
च्या मांडीच्या खोलग्याला शिवला; तेव्हां त्यासीं
याकोब झोंबी करीत असतां, याच्या मांडीचा
खोलगा उखळला. २६ मग तो बोलला, पांहाट
उगवली, यास्तव मला रवाना कर; परंतु हा बो-
लला, त्वां मला आशीर्वाद दिल्यावांचून मी तुला
जाऊं देणार नाहीं. २७ मग तो याला बोलला,
तुझें नांव काय? आणि हा बोलला, याकोब.
२८ तेव्हां तो बोलला, आतापासून तुझें नांव
याकोब नाहीं, परंतु इस्राएल असें ह्मटलें जाईल;
कां कीं तूं देवाजवळ आणि माणसांजवळ स-
मर्थ आहेस, आणि जय पावला आहेस. २९
मग याकोब विचारीत बोलला, तूं कृपा करून
आपलें नांव सांग; तेव्हां तो बोलला, माझें
नांव तूं पुसतोस, हें कशास्तव? नंतर त्याने
तेथें त्याला आशीर्वाद दिल्हा. ३० तेव्हां या-
कोबाने त्या जाग्याचें नांव पनियेल ठेविलें,
कां कीं म्या देवाला तोंडोंतोंड पाहिलें आणि
माझा प्राण जगला आहे. ३१ मग पनुवेलाच्या
पलिकडे जातांना त्याजवर सूर्य उगवला, आणि तो
आपल्या मांडींत लंगडत चालला. ३२ याकरितां
मांडीच्या खोलग्यांतील जी सीर लुली झाली, ती
इस्राएल लोक आजपावेतों खात नाहींत; कां कीं
जी सीर लुली झाली, तिला याकोबाच्या मांडी-
च्या खोलग्यांत तो शिवला.

## अध्याय ३३.

तेव्हां याकोबाने आपले डोळे वर करून पाहि-
लें; आणि पाहा, एसाव आला आणि त्या-
सहित चारशें माणसें; तेव्हां त्याने ल्या व रा-
हेल व दोन दासी, यांजवळ लेंकरें वांटून दि-
ल्हीं. २ आणि त्याने दासी व त्यांचीं लेंकरें
पुढें, आणि नंतर ल्या व तिचीं लेंकरें, आणि
मागें राहेल व योसेफ, असीं ठेविलीं. ३ आणि
तो त्यांपुढें चालून आपल्या भावाजवळ येई-
पर्यंत सात वेळां भूमीकडे नमला. ४ तेव्हां
एसाव त्याला भेटायास धांवला, आणि त्याने
त्याला आलिंगन दिल्हें, आणि त्याच्या मानेवर
पडून त्याचें चुंबन घेतलें, आणि ते रडले. ५
नंतर त्याने आपले डोळे वर केले, आणि स्त्रिया व
लेंकरें यांस पाहिलें; तेव्हां ह्मटलें, तुजसंगतीं हीं
कोण? मग हा बोलला, देवाने कृपा करून तुझ्या
दासाला जीं लेंकरें दिल्हीं, तीं आहेत. ६ तेव्हां
त्या दासी व त्यांचीं लेंकरें जवळ येऊन नमलीं.
७ मग ल्याहि व तिचीं लेंकरें जवळ येऊन न-
मलीं, मग मागून योसेफ व राहेल जवळ येऊन
नमली. ८ मग तो बोलला, सर्व गोट मला भेट-
ला, हा तुला काय? तेव्हां हा बोलला, माझ्या
धन्याच्या दर्शनांत कृपा साधायासाठीं आहे. ९
मग एसाव बोलला, हे माझ्या भाऊ, मला पुष्कळ

आहे, जें तुझें, तें तुला असो. १० तेव्हां याकोब
बोलला, असें नसावें, मी मागतों कीं जर आतां तु-
झ्या दर्शनांत कृपा पावलों तर त्वां माझ्या हाता-
पासून माझी भेट घ्यावी, कां तर देवाचें तोंड पा-
हिल्यासारिखें म्या तुझें तोंड पाहिलें, आणि तूं
मजवर प्रसन्न झालास, यास्तव घ्यावी. ११ मा-
झा वर जो तुजकडे आणिला त्याला तूं कृपा क-
रून घे, कां तर देवाने मजवर दया केली आहे,
आणि हें सर्व माझेंच आहे; वसें त्याने त्यावर
आग्रह केला, यास्तव त्याने घेतला. १२ तेव्हां तो
बोलला, आपण निघून जाऊं, आणि मी तुझ्यापुढें
चालेन. १३ परंतु हा त्याला बोलला, माझा धनी
जाणतो कीं लेंकरें कोंवळीं, आणि तान्हीं शेरडें व
गुरें मजवळ आहेत; आणि त्यांस जर एक दिवस
पिटितील तर अवघीं शेरडें मरतील. १४ कृपा
करून माझा धनी आपल्या दासापुढें जावो, आणि
माझ्यापुढें जीं खिलारें, त्यांच्या शक्तीप्रमाणें आणि
लेंकरांच्या शक्तीप्रमाणें मी सेईरास माझ्या धन्या-
जवळ पोहंचेन तोंपर्यंत त्यांस हळूहळू चालवीन.
१५ मग एसाव बोलला, आतां माझ्याजवळ जे
लोक त्यांतील कित्येक तुझ्यासहित ठेवीन; परंतु
हा बोलला, असें कशाला? मला माझ्या धन्याच्या
दृष्टींत कृपा मिळावी. १६ तेव्हां त्या दिवशीं ए-
साव आपल्या वाटेने सेईरास परत गेला. १७
आणि याकोब निघून सुक्कोथास गेला; मग त्याने
आपल्यासाठीं घर बांधिलें आणि आपल्या ढोरांसा-
ठीं गोठे केले, यास्तव त्या जाग्याचें नांव सुक्कोथ
ठेविलें. १८ आणि याकोब पाद्दानअरामाहून येत
असतां खनान देशांतील जें शखेमाचें शालेम न-
गर तेथें आला, आणि नगरासमोर उतरला. १९
आणि जेथें त्याने आपली राहोटी ताणिली होती,
तेथल्या त्या भूमीचा तुकडा त्याने शखेमाचा बाप
हमोर याच्या संतानांच्या हातून शंभर मुद्रांवर
विकत घेतला. २० मग तेथें त्याने वेदी बांधिली,
आणि त्याचें नांव एलअलोहे इस्राएल ठेविलें.

### अध्याय ३४.

तेव्हां दीना ल्येची कन्या जिला ती याकोबापा-
सून प्रसवली, ती त्या देशांतील कन्यांस पाहा-
यासाठीं बाहेर गेली. २ मग त्या देशाचा अधि-
कारी हमोर जो हिव्वी त्याचा पुत्र शखेम याने
तिला पाहून तिला घेतलें आणि तिच्याजवळ नि-
जून तिला नीच केलें. ३ आणि याकोबाची कन्या
दीना इजवर त्याचा जीव लागला, तसें त्या लें-
कीवर त्याने प्रीति केली आणि त्या लेंकीचें चि-
त्तपूर्वक भाषण केलें. ४ मग शखेमाने आपला
बाप हमोर याला असें ह्मटलें कीं, त्वां ही मु-
लगी माझी नवरी करून घ्यावी. ५ तेव्हां या-
कोबाने ऐकिलें कीं आपली कन्या दीना इला त्या-
ने विटाळविलें, परंतु त्याचे पुत्र शिवारांत ढोरां-
जवळ होते, यास्तव ते येत तोंपर्यंत याकोब उ-
गाच राहिला. ६ तेव्हां शखेमाचा बाप ह-
मोर याकोबासीं बोलायाकरितां त्याजवळ बाहेर
आला. ७ आणि याकोबाचे पुत्र ऐकून शिवारां-
तून आले; तेव्हां तीं माणसें खेद पावलीं आणि
त्यांस फार राग आला, कां कीं याकोबाच्या कन्ये-
जवळ निजण्यांत त्याने इस्राएलांत मूर्खपण, आणि
जसें काम करायाचें नाहीं, तसें केलें होतें. ८ ते-
व्हां हमोर त्यांजवळ बोलला कीं, माझा पुत्र श-
खेम याचा जीव तुमच्या कन्येसीं जडला आहे;
तुह्मी कृपा करून ती त्याची नवरी करून द्या. ९
आणि तुह्मी आह्मासीं सोयरीक करा तुमच्या क-
न्या आह्मास द्या, आणि आमच्या कन्या तुह्मी
आपल्यासाठीं घ्या. १० असें तुह्मी आमच्यासं-
गतीं राहावें, ह्मणजे देश तुह्मापुढें सादर होईल;
त्यांत तुह्मी राहा व व्यापार करा व वतन घ्या.
११ आणि शखेमाने तिचा बाप व तिचे भाऊ
यांस ह्मटलें, मला तुमच्या दर्शनीं कृपा मिळावी,
मग जें तुह्मी मला सांगाल तें मी देईन. १२
तुह्मी मजवर आंदण व देणें फार वाढवून घाला,
आणि जितकें तुह्मी मला सांगाल तितकें मी देईन,
परंतु ही मुलगी नवरी करून मला द्या. १३ ते-
व्हां याकोबाच्या पुत्रांनी शखेम व त्याचा बाप
हमोर यांस कपटाने उत्तर केलें; त्यांची बहीण
दीना इला त्याने विटाळविल्यामुळें त्यांनी असें
ह्मटलें; १४ तर ते त्यांस असें बोलले, असुंती
माणूस, त्याला आमची बहीण देणें ही गोष्ट आ-
मच्याने करवत नाहीं, कां तर तें आमची फजिती
होईल. १५ जर तुह्मी आपल्या सर्व पुरुषांची
सुंता करण्याने आमच्यासारिखे व्हाल, तर आह्मी

मात्र आह्मी तुह्मास मानूं. १६ तेव्हा आह्मी
आपल्या कन्या तुह्मास देऊं आणि तुमच्या कन्या
आह्मी आपल्याजवळ घेऊं, आणि तुह्मामध्यें आ-
ह्मी राहून आपण एक लोक असें होऊं. १७
परंतु सुंता करण्याविषयीं तुह्मी आमचें न ऐकाल,
तर आह्मी आपली कन्या घेऊन जाऊं. १८ तेव्हां
त्यांच्या गोष्टी हमोराच्या विचारांत व हमोराचा
पुत्र शखेम याच्या विचारांत चांगल्या दिसल्या.
१९ तेव्हां ती गोष्ट करण्यास त्या पुरुषाने उशीर
केला नाहीं, का कीं त्याचा छंद झाला होता, आणि
तो आपल्या बापाच्या घरांतल्या सर्वांपेक्षां मान्य
होता. २० तेव्हा हमोर व त्याचा पुत्र शखेम
आपल्या नगराच्या वेसीजवळ येऊन आपल्या नग-
रांतील माणसांजवळ असें बोलले कीं, २१ तीं
माणसें आह्मासीं शांत आहेत, यास्तव त्यांस दे-
शांत राहूं द्या, आणि त्यांत व्यापार करूं द्या, कां
पाहा, देश त्यांच्यासाठीं पुरता पसरट आहे; आ-
ह्मी त्यांच्या कन्या आपल्या नवऱ्या करून घेऊं,
आणि आमच्या कन्या त्यांस देऊं. २२ केवळ
जसें ते सुंता करितात तसें आह्मामधील सर्व पु-
रुषांची सुंता व्हावी, येणेंकडून तीं माणसें आह्मा-
जवळ राहून एक लोक व्हायास आह्मास मानि-
तील. २३ त्यांचीं ढोरें व त्यांची संपत्ति व
त्यांचे अवघे पशू आमचे होणार नाहींत कीं काय?
केवळ आह्मी त्यांस मानावें, मग ते आह्माजवळ
राहतील.

२४ तेव्हां हमोर व त्याचा पुत्र शखेम यांची
गोष्ट त्याच्या नगराच्या वेसींतून अवघे जाणारे या-
नी ऐकिली; तसें त्याच्या नगराच्या वेसींतून सर्व
जाणारे ह्मणजे सर्व पुरुष यांची सुंता केली गेली.
२५ मग तिसऱ्या दिवसीं जेव्हां त्यांचे घाव चि-
डले, तेव्हां असें झालें कीं याकोबाचे दोघे पुत्र
शिमोन व लेवी, दीनेचे भाऊ यानी आपली आ-
पली तरवार घेतली आणि धैर्याने नगरावर येऊन
सर्व पुरुष वधिले. २६ हमोर व त्याचा पुत्र
शखेम यासहि त्यानी तरवारीने मारिलें, मग श-
खेमाच्या घरांतून दीनेस घेऊन गेला. २७ याको-
बाच्या पुत्रानी मारिलेल्यांवर येऊन नगर लुटिलें,
यास्तव कीं त्यानी त्यांच्या बहिणीस विटाळविलें
होतें. २८ त्यानी त्यांचीं शेरडें, व त्यांचीं गुरें
व त्यांचीं गाढवें, आणि जें नगरांत व जें शेतांत
होतें तें घेतलें. २९ त्यांची संपूर्ण संपत्तिहि व
त्यांचीं अवघीं बाळकें व त्यांच्या बायका पाडाव
करून नेल्या, आणि घरांत जें कांहीं त्याची लूट
केली. ३० मग याकोबाने शिमोन व लेवी यांस
ह्मटलें, ह्या देशांतील वसणारे खनानी व परिज्जी
यांमध्यें तुह्मी माझा दुर्गंध करून माझा उपद्रव
केला आहे, आणि माझी गणना थोडी, यास्तव ते
मजवर एकवट होऊन मला मारितील, तसें मला
व माझ्या घराला नाश होईल. ३१ तेव्हां ते
बोलले, त्याने आमच्या बहिणीला वेश्येसारिखें क-
रावें काय?

## अध्याय ३५.

तेव्हां देवाने याकोबाला सांगितलें कीं, तूं ऊठ,
बेथएलास जाऊन तेथें राहा, आणि तूं आप-
ला भाऊ एसाव याच्या तोंडापासून पळालास,
तेव्हां देवाने तुला दर्शन दिल्हें, त्यासाठीं तेथें
वेदी कर. २ मग याकोबाने आपल्या घरचे आणि
सर्व जे त्याच्यासहित त्यांस सांगितलें, तुह्मामध्यें
जे अन्य देव त्यांस तुह्मी घालवा, आणि शुद्ध
व्हा, आपलीं वस्त्रेंहि बदला. ३ मग आपण उ-
ठून बेथएलास जाऊं, आणि देवासाठीं ह्मणजे
ज्याने, माझ्या संकटाच्या दिवसीं मला उत्तर दि-
ल्हें, आणि ज्या वाटेने मी चालत होतों, त्यांत जो
माझ्यासहित होता, त्यासाठीं मी तेथें वेदी करीन.
४ तेव्हां त्यानी आपल्या हातीं जे अवघे अन्य देव
आणि आपल्या कानांतील जीं कुंडलें, ती याकोबाला
दिल्हीं, मग याकोबाने शखेमाजवळील एला झाड
याच्याखालीं तीं पुरलीं. ५ मग ते निघाले, आणि
त्यासभोंवतीं जीं नगरें त्यांस देवाचें भय प्राप्त
झालें, यास्तव तीं याकोबाच्या पुत्रांच्या पाठीस
न लागलीं. ६ तेव्हां याकोब आपल्यासहित जे अ-
वघे लोक त्यांसुद्धां खनान देशांतील लूज तेंच
बेथएल, तेथें आला. ७ नंतर त्याने तेथें वेदी
बांधिली आणि त्या जाग्याचें नांव एलबेथएल ठे-
विलें; का कीं तो आपल्या भावासमोरून पळाला,
तेव्हां देव त्याला तेथें प्रगट झाला. ८ तेव्हां
रबेकेची दाई दबोरा मेली, आणि बेथएलाच्या
खालीं अल्लोन झाड याच्याखालीं पुरली गेली,

यास्तव त्याने त्याचें नांव आल्लोनबाखुथ ठेविलें.
९ तर याकोब पाद्दानअरामांतून येत असतां
त्याला देवाने फिरून दर्शन दिल्हें, आणि त्याला
आशीर्वाद दिल्हा. १० तेव्हां देवाने त्याला
सांगितलें, तुझें नांव याकोब, आतांपासून तुझें नांव
याकोब ह्मटलें जाणार नाहीं, परंतु इस्राएल तुझें
नांव होईल; तसें त्याने त्याचें नांव इस्राएल ठेविलें.
११ आणि देव त्याला बोलला, मी सर्वस-
मर्थ देव आहें; तूं सफळ होऊन वाढ, तुजपासून
राष्ट्र व राष्ट्रांचा समुदाय होईल, आणि तुझ्या
कंबरेंतून राजे निघतील. १२ आणि जो देश म्या
आब्राहाम व इझाक यांस दिल्हा तो मी तु-
ला देईन, आणि तुझ्यानंतर तुझ्या संतानाला तो
देश देईन. १३ तेव्हां ज्या ठिकाणीं देव त्यासीं
बोलला, तेथून तो त्यापासून चढला. १४ तेव्हां
जेथें तो त्यासीं बोलला, त्या ठिकाणीं याकोबाने
खांब धोंड्याचा खांब उभा केला, आणि त्याजवर
तरपण करून त्यावर तेल ओतिलें. १५ आणि जेथें
देव त्यासीं बोलला, त्या ठिकाणाचें नांव याकोबाने
बेथएल ठेविलें. १६ तेव्हां ते बेथएलाहून निघाले
आणि तितक्यांत एफ्राथास जायाची कोसभर वाट
राहिली, तेव्हां राहेलीला प्रसव लागला, आणि
प्रसवतां तिला अवघड झालें. १७ मग तिचें प्र-
सवणें कष्ट असतां असें झालें कीं सुईण तिला
बोलली, भिऊं नको, कां कीं तुला हाहि पुत्र हो-
ईल. १८ नंतर तिचा प्राण जात होता,(कां तर
ती मेली); तेव्हां असें झालें कीं तिने त्याचें नांव
बेनओनी ठेविलें, परंतु त्याच्या बापाने त्याचें नांव
बन्यामीन ठेविलें. १९ तेव्हां राहेल मेली, आ-
णि एफ्राथ तेंच बेथलेहेम त्याच्या वाटेंत ती पुरली
गेली. २० मग याकोबाने तिच्या कबरेवर खांब
उभा केला; तो आजपर्यंत राहेलीच्या कबरेवर
खांब आहे. २१ मग इस्राएल पुढें गेला, आणि
एदेर कोटाच्या पलिकडे त्याने आपलीं राहोटी
ताणिली. २२ आणि इस्राएल त्या देशांत राहत
होता, तेव्हां असें झालें कीं रऊबेन जाऊन आप-
ल्या बापाची उपपत्नी बिल्हा, इच्याजवळ निजला,
मग इस्राएलाने ऐकिलें.

२३ तर याकोबाचे बारा पुत्र होते; ल्या इचे
पुत्र हे याकोबाचा वडील रऊबेन, नंतर शिमोन,
व लेवी, व यहूदा, व इस्साखार, व जबूलून, रा-
हेलीचे पुत्र योसेफ व बन्यामीन. २४ आणि
राहेलीची दासी बिल्हा इचे पुत्र, दान व नाफ्-
ताली. २५ आणि ल्येची दासी जिल्पा इचे
पुत्र गाद व आशेर; २६ हे याकोबाचे पुत्र
जे त्यासीं पाद्दान अरामांत जन्मले ते. २७ तेव्हां
जेथें आब्राहाम आणि इझाक प्रवासी राहिले, मा-
म्रेंतील आर्बागांव तेंच हेब्रोन, तेथें याकोब आप-
ला बाप इझाक याजवळ आला. २८ तर इझा-
काचे दिवस एकशें ऐशीं वर्षे झाले. २९ तेव्हां
इझाक ह्मातारा व दिवसानी पुरा होऊन प्राण सो-
डून मेला, आणि आपल्या लोकांसीं मिळाला; मग
त्याचे पुत्र एसाव व याकोब यानी त्याला पुरिलें.

## अध्याय ३६.

आणि एसाव जो अदोम त्याची वंशावळी ही;
२ एसावाने आपल्या नवऱ्या खनानांतील
कन्यांतून घेतल्या, ह्मणजे एलोन जो हित्ती त्याची
कन्या आदा, आणि जिबोन जो हिव्वी त्याची
नात जी अनाची कन्या आहलीबामा; ३ आ-
णि नबायोथाची बहीण जी इश्माएलाची कन्या
बाशमाथ. ४ तर आदा एसावापासून अली-
फाजाला प्रसवली, आणि बाशमाथ रगुवेलास प्र-
सवली. ५ आणि आहलीबामा यऊश, व या-
लाम, व कोराह, यांस प्रसवली; हे एसावाचे
पुत्र जे त्याजपासून खनान देशांत जन्मले. ६
तेव्हां एसाव, आपल्या बायका, व आपले पुत्र, व
आपल्या कन्या, व आपल्या घरचे अवघे प्राणी,व आ-
पलीं ढोरें, व आपले अवघे पशू व आपली अवघी
जी संपत्ति त्याने खनान देशांत मिळविली होती, यां-
स घेऊन आपला भाऊ याकोब याच्या पूर्वेकडील
देशांत गेला. ७ कां कीं ते एकवट राहाया-
पेक्षां त्याचें धन मोठें झालें, आणि त्यांच्या प्रवा-
साचा देश त्यांच्या ढोरांकरितां यांस सोसाया-
ला शकत नव्हता. ८ तसें एसाव सेईर डों-
गरावर राहिला.

९ एसाव तोच अदोम आणि सेईर डोंगरा-
वरील अदोमी यांचा पूर्वज जो एसाव याची
वंशावळी ही; १० एसावाच्या संतानाचीं नांवें हीं,
एसावाची बायको आदा इचा पुत्र अलीफाज;

आणि एसावाची बायको बाशमाथ इचा पुत्र
रगुवेल. ११ आणि अलीफाजाचें संतान, ते-
मान, ओमार, झफो, व गाताम, व कनाज, होते.
१२ आणि एसावाचा पुत्र अलीफाज याची उप-
पत्नी थिम्ना होती, तीहि अलीफाजापासून अ-
मालेकाला प्रसवली, हे एसावाची बायको आदा
इचें संतान. १३ आणि रगुवेलाचें संतान हे, अ-
नाथ, व झेराह, शाम्मा, व मिज्जा, हे एसावाची
बायको बाशमाथ इचें संतान होते. १४ आ-
णि झिबोनाची नात जी अनाची कन्या अहली-
बामा एसावाची बायको इचें संतान हे होते,
ह्मणजे ती एसावासीं यऊश, व यालाम, व
कोराह, यांस प्रसवली. १५ एसावाच्या संता-
नांतील हे नायक, एसावाचा वडील पुत्र अली-
फाज याचें संतान, तेमाम नायक, ओमार नायक,
झफो नायक, कनाज नायक. १६ कोराह ना-
यक, गाताम नायक, अमालेक नायक; हे नायक,
अदोम देशांत अफीलाजापासून, हे आदेचें संतान.
१७ आणि एसावाचा पुत्र रगुवेल याचें संतान
हे, नाहाथ नायक, झेराह नायक, शाम्मा नायक,
मिज्जा नायक, हे नायक अदोमदेशांत रगुवेला-
पासून, हे एसावाची बायको बाशमाथ इचें संतान.
१८ आणि एसावाची बायको आहलीबामा इचें
संतान हे, यऊश नायक, यालाम नायक, कोराह
नायक; हे नायक एसावाची बायको आहलीबा-
मा जी अनाची कन्या इजपासून. १९ हे एसा-
वाचें संतान आणि ह्यांतील हे नायक, तोच आ-
दोम. २० सेईर जो होरी याचें संतान त्या
देशांतील राहणारे हे, लोटान, व शोबाल, व
झिबोन, व अना, व दिशोन, व एजर. २१
आणि दीशान, हे अदोमदेशांतील सेईर याचें
संतान, होरी यांतील नायक. २२ आणि लो-
टानाचें संतान, होरी व हेमान, होतें; आणि
लोटानाची बहीण तिम्ना. २३ आणि हे शो-
बालाचें संतान, आल्वान, व मानाहाथ, व अबाल,
शफो, व ओनाम. २४ आणि हे झिबोनाचें
संतान, की आय्या, व अना, जो अना आपला
बाप झिबोन याच्या गाढवांस चारीत असतां रा-
नांत येमीम पावला, तो हा. २५ आणि हे अ-
नाचें संतान दिशोन, आणि अनाची कन्या आह-
लीबामा. २६ आणि हे दिशानाचें संतान हेम्
दान, व एश्बान, व इथ्रान, व खरान. २७ हे
एझेराचें संतान, बिल्हान, व झवान व अकान.
२८ हे दीशानाचें संतान, ऊज, आणि अरान.
२९ होरी यांपासून नायक हे, लोटान नायक,
शोबाल नायक, झिबोन नायक. ३० अना ना-
यक, दिशोन नायक, एजर नायक, दीशान नायक;
हे आपल्या नायकीप्रमाणें सेईर देशांतील होरी
यांचे नायक.

३१ आणि इस्राएलाच्या संतानावर कोणी
राजाने राज्य केल्यापूर्वी अदोमदेशांत जे राज्य
करीत होते, ते हे. ३२ ह्मणजे बौराचा पुत्र ऐ-
ला याने अदोमांत राज्य केलें, आणि त्याच्या न-
गराचें नांव दिन्हाबा. ३३ आणि ऐला मेल्या-
वर त्याच्या ठिकाणीं बज्ऱ्यांतील झेराहाचा पुत्र
योबाब याने राज्य केलें. ३४ आणि योबाब
मेला, तेव्हां त्याच्या ठिकाणीं तेमानी देशांतील
हुशाम याने राज्य केलें. ३५ आणि हुशाम
मेला, तेव्हां त्याच्या ठिकाणीं बदादाचा पुत्र ह-
दाद याने राज्य केलें; त्याने मोवाबाच्या शिवारांत
मिद्यानाला मारिलें, आणि त्याच्या नगराचें नांव
अवीथ. ३६ आणि हदाद मेला, तेव्हां त्याच्या
ठिकाणीं मास्रेक्यांतील साम्ला याने राज्य केलें.
३७ आणि साम्ला मेला, तेव्हां त्याच्या ठिकाणीं
नदीजवळील रहोबोथ तेथील शाऊल याने राज्य
केलें. ३८ आणि शाऊल मेला, तेव्हां त्याच्या
ठिकाणीं आख्बोराचा पुत्र बालहनान याने राज्य
केलें. ३९ आणि आख्बोराचा पुत्र बालहानान
मेला, तेव्हां त्याच्या ठिकाणीं हदार याने राज्य
केलें; तेव्हां त्याच्या नगराचें नांव पाऊ, आणि
त्याच्या बायकोचें नांव महेटाबेल माट्रेदाची नात
मेआहाबाची कन्या. ४० एर एसावापासून ना-
यक त्यांचीं नांवें आपापल्या ठिकाणीं आपल्या नां-
वानी हीं, तिम्ना नायक, अल्वा नायक, यथेथ ना-
यक; ४१ आहलीबामा नायक, अला नायक,
पीनोन नायक; ४२ कनाज नायक, तेमान ना-
यक, मिब्जार नायक; ४३ माग्दियेल नायक,
ईराम नायक; हे आपापल्या वस्त्यांत आपापल्या
वतन देशांत अदोमाचे नायक, तो एसाव अदो-
माचा पूर्वज.

## अध्याय ३७.

तेव्हां याकोब आपल्या बापाच्या प्रवास देशांत
ह्मणजे खनान देशांत राहिला· २ हे याको-
बाच्या जन्मांतील वृत्तांत; योसेफ सत्रा वर्षांचा
असतां आपल्या भावांसंगतीं शेरडांत चारीत हो-
ता; तसें तो मूल आपल्या बापाच्या बायका बि-
ल्हा व झिल्पा यांच्या पुत्रांसहित होता, तेव्हां यो-
सेफाने त्यांच्या दुष्टाईचें गाऱ्हाणें त्यांच्या बापाजवळ
आणिलें· ३ आणि इस्राएलाने आपल्या सर्व
पुत्रांपेक्षां योसेफावर प्रीति केली होती, कां कीं हा
त्याचा ह्मातारपणाचा पुत्र; तेव्हां त्यासाठीं त्याने
विचित्र अंगरखा केला. ४ आणि त्याच्या भावा-
नी पाहिलें कीं आपला बाप त्याजवर त्याच्या सर्व
भावांपेक्षा प्रीति करीत होता, यास्तव त्यानी त्या-
चा द्वेष केला, आणि त्यांच्याने त्याला सुखरूपें
बोलवत नव्हतें· ५ तेव्हां योसेफाने स्वप्न पाहिलें
आणि त्याने तें आपल्या भावांस सांगितलें, परंतु
त्यानी त्याचा द्वेष अधिकच केला· ६ तेव्हां तो
त्यांस बोलला, हें स्वप्न कृपा करून ऐका. ७ म-
ला असें पडलें कीं, पाहा, आह्मी शेतामध्यें पेंढ्या
बांधीत होतों, आणि पाहा, माझी पेंढी उठून उभीच
राहिली, आणि पाहा, तुमच्या पेंढ्या तिच्याभोंवतें
उभ्या राहून माझ्या पेंढीला नमल्या· ८ तेव्हां
त्याचे भाऊ त्याला बोलले, तूं आह्मावर राजा हो-
सीलच होसील काय? आह्मावर धनीपण करसी-
लच करसील खरें? मग त्यानी त्याच्या स्वप्नांमुळें
व त्याच्या गोष्टींमुळें त्याचा द्वेष अधिकच केला.
९ नंतर त्याने अणखी स्वप्न पाहिलें आणि तेंहि
आपल्या भावांस सांगून ह्मटलें, पाहा मला अणखी
स्वप्न पडलें कीं पाहा, सूर्य, व चंद्र, व अकरा नक्ष-
त्रें मला नमलीं· १० आणि जसें त्याने आपल्या भा-
वांस तसें आपल्या बापास सांगितलें; तेव्हां त्याच्या
बापाने त्याचा निषेध करून त्याला ह्मटलें, त्वां हें
काय स्वप्न पाहिलें? मी आणि तुझी आई आणि
तुझे भाऊ तुला भूमीपर्यंत नमायास येऊंच येऊं
काय? ११ तेव्हां त्याचे भाऊ त्याजवर संतापले,
परंतु त्याच्या बापाने ती गोष्ट मनांत ठेविली· १२
नंतर त्याचे भाऊ आपल्या बापाच्या शेरडांस चा-
रायाला शखेमास गेले. १३ मग इस्राएल यो-
सेफाला बोलला, तुझे भाऊ शखेमांत चारितात
कीं नाहींत? ये, ह्मणजे मी तुला त्यांजवळ पाठवीन;
तेव्हां हा त्याला बोलला, मी एथें आहें. १४ म-
ग तो ह्याला बोलला, आतां तूं जाऊन आपल्या
भावांचें समाधान आणि शेरडांचें समाधान पाहून
मला वर्त्तमान परत आण; तसें त्याने त्याला हेब्रोन
खिंडीहून पाठविलें आणि तो शखेमास गेला.
१५ तेव्हां तो कोणाला असा आढळला कीं पाहा
शिवारांत फिरत होता, यास्तव त्या माणसाने त्या-
ला असें विचारिलें कीं, तूं काय शोधितोस? १६
तेव्हां तो बोलला, मी आपले भाऊ शोधीत आहें,
ते कोठें चारितात हें तूं कृपा करून मला सांग·
१७ मग तो माणूस बोलला, ते एथून निघाले,
कां कीं आपण दोथानास जाऊं, असें त्यांचें ह्मणणें
म्या ऐकिलें; मग योसेफ आपल्या भावांच्या पाठी-
मागें गेला, आणि त्यांस दोथानांत पावला. १८
तेव्हां त्यानी त्याला दुरून पाहिलें, आणि तो
त्यांजवळ आल्यापूर्वी त्यानी त्याला मारायास त्या-
विषयीं योजना केली· १९ आणि ते एकमेकांसीं
बोलले, पाहा, तो स्वप्नदर्शी येत आहे· २० तर
आतां चला, आपण त्याला जिवें मारूं, आणि ए-
खाद्या खांचेंत त्याला टाकूं, मग असें बोलूं कीं, दुष्ट
श्वापदाने त्याला खाल्लें आहे; नंतर त्याचीं स्वप्नें
काय होतील तें आपण पाहूं· २१ तेव्हां रऊबे-
नाने ऐकिलें आणि त्याला त्यांच्या हातांतून सोड-
वावें ह्मणून असें ह्मटलें, आपण त्याला जिवें मरूं
नये· २२ आणि त्याला त्यांच्या हातांतून सोड-
वून त्याच्या बापाजवळ त्याला परतवावें, ह्मणून
रऊबेनाने त्यांस ह्मटलें, रक्त पाडूं नका, रानांत
या खांचेमध्यें त्याला घाला, परंतु त्याजवर हात
टाकूं नका· २३ नंतर योसेफ आपल्या भावांज-
वळ आल्यावर असें झालें कीं त्यानी योसेफाचा
अंगरखा, जो विचित्र अंगरखा त्याच्या आंगीं होता,
तो काढून घेतला, आणि त्याला धरून त्या खांचेंत
टाकिलें; २४ तेव्हां ती खांच रिकामी, त्यांत पा-
णी नव्हतें. २५ मग ते भाकरी खायास बसले;
तेव्हां त्यानी आपले डोळे वर करून पाहिलें कीं
पाहा, इश्माएलांचा काफला त्यांच्या उंटांसुद्धां
गिलादाहून आला, सुगंध द्रव्यें व ऊद व
बोळ वाहून मिसरांत उतरायास ते जात होते·

२६ तेव्हां यहूदा आपल्या भावांजवळ बोलला, जर
आम्ही आपला भाऊ मारूं आणि त्याचें रक्त ल-
पवूं तर लाभ काय २७ चला, ह्मणजे आपण तो
इश्माएल्यांस विकूं, परंतु आमचा हात त्याजवर
नसो, कां तर तो आमचा भाऊ, आमचें आंग आहे;
मग त्याच्या भावानी ऐकिलें. २८ तसें मिद्यानी
व्यापारी लोक जवळून जात असतां त्यानी योसे-
फाला खांचींतून ओढून काढिलें, योसेफाला वीस
रुप्यांसाठीं इश्माएल्यांस विकिलें; नंतर त्यानी यो-
सेफाला मिसरांत नेलें. २९ तेव्हां रऊबेन फि-
रून खांचेजवळ आला, आणि पाहा, खांचेमध्यें
योसेफ नाहीं, यास्तव त्याने आपलीं वस्त्रें फा-
डिलीं. ३० मग तो आपल्या भावांजवळ परत
येऊन बोलला, मूल तो नाहीं, आणि मी कोणीकडे
जाऊं! ३१ तेव्हां त्यानी योसेफाचा अंगरखा
घेतला, आणि शेरडांतील बकरूं मारिलें, नंतर
रक्तांत अंगरखा बुचकळला. ३२ मग त्यानी तो
विचित्र अंगरखा पाठविला आणि आपल्या बापाजव-
ळ पोंहचवून ह्मटलें, हा आह्मास सांपडला आहे,
आतां तूं ओळख, हा तुझ्या पुत्राचा अंगरखा आ-
हे किंवा नाहीं! ३३ तेव्हां त्याने तो ओळखिला,
आणि ह्मटलें, माझ्या पुत्राचा अंगरखा आहे; को-
णी दुष्ट श्वापदाने त्याला खाल्लें आहे, योसेफ फा-
डून टाकिला गेला. ३४ मग याकोबाने आपलीं
वस्त्रें फाडिलीं; आणि आपल्या कंबरेस तरट ने-
सून आपल्या पुत्रासाठीं बहुत दिवस शोक केला.
३५ नंतर त्याचे सर्व पुत्र व त्याच्या सर्व क-
न्या त्याचें समाधान करायास उठल्या, परंतु तो
समाधान पावायाचा नकार करीत बोलला, मी
शोक करीत आपल्या पुत्राजवळ लोकांतरीं उत-
रेन, तसा त्याचा बाप त्याच्यासाठीं रडला. ३६
त्या मिद्यानी तर त्याला, मिसरांत फारोचा
सेवक पोटीफर मुख्य हस्तकी, याजवळ विकिलें.

## अध्याय ३८

आणि त्या वेळेस असें झालें कीं यहूदा आप-
ल्या भावांजवळून उतरला, आणि कोणी अ-
दुल्लामकर हीरा नामक त्याजवळ वळून गेला. २
मग यहूदाने एथें कोणी कनानी शूवा नामक या-
ची कन्या पाहिली; तेव्हां तो तिला घेऊन तिच्या
जवळ गेला. ३ मग ती गरोदर होऊन पुत्र प्र-
सवली, आणि त्याने त्याचें नांव एर ठेविलें. ४
नंतर ती अणखी गरोदर होऊन पुत्र प्रसवली,
आणि तिने त्याचें नांव ओनान ठेविलें. ५ मग
ती फिरूनाहि पुत्र प्रसवली, आणि तिने त्याचें
नांव शेला ठेविलें; जेव्हां ती त्याला प्रसवली ते-
व्हां तो खजीबांत होता. ६ नंतर यहूदाने आ-
पला वडील पुत्र एर यासाठीं नवरी घेतली, आणि
तिचें नांव तामार. ७ परंतु यहूदाचा वडील
पुत्र एर परमेश्वराच्या दृष्टींत दुष्ट होता, यास्तव
परमेश्वराने त्याला मारिलें. ८ मग यहूदाने
ओनानाला सांगितलें, तूं आपल्या भावाच्या बाय-
कोजवळ जा, ह्मणजे तिजसीं लग्न करून आपल्या
भावासाठीं संतान होऊं दे. ९ तेव्हां ओनान
समजला कीं तें संतान आपलें होणार नाहीं, या-
स्तव जेव्हां तो आपल्या भावाच्या बायकोजवळ
गेला, तेव्हां असें झालें कीं त्याने आपल्या भावा-
ला संतान न द्यावें ह्मणून भूमीवर नासविलें. १०
आणि त्याने जें केलें तें परमेश्वराच्या दृष्टींत
वाईट होतें, यास्तव त्याने त्यालाहि मारिलें. ११
तेव्हां यहूदा आपली सून तामार इला बोलला,
माझा पुत्र शेला प्रौढ होईपर्यंत तूं आपल्या बापा-
च्या घरीं विधवा राहा; कां कीं त्याने ह्मटलें, क-
दाचित् तोहि आपल्या भावांसारिखा मरेल; मग
तामार जाऊन आपल्या बापाच्या घरीं राहिली.
१२ तेव्हां बहुत दिवस झाल्यावर यहूदाची बा-
यको शूवाची कन्या मेली; मग यहूदा समाधान
पावल्यावर आपला मित्र हीरा जो अदुल्लामी या-
सुद्धां आपल्या शेरडांच्या कातरणाऱ्यांजवळ तिम्ना-
थास चढला. १३ तेव्हां तामारीला असें क-
ळविलें गेलें कीं, पाहा तुझा सासरा आपल्या शे-
रडांस कातरायासाठीं तिम्नाथास चढत आहे.
१४ मग तिने आपल्या विधवेपणाचीं वस्त्रें आप-
ल्यावरून काढिलीं आणि आपल्या मुखवस्त्राने झां-
किलें; तसा वेष धरून ती तिम्नाथाच्या वाटेवर
उघड्या ठिकाणीं बसली, कां तर शेला प्रौढ झाला
परंतु आपण त्याची नवरी करून दिल्ही गेली ना-
हीं, असें तिने पाहिलें. १५ तेव्हां यहूदाने ति-
ला पाहून तिला वेश्या असी मोजिली, कां कीं ति-
ने आपलें तोंड झांकिलें होतें. १६ मग तो वाटे-

वर तिजकडे फिरून बोलला, अगे चाल, मी तुज-
पाशीं येईन; तो तर समजला नाहीं कीं ती आप-
ली सून; मग ती बोलली, तूं मजवळ येसील तर
मला काय देसील? १७ आणि तो बोलला, मी
शेरडांतून बकरूं पाठवीन; तेव्हां ती बोलली, तूं
पाठविसील तोंपर्यंत हडप देसील कीं काय? १८
मग तो बोलला, मी तुला हडप काय देऊं? आ-
णि ती बोलली, तुझा ठसा व तुझ्या पोहंच्या
व तुझ्या हातांत जी काठी ती; तेव्हां तो तीं
तिला देऊन तिच्याजवळ गेला, आणि ती त्यापा-
सून गरोदर झाली. १९ तेव्हां ती उठून गेली,
आणि तिने आपल्यावरून आपलें मुखवस्त्र काढून
आपल्या विधवेपणाचीं वस्त्रें आंगीं घेतलीं. २०
तेव्हां त्या स्त्रीच्या हातापासून हडप घ्यायास
यहूदाने आपला मित्र जो अदुल्लामी त्याच्या हा-
ताने शेरडांतून बकरूं पाठविलें, परंतु ती त्याला
सांपडली नाहीं. २१ मग त्याने त्या जाग्यांतील
माणसांस विचारिलें कीं, जी वेश्या वाटेवर दृष्टींत
होती ती कोठें आहे? आणि ते बोलले; एथें कोणी
वेश्या नव्हती. २२ तेव्हां तो यहूदाजवळ परत
येऊन बोलला, ती मला सांपडली नाहीं, अणखी
त्या जाग्यांतील माणसें बोललीं कीं, एथें कोणी वे-
श्या नव्हती. २३ तेव्हां यहूदा बोलला, ती आ-
पल्यासीं घेवो, नाहीं तर आह्मी तुच्छ होऊं; पाहा,
म्या हें बकरूं पाठविलें परंतु ती तुला सांपडली
नाहीं. २४ मग सुमारें तीन महिन्यांनंतर असें
झालें कीं यहूदाला असें कळविलें गेलें कीं, तुझी
सून तामार, इने व्यभिचार केला आहे; अणखी
पाहा, व्यभिचाराने ती गरोदर झाली आहे; मग
यहूदा बोलला, तुह्मी तिला काढा, आणि ती ज-
ळली जावो. २५ तेव्हां ती काढिलेली असतां,
तिने आपल्या सासऱ्याजवळ पाठवून सांगितलें कीं,
ज्याचीं हीं आहेत त्या माणसापासून मी गरोदर
झालें; आणि ती बोलली, आतां तूं ओळख, हा
ठसा व पोहंच्या व काठी हीं कोणाचीं? २६ ते-
व्हां यहूदाने ओळखिलीं, आणि ह्मटलें, ती मा-
झ्यापेक्षां नीतिवंत आहे, कां कीं म्या आपला पुत्र
शेला याला ती दिल्ही नाहीं ह्मणून; मग त्याने
तिला फिरून अनुभविलें नाहीं. २७ तेव्हां ति-
च्या प्रसवण्याच्या वेळेस असें झालें कीं पाहा ति-
च्या पोटांत जावळे होतें. २८ आणि तिच्या
प्रसवण्यांत असें झालें कीं एकाने हात काढिला,
आणि सुइणीने त्याचा हात धरून त्याला आंभळें
सूत बांधून ह्मटलें, हा पहिलें निघाला. २९ मं-
तर त्याने आपला हात माघारें घेतला, तेव्हां असें
झालें कीं पाहा, त्याचा भाऊ निघाला; तेव्हां ति-
ने ह्मटलें, तूं कसें फोडीत आलास? तुजवर फो-
डणें असो; यास्तव त्याचें नांव फारेज ठेविलें
गेलें. ३० आणि त्यानंतर त्याचा भाऊ ज्याच्या
हाताला आंभळें सूत तो निघाला; आणि त्याचें
नांव जाराह ठेविलें गेलें.

## अध्याय ३९.

योसेफ तर मिसरांत नेला गेला, आणि ज्यानी
त्याला तेथें खालीं नेलें, त्या इश्माएल्यांच्या
हातापासून पोटीफार फारोचा सेवक जो मुख्य ह-
स्तकी मिसरी माणूस याने त्याला विकत घेतलें.
२ परंतु परमेश्वर योसेफासंगतीं होता, आणि
तो सभाग्य माणूस झाला, आणि आपला धनी
मिसरी याच्या घरीं असत होता. ३ तेव्हां त्या-
च्या धन्याने पाहिलें कीं परमेश्वर त्याच्यासंगतीं
आहे, आणि तो जें कांहीं करितो तें त्याच्या हाता-
कडून परमेश्वर सफळ करवितो. ४ तसें त्याच्या
दृष्टींत योसेफाला कृपा मिळाली आणि त्याने त्या-
ची सेवा केली; मग त्याने त्याला आपल्या घरावर
ठेविलें, आणि आपलें जें अवघें होतें तें त्याच्या
हातीं ठेविलें. ५ आणि त्याने आपलें घर आणि
जें आपलें सर्व होतें तें त्याला सोंपिलें, तेव्हांपासून
असें झालें कीं परमेश्वराने योसेफाकरितां त्या
मिसऱ्याच्या घरास आशीर्वाद दिल्हा; तसें घरा-
मध्यें व शेतामध्यें जें अवघें त्याचें होतें, त्यावर
परमेश्वराचा आशीर्वाद झाला. ६ यास्तव
त्याने आपलें जें अवघें योसेफाच्या हातीं असें
सोंपिलें कीं त्याने जें अन्न खालें त्यावांचून आपलें
कांहीं जाणिलें नाहीं; आणि योसेफ सुंदर व सु-
दर्शन होता. ७ आणि ह्या गोष्टींनंतर असें
झालें कीं त्याच्या धन्याच्या बायकोने आपली
दृष्टि योसेफावर ठेविली, आणि ह्मटलें, माझ्या-
जवळ नीज. ८ परंतु त्याने नकार केला, आणि
आपल्या धन्याच्या बायकोला ह्मटलें, पाहा, मा-

ह्याजवळ घरांत काय तें माझा धनी जाणत नाहीं,
आणि त्याने आपलें सर्व जें आहे तें माझ्या हातीं
ठेविलें आहे. ९ या घरांत मजपेक्षां कोणी मो-
ठा नाहीं, आणि त्याने तुजशिवाय मजपासून कांहीं
राखिलें नाहीं, कारण कीं तूं त्याची स्त्री आहेस;
तर ही मोठी दुष्टाई मी कसें करूं? आणि देवा-
जवळ पाप कसें करूं? १० परंतु ती योसेफास
दिवसोदिवस ह्मणत होती, तथापि असें झालें कीं
त्याने तिच्याजवळ निजायास अथवा तिच्याजवळ
असायास तिचें ऐकिलें नाहीं. ११ आणि कोणी-
एका वेळेस असें झालें कीं तो आपलें काम करा-
यास घरांत आला, आणि घरच्या माणसांतील को-
णी तेथें घरामध्यें नव्हता, १२ तेव्हां तिने त्याचें
वस्त्र धरून ह्मटलें, माझ्याजवळ नीज; मग तो
आपलें वस्त्र तिच्या हातांत सांडून पळतां बाहेर
निघाला. १३ तसें तो आपलें वस्त्र तिच्या हा-
तीं सांडून बाहेर पळाला हें तिने पाहिलें, तेव्हां
असें झालें कीं; १४ तिने आपल्या घरच्या मा-
णसांस बोलाविलें आणि त्यांस असें ह्मटलें कीं,
पाहा, आमचें हांसूं करायास त्याने इब्री माणसाला
आमच्याजवळ आणिलें आहे; तो माझ्याजवळ नि-
जायास मजकडे आला, मग मी मोठ्या शब्दाने
ओरडलें. १५ आणि मी हाक फोडून ओरडलें
हें त्याने ऐकिलें, तेव्हां असें झालें कीं तो आपलें
वस्त्र माझ्याजवळ सांडून पळतां बाहेर निघाला.
१६ मग त्याचा धनी आपल्या घरीं येईपर्यंत तिने
त्याचें वस्त्र आपल्याजवळ ठेविलें. १७ नंतर
तिने त्याला ह्या गोष्टींप्रमाणें सांगितलें कीं, तो इब्री
चाकर ज्याला त्वां आमच्याजवळ आणिलें, तो
माझें हांसूं करायास मजकडे आला. १८ आणि
मी हाक फोडून ओरडलें, तेव्हां असें झालें कीं तो
आपलें वस्त्र माझ्याजवळ सांडून बाहेर पळाला.
१९ आणि जेव्हां त्याच्या धन्याने आपल्या बाय-
कोने आपल्याला सांगितलेली गोष्ट ऐकिली कीं, तु-
झ्या चाकराने अशा गोष्टीप्रमाणें मला केलें, तेव्हां
असें झालें कीं त्याचा राग पेटला. २० यास्तव
योसेफाच्या धन्याने त्याला धरिलें, आणि ज्या ठि-
काणीं राजाचे बंदिवान बंदांत होते त्या बंदिशाळेंत
त्याला घातलें; तसें तो तेथें बंदिशाळेंत असत
होता. २१ परंतु परमेश्वर योसेफासंगतीं हो-
ता आणि त्याजवर दया केली, आणि त्याला बंदि-
शाळेच्या अधिकाऱ्याच्या दृष्टींत कृपा दिल्ही. २२
यास्तव बंदिशाळेच्या अधिकाऱ्याने बंदिशाळेंतील
सर्व बंदिवान योसेफाच्या हातांत दिल्हे, आणि
तेथें त्यानी अवघें जें केलें त्याचा हा करविणारा
होता. २३ आणि बंदिशाळेच्या अधिकाऱ्याने
त्याच्या हाताखालीं कशास कांहीं पाहिलें नाहीं,
यास्तव कीं परमेश्वर त्याच्यासंगतीं होता, आणि
त्याने जें केलें तें परमेश्वराने सफळ केलें.

## अध्याय ४०.

ह्या गोष्टींनंतर असें झालें कीं मिसरी राजाचा
प्राशनकारी व भाजणारा यानी आपला प्रभु
मिसरी राजा याचा अपराध केला होता. २
यास्तव फारो आपल्या दोघा सेवकांवर, ह्मणजे
प्राशनकाऱ्यांचा पुढारी व भाजणाऱ्यांचा पुढारी
यांजवर कोपला. ३ आणि हस्तकांच्या पुढाऱ्या-
च्या घरीं ज्या ठिकाणीं योसेफ बंदिवान होता तेथें
त्याने त्यांस बंदीस घातलें. ४ तेव्हां हस्तकांच्या
पुढाऱ्याने त्यांस योसेफाच्या स्वाधीन केलें, मग
त्याने त्यांची सेवा केली, आणि ते कित्येक दिवस
बंदीस राहिले. ५ नंतर मिसरी राजाचा प्राश-
नकारी व भाजणारा जे बंदिशाळेंत बंद होते ह्या
दोघानी एका रात्रीं आपल्या आपल्या स्वप्नाच्या
अर्थाप्रमाणें स्वप्न पाहिलें. ६ मग सकाळीं यो-
सेफ त्यांजवळ आला आणि त्याने त्यांस पाहिलें,
तेव्हां पाहा, ते ग्लान झाले. ७ तेव्हां त्याने आ-
पल्यासंगतीं बंदीस आपल्या धन्याच्या घरीं फारो-
चे सेवक यांस असें विचारिलें कीं, आज तुमचीं
तोंडें ग्लान कां झालीं? ८ मग ते त्याला बोलले,
आह्मी स्वप्न पाहिलें आणि त्याचा अर्थ काढणारा
नाहीं; तेव्हां योसेफ त्यांस बोलला, अर्थ काढणीं
देवाकडे नाहींत कीं काय? तुह्मी आतां तीं मला
सांगा. ९ मग प्राशनकाऱ्यांच्या पुढाऱ्याने आप-
लें स्वप्न योसेफाला सांगितलें; असें त्याला ह्मट-
लें कीं, माझ्या स्वप्नांत असें झालें कीं पाहा, मा-
झ्यासमोर द्राक्षवेल झाला, आणि द्राक्षवेलाचे तीन
फांटे. १० तेव्हां तो फुटल्यासारिखा झाला फु-
लवरा येऊन त्याच्या घडानी द्राक्षें पिकविलीं.
११ तेव्हां फारोची वाटी माझ्या हातांत

होती आणि म्यां द्राक्षें घेऊन तीं फारोच्या
वाटींत पिळिलीं, मग वाटी फारोच्या हातावर ठे-
विली. १२ तेव्हां योसेफ त्याला बोलला, त्याचा
अर्थ असा, ते तीन फांटे तीन दिवस आहेत. १३
पुढें तीन दिवसात फारो तुझें मस्तक उंचावील
आणि तुझ्या कारभारावर तुला पूर्ववत् करील, मग
जेव्हां तूं त्याचा प्राशनकारी होतास त्या पहिल्या
रीतीप्रमाणें तूं फारोची वाटी त्याच्या हातांत दे-
सील. १४ आणि जेव्हां तुझें बरें होईल, तेव्हां
तूं अवश्य आपल्यासीं माझी आठवण कर, आणि
कृपेने मजवर दया करून माझी गोष्ट फारोला
सांग, आणि मला या घरांतून काढ. १५ कां
तर मीं इब्र्यांच्या देशांतून चोरलेला खरें, आणि
त्यानी मला कैदेंत ठेवावें ह्मणून म्या एथेंहि कांहीं
केलें नाहीं. १६ नंतर अर्थ चांगला, हें भाज-
णाऱ्यांच्या पुढाऱ्याने पाहून योसेफाला ह्मटलें, मी-
हि आपल्या स्वप्नांत असा होतों कीं पाहा, माझ्या
मस्तकावर तीन पांढऱ्या टोपल्या; १७ आणि
वरील टोपलींत भाजण्याने केलेलीं फारोचीं सर्व
प्रकारचीं खाणीं होतीं, आणि पांखरानी तीं माझ्या
मस्तकावरील टोपलींतून खाल्लीं. १८ तेव्हां यो-
सेफ उत्तर करीत बोलला, त्याचा अर्थ हा, त्या
तीन टोपल्या तीन दिवस आहेत. १९ पुढें तीन
दिवसांत फारो तुझ्यावरून तुझा मस्तक उंचावील
आणि तुला झाडावर टांगील, मग पांखरें तुजवरून
तुझें मांस खातील. २० नंतर तिसऱ्या दिवसीं
फारोचा जन्मदिवस झाला, तेव्हां त्याने आपल्या सर्व
चाकरांमध्यें प्राशनकाऱ्यांचा पुढारी व भाजणाऱ्यांचा
पुढारी यांचा तपास केला. २१ आणि त्याने प्रा-
शनकाऱ्यांच्या पुढाऱ्याला त्याच्या प्राशनकारीपणा-
वर पूर्ववत् केलें, मग त्याने फारोच्या हातावर वाटी
ठेविली; २२ परंतु भाजणाऱ्यांच्या पुढाऱ्याला
टांगिलें; जसें योसेफाने त्यांस अर्थ सांगितला, तसें.
२६ तथापि प्राशनकाऱ्यांच्या पुढाऱ्याने योसेफा-
ची आठवण केली नाहीं, त्याला विसरला.

## अध्याय ४१.

मग दोन वर्षांचा काळ गेल्यावर असें झालें कीं
फारोला स्वप्न पडलें; तेव्हां पाहा, तो नदी-
जवळ उभा राहिला. २ नंतर पाहा, सात गायी
दिसण्यांत सुंदर व आंगीं पुष्ट अशा नदींतून
चढल्या आणि लव्हाळ्यांत चरत होत्या. ३
आणि पाहा, त्यांच्यामागें दुसऱ्या सात गायी, दि-
सण्यांत कुरूप व आंगीं शुष्क, अशा नदींतून
चढल्या, आणि नदीच्या कांठीं त्या पहिल्या गायीं-
जवळ उभ्या राहिल्या. ४ तेव्हां दिसण्यांत कु-
रूप व शुष्क आंगाच्या गायी यानी त्या दिसण्यांत
सुंदर व पुष्ट सात गायी खाऊन टाकिल्या; नंतर
फारो जागा झाला. ५ मग तो झोंपीं गेला आणि
दुसरी वेळ त्याला असें स्वप्न झालें कीं सात फु-
गीर व चांगलीं कणसें एका तांटावर उगवलीं. ६
आणि पाहा, त्यांच्यामागें शुष्क व पूर्वेकडल्या वा-
ऱ्याने करपलेलीं, असीं सात कणसें वाढिलीं. ७
आणि त्या सात शुष्क कणसानी तीं सात फुगीर
व भरींव कणसें गिळिलीं; मग फारो जागा झाला,
आणि पाहा स्वप्न आहे. ८ नंतर सकाळीं असें
झालें कीं त्याचें मन चिंतातूर असून त्याने पाठवून
मिसरांतील सर्व ज्योतिषी आणि तेथील सर्व च-
तुर यांस बोलाविलें, आणि त्यांस फारोने आपलें
स्वप्न सांगितलें; परंतु त्याचा अर्थ फारोजवळ को-
णाच्याने सांगवला नाहीं. ९ मग प्राशनकाऱ्यां-
चा पुढारी फारोला असें बोलला कीं, आज मी
आपले अपराध आठवितों. १० फारो आपल्या
चाकरावर रागें भरला होता, आणि त्याने मला
व मजसहित भाजणाऱ्यांच्या पुढाऱ्याला हस्तक्यां-
च्या पुढाऱ्याच्या घरीं बंदीस घातलें. ११ मग एक
रात्रीं आह्मी स्वप्न पाहिलें, म्या आणि त्याने आप-
ल्या स्वप्नाच्या अर्थाप्रमाणें असें आह्मी स्वप्न पा-
हिलें. १२ तेव्हां एक इब्री नवातरणा जो हस्त-
क्यांच्या पुढाऱ्याचा चाकर तो तेथें आमच्यासंगतीं
होता, आणि आह्मी त्याला सांगितलें; मग त्याने
आमच्या स्वप्नाचा अर्थ आह्मासाठीं काढिला, आ-
पापल्या स्वप्नाप्रमाणें अर्थ काढिला. १३ आणि
असें झालें कीं त्याने आह्मासाठीं जसा अर्थ का-
ढिला तसें झालें; त्याने मला माझ्या कारभारावर
पूर्ववत् केलें, आणि त्याला टांगिलें.

१४ तेव्हां फारोने पाठवून योसेफाला बोला-
विलें, आणि त्यानी त्याला कैदेंतून लवकर काढिलें
तेव्हां त्याने आपणास आणि आपलीं वस्त्रें बदलीं,

मग तो फारोजवळ आला· १५ तेव्हां फारो
योसेफाला बोलला, म्या स्वप्न पाहिलें परंतु त्याचा
अर्थ काढणारा कोणी नाहीं ; आणि म्या तुजविषयीं
असें ऐकिलें कीं तूं स्वप्न ऐकून त्याचा अर्थ का-
ढितोस· १६ तेव्हां योसेफानें फारोला असें उ-
त्तर केलें कीं, माझ्यानेच नाहीं, देव फारोला सु-
खाचें उत्तर देवो· १७ मग फारो योसेफाला बो-
लला, माझ्या स्वप्नामध्यें पाहा, मी नदीच्या कांठीं
उभा राहिलों· १८ आणि पाहा सात गायी आं-
गीं पुष्ट व सुंदर रूपाच्या अशा नदींतून चढल्या,
आणि लव्हाळ्यांत चरत होत्या· १९ मग पाहा,
त्यांच्यामागें रोड व फार कुरूप व शून्य आंगीं
अशा अणखी सात गायी चढल्या; अवघ्या मि-
सरदेशांत त्यांसारिख्या वाईट म्या कधीं पाहिल्या
नाहींत· २० तेव्हां शून्य व वाईट गायी यानी
त्या पहिल्या पुष्ट सात गायी खाऊन टाकिल्या·
२१ आणि त्या त्यांच्या पोटांत गेल्यावरहि असें
जाणवलें नाहीं कीं त्यांच्या पोटांत गेल्या, परंतु त्यां-
चें रूप पहिल्याप्रमाणें वाईट राहिलें; मग मी जा-
गा झालों· २२ नंतर माझ्या स्वप्नांत मला दि-
सलें कीं पाहा, एका तांटावर सात कणसें भरींव
व चांगलीं, असीं वरतीं आलीं· २३ आणि पाहा
त्यांच्यामागें सात कणसें निबर, शुष्क, पूर्वेकडल्या
वाऱ्यानें करपलेलीं, असीं उगवलीं· २४ आणि
त्या शुष्क कणसानी तीं सात चांगलीं कणसें गि-
ळिलीं; तर म्या ज्योतिष्यांस सांगितलें, परंतु कोणी
मला समजाविलें नाहीं· २५ तेव्हां योसेफ फा-
रोला बोलला, फारोचें स्वप्न तें एक आहे ; देव
जें करितो तें फारोला कळविलें· २६ सात चां-
गल्या गायी तीं सात वर्षें, आणि सात चांगलीं क-
णसें तीं सात वर्षें आहेत ; स्वप्न एकच· २६ आणि
त्या गायींच्या मागें रोड व वाईट ज्या सात गायी
वरतीं आल्या तीं सात वर्षें आहेत; आणि सात
कणसें जीं शुष्क पूर्वेकडल्या वाऱ्यानें करपलेलीं, तीं
दुकाळाचीं सात वर्षें होतील· २८ जी गोष्ट म्या
फारोला सांगितली ती हीच, देव जें करितो तें
फारोला दाखवितो· २९ पाहा, सर्व मिसरदे-
शांत अति सवंगाईचीं सात वर्षें येत आहेत· ३०
आणि त्यानंतर दुकाळाचीं सात वर्षें उगवतील ;
मग मिसरदेशांत सवंगाई अगदीं विसरली जाईल,
आणि दुकाळ देशाचा क्षय करील· ३१ आणि
तिच्यानंतर जो दुकाळ त्यामुळें ती सवंगाई देशांत
कळणार नाहीं, कां तर तो फार भारी होईल· ३२
आणि फारोला स्वप्न दोन वेळा झालें, तें इतक्या
वरून कीं ही गोष्ट देवाकडून खचीत केलेली आ-
हे, आणि ती पूर्ण करायास देव उतावळी करीत
आहे. ३३ यास्तव आतां फारोनें बुद्धिमान् व
शाहाणा माणूस शोधावा, आणि त्याला मिसर
देशावर ठेवावें· ३४ फारोनें हेंहि करावें कीं दे-
शावर पाहणेकरी ठेवावा; आणि सवंगाईच्या सात
वर्षांपर्यंत मिसर देशाचा पांचवा हिस्सा घ्यावा.
३५ आणि त्यानी जीं सात चांगलीं वर्षें येतात
त्यांतील अवघें खाणें एकवट करावें, आणि फारो-
च्या हाताखालीं धान्य सांठवावें, तसें त्यानी नगरा-
मध्यें खाणें राखावें· ३६ तसें दुष्काळाचीं जीं
सात वर्षें मिसर देशांत होतील त्यांत तें खाणें
देशाच्या भांडवलासाठीं होईल; ह्मणजे दुष्काळानें
देशाचा क्षय न व्हावा· ३७ तेव्हां ती गोष्ट फा-
रोच्या दृष्टींत आणि त्याच्या सर्व चाकरांच्या
दृष्टींत बरी वाटली·

३८ मग फारो आपल्या चाकरांस बोलला,
यासारिखा माणूस ज्यामध्यें देवाचा आत्मा आहे,
आह्मास तसा सांपडेल कीं काय? ३९ यास्तव
फारो योसेफाला बोलला, देवानें हें सर्व तुला
जाणविलें आहे, यावरून तुझ्यासारिख्या बुद्धिमान्
व शाहाणा कोणी नाहीं· ४० तूं माझ्या घरावर
हो, आणि माझे सर्व लोक तुझ्या आज्ञेप्रमाणें व-
र्त्ततील, केवळ सिंहासनीं मी तुजपेक्षां मोठा हो-
ईन· ४१ आणि फारो योसेफाला बोलला, पाहा
म्या तुला अवघ्या मिसरदेशावर ठेविलें आहे·
४२ तेव्हां फारोनें आपली मोहर आपल्या हा-
तांतून काढून योसेफाच्या हातांत घातली, आणि
त्याच्या गळ्यांत सोन्याचा हार घातला· ४३
मग आपला जो दुसरा रथ त्यांत त्याला बसविलें
आणि त्याच्यापुढें गुडघे टेंका, असें लोकानी लल-
कारिलें ; तसें त्यानें त्याला अवघ्या मिसरदेशावर
ठेविलें· ४४ आणि फारो योसेफाला बोलला,
मी फारो आहें आणि तुझ्या आज्ञेवांचून अवघ्या
मिसरदेशांत कोणी आपला हात किंवा पाय उच-
लणार नाहीं· ४५ तेव्हां फारोनें योसेफाचें नांव

झाफनाथपानेहा असें ठेविलें, आणि ओनाचा या-
जक पोटीफेरा याची कन्या आसनाथ ही त्याची
नवरी करून त्याला दिल्ही, आणि योसेफ अव-
घ्या मिसरदेशावरून गेला.
४६ आणि जेव्हां योसेफ मिसराचा राजा
फारो यासमोर उभा राहिला, तेव्हां तो तीस व-
र्षांचा होता; नंतर योसेफ फारोच्या पुढून नि-
घाला आणि अवघ्या मिसरदेशांत फिरला. ४७
तेव्हां सवंगाईचीं सात वर्षें भूमीने भरमुठी करून
पिकविलें. ४८ आणि जीं सात वर्षें मिसरदेशांत
झालीं त्यांतील अवघें खाणें त्याने एकवट केलें,
आणि तें खाणें नगरांमध्यें ठेविलें, आणि एकएक
नगराच्या चहुंकडील देशांत जें अन्न तें त्यामध्यें
ठेविलें. ४९ तसें योसेफाने समुद्राच्या वाळूसा-
रिखें पुष्कळच धान्य एकवट केलें, इतकें कीं त्याने
मोजणें सोडिलें, कां तर तें अगणित झालें. ५०
आणि दुकाळाचीं वर्षें आल्यापूर्वी योसेफाचे दोन
पुत्र जन्मले; ओनाचा याजक जो पोटीफेरा याची
कन्या आसनाथ ही त्यापासून त्यांस प्रसवली.
५१ आणि योसेफाने वडिलाचें नांव मनाश्शे
ठेविलें, कां कीं त्याने ह्मटलें, माझे अवघे कष्ट
आणि माझ्या बापाचें सर्व घर देवाने मला वि-
सरविलें आहे. ५२ आणि दुसऱ्याचें नांव त्याने
एफ्राईम ठेविलें, कां की माझ्या दुःखाच्या देशांत
देवाने मला सफळ केलें आहे.
५३ तेव्हां मिसरदेशांत सवंगाईचीं जीं सात
वर्षें झालीं, तीं संपलीं. ५४ नंतर योसेफाने सां-
गितल्याप्रमाणें दुकाळाचीं सात वर्षें येऊं लाग-
लीं; तेव्हां दुकाळ त्या सर्व देशांमध्यें झाला परंतु
अवघ्या मिसरदेशांत भाकर होती. ५५ मग अ-
वघ्या मिसरदेशांत दुकाळ झाल्यावर रयत फा-
रोजवळ अन्नासाठीं ओरडली, तेव्हां फारो सर्व
मिसऱ्यांस बोलला, योसेफाजवळ जा, तो तुह्मास
जें सांगेल तें तुह्मी करा. ५६ तेव्हां दुकाळ
देशाच्या सर्व पाठीवर झाल्यानंतर योसेफाने
सर्व सांठे उघडले आणि मिसऱ्यांस विकिलें;
आणि मिसरदेशांत दुकाळ भारी झाला.
५७ तेव्हां सर्व देशांचे ते मिसरांत योसेफा-
जवळ विकत घ्यायास आले, कां तर सर्व दे-
शांत दुकाळ भारी झाला.

अध्याय ४२.

नंतर याकोबाने पाहिलें कीं मिसरांत धान्य आ-
हे, तेव्हां याकोब आपल्या पुत्रांस बोलला, तु-
ह्मी परस्परांस कां पाहतां? २ मग तो बोलला,
पाहा, म्या ऐकिलें कीं मिसरांत धान्य आहे, तिकडे
उतरा आणि तेथून आह्मासाठीं विकत घ्या, ह्म-
णजे आह्मी न मरतां जगूं. ३ तसें योसेफाचे
दाहा भाऊ धान्य विकत घ्यायास मिसरांत उत-
रले. ४ परंतु योसेफाचा भाऊ बन्यामीन याला
त्याच्या भावांसंगतीं याकोबाने पाठविलें नाहीं; कां
तर त्याने ह्मटलें, कदाचित् त्याला विघ्न प्राप्त हो-
ईल. ५ तेव्हां इस्राएलाचे पुत्र विकत घ्यायास
येणाऱ्यांमध्यें आले, कां कीं खनानदेशांत दुकाळ
झाला. ६ तर त्या देशावर योसेफ अधिकारी
होता, त्याने देशांतील सर्व लोकांस विकिलें, तेव्हां
योसेफाचे भाऊ आले, आणि आपलीं तोंडें भूमी-
कडे करून त्याला नमले. ७ तेव्हां योसेफाने
आपले भाऊ पाहून त्यांस ओळखिलें, परंतु त्यांस
आपणाला अनोळखी दाखविलें, आणि त्यांसीं क-
ठोर भाषणेंकरून त्यांस ह्मटलें, तुह्मी कोठून आ-
लां? तेव्हां ते त्याला बोलले, आह्मी खाणें वि-
कत घ्यायास खनानदेशाहून आलों. ८ तेव्हां
योसेफाने आपले भाऊ ओळखिलें असतांहि
त्यांनी त्याला ओळखिलें नाहीं. ९ आणि यो-
सेफाने त्यांविषयीं जीं स्वप्नें पाहिलीं होतीं तीं
आठविलीं, आणि त्यांस ह्मटलें, तुह्मी हेर आहां,
देशाचें नागवेंपण पाहायास आलां आहां. १०
तेव्हां ते त्याला बोलले, हे माझ्या धनी, असें न-
व्हे, परंतु धान्य विकत घ्यायास तुझे चाकर आले
आहेत. ११ आह्मी सर्व एक माणसाचे पुत्र आ-
हों, आह्मी खरे आहों; तुझे चाकर आह्मी हेर
नव्हों. १२ परंतु तो त्यांस बोलला, असें नव्हे,
कां कीं देशाचें नागवेपण पाहायास तुह्मी आलां
आहां. १३ तेव्हां ते बोलले तुझे चाकर आ-
ह्मी बारा भाऊ खनानदेशांतील एक माणसाचे
पुत्र आहों; आणि पाहा धाकटा तो आज आम-
च्या बापाजवळ, आणि एक नाहींच. १४ तेव्हां
योसेफ त्यांस बोलला, जें म्या तुह्मास सांगितलें,
तें तुह्मी हेर आहां. १५ यावरून तुमची परीक्षा

होईल, जर तुमचा धाकटा भाऊ एथें येत नाहीं
तर तुह्मी एथून जाणार नाहीं, असी फारोच्या जि-
वाची शपथ मी करितों. १६ तुह्मी आपल्यांतून
एकाला पाठवा, आणि त्याने तुमचा भाऊ आणावा
परंतु तुह्मी बंद राहा; तसें तुमच्या गोष्टींची प-
रीक्षा होईल कीं तुमच्यांत सत्यता आहे किंवा
नाहीं; तसें न कराल, तर फारोच्या जिवावरून
तुह्मी हेर आहां. १७ तेव्हां त्याने त्यांस तीन
दिवसपर्यंत अटकेंत कोंडिलें. १८ मग तिसऱ्या
दिवसीं योसेफ त्यांस बोलला, हें तुह्मी करा आ-
णि जगा, कां कीं मी देवाला भितों. १९ जर तु-
ह्मी खरे तर तुमचा एक भाऊ तुमच्या बंदिशाळेंत
बंदिवान राहो, परंतु तुह्मी जा, आणि आपल्या
घरांच्या भुकेसाठीं खाणें न्या. २० मग तुमचा
धाकटा भाऊ माझ्याजवळ आणा, ह्मणजे तुमच्या
गोष्टी खऱ्या ठरतील आणि तुह्मी मरणार नाहीं;
नंतर त्यांनी त्याप्रमाणें केलें. २१ तेव्हां ते एकमेका-
सीं बोलले, हाहा आह्मी आपल्या भावाविषयीं दोषी
आहों, कां कीं आह्मी त्याच्या जिवाचें संकट पा-
हिलें, जेव्हां तो आह्माजवळ काकुळती करित हो-
ता, तेव्हां आह्मी ऐकिलें नाहीं, त्यासाठीं हें संकट
आह्मास लागलें. २२ तेव्हां रऊबेन त्यांस उत्तर
देऊन बोलला, मुलावर पाप करूं नका, असें म्या
तुह्मास सांगितलें नाहीं कीं काय? परंतु तुह्मी ऐ-
किलें नाहीं, यास्तव पाहा, त्याच्या रक्तपाताचा
झाडा घेतला जातो २३ आणि योसेफाने ऐकून
समजलें हें त्यांस ठाऊक नव्हतें, कां तर दुभाषी
त्याच्यांमध्यें होता. २४ तेव्हां तो त्यांजवळून
मुरडून रडला, मग त्यांकडे फिरला, आणि त्यांसीं
बोलला; नंतर त्याने त्यांमधून शिमोन काढिला,
आणि त्याच्या दृष्टींत त्याला बांधिलें. २५ तेव्हां
योसेफाने आज्ञा दिल्ही कीं त्यांच्या गोण्यांत धान्य
भरावें, आणि प्रत्येकाच्या गोणींत त्याचा पैका फि-
रून घालावा, आणि वाटेचा शिधा त्यांस द्यावा;
आणि चाकराने त्यांस तसें केलें. २६ नंतर ते
आपल्या गाढवांवर धान्य घालून तेथून गेले. २७
मग उतारशाळेंत एकाने आपल्या गाढवाला चै-
रण द्यायास आपली गोण सोडिली, तेव्हां त्या-
ला आपला पैका दिसला कीं पाहा, तो आपल्या
गोणीच्या तोंडांत होता. २८ तेव्हां तो आ-
पल्या भावांस बोलला, माझा पैका माघारा दिल्हा
आहे, आणि पाहा, माझ्या गोणींतच आहे; तेव्हां
त्यांचें हृदय उचकलें, आणि ते थरथरले होऊन
परस्परें बोलले, देवाने आह्मास हें काय केलें?
२९ नंतर ते खनानदेशांत आपला बाप याकोब
याजवळ पोहंचले, आणि आपणांस जें लागलें, तें स-
र्व त्यांनी त्याला सांगितलें कीं, ३० त्या देशाचा
जो धनी तो माणूस आह्मासीं कठोर बोलला, आ-
णि देशाचे हेर असें त्याने आह्मास ठरविलें. ३१
परंतु आह्मी त्याला बोललों, आह्मी खरे आहों,
आह्मी हेर नव्हों. ३२ आह्मी आपल्या बापाचे
पुत्र बारा भाऊ आहों; एक तो नाहीं, आणि धा-
कटा तो आज आमच्या बापाजवळ खनानदेशांत
आहे. ३३ तेव्हां जो त्या देशचा धनी, त्या मा-
णसाने आह्मास ह्मटलें, यावरून मी जाणेन कीं
तुह्मी खरे आहां, तुह्मी आपला एक भाऊ मजपा-
सीं ठेवावा, आणि तुह्मी आपल्या घरांच्या भुकेसा-
ठीं धान्य घेऊन जा. ३४ आणि तुमचा धाकटा
भाऊ माझ्याजवळ आणा, मग तुह्मी हेर नव्हां,
परंतु तुह्मी खरे आहां, असें मी जाणेन; तुमचा
भाऊ तुह्मास देईन, आणि तुह्मी या देशांत व्या-
पार करावा. ३५ तेव्हां ते आपल्या गोण्या रिकाम्या
करीत असतां असें झालें कीं पाहा, प्रत्येकाच्या
पैक्याची गांठोडी आपल्या गोणींत आहे, तेव्हां ते
आणि त्यांचा बाप त्यांच्या पैक्यांच्या गांठोड्या पा-
हून भ्याले. ३६ तेव्हां त्यांचा बाप याकोब त्यांस
बोलला, तुह्मी मला पुत्रहीन करीत आहां; योसेफ
तो नाहीं, आणि शिमोन तो नाहीं, बन्यामीना-
लाहि तुह्मी घ्याल, हीं अवघीं मला प्रतिकूळ
आहेत. ३७ नंतर रऊबेन आपल्या बापाला बो-
लला कीं, जर मी त्याला तुझ्याजवळ न आणीन
तर त्वां माझे दोन पुत्र मारावे, त्याला माझ्या
हातांत दे, ह्मणजे मी त्याला माघारें तुझ्याजवळ
आणीन. ३८ परंतु तो बोलला, माझा पुत्र तुम-
च्यासंगतीं खालीं जाणार नाहीं, कां कीं त्याचा
भाऊ मेला आणि तो एकला राहिला; आणि
ज्या वाटेने तुह्मी जातां त्यांत जर त्याला विघ्न
प्राप्त होतें, तर तुह्मी माझे पिकलेले केंस खेदाने
लोकांतरीं पाडाल.

## अध्याय ४३.

तेव्हां देशांत दुकाळ भारी झाला. २ आणि
त्यांनीं जें धान्य मिसरांतून आणिलें होतें, तें
त्यांनी खाऊन संपविलें; तेव्हां असें झालें कीं त्यां-
चा बाप त्यांस बोलला, तुह्मी परत जाऊन आह्मा-
साठीं थोडें खाणें विकत घ्या. ३ मग यहूदा त्या-
ला बोलला कीं, त्या माणसानें आह्मास खचीतच
खचीत सांगितलें कीं, तुमचा भाऊ तुमच्यासंगतीं
नसला, तर तुह्मी माझें तोंड पाहणार नाहीं. ४
जर तूं आमच्या भावाला आमच्यासंगतीं पाठविणार
आहेस, तर आह्मी उतरूं आणि तुझ्यासाठीं खाणें
विकत घेऊं. ५ परंतु जर तूं पाठविणार नाहींस, तर
आह्मी उतरणार नाहीं, कां कीं तो माणूस आह्मा-
स बोलला, तुमचा भाऊ तुह्माबरोबर नसला, तर
तुह्मी माझें तोंड पाहणार नाहीं. ६ तेव्हां इस्रा-
एल बोलला, तुमचा अणखी भाऊ आहे, हें त्या
माणसाला सांगावें, असें माझें वाईट तुह्मी कां
केलें? ७ तेव्हां ते बोलले, त्या माणसानें आह्मा-
विषयीं आणि आमच्या नात्याविषयीं चौकसीनें
विचारिलें कीं तुमचा बाप अजून जिवंत आहे
कीं काय? तुमचा दुसरा भाऊ आहे कीं काय?
आणि त्या गोष्टींच्या अर्थाप्रमाणें आह्मी त्याला
सांगितलें; तुह्मी आपला भाऊ खालीं आणा,
असें तो सांगेल, हें आमच्यानें जाणवलेंच कीं
काय? ८ नंतर यहूदा आपला बाप इस्राएल या-
ला बोलला, माझ्यासंगतीं मूल पाठीव, मग आह्मी
उठून जाऊं, ह्मणजे आह्मी न मरतां जगूं, आह्मी
आणि तूं आणि आमचीं बाळकेंहि. ९ मी त्या-
विषयीं जामीन होईन, त्वां त्याला माझ्या हाता-
पासीं शोधावें; जर मी त्याला तुझ्याजवळ न आ-
णितों आणि तुझ्यासमोर न ठेवितों, तर मी सर्वदा
तुझा अपराधी होईन. १० कां कीं जर आह्मी
विलंब केला नसता, तर निश्चयें आतां दुसरी खेप
करून परत आलों असतों. ११ तेव्हां त्यांचा
बाप इस्राएल त्यांस बोलला, जर सध्यां असें आ-
हे तर तुह्मी हें करा; या देशांतील निवडक पदार्थ
तुमच्या गोण्यांत घेऊन त्या माणसासाठीं भेट
खालीं न्या, थोडा डीक व थोडी मध, सुगंधद्रव्यें
व बोळ, पिस्ते व बदाम, हीं न्या. १२ आणि
दुप्पट पैका आपल्या हातांत घ्या, आणि तुमच्या
गोण्यांच्या तोंडांत जो पैका मागें आणिला गेला
तो तुह्मी आपल्या हातांत परत न्या; कदाचित् ती
चूक होती. १३ आणि तुमचा भाऊ घ्या, मग
उठून त्या माणसाजवळ परत जा. १४ आणि
सर्वसमर्थ देवानें त्या माणसाच्या दर्शनीं तुह्मास
दया देऊन तुह्मासुद्धां तुमचा दुसरा भाऊ, आणि
बन्यामीन माघारें पाठवावा, आणि जर मी पुत्रहीन
होतों तर पुत्रहीन होतों. १५ नंतर त्या माण-
सानीं अशी भेट घेतली, आणि आपल्या हातांत
दुप्पट पैका आणि बन्यामीनहि घेतला, मग ते उ-
ठून मिसरांत उतरले आणि योसेफासमोर उभे
राहिले. १६ तेव्हां योसेफानें त्यांच्यासंगतीं ब-
न्यामीनाला पाहून आपल्या घरच्या कारभाऱ्याला
सांगितलें कीं, या माणसांस घरीं ने, आणि खाटी-
कपणा करून सिद्ध कर, कां कीं हीं माणसें दुपारीं
माझ्यासंगतीं जेवतील. १७ तेव्हां जसें योसेफानें
सांगितलें तसें त्या माणसानें केलें, ह्मणजे त्या मा-
णसानें त्या माणसांस योसेफाच्या घरीं नेलें. १८
तेव्हां तीं माणसें आपण योसेफाच्या घरीं आणि-
ल्यावरून भ्यालीं, आणि बोललीं, जो पैका पहि-
ल्यानें आमच्या गोण्यांत परत दिल्हा, त्या कार-
णावरून त्यानें आह्मावर निमित्त ठेवायास आणि
आह्मावर पडायास आणि आह्मास आमच्या गा-
ढवांसुद्धां चाकरांसाठीं धरायास आह्मी आतां आ-
णिले गेलों. १९ तेव्हां ते योसेफाच्या घरावरच्या
माणसाजवळ आले, आणि त्यापासीं घरच्या दर-
वाज्याजवळ बोलतां ह्मणाले, २० हे माझ्या
धनी, माझें ऐकावें, आह्मी खाणें विकत घ्यायास
पूर्वी खालीं आलों, हें खरें. २१ आणि जेव्हां
आह्मी उतारशाळेस पोहंचलों, तेव्हां असें झालें
कीं आह्मी आपल्या गोण्या सोडिल्या, आणि पाहा
प्रत्येकाचा पैका त्याच्या गोणींच्या तोंडांत, आमचा
पैका यथावजनी होता, यास्तव आह्मी आपल्या
हातीं तो परत आणिला आहे. २२ आणि खाणें
विकत घ्यायास आपल्या हातीं दुसरा पैका खालीं
आणिला आहे; आमचा पैका आमच्या गोण्यांत
कोणी घातला, हें आह्मी जाणत नाहीं. २३ ते-
व्हां तो बोलला, तुह्मी सुखरूप असा, भिऊं न-
का, तुमचा देव ह्मणजे तुमच्या बापाचा देव, यानें

तुमच्या गोण्यांत तुह्मास धन दिल्हें, तुमचा पैका
मला पोहंचला; मग त्याने शिमोन काढून त्यांच्या
जवळ आणिला. २४ नंतर त्या माणसाने त्या
माणसांस योसेफाच्या घरांत आणिलें, मग पाणी
दिल्हें, आणि त्यानी आपले पाय धुतले, आणि
त्याने त्यांच्या गाढवांस वैरण दिल्ही. २५ तेव्हां
योसेफ दुपारीं येई त्या वेळेसाठीं त्यानी भेट सि-
द्ध केली; कां कीं आपण एथें अन्न खाणार असें
त्यानी ऐकिलें होतें. २६ मग योसेफ घरीं आ-
ला आणि ते आपल्या हातीं जी भेट ती घरांत
त्याजवळ आणून भूमीकडे त्याला नमले. २७ ते-
व्हां त्याने त्यांस कुशलतेविषयीं विचारितां ह्मटलें,
तुमचा ह्मातारा बाप, ज्याविषयीं तुह्मी बोललां
तो सुखरूप आहे कीं काय? अझून जिवंत आहे
कीं काय? २८ आणि ते बोलले, तुझा चाकर
आमचा बाप तो कुशल आहे, अझून जिवंत आहे;
तेव्हां ते लवून नमले. २९ नंतर त्याने आपले
डोळे वर करून आपला भाऊ बन्यामीन आपल्या
आईचा पुत्र याला पाहिलें, आणि ह्मटलें, तुमचा
धाकटा भाऊ ज्याविषयीं तुह्मी मला सांगितलें, तो
हाच कीं काय? अणखी त्याने ह्मटलें, हे माझ्या
पुत्रा, देव तुजवर कृपा करो. ३० तेव्हां योसेफ
उतावळा झाला, कां कीं त्याच्या भावाविषयीं त्या-
चीं आंतडीं कळवळलीं, आणि त्याने रडायाचा
जागा शोधिला; तेव्हां तो आपल्या खोलींत गेला
आणि तेथें रडला. ३१ नंतर त्याने आपलें तोंड
धुतलें आणि बाहेर येऊन आपणाला आकळिलें,
मग अन्न वाढायास सांगितलें. ३२ नंतर त्यानी
त्याच्यासाठीं वेगळें आणि त्यांच्यासाठीं वेगळें, आ-
णि जे मिसरी त्याबरोबर जेवणारे त्यांच्यासाठीं
वेगळें मांडिलें, कां कीं इब्र्यांच्यासंगतीं मिसऱ्यां-
च्याने अन्न जेववत नाहीं, कां तर हें मिसऱ्यांसीं
मळमळी आहे. ३३ तेव्हां ते त्याच्यासमोर
वडील आपल्या वडीलपणाप्रमाणें आणि धाकटा
आपल्या धाकटेपणाप्रमाणें, असे बसले, यास्तव त्या
माणसानी एकमेकांस आश्चर्य दाखविलें. ३४
आणि त्याने आपल्यापुढून त्यांच्यासाठीं वांटे का-
ढिले, परंतु त्या सर्वांच्या वांट्यांपेक्षां बन्यामी-
नाचा वांटा पांचपट मोठा होता; तसें ते त्यांच्या-
संगतीं पिऊन तृप्त झाले.

## अध्याय ४४.

नंतर त्याने आपल्या घरच्या कारभाऱ्याला आज्ञा
दिल्ही कीं, हीं माणसें वाहूं शकतील इतकें
खाणें तूं त्यांच्या गोण्यांत भर, आणि एकएकाचा
पैका त्याच्या गोणीच्या तोंडांत घाल. २ आणि
माझा गडवा ह्मणजे तो रुप्याचा गडवा, धाकट्या-
च्या गोणींच्या तोंडांत त्याच्या धान्य पैक्यासुद्धां
घाल; तर योसेफ जी गोष्ट बोलला, तिजप्रमाणें
त्याने केलें. ३ मग सकाळ उजाडली तेव्हां तीं
माणसें आपल्या गाढवांसुद्धां रवाना झालीं. ४ ते
नगरांतून निघून दूर गेले नव्हते, तेव्हां योसेफ आ-
पल्या घरच्या कारभाऱ्याला बोलला, तूं ऊठ, त्या
माणसांच्या पाठीस लाग, आणि त्यांस आटोपल्या-
वर त्यांस असें ह्मण, तुह्मी बऱ्याच्या ठिकाणीं
वाईट कां केलें? ५ ज्यांतून माझा धनी पितो,
आणि ज्यावर तो निरखूनच पाहतो, हें तेंच कीं
नव्हें? जें तुह्मी केलें तें हें वाईट केलें. ६
नंतर त्याने त्यांस आटोपिलें आणि त्यांस त्याच
गोष्टी सांगितल्या. ७ तेव्हां ते त्याला बोलले,
माझा धनी अशा गोष्टी कां ह्मणतो? ह्या गोष्टीप्र-
माणें करणें हें तुझ्या चाकरांस वाईटच आहे. ८
पाहा, जो पैका आह्मी आपल्या गोण्यांच्या तोंडीं
पावलों, तो आह्मी खनानदेशाहून तुझ्याजवळ परत
आणिला; तर तुझ्या धन्याच्या घरांतून रुपें अथवा
सोनें आह्मी कसें चोरूं? ९ तुझ्या चाकरांतील
ज्याजवळ तें मिळेल तो मरो, आणि आह्मीहि
आपल्या धन्याचे चाकर असे होऊं. १० नंतर
तो बोलला, बरें, आतां तुमच्या गोष्टींप्रमाणें असें
होवो कीं ज्याच्याजवळ तें मिळेल तो माझा चाकर
होवो, परंतु तुह्मी निर्दोषी असा. ११ तेव्हां
त्यानी आपली आपली गोण भूमीवर लवकर उत-
रिली, आणि एकएकाने आपापली गोण सोडिली.
१२ मग तो वडिलापासून शोधूं लागला आणि
धाकट्यापर्यंत आला, तेव्हां बन्यामीनाच्या गोणींत
गडवा सांपडला. १३ मग त्यानी आपलीं वस्त्रें
फाडिलीं, नंतर ते आपला आपला गाढव लादून
माघारें नगरांत गेले. १४ तसें यहूदा आपल्या
भावांसुद्धां योसेफाच्या घरीं आला, कां कीं तोंपर्यंत
तो तेथें होता, मग ते त्यासमोर भूमीवर पडले

१५ तेव्हां योसेफ त्यांस बोलला, तुह्मी जें काम
केलें तें काय? माझ्यासारिखा जो माणूस तो नि-
रखूनच पाहील, हें तुह्मास कळलें नव्हतें काय?
१६ तेव्हां यहूदा बोलला, माझ्या धन्याला आ-
ह्मी काय सांगूं? आह्मी कसें बोलूं आणि आप-
ल्यांस निर्दोषी कसें करूं? तुझ्या चाकरांचें पाप
देवाला सांपडलें आहे; पाहा, आह्मी आपल्या
धन्याचे चाकर आहों, आणि ज्याच्या हातांत गड-
वा सांपडला तोहि आहे. १७ तेव्हां तो बोल-
ला, तसें करणें तें मला वाईटच आहे; ज्या मा-
णसाच्या हातांत गडवा सांपडला तोच माझा चा-
कर होवो, परंतु तुह्मी आपल्या बापाजवळ सुख-
रूप जा. १८ तेव्हां यहूदा त्याच्याजवळ आला
आणि बोलला, हे माझ्या धनी, कृपा करून तूं
आपल्या चाकराला त्याच्या धन्याच्या कानांत एक
गोष्ट बोलूं दे, आणि आपल्या चाकरावर आपला
राग न पेटो, कां कीं जसा फारो तसाच तूं आहेस.
१९ माझ्या धन्यानें आपल्या चाकरांस असें वि-
चारिलें कीं, तुह्मास बाप किंवा भाऊ आहे कीं
काय? २० तेव्हां आह्मी आपल्या धन्याला सां-
गितलें, आह्मास ह्मातारा बाप आहे, आणि त्या-
च्या ह्मातारपणाचा धाकटा लेंक आहे, परंतु त्याचा
भाऊ मेला असतां तो आपल्या आईचा एकच
राहिलेला आहे, आणि त्याचा बाप त्याजवर प्रीति
करितो. २१ मग त्वां आपल्या चाकरांस सांगि-
तलें, म्या आपली दृष्टि त्याजवर ठेवावी ह्मणून
तुह्मी त्याला माझ्याजवळ खालीं आणा. २२
तेव्हां आह्मी आपल्या धन्याला ह्मटलें कीं, मूल
आपल्या बापाला सोडूं शकत नाहीं; जर तो आ-
पल्या बापाला सोडील, तर हा मरेल. २३ तेव्हां
त्वां आपल्या चाकरांस ह्मटलें, जर तुमचा धाकटा
भाऊ तुमच्यासंगतीं खालीं येत नाहीं, तर तुह्मी
माझें तोंड फिरून पाहणार नाहीं. २४ नंतर
तुझा चाकर माझा बाप याजवळ जेव्हां आह्मी गे-
लों, तेव्हां असें झालें कीं माझ्या धन्याच्या गोष्टी
आह्मी त्याला सांगितल्या. २५ नंतर आमचा
बाप बोलला, तुह्मी परत जाऊन आह्मासाठीं थो-
डें खाणें विकत घ्या. २६ तेव्हां आह्मी बोललों
आमच्यानें खालीं जाववत नाहीं; जर आमचा धा-
कटा भाऊ आमच्यासंगतीं असला, तर आह्मी
खालीं जाऊं; कां कीं आमचा धाकटा भाऊ आम-
च्यासंगतीं नसल्यास आमच्यानें त्या माणसाचें
तोंड पाहवत नाहीं. २७ तेव्हां तुझा चाकर माझा
बाप आह्मास बोलला, तुह्मी जाणतां कीं माझी
बायको माझे दोन पुत्र प्रसवली. २८ तर एक
मजपासून गेला आणि म्या ह्मटलें, निश्चयें तो फाड-
लाच फाडला गेला आहे, आणि आतांपर्यंत म्या त्या-
ला पाहिलें नाहीं. २९ आतां तुह्मी यालाहि माझ्या-
पासून घ्याल आणि याला विघ्न प्राप्त होईल, तेव्हां
तुह्मी माझे पिकलेले केंस खेदानें लोकांतरीं पाडाल.
३० तर आतां तुझा चाकर माझा बाप याजवळ
जेव्हां मी पोहंचेन, तेव्हां तो मूल आमच्यासंगतीं
नसतां आणि याच्या प्राणाशीं त्याचा प्राण बांध-
ला असतां, ३१ तेव्हां तो पाहील कीं मूल
नाहीं, तेव्हां असें होईल कीं तो मरेल; तसें तुझा
चाकर आमचा बाप याच्या पिकलेल्या केंसांस तु-
झे चाकर खेदानें लोकांतरीं पाडितील. ३२ आ-
णखी माझ्या बापाजवळ तुझा चाकर मी या मुला-
चा जामीन होऊन बोललों, जर मी त्याला तुझ्या-
जवळ न आणीन तर माझ्या बापाजवळ सर्वदा
अपराधी होईन. ३३ यास्तव आतां कृपा करून
या मुलाच्या ठिकाणीं आपल्या चाकराला मा-
झ्या धन्याजवळ दास राहूं दे, आणि मुलाला
आपल्या भावांच्यासंगतीं जाऊं दे. ३४ कां कीं
हा मूल माझ्याजवळ नसला, तर मी आपल्या
बापाजवळ कसा जाईन? गेलों तर जें वाईट मा-
झ्या बापाला लागेल तें पाहीन.

## अध्याय ४५.

तेव्हां योसेफाच्यानें आपल्याजवळील सर्व उभे
राहणारे यांच्यापुढें आपणाला आकळवत न-
व्हतें, यास्तव तो मोठ्यानें बोलला, माझ्याजवळून
प्रत्येक माणसाला बाहेर काढा; नंतर योसेफ आ-
पल्या भावांस आपली ओळख देत असतां त्या-
जवळ कोणी उभा राहिला नाहीं. २ तेव्हां त्यानें
आपला शब्द रडतांना काढिला, आणि मिसऱ्यांनी
ऐकिला, व फारोच्या घरचे यांनी ऐकिला. ३
तेव्हां योसेफ आपल्या भावांस बोलला, मी योसेफ,
माझा बाप अझून जिवंत आहे कीं काय? परंतु
त्याचे भाऊ त्याला उत्तर करायास शकत नव्हते,
कां तर त्यासमोर ते घाबरे झाले. ४ मग यो-

सेफ आपल्या भावांस बोलला, तुह्मी आतां माझ्या-
जवळ या, नंतर ते जवळ आले; तेव्हां तो बोल-
ला, मी योसेफ तुमचा भाऊ, ज्याला तुह्मी मिस-
रांत विकत दिल्हें, तो मी आहें. ५ तर तुह्मी
मला इकडे विकत दिल्हें, यावरून आतां खिन्न
होऊं नका, आणि तुमच्या मनांत त्रास येऊं नये,
कारण कीं जीव राखायासाठीं देवाने मला तुमच्या-
पुढें पाठविलें होतें. ६ कां तर हीं दोन वर्षे दे-
शांत दुकाळ झाला, आणि यापुढें पांच वर्षे ज्यांत
नांगरणी व कापणी होणार नाहीं असीं आहेत. ७
तर तुमचें शेष पृथ्वीमध्यें ठेवायास आणि मोठ्या
तारणेंकरून तुह्मास वांचवायास देवाने मला तु-
मच्यापुढें पाठविलें. ८ तर आतां तुह्मी नव्हे
परंतु देवाने मला एथें पाठविलें, आणि त्याने मला
फारोचा बाप असा आणि त्याच्या अवघ्या घराचा
धनी असा, आणि अवघ्या मिसरदेशाचा अधि-
कारी केला आहे. ९ तुह्मी उतावळी करून
माझ्या बापाजवळ जा, आणि त्याला सांगा कीं, तु-
झा पुत्र योसेफ असें ह्मणतो, देवाने मला अवघ्या
मिसरदेशाचा धनी असा केला आहे, तूं माझ्या-
जवळ खालीं ये, उशीर करूं नको. १० मग
त्वां गोशेन प्रांतामध्यें राहावें, आणि माझ्याजवळ
असावें, ह्मणजे त्वां व तुझे पुत्र, व तुझ्या पुत्रांचे
पुत्र, आणि तुझीं शेरडें, व तुझीं गुरें, आणि सर्व जें
तुझें आहे, त्यांसुद्धां यावें. ११ आणि मी तुझा
प्रतिपाळ तेथें करीन, कां कीं दुकाळाचीं अणखी
पांच वर्षे आहेत; तसें न केल्यास, तूं, तुझें घर
आणि अवघें जें तुझें त्यांसुद्धां दरिद्री होसील.
१२ आणि पाहा, तुमचे डोळे आणि माझा भाऊ
बन्यामीन याचे डोळे असें पाहत आहेत कीं माझें
तोंड तुह्मास बोलत आहे. १३ आणि मिसरांत
माझें अवघें गौरव आणि सर्व जें तुह्मी पाहिलें आ-
हे तें तुह्मी माझ्या बापाला सांगा, आणि उतावळी
करून माझ्या बापाला एथें खालीं आणा. १४
तेव्हां तो आपला भाऊ बन्यामीन याच्या मानेवर
पडून रडला, आणि त्याच्या मानेवर बन्यामीन
रडला. १५ आणि तो आपल्या सर्व भावांचें
चुंबन घेऊन त्यांवर रडला, आणि त्यानंतर त्याचे
भाऊ त्यासीं बोलले.

१६ तेव्हां फारोच्या घरीं ही गोष्ट ऐकिली
गेली कीं योसेफाचे भाऊ आले आहेत, आणि हें
फारोच्या दृष्टींत व त्याच्या चाकरांच्या दृष्टींत
बरें वाटलें. १७ तेव्हां फारो योसेफाला बोलला,
तूं आपल्या भावांस सांग कीं, तुह्मी हें करा, आप-
ल्या गाढवांस लादा, आणि निघून खनानदेशास
जा. १८ मग तुमच्या बापाला आणि तुमच्या
कुटुंबांस घेऊन माझ्याजवळ या, नंतर मिसर-
देशांतील जें उत्तम तें मी तुह्मास देईन, आणि
तुह्मी या देशाचें उत्तम खा. १९ तर तुह्माला
आज्ञा आहे हें तुह्मी करा, तुमच्या लेंकरांसाठीं
आणि तुमच्या बायकांसाठीं मिसरदेशांतून गाड्या
आपल्यासंगतीं घ्या, आणि तुह्मी आपल्या बापाला
घेऊन या. २० आणि आपल्या दृष्टीने आपल्या
वस्तूंवर ममता ठेवूं नका, कां तर अवघ्या मिसर-
देशांतील जें उत्तम तें तुमचें आहे. २१ तेव्हां
इस्राएलाच्या पुत्रानी तसें केलें, कां कीं योसेफाने
फारोच्या आज्ञेप्रमाणें त्यांस गाड्या दिल्ह्या, आणि
वाटेसाठीं शिधा त्यांस दिल्हा. २२ त्यांतील
प्रत्येकाला वस्त्रांचे पोशाक दिल्हे, परंतु बन्यामी-
नाला रुप्याच्या तीनशें मुद्रा आणि वस्त्रांचे पांच
पोशाक दिल्हे. २३ अणखी आपल्या बापासाठीं
मिसरांतील जें उत्तम तें वाहतां दाहा गाढव व
धान्य व भाकरी व आपल्या बापासाठीं वाटेवरचा
भक्ष हीं वाहतां दाहा गाढवी, या प्रकारें पाठविलें.
२४ नंतर त्याने आपल्या भावांस निरोप केला
आणि ते गेले, तेव्हां तो त्यांस बोलला, तुह्मी वा-
टेवर चेष्टा करूं नका. २५ मग ते मिसरांतून
वर जाऊन खनानदेशांत आपला बाप याकोब या-
जवळ आले. २६ आणि त्यानी त्याला सांगि-
तलें कीं, योसेफ अझून जिवंत आहे, अणखी तो
सर्व मिसरदेशावर अधिकार करीत आहे; तेव्हां
याकोबाचें मन निचेतन झालें, कां तर तो त्यांस
विश्वासला नाहीं. २७ नंतर योसेफाने ज्या सर्व
गोष्टी त्यांस ह्मटल्या होत्या त्या त्यानी त्याला
सांगितल्या, आणि त्याला आणायासाठीं ज्या गा-
ड्या योसेफाने पाठविल्या त्यांस त्याने पाहिलें, नं-
तर त्यांचा बाप याकोब याचें मन जिवंट झालें.
२८ तेव्हां इस्राएल बोलला, पुरें, माझा पुत्र यो-
सेफ अझून जिवंत आहे, माझ्या मरणापूर्वी मी जा-
ऊन त्याला पाहीन.

## अध्याय ४६.

नंतर इस्राएल आपल्या अवघ्यासुद्धां निघाला
आणि बैरशेब्यास आला, तेव्हां त्याने आपला
बाप इझाक याच्या देवाला यज्ञ केला. २ आणि
देव इस्राएलासीं रात्रींतील दृष्टांतामध्यें बोलून
ह्मणाला, हे याकोबा, याकोबा, तेव्हां हा बोलला,
मी एथें आहें. ३ मग तो बोलला, मी देव,
तुझ्या बापाचा देव आहें; मिसरांत उतरण्या-
विषयीं तूं भिऊं नको, कां तर मी तुला तेथें मोठें
राष्ट्र असें करीन. ४ मी तुझ्यासंगतीं मिसरांत
उतरेन, आणि मी तुला माघारें वरहि आणीनच
आणीन, आणि योसेफ आपला हात तुझ्या डोळ्यां-
वर ठेवील. ५ तेव्हां याकोब बैरशेब्याहून उ-
ठला, आणि त्याला आणायासाठीं ज्या गाड्या फा-
रोने पाठविल्या होत्या, त्यांवर इस्राएलाच्या पुत्रा-
नीं आपला बाप याकोब आणि आपलीं लेंकरें आ-
णि आपल्या बायका यांस नेलें. ६ आणि त्यानी
आपलीं ढोरें व आपली संपत्ति जी खनानदेशांत
मिळविली होती ती त्यानी घेतली; तसें याकोब
आणि आपल्यासुद्धां आपलें सर्व संतान मिसरांत
आलीं. ७ त्याने आपल्यासुद्धां आपल्या पुत्रांस
व आपल्या पुत्रांच्या पुत्रांस आणि आपल्या कन्यांस
व आपल्या पुत्रांच्या कन्यांस, ह्मणजे आपल्या सं-
तानाला आपल्यासंगतीं मिसरांत आणिलें.

८ तर इस्राएलाचे वंशस्थ जे मिसरांत गेले त्यांचीं
हीं नावें; याकोब व त्याचे पुत्र, याकोबाचा वडील
पुत्र रऊबेन. ९ आणि रऊबेनाचे पुत्र, हनोख
व फालू व हेज्रोन व खार्मी. १० आणि
शिमोनाचे पुत्र, यमुवेल व यामीन व ओहाद व
याखीन व जोहार व खनानिणीचा पुत्र शाऊल.
११ आणि लेवीचे पुत्र, गेर्षोन, कहाथ व मरारी.
१२ आणि यहूदाचे पुत्र, एर व ओनान व शेला
व फारेज व जेराह, परंतु एर व ओनान ख-
नानदेशांत मेले, आणि फारेजाचे पुत्र, हेज्रोन व
हामुल होते. १३ आणि इस्साखाराचे पुत्र, तो-
ला व पुवा व योब व शिम्रोन. १४ आणि
जबुलूनाचे पुत्र, सेरेद व एलोन व याहलेल.
१५ हे लेआचें संतान जीस तिने याकोबाकडून
पादानअरामांत जन्म दिल्हें, आणि तिची कन्या
दीना इत्यादि; त्याचें पुत्रसंतान व त्याचें कन्या-
संतान सर्व तेहेतीस प्राणी. १६ आणि गादाचे
पुत्र, झिफयोन व हाग्गि, शुनी व एबबोन, एरी
व अरोदी व आरेली. १७ आणि आशेराचें सं-
तान इम्ना व इश्वा व इश्वी व बरिया, आणि त्यां-
ची बहीण सेराह; आणि बरियाचे पुत्र, हेबेर व
मालकीयल. १८ हे, लाबानाने आपली कन्या
ल्या इला जी झिल्पा दिल्ही तिचें संतान; तसें
या सोळा प्राण्यांस तिने याकोबाकडून जन्म दिल्हें.
१९ याकोबाची बायको राहेल इचे पुत्र, योसेफ
व बन्यामीन. २० आणि योसेफापासून मनाश्शे
व एफ्राइम मिसरदेशांत जन्मले, यांस ओनाचा
याजक पोटीफेरा याची कन्या आसनाथ त्यापा-
सून प्रसवली. २१ आणि बन्यामीनाचे पुत्र, बेला
व बेखेर व आश्बेल, गेरा व नामान, एहा व रोष
मुप्पीम व हुप्पीम व आर्द. २२ हें राहेलीचें जें
संतान याकोबासीं झालें, ते सर्व चवदा प्राणी. २३
आणि दानाचें संतान हुशीम; २४ आणि नाफ्ता-
ल्याचे पुत्र, याहजेल व गूनी व येजेर व शिलेम.
२५ हे लाबानाने आपली कन्या राहेल इला जी
बिल्हा दिल्ही, तिचें संतान आणि यांस तिने
याकोबाकडून जन्म दिल्हें; अवघे प्राणी सात.
२६ याकोबाच्या पुत्रांच्या बायकांखेरीज त्याच्या
कमरेपासून निघालेले, जे अवघे प्राणी याकोबा-
संगतीं मिसरांत गेले, ते सर्व सासष्ट प्राणी होते.
२७ आणि योसेफाचे पुत्र जे त्यापासून मिसरांत
जन्मले ते दोन प्राणी याकोबाच्या घरचे सगळे
प्राणी जे मिसरांत गेले ते सत्तर.

२८ तेव्हां त्याने आपल्यापुढें यहूदाला योसे-
फाजवळ यासाठीं पाठविलें कीं त्याने त्याचें तोंड
गोशेनास लावावें; तसें ते गोशेन प्रांतांत आले.
२९ तेव्हां योसेफ आपला रथ जुंपून आपला बाप
इस्राएल याला भेटायासाठीं गोशेनाजवळ गेला,
आणि त्याला पाहून त्याच्या मानेवर पडला, आ-
णि फार वेळ त्याच्या मानेवर रडला. ३० तेव्हां
इस्राएल योसेफाला बोलला, म्या तुझें तोंड पाहि-
ल्यानंतर आतां मरावें, कां कीं तूं अझून जिवंत
आहेस. ३१ मग योसेफ आपल्या भावांस आ-
णि आपल्या बापाच्या घरच्यांस बोलला, मी ज-
ऊन फारोला बोलतों त्याला सांगेन कीं, माझे

भाऊ व माझ्या बापाच्या घरचे जे खनानदेशांत
होते ते माझ्याजवळ आले. ३२ आणि तीं मा-
णसें शेरडांचे चारणारे आहेत, का कीं ते ढोरांचे
वहिवाटी असत आले ; आणि त्यानी आपली शे-
रडें आणि आपलीं गुरें आणि आपलें जें अवघें तें
आणिलें आहे. ३३ आणि जेव्हां फारो तुह्मास
बोलावील आणि ह्मणेल, तुमचा उद्योग काय आ-
हे? ३४ तेव्हां असें होवो कीं तुह्मी ह्मणा, तुझे
चाकर आह्मी आपल्या बाळपणापासून आतांपा-
वेतों ढोरांचे वहिवाटक असत आलों, आमचे
वडीलहि तसेच; ह्मणजे तुह्मी गोशेन प्रांतांत रा-
हाल, कां तर शेरडांचा प्रत्येक चारणारा मि-
सऱ्यांसीं ओंगळ आहे.

## अध्याय ४७.

तेव्हां योसेफाने येऊन फारोला असें सांगित-
लें कीं माझा बाप व माझे भाऊ त्यांचीं शेरडें
आणि त्यांचीं गुरें आणि त्यांचें जें अवघें त्यासुद्धां
खनानदेशापासून आले, आणि पाहा, ते गोशेन
प्रांतांत आहेत. २ मग त्याने आपल्या भावांमधून
कित्येक ह्मणजे पांच माणसें यांस घेऊन फारोपुढें
सादर ठेविलें. ३ तेव्हां फारो त्याच्या भावांस
बोलला, तुमचे उद्योग काय आहेत? आणि ते
फारोला बोलले, तुझे चाकर आह्मी शेरडांचे
चारणारे आहों, आमचे वडीलहि तसेच. ४ अ-
णखीं ते फारोला बोलले, देशांत प्रवास करायास
आह्मी आलों आहों, यास्तव कीं तुझ्या चाकरांच्या
शेरड्यांसाठीं चारा नाहीं, कां तर खनानदेशांत
दुकाळ भारी आहे; यास्तव आतां कृपा करून त्वां
आपल्या चाकरांस गोशेन प्रांतांत राहूं द्यावें. ५
तेव्हां फारो योसेफाला बोलला कीं, तुझा बाप
व तुझे भाऊ तुझ्याजवळ आले आहेत. ६ मि-
सरदेश हा तुझ्यासमोर आहे, तुझा बाप व तुझे
भाऊ यांस या देशांतील उत्तम भागीं राहूं दे, त्या-
नी गोशेन प्रांतांत राहावें, आणि त्यांमध्यें कोणी स-
त्ववान् माणूस आहेत ह्मणून जर तूं जाणतोस, तर
त्यांस माझ्या ढोरांवर अधिकारी ठेव. ७ नं-
तर योसेफाने आपला बाप याकोब याला आणून
फारोपुढें उभें केलें; तेव्हां याकोबाने फारोला
आशीर्वाद दिल्हा. ८ मग फारो याकोबाला
बोलला, तुझें वय किती वर्षांचें झालें? ९ तेव्हा
याकोब फारोला बोलला, माझ्या प्रवासांतील दि-
वसांची संख्या एकशें तीस वर्षे झालीं; माझ्या आ-
युष्यांतील वर्षांचे दिवस थोडके व वाईट होत
झाले, आणि माझ्या पितरांच्या प्रवासामध्यें त्यांच्या
आयुष्यांतील सर्वांच्या दिवसाइतके झाले नाहींत.
१० तेव्हां याकोबाने फारोला आशीर्वाद दिल्हा,
नंतर तो फारोपुढून निघाला. ११ मग योसे-
फाने आपला बाप आणि आपले भाऊ यांची वस्ति
करविली, आणि जसी फारोने आज्ञा दिल्ही, तसें
त्यांस मिसरदेशांत त्या देशांतील उत्तम भागीं
रामसेस प्रांतांत वतन दिल्हें. १२ आणि योसे-
फाने आपला बाप व आपले भाऊ आणि आपल्या
बापाच्या सर्व घरचे, यांस त्यांच्या कुटुंबांप्रमाणें
अन्न पुरविलें. १३ तेव्हां त्या सर्व देशांत अन्न
नव्हतें, कां तर दुकाळ फार भारी झाला, आणि
मिसरदेश व खनानदेश दुकाळाकडून कुंठीत झाले.
१४ आणि त्यानी जें धान्य विकत घेतलें त्याकरि-
तां जो सर्व पैका मिसरदेशांत व खनानदेशांत मि-
ळाला तो योसेफाने जमा केला, आणि योसेफाने
तो पैका फारोच्या घरीं आणिला. १५ तसें
मिसरदेशांतील व खनानदेशांतील पैका संपला,
तेव्हां सर्व मिसरी योसेफाजवळ येऊन बोलले,
आह्मास अन्न दे, कां कीं आह्मी तुझ्यापुढें कशा-
ला मरूं? पैका तर सरला. १६ तेव्हां योसेफ
बोलला, तुमचीं ढोरें द्या, ह्मणजे जर पैका सरला
तर तुमच्या ढोरांसाठीं मी तुह्मास देईन. १७
तेव्हां त्यानी आपलीं ढोरें योसेफाजवळ आणिलीं
आणि योसेफाने घोडे, व शेरडांचे कळप, व गुरांचे
कळप, व गाढवें, यांसाठीं त्यांस अन्न दिल्हें ; तसें
त्यांच्या अवघ्या ढोरांसाठीं त्याने त्या वर्षी अन्नाने
त्यांचें चालविलें. १८ नंतर तें वर्ष पूर्ण झाल्या-
वर दुसऱ्या वर्षांत ते त्याजवळ येऊन त्याला बो-
लले, आह्मी आपल्या धन्यापासून गुप्त करीत ना-
हीं कीं पैका निश्चयें संपला आहे, आणि आ-
मचें पशुधन आमच्या धन्याजवळ आहे ; आमचीं
शरिरें आणि आमची भूमि यांवांचून आमच्या ध-
न्यापुढें कांहीं राहिलें नाहीं. १९ तुझ्या देखत
आह्मी आणि आमची भूमीहि कां व्यर्थ जाऊं? तूं
आह्मास आमच्या भूमीसुद्धां अन्नाने विकत घे,

मग आह्मी आपल्या भूमीसुद्धां फारोचे चाकर
होऊं, आणि तूं बीज दे, ह्मणजे आह्मी न मरतां ज-
गावें आणि भूमि ओस न व्हावी. २० तसें योसे-
फाने मिसऱ्यांची अवघी भूमि फारोसाठीं विकत
घेतली, कां तर मिसऱ्यांनी आपलें आपलें भूधन
विकिलें, कारण कीं दुकाळ त्यांजवर भारी झाला;
तसें तो देश फारोचा झाला. २१ आणि मिस-
ऱ्याच्या सीमेच्या एका शेवटापासून त्याच्या दु-
सऱ्या शेवटपर्यंत त्याने लोकांस नगरांमध्यें आ-
णिलें. २२ याजकांची भूमि मात्र त्याने विकत
घेतली नाहीं, कां कीं फारोपासून याजकांस हक्क
होता, आणि त्यांचा हक्क जो फारो त्यांस देत
होता तो ते खात होते, यास्तव त्यांनी आपली
भूमि विकिली नाहीं. २३ तेव्हां योसेफ लोकांस
बोलला, पाहा म्या तुह्मास आणि तुमच्या भूमीस
फारोसाठीं आज विकत घेतलें आहे, जाणा तु-
ह्मासाठीं बीज आहे, तुह्मी भूमि पेरा. २४ आणि
उपजल्यावर असें होवो कीं तुह्मी पांचवा वांटा
फारोला द्यावा, आणि चार वांटे शेताच्या बीजा-
साठीं व तुमच्या खाण्यासाठीं व तुमच्या घरांतील
जे त्यांसाठीं व तुमच्या बाळकांच्या खाण्यासाठीं
तुमचे होतील. २५ तेव्हां ते बोलले, त्वां आ-
ह्मास वांचविलें आहे, आह्मी आपल्या धन्याच्या
विचारांत कृपा पावलों आणि आह्मी फारोचे चा-
कर होऊं. २६ तेव्हां योसेफाने मिसऱ्यांच्या
भूमीवर आजपर्यंत हा नेम बसविला कीं फारोने
पांचवें घ्यावें; केवळ याजक त्यांची भूमिमात्र
फारोची झाली नाहीं. २७ तसें इस्राएल मि-
सर देशांतील गोशेन प्रांतांत तेथें राहिला, आणि
तेथें त्यांनी धन मिळविलें, अणखी ते सफळ
होऊन फार वाढिले.
२८ आणि याकोब मिसरदेशांत सतरा वर्षें
वांचला, तसें याकोबाचे दिवस त्याच्या आयुष्यां-
तील वर्षें एकशें सत्तेचाळीस इतकीं वर्षें झालीं.
२९ आणि इस्राएलाचा मरणकाळ जवळ आला,
तेव्हां त्याने आपला पुत्र योसेफ याला बोलाविलें
आणि त्याला ह्मटलें, आतां जर मी तुझ्या विचा-
रांत कृपा पावलों तर तूं कृपा करून आपला हात
माझ्या मांडीखालीं ठेवावा, आणि मजसीं कृपा व
सत्यता वर्त्तावी; मला मिसरांत पुरूंच नये.
३० कारण कीं म्या आपल्या पितरांजवळ नि-
जावें, ह्मणून त्वां मला मिसरांतून न्यावें आणि
त्यांच्या प्रेतस्थानांत मला पुरावें; तेव्हां तो बोलला,
तुझ्या सांगण्याप्रमाणें मी करीन. ३१ मग हा
बोलला माझ्याजवळ शपथ कर, तेव्हां त्याने
त्याच्याजवळ शपथ वाहिली; नंतर इस्राएल पलं-
गाच्या मस्तकावर नमला.

## अध्याय ४८.

तर त्या गोष्टींनंतर असें झालें कीं कोणी योसे-
फाला सांगितलें, पाहा, तुझा बाप दुखणाईत
आहे; तेव्हां तो आपले दोन पुत्र मनाश्शे व
एफ्राइम यांस आपल्यासंगतीं घेऊन गेला. २
आणि कोणी याकोबाला कळवीत ह्मटलें, पाहा,
तुझा पुत्र योसेफ तुझ्याजवळ आला; तेव्हां इ-
स्राएल धीर धरून पलंगावर बसला. ३ नंतर
याकोब योसेफाला बोलला, खनानदेशांतील लूज
तेथें सर्वसमर्थ देवाने मला दर्शन देऊन आशी-
र्वाद दिल्हा. ४ तेव्हां त्याने मला ह्मटलें, पाहा,
मी तुला सफळ करून तुला असें वाढवीन कीं
तुला राष्ट्रांचा समुदाय असा करीन, आणि तुझ्या-
नंतर तुझ्या संतानाला या देशाचें सर्वकाळ वतन
देईन. ५ आणि आतां मी मिसरांत तुझ्याजवळ
आल्यापूर्वीं तुझे दोन पुत्र जे तुजपासून मिसर-
देशांत जन्मले, एफ्राइम व मनाश्शे ते माझे,
रऊबेन व शिमोन यांसारिखे ते माझे होतील.
६ आणि त्यांच्यानंतर तुझे जन्मलेले वंशस्थ तुझे
होतील, आणि त्यांच्या वतनांत त्यांच्या भावांच्या
नावांवर ह्मटलें जातील. ७ मी तर जेव्हां पादा-
नाहून आलों, तेव्हां जेथून एफ्राथास जाण्याची
कोसभर वाट राहिली तेथें राहेल माझ्याजवळ
खनानदेशांत वाटेवर मेली, आणि तेथें एफ्राथ तेंच
बेथलेहेम त्याच्या वाटेवर म्या तिला पुरिलें. ८
तेव्हां इस्राएल योसेफाच्या पुत्रांस पाहून बोलला,
हे कोण? ९ नंतर योसेफ आपल्या बापाला
बोलला, माझे पुत्र जे देवाने मला एथें दिल्हे ते
हेच; तेव्हां तो बोलला, आतां त्यांस माझ्याजवळ
आण, आणि मी त्यांस आशीर्वाद देईन. १०
तेव्हां इस्राएलाची दृष्टि ह्मातारपणाने मंद झाली
होती, तो पाहायास शकत नव्हता; तेव्हां त्याने

त्यांस त्याच्याजवळ आणिलें, आणि त्याने त्यांचें
चुंबन घेतलें आणि त्यांस आलिंगन दिल्हें. ११
मग इस्राएल योसेफाला बोलला, तुझें तोंड दृ-
ष्टीस पडेल असें मला वाटलें नाहीं, परंतु पाहा,
देवाने तुझें संतानहि मला दाखविलें आहे. १२
तेव्हां योसेफाने आपल्या गुडघ्यांजवळून त्यांस का-
ढिलें आणि तोंड भूमीस लावून नमला. १३ मग
योसेफाने एफ्राइमाला आपल्या उजव्या हातांत
इस्राएलाच्या डाव्या हाताकडे, आणि आपल्या
डाव्या हातांत मनाश्श्याला इस्राएलाच्या उजव्या
हाताकडे, असें त्या दोघांस घेऊन त्याच्याजवळ
आणिलें. १४ तेव्हां इस्राएलाने आपला उजवा
हात काढून एफ्राइम हा धाकटा असतांहि याच्या
मस्तकावर ठेविला, आणि आपला डावा हात
मनाश्श्याच्या मस्तकावर ठेविला; त्याने आपल्या
हातांविषयीं ज्ञान केलें, कां तर मनाश्शे वडील हो-
ता. १५ तेव्हां त्याने योसेफाला आशीर्वाद दि-
ल्हा आणि ह्मटलें, ज्या देवासमोर माझे पितर
आब्राहाम व इझाक चालले, ज्या देवाने पूर्वी-
पासून आजपर्यंत माझें प्रतिपाळण केलें आहे;
१६ ज्या दूताने मला सगळ्या वाईटापासून खं-
डून घेतलें, तो या मुलांस आशीर्वाद देवो, आ-
णि त्यांजवर माझें नांव आणि माझे पितर आब्रा-
हाम व इझाक यांचें नांव ठेविलें जावो, आणि ते
पृथ्वीवर वाढून समुदाय असा होवोत. १७ यो-
सेफाने तर पाहिलें कीं आपल्या बापाने आपला
उजवा हात एफ्राइमाच्या मस्तकावर ठेविला, तेव्हां
तें त्याला वाईट दिसलें, आणि त्याने आपल्या बा-
पाचा हात एफ्राइमाच्या मस्तकावरून मनाश्श्या-
च्या मस्तकावर ढळवायास तो धरिला. १८ आ-
णि योसेफ आपल्या बापाला बोलला, हे माझ्या
बापा, असें नव्हे, कां तर हाच वडील याच्या म-
स्तकावर तूं आपला उजवा हात ठेव. १९ तेव्हां
त्याचा बाप नकार करून बोलला, मी जाणतों, मा-
झ्या पुत्रा मी जाणतों, तोहि एक लोक असा हो-
ईल अणखी तो मोठा होईल, परंतु त्याचा धाकटा
भाऊ त्यापेक्षां मोठा होईल खरें, आणि त्याचें सं-
तान राष्ट्रांभर होईल. २० तेव्हां त्याने त्या दिव-
सीं त्यांस असा आशीर्वाद दिल्हा कीं, तुजवरून
इस्राएल आशीर्वाद देतां ह्मणेल कीं, देव तुला
एफ्राइमासारिखा आणि मनाश्श्यासारिखा करो;
तसें त्याने एफ्राइमाला मनाश्श्यापुढें केलें. २१
नंतर इस्राएल योसेफाला बोलला, पाहा, मी म-
रतों, परंतु देव तुमचें सहाय करील, आणि तु-
ह्मास तुमच्या पितरांच्या देशास माघारें नेईल.
२२ आणि म्या तुला तुझ्या भावांपेक्षां अधिक
एक भाग दिल्हा, तो हा म्या आपली तरवार व
आपलें धनुष्य याकडून अमोऱ्यांच्या हातांतून घे-
तला होता.

## अध्याय ४९.

तेव्हां याकोबाने आपल्या पुत्रांस बोलविलें आ-
णि ह्मटलें, तुह्मी एकवट व्हा, मग जें पुढील
दिवसांमध्यें तुह्मास प्राप्त होईल तें मी तुह्मास
सांगेन. २ अहो याकोबाचे पुत्र, तुह्मी एकवट
व्हा आणि ऐका, ह्मणजे तुमचा बाप इस्राएल
याचें ऐका. ३ रऊबेन, तूं माझा प्रथम पुत्र आ-
हेस, माझें बळ, आणि माझी आदिशक्ति, अधि-
काराने श्रेष्ठ, आणि सामर्थ्यांने श्रेष्ठ; ४ तूं पा-
ण्यासारिखा चंचळ असून श्रेष्ठ होणार नाहींस,
कां कीं तूं आपल्या बापाच्या खाटेवर चढलास,
तेव्हां त्वां ती विटाळिली; तो माझ्या आंथरूणा-
वर चढला. ५ शिमोन व लेवी भाऊ आहेत,
त्यांचीं शस्त्रें बळात्काराचीं हातेरें आहेत. ६
हे माझ्या जिवा, तूं त्यांच्या जुटांत जाऊं नको,
हे माझ्या मना, तूं त्यांच्या मंडळींत मिळूं नको, कां
कीं त्याने आपल्या रागाने मनुष्याला जिवें मा-
रिलें, आणि आपल्या उन्मत्तपणाने भिंत फोडिली.
७ त्यांच्या रागावर शाप होवो, कां तर तो क्रूर;
आणि त्यांच्या क्रोधावर शाप होवो, कां तर तो
कठोर; मी याकोबांत त्यांचे विभाग करीन, आणि
इस्राएलांत त्यांस दाणादाण करीन. ८ हे य-
हूदा, तुझे भाऊ तुला स्तवितील; तुझा हात तुझ्या
शत्रूंच्या मानेवर होईल; तुझ्या बापाचे पुत्र तु-
ला नमतील. ९ यहूदा सिंहाचें पिलूं आहे;
हे माझ्या पुत्रा, तूं फाडलेल्या भक्षापासून च-
ढलास; तो लवून सिंहासारिखा व सिंहिणी-
सारिखा बसला, त्याला कोण उठवील? १० य-
हूदापासून राजछडी आणि त्याच्या पायांमधून
शक चालविणारा शिलो येई तोंपर्यंत जाणार ना-

हीं, आणि त्याजवळ राष्ट्रांचें मिळणें होईल. ११
त्याने आपल्या शिंगराला द्राक्षवेलासीं आणि आ-
पल्या गाढवीच्या पोराला खिसमीस वेलासीं बां-
धून आपलें वस्त्र द्राक्षरसांत आणि आपलें पांघ-
रूण द्राक्षाच्या रक्तांत धुतलें. १२ द्राक्षरसाने
त्याचे डोळे आरक्त आणि दुधाने त्याचे दांत पां-
ढरे आहेत. १३ जबूलुन तो समुद्राच्या तिरीं
राहील तो नौकांचें बंदर संपन्न होईल, आणि त्या-
चा विस्तार जीदोनापर्यंत होईल. १४ इस्साखार
हाडाचा गाढव दुशाख्यांत बसत आहे. १५
आणि त्याने पाहिलें कीं विसांवा चांगला आणि
देशहि आवडता, यास्तव त्याने ओझें वाहायास
आपला खांदा ओणवा केला, आणि बिगारींत चा-
कर झाला. १६ दान इस्राएलाच्या एका वंशा-
सारिखा आपल्या लोकांचा न्याय करील. १७
दान मार्गाजवळील साप होईल; वाटेजवळील
शफिफोन साप जो घोड्याचा शंभ डंशितो, मग
त्यावरील स्वार उताणा पडतो, तसा होईल. १८
हे परमेश्वरा, तुजकडील तारण याची वाट म्या
पाहिली आहे. १९ गाद यावर गोट घाला घा-
लील, परंतु शेवटीं तो घाला घालील. २० आशे-
राविषयीं असें होईल कीं यांचें अन्न पौष्टिक हो-
ईल आणि तो राजरुचिकर देईल. २१ नाफ्ताली
सुटलेला हरण, तो सुंदर वाक्यें बोलतो. २२
योसेफ सफळ फांदी आहे, झऱ्याच्या जवळील
सफळ फांदी, तिचे टाहाळे भिंतीवर गेले आहेत.
२३ आणि तिरंदाजानी त्याला त्रासिलें आणि
भांडण केलें, आणि त्याचें वैर धरिलें आहे; २४
परंतु त्याचें धनुष्य बळकटींत राहिलें, आणि त्या-
च्या हातांचे भूज याकोबाच्या बळाढ्याच्या हा-
तानी सबळ केले गेले; जेथें इस्राएलासीं मेंढपाळ
व पाषाणघर आहे तेथून. २५ ह्मणजे तुझ्या
बापाच्या देवाकडून, आणि तो तुझें सहाय क-
रील, ह्मणजे सर्वसमर्थ याच्याने, आणि तो व-
रील आकाशांतील आशीर्वादानी, आणि खालीं
राहणाऱ्या खोल स्थळांतील आशीर्वादानी, आणि
स्थनांच्या व गर्भाच्या आशीर्वादानी, तुला आशी-
र्वाद प्राप्त होईल. २६ तुझ्या बापाच्या आशी-
र्वादानीहि, हे अक्षय पर्वतांच्या आशीर्वादांवर आ-
णि सर्वकाळच्या डोंगरांच्या इष्ट वस्तुंवर समर्थ
झाले आहेत; ते योसेफाच्या मस्तकावर होय, जो
आपल्या भावांपासून वेगळा झाला त्याच्या टाळू-
वर होतील. २७ बन्यामीन लांडगा, तो फाडील;
सकाळीं तो धरलेलें खाईल, आणि संध्याकाळीं
लूट वांटील. २८ हे सर्व इस्राएलाचे बारा वंश
आहेत आणि त्यांच्या बापाने त्यांस जें ह्मटलें तें
हें; तसें त्यानें त्यांस आशीर्वाद दिल्हा, एकएकाला
आपल्या आशीर्वादाप्रमाणें त्यांस आशीर्वाद दिल्हा.
२९ नंतर त्याने त्यांसीं आज्ञा करितां त्यांस ह्मट-
लें, मी आपल्या लोकांसीं मिळतों; एफ्रोन जो हि-
त्ती याच्या भूमींत जी गुहा तिजमध्यें माझ्या पित-
रांजवळ तुह्मी मला पुरा; ३० ह्मणजे खनान-
देशांत माम्रेसमोरील माखपेला भूमि तींत जी
गुहा आब्राहामाने भूमीसुद्धां एफ्रोन जो हित्ती
त्यापासून मसणवटीच्या वतनासाठीं विकत घेतली
तींत पुरा. ३१ तेथें त्यानी आब्राहाम व त्याची
बायको सारा पुरिली, तेथें त्यानी इझाक व त्याची
बायको रिब्का पुरिली, आणि तेथें म्या ल्या पु-
रिली. ३२ त्या भूमीचा आणि तींतील गुहेचा
विकरा हेथच्या संतानापासून होता. ३३ तेव्हां
याकोब आपल्या पुत्रांस आज्ञा देण्याची समाप्ति
करून आपले पाय आंथरूणावर आखडून मेला,
आणि आपल्या लोकांसीं मिळाला.

## अध्याय ५०.

तेव्हां योसेफ आपल्या बापाच्या तोंडावर पडून
त्याजवर रडला, आणि त्याला चुंबिलें. २
मग योसेफाने आपला बाप सुगंधित करण्याची
आज्ञा आपले चाकर जे वैद्य त्यांस दिल्ही, तसें
वैद्यानी इस्राएलाला सुगंधित केलें. ३ तर त्याचे
चाळीस दिवस पूर्ण झाले, कां कीं सुगंधित केले-
ल्याचे दिवस असे पूर्ण होत होते; आणि मिस-
ऱ्यानी त्याच्यासाठीं सत्तर दिवस रुदन केलें. ४
मग त्याविषयीं रुदनाचे दिवस गेल्यावर योसेफ
फारोच्या घरच्यांस बोलला कीं, आतां जर तुम-
च्या विचारांत मी कृपा पावलों आहें, तर तुह्मी कृ-
पेने फारोच्या कानांत असें सांगा कीं, ५ माझ्या
बापाने मला शपथ घातली कीं पाहा, मी मरतों,
माझें जें प्रेतस्थान म्या आपल्यासाठीं खनानदेशांत
खणिलें आहे तेथें तूं मला पूर; यास्तव कृपा

करून मला आपला बाप पुरायास जाऊं दे, नंतर
मी परत येईन. ६ मग फारो बोलला, तूं वर
जा, आणि जसें तुझ्या बापाने तुला शपथ घातली,
तसें तूं त्याला पूर. ७ तेव्हां योसेफ आपल्या
बापाला पुरायास वर गेला, आणि फारोचे सर्व
चाकर त्याच्या घरचे पुरातन आणि मिसर देशां-
तील सर्व पुरातन त्याच्यासंगतीं वर गेले. ८
योसेफाच्या सर्व घरचेहि आणि त्याचे भाऊ व
त्याच्या बापाच्या घरचे ते गेले; त्यानी आपलीं बा-
ळकें व आपलीं शेरडें व आपलीं गुरें हीं मात्र
गोशेन प्रांतांत ठेविलीं. ९ आणि त्याच्यासंगतीं
रथाहि व स्वार वर गेले, तसें थवा फार मोठा
झाला. १० मग आटादाचें खळें जें यार्देनेच्या
पलिकडे तेथवर ते पावले, आणि तेथें त्यानी मोठा
व फार भारी विलाप केला; तसें त्याने आपल्या
बापासाठीं सात दिवस शोक केला. ११ तेव्हां
त्या देशांतील राहणारे खनानी यानी आटादाच्या
खळ्यांत तो शोक पाहिला, आणि ते बोलले, मि-
सऱ्यांचा हा भारी शोक आहे, यास्तव तेथल्याचें
नांव यार्देनेपलिकडील अबेलमिज्राइम ठेविलें गेलें.
१२ तर त्याने आपल्या पुत्रांस जसी आज्ञा दिल्ही
होती तसें त्यानी त्यासीं केलें; १३ ह्मणजे त्याच्या
पुत्रानी त्याला खनानदेशांत आणिलें, आणि मा-
म्रेसमोर जी गुहा भूमीसुद्धां आब्राहामाने मसण-
वटीच्या वतनासाठीं एफ्रोन जो हित्ती त्यापासून
विकत घेतली होती, त्या माखपेला भूमींतील गु-
हेंत त्याला पुरिलें. १४ नंतर योसेफ मिसरांत
परत गेला, तो व त्याचे भाऊ आणि त्यासहित
सर्व जे त्याच्या बापाला पुरायास वर गेले होते ते
त्याचा बाप पुरून परत गेले. १५ मग योसेफा-
च्या भावानी पाहिलें कीं आपला बाप मेला; तेव्हां
त्यानी ह्मटलें, योसेफ आमचें वैर अगत्य धरील,
आणि जें अवघें वाईट आह्मी त्यासीं केलें आहे,
तें तो आह्मासीं परत देईलच देईल. १६ या-
स्तव त्यानी कोणाला आज्ञा देऊन योसेफाला ह्म-
टलें, तुझ्या बापाने आपल्या मरणापूर्वीं आज्ञा दि-
ल्ही कीं, १७ तुह्मी योसेफाला असें सांगा कीं,
मी विनंती करितों तूं आपल्या भावांचें उल्लंघन
आणि त्यांचें पाप कृपेने क्षमा कर, कां तर त्यानी
तुझें वाईट केलें, यास्तव आतां कृपेने तुझ्या बापा-
च्या देवाचे चाकर या आमचें उल्लंघन तूं क्षमा
कर; तेव्हां योसेफ आपल्याजवळ त्यांचें बोलणें
यावरून रडला. १८ अणखी त्याचे भाऊ ये-
ऊन त्याच्यापुढें पडले, आणि बोलले, पाहा, आह्मी
तुझे चाकर आहों. १९ तेव्हां योसेफ त्यास
बोलला, तुह्मी भिऊं नका, कां तर मी देवाच्या
ठिकाणीं आहें कीं काय? २० तुह्मी तरी मज-
वर वाईट योजिलें, परंतु देवाने तें बऱ्यासाठीं यो-
जिलें, ह्मणजे तेणेंकडून जसें या दिवसीं झालेलें,
तसें करावें कीं बहुत लोकांस वांचवावें. २१ तर
आतां तुह्मी भिऊं नका, मी तुमचें व तुमच्या बा-
ळकांचें प्रतिपाळण करीन; असें त्याने त्यांचें समा-
धान केलें, आणि त्यांसीं चित्तपूर्वक बोलला. २२
तेव्हां योसेफ आपण आणि त्याच्या बापाच्या घर-
चे हे मिसरांत राहिले; आणि योसेफ एकशें दा-
हा वर्षें जगला. २३ तसें योसेफाने तिसऱ्या
पिढींतील एफ्राइमाचें संतान पाहिलें; अणखी म-
नाश्श्याचा पुत्र माखीर याचे पुत्र योसेफाच्या
मांडीवर बाळव्यवहार पावले. २४ मग योसेफ
आपल्या बंधूंस बोलला, मी मरतों, परंतु देव तु-
मच्या भेटीस येईलच येईल, आणि जो देश त्याने
आब्राहामासीं व इझाकासीं व याकोबासीं शपथेने
देऊं केला, तेथें या देशांतून तुह्मास वर नेईन.
२५ आणि योसेफाने इस्राएलाच्या संतानांला श-
पथ घालून ह्मटलें, देव तुमच्या भेटीस येईलच
येईल, तेव्हां तुह्मी माझीं हाडें एथून वर न्या.
२६ नंतर योसेफ एकशें दाहा वर्षांचा होऊन मे-
ला, आणि त्यानी त्याला सुगंधित करून पेटीमध्यें
मिसर देशांत ठेविलें.

# मोशयानें लिहिलेलें दुसरें पुस्तक;

म्हणजे

# निर्गम.

## अध्याय १.

इस्राएलाचे पुत्र जे आपापल्या कुटुंबांसुद्धां याको-
बाबरोबर मिसर देशांत गेले, त्यांचीं हीं नांवें.
२ रऊबेन, शिमोन, लेवी, व यहूदा, ३ इस्सा-
खार, जबूलुन व बन्यामीन, ४ दान व नाफ्-
ताली, गाद व आशेर. ५ आणि याकोबापासून
सर्व झालेल्या संततीचीं सत्तर मनुष्यें होतीं, यो-
सेफ तर मिसरांत होता. ६ नंतर योसेफ व
त्याचे सर्व भाऊ व ती सर्व पिढी मेली. ७
परंतु इस्राएलाचीं संतानें सफळ होऊन पुष्कळ
झालीं, आणि वाढून फार फार शक्तिमान् झालीं,
आणि तो देश त्यानीं भरला.

८ नंतर ज्याने योसेफाला जाणिलें नाहीं, अ-
सा मिसर देशाचा एक नवा राजा झाला. ९
आणि तो आपल्या लोकांला बोलला, "पाहा, इ-
स्राएलाच्या संतानांचे लोक बहुत आणि आह्मा-
पेक्षां शक्तिमान् आहेत. १० चला, आह्मी त्यां-
विषयीं चतुराईने वागूं, नाहीं तर ते वाढतील,
आणि असें होईल कीं लढाई लागल्यास ते आम-
च्या शत्रूंस मिळतील, आणि आह्मासीं लढतील,
आणि देशांतून जातील." ११ मग कठिण कामाने
त्यांस दुःख द्यावें ह्मणून त्यानी त्यांपासून बिगार
घेण्यासाठीं मुकदम ठेविले; आणि त्यानी फारो-
साठीं पिथोम व रामसेस सांठविण्याचीं नगरें बां-
धिलीं. १२ परंतु त्यानी त्यांस जसेंजसें दुःख
दिल्हें, तसेंतसें ते वाढून विस्तारिले, यास्तव इस्रा-
एलाच्या संतानांमुळें ते त्रास पावले. १३ आणि
मिसऱ्यानी इस्राएलाच्या संतानांकडून जबरीनें चा-
करी करविली. १४ आणि गाऱ्यामध्यें व विटां-
मध्यें व शेतांतील सर्व कामामध्यें अवघड चाकरी-
कडून त्यांच्या जिवांला दुःख दिल्हें; त्यांकडून जी
सर्व चाकरी करविली ती जबरीने होती. १५
तेव्हां इब्रिणींच्या सुइणी, ह्यांतील एकीचें नांव
शिफ्रा; आणि दुसरीचें नांव पुवा, ह्यांस मिस-
राच्या राजाने असें सांगितलें कीं, १६ "इब्री
बायकांस प्रसवितेवेळेस तुह्मी सुइणीचें काम क-
रितां, आणि पुत्रकन्येविषयीं पाहतां, तेव्हां जर तें
पुत्र असेल तर तुह्मी त्याला जिवें मारा, आणि
जर तें कन्या असेल तर तिने जगावें." १७ परं-
तु सुइणी देवाला भ्याल्या, यास्तव जसें मिस-
राच्या राजाने त्यांस सांगितलें होतें तसें त्यानी के-
लें नाहीं, परंतु पुत्रांस वांचविलें. १८ नंतर
मिसराच्या राजाने सुइणी बोलाविल्या आणि
त्यांस ह्मटलें, "तुह्मी ही गोष्ट कशासाठीं केली!
पुत्रांस कां वांचविलें?" १९ तेव्हां सुइणीने फा-
रोला ह्मटलें, "कारण कीं इब्रिणी मिसरिणी बाय-
कांसारिख्या नाहींत, त्या तर जिवट आहेत, त्यां-
पासीं सुइणी आल्यापूर्वींच त्या प्रसूत होतात."
२० यास्तव देवाने सुइणींचें बरें केलें, आणि
लोक वाढून फार बळावले. २१ आणि असें
झालें कीं सुइणी देवाला भ्याल्या, यावरून त्याने
त्या लोकांचीं कुटुंबें वाढविलीं. २२ तेव्हां फा-
रोने आपल्या सर्व लोकांला असी आज्ञा दिल्ही
कीं, "त्यांचा जो प्रत्येक पुरुष जन्मेल त्याला तु-
ह्मी नदींत टाका, आणि प्रत्येक कन्येला वांचवा."

## अध्याय २.

तेव्हां लेवीच्या घराण्यांतील एका माणसाने जा-
ऊन लेवीच्यांतील कन्या बायको करून घेतली.
२ आणि ती स्त्री गरोदर होऊन तिला पुत्र झाला;
तेव्हां तो उत्तम हें तिने पाहिलें, यास्तव त्याला
तीन महिन्यांपर्यंत लपविलें. ३ नंतर त्याचें ल-
पविणें तिला अणखी साधलें नाहीं, यास्तव तिने
त्याच्यासाठीं लव्हाळ्याची पेटी घेतली, आणि ति-
ला चिकोटा व राळ इहींकडून लेपिलें, आणि ति-
जमध्यें बाळक ठेवून लव्हाळ्यांत नदीच्या तिरीं
ठेविलें. ४ मग त्याला काय होईल, हें जाणा-
याकरितां त्याची बहीण दूर उभी राहिली. ५

तेव्हां फारोची कन्या स्नानाला नदीवर गेली, आ-
णि तिच्या चाकरिणी नदीच्या कडेस चालल्या;
तेव्हां तिने ती पेटी लव्हाळ्यांत पाहून आपली
दासी पाठवून घेतली. ६ नंतर उघडून त्या बा-
ळकाला पाहिलें, आणि पाहा मूल रडत आहे;
तेव्हां तिने त्याजवर ममता केली, आणि ह्मटलें,
"हें इब्र्यांच्या लेंकरांतील एक आहे." ७ मग
त्याची बहीण फारोच्या कन्येस बोलली कीं, "मी
जाऊन तुजसाठीं इब्रिणींमधून कोणीएक दाई बो-
लावूं कीं काय? ह्मणजे तिने तुजसाठीं या बाळ-
काला स्तन पाजावें." ८ तेव्हां फारोची कन्या
तिला बोलली, "जा;" नंतर त्या कुमारीने जाऊन
त्या बाळकाच्या आईला बोलाविलें. ९ तेव्हां
फारोच्या कन्येने तिला सांगितलें कीं, "तूं हें बा-
ळक नेऊन मजसाठीं याला स्तन पाज, ह्मणजे मी
तुझें वेतन देईन." तेव्हां त्या स्त्रीने त्या बाळका-
ला घेतलें आणि त्याला स्तन पाजिलें. १० मग
बाळक मोठा झाल्यावर तिने त्याला फारोच्या
कन्येजवळ आणिलें, आणि तो तिला पुत्र असा
झाला, आणि तिने त्याचें नांव मोशे ठेविलें, का-
रण तिने ह्मटलें कीं, "म्या त्याला पाण्यांतून का-
ढिलें." ११ आणि त्या दिवसांमध्यें असें झालें
कीं मोशे प्रौढ झाल्यावर आपल्या भाऊबंदांजवळ
गेला; तेव्हां त्याने त्यांवरचीं ओझीं पाहिलीं, आ-
णि आपल्या भाऊबंदांतील इब्री माणसाला मारि-
तां असा मिसरी माणूस पाहिला. १२ नंतर
त्याने इकडे तिकडे अवलोकन करून पाहिलें कीं
कोणी नाहीं, तेव्हां त्याने त्या मिसऱ्याला मारिलें
आणि त्याला वाळूमध्यें लपविलें. १३ मग दु-
सऱ्या दिवशीं तो बाहेर गेला, तेव्हां तेथें दोन
इब्री माणसें भांडण करीत होतीं, यास्तव तो त्या-
तल्या दुष्टाला बोलला, "तूं आपल्या शेजाऱ्याला
कां मारितोस?" १४ तेव्हां हा बोलला, "तुला
नायक व न्यायाधीश आह्मावर कोणी नेमिलें?
असें त्वां मिसऱ्याला जिवें मारिलें तसें तूं मला
जिवें मारायास पाहतोस कीं काय?" तेव्हां मोशे
भ्याला, आणि ह्मणाला, "निश्चयें ती गोष्ट कळली
आहे. १५ आणि फारोने ती गोष्ट ऐकिली,
तेव्हां तो मोशाला जिवें मारायास ह्मटला; मग
मोशे फारोपुढून पळाला आणि मिद्यान देशांत
राहिला, तेव्हां तो विहिरीवर बसला. १६
आणि मिद्यानांतील याजकाला सात कन्या होत्या,
त्या तर येऊन आपल्या बापाच्या शेरडांस पाजा-
यासाठीं पाणी काढून कुंड्या भरीत होत्या. १७
तेव्हां कोणी चारणारे येऊन त्यांस तेथून घालवूं
लागले, परंतु मोशाने उठून त्यांचें सहाय केलें,
आणि त्यांच्या शेरडांस पाजिलें. १८ नंतर त्या
आपला बाप रगुवेल याजवळ आल्या, आणि तो
बोलला, "तुह्मी आज इतकें लवकर कशाने आ-
लां आहां?" १९ तेव्हां त्या बोलल्या, "मि-
सरी माणसाने आह्मास चारणाऱ्यांच्या हातांतून
सोडविलें, अणखी आह्मासाठीं पाणी काढून का-
ढून शेरडांस पाजिलें." २० तेव्हां तो आपल्या
कन्यांस बोलला, "तर तो कोठें आहे? तुह्मी त्या
माणसाला कां सोडून आलां? त्याला बोलावा,
ह्मणजे त्याने अन्न खावें." २१ नंतर मोशे त्या
माणसापाशीं राहायास मान्य झाला, आणि त्याने
आपली कन्या सिप्पोरा मोशाला दिल्ही. २२
नंतर तिला पुत्र झाला, आणि त्याने त्याचें नाम
गेर्षोम ठेविलें, कां कीं त्याने ह्मटलें, "मी अन्य
देशांत प्रवासी झालों आहें."

२३ आणि त्यानंतर बहुत दिवसानी असें
झालें कीं मिसराचा राजा मेला, तेव्हां इस्राए-
लाचीं संतानें चाकरपणामुळें कण्हलीं व ओरडलीं,
आणि चाकरपणामुळें त्यांची काकुळती देवाजवळ
चढली. २४ तसें देवाने त्यांचीं कुंथणीं ऐ-
किलीं, आणि देवाने आब्राहामाशीं, इसाकाशीं,
व याकोबाशीं जो आपला करार तो आठविला.
२५ तेव्हां देवाने इस्राएलाच्या संतानास पाहिलें
आणि देवाने ध्यानांत आणिलें.

## अध्याय ३.

तेव्हां मोशे आपला सासरा इथ्रो जो मिद्या-
नांतील याजक त्याच्या शेरडांस चारीत होता;
आणि तो शेरडांस रानाच्यामागें नेऊन देवाचा
डोंगर होरेब तेथवर गेला. २ तेव्हां परमेश्व-
राचा दूत झुडपांतून अग्नीच्या ज्वाळांत त्याला
दृश्य झाला, मग त्याने अवलोकन केलें, आणि पा-
हा, झुडूप अग्नीने जळत होतें, तरीं झुडूप तें भस्म
झालें नाहीं. ३ तेव्हां मोशाने ह्मटलें, "आतां

मी तिकडे जाऊन झुडूप कशासाठीं जळलें नाहीं,
हें मोठें आश्चर्य पाहीन." ४ तेव्हां परमेश्व-
राने पाहिलें कीं तो पाहायास वळला, आणि दे-
वाने झुडपांतून त्याला हाक मारीत ह्मटलें, "मो-
श्या, मोश्या;" मग हा बोलला, "मी एथें आहें."
५ तेव्हां तो बोलला, "इकडे जवळ येऊं नको,
तूं आपल्या पायांतून आपलीं पायतणें काढ, कां तर
ज्या जाग्यावर उभा राहतोस ती पवित्र भूमि आ-
हे." ६ अणखी तो बोलला, "मी तुझ्या पूर्वजां-
चा देव, आब्राहामाचा देव, इझाकाचा देव, व
याकोबाचा देव आहें;" मग मोश्याने आपलें तोंड
झांकिलें, कारण कीं देवाकडे दृष्टि लावण्यास तो
भ्याला. ७ मग परमेश्वर बोलला, "माझे जे लोक
मिसरांत आहेत त्यांचें दुःख म्या पाहिलेंच पा-
हिलें, आणि त्यांच्या बिगारनीसाकरितां त्यांचें ओ-
रडणें म्या ऐकिलें, कारण म्या त्यांचे खेद जाणिले
आहेत. ८ आणि त्यांजला मिसऱ्यांच्या हातांतून
सोडवून त्यांस त्या देशांतून चांगल्या व पसरट दे-
शांत, दूध व मध वाहण्याच्या देशांत, खनानी व
हित्ती व अमेरी व परिज्जी व हिव्वी व यबूसी,
यांच्या ठिकाणांत आणायास मी उतरलों आहें.
९ तर आतां तूं जाण, इस्राएलाच्या संतानांचें ओ-
रडणें मजजवळ आलें आहे, अणखी ज्या काचाने
मिसरी त्यांस काचतात तो म्या पाहिला आहे.
१० तर आतां चल, आणि मी तुला फारोजवळ
पाठवीन, ह्मणजे त्वां माझे लोक इस्राएलाचीं सं-
तानें यांस मिसरांतून आणावें." ११ तेव्हां मोशे
देवाला बोलला, "म्या फारोजवळ जावें अणखी
इस्राएलाच्या संतानांस मिसरांतून आणावें, ह्म-
णून मी कोण?" १२ मग तो बोलला, "निश्चयें
मी तुला अनुकूळ होईन, आणि म्या तुला पाठविलें
याची ही तुला खूण, त्वां त्या लोकांला मिसरां-
तून आणिल्यावर तुह्मी याच डोंगरावर देवा-
ला भजाल." १३ तेव्हां मोशे देवाला बोल-
ला, "पाहा मी इस्राएलाच्या संतानांजवळ जाऊन
त्यांस ह्मणेन कीं, तुमच्या पूर्वजांच्या देवाने मला
तुह्मांजवळ पाठविलें आहे, आणि ते मला ह्मण-
तील, 'त्याचें नाम काय?' तेव्हां मी त्यांस काय
सांगूं?" १४ तेव्हां देव मोश्याला बोलला, "मी
जो आहें तोच आहें;" अणखी त्याने सांगितलें,
"तूं इस्राएलाच्या संतानांस असें बोल कीं, मी
आहें, असें ज्याचें नाम, त्याने मला तुह्मांजवळ
पाठविलें आहे." १५ आणि फिरून देवाने मो-
श्याला सांगितलें, "तूं इस्राएलाच्या संतानांस असें
बोल, परमेश्वर तुमच्या पूर्वजांचा देव, आब्रा-
हामाचा देव, इझाकाचा देव, व याकोबाचा देव
याने मला तुह्मांजवळ पाठविलें आहे; हें सर्व-
काळ माझें नाम आणि हें पिढोपिढी मजविष-
यींचें सूचक आहे. १६ तूं जाऊन इस्राएलां-
च्या वडिलांस एकवट कर आणि त्यांस ह्मण
कीं, परमेश्वर तुमच्या पूर्वजांचा देव, आब्रा-
हामाचा, इझाकाचा, व याकोबाचा देव, तो मला
दृश्य होऊन असें बोलला कीं, म्या तुह्मांकडे,
आणि जें तुह्मांस मिसरांत केलेलें, त्याकडे लक्ष
दिल्हेंच आहे; १७ आणि म्या सांगितलें आहे
कीं, मी तुह्मांस मिसरांतील कष्टापासून खनानी
व हित्ती व अमोरी व परिज्जी व हिव्वी व य-
बूसी यांच्या देशांत, दूध व मध वाहण्याच्या
देशांत नेईन.' १८ आणि ते तुझी गोष्ट ऐक-
तील, मग तूं व इस्राएलांचे वडील मिसराच्या
राजाजवळ जा, आणि तुह्मी त्याला असें बोला
कीं, परमेश्वर इब्र्यांचा देव आह्मांस भेटला
आहे, तर आतां कृपेने आह्मांस तीन दिवसांची
वाट रानांत जाऊं दे, ह्मणजे आह्मी परमेश्वर
आपला देव याला यज्ञ करूं. १९ आणि
मला कळलें कीं मिसराचा राजा तुह्मांस जाऊं
देणार नाहीं, बळकट हात लाविला तरी जाऊं
देणार नाहीं. २० तथापि मी आपला हात घा-
लीन, आणि माझीं जीं आश्चर्यकृत्यें मी त्यामध्यें
करणार आहें, त्या सर्वांकडून मिसराला मारीन,
तेव्हां त्यानंतर तो तुह्मांस सोडील. २१ आणि
मी या लोकांविषयीं मिसऱ्यांच्या मनांत कृपा उ-
त्पन्न करीन, यास्तव जेव्हां तुह्मी निघाल, तेव्हां
असें होईल कीं रिकामे निघणार नाहीं. २५ परंतु
स्त्री आपल्या शेजारणीपासून आणि तिच्या घरां-
तील राहणारणीपासून रुप्याचे डागिणे, व सोन्या-
चे डागिणे, व वस्त्रें मागून घेईल, आणि तुह्मी तीं
आपल्या पुत्रांवर व आपल्या कन्यांवर घालाल;
तसें तुह्मी मिसऱ्यांस लुटाल."

## अध्याय ४.

तेव्हां मोशाने असें उत्तर केलें कीं, "कदाचित्
ते मजवर विश्वास ठेवणार नाहींत आणि मा-
झी गोष्ट ऐकणार नाहींत परंतु ह्मणतील, परमे-
श्वर तुला दृश्य झाला नाहीं." २ नंतर पर-
मेश्वर त्याला बोलला, "तें तुझ्या हातांत काय
आहे?" तेव्हां हा बोलला कीं, "काठी आहे."
३ मग त्याने सांगितलें, "ती भूमीवर टाक;" तेव्हां
त्याने ती भूमीवर टाकिली आणि ती साप असी
झाली, मग मोशे त्याच्यापुढून पळाला. ४ तेव्हां
परमेश्वराने मोशाला सांगितलें कीं, "तूं आ-
पला हात लावून त्याच्या शेपटाला धर;" नंतर
त्याने आपला हात लावून त्याला धरिलें, आणि
त्याच्या हातांत तो काठी असा झाला. ५ "त्या-
वरून ते विश्वास धरितील कीं परमेश्वर जो
त्यांच्या पूर्वजांचा देव, आब्राहामाचा देव, इझा-
खाचा देव, व याकोबाचा देव तो तुला दृश्य झा-
ला." ६ नंतर परमेश्वराने त्याला अणखी सां-
गितलें, "आतां तूं आपला हात आपल्या उरावर
ठेव." तेव्हां त्याने आपला हात आपल्या उरावर
ठेविला, मग तो काढिला, तेव्हां पाहा, त्याचा
हात, कोढ लागून बर्फाप्रमाणें पांढरा झाला. ७
नंतर त्याने सांगितलें, "तूं आपला हात आप-
ल्या उरावर फिरून ठेव." तेव्हां त्याने आपला
हात आपल्या उरांत फिरून ठेविला; नंतर तो
आपल्या उरांतून काढिला, तेव्हां पाहा, त्याच्या
आंगासारिखा फिरून झाला. ८ आणि देवाने
सांगितलें कीं, "जर ते तुजवर विश्वास न ठेवून
पहिल्या खुणेला मानणार नाहींत, तर असें हो-
ईल कीं दुसऱ्या खुणेला मानितील. ९ आणि
जर ते या दोन्ही खुणांसहि मानणार नाहींत
आणि तुझी गोष्ट ऐकणार नाहींत तर असें हो-
वो कीं तूं त्या नदींतील कांहीं पाणी घेऊन
कोरड्या स्थळावर ओत, आणि जें पाणी तूं न-
दींतून घेसील तें कोरड्या स्थळीं रक्त होईल".
१० तेव्हां मोशे परमेश्वराला बोलला "हे
प्रभू, माझी विनंती आहे, मी मागें कधींहि व-
क्ता मनुष्य नव्हतों, अणखी तूं आपल्या चाक-
रासीं बोललास तेव्हांपासूनहि नाहीं, कां तर मी
जड तोंडाचा व जड जिभेचा आहें." ११ मग
परमेश्वर त्याला बोलला कीं, "माणसाला तोंड
कोणी दिल्हें? अथवा मुका, किंवा बहिरा, किंवा
डोळस, किंवा अंधळा कोण करितो? तो मी पर-
मेश्वर नव्हें कीं काय? १२ तर आतां चल,
ह्मणजे मी तुझ्या तोंडाला अनुकूल होईन, आणि
जें त्वां बोलावें तें मी तुला शिकवीन." १३ तेव्हां
तो बोलला, "हे प्रभू, माझी विनंती आहे, तूं
ज्याला पाठविसील, त्याच्या हातीं कृपा करून पा-
ठीव." १४ तेव्हां परमेश्वर मोशावर रागें
भरला, आणि तो बोलला, "आहरोन जो लेवी
तो तुझा भाऊ नव्हे काय? मला कळलें कीं तो
चांगलें बोलेल, अणखी पाहा तो तुला भेटायास
येईल आणि तुला पाहून तो आपल्या मनांत सं-
तोष पावेल. १५ मग त्वां त्याला बोलून त्याला
या गोष्टी सुचवून ठेवाव्या; मीहि तुझ्या तोंडाला
अनुकूल आणि त्याच्या तोंडाला अनुकूल होईन,
आणि जें तुह्मी करावें तें तुह्मास शिकवीन. १६
मग तो तुजसाठीं लोकांजवळ बोलेल; तेव्हां असें
होईल कीं तो तुझें मुख असें होईल, आणि तूं
त्याला देवाच्या ठिकाणीं होसील. १७ आणि
तूं ती काठी आपल्या हातांत घे, ह्मणजे तिच्या
योगें तूं ते चमत्कार करसील."

१८ नंतर मोशे निघून आपला सासरा येथेर
याजवळ माघारें गेला, आणि त्याला बोलला,
"आतां मी निघून मिसर देशांत जे माझे भाऊबंद
त्यांजवळ माघारें जाईन, आणि ते अझून जिवंत
आहेत कीं काय हें पाहीन." तेव्हां इत्री मोशा-
ला बोलला, "तूं सुखरूप जा." १९ आणि प-
रमेश्वराने मोशाला मिद्यानांत सांगितलें कीं,
"मिसरास परतून जा, कां तर जीं माणसें तुझा प्राण
घ्यायाला पाहत होतीं, तीं सर्व मेलीं आहेत."
२० तेव्हां मोशाने आपली बायको व आपले पुत्र
यांस घेऊन गाढवावर बसवून मिसर देशांत प-
रत जाऊं निघाला; आणि मोशाने देवाची जी
काठी ती आपल्या हातांत घेतली. २१ तेव्हां पर-
मेश्वराने मोशाला सांगितलें होतें कीं, "तूं जेव्हां
मिसरांत माघारें जातोस, तेव्हां संभाळ आणि जे
चमत्कार म्यां तुझ्या हातीं ठेविले होते, ते सर्व
फारोच्यापुढें कर; तथापि मी त्याचें मन कठीण

करीन, आणि तो लोकांला सोडणार नाहीं. २२
परंतु तूं फारोला बोल कीं, "परमेश्वर असें
ह्मणतो, इस्राएल माझा पुत्र, माझा ज्येष्ठ पुत्र
आहे. २३ तर मी तुला सांगतों कीं तूं माझ्या
पुत्राला सोड, ह्मणजे त्याने माझी सेवा करावी;
आणि जर तूं त्याला सोडण्याविषयीं अनमान क-
रितोस, तर पाहा, मी तुझ्या पुत्राला तुझ्या ज्येष्ठ
पुत्राला जिवें मारीन." २४ मग वाटेवर धर्म-
शाळेंत असें झालें कीं परमेश्वर त्याला भेटला,
आणि त्याला जिवें मारायास पाहिलें. २५ तेव्हां
जिप्पोरेने हत्यार घेऊन आपल्या पुत्राचें मुरदाड
कातडें तोडिलें, आणि त्याच्या पायांपासीं टाकून
ह्मटलें कीं, "तूं मला रक्ताचा सोयरा आहेस."
२६ नंतर जेव्हां तिने सुंतेमुळें ह्मटलें, "रक्ताचा
सोयरा," तेव्हां त्याने याला सोडिलें.

२७ तेव्हां परमेश्वराने आहरोनाला सांगि-
तलें, "तूं मोश्याला भेटायास रानांत जा." यास्तव
तो जाऊन देवाच्या डोंगरांत त्याला भेटला आ-
णि त्याने त्याचें चुंबन घेतलें. २८ नंतर मो-
श्याने आपणाला पाठविणारा जो परमेश्वर त्याचें
सर्व बोलणें आणि आपणाला जे चमत्कार त्याने
दिल्हे होते ते सर्व आहरोनाला सांगितलें. २९
मग मोशे व आहरोन यानी जाऊन इस्राएलाच्या
संतानांचे सर्व वडील एकवट केले. ३० आणि
ज्या सर्व गोष्टी परमेश्वराने मोश्याला सांगि
तल्या होत्या, त्या आहरोनाने सांगितल्या, आणि
ते चमत्कार लोकांच्या देखतां केले. ३१ तेव्हां
लोकानी विश्वास धरिला, आणि परमेश्वराने
इस्राएलाच्या संतानाची भेट घेतली, अणखी त्या-
च्या दुःखावर दृष्टि लाविली, असें जेव्हां त्यानी
ऐकिलें, तेव्हां लवून भजन केलें.

## अध्याय ५.

आणि त्यानंतर मोशे व आहरोन जाऊन
फारोला बोलले कीं, "परमेश्वर इस्राए-
लाचा देव याने असें सांगितलें, माझ्या लोकानी
मजसाठीं रानांत सण करावा, ह्मणून त्यांस जाऊं
दे." २ तेव्हां फारो बोलला कीं, "परमेश्वर
कोण आहे कीं म्या त्याची आज्ञा ऐकून इस्राए-
लास जाऊं द्यावें? मी परमेश्वराला जाणत
नाहीं अणखी मी इस्राएलास जाऊं देणार नाहीं."
३ मग ते बोलले कीं, "इब्र्यांचा देव आह्मास
भेटला आहे; असी विनंती आहे कीं आह्मी तीन
दिवसांची वाट रानांत जावें, आणि परमेश्वर
आमचा देव याला पशुयज्ञ करावा, नाहीं तर तो
मरीने अथवा तरवारीने आह्मावर पडून मारील."
४ तेव्हां मिसराचा राजा त्यांस बोलला, "मो-
श्या व आहरोन, तुह्मी लोकांस त्यांच्या कामा-
पासून कां खोळंबवितां? तुह्मी आपल्या ओझ्यांच्या
कामावर चाला. ५ आणि फारो बोलला, "पाहा,
देशांतील लोक आतां बहुत आहेत, आणि तुह्मी
त्यांस त्यांच्या ओझ्यांच्या कामापासून खोळंब-
वितां." ६ आणि त्याच दिवसीं फारोने लो-
कांच्या बिगारीच्या सरदारांस व त्यांच्या नायकांस
असी आज्ञा केली कीं, ७ "इटा करण्यासाठीं जसें
मागून आजपर्यंत पेंढा दिल्हा, तसें तुह्मी लोकांस
अणखी देऊं नका, त्यानी जाऊन आपल्यासाठीं
पेंढा मिळवावा. ८ परंतु इटांची संख्या जी ते
मागून आजपर्यंत करीत आले ती त्यांजवर तुह्मी
ठेवा, त्यांत उणें करूं नका; कां तर ते आळसी
आहेत, ह्मणून ते ओरडतात कीं, आह्मास जाऊं
दे, आणि आह्मी आपल्या देवासाठीं यज्ञ करूं;
९ त्या माणसांवर काम भारी घाला, आणि त्यानीं
त्याप्रमाणें काम करून व्यर्थ गोष्टींवर चित्त न
ठेवावें." १० नंतर लोकांचे बिगारीचे सरदार
व त्यांचे नायक बाहेर जाऊन लोकांस बोलले कीं,
"फारो असें बोलतो, 'मी तुह्मास पेंढा देणार
नाहीं; ११ तुह्मी जा, जेथें पेंढा तुह्मास सांप-
डेल तेथून मिळवा, परंतु तुमच्या कामांत कांहीं उणें
व्हायाचें नाहीं." १२ नंतर ते लोक पेंढ्याच्या
ठिकाणीं धसकटें मिळवायास सर्व प्रदेशांत पसरले
गेले. १३ आणि बिगारीचे सरदार त्यांस घाई
करीत बोलले, "तुह्मी आपलें काम रोजच्या नेमा-
प्रमाणें रोज करा, जेव्हां पेंढा होता, त्याप्रमाणें."
१४ तेव्हां इस्राएलाच्या संतानांचे जे नायक फा-
रोच्या बिगारीच्या सरदारानी त्यांजवर ठेविले
होते, त्यांस मार देऊन यानी ह्मटलें कीं, "तुह्मी
मागल्या वेळाप्रमाणें इटा करण्याचा आपला नेम
काल व आजहि कशास्तव पूर्ण केला नाहीं?" १५
तेव्हां इस्राएलाच्या संतानांचे नायक येऊन फारो-

जवळ ओरडले कीं, "तूं आपल्या चाकरांस असें
कां करितोस? १६ तुझ्या चाकरांस पेंढा देत
नाहींत, परंतु ते आह्मास ह्मणतात, 'इटा करा,'
आणि पाहा तुझे चाकर मार खातात, परंतु अप-
राध तुझ्या लोकांचा आहे." १७ तेव्हां तो बो-
लला, "तुह्मी आळसी, आळसी आहां, यास्तव
तुह्मी ह्मणतां 'आह्मी जाऊन परमेश्वराला
यज्ञ करूं.' १८ तर आतां जा, चाकरी करा,
कां कीं पेंढा तुह्मास द्यायाचा नाहीं, तथापि तुह्मी
इटा नेमाप्रमाणें करून द्या." १९ नंतर इस्रा-
एलाच्या संतानांच्या नायकांनी आपण संकटांत
आहों असें पाहिलें, कां कीं त्यानें सांगितलें, "तु-
ह्मी रोज रोज इटांच्या रोजच्या नेमांत उणें करूं
नये." २० तेव्हां ते फारोजवळून निघत असतां
त्यांस भेटायास मोशे व आहरोन उभे राहतां
आढळले. २१ तेव्हां त्यास ते बोलले कीं, "पर-
मेश्वराने तुह्माकडे पाहावें आणि न्याय ठरवावा,
कारण कीं तुह्मी फारोच्या लक्षांत आणि त्याच्या
चाकरांच्या लक्षांत आमचा कंटाळा यावा असें
केलें आहे, ह्मणजे त्यांच्या हातीं आह्मास मारा-
याची तरवार दिल्ही." २२ तेव्हां मोशे परमे-
श्वराजवळ फिरून जाऊन बोलला, "हे प्रभू,
त्वां या लोकांला वाईट कां केलें आहे? त्वां मला
पाठविलें हें कशास्तव? २३ कां कीं मी तुझ्या
नामानें बोलायास फारोजवळ आलों तेव्हांपासून
त्यानें या लोकांला वाईट केलें आहे, आणि त्वां
आपल्या लोकांला कांहींच सोडविलें नाहीं."

## अध्याय ६.

तेव्हां परमेश्वर मोशाला बोलला कीं, "मी
जें फारोला करीन तें तूं आतां पाहसील, कां
तर तो बळकट हात लाविल्यानें त्यांस सोडील,
आणि बळकट हात लाविल्यानें तो त्यांस आपल्या
देशांतून घालवील."
२ तेव्हां देव मोशासीं बोलून त्याला ह्मणा-
ला, "मी यहोवा आहें. ३ आणि आब्राहाम,
इझाक, व याकोब, यांस मी सर्वसमर्थ देव
असा प्रगट झालों, परंतु यहोवा अशा माझ्या
नामानें मी कळलों नव्हतों. ४ अणखी खनान
देश त्यांचा प्रवासदेश ज्यांत ते प्रवासी होते,
तो त्यांस द्यायासाठीं म्यां आपला करार त्यां-
सीं स्थापिला होता. ५ अणखी इस्राएलाचीं
संतानें ज्यांस मिसरी लोक चाकर करितात
त्यांचें कण्हणें म्यां ऐकिलें, आणि आपला करार
आठविला आहे. ६ याकरितां तूं इस्राएलाच्या
संतानांस सांग, 'मी परमेश्वर आहें, आणि मी
तुह्मास मिसऱ्यांच्या ओझ्यांखालून मोकळें क-
रून आणीन, आणि त्यांच्या चाकरीपासून तुह्मास
सोडवीन, आणि लांबविलेल्या हाताकडून व मोठ्या
न्यायांकडून तुह्मास सोडवून घेईन. ७ अणखी
मी तुह्मास आपले लोक होण्यासाठीं घेईन, आणि
मी तुमचा देव असा होईन; मग तुह्मी जाणाल
कीं परमेश्वर तुमचा देव जो तुह्मास मिसऱ्यां-
च्या ओझ्यांखालून मोकळें करून आणितो, तोच
मी आहें. ८ आणि जो देश आब्राहामाला,
इझाकाला व याकोबाला देण्यासाठीं म्यां आपला
हात उचलून शपथ वाहिली त्यांत मी तुह्मास आ-
णीन, आणि तो तुह्मास वतनरूप देईन; मी प-
रमेश्वर आहें." ९ नंतर मोशे इस्राएलाच्या सं-
तानांस त्याप्रमाणें बोलला, परंतु त्यांनी जिवाच्या
संकटामुळें व कठिण चाकरीमुळें मोशाकडे चित्त
दिल्हें नाहीं.
१० तेव्हां परमेश्वराने मोशाला बोलून
ह्मटलें कीं, ११ "मिसराचा राजा फारो याज-
वळ तूं जाऊन सांग कीं, त्यानें इस्राएलाच्या सं-
तानांस आपल्या देशांतून जाऊं द्यावें." १२
मग मोशानें परमेश्वरापुढें असें ह्मटलें कीं,
"पाहा, इस्राएलाच्या संतानानीं माझें ऐकिलें नाहीं,
तर फारो माझें कसें ऐकेल? मी तर जड होंठांचा
आहें." १३ तथापि परमेश्वराने मोशे व
आहरोन यांस ह्मटलें, आणि इस्राएलाचीं संतानें
मिसरदेशांतून आणावीं ह्मणून इस्राएलाच्या सं-
तानांजवळ व मिसरांचा राजा फारो याजवळ
जाण्याची आज्ञा त्यांस दिल्ही.
१४ हे आपल्या पूर्वजांच्या घराण्यांतील मूल-
पुरुष आहेत, इस्राएलाचा ज्येष्ठ पुत्र रऊबेन, या-
चे पुत्र हनोख व फालू, हेस्रोन व कार्मी, हे
रऊबेनाचीं गोत्रें. १५ आणि शिमोनाचे पुत्र
यमुवेल व यामीन व ओहाद व याखीन व जो-
हार, व खनानिणीचा पुत्र शाऊल, हे शिमोनाचीं

गोत्रें. १६ आणि लेवीच्या पुत्रांचीं नांवें त्याच्या
कुळांप्रमाणें हीं, गेर्षोन व कहाथ व मरारी; आ-
णि लेवीच्या आयुष्याचीं वर्षें एकशें सततीस हो-
तीं. १७ गेर्षोनाचे पुत्र आपल्या गोत्रांप्रमाणें
लिब्नी व शिमी. १८ आणि कहाथाचे पुत्र
आम्राम व इस्हार व हेब्रोन व उज्जियेल, आणि
कहाथाच्या आयुष्याचीं वर्षें एकशें तेहेतीस होतीं.
१९ आणि मरारी याचे पुत्र माहाली व मूशी,
हे आपापल्या कुळांप्रमाणें लेवीचीं गोत्रें. २० तर
आम्रामाने आपली आत योखेबेद इला बायको
करून घेतली, आणि तिजपासून त्याला आहरोन
व मोशे हीं लेंकरें झालीं; आणि आम्रामाच्या
आयुष्याचीं वर्षें एकशें सततीस होतीं. २१ आ-
णि इस्हाराचे पुत्र, कोराह व नेफेग व झिख्री.
२२ आणि उज्जियेलाचे पुत्र मीशाएल व एल्-
साफान व सिथ्री. २३ तर आहरोनाने अली-
शेबा, जी आम्मीनादाबाची कन्या नाहशोनाची
बहीण तिला आपली बायको करून घेतली, आ-
णि तिजपासून त्याला नादाब व अबीहू, एलाजार
व इथामार, हीं लेंकरें झालीं. २४ आणि को-
राहाचे पुत्र आस्सीर व एल्काना व अबियासाफ,
हे करही यांचीं गोत्रें. २५ तर एलाजार आह-
रोनाचा पुत्र याने आपल्याला पूटीयेलाच्या कन्यां-
तून आपली बायको करून घेतली, आणि तिजपा-
सून त्याला फीनहास झाला; हे आपल्या गोत्रां-
प्रमाणें लेव्यांच्या पूर्वजातील मूळपुरुष. २६
आहरोन व मोशे ज्यांस परमेश्वराने सांगितलें
कीं, "इस्राएलाचीं संतानें त्याच्या मंडळ्यांच्या मं-
डळ्या अशा मिसरदेशांतून आणा," ते हे आ-
हेत. २७ जे इस्राएलाच्या संतानांस मिसरां-
तून आणायाकरितां मिसराचा राजा फारो याला
बोलले, ते हेच मोशे व आहरोन. २८ आणि
ज्या दिवसीं परमेश्वर मिसर देशांत मोश्याला
बोलला, तेव्हां असें झालें कीं २९ परमेश्वराने
मोश्याला असें ह्मटलें, "मी परमेश्वर आहें,
जें अवघें मी तुला सांगतों, तें तूं मिसराचा
राजा फारो याला सांग." ३० तेव्हां मोशे
परमेश्वरापुढें बोलला, "अहो मी जड होंठांचा
आहें, यास्तव फारो माझें कसें ऐकेल?"

अध्याय ७.

परंतु परमेश्वर मोश्याला बोलला, "पाहा, म्या
तुला फारोजवळ देव असा करून ठेविला
आहे, आणि आहरोन तुझा भाऊ तो तुझा वक्ता
होईल. २ जें कांहीं मी तुला बोलायाला सां-
गेन, तें तूं बोल, आणि आहरोन तुझा भाऊ याने
फारोला असें बोलावें कीं, 'इस्राएलाच्या संता-
नांस आपल्या देशांतून जाऊं दे.' ३ परंतु मी
आपल्या खुणा व आपले चमत्कार मिसर देशांत
बहुत करीत असतांहि फारोचें मन कठोर करीन.
४ आणि फारो तुमचें ऐकणार नाहीं, मग मी
मिसराला आपला हात लावीन, आणि मोठे
न्याय करून माझीं सैन्यें माझे लोक इस्राएलाचीं
संतानें यांस मिसर देशांतून आणीन. ५ जेव्हां
मी आपला हात मिसऱ्यावर लांब करून त्यांम-
धून इस्राएलाच्या संतानांस आणीन, तेव्हां मिसरी
लोक जाणतील कीं मी परमेश्वर आहें." ६
आणि मोशे व आहरोन यांनी तसें केलें, जसी
परमेश्वराने त्यांस आज्ञा दिल्ही तसें त्यांनी
केलें. ७ आणि जेव्हां ते फारोला बोलले, तेव्हां
मोशे ऐशीं वर्षांचा, आणि आहरोन त्र्याऐशीं
वर्षांचा होता.

८ तेव्हां परमेश्वर मोश्याला व आहरोना-
ला असें ह्मणाला कीं, ९ "जेव्हां फारो तु-
ह्मास सांगेल कीं 'तुह्मी आपणासाठीं चमत्कार
दाखवा,' तेव्हां तूं आहरोनाला सांग कीं, 'आपली
काठी घेऊन फारोपुढें टाक;' मग ती सर्प असी
होईल." १० नंतर मोशे व आहरोन फारो-
जवळ आले, आणि जसी परमेश्वराने आज्ञा
दिल्ही तसें त्यांनी केलें; ह्मणजे आहरोनाने आ-
पली काठी फारोपुढें व त्याच्या चाकरांपुढें टा-
किली, आणि ती सर्प असी झाली. ११ मग
फारोनेहि सुज्ञांस व मांत्रिकांस बोलाविलें, मग
हे मिसरी जोशी यांनीहि आपल्या गुंडाईकडून
तसें केलें; १२ ह्मणजे एकएकाने आपली काठी
टाकिली, आणि त्या सर्प अशा झाल्या, परंतु आ-
हरोनाच्या काठीने त्यांच्या काठ्यास गिळिलें. १३
तेव्हां फारोचें मन कठीण झालें, आणि त्यांनी
त्याचें ऐकिलें नाहीं; असें परमेश्वर बोलला,

तसें. १४ नंतर परमेश्वर मोश्याला बोलला
कीं, "फारोचें मन कठीण झालें, तो लोकांला
जाऊं द्यायास अनमान करितो. १५ तूं सकाळीं
फारोजवळ जा, पाहा तो पाण्याकडे बाहेर जा-
ईल तेव्हां तूं त्याला भेटायास नदीच्या कांठावर
उभा राहा; आणि जी काठी रूप पालटून सर्प
असी झाली होती ती आपल्या हातांत घे. १६
मग तूं त्याला ह्मण कीं, 'इब्र्यांचा देव परमे-
श्वर याने मला तुजकडे पाठवितांना असें सां-
गितलें कीं, 'माझ्या लोकांला जाऊं दे, ह्मणजे
त्यांनी रानांत माझी सेवा करावी', परंतु पाहा त्वां
अद्याप ऐकिलें नाहीं. १७ परमेश्वर असें
ह्मणतो कीं, 'यावरून त्वां जाणावें कीं मी पर-
मेश्वर आहें, पाहा, माझ्या हातांत जी काठी
तिने मी नदींतल्या पाण्याला मारितों आणि तें
पालटून रक्त असें होईल. १८ आणि नदीमध्यें
जे मासे ते मरतील, मग नदीची घाण होईल,
आणि नदीचें पाणी पिण्याविषयीं मिसऱ्यांस म-
ळमळ होईल." १९ तेव्हां परमेश्वराने मो-
श्याला सांगितलें कीं, "आहरोनाला सांग 'तूं आ-
पली काठी घेऊन मिसऱ्याच्या पाण्यावर, त्यांच्या
नद्यांवर, त्यांच्या ओघांवर व त्यांच्या तळ्यांवर
व त्यांच्या पाण्याच्या सर्व संचयांवर आपला हात
लांबीव, ह्मणजे तें रक्त होईल; तसें सर्व मि-
सरदेशांत लाकडी पात्रांमध्यें व दगडी पात्रांमध्यें
रक्त होईल." २० तेव्हां परमेश्वराने असी
आज्ञा दिल्ही तसें मोशे व आहरोन यांनी केलें;
ह्मणजे याने काठी उंच केली, आणि फारोच्या
देखतां व त्याच्या चाकरांच्या देखतां नदींतल्या
पाण्याला मारिलें, आणि नदींत जें सर्व पाणी तें
पालटून रक्त झालें. २१ ह्मणती नदीमध्यें जे
मासे ते मेले, आणि नदीची घाण असी झाली
कीं मिसरी लोकांच्याने नदींतील पाणी पिववेना;
आणि सर्व मिसरदेशांत रक्त झालें. २२ तेव्हां
मिसरी ज्योती यांनी आपल्या गुंडाईकरून त्याप्र-
माणें केलें, आणि असें परमेश्वराने सांगितलें
होतें तसें फारोचें मन कठीण होऊन त्याने त्यांचें
ऐकिलें नाहीं. २३ तेव्हां फारो मागें फिरून
आपल्या घरीं गेला आणि या गोष्टीकडे त्याने
आपलें मन लाविलें नाहीं. २४ तेव्हां सर्व मि-
सऱ्यांनी नदीच्या आसपास खणून पाणी पिण्या-
साठीं पाहिलें, का कीं त्यांच्याने नदींतील पाणी
पिववेना. २५ आणि परमेश्वराने नदीला मा-
रिल्यापासून सात दिवस पूर्ण झाले.

## अध्याय ८

तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें, "तूं
फारोजवळ जाऊन त्याला ह्मण कीं परमे-
श्वर असें सांगतो, 'तूं माझ्या लोकांस जाऊं दे,
ह्मणजे त्यांनी माझी सेवा करावी. २ आणि जर
तूं जाऊं द्यायास अनमान करितोस, तर पाहा,
मी तुझ्या सर्व देशाला बेडकांकडून पिडीन. ३
ह्मणजे नदीमध्यें बेडकांचा सुळसुळाट होईल,
आणि ते वरतें येऊन तुझ्या घरांत व तुझ्या
निजण्याच्या खोलींत व तुझ्या आंथरुणावर व
तुझ्या चाकरांच्या घरांत व तुझ्या लोकांवर व
तुझ्या भट्ट्यांमध्यें व तुझ्या काठवटींमध्यें जातील.
४ तसें तुजवर व तुझ्या लोकांवर व तुझ्या सर्व
चाकरांवर बेडूक येतील."

५ तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें,
"तूं आहरोनाला सांग कीं, 'तूं काठी घेऊन आ-
पला हात नद्यांवर, ओघांवर, व तळ्यांवर लांबीव,
आणि बेडकांस मिसरदेशावर वरतें आण." ६
वास्तव आहरोनाने आपला हात मिसऱ्याच्या पा-
ण्यावर लांबविला, तेव्हां बेडूक वरतें आले, आणि
त्यांनी मिसरदेशाची भूमि झांकिली. ७ मग
ज्योत्यांनी आपल्या गुंडाईकरून तसें केलें, आणि
बेडकांस मिसरदेशावर वरतें आणिलें. ८ नंतर
फारोने मोशे व आहरोन यांस बोलावून सांगि-
तलें, "तुह्मी परमेश्वराला विनंती करा कीं त्याने
बेडकांस मजपासून व माझ्या लोकांपासून दूर क-
रावें, ह्मणजे मी लोकांस परमेश्वराला यज्ञ क-
रायास जाऊं देईन." ९ तेव्हां मोशे फारोला
ह्मणाला कीं, "तूं मजवरून गौरव पाव, मी तुझ्या-
साठीं व तुझ्या चाकरांसाठीं व तुझ्या लोकांसाठीं
प्रार्थना केव्हां करूं, असी कीं बेडूक तुजपासून व
तुझ्या घरांतून काढिले जावे, आणि केवळ नदीमध्यें
राहावे?" १० तेव्हां तो बोलला, "उद्यां;" मग
हा बोलला, "तुझ्या वचनाप्रमाणें होवो, ह्मणजे त्वां
जाणावें कीं आमचा देव परमेश्वर यासारिखा

कोणी नाहीं. ११ यास्तव बेडूक तुजपासून व
तुझ्या घरांपासून व तुझ्या चाकरांपासून व तुझ्या
लोकांपासून जातील, केवळ नदीमध्यें राहतील."
१२ नंतर मोशे व आहरोन फारोजवळून गेले,
आणि परमेश्वराने बेडकांकडून जी पीडा फारो-
वर आणिली होती, तिजमुळें मोश्याने त्याजवळ
हाक मारिली. १३ तेव्हां मोश्याच्या बोलण्या-
प्रमाणें परमेश्वराने केलें, ह्मणजे घरांमध्यें, गां-
वांमध्यें व शेतांमध्यें जे बेडूक होते ते मेले. १४
मग त्यांस त्यांनी खंड्यांच्या खंड्या गोळा केलें,
आणि देशाची घाण आली. १५ परंतु फारोने
पाहिलें कीं अवकाश झाला, यास्तव त्याने आपलें
मन कठीण केलें, आणि त्यांचें ऐकिलें नाहीं; जसें
परमेश्वराने सांगितलें होतें, तसें.

१६ नंतर परमेश्वराने मोश्याला सांगितलें
कीं, "तूं आहरोनाला असें सांग, 'तूं आपली का-
ठी उचलून भूमीच्या धुळीस मार, मग ती सर्व
मिसरदेशांत उवा असी होईल." १७ नंतर
त्यांनी तसें केलें ह्मणजे आहरोनाने आपल्या काठी-
सुद्धा आपला हात लांबवून भूमीच्या धुळीस मा-
रिलें; मग ती मनुष्यांवर व पशूंवर उवा असी
झाली, सर्व मिसरदेशांत भूमीची अवघी धूळ
उवा असी झाली. १८ नंतर जोश्यानी आपल्या
मंत्राईकडून उवा काढायास तसें केलें, परंतु त्या-
च्याने होईना; आणि माणसांवर व पशूंवर उवा
झाल्या. १९ तेव्हां जोशी फारोला बोलले कीं,
"हें देवाचेंच कृत्य आहे;" तथापि फारोचें मन
कठीण राहिलें, आणि त्याने त्यांचें ऐकिलें नाहीं;
जसें परमेश्वराने सांगितलें होतें, तसें. २०
नंतर परमेश्वराने मोश्याला सांगितलें कीं, "तूं
सकाळीं उठून फारोपुढें उभा राहा, पाहा, तो पा-
ण्याकडे बाहेर जाईल; तेव्हां तूं त्याला ह्मण कीं,
परमेश्वर असें सांगतो, 'माझ्या लोकांनी माझी
सेवा करावी ह्मणून तूं त्यांस जाऊं दे. २१ जर
तूं माझ्या लोकांस जाऊं देत नाहींस, तर पाहा,
मी तुजवर व तुझ्या चाकरांवर व तुझ्या लोकांवर
व तुझ्या घरांत माश्या सोडितों, आणि माश्या मि-
सऱ्यांचीं घरें व ज्या भूमीवर ते आहेत, तीहि
भरतील. २२ परंतु गोशेन प्रांत ज्यांत माझे लोक
राहतात, त्याला मी त्या दिवशीं वेगळें करीन;

असें कीं तेथें माश्या कांहीं होणार नाहींत, यासा-
ठीं कीं त्वां जाणावें कीं मी परमेश्वर या देशा-
मध्यें आहें. २३ आणि माझे लोक व तुझे लोक
यांमध्यें मी भेद ठेवीन, उद्यां हा चमत्कार हो-
ईल." २४ तेव्हां परमेश्वराने तसें केलें, ह्मणजे
भारी माश्या फारोच्या घरीं व त्याच्या चाकरां-
च्या घरीं व सर्व मिसरदेशांत आल्या; त्या मा-
श्यांकडून देशाला अनर्थ झाला. २५ नंतर फा-
रोने मोश्याला व आहरोनाला बोलावून सांगि-
तलें, "तुह्मी जाऊन या देशांत आपल्या देवाला
यज्ञ करा." २६ तेव्हां मोशे बोलला, "असें
करायास योग्य नाहीं, कां कीं मिसऱ्यांला कंटाळा
येईल असें अर्पण आह्मी आपला देव परमेश्वर
याला करूं; पाहा मिसऱ्यांला कंटाळा येईल अ-
सा यज्ञ त्यांच्या दृष्टीसमोर करूं, तर ते आ-
ह्मास धोंडमार करणार नाहींत कीं काय? २७
आह्मी तीन दिवसांची वाट रानांत जाऊं, आणि
आमचा देव परमेश्वर याने असें आह्मास सां-
गितलें तसें आह्मी त्याला यज्ञ करूं." २८ ते-
व्हां फारो बोलला, "मी तुह्मास असें सोडीन
कीं तुह्मी आपला देव परमेश्वर याजवळ रा-
नांत यज्ञ करावे, केवळ फार दूर जाऊं नका;
तुह्मी मजसाठीं प्रार्थना करा." २९ तेव्हां मो-
शे बोलला, "पाहा, मी तुझ्याजवळून बाहेर जा-
ऊन परमेश्वराजवळ असी प्रार्थना करीन कीं उ-
द्यां माश्या फारोपासून त्याच्या चाकरांपासून व
त्याच्या लोकांपासून जाव्या, केवळ फारोने लो-
कांला परमेश्वराजवळ यज्ञ करायास न सो-
डण्याने अधिक न चाळवावें." ३० नंतर मो-
श्याने फारोजवळून जाऊन परमेश्वराजवळ प्रा-
र्थना केली. ३१ आणि परमेश्वराने मोश्याच्या
वचनाप्रमाणें केलें, ह्मणजे फारोपासून, त्याच्या
चाकरांपासून, व त्याच्या लोकांपासून माश्या का-
ढिल्या, एकहि राहिली नाहीं. ३२ तथापि फारोने
या वेळेसहि आपलें मन कठीण करून लोकांस
जाऊं दिल्हें नाहीं.

## अध्याय ९.

मग परमेश्वराने मोश्याला सांगितलें कीं, "तूं
फारोजवळ जाऊन त्याला बोल कीं, [illegible]

परमेश्वर असें सांगतो, माझ्या लोकांनी माझी
सेवा करावी ह्मणून तूं त्यांस जाऊं दे; २ कां
कीं जर तूं सोडायांस अनमान करून त्यांस बळा-
नें अणखी धरितोस, ३ तर पाहा तुझे जे पशू
शिवारांत आहेत त्यांवर परमेश्वराचा हात पड-
णार आहे, घोड्यांवर, गाढवांवर, उंटांवर, गुरांवर,
व शेरडांवर, फार भारी मरी होईल. ४ तेव्हां
इस्राएलाचे पशू व मिसऱ्याचे पशू यांमध्यें परमे-
श्वर असा भेद करील कीं इस्राएलाच्या संतानां-
च्या सर्वांतील कांहींच मरणार नाहीं." ५ आणि
परमेश्वराने असा नेम केला आहे कीं "उद्यां
परमेश्वर ही गोष्ट या देशांत करील". ६ तेव्हां
दुसऱ्या दिवशीं परमेश्वराने ती गोष्ट केली, ह्म-
णजे मिसऱ्याचे सर्व पशू मेले, परंतु इस्राएलाच्या
संतानांच्या पशूंतील एकहि मेला नाहीं. ७ नं-
तर फारोने पाठविलें, आणि पाहा, इस्राएलांच्या
पशूंतील एकहि मेला नाहीं, तथापि फारोचें मन
कठीण राहिलें आणि त्याने लोकांला जाऊं दिल्हें
नाहीं.

८ नंतर परमेश्वराने मोश्याला व आहरो-
नाला सांगितलें, "तुह्मी आपली ओंजळभर आ-
व्यांतील राख घ्या, आणि मोश्याने ती फारोच्या
देखतां आकाशाकडे उधळावी; ९ मग ती सर्व
मिसरदेशावर धुरळा असी होईल, आणि ती मा-
णसांवर व पशूंवर पुष्कळ फोड येण्याचा व्रण अ-
सी सर्व मिसरदेशांत होईल." १० तसें ते
आव्यांतील राख घेऊन फारोपुढें उभे राहिले,
आणि मोश्याने ती आकाशाकडे उधळिली, आणि
ती माणसांवर व पशूंवर पुष्कळ फोड येण्याचा
व्रण असी झाली. ११ तेव्हां त्या व्रणामुळें ज्यो-
शी यांच्याने मोश्यापुढें उभे राहावेना, कां तर तो
व्रण ज्योश्यांवर व सर्व मिसऱ्यांवर झाला. १२
परंतु परमेश्वराने फारोचें मन कठीण केलें, आ-
णि त्याने त्याचें ऐकिलें नाहीं; असें परमेश्वराने
मोश्याला सांगितलें होतें, तसें.

१३ नंतर परमेश्वराने मोश्याला सांगितलें,
"तूं सकाळीं उठून फारोपुढें उभा राहा, आणि
त्याला ह्मण कीं, परमेश्वर इब्र्यांचा देव असें
सांगतो, माझ्या लोकांनी माझी सेवा करावी ह्मणून
तूं त्यांस जाऊं दे. १४ कां तर या वेळेस मी
आपल्या सर्व पटक्या तुझ्या मनावर व तुझ्या चा-
करांवर, व तुझ्या लोकांवर घालितों, ह्मणजे त्वां
जाणावें कीं सर्व पृथ्वीमध्यें मजसारिखा कोणी ना-
हीं. १५ कां तर आतां मी आपला हात लावून
तुला व तुझ्या लोकांला मरीकडून मारीन, आणि
तूं पृथ्वींतून नाहींसा होसील. १६ तर निश्चयें
यासाठीं म्या तुला उभारिलें आहे कीं म्या आ-
पला पराक्रम तुला प्रगट करावा, आणि यासाठीं
कीं माझ्या नामाचें वर्णन सर्व पृथ्वीमध्यें व्हावें.
१७ माझ्या लोकांस न सोडण्याने त्यांजवर तूं
आपणाला अद्याप थोर करितोस; १८ पाहा मी
उद्यां या वेळेस फार भारी गारांची वृष्टि करीन;
जसी मिसरदेशांत त्याचें मूळ होण्याच्या दिवसा-
पासून आतांपर्यंतहि झाली नाहीं, तसी. १९ तर
आतां तूं पाठवून आपले पशू व रानांत आपलें जें
अवघें त्यांचा बंदोबस्त कर; प्रत्येक माणूस व
पशु जो घरीं आणून ठेविला नसतां रानांत सांप-
डेल, त्यांवर गारा पडतील आणि ते मरतील."
२० फारोच्या चाकरांतील जो परमेश्वराच्या
गोष्टीला भ्याला, त्याने आपले चाकर व पशू घरीं
पळवून आणिले. २१ परंतु ज्याने आपलें चित्त
परमेश्वराच्या गोष्टीला दिल्हें नाहीं, त्याने आपले
चाकर व आपले पशू यांस रानांत राहूं दिल्हें.

२२ तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें,
"तूं आपला हात आकाशाकडे लांबीव, ह्मणजे गा-
रांची वृष्टि सर्व मिसरदेशांत मनुष्यांवर व पशूंवर
व मिसरदेशांतील रानांतल्या सर्व हिरवळीवर
होईल." २३ वास्तव मोश्याने आपली काठी
आकाशाकडे लांबविली, तेव्हां परमेश्वराने ग-
र्जना केल्या व गारा पाडिल्या, आणि विजेचा अग्नि
भूमीवर पडला, तसें परमेश्वराने मिसरदेशावर
गारांची वृष्टि केली. २४ आणि गारा पडल्या
तेव्हां गारांच्या वृष्टीमध्यें वीज वळवळत होती,
ती वृष्टि असी भारी झाली कीं मिसरदेश राष्ट्र
झाला तेव्हांपासून त्या सर्वांत तिच्या समान झाली
नव्हती. २५ आणि सर्व मिसरदेशामध्यें जे
कोणी मनुष्य व पशूहि रानांत त्यांस गारांनी मा-
रिलें, आणि रानांतील सर्व हिरवळीला गारांनी
मारिलें, व रानांतील अवघीं झाडें मोडिलीं. २६
केवळ गोशेन प्रांतांत जेथें इस्राएलाचीं संतानें

होतीं तेथें गारांची वृष्टि झाली नाहीं· २७ नंतर
फारोने पाठवून मोशे व आहरोन यांस बोलाविलें,
आणि त्यांस ह्मटलें, "या वेळेस म्या पाप केलें आहे;
परमेश्वर नीतिमान् आणि मी व माझे लोक पा-
पी आहों· २८ पुरें आहे, यास्तव तुह्मी परमे-
श्वराची प्रार्थना करा कीं देवाच्या गर्जना व गा-
रांची वृष्टि अणखी न व्हावी, ह्मणजे मी तुह्मास
जाऊं देईन; तुह्मी अणखी राहणारच नाहीं."
२९ तेव्हां मोशे त्याला बोलला, "म्या नगरा-
बाहेर जाऊन आपले हात परमेश्वराजवळ पस-
रिल्यावर गर्जना खुंटतील व गारांची वृष्टि अणखी
होणार नाहीं, ह्मणजे त्वां असें जाणावें कीं पृथ्वी
परमेश्वराची आहे· ३० तथापि तूं व तुझे
चाकर परमेश्वर देव यासमोर अद्याप भय धर-
णार नाहीं, हें मला कळलें." ३१ तेव्हां जवस व
सातू यांचा नाश झाला, कां कीं सातू निसवलेले
होते, आणि जवसाला बोंडें आलीं होतीं· ३२
परंतु गहूं व खुस्सेमेथ यांचा नाश झाला नाहीं,
कां तर तीं मागस होतीं· ३३ तेव्हां मोशे फा-
रोजवळून नगरांतून गेला, आणि त्याने आपले
हात परमेश्वराजवळ पसरिले, नंतर गर्जना खुं-
टल्या आणि गारा व पाऊस भूमीवर अगखी प-
डला नाहीं. ३४ मग फारोने पाहिलें कीं पा-
ऊस व गारांची वृष्टि व गर्जना खुंटल्या, तेव्हां
त्याने आपल्या चाकरांसुद्धां अणखी पाप करून
आपलें मन कठीण केलें· ३५ तसें ज्याप्रमाणें
परमेश्वराने मोश्याकडून सांगितलें होतें, त्या-
प्रमाणें फारोचें मन कठीण झालें, आणि त्याने
इस्राएलाच्या संतानांस जाऊं दिल्हें नाहीं.

## अध्याय १०.

मग परमेश्वराने मोश्याला सांगितलें कीं, "तूं
फारोजवळ जा, कां तर म्या त्याचें मन व
त्याच्या चाकरांचें मन कठीण केलें आहे, यासाठीं
कीं म्या त्यांमध्यें हे माझे चमत्कार करावे· २
आणि यासाठीं कीं म्या मिसऱ्यामध्यें कसीं चरित्रें
केलीं, हें आणि माझे चमत्कार जे म्या त्यांवर ला-
विले ते त्वां आपल्या पुत्राच्या कानांत व आपल्या
नातवाच्या कानांत सविस्तर सांगावे, आणि तुह्मी
जाणावें कीं मी परमेश्वर आहें." ३ तेव्हां
मोशे व आहरोन फारोजवळ गेले आणि त्याला
बोलले कीं, "इब्र्यांचा देव परमेश्वर असें ह्म-
णतो, तूं माझ्यापुढें मान्य होण्यास कोठपर्यंत अन-
मान करितोस? माझ्या लोकानी माझी सेवा करा-
वी ह्मणून तूं त्यांस सोड, ४ कांतर जर तूं माझ्या
लोकांला सोडायास अनमान करितोस, तर पाहा
मी उद्यां तुझ्या देशांत टोळ आणीन· ५ आणि
ते पृथ्वीचें दर्शनांग असें झांकितील कीं भूमि पा-
हतां दिसेनासी होईल, आणि गारांपासून जें निभा-
वलेलें शेष तुह्मास उरलें, तें खातील, आणि अ-
वघीं झाडें जीं तुह्मासाठीं भूमींतून वाढितात तीं
खातील. ६ आणि तुझीं घरें व तुझ्या सर्व चा-
करांचीं घरें व मिसऱ्यांचीं घरें यांत भरतील; ज-
से तुझे पूर्वज व तुझ्या पूर्वजांचे पूर्वज यानी भूमी-
वर होण्याच्या दिवसांपासून या दिवसापर्यंत पाहिलें
नाहींत, तसे;" मग तो परतून फारोजवळून नि-
घाला. ७ नंतर फारोचे चाकर त्याला बोलले,
"हा कोठपर्यंत आह्मास फासरूप होईल? या
माणसानी आपला देव परमेश्वर याची सेवा
करावी ह्मणून त्यांस जाऊं दे; काय, तूं अद्याप
जाणत नाहींस कीं मिसराचा नाश झाला आहे?"
८ तेव्हां त्यानी मोशे व आहरोन फारोजवळ
परत आणिले, आणि तो त्यांस बोलला, "तुह्मी
जा, तुमचा देव परमेश्वर याची सेवा करा,
परंतु कोण कोण जातां?" ९ तेव्हां मोशे बोलला,
"आह्मी आपल्या तरुणांसुद्धां व वृद्धांसुद्धां जाऊं,
आमच्या पुत्रांसुद्धां व आमच्या कन्यांसुद्धां; आम-
च्या बकऱ्यांसुद्धां व आमच्या गुरांसुद्धां जाऊं, कां
कीं परमेश्वरासाठीं आह्मास सण करायाचा
आहे· १० तेव्हां तो त्यांस बोलला, "म्या तु-
मच्या बाळकांसुद्धां तुह्मास जाऊं द्यावें, असें पर-
मेश्वर तुह्मासीं होवो, जाणा, कां कीं तुमच्या
तोंडापुढें वाईट आहे· ११ तसें नको, तर जे
प्रौढ ते तुह्मी जाऊन परमेश्वराची सेवा करा,
कां कीं तुह्मी तेंच मागतां·" तेव्हां कोणी त्यांस
फारोच्या समोरून घालविलें.

१२ मग परमेश्वराने मोश्याला सांगितलें
कीं, "तूं टोळ यावे ह्मणून आपला हात मिसर
देशावर लांब कर, मग ते मिसरदेशावर येऊन
भूमीवरची सर्व हिरवळ जी कांहीं गारांच्या वृष्टीने

राहिली, ती खातील." १३ तेव्हां मोशाने
आपली काठी मिसरदेशावर लांबविली, मग प-
रमेश्वराने त्या संपूर्ण दिवशीं व संपूर्ण रात्रीं
पूर्वेचा वारा देशावर वाहविला; नंतर सकाळ
झाल्यावर पूर्वेच्या वाऱ्याने टोळ आणिले. १४
तेव्हां टोळ सर्व मिसरदेशावर येऊन संपूर्ण
मिसरदेशांत बसले; ते फार भारी होते, त्यां-
पूर्वी त्यांसारिखे टोळ झाले नव्हते, आणि त्यांपुढें
तसे होणार नाहींत. १५ तेव्हां त्यांनी सर्व
भूमीची पाठ झांकिली, आणि भूमीवर अंधार पड-
ला, आणि त्यांनी भूमीवरची सर्व हिरवळ आणि
झाडांचीं सर्व फळें जीं गारांच्या वृष्टीने राहिलीं,
तीं खाल्लीं; मग सर्व मिसरदेशांत झाडांतील व
भूमीवरल्या गवतांतील कांहीं हिरवें राहिलें नाहीं.
१६ तेव्हां फारोने उतावळी करून मोशाला
व आहरोनाला बोलावून ह्मटलें, "म्यां तुमचा
देव परमेश्वर यासीं व तुह्मांसीं पाप केलें
आहे. १७ तर आतां तूं कृपा करून ही ए-
कच वेळ माझें पाप क्षमा कर, आणि तुह्मी आ-
पला देव परमेश्वर याजवळ असी विनंती करा
कीं त्याने केवळ हें मरण मजपासून दूर करावें."
१८ तेव्हां त्याने फारोजवळून बाहेर जाऊन प-
रमेश्वराजवळ विनंती केली." १९ मग पर-
मेश्वराने फार बळकट पश्चिमेकडचा वारा फि-
रविला, आणि त्याने टोळ उचलून सुफसमुद्रांत
घातले; सर्व मिसरदेशांत एक टोळ राहिला
नाहीं. २० आणि परमेश्वराने फारोचें मन
कठीण केलें आणि त्याने इस्राएलच्या लोकांस
जाऊं दिल्हें नाहीं.

२१ मग परमेश्वराने मोशाला सांगितलें,
"तूं आपला हात आकाशाकडे लांब कर, मग सं-
पूर्ण मिसरदेशावर काळोख होईल, चांचपाया-
जाहि असा काळोख." २२ मग मोशाने आ-
पला हात आकाशाकडे लांब केला, मग काळो-
खाची निबिडता तीन दिवस संपूर्ण मिसरदेशांत
झाली. २३ त्यांनी एकमेकांस पाहिलें नाहीं
आणि त्यांतील कोणी आपल्या ठिकाणांतून तीन
दिवसपर्यंत उठला नाहीं; परंतु सर्व इस्राएलाच्या
लोकांस आपल्या वस्तींत उजेड होता. २४ मग
फारोने मोशाला बोलावून सांगितलें, "तुह्मी
जाऊन परमेश्वराची सेवा करावी, केवळ तुमचीं
बकरें व तुमचीं गुरें ठेवावीं, तुमच्या बाळकांनी
देखील तुमच्यासंगतीं जावें." २५ तेव्हां मोशे
बोलला, "त्वां अणखी यज्ञपशू व होमपशू आम-
च्या हातीं द्यावे, यासाठीं कीं आमचा देव पर-
मेश्वर यासाठीं आह्मी अर्पण करावें. २६ वा-
स्तव आमचे पशूहि आमच्यासंगतीं जायाचे आ-
हेत, एक खूर न राहावा, का तर आमचा देव
परमेश्वर याची सेवा करायास आह्मी यांतून
घेणार आहों; आणि आह्मी कशाने परमेश्व-
राची सेवा करावी, हें आह्मी तेथें पोहंचूं तोंप-
र्यंत जाणत नाहीं." २७ तेव्हां परमेश्वराने
फारोचें मन कठीण केलें, आणि त्यांस जाऊं द्या-
यास तो मान्य झाला नाहीं. २८ मग फारोने त्या-
ला सांगितलें, "तूं माझ्याजवळून जा, आपणाला
संभाळ, माझें तोंड फिरून पाहूं नको, का तर
माझें तोंड पाहसील त्या दिवशीं मरसील." २९
तेव्हां मोशे बोलला, "तूं बरें बोललास, मी आ-
तांपासून तुझें तोंड फिरून पाहणार नाहीं."

## अध्याय ११

तेव्हां परमेश्वराने मोशाला सांगितलें कीं,
"मी फारोवर व मिसऱ्यांवर अणखी एक
पीडा आणितों, त्यानंतर तो तुह्मांस एथून जाऊं
देईल; जेव्हां जाऊं देईल, तेव्हां तो तुह्मांस ए-
थून अगदीं हाकीलच हाकील. २ तर तूं लो-
कांच्या कानांत सांग कीं त्यांतील प्रत्येकाने आप-
ल्या शेजाऱ्यापासीं आणि प्रत्येक स्त्रीने आपल्या
शेजारणीपासीं रुप्याचे डागिने व सोन्याचे डा-
गिने मागावे." ३ तेव्हां परमेश्वराने लोकां-
वर मिसऱ्यांच्या मनांत कृपा उत्पन्न केली, अण-
खी हा माणूस मोशे मिसरदेशांत फारोच्या
चाकरांच्या लक्षांत आणि लोकांच्या लक्षांत फार
थोर होता. ४ तेव्हां मोशे ह्मणाला, "परमे-
श्वर असें सांगतो कीं, 'आज मध्यरात्रीच्या सु-
मारांत मी मिसरदेशामध्यें जाईन; ५ आणि
फारो जो आपल्या सिंहासनावर बसतो त्याच्या
ज्येष्ठ पुत्रापासून, जी दासी जात्याच्याजवळ बस-
ती तिच्या ज्येष्ठ पुत्रापर्यंत, मिसरदेशांतील प्र-
त्येक ज्येष्ठ पुत्र, आणि पशूमधील प्रत्येक प्रथम

वत्स मरेल. ६ आणि मोठा आकांत, मागें झा-
ला नाहीं आणि पुढें होणार नाहीं, असा सर्व
मिसरदेशांत होईल. ७ परंतु इस्राएलचे सर्व
लोक, मनुष्य व पशूहि यांवर कुत्रें आपली जीभ
काढून भोंकणार नाहीं, ह्मणजे मिसर व इस्राएल
यांमध्यें परमेश्वर कसा भेद करितो तो तुह्मी
जाणावा.' ८ आणि हे तुझे सर्व चाकर माझ्या-
जवळ खालीं येऊन मला दंडवत करून ह्मण-
तील कीं, 'तूं जा, आणि तुझ्या हाताखालचे
जे सर्व लोक त्यानी जावें; मग यानंतर मी
जाईन." तेव्हां तो फार रागेंभरून फारोजवळून
निघाला. ९ आणि परमेश्वराने मोश्याला सां-
गितलें कीं, "मिसरदेशांत माझे चमत्कार फार
व्हावे ह्मणून फारो तुमचें ऐकणार नाहीं." १०
तसें मोशे व आहरोन यानी हे सर्व चमत्कार
फारोसमोर केले, तथापि परमेश्वराने, फारोचें
मन कठीण केलें आणि त्याने इस्राएलच्या लोकांस
आपल्या देशांतून जाऊं दिलें नाहीं.

## अध्याय १२.

तेव्हां मिसरदेशांत परमेश्वराने मोश्याला व
आहरोनाला सांगितलें कीं, २ "महिन्यांतील
हा तुमचा पहिला महिना, वर्षांतील महिन्यांत हा
तुमचा पहिला होवो. ३ तुह्मी इस्राएलाच्या
सर्व समुदायाला असें सांगा कीं, त्यांतील प्रत्ये-
काने आपापल्या पूर्वजांच्या घराण्याप्रमाणें आपल्या
जवळ कोंकरूं या महिन्यांतील दशमीस घ्यावें,
एकएका घरासाठीं एक कोंकरूं असें. ४ आणि
जर घरचे थोडके असतील, ह्मणजे कोंकरापुरते
नसतील, तर त्याच्या घराजवळ जो शेजारी त्या-
सुद्धां त्याने घ्यावें, मनुष्यांच्या संख्येप्रमाणें घ्यावें,
प्रत्येकाला त्याच्या त्याच्या खाण्याप्रमाणें तुह्मी
कोंकरासाठीं मोजावें. ५ तुमचें कोंकरूं सांगो-
पांग एका वर्षाचा नर असावें, तुह्मी मेंढरांतील
किंवा शेळ्यांतील घ्यावें. ६ आणि तें या महि-
न्यांतील चौदाव्या दिवसापर्यंत तुह्मापाशीं रक्षणांत
असावें, मग इस्राएलाच्या समुदायांतील प्रत्येक
घोळक्याने सायंकाळीं त्याला मारावें. ७ आणि
त्यानी त्या रक्तांतून कांहीं घेऊन ज्या घरांमध्यें ते
त्याला खातात त्या घरांच्या दोन्ही दारबाह्यांवर
व कपाळपट्टीवर घालावें. ८ आणि त्यानी याच
रात्रीं तें मांस खावें, तें विस्तवाने भाजलेलें
असें आणि बेखमीर भाकर कडवट भाजीबरोबर
खावी. ९ हिरवें अथवा पाण्यांत कोणत्या प्र-
कारें शिजविलेलें असें तुह्मी त्यांतील खाऊं नका,
परंतु विस्तवाने भाजलेलें त्याचें शीर त्याच्या पाया-
सुद्धां व त्याच्या आंतड्यांसुद्धां असें खा, आणि
त्यांतील कांहीं सकाळपर्यंत ठेवूं नका. १० आ-
णि सकाळपर्यंत त्यांतील कांहीं राहिल्यास त्याला
तुह्मी विस्तवाने जाळून टाका. ११ आणि या
प्रकारें तुह्मी तें खा कीं, आपल्या कंबरा बांधलेल्या,
आपल्या पायांत आपलीं पायतणें, आणि आपल्या
हातांत आपली काठी असें, आणि उतावळीने तें
खा; तें परमेश्वरासाठीं वल्हांडण सण आहे.
१२ कां कीं याच रात्रीं मी मिसऱ्याच्या देशांत
फिरेन, आणि मिसरदेशांतील मनुष्यांचा व पशूं-
चाहि प्रत्येक ज्येष्ठ पुत्र मारीन, आणि मिसऱ्यांच्या
सर्व देवांचें शासन करीन, मी परमेश्वर आहें.
१३ आणि ज्या घरांत तुह्मी आहां त्यांवर तें रक्त
तुह्मांविषयीं खूण असें होईल, आणि मी तें रक्त
पाहून तुह्मांवरून वल्हांडून जाईन, ह्मणजे जेव्हां
मी मिसरदेशांतल्यांस मारितो, तेव्हां नाश किंवा
पटकी तुह्मांवर होणार नाहीं. १४ आणि हाच
दिवस तुह्मांला आठवणीचा व्हावा, ह्मणजे तुह्मी
हा सण परमेश्वरासाठीं पाळावा, आपल्या पिढ्या-
नपिढी सर्वकाळच्या नेमाने हा पाळावा. १५
तुह्मी सात दिवसांपर्यंत बेखमीर भाकरी खा;
पहिल्या दिवशीं देखील तुह्मी खमीर आपल्या घ-
रांतून घालवा, कारण कीं पहिल्या दिवसापासून
सातव्या दिवसापर्यंत जो कोणी खमीर खातो तो
मनुष्य इस्राएलांतून मारून टाकावा. १६ आणि
तुह्मांस पहिल्या दिवशीं पवित्र मेळा व सातव्या
दिवशीं पवित्र मेळा व्हावा, त्यांमध्यें कांहीं काम
करायाचें नाहीं, केवळ जें प्रत्येक मनुष्याने खावें
तें मात्र तुह्मी करावें. १७ आणि हा बेखमीर
भाकरीचा सण तुह्मी पाळा, कारण कीं याच दि-
वसांत ह्या तुमच्या मंडळ्या मिसरदेशांतून काढि-
ल्या आहेत, यास्तव तुह्मी आपल्या पिढ्यानपिढी
हा दिवस पाळा, सर्वकाळचा नेम आहे. १८
पहिल्या महिन्यांतील चौदाव्या दिवशीं संध्याकाळीं

आणि तेव्हांपासून महिन्यांतील एकविसाव्या दि-
वसांतल्या संध्याकाळापर्यंत तुह्मी बेखमीर भा-
करी खा. १९ सात दिवस खमीर तुमच्या
घरीं न सांपडावें, कारण कीं जो कोणी खमीराचें
खातो तो प्रवास्यांतील असो किंवा देशांत उत्पन्न
झालेले यांतील असो, तो मनुष्य इस्राएलाच्या
समुदायांतून मारून टाकावा. २० तुमच्या सर्व
वस्त्यांत तुह्मी कांहीं खमीराचें खाऊं नका; बे-
खमीर भाकरी खा."

२१ तेव्हां मोशानें इस्राएलाचे सर्व वडील
बोलाविले आणि त्यांस सांगितलें, "तुह्मी आपा-
पल्या कुटुंबांसाठीं मेंढरूं काढून घ्या, आणि त्या-
ला वल्हांडणासाठीं मारा. २२ आणि एजोब
झाडाची जुडी घेऊन पात्रांतल्या रक्तांत बुचकळून
पात्रांत जें रक्त त्यांतील कांहीं चौकटीच्या कपाळ-
पट्टीवर व दोन बाह्यांवर मारा, मग सकाळपर्यंत
तुह्मांतील कोणी आपल्या घराच्या दाराबाहेर जा-
ऊं नये. २३ कां कीं मिसऱ्यांवर पीडा लावा-
यास परमेश्वर फिरतो, आणि कपाळपट्टीवरील
व दोन्ही बाह्यांवरील रक्त तो पाहील, मग परमे-
श्वर त्या दारावरून वल्हांडून जाईल, आणि
नाश करणाऱ्याला तुमच्या घरांत पीडा लावायास
जाऊं देणार नाहीं. २४ आणि ही गोष्ट तुह्मी
सर्वकाळपर्यंत आपापल्यांसाठीं व आपापल्या संता-
नांसाठीं नेम, असें मानून पाळा. २५ आणि
परमेश्वरानें सांगितल्याप्रमाणें जो देश तो तुह्मा-
स देणार आहे तेथें जेव्हां तुह्मी जाल, तेव्हां असें
होवो कीं तुह्मी ही रीति पाळावी. २६ आणि
जेव्हां तुमचीं लेंकरें तुह्मास ह्मणतील, 'ही रीति
तुमची काय आहे?' २७ तेव्हां असें होवो कीं
तुह्मी ह्मणावें 'ही परमेश्वरासाठीं वल्हांडणाचा
यज्ञ आहे, कां कीं जेव्हां त्यानें मिसऱ्यांस मारि-
लें, तेव्हां त्यानें मिसरांत इस्राएलाच्या संतानांचीं
घरें वल्हांडून आमचीं घरें राखिलीं;" तेव्हां लोका-
नीं लवून भजन केलें. २८ मग इस्राएलाच्या
संतानानीं जाऊन तसें केलें; जसें परमेश्वरानें
मोशे व आहरोन यांस आज्ञा दिल्ही, तसें
त्यानीं केलें.

२९ मग मध्यरात्रीं असें झालें कीं परमेश्व-
रानें मिसरदेशांतील सर्व ज्येष्ठ पुत्रांस जिवें मा-
रिलें; फारो जो आपल्या राजासनावर बसणारा
त्याच्या ज्येष्ठ पुत्रापासून जो पराजित बंदिशाळेंत
होता त्याच्या ज्येष्ठ पुत्रापर्यंत यांस, आणि पशूं-
तील प्रत्येक प्रथम वत्स यांस जिवें मारिलें. ३०
तेव्हां फारो आपण व आपले सर्व चाकर व सर्व
मिसरी रात्रीं उठले, आणि मिसरदेशामध्यें मो-
ठा आकांत झाला, कां कीं ज्यांत कोणी मेला नाहीं
असें घर नव्हतें. ३१ तेव्हां त्यानें मोशे व
आहरोन यांस रात्रीं बोलावून ह्मटलें कीं, "तुह्मी
आणि इस्राएलाचीं संतानेंहि उठा, माझ्या लोकां-
मधून निघा, आणि तुह्मी ह्मटलेल्याप्रमाणें जाऊन
परमेश्वराची सेवा करा. ३२ तुह्मी सांगितलें
त्याप्रमाणें तुमचीं बकरेंहि अणखी गुरें यांस घेऊन
जा, आणि मलाहि आशीर्वाद द्या." ३३ तेव्हां
लोकांस देशांतून उतावळीनें पाठविण्याविषयीं
मिसऱ्यानी त्यांवर आग्रह केला; कारण कीं त्या-
नीं ह्मटलें, "आह्मी सर्व मेलों." ३४ यास्तव
लोकानीं आपला उंडा खमीर घातल्यापूर्वी उच-
लिला, आणि आपल्या काठवटी आपल्या वस्त्रानीं
आपल्या खांद्यांवर बांधिल्या. ३५ आणि असें
मोशानें सांगितलें तसें इस्राएलाच्या संतानानीं
केलें, ह्मणजे मिसऱ्यांजवळ रुप्याचे डागिने व
सोन्याचे डागिने व वस्त्रें मागितलीं. ३६ आणि
परमेश्वरानें लोकांवर मिसऱ्यांच्या मनांत कृपा
दिल्ही आणि यानीं त्यांला मागितल्याप्रमाणें दि-
ल्हीं; तसें त्यानीं मिसऱ्यांस लुंघविलें.

३७ तेव्हां इस्राएलाचीं संतानें रामसेसापासून
निघून सुकोथास गेलीं; बाळकांशिवाय सुमारें सा-
हा लाख पुरुष पायउतारे होते. ३८ अणखी
परक्यांचा समुदाय त्यांसहित चढला, आणि शे-
रडें व गुरें असें धन फार मोठें होतें. ३९ तेव्हां
जो उंडा त्यानीं मिसरांतून नेला त्याच्या बेखमीर
पोळ्या त्यानीं भाजिल्या, त्यांत खमीर घातलें
नव्हतें ह्मणून; कां कीं ते मिसरांतून हाकले गेले
आणि त्यांच्यानें उशीर करवला नाहीं, अणखी
त्यानीं आपल्यासाठीं सिधा तयार केला नव्हता.
४० तेव्हां इस्राएलाच्या संतानानीं मिसरांत जो
प्रवास केला तो चारशें तीस वर्षांचा झाला. ४१
मग असें झालें कीं चारशें तीस वर्षांच्या समा-
प्तीस, त्याच दिवसांत असें झालें कीं परमेश्व-

राचे सर्व समुदाय मिसरदेशांतून निघाले. ४२
त्यांस मिसरदेशांतून काढिल्यामुळें परमेश्वरा-
साठीं ती रात्रि फार पाळायाची आहे; तीच
ती रात्रि सर्व इस्राएलाच्या संतानांकडून त्यांच्या
पिढ्यानपिढी परमेश्वरासाठीं फार पाळायाची
आहे.

४३ तेव्हां परमेश्वराने मोशे व आहरोन
यांस सांगितलें कीं, "वल्हांडणाचा हा नेम, कोणी
परक्याने त्यांतलें खाऊं नये. ४४ परंतु एकाए-
काचा कोणी चाकर पैक्याने विकत घेतलेला अ-
सतां त्वां त्याची सुंता केल्यावर त्याने त्यांतलें
खावें. ४५ प्रवासी व मोलकरी यानी त्यांतलें
खाऊं नये. ४६ एका घरांत खायाचें आहे;
त्वां त्याचें कांहीं मांस घरांतून बाहेर नेऊं नये,
आणि तुह्मी त्यांतील हाड मोडूं नये. ४७ इ-
स्राएलाच्या सर्व समुदायाने तो करावा. ४८
आणि जेव्हां प्रवासी तुझ्याजवळ राहतो आणि
परमेश्वरासाठीं वल्हांडणाचा सण करील, तेव्हां
त्याच्या सर्व पुरुषांची सुंता करायाची आहे,
आणि मग त्याने तो करायास अवळ यावें आणि
देशांत जन्मलेल्यासारिखें व्हावें, परंतु कोणी अ-
सुंती पुरुषाने त्यांतलें खाऊं नये. ४९ देशस्था-
ला आणि तुह्मामधील राहणाऱ्या प्रवास्याला ए-
कच नियम व्हावा." ५० तेव्हां सर्व इस्राए-
लाच्या संतानानी तसें केलें; जसी परमेश्वराने
मोशे व आहरोन यांस आज्ञा दिल्ही, तसें
केलें. ५१ आणि असें झालें कीं त्याच दिवसांत
परमेश्वराने इस्राएलाचीं संतानें त्यांच्या मं-
डळ्यांप्रमाणें मिसरदेशांतून आणिलीं.

## अध्याय १३.

तेव्हां परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं प्रत्येक ज्येष्ठ पुत्राला मजसाठीं प-
वित्र कर, इस्राएलाच्या संतानांत मनुष्यांमध्यें व
पशूंमध्यें प्रत्येक पोटचा प्रथम झालेला तो माझा."
३ तेव्हां मोशाने लोकांस सांगितलें कीं, "हा
दिवस ज्यांत तुह्मी मिसरांतून, दासपणांतून नि-
घालां, हा आठवायाचा; कारण कीं परमेश्वराने
हाताच्या बळाने तुह्मास तेथून काढिलें आहे, या-
स्तव कांहीं खमीराचें खायाचें नाहीं. ४ याच
दिवसीं चैत्रमासांत तुह्मी निघालां. ५ आणि
असें होवो कीं खनानी व हित्ती व अमोरी व
हिव्वी व यबूसी यांचा जो देश तुला द्यायास तु-
झ्या पूर्वजांजवळ परमेश्वराने शपथ वाहिली,
जो दूध व मध वाहण्याचा देश त्यांत जेव्हां तो
तुला आणील, तेव्हां त्वां ही सेवा या महिन्यांत
करावी. ६ सात दिवस तूं बेखमीर भाकरी खा,
आणि सातव्या दिवसीं परमेश्वरासाठीं सण कर.
७ सात दिवस बेखमीर भाकरी खायाच्या, कांहीं
खमीराचें तुझ्या दृष्टीस पडूं नये, आणि ख-
मीर तुझ्या सर्व देशांत तुझ्या दृष्टीस पडूं नये.
८ नंतर त्या दिवसीं तूं आपल्या पुत्राला असें
सांग कीं, 'जेव्हां मी मिसरांतून निघालों, तेव्हां जें
परमेश्वराने मजसाठीं केलें त्यावरून मी हा क-
रितों. ९ आणि हा तुझ्या हातावर खूण असी
आणि तुझ्या डोळ्यांच्यामध्यें सूचक असा असावा;
यासाठीं कीं परमेश्वराचें शास्त्र तुझ्या तोंडांत
व्हावें, कां तर परमेश्वराने बळकट हाताने तु-
ला मिसरांतून काढिलें. १० तर तूं हा नेम
याच्या नेमलेल्या काळीं वर्षोवर्षी पाळ."

११ "आणि जसें परमेश्वराने तुजसीं व
तुझ्या पूर्वजांसीं शपथ वाहिली आहे, तसें जेव्हां
तो तुला खनानी देशांत आणील आणि तुला तो
देईल, तेव्हां असें होवो कीं, १२ त्वां पोटचा
प्रत्येक प्रथम झालेला पुरुष परमेश्वरासाठीं ए-
कीकडे ठेवावा, आणि जे पशू तुझ्याजवळ असती-
ल त्यांच्या पोटचे सर्व प्रथम झालेले नर परमे-
श्वरासाठीं एकीकडे ठेवावे. १३ आणि प्रत्येक प्र-
थम झालेला गाढव त्वां शेरडूं देऊन खंडून घ्या-
वा; आणि जर तूं न खंडिसील, तर त्याची मान
मोडावी; आणि मनुष्याचा ज्येष्ठ पुत्र ह्मणजे तुझ्या
लेंकरांतील ज्येष्ठ यासाठीं खंड भरावा. १४
मग असें होईल कीं जेव्हां तुझा पुत्र पुढें तुला
पुसेल कीं, 'हें काय?' तेव्हां त्वां त्याला ह्म-
णावें, 'परमेश्वराने हाताच्या बळाने आह्मास
मिसरांतून, दासपणांतून काढिलें. १५ आणि
जेव्हां फारो आह्मास जाऊं देण्याविषयीं कठोर
होता, तेव्हां असें झालें कीं परमेश्वराने मिसर
देशांतील अवघे ज्येष्ठ पुत्र, माणसांचे ज्येष्ठ पुत्र
आणि पशूंचींहि प्रथम वत्सें जिवें मारिलीं; यास्तव

मी पोटच्या सर्व प्रथम झालेल्या नराचा यज्ञ पर-
मेश्वराजवळ करितों, आणि माझे सर्व ज्येष्ठ पुत्र
खंडून घेतों.' १६ तसें हें तुझ्या हातावर खूण व
तुझ्या डोळ्यांच्यामध्यें सूचनेची पट्टी असें व्हावें,
का कीं परमेश्वराने हाताच्या बळाने आह्मास
मिसरांतून काढिलें."
१७ आणि फारोने लोकांस जाऊं दिल्यावर
असें झालें कीं पलिष्टी देशाकडली वाट जवळ
असतांहि देवाने त्यांस त्या वाटेने नेलें नाहीं; का
कीं देवाने ह्मटलें, "कदाचित हे लोक लढाई
पाहिल्यावर पश्चात्ताप करून मिसराकडे माघारे
फिरतील." १८ वास्तव देवाने लोकांस सुफ-
समुद्राकडील रानांतील वाटेने लांबून नेलें, आणि
इस्राएलाचीं संतानें मिसरदेशांतून सैन्यरूपी च-
ढले. १९ तेव्हां मोशाने आपल्यासंगतीं यो-
सेफाचीं हाडें नेलीं, का कीं त्याने इस्राएलाच्या
संतानांस बळकट शपथ घातली होती कीं, "देव
तुमची भेट घेईलच घेईल, तेव्हां तुह्मी आपल्या-
संगतीं माझीं हाडें एथून न्या." २० तर त्यानी
सुकोथापासून निघून जाऊन एथामांत रानाच्या
कडेस तळ दिल्हा. २१ तेव्हां त्यांस वाटेने
नेण्यासाठीं परमेश्वर दिवसा ढगाच्या खांबाने,
आणि रात्रीं त्यांस उजेड करायास अग्नीच्या
खांबाने त्यांच्यापुढें चालला, असें कीं त्यानी रा-
त्रींदिवस चालावें. २२ दिवसा ढगाचा खांब
आणि रात्रीं अग्नीचा खांब लोकांपुढून गेला
नाहीं.

## अध्याय १४.

मग परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असें सांग
कीं, त्यानी फिरावें आणि पीहाहीरोथाच्यापुढें
मिग्दाल व समुद्र यांच्यामध्यें तळ द्यावा, बाल-
जफोनाच्यापुढें त्यासमोरच समुद्राजवळ तुह्मी
तळ द्या. ३ का कीं फारो इस्राएलाच्या संतानां-
विषयीं ह्मणेल कीं, 'ते देशांत घोटाळले, रानाने
ते कोंडिले आहेत.' ४ आणि मी फारोचें मन
कठीण करीन आणि तो त्यांच्या पाठीस लागेल,
आणि फारोच्यायोगाने व त्याच्या सर्व सैन्याच्या
योगाने माझें गौरव होईल; तेव्हां मिसरी जाण-
तील कीं मी परमेश्वर आहें." नंतर त्यानी
तसें केलें. ५ तेव्हां मिसरी राजाला असें वर्त्त-
मान आलें कीं ते लोक पळाले आहेत, मग फा-
रोचें मन व त्याच्या चाकरांचें मन लोकांविषयीं
फिरलें, आणि ते ह्मणाले, "आह्मी इस्राएलास
आमची चाकरी करण्यापासून सोडिलें, हें आह्मी
काय केलें?" ६ मग त्याने आपला रथ जुंपून
आपले लोक आपल्यासंगतीं घेतले. ७ आणखी
साहाशें निवडलेले रथ, आणि मिसरांतील सर्व
रथ, आणि त्यांतील प्रत्येकावरले सरदार असे
घेतले. ८ आणि परमेश्वराने मिसरी राजा
फारो याचें मन कठीण केलें, आणि तो इस्राएला-
च्या संतानांच्या पाठीस लागला; परंतु इस्राएलाचीं
संतानें प्रशस्त भुजेच्या योगाने निघालीं होतीं. ९
तथापि मिसरी त्यांच्या पाठीस लागले; आणि
ते समुद्राजवळ पीहाहीरोथाजवळ बालजफोना-
समोर तळ देऊन उतरले असतां, फारोचे सर्व
घोडे व रथ आणि त्याचे स्वार व त्याचें सैन्य
यानी त्यांस आटोपिलें. १० आणि फारो जवळ
आला तेव्हां इस्राएलाच्या संतानानी आपली
दृष्टि लाविली, आणि पाहा आपल्यामागें मिसरी
चालत आहेत; मग इस्राएलाच्या संतानानी फार
भिऊन परमेश्वराला हाक मारिली. ११ आणि
त्यानी मोशाला सांगितलें कीं, "मिसरांत प्रेत-
स्थळें नव्हतीं ह्मणून त्वां आह्मास रानांत मर-
ण्यासाठीं आणिलें कीं काय? त्वां आह्मास मि-
सरांतून आणून आह्मासीं काय केलें? १२
आह्मी जी गोष्ट तुला मिसरांत सांगितली, तीच
ही कीं नव्हे? कीं आह्मास असूं दे, ह्मणजे आ-
ह्मी मिसऱ्यांची चाकरी करूं, का तर आह्मी
रानांत मरावें यापेक्षां मिसऱ्यांची चाकरी करणें,
हें आह्मास बरें." १३ तेव्हां मोशे लोकांस
बोलला, "तुह्मी भिऊं नका, उभे राहा, आणि जें
तुमचें तारण परमेश्वर आज करील तें पाहा;
का कीं तुह्मी आज मिसऱ्यांस पाहिलें, तर तुह्मी
त्यांस फिरून कधींहि पाहणार नाहीं. १४ पर-
मेश्वर तुह्मासाठीं लढाई करील, आणि तुह्मी
उगीच राहाल."
१५ मग परमेश्वर मोशाला बोलला कीं,
"तूं मला का हाक मारितोस? इस्राएलाच्या सं-

तानांस असें सांग कीं, 'तुम्ही पुढें चाला.' १६ मग
तूं आपली काठी उचलून आपला हात समुद्रावर
लांब करून त्याचे दुभाग कर, आणि इस्राएलाचीं
संतानें समुद्रामधून कोरड्या भूमीवरून जातील.
१७ मी तर पाहा, मीच मिसऱ्यांचें मन कठिण
करितों आणि ते यांच्यामागें येतील, आणि मी
फारोविषयीं व त्याच्या सर्व सैन्याविषयीं त्याच्या
रथांविषयीं व त्याच्या स्वारांविषयीं गौरविला जा-
ईन. १८ आणि जेव्हां मी फारोविषयीं त्याच्या
रथांविषयीं व त्याच्या स्वारांविषयीं गौरव पावेन
तेव्हां मिसरी जाणतील कीं मी परमेश्वर आहें.
१९ तेव्हां देवाचा जो दूत इस्राएलाच्या गोटा-
च्यापुढें चालत होता तो निघून त्यांच्यामागें चा-
लला, आणि ढगाचा खांब त्यांच्या पुढून निघून
त्यांच्यामागें उभा राहिला. २० तसें मिसऱ्यां-
चा गोट व इस्राएलाचा गोट यांच्यामध्यें तो आ-
ला, आणि तिकडे ढग काळोखमय होता परंतु
इकडे रात्रीं उजेड करीत होता; तसें एक गोट
दुसऱ्या गोटाजवळ सर्व रात्रीं आला नाहीं. २१
तेव्हां मोश्यानें आपला हात समुद्रावर लांब के-
ला, मग परमेश्वरानें बळकट पूर्वेच्या वाऱ्याक-
डून समुद्राला रात्रभर सारून सारून समुद्र को-
रडा केला आणि पाणी दुभागलें. २२ मग इस्रा-
एलाचीं संतानें समुद्राच्यामधून कोरड्या भूमीवरून
चाललीं, आणि त्यांच्या उजव्याकडे व डाव्याकडे
पाणी त्यांस भिंतअसी झाली. २३ तेव्हां मिस-
री पाठीस लागून फारोचे सर्व घोडे त्याचे रथ
व त्याचे स्वार यांच्यामागें समुद्राच्या मध्यभागीं
आले. २४ मग पाहटेच्या प्रहरीं असें झालें
कीं अग्नीच्या व ढगाच्या खांबांतून परमेश्वरानें
मिसऱ्यांच्या गोटाकडे पाहिलें, आणि मिसरी गो-
टाची गडबड केली; आणि त्यानें त्यांच्या रथांचीं
चाकें काढून ते आयासानें चालावे असें केलें.
२५ मग मिसरी ह्मणाले, "आपण इस्राएला-
पासून पळूं, कां कीं परमेश्वर त्यांसाठीं मि-
सऱ्यांसीं लढतो."

२६ तेव्हां परमेश्वरानें मोश्याला सांगितलें
कीं, "तूं आपला हात समुद्रावर लांब कर, ह्मणजे
पाणी मिसऱ्यांवर, त्यांतल्या रथांवर व त्यांत-
ल्या स्वारांवर फिरेल." २७ मग मोश्यानें आ-
पला हात समुद्रावर लांब केला, आणि सकाळ
जवळ आली असतां समुद्र आपल्या बळानें
माघारें फिरला; तेव्हां तो लागून मिसरी पळा-
ले, परंतु परमेश्वरानें मिसऱ्यांस समुद्रामध्यें
बुडवून टाकिलें. २८ तसें पाणी परत येऊन
त्यानें फारोच्या सर्व सैन्यांतील रथ व स्वार जे
त्यांच्या पाठीमागें समुद्रांत आले होते त्यांस बु-
डविलें, त्यांतील एकहि राहिला नाहीं. २९ परंतु
इस्राएलाचीं संतानें कोरड्या भूमीवरून समुद्रा-
मधून गेली, आणि त्यांस त्यांच्या उजव्याकडे व
त्यांच्या डाव्याकडे पाणी त्यांस भिंत असी झाली.
३० तसें त्या दिवसीं परमेश्वरानें इस्राएलास
मिसऱ्याच्या हातांतून सोडविलें, आणि इस्राए-
लानें समुद्राच्या काठीं मिसरी मेलेले पाहिले.
३१ तेव्हां जो मोठा पराक्रम परमेश्वरानें मि-
सऱ्यांवर केला, तो इस्राएलानें पाहिला; तेव्हां
लोकांनी परमेश्वराचें भय धरिलें, आणि परमे-
श्वरावर व त्याचा सेवक मोशे यावर भरवसा
ठेविला.

## अध्याय १५.

मग इस्राएलाच्या संतानांसुद्धां मोश्यानें परमे-
श्वराला हें गायन गाऊन असें ह्मटलें कीं,
"परमेश्वराला मी गाईन, त्यानें तर जयच जय
केला आहे; त्यानें घोडा व त्यावरील स्वार
समुद्रांत टाकिला आहे. २ परमेश्वर माझें
बळ व कीर्त्तनपात्र, कां कीं तो माझें तारण
झाला आहे; तो माझा देव, ह्मणून मी त्याचा
गौरव करीन; तो माझ्या पूर्वजांचा देव, ह्मणून मी
त्याला थोर मानीन. ३ परमेश्वर युद्ध कर-
णारा, त्याचें नाम परमेश्वर. ४ त्यानें फारोचे
रथ व त्याचें सैन्य समुद्रांत टाकिलें आहे; याचे
निवडलेले सरदारहि सुफसमुद्रांत बुडाले. ५
जळांनी त्यांस झांकिलें, ते धोंड्यासारिखे तळीं
गेले. ६ हे परमेश्वरा, तुझा उजवा हात ब-
ळानें महान झाला; हे परमेश्वरा, तुझ्या उजव्या
हातानें शत्रूला आपटून टाकिलें आहे. ७ त्वां
आपल्यावरील उठणाऱ्यांस आपल्या अति थोर-
पणानें पाडिलें आहे; त्वां आपला मोठा संताप
लाविला, याकडून ते भुसांसारिखे नष्ट झाले. ८
तेव्हां तुझ्या नाकपुड्यांच्या श्वासानें पाणी गोळा

झालें, राशीसारिखे ओघ उभे राहिले, समुद्राच्या
पोटांत जळें थिजलीं. ९ शत्रूने म्हटलें, मी
पाठीस लागेन, मी आटोपीन, मी लूट वांटीन,
माझा जीव त्यांकडून तृप्त होईल; माझी तरवार
उपसीन, माझा हात त्यांचें ग्रहण करील. १०
त्वां आपल्या वाऱ्याने फुंकिलें; समुद्राने त्यांस
झांकिलें; ते शिस्यासारिखे महापाण्यांत बुडाले.
११ हे परमेश्वरा, देवांमध्यें तुझ्यासारिखा
कोण! पवित्रतेने तुझ्यासारिखा महान कोण!
स्तवण्यांविषयीं भयमान्, चमत्कार कर्त्ता आहेस.
१२ त्वां आपला उजवा हात लांबविला, पृथ्वीने
त्यांस गिळिलें. १३ त्वां हे खंडून घेतलेले लोक
दयेने आणिले, आपल्या सामर्थ्याने आपल्या प-
वित्र स्थानाकडे नेले. १४ राष्ट्रें ऐकून कांपतील,
पलेशेतांतील राहणाऱ्यांस दुःख व्याप्त करील.
१५ तेव्हां अदोमाचे अग्रसर विस्मित होतील;
मवाबी बलाढ्य यांस कंप व्यापील; खनानांतील
सर्व राहणारे विरून जातील. १६ भय व
घाबरेपण त्यांवर पडेल, तुझ्या मोठ्या भुजामुळें
ते दगडासारिखे एथपर्यंत स्तब्ध होतील कीं हे
परमेश्वरा, तुझे लोक पार जातील, जे लोक
त्वां विकत घेतले ते पार जातील तोंपर्यंत. १७
तूं त्यांस आणून आपल्या वतनाच्या डोंगरांत
लावसील; हे परमेश्वरा, तें ठिकाण त्वां आ-
पल्या वस्तीसाठीं केलें आहे; हे प्रभू, तें पवित्र-
स्थान तुझ्या हातानी सिद्ध केलें आहे. १८
परमेश्वर सदासर्वकाळ राज्य करील. १९ कां
तर फारोचे घोडे त्याच्या रथांसुद्धां व त्याच्या
स्वारांसुद्धां समुद्रांत गेले, आणि परमेश्वराने
समुद्राचें पाणी त्यांजवर फिरवून आणिलें, परंतु
इस्राएलाचीं संतानें समुद्राच्यामधून कोरड्या भू-
मीवरून गेलीं."

२० तेव्हां मिर्याम जी भविष्यवादीण आह-
रोनाची बहीण तिने आपल्या हातीं डफ घेतला,
आणि तिच्यामागें सर्व स्त्रिया डफ घेऊन ताफ्या-
नी बाहेर आल्या. २१ तेव्हां मिर्यामीने त्यांस
असें उत्तर केलें, "तुह्मी परमेश्वराला गायन
करा, कां कीं त्याने अयच जय केला, घोडे व
त्यांवरचे स्वार समुद्रांत टाकिले आहेत."
२२ मग मोशाने इस्राएलास सुफसमुद्राहा-
सून नेलें, आणि ते शूर नांवें रानांत गेले; तेव्हां
ते रानांत तीन दिवस चालले आणि त्यांस पाणी
मिळालें नाहीं. २३ मग ते माऱ्यास आले,
परंतु माऱ्यांतील पाणी त्यांच्याने पिववलें नाहीं
कारण कीं तें कडू होतें, यास्तव त्याला मारा असें
नांव पडलें. २४ तेव्हां लोकानी मोशावर कुर-
कुरीत म्हटलें, "आह्मी काय पिऊं?" २५ तेव्हां
त्याने परमेश्वराला हाक मारिली, मग परमे-
श्वराने त्याला झाड दाखविलें आणि त्याने तें
पाण्यांत घातलें, मग पाणी गोड झालें; तेथें त्या-
ने त्यांस नेम व न्याय लाविला, आणि तेथें त्यांची
परीक्षा घेतली. २६ तेव्हां त्याने म्हटलें, "जर
तूं आपला देव परमेश्वर याची वाणी ऐकसी-
लच ऐकसील, आणि त्याच्या दृष्टीस जें नीट तें
करसील, आणि त्याच्या आज्ञा मानसील, आणि
त्याचे सर्व नेम पाळसील, तर जीं दुखणीं म्या
मिसऱ्यांवर घातलीं, त्यांतील कोणतेंहि मी तुज-
वर घालणार नाहीं, कां तर तुला निरोगी करणा-
रा मी परमेश्वर आहें." २७ मग ते एलीमास
आले, तेथें पाण्याचे बारा झरे आणि सत्तर
खजुऱ्या होत्या आणि तेथें पाण्याजवळ उतरले.

### अध्याय १६.

मग इस्राएलाच्या संतानांचा सर्व समुदाय ए-
लीमापासून निघाला, आणि मिसरदेशांतून
निघाल्यापासून दुसऱ्या महिन्यांतील पंधराव्या
दिवसीं एलीम व सिना यांमध्यें जें सीनरान
तेथें आला. २ मग रानामध्यें इस्राएलाच्या संता-
नांच्या सर्व समुदायाने मोशावर व आहरोनावर
कुरकूर केली. ३ तेव्हां इस्राएलाच्या संतानानी त्यां-
स म्हटलें, "आह्मी मिसरदेशांत मांसाच्या भांड्या-
जवळ बसून जेव्हां तृप्ति होईपर्यंत आह्मी अन्न
खालें तेव्हां परमेश्वराच्या हाताकडून आह्मा-
ला मरण आलें असतें तर बरें; कां तर तुह्मी
या सर्व मंडळीला भुकेने मरावें म्हणून आह्मास
या रानांत आणिलें आहे." ४ तेव्हां परमे-
श्वर मोशाला बोलला, "पाहा, मी तुमच्यासा-
ठीं आकाशांतून अन्नाची वृष्टि करीन, मग लोक
रोजरोज बाहेर जाऊन रोजचें रोजचें गोळा क-
रितील, [illegible] ते माझ्या शास्त्राप्रमाणें चालतील

किंवा नाहीं, याविषयीं मी त्यांची परीक्षा घेईन.
५ आणि साहाव्या दिवशीं असें व्हावें कीं जें ते
आंत आणितात तें त्यांनी सिद्ध करावें, आणि जें
रोजरोज ते गोळा करितात त्याची दुप्पट होईल."
६ मग मोशे व आहरोन सर्व इस्राएलाच्या
संतानांस बोलले, "परमेश्वराने तुह्मांस मिसर
देशांतून आणिलें आहे, हें संध्याकाळीं तुह्मी जा-
णाल, आणि सकाळीं परमेश्वराचें गौरव तुह्मी
पाहाल. ७ कारण कीं परमेश्वरावर तुमच्या
ज्या कुरकुरी त्या त्याने ऐकिल्या आहेत, आणि
आह्मी काय आहों कीं तुह्मी आह्मावर कुरकूर
करितां?" ८ आणि मोशे बोलला, "संध्याका-
ळीं परमेश्वर तुह्मांस मांस खायास देईल,
आणि सकाळीं भाकर तृप्ति होईपर्यंत देईल,
कारण कीं तुमच्या ज्या कुरकुरी तुह्मी परमे-
श्वरावर करितां त्या त्याने ऐकिल्या आहेत;
आह्मी तर काय आहों? तुमच्या कुरकुरी
आह्मावर नाहींत परंतु परमेश्वरावर आहेत."
९ तेव्हां मोशाने आहरोनाला सांगितलें,
"तूं इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायाला
सांग कीं, तुह्मी परमेश्वरासमोर जवळ या, कां
तर त्याने तुमच्या कुरकुरी ऐकिल्या आहेत." १०
मग इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायाला
जेव्हां आहरोन बोलत होता, तेव्हां असें झालें
कीं त्यांनी वळून रानाकडे पाहिलें, तों पाहा, पर-
मेश्वराचें गौरव ढगांत दिसलें.

११ तेव्हां परमेश्वराने मोशाला असें सा-
गितलें कीं, १२ "म्यां इस्राएलाच्या संतानांच्या
कुरकुरी ऐकिल्या आहेत; तूं त्यांस असें सांग
कीं सायंकाळीं तुह्मी मांस खाल आणि सकाळीं
भाकर खाऊन तृप्त व्हाल, मग तुह्मी जाणाल कीं
मी परमेश्वर तुमचा देव आहें." १३ नंतर
संध्याकाळीं असें झालें कीं लावे वरतीं आले आ-
णि त्यांनी तळ झांकिला, आणि सकाळीं तळाच्या
चहुंकडे दहिंवर पसरलेलें होतें. १४ मग द-
हिंवराचा पसारा आटून गेल्यावर पाहा, रानाच्या
पाठीं बारीक भुकटी थिजलेल्या दहिंवराप्रमाणें
बारीक असी भूमीवर होती. १५ तेव्हां इस्रा-
एलाच्या संतानांनी पाहून एकमेकांस ह्मटलें, "हें
काय!" कारण कीं तें काय हें त्यांस कळलें
नव्हतें; मग मोशे त्यांस बोलला, "जें अन्न पर-
मेश्वराने तुह्मांस खायास दिल्हें तें हेंच. १६
ही गोष्ट परमेश्वराने आज्ञा करून सांगितली,
तीच ही; तुह्मी प्रत्येक आपल्या खाण्याच्या
नेमाप्रमाणें एका जणासाठीं एक ओमेर असें
त्यांतून गोळा करा; प्रत्येक आपल्या राहो-
टींतल्यांसाठीं आपल्या मनुष्यांच्या गणतीप्रमाणें
असें तुह्मी गोळा करा." १७ तेव्हां इस्राएलाच्या
संतानांनी तसें केलें, आणि कोणी फार व कोणी
थोडें, असें गोळा केलें. १८ मग त्यांनी ओमेर
मापाने मोजून घेतलें, तेव्हां ज्याने फार आणिलें
त्याला अधिक झालें नाहीं, आणि ज्याने थोडें
आणिलें त्याला उणें झालें नाहीं; आपापल्या खा-
ण्याच्या नेमाप्रमाणें त्यांनी गोळा केलें. १९ आ-
णि मोशाने त्यांस सांगितलें कीं, "कोणी त्यांतील
कांहीं सकाळपर्यंत ठेवूं नये." २० परंतु कित्ये-
कांनी मोशाचें न ऐकून त्यांतील सकाळपर्यंत
ठेविलें, आणि त्याला किडे झाले व त्याची घाण
झाली, यास्तव मोशे त्यांवर रागें भरला. २१
मग ते प्रत्येक आपल्या खाण्याच्या नेमाप्रमाणें,
तें रोजरोज सकाळीं गोळा करीत असत, कां कीं
ऊन फार पडलें तेव्हां तें विरलें. २२ नंतर
साहाव्या दिवशीं असें झालें कीं त्याने दुप्पट
ह्मणजे एकासाठीं दोन ओमेर, असें गोळा केलें
आणि समुदायाच्या सर्व अधिकाऱ्यांनी येऊन मो-
शाला सांगितलें. २३ तेव्हां तो त्यांस बोलला,
"जें परमेश्वराने सांगितलें तें हेंच, उद्यां पर-
मेश्वरासाठीं विसांव्याचा पवित्र शाब्बाथ आहे,
यास्तव जें तुह्माला भाजायाचें तें भाजा, आणि
जें शिजवायाचें तें शिजवा, आणि जें अवघें उर-
लें तें सकाळपर्यंत राखायास आपल्याजवळ ठेवा."
२४ मग जसें मोशाने आज्ञा दिल्ही तसें त्यांनी
तें सकाळपर्यंत ठेविलें, आणि त्याची घाण झाली
नाहीं आणि त्यांत किडा झाला नाहीं. २५ ते-
व्हां मोशाने सांगितलें कीं, "आज तें खा, कारण
कीं आज परमेश्वरासाठीं शाब्बाथ आहे, आज
रानांत तुह्मांस मिळणार नाहीं. २६ साहा
दिवस तुह्मी तें गोळा करावें, परंतु सातवा दिवस
शाब्बाथ आहे, त्यांत तें होणार नाहीं." २७
तथापि सातव्या दिवशीं असें झालें कीं लोकांतील

कोणी गोळा करायास बाहेर गेले, परंतु त्यांस
कांहीं मिळालें नाहीं. २८ तेव्हां परमेश्वर
मोश्याला बोलला कीं, "माझ्या आज्ञा व माझीं
शास्त्रें पाळायास तुह्मी कोठपर्यंत मान्य नाहीं. २९
तुह्मी पाहा, परमेश्वराने तुह्मास शाब्बाथ दि-
ल्हा, तर याकरितां त्यानें साहाव्या दिवशीं तुह्मास
दोन दिवसांचें अन्न दिल्हें आहे; तुह्मी प्रत्येक
आपल्या वस्तींत राहा, सातव्या दिवशीं कोणी
आपल्या ठिकाणांतून बाहेर जाऊं नये." ३०
नंतर लोक सातव्या दिवशीं स्वस्थ राहिले. ३१
तेव्हां इस्राएलाच्या संतानानी त्याचें नांव मान्ना
ठेविलें; तें तर धणाबिजासारिखें पांढरें, आणि
त्याची चव मध घातलेल्या पोळीसारिखी होती.
३२ तेव्हां मोश्याने सांगितलें कीं, "परमेश्वरा-
ने ही गोष्ट आज्ञा करून सांगितली कीं तुमच्या
पिढ्यानपिढी राखण्यासाठीं त्यांतून एक ओमेर
भरावा, ह्मणजे म्या तुह्मास मिसरदेशांतून आ-
णितांना तुह्मास रानांत कोणतें अन्न खायास
दिल्हें, हें त्यानी पाहावें." ३३ नंतर मोश्याने
आहरोनाला सांगितलें कीं, "तूं एक पात्र घेऊन
त्यांत ओमेरभर मान्ना घालून तुमच्या पिढ्यान-
पिढी राखण्यासाठीं परमेश्वरासमोर तो ठेव."
३४ मग जसें परमेश्वराने मोश्याला आज्ञा
दिल्ही, तसें आहरोनाने तें राखण्यासाठीं संकेत
लेखाच्या पुढें ठेविलें. ३५ आणि इस्राएलाच्या
संतानानी मान्ना चाळीस वर्षें खाल्ला; तीं वस-
लेल्या देशास आलीं तोंपर्यंत ह्मणजे खनान दे-
शाच्या सीमेपावेतों आलीं तोंपर्यंत त्यानी मान्ना
खाल्ला. ३६ तो ओमेर तर एक मापाचा दाहावा
वांटा आहे.

## अध्याय १७.

मग इस्राएलाच्या संतानांचा सर्व समुदाय पर-
मेश्वराच्या आज्ञेप्रमाणें सीनरानापासून नि-
घून मजल दरमजल जाऊन रफीदीमांत उतरला,
तेव्हां लोकांला प्यायाला पाणी नव्हतें. २ या-
स्तव लोकानी मोश्यासीं भांडून ह्मटलें, "तुह्मी
आह्मास पाणी प्यायास द्या." तेव्हां मोशे त्यांस
बोलला, "तुह्मी मजसीं कां भांडतां? तुह्मी पर-
मेश्वराला कां चेतवितां?" ३ तेव्हां लोक तेथें
पाण्यासाठीं व्याकूळ झाले, आणि मोश्यावर कुर-
कूर करून लोकानी ह्मटलें, "आह्मास व आम-
च्या लेंकरांस व आमच्या पशूंस तान्हेमे जिवें
मारायास त्वां आह्मास मिसरांतून कां आणिलें?"
४ तेव्हां मोश्याने परमेश्वराचा असा धांवा
केला कीं, "या लोकांला मी काय करूं? मला द-
गड मारायास ते सिद्ध आहेत." ५ मग परमे-
श्वराने मोश्याला सांगितलें कीं, "तूं लोकां-
पुढें जा, आणि इस्राएलाच्या वडिलांतील कित्येक
आपल्यासंगतीं घे, आणि आपल्या ज्या काठीने
त्वां नदीला मारिलें ती आपल्या हातांत घेऊन
जा. ६ पाहा, मी तेथें तुजपुढें होरेबांत खड-
कावर उभा राहतों, आणि तूं खडकावर मार,
मग त्यांतून पाणी निघेल आणि लोक पितील."
तेव्हां इस्राएलाच्या वडिलांच्या देखतां मोश्याने
तसें केलें. ७ तेव्हां इस्राएलाच्या लोकांच्या भां-
डणावरून आणि त्यानी "परमेश्वर आमच्या-
मध्यें आहे किंवा नाहीं," असें ह्मणून परमेश्व-
राची परीक्षा केली, यावरून त्याने त्या ठिकाणा-
चें नांव मास्सा व मरीबा ठेविलें.
८ नंतर अमालेकाने येऊन इस्राएलासीं रफी-
दीमांत लढाई केली. ९ तेव्हां मोश्याने यहो-
शवाला सांगितलें कीं, "तूं आह्मासाठीं माणसें
निवडून घे आणि जाऊन अमालेकासीं लढाई कर;
उद्यां मी देवाची काठी हातांत घेऊन डोंगराच्या
शिखरावर उभा राहतों." १० मग जसें मोश्याने
यहोशवाला सांगितलें तसें त्याने अमालेकासीं लढा-
ई केली, आणि मोशे, आहरोन, व हूर, डोंगराच्या
शिखरावर चढले. ११ तेव्हां असें झालें कीं जेव्हां
मोशे आपला हात वर करी तेव्हां इस्राएल
बळावे, परंतु जेव्हां तो आपला हात खालीं करी
तेव्हां अमालेक बळावे. १२ परंतु मोश्याचे हात
थकले, यास्तव त्यानी धोंडा घेऊन त्याच्याखालीं
ठेविला आणि तो त्यावर बसला, आणि आहरोन
व हूर एक इकडे व एक तिकडे असे राहून त्या-
नी त्याच्या हातांस आधार दिल्हा; तसें सूर्य
मावळेपर्यंत त्याचे हात स्थिर राहिले. १३ आणि
यहोशवाने तरवारीने अमालेकाचा व त्याच्या लो-
कांचा मोड केला. १४ तेव्हां परमेश्वराने
मोश्याला सांगितलें कीं, "आठवणीसाठीं तूं हें

पोथींत लिही आणि यहोशवाच्या कानांत सांग,
कां तर मी अमालेकाची आठवण आकाशाखालून
पुसून टाकीनच टाकीन." १५ मग मोश्याने
वेदी बांधिली आणि तिचें नांव यहोवानिस्सी असें
ठेविलें. १६ तेव्हां त्याने ह्मटलें, "परमेश्वरा-
च्या आसनावर हात झाला, यास्तव अमाले-
कासीं परमेश्वराची लढाई पिढोपिढीं होईल."

## अध्याय १८.

आणि परमेश्वराने इस्राएलास मिसरांतून
आणिलें, तेव्हां देवाने मोश्यासाठीं व
आपले लोक इस्राएल यांसाठीं जें अवघें केलें तें
मोश्याचा सासरा इथ्रो जो मिद्यानांतील याजक
त्याने ऐकिलें. २ यास्तव मोश्याचा सासरा
इथ्रो याने मोश्याची बायको झिप्पोरा जी त्याने
अगोदर माघारें पाठविली होती तिला घेतलें;
३ अणखी तिचे दोन पुत्र; त्यांतलि एकाचें नांव गे-
र्षोम ठेविलें होतें, कां कीं त्याने ह्मटलें, मी अन्य
देशांत प्रवासी झालों. ४ आणि दुसऱ्याचें नांव
आलियेजेर, कारण कीं त्याने ह्मटलें, माझ्या पूर्व-
जांच्या देवाने माझें सहाय करून फारोच्या
तरवारीपासून माझें रक्षण केलें. ५ मग मो-
श्याचा सासरा इथ्रो त्याचे पुत्र व त्याची स्त्री
यांसुद्धां मोश्याजवळ रानांत देवाच्या डोंगरा-
जवळ जेथें हा उतरला होता तेथें आला. ६
आणि त्याने मोश्याला सांगून पाठविलें कीं, "मी
तुझा सासरा इथ्रो तुजकडे आलों आहें, आणि
तुझी स्त्री व तिच्यासंगतीं तिचे दोन पुत्र आले
आहेत." ७ तेव्हां मोशे आपल्या सासऱ्याला
भेटायास बाहेर आला आणि नमस्कार करून
त्याने त्याला चुंबन दिल्हें, मग ते एकमेकांचा स-
माचार विचारून राहोटींत आले. ८ नंतर पर-
मेश्वराने इस्राएलामुळें जें अवघें फारोला व
मिसऱ्यांस केलें होतें, जे सर्व कष्ट त्यांस वाटेवर
लागले, आणि परमेश्वराने त्यांचें रक्षण कसें
केलें, हें मोश्याने आपल्या सासऱ्याला सविस्तर
सांगितलें. ९ तेव्हां परमेश्वराने इस्राएलाला
मिसऱ्यांच्या हातांतून सोडवून जें त्यांचें बरें केलें
तें सर्व ऐकून इथ्रो संतोष पावला. १० आणि
इथ्रो बोलला कीं, "परमेश्वराने तुह्मास मिस-
ऱ्यांच्या हातांतून व फारोच्या हातांतून सोडविलें,
ह्मणजे या लोकांला मिसऱ्यांच्या हाताखालून
सोडविलें, यास्तव त्याची स्तुति होवो. ११ आ-
तां मी जाणतों कीं परमेश्वर सर्व देवांपेक्षां थोर
आहे, कां कीं ज्या गोष्टींविषयीं ते ताठा करीत
होते, त्यांत तो त्यांच्यापेक्षां वरिष्ठ झाला." १२
तेव्हां इथ्रो मोश्याचा सासरा याने देवाजवळ
होम व यज्ञ केले, आणि आहरोन व इस्राएला-
चे सर्व वडील मोश्याच्या सासऱ्यासंगतीं देवा-
समोर अन्न खायास आले.

१३ मग दुसऱ्या दिवसीं असें झालें कीं लो-
कांचा न्याय करायास मोशे बसला, आणि सका-
ळपासून सांजपर्यंत लोक मोश्याजवळ उभे रा-
हिले. १४ तेव्हां मोश्याने लोकांसाठीं जें अवघें
केलें तें त्याच्या सासऱ्याने पाहून ह्मटलें, "तूं
लोकांसाठीं जें करितोस तें काय? तूं एकला ब-
सतोस आणि सकाळपासून सांजपर्यंत सर्व लोक
तुझ्याजवळ उभे असतात, हें काय!" १५ तेव्हां
मोशे आपल्या सासऱ्याला बोलला, "यासाठीं
कीं लोक देवाजवळ विचारायास मजपासीं येतात;
१६ तेव्हां त्याचें कार्य असेल तेव्हां ते माझ्या-
जवळ येतात, मग मनुष्य व त्याचा शेजारी यां-
मध्यें मी न्याय करितों, आणि देवाचे नेम व
त्यांचीं शास्त्रें कळवितों." १७ मग मोश्याच्या
सासऱ्याने त्याला सांगितलें कीं, "तूं जे करितोस
तें बरें नाहीं. १८ तूं झिजूनच जासील, अणखी
तुझ्याजवळचे लोक तेहि, कां कीं ही गोष्ट तुझ्या
शक्तीपेक्षां भारी, तुझ्या एकल्याने करवत नाहीं.
१९ आतां माझें बोलणें ऐक, मी तुला बोध क-
रितों आणि देव तुला अनुकूल होवो; तूं लोकां-
साठीं देवाकडला ऐस, आणि तूं त्यांचीं कार्यें
देवाजवळ ने. २० आणि त्वां त्यांस नेम व
शास्त्रें प्रगट करावीं, अणखी ज्या वाटेने त्यानी
चालावें तीं, आणि जें काम त्यानी करावें, तें
त्यांस कळवावें. २१ तथापि तूं सर्व लोकांतून
गंभीर मनुष्य, देवाला भिणारे, सत्यतेचे मनुष्य,
लांचेचा द्वेष करणारे, असे पाहून हे त्यांजवळ
हजारांचे अग्रसर, शंभरांचे अग्रसर, पन्नासांचे
अग्रसर, दाहांचे अग्रसर, असे करून ठेव. २२
आणि नेहमी त्यानी लोकांचे न्याय करावे;

तथापि असें व्हावें कीं त्याने प्रत्येक मोठें कार्य
तुझ्याजवळ आणावें आणि प्रत्येक लाहन कार्य
त्यानी आपणच ठरवावें; तसें तुजवरलें ओझें
हलकें होईल, आणि ते तुझ्यासहित साहतील.
२३ जर तू ही गोष्ट करसील आणि देव तुला
आज्ञा देईल, तर तुझ्याने टिकवेल, अणखी हे
सर्व लोक आपल्या ठिकाणास सुखरूप पावतील."
२४ तेव्हां मोश्याने आपल्या सासऱ्याची गोष्ट
मानून त्याने जें सांगितलें तें सर्व केलें. २५ तसें
मोश्याने सर्व इस्राएलांतून गंभीर मनुष्य निवडून
त्यांस लोकांवर अधिकारी, हजारांचे अग्रसर,
शंभरांचे अग्रसर, पन्नासांचे अग्रसर, आणि दा-
हांचे अग्रसर असे करून ठेविलें. २६ आणि
त्यानी नेहमी लोकांचे न्याय केले; त्यानी कठीण
कार्यें मोश्याजवळ आणिलीं, आणि प्रत्येक लाहन
कार्य त्यानी आपण ठरविलें. २७ मग मोश्याने
आपल्या सासऱ्याला रवाना केलें, आणि तो आ-
पल्या देशास गेला.

## अध्याय १९.

इस्राएलाचीं संतानें मिसरदेशांतून आल्यावर
तिसऱ्या महिन्यांत प्रतिपदेच्याच दिवसीं तीं
सीनाच्या रानांत आलीं. २ कां कीं तीं रफी-
दिमापासून निघून सीनाच्या रानांत आलीं
आणि रानांत उतरलीं; तसे इस्राएल तेथें डोंग-
रापुढें तळ देऊन राहिले. ३ तेव्हां मोशे
देवाजवळ डोंगरावर चढला, आणि परमेश्व-
राने डोंगरावरून त्याला हाक मारून ह्मटलें,
"तूं याकोबाच्या घराण्यास बोलून इस्राएलाच्या
संतानांस असें सांग कीं, ४ जें म्या मिसऱ्यांला
केलें तें, आणि म्या तुह्मास गरुडांच्या पंखांवर
उचलून घेऊन माझ्याजवळ तुह्मास आणिलें, हें
तुह्मी पाहिलें आहे. ५ यास्तव जर तुह्मी माझें
बोलणें ऐकालच ऐकाल, आणि माझा करार पा-
ळाल, तर तुह्मी सगळ्या लोकांपेक्षां माझे खास-
गीचे व्हाल; सर्व पृथ्वी तर माझी आहे. ६
आणि तुह्मी माझे याजकांचें राज्य व पवित्र राष्ट्र,
असे मला व्हाल; ज्या गोष्टी त्वां इस्राएलाच्या
संतानांस सांगाव्या, त्या त्याच आहेत." ७ मग
मोश्याने येऊन लोकांच्या वडिलांस बोलाविलें,
आणि ज्या सर्व गोष्टी परमेश्वराने त्याला सां-
गितल्या, त्या त्यांच्यापुढें ठेविल्या. ८ तेव्हां सर्व
लोकानी एकंदर असें उत्तर केलें, "परमेश्वराची
जी प्रत्येक गोष्ट ती आह्मी पाळूं." मग मोश्याने
लोकांचीं वचनें परमेश्वराजवळ माघारें जाऊन
सांगितलीं. ९ तेव्हां परमेश्वर मोश्याला
बोलला, "पाहा, मी तुझ्याजवळ निबिड ढगांत
येतों, यासाठीं कीं मी तुजसीं बोलतांना लोकानी
ऐकावें, आणि त्यानी तुजवरहि सर्वकाळपर्यंत
विश्वास ठेवावा." तेव्हां मोश्याने लोकांच्या
गोष्टी परमेश्वराजवळ सांगितल्या. १० मग
परमेश्वराने मोश्याला सांगितलें, "तूं लोकांज-
वळ जा, आणि आज व उद्यां त्यांस शुद्ध कर,
आणि त्यानी आपलीं वस्त्रें धुवावीं. ११ आणि
तिसऱ्या दिवसासाठीं त्यानी सिद्ध व्हावें, कां कीं
तिसऱ्या दिवसीं परमेश्वर सर्व लोकांच्या दे-
खतां सीनाडोंगरावर उतरेल. १२ आणि तूं
चहुंकडे लोकांस सीमा करून सांग कीं, तुह्मी
डोंगरावर चढण्याविषयीं आणि त्याच्या कांठाला
शिवण्याविषयीं आपणास संभाळा, कोणी डोंग-
राला शिवल्यास मरावेंच मरावें. १३ एका
हाताने त्याला न शिवावें; शिवला, तर धोंड्यानी
मारिला जावाच जावा, अथवा बाणाने विंधलाच
जावा, पशू किंवा माणूस असो, तर तो वांचा-
याचा नाहीं; जेव्हां शिंगाचा दीर्घ शब्द होईल
तेव्हां त्यानी डोंगराजवळ यावें." १४ नंतर
मोशे डोंगरावरून उतरून लोकांजवळ आला,
मग त्याने लोकांस पवित्र केलें, आणि त्यानी आ-
पलीं वस्त्रें धुतलीं. १५ तेव्हां त्याने लोकांस
सांगितलें कीं, "तुह्मी तीन दिवसपर्यंत सिद्ध व्हा,
बायकांजवळ जाऊं नका." १६ मग तिसऱ्या
दिवसीं सकाळीं असें झालें कीं गर्जना, व विजा,
व डोंगरावर भारी ढग, आणि शिंगाचा फार
मोठा शब्द झाला, यास्तव तळांत जे सर्व लोक
ते कांपले. १७ तेव्हां देवाच्या भेटीसाठीं मो-
श्याने लोकांस तळांतून बाहेर आणिलें, आणि ते
डोंगराखालीं उभे राहिले. १८ तेव्हां सीना
डोंगर अगदी धूरमय झाला, यामुळें कीं पर-
मेश्वर अग्नीने त्यावर उतरला, आणि त्याचा
धूर भट्टीच्या धुरासारिखा वरतीं गेला, सर्व डों-

गरहि फार कांपला. १९ मग शिंगाचा शब्द
वाढून फार मोठा झाला तेव्हां मोशे बोलला,
आणि देवाने शब्देकरून त्याला उत्तर दिल्हें.
२० आणि परमेश्वर सीना डोंगरावर डोंगरा-
च्या शिखरावर उतरला, तेव्हां परमेश्वराने मो-
श्याला डोंगराच्या शिखरावर बोलाविलें, आणि
मोशे चढला. २१ मग परमेश्वराने मोश्या-
ला सांगितलें कीं, "तूं उतरून लोकांस बजावून
सांग, नाहीं तर ते पाहायास परमेश्वराजवळ
मर्यादा मोडून येतील आणि त्यांतील बहुत म-
रून पडतील. २२ आणि याजकहि जे परमे-
श्वराजवळ येतात त्यानी आपण शुद्ध व्हावें,
नाहीं तर परमेश्वराचा क्षोभ त्यांवर होईल."
२३ तेव्हां मोशे परमेश्वराला बोलला कीं,
"सीना डोंगरावर लोकांच्याने चढवत नाहीं, कां
तर त्वां आह्मास बजावून सांगितलें कीं, डोंगराला
सीमा कर आणि त्याला पवित्र कर." २४ तेव्हां
परमेश्वराने त्याला सांगितलें, "तूं जा, उतर,
मग तूं वरतीं ये, आणि आहरोनाने तुझ्यासंगतीं
यावें परंतु याजकानी व लोकानी परमेश्वराजवळ
वरतीं येण्याकरितां मर्यादा मोडूं नये, नाहीं तर
त्याचा क्षोभ त्यांवर होईल." २५ मग मोश्याने
लोकांजवळ खालीं येऊन त्यांस सांगितलें.

## अध्याय २०.

तेव्हां देवाने हीं अवघीं वचनें ह्मटलीं कीं,
२ "ज्याने तुला मिसरदेशांतून दासांच्या
घरांतून काढिलें, तो मी परमेश्वर तुझा देव
आहें.
३ माझ्यासमोर तुला दुसरे देव नसोत.
४ तूं आपल्यासाठीं कोरींव मूर्त्ति करूं नको,
आणि जें वरतीं आकाशांत अथवा जें खालतीं
पृथ्वींत अथवा जें पृथ्वीच्या खालतीं पाण्यांत त्या-
ची प्रतिमा करूं नको. ५ त्याच्या पायां पडूं
नको, आणि त्याची सेवा करूं नको; कां कीं मी
परमेश्वर तुझा देव आवेशी देव आहें, जे मा-
झा द्वेष करितात त्यांच्या तिसऱ्या व चवथ्या
पिढीपर्यंत बापांच्या अन्यायामुळें लेंकरांचें शासन
करितों. ६ आणि जे मजवर प्रीति करितात
आणि माझ्या आज्ञा पाळितात त्यांच्या हजारांवर
मी दया करितों.
७ परमेश्वर तुझा देव याचें नाम व्यर्थ
घेऊं नको, कां कीं जो त्याचें नाम व्यर्थ घेतो त्या-
ला परमेश्वर निर्दोषी असें मानणार नाहीं.
८ शाब्बाथ जो दिवस तो पवित्र पाळावा
ह्मणून त्याची आठवण कर. ९ साहा दिवस
उद्योग करून आपलें सर्व काम कर. १० पण
सातवा दिवस परमेश्वर तुझा देव याच्या वि-
साव्याचा दिवस आहे, त्यांत तूं कांहीं काम करूं
नको, तूं व तुझा पुत्र व तुझी कन्या व तुझा दास
व तुझी दासी व तुझा पशु व तुझ्या दरवाज्यां-
तील जो तुझा विदेशी त्यानेहि करूं नये; ११
कां कीं परमेश्वराने साहा दिवसांत आकाश
व पृथ्वी व समुद्र यांस व यांमध्यें जीं सर्व त्यांस
उत्पन्न केलें, आणि सातव्या दिवशीं तो स्वस्थ
राहिला; यास्तव परमेश्वराने शाब्बाथ दिव-
साला आशीर्वाद देऊन त्याला पवित्र ठरविलें.
१२ परमेश्वर तुझा देव जो देश तुला दे-
तो त्यांत तुझें आयुष्य दीर्घ व्हावें ह्मणून आपला
बाप व आपली आई यांचा सन्मान कर.
१३ तूं हत्या करूं नको.
१४ तूं जारकर्म करूं नको.
१५ तूं चोरी करूं नको.
१६ तूं आपल्या शेजाऱ्याविषयीं खोटी साक्ष
देऊं नको.
१७ तूं आपल्या शेजाऱ्याच्या घरावर लोभ
ठेवूं नको; आपल्या शेजाऱ्याची बायको, अथवा
त्याचा दास, अथवा त्याची दासी, अथवा
त्याचा बैल, अथवा त्याचें गाढव, अथवा आ-
पल्या शेजाऱ्याचें जें कांहीं असेल त्याजवर लोभ
ठेवूं नको."
१८ तेव्हां त्या गर्जना, व ते आळ, व शिंगाचा
शब्द, व धूरयुक्त डोंगर हीं सर्व लोकानी पा-
हिलीं; यास्तव लोक पाहून पळाले आणि दूर उभे
राहिले. १९ आणि त्यानी मोश्याला ह्मटलें, "तूं
आह्मासीं बोल, मग आह्मी ऐकूं, परंतु देवाने
आह्मासीं न बोलावें; बोलला, तर आह्मी मरूं."
२० तेव्हां मोशे लोकांस बोलला, "तुह्मी भिऊं
नका, कां तर देव यासाठीं आला कीं तुमची

परीक्षा करावी, आणि यासाठीं कीं त्याचें भय
तुमच्या लक्षांत असतां तुह्मी पाप न करावें."
२१ तेव्हां लोक दूर उभे राहिले, परंतु मोशे
निबिड काळोखाजवळ जेथें देव होता तेथें गेला·
२२ मग परमेश्वराने मोशाला सांगितलें, "तूं
इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं, 'मी आका-
शांतून तुह्मासीं बोललों, हें तुह्मी पाहिलें आहे·
२३ तुह्मी माझ्यासमोर रुप्याचे देव करूं नका,
आणि सोन्याचे देव आपल्यासाठीं करूं नका·
२४ तूं मजसाठीं मातीची वेदी कर, आणि ति-
जवर तुझ्या शेरडांतून व तुझ्या गुरांतून तुझे होम
व तुझीं शांतिकारक यज्ञ कर; ज्या प्रत्येक ठि-
काणीं मी आपल्या नामाचें स्मरण करवितों, तेथें
तुझ्याजवळ येऊन तुला आशीर्वाद देईन. २५
आणि जर तूं मजसाठीं धोंड्यांची वेदी करसील,
तर ती चिऱ्यांची बांधूं नको; कां कीं जर तूं आ-
पलें शस्त्र तिजवर लावितोस, तर त्वां तिला विटा-
ळलें आहे· २६ आणि माझ्या वेदीवर पायऱ्यांनीं
चढूं नको, ह्मणजे तिजवर तुझें नागवेपण उघडें न
व्हावें."

### अध्याय २१·

"आणि हे नियम त्वां त्यांस सांगावे, ते हे
आहेत· २ जर तूं इब्री चाकर विकत
घेतोस, तर त्याने साहा वर्षें चाकरी करावी, प-
रंतु सातव्या वर्षी तो फुकट मोकळा व्हावा. ३
जर तो सडाच आला, तर तो सडाच निघावा;
जर तो बायको घेऊन आला, तर त्याच्या बायकोनें
त्याच्यासंगतीं निघावें. ४ जर त्याच्या मालकानें
त्याला बायको करून दिल्ही आणि त्या बायको-
ला त्यापासून पुत्र अथवा कन्या झाली, तर ती
आणि तिचीं लेंकरें तिच्या मालकाचीं व्हावीं,
आणि तो सडाच निघावा. ५ परंतु जर तो
चाकर निश्चयेंकरून ह्मणतो कीं, 'मी आपल्या
मालकावर, आपल्या बायकोवर, आणि आपल्या
लेंकरांवर प्रीति करितों, मी मोकळा होऊन जात
नाहीं,' ६ तर त्याच्या धन्यानें त्याला न्याया-
धीशांजवळ आणावें, आणि त्यानें त्याला दारा-
जवळ अथवा चौकटीच्या बाहीजवळ आणावें,
मग त्याच्या धन्याने आरी घेऊन त्याचा कान टों-
चावा, नंतर त्याने त्याची चाकरी सर्वकाळ करावी·
७ आणि जेव्हां कोणी आपली कन्या चाक-
रीण होण्यास विकितो, तेव्हां जसें चाकर निघ-
तात तसें तिने न निघावें· ८ तिच्या ज्या धन्याने
ती आपली व्हावी ह्मणून निश्चय केला होता,
त्याच्या विचारांत जर ती वाईट असेल तर त्या-
ने तिला खंडणी घेऊन सोडावें, त्याने तिजविषयीं
दगा केल्यावर अन्य लोकांजवळ तिला विकायास
त्याला सत्ता नाहीं· ९ आणि जर त्याने तिला
आपल्या पुत्रासाठीं निश्चय करून ठेविलें होतें,
तर त्याने तिला कन्यांच्या रीतीप्रमाणें करावें·
१० जरीं तो दुसरी बायको करून घेतो तरीं
तिचें अन्नवस्त्र आणि तिजसीं व्यवहार त्याने
कमी करूं नये· ११ आणि जर तो हीं तिन्ही
तिजसीं करीत नाहीं तर तिने पैका दिल्ह्यावांचून
फुकट निघावें.

१२ माणूस मरेल असें जो त्याला हाणितो,
तो मारिलाच जावा· १३ परंतु जर कोणी टपून
मारिलें असें नाहीं, परंतु देवाने त्याच्या हातीं
लागूं केला, तर जेथें त्याने पळावें असें ठिकाण मी
तुझ्यासाठीं नेमून देईन· १४ परंतु जर कोणी
बुद्धीने आपल्या शेजाऱ्याला जिवें मारायास त्या-
वर दाटून येतो, तेव्हां तुह्मी त्याला जिवें मारा-
यास माझ्या वेदीजवळून देखील काढा· १५
आणि जो आपल्या बापाला किंवा आपल्या आ-
ईला हाणितो, तो मारिलाच जावा· १६ आणि
जो माणसाला चोरितो व त्याला विकितो अथवा
हा त्याच्या हातांत सांपडतो, तर तो मारिलाच
जावा· १७ आणि जो आपल्या बापाला अथवा
आपल्या आईला शाप देतो, तो मारिलाच जावा,
१८ आणि जर माणसें भांडत असतां कोणी
आपल्या शेजाऱ्याला धोंड्याने अथवा बुकीने हा-
णितो, आणि हा मरत नाहीं परंतु आपल्या अं-
थरुणावर पडतो, १९ मग जर उठून आपल्या
काठीच्या आधाराने बाहेर चालतां तर तो मार-
णारा दंडापासून सुटा व्हावा, केवळ त्याने याची
रिकामकी फेडावी आणि पूर्ण निरोगी करवावें·
२० आणि जर कोणी आपल्या चाकराला अथवा
आपल्या चाकरणीला काठीने मारितो, आणि त्या-
च्या हाताखालीं तें माणूस मरतें, तर त्याला दंड

व्हावाच व्हावा. २१ परंतु जर तें एक अथवा
दोन दिवसपर्यंत वांचेल, तर त्याला दंड करूं
नये, कां कीं तें त्याचें धन आहे.

२२ आणखी जर माणसें भांडून गरोदर स्त्री-
ला आपटितात आणि तिचा गर्भपात होतो, परं-
तु मरण होत नाहीं, तर स्त्रीचा धनी त्यावर
जितका खंड लावील तितका त्याने निश्चयें द्यावा,
किंवा न्यायाधीशांच्या ठरावाप्रमाणें त्याने द्यावा.
२३ परंतु जर मरण होतें, तर तूं जिवाबदल
जीव देवीव. २४ डोळ्याबदल डोळा, दांताबदल
दांत, हाताबदल हात; २५ पायाबदल पाय,
पोळण्याबदल पोळणें, जखमाबदल जखम, क्षता-
बदल क्षत, असें ठरीव. २६ आणि जर कोणी
आपल्या चाकराच्या डोळ्यावर, अथवा आपल्या
चाकरिणीच्या डोळ्यावर हाणितो आणि तो फुटतो,
तर त्याच्या डोळ्याबदल त्याने त्याला मोकळें
करून सोडावें. २७ आणि जर तो आपल्या
चाकराचा दांत अथवा आपल्या चाकरिणीचा
दांत पाडितो, तर त्याच्या दांताबदल त्याने त्या-
ला मोकळें करून सोडावें.

२८ आणि जर गुरूं पुरुषाला किंवा स्त्रीला
हुंडारून मारितें, आणि मरण होतें, तर तें गुरूं
धोंड्यानी मारिलेंच जावें, आणि त्याचें मांस खा-
याचें नाहीं, मग त्या गुराचा धनी दंडापासून
सुटा व्हावा. २९ परंतु जर तें गुरूं पूर्वकाळीं
हुंडारीत असे, आणि हें त्याच्या धन्याजवळ पट-
विल्यावर त्याने त्याला आवरिलें नाहीं, आणि
त्याने पुरुषाला किंवा स्त्रीला जिवें मारिलें आहे,
तर तें गुरूं धोंड्यानी जिवें मारायाचें आहे, आ-
णि त्याच्या धन्याचाहि जीव घ्यावयाचा आहे.
३० जर पैक्याचा नेम त्यावर बसविला असेल,
तर जितका त्यावर बसविला, तितका त्याने आ-
पल्या जिवाच्या खंडणीसाठीं द्यावा. ३१ जरीं
पुत्राला हुंडारितें किंवा कन्येला हुंडारितें, तरीं
या न्यायाप्रमाणें त्याला करायाचें आहे. ३२
जर गुरानें चाकर किंवा चाकरीण हुंडारिली, तर
त्याच्या धन्याला तीस शेकेल रुपें द्यावें, आणि
तें गुरूं धोंड्यानी जिवें मारिलें जावें. ३३ आणि
जर कोणी खांच उघडितो, अथवा जर कोणी
खांच खाणितो, आणि तिला झांकीत नाहीं, आणि
गुरूं अथवा गाढव त्यांत पडतें; ३४ तर त्याच्या
धन्याला खांचेच्या धन्याने पैका फेडून पूर्ण मोल
द्यावें, आणि मेलेलें त्याचें व्हावें. ३५ आणि
जर कोणाचें गुरूं दुसऱ्याच्या गुराला मारितें
आणि हें मरतें, तर त्यानी जिवंत गुरूं विकून
त्याचा पैका वांटावा, आणि मेलेलेंहि वांटावें.
३६ अथवा जर हें कळलें कीं गुरूं पूर्वकाळीं हुंडा-
रीत असे परंतु त्याच्या धन्याने त्याला आवरिलें
नाहीं, तर त्याने संपूर्ण मोल गुराकरितां गुरूं
असें देऊन फेडावें, आणि मेलेलें त्याचें व्हावें.

## अध्याय २२.

जर कोणी गुराला अथवा शेरडाला चोरून
त्याला मारितो, अथवा तें विकितो, तर त्याने
गुराकरितां पांच गुरें, आणि शेरडाकरितां चार शेर-
डें परत द्यावीं. २ जर कोणी चोर फोडीत अ-
सतां सांपडतो आणि मारिला असतां मरतो, तर
त्याच्यामुळें रक्तपात करायाचा नाहीं. ३ जर
सूर्य त्यावर उगवलेला, तर त्याच्यामुळें रक्तपात
करावा, त्याने आपल्या चोरण्याकरितां पूर्ण फेड
करावी; जर त्याचें कांहीं नाहीं, तर तो आपल्या
चोरीकरितां विकला जावा. ४ जर चोरलेली
वस्तु कोणी गुरूं अथवा गाढव अथवा शेरडूं त्या-
च्या हातांत प्रत्यक्ष सांपडते, तर त्याने दुप्पट
माघारी द्यावी. ५ जर कोणी शेत अथवा मळा
खावविता, ह्मणजे आपला पशु दुसऱ्याच्या शे-
तांत घालून चारितो, तर त्याने आपल्या शेतांतील
उत्तम उत्पन्न अथवा मळ्यांतील उत्तम उत्पन्न
देऊन फेडावें. ६ जर विस्तु सुटून कांटवणांमध्यें
लागतो आणि धान्याच्या गंज्या, अथवा जित्रबें,
अथवा शेतमळा जळतो, तर ज्याने विस्तु पेट-
विला त्याने मोल भरून द्यावें.

७ जर कोणी पैका अथवा वस्तु आपल्या
शेजाऱ्याजवळ राखायास ठेवितो आणि त्या मा-
णसाच्या घरांतून कांहीं चोरलें जातें, तर चोर
सांपडल्यास त्याने दुप्पट मोल भरून द्यावें.
८ जर चोर सांपडत नाहीं, तर घरधन्याने
आपला हात आपल्या शेजाऱ्याच्या धनावर घा-
तला किंवा नाहीं, याविषयीं तो न्यायाधीशां-
जवळ नेला जावा. ९ प्रत्येक अपराधाच्या

गोष्टीविषयीं, गुराविषयीं, गाढवाविषयीं, शेरडा-
विषयीं, पांघरुणाविषयीं, कांहीं हरपलेल्याविषयीं,
हें आपलें, असें कोणी ह्मणतो, तर त्याविषयीं
दोघांचा वाद न्यायाधीशांजवळ जावा; ज्याला
न्यायाधीश अन्यायी ठरवितील, त्याने आपल्या
शेजाऱ्याला दुप्पट मोल भरून द्यावें. १०
जर कोणी आपल्या शेजाऱ्याजवळ गाढव अ-
थवा गुरूं अथवा शेरडूं किंवा कोणताहि पशु
राखायास ठेवितो, आणि तें मरतें अथवा व्यंग
होतें अथवा कोणी पाहत नसतां वळवून नेलें जातें,
११ तर परमेश्वराची शपथ त्या दोघांमध्यें
व्हावी कीं त्याने आपल्या शेजाऱ्याच्या धनावर हात
घातला नाहीं, मग त्याच्या धन्याने अंगीकारावी
आणि त्याने मोल न भरावें. १२ आणि जर
त्यापासून चोरलेंच गेलें, तर त्याच्या धन्याज-
वळ त्याने मोल भरून द्यावें. १३ जर फा-
डलेंच, तर त्याने तें साक्षीसाठीं आणावें; जें फा-
डलें, त्याचें मोल त्याने न भरावें. १४ आणि
जर कोणी आपल्या शेजाऱ्याजवळून मागून घेतो,
आणि त्याचा धनी त्याच्यासंगतीं नसतां तें व्यंग
होतें अथवा मरतें, तर त्याने संपूर्ण मोल भरून
द्यावें. १५ जर त्याचा धनी त्याच्याजवळ होता,
तर त्याने मोल न भरावें; जर तें भाड्याचें, तर
त्याच्या भाड्यासाठीं आलें. १६ आणि जी
कुमारी वाग्दत्त झाली नाहीं, तिला जर कोणी
भुलवून तिच्याजवळ निजतो, तर त्याने निश्चयें
पैका देऊन आपली नवरी असी करावी. १७
जर तिचा बाप ती त्याला द्यायास अगदीं अन-
मान करितो, तर कुमाऱ्यांच्या आंदणाप्रमाणें त्याने
पैका तोलून द्यावा. १८ तूं जादुखोरिणीला जगूं
देऊं नको. १९ प्रत्येक जो पशूजवळ निजतो,
तो मारिलाच जावा. २० परमेश्वराजवळ या
एकावांचून दुसऱ्या देवाजवळ जो अर्पण करितो,
त्याचा जीवोत्सर्ग केला जावा.

२१ विदेश्याला तर तूं त्रास देऊं नको, त्याचा
जाच करूंच नको, कां कीं तुह्मी मिसरदेशांत
विदेशी होतां. २२ कोणत्या विधवेला अथवा
पोरक्याला तुह्मी जाचूं नका. २३ जर तूं असा
कोणीएकाला जाचसील, आणि जर तो मला
कांहीं ओरडेल, तर मी त्याचें ओरडणें ऐकेनच
ऐकेन, २४ आणि माझा राग पेटेल, आणि मी
तुह्मास तरवारीने जिवें मारीन, मग तुमच्या स्त्रि-
या विधवा होतील, आणि तुमचीं लेंकरें पोरकीं
होतील. २५ माझे लोक जे तुझ्याजवळ दरिद्री
असतील त्यांला जर तूं पैका उसणा देतोस, तर
त्यांपासून व्याज घेणारा असा होऊं नको, त्यांवर
व्याजभार ठेवूं नको. २६ जर तूं आपल्या शे-
जाऱ्याचें पांघरूण हाडपरूपें कांहीं घेसील, तर
सूर्य मावळे तोंपर्यंत तें त्याला परत दे; २७
कां कीं तें त्याचें प्रावरण केवळ तेंच, त्याच्या
आंगासाठीं त्याचें पांघरूण, तें घेतलें तर तो
काय घेऊन निजेल? आणि असें होईल कीं जेव्हां
तो मला हाक मारील, तेव्हां मी ऐकेन, कां तर
मी दयाळू आहें. २८ तूं प्रभूंची निंदा करूं
नको, आणि आपल्या लोकांच्या अधिकाऱ्याला
शाप देऊं नको. २९ तूं आपलें उत्पन्न व आ-
पला रस अर्पायाला उशीर करूं नको; तुझ्या
पुत्रांतील प्रथम जन्मलेला मला दे. ३० तुझ्या
गुरांविषयीं व तुझ्या शेरडांविषयीं तसेंच कर,
त्यांतला ज्येष्ठ नर सात दिवस आपल्या आई-
जवळ असावा, मग आठव्या दिवसीं तूं तो मला
दे. ३१ तुह्मी तर माझ्यासाठीं पवित्र माणसें
व्हा, आणि माळांत जें फाडलेलें मांस तें तुह्मी
खाऊं नका, तें कुत्र्याला घाला."

## अध्याय २३.

"तूं खोटी अवई वाहूं नको; खोटे साक्षी हो-
ण्यास तूं दुष्टाच्यासंगतीं आपला हात घालूं
नको. २ तूं दुष्टाई करायास बहुतांलाहि अनुसरूं
नको, आणि वादांत बहुतांला अनुसरून विपरीत
उत्तर देऊं नको. ३ दुबळ्याच्याहि वादांत त्याज-
वर दृष्टि देऊं नको. ४ जर तुझ्या शत्रूचें गुरूं
अथवा त्याचें गाढव मोकार जातांना तुला आढ-
ळेल, तर तूं याला त्याजकडे अगत्य फिरीव. ५
जर तूं आपल्या द्वेष्याचें गाढव त्याच्या ओझ्या-
खालीं बसलेलें पाहतोस, तर त्याचें सहाय केल्या-
वांचून राहूं नये, त्याचें सहाय तर अगत्य कर.
६ तूं आपल्या दरिद्र्याचा निवाडा करण्यांत त्या-
चा न्याय विपरीत करू नको. ७ तूं खोट्या
गोष्टीपासून दूर ऐस, आणि निर्दोषी व नीतिमान्

यांस जिवें मारूं नको, कां कीं मी दुष्टाला नीति-
वान् ठरविणार नाहीं. ८ आणि तूं लांच घेऊं
नको, कां तर लांच डोळसांस अंधळें करिती,
आणि नीतिवंतांचीं बोलणीं विपरीत करिती. ९
आणि तूं विदेश्याला जाचूं नको, कां कीं तुह्मी
विदेश्याचा जीव जाणतां, कारण कीं तुह्मी मिसर
देशांत विदेशी होतां. १० आणि तूं आप-
ली भूमि साहा वर्षें पेरून तिचें उत्पन्न सा-
ठीव. ११ परंतु सातव्यांत तिला सोडून पडीत
ठेव, मग तुझ्या लोकांतील दरिद्री खातील, आणि
त्यांपासून जें उरलें तें रानांतील पशु खाईल;
तुझा द्राक्षमळा व जाईतवन यांविषयीं तसेंच कर.
१२ साहा दिवस तूं आपलीं कामें कर,
परंतु सातव्या दिवशीं स्वस्थ राहा, ह्मणजे तुझें
गुरूं व तुझें गाढव यांस विसावा व्हावा, आणि
तुझ्या चाकरणीचा मूल व विदेशी, यांनीं विसावा
घ्यावा. १३ आणखी जें म्या तुह्मांस सांगितलें
त्या अवघ्याविषयीं तुह्मी संभाळा; आणि दुस-
ऱ्या देवांच्या नांवाची आठवण करूं नका, तुझ्या
तोंडांतून न ऐकावें. १४ वर्षांत तीन वेळा तूं
मजसाठीं सण कर. १५ तूं बेखमीर भाक-
रीचा सण पाळ, नेमीत काळीं चैत्रमासांत, कां
कीं त्यांत तूं मिसरांतून निघालास, तेव्हां म्या
तुला आज्ञा दिल्याप्रमाणें सात दिवस बेखमीर
भाकरी खा, आणि माझ्या दर्शनास लोकांनीं
रिकामें न यावें. १६ तुझ्या श्रमांचीं प्रथम फळें
ह्मणजे जें त्वां शेतात पेरिलें त्याचा कापणीसण
हाहि, आणि वर्षाच्या समाप्तीस जेव्हां तूं शेतां-
तून आपल्या श्रमांच्या फळांचा संग्रह करितोस,
तेव्हांचा संग्रहसण हा पाळ. १७ वर्षांत तीन
वेळा तुझ्या सर्व पुरुषांनीं परमेश्वर प्रभु यापुढें
दर्शनास यावें. १८ तूं माझ्या यज्ञाचें रक्त
खमीराच्या भाकरीसुद्धां वाहूं नको, आणि माझ्या
यज्ञाचा मेद सकाळपर्यंत ठेवायाचा नाहीं. १९
तुझ्या भूमीच्या प्रथम फळांतील जो प्रथम भाग
तो तूं आपला देव परमेश्वर याच्या घरीं आण;
तूं करडूं त्याच्या आईच्या दुधांत शिजवूं नको.
२० पाहा तुला वाटेवर राखायास आणि
जें ठिकाण म्या सिद्ध केलें आहे, तेथें तुला पों-
हंचायास मी तुजपुढें दूत पाठवितों. २१ त्या-
समोर संभाळून त्याची गोष्ट ऐक, त्याशीं कडूं
होऊं नको, कां तर तो तुमचा अपराध साहणार
नाहीं, कारण कीं माझें नाम त्यामध्यें आहे. २२
आणखी जर तूं त्याची वाणी ऐकसीलच ऐकसी-
ल, आणि जें अवघें मी तुला सांगेन तें करसील,
तर तुझ्या वैऱ्यांशीं मी वैरी होईन, आणि तुझ्या
जाचणाऱ्यांस मी जाचीन. २३ आणखी माझा
दूत तुजपुढें जाऊन तुला अमोरी, व हित्ती, व
परिज्जी, व कनानी, हिव्वी व यबूसी यांमध्यें
पोंहंचवील, आणि मी त्यांचा नाश करीन. २४
तूं त्यांच्या देवांच्या पायां पडूं नको, आणि त्यांची
सेवा करूं नको, आणि त्यांच्या कामांप्रमाणें करूं
नको, परंतु त्यांस अगदीं पाड, आणि त्यांच्या
मूर्त्ती अगदीं फोडून टाक. २५ तुह्मी तर आ-
पला देव परमेश्वर याची सेवा करा, मग तो
तुझ्या अन्नाला व तुझ्या पाण्याला आशीर्वाद
देईल, आणि मी रोग तुजमधून दूर करीन. २६
तुझ्या देशांत कोणी गर्भपाती व वांझ होणार
नाहीं; तुझ्या दिवसांची संख्या मी पूर्ण करीन.
२७ मी आपलें भय तुजपुढें चालवून त्यांस दा-
खवीन, आणि ज्या सर्व लोकांवर तूं जासील
त्यांचा नाश करीन, आणि तुझ्या सर्व वैऱ्यांस
तुजपुढें पाठमोरे करून लावीन. २८ आणखी
तुझ्यापुढें गांधण्या पाठवीन, आणि त्या तुझ्यापु-
ढून हिव्वी, कनानी, व हित्ती, यांस घालवितील.
२९ देश ओसाड न व्हावा आणि रानांतील
पशु तुजवर न उठावे ह्मणून मी एकाच वर्षांत
त्यांस तुजपुढून घालविणार नाहीं. ३० मी त्यां-
स तुजपुढून थोडेंथोडें घालवीन, तितक्यांत तूं
सफळ होऊन सर्व देशाचें वतन करसील तों-
पर्यंत. ३१ आणि मी तुझी सीमा सुफसमुद्रा-
पासून पलिष्ट्यांच्या समुद्रापर्यंत, आणि रानापा-
सून नदीपर्यंत ठेवीन; कां कीं देशांतील राहणारे
तुझ्या हातीं देईन, आणि तूं त्यांस आपल्यापुढून
घालविसील. ३२ त्यांशीं आणि त्यांच्या दे-
वांशीं तूं करार करूं नको. ३३ त्यांनीं तुझ्या
देशांत न राहावें, राहिलें तर ते तुला मजविषयीं
पापांत लावितील, कां कीं तूं त्यांच्या देवांची से-
वा करसील, आणि तें तुला फांसरूप होईल."

## अध्याय २४.

तेव्हां त्याने मोश्याला सांगितलें, "तूं व आह-
रोन, नादाब व अबीहू व इस्राएलाच्या व-
डिलांतील सत्तर जण परमेश्वराजवळ चढून
या, परंतु तुह्मी दुरून भजन करा. २ आणि
मोश्याने मात्र परमेश्वराजवळ यावें, परंतु त्या-
नी जवळ न यावें, आणि लोकांनी त्याच्यासंगतीं
वर न यावें." ३ तेव्हां मोश्याने येऊन लो-
कांजवळ परमेश्वराच्या सर्व गोष्टी आणि सर्व
न्याय सविस्तर सांगितले, मग सर्व लोकांनी
एका शब्दरूपें उत्तर देतां ह्मटलें कीं, परमेश्व-
राने ज्या अवघ्या गोष्टी सांगितल्या त्या आह्मी
करूं." ४ तेव्हां मोश्याने परमेश्वराच्या सर्व
गोष्टी लिहिल्या, आणि सकाळीं उठून डोंगरा-
खालीं वेदी बांधिली, आणि इस्राएलाच्या बारा
वंशांप्रमाणें बारा खांब बांधिले. ५ आणि त्याने
इस्राएलाच्या संतानांतील तरणे पाठविले, मग
त्यांनी परमेश्वराजवळ होम केले आणि शांति-
कारक गोऱ्ह्यांचे यज्ञ केले. ६ तेव्हां मोश्याने
अर्धे रक्त घेऊन वाट्यांमध्यें ठेविलें, आणि अर्धे
रक्त वेदीवर शिंपडिलें. ७ मग त्याने क-
राराचें पुस्तक घेऊन लोकांच्या कानीं वाचिलें;
तेव्हां त्यांनी ह्मटलें कीं, "जें अवघें परमेश्व-
राने सांगितलें तें आह्मी करूं आणि मानूं." ८
मग मोश्याने तें रक्त घेऊन लोकांवर शिंपडून
ह्मटलें कीं, "पाहा, ह्या अवघ्या गोष्टींविषयीं जो
करार परमेश्वराने तुह्मांसीं केला, त्याचें रक्त
हें आहे." ९ मग मोशे व आहरोन, नादाब
व अबीहू व इस्राएलाचे सत्तर वडील चढले.
१० आणि त्यांनी इस्राएलाचा देव पाहिला,
तेव्हां त्याच्या पायांखालीं निळारंगी पाषाणाच्या
चिरेबंदी कामासारिखें, व शुद्धतेने आकाशाच्या
तळासारिखें होतें. ११ तेव्हां इस्राएलाच्या
संतानांच्या अधिकाऱ्यांस त्याने आपला हात ला-
विला नाहीं, परंतु त्यांनी देव पाहिला, मग
ते जेविले व प्याले. १२ तेव्हां परमेश्वराने
मोश्याला सांगितलें, "तूं डोंगरावर मजपाशीं चढ,
आणि तेथें ऐस, मग त्यांस शिकवायास धोंड्या-
च्या पाट्या व शास्त्र व आज्ञा ज्या म्या लिहि-
ल्या, त्या मीं तुला देईन." १३ तेव्हां मोशे
आपला सेवक यहोशवा यासुद्धां उठला, आणि
मोशे देवाच्या डोंगरावर चढला. १४ तेव्हां
त्याने त्या वडिलांस सांगितलें कीं, "आह्मी मा-
घारें तुमच्याजवळ येऊं तोंपर्यंत तुह्मी एथें आ-
ह्मासाठीं राहा; आणि पाहा, आहरोन व हूर
तुमच्यासंगतीं आहेत, कोणाचा कांहीं वाद अस-
ल्यास त्याने त्यांजवळ जावें." १५ मोशे तर
डोंगरावर चढला, आणि ढगाने डोंगराला झां-
किलें. १६ तेव्हां परमेश्वराचें तेज सीना-
डोंगरावर राहिलें, आणि ढगाने त्याला साहा
दिवस झांकिलें; मग सातव्या दिवशीं त्याने ढ-
गाच्या मधून मोश्याला हाक मारिली. १७ तेव्हां
परमेश्वराचें तेज इस्राएलाच्या संतानांच्या दृ-
ष्टीस जळत अग्नीसारिखें डोंगराच्या माथ्यावर
दिसलें. १८ परंतु मोशे ढगाच्यामध्यें जाऊन
डोंगरावर चढला, आणि मोशे चाळीस दिवस
आणि चाळीस रात्री डोंगरावर होता.

## अध्याय २५.

तेव्हां परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असें सांग,
त्यांनी मजसाठीं वर्गणी करून घ्यावी; जो कोणी
आपल्या संतोषाने तें देईल त्यापासून तुह्मी माझी
वर्गणी घ्या. ३ आणि जी वर्गणी तुह्मी त्यांपा-
सून घ्यावी ती हीच, सोनें व रुपें व पितळ; ४
व निळें व जांबळें व किरमिजी रंगी व बारीक
सूत व शेळ्यांची लंव. ५ आणि एडक्यांचीं
आरक्त केलेलीं कातडीं, व ताहाश कातडीं व
शिट्टी लांकडें; ६ उजेडासाठीं तेल, अभिषेकाच्या
तेलासाठीं आणि सुवासीक धुपासाठीं सुगंध द्रव्यें;
७ शोहाम पाषाण आणि एफोदासाठीं व उर-
पटासाठीं कोंदावयाचे पाषाण. ८ आणि म्या
त्यांमध्यें वस्ती करावी ह्मणून त्यांनी मजसाठीं
पवित्रस्थान करावें. ९ मंडपाचा डौल व त्यांतील
सर्व पात्रांचा डौल जो मी तुला दाखवितों त्या
अवघ्याप्रमाणें तसेंच तुह्मी करा. १० आणि
त्यांनी शिट्टी लांकडाचा कोश करावा, त्याची
लांबी अडीच हात, आणि त्याची रुंदी दीड
हात, आणि त्याची उंची दीड हात असावी.

११ आणि तूं त्याला शुद्ध सोन्याने, मढ आंतून
व बाहेरून त्याला मढ, आणि त्याजवर चहुंकडे
सोन्याचा कांठ कर. १२ आणि तूं त्याच्यासा-
ठीं सोन्याच्या चार कड्या ओतून कर, मग त्या-
च्या चार पावक्यांस लाव, ह्मणजे एका बाजूस
दोन कड्या, व दुसऱ्या बाजूस दोन कड्या अशा.
१३ आणि शिट्टी लांकडांच्या काठ्या करून
त्यांस सोन्याने मढ. १४ आणि तूं त्या काठ्या
कोशाच्या बाजूंस कड्यांत घाल, ह्मणजे त्यांकडून
कोश न्यावा. १५ काठ्या कोशाच्या कड्यांत
राहाव्या, त्यापासून काढायाच्या नाहींत. १६
आणि जो संकेतलेख मी तुला देईन तो त्या
कोशांत ठेव. १७ आणि शुद्ध सोन्याचें दयासन
असें झांकण कर; त्याची लांबी अडीच हात, व
त्याची रुंदी दीड हात असावी. १८ आणि
घडींव सोन्याचे दोन करूब कर, त्यांस दया-
सनाच्या दोन शेवटांवर कर. १९ ह्मणजे एक
करूब एका शेवटावर आणि दुसरा करूब दुस-
ऱ्या शेवटावर कर, तसें तुह्मी ते करूब दया-
सनाच्या दोन शेवटांवर करा. २० आणि करूब
आपले पंख वरतीं पसरून दयासनावर आपल्या
पंखानी छाया धरीत असावे; आणि त्यांचीं तोंडें
एकमेकाकडे दयासनाकडे करुबांचीं तोंडें असावीं.
२१ आणि तूं दयासन वरतीं कोशावर ठेव,
आणि जो संकेतलेख तुला देईन तो कोशांत
ठेव. २२ मग मी तेथें तुला साक्षात् भेटेन,
आणि इस्राएलाच्या संतानांसाठीं ज्या सर्व आज्ञा
तुला देईन, त्या त्या दयासनावरून संकेतलेखा-
च्या कोशावर जे दोन करूब त्यांमधल्या जाग्यां-
तून तुला सांगेन. २३ आणि तूं शिट्टी लांक-
डांचें मेज कर, त्याची लांबी दोन हात, व त्याची
रुंदी हातभर, व त्याची उंची दीड हात असावी.
२४ आणि तूं त्याला शुद्ध सोन्याने मढ, आणि
त्याच्या चहुंकडे सोन्याचा कांठ कर. २५ त्या-
च्यासाठीं चार बोटभर पाळहि चहुंकडे कर, आणि
चहुंकडे त्याच्या पाळीला सोन्याच्या कांठ कर.
२६ आणि त्याच्या सोन्याच्या चार कड्या कर,
आणि त्याच्या चार पायांस ज्या चार बाजू, त्यावर
त्या कड्या लाव. २७ कड्या पाळीजवळ मेज
न्यायाच्या काठ्यांसाठीं घरें असीं असावीं. २८
आणि काठ्या शिट्टी लांकडांच्या करून त्यांस
सोन्याने मढ, ह्मणजे त्यांकडून मेज न्यावयाचें
आहे. २९ आणि त्यांचीं तबकें व त्यांचीं
धूपपात्रें व त्यांचीं पात्रें व त्यांचीं शुद्धकारी पात्रें,
ज्यांकडून तर्पण करायाचें, तीं तूं शुद्ध सोन्याचीं
कर. ३० आणि मेजावर दर्शनीय अपूप मा-
झ्यासमोर अखंडित ठेव.

३१ आणि तूं शुद्ध सोन्याने दिव्याचें झाड
कर, तें दिव्याचें झाड घडींव असें करायाचें आ-
हे; त्याचें कांड व त्याच्या खांद्या, त्याचीं वात-
घरें, त्याचीं बोंडें व त्याचीं फुलें त्याचींच असा-
वीं. ३२ आणि त्याच्या बाजूंतून साहा खांद्या
निघाव्या, दिव्याच्या झाडाच्या एका बाजूंतून तीन
खांद्या आणि दिव्याच्या झाडाच्या दुसऱ्या बाजूं-
तून तीन खांद्या अशा. ३३ एका खांदीला
बदामरूपी तीन वातघरें, बोंड व फूल, आणि
दुसऱ्या खांदीला बदामरूपी तीन वातघरें, बोंड
व फूल; दिव्याच्या झाडांतून निघणाऱ्या साहा
खांद्यांचीं तसींच असावीं. ३४ आणि दिव्याच्या
झाडाच्या वरतीं बदामरूपी चार वातघरें, त्यांचीं
बोंडें, व त्यांच्या फुलासुद्धां असावीं. ३५ आणि
दिव्याच्या झाडांतून निघणाऱ्या साहा खांद्यांतील
दोन खांद्यांखालीं त्याच्यांतील बोंड, आणि दोन
खांद्यांखालीं त्याच्यांतील बोंड, आणि दोन खां-
द्यांखालीं त्याच्यांतील बोंड, असीं असावीं. ३६
त्याचीं बोंडें व त्यांच्या खांद्या त्यांच्याच अ-
साव्या, ते संपूर्ण शुद्ध सोन्याचा एक घडींव तुकडा
असावा. ३७ तसें तूं त्याचे सात दिवे कर,
आणि त्याने त्याच्या पुढल्या अंगीं उजेड पाडावा
ह्मणून कोणी त्याचे दिवे उजळावे. ३८ आणि
त्याचे चिमटे व त्याचीं अग्निपात्रें शुद्ध सोन्याचीं
असावीं. ३९ तें आणि त्याचीं हीं सर्व साहि-
त्यें एक मणभर शुद्ध सोन्याचीं करावीं. ४०
आणि त्याचा जो डौल तुला डोंगरावर दाख-
विला, त्याप्रमाणें त्यां करावें ह्मणून तूं संभाळ.

## अध्याय २६.

आणि तूं मंडप कर; कांतलेलें बारीक सूत,
व निळें व आंबळें व किरमिज रंगी सूत
यांचीं दाहा थानें कर; तीं बुटीदार कामाचीं

करूबमय असीं कर· २ एका थानाची लांबी
अठ्ठावीस हात, आणि एका थानाची रुंदी चार
हात, सर्व थानांचें एक परिमाण असावें· ३ पांच
थानें एकमेकाला जडलेलीं असावीं, आणि दुसरीं
पांच थानें एकमेकाला जडलेलीं असावीं· ४ मग
तूं बाजूकडल्या एका थानाच्या कांठीं जडण्यासाठीं
निळ्या सुताचीं बिरडीं कर, आणि दुसऱ्या पां-
चास जडण्यासाठीं बाजूकडल्या थानाच्या कांठीं
तसीं कर· ५ एका थानांत पन्नास बिरडीं कर,
आणि जें दुसरें थान जडायाचें त्याच्या बाजूला
पन्नास बिरडीं कर; तीं बिरडीं एकमेकाच्या स-
मोर असावीं· ६ आणि तूं सोन्याचीं पन्नास
अडकणें करून एक मंडप व्हावा ह्मणून त्या
अडकणानी तीं थानें एकमेकाला जोड· ७ आणि
मंडपावरील आच्छादनासाठीं शेळ्यांच्या लंवेचीं
थानें कर, तीं अकरा थानें असीं कर· ८ एका
थानाची लांबी तीस हात, आणि एका थानाची
रुंदी चार हात, अकरा थानांचें एक परिमाण अ-
सावें· ९ आणि पांच थानें वेगळीं व साहा था-
नें वेगळीं जोड, आणि साहावें थान मंडपाच्या
पुढल्या अंगीं दुणें कर. १० आणि बाजूच्या
एका थानांतील कांठीं जडण्यासाठीं पन्नास बिर-
डीं कर, दुसऱ्या जडण्याच्या थानांतील कांठींहि
पन्नास बिरडीं कर. ११ आणि पितळांचीं प-
न्नास अडकणें कर, मग तीं अडकणें बिरड्यांत
घालून राहोटी एक व्हावी ह्मणून जोड· १२
आणि राहोटीच्या थानांतील जें शेष अधिक होतें,
तें उरलेलें अर्धें थान मंडपाच्या मागें पलिकडे
होऊं दे· १३ आणि राहोटीच्या थानांतील
लांबींत जें अधिक, त्यांतील इकडे हातभर व
तिकडे हातभर तें मंडपाच्या बाजूंवर त्याच्या आ-
च्छादनासाठीं इकडे व तिकडे बाहेर व्हावें· १४
आणि तूं राहोटीसाठीं एडक्यांचीं आरक्त केलेलीं
कातडीं यांचें आच्छादन कर, अणखी वरील आ-
च्छादन ताहाश कातडीं यांचें कर· १५ आणि
तूं मंडपासाठीं शिट्टी लांकडांच्या उभ्या फळ्या
कर· १६ एका फळीची लांबी दाहा हात आणि
एका फळीची रुंदी दीड हात असावी· १७
एका फळीला दोन कुसें एकमेकाबरोबर असावीं·
मंडपाच्या सर्व फळ्या तशाच कर. १८ आणि
मंडपाच्या फळ्यांतील वीस फळ्या दक्षिणेकडल्या
बाजूसाठीं कर. १९ आणि त्या वीस फळ्यां-
खालीं रुप्याच्या चाळीस उथळ्या, एका फळी-
खालीं तिच्या दोन कुसांसाठीं दोन उथळ्या,
आणि दुसऱ्या फळीखालीं तिच्या दोन कुसां-
साठीं दोन उथळ्या अशा कर· २० आणि
मंडपाच्या दुसऱ्या बाजूसाठीं उत्तर अंगासाठीं
वीस फळ्या. २१ आणि त्यांच्या चाळीस
रुप्याच्या उथळ्या, एका फळीखालीं दोन उ-
थळ्या, आणि दुसऱ्या फळीखालीं दोन उथळ्या
अशा कर· २२ आणि पश्चिमेकडे मंडपाच्या
बाजूच्या शेवटीं साहा फळ्या कर· २३ आणि
दोन फळ्या मंडपाच्या दोन बाजूंस कोंपऱ्या-
साठीं अशा कर· २४ आणि त्या खालीं जोडले-
ल्या असाव्या, तसेंच त्याच्या वरतीं एका कों-
ड्यांत जोडलेल्या असाव्या; तसें त्या दोहोंविषयीं
असावें, दोन कोंपऱ्यांसाठीं त्या असाव्या. २५
तसें आठ फळ्या आणि त्यांच्या रुप्याच्या उथ-
ळ्या सोळा उथळ्या, एका फळीखालीं दोन
उथळ्या, आणि दुसऱ्या फळीखालीं दोन उथ-
ळ्या अशा सर्व असाव्या· २६ आणि तूं मंड-
पाच्या एका बाजूच्या फळ्यांसाठीं शिट्टी लांकडांचे
पांच अडसर कर. २७ आणि मंडपाच्या दुस-
ऱ्या बाजूच्या फळ्यांसाठीं पांच अडसर, आणि
मंडपाच्या दोन बाजूंच्या शेवटल्या अंगाच्या फ-
ळ्यांसाठीं पश्चिमेस पांच अडसर असे कर. २८
आणि फळ्यांच्या मध्यें जो मधला अडसर, तो
या शेवटापासून त्या शेवटापर्यंत पोहंचावा· २९
आणि तूं सोन्याने फळ्यांस मढ, आणि त्यांचे
कोंडे अडसरांचीं घरें ते तूं सोन्याचे कर, आणि
सोन्याने अडसरांस मढ· ३० मग जो विधि
त्या डोंगरावर पाहिला, त्याप्रमाणें तूं तो मंडप
उभा कर. ३१ आणि तूं निळें व जांबळें व
किरमिजरंगी व कांतलेलें बारीक सूत यांचा प-
डदा बुटीदार कामाचा कर, तो करूबानी युक्त
असा करायाचा आहे· ३२ नंतर तूं त्याला चार
शिट्टी खांबांवर अडकाव; हे सोन्याने मढलेले
असून रुप्याच्या चार उथळ्यांवर असावे, आणि
त्यांचे अकडे सोन्याचे असावे· ३३ तो पडदा
तर तूं त्या अडकणांखालीं घाल, आणि तेथें

पडद्याच्या आंत संकेतलेखाचा कोश ने; तसा
तो पडदा तुमच्यासाठीं पवित्रस्थान व पवित्रां-
तील पवित्रस्थान हीं भिन्न करील. ३४ आणि
तूं पवित्रांतील पवित्रस्थानांत संकेतलेखाच्या को-
शावर तें दयासन ठेव. ३५ मग तें मेज प-
डद्याच्या बाहेर ठेव, आणि तें दिव्याचें झाड
मंडपाच्या दक्षिण बाजूस मेजासमोर ठेव, आणि
मेज उत्तर बाजूस ठेव. ३६ आणि राहोटीच्या
दारासाठीं निळें व जांबळें व किरमिजरंगी व
कांतलेलें बारिक सूत, यांचा पडदा वेलबुटीचा
कर. ३७ आणि पडद्यासाठीं पांच शिट्टी खांब,
करून त्यांस सोन्याने मढ; त्यांचे अकडे सोन्याचे
असावे, आणि तूं त्यांच्यासाठीं पितळाच्या पांच
उथळ्या ओतून कर."

## अध्याय २७.

"आणि तूं शिट्टी लांकडांची वेदी कर, पांच
हात लांब व पांच हात रुंद; असी वेदी
चौरस असावी, आणि तिची उंची तीन हात
असावी. २ आणि तिच्या चार कोंपऱ्यांवर
तिला शिंगें कर; तिचीं शिंगें तिचींच असावीं,
आणि तिला पितळाने मढ. ३ आणि तूं तिच्या
राखेसाठीं तिचीं भांडीं व तिचीं चेतणारीं व
तिचीं शिंपणारीं व तिचे कांटे व तिचीं अग्नि-
पात्रें कर; तिचीं सर्व पात्रें पितळाचीं कर. ४
आणि तिच्यासाठीं जाळीकामाची पितळाची चा-
ळण कर, आणि जाळीला तिच्या चार कोनांवर
पितळाच्या चार कड्या कर. ५ आणि ती वे-
दीच्या कांठाखालीं लाव, एवढी नीच कीं ती जाळी
वेदीच्या मध्यापर्यंत असावी. ६ आणि वेदी-
साठीं कांठ्या कर; कांठ्या शिट्टी लांकडांच्या अ-
साव्या, आणि तूं त्यांस पितळाने मढ. ७ मग
तिच्या कांठ्या कड्यांमध्यें शिरात्र्या, अशा कीं
कांठ्या वेदीच्या दोन बाजूंस तिला नेण्यासाठीं
असाव्या. ८ तिला फळ्यांचे पोकळ कर, जसें
तुला डोंगरावर दाखविलें तसें त्यांनी ती करावी.
९ आणि तूं मंडपाचें अंगण कर; दक्षिणेकडल्या
बाजूस अंगणासाठीं कांतलेलें बारिक सूत, याच्या
पाडग्यांनी शंभर हातांचा विस्तार एका बाजूस
असावा. १० आणि तिचे खांब वीस व यांच्या
वीस उथळ्या पितळाच्या; खांबांचे अकडे व
त्यांचे सर रुप्याचे असावे. ११ उत्तर बाजू-
विषयीं तसेंच, लांबींत पाडग्यांचा विस्तार शंभर
हात, आणि तिचे वीस खांब, आणि यांच्या पित-
ळाच्या उथळ्या वीस खांबांचे अकडे व त्यांचे
सर रुप्याचे असावे. १२ आणि अंगणाच्या
पश्चिम बाजूची रुंदी पाडग्यांनी पन्नास हातांची,
त्यांचे खांब दाहा व यांच्या उथळ्या दाहा. १३
आणि पुढें उगवतेकडल्या बाजूस अंगणाची रुंदी
पन्नास हात. १४ म्हणजे एकीकडे पाडग्यांचे
पंधरा हात, त्यांचे खांब तीन व यांच्या उथळ्या
तीन. १५ आणि दुसरीकडे पाडग्यांचे पंधरा
हात त्यांचे खांब तीन व यांच्या उथळ्या तीन.
१६ आणि अंगणाच्या दरवाज्यासाठीं निळें व
जांबळें व किरमिजरंगी व कांतलेलें बारीक सूत,
यांचा वेलबुटीचा पडदा वीस हातभर रुंद, यां-
तले खांब चार व यांच्या उथळ्या चार असा-
व्या. १७ अंगणाच्या चहुंकडे सर्व खांबांस
रुप्याचे सर द्यावे, त्यांच्या अकड्या रुप्याच्या,
आणि त्यांच्या उथळ्या पितळाच्या असाव्या.
१८ कांतलेलें बारीक सूत याच्या पाडग्यांनी
अंगणाची लांबी शंभर हात, व रुंदी पन्नासांचे
पन्नास, व उंची पांच हात; आणि त्यांतल्या खां-
बांच्या उथळ्या पितळाच्या असाव्या. १९ मंड-
पांतील सर्व कामासाठीं त्याचीं सर्व पात्रें, त्याच्या
सर्व मेखाहि, आणि अंगणाच्या सर्व मेखा, यां-
साठीं पितळ असावें. २० आणि तूं इस्राएलाच्या
संतानांस असी आज्ञा दे कीं, उजेडासाठीं दिवा
अखंडित उजळ राखायास त्यांनी जाईतांचें कु-
टून काढलेलें निवळ तेल तुझ्याजवळ आणावें.
२१ संकेतलेखाच्या आड जो पडदा त्याच्या
बाहेर सभामंडपांत आहरोनाने व त्याच्या संता-
नांनी संध्याकाळापासून सकाळपर्यंत परमेश्वरा-
समोर तो उजळावा, इस्राएलाच्या संतानांवर
त्यांच्या पिढ्यानपिढी हा सर्वकाळ नेम आहे."

## अध्याय २८

"आणि तुझा भाऊ आहरोन याने मजसाठीं
याजकपण करावें म्हणून तूं त्याला व
त्यासहित त्याच्या पुत्रांस इस्राएलाच्या संतानां-

तून तुझ्यापासीं घे, आहरोनाला व आहरोनाचे
पुत्र नादाब व अबीहू, एलाजार व ईथामार यांस
घे. २ आणि मानासाठीं व शोभेसाठीं तुझा
भाऊ आहरोन याकरितां पवित्र वस्त्रें कर. ३
आणि कोणी बुद्धिज्ञानी ज्यांत म्या ज्ञानाचा आ-
त्मा भरिला आहे, अशांस तूं सांग कीं, आहरो-
नानें मजपासीं याजकपण करावें ह्मणून त्याला
पवित्र करायास त्यानी त्याचीं वस्त्रें करावीं. ४
आणि जीं वस्त्रें त्यानी करावीं, तीं हीं आहेत कीं
ऊरपट व एफोद व झगा व खेंसी अंगरखा, फेंटा
व काच्या, तसीं तुझा भाऊ आहरोन यानें मज-
पासीं याजकपण करावें ह्मणून त्यानी त्यासाठीं
व त्याच्या पुत्रांसाठीं पवित्र वस्त्रें करावीं. ५ या-
स्तव त्यानी सोनें व निळें व जांबळें व किरमिजरंगीं
व बारीक सूत घ्यावें. ६ मग त्यानी सोनें व निळें
व जांबळें व किरमिजरंगीं व कांतलेलें बारीक सूत,
यांचें एफोद बुटीदार कामाचें करावें. ७ तें जड-
लेलें असावें, ह्मणून त्याच्या दोन वरल्या कांठीं त्या-
च्या जडणाऱ्या दोन खांदपट्ट्या व्हाव्या. ८ आ-
णि त्याला आवळण्यास जें त्यावर बुटीदार वेष्टन
तें त्याच्या कामाप्रमाणें त्याच्यांतील व्हावें; सोनें,
निळें व जांबळें व किरमिजरंगीं व कांतलेलें बा-
रीक सूत, यांचें असावें. ९ आणि तूं दोन
शोहामपाषाण घेऊन त्यांवर इस्राएलाच्या पुत्रांचीं
नांवें कोर. १० त्यांच्या नांवांतील साहा एका
पाषाणावर, आणि दुसरीं साहा नांवें दुसऱ्या
पाषाणावर त्यांच्या जन्मांच्या अनुक्रमाप्रमाणें कोर.
११ पाषाण कोरणाऱ्याचें काम मुद्रेचीं कोरणीं
याप्रमाणें त्या दोन पाषाणांवर इस्राएलाच्या पु-
त्रांचीं नांवें कोर, सोन्यांतील कोंदणानी कोंदायाला
त्यांस सिद्ध कर. १२ आणि इस्राएलाच्या सं-
तानांच्या सुचविण्याचे पाषाण होण्यास ते दोन
पाषाण एफोदाच्या खांदपट्ट्यांवर ठेव; आणि
सुचविण्यासाठीं आहरोनानें त्यांचीं नांवें आपल्या
दोन खांद्यांवर परमेश्वरासमोर वाहावीं. १३
आणि तूं सोन्याचीं कोंदणें कर. १४ शेवटांस
दोन सांखळ्याहि शुद्ध सोन्याच्या पीळकामी अ-
शा कर, आणि पिळलेल्या सांखळ्या त्या कों-
दणांवर लाव. १५ आणि तूं न्याय ठरण्याचा
ऊरपट कर, बुटीदार कामाचा, एफोदाच्या काम-
सारिखा तो कर; सोनें, निळें व जांबळें व किर-
मिजरंगीं व कांतलेलें बारीक सूत यांचा तो कर.
१६ तो दुप्पट होऊन चौरस व्हावा, त्याची
लांबी वीतभर व त्याची रुंदी वीतभर असावी.
१७ आणि त्यांत पाषाण भरून जडीत कर, पा-
षाणांच्या चार पंक्ती असाव्या; एक पंक्ति आरक्तक,
हिरवपिंगटी, व विजक; ही पहिली पंक्ति. १८
आणि दुसरी पंक्ति नोंफक, निळारंगी, व याहलोम.
१९ आणि तिसरी पंक्ति लेशेम, विचित्रक, व
द्राक्षरंगी. २० आणि चवथी पंक्ति तार्शीश, व
शोहाम, व याशफे; त्यांच्या कोंदणांत ते सोन्यानें
खचीत असावे. २१ आणि ते पाषाण इस्राएलाच्या
बारा पुत्रांच्या नांवांचे असावे; बारा वंशांसाठीं
एकएकाला त्यांचें नांव, असें मुद्रेवरच्या कोरण्या-
प्रमाणें ते त्यांच्या नांवानी युक्त असावे. २२
आणि तूं ऊरपटावर शेवटांस शुद्ध सोन्याच्या
सांखळ्या पीळकामी अशा कर. २३ आणि
ऊरपटासाठीं सोन्याच्या दोन कड्या कर, मग त्या
दोन कड्या ऊरपटाच्या दोन वरल्या कोनावर
लाव. २४ आणि त्या दोन पिळलेल्या सोन्या-
च्या सांखळ्या ऊरपटाच्या कोनांवरल्या दोन क-
ड्यांत घाल. २५ आणि त्या दोन पिळलेल्या
सांखळ्यांचे दुसरे दोन शेवट त्या दोन कोंदणांत
ठेवून एफोदाच्या समोरल्या अंगीं त्याच्या खांद-
पट्ट्यांवर लाव. २६ आणि सोन्याच्या दोन
कड्या करून त्यांस ऊरपटाच्या दोन कोनांवर
त्याची जी पाठ एफोदाच्या वरतीं तिजवर आंत
लाव. २७ आणि सोन्याच्या दोन कड्या करून
त्यांस एफोदाच्या दोन खांदपट्ट्यांवर खालीं
त्याच्या पुढल्या भागीं त्याच्या जडण्याच्या ठिकाणीं
एफोदाच्या बुटीदार वेष्टनाच्या वरतीं लाव. २८
आणि त्यानी निळ्या दोरीकडून ऊरपटाच्या क-
ड्यानी एफोदाच्या कड्यांस तो बंद करावा, ह्म-
णजे तो एफोदाच्या बुटीदार वेष्टनावर असावा,
तसा एफोदापासून ऊरपट काढला न जावा. २९
आणि जेव्हां आहरोन पवित्रस्थानांत जातो,
तेव्हां त्यानें इस्राएलाच्या संतानांचीं नांवें परमे-
श्वरासमोर अखंडित सुचविण्यासाठीं न्याय ठर-
ण्याच्या ऊरपटांत आपल्या हृदयीं वाहावीं. ३०
आणि न्याय ठरण्याच्या ऊरपटांत तूं ते ऊरीम व

थुयीम ठेव, ह्मणजे जेव्हां **आहरोन परमेश्वरा**-
समोर येतो, तेव्हां ते त्याच्या हृदयीं असावें; तसें
**आहरोनानें इस्राएलाच्या** संतानांचा न्याय आपल्या
हृदयीं **परमेश्वरासमोर** अखंडित वाहावा. ३१
**आणि** तूं एफोदाच्या संगतीचा झगा संपूर्ण निळा
कर. ३२ **आणि** गळ्यांत घालायास तिच्या
वरील भागीं तिच्यामध्यें तोंड असावें; ती फा-
डली न जावी ह्मणून तिच्या तोंडाभोंवतें गुंफीत
कामाचा गोट असावा, चिलखताच्या तोंडासा-
रिखा तिला असावा. ३३ **आणि** तिच्या पदरा-
वर निळें व जांबळें व किरमिजरंगीं सूत यांचीं
डाळिंबें तिच्या सभोंवतील पदरावर कर, आणि
त्यांच्यामध्यें सभोंवतें सोन्याचीं घुंगरें कर. ३४
झग्याच्या पदरावर सभोंवतें सोन्याचें घुंगरूं व
डाळिंब; सोन्याचें घुंगरूं व डाळिंब असें असावें.
३५ **आणि** सेवा करण्यासाठीं ती **आहरोनाच्या**
अंगीं असावी, आणि तो न मरावा ह्मणून जेव्हां
तो **परमेश्वरासमोर** पवित्रस्थानांत येतो आणि
जेव्हां बाहेर जातो, तेव्हां त्याचा शब्द ऐकिला
जावा. ३६ **आणि** तूं शुद्ध सोन्याचें फूल करून
त्यावर मुद्रेवरचीं कोरणीं कोरून असें काढ कीं,
**परमेश्वरासाठीं पवित्र.** ३७ **आणि** फेंट्यावर
पुढें होण्यासाठीं त्याला निळ्या दोरीवर घाल,
फेंट्याच्या पुढल्या अंगीं असो. ३८ **आणि** तें
**आहरोनाच्या** कपाळावर असून इस्राएलाच्या सं-
तानांच्या सर्व पवित्र दानांविषयीं जीं तीं पवित्र
करितात, त्या पवित्र वस्तूंविषयींचा अन्याय **आ**-
**हरोनानें** संभाळून घ्यावा, आणि **परमेश्वरासमोर**
त्यांस पावण्यासाठीं तें त्याच्या कपाळावर अखं-
डित असावें. ३९ **आणि** तूं बारीक सुताचा
खेंसी अंगरखा कर, आणि बारीक सुताचा फेंटा
कर, आणि वेलबुटीचा काच्या कर. ४० **आह**-
**रोनाच्या** पुत्रांसाठींहि अंगरखे कर, आणि त्यां-
साठीं काच्ये कर, त्यांसाठीं पागोटींहि माना-
करितां व शोभेकरितां असीं कर. ४१ **आ**-
**णि** तुझा भाऊ **आहरोन** याच्या अंगीं व त्या-
सहित त्याच्या पुत्रांच्या अंगीं तीं घाल, आणि
तूं त्यांस अभिषेक करून व त्यांचा संस्कार
करून त्यांस पवित्र कर; मग त्यांनी मजसाठीं
याजकपण करावें. ४२ **आणि** त्यांसाठीं जव-
सी वस्त्राचे चोळणे कर; ते लज्जा झांकण्या-
साठीं कंबरेस व मांड्यांसहि असावे. ४३
**आणि आहरोनानें** व त्याच्या पुत्रांनी अन्याय न
सोसावा आणि न मरावें, ह्मणून जेव्हां हे सभा-
मंडपांत येतात, किंवा पवित्रस्थानावर वेदीजवळ
सेवा करायासाठीं जवळ येतात, तेव्हां ते त्यांच्या
अंगीं असावे; त्याला व त्याच्या मागें त्याच्या
संतानांला हा निरंतर नेम असावा."

## अध्याय २९.

"**आ**णि त्यांनी मजसाठीं याजकपण करावें
ह्मणून त्यांस पवित्र करण्यासाठीं जी
गोष्ट त्वां त्यांस करावी ती ही; गुरांतील एक
तरुण गोऱ्हा व दोन एडके सांगोपांग असे घे.
२ **आणि** बेखमीर भाकरी व बेखमीर पोळ्या
तेलानें मळलेल्या अशा, व तेलानी माखलेल्या
पापड्या घे; त्या गव्हांच्या पिठाच्या कर. ३
**आणि** त्यांस एका टोपलींत ठेवून टोपलीनें त्यांस
व तो गोऱ्हा व ते दोन एडके यांसहि जवळ
आण. ४ **आणि आहरोन** व त्याचे पुत्र यांस
सभामंडपाच्या दाराजवळ आणून त्यांस पाण्यानें
धू. ५ **आणि** तीं वस्त्रें घेऊन तो अंगरखा व
एफोदाच्या संगतीचा झगा व एफोद व ऊरपट
**आहरोनाच्या** अंगांत घाल, आणि एफोदाच्या
बुटकर वेष्टनानें त्याला आवळ. ६ **आणि**
त्याच्या डोक्यावर फेंटा घाल, मग फेंट्यावर तो
पवित्र किरीट घाल. ७ **मग** अभिषेकाचें तेल
घेऊन त्याच्या मस्तकावर ओतून त्याला अभिषेक
कर. ८ **आणि** त्याचे पुत्र जवळ आणून त्यांच्या
अंगांत ते अंगरखे घाल. ९ **आणि आहरोन**
व त्याचे पुत्र यांस काच्यांनी आवळ, त्यांस पा-
गोटींहि बांध, आणि सर्वकाळ नेमानें याजकपण
त्यांचें होवो; तसें तूं **आहरोन** व त्याचे पुत्र
यांचा संस्कार कर. १० **आणि** तूं तो गोऱ्हा
सभामंडपापुढें जवळ आण, मग **आहरोन** व
त्याचे पुत्र यांनी आपले हात गोऱ्ह्याच्या डोक्या-
वर ठेवावे. ११ **मग परमेश्वरापुढें** सभा-
मंडपाच्या दारासीं तो गोऱ्हा मार. १२ **मंतर**
गोऱ्ह्याच्या रक्तांतील कांहीं घेऊन तूं आपल्या बो-
टानें वेदीच्या शिंगांस लाव, मग सर्व रक्त वेदी-

त्या पायाजवळ ओत. १३ आणि आंतड्यांवर
भरलेला सर्व मेद व काळिजावरील वपा दोन
गुर्दे व यांजवर जो मेद तो घेऊन वेदीवर त्याचा
धूप कर. १४ परंतु गोऱ्ह्याचें मांस व त्याचें
कातडें व त्याची विष्टा छावणीबाहेर अग्नीने जाळ,
तो पापहारक यज्ञ आहे. १५ आणि तूं एक
एडका घे, मग आहरोन व त्याचे पुत्र यानी आ-
पले हात त्या एडक्याच्या डोक्यावर ठेवावे. १६
नंतर तूं एडक्याला मार, आणि त्याचें रक्त घे-
ऊन वेदीवर सभोंवतें शिंपड. १७ मग एड-
क्याला तोडून त्याचे तुकडे कर, आणि त्याचीं
आंतडीं व त्याचे पाय धुऊन त्याच्या तुकड्यांसीं
व त्याच्या डोक्यासीं ठेव. १८ मग वेदीवर सर्व
एडक्याचा धूप कर, तो परमेश्वरासाठीं होम,
तो परमेश्वरासाठीं शांतिकारक सुवास असें अ-
र्पण आहे. १९ नंतर तूं दुसरा एडका घे, आणि
आहरोन व त्याचे पुत्र यानीं आपले हात त्या
एडक्याच्या डोक्यावर ठेवावे. २० मग तूं ए-
डक्याला मार, नंतर त्याच्या रक्तांतील कांहीं
घेऊन आहरोनाच्या उजव्या कानाच्या टोंकाला
आणि त्याच्या पुत्रांच्या कानाच्या टोंकाला आणि
त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्याला, आणि त्यां-
च्या उजव्या पायाच्या आंगठ्याला लाव, आणि
रक्त वेदीवर सभोंवतें शिंपड. २१ आणि वेदीवर
जें रक्त त्यांतून व अभिषेकाच्या तेलांतून कांहीं
घेऊन आहरोनावर व त्याच्या वस्त्रांवर, आणि
त्यासहित त्याच्या पुत्रांवर व त्याच्या पुत्रांच्या
वस्त्रांवर शिंपड; तसें तो व त्याचीं वस्त्रें आणि
त्यासुद्धां त्याचे पुत्र व त्याच्या पुत्रांचीं वस्त्रें प-
वित्र व्हावीं. २२ आणि एडक्यांतील मेद व
शेपूट व आंतड्यांवर भरलेला मेद व काळजाची
वपा व दोन गुर्दे यांजवरील मेदासुद्धां व उजवा
फरा घे, कां कीं तो संस्कारांचा एडका आहे. २३
आणि परमेश्वरासमोरच्या बेखमीर भाकरीच्या
टोपलींतून एक चांदकी भाकर व एक तेलकट
पोळी भाकर व एक पापडी घे. २४ आणि अवघीं
आहरोनाच्या हातांवर व त्याच्या पुत्रांच्या हातां-
वर ठेव, आणि परमेश्वरासमोर त्यांची ओवा-
ळणी कर. २५ मग त्यांस त्यांच्या हातून घेऊन
शांतिकारक सुगंधासाठीं परमेश्वरासमोर वेदीवर
होम करून त्याचा धूप कर; तें परमेश्वरासाठीं
अर्पण आहे. २६ आणि जो आहरोनासाठीं सं-
स्कारांचा एडका त्याचा ऊर घेऊन परमेश्वरा-
समोर त्याची ओवाळणी कर, आणि तो तुझा
वांटा होईल. २७ आणि संस्कारांच्या एडक्यां-
तील जें आहरोनाचें व जें त्याच्या पुत्रांचें,
त्यांतील ओवाळणीचा जो ऊर व उचलणीचा
जो फरा जो ओवाळला व जो उचलला, त्यांस
तूं पवित्र कर. २८ आणि ते इस्राएलाच्या सं-
तानांपासून सर्वकाळ नेमाने आहरोनाचे व त्या-
च्या पुत्रांचे होवोत, कां कीं तें उचललेलें दान
आहे, आणि इस्राएलाच्या संतानांपासून त्यांच्या-
शांतिकारक यज्ञांतून उचललेलें दान, परमेश्व-
रासाठीं त्यांचें उचललेलें दान असें असावें.
२९ आणि आहरोनाचीं जीं पवित्र वस्त्रें तीं
त्याच्यामागें त्याच्या संतानांचीं व्हावीं, ह्मणजे
तीं अंगांत असतां अभिषेक व्हावा, आणि तीं
अंगांत असतां त्यांस संस्कार व्हावा. ३०
त्याच्या पुत्रांतील त्याच्या ठिकाणीं जो याजक
पवित्रस्थानीं सेवा करायास सभामंडपांत येईल,
त्याने तीं वस्त्रें सात दिवस घालावीं. ३१ आ-
णि तूं संस्कारांचा एडका घेऊन त्याचें मांस
पवित्रस्थानांत शिजीव. ३२ मग आहरोन व
त्याचे पुत्र यानी एडक्याचें मांस व टोपलींत
ज्या भाकरी त्या सभामंडपाच्या दारीं खाव्या.
३३ आणि त्यांचा संस्कार करायास त्यांस पवित्र
करण्यासाठीं ज्यांकडून प्रायश्चित्त झालें, तीं
त्यानी खावीं, परंतु परक्याने न खावीं, कां कीं
तीं पवित्र आहेत. ३४ आणि संस्कारांच्या
मांसांतील अथवा भाकरींतील, जर कांहीं सका-
ळपर्यंत राहतें, तर तूं तें शेष अग्नीने जाळ, तें
खायाचें नाहीं, कां कीं पवित्र आहे. ३५ तर
याप्रमाणें ह्मणजे म्या तुला आज्ञा दिल्या त्या
सर्वांप्रमाणें तूं आहरोनाला व त्याच्या पुत्रांला
कर, सात दिवसपर्यंत त्यांचा संस्कार कर. ३६
आणि तूं प्रतिदिवसीं पापहारक गोऱ्हा प्राय-
श्चित्तासाठीं अर्पण कर, आणि वेदीला पवित्र
करण्यासाठीं तूं तिजविषयीं प्रायश्चित्त करून
तिजवर पाप अर्पण कर आणि तिला अभिषेक
कर. ३७ सात दिवस वेदीविषयीं प्रायश्चित्त

करून तिला पवित्र कर, आणि ती वेदी परम पवित्र असावी; वेदीला जें कांहीं शिवतें तें पवित्र असावें. ३८ आणि वेदीवर जें त्वां वाहावें तें हें, एका वर्षाचीं दोन कोंकरें अखंडित प्रतिदिवशीं; ३९ एक कोंकरूं सकाळीं वाहा, आणि दुसरें कोंकरूं संध्याकाळीं वाहा. ४० आणि एका कोंकऱ्याला मापभराचा दाहावा भाग पीठ पावहिनभर कुटून काढलेल्या तेलाने मळलेलें आणि पेय अर्पण पावहिनभर द्राक्षारस व्हावें. ४१ आणि दुसरें कोंकरूं संध्याकाळीं वाहा, जितका सकाळचा नैवेद्य आणि जितकें पेयअर्पण, तितकें या अर्पणासहित वाहा, ह्मणजे **परमेश्वरासाठीं** शांतिकारक सुगंध अर्पण असें व्हावें. ४२ हा तुमच्या पिढ्यांतून अखंडित होम **परमेश्वरासमोर** सभामंडपाच्या दारीं व्हावा, तेथें तुजसीं बोलण्यास तेथें तुह्मास साक्षात् भेटेन. ४३ तेथें इस्राएलाच्या संतानांसहि साक्षात् भेटेन आणि माझ्या गौरवाने तो मंडप पवित्र होईल. ४४ आणि मी सभामंडपाला व वेदीला पवित्र करीन, आणि आहरोनाला व त्याच्या पुत्रांस माझ्याजवळ याजकपण करण्यासाठीं पवित्र करीन. ४५ तसें मी इस्राएलाच्या संतानांमध्यें वस्ती करीन, आणि त्यांचा देव असा होईन. ४६ आणि ते जाणतील कीं मी **परमेश्वर** त्यांचा देव, कां तर त्यांमध्यें वस्ती करण्यासाठीं म्या त्यांस मिसरदेशांतून आणिलें आहे; मी **परमेश्वर** त्यांचा देव आहें."

## अध्याय ३०.

"आणि तूं धूप जाळण्यासाठीं धूपवेदी कर, ती शिट्टी लांकडांची कर; २ तिची लांबी हातभर व तिची रुंदी हातभर, असी ती चौरस असावी; आणि तिची उंची दोन हातभर, तिचीं शिंगें तिचींच असावीं. ३ आणि तूं तिला ह्मणजे तिचा माथा व तिच्या बाजू चहुंकडे व तिचीं शिंगें यांस शुद्ध सोन्याने मढ; आणि तिला सोन्याचा कांठ चहुंकडे कर. ४ आणि तिच्यासाठीं सोन्याच्या दोन कड्या कर, तिच्या कांठाखालीं दोहींकडे तिच्या दोन बाजूंला कर, ह्मणजे काठ्यांचीं घरें, अशा त्यांकडून तिला नेण्यासाठीं व्हाव्या. ५ आणि काठ्या शिट्टी लांकडांच्या करून त्यांस सोन्याने मढ. ६ आणि संकेतलेखावर कोशाला जो पडदा त्याच्या पुढें संकेतलेखावर जें दयासन त्याच्या पुढें तिला ठेव, तेथें मी तुला साक्षात् भेटेन. ७ आणि आहरोनाने सुगंध द्रव्यांचा धूप तिजवर जाळावा सकाळच्या सकाळीं, जेव्हां तो दिवे नीट करितो, तेव्हां त्याने तिजवर धूप जाळावा. ८ आणि संध्याकाळीं जेव्हां आहरोन दिवे लावितो, तेव्हां त्याने तिजवर **परमेश्वरासमोर** धूप नित्य जाळावा; तुमच्या पिढ्यानपिढी असें असावें. ९ तुह्मी तिजवर अन्य धूप जाळूं नका, आणि होम अथवा नैवेद्य अथवा पेय अर्पण तिजवर करूं नका. १० परंतु आहरोनाने वर्षांतून एकदा तिच्या शिंगावर प्रायश्चित्त करावें; प्रायश्चित्तासाठीं पापहारक यज्ञ याच्या रक्तांतून वर्षांत एकदा तुमच्या पिढ्यानपिढी त्याने तिजवर प्रायश्चित्त करावें; हें **परमेश्वरासाठीं** परम पवित्र आहे."

११ तेव्हां **परमेश्वराने** मोशाला असें सांगितलें कीं, १२ "इस्राएलाच्या संतानांची झडती घेते वेळेस जेव्हां तूं त्यांची संख्या करितोस, तेव्हां त्यांची झडती घेण्यांत त्यांतील प्रत्येकाने आपल्या जिवाचें प्रायश्चित्त असें **परमेश्वराला** द्यावें, ह्मणजे त्यांची झडती घेते वेळेस त्यांवर पटकी न व्हावी ह्मणून. १३ सर्व जे पट्ट्यांवर उतरले जातात, त्यांनी हा द्यावा कीं पवित्र स्थानाच्या शेकेलाप्रमाणें अर्धा शेकेल, (तो शेकेल वीस गेरे असा आहे) **परमेश्वरासाठीं** अर्पण अर्धा शेकेल असावें. १४ वीस वर्षांचा आणि त्यांवरला प्रत्येक जो पट्ट्यांवर उतरला जातो, त्याने **परमेश्वरासाठीं** अर्पण द्यावें. १५ तुमच्या जिवाचें प्रायश्चित्त करण्यासाठीं **परमेश्वराला** अर्पण देतांना धनवानाने अर्ध्या शेकेलापेक्षां अधिक न द्यावें, आणि दरिद्र्याने उणें न द्यावें. १६ आणि तूं प्रायश्चित्तांचा पैका इस्राएलाच्या संतानांपासून घेऊन तो सभामंडपांतील सेवेसाठीं ठेव, आणि तो **परमेश्वरासमोर** इस्राएलाच्या संतानांचा सूचक असा, तुमच्या जिवाचें प्रायश्चित्त होईल."

१७ मग **परमेश्वराने** मोशाला असें सांगितलें कीं, १८ धुवायासाठीं तूं पितळाचें गंगाळ,

व त्याची पितळाची मांडणी कर, आणि त्याला
सभामंडप व वेदी यांच्या मध्यें ठेवून त्यांत
पाणी ठेव. १९ आणि आहरोनानें व त्याच्या
पुत्रांनी आपले हात व आपले पाय त्यांतून धुवावे.
२० जेव्हां ते सभामंडपांत जातात, तेव्हां त्यांनी
न मरावें ह्मणून पाण्यानें धुवावें; अथवा परमे-
श्वरासाठीं अग्नीनें धूप करायास वेदीपाशीं सेवा
करायाला जवळ येतात, तेव्हां त्यांनी न मरावें
ह्मणून आपले हात व आपले पाय धुवावे. २१
आणि हा त्यांस ह्मणजे त्याला व त्याच्या संता-
नाला तुमच्या पिढ्यानपिढी सर्वकाळ नेम असावा."
२२ तेव्हां परमेश्वरानें मोशाला असें सांगि-
तलें कीं, २३ "अणखी तूं आपल्याजवळ मुख्य
सुगंध द्रव्यें घे, शुद्ध बोळ पांचशें शेकेल, आणि
त्याच्या अर्धी सुगंध दालचिनी अडीचशें शेकेल,
आणि सुगंध कांड्या अडीचशें शेकेल; २४
आणि किद्दा पांचशें शेकेल, पवित्रस्थानाच्या
शेकेलाप्रमाणें, आणि जाईतांचें तेल एक हिन-
भर, २५ आणि त्यांचें पवित्र अभिषेकाचें तेल
मिश्रित मसाल्यांचें, गांध्याचें काम असें तेल
कर; तें पवित्र अभिषेकाचें तेल असावें. २६
आणि तेणेंकरून सभामंडपाचा व संकेतलेखा-
चा कोश यांला अभिषेक कर. २७ आणि
मेजाला व त्याच्या सर्व सामानाला आणि दि-
व्याच्या झाडाला व त्याच्या सामानाला व धूप-
वेदीला; २८ आणि होमवेदीला व त्याच्या
सर्व सामानाला आणि गंगाळ व याची मांडणी
यांलाहि अभिषेक कर. २९ तसें तूं त्यांस प-
वित्र कर, आणि तीं परम पवित्र असावीं; जें
कांहीं त्यांस शिवतें तें पवित्र असावें. ३० आणि
तूं आहरोनाला व त्याच्या पुत्रांला अभिषेक क-
रून त्यांनी मजसाठीं याजकपण करावें ह्मणून
त्यांस पवित्र कर. ३१ आणि तूं इस्राएलाच्या
संतानांस असें सांग कीं, हें तुमच्या पिढ्यानपिढी
मजसाठीं पवित्र अभिषेकाचें तेल असावें. ३२
भलत्या माणसाच्या आंगावर ओतायाचें नाहीं,
आणि त्याच्या परिमाणावर त्यासारिखें तुह्मी क-
रूं नका; तें पवित्र आहे, तुह्मांला पवित्र असावें.
३३ जो कोणी त्यासारिखें भेळवितो, अथवा जो
परक्यावर त्यांतून लावितो, तो आपल्या लोकां-
तून छेदलाच जावा." ३४ आणि परमेश्वरानें
मोशाला सांगितलें, "तूं आपल्यापाशीं किराणे
नाटाफ व शहेलेथ व हेलबना हे किराणे, आणि
निर्मळ ऊद घे, भागाप्रमाणें भाग व्हावा. ३५
आणि यांचा धूप गांध्याच्या कामानें मीठ घालून
निर्मळ पवित्र असा कर. ३६ आणि त्यांतील
कांहीं बारीक कूट, मग त्यांतील कांहीं संकेत-
लेखाच्या पुढें सभामंडपांत जेथें मी तुला साक्षात्
भेटेन, तेथें ठेव; तो तुह्मांला परम पवित्र अ-
सावा. ३७ आणि जो धूप तूं करितोस त्याच्या
परिमाणावरून तुह्मी आपल्यासाठीं करूं नका,
परमेश्वरासाठीं तो तुला पवित्र असावा. ३८
जो कोणी त्याचा वास घेण्याकरितां त्याच्या सा-
रिखा करितो, तो आपल्या लोकांतून छेदलाच
जावा."

## अध्याय ३१.

तेव्हां परमेश्वरानें मोशाला असें सांगितलें
कीं, २ "पाहा, यहूदांच्या वंशांतील हूराचा
पुत्र ऊरी याचा पुत्र बसालेल, याला म्यां नांवानें
बोलाविलें आहे. ३ आणि सर्वहि कामाविषयीं
बुद्धि व चातुर्य व ज्ञान होण्यासाठीं म्यां त्याला
देवाच्या आत्म्यानें भरिलें आहे; ४ ह्मणजे त्यानें
युक्ति काढून सोनें व रुपें व पितळ, यांचें काम
करावें. ५ आणि जडण्यासाठीं पाषाण कोंदावे,
आणि लांकूड खोदावें, आणि सर्व कार्य करावें. ६
आणि पाहा, म्याच त्याला दानाच्या वंशांतील
अहीसाखाचा पुत्र आहलियाब दिल्हा आहे;
आणि सर्व बुद्धिमंतांच्या ह्रदयांत म्यां ज्ञान असें
घातलें आहे कीं जें म्यां तुला आज्ञा देऊन सां-
गितलें तें अवघें त्यांनी करावें. ७ सभामंडप व
संकेतलेखासाठीं जो कोश व त्यावर जें दयासन,
व मंडपांतील सर्व सामान. ८ आणि मेज व
त्यावरील सामान, आणि शुद्ध दिव्याचें झाड व
त्याचें सर्व सामान, व धूपवेदी. ९ आणि होम-
वेदी व तिचें सर्व सामान, आणि गंगाळ व त्या-
ची मांडणी. १० आणि पदवीचीं वस्त्रें ह्मणजे
आहरोन याजक यासाठीं पवित्र वस्त्रें, व याज-
कपणासाठीं त्याच्या पुत्रांचीं वस्त्रें; ११ अभिषे-
काचें तेल, व पवित्रस्थानासाठीं किराण्यांचा धूप,

हीं, जें म्या तुला आज्ञा देऊन सांगितलें त्या
अवघ्याप्रमाणें त्यांनी करावीं." १२ तेव्हां पर-
मेश्वराने मोशाला असें सांगितलें कीं, १३
"अणखी तूं इस्राएलाच्या संतानांस असें सांग
कीं, माझे शाब्बाथ तुह्मी अगत्य पाळा, कारण
कीं तुमच्या पिढ्यानपिढी माझ्या व तुमच्या मध्यें
ती खूण आहे, ह्मणजे तुह्मी हें जाणावें कीं पर-
मेश्वर तुमचा पवित्र करणारा आहे. १४ तर
तुह्मी शाब्बाथ पाळा, कारण कीं तो तुह्माला
पवित्र आहे, जे त्याला विटाळवितात त्यांतील
प्रत्येक मरावाच मरावा, कारण कीं जो कोणी
त्यांत काम करितो, तो मनुष्य आपल्या लोकां-
मधून छेदलाच जावा. १५ साहा दिवस काम
करायाचें आहे, परंतु सातव्या दिवसीं परमे-
श्वरासाठीं पवित्र, असा विसांव्याचा शाब्बाथ
आहे, जो कोणी शाब्बाथ दिवसांत काम करितो,
तो मरावाच मरावा. १६ आणि शाब्बाथ पा-
ळायास इस्राएलाच्या संतानांनी त्यांच्या पिढ्या-
नपिढी शाब्बाथाला सर्वकाळ कराराप्रमाणें मा-
नावें; १७ माझ्या व इस्राएलाच्या संतानांमध्यें ती
सर्वकाळपर्यंत खूण, कारण कीं साहा दिवसांत
परमेश्वराने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, आ-
णि सातव्या दिवसीं स्वस्थ राहून विसांवा घेतला."
१८ मग त्याने सीना डोंगरावर मोशासीं बो-
लणें समाप्त केल्यावर त्याला संकेतलेखाच्या दोन
पाट्या दिल्या; त्या धोंड्याच्या पाट्या देवाच्या
बोटाने लिहिलेल्या अशा होत्या.

## अध्याय ३२.

तेव्हां लोकांनी पाहिलें कीं मोशे डोंगरावरून
उतरायास उशीर करितो, यास्तव लोक आ-
हरोनाजवळ मिळून त्याला ह्मणाले, "तूं ऊठ,
आह्मासाठीं असे देव कर कीं आमच्यापुढें चाल-
तील; कां तर तो मोशे, ज्या माणसाने आह्मास
मिसरदेशांतून आणिलें, त्याला काय झालें हें
आह्मास कळलें नाहीं." २ तेव्हां आहरोनाने
त्यांस सांगितलें कीं, "जीं सोन्याचीं कुंडलें तुम-
च्या स्त्रियांच्या, तुमच्या पुत्रांच्या व तुमच्या क-
न्यांच्या कानांत आहेत, तीं तुह्मी काढून माझ्या
जवळ आणा." ३ यास्तव सर्व लोकांनी आपल्या
कानांत जीं सोन्याचीं कुंडलें, तीं काढून आह-
रोनाजवळ आणिलीं. ४ मग त्याने त्यांच्या
हातांतून घेतलीं आणि त्याचें ओतींव वासरूं
करून त्याला कोरणीने घडिलें; नंतर त्यांनी
ह्मटलें, "हे इस्राएला, तुझ्या ज्या देवांनी तुला
मिसरदेशांतून आणिलें, ते हेच." ५ तेव्हां
आहरोनाने पाहिलें, आणि त्याच्यापुढें वेदी बांधि-
ली; आणि आहरोनाने प्रगट करून सांगितलें
कीं, "उद्यां परमेश्वरासाठीं सण आहे." ६
मग सकाळीं त्यांनी उठून होम केले, आणि
शांतिकारक यज्ञ आणून वाहिले; तेव्हां लोक
खाण्यास बसले आणि प्याले, मग खेळण्यास
उठले.

७ आणि परमेश्वराने मोशाला सांगि-
तलें कीं, "तूं चल, उतर, कां कीं तुझ्या ज्या
लोकांस त्वां मिसरदेशांतून आणिलें त्यांनी दुष्टाई
केली आहे. ८ जो मार्ग म्या त्यांस सांगितला
त्यांतून ते लवकर वळले आहेत, त्यांनी आपल्या-
साठीं ओतींव वासरूं करून त्याचें भजन केलें,
त्याला यज्ञहि केले आणि ह्मटलें, हे इस्राएला,
तुझ्या ज्या देवांनी तुला मिसरदेशांतून आणिलें
ते हेच." ९ अणखी परमेश्वराने मोशाला
ह्मटलें, "म्या हे लोक पाहिले आहेत, आणि पाहा
हे ताठर मानेचे लोक आहेत. १० तर आतां
मला असूं दे, ह्मणजे त्यांवर माझा राग तापून
मी त्यांचा क्षय करीन, आणि तुला मोठें राष्ट्र
असें करीन." ११ तेव्हां मोशाने आपला देव
परमेश्वर यासमोर विनंती करून ह्मटलें, "हे
परमेश्वरा, तुझ्या ज्या लोकांस त्वां मोठ्या ब-
ळाने व पराक्रमी हाताने मिसरदेशांतून काढिलें,
त्यांवर तुझा राग कां संतापला? १२ मिसऱ्यांनी
कां ह्मणावें कीं त्याने त्यांस डोंगरांमध्यें जिवें
मारून भूमीच्या पाठीवरून त्यांचा नाश करा-
यास त्यांस दुष्टाईने काढिलें आहे? तूं आपल्या
रागाचा संताप सोड, आणि आपल्या लोकांवरच्या
या वाईटाविषयीं पश्चात्ताप कर. १३ तूं आपले
सेवक आब्राहाम, इझाक, व इस्राएल, यांची
आठवण कर कीं त्वां आपल्यावरून त्यांसीं शपथ
वाहून त्यांस ह्मटलें, मी तुमच्या संतानाला आ-

काशांतील ताऱ्यांसारिखें वाढवीन, आणि हा
अवघा देश जो म्या सांगितला तो तुमच्या
संतानाला देईन, आणि तो सर्वकाळपर्यंत त्यांचें
वतन होईल." १४ तेव्हां **परमेश्वराने** आ-
पल्या लोकांवर जें वाईट करावें ह्मणून ह्मटलें
त्याविषयीं पश्चात्ताप केला. १५ मग मोशे मागें
फिरून डोंगरावरून उतरला, आणि संकेतले-
ख्याच्या दोन पाट्या त्याच्या हातांत होत्या; पा-
ट्या दोही बाजूंवर लिहिलेल्या, यावर व त्यावर
अक्षर लिहिलेल्या होत्या. १६ आणि त्या पाट्या
देवाचें काम होत्या, आणि लिहिणें तें देवाचें
लिहिणें, पाट्यांवर कोरलेलें असें होतें. १७
मग लोक ओरडत असतां यहोशवाने त्यांचा शब्द
ऐकून मोश्याला ह्मटलें कीं, "छावणींत लढाईचा
शब्द आहे." १८ परंतु तो बोलला, "जय ओ-
रडण्यांचा शब्द नव्हे, आणि हाय ओरडण्यांचा
शब्द नव्हे, परंतु गायनांचा शब्द मी ऐकतों."
१९ मग असें झालें कीं छावणीजवळ आल्यावर
आणि वांसरूं व तापे पाहिल्यावर मोश्याचा राग
तापला, आणि डोंगराखालीं त्याने आपल्या हातां-
तून पाट्या टाकून त्यांस मोडिलें. २० आणि जें
वांसरूं त्यानी केलें होतें तें घेऊन त्याने अग्नींत
जाळिलें आणि वाटून चूर्ण केलें, मग पाण्यावर
विखरिलें आणि इस्राएलाच्या संतानांस पाजिलें.
२१ तेव्हां मोश्याने आहरोनाला ह्मटलें, "या
लोकानी तुला काय केलें ह्मणून त्वां त्यावर मोठें
पाप आणिलें?" २२ तेव्हां आहरोनाने ह्मटलें,
"माझ्या प्रभूचा राग तापूं नये, तूं लोकांला जा-
णतोस कीं ते दुष्कर्मी आहेत. २३ तर त्यानी
मला सांगितलें, तूं आह्मासाठीं असे देव कर कीं
आमच्यापुढें चालतील, कां तर तो मोशे, ज्या
माणसानें आह्मास मिसरदेशांतून आणिलें, त्या-
ला काय झालें हें आह्मास कळलें नाहीं. २४
मग मी त्यांस बोललों, ज्यांजवळ सोनें असेल
त्यानी काढून मला द्यावें, मग म्या तें अग्नींत
घातलें आणि हें वांसरूं निघालें." २५ तेव्हां
मोश्याने लोकांला पाहिलें कीं ते उघडे, कारण कीं
आहरोनाने त्यांच्या वैऱ्यांमध्यें विटंबना होण्या-
पर्यंत त्यांस उघडें केलें होतें. २६ मग मोशे
छावणीच्या दरवाज्यांत उभा राहून बोलला,
"**परमेश्वराच्या** पक्षीं कोण? तो माझ्याजवळ
येवो"; मग लेवीच्या सर्व वंशांतील माणसें त्या-
जवळ मिळालीं. २७ तेव्हां त्याने त्यांस सांगि-
तलें, इस्राएलाचा देव **परमेश्वर** असें सांगतो
कीं, तुह्मी प्रत्येक आपली तरवार आपल्या कंबरेस
बांधा, छावणीच्या दरवाज्यापासून दरवाज्यापर्यंत
फिरत जाऊन आपापल्या भावाला व आपापल्या
मित्राला व आपापल्या शेजाऱ्याला जिवें मारा."
२८ मग लेवीच्या वंशस्थानी मोश्याच्या सांग-
ण्याप्रमाणें केलें, आणि त्याच दिवसीं लोकांतील
सुमारें तीन हजार माणसें पडलीं. २९ कां कीं
मोश्याने सांगितलें होतें कीं, "तुह्मी आज आपा-
पल्या पुत्रांवर देखील, आणि आपले भाऊ यां-
वर **परमेश्वरासाठीं** आपल्यांस संस्कार करा,
ह्मणजे आज तो तुह्मास आशीर्वाद देईल."
३० मग दुसऱ्या दिवसीं असें झालें कीं मो-
श्याने लोकांस ह्मटलें, "तुह्मी मोठेंच पाप केलें
आहे, तथापि मी आतां **परमेश्वराजवळ** वर
जातों, कदाचित् तुमच्या पापाविषयीं प्रायश्चित्त
करीन." ३१ नंतर मोशे **परमेश्वराजवळ** परत
जाऊन बोलला कीं, "अरेरे या लोकानी मोठेंच
पाप केलें आहे; त्यानी आपल्यांसाठीं सोन्याचे
देव केले आहेत. ३२ तथापि आतां अवश्य
त्यांचें पाप क्षमा कर; परंतु जर न करसील, तर
जें पुस्तक त्वां लिहिलें त्यांतून माझें नांव खोड."
३३ तेव्हां **परमेश्वराने** मोश्याला सांगितलें,
"ज्या कोणी मजसीं पाप केलें त्याला मी आपल्या
पुस्तकांतून खोडीन. ३४ तर आतां तूं चल, जेथें
म्या तुला सांगितलें तेथें लोकांला ने; पाहा, माझा
दूत तुझ्यापुढें चालेल, परंतु ज्या दिवसीं मी
झडती घेतों, त्यांत त्यांच्या पापांचें शासन त्यांवर
घालीन." ३५ तेव्हां जें वांसरूं लोकानी करविलें
जें आहरोनाने केलें होतें, त्यामुळें **परमेश्वराने**
त्यांवर पटकी घातली.

## अध्याय ३३.

तेव्हां **परमेश्वराने** मोश्याला सांगितलें कीं,
"चल, जे लोक त्वां मिसरदेशांतून आणिलें
त्यांसुद्धां एथून जा; ज्या देशाविषयीं म्या आ-
ब्राहामासीं, इसाकासीं व याकोबासीं असी शपथ

वाहिली कीं तुझ्या संतानाला तो देईन, तिकडे
जा. २ आणि मी तुझ्यापुढें दूत पाठवून खनानी,
अमोरी व हित्ती व परिज्जी, हिव्वी व यबूसी
यांस घालवीन. ३ ज्या देशांत दूध व मध वा-
हत आहे, तिकडे जा; तूं ताठर मानेचे लोक,
यास्तव म्या तुझ्यामध्यें न जावें, गेलों तर वाटेवर
मी तुझा क्षय करीन." ४ तेव्हां लोक ही वाईट
गोष्ट ऐकून कष्टी झाले, आणि त्यांतील कोणी
आपले अलंकार अंगावर घातले नाहींत. ५
कां कीं परमेश्वराने मोशाला सांगितलें होतें
कीं, "इस्राएलाच्या संतानांस बोल, "तुह्मी ताठर
मानेचे लोक आहां; एका क्षणांत तुह्मामध्यें येऊन
म्या तुमचा नाश करावा, तर आतां तुह्मी आपले
अलंकार आपल्यावरून काढून ठेवा, ह्मणजे म्या
तुह्मास काय करावें तें मी जाणेन." ६ मग
इस्राएलाच्या संतानांनी होरेबडोंगराजवळ आपले
अलंकार काढिले. ७ तेव्हां मोशाने मंडप घेऊन
छावणीच्या बाहेर छावणीपासून दूर तेथें तो दि-
ल्हा, आणि त्याला सभामंडप ह्मटलें, आणि असें
झालें कीं परमेश्वराला जे शोधीत होते, ते सर्व
छावणीबाहेर सभामंडपाजवळ गेले. ८ आणि
जेव्हां मोशे मंडपाजवळ गेला, तेव्हां असें झालें
कीं सर्व लोक उठून आपापल्या राहोटीच्या दारीं
उभे राहिले, आणि मोशे मंडपांत गेला तोंपर्यंत
त्याच्या मागें पाहत होते. ९ आणि जेव्हां
मोशे मंडपांत गेला, तेव्हां असें झालें कीं ढगाचा
खांब उतरून मंडपाच्या दारीं उभा राहिला,
आणि परमेश्वर मोशासीं बोलला. १० तेव्हां
सर्व लोकांनी ढगाचा खांब मंडपाच्या दारीं उभा
राहतां पाहिला, मग सर्व लोकांनी उठून आपा-
पल्या राहोटीच्या दारीं भजन केलें. ११ आणि
जसें कोणी आपल्या मित्रासीं बोलतो, तसें पर-
मेश्वर मोशासीं तोंडच्या तोंडीं बोलला; मग
हा छावणींत फिरला, परंतु त्याचा सेवक यहो-
शवा नूनाचा पुत्र नवा तरणा तो मंडपांतून गेला
नाहीं. १२ तेव्हां मोशे परमेश्वराला बोलला,
"पाहा, तूं मला सांगतोस, या लोकांला ने, परंतु
तूं माझ्यासंगतीं कोणाला पाठविसील, हें त्वां मला
कळविलें नाहीं; तथापि तूं ह्मणतोस कीं, मी तुला
नांवाने ओळखतों, अणखी माझ्या लक्षांत तुला
कृपा मिळाली आहे. १३ तर आतां ही विनंती
जर तुझ्या लक्षांत मला कृपा मिळाली, तर कृपा
करून तूं आपला मार्ग मला कळीव, यासाठीं कीं
म्या तुला ओळखावें, तुझ्या लक्षांत मला कृपा
व्हावी ह्मणून; आणि हें राष्ट्र तुझे लोक आहेत,
असें तूं मान." १४ मग तो बोलला, "माझी
समक्षता संगतीं चालेल आणि मी तुला स्वस्थ-
पण देईन." १५ मग हा त्याला बोलला, "जर
तुझी समक्षता येत नाहीं, तर आह्मास एथून
नेऊं नको. १६ अणखी तुझ्या लक्षांत मला
कृपा मिळाली, आणि हे तुझे लोक आहेत, हें तर
कशावरून कळेल? तूं आमच्यासंगतीं येतोस,
येणेंकडून कीं नाहीं? तसें भूमीच्या पाठीवर जे
सर्व लोक त्यांपासून मी व तुझे लोक भिन्न होऊं.
१७ मग परमेश्वराने मोशाला ह्मटलें, "जी
गोष्ट त्वां ह्मटली तीहि मी करीन, कां तर माझ्या
लक्षांत तुला कृपा मिळाली आहे आणि मी नां-
वाने तुला ओळखतों." १८ मग त्याने ह्मटलें,
"तूं कृपा करून आपलें गौरव मला दाखीव." १९
तेव्हां तो बोलला कीं, "मी आपलें सर्व बरेंपण
तुझ्यापुढें जवळून चालवीन, आणि तुझ्यापुढें पर-
मेश्वराचें नाम प्रगट सांगेन, आणि ज्यावर दया
करीन त्यावर दया करीनच, आणि ज्यावर ममता ठे-
वीन त्यावर ममता ठेवीनच. २० तेव्हां त्याने ह्म-
टलें, "तुझ्याने माझें तोंड पाहवत नाहीं, कां तर
कोणी माणूस मला पाहून जगणार नाहीं." २१ अ-
णखी परमेश्वर बोलला, "पाहा, मजपासीं ठिकाण
आहे, आणि तूं खडकावर उभा राहा. २२ मग
असें होईल कीं जेव्हां माझें गौरव जवळून
चालतें, तेव्हां मी तुला खडकाच्या खोलग्यांत
ठेवीन, आणि मी जवळून जातों, तेव्हां हाताने
तुजवर झांकण करीन. २३ मग मी आपला हात
काढीन, तसें माझें मागलें अंग तूं पाहसील, परंतु
माझें तोंड दिसणार नाहीं."

## अध्याय ३४.

तेव्हां परमेश्वराने मोशाला सांगितलें कीं, "तूं
आपल्यासाठीं धोंड्याच्या दोन पाट्या पहिल्या-
सारिख्या घडून कर, मग ज्या पहिल्या पाट्या
त्वां मोडिल्या त्यांवर ज्या गोष्टी होत्या, त्या ह्या

पत्थ्यांवर मी लिहिन. २ आणि तूं पाहटेस
सिद्ध होऊन सकाळीं सीना डोंगरावर येऊन मा-
झ्याजवळ तेथें डोंगराच्या शिखरावर उभा राहा.
३ आणि कोणी तुझ्यासंगतीं चढूं नये, अणखी
डोंगरांत कोठेंहि कोणी दिसूं नये, मेंढरानेंहि व
गुराने त्या डोंगराच्या काठीं चढूं नये." ४ मग
त्याने धोंड्यांच्या दोन पाट्या पहिल्यांसारिख्या
घडल्या, आणि मोशे सकाळीं उठून जसी पर-
मेश्वराने त्याला आज्ञा दिल्ही; तशा त्या दोन
दमडी पाट्या आपल्या हातीं घेऊन तो सीना डों-
गरावर गेला. ५ तेव्हां परमेश्वर मेघांत उत-
रला, आणि तेथें त्याजवळ उभा राहिला, आणि
त्याने परमेश्वराचें नाम मोठ्याने सांगितलें. ६
तेव्हां परमेश्वराने त्याच्यापुढें जवळून जाऊन
मोठ्याने असें ह्मटलें कीं, "परमेश्वर, परमेश्वर,
दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोधी आणि फार दये-
चा व सत्यतेचा; ७ हजारोंसीं दया राखितो, अ-
न्याय व उल्लंघणें व पाप यांची क्षमा करितो, आणि
दोष्यांस निर्दोष ठरविणारच नाहीं; वडिलांच्या
अन्यायांचें शासन लेंकरांवर व लेंकरांच्या लेंकरां-
वर तिसऱ्या व चवथ्या पिढीपर्यंत करितो." ८
तेव्हां मोश्याने त्वरेने भूमीवर नमन करून भजन
केलें. ९ आणि त्याने ह्मटलें, "हे माझ्या प्रभू,
तुझ्या लक्षांत जर मला कृपा मिळाली, तर माझ्या
प्रभूने कृपा करून आमच्या मध्यें चालावें; जरी
हे ताठर मानेचे लोक आहेत तथापि आमच्या
अन्यायाची व आमच्या पापाची क्षमा कर, आणि
आह्मास तुझें वतनरूप कर."

१० मग तो बोलला, "पाहा मी करार करि-
तों; तुझ्या सर्व लोकांपुढें असे चमत्कार करीन कीं
संपूर्ण पृथ्वीवर व सर्व राष्ट्रांत केलेले नाहींत, आ-
णि ज्या लोकांमध्यें तूं आहेस ते सर्व परमेश्वरा-
चें काम पाहतील, कां कीं जें मी तुजसीं करीन
तें भयंकर होईल. ११ जें मी आज तुला आ-
ज्ञेने सांगतों त्याविषयीं तूं आपणाला संभाळ; पा-
हा, मी तुझ्यापुढून अमोरी व खनानी व हित्ती व
परिज्जी व हिव्वी व यबूसी यांस घालवितों. १२
तूं आपणाला असें संभाळ कीं ज्या देशांत तूं जा-
तोस, त्यांतल्या राहणाऱ्यांसीं करार करूं नको,
केला तर तो तुजमध्यें फासरूप होईल. १३
परंतु त्यांच्या वेद्या तुह्मी पाडा, आणि त्यांच्या
मूर्त्ती मोडा, आणि त्यांचीं वनें तोडा. १४ कां
तर त्वां दुसऱ्या देवाला न भजावें, कारण कीं पर-
मेश्वर याचें नाम आवेशी, तो आवेशी देव
आहे. १५ असें संभाळ कीं तूं या देशांतील
राहणाऱ्यांसीं करार करूं नको, केला तर त्यांच्या
देवांकडे ते व्यभिचार करून फिरतील आणि
त्यांच्या देवांला यज्ञ करितील, आणि ते तुला
बोलावून तूं त्यांच्या यज्ञांतील खासील. १६ आणि
तूं आपल्या पुत्रांसाठीं त्यांच्या कन्यांतील करून
घेसील, मग त्यांच्या कन्या आपल्या देवांकडे व्य-
भिचार करून फिरतील, आणि आपल्या देवांकडे
तुझ्या पुत्रांस व्यभिचारांत नेतील. १७ ओ-
तींव देव असे तूं आपल्यासाठीं करूं नको. १८
बेखमीर भाकरीचा सण तूं पाळ; चैत्रमासाच्या
नेमांत जसी म्या तुला आज्ञा दिल्ही तशा सात
दिवस बेखमीर भाकरी खा, कां तर चैत्रमासांत
तूं मिसरांतून निघालास. १९ उदरांतून प्रत्येक
पहिला सुटणारा माझा, आणि तुझ्या पशूंतील
प्रत्येक जन्मलेला नर, गुरांचा व शेरडांचा प्रथम
सुटणारा माझा आहे. २० परंतु गाढवांतील
प्रथम सुटणारा त्वां शेरडाने खंडून घ्यावा, आणि
जर तूं खंडून घेणार नाहींस तर त्याची मान मो-
डावी; तूं आपल्या पुत्रांतील प्रत्येक ज्येष्ठाला खं-
डून घे; आणि त्यांनी माझ्यासमोर रिकामें दिसूं
नये. २१ तूं साहा दिवस काम कर, परंतु सा-
तव्या दिवसीं विसांवा घे, नांगरण्याच्या व काप-
ण्याच्या वेळेसहि विसांवा घे. २२ आणि सा-
त्यांचा सण, गहूं कापण्यांत प्रथम पिकाचा व
वर्षसमाप्तीस साठवण्याचा सण तूं आपल्यासाठीं
पाळ. २३ वर्षांत तीन वेळा तुझ्या प्रत्येक पुरु-
षाने प्रभु परमेश्वर इस्राएलाचा देव यासमोर
दर्शनास यावें. २४ कां कीं तुझ्यापुढून मी राष्ट्रांस
घालवीन, आणि तुझ्या सीमा वाढवीन, आणि
जेव्हां तूं आपला देव परमेश्वर यासमोर वर्षांत
तीन वेळा दर्शनास जातोस, तेव्हां तुझ्या देशाचा
लोभ कोणी धरणार नाहीं. २५ माझ्या यज्ञाचें
रक्त खमीरासुद्धां अर्पूं नको, आणि वल्हांडण स-
णाचा यज्ञ सकाळपर्यंत राहूं नये. २६ तूं आ-
पल्या भूमीच्या प्रथम उत्पन्नांतील पहिलें उत्पन्न

आपला देव परमेश्वर याच्या घरीं आण; तूं
करडूं त्याच्या आईच्या दुधांत शिजवूं नको."
२७ तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें
कीं, "तूं आपल्यासाठीं ह्या गोष्टी लिही, कारण
कीं या गोष्टींच्या अर्थाप्रमाणें म्या तुजसीं व इस्रा-
एलासीं करार केला आहे." २८ आणि तो
परमेश्वरापासीं चाळीस दिवस व चाळीस रात्री
तेथें होता; त्याने अन्न खाल्लें नाहीं, आणि तो
पाणी प्याला नाहीं; आणि त्या पाट्यांवर करारां-
तील गोष्टी, त्या दाहा आज्ञा, त्याने लिहिल्या.
२९ मग मोशे सीना डोंगरावरून उतरला, तेव्हां
असें झालें कीं मोशे डोंगरावरून उतरतांना त्या
संकेतलेखाच्या दोन पाट्या त्याच्या हातांत होत्या;
आणि मोश्याला कळलें नाहीं कीं त्यासीं बोलल्या
मुळें आपल्या तोंडाच्या कातड्यापासून किरण
झाले. ३० परंतु आहरोन व सर्व इस्राएलाचीं
संतानें यांस मोशे असा दिसला कीं पाहा, त्या-
च्या तोंडाचें कातडें प्रकाशलें, आणि त्याच्या-
जवळ आवयास ते भ्याले. ३१ तेव्हां मोश्याने
त्यांस हाक मारिली, मग आहरोन आणि समु-
दायाचे सर्व अधिकारी त्याकडे फिरले, आणि
मोशे त्यांसीं बोलला. ३२ आणि त्यानंतर
सर्व इस्राएलाचीं संतानें जवळ आलीं, आणि जें
परमेश्वराने त्याला सीना डोंगरावर सांगितलें
होतें, तें अवघें त्याने त्यांस आज्ञा करून सांगि-
तलें. ३३ तेव्हां मोशे त्यांसीं बोलण्याची स-
माप्ति करीपर्यंत त्याने आपल्या तोंडावर मुखवस्त्र
घातलें होतें. ३४ आणि जेव्हां मोशे परमे-
श्वरासमोर त्यासीं बोलायास आंत गेला, तेव्हां
आपण आपल्या बाहेर जाण्यापर्यंत मुखवस्त्र का-
ढिलें, मग जी आज्ञा झाली ती बाहेर येऊन
इस्राएलाच्या संतानांस सांगितली. ३५ आणि
इस्राएलाच्या संतानानी मोश्याचें तोंड पाहिलें
कीं मोश्याच्या तोंडाचें कातडें किरणमय झालें,
यास्तव मोश्याने आपण त्यासीं बोलायास आंत
जाई तोंपर्यंत आपल्या तोंडावर मुखवस्त्र फिरून
घातलें.

## अध्याय ३५

तेव्हां मोश्याने इस्राएलाच्या संतानांचा सर्व
समुदाय एकवट करून त्यांसीं म्हटलें, "ज्या
गोष्टी करायास परमेश्वराने तुह्मांस आज्ञा
करून सांगितल्या त्या ह्या आहेत कीं; २ सा-
हा दिवस काम करायाचें आहे, परंतु सातव्या
दिवसीं तुह्मांस परमेश्वरासाठीं विसांव्याचा प-
वित्र शाब्बाथ व्हावा; जो कोणी त्यांत काम करि-
तो, तो जिवें मारिला जावा. ३ शाब्बाथ दिवसीं
तुह्मी आपल्या सर्व वस्त्यांत अग्नि पेटवूं नका."
४ तेव्हां मोश्याने इस्राएलाच्या संतानांच्या सर्व
समुदायाला म्हटलें कीं, "परमेश्वराने जी गोष्ट
आज्ञा करून सांगितली ती हीच कीं, ५ तुह्मी
आपल्यापासून परमेश्वरासाठीं अर्पण घ्या, ज्या
कोणाच्या मनांत इच्छा आहे त्याने परमेश्वरा-
साठीं अर्पण आणावें; सोनें व रुपें व पितळ; ६
आणि निळें व जांबळें व किरमिजरंगी व बारीक
सूत व शेळ्यांची लंव; ७ आणि एडक्यांचीं
आरक्त केलेलीं कातडीं व ताहाश कातडीं, आणि
शिट्टी लांकडें; ८ आणि उजेडासाठीं तेल, अ-
भिषेकाच्या तेलासाठीं आणि सुवासिक धुपासाठीं
सुगंधद्रव्यें; ९ आणि एफोदासाठीं व ऊरपटासाठीं
शोहाम पाषाण व कोंदायाचे दुसरे पाषाण, हीं
आणावीं. १० आणि तुह्मामध्यें सर्व सुज्ञ म-
नाचे यानी येऊन परमेश्वराने जीं अवघीं आज्ञा
करून सांगितलीं, तीं करावीं. ११ मंडप व
त्याची राहोटी व त्याचें आच्छादन, त्याचीं अड-
कणें व त्याच्या फळ्या, त्याचे अडसर, त्याचे खांब
व त्याच्या उथळ्या; १२ कोश व त्याच्या
काठ्या, दयासन व अंतरवस्त्र पडदा; १३ मेज
व त्याच्या काठ्या व त्याचें सर्व सामान व दर्शं-
नीय अपूप; १४ आणि उजेडासाठीं दिव्याचें झाड
व त्याचें सामान व त्याचे दिवे व उजेडासाठीं
तेल; १५ आणि धूपवेदी व तिच्या काठ्या,
आणि अभिषेकाचें तेल व किराण्याचा धूप, आणि
मंडपाच्या दारासाठीं पडदा; १६ होमवेदी,
व तिची जी पितळाची जाळी, तिच्या काठ्या
व तिचें सर्व सामान, गंगाळ व त्याची मांडणी;
१७ अंगणाचीं पाडदीं, त्याचे खांब व त्यांच्या
उथळ्या, आणि अंगणाच्या दरवाजाचा पडदा;
१८ मंडपाच्या मेखा, आणि अंगणाच्या मेखा व
त्यांच्या दोऱ्या; १९ पवित्रस्थान यांतील कामा-
साठीं पदवीचीं वस्त्रें, आहरोन याजक यासाठीं

पवित्र वस्त्रें, आणि याजकपण करायासाठीं त्याच्या
पुत्रांचीं वस्त्रें, हीं करावीं." २० मग इस्राएला-
च्या संतानांचा सर्व समुदाय मोशाच्या समोरून
गेला. २१ तेव्हां ज्या प्रत्येकाला आपल्या मना-
ची प्रेरणा झाली, आणि ज्या प्रत्येकाला आपाप-
ल्या बुद्धीने इच्छा झाली, त्यानी येऊन सभामं-
डपाच्या कामासाठीं, आणि तिच्या सर्व कामासा-
ठीं, आणि पवित्र वस्त्रांसाठीं परमेश्वराला अ-
र्पण आणिलें. २२ तेव्हां स्त्रियासुद्धां पुरुष
आले, ज्या सर्वांच्या मनांत इच्छा होती त्यानी
नथा व कुंडलें व कडीं व गोंडे, सोन्याचे सर्व
डागिणे आणिले, आणि ज्या प्रत्येक पुरुषाने
अर्पण केलें त्याने परमेश्वराला सोन्याचें अर्पण
आणिलें. २३ आणि ज्या सर्व माणसांपासीं निळें व
जांबळें व किरमिजरंगी व बारीक सूत व शेळ्यां-
ची लंव व एडक्यांचीं आरक्त केलेलीं कातडीं व
ताहाश कातडीं मिळालीं, त्यानी आणिलीं. २४
ज्या कोणी रुपें व पितळ यांतील अर्पण केलें त्याने
परमेश्वरासाठीं अर्पण आणिलें; आणि त्या सेवे-
च्या कांहीं कामाचीं शिट्टी लाकडें ज्या कोणाजवळ
होतीं त्यानी आणिलीं. २५ आणि सुज्ञ मनाच्या
ज्या सर्व स्त्रिया त्यानी आपल्या हातानी कांतून
निळें व जांबळें व किरमिजरंगी व बारीक सूत
आणिलें. २६ आणि ज्या सर्व स्त्रियांच्या मनांत
ज्ञानेंकरून प्रेरणा झाली, त्यानी शेळ्यांची लंव
कांतिली. २७ आणि अधिकाऱ्यानी एफोदासाठीं
व ऊरपटासाठीं शोहाम पाषाण व कोंदायाचे पा-
षाण आणिले. २८ आणि उजेडासाठीं व अ-
भिषेकाच्या तेलासाठीं आणि सुवासिक धुपासाठीं
सुगंधद्रव्यें व तेल आणिलीं. २९ परमेश्वराने
मोशाकडून जें करायास आज्ञा दिल्ही त्या
कोणत्याहि कामास आणायाला ज्या प्रत्येक पुरु-
षाच्या व स्त्रियेच्या मनांत इच्छा झाली, त्या-
ने आणिलें; इस्राएलाच्या संतानानी संतोषाने
आणिलें.

३० तेव्हां मोशाने इस्राएलाच्या संतानांस
म्हटलें कीं, "पाहा, यहूदाच्या वंशांतील हूराचा
पुत्र ऊरी याचा पुत्र बसालेल याला परमेश्व-
राने नांवाने बोलाविलें आहे. ३१ आणि दे-
वाच्या आत्म्याने त्यांत ज्ञान व बुद्धि व समज
सर्व कामासाठींहि भरविला आहे; ३२ असें कीं
त्याने चतुर युक्ती काढून सोन्याचें व रुप्याचें व
पितळाचें काम करावें; ३३ कोंदायाचे पाषाण
घडावे आणि लाकूड कोरावें ह्मणून, असें कीं
त्याने सर्व युक्तीच्या कामांत उद्योग करावा. ३४
आणि त्याच्या मनांत शिकवायाचें ज्ञान ठेविलें
आहे, तो आणि दानाच्या वंशांतील अहीसामा-
खाचा पुत्र आहलियाब त्या दोघांच्या मनांत.
३५ त्यांमध्यें मनाचें ज्ञान असें भरविलें आहे
कीं त्यानी कोरणाऱ्याचें अवघें काम करावें, आणि
निळें व जांबळें व किरमिजरंगी व बारीक सूत यां-
च्या बुटीदार व वेलबुटीच्या विणकर कोणत्याहि
कामाचे कारागीर व युक्ती काढणारे यांचें काम
करावें."

## अध्याय ३६.

मग बसालेल व आहलियाब, आणि सुज्ञ मना-
च्या ज्या प्रत्येक माणसांत परमेश्वराने ज्ञान
व बुद्धि असी ठेविली कीं जें कांहीं परमेश्वराने
आज्ञा करून सांगितलें त्याप्रमाणें पवित्रस्थानाच्या
सर्व सेवेचें काम करायास जाणावें, त्यानी काम
केलें. २ आणि मोशाने बसालेलाला व आह-
लियाबाला आणि ज्या प्रत्येक सुज्ञ मनाच्या माण-
साच्या अंतःकरणांत परमेश्वराने ज्ञान ठेविलें
होतें, ज्या प्रत्येकाच्या मनांत तें काम करण्यासाठीं
जवळ येण्याची प्रेरणा झाली, त्यांस बोलाविलें.
३ मग त्यानी त्या पवित्रस्थानाच्या सेवेचें काम
करण्यासाठीं जें इस्राएलाच्या संतानानी आणिलें
होतें, तें अवघें अर्पण मोशाजवळून घेतलें; तथा-
पि त्यानी संतोषाने सकाळच्या सकाळीं त्याजवळ
अणखी आणिलें. ४ आणि जे पवित्रस्थानाचें सर्व
काम करीत होते, ते सर्व शाहाणे कामकरी एक-
एक आपापल्या कामावरून येऊन मोशाला असें
बोलले कीं, ५ "जें काम करायास परमेश्वराने
आज्ञा दिल्ही, तें करण्यास पुरण्यापेक्षां लोक फार
अधिक आणितात." ६ तेव्हां मोशाने आज्ञा
दिल्ही आणि त्यानी छावणींतून असा हुकूम प्रगट
केला कीं, "पवित्र, वर्गणीसाठीं कोणी पुरुषाने अ-
थवा स्त्रीने अणखी काम करूं नये." तसें लोक
आणण्यापासून आटोपले गेले. ७ कां कीं तें
सर्व काम करण्यासाठीं जें मिळविलें, तें पुरें

होऊन अधिक झालें. ८ आणि मंडपकार्याच्या
कामकऱ्यांतील कोणी सुज्ञ मनाचे यांनी कांतलेलें
बारीक सूत व निळें व जांबळें व किरमिजरंगी,
यांतील दाहा थानें केलीं, करूबयुक्त बुटीदार
कामाचीं असीं त्याने तीं केलीं. ९ एका थानाची
लांबी अठ्ठावीस हात, आणि एका थानाची रुंदी
चार हात; सर्व थानांस एकच मेज होतें. १०
आणि त्याने पांच थानें एकमेकांसीं जोडिलीं, आ-
णि दुसरीं पांच थानें एकमेकांसीं जोडिलीं. ११
आणि हीं जडण्यासाठीं त्याने बाजूकडल्या एका
थानाच्या कांठीं निळ्या सुताचीं बिरडीं केलीं आणि
जडण्यासाठीं दुसऱ्या पांचांच्या बाजूकडल्या था-
नाच्या कांठीं केलीं. १२ एका थानांत त्याने पन्नास
बिरडीं केलीं, आणि जें दुसरें थान जडायाचें त्या-
च्या कांठीं पन्नास बिरडीं केलीं; तीं बिरडीं एक-
मेकासमोर होतीं. १३ आणि त्याने सोन्याचीं
पन्नास अडकणें करून थानें एकमेकाला अडक-
ण्यांनी जोडिलीं, आणि मंडप एक झाला.

१४ आणि मंडपावरील आच्छादनासाठीं त्याने
शेळ्यांच्या लंवेचीं थानें केलीं, तीं अकरा थानें
केलीं. १५ एका थानाची लांबी तीस हात, आणि
एका थानाची रुंदी चार हात; त्या अकरा थानांचें
एकच मेज होतें. १६ आणि त्याने पांच थानें
वेगळीं जोडिलीं, आणि साहा थानें वेगळीं जोडिलीं.
१७ आणि जडण्यासाठीं त्याने बाहेरल्या थानाच्या
कांठीं पन्नास बिरडीं केलीं, आणि दुसऱ्या जड-
ण्याच्या थानाच्या कांठीं पन्नास बिरडीं केलीं. १८
आणि राहोटी एक व्हावी ह्मणून त्याला जड-
ण्यासाठीं त्याने पितळाचीं पन्नास अडकणें केलीं.
१९ आणि राहोटीसाठीं एडक्यांच्या आरक्त के-
लेल्या कातड्यांचें आच्छादन केलें, आणि वरतीं
ताहाश कातड्यांचें आच्छादन केलें. २० आणि
त्याने मंडपासाठीं शिट्टी लांकडांच्या उभ्या फळ्या
केल्या. २१ एका फळीची लांबी दाहा हात,
आणि एका फळीची रुंदी दीड हात होती. २२
एका फळीचीं दोन कुसें, एकमेकाच्या बरोबर,
तसीं मंडपाच्या सर्व फळ्यांस त्याने केलीं. २३
आणि मंडपाच्या फळ्या अशा केल्या, दक्षिणेक-
डल्या बाजूस वीस फळ्या. २४ आणि त्या वीस
फळ्यांखालीं रुप्याच्या चाळीस उथळ्या; एका
फळीच्या खालीं तिच्या दोन कुसांसाठीं दोन उ-
थळ्या, आणि दुसऱ्या फळीखालीं तिच्या दोन
कुसांसाठीं दोन उथळ्या, अशा केल्या. २५ आ-
णि मंडपाच्या उत्तरेकडल्या बाजूसाठीं त्याने वीस
फळ्या केल्या. २६ आणि त्यांच्या चाळीस
रुप्याच्या उथळ्या, एका फळीखालीं दोन उथळ्या
आणि दुसऱ्या फळीखालीं दोन उथळ्या, अशा
केल्या. २७ आणि मंडपाच्या दोन बाजूंच्या शे-
वटीं पश्चिमेस त्याने साहा फळ्या केल्या. २८
आणि मंडपाच्या कोंपऱ्यांसाठीं दोन बाजूंच्या
शेवटीं दोन फळ्या केल्या. २९ ह्या तर खालीं
जोडलेल्या होत्या, आणि त्याप्रमाणें वरतीं एका
कोंड्यांत जोडलेल्या होत्या, तसें त्या दोघांस दोन
कोंपऱ्यांसाठीं त्याने केलें. ३० तशा आठ फळ्या
व त्यांच्या सोळा रुप्याच्या उथळ्या होत्या, एक-
एका फळीखालीं दोन दोन उथळ्या होत्या. ३१
आणि मंडपाच्या एका बाजूकडल्या फळ्यांसाठीं
त्याने शिट्टी लांकडांचे पांच अडसर केले. ३२
मंडपाच्या दुसऱ्या बाजूकडल्या फळ्यांसाठींहि
पांच अडसर, आणि मंडपाच्या दोन बाजूंच्या
शेवटीं पश्चिमेकडल्या फळ्यांसाठीं पांच अडसर
केले. ३३ आणि मधला अडसर फळ्यांमधून
या शेवटापासून त्या शेवटापर्यंत जाई असा केला.
३४ आणि त्याने फळ्यांस सोन्याने मढविलें, आ-
णि त्याचे कोंडे अडसरांचीं घरें हीं त्याने सोन्या-
चीं केलीं, आणि अडसरांस सोन्याने मढविलें
३५ आणि निळें व जांबळें व किरमिजरंगीं व
कांतलेलें बारीक सूत यांचा पडदा त्याने केला;
बुटीदार कामाचें करूबयुक्त असें केलें. ३६
आणि त्याच्यासाठीं त्याने शिट्टी लांकडांचे चार
खांब केले, मग त्यांस सोन्याने मढविलें, त्यां-
चे आंकडे सोन्याचे होते, आणि त्यांच्यासाठीं
त्याने रुप्याच्या चार उथळ्या ओतून केल्या. ३७
आणि राहोटीच्या दारासाठीं निळें व जांबळें
व किरमिजरंगीं व कांतलेलें बारीक सूत, यांचा
वेलबुटीचा पडदा त्याने केला. ३८ आणि त्याचे
पांच खांब व यांचे आंकडे केले, आणि त्यांचीं
शिखरें व त्यांचे सर यांस सोन्याने मढविलें, आ-
णि त्यांच्या पांच उथळ्या पितळाच्या केल्या.

## अध्याय ३७.

तेव्हां बसालेलाने शिट्टी लांकडांचा कोश केला;
त्याची लांबी अडीच हात, व त्याची रुंदी
दीड हात, त्याची उंचीहि दीड हात होती.
२ आणि त्याला आंतून व बाहेरून शुद्ध सो-
न्याने मढविलें, आणि त्याच्या चहुंकडे सोन्या-
चा कांठ केला. ३ आणि त्याच्यासाठीं त्या-
च्या चार पावक्यांस त्याने सोन्याच्या चार कड्या
ओतून केल्या, म्हणजे त्याच्या एका बाजूवर
दोन कड्या, आणि त्याच्या दुसऱ्या बाजूवर
दोन कड्या केल्या. ४ आणि त्याने शिट्टी लां-
कडाच्या काठ्या करून त्यांस सोन्याने मढविलें.
५ आणि कोश नेण्यासाठीं त्याने काठ्या कोशाच्या
बाजूवरल्या कड्यांत घातल्या. ६ आणि त्याने
शुद्ध सोन्याचें दयासन केलें; त्याची लांबी अ-
डीच हात, व त्याची रुंदी दीड हात होती. ७
आणि त्याने सोन्याचे दोन करूब केले, दया-
सनाच्या दोन शेवटांवर घडींव, असे केले. ८ एक
करूब या शेवटावर आणि दुसरा करूब त्या
शेवटावर, दयासनांतील त्याच्या दोन शेवटांवर
करूब केले. ९ आणि करूब आपले दोन पंख
वरतीं पसरून दयासनावर आपल्या पंखांनी छा-
या धरीत होते, आणि त्यांचीं तोंडें एकमेकाकडे;
दयासनाकडे करूबांचीं तोंडें होतीं.

१० आणि त्याने शिट्टी लांकडाचें मेज केलें;
त्याची लांबी दोन हात, व त्याची रुंदी हातभर,
व त्याची उंची दीड हात होती. ११ आणि
त्याने शुद्ध सोन्याने मढविलें, आणि चहुंकडे त्या-
ला सोन्याचा कांठ केला. १२ आणि चहुंकडे
चौंगाभर पाळ त्याने त्याला केली, आणि त्याच्या
पाळीला चहुंकडे सोन्याचा कांठ केला. १३ आणि
त्याने त्याच्यासाठीं सोन्याच्या चार कड्या ओ-
तून केल्या, आणि पायाचे जे चार कोंपरे त्यांवर
त्या कड्या लाविल्या. १४ मेज नेण्यासाठीं त्या
कड्या पाळीजवळ काठ्यांचीं घरें, अशा होत्या.
१५ आणि नेण्याच्या काठ्या त्याने शिट्टी लांकडांच्या
करून त्यांस सोन्याने मढविलें. १६ आणि
मेजावरलीं जीं पात्रें, त्याचीं तबकें व त्याचीं धुप-
पात्रें व त्याचीं शुद्धकारी पात्रें व त्याचें अर्घ्यें,
ज्यांकडून तर्पण करायाचें, तीं शुद्ध सोन्याचीं
त्याने केलीं.

१७ आणि त्याने दिव्याचें झाड शुद्ध सो-
न्याचें केलें, घडींव दिव्याचें झाड केलें; त्याचें
कांड व त्याची प्रत्येक खांदी, त्याचीं वातघरें,
त्याचीं बोंडें व त्याचीं फुलें त्यांतीलच होतीं.
१८ आणि त्याच्या बाजूंतून साहा खांद्या निघा-
ल्या, दिव्याच्या झाडाच्या एका बाजूंतून तीन
खांद्या, आणि दिव्याच्या झाडाच्या दुसऱ्या बा-
जूंतून तीन खांद्या होत्या. १९ एका खांदीला
बदामरूपी तीन वातघरें, बोंड व फूल, आणि दुस-
ऱ्या खांदीला बदामरूपी तीन वातघरें, बोंड व
फूल; तसें दिव्याच्या झाडांतून निघणाऱ्या साहा
खांद्यांस होतें. २० आणि दिव्याच्या झाडा-
लाच बदामरूपी चार वातघरें, त्याचीं बोंडें व
त्याचीं फुलें होतीं. २१ आणि त्यांतून निघणा-
ऱ्या साहा खांद्यांतील दोन खांद्यांखालीं त्याच्यां-
तील बोंड आणि दोन खांद्यांखालीं त्यांच्यांतील
बोंड, आणि दोन खांद्यांखालीं त्यांच्यांतील बोंड
होतें. २२ त्याचीं बोंडें व त्याच्या खांद्या त्यां-
च्यांतीलच होत्या; तें संपूर्ण घडींव शुद्ध सो-
न्याचा एकच तुकडा होता. २३ आणि त्याचे
सात दिवे व त्याचे चिमटे व त्याचीं अग्निपात्रें
त्याने शुद्ध सोन्याचीं केलीं. २४ तें व त्याचें
सर्व सामान एक तालांत शुद्ध सोन्याचें त्याने
केलें.

२५ आणि त्याने शिट्टी लांकडाची धूपवेदी केली;
तिची लांबी हातभर व तिची रुंदी हातभर, असें
चौरस, आणि तिची उंची दोन हात होती; तिचीं
शिंगें त्यांतीलच होतीं. २६ आणि त्याने तिला
तिचा माथा व सभोंवतें तिच्या बाजूंचीं शिंगें
यांस शुद्ध सोन्याने मढविलें, आणि तिला चहुं-
कडे सोन्याचा कांठ केला. २७ आणि तिच्या-
साठीं तिच्या कांठाखालीं तिच्या दोहींकडे, तिच्या
दोन बाजूंवर, तिला नेण्याच्या काठ्या यांचीं घरें
होण्यासाठीं सोन्याच्या दोन कड्या त्याने केल्या.
२८ आणि काठ्या शिट्टी लांकडांच्या करून
त्यांस सोन्याने मढविलें. २९ आणि त्याने अभि-
षेकाचें पवित्र तेल व किराण्यांचा शुद्ध धूप,
गांध्याचें काम, असा केला.

## अध्याय ३८.

आणि त्याने होमवेदी शिट्टी लाकडांची केली;
तिची लांबी पांच हात व तिची रुंदी
पांच हात असी चौरस, आणि तिची उंची तीन
हात होती. २ आणि तिच्या चार कोंपऱ्यांवर
तिचीं शिंगें केलीं; त्यांतीलच तिचीं शिंगें हो-
तीं; आणि त्याने तिला पितळाने मढविलें. ३
आणि वेदीचें सर्व सामान, भांडीं व चेतणारीं
व शिंपणारीं, कांटे व अग्निपात्रें त्याने केलीं, तिचें
सर्व समान पितळाचें केलें. ४ आणि वेदीसाठीं
तिच्या कांठाखालीं तिच्या मध्यापर्यंत नीच जा-
ळींचें काम असी पितळाची चाळण त्यानी केली.
५ आणि चाळणीच्या चार कोंपऱ्यांस कांठ्यांचीं
घरें, अशा पितळाच्या चार कड्या त्याने ओतून
केल्या. ६ आणि त्याने शिट्टी लाकडाच्या कांठ्या
करून त्यांस पितळाने मढविलें. ७ आणि कांठ्यां-
कडून वेदी नेण्यास त्याने त्या त्याच्या बाजूंकडल्या
कड्यांत घातल्या; त्याने ती फळ्यांचें पोकळ असी
केली. ८ आणि सभामंडपाच्या दारीं ज्या ज-
मून मिळत असत, त्यांच्या आरश्यांतून पितळाचें
गंगाळ व त्याची मांडणी त्याने पितळाची केली.
९ आणि त्याने अंगण केलें; दक्षिणेकडल्या आंगीं
अंगणाचीं पाडगीं कांतलेल्या बारीक सुताचीं शं-
भर हात. १० त्यांचे खांब वीस, आणि त्यांच्या
उथळ्या पितळाच्या वीस, खांबांचे आंकडे व
त्यांचे सर रुप्याचे केले. ११ आणि उत्तर
आंगीं शंभर हात पाडगीं, त्यांचे खांब वीस, आणि
यांच्या उथळ्या पितळाच्या वीस, खांबांचे आं-
कडे व त्यांचे सर रुप्याचे केले. १२ आणि
पश्चिम आंगीं पन्नास हात पाडगीं यांचे खांब
दाहा, व यांच्या उथळ्या दाहा, खांबांचे आंकडे
व त्यांचे सर रुप्याचे. १३ आणि पुढल्या
आंगीं उगवतेस पन्नास हात; १४ एकीकडे
पंधरा हात पाडगीं; त्यांचे खांब तीन व यांच्या
उथळ्या तीन. १५ आणि दुसरीकडे तसेंच,
अंगणांतील दरवाज्याच्या इकडे व तिकडे पंधरा
हात पाडगीं, यांचे खांब तीन व यांच्या उथळ्या
तीन, असे केले. १६ अंगणाचीं सर्व पाडगीं चहुं-
कडे कांतलेल्या बारीक सुताचीं होतीं. १७
आणि खांबांसाठीं पितळाच्या उथळ्या, खांबांचे
आंकडे व त्यांचे सर रुप्याचे, आणि त्यांच्या
शिखरांचें मढण रुप्याचें आणि अंगणाच्या सर्व
खांबांचे जे सर ते रुप्याचे होते. १८ आ-
णि अंगणाच्या दरवाज्याचा पडदा वेलबुटीचा,
निळें व जांबळें व किरमिजरंगी व कांतलेलें बा-
रीक सूत, यांचा होता; आणि त्याचा विस्तार
वीस हात, व त्याच्या रुंदीची उंची अंगणाच्या
पाडग्यांप्रमाणें पांच हात होती. १९ आणि
दरवाज्याचीं पाडगीं यांचे खांब चार, व यांच्या
पितळाच्या उथळ्या चार, त्यांचे आंकडे रुप्याचे
व त्यांच्या शिखरांचें मढण आणि त्यांचे सर
रुप्याचे होते. २० आणि मंडपाच्या व अंग-
णाच्या चहुंकडल्या सर्व मेखा पितळाच्या होत्या.
२१ लेव्यांच्या सेवेसाठीं जो संकेतलेखाचा
मंडप, त्या मंडपाची जी याद मोशाच्या सांगण्या-
प्रमाणें याजक आहरोनाचा पुत्र इथामार याकडून
केलेली, ती ही आहे. २२ यहूदाच्या वंशांतील
हूर याचा पुत्र ऊरी याचा पुत्र बसालेल याने तर
जें कांहीं परमेश्वराने मोशाला आज्ञा करून
सांगितलें, तें केलें. २३ आणि दानाच्या वंशां-
तील अहीसामाख याचा पुत्र आहलियाब त्याच्या
संगतीं होता; हा कोरणारा आणि निळें व जांबळें
व किरमिजरंगी व बारीक सूत, यांचा बुटीदार व
वेलबुटीचें काम करणारा असा होता. २४ पवि-
त्रस्थानाच्या सर्व कामांत जें अवघें सोनें कामाला
लाविलेलें होतें, ह्मणजे अर्पिलेलेंच सोनें, तें एकु-
णतीस तालांत आणि पवित्रस्थानाच्या शेकेलाप्र-
माणें सातशें तीस शेकेल होतें. २५ आणि स-
मुदायांतील झाडा देणाऱ्यांचें रुपें शंभर तालांत,
आणि पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एक हजार
सातशें पंच्याहत्तर शेकेल होतें. २६ जे झाडा
देण्यास गेले, वीस वर्षांचे व त्यांहून अधिक, ते
सर्व ह्मणजे साहा लाख तीन हजार साडे पांच-
शें यांतील प्रत्येकाला एक बेका ह्मणजे पवित्र-
स्थानांतील शेकेलाप्रमाणें अर्धा शेकेल होता.
२७ आणि ते शंभर तालांत रुपें पवित्रस्थाना-
च्या उथळ्या व एफोदाच्या उथळ्या ओतण्यास
लागले, शंभर तालांतांच्या एकशें उथळ्या; एक
उथळी एका तालांताची होती. २८ आणि ते एक

हजार सातशें पंचाहत्तर शेकेल यांतून त्याने खां-
बांचे आंकडे केले, आणि त्यांचीं शिखरें मढविलीं,
आणि त्यांचे सर केले. २९ आणि अर्पिलेलें
पितळ सत्तर तालांत आणि दोन हजार चारशें
शेकेल होतें. ३० आणि त्यांतून त्याने सभा-
मंडपाच्या दाराच्या उथळ्या, आणि पितळाची
वेदी, आणि तिला जी पितळाची चाळण ती,
आणि वेदीचें सर्व सामान केलें. ३१ आणि
अंगणाच्या चहुंकडल्या उथळ्या आणि अंगणां-
तील दरवाज्याच्या उथळ्या, आणि मंडपाच्या
सर्व मेखा, आणि अंगणाच्या चहुंकडल्या सर्व
मेखा केल्या.

## अध्याय ३९.

आणि निळें व जांबळें व किरमिजरंगी यां-
तून त्यानी पदवीचीं वस्त्रें पवित्रस्थानांतील
कामासाठीं केलीं, तसें आहरोनासाठीं जीं पवित्र
वस्त्रें तीं **परमेश्वराने** ज्याप्रमाणें **मोशाला** आ-
ज्ञा दिल्ही त्याप्रमाणें त्यानी केलीं. २ एफोद तर
त्याने सोनें, निळें, जांबळें व किरमिजरंगी व बारीक
सूत, यांचें केलें. ३ आणि त्यानी सोन्याचीं पत्रें
विस्तारिलीं, मग बुटीदार काम, निळें व जांबळें
व किरमिजरंगी व बारीक सूत, यांमध्यें लागूं
करायास तंतु केले. ४ त्या एफोदाच्या जडणाऱ्या
खांदपट्ट्या त्यानी केल्या, तसें तें त्याच्या दोन
वरल्या कांठीं जडलें गेलें. ५ आणि त्यावर जें
त्याला आवळण्यास बुटीदार वेष्टन त्याच्यांतील
त्याच्या कामाप्रमाणें, सोनें, निळें व जांबळें व
किरमिजरंगी व बारीक सूत, यांचें; जसी **परमे-
श्वराने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसें तें केलें.
६ आणि शोहामपाषाण सोन्याच्या कोंदणानी
कोंदायास मुद्रेवरचीं कोरणीं, याप्रमाणें इस्राएला-
च्या पुत्रांचीं नांवें कोरलेलीं, असे त्यानी केले.
७ आणि इस्राएलाच्या संतानांसाठीं सुचविण्याचे
पाषाण होण्यास त्याने त्यांस एफोदाच्या खांद-
पट्ट्यांवर जसी **परमेश्वराने मोशाला** आज्ञा
दिल्ही, तसे लाविले. ८ आणि एफोदाच्या
कामासारिखा, सोनें, निळें व जांबळें व किरमिज-
रंगी व कांतलेलें बारीक सूत, यांचा बुटीदार का-
माचा ऊरपट त्याने केला. ९ तो चौरस व दुहिरी
होता, दुणल्यावर त्याची लांबी वीतभर व त्याची
रुंदी वीतभर, असा त्यानी ऊरपट केला. १०
आणि त्यांत त्यानी पाषाणांच्या चार पंक्ती भ-
रिल्या, एक पंक्ति आरक्तक, हिरवापिंगटी व विजक;
ही पहिली पंक्ति; ११ आणि दुसरी पंक्ति नोफेक,
निळारंगी व याहलोम ; १२ आणि तिसरी
पंक्ति लेशम, विचित्रक व द्राक्षरंगी; १३ आणि
चवथी पंक्ति तार्शीश, शोहाम व यादाफे होती;
त्यांच्या भरण्यानी सोन्याच्या कोंदणांत ते खचीत
होते. १४ आणि हे पाषाण इस्राएलाच्या पुत्रां-
च्या नांवानी युक्त, त्यांच्या नांवांवरून बारा मुद्रे-
वरच्या कोरणानी एक एक आपापल्या नांवाने बारा
वंशांप्रमाणें असे होते. १५ आणि ऊरपटावर
शेवटांस शुद्ध सोन्याच्या पिळकामी सांखळ्या
त्यानी केल्या. १६ आणि त्यानी सोन्याचीं दोन
कोंदणें व सोन्याच्या दोन कड्या केल्या, आणि
त्या दोन कड्या ऊरपटाच्या वरल्या दोन कोनांवर
लाविल्या. १७ आणि ऊरपटाच्या कोनांवरल्या
दोन कड्यांत त्यानी त्या दोन पिळलेल्या सोन्या-
च्या सांखळ्या घातल्या. १८ आणि पिळलेल्या
सांखळ्यांचे दुसरे दोन शेवट त्या दोन कोंदणांत
घालून त्यांस एफोदाच्या खांदपट्ट्यावर त्याच्या
समोरल्या अंगीं घातले. १९ आणि त्यानी
सोन्याच्या दोन कड्या करून ऊरपटाच्या दोन
कोनांवर त्याचा जो कांठ एफोदाच्या वरतीं, त्या-
वर आंत लाविल्या. २० आणि त्यानी सोन्याच्या
दुसऱ्या दोन कड्या केल्या, आणि त्यांस एफो-
दाच्या दोन खांदपट्ट्यांवर खालीं त्याच्या समो-
रल्या अंगीं त्याच्या जडण्याच्या ठिकाणीं एफोदाचें
बुटीदार वेष्टन याच्या वरतीं लाविल्या. २१
आणि त्यानी ऊरपटाला याच्या कड्यानी एफो-
दाच्या कड्यांसीं निळ्या दोरीने बांधिलें, असें कीं
तो एफोदाच्या बुटीदार वेष्टनावर व्हावा, आणि
ऊरपट एफोदावरून न निघावा; जसी **परमेश्व-
राने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसा.
२२ आणि त्याने एफोदाच्या संगतीचा झगा
विणकर कामाचा संपूर्ण निळ्याचा, असा केला.
२३ आणि झग्याचें भोंक त्याच्यामध्यें चिल-
खताच्या भोंकासारिखें, तो न फाटावा ह्मणून
त्याच्या तोंडाला सभोंवतील गोट होता. २४

**आणि** त्यांनी झग्याच्या पदरांवर निळें व जांबळें
व किरमिजरंगी सूत, यांचीं डाळिंबें केलीं. २५
**आणि** त्यांनी शुद्ध सोन्याचीं घुंगरें केलीं, आणि
तीं घुंगरें डाळिंबांच्या मध्यें झग्याच्या पदरांवर
डाळिंबाच्या आड सभोंवतें लाविलीं. २६ से-
वेसाठीं झग्याच्या सभोंवतें पदरांवर घुंगरूं व
डाळिंब, घुंगरूं व डाळिंब असें केलें; जसी **पर-
मेश्वराने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसें. २७
**आणि** त्यांनी आहरोनासाठीं व त्याच्या पुत्रांसाठीं
विणकर कामाचे बारीक सुताचे अंगरखे केले.
२८ **आणि** बारीक सुताचा फेंटा, आणि बारीक
सुताचीं शोभायमान पागोटीं, आणि जवसाचें
वाखसूत, यांचे चोळणे. २९ **आणि** कांतलेलें
बारीक सूत व निळें व जांबळें व किरमिजरंगी,
यांचा काच्या वेलबुटीच्या कामाचा; जसी **परमे-
श्वराने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसा त्यांनी
केला. ३० **आणि** त्यांनी तें पवित्र किरीटफूल
शुद्ध सोन्याचें केलें, आणि त्यावर **परमेश्वरा-
साठीं पवित्र**, हा लेख मुद्रेवरच्या कोरणानी
लिहिला. ३१ **आणि** फेंट्यासीं वरतीं लावायास
त्यांनी त्यावर निळ्याची दोरी घातली; जसी **पर-
मेश्वराने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसी. ३२
**असें** सभामंडपाच्या राहोटीचें सर्व काम समाप्त
झालें, कां कीं इस्राएलाच्या संतानानी तें केलें;
ज्याप्रमाणें **परमेश्वराने मोशाला** आज्ञा दिल्ह्या,
त्या अवघ्यांप्रमाणें त्यांनी केलें.

३३ **मग** त्यांनी मोशाजवळ राहोटीसुद्धां
मंडप आणिला, आणि त्याचें सर्व सामान, त्याचीं
अडकणें, त्याच्या फळ्या, त्याचे अडसर, आणि
त्याचे खांब, व त्याच्या उथळ्या; ३४ **आणि** ए-
डक्यांच्या आरक्त केलेल्या कातड्यांचें आच्छादन,
व तहाश कातड्यांचें आच्छादन, व अंतरवस्त्र प-
डदा; ३५ संकेतलेखाचा कोश, व त्याच्या काठ्या,
व दयासन; ३६ मेज यांचें सर्व सामान, आणि
दर्शनीय अपूप. ३७ शुद्ध दिव्याचें झाड यांचीं
टवळीं, ह्मणजे लावण्याचे दिवे आणि त्याचें सर्व
सामान, व उजेडाचें तेल; ३८ **आणि** सोन्याची
वेदी, व अभिषेकाचें तेल, व किराण्याचा धूप, व
मंडपाच्या दाराचा पडदा; ३९ पितळाची वेदी
आणि तिला जी पितळाची चाळण तिच्या काठ्या,
आणि तिचें सर्व सामान; गंगाळ व त्याची मां-
डणी; ४० अंगणाचीं पाडगीं, त्याचे खांब, व
त्याच्या उथळ्या, आणि अंगणाच्या दरवाज्या-
साठीं जो पडदा, त्याचे दोरे, व त्याच्या मेखा,
आणि सभामंडपाच्या राहोटीविषयींच्या सेवेचें
सर्व सामान; ४१ पवित्रस्थानांतील सेवेसाठीं
पदवीचीं वस्त्रें, आहरोन याजक यासाठीं पवित्र
वस्त्रें, आणि याजकपणासाठीं त्याच्या पुत्रांचीं
वस्त्रें, हीं आणिलीं. ४२ ज्याप्रमाणें **परमेश्व-
राने मोशाला** आज्ञा दिल्ह्या, त्या सर्वांप्रमाणें
इस्राएलाच्या संतानानी अवघें काम केलें. ४३
तेव्हां मोशाने तें अवघें काम पाहिलें, आणि
पाहा, त्यांनी तें केलें होतें; जसी **परमेश्वराने**
आज्ञा दिल्ही होती, तसें त्यांनी केलें; मग मो-
शाने त्यांस आशीर्वाद दिल्हा.

## अध्याय ४०.

तेव्हां **परमेश्वराने मोशाला** असें सांगितलें
कीं, २ "पहिल्या महिन्यांत महिन्याच्या पहि-
ल्या दिवसीं, तूं सभामंडपाची राहोटी उभी कर.
३ आणि त्यांत संकेतलेखाचा कोश ठेव, आणि
कोशाच्या आड अंतरवस्त्र लावून पडदा दे. ४
आणि मेज आणून त्याचें सामान सिद्ध ठेव, आ-
णि दिव्याचें झाड आणून त्याचे दिवे लाव. ५
आणि धुपासाठीं सोन्याची वेदी संकेतलेखाच्या
कोशापुढें ठेव, आणि मंडपाला दाराचा पडदा
लाव. ६ आणि सभामंडपाच्या राहोटीच्या दा-
रापुढें होमवेदी ठेव. ७ आणि सभामंडप व
वेदी यांच्या मध्यें गंगाळ ठेवून त्यांत पाणी
घाल. ८ आणि चहुंकडे अंगणाचा आवार घा-
लून अंगणाच्या दरवाज्याचा पडदा लाव. ९
आणि अभिषेकाचें तेल घेऊन मंडपाचें आणि
त्यांत जें अवघें, त्याचें उटणें करून त्याला व त्या-
च्या सर्व सामानाला पवित्र कर, आणि तो पवित्र
असावा. १० आणि होमवेदी व तिचें सर्व सा-
मान यांचें उटणें करून वेदीला पवित्र कर, आणि
ती परम पवित्र असी वेदी असावी. ११ आणि
गंगाळाला त्याच्या मांडणीसुद्धां उटणें करून त्या-
ला पवित्र कर. १२ आणि आहरोनाला व
त्याच्या पुत्रांस सभामंडपाच्या दाराजवळ आणून

त्यांस पाण्याने धू. १३ आणि पवित्र वस्त्रें आ-
हरोनाच्या अंगीं घालून त्याला अभिषेक कर, तसें
त्याला पवित्र कर, म्हणजे त्याने माझ्याजवळ
याजकपण करावें. १४ आणि त्याच्या पुत्रांस ज-
वळ आणून त्यांच्या अंगीं अंगरखे घाल. १५
आणि जसा त्वां त्यांच्या बापाला अभिषेक केला,
तसा त्यांस अभिषेक कर, म्हणजे त्यानी माझ्या-
जवळ याजकपण करावें, आणि त्यांच्या पिढ्यान-
पिढी परंपरा याजकपणासाठीं त्यांचा अभिषेक
त्यांस होत जावा." १६ तेव्हां मोश्याने तें केलें,
ज्याप्रमाणें परमेश्वराने त्याला आज्ञा दिल्ह्या,
त्या सर्वांप्रमाणें त्याने केलें.

१७ आणि असें झालें कीं दुसऱ्या वर्षांतील
पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवसीं मंडप उभा
झाला. १८ आणि मोश्याने मंडप असा उभा
केला कीं त्याने त्याच्या उथळ्या मांडून त्याच्या
फळ्या लाविल्या, आणि त्याचे अडसर भरिले,
आणि त्याचे खांब उभे केले. १९ आणि त्याने
मंडपावर राहोटी विस्तारिली, आणि वरतीं राहो-
टीचें आच्छादन तिजवर घातलें; जसी परमेश्व-
राने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसें. २० आणि
त्याने संकेतलेख घेऊन कोशांत ठेविला, आणि का-
ठ्या कोशाला घातल्या, आणि वरलें दयासन को-
शावर घातलें. २१ मग त्याने कोश मंडपांत
आणिला, आणि अंतरवस्त्र पडदा अडकावून सं-
केतलेखाच्या कोशाचा आडपडदा दिल्हा; जसी
परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसा. २२
आणि सभामंडपाच्या राहोटीच्या उत्तर बाजूस
पडद्याबाहेर मेज ठेविलें. २३ आणि त्याजवर
परमेश्वरासमोर अपूपाची मांडणूक केली; जसी
परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसी.
२४ आणि सभामंडपांत मेजासमोर मंडपाच्या
दक्षिण बाजूस दिव्याचें झाड ठेविलें. २५ मग
परमेश्वराच्यासमोर ते दिवे लाविले, जसी पर-
मेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसे. २६
आणि त्याने सोन्याची वेदी सभामंडपांत पड-
द्याच्यासमोर ठेविली. २७ आणि त्यावर किरा-
ण्याचा धूप केला; जसी परमेश्वराने मोश्याला
आज्ञा दिल्ही, तसा. २८ आणि त्याने मंडपाला
दाराचा पडदा लाविला. २९ आणि सभामंड-
पाच्या राहोटींतल्या दारीं होमवेदी ठेवून तिजवर
पशुहोम व नैवेद्य अर्पिला; जसी परमेश्वराने
मोश्याला आज्ञा दिल्ही, तसा. ३० आणि सभा-
मंडप व वेदी यांच्या मध्यें त्याने गंगाळ ठेवून धु-
ण्यासाठीं त्यांत पाणी घातलें. ३१ मग मो-
श्याने व आहरोनाने व त्याच्या पुत्रानी आपले
हात व आपले पाय त्यांतून धुतले. ३२ जेव्हां
ते सभामंडपांत गेले, आणि जेव्हां वेदीजवळ गेले,
तेव्हां धुतले; जसी परमेश्वराने मोश्याला आ-
ज्ञा दिल्ही, तसे. ३३ आणि त्याने मंडप व वे-
दी यांच्या चहुंकडे अंगणाचा आवार उभारिला,
आणि अंगणाच्या दरवाज्याचा पडदा लाविला;
असें मोश्याने तें काम समाप्त केलें.

३४ मग त्या ढगाने सभामंडपाला झांकिलें,
आणि परमेश्वराचें गौरव मंडपांत भरिलें. ३५
तेव्हां मोश्याच्याने सभामंडपांत जावलें नाहीं,
कां कीं तो ढग त्याजवर राहिला, आणि पर-
मेश्वराचें गौरव मंडपांत भरिलें. ३६ नंतर
इस्राएलाचीं संतानें आपल्या सर्व चालण्यांत
जेव्हां तो ढग मंडपावरून चढला तेव्हां निघत
असत. ३७ परंतु जेव्हां तो ढग चढला नाहीं,
तेव्हां त्याच्या चढण्याच्या दिवसापर्यंत निघत
नसत. ३८ कां तर इस्राएलाच्या संपूर्ण घरा-
ण्याच्या दृष्टींत त्यांच्या सर्व चालण्यांत परमे-
श्वराचा ढग दिवसा मंडपावर होता, आणि
रात्रीं त्यावर अग्नि होता.

# मोशयाने लिहिलेलें तिसरें पुस्तक ;

म्हणजे

# लेवीय.

## अध्याय १.

आणखी परमेश्वराने मोश्याला हाक मारून
सभामंडपांतून त्याला असें सांगितलें ; २ "तूं
इस्राएलाच्या संतानांस बोलून त्यांस सांग कीं,
जर तुमच्यांतला माणूस परमेश्वराला पशूंत-
ल्यांचें अर्पण करील, तर तुह्मी आपलें अर्पण गु-
रांचें किंवा बकऱ्यांचें करा. ३ जर त्याचें अर्पण
गुरांतल्यांचा होम असला, तर त्याने सांगोपांग
नर असा अर्पावा, त्यावर परमेश्वराची प्रसन्न-
ता होण्यासाठीं त्यानें तो सभामंडपाच्या दारीं
अर्पावा. ४ आणि त्याने आपला हात होमपशू-
च्या डोक्यावर ठेवावा, मग त्याच्या प्रायश्चित्ता-
साठीं तो मान्य केला जाईल. ५ आणि त्याने
तो गोऱ्हा परमेश्वरापुढें कापावा; नंतर आह-
रोनाचे पुत्र याजक यानी त्याचें रक्त आणावें;
आणि जी वेदी सभामंडपाच्या दारीं आहे, तिज-
वर चहुंकडे तें रक्त शिंपडावें. ६ आणि त्याने
होमपशूचें कातडें काढावें, मग तो तोडून त्याचे
तुकडे करावे. ७ आणि आहरोन याजक याच्या
पुत्रानी वेदीवर अग्नि ठेवून त्या अग्नीला लांकडें
लावावीं. ८ मग वेदीवर जो अग्नि, त्यावरल्या
लांकडांवर आहरोनाचे पुत्र याजक यानी ते तुकडे
व शिर व मांदें ठेवावें. ९ आणि त्याने त्याचीं
अंतडीं व त्याचे पाय पाण्याने धुवावे, मग याज-
काने वेदीवर तीं अवघीं जाळावीं; हा होम पर-
मेश्वराला शांतिकारक सुगंध असें अर्पण आहे.
१० आणि होमासाठीं त्याचें अर्पण जर कळपां-
तल्याचें, ह्मणजे मेंढराचें किंवा शेरडाचें असलें,
तर त्याने तें सांगोपांग नर याचें करावें. ११
आणि त्याने वेदीच्या उत्तर बाजूस परमेश्वरा-
समोर तो कापावा; मग आहरोनाचे पुत्र याजक
यानी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिंपडावें. १२
आणि त्याने त्याचें शिर व त्याचें मांदें यांसुद्धां
त्याला तोडून त्याचे तुकडे करावे, मग याजकाने ते
वेदीवरल्या अग्नीवरच्या लांकडांवर ठेवावे. १३
आणि त्याने अंतडीं व पाय पाण्याने धुवावे; मग
याजकाने तीं अवघीं अर्पून वेदीवर जाळावीं ; हा
होम परमेश्वराला शांतिकारक सुगंध असें अ-
र्पण आहे. १४ आणि परमेश्वरासाठीं त्याचें
अर्पण जर पांखरांतल्याचा होम असला, तर
त्याने आपलें अर्पण होल्याचें अथवा पारव्याच्या
पिलाचें करावें. १५ तेव्हां याजकाने तें वेदी-
जवळ आणून त्याचें शिर मुरगाळून काढावें आणि
वेदीवर जाळावें, आणि त्याचें रक्त वेदीच्या बाजू-
वर पिळावें. १६ मग त्याच्या पिसांसुद्धां त्याचा
कोठा काढून वेदीजवळ पूर्वेकडे, राखेच्या ठिकाणीं
टाकावा. १७ नंतर तुकडे न करितां त्याच्या
पंखांमधून त्याला चिरावें, मग याजकाने वेदीवर
अग्नीवरल्या लांकडांवर जाळावें; हा होम पर-
मेश्वराला शांतिकारक सुगंध असें अर्पण आहे."

## अध्याय २.

"आणि जेव्हां कोणी परमेश्वराला नैवेद्य
अर्पण करील, तेव्हां त्याचें अर्पण सपीठ
व्हावें, आणि त्याने त्यावर तेल ओतावें, आणि
त्यावर धूप ठेवावा. २ मग तें आहरोनाचे पुत्र
याजक यांजवळ आणावें, नंतर त्यांतून ह्मणजे त्यां-
तल्या सपिठांतून व त्यांतल्या तेलांतून त्यावरल्या
सर्व धुपासुद्धां याजकाने आपल्या मुठीने मूठभर
घेऊन सुचनेसाठीं त्यांतलें कांहीं वेदीवर जाळावें;
परमेश्वराला शांतिकारक सुगंध असें अर्पण
आहे. ३ मग त्या नैवेद्यांतून जें उरेल, तें आ-
हरोनाचें व त्याच्या पुत्रांचें व्हावें; तें परम पवित्र,
परमेश्वराला जीं अर्पणें त्यांतलें आहे. ४ आ-
णि भट्टींत भाजलेलें नैवेद्य अर्पण जर करसील,
तर तेलाने मळलेल्या सपिठाच्या बेखमीर पोळ्या,
अथवा तेलाने माखलेले बेखमीर पापड, असें
असावें. ५ आणि जर तुझें अर्पण तव्यावरला
नैवेद्य असला, तर सपिठाचा, तेलाने माखलेला

बेखमीर, असा असावा. ६ तूं त्याचे तुकडे करून
त्यावर तेल ओत; हा नैवेद्य आहे. ७ आणि
जर तुझें अर्पण कढईंतला नैवेद्य असला, तर
तेलानें सपिठाचा करावा. ८ आणि यांतला जो
नैवेद्य केलेला, तो **परमेश्वरा**जवळ आणून याज-
कापासीं सादर कर; मग त्याने तो वेदीजवळ आ-
णावा. ९ नंतर याजकाने नैवेद्यांतून सुचनेसाठीं
कांहीं घेऊन वेदीवर जाळावें; **परमेश्वराला**
शांतिकारक सुगंध असें अर्पण आहे. १० आणि
नैवेद्यांतून जें उरेल, तें आहरोनाचें व त्याच्या
पुत्रांचें व्हावें; तें परम पवित्र, **परमेश्वराला** जीं
अर्पणें त्यांतलें आहे. ११ जो कांहीं नैवेद्य तुह्मी
**परमेश्वराला** अर्पाल, तो खमीरानें केलेला न-
सावा; कारण कीं कांहीं खमीर अथवा कांहीं मध
यांतून तुह्मी **परमेश्वराला** अर्पण करून जाळूं
नये. १२ पहिल्या उत्पन्नांतलें अर्पण तुह्मी **परमे-
श्वराला** करावें; परंतु तें शांतिकारक सुवासासाठीं
वेदीवर अर्पूं नये. १३ अणखी तूं आपल्या नैवे-
द्याच्या प्रत्येक अर्पणांत मीठ घाल; ह्मणजे आप-
ल्या **देवाच्या** कराराविषयीं मीठ आपल्या नैवेद्यांत
घालायास चुकूं नको; आपल्या प्रत्येक अर्पणा-
सुद्धां मीठ अर्प. १४ आणि जर तूं प्रथम उत्प-
न्नांचा नैवेद्य **परमेश्वराला** अर्पण करसील तर
अग्नीनें भाजलेलीं कणसें, ह्मणजे कुटून काढले-
ले दाणे यांतला तुझ्या प्रथम उत्पन्नांचा नैवेद्य
अर्पण कर. १५ आणि त्यावर तेल घाल, धूपहि
त्यावर ठेव; हा नैवेद्य आहे. १६ आणि याज-
कानें त्यांतली सूचवण ह्मणजे त्या दाण्यांतलें
आणि त्या तेलांतलें कांहीं घेऊन सर्व धुपासुद्धां
जाळावें; हें **परमेश्वराला** अर्पण आहे."

## अध्याय ३.

"आणि जर त्याचें अर्पण शांतिकारक यज्ञ
असला, जर तो तें गुरांतून वाहतो तर
तें, नर किंवा मादी असो, त्याने तें सांगोपांग असें
**परमेश्वरा**समोर आणावें. २ आणि त्याने आ-
पल्या यज्ञपशूच्या डोक्यावर आपला हात ठेवावा,
आणि सभामंडपाच्या दारीं तो कापावा, मग
आहरोनाच्या पुत्रानी त्याचें रक्त वेदीवर चहुं-
कडे शिंपडावें. ३ आणि शांतिकारक यज्ञांतून
त्याने हें अर्पण **परमेश्वराला** करावें, अंतड्यांस
झांकणारें मांदें व अंतड्यांवरलें सर्व मांदें; ४
आणि दोन गुर्दे व त्यांवर जें मांदें जें कुसींसीं तें,
आणि काळजाकडली सांगड, ही त्याने गुर्द्यांसुद्धां
काढावी; ५ मग आहरोनाच्या पुत्रानी वेदीवर
जो अग्नि त्यावरल्या लांकडावर जें होमासाठीं अ-
र्पिलेलें, त्यावर हीं जाळावीं; **परमेश्वराला** शां-
तिकारक सुगंध असें अर्पण आहे. ६ आणि त्याचें
अर्पण **परमेश्वरा**पासीं शांतिकारक यज्ञासाठीं, जर
शेळ्यांमेंढ्यांतून असलें तर त्याने तें सांगोपांग नर
अथवा मादी असें अर्पण करावें. ७ जर तो
आपलें अर्पण मेंढराचें करितो, तर त्याने तें **पर-
मेश्वरा**समोर आणावें. ८ मग आपल्या यज्ञ-
पशूच्या डोक्यावर आपला हात ठेवावा, आणि
सभामंडपापुढें तो कापावा; नंतर आहरोनाच्या
पुत्रानी त्याचें रक्त वेदीवर चहुंकडे शिंपडावें.
९ आणि त्याने शांतिकारक यज्ञांतून हें अर्पण
**परमेश्वराला** करावें, त्याचें मांदें व संपूर्ण शे-
पुट, हें त्याने माजकण्याजवळून काढावें, व अं-
तड्यांस झांकणारें मांदें आणि अंतड्यांवर जें
सर्व मांदें; १० आणि दोन गुर्दे व त्यांवर जें मां-
दें जें कुसींसीं आणि काळजाकडली सांगड, ही
त्याने गुर्द्यांसुद्धां काढावी; ११ मग याजकाने हें
वेदीवर जाळावें; **परमेश्वराला** अर्पणाचें अन्न
आहे. १२ आणि जर त्याचें अर्पण शेरडा-
चें असलें, तर त्याने तें **परमेश्वरा**समोर आ-
णावें. १३ मग त्याने आपला हात त्याच्या डो-
क्यावर ठेवावा, आणि सभामंडपापुढें तें कापावें;
नंतर आहरोनाच्या पुत्रानी त्याचें रक्त वेदीवर
चहुंकडे शिंपडावें. १४ आणि त्याने त्यांतून
आपलें अर्पण **परमेश्वराला** करावें, ह्मणजे अंत-
ड्यांस झांकणारें मांदें व अंतड्यांवर जें सर्व मांदें;
१५ आणि दोन गुर्दे व त्यांवरलें मांदें, जें कुसीं-
सीं तें आणि काळजाची सांगड, ही त्याने गुर्द्यां-
सुद्धां काढावी; १६ मग याजकाने वेदीवर
हीं जाळवीं; शांतिकारक सुवासासाठीं अर्पणाचें
अन्न आहे; सर्व मांदें **परमेश्वरा**साठींच आहे.
१७ तुमच्या पिढ्यांतून तुमच्या सर्व वस्त्यांत
हा सर्वकाळचा नेम, कीं तुह्मी कांहीं मांदें व
कांहीं रक्त खाऊं नये."

## अध्याय ४.

आणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
२ "इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं,
जर मनुष्य चुकून पाप करितो; परमेश्वरा-
च्या सर्व आज्ञा मोडून अथवा त्यांतली एक
मोडून जीं न करावीं तीं कर्मे करितो; ३ जर
अभिषिक्त याजक लोकांच्या दोषाप्रमाणें पाप करि-
तो, तर त्याने आपण केलेल्या पापासाठीं तरणा
सांगोपांग खोंड असा पापहारक यज्ञ परमेश्वरा-
ला करावा. ४ तेव्हा त्याने तो खोंड सभा-
मंडपाच्या दाराजवळ परमेश्वरासमोर आणावा,
आणि आपला हात खोंडाच्या डोक्यावर ठेवावा,
मग परमेश्वरासमोर खोंड कापावा. ५ नंतर
अभिषिक्त याजकाने त्या खोंडाचें कांहीं रक्त घे-
ऊन सभामंडपांत आणावें. ६ मग याजकाने
आपलें बोट रक्तांत बुचकळून कांहीं रक्त पर-
मेश्वरासमोर पवित्रस्थानाच्या पडद्यासमोर सात
वेळां शिंपडावें. ७ आणि परमेश्वरासमोर सु-
गंध द्रव्यांची धूपवेदी जी सभामंडपांत, तिच्या
शिंगांस याजकाने कांहीं रक्त लावावें; मग खों-
डाचें सर्व रक्त, सभामंडपाच्या दारापुढें जी होम-
वेदी, तिच्या पायाजवळ ओतावें. ८ आणि त्याने
पापहारक यज्ञासाठीं खोंडाचें सर्व मांदें त्यांतून
काढावें; अंतड्यांस झांकणारें मांदें व अंतड्यांवर
जें सर्व मांदें; ९ आणि दोन गुर्दे व त्यांवर जें
मांदें जें कुशींसीं तें, आणि काळजाकडली सांगड,
ही त्याने गुर्दांसुद्धां काढावी. १० जसी शांति-
कारक यज्ञपशूंतून काढिली होती, तसी; आणि या-
जकाने होमवेदीवर तीं जाळावीं. ११ परंतु त्याने
खोंडाचें कातडें व त्याचें सर्व मांस, त्याच्या शिरा-
सुद्धां व त्याच्या पायांसुद्धां आणि त्याचीं अंतडीं
व त्याची विष्ठा. १२ असा सर्व खोंड छावणी-
च्या बाहेर, शुद्ध ठिकाणीं, राख टाकण्याच्या जा-
ग्यावर न्यावा; आणि त्याला लाकडांवर ठेवून
अग्नीने जाळावें, राख टाकण्याच्या जाग्यावर तो
जाळावा. १३ आणखी इस्राएलाचा सर्व समु-
दाय जर चुकून पाप करितो; आणि ती गोष्ट
मंडळीच्या दृष्टीपासून गुप्त असतांहि परमेश्वरा-
च्या सर्व आज्ञांतली एक मोडून जीं कर्मे न करावीं
तीं केल्याने दोषी होतो; १४ तर जें त्यांनी
पाप केलें, तें पाप जेव्हां कळेल, तेव्हां मंड-
ळीने पापहारक यज्ञासाठीं तरणा खोंड अर्पावा;
आणि त्यांनी तो सभामंडपापुढें आणावा. १५
मग समुदायाच्या वडिलांनी आपले हात परमे-
श्वरासमोर खोंडाच्या डोक्यावर ठेवावे, नंतर
परमेश्वरासमोर खोंड कापावा. १६ मग अभि-
षिक्त याजकाने त्या खोंडाचें कांहीं रक्त सभा-
मंडपांत आणावें. १७ आणि याजकाने आपलें
बोट बुचकळून परमेश्वरासमोर पडद्यापुढें कांहीं
रक्त सातवेळां शिंपडावें. १८ आणि सभामंड-
पांत जी वेदी परमेश्वरासमोर, तिच्या शिंगांस
कांहीं रक्त लावावें; मग सभामंडपाच्या दारीं जी
होमवेदी तिच्या पायाजवळ सर्व रक्त ओतावें.
१९ आणि त्याचें सर्व मांदें त्यांतून काढून वेदी-
वर तें जाळावें. २० आणि खोंडाविषयीं जसें
करावें, तर जसें पापहारक यज्ञाच्या खोंडाविषयीं
केलें, तसें याविषयीं करावें, मग याजकाने त्यांच्या-
साठीं प्रायश्चित्त केल्यावर त्यांची क्षमा होईल.
२१ खोंडाला तर छावणीच्या बाहेर न्यावें, आणि
जसें पहिल्या खोंडाला जाळिलें, तसें याला जा-
ळावें; हा मंडळीचा पापहारक यज्ञ आहे. २२
जर अधिकारी पाप करितो, ह्मणजे आपला देव
परमेश्वर याच्या आज्ञांतली कोणीएक मोडून जीं
कर्मे न करावीं, तीं चुकून केल्याने दोषी होतो;
२३ तर त्याने जें पाप केलें तें त्याचें पाप त्याला
जेव्हां कळेल, तेव्हां त्याने आपलें अर्पण, शेळ्यां-
तलें शेरडुं सांगोपांग नर, असें आणावें. २४
आणि आपला हात शेरडाच्या डोक्यावर ठेवावा;
मग परमेश्वरापुढें, ज्या ठिकाणीं होमपशु का-
पीत असतात, तेथें तो कापावा; हा पापहारक
यज्ञ आहे. २५ आणि याजकाने पापहारक यज्ञप-
शूचें कांहीं रक्त आपल्या बोटाने घेऊन होमवेदी-
च्या शिंगांस लावावें; नंतर त्याचें रक्त होमवेदी-
च्या पायाजवळ ओतावें. २६ आणि जसें शांति-
कारक यज्ञपशूंतलें मांदें, तसें त्यांतलें सर्व मांदें
त्याने वेदीवर जाळावें; असें याजकाने त्याच्या-
साठीं त्याच्या पापाचें प्रायश्चित्त केल्यावर त्याची
क्षमा होईल. २७ आणि देशाच्या लोकांतला
कोणी मनुष्य जर चुकून पाप करितो, ह्मणजे पर-

मेश्वराची एक आज्ञा मोडून जीं कर्में न करावीं
तीं केल्याने दोषी होतो; २८ तर त्याने केलेलें
जें पाप तें त्याला जेव्हां कळेल, तेव्हां त्याने आपण
केलेल्या पापासाठीं आपलें अर्पण, शेरडांतलें बकरें
सांगोपांग मादी, असें आणावें. २९ आणि आप-
ला हात यज्ञपशूच्या डोक्यावर ठेवावा; मग त्याने
होमाच्या ठिकाणीं पापहारक यज्ञपशु कापावा. ३०
नंतर याजकाने आपल्या बोटाने त्याचें कांहीं रक्त
घेऊन होमवेदीच्या शिंगांस लावावें; मग त्याचें
सर्व रक्त वेदीच्या पायाजवळ ओतावें. ३१ आ-
णि शांतिकारक यज्ञपशूंतून जसें मांदें काढिलें, तसें
त्याने याचें सर्व मांदें काढावें; मग परमेश्वरा-
पाशीं शांतिकारक सुवासासाठीं याजकाने वेदीवर
तें जाळावें; असें याजकाने त्याच्यासाठीं प्रायश्चित्त
करावें, ह्मणजे त्याची क्षमा होईल. ३२ अथवा
जर तो पापहारक यज्ञासाठीं मेंढरूं असें अर्पण
आणितो, तर त्याने तें, सांगोपांग मादी, असें
आणावें. ३३ मग आपला हात त्या पापहारक
यज्ञपशूच्या डोक्यावर ठेवावा, आणि ज्या ठिकाणीं
होमपशु कापीत असतात, तेथें पापहारक यज्ञा-
साठीं तो कापावा. ३४ नंतर याजकाने त्या पा-
पहारक यज्ञपशूचें कांहीं रक्त आपल्या बोटाने
घेऊन होमवेदीच्या शिंगांस लावावें; मग त्याचें
सर्व रक्त वेदीच्या पायाजवळ ओतावें. ३५ आणि
जसें शांतिकारक यज्ञाच्या मेंढरांचें मांदें काढिलें,
तसें त्याने याचें सर्व मांदें काढावें; मग याजकाने
वेदीवर परमेश्वराला जीं अर्पणें त्याप्रमाणें तें
जाळावें; असें त्याने केलेल्या पापामुळें त्याच्या-
साठीं याजकाने प्रायश्चित्त करावें, ह्मणजे त्याची
क्षमा होईल."

## अध्याय ५.

आणि जर मनुष्य असें पाप करितो कीं आपण
शपथेचा शब्द ऐकून साक्षी आहे, परंतु
त्याने पाहिलें अथवा जाणिलें असतांहि तो सांगत
नाहीं, तर त्याने आपला अन्याय सोसावा. २
किंवा जर मनुष्य कांहीं अशुद्ध वस्तूला शिवतो,
ह्मणजे अशुद्ध रानपशूचा मुडदा, किंवा अशुद्ध
ग्रामपशूचा मुडदा, किंवा अशुद्ध जंतूचा मुडदा,
यांस शिवतो, तर तें त्याला ठाऊक नसतांहि तो
अशुद्ध व दोषी होतो. ३ किंवा माणूस आपल्या
ज्या कोणत्याहि अशुद्धाने अशुद्ध असेल, त्या अ-
शुद्धाला जर शिवतो, आणि त्याला ठाऊक नाहीं;
मग त्याला कळतें, तर तो दोषी होतो. ४ किंवा
माणसें शपथ वाहून जें कांहीं अविचाराने बोल-
तात, तेणेंकरून जर कोणी मनुष्य वाईट करायास
अथवा बरें करायास तोंडांतून अविचाराने बोलून
शपथ वाहतो, आणि त्याला ठाऊक नाहीं, मग
त्याला कळतें, तर तो यांतल्या एखाद्याविषयीं
दोषी होतो. ५ आणि असें व्हावें कीं जेव्हां तो
यांतल्या एखाद्याविषयीं दोषी होतो, तेव्हां त्याने
जें पाप केलें, तें पत्करून घ्यावें. ६ आणि त्याने
आपण केलेल्या पापामुळें आपल्या दोषकारक य-
ज्ञासाठीं एक मादी, ह्मणजे मेंढरांतली मेंढी किंवा
शेरडांतली शेळी, पापहारक यज्ञासाठीं परमे-
श्वराजवळ आणावी; मग त्याच्यासाठीं त्याच्या
पापाविषयीं याजकाने प्रायश्चित्त करावें. ७
परंतु बकरें इतकें जर त्याला मिळेना, तर
त्याने जें पाप केलें, त्याविषयीं त्याचा जो दोष
त्यामुळें दोन होले, किंवा पारव्याचीं दोन पिलें,
एक पापहारक यज्ञासाठीं आणि एक होमासाठीं,
असीं परमेश्वराजवळ आणावीं. ८ तेव्हां त्याने
तीं याजकाजवळ आणावीं, मग त्याने जें पापहारक
यज्ञासाठीं तें प्रथम वाहावें; ह्मणजे त्याच्या माने-
पासून त्याचें शिर मुरगाळून तोडावें, परंतु वेगळें
करूं नये. ९ मग त्याने त्या पापहारक यज्ञाचें
कांहीं रक्त वेदीच्या बाजूवर शिंपडावें, आणि त्या
रक्ताचें शेष वेदीच्या पायाजवळ पिळावें; हा
पापहारक यज्ञ आहे. १० मग विधिप्रमाणें त्याने
दुसऱ्याचा होम करावा; असें त्याविषयीं त्याने
केलेल्या पापासाठीं याजकाने प्रायश्चित्त केल्यावर
त्याची क्षमा होईल. ११ परंतु ज्याने पाप केलें,
त्याच्या हातास जर दोन होले किंवा पारव्याचीं
दोन पिलें इतकीं मिळत नाहींत, तर त्याने आपलें
अर्पण एका मापाचा दाहावा वांटा सपीठ पापहारक
यज्ञासाठीं आणावें, त्याने त्यावर तेल घालूं नये,
त्यावर धूपहि ठेवूं नये; कारण कीं तो पापहारक
यज्ञ आहे. १२ तेव्हां त्याने तें याजकाजवळ
आणावें; मग याजकाने आपल्या मुठीने मूठभर
घेऊन सुचनेसाठीं त्यांतलें कांहीं वेदीवर परमे-

श्वराला जें अर्पणें त्याप्रमाणें जाळावें; तो पापहा-
रक यज्ञ आहे. १३ असें यांतल्या एखाद्याविषयीं
त्याने केलेल्या पापामुळें याजकाने त्याच्यासाठीं
प्रायश्चित्त करावें, ह्मणजे त्याची क्षमा होईल;
मग जें उरेल, तें नैवेद्याप्रमाणें याजकाचें व्हावें."
१४ आणखी परमेश्वराने मोश्याला असें
सांगितलें कीं, "१५ जर मनुष्य परमेश्वरा-
च्या पवित्र वस्तूंविषयीं अपराध करितो, ह्मणजे
चुकून पाप करितो, तर त्याने आपल्या दोषहारक
यज्ञासाठीं कळपांतला सांगोपांग मेंढा परमेश्व-
राजवळ आणावा; आणखी दोषाप्रमाणें, तुझ्या
ठरावाप्रमाणें, पवित्रस्थानाच्या शेकेलाने, शेकेल रुपें
आणावें. १६ तसें त्याने पवित्र वस्तूविषयीं जें
पाप केलें, तें फेडावें; आणि त्यांत त्याचा पांचवा
वांटा वाढवून तितकें याजकाला द्यावें; मग या-
जकाने त्याच्यासाठीं दोषहारक यज्ञाचा मेंढा अर्पून
प्रायश्चित्त करावें, ह्मणजे त्याची क्षमा होईल.
१७ आणि जर मनुष्य असें पाप करितो कीं
परमेश्वराच्या सर्व आज्ञांतली एक मोडून जें
कर्म न करावें तें करितो, तर जरी त्याने जाणिलें
नाहीं तरी तो दोषी आहे, आणि त्याने आपला
अन्याय सोसावा. १८ आणि त्याने दोषहारक
यज्ञासाठीं तुझ्या ठरावाप्रमाणें कळपांतला सांगो-
पांग मेंढा याजकाजवळ आणावा, मग जी त्याची
चूक न कळून घडली तिजमुळें याजकाने त्याच्या-
साठीं प्रायश्चित्त करावें, ह्मणजे त्याची क्षमा हो-
ईल. १९ हा दोषहारक यज्ञ; तो परमेश्वरा-
जवळ दोषीच दोषी आहे."

## अध्याय ६.

आणखी परमेश्वराने मोश्याला असें सांगि-
तलें, २ "जर मनुष्य परमेश्वरावर अपराध
करून असें पाप करितो कीं ठेवीविषयीं अथ-
वा सरकतीविषयीं आपल्या शेजाऱ्याशीं लबाडी
करितो, अथवा नाडण्याने पाप करितो, अथवा
आपल्या शेजाऱ्याला जाचितो; ३ अथवा जें
हरपलेलें तें त्याला सांपडतें, आणि तो त्याविषयीं
लबाडी करितो, किंवा खोटेपणाने शपथ वाहतो;
जें कांहीं केल्याने मनुष्य पापी होतो, त्यांतल्या
एखाद्याविषयीं जर मनुष्य पाप करितो; ४ तर
असें व्हावें कीं पाप करून दोषी झाला ह्मणून
त्याने जें नाडून घेतलें, अथवा ज्याविषयीं जबर-
दस्ती करून हानी केली, अथवा जी ठेव त्याच्या
स्वाधीन केली होती, अथवा जें हरपलेलें त्याला
सांपडलें; ५ अथवा ज्या कशाविषयीं त्याने
खोटी शपथ वाहिली, तें त्याने परत द्यावें; तसें
त्याजवर दोष ठरण्याच्या दिवशीं तें मुदल देऊन
फेडावें, आणि त्यांत त्याचा पांचवा वांटा वाढवून
ज्याचें तें होतें, त्याला द्यावें. ६ आणि त्याने
दोषामुळें तुझ्या ठरावाप्रमाणें आपला दोषहारक
यज्ञ कळपतांला सांगोपांग मेंढा परमेश्वरासाठीं
याजकाजवळ आणावा. ७ मग जें कांहीं तो
करून दोषी झाला, त्यांतल्या प्रत्येकाविषयीं या-
जकाने त्याच्यासाठीं परमेश्वरासमोर प्रायश्चित्त
करावें, ह्मणजे त्याची क्षमा होईल.
८ आणखी परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, "९ आहरोनाला व त्याच्या पुत्रांस
असी आज्ञा दे कीं, हाच होमाचा विधि, सगळ्या
रात्रीं सकाळपर्यंत वेदीवर जळण्यामुळें तो होम
आहे; कारण कीं त्यांत वेदीवर अग्नि जळत असा-
वा. १० मग याजकाने आपला जवसाच्या वाखा-
चा झगा घालून व जवसाच्या वाखाचा चोळणा
आपल्या अंगीं घालून वेदीवर अग्नीने होमाचें भस्म
झालें, त्याची राख उचलून वेदीजवळ ठेवावी.
११ मग आपलीं वस्त्रें काढून दुसरीं वस्त्रें घाला-
वीं, आणि ती राख छावणीच्या बाहेर शुद्ध ठिका-
णीं न्यावी. १२ तथापि वेदीवरला अग्नि तिजवर
जळत असावा, विझूं नये; आणि दर सकाळीं या
जकाने तिजवर लांकडें पेटवावीं, नंतर तिजवर होम-
पशु ठेवावा, आणि तिजवर शांतिकारक यज्ञाचें मांदें
जाळावें. १३ वेदीवर अग्नि अखंड जळत असावा,
तो विझूं नये. १४ आणि हाच नैवेद्याचा विधि;
आहरोनाच्या पुत्रानी तो परमेश्वरासमोर वेदीच्या
पुढें आणावा. १५ आणि आपल्या मुठीने त्यांतलें
ह्मणजे नैवेद्याच्या सपिठांतलें, व त्याच्या तेलांतलें
कांहीं आणि नैवेद्यावर जो धूप तो सर्व काढावा;
आणि वेदीवर त्याचा सुगंध, ह्मणजे त्यांतल्या
तश्या सुचवणीचा शांतिकारक सुवास परमेश्व-
राला करावा. १६ मग त्यांतून जें उरेल,
तें आहरोनाने व त्याच्या पुत्रानी खावें, खमीर

न घालून खावें पवित्र स्थानांत, सभामंडपाच्या अंग-
णांत त्यानी तें खावें· १७ तें खमीर घालून भाजूं
नये; तो त्यांचा भाग; जीं मला अर्पणें केलीं
त्यांतून म्या दिल्हें आहे; पापहारक यज्ञासारिखें
व दोषहारक यज्ञासारिखें तें परम पवित्र आहे·
१८ आहरोनाच्या वंशस्थांतल्या सर्व पुरुषानी
तें खावें, तुमच्या पिढोपिढी **परमेश्वराला** जीं
अर्पणें त्यांविषयीं हा सर्वकाळचा नेम आहे; त्यांस
जो कोणी शिवतो तो पवित्र असावा." १९ आणि
**परमेश्वराने** मोश्याला असें सांगितलें कीं, २०
"आहरोनाला अभिषेक करण्याच्या दिवसीं त्याने
व त्याच्या पुत्रानी **परमेश्वराला** जें अर्पण करावें
तें हें, म्हणजे एका मापाचा दाहावा वांटा सपीठ
असा नेहमी नैवेद्य असावा; त्यांतलें अर्धें सकाळीं
व त्यांतलें अर्धें संध्याकाळीं अर्पावें· २१ तें तव्या-
वर तेलाने सिद्ध केलें जावें; मग तळल्यावर तूं
तें आंत आणून नैवेद्याच्या चकत्यांचे तुकडे करून
**परमेश्वराला** शांतिकारक सुवास होण्यासाठीं
अर्पण कर· २२ त्याच्या पुत्रांतला जो त्याच्या
ठिकाणीं अभिषिक्त याजक, त्याने तर तें सिद्ध क-
रावें, **परमेश्वरासाठीं** हा सर्वकाळचा नेम आहे;
तें सगळें जाळावें· २३ तसा याजकाचाच प्रत्येक
नैवेद्य संपूर्ण जाळावा, खाऊं नये". २४ आणि
**परमेश्वराने** मोश्याला असें सांगितलें कीं, २५
'तूं आहरोनाला व त्याच्या पुत्रांस असें सांग
कीं, हाच पापहारक यज्ञाचा विधि; ज्या ठिकाणीं
होमपशु कापीत असतात, तेथें **परमेश्वरापुढें**
पापहारक यज्ञपशु कापावा; हा परम पवित्र आहे·
२६ तो अर्पून जो याजक प्रायश्चित्त करितो, त्याने
तो खावा; पवित्र स्थानांत, सभामंडपाच्या अंगणांत
तो खावा· २७ जो कोणी त्याच्या मांसाला
शिवतो तो पवित्र असावा; आणि त्याचें कांहीं
रक्त वस्त्रावर उसळल्यास, ज्या कशावर उसळलें,
तें तूं पवित्र स्थानांत धू· २८ आणि मातीच्या ज्या
पात्रांत शिजविला तें फोडावें; आणि जर तांब्या-
च्या भांड्यांत शिजविला, तर तें घासून पाण्याने
विसळावें· २९ याजकांतल्या सर्व पुरुषानी तो
खावा; तो परम पवित्र आहे· ३० परंतु प्रत्येक
पापहारक यज्ञपशु, ज्याचें कांहीं रक्त पवित्र
स्थानांत प्रायश्चित्त करायास सभामंडपांत आ-
णिलें जातें, तो खाऊं नये; अग्नींत जाळा-
याचा आहे·

## अध्याय ७.

"आणि दोषहारक यज्ञाचा विधि हाच; तो
परम पवित्र आहे. २ ज्या ठिकाणीं होम-
पशु कापीत असतात, तेथें त्यानी दोषहारक यज्ञ-
पशु कापावा; आणि त्याचें रक्त याजकाने वेदीवर
चहुंकडे शिंपडावें· ३ आणि त्याचें सर्व मांदें त्याने
त्यांतून काढून अर्पावें; शेपूट व जें मांदें अंतड्यांस
झांकितें तें; ४ आणि दोन गुर्दे, व त्यांवर जें
मांदें, जें कुशींसीं तें, आणि काळजाकडली सां-
गड, हीं त्याने गुर्द्यांसुद्धां काढावी; ५ आणि हीं
याजकाने वेदीवर जाळावीं; हें **परमेश्वरासाठीं**
अर्पण; दोषहारक यज्ञ आहे· ६ याजकांतल्या
सर्व पुरुषानी तें खावें; तें पवित्र स्थानांत खावें;
परम पवित्र आहे· ७ जसा पापहारक यज्ञ
तसा दोषहारक यज्ञ, त्यांस एकच नेम असावा;
जो याजक तें अर्पून प्रायश्चित्त करितो, त्याचें
तें असावें· ८ आणि जो याजक कोणाचा होम
करितो, त्याने जो होमपशु अर्पिला, त्यावरलें का-
तडें याजकाचें आहे; त्याचेंच असावें· ९ आणि
प्रत्येक नैवेद्य जो भट्टींत भाजलेला, आणि कढईंत
व तव्यावर सिद्ध केलेला प्रत्येक, हा जो याजक
अर्पितो, त्याचा आहे; त्याचा असावा· १० आणि
प्रत्येक नैवेद्य तेलाने मळलेला अथवा कोरडा,
असा आहरोनाच्या सर्व पुत्रांस प्रत्येकास एका-
सारिखा असावा· ११ आणि जो कोणी शांति-
कारक यज्ञपशु **परमेश्वराला** अर्पितो, त्याचा
हाच नेम आहे· १२ आभार मानण्यासाठीं जर
तो हा अर्पितो, तर आभार मानण्याच्या यज्ञा-
सुद्धां त्याने तेलाने मळलेल्या बेखमीर पोळ्या,
व तेलाने माखलेले बेखमीर पापड, व तेलाने
मळलेल्या सपीठाच्या तळलेल्या पोळ्या, अशा
अर्पाव्या· १३ त्याच्या शांतिकारक आभाराच्या
यज्ञासुद्धां त्याने पोळ्यांच्यासंगतीं खमीराची भा-
कर, असें आपलें अर्पण आणावें· १४ आणि त्यां-
तून व तशा सर्व अर्पणांतून त्याने एक भाकर असें
उचललेलें दान **परमेश्वराला** अर्पावें; जो शांति-
कारक यज्ञाचें रक्त शिंपडितो, त्या याजकाचें तें

आहे; त्याचेंच असावें. १५ आणि कोणाच्या
शांतिकारक आभाराच्या यज्ञपशूचें मांस तें अर्प-
ण्याच्या दिवशीं खावें; त्यांतलें कांहीं सकाळ-
पर्यंत ठेवूं नये. १६ आणि जर त्याचें अर्पण
नवसाचा यज्ञ अथवा स्वबुद्धीचा यज्ञ असला,
तर तो आपला यज्ञ करितो, त्या दिवशीं खावें,
आणि त्यांतून जें उरेल, तें दुसऱ्या दिवशींहि
खावें. १७ परंतु यज्ञांतलें कांहीं जें मांस तिसऱ्या
दिवशीं उरेल, तें अग्नींत जाळावें. १८ आणि
त्याच्या शांतिकारक यज्ञांतलें कांहीं मांस जर
तिसऱ्या दिवशीं खाल्लेंच, तर तें मान्य होणार
नाहीं; ज्याने तें अर्पिलें त्याजकडे मोजलें जाणार
नाहीं, नाकारें होईल; आणि जो मनुष्य त्यांतलें
खातो, त्याने आपला अन्याय सोसावा. १९ आ-
णि जें मांस कोणत्याहि अशुद्धाला लागेल, तें
खाऊं नये, अग्नींत जाळावें, परंतु दुसरें मांस, जो
कोणी शुद्ध त्याने तें मांस खावें. २० आणि **पर-
मेश्वराला** जें शांतिकारक यज्ञपशूचें मांस, जो
कोणी आपल्यावर आपलें अशुद्धपण असतांना तें
खातो, तो मनुष्य आपल्या लोकांतून छेदलाच
जावा. २१ आणि जर कोणी कोणत्याहि अशुद्ध-
पणाला, मनुष्याच्या अशुद्धपणाला किंवा अशुद्ध
पशूला किंवा कोणत्याहि अशुद्ध ओंगळाला शिव-
ल्यावर, **परमेश्वराला** जीं शांतिकारक अर्पणें
त्यांच्या यज्ञांतलें कांहीं मांस खातो, तर तो मनु-
ष्य आपल्या लोकांतून छेदलाच जावा." २२ आ-
णि **परमेश्वराने** मोश्याला असें सांगितलें कीं,
२३ "इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं, गुरें व
मेंढरूं व शेरडूं, यांचें कांहीं मांदें तुम्ही खाऊं नका.
२४ मरत मुडद्याचें मांदें व फाडलेल्याचें मांदें,
कांहीं कार्याला लावावें, पण तें खाऊं नका. २५
अणखी ज्या पशूंतल्याचें **परमेश्वराला** अर्पण
करितात, त्यांचें मांदें जो कोणी खातो, तो खा-
णारा मनुष्य आपल्या लोकांतून छेदलाच जावा.
२६ आणि तुम्ही आपल्या अवघ्या वस्त्यांत पशूचें
किंवा पांखराचें रक्त खाऊं नका. २७ जो कोणी
कांहीं रक्त खातो, तो मनुष्य आपल्या लोकांतून
छेदलाच जावा." २८ आणि **परमेश्वराने** मो-
श्याला असें सांगितलें कीं, २९ "तूं इस्राएला-
च्या संतानांस असें सांग कीं, जो आपला शांति-
कारक यज्ञपशु **परमेश्वराला** अर्पितो, त्याने
आपल्या शांतिकारक यज्ञांतून आपलें अर्पण **पर-
मेश्वरापाशीं** आणावें; ३० आपल्याच हातांनी
**परमेश्वराला** जीं अर्पणें तीं आणावीं; त्याने ऊ-
राबरोबर मांदें, म्हणजे ऊर, हें **परमेश्वरासमोर**
ओवाळणीसाठीं ओवाळायास आणावें; ३१ आणि
मांदें हें याजकाने वेदीवर जाळावें, परंतु ऊर
आहरोनाचा व त्याच्या पुत्रांचा असावा. ३२
आणि उजवा पाय हें उचललेलें दान तुम्ही आप-
ल्या शांतिकारकाच्या यज्ञपशूंतून याजकाला द्या.
३३ आहरोनाच्या पुत्रांतला जो शांतिकारक रक्त
व मांदें अर्पितो, त्याला उजवा पाय असा भाग
व्हावा. ३४ कां तर ओवाळणाचा ऊर व उच-
ललेलें दान जो पाय, हे इस्राएलाच्या संतानांपा-
सून त्यांच्या शांतिकारक यज्ञपशूंतून म्या घेतले
आहेत; आणि आहरोन याजकाला व त्याच्या
पुत्रांला इस्राएलाच्या संतानांपासून सर्वकाळच्या
नेमणुकीने दिल्हे आहेत. ३५ हेंच **परमेश्वरा-
ला** जीं अर्पणें त्यांतून आहरोनाचा अभिषेक हो-
ण्यामुळें भाग व त्याच्या पुत्रांचा अभिषेक हो-
ण्यामुळें भाग ज्या दिवशीं त्याने त्यांस याजकपण
करायाला **परमेश्वराजवळ** सादर केलें तेव्हांचें;
३६ ज्या दिवशीं त्याने त्यांस अभिषेक केला,
त्यांत त्यांस इस्राएलाच्या संतानांपासून जें द्यावें
म्हणून **परमेश्वराने** आज्ञा दिल्ही तें; त्यांच्या
पिढोपिढी सर्वकाळची नेमणूक आहे." ३७ होमा-
विषयीं, नैवेद्याविषयीं, व पापहारक यज्ञाविषयीं, व
दोषहारक यज्ञाविषयीं, व संस्कारांविषयीं, व शां-
तिकारक यज्ञाविषयीं, हाच विधि; ३८ म्हणजे
ज्या दिवशीं **परमेश्वराने** इस्राएलाच्या संतानांस
त्यांचीं अर्पणें आणण्याविषयीं सीना रानांत आज्ञा
दिल्ही, त्या दिवशीं जो विधि सीना डोंगरावर
मोश्याला आज्ञा करून दिल्हा, तो."

## अध्याय ८.

आणि **परमेश्वराने** मोश्याला असें सांगितलें
कीं, २ "तूं आहरोनाला व त्यासुद्धां त्या-
च्या पुत्रांस, आणि वस्त्रें व अभिषेकाचें तेल व
होमासाठीं खोंड व दोन एडके व टोपलेंभर बेखमीर
भाकरी घे; ३ आणि सभामंडपाच्या दारीं सर्व

समुदाय एकवट कर." ४ मग असी परमेश्व-
राने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसें त्याने केलें;
तेव्हां समुदाय सभामंडपाच्या दारीं मिळाला.
५ नंतर मोश्याने समुदायाला ह्मटलें, "जी गोष्ट
करावी ह्मणून परमेश्वराने आज्ञा दिल्ही, ती
हीच." ६ मग मोश्याने आहरोनाला व त्याच्या
पुत्रांस जवळ आणून त्यांस पाण्याने धुतलें. ७
नंतर त्याच्या अंगांत अंगरखा घातला; आणि
त्याच्या कमरेस काच्या बांधिला; आणि त्याला क-
फणी घातली; आणि त्यावर एफोद घातलें; आणि
एफोदाचा बुटेदार काच्या त्यावर गुंडाळून तेणें
करून त्याला आवरिलें. ८ मग त्यावर ऊरपट
घालून ऊरपटांत तें उरीम व थुम्मीम घातलें. ९
मग त्याच्या डोक्यावर तो फेंटा घातला, आणि
फेंट्यावर पुढच्या अंगीं सोन्याचें फूल, ह्मणजे प-
वित्र शिरपेंच घातला; जसी परमेश्वराने मो-
श्याला आज्ञा दिल्ही तसा. १० आणि मोश्याने
अभिषेकाचें तेल घेऊन मंडपाला व त्यांत जीं
अवयीं त्यांस लावून त्यांस पवित्र केलें. ११ आणि
त्यांतलें सात वेळां वेदीवर कांहीं शिंपडून वेदीला
व त्याच्या सर्व साहित्यांस आणि गंगाळ व त्याची
मांडणी त्यांस पवित्र करायाला त्यांस अभिषेक
केला. १२ आणि त्याने कांहीं अभिषेकाचें तेल
आहरोनाच्या डोक्यावर ओतून त्याला पवित्र करा-
यास त्याला अभिषेक केला. १३ मग मोश्याने
आहरोनाच्या पुत्रांस जवळ आणून त्यांस अंगरखे
घातले, आणि त्याच्या कमरेस काच्ये बांधिले, त्यांस
पागोटींहि बांधिलीं; जसी परमेश्वराने मोश्याला
आज्ञा दिल्ही, तसीं. १४ मग त्याने होमासाठीं
खोंड जवळ आणिला, आणि आहरोनाने व त्याच्या
पुत्रानी आपले हात होमासाठीं जो खोंड त्याच्या डो-
क्यावर ठेविले. १५ मग त्याने तो कापिला, आणि
मोश्याने रक्त घेऊन आपल्या बोटाने वेदीच्या चहुं-
कडल्या शिंगांस लाविलें; असी त्याने वेदीची
शुद्धि केली, मग वेदीच्या पायाजवळ रक्त ओतिलें;
असें त्याने तिजवर प्रायश्चित्त करण्यासाठीं तिला
पवित्र केलें. १६ आणि अंतड्यांवर जें सर्व मांदें
व काळजाची सांगड व दोन गुर्दे व त्यांचें मांदें
काढून मोश्यांने वेदीवर तीं जाळिलीं. १७ परंतु
खोंड, ह्मणजे त्याचें कातडें व त्याचें मांस व त्याची
विष्ठा त्याने छावणीबाहेर अग्नीने जाळिली; जसी
परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसी. १८
मग त्याने होमासाठीं एडका जवळ आणिला,
आणि आहरोनाने व त्याच्या पुत्रानीं आपले हात
एडक्याच्या डोक्यावर ठेविले. १९ नंतर त्याने
तो कापिला, आणि मोश्याने रक्त वेदीवर चहुं-
कडे शिंपडिलें. २० मग एडक्याला तोडून
त्याचे तुकडे करून मोश्याने शिर व तुकडे
व मांदें, हीं जाळिलीं; २१ आणि अंतडें व पाय
पाण्याने धुतले, मग मोश्याने वेदीवर सर्व एडका
जाळिला; हा शांतिकारक सुवासासाठीं होम,
परमेश्वराला हें अर्पण आहे; जसी परमेश्व-
राने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसें. २२ मग
त्याने दुसरा एडका, ह्मणजे संस्कारांचा एडका
जवळ आणिला; आणि आहरोनाने व त्याच्या
पुत्रानी आपले हात त्या एडक्याच्या डोक्यावर
ठेविले. २३ नंतर त्याने तो कापिला; आणि
मोश्याने त्याचें कांहीं रक्त घेऊन आहरोनाच्या
उजव्या कानांच्या टोंकाला व त्याच्या उजव्या
हातांच्या अंगठ्यांला व त्यांच्या उजव्या पायांच्या
अंगठ्याला लाविलें. २४ मग आहरोनाच्या
पुत्रांस जवळ आणून मोश्याने कांहीं रक्त त्यांच्या
उजव्या कानाच्या टोंकाला, त्यांच्या उजव्या हा-
ताच्या आंगठ्याला व त्याच्या उजव्या पायाच्या
अंगठ्यांला लाविलें; आगि मोश्याने वेदीवर
चहुंकडे रक्त शिंपडिलें. २५ मग त्याने मांदें
व शेपूट व अंतड्यांवर जें सर्व मांदें व काळजाची
सांगड व दोन गुर्दे व त्यांचें मांदें व उजवा पाय
घेतला. २६ आणि परमेश्वरासमोर बेखमीर
भाकरीचें जें टोपलें, त्यांतून त्याने एक बेखमीर
पोळी व तेलकट भाकर असी एक पोळी व एक
पापड घेऊन मांद्यावर व उजव्या पायावर ठेविला.
२७ मग तीं अवघीं आहरोनाच्या हातांवर व
त्याच्या पुत्रांच्या हातांवर ठेवून, परमेश्वरासमोर
ओवाळण, असीं ओवाळिलीं. २८ मग मोश्याने
तीं त्यांच्या हातांवरून घेऊन वेदीवर होमाच्या
अर्पणासुद्धां जाळिलीं; तीं संस्कारांचीं; परमे-
श्वराला शांतिकारक सुवासासाठीं असें अर्पण
आहे. २९ मग मोश्याने ऊर घेऊन, परमेश्व-
रासमोर ओवाळण, असा ओवाळिला; संस्कारांच्या

एडक्यांतला मोशाचा भाग तो होता; जसी पर-
मेश्वराने मोशाला आज्ञा दिल्ही, तसा. ३०
तेव्हां मोशाने अभिषेकाच्या तेलांतलें व वेदीवर
जें रक्त त्यांतलें कांहीं घेऊन, आहरोनावर, त्या-
च्या वस्त्रांवर व त्याच्यासुद्धां त्याच्या पुत्रांवर व
त्याच्या पुत्रांच्या वस्त्रांवर शिंपडिलें; तसें त्याने
आहरोनाला व त्याच्या वस्त्रांस, आणि त्या-
सुद्धां त्याच्या पुत्रांस व त्याच्या पुत्रांच्या वस्त्रांस
पवित्र केलें. ३१ तेव्हां मोशाने आहरोनाला
व त्याच्या पुत्रांस सांगितलें, "तुह्मी सभामंडपाच्या
दारीं मांस शिजवा; आणि तेथें तें आणि संस्का-
रांच्या टोपल्यांत जी भाकर ती खा; जसी म्या
आज्ञा दिल्ही होती कीं आहरोनाने व त्याच्या
पुत्रानी ती खावी, तसी; ३२ आणि मांसांतलें
व भाकरींतलें जें उरेल, तें तुह्मी अग्नींत जाळा.
३३ आणि सात दिवसपर्यंत, ह्मणजे तुमच्या
संस्कारकाळाच्या समाप्तीच्या दिवसापर्यंत तुह्मी
सभामंडपाच्या दारांतून जाऊं नका; कां तर तो
तुमचें संस्कारकर्म सात दिवस करील. ३४
जसें आज केलें, तसें करायास परमेश्वराने
आज्ञा दिल्ही आहे; तुह्माविषयीं प्रायश्चित्त व्हा-
वें ह्मणून. ३५ यास्तव सभामंडपाच्या दारीं दि-
वसां व रात्रीं, सात दिवसपर्यंत राहून परमे-
श्वराची आज्ञा पाळा; तुह्मी मरूं नये ह्मणून, कां
तर मला तसी आज्ञा झाली आहे." ३६ असें प-
रमेश्वराने मोशाकडून ज्या गोष्टी आज्ञेने लावि-
ल्या, त्या सर्व आहरोनाने व त्याच्या पुत्रानी केल्या.

## अध्याय ९.

मग आठव्या दिवसीं असें झालें कीं मोशाने
आहरोनाला व त्याच्या पुत्रांस व इस्राएला-
च्या वडिलांस बोलाविलें. २ मग त्याने आह-
रोनाला "सांगितलें, पापहारक यज्ञासाठीं गुरांतला
पाडा व होमासाठीं एडका सांगोपांग, असे तूं आ-
पल्याजवळ घेऊन परमेश्वरासमोर अर्पण कर.
३ आणि इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं,
पापहारक यज्ञासाठीं शेळ्यांतला बोकड, आणि
होमासाठीं पाडा व मेंढा, एका वर्षाचे व सांगो-
पांग असे; ४ आणि शांतिकारक अर्पणांसाठीं
बैल व एडका परमेश्वरासमोर यज्ञ करण्यासाठीं
आणि तेलानें मळलेला नैवेद्य, हीं घ्या; कां तर
आज परमेश्वर तुह्मास दर्शन देईल." ५ तेव्हां
मोशाने आज्ञा करून जें सांगितलें, तें त्यानी
सभामंडपाच्या पुढें आणिलें; आणि सर्व समुदाय
जवळ येऊन परमेश्वरासमोर उभे राहिले. ६
तेव्हां मोशाने ह्मटलें कीं, "जी गोष्ट तुह्मी क-
रावी ह्मणून परमेश्वराने आज्ञा करून सांगि-
तली, ती हीच; नंतर परमेश्वराचें तेज तुह्मास
प्रगट होईल." ७ तेव्हां मोशाने आहरोना-
ला सांगितलें, "तूं वेदीजवळ जा, आणि आप-
ला पापहारक यज्ञ व आपला होम करून
आपल्याविषयीं व लोकांविषयीं प्रायश्चित्त कर;
आणि लोकांचें अर्पण अर्पून त्याविषयीं प्रायश्चित्त
कर; जसी परमेश्वराने आज्ञा दिल्ही, तसें. ८
नंतर आहरोनाने वेदीजवळ जाऊन आपल्यासाठीं
जो पापहारक यज्ञाचा पाडा तो कापिला. ९
मग आहरोनाच्या पुत्रानी तें रक्त त्याच्याजवळ
आणिलें, आणि त्याने आपलें बोट रक्तांत बुचक-
ळून वेदीच्या शिंगांस लाविलें; मग वेदीच्या पा-
याजवळ रक्त ओतिलें; १० आणि पापहारक
अर्पणांतलें मांदें व गुर्दें व काळजाकडली सांगड,
हीं वेदीवर जाळिलीं; जसी परमेश्वराने मो-
शाला आज्ञा दिल्ही, तसीं. ११ परंतु मांस व
कातडें हीं छावणीबाहेर अग्नीने जाळिलीं. १२
मग त्याने तो होमपशु कापिला, आणि आह-
रोनाच्या पुत्रानी तें रक्त त्याला दिल्ह्यावर त्याने तें
वेदीवर चहुंकडे शिंपडिलें. १३ नंतर त्यानी
तो होमपशु तुकडे करून शिरासुद्धां त्याजवळ
दिल्हा, आणि त्याने वेदीवर तो जाळिला. १४ मग
त्याने अंतडीं व पाय धुऊन त्या होमाच्या अर्पणां-
सुद्धां वेदीवर तीं जाळिलीं. १५ नंतर त्याने
लोकांचें अर्पण जवळ आणून लोकांसाठीं जो पाप-
हारक यज्ञासाठीं बोकड, तो घेऊन कापिला, आणि
पहिल्यासारिखा तो प्रायश्चित्तासाठीं अर्पिला. १६
मग विधीप्रमाणें होमाचें अर्पण आणून वाहिलें.
१७ नंतर त्याने सकाळच्या होमाच्या अर्पणा-
खेरीज नैवेद्य जवळ आणिला; आणि त्यांतून
आपला पसा भरून वेदीवर जाळिला. १८
मग लोकांसाठीं जो शांतिकारक यज्ञ त्याचा बैल
व एडका त्याने कापिला; आणि आहरोनाच्या

पुत्रांनी त्याचें रक्त त्याजवळ दिल्यावर, त्याने तें
वेदीवर चहुंकडे शिंपडिलें. १९ मग त्यांनी
बैलाचें मांदें व एडक्याचें शेपूट व अंतड्यां-
वरली जाळी व गुर्दे व काळजाची सांगड त्या-
जवळ आणिली. २० आणि मांदें त्या उरांवर
ठेविलें; नंतर त्याने वेदीवर तें मांदें जाळिलें. २१
परंतु ते ऊर व उजवा पाय, जसी मोशाने आज्ञा
दिल्ही तसे आहरोनाने ते परमेश्वरासमोर ओ-
वाळणासाठीं ओवाळिले. २२ मग आहरोनाने
आपले हात लोकांकडे उभारून त्यांस आशी-
र्वाद दिल्हा; मग पापहारक यज्ञ व होम व शां-
तिकारक यज्ञ केल्यावर तो उतरला. २३ मग
मोशे व आहरोन सभामंडपांत जाऊन बाहेर
आले, आणि त्यांनी लोकांस आशीर्वाद दिल्हा;
तेव्हां परमेश्वराचें तेज सर्व लोकांस प्रगट झालें;
२४ आणि अग्नि परमेश्वरापुढून निघाला, आ-
णि त्याने वेदीवरलें होमाचें मांस व मांदें जाळून
टाकिलें; तेव्हां सर्व लोक पाहून ओरडले आणि
पालथे पडले.

## अध्याय १०.

तेव्हां आहरोनाचे पुत्र नादाब व अबीहू, यांनी
आपापलें धुपाटणें घेऊन त्यांमध्यें अग्नि घातला,
आणि त्यावर धूप ठेवून परमेश्वरासमोर अन्य
अग्नि, जो त्याने त्यांस सांगितला नाहीं तो अर्पिला.
२ तेव्हां परमेश्वरापुढून अग्नि निघाला, आणि
त्याने त्यांस खाऊन टाकिलें; असे ते परमेश्व-
रासमोर मेले. ३ तेव्हां मोशाने आहरोनाला
ह्मटलें, "जें परमेश्वराने सांगितलें तें हेंच कीं,
जे माझ्याजवळ येतात, त्यांनी मला पवित्र मा-
नावें; सर्व लोकांसमोर माझी मान्यता व्हावी."
तेव्हां आहरोन उगाच राहिला. ४ मग मो-
शाने आहरोनाचा चुलता उज्जियेल याचा पुत्र
मीशाएल व एल्साफान यांस बोलावून सांगितलें,
"तुह्मी जवळ जाऊन आपल्या भावांस पवित्र
स्थानापुढून छावणीच्या बाहेर न्या." ५ तेव्हां
जसें मोशाने सांगितलें, तसें त्यांनी जवळ जाऊन
त्यांस त्यांच्या अंगरख्यांसुद्धां छावणीच्या बाहेर
नेलें. ६ तेव्हां मोशाने आहरोनाला व त्याचे
पुत्र एलाजार व ईथामार यांस सांगितलें, "तुह्मी
आपलीं डोकीं उघडीं करूं नका, आणि आपलीं
वस्त्रें फाडूं नका; तुह्मी न मरावें आणि सर्व
समुदायावर क्षोभ न व्हावा ह्मणून; परंतु इस्राए-
लाचें सर्व घराणें असे जे तुमचे भाऊ यांनी जें
दहन परमेश्वराने केलें त्याविषयीं रडावें. ७
तुह्मी तर न मरावें ह्मणून सभामंडपाच्या दारां-
तून जाऊं नका, कां तर परमेश्वराचें अभिषेकाचें
तेल तुह्मावर आहे." मग जसें मोशाने सांगितलें,
तसें त्यांनी केलें. ८ आणखी परमेश्वराने आह-
रोनाला असें सांगितलें कीं, ९ "तूं आणि तुझ्या
संगतीं तुझे पुत्र जेव्हां तुह्मी सभामंडपांत जातां,
तेव्हां तुह्मी न मरावें ह्मणून द्राक्षरस किंवा मद्य
पिऊं नका; हा तुमच्या पिढोपिढी सर्वकाळचा नेम
आहे. १० ह्मणजे पवित्र व अपवित्र यांचा
आणि अशुद्ध व शुद्ध यांचा तुह्मी भेद करावा;
११ आणि इस्राएलाच्या संतानांस, जे नेम पर-
मेश्वराने मोशाकडून सांगितले, ते सर्व तुह्मी
त्यांस शिकवावे ह्मणून." १२ तेव्हां मोशाने आ-
हरोनाला, व त्याचे उरलेले पुत्र एलाजार व ईथा-
मार यांस सांगितलें कीं, "परमेश्वराला जीं अर्प-
णें त्यांतून उरलेला नैवेद्य घेऊन खमीरावांचून
वेदीजवळ खा; कां तर तो परम पवित्र आहे.
१३ तुह्मी तो पवित्र स्थानीं खा; कारण कीं
परमेश्वराला जीं अर्पणें त्यांतून तो तुझा नेम-
भाग, आणि तुझ्या पुत्रांचा नेमभाग आहे; कां
तर मला तसी आज्ञा झाली. १४ परंतु ओ-
वाळण्याचा जो ऊर व भागदानाचा जो पाय ते
शुद्ध ठिकाणीं खा; त्वां व तुझ्यासंगतीं तुझे पुत्र
व तुझ्या कन्या यांनीहि खावे; कां तर ते इस्रा-
एलाच्या संतानांच्या शांतिकारक यज्ञांतून तुझा
नेमभाग व तुझ्या पुत्रांचा नेमभाग, असे दि-
ल्हेले आहेत. १५ त्यांनी अर्पणांच्या मांदासुद्धां
भागदानाचा जो पाय व ओवाळण्याचा जो ऊर
ते परमेश्वरासमोर ओवाळणासाठीं ओवाळायास
आणावे, आणि जसी परमेश्वराने आज्ञा केली,
तसे, सर्वकाळच्या नेमाने ते तुझे व तुझ्यासंगतीं
तुझ्या पुत्रांचे व्हावे." १६ मग मोशाने पाप-
हारक यज्ञाचा बोकड फार शोधिला; तेव्हां पाहा
तो जळलेला होता; यास्तव त्याने आहरोनाचे
उरलेले पुत्र एलाजार व ईथामार यांवर रागें

भरून ह्मटलें, १७ "तुह्मी पापहारक अर्पण
पवित्र स्थानीं कां खालें नाहीं? कां तर तें परम
पवित्र आहे; आणि समुदायाचा अन्याय वागवून
त्यांविषयीं **परमेश्वरा**समोर प्रायश्चित्त करावें
ह्मणून त्याने तें तुह्मास दिल्हें आहे. १८ पाहा,
त्याचें रक्त पवित्र स्थानाच्या आंत आणिलें नव्हतें;
जसी म्यां आज्ञा केली, तसें तुह्मी तें पवित्र स्था-
नांत अगत्य खायाचें होतें." १९ तेव्हां आह-
रोनाने **मोशा**ला सांगितलें, "पाहा, त्यांनी आज
आपला पापहारक यज्ञ व आपला होम **परमेश्व-
रा**समोर केला आहे; आणि मला आज असीं
दुःखें प्राप्त झालीं आहेत; आणि जर म्यां आज
पापहारक अर्पण खालें असतें तर **परमेश्वरा-
च्या** दिसण्यांत बरें झालें असतें कीं काय?"
२० मग **मोशा**ने ऐकिल्यावर त्याच्या दिसण्यांत
बरें झालें.

## अध्याय ११.

आणखी **परमेश्वर मोशा**ला व **आहरोना**ला
बोलून त्यांस ह्मणाला, २ "तुह्मी इस्राएला-
च्या संतानांस असें सांगा कीं पृथ्वीवर जे त्या स-
र्वांतले जे जीव तुह्मी खावे ते हेच; ३ पशूंमध्यें
ज्या सर्वांचा खुर दुभागलेला, ह्मणजे ज्याच्या
खुराची चीर होऊन दोन भाग झाले आहेत, आणि
जो रवंथ करितो, ते तुह्मी खावे. ४ केवळ हे
रवंथ करणारे व दुभागी पायाचे यांस तुह्मी खाऊं
नका; ह्मणजे उंट, कां तर तो रवंथ करीत अस-
तांहि, त्याला दुभागलेला खुर नाहीं; तो तुह्मास
अशुद्ध आहे. ५ आणि शाफान; कां तर तो
रवंथ करीत असतांहि, त्याला दुभागलेला खुर
नाहीं; तो तुह्मास अशुद्ध आहे. ६ आणि ससा,
कां कीं तो रवंथ करीत असतांहि, त्याला दुभाग-
लेला खुर नाहीं; तो तुह्मास अशुद्ध आहे. ७
डुकराहि, कां तर त्याचा खुर दुभागलेला असून
खुराची चीर पार गेली असतांहि, रवंथ करीत
नाहीं; तो तुह्मास अशुद्ध आहे. ८ त्यांचें कांहीं
मांस तुह्मी खाऊं नका, आणि त्यांच्या शवाला शिवूं
नका; ते तुह्मास अशुद्ध आहेत. ९ पाण्यांत जे अ-
वघे त्यांतले हे तुह्मी खावे; समुद्रांच्या व नद्यां-
च्या पाण्यांत ज्या अवघ्यांस पंख व खपल्या, ते
तुह्मी खावे. १० आणि समुद्रांत व नद्यांत जे
कांहीं जलचर त्यांतल्या, ह्मणजे पाण्यांत जे कोणी
जीवजंतु त्यांतल्या ज्यांस पंख व खपल्या नाहींत, ते
सर्व तुह्मास ओंगळ; ११ तसे तुह्मास ओंगळच
असावे, त्यांचें कांहीं मांस तुह्मी खाऊं नका, आणि
त्यांचें शव तुह्मी ओंगळ मोजा. १२ पाण्यांत
ज्याला पंख व खपल्या नाहींत, तें तुह्मास ओंगळ
असावें. १३ आणि पांखरांतलीं हीं तुह्मी ओंगळ
मोजा, खाऊं नये; तीं ओंगळच आहेत; ह्मणजे ग-
रुड, व लोळणारा गीध, व मच्छमाऱ्या; १४ आणि
गीध, व जातिजातीचा घार; १५ जातिजातीचे
सर्व खादाड पक्षी; १६ आणि घुबड, व गवळण,
व कोकिळ, व जातिजातीची बहिरी; १७ आ-
णि पिंगळें, व करढोंक, व मानसुफ; १८ आणि
थिन्मत, व पाणकोळी, व राहाम; १९ आ-
णि बगळा, जातिजातीची कर्कुची, व टिटवी, व
पाकोळी. २० जो कोणी जीव उडतो व चौ-
पायांनी चालतो, तो तुह्मास ओंगळ असावा.
२१ तथापि जे उडणारे जीव चौपायांनी चालतात,
त्या सर्वांतले हेच तुह्मी खावे; ज्यांस त्यांच्या
पायांखेरीज भूमीवरून उडी मारायास दोन तंग-
ड्या आहेत ते. २२ त्यांतले हेच तुह्मी खावे;
जातिजातीचा टोळ, व जातिजातीचा नाकतोडा, व
जातिजातीचा हारघोळकी, व जातिजातीचा डोळा-
फोडी. २३ परंतु ज्या कोणत्या उडणाऱ्या जिवाला
चारच पाय, तो तुह्मास ओंगळ असावा. २४
यांकडून तर तुह्मी अशुद्ध व्हाल; कोणी त्यांच्या
शवाला शिवल्यास तो सांजपर्यंत अशुद्ध असावा.
२५ आणि कोणी त्यांतलें कोणतेंहि शव उचलून
नेतो, तो आपलीं वस्त्रें धुऊन सांजपर्यंत अ-
शुद्ध असावा. २६ ज्या पशूचा खुर दुभाग-
लेला असतांहि चीर होऊन दोन भाग झाले
आहेत अथवा जो रवंथ करीत नाहीं ते सर्व
तुह्मास अशुद्ध; कोणी त्यांस शिवला असतां
अशुद्ध असावा. २७ आणि अवघ्या चतुष्पद
जिवांत, जो आपल्या पंज्यांवर चालतो, असे सर्व
तुह्मास अशुद्ध; कोणी त्यांच्या शवाला शिव-
ल्यास, तो सांजपर्यंत अशुद्ध असावा. २८ आ-
णि कोणी त्यांचें शव उचलिल्यास, तो आप-
लीं वस्त्रें धुऊन सांजपर्यंत अशुद्ध असावा; ते

तुह्मास अशुद्धच आहेत. २९ आणि भूमीवरून
चालणाऱ्या जिवांमध्यें हे तुह्मास अशुद्ध; ह्म-
णजे चिचुंदरी, व उंदीर, व जातिजातीची घोरपड;
३० आणि चौपय, व सरड, व पाल, व डोमेत,
व फुस्कारी. ३१ सर्व भूमीवरून चालणाऱ्यांमध्यें
तुह्मास अशुद्ध; ते मेल्यावर त्यांस जो कोणी शि-
वतो, त्याने सांजपर्यंत अशुद्ध असावें. ३२ आ-
णि ते मेल्यानंतर त्यांचें कांहीं ज्या कशावर पडेल,
तें अशुद्ध असावें; लांकडाचीं पात्रें, अथवा वस्त्र,
अथवा कातडें, अथवा तरट, आणि ज्या ज्या सा-
मानाकडून काम करितात, तेंहि सर्व पाण्यांतून
काढावें, आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें; मग
शुद्ध होईल. ३३ आणि ज्या ज्या मातीच्या
पात्रांमध्यें त्यांतलें कांहीं पडेल, त्यांतलें अवघें तें
अशुद्ध होईल; आणि तें पात्र तुह्मी फोडावें. ३४
जें खायाचें कोणतेंहि भक्ष्य ज्यावर पाणी पडलें
असेल, तें अशुद्ध होईल; आणि जें कांहीं पिणें प्या-
याचें तें अशा कोणत्याहि भांड्यांत अशुद्ध होईल.
३५ आणि ज्या ज्यावर त्यांच्या शवाचें कांहीं पडेल,
तें अशुद्ध होईल; पाकाची भट्टी किंवा चुलीचीं
ओलें यांवर जर पडेल, तर तीं मोडावीं; तीं अशुद्ध
आहेत, आणि तुह्मास अशुद्ध असावीं. ३६
तथापि झरा, अथवा विहीर, व पाण्याचें तळें हें
शुद्ध असतें; परंतु त्यांतल्या शवाला जें पाणी
लागेल, तें अशुद्ध होईल. ३७ आणि कोणत्याहि
धान्याचें बीं जें पेरायाचें आहे, त्यावर त्यांतल्या श-
वाचें कांहीं पडलें असतांहि, तें शुद्ध होईल. ३८
तथापि ब्यावर पाणी घातलें असतां, जर त्यावर
त्यांतल्या शवाचें कांहीं पडलें तर तें तुह्मास
अशुद्ध असावें. ३९ आणि तुमच्या खाण्याचे जे
पशू, त्यांतला कोणी जेव्हां मरतो, तेव्हां जो
त्याच्या शवाला शिवतो, तो सांजपर्यंत अशुद्ध.
४० आणि जो त्याच्या शवांतलें कांहीं खातो,
तो आपलीं वस्त्रें धुऊन सांजपर्यंत अशुद्ध अ-
सावा; आणि जो त्याचें शव उचलून नेतो, तो
आपलीं वस्त्रें धुऊन सांजपर्यंत अशुद्ध असावा.
४१ आणि जो कोणी जीव भूमीवर सरसर चा-
लतो, तो ओंगळ आहे, खायाचा नाहीं. ४२
भूमीवरून सर्व चालणाऱ्या जंतूंमध्यें जो कोणी
पोटाने चालतो, आणि जो कोणी चौपायानी चा-
लतो, अणखी ज्या कोणाला अधिक पाय, तसे
तुह्मी खाऊं नका; कां तर ते ओंगळ आहेत.
४३ कोणत्याहि भूमीवरून चालणाऱ्या जंतूं-
कडून तुह्मी आपणास विटाळवूं नका; त्यांकडून
आपणाला अशुद्ध करूं नका, आणि त्यांकडून अ-
शुद्ध होऊं नका. ४४ कां कीं मी परमेश्वर
तुमचा देव, ह्मणून तुह्मी आपणास पवित्र करून
पवित्र असा, कारण कीं मी पवित्र आहें; यास्तव
भूमीवरल्या कोणत्याहि चालणाऱ्या जंतूकडून तु-
ह्मी आपल्या जिवांस अशुद्ध करूं नका. ४५
कां तर ज्याने तुमचा देव असा होण्यासा-
ठीं तुह्मास मिसर देशांतून वर आणिलें, तोच
मी परमेश्वर; आणि मी पवित्र आहें, यास्तव
तुह्मीहि पवित्र व्हा. ४६ पशूंचा व पांखरांचा
व प्रत्येक जीवजंतु जो पाण्यांत फिरतो त्याचा,
आणि भूमीवर प्रत्येक चालणारा जंतु यांविषयीं-
चा हा नेम आहे. ४७ यासाठीं कीं अशुद्ध
व शुद्ध यांचा, आणि खायाचा जीव व न खा-
याचा जीव यांचा भेद करावा."

## अध्याय १२.

अणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असें सांग
कीं, जेव्हां स्त्री गरोदर होऊन पुत्र प्रसवती, तेव्हां
ती सात दिवसपर्यंत अशुद्ध असावी; तिच्या रज-
स्रावामुळें जो विटाळ त्याच्या दिवसांप्रमाणें ती
अशुद्ध असावी. ३ मग आठव्या दिवशीं त्या-
ची सुंता करावी. ४ आणि तिने तेहतीस दिवस
आपल्या शुद्धि होण्याच्या रक्तांत राहावें; तिचे शुद्ध
होण्याचे दिवस पूर्ण होत तोंपर्यंत तिने कोण-
त्याहि पवित्र वस्तूला न शिवावें, आणि पवित्र-
स्थानांत न यावें. ५ परंतु ती जर कन्या प्रसवती,
तर ती आपल्या विटाळशीपणाप्रमाणें दोन सप्तकें
अशुद्ध असावी; आणि तिने आपल्या शुद्धि होण्या-
च्या रक्तांत सासष्ट दिवस राहावें. ६ मग पुत्राविष-
यीं अथवा कन्येविषयीं तिचे शुद्ध होण्याचे दिवस
पूर्ण झाल्यावर तिने होमासाठीं पहिल्या वर्षांतला
मेंढा, आणि पापहारक यज्ञासाठीं पारव्याचें पिलुं
अथवा होला सभामंडपाच्या दारीं याजकाजवळ
आणावा. ७ आणि त्याने तें परमेश्वरासमोर

अर्पून तिजविषयीं प्रायश्चित्त करावें; नंतर ती
आपल्या रक्तस्रावापासून शुद्ध होईल; जी पुत्र
अथवा कन्या प्रसवती, तिजविषयीं हा नेम. ८
परंतु जर बकरें एवढें तिला मिळेना, तर तिने
दोन होले अथवा पारव्याचीं दोन पिलें, एक
होमासाठीं आणि एक पापहारक यज्ञासाठीं आ-
णावीं; मग याजकाने तिजकरितां प्रायश्चित्त करावें,
नंतर ती शुद्ध होईल."

## अध्याय १३.

**आ**णखी **परमेश्वराने मोशेला** व **आहरोना-**
ला असें सांगितलें कीं, २ "**माणसाच्या** श-
रिराच्या कातड्यांत उंचवटा, अथवा चट्टा, अथवा
वर्णांतर जेव्हां असेल, आणि त्याच्या शरिराच्या
कातड्यांत कोडाच्या पटकीसारिखें कांहीं असेल,
तेव्हां त्याला **आ**हरोन याजक याजवळ, अथवा
त्याचे पुत्र याजक त्यांतील एकाजवळ आणावें.
३ **मग** याजकाने शरिराच्या कातड्यांतला चट्टा
पाहावा; आणि चट्ट्यांतली लंव पांढरी असी
झाल्यास, आणि चट्टा त्याच्या अंगाच्या कातड्याच्या
आंत दिसल्यास, तो कोडाचा चट्टा आहे; तेव्हां
याजकाने तो पाहिल्यावर, त्याला अशुद्ध ठरवावें.
४ **आ**णि त्याच्या अंगाच्या कातड्यांत तें वर्णांतर
जर पांढरें आणि कातड्याच्या आंत दिसत नाहीं,
आणि त्यांतली लंव पांढरी झाली नाहीं, तर याज-
काने पटकीकऱ्याला सात दिवस कोंडावें; ५ **मग**
सातव्या दिवशीं याजकाने त्याला पाहावें; आणि
पाहा, चट्टा त्याच्या पाहण्यांत तसाच राहिला,
ह्मणजे चट्टा कातड्यांत पसरला नसला, तर याज-
काने त्याला अणखी सात दिवस कोंडावें. ६ **मग**
याजकाने पुढल्या सातव्या दिवशीं त्याला पाहावें;
आणि पाहा, चट्टा मंद झाला, ह्मणजे कातड्यांत चट्टा
पसरला नसला, तर याजकाने त्याला शुद्ध ठरवावें;
तो केवळ चट्टा आहे, यास्तव त्याने आपलीं वस्त्रें
धुवून शुद्ध व्हावें. ७ **परंतु** तो शुद्ध होण्यासाठीं
याजकाला दाखविल्यावर, जर कातड्यांत चट्टा पस-
रला खरा, तर तो फिरून याजकाला दाखविला पा-
हिजे. ८ **तेव्हां** याजकाने पाहावें; आणि पाहा, चट्टा
जर कातड्यांत पसरला, तर याजकाने त्याला अ-
शुद्ध ठरवावें; तो कोडच आहे. ९ **जेव्हां** कोडाचा
चट्टा माणसाला असेल तेव्हां तो याजकाजवळ
आणावा. १० **मग** याजकाने पाहावें; आणि पाहा,
कातड्यांत पांढरा उंचवटा असला, व तेणेंकडून
लंव पांढरी झाली असली, आणि सडलेलें मांस
उंचवट्यांत उत्पन्न असलें, ११ **तर** तो त्याच्या
अंगाच्या कातड्यांत जुना झालेला कोड; यास्तव
याजकाने त्याला अशुद्ध ठरवावें; त्याने त्याला
कोंडूं नये, कारण तो अशुद्ध आहे. १२ **परंतु**
जर कोड कातड्यांत असा व्यापून जातो कीं पट-
कीकऱ्याच्या सर्व कातड्याला डोक्यापासून पाया-
पर्यंतहि, ह्मणजे याजकाच्या डोळ्यास जें दिसतें
त्या अवघ्याला कोड व्यापितो; १३ **तर** याज-
काने पाहावा, आणि पाहा जर त्याचें सर्व अंग
व्यापिलें, तर त्याने पटकीकऱ्याला शुद्ध ठरवावें;
तो अगदीं पांढरा झाला, ह्मणून शुद्ध आहे.
१४ **परंतु** ज्या दिवशीं त्याच्या अंगावर सड-
लेलें मांस दिसेल, तेव्हां तो अशुद्ध होईल. १५
**आ**णि याजक सडलेलें मांस पाहील आणि त्याला
अशुद्ध ठरवील; जें सडलेलें मांस तें अशुद्ध; तो
कोड आहे. १६ **अथवा** जर कधीं सडलेलें मांस
पालटेल, ह्मणजे पांढरें होईल, तर त्याने याजका-
जवळ यावें. १७ **आ**णि याजकाने त्याला पाहावें;
तेव्हां पाहा जर पटकी पांढरी झाली असली, तर
याजकाने पटकीकऱ्याला शुद्ध ठरवावें; तो शुद्ध
आहे. १८ **आ**णि अंगाला ह्मणजे कोणाच्या
कातड्यांत, जर फोड होऊन बरा झाला, १९
**आ**णि फोडाच्या ठिकाणीं पांढरा उंचवटा, अथवा
वर्णांतर कांहीं तांबडें कांहीं पांढरें असें झालें अ-
सलें, तर याजकाला तें दाखविलें जावें. २० **आ**णि
याजकाने पाहावें; तेव्हां पाहा, जर तें कातड्याच्या
आंत दिसतें, आणि त्यांतली लंव पांढरी झाली
असली, तर याजकाने त्याला अशुद्ध ठरवावें;
ती कोडाची पटकी फोडांत उत्पन्न झालेली असी
आहे. २१ **परंतु** याजक पाहते वेळेस जर त्यांत
पांढरी लंव नाहीं, आणि तें कातड्याच्या आंत
नाहीं, आणि तें मंद झालें आहे, तर याजकाने
त्याला सात दिवस कोंडावें. २२ **मग** जर तें
कातड्यांत पसरलें खरें, तर याजकाने त्याला
अशुद्ध ठरवावें; ती पटकीच आहे. २३ **परंतु**
जर वर्णांतर आपल्या ठिकाणीं तसेंच राहून, पस-

रव नाहीं, तर तो फोडाचा वण, यास्तव या-
जकाने त्याला शुद्ध ठरवावें. २४ अथवा जेव्हां
अंगाच्या कातड्यांत अग्नीच्या पोळण्याचें क्षत अ-
सेल, आणि पोळण्याचें क्षत कांहीं आरक्त पां-
ढरें अथवा पांढरेंच वर्णांतर असेल, २५ तेव्हां
याजकाने तें पाहावें; आणि पाहा, वर्णांतरांतली लंव
पांढरी असी झाली असली व तें कातड्याच्या आंत
दिसलें, तर तो पोळलेल्यांत उत्पन्न झालेला कोड;
यास्तव याजकाने त्याला अशुद्ध ठरवावें; ती को-
डाची पटकीच आहे. २६ परंतु जर याजकाच्या
दृष्टीस असें येतें कीं वर्णांतरामध्यें प्रत्यक्ष पांढरी
लंव नाहीं, आणि तें कातड्याच्या आंत नाहीं,
आणि तें मंद झालें आहे, तर याजकाने त्याला
सात दिवस कोंडावें. २७ मग सातव्या दिवशीं
याजकाने त्याला पाहावें; जर तें कातड्यांत फार
पसरलें असलें, तर याजकाने त्याला अशुद्ध ठर-
वावें; ती कोडाची पटकीच आहे. २८ परंतु
जर तें वर्णांतर आपल्या ठिकाणीं तसेंच राहून
कातड्यांत पसरलें नसलें आणि तें मंद झालें अ-
सलें, तर तो पोळण्याचा उंचवटा; यास्तव याज-
काने त्याला शुद्ध ठरवावें, कां तर तो पोळण्याचा
वण आहे. २९ आणि जेव्हां पुरुषाला किंवा
स्त्रीला डोक्यावर किंवा हनवटीवर चट्टा असेल;
३० तेव्हां याजकाने चट्टा पाहावा; आणि पाहा,
तो दिसण्यांत कातड्याच्या आंत असला, आणि
त्यांत पिंगट बारीक लोमें असलीं, तर याजकाने
त्याला अशुद्ध ठरवावें; तो खवडा, डोक्याचा
किंवा हनवटीचा कोड तोच आहे. ३१ परंतु
जेव्हां याजकाच्या पाहण्यांत खवड्याचा चट्टा अ-
सा असेल कीं तो दिसण्यांत कातड्याच्या आंत
नाहीं, आणि त्यांतली लव काळसर नाहीं, तेव्हां
याजकाने खवड्याच्या पटकीकऱ्याला सात दि-
वस कोंडावें. ३२ मग सातव्या दिवशीं याज-
काने चट्टा पाहावा; आणि पाहा, खवडा पसरला
नसला, आणि त्यांतलीं लोमें पिंगट झालीं नसलीं,
आणि खवडा दिसण्यांत कातड्याच्या आंत नसला;
३३ तर पटकीकऱ्याने आपलें मुंडन करावें, परंतु
खवडा मुंडूं नये; आणि याजकाने खवडेकऱ्याला
आणखी सात दिवस कोंडावें. ३४ मग सातव्या
दिवशीं याजकाने खवडा पाहावा; तेव्हां पाहा,
खवडा कातड्यांत पसरला नसला, आणि तो दिस-
ण्यांत कातड्याच्या आंत नसला, तर याजकाने
त्याला शुद्ध ठरवावें; आणि त्याने आपलीं वस्त्रें
धुऊन शुद्ध व्हावें. ३५ परंतु तो शुद्ध झाल्यानंतर
जर खवडा कातड्यांत पसरला, ३६ तर याज-
काने तो पाहावा; तेव्हां पाहा, खवडा कातड्यांत
पसरला असल्यास, याजकाने पिंगट लोमांचा शोध
न करावा; तो अशुद्धच आहे. ३७ परंतु त्याच्या
दृष्टीस जर खवडा तसाच राहिला असला, आणि
त्यांत काळसर लोमें उत्पन्न झालीं असलीं, तर
खवडा बरा झाला; तो शुद्धच आहे, यास्तव याज-
काने त्याला शुद्ध ठरवावें. ३८ आणि पुरुषाच्या
किंवा स्त्रीच्या अंगावरल्या कातड्याला जेव्हां पांढरीं
वर्णांतरें बहुत असतील, ३९ तेव्हां याजकाने पाहावें;
आणि पाहा, जर त्यांच्या अंगाच्या कातड्यांतलीं
पांढरीं वर्णांतरें मंद झालीं, तेव्हां तो कवड्यावर्ण
कातड्यांत फुटलेला असतांहि, तो शुद्ध आहे. ४०
आणि जेव्हां माणसाच्या डोक्यावरले केंस झड-
लेले असतील, तेव्हां तो टाळूखल्वाट, तो शुद्ध
आहे. ४१ आणि त्याचें डोकें, ह्मणजे त्याच्या
कपाळावरल्या भागाचे केंस झडलेले जर असले,
तर तो भाळखल्वाट, तो शुद्ध आहे. ४२ परंतु
जर टाळूटकलांत किंवा भाळटकलांत कांहीं आ-
रक्त पांढरा चट्टा असेल, जर त्याच्या टाळु-
टकलांत किंवा त्याच्या भाळटकलांत तो उत्पन्न
झालेला कोड आहे. ४३ मग याजकाने त्याला
पाहावें; आणि पाहा, जर असा अंगाच्या कातड्या-
वर कोड दिसतो, तसा त्याच्या टाळुटकलांत
किंवा त्याच्या भाळटकलांत चट्ट्याचा कांहीं आरक्त
पांढरा असा उंचवटा असला, ४४ तर तो
माणूस कोडी, तो अशुद्धच आहे, याजकाने त्याला
अगदी अशुद्ध ठरवावें; त्याच्या डोक्यावर त्या-
ला पटकी आहे. ४५ तर ज्याला कोडाची
पटकी आहे, त्याचीं वस्त्रें फाडलेलीं असावीं;
आणि त्याचें डोकें उघडें असावें, आणि त्याने
तोंडावर चिरगुट घालून, 'अशुद्ध, अशुद्ध, ओ-
रडावें. ४६ जितके दिवस त्याला कोड आहे,
तितके दिवस त्याने अगदी अशुद्ध असावें; त्याने
एकीकडे राहावें; त्याची वस्ति छावणीबाहेर असावी.
४७ तसें कांहीं वस्त्रांत, ह्मणजे लोंकरीच्या

वस्त्रांत, किंवा जवस जातीच्या वस्त्रांत, ४८
अथवा जवस जातीच्या किंवा लोंहकरीच्या उभ्या
सुतांत, किंवा आडव्या सुतांत, अथवा कोणीएका
कातड्यांत, किंवा कातड्याच्या कांहीं केलेल्या सा-
मानांत, जेव्हां कोडाची पटकी असेल, ४९ आणि
वस्त्रांत, किंवा कातड्यांत, अथवा उभ्या सुतांत, किंवा
आडव्या सुतांत, अथवा कातड्याच्या कांहीं सामानांत
पटकी कांहीं हिरवी अथवा कांहीं अरक्त असेल,
तेव्हां ती कोडाची पटकी; यास्तव ती याजकाला
दाखवावी. ५० तेव्हां याजकाने पटकी पाहून पट-
कीची वस्तु सात दिवस कोंडून ठेवावी. ५१ मग
सातव्या दिवशीं पटकी पाहावी, आणि जर ती
पटकी वस्त्रांत ह्मणजे उभ्या सुतांत, किंवा आडव्या
सुतांत, किंवा कातड्यांत, किंवा कार्यासाठीं कात-
ड्याच्या कांहीं केलेल्या सामानांत पसरलेली, तर ती
पटकी पीडाकारक कोड; तें अशुद्ध. ५२ यास्तव
त्याने तें वस्त्र जाळावें; उभ्या सुतांत, किंवा आड-
व्या सुतांत, लोंहकरीच्या, किंवा जवस जातीच्या
वस्त्रांत, अथवा कातड्याच्या कांहीं सामानांत
पटकी असो, तरी ज्यांत ती आहे, तें अग्नींत जा-
ळावें; कारण कीं तो पीडाकारक कोड आहे.
५३ परंतु जर याजकाच्या दृष्टीस असें येतें कीं
पाहा वस्त्रांतल्या उभ्या सुतांत, किंवा आडव्या
सुतांत, किंवा कातड्याच्या कांहीं सामानांत ती
पटकी पसरली नाहीं; ५४ तर याजकाने आज्ञा
द्यावी कीं ज्यांत ती पटकी आहे, तें त्यांनी धुवावें;
मग त्याने तें अणखी सात दिवस कोंडावें. ५५
नंतर तें धुतल्यावर, याजकाने पटकी पाहावी; आणि
पाहा, जर त्याच्या दृष्टीस पटकी पालटली नस-
ली, पटकी पसरली नसताहि, तर तें अशुद्ध आहे;
तूं तें अग्नींत जाळ; आंतल्या अंगीं किंवा बाहेरल्या
अंगीं असा, ती पटकी आहे. ५६ परंतु तें धुत-
ल्यावर जर याजकाच्या दृष्टीस असें येतें कीं पाहा
पटकी कमी झाली, तर त्याने ती त्या वस्त्रांतून,
अथवा कातड्यांतून, अथवा उभ्या सुतांतून, किंवा
आडव्या सुतांतून फाडून काढावी. ५७ मग
जर ती फिरून वस्त्रांत दिसती, उभ्या सुतांत, किं-
वा आडव्या सुतांत, अथवा कातड्याच्या कांहीं
डागिण्यांत असो तर ती फुटणारी पटकी आहे,
ज्यांत ती पटकी आहे, तें तूं अग्नींत जाळ.
५८ आणि जें वस्त्र, अथवा उभें सूत, किंवा आ-
डवें सूत, किंवा कातड्याचें कांहीं सामान, जें
कांहीं त्वां धुतलें असतां ज्यापासून पटकी दूर
झाली, तें फिरून धुवावें, ह्मणजे शुद्ध होईल.
५९ लोंहकरीचें किंवा जवस जातीचें वस्त्र, अथवा
उभें सूत, किंवा आडवें सूत, अथवा कातड्याचें
कांहीं सामान, यांतली कोडाची पटकी इजविषयीं,
ह्मणजे तें वस्त्रादि शुद्ध ठरवावें किंवा अशुद्ध
ठरवावें, याविषयीं हाच नेम आहे.

## अध्याय १४.

अणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "कोडी शुद्ध होण्याच्या दिवशीं
त्याविषयीं हाच नेम असावा कीं, त्याला या-
जकाजवळ आणावें; ३ आणि याजकाने छाव-
णीच्या बाहेर जावें; मग जर याजकाच्या दृष्टीस
असें आलें कीं पाहा कोडाची कोडपटकी बरी
झाली, ४ तर याजकाने आज्ञा द्यावी कीं त्याने
शुद्ध होण्यासाठीं दोन जिवंत शुद्ध चिमण्या, व
गंधसुरूचें लांकूड, व किरमिजरंगी सूत, व जुफा
घ्यावा. ५ मग त्याने एक चिमणी जित्या पाण्या-
वर धरून मातीच्या पात्रांत कापावी, ह्मणून
याजकाने आज्ञा द्यावी. ६ नंतर त्याने जिवंत
चिमणी घ्यावी; आणि गंधसुरूचें लांकूड, व कि-
रमिजरंगी सूत, व जुफा, हीं जिवंत चिमणीसुद्धां
जित्या पाण्यावर कापलेल्या चिमणीच्या रक्तांत
बुचकळून, ७ कोडापासून शुद्ध होणारा यावर
सात वेळा शिंपडावें, आणि त्याला शुद्ध ठरवावें;
मग जिवंत चिमणी रानांत सोडावी. ८ नंतर
शुद्ध होणाऱ्याने आपलीं वस्त्रें धुवावीं, आणि आ-
पलें मुंडन करून सर्व केंस काढावे; मग पाण्याने
अंघोळ करून शुद्ध व्हावें; आणि त्यानंतर छाव-
णींत यावें, परंतु सात दिवस आपल्या राहोटीबा-
हेर राहावें. ९ मग सातव्या दिवशीं असें व्हावें
कीं त्याने आपले सर्व केंस मुंडवावे; ह्मणजे आपल्या
डोक्याचे व आपल्या दाढीचे व आपल्या भवयांचे,
असें आपल्या सर्व केसांचें मुंडन करवावें; आणि
आपलीं वस्त्रें धुवावीं, आणि पाण्याने आपल्या श-
रिराला अंघोळ घालून शुद्ध व्हावें. १० मग
आठव्या दिवशीं त्याने सांगोपांग दोन कोंकरें,

आणि पहिल्या वर्षांतली एक सांगोपांग मेंढी, आ-
णि एक चोव्याया दाहावा यांतले तीन वांटे स-
पीठ, तेलाने मळलेलें असा नैवेद्य, आणि एक अद-
पाव तेल घ्यावें. ११ मग शुद्ध करणाऱ्या याज-
काने शुद्ध होणाऱ्या माणसाला त्यांसुद्धां सभा-
मंडपाच्या दारीं परमेश्वरासमोर सादर करावें.
१२ नंतर याजकाने एक कोंकरा घेऊन दोषहारक
यज्ञासाठीं जवळ आणावा, आणि तें अदपाव तेल
घेऊन तीं ओंवाळणीसाठीं परमेश्वरासमोर ओं-
वाळावीं; १३ आणि पवित्र स्थानांत, जेथें त्याने
पापहारक यज्ञपशु व होमपशु कापायाचा, त्या
ठिकाणीं त्याने तो कोंकरा कापावा; का तर असें
पापहारक तसें दोषहारक अर्पण, हें याजकाचें
अर्पण आहे; तें परम पवित्र आहे. १४ मग
याजकाने दोषहारक यज्ञपशूचें कांहीं रक्त घ्यावें;
आणि याजकाने शुद्ध होणाऱ्याच्या उजव्या काना-
च्या टोंकास व त्याच्या उजव्या हाताच्या अंग-
ठ्यास व त्याच्या उजव्या पायाच्या अंगठ्यास
लावावें. १५ मग याजकाने तें अदपाव तेल
घेऊन त्यांतलें कांहीं आपल्या डाव्या तळहाता-
वर ओतावें. १६ नंतर याजकाने आपल्या डाव्या
तळहातावर जें तेल, त्यांत आपल्या उजव्या हा-
ताचें बोट बुचकळून, आपल्या बोटाने कांहीं तेल
सात वेळा परमेश्वरासमोर शिंपडावें. १७
मग याजकाने आपल्या तळहातावर जें उरलेलें
तेल, त्यांतलें कांहीं शुद्ध होणाऱ्याच्या उजव्या का-
नाच्या टोंकाला, व त्याच्या उजव्या हाताच्या अंग-
ठ्याला, व त्याच्या उजव्या पायाच्या अंगठ्याला,
दोषहारक यज्ञपशूचें रक्त जें आहे त्यावर लावावें.
१८ आणि याजकाने आपल्या तळहातावरल्या ते-
लांतून उरलेलें जें तें शुद्ध होणाऱ्याच्या डोक्याला
लावावें; असें याजकाने त्याविषयीं परमेश्वरासमोर
प्रायश्चित्त करावें. १९ नंतर याजकाने तो पाप-
हारक यज्ञपशु अर्पून, जो आपल्या अशुद्धपणापासून
शुद्ध होणार, त्याविषयीं प्रायश्चित्त करावें; आ-
णि मग त्याने होमपशु कापावा. २० नंतर या-
जकाने तो होमपशु व नैवेद्य वेदीवर अर्पावा; असें
याजकाने त्याविषयीं प्रायश्चित्त केल्यावर तो शुद्ध
होईल. २१ परंतु जर तो दरिद्री, आणि हें
त्याला मिळेना, तर त्याने आपल्याविषयीं प्राय-
श्चित्त करायास ओंवाळणीसाठीं, दोषहारक यज्ञा-
साठीं एक कोंकरा, आणि नैवेद्यासाठीं तेलाने
मळलेलें चोव्यांतला एक दाहावा वांटा सपीठ,
आणि अदपाव तेल घ्यावें. २२ आणि दोन
होले, किंवा पारव्याचीं दोन पिलें, असीं त्याला
मिळतील तसीं; मग एक पापहारक यज्ञासाठीं
व एक होमासाठीं व्हावा. २३ आणि त्याने
आपली शुद्धि होण्यासाठीं आठव्या दिवसीं तीं
याजकाजवळ सभामंडपाच्या दारीं परमेश्वरा-
समोर आणावीं. २४ मग याजकाने दोषहारक
यज्ञाचा तो कोंकरा, आणि तें अदपाव तेल
घेऊन याजकानेच तीं परमेश्वरासमोर ओंवा-
ळणीसाठीं ओंवाळावीं. २५ आणि त्याने दोष-
हारक यज्ञासाठीं जो कोंकरा तो कापावा; मग
याजकाने दोषहारक यज्ञपशूचें कांहीं रक्त घेऊन
शुद्ध होणाऱ्याच्या उजव्या कानाच्या टोंकाला, व
त्याच्या उजव्या हाताच्या अंगठ्याला, व त्याच्या
उजव्या पायाच्या अंगठ्याला लावावें. २६ मग
याजकाने कांहीं तेल आपल्या डाव्या तळहातावर
ओतावें. २७ आणि याजकाने आपल्या डाव्या
तळहातावरलें कांहीं तेल आपल्या उजव्या हाता-
च्या बोटाने परमेश्वरासमोर सात वेळा शिंप-
डावें. २८ आणि याजकाने आपल्या तळहाता-
वरलें कांहीं तेल शुद्ध होणाऱ्याच्या उजव्या काना-
च्या टोंकाला, व त्याच्या उजव्या हाताच्या अंग-
ठ्याला, व त्याच्या उजव्या पायाच्या अंगठ्याला,
दोषहारक यज्ञपशूचें रक्त जें आहे त्यावर रक्ताच्या
ठिकाणीं लावावें. २९ आणि याजकाच्या तळहा-
तावर उरलेलें जें तेल तें त्याने शुद्ध होणाऱ्याविषयीं
परमेश्वरासमोर प्रायश्चित्त करायास त्याच्या डो-
क्याला लावावें. ३० मग जीं त्याला मिळतील,
होले किंवा पारव्याचीं पिलें, त्यांतून एक अर्पावें:
३१ त्याला जीं मिळालीं असतील, त्यांतील
एक पापहारक यज्ञासाठीं व एक होमासाठीं असीं
तीं नैवेद्यासुद्धां याजकाने वेदीवर अर्पून शुद्ध
होणाऱ्यासाठीं परमेश्वरासमोर प्रायश्चित्त क-
रावें. ३२ ज्याला कोडपटकी झाली, ज्याला
आपली शुद्धि होण्यासाठीं मिळत नाहीं त्या-
विषयीं हाच नेम." ३३ आणखी परमेश्वराने
मोश्याला व आहरोनाला असें सांगितलें कीं,

२४ "जो कनान देश मी तुह्मास वतन करून
देतों, त्यांत जेव्हां तुह्मी पोहंचाल, आणि तुमच्या
वतनाच्या देशांतल्या घरावर मी कोडाची पटकी
लावीन, २५ तेव्हां ज्याचें तें घर आहे, त्याने येऊन
याजकाला असें सांगावें कीं, घराला पटकी लागल्या-
सारिखें मला कांहीं दिसतें.' २६ मग घरांत जें
अवघें तें अशुद्ध न व्हावें ह्मणून याजकाने या-
प्रमाणें आज्ञा द्यावी कीं याजक पटकी पाहायास
गेल्यापूर्वी तुह्मी घर रिकामें करावें, आणि त्या-
नंतर याजकाने घर पाहायास जावें. २७ आणि
पटकी पाहावी, आणि पाहा जर घराच्या भिंतींस
पटकीचे खळगे कांहीं हिरवे, अथवा कांहीं आरक्त,
असे आहेत, आणि भिंतींच्या आंत खोल दिस-
तात; २८ तर याजकाने घरांतून घराच्या दारा-
सीं येऊन घर सात दिवस बंद करावें. ३९ मग
सातव्या दिवसीं याजकाने फिरून जाऊन पाहावें;
तेव्हां पाहा, जर घराच्या भिंतींत पटकी पसरली,
४० तर याजकाने असी आज्ञा द्यावी कीं त्यांनी
पटकी लागलेले धोंडे काढून नगराच्या बाहेर
अशुद्ध ठिकाणीं टाकावे. ४१ आणि त्याने तें घर
आंतून चहुंकडून खरवडवावें; नंतर त्यांनी खर-
वडून काढलेली जी माती, ती नगराच्या बाहेर
अशुद्ध ठिकाणीं ओतून टाकावी. ४२ मग त्या
धोंड्याच्या ठिकाणीं त्यांनी दुसरे धोंडे आणून
बसवावे; आणि त्याने दुसरी माती घेऊन घर
लेपावें. ४३ मग ते धोंडे काढल्यानंतर, आणि
घर खरवडून लेपल्यानंतर, जर पटकी फि-
रून घरांत उत्पन्न होती, ४४ तर याजकाने
येऊन पाहावी; आणि पाहा, जर पटकी घरांत
पसरली, तर तो घरांतला पीडत्कारक कोड; तें
अशुद्ध आहे. ४५ मग त्याने त्या घराचे धोंडे व
त्याचीं लाकडें व त्याची सर्व माती यांसुद्धां तें घर
मोडून नगराच्या बाहेर अशुद्ध ठिकाणीं न्यावें.
४६ आणखी तें घर बंद झालेल्या सर्व दिवसांत,
जो त्यामध्यें जाईल, त्याने सांजपर्यंत अशुद्ध
असावें. ४७ आणि जो त्या घरांत निजेल, त्याने
आपलीं वस्त्रें धुवावीं; जो त्या घरांत खाईल, त्याने-
हि आपलीं वस्त्रें धुवावीं. ४८ परंतु याजक
वेळोवेळ जाव असतां जर त्याच्या दृष्टीस असें
येईं कीं पाहा घर लेपल्यानंतर घरांत पटकी
पसरली नाहीं, तर याजकाने तें घर शुद्ध ठरवावें-
कां कीं पटकी बरी झाली. ४९ मग त्याने घरा-
च्या शुद्धि होण्यासाठीं दोन चिमण्या, व गंधसु-
रूचें लांकूड, व किरमिजी रंगाचें सूत, व जुफा
घ्यावा. ५० आणि एक चिमणी मातीच्या पा-
त्रांत जित्या पाण्यावर कापावी. ५१ मग त्याने
गंधसुरूचें लाकूड, व जुफा, व किरमिजी रंगाचें
सूत, व जिवंत चिमणी घेऊन त्यांस कापलेल्या
चिमणीचें रक्त व जितें पाणी यांत बुचकळून त्या
घरावर सात वेळां शिंपडावें. ५२ असें चिम-
णीचें रक्त, व जितें पाणी, व जिवंत चिमणी, व
गंधसुरूचें लाकूड, व जुफा, व किरमिजी रंगाचें
सूत, यांकडून त्याने घराची शुद्धि करावी. ५३
मग त्याने ती जिवंत चिमणी नगराच्या बाहेर
रानांत सोडावी. ५४ असें त्याने घराविषयीं
प्रायश्चित्त केल्यावर तें अशुद्ध होईल." ५५
कोडाची प्रत्येक पटकी, ह्मणजे खवडा, आणि
वस्त्राचा व घराचा कोड; ५६ आणि उंचवटा
व चट्टा व वर्णांतर, यांविषयीं हाच नेम. ५७ अ-
शुद्ध होण्याच्या दिवसीं व शुद्ध होण्याच्या दिवसीं
जें करणें तें दाखवायासाठीं कोडाचा हाच नेम.

## अध्याय १५.

आणखी परमेश्वराने मोशाला व आहरोना-
ला असें सांगितलें कीं, २ "तुह्मी इस्राएला-
च्या संतानांस बोलून त्यांस सांगा, जेव्हां कोणी मा-
णसाच्या देहांतून स्राव होत असेल, तेव्हां तो
आपल्या स्रावामुळें अशुद्ध आहे. ३ आणि त्या-
च्या स्रावाने त्याचें अशुद्धपण असें व्हावें; त्याच्या
देहांतला स्राव वाहत असो, किंवा त्याच्या देहां-
तला स्राव कुंटत असो, तरी त्याचें अशुद्धपण
हेंच; ४ ज्या प्रत्येक बाजेवर तो स्रावी निजतो,
ती अशुद्ध होईल; आणि ज्या प्रत्येक वस्तूवर तो
बसतो, ती अशुद्ध होईल. ५ आणि जो कोणी
त्याच्या बाजेला शिवतो, त्याने आपलीं वस्त्रें धुऊन
पाण्याने अंघूळ करावी, आणि सांजपर्यंत अशुद्ध
असावें. ६ ज्या वस्तूवर तो स्रावी बसला, तिज-
वर जो बसतो, त्यानेहि आपलीं वस्त्रें धुऊन पा-
ण्याने अंघूळ करावी, आणि सांजपर्यंत अशुद्ध
असावें. ७ आणि ज्या स्रावकाच्या देहाला जो

शिवतो, त्याने आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ
करावी, आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें. ८
आणि ज्या शुद्धावर स्रावी थुंकतो, त्याने आप-
लीं वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ करावी, आणि सां-
जपर्यंत अशुद्ध असावें. ९ आणि ज्या प्रत्येक वा-
हनावर तो स्रावी बसून जाईल, तें अशुद्ध होईल.
१० आणि जें कांहीं त्याच्या खालीं असेल,
त्याला जो कोणी शिवतो, त्याने सांजपर्यंत अशुद्ध
असावें, आणि जो तीं उचलतो, त्याने आपलीं
वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ करावी आणि सांज-
पर्यंत अशुद्ध असावें. ११ आणि तो स्रावी आ-
पले हात पाण्यांत धुतल्यावांचून ज्याला शिवतो
त्याने आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ करावी
आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें. १२ आणि
ज्या मातीच्या पात्राला तो स्रावी शिवतो, तें
फोडलें जावें, आणि सर्व लाकडी पात्रें पाण्यांत
विसळावीं. १३ आणि जेव्हां स्रावी आपल्या
स्रावापासून शुद्ध झाला असेल, तेव्हां त्याने आप-
ल्या शुद्धीस होण्याला आपणासाठीं सात दिवस
मोजावे; मग आपलीं वस्त्रें धुवावीं, आणि झऱ्या-
च्या पाण्याने आपलें अंग धुऊन शुद्ध व्हावें.
१४ नंतर आठव्या दिवशीं त्याने आपल्यासाठीं
दोन होले अथवा पारव्याचीं दोन पिलें घेऊन
परमेश्वरासमोर सभामंडपाच्या दारीं यावें,
आणि तीं याजकाजवळ द्यावीं. १५ मग या-
जकाने त्यांतल्या एकाचा पापहारक यज्ञ आणि
एकाचा होम करावा; असें याजकाने त्यासाठीं
त्याच्या स्रावाविषयीं परमेश्वरासमोर प्रायश्चित्त
करावें. १६ आणि पुरुषापासून जेव्हां धातुपात
होतो, तेव्हां त्याने पाण्याने आपलें सर्व अंग
धुवावें, आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें. १७
आणि प्रत्येक वस्त्र व प्रत्येक कातडें, ज्यावर
धातुपात झाला असेल, तेंहि पाण्याने धुवावें, आणि
सांजपर्यंत अशुद्ध असावें. १८ आणि जेव्हां
पुरुष स्त्रीजवळ निजून धातुपात करितो, तेव्हां
त्याने पाण्याने अंघूळ करावी आणि सांजपर्यंत
अशुद्ध असावें. १९ आणि जेव्हां स्त्री स्रावी
असतां तिच्या देहांतला तिचा स्राव रक्त असेल,
तेव्हां तिने आपल्या विटाळपणानें सात दिवस
असावें; आणि जो कोणी तिला शिवतो, त्याने

सांजपर्यंत अशुद्ध असावें. २० आणि ज्या कशावर
ती आपल्या विटाळांत निजती, तें अशुद्ध होईल;
ज्या कशावर ती बसती, तेंहि अशुद्ध होईल. २१
आणि जो कोणी तिच्या बाजेला शिवतो, त्याने
आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ करावी आणि
सांजपर्यंत अशुद्ध असावें. २२ आणि ती ज्या
कोणत्या वस्तूवर बसती, तिला जो कोणी शिवतो
त्याने आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने अंघूळ करावी
आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें. २३ आणि
तिच्या बाजेवर जें कांहीं असेल, अथवा ज्या को-
णत्याहि पदार्थावर ती बसती, त्यावर असेल,
तें जर कोणी शिवतो, तेव्हां त्याने सांजपर्यंत
अशुद्ध असावें. २४ आणि जर पुरुष तिच्या
जवळ निजतो आणि तिचें रज त्याला लागतें, तर
त्याने सात दिवस अशुद्ध असावें; आणि ज्या
कोणत्याहि अंथरुणावर तो निजतो, तें अशुद्ध
असावें. २५ आणि जर स्त्रीचा रक्तस्राव बहुत
दिवस वाहत असेल, म्हणजे तिच्या विटाळाचा
काळ आला नाहीं तितक्यांत, किंवा जर ती
आपल्या पाळीहून पलिकडेहि स्रावी असेल, तर
तिचें अशुद्ध स्रावाचे सर्व दिवस तिच्या विटा-
ळाच्या दिवसांप्रमाणें असावे; ती अशुद्ध आहे.
२६ तिच्या स्रावाच्या सर्व दिवसांत ती ज्या
कोणत्याहि अंथरुणावर निजती, तें तिच्या विटा-
ळाच्या अंथरुणाप्रमाणें असावें; आणि ज्या को-
णत्याहि पदार्थावर ती बसती, तो तिच्या विटा-
ळाच्या अशुद्धतेप्रमाणें अशुद्ध असावा. २७
आणि तशांस जो कोणी शिवतो, तो अशुद्ध होतो;
आणि त्याने पाण्याने आपलीं वस्त्रें धुवून अंघूळ
करावी, आणि सांजपर्यंत अशुद्ध राहावें. २८
आणि जर ती आपल्या स्रावापासून शुद्ध झाली,
तर तिने आपले सात दिवस मोजावे, आणि त्या-
नंतर शुद्ध व्हावें. २९ आणि आठव्या दिवशीं
तिने आपल्यासाठीं दोन होले, किंवा पारव्याचीं
दोन पिलें घेऊन याजकाजवळ सभामंडपाच्या दारीं
आणावीं. ३० मग याजकाने पापहारक यज्ञासा-
ठीं एक व होमासाठीं एक अर्पावें; याप्रमाणें याज-
कानें तिच्यासाठीं तिच्या अशुद्ध स्रावाविषयीं पर-
मेश्वरासमोर प्रायश्चित्त करावें. ३१ असें तुम्ही
इस्राएलाच्या संतानांस त्यांच्या अशुद्धपणापासून

वेगळें करावें; नाहींतर तुमच्यामध्यें जें माझें स्थान
त्याला ते विटाळवून आपल्या अशुद्धपणांत मर-
तील. ३२,३३ जो स्रावी, आणि जो आपल्या-
पासून धातुपाताने अशुद्ध होतो, आणि जी आप-
ल्या विटाळशीनें दुखणेकरीण असी जीं जीं स्त्री-
पुरुषें आपापल्या स्रावाने स्रावी असतील त्याविष-
यीं, आणि जो पुरुष विटाळशीजवळ निजतो,
त्याविषयीं हाच नेम आहे."

## अध्याय १६.

आणि आहरोनाचे दोन पुत्र परमेश्वरा-
समोर अर्पण करून मेले, तेव्हां त्यांच्या
मरणानंतर परमेश्वर मोश्याला बोलला. २
त्या वेळेस परमेश्वराने मोश्याला सांगितलें, "तूं
आपला भाऊ आहरोन याला सांग कीं त्यानें न
मरावें ह्मणून भलत्या वेळेस पवित्र स्थानांत, पड-
द्याच्या आंत कोशावरल्या दयासनासमोर न यावें;
कां कीं मी दयासनावर ढगांत दृश्य असतों. ३
आहरोनाने पवित्र स्थानांत याप्रकारें यावें कीं पाप-
हारक यज्ञासाठीं तरणा खोंड व होमासाठीं एडका
घेऊन यावें. ४ त्याने जवस वस्त्राचा पवित्र
अंगरखा घालावा, आणि जवस वस्त्राचा चोळणा
त्याने घालावा, आणि जवस वस्त्राचा काच्या त्याने
आवळावा, जवस वस्त्राचा फेंटाहि बांधावा; हीं
पवित्र वस्त्रें आहेत, आणि त्याने पाण्याने आपलें
अंग धुऊन हीं ल्यावीं. ५ आणि इस्राएला-
च्या संतानांच्या समुदायापासून पापहारक यज्ञा-
साठीं शेरडांतले दोन बोकड, आणि होमासाठीं
एक एडका घ्यावा. ६ आणि आहरोनाने आप-
ल्यासाठीं जो पापहारक यज्ञाचा खोंड तो अर्पून
आपल्याविषयीं व आपल्या घराण्याविषयीं प्राय-
श्चित्त करावें. ७ मग त्याने ते दोन बोकड घेऊन
सभामंडपाच्या दारीं परमेश्वरासमोर उभे क-
रावे. ८ आणि आहरोनाने त्या दोन बोकडांवर
पण पाडावे; एक पण परमेश्वरासाठीं व एक पण
सुटा बोकड होण्यासाठीं. ९ मग ज्या बोकडा
वर परमेश्वरासाठीं पण निघेल, तो आहरोनाने
जवळ आणून पापहारक यज्ञासाठीं अर्पावा. १०
आणि ज्या बोकडावर सुटा बोकड होण्याचा पण
निघेल, तेणेंकडून प्रायश्चित्त करितांना तो सुटा
बोकड रानांत सोडण्याकरितां जिवंत असा
परमेश्वरासमोर उभा करावा. ११ मग आह-
रोनाने आपल्यासाठीं जो पापहारक यज्ञाचा खोंड
तो जवळ आणून आपल्याविषयीं व आपल्या घरा-
ण्याविषयीं प्रायश्चित्त करावें, आणि त्याने आप-
ल्यासाठीं जो पापहारक यज्ञाचा खोंड तो कापावा.
१२ मग परमेश्वरासमोरच्या वेदीवरून धुपाटणे
भर इंगळ घेऊन, आणि आपली ओंजळभर सु-
वासिक बारीक केलेला धूप घेऊन पडद्याच्या
आंत आणावें. १३ आणि तो धूप परमेश्वरा-
समोर अग्नीवर असा ठेवावा कीं धुपाच्या धुराने
संकेतलेखावरलें दयासन झांकावें; यासाठीं कीं
तो न मरावा. १४ आणि त्याने खोंडाचें कांहीं
रक्त घेऊन तें आपल्या बोटाने दयासनावर पूर्वेस
शिंपडावें; आणि दयासनाच्या समोर कांहीं रक्त
आपल्या बोटाने सात वेळा शिंपडावें. १५ मग
लोकांसाठीं जो पापहारक यज्ञाचा बोकड, तो
त्याने कापावा; आणि त्याचें रक्त पडद्याच्या आंत
आणून, जसें खोंडाच्या रक्ताने केलें, तसें त्याच्या
रक्ताने करावें, ह्मणजे तें दयासनावर व दयासना
समोर शिंपडावें. १६ याप्रमाणें त्याने इस्राएलाच्या
संतानांच्या अशुद्धपणामुळें, आणि त्यांची उल्लंघनें
ह्मणजे त्यांचीं सर्व पापें यांमुळें पवित्र स्थानावि-
षयीं प्रायश्चित्त करावें; तसें त्यांच्यामध्यें त्यांच्या
अशुद्धपणांत राहणाऱ्या सभामंडपाविषयींहि करावें.
१७ आणि जेव्हां तो प्रायश्चित्त करायास पवित्र
स्थानामध्यें जातो, तेव्हां तो बाहेर येई तोंपर्यंत
कोणी माणूस सभामंडपांत नसावा; याप्रमाणें त्याने
आपल्याविषयीं व आपल्या घराण्याविषयीं व इ-
स्राएलाच्या सर्व मंडळीविषयीं प्रायश्चित्त करावें.
१८ मग त्याने परमेश्वराच्या समोरल्या वेदी
जवळ बाहेर येऊन त्याविषयीं प्रायश्चित्त करावें;
ह्मणजे खोंडाचें कांही रक्त व बोकडाचें कांहीं रक्त
घेऊन त्या वेदीच्या चहुंकडल्या शिंगांस लावावें.
१९ आणि तिजवर आपल्या बोटाने कांहीं रक्त
सात वेळां शिंपडून तिला इस्राएलाच्या विटाळां-
पासून शुद्ध करून पवित्र असें करावें. २०
तेव्हां पवित्र स्थानाविषयीं व सभामंडपाविषयीं
व वेदीविषयीं प्रायश्चित्त समाप्त केल्यावर, त्याने
तो जिवंत बोकड जवळ आणावा. २१ नंतर

आहरोनाने आपले दोन्ही हात जिवंत बोकडाच्या
डोक्यावर ठेवावे, आणि इस्राएलाच्या संतानांकडले
सर्व अन्याय व त्यांचीं सर्व उल्लंघनें, ह्मणजे त्यांचीं
सर्व पापें, तीं त्यावर पतकरून त्या बोकडाच्या
डोक्यावर ठेवावीं; मग योग्य माणसाच्या हातें
तो रानांत पाठवावा. २२ आणि त्या बोकडाने
आपल्यावर त्यांकडले सर्व अन्याय घेऊन ओ-
साड देशांत जावें; ह्मणजे त्याने तो बोकड रानांत
सोडावा. २३ मग आहरोनाने सभामंडपांत
येऊन, जीं जवसाचीं वस्त्रें आपण पवित्र स्थानांत
जातांना घातलीं होतीं, तीं काढून तेथें ठेवावीं. २४
आणि पवित्र स्थानांत आपले अंग पाण्याने धुऊन
आपलीं वस्त्रें घालावीं, मग बाहेर जाऊन आपल्या
साठीं होम व लोकांसाठीं होम करून आपल्या-
विषयीं व लोकांविषयीं प्रायश्चित्त करावें. २५
आणि वेदीवर पापहारक यज्ञपशूचें मांदें त्याने
जाळावें. २६ अणखी ज्याने सुटा बोकड असा
बोकड सोडून दिल्हा, त्याने पाण्याने आपलीं वस्त्रें
धुऊन आपलें अंग धुवावें, आणि त्यानंतर छाव-
णींत यावें. २७ आणि पापहारक यज्ञाचा खोंड
व पापहारक यज्ञाचा बोकड, ज्यांचें रक्त पवित्र
स्थानांत प्रायश्चित्त करायास आणलें होतें, ते ए-
काने छावणीच्या बाहेर न्यावे; मग त्यांचीं कातडीं
व त्यांचें मांस व त्यांची विष्टा त्यांनी अग्नीने
जाळावी. २८ आणि ज्याने तीं जाळिलीं, त्याने
पाण्याने आपलीं वस्त्रें धुऊन आपलें अंग धुवावें;
आणि त्यानंतर छावणींत यावें. २९ तर हा
तुह्मास सर्वकाळचा नेम असावा, कीं सातव्या
महिन्याच्या दाहाव्या दिवसीं तुह्मी आपल्या जि-
वांस दुःख लावून घ्यावें, आणि कांहींच काम करूं
नये; स्वदेशीय त्या तुह्मी आणि तुह्मामध्यें राह-
णाऱ्या विदेश्याने करूं नये. ३० कारण कीं
त्याच दिवसीं तुह्मास शुद्ध करायास तुह्माविषयीं
प्रायश्चित्त तो करील; यासाठीं कीं तुह्मी आपल्या
सर्व पापांपासून परमेश्वरासमोर शुद्ध व्हावें.
३१ तो दिवस तुह्मास पूर्ण विसाव्याचा असावा;
आणि तुह्मी आपल्या जिवांस दुःख लावून घ्या; हा
सर्वकाळचा नेम आहे. ३२ आणि ज्याला आ-
पल्या बापाच्या ठिकाणीं याजकपण करण्यासाठीं
अभिषेक व संस्कार होईल, त्या याजकाने प्राय-
श्चित्त करावें; तेव्हां त्याने जवसाचीं वस्त्रें, ह्मणजे
तीं पवित्र वस्त्रें घालावीं. ३३ आणि त्याने प-
रम पवित्र स्थानाविषयीं प्रायश्चित्त करावें, आणि
सभामंडपाविषयीं व वेदीविषयीं प्रायश्चित्त क-
रावें; अणखी याजकांविषयीं व मंडळींतल्या सर्व
लोकांविषयीं त्याने प्रायश्चित्त करावें. ३४ हा
तुह्मास सर्वकाळचा नेम असावा कीं प्रतिवर्षांत
एकदां इस्राएलाच्या संतानांचीं सर्व पापें आण्या-
साठीं त्यांविषयीं प्रायश्चित्त असावें." तेव्हां जसी
परमेश्वराने मोशाला आज्ञा दिल्ही, तसें त्याने
केलें.

## अध्याय १७.

अणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं, आहरोन, व त्याचे पुत्र, व इस्राए-
लाचीं संतानें त्यांस बोलून असें सांग, 'जी गोष्ट
परमेश्वराने आज्ञा करून सांगितली ती हीच आ-
हे. ३ इस्राएलाच्या घराण्यांतला जो कोणी माणूस
गुराला किंवा मेंढराला किंवा शेरडाला छावणींत
कापील किंवा छावणीबाहेर कापिल, ४ आणि
परमेश्वराच्या मंडपासमोर सभामंडपाच्या दारीं
परमेश्वराला अर्पण करायास तें आणणार
नाहीं, त्या माणसाला हत्येचा दोष लागेल;
त्याने रक्त पाडिलें, यास्तव तो माणूस आपल्या
लोकांतून छेदलाच जाईल. ५ हें यासाठीं कीं
इस्राएलाचीं संतानें आपले जे यज्ञपशू रानांत
अर्पितात, ते त्यांनी आणावे; परमेश्वरापासींच
सभामंडपाच्या दारीं याजकाजवळ ते आणावे,
आणि शांतिकारक यज्ञ करून ते परमेश्वरा-
ला अर्पावे. ६ ह्मणजे याजकाने त्यांचें रक्त
सभामंडपाच्या दारीं परमेश्वराच्या वेदीवर
शिंपडावें; आणि परमेश्वरापासीं शांतिकारक सु-
वासासाठीं मांदें जाळावें. ७ असें त्यांनी, ज्या
भुतांच्या मागें लागून त्यांनी व्यभिचार केला,
त्यांस आपले यज्ञ अणखी न करावे; हा त्यांस
पिढोपिढीं सर्वकाळचा नेम असावा. ८ आणि
तूं त्यांस सांग कीं, 'इस्राएलाचें घराणें यांतला,
व तुमच्यामध्यें राहणारे विदेशी यांतला, जर
कोणी माणूस होमपशु किंवा यज्ञपशु अर्पितो,
९ आणि त्याला परमेश्वराला अर्पायास सभा-

मंडपाच्या दारीं आणणार नाहीं, तर तो माणूस
आपल्या लोकांतून छेदला जाईल. १० आणि
इस्राएलाचें घराणें यांतला, व तुमच्यामध्यें राहणारे
विदेशी यांतला, जर कोणी माणूस कांहीं रक्त
खाईल, तर त्या रक्त खाणाऱ्या मनुष्यावर मी
आपली दृष्टि लावीन, आणि त्याला त्याच्या लो-
कांतून छेदीन. ११ कारण कीं देहाचें जिवन
रक्तामध्यें आहे, आणि तुमच्या जिवांविषयीं वेदीवर
प्रायश्चित्त करायास म्या तें तुह्मास दिल्हें आहे;
कां तर जिवासाठीं प्रायश्चित्त रक्तामध्यें आहे. १२
यास्तव म्या इस्राएलाच्या संतानांस सांगितलें कीं,
तुमच्यांतल्या कोणत्याहि मनुष्याने रक्त खाऊं
नये; तुमच्यामध्यें राहणारा विदेशी यानेंहि रक्त
खाऊं नये. १३ आणि इस्राएलाच्या संतानांतील
व तुमच्यामध्यें राहणाऱ्या विदेश्यांतील कोणी मा-
णूस जर खायाच्या पारधपशूला किंवा पांखराला
शिकार करून धरील, तर त्याने त्याचें रक्त का-
ढून मातीने झांकावें. १४ कां तर सर्व देहांचें
रक्त तें त्याचें त्याचें जिवन आहे; त्याच्या जिवना-
साठीं; तैंच आणि म्या इस्राएलाच्या संतानांस
सांगितलें कीं, सर्व देहाचें रक्त त्यांचें जिवन आहे,
यावरून तुह्मी कोणत्याहि देहाचें रक्त खाऊं नका;
जे तें खातील त्यांतील प्रत्येक छेदला जाईल. १५
आणि देशस्थांतील व विदेश्यांतील कोणी मनुष्य
जर आपोआप मेलेलें किंवा फाडून मारलेलें खा-
ईल, तर त्याने पाण्याने आपलीं वस्त्रें धुऊन अं-
घूळ करावी; आणि सांजपर्यंत अशुद्ध असावें,
मग तो शुद्ध होईल. १६ परंतु जर तो तीं धूत
नाहीं, आणि अंघूळ करीत नाहीं, तर तो आपला
अन्याय सोसील."

## अध्याय १८.

आणखी परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस बोलून त्यांस
सांग, मी परमेश्वर तुमचा देव आहें; ३ ज्या
मिसर देशांत तुह्मी राहत होतां, तेथल्या चालीं-
प्रमाणें तुह्मी करूं नका; आणि ज्या खनान देशांत
मी तुह्मास नेतों, तेथल्या चालींप्रमाणें तुह्मी करूं
नका; त्यांच्या नेमांप्रमाणेंहि चालूं नका. ४ तुह्मी
माझे न्याय आचरा, आणि माझ्या नेमणुकी
पाळून त्यांप्रमाणें चाला; मी परमेश्वर तुमचा
देव आहें. ५ तुह्मी माझ्या नेमणुकी व माझे
न्याय पाळाच; कां कीं जर कोणी माणूस ते आ-
चरील, तर तो त्यांकडून वांचेल; मी परमेश्वर
आहें. ६ तुह्मांतील कोणीएकाने आपल्या नातलगाचें
गुह्य उघडें करायास जवळ जाऊं नये; मी परमे-
श्वर आहें. ७ तूं आपल्या बापाचें गुह्य व आप-
ल्या आईचें गुह्य उघडें करूं नको; ती तुझी आई,
तिचें गुह्य उघडें करूं नको. ८ तूं आपल्या
बापाच्या बायकोचें गुह्य उघडें करूं नको; तें
तुझ्या बापाचेंच गुह्य आहे. ९ तूं आपल्या बहि-
णीचें गुह्य उघडें करू नको; आपल्या बापाची कन्या
किंवा आपल्या आईची कन्या घरीं जन्मलेली, किंवा
बाहेर जन्मलेली, अशांचें गुह्य उघडें करूं नको.
१० तूं आपल्या पुत्राच्या कन्येचें गुह्य, किंवा आ-
पल्या कन्येच्या कन्येचें गुह्य उघडें करूं नको;
कां तर तें तुझेंच गुह्य आहे. ११ तूं आप-
ल्या बापाच्या बायकोच्या कन्येचें गुह्य उघडें करूं
नको; ती तुझ्या बापापासून जन्मलेली, तुझी
बहीण, यास्तव तिचें गुह्य उघडें करूं नको.
१२ तूं आपल्या आतेचें गुह्य उघडें करूं नको;
ती तुझ्या बापाची नातलग आहे. १३ तूं आ-
पल्या आईच्या बहिणीचें गुह्य उघडें करूं नको;
कां तर ती तुझ्या आईची नातलग आहे. १४
तूं आपल्या बापाच्या भावाचें गुह्य उघडें करूं
नको; त्याच्या बायकोजवळ जाऊं नको; ती तु-
झी चुलती आहे. १५ तूं आपल्या सुनेचें गुह्य
उघडें करूं नको; ती तुझ्या पुत्राची बायको,
तिचें गुह्य उघडें करूं नको. १६ तूं आपल्या
भावाच्या बायकोचें गुह्य उघडें करूं नको; तें
तुझ्या भावाचें गुह्य आहे. १७ कोणीएका स्त्रीचें
गुह्य उघडें केलें असतां तिच्या कन्येचें गुह्य उघडें
करूं नको; तिच्या पुत्राच्या कन्येचें व तिच्या
कन्येच्या कन्येचें गुह्य उघडें करायास तूं त्यांस
करून घेऊं नको; त्या तिच्या नातलग आहेत;
तो दुर्विचार आहे. १८ आणि तूं कोणी स्त्री
तिच्या बहिणीवर ती जिवंत आहे तोंपर्यंत करून
घेऊं नको; कारण कीं इच्यासुद्धां तिचें गुह्य उघड
करून इला त्रास होईल. १९ आणि बायको-
च्या विटाळांत तिचें गुह्य उघडें करून तूं तिच्या

जवळ जाऊं नको· २० आणि तूं आपल्या शे-
जाऱ्याच्या बायकोशीं संग करणें, हा विटाळ तिज-
कडून करवूं नको· २१ आणि तूं आपलें कांहीं
संतान अग्नींतून चालवून मोलेख देवाला देऊं
नको; आपल्या देवाचें नाम भ्रष्ट करूंच नको,
मी परमेश्वर आहें· २२ आणि स्त्रीजवळ नि-
जण्याप्रमाणें तूं पुरुषाजवळ निजूं नको; तें अमं-
गळ आहे· २३ आणि तूं कोणत्याहि पशूंशीं
संग करणें, हा विटाळ त्याकडून करूं नको; स्त्री-
नेंहि पशूंशीं संग करायास सिद्ध होऊं नये, ती
घालमेल आहे· २४ अशा कोणत्याहि प्रकारें
तुह्मी अशुद्ध होऊं नका; कां तर जीं राष्ट्रें मी
तुमच्या समोरून घालवितों, तीं तशा अवघ्या प्र-
कारें अशुद्ध झालीं· २५ आणि देश अशुद्ध झाला,
यास्तव मी त्याचा अन्याय त्यावर लागूं करितो,
असा तो देश आपल्या राहणाऱ्यांस ओकून टाकि-
तो· २६ तर तुह्मी माझ्या नेमणुकी व माझे
न्याय पाळा, आणि त्या अमंगळ कामांतलें कोण-
तेंहि करूं नका; तुह्मी देशस्थ करूं नका, आणि
तुमच्यामध्यें राहणारा जो विदेशी त्यानेहि करूं
नये· २७ कारण कीं देशांतल्या तुमच्या पूर्वी-
च्या माणसानी तीं सर्व अमंगळ कामें केलीं; त्या-
मुळें तो देश अशुद्ध झाला आहे· २८ तुमच्या
पूर्वी ज्या प्रजा होत्या त्यांस जसें देशाने ओकून
टाकिलें, तसें तुह्मी त्याला अशुद्ध केल्यावर, तो
तुह्मासहि ओकून टाकील· २९ कारण कीं जे
प्राणी या अमंगळ कामांतलें कोणतेंहि करितील,
ते सर्व करणारे मनुष्य आपल्या लोकांतून छेदले
जातील· ३० यास्तव जें म्या पाळायास सांगितलें
तें तुह्मी पाळा; ह्मणजे ज्या अमंगळ रीतीप्रमाणें
तुमच्यापूर्वी जे होते त्यांनी केलें त्यांतल्या कोण-
त्याहि रीतीप्रमाणें करूं नये; आणि त्यांच्या
योगाने तुह्मी अशुद्ध होऊं नये; मी परमेश्वर
तुमचा देव आहें."

## अध्याय १९.

आणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ तूं इस्राएलाच्या संतानांच्या सर्व स-
मुदायाजवळ बोलून त्यांस सांग, 'तुह्मी पवित्र
असा; कारण कीं मी परमेश्वर तुमचा देव
पवित्र आहें· ३ तुह्मी सर्व आपापल्या आई-
चें व आपापल्या बापाचें भय धरा, आणि माझे
शाब्बाथ दिवस पाळा; मी परमेश्वर तुमचा
देव आहें. ४ तुह्मी मूर्त्तींकडे वळूं नका, आ-
णि आपल्यांसाठीं ओतीव देव करूं नका; मी
परमेश्वर तुमचा देव आहें· ५ आणि जेव्हां
तुह्मी परमेश्वरासाठीं शांतिकारक यज्ञ करितां,
तेव्हां आपल्या इच्छेने तो करा· ६ तुह्मी यज्ञ
कराल त्या दिवशीं व त्याच्या दुसऱ्या दिवशीं
त्यांतलें खावें; मग तिसऱ्या दिवशीं जें राहिलेलें
तें अग्नींत जाळावें· ७ आणि तिसऱ्या दिवशीं
जर कांहीं खाल्लें, तर तें अमंगळ आहे; मान्य
होणार नाहीं· ८ आणि जे तें खातील त्यां-
तला प्रत्येक आपला अन्याय सोसील; कां तर
त्याने परमेश्वराचा पवित्र पदार्थ विटाळिला;
यास्तव तो मनुष्य आपल्या लोकांतून छेदला
जाईल. ९ आणि जेव्हां तुह्मी आपल्या देशांतलें
पीक कापितां, तेव्हां तूं आपलें सगळें शेत कांठां-
सुद्धां कापूं नको, आणि आपलें पीक काढून घेत-
ल्यावर वेंचूं नको. १० आपला द्राक्षाचा मळा-
हि संपूर्ण खुडूं नको; आणि आपल्या द्राक्षमळ्या-
ची पड वेंचूं नको; तें दरिद्र्यासाठीं व विदेश्या-
साठीं ठेव; मी परमेश्वर तुमचा देव आहें·
११ तुह्मी चोरी करूं नका, आणि लबाडी करूं
नका, आणि एकमेकांशीं कपट करूं नका· १२ आ-
णि तुह्मी माझ्या नामाने खोटी शपथ वाहूं नका,
आणि तूं आपल्या देवाचें नाम भ्रष्ट करूं नको;
मी परमेश्वर आहें· १३ तूं आपल्या शेजाऱ्यावर
जुलूम करूं नको, आणि नाडूं नको; कामकऱ्याची
मजुरी आपल्याजवळ सकाळपर्यंत राहूं देऊं नको·
१४ बहिऱ्याला शिवी देऊं नको, आणि अंधळ्या-
पुढें ठेंचाड ठेवूं नको; आपल्या देवाचें भय धर;
मी परमेश्वर आहें· १५ तुह्मी न्याय करण्यांत
अन्याय करूं नका; तूं दरिद्र्यांचा पक्ष अंगीकारूं
नको, मोठ्याचेंहि भय धरूं नको; तूं नीतीने
आपल्या शेजाऱ्याचा न्याय कर· १६ तूं आप-
ल्या लोकांमध्यें चहाडी करीत फिरूं नको; आ-
पल्या शेजाऱ्याचा रक्तपात करण्याविषयीं उद्युक्त
होऊं नको; मी परमेश्वर आहें· १७ तूं आ-
पल्या मनांत आपल्या भावाचा द्वेष करूं नको;

आपल्या शेजाऱ्याला बोध करच कर, आणि त्या-
वर पाप राहूं देऊं नको. १८ तूं सूड उगवूं
नको, आणि आपल्या लोकांतल्या वंशस्थांवर द्वेष
करूं नको; तर आपल्यासारिखी आपल्या शेजा-
ऱ्यावर प्रीति कर; मी **परमेश्वर** आहें. १९
तुह्मी माझे नेम पाळा; तूं आपल्या पशूंची भिन्न
जातींसीं भेळ होऊं देऊं नको; आपल्या शेतांत
नाना धान्य भेळून पेरूं नको; नाना प्रकारच्या
सुतांचें वस्त्र तुझ्या अंगावर नसावें. २० अण-
खी जी स्त्री दासी असून पुरुषाला वाग्दत्त झाली,
आणि खंडून सोडविलेली नाहीं, आणि जिला मो-
कळीक दिल्ही नाहीं, तिजसीं जर कोणी संग करील,
तर शासन व्हावें, परंतु त्यांस जिवें न मारावें,
कारण कीं ती मोकळी नव्हती. २१ आणि त्याने
आपल्या दोषामुळें दोषहारक यज्ञासाठीं एडका
**परमेश्वरा**जवळ सभामंडपाच्या दारीं आणा-
वा. २२ मग याजकाने तो दोषकारक यज्ञाचा
एडका घेऊन त्याच्यासाठीं त्याने केलेल्या पापा-
विषयीं **परमेश्वरा**समोर प्रायश्चित्त करावें; ह्मणजे
त्याने केलेल्या पापाची क्षमा त्याला होईल.

२३ आणि जेव्हां तुह्मी त्या देशांत पोहंचून
खाण्याचीं सर्व प्रकारचीं झाडें लावाल, तेव्हां त्या-
चें फळ अशुद्ध असें मोजा; तीन वर्षें तें असुंता
असें तुह्मास असावें, तें खायाचें नाहीं. २४ मग
चवथ्या वर्षीं त्याचीं सर्व फळें **परमेश्वराला** उ-
त्साहासाठीं पवित्र व्हावीं. २५ आणि पांचव्या वर्षीं
तुह्मी त्याचीं फळें खावीं; अशाने तें आपलें उ-
त्पन्न तुह्मास फार देईल; मी **परमेश्वर** तुमचा
देव आहें. २६ तुह्मी रक्तासुद्धां कांहीं खाऊं
नका; मारूड्याचें कर्म करूं नका, आणि अभा-
ळावरून मांत्रिकी करूं नका. २७ तुह्मी आप-
ल्या डोक्याचे केंस कापून गोल करूं नका, आणि
तूं आपल्या दाढीचा कांठ मोडूं नको. २८ अण-
खी मेल्यामुळें तुह्मी आपल्या अंगाला घाव देऊं
नका, आणि आपल्यावर गोंदण्याचें लेखन करूं
नका; मी **परमेश्वर** आहें. २९ तूं आपल्या
कन्येला कळवांतीण होऊं देण्याने भ्रष्ट करूं नको;
नाहीं तर देश व्यभिचारी होईल, आणि दुष्टप-
णाने देश भरेल. ३० तुह्मी माझे शाब्बाथ पाळा,
आणि माझ्या पवित्र स्थानाचें भय धरा; मी **पर-
मेश्वर** आहें. ३१ तुह्मी भूतसंचारिणींकडे वळूं
नका, आणि ज्यादुकऱ्यांजवळ विचारूं नका, ह्म-
णजे त्यांकडून अशुद्ध होऊं नका; मी **परमेश्वर**
तुमचा देव आहें. ३२ ज्याचे केंस पिकलेले
त्याच्यासमोर तूं उठून उभा राहा, आणि वडि-
लाला मान दे, आणि आपल्या देवाचें भय धर;
मी **परमेश्वर** आहें. ३३ अणखी जेव्हां वि-
देशी तुमच्या देशांत तुह्माजवळ राहतो, तेव्हां
तुह्मी त्याला जाचूं नका. ३४ जो विदेशी तुम-
च्याजवळ राहतो, तो तुमच्यांतला देशस्थासारि-
खा तुह्मास असावा, आणि जसी तूं आपल्यावर
प्रीति करितोस, तसी त्यावर कर; कारण कीं
तुह्मीहि मिसर देशांत विदेशी होतां; मी **परमे-
श्वर** तुमचा देव आहें. ३५ तुह्मी न्यायांत,
परिणामांत, जोखण्यांत, व मापांत अन्याय करूं
नका. ३६ तुमची तराजु यथार्थ, वजन यथार्थ,
कैलीमाप यथार्थ, आणि रसमाप यथार्थ, असीं
असावीं; ज्याने तुह्मास मिसर देशांतून काढिलें,
तो मी **परमेश्वर** तुमचा देव आहें. ३७ तर
माझे सर्व नेम व माझे सर्व न्याय तुह्मी पाळा; आ-
णि त्याप्रमाणें आचरण करा, मी **परमेश्वर** आहें."

## अध्याय २०.

अणखी परमेश्वराने मोशाला असें सांगिलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असेंहि
सांग, इस्राएलाच्या संतानांतला व इस्राएलामध्यें
राहणारे विदेशी यांतला जो कोणी आपलें कांहीं
संतान मोलेखाला देईल, त्याला मारावेंच मारावें;
देशांतल्या लोकानी त्याला धोंडमार करावा. ३
आणि मी आपली दृष्टि त्या माणसावर लावून
त्याला त्याच्या लोकांतून छेदून टाकीन; कारण
कीं त्याने आपलें कांहीं संतान मोलेखाला दिल्हें,
येणेंकरून त्यानें माझी पवित्र भूमि विटाळिली,
आणि माझें पवित्र नाम भ्रष्ट केलें. ४ आणि जेव्हां
तो आपलें कांहीं संतान मोलेखाला देतो, तेव्हां
त्याला न मारावें ह्मणून जर देशांतले लोक त्या
माणसाविषयीं आपले डोळे झांकितात, ५ तर
मी आपली दृष्टि त्या माणसावर व त्याच्या कु-
टुंबावर लावून त्याला आणि त्याला अनुसरून जे
व्यभिचार करून मोलेखाचा आश्रय करितात,

त्या सर्व व्यभिचाऱ्यांस त्यांच्या लोकांतून छेदून
टाकीन. ६ आणि जर कोणी मनुष्य भूतसंचारिणीं-
कडे किंवा जादूकऱ्यांकडे वळून त्यांच्या बरोबर
व्यभिचार करील, तर त्या मनुष्यावर मी आपली
दृष्टि लावून त्याला त्याच्या लोकांतून छेदून टा-
कीन. ७ तर तुह्मी आपणांस पवित्र करून पवित्र
असा; कारण कीं मी **परमेश्वर** तुमचा देव आहें.
८ आणि तुह्मी माझे नेम संभाळून त्यांप्रमाणें
आचरण करा; जो तुह्मास पवित्र करितो, तो मी
**परमेश्वर** आहें. ९ जर कोणी माणूस आपल्या
बापाला किंवा आपल्या आईला शाप देईल, तर
त्याला मारावेंच मारावें; त्याने आपल्या बापाला
किंवा आपल्या आईला शाप दिल्हा, त्याचा रक्त-
पात त्यावर व्हावा. १० आणि जर कोणी कोणा-
च्या स्त्रीसीं व्यभिचार करील, तर त्याने आपल्या
शेजाऱ्याच्या स्त्रीसीं व्यभिचार केला आहे; या-
स्तव त्या व्यभिचाऱ्याला व त्या व्यभिचारिणीला
मारावेंच मारावें. ११ आणि जर कोणी आपल्या
बापाच्या स्त्रीजवळ निजतो, तर त्याने आपल्या
बापाचें गुह्य उघडें केलें आहे; त्या दोघांसहि
मारावेंच मारावें, त्यांचा रक्तपात त्यांवर व्हावा.
१२ आणि जर कोणी आपल्या सुनेजवळ निजतो,
तर त्या दोघांसहि मारावेंच मारावें; त्यानी घाल-
मेल केली आहे; त्यांचा रक्तपात त्यांवर व्हावा.
१३ आणि जर कोणी स्त्रीजवळ निजण्याप्रमाणें
पुरुषाजवळ निजतो, तर त्यानी अमंगळ काम
केलें आहे; त्या दोघांस मारावेंच मारावें; त्यांचा
रक्तपात त्यांवर व्हावा. १४ आणि जर कोणी
स्त्रीला तिच्या आईसुद्धां करून घेतो, तर ही
दुष्टाई; त्याला व त्या दोघींस अग्नींत जाळून टा-
कावें; असी तुह्मी आपल्यामध्यें दुष्टाई होऊं देऊं
नका. १५ आणि जर कोणी पशूसीं संग करितो
तर त्याला मारावेंच मारावें, आणि लोकानी पशू-
लाहि जिवें मारावें. १६ आणि जर स्त्री कोण-
त्याहि पशूसीं संग करायास त्याजवळ जाती, तर
त्या स्त्रीला व त्या पशूला तूं जिवें मार; त्यांस
मारावेंच मारावें; त्यांचा रक्तपात त्यांवर व्हावा.
१७ आणि जर कोणी आपली बहीण, आपल्या
बापाचीच कन्या किंवा आपल्या आईची कन्या, ह्य-
ला घेऊन हिचें गुह्य पाहतो, आणि तीहि त्याचें
गुह्य पाहती, तर तो अधर्म; तीं आपल्या वंशस्थ लो-
कांच्या समक्ष छेदलीं जातील; त्याने आपल्या बहि-
णीचें गुह्य उघडें केलें आहे; त्याने आपला अन्याय
सोसावा. १८ आणि जर कोणी विटाळशी स्त्री-
जवळ निजतो, तर तो तिचें गुह्य व तिच्या गुह्या-
चा उभड उघडा करितो, तीहि आपल्या रक्ता-
चा उभड उघडा करिती, यास्तव त्या दोघांसहि
त्यांच्या लोकांतून छेदलें जावें. १९ आणि तूं
आपल्या मावशीचें किंवा आपल्या आतेचें गुह्य
उघडें करूं नको; कारण कीं जर कोणी असें करितो,
तर तो आपली नातलग नागवी करितो; असांनी
आपला अन्याय सोसावा. २० आणि जर कोणी
आपल्या चुलतीजवळ निजतो, तर तो आपल्या
चुलत्याचें गुह्य उघडें करितो; त्यानी आपलें पाप
सोसावें; तीं अनपत्य मरतील. २१ आणि जर
कोणी आपल्या भावाची स्त्री घेतो, तर हें अमंगळ
आहे; त्याने आपल्या भावाचें गुह्य उघडें केलें
आहे; तीं अनपत्य होतील. २२ ह्मणून तुह्मी माझे
सर्व नेम व माझे सर्व न्याय संभाळून त्यांप्रमाणें
आचरण करा; ह्मणजे ज्या देशांत राहण्यासाठीं
मी तुह्मास नेतों, तो तुह्मास ओकून टाकणार
नाहीं. २३ आणि ज्या राष्ट्रांस मी तुमच्या पुढून
घालवितों, त्यांच्या नेमांप्रमाणें तुह्मी चालूं नका;
कारण कीं त्यानी तीं अवघीं कर्मे केलीं आहेत;
यास्तव मी त्यांविषयीं कंटाळलों आहें. २४
आणि म्या तुह्मास सांगितलें आहे कीं, तुह्मी
त्यांची भूमि वतन करून घ्या, मीहि तुह्मास ती
वतन करून देईन; दूध व मध वाहणारा असा तो
देश आहे; ज्याने तुह्मास अन्य लोकांपासून भिन्न
केलें, तो मी **परमेश्वर** तुमचा देव आहें. २५
ह्मणून शुद्ध व अशुद्ध पशु यांचा, आणि अशुद्ध
व शुद्ध पांखरूं यांचा तुह्मी भेद करा; आणि
पशु व पांखरूं व जें कांहीं भूमीवरून चालतें,
ज्याला अशुद्धपणामुळें म्या तुह्मापासून वेगळें केलें,
तेणेकरून तुह्मी आपले जीव ओंगळ करूं नका.
२६ आणि तुह्मी माझ्यासाठीं पवित्र असा; का-
रण कीं मी **परमेश्वर** पवित्र आहें; आणि तुह्मी
माझे असावे ह्मणून म्या तुह्मास अन्य लोकांपासून
वेगळें केलें आहे. २७ आणि भूत बाळगणारीं
किंवा जादू करणारीं असीं पुरुष किंवा स्त्रिया यांत

कोणी असलीं तर त्यास मारावेंच मारावें; त्यास
धोंडमार करावा; त्यांचा रक्तपात त्यांवर होवो."

## अध्याय २१.

आणखी परमेश्वराने मोशाला सांगितलें कीं,
"तूं आहरोनाचे पुत्र जे याजक त्यांजवळ
बोलून त्यास असें सांग कीं, कोणी आपल्या लोकां-
तल्या मेल्याचा विटाळ घेऊं नये; २ परंतु आप-
ला जवळचा नातलग, ह्मणजे आपली आई व
आपला बाप व आपला पुत्र व आपली कन्या व
आपला भाऊ यांचा घ्यावा; ३ आणि नवरा न
केलेली असी जी कुमारी आपल्या जवळची ब-
हीण, तिचाहि त्याने विटाळ घ्यावा. ४ मुख्याने
आपल्या लोकांमध्यें विटाळ करून घेऊं नये, कां
तर तो भ्रष्ट होईल. ५ त्यानी आपल्या डोक्या-
वर टकल करूं नये, आणि आपल्या दाढीचा कांठ-
हि मुंडूं नये, आणि आपल्या देहावर घावाचें
चिन्ह करूं नये. ६ त्यानी आपल्या देवासाठीं
पवित्र असावें; आपल्या देवाचें नाम भ्रष्ट करूंच
नये; कां तर ते परमेश्वराचीं अर्पणें, आपल्या
देवाचें अन्न असीं अर्पणें अर्पीत असतात; ह्मणून
त्यानी पवित्र असावें. ७ त्यानी वेश्या किंवा भ्रष्ट
स्त्री करून घेऊं नये; जी स्त्री आपल्या नवऱ्याने
घालविलेली, तीहि करून घेऊं नये; कां तर ते सर्व
आपल्या देवासाठीं पवित्र असावे. ८ ह्मणून तूं
त्याला पवित्र मोज, कां कीं तो तुझ्या देवाचें अन्न
अर्पीत असतो; तो तुला पवित्र असावा; कारण
कीं जो परमेश्वर तुह्मास पवित्र करितो, तो
मी पवित्र आहें. ९ आणि कोणत्याहि याजका-
ची कन्या जर व्यभिचार करून भ्रष्ट होती, तर
ती आपल्या बापाला भ्रष्ट करिती; ती अग्नींत
जाळावी. १० आणि जो आपल्या भावांतला
मुख्य याजक, ज्याच्या मस्तकावर अभिषेकाचें
तेल ओतलें, ज्याला वस्त्रें ल्यावयास संस्कारहि
झाला, त्याने आपलें मस्तक उघडें करूं नये, आ-
णि आपलीं वस्त्रें फाडूं नये; ११ आणि कोण-
तेंहि मेल्याचे शरीराजवळ जाऊं नये; आपला
बाप किंवा आपली आई यांचाहि त्याने विटाळ
घेऊं नये. १२ आणि पवित्र स्थानांतून जाऊं नये,
आणि आपल्या देवाच्या पवित्र स्थानाला विटाळूं
नये; कारण कीं त्याच्या देवाचा मुगुट व अभि-
षेकाचें तेल त्यावर आहे; मी परमेश्वर आहें.
१३ आणि त्याने स्त्री कुमारीच करून घ्यावी.
१४ विधवा, किंवा घालविलेली, किंवा भ्रष्ट, किंवा
वेश्या, ह्या त्याने करून घेऊं नये; केवळ आपल्या
लोकांतली कुमारी असी नवरी करावी. १५ आ-
णि त्याने आपल्या लोकांमध्यें आपलें संतान भ्रष्ट
करूं नये; कारण कीं जो त्याला शुद्ध करितो, तो
मी परमेश्वर आहें." १६ आणखी परमेश्वराने
मोशाजवळ बोलून सांगितलें, १७ "तूं आहरो-
नाला असें सांग कीं, 'तुझ्या संतानाच्या पिढोपिढीं
कोणाला अंगदोष असेल, तर त्याने आपल्या
देवाचें अन्न अर्पायास जवळ येऊं नये. १८
ह्मणजे कोणी अंगदोषी न यावा; जो अंधळा,
किंवा लंगडा, अथवा नकटा, किंवा जो अंगाने उणा
किंवा अधिक असेल, १९ अथवा जो माणूस हात
किंवा पाय मोडका असेल; २० अथवा कुबडा,
किंवा खुजट, किंवा डोळेविकारी, किंवा त्याचें अंग
खरबरित, किंवा जो गजकर्णी, किंवा अंडफुटी; २१
असा आहरोन याजकाच्या संतानांत कोणत्याहि
माणसाला अंगदोष, त्याने परमेश्वराला जीं अ-
र्पायाचीं तीं अर्पायास जवळ येऊं नये; त्याला
अंगदोष, यास्तव त्याने आपल्या देवाचें अन्न अर्पा-
यास जवळ न यावें. २२ त्याने परम पवित्रांतलें
आणि साधारण पवित्रांतलें असें जें आपल्या दे-
वाचें अन्न तें त्याने खावें. २३ परंतु पडद्याच्या
आंत त्याने न यावें, आणि वेदीजवळ न यावें;
कारण कीं त्याला अंगदोष आहे; तर त्याने माझीं
जीं पवित्र तीं विटाळूं नये; कारण कीं जो त्यास
पवित्र करितो, तो मी परमेश्वर आहें." २४
नंतर मोशाने आहरोनाला व त्याच्या पुत्रांस व
इस्राएलाच्या सर्व संतानास असेंच सांगितलें.

## अध्याय २२.

आणखी परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं आहरोनाला व त्याच्या पुत्रांस
याप्रमाणें सांग, त्यानी इस्राएलाच्या संतानाच्या
पवित्र वस्तूंपासून वेगळें राहावें, आणि जेव्हां ते
माझ्यासाठीं कांहीं पवित्र करितात, तेव्हां त्यानी
माझें पवित्र नाम भ्रष्ट करूं नये; मी परमेश्वर

आहें. २ आणि त्यांस सांग कीं, तुमच्या पिढ्ये-
पिढीं तुमच्या सर्व संतानांतला जर कोणी माणूस
आपली अशुद्धता आपल्या अंगीं असतांना, पवित्र
वस्तूंजवळ, ह्मणजे ज्या वस्तू इस्राएलाचीं संतानें
परमेश्वरासाठीं पवित्र करितात, त्यांजवळ येतो,
तर तो मनुष्य माझ्या समोरून छेदलाच जाईल; मी
परमेश्वर आहें. ४ आहरोनाच्या संतानांतला जो
कोणी कोडी किंवा स्रावी, तो शुद्ध होई तोंपर्यंत
त्याने पवित्र पदार्थ खाऊं नये; आणि जो मेल्यामुळें
अशुद्ध त्याला, किंवा ज्या माणसापासून धातुपात
होतो त्याला जो शिवतो, ५ किंवा ज्या कोणत्याहि
जंतूकडून माणूस अशुद्ध होतो त्याला किंवा कोण-
त्याहि अशुद्धपणाने अशुद्ध झालेल्या माणसाला
शिवतो; ६ जो कोणी अशाला शिवतो, तो
सांजपर्यंत अशुद्ध असावा, आणि त्याने पवित्रांतलें
कांहीं खाऊं नये; परंतु पाण्याने आपलें अंग धुवावें,
७ मग सूर्य मावळल्यावर तो शुद्ध होईल; नंतर
त्याने पवित्रांतलें खावें, का तर तेंच त्याचें अन्न
आहे. ८ त्याने शव, आपोआप मेलेलें किंवा फाडून
मारलेलें, खाऊं नये; कां कीं तेणेकरून तो अशुद्ध
होईल; मी परमेश्वर आहें. ९ तर जें म्या
सांगण्यास सांगितलें, तें त्यानी पाळावें; नाहीं तर
त्यानी कांहीं पवित्र विटाळल्यावरून त्याविषयीं
पाप सोसून त्यामुळें ते मरतील; जो त्यांस शुद्ध
करितो, तो मी परमेश्वर आहें. १० आणि
कोणत्याहि परक्याने पवित्र पदार्थ खाऊं नये; या-
जकाजवळ राहणारा व कामकरी यानेहि पवित्र
पदार्थ खाऊं नये. ११ परंतु जर याजक कोणा-
ला विकत घेतो, तर तो त्याच्या पैक्याचा माल
आहे, त्याने तें खावें; आणि त्याच्या घरीं जन्म-
लेले, यानीहि त्याचें अन्न खावें. १२ परंतु या-
जकाची कन्या जर परक्यांतल्या नवऱ्याला दिल्हे-
ली आहे, तर तिने पवित्रांचें अर्पण खाऊं नये.
१३ तथापि याजकाची कन्या जर विधवा, किंवा
नवऱ्याने घालविलेली आहे, आणि तिला संतान
नाहीं, आणि ती आपल्या बाळपणाप्रमाणें आपल्या
बापाच्या घरीं परत आली, तर तिने आपल्या बा-
पाचें अन्न खावें; परंतु कोणी परक्याने तें खाऊं
नये. १४ आणि जर कोणी चुकून पवित्र पदार्थ
खातो, तर त्याने त्याचा पांचवा वांटा त्यांत घा-
लून याजकाला द्यावा. १५ कां तर इस्राएलाच्या
संतानांचे पवित्र पदार्थ जे परमेश्वराला अर्पितात,
ते त्यानी विटाळूं नये. १६ आणि त्यांचे जे पवित्र
पदार्थ ते खाल्ल्यावरून त्यानी आपल्यावर अन्या-
याचा दोष आणून घेऊं नये; कारण कीं जो त्यांस
पवित्र करितो, तो मी परमेश्वर आहें."

१७ आणखी परमेश्वराने मोशाला असें
सांगितलें कीं, १८ "तूं आहरोनाला व त्याच्या
पुत्रांस व इस्राएलाच्या सर्व संतानांजवळ बोलून
त्यांस सांग, 'इस्राएलाच्या घराण्याचे लोक व इस्रा-
एलांत राहणारे त्यांतील जे आपापलें अर्पण करि-
तात, ते कोणीहि असोत, त्यांच्या नवसांचीं सर्व
अर्पणें व त्यांच्या स्वबुद्धीचीं सर्व अर्पणें यांत जें
त्यानी होमासाठीं परमेश्वराला करावें, १९
तें तुह्मी आपल्या इच्छेने गुरांतला किंवा मेंढरां-
तला किंवा शेरडांतला सांगोपांग नर, असें अर्पावें.
२० ज्या कशाला खोड, तें तुह्मी अर्पूं नका; कां
तर तें तुमच्यासाठीं मान्य होणार नाहीं. २१
आणि जेव्हां कोणी नवस फेडायासाठीं किंवा
स्वबुद्धीच्या अर्पणासाठीं गुरांतला किंवा बकऱ्यां-
तला शांतिकारक यज्ञपशु परमेश्वराला अर्पितो,
तेव्हां तो प्रसन्नतेसाठीं सांगोपांग असावा; कांहीं
खोड त्याला नसावी. २२ अंधळा, किंवा मो-
डका, किंवा घायाळ, किंवा टेंगळी, किंवा खरजुला,
किंवा नायटेकरी, असे परमेश्वराला तुह्मी अर्पूं
नका; आणि त्यांतलें अर्पण परमेश्वरासाठीं वे-
दीवर ठेवूं नका. २३ तरी गुरूं किंवा बकरें
जें अंगाने अधिक किंवा उणें, तें स्वबुद्धीचें अर्पण
खा करावें, परंतु नवसासाठीं तें मान्य होणार नाहीं.
२४ आणि ठेंचलेलें, किंवा बडविलेलें, किंवा थोटें,
किंवा चिरलेलें, असें परमेश्वराला तुह्मी अर्पूं
नका; तुह्मी आपल्या देशांत असें करूं नकाच.
२५ परक्या वंशस्थाच्या हातांतून देखील त्या
कशांतलेंहि आपल्या देवाचें अन्न अर्पूं नका; कारण
कीं त्यांचें नासकें त्यांमध्यें आहे; त्यांस खोड
आहे; ती तुह्माविषयीं मान्य होणार नाहींत."
२६ आणखी परमेश्वराने मोशाला असें सांगि-
तलें कीं, "२७ गुरूं किंवा मेंढरूं, किंवा शेरडूं,
जन्मल्यानंतर सात दिवस आपल्या आईच्या खालीं
असावें मग आठव्या दिवसीं आणि पुढें परमे-

श्वराजवळच्या अर्पणासाठीं मान्य होईल. २८
आणि गुरूं किंवा शेरडुं याला त्याच्या वत्सासुद्धां
एक्याच दिवसीं तुह्मी कापूं नका. २९ आणि
जेव्हां तुह्मी **परमेश्वरा**जवळ आभार मानण्याचा
यज्ञ करितां, तेव्हां आपल्या इच्छेने करा. ३०
त्याच दिवसीं त्यांतलें खावें; त्यांतलें कांहीं सका-
ळपर्यंत तुह्मी ठेवूं नका; मी **परमेश्वर** आहें.
३१ अशा माझ्या आज्ञा संभाळून त्यांप्रमाणें करा;
मी **परमेश्वर** आहें. ३२ तर तुह्मी माझें पवित्र
नाम भ्रष्ट करूं नका; कां कीं इस्राएलाच्या
संतानांमध्यें मला पवित्र मानिलें पाहिजे; जो
तुह्मास पवित्र करितो, तो मी **परमेश्वर**. ३३
ज्याने तुमचा देव होण्यासाठीं तुह्मास मिसर-
देशांतून काढिलें, तो मी **परमेश्वर** आहें."

## अध्याय २३.

आणखी **परमेश्वराने** मोशेयाला असें सांगितलें
कीं, २ तूं इस्राएलाच्या संतानांजवळ बोलून
त्यांस सांग, **परमेश्वराचे** पर्वकाळ ते पवित्र मेळा
मिळविण्याचे काळ असे तुह्मी प्रगट करावे, ते पर्व-
काळ हेच. ३ साहा दिवस काम करावें, परंतु
सातव्या दिवसीं विसांव्याचा शाब्बाथ व पवित्र
मेळा असावा; त्यांत तुह्मी कांहीं काम करूं नका;
तो तुमच्या सर्व ठिकाणीं **परमेश्वरासाठीं** शा-
ब्बाथ असावा. ४ हे **परमेश्वराचे** पर्वकाळ,
पवित्र मेळांचे जे यथाकाळीं तुह्मी प्रगट करावे, ते
असे; ५ पहिल्या महिन्यांतल्या शुद्ध चतुर्द-
शीस संध्याकाळपासून **परमेश्वरासाठीं** वल्हांडण
सण असावा. ६ आणि त्याच महिन्याच्या पंध-
राव्या दिवसापासून **परमेश्वरासाठीं** बेखमीर
भाकरीचा सण असावा; सात दिवस तुह्मी बेखमीर
भाकरी खा. ७ पहिल्या दिवसीं तुमचा पवित्र
मेळा असावा; तुह्मी संसाराचें कांहीं काम करूं
नका. ८ आणि सात दिवस तुह्मी **परमेश्वराला**
अर्पण वाहा; सातव्या दिवसीं पवित्र मेळा असावा;
तुह्मी संसाराचें कांहीं काम त्यांत करूं नका."
९ आणखी **परमेश्वराने** मोशेयाला असें सांगि-
तलें कीं, १० "तूं इस्राएलाच्या संतानांजवळ
बोलून त्यांस सांग, जो देश मी तुह्मास देतों,
त्यांत जेव्हां तुह्मी पोहंचाल आणि त्यांतलें पीक
कापाल, तेव्हां आपल्या पिकाची पहिली पेंढी या-
जकाजवळ आणा. ११ आणि तुह्मावर प्रसन्नता
होण्यासाठीं **परमेश्वरासमोर** पेंढी ओंवाळावी;
शाब्बाथाच्या दुसऱ्या दिवसीं याजकाने ती ओं-
वाळावी. १२ आणि ज्या दिवसीं तुह्मी पेंढी
ओंवाळितां, त्या दिवसीं होमासाठीं पहिल्या वर्षां-
तला सांगोपांग मेंढा **परमेश्वराला** अर्पा. १३
आणि त्यासंगतींचा नैवेद्य, चोथ्याच्या दाहा वां-
ट्यांतले दोन वांटे सपीठ, तेलाने मळलेलें, असें
अर्पण **परमेश्वराला** शांतिकारक सुगंध होण्या-
साठीं करावें; आणि त्यासंगती पेय अर्पणासाठीं
पावशेर द्राक्षरस अर्पावा. १४ तर त्याच दिवसा-
पर्यंत, ह्मणजे तुह्मी आपल्या देवाला अर्पण कराल
तोंपर्यंत भाकर किंवा भाजलेलें धान्य किंवा हिरवें
धान्य खाऊं नये; हा तुमच्या सर्व ठिकाणीं तुम-
च्या पिढोपिढीं सर्वकाळचा नेम आहे. १५ आणि
शाब्बाथाच्या दुसऱ्या दिवसापासून, ह्मणजे तुह्मी
ओंवाळायाची पेंढी आणितां त्या दिवसापासून
आपल्यांसाठीं दिवस मोजा; सात शाब्बाथ पूर्ण
व्हावे. १६ सातव्या शाब्बाथाच्या दुसऱ्या दिव-
सापर्यंत पन्नास दिवस मोजा; मग **परमेश्व-
राला** नवा नैवेद्य अर्पा. १७ तुह्मी आपल्या
वस्तींतून ओंवाळायाच्या दोन भाकरी आणा; त्या
चोथ्याच्या दाहा वाट्यांतले दोन वांटे सपीठ,
याच्या असाव्या; खमीर घालून भाजाव्या; **पर-
मेश्वराला** पहिल्या उत्पन्नांतलें असें हें अर्पण
आहे. १८ आणि त्या भाकरींसंगतीं पहिल्या
वर्षांतले सांगोपांग सात मेंढे व एक तरणा खोंड
व दोन एडके अर्पा; **परमेश्वराला** त्यांचा होम
व्हावा; त्यांच्या संगतींचा नैवेद्य, व त्यांच्या संग-
तींचें पेय अर्पणाहि व्हावें; **परमेश्वराला** शांति-
कारक सुगंध असें अर्पण आहे. १९ आणि तुह्मी
पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक बोकड व
शांतिकारक यज्ञासाठीं पहिल्या वर्षांतले दोन मेंढे
अर्पा; २० ह्मणजे हे प्रथम उत्पन्नांच्या भाकरीं-
सहित याजकाने ओंवाळावे; त्या भाकरी दोन
मेंढ्यांसहित **परमेश्वरासमोर** ओंवाळणीसाठीं
आहेत; आणि **परमेश्वराला** याजकासाठीं
पवित्र असाव्या. २१ आणि पवित्र मेळा मि-
ळविण्याचा काळ व्हावा ह्मणून त्याच दिवसीं

तुम्ही तो प्रगट करा; संसाराचें कांहीं काम करूं
नका; हा तुमच्या सर्व वस्त्यांत तुमच्या पिढोपिढीं
सर्वकाळचा नेम आहे· २२ आणि जेव्हां तुम्ही
आपल्या देशांतलें पीक कापाल तेव्हां तूं आपल्या
कापण्यांत आपलें शेत पूर्ण काठांपर्यंत कापूं नको;
आणि आपल्या पिकाची वेंचणी करूं नको; तें
दरिद्र्यासाठीं व विदेश्यासाठीं ठेव; मी **परमेश्वर**
तुमचा देव आहें·" २३ अणखी **परमेश्वराने**
मोशाला असें सांगितलें कीं, २४ "तूं इस्राए-
लाच्या संतानांस असें सांग कीं, सातव्या महि-
न्याच्या प्रतिपदेस तुम्हाला विसांवा आणि करणा
वाजविण्याच्या सुचविण्याने पवित्र मेळा व्हावा;
२५ त्यांत तुम्ही संसाराचें कांहीं काम करूं नका,
परंतु **परमेश्वराला** अर्पण करा·" २६ आणि
**परमेश्वराने** मोशाला असें सांगितलें कीं, २७
"अणखी त्याच सातव्या महिन्याच्या शुद्धदशमी-
चा दिवस तुम्हास प्रायश्चित्ताचा व पवित्र मेळा
मिळविण्याचा असावा; आणि तुम्ही आपल्या
जिवांस दुःख लावून घ्या; **परमेश्वराला** अर्पण-
हि करा· २८ आणि तो सर्व दिवस कांहीं काम
करूं नका; कारण कीं तुमचा देव **परमेश्वर** या-
समोर तुम्हाविषयीं प्रायश्चित्त करायास तो दिवस
प्रायश्चित्ताचा आहे· २९ अणखी जर कोणी
मनुष्य त्या दिवसांत दुःख लावून घेणार नाहीं,
तर तो आपल्या लोकांतून छेदला जाईल· ३०
आणि जर कोणी मनुष्य त्या दिवसांत कांहीं
काम करील, तर मी त्याच्या लोकांतून त्या मनु-
ष्याचा नाश करीन· ३१ तुम्ही कांहीं काम
करूं नका; हा तुमच्या पिढोपिढीं तुमच्या सर्व
वस्त्यांत सर्वकाळचा नेम आहे· ३२ तो तुम्हा-
ला विसांव्याचा शाब्बाथ असावा, आणि तुम्ही
आपल्या जिवांस दुःख लावून घ्या; त्या महिन्या-
च्या नवमीस संध्याकाळीं आरंभ करून संध्याका-
ळापासून संध्याकाळपर्यंत तुम्ही आपला शाब्बाथ
विसांवा पाळा·" ३३ अणखी **परमेश्वराने**
मोशाला असें सांगितलें कीं, ३४ "तूं इस्राए-
लाच्या संतानांस असें सांग कीं त्याच सातव्या
महिन्याच्या पंधराव्या दिवसापासून सात दिवस
**परमेश्वरासाठीं** मंडपांचा सण व्हावा· ३५
पहिल्या दिवसीं पवित्र मेळा व्हावा; तुम्ही सं-
साराचें कांहीं काम करूं नका· ३६ सात दिवस
**परमेश्वराला** अर्पण करा; आठव्या दिवसीं
तुमचा पवित्र मेळा व्हावा, आणि तुम्ही **परमेश्व-
राला** अर्पण करा; ती पवित्र सभा, तुम्ही संसा-
राचें कांहीं काम करूं नका· ३७ **परमेश्वराचे**
जे पर्वकाळ तुम्ही जाहीर करून पवित्र मेळा मि-
ळवावा, ते हेच; त्यांत होम व नैवेद्य व यज्ञ व
पेय अर्पणें, असीं **परमेश्वराला** अर्पणें दिवसोदि-
वसाच्या नेमाप्रमाणें करावीं· ३८ **परमेश्वराचा**
शाब्बाथ व तुमचीं दानें व तुमचे सर्व नवस व
तुम्ही आपल्या स्वबुद्धीने जीं **परमेश्वराला** द्याल,
त्या सर्वांशिरीज हे असावे· ३९ आणि तुम्ही
देशांतलें उत्पन्न गोळा केल्यावर सातव्या महि-
न्याच्या पंधराव्या दिवसापासून सात दिवस **पर-
मेश्वराचा** सण करा; पहिल्या दिवसीं विसांवा,
आणि आठव्या दिवसीं विसांवा व्हावा· ४०
तेव्हां पहिल्या दिवसीं तुम्ही आपल्यासाठीं शो-
भायमान झाडांचीं फळें, खारकी झावळ्या, व
पालवट झाडांच्या फांद्या, व नदीजवळचीं वाळुंजें
घेऊन, तुमचा **देव परमेश्वर** यासमोर सात
दिवस उत्सव करा· ४१ याप्रमाणें प्रतिवर्षी
सात दिवस **परमेश्वराचा** सण करा; हा तुम-
च्या पिढोपिढीं सर्वकाळचा नेम आहे, सातव्या
महिन्यांत हा सण करीत जा· ४२ सात दिवस
मंडपांमध्यें राहा; इस्राएलांतल्या सर्व देशस्थानी
मंडपांमध्यें राहावें· ४३ म्हणजे म्या इस्राएलाच्या
संतानांस मिसर देशांतून काढिलें, तेव्हां म्या
त्यांस मंडपांमध्यें ठेविलें, असें तुमच्या पिढ्यांतील
लोक जाणतील; मी **परमेश्वर** तुमचा **देव**
आहें·" ४४ याप्रमाणें मोशाने इस्राएलाच्या
संतानांस **परमेश्वराचे** पर्वकाळ सांगितले·

## अध्याय २४·

अणखी **परमेश्वराने** मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असी
आज्ञा दे; उजेडासाठीं दीप लावायास त्यानीं कुटून
काढलेलें जाइतांचें निवळ तेल तुझ्याजवळ आ-
णावें· ३ संकेतलेखाच्या पडद्याबाहेर सभामंडपांत
आहरोनाने तें मांडून सायंकाळापासून सकाळपर्यंत
**परमेश्वरासमोर** सर्वकाळ ठेवावें; हा तुमच्या

पिढोपिढीं सर्वकाळचा नेम असावा. ४ त्याने
दिव्याच्या शुद्ध झाडावर दिवे परमेश्वरासमोर
सर्वकाळ ठेवावे. ५ आणि तूं सपीठ घेऊन त्याच्या
बारा पोळ्या भाज; एक एक पोळी चोव्याच्या
दाहा वांट्यांतून दोन वांट्यांची असावी. ६ आणि
त्यांच्या दोन पंक्ती करून एकएका पंक्तींत साहा
अशा परमेश्वरासमोर शुद्ध मेजावर ठेव. ७
आणि एकएका पंक्तीवर स्वच्छ धूप ठेव; ह्मणजे
तो त्या भाकरींवर परमेश्वराला सुचवणीचें अ-
र्पण असा होईल. ८ तर शाब्बाथाच्या दिवशीं
त्याने असें परमेश्वरासमोर नित्य मांडून ठेवावें;
हें इस्राएलाच्या संतानांकडून सर्वकाळच्या करा-
राने असें असावें. ९ आणि त्या भाकरी आह-
रोनाच्या व त्याच्या पुत्रांच्या व्हाव्या, आणि त्या-
नी पवित्रस्थानांत त्या खाव्या; कां तर त्या परम
पवित्र, परमेश्वराच्या अर्पणांतून त्याच्या आहेत;
हा सर्वकाळचा नेम आहे."

१० आणखी इस्राएली स्त्रीचा पुत्र बाहेर गेला;
तो तर इस्राएलाच्या संतानांमध्यें राहत होता प-
रंतु त्याचा बाप मिसरी होता; मग त्या इस्राएली-
चा पुत्र व एक इस्राएली माणूस, यांनी छावणींत
भांडण केलें. ११ तेव्हां त्या इस्राएली स्त्रीच्या
पुत्राने परमेश्वराच्या नामाला दुर्भाषण बोलून
शिवी दिल्ही; नंतर त्यांनी त्याला मोश्याजवळ
आणिलें; त्याच्या आईचें नांव तर शलोमीथ;
ती दानाच्या वंशातला दिब्री याची कन्या होती.
१२ आणि त्यांनी आपणास परमेश्वराचा ठराव
कळावा ह्मणून त्याला बंदांत ठेविलें. १३ तेव्हां
परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, १४
"ज्याने शिवी दिल्ही, त्याला छावणीच्या बाहेर
घेऊन जा, आणि सर्व ऐकणाऱ्यांनी आपले हात
त्याच्या डोक्यावर ठेवावे; मग सर्व समुदायाने
त्याला धोंडमार करावा. १५ आणि तूं इस्राएला-
च्या संतानांस असें सांग कीं, जर कोणी माणूस
आपल्या देवाला शिवी देईल तर त्याने आपल्या
पापाचें फळ भोगावें. १६ ह्मणजे जो परमेश्व-
राच्या नामाला दुर्भाषण बोलतो त्याला मारा-
वेंच मारावें; सर्व समुदायाने त्याला धोंडमार करा-
वाच करावा; असा देशस्थ तसा विदेशी, जेव्हां
तो त्या नामाला दुर्भाषण बोलतो, तेव्हां त्याला
मारावें. १७ आणि माणूस जर कोणत्याहि मनु-
ष्याला जिवें मारील, तर त्याला मारावेंच मारावें.
१८ आणि जो दुसऱ्याच्या पशूला जिवें मारील,
त्याने पशूबदल पशु देऊन फेड करावी. १९
आणि कोणी जर आपल्या शेजाऱ्याला खोड करील,
तर जसें त्याने केलें, तसें त्याला करावें. २०
मोडण्याबदल मोडणें, डोळ्याबदल डोळा, दातां-
बदल दांत; कोणी जसी माणसाला खोड करील,
तसी त्याला करावी. २१ आणि जो दुसऱ्याच्या
पशूला मारील, त्याने त्याची फेड करावी; आणि
जो मनुष्याला मारील, त्याला मारावेंच. २२
तुह्मांसीं एक न्याय व्हावा; असा देशस्थ तसा
विदेशी असावा, कां कीं मी परमेश्वर तुमचा देव
आहें." २३ तेव्हां मोश्याने इस्राएलाच्या संता-
नांस सांगितलें; नंतर त्यांनी त्या शिवी देणाऱ्याला
छावणीच्या बाहेर काढून धोंड्यांनी त्याला मारिलें;
याप्रमाणें जसी परमेश्वराने मोश्याला आज्ञा
दिल्ही तसें इस्राएलाच्या संतानांनी केलें.

## अध्याय २५.

आणि सीना डोंगरावर परमेश्वराने मोश्या-
ला असें सांगितलें कीं, २ तूं इस्राए-
लाच्या संतानांजवळ बोलून त्यांस असें सांग जो
देश मी तुह्मास देतों, त्यांत जेव्हां तुह्मी पोहंचाल
तेव्हां परमेश्वरासाठीं शाब्बाथ असा देशाला वि-
सांवा असावा. ३ तूं साहा वर्षें आपलें शेत पेर;
साहा वर्षें आपला मळाहि खसी कर, आणि त्याचें
उत्पन्न जमा कर. ४ परंतु सातव्या वर्षी देशाला
विसांव्याचा शाब्बाथ, परमेश्वरासाठीं शाब्बाथ
व्हावा; तूं आपलें शेत पेरूं नको, आणि आपला
मळा खसी करूं नको. ५ आपलें जें सहज पीक
होतें तें कापूं नको, आणि खसी न केलेल्या आ-
पल्या वेलाचीं द्राक्षें तोडूं नको; देशाला विसांव्याचें
वर्ष व्हावें. ६ आणि देशाच्या शाब्बाथाचें उत्पन्न
तुह्मास खायास होईल; तुला व तुझ्या दासाला व
तुझ्या दासीला व तुझ्या कामकऱ्याला, व तुजसहित
जे राहतात त्यांतल्या तुझ्या विदेश्याला; ७ आणि
तुझ्या पशूला व तुझ्या देशांत जो रानपशु त्याला,
त्या देशांतलें सर्व उत्पन्न खायाला होईल. ८
आणखी तूं आपल्यासाठीं शाब्बाथरूप सात वर्षें

ह्मणजे सात सप्तक वर्षे मोज; असे वर्षांचे सात
शाब्बाथ यांचा काळ, एकुणपन्नास वर्षे तुला हो-
तील. ९ आणि सातव्या महिन्याच्या शुद्धदश-
मीस तूं करणा चहुंकडे वाजीव; प्रायश्चित्ताच्या
दिवसीं तुह्मी आपल्या सर्व देशांत करणा चहुं-
कडे वाजवीत फिरा. १० आणि पन्नासावें वर्ष
पवित्र करा, आणि देशांतल्या सर्व राहणाऱ्यांस
मोकळिक गाजवा; तें तुह्मास योबेल व्हावें, ह्म-
णजे तुह्मी सर्वांनी माघारें आपापल्या वतनावर परत
जावें, आणि सर्वांनी आपापल्या कुळांत परत जावें.
११ तें पन्नासावें वर्ष तुह्मास योबेल वर्ष व्हावें;
तुह्मी पेरूं नका, आणि त्यांत सहज पीक होतें तें
कापूं नका; त्यांत खसी न केलेल्या वेलाचीं द्रा-
क्षेंहि तोडूं नका. १२ कारण कीं तें योबेल तुह्मास
पवित्र व्हावें; त्यांतलें उत्पन्न शेतांतून काढून तुह्मी
खावें. १३ त्या योबेल वर्षांत तुह्मी सर्वांनी आपा-
पल्या वतनावर परत जावें. १४ आणि जेव्हां तुह्मी
आपापल्या शेजाऱ्याला विकत देतां, किंवा आपापल्या
शेजाऱ्याच्या हातांतून विकत घेतां, तेव्हां तुह्मी एक-
मेकाला जाचूं नका. १५ योबेलानंतर जीं वर्षे झा-
लीं त्यांच्या गणतीप्रमाणें तूं आपल्या शेजाऱ्याच्या
जवळून विकत घे; त्याने जितकीं वर्षे उत्पन्न होईल
त्याच्या गणतीप्रमाणें तुला विकत द्यावें. १६ वर्षे
जसीं बहुत असतील तसीं तूं एखाद्याचें मोल वा-
ढीव, आणि जसीं कमी असतील तसें एखाद्याचें
मोल कमी कर; कारण कीं उत्पन्नांच्या गणतीप्रमाणें
तो तुला विकत देतो. १७ याप्रमाणें तुह्मी सर्व आ-
पापल्या शेजाऱ्याला जाचूं नका; तर तूं आपल्या
देवाचें भय धर, कारण कीं मी परमेश्वर तुमचा
देव आहें. १८ तर तुह्मी माझे नेम पाळा;
माझे न्यायहि संभाळून त्यांप्रमाणें आचरण करा,
ह्मणजे तुह्मी त्या देशांत निर्भय राहाल. १९
आणि तो देश आपलें फळ देईल, आणि तु-
ह्मी तृप्तिपर्यंत खाल आणि त्यांत निर्भय राहाल.
२० आणि जर तुह्मी ह्मणाल कीं, 'आह्मी सा-
तव्या वर्षी काय खावें? पाहा, आह्मी पेरायाचें
नाहीं आणि आपलें उत्पन्न गोळा करायाचें नाहीं.'
२१ तर मी त्या साहाव्या वर्षी आपला आशी-
र्वाद तुह्मास देईन, आणि तें तीन वर्षांपुरतें उत्पन्न
देईल; २२ मग आठव्या वर्षी तुह्मी पेराल,
आणि नवव्या वर्षापर्यंत जुन्या उत्पन्नांतलें खाल;
याचें उत्पन्न येई तोंपर्यंत तुह्मी जुनें खाल.

२३ तो देश सर्वकाळपर्यंत विकायाचा नाहीं;
कारण कीं तो देश माझा आहे, आणि तुह्मी प्रवा-
सी व माझ्याजवळ राहणारे असे उपरी आहां.
२४ आणि तुह्मी आपल्या सगळ्या वतनी देशांत-
ल्या भूमीची खंडसुटका होऊं द्या. २५ जर तुझा
भाऊ गरीब होऊन आपलें कांहीं वतन विकतो,
तर त्याच्या जवळचा, त्याचा खंड भरणारा, याने
येऊन आपल्या भावाची विकरी खंडून सोडवावी.
२६ आणि जर कोणाला खंड भरणारा नाहीं,
परंतु तो आपल्या हाताने साधून आपल्या खंडा-
पुरतें मिळवितो, २७ तर त्याने आपलें विकल्या-
पासून वर्षे मोजून, ज्या माणसाला विकिलें त्याला
उरलेलें मोल भरून देऊन आपल्या वतनावर
परत जावें. २८ परंतु त्याचें फेडायास जर आ-
पल्या हाताने पुरतें मिळवत नाहीं, तर जें विकलें तें
ज्याने विकत घेतलें त्याच्या हातांत योबेल वर्षा-
पर्यंत राहावें; मग योबेलांत तें सुटावें, आणि
त्याने आपल्या वतनावर परत जावें. २९ आणि
ज्याला गांवकुसू आहे अशा नगरांतलें राहण्याचें
घर जर कोणी विकितो, तर तें विकल्यापासून पूर्ण
वर्षापर्यंत त्याची खंडणी व्हावी; त्याच्या खंड-
णीचा काळ तितकाच असावा. ३० परंतु त्या-
ची समाप्ति, ह्मणजे पूर्ण वर्ष होईपर्यंत जर खंड-
णी होत नाहीं, तर तें गांवकुसाच्या नगरांतलें घर
त्याच्या विकत घेणाऱ्याचें त्याच्या पिढोपिढीं सर्व-
काळपर्यंत असें स्थापित व्हावें; तें योबेलांत न
सुटावें. ३१ परंतु ज्या गांवांस गांवकुसूं नाहीं,
त्यांतलीं घरें देशांतल्या भूमीसारिखीं मोजावीं;
त्यांची खंडणी व्हावी आणि तीं योबेलांत सुटावीं.
३२ तथापि लेव्यांचीं नगरें, ह्मणजे त्यांचीं वतनी
नगरें, यांतल्या घरांची खंडणी लेव्यांकडून कधींहि
व्हावी. ३३ आणि लेव्यांतील कोणीहि खंडणी
देऊन सोडवावें, तर विकलेलें घर व त्या वंशाचें
वतनी नगर योबेलांत सुटावें; कारण कीं लेव्यांच्या
नगरांतलीं घरें, तीं इस्राएलाच्या संतानांमध्यें त्यांचें
वतन आहे. ३४ आणि त्यांच्या नगरांची शिवार-
भूमि विकायाची नाहीं, कां तर तें त्यांचें सर्व-
काळचें वतन आहे. ३५ आणि जर तुझा भाऊ

तुझ्याजवळ दरिद्री होतो आणि त्याचा हात चा-
लत नाहीं तर तो विदेशी किंवा प्रवासी असो, तरी
तूं त्याला असा आधार दे कीं त्याने तुझ्या शेजारीं
वागावें. ३६ तूं त्यापासून व्याज व वर्त्ताळा घेऊं
नको, तर आपल्या **देवाला** भिऊन तूं आपल्या
शेजारीं आपल्या भावाला जगूं दे. ३७ तूं आ-
पला पैका त्याला व्याजाने देऊं नको, आणि आ-
पलें अन्न वाढीने घालूं नको. ३८ तुमचा **देव**
व्हावा ह्मणून ज्याने तुह्मास **कनान** देश देण्या-
साठीं तुह्मास **मिसर** देशांतून काढिलें, तोच मी
**परमेश्वर** तुमचा **देव** आहें. ३९ आणि जर
तुझा भाऊ तुझ्याजवळ दरिद्री झाला आणि तुला
विकत मिळाला, तर तूं त्याकडून दासाचें काम
करवूं नको. ४० तो मजूरदारासारिखा आणि
प्रवास्यासारिखा तुझ्याजवळ असावा; योबेल वर्षा-
पर्यंत त्याने तुझ्याजवळ चाकरी करावी. ४१
मग त्याने व त्यासहित त्याच्या लेंकरानी तुझ्या-
जवळून निघून आपल्या कुळांत परत जावें, आणि
आपल्या वडिलांच्या वतनावरहि परत जावें. ४२
कारण कीं ज्यांस म्यां **मिसर** देशांतून काढिलें ते
माझे चाकर आहेत; त्यांचा दासाप्रमाणें विक्रय
न व्हावा. ४३ तूं त्यांवर कठोरपणाने धनीपण
करूं नको; तर तूं आपल्या **देवाला** भी. ४४
आणि तुझा दास व तुझी दासी जीं तीं तुमच्या
चहुंकडल्या राष्ट्रांतलीं असावीं; त्यांपासून तुह्मी
चाकर किंवा चाकरीण विकत घ्यावी. ४५ आ-
णि जीं कुटुंबें तुमच्या देशांत होऊन तुह्माजवळ
असतील त्यांतलीं, आणि त्यांचीं जीं कुटुंबें तुमच्या
जवळ असतील, ज्यांस तुमच्या देशांत प्रसवतील,
त्यांतलीं तुह्मी विकत घ्यावीं, आणि तीं तुह्मास
वतनी व्हावीं. ४६ आणि तुह्मी त्यांस आपल्या
मागें आपल्या लेंकरांसाठीं वतनधन असें ठेवावें,
त्यांस चाकरींत सर्वकाळ घालावें; परंतु आपले भाऊ
**इस्राएलाचीं** संतानें यांतल्या कोणावर ह्मणजे आ-
पल्या भावावर कठोरपणाने धनीपण करूं नये.
४७ आणि तुझ्या शेजारीं राहणारा विदेशी किंवा
प्रवासी, जर तो द्रव्यवान झाला, आणि त्याजवळ
राहणारा तुझा भाऊ तो दरिद्री झाला, आणि
तुझ्या शेजारीं राहणारा विदेशी त्याला किंवा त्या
विदेश्याचा कुळफांटा त्यांत त्याचा विक्रय झाला,
४८ तर त्याचा विक्रय झाल्यावर त्याची खंडणी
भरून सुटका व्हावी; त्याच्या कोणीएका भावाने
त्याची खंडणी भरून सुटका करावी. ४९ ह्मणजे
त्याच्या चुलत्याने किंवा त्याच्या चुलतभावाने त्याची
खंडणी भरून सुटका करावी; किंवा त्याच्या कुळां-
तल्या त्याच्या देहाच्या नातलगाने त्याची खंडणी
भरून सुटका करावी; अथवा त्यांचा हात चालत
असल्यास त्याने आपलीच खंडणी भरावी. ५०
तेव्हां त्याने आपल्याला विकत घेणाऱ्याजवळ, आ-
पल्याला त्याने घेतलें त्या वर्षापासून योबेल वर्षा-
पर्यंत हिशोब करावा, आणि त्याच्या विकण्याचा
पैका वर्षांच्या गणतीप्रमाणें व्हावा; मजूरदाराच्या
दिवसांप्रमाणें त्याचा हिशोब व्हावा. ५१ तित-
क्यांत जर बहुत वर्षे उरतील, तर त्याने त्यांच्या
संख्येप्रमाणें आपल्या विकण्याचें जें मोल त्याची
बाकी आपल्या सुटकासाठीं फेडावी. ५२ आणि
योबेल वर्षापर्यंत जर थोडकीं वर्षे राहतील, तर
त्याने त्याजवळ गणना तसी करावी; आपल्या वर्षां-
च्या संख्येप्रमाणें त्याने आपला खंड भरावा. ५३
तो मजूरदारासारिखा वर्षोवर्ष त्याजवळ असावा;
त्यावर तुझ्या देखत त्याने कठोरपणानें धनीपण करूं
नये. ५४ आणि याप्रमाणें जर त्याची खंडणी होत
नाहीं, तर योबेल वर्षांत तो आणि त्याच्यासंगतीं
त्याचीं लेंकरें सुटावीं. ५५ कारण कीं **इस्राएला-
चीं** संतानें माझे चाकर; म्या त्यांस **मिसर** दे-
शांतून काढिलें, यास्तव ते माझे चाकर आहेत;
मी **परमेश्वर** तुमचा **देव** आहें."

## अध्याय २६.

तुह्मी आपल्यासाठीं खोटे देव व कोरीव मूर्त्ति
करूं नका, आणि आपल्यासाठीं स्तंभरूप देव
उभारूं नका, आणि धोंड्याचा कांहीं आकार
त्याला भजावें, ह्मणून आपल्या देशांत स्थापूं नका,
कारण कीं मी **परमेश्वर** तुमचा **देव** आहें. २
तुह्मी माझे शाब्बाथ पाळा; आणि माझ्या पवित्र-
स्थानाची मर्यादा राखा, मी **परमेश्वर** आहें. ३
जर तुह्मी माझ्या नेमांप्रमाणें चालाल, आणि
माझ्या आज्ञा संभाळून त्याप्रमाणें आचरण कराल,
४ तर मी तुमच्यासाठीं पाऊस यथाकाळीं पाडीन,
आणि भूमि आपलें उत्पन्न देईल; शेतमळ्यांतलें

झाडहि आपलें फळ देईल. ५ आणि तुमची मळणी
द्राक्षांच्या तोडणीपर्यंत चालेल, द्राक्षांची तोडणीहि
पेरणीपर्यंत चालेल; आणि तुह्मी आपलें अन्न तृप्ति-
पर्यंत खाल आणि आपल्या देशांत निर्भय राहाल.
६ तेव्हां मी देशाला सुख देईन, आणि तुह्मी नि-
जाल तेव्हां कोणापासून तुह्मास भय होणार नाहीं;
दुष्ट श्वापदेंहि देशांतून मी नाहींसे करीन, आणि
तरवार तुमच्या देशांत चालणार नाहीं. ७ आणि
तुह्मी आपल्या शत्रूंच्या पाठीस लागाल तेव्हां ते तु-
मच्या पुढें तरवारीनें पडतील. ८ तुमच्यांतले पांच
शंभरांच्या पाठीस लागतील, आणि तुमच्यांतले
शंभर दाहा हजारांच्या पाठीस लागतील, आणि
तुमचे शत्रू तुमच्या पुढें तरवारीने पडतील. ९ आ-
णि मी तुह्मावर कृपादृष्टि लावीन, आणि तुह्मास
सफळ करून तुह्मास वाढवीन, आणि मी आपला
करार तुह्मासीं स्थापित करीन. १० आणि जुन्यांत-
लें जुनें तुह्मी खाल; नव्यामुळें जुनें दूरहि कराल.
११ आणि मी आपली वस्ति तुमच्यामध्यें करीन;
माझा जीव तुमचा कंटाळा करणार नाहीं. १२
आणि मी तुमच्यामध्यें चालेन, आणि तुमचा देव
असा होईन, आणि तुह्मी माझे लोक असे व्हाल.
१३ परमेश्वर जो तुमचा देव, ज्याने तुह्मास
मिसर देशांतून तेथें तुह्मी चाकर न राहावे ह्मणून
काढिलें, तो मी आहें; म्या तुमच्या जूंच्या शिवळी
मोडिल्या, आणि तुह्मास मोकळें चालविलें आहे.
१४ अणखी जर तुह्मी माझें न ऐकाल आणि ह्या
सर्व आज्ञा न पाळाल, १५ आणि जर माझ्या नेमां-
चा धिक्कार कराल, आणि जर तुमचा जीव माझ्या
न्यायांचा असा कंटाळा करील कीं माझ्या सर्व आ-
ज्ञा न पाळल्याने तुह्मी माझा करार मोडाल, १६
तर मीहि तुह्मास असें करीन कीं धास्ती, क्षयरोग,
व ताप, डोळ्यांस क्षयकारक व जिवाला तळमळका-
रक, असी शिक्षा तुह्मास करीन, आणि तुह्मी आपलें
बीं व्यर्थ पेराल, कां कीं तुमचे शत्रू त्याचें उत्पन्न
खातील. १७ आणि मी आपलें लक्ष तुह्माला प्रति-
कूळ असें करीन, तेव्हां शत्रूंसमोर तुमचा नाश
होईल; तुमचे शत्रू तुह्मावर धनीपणहि करितील,
आणि कोणी तुमच्या पाठीस लागला नसतांहि तुह्मी
पळाल. १८ आणि इतकीं असतांहि जर तुह्मी
माझें ऐकणार नाहीं, तर मी तुमच्या पापांमुळें या-
पेक्षां तुह्मास सातपट शिक्षा करीन. १९ आणि
तुमच्या बळाचा गर्व मोडीन, आणि तुमचें आकाश
लोखंडासारिखें व तुमची भूमि तांब्यासारिखी क-
रीन. २० तेव्हां तुमची शक्ति खर्चली तरी व्यर्थ
होईल, कां तर तुमची भूमि आपलें उत्पन्न देणार
नाहीं, भूमीचें झाडहि आपलें फळ देणार नाहीं.
२१ आणि जर तुह्मी माझ्याविरुद्ध चालाल आणि
माझें ऐकणार नाहीं, तर तुमच्या पापांप्रमाणें तुह्मा-
वर यापेक्षां सातपट दुःखें करीन. २२ आणि
तुह्मावर रानांतले पशू मी सोडीन, मग ते तुह्मास
निर्वंश करितील, तुमचीं गुरेंहि नाहींसीं करून
तुह्मास थोडकें करितील, आणि तुमचे मार्ग ओस
होतील. २३ तेव्हां जर इतक्यानी तुह्मी मज-
कडून बोधित होणार नाहीं, आणि माझ्याविरुद्ध
चालाल, २४ तर मीहि तुमच्याविरुद्ध चालेन,
आणि मीच तुमच्या पापांमुळें तुह्मास त्यापेक्षां
सातपट शिक्षा करीन. २५ ह्मणजे मी तुह्मावर
तरवार चालवीन; ती माझ्या कराराविषयीं सूड
घेईल; तेव्हां तुह्मी आपल्या नगरांत एकत्र मिळा-
लां ह्मणजे मी तुमच्यामध्यें मरी पाठवीन, आणि
तुह्मी शत्रूंच्यास्वाधीन व्हाल. २६ जेव्हां मी
तुमची अन्नरूप काठी मोडीन, तेव्हां दाहा स्त्रिया
तुमची भाकर एका पाकभटींत भाजतील आणि
तुमची भाकर तोलून माघारें देतील, आणि तुह्मी
खाऊन तृप्त होणार नाहीं. २७ आणि जर इत-
क्यानी तुह्मी माझें न ऐकून माझ्याविरुद्ध चालाल,
२८ तर मी रागाने तुह्माविरुद्ध चालेन, आणि
मीच तुमच्या पापांमुळें तुह्मास त्यापेक्षां सातपट
शिक्षा करीन. २९ तेव्हां तुह्मी आपल्या पुत्रांचें
मांस खाल, आपल्या कन्यांचेंहि मांस तुह्मी खाल.
३० आणि मी तुमचीं उंच स्थानें ओसाड करीन;
तुमच्या मूर्त्ती नाहींशा करीन, आणि तुमचीं मढीं
तुमच्या तांदळ्यांच्या मंढ्यांवर टाकून देईन, आणि
माझा जीव तुमचा कंटाळा करील. ३१ मी
तुमचीं नगरेंहि ओसाड करीन; आणि तुमचीं
पवित्रस्थानें उजाड करीन; तुमच्या शांतिकारक
सुगंधाचा वासहि मी घेणार नाहीं. ३२ आणि
मी तो देश असा उजाड करीन कीं त्यांतले राह-
णारे जे तुमचे शत्रु, ते त्याविषयीं विस्मित होतील.
३३ आणि मी राष्ट्रांमध्यें तुमची दाणादाण करून

तुमच्या पाठीमागें तरवार उपसीन; मग तुमच्या
देशाची उजाडी होईल, तुमचीं नगरेंहि ओसाड
होतील. ३४ तेव्हां तो देश उजाडपणाच्या सर्व
दिवसांत आपले शाब्बाथ भरून घेईल, आणि
तुह्मी आपल्या शत्रूंच्या देशांत राहाल; तेव्हां तो
देश निवांत राहील, आणि आपले शाब्बाथ भरून
घेईल. ३५ तो उजाड असतो त्या सर्व दिवसांत
निवांत होईल; कां तर तुह्मी त्यांत राहिलां तेव्हां
तो तुमच्या शाब्बाथांत निवांत राहिला नाहीं.
३६ आणि तुमच्यांतून जे उरतील, ते आपल्या
शत्रूंच्या देशांत राहतील तेव्हां त्यांच्या मनांत मीं
असें भय घालीन कीं हालणाऱ्या पानाचा शब्द
त्यांस पळवील; तरवारीच्या धाकाने पळण्यासारिखें
पळतील, आणि पाठीस कोणी लागला नसतांहि पड-
तील. ३७ आणि कोणी पाठीस लागला नसतांहि
ते तरवारीच्या पुढें पळत असल्यासारिखे एकमे-
कावर ठेंचळतील, आणि तुमच्या शत्रूंपुढें तुमचें
टिकणें होणार नाहीं. ३८ असे तुह्मी राष्ट्रांमध्यें
नाश पावाल, कां तर तुमच्या शत्रूंचा देश तुह्मास
खाऊन टाकील. ३९ आणि तुमच्यांतून जे उर-
तील, ते आपल्या अन्यायामुळें तुमच्या शत्रूंच्या
देशांमध्यें क्षीण होऊन जातील; आणि आपल्या
वडिलांच्या अन्यायांमुळेंहि त्यांप्रमाणें क्षीण होऊन
जातील. ४० परंतु त्यानी आपण माझा जो अति-
क्रम केला, त्यांत आपला अन्याय व आपल्या व-
डिलांचा अन्याय जर ते असा पत्करितील कीं
आपण माझ्याविरुद्ध चाललां खरे, ४१ म्याहि
त्यांविरुद्ध चालून त्यांस त्यांच्या शत्रूंच्या देशांत
आणिलें आहे; सारांश, जर त्यांचें असुंती हृदय
तेव्हां नम्र होईल, आणि ते तेव्हां आपला अन्याय
पदरीं घेतील, ४२ तर मी याकोबासीं जो माझा
करार तो आठवीन, आणि इझाकासींहि जो माझा
करार व आब्राहामासींहि जो माझा करार तो आ-
ठवीन, आणि तो देश आठवीन. ४३ जरी तो
देश त्यानी सोडलेला असा झाला, आणि त्यां-
विरहित उजाड असतांना आपले शाब्बाथ भरून
घेईल, आणि ते आपला अन्याय पदरीं घेतील;
कारण काय? तर याच कारणामुळें कीं त्यानी माझे
न्याय धिक्कारिले आणि माझ्या नेमांस त्यांचा जीव
कंटाळला. ४४ तरी असें असतांहि ते आपल्या
शत्रूंच्या देशांत राहतील, तेव्हां मी त्यांची समाप्ति
करावी आणि त्यांसीं म्या केलेला करार मोडावा,
असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं आणि त्यांचा
कंटाळाहि करणार नाहीं; कां तर मी परमेश्वर
त्यांचा देव आहें. ४५ तर त्यांच्या पूर्वजांसीं
जो करार, तो मी त्यांच्यासाठीं आठवीन; कां तर
त्या पूर्वजांस त्यांचा देव व्हावा ह्मणून म्या रा-
ष्ट्रांच्या देखतां मिसर देशांतून काढिलें; मी पर-
मेश्वर आहें." ४७ जे नेम व न्याय व शास्त्रें
परमेश्वराने आपण व इस्राएलाचीं संतानें यां-
मध्यें सीना डोंगरावर मोशाच्या हातें लावून
दिल्हीं तीं हींच आहेत.

## अध्याय २७.

आणि परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांजवळ
बोलून त्यांस सांग, जेव्हां कोणी मनुष्य नवस क-
रितो तेव्हां एकएका प्राण्याचें मोल परमेश्वराला
तुझ्या ठरविण्याप्रमाणें असावें. ३ आणि तुझें
ठरविणें पुरुषाविषयीं असलें, तर वीस वर्षांपा-
सून साठ वर्षांपर्यंत त्याविषयीं तुझें ठरविणें पवित्र
शेकेलाने पन्नास शेकेल रुपें असें व्हावें. ४
आणि जर ती स्त्री असली, तर तुझें ठरविणें तीस
शेकेल असें व्हावें. ५ आणि पांच वर्षांपासून
वीस वर्षांपर्यंत त्याविषयीं जर असलें, तर तुझें
ठरविणें पुरुषाविषयीं वीस शेकेल व स्त्रीविषयीं
दाहा शेकेल असें व्हावें. ६ आणि महिन्यापा-
सून पांच वर्षांपर्यंत त्याविषयीं जर असलें, तर
तुझें ठरविणें पुरुषाविषयीं पांच शेकेल रुपें, व
स्त्रीविषयीं तुझें ठरविणें तीन शेकेल रुपें, असें
व्हावें. ७ आणि साठ वर्षांपासून त्याविषयीं जर
असलें, तर पुरुष असल्यास तुझें ठरविणें पंधरा
शेकेल व स्त्रीविषयीं दाहा शेकेल, असें व्हावें.
८ आणि तुझ्या ठरविण्यापेक्षां जर तो गरीब
असला, तर त्याने याजकासमोर सादर व्हावें,
मग याजकाने त्याविषयीं ठरवावें; नवस कर-
णाऱ्याला जें साधेल तसें याजकाने त्याविषयीं
ठरवावें. ९ आणि ज्या पशूंस लोक परमे-
श्वराला अर्पितात, त्यांतला जर नवस असला,
तर अशांतून जो कांहीं दिल्हा जातो, तो पर-

मेश्वरासाठीं पवित्र व्हावा· १० त्याने तो
बदलूं नये, ह्मणजे वाईटाबदल बरा किंवा बऱ्या-
बदल वाईट, असा त्याने तो पालटूं नये; आणि
पशुबदल पशु असें जर पालटीलच, तर तो व
त्याचा बदला ते दोन्ही पवित्र व्हावेच व्हावे·
११ आणि कोणताहि अशुद्ध पशु, ज्याचें अर्पण
परमेश्वराला करीत नाहींत, तसा जर असला,
तर त्याने तो पशु याजकासमोर आणून ठेवावा·
१२ मग याजकाने बरें व वाईट पाहून त्याचें
मोल ठरवावें; त्वां याजकाने जितकें मोल ठरविलें,
तितकें व्हावें· १३ आणि जर तो त्याला खंडून
घेईलच, तर त्याने त्वां तें ठरविलेलें मोल त्याचा
पांचवा वांटा त्यांत घालून द्यावें· १४ आणि
जर कोणी आपलें घर परमेश्वराला देऊन पवित्र
करील, तर याजकाने बरें व वाईट पाहून त्याचें
मोल ठरवावें; जसें याजक त्याचें मोल ठरवील,
तसें स्थापित व्हावें· १५ आणि ज्याने पवित्र केलें,
तो जर आपलें घर खंडून घेईल, तर त्वां जो ठर-
विलेला पैका, तो त्याने त्याचा पांचवा वाटा त्यांत
घालून दिल्यास, तें त्याचें व्हावें· १६ आणि
जर कोणी आपली वतनी कांहीं भूमि परमेश्वरा-
साठीं पवित्र करील, तर तुझें ठरविणें तिच्या उत्प-
न्नाप्रमाणें व्हावें; जवाच्या होमर धान्याची भूमि
पन्नास शेकेल रूप्यावर व्हावी· १७ जर तो
आपली भूमि योबेल वर्षापासून पवित्र करील तर
त्वां ठरविलेल्याप्रमाणें स्थापित होईल. १८ परंतु
जर तो योबेलानंतर आपली भूमि पवित्र करील,
तर पुढल्या योबेल वर्षापर्यंत जीं वर्षें उरलीं अस-
तील, त्यांच्या संख्येप्रमाणें याजकाने त्याजवळ रु-
प्याची गणना करावी, आणि त्वां जें ठरविलेलें मोल
त्यांत कांहीं उणें करावें. १९ आणि ज्याने भूमि
पवित्र केली, तो जर ती खंडून घेईलच, तर त्वां जो
ठरविलेला पैका, तो त्याने पांचवा वांटा त्यांत घा-
लून दिल्यास, ती त्याची असी स्थापित होईल·
२० आणि जर तो ती भूमि खंडून घेत नाहीं, परंतु
त्याने दुसऱ्या कोणाला जर ती भूमि विकली असली,
तर तिची खंडणी कधींहि न व्हावी· २१ परंतु ती
भूमि योबेलांत सुटली, ह्मणजे परमेश्वरासाठीं
पवित्र व्हावी; जसी याजकाची उत्सर्गभूमि तसी ती
त्याची वतनी व्हावी· २२ परंतु कोणी आपली वि-
कत घेतलेली भूमि जी आपल्या वतनी भूमींतली
नव्हे, ती जर परमेश्वरासाठीं पवित्र करितो, २३
तर याजकाने योबेल वर्षापर्यंत त्वां जें ठरविलेलें
मोल त्याचा हिशोब त्याजवळ करावा, मग त्याने
त्या दिवसीं त्वां जें ठरविलेलें मोल तें परमेश्वराला
देऊन पवित्र करावें· २४ ती भूमि ज्यापासून त्याने
विकत घेतली होती, ज्याची वतनी भूमि होती,
त्याची योबेल वर्षांत फिरुन व्हावी· २५ तुझें सर्व
मोल ठरविणें तर पवित्र शेकेलाने व्हावें; तो शेकेल
वीस गेरा इतका असावा· २६ केवळ पशूचा प्र-
थम वत्स, तो परमेश्वराला प्रथम अर्पणीय आहे,
तो गुरुं किंवा बकरें असो, तरी कोणी पवित्र न
करावा; तो परमेश्वराचाच· २७ परंतु जर तो
अशुद्ध पशूंतला असला, तर त्याने त्वां जें ठरविलेलें
मोल त्याचा पांचवा वांटा त्यांत घालून तो खंडून
घ्यावा; परंतु जर त्याची खंडणी दिल्ही जात नाहीं,
तर त्वां ठरविलेलें मोल तेवढ्याने त्याचा विक्रय
व्हावा· २८ परंतु जे कोणी उत्सर्ग करून परमे-
श्वराला दिल्हें तें उत्सर्जित आपल्या कशांतलें,
मनुष्य किंवा पशुं किंवा आपली वतनी भूमि यांतील
कांहींहि असो, तरी त्याचा विक्रय न व्हावा, आणि
त्याची खंडणीहि न व्हावी; प्रत्येक उत्सर्ग हा पर-
मेश्वरासाठीं परम पवित्र आहे· २९ प्रत्येक उत्सर्ग
जो मनुष्यापासून उत्सर्गरूप दिल्हा जातो, त्याची
खंडणी न व्हावी; त्याला मारावेंच मारावें· ३०
आणि भूमीच्या सर्व उत्पन्नाचा दाहावा वांटा, ह्म-
णजे भूमीच्या पिकांतला व झाडाच्या फळांतला,
हा परमेश्वराचा; परमेश्वरासाठीं पवित्र अ-
सावा· ३१ परंतु जर कोणी आपल्या दाहाव्या
वांट्यांतलें कांहीं खंडून घेईलच, तर त्याने त्याचा
पांचवा वांटा त्यांत घालून द्यावें· ३२ आणि
गुरांतला व बकऱ्यांतला प्रत्येक दाहावा वांटा, जें
कांहीं पशु राखणाऱ्याच्या छडीखालीं चालतें,
त्याचा दाहावा भाग परमेश्वरासाठीं पवित्र
व्हावा· ३३ बरें किंवा वाईट यांकडे त्याने लक्ष
देऊं नये, आणि तें पालटूं नये; परंतु जर तो तें
पालटीलच, तर तें व त्याचा बदलाहि पवित्र व्हा-
वाच व्हावा; त्याची खंडणी न व्हावी·" ३४ सीना
डोंगरावर परमेश्वराने इस्राएलाच्या संतानांसाठीं
ज्या आज्ञा मोशेला दिल्या त्या ह्याच आहेत·

# मोशाने लिहिलेलें चवथें पुस्तक;

म्हणजे

# गणना.

**अध्याय १.**

आणि इस्राएल लोक **मिसर** देशांतून निघा-
ल्यावर दुसऱ्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या
पहिल्या दिवसीं **सीना** रानामध्यें सभामंडपांत **पर-**
**मेश्वराने मोशाला** असें सांगितलें कीं, २ इस्रा-
एलाच्या संतानांच्या सर्व समुदायाची संख्या
त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्या-
वरून त्यांच्या डोक्यांप्रमाणें तुह्मी सर्व पुरुषांच्या
नांवांची गणति करून घ्या. ३ **वीस** वर्षांचे व
वरले, इस्राएलांतले जे कोणी सैन्यांत मिळून जा-
तात, त्यांची झडती त्यांच्या सैन्यांप्रमाणें तूं व
**आहरोन** घ्या. ४ **आणि** प्रत्येक वंशांतला एक
एक असे जे आपल्या पूर्वजांच्या घराण्यांतले
मुख्य, ते तुह्माबरोबर असावे. ५ **आणि** ज्या
माणसानी तुमच्या संगतीं उभें राहावें त्यांचीं नांवें
हींच; **रऊबेनांतला शदेयुराचा** पुत्र **अलीजूर.**
६ **शिमोनांतला** **सुरीशाद्दाय्‌चा** पुत्र **शलूमियेल.**
७ **यहूदांतला आम्मीनादाबाचा** पुत्र **नाहशोन.**
८ **इस्साखारांतला** **सुवाराचा** पुत्र **नथानेल.**
९ **जबुनांतला हेलोनाचा** पुत्र **अलियाब**; १०
**योसेफाच्या** वंशस्थांतले असे कीं **एफ्राइमांतला**
**आम्मीहूदाचा** पुत्र **अलीशामा**, आणि **मनाश्**-
**श्यांतला पदाहजूराचा** पुत्र **गामलियेल.** ११
**बन्यामीनांतला गिदोनी** याचा पुत्र **अबीदान**; १२
**दानांतला आम्मीशाद्दाय्‌चा** पुत्र **अहियेजेर**; १३
**आशेरांतला अखानाचा** पुत्र **पागियेल**; १४ **गा-**
**दांतला दऊवेलाचा** पुत्र **एल्यासाफ**; १५ **नाफ्-**
**ताल्यांतला एनानाचा** पुत्र **अहीरा.** १६ **हे** समु-
दायांतले श्रेष्ठ, आपापल्या पूर्वजांच्या वंशाचे अ-
धिकारी, इस्राएलांतल्या हजारांचे अधिपती असे
होते. १७ **मग** हे मनुष्य ज्यांचीं नांवें सांगितलीं
त्यांस **मोशे** व **आहरोन** यानी घेतले; १८ **आणि**
दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवसीं सर्व समुदाय
त्यानी एकवट केला; मग वीस वर्षांचे व वरले
यानी आपल्या कुळांप्रमाणें आपल्या पूर्वजांच्या
घराण्यावरून नांवांच्या गणतीने आपल्या डोक्यां-
प्रमाणें आपलें जन्म सांगितलें. १९ **जशी पर-**
**मेश्वराने मोशाला** आज्ञा दिल्ही, तसीच त्याने
**सीना** रानामध्यें त्यांची झडती घेतली.

२० **तर** इस्राएलाचा ज्येष्ठ पुत्र **रऊबेन** याचे
वंशस्थ असे होते कीं त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या
कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नां-
वांच्या गणतीने, त्यांच्या डोक्यांप्रमाणें वीस वर्षांचे
व वरले सर्व पुरुष, सैन्यांत मिळून जाणारे सर्व;
२१ **त्यांच्या** झडतींतले, ह्मणजे **रऊबेनाच्या** वंशां-
तले, ते शेताळीस हजार पांचशें. २२ **शिमो-**
**नाच्या** वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले त्यांच्या
कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून त्यां-
च्या झडतीचे, नांवांच्या गणतीने त्यांच्या डोक्यां-
प्रमाणें वीस वर्षांचे व वरले सर्व पुरुष सैन्यांत
मिळून जाणारे सर्व; २३ **त्यांच्या** झडतींतले,
ह्मणजे **शिमोनाच्या** वंशांतले, ते एकुणसाठ हजार
तीनशें. २४ **गादाच्या** वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्म-
लेले, त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घरा-
ण्यावरून नांवांच्या गणतीने वीस वर्षांचे व वरले,
सैन्यांत मिळून जाणारे सर्व, २५ **त्यांच्या** झड-
तींतले, ह्मणजे **गादाच्या** वंशांतले, ते पंचेताळीस
हजार साडेसाहाशें. २६ **यहूदाच्या** वंशस्थांतले,
त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या
पूर्वजांच्या घराण्यावरून नांवांच्या गणतीने वीस
वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून जाणारे सर्व; २७
**त्यांच्या** झडतींतले, ह्मणजे **यहूदाच्या** वंशांतले, ते
चौऱ्याहत्तर हजार साहाशें. २८ **इस्साखाराच्या**

वंशस्थांतले यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कुळांप्रमाणें
त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नांवांच्या गणतीनें
वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून जाणारे सर्व;
२९ त्यांच्या झडतींतले, ह्मणजे इस्साखाराच्या वं-
शांतले, ते चौपन्न हजार चारशें. ३० जबूलुना-
च्या वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कु-
ळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नां-
वांच्या गणतीनें, वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत
मिळून जाणारे सर्व; ३१ त्यांच्या झडतींतले,
ह्मणजे जबूलुनाच्या वंशांतले, ते सत्तावन्न हजार
चारशें. ३२ योसेफाच्या पुत्रांतला एफ्राइम, या-
च्या वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कु-
ळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नांवां-
च्या गणतीनें, वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून
जाणारे सर्व; ३३ त्यांच्या झडतींतले, ह्मणजे
एफ्राइमाच्या वंशांतले, ते चाळीस हजार पांचशें.
३४ मनाश्शाच्या वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले,
त्यांच्या कुळांप्रमाणें झडल्यांच्या पूर्वजांच्या घरा-
ण्यावरून नांवांच्या गणतीनें, वीस वर्षांचे व वरले,
सैन्यांत मिळून जाणारे सर्व; ३५ त्यांच्या तींतले,
ह्मणजे मनाश्शाच्या वंशांतले, ते बत्तीस हजार
दोनशें. ३६ बन्यामीनाच्या वंशस्थांतले, त्याम-
ध्यें जन्मलेले त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजां-
च्या घराण्यावरून नांवांच्या गणतीनें, वीस वर्षांचे
व वरले, सैन्यांत मिळून जाणारे सर्व; ३७ त्यांच्या
झडतींतले, ह्मणजे बन्यामीनाच्या वंशांतले, ते
पसतीस हजार चारशें. ३८ दानाच्या वंशस्थां-
तले, त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कुळांप्रमाणें त्यां-
च्या पूर्वजांच्या घराण्यावरून नांवांच्या गणतीनें,
वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून जाणारे सर्व;
३९ त्यांच्या झडतींतले, ह्मणजे दानाच्या वंशांत-
ले ते बासष्ट हजार सातशें. ४० आशेराच्या
वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या कुळांवरून
त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नांवांच्या गणतीनें,
वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून जाणारे सर्व;
४१ त्यांच्या झडतींतले, ह्मणजे आशेराच्या वं-
शांतले, ते एकेताळीस हजार पांचशें. ४२ नाफ्-
ताल्याच्या वंशस्थांतले, त्यांमध्यें जन्मलेले, त्यांच्या
कुळांवरून त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून नांवां-
च्या गणतीनें, वीस वर्षांचे व वरले, सैन्यांत मिळून
जाणारे सर्व; ४३ त्यांच्या झडतींतले, ह्मणजे
नाफ्तालीच्या वंशांतले, ते त्रेपन्न हजार चारशें
असे होते.

४४ मोशे व आहरोन, आणि इस्राएलाचे
अधिकारी, जे बारा पुरुष एकएक आपापल्या पूर्व-
जांच्या घराण्यासाठीं होते, त्यानी जी झडती घेतली
त्या झडतींतले हेच; ४५ ह्मणजे इस्राएलाच्या
संतानांतल्या झडतीचे सर्व, त्यांच्या पूर्वजांच्या घरा-
ण्यावरून वीस वर्षांचे व वरले, इस्राएलांतल्या सै-
न्यांत मिळून जाणारे सर्व असे होते, ४६ कीं
झडतीचे सर्व साहा लाख, तीन हजार, साडे पांचशें.
४७ परंतु त्यांमध्यें लेवी लोक आपल्या पूर्वजांच्या
वंशांवरून झडतींत घेतले नव्हते; ४८ कां कीं
परमेश्वरानें मोशाला असें सांगितलें होतें कीं,
४९ लेवीच्या वंशाची झडती तूं घेऊं नको, ह्मणजे
त्यांची संख्या इस्राएलाच्या संतानांमध्यें करूं नको.
५० परंतु संकेतलेखाच्या मंडपावर व त्यांतल्या
सर्व सामानांवर व त्याविषयींच्या सर्वांवर तूं ले-
व्यांची नेमणूक कर; त्यानी मंडप व त्यांतलें सर्व
सामान वाहावें, आणि त्याची सेवा करावी, आणि
मंडपाच्या चहुंकडे छावणी करीत जावी. ५१ आ-
णि जेव्हां मंडप पुढें न्यावयाचा, तेव्हां लेव्यानी
तो खालीं काढावा; आणि जेव्हां मंडप द्यायाचा,
तेव्हां लेव्यानी तो उभारावा; परंतु कोणी परका
जवळ आला असतां त्याला मारलें जावें. ५२ आ-
णि इस्राएलाच्या संतानानी आपल्या सैन्यांप्रमाणें
एकएकानें आपापल्या गोटांत, ह्मणजे एकएकानें
आपापल्या झेंड्याजवळ छावणी करावी. ५३ आणि
इस्राएलाच्या संतानांच्या समुदायावर क्रोध न
व्हावा ह्मणून लेव्यानी संकेतलेखाच्या मंडपा-
जवळ चहुंकडे छावणी करावी, आणि संकेतलेखा-
च्या मंडपाचें संरक्षण लेव्यानी करावें. ५४ असें
इस्राएलाच्या संतानानी केलें; जसी परमेश्व-
रानें मोशाला आज्ञा दिल्ही, त्या अवघ्याप्रमाणें
त्यानी केलें.

## अध्याय २.

आणखी परमेश्वरानें मोशे व आहरोन यांस
असें सांगितलें कीं, २ "इस्राएलाच्या संता-
नांतल्या प्रत्येकानें आपल्या झेंड्याजवळ आपापल्या

पूर्वजांच्या घराण्याच्या खुणांजवळ छावणी करावी;
सभामंडपाच्या चहुंकडे दूर त्यानी छावणी करावी.
३ आणि ज्यानी पूर्व दिशेस उतरावें, ते आपल्या
सैन्याप्रमाणें यहूदाच्या गोटांतल्या झेंड्याचे अ-
सावे , आणि आम्मीनादाबाचा पुत्र नाहशोन
यहूदाच्या संतानाचा अधिकारी व्हावा. ४ तर
त्याचें सैन्य , ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते चौ-
ऱ्याहत्तर हजार साहाशें. ५ आणि त्याच्या
जवळ ज्यानी उतरावें ते इस्साखाराच्या वंशाचे
असावे, आणि सुवाराचा पुत्र नथानेल इस्साखा-
राच्या संतानांचा अधिकारी व्हावा. ६ तर
त्याचें सैन्य, ह्मणजे त्याच्या झडतीचे, ते चौपन्न
हजार चारशें. ७ नंतर जबूलुनाच्या वंशाने
उतरावें, आणि हेलोनाचा पुत्र अलियाब जबूलु-
नाच्या संतानांचा अधिकारी व्हावा. ८ तर त्याचें
सैन्य, ह्मणजे त्याच्या झडतीचे, ते सत्तावन्न हजार
चारशें. ९ यहूदाच्या गोटांतल्या झडतीचे, ते
सर्व आपल्या सैन्याप्रमाणें एक लाख शायशी ह-
जार चारशें ; त्यानी पुढें चालावें. १० रऊबे-
नाच्या गोटांतला झेंडा त्याच्या सैन्याप्रमाणें दक्षि-
णेस असावा, आणि शदेयूराचा पुत्र अलीजूर
रऊबेनाच्या संतानांचा अधिकारी व्हावा. ११
तर त्याचें सैन्य, ह्मणजे त्याच्या झडतीचे, ते
शेताळीस हजार पांचशें. १२ आणि त्या-
च्या जवळ ज्यानी उतरावें, ते शिमोनाच्या वंशा-
चे असावे, आणि सुरीशाद्दाय्चा पुत्र शलुमि-
येल शिमोनाच्या संतानांचा अधिकारी व्हा-
वा. १३ तर त्याचें सैन्य, ह्मणजे त्यांच्या
झडतीचे, ते एकुणसाठ हजार तीनशें. १४ मग
गादाचा वंश; आणि रगुवेलाचा पुत्र एल्यासाफ
गादाच्या संतानांचा अधिकारी व्हावा. १५ तर
त्याचें सैन्य, ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते पंचेता-
ळीस हजार साडेसाहाशें. १६ रऊबेनाच्या गो-
टाच्या झडतीचे, ते सर्व आपल्या सैन्याप्रमाणें
एक लाख एकावन्न हजार साडेचारशें; त्यानी तर
दुसऱ्या ठिकाणीं चालावें. १७ नंतर गोटांच्या
मध्यें सभामंडपासुद्धां लेवीच्या गोटाने निघावें;
जसे उतरतात तसें त्यानी चालावें; प्रत्येकाने आ-
पल्या ठिकाणीं आपल्या झेंड्याजवळ असावें. १८
एफ्राइमाच्या गोटांतला झेंडा त्याच्या सैन्याप्रमाणें
पश्चिमेस असावा, आणि अम्मीहूदाचा पुत्र अलि-
शामा एफ्राइमाच्या संतानाचा अधिकारी व्हावा.
१९ तर त्याचें सैन्य, ह्मणजे त्याच्या झडतीचे,
ते चाळीस हजार पांचशें. २० मग त्याच्याजवळ
मनाश्श्याचा वंश व पदाहसुराचा पुत्र गमा-
लियेल मनाश्शेच्या संतानांचा अधिकारी व्हावा.
२१ तर त्याचें सैन्य, ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते
बत्तीस हजार दोनशें. २२ मग बन्यामीनाचा
वंश, आणि गिदोन्याचा पुत्र अबीदान बन्यामी-
नाच्या संतानांचा अधिकारी व्हावा. २३ तर
त्याचें सैन्य, ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते पस्तीस
हजार चारशें. २४ एफ्राइमाच्या गोटाच्या झड-
तीचे, ते सर्व आपल्या सैन्याप्रमाणें एक लाख
आठ हजार शंभर ; त्यानी तर तिसऱ्या ठिकाणीं
चालावें. २५ दानाच्या गोटाचा झेंडा त्याच्या
सैन्याप्रमाणें उत्तरेस असावा, आणि आम्मीशा-
द्दाय्चा पुत्र अहियेजेर दानाच्या संतानांचा अधि-
कारी व्हावा. २६ तर त्याचें सैन्य, ह्मणजे
त्यांच्या घडतीचे, ते बासष्ट हजार सातशें. २७
आणि त्याच्या जवळ ज्यानी उतरावें, ते आशे-
राच्या वंशाचे असावे ; आणि अख्रानाचा पुत्र
पागियेल आशेराच्या संतानाचा अधिकारी व्हावा;
तर त्याचें सैन्य, ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते एके-
ताळीस हजार पांचशें. २८ मग नाफ्तालीचा
वंश आणि एनानाचा पुत्र अहीरा नाफ्तालीच्या
संतानांचा अधिकारी व्हावा. ३० तर त्याचें
सैन्य, ह्मणजे त्यांच्या झडतीचे, ते त्रेपन्न हजार
आणि चारशें होतें. ३१ दानाच्या गोटाच्या झड-
तीचे सर्व ते एक लाख सत्तावन्न हजार साहाशें;
त्यानी आपापल्या झेंड्यांसुद्धां मागें चालावें. ३२
जितके आपल्या पूर्वजांच्या घराण्यावरून इस्रा-
एलाच्या संतानांच्या झडतीचे होते ; गोटांच्या
झडतीचे, ते सर्व आपापल्या सैन्याप्रमाणें साहा
लाख, तीन हजार, साडेपांचशें. ३३ परंतु जसी
परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही होती,
तसी इस्राएलाच्या संतानामध्यें लेव्यांची झडती
घेतली नव्हती. ३४ आणि त्या आज्ञा परमे-
श्वराने मोश्याला दिल्या होत्या, त्या अवघ्यां-
प्रमाणें इस्राएलाच्या संतानानी केलें ; तसे ते
आपापल्या झेंड्याजवळ उतरत होते, आणि तसे

आपापल्या कुळानें आपापल्या पूर्वजांच्या घराण्यानें
चालत होते.

## अध्याय ३.

आणि ज्या दिवशीं परमेश्वर सीना डोंगरावर
मोशाला बोलला, तेव्हां मोशे व आह-
रोन यांच्या पिढीचे हे होते; २ आहरोनाच्या
पुत्रांचीं नांवें असीं कीं, प्रथम पुत्र नादाब, मग
अबीहू, एलाजार, व ईथामार. ३ आहरोनाचे
पुत्र, अभिषिक्त याजक, ज्यांचा संस्कार याजक-
पण करायासाठीं झाला, त्यांचीं नांवें हींच. ४
परंतु नादाब व अबीहू यानी जेव्हां सीना रा-
नांत परमेश्वरासमोर अन्य अग्नि अर्पिला, तेव्हां
ते परमेश्वरासमोर मेले; आणि त्यांस पुत्र न-
व्हते, यास्तव एलाजार व ईथामार यानी आपला
बाप आहरोन याच्या समक्ष याजकपण केलें.
५ तेव्हां परमेश्वरानें मोशाला असें सांगि-
तलें कीं, ६ "तूं लेवीचा वंश जवळ आणून त्याला
आहरोन याजकासमोर सादर कर, ह्मणजे त्यानी
त्याच्या संगतीं सेवा करावी. ७ आणि त्याचें जें
संभाळायाचें व सर्व मंडळीचें जें संभाळायाचें,
तें त्यानी सभामंडपापुढें मंडपाची सेवा संभाळून
करावें. ८ आणि त्यानी मंडपाची सेवा करि-
तांना सभामंडपांतलें सर्व सामान व इस्राएलाच्या
संतानांचें जें संभाळायाचें तें संभाळावें. ९ असे
तूं आहरोनाला व त्याच्या पुत्रांस लेवी दे; ते
इस्राएलाच्या संतानांतून त्याला दिल्हेलेच आहेत.
१० परंतु आहरोनाला व त्याच्या पुत्रांस तूं नेम-
णूक असी दे कीं त्यानी आपलें याजकपण जपून
करावें; आणि कोणी परका जवळ आला अस-
तां त्याला मारावें." ११ आणखी परमेश्वरानें
मोशाला असें सांगितलें कीं, १२ "पाहा, इस्रा-
एलाच्या संतानांतले, प्रथम जन्मलेले पुत्र यांच्या
ठिकाणीं म्या इस्राएलाच्या संतानांतून लेव्यांस
घेतलें आहे; तसे लेवी माझे आहेत. १३ कां
तर सर्व ज्येष्ठ पुत्र माझे; म्या मिसर देशांतल्या
सर्व ज्येष्ठ पुत्रांस मारिलें त्या दिवशीं इस्राएला-
मध्यें मनुष्यांतील व पशूंतील प्रथम जन्मलेले सर्व
म्या आपल्यासाठीं पवित्र केले; ते माझे असावे;
मी परमेश्वर आहें."
१४ आणि परमेश्वरानें सीना रानांत मो-
शाला असें सांगितलें कीं, १५ "तूं लेवीच्या
वंशस्थांची झडती घे; त्यांच्या पूर्वजांच्या घराण्या-
वरून त्यांच्या कुळांप्रमाणें महिन्याचे व वरले सर्व
पुरुष यांची झडती घे." १६ तेव्हां परमेश्वरा-
च्या आज्ञेप्रमाणें जसें मोशाला सांगितलें होतें,
तसी त्यानें त्यांची झडती घेतली. १७ तर ले-
वीचे पुत्र त्यांच्या नांवांप्रमाणें गेर्षोन व कहाथ व
मरारी, असे होते. १८ आणि गेर्षोनाच्या पुत्रां-
चीं नांवें त्यांच्या कुळांप्रमाणें हींच, लिब्नी व
शिमी. १९ आणि कहाथाचे पुत्र आपल्या
कुळांप्रमाणें आम्राम व इझार, हेब्रोन व उज्जि-
येल होते. २० आणि मराऱ्याचे पुत्र आपल्या
कुळांप्रमाणें माहली व मूशी होते; लेव्यांचीं
कुळें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून हींच आ-
हेत कीं, २१ गेर्षोनापासून लिब्नीचें कुळ व शि-
मीचें कुळ; हींच गेर्षोनीचीं कुळें. २२ गणतीनें,
त्यांच्या झडतीचे, महिन्याचे व वरले सर्व पुरुष,
त्यांच्या झडतीचे सात हजार पांचशें. २३ गेर्षो-
नीच्या कुळानी मंडपाच्या मागें पश्चिमेस उत-
रावें. २४ आणि लाएलाचा पुत्र एल्यासाफ
गेर्षोन्यांच्या पूर्वजांच्या घराण्याचा अधिकारी व्हा-
वा. २५ आणि सभामंडपाविषयीं जें गेर्षोनीच्या
वंशस्थानीं संभाळावें, तें मंडप व राहोटी, याचें
आच्छादन व सभामंडपाच्या दाराचा पडदा;
२६ आणि अंगणाच्या सभोंवतीच्या आवाराचे
पडदे, आणि मंडपापुढल्या व वेदीपुढल्या अंगणा-
च्या दाराचा पडदा, आणि त्याच्या सर्व कामासाठीं
त्याच्या दोऱ्या, असें व्हावें. २७ आणि कहा-
थाच्या आम्रामीचें कुळ, व इझारीचें कुळ, व
हेब्रोनीचें कुळ, व उज्जियेलीचें कुळ; हींच कहा-
थाचीं कुळें. २८ एक महिन्याचे व वरले सर्व
पुरुष गणतीनें आठ हजार साहाशें; हे पवित्र-
स्थानांचें रक्षण करणारे होते. २९ कहाथा-
च्या संतानांच्या कुळानी मंडपाच्या दक्षिण बा-
जूस उतरावें. ३० आणि उज्जियेलाचा पुत्र
अलीजाफान हा कहाथ्यांच्या कुळीं पूर्वजांच्या
घराण्याचा अधिकारी व्हावा. ३१ आणि त्यानी
जीं संभाळावीं, तीं कोश व मेज व दिव्याचें झाड
व वेदी, आणि ज्यांकडून सेवा करितात, तसें पवित्र

स्थानातलें सामान व पडदा व त्यांतल्या सर्व से-
वेचें तें, असीं असावीं. ३२ आणि आहरोन
याजक याचा पुत्र एलाजार हा लेव्यांवरल्या अधि-
कार्‍यांचा अधिकारी, पवित्रस्थानाचें रक्षण करणारे,
यांचा पाहणारा असावा. ३३ मरार्‍यापासून मा-
हलीचें कुळ व मूशीचें कुळ; हीं मरार्‍याचीं कुळें.
३४ आणि त्यांच्या झडतीचे, एक महिन्याचे व
वरले सर्व पुरुष गणतीने साहा हजार दोनशें. ३५
आणि अबीहाइलाचा पुत्र जूरियेल हा मरार्‍या-
च्या कुळीं पूर्वजांच्या घराण्याचा अधिकारी व्हावा;
त्यानी मंडपाच्या उत्तर बाजूस उतरावें. ३६
आणि मरार्‍याच्या संतानानी पाहणी करून जीं
संभाळावीं तीं असीं कीं, मंडपाच्या फळ्या, व
त्याचे अडसर, व त्याचे खांब, व त्याच्या उथ-
ळ्या, व त्याचें सर्व सामान, ह्मणजे त्याविषयीं
सेवेचें अवघें, ३७ आणि अंगणाचे चहुंकडले
खांब व त्यांच्या उथळ्या व त्यांच्या मेखा व
त्यांच्या दोर्‍या, असीं असावीं. ३८ आणि ज्या-
नी समोरल्या ठिकाणीं मंडपाच्या पुढें, सभामंड-
पापुढें पूर्वेस उतरावें, ते मोशे आणि आहरोन व
त्याचे पुत्र असावे; हे इस्राएलाच्या संतानांच्या
रक्षणासाठीं पवित्रस्थानाचें रक्षण करणारे व्हावे;
आणि कोणी परका जवळ आला असतां, त्याला
मारावें." ३९ लेव्यांच्या झडतीचे सर्व, ज्यां-
ची झडती मोशे व आहरोन यानी परमे-
श्वराच्या आज्ञेप्रमाणें त्यांच्या कुळांप्रमाणें घेतली,
ते एक महिन्याचे व वरले सर्व पुरुष बावीस
हजार होते.

४० आणखी परमेश्वराने मोश्याला सांगि-
तलें कीं, "तूं इस्राएलाच्या संतानांतले प्रथम जन्म-
लेले सर्व पुरुष, एक महिन्याचे व वरले, यांची
झडती घेऊन त्यांच्या नांवांची गणती कर. ४१
आणि इस्राएलाच्या संतानांतले सर्व ज्येष्ठ पुत्र
यांच्या ठिकाणीं लेव्यांस, आणि इस्राएलाच्या सं-
तानांच्या पशूंतले सर्व वत्स यांच्या ठिकाणीं ले-
व्यांच्या पशूंस माझ्यासाठीं घे; मी परमेश्वर
आहें." ४२ तर जसी परमेश्वराने मोश्याला
आज्ञा दिल्ही होती, तसी त्याने इस्राएलाच्या
संतानांतल्या सर्व ज्येष्ठ पुत्रांची झडती घेतली.
४३ तेव्हां एक महिन्याचे व वरले प्रथम जन्म-
लेले सर्व पुरुष, नांवांच्या गणतीने, झडती घेतलेले
एकंदर बावीस हजार व दोनशें तिर्‍याहत्तर होते.
४४ आणखी परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, ४५ "इस्राएलाच्या संतानांतले सर्व
ज्येष्ठ पुत्र यांच्या ठिकाणीं लेव्यांस, आणि त्यांच्या
पशुंच्या ठिकाणीं लेव्यांच्या पशूंस तूं घे; ह्मणजे
लेवी माझे व्हावे; मी परमेश्वर आहें. ४६
आणि लेव्यांपेक्षां इस्राएलाच्या संतानांच्या ज्येष्ठ
पुत्रांतले अधिक होऊन राहिलेले दोनशें तिर्‍या-
हत्तर, ज्यांची खंडणी करायाची त्याविषयीं, ४७
तर प्रति डोकीस पांच पांच शेकेल घे; पवित्र
शेकेलाप्रमाणें घे; वीस गेरा ह्मणजे एक शेकेल
आहे. ४८ आणि त्यांतले जे अधिक, त्यांची
खंडणी जेणेकडून करायाची, तें रुपें आहरोनाला
व त्याच्या पुत्रांस दे." ४९ आणि लेव्यांकडून
ज्यांची खंडणी झाली, त्यांपेक्षां जे अधिक होऊन
राहिले, त्यांविषयींचा खंडणीपैका मोश्याने घेतला;
५० इस्राएलाच्या संतानांतल्या ज्येष्ठ पुत्रांपासून
पवित्र शेकेलाप्रमाणें एक हजार व तीनशें पांसष्ट
शेकेल रुपें घेतलें. ५१ आणि जसी परमेश्व-
राने मोश्याला आज्ञा दिल्ही होती, तसा मो-
श्यानें तो खंडणीपैका परमेश्वराच्या सांगण्या-
प्रमाणें आहरोनाला व त्याच्या पुत्रांस दिल्हा.

## अध्याय ४.

आणखी परमेश्वराने मोश्याला व आहरो-
नाला असें सांगितलें कीं, २ "तूं लेवी-
च्या वंशस्थांतल्या कहाथाची संख्या, त्यांच्या
कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून
करून घे. ३ तीस वर्षांचे व वरले असे पनास
वर्षांपर्यंत, जे सभामंडपांतलें काम करायास मं-
डळींत जातात, त्या सर्वांची संख्या कर. ४
सभामंडपांतलें परमपवित्र वस्तूविषयीं जें काम
कहाथाच्या पुत्रानी करावें तें हेंच; ५ ह्मणजे
सैन्याचा गोट निघतो, तेव्हां आहरोन व त्याचे
पुत्र यानी येऊन पडदा खालीं काढून, तेणेंकरून
संकेतलेखाचा कोश झांकावा. ६ मग त्यावर
ताहाश कातड्याचें आच्छादन ठेवावें, आणि वरून
पूर्ण निळ्या वस्त्राने वेष्टावा, आणि त्याच्या काठ्या
घालाव्या. ७ आणि दर्शनीय अभूपाचें मेज

त्यानी निळ्या वस्त्राने वेष्टावें, आणि त्यावर तबकें,
व धूपपात्रें, व पात्रें, व तर्पणाचीं पात्रें ठेवावीं;
त्यावर अपूप तर सर्वदा असावे. ८ मग
यावरून किरमिजी सुताचें वस्त्र वेष्टावें, आणि
ताहाश कातड्याच्या आच्छादनाने ती झांकावी,
आणि तिच्या काठ्या घालाव्या. ९ नंतर त्यानी
निळें वस्त्र घेऊन उजेडाच्या दिव्याचें झाड, व
त्यावरले दिवे, व त्याचे चिमटे, व त्याचीं अग्नि-
पात्रें, व त्याच्या तेलाचीं पात्रें, ज्या अवघ्यांकडून
ते त्याची सेवा करितात, तीं झांकावीं. १० मग
त्याच्या सर्व साहित्यांसुद्धां त्याला ताहाश कात-
ड्यांचें आच्छादन लावून नवघणासीं बांधावें. ११
आणि सोन्याची वेदी त्यानी निळ्या वस्त्राने वेष्टा-
वी, आणि ताहाश कातड्यांच्या आच्छादनाने ति-
ला झांकून तिच्या काठ्या घालाव्या. १२ असीं
सेवेचीं साहित्यें, ज्यांकडून ते पवित्रस्थानांत सेवा
करितात, तीं सर्व त्यानी घेऊन निळ्या वस्त्रांत
घालावीं, मग ताहाश कातड्यानी तीं आच्छादावीं
आणि नवघणासीं बांधावीं. १३ आणि त्यानी
वेदीवरली राख काढून तिजवर जांभळें वस्त्र पस-
रावें. १४ आणि तिच्या ज्या साहित्यांकडून ते
तिजवर सेवा करितात, तीं सर्व धुपाटणीं, अकडे,
व चेतविणारीं, व शिंपणेंपात्रें, असीं वेदीचीं सर्व
साहित्यें तिजवर ठेवावीं; आणि तिजवर ताहाश
कातड्याचें आच्छादन पसरावें, मग तिच्या का-
ठ्या घालाव्या. १५ आणि गोट निघत्या वेळेस
आहरोनाने व त्याच्या पुत्रानी पवित्रस्थान व पवि-
त्रस्थानाचीं सर्व साहित्यें यांस झांकून बांधण्याची
समाप्ति केल्यावर, कहाथाच्या पुत्रानी येऊन उच-
लावीं; परंतु पवित्र वस्तूला शिवूं नये, नाहीं तर
हे मरतील; हीं सभामंडपांतलीं कहाथाच्या पुत्रां-
चीं ओझीं व्हावीं. १६ आणि एलाजार जो आह-
रोन याजकाचा पुत्र त्याचें काम हेंच, उजेडाचें
तेल व किराण्याचा धूप व नित्याचा नैवेद्य व
अभिषेकाचें तेल, यांचा सांभाळ; आणि संपूर्ण
मंडप व त्यांतलें अवघें व पवित्रस्थान व त्याचें
सर्व सामान, यांचा सांभाळ करावा."

१७ असी परमेश्वराने मोशे व आहरोन
यांस असें सांगितलें कीं, १८ "तुह्मी कहाथ्या-
च्या कुळांचा वंश लेव्यांपासून छेदून टाकूं नका;
१९ परंतु त्यानी परमपवित्र वस्तूंजवळ येण्याने
न मरतां जगावें, ह्मणून त्यांसीं असें करा कीं आ-
हरोनाने व त्याच्या पुत्रानी येऊन त्यांतल्या एक-
एकाला त्याच्या कामास व त्याच्या ओझ्यास ने-
मावें. २० परंतु पवित्र वस्तू झांकायाच्या वेळेस
त्यानी पाहायास जवळ येऊं नये; नाहीं तर
ते मरतील."

२१ आणि परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, २२ "गेर्षोनाचे वंशस्थ यांचीहि
संख्या त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून त्यांच्या
कुळांप्रमाणें तूं करून घे. २३ तीस वर्षांचे व
वरले पन्नास वर्षांपर्यंत जे सर्व सभामंडपा-
जवळ सेवा करायास मंडळींत जाऊन मिळतात,
त्यांची झडती घे. २४ काम करण्याने व ओझीं
वाहण्याने गेर्षोनाच्या कुळांची सेवा हीच, २५
कीं मंडपाचे पडदे व सभामंडप त्याचें आ-
च्छादन व त्याजवरलें जें ताहाश कातडी आ-
च्छादन व सभामंडपाच्या दाराचा पडदा. २६
आणि सभोंवतीं अंगणाच्या आवाराचे पडदे, व
मंडपाजवळच्या व वेदीजवळच्या अंगणाच्या दारा-
चा पडदा, आणि त्यांच्या दोऱ्या, आणि त्यांच्या
कामाचीं सर्व साहित्यें, ह्मणजे जें कांहीं त्यांच्या-
साठीं केलेलें, ज्यांकडून कामहि करितात, तें त्यानी
वाहावें. २७ गेर्षोनाच्या पुत्रांच्या सर्व ओझीं
वाहण्याने व त्यांच्या सर्व काम करण्याने त्यांची
सर्व सेवा, आहरोनाच्या व त्याच्या पुत्रांच्या सां-
गण्यावरून व्हावी; ह्मणजे त्यांच्या प्रत्येक ओ-
झ्याचा संभाळ त्यांकडे तुह्मी नेमून द्यावा. २८
सभामंडपाविषयीं गेर्षोनाच्या पुत्रांच्या कुळांची
सेवा तीच, आणि त्यानी जें संभाळावें तें आहरोन
याजक याचा पुत्र इथामार याच्या हाताखालीं
असावें. २९ मरारीच्या वंशस्थांची झडती त्यां-
च्या कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून
तूं घे. ३० तीस वर्षांचे व वरले, ह्मणजे पन्नास
वर्षांपर्यंत, सभामंडपाची सेवा करायास जे मंड-
ळींत जातात, त्या सर्वांची झडती घे. ३१ आणि
सभामंडपाविषयीं त्यांच्या सर्व सेवेंत, त्यांचें सं-
भाळायाचें ओझें हेंच कीं, मंडपाच्या फळ्या, व
त्याचे अडसर, व त्याचे खांब, व त्याच्या उथळ्या;
३२ आणि अंगणाचे चहुंकडले खांब, व त्यांच्या

उथळ्या, व त्यांच्या मेखा, व त्यांच्या दोऱ्या, असीं
त्यांचीं सर्व साहित्यें, व त्यांच्या सर्व सेवेचें
काम, याप्रमाणें त्यानी वाहावीं; आणि तुह्मी त्यांच्या
ओझ्यांच्या कामांतल्या साहित्यांची झडती नांवानी
घ्या. ३३ सभामंडपाविषयीं मराऱ्याचे पुत्र यांच्या
कुळांच्या सर्व कामांतली त्यांची ही सेवा आह-
रोन याजक याचा पुत्र ईथामार याच्या हाता-
खालीं व्हावी."

३४ मग मोशे व आहरोन व समुदायाचे अ-
धिकारी यानी कहाथाच्या पुत्रांची झडती त्यांच्या
कुळांप्रमाणें व त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून घे-
तली; ३५ तीस वर्षांचे व वरले, ह्मणजे पन्नास वर्षां-
पर्यंत जे सभामंडपाविषयींची सेवा करायास मंड-
ळींत जात होते, त्या सर्वांची घेतली. ३६ तेव्हां
त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या झडतीचे दोन हजार
साडेसातशें झाले. ३७ मोश्याकडून जी परमेश्व-
राची आज्ञा तिजप्रमाणें ज्यांची झडती मोश्याने
व आहरोनाने घेतली, कहाथाच्या कुळांच्या झड-
तीचे, जे सभामंडपाविषयींची सेवा करीत होते, ते
सर्व तेच. ३८ तर गेर्शोनाच्या पुत्रांच्या झडतीचे
त्यांच्या कुळांप्रमाणें व त्यांच्या पूर्वजांच्या घराण्या-
वरून, ३९ तीस वर्षांचे व वरले, ह्मणजे पन्नास
वर्षांपर्यंत जे सभामंडपाविषयींची सेवा करायास
मंडळींत जात होते ते सर्व; ४० ह्मणजे त्यांच्या
झडतीचे, त्यांच्या कुळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या
घराण्यावरून दोन हजार व साहाशें तीस होते.
४१ गेर्शोनाच्या पुत्रांच्या कुळांतल्या झडतीचे, जे
सर्व सभामंडपाविषयींची सेवा करीत होते, ज्यांची
झडती मोशे व आहरोन यानी परमेश्वराच्या
सांगण्यावरून घेतली ते तेच. ४२ आणि मरा-
ऱ्याचे पुत्र यांच्या कुळांतल्या झडतीचे, त्यांच्या कु-
ळांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यावरून; ४३
तीस वर्षांचे व वरले, ह्मणजे पन्नास वर्षांपर्यंत
सभामंडपाविषयींची सेवा करायास मंडळींत जे सर्व
जात होते; ४४ असे त्यांच्या झडतीचे त्यांच्या
कुळांत तीन हजार व दोनशें होते. ४५ मरा-
रीचे पुत्र यांच्या कुळांतल्या झडतीचे, ज्यांची
झडती मोश्याकडून जी परमेश्वराची आज्ञा
तिजप्रमाणें मोशे व आहरोन यानी घेतली, तेच
ते. ४६ लेव्यांच्या झडतीचे सर्व, ज्यांची झडती
मोशे व आहरोन व इस्राएलाचे अधिकारी यानी
घेतली, त्यांच्या कुळांप्रमाणें व त्यांच्या पूर्वजांच्या
घराण्यावरून; ४७ तीस वर्षांचे व वरले, ह्मणजे
पन्नास वर्षांपर्यंत जे सर्व सभामंडपाविषयीं सेवे-
चें काम व ओझ्याचें काम करायास जात होते;
४८ असे त्यांच्या झडतीचे आठ हजार व पांचशें
ऐशीं होते. ४९ परमेश्वराची जी आज्ञा मो-
श्याकडून केली होती तिजप्रमाणें त्याने त्यांतल्या
एकएकाची झडती त्याच्या सेवेसुद्धां आणि त्या-
च्या ओझ्यासुद्धां घेतली; जसी परमेश्वराने
मोश्याला आज्ञा दिल्ही होती, तसी त्यांची झडती
त्याने केली.

## अध्याय ५.

आणखी परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असी
आज्ञा दे कीं त्यानी प्रत्येक कोडी व प्रत्येक स्रावी
व प्रेताकडून प्रत्येक अशुद्ध, यांस छावणीबाहेर
घालावें. ३ पुरुष असो अथवा स्त्री असो,
त्यांस तुह्मी घालवा; त्यांस छावणीच्या बाहेर घाला,
त्यानी आपल्या छावण्या, ज्यांमध्यें मी वस्ति करीत
आहें, त्यांस अशुद्ध करूच नये. ४ तेव्हां इस्राए-
लाच्या संतानानी असें केलें, ह्मणजे अशांस छाव-
णीच्या बाहेर घातलें; जसें परमेश्वराने मोश्या-
ला सांगितलें होतें, तसें इस्राएलाच्या संतानानी
केलें. ५ आणि परमेश्वराने मोश्याला असें
सांगितलें कीं, ६ "तूं इस्राएलाच्या संतानांस
असें सांग कीं जर कोणी पुरुष किंवा स्त्री मनुष्या-
चा कोणताहि अपराध करितो, ह्मणजे परमेश्व-
राजवळ अतिक्रम करितो, तर ते जन दोषी हो-
तात; ७ आणि त्यानी आपला केलेला अपराध
पत्करावा, आणि आपापल्या दोषाचें मूळद्रव्य
त्याचा पांचवा वांटा त्यांत घालून, ज्याजवळ दोष
केला, त्याला द्यावें. ८ आणि ज्याजवळ तो
दोष फेडावा, असा त्या माणसाचा कोणी नातलग
जर नाहीं, तर तो दोष परमेश्वरासाठीं याजका-
जवळ फेडला जावा; प्रायश्चित्ताच्या ज्या मेंढ्याने
त्याच्यासाठीं प्रायश्चित्त होतें, त्याशिवाय निराळी
फेड व्हावी. ९ आणि इस्राएलाच्या संतानांच्या
सर्व पवित्र पदार्थांतलें प्रत्येक भागदान जें याजका-

कडे ते आणितात, तें त्याचें व्हावें. १० कोणा-
चींहि जीं पवित्र तीं त्याचीं व्हावीं, आणि कोणी
जें कांहीं याजकाला देतो, तें त्याचें व्हावें."
११ आणि **परमेश्वराने** मोश्याला असें
सांगितलें कीं, १२ "तूं इस्राएलाच्या संतानां-
जवळ बोलून त्यांस सांग, जर कधीं कोणी मा-
णसाची स्त्री फितली जाऊन त्याविषयीं अतिक्रम
करिती; १३ ह्मणजे कोणी तिजसीं संग करितो,
आणि तें तिच्या नवऱ्याच्या दृष्टीपासून गुप्त होऊन
लपविलें राहतें, असी ती भ्रष्ट होती परंतु तिज-
विषयीं कोणी साक्षी नाहीं आणि ती धरली जात
नाहीं; १४ तेव्हां ती भ्रष्ट असतां त्याला सं-
शय होऊन तो आपल्या बायकोविषयीं शंका धरि-
तो, अथवा ती भ्रष्ट नसतां त्याला संशय हो-
ऊन तो आपल्या बायकोविषयीं शंका धरितो;
१५ तेव्हां त्या नवऱ्याने आपली बायको याजका-
जवळ आणावी आणि तिजविषयीं तिचें अर्पण
एक दशमांश सातूचें पीठ आणावें; त्याने त्या-
वर तेल घालूं नये, आणि धूप त्यावर ठेवूं
नये, कारण कीं तो शंकेचा नैवेद्य, अन्याय-
सूचक सूचनेचा नैवेद्य आहे. १६ तेव्हां याज-
काने तिला जवळ आणून ती **परमेश्वरासमोर**
सादर करावी. १७ मग याजकाने मातीच्या पा-
त्रांत पवित्र पाणी घ्यावें, आणि मंडपांतल्या भूमी-
वर जी धूळ आहे, ती कांहीं याजकाने घेऊन पा-
ण्यांत घालावी. १८ नंतर याजकाने त्या स्त्रीला
**परमेश्वरासमोर** उभें करून त्या स्त्रीचें डोकें
उघडें करावें, आणि सुचनेचा नैवेद्य, तो शंकेचा
नैवेद्य, तिच्या हातांवर ठेवावा, आणि तें शापदायक
कडु पाणी याजकाच्या हातीं असावें. १९ मग
याजकाने त्या स्त्रीला शपथ घालून ह्मणावें कीं,
'जर कोणी तुझ्याजवळ निजला नाहीं, ह्मणजे जर
तूं आपल्या नवऱ्याजवळून फितून भ्रष्ट झाली ना-
हींस, तर तूं या शापदायक कडु पाण्यापासून
सुटी ऐस. २० परंतु तूं जर कधीं आपल्या
नवऱ्याजवळून फितून गेली असलीस, ह्मणजे तूं
असी भ्रष्ट झाली असलीस कीं तुझ्या नवऱ्या
खेरीज कोणी तुजसीं संग केला असला तर.'
२१ तेव्हां याजकाने स्त्रीला शापपूर्वक शपथ घा-
लावी, ह्मणजे याजकाने स्त्रीला ह्मणावें कीं, 'पर-
**मेश्वराने** तुला तुझ्या लोकांमध्यें शापरूप व शप-
थरूप करावें: या प्रकारें कीं **परमेश्वराने** तुझी
मांडी सडे आणि तुझें पोट फुगे, असें करावें; २२
ह्मणजे हें शापदायक पाणी पोट फुगवायास व
मांडी सडवायास तुझ्या अंतड्यांत जावें.' तेव्हां
स्त्रीने 'आमेन, आमेन,' ह्मणावें. २३ मग याज-
काने हे शाप पुस्तकांत लिहून कडु पाण्याने पुसून
टाकावे. २४ आणि स्त्रीला शापदायक कडु पा-
णी पाजावें; असें तें शापदायक पाणी कडुपणाने
तिजमध्यें जावें. २५ तेव्हां याजकाने तो शंकांचा
नैवेद्य स्त्रीच्या हातांतून घ्यावा, आणि **परमेश्वरा-**
समोर तो नैवेद्य ओंवाळून वेदीजवळ आणावा.
२६ तेव्हां याजकाने नैवेद्यांतून त्याची सूचवण
असें मूठभर घेऊन वेदीवर जाळावा, आणि नंतर
स्त्रीला तें पाणी पाजावें. २७ तेव्हां तिला पाणी
पाजल्यावर, असें होईल कीं जर ती भ्रष्ट झाली
असली, आणि तिने आपल्या नवऱ्याचें उल्लंघन
केलें असलें, तर तें शापदायक पाणी कडुपणाने
तिजमध्यें गेल्यावर, तिचें पोट फुगेल आणि तिची
मांडी सडेल; असी ती स्त्री आपल्या लोकांमध्यें
शापदाखला होईल. २८ परंतु जर ती स्त्री
भ्रष्ट नसतां, शुद्धच आहे, तर ती सुटी होऊन
गरोदर होईल. २९ जेव्हां स्त्री आपल्या नव-
ऱ्याजवळून फितली जाऊन भ्रष्ट होती, तेव्हां शं-
काविषयींचा हा नेम; ३० ह्मणजे जेव्हां नव-
ऱ्याला संशय होऊन तो आपल्या स्त्रीविषयीं
शंका धरितो, तेव्हां त्याने त्या स्त्रीला **परमेश्वरा-**
समोर सादर करावें, आणि याजकाने तिच्याजवळ
या सर्व नेमाप्रमाणें करावें. ३१ आणि तो नवरा
अन्यायापासून सुटा असतां, ती स्त्री आपला
अन्याय सोसील."

## अध्याय ६.

आणि **परमेश्वराने** मोश्याला असें सांगि-
तलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानां-
जवळ बोलून त्यांस सांग, 'जेव्हां पुरुष किंवा स्त्री
संकल्प करून नेजेर धरिती कीं आपण **परमे-**
**श्वरासाठीं** वेगळेंच व्हावें, ३ तेव्हां त्याने द्रा-
क्षरस व मद्य यांविरहित व्हावें, द्राक्षरसाचा ऊत
व मद्याचा ऊत त्याने न प्यावा, आणि द्राक्षांची

काहीं भेळ न प्यावी; ओलीं व सुकीं द्राक्षेंहि
त्याने न खावीं. ४ त्याने आपल्या वेगळेपणाच्या
सर्व दिवसांत द्राक्षवेलाच्या दाण्यांपासून सालपट-
पर्यंतहि यांचें जें कांहीं केलेलें, त्यांतलें न खावें.
५ त्याच्या संकल्पाच्या वेगळेपणांतल्या सर्व दि-
वसांत वस्तरा त्याच्या डोक्यावर न फिरावा; जि-
तके दिवस त्याने परमेश्वरासाठीं वेगळेपण ध-
रिलें, तितके भरतील तोंपर्यंत त्याने पवित्र असावें;
आपल्या डोक्यावरल्या केसांच्या जटा वाढवाव्या.
६ तो परमेश्वरासाठीं वेगळा राहतो त्या सर्व
दिवसांत त्याने मेताजवळ न जावें. ७ आपला
बाप किंवा आपली आई, आपला भाऊ किंवा आ-
पली बहीण, यांतलें कोणी मेलें असताहि, त्यां-
कडून त्याने आपणाला विटाळवूं नये; कारण कीं
त्याच्या देवाविषयींचा नवस त्याच्या डोक्यावर
आहे. ८ त्याने आपल्या वेगळेपणाच्या सर्व
दिवसांत परमेश्वरासाठीं पवित्र असावें. ९
आणि जर कधीं अकस्मात् एकाएकीं त्याजवळ को-
णाचें मरण होतें, आणि तो आपलें अलिप्त डोकें
विटाळवितो, तर त्याने आपल्या शुद्ध होण्याच्या
दिवशीं आपलें डोकें मुंडवावें; सातव्या दिवशीं
त्याने तें मुंडवावें. १० आणि आठव्या दिवशीं
त्याने दोन होले किंवा पारव्याचीं दोन पिलें
याजकाजवळ सभामंडपाच्या दारीं आणावीं. ११
मग याजकाने एक पापहारक यज्ञरूपें व एक हो-
मरूपें अर्पून त्याविषयीं प्रायश्चित्त करावें, कारण
कीं मेताच्या योगें त्याला पाप लागलें; असें त्याने
त्याच दिवशीं आपलें डोकें पवित्र करावें. १२
आणि त्याने आपल्या वेगळेपणाचे दिवस पर-
मेश्वरासाठीं वेगळे पाळावे, आणि दोषहारक
यज्ञासाठीं पहिल्या वर्षांतला मेंढा आणावा; ते-
व्हां पहिले दिवस गाळले जावे, कारण कीं त्याचें
अलिप्तपण विटाळलें गेलें. १३ आणि नेजे-
राच्या अलिप्तपणाचे दिवस भरतील, त्या वेळेस
त्याचा हा नेम कीं त्याने त्या अलिप्तपणाची खूण
सभामंडपाच्या दारीं सादर करावी; १४ तेव्हां
त्याने आपलें अर्पण परमेश्वराला वाहावें; होमा-
साठीं पहिल्या वर्षांतला एक निर्दोष मेंढा, आणि
पापहारक यज्ञासाठीं पहिल्या वर्षांतली एक निर्दोष
मेंढी आणि शांतिकारक यज्ञासाठीं एक निर्दोष
एडका; १५ आणि टोपलीभर सपिठाच्या बेख-
मीर पोळ्या तेलांत मळून केलेल्या व बेखमीर
पापड तेलाने माखलेले, आणि त्याच्या संगती-
चा नैवेद्य व त्याच्या संगतीचीं पेय अर्पणें,
असीं वाहावीं. १६ तेव्हां याजकाने तीं पर-
मेश्वरासमोर आणून त्याचा पापहारक यज्ञपशु
व त्याचा होमपशु अर्पावा. १७ नंतर शां-
तिकारक यज्ञासाठीं तो एडका टोपलीभर बेख-
मीर भाकरीसुद्धां परमेश्वराला अर्पावा, आणि
त्याच्या संगतीचा नैवेद्य व त्याच्या संगतीचें पेय-
अर्पण याजकाने अर्पावें. १८ तेव्हां नेजेराने
आपलें अलिप्त डोकें सभामंडपाच्या दारीं मुंडवावें,
नंतर आपल्या अलिप्त डोक्याचे केस घेऊन शांति-
कारक यज्ञांतल्या अग्नीवर ठेवावे. १९ आणि
त्याने आपल्या वेगळेपणाचें मुंडन केल्यावर, याज-
काने एडक्याचा सिजलेला पाय खांदा व टोपलीं-
तून एक बेखमीर पोळी, व एक बेखमीर पापड
घेऊन नेजेराच्या हातांवर ठेवावा. २० मग
याजकाने तीं ओवाळणीसाठीं परमेश्वरासमोर
ओवाळावीं; ते ओंवाळण उरासुद्धां व भागदान
पायफऱ्यासुद्धां याजकासाठीं पवित्र व्हावें, आणि
त्यानंतर नेजेराने द्राक्षरस प्यावा. २१ जो ने-
जेरपणाचा संकल्प करितो, त्याचा हा नेम; वेगळे-
पणाविषयीं परमेश्वराला त्याचें अर्पण, त्या-
च्या हाताने साधलेल्या खेरीज असावें, जो संकल्प
त्याने केला, त्याच्या त्या संकल्पाच्या अर्थाप्रमाणें
त्याच्या वेगळेपणाच्या नेमावरून त्याने करावें."

२२ आणखी परमेश्वराने मोशाला असें
सांगितलें कीं, २३ "तूं आहरोनाला आणि त्या-
च्या पुत्रांस बोलून सांग कीं, 'तुह्मी इस्राएला-
च्या संतानांस आशीर्वाद देत असतां त्यांस असें
ह्मणा कीं, २४ 'परमेश्वराने तुला आशीर्वाद
देऊन तुझें रक्षण करावें. २५ परमेश्वराने
आपल्या दृष्टीचा प्रकाश तुझ्याजवळ पाडून तुज-
वर कृपा करावी. २६ परमेश्वराने आपली
दृष्टि तुजवर लावून तुझें कल्याण करावें.' २७
तसें त्यांनी माझें नांव इस्राएलाच्या संतानांवर
लावावें, ह्मणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.'

## अध्याय ७.

तर ज्या दिवशीं मोशाने सभामंडप कर-
ण्याची समाप्ति केली, आणि त्याला स्थापा-
याचें उटणें लावून पवित्र केलें, आणि त्याचीं सर्व
साहित्यें, व वेदी व तिचीं सर्व साहित्यें, त्यास
स्थापायाचें उटणें लावून पवित्र केलें होतें, तेव्हां
असें झालें कीं, २ इस्राएलाचे अधिकारी आ-
पल्या पूर्वजांच्या घराण्याचे अधिपती, जे वंशा-
चे अधिकारी जे झडतीच्यांवर नेमिलेले, त्यानी
अर्पणें वाहिलीं. ३ आणि त्यानी आपलें अर्पण
परमेश्वरासमोर बुरखींच्या साहा गाड्या व
बारा बैल असें आणिलें; ह्मणजे दोघांदोघां अ-
धिकाऱ्यांला एक गाडी, व एकएकाला एक बैल;
हीं त्यानी तर मंडपाच्यापुढें आणिलीं. ४ तेव्हां
परमेश्वराने मोशाला असें सांगितलें कीं, "५
"तूं त्यांपासून घे, आणि ती सभामंडपाची सेवा
करण्यासाठीं असूं दे, आणि लेव्यांतल्या पुरुषास
त्याच्या त्याच्या कामाप्रमाणें तूं दे." ६ मग
मोशाने त्या गाड्या व बैल घेऊन लेव्यांस दिल्हे;
७ ह्मणजे गेर्षोनाच्या पुत्रांस त्यांच्या कामाप्रमाणें
त्याने दोन गाड्या व चार बैल दिल्हे. ८ आणि
मरारीच्या पुत्रांचें काम, जें आहरोन याजक याचा
पुत्र इथामार याच्या हाताखालचें, त्याप्रमाणें त्यास
चार गाड्या व आठ बैल दिल्हे. ९ परंतु कहाथा-
च्या पुत्रांस कांहीं दिल्हें नाहीं, कारण कीं त्यानी प-
वित्र वस्तू खांद्यांवर वाहाव्या, असें त्यांकडे काम होतें.
१० तर अधिकाऱ्यानी वेदीच्या संस्काराविषयीं
तिला उटणें लावण्याच्या दिवशीं अर्पण दिल्हें;
ह्मणजे अधिकाऱ्यानी आपलें अर्पण वेदीपुढें आणिलें.
११ तेव्हां परमेश्वराने मोशाला सांगि-
तलें कीं, "वेदीच्या संस्कारासाठीं एकएका अधिका-
ऱ्याने एकएका दिवशीं आपापलें अर्पण आणावें."
१२ तर पहिल्या दिवशीं ज्याने आपलें अर्पण
आणिलें, तो यहूदाच्या वंशांतला आम्मीनादाबा-
चा पुत्र नाहशोन होता. १३ आणि त्याचें
अर्पण, पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस
शेकेल रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्या-
चें एक शिपणें पात्र, हीं दोन्ही नैवेद्यासाठीं ते-
लांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं; १४ दाहा
शेकेल सोन्याची एक वाटी धुपाने भरलेली; १५
होमासाठीं एक तरणा गोऱ्हा, एक एडका, पहि-
ल्या वर्षांतील एक मेंढा; १६ पापहारक यज्ञा-
साठीं शेरडांतला एक बकरा, १७ आणि शां-
तिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके, पांच
बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे; असें आम्मी-
नादाबाचा पुत्र नाहशोन, याने अर्पण केलें. १८
दुसऱ्या दिवशीं इस्साखाराचा अधिकारी जुवाराचा
पुत्र नथानेल, याने अर्पण केलें. १९ त्याने आपलें
अर्पण असें वाहिलें कीं पवित्रस्थानाच्या शेकेला-
प्रमाणें एकशें तीस शेकेल रुप्याचें एक ताट, स-
त्तर शेकेल रुप्याचें एक शिपणेंपात्र, हीं दोन्ही
नैवेद्यासाठीं तेलांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं;
२० दाहा शेकेल सोन्याची एक वाटी धुपाने भर-
लेली; २१ होमासाठीं एक तरणा गोऱ्हा, एक
एडका, पहिल्या वर्षांतील एक मेंढा; २२ पाप-
हारक यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा; २३
आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एड-
के, पांच बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे;
असें जुवाराचा पुत्र नथानेल याने अर्पण केलें.
२४ तिसऱ्या दिवशीं जबूलुनाच्या संतानांचा अ-
धिकारी हेलोनाचा पुत्र एलियाब याने अर्पण
वाहिलें. २५ त्याचें अर्पण, पवित्रस्थानाच्या शे-
केलाप्रमाणें एकशें तीस शेकेल रुप्याचें एक ताट,
सत्तर शेकेल रुप्याचें एक शिपणेंपात्र; हीं दोन्ही
नैवद्यासाठीं तेलांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं;
२६ दाहा शेकेल सोन्याची एक वाटी धुपाने भर-
लेली; २७ होमासाठीं एक तरणा गोऱ्हा, एक
एडका, पहिल्या वर्षांतील एक मेंढा; २८ पापहारक
यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा. २९ आणि
शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके, पांच
बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे, असें हेलो-
नाचा पुत्र एलियाब याने अर्पण केलें. ३० चव-
थ्या दिवशीं रऊबेनाचा अधिकारी शदेयुराचा
पुत्र अलीजूर याने अर्पण वाहिलें. ३१ त्याचें
अर्पण, पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस
शेकेल रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्या-
चें एक शिपणेंपात्र; हीं दोन्ही नैवेद्यासाठीं ते-
लांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं; ३२ दाहा
शेकेल सोन्याची एक वाटी धुपाने भरलेली; ३३

होमासाठीं एक तरणा गोन्हा, एक एडका, पहिल्या
वर्षांतील एक मेंढा; ३४ पापहारक यज्ञासाठीं शेर-
डांतला एक बकरा; ३५ आणि शांतिकारक यज्ञा-
साठीं दोन बैल, पांच एडके, पांच बोकड, पहिल्या
वर्षांतलि पांच मेंढे; असें शदेयुराचा पुत्र अलीजूर
याने अर्पण केलें. ३६ पांचव्या दिवशीं शिमो-
नांच्या संतानांचा अधिकारी जूरीशाद्दाय्चा पुत्र
शलुमियेल याने अर्पण वाहिलें. ३७ त्याचें अर्पण,
पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस शेकेल
रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्याचें एक शिं-
पणेंपात्र; हीं दोन्ही नैवेद्यासाठीं तेलांत मळलेल्या
सपिठाने भरलेलीं; ३८ दाहा शेकेल सोन्याची
एक वाटी धुपाने भरलेली; ३९ होमासाठीं
एक तरणा गोन्हा, एक एडका, पहिल्या वर्षांतील
एक मेंढा; ४० पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला
बकरा. ४१ आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन
बैल, पांच एडके, पांच बोकड, पहिल्या वर्षांतील
पांच मेंढे, असें जूरीशाद्दाय्चा पुत्र शलुमियेल
याने अर्पण केलें. ४२ साहाव्या दिवशीं गा-
दाच्या संतानांचा अधिकारी दउवेलाचा पुत्र एल्या-
साफ याने अर्पण वाहिलें. ४३ त्याचें अर्पण,
पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस शेकेल
रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्याचें एक शिं-
पणेंपात्र, हीं दोन्ही नैवेद्यासाठीं तेलांत मळलेल्या
सपिठाने भरलेलीं; ४४ दाहा शेकेल सोन्याची
एक वाटी, धुपाने भरलेली; ४५ होमासाठीं एक
तरणा गोन्हा, एक एडका, पहिल्या वर्षांतील एक
मेंढा; ४६ पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक
बकरा; ४७ आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन
बैल, पांच एडके, पांच बोकड, पहिल्या वर्षां-
तील पांच मेंढे; असें दउवेलाचा पुत्र एल्यासाफ
याने अर्पण केलें. ४८ सातव्या दिवशीं एफ्रा-
इमाच्या संतानांचा अधिकारी आम्मीहूदाचा पुत्र
अलीशामा याने अर्पण वाहिलें. ४९ त्याचें
अर्पण, पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस
शेकेल रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्याचें
एक शिंपणेंपात्र; हीं दोन्ही नैवेद्यासाठीं तेलांत
मळलेल्या सपिठाने भरलेलीं; ५० दाहा शेकेल
सोन्याची एक वाटी, धुपाने भरलेली; ५१ होमा-
साठीं एक तरणा गोन्हा, एक एडका, पहिल्या
वर्षांतील एक मेंढा; ५२ पापहारक यज्ञासा-
ठीं शेरडांतला एक बकरा; ५३ आणि शांति-
कारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके, पांच
बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे; असें आम्मी-
हूदाचा पुत्र अलीशामा याने अर्पण केलें. ५४
आठव्या दिवशीं मनाश्शाच्या संतानांचा अधि-
कारी पदाजूराचा पुत्र गामलियेल याने अर्पण वा-
हिलें. ५५ त्याचें अर्पण, पवित्रस्थानाच्या शेकेला-
प्रमाणें एकशें तीस शेकेल रुप्याचें एक ताट, सत्तर
शेकेल रुप्याचें एक शिंपणेंपात्र; हीं दोन्ही नैवे-
द्यासाठीं तेलांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं;
५६ दाहा शेकेल सोन्याची एक वाटी, धुपाने
भरलेली; ५७ होमासाठीं एक तरणा गोन्हा,
एक एडका, पहिल्या वर्षांतील एक मेंढा; ५८
पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा; ५९
शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके, पांच
बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढें; असें पदाजू-
राचा पुत्र गामलियेल याने अर्पण केलें. ६०
नवव्या दिवशीं बन्यामीनाच्या संतानांचा अधिका-
री गिदोन्याचा पुत्र अबीदान याने अर्पण वाहिलें.
६१ त्याचें अर्पण, पवित्रस्थाच्या शेकेलाप्रमाणें एक
शें तीस शेकेल रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल
रुप्याचें एक शिंपणेंपात्र; हीं दोन्ही नैवेद्यासाठीं
तेलांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं; ६२ दाहा
शेकेल सोन्याची एक वाटी, धुपाने भरलेली;
६३ होमासाठीं एक तरणा गोन्हा, एक एडका,
पहिल्या वर्षांतील एक मेंढा; ६४ पापहा-
रक यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा; ६५
आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच
एडके, पांच बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे;
असें गिदोनी याचा पुत्र अबीदान याने अर्पण
केलें. ६६ दाहाव्या दिवशीं दानाच्या संता-
नांचा अधिकारी आम्मीशाद्दाय्चा पुत्र अहियेजेर
याने अर्पण वाहिलें. ६७ त्याचें अर्पण, पवित्र-
स्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस शेकेल
रुप्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्याचें एक
शिंपणेंपात्र; हीं दोन्ही नैवेद्यासाठीं तेलांत मळ-
ळेल्या सपिठाने भरलेलीं; ६८ दाहा शेकेल
सोन्याची एक वाटी, धुपाने भरलेली; ६९ होमा-
साठीं एक तरणा गोन्हा, एक एडका, एक मेंढा

आपल्या पहिल्या वर्षाचा· ७० पापहारक यज्ञा-
साठीं शेरडांतला एक बकरा; ७१ आणि
शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके,
पांच बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे; असें
आम्मीशाद्दायाचा पुत्र अहियेजेर याने अर्पण
केलें· ७२ अकराव्या दिवशीं, आशेराच्या सं-
तानाचा अधिकारी अख्रानाचा पुत्र पागियेल
याने अर्पण वाहिलें· ७३ त्याचें अर्पण, पवित्र-
स्थानाच्या शेकेलाप्रमाणें एकशें तीस शेकेल रु-
प्याचें एक ताट, सत्तर शेकेल रुप्याचें एक
शिंपणेंपात्र; हीं दोन्हीं नैवेद्यासाठीं तेलांत मळ-
लेल्या सपिठाने भरलेलीं; ७४ दाहा शेकेल
सोन्याचीं एक वाटी, धुपाने भरलेली; ७५
होमासाठीं एक तरणा गोऱ्हा, एक एडका, आ-
पल्या पहिल्या वर्षांतील एक मेंढा· ७६ पाप-
हारक यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा; ७७
आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच एडके,
पांच बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे; असें
अख्रानाचा पुत्र पागियेल याने अर्पण केलें.
७८ बाराव्या दिवशीं नाफ्तालीच्या संतानां-
चा अधिकारी एनानाचा पुत्र अहीरा याने अर्पण
वाहिलें. ७९ त्याचें अर्पण, पवित्रस्थानाच्या शे-
केलाप्रमाणें एकशें तीस शेकेल रुप्याचें एक ताट,
सत्तर शेकेल रुप्याचें एक शिंपणेंपात्र; हीं दोन्ही
नैवेद्यासाठीं तेलांत मळलेल्या सपिठाने भरलेलीं;
८० दाहा शेकेल सोन्याची एक वाटी, धुपाने
भरलेली; ८१ होमासाठीं एक तरणा गोऱ्हा,
एक एडका, आपल्या पहिल्या वर्षांतील एक मेंढा;
८२ पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा;
८३ आणि शांतिकारक यज्ञासाठीं दोन बैल, पांच
एडके, पांच बोकड, पहिल्या वर्षांतील पांच मेंढे;
असें एनानाचा पुत्र अहीरा याने अर्पण केलें·
८४ वेदीची स्थापना करण्याच्या दिवशीं इस्राए-
लाच्या अधिकाऱ्यांकडून त्याचा हाच संस्कार; रु-
प्याचीं बारा ताटें, रुप्याचीं बारा शिंपणेंपात्रें, सो-
न्याच्या बारा वाट्या; ८५ एक एक ताट रुप्याचें
एकशें तीस शेकेल, आणि एक एक शिंपणेंपात्र
सत्तर शेकेल; या पात्रांचें सर्व रुपें पवित्रस्थाना-
च्या शेकेलाप्रमाणें दोन हजार चारशें शेकेल होतें·
८६ सोन्याच्या बारा वाट्या, धुपाने भरलेल्या;
एक एक वाटी पवित्रस्थानाच्या शेकेलाप्रमाणें दा-
हा दाहा शेकेलांची; वाट्यांचें सर्व सोनें एकशें
वीस शेकेल होतें. ८७ होमासाठीं सर्व गुरें
बारा गोऱ्हे, बारा एडके, पहिल्या वर्षांतील बारा
मेंढे, त्यांच्या संगतीच्या नैवेद्यासुद्धां होते; आणि
पापहारक यज्ञासाठीं शेरडांतले बारा बकरे; ८८
आणि शांतिकारक यज्ञांचे सर्व बैल, ह्मणजे गोऱ्हे,
चोवीस होते, साठ एडके, साठ बोकड, पहिल्या
वर्षांतील साठ मेंढे; वेदीची स्थापना केल्यावर
त्याचा असा संस्कार होता· ८९ आणि मोशे
त्याला बोलायास सभामंडपांत गेला, तेव्हां संकेत-
लेखाच्या कोशावर जें दयासन त्यावरून, ह्मणजे
त्या दोन करूबांमधून आपल्याला बोलणारा याचा
शब्द त्याने ऐकिला, आणि तो त्याला बोलला·

## अध्याय ८.

आणखी परमेश्वराने मोशाला असें सांगि-
तलें कीं, २ "तूं आहरोनाजवळ बोलून
त्याला सांग, 'जेव्हां तूं दिवे लावितोस, तेव्हां
दिव्याच्या झाडासमोर सात दिव्यांचा उजेड
पडावा·" ३ मग आहरोनाने तसें केलें; जसी
परमेश्वराने मोशाला आज्ञा दिल्ही होती, तसे
त्याने दिव्याच्या झाडासमोर त्याचे दिवे ला-
विले. ४ आणि दिव्याच्या झाडाचें असें काम
कीं सोन्याचें घडींव; त्याच्या सरासुद्धां त्याच्या
फुलांपर्यंतहि तें घडींव होतें; जसी आकृति परमे-
श्वराने मोशाला दाखविली होती, तसें त्याने
तें दिव्याचें झाड केलें· ५ आणि परमेश्वराने
मोशाला असें सांगितलें कीं, ६ "तूं इस्राए-
लाच्या संतानांतून लेव्यांस घेऊन त्यांस शुद्ध कर·
७ आणि ते शुद्ध होण्यासाठीं त्यांस असें कर
कीं शुद्ध करण्याचें पाणी त्यांवर शिंपड; त्यानीहि
आपापल्या सर्व शरिरावर वस्तरा फिरवावा, आ-
णि आपलीं वस्त्रें धुऊन आपणास शुद्ध करावें·
८ मग त्यानी तरणा गोऱ्हा व त्याच्या संगतीचा
नैवेद्य तेलांत मळलेलें सपीठ घ्यावें; तूंहि पाप-
हारक यज्ञासाठीं दुसरा तरणा गोऱ्हा घे· ९ मग
लेव्यांस सभामंडपापुढें आण, आणि इस्राएला-
च्या संतानांच्या सर्व समुदायाला एकवट कर·
१० आणि त्यां लेव्यांस परमेश्वरापुढें आणि-

त्यावर, इस्राएलाच्या संतानानी आपले हात ले-
व्यांवर ठेवावे. ११ आणि आहरोनाने इस्राए-
लाच्या संतानांतले लेवी परमेश्वरासमोर अ-
र्पण करावे, असे कीं ते परमेश्वराची सेवा
करण्यासाठीं व्हावे. १२ तेव्हां लेव्यानी आपले
हात गोऱ्ह्यांच्या डोक्यांवर ठेवावे, मग लेव्यांसा-
ठीं प्रायश्चित्त करायास तूं परमेश्वराजवळ एका-
चा पापहारक यज्ञ व एकाचा होम कर. १३
नंतर लेव्यांस आहरोनासमोर व त्याच्या पुत्रां-
समोर उभें करून, ते परमेश्वराला अर्पण
करा. १४ असें तूं लेव्यांस इस्राएलाच्या
संतानांतून वेगळें कर, ह्मणजे लेवी माझे हो-
तील. १५ आणि त्यानंतर लेव्यानी सभामं-
डपाजवळ सेवा करायास यावें; तर तूं त्यांस
शुद्ध कर आणि ते अर्पण कर. १६ का-
रण कीं ते इस्राएलाच्या संतानांतून मला दिल्हेंच
दिल्हे आहेत; सर्व प्रथम जन्मलेले पुत्र यां-
च्या ठिकाणीं म्या आपल्यासाठीं इस्राएलाच्या
संतानांतून त्यांस घेतलें आहे. १७ कारण कीं
इस्राएलाच्या संतानांतले, मनुष्यांमध्यें व पशूंमध्यें
जे प्रथम जन्मलेले, ते सर्व माझे; म्या मिसर
देशांतले सर्व ज्येष्ठ पुत्र मारिले, त्या दिवसीं म्या
आपल्यासाठीं त्यांस पवित्र केलें. १८ परंतु इ-
स्राएलाच्या संतानांतल्या सर्व ज्येष्ठ पुत्रांच्या ठि-
काणीं म्या लेव्यांस घेतलें आहे. १९ आणि
म्या इस्राएलाच्या संतानांतून लेवी आहरोनाला व
त्याच्या पुत्रांस दान दिल्हे आहेत; यासाठीं कीं
त्यानी सभामंडपाजवळ इस्राएलाच्या संतानांची
सेवा करावी, आणि इस्राएलाच्या संतानांसाठीं
प्रायश्चित्त करावें, असें कीं इस्राएलाचीं संतानें
पवित्रस्थानाजवळ जेव्हां येतात तेव्हां इस्राएलाच्या
संतानांवर घटकी न व्हावी."

२० तेव्हां मोशे व आहरोन व इस्राएलाच्या
संतानांचा सर्व समुदाय यानी लेव्यांस तसें केलें;
जसी परमेश्वराने मोशाला लेव्यांविषयीं आ-
ज्ञा दिल्ही होती, त्या अवघ्याप्रमाणें इस्राएलाच्या
संतानानी त्यांस केलें. २१ आणि लेव्यांची शुद्धि
झाली आणि त्यानी आपलीं वस्त्रें धुतलीं, मग
आहरोनाने ते परमेश्वरासमोर अर्पण केले आणि
त्यांची शुद्धि होण्यासाठीं आहरोनाने त्यांसाठीं
प्रायश्चित्त केलें. २२ आणि त्यानंतर लेवी आ-
हरोनापुढें व त्याच्या पुत्रांपुढें सभामंडपाजवळ
आपली सेवा करायास गेले; जसी परमेश्वराने
मोशाला लेव्यांविषयीं आज्ञा दिल्ही होती, तसें
त्यानी त्यांविषयीं केलें. २३ आणि परमेश्व-
राने मोशाला असें सांगितलें कीं, २४ "ले-
व्यांची नेमणूक हीच कीं पंचवीस वर्षांचे व वर-
ले त्यानी सभामंडपाच्या सेवेच्या मंडळींत सेवा
करायास जावें. २५ आणि पन्नास वर्षांचे
त्यानी सेवेच्या मंडळींतून माघारें जावें, आणि त्या-
पुढें सेवा न करावी. २६ परंतु जें संभाळायाचें
तें संभाळायास सभामंडपाजवळ त्यानी आपल्या
भावांबंदांसहित काम करावें, आणि सेवा न करा-
वी; याप्रमाणें तूं लेव्यांस त्यांच्या आचाराविषयीं
कर."

## अध्याय ९.

आणि ते मिसर देशांतून निघाल्यावर दुसऱ्या
वर्षांतील पहिल्या महिन्यांत परमेश्वराने
सीना रानामध्यें मोशाला असें सांगितलें कीं,
२ "इस्राएलाच्या संतानानी वल्हांडण सण यथा-
काळीं पाळावा. ३ तुह्मी या महिन्याच्या चौदाव्या
दिवसीं संध्याकाळीं अशा त्याच्या समयीं तो पाळा;
त्याच्या सर्व नेमांप्रमाणें व त्याच्या सर्व रीतींप्रमाणें
तो पाळा." ४ मग मोशाने इस्राएलाच्या सं-
तानांस वल्हांडण सण पाळायास सांगितलें. ५
आणि त्यानी सीना रानांत पहिल्या महिन्याच्या
चौदाव्या दिवसीं संध्याकाळीं वल्हांडण सण पा-
ळला; ज्याप्रमाणें परमेश्वराने मोशाला आ-
ज्ञा दिल्ही होती, त्या अवघ्याप्रमाणें इस्राएलाच्या
संतानानी पाळिला. ६ तेव्हां माणसाच्या प्रेताने
अशुद्ध झालेले मनुष्य होते, यास्तव त्यांच्याने त्या
दिवसीं वल्हांडण सण पाळवत नव्हता; ह्मणून ते
त्या दिवसीं मोशापुढें व आहरोनापुढें आले. ७
आणि त्या माणसानी त्याला ह्मटलें कीं, "आह्मी
मनुष्याच्या प्रेताने अशुद्ध; तथापि इस्राएलाच्या
संतानांमध्यें परमेश्वराला अर्पण यथाकाळीं न
वाहावें, असें आह्मी कशासाठीं वेगळे व्हावें? ८
मग मोशे त्यांस बोलला, "तुह्मी उभे राहा,
ह्मणजे परमेश्वर तुह्मांविषयीं जी काय आज्ञा

देईल, ती मी ऐकेन. ९ तेव्हां परमेश्वराने मो-
शाला असें सांगितलें कीं, १० "तूं इस्राएलाच्या
संतानांस असें सांग कीं तुमच्यांतला किंवा तुम-
च्या पिढ्यांतला कोणी माणूस जरी प्रेताने अशुद्ध
किंवा दुरल्या मार्गावर असला, तरी त्याने वल्हां-
डण सण परमेश्वरासाठीं पाळावा. ११ दुसऱ्या
महिन्याच्या चौदाव्या दिवशीं संध्याकाळीं त्यांनी
तो पाळावा; बेखमीर भाकरींसीं व कडवटांसीं तो
खावा. १२ त्याचें कांहीं सकाळपर्यंत ठेवूं नये,
आणि त्याचें हाडूक मोडूं नये; वल्हांडण सणाच्या
प्रत्येक नेमाप्रमाणें तो पाळावा. १३ आणि जो
माणूस, शुद्ध असतां व मार्गावर नसतां, वल्हांडण
सण पाळीत नाहीं, तो माणूस आपल्या लोकांतून
छेदलाच जाईल; कारण कीं त्याने परमेश्वराचें
अर्पण यथाकाळीं वाहिलें नाहीं; त्याने आपलें पाप
भोगावें. १४ आणि जर कोणी प्रवासी तुमच्या-
जवळ राहून वल्हांडण सण परमेश्वरासाठीं पा-
ळील, तर त्याने वल्हांडण सणाच्या नेमाप्रमाणें व
त्याच्या रीतिप्रमाणें असा पाळावा; तुह्मांस व
प्रवास्यास व देशांतल्या जन्मलेल्यास एकच नेम
असावा."

१५ आणि मंडप उभारण्याच्या दिवशीं ढगाने
मंडप ह्मणजे संकेतलेखाच्या राहोटी झांकिली,
आणि संध्याकाळीं मंडपावर अग्नीचा आभास होऊन
सकाळपर्यंत राहिला. १६ असें नित्य झालें कीं
दिवसां ढगाने त्याला झांकावें, आणि रात्रीं अग्नि
दिसावा. १७ आणि ज्या काळीं ढग मंडपावरून
वरतां चढे, त्यानंतर इस्राएलाचीं संतानें निघून
पुढें जात असत; आणि ज्या ठिकाणावर ढग राही,
तेथें इस्राएलाचीं संतानें तळ धरीत असत. १८
परमेश्वराच्या सांगण्यावरून इस्राएलाचीं सं-
तानें पुढें गेलीं, आणि परमेश्वराच्या सांगण्या-
वरून उतरलीं; जितके दिवस ढग मंडपावर रा-
हिला, तितके तीं तळांत राहिलीं. १९ जेव्हां ढग
मंडपावर बहुत दिवस टिकून राहिला, तेव्हां इस्रा-
एलाचीं संतानें परमेश्वराचा नेम पाळीत अस-
तां निघालीं नाहींत. २० आणि जेव्हां ढग मं-
डपा वर थोडके दिवस होता, तेव्हां असें झालें
कीं परमेश्वराच्या सांगण्यावरून तीं उतरलीं,
आणि परमेश्वराच्या सांगण्यावरून चाललीं.
२१ आणि जेव्हां ढग सायंकाळापासून सकाळपर्यंत
होता आणि सकाळीं ढग चढला, तेव्हां असें झालें
कीं तीं निघालीं; दिवसां असो अथवा रात्रीं असो
जेव्हां ढग चढला तेव्हां तीं निघालीं. २२ दोन
दिवस असो किंवा महिना असो किंवा वर्ष असो,
ढग मंडपावर टिकून राहिला, तेव्हां इस्राएलाचीं
संतानें तळांत राहिलीं, चाललींच नाहींत; जेव्हां
तो चढला तेव्हां मात्र तीं निघालीं. २३ पर-
मेश्वराच्या सांगण्यावरून तीं उतरलीं, आणि
परमेश्वराच्या सांगण्यावरून चाललीं; मोशा-
च्या योगें परमेश्वराचें सांगणें यावरून त्यांनी
परमेश्वराचे नेम पाळिले.

## अध्याय १०

आणि परमेश्वराने मोशाला असें सांगितलें
कीं, २ "तूं आपल्यासाठीं रुप्याचे दोन करणे
कर; ते घडींव असे कर; आणि ते समुदायाला
बोलावायासाठीं व गोटांस काढायासाठीं तुझ्या-
जवळ ठेव. ३ जेव्हां ते त्यांस वाजवितात, तेव्हां
सर्व समुदायाने तुझ्याजवळ सभामंडपाच्या दारीं
मिळावें. ४ आणि जेव्हां एकच वाजवितात,
तेव्हां इस्राएलांतले सरदार हजारांचे अधिकारी
यांनी तुझ्याजवळ मिळावें. ५ जेव्हां तुह्मी
वाजवितांना गजर करितां, तेव्हां पूर्वेस उतरलेल्या
गोटांनी निघावें. ६ आणि तुह्मी दुसऱ्याने वाज-
वितांना गजर केला असतां, दक्षिणेस उतरलेल्या
गोटांनी निघावें; त्यांच्या निघण्यासाठीं त्यांनी वाज-
वितांना गजर करावा. ७ आणि मंडळी मिळण्या-
साठीं तुह्मी वाजवा, परंतु गजराने वाजवूं नका. ८
तर आहरोनाचे पुत्र याजक यांनी करणे वाजवावे,
आणि हे नेम सर्वकाळ पिढ्यानपिढीं तुह्मांस अ-
सावे. ९ आणि जेव्हां तुह्मी आपल्या देशांत
आपल्या जुलूम करणाऱ्या वैऱ्यावर लढायास
जाल, तेव्हां करणे गजराने वाजवा; ह्मणजे तुमच्या
देव परमेश्वर याला आठवण होईल, आणि
तुह्मी आपल्या शत्रूंपासून तारले जाल. १०
आणि तुह्मी आपल्या हर्षाच्या दिवसांत, व आप-
ल्या सणांत, व आपल्या महिन्यांच्या प्रारंभीं, व
आपल्या होमांजवळ, व आपल्या शांतिकारक यज्ञां-
जवळ करणे वाजवा; ह्मणजे ते तुमच्या देवाच्या

लक्षांत तुह्माविषयीं सूचक असे होतील; मी पर-
मेश्वर तुमचा देव आहें."
११ आणि दुसऱ्या वर्षी दुसऱ्या महिन्याचा
विसावा दिवस त्यांत तो ढग संकेतलेख्याच्या मंड-
पावरून वरता चढला. १२ मग इस्राएलाचीं
संतानें सीना रानांतून आपल्या चालीवर चा-
लूं लागलीं; नंतर तो ढग पारान रानांत राहिला.
१३ तेव्हां मोश्याच्या योगें परमेश्वराच्या सांग-
ण्यावरून ते पहिल्याने निघाले. १४ ह्मणजे यहू-
द्याच्या संतानांच्या झेंड्याचा गोट आपल्या सैन्यां-
प्रमाणें पहिल्याने निघाला; त्याच्या सैन्यावर तर
आम्मीनादाबाचा पुत्र नाहशोन होता. १५ आणि
इस्साखाराच्या वंशाच्या सैन्यावर त्सुवाराचा पुत्र
नथानेल होता. १६ आणि जबूलुनाच्या वंशा-
च्या सैन्यावर हेलोनाचा पुत्र अलियाब होता.
१७ आणि मंडप उस्तरल्यावर गेर्षोनाचे वंशस्थ
व मरारीचे वंशस्थ मंडप उचलून निघाले. १८
मग रऊबेनाच्या झेंड्याचा गोट आपल्या सैन्यांप्र-
माणें निघाला, आणि त्याच्या सैन्यावर शदेयूरा-
चा पुत्र अलीजूर होता. १९ आणि शिमोनाच्या
वंशाच्या सैन्यावर सूरीशाद्दायचा पुत्र शलुमियेल
होता. २० आणि गादाच्या वंशाच्या सैन्यावर
दऊवेलाचा पुत्र एल्यासाफ होता. २१ मग क-
हाथी पवित्र वस्तू उचलून निघाले, आणि हे पोहं-
चवात तितक्यांत त्यानी मंडप उभा करावा. २२
मग एफ्राइमाच्या संतानांच्या झेंड्याचा गोट आ-
पल्या सैन्यांप्रमाणें निघाला; त्याच्या सैन्यावर तर
आम्मीहूदाचा पुत्र अलीशामा होता. २३ आणि
मनाश्शेच्या वंशाच्या सैन्यावर पदाजूराचा पुत्र
गामलियेल होता. २४ आणि बन्यामीनाच्या
वंशाच्या सैन्यावर गिदोनी याचा पुत्र अबीदान
होता. २५ मग सर्व गोटांच्या मागें मिळून चा-
लणारा दानाच्या संतानांच्या झेंड्याचा गोट आप-
ल्या सैन्यांप्रमाणें निघाला; त्याच्या सैन्यावर तर
आम्मीशाद्दायचा पुत्र अहियेजेर होता. २६ आणि
आशेराच्या वंशाच्या सैन्यावर अख्रानाचा पुत्र
पागियेल होता. २७ आणि नाफ्तालीच्या वं-
शाच्या सैन्यावर एनानाचा पुत्र अहीरा होता.
२८ तर इस्राएलाच्या संतानांचीं चालणीं त्यांच्या
सैन्यांप्रमाणें हींच; असीं तीं चाललीं.
२९ तेव्हां मोश्याचा सासरा मिद्यानी रगु-
वेल याचा पुत्र होबाब याला मोशे बोलला,
"ज्या ठिकाणाविषयीं परमेश्वराने सांगितलें कीं,
'मी तें तुह्मास देईन,' तिकडे आह्मी चालत आ-
हों; तूं आमच्या संगतीं ये, ह्मणजे आह्मी तुझें
बरें करूं, कारण कीं परमेश्वराने इस्राएलावि-
षयीं बऱ्याचें वचन दिल्हें आहे." ३० तेव्हां
तो याला बोलला कीं "मी येणार नाहीं, परंतु आ-
पल्या देशांत आपल्या नात्यांच्या ठिकाणीं जाईन"
३१ मग हा बोलला, "तूं आह्मास सोडूंच नको:
कारण कीं रानामध्यें आमचीं उतरायाचीं ठिकाणें
तुला ठाऊक आहेत; यास्तव तूं आह्मासीं डोळे
असा होसील. ३२ आणि जर तूं आमच्या सं-
गतीं येसील, तर असें होईलच होईल कीं परमे-
श्वर जसें आह्मासीं बरें करील, तसेंच आह्मी
तुजसीं बरें करूं." ३३ मग ते परमेश्वराच्या
डोंगरापासून तीन दिवसांची वाट चालून गेले,
आणि परमेश्वराच्या कराराचा कोश त्यांचें उ-
तरायाचें ठिकाण शोधायास त्यांच्यापुढें तीन दि-
वसांच्या वाटेवर गेला होता. ३४ आणि जेव्हां
ते छावणी सोडून चालले, तेव्हां दिवसा परमे-
श्वराचा ढग त्यांवर होता. ३५ आणि कोश
निघाला तेव्हां असें होत असे कीं मोशे ह्मणे,
"हे परमेश्वरा, ऊठ; ह्मणजे तुझ्या शत्रूंची
दाणादाण होवो, आणि तुझे द्वेषी तुझ्यापुढून पळोत."
३६ आणि तो उतरते वेळेस तो ह्मणे, "हे परमे-
श्वरा, इस्राएलाच्या हजारांच्या अयुतांकडे फीर."

## अध्याय ११.

आणि असें झालें कीं लोकानी कुरकूर केली हें
परमेश्वराला वाईट वाटलें, आणि परमे-
श्वर ऐकून रागें भरला; आणि परमेश्वराचा
अग्नि त्यांवर पेटून छावणीच्या सीमांत जे होते
त्यांस जाळून टाकिता झाला. २ तेव्हां लोक
मोश्याजवळ ओरडूं लागले, आणि मोश्याने पर-
मेश्वराची प्रार्थना केली, नंतर तो अग्नि विझा-
ला. ३ मग त्याने त्या ठिकाणाचें नांव ताबेरा ठेवि-
लें, कारण कीं परमेश्वराचा अग्नि त्यांवर पेटला
होता. ४ तेव्हां त्यांमध्यें जो भेळलेला समुदाय
त्यानी वांच्छा धरिली, आणि इस्राएलाचीं संतानें

देखील फिरून रडत बोललीं कीं, "आह्मास
मांस खायाला कोण देईल? ५ जे मासे आह्मी
मिसरांत फुकट खाल्ले, त्यांची आठवण आह्मास
आहे; कांकड्या, व खर्बूज, व शाक, व कांदे, व
लसूण यांचीहि आहे. ६ परंतु आतां आमचा
जीव सुकला; या मान्नाखेरीज आमच्या दृष्टीस
कांहीं पडत नाहीं." ७ तें मान्ना तर कोथिंबिरीच्या
बिजाप्रमाणें आणि त्याचा रंग बदोलाहाच्या रंगा-
प्रमाणें होता. ८ लोक फिरत फिरत गोळा क-
रीत होते, आणि जात्यानी दळीत होते किंवा
उखळींत कुटीत होते, आणि भांड्यांत शिजवीत
होते किंवा त्याच्या पोळ्या करीत होते; त्याची
चव तर साजूक तेलाच्या चवेसारिखी होती. ९
आणि रात्रीं जेव्हां दहिंवर छावणीवर पडत असे,
तेव्हां त्यांच्या संगतीं मान्ना पडत असे. १०
तेव्हां मोश्याने लोकांचें रडणें त्यांच्या कुटुंबांत व
त्यांच्या राहोटीच्या दारीं ऐकिलें; आणि परमे-
श्वर फार रागें भरला, मोश्याच्याहि दिसण्यांत
वाईट वाटलें. ११ मग मोशे परमेश्वराला
बोलला, "तूं आपल्या सेवकाला दुःख कां देतोस?
आणि तुझ्या लक्षांत मला कृपा कां मिळत नाहीं
कीं त्वां या सर्व लोकांचें ओझें मजवर घातलें
आहे? १२ म्या या सर्व लोकांचें गर्भधारण केलें
काय? म्या यांस जन्मविलें ह्मणून जी भूमि त्वां
यांच्या वडिलांस शपथेने दिल्ही तिकडे, 'जसा
प्रतिपाळक तान्ह्याला नेतो, तसा तूं यांस आपल्या
उरासीं धरून ने,' ह्मणून मला सांगतोस काय?
१३ या सर्व लोकांस मांस द्यायाला मला कोठून
मिळेल? कां तर ते माझ्याजवळ रडून ह्मणतात,
'तूं आह्मास खायाला मांस दे.' १४ या सर्व
लोकांस वाहणें माझ्या एकट्याच्याने होत नाहीं,
कारण कीं माझ्यापेक्षां भारी आहे. १५ जर
तूं याप्रमाणें मजसीं करितोस, तर मी मागतों कीं
तुझ्या लक्षांत कृपा मजवर असली, तर मला
जिवेंच मार, ह्मणजे म्या आपलें दुःख पाहूं नये."
१६ तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें
कीं, "इस्राएलाच्या वडिलांतलीं सत्तर माणसें,
ज्यांविषयीं तूं जाणतोस कीं ते लोकांचे वडील
व त्यांचे कारभारी, त्यांस माझ्याजवळ मिळीव,
ह्मणजे त्यांस सभामंडपाजवळ घेऊन ये, आणि
त्यानी तुझ्यासंगतीं तेथें सादर असावें. १७ मग
मी तेथें उतरून तुजसीं बोलेन, आणि तुजवर जो
आत्मा, तो कांहीं घेऊन त्यांवर ठेवीन, ह्मणजे ते
तुझ्यासंगतीं या लोकांचें ओझें वाहतील; मग स्वतां
तूं एकटा वाहणार नाहींस. १८ आणि तूं लोकांस
सांग, "तुह्मी उद्यांसाठीं शुद्ध व्हा, ह्मणजे मांस
खाल; कारण कीं तुह्मी परमेश्वराच्या कानांसीं
रडून ह्मटलें, 'आह्मास मांस खायाला कोण देईल?
आह्मास मिसरांत किती बरें'! यास्तव परमेश्वर
तुह्मास मांस खायास देईल. १९ तुह्मी केवळ
एक दिवस, किंवा दोन दिवस, किंवा पांच दिवस,
किंवा दाहा दिवस, किंवा वीस दिवस खाल, असें
नाहीं; २० महिनाभर एवढे दिवस खाल; तें
तुमच्या नाकांतून निघेल, असें तुह्मास कंटाळा येई
तोंपर्यंत खाल; कारण कीं तुह्मामध्यें जो परमे-
श्वर, त्याला तुह्मी धिक्कारिलें आहे, आणि तुह्मी
त्याच्यापुढें रडून ह्मटलें कीं, 'आह्मी मिसरांतून
कशासाठीं निघालों?" २१ तेव्हां मोशे बोलला,
"ज्या लोकांमध्यें मी आहें, ते साहा लाख पाय-
दळ आहेत, तथापि तूं ह्मणतोस, मी त्यांस मांस
असें देईन कीं ते महिनाभर एवढे दिवस खातील.
२२ बकरें व गुरें त्यांच्यासाठीं जर कापलीं तर
त्यांस पुरतील कीं काय? समुद्रांतले सर्व मासे त्यां-
च्यासाठीं गोळा केले, तर त्यांस पुरे होतील कीं
काय?" २३ तेव्हां परमेश्वर मोश्याला बोलला,
"परमेश्वराचा हात आखूड झाला आहे काय?
माझें वचन तुझ्या अनुभवास येईल किंवा नाहीं, हें
तूं आतां पाहसील." २४ तेव्हां मोश्याने बाहेर
जाऊन परमेश्वराचीं वचनें लोकांस सांगितलीं,
आणि लोकांच्या वडिलांतलीं सत्तर माणसें मिळवून
मंडपाजवळ त्यांस पाळ्याने सादर केलें. २५ मग
परमेश्वर ढगासुद्धां उतरून त्यांसीं बोलला; नंतर
त्याने त्यावरल्या आत्म्यांतलें कांहीं घेऊन त्या स-
त्तर वडिल माणसांवर ठेविलें; तेव्हां असें झालें
कीं आत्मा त्यांवर येतांच, त्यानी भविष्य सांगितलें
आणि दम धरिला नाहीं. २६ परंतु त्यांतले दोन
पुरुष छावणींत राहिले होते, एकाचें नांव एल्दाद
आणि दुसऱ्याचें नांव मेदाद; तरी आत्मा त्यांवर
येऊन राहिला; ते तर लिहिलेल्यांमध्यें होते परंतु
मंडपास गेले नव्हते, आणि त्यानी छावणींत

भविष्य सांगितलें· २७ तेव्हां एक तरुण धांवून
मोश्याला सांगून बोलला कीं, "एल्दाद व मेदाद
छावणींत भविष्य सांगतात·" २८ मग मोश्या-
च्या तरण्यांतला नूनाचा पुत्र यहोशवा त्याचा
सेवक, याने उत्तर देऊन ह्मटलें, "हे माझ्या प्रभू
मोशे, तूं त्यांस मना कर·" २९ तेव्हां मोशे
त्याला बोलला, "तूं माझ्यासाठीं हेवा करितोस
काय? परमेश्वराचे सर्व लोक भविष्यवादी अ-
सते, ह्मणजे परमेश्वराने आपला आत्मा त्यांवर
ठेविला असतां, तर हें किती बरें असतें·" ३०
मग मोशे आपण व इस्राएलाचे वडील मिळून
छावणींत गेले· ३१ तेव्हां परमेश्वराकडून वा-
ऱ्याने सुटून समुद्रावरून लावे पक्षी आणिले,
आणि छावणीच्या चहुंकडे सुमारें एक दिवसाची
वाट अलिकडे, आणि सुमारें एक दिवसाची वाट
पलिकडे, आणि भूमीच्या पाठीवर सुमारें दोन
हात उंच असे छावणीवर सोडिले· ३२ तेव्हां
लोकानी उठून त्या सगळ्या दिवसीं व त्या सग-
ळ्या रात्रीं लावे गोळा केले; ज्याने थोडे घेतले,
त्याने तर दाहा होमर इतके गोळा केले; मग
त्यानी आपल्यासाठीं छावणीच्या चहुंकडे पसरून
ठेविले· ३३ तें मांस त्यांच्या दातीं होतें ति-
तक्यांत खाल्ल्यापूर्वी परमेश्वर लोकांवर रागें
भरला, आणि परमेश्वराने लोकांवर फार भारी
पटकी लाविली· ३४ मग त्याने त्या ठिकाणाचें
नांव 'कब्राथहात्तावा,' असें ठेविलें; कारण कीं
त्यानी तेथें वांच्छा धरणारे लोक पुरिले· ३५
मग लोक किब्राथहात्तावापासून निघून हजेरोथास
गेले, आणि हजेरोथांत ते राहिले·

## अध्याय १२.

आणि मोश्याने जी खुश देशांतली स्त्री क-
रून घेतली होती, तिजमुळें मिर्याम व
आहरोन हीं त्याच्याविरुद्ध बोललीं; कां तर
त्याने खुशीण स्त्री करून घेतली होती· २ त्यानी
असें ह्मटलें, "परमेश्वर केवळ मोश्याकडूनच
बोलला काय? आह्माकडूनहि बोलला नाहीं कीं
काय?" आणि परमेश्वराने ऐकिलें. ३ तर तो
माणूस मोशे फार नम्र, भूमीच्या पाठीवरल्या
सर्व माणसांपेक्षां अधिक नम्र होता· ४ तेव्हां
मोशे व आहरोन व मिर्याम यांस परमेश्वराने
एकाएकीं सांगितलें कीं, "तुह्मी तिघे बाहेर सभा-
मंडपाकडे या·" मग तीं तिघें बाहेर आलीं· ५
आणि परमेश्वर ढगाच्या खांबांत उतरून मंड-
पाच्या दारीं उभा राहिला, मग त्याने आहरो-
नाला व मिर्यामेला बोलाविलें आणि तीं उभयतां
निघालीं· ६ तेव्हां तो बोलला, "तुह्मी माझ्या
गोष्टी अगत्य ऐका; जर तुमच्यामध्यें भविष्यवादी
असला, तर त्याला मी परमेश्वर दृष्टांताने प्रगट
होईन; स्वप्नांत त्यासीं बोलेन. ७ माझा सेवक
मोशे तसा नाहीं; तो माझ्या सगळ्या घरामध्यें
विश्वासूक आहे· ८ मी तोंडोतोंड दर्शन देऊन
त्यासीं बोलत जाईन, परंतु कूट वाक्यानी नाहीं,
आणि तो परमेश्वराचें प्रतिरूप पाहील; तर
माझा सेवक मोशे याच्याविरुद्ध बोलायास तुह्मी
कां भ्यालां नाहीं?" ९ तेव्हां परमेश्वर त्यांवर
रागें भरून गेला· १० ढगहि मंडपावरून गेला,
आणि पाहा, मिर्याम बर्फासारिखी कोडी झा-
ली; तेव्हां आहरोनाने मिर्यामेला पाहिली, तर
पाहा, ती कोडी आहे· ११ मग आहरोन मो-
श्याला बोलला, "हे माझ्या प्रभू, कृपा करून
जें पाप आह्मी मूर्खपणाने व पापिष्ठपणाने केलें
तें आह्मावर लावूं नको; १२ जसा को-
णी आपल्या आईच्या पोटांतून निघतांच मेले-
ला, आणि त्याच्या अर्ध्या शरिराचा क्षय झा-
लेला, त्यासारिखी ही नसावी·" १३ तेव्हां
मोशे परमेश्वराजवळ ओरडत बोलला, "हे
देवा, तूं इला अगत्य बरें कर·" १४ तेव्हां पर-
मेश्वर मोश्याला बोलला कीं, "तिचा बाप तिच्या
तोंडावर थुंकलाच असतां तर ती सात दिवस न
लाजती कीं काय? तिला सात दिवस छावणी
बाहेर घालून प्रतिबंध व्हावा, आणि मग तिला
घ्यावें· १५ यास्तव मिर्यामेला सात दिवस
छावणीबाहेर घालून प्रतिबंध झाला, आणि मि-
र्यामेचा अंगीकार झाला तोंपर्यंत लोक निघाले
नव्हते· १६ आणि मग लोक हजेरोथापासून
निघून पारान अरण्यांत उतरले·

## अध्याय १३.

आणि परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें
कीं, २ "जो खनान देश मी इस्राएला-
च्या संतानांस देतों, त्याचा शोध करायास तूं आप-
ल्यासाठीं माणसें पाठीव; तुह्मी प्रत्येकाच्या पूर्व-
जांच्या वंशांतला एक एक माणूस पाठवा; ते सर्व
त्यांतले अधिकारी असावे. ३ मग परमेश्व-
राच्या सांगण्याप्रमाणें मोश्याने त्यांस पारानाच्या
अरण्यांपासून पाठविलें; ते सर्व मनुष्य इस्राएला
च्या संतानांचे अधिपति होते. ४ आणि त्यांचीं
नांवें हींच; रऊबेनाच्या वंशांतला, जाकूराचा पुत्र
शाम्मुवा; ५ शिमोनाच्या वंशांतला, होरीचा
पुत्र शाफाट; ६ यहूदाच्या वंशांतला, यफुन्ने
याचा पुत्र कालेब; ७ इस्साखाराच्या वंशांतला,
योसेफाचा पुत्र इगाल; ८ एफ्राइमाच्या वंशां-
तला, नूनाचा पुत्र होश्या; ९ बन्यामिनाच्या
वंशांतला, राफूचा पुत्र पाल्टी; १० जबुलुना-
च्या वंशांतला, सोदी याचा पुत्र गादियेल; ११
योसेफाच्या वंशांतला, मनाश्याच्या वंशांत सुरसी
याचा पुत्र गादी; १२ दानाच्या वंशांतला, गमा-
ली याचा पुत्र आम्मियेल; १३ आशेराच्या
वंशांतला, मीखाएलाचा पुत्र सथूर; १४ ना-
फ्तालीच्या वंशांतला, वफसी याचा पुत्र नाहबी;
१५ गादाच्या वंशांतला, माखी याचा पुत्र गउ-
वेल. १६ ज्या माणसांस तो देश हेरायाला
मोश्याने पाठविलें, त्यांचीं नांवें असीं होतीं, आणि
नूनाचा पुत्र होश्या, याला मोश्याने यहोशवा
असें ह्मटलें.

१७ जेव्हां मोश्याने त्यांस खनान देशाचा
शोध करायास पाठविलें, तेव्हां त्याने त्यांस सां-
गितलें कीं, "तुह्मी इकडून दक्षिणेस चढून डों-
गरावर जा; १८ आणि तो देश कसा, आणि
त्यावरले राहणारे लोक ते सबळ किंवा दुर्बळ,
थोडे किंवा बहुत; १९ आणि ज्या भूमीवर ते
राहतात, ती कसी, बरी किंवा वाईट; आणि ज्या
नगरांत ते राहतात ती कसी; ते तळामध्यें किं-
वा कोठांमध्यें राहतात; २० आणि ती जमीन
कसी, पिकाऊ किंवा नापीक; तिजवर झाडें आहेत
किंवा नाहींत हें पाहा; आणि तुह्मी धीर धरा,
देशांतलीं फळेंहि घेऊन या." ते दिवस तर
द्राक्षांच्या पहिल्या उत्पन्नांचे दिवस होते. २१
तेव्हां त्यानी वर जाऊन जिनाच्या रानापासून
हमाथाच्या वाटेवरल्या रहोबापर्यंत, तो देश हे-
रिला. २२ आणि ते दक्षिणेकडून चढून हे-
ब्रोनास गेले; तेथें अनाकाचे वंशस्थ अहीमान,
शेशाय व तालमाय होते; हेब्रोन तर मिसरां-
तल्या जोवानापूर्वी सात वर्षें बांधलें होतें. २३
तेव्हां एष्कोल ओहळापर्यंत ते आले आणि तेथ-
ल्या द्राक्षांच्या एकाचा फांटा घोंसासुद्धां तोडिला,
आणि त्याला दोघानी काठीवर वाहिलें, आणि
कांहीं दाळिंबें व कांहीं अंजिर त्यानी घेतले. २४
तेथें इस्राएलाच्या संतानानी जो घोंस तोडिला,
त्यामुळें त्या ठिकाणाचें नांव एष्कोल ओहळ असें
ह्मटलें गेलें. २५ मग चाळीस दिवसांच्या शेव-
टीं ते तो देश हेरून माघारे आले. २६ आणि
ते चालून मोशे व आहरोन व इस्राएलाच्या
संतानांचा सर्व समुदाय यांजवळ पारानाच्या अर-
ण्यांतल्या कादेशास आले; तेव्हां त्यानी त्यांजवळ
व सर्व समुदायाजवळ वर्त्तमान आणिलें, आणि
त्या देशांतलें फळ त्यांस दाखविलें. २७ तेव्हां
त्यानी त्याजवळ निवेदन करून ह्मटलें कीं, "ज्या
देशांत त्वां आह्मास पाठविलें, तेथें आह्मी पोंह-
चलों; तर तो मध व दूध वाहण्याचा देश आहे
खरा, आणि हें त्यांतलें फळ आहे. २८ परंतु
त्या देशांत राहणारे लोक बळकट, आणि तेथलीं
नगरें फार मोठीं व सपरिघ आहेत; अणखी तेथें
अनाकाचे वंशस्थ आह्मी पाहिले. २९ दक्षिण
प्रांतीं अमालेक लोक राहतात, आणि डोंगरवटी-
वर हित्ती व यबूसी व अमोरी राहतात, आणि
समुद्राजवळ व यार्देनेच्या कांठीं खनानी राहतात."
३० तेव्हां कालेब लोकांस मोश्याजवळ शांतवीत
ह्मणाला, "आपण वर जाऊंच जाऊं, आणि तो
वतन करून घेऊं, कां तर घ्यायास आह्मी शक्ति-
मान आहों." ३१ तथापि जे मनुष्य त्याच्या-
संगतीं वर गेले, त्यानी ह्मटलें, "आमच्याने त्या
लोकांजवळ वर जाववत नाहीं; कां तर ते आ-
ह्मापेक्षां सबळ आहेत." ३२ अणखी त्यानी
जो देश हेरिला, त्याविषयीं इस्राएलाच्या सं-
तानांजवळ ते असें वाईट बोलले कीं, "ज्या देशांत

आह्मी हेरीत फिरलों, तो देश आपल्यांतल्या रा-
हणाऱ्यांस खाऊन टाकितो, आणि त्यामध्यें जे
लोक आह्मी पाहिले, तितके सर्व फार उंच मनुष्य
आहेत. ३३ तेथें महाकायापासून झालेले, अ-
नाकाचे वंशस्थ असे महाकाय आह्मी पाहिले,
आणि आह्मी आपल्या दृष्टीस नाकतोड्यांसारिखे
होतों; त्यांच्या दृष्टींसहि तसेच होतों."

## अध्याय १४.

तेव्हां सर्व समुदायाने आपला स्वर काढून आ-
कांत केला, आणि त्या रात्रीभर लोक रडले.
२ आणि इस्राएलाच्या सर्व संतानांनी मोश्यावि-
षयीं व आहरोनाविषयीं कुरकूर केली, आणि सर्व
समुदायाने त्यांजवळ ह्मटलें, "आह्मी मिसर दे-
शांत मेलों असतों तर किती बरें! किंवा या
रानांत मेलों तर किती बरें होतें!" ३ आणि पर-
मेश्वराने आह्मास या देशांत कशाला आणिलें?
आह्मी तरवारीने पडावें ह्मणून; आमच्या स्त्रिया
व आमचीं लेंकरें लुटीचीं होतील; आह्मास मि-
सरांत परत जाणें हें बरें नाहीं काय?" ४ आणि
त्यांनी एकमेकांसीं ह्मटलें, "आपण पुढारी करून
माघारे मिसरांत जाऊं." ५ तेव्हां मोशे व आ-
हरोन इस्राएलाच्या संतानांच्या समुदायाच्या सर्व
मंडळीपुढें उपडे पडले. ६ आणि देशाच्या हेर-
णाऱ्यांतला नूनाचा पुत्र यहोशवा व यफुन्न्याचा
पुत्र कालेब यांनी आपलीं वस्त्रें फाडिलीं; ७
आणि इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायास
असें ह्मटलें कीं, "आह्मी ज्या देशांत हेरीत फि-
रलों, तो फार फार चांगला देश आहे. ८ जर
परमेश्वराची आवड आह्मावर आहे, तर तो
आह्मास त्या देशांत नेईल; दूध व मध जेथें वा-
हतो तो देश आह्मास देईल. ९ परमेश्वरा-
विषयीं केवळ विरुद्ध करूं नका, आणि तुह्मी त्या
देशांतल्या लोकांस भिऊं नका; कारण कीं ते आ-
ह्मासीं अन्नरूप होतील; त्यांचा आश्रय त्यांव-
रून गेला, आणि आह्मास परमेश्वर अनुकूल
आहे; तुह्मी त्यांस भिऊं नका." १० मग सर्व
समुदायाने सांगितलें कीं, "तुह्मी त्यांस धोंड-
मार करा." तेव्हां सभामंडपांत परमेश्वरा-
चें वैभव इस्राएलाच्या सर्व संतानांस दिसलें.
११ आणि परमेश्वराने मोश्याला ह्मटलें, "हे
लोक कोठपर्यंत मला धिक्कारितील आणि त्यांमध्यें
जे चमत्कार म्या दाखविले, ते सर्व असतांहि
कोठवर मला मानणार नाहींत? १२ मी तर
रानांत त्यांस घालवून तुला त्यांपेक्षां मोठें व
बळकट राष्ट्र असें करीन." १३ तेव्हां मोशे
परमेश्वराला बोलला, "तर मिसरी वर्त्तमान
ऐकतील, कारण कीं त्वां आपल्या बळाने त्यांमधून
या लोकांस वर आणिलें. १४ मग ते या देशां-
तल्या राहणाऱ्यांस सांगतील; त्यांनी ऐकिलें आहे
कीं तूं परमेश्वर या लोकांमध्यें आहेस; अणखी
तूं परमेश्वर प्रत्यक्ष दृष्टीस दिसत आहेस,
आणि तुझा ढग त्यावर उभा राहतो, आणि दिव-
सां तूं ढगाच्या खांबांत व रात्रीं अग्नीच्या खांबांत
त्यांच्यापुढें चालतोस; १५ यास्तव तूं या लो-
कांस एका मनुष्यासारिखें जिवें मारसील, तर
ज्या राष्ट्रांनी तुझें वर्त्तमान ऐकिलें आहे, तीं असें
ह्मणतील कीं, १६ 'परमेश्वराने जो देश त्या
लोकांस शपथेने देऊं केला होता त्यांत तो त्यांस
न्यावयास समर्थ नव्हता, ह्मणून त्याने त्यांचा
घात रानांत केला.' १७ तर आतां माझ्या प्रभू-
चा पराक्रम थोर दिसावा, जसें त्वां सांगितलें
तसें; १८ ह्मणजे परमेश्वर मंदक्रोध व फार
दयावान, अन्यायाची व पातकाची क्षमा करणारा
आहे, आणि तिसऱ्या व चवथ्या पिढीपर्यंत बापां-
च्या अन्यायाचें शासन लेंकरांस करीत असतां,
दोष्यांस निर्दोषी ठरविणार नाहीं. १९ तूं आपल्या
मोठ्या दयेप्रमाणें आणि मिसरापासून एथपर्यंतहि
जसें त्वां या लोकांचें सहन केलें आहे, तसा या
लोकांचा अन्याय क्षमा कर." २० तेव्हां परमे-
श्वर बोलला, "तुझ्या मागण्याप्रमाणें म्या क्षमा
केली आहे. २१ तथापि मी स्वजिवाची शपथ
करितों कीं संपूर्ण पृथ्वी परमेश्वराच्या गौरवाने
भरेल; २२ कारण कीं ज्या सर्व माणसांनी
माझें वैभव आणि मिसरांत व रानांत माझे दाख-
विलेले चमत्कार पाहिले, तथापि एवढ्यांत दाहा
वेळां माझी परीक्षा केली, आणि माझा शब्द ऐकि-
ला नाहीं, २३ त्यांच्या पूर्वजांस जो देश म्या
शपथेने देऊं केला, त्याला ते निश्चयें पाहणार ना-
हींत; ज्यांनी मला धिक्कारिलें त्यांतील कोणीहि

त्याला पाहणार नाहींत. २४ परंतु माझा सेवक कालेब यांत स्वभाव वेगळा होता या कारणास्तव आणि त्याने सर्व प्रकारें मला मानिलें, यास्तव ज्या देशांत तो गेला होता तेथें मी त्याला नेईन, आणि त्याचें संतान तेथलें वतन पावेल. २५ अमालेकी व खनानी हे तर तळवटीं राहतात; तुह्मी उद्यां फिरा, आणि रानाकडे सूफ समुद्राच्या वाटेस निघून जा."

२६ आणखी परमेश्वराने मोशे व आहरोन यांस असें सांगितलें कीं, २७ "हा दुष्ट समुदाय जो मजवर कुरकूर करितो, त्याचें कोठपर्यंत सोसावें? ज्या कुरकुरी इस्राएलाचीं संतानें मजवर करितात, त्या म्या ऐकिल्या आहेत. २८ त्यांस तूं सांग, 'परमेश्वर ह्मणतो कीं मी जिवंत आहें यावरून जसें तुह्मी माझ्या ऐकण्यांत बोललां तसें मी तुह्मास करीन. २९ तुमचीं प्रेतें या रानांत पडतील; तुमच्या झडतीचे सर्वहि, तुमच्या गणतीचे सर्व, वीस वर्षांचे व वरले, जे मजवर कुरकुरले, ३० ते तुह्मी, ज्या देशांत तुह्मास वस्ति द्यायाला म्या शपथ केली, त्यांत निश्चयें पोहंचणार नाहीं; केवळ यफुन्नयाचा पुत्र कालेब व नूनाचा पुत्र यहोशवा. ३१ आणि तुमचीं बाळकें, ज्यांविषयीं तुह्मी ह्मटलें, 'तीं लुटीचीं होतील,' त्यांसच मी तेथें नेईन, आणि जो देश तुह्मी तुच्छ केला, त्याचा अनुभव ते घेतील. ३२ परंतु स्वतां तुमचीं प्रेतें या रानांत पडतील. ३३ आणि रानांत तुमचीं प्रेतें अगदीं नाहींसीं होतील तोंपर्यंत चाळीस वर्षे तुमचीं लेंकरें रानामध्यें फिरत असतां तुमच्या दुष्टाईचें फळ भोगतील. ३४ जितके दिवस तुह्मी देश हेरिला, तितक्यांच्या गणतीप्रमाणें चाळीस दिवस, एक एक दिवसाला एक एक वर्ष, असीं चाळीस वर्षे तुह्मी आपला अन्याय सोसाल, आणि माझ्या त्यागाचा अनुभव घ्याल. ३५ मी परमेश्वर बोललों आहें कीं मजवर जे मिळाले, त्यांचा हा सर्व दुष्ट समुदाय याला मी निश्चयें असें करीन; या रानांत त्यांचा नाश होईल, एथेंच ते मरतील." ३६ तेव्हां जे मनुष्य देश हेरायास मोश्याने पाठविले होते, ज्यांनी परत येऊन देशाविषयीं वाईट बोलून सर्व समुदाय त्यावर कुरकुरे असें केलें; ३७ ते मनुष्य ज्यांनी देशाचें वाईट वर्त्तमान आणिलें, ते परमेश्वरासमोर पटकीने मेले. ३८ परंतु देश हेरायास जे गेले, त्या माणसांतले नूनाचा पुत्र यहोशवा, व यफुन्नयाचा पुत्र कालेब, हे जगले. ३९ तेव्हां मोश्याने ह्या गोष्टी इस्राएलाच्या सर्व संतानांस सांगितल्या, आणि लोकांनी फार शोक केला. ४० मग ते सकाळीं उठून डोंगराच्या शिखरापर्यंत चढले आणि ह्मणाले, "पाहा, आह्मी सिद्ध आहों, आणि जें ठिकाण परमेश्वराने सांगितलें, तेथें आह्मी वर जाऊं; कारण कीं आह्मी पाप केलें आहे. ४१ तेव्हां मोशे बोलला, "तुह्मी परमेश्वराच्या सांगण्याचें उलंघन करितां, हें कशासाठीं? हें सफळ होणारच नाहीं. ४२ परमेश्वर तुमच्यांमध्यें नाहीं, यास्तव तुह्मी वर जाऊं नका; जातां, तर आपल्या शत्रूंसमोर मारले जाल. ४३ कां तर अमालेकी व खनानी तिकडे तुमच्यासमोर आहेत; आणि तुह्मी तरवारीनें पडाल; कारण कीं तुह्मी परमेश्वराच्या मागून फिरलां आहां, यामुळें परमेश्वर तुह्मास अनुकूळ होणार नाहीं." ४४ तथापि ते हूड होऊन डोंगराच्या शिखरापर्यंत चढले; परंतु परमेश्वराच्या कराराचा कोश व मोशे छावणींतून निघाला नाहीं. ४५ आणि त्या डोंगरावर राहणारे अमालेकी व खनानी यांनी उतरून त्यांस मारून हर्म्यापर्यंत भडकविलें.

## अध्याय १५.

आणखी परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांजवळ बोलून त्यांस असें सांग कीं, तुमच्या वस्त्यांसाठीं जो देश मी तुह्मास देतों तेथें जेव्हां तुह्मी पोहंचाल, ३ आणि परमेश्वराजवळ गुरांतलें किंवा बकऱ्यांतलें अर्पण, होम, किंवा नवस पूर्ण करण्याचा यज्ञ, किंवा स्वइच्छेने किंवा आपल्या पर्वकाळीं परमेश्वरापासीं शांतिकारक सुवास करायास कांहीं अर्पण कराल, ४ तेव्हां जो आपलें अर्पण परमेश्वराजवळ आणितो, त्याने हिनाचा एक चतुर्थांश तेल यांत मळलेलें दशमांश सपीठ असा नैवेद्य आणावा; ५ आणि एका कोंकऱ्याच्या होमांत किंवा यज्ञांत तूं पेय अर्पणासाठीं एक

हिनाचा चतुर्थांश द्राक्षारस वाहा. ६ किंवा एडका
असला, तर त्यासंगतीं हिनाचा एक तृतीयांश
तेलांत मळलेलें दोन दशमांश सपीठ, असा नैवेद्य
वाहा. ७ आणि पेय अर्पणासाठीं एक तृतीयांश
द्राक्षारस **परमेश्वरा**जवळ शांतिकारक सुगंध क-
रायास वाहा. ८ आणि जेव्हां तूं तरण्या गो-
ऱ्ह्याचा होम, अथवा नवस पूर्ण करण्याचा किंवा
शांतिकारक यज्ञ **परमेश्वरा**जवळ करितोस, ९
तेव्हां अर्ध्या हिनाच्या तेलांत मळलेले तीन दश-
मांश सपीठ असा नैवेद्य तरण्या गोऱ्ह्याच्या सं-
गतीं आणावा. १० आणि पेय अर्पणासाठीं अर्धा
हिनाचा द्राक्षारस **परमेश्वरा**जवळ शांतिकारक सु-
वास करायास असें अर्पण तूं आण. ११ याप्रमाणें
एका बैलासंगतीं किंवा एका एडक्यासंगतीं अथवा
मेंढ्यांतल्या किंवा शेरडांतल्या बकऱ्यासंगतीं करावें.
१२ असें तुह्मी जितके पशू अर्पितां, त्यांच्या सं-
ख्येप्रमाणें एकएकाच्या संगतीं अर्पा. १३ **पर-
मेश्वरा**जवळ शांतिकारक सुवास करायास अर्पण
वाहते वेळेस देशांतल्या प्रत्येकानें याप्रमाणें तीं
साहित्यें वाहावीं. १४ आणि जर कोणी विदेशी
तुमच्याजवळ राहतो, किंवा तुमच्या पिढीपरंपरा
कोणी तुह्मामध्यें आहे, आणि **परमेश्वरा**पाशीं शां-
तिकारक सुवास करायास अर्पण करील, तर जसें
तुह्मी करितां, तसें त्यानें करावें. १५ मंडळीं-
तल्या तुह्मास आणि प्रवास करणाऱ्या विदेश्यास
नेम एकच, तुमच्या पिढीपरंपरा सर्वकाळचा नेम
व्हावा; जसा तुह्मास तसा विदेश्यास **परमेश्व-
रा**समोर असावा. १६ तुह्मास व तुमच्याजवळ
राहणाऱ्या विदेश्यास नेम एक व रीति एक
व्हावी." १७ आणि **परमेश्वरानें** मोश्याला
असें सांगितलें कीं, १८ तूं इस्राएलाच्या संता-
नांस बोलून त्यांस सांग, ज्या देशांत मी तुह्मास
नेतों, तेथें तुह्मी पोहंचाल, १९ आणि त्या दे-
शांतलें अन्न खाल, तेव्हां असें व्हावें कीं तुह्मी
**परमेश्वराला** उचललेलें दान द्यावें. २० तुह्मी
आपापल्या पहिल्या उंड्याची एक भाकर असें
उचललेलें दान द्या; जसें खळ्यांतलें उचललेलें
दान, तसें हें दान करा. २१ आपल्या पिढी-
परंपरा आपापल्या पहिल्या उंड्याचें उचललेलें
दान **परमेश्वराला** द्या."

२२ आणि जर तुह्मी चुकून ज्या सर्व आज्ञा
**परमेश्वरानें** मोश्याजवळ सांगितल्या त्या पाळि-
ल्या नाहींत. २३ ह्मणजे ज्या सर्व आज्ञा **परमे-
श्वरानें** मोश्याच्या योगें दिल्या, जेव्हां **परमे-
श्वरानें** आज्ञा दिल्या त्या दिवसापासून पुढेंहि तु-
मच्या पिढीपरंपरा, त्यांतील सर्व पाळिल्या नाहींत;
२४ आणि जर समुदायाला न कळतां चूक घड-
ली, तर असें व्हावें कीं सर्व समुदायानें **परमे-
श्वरा**पाशीं शांतिकारक सुवासाच्या होमासाठीं
एक तरणा गोऱ्हा, आणि विधीप्रमाणें त्याचा नैवेद्य
व त्याचें पेय अर्पण, आणि पापहारक यज्ञासाठीं
शेरडांतला एक बकरा वाहावा. २५ तेव्हां याज-
कानें इस्राएलाच्या संतानांच्या सर्व समुदायासाठीं
प्रायश्चित्त करावें, ह्मणजे त्यांस तिची क्षमा हो-
ईल; कारण कीं ती चूक होती, आणि त्यांनी
आपल्या चुकीमुळें **परमेश्वरा**जवळ आपलें अर्पण
आणि आपला पापहारक यज्ञपशु **परमेश्वरा-**
समोर आणिला; २६ असी इस्राएलाच्या संता-
नांच्या सर्व समुदायाला आणि त्यांच्यामध्यें राह-
णाऱ्या विदेश्याला तिची क्षमा होईल; कारण कीं
सर्व लोकांकडून ती चुकून झाली होती.

२७ आणि जर कोणीएक चुकून पाप करितो,
तर त्यानें पापहारक यज्ञासाठीं पहिल्या वर्षांतील
शेळी आणावी. २८ आणि ज्या मनुष्यानें चुकून
पाप केलें, त्याची क्षमा साधायासाठीं याजकानें
त्यासाठीं **परमेश्वरा**समोर प्रायश्चित्त करावें;
ह्मणजे त्याला त्याची क्षमा होईल. २९ इस्रा-
एलाच्या संतानांतला देशस्थ असो किंवा विदेशी
असो, तरी जो कोणी चूक करितो त्याविषयीं एक
नेम तुह्मास असावा. ३० परंतु देशस्थांतला
किंवा विदेश्यांतला जो कोणी धृष्टतेनें पाप करितो,
तो **परमेश्वराला** धिक्कारितो, यास्तव तो मनुष्य
आपल्या लोकांतून छेदला जाईल; ३१ कारण
कीं त्यानें **परमेश्वराची** गोष्ट तुच्छ केली, त्याची
आज्ञाहि मोडिली; तो मनुष्य छेदला जाईलच
जाईल; त्याचा अन्याय त्यावरच असावा." ३२
आणि इस्राएलाचीं संतानें रानांत होतीं, तेव्हां
शाब्बाथ दिवशीं कोणी लांकडें गोळा करीत अस-
तां त्यांस अढळला. ३३ आणि ज्यांस तो लां-
कडें गोळा करितां अढळला, त्यांनी त्याला मोश्या-

व आहरोन व सर्व समुदाय यांजवळ आणिलें.
३४ तेव्हां त्यानी त्याला बंदांत ठेविलें, कारण कीं
त्याला काय करावें, हें उघडें सांगितलें नव्हतें.
३५ मग परमेश्वराने मोश्याला सांगितलें, "त्या
माणसाला मारावेंच मारावें; सर्व समुदायाने त्या-
ला छावणीबाहेर धोंडमार करावा." ३६ मग
अशी परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसा
सर्व समुदायाने त्याला छावणीबाहेर नेऊन धोंड-
मार केला आणि तो मेला.

३७ आणि परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, ३८ "तूं इस्राएलाच्या संतानांजवळ
बोलून त्यांस सांग कीं त्यानी आपल्या पिढीपरंपरा
आपल्यासाठीं आपल्या वस्त्रांच्या कांठांस झालर
लावावी, आणि कांठाच्या झालरीस निळा नाडा
लावावा. ३९ ती झालर तर तुह्मास असी
व्हावी कीं तुह्मी ती पाहून परमेश्वराच्या सर्व
आज्ञा आठवाव्या आणि त्यांप्रमाणें आचरण करावें,
असें कीं ज्यांस अनुसरून तुह्मी व्यभिचारी झा-
लां, ह्मणजे आपलें हृदय व आपली दृष्टि, त्याच्या
मागें जाऊं नये. ४० यासाठीं कीं तुह्मी माझ्या
सर्व आज्ञा आठवून पाळाव्या, आणि आपल्या
देवासाठीं पवित्र व्हावें. ४१ मी परमेश्वर
तुमचा देव; ज्याने तुमचा देव असा होण्यासाठीं
तुह्मास मिसर देशांतून आणिलें तोच मी परमे-
श्वर तुमचा देव आहें."

## अध्याय १६.

तेव्हां लेव्याचा पुत्र कहाथ याचा पुत्र इझार
याचा पुत्र कोराह, हा आणि रऊबेनाचे वंशस्थ
अलियाबानाचे पुत्र दाथान, व अबीराम, व पेले-
थाचा पुत्र ओन, यानी तट केला; २ ह्मणजे ते
आणि इस्राएलाच्या संतानांतले अडीचशें पुरुष जे
समुदायाचे अधिकारी, मंडळींत कीर्त्तिमंत, नामां-
कित मनुष्य, ते मोश्यासमोर उठले. ३ आणि
मोशे व आहरोन यांविरुद्ध मिळून त्यांस बोलले,
तुमचें अतिरिक्त आहे; कारण कीं सर्व समुदायां-
तले सर्वच पवित्र, आणि परमेश्वर त्यांच्यामध्यें
आहे; तर तुह्मी आपणांस परमेश्वराच्या मंड-
ळीवर कां उंच करितां?" ४ तेव्हां मोशे ऐकून
उपडा पडला; ५ आणि कोराहाला व त्याच्या
सर्व समुदायाला असें बोलला कीं, "परमेश्वराचे
कोण व पवित्र कोण हें तो सकाळीं कळवीलच,
आणि आपल्याजवळ येऊं देईल, ह्मणजे ज्याला
निवडील त्याला आपल्याजवळ येऊं देईल. ६
हे कोराहा व त्याच्या सर्व समुदायाहो, तुह्मी हें
करा; आपल्याजवळ धुपाटणीं घ्या. ७ आणि
उद्यां परमेश्वरासमोर त्यांत अग्नि घालून त्यांवर
धूप ठेवा; मग ज्या माणसाला परमेश्वर निव-
डील, तो पवित्र होईल. अहो लेवीच्या वंशानो,
तुमचें अतिरिक्त आहे." ८ आणि मोश्याने
कोराहाला सांगितलें, "अहो लेवीच्या वंशानों,
तुह्मी ऐकून घ्या; ९ इस्राएलाच्या देवाने तु-
ह्मास इस्राएलाच्या समुदायांतून वेगळें केलें, असें
कीं आपल्याजवळ तुह्मास येऊं दिल्हें, ह्मणजे
तुह्मी परमेश्वराच्या मंडपाचें काम करावें, आणि
समुदायाची सेवा करायास त्यासमोर उभें राहावें,
हें तुह्मास उणें आहे काय? १० असें त्याने
तुला आणि तुझ्यासंगतीं तुझे सर्व भाऊ लेव्याचे
वंशस्थ यांस जवळ केलें आहे; तरी तुह्मी याज-
काचें कामहि मिळवायास पाहतां. ११ यास्तव
तूं व तुझा सर्व समुदाय परमेश्वराविरुद्ध मि-
ळाला; आहरोन तर तो काय कीं तुह्मी त्या-
वर कुरकुरावें?" १२ तेव्हां मोश्याने अलिया-
बाचे पुत्र दाथान व अबीराम यांस बोलावणें पा-
ठविलें; परंतु त्यानी ह्मटलें, "आह्मी वर येणार
नाहीं; १३ त्वां आह्मास रानांत जिवें मारावें,
ह्मणून दुध व मध वाहण्याच्या देशांतून आह्मास
वर आणिलें, हें थोडें ह्मणून तूं आह्मावर कठोर
धनीपण करसीलच कीं काय? १४ त्वां आह्मास
दुध व मध वाहण्याच्या देशांत आणिलेंच नाहीं,
आणि आह्मास शेताचें व मळ्याचें वतन दिल्हें
नाहीं; तूं या माणसांचे डोळे फोडसील काय?
आह्मी वर येणार नाहीं." १५ तेव्हां मोश्याला
फार राग आला, आणि तो परमेश्वराला बोल-
ला, 'तूं त्यांच्या अर्पणावर दृष्टि लावूं नको; म्या
त्यांपासून एक गाढव घेतलें नाहीं, आणि त्यां-
तल्या एकाचें वाईट केलें नाहीं."

१६ मग मोशे कोराहाला बोलला, "तूं व तुझा
सर्व समुदाय, ह्मणजे तूं व ते व आहरोन उद्यां
परमेश्वरासमोर असा. १७ आणि तुह्मी एक

एक आपापलें धुपाटणें घेऊन त्यांवर धूपहि ठेवून
परमेश्वरासमोर अर्पण करा, प्रत्येकाने आपा-
पलें धुपाटणें, असीं अडीचशें धुपाटणीं; त्वां व
आहरोनानेहि आपलें धुपाटणें घ्यावें. १८ मग
त्यांतल्या प्रत्येकाने आपापलें धुपाटणें घेतलें, आणि
त्यांत अग्निहि घालून त्यांवर धूप ठेविला; तेव्हां
ते व मोशे व आहरोन सभामंडपाच्या दाराजवळ
उभे राहिले. १९ याप्रमाणें कोराहाने त्यांवर
सभामंडपाच्या दाराजवळ सर्व समुदाय मिळ-
विला; तेव्हां परमेश्वराचें वैभव सर्व समुदाया-
ला दिसलें. २० आणि परमेश्वराने मोशे व
आहरोन यांस असें सांगितलें कीं, २१ "तुह्मी
या समुदायांतून वेगळे व्हा, ह्मणजे मी क्षणमा-
त्रांत त्यांचा नाश करीन." २२ तेव्हां ते उपडे
पडून बोलले, "हे देवा, सर्व जीवात्म्यांच्या देवा,
एका माणसाने पाप केल्यावरून त्वां सर्व समु-
दायावर क्षोभ करावा कीं काय?" २३ मग पर-
मेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, २४
तूं समुदायाला असें सांग कीं, 'कोराह, दा-
थान, व अबीराम, यांच्या राहोट्यांच्या चहुं-
कडून तुह्मी उठून जा.' २५ यास्तव मोशे उठून
दाथान व अबीराम यांजवळ गेला, आणि इस्रा-
एलाचे वडील त्याच्या मागें गेले. २६ तेव्हां
मोश्याने समुदायाला असें सांगितलें कीं, "तुह्मी
या दुष्ट माणसांच्या राहोट्यांपासून दूर व्हा, आणि
त्यांच्या कशालाहि शिवूं नका; शिवलां तर तुह्मी
त्यांच्या अवघ्या पापांमध्यें नाश पावाल." २७
मग कोराह, दाथान व अबीराम, यांच्या राहो-
ट्यांच्या चहुंकडून ते उठून गेले; आणि दाथान
व अबीराम, आपल्या स्त्रिया व आपलीं पोरें व
आपलीं लेंकरें यांसुद्धां बाहेर येऊन आपापल्या
राहोट्यांच्या दारीं उभे राहिले. २८ तेव्हां
मोशे बोलला, "मी आपल्याच बुद्धीने हीं सर्व
कामें केलीं नाहींत, परंतु परमेश्वराने मला हीं
करायास पाठविलें आहे, हें येणेंकरून जाणा;
२९ जर ते सर्व माणसांच्या मरणाप्रमाणें मर-
तात, किंवा सर्व माणसांच्या झडतीप्रमाणें त्यांवर
झडती होती, तर परमेश्वराने मला पाठविलें
नाहीं. ३० परंतु जर परमेश्वर कांहीं नवीच
गोष्ट घडवितो, असी कीं भूमि आपलें तोंड पस-
रून त्यांस आणि त्यांचीं अवघीं यांस गिळिती
ह्मणजे ते जितेच प्रेतस्थळीं उतरतात, तर तुह्मी
जाणा कीं त्या माणसानी परमेश्वराला धिका-
रिलें आहे.

३१ मग असें झालें कीं त्याने ह्या अवघ्या
गोष्टी बोलण्याची समाप्ति केली, तेव्हांच त्यांच्या
खालची भूमि उकलली. ३२ आणि पृथ्वीने
आपलें तोंड पसरून ते व त्यांचीं घरें व कोरा-
हाकडलीं सर्व माणसें व अवघें सर्वस्व गिळिलें.
३३ असे ते आपल्या अवघ्यांसुद्धां जितेच प्रेतस्थ-
ळीं उतरले, आणि त्यांस पृथ्वीने मिळून झांकिलें;
असे ते मंडळींतून नाश पावले. ३४ तेव्हां त्यां-
च्या सभोंवते जे इस्राएली, ते सर्व त्यांच्या शब्दा-
वरून पळाले; कां तर ते ह्मणाले, "कदाचित् पृ-
थ्वी आह्मास गिळील." ३५ तेव्हां परमेश्वरा-
च्या जवळून अग्नि निघाला, आणि त्याकडून ते
धूप अर्पणारे अडीचशें पुरुष जळून गेले. ३६ तेव्हां
परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें कीं, ३७
आहरोन याजक याचा पुत्र एलाजार याला तूं सांग
कीं त्याने धुपाटणीं जळण्यांतून उचलून अग्नि दूर
झोंकावा; कारण कीं तीं पवित्र आहेत. ३८ ज्या
माणसानी आपल्या जिवांविरुद्ध पाप केलें, त्यांचीं
धुपाटणीं घेऊन त्यांचे विस्तीर्ण पत्रे वेदीला झांका-
यासाठीं करावे; कारण कीं त्यानी त्यांत परमेश्व-
रासमोर अर्पण केलें, यास्तव तीं पवित्र आहेत;
असे इस्राएलाच्या संतानांस खूण होतील." ३९
मग याजक एलाजार याने, जळून गेलेल्यांचीं तां-
ब्याचीं धुपाटणीं, ज्यांत त्यानी अर्पण केलें होतें,
तीं घेतलीं, आणि वेदीला झांकायासाठीं तीं घडून
विस्तारिलीं. ४० असी इस्राएलाच्या संतानांस
सूचना झाली कीं कोणी परका, जो आहरोना-
च्या संतानांतला नाहीं, त्याने परमेश्वरासमोर
धूप करायास जवळ न आवें, आणि कोराहासा-
रिखें व त्याच्या समुदायासारिखें न व्हावें; जसें
परमेश्वराने मोश्याच्या योगें त्याला सांगितलें
होतें, तसें झालें. ४१ नंतर सकाळीं इस्राए-
लाच्या संतानांच्या सर्व समुदायाने मोश्यावर
व आहरोनावर कुरकूर करीत ह्मटलें, "तुह्मी
परमेश्वराच्या लोकांस जिवें मारिलें." ४२
तेव्हां असें झालें कीं मोश्यावर व आहरोनावर

समुदाय मिळाला असतां, त्यानी सभामंडपा-
कडे दृष्टि लाविली, आणि पाहा, त्या ढगाने ती
झांकिली, आणि **परमेश्वराचें** वैभव दिसलें.
४३ तेव्हां **मोशे** व **आहरोन** सभामंडपापुढें आ-
ले. ४४ मग **परमेश्वराने मोश्याला** असें
सांगितलें कीं, ४५ "तुह्मी या समुदायांतून निघून
जा, ह्मणजे मी क्षणमात्रांत त्यांचा नाश करीन."
तेव्हां हे उपडे पडले. ४६ आणि **मोश्याने आ-
हरोनाला** सांगितलें, "तूं धुपाटणें घेऊन त्यांत
वेदीवरला अग्नि घाल, आणि धूप ठेवून लवकर
समुदायांत जा, आणि त्यांसाठीं प्रायश्चित्त कर;
कारण कीं **परमेश्वरापासून** क्षोभ निघाला; पटकी
लागली आहे." ४७ मग जसें **मोश्याने** सांगि-
तलें, तसें **आहरोनाने** घेतलें आणि तो मंडळी-
मध्यें धांवला; तेव्हां पाहा, पटकी लोकांस होऊं
लागली होती, परंतु त्याने धूप घालून लोकांसाठीं
प्रायश्चित्त केलें. ४८ असा मेलेले व जिवंत
यांमध्यें तो उभा राहिला, आणि ती पटकी बंद
झाली. ४९ तेव्हां **कोराहाच्या** गोष्टींत मेलेले
त्यांखेरीज या पटकीने जे मेले, ते चौदा हजार व
सातशें होते. ५० तेव्हां पटकी बंद झाल्यावर,
**आहरोन** सभामंडपाच्या दाराकडे **मोश्याजवळ**
माघारा गेला.

## अध्याय १७.

आणि **परमेश्वराने मोश्याला** असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस सांग,
आणि त्यांपासून त्यांच्या पूर्वजांच्या घराण्याप्रमाणें
एकएक काठी, अशा त्यांच्या पूर्वजांच्या घराण्यांवर-
ल्या त्यांच्या सर्व अधिकाऱ्यांजवळून बारा काठ्या,
घेऊन एकएकाचें नांव त्याच्या त्याच्या काठीवर
लिही. ३ आणि लेव्याच्या काठीवर **आहरो-
नाचें** नांव लिही, कारण कीं त्यांच्या पूर्वजांच्या
दर घराण्याच्या अधिपतीला एक काठी होईल.
४ मग सभामंडपांत संकेतलेखाच्या पुढें, जेथें मी
तुह्मास साक्षात् होत असतों, तेथें त्या तूं ठेव. ५
नंतर असें होईल कीं ज्या माणसाला मी निवडून
घेतों, त्याच्या काठीला अंकुर फुटेल; आणि इस्रा-
एलाचीं संतानें ज्या कुरकुरी तुह्मावर करितात, त्या
मी आपल्यावरून शांत करीन." ६ मग **मोश्याने**
इस्राएलाच्या संतानांस सांगितलें, आणि त्यांच्या
सर्व अधिकाऱ्यानी त्याला काठ्या दिल्या, ह्मणजे
त्यांच्या पूर्वजांच्या घराण्याप्रमाणें एकएक अधि-
काऱ्यासाठीं एकएक काठी, अशा बारा; आणि
त्यांच्या काठ्यांमध्यें **आहरोनाची** काठी होती. ७
मग **मोश्याने** त्या काठ्या संकेतलेखाच्या मंडपांत
**परमेश्वरासमोर** ठेविल्या. ८ आणि सकाळीं
असें झालें कीं **मोशे** संकेतलेखाच्या मंडपांत ग-
ला; तेव्हां पाहा, लेव्याच्या घराण्यासाठीं **आह-
रोनाची** काठी फुटली, ह्मणजे तिला अंकुर आले
आणि फुलें उमललीं, बदामहि आले. ९ तेव्हां
**मोश्याने परमेश्वरासमोरून** सर्व काठ्या बाहेर
इस्राएलाच्या सर्व संतानांजवळ आणिल्या; मग
त्यानी पाहून एकएकाने आपापली काठी घेतली.
१० तेव्हां **परमेश्वराने मोश्याला** सांगितलें, "तूं
**आहरोनाची** काठी पुन्हा संकेतलेखापुढें ठेव, आणि
ती फितुरकऱ्यांस खूण होण्यासाठीं राखली जावी;
अशाने त्वां मजवरून त्यांच्या कुरकुरीचें निवारण
करावें आणि ते न मरावे." ११ मग **मोश्याने** तें
केलें; जसी **परमेश्वराने** त्याला आज्ञा दिल्ही
होती, तसें त्याने केलें. १२ तेव्हां इस्राएलाच्या
संतानानी **मोश्याला** असें ह्मटलें कीं, "पाहा,
आह्मी मरतों, नाश पावतों; आह्मी सर्व नाश
पावतों. १३ जो कोणी **परमेश्वराच्या** मंड-
पाच्या कांहीं जवळ जातो तो मरतो; तर आह्मी
मरून समाप्त होऊं कीं काय?"

## अध्याय १८.

तेव्हां **परमेश्वराने आहरोनाला** सांगितलें कीं,
"त्वां व तुजसहित तुझ्या संतानानी व तुझ्या पू-
र्वजांच्या घराण्याने पवित्रस्थानाविषयींचा अन्याय
संभाळून घ्यावा; आणि त्वां व तुजसहित तुझ्या
संतानानी आपल्या याजकपणाचा अन्याय संभा-
ळून घ्यावा. २ आणि तुझे भाऊ लेवीचा वंश
तुझ्या पूर्वजाचा वंश, यांसहि तूं आपल्यासंगतीं
आण, आणि त्यानी तुजसीं जडलें जाऊन तुझी
सेवा करावी, परंतु त्वां व तुझ्यासंगतीं तुझ्या वंश-
स्थानी संकेतलेखाच्या मंडपापुढें सेवा करावी. ३
त्यानी तर तुझें जें संभाळायाचें, आणि मंडपाचें
जें सर्व संभाळायाचें, तें संभाळावें; परंतु पवित्र-

स्थानांतल्या साहित्यांजवळ व वेदीजवळ येऊं नये;
आले, तर ते व तुह्मीहि मरावे. ४ ते तर तुजसीं
जडले जाते, आणि मंडपाच्या सर्व सेवेंत सभामं-
डपाचें जें संभाळायाचें तें त्यानी संभाळावें; आणि
परक्याने तुमच्याजवळ येऊं नये. ५ पवित्र-
स्थानांतलें जें संभाळायाचें, आणि वेदीचें जें संभा-
ळायाचें तें तुह्मीच संभाळा; ह्मणजे इस्राएलाच्या
संतानांवर अणखी क्षोभ न व्हावा. ६ आणि पा-
हा, म्या तुमचे भाऊ लेवी इस्राएलाच्या संतानां-
तून घेतले आहेत; सभामंडपाची सेवा करायास ते
**परमेश्वरा**साठीं तुह्मास दान दिल्हेले आहेत.
७ आणि वेदीच्या प्रत्येक कार्याविषयीं व पडद्या-
च्या आंतल्याविषयीं त्वां व तुझ्यासंगतीं तुझ्या
संतानानी आपलें याजकपण करावें; असी तुह्मी
सेवा करा; मी तुमचें याजकपण तुह्मास दान देतों;
आणि कोणी परका जवळ आला असतां त्याला
मारावें." ८ अणखी **परमेश्वराने** आहरोनाला
सांगितलें कीं, "पाहा इस्राएलाच्या संतानांच्या सर्व
पवित्रांतलीं माझीं उचललेलीं दानें यांचा अधिकार
म्या तुला दिल्हा आहे, अभिषेकामुळें त्या पवित्र
वस्तू तुला व तुझ्या संतानांस सर्वकाळ नेमाने दि-
ल्ह्या आहेत. ९ परम पवित्र वस्तूंतलें जें अग्नी-
बाहेर राहतें, तें तुझें व्हावें, त्यांच्या सर्व नैवेद्यां-
तलें, व त्यांच्या सर्व पापहारक यज्ञांतलें, व त्यांच्या
सर्व दोषहारक यज्ञांतलें त्यांचें प्रत्येक जें अर्पण ते
मला देतील, तें परम पवित्र तुझें व तुझ्या संता-
नांचें व्हावें. १० परम पवित्रांतल्या ठिकाणीं त्वां तें
खावें, प्रत्येक पुरुषाने तें खावें; तें पवित्र द्रव्य तुझें
व्हावें. ११ हींहि तुझीं असावीं, ह्मणजे इस्राए-
लाच्या संतानांच्या सर्व ओंवाळणांसुद्धां त्यांचीं
उचललेलीं दानें सर्वकाळ नेमाने तुला व तुझ्या-
संगतीं तुझे पुत्र व तुझ्या कन्या यांस म्या दिल्हीं
आहेत; तुझ्या घरांत प्रत्येक जो शुद्ध, त्याने तीं
खावीं. १२ सर्व निरें तेल, व सर्व निरा ताजा
द्राक्षरस, व धान्य यांतलीं जीं प्रथम फळें ते
**परमेश्वराला** देतील, तीं म्या तुला दिल्हीं आ-
हेत. १३ ते आपल्या देशांतलीं जीं अवघीं प्रथम
उत्पन्नें **परमेश्वरा**जवळ आणतील, तीं तुझीं होतील;
तुझ्या घरांत जो कोणी शुद्ध, त्याने तीं खावीं. १४
इस्राएलाकडलीं सर्व उत्सर्ग दानें तुझीं होतील
१५ सर्व जिवांत प्रथम जन्मलेले सर्व, मनुष्यांतले
व पशूंतले जे ते **परमेश्वरा**जवळ आणून देतात,
ते तुझे होतील; परंतु मनुष्याचा प्रथम जन्मलेला तूं
खंडणीने अवश्य सोड; आणि अशुद्ध पशूंचा प्रथम
जन्मलेला खंडणीने सोड. १६ आणि ज्यांची
खंडणी करायाची त्यांस एक महिना झाल्यावर
तुझ्या ठरावाप्रमाणें पवित्रस्थानाचें शेकेल जें वीस
गेराचें त्याप्रमाणें पाच शेकेल रुपें यावर तूं सोड.
१७ परंतु गुरांतला प्रथम, किंवा मेंढरांतला प्रथम,
किंवा शेरडांतला प्रथम, यांस तूं सोडूं नको; ते
पवित्र आहेत; त्यांचें रक्त वेदीवर शिंपड, आणि
**परमेश्वरा**जवळ शांतिकारक सुवासासाठीं अर्पण
असा त्यांच्या मांद्याचा धूप कर. १८ आणि
त्यांचें मांस तुझें होईल; ओंवाळणऊर व उजवे
पायखांद्यासारिखें तें तुझें होईल. १९ इस्राएला-
चीं संतानें पवित्र वस्तूंचीं जीं उचललेलीं दानें
**परमेश्वराला** अर्पितील, तीं सर्व म्या तुला आणि
तुझ्यासंगतीं तुझे पुत्र व तुझ्या कन्या यांस सर्व-
काळ नेमाने दिल्हीं आहेत; हा **परमेश्वरासमोर**
तुला व तुझ्यासंगतीं तुझ्या संतानाला मीठपूर्वक
सर्वकाळचा करार आहे."

२० आणि **परमेश्वराने** आहरोनाला सांगि-
तलें, "तूं त्यांच्या देशांतलें वतन घेऊं नको;
त्यांच्यामध्यें तुला वांटाहि नसावा; इस्राएलाच्या
संतानांमध्यें मी तुझा वांटा व तुझें वतन असा
आहें. २१ आणि पाहा, म्या लेव्याच्या वंश-
स्थांस वतनासाठीं इस्राएलांतले सर्व दाहावे
भाग त्यांच्या सेवेमुळें दिल्हे आहेत; कारण कीं
ते सभामंडपाविषयीं सेवा करितात. २२ आणि
यापुढें इस्राएलाच्या संतानानी पाप भोगायास व
मरायास सभामंडपाजवळ न यावें. २३ परंतु
लेव्यानी सभामंडपाचें काम करावें, आणि आप-
ल्याकडे अन्याय सोसावे; हा तुमच्या पिढीपरं-
परा सर्वकाळचा नेम आहे; त्यानी तर इस्राएला-
च्या संतानांमध्यें वतन घेऊं नये. २४ कारण
कीं इस्राएलाच्या संतानांकडला दाहावा भाग, जो
ते उचललेलें दान करून **परमेश्वराला** देतात,
तो म्या लेव्यांस वतनासाठीं दिल्हा; यास्तव म्या
त्यांस सांगितलें कीं, 'तुह्मी इस्राएलाच्या संतानां-
मध्यें वतन घेऊं नये. २५ तेव्हां **परमेश्वराने**

मोश्याला असें सांगितलें कीं, २६ "तूं लेव्यांस
बोलून त्यांस सांग कीं म्या इस्राएलाच्या संता-
नांपासून जो दाहावा भाग तुमचें वतन होण्या-
साठीं तुह्मांस दिल्हा, तो जेव्हां तुह्मी त्यापासून
घ्याल, तेव्हां त्यांतून **परमेश्वराला** उचललेलें
दान, दाहाव्याचा दाहावा भाग द्या. २७ आणि ते
तुमचें उचललेलें दान खळ्यांतल्या धान्यासारिखें
आणि द्राक्षरसाच्या हौदांतल्या भरण्यासारिखें तु-
मचें असें मोजलें जाईल. २८ असें तुह्मीहि
आपले जे दाहावे भाग इस्राएलाच्या संतानांपासून
घ्याल, त्या सर्वांतून **परमेश्वराला** उचललेलें दान
द्या, आणि त्यांतलें **परमेश्वराचें** उचललेलें दान
आहरोन याजक याला द्या. २९ तुमचीं सर्व दानें
यांतलें **परमेश्वराचें** प्रत्येक उचललेलें दान, ह्म-
णजे त्या सर्वांतला सार यांतून पवित्र भाग द्या.
३० आणि तूं त्यांस सांग, 'तुह्मी त्यांतला सार
असें उचललेलें दान दिल्हें असतां तें तुह्मांस
लेव्यांस, जसें खळ्यांतलें उत्पन्न व जसें द्राक्ष-
रसाच्या हौदांतलें उत्पन्न, तसें मोजलें जाईल.
३१ मग तुह्मी आपल्या घरच्यांसुद्धां तें कोणत्या-
हि ठिकाणीं खा; कारण कीं तें तुमचें वतन, सभा-
मंडपाजवळ तुमची सेवा याची फेड आहे. ३२
आणि तुह्मी त्यांतला सार असें उचललेलें दान
दिल्यावर त्याविषयीं पाप भोगणार नाहीं; परंतु
तुह्मी न मरावें ह्मणून इस्राएलाच्या संतानांच्या
पवित्र वस्तू विटाळूं नका.'"

## अध्याय १९.

आणखी **परमेश्वराने** मोशे व आहरोन यांस
असें सांगितलें कीं, २ "जो विधि **परमे-
श्वराने** आज्ञा करून सांगितला, त्याचा हाच
नेम आहे; तूं इस्राएलाच्या संतानांस सांग कीं,
त्यांनी पोंवळी कालवड सांगोपांग, जिला कांहीं
खोड नाहीं, जिजवर जूं घातलें नाहीं, असी तुझ्या-
जवळ आणावी. ३ आणि तुह्मी तिला एलाजार
याजक याजवळ द्या; मग कोणी तिला छावणी-
बाहेर नेऊन तिला त्याच्यासमोर कापावें. ४ नंतर
एलाजार याजकाने तिचें कांहीं रक्त आपल्या बो-
टाने घेऊन सभामंडपापुढें तिचें कांहीं रक्त सात
वेळां शिंपडावें. ५ आणि त्याच्या दृष्टीपुढें ए-
काने ती कालवड जाळावी; तिच्या विष्टेसुद्धां तिचें
कातडें व तिचें मांस व तिचें रक्त जाळावें. ६
मग याजकाने गंधसरूचें लांकूड व जुफा व किर-
मिजी दोरे घेऊन कालवडीच्या जळण्यांत टाकावें.
७ मग याजकाने आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने अं-
घोळ करावी, आणि त्यानंतर छावणींत यावें, आ-
णि याजकाने सांजपर्यंत अशुद्ध राहावें. ८ आणि
ज्याने ती जाळली, त्याने आपलीं वस्त्रें धुऊन पाण्याने
अंघोळ करावी, व सांजपर्यंत अशुद्ध राहावें. ९
आणि कोणी जो शुद्ध त्याने कालवडीची राख
गोळा करून छावणीच्या बाहेर शुद्ध ठिकाणीं
नेऊन ठेवावी, आणि ती इस्राएलाच्या संताना-
च्या मंडळीकरितां शुद्ध करण्याच्या पाण्यासाठीं
राखली जावी. १० आणि ज्याने कालवडीची
राख गोळा केली, त्याने आपलीं वस्त्रें धुवावीं व
सांजपर्यंत अशुद्ध राहावें, आणि इस्राएलाच्या सं-
तानांसाठीं व त्यांमध्यें राहणारा विदेशी यासाठीं
हा निरंतर नेम असावा. ११ कोणत्याहि मनु-
ष्याच्या प्रेताला जो शिवतो, त्याने तर सात दिवस
अशुद्ध राहावें. १२ त्याने तिसऱ्या दिवशीं तेणें-
करून शुद्धता करावी, मग सातव्या दिवशीं शुद्ध
व्हावें; परंतु जर तो तिसऱ्या दिवशीं शुद्धता
करीत नाहीं, तर सातव्या दिवशीं शुद्ध होणार
नाहीं. १३ जर मेलेल्या माणसाच्या प्रेताला
कोणी शिवतो, आणि शुद्धता करीत नाहीं, तर
तो **परमेश्वराच्या** मंडपाला विटाळितो, आणि
तो मनुष्य इस्राएलांतून छेदला जाईल; कारण
कीं शुद्ध करण्याचें पाणी त्यावर शिंपडलें गेलें
नाहीं; तो अशुद्ध; त्याचें अशुद्धपण अजून त्या-
वर आहे. १४ जेव्हां माणूस राहोटींत मरतो,
तेव्हां त्याविषयीं हा नेम कीं जो कोणी राहोटींत
जातो तो आणि राहोटींत जें कांहीं, तें सात दि-
वस अशुद्ध असावें. १५ आणि प्रत्येक उघडें
पात्र, ज्यावर झांकण किंवा ढांपण नाहीं, तें
अशुद्ध. १६ आणि भूमीच्या पाठीवर तरवारीने
मारलेलें, किंवा मेलेलें, किंवा मनुष्याचें हाडूक,
किंवा कबर यांस जो कोणी शिवतो, त्याने सात
दिवस अशुद्ध राहावें. १७ आणि अशुद्ध झा-
लेल्यासाठीं त्यानी त्या जाळलेल्या कालवडीची
कांहीं राख भांड्यांत घेऊन तिजवर झऱ्याचें पाणी

घालावें; १८ आणि शुद्ध माणसानें जुफा घेऊन
त्या पाण्यांत बुचकळून राहोटीवर व सर्व पात्रांवर
व तेथें जे प्राणी होते त्यांवर, आणि जो हाडकाला
किंवा वधलेल्याला किंवा मेलेल्याला किंवा कबरेला
शिवला, त्यावर तें शिंपडावें. १९ आणि शुद्धानें
अशुद्धावर तिसऱ्या दिवशीं व सातव्या दिवशीं
शिंपडावें; मग सातव्या दिवशीं त्यानें आपली
शुद्धता केल्यावर, आपलीं वस्त्रें धुऊन पाण्यानें
अंघोळ करावी, आणि संध्याकाळीं शुद्ध व्हावें.
२० परंतु जो माणूस अशुद्ध झाल्यावर शुद्धता
न करील, तो मंडळींतून छेदलाच जाईल; कारण
कीं त्यानें परमेश्वराचें पवित्रस्थान विटाळिलें;
शुद्ध करण्याचें पाणी त्यावर शिंपडलें गेलें नाहीं;
तो अशुद्ध राहिला आहे. २१ हा त्यांस निरं-
तर नेम असावा; जो शुद्ध करण्याचें पाणी शिंप-
डितो, त्यानें तर आपलीं वस्त्रें धुवावीं, आणि जो
शुद्ध करण्याच्या पाण्याला शिवतो, त्यानें सांज-
पर्यंत अशुद्ध राहावें. २२ आणि जो अशुद्ध तो
ज्या कशालाहि शिवतो तें अशुद्ध होईल, आणि
जो कोणी शिवतो त्यानें सांजपर्यंत अशुद्ध राहावें."

## अध्याय २०.

तेव्हां पहिल्या महिन्यांत इस्राएलाच्या संतानां-
चा सर्व समुदाय सीन रानांत आला; आणि
लोक कादेशांत राहिले, तेव्हां तेथें मिर्याम मेली
आणि तेथें ती पुरली. २ आणि समुदायासाठीं
पाणी नव्हतें, यास्तव ते मोशे व आहरोन यां-
विरुद्ध मिळाले. ३ तेव्हां लोक मोश्याशीं भांडत
असतां असें बोलले कीं, "जेव्हां आमचे भाऊ पर-
मेश्वरासमोर मेले, तेव्हां आह्मीहि मेलों असतों
तर बरें होतें. ४ तुह्मी तर परमेश्वराची मं-
डळी या रानांत कां आणिली? येणेंकरून आह्मी
आपल्या पशूंसुद्धां एथें मरतों. ५ आणि आ-
ह्मास या वाईट ठिकाणीं आणायास तुह्मी आ-
ह्मास मिसरांतून कां वर आणिलें? पीक, किंवा
अंजीर, किंवा द्राक्षवेल, किंवा दाळिंब यांचें हें
ठिकाण नाहीं, प्यायाला पाणी देखील नाहीं."
६ तेव्हां मोशे व आहरोन मंडळीपुढून सभा-
मंडपाच्या दाराजवळ आले, आणि उपडे पडले;
तेव्हां परमेश्वराचें वैभव त्यांस दिसलें. ७
मग परमेश्वरानें मोश्याला असें सांगितलें कीं,
८ ती काठी घे, आणि तूं व आपला भाऊ आहरोन
समुदाय एकत्र कर; मग तुह्मी त्यांच्यासमोर
खडकाला बोला, आणि तो आपलें पाणी दे-
ईल, असें तूं त्यांच्यासाठीं खडकांतून पाणी का-
ढून समुदायाला व त्यांच्या पशूंस पाज." ९
मग मोश्यानें परमेश्वरापुढून ती काठी घेतली;
जसी त्याला त्यानें आज्ञा दिल्ही होती, तसी.
१० मग मोशे व आहरोन यांनी खडकापुढें
मंडळी मिळविली, आणि त्यांस ह्मटलें, "अहो
फितुरकरी, तुह्मी ऐकून घ्या; आह्मी तुमच्यासाठीं
या खडकांतून पाणी काढूं कीं काय?" ११ मग
मोश्यानें आपला हात उभारून खडकावर दोनदां
काठी मारिली; तेव्हां पुष्कळ पाणी निघालें, आ-
णि समुदाय व त्यांचे पशु प्याले. १२ तेव्हां
मोशे व आहरोन यांस परमेश्वर बोलला,
"ज्यापेक्षां तुह्मी इस्राएलाच्या संतानांसमोर मला
पवित्र मानायास मजवर विश्वास ठेविला नाहीं
त्यापेक्षां या मंडळीला जो देश म्या दिल्हा, त्यांत
तुह्मी त्यांस नेणार नाहीं." १३ तें मेरीबाचें पाणी;
कारण कीं तेथें इस्राएलाचीं संतानें परमेश्वराशीं
भांडलीं, आणि तो त्यांकडून पवित्र मानला गेला.
१४ तेव्हां मोश्यानें कादेशांतून अदो-
माच्या राजाजवळ दूत पाठविले कीं, "तुझा
भाऊ, इस्राएल असें ह्मणतो, 'जे कष्ट आह्मास
प्राप्त झाले, ते सर्व तुला कळले, १५ कीं
आमचे पूर्वज खालीं मिसरांत गेल्यावर आह्मी
मिसरांत बहुत दिवस राहिलों, आणि मिस-
ऱ्यांनी आह्मास व आमच्या पूर्वजांस दुःख दिल्हें.
१६ मग आह्मी परमेश्वराजवळ ओरडलों, आ-
णि त्यानें आमची प्रार्थना ऐकून दूत पाठवून आ-
ह्मास मिसरांतून काढिलें; तर पाहा, तुझ्या देशाचे
शेवटलें नगर कादेश यांत आह्मी आहों. १७
कृपा करून आह्मास तुझ्या देशामधून जाऊं दे.
शेतांतून व मळ्यांतून आह्मी जाणार नाहीं, आणि
विहिरींतलें पाणी पिणार नाहीं; आह्मी राजमार्गांत
चालून तुझ्या सीमेंतून पार होऊं, तोंपर्यंत उज-
व्याकडे किंवा डाव्याकडे फिरणार नाहीं." १८
तेव्हां अदोमी त्याला बोलला, "तूं माझ्यावरून
जाऊं नको; जाशील, तर मी तुजसीं भिडायास

तरवार घेऊन बाहेर येईन." १९ मग इस्राए-
लाच्या संतानानी त्याला सांगितलें कीं, "आह्मी
सडकेवरून जाऊं, आणि आपल्या गुरांसुद्धां जर
तुझें कांहीं पाणी पिऊं, तर मी त्याचें मोल देईं.;
केवळ आपल्या पायीं जाईन, अणखीं कांहींच
नाहीं." २० परंतु तो असें बोलला कीं, "तूं
मधून जाऊं नको." आणि अदोमी त्यासीं लढा-
यास बहुत लोकांसहित व बळकट हाताने बाहेर
आले. २१ असें अदोम्यानीं इस्राएलास आपल्या
सीमेंतून जावयास मना केलें; यास्तव इस्राएल
त्याजवळून फिरले. २२ असें इस्राएलाच्या संता-
नांचा सर्व समुदाय कादेश सोडून होर डोंग-
रापर्यंत आला. २३ तेव्हां अदोम देशाच्या
सीमेजवळच्या होर डोंगराजवळ परमेश्वराने
मोशे व आहरोन यांस असें सांगितलें कीं, २४
"आहरोन आपल्या लोकांसीं मिळून जाईल; कां
कीं जो देश म्या इस्राएलाच्या संतानांस दिल्हा,
त्यांत तो पोहंचणार नाहीं, यामुळें कीं मरीबाच्या
पाण्याजवळ तुह्मी माझ्या सांगण्याविरुद्ध केलें.
२५ आहरोन व त्याचा पुत्र एलाजार यांस तूं
घेऊन होर डोंगरावर आण. २६ मग आह-
रोनावरून त्याचीं वस्त्रें काढून त्याचा पुत्र एला-
जार याला लेवीव, नंतर आहरोन तेथें मरून
आपल्या लोकांसीं मिळेल." २७ मग जसी पर-
मेश्वराने आज्ञा दिल्ही, तसें मोशाने केलें; ते
सर्व समुदायाच्या देखत होर डोंगरावर चढले.
२८ मग मोशाने आहरोनाचीं वस्त्रें त्यावरून
काढून त्याचा पुत्र एलाजार याला तीं लेवविलीं,
आणि आहरोन तेथें त्या डोंगराच्या माथ्यावर
मेला; मग मोशे व एलाजार डोंगरावरून उतरले.
२९ आणि सर्व समुदायाने पाहिलें कीं आहरोन
मेला, तेव्हां इस्राएलाच्या घराण्याच्या सर्वांनी
आहरोनाविषयीं तीस दिवस शोक केला.

## अध्याय २१.

आणि खनानी अराद राजा दक्षिणेस राहणारा
याने जेव्हां ऐकिलें कीं इस्राएल हेरांच्या
वाटेने येत आहेत, तेव्हां त्याने इस्राएलासीं लढून
त्यांतल्या कित्येकांस पाडाव करून नेलें. २ यास्तव
इस्राएलाने परमेश्वराजवळ नवस करून ह्मटलें,
"जर तूं हे लोक माझ्या हातीं देसीलच देसील, तर
मी त्यांच्या नगरांचा नाश करीन." ३ तेव्हां परमे-
श्वराने इस्राएलाचा शब्द ऐकून खनानी त्याच्या
हातीं दिल्हे; ह्मणून त्यानी त्यांचा व त्यांच्या नगरां-
चा नाश केला; यास्तव त्या ठिकाणाचें नांव हर्मा
ठेविलें. ४ मग ते अदोम देशाला फेरा घालून
जायास होर डोंगराला सोडून सूफ समुद्राच्या
वाटेने निघाले, तेव्हां त्या वाटेमुळें लोकांचा जीव
त्रासला. ५ आणि लोक परमेश्वराविरुद्ध व
मोशाविरुद्ध बोलले, "त्वां आह्मास रानांत म-
रायास मिसरापासून कां आणिलें? कां तर एथें
अन्न नाहीं, पाणीहि नाहीं; या फार हलक्या अ-
न्नाला तर आमचा जीव कंटाळला आहे." ६
मग परमेश्वराने जळजळण्याचे साप लोकांमध्यें
सोडिले, आणि ते लोकांस डसले व इस्राएलांतले
लोक बहुत मेले. ७ तेव्हां लोक मोशाजवळ
येऊन बोलले कीं, "परमेश्वराविरुद्ध व तुझ्यावि-
रुद्ध बोलून आह्मी पाप केलें आहे; तूं परमेश्वराज-
वळ असी प्रार्थना कर कीं त्याने हे साप आह्मा-
वरून दूर करावे." मग मोशाने लोकांसाठीं
प्रार्थना केली. ८ तेव्हां परमेश्वराने मोशाला
सांगितलें, "तूं आपल्यासाठीं जळजळण्याचा साप
करून, तो उंच काठीवर बसीव; मग असें होईल
कीं कोणी डसलेला त्याला पाहून जगेल." ९
यास्तव मोशाने पितळाचा साप केला, आणि तो
उंच काठीवर बसविला; मग असें झालें कीं जर
साप कोणाला डसला, तर त्याने त्या पितळाच्या
सापावर दृष्टि लाविली असतां जगावें.

१० मग इस्राएलाच्या संतानानी निघून ओ-
बोथांत तळ धरिला. ११ मग त्यानी ओबोथा-
पासून निघून, मोवाब याच्या पुढल्या रानांत सू-
र्याच्या उगवतीस ईयेअबारीमांत तळ धरिला.
१२ तेथून निघून जारेद ओहोळावर तळ धरिला.
१३ तेथून निघून, रानांत जी आर्णोन अमोऱ्यांच्या
सीमेने वाहती, तिच्या पलिकडे तळ धरिला; आ-
र्णोन तर मोवाबाची सीमा, मोवाब व अमोरी
यांच्यामध्यें आहे. १४ यास्तव परमेश्वराच्या
लढायांच्या पुस्तकांत ह्मटलें आहे कीं, "सूफाज-
वळ वाहेब व आर्णोनेचा ओहोळ. १५ ओह-
ळांचा जो ओघ आराच्या वस्तीकडे वाहतो, आणि

मोवाबाच्या सीमेस लागलेला आहे·” १६ मग
ते तेथून बैऱ्यास गेले; ज्याविषयीं परमेश्वर
मोश्याला बोलला होता, “तूं लोकांस एकवट कर,
ह्मणजे मी त्यांस पाणी देतों, तोच तो झरा·” १७
तेव्हां इस्राएलानी हें गीत गायलें, “हे विहिरी, उ-
पळून ये; तुह्मी याविषयीं परस्परें गायन करा· १८
अधिकाऱ्यानी हा झरा उकरला; लोकांच्या निव-
डलेल्यानी नेमणाऱ्याच्या सांगण्यावरून आपल्या
काठ्या घेऊन तो खाणून काढिला·” मग ते रा-
नांतून मात्तानास गेले· १९ आणि मात्तानापा-
सून नाहालियेलास आणि नाहलियेलापासून बा-
मोथास; २० आणि बामोथ सोडून, जी खिंड
मोवाबाच्या देशांत पिसग्याचा माथा, जिचें तोंड
तर यशीमोनासमोर आहे, तिकडे गेले·

२१ मग इस्राएलानी अमोऱ्यांचा राजा सीहोन
याजवळ दूत पाठवून ह्मटलें, २२ “मी तुझ्या
देशांमधून जातों; आह्मी शेतांकडे किंवा मळ्यांकडे
वळणार नाहीं, विहिरींतलें पाणी पिणार नाहीं;
तुझ्या सीमेच्या पार जाऊं तोंपर्यंत राजाच्या मा-
र्गाने चालूं.” २३ तेव्हां सीहोनाने इस्राएलास
आपल्या सीमेंतुन जाऊं दिल्हें नाहीं, परंतु सी-
होन आपले सर्व लोक मिळवून इस्राएलासीं लढा-
यास बाहेर रानांत आला, आणि याहाजास येऊन
इस्राएलासीं लढला· २४ यास्तव इस्राएलानी
तरवारीने त्याला मारिलें, आणि आर्णोनेपासून
याब्बोकेपर्यंत, आम्मोनाच्या लोकांपर्यंत, त्याचा
देश घेतला; आम्मोन लोकांची सीमा तर बळकट
होती· २५ असें इस्राएलानी तीं सर्व नगरें घेतलीं
आणि इस्राएल अमोऱ्यांच्या सर्व नगरांत, हेश्बो-
नांत व त्याजवळच्या सर्व गावांत राहिले. २६
कारण कीं हेश्बोन नगर अमोऱ्यांचा राजा सी-
होन याचें होतें, कां कीं याने पूर्वी मोवाबी रा-
जासीं लढून त्याच्या हातांतून त्याचा सर्व देश
आर्णोनेपर्यंत घेतला होता· २७ यास्तव प्रबंध-
कर्त्ते ह्मणतात, “हेश्बोनास जा; सीहोनाचें नगर
रचलें जाऊन सिद्ध व्हावें; २८ कारण कीं हेश्-
बोनांतून अग्नि निघाला आहे; सीहोनाच्या बंदिस्त
गावांतल्या ज्वाळाने मोवाबांतल्या आराचें, आणि
आर्णोनेजवळच्या उंचस्थानांच्या अधिकाऱ्यांचें भ-
स्म केलें आहे· २९ हे मोवाबा, तुला हायहाय;
हे कमोशाच्या लोका, तुझा नाश झाला; त्याने
आपले निभावलेले पुत्र व आपल्या कन्या अमो-
ऱ्यांचा राजा सीहोन याच्या हातीं दिल्या आहेत·
३० तर आह्मी त्यांस विंधिलें; दीबोनापर्यंत हे-
श्बोनाचा नाश झाला; मेदब्याजवळ जो नोफा
तेथपर्यंतहि आह्मी त्यांची ओसाडी केली आहे·”

३१ तसें इस्राएल अमोऱ्यांच्या देशांत राहिले·
३२ आणि मोश्याने याजेर हेरायास पाठविलें;
मग त्यानी त्याजवळचे गांव धरून जे अमोरी तेथें
होते, त्यांस वतनांतून घालविलें. ३३ मग ते
फिरले, आणि बाशानाच्या वाटेने वर गेले; तेव्हां
बाशानाचा राजा ओग त्यांसीं लढायास निघाला;
तो आपल्या सर्व लोकांसुद्धां एद्रेईंत लढायास
आला· ३४ तेव्हां परमेश्वर मोश्याला बोलला,
“तूं त्याला भिऊं नको; कारण कीं म्या तो व त्या-
चे सर्व लोक व त्याचा देश तुझ्या हातीं दिल्हा
आहे; तर अमोऱ्यांचा राजा सीहोन जो हेश्बो-
नांत राहिला, त्याला जसें त्वां केलें, तसें याला
कर.” ३५ असें त्यानी त्याला व त्याच्या पु-
त्रांस व त्याच्या सर्व लोकांस मारिलें; असें कीं
त्याचा कोणी निभावलेला राहिला नाहीं, आणि
त्यानी त्याचा देश घेतला·”

## अध्याय २२.

मग इस्राएलाच्या संतानानी निघून मोवाबांतल्या
अरण्यांत यार्देनेच्या पलिकडे यरिहोजवळ तळ
धरिला· २ आणि इस्राएलानी अमोऱ्यांसीं जें
केलें, तें सर्व जिप्पोराचा पुत्र बालाक याने पा-
हिलें. ३ आणि लोक मोठे होते; यास्तव त्यांमुळें
मोवाबी फार भ्याले, आणि मोवाबी इस्राएलाच्या
संतानांमुळें त्रास पावले· ४ मग मोवाबी मिद्या-
नी वडिलांस बोलला कीं, “आतां जसा बैल शेतां-
तली हिरवळ चाटून घेतो, तसा हा मेळा आपल्या
चहुंकडलीं अवघीं चाटून घेईल·” आणि त्या-
काळीं जिप्पोराचा पुत्र बालाक मोवाबाचा राजा
होता· ५ तेव्हां त्याने बौराचा पुत्र बलाम त्या-
कडे, त्याच्या लोकांच्या देशांतल्या नदीजवळ जें
पथोर तेथें दूत पाठवून त्याला बोलावून ह्मटलें
कीं, “पाहा, मिसरांतून लोक निघाले; पाहा, ते
पृथ्वीची पाठ झांकितात, आणि ते माझ्यासमोर

उतरले आहेत. ६ तर आतां तूं ये, आणि त्या
लोकांस माझ्यासाठीं शाप दे, कां तर ते माझ्या-
पेक्षां बळकट आहेत; कदाचित् मी त्यांस मारा-
यास समर्थ होऊन देशांतून घालवीन; कां तर मी
जाणतों कीं ज्याला तूं आशीर्वाद देतोस, तो आ-
शीर्वादित होतो; आणि ज्याला शाप देतोस, तो
शापित होतो." ७ मग मोवाबाचे वडील व
मिद्यानाचे वडील आपल्या हातीं चेटकासाठीं देण-
गी घेऊन चालले, आणि त्यांनी बलामाजवळ जा-
ऊन त्याला बालाकाच्या गोष्टी सांगितल्या. ८
तेव्हां तो त्यांस ह्मणाला, "तुह्मी आज रात्रीं एथें
राहा; मग जसें परमेश्वर मला सांगेल, तसें
तुह्मांस उत्तर देईन." यास्तव मोवाबाचे सरदार
बलामाजवळ राहिले. ९ आणि देव बलामा-
जवळ येऊन ह्मणाला, "जे पुरुष तुझ्याजवळ ते
कोण आहेत?" १० मग बलाम देवाला बोल-
ला, "बालाक जिप्पोराचा पुत्र मोवाबाचा राजा
याने त्यांस माझ्याजवळ पाठवून असें सांगितलें
कीं, ११ 'पाहा, मिसरांतून लोकांनी निघून
पृथ्वीची पाठ झांकिली आहे; आतां तूं येऊन मा-
झ्यासाठीं त्यांस शाप दे; कदाचित् मी त्यांशीं
लढून त्यांस घालवायास समर्थ होईन." १२
तेव्हां देव बलामाला बोलला, "तूं त्यांच्यासंगतीं
जाऊं नको; त्या लोकांस शाप देऊं नको; कां तर
ते आशीर्वादित आहेत." १३ मग सकाळीं बलाम
उठून बालाकाच्या सरदारांस ह्मणाला, "तुह्मी आ-
पल्या देशास जा, कां तर परमेश्वराने मला तुम-
च्यासंगतीं जायास मना केलें आहे." १४ तेव्हां
मोवाबाचे सरदार उठून बालाकाजवळ येऊन
ह्मणाले, "बलामाने आमच्यासंगतीं येण्यास अन-
मान केला."

१५ मग बालाकाने फिरून त्यांपेक्षां अधिक
आणि अधिक मान्य सरदार पाठविले. १६
आणि ते बलामाजवळ जाऊन त्याला ह्मणाले,
"जिप्पोराचा पुत्र बालाक असें ह्मणतो कीं, 'तूं
मजकडे यावयास नकारूं नको. १७ कां तर मी
तुझें फार गौरव करीनच करीन, आणि जें कांहीं
तूं मला सांगसील तें करीन; तर तूं अगत्य ये;
माझ्यासाठीं या लोकांस शाप दे.' १८ तेव्हां
बलाम उत्तर देतां बालाकाच्या चाकरांस बोलला,
"जरी बालाक आपल्या घरभर सोनें व रुपें मला
देईल, तरी माझ्याने उणें किंवा अधिक करायास
माझा देव परमेश्वर याच्या सांगण्यापलिकडे
जाववत नाहीं. १९ तथापि आतां तुह्मी अणखी
आज रात्रीं राहा; ह्मणजे परमेश्वर मला जें
काय अधिक बोलेल तें मला कळेल." २० तेव्हां
रात्रीं देव बलामाजवळ येऊन त्याला ह्मणाला,
"तीं माणसें तुला जर बोलावयास आलीं आहेत,
तर तूं उठून त्यांच्यासंगतीं जा; परंतु जी गोष्ट मी
तुला सांगेन ती मात्र तूं कर." २१ मग सका-
ळीं बलाम उठून आपली गाढवी आवळून मोवा-
बाच्या सरदारांसंगतीं गेला. २२ परंतु तो गे-
ल्यावरून देव रागें भरला, आणि त्याचा विरोध
करायास परमेश्वराचा दूत वाटेंत उभा राहि-
ला; तेव्हां तो आपल्या गाढवीवर बसून आपल्या
दोघा तरुणांसुद्धां जात होता. २३ आणि परमे-
श्वराचा दूत वाटेंत उभा राहिलेला व त्याच्या
हातीं त्याची तरवार उपसलेली, असें गाढवीने
पाहिलें; आणि गाढवी वाटेंतून वळून शेतांत चा-
लली, ह्मणून बलामाने गाढवी वाटेंत फिरवायास
तिला मारिलें. २४ मग परमेश्वराचा दूत
मळ्यांच्या गल्लींत उभा राहिला; इकडे भिंत व
तिकडे भिंत होती. २५ तेव्हां गाढवीने परमे-
श्वराचा दूत पाहून भिंतीशीं लागून बलामाचा
पाय भिंतीशीं चेंचरला; यास्तव त्याने तिला फि-
रून मारिलें. २६ मग परमेश्वराचा दूत
फिरून पुढें गेला, आणि अडचणीच्या ठिकाणीं
जेथें उजव्याकडे व डाव्याकडे वळायाची वाट न-
व्हती, तेथें उभा राहिला. २७ तेव्हां गाढवी
परमेश्वराचा दूत पाहून बलामाखालीं बसली;
यास्तव बलाम रागें भरला, आणि त्याने गाढवीला
काठी मारिली. २८ मग परमेश्वराने गाढ-
वीचें तोंड मोकळें केलें, आणि तिने बलामाला
ह्मटलें, "म्या तुझें काय केलें ह्मणून त्वां मला आ-
तां तीन वेळां मारिलें?" २९ तेव्हां बलाम गा-
ढवीला बोलला, "यासाठीं कीं त्वां माझा अपमान
केला; माझ्या हातीं तरवार असती, तर बरें;
म्या आतां तुला जिवें मारिलें असतें." ३० मग
गाढवी बलामाला बोलली, "मी तुझी गाढवी ना-
हीं कीं काय? मी तुझी गाढवी, तुझी झाल्यापासून

आजपर्यंत जिजवर तूं बसत आला आहेस, असी
मी नाहीं कीं काय? मी तुझें असें करीत असतेंच
कीं काय? तेव्हां तो बोलला, "नाहीं." ३१ मग
**परमेश्वराने** बलामाचे डोळे उघडिले, आणि
त्याने **परमेश्वराचा** दूत आपल्या हातीं तरवार
उपसून वाटेवर उभा राहिलेला, असा पाहिला;
मग त्याने उपडें पडून भजन केलें. ३२ नंतर
**परमेश्वराचा** दूत त्याला बोलला, "त्वां आपल्या
गाढवीला आतां तीन वेळां कशासाठीं मारिलें?
पाहा, मी तुझा विरोध करायास निघालों आहें;
कारण कीं तुझा मार्ग माझ्या विचारांत विपरीत
आहे. ३३ आणि गाढवी मला पाहून आतां
तीन वेळां माझ्यापुढून वळली; जर ती माझ्या-
पुढून वळली नसती, तर निश्चयें म्या आतां तिला
वांचवून तुलाच जिवें मारिलें असतें." ३४ तेव्हां
बलाम **परमेश्वराच्या** दूताला बोलला, "म्या
पाप केलें आहे; कां कीं मला कळलें नाहीं कीं तूं
मजसीं भिडायास वाटेमध्यें उभा राहिलास; तर
आतां तुझ्या दिसण्यांत जर वाईट आहे, तर मी
आपला परत जाईन." ३५ मग **परमेश्वराचा**
दूत बलामाला बोलला, "तूं त्या माणसांसंगतीं जा,
परंतु जी गोष्ट मी तुला सांगेन, ती मात्र तूं बोल."
मग बलाम बालाकाच्या सरदारांसंगतीं गेला.

३६ आणि बालाकाने ऐकिलें कीं बलाम येत
आहे; यास्तव तो त्याला भेटायास निघून मोवा-
बांतलें नगर आर्णोनेच्या तिरीं, सीमेच्या काठीं
आहे, तेथपर्यंत गेला. ३७ तेव्हां बालाक बलामा-
ला बोलला, "म्या तुला बोलावणें करायास तुझ्या-
जवळ निश्चयें पाठविलेंच कीं नाहीं? तूं माझ्या-
जवळ कां आला नाहींस? तुझें गौरव करायास
मला शक्ति नाहीं काय? ३८ मग बलाम बा-
लाकाला बोलला, "पाहा, मी तुझ्याजवळ आलों;
आतां माझ्याने कांहीं बोलवेलच कीं काय? देव
माझ्या तोंडीं जे शब्द घालील, तेच मी बोलेन."
३९ तेव्हां बलाम बालाकाच्यासंगतीं गेला, आ-
णि ते किर्याथहुजोथ एथें आले. ४० मग
बालाकाने गुरें व मेंढरें यांचे यज्ञ केले, आणि
बलाम व त्याच्यासंगतीं जे सरदार होते, त्यांस
बोलावणें केलें. ४१ नंतर सकाळीं असें झालें
कीं बालाकाने बलामाला घेऊन, बाल देव या-
च्या उंच स्थानावर नेलें, असें कीं त्याने तेथून
लोकांचा शेवट पाहिला.

## अध्याय २३.

तेव्हां बलामाने बालाकाला सांगितलें, "तूं मा-
झ्यासाठीं एथें सात वेद्या बांध, आणि मा-
झ्यासाठीं एथें सात गोऱ्हे व सात एडके सिद्ध
कर." २ तेव्हां जसें बलामाने सांगितलें, तसें
बालाकाने केलें; आणि बालाक व बलाम यांनी
एकएका वेदीवर गोऱ्हा व एडका यांचा होम
केला. ३ मग बलामाने बालाकाला सांगितलें,
"तूं आपल्या होमाजवळ उभा राहा; म्हणजे मी
जाईन; कदाचित् **परमेश्वर** मला भेटेल, आणि
जी कांहीं गोष्ट मला कळवील, तीच मी तुला
सांगेन." नंतर तो डोंगरावर गेला. ४ तेव्हां
देव बलामाला भेटला; आणि हा त्याला बो-
लला, म्या सात वेद्या सिद्ध करून एकएका वे-
दीवर गोऱ्हा व एडका यांचा होम केला आहे." ५
तेव्हां **परमेश्वराने** बलामाच्या तोंडीं शब्द घा-
लून सांगितलें, "तूं बालाकाजवळ परत जाऊन या
प्रकारें बोल' ६ मग तो याजवळ परत आला;
आणि पाहा, हा मोवाबाच्या सर्व सरदारांसुद्धां
आपल्या होमाजवळ उभा होता. ७ तेव्हां तो
आपलें अनुसंधान धरून बोलला, "मोवाबाचा
राजा बालाक याने मला अरामांतून पूर्वेकडल्या
डोंगरांतून आणून सांगितलें, 'तूं येऊन माझ्यासाठीं
याकोबाला शाप दे', आणि येऊन इस्राएलाचा
धिक्कार कर.' ८ ज्याला देवाने शाप दिल्हा
नाहीं, त्याला मी शाप कसा देऊं? किंवा ज्याचा
धिक्कार **परमेश्वराने** केला नाहीं, त्याचा धिक्कार
मी कसा करूं? ९ तर खडकाच्या शिखरावरून
मी त्याला पाहतों, आणि डोंगरांवरून त्याला
न्याहाळितों; पाहा, ते लोक वेगळे राहतील; आ-
पणाला राष्ट्रांमध्यें मोजणारच नाहींत. १० या-
कोबाचे रजःकण कोण मोजील आणि इस्राएलाच्या
चवथाईची गणना कोण करील? नीतिवंतांच्या
मरणासारिखें माझें मरण व्हावें, आणि त्यांच्या
सारिखा माझा परिणाम व्हावा." ११ तेव्हां
बालाक बलामाला बोलला, "त्वां मजसीं हें काय
केलें? माझ्या शत्रूंस शाप द्यायास म्या तुला आ-

फिलें; परंतु पाहा, त्वां आशीर्वादच दिल्हा." १२
मग तो उत्तर देऊन बोलला, "परमेश्वर जें
माझ्या तोंडीं घालील, तें म्या संभाळून बोलूं नये
काय?" १३ मग बालाक त्याला बोलला, "तूं
माझ्यासंगतीं दुसऱ्या ठिकाणीं चाल, म्हणजे तेथून
ते तुला दिसतील; परंतु त्यांचा कांठ मात्र दि-
सेल, ते अवघेच दिसणार नाहींत, मग माझ्या
साठीं तेथून तूं त्यांस शाप दे." १४ तेव्हां तो
त्याला घेऊन जोफ्यांच्या भूमीवर पिसग्याच्या
शिखरास गेला; नंतर त्याने सात वेद्या बांधिल्या,
आणि एकएका वेदीवर गोऱ्हा व एडका यांचा
होम केला. १५ मग त्याने बालाकाला सांगि-
तलें, "तूं एथें आपल्या होमाजवळ उभा राहा,
म्हणजे मी तिकडे दर्शनासाठीं जाईन." १६ ते-
व्हां परमेश्वराने बलामाला दर्शन दिल्हें, आणि
त्याच्या तोंडीं शब्द घालून सांगितलें, "तूं बाला-
काजवळ परत जाऊन या प्रकारें बोल." १७ मग
तो त्याजवळ आला; तेव्हां पाहा, तो आपल्या
होमाजवळ उभा होता, आणि त्याच्यासंगतीं मो-
वाबाचे सरदार होते; मग बालाक त्याला म्हणा-
ला, "परमेश्वराने काय सांगितलें?" १८ तेव्हां
तो आपलें अनुसंधान धरून बोलला; "हे बाला-
का, उठून ऐक; हे जिप्पोराच्या पुत्रा, माझ्याकडे
कान लाव. १९ देव माणूस नाहीं कीं त्याने
लबाडी करावी; तो तर आदामाचा वंशस्थ नाहीं
कीं त्याने पश्चात्ताप करावा; तो वचन देऊन तें पा-
ळणार नाहीं काय? किंवा त्याने जें सांगितलें तें
तो स्थापणार नाहीं कीं काय? २० पाहा, आ-
शीर्वाद द्यायास मला प्राप्त आहे; त्याने आशी-
र्वादच दिल्हा, आणि हा माझ्याने फिरवतच ना-
हीं. २१ त्याने याकोबाकडलें अनुचित न्याहा-
ळिलें नाहीं; इस्राएलांतलें दुष्कर्म पाहिलेंच नाहीं;
त्याचा देव परमेश्वर त्याला अनुकूळ आहे;
आणि त्यामध्यें राजाचा जयजयकार आहे. २२
देवाने त्यांस मिसरांतून आणिलें; त्याला गेंड्यासा-
रिखी अति शक्ति आहे. २३ निश्चयें याकोबा-
वर गारूड चालत नाहीं; इस्राएलावर मांत्रिकी
चालतच नाहीं; वेळोवेळ याकोबाविषयीं व इस्रा-
एलाविषयीं म्हटलें जाईल कीं, देवाने केवढा प-
राक्रम केला! २४ पाहा, ते लोक सिंहिणीसा-
रिखे उठतील; सिंहासारिखेहि उभे ठाकतील
वधलेल्यांचें रक्त पिऊन शिकार खाई तोंपर्यंत नि-
जणार नाहीं." २५ तेव्हां बालाकाने बलामा-
ला सांगितलें, "तूं त्यांस शाप देऊं नको, आणि
आशीर्वादहि त्यांस देऊं नको." २६ तेव्हां ब-
लाम उत्तर देऊन बालाकाला बोलला, "काय,
मी तुजसीं असें बोललों नव्हतों कीं जें कांहीं
परमेश्वर सांगेल, तेंच मी करीन?" २७ मग
बालाक बलामाला म्हणाला, "तूं चाल; मी तुला
दुसऱ्या ठिकाणीं नेतों; त्वां माझ्यासाठीं तेथून
त्यांस शाप द्यावा, हें कदाचित् देवाच्या दिसण्यांत
बरें होईल." २८ तेव्हां बालाक बलामाला घे-
ऊन, पीर डोंगर याच्या ज्या शिखराचें तोंड यशि-
मोनासमोर आहे, तिकडे गेला. २९ तेव्हां बला-
माने बालाकाला सांगितलें, "तूं माझ्यासाठीं एथें
सात वेद्या बांध, आणि माझ्यासाठीं एथें सात गो-
ऱ्हे व सात एडके सिद्ध कर." ३० मग असें
बलामाने सांगितलें, तसें बालाकाने केलें; आणि
एकएका वेदीवर त्याने गोऱ्हा व एडका यांचा
होम केला.

## अध्याय २४.

तेव्हां बलामाने पाहिलें कीं इस्राएलास आशी-
र्वाद देणें हें परमेश्वराच्या दिसण्यांत बरें
आहे; यास्तव तो जसा पूर्वी वेळोवेळ, तसे श-
कुन पाहायास गेला नाहीं, परंतु त्याने आपलें
तोंड रानाकडे लाविलें. २ तेव्हां बलामाने आ-
पली दृष्टि लावून इस्राएल आपापल्या वंशांत रा-
हिलेले असे पाहिले, आणि देवाचा आत्मा त्याज-
वर आला. ३ मग तो आपलें अनुसंधान धरून
बोलला, "बौराचा पुत्र बलाम याचें म्हणणें; ज्या
पुरुषाची दृष्टि निवळ झाली, त्याचें म्हणणें; ४
जो देवाचीं वाक्यें ऐकतो, ज्याला सर्वसमर्थाचा
दृष्टांत झाला, डोळे उघडे असताहि ज्याला स्वप्न
पडलें, त्याचें म्हणणें असें आहे; ५ हे याको-
बा, तुझ्या राहोट्या, हे इस्राएला, तुझ्या वस्त्या
किती सुंदर आहेत! ६ खिंडींसारिख्या वि-
स्तारलेल्या, नदीजवळच्या मळ्यांसारिख्या, परमे-
श्वराने लावलेलीं अहाली झाडें यांसारिख्या,
पाण्याजवळच्या गंधसुरूंसारिख्या आहेत. ७ तो

आपल्या डोलानी पाणी रिचवील, आणि त्याचें
पीक बहुत पाण्याचें; त्याचा राजा अगागापेक्षां
वरिष्ठ होईल, आणि त्याचें राज्य वरचढ होईल.
८ देवाने त्याला मिसरांतून आणिलें; त्याला गेंड्या-
सारिखी अति शक्ति होईल; जीं राष्ट्रें त्याचे वैरी
त्यांस तो खाऊन टाकील; त्यांचीं हाडें तो मो-
डील, आणि आपल्या बाणानी तो त्यांस भोसकील.
९ तो सिंहासारिखा, सिंहिणीसारिखाहि बसतो,
निजतो; त्याला कोण उठवील? जे तुला आशी-
र्वाद देतात, ते आशीर्वादित; आणि जे तुला शाप
देतात, ते शापित होतील."

१० तेव्हां बलामावर बालाकाने रागें भरून
आपले हात आपटिले; आणि बालाक बलामाला
बोलला, "माझ्या शत्रूंस शाप द्यायास म्या तुला
बोलाविलें; परंतु पाहा, त्वां आतां तीन वेळा त्यांस
आशीर्वादच दिल्हा. ११ तर आतां तूं आपल्या
ठिकाणीं पळून जा; मी तुझें मोठें गौरव करीन,
असें म्या ह्मटलें; परंतु पाहा, परमेश्वराने
गौरवाविषयीं तुला प्रतिबंध केला आहे." १२
तेव्हां बलामाने बालाकाला ह्मटलें, "जे दूत
त्वां माझ्याजवळ पाठविले होते, त्यांस देखील
म्या असें सांगितलें नव्हतें काय? १३ जर
बालाक आपल्या घरभर रूपें व सोनें मला देईल,
तर मी आपल्याच बुद्धीने बरें किंवा वाईट करून
परमेश्वराच्या सांगण्याचें उल्लंघन करायास श-
क्तिमान नाहीं! 'जें परमेश्वर बोलेल, तेंच मी
बोलेन.' १४ तर आतां पाहा, मी आपल्या लो-
कांजवळ जातों; तूं ये, पुढल्या दिवसीं हे लोक
तुझ्या लोकांचें काय करितील, हें मी तुला सांगतों."
१५ तेव्हां तो आपलें अनुसंधान धरून बोलला,
"बौराचा पुत्र बलाम याचें ह्मणणें, ह्मणजे ज्या
पुरुषाची दृष्टि निवळ झाली, त्याचें ह्मणणें; १६
जो देवाचीं वाक्यें ऐकून परात्पराचें ज्ञान पावला,
ज्याला सर्वसमर्थाचा दृष्टांत झाला, डोळे उघडे
असतांहि ज्याला स्वप्न पडलें, त्याचें ह्मणणें असें
आहे. १७ तो माझ्या दृष्टीस पडेल, परंतु आतां
नाहीं; मी त्याला न्याहाळीन, परंतु जवळ नाहीं;
याकोबांतून तारा येईल, आणि इस्राएलांतून का-
ठी उठेल, आणि मोवाबाच्या सीमांस फोडील;
शेथाच्या सर्व संतानांचाहि नाश करील. १८
तेव्हां अदोम वतन होईल; सेईरहि आपल्या श-
त्रूंचें वतन होईल, आणि इस्राएल पराक्रमी होईल.
१९ तर याकोबांतला जो तो अधिकार करील,
आणि नगरांतल्या उरलेल्यांचा नाश करील." २०
मग तो अमालेकाला पाहून आपलें अनुसंधान ध-
रून बोलला, "अमालेक राष्ट्रांतला प्रथम, परंतु
त्याचा परिणाम सर्वकाळचा नाश असा होईल."
२१ मग तो केनी लोक पाहून आपलें अनुसंधान
धरून बोलला, "तुझी वस्ति बळकटीची आहे;
कां तर तूं आपलें कोटें खडकांत लावून करितोस:
२२ तरी निश्चयें केनींचा जय होई तोंपर्यंत
आश्शूर तुला जिंकून नेईल." २३ आणखी तो आ-
पलें अनुसंधान धरून बोलला, हायहाय, देव
असें करीत असतां कोण जगेल? २४ आणि
कित्तीच्या किनाऱ्यापासून तारवें येऊन आश्शू-
राला दुःख देतील, आणि एबेराला दुःख देतील,
आणि तोंहि नाहींसा होईल." २५ मग बलाम
उठून माघारा आपल्या ठिकाणीं गेला, आणि बा-
लाकहि आपल्या वाटेने चालला.

## अध्याय २५.

आणि इस्राएल शिट्टीमांत राहत होते, तेव्हां
लोक मोवाबांतल्या कन्यांसीं व्यभिचार क-
रूं लागले. २ आणि त्यानी लोकांस आपल्या
देवांच्या यज्ञांजवळ बोलाविलें; तेव्हां लोकानी
जेवून त्यांच्या देवांचें भजन केलें. ३ असे इस्रा-
एल बालपौरासीं जडले, यास्तव परमेश्वर इ-
स्राएलांवर रागें भरला. ४ आणि परमेश्व-
राने मोश्याला सांगितलें, "तूं लोकांतल्या सर्व
मुख्यांस घेऊन त्यांस सूर्यासमोर परमेश्वरासाठीं
फांसीं दे; ह्मणजे परमेश्वराचा संताप इस्राए-
लावरून फिरेल." ५ तेव्हां मोश्याने इस्राएला-
च्या न्यायाधीशांस सांगितलें, "जे बालपौरासीं
जडले, त्या आपापल्या माणसांस तुह्मी जिवें मा-
रा." ६ तेव्हां पाहा, इस्राएलाच्या संतानांतल्या
एका माणसाने जाऊन आपल्या भावांजवळ, मो-
श्याच्या दृष्टीपुढें व इस्राएलाच्या संतानांतल्या सर्व
समुदायाच्या दृष्टीपुढें एक मिद्यानीण आणिली;
तेव्हां ते सभामंडपाच्या दारीं रडत होते. ७
यास्तव आहरोन याजक याचा पुत्र एलाजार

याचा पुत्र फीनहास याने पाहिलें तेव्हां समुदायां-
तून उठून आपल्या हातीं भाला घेतला; ८
आणि त्या इस्राएली माणसाच्या मागें खोलींत
तो इस्राएली माणूस व ती स्त्री त्या उभयतांच्या
पोटांत भोसकिलें; मग इस्राएलाच्या संतानांव-
रली पटकी बंद झाली. ९ आणि पटकीने जीं
मेलीं तीं चोवीस हजार इतकीं होतीं.
१० तेव्हां परमेश्वराने मोश्याला असें सांगितलें
कीं, ११ "आहरोन याजक याचा पुत्र एलाजार या-
चा पुत्र फीनहास याने इस्राएलाच्या संतानांवरून
माझा संताप फिरविला; त्याने त्यांमध्यें माझ्यासा-
ठीं आवेश धरिला, यास्तव म्या आपल्या आवेशाने
इस्राएलाच्या संतानांचा पूर्ण नाश केला नाहीं.
१२ यावरून तूं सांग, पाहा मी आपला समाधाना-
चा करार त्याजवळ करून ठेवितों; १३ आणि
त्याजवळ व त्याच्यामागें त्याच्या संतानाजवळ या-
जकपणाचा करार सर्वकाळ होईल; कारण कीं
त्याने आपल्या देवासाठीं आवेश धरिला, आणि
इस्राएलाच्या संतानांसाठीं क्षमासाधन केलें." १४
जो मारलेला इस्राएली माणूस मिद्यानिणीसहित
मारला गेला, त्याचें नांव जिम्री; तो सालूचा
पुत्र, शिमोन्यांतल्या पूर्वजघराण्याचा अधिकारी
होता. १५ आणि मारलेल्या मिद्यानी स्त्रीचें
नांव कजबी, ती जूराची कन्या; तो मिद्यानांत
पूर्वजाच्या घराण्यांतल्या प्रजांचा अधिकारी होता.
१६ तेव्हां परमेश्वराने मोश्याला सांगितलें कीं,
"१७ तुह्मी मिद्यान्यांस पीडा करा, आणि तुह्मी
त्यांस मारा; १८ कारण कीं त्यांनी आपल्या
त्या कृत्रिम युक्ती तुह्मावर योजिल्या, त्यांकडून
तुह्मास पीडा केली; ह्मणजे पौराच्या गोष्टीने आणि
मिद्यानी अधिकाऱ्याची कन्या कजबी त्यांची ब-
हीण, जी पौराच्या गोष्टीविषयीं पटकीच्या दिव-
सांत मारली गेली, तिच्या गोष्टीने केली आहे."

## अध्याय २६.

आणि पटकीनंतर असें झालें कीं परमेश्वराने
मोशे व आहरोन याजक याचा पुत्र एला-
जार यांस असें सांगितलें कीं, २ "इस्राएलाच्या
संतानांच्या सर्व समुदायाचे वीस वर्षांचे व वरले,
इस्राएलामध्यें सैन्यांत मिळून जाणारे सर्व, त्यांच्या
पूर्वजांच्या घराण्यावरून त्यांची संख्या तुह्मी क-
रून घ्या." ३ तेव्हां मोशे व एलाजार याजक
यांनी मोवाबाच्या अरण्यांत यरीहोजवळच्या या-
र्देनेवर त्यांस असें सांगितलें कीं, ४ "जसें पर-
मेश्वराने मोश्याला व मिसर देशांतून आ-
लेल्या इस्राएलाच्या संतानांस सांगितलें तसें
वीस वर्षांचे व वरले यांची संख्या तुह्मी करून
घ्या." ५ इस्राएलाचा ज्येष्ठ पुत्र रऊबेन, रऊबे-
नाचे वंशस्थ हनोख याचें हनोखी कूळ, पाळू
याचें पाळुवी कूळ. ६ हेस्रोन याचें हेस्रोनी
कूळ, कार्मी याचें कार्मी कूळ; ७ हीं रऊबे-
न्यांचीं कुळें, आणि यांच्या झडतीचे त्रेताळीस
हजार व सातशें तीस होते. ८ आणि पाळूचे
वंशस्थ अलियाब; ९ आणि अलियाबाचे वंश-
स्थ नमुवेल व दाथान व अबीराम; हे दाथान व
अबीराम समुदायांत विख्यात होते, जेव्हां को-
राहाचा समुदाय परमेश्वरासीं भांडत होता,
तेव्हां त्यांत ते मोश्यासीं व आहरोनासीं भांडिले.
१० आणि जेव्हां अग्नीने अडीचशें माणसें जाळ-
लीं आणि तो समुदाय मेला तेव्हां पृथ्वीने आपलें
तोंड उघडून ते व कोराह यांस गिळिलें; असे
ते खूणरूप झाले. ११ तथापि कोराहाचे वंशस्थ
सर्व मेले नाहींत. १२ शिमोनाचे वंशस्थ आपल्या
कुळांप्रमाणें असे; नमुवेलाचें नमुवेली कूळ, यामी-
नाचें यामीनी कूळ, याखीनाचें याखीनी कूळ; १३
जेराहाचें जाऱ्ही कूळ, शाऊलाचें शाऊली कूळ.
१४ हीं शिमोन्यांचीं कुळें; यांचे बावीस हजार
व दोनशें होते. १५ गादाचे वंशस्थ आपल्या
कुळांप्रमाणें असे; जफोनाचें जफोनी कूळ; हाग्गी-
चें हाग्गी कूळ, शूनीचें शूनी कूळ; १६
अजनीचें अजनी कूळ, एरीचें एरी कूळ; १७
अरोदाचें अरोदी कूळ, आरेलीचें आरेली कूळ.
१८ हीं गादाच्या वंशस्थांचीं कुळें; यांच्या झड-
तीचे चाळीस हजार व पांचशें होते. १९ यहू-
दाचे पुत्र एर व ओनान; तर कनान देशांत एर
व ओनान मेले. २० मग यहूदाचे वंशस्थ आ-
पल्या कुळांप्रमाणें असे होते; शेल्याचें शेलानी
कूळ, फारेजाचें फार्जी कूळ; जेराहाचें जाऱ्ही
कूळ; २१ आणि फारेजाचे वंशस्थ असे होते;
हेस्रोनाचें हेस्रोनी कूळ; हामूलाचें हामूली कूळ;

२२ हीं यहूदाचीं कुळें; यांच्या झडतीचे शाहत्तर
हजार व पांचशें. २३ इस्साखाराचे वंशस्थ आ-
पल्या कुळांप्रमाणें असे; तोला याचें तोलाई कूळ,
पूवा याचें पूनी कूळ; २४ याशूबाचें याशूबी
कूळ, शिम्रोनाचें शिम्रोमी कूळ; २५ हीं इ-
स्साखाराचीं कुळें; यांच्या झडतीचे चौसष्ट हजार
व तीनशें. २६ जबूलुनाचे वंशस्थ, आपल्या
कुळांप्रमाणें असे, सेरेदाचें सार्दी कूळ, एलोनाचें
एलोनी कूळ, याहलेलाचें याहलेली कूळ; २७ हीं
जबूलुन्याचीं कुळें; यांच्या झडतीचे साठ हजार व
पांचशें. २८ योसेफाचे पुत्र आपल्या कुळांप्रमाणें
मनाश्शे व एफ्राइम; २९ मनाश्श्या याचे वंश-
स्थ, माखीराचें माखीरी कूळ; आणि माखीराने
गिलादाला जन्म दिल्हा; गिलादाचें गिलादी
कूळ; ३० गिलादाचे वंशस्थ असे, इयेजेराचें
इयेजेरी कूळ, हेलेकाचें हेलकी कूळ; ३१ आणि
आस्रियेलाचें आस्रियेली कूळ, आणि शेखेमाचें
शिखमी कूळ; ३२ आणि शमीदाचें शमीदाई
कूळ, आणि हेफेराचें हेफरी कूळ; ३३ आणि
हेफेराचा पुत्र जलफहाद याला पुत्र झाले नाहींत,
परंतु कन्या मात्र; आणि जलफहादाच्या कन्यां-
चीं नावें माहला व नवा, हग्ला व मिल्का व
थिर्झा. ३४ हीं मनाश्श्याचीं कुळें; तर यांच्या
झडतीचे बावन्न हजार व सातशें. ३५ एफ्राइ-
माचे वंशस्थ आपल्या कुळांप्रमाणें असे; शूथेला-
हाचें शुथाल्ही कूळ, बेखेराचे बाखी कूळ, था-
हानाचें थाहनी कूळ; ३६ आणि शूथालाहाचे
वंशस्थ असे; एरानाचें एरानी कूळ. ३७ हीं
एफ्राइमाच्या संतानाचीं कुळें; यांच्या झडतीचे
बत्तीस हजार व पांचशें; असे आपल्या कुळां-
प्रमाणें योसेफाचे वंशस्थ होते. ३८ बन्यामी-
नाचे वंशस्थ आपल्या कुळांप्रमाणें असे, बेला
याचें बाल्यी कूळ, आश्बेलाचें आश्बेली कूळ,
अहीरामाचें अहीरामी कूळ; ३९ शफुफामाचें
शुफामी कूळ, हूफामाचें हूफामी कूळ. ४०
बेला याचे पुत्र आर्द व नामान होते; आ-
र्दाचें आर्दी कूळ, मामामाचें नामी कूळ. ४१
हे आपल्या कुळांप्रमाणें बन्यामीनाचे वंशस्थ; आ-
णि यांच्या झडतीचे पंचेताळीस हजार व साहाशें.
४२ दानाचे वंशस्थ आपल्या कुळांप्रमाणें असे,
शूहामाचें शुहामी कूळ; यांचे आपल्या कुळांसु-
द्धां दानाचीं कुळें; ४३ शूहाम्याचीं सर्व कुळें,
यांच्या झडतीचे चौसष्ट हजार व चारशें. ४४
आशेराचे वंशस्थ आपल्या कुळांप्रमाणें असे; इम्-
ना याचें इम्ना कूळ, इश्वी याचें इश्वी कूळ, बरि-
या याचें बरियी कूळ; ४५ बरियाच्या वंश-
स्थांतल्या हेबेराचें हेब्री कूळ, माल्कीयेलाचें मा-
ल्कियेली कूळ; ४६ आणि आशेराच्या कन्येचें
नांव साराह होतें; ४७ हीं आशेराच्या वंश-
स्थाचीं कुळें; यांच्या झडतीचे त्रेपन्न हजार व
चारशें. ४८ नाफ्ताली वंशस्थ आपल्या कुळां-
प्रमाणें असे, याहजेलाचें याहजेली कूळ, गूनी
याचें गूनी कूळ; ४९ येजेराचें यिज्री कूळ, शिल्ले-
माचें शिल्लेमी कूळ; ५० हे आपल्या कुळांसुद्धां
नाफ्ताल्याचीं कुळें, आणि यांच्या झडतीचे पंचे-
ताळीस हजार व चारशें. ५१ इस्राएलाच्या संता-
नांच्या झडतीचे साहा लाख व एक हजार सातशें
तीस इतके होते.

५२ आणि परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, ५३ यांस तो देश वतनासाठीं नांवांच्या
गणतीवरून वांटून द्यायाचा आहे. ५४ तूं बहु-
तांस बहुत वतन दे, आणि थोडक्यांस थोडें व-
तन दे; प्रत्येकाला त्याच्या झडतीच्या संख्येप्रमाणें
वतन दिल्हें जावें. ५५ तथापि तो देश नेमखु-
णानी वांटायाचा आहे; त्यानी आपल्या पूर्वजांच्या
वंशांच्या नांवांप्रमाणें वतन घ्यावें. ५६ थोडके
व बहुत यांमध्यें त्याचें त्याचें वतन दैवखुणांच्या
नेमाने वांटलें जावें. ५७ आणि लेव्यांच्या झड-
तीचे आपल्या कुळांप्रमाणें असे; गेर्षोनाचें गेर्षुनी
कूळ, कहाथाचें कहाथी कूळ, मरारी याचें म-
रारी कूळ; ५८ हींहि लेव्याचीं कुळें, लिब्नी
कूळ, हेब्रोनी कूळ, माहली कूळ, मुशी कूळ, क-
ऱ्ही कूळ; आणि कहाथाने आम्रामाला जन्म
दिल्हा. ५९ आणि आम्रामाच्या स्त्रीचें नांव
योखेबेद, ती लेवीची कन्या लेवीपासून मिसरांत
जन्मली; आणि ती आम्रापासून आहरोन व
मोशे व यांची बहीण मिर्याम, यांस प्रसवली.
६० आणि आहरोनापासून नादाब व अबीहू
एलाजार व इथामार हे जन्मले. ६१ आणि
नादाब व अबीहू परमेश्वरासमोर अन्य अग्नि

अर्पितांना मेले. ६२ तर त्यांच्या झडतीचे तेवीस
हजार होते; ह्मणजे सर्व पुरुष जे एका महि-
न्याचे व वरले ते; कां तर त्यांस इस्राएलाच्या
संतानांमध्यें वतन दिल्हें नव्हतें, आणि त्यांची
झडती इस्राएलाच्या संतानांमध्यें घेतली नव्हती.
६३ मोशे व एलाजार याजक यांकडल्या झड-
तीचे हेंच; त्यांनी इस्राएलाच्या संतानांची झड-
ती मोवाबीच्या अरण्यांमध्यें यरीहोजवळच्या या-
र्देनेवर घेतली. ६४ परंतु जेव्हां मोशे व आह-
रोन याजक यांनी सीना रानामध्यें इस्राएलाच्या
संतानांची झडती घेतली होती, तेव्हां त्यांकडल्या
झडतीच्यांतला कोणी यांमध्यें नव्हता. ६५ कां
तर परमेश्वराने त्यांविषयीं सांगितलें होतें कीं,
"ते रानांत मरतीलच मरतील;" ह्मणून त्यांतला
कोणी उरला नाहीं, केवळ यफुन्न्याचा पुत्र का-
लेब व नूनाचा पुत्र यहोशवा, हे मात्र उरले होते.

## अध्याय २७.

आणि मनाश्याचा पुत्र माखीर, याचा पुत्र
गिलाद, याचा पुत्र हेफेर, याचा पुत्र जल-
फहाद जो योसेफाचा पुत्र मनाशे याच्या कुळांतला
होता, त्याच्या कन्या जवळ आल्या; त्याच्या कन्यां-
चीं नांवें, तर माहला, नवा व हग्ला व मिल्का व
थिर्जा असीं होतीं. २ आणि त्यांनी मोश्यासमोर
व एलाजार याजक यासमोर आणि अधिकारी व
सर्व समुदाय यांसमोर सभामंडपाच्या दाराजवळ
उभें राहून ह्मटलें, ३ "आमचा बाप रानांत
मेला, आणि जे परमेश्वरावर कोराहाच्या स-
मुदायांत मिळाले होते, त्यांच्या समुदायामध्यें तो
नव्हता, परंतु आपल्याच पापाने मेला; आणि
त्याला पुत्र झाले नाहींत. ४ आमच्या बापाला
पुत्र नाहीं, ह्मणून त्याचें नांव त्याच्या कुळांतून
कां बुडावें? तूं आह्मास आमच्या बापाच्या भावां-
मध्यें वतन दे." ५ मग मोश्याने त्यांचा वाद
परमेश्वरासमोर आणिला. ६ तेव्हां परमे-
श्वर मोश्याला असें बोलला कीं, ७ "जलफ-
हादाच्या कन्या ठीक बोलतात; तूं त्यांस त्यांच्या
बापाच्या भावांमध्यें वतनधन अवश्य दे, असें
त्यांच्या बापाचें वतन त्यांस जाऊं दे. ८ आणि
तूं इस्राएलाच्या संतानांस असें सांग कीं जर को-
णी आपल्याला पुत्र नसतां मरतो, तर तुह्मी त्याचें
वतन त्याच्या कन्येला जाऊं द्या. ९ आणि जर
त्याला कन्या नसली, तर तुह्मी त्याचें वतन त्या-
च्या भावांस द्या. १० आणि जर त्याला भाऊ
नसले, तर त्याचें वतन त्याच्या बापाच्या भावांस
द्या. ११ आणि जर त्याच्या बापाला भाऊ
नसले, तर त्याच्या कुळांतला त्याच्या जवळचा,
त्याचा नातलग याला त्याचें वतन द्या, आणि
तें त्याचें वतन होईल, आणि हा इस्राएलाच्या
संतानांसाठीं न्यायाचा नेम असावा; जसी परमे-
श्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसा.
१२ मग परमेश्वराने मोश्याला सांगितलें,"तूं
या अबारीम डोंगरावर चढ, आणि जो देश म्या
इस्राएलाच्या संतानांस दिल्हा, तो पाहा. १३
आणि तो पाहिल्यावर जसा तुझा भाऊ आहरोन
मिळून गेला, तसा तूंहि आपल्या लोकांसीं मिळून
जासील. १४ कां तर जेव्हां समुदाय जीन
रानांत भांडला, तेव्हां त्यांच्या दृष्टीपुढें तुह्मी पा-
ण्याजवळ मला पवित्र मानायाविषयीं माझ्या सां-
गण्याला विरुद्ध केलें." तेंच जीन रानांतल्या
कादेशांत मेरीबाचें पाणी आहे. १५ तेव्हां मो-
शे परमेश्वराला असें ह्मणाला कीं, १६ पर-
मेश्वर सर्व मानवी आत्म्यांचा देव, याने समुदा-
यावर कोणी नेमून ठेवावा. १७ असा कीं त्याने
त्यांच्यापुढें बाहेर जावें व त्यांच्यापुढें आंत जावें,
आणि त्यांस बाहेर न्यावें व त्यांस आंत आणावें;
ह्मणजे परमेश्वराचा समुदाय पाळकाविरहित
जीं मेंढरें त्यांसारिखा न व्हावा." १८ तेव्हां पर-
मेश्वराने मोश्याला सांगितलें कीं, "नूनाचा पुत्र
यहोशवा ज्यावर आत्मा आहे, त्या पुरुषाला तूं
आपल्याजवळ आणून आपला हात त्यावर ठेव.
१९ आणि त्याला एलाजार याजकासमोर व सर्व
समुदायासमोर उभें करून त्यांच्या समक्ष त्याला
आज्ञा कर. २० आणि इस्राएलाच्या संतानां-
च्या सर्व समुदायाने त्याचें ऐकावें, ह्मणून तूं आ-
पला कांहीं मान त्याला दे. २१ मग त्याने ए-
लाजार याजकासमोर उभें राहावें, आणि याने
त्याच्यासाठीं परमेश्वरासमोर ऊरीमाच्या रीती-
प्रमाणें विचारावें; याने आणि याच्यासंगतीं इस्रा-
एलाच्या सर्व संतानांनी सर्व समुदायानेंहि त्याच्या

सांगण्यावरून बाहेर जावें, व त्याच्या सांगण्याव-
रून आंत जावें." २२ मग परमेश्वराने जसी
मोशाला आज्ञा दिल्ही होती, तसें त्याने केलें;
त्याने यहोशवाला आणून एलाजार याजकासमोर
व सर्व समुदायासमोर उभें केलें. २३ आणि आ-
पले हात त्यावर ठेवून त्याला आज्ञा केली; मो-
शाच्या योगें जसें परमेश्वराने सांगितलें तसें.

## अध्याय २८.

आणि परमेश्वराने मोशाला असें सांगि-
तलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस
आज्ञा देऊन सांग कीं, माझीं अर्पणें, माझीं अन्नदानें,
हीं शांतिकारक सुवासासाठीं माझ्याजवळ यथा-
काळीं करायास तुह्मी संभाळा." ३ आणि तूं
त्यांस सांग, 'तुह्मी जे होमपशू नेहमी प्रतिदिवसीं
परमेश्वराला अर्पावे, ते असे, पहिल्या वर्षांतील
सांगोपांग दोन मेंढे. ४ एक मेंढा सकाळीं तूं अ-
र्पण कर, आणि एक मेंढा संध्याकाळीं अर्पण कर.
५ आणि नैवेद्यासाठीं एकाचा एक दशमांश सपीठ,
पावहीन कुटून काढलेलें तेल यांत मळलेलें व्हावें.
६ हा नित्य होम सीना डोंगरावर नेमलेला,
परमेश्वराजवळ शांतिकारक सुवासासाठीं अर्पण
असा आहे. ७ आणि त्याच्यासंगतीं जें पेय
अर्पण करायाचें, तें एका मेंढ्यासंगतीं पावहीन द्रा-
क्षारस; तें तूं पवित्रस्थानांत परमेश्वराजवळ ओ-
तून पेय अर्पण कर. ८ आणि संध्याकाळीं तूं
दुसऱ्या मेंढ्याचें अर्पण कर; जसा सकाळचा नै-
वेद्य आणि त्याचें पेय अर्पण तसें कर; हें अर्पण
परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास आहे. ९
आणि शाब्बाथ दिवसीं पहिल्या वर्षांतील सांगो-
पांग दोन मेंढे, आणि तेलांत मळलेल्या दोन दश-
मांश सपिठाचा नैवेद्य, आणि त्याचें पेय अर्पण
व्हावें. १० नित्य होम व त्याचें पेय अर्पण यां-
खेरीज हा होम प्रत्येक शाब्बाथीं व्हावा. ११
आणि तुह्मी आपल्या महिन्यांच्या पहिल्या दिवसीं
दोन तरणे गोऱ्हे व एक एडका, पहिल्या वर्षांतील
सांगोपांग सात मेंढे परमेश्वराजवळ होम करा.
१२ आणि एकएका गोऱ्ह्यासंगतीं तेलांत मळ-
लेल्या तीन दशमांश सपिठाचा नैवेद्य आणि
त्या एका एडक्यासंगतीं तेलांत मळलेल्या दोन
दशमांश सपिठाचा नैवेद्य व्हावा. १३ आणि
एकएका मेंढ्यासंगतीं तेलात मळलेल्या एक-
एक दशमांश सपिठाचा नैवेद्य व्हावा; हा होम
परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास, अर्पण असा
आहे. १४ आणि त्यांच्या पेय अर्पणासाठीं दर
गोऱ्ह्यासंगतीं अर्धा हीन, आणि एडक्यासंगतीं आ-
णि दर मेंढ्यासंगतीं तृतीयांश हीन इतका द्राक्षा-
रस व्हावा; असा वर्षांतल्या महिन्यांतून प्रत्येक
महिन्यांत होम व्हावा. १५ आणि नित्य होमा-
खेरीज परमेश्वराजवळ पापहारक यज्ञासाठीं शे-
रडांतला एक बकरा अर्पिला जावा, आणि त्याचें
पेय अर्पण व्हावें. १६ आणि पहिल्या महिन्यांत
महिन्याच्या चौदाव्या दिवसीं परमेश्वरासाठीं
वल्हांडण सण व्हावा. १७ आणि त्याच महि-
न्याच्या पंधराव्या दिवसीं सण व्हावा; बेखमीर
भाकरी सात दिवस खाव्या. १८ पहिल्या दि-
वसीं पवित्र सभा असावी; तुह्मी संसाराचें कांहीं
काम करूं नका. १९ आणि परमेश्वराजवळ
होमासाठीं अर्पण दोन तरणे गोऱ्हे, व एक एड-
का, व पहिल्या वर्षांतील सात मेंढे असे तुह्मी
आणा; ते तुमच्यासाठीं सांगोपांग असावे. २०
आणि त्यांचा नैवेद्य, दर गोऱ्ह्यासंगतीं तेलांत मळ-
लेलें तीन दशमांश सपीठ आणि एडक्यासंगतीं
दोन दशमांश, असा तुह्मी अर्पा. २१ त्या सात
मेंढ्यांतल्या एकएका मेंढ्यासंगतीं एकएक दशमांश
सपीठ तूं अर्पण कर. २२ आणि तुह्मी आपल्या-
विषयीं प्रायश्चित्त करायास पापहारक यज्ञासाठीं
एक शेरडा अर्पा. २३ जो सकाळचा होम ह्मणजे
नित्य होम त्याखेरीज हें अर्पा. २४ याप्रमाणें
सात दिवसांतल्या प्रति दिवसीं परमेश्वराजवळ
शांतिकारक सुवासासाठीं जळायाचें अन्न अर्पा,
नित्य होमाखेरीज इतकें, याच्या पेय अर्पणासुद्धां
अर्पिलें जावें. २५ आणि सातव्या दिवसीं तु-
मची पवित्र सभा व्हावी; तुह्मी संसाराचें कांहीं
काम करूं नका. २६ आणि प्रथम उत्पन्नें अर्पा-
याच्या दिवसीं जेव्हां तुह्मी नवा नैवेद्य परमेश्व-
राजवळ आणितां तेव्हां तुमच्या सातव्यांनंतर तुम-
ची पवित्र सभा व्हावी; तुह्मी संसाराचें कांहीं काम
करूं नका. २७ आणि परमेश्वराजवळ शांति-
कारक सुवास होण्यासाठीं दोन तरणे गोऱ्हे, एक

एडका; पहिल्या वर्षांतील सात मेंढे अर्पून होम
करा; २८ आणि त्यांचा नैवेद्य, एकएका गोऱ्ह्या-
संगतीं तेलांत मळलेलें तृतीयांश सपीठ, त्या एका
एडक्यासंगतीं दोन दशमांश; २९ त्या सात में-
ढ्यांतल्या एकएका मेंढ्यासंगतीं एकएक दशमांश
असा अर्पा. ३० तुह्मी आपल्यांविषयीं प्राय-
श्चित्त करायास शेरडांतला एक बकरा. ३१
आणि नित्य होम व त्याचा नैवेद्य (ते तुमच्या-
साठीं सांगोपांग असावे) त्याखेरीज हीं व त्याचीं
पेय अर्पणें तुह्मी वाहा.

## अध्याय २९.

"आणि सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवशीं
तुमची पवित्र सभा व्हावी; तुह्मी संसा-
राचें कांहीं काम करूं नका; तो तुमचे करणे वा-
जवायाचा दिवस व्हावा. २ आणि परमेश्वरा-
जवळ शांतिकारक सुवास होण्यासाठीं एक तर-
णा गोऱ्हा, एक एडका, पहिल्या वर्षांतील सांगोपांग
सात मेंढे यांचा होम तुह्मी करा. ३ त्यांच्या संग-
तींचा नैवेद्यहि, गोऱ्ह्यासंगतीं तीन दशमांश, एड-
क्यासंगतीं दोन दशमांश, ४ आणि त्या सात मेंढ्यां-
तल्या एकएका मेंढ्यासंगतीं एक दशमांश इतकें
सपीठ तेलांत मळलेलें याचा व्हावा. ५ आणि
शेरडांतला एक पापहारक यज्ञासाठीं बकरा तुह्मा-
विषयीं प्रायश्चित्त करायास व्हावा. ६ महि-
न्याचा होम व त्याचा नैवेद्य, आणि नित्य होम
व त्याचा नैवेद्य, आणि त्यांच्या विधीप्रमाणें त्यांचीं
पेय अर्पणें यांखेरीज परमेश्वराजवळ अर्पण
शांतिकारक सुवास होण्यासाठीं हें व्हावें. ७
आणि त्याच सातव्या महिन्याच्या दाहाव्या दिवशीं
तुमची पवित्र सभा व्हावी, आणि तुह्मी आपल्या
जिवांस दुःख करून घ्या; कांहीं काम करूं नका.
८ आणि परमेश्वराजवळ शांतिकारक सुवास
होण्यासाठीं तुह्मी एक तरणा गोऱ्हा, एक एडका,
पहिल्या वर्षांतील सात मेंढ्यांचा होम करा; ते तु-
मच्यासाठीं सांगोपांग असावे. ९ आणि त्यांचा
नैवेद्य तेलांत मळलेलें सपीठ, गोऱ्ह्यासंगतीं तीन
दशमांश, व एका एडक्यासंगतीं दोन दशमांश,
१० त्या सात मेंढ्यांतल्या एकएका मेंढ्यासंगतीं
एकएक दशमांश, असा व्हावा. ११ पापहारक
यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा, प्रायश्चित्ताचा
पापहारक यज्ञ व नित्य होम व त्याचा नैवेद्य व
त्यांचीं पेय अर्पणें, यांखेरीज ते व्हावे. १२ मग
त्या सातव्या महिन्याच्या पंधराव्या दिवशीं तुमची
पवित्र सभा व्हावी; तुह्मी संसाराचें कांहीं काम
करूं नका, परंतु सात दिवस परमेश्वरासाठीं सण
पाळा. १३ आणि परमेश्वराजवळ शांतिकारक
सुवास होण्यासाठीं तेरा तरणे गोऱ्हे, दोन एडके,
पहिल्या वर्षांतील चवदा मेंढे, असे होमपशू तुह्मी
अर्पा; ते सांगोपांग असावे. १४ आणि त्यांचा
नैवेद्य तेलांत मळलेलें सपीठ तेरा गोऱ्ह्यांतल्या
एकएका गोऱ्ह्यासंगतीं तीन दशमांश, दोन एडक्यां-
तल्या एकएका एडक्यासंगतीं दोन दशमांश. १५
आणि चवदा मेंढ्यांतल्या एकएका मेंढ्यासंगतीं
एकएक दशमांश व्हावा. १६ आणि पापहारक
यज्ञासाठीं शेरडांतला एक बकरा व्हावा; नित्य
होम, त्याचा नैवेद्य व त्याचें पेय अर्पण, यांखे-
रीज ते व्हावे. १७ मग दुसऱ्या दिवशीं बारा
तरणे गोऱ्हे, दोन एडके, व पहिल्या वर्षांतील सां-
गोपांग चवदा मेंढे; १८ आणि गोऱ्ह्यांसंगतीं,
एडक्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणतीप्रमाणें
यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अर्पणें व्हावीं.
१९ आणि पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक
बकरा; नित्य होम व त्याचा नैवेद्य व त्यांचीं पेय
अर्पणें, यांखेरीज ते व्हावे. २० मग तिसऱ्या
दिवशीं अकरा गोऱ्हे, दोन एडके, पहिल्या वर्षां-
तील सांगोपांग चवदा मेंढे; २१ आणि गो-
ऱ्ह्यांसंगतीं, एडक्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या
गणतीप्रमाणें यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय
अर्पणें व्हावी. २२ आणि पापहारक यज्ञासाठीं
एक शेरडा; नित्य होम व त्याचा नैवेद्य व त्याचें
पेय अर्पण, यांखेरीज ते व्हावे. २३ मग चवथ्या
दिवशीं दाहा गोऱ्हे, दोन एडके, पहिल्या वर्षांतील
सांगोपांग चवदा मेंढे. २४ गोऱ्ह्यांसंगतीं, एड-
क्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणतीप्रमाणें
यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अर्पणें व्हावीं.
२५ आणि पापहारक यज्ञासाठीं शेरडांतला एक
बकरा; नित्य होम, त्याचा नैवेद्य व त्याचें पेय
अर्पण, यांखेरीज ते व्हावे. २६ मग पांचव्या
दिवशीं नऊ गोऱ्हे, दोन एडके, पहिल्या वर्षांतील

सांगोपांग चवदा मेंढे ; २७ **आणि** गोऱ्ह्यासंगतीं,
एडक्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणतीप्र-
माणें यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अर्पणें
व्हावीं ; २८ **आणि** पापहारक यज्ञासाठीं एक
शेरडा ; नित्य होम व त्याचा नैवेद्य व त्याचें पेय
अर्पण, यांखेरीच ते व्हावे. २९ **मग** साहाव्या
दिवशीं आठ गोऱ्हे, दोन एडके, पहिल्या वर्षांतील
सांगोपांग चवदा मेंढे ; ३० **आणि** गोऱ्ह्यांसंगतीं,
एडक्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणतीप्र-
माणें यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अर्पणें
व्हावीं ; ३१ **आणि** पापहारक यज्ञासाठीं एक शे-
रडा ; नित्य होम, त्याचा नैवेद्य व त्याचीं पेय
अर्पणें, यांखेरीज ते व्हावे. ३२ **मग** सातव्या
दिवशीं सात गोऱ्हे, दोन एडके, पहिल्या वर्षांतील
सांगोपांग चवदा मेंढे ; ३३ **आणि** गोऱ्ह्यांसंगतीं,
एडक्यांसंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणती-
प्रमाणें यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय
अर्पणें व्हावीं. ३४ **आणि** पापहारक यज्ञासाठीं
एक शेरडा ; नित्य होम, त्याचा नैवेद्य व त्याचें
पेय अर्पण, यांखेरीज ते व्हावे. ३५ **आठव्या**
दिवशीं तुमचें निवारण व्हावें ; तुह्मीं संसाराचें
कांहीं काम करूं नका. ३६ परंतु **परमेश्वरा**-
जवळ शांतिकारक सुवास होण्यासाठीं एक गोऱ्हा,
एक एडका, पहिल्या वर्षांतील सांगोपांग सात में-
ढे असें होम तुह्मी करा. ३७ **गोऱ्ह्यासंगतीं,**
एडक्यासंगतीं व मेंढ्यांसंगतीं त्यांच्या गणतीप्र-
माणें यथाविधि त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अ-
र्पणें व्हावीं ; ३८ **आणि** पापहारक यज्ञासाठीं
एक शेरडा ; नित्य होम व त्याचा नैवेद्य व त्याचें
पेय अर्पण, यांखेरीज ते व्हावे. ३९ **तुमचीं** नव-
सांचीं अर्पणें व तुमचीं स्वबुद्धीचीं अर्पणें यांखेरीज
तुमचे होम व तुमचे नैवेद्य व तुमचीं पेय अर्पणें व
तुमचे शांतिकारक यज्ञ यांविरहित ते तुह्मी आप-
ल्या पर्वकाळीं **परमेश्वराला** अर्पा." ४० **तर पर-
मेश्वराने मोशाला** ज्या सर्व आज्ञा दिल्या, त्यां-
प्रमाणें **मोशाने** इस्राएलाच्या संतानांस सांगितलें.

## अध्याय ३०.

**आ**णखी इस्राएलाच्या संतानांतल्या वंशांच्या अ-
धिकाऱ्याजवळ **मोशाने** असें सांगितलें कीं,
"जी गोष्ट **परमेश्वरानें** आज्ञेने सांगितली ती
हीच. २ जर कोणी पुरुष **परमेश्वरा**जवळ नवस
करितो, किंवा आपल्या जिवावर बंधन करण्याने
शपथ वाहतो, तर त्याने आपलें वचन न मोडावें:
जें त्याच्या तोंडांतून निघालें, त्या अवघ्याप्रमाणें
त्याने करावें. ३ **आणि** कोणी स्त्री आपल्या बा-
पाच्या घरीं आपल्या बाळपणांत, जर **परमेश्वरा**-
जवळ नवस करून बंधन पत्करिती, ४ **आणि**
तिचा नवस व तिचें बंधन, जें तिने आपल्या जिवा-
वर घेतलें, तें तिचा बाप ऐकतो, आणि तिचा बाप
तिच्याजवळ उगाच राहतो, तर तिचे सर्व नवस
स्थापले जातील ; आणि तिचें जें प्रत्येक बंधन तिने
आपल्या जिवावर घेतलें, तें स्थापलें जाईल. ५
परंतु जर तिचा बाप, आपण ऐकल्या वेळेस तिला
मना करितो, तर तिचे नवस व तिचीं बंधनें जीं
तिने आपल्या जिवावर घेतलीं, त्यांतलें कांहीं स्था-
पलें जाणार नाहीं ; आणि **परमेश्वर** तिची क्षमा
करील, कारण कीं तिच्या बापाने तिला मना केलें.
६ **आणि** तिला नवरा असतां, जर तिजवर नवस
आहेत अथवा तिच्या तोंडांतून अविचाराने उद्गार
निघून तिने आपल्या जिवाला बंधन केलें आहे.
७ **आणि** तिचा नवरा ऐकत असतां आपण ऐकल्या
वेळेस तिच्याजवळ उगाच राहिला, तर तिचे
नवस स्थापले जातील ; आणि जीं बंधनें तिने आ-
पल्या जिवावर घेतलीं, तीं स्थापलीं जातील. ८
परंतु ज्या काळीं तिच्या नवऱ्याने ऐकिलें, तेव्हां
जर त्याने तिला मना केलें, तर तिजवरला तिचा
तो नवस आणि जें तिने आपल्या होटांतल्या उ-
द्गाराने आपल्या जिवाला बांधून घेतलें, तेंहि त्या-
ने मोडून टाकिलें आहे, आणि **परमेश्वर** तिची
क्षमा करील. ९ परंतु विधवा किंवा घालविलेली
इचा नवस कशानेहि तिने आपल्या जिवाला बां-
धून घेतलें, तें तिजवर स्थापलें जाईल. १०
**आणि** जर तिने आपल्या नवऱ्याच्या घरीं नवस
केला, किंवा शपथेने आपल्या जिवावर बंधन घेत-
लें. ११ **आणि** तिच्या नवऱ्याने ऐकतांना तिच्या
जवळ उगेंच राहून तिला मना न केलें, तर तिचे
सर्व नवस स्थापले जातील ; आणि जें कांहीं बंधन
तिने आपल्या जिवावर घेतलें, तें स्थापलें जाईल.
१२ परंतु जर तिच्या नवऱ्याने आपण ऐकिलें,

त्या दिवसीं तीं अगदी मोडून टाकिलीं, तर तिच्या
नवसांविषयीं व तिच्या जिवाच्या बंधनाविषयीं जें
कांहीं तिच्या होटांतून निघालें, तें स्थापलें जाणार
नाहीं; तिच्या नवऱ्याने तीं मोडून टाकिलीं आ-
हेत, आणि परमेश्वर तिची क्षमा करील. १३
सर्व नवस व जिवाला दुःख घेण्याविषयीं बंधनाच्या
सर्व शपथा तिच्या नवऱ्याने स्थापाव्या, किंवा
तिच्या नवऱ्यानें मोडून टाकाव्या. १४ परंतु जर
तिचा नवरा दिवसोंदिवस तिच्याजवळ अगदी उ-
गा राहील, तर त्याने तिचे सर्व नवस स्थापिले
आहेत, किंवा तिजवर जीं तिचीं बंधनें तीं सर्व
त्याने स्थापिलीं आहेत; कां तर त्याने ऐकिलीं,
त्या दिवसीं तो तिच्याजवळ उगाच राहिला होता.
१५ परंतु जर त्याने ऐकिल्यानंतर आपण तीं
मोडूनच टाकितो, तर त्याने तिचा दोष घेऊन
संभाळावा." १६ पुरुष व त्याची स्त्री यांमध्यें, बाप
व त्याची कन्या जी आपल्या बाळपणांत आपल्या
बापाच्या घरीं, त्यांमध्यें जीं बंधारणें परमेश्वराने
मोशाजवळ आज्ञेने लाविलीं तीं हींच आहेत.

## अध्याय ३१.

आणि परमेश्वराने मोशाला असें सांगि-
तलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संताना-
साठीं मिद्यानी यांचे सूड घे, नंतर तूं आपल्या
लोकांशीं मिळून जासील." ३ मग मोशाने
लोकांस असें सांगितलें कीं, "तुह्मी आपल्यामधून
लढण्यासाठीं मनुष्यें सिद्ध करा, आणि मिद्याना-
वर परमेश्वरासाठीं सूड घ्यायास तीं मिद्याना-
विरुद्ध जातील. ४ इस्राएलाच्या सर्व वंशांत-
ल्या एकएका वंशाचे एक एक हजार लढायास पा-
ठवा." ५ मग इस्राएलाच्या हजारांतून दर वं-
शाचे एक हजार, असे बारा हजार लढायाचे
हत्यारबंद सिद्ध करून काढले गेले. ६ आणि
मोशाने दर वंशांतले एक हजार असे ते लढा-
याला पाठविले; त्यांस आणि एलाजाराचा पुत्र
फीनहास याजक यालाहि सैन्यांत पाठविलें;
आणि पवित्र साहित्यें व वाजवायाचे करणे त्या-
च्या हातीं होते. ७ मग जसी परमेश्वराने
मोशाला आज्ञा दिल्ही होती, तसें त्यांनी मिद्या-
नाशीं लढून सर्व पुरुष मारिले. ८ तेव्हां त्यां-
तल्या मारलेल्यांसंगतीं मिद्यानी राजे, अवी व
रेकेम व सूर व हूर व रेबा हे मिद्यानी पांच
राजे मारिले; आणि बौराचा पुत्र बलाम यालाहि
त्यांनी तरवारीने मारिलें. ९ आणि इस्राएला-
च्या संतानांनी मिद्यानी स्त्रिया व त्यांचीं बाळकें,
आणि त्यांचीं सर्व गुरें व त्यांचे सर्व पशू धरून
नेले; त्यांचें सर्व धनहि घेतलें. १० आणि
त्यांच्या वस्त्यांचीं सर्व नगरें व त्यांचे सर्व गड
अग्नीने जाळिले. ११ आणि मनुष्यांतलें व पशूं-
तलें सर्व लुटाऊ व सर्व धराऊ त्यांनी धरिलें.
१२ आणि त्यांनी ते पराजित बंदिवान् व बाहेर-
ची लूट व अंगची लूट मोवाबाच्या अरण्यांत
यरीहोजवळच्या यार्देनेवर जी छावणी, तींत मोशे
व एलाजार याजक व इस्राएलाच्या संतानांचा
समुदाय यांजवळ आणिली. १३ मग त्यांस भेटा-
याला मोशे व एलाजार याजक व सभेचे सर्व
अधिकारी छावणीबाहेर गेले. १४ तेव्हां सैन्याचे
अधिकारी, हजारांचे सरदार व शंभरांचे सरदार
जे लढाई करून आले, त्यांवर मोशे कोपला.
१५ आणि मोशे त्यांस बोलला, "तुह्मी सर्व
स्त्रिया वांचविल्या काय? १६ पाहा, त्यांनी बला-
माच्या सांगण्यावरून पौराच्या प्रकरणांत इस्राएला-
च्या संतानांस परमेश्वरावर दुष्टाई करायास शिक-
विल्या; यास्तव परमेश्वराच्या समुदायावर पटकी
प्राप्त झाली होती. १७ तर आतां बाळकांतल्या
सर्व पुरुषांस मारा; आणि ज्या स्त्रियांस पुरुषाशीं
संयोग झाला, त्यांसहि मारा. १८ परंतु स्त्रिया-
मध्यें सर्व मुली ज्यांस पुरुषाशीं संयोग झाला ना-
हीं, त्यांस तुह्मी आपल्यासाठीं वांचवा. १९ आ-
णि ज्या सर्वांनीं प्राण्याला मारिलें, आणि जे सर्व
मारलेल्याला शिवले, ते तुह्मी सात दिवस छाव-
णीबाहेर वस्ती करा; तुह्मी तिसऱ्या दिवसीं व
सातव्या दिवसीं आपणास व आपल्या बंदिवानांस
शुद्ध करा. २० आणि सर्व वस्त्रें व कातड्याच्या सर्व
वस्तू व शेळ्यांचें कांहीं केलेलें व लांकडाच्या सर्व
वस्तू, यांस तुह्मी शुद्ध करा." २१ आणि एला-
जार याजकाने, जीं सैनिक माणसें लढायाला गेलीं
होतीं, त्यांस सांगितलें, "जो शास्त्रविधि परमे-
श्वराने मोशाला दिल्हा तो हाच; २२ केवळ
सोनें व रुपें, तांबें, लोखंड, कथील व शिसें,

२३ जो कांहीं पदार्थ अग्नींतून निभावेल, तो तुम्ही
अग्नींत घालून काढा, ह्मणजे शुद्ध होईल; तथापि
शुद्ध करण्याच्या पाण्यानें त्याला शुद्ध करावें;
आणि जें कांहीं अग्नींतून निभावणार नाहीं, तें तुम्ही
पाण्यांत घालून काढा. २४ आणि सातव्या दि-
वशीं तुम्ही आपलीं वस्त्रें धुऊन शुद्ध व्हा, आणि
मग छावणींत या."

२५ आणि परमेश्वरानें मोशाला असें सां-
गितलें कीं, २६ "एलाजार याजक व समुदाया-
चे मुख्य वडील यांसहित तूं माणसांतल्या व प-
शूंतल्या आणिलेल्या लुटीची संख्या कर. २७
मग जे लढाई पत्करून सैन्यांत गेले आणि समु-
दायाचे सर्व या उभयतांस लुटीचा विभाग करून
दे. २८ आणि सैन्यांत गेलेलीं लढायाचीं माणसें
यांच्यांतून परमेश्वरासाठीं करभार काढून घे;
असा कीं पांच पांचशें माणसांतून व गुरांतून व
गाढवांतून व बकऱ्यांतून एक एक जीव; २९ त्यां-
च्या अर्ध्यांतून परमेश्वराचें उचललेलें दान
तुम्ही घ्या; मग तूं एलाजार याजकाला दे. ३०
आणि इस्राएलाच्या संतानांच्या अर्ध्यांतून असे
कीं धरलेले मनुष्य, गुरें, गाढवें व बकरें सर्व पशू
यांच्या प्रत्येक पन्नासींतून एक एक घे; आणि जे
लेवी परमेश्वराच्या मंडपाचा संभाळ करितात,
त्यांस ते दे." ३१ मग जसी परमेश्वरानें
मोशाला आज्ञा दिल्ही, तसें मोशानें व एला-
जार याजकानें केलें. ३२ तेव्हां धरलेली लूट
जी सैनिक लोकांनी हिरावून आणिली, तिची सं-
ख्या इतकी होती कीं, साहा लाख व पंच्या-
हत्तर हजार बकरें; ३३ आणि बाहत्तर हजार
गुरें; ३४ आणि एकसष्ट हजार गाढवें; ३५
आणि मनुष्यें, ह्मणजे ज्या स्त्रियांस पुरुषासीं
संयोग झाला नाहीं, त्यांतील सर्व माणसें बत्तीस
हजार होतीं. ३६ आणि सैन्यांत गेलेल्यांचा
अर्धा वांटा, गणतीनें तीन लाख सततीस हजार व
पांचशें बकरें, इतका होता. ३७ आणि त्या बक-
ऱ्यांतला परमेश्वराचा करभार साहाशें पंच्याह-
त्तर होता. ३८ आणि गुरें छत्तीस हजार; आणि
त्यांतला परमेश्वराचा करभार बाहत्तर होता.
३९ आणि गाढवें तीस हजार पांचशें; आणि
त्यांतला परमेश्वराचा करभार एकसष्ट होता.
४० आणि मनुष्यें सोळा हजार, आणि त्यांतला
परमेश्वराचा करभार बत्तीस जीव होता. ४१
तेव्हां जसी परमेश्वरानें मोशाला आज्ञा दिल्ही,
तसें मोशानें तो करभार, ह्मणजे परमेश्वराचें
उचललेलें दान एलाजार याजकाला दिल्हें. ४२
आणि इस्राएलाच्या संतानांचा अर्धा वांटा, जो
मोशानें लढाईच्या माणसांपासून विभागून घेतला,
४३ त्याविषयीं असें होतें कीं बकऱ्यांत समुदा-
याचें, तीन लाख सततीस हजार आणि पांचशें;
४४ आणि गुरें छत्तीस हजार; ४५ आणि गाढवें
तीस हजार आणि पांचशें; ४६ आणि मनुष्यें
सोळा हजार होते. ४७ आणि इस्राएलाच्या संता-
नांच्या अर्ध्यांत जे मनुष्य व पशू त्यांतल्या पन्नास
पन्नासांतून एक मोशानें घेतला, आणि परमेश्व-
राच्या मंडपाचा संभाळ करणारे लेवी यांस ते
दिल्हे; जसी परमेश्वरानें मोशाला आज्ञा दि-
ल्ही होती तसे.

४८ मग सैन्याच्या हजारांवर जे अधिकारी,
हजारांचे सरदार व शंभरांचे सरदार ते मोशा-
जवळ आले. ४९ तेव्हां ते मोशाला बोलले,
"तुझ्या चाकरानी ह्मणजे आह्मी आपल्या हाता-
खालीं जीं लढायाचीं माणसें होतीं, त्यांची संख्या
करून घेतली आहे; तर आमच्यांतून कोणी उणा
झाला नाहीं. ५० यास्तव प्रत्येकाला जे सो-
न्याचे डागिणे मिळाले, तोडा किंवा कडें, अंगठी,
कुंडल किंवा गोंडा, त्यांतून परमेश्वराजवळ अ-
र्पण आमच्या जिवासाठीं परमेश्वरासमोर प्राय-
श्चित्त होण्याकरितां आह्मी आणिलें आहे." ५१
तेव्हां मोशे व एलाजार याजक, यानी त्यांपासून
तें सोनें ह्मणजे सर्व घडीव डागिणे घेतले. ५२
आणि जें अंशदान त्यानी हजारांचे सरदार व
शंभरांचे सरदार यांपासून घेऊन परमेश्वराला
दिल्हें, त्याचें सर्व सोनें सोळा हजार सातशें
पन्नास शेकेल होतें. ५३ सैनिक मनुष्यांतल्या
एकएकानें आपापल्यासाठीं लुटून घेतलें होतें. ५४
आणि मोशे व एलाजार याजक, यानी हजारां-
च्या व शंभरांच्या सरदारांपासून तें सोनें घेऊन
इस्राएलाच्या संतानांसाठीं परमेश्वरासमोर सू-
चनेसाठीं असें सभामंडपांत आणून ठेविलें.

**अध्याय ३२.**

आणि रऊबेनाचे वंशस्थ व गादाचे वंशस्थ
यांजवळ गुरें पुष्कळ, फार वाढलेलीं होतीं;
आणि त्यानी याजेर प्रांत व गिलाद प्रांत पाहि-
ला होता कीं हा देश गुरांजोगें ठिकाण आहे.
२ यास्तव गादाचे वंशस्थ व रऊबेनाचे वंशस्थ
यानी मोशे व एलाजार याजक व समुदायाचे
अधिकारी यांजवळ येऊन असें ह्मटलें कीं, ३
"अटरोथ व दीबोन व याजेर व निम्रा व हेश्-
बोन व एलाले व सबाम व नबो व बौन, ४
याचा जो प्रांत परमेश्वराने इस्राएलाच्या समु-
दायापुढें मारिला, तो गुरांचा प्रांत आहे; आणि
तुझ्या चाकरांस गुरें आहेत. ५ आणि जर तु-
झ्या लक्षांत आह्मावर कृपा प्राप्त झाली आहे,
तर हाच प्रांत तुझ्या चाकरांस वतन करून दि-
ल्हा जावा, तूं आह्मास यार्देनेच्या पलिकडे नेऊं
नको;" असें त्यानी ह्मटलें.
६ तेव्हां मोशे गादाच्या वंशस्थांस व रऊबे-
नाच्या वंशस्थांस बोलला, "तुमच्या भावानी लढा-
याला जावें, आणि तुह्मी एथें बसावें काय? ७
आणि जो देश परमेश्वराने इस्राएलाच्या संता-
नांस दिल्हा आहे, तेथें पलिकडे जाण्याविषयीं तुह्मी
त्याचें मन निराश कां करितां? ८ ह्या तुमच्या
वडिलांस कादेशबार्ण्यापासून तो देश पाहायास
पाठविलें, तेव्हां त्यानी तसें केलें. ९ त्यानी तर
एष्कोल ओहळापर्यंत वर जाऊन तो देश पाहिला;
मग जो देश परमेश्वराने त्यांस दिल्हा होता,
तिकडे न जावें असें इस्राएलाच्या संतानांचें मन
त्यानी निराश केलें. १० आणि त्याच दिवसीं
परमेश्वराने रागें भरून असी शपथ वाहिली
कीं, ११ 'जी भूमि म्या आब्राहाम, इझाक व
याकोब यांजवळ शपथ वाहून देऊं केली होती,
तिला वीस वर्षांचे व वरले जे मनुष्य मिसरांतून
वर आले, ते निश्चयें पाहणार नाहींत; कारण कीं
त्यानी माझें पूर्ण अनुसरण केलें नाहीं. १२ के-
वळ यफुन्नयाचा पुत्र कनिज्झी कालेब, आणि
नूनाचा पुत्र यहोशवा हे मात्र पाहतील; कारण
कीं त्यानी परमेश्वराचें अनुसरण पूर्ण केलें आहे.'
१३ तेव्हां परमेश्वराने इस्राएलावर रागें भरून,
ज्या पिढीने परमेश्वराच्या दिसण्यांत दुष्टाई
केली होती, ती सर्व संपे तोंपर्यंत चाळीस वर्षें
त्यांस रानांत फिरविलें. १४ आणि पाहा, इस्रा-
एलावर परमेश्वराचा संताप अणखी वाढवायास
तुह्मी आपल्या वडिलांच्या ठिकाणीं पापिष्ठ माण-
सांची पिढी असे उठलां आहां. १५ कां तर
तुह्मी त्यापासून फिराल तर तो त्यांस रानांत
अणखीहि ठेवील, आणि तुह्मी या सर्व लोकांचा
नाश कराल." १६ तेव्हां ते त्याच्याजवळ ये-
ऊन बोलले, "आह्मी आपलीं बकरें गुरें यांसाठीं
गोठे आणि आपल्या बाळकासाठीं नगरें एथें बांधूं.
१७ मग आह्मी इस्राएलाच्या संतानांस त्यांच्या
ठिकाणीं पोहंचवूं तोंपर्यंत त्यांच्यापुढें सडे हत्यार-
बंद होऊं, आणि आमचीं बाळकें देशांतल्या रा-
हणाऱ्यांमुळें बांधलेल्या नगरांत राहतील. १८
इस्राएलाच्या संतानांतला प्रत्येक आपापलें वतन
पावेल तोंपर्यंत आह्मी आपल्या घरांस परत येणार
नाहीं. १९ आणि आमचें वतन यार्देनेच्या अ-
लिकडे उगवतेस आह्मास प्राप्त झालें ह्मणून आ-
ह्मी त्यांच्यासंगतीं यार्देनेच्या पलिकडे आणि पुढें
वतन घेणार नाहीं." २० मग मोशाने त्यांस
सांगितलें, "जर तुह्मी ही गोष्ट कराल, जर तुह्मी
लढायास परमेश्वरापुढें हत्यारबंद व्हाल. २१
ह्मणजे, परमेश्वर आपल्यापुढून आपले शत्रू वत-
नांतून घालवील, तोंपर्यंत सर्व तुह्मी यार्देनेच्या
पलिकडे जाऊन, परमेश्वरापुढें हत्यारबंद राहाल,
२२ आणि देश परमेश्वरापुढें स्वाधीन केला
जाईल, तर त्यानंतर तुह्मी परत येऊन पर-
मेश्वराजवळ व इस्राएलाजवळ निर्दोषी व्हाल,
आणि हा देश परमेश्वरापुढें तुमचें वतन असा
होईल. २३ परंतु जर तुह्मी तसें न कराल, तर
पाहा, तुह्मी परमेश्वराजवळ दोषी आहां, आ-
णि तुह्मी आपलें पाप जाणा, कां तर त्याला तम-
चा शोध लागेल. २४ तुह्मी आपल्या बाळकां-
साठीं नगरें आणि आपल्या कळपांसाठीं कोंडाळीं
बांधा, आणि तुमच्या तोंडांतून जें निघालें तें करा."
२५ तेव्हां गादाच्या वंशस्थानी व रऊबेनाच्या
वंशस्थानी मोशाजवळ असें सांगितलें कीं, "जसी
आमच्या धन्यानें आज्ञा दिल्ही, तसे तुझे सेवक
करितील. २६ आमचीं बाळकें, आमच्या बायका,

आमचीं गुरें, व आमचे सर्व पशू एथें गिला-
दांतल्या नगरांत राहतील; २७ परंतु जसें आ-
मच्या धन्यानें सांगितलें, तसे तुझे सर्व सेवक सै-
न्यरूपें हत्यारबंद होऊन परमेश्वरापुढें लढाया-
साठीं पलिकडे जातील." २८ मग त्यांविषयीं
मोश्यानें एलाजार याजकाला व नूनाचा पुत्र यहो-
शवा याला व इस्राएलाच्या संतानांतल्या वंशां-
च्या मुख्य वडिलांस आज्ञा दिल्ही. २९ आणि
मोश्यानें त्यांस सांगितलें, "जर सर्व गादाचे वंश-
स्थ व रऊबेनाचे वंशस्थ लढायासाठीं हत्यारबंद
होऊन परमेश्वरापुढें तुमच्यासंगतीं यार्देनेच्या
पलिकडे येतील, आणि देश तुमच्यापुढें स्वाधीन
केला जाईल, तर तुह्मी त्यांस गिलाद प्रांत वतन
करून द्या. ३० परंतु जर ते हत्यारबंद होऊन
तुमच्यासंगतीं पलिकडे न येतील, तर त्यानी तुम-
च्यामध्यें खनान देशांत वतन घ्यावें." ३१ तेव्हां
गादाच्या वंशस्थानी व रऊबेनाच्या वंशस्थानी
असें उत्तर केलें कीं, "जसें परमेश्वरानें तुझ्या
चाकरांस सांगितलें, तसें आह्मी करूं. ३२
आह्मी हत्यारबंद होऊन परमेश्वरापुढें पलिकडे
खनान देशास जाऊं; परंतु आमचें वतनधन या-
र्देनेच्या अलिकडे आह्मास मिळावें." ३३ मग
मोश्यानें गादाच्या वंशस्थांस व रऊबेनाच्या वंश-
स्थांस व योसेफाचा पुत्र मनाश्शे याच्या अर्ध्या
वंशास अमोऱ्यांचा राजा सीहोन याचें राज्य, व
बाशानाचा राजा ओग याचें राज्य, असा देश
त्याच्या सीमांतलीं नगरें, ह्मणजे देशाच्या चहुंक-
डलीं नगरें, यांसुद्धां दिल्हा. ३४ मग गादाच्या
वंशस्थानी दीबोन, व अटारोथ, अरवेर; ३५ व
आटरोथ, शोफान, व याजेर, व यगबहा. ३६
व बेथनिम्रा, व बेथहारान, असीं बंदिस्तीचीं न-
गरें, आणि कळपाचीं कोंडाळीं बांधिलीं. ३७ आ-
णि रऊबेनाच्या वंशस्थानी, हेश्बोन व एलाले व
किर्याथाइम, ३८ व नेबो, व बालमीन (त्यांचीं नावें
फिरविलीं असतां) व सिब्मा, असीं बांधिलीं; आणि
जीं नगरें त्यानी बांधिलीं, त्यांवर निराळीं नावें
ठेविलीं. ३९ आणि मनाश्श्याचा पुत्र माखीर
याच्या वंशस्थानी गिलादास जाऊन तो घेतला,
आणि त्यांतले अमोरी घालविले. ४० आणि
मोश्यानें मनाश्श्याचा पुत्र माखीर याला गि-
लाद दिल्हा; मग तो त्यांत राहिला. ४१ आणि
मनाश्श्याचा पुत्र याईर यानें जाऊन त्याचें गांव
घेतलें, आणि त्याला हावोथयाईर ह्मटलें. ४२
नोबाह यानेंहि जाऊन कनाथ व त्याचीं खेडीं
घेतलीं, आणि त्याला नोबाह असें आपलें नांव
ठेविलें.

## अध्याय ३३.

जीं इस्राएलाचीं संतानें मोश्याच्या व आहरो-
नाच्या योगें त्यांच्या सैन्यांप्रमाणें मिसर दे-
शांतून निघालीं होतीं, त्यांचे मुकाम असे होते. २
कां कीं परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणें मोश्यानें
त्यांच्या मजली त्यांच्या मुकामांप्रमाणें लिहिल्या
आहेत; तर त्यांच्या मजलांप्रमाणें त्यांचे मुकाम
असे. ३ आणि पहिल्या महिन्यांत पहिल्या
महिन्याच्या पंधराव्या दिवसीं वल्हांडण सणाच्या
दुसऱ्या दिवसीं इस्राएलाचीं संतानें रामसेसापासून
निघून उंच हातानें सर्व मिसऱ्यांच्या देखतां बा-
हेर आलीं. ४ तेव्हां मिसरी मेतें पुरीत होते,
कारण कीं परमेश्वरानें त्यांचे सर्व ज्येष्ठ पुत्र
मारिले होते, आणि त्यांच्या देवांवर परमेश्वरानें
न्याय केले होते. ५ आणि इस्राएलाचीं संतानें
रामसेसापासून निघून सुक्कोथांत उतरलीं. ६
मग सुक्कोथापासून निघून रानाच्या काठीं एथाम
तेथें उतरलीं. ७ मग एथामापासून निघून बाल-
जफोनासमोर जें हीरोथ त्याच्या तोंडाजवळ व-
ळून मिग्दोलासमोर उतरलीं. ८ मग तीं हीरो-
थाच्यासमोरून निघून समुद्रामधून पार होऊन
रानांत आलीं; मग एथाम रानांत तीन दिवसांची
वाट चालून मारा यांत उतरलीं. ९ मग माऱ्या-
पासून निघून एलीमास आलीं, आणि एलीमांत
पाण्याचे बारा झरे व सत्तर खारीक झाडें होतीं,
आणि तेथें उतरलीं. १० मग एलीमापासून
निघून सूफसमुद्राजवळ उतरलीं. ११ नंतर
सूफ समुद्राजवळून निघून सीन रानांत उतरलीं.
१२ मग सीन रानांतून निघून दफका यांत उत-
रलीं. १३ मग दफक्यापासून निघून आलू-
शांत उतरलीं. १४ मग आलूशापासून निघून
रफीदीमांत उतरलीं, आणि तेथें लोकांस प्यायास
पाणी नव्हतें. १५ मग रफीदीमापासून निघून

सीना रानांत उतरलीं. १६ मग सीना राना-
पासून निघून किब्रोथहात्तावांत उतरलीं. १७
मग किब्रोथहात्तावापासून निघून हजेरोथांत
उतरलीं. १८ मग हजेरोथापासून निघून रि-
थमा यांत उतरलीं. १९ मग रिथम्यापासून
निघून रिम्मोनपारेजांत उतरलीं. २० मग रि-
म्मोनपारेजापासून निघून लिब्ना यांत उतरलीं. २१
मग लिब्न्यापासून निघून रिस्सा यांत उतरलीं.
२२ मग रिस्सापासून निघून कहेलाथा यांत उत-
रलीं. २३ मग कहेलाथ्यापासून निघून शाफार
डोंगराजवळ उतरलीं. २४ मग शाफार डोंग-
राजवळून निघून हरादा यांत उतरलीं. २५ मग
हरादापासून निघून माकहेलोथांत उतरलीं. २६
मग माकहेलोथापासून निघून ताहाथांत उतरलीं.
२७ मग ताहाथापासून निघून ताराहांत उतरलीं.
२८ मग ताराहापासून निघून मिथ्का यांत उ-
तरलीं. २९ मग मिथ्क्यापासून निघून हाश्मो-
ना यांत उतरलीं. ३० मग हाश्मोन्यापासून नि-
घून मोसेरोथांत उतरलीं. ३१ मग मोसेरोथा-
पासून निघून बेनेयाकाना यांत उतरलीं. ३२
मग याकानसंतानांपासून निघून होरहागिद्गा-
दांत उतरलीं. ३३ मग होरहागिद्गादापासून
निघून एटबाथा यांत उतरलीं. ३४ मग यट-
बाथ्यापासून निघून आब्रोना यांत उतरलीं. ३५
मग आब्रोन्यापासून निघून एज्योनगाबेरांत उत-
रलीं. ३६ मग एज्योनगाबेरापासून निघून झीन
रान म्हणजे कादेश यांत उतरलीं. ३७ मग
कादेशापासून निघून अदोम देशाच्या सीमेंतल्या
होर डोंगराजवळ उतरलीं. ३८ तेव्हां आह-
रोन याजक परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणें होर
डोंगरावर चढला, आणि इस्राएलाचीं संतानें मि-
सर देशांतून निघाल्यावर चाळिसाव्या वर्षी पां-
चव्या महिन्याच्या पहिल्या दिवशीं तेथें मेला.
३९ आणि आहरोन होर डोंगरावर मेला, तेव्हां
तो एकशें तेवीस वर्षांचा होता. ४० आणि ख-
नानी राजा अराद जो खनान देशांत दक्षिणेस
राहत होता, त्याने इस्राएलाच्या संतानांच्या ये-
ण्याविषयीं ऐकिलें. ४१ मग तीं होर डोंगरापा-
सून निघून साल्मोना यांत उतरलीं. ४२ मग
साल्मोन्यापासून निघून पूनोनांत उतरलीं. ४३
मग पूनोनापासून निघून ओबोथांत उतरलीं. ४४
मग ओबाथापासून निघून मोवाबाच्या सीमेंतल्या
इयअबारीमांत उतरलीं. ४५ मग इमायापा-
सून निघून गादाच्या दीबोनांत उतरलीं. ४६
मग गादाच्या दीबोनापासून निघून दिब्लाथाइमा-
कडल्या आल्मोनांत उतरलीं. ४७ मग दिब्-
लाथाइमाकडल्या आल्मोनापासून निघून अबारी
डोंगरांमध्यें नबोपुढें उतरलीं. ४८ मग अबा-
री डोंगरापासून निघून मोवाबाच्या अरण्यांत
यरीहोजवळच्या यार्देनेवर उतरलीं. ४९ तेव्हां
मोवाबाच्या अरण्यांत यार्देनेवर बेथयाशिमाथा-
पासून आबेलशिट्टीमापर्यंत उतरत होतीं.

५० आणि मोवाबाच्या अरण्यांत यरीहोजव-
ळच्या यार्देनेवर परमेश्वराने मोशाला असें
सांगितलें कीं, ५१ "तूं इस्राएलाच्या संतानांस
बोलून त्यांस सांग कीं, जेव्हां तुह्मी यार्देनेच्या
पलिकडे खनान देशांत जाल, ५२ तेव्हां तुह्मी
देशांतल्या सर्व राहणाऱ्यांस आपल्यापुढून घालवा,
आणि त्यांच्या सर्व चित्रांचा नाश करा; त्यांच्या
सर्व ओतीव मूर्त्तींचाहि नाश करा, आणि त्यांचीं
सर्व उंचस्थानें मोडून टाका. ५३ असे तुह्मी
तो देश वतन करून त्यांत राहा; कारण कीं तुह्मी
तो देश वतन करून घ्यावा ह्मणून म्या तो तुह्मा-
स दिल्हा आहे. ५४ आणि तुह्मी तो देश, आ-
पल्या कुळांप्रमाणें दैवखुणांनी वांटून घ्या; बहुतांस
बहुत वतन दे, आणि थोडक्यांस थोडें वतन दे;
जेथें ज्याची दैवखूण पडेल, तेथें त्याचें वतन व्हावें;
तुह्मी आपल्या पूर्वजांच्या वंशांप्रमाणें वतन घ्या.
५५ परंतु जर तुह्मी आपल्यापुढून देशांतल्या राह-
णाऱ्यांस वतनांतून न घालवाल, तर असें हो-
ईल कीं त्यांतले जे तुह्मी ठेवाल, ते तुमच्या डो-
ळ्यांत कुसळें असे, आणि तुमच्या कुसींत कांटे
असे होतील; आणि ज्या देशांत तुह्मी राहाल,
त्यांत तुह्मास त्रास देतील. ५६ मग असें हो-
ईल कीं जसें म्या त्यांचें करायास योजिलें, तसें
तुमचें मी करीन."

## अध्याय ३४.

आणि परमेश्वराने मोशाला असें सांगि-
तलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस

आज्ञा देऊन त्यास सांग कीं, जेव्हां तुह्मी खनान
देशांत आलां आहां, (जो देश तुह्मास वतनासाठीं
प्राप्त होईल, तो त्याच्या सीमासुद्धां खनान देश
आहे). ३ तेव्हां तुमची दक्षिण बाजु झीन रा-
नापासून अदोमाच्या कांठाकडे व्हावी ; ह्मणजे
तुमची दक्षिण सीमा पूर्वेस जो मीठ समुद्र त्याच्या
शेवटापासून व्हावी. ४ मग तुमची ती सीमा
आक्राब्बीमाच्या चढण्याच्या दक्षिणेकडून वळून
पुढें झीनास जावी ; नंतर तिच्या गती कादेश-
बाण्र्याच्या दक्षिणेकडून व्हाव्या; मग ती हजार-
आद्दारास जाऊन पुढें आज्मोनास जावी. ५ मग
ती सीमा आज्मोनापासून मिसरी नदीपर्यंत व-
ळावी; अशा तिच्या गती समुद्रापर्यंत व्हाव्या.
६ आणि पश्चिम सीमा, तर मोठा समुद्र तुह्मास
सीमा व्हावा ; तीच तुमची पश्चिम सीमा व्हावी.
७ आणि तुमची उत्तर सीमा असी व्हावी कीं
तुह्मी आपल्यासाठीं मोठ्या समुद्रापासून होर डों-
गरापर्यंत खुणा करा. ८ होर डोंगरापासून ह-
माथाच्या वाटेस खुणा करा, मग त्या सीमेच्या
गती जदादापर्यंत व्हाव्या. ९ मग ती सीमा
झिफ्रोनास जावी, आणि तिच्या गती हजारएना-
मापर्यंत व्हाव्या ; असी तुमची उत्तर सीमा व्हा-
वी. १० आणि तुह्मी आपल्या पूर्वेकडल्या सी-
मेसाठीं हजारएनानापासून शफामापर्यंत खुणा
करा. ११ मग ती सीमा शफामापासून आइ-
नाच्या पूर्वेकडून रिबला तेथवर उतरावी; नंतर
ती सीमा उतरून पूर्वेकडल्या किन्नेरेथ समुद्राच्या
कांठांपर्यंत पोहंचावी. १२ मग ती सीमा खालीं
यार्देनेजवळ जावी, आणि तिच्या गती मिठाच्या
समुद्रापर्यंत व्हाव्या ; हा देश त्याच्या चहुंकडल्या
सीमांप्रमाणें तुमचा व्हावा." १३ तेव्हां मो-
श्याने इस्राएलाच्या संतानांस असी आज्ञा दिल्ही
कीं, तुह्मी जो देश दैवखुणाने वांटून वतनाचा क-
रावा, ह्मणजे नऊ वंशांस व अर्ध्या वंशास द्यावा,
ह्मणून परमेश्वराने आज्ञा दिल्ही आहे, तो
हाच. १४ कारण कीं रऊबेनाच्या संतानाच्या
वंशाने आपल्या पूर्वजांच्या घराण्याप्रमाणें आपलें
वतन घेतलें ; आणि गादाच्या संतानाच्या वंशाने
आपल्या पूर्वजांच्या घराण्याप्रमाणें व मनाश्शा-
च्या अर्ध्या वंशाने घेतलें आहे. १५ दोन वंश
व अर्धा वंश यानी यरीहोजवळच्या यार्देनेच्या
अलिकडे पुढल्या ठिकाणीं उगवतेस आपलें वतन
घेतलें आहे."

१६ आणि परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, १७ "ज्या माणसानी तो देश वतन-
रूपें तुह्मास वांटून द्यावा, त्यांचीं नांवें हींच कीं,
एलाजार याजक व नूनाचा पुत्र यहोशवा. १८
आणि देश वतनरूपें वांटायासाठीं तुह्मी प्रति वं-
शाचा एकएक अधिकारी घ्या. १९ आणि त्या
माणसांचीं नांवें हींच, यहूदाच्या वंशासाठीं यफु-
न्न्याचा पुत्र कालेब ; २० आणि शिमोनाच्या
संतानांच्या वंशासाठीं आम्मीहूदाचा पुत्र शमु-
वेल; २१ बन्यामीनाच्या वंशासाठीं किस्लो-
नाचा पुत्र अलीदाद ; २२ आणि दानाच्या
संतानांच्या वंशासाठीं अधिकारी यग्लीचा पुत्र
बुक्की ; २३ योसेफाच्या संतानांतला मनाश्शे
याच्या संतानांच्या वंशासाठीं अधिकारी एफोदा-
चा पुत्र हान्नियेल ; २४ आणि एफ्राइमाच्या
संतानांच्या वंशासाठीं अधिकारी शिफ्टानाचा पुत्र
कमुवेल ; २५ आणि जबुलुनाच्या संतानांच्या
वंशासाठीं अधिकारी पार्णाखाचा पुत्र अलीजा-
फान ; २६ आणि इस्साखाराच्या संतानांच्या
वंशासाठीं अधिकारी आज्जानाचा पुत्र पाल्टि-
येल ; २७ आणि आशेराच्या संतानांच्या वंशा-
साठीं अधिकारी शलोमीचा पुत्र अहीहूद ; २८
आणि नाफ्ताली याच्या संतानांच्या वंशासाठीं
अधिकारी आम्मीहूदाचा पुत्र पदाहेल." २९
इस्राएलाच्या संतानांस खनान देश वतनरूपें वां-
टून द्यावा ह्मणून परमेश्वराने ज्यांस आज्ञा
दिल्ही ते हेच.

## अध्याय ३५.

आणि मोवाबाच्या अरण्यांत यरीहोजवळच्या
यार्देनेवर परमेश्वराने मोश्याला असें
सांगितलें कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस असी
आज्ञा दे कीं, त्यानी आपल्या वतनांतून लेव्यांस
वस्तीसाठीं नगरें द्यावीं, आणि त्या नगरांच्या चहुंक-
डले शिवार तुह्मी लेव्यांस द्या. ३ मग तीं नगरें
त्यांच्या वस्तीसाठीं व्हावीं, आणि त्यांकडले शिवार
त्यांच्या गुरांसाठीं व त्यांच्या पाठाळांसाठीं, आणि

त्यांच्या सर्व पशूंसाठीं व्हावे. ४ आणि जे शिवार
तुह्मी लेव्यांस द्याल, ते चहुंकडे नगराच्या गांव-
कुसापासून हजार हात बाहेर असावे. ५ आणि
तुह्मी नगराबाहेरच्या पूर्वीकडे दोन हजार हात,
आणि दक्षिणेकडे दोन हजार हात, आणि पश्चि-
मेकडे दोन हजार हात, आणि उत्तरेकडे दोन
हजार हात, असे मोजा, आणि मध्यांत नगर अ-
सावें; हेच त्यांच्यासाठीं नगरांचे शिवार व्हावे.
६ आणि जीं नगरें तुह्मी लेव्यांस द्यावीं, त्यांतील
आश्रयाचीं साहा नगरें असावीं, असीं कीं ज्याने
जीव घेतला, त्याने त्यांत पळून जावें; आणि त्यां-
खेरीज बेताळीस नगरें द्या. ७ जीं नगरें तुह्मी
लेव्यांस द्यावीं, तीं सर्व अठ्ठेताळीस नगरें; तीं
त्यांच्या शिवारांसुद्धां द्या. ८ आणि इस्राएला-
च्या संतानांच्या वतनांतून तीं नगरें असीं द्या कीं
बहुवांतून बहुत आणि थोडक्यांतून थोडकीं द्या;
जें वतन ते पावतील, त्यांतून एकएकाने आपल्या
वतनाच्या परिमाणाप्रमाणें आपलीं कांहीं नगरें ले-
व्यांस द्यावीं."

९ आणि परमेश्वराने मोश्याला असें सां-
गितलें कीं, १० "तूं इस्राएलाच्या संतानांस बो-
लून त्यांस सांग कीं, 'जेव्हां तुह्मी यार्देनेच्या प-
लिकडे खनान देशांत जाल ११ तेव्हां तुमच्या-
साठीं आश्रयाचीं नगरें व्हावीं ह्मणून तुह्मी आप-
ल्यासाठीं नगरें असीं नेमून ठेवा कीं ज्याने चुकून
जीव घेतला, असा हत्या करणारा त्यांत पळून
जावा. १२ असीं तीं नगरें सूड घेणाऱ्यापासून
आश्रयासाठीं तुह्मास व्हावीं, आणि ज्याने जीव
घेतला, तो न्यायासाठीं सभेपुढें उभा राहील तों-
पर्यंत न मरावा. १३ असीं जीं नगरें तुह्मी द्यावीं,
त्यांतलीं साहा नगरें तुमच्यासाठीं आश्रयाचीं
व्हावीं. १४ तुह्मी यार्देनेच्या अलिकडलीं तीन
नगरें द्या, आणि खनान देशांतलीं तीन नगरें द्या;
तीं आश्रयाचीं नगरें व्हावीं. १५ इस्राएलाच्या
संतानांसाठीं व विदेशासाठीं व त्यांमध्यें प्रवासी,
यासाठीं तीं साहा नगरें आश्रयाचीं व्हावीं; या-
साठीं कीं कोणी चुकून मनुष्याला मारिलें अस-
तां त्याने तेथें पळून जावें. १६ परंतु जर कोणी
लोखंडी शस्त्राने कोणाला असें हाणितो कीं तो
मरतो, तर तो घातक आहे; घातकाला मारावेंच
मारावें. १७ आणि हातच्या ज्या धोंड्याने मरण
व्हावें, तो जर कोणी कोणाला असा हाणितो कीं
तो मरतो, तर तो घातक आहे; घातकाला मारावेंच
मारावें. १८ किंवा ज्या लांकडाच्या हातश-
स्त्राने मरण व्हावें, तेणेकडून कोणी कोणाला असें
हाणितो कीं तो मरतो, तर तो घातक आहे; घा-
तकाला मारावेंच मारावें. १९ रक्तपाताचा सूड
घेणाऱ्याने घातकाला जिवें मारावें; जेव्हां याची
त्याची गाठ पडेल, तेव्हां त्याने याला जिवें मारावें;
२० आणि जर कोणी कोणाला द्वेषाने लोटितो,
किंवा टपून कोणावर कांहीं असें टाकितो कीं तो
मरतो; २१ किंवा कोणी वैरेंकरून आपल्या
हाताने कोणाला असें हाणितो कीं तो मरतो, तर
तो हाणणारा मरावाच मरावा; तो घातक आहे;
रक्तपाताचा सूड घेणाऱ्याने घातकाची गांठ पडेल
तेव्हांच त्याला जिवें मारावें. २२ परंतु जर
कोणी कांहीं वैर नसतां कोणाला अकस्मात् लोटि-
तो, किंवा टपण्यावांचून कांहीं शस्त्र कोणावर टा-
कितो; २३ किंवा त्याचा वैरी नसून त्याचें वा-
ईट न इच्छून त्याला न पाहून, जेणेकडून मरे
असा कांहीं धोंडा जर तो त्यावर टाकितो आणि
तो मरतो, २४ तर सभेने हाणणारा व रक्तपा-
ताचा सूड घेणारा यांमध्यें या नेमाप्रमाणें निवाडा
करावा. २५ आणि सभेने अशा घातकाला रक्त-
पाताचा सूड घेणाऱ्याच्या हातांतून सोडवावें, आणि
तो आपल्या आश्रयाच्या ज्या नगरांत पळून गेला
होता, तिकडे सभेने माघारा फिरवावा; आणि ज्या
मुख्य याजकाला पवित्र तेलाने अभिषेक झाला,
त्याच्या मरणापर्यंत त्याने तेथें राहावें. २६ परंतु
जर घातक जेथें पळून गेला होता, त्या आपल्या
आश्रयी नगराच्या सीमेबाहेर कधींच जाईल, २७
आणि आपल्या आश्रयी नगराच्या सीमेबाहेर
रक्तपाताच्या सूड घेणाऱ्याला सांपडेल, आणि रक्त-
पाताचा सूड घेणारा त्या घातकाचा घात करील,
तर त्याला हत्येचा दोष लागणार नाहीं; २८
कारण कीं त्याने आपल्या आश्रयाच्या नगरांत
मुख्य याजकाच्या मरणापर्यंत राहायाचें होतें;
परंतु मुख्य याजकाच्या मरणानंतर घातकाने
आपल्या वतनभूमीवर माघारें जावें. २९
तर हे विधी तुमच्या पिढीपरंपरा तुमच्या

सर्व वस्त्यांत तुह्मास न्यायाचें बंधारण असे
व्हावे. ३० ज्याने कोणीएकाला जिवें मारि-
लें त्या घातकाचा घात साक्षीदारांच्या सांगण्या-
वरून व्हावा; परंतु कोणावर एकाच साक्षीदा-
राची मरणाएवढी साक्ष न मानावी. ३१ आ-
णि जो घातक मारण्यायोग्य आहे, त्याच्या जि-
वाविषयीं तुह्मी क्षमासाधन घेऊं नका, कारण कीं
त्याला मारावेंच मारावें. ३२ आणि जो आपल्या
आश्रयाच्या नगरांत पळून गेला, त्याने मुख्य आ-
श्रयाच्या मरणापूर्वी देशांत राहायास माघारें जावें
ह्मणून तुह्मीं क्षमासाधन घेऊं नका. ३३ आणि ज्या
देशांत तुह्मी राहाल, तो तुह्मी भ्रष्ट करूं नका;
कारण कीं रक्तपाताकडून देश भ्रष्ट होतो, आणि
ज्या देशांत रक्तपात झाला, ज्याने तो केला त्या-
च्या रक्तपातावांचून त्या रक्तपाताविषयीं क्षमा-
साधन होत नाहीं. ३४ तर ज्या देशांत तुह्मी
राहाल, ज्यामध्यें मी राहतों, त्याला तूं अशुद्ध
करूं नको; कारण कीं मी परमेश्वर इस्राएला-
च्या संतानांमध्यें राहतों."

## अध्याय ३६.

तेव्हां योसेफाच्या वंशाच्या कुळांत मनाश्शाचा
पुत्र माखीर याचा पुत्र गिलाद, याच्या वंशा-
च्या कुळांतल्या वडिलांत जे मुख्य ते मोश्या-
पुढें आणि इस्राएलाच्या संतानांतल्या वडिलांत जे
मुख्य अधिकारी त्यांपुढें येऊन बोलले; २ त्यांनी
ह्मटलें कीं, "आमच्या प्रभूला परमेश्वराने आज्ञा
दिल्ही कीं, 'तो देश दैवखुणाने इस्राएलाच्या संता-
नांस वतनासाठीं द्यावा;' आणि आमच्या प्रभूला
परमेश्वराकडून आज्ञा असी झाली कीं, 'आम-
चा भाऊ जलफहाद याचें वतन त्याच्या कन्यांस
द्यावें. ३ तर त्या इस्राएलाच्या संतानाच्या
वंशांतल्या कोण्या वंशस्थांच्या स्त्रिया अशा झा-
ल्यास, त्यांचें वतन आमच्या पूर्वजांच्या वतनां-
तून काढलें जाऊन, ज्यांच्या त्या होतील त्यांच्या
वंशाच्या वतनांत लावलें जाईल, आणि आमच्या
वतनांतून काढलें जाईल. ४ आणि जेव्हां
इस्राएलाच्या संतानांस योबेल होईल, तेव्हां
ज्यांच्या त्या होतील त्यांच्या वंशाच्या वत-
नांत त्यांचें वतन लाविलें जाईल; असें त्यांचें
वतन आमच्या पूर्वजांच्या वंशाच्या वतनांतून का-
ढलें जाईल." ५ तेव्हां परमेश्वराच्या सांग-
ण्यावरून मोश्याने इस्राएलाच्या संतानांस असी
आज्ञा दिल्ही कीं, "योसेफाचे वंशस्थ नीट बोल-
तात. ६ जी गोष्ट परमेश्वराने जलफहादाच्या
कन्यांविषयीं आज्ञेने सांगितली ती हीच कीं, त्यांच्या
दिसण्यांत जे बरे, त्यांच्या त्या स्त्रिया व्हाव्या,
केवळ आपल्या बापाच्या वंशांतल्या कुळांत त्या
स्त्रिया व्हाव्या. ७ आणि इस्राएलाच्या संतानांचें
वतन वंशांतून वंशांत न फिरावें; तर इस्राएलाच्या
संतानांतल्या प्रत्येकाने आपल्या पूर्वजांच्या वंशाच्या
वतनावर लगटून राहावें. ८ आणि प्रत्येक क-
न्येने इस्राएलाच्या संतानाच्या वंशांत वतन पावून
आपल्या बापाच्या वंशांतल्या कुळांत कोणीएकाची
स्त्री असें व्हावें; यासाठीं कीं इस्राएलाच्या संता-
नांतल्या प्रत्येकाने आपल्या पूर्वजांचें वतन पावावें;
९ आणि वतन एका वंशांतून दुसऱ्या वंशांत न
फिरावें; तर इस्राएलाच्या संतानांच्या वंशांतल्या
प्रत्येकाने आपल्या वतनावर लगटून राहावें." १०
जसी परमेश्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसें
जलफहादाच्या कन्यानी केलें; ११ ह्मणजे माह-
ला, थिर्सा व हग्ला व मिल्का व नोवा, ह्या ज-
लफहादाच्या कन्या आपल्या चुलत्याच्या पुत्रांच्या
स्त्रिया झाल्या; १२ योसेफाचा पुत्र मनाश्शे
याच्या संतानांच्या कुळांत स्त्रिया झाल्या, आणि
त्यांचें वतन त्यांच्या बापाच्या कुळाच्या वंशांत
राहिलें. १३ मोवाबाच्या अरण्यांत यरीहोजवळ-
च्या यार्देनेवर, ज्या आज्ञा व जे नेम परमेश्व-
राने मोश्याच्या योगें इस्राएलाच्या संतानांस
लावून दिल्हे ते हेच.

DEUTERONOMY.

# मोश्याने लिहिलेलें पांचवें पुस्तक;

ह्मणजे

# अनुवाद.

## अध्याय १.

यार्देनेच्या पलिकडे सपाटींतल्या रानांत सूफा-
च्या समोर पारान व तोफेल व लाबान व
हजेरोथ व दीजाहाब यांमध्यें ज्या गोष्टी मोश्याने
सर्व इस्राएलास सांगितल्या त्या पुढें लिहिल्या
आहेत. २ होरेबापासून सेईर डोंगरावरून का-
देशबाण्र्यापर्यंत अकरा दिवसांची वाट होती. ३
तेव्हां चाळिसाव्या वर्षांतल्या अकराव्या महिन्या-
च्या पहिल्या दिवशीं असें झालें कीं ज्याप्रमाणें
परमेश्वराने मोश्याला इस्राएलाच्या संतानां-
साठीं आज्ञा दिल्ह्या होत्या, त्या सर्वांप्रमाणें त्याने
त्यांस सांगितलें. ४ त्याने अमोऱ्यांचा राजा
सीहोन जो हेश्बोनांत राहत होता, आणि बाशा-
नाचा राजा ओग जो एद्रेईतल्या आष्टारोथांत
राहत होता त्याला मारिल्यावर, ५ यार्देनेच्या
पलिकडे मोवाब देशांत मोशे हें शास्त्र असें
सांगू लागला कीं, "आमचा देव परमेश्वर याने
होरेबाजवळ आह्मास असें सांगितलें कीं, ६ या
डोंगराजवळ तुमचें राहणें पुरें झालें. ७ तुह्मी
आपलें ठिकाण सोडून मागें फिरा, आणि अमो-
ऱ्यांच्या डोंगरावर व त्यांच्या सर्व वस्तींस रानांत
डोंगरवटी व तळवटी व दक्षिण व खनान्यांच्या
देशांतल्या समुद्राच्या तीरास व लबानोन व जी
मोठी नदी फराथ नदी, तेथवर चला. ८ पाहा,
म्या तो देश तुमच्यापुढें ठेविला आहे; जो देश
परमेश्वराने तुमच्या पूर्वजांजवळ, ह्मणजे आ-
ब्राहाम व इझाक व याकोब यांजवळ शपथ वाहून
त्यांस ह्मणजे त्यांच्यामागें त्यांच्या संतानांस देऊं
केला, तो वतनासाठीं घ्यायाला तुह्मी चला.'

९ मग त्या वेळेस मी तुह्मास असें बोललों
होतों कीं, 'माझ्या एकल्याने तुह्मास वागवत नाहीं.
१० तुमचा देव परमेश्वर याने तुह्मास फार
वाढविलें, आणि पाहा तुह्मी आज गणनेने आका-
शांतल्या ताऱ्यांसारिखे आहां. ११ तुमच्या पूर्व-
जांचा देव परमेश्वर याने तुह्मी जितके आहां
त्यांपेक्षां हजारपट अधिक करावें, आणि जसें त्याने
तुह्मास वचन दिल्हें तसा तुह्मास आशीर्वाद द्या-
वा; १२ माझ्या एकल्याने तुमची खटपट व तुमचा
भार व तुमचें भांडण कसें वागवेल? १३ ज्ञानी
व बुद्धिमंत, आणि तुमच्या वंशांनी जाणलेले असे
पुरुष तुह्मी आपल्यांसाठीं निवडून द्या; ह्मणजे
मी ते तुमचे अधिकारी करीन. १४ तेव्हां तुह्मी
मला असें उत्तर दिल्हें कीं, जी गोष्ट त्वां करा-
याला सांगितली ती उत्तम आहे. १५ यास्तव म्या
ज्ञानी व जाणलेले असे तुमच्या वंशांतले मुख्य पु-
रुष घेतले, आणि ते हजारांचे सरदार व शंभरांचे
सरदार व पन्नासांचे सरदार व दाहांचे सरदार,
व तुमच्या वंशांचे कारभारी, असे तुह्मावर अधि-
कारी करून ठेविले. १६ आणि त्या वेळेस म्या
तुमच्या न्यायाधीशांस असी आज्ञा दिल्ही कीं तुह्मी
आपल्या भावांच्या फिर्यादी ऐका, आणि माणूस
व त्याचा भाऊ व त्याजवळचा प्रवासी यांमध्यें
यथार्थ न्याय ठरवा. १७ तुह्मी न्याय करण्यांत
पक्षपात करूं नका, लाहान मोठा यांचें एकसा-
रिखेंच ऐका; कोणीएकाचें भय धरूं नका, कारण
कीं जो न्याय तो देवाकडला आहे, आणि जी
गोष्ट तुह्मास अवघड ती माझ्याजवळ येऊन सांगा,
ह्मणजे मी ती ऐकेन. १८ आणि ज्या अवघ्या
गोष्टी तुह्मी कराव्या, त्या म्या त्या वेळेस तुह्मास
आज्ञेने सांगितल्या.

१९ मग असी आमचा देव परमेश्वर याने
आह्मास आज्ञा दिल्ही, तसें आह्मी होरेब सोडून
अमोऱ्यांच्या डोंगरावरल्या वाटेवर जें मोठें व भ-
यंकर रान तुह्मी पाहिलें, त्या अवघ्यांतून आह्मी
चालून कादेशबाण्र्यापर्यंत येऊन पोहंचलों. २०

तेव्हां म्या तुह्मास असें सांगितलें कीं, जो अमो-
ऱ्यांचा डोंगर आमचा देव परमेश्वर याने आ-
ह्मास दिल्हा आहे, तेथवर तुह्मी आलां आहां.
२१ पाहा, तुझा देव परमेश्वर याने तुझ्या स्वा-
धीन देश केला आहे; जसें तुझ्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याने तुला सांगितलें, तसें तूं चढून व-
तनासाठीं घे; भिऊं नको, आणि घाबरूं नको.

२२ तेव्हां तुह्मी सर्व माझ्याजवळ येऊन बोलला
कीं, आह्मी आपल्यापुढें माणसें पाठवूं कीं त्यानी
आमच्यासाठीं तो देश शोधून पाहावा, आणि आ-
ह्मी कोणत्या वाटेने चढून जावें, आणि कोणत्या
नगराकडे येऊं, यांविषयीं त्यानी माघारें येऊन आ-
मच्याजवळ वर्त्तमान सांगावें. २३ तेव्हां ती गोष्ट
मला बरी वाटली, यास्तव म्या प्रति वंशाचा एक
पुरुष, असीं तुमच्यांतलीं बारा माणसें घेतलीं. २४
तेव्हां तीं हिंडत जाऊन डोंगरवटीवर चढून ए-
ष्कोल ओढ्यापर्यंत गेलीं; असा त्यानी तो देश
शोधून पाहिला. २५ आणि त्यानी आपल्या हा-
तीं त्या देशांतलीं कांहीं फळें घेऊन खालीं आम-
च्याजवळ आणिलीं, आणि आमच्याजवळ माघारें
येऊन असें वर्त्तमान सांगितलें कीं, आमचा देव
परमेश्वर जो देश आह्मास देत आहे, तो
चांगला आहे. २६ तथापि तुह्मी वर जायास
मान्य न होऊन आमचा देव परमेश्वर याच्या
आज्ञेविरुद्ध केलें. २७ आणि तुह्मी आपल्या
राहोट्यांत कुरकूर करीत ह्मटलें कीं, "परमेश्व-
राने आमचा द्वेष केला ह्मणून आमचा नाश
करायासाठीं आह्मास अमोऱ्याच्या हातांत द्यायास
त्याने आह्मास मिसर देशांतून काढिलें आहे.
२८ आह्मी वर कोणीकडे जावें! आमच्या भा-
वानी आमचें अंतःकरण अधीर केलें आहे; त्यानी
सांगितलें कीं, आपल्यापेक्षां ते लोक मोठे आणि
उंच; नगरेंहि मोठीं आणि आकाशीं लागून बंदि-
स्तीचीं आहेत, अणखी अनाकाचें संतान आह्मी
तेथें पाहिलें. २९ तेव्हां मी तुह्मास बोललों,
तुह्मी घाबरूं नका, त्यांस भिऊंच नका. ३०
तुमचा देव परमेश्वर जो तुमच्यापुढें चालतो
तो तुमच्यासाठीं लढाई करील; ३१ जसा,
तर त्याने तुमच्या देखतां मिसरांत आणि रा-
नांत तुमच्यासाठीं जें अवघें केलें त्याप्रमाणें;
कां तर त्वां पाहिलें कीं जसा माणूस आपला पुत्र
वाहतो तसें, जी सर्व वाट तुह्मी चालून या ठिका-
णापर्यंत पोहंचलां, तिजवर तुझा देव परमेश्वर
याने तुला वाहिलें आहे.' ३२ तथापि त्या
गोष्टीविषयीं तुह्मी आपला देव परमेश्वर यावर
विश्वासी नव्हतां. ३३ तो तुह्मासाठीं उतरण्याचें
ठिकाण वाटेंत पाहायास आणि ज्या वाटेने तुह्मी
चालावें, ती तुह्मास दाखवायास रात्रीं अग्नींत व
दिवसां ढगांत तुमच्यापुढें राहून चालत होता.

३४ तेव्हां परमेश्वराने तुमचें बोलणें ऐकिलें,
यास्तव त्याने रागें भरून असी शपथ वाहिली
कीं, ३५ जो चांगला देश म्या तुमच्या पूर्वजांस
शपथेने देऊं केला, त्याला या दुष्ट पिढीच्या मा-
णसांतील कोणीएक निश्चयें पाहणार नाहीं. ३६
यफुन्न्याचा पुत्र कालेब तो मात्र त्याला पाहील;
ज्या देशांत तो गेला होता, तो त्याला व त्याच्या
संतानांस मी देईनच, कारण कीं तो सर्वांविषयीं
परमेश्वराला अनुसरून चालला." ३७ अ-
णखी तुमच्यामुळें परमेश्वराने मजवर क्रुद्ध
होऊन सांगितलें, 'तूंहि तेथें पोहंचणार नाहींस.
३८ परंतु नूनाचा पुत्र यहोशवा जो तुझ्यापुढें
उभा असतो, तो तेथें पोहंचेल; तूं त्याला धैर्य
दे, कां तर तो तें वतन इस्राएलांस देववील. ३९
आणि तुमचीं बाळकें, ज्यांविषयीं तुह्मी ह्मटलें
कीं, 'लुटीचीं होतील,' तुमचीं लेंकरेंहि जीं त्या
दिवसीं बरें किंवा वाईट जाणत नव्हतीं, तींच तेथें
पोहंचतील; मी त्यांस तो देश देईन, आणि तीं
तें वतन पावतील. ४० परंतु तुह्मी आपले फिरा,
आणि रानांत सूफसमुद्राच्या वाटेस मुकाम करीत
जा. ४१ तेव्हां तुह्मी मला असें उत्तर दिल्हें
कीं, 'आह्मी परमेश्वराजवळ पाप केलें आहे;
तथापि आमचा देव परमेश्वर याने ज्या आज्ञा
आह्मास दिल्या, त्या अवघ्यांप्रमाणें आह्मी वर
जाऊन लढूं.' मग तुह्मी आपापलीं लढायाचीं
हत्यारें बांधून डोंगरावर चढायास सिद्ध झालां.
४२ तेव्हां परमेश्वराने मला असें सांगि-
तलें कीं, 'तूं त्यांस सांग, मी तुमच्यामध्यें नाहीं;
यास्तव तुह्मी चढूं नका आणि लढूं नका; लढलां,
तर तुह्मी आपल्या शत्रूंपुढें मारले जाल.' ४३ असें
म्या तुह्मास सांगितलें; परंतु तुह्मीं न ऐकून पर-

मेश्वराच्या आज्ञेविरुद्ध केलें; असे तुह्मी उन्मत्त
होऊन डोंगरावर चढलां. ४४ मग त्या डोंगरा-
वर राहणारे अमोरी तुह्मासीं लढायास निघाले;
आणि ते तुह्मास मारीत सेईरांतल्या हर्म्यापर्यंत
मधमाशांसारिखे तुमच्या पाठीस लागले. ४५
तेव्हां तुह्मी माघारें येऊन परमेश्वरापुढें रडलां;
तथापि परमेश्वराने तुमचा शब्द ऐकिला नाहीं,
आणि तुमच्याकडे कान लाविला नाहीं. ४६
यास्तव जे दिवस तुह्मी कादेशांत वस्तीस रा-
हिलां, ते दिवस बहुत होते.

## अध्याय २.

तेव्हां जसें परमेश्वराने मला सांगितलें होतें,
तसें आह्मी मागें फिरून रानांत सूफसमुद्राच्या
वाटेने निघालों, आणि बहुत दिवस सेईर डोंग-
राभोंवतीं फिरत होतों. २ तेव्हां परमेश्वराने
मला असें सांगितलें कीं, ३ "या डोंगराभोंवतें
तुमचें फिरणें पुरें झालें; उत्तरेकडे तुह्मी आपले
फिरा. ४ आणि तूं लोकांस असी आज्ञा दे कीं,
एसावाचीं संतानें तुमचे भाऊ जे सेईरांत राहतात
त्यांच्या सीमेंतून तुह्मास जायाचें आहे, आणि ते
तुह्मास भितील; तर तुह्मी फार संभाळा. ५
त्यांसीं विरुद्ध करूं नका, कारण कीं मी तुह्मास
त्यांच्या देशांतली भूमि पाऊलभराहि देणार नाहीं;
कां कीं म्या सेईर डोंगर एसावाला वतन करून
दिल्हा आहे. ६ तुह्मी खायासाठीं त्यांजवळून
अन्न पैका देऊन विकत घ्या, आणि तुह्मी प्याया-
साठीं पाणीहि त्यांजवळून पैका देऊन विकत घ्या.
७ कां तर तुझ्या हातच्या सर्व कार्यांत तुझा देव
परमेश्वर याने तुला आशीर्वाद दिल्हा आहे, या
मोठ्या रानांत तुझें चालणें त्याला माहीत आहे;
हीं चाळीस वर्षें तुझा देव परमेश्वर तुज-
सीं अनुकूळ आहे; तुला कांहीं उणें झालें ना-
हीं.' ८ असे सेईरांत राहणारे एसावाचें सं-
तान आमचे भाऊ यांजवळून सपाटीच्या वाटेने
एलाथावरून व एस्योनगाबेरावरून आह्मी पार
केलें; तेव्हां आह्मी वळून मोवाबाच्या रानांतल्या
वाटेने आलों. ९ आणि परमेश्वराने मला
सांगितलें, 'तूं मोवाबासीं वैर करूं नको, आणि
त्यासीं लढाई करूं नको; कारण कीं त्याच्या दे-
शांतलें वतन मी तुला देणार नाहीं; कां कीं म्या
आर लोटाच्या संतानांस वतन करून दिल्हा आहे.
१० पूर्वीं एमी त्यांत राहत होते; ते लोक मोठे
व बहुत आणि अनाक्यांच्या सारिखे उंच होते.
११ अनाक्यांच्या सारिखे तेहि रफाई मोजले गेले,
परंतु मोवाबी त्यांस एमी ह्मणतात. १२ आणि
सेईरांत पूर्वीं होरी राहत होते, परंतु एसावाच्या
संतानानी त्यांस आपल्यापुढून वतनांतून घालवून
त्यांचा नाश केला, आणि त्यांच्या ठिकाणीं वस्ती
केली; असें इस्राएलानी आपल्यास परमेश्वराने
जो देश वतनासाठीं दिल्हा होता याविषयीं केलें,
तसें. १३ मग असी आज्ञा झाली कीं, आतां
तुह्मी आपले उठा, आणि जारेद ओढ्याच्या प-
लिकडे जा; मग आह्मी जारेद ओढ्याला वल्हां-
डून आलों. १४ तर ज्या दिवसीं आह्मी का-
देशबार्ण्यापासून निघालों त्या दिवसापासून जा-
रेद ओढ्याच्या अलिकडे आलों तोंपर्यंत अडतीस
वर्षें भरलीं; तितक्यांत लढाऊ माणसांची सर्व
पिढी, परमेश्वराने त्यांजवळ शपथ वाहिल्या-
प्रमाणें गोटामधून नाहींसी झाली. १५ कां कीं
ते नाहींसे होत तोंपर्यंत गोटांतून त्यांचा क्षय
करायाला परमेश्वराचा हातहि त्यांवर होता.
१६ आणि लढायाचीं सर्व माणसें मरणाने
लोकांतून नाहींसीं झाल्यावर असें झालें कीं, १७
परमेश्वराने मला असें सांगितलें कीं, १८ तुला
आज पलिकडे मोवाबाच्या सीमेवरून आराकडे
जायाचें आहे. १९ आणि तूं आम्मोनाच्या सं-
तानांजवळून जातांना त्यांसीं भिडूं नको, त्यांस त्रा-
साहि देऊं नको; कारण कीं मी आम्मोनाच्या सं-
तानांच्या देशांतलें वतन तुला देणार नाहीं, कां कीं
म्या तो लोटाच्या संतानांस वतन करून दिल्हा
आहे.' २० तोहि रफाई यांचा देश मोजला
गेला; पूर्वीं रफाई त्यांत राहत होते, परंतु आ-
म्मोनी त्यांस जमजुम्मि ह्मणत असतात. २१
ते लोक मोठे व बहुत आणि अनाक्यांसारिखे
उंच होते, परंतु परमेश्वराने त्यांचा नाश यां-
च्या समोर केला; यास्तव यानी त्यांचें वतन घेऊन
त्यांच्या ठिकाणीं वस्ती केली. २२ जसा त्याने
सेईरांत राहणाऱ्या एसावाच्या संतानांसाठीं केला
तसा, कां तर त्याने त्यांच्यासमोर होरी यांचा

नाश केला; यास्तव यांनी त्यांचें वतन घेऊन त्या-
च्या ठिकाणीं आजच्या दिवसापर्यंत वस्ती केली
आहे. २३ आणि आव्वी जे हजेरीमांत गाज्जा
एथपर्यंत राहत होते,काफ्तोरापासून उत्पन्न झालेले
काफ्तोरी, यांनी त्यांचा नाश करून त्यांच्या ठि-
काणीं वस्ती केली. २४ तुह्मी उठून निघा, आ-
णि आर्णोन नदीच्या पलिकडे जा; पाहा, हेश्बो-
नाचा राजा सीहोन जो अमोरी तो व त्याचा
देश म्या तुझ्या हातीं दिल्हा आहे; तूं त्यासीं
लढाई करून वतन घ्यायाला लाग. २५ सर्व
आकाशाखालचे लोक जे तुझें वर्त्तमान ऐकतील,
त्यांच्या हृदयांत तुझें भय व तुझा धाक मी आ-
जच्या दिवसीं असा घालूं लागेन कीं ते तुझ्यापुढें
कांपून घाबरतील.

२६ तेव्हां म्या कदेमोथ रानापासून दूतांस हे-
श्बोनाचा राजा सीहोन याजवळ पाठवून तहाच्या
गोष्टी सांगितल्या कीं, २७ 'तूं आपल्या देशाम-
धून मला जाऊं दे; मी सडकेच्या वाटेने चाल-
तांना उजव्याकडे किंवा डाव्याकडे फिरणार नाहीं.
२८ तूं मला खायाला अन्न पैका घेऊन विकत दे,
आणि मला प्यायाला पाणी पैका घेऊन दे, मी
केवळ पायांनी पार जाईन. २९ जसें सेईरांत
राहणाऱ्या एसावाच्या संतानांनी आणि आरांत
राहणाऱ्या मोवाब्यांनी माझ्याजवळ केलें, तसें
तूं कर; जो देश आमचा देव परमेश्वर आह्मास
देत आहे त्यांत यार्देनेच्या पलिकडे मी जाईन
तोंपर्यंत. ३० परंतु हेश्बोनाचा राजा सीहोन
यानें आपल्या देशामधून आह्मास जाऊं दिल्हें
नाहीं; कारण कीं तुझा देव परमेश्वर यानें त्या-
चा स्वभाव कठीण केला होता, आणि त्याचें हृदय
घट्ट केलें होतें; यासाठीं कीं तो जसा आजच्या
दिवसीं आहे, तसा तुझ्या हातीं द्यावा ह्मणून.
३१ तेव्हां परमेश्वरानें मला सांगितलें, 'पाहा,
सीहोन व त्याचा देश तुझ्या स्वाधीन करूं ला-
गलों, तूं त्याचा देश वतनासाठीं धरायाला लाग.
३२ तेव्हां सीहोन आपल्या सर्व लोकांसुद्धां आ-
ह्मासीं लढाई करायास याहाजापर्यंत बाहेर आ-
ला. ३३ आणि आमचा देव परमेश्वर यानें
तो आमच्या स्वाधीन दिल्हा, यास्तव आह्मी तो व
त्याचे पुत्र व त्याचे सर्व लोक यांस मारिलें. ३४
असीं आह्मी त्या वेळेस त्यांचीं सर्व नगरें घेतलीं;
आणि सर्व नगरांसुद्धां, पुरुष व स्त्रिया व बाळकें
यांचा विनाश केला; कोणी निभावलेला ठेविला
नाहीं. ३५ केवळ पशू आणि जीं नगरें आह्मी
घेतलीं, त्यांतलें जें लुटाऊ तें आह्मी आपल्यांसा-
ठीं लुटून घेतलें. ३६ आर्णोन नदीच्या कांठा-
वर जें अरवेर, ह्मणजे नदीवर जें नगर त्यापासून
गिलादापर्यंतहि आमच्यापेक्षां दुर्गम असें एकहि
शहर नव्हतें, आमचा देव परमेश्वर यानें
आमच्या स्वाधीन केलें. ३७ केवळ अम्मोना-
च्या संतानांचा देश, याब्बोक नदीचा सर्व कांठ
व डोंगरवटीचीं नगरें, आणि जें कांहीं आमचा
देव परमेश्वर यानें वर्जिलें, त्याजवळ तूं गेला
नाहींस."

## अध्याय ३.

"मग आह्मी फिरलों आणि वळून बाशानाच्या
वाटेने वर गेलों, तेव्हां बाशानाचा राजा
ओग आपल्या सर्व लोकांसुद्धां आह्मासीं लढाई
करायास एद्रेईजवळ बाहेर आला. २ तेव्हां
परमेश्वरानें मला सांगितलें, 'तूं त्याला भिऊं
नको; कारण कीं म्या तो व त्याचे सर्व लोक व
त्याचा देश तुझ्या स्वाधीन केला आहे; आणि
जो हेश्बोनांत राहणारा अम्मोऱ्यांचा राजा सी-
होन याचें जसें त्वां केलें, तसें त्याचें तूं करसील."
३ याप्रमाणें आमचा देव परमेश्वर यानें बा-
शानाचा राजा ओग, आणि त्याचे सर्व लोक आ-
मच्या हातीं दिल्हे; आणि त्याचा कोणी निभाव-
लेला राहिला नाहीं, इतकें आह्मी त्याला मारिलें.
४ आणि त्या वेळेस आह्मी त्याचीं सर्व नगरें
घेतलीं; आह्मी त्यापासून घेतलें नाहीं, असें एक-
हि शहर राहिलें नाहीं; बाशानांतला ओग याचें
राज्य साठ नगरांचें ह्मणजे संपूर्ण आर्गोब प्रांत,
एवढें होतें. ५ ऊंच गांवकुसें, वेसी व अडसर
यांहींकरून तीं सर्व नगरें बंदोबस्ताचीं होतीं;
त्यांखेरीज मोकळे गांव बहुतच होते. ६ तरी
आह्मी त्यांचा विनाश केला; जसा हेश्बोनाचा
राजा सीहोन याचा केला, तसा सर्व नगरांतले
पुरुष स्त्रिया व बाळकें यांचा विनाश केला. ७
परंतु सर्व पशू व नगरांचें जें लुटाऊ तें आह्मी

आपल्यासाठीं लुटून घेतलें. ८ असें त्या वेळेस
यार्देनेच्या अलिकडे आर्णोन नदीपासून हेर्मोन
डोंगरापर्यंत, जो देश तो आह्मी अमोऱ्यांचे दोन
राजे यांच्या हातांतून घेतला. ९ सीदोनी हेर्मो-
नाला सिर्योन ह्मणतात, आणि अमोरी त्याला
सनीर ह्मणतात. १० सपाटींतलीं सर्व नगरें व
सर्व गिलाद प्रांत आणि बाशानांत ओगाच्या रा-
ज्यांतलीं नगरें सल्खा व एद्रेई एथपर्यंत सर्व
बाशान आह्मी घेतला. ११ तर बाशानाचा रा-
जा ओग मात्र रफायांचा शेष उरला होता;
पाहा, त्याचा पलंग लोखंडी पलंग होता; तो आ-
म्मोनाच्या संतानांच्या राब्बाथांत आहे कीं नाहीं?
त्याची लांबी पुरुषाच्या हाताने नऊ हात व त्याची
रुंदी चार हात आहे. १२ तेव्हां आर्णोन नदीवर
जें अरोएर तेथून अलिकडला हा देश आह्मी त्या
वेळेस वतन करून घेतला, आणि गिलाद डोंग-
राचा अर्धा भाग त्यांतल्या नगरांसुद्धां म्या रऊ-
बेनी व गादी यांस दिल्हा आहे. १३ आणि
गिलादाचा उरलेला भाग व सर्व बाशान हें ओ-
गाचें राज्य म्या मनाश्श्याच्या अर्ध्या वंशाला दि-
ल्हें; सर्व बाशानासुद्धां सर्व आर्गोब प्रांत, तोच
रफायांचा देश ह्मटलेला आहे. १४ मना-
श्श्याचा वंश याईर याने सर्व आर्गोब प्रांत गशू-
रांच्या व माखाथ्यांच्या सीमेपर्यंत घेतला, आणि
आपल्या नांवावरून ते गांव आजच्या दिवसापर्यंत
बाशानांतले याईर गांव ह्मटले आहेत. १५
आणि म्या माखीराला गिलाद दिल्हा आहे. १६
असें रऊबेनी व गादी यांस गिलादापासून तिकडे
आर्णोनेच्या खोऱ्याचा मध्यभाग तीच सीमा तेथ-
पर्यंत, आणि इकडे याब्बोक नदी आम्मोनाच्या
संतानांची सीमा तेथपर्यंत इतका देश म्या दिल्हा
आहे. १७ आणि किन्नेरेथापासून सपाटींतला
समुद्र ह्मणजे मिठाचा समुद्र तेथपर्यंत जी यार्देन
तीच सीमा असी सपाटी दिल्ही, आणि पूर्वेस पि-
सग्याखालच्या उभडांपर्यंत इतका देश दिल्हा.
१८ आणि त्या वेळेस म्या तुह्मास असी
आज्ञा दिल्ही कीं, तुमचा देव परमेश्वर याने
तुह्मास हा देश वतन होण्यासाठीं दिल्हा आहे;
तुह्मी सर्व सबळ पुरुष हत्यारबंद होऊन आपले
भाऊ इस्राएलाचीं संतानें यांच्यापुढें पलिकडे जा.
१९ मला कळलें कीं तुह्मास गुरें बहुत; तुम-
च्या गुरांसुद्धां तुमच्या स्त्रिया व तुमचीं बाळकें
यानी मात्र जी नगरें म्या तुह्मास दिल्हीं, त्या तुम-
च्या नगरांत राहावें. २० जसा परमेश्वराने
तुह्मास विसांवा दिल्हा, तसा तो तुमच्या भावांस
देईल, ह्मणजे यार्देनेच्या पलिकडे जो देश तुमचा
देव परमेश्वर त्यांस देणार आहे, तो तेहि वतन-
रूपें पावतील तोंपर्यंत; मग जें म्या तुह्मास दि-
ल्हें, त्या आपापल्या वतनावर तुह्मी परत या.
२१ आणि त्या वेळेस म्या यहोशवाला असी
आज्ञा दिल्ही कीं, तुमचा देव परमेश्वर याने
या दोन राजांचें जें केलें, तें अवघें तुझ्या डोळ्या-
नीं पाहिलें आहे; ज्या राज्यांत तूं फिरसील, त्या
अवघ्याचें परमेश्वर तसें करील. २२ तुह्मी
त्यांस भिऊं नका; कारण कीं तुमचा देव परमे-
श्वर तोच तुमच्यासाठीं लढणारा आहे.
२३ आणि त्या वेळेस म्या परमेश्वराजवळ
असी प्रार्थना केली कीं, २४ हे प्रभू परमेश्व-
रा, तूं आपल्या सेवकाला आपलें मोठेंपण व आ-
पल्या हाताचें सामर्थ्य दाखवूं लागलास; का तर
जो तुझ्या कृत्यांप्रमाणें व तुझ्या पराक्रमांप्रमाणें क-
रील, तसा देव आकाशांत किंवा पृथ्वीवर कोणता
आहे? २५ मी विनंती करितों कीं म्या पार
जाऊन यार्देनेच्या पलिकडचा जो चांगला देश तो
आणि तो चांगला डोंगर लबानोन पाहावा. २६
परंतु तुमच्यामुळें परमेश्वराने मजवर कोपायमान
होऊन माझें ऐकिलें नाहीं; आणि परमेश्वर मला
बोलला, "तुला पुरें असो, या गोष्टीविषयीं तूं मला
अणखी बोलूं नको. २७ पिसग्याच्या शिखरावर
चढ, आणि आपली दृष्टि पश्चिमेस व उत्तरेस
आणि दक्षिणेस व पूर्वेस लावून आपल्या डोळ्या-
नीं पाहा, कारण कीं तुला या यार्देनेच्या पलिकडे
जायाचें नाहीं. २८ परंतु यहोशवाला आज्ञा दे,
आणि त्याला धैर्य देऊन त्याला बलवान् कर; का-
रण कीं त्याला या लोकांच्यापुढें पलिकडे जायाचें
आहे, आणि तूं जो देश पाहसील तो वतनासाठीं
तो यांस देईल." २९ असे आह्मी बेथपीराच्या
समोरल्या खोऱ्यांत राहिलों होतों.

## अध्याय ४.

तर आतां हे इस्राएला, जे नेम व ज्या नीति
मी तुह्मास पाळायाला शिकवितों, त्या तुह्मी
ऐका; ह्मणजे तुह्मी जगाल, आणि तुमच्या पूर्व-
जांचा **देव परमेश्वर** तुह्मास जो देश देत आहे,
त्यांत तुह्मी जाऊन त्याचें वतन पावाल. २ मी
जी गोष्ट आज्ञेने तुह्मास सांगतों, ती तुह्मी वाढवूं
नका, आणि तींत उणें करूं नका; ह्मणजे तुमचा
**देव परमेश्वर** याच्या ज्या आज्ञा मी तुह्मास
लावून देतों, त्या तुह्मी पाळाव्या. ३ **परमेश्वराने**
बालपीरामुळें जें केलें, तें तुमच्या दृष्टीस पडलें
आहे; कां तर जे मनुष्य बालपीरामागें लागले,
त्या सर्वांस तुमचा **देव परमेश्वर** याने नाश क-
रून तुमच्यामधून घालविलें आहे. ४ परंतु जे
तुह्मी तुमचा **देव परमेश्वर** याला लगटून रा-
हिला, ते तुह्मी सर्व आजपर्यंत जिवंत आहां. ५
पाहा, तुह्मी जो देश वतनरूपें घ्यायास जातां,
त्यांत ज्याप्रमाणें करावें, ह्मणून माझा **देव परमे-
श्वर** याने मला नेम व नीति आज्ञेने जशा सांगि-
तल्या, तशा म्या तुह्मास शिकविल्या आहेत. ६
तर तुह्मी त्या संभाळून पाळा, कारण कीं अशाने
तुमचें ज्ञान व तुमची बुद्धि राष्ट्रांच्या दिसण्यांत
येईल; कसें, तर तीं हे सर्व नेम ऐकून ह्मणतील,
हें मोठें राष्ट्र निश्चयेंकरून ज्ञानी व बुद्धिमान्
लोक असें आहे. ७ कां तर आमचा **देव पर-
मेश्वर** ज्याविषयीं आह्मी त्याला हाक मारितों,
त्या अवघ्यांत जसा आमच्याजवळ आहे, तसा
ज्याच्याजवळ देव, असें मोठें राष्ट्र कोणतें आहे?
८ आणि हें शास्त्र जें मी आज तुमच्यापुढें ठेवि-
तों, त्यांतल्या अवघ्यासारिखे यथार्थ नेम व नीति
कोणत्या मोठ्या राष्ट्राला आहेत? ९ केवळ तूं
आपल्याला संभाळ, ह्मणजे आपला जीव फार सं-
भाळ कीं ज्या गोष्टी तुझ्या दृष्टीस पडल्या, त्या
त्वां न विसराव्या, आणि तुझ्या आयुष्याच्या सर्व
दिवसांत त्या तुझ्या हृदयांतून न जाव्या; परंतु
त्वां आपल्या लेंकरांस व आपल्या लेंकरांच्या लेंक-
रांस त्या कळवाव्या. १० ज्या दिवसीं तूं होरे-
बाजवळ आपला **देव परमेश्वर** यापुढें उभा
राहिलास, जेव्हां **परमेश्वराने** मला सांगितलें
कीं, "तूं मजपासीं लोक मिळीव, ह्मणजे मी त्यांस
गोष्टी अशा ऐकवीन कीं त्यानी पृथ्वीवर आपले
जिणें याच्या सर्व दिवसांत मला भ्यावें ह्मणून शि-
काव्या, आणि आपल्या लेंकरांस शिकवाव्या तेव्हां."
११ तेव्हां तुह्मी जवळ येऊन डोंगराच्या खालीं
उभे राहिलां; आणि आकाशाच्या मध्यभागीं ला-
गलेल्या अग्नीने तो डोंगर जळत होता; काळोख,
ढग व निबीडता होती. १२ आणि अग्नीम-
धून **परमेश्वर** तुह्मास बोलला; तुह्मी गोष्टीचा
उच्चार ऐकिला, परंतु प्रतिमा पाहिली नाहीं; उ-
च्चार मात्र ऐकिला होता. १३ आणि त्याने आ-
पला करार, जो तुह्मी पाळावा ह्मणून तुह्मास
सांगितला, तो ह्मणजे दाहा आज्ञा तुमच्याजवळ
प्रगट केल्या, आणि त्याने धोंड्यांच्या दोन पाट्यां-
वर त्या लिहिल्या.

१४ आणि तुह्मी पलिकडे जो देश वतनरूपें
घ्यायास जातां त्यांत जे नेम व ज्या नीति तुह्मी
पाळाव्या त्या तुह्मास शिकवायाला **परमेश्वराने**
त्या वेळेस मला आज्ञा दिल्ही. १५ तर तुह्मी
आपल्याविषयीं फार संभाळा; कारण कीं ज्या दि-
वसीं **परमेश्वर** होरेबांत अग्नीमधून तुह्मास बो-
लला, त्यांत तुह्मी कांहीं प्रतिमा पाहिली नाहीं.
१६ असें संभाळा कीं तुह्मी नासकें करूं नका:
ह्मणजे आपल्यासाठीं कोरींव मुर्त्ति, कोणत्याहि
साकार देवाची प्रतिमा, पुरुषाचा किंवा स्त्रीचा
आकार; १७ पृथ्वीवर जो कोणी पशू त्याचा
आकार, आकाशांत उडणारे जातीचें कोणतेंहि पा-
खरूं, त्याचा आकार; १८ भूमीवरल्या कोण-
त्याहि वळवळणाऱ्याचा आकार, पृथ्वीच्या खाल-
च्या ठिकाणीं पाण्यांत जो कांहीं मासा, त्याचा आ-
कार करूं नका. १९ आणि असें संभाळा कीं
तुह्मी आपली दृष्टि आकाशाकडे लावितांना सर्व
आकाशमंडळ सूर्य व चंद्र व तारे यांस पाहून भ्र-
मिष्ट होऊं नका, ह्मणजे त्यांस भजूं नका; त्यांची
सेवा करूंच नका; कां तर तुमचा **देव परमे-
श्वर** याने ते अवघ्या आकाशाखालच्या सर्व लो-
कांसाठीं करून ठेविले आहेत. २० आणि **पर-
मेश्वराने** तुह्मास घेऊन ठेविलें आहे; आणखी
आजच्या दिवसाप्रमाणें तुह्मी त्याच्या वतनाचे लोक
असें व्हावें ह्मणून तुह्मास लोखंडी भट्टी ह्मणजे

मिसर देश यांतून काढिलें आहे. २१ परंतु
तुह्माकडल्या कारणावरून परमेश्वर मजवर रागें
भरला, आणि त्याने शपथ वाहिली, असी कीं
त्वां यार्देनेच्या पलिकडे न जावें; तुझा देव प-
रमेश्वर तुला जो चांगला देश वतनरूपें देत
आहे, त्यांत त्वां जाऊंच नये. २२ यास्तव मला
याच देशांत मरावें लागतें; यार्देनेच्या पलिकडे
मला जायाचें नाहीं, परंतु तुह्मी पलिकडे जाऊन
तो चांगला देश वतन करून घ्याल. २३ तुह्मी
आपल्याविषयीं असें संभाळा कीं तुमचा देव पर-
मेश्वर याचा करार जो त्याने तुह्मासीं केला, तो
तुह्मी विसरूं नका; तुह्मी आपल्यासाठीं कोरींव
मूर्त्ति, कशाचीहि प्रतिमा, करूंच नका, कां तर
तुझा देव परमेश्वर याने तुला तसी आज्ञा दि-
ल्ही आहे. २४ अणखी तुझा देव परमेश्वर
नाशकारक अग्नि, असा आवेशी देव आहे.

२५ जेव्हां तूं लेंकरांस व लेंकरांच्या लेंकरांस
जन्म देसील, आणि तुह्मी देशांत राबाल, तेव्हां
जर कोरींव मूर्त्ति, कशाचीहि प्रतिमा, करून नासके
व्हाल, तसी आपला देव परमेश्वर याच्या देख-
तां दुष्टाई करून त्याला राग आणाल, २६ तर
मी आज आकाशाला व पृथ्वीला तुमच्याविषयीं
साक्षीस ठेवून सांगतों कीं तुह्मी जो देश वतन क-
रून घ्यायास यार्देनेच्या पलिकडे जातां, त्यांतून
लौकर सत्यनाश पावाल; त्यांत तुह्मास बहुत
दिवस होणार नाहींत, परंतु तुमचा विनाश होई-
लच होईल. २७ अणखी परमेश्वर लोकांमध्यें
तुमची दाणादाण करील, आणि ज्या राष्ट्रांमध्यें
परमेश्वर तुह्मास नेईल, त्यांमध्यें तुमची संख्या
थोडकी होईल. २८ आणि मनुष्याच्या हातानी
केलेले लांकडाचे व दगडाचे देव, जे पाहत ना-
हींत, आणि ऐकत नाहींत, आणि खात नाहींत,
आणि वास घेत नाहींत, त्यांची सेवा तुह्मी तेथें
कराल. २९ परंतु जर तुह्मी तेथें आपला देव
परमेश्वर याला शरण जाल, जर तुह्मी आपल्या
सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व जिवाने त्याला
शोधायास झटाल, तर तो तुह्माला मिळेल. ३०
जेव्हां तुमच्या संकटांत ह्या सर्व गोष्टी तुह्माला
प्राप्त होतील, आणि पुढल्या दिवसांत तुह्मी
आपला देव परमेश्वर याकडे फिराल, आणि
त्याची वाणी ऐकाल, तेव्हां. ३१ कारण कीं
तुमचा देव परमेश्वर कृपाळू देव आहे; तो
तुह्माला सोडणार नाहीं, आणि तुह्माला नाहींसें
करणार नाहीं; आणि त्याने तुमच्या पूर्वजांसीं
जो करार शपथ वाहून केला, त्याला तो विसरणार
नाहीं. ३२ कां तर प्रथम दिवसांतले जे तुमच्या
पूर्वीं होते त्यांजवळ जेव्हां देवाने मनुष्याला पृथ्वी-
वर उत्पन्न केलें, तेव्हांपासून जे, त्यांजवळ तुह्मी अ-
गत्य पुसा, आणि आकाशाच्या एका शेवटापासून
आकाशाच्या दुसऱ्या शेवटापर्यंतहि पुसा कीं या
मोठ्या गोष्टींप्रमाणें झालें कीं काय? ३३ किंवा
याप्रमाणें ऐकण्यांत आलें कीं काय? देव अग्नीमधून
बोलत असतां त्याची वाणी जसी तुह्मी ऐकिली,
तसे दुसरे कोणी ऐकून वाचले कीं काय? ३४ किंवा
तुमच्या देखतां तुमचा देव परमेश्वर याने तुम-
च्यासाठीं मिसरांत जें सर्व केलें, त्याप्रमाणें देवाने
परीक्षा, खुणा, व चमत्कार, व लढाई, व बळकट
हात, व उभारलेला बाहु, व मोठ्या भयंकर गोष्टी,
इहींकरून आपल्यासाठीं राष्ट्रांमधून राष्ट्र घ्याया-
चा प्रयत्न केला कीं काय? ३५ परमेश्वर
तोच देव त्याखेरीज दुसरा कोणी देव नाहीं,
असें तुह्मी जाणावें ह्मणून हें सर्व तुह्मास दाखवून
दिल्हें आहे. ३६ तुह्माला उपदेश करायास
त्याने आपली वाणी आकाशांतून तुह्माला ऐकविली
आहे, आणि पृथ्वीवर आपला मोठा अग्नि दाख-
विला आहे, आणि तुह्मी अग्नींतून त्याच्या गोष्टी
ऐकिल्या आहेत. ३७ आणि त्याने तुमच्या पूर्व-
जांवर प्रीति केली होती, यामुळें त्याने त्याच्यामागें
त्याचें संतान निवडून घेतलें, आणि आपल्यापुढें
आपल्या मोठ्या पराक्रमाने तुह्माला मिसरांतून
काढिलें आहे. ३८ यासाठीं कीं त्याने तुमच्या-
पेक्षां मोठीं व बळकट राष्ट्रें तुमच्यापुढून घालवा-
वीं, आणि तुह्माला नेऊन आजच्या दिवसाप्रमाणें
त्यांचा देश वतनरूपें तुह्माला द्यावा ह्मणून. ३९
तर आज तुह्मी जाणून आपल्या हृदयीं असें ठस-
वून घ्या कीं वरतीं आकाशांत आणि खालतीं पृथ्वी-
वर परमेश्वर तोच देव, दुसरा कोणी नाहीं.
४० तर तुमचें आणि तुमच्या पाठीमागें तुमच्या
संतानाचें बरें व्हावें, आणि तुमचा देव परमेश्वर
जी भूमि तुह्माला सर्वकाळपर्यंत देतो, तिजवर

तुह्माला बहुत दिवस व्हावे ह्मणून तुह्मी त्याचे
नेम व त्याच्या आज्ञा, ज्या मी आज तुह्माला ला-
वून देतों, त्या पाळा."
४१ तेव्हां मोश्याने यार्देनेच्या पलिकडे सूर्या-
च्या उगवतेस तीन नगरें वेगळीं ठेविलीं; ४२
यासाठीं कीं जो असा हेतु न धरून आणि आप-
ल्या शेजाऱ्याचा द्वेष पूर्वी न करून त्याला जिवें
मारिलें, तशा घातकाने त्यांत पळून जावें, आणि
त्यांतल्या एखाद्या नगरांत पळून जगावें. ४३
रऊबेनासाठीं सपाट भूमीवर रानांतलें बेजेर, आणि
गादासाठीं गीलादांतलें रामोथ, आणि मनाश्-
श्यासाठीं बाशानांतलें गोलान असीं ठेविलीं.
४४ तर जें शास्त्र मोश्याने इस्राएलाच्या सं-
तानांस सांगून ठेविलें तें हेंच. ४५ जे नेम-
साक्षी व बंधारणें व नीति मोश्याने मिसरांतून
आलेल्या इस्राएलाच्या संतानांस सांगितल्या, त्या
ह्याच आहेत. ४६ कोठें, तर यार्देनेच्या पलि-
कडे बेथपौरासमोरल्या खोऱ्यांत अमोऱ्यांचा राजा
सीहोन जो हेशबोनांत राहत होता त्याच्या दे-
शांत; त्याला मोशे व इस्राएलाचीं संतानें यानी
मिसरांतून आल्यावर मारिलें; ४७ आणि त्या-
चा देश व बाशानांतला राजा ओग याचा देश
वतन करून घेतला; यार्देनेच्या पलिकडे सू-
र्याच्या उगवतेस जे अमोऱ्यांचे दोन राजे तेच
ते. ४८ आर्णोन नदीच्या कांठीं जें अरोएर तेथून
सियोन ह्मणजे हेर्मोन डोंगर तेथपर्यंत. ४९
आणि पूर्वेस यार्देनेच्या पलिकडली सर्व सपाटी,
ह्मणजे पिसग्याच्या खालचे उभड तेथून तळव-
टीकडल्या समुद्रापर्यंत घेतला.

## अध्याय ५.

तेव्हां मोश्याने सर्व इस्राएलास बोलावून त्यांस
सांगितलें, "हे इस्राएला, मी जे नेम व नीति
तुमच्या कानीं आज सांगतों, त्या तुह्मी ऐकून शि-
का, आणि त्यांचें आचरण करायास संभाळा. २
होरेबांत आमचा देव परमेश्वर याने आह्मासीं
करार केला. ३ परमेश्वराने तो करार आमच्या
पूर्वजासीं केला नाहीं, परंतु आह्मासीं, ह्मणजे जे
सर्व आह्मी एथें आज जिवंत आहों, त्या आह्मासीं
केला. ४ डोंगरावर परमेश्वर अग्नींतून तुमच्या-
बरोबर तोंडातोंडीं बोलला. ५ मी त्या वेळेस
तुह्मास परमेश्वराचें वचन सांगायास परमेश्व-
राच्या व तुमच्यामध्यें उभा राहिलों होतों; कारण
कीं तुह्मी त्या अग्नीपुढें भिऊन डोंगरावर चढला
नव्हतां. ६ ती गोष्ट असी कीं, ज्याने तुला मि-
सर देशांतून, दासांच्या वस्तींतून काढिलें, तो मी
परमेश्वर तुझा देव आहें. ७ माझ्यासमोर
तुला दुसरे देव नसोत. ८ तूं आपल्यासाठीं को-
रींव मुर्त्ति करूं नको; आणि जें वरतीं आकाशांत,
अथवा जे खालतीं पृथ्वींत, अथवा जे पृथ्वीच्या
खालतीं पाण्यांत त्याची प्रतिमा करूं नको. ९
त्यांच्या पायां पडूं नको, आणि त्यांची सेवा करूं
नको; कारण कीं मी परमेश्वर तुझा देव आ-
वेशी देव आहें; जे माझा द्वेष करितात त्यांच्या
तिसऱ्या व चवथ्या पिढीपर्यंत बापांच्या अन्या-
यामुळें लेंकरांचें शासन करितों. १० आणि
जे मजवर प्रीति करितात, आणि माझ्या आज्ञा
पाळितात, त्यांच्या हजारांवर मी दया करितों.
११ परमेश्वर जो तुझा देव त्याचें नाम तूं
व्यर्थ घेऊं नको; कां कीं जो त्याचें नाम व्यर्थ
घेतो त्याला परमेश्वर निर्दोषी असें मोजणार
नाहीं.' १२ ज्याप्रमाणें परमेश्वर तुझा देव
याने तुला आज्ञा दिल्ही, त्याप्रमाणें तूं शाब्बाथ
दिवसाला पवित्र पाळायास संभाळ. १३ सा-
हा दिवस उद्योग करून आपले सर्व काम कर:
१४ परंतु सातवा दिवस तुझा देव परमेश्वर
याच्या विसांव्याचा दिवस आहे; त्यांत तूं कांहीं
काम करूं नको, तूं व तुझा पुत्र व तुझी कन्या व
तुझा दास व तुझी दासी व तुझा बैल व तुझा गा-
ढव व तुझा कोणी पशु व तुझ्या दरवाज्याच्या आंत
जो जवळचा विदेशी यांस करूं देऊं नको; ह्मणजे
तुझ्या चाकराने व तुझ्या चाकरणीने तुझ्यासारिखा
विसांवा घ्यावा. १५ आणि असी आठवण कर
कीं तूं मिसर देशांत चाकर होतास, आणि तुझा
देव परमेश्वर याने तुला तेथून बळकट हाताने
व लांबविलेल्या बाहूने काढिलें, यास्तव तुझा देव
परमेश्वर याने तुला शाब्बाथ दिवस पाळायास
आज्ञा दिल्ही आहे. १६ तुला दिवस फार व्हावे
ह्मणून आणि जी भूमि तुझा देव परमेश्वर
तुला देत आहे, तिजवर तुझें बरें व्हावें, ह्मणून

त्याप्रमाणें तुझा देव परमेश्वर याने तुला आज्ञा
दिल्ही, त्याप्रमाणें तूं आपल्या बापाचा व आपल्या
आईचा सन्मान कर. १७ तूं हत्या करूं नको.
१८ आणि जारकर्म करूं नको. १९ आणि चो-
री करूं नको. २० आणि आपल्या शेजाऱ्याविषयीं
खोटी साक्ष देऊं नको. २१ आणि आपल्या
शेजाऱ्याच्या बायकोवर लोभ ठेवूं नको, आणि
आपल्या शेजाऱ्याचें घर, त्याचें, शेत अथवा
त्याचा चाकर, अथवा त्याची चाकरीण, अथ-
वा त्याचा बैल, अथवा त्याचें गाढव, अथवा आ-
पल्या शेजाऱ्याचें जें कांहीं असेल त्यावर लोभ
ठेवूं नको.

२२ परमेश्वराने ह्या गोष्टी डोंगरावर, अग्नि,
ढग व काळोख यांतून मोठ्या शब्दाने तुमच्या
सर्व समुदायाला सांगितल्या, आणि अधिक सां-
गितल्या नाहींत; मग त्याने दोन धोंड्यांच्या पाट्यां-
वर त्या लिहिल्या, आणि त्या मला दिल्या. २३
तेव्हां असें झालें कीं तुह्मी अंधारांतून वाणी ऐकिली
आणि डोंगर अग्नीने जळता पाहून आपल्या वंशांचे
सर्व अधिपती व आपले वडील यांच्यासंगतीं माझ्या-
जवळ आलां. २४ आणि असें बोलला,"पाहा, आ-
मचा देव परमेश्वर याने आपलें वैभव व आपलें
मोठेपण आह्मास दाखविलें, आणि आह्मी अग्नींतून
त्याची वाणी ऐकिली; आजच्या दिवसीं पाहिलें
कीं देव मनुष्यास बोलतो तथापि हा जगतो. २५
परंतु आतां आह्मी कां मरावें? कारण कीं हा मोठा
अग्नि आह्मास भस्म करील; जर आह्मी आपला
देव परमेश्वर याचा शब्द अणखी ऐकूं तर
मरूं. २६ कां तर जीववान् देव अग्नींतून बोलत
असतां, त्याचा शब्द ऐकून जगला, असा आम-
च्यासारिखा सर्व देहांत कोण आहे? २७ तूं
जवळ जाऊन, आमचा देव परमेश्वर सांगेल तें
अवघें ऐक; आणि आमचा देव परमेश्वर जें
तुला सांगेल, तें अवघें आह्मास सांग; ह्मणजे
आह्मी ऐकूं, आणि तसें करूं." २८ तेव्हां तुह्मी
मजसीं बोलत असतां, परमेश्वराने तुमच्या बो-
लण्याचा शब्द ऐकिला, आणि परमेश्वराने मला
ह्मटलें,"हे लोक आपल्या ज्या गोष्टी तुझ्याजवळ
बोलले, त्यांचे शब्द म्या ऐकिले आहे; त्यांनी
जे ह्मटले, त्या सर्वांविषयीं त्यांनी बरें केलें आहे.
२९ त्यांचा भाव त्यांत असा असता, तर किती बरें
होतें! कीं त्यांनी मला भिऊन माझ्या अवघ्या
आज्ञा सर्वकाळ पाळाव्या; ह्मणजे त्यांचें आणि
त्यांच्या संतानांचें सर्वकाळ बरें होईल. ३० तूं
जाऊन त्यांस सांग, तुह्मी आपल्या राहोट्यांकडे
आपले फिरा.' ३१ तूं तर एथें माझ्याजवळ
उभा राहा; ह्मणजे ज्या आज्ञा व नेम व नीति
त्वां त्यांस शिकवाव्या, आणि मी जो देश वतन
होण्यासाठीं त्यांस देत आहें, त्यांत त्यांनी पाळा-
व्या; त्या अवघ्या मी तुला सांगेन." ३२ तर
तुमचा देव परमेश्वर याने जी आज्ञा तुह्मास सां-
गून दिल्ही त्याप्रमाणें करायास तुह्मी संभाळा;
उजव्याकडे किंवा डाव्याकडे वळूं नका. ३३
तुमचा देव परमेश्वर याने जो कांहीं मार्ग तुह्मास
लावून दिल्हा, त्यांत तुह्मी चाला, ह्मणजे जगाल,
आणि तुमचें बरें होईल; आणि जो देश तुह्मी
वतनरूपें पावाल, त्यांत तुह्मी बहुतकाळ राहाल.

## अध्याय ६.

तर तुह्मी जो देश वतनरूपें पावायास पलि-
कडे जातां, त्यांत पाळायासाठीं तुह्मास शि-
कवाव्या ह्मणून ज्या आज्ञा, नेम, व नीति तुमचा
देव परमेश्वर याने लावून दिल्ह्या त्या ह्याच
आहेत; २ ह्मणजे त्वां आपला देव परमेश्वर
याला असें भ्यावें कीं त्याचे सर्व नेम व त्याच्या
आज्ञा, ज्या मी तुला लावून देतों, त्या त्वां व
तुझ्या पुत्राने व तुझ्या पुत्राच्या पुत्राने आपल्या
आयुष्याच्या सर्व दिवसांत पाळाव्या, आणि
तेणेंकरून तुझे दिवस फार व्हावे. ३ तर हे
इस्राएला, तूं ऐकून पाळायास संभाळ; यासाठीं
कीं तुझें बरें व्हावें, अणखी त्याप्रमाणें तुझ्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याने तुला वचन दिल्हें,
त्याप्रमाणें दूध व मध वाहण्याच्या देशांत तुह्मी
बहुत वाढावें. ४ हे इस्राएला, ऐक; परमेश्वर
अमचा देव आहे, आणि परमेश्वर एकच आहे.
५ तर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या
सर्व जिवाने व आपल्या सर्व शक्तीने आपला देव
परमेश्वर यावर प्रीति कर. ६ आणि मी आज
तुला ज्या गोष्टी आज्ञेने सांगतों, त्या तुझ्या हृद-
यांत असाव्या. ७ आणि तूं आपल्या लेकरांजवळ

ह्या पुनः पुनः सांग; आणि आपल्या घरीं बसतांना
आणि वाटेवर चालतांना आणि निजतांना आणि
उठतांना यांविषयीं बोलत जा.
८ आणि तूं ह्या आपल्या हातासीं खुणेसाठीं
बांध, आणि आपल्या दोहीं डोळ्यांच्या मध्यभागीं
कपाळभूषण असा असूं दे. ९ आणि तूं आपल्या
घराच्या खांबांवर, व आपल्या दरवाज्यांवर ह्या
लिही. १० आणखी जेव्हां तुझा देव परमेश्वर
तुला त्या देशांत नेईल; ह्मणजे जो त्यानें तुला
द्यायास तुझे पूर्वज, आब्राहाम, व इझाक व या-
कोब यांजवळ शपथ वाहिली त्यांत; मोठीं व चां-
गलीं नगरें, जीं त्वां बांधिलीं नाहींत, त्यांत; ११
आणि सर्व उत्तम वस्तूंनी भरलेलीं घरें, जीं त्वां
भरलीं नाहींत, त्यांत; आणि खोदलेल्या विहिरी,
ज्या त्वां खोदिल्या नाहींत, त्यांजवळ; द्राक्षांचे
मळे व जैतूनबनें, जीं त्वां लाविलीं नाहींत, त्यांत
नेईल, आणि तूं खाऊन तृप्त होसील, तेव्हां असें
व्हावें कीं, १२ त्वां आपल्याविषयीं संभाळावें,
नाहीं तर ज्यानें तुला मिसर देशांतून, ह्मणजे दा-
स्यांच्या वस्तींतून काढिलें, त्या परमेश्वराला तूं
विसरसील. १३ तूं आपला देव परमेश्वर
याला भिऊन त्याची सेवा कर, आणि त्याचें नाम
घेऊन शपथ वाहा. १४ दुसर देव, ह्मणजे तुम-
च्या चहुंकडल्या राष्ट्रांचे देव, त्यांतल्या कोणाच्या-
हि पाठीमागें चालूं नका; १५ कारण कीं तुझ्या-
मध्यें तुझा देव परमेश्वर तो आवेशी देव;
कदाचित् तुझा देव परमेश्वर याचा राग तुजवर
पेटेल, आणि तो तुला भूमीच्या पाठीवरून नाशानें
घालवील. १६ तुह्मी आपला देव परमेश्वर
याचें सत्व असें मास्सांत पाहिलें, तसें सत्व पाहूं
नका. १७ तुह्मी आपला देव परमेश्वर याच्या
आज्ञा व त्याचे नेम व त्याचीं बंधारणें, जीं त्यानें
तुला लावून दिल्हीं, तीं पाळाच पाळा. १८
परमेश्वराच्या दिसण्यांत जें नीट आणि जें बरें
तेंच तूं कर; ह्मणजे तुझें बरें होईल, आणि जो
चांगला देश परमेश्वरानें तुझ्या पूर्वजांजवळ
शपथेनें देऊं केला, त्यांत तूं जाऊन वतन पावसील.
१९ आणखी असें परमेश्वरानें वचन दिल्हें, तसें
तो तुझ्यापुढून तुझ्या सर्व शत्रूंस घालवील.
२० पुढल्या काळीं जेव्हां तुझें लेंकरूं तुला
असें पुसेल कीं, 'जे नेम व बंधारणें व नीति आ-
मचा देव परमेश्वर यानें तुह्मास आज्ञेनें लावि-
ल्या, त्या कशा आहेत? २१ तेव्हां तूं आपल्या
लेंकराला सांग, आह्मी मिसरांत फारोचे दास
होतों, परंतु परमेश्वरानें बळकट हातें आह्मास
मिसरांतून काढिलें. २२ आणि परमेश्वरानें
आमच्या देखतां मिसऱ्यांवर, फारोवर व त्याच्या
घरच्या सर्वांवर खुणा व मोठे चमत्कार व दुःखें
लाविलीं. २३ मग जो देश त्यानें आमच्या पूर्व-
जांजवळ शपथेनें देऊं केला, तो आह्मास द्यायाला
त्यानें आह्मास न्यावें, ह्मणून आह्मास तेथून का-
ढिलें. २४ आणि परमेश्वरानें आह्मास अशी
आज्ञा दिल्ही कीं आह्मी हे सर्व नेम पाळावे; ह्म-
णजे आह्मी आपल्या सर्वकाळच्या बऱ्यासाठीं आ-
पला देव परमेश्वर याला भ्यावें; तेणेंकरून
त्यानें आह्मास आजच्या दिवसाप्रमाणें जगवावें.
२५ आणि ज्याप्रमाणें आमचा देव परमेश्वर
यानें आह्मास आज्ञा दिल्ही, त्याप्रमाणें ह्या सर्व
आज्ञा आह्मी त्याच्या दिसण्याप्रमाणें संभाळून पा-
ळल्यास आह्मास पुण्य होईल.

## अध्याय ७.

जो देश वतन करून घ्यायास तूं जातोस,
त्यांत जेव्हां तुझा देव परमेश्वर तुला
पोहंचवील, आणि मोठीं राष्ट्रें, हित्ती व गिर्गाशी
व अमोरी व खनानी व परिज्जी व हिव्वी व य-
बूसी, हीं तुझ्यापेक्षां मोठीं व बळकट सात राष्ट्रें
तुझ्यापुढून घालवील. २ आणि तुझा देव पर-
मेश्वर त्यांस तुझ्यापुढें ठेवील, तेव्हां तूं त्यांस
मार; त्यांचा अगदी विनाश कर; त्यांसीं करार
करूं नको, आणि त्यांवर दया करूं नको. ३
आणि त्यांसीं सोयरीक करूं नको, त्यांतल्या को-
णाच्या पुत्राला आपली कन्या देऊं नको, आणि
त्यांतल्या कोणाची कन्या आपल्या पुत्राला करून
घेऊं नको. ४ कां तर तुझ्या पुत्राला माझ्याकडल्या
अनुसरण्यापासून ते फिरवतील आणि तीं दुसऱ्या
देवांस भजतील, मग परमेश्वराचा राग तुह्मावर
पेटेल, आणि तो तुझा नाश लवकर करील. ५
तर तुह्मी त्यांचें असें करा कीं त्यांच्या वेद्या मो-
डून टाका. आणि त्यांच्या मूर्ति फोडून टाका,

आणि त्यांचीं भजनाचीं वनें तोडून टाका, आणि
त्यांच्या पुतळ्या अग्नीने जाळा. ६ कां तर तु-
ह्मी आपला देव परमेश्वर यासाठीं पवित्र लोक
असावे; तुमचा देव परमेश्वर याने तुह्मास या-
साठीं निवडून घेतलें आहे कीं भूमीच्या पाठीवर जे
सर्व लोक त्यांपेक्षां तुह्मी विशेषेंकरून त्याचेच
लोक व्हावे. ७ तुह्मी सर्व लोकांपेक्षां पुष्कळ, यास्तव
परमेश्वराने तुमचें आलिंगन करून तुह्मास निव-
डून घेतलें, असें नाहीं; कां तर तुह्मी सर्व लोकांपेक्षा
थोडके होतां. ८ परंतु परमेश्वराची तुह्मावर
प्रीति होती ह्मणून निवडून घेतलें; आणि जी श-
पथ त्याने तुमच्या पूर्वजांजवळ वाहिली ती आपण
पाळावी, ह्मणून परमेश्वराने तुह्मास बळकट
हाताने काढिलें; असें त्याने तुह्मास दास्यांच्या
घरांतून मिसरी राजा फारो याच्या हातांतून
सोडविलें आहे. ९ तर तूं हें जाण कीं परमे-
श्वर जो तुझा देव तोच देव; तो विश्वासी देव;
जे त्यावर प्रीति करितात व त्याच्या आज्ञा पाळि-
तात, त्यांजवळ तो हजारांच्या पिढींपर्यंत करार
पाळून त्यांवर दया करितो. १० आणि जे त्या-
चा द्वेष करितात त्यांचा नाश करून त्यांच्या-
समक्ष फेड करितो; आपल्या द्वेष्याविषयीं उ-
शीर करणार नाहीं, आपल्यासमक्ष त्याची फेड
करील. ११ तर जी आज्ञा व जे नेम व ज्या
नीति मी आज तुला आज्ञेने लाविती, त्या तूं सं-
भाळून पाळ.

१२ तर तुह्मी त्या नीति जर ऐकाल आणि
संभाळून त्यांचें आचरण कराल, तर त्यावरून
असें होईल कीं तुझा देव परमेश्वर याने तुझ्या
पूर्वजांजवळ शपथ वाहून जो करार आणि जी
दया केली, ती तो तुजविषयीं राखील. १३ आ-
णि त्याने तुझ्या पूर्वजांजवळ शपथ वाहून जी भूमि
तुला देऊं केली, तिजवर तो तुजवर प्रीति करील,
आणि तुला आशीर्वाद देऊन तुला वाढवील; आ-
णि तुझ्या पोटच्या फळाला व तुझ्या भूमीच्या फ-
ळाला, तुझ्या धान्याला व तुझ्या ताज्या द्राक्षारसा-
ला व तुझ्या तेलाला, तुझ्या गुरांच्या वाढण्याला
व तुझ्या बकऱ्यांच्या कळपांस आशीर्वाद देईल.
१४ तूं सर्व लोकांपेक्षा आशीर्वादित होसील; तु-
झ्यामध्यें तुझ्या पशूंमध्यें नर किंवा मादी वांझ
होणार नाहीं. १५ आणि परमेश्वर तजपासून
सर्व रोग दूर करील; आणि मिसऱ्यांचीं वाईट
दुखणीं जीं तुला कळलीं, त्यांतलें कोणतेंहि तुला
लावणार नाहीं, परंतु तो तुझ्या सर्व द्वेष्यास तीं
लावील. १६ तर तुझा देव परमेश्वर जे मु-
लुख तुला देतो, त्या सर्वांचा तूं क्षय कर, तुझ्या
दृष्टीने त्यांवर ममता न व्हावी, आणि त्यांच्या दे-
वांची सेवा तूं करूं नको; कां तर ती तुला फांस-
रूप होईल. १७ जरी तूं आपल्या मनांत ह्मण-
सील कीं हीं राष्ट्रें मजपेक्षां मोठीं; माझ्याने त्यांस
वतनांतून कसें घालववेल? १८ तरी तूं त्यांस
भिऊं नको; तुझा देव परमेश्वर याने फारोचें
व सर्व मिसऱ्यांचें जें केलें, त्याची तूं पक्की आठ-
वण कर. १९ तुझ्या दृष्टीस पडलेल्या ज्या मो-
ठ्या प्रचिती व खुणा व चमत्कार व बळकट हात
व लांबविलेला बाहु, ज्यांकडून तुझा देव परमे-
श्वर याने तुला काढिलें, त्यांची आठवण कर;
ज्या लोकांस तूं भितोस, त्या सर्वांचें तुझा देव
परमेश्वर तसें करील. २० आणखी तुझा देव
परमेश्वर त्यांमध्यें गांधण्या इतक्या पाठवील कीं
जे उरलेले व तुझ्यापुढें लपलेले, ते नाश पावतील.
२१ तूं त्यांच्यापुढें घाबरूं नको, कां तर तुझा देव
परमेश्वर तुझ्यामध्यें आहे, तो मोठा व भयंकर
देव आहे. २२ आणि तुझा देव परमेश्वर
त्या राष्ट्रांस तुझ्यापुढून थोडें थोडें घालवील; तु-
झ्याने त्यांचा क्षय लौकरच व्हावयाचा नाहीं;
झाला, तर रानपशू तुजवर वाढतील. २३ परंतु
तुझा देव परमेश्वर त्यांस तुझ्या स्वाधीन ठेवील,
आणि त्यांचा संहार करील तोंपर्यंत त्यांचा मोठा
मोड करीत जाईल. २४ असा तो तुझ्या हातीं
त्यांचे राजे देईल, आणि तूं आकाशाखालून त्यां-
चीं नावें नाहींसीं करसील; तूं त्यांचा संहार कर-
सील तोंपर्यंत कोणी तुझ्यासमोर उभा टिकणार
नाहीं. २५ तुह्मी त्यांच्या देवांच्या पुतळ्या अ-
ग्नीने जाळा; त्यांवरलें रुपें व सोनें तूं इच्छूं नको,
आणि आपल्याजवळ घेऊं नको; घेतलें, तर तेणें-
करून तूं फांसांत पडसील, कारण कीं तुझा देव
परमेश्वर याला त्याची चिळस आहे. २६
आणि तूं आपल्या घरीं चिळसकारक आणूं नको;
आणिली, तर त्याच्यासारिखा तुझा अति नाश

होईल; तूं त्यासीं अगदी विटून त्याची चिळस
धरच धर; कारण कीं तें अति नाशाचें आहे.

### अध्याय ८.

ह्या सर्व आज्ञा मी आज तुह्मांला देतों, त्या
तुह्मी संभाळून पाळा; ह्मणजे तुह्मी ज-
गाल आणि वाढाल, आणि जो देश परमेश्वराने
तुमच्या पूर्वजांजवळ शपथेने देऊं केला, तेथें तुह्मी
जाऊन तो वतनरूपें पावाल. २ आणि तुझा देव
परमेश्वर याने तुझें दमन करायास, आणि तूं
त्याच्या आज्ञा पाळसील किंवा नाहीं, याविषयीं
तुझ्या अंतःकरणांत जें आहे तें जाणायासाठीं तुझी
परीक्षा करायास तुला या चाळीस वर्षे रानांत-
ल्या ज्या वाटेने चालविलें, त्या सर्वांची तूं आठवण
कर. ३ तर त्याने तुझें दमन केलें, तुला भूकहि
दिल्ही; आणि जें मान्ना तुला ठाऊक नव्हतें, तु-
झ्या पूर्वजांसहि ठाऊक नव्हतें, तें तुला खायास
दिल्हें; ह्मणजे आपण तुला असें कळवावें कीं
माणूस केवळ अन्नाने वांचणार नाहीं, तर परमे-
श्वराच्या तोंडातून जें कांहीं निघतें, त्याकडून
माणूस वांचेल. ४ या चाळीस वर्षे तुझें वस्त्र
तुझ्यावरून जुनें होऊन गेलें नाहीं, आणि तुझा
पाय सुजला नाहीं. ५ तर तूं आपल्या ह्रदयांत
असें जाण कीं कोणी आपल्या पुत्राला जसी शि-
क्षा करितो, तसी तुझा देव परमेश्वर तुला
शिक्षा करितो. ६ तर तूं आपला देव परमेश्वर
याच्या मार्गांत चालण्याने व त्याला भिण्याने त्या-
च्या आज्ञा पाळ. ७ कां तर तुझा देव परमे-
श्वर तुला चांगल्या देशांत नेतो, त्या देशांत पा-
ण्याचे ओहोळ, झरे, आणि उभड खिंडींत व
डोंगरांत वाहतात. ८ तो देश गव्हांचा व सा-
तुचा व द्राक्षाचा व अंजिराचा व दाळिंबाचा,
तेलाच्या जैतूनाचा व मधाचा देश आहे. ९
ज्यांत अबाळ न होतां त्वां अन्न खावें, ज्यांत क-
शाचेंहि तुला उणें होणार नाहीं तसा देश; ज्यां-
तले धोंडे लोखंडाचे आहेत, आणि ज्यांतल्या
डोंगरांतून त्वां तांबें खाणून काढावें, तसा देश आ-
हे. १० तर त्वां खाऊन तृप्त व्हावें, आणि तुझा
देव परमेश्वर याने जो चांगला देश तुला दिल्हा,
त्यामुळें त्वां त्याचा आशीर्वाद मानावा. ११ तूं
आपल्याविषयीं संभाळ, नाहीं तर तुझा देव पर-
मेश्वर याच्या ज्या आज्ञा व नीति व नेम मी
आज तुला लावून देतों, त्या न पाळून त्याला
विसरसील; १२ तूं खाऊन तृप्त झाल्यावर, आणि
त्वां चांगलीं घरें बांधून वस्ती केल्यावर, १३
आणि तुझीं गुरें व तुझीं बकरीं वाढल्यावर, आणि
तुझ्याजवळ रुपें व सोनें वाढल्यावर, असें तुझें
जें अवघें तें वाढल्यावर, १४ कदाचित् तुझें
ह्रदय उद्धट होईल, आणि तूं आपला देव पर-
मेश्वर याला विसरसील; ज्याने तुला मिसर
देशांतून, ह्मणजे दास्यांच्या वस्तींतून काढिलें, त्या-
ला; १५ मोठें व भयंकर रान, जळजळणारे साप
व विंचू व निर्जल भूमि, जेथें पाणी नाहीं, त्यांतून
ज्याने तुला आणिलें, त्याला; ज्याने तुझ्यासाठीं
गारेच्या खडकांतून पाणी काढिलें, त्याला; १६
जें मान्ना तुझ्या पूर्वजांस ठाऊक नव्हतें, तें तुला
रानांत खायास ज्याने दिल्हें, त्याला विसरसील;
त्याचा हेतु असा कीं आपण तुझें दमन करावें,
आणि तुझी परीक्षा करावी ह्मणून, ह्मणजे तुझ्या
परिणामीं तुझें बरें करावें. १७ आणि कदाचित्
तूं आपल्या मनांत ह्मणसील कीं, माझ्या शक्तीने
व माझ्या हाताच्या बळाने ही संपत्ति माझ्यासाठीं
मिळाली आहे. १८ तर तूं आपला देव पर-
मेश्वर याची आठवण कर, कारण कीं जो तुला
संपत्ति मिळवायास शक्ति देतो तोच तो आहे;
कशासाठीं देतो तर त्याने आपला जो करार तुझ्या
पूर्वजांजवळ शपथ वाहून केला, तो आजच्या दिव-
साप्रमाणें स्थापावा. १९ परंतु जर तूं आपला
देव परमेश्वर याला विसरसील आणि दुसऱ्या
देवांच्या पाठीमागें लागून त्यांची सेवा करसील
आणि त्यांच्या पायां पडसील, तर असें होईल कीं
तुह्मी नाश पावालच पावाल; याप्रमाणें मी आज
तुह्मास खचीत सांगतों. २० जीं राष्ट्रें परमे-
श्वर तुझ्यापुढून नाहींसीं करितो, त्यांचा जसा,
तसा नाश तुह्मी पावाल; कारण कीं तुह्मी आपला
देव परमेश्वर याची गोष्ट ऐकून मानिली नाहीं.

### अध्याय ९.

हे इस्राएला, ऐक; राष्ट्रांचें वतन घ्यायास तुला
आज यार्देनेच्या पलिकडे जायाचें आहे; तीं

तुझ्यापेक्षां मोठीं व शक्तिमान; त्यांचीं नगरें मोठीं
व आकाशापर्यंत एवढ्या बंदिस्तीचीं आहेत; २
ते लोक स्थूळ व उंच, अनाकीचे वंशस्थ; ते
तुला ठाऊक आहेत, कां तर त्वां ऐकिलें कीं,
अनाकीच्या संतानापुढें कोण उभा टिकेल? ३
तर तूं आज असें जाण कीं तुझा देव परमेश्वर
तोच तुझ्यापुढें नाशकारक अग्नीने पलिकडे चा-
लत जातो, तो त्यांचा नाश करील, तोच त्यांस
तुझ्यापुढें पाडील; या प्रकारें तूं त्यांस वतनांतून
घालवून त्यांचा नाश लवकर करसील; जसा
परमेश्वराने तुला सांगितला तसा. ४ जेव्हां
तुझा देव परमेश्वर त्यांस तुझ्यापुढून दवडील,
तेव्हां तूं आपल्या मनांत असें ह्मणूं नको कीं,
माझ्या पुण्यावरून परमेश्वराने मला हा देश
वतनरूपें पावायास आणिलें; कां कीं त्या राष्ट्रां-
च्या दुष्टाईमुळें परमेश्वर त्यांस तुझ्यापुढून वत-
नांतून घालवितो. ५ तूं त्यांचा देश वतनरूपें
पावायास जातोस, हें तुझ्या पुण्यावरून किंवा तु-
झ्या ह्रदयाच्या सरळपणावरून नव्हे, परंतु त्या
राष्ट्रांच्या दुष्टाईवरून तुझा देव परमेश्वर त्यांस
तुझ्यापुढून वतनांतून घालवितो; आणि यासाठीं
कीं तुझे पूर्वज आब्राहाम, इझाक व याकोब यां-
जवळ शपथ वाहून जें वचन परमेश्वराने दिल्हें,
तें आपण पूर्ण करावें. ६ तर तूं हें जाण कीं तुझा
देव परमेश्वर तुझ्या पुण्यावरून तुला हा चांगला
देश वतन करून देतो, असें नाहीं; कारण कीं तूं
ताठर मानेचा लोक आहेस. ७ तूं विसरूं नको;
आठवण धर कीं आपण आपला देव परमेश्वर
याला रानांत कसें कोपविलें, जेव्हां तूं मिसर दे-
शांतून निघालास, त्या दिवसापासून तुह्मी या
ठिकाणीं येऊन पोहंचला तोंपर्यंत तुह्मी परमेश्व-
रासीं विरोधी होत आला. ८ आणि होरे-
बांत तुह्मी परमेश्वराला असें कोपविलें कीं तुम-
चा नाश करावा एवढा परमेश्वर तुह्मावर रागें
भरला. ९ जेव्हां, तर धोंड्यांच्या पाट्या, ह्म-
णजे जो करार परमेश्वराने तुह्मासीं केला त्याच्या
पाट्या घ्यायास जेव्हां मी डोंगरावर चढलों, आणि
अन्न न खातां, पाणीहि न पितां, चाळीस दि-
वस व चाळीस रात्री डोंगरावर राहिलों, तेव्हां.
१० आणि धोंड्यांच्या दोन पाट्या, देवाच्या बो-
टाने लिहिलेल्या परमेश्वराने मला दिल्या,
आणि मंडळीच्या दिवसीं डोंगरावर ज्या गोष्टी
परमेश्वराने तुमच्याजवळ अग्नींतून सांगितल्या,
त्या अवघ्याप्रमाणें त्यांवर होतें. ११ तेव्हां चा-
ळीस दिवस व चाळीस रात्री यांच्या शेवटीं
असें झालें कीं परमेश्वराने धोंड्यांच्या दोन पा-
ट्या, ह्मणजे त्या कराराच्या पाट्या, मला दिल्या.
१२ तेव्हां परमेश्वराने मला सांगितलें, "तूं उठ,
एथून लवकर उतर; कारण कीं तुझे लोक जे त्वां
मिसरांतून आणिले ते नासले, जो मार्ग म्यां त्यांस
आज्ञेने लाविला, तो त्यांनी पटकण सोडिला; त्यां-
नी आपल्यासाठीं ओतींव मूर्त्ति केली आहे." १३
आणखी परमेश्वराने मला असें सांगितलें कीं,
"म्यां त्या लोकांस न्याहाळिलें, तर पाहा, ते ताठर
मानेचे लोक आहेत. १४ तूं मला सोड; ह्मणजे
मी त्यांचा नाश करीन, आणि त्यांचें नांव आका-
शाखालून खोडून टाकीन; मग मी तुला त्यांपेक्षां
शक्तिमान् व मोठें राष्ट्र असें करीन." १५ तर
मी मुरडून डोंगरावरून उतरलों; तेव्हां तो डों-
गर अग्नीने जळत होता, आणि कराराच्या दोन
पाट्या माझ्या दोन्ही हातीं होत्या. १६ तेव्हां म्यां
न्याहाळिलें; तर पाहा, तुह्मी आपला देव पर-
मेश्वर यांजवळ पाप केलें होतें; तुह्मी आपल्या-
साठीं ओतींव वांसरूं केलें होतें; जो मार्ग पर-
मेश्वराने तुह्मास आज्ञेने लाविला, तो तुह्मी पट-
कण सोडिला होता. १७ तेव्हां त्या दोन पाट्या
धरित असतां, तुमच्या देखतां म्यां आपल्या दो-
न्ही हातांतून त्या टाकून फोडिल्या. १८ तर
परमेश्वराच्या दिसण्यांत तुह्मी दुष्टाई करून
त्याला त्रासिलें, यांत जें पाप केलें होतें, त्या तुम-
च्या अवघ्या पापामुळें मी पहिल्यासारिखा चाळीस
दिवस व चाळीस रात्री परमेश्वराच्यापुढें पडून
राहिलों; म्यां अन्न खाल्लें नाहीं, पाणीहि मी
प्यालों नाहीं. १९ कारण कीं परमेश्वर तुमचा
नाश करायास ज्या क्रोधाने व संतापाने तुह्मावर
कोपिला, त्यामुळें मी भ्यालों होतों; परंतु त्या वे-
ळेसहि परमेश्वराने माझें ऐकिलें. २० आणि
आहरोनावर परमेश्वर फार रागें भरला, त्याचा
नाश कराया एवढा, परंतु आहरोनाविषयींहि म्यां
त्या वेळेस प्रार्थना केली. २१ नंतर तुमचें पाप-

रूप वासरूं जें तुह्मी केलें होतें, तें म्या घेऊन
अग्नीने जाळिलें, आणि तें कुटून धुळीच्या रजःक-
णाइतकें पकें वाटिलें; मग जो ओहोळ डोंगरांतून
उतरतो, त्यांत त्याची धूळ टाकिली.

२२ आणि थाबेऱ्यांत, व मास्स्यांत, व कि-
ब्राथहत्तावासांत तुह्मी परमेश्वराला कोपविलें.
२३ आणि जेव्हां परमेश्वराने तुह्मास कादेश-
बाण्यांतून पाठविता असें सांगितलें कीं, "तुह्मी वर
जाऊन जो देश म्या तुह्मास दिल्हा, तो वतन क-
रून घ्या," तेव्हां तुह्मी परमेश्वर आपला देव
याच्या सांगण्याला विरुद्ध केलें, त्यावर विश्वास
ठेविलाच नाहीं आणि त्याची गोष्ट ऐकिली नाहीं.
२४ तुह्मी मला माहित झालां त्या दिवसापासून
परमेश्वरासीं विरोध करीत आलां. २५ तर
जसा मी पूर्वी पडून राहिलों होतों, तसा फिरून
चाळीस दिवस व चाळीस रात्री परमेश्वरापुढें
पडून राहिलों; कारण कीं परमेश्वराने तुमचा
नाश करावा ह्मणून ह्मटलें होतें. २६ तेव्हां मी
परमेश्वरासीं प्रार्थना करितांना बोललों, "हे प्रभू
परमेश्वरा, तूं आपले लोक तीच आपली वस्तभाव
जी त्वां आपल्या मोठेपणाने सोडवून घेतली, जी
आपल्या बळकट हाताने मिसरांतून आणिली, ति-
चा नाश करूं नको. २७ तूं आपल्या सेवकांची,
ह्मणजे आब्राहाम, इझाक, व याकोब यांची आ-
ठवण कर; या लोकांच्या कठीणपणावर व त्यांच्या
दुष्टाईवर व त्यांच्या पापावर लक्ष लावूं नको.
२८ नाहीं तर ज्या देशांतून त्वां आह्मास आणिलें
त्यांतले ह्मणतील कीं, ज्या देशाविषयीं परमेश्व-
राने त्यांस वचन दिल्हें होतें, त्यांत त्यांस न्या-
याला तो शक्तिमान् नव्हता, आणि त्याने त्यांचा
द्वेष केला, यामुळें त्यांस मारायाला रानांत का-
ढिलें. २९ परंतु ते तुझे लोक, तीच तुझी वस्त-
भाव, जी त्वां आपल्या मोठ्या बळाने व आपल्या
लांबविलेल्या बाहूने काढिली तसे आहेत.

## अध्याय १०.

त्या वेळेस परमेश्वराने मला सांगितलें, "तूं
आपल्यासाठीं धोंड्याच्या दोन पाट्या प-
हिल्यासारिख्या घडून कर; मग माझ्याजवळ,
डोंगरावर चढ; लांकडाचा कोश आपल्यासाठीं
कर. २ ह्मणजे ज्या पहिल्या पाट्या त्वां फोडून
टाकिल्या, त्यांवर ज्या गोष्टी होत्या, त्या मी या
पाट्यांवर लिहीन, मग तूं त्या कोशांत ठेव. ३
यास्तव म्या शिट्टीलांकडाचा कोश केला, आणि
धोंड्याच्या दोन पाट्या पहिल्यासारिख्या घडून
केल्या; मग मी आपल्या हातीं त्या दोन पाट्या
घेउन डोंगरावर चढलों. ४ तर ज्या दाहा आज्ञा
परमेश्वराने डोंगरावर मंडळीच्या दिवसीं अग्नीं-
तून तुह्मास सांगितल्या होत्या, त्या परमेश्वराने
पहिल्या लिहिलेल्याप्रमाणें या पाट्यांवर लिहून
मला दिल्या. ५ मग मी मुरडून डोंगरावरून
उतरलों, आणि जो कोश म्या केला होता, त्यांत
त्या पाट्या ठेविल्या, आणि त्या तेथें आहेत; ज्या-
प्रमाणें परमेश्वराने मला आज्ञा दिल्ही होती
त्याप्रमाणें.

६ मग इस्राएलाचीं संतानें याकानाच्या संता-
नांतल्या बेरोथ सोडून मोसेऱ्यास आलीं; तेथें
आहरोन मेला, आणि तेथें पुरला गेला, मग त्या-
च्या ठिकाणीं त्याचा पुत्र एलाजार याने याजकपण
केलें. ७ नंतर तीं तेथून निघून गुद्गोदास आलीं,
मग गुद्गोदापासून यटबाथ्यास आलीं; तो पा-
ण्याच्या ओहळांचा देश आहे. ८ त्या वेळेस
परमेश्वराने लेवीचा वंश वेगळा केला, यासाठीं
कीं त्याने परमेश्वराच्या कराराचा कोश वाहावा;
परमेश्वरासमोर उभें राहून त्याची सेवा करावी,
आणि त्याच्या नांमाने आशीर्वाद द्यावा; आजच्या
दिवसापर्यंत तसें आहे. ९ यास्तव लेव्याला त्या-
च्या भावांच्यासंगतीं वांटा व वतन होत नाहीं;
जसें तुझा देव परमेश्वर याने त्याला सांगितलें,
तसें परमेश्वरच त्याचें वतन आहे. १० मी
तर पहिल्या दिवसांप्रमाणें चाळीस दिवस व चा-
ळीस रात्री डोंगरावर राहिलों होतों, आणि त्या
वेळेसहि परमेश्वराने माझें ऐकिलें; परमेश्वर
तुझा नाश करायाला मान्य झाला नाहीं. ११
तेव्हां परमेश्वराने मला असें सांगितलें कीं "तूं
ऊठ, दर मजलेस लोकांच्यापुढें चाल, ह्मणजे जो
देश त्यांस द्यायाला त्यांच्या पूर्वजांजवळ म्या श-
पथ वाहिली, तेथें ते जाऊन वतन पावतील."

१२ तर आतां हे इस्राएला, याखेरीज तु-
झा देव परमेश्वर तुझ्याजवळ काय मागतो?

ह्मणजे त्वां आपला देव **परमेश्वर** याला भिऊन
त्याच्या सर्व मार्गांत चालावें, आणि त्यावर प्रीति
करावी, आणि आपला देव **परमेश्वर** याची सेवा
करावी; आपल्या सर्व हृदयाने व आपल्या सर्व
जिवाने करावी· १३ तुझ्या बऱ्यासाठीं परमे-
श्वराच्या ज्या आज्ञा व जे नेम मी आज तुला
लावून देतों, ते त्वां पाळावे· १४ पाहा, आकाश
व आकाशावरलें आकाश, पृथ्वी आणि तींत जें
अवघें, तें तुझा देव **परमेश्वर** याचें आहे· १५
**परमेश्वर** तुझ्या पूर्वजांवर केवळ प्रीति करून
त्यांस जडला, आणि त्याने त्यांच्यामागें त्यांचें सं-
तान त्या तुह्मास सर्व लोकांपेक्षां आजच्या दिव-
सामप्रमाणें निवडून घेतलें. १६ तर तुह्मी आ-
पल्या हृदयाची असुंता कापून टाका आणि यापुढें
आपली मान ताठर करूं नका· १७ कारण कीं
तुमचा देव **परमेश्वर** तो देवांचा देव, आणि
प्रभूंचा प्रभु, मोठा पराक्रमी, व भयंकर देव; तो
तोंड पाहून मानीत नाहीं, आणि लोभलांच घेत
नाहीं· १८ तो बापहीनाचा व विधवेचा न्याय
करितो, आणि विदेश्यावर प्रीति करून त्याला अन्न
व वस्त्र देतो· १९ तुह्मीहि विदेश्यावर प्रीति
करा, कां तर तुह्मी मिसर देशांत विदेशी होतां·
२० तूं आपला देव **परमेश्वर** याचें भय धर,
त्याची सेवा कर, आणि त्याला लगटून राहा; त्या-
च्याच नामाने शपथ कर· २१ तो तुझें स्तुतिपात्र;
तोच तुझा देव; जीं मोठालीं व भयंकर कृत्यें तुझ्या
डोळ्यानी पाहिलीं, तीं ज्याने तुझ्यासाठीं केलीं
तोच तो आहे· २२ तुझे पूर्वज खालीं मिसरांत
गेले, तेव्हां सत्तर जीव होते; परंतु आतां तुझा
देव **परमेश्वर** याने तुला पुष्कळपणाने आकाशां-
तल्या ताऱ्यांसारिखें केलें आहे·

## अध्याय ११.

तर तूं आपला देव **परमेश्वर** यावर प्रीति कर,
आणि त्याचें जें पाळायाचें तें, ह्मणजे त्याचे
नेम व त्याच्या नीति व त्याच्या आज्ञा सर्व दिव-
सांत पाळ· २ तुह्मास तर आज कळलें; कारण
कीं तुमचीं लेंकरें, ज्यांस कळत नव्हतें, ह्मणजे
ज्यानी तुमचा देव **परमेश्वर** याची शिक्षा पा-
हिली नाहीं; ज्यांनी त्याचें मोठेपण, त्याचा बळ-
कट हात व त्याचा लांबविलेला बाहु; ३ आणि
त्याच्या खुणा व त्याचे जे चमत्कार त्याने मिस-
रामध्यें मिसऱ्यांचा राजा फारो याविषयीं व त्या-
च्या संपूर्ण देशाविषयीं केले; ४ आणि जे त्या-
ने मिसरी सैन्याविषयीं, त्याच्या घोड्याविषयीं व
त्यांच्या रथाविषयीं केले कीं जेव्हां ते तुमच्या पाठीं
लागले होते, तेव्हां **परमेश्वराने** त्यांच्या तोंडा-
वरून सूफ समुद्राचें पाणी वाहविलें, असा आजं-
च्या दिवसापर्यंत त्यांचा नाश केला. ५ आणि
तुह्मी या ठिकाणीं आलां एथपर्यंत जे त्याने तु-
ह्मासाठीं रानांत केले. ६ आणि रऊबेनाचा वं-
शस्थ एलियाब याचे वंशस्थ दाथान व अबी-
राम याविषयीं जीं त्याने केलीं कीं पृथ्वीने आपलें
तोंड पसरून ते गिळिले, त्यांचीं घरेंहि व त्यांच्या
राहोट्या व त्यांच्या सत्तेच्या ज्या वस्तू त्या अवघ्या
सर्व इस्राएलामध्यें गिळिल्या, तसीं न पाहिलीं,
त्यांस नाहीं परंतु तुह्मास सांगितलें आहे· ७
कारण कीं **परमेश्वराने** जें प्रत्येक मोठें चरित्र
केलें, तें तुमच्या डोळ्यानी पाहिलें आहे· ८ तर
जी प्रत्येक आज्ञा मी आज तुला लावून देतों, ती
तुह्मी पाळा; ह्मणजे तुह्मास धीर येईल, आणि
जो देश वतन करून घ्यायास तुह्मी पलिकडे जा-
तां, तेथें जाऊन वतन पावाल· ९ आणि जी भूमि
**परमेश्वराने** तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून
त्यांस ह्मणजे त्याच्या संतानाला देऊं केली, तिज-
वर तुह्मी बहुत आयुष्य पावाल, यासाठीं पाळा;
तो दूध व मध वाहण्याचा देश आहे· १० कां
तर जो देश वतन करून घ्यायास तूं जातोस, तो
ज्या मिसर देशांतून तुह्मी आलां, त्याच्यासारिखा
नव्हे; कां तेथें त्वां आपलें बीज पेरून भाजीच्या
मळ्यासारिखें आपल्या पायाने त्याचें शिंपणें केलें.
११ परंतु जो देश वतन करून घ्यायास तुह्मी
पलिकडे जातां, तो डोंगरांचा व खोऱ्यांचा देश
आकाशांतल्या पावसाचें पाणी पितो. १२ असा
देश कीं तुझा देव **परमेश्वर** त्याचा प्रतिपाळ
करितो वर्षाच्या प्रारंभापासून वर्षाच्या शेवटपर्यंत-
हि तुझा देव **परमेश्वर** याचें लक्ष त्यावर नेहमी
आहे·

१३ आणि ज्या आज्ञा मी आज तुह्मास ला-
वून देतों, त्या जर तुह्मी ऐकालच ऐकाल, ह्मणजे

आपल्या सर्व हृदयानें व आपल्या सर्व जिवानें
आपला देव परमेश्वर यावर प्रीति कराल, आ-
णि त्याची सेवा कराल, १४ तर असें होईल
कीं मी यथाकाळीं तुमच्या देशाचा पाऊस पहिली
वृष्टि व मागली वृष्टि पाडीन; अशानें तूं आपलें
धान्य व आपला ताजा द्राक्षारस व आपलें तेल
यांचा संग्रह करसील. १५ आणि मी तुझ्या
पशूंसाठीं तुझ्या कुरणांत गवत वाढवून देईन;
असा तूं खाऊन तृप्त होसील. १६ तुह्मी आ-
पल्याविषयीं संभाळा, नाहीं तर तुमचें हृदय फ-
सेल, आणि तुह्मी वळून दुसऱ्या देवांची सेवा क-
राल व त्यांचें भजन कराल. १७ मग परमे-
श्वर तुह्मावर रागें भरेल, आणि तो आकाशाला
असें बंद करील कीं पाऊस होणार नाहीं, भूमिहि
आपलें उत्पन्न देणार नाहीं; आणि जो चांगला
देश परमेश्वर तुह्मास देतो, त्यांतून तुह्मी लव-
कर नाहींसे व्हाल.

१८ तर तुह्मी ह्या गोष्टी आपल्या हृदयांत व
आपल्या जिवांत ठेवा, आणि आपल्या हातासीं
खुणेसाठीं त्या बांधा, आणि आपल्या दोही डो-
ळ्यांच्या मध्यभागीं कपाळभूषण, अशा असूं द्या.
१९ आणि तुह्मी आपल्या लेंकरांस त्या शिकवा;
ह्मणजे जेव्हां तूं आपल्या घरीं बसतोस, आणि
जेव्हां वाटेनें चालतोस, आणि जेव्हां निजतोस,
आणि जेव्हां उठतोस, तेव्हां त्यांविषयीं बोलत
जा. २० आणि आपल्या घराच्या दारांच्या बा-
ह्यांवर व आपल्या दरवाज्यांवर त्या लिहीं. २१
ह्मणजे जी भूमि परमेश्वरानें तुमच्या पूर्वजांज-
वळ शपथ वाहून त्यांस देऊं केली, तिजवर तुमचे
दिवस व तुमच्या लेंकरांचे दिवस पुष्कळ होतील;
जसे पृथ्वीवर आकाशाचे दिवस तसे. २२ का-
रण कीं ज्या सर्व आज्ञा मी तुह्मास लावून देतों,
त्यांचें आचरण करून जर तुह्मी पाळालच पाळाल,
ह्मणजे आपला देव परमेश्वर यावर प्रीति क-
राल, अणखी त्याला लगटून त्याच्या सर्व मार्गांत
चालाल; २३ तर परमेश्वर त्या सर्व राष्ट्रांस
तुमच्यापुढून वतनांतून घालवीलच, आणि तुह्मी
आपल्यापेक्षां मोठीं व शक्तिमान् राष्ट्रें यांचें वतन
पावाल. २४ जेथें तुमचा तळपाय पडेल, तें प्र-
त्येक ठिकाण तुमचें होईल, रानापासून तर लबा-
नोनापर्यंत, आणि फरात जी नदी त्या नदीपासून
तर पश्चिम समुद्रापर्यंत तुमची सीमा होईल. २५
तुमच्यापुढें कोणी टिकणार नाहीं; ज्या कोणत्याहि
देशांत तुह्मी जाल, त्याच्या लक्षांत तुमचा देव
परमेश्वर तुमचें भय व तुमची भीड ठेवील;
जसें त्यानें तुह्मास सांगितलें तसें.

२६ पाहा, आज मी तुमच्यापुढें आशीर्वाद
आणि शाप ठेवितों. २७ तुमचा देव परमेश्वर
याच्या ज्या आज्ञा मी आज तुह्मास लावून देतों
त्या तुह्मी ऐकून मानाल, तर आशीर्वाद; २८
परंतु जर तुह्मी आपला देव परमेश्वर याच्या
आज्ञा न ऐकाल, आणि जो मार्ग मी आज तुह्मास
आज्ञेनें लावितों त्यांतून निघून जे दुसरे देव तुह्मास
ठाऊक नाहींत, त्यांच्यामागें चालाल, तर शाप
लागेल. २९ आणि जो देश वतन करून घ्यायास
तूं जातोस त्यांत जेव्हां तुझा देव परमेश्वर तुला
पोहंचवील, तेव्हां असें व्हावें कीं त्वां गरिज्जीम
डोंगरावर आशीर्वाद, आणि एबाल डोंगरावर शाप
ठेवावा. ३० ते डोंगर यार्देनेच्या पलिकडे, मार्गे
सूर्य मावळण्याच्या दिशेस, सपाटींतले राहणारे
खनानी यांच्या देशांत गिल्गालाच्यापुढें एलोने-
मोरे याच्याजवळ नाहींत कीं काय? ३१ जो
देश तुमचा देव परमेश्वर तुह्मास देत आहे, तो
वतन करून घ्यायास जातांना जेव्हां तुह्मी यार्दे-
नेच्या पलिकडे जाल, आणि तो वतनरूपें पावून
त्यांत वस्ती कराल, ३२ तेव्हां जे नेम व ज्या
नीति मी आज तुमच्यापुढें ठेवितों, त्या सर्व सं-
भाळून पाळा.

## अध्याय १२.

तुमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर यानें तुह्मा-
ला जो देश वतन करून दिल्हा, त्यांत जे
नेम व नीति तुह्मी भूमीवर आपल्या जिण्याच्या
सर्व दिवसांत संभाळून पाळाव्या त्या ह्याच; २
ज्या राष्ट्रांचें वतन तुह्मी पावाल, त्यांनीं उंच डों-
गरांवर व टेंकड्यांवर व प्रत्येक पालवट झाडाखा-
लीं, जेथें आपल्या देवांची सेवा केली, त्या सर्व
ठिकाणांचा नाश कराच करा. ३ आणि त्यांच्या
वेद्या मोडून टाका, व त्यांच्या मूर्ति फोडून टाका;
त्यांचीं भजनवनेंहि अग्नीनें जाळून टाका, आणि

त्याच्या देवांच्या मूर्ति छेदून टाका; त्या ठिकाणां-
तून त्यांचें नांवहि नाहींसें करा. ४ तुह्मी आपल्या
देव परमेश्वर याचें तसें करूं नका. ५ परंतु
तुमचा देव परमेश्वर आपलें नाम ठेवायास तु-
मच्या कोण्हीएक्या वंशांतलें जें ठिकाण निवडून घे-
ईल, तेथें त्याच्या वस्तींत तुह्मी शरण जा; तेथेंच
जात जा. ६ आणि तुह्मी तेथें आपले होमपशु,
व आपले यज्ञपशू, व आपल्या उत्पन्नाचा दाहा-
वा भाग, व आपलें उचललेलें दान, व आपलें
नवसांचें अर्पण, व आपल्या स्वबुद्धीचीं अर्पणें,
आणि आपल्या गुरांतलीं, व आपल्या बकऱ्यांतलीं
प्रथम झालेलीं आणा. ७ मग तेथें आपला देव
परमेश्वर यासमोर जेवा, आणि ज्या कांहीं का-
मांस तूं हात लावितोस, ज्याविषयीं तुझा देव पर-
मेश्वर याने तुला आशीर्वाद दिल्हा, त्यांत तुह्मी
आपल्या घरच्यांसुद्धां आनंद करा. ८ एथें आज
आपण आपापल्या दिसण्यांत जें कांहीं बरें तें क-
रितों, त्या अवघ्याप्रमाणें तुह्मी तेथें करूं नका. ९
आजवर तुझा देव परमेश्वर जो विसांवा, ह्मणजे
वतन तुला देतो, त्यांत तुह्मी अझून पोहंचला
नाहीं. १० जेव्हां तुह्मी यार्देनेच्या पलिकडे जाल,
आणि तुमचा देव परमेश्वर जो देश तुह्मास
वतन करून देतो, त्यांत वस्ती कराल, आणि तो
तुमच्या चहुंकडल्या सर्व वैऱ्यांविषयीं तुह्मास असें
स्वस्थ करील कीं तुह्मी निर्भय राहाल; ११ ते-
व्हां असें व्हावें कीं तुमचा देव परमेश्वर आप-
ल्या नामाची वस्ती करायास जें ठिकाण निवडून
घेईल, तेथें तुह्मी, जें मी तुह्मास आज्ञा करून
सांगतों तें, ह्मणजे अवघे तुमचे होमपशू, तुमचे
यज्ञपशू, तुमच्या उत्पन्नाचा दाहावा भाग व तुमचें
उचललेलें दान व जे नवस तुह्मी परमेश्वरा-
जवळ कराल, त्यांतल्या सर्व निवडक वस्तू आणा.
१२ आणि तुह्मी आपले पुत्र व आपल्या कन्या व
आपले चाकर व आपल्या चाकरिणी यांसुद्धां आ-
पला देव परमेश्वर यासमोर आनंद करा, आणि
आपल्या दरवाज्यांच्या आंत जो लेवी त्यासुद्धांहि
करा, कारण कीं त्याला तुमच्यासंगतीं वांटा व
वतन नाहीं. १३ तूं आपल्याविषयीं संभाळ कीं
जें कांहीं मलतें ठिकाण तुझ्या दृष्टीस पडेल, त्यांत
आपले होम करूं नको; १४ परंतु तुझ्या एका
वंशांत जें ठिकाण परमेश्वर निवडून घेईल, तेथें
तूं आपले होम कर, आणि जें मी तुला आज्ञेने
लावितों तें अवघें तेथें कर. १५ तथापि तुझा देव
परमेश्वर याने जो आशीर्वाद तुला दिल्हा असेल,
त्याप्रमाणें आपल्या जिवाच्या सर्व इच्छेप्रमाणें त्वां
आपल्या सर्व दरवाज्यांच्या आंत मारून मांस
खावें; असें हरण व असें सांबर तसें अशुद्धाने
व शुद्धाने तें खावें. १६ रक्त मात्र तुह्मी खाऊं
नका; पाण्यासारिखें तें पृथ्वीवर ओता. १७ तु-
झ्या धान्याचा, व तुझ्या ताज्या द्राक्षारसाचा, व
तुझ्या तेलाचा दाहावा भाग, आणि तुझ्या गुरांतलीं
व तुझ्या बकऱ्यांतलीं प्रथम झालेलीं, व आपले जे
नवस तूं करसील, त्या अवघ्यांचीं अर्पणें व तुझ्या
स्वबुद्धीचीं अर्पणें व तुझें ओवाळणीचें अर्पण तुझ्या
दरवाज्यांच्या आंत तूं खाऊं नये. १८ परंतु
तुझा देव परमेश्वर जें ठिकाण निवडून घेईल,
त्यांत तूं आपला देव परमेश्वर यासमोर तें खा;
आपला पुत्र व आपली कन्या व आपला चाकर
व आपली चाकरीण व आपल्या दरवाज्यांच्या
आंत जो लेवी त्यासुद्धां तूं खा; आणि आपल्या
ज्या कांहीं कार्यास तूं हात लावितोस त्यांत तूं
आपला देव परमेश्वर यासमोर आनंद कर.
१९ तूं आपल्याविषयीं संभाळ कीं आपल्या भूमी-
वर आपल्या सर्व दिवसांत लेव्याला सोडूं नको.
२० जेव्हां तुझा देव परमेश्वर तुला आपल्या
सांगितल्याप्रमाणें तुझी सीमा वाढवील, आणि "मी
मांस खाईन," असें तूं ह्मणसील, कारण कीं तुझ्या
जिवाला मांस खायाची इच्छा होईल, तेव्हां
तूं आपल्या जिवाच्या पूर्ण इच्छेप्रमाणें मांस खा.
२१ तुझा देव परमेश्वर आपलें नाम ठेवायास
जें ठिकाण निवडून घेईल, तें जर तुझ्यापासून दूर
असलें, तर तूं आपलीं गुरें व आपलीं बकरीं जीं
परमेश्वराने तुला दिल्हीं, त्यांतलें म्या तुला आ-
ज्ञा दिल्हेल्याप्रमाणें मारून आपल्या दरवाज्यांच्या
आंत आपल्या जिवाच्या पूर्ण इच्छेप्रमाणें खा. २२
जसें हरण व सांबर खाल्लें जातें, तसें देखील तें
खा; अशुद्ध व शुद्ध यानी एकसारिखें तें खावें.
२३ केवळ रक्त न खाण्याविषयीं तूं बळकट ऐस,
कारण कीं जें रक्त तोच जीव, तर मांसासंगतीं
जीव खाऊं नको; २४ तें खाऊं नको, पृथ्वीवर

पाण्यासारिखें तें ओतून टाक. २५ तुझें आणि
तुझ्यामागें तुझ्या संतानांचें बरें व्हावें ह्मणून तूं तें
खाऊं नको; तर परमेश्वराच्या दिसण्यांत जें
नीट तें कर. २६ जें ठिकाण परमेश्वर निवडून
घेईल तेथें जातांना ज्या तुझ्या पवित्र वस्तू तुझ्या-
जवळ असतील, आणि तुझ्या नवसाच्या त्या मात्र
तूं घेऊन जा. २७ आणि आपला देव परमे-
श्वर याच्या वेदीवर आपल्या होमपशूंचें मांस व
रक्त अर्पण कर, असें आपला देव परमेश्वर
याच्या वेदीवर आपल्या यज्ञपशूंचें रक्त ओतलें
जावें; मग तूं त्यांचें मांस खा. २८ ज्या आज्ञा
मी तुला सांगतों, त्या ह्या सर्व तूं ऐकून संभाळ,
ह्मणजे तुझा देव परमेश्वर याच्या दिसण्यांत जें
बरें व नीट तें जर करसील, तर तुझें व तुझ्यामागें
तुझ्या संतानांचें सर्वकाळ बरें होईल. २९ जि-
कडे ज्या राष्ट्रांचें वतन पावायास तूं जातोस, त्यांस
जेव्हां तुझा देव परमेश्वर तुझ्यापुढून छेदून टा-
कील, आणि तूं त्यांचें वतन घेऊन त्यांच्या देशांत
वस्ती करसील, ३० तेव्हां तूं आपल्याविषयीं
संभाळ, नाहीं तर तीं तुझ्यापुढून नाहींसीं झाल्या-
नंतर तूं त्यांच्या पाठीमागें फांसांत फससील, आणि
तूं त्यांच्या देवाविषयीं असा विचार करसील कीं,
'त्या राष्ट्रानी आपल्या देवांची सेवा कसी केली!
तर तसी मीहि करीन.' ३१ तूं आपला देव
परमेश्वर याजवळ तसें करूं नको, कारण कीं
परमेश्वराला चिळसकारी ज्याचा द्वेष तो करि-
तो, तें सर्व त्यानी आपल्या देवांजवळ केलें; त्या-
नी आपले पुत्र व आपल्या कन्या यांस देखील
आपल्या देवांजवळ अग्नींत जाळिलें. ३२ जी
कांहीं आज्ञा मी तुह्मास लावून देतों, तीच तुह्मी
संभाळून पाळा; तिला तूं अधिक करूं नको, आ-
णि तींतून काढूं नको.

## अध्याय १३.

जरी भविष्यवादी किंवा स्वप्न पाहणारा तुह्मा-
मध्यें उत्पन्न होऊन तुह्माजवळ खूण किंवा
चमत्कार सांगून ठेवितों, २ आणि जी खूण
किंवा जो चमत्कार तुला सांगतों, तो अशा अर्थानें
प्रत्ययास येतो कीं, "आपण दुसऱ्या देवांच्यामागें
लागून त्यांची सेवा करूं," जे तुला ठाऊक नाहींत
त्यांच्यामागें, ३ तरी त्या भविष्यवाद्याच्या किंवा त्या
स्वप्न पाहणाऱ्याच्या गोष्टीं तूं ऐकूं नको; कारण
कीं तुमचा देव परमेश्वर तुमची परीक्षा पाहतो,
असी कीं तुह्मी आपल्या सर्व हृदयानें व आपल्या
सर्व जिवानें आपला देव परमेश्वर यावर प्रीति
करीत आहां किंवा नाहीं हें जाणावें ह्मणून. ४
तुह्मी आपला देव परमेश्वर याला मानून चाला,
आणि त्याचें भय धरा; त्याच्या आज्ञाहि पाळा,
आणि त्याचा शब्द ऐका; त्याचीच सेवा करा,
त्यालाच लगटून राहा. ५ तो भविष्यवादी किं-
वा तो स्वप्न पाहणारा तर मारला जावा; कारण
कीं ज्यानें तुह्मास मिसरदेशांतून काढिलें, ह्मणजे
ज्यानें तुला दासांतून सोडविलें, तो तुमचा देव
परमेश्वर यावर त्यानें फितूर करायास सां-
गितला आहे; ह्मणजे ज्या मार्गांत तुझा देव पर-
मेश्वर यानें तुला चालायाची आज्ञा दिल्ही, त्यां-
तून तुला तो ढकलायास लागला आहे; तर तूं
आपल्यामधून तसें दुष्टपण नाहींसें कर. ६ ज-
री तुझ्या आईचा पुत्र असा तुझा भाऊ, किंवा
तुझा पुत्र, किंवा तुझी कन्या, किंवा तुझ्या उराजव-
ळची स्त्री, किंवा जो तुझ्या जिवासारिखा तुझा
मित्र तो तुला गुप्तपणें असी फूस लावितों कीं
"या, आपण जाऊन दुसऱ्या देवांची सेवा करूं;"
जे तुला व तुझ्या पूर्वजांस ठाऊक नव्हते त्यांची;
७ ह्मणजे तुमच्या चहुंकडे जे लोक जे तुझ्याजवळ
किंवा तुझ्यापासून दूर, जे पृथ्वीच्या एका सीमेपा-
सून पृथ्वीच्या दुसऱ्या शेवटापर्यंतहि त्यांच्या देवां-
तल्या कोणीएकाची; ८ तरी तूं त्याला मानूं
नको, त्याचें ऐकूंच नको; आणि तुझ्या लक्षांत
त्याविषयीं करुणा न यावी, तूं ममता करून वांच-
वूं नको, त्याला गुप्त ठेवूंच नको. ९ तर त्याला
जिवें मारच मार; त्याचा जीव घ्यायास पहिल्यानें
तुझा हात, आणि त्यानंतर सर्व लोकांचा हात
त्यावर पडावा. १० तूं त्याला धोंडमारहि असा
कर कीं त्यानें मरावें; कां तर ज्यानें तुला मिसर
देशांतून, ह्मणजे दासांतून काढिलें, तुझा देव पर-
मेश्वर याजवळून तो तुला ढकलायास झटलेला
आहे. ११ मग सर्व इस्राएलानी ऐकून भ्यावें,
आणि तुह्मामध्यें त्या दुष्ट गोष्टीप्रमाणें पुढें न
करावें.

१२ ज्यांत त्वां राहावें ह्मणून जीं नगरें तुझा
देव परमेश्वर तुला देतो, त्यांतल्या एखाद्यांत जर
तूं असें ऐकसील कीं, १३ माणसानी ह्मणजे
दुष्ट लोकानी तुझ्यामधून जाऊन आपल्या नगरांत-
ल्या राहणाऱ्यांस चेतवून ह्मटलें कीं, "या, आपण
जाऊन दुसऱ्या देवांची सेवा करूं," जे तुह्मास
ठाऊक नाहींत त्यांची; १४ तर तूं झाडा घेऊन
शोध कर, आणि चौकसीने पूस; मग जर ती
गोष्ट खरी व स्थापित झाली कीं ती दुष्टाई तुजम-
ध्यें झाली आहे; १५ तर तूं त्या नगरांतल्या
राहणाऱ्यांस तरवारीच्या घाताने मारच मार; त्या-
चा व त्यांतलें जे सर्व त्यांचा, त्यांतल्या पशूंचाहि
तरवारीच्या घाताने अति नाश कर. १६ आणि
त्यांतली सर्व लूट त्याच्या चव्हाट्यामध्यें आणून
गोळा कर. १७ आणि आपला देव परमेश्वर
यासाठीं त्यांतल्या सर्व लुटीसुद्धां त्या नगराला
अग्नि लावून अगदी जाळ; मग सर्वकाळ ढिगर
होवो, कधीं बांधलें न जावो. १८ आणि त्या
अतिनाशाचें कांहींच तुझ्या हाताला लागूं नये;
ह्मणजे परमेश्वर आपल्या रागाच्या तप्तपणापा-
सून फिरेल, आणि तुजवर ममता ठेवील; तुझी म-
मता करीलच आणि ज्याप्रमाणें त्याने तुझ्या पूर्वजां-
जवळ शपथ वाहिली, त्याप्रमाणें तुला वाढवील.
१९ केवळ तूं आपला देव परमेश्वर याचा शब्द
ऐकून त्याच्या ज्या आज्ञा मी आज तुला लावून
देतों त्या सर्व पाळ; ह्मणजे आपला देव परमे-
श्वर याच्या दिसण्यांत जें नीट तें कर.

## अध्याय १४.

तुह्मी आपला देव परमेश्वर याचीं लेंकरें आ-
हां; मेलेल्यामुळें फासण्या करून घेऊं नका,
आणि आपल्या दोही डोळ्यांच्या मध्यभागीं टकल
करूं नका. २ कारण कीं तूं आपला देव पर-
मेश्वर यासाठीं पवित्र लोक आहेस, आणि पर-
मेश्वराने तुला यासाठीं निवडून घेतलें कीं भूमी-
च्या पाठीवर जे सर्व लोक त्यांपेक्षां त्वां त्याचे खा-
समीचे लोक असें व्हावें. ३ तूं कांहीं ओंगळ
खाऊं नको. ४ जे पशू तुह्मी खावे ते हेच कीं,
गुरूं, मेंढरूं, व शेरडूं; ५ सांबर, व हरण, व भें-
कर, व रानशेरडूं, व दिशोन, व गवा, व डोंगरशेरडूं,
६ आणि ज्या कोणत्याहि पशूचा खूर विभागलेला
असतां त्याची चीर पार होऊन दोंन शकलें आ-
हेत, जो रवंथ करितो, पशूंमध्यें तसा तुह्मी खावा.
७ जे रवंथ करितात, आणि ज्यांचा खूर विभागून
चिरलेला, त्यांतलें हे मात्र तुह्मी खाऊं नका; उंट
व ससा व शाफान, कारण कीं ते रवंथ करीत अ-
सतांहि त्यांस विभागलेला खूर नाहीं; ते तुह्मास
अशुद्ध होवोत; ८ डुकरहि, कां तर त्याचा
खूर विभागलेला असतांहि तें रवंथ करीत नाहीं;
तें तुह्मास अशुद्ध; त्याचें कांहीं मांस तुह्मी खाऊं
नका, आणि त्यांच्या शवाला शिवूं नका. ९ जे
पाण्यांत त्या सर्वांतले हे तुह्मी खावें; ज्या कोणा-
ला पंख व खपल्या आहेत, तो तुह्मी खावा; १०
परंतु ज्या कोणाला पंख व खपल्या नाहींत, तो
तुह्मी खाऊं नका, तो तुह्मास अशुद्ध होवो. ११
सर्व शुद्ध पांखरें तुह्मी खावीं. १२ आणि जे
तुह्मी न खावे ते हेच; गरुड, व लोळवणारा गीड,
व मछामाऱ्या; १३ आणि गीध, व घार, व जा-
तिजातीचा खादाड पक्षी; १४ आणि जातीजा-
तीचे सर्व कावळे; १५ आणि घुबड, व गवळण,
व कोळिक, व जातिजातीची बहिरीं; १६ आणि
पिंगळे, व मानसुफ, व थिनमन; १७ आणि
पाणकोळी, व राहाम, व करडोंक; १८ आणि
बगळा, व जातिजातींचीं कर्कुचीं, व टिटवी, व पा-
कोळी; १९ आणि सर्व कळवळणारीं पांखरें,
तीं तुह्मास अशुद्ध, खायाचीं नाहींत. २० सर्व
शुद्ध पांखरें तुह्मी खावीं. २१ कांहीं आपाप
मेलेलें तुह्मी खाऊं नका; त्वां आपल्या दरवाज्या-
च्या आंत जो विदेशी त्याला तें द्यावें, आणि त्याने
तें खावें, किंवा त्वां परक्याला विकावें; तूं तर आ-
पला देव परमेश्वर यासाठीं पवित्र लोक ऐस;
करडूं त्याच्या आईच्या दुधांत सिजवूं नको.

२२ वर्षाच्या वर्षी तुझें शेत बिजाचें जें उत्पन्न
देतें, त्या अवघ्यांतून तूं दाहावा भाग काढून देत
जा. २३ आणि तुझा देव परमेश्वर आपल्या
नामाची वस्ती करायास जें ठिकाण निवडून घेईल,
तेथें त्याच्यासमोर तूं आपलें धान्य, आपला ताजा
द्राक्षारस, व आपलें तेल, यांचा दाहावा भाग
खा; आणि आपल्या गुरांपासून व आपल्या बक-
ऱ्यांपासून प्रथम झालेलीं हीं खा; यासाठीं कीं

त्वा आपला देव परमेश्वर याचें भय सर्वकाळ
धरायास शिकावें. २४ आणि जेव्हां ती वाट
तुजपासून असी लांब होईल कीं तुझा देव पर-
मेश्वर आपलें नाम ठेवायास जें ठिकाण निवडून
घेईल, तें तुजपासून दूर असल्यावरून तुझ्याने
तो भाग नेववणार नाहीं; कां तर तुझा देव पर-
मेश्वर तुला आशीर्वाद देईल. २५ तेव्हां तूं तो
पैक्यावर विकत देऊन, तो पैका बांधून आपल्या
हातीं घे, आणि तुझा देव परमेश्वर जें ठिकाण
निवडून घेईल, तिकडे जा. २६ मग ज्या कशावर
तुझ्या जिवाची इच्छा होईल, ह्मणजे गुराकर, किं-
वा बकऱ्यावर, किंवा द्राक्षारसावर, किंवा मद्यावर,
किंवा जें कांहीं तुझा जीव मागेल, त्यांवर तो पैका
दे; नंतर तेथें आपला देव परमेश्वर यासमोर
तूं आपल्या घरच्यासुद्धां खाऊन आनंद कर. २७
आणि तुझ्या दरवाज्यांचा आंत जो लेवी त्यासु-
द्धांहि कर, तूं त्याला सोडूं नको; कारण कीं त्याला
तुझ्यासंगतीं वांटा व वतन नाहीं. २८ तिसऱ्या
तिसऱ्या वर्षाच्या शेवटीं तूं त्या वर्षांत जें आपलें
उत्पन्न झालें असेल त्यांतून सर्व दाहावा भाग
काढून आपल्या दरवाज्यांत ठेवीत जा. २९ मग
लेव्याला तुझ्यासंगतीं वांटा व वतन नाहीं, यास्तव
त्याने आणि तुझ्या दरवाज्यांत जो प्रवासी व बाप-
हीन व विधवा, यानी येऊन खाऊन तृप्त व्हावें;
ह्मणजे तूं आपल्या हाताने जें काम करितोस, त्या
अवघ्यांत तुझा देव परमेश्वर तुला आशीर्वाद
देईल

## अध्याय १५.

सात सात वर्षांच्या शेवटीं तूं सुटका कर.
२ आणि त्या सुटकेचा हा प्रकार असा अ-
सावा कीं, कोणी सावकाराने आपल्या हाताने आप-
ल्या शेजाऱ्याला जें कर्ज दिल्हें तें सोडावें; आपल्या
शेजाऱ्याजवळून अथवा आपल्या भावाजवळून न
उगवावें, कारण कीं ती परमेश्वरासाठीं सुटका
सांगितली आहे. ३ त्वां परक्याजवळून उगवावें,
परंतु तुझ्या भावाकडे जें तुझें असेल, तें आपल्या
हाताने सोडून द्यावें. ४ अगदीं सोडावें, कारण
कीं तुझ्यामध्यें कोणी दरिद्री नसावा; कां तर तुझा
देव परमेश्वर तुला जो देश वतन करून ठेवावा-
स देतो, त्यांत परमेश्वर तुला आशीर्वाद देईलच
देईल. ५ केवळ जर तूं आपला देव परमेश्वर
याची गोष्ट ऐकसीलच ऐकसील; ह्मणजे ज्या सर्व
आज्ञा, ज्या मी आज तुला लावून देतों त्या सं-
भाळून पाळसील, तर देईल. ६ कारण कीं तुझा
देव परमेश्वर जसें त्याने तुला सांगितलें, तसा
तुला आशीर्वाद देतो; यास्तव तूं बहुत राष्ट्रांस
उसणें देसील परंतु तूं उसणें घेणार नाहींस, आणि
बहुत राष्ट्रांवर अधिकार करसील परंतु तीं तुजवर
अधिकार करणार नाहींत.

७ जो देश तुझा देव परमेश्वर तुला देतो,
त्यांत तुझ्या एखाद्या दरवाज्याच्या आंत तुझा ए-
खादा भाऊ तुझ्यामध्यें जर दरिद्री होईल, तर तूं
आपलें हृदय कठीण करूं नको, आणि आपल्या
दरिद्री भावापासून आपला हात आखडूं नको. ८
तूं आपला हात मोकळा करूनच त्याला दे, आणि
जसी त्याला गरज लागेल तितकें त्याला उसणें
देऊन त्याची गरज कर. ९ तूं आपल्याविषयीं
संभाळ, नाहीं तर तुझ्या दुष्टाईकारक अंतःकरणां-
सीं असे ह्मणणें होईल कीं, “सातवें वर्ष, सुटकेचें
वर्ष जवळ आलें;” आणि तुझ्या दरिद्री भावावर
तुझी दृष्टि असी दुष्ट होईल कीं तूं त्याला न देसील
मग तो तुजविषयीं परमेश्वराची प्रार्थना करील,
आणि तुला पाप लागेल. १० तूं त्याला देच दे,
आणि जेव्हां त्याला देतोस, तेव्हां तुझें हृदय दुः-
खित होऊं नये; कां कीं त्या गोष्टीवरून तुझा देव
परमेश्वर तुझ्या सर्व कामांत व ज्या कशाला तूं
आपला हात लावितोस त्यांत तुला आशीर्वाद दे-
ईल. ११ दरिद्री तर देशांतून सरणार नाहींत;
यास्तव मी तुला असी आज्ञा देतों कीं, तूं आप-
ल्या देशांत आपला भाऊ, आपला लाचार व आ-
पला दरिद्री, याला आपला हात मोकळा करू-
नच दे.

१२ जर तुझा भाऊ इब्री, किंवा इब्रीण तुला
विकली जाती, तर तशाने तुझी चाकरी साहा वर्षे
करावी; मग सातव्या वर्षी, तूं त्याला मोकळें क-
रून आपल्याजवळून सोड. १३ आणि जेव्हां
तूं त्याला मोकळें करून आपल्याजवळून सोडितोस,
तेव्हां त्याला रिकामा जाऊं देऊं नको. १४ आ-
पल्या कळपांतून व आपल्या खळ्यांतून व आपल्या

द्राक्षारसाच्या कुंडांतून त्याला लादून देच दे;
त्याविषयीं तुझा देव परमेश्वर याने तुला आशी-
र्वाद दिल्हा, त्यांतून त्याला दे. १५ आणि ही
आठवण कर कीं तूं मिसर देशांत चाकर होतास,
परंतु तुझा देव परमेश्वर याने तुला सोडविलें;
यास्तव मी आज ही आज्ञा तुला लावून देतों. १६
परंतु तुजवर व तुझ्या घरच्यांवर त्याची प्रीति अ-
सल्यामुळें आणि तुझ्याजवळ त्याचें बरें झाल्या-
मुळें तो जर ह्मणेल कीं, मी तुझ्याजवळून जा-
णार नाहीं. १७ तर असें व्हावें कीं तूं आरि
घेऊन त्याचा कान दाराबर टोंच, मग तो सर्व-
काळ तुझा चाकर व्हावा; आणि त्वां आपल्या
चाकरिणीसींहि असें करावें. १८ जेव्हां तूं त्या-
ला मोकळें करून आपल्याजवळून सोडितोस,
तेव्हां तुझ्या लक्षांत कठीण वाटूं नये; कां तर
त्याने मजुरदाराच्या मजूरीपेक्षां दुप्पट चाकरी तु-
झ्याजवळ साहा वर्षें केली आहे; अशाने जें अव-
घें तूं करसील, त्याविषयीं तुझा देव परमेश्वर
तुला आशीर्वाद देईल.

१९ तुझ्या गुरांमध्यें व तुझ्या बकऱ्यांमध्यें जे
प्रथम जन्मलेले नर, त्या सर्वांस तूं आपला देव
परमेश्वर यासाठीं पवित्र कर; तूं आपल्या गुरां-
च्या प्रथम जन्मलेल्याला कामांत लावूं नको, आ-
णि आपल्या बकऱ्यांतल्या प्रथम जन्मलेल्याला का-
तरूं नको. २० तूं आपल्या घरच्यासुद्धां आ-
पला देव परमेश्वर यासमोर, ह्मणजे परमे-
श्वर जें ठिकाण निवडून घेईल तेथें वर्षोवर्ष तो
खा. २१ परंतु त्याला खोड, लंगडेपण, किंवा
आंधळेपण, किंवा कोणतीहि वाईट खोड जर अस-
ली, तर आपला देव परमेश्वर याला तो अर्पूं
नको. २२ आपल्या दरवाज्यांच्या आंत त्याला
खा; अशुद्धाने व शुद्धाने एकसारिखें खावें, जसें
हरण व जसें सांबर तसें. २३ तूं त्याचें रक्त
मात्र खाऊं नको; तें पाण्यासारिखें भूमीवर ओत.

## अध्याय १६.

तूं आबीब महिना संभाळून आपला देव परमे-
श्वर यासाठीं वल्हांडण सण पाळ, कां तर
आबीब महिन्यांत रात्रीं तुझा देव परमेश्वर
याने तुला मिसरांतून काढिलें. २ आणि परमे-
श्वर आपल्या नामाची वस्ती करायास जें ठिकाण
निवडून घेईल, तेथें तूं आपला देव परमेश्वर या
जवळ वल्हांडण सणांत बकऱ्याचा व गुराचा यज्ञ
कर. ३ त्याच्यासंगतीं खमीर खाऊं नको; तूं
घाईने मिसर देशांतून निघालास, यास्तव सात
दिवस त्यासंगतीं दुःखाच्या बेखमीर भाकरी खा;
यासाठीं कीं ज्या दिवसीं तूं मिसर देशांतून निघा-
लास, तो त्वां आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत
आठवावा. ४ आणि तुझ्याजवळ तुझ्या संपूर्ण
सीमेच्या आंत सात दिवस खमीर न दिसावें;
आणि जें मांस तूं पहिल्या दिवसीं संध्याकाळीं
यज्ञांत अर्पिसील, त्यांतलें कांहीं सकाळपर्यंत न
राहावें. ५ जे दरवाजे तुझा देव परमेश्वर तुला
देतो, त्यांतल्या कोणत्याहि दरवाज्याच्या आंत
वल्हांडणाचा यज्ञ करायास तुला अधिकार नाहीं.
६ परंतु तुझा देव परमेश्वर आपल्या नामाची
वस्ती करायास जें ठिकाण निवडून घेईल, तेथें सं-
ध्याकाळीं सूर्य मावळतांना, ह्मणजे तूं मिसरांतून
निघालास त्या नेमलेल्या काळीं वल्हांडण सणाचा
यज्ञ कर. ७ आणि जें ठिकाण तुझा देव परमे-
श्वर निवडून घेईल, तेथें भाजून खा; मग सका-
ळीं तूं माघारा फिरून आपल्या राहोट्यांस जा.
८ तूं साहा दिवस बेखमीर भाकरी खा, मग सा-
तव्या दिवसीं तुझा देव परमेश्वर यासाठीं सभा
व्हावी; तूं काम करूं नको.

९ तूं आपल्यासाठीं सात सातरीं मोज; पि-
काला विळा लागल्यापासून सात सातरीं मोजाया-
ला लाग. १० मग आपला देव परमेश्वर
यासाठीं सातऱ्यांचा सण पाळ, जें तूं देसील, तो
स्वइच्छेचा, तुझ्या हाताचा कर असा व्हावा; ज-
सा तुझा देव परमेश्वर तुला आशीर्वाद देईल
तसा व्हावा. ११ आणि जें ठिकाण तुझा देव
परमेश्वर आपल्या नामाची वस्ती करायाला नि-
वडून घेईल, तेथें आपला देव परमेश्वर यास-
मोर आपला पुत्र, व आपली कन्या, व आपला
चाकर, व आपली चाकरीण, व आपल्या दरवा-
ज्यांत जो लेवी, व प्रवासी, व बापहीन, व विधवा
असीं जीं तुझ्यामध्यें असतील, त्यांसुद्धां तूं आनंद
कर. १२ आणि तूं मिसरांत चाकर होतास, ही
आठवण करून हे नेम संभाळून पाळ. १३ त्वां

आपल्या खळ्यांतून व आपल्या द्राक्षारसाच्या कुंडां-
तून संग्रह केल्यावर तूं आपल्यासाठीं मंडपाचा
सण सात दिवस पाळ. १४ आणि आपला पुत्र,
व आपली कन्या, व आपला चाकर व आपली
चाकरीण, व लेवी, व प्रवासी, व बापहीन, व वि-
धवा, असीं जीं तुझ्या दरवाज्यांच्या आंत अस-
तील, त्यांसुद्धां तूं आपल्या सणांत आनंद कर.
१५ जें ठिकाण **परमेश्वर** निवडून घेईल, तेथें
आपला देव **परमेश्वर** यासाठीं सात दिवस सण
पाळ; कारण कीं तुझ्या सर्व उत्पन्नाविषयीं व तु-
झ्या हातांच्या सर्व कामाविषयीं तुझा देव **परमे-
श्वर** तुला आशीर्वाद देईल; तर तूं केवळ आ-
नंदित हो. १६ बेखमीर भाकरींच्या सणांत, व
सातऱ्यांच्या सणांत, व मंडपांच्या सणांत, असें
वर्षांत तीन वेळां, तुझ्या सर्व पुरुषानी तुझा देव
**परमेश्वर** यासमोर, ह्मणजे जें ठिकाण तो निवडून
घेईल तेथें दर्शनास यावें; आणि **परमेश्वराच्या**-
समोर रितें न यावें. १७ जसा तुझा देव **परमे-
श्वर** याने तुला आशीर्वाद दिल्हा असेल, तसें
प्रत्येकाने आपल्या दानशक्तीप्रमाणें घेऊन यावें.

१८ जे दरवाजे तुझा देव **परमेश्वर** तुला
देतो, त्या सर्वांत तूं आपल्या प्रतिवंशीं आपल्या-
साठीं न्यायाधीश व कारभारी करून ठेव; मग
त्यानी यथार्थ न्यायाने लोकांचा निवाडा करावा.
१९ तूं न्याय फिरवूं नको, पक्षपात धरूं नको,
आणि लांच घेऊं नको; कां तर ती लांच ज्ञान्यां-
चे डोळे अंधळे करिती, आणि नीतिवंताच्या गो-
ष्टी विपरीत करिती. २० त्वां जगावें, आणि जो
देश तुझा देव **परमेश्वर** तुला देतो तो वतनरूपें
ठेवावा, ह्मणून तूं नीतीच्याच नीतीची पाठ पुरीव.
२१ तूं आपल्यासाठीं आपला देव **परमेश्वर** या-
ची जी वेदी बांधसील, तिच्याजवळ कोणतेंहि
झाड लावून आपल्यासाठीं भजनवन करूं नको.
२२ आणि मूर्त्ति जिचा द्वेष तुझा देव **परमेश्वर**
करितो, ती आपल्यासाठीं मांडूं नको."

### अध्याय १७.

गुरूं किंवा बकरें ज्याला खोड, ह्मणजे कोणती-
हि वाईट गोष्ट असेल, तें तूं आपला देव
**परमेश्वर** याला अर्पूं नको; कारण कीं त्याची
तुझा देव **परमेश्वर** याला चिळस आहे. २ जे
दरवाजे तुझा देव **परमेश्वर** तुला देतो, त्यांतल्या
एखाद्यांत तुझ्यामध्यें जर असा पुरुष किंवा स्त्री
सांपडेल कीं त्याने तुझा देव **परमेश्वर** याचा करार
उल्लंघून त्याच्या दिसण्यांत वाईट केलें. ३ असें कीं
त्याने जाऊन ज्यांविषयीं म्या मना केलें, अशा अ-
न्य देवांची सेवा केली किंवा त्यांस नमस्कार केला,
अथवा सूर्याला किंवा चंद्राला किंवा आकाशांतल्या
समुदायाच्या कोणत्यालाहि केला; ४ असें ऐकून
तुला कळूं येतें, तर तूं पक्केपणाने शोध कर, आणि
पाहा, जर ती गोष्ट खरी आहे आणि असें स्थापित
होतें कीं इस्राएलांत तसी दुष्टाई झाली आहे; ५
तर ज्यानी ती वाईट गोष्ट केली, त्या पुरुषाला किंवा
त्या स्त्रीला तूं आपल्या दरवाज्यांतून बाहेर काढ,
आणि तो पुरुष किंवा ती स्त्री असीं माणसें मर-
तील, एवढा धोंडमार त्यांस कर. ६ जो मरायाचा
तो दोघे साक्षीदार किंवा तिघे साक्षीदार यांच्या
सांगण्यावरून मारला जावा; एका साक्षीदाराच्या
सांगण्यावरून मारला न जावा. ७ त्याला मा-
रायास पहिल्याने साक्षीदारांचा हात त्यावर पडा-
वा, आणि नंतर सर्व लोकांचा हात पडावा; असी
तूं आपल्यामधून ती दुष्टाई नाहींसी कर. ८ तुझ्या
दरवाज्यांत भांडणाच्या गोष्टी होऊन रक्तासीं रक्त,
वादासीं वाद, व फटक्यासीं फटका, यांमध्यें न्याय
करण्याविषयीं जर तुझ्या शक्तीपेक्षां गोष्ट अवघड
पडेल, तर तूं उठून जें ठिकाण तुझा देव **परमे-
श्वर** निवडून घेईल, तेथें जा. ९ आणि याजक
लेवी यांजवळ व जो न्यायाधीश त्या दिवसांत
होईल, त्याजपळ जाऊन विचार; मग ते तुला
न्यायाची गोष्ट सांगतील. १० तेव्हां जें ठिकाण
**परमेश्वर** निवडून घेईल, तेथें जो निवाडा ते तुला
सांगतील, त्याच्या अर्थाप्रमाणें तूं कर; ते तुला जें
दाखवितील, त्या अवघ्याप्रमाणें तूं संभाळून कर.
११ जें शास्त्र ते तुला दाखवितील, त्याच्या अर्था-
प्रमाणें, आणि जो न्याय ते तुला सांगतील त्या-
प्रमाणें तूं कर; ह्मणजे जो निवाडा ते तुला कळ-
वितील, त्यांतून उजव्याकडे किंवा डाव्याकडे वळूं
नको. १२ आणि जो याजक तुझा देव **परमेश्वर**
याच्या नामाची सेवा करायास उभा राहतो त्याचे
किंवा जो न्यायाधीश त्याचें न ऐकून जो माणूस

उन्मत्तपणाने वर्त्तणूक करितो, तो माणूस मरावाच ;
असी तूं इस्राएलांतून ती दुष्टाई नाहींसी कर. १३
मग सर्व लोकांनी ऐकून भ्यावें, आणि तेव्हांपासून
उन्मत्तता न करावी.
१४ जो देश तुझा देव **परमेश्वर** तुला देतो,
तेथें जेव्हां तूं पोहंचसील, आणि तो वतनरूपें घेऊन
त्यांत राहसील, आणि ह्मणसील कीं, “मी आपल्या
चहुंकडल्या सर्व राष्ट्रांप्रमाणें आपल्यावर राजा क-
रून ठेवीन.” १५ तेव्हां ज्याला तुझा देव **पर-
मेश्वर** निवडील, त्याला मात्र तूं आपल्यावर रा-
जा करून ठेव ; जो तुझ्या भावांतला त्याला आ-
पल्यावर राजा करून ठेव; जो परका तुझा भाऊ
नाहीं, तसा माणूस तूं आपल्यावर ठेवूं नये. १६
केवळ त्या राजानें आपल्याजवळ घोडे फार ठेवूं
नये; ह्मणजे घोडे फार झाल्यावरून लोकांला मि-
सरांत माघारें न लावावें; कारण **परमेश्वराने**
तुह्मास सांगितलें आहे कीं, “तुह्मी यापुढें त्या वा-
टेनें परत जाऊं नये.” १७ आणि त्यानें आपल्या-
ला बायका फार करूं नये ; केल्या, तर त्याचें अं-
तःकरण कुमार्गी फिरेल ; रुपें व सोनेंहि त्यानें
आपल्याजवळ फार सांठवूं नये. १८ आणि असें
व्हावें कीं त्यानें आपल्या राज्याच्या आसनावर
बसतांना आपल्यासाठीं या शास्त्राची प्रत याजक
लेवी यांपुढून वहीवर लिहून घ्यावी. १९ आणि
ती त्याच्याजवळ असावी, ह्मणजे त्यानें ती आ-
पल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत वाचीत जावी ;
यासाठीं कीं त्यानें आपला देव **परमेश्वर** याला
भिऊन या शास्त्रांतल्या सर्व गोष्टी, आणि हे नेम
संभाळून पाळायास शिकावें ; २० ह्मणजे त्या-
चें मन त्याच्या भावांपेक्षां उंचावलें न जावें, आणि
त्यानें आज्ञेतून उजव्याकडे किंवा डाव्याकडे न फि-
रावें; अशानें तो व त्याचीं संतानें इस्राएलामध्यें
आपल्या राज्यावर बहुत आयुष्य पावतील.

## अध्याय १८.

याजक, लेवी, आणि सर्व लेवीचा वंश यांचा
इस्राएलासंगतीं वांटा व वतन न व्हावें ;
**परमेश्वराचे** होम जे त्याचे विभाग ते त्यांनी
खावे. २ परंतु त्याच्या भावांमध्यें त्याचें वतन
व्हावयाचें नाहीं ; **परमेश्वरानें** जसें त्याला सां-
गितलें, तसा तोच त्याचें वतन आहे. ३ आणि
लोकांकडली, ह्मणजे यज्ञ करविणाऱ्यांकडली या-
जकांची असी कानू व्हावी कीं जर गुरूं किंवा
बकरें कोणी वाहतो, तर त्यानें याजकाला पायखां-
दा व गालफडें व कोथळा द्यावा. ४ तूं आपल्या
धान्यांतलें, आपल्या ताज्या द्राक्षारसांतलें व आ-
पल्या तेलांतलें प्रथम उत्पन्न, आणि आपल्या बक-
ऱ्याची पहिल्यानें कातरलेली लोंकर त्याला दे.
५ कारण कीं तुझा देव **परमेश्वर** यानें त्याला
**परमेश्वराच्या** नामानें उभें राहून सेवा करायास
तुझ्या सर्व वंशांतून निवडून घेतलें आहे ; त्याला
व त्याच्या संतानांस सर्वकाळ घेतलें. ६ आणि
जेथें लेवी प्रवास करितो, त्या सर्व इस्राएलांतल्या
तुझ्या एका दरवाज्यांतून जेव्हां तो येईल, ह्मणजे
जें ठिकाण **परमेश्वर** निवडून घेईल, तेथें आप-
ल्या जिवाच्या पूर्ण इच्छेनें येईल ; ७ आणि
त्याचे सर्व भाऊ लेवी तेथें **परमेश्वराच्या** समोर
जसे उभे राहतात, तसा तो आपला देव **परमे-
श्वर** याच्या नामानें सेवा करील. ८ तेव्हां पूर्व-
जांकडल्यांची त्याची जी विक्री तिजखेरीज वां-
ट्यासारिखा वांटा त्यांनी खावा.
९ जो देश तुझा देव **परमेश्वर** तुला देतो,
तेथें जेव्हां तूं पोहंचसील, तेव्हां त्या राष्ट्रांच्या
ओंगळपणाप्रमाणें करायाला शिकूं नको. १० असा
तुह्मामध्यें कोणी नसावा, जो आपल्या पुत्राला
किंवा आपल्या कन्येला अग्नींत घालून काढितो, जो
ठोक्यांनी जोसीपण करितो, जो अभाळ पाहून भा-
कितो, किंवा गारुडी, किंवा चेटकी; ११ किंवा
गुंडाई करणारा, किंवा जो भूतसंचाऱ्याला पुसतो,
किंवा जादुकरी, किंवा मेलेल्याजवळ जो विचारितो;
१२ कारण कीं जो तसीं करितो, त्या प्रत्येकाची
**परमेश्वराला** चिळस आहे, आणि अशा ओं-
गळपणामुळें तुझा देव **परमेश्वर** त्यांस तुझ्या-
पुढून वतनांतून घालवितो. १३ तूं आपला देव
**परमेश्वर** याजवळ परिपूर्ण ऐस. १४ कां तर
तीं राष्ट्रें ज्यांचें वतन तूं घेतोस, त्यांनी अभाळ
पाहणाऱ्यांचें व ठोकताळ्यांचें ऐकिलें, परंतु तूं ऐकूं
नको ; तुझा देव **परमेश्वर** तुला तसें करूं देत
नाहीं. १५ तुझ्यांतून ह्मणजे तुझ्या भावांतून म-
जसारिख्या भविष्यवाद्याला तुझा देव **परमेश्वर**

तुजसाठीं उत्पन्न करील, त्याचें तुह्मी ऐका. १६
होरेबांत मंडळीच्या दिवशीं, त्वां आपला देव पर-
मेश्वर याजवळ जें मागितलें, त्या अवघ्याप्रमाणें
होईल ; तूं असें बोललास कीं, "म्या आपला देव
परमेश्वर याचा शब्द अणखी न ऐकावा, आ-
णि हा मोठा अग्नि फिरून न पाहावा, नाहीं तर
मला मरण येईल." १७ तेव्हां परमेश्वर मज-
सीं बोलला, "जें त्यानी ह्मटलें त्यांत बरें केलें ;
१८ मी त्यांच्या भावांमधून तुझ्यासारिखा भवि-
ष्यवादी त्यांच्यासाठीं उत्पन्न करीन, आणि मी आ-
पल्या गोष्टी त्याच्या तोंडीं घालीन ; नंतर जें मी
त्याला आज्ञेने सांगेन, तें अवघें तो त्यांस सांगेल.
१९ मग असें होईल कीं तो ज्या गोष्टी माझ्या
नामाने सांगेल, त्या जर कोणी न ऐकेल तर त्या-
जवळ मी झाडा घेईन. २० परंतु जर कोणी भ-
विष्यवादी धट्टाई करून जी गोष्ट बोलायास म्या
त्याला आज्ञा दिल्ही नाहीं, ती माझ्या नामाने बो-
लेल, किंवा जर तो दुसऱ्या देवांच्या नामाने बो-
लेल तर तो भविष्यवादी मरावाच." २१ आणि
जर तूं आपल्या मनांत ह्मणसील कीं, "जी गोष्ट
परमेश्वराने सांगितली नाहीं ती आह्मास कसी
कळेल?" २२ तर जेव्हां भविष्यवादी परमेश्वरा-
च्या नामाने बोलेल, आणि ती गोष्ट घडत नसतां
प्रत्ययास येतच नाहीं, तेव्हां जी गोष्ट परमे-
श्वराने सांगितली नाहीं ती तीच; त्या भविष्यवा-
द्याने धट्टाई करून ती सांगितली आहे, त्याला तूं
भिऊं नको.

## अध्याय १९.

तुझा देव परमेश्वर तुला ज्यांचा देश देतो,
त्या राष्ट्रांचा विनाश जेव्हां तुझा देव पर-
मेश्वर करील, आणि तूं त्यांचें वतन घेऊन त्यां-
च्या नगरांत व त्यांच्या घरांत वस्ती करसील; २
तेव्हां तुझा देव परमेश्वर तुला जो देश वतना-
साठीं देतो, त्या आपल्या देशांत तूं आपल्यासाठीं
तीन नगरें वेगळीं ठेव. ३ तुझा देव परमेश्वर
तुला जो देश वतन करून देईल, त्याच्या विस्ता-
राचे तूं तीन विभाग करून आपल्यासाठीं मार्ग
सिद्ध कर; आणि असें व्हावें कीं ज्याने घात केला
त्या प्रत्येकाने तेथें पळून जावें. ४ आणि ज्या
घातक्याने तेथें पळून जाऊन जगावें, त्याची गोष्ट
असी कीं जो न जाणतांना आपल्या शेजाऱ्याला
मारितो, आणि आपण पूर्वकाळीं त्याचा द्वेष करीत
नव्हता ; ५ अथवा जर कोणी लांकडें कापायास
आपल्या शेजाऱ्यासंगतीं झाडींत जातो, आणि ला-
कूड तोडायास आपल्या हाताने कुऱ्हाड मारितां-
ना लोखंड दांड्यांतून निसटून आपल्या शेजाऱ्या-
ला लागून तो मरतो, तर तह्याने त्यांतल्या एका
नगरांत पळून जाऊन जगावें. ६ नाहीं तर
रक्तपाताच्या फेडकऱ्याचें मन संतापलें असतां,
तो घातक्याच्या पाठीं लागेल, आणि मार्ग लांब
असल्यावरून त्याला आटोपून जिवें मारील ;
तथापि तो मरणास योग्य नव्हता, कारण कीं
त्याने पूर्वकाळीं त्याचा द्वेष केला नव्हता. ७
यास्तव मी तुला असी आज्ञा देतों कीं, तूं आप-
ल्यासाठीं तीन नगरें वेगळीं ठेव. ८ आणि जर
तुझा देव परमेश्वर असी त्याने तुझ्या पूर्वजांज-
वळ शपथ वाहिली, तसी तुझी सीमा वाढवील,
आणि त्याने तुझ्या पूर्वजांजवळ ज्या देशाविषयीं
देण्याचें वचन दिल्हें तो सर्व तुला देईल ; ९
जर तुझा देव परमेश्वर यावर प्रीति करून
व त्याच्या मार्गांत चालून ह्या सर्व आज्ञा ज्या
मी आज लावून देतों त्या अवघ्या तूं संभा-
ळून पाळसील, तर तूं त्या तीन नगरांवर अणखी
तीन आपल्यासाठीं वाढीव. १० यासाठीं कीं
तुझा देव परमेश्वर तुला जो देश धनरूपें देतो,
त्यांमध्यें निर्दोष्याचें रक्त पाडलें न जावें, आणि तु-
जवर रक्तपाताचा दोष न यावा. ११ परंतु जर
कोणी आपल्या शेजाऱ्याचा द्वेष करून त्यावर टप-
तो, आणि त्यावर उठून त्याला असें मारितो कीं
जीव जातो, मग त्यांतल्या एका नगरांत पळून जा-
तो, १२ तर त्याच्या नगरांतल्या वडिलानी पा-
ठवून त्याला तेथून आणावें, आणि तो मरावा
ह्मणून रक्तपाताचा फेडकरी याच्या हातीं द्यावा.
१३ तुझ्या दृष्टीची ममता त्यावर न व्हावी, परंतु
तूं आपल्या बऱ्यासाठीं इस्राएलांतून निर्दोष्याचा
रक्तपात नाहींसा कर.

१४ तुझा देव परमेश्वर तुला जो देश वत-
नासाठीं देतो, त्यांत तूं जें भूधन पावसील, त्याम-
ध्यें तुझ्या शेजाऱ्याची जी हद्द पूर्वींच्या पुरुषानी

लाविली, ती ढळवूं नको· १५ माणूस जें कांहीं
पाप करितो, त्यांतल्या कोणत्याहि अन्यायाविषयीं,
किंवा कोणत्याहि दोषाविषयीं, एका साक्षीदाराने
त्यावर उठूं नये; दोघां साक्षीदारांच्या तोंडाने किं-
वा तिघां साक्षीदारांच्या तोंडाने कांहीं गोष्ट स्थाप-
ली जावी. १६ जर खोटा साक्षीदार माणसा-
कडे वावगें कर्म लावायास त्यावर उठतो· १७
तर ज्या माणसांचा वाद आहे, त्या दोघानी पर-
मेश्वरासमोर, आणि जे याजक व न्यायाधीश त्या
दिवसांत असतील, त्यांसमोर उभें राहावें; १८
नंतर न्यायाधीशानी पक्का शोध करावा; आणि
पाहा, जर खोट्या साक्षीदाराने आपल्या भावावर
खोटी साक्ष दिल्ही आहे, १९ तर जसें त्याने
आपल्या भावाचें करायाला योजिलें होतें, तसें
तुह्मी त्याचें करा; असी तूं आपल्यामधून ती दु-
ष्टाई नाहींसी कर. २० मग वरकडानी ऐकून
भ्यावें, आणि पुढें तुझ्यामध्यें तशा वाईट गोष्टी-
प्रमाणें अणखी न करावें· २१ आणि तुझ्या
दृष्टीची ममता न व्हावी; जिवामुळें जीव, डो-
ळ्यामुळें डोळा, दांतामुळें दांत, हातामुळें हात,
पायामुळें पाय जावा·

## अध्याय २०.

जेव्हां तूं आपल्या शत्रूंसीं लढायाला जासील,
आणि घोडे व रथ व आपल्यापेक्षां मोठे
लोक पाहसील, तेव्हां त्यांस भिऊं नको; कारण
कीं तुझा देव परमेश्वर ज्याने तुला मिसर देशां-
तून वर आणिलें, तो तुजसीं अनुकूळ होईल. २
आणि तुह्मी लढायाला जवळ आलां असतांना
असें व्हावें कीं याजकाने जवळ येऊन लोकांसीं
बोलावें. ३ आणि त्यांस ह्मणावें, "हे इस्राएला,
ऐक; तुह्मी आज आपल्या शत्रूंवर लढायाला ज-
वळ आलां; तुमचें मन कोंवळें न व्हावें तुह्मी
भिऊं नका, आणि घाबरूं नका, आणि त्यांच्यापुढें
थरथरूं नका; ४ कारण कीं तुमचा देव परमे-
श्वर तो तुमच्यासाठीं तुमच्या शत्रूंसीं लढायाला
आणि तुह्मास तारायाला तुमच्यासंगतीं येईल."
५ आणि अधिपतीनी लोकांला असें ह्मणावें कीं,
ज्या माणसाने नवें घर बांधून त्याचा संस्कार के-
ला नाहीं, तसा कोण आहे? त्याने माघारें आप-
ल्या घरास जावें; नाहीं तर तो लढाईंत मेल्यास,
दुसरा माणूस त्या घराचा संस्कार करील· ६ आणि
ज्याने द्राक्षमळा लावून त्याचा मुळचा उपभोग
घेतला नाहीं, तसा माणूस कोण आहे? त्याने मा-
घारें आपल्या घरास जावें; नाहीं तर तो लढा-
ईंत मेल्यास, दुसरा माणूस त्या मळ्याचा मुळचा
उपभोग घेईल; आणि ज्याने स्त्रीला मागणी
घालून ती करून घेतली नाहीं, तसा माणूस कोण
आहे? ७ त्याने माघारें आपल्या घरास जावें;
नाहीं तर तो लढाईंत मेल्यास, दुसरा माणूस
तिला करून घेईल." ८ आणि अधिपतीनी लो-
कांला अणखी बोलतांना ह्मणावें, "जो माणूस म-
नाचा कोंवळा असल्याने भितो, तसा कोण आहे
त्याने माघारें आपल्या घरास जावें, नाहीं तर
त्याच्या मनासारिखें त्याच्या भावांचें मन विरेल."
९ मग अधिपतीनी लोकांसीं बोलणें समाप्त केल्या-
वर असें व्हावें कीं त्याने लोकांच्या शिरावर सै-
न्यांचे सरदार नेमून ठेवावे.

१० जेव्हां तूं नगरासीं लढायाला त्याच्याज-
वळ जासील, तेव्हां त्यासीं समेट करण्याची हा-
काटी कर· ११ मग जर असें होईल कीं त्यांत-
लें तुला समेटाचें उत्तर येऊन तुजसाठीं तें उघ-
डलें जातें, तर असें व्हावें कीं त्यांत जे लोक सां-
पडतात, त्या सर्वांनी तुजसीं कारभाराचे होऊन
तुझी चाकरी करावी. १२ परंतु जर तें तुझ्या-
जवळ समेट न करून तुजसीं लढाई करील, तर
तूं त्याला वेढा घाल· १३ आणि तुझा देव पर-
मेश्वर तें तुझ्या हातीं देईल, तेव्हां तूं त्यांतले
सर्व पुरुष तरवारीच्या धारेने मार. १४ परंतु
स्त्रिया व बाळकें व पशु आणि नगरांत जें कांहीं
असेल, ह्मणजे त्यांतली सर्व लूटवस्तु तूं आपल्या-
साठीं घे; असीं तुझा देव परमेश्वर याने तुझ्या
शत्रूंची जी जी लूटवस्तु तुला दिल्हेली होईल,
तिचा उपभोग घे· १५ जीं नगरें तुजपासून फार
दूर, ह्मणजे जीं या राष्ट्रांच्या नगरांतलीं नाहींत,
त्यांचें तूं तसें कर· १६ तुझा देव परमेश्वर
तुला या लोकांचीं जीं नगरें वतन करून देतो,
त्यांतल्या मात्र कोणत्याहि श्वासवानाला वांचवूं
नको· १७ तर ज्याप्रमाणें तुझा देव परमेश्वर
याने तुला आज्ञा दिल्ही त्याप्रमाणें हित्ती व अ-

मोरी, खनानी व परिज्झी, हिव्वी व यबूसी यांचा
अगदी विनाश कर. १८ यासाठीं कीं त्यांनी
आपल्या देवांजवळ जीं आपलीं ओंगळपणें केलीं,
त्या अवध्यांप्रमाणें तुह्मास करायाला न शिकवावें;
शिकलें,तर तुमचा देव **परमेश्वर** याजवळ तुह्मा-
स पाप घडेल. १९ जेव्हां तूं नगराला धरायास
त्यासीं लढतांना त्याला बहुत दिवस वेढा घाल-
सील, तेव्हां त्याच्या झाडांवर कुऱ्हाड चालवून
त्यांचा नाश करूं नको; कारण कीं त्यावरलें त्वां
खावें, तर तीं तोडूं नको; कां तर वेढा घालण्यांत
रानांतलीं झाडें तुझ्यापुढें जायासाठीं मनुष्यरूप
आहेत. २० ज्या झाडांस भक्ष्य येत नाहीं ह्म-
णून तूं जाणतोस, तीं मात्र तोडून त्यांचा नाश
कर, आणि जें नगर तुजसीं लढाई करितें, तें खा-
लीं होईल तोंपर्यंत त्यावर मोर्चा बांध.

## अध्याय २१.

जी भूमि तुझा देव **परमेश्वर** तुला वतना-
साठीं देतो, तिजवर जर वधलेला कोणी
सांपडेल, ह्मणजे रानमाळावर पडलेला असतां,
त्याला कोणी मारिलें हें कळत नाहीं. २ तर
तुझ्यावडिलांनी व तुझ्या न्यायाधीशांनी बाहेर
येऊन त्या वधलेल्याच्या चहुंकडे नगरांपर्यंत मेज
घ्यावें. ३ मग असें व्हावें कीं जें नगर वधले-
ल्याला अधिक जवळ, त्या नगराच्या वडिलांनी
गुरांतली कालवड, जीकडून काम घडलें नाहीं,
जिने जूं ओढिलें नाहीं, तसी घ्यावी. ४ आणि
त्या खळाळाच्या ओढ्यावर शेतकाम चालत
नाहीं, आणि पेरणी होत नाहीं, तेथें त्या नगरच्या
वडिलांनी ती कालवड खालीं न्यावी, मग तेथें
ओढ्यावर कालवडीची मान कापावी. ५ आणि
लेवीच्या वंशांतील याजकांनी जवळ यावें; कां तर
तुझा देव **परमेश्वर** यानें आपली सेवा करायाला
व **परमेश्वराच्या** नामानें आशीर्वाद द्यायाला
त्यांस निवडून घेतलें आहे, आणि त्यांच्या तोंडानें
प्रत्येक वादाचा व फटक्याचा निवाडा व्हावा. ६
आणि त्या नगरचे वडील, जे त्या वधलेल्याच्या
जवळ असतील, त्या सर्वांनी ओढ्यांत त्या मान
कापलेल्या कालवडीवर आपले हात धुवावे. ७
तेव्हां त्यांनी उत्तर देतां ह्मणावें कीं, "आमच्या
हातांनी तें रक्त पाडिलें नाहीं, आणि आमच्या
डोळ्यांनी पाहिलें नाहीं; ८ हे **परमेश्वरा**, त्वां
ज्या इस्राएलाला सोडविलें, त्या आपल्या लोकां-
वर क्षमा करून आपल्या इस्राएल लोकांकडे निर्दो-
ष्याचा रक्तपात लावूं नको," असी त्या रक्तपाता-
विषयीं त्यांवर क्षमा व्हावी. ९ तर **परमेश्व-
राच्या** दिसण्यांत जें नीट तें करण्यानें तूं आप-
ल्यांतून निर्दोष्याचा रक्तपात नाहींसा कर.

१० जर तूं आपल्या शत्रूंसीं लढायाला बाहेर
जासील, आणि तुझा देव **परमेश्वर** यानें ते
तुझ्या हातीं दिल्हे असतां, तूं त्यांस धरून ने-
सील, ११ आणि नेलेल्यांमध्यें सुंदर स्वरूपाची
स्त्री पाहून तिजसीं लगटून आपल्याला बायको
करून घेसील, १२ तर त्वां तिला आपल्या
घरांत आणिल्यावर तिने आपलें डोकें भादरावें,
आणि आपलीं नखें नीट करावीं. १३ तिने आ-
पल्या हरणकाळचें वस्त्रहि आपल्यावरून काढून
टाकावें, आणि महिनाभर तुझ्या घरीं राहून आ-
पला बाप व आपली आई यांविषयीं शोक करावा,
आणि त्यानंतर त्वां तिजसीं लग्न लावून तिच्याज-
वळ जावें; याप्रमाणें ती तुझी बायको असी व्हावी.
१४ मग असें व्हावें कीं जर तुझी आवड तिजवर
न होईल, तर तिच्या जिवेच्छेप्रमाणें तूं तिला
सोड; परंतु पैक्यावर तिला अगदी विकूं नको,
तिला बंद राखूं नको, कारण कीं त्वां तिला भ्रष्ट
केलें आहे.

१५ जर पुरुषाला दोन स्त्रिया, एक आवडती
व दुसरी नावडती अशा असतील, आणि आव-
डती व नावडती या दोघींस त्यापासून पुत्र झाले
असतील, आणि ज्येष्ठ पुत्र नावडतीचा असेल,
१६ तर असें व्हावें कीं त्याजवळ जें असेल, तें
ज्या दिवसीं तो आपल्या पुत्रांस वतनरूपें देतो,
त्यांत नावडतीचा पुत्र जो ज्येष्ठ त्यापुढें आवडती-
च्या पुत्राला ज्येष्ठ मोजायास त्याला अधिकार
होणार नाहीं, १७ तर त्यानें आवडतीचा पुत्र
ज्येष्ठ असा मानून आपल्याला जें मिळालें असेल,
त्या अवघ्यांतून त्याला दुप्पट द्यावें; कारण कीं तो
आपल्या बळाच्या प्रारंभींचा आहे; त्याला न्या-
यांत ज्येष्ठपण व्हावें. १८ जर कोणाचा पुत्र
वावगा व अनिवार आहे, तो आपल्या बापाचा

शब्द व आपल्या आईचा शब्द ऐकत नाहीं, आ-
णि त्यानी त्याला शिक्षा केली असतांहि तो त्यांचें
ऐकत नाहीं, १९ तर त्याच्या आईबापानी त्या-
ला धरून त्याच्या नगरच्या वडिलांजवळ, ह्मणंजे
त्याच्या वस्तीच्या वेसींत न्यावें. २० आणि
त्याच्या नगरच्या वडिलांजवळ सांगावें कीं, "हा
आमचा पुत्र वावगा व अनिवार आमचा शब्द
ऐकत नाहीं; खादाड व पिदाड आहे." २१ तेव्हां
त्याच्या नगरच्या सर्व माणसानी त्याला मरण
येईल तोंपर्यंत धोंडमार करावा; असी तूं ती
दुष्टाई आपल्यामधून नाहींसी कर; मग सर्व इस्रा-
एलानी ऐकून भ्यावें. २२ आणि मरणास योग्य
असा अपराध जर कोणीएकाने केला आहे, आणि
तो मारला जाणार असतां, तूं त्याला लांकडावर
फांसी देसील, २३ तर त्याचें प्रेत रात्रीं लांक-
डावर न राहावें; तर तूं त्याच दिवसीं त्याला
पुरच पूर, कारण कीं ज्याला फांसी दिल्हें त्यावर
देवाचा शाप आहे; तर जें वतन तुझा देव पर-
मेश्वर तुला देतो, त्या आपल्या भूमीला तूं अ-
शुद्द करूं नको.

## अध्याय २२.

तुझ्या भावाचें गुरूं किंवा त्याचें बकरें हरवलेलें
असतां तूं पाहून त्यांविषयीं उगाच राहूं नको;
आपल्या भावाकडे त्यांस फिरीवच फिरीव. २
आणि जर तुझा भाऊ तुला जवळ नसला, किंवा
तूं त्याला ओळखत नसलास, तर तसा पशू आ-
पल्या घरांत आणून ठेव, आणि तुझा भाऊ त्याचा
शोध करील तोंपर्यंत तुझ्याजवळ असूं दे, मग तो
त्याला परत दे. ३ आणि त्याच्या गाढवाविषयीं
तसें कर, त्याच्या वस्त्राविषयींहि तसें कर; आणि
तुझ्या भावाचें जें कांहीं हरवलेलें, ह्मणजे त्यापा-
सून गहाळलेलें असतां तुला सांपडतें त्याविषयीं
तसें कर; उगाच राहायास तुला अधिकार होणार
नाहीं. ४ तुझ्या भावाचें गाढव किंवा त्याचें
गुरूं वाटेवर पडलेलें असतां, तूं पाहून त्याविषयीं
उगाच राहूं नको; त्याला अनुकूळ होऊन उठी-
वच उठीव. ५ स्त्रीच्या अंगीं पुरुषाचें लेणें न-
सावें, आणि पुरुषाने स्त्रीचें वस्त्र न ल्यावें; का-
रण कीं जे तसें करितात, त्या सर्वांची तुझा देव
परमेश्वर याला चिळस आहे. ६ जर वाटे-
वर पांखराचें कोटें कोणत्याहि झाडावर किंवा
भूमीवर तुला अढळेल, त्यांत पिलें किंवा अंडीं
असलीं, आणि आई पिलांवर किंवा अंड्यांवर
बसलेली असली, तर तूं लेंकरांसुद्धां आई धरूं
नको. ७ तूं आपल्यासाठीं लेंकरें घेऊन आईला
सोडच सोड; यासाठीं कीं तुझें बरें व्हावें, आणि
तुला बहुत दिवस व्हावे. ८ जेव्हां तूं नवें घर
बांधसील, तेव्हां आपल्या धाब्यावर आवार कर;
नाहीं तर कोणी त्यावरून पडला असतां तूं आ-
पल्या घराला रक्तपात लावसील. ९ तूं आपल्या
मळ्यांत भेळलेलें बीं पेरूं नको; पेरिलें, तर जें बीं
तूं पेरसील, त्याच्या पीकाचा बार आणि मळ्याचें
उत्पन्न अशुद्ध होईल. १० बैल व गाढव एकत्र
लावून तूं नांगरूं नको. ११ लोंहकर व वाख
एकत्र करून भेळसुती वस्त्र लेऊं नको. १२ तूं
आपलें जें वस्त्र अंगावर घेतोस, त्याला चहुं को-
पऱ्यांस आपल्यासाठीं गोंडे कर. १३ जर पुरुष
बायको करून घेतो, आणि तिच्याजवळ गेल्यावर
तिचा द्वेष करितो. १४ आणि तिजकडे कुकर्मा-
च्या गोष्टी लावून तिजविषयीं वाईट नांव प्रगट
करितां ह्मणतो, "म्यां ही स्त्री करून घेतली, परंतु
तिच्याजवळ जातांना तिच्या कुमारखुणा मला सां-
पडल्या नाहींत." १५ तेव्हां मुलीच्या आईबापा-
नी त्या मुलीच्या कुमारखुणा घेऊन त्या नगरच्या
वडिलांजवळ वेसींत न्याव्या. १६ मग मुलीच्या
बापाने वडिलांजवळ ह्मणावें, "म्यां आपली कन्या
या पुरुषाला बायको करून दिल्ही, परंतु हा
तिचा द्वेष करितो. १७ आणि पाहा, हा कु-
कर्मांच्या गोष्टी लावून ह्मणतो कीं, तुझ्या कन्ये-
च्या कुमारखुणा मला सांपडल्या नाहींत; तरी
माझ्या कन्येच्या कुमारखुणा ह्याच." तेव्हां त्या-
नी तें वस्त्र त्या नगरच्या वडिलांसमोर पसरावें.
१८ मग त्या नगरच्या वडिलानी त्या पुरुषाला
धरून त्याला शिक्षा करावी. १९ आणि त्याज-
वळून दंडाचे शंभर शेकेल रुपें घेऊन मुलीच्या
बापाला द्यावें, कारण कीं त्याने इस्राएलांतल्या कु-
मारीविषयीं वाईट नांव प्रगट केलें आहे; तर ती
याची स्त्री असावी; तिला घालवायास त्याला
त्याच्या सर्व आयुष्यांत अधिकार होणार नाहीं.

२० परंतु जर ती गोष्ट खरी आहे, आणि मुली-
च्या कुमारखुणा सांपडत नाहींत, २१ तर त्यांनी
त्या मुलीला तिच्या बापाच्या घराच्या दाराबाहेर
काढावें, आणि ती मरेल तोंपर्यंत तिच्या नगरांत-
ल्या माणसांनी तिला धोंडमार करावा; कारण
कीं तिने आपल्या बापाच्या घरीं व्यभिचार करून
इस्राएलांत मूर्खपण केलें; असी तूं आपल्यामधून
ती दुष्टाई नाहींसी कर. २२ विवाहित स्त्रिया-
जवळ जर कोणी निजलेला सांपडेल, तर त्या स्त्रि-
याजवळ निजलेला तो पुरुष आणि ती स्त्री हीं दो-
न्हीं मरावीं; असी तूं इस्राएलांतून ती दुष्टाई नाहीं
सी कर. २३ जर कुमारी मूल कोणाला मागणीने
दिल्हेली असली, आणि ती नगरांत कोणाला आ-
ढळल्यावर, तो तिच्याजवळ निजलेला असला,
२४ तर तुह्मी त्या दोघांस त्या नगराच्या दरवा-
ज्याबाहेर काढा, आणि तीं मरतील तोंपर्यंत त्यांस
धोंडमार करा; मुलीला यामुळें कीं ती नगरांत अ-
सून ओरडली नाहीं, आणि पुरुषाला यामुळें कीं
त्याने आपल्या शेजाऱ्याच्या बायकोला भंगिलें;
असी तूं आपल्यामधून ती दुष्टाई नाहींसी कर.
२५ परंतु मागणीने दिल्हेली मूल जर बाहेरच्या
ठिकाणीं कोणाला अढळेल, आणि तो पुरुष तिज-
वर बळात्कार करून तिच्याजवळ निजेल, तर जो
पुरुष तिच्याजवळ निजला, तो मात्र मरावा; २६
आणि तूं मुलीला कांहीं करूं नको; मुलीकडे म-
रायाएवढें पाप नाहीं, कां तर जसा कोणी आपल्या
शेजाऱ्यावर उठून त्याला जिवें मारितो, तसी ही
गोष्ट आहे. २७ कारण कीं ती मागणीने दिल्हेली
मूल बाहेरच्या ठिकाणीं सांपडल्यावर ओरडली,
परंतु तिला राखणारा कोणी नव्हता. २८ जी
मागणीने दिल्हेली नाहीं, तसी कुमारी मूल जर
कोणाला अढळेल, आणि तो तिला धरून तिच्या-
जवळ निजेल आणि तीं सांपडतील, २९ तर
तिच्याजवळ जो निजला, त्या पुरुषाने मुलीच्या
बापाला पन्नास शेकेल रुपें द्यावें; आणि ती त्या-
ची बायको असी व्हावी, त्याने तिला भंगिलें या-
स्तव त्याच्या सर्व आयुष्यांत तिला घालवायास
त्याला अधिकार होणार नाहीं. ३० कोणी आपल्या
बापाची स्त्री करून घेऊं नये; आपल्या बापाचा
पदर काढूं नये.

## अध्याय २३.

जो पुरुष बडवलेपणाने घायाळ, किंवा त्याचें
मूत्रेंद्रिय तोडलेलें, त्याने परमेश्वराच्या
मंडळींत न यावें. २ जारजन्म्याने परमेश्वरा-
च्या मंडळींत न यावें, दाहाव्या पिढीपर्यंतहि त्याक-
डला कोणी परमेश्वराच्या मंडळींत न यावा. ३
आम्मोनी व मवाबी यांनी परमेश्वराच्या मंड-
ळींत न यावें, दाहाव्या पिढीपर्यंत देखील त्यांचा
कोणी कधींहि परमेश्वराच्या मंडळींत न यावा.
४ कारण कीं तुह्मी मिसरांतून येत असतांना वा-
टेवर ते अन्न व पाणी घेऊन तुमच्या भेटीस आले
नव्हते, आणि यामुळें कीं मवाबी यांनी अराम
नाहाराइमांतलें पथोर यांतला बौराचा पुत्र ब-
लाम याला तुझ्या प्रतिकूळपणाने तुला शाप द्या-
यास मोलावर ठेविलें होतें. ५ तथापि तुझा देव
परमेश्वर बलामाचें ऐकायास मान्य झाला नाहीं,
यास्तव तुझ्यासाठीं तुझा देव परमेश्वर याने तो
शाप आशीर्वादरूपें पालटिला; कारण कीं तुझा
देव परमेश्वर याने तुजवर प्रीति केली. ६ तूं
आपल्या सर्व दिवसांत कधींहि त्यांसीं समेट किंवा
त्याचें बरें करायाला पाहूं नको. ७ अदोम्याची
किळस तुला न यावी, कारण कीं तो तुझा भाऊ
आहे; मिसऱ्याची किळस तुला न यावी, कारण
कीं त्याच्या देशांत तूं प्रवासी होतास. ८ त्यांस
जीं लेंकरें होतील, त्यांच्या तिसऱ्या पिढीने परमे-
श्वराच्या मंडळींत यावें. ९ जेव्हां तूं सैन्यमो-
टाने आपल्या शत्रूंवर जासील, तेव्हां प्रत्येक वा-
ईट गोष्टीपासून दूर ऐस. १० रात्रीं जें लागतें
तेणेंकरून अशुद्ध झालेला, असा जर तुह्मामध्यें
कोणी असला, तर त्याने छावणीच्या बाहेर जावें,
त्याने छावणीमध्यें न यावें. ११ परंतु सांज आ-
ल्यावर असें व्हावें कीं त्याने पाणी घेऊन अंघोळ
करावी, आणि सूर्य मावळतांना छावणीमध्यें यावें.
१२ आणि छावणीच्या बाहेर तुझी जागा व्हावी,
ह्मणजे त्वां तिकडे बाहेर जात जावें. १३ आणि
तुझ्या कसणींत तुझ्यासाठीं मेख असावी, आणि
जेव्हां तूं बहिर्दिशेस बसतोस तेव्हां असें व्हावें कीं
त्वां तिने खाणावें, मग उलटून आपला मळ झाकावा.
१४ कारण कीं तुझा देव परमेश्वर तुला राखा-

मस आणि तुझे शत्रू तुझ्या स्वाधीन करायास,
तुझ्या छावणीमध्यें चालत असतो; तर तुझी छा-
वणी पवित्र असावी, नाहीं तर तो तुझ्यामध्यें
लाजेची गोष्ट पाहून तुझी संगत सोडील.
१५ जो चाकर आपल्या धन्याजवळून निघून
तुला शरण येतो, त्याला तूं त्याच्या धन्याच्या
स्वाधीन करूं नको. १६ जें ठिकाण तो निवडून
घेईल, तेथें तुझ्या एखाद्या दरवाज्यांत, जेथें त्या-
ला बरें वाटेल, तेथें तुझ्यामध्यें तुझ्याजवळ त्याने
राहावें; तूं त्याला जाचूं नको. १७ इस्राएला-
च्या कन्यांमध्यें कोणी वेश्या न व्हावी, आणि इस्रा-
एलाच्या पुत्रांमध्यें कोणी शिंदळ न व्हावा. १८
कळवातिणीची देणगी किंवा कुत्र्याचें मोल कांहीं
नवसाकरितां तूं आपला देव परमेश्वर याच्या
घरांत आणूं नको, कारण कीं त्या दोहोंचीहि तुझा
देव परमेश्वर याला चिळस आहे. १९ व्या-
जावर पैका, किंवा व्याजावर अन्न, किंवा जें कांहीं
व्याजावर जातें, तें तूं आपल्या भावाला व्याजावर
देऊं नको. २० त्वां परक्याला व्याजावर द्यावें,
परंतु आपल्या भावाला व्याजावर देऊं नये; या-
साठीं कीं जो देश वतन करून घ्यायास तूं जा-
तोस, त्यावर तुझ्या हातच्या प्रत्येक कार्याविषयीं
तुझा देव परमेश्वर याने तुला आशीर्वाद प्राप्त
करावा.

२१ जर तूं आपला देव परमेश्वर याजवळ
संकल्प करितोस, तर तो पूर्ण करायास उशीर
करूं नको, कारण कीं तुझा देव परमेश्वर त्याचा
झाडा तुझ्याजवळ घेईलच घेईल, आणि तुला
पाप लागेल. २२ परंतु जर संकल्प करण्याविष-
यीं तूं उगाच राहतोस, तर तुला पाप लागणार
नाहीं. २३ जें तुझ्या होंटांतून निघतें तें तूं सं-
भाळून कर; जसा तूं आपला देव परमेश्वर या-
जवळ संकल्प करितोस, स्वबुद्धीने जें तूं आपल्या
तोंडानें बोलतोस, त्याप्रमाणेंच कर. २४ जेव्हां
तूं आपल्या शेजाऱ्याच्या द्राक्षमळ्यांत जातोस,
तेव्हां आपल्या इच्छेप्रमाणें आपल्या तृप्तीपर्यंत
द्राक्षें खा, परंतु आपल्या पात्रांत घालूं नको. २५
जेव्हां तूं आपल्या शेजाऱ्याच्या पिकांत जातोस,
तेव्हां कणसें हाताने खुड; परंतु आपल्या शेजा-
ऱ्याच्या पिकाला विळा लावूं नको.

## अध्याय २४.

जेव्हां पुरुष स्त्रीशीं लग्न लावून तिला नेतो,
तेव्हां त्याला तिजकडली लाजेची गोष्ट दिसून
आल्यामुळें जर तिला त्याची कृपादृष्टि मिळत नाहीं,
तर असें व्हावें कीं त्याने सूटपत्र लिहावें आणि ति-
च्या हातीं देऊन तिला आपल्या घराबाहेर लावावें.
२ मग ती त्याच्या घरांतून निघून गेल्यावर दुस-
ऱ्या पुरुषाची व्हावी. ३ नंतर जर तिजवर त्या
दुसऱ्या नवऱ्याची नावड होती, आणि तोहि सूट-
पत्र लिहून तिच्या हातीं देऊन तिला आपल्या
घराबाहेर लावितो; किंवा ज्या दुसऱ्या नवऱ्याने
तिला आपली बायको करून घेतली, तो जर
मरतो, ४ तर तिचा पहिला धनी ज्याने तिला
सोडिलें, त्याला ती भ्रष्ट झाल्यावर त्याची बायको
व्हावी, ह्मणून फिरून ती करून घ्यायास अधि-
कार होणार नाहीं; कारण कीं तें परमेश्वरापुढें
ओंगळ आहे; तर तुझा देव परमेश्वर तुला
जो देश वतन करून देतो, त्याला तूं पाप लावूं
नको. ५ जेव्हां पुरुष नवी स्त्री करून घेतो,
तेव्हां त्याने सैन्यांत न जावें, आणि कोणत्याहि
गोष्टीविषयीं त्यावर भार घातला न जावा; त्याने
आपल्या घरीं एक वर्ष सुटें असावें, आणि जी
स्त्री त्याने करून घेतली तिचा संतोष करावा. ६
जांत्याची खालची तळी किंवा वरची तळी कोणी
गाहाण न ठेवावी; का कीं तशाने तो जिणें गाहाण
ठेवितो. ७ कोणी माणूस आपल्या भावांतला,
ह्मणजे इस्राएलाच्या संतानांतला प्राणी चोरून
त्याला बंद करितो किंवा त्याला विकितो, असा
जर सांपडतो, तर तो चोर मारला जावा; असी
तूं आपल्यामधून ती दुष्टाई नाहींसी कर. ८ को-
डपटकीविषयीं चौकसीने फार संभाळ, ह्मणजे
लेवी याजक जें नेमून तुह्मास सांगतील, त्या अ-
ध्याप्रमाणें कर; जसी म्या त्यांस आज्ञा दिली,
तसें तुह्मी संभाळून करा. ९ तुह्मी मिसरांतून
येत होतां, तेव्हां वाटेवर मिर्यामेला जें तुझा देव
परमेश्वर याने केलें, त्याची तूं आठवण कर.
१० जेव्हां तूं आपल्या शेजाऱ्याला कांहीं उसणें
देतोस, तेव्हां त्याचें गाहाण घ्यायास त्याच्या
घरांत जाऊं नको. ११ तूं बाहेर उभा राहा,

आणि ज्या माणसाला तूं उसणें देतोस, त्याने तें
गाहाण बाहेर तुझ्याजवळ आणावें; १२ आणि
जर तो माणूस दरिद्री, तर तूं त्याचें गाहाण ठेवून
निजूं नको. १३ सूर्य मावळतांना तें गाहाण
त्याला परत देच दे, ह्मणजे तो आपलें वस्त्र घे-
ऊन निजेल, आणि तुला आशीर्वाद देईल; असें
तुला तुझा देव परमेश्वर यापुढें प्रशंसा प्राप्त
होईल. १४ जो तुझे भाऊ किंवा तुझ्या देशांत-
ल्या तुझ्या दरवाज्यांत जो तुझा प्रवासी त्यांतला
दीन व दुबळा कामकरी याला तूं जाचूं नको.
१५ त्याची करणावळ त्याच्या दिवसीं दे, आणि
तिला सूर्य मावळूं देऊं नको, कारण कीं तो दरिद्री
आणि तो आपला जीव तिजवर ठेवितो; न देसील
तर तो तुजविषयीं परमेश्वराजवळ ओरडला
असतां, तुला पाप घडेल. १६ पुत्रांच्या ठिकाणीं
बाप मारले न जावे, आणि बापांच्या ठिकाणीं पुत्र
मारले न जावे; एकएक आपापल्या पापामुळें मार-
ला जावा; १७ प्रवासी व अनाथ यांचा न्याय
तूं विपरीत करूं नको, आणि विधवेचें वस्त्र गाहाण
ठेवूं नको. १८ तर तूं असी आठवण कर कीं
तूं मिसरांत चाकर होतास, आणि तुझा देव पर-
मेश्वर याने तुला तेथून सोडविलें; यास्तव मी
तुला तसें करायास आज्ञा देतों. १९ तूं आपल्या
शेतांत आपलें पीक कापून, जर शेतांत पेंढी विस-
रतोस, तर ती घ्यायास मागें फिरूं नको; प्रवासी
अनाथ, व विधवा, यांसाठीं ती राहावी, ह्मणजे
तुझा देव परमेश्वर तुझ्या हातांच्या अवघ्या
कामाविषयीं तुला आशीर्वाद प्राप्त करील. २०
जेव्हां तूं आपल्या जैतुनाला झोडून फळें पाडि-
तोस तेव्हां त्यां आपल्या मागून डाहाळे शोधूं न-
येत; प्रवासी, अनाथ, व विधवा, यांसाठीं तें रा-
हावें. २१ जेव्हां तूं आपला द्राक्षमळा खुडि-
तोस, तेव्हां आपल्यामागून निःशेष करूं नको; प्र-
वासी, अनाथ, व विधवा, यांसाठीं कांहीं राहावें.
२२ आणि तू असी आठवण कर कीं मिसर दे-
शांत तूं चाकर होतास, यास्तव मी तुला तसें
करायास आज्ञा देतों."

### अध्याय २५.

जर माणसांमध्यें वाद असला, आणि तीं न्या-
यासाठीं येतात, तर न्यायाधीशानी त्यांचा
न्याय करून नीतिवानाला नीतिवानच ठरवावें,
आणि दोष्याला दोषीच ठरवावें. २ आणि दो-
षी जर फटक्यांस योग्य असला, तर असें व्हावें
कीं न्यायाधीशाने त्याला पाडून त्याच्या दुष्टपणा-
च्या परिमाणाप्रमाणें गणती करून आपल्यासमोर
त्याला फटके मारवावे. ३ त्याने त्याला चाळीस
फटके मारवावे; वाढवूं नयेत, का कीं कदाचित्
त्यांपेक्षां वाढवून त्याला फार मार दिल्हा असतां,
तुझा भाऊ तुझ्या दृष्टींत हलका होईल. ४ जे-
व्हां बैल मळणी करितो, तेव्हां तूं त्याला मुसकें
घालूं नको. ५ जेव्हां भाऊ एकत्र राहतात,
आणि त्यांतल्या एकाला पुत्र नसतां जर मरण येतें
तर त्या मेलेल्याची स्त्री बाहेरल्या परक्या पुरु-
षाची न व्हावी; तिच्या दिराने आपल्याला ती
स्त्री असी करून तिजसीं लग्न लावून तिच्याजवळ
जावें. ६ आणि असें व्हावें कीं जो पहिला पुत्र
तिला होईल, त्याने त्या मेलेल्या भावाच्या नांवानें
उठावें; असें त्याचें नांव इस्राएलांतून खोडून टा
कलें न जावें. ७ आणि जर तो पुरुष आपली
भावजय करून घ्यायाला इच्छीत नाहीं, तर त्या
च्या भावजयीने वेसींतल्या वडिलांजवळ जाऊन
ह्मणावें, 'माझा दीर आपल्या भावाचें नांव इस्राए
लांत उठवायास अनमान करितो, ह्मणजे तो मज
सीं लग्न लावायास मान्य होत नाहीं.' ८ मग
त्याच्या नगरच्या वडिलानी त्याला बोलावून त्याला
सांगावें; आणि जर तो उभा राहून ह्मणतो, मी
इला करून घ्यायास इच्छीत नाहीं;' ९ तेव्हां
त्याच्या भावजयीने त्या वडिलांच्या देखतां त्याच्या
जवळ जाऊन त्याचा जोडा त्याच्या पायांतून का-
ढावा, आणि त्याच्या तोंडावर थुंकून उत्तर करित
ह्मणावें, 'जो माणूस आपल्या भावाचें घर बांधीत
नाहीं, त्याजवळ याप्रमाणें केलें जावें.' १० नंतर
तर इस्राएलांत त्याला नांव असें ठेवलें जावें
'जोडा काढलेल्याचें घराणें.' ११ जर माणसें
एकवट होऊन एकमेकासीं भांडतात, आणि त्यांत
ल्या एकाची स्त्री आपल्या नवऱ्याला मारणाऱ्या
च्या हातांतून सोडवायास जवळ जाऊन आपला
हात लावून त्याचीं लज्जांगें धरिती, १२ तर
तिचा हात कापून टाक; तुझ्या दृष्टीची ममता न
व्हावी.

१३ तुझ्या पिशवींत वजनावर वजन, मोठें व
लाहान असें तुला नसावें. १४ तुझ्या घरांत
मापावर माप, मोठें व लाहान असें तुला नसावें.
तुझें वजन बरोबर व नीतीचें असावें. १५ तुझें
माप बरोबर व नीतीचें असावें; यासाठीं कीं जी
भूमि तुझा देव परमेश्वर तुला देतो, तिजवर
तुझे दिवस फार व्हावे. १६ कां तर जो कोणी
असें करितो, जो कोणी अन्याय करितो, तो तुझा
देव परमेश्वर याजवळ ओंगळ आहे. १७ तुह्मी
मिसरांतून आलां, तेव्हां वाटेवर जें अमालेकाने
तुझें केलें, त्याची तूं आठवण कर, १८ कीं तूं
भागून दमला असतांना त्याने तुझ्या वाटेवर येऊन
तुझ्या मागले जे दुर्बळ त्या सर्वांस हाणिलें, असें
त्याचें भय धरिलें नाहीं. १९ तर असें व्हावें
कीं तुझा देव परमेश्वर तुला जो देश वतन हो-
ण्यासाठीं देतो, त्यांत तुझ्या चहुंकडल्या शत्रूंवि-
षयीं जेव्हां तुझा देव परमेश्वर तुला विसांवा
देईल, तेव्हां तूं अमालेकाची आठवण आकाशा-
खालून खोडून टाक: विसरूं नको.

## अध्याय २६.

आणि असें व्हावें कीं तुझा देव परमेश्वर
तुला जो देश वतन करून देतो, त्यांत
जेव्हां तूं पोहंचसील, आणि तो वतनरूपें पावून
त्यांत राहसील, २ तेव्हां जो देश तुझा देव
परमेश्वर तुला देतो, त्याच्या भूमीवरलीं जीं फळें
तूं मिळविसील, त्या सर्वांतलें कांहीं प्रथम उत्पन्न
घेऊन पाटींत घालून, जें ठिकाण तुझा देव परमे-
श्वर आपल्या नामाची वस्ती करायास निवडून
घेईल तिकडे जा. ३ आणि त्या दिवसांत जो
याजक होईल, त्याच्याजवळ जाऊन त्याला ह्मण,
तुझा देव परमेश्वर याजवळ मी आज प्रकरितों
कीं जो देश आह्मास द्यायाला परमेश्वराने आ-
मच्या पूर्वजांजवळ शपथ वाहिली, त्यांत मी पोहं-
चलों आहें. ४ मग याजकाने तुझ्या हातांतून
ती पाटी घेऊन तुझा देव परमेश्वर याच्या वेदी-
पुढें ठेवावी. ५ नंतर तूं आपला देव परमेश्वर
यासमोर उत्तर करितां बोल, “माझा पूर्वज अरामी
नाश पावणार होता; तेव्हां त्याने थोडक्या माण्यां-
सुद्धां मिसरांत उतरून तेथें प्रवास केला, परंतु
तेथें मोठें, बळकट व स्वतंत्र राष्ट्र असा तो झाला.
६ मिसऱ्यानी तर आह्मास दुःख देतां आमची
जाचणूक केली, आणि आह्मास कठीण दासांत
घातलें. ७ मग आह्मी आपल्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याजवळ ओरडलों, नंतर परमेश्व-
राने आमचा शब्द ऐकून आमचें निचपण, व
आमचे कष्ट, व आमचा काच पाहिला. ८ मग
परमेश्वराने आह्मास बळकट हाताने, व लांब-
विलेल्या बाहूने, व मोठ्या भयाने, व खुणानी,
व चमत्कारानी मिसरांतून काढिलें. ९ आणि
आह्मास या ठिकाणापर्यंत आणून हा देश, दूध
व मध वाहण्याचा देश, असा आह्मास दिल्हा.
१० तर आतां, हे परमेश्वरा, पाहा भूमीवरलीं
फळें जीं त्वां मला दिल्हीं, त्यांतलीं पहिलीं म्या
आणिलीं आहेत.” या प्रकारें तूं आपला देव
परमेश्वर यासमोर ती पाटी ठेव, आणि आपला
देव परमेश्वर यासमोर नमस्कार घाल. ११
आणि तुझा देव परमेश्वर याने तुला व तुझ्या
घरच्यांस जें सर्व उत्तम दिल्हें, त्यावरून लेव्या-
सुद्धां व जो तुझ्यामध्यें प्रवासी त्यासुद्धां तूं आ-
नंद कर. १२ तिसरें वर्ष, दाहावा भाग काढून
देण्याचें वर्ष, त्यांत जेव्हां तूं आपल्या उत्पन्नांतला
सर्व दाहावा भाग काढून देण्याची समाप्ति कर-
सील, ह्मणजे लेव्याला, प्रवास्याला, अनाथाला,
व विधवेला असें देसील कीं ते तुझ्या दरवाज्यांत
खाऊन तृप्त होतील; १३ तेव्हां तूं आपला देव
परमेश्वर यासमोर बोल कीं, “जें पवित्र तें सं-
पूर्ण म्या घरांतून काढिलें, अणखी ते लेव्याला व
प्रवास्याला, अनाथाला व विधवेला दिल्हें; तुझी
जी आज्ञा त्वां मला दिल्ही, त्या अवघ्यांप्रमाणें
दिल्हें; म्या तुझ्या आज्ञा सोडून उल्लंघन केलें
नाहीं, आणि मी विसरलों नाहीं. १४ म्या आ-
पल्या खेदकाळीं त्यांतलें कांहीं खाल्लें नाहीं, आणि
अशुद्धपणांत त्यांतून काढिलें नाहीं, आणि मेले-
ल्याला त्यांतलें दिल्हें नाहीं, म्या आपला देव
परमेश्वर याची गोष्ट ऐकिली, ज्या त्वां मला
आज्ञा दिल्ह्या त्या अवघ्यांप्रमाणें म्या केलें आहे.
१५ तूं आपल्या पवित्र वस्तींतून ह्मणजे आकाशां-
तून दृष्टि लावून आपल्या इस्राएलाच्या लोकांला
आशीर्वाद दे, आणि जी भूमि त्वां आमच्या पूर्व-

बांजवळ शपथ वाहिल्याप्रमाणें आह्मास दिल्ही,
जो दूध व मध वाहण्याचा देश, त्यालाहि आशी-
र्वाद दे.
१६ आजच्या दिवसीं तुझा **देव परमेश्वर**
तुला हे नेम व ह्या नीती पाळायास आज्ञा देत
आहे; तर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आ-
पल्या सर्व जिवाने ह्या संभाळून पाळ. १७
तुझा **देव परमेश्वर** असा व्हावा ह्मणून, आणि
त्वां त्याच्या मार्गांत चालावें, आणि त्याचे नेम
व त्याच्या आज्ञा व त्याच्या नीति पाळाव्या, आणि
त्याची गोष्ट ऐकावी ह्मणून आज त्वां त्याला
पत्करून घेतलें आहे. १८ **परमेश्वरानेहि** आज
तुला असें पत्करून घेतलें आहे कीं जसें त्याने
तुला सांगितलें, तसा तूं त्याचा लोक, त्याच्या ज-
वळची वस्तभाव असा आहेस, ह्मणजे त्वां त्या-
च्या सर्व आज्ञा पाळाव्या. १९ आणि त्याने जीं
राष्ट्रें उत्पन्न केलीं, त्या सर्वांपेक्षां तुला कीर्त्तिमान्
व गुणवान् व शोभायमान असें करावें; आणि
ज्याप्रमाणें त्याने सांगितलें, त्याप्रमाणें त्वां आपला
**देव परमेश्वर** यासाठीं पवित्र लोक असें व्हावें.

## अध्याय २७.

तेव्हां इस्राएलाच्या वडिलांसहित मोशाने लो-
कांला असी आज्ञा दिल्ही कीं, आज मी
तुह्मास जी जी आज्ञा लावून देतों त्या सर्व तूं
पाळ. २ आणि जो देश तुझा **देव परमेश्वर**
तुला देतो, तिकडे ज्या दिवसीं तुह्मी यार्देनेच्या
पलिकडे जाल, तेव्हां असें व्हावें कीं त्वां आपल्या-
साठीं मोठे धोंडे रचावे, आणि त्यास चुना देऊन
चुनेगच्ची करावी. ३ मग त्यांवर या शास्त्रांतल्या
सर्व गोष्टी लिहाव्या; कोठें रचावे, तर आपल्या
पलिकडे जाण्याच्या ठिकाणीं, ह्मणजे ज्याप्रमाणें
तुझ्या पूर्वजांचा **देव परमेश्वर** याने तुला सांगि-
तलें त्याप्रमाणें दूध व मध वाहण्याचा जो देश
तुझा **देव परमेश्वर** तुला देत आहे, त्या देशांत
जेथें तूं जासील तेथें. ४ तर जेव्हां तुह्मी यार्दे-
नेच्या पलिकडे जाल, तेव्हां असें व्हावें कीं ज्यां-
विषयीं मी आज तुह्मास आज्ञा देतों, ते धोंडे
एबाल डोंगरावर रचावे, आणि त्यास चुना देऊन
चुनेगच्ची करावी. ५ आणि तूं आपला **देव पर-
मेश्वर** यासाठीं तेथें वेदी बांध; धोंड्याची वेदी
बांध: तिला लोखंडी शस्त्र लावूं नको. ६ आप-
ला **देव परमेश्वर** याची वेदी धड धोंड्यांनी
बांध; आणि तिजवर आपला **देव परमेश्वर**
याजवळ होम कर. ७ शांतिकारक यज्ञहि
करून तेथें खा, आणि आपला **देव परमेश्वर**
यासमोर आनंद कर. ८ आणि त्या धोंड्यांवर
या शास्त्रांतल्या सर्व गोष्टी लिहितांना पक्की खोद-
णी कर.
९ तेव्हां लेवी याजक यांसहित मोशाने सर्व
इस्राएलास असें सांगितलें कीं, हे इस्राएला, तूं
निवांत होऊन ऐक, आजच्या दिवसीं तूं आपला
**देव परमेश्वर** याचा लोक असा झालास. १०
तर आपला **देव परमेश्वर** याची गोष्ट ऐक, आ-
णि त्याच्या आज्ञा व त्याचे नेम जे मी आज तुला
लावून देतों, ते तूं पाळ.
११ आणि त्याच दिवसीं मोशाने लोकांला
असी आज्ञा दिल्ही कीं, १२ जेव्हां तुह्मी
यार्देनेच्या पलिकडे जाल, तेव्हां लोकांला आशी-
र्वाद द्यायास शिमोन व लेवी व यहूदा व इस्सा-
खार व योसेफ व बन्यामीन, यांनी गरिज्जीम
डोंगरावर उभें राहावें. १३ आणि शाप सुच-
विण्यासाठीं रऊबेन, गाद व आशेर व जबुलुन,
दान व नाफ्ताली, यांनी एबाल डोंगरावर उभें
राहावें. १४ आणि लेव्यांनी प्रारंभ करून
इस्राएलांतल्या सर्व माणसांसीं मोठ्या शब्दाने
बोलावें. १५ "**परमेश्वराजवळ** ओंगळ, कारा-
गिराच्या हातांचें काम असी कोरींव किंवा ओतींव
मूर्त्ति जो कोणी करून गुप्त ठिकाणीं ठेवितो, तो
शापित असो, तेव्हां सर्व लोकांनी प्रतिशब्देंकरून
'आमेन' ह्मणावें. १६ जो आपल्या बापाला
किंवा आपल्या आईला हलकें मोजितो, तो शापित
असो; तेव्हां सर्व लोकांनी 'आमेन' ह्मणावें. १७
जो आपल्या शेजाऱ्याची सीमाखूण ढळवितो, तो
शापित असो; तेव्हां सर्व लोकांनी 'आमेन' ह्म-
णावें. १८ जो आंधळ्याला वाटेविषयीं चुक-
वितो, तो शापित असो; तेव्हां सर्व लोकांनी 'आ-
मेन' ह्मणावें. १९ प्रवासी, अनाथ, व विधवा
यांचा न्याय जो विपरीत करितो, तो शापित असो;
तेव्हां सर्व लोकांनी 'आमेन' ह्मणावें. २० जो

आपल्या बापाच्या स्त्रीजवळ निजतो, तो शापित
असो, कारण कीं तो आपल्या बापाचा पदर का-
ढितो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन' ह्मणावें. २१
जो कोणत्याहि पशूजवळ निजतो, तो शापित
असो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन' ह्मणावें. २२
जो आपली बहीण, आपल्या बापाची कन्या किंवा
आपल्या आईची कन्या, इच्याजवळ निजतो, तो
शापित असो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन' ह्म-
णावें. २३ जो आपल्या सासूजवळ निजतो,
तो शापित असो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन'
ह्मणावें. २४ जो गुप्तपणानें आपल्या शेजाऱ्या-
ला मारितो, तो शापित असो; तेव्हां सर्व लोकानी
'आमेन' ह्मणावें. २५ जो निर्दोष रक्ताच्या
प्राण्याला मारायास लोभलांच घेतो, तो शापित
असो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन' ह्मणावें. २६
जो ह्या शास्त्राच्या गोष्टी पाळून स्थापीत नाहीं,
तो शापित असो; तेव्हां सर्व लोकानी 'आमेन'
ह्मणावें.

## अध्याय २८.

आणि जर तूं आपला देव **परमेश्वर** याची
गोष्ट ऐकसीलच ऐकसील, ह्मणजे त्याच्या
ज्या आज्ञा मी आज तुला लावून देतों, त्या सर्व
संभाळून पाळसील, तर असें होईल कीं तुझा देव
**परमेश्वर** तुला पृथ्वींतल्या सर्व राष्ट्रांवर वरिष्ठ
करून ठेवील. २ आणि त्वां आपला देव **पर-
मेश्वर** याची गोष्ट ऐकिली असतां हे सर्व आ-
शीर्वाद तुला प्राप्त होऊन तुझ्याजवळ दाटीने
राहतील. ३ नगरांत तुला आशीर्वाद होईल,
आणि शेतांत तुला आशीर्वाद होईल. ४ तुझ्या
पोटचें फळ, व तुझ्या भूमीवरलें फळ, व तुझ्या
पशूंचें फळ, तुझ्या गुरांची वृद्धि, व तुझ्या बक-
ऱ्यांचे वत्सकळप यांस आशीर्वाद प्राप्त होईल. ५
तुझी पाटी व तुझा संग्रह यांस आशीर्वाद होईल.
६ जेव्हां आंत येतोस, तेव्हां तूं आशीर्वादित हो-
सील; जेव्हां बाहेर जातोस, तेव्हांहि तूं आशी-
र्वादित होसील. ७ जे तुझे शत्रू तुजवर उठतील,
ते तुझ्यापुढें हाणलेले असे **परमेश्वर** ठेवील; ते
तुझ्याजवळ एका वाटेनें बाहेर येतील, परंतु तुझ्या-
पुढून सात वाटांनी पळून जातील. ८ तुझ्या सांठ-
वणांविषयीं व तुझ्या हाताच्या प्रत्येक कार्याविषयीं
**परमेश्वर** तुला आशीर्वाद प्राप्त करील; या प्र-
कारें तुझा देव **परमेश्वर** तुला जो देश देतो, त्या-
विषयीं तो तुला आशीर्वाद देईल. ९ तूं केवळ
आपला देव **परमेश्वर** याच्या आज्ञा पाळसील,
आणि त्याच्या मार्गांत चालसील, तर जसी **पर-
मेश्वरानें** तुझ्याजवळ शपथ वाहिली, तसा तो
आपल्याजवळ पवित्र लोक असें तुला स्थापील. १०
मग पृथ्वींतले सर्व लोक पाहतील कीं **परमेश्वरा-
चें** नाम तुजविषयीं घेतलें जातें, आणि ते तुला भितील.
११ आणखी उत्तम पदार्थांनी, ह्मणजे तुझ्या पोटचीं
फळें व तुझ्या पशूंचीं फळें आणि **परमेश्वरानें** जी
भूमि तुला द्यायास तुझ्या पूर्वजांजवळ शपथ वा-
हिली तिजवरलीं तुझीं भूफळें, इहींकरून **परमेश्वर**
तुला भरपूर करील. १२ तुझ्या देशांत पाऊस
यथाकाळीं द्यायासाठीं आणि तुझ्या हाताच्या प्र-
त्येक कामाला आशीर्वाद द्यायासाठीं **परमेश्वर**
आपलें उत्तम सांठवणरूप आकाश तुजसाठीं उ-
घडील; यास्तव तूं बहुत राष्ट्रांस उसणें देसील,
परंतु तूं उसणें घेणार नाहींस. १३ आणि **परमे-
श्वर** तुला शेपुटरूप करणार नाहीं, तर मस्तक-
रूप करील, आणि तूं निंच असा होणार नाहींस,
तर केवळ उंच असा होशील; केवळ तुझा देव
**परमेश्वर** याच्या ज्या आज्ञा मी आज तुला ला-
वून देतों, त्या त्वां संभाळून पाळल्याने ऐकाव्या.
१४ आणि ज्या गोष्टी मी आज तुह्मास आज्ञेने
सांगतों, त्यांतली कोणतीहि सोडून दुसऱ्या देवांची
सेवा करायास त्यांच्यामागें जायासाठीं उजव्याकडे
किंवा डाव्याकडे न वळावें ह्मणजे तसें होईल.

१५ परंतु तूं आपला देव **परमेश्वर** याच्या
आज्ञा व त्याचे नेम जे मी आज तुला लावून देतों
ते सर्व संभाळून पाळण्याविषयीं, जर त्याची गोष्ट
न ऐकसील, तर असें होईल कीं हे सर्व शाप तु-
जवर येऊन तुझ्याजवळ दाटीने राहतील; १६
ह्मणजे नगरांत तुला शाप, आणि शेतांत तुला शाप
होईल. १७ तुझ्या पाटीला व तुझ्या संग्रहाला
शाप होईल. १८ तुझ्या पोटचीं फळें, आणि
तुझ्या भूमीवरलीं फळें, तुझ्या गुरांची वृद्धि आणि
तुझ्या बकऱ्यांचे वत्सकळप यांस शाप होईल. १९
जेव्हां तूं आंत येतोस, तेव्हां तुला शाप; जेव्हां

बाहेर जातोस, तेव्हांहि तुला शाप होईल. २०
तूं आपल्या हाताने जें प्रत्येक कार्य करसील, त्यांत
परमेश्वर तुजवर शाप व मोड व निषेध एथवर
लावील कीं तुझ्या दुष्टाईच्या कुकर्मामुळें लौकर
तुझी हानि व तुझा नाशहि होईल; कारण कीं त्वां
मला सोडिलें आहे. २१ परमेश्वर तुजसीं मरी
एवढी लगटवील कीं जी भूमि वतनरूपें पावायास
जिकडे तूं जातोस तिजवरून तो तुला नाहींसें क-
रील. २२ क्षयरोग व ताप व चिडणें व जळज-
ळणें व अवर्षण व हुरपळणें व तांबारा, इहींकरून
परमेश्वर तुला मारील, आणि तूं नाश पावसील
तोंपर्यंत तीं तुझ्या पाठीं लागतील. २३ आणि
तुझ्या डोक्यावर जें तुझें आकाश तें तांबें असें,
आणि तुझ्याखालीं जी पृथ्वी ती लोखंड असी हो-
ईल. २४ परमेश्वर तुझ्या देशांत केराचा व
धुळीचा पाऊस पाडील; तुझा नाश होईल तों-
पर्यंत आकाशातून तुजवर पडेल. २५ परमेश्वर
तुला तुझ्या शत्रूंपुढें हाणलेले असें ठेवील; तूं त्यां-
जवळ बाहेर एका वाटेने जासील; परंतु त्यापुढून
सात वाटानी पळसील, आणि पृथ्वींतल्या सर्व रा-
ष्ट्रांत उधळलेला असा होसील. २६ आणि तुझें
प्रेत आकाशांतल्या सर्व पांखरांस व पृथ्वींतल्या
श्वापदास खाद्य होईल, आणि कोणी त्यांस भय दे-
णार नाहीं. २७ मिसऱ्यांचा फोडरोग व मुळव्याध
व भुसारी रोग व खरूज, ज्यांविषयीं तुझा उपाय
चालणार नाहीं, त्यांकडून परमेश्वर तुला मारील.
२८ वेड व अंधळेपण व मनाचें व्यग्रपण इहींक-
रून परमेश्वर तुला मारील. २९ आणि जसा
अंधळा काळोखांत चांपसतो, तसा तूं दुपारीं चांप-
सीत जासील; तुझ्या मार्गांत तुला सिद्धी होणा-
रच नाहीं, आणि सर्व दिवस तूं केवळ जाचलेला
व नाडलेला होसील, तेव्हां कोणी तारणारा हो-
णार नाहीं. ३० तूं स्त्रीला मागणी घालसील,
परंतु दुसरा पुरुष तिचा उपभोग घेईल; घर बांध-
सील, परंतु त्यांत तुझें राहणें होणार नाहीं; मळा
लावसील, परंतु त्याचा संस्कारहि तुला होणार
नाहीं. ३१ तुझ्या देखता तुझ्या गुराची खाटकी
होईल, परंतु तूं त्यांतलें खाणार नाहींस; तुझें
गाढव तुझ्यापुढून लुटून नेलें असतांना तें तुझ्या-
जवळ परत येणार नाहीं; तुझीं बकरीं तुझ्या श-
त्रूंस दिल्हीं जातील, आणि तुला कोणी तारणारा
होणार नाहीं. ३२ तुझे पुत्र व तुझ्या कन्या दुस-
ऱ्या लोकांला दिल्ह्या जातील, आणि तुझे डोळे
त्याविषयीं सारा दिवस लागण्याने क्षय पावतील,
आणि तुझ्या हाताच्या शक्तीने कांहीं होणार नाहीं.
३३ ज्या लोकांला तूं ओळखत नाहींस, तो तुझ्या
भूमीचें उत्पन्न व तुझें सर्व कष्टफळ खातील, आणि
सर्व दिवस तूं केवळ जाचलेला व अपटलेला हो-
सील. ३४ आणि जें तुझ्या डोळ्यांच्या पाहण्यांत
येईल, तेणेंकरून तूं वेडा होसील. ३५ ज्या
दुष्ट फोडरोगाविषयीं तुझा उपाय चालणार नाहीं,
तो गुडघ्यांवर व तंगड्यांवर तुझ्या तळपायापासून
तुझ्या टाळूपर्यंतहि लावून परमेश्वर तुला मारील.
३६ तुला व तुझ्या पूर्वजांसहि जें राष्ट्र माहीत ना-
हीं, त्यांत तुला व तुझा राजा जो तूं आपल्यावर
स्थापून घेसील, त्याला परमेश्वर नेईल, आणि
तेथें दुसरे देव, लांकडाचे व धोंड्याचे, अशांची तूं
सेवा करसील. ३७ आणि ज्या सर्व लोकांमध्यें पर-
मेश्वर तुला नेईल, तेथें तूं विस्मयकारक व दाखला-
रूप व कुचेष्टामूळ असा होसील. ३८ बाहेर शे-
तांत बहुत बीं नेसील, परंतु तुला थोडकें मिळेल,
कारण कीं टोळ त्याला खाऊन टाकतील. ३९
तूं द्राक्षमळे लावसील, आणि बागकाम करसील,
परंतु द्राक्षारस पिणार नाहींस आणि फळसंग्रह
करणार नाहींस, कारण कीं कीड त्याला खाऊन
टाकील. ४० तुझ्या सर्व सीमांत तुझीं जैतून बनें
होतील, परंतु तुला न्हायाला तेल मिळणार नाहीं,
कारण कीं तुझीं जैतुनें गळतील. ४१ तुला पुत्र
व कन्या होतील, परंतु तुझ्याजवळ राहणार ना-
हींत, कां तर लुटींत नेल्या जातील. ४२ तुझीं
सर्व झाडें व तुझ्या भूमीवरलें पीक टोळ खातील
४३ तुझ्यामध्यें जो विदेशी तो तुजपेक्षां अति उंच-
पणाने चढेल, आणि तूं अति निंचपणाने उतरसील.
४४ तो तुला उसणें देईल, परंतु तूं त्याला उसणें
देणार नाहींस; तो शिरोभाग असा होईल, परंतु
तूं शेपूट असा होसील. ४५ आणि हे सर्व शाप
तुजवर येतील, तुझ्या पाठींहि लागून तुझा नाश
होईल, तोंपर्यंत तुझ्याजवळ दाटीने राहतील;
कारण कीं आपला देव परमेश्वर याच्या आज्ञा
व नेम जे त्याने तुला लाविले, ते पाळून त्वां

त्याची गोष्ट ऐकिली नाहीं. ४६ आणि हे शाप
खूणरूपें व चमत्काररूपें तुजवर व तुझ्या संताना-
वर सर्वकाळ असत जातील. ४७ कारण कीं
अवघीं भरपूर असताहि त्वां आपला देव परमे-
श्वर याची सेवा संतोषाने व अंतःकरणाच्या ह-
र्षाने केली नाहीं. ४८ यास्तव तुझ्या ज्या शत्रूंस
परमेश्वर तुजवर पाठवील, त्यांची सेवा तूं भुकेने
व ताहानेने व उघड्या अंगाने व अवघ्यांच्या अभा-
वीने करसील, आणि तो तुझा नाश करील तोंपर्यंत
तुझ्या मानेवर लोखंडी जूं घालील. ४९ परमे-
श्वर दुरून पृथ्वीच्या कांठचें राष्ट्र तजवर आणील;
सुसाटी मारणाऱ्या गरुडासारिखें ज्या राष्ट्राची
भाषा तूं समजणार नाहींस तसें ; ५० उग्र मु-
खाचें, जें वडिलाची मान्यता राखणार नाहीं, आणि
तरुण्यावर दया करणार नाहीं तसें राष्ट्र. ५१
आणि तुझा क्षय होईल तोंपर्यंत तुझ्या पशूंचीं फ-
ळें व तुझ्या भूमीचीं फळें तें खाऊन टाकील;
तुला धान्य, द्राक्षारस किंवा तेल, तुझ्या गुरांची
वृद्धि, किंवा तुझ्या बकऱ्यांचे वत्सकळप ठेवणार
नाहीं एथपर्यंत तें तुझा नाश करील. ५२ आणि
तुझ्या सर्व देशांत तुझ्या सर्व दरवाज्यांच्या आंत
तुला असें वेढील कीं तुझीं उंच व बंदोबस्तीचीं
गांवकुसें, ज्यांवर त्वां आशा ठेविली, तीं पडतील;
या प्रकारें तुझा जो देश तुझा देव परमेश्वर
याने तुला दिल्हा त्या सर्वांमध्यें तुझ्या सर्व दरवा-
ज्यांच्या आंत तें तुला वेढील. ५३ तेव्हां ज्या
संकटांत व ज्या पेंचाटींत तुझा शत्रु तुला आणील,
तींत तूं आपल्या पोटचीं फळें, आपले पुत्र व आ-
पल्या कन्या ज्या तुझा देव परमेश्वर याने तुला
दिल्या, त्यांचें मास खासील. ५४ तुझ्यामध्यें
जो कोंवळा व फार सकुमार पुरुष त्याची दृष्टि
त्याच्या भावाविषयीं, व त्याच्या उराजवळच्या स्त्री-
विषयीं, व जें त्याच्या संतानाचें राहिलेलें शेष त्या-
विषयीं दुष्ट होईल ; ५५ इतकी कीं तो आपल्या
ज्या पुत्रांस खाईल, त्यांचें कांहीं मास त्यांतल्या
कोणालाहि देणार नाहीं, कारण कीं त्याला कांहींच
राहणार नाहीं; तुझ्या सर्व दरवाज्यांच्या आंत तुला
तुझा शत्रु तितक्या संकटांत व पेंचाटींत आणील.
५६ तुझ्यामध्यें जी कोंवळी व सकुमार स्त्री, सकु-
मारपणावरून व कोंवळेपणावरून आपला तळपाय
भूमीवर ठेवायास धजत नव्हती, तिची दृष्टि तिच्या
उराजवळच्या नवऱ्याविषयीं व तिच्या पुत्राविषयीं
व तिच्या कन्येविषयीं दुष्ट होईल. ५७ तिचा जो
गर्भ तिच्या पायांच्यामधून निघतो त्याविषयींहि,
असी ती आपल्या ज्या लेंकरांस प्रसवेल, त्यावि-
षयीं तिची दृष्टि दुष्ट होईल ; कां तर तुझ्या दर-
वाज्यांच्या आंत तुला तुझा शत्रु ज्या संकटांत व
ज्या पेंचाटींत आणील, तींत अवघीं नाहींसीं झा-
ल्यामुळें ती त्यांस गुप्तपणाने खाईल. ५८ या शा-
स्त्रांतल्या ज्या गोष्टी या पुस्तकांत लिहिलेल्या, त्या
पाळायास ह्मणजे आपला देव परमेश्वर हें गौ-
रवी व भययोग्य नाम याचें भय धरायास जर तूं
न संभाळसील; ५९ तर परमेश्वर तुला पटक्या
व तुझ्या संतानाला पटक्या चमत्कारिक लावील;
मोठ्या व राहणाऱ्या पटक्या, आणि मोठे व राहणारे
रोग लावील. ६० आणि मिसऱ्यांच्या ज्या दुख-
ण्याएंढें तूं भ्यालास, तीं तो तुला फिरून लावील
आणि तीं तुला लगटतील. ६१ अणखी सर्व रोग
व सर्व पटक्या ज्या या शास्त्रपुस्तकांत लिहिल्या
नाहींत, त्या सर्व तुझा नाश होईल तोंपर्यंत परमे-
श्वर तुजवर लावील. ६२ तेव्हां जरी तुह्मी पुष्क-
ळपणावरून आकाशांतल्या ताऱ्यांसारिखे असलां,
तरी जनगणतीने थोडके राहाल, कारण कीं त्वां आ-
पला देव परमेश्वर याची गोष्ट ऐकिली नाहीं. ६३
आणि असें होईल कीं परमेश्वर तुमचें बरें करून
तुह्मास वाढवायाला तुह्मावर जसा संतुष्ट होता
तसा तुमचा क्षय करायास व तुमचा नाश करा-
यास परमेश्वर तुह्मावर संतुष्ट होईल; आणि
जी भूमि वतन करून घ्यायास जिकडे तूं जातोस,
तिजवरून तुह्मी हिसकले जाल. ६४ आणि पर-
मेश्वर पृथ्वीच्या या कांठापासून त्या कांठापर्यंत
सर्व लोकांमध्यें तुझी दाणादाण करील; आणि तेथें
लांकडाचे व दगडाचे दुसरे देव, जे तुला व तुझ्या
पूर्वजांस ठाऊक नव्हते, त्यांची सेवा तूं करसील.
६५ आणि त्या राष्ट्रांमध्यें तुला चैन पडणार नाहीं,
आणि तुझ्या तळपायाला विसांवा होणार नाहीं;
अणखी तेथें परमेश्वर तुझ्या हृदयांत धगधगी
व डोळ्यांस क्षय व जिवाला कासाविसी देईल.
६६ आणि तुझा जीव तुझ्या लक्षांत लोंबकळता
होईल; रात्रंदिवस तुला धास्तीच होईल, आणि

तुझ्या जिवाचा तुला भरवसा होणार नाहीं. ६७
तूं आपल्या मनांत जी धास्ती धरसील तिजमुळें
आणि जें तुझ्या डोळ्यांच्या पाहण्यांत येईल त्या-
मुळें तूं सकाळीं ह्मणसील कीं, 'सांज झाली अ-
सती तर किती बरें होतें!' आणि संध्याकाळीं
ह्मणसील कीं, 'सकाळ झाली असती तर किती
बरें होतें!' ६८ अणखी ज्या मिसराच्या वा-
टेविषयीं म्या तुला सांगितलें कीं, 'ती तूं फि-
रून न पाहावी,' त्यांत परमेश्वर तुला तारवां-
नी माघारें नेईल; आणि तेथें चाकर व चाक-
रिणी होण्यासाठीं तुह्मी आपल्या शत्रूंकडून असे
विकले जाल कीं कोणी विकत घेणारा मिळणार
नाहीं.

## अध्याय २९.

मोआब देशांत इस्राएलाच्या संतानासीं जो
करार करायास परमेश्वराने मोशाला
आज्ञा दिल्ही त्यांतल्या ह्या गोष्टी आहेत; त्याने
होरेबांत त्यांसीं जो करार केला त्याखेरीज हा
आहे. २ तेव्हां मोशाने सर्व इस्राएल बोलावून
त्यांस सांगितलें, मिसर देशांत फारोला व त्या-
च्या सर्व चाकरांस व त्याच्या अवघ्या देशाला जें
परमेश्वराने तुमच्या देखतां केलें, तें अवघें तुह्मी
पाहिलें आहे. ३ ज्या मोठ्या प्रचीति तुझ्या
डोळ्यांनी पाहिल्या, आणि जीं अद्भुतें तीं व
ते मोठे चमत्कार त्याने केले. ४ तथापि आ-
जच्या दिवसापर्यंत परमेश्वराने तुह्मास सम-
जणारें मन व पाहणारे डोळे व ऐकणारे कान
दिल्हे नाहींत. ५ म्या तर तुह्मास रानांत
चाळीस वर्षें चालविलें आहे, तुमचीं वस्त्रें
तुमच्यावरून जुनीं होऊन गेलीं नाहींत, आणि
तुझ्या पायांतून तुझें पायतण झिजून गेलें नाहीं.
६ तुह्मी भाकर खाली नाहीं, आणि द्राक्षारस व
मद्य प्याला नाहीं; यासाठीं कीं मी तुमचा देव
परमेश्वर हें तुह्मास कळावें. ७ जेव्हां तुह्मी
या ठिकाणीं आला, तेव्हां हेश्बोनाचा राजा सी-
होन व बाशानाचा राजा ओग, हे आह्मासीं ल-
ढायास बाहेर आले, परंतु आह्मी ते मारिले. ८
आणि आह्मी त्यांचा देश घेऊन रऊबेनी व गा-
दी व मनश्शेच्या अर्ध्या वंशास वतन करून
दिल्हा. ९ तर जें कांहीं तुह्मी कराल, त्यांत
तुमचें सफळपण व्हावें ह्मणून या करारांतल्या
गोष्टी संभाळून त्यांचें आचरण करा.

१० स्वतां तुह्मी सर्व आपला देव परमे-
श्वर यासमोर आज उभे राहिला आहां; तुमच्या
वंशांचे तुमचे अधिकारी, तुमचे वडील व तुह्मा-
वरले प्रधान, असे इस्राएलांतले सर्व पुरुष; ११
तुमचीं बाळकें, तुमच्या स्त्रिया, आणि तुझ्या छा-
वणींत जो तुझा विदेशी, तुझीं लांकडें तोडणाराहि
आणि तुझें पाणी भरणारा देखील उभा राहिला
आहे. १२ यासाठीं कीं तुझा देव परमेश्वर
याचा करार व त्याची शपथ, जी तुझा देव पर-
मेश्वर आज तुझ्याजवळ करितो, तींत त्वां शि-
रावें. १३ हेतु असा कीं त्याने तुला आपला
लोक असें आज स्थापावें, आणि तो तुझा देव
असा व्हावा; असें त्याने तुला सांगितलें, आणि
तुझे पूर्वज, आब्राहाम, इसहाक व याकोब यांजवळ
जसी शपथ वाहिली तसें. १४ आणि हा करार
व ही शपथ केवळ तुह्माजवळच मी करितों, असें
नाहीं. १५ तर जो एथें आमचा देव परमे-
श्वर यासमोर आज आमच्यासंगतीं उभा राहत
आहे त्याजवळ, आणि जो आज एथें आमच्या-
संगतीं नाहीं त्याजवळहि करितों. १६ कां तर
तुह्मास ठाऊक आहे कीं आपण मिसर देशांत
राहत होतों, आणि असें कीं तुह्मी ज्या राष्ट्रां-
मध्यें फिरलां, त्यांमध्यें आपण फिरलों आहों.
१७ आणि त्यांचीं ओंगळपणें व त्यांचे ताबडे देव
ह्मणजे लाकडाचे व दगडाचे, रुप्याचे व सोन्या-
चे जे त्यांजवळ आहेत, ते तुह्मी पाहिले. १८
कोण जाणे! तुमच्यामध्यें पुरुष, किंवा स्त्री, किंवा
कूळ, किंवा वंश ज्याचें अंतःकरण आज आमचा
देव परमेश्वर याला सोडून गैरमार्गाने त्या राष्ट्रां-
च्या देवांची सेवा करायास जातें, तसा कोणी अ-
सेल. १९ कोण जाणे! विष व कडूदवणा फळ-
देणारा अंकुर तुमच्यामध्यें असेल; असाहि कोणी
असेल कीं या शपथेच्या गोष्टी ऐकतांना आपल्या
मनांत असा आशीर्वाद ह्मणून घेईल कीं, "जरी
मी आपल्या मनाच्या दुर्विचाराप्रमाणें चालतों
कीं शोषकर शिपणें करिशीं, तरी माझें कल्याण
होईल." २० तसल्यास परमेश्वर

सोडायास मान्य होणार नाहीं, परंतु त्या माणसा-
वर **परमेश्वराचा** क्रोध व त्याचा संताप धुमस-
ता होईल, आणि या पुस्तकांत लिहिलेले सर्व
शाप त्यावर पडतील, आणि **परमेश्वर** त्याचें
नाम आकाशाखालून खोडून टाकील. २१ आ-
णि या शास्त्रपुस्तकांत लिहिलेल्या करारांतल्या
सर्व शापांप्रमाणें **परमेश्वर** त्याला इस्राएलाच्या
सर्व वंशांतून वाईट होण्यासाठीं वेगळें करील.
२२ तेव्हां पुढल्या पिढीचीं तुमचीं लेंकरें जीं तुम-
च्यामागें होऊन उठतील तीं ह्मणतील, आणि पर-
का जो दुरल्या देशापासून येईल तोहि ह्मणेल,
कां कीं त्या देशाला ज्या पटक्या, आणि त्याला
जे रोग **परमेश्वराने** लावलेले होतील, त्यांस
तीं पाहतील, २३ कीं त्यातली सर्व भूमि गंध-
की नखताची व खाराची व जळकी आहे; ती
पेरली जात नाहीं आणि उत्पन्न देत नाहीं; तिज-
वर कांहीं हिरवळहि वाढत नाहीं; सदोम व ग-
मोरा, अद्मा व जबोयीम ज्यांस **परमेश्वराने**
क्रोधेंकरून व संतापेंकरून मोडून टाकिलें, त्यांच्या
मोडून टाकण्याप्रमाणें तेथें झालें. २४ सर्व रा-
ष्ट्रेंहि ह्मणतील कीं, **परमेश्वराने** या देशाला
असें कशासाठीं केलें? एवढ्या मोठ्या क्रोधाचें
कारण कां झालें? २५ मग कोणी सांगतील,
त्यांच्या पूर्वजांचा देव **परमेश्वर** यानें जेव्हां
त्यांस मिसर देशांतून काढिलें, तेव्हां जो करार
त्यांसीं केला, त्याचा तो करार त्यांनी टाकून दि-
ल्हा, यास्तव. २६ आणि त्यांनी जाऊन दुसऱ्या
देवांची सेवा केली आणि त्यांचें भजन केलें; त्यांस
जे देव ठाऊक नव्हते, आणि त्यांजवळ त्यानें नेमि-
ले नव्हते त्यांची केली. २७ यास्तव **परमेश्व-
राने** या देशावर रागें भरून या पुस्तकांत लिहि-
लेले सर्व शाप यावर आणिले. २८ आणि पर-
मेश्वराने रागेंकरून व संतापेंकरून व मोठ्या को-
पेंकरून त्यांस त्यांच्या देशांतून उपटून आजच्या
दिवसाप्रमाणें त्यास दुसऱ्या देशांत घातलें.’ २९
ज्या गोष्टी गुप्त ठेवलेल्या, त्या आमचा देव **पर-
मेश्वर** याच्या आहेत, परंतु ज्या उघड्या केले-
ल्या, त्या आमच्या व आमच्या संतानांच्या सर्व-
काळ आहेत; ह्मणजे आह्मी या शास्त्रांतल्या
सर्व गोष्टी पाळाव्या.

## अध्याय ३०.

तरी असें होईल कीं जेव्हां ह्या सर्व गोष्टी ह्म-
णजे हा आशीर्वाद व शाप, जे म्या तुझ्यापुढें
ठेविले, ते तुजवर येतील, आणि तुझा देव **परमे-
श्वर** याकडून ज्या सर्व राष्ट्रांत तूं ढकलेला हो-
सील, त्यांमध्यें तूं ह्या गोष्टी आपल्या मनांत जर
आणसील; २ आणि ज्यांप्रमाणें मी आज तुला
आज्ञा देतों, त्या अवघ्यांप्रमाणें तूं आपल्या संतानां-
सुद्धां आपल्या सर्व अंतःकरणाने व आपल्या सर्व
जिवाने आपला देव **परमेश्वर** याकडे फिरसील,
आणि त्याची गोष्ट ऐकसील; ३ तर तुझा देव
**परमेश्वर** तुझ्या पाडावकरून नेलेल्यांस फिर-
वील, आणि तुजवर ममता करील; असें ज्या लो-
कांमध्यें तुझा देव **परमेश्वर** यानें तुझी दाणादाण
केली, त्या सर्वांतून तुला फिरून गोळा करील.
४ जरी आकाशाच्या कांठापर्यंत तुला ढकलें अ-
सलें, तरी तुझा देव **परमेश्वर** तुला तेथून गोळा
करील; तेथून देखील तुला मिळवून घेईल. ५
आणि तुझ्या पूर्वजांस जो देश वतनाचा होता,
त्यांत तुझा देव **परमेश्वर** तुला आणील, आणि
तो तुझ्या वतनाचा होईल; तुझ्या पूर्वजांपेक्षांहि
तुझें बरें करून तुला वाढवील. ६ आणि त्वां
जगावें ह्मणून आपल्या सर्व मनाने व आपल्या सर्व
जिवाने आपला देव **परमेश्वर** यावर प्रीति करा-
वी, यासाठीं तुझा देव **परमेश्वर** तुझ्या मनाची
व तुझ्या संतानाच्या मनाची सुंता करील. ७
आणि तुझे शत्रू व तुझे द्वेषी, जे तुझ्या पाठीं ला-
गतील, त्यांवर तुझा देव **परमेश्वर** हे सर्व शाप
लावील. ८ जेव्हां तूं फिरसील आणि **परमे-
श्वराची** गोष्ट ऐकून त्याच्या ज्या आज्ञा मी आज
तुला लावून देतों, त्या सर्व पाळसील, ९ तेव्हां
तुझ्या हातच्या सर्व कामावरून तुझ्या पोटच्या
फळांवरून व तुझ्या पशूंच्या फळांवरून व तुझ्या
भूमीच्या फळांवरून तुझा देव **परमेश्वर** बऱ्या-
साठीं तुला भरपूर करील; कां तर **परमेश्वर**
तुझ्या पूर्वजांवर जसा संतुष्ट होता, तसा तो फि-
रून बऱ्यासाठीं तुजवर संतुष्ट होईल. १० जर
तूं आपला देव **परमेश्वर** याची गोष्ट ऐकून या
शास्त्रपुस्तकांत लिहिलेल्या त्याच्या आज्ञा व त्याचे

नेम पाळसील, आणि तूं आपल्या सर्व अंतःकरणाने
व आपल्या सर्व जिवाने आपला देव परमेश्वर
याकडे फिरसील तर तो करील. ११ आणि मी
आज तुला जी आज्ञा लावून देतों, ती ही तुला
अवघड नाहीं, ती दूरहि नाहीं. १२ ती आका-
शांत असी नव्हे कीं तुह्मी ह्मणावें, "आमच्या-
साठीं कोण आकाशांत चढून तिला आमच्याज-
वळ आणील कीं आह्मी ती ऐकून तिचें आचरण
करावें." १३ आणि ती समुद्राच्या पलिकडे
असी नव्हे कीं तुह्मी ह्मणावें, "समुद्राच्या पलिकडे
आमच्यासाठीं कोण जाऊन तिला आमच्याजवळ
आणील कीं आह्मी ती ऐकून तिचें आचरण
करावें." १४ परंतु ही गोष्ट तुला फार जवळ
आहे, मानण्याविषयीं तुझ्या तोंडीं व तुझ्या हृद-
यीं आहे.

१५ पाहा, म्या आज तुझ्यापुढें बऱ्यासंगतीं
जीवन आणि वाईटासंगतीं मरण ठेविलें आहे.
१६ कां तर मी आज तुला असी आज्ञा देतों कीं
त्वां आपला देव परमेश्वर यावर प्रीति करावी;
त्याच्या मार्गांत चालावें, आणि त्याच्या आज्ञा व
त्याचे नेम व त्याच्या नीति पाळाव्या; मग तूं
जगसील आणि वाढसील, आणि तूं ज्या देशाला
वतन करून घ्यायास जातोस, त्यांत तुझा देव
परमेश्वर तुला आशीर्वाद प्राप्त करील. १७
परंतु जर तुझें मन विपरीत होऊन तूं न ऐकसील,
आणि मोहित होऊन दुसऱ्या देवांस भजून त्यां-
ची सेवा करसील. १८ तर मी आज तुह्मास
सांगून ठेवितों कीं तुह्मी नाश पावालच पावाल; ज्या
भूमीला वतन करून घ्यायास जातांना तूं यार्देन
वल्हांडितोस, तिजवर तुह्मी बहुत दिवस राह-
णार नाहीं. १९ मी आज तुह्माविषयीं आकाश
व पृथ्वी हे साक्षीदार करून घेतों; जीवन व मरण,
आशीर्वाद व शाप तुझ्यापुढें ठेवितों, तर तूं जीवन
निवडून घे, ह्मणजे तूं आपल्या संतानासुद्धां जग-
सील. २० ह्मणजे त्वां आपला देव परमेश्वर
यावर प्रीति करून त्याची गोष्ट ऐकावी, अणखी
त्याला लगटून राहावें; कां तर तोच तुझें जीवन
व तुझ्या दिवसांचें वाढवण आहे; तेणेंकरून जी
भूमि परमेश्वराने तुझे पूर्वज, आब्राहाम, इझाक
व याकोब यांस शपथ वाहून देऊं केली, तिजवर
तूं राहसील.

## अध्याय ३१.

तेव्हां मोशाने जाऊन ह्या गोष्टी सर्व इस्राए-
लास सांगितल्या. २ आणि त्याने त्यांस असें
ह्मटलें, मी आज एकशें वीस वर्षांचा आहें;
माझ्याने बाहेर जाणें आणि आंत येणें यापुढें हो-
णार नाहीं; आणि परमेश्वराने मला सांगितलें, "तूं
या यार्देनेच्या पलिकडे जाणार नाहींस." ३ तुझा
देव परमेश्वर तो तुझ्यापुढें चालत जाईल; तो
तुझ्यापुढून तीं राष्ट्रें नाहींसीं करील आणि तूं त्यां-
चें वतन करून घेसील, यहोशवा तो तुझ्यापुढें
चालत जाईल; असें परमेश्वराने सांगितलें,
तसें होईल. ४ आणि परमेश्वराने अमोऱ्यांचे
राजे सीहोन व ओग यांसीं, आणि यांच्या देशा-
सीं असें केलें, ह्मणजे यांचा नाश केला, तसें
त्यांसीं करील; ५ कां कीं परमेश्वर त्यांस
तुमच्या स्वाधीन करील; आणि जी जी आज्ञा म्या
तुह्मास दिल्ही, त्या सर्वांप्रमाणें तुह्मी त्यांस क-
राल. ६ तुह्मी धीर धरून धीट व्हा, त्यांपुढें भिऊं
नका आणि घाबरूं नका; कारण कीं तुझा देव
परमेश्वर तो तुझ्यासंगतीं चालत आहे; तो तुला
टाकणार नाहीं, आणि तुला सोडणार नाहीं.

७ तेव्हां मोशाने यहोशवा बोलावून सर्व
इस्राएलाच्या देखतां त्याला सांगितलें, 'तूं धीर
धरून धीट हो; कारण कीं परमेश्वर या लोकां-
ला जो देश द्यायास यांच्या पूर्वजांजवळ शपथ
वाहिली, त्यांत त्यांसुद्धां तुला जायाचें आहे, आणि
तुला त्यांस तो वतन करून द्यायाचा आहे. ८
आणि परमेश्वर, तो तुझ्यापुढें चालणारा; तो
तुला अनुकूल होईल तो तुला टाकणार नाहीं,
आणि तुला सोडणार नाहीं; तूं भिऊं नको आणि
धास्ती धरूं नको.

९ तर मोशाने हें शास्त्र लिहून जे लेवीच्या
वंशांतील याजक परमेश्वराच्या कराराचा कोश
वाहत होते, त्यांस व इस्राएलाच्या सर्व वडिलांस
दिल्हें. १० आणि मोशाने त्यांस असी आज्ञा
दिल्ही कीं सात सात वर्षांच्या शेवटीं सुटकेच्या

वर्षांतल्या पूर्वकाळीं मंडपांच्या सणांत, ११ जेव्हां
सर्व इस्राएल तुझा **देव परमेश्वर** यासमोर जें
ठिकाण तो निवडून घेईल तेथें दर्शनास येईल,
तेव्हां तूं हें शास्त्र सर्व इस्राएलापुढें त्यांच्या
कानांस वाचून सांग. १२ लोक, ह्मणजे पुरुष
व स्त्रिया व बाळकें व तुझ्या दरवाज्यांतला तुझा
विदेशी यांची मंडळी मिळीव; यासाठीं कीं त्यांनी
ऐकावें, आणि यासाठीं कीं त्यांनी शिकावें, आणि
तुमचा **देव परमेश्वर** याला भ्यावें, आणि या
शास्त्रांतल्या सर्व गोष्टी संभाळून पाळाव्या. १३
असीं त्यांचीं लेंकरें ज्यांस कळलें नाहीं, त्यांनी
ऐकून असें शिकावें कीं जी भूमि वतन करून
घ्यायास तुह्मी यार्देनेच्या पलिकडे जेथें जातां, तेथें
जितके दिवस तुह्मी जगाल, त्या सर्वांत त्यांनी
तुमचा देव **परमेश्वर** याला भ्यावें.

१४ तेव्हां **परमेश्वराने** मोशाला सांगितलें
कीं, "पाहा, तुझे मरायाचे दिवस जवळ आले; तूं
यहोशवाला बोलाव, मग तुह्मी सभामंडपाच्या
ठिकाणीं उभे राहा; मग मी त्याला आज्ञा देईन."
यास्तव मोशे आणि यहोशवा हे जाऊन सभामं-
डपाच्या ठिकाणीं उभे राहिले. १५ तेव्हां पर-
मेश्वर मंडपांत ढगाच्या खांबाने दिसला, आणि
ढगाचा खांब मंडपाच्या दारासीं उभा राहिला.
१६ तेव्हां **परमेश्वर** मोशाला बोलला, "पाहा,
तुला तुझ्या पूर्वजांसंगतीं निजायाचें आहे, आणि हे
लोक ज्या देशांत जातात त्यांमध्यें उठून अन्य देवां-
च्या पाठीं लागून व्यभिचार करितील; असें म-
ला सोडून जो करार म्या त्यांसीं केला, त्याला
मोडतील. १७ यास्तव त्या दिवसीं माझा राग
त्यांवर पेटेल, आणि मी त्यांस सोडून आपलें तोंड
त्यांविषयीं गुप्त करीन; तेव्हां ते क्षयाचे होतील,
आणि त्यांस बहुत दुःखें व संकटें प्राप्त होतील;
मग त्या दिवसीं ते ह्मणतील, आमचा देव आम-
च्यामध्यें नाहीं, यामुळें तर हीं दुःखें आह्मास
प्राप्त झालीं नाहींत काय?' १८ परंतु ते दुसऱ्या
देवांकडे वळण्याने जी अवघी दुष्टाई करितील
तिजमुळें मी त्या दिवसीं आपलें तोंड गुप्त करी-
नच करीन. १९ तर आतां तुह्मी आपल्यासाठीं
हें गीत लिहा, आणि तूं हें इस्राएलाच्या संतानांस
शिकीव, हें त्यांच्या तोंडांत घाल; ह्मणजे हें गीत
इस्राएलाच्या संतानांविषयीं माझा साक्षी असें
होईल. २० जी दूध व मध वाहण्याची भूमि
म्या त्यांच्या पूर्वजांस शपथेने देऊं केली, तिजवर
म्या त्यांस नेल्यानंतर ते खाऊन तृप्त होऊन पुष्ट
होतील, आणि दुसऱ्या देवांकडे वळून त्यांची
सेवा करितांना मला धिक्कारून माझा करार मोड-
तील. २१ आणि जेव्हां त्यांस बहुत दुःखें व
संकटें प्राप्त होतील, तेव्हां असें होईल कीं हें
गीत त्यांच्यापुढें साक्षीरूपें उत्तर करील, यास्तव
त्यांच्या संतानांच्या तोंडांतून विसरून न जावें;
कारण कीं जो देश म्या शपथेने देऊं केला, त्यांत
म्या त्यांस नेल्यापूर्वी, ह्मणजे आज ते आपली जी
योजना करितात, ती मला कळली आहे. २२
यास्तव मोशाने त्या दिवसीं हें गीत लिहून
इस्राएलाच्या संतानांस शिकविलें. २३ त्याने
तर नूनाचा पुत्र यहोशवा याला आज्ञा देतां सां-
गितलें, "तूं धीर धरून धीट हो, कारण कीं जो
देश म्या इस्राएलाच्या संतानांस शपथेने देऊं
केला, त्यांत तुला तीं न्यायाचीं आहेत, आणि मी
तुला अनुकूळ होईन.

२४ तर मोशाने या शास्त्राच्या गोष्टी त्यां-
च्या शेवटपर्यंत पुस्तकांत लिहून समाप्त केल्या.
२५ तेव्हां असें झालें कीं जे लेवी **परमेश्वरा-
च्या** कराराचा कोश वाहत होते, त्यांस मोशाने
असी आज्ञा दिल्ही कीं, २६ तुह्मी हें शास्त्र
पुस्तक घेऊन आपला **देव परमेश्वर** याच्या क-
राराच्या कोशांत एका बाजूस ठेवा, आणि तेथें
तुजविषयीं साक्षी असें होवो. २७ कां तर तुझें
फितुरीपण व तुझ्या मानेचें ताठरपण मला कळलें;
पाहा, मी तुमच्यासंगतीं जिवंत असतां, इतक्यांत
आज तुह्मी **परमेश्वराविषयीं** फितुरी झालां, तर
मी मेल्यावर किती व्हाल. २८ तुह्मी आपल्या
वंशांतल्या सर्व वडिलांस व आपल्या सरदारांस
माझ्याजवळ मिळवा; मग मी त्यांच्या कानांसीं
ह्या गोष्टी बोलेन, आणि त्यांविषयीं आकाश व
पृथ्वी साक्षीस ठेवीन. २९ कां तर मला हें
कळलें कीं मी मेल्यानंतर तुह्मी अगदीं बिघडून
जो मार्ग म्या तुह्मास आज्ञेने लाविला त्यामधून
वळून जाल, आणि पुढल्या दिवसांत तुह्मास दुः-
ख प्राप्त होईल; कां तर तुह्मी **परमेश्वराच्या**

देखतां दुष्टाई करून आपल्या हातांच्या कामा-
वरून त्यांसीं चिडणूक कराल. ३० तर मो-
श्याने या गितांतल्या गोष्टी त्यांच्या शेवटपर्यंत सर्व
इस्राएलाच्या समुदायाच्या कानांसीं सांगितल्या.

## अध्याय ३२.

हे आकाशा, मी बोलत असतां तूं कान लाव;
हे पृथ्वी, तूंहि माझ्या तोंडच्या गोष्टी ऐक. २
पावसाप्रमाणें माझ्या अनुसंधानांची वृष्टि होईल;
माझा बोध दहिंवरासारिखा पाझरेल; जसें धु-
कें हरळीवर, आणि जशा पाहळ्या हिरवळीवर
तसी. ३ कारण कीं मी **परमेश्वराचें** नाम गा-
जवीन; तुह्मी आमच्या **देवाला** थोरपण मानून
द्या. ४ **तो** खडकरूप, त्याचें काम पक्कें, कारण
कीं त्याचे सर्व मार्ग न्यायाचे; तो सात्विक देव;
अन्यायाचा नाहींच; नीतिवान व सरळ आहे.
५ ते आपणच नासले, यांची खोड त्याच्या लेंक-
रांची नाहीं; वांकडी व विपरीत पिढी, असी ते
आहेत. ६ अशानेच **परमेश्वराचे** उपकार फे-
डितां काय? अरे मूर्ख व ज्ञानशून्य लोका; तो
तुझा बाप, त्याने तुला सोडवून घेतलें; तो तुझा
उत्पन्न कर्त्ता, त्याने तुला उभारिलेंहि, असें नव्हे
काय? ७ पूर्वकाळचे दिवस आठीव; तुह्मी पि-
ढीपिढीचीं वर्षे ध्यानांत आणा; तूं आपल्या बा-
पाला विचार, मग तो तुला कळवील; आपल्या
वडिलांसहि, मग ते तुला सांगतील. ८ जेव्हां
**परात्पराने** राष्ट्रांस वतन दिल्हें, जेव्हां त्याने आ-
दामाचे वंशस्थ विस्तारले, तेव्हां इस्राएलाच्या सं-
तानांच्या गणतीप्रमाणें लोकांस सीमा लावून दि-
ल्ह्या. ९ कारण कीं **परमेश्वराचे** लोक ते
त्याचा विभाग; याकोब लोक त्याचें सूत्रनेमित
वतन आहे. १० ते त्याला रानरूप देशांत
मिळाले; ओरडण्याच्या घोर अरण्यांतच त्याने
त्यांस फिरवीत नेलें; तो त्यांस बोध करीत गे-
ला; त्याने त्यांस डोळ्याच्या बुबुळासारिखें
राखिलें. ११ जसा गरुड आपलें कोटें हालवून
नीट करितो, आपल्या पिल्लांवर थरारून बस-
तो, आपले पंख त्यांवर पसरितो, आणि त्यांस
उचलून आपल्या पंखांवर घेतो; १२ तसें
**परमेश्वराने** त्यांस वागविलें; परका देव त्या
संगतीं अगदीं नव्हता. १३ त्याने त्यांस पृथ्वींत-
ल्या उंच स्थानांवर चालविलें, ह्मणून त्याने शेतां-
चीं उत्पन्नें खाल्लीं, आणि त्याने त्यांस खडकावरलें
मोहोळ चोखूं दिल्हें; गारेच्या खडकांतून तेलहि
दिल्हें. १४ गुरांचें लोणी व शेरडांचें दूध, यां-
सुद्धां पुष्ट कोंकरें, आणि बाशान जातीचे मेंढे
व बोकड, यांसुद्धां पौष्टिक उत्कृष्ट गहूं दिल्हे,
आणि तूं द्राक्षाचा निरा रस प्यालास. १५ तरी
येशूरून पुष्ट होऊन लात मारिता झाला; तूं पुष्ट
झालास, फुगलास, पुष्टतेने व्यापला गेलास; तेव्हां
त्याने आपल्या उत्पन्न करणाऱ्या **देवाचा** त्याग
केला, आणि आपल्या तारणाच्या खडकाला तुच्छ
मोजिलें. १६ जे परके त्यांच्या योगें त्यांनी त्याला
आवेशी केलें; ओंगळपणेंकरून त्याला चिडविलें.
१७ त्यांनी देवासाठीं यज्ञ केले नाहींत, भुतांसा-
ठीं केले; जे देव त्यांस ठाऊक नव्हते, जे नवे,
मध्येंच आलेले, त्यांसाठीं केले; तुमचे पूर्वज त्यांस
भीत नव्हते. १८ जो खडकरूप, ज्याने तुला
जन्म दिल्हा, त्याची आठवण त्वां सोडिली; तूं
आपल्या उत्पादक **देवाला** विसरलास. १९ ते-
व्हां **परमेश्वराने** पाहिलें, आणि त्याच्या पुत्रांनी
व त्याच्या कन्यांनी चिडणूक केलें यावरून तो
कंटाळला. २० तेव्हां त्याने ह्मटलें, 'मी आपलें
तोंड त्यांविषयीं गुप्त करीन; त्यांचा परिणाम कसा,
हें मी पाहीन; कारण कीं ते अति विपरीत पिढीचे,
ज्यांचा विश्वास नाहीं तसीं लेंकरें आहेत. २१
जे देव नाहींत, त्यांच्यायोगें त्यांनी मला आवेशी
केलें; त्यांनी आपल्या व्यर्थ कामांच्यायोगें मला
चिडविलें; तर जे लोक नाहींत, त्यांच्यायोगें मी
त्यांस आवेशी करीन; मूर्ख राष्ट्राच्यायोगें त्यांस
चिडवीन. २२ कारण कीं माझ्या रागांत अग्नि
पेटला आहे; तर तो अति खोल अधोगतीपर्यंत
जाळील; पृथ्वीला तिच्या उत्पन्नासुद्धां भस्मच
करील; डोंगरांच्या पायांसहि जाळील. २३ मी
त्यांवर दुःखांची रास करीन; आपले बाण त्यांवर
सारून टाकीन. २४ भुकेने क्षय आणि विजेने
अति खालेपण, कडुपणाने निर्दाळणच करीन; ह्म-
णजे श्वापदांचे दांत, मातींतल्या वळवळणाऱ्यांचें
विषहि त्यांवर लावीन. २५ बाहेर तरवार, खो-
ल्यांमध्येंहि भय त्यांस करील; तरणा व तरणीहि,

तान्ह्यासुद्धां पिकलेल्या केसांचा पुरुष यांचा नाश
होईल. २६ म्या ह्मटलें होतें कीं, 'आपण त्यां-
चा निःपात करावा, मनुष्यांतून त्यांची आठवण ना-
हींसी करावी. २७ तरी मी शत्रूच्या कुचेष्टेला
भितों; कदाचित् त्यांचे वैरी परकेपण करितील,
कदाचित् ह्मणतील, 'आमचा हात उंचावलेला
आहे, आणि परमेश्वराने हें काम कांहीं केलें
नाहीं. २८ कां तर ते बुद्धिनाश पावलेलें राष्ट्र
असे आहेत, त्यांस समजच नाहीं. २९ ते
ज्ञानी असते तर किती बरें होतें! त्यानी हें सम-
जावें; आपल्या परिणामावर ध्यान लावावें. ३०
त्यांच्या खडकाश्रयानें त्यांस विकून टाकिलें; पर-
मेश्वरानेच ते कोंडून दिल्हे; असें जर झालें
नसतें, तर एकाने हजारांची पाठ कसी पुरविली
असती? आणि दोघानी दाहा हजारांस कसें
पळविलें असतें? ३१ कां कीं आमचे शत्रू देखील
निवाडा करीत असतांहि त्यांचा खडक आमच्या
खडकासारिखा नाहीं. ३२ कारण कीं त्यांचा
द्राक्षवेल सदोमी द्राक्षवेलाचा, आणि गमोऱ्याच्या
शेतांतला, त्यांचीं द्राक्षें पित्तरूप विषाचीं द्राक्षें;
त्यांचे घोस अति कडू आहेत. ३३ त्यांचा द्राक्षा-
रस भुजंगांचें विष, पथानी सर्पांचेंहि, मृत्युकारक
कडू विष आहे. ३४ हें माझ्याजवळ सांठवलेलें,
माझ्या संग्रहांमध्यें शिक्का मारलेलें असें नाहीं कीं
काय? ३५ सूड घेणें व फेडणें हें माझ्याकडे
आहे; काळेंकरून त्यांचा पाय निसटेल; कारण
कीं त्यांच्या संकटाचा दिवस जवळ आला आहे,
त्यांचीं भविष्यें उतावळीच करितात. ३६ का-
रण कीं परमेश्वर आपल्या लोकांचा निवाडा क-
रील, आणि आपल्या सेवकांविषयीं अनुताप क-
रील, कां तर तो पाहील कीं पराक्रम होऊन गेला,
आणि जो कोंडलेला व उरलेला असा कोणी
नाहीं. ३७ तेव्हां तो बोलेल, 'त्यांचे देव ह्मणजे
ज्या खडकाश्रयावर त्यानी आशा ठेविली, ते कोठें
आहेत? ३८ ज्यानी त्यांच्या यज्ञांतलें मांदें
खालें, जे त्यांच्या पेय अर्पणांचा द्राक्षारस प्याले,
त्यानी उठून तुमचें सहाय करावें; त्यानी तु-
ह्मावर छायारूप व्हावें.' ३९ आतां तुह्मी पा-
हा कीं मी हाच मी, आणि माझ्यासंगतीं देव
नाहीं; मी मरण देतों, जिणेंहि देतों; घायाळ
करितों, बरेंहि मीच करितों, आणि माझ्या हातां-
तून सोडविणारा कोणी नाहीं. ४० केवळ मी
आपला हात आकाशाकडे उभारून ह्मणतों कीं,
मी सर्वकाळ जिवंत आहें. ४१ निश्चयें मी
आपली झळकणारी तरवार पाजितों, आणि आप-
ल्या हाताने न्याय धरितों, आपल्या वैऱ्यांवर सूड-
रूप फेड करितों; आपल्या द्वेष्ट्यांची फेड करि-
तोंच. ४२ मी आपल्या बाणांस रक्ताने माज-
वीन; माझी तरवारहि मांस खाईल; हाणलेले
व धरून आणलेले यांच्या रक्ताने भरेल; शत्रू-
च्या मुख्य अग्रसरांविषयीं तसें होईल. ४३
अहो राष्ट्रें, तुह्मी त्याच्या लोकांसंगतीं उल्हास
करा; कां तर तो आपल्या सेवकांच्या रक्तपाताचे
सूड घेईल; आपल्या वैऱ्यांची सूडरूप फेड करी-
लच; परंतु आपल्या भूमीवर व आपल्या लोकां-
वर प्रसन्न होईल.

४४ तेव्हां मोश्याने, नूनाचा पुत्र होश्या यां-
सुद्धां जाऊन या गीताच्या सर्व गोष्टी लोकांच्या
कानांसीं सांगितल्या. ४५ आणि मोश्याने ह्या
अवघ्या गोष्टी सर्व इस्राएलास सांगून समाप्त केल्या.
४६ तेव्हां त्याने त्यांस सांगितलें कीं, ज्या गोष्टी
मी आज तुमच्याजवळ प्रमाणाने पटवितों, त्या स-
र्वांवर तुह्मी आपलें चित्त ठेवा; त्या आपल्या
लेंकरांस आज्ञेने सांगा; यासाठीं कीं त्यानी या
शास्त्रांतल्या सर्व गोष्टी संभाळून पाळाव्या. ४७
कारण कीं ही गोष्ट तुह्मास अनुपयोगी नव्हे; तर
हेंच तुमचें जीवन आहे, आणि ज्या भूमीला वतन
करून घ्यायास तुह्मी यार्देनेच्या पलिकडे जातां,
तिजवर या गोष्टीच्यायोगें बहुत दिवस पावाल.
४८ मग त्याच दिवसाच्या अवधींत परमेश्वराने
मोश्याला असें सांगितलें कीं, ४९ "या अबारी
डोंगरावरला जो नबो डोंगर मोवाब देशांत यरी-
होच्या समोर आहे, त्यावर तूं चढ, आणि कनान
देश जो इस्राएलाच्या संतानांस मी वतन करून
देतों, तो तूं पाहा. ५० मग जसा तुझा भाऊ
आहरोन होर डोंगरावर मरून आपल्या लोकांसीं
मिळून गेला, तसा तूं ज्या डोंगरावर चढतोस,
तेथें मरून आपल्या लोकांसीं मिळून जा. ५१
कारणसाठीं, तर जीन रानांतला मरीबा कादेश
त्याच्या पाण्याजवळ इस्राएलाच्या संतानांमध्यें

तुम्ही मजवर आज्ञा उलंघन केलें; कसें, तर तुम्हीं
इस्राएलाच्या संतानांत मला पवित्र मानिलें नाहीं.
५२ तर जो देश मी इस्राएलाच्या संतानांस देतों,
त्या देशाला तूं समोर पाहसील, परंतु तिकडे जा-
णार नाहींस.

## अध्याय ३३.

आणि देवाचा माणूस मोशे याने आपल्या
मरणाच्या पूर्वी इस्राएलाच्या संतानांस या-
प्रमाणें आशीर्वाद दिल्हा. २ त्याने असें ह्मटलें
कीं, परमेश्वर सीनायपासून आला; सेईराव-
रून त्यांवर उगवला; पारान डोंगरावरून प्रका-
शला; दाहा हजार भक्तांसुद्धांहि आला; त्यां-
च्यासाठीं त्याच्या उजव्या हातांतून अग्निरूप
नेमबंधन निघालें. ३ निश्चयें लोकांवर प्रीति क-
रितो; त्या तुझे सर्व भक्त तुझ्या हातीं आहेत;
आणि ते तुझ्या पायांजवळ टिकलेले आहेत; एक-
एक तुझ्या गोष्टींचा अंगीकार करितो. ४ मो-
श्याने आज्ञा करून आह्मास शास्त्र दिल्हें; हेंच
याकोबाच्या समुदायाचें वतन आहे. ५ आणि
तो यशुरूनावर राजा होता; जेव्हां लोकांचे अ-
धिकारी व इस्राएलाचे वंश एकत्र मिळाले, तेव्हां
तो बोलला. ६ "रऊबेनाने जगावें, त्याने मरूंच
नये, आणि त्याचे जन थोड्या गणतीचे न व्हावे."
७ आणि तो यहूदाविषयीं हेंच बोलला कीं,
"परमेश्वरा, तूं यहूदाचा शब्द ऐक, आणि त्या-
ला त्याच्या लोकांजवळ ने; त्याचे हात त्याच्या-
साठीं पुरे व्हावे; असा तूं त्याच्या शत्रूंविषयीं
त्याला सहाय हो." ८ आणि लेवीविषयीं तो
बोलला, "हे परमेश्वरा, तुझें थुम्मीम व तुझें ऊ-
रीम तुझ्या धर्माच्या पुरुषाजवळ व्हावें; तरी हे
लेवी, त्वां मास्स्यांत त्याचें सत्व पाहिलें, मारी-
बाच्या पाण्याजवळ तूं त्यासीं भांडलास. ९
त्याने आपल्या बापाविषयीं व आपल्या आईवि-
षयीं ह्मटलें, 'म्या त्याला पाहिलें नाहीं, त्याने तर
आपल्या भावांची ओळख धरिली नाहीं, आणि
आपल्या लेंकरांसहि जाणिलें नाहीं, कारण कीं 'हे
परमेश्वरा, त्यांनी तुझी गोष्ट मानिली होती, आ-
णि तुझा करार पाळिला होता. १० त्यांनी
तुझ्या नीति याकोबाला व तुझें शास्त्र इस्राएला-
ला सांगून दाखवावें; त्यांनी तुझ्या तोंडाजवळ
धूप, आणि तुझ्या वेदीवर सर्वांग होम करून ठे-
वावा. ११ हे परमेश्वरा, तूं त्याच्या द्रव्याला
आशीर्वाद दे, आणि त्याच्या हातांच्या कामावर
प्रसन्न हो; त्यावर जे उठतात, आणि त्याला जे
द्वेषितात, त्यांची कंबर अशी मोड कीं त्यांनी न
उठावें." १२ बन्यामीनाविषयीं तो बोलला, "पर-
मेश्वराच्या प्रियकराने त्याच्याजवळ सुखरूप
राहावें; त्यावर सर्व दिवस त्याने छाया करावी,
आणि त्याच्या खांद्यामध्यें वस्ती करावी." १३
आणि योसेफाविषयीं तो बोलला, "त्याच्या देशा-
वर परमेश्वराचा आशीर्वाद व्हावा; असा कीं
आकाशांतलें उत्तम, दहिंवर, आणि खालीं पसर-
लेलें अगाध पाणी. १४ आणि सूर्याच्या उत्प-
न्नांतलें उत्तम, व चंद्र चंद्राच्या काळीं वाढवून
काढलेलें उत्तम; १५ आणि पूर्वकालिक डोंग-
रांचीं शिखरें, व सर्वकालिक टेंकड्यांवरलें उत्तम,
१६ आणि पृथ्वीच्या भरणासुद्धां तिचें उत्तम;
आणि जो झुडपांत राहिला, त्याच्या आवडी यो-
सेफाच्या मस्तकावर, ह्मणजे जो आपल्या भावांसीं
अलिप्त त्याच्या टाळूवर आशीर्वाद यावा. १७
जसें त्याच्या प्रथम गुराचें वैभव तसें त्याला
व्हावें; आणि त्याचीं शिंगें गेंड्याचीं शिंगें व्हावीं;
त्यांच्यायोगें तो मुलखांस पृथ्वीच्या शेवटापर्यंत
एकत्र लोटील; तीं तर एफ्राइमाचीं अयुतें, आ-
णि तींच मनाश्श्याचे हजारावधि लोक आहेत."
१८ आणि जबूलुनासीं तो बोलला, "हे जबूलुना,
तूं आपल्या बाहेर जाण्यांत आनंद कर; हे इस्सा-
खारा, तूंहि आपल्या राहोट्यांत आनंद कर. १९
ते मुलखांत डोंगरावर बोलावितील, तेथें नीतीचे
यज्ञ करितील; कारण कीं समुद्रामध्यें जो भरपूर,
व जे वाळूंत गुप्त राहिलेले संग्रह त्यांस ते शोषून
घेतील." २० आणि गादाविषयीं तो बोलला,
"जो गादाचा विस्तार करितो, त्याचे धन्यवाद
व्हावे; हा सिंहिणीसारिखा बसला, आणि याने
हाताचें व टाळूचेंहि विदारण केलें. २१ त्याने
तर आपल्यासाठीं प्रथम भाग पाहून घेतला; कां
कीं तेथें तो शककाऱ्याच्या वांटलेल्यांत छावणी
पावला; तरी लोकांच्या अधिकाऱ्यांसहित चा-
लला; त्याने इस्राएलाच्यासंगतीं परमेश्वराची

नीति व त्याचे न्याय नेम पाळिले." २२ आणि
दानाविषयीं तो बोलला, "दान सिंहाचें पिलूं; तो
बाशानावरून उडी मारील." २३ आणि नाफ्-
तालीसीं तो बोलला, "हे नाफ्ताली, तूं प्रसन्नतेने
तृप्त व परमेश्वराच्या आशीर्वादाने पूर्ण; तूं समु-
द्राजवळ व दक्षिणेस वतन पाव." २४ आणि
आशेराविषयीं तो बोलला, "संतानांवरून आशेर
धन्यवादित व्हावा; तो आपल्या भावांस आवडता
होवो, आणि आपला पाय तेलांत बुचकळो. २५
तुझीं पायतणें लोखंडाचीं व तांब्याचीं होवोत,
आणि जसे तुझे दिवस तसें तुझें निवांतपण होवो.
२६ यशुरूनाच्या देवासारिखा कोणी नाहीं; तो
तुझ्या सहायतेने आकाशावर, आणि आपल्या उ-
त्कृष्टतेने अभाळांवर बसून चालतो. २७ अना-
दि देव तुझ्या वस्तीचा, आणि तुला सर्वकाळच्या
हातांचा आधार आहे; तोच तुझ्यापुढून शत्रूला
घालवील; तोच सांगेल, 'नाश कर.' २८ इस्रा-
एल तर सुखरूप एकटाच राहील; याकोबाच्या
झऱ्याजवळ, धान्य व ताजा द्राक्षारस यांच्या दे-
शांत राहील, अणखी त्यावरलें आकाश दहिं-
वर पाडील. २९ हे इस्राएला, तुजवर आशी-
र्वाद आहेत; तुझ्यासारिखे लोक कोण! परमे-
श्वराकडून तारलेला आहेस, तोच तुझ्या सहा-
य्यासाठीं ढालरूप आणि तुला जयाची तरवार
आहे; यास्तव तुझे शत्रू तुझ्यापुढें खोटे होतील,
आणि तूं त्यांच्या उंच ठिकाणांवर पाय देसील.

## अध्याय ३४.

तर मोशे मोवाबाच्या अरण्यांतून यरीहोच्या
समोर जो पिस्गा, त्याचें शिखर नबो डोंगर
यावर चढला; तेव्हां परमेश्वराने त्याला दाना-
पर्यंत गिलादाचा सर्व प्रांत दाखविला. २ आ-
णि सर्व नाफ्ताली, व एफ्राइम व मनाश्शे यांचा
प्रांत, आणि मागल्या समुद्रापर्यंत यहूदाचा सर्व
प्रांत; ३ आणि दक्षिणभाग, ह्मणजे यरीहोज-
वळच्या खोऱ्यांतली तळवट, ज्वारापर्यंत खारीक
झाडांचें नगर असें दाखविलें. ४ तेव्हां परमे-
श्वराने त्याला सांगितलें, "ज्या देशाविषयीं म्यां
आब्राहामाजवळ, इझाकाजवळ व याकोबाजवळ
शपथ वाहून सांगितलें कीं, मी तो तुझ्या संतानाला
देईन,' तो हाच; म्यां तुला तुझ्या डोळ्यांपुढेंच
दाखविला, परंतु तूं पलिकडे तेथें जाणार ना-
हींस." ५ यास्तव परमेश्वराचा सेवक मोशे
तेथें मोवाबाच्या देशांत परमेश्वराच्या सांग-
ण्याप्रमाणें मेला. ६ मग त्याने त्याला मोवाबा-
च्या देशांतल्या खोलग्यांत बेथपौरासमोर पुरिलें;
परंतु आजच्या दिवसापर्यंत त्याची कबर कोणाला-
हि ठाऊक नाहीं. ७ आणि जेव्हां मोशे मेला,
तेव्हां तो एकशें वीस वर्षांचा होता; त्याची दृष्टि
मंद झाली नव्हती, आणि त्याचें जिवटपणहि उ-
डून गेलें नव्हतें. ८ आणि इस्राएलाच्या संतानांनी
मोवाबाच्या अरण्यांत मोश्यासाठीं तीस दिवस
शोक केला; असे मोश्याविषयीं शोकांतल्या रड-
ण्याचे दिवस समाप्त झाले. ९ तेव्हां नुनाचा पुत्र
यहोशवा ज्ञानाच्या आत्म्याने पूर्ण झाला; कारण कीं
मोश्याने आपले हात त्यावर ठेविले होते, आणि
इस्राएलाच्या संतानांनी त्याचें ऐकून जसी परमे-
श्वराने मोश्याला आज्ञा दिल्ही, तसें केलें. १०
तथापि ज्याला परमेश्वराने तोंडोतोंडीं ओळ-
खिलें, तसा मोश्यासारिखा दुसरा कोणी भविष्य-
वादी इस्राएलांत उठला नाहीं. ११ मिसर दे-
शांत फारोवर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्या-
च्या संपूर्ण देशावर, जीं अद्भुतें व आश्चर्यकृत्यें
करायास परमेश्वराने त्याला पाठविलें, त्या स-
र्वांविषयीं; १२ आणि सर्व भारी पराक्रम व
सर्व मोठें भय, जीं मोश्याने संपूर्ण इस्राएलाच्या
देखतां करून दाखविलीं, त्यांविषयीं तसा दुसरा
कोणी नाहीं.

# यहोशवा याचें पुस्तक.

## अध्याय १.

तेव्हां परमेश्वराचा सेवक मोशे मेल्यावर
असें झालें कीं नूनाचा पुत्र यहोशवा मोश्या-
चा चाकर, याला परमेश्वराने असें सांगितलें
कीं, २ "माझा सेवक मोशे मेला, तर आतां
तूं उठून, जो देश मी या इस्राएलाच्या संतानांस
देतों तेथें त्या सर्व लोकांस घेऊन या यार्देनेच्या
पलिकडे जा. ३ जसें म्या मोश्याला सांगितलें
होतें तसें ज्या ज्या ठिकाणीं तुमच्या पायाचा
तळवा लागेल, तें तें सर्व म्या तुह्मास दिल्हें आहे.
४ या रानापासून त्या लबानोनापर्यंत, आणि मो-
ठी फरात नदी त्या नदीपर्यंत, हित्यांचा सर्व देश
आणि मावळत्या बाजूस मोठ्या समुद्रापर्यंत, अशा
तुमच्या सीमा होतील. ५ तुझ्या आयुष्याचे
दिवस संपत तोंपर्यंत कोणी तुझ्यापुढें टिकणार
नाहीं; जसा मी मोश्याला अनुकूळ होतों, तसा
तुला अनुकूळ होईन; मी तुला टाकणार नाहीं,
आणि तुला सोडणार नाहीं. ६ तूं धीर धरून
धीट हो, कां तर या लोकांस जो देश द्यायासाठीं
म्या यांच्या पूर्वजांजवळ शपथ वाहिली, तो तूं त्यां-
जवळ वतनासाठीं देसील. ७ माझा सेवक मोशे
याने जें शास्त्र तुला नेमून दिल्हें, त्या सर्वांप्रमाणें
संभाळून करायासाठीं तूं धीरच धरून फार धीट
हो; जेथें कोठें जासील तेथें तेथें आपण सुज्ञपणानें
वागावें ह्मणून तें सोडून उजव्याकडे किंवा डाव्या-
कडे वळूं नको. ८ त्या शास्त्राच्या लेखाने तुझें
तोंड न सोडावें; तर दिवसां व रात्रीं त्वां त्याचें
मनन करावें; यासाठीं कीं त्यांत जें लिहिलेलें त्या
सर्वांप्रमाणें त्वां संभाळून चालावें; कारण कीं तशानें
तूं आपला मार्ग सफळ करसील, आणि तेव्हां
सुज्ञपणाने वागसील. ९ म्या तुला आज्ञा दिल्ही
कीं नाहीं? तूं धीर धरून धीट हो; घाबरूं नको,
आणि भिऊं नको; कारण कीं जेथें कोठें तूं जासील,
तेथें तेथें तुझा देव परमेश्वर तुला अनुकूळ होईल.
१० यास्तव यहोशवाने लोकांवर अधिकारी
करणारे जे त्यांस असी आज्ञा दिल्ही कीं, ११
"तुह्मी छावणीमध्यें फिरा, आणि लोकांस असी
आज्ञा द्या कीं, तुह्मी आपल्यासाठीं शिधा सिद्ध
करा, कां तर तुमचा देव परमेश्वर तुह्मास जो
देश वतनासाठीं देत आहे, तो वतन करून घ्या-
याला जायासाठीं तुह्मास तीन दिवसानी ही या-
र्देन उतरायाची आहे."

१२ अणखी रऊबेनी व गादी व मनाशेच्याचा
अर्धा वंश, यांस यहोशवाने असें सांगितलें कीं,
१३ "परमेश्वराचा सेवक मोशे याने तुह्मास
ज्या गोष्टींविषयीं आज्ञा दिल्ही, तिची आठवण
तुह्मी करा; ती असी कीं तुमचा देव परमेश्वर
याने तुह्मास विसांवा दिल्हा, ह्मणजे हाच देश
तुह्मास दिल्हा आहे. १४ यार्देनेच्या अलिकडे
जो देश मोश्याने तुह्मास दिल्हा, त्यांत तुमच्या
स्त्रिया, तुमचीं बाळकें व तुमचें पशुधन या-
नी राहावें; परंतु तुह्मी सर्व बळवान पुरुषानी
हत्यारबंद होऊन आपल्या भावांपुढें पलिकडे
जाऊन त्यांचें सहाय करावें; १५ कोठपर्यंत,
तर परमेश्वराने असा तुह्मास विसांवा दिल्हा,
तसा तो तुमच्या भावांस देईल, आणि जो देश
तुमचा देव परमेश्वर त्यांस देत आहे, तो वतन-
रूपें त्यांस प्राप्त होई तोंपर्यंत; मग तुह्मी आपल्या
वतनाच्या देशास परत यावें, आणि परमेश्वरा-
चा सेवक मोशे याने यार्देनेच्या अलिकडे उगव-
त्या बाजूस जो देश तुह्मास दिल्हा तो वतनासाठीं
ठेवावा." १६ तेव्हां त्यानी यहोशवाला असें उ-
त्तर दिल्हें कीं, "जी आज्ञा तूं आह्मास देतोस ती
अवघी आह्मी पाळूं, आणि जिकडे जिकडे आह्मास
पाठवसील, तिकडे तिकडे आह्मी जाऊं. १७ जसें
आह्मी मोश्याचें ऐकत होतों, तसें सर्व प्रकारें
आह्मी तुझें ऐकूं; केवळ जसा तुझा देव पर-
मेश्वर मोश्याला अनुकूळ होता, तसा तुला

तुला अनुकूल होवो. १८ तूं जी कांहीं आज्ञा
कोणाला देसील, तिजविषयीं जो कोणी माणूस तु-
झ्या सांगण्याला विरुद्ध करून तुझे शब्द न ऐकेल,
तो मरो; तूं धीर धरून धीट मात्र हो."

## अध्याय २.

तेव्हां नूनाचा पुत्र यहोशवा याने शिट्टीमांतून
दोन पुरुषांस गुप्तपणाने हेरायास सांगून पाठ-
विलें कीं, "तुम्ही जाऊन तो देश आणि यरीहो
पाहा." तेव्हां ते जाऊन राहाब नामें एक भाडे-
करीण इच्या घरीं उतरले, आणि ते तेथें निजले.
२ तेव्हां यरीहोच्या राजाला असें वर्तमान लागलें
कीं, "पाहा, देश ट्याहाळायास इस्राएलाच्या सं-
तानांतलीं माणसें आज रात्रीं एथें आलीं आहेत."
३ तेव्हां यरीहोच्या राजाने राहाबेला असें सां-
गून पाठविलें, "जीं माणसें तुझ्याकडे येऊन तुझ्या
घरांत उतरलीं आहेत, त्यांस तूं बाहेर काढ; कारण
कीं तीं सर्व देश ट्याहाळायास आलीं आहेत."
४ तेव्हां त्या स्त्रीने तीं दोन माणसें नेऊन लप-
विलीं होतीं; आणि तिने म्हटलें, "माणसें मज-
कडे आलीं होतीं खरीं, परंतु तीं कोठलीं हें मला
कळलें नाहीं. ५ पण काळोख पडल्यावर वेस
लावायाच्या वेळेस असें झालें कीं तीं माणसें नि-
घालीं; तीं माणसें कोणीकडे गेलीं हें मला कळत
नाहीं; तुम्ही त्यांच्या पाठीस लवकर लागा, कां तर
त्यांस आटोपाल." ६ पण तिने त्यांस धाब्यावर
चढवून आपलीं जीं आळसीचीं झाडें धाब्यावर
पसरलेलीं होतीं, त्यांत त्यांस लपविलें होतें. ७
तेव्हां यार्देनेकडे जाऊन उताऱ्यापर्यंत माणसें त्यां-
च्या पाठीस लागलीं, आणि त्यांच्या पाठीस लाग-
णारे बाहेर निघतांच लोकानी वेस लाविली.

८ तेव्हां ते निजल्यापूर्वी ती त्यांच्याजवळ धा-
ब्यावर चढून गेली; ९ आणि त्या माणसांस बो-
लली, "परमेश्वराने हा देश तुम्हांस दिल्हा आहे,
आणि तुमचें भय आम्हांवर पडलें आहे, आणि
देशांतले सर्व राहणारे तुमच्यामुळें विरून गेले
आहेत, हें मला कळतें. १० कारण आम्ही असें
ऐकिलें कीं तुम्ही मिसरांतून आलां, तेव्हां परमे-
श्वराने तुमच्यापुढें सूफ समुद्राचें पाणी आटविलें,
आणि सीहोन व ओग असे जे अमोऱ्यांचे दोन
राजे यार्देनेच्या पलिकडे होते, त्यांचा अगदींच
नाश तुम्ही केला. ११ हें आम्ही ऐकल्यावर
आमचें हृदय असें विरून गेलें कीं तुमच्यामुळें
कोणामध्येंहि जीव राहिला नाहीं; कां तर तुमचा
देव परमेश्वर तोच वरतीं आकाशांत व खालतीं
पृथ्वीवर देव आहे. १२ तर आतां तुम्ही अग-
त्य माझ्याजवळ परमेश्वराची शपथ वाहा कीं
म्या तुम्हांवर दया केली म्हणून तुम्हीहि माझ्या
बापाच्या घरावर दया करावी, आणि मला खरी
खूण द्यावी; १३ म्हणजे तुम्ही माझ्या बापाला
व माझ्या आईला व माझ्या भावांस व माझ्या
बहिणींस व त्यांचीं जीं सर्व त्यांस वांचवावीं, आणि
आमच्या जिवांस मरणापासून राखावें." १४ तेव्हां
त्या माणसानी तिला सांगितलें, "जर तुम्ही आ-
मची ही गोष्ट न सांगाल, तर तुमच्या मरणाबद्दल
आमचा प्राण जावो, आणि जेव्हां परमेश्वर हा
देश आम्हांस देईल, तेव्हां असें होईल कीं आम्ही
तुजविषयीं दयेने व सत्यतेने वागूं." १५ तेव्हां
तिने त्यांस खिडकींतून दोराने उतरिलें; कारण कीं
तिचें घर गांवकुसास लागून होतें, आणि ती गांव-
कुसावर राहत होती. १६ तेव्हां तिने त्यांस
सांगितलें कीं, "तुम्हांस पाठीस लागणाऱ्यांची गांठ
न पडावी म्हणून तुम्ही डोंगराकडे जाऊन तेथें तीन
दिवस लपून राहा; तितक्यांत पाठीस लागणारे
माघारें येतील, मग तुम्ही आपल्या वाटेने जा."
१७ तेव्हां त्या माणसानी तिला सांगितलें कीं, "त्वां
आपल्याजवळ जी शपथ आम्हाकडून वाहविली
तिजपासून आम्ही असे सुटूं; १८ कीं पाहा,
आम्ही देशांत येऊं, तेव्हां ज्या खिडकींतून त्वां
आम्हांस उतरिलें, तींत तूं हा किरमजी सुतांचा
दोर बांध; आणि आपला बाप व आपली आई
व आपले भाऊ व आपल्या बापाचें सर्व घराणें
आपल्याजवळ घरांत जमा करून ठेव. १९ आणि
जो कोणी तुझ्या घराच्या दाराबाहेर निघेल, त्या-
च्या रक्तपाताचा दोष त्याच्या मस्तकावर होईल
आणि आम्ही सुटे होऊं; परंतु जो कोणी तुझ्या-
जवळ घरांत असेल, त्यावर जर कोणाचा हात
पडला, तर त्याच्या रक्तपाताचा दोष आमच्या
मस्तकावर होईल. २० परंतु जर तूं आमची
ही गोष्ट सांगसील, तर त्वां आपल्याजवळ जी

शपथ आह्माकडून वाहविली तिजपासून आह्मी
सुटे होऊं." २१ तेव्हां तिने ह्मटलें, "तुमच्या
सांगण्यांप्रमाणें होवो." असें तिने त्यांस निर-
वल्यावर ते गेले; मग तिने किरमजी दोर खिड-
कींत बांधिला. २२ आणि ते जाऊन डोंगरास
पोहंचले, आणि पाठीस लागणारे माघारें जात
तोंपर्यंत तीन दिवस ते तेथें राहिले; आणि पाठीस
लागणाऱ्यानी सर्व मार्गांत शोध केला, परंतु त्यांस
ते सांपडले नाहींत. २३ तेव्हां ते दोन पुरुष
माघारें फिरून डोंगरावरून उतरून पलिकडे जा-
ऊन नूनाचा पुत्र यहोशवा याजवळ पोहंचले;
आणि आपणांस जें प्राप्त झालें होतें, तें सर्व वर्त्त-
मान त्यानी त्याला सांगितलें. २४ आणि त्यानी
यहोशवाला असें ह्मटलें कीं, "निश्चयें परमेश्व-
राने सर्व देश आमच्या हातीं दिल्हा आहे, अ-
णखी देशांतले सर्व राहणारे आमच्यामुळें विरून
गेले आहेत."

## अध्याय ३.

मग सकाळीं यहोशवा सिद्ध झाला, आणि तो
व इस्राएलाचीं सर्व संतानें शिट्टीमापासून नि-
घून यार्देनेपर्यंत आलीं, आणि तीं अलिकडे येत
तोंपर्यंत तेथें वस्तीस राहिलीं. २ मग तीन दिवसां-
नंतर असें झालें कीं अधिकारी छावणींमध्यें फि-
रले. ३ आणि त्यानी लोकांस असी आज्ञा दिल्ही
कीं, "आपला देव परमेश्वर याच्या कराराचा
कोश आणि लेवी जे याजक त्यांस तो वाहतां पा-
हाल तेव्हां तुह्मी आपलें ठिकाण सोडून तिच्या-
मागें चाला. ४ परंतु तुमच्या व तिच्यामध्यें
मेजाने सुमारें दोन हजार हातांचें अंतर असावें;
"तुह्मी तिच्याजवळ जाऊं नका; ह्मणजे ज्या वा-
टेने तुह्मास चालायाचें, ती तुह्मास कळेल; कां
तर यापूर्वी या वाटेने तुह्मी गेलां नाहीं."
५ आणि यहोशवाने लोकांला सांगितलें कीं,
'तुह्मी शुद्ध व्हा; कां तर उद्यां परमेश्वर तुम-
च्यामध्यें आश्चर्याचीं कामें करील." ६ नंतर
याजकांस यहोशवाने असें सांगितलें कीं, "तुह्मी
कराराचा कोश उचलून लोकांपुढें चाला." यास्तव
ते कराराचा कोश उचलून लोकांपुढें चालले. ७
तेव्हां परमेश्वराने यहोशवाला सांगितलें, "आ-
जच्या दिवसीं मी तुला सर्व इस्राएलाच्या देख
महान करूं लागेन; ह्मणजे ते असे जाणतील
जसा मी मोश्याला अनुकूळ होतों, तसा तुला
आनुकूळ होईन. ८ आणि जे याजक कराराच
कोश वाहतात, त्यास तूं असी आज्ञा दे कीं, तुह
यार्देनेच्या प्रवाहाच्या काठीं पोहंचतांच यार्देनें
उभे राहा." ९ तेव्हां यहोशवाने इस्राएलाच
संतानांस सांगितलें, "तुह्मी इकडे येऊन आप
देव परमेश्वर याच्या गोष्टी ऐका." १० आं
यहोशवाने सांगितलें, "येणेकरून तुह्मी जाणा
जीवंत देव तुमच्यामध्यें आहे, आणि तुमच्यापुढ
खनानी व हित्ती व हिव्वी व परिज्जी व गिग
सी व अमोरी व यबूसी, यांस तो वतनांतून घाल
वीलच घालवील. ११ पाहा, संपूर्ण पृथ्वीच
प्रभू याच्या कराराचा कोश तुमच्यापुढें यार्देनें
जातो. १२ तर आतां तुह्मी आपल्यासाठीं प्र
त्येक वंशांतील एकएक माणूस, असीं इस्राएलाच्य
वंशांतलीं बारा माणसें घ्या. १३ मग असें हो
ईल कीं संपूर्ण पृथ्वीचा प्रभू परमेश्वर याच
कोश वाहणार जे याजक, त्यांच्या पायांचे तळ
यार्देनेच्या पाण्यास लागतांच यार्देनेचें पाणी
वरून खालीं वाहतें तें वियुक्त होईल, आणि
एक रास होऊन उभे राहील."
१४ तेव्हां असें झालें कीं जेव्हां लोक यार्देने
च्या पलिकडे जायासाठीं आपल्या राहोट्यांतु
निघाले, तेव्हां कराराचा कोश वाहणारे जे याज
ते लोकांपुढें होते. १५ यार्देन तर सुगीचे स
दिवस सर्वत्र आपलीं तिरें बुडवून जात होतीं
तेव्हां कोश वाहणारे यार्देनेपर्यंत येतांच, ह्मण
कोश वाहणारे याजक यानी काठीं पाण्यांत पा
बुचकळतांच, १६ तेव्हां वरून उतरणारें पाणी
उभें राहिलें, आणि फार दूर, जारतानाजवळच्य
आदाम नगरापर्यंत एक रास होऊन चढलें, आणि
सपाटींतला समुद्र, ह्मणजे मिठाचा समुद्र, याक
जें उतरत होतें, तें अगदीं सरून पार गेलें; तेव
लोक यरीहोच्या समोर गेले. १७ आणि परमे
श्वराच्या कराराचा कोश वाहणारे जे याजक,
यार्देनेमध्यें कोरड्या ठिकाणीं स्थीर उभे राहि
आणि सर्व इस्राएल कोरड्या भूमीवरून पार गे

ह्मणजे तितक्यांत सर्व लोक झाडून यार्देनेच्या पार गेले.

## अध्याय ४.

आणि जेव्हां सर्व लोक झाडून यार्देनेच्या पार गेले होते, तेव्हां असें झालें कीं परमेश्वराने यहोशवाला सांगितलें कीं, २ "तुह्मी आपल्यासाठीं लोकांतून बारा माणसें ह्मणजे एक एक वंशांतून एक एक माणूस घ्या. ३ आणि त्यांस असी आज्ञा द्या कीं, "एथून यार्देनेच्या मधून, जेथें याजकांचे पाय उभे राहिले, तेथून तुह्मी आपल्यांसाठीं बारा धोंडे उचलून आपल्यासंगतीं पलिकडे न्या, आणि आज रात्रीं जेथें उतराल, त्या मुकामीं ते ठेवा." ४ यास्तव यहोशवाने एकएक वंशांतून एकएक माणूस, असीं इस्राएलाच्या संतानांतलीं जीं बारा माणसें सिद्ध केलीं होतीं, त्यांस बोलाविलें. ५ आणि यहोशवाने त्यांस सांगितलें कीं, "तुह्मी आपला देव परमेश्वर याच्या कोशापुढें यार्देनेच्या मध्यभागीं जा, आणि तुह्मी एकएकाने इस्राएलाच्या वंशांतल्या संख्येप्रमाणें एकएक धोंडा आपापल्या खांद्यावर उचलून घ्या. ६ ह्मणजे तुमच्यामध्यें ही खूण राहील कीं पुढल्या काळीं जेव्हां तुमचीं संतानें असें विचारितील कीं, 'हे धोंडे तुमचे कशाचे?' ७ तेव्हां तुह्मी त्यांस असें सांगा कीं, 'यार्देनेचें पाणी वियुक्त होऊन गेलें; जेव्हां परमेश्वराच्या कराराचा कोश यार्देनेंतून पार झाला, तेव्हां त्याच्या पुढून यार्देनेचें पाणी वियुक्त होऊन गेलें'; असे हे धोंडे इस्राएलाच्या संतानांस सुचनेसाठीं सर्वकाळ असोत."

८ मग जसी यहोशवाने आज्ञा दिल्ही तसें इस्राएलाच्या संतानानी केलें, ह्मणजे परमेश्वराने यहोशवाला सांगितल्याप्रमाणें त्यानी इस्राएलाच्या वंशांतल्या संख्येप्रमाणें यार्देनेच्या मधून बारा धोंडे उचलून घेतले, आणि आपल्यासंगतीं मुकामापर्यंत नेऊन तेथें ते ठेविले. ९ आणि यार्देनेच्या मध्यभागीं, जेथें कराराचा कोश वाहणारे याजक यांचे पाय उभे राहिले होते, त्या ठिकाणीं यहोशवाने बारा धोंडे उभारिले, आणि ते या दिवसापर्यंत तेथें आहेत. १० आणि जें कांहीं परमेश्वराने यहोशवाला लोकांबद्दल बोलायास आज्ञा दिल्ही, तें सर्व जसें मोश्याने यहोशवाला सांगितलें त्याप्रमाणें समाप्त होई तोंपर्यंत कोश वाहणारे याजक यार्देनेमध्यें उभे राहिले, आणि लोक त्वरा करून पार गेले. ११ आणि सर्व लोक पार गेल्यावर तेव्हां असें झालें कीं परमेश्वराचा कोश आणि याजक लोकांच्या देखतां अलिकडे आले. १२ आणि रऊबेनाचीं संतानें व गादाचीं संतानें व मनाश्शाचा अर्धा वंश यांस जसें मोश्याने सांगितलें होतें, तसे ते हत्यारबंद होऊन इस्राएलाच्या संतानांपुढें वल्हांडून आले. १३ सुमारें चाळीस हजार लोक लढाईसाठीं सिद्ध झालेले असे परमेश्वराच्यापुढें यरीहोजवळच्या सपाटींमध्यें लढायास अलिकडे आले.

१४ त्याच दिवसीं परमेश्वराने यहोशवाला सर्व इस्राएलाच्या देखतां मोठें केलें, आणि जसे ते मोश्याला भीत होते, तसे त्याचें आयुष्य संपे तोंपर्यंत ते त्याला भ्याले. १५ आणि परमेश्वराने यहोशवाला असें सांगितलें कीं, १६ "संकेतलेखाचा कोश वाहणारे जे याजक, त्यांस यार्देनेंतून चढून येण्यास आज्ञा कर." १७ यास्तव यहोशवाने याजकांस असी आज्ञा केली कीं, "तुह्मी यार्देनेंतून चढून या." १८ मग परमेश्वराच्या कराराच्या कोशाचे वाहणारे याजक जेव्हां यार्देनेच्या मध्यापासून चढले, आणि याजकांच्या पायांचे तळवे कोरड्या ठिकाणीं लागले, तेव्हां असें झालें की यार्देनेचें पाणी आपल्या ठिकाणीं येऊन पूर्ववत सर्व तिरें बुडवून चाललें.

१९ आणि लोक यार्देनेंतून चढले तेव्हां पहिल्या महिन्याची शुद्ध दशमी होती, आणि यरीहोच्या पूर्वेकडल्या सीमेवर गिल्गालांत त्यानी तळ दिल्हा. २० आणि ते बारा धोंडे जे त्यानी यार्देनेंतून आणिले होते ते यहोशवाने गिल्गालांत उभारिले. २१ तेव्हां त्याने इस्राएलाच्या संतानांस असें सांगितलें कीं, "पुढें जेव्हां तुमचीं संतानें आपल्या बापांजवळ असें विचारितील कीं, 'हे धोंडे कशाचे?' २२ तेव्हां तुह्मी आपल्या संतानांस याप्रमाणें कळवा कीं इस्राएल या यार्देनेंतून सुकलेल्या भूमीवरून पार आले. २३ तें असें कीं तुमचा देव परमेश्वर याने यार्देनेचें पाणी तुमच्यापुढून अटवून टाकिलें, तितक्यांत तुह्मी पार झालां;

असें तुमचा देव **परमेश्वर** याने सूफ समुद्राचें
केलें कीं आपण पार होऊं तोंपर्यंत त्याला आम-
च्या पुढून अटवून टाकिलें तसें, याप्रमाणें सांगा.
२४ हेतु असा कीं पृथ्वींतल्या सर्व लोकानी **पर-**
**मेश्वराचा** हात बळकट आहे असें जाणावें
ह्मणून, आणि तुह्मी सर्वकाळ आपला देव **परमे-**
**श्वर** याचें भय धरावें ह्मणून.

## अध्याय ५.

नंतर यार्देनेच्या अलिकडे पश्चिमेस जे सर्व अ-
मोरी राजे, आणि समुद्राकडले जे सर्व खनानी
राजे, त्यानी जेव्हां ऐकिलें कीं, "इस्राएलाचीं सं-
तानें उतरत तोंपर्यंत **परमेश्वराने** त्यांच्यापुढें
यार्देनेचें पाणी अटवून टाकिलें," तेव्हांच इस्रा-
एलाच्या संतानांमुळें त्यांचें ह्रदय विरून गेलें,
आणि तेव्हांपासून त्यांमध्यें जीव राहिला नाहीं.
२ त्या काळीं **परमेश्वराने** यहोशवाला सां-
गितलें, "तूं आपल्यासाठीं तिखट सुऱ्या करून
दुसऱ्याने इस्राएलाच्या संतानांची सुंता कर." ३
यास्तव यहोशवाने आपल्यासाठीं तिखट सुऱ्या
करून इस्राएलाच्या संतानांची सुंता अग्रत्वचांच्या
टेंकडीजवळ केली. ४ आणि यहोशवाने सुंता
केली याचें कारण हेंच; मिसरांतून आलेले सर्व
पुरुष, ह्मणजे लढाऊ जीं सर्व माणसें मिसरांतून
निघालीं तीं वाटेंत रानांत मरून गेलीं. ५ जे
लोक निघाले, त्या सर्वांची सुंता झाली होती ख-
री, परंतु मिसरांतून निघाल्यानंतर जे रानांत वा-
टेंत जन्मले, त्या सर्व लोकांची सुंता त्यानी के-
ली नव्हती. ६ कां तर इस्राएलाचीं संतानें
चाळीस वर्षें रानांत फिरत होतीं; इतक्यांत
सर्व लोक ह्मणजे मिसरांतून निघालेलीं लढाऊ
सर्व माणसें संपलीं, कारण कीं त्यानी **परमे-**
**श्वराची** आज्ञा मानिली नाहीं; ह्मणून त्याच्या
पूर्वजांजवळ **परमेश्वराने** दुध व मध वाह-
ण्याचा जो देश आह्मास द्यायाविषयीं शपथ वा-
हिली होती, तो देश त्यांस पाहूंच देणार नाहीं,
असी शपथ **परमेश्वराने** त्यांविषयीं वाहिली.
७ परंतु त्यांच्या ठिकाणीं त्यांचीं जीं लेंकरें त्याने
वाढविलीं, त्यांची सुंता यहोशवाने केली, कारण
कीं वाटेंत त्यांची सुंता केली नव्हती, ह्मणजे तीं
असुंती होतीं. ८ तर सर्व मनुष्यांनी सुंता करून
घेण्याची समाप्ति केली, तेव्हां असें झालें कीं तीं
बरीं होत तोंपर्यंत आपल्या ठिकाणीं छावणींत रा-
हिलीं. ९ नंतर **परमेश्वराने** यहोशवाला सां-
गितलें, "आज म्या तुह्मावरून मिसराचा बट्टा
घालविला आहे." यास्तव त्या ठिकाणाचें गिल्-
गाल असें नांव आजपर्यंत ह्मणत आले. १०
तेव्हां इस्राएलाच्या संतानानी गिल्गालांतल्या
छावणींत राहून महिन्याच्या चवदाव्या दिवसीं
संध्याकाळीं यरीहोजवळच्या सपाटीवर वल्हांडण
सण पाळिला. ११ आणि वल्हांडण सणाचा
दुसरा दिवस, त्याच दिवसीं त्यानी त्या दे-
शांतले मागल्या वर्षाचें धान्य याच्या बेखमीर
भाकरी व हुरडाहि खाला. १२ तेव्हां त्यानी
देशांतील मागल्या वर्षाचें धान्य खाल्यावर दुस-
ऱ्या दिवसीं मान्ना बंद झालें, आणि तें मान्ना
इस्राएलाच्या संतानांस फिरून प्राप्त झालें नाहीं;
तर त्याच वर्षी त्यानी खनान देशांतलें उत्पन्न
खालें.
१३ तेव्हां यहोशवा यरीहोजवळ असतां असें
झालें कीं त्याने आपले डोळे वर करून पाहिलें;
मग पाहा, त्याच्यापुढें कोणी उभा राहिला होता,
आणि त्याच्या हातीं त्याची तरवार उपसलेली
होती ; मग यहोशवा त्याच्याजवळ जाऊन त्याला
बोलला, "काय, तूं आमच्याकडला आहेस किंवा
आमच्या वैऱ्यांकडला?" १४ तेव्हां तो बोलला,
"तसा नाहीं, तर **परमेश्वराच्या** सैन्याचा सर-
दार असा मी आतां आलों आहें." मग यहो-
शवा भूमीवर पालथा पडला, आणि त्याचें भजन
करून त्याला ह्मणाला, "माझा प्रभू आपल्या से-
वकाला काय सांगतो?" १५ तेव्हां **परमेश्वरा-**
**च्या** सैन्याच्या सरदाराने यहोशवाला सांगितलें,
"तूं आपलें पायतण आपल्या पायांतून काढ, कां
तर ज्या ठिकाणीं तूं उभा आहेस, तें पवित्र आहे;"
यास्तव यहोशवाने तसें केलें.

## अध्याय ६.

त्या वेळेस इस्राएलाच्या संतानांमुळें यरीहो
बंद झालें, आणि बंद राखलें गेलें; कोणी
बाहेर आला नाहीं, आणि कोणी आंत गेला नाहीं.

२ तेव्हां परमेश्वराने यहोशवाला सांगितलें कीं,
"पाहा, यरीहो व त्याचा राजा व सैन्यांतले शूर
हे म्या तुझ्या हातीं दिल्हे आहेत. ३ तर तुह्मी
लढाऊ सर्व माणसें एकदां नगराला फेरी घालून
नगराची प्रदक्षिणा करा; असें साहा दिवस क-
रा. ४ आणि सात याजकानी कोशापुढें एडक्यां-
चीं सात रणशिंगें घेऊन चालवावीं; मग सातव्या
दिवशीं तुह्मी नगराच्या भोंवते सात वेळा फिरा,
आणि याजकानी तीं रणशिंगें वाजवावीं. ५ आ-
णि एडक्याचें शिंग फुंकल्या वेळेस तुह्मी रणशिं-
गाचा शब्द ऐकाल, तेव्हां असें व्हावें कीं सर्व
लोकानी मोठी आरोळी करावी; मग नगराचें गाव-
कुसुं आपल्या आपण खालीं पडेल, तेव्हां लोकानी
आपापल्यापुढें चढावें."

६ मग नूनाचा पुत्र यहोशवा याने याजकांस
बोलावून सांगितलें, "तुह्मी कराराचा कोश उचला,
आणि सात याजकानी परमेश्वराच्या कोशापुढें
एडक्यांचीं सात रणशिंगें घेऊन चालवावीं." ७
आणि त्याने लोकाला सांगितलें, "तुह्मी चला,
नगराला फेरी घाला, आणि जो हत्यारबंद त्याने
परमेश्वराच्या कोशापुढें चालावें." ८ तेव्हां यहो-
शवाने लोकाला सांगितल्याप्रमाणें असें झालें कीं
सात याजकानी एडक्यांचीं सात रणशिंगें घेऊन
परमेश्वरापुढें चालतांना रणशिंगें वाजविलीं;
आणि परमेश्वराच्या कराराचा कोश त्यांच्या-
मागून चालला. ९ तेव्हां जो हत्यारबंद तो रण-
शिंगें वाजविणाऱ्या याजकांच्यापुढें चालला; आणि
कोश चालत असतां व रणशिंगें वाजत असतां,
मागचे लोक त्याच्यामागें चालले. १० तेव्हां
यहोशवाने लोकांस असी आज्ञा दिल्ही कीं, "तुह्मी
आरोळी करूं नका, आणि तुह्मी आपला स्वर ऐ-
कण्यांत येऊं देऊं नका, आणि तुमच्या तोंडांतून
कांहीं शब्द निघूं नये; मी तुह्मास आरोळी करा-
यास सांगेन तेव्हांच आरोळी करा." ११ याप्रमाणें
परमेश्वराच्या कोशाने सभोंवतीं चालून नगराला
एकदां फेरी घातली, मग ते छावणींत येऊन मुक्का-
मीं राहिले. १२ नंतर सकाळीं यहोशवा उठला,
आणि याजकानी परमेश्वराचा कोश उचलून
घेतला. १३ आणि सात याजक एडक्यांचीं सात
रणशिंगें घेऊन परमेश्वराच्या कोशापुढें रणशिंगें
वाजवीत चालले; हत्यारबंदहि त्यांच्यापुढें चा-
लले, आणि परमेश्वराचा कोश चालत असतां
व रणशिंगें वाजत असतां, मागचे लोक त्याच्या-
मागें चालले. १४ याप्रमाणें ते दुसऱ्या दिवशीं
नगराला एकदां फेरी घालून माघारें छावणींत आले;
असेंच त्यानी साहा दिवस केलें. १५ मग सा-
तव्या दिवशीं असें झालें कीं उजाडतांच त्यानी
उठून नगराला सात वेळा त्याच रीतिप्रमाणें फेरी
घातली; त्या दिवशीं तर नगराला सात वेळा फेरी
घातली. १६ आणि सातव्या वेळेस असें झालें
कीं याजक रणशिंगें वाजवीत असतां यहोशवाने
लोकांस सांगितलें, "तुह्मी आरोळी करा, कां तर
परमेश्वराने हें नगर तुह्मास दिल्हें आहे. १७
आणि हें नगर व यांतलें जें तें सर्व परमेश्वरा-
साठीं उत्सृष्ट होवो; केवळ जी भाडेकरीण राहाब
ती आणि तिच्यासंगतीं घरांत जे ते सर्व जगावे;
कारण कीं जे दूत आह्मी पाठविले, ते तिने लपविले
होते. १८ परंतु तुह्मी उत्सृष्ट वस्तुविषयीं सर्वथा
संभाळा, नाहीं तर उत्सृष्टांतलें कांहीं घेतलें अस-
तां, आपण उत्सृष्ट व्हाल, आणि इस्राएलाची छा-
वणी उत्सृष्ट करून त्याला त्रास द्याल. १९ परंतु
सर्व रुपें व सोने, आणि तांब्याचीं व लोखंडाचीं
जीं तीं परमेश्वरासाठीं पवित्र होऊन परमे-
श्वराच्या भांडारात जावीं." २० तेव्हां रण-
शिंगें वाजवितां लोकानी आरोळी केली, आणि
असें झालें कीं इतर लोक रणशिंगाचा शब्द ऐक-
तांच मोठी आरोळी करून ओरडले; तेव्हां गाव-
कुसुं आपल्या आपण खालीं पडलें, आणि लोकानी
आपापल्यापुढें नगरांत चढून जाऊन नगर घेतलें.
२१ आणि नगरांत जें अवघें ह्मणजे पुरुष व स्त्री,
तरणा व वडील, व गुरूं व शेरडूं व गाढव त्यांचा
विनाश त्यानी तरवारीने केला. २२ तेव्हां ज्या-
दोन माणसानी देश हेरिला होता त्यांस यहोश-
वाने सांगितलें कीं, "तुह्मी त्या भाडेकरीण स्त्रिच्या
घरांत जाऊन तिच्याजवळ शपथ वाहिल्याप्रमाणें
तुह्मी तिला आणि तिचीं जीं सर्व त्यांसुद्धां तेथून
काढा." २३ यास्तव त्या तरण्या हेरानी आंत
जाऊन राहाबेला व तिच्या बापाला व तिच्या आ-
ईला व तिच्या भावांस व तिचीं जीं अवघीं त्यांस
काढिलें; ह्मणजे तिचा सर्व परिवार काढून इस्राए-

लाच्या छावणीबाहेर नेऊन ठेविला. २४ मग त्यानी
त्या नगराला आणि त्यांत जें अवघें तें अग्नीने
जाळिलें; केवळ रुपें व सोनें, आणि तांब्याचीं व
लोखंडाचीं वस्तु हीं त्यानी **परमेश्वराच्या** मंदि-
रांतल्या भांडारांत ठेविलीं. २५ **याप्रमाणें** भाडे-
करीण **राहाब** आणि तिच्या बापाचें घर, ह्मणजे
तिचीं जीं अवघीं, त्यांस **यहोशवाने** वांचविलें;
आणि ती आजपर्यंत **इस्राएलामध्यें** राहत आहे;
कारण कीं **यरीहोला** हेरायास जे दूत **यहोशवाने**
पाठविले, ते तिने लपविले होते. २६ **आणि** त्या
काळीं **यहोशवाने** असी शपथ घातली कीं, "जो
कोणी उठून हें **यरीहो** नगर बांधील, तो **परमे-
श्वरापुढें** शापित होईल; तो आपल्या ज्येष्ठ पु-
त्राने त्याचा पाया घालील, आणि आपल्या धाक-
ट्याने त्याचीं कवाडें उभारील." २७ **याप्रमाणें**
**परमेश्वर यहोशवाला** अनुकूल होता, आणि
सर्व देशांत त्याची कीर्त्ति झाली.

## अध्याय ७.

**प**रंतु **इस्राएलाच्या** संतानानी उत्सृष्ट वस्तूविषयीं
उल्लंघन केलें; ह्मणजे **यहूदाच्या** वंशांतला
**जेरा** याचा पुत्र **जाब्दी** याचा पुत्र **कार्मी** याचा
पुत्र **आखान** याने उत्सृष्ट वस्तूचें कांहीं घेतलें;
यास्तव **परमेश्वराचा** राग **इस्राएलाच्या** संतानां-
वर पेटला. २ तेव्हां **बेथआवेनाजवळ**, **बेथ-
एलाच्या** पूर्वेस जें **आय**, तिकडे **यहोशवाने** **यरी-
होपासून** माणसांस पाठवून त्यांस असें सांगितलें
कीं, "तुह्मी जाऊन तो प्रांत हेरा." यास्तव त्या
माणसानी जाऊन **आय** हेरिलें. ३ **मग** तीं
**यहोशवाजवळ** माघारीं येऊन त्याला बोललीं,
"सर्व लोकानी जाऊं नये; सुमारें दोन हजार
पुरुषानी किंवा सुमारें तीन हजार पुरुषानी जाऊन
**आय** मारावें; तूं सर्व लोकांस त्याविषयीं श्रम
देऊं नको, कारण कीं ते लोक थोडे आहेत.
४ **यास्तव** लोकांतले सुमारें तीन हजार पुरुष
तिकडे गेले, परंतु **आयाच्या** माणसांपुढें ते पळाले.
५ **आणि आयाच्या** माणसानी त्यांतले सुमारें छ-
त्तीस पुरुष मारिले; तें असें कीं वेसीपुढून **शबा-
रीमापर्यंत** त्यांच्या पाठीस लागून उतरणीवर त्यांस
मारिलें; यास्तव लोकांचें ह्रदय विरून पाणी सा-
रिखें झालें. ६ **तेव्हां यहोशवाने** आपलीं वस्त्रें
फाडिलीं, आणि आपण **इस्राएलाच्या** वडिलांसुद्धां
**परमेश्वराच्या** कोशापुढें भूमीवर उपडा पडून
सांजपर्यंत राहिला, आणि त्यानी आपल्या डोक्यां-
वर माती उडविली. ७ **तेव्हां यहोशवा** बोलला,
"आहाहा, हे **प्रभू परमेश्वरा**, त्वां या लोकांस
**यार्देनेच्या** अलिकडे आमचा नाश करायास ह्मणून
आह्मांस **अमोऱ्यांच्या** हातीं द्यायास आणिलेंच
कीं काय? आह्मी संतुष्ट होऊन **यार्देनेच्या** पलिकडे
राहिलों तर बरे. ८ **हे प्रभू**, **इस्राएलानी** आ-
पल्या शत्रूंस पाठ दिल्ही ह्मणून मी काय बोलूं!
९ **आतां खनानी** व देशांतले सर्व राहणारे ऐक-
तील, आणि आमच्या चहुंकडे येऊन आमचें नांव
पृथ्वींतून नाहींसें करितील; मग तूं आपल्या मो-
ठ्या नामाविषयीं काय करसील?" १० **तेव्हां**
**परमेश्वराने यहोशवाला** सांगितलें कीं, "तूं
आपला उठ; तूं असा उपडा कां पडलास?
११ **इस्राएलानी** पाप केलें आहे; ह्मणजे जो
करार म्या आज्ञा करून त्यांसीं केला, त्याचें त्यानी
उल्लंघन देखील केलें, असें कीं त्यानी उत्सृष्टांतलें
देखील कांहीं घेतलें आहे; अणखी चोरिलें आणि
लबाडीहि केली, आणि आपल्या वस्तूमध्यें ठेविलेंहि
आहे. १२ **यामुळें इस्राएलाचीं** संतानें आपल्या
शत्रूंपुढें पाठ फिरविली; कारण कीं आपण नाशास
योग्य झालीं आहेत; जी उत्सृष्ट वस्तु तिला जर
तुह्मी आपल्यामधून घालविणार नाहीं, तर मी
यापुढें तुह्मास अनुकूळ होणार नाहीं. १३ तूं
उठून लोकांस पवित्र कर, आणि सांग, 'तुह्मी
उद्यासाठीं पवित्र व्हा; कारण कीं **इस्राएलाचा**
देव **परमेश्वर** असें सांगतो कीं, 'हे **इस्राएला**,
तुझ्यामध्यें उत्सृष्ट वस्तु आहे, तुह्मी आपल्या
मधून उत्सृष्ट वस्तु काढून टाकितां, तोंपर्यंत आ-
पल्या शत्रूंपुढें तुझ्याने उभें राहववणार नाहीं.'
१४ **यास्तव** सकाळीं तुह्मी आपापल्या वंशांप्रमाणें
जवळ या; मग असें व्हावें कीं ज्या वंशाला
**परमेश्वर** धरील, तो कुळाच्या कुळाने जवळ
यावा; मग ज्या कुळाला **परमेश्वर** धरील, तें
घराणाच्या घराणाने जवळ यावें; मग ज्या घरा-
णाला **परमेश्वर** धरील, तें पुरुषाच्या पुरुषाने
जवळ यावें. १५ **मग** असें व्हावें कीं त्याच्या

होतीं उत्सृष्ट वस्तु मिळेल तो स्वतां आणि त्याचीं
जीं अवघीं तीं अग्नीनें जाळावीं; कारण कीं त्यानें
परमेश्वराचा करार उलंघिला आहे, अणखी
इस्राएलांत दुष्टाई केली आहे."
१६ मग यहोशवानें सकाळीं सिद्ध होऊन
इस्राएलाला त्याच्या त्याच्या वंशांप्रमाणें जवळ
आणिलें; तेव्हां यहूदाचा वंश सांपडला. १७
मग त्यानें यहूदाचें एकएक कुळ जवळ आणिलें,
तेव्हां त्यानें जार्‍हीचें कुळ धरिलें; मग त्यानें जा-
र्‍हीचें कुळ पुरुषाचा पुरुष असें जवळ आणिलें,
तेव्हां जाब्दी सांपडला. १८ मग त्याचें घराणें
पुरुषाचा पुरुष असें जवळ आणिलें; तेव्हां यहूदा-
च्या वंशांतला जेरा याचा पुत्र जाब्दी याचा
पुत्र कार्मी याचा पुत्र आखान, हा सांपडला. १९
तेव्हां यहोशवानें आखानाला ह्मटलें, "हे माझ्या
पुत्रा, इस्राएलाचा देव परमेश्वर याला गौरव
मानून दे, आणि त्याला पत्करून स्तुति कर; आणि
त्वां काय केलें आहे हें मला अगत्य सांग; मा-
झ्याजवळ गुप्त राखूं नको." २० तेव्हां आखा-
नानें यहोशवाला उत्तर देतां ह्मटलें, "खरें, इस्रा-
एलाचा देव परमेश्वर याजवळ म्यां पाप केलें
आहे; ह्मणजे असें असें केलें आहे. २१ लुटी-
मध्यें एक चांगला शिनारी झगा, आणि दोनशें
शेकेल रुपें, व सोन्याचा एक तुकडा पन्नास शेकेल
वजन, हीं पाहून तेव्हां त्यांचा लोभ धरून म्यां
घेतलीं; आणि पाहा, तीं माझ्या राहोटीमध्यें भूमींत
गुप्त ठेवलेलीं आहेत; रूपें तर त्याच्या खालीं
आहे." २२ तेव्हां यहोशवानें दूत पाठविले, आ-
णि राहोटीकडे धांवून राहोटीमध्यें तो झगा आणि
त्याच्या खालीं रुपें गुप्त ठेविलेलें आहे, असें त्यांनी
पाहिलें. २३ मग त्यांनी तीं राहोटींतून यहोशवा-
जवळ व सर्व इस्राएलाच्या संतानांजवळ आणि-
लीं; तेव्हां त्यांनी तीं परमेश्वरापुढें काढून ठेवि-
लीं. २४ मग यहोशवानें व त्याच्या बरोबर
सर्व इस्राएलानी, जेराहाचा पुत्र आखान व तें
रुपें व तो झगा व सोन्याचा तो तुकडा, आ-
णि त्याचे पुत्र व त्याच्या कन्या व त्याचीं गुरें
व त्याचीं गाढवें व त्याचीं बकरीं व त्याची रा-
होटी व त्याचें जें अवघें तें काढिलें, मग त्यांनी
त्यांस आखोर खिंडीपर्यंत वर नेलें. २५ तेव्हां
यहोशवानें ह्मटलें, "त्वां आह्मास त्रास कां दिल्हा?
आज परमेश्वर तुला त्रासील." मग सर्व इस्राएला-
नी त्याला धोंड्यांनी मारिलें, आणि त्यांस धोंडमार
केल्यावर तीं अग्नीनें जाळिलीं. २६ मग त्यांनी
त्याजवर धोंड्यांची मोठी रास केली, ती आज-
पर्यंत आहे; तेव्हां परमेश्वर आपल्या रागाच्या
संतापापासून फिरला, तर त्यावरून त्या ठिकाणा-
चें नांव आजपर्यंत आखोरखिंड असें ह्मटलें
आहे.

## अध्याय ८.

तेव्हां परमेश्वरानें यहोशवाला सांगितलें कीं,
"तूं भिऊं नको, आणि हतवीर्य होऊं नको;
आपल्यासंगतीं लढाऊ सर्व लोक घे, मग उठून
आयास जा; पाहा, आयाचा राजा व त्याचे लोक
व त्याचें नगर व त्याचा प्रांत म्या तुझ्या हातीं
दिल्हा आहे. २ आणि जसें त्वां यरीहोला व
त्याच्या राजाला केलें, तसें आयाला व त्याच्या
राजाला कर; परंतु त्यांतलें लूट व त्यांतले पशू
यांस तुह्मी घेऊन आपल्यासाठीं राख; तूं आप-
ल्यासाठीं नगराच्यामागें त्यावर दबाधारी ठेव." ३
यास्तव आयावर जायास यहोशवा सर्व लढाऊ
लोकांसुद्धां उठला, आणि यहोशवानें तीस हजार
शूर पुरुष निवडून त्यांस रात्रीं पाठविले. ४
तेव्हां त्यानें त्यांस असी आज्ञा दिल्ही कीं, "पाहा,
तुह्मी नगर घ्यायासाठीं त्याच्यामागें दबा धरा;
नगरापासून फार दूर जाऊं नका, तर तुह्मी सर्व
सिद्ध असा. ५ आणि मी व माझ्यासंगतीं जे सर्व
लोक तसे आह्मी नगराजवळ येऊं, मग असें हो-
ईल कीं ते पहिल्यासारिखे आह्मासीं लढायास
बाहेर येतील, तेव्हां आह्मी त्यांच्यापुढून पळूं. ६
तेव्हां ते बाहेर येऊन आमच्या पाठीं लागतील,
इतक्यांत आह्मी त्यांस नगरापासून ओढूं; कां तर
ते ह्मणतील, 'हे पहिल्यासारिखे आमच्या पुढून
पळतात'; असें आह्मी त्यांच्यापुढून पळूं. ७
मग तुह्मी दबा सोडून उठा आणि नगर घ्या;
कां तर तुमचा देव परमेश्वर तुमच्या हातीं
तें देईल. ८ तेव्हां असें व्हावें कीं तुह्मी
नगर धरितांच नगराला आग लावा; जसें
परमेश्वरानें सांगितलें तसें करा; पाहा, म्यां
तुह्मास आज्ञा दिल्ही आहे." ९ याप्रमाणें

यहोशवाने त्यांस पाठविलें, तेव्हां ते दबा धराया-
साठीं बेथएल व आय यांच्यामध्यें, आयाच्या प-
श्चिमेस जाऊन राहिले, आणि त्या रात्रीं यहोश-
वाने लोकांमध्यें वस्ती केली. १० नंतर सकाळीं
यहोशवाने सिद्ध होऊन लोकांची पाहणी केली,
आणि तो इस्राएलाच्या वडिलांसुद्धां लोकांपुढें
आयाजवळ चढला. ११ त्यासंगतीं जे लढाऊ
लोक होते, तेहि सर्व चढले; आणि जवळ जाऊन
नगरापुढें गेल्यावर आयाच्या उत्तरेस उतरले, आ-
णि त्यांच्या व आयाच्यामध्यें खिंड होती. १२
तेव्हां त्याने बेथएल व आय यांच्यामध्यें आया-
च्या पश्चिमेस दबा धरायासाठीं सुमारें पांच हजार
माणसें नेऊन ठेविलीं. १३ तेव्हां नगराच्या उ-
त्तरेस जी सर्व फौज त्या लोकांस आणि त्यांतले
गुप्त राहणारे यांसहि नगराच्या पश्चिमेस त्यांनी
नीट लाविल्यावर त्याच रात्रीं यहोशवा खिंडींत
गेला. १४ मग असें झालें कीं आयाच्या राजाने
पाहिलें, तेव्हांच नगरांतलीं माणसें लवकर सिद्ध
होऊन इस्राएलासीं लढायास बाहेर आलीं; तो
आपल्या सर्व लोकांसुद्धां नेमलेल्या वेळेस सपाटी-
वर आला; परंतु आपल्यावर नगराच्यामागें दबा-
धारी आहेत, हें त्याला ठाऊक नव्हतें. १५
तेव्हां यहोशवा आणि सर्व इस्राएल त्यांच्यापुढें
पराजित होण्याचें मीस दाखवून रानाच्या वाटेने
पळाले. १६ तेव्हां त्यांच्या पाठीस लागायासाठीं
आयांत जे लोक, ते सर्व बोलावले गेले, आणि
यहोशवाच्या पाठीस लागून ते नगरांतून लांब गेले.
१७ यास्तव इस्राएलाच्यामागें गेला नाहीं, असा
आयांत किंवा बेथएलांत कोणी राहिला नाहीं,
आणि इस्राएलाच्या पाठीस लागतांना, त्यांनी नगर
उघडें टाकिलें. १८ तेव्हां परमेश्वराने यहो-
शवाला सांगितलें, "तूं आपल्या हातांतला भाला
आयाकडे लांब कर, कां तर मी तें तुझ्या हातीं
देईन." यास्तव यहोशवाने आपल्या हातांतला
भाला नगराकडे लांब केला. १९ तेव्हां तो आ-
पला हात लांब करितांच, ते दबाधारी आपल्या
ठिकाणांतून लवकर उठून धांवले, आणि त्यांनी
नगरांत जाऊन तें धरिलें, आणि लवकर नगराला
आग लाविली. २० आणि आयाच्या माणसांनी
आपल्यामागें फिरून पाहिलें, तेव्हां पाहा, नगराचा
धूर आकाशांत चढला आहे, आणि इकडे किंवा
तिकडे पळायास त्यांमध्यें सामर्थ्य राहिलें नाहीं;
इतक्यांत रानाकडे जे लोक पळत होते ते त्या पा-
ठीस लागणाऱ्यांवर उलटले. २१ म्हणजे दबाधा-
ऱ्यांनी नगर धरिलें आहे, आणि नगराचा धूर च-
ढत आहे, असें जेव्हां यहोशवाने व सर्व इस्राए-
लांनी पाहिलें, तेव्हां त्यांनी माघारें फिरून आया-
च्या माणसांस मारिलें. २२ असें त्यांसीं लढायास
ते नगरांतून आल्यावर कित्येक इकडे आणि कित्ये-
क तिकडे, असे ते इस्राएलामध्यें सांपडले; यास्तव
त्यांनी त्यांस असें मारिलें कीं त्यांतला उरलेला
किंवा पळून गेलेला, असा कोणी राहिला नाहीं.
२३ तेव्हां त्यांनी आयाच्या राजाला जिवंत धरून
यहोशवाजवळ आणिलें. २४ मग असें झालें
कीं आयांतले सर्व राहणारे, जे माळांत व रानांत
इस्राएलाच्या पाठीस लागले होते, त्यांस अगदीं
झोडून तरवारीने मारण्याची समाप्ति इस्रा-
एलांनी केली होती तेव्हां त्या सर्वांनी आया-
कडे माघारें येऊन त्याला तरवारीने मारिलें.
२५ तेव्हां त्या दिवसीं पुरुष व स्त्रिया सर्व
मिळून बारा हजार, म्हणजे आयांतलीं सर्व
माणसें पडलीं. २६ कारण कीं यहोशवाने आ-
यांतल्या सर्व राहणाऱ्यांचा विनाश केला तोंपर्यंत
आपल्या ज्या हाताने भाला लांबविला, तो माघारा
केला नाहीं. २७ केवळ जी गोष्ट परमेश्वराने
यहोशवाला आज्ञेने सांगितली होती, तिजप्रमाणें नग-
रांतले पशू व लूट हीं इस्राएलांनी घेऊन आपल्या-
साठीं राखिलीं. २८ आणि यहोशवाने आय जा-
ळून त्याचा सर्वकाळच्या ओसाडाचा ढीग केला;
आजपर्यंत तसाच आहे. २९ आणि त्याने आया-
चा राजा संध्याकाळपर्यंत झाडावर टांगिला; मग
सूर्य मावळतांना यहोशवाने आज्ञा दिल्ही, म्हणून
त्यांनी त्याचें मेत झाडावरून काढून नगराच्या
वेसीजवळच्या मोकळ्या ठिकाणीं टाकिलें; मग
त्यावर धोंड्यांची मोठी रास केली; आजपर्यंत
ती आहे.

३० तेव्हां यहोशवाने एबाल डोंगरावर इस्रा-
एलाचा देव परमेश्वर यासाठीं वेदी बांधिली,
३१ परमेश्वराचा सेवक मोशे याने इस्राएला-
च्या संतानांस जशी आज्ञा दिल्ही होती, आणि

जसें मोशाच्या शास्त्राच्या पुस्तकांत लिहि-
लेलें आहे, तसे अखंड धोंडे ज्यांस लोखंड
कधीं लागलें नाहीं, अशांची वेदी बांधिली; मग
त्यानी तिजवर परमेश्वरासाठीं होम केले, आणि
शांतिकारक यज्ञ केले. ३२ आणि तेथें त्याने
त्या धोंड्यांवर मोशाच्या शास्त्राची प्रत लि-
हिली; ती इस्राएलाच्या संतानांपुढें लिहिली.
३३ आणि सर्व इस्राएल व त्याचे वडील व अ-
धिकारी व त्याचे न्यायाधीश कोशाच्या दोहीं-
कडे उभे राहिले, परमेश्वराच्या कराराच्या को-
शाचे वाहणारे जे याजक लेवी त्यांपुढें देशस्थ व
विदेशी एकसारिखे उभे राहिले; त्यांतले अर्धे
गरिज्जीम डोंगराच्या पुढल्या भागीं, आणि अर्धे
एबाल डोंगराच्या पुढल्या भागीं, परमेश्वराचा
सेवक मोशे याने पूर्वी इस्राएलाच्या लोकांस आ-
शीर्वाद देण्याविषयीं आज्ञा दिल्ही होती, तसे
उभे राहिले. ३४ आणि त्यानंतर त्याने शास्त्रां-
तल्या सर्व गोष्टी आशीर्वाद व शाप, शास्त्राच्या
पुस्तकांत जशा लिहिलेल्या तशा अवघ्या वाचि-
ल्या. ३५ मोशाने ज्या आज्ञा लावून दिल्या,
त्या सर्व यहोशवाने स्त्रिया व बाळकें व इस्रा-
एलाचा सर्व समुदाय व त्यांमध्यें चालणारा वि-
देशी यांसमोर वाचिल्या; त्या अवघ्यांतली एकहि
राहिली नाहीं.

## अध्याय ९.

मग यार्देनेच्या अलिकडे डोंगरवटीवर व तळव-
टीवर व मोठ्या समुद्राच्या सगळ्या कांठावर
लबानोनाच्या पुढल्या भागापर्यंत जे सर्व राजे,
हित्ती व अमोरी, खनानी, परिज्जी, हिव्वी व
यबूसी त्यानी जेव्हां झालेलें वर्त्तमान ऐकिलें, ते-
व्हां असें झालें, २ कीं ते एका सम्मताने यहो-
शवाशीं व इस्राएलाशीं लढायास एकत्र आले. ३
आणि यहोशवाने यरीहोचें व आयाचें जें केलें
होतें, तें गिबोनांतल्या राहणाऱ्यानी ऐकिलें. ४
आणि त्यानी धूर्त्तपणहि केलें; ह्मणजे आपण जा-
ऊन दुसऱ्या वकिलांचें मीस घेतलें, असें कीं आ-
पल्या गाढवांसाठीं जुनीं गोणपटें, आणि द्राक्षर-
साच्या डबक्या झिजलेल्यां व फुटलेल्या व शिव-
लेल्या अशा; ५ आणि आपल्या पायीं जोडे
जुने व सांधलेले असे, आणि आपल्या अंगावर
जुनीं वस्त्रें घेतलीं; आणि त्यांच्या पोटगींतल्या सर्व
भाकरी वाळलेल्या व बुरा आलेल्या अशा होत्या.
६ असें त्यानी गिल्गालांतल्या छावणींत यहोश-
वाजवळ येऊन त्याला व इस्राएलाच्या माणसांस
सांगितलें कीं, "आह्मी दूर देशांतून आलों आहों;
यास्तव आतां तुह्मी आमच्याजवळ करार करा."
७ तेव्हां इस्राएलाच्या माणसानी हिव्व्यांस
ह्मटलें, "कोण जाणे, तुह्मी या आमच्या देशांत
राहत असाल, मग आह्मी तुमच्याजवळ करार
कसा करूं? ८ तेव्हां त्यानी यहोशवाला सां-
गितलें, "आह्मी तुझे चाकर आहों." मग यहो-
शवाने त्यांस ह्मटलें, "तुह्मी कोण? आणि कोठून
आलां आहां?" ९ तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें,
"तुझा देव परमेश्वर याच्या नामामुळें आह्मी
तुझे चाकर फार दूर देशापासून आलों; कारण
कीं त्याची कीर्त्ति, ह्मणजे त्याने मिसरांत जें केलें
तें अवघें आह्मी ऐकिलें. १० आणि यार्देनेच्या
पलिकडे जे अमोऱ्यांचे दोन राजे, हेश्बोनाचा
राजा सीहोन व आष्टारोथांतला जो बाशानाचा
राजा ओग, त्यांस जें केलें तेंहि अवघें आह्मी
ऐकिलें आहे. ११ यास्तव आमचे वडील व
आमच्या देशांतले सर्व राहणारे यानी आह्मास
असें सांगितलें कीं, 'तुह्मी वाटेसाठीं पोटगी आ-
पल्या हातीं घेऊन त्यांस भेटायास जा, आणि
त्यांस ह्मणा, 'आह्मी तुमचे चाकर; यास्तव आ-
तां तुह्मी आमच्याजवळ करार करा.' १२ ज्या
दिवशीं आह्मी तुमच्याजवळ यावयास निघालों,
तेव्हां ह्या आमच्या पोटगीच्या भाकरी आह्मी
आपल्या घरांतून उष्ण घेतल्या होत्या; परंतु पाहा,
आतां वाळून गेलेल्या व बुरा आलेल्या आहेत.
१३ आणि द्राक्षारसाच्या ज्या डबक्या आह्मी
भरिल्या, त्या ह्या नव्या होत्या; परंतु पाहा, आ-
तां फुटून गेल्या आहेत; आणि हीं आमचीं वस्त्रें
व आमचे जोडे फार लांब वाटेमुळें फाटून गेले
आहेत." १४ तेव्हां माणसानी परमेश्वराचें
सम्मत न मागून त्यांच्या पोटगींतलें कांहीं घे-
तलें. १५ आणि यहोशवाने त्यांशीं समेट करून
त्यांस वांचवायाचा करार त्यांजवळ केला; मंड-
ळीच्या अधिकाऱ्यानीहि त्यांजवळ शपथ वाहिली.

१६ तेव्हां त्यांशीं करार केल्यानंतर तीन दिवसां-
च्या शेवटीं असें झालें कीं, 'ते आमच्या जवळचे,
आमच्यामध्येंहि ते राहतात,' असें त्यानी ऐकिलें.
१७ मग इस्राएलाचीं संतानें निघून तिसऱ्या दि-
वसीं त्यांच्या नगरांस पोहंचलीं; त्यांचीं नगरें तर
गिबोन व कफिरा व बैरोथ व किर्याथयारीम
असीं होतीं. १८ तेव्हां इस्राएलाच्या संताना-
नी त्यांस मारिलें नाहीं; कारण कीं मंडळीच्या
अधिकाऱ्यानी इस्राएलाचा देव परमेश्वर याची
शपथ त्यांजवळ वाहिली होती; परंतु सर्व मंड-
ळीनें अधिकाऱ्यांवर कुरकूर केली. १९ तेव्हां
सर्व अधिकाऱ्यानी अवघ्या मंडळीस ह्मटलें, "आ-
ह्मीं इस्राएलाचा देव परमेश्वर याची शपथ
त्यांजवळ वाहिली आहे; यास्तव आतां आम-
च्यानें त्यांवर हात टाकवत नाहीं. २० त्यांवि-
षयीं असें करूं कीं त्यांस आह्मी वांचूं देऊं, ना-
हीं तर जी शपथ आह्मी त्यांजवळ वाहिली, तिज-
मुळें आह्मावर क्षोभ होईल." २१ अणखी
अधिकाऱ्यानी त्यांविषयीं ह्मटलें, "ते वांचोत, परंतु
सर्व मंडळीचीं लांकडें तोडणारे व पाणी भरणारे
होवोत." याप्रमाणें अधिकाऱ्यानी त्यांस सांगि-
तलें. २२ मग यहोशवानें त्यांस बोलावून त्यांस
असें ह्मटलें कीं, "तुह्मी आमच्यामध्यें राहत
असतां आह्मास कपटानें असें कां बोललां कीं,
'आह्मी तुमच्यापासून फार दूरचे आहों.' २३
तर आतां तुह्मी शापित आहां, आणि तुमच्यांत-
ला कोणीहि दास्यांतून सुटणार नाहीं; परंतु तुह्मी
माझ्या देवाच्या घरीं लांकडें तोडावीं, आणि पा-
णी भरावें." २४ तेव्हां त्यानी यहोशवाला उ-
त्तर देतां ह्मटलें, आह्मी आपल्या जिवांविषयीं
तुमच्यापुढें फार भिऊन ही गोष्ट केली आहे;
कारण कीं तुझा देव परमेश्वर यानें आपला
सेवक मोशे याला असी आज्ञा दिल्ही कीं,
सर्व देश तुह्मास मी देईन आणि तुमच्यापुढून
देशांतले सर्व राहणारे नाहींसे करीन; असें
तुझ्या चाकरांस खचीत सांगितलें होतें. २५
तर आतां पाहा, आह्मी तुझ्या हातांत आहों;
आमच्याविषयीं करायाला जसें तुला बरें व
नीट वाटेल तसें कर." २६ यास्तव त्यानें त्यांस
तसें केलें, आणि त्यांस इस्राएलाच्या संतानांच्या
हातांतून असें सोडविलें त्यानी त्यांस जिवें मारिलें
नाहीं. २७ आणि त्याच दिवसीं यहोशवानें
त्यांस असें नेमून दिल्हें कीं मंडळीसाठीं आणि जें
ठिकाण परमेश्वर निवडून घेईल, तेथें त्याच्या
वेदीसाठीं त्यानी लांकडें तोडावीं आणि पाणी भ-
रावें; आणि आजपर्यंत तसें आहे.

## अध्याय १०.

तेव्हां यरूशालेमाचा राजा अदोनीजेदेक यानें
ऐकिलें कीं यहोशवानें आय धरून त्याचा
विनाश केला, जसें त्यानें यरीहोचें व त्याच्या रा-
जाचें केलें, तसें आयाचें व त्याच्या राजाचें केलें;
अणखी असें कीं गिबोनांतल्या राहणाऱ्यानी इस्रा-
एलाशीं समेट केला, आणि ते त्यांच्यामध्यें आ-
हेत. २ तेव्हां ते फार भ्याले; कां तर गिबोन
मोठें नगर होतें, जसें एखादें राजधानी नगर तसें
होतें; अणखी आयापेक्षां तें मोठें होतें आणि
त्यांतलीं सर्व माणसेंहि शूर होतीं. ३ यास्तव
यरूशालेमाचा राजा अदोनीजेदेक यानें हेब्रो-
नाचा राजा होहाम, आणि यार्मूथाचा राजा पि-
राम, आणि लाखीशाचा राजा याफिया आणि
एग्लोनाचा राजा दबीर यांस असा निरोप पाठ-
विला कीं, ४ "तुह्मी वर माझ्याजवळ येऊन
माझें सहाय करा, ह्मणजे आपण गिबोनाला मा-
रूं, कां तर त्यानें यहोशवाशीं व इस्राएलाच्या
संतानांशीं समेट केला आहे." ५ ह्मणून यरू-
शालेमाचा राजा, हेब्रोनाचा राजा, यार्मूथाचा रा-
जा, लाखीशाचा राजा, एग्लोनाचा राजा, हे अ-
मोऱ्यांचे पांच राजे मिळून आपल्या सर्व सैन्यां-
सुद्धां गेले, आणि गिबोनावर तळ धरून त्यांशीं
लढूं लागले. ६ तेव्हां गिबोनांतल्या माणसानी
गिल्गालांतल्या छावणींत यहोशवाजवळ असा
निरोप पाठविला कीं, "तूं आपल्या सेवकांवरून
आपले हात काढूं नको; आमच्याजवळ लवकर
ये आणि आमचें सहाय करून आह्मास तार;
कारण कीं डोंगरांतले राहणारे अमोरी यांचे सर्व
राजे एकवट होऊन आह्मावर आले आहेत."
७ तेव्हां यहोशवा व त्याच्यासंगतीं सर्व लढाऊ
लोक ह्मणजे सर्व सामर्थ्यवान पुरुष गिल्गाला-
पासून गेले.

८ तेव्हां परमेश्वराने यहोशवाला असें सां-
गितलें कीं, "तूं त्यांस भिऊं नको, कां तर म्या ते
तुझ्या हातीं दिल्हे आहेत; त्यांतला कोणी तुझ्या-
पुढें ठरणार नाहीं." ९ तेव्हां यहोशवा गिल्-
गालपासून सारी रात्र चढून अकस्मात् त्यांवर
गेला. १० आणि परमेश्वराने इस्राएलपुढें
त्यांस असें घाबरें केलें कीं गिबोनांत त्यांचा फार
मोड केला, आणि बेथहोरोनास चढून जाण्याच्या
वाटेने त्यांनी त्यांच्या पाठीं लागून अजेक्यापर्यंत
व माक्केदापर्यंत त्यांस मारून टाकिलें. ११ आ-
णि ते इस्राएलाच्या संतानांपुढून पळून बेथहोरो-
नाच्या उतरणीवर आले होते, तेव्हां असें झालें
कीं अजेक्यापर्यंत परमेश्वराने त्यांवर आकाशां-
तून मोठ्या खड्यांची वृष्टि केली, आणि बहुत जे
गाराच्या खड्यांनी मेले, ते इस्राएलाच्या संताना-
नी तरवारीने जिवें मारिले यांपेक्षां अधिक होते.
१२ तेव्हां परमेश्वराने अमोरी इस्राएला-
च्या संतानांच्या स्वाधीन केले, त्या दिवशीं यहो-
शवा परमेश्वराजवळ बोलला, आणि इस्राएला-
च्या देखतां ह्मणाला, "हे सूर्या, तूं गिबोनावर
स्थिर राहा;" आणि "हे चंद्रा, तूं आयालोनाच्या
खोऱ्यावर स्थिर राहा." १३ आणि राष्ट्रांनी आ-
पल्या शत्रूंचे सूड घेतले तोंपर्यंत सूर्य स्थिर रा-
हिला, आणि चंद्र स्थिर राहिला; "सूर्य आकाशा-
च्या मध्यें स्थिर राहिला, आणि समाप्त होण्या-
च्या संधीस दिवस मावळायास चालला नाहीं,
हें याशाराच्या पुस्तकांत लिहिलें कीं नाहीं? १४
त्या दिवसासारिखा एकहि दिवस त्याच्यामागें
किंवा त्याच्यापुढें झाला नाहीं कीं परमेश्वराने
माणसाचा शब्द ऐकिला; कारण कीं इस्राएला-
साठीं परमेश्वर लढत होता. १५ मग यहो-
शवा व त्याच्यासंगतीं सर्व इस्राएल गिल्गालांत-
ल्या छावणीस माघारें फिरले.
१६ ते पांच राजे तर पळून माक्केदाच्या गुहेंत
लपाले. १७ मग यहोशवाला कोणी असें सां-
गितलें कीं, "ते पांच राजे माक्केदाच्या गुहेंत लप-
लेले असे सांपडले." १८ तेव्हां यहोशवाने
सांगितलें, "तुह्मी गुहेच्या तोंडीं मोठे दगड लोटा,
आणि त्यांस राखावाला त्यांजवळ पाहरेकरी ठेवा.
१९ तर तुह्मी उभे राहूं नका; आपल्या शत्रूंच्या
पाटीस लागून त्यांतल्या उरलेल्यांस मारा; त्यांच्या
नगरांत त्यांस जाऊं देऊं नका; कां तर तुमचा देव
परमेश्वर याने ते तुमच्या हातीं दिल्हे आहेत."
२० तेव्हां असें झालें कीं ते नाहींसे झाले किंवा
त्यांतून जे शेष राहिले, ते बंदोबस्तीच्या नगरांत
जात तोंपर्यंत यहोशवा व इस्राएलाचीं संतानें
त्यांवर मोठा भडिमार करीत गेलीं. २१ तेव्हां
सर्व लोक माक्केद्यांतल्या छावणींत यहोशवाजवळ
सुखाने माघारें आले; इस्राएलाच्या संतानांतल्या
कोणावर कोणी आपली जीभ काढिली नाहीं. २२
मग यहोशवाने सांगितलें, "तुह्मी गुहेचें तोंड
उघडून त्या पांच राजांस गुहेंतून काढून माझ्या-
जवळ आणा." २३ मग त्यांनी असें केलें, ह्मणून
यरूशालेमाचा राजा, हेब्रोनाचा राजा, यार्मूथाचा
राजा, लाखीशाचा राजा, एग्लोनाचा राजा, हे
पांच राजे गुहेंतून काढून त्याच्याजवळ आणिले.
२४ तेव्हां त्यांनी ते राजे यहोशवाजवळ आणि-
ल्यावर असें झालें कीं यहोशवाने इस्राएलाच्या
सर्व माणसांस बोलाविलें, आणि लढाऊ माणसांचे
सरदार जे त्याच्यासंगतीं आले होते, त्यांस सांगि-
तलें, "तुह्मी जवळ येऊन आपले पाय या राजां-
च्या मानांवर द्या." यास्तव त्यांनी जवळ येऊन
आपले पाय त्यांच्या मानांवर दिल्हे. २५ मग
यहोशवाने त्यांस सांगितलें, "तुह्मी भिऊं नका,
आणि हतवीर्य होऊं नका; धीर धरून बळकट
असा; कारण कीं तुह्मी आपल्या ज्या शत्रूंसीं
लढणार आहां, त्या सर्वांस परमेश्वर असें
करील." २६ आणि त्यानंतर यहोशवाने त्यांस
जिवें मारिलें; असें त्यांस मारिल्यावर त्याने पांच
झाडांवर त्यांस टांगिलें, आणि सांजपर्यंत ते झाडां-
वर टांगलेले राहिले. २७ मग सूर्य मावळत्या
वेळेस असें झालें कीं यहोशवाने आज्ञा दिल्ही
ह्मणून त्यांनी त्यांस झाडांवरून खालीं काढून
ज्या गुहेंत लपलेले होते, तींत त्यांस टाकिलें, आ-
णि गुहेच्या तोंडीं मोठे धोंडे ठेविले; ते आज
दिवसाच्या अवधीपर्यंत तसे आहेत.
२८ आणि त्या वेळेस यहोशवाने माक्केदा
घेतला, आणि त्याला व त्याच्या राजाला तरवारीने
मारिलें; त्याचा ह्मणजे त्यांतल्या सर्व मनुष्यांचा
विनाश केला; त्याने कोणीएकाला राहूं दिल्हें

नाहीं; आणि जसें यरीहोच्या राजाचें केलें होतें,
तसें माकेदाच्या राजाचें केलें. २९ नंतर यहो-
शवानें आणि त्याच्यासंगतीं सर्व इस्राएलानीं मा-
केदा सोडून लिब्ना तेथें जाऊन लिब्न्याशीं ल-
ढाई केली. ३० तेव्हां परमेश्वरानें त्याला व
त्याच्या राजालाहि इस्राएलाच्या हातीं दिल्हें;
ह्मणून त्यानें त्याला व त्यांतल्या सर्व मनुष्यांस
तरवारीनें मारिलें; त्यांतलें शेष ठेविलें नाहीं,
आणि जसें यरीहोच्या राजाचें केलें होतें, तसें
त्याच्या राजाचें केलें. ३१ नंतर यहोशवानें
आणि त्याच्यासंगतीं सर्व इस्राएलानीं लिब्ना
सोडून लाखीशास जाऊन त्यावर तळ धरिला,
आणि त्याशीं लढाई केली. ३२ तेव्हां परमे-
श्वरानें लाखीश इस्राएलाच्या हातीं दिल्हें,
ह्मणून दुसऱ्या दिवशीं त्यानीं तें धरून त्याला
ह्मणजे त्यांतल्या सर्व मनुष्यांस तरवारीनें मारि-
लें; ज्याप्रमाणें लिब्न्याचें केलें होतें, त्या अवघ्या-
प्रमाणें केलें.

३३ तेव्हां गेजेराचा राजा होराम लाखीशा-
चें सहाय करायास चढून आला होता, परंतु
यहोशवानें त्याला व त्याच्या लोकांस एवढें मा-
रिलें कीं त्याचें शेष ठेविलें नाहीं. ३४ नंतर
यहोशवानें आणि त्याच्यासंगतीं सर्व इस्राएलानीं
लाखीश सोडून एग्लोनास जाऊन त्यावर तळ
धरिला, आणि त्याशीं लढाई केली. ३५ आणि
त्याच दिवशीं त्याला घेतलें, आणि त्याला ह्मणजे
त्यांतल्या सर्व मनुष्यांस तरवारीनें मारिलें; त्याच
दिवशीं त्यानें विनाश केला; ज्याप्रमाणें त्यानें
लाखीशाचें केलें होतें, त्या अवघ्याप्रमाणें केलें.
३६ नंतर यहोशवानें आणि त्याच्यासंगतीं सर्व
इस्राएलानीं एग्लोन सोडून हेब्रोनास चढून जा-
ऊन त्याशीं लढाई केली. ३७ तेव्हां त्याच्या
खालच्या सर्व नगरांसुद्धां त्याला धरून, तरवारीनें
त्याला व त्याच्या राजाला व त्यांतल्या सर्व मनु-
ष्यांस मारिलें; त्यानें शेष ठेविलें नाहीं; ज्याप्रमाणें
त्यानें एग्लोनाचें केलें होतें, त्या अवघ्याप्रमाणें
केलें; ह्मणजे त्याचा व त्यांतल्या सर्व मनुष्यांचा
विनाश केला. ३८ नंतर यहोशवानें आणि त्या-
च्यासंगतीं सर्व इस्राएलानीं माघारें दबीरास येऊन
त्याशीं लढाई केली. ३९ तेव्हां त्यानें त्याला व
त्याच्या राजाला व त्याच्या खालच्या सर्व नगरांस
घेतलें, ह्मणजे त्यास तरवारीनें मारून प्रत्येकां-
तल्या सर्व मनुष्यांचा विनाश केला; त्यानें शेष
ठेविलें नाहीं; जसें हेब्रोनाचें केलें होतें, आणि
जसें लिब्न्याचें व त्याच्या राजाचें केलें होतें,
तसें दबीराचें व त्याच्या राजाचें केलें. ४०
असें यहोशवानें डोंगरवट व दक्षिण व तळवट व
उभडांचें ठिकाण, हे सर्व देश आणि त्यांचे सर्व
राजे मारिले; त्यानें शेष ठेविलें नाहीं; ह्मणजे
जसी इस्राएलाचा देव परमेश्वर यानें आज्ञा
दिल्ही होती, तसा प्रत्येक श्वासवानाचा विनाश
केला. ४१ असीं कादेशबाण्यापासून गाज्जा
तेथपर्यंत जे, आणि गिबोनापर्यंत सर्व गोशेन
प्रांताचे जे, ते यहोशवानें मारिले. ४२ आणि
हे सर्व राजे व यांचा देश यहोशवानें एकाच
वेळेस घेतला; कारण कीं इस्राएलाचा देव पर-
मेश्वर इस्राएलासाठीं लढत होता. ४३ नंतर
यहोशवा आणि त्याच्यासंगतीं सर्व इस्राएल गि-
ल्गालांतल्या छावणीस माघारें फिरले.

## अध्याय ११.

मग हासोराचा राजा याबीन यानें हें वर्त्तमान
ऐकिलें असतां असें झालें कीं त्यानें मादोनाचा
राजा योबाब आणि शिम्रोनाचा राजा व आक्षा-
फाचा राजा यांजवळ पाठविलें; २ आणि उत्तरेस
डोंगरांतले जे राजे व किन्नरोथाच्या दक्षिणेकडल्या
सपाटींतले व तळवटींतले व पश्चिमेस दोराच्या
परगण्यांतले, ३ पूर्वेचे व पश्चिमेचे कनानी, ह्म-
णजे अमोरी व हित्ती व परिज्जी व डोंगरांतले य-
बूसी व हेर्मोनाच्या खालीं मिस्पे याच्या प्रांतांतले
हिव्वी त्या सर्वांजवळ पाठविलें. ४ मग ते राजे
आणि त्यांच्यासंगतीं त्यांचें सर्व सैन्य निघालें; ते
संख्येकरून समुद्रकांठावरल्या वाळूसारिखे फार
लोक, आणि घोडे व रथ यांचा मोठा समुदाय
होता. ५ तेव्हां ते सर्व राजे इस्राएलाशीं लढा-
यास मिळून आले, आणि त्यानीं मेरोम सरोवरा-
जवळ एका ठिकाणीं तळ धरिला.

६ तेव्हां परमेश्वरानें यहोशवाला सांगितलें,
"तूं त्यांस भिऊं नको; कारण कीं उद्यां सुमारें या
वेळेस मी त्या सर्वांस इस्राएलाच्यापुढें मारलेलें

असें ठेविलों; तूं त्यांच्या घोड्यांची पायनाड तोड,
आणि त्यांचे रथ अग्नीने जाळ." ७ तेव्हां यहो-
शवा आणि त्याच्यासंगतीं सर्व लढाऊ लोक हे
मेरोम सरोवराजवळ त्यांवर अकस्मात् येऊन त्यां-
वर पडले. ८ तेव्हां परमेश्वराने ते इस्राएला-
च्या हातीं दिल्हे, ह्मणून त्यांनी मोठ्या सीदोना-
पर्यंत व मीसपोथमाइमापर्यंत व पूर्वेस मिस्पे
खोऱ्यापर्यंत त्यांच्या पाठीस लागून त्यांस मारिलें;
ह्मणजे त्यांस असें मारिलें कीं त्यांचें शेष राहिलें
नाहीं. ९ तेव्हां असें परमेश्वराने यहोशवाला
सांगितलें होतें, तसें त्याने त्यांचें केलें; त्यांच्या
घोड्यांची पायनाड तोडिली, आणि त्यांचे रथ अ-
ग्नीने जाळिले.

१० आणि त्या वेळेस यहोशवाने माघारें
येऊन हासोर घेतलें, आणि त्याच्या राजाला तर-
वारीने मारिलें; कारण कीं पूर्वी तें हासोर त्या
सर्व राज्यांमध्यें मुख्य होतें. ११ आणि त्यांनी
त्यांतल्या सर्व मनुष्यांस तरवारीने मारून विनाश
केला; कोणी प्राणी राहिला नाहीं; आणि त्याने
हासोर अग्नीने जाळिलें. १२ आणि यहोशवाने
त्या राजांचीं सर्व नगरें आणि ते सर्व राजे धरिले;
आणि परमेश्वराचा सेवक मोशे याने जसी
आज्ञा दिल्ही होती, तसें त्यांस तरवारीने मारून
त्यांचा विनाश केला. १३ परंतु ज्या सर्व नग-
रांची स्थिती त्यांच्या टेंकड्यांवर होती, तीं इस्रा-
एलानी जाळिलीं नाहींत; केवळ हासोर मात्र
यहोशवाने जाळिलें. १४ आणि त्या नगरांतली
सर्व लूट व पशू इस्राएलाच्या संतानांनी आपल्या-
साठीं हरण केलें; सर्व माणसांचा मात्र नाश होई
तोंपर्यंत त्यांस तरवारीने मारिलें; कोणी श्वासवान्
ठेविला नाहीं. १५ परमेश्वराने आपला से-
वक मोशे याला जसी आज्ञा दिल्ही होती, तसी
मोश्याने यहोशवाला आज्ञा दिल्ही, आणि तसें
यहोशवाने केलें; परमेश्वराने मोश्याला ज्या
आज्ञा दिल्या होत्या, त्या अवघ्यांतली एकहि
गोष्ट त्याने फिरविली नाहीं.

१६ तर डोंगरवट व सर्व दक्षिण प्रांत व सर्व
गोशेन प्रांत व तळवट व सपाटी व इस्राएलाचा
डोंगर व त्याजवळची तळवट असा सर्व देश
यहोशवाने घेतला. १७ सेईरास चढून जाण्या-
चा हालाक डोंगरापासून हेर्मोन डोंगराच्या खा-
लीं लबानोनाच्या खोऱ्यांतल्या बालगादापर्यंतहि
असे प्रांत, आणि त्यांचे सर्व राजे त्याने धरिले,
अशा त्यांचा मोड करून त्यांस जिवें मारिलें.
१८ त्या सर्व राजांसीं यहोशवाने बहुत दिवस
लढाई केली. १९ गिबोनांतले राहणारे हिव्वी
यांवांचून ज्याने इस्राएलाच्या संतानांसीं समेट
केला, तसें एकहि नगर नव्हतें, यांनी लढाई करून
अवघीं घेतलीं. २० कां तर परमेश्वराकडून
असें झालें कीं ते मनाचे कठीण होऊन इस्राएला-
सीं लढायास भिडले, ह्मणजे त्यांने त्यांचा विनाश
करावा; त्यांवर दया अगदीं न व्हावी, परंतु पर-
मेश्वराने मोश्याला जसी आज्ञा दिल्ही, तसा
त्यांचा नाश व्हावा ह्मणून.

२१ आणि त्या वेळेस यहोशवाने जाऊन डों-
गरवटींतले, हेब्रोनांतले, दबीरांतले, अनाबांतले,
आणि सर्व यहूदाच्या डोंगरांतले, व सर्व इस्राए-
लाच्या डोंगरांतले जे अनाकी, त्यांस त्यांच्या नग-
रांसुद्धां छेदून टाकिलें; यहोशवाने त्यांचा विनाश
केला. २२ इस्राएलाच्या संतानांच्या देशांत अ-
नाकी उरले नाहींत: गाज्जा, गाथ व आश्दोद
यांत मात्र राहिले. २३ परमेश्वराने मोश्याला
जें सांगितलें होतें, त्या अवघ्याप्रमाणें यहोशवाने
सर्व देश घेतला, आणि तो देश इस्राएलास त्यां-
च्या वंशांप्रमाणें त्यांच्या वांटण्यांसारिखा यहोश-
वाने वतन करून दिल्हा; तेव्हां देश लढाईविषयीं
स्वस्थ झाला.

## अध्याय १२.

यार्देनेच्या पलिकडे सूर्याच्या उगवतेस, आर्णोन
नदीपासून हेर्मोन डोंगरापर्यंत, असी पूर्वेकड-
ली सर्व सपाटी, त्या देशाच्या ज्या राजांस इस्रा-
एलाच्या संतानांनी मारून त्यांचे देश वतनासाठीं
घेतले, ते हेच: २ अमोऱ्यांचा राजा सीहोन,
त्याने हेश्बोनांत राहून आर्णोन नदीच्या कांठाव-
रलें अरवेर ह्मणजे खिंडीचा मध्यभाग व अर्धा
गिलाद तेथून आम्मोनाच्या संतानांची सीमा या-
ब्बोक नदी तेथपर्यंतहि अधिकार केला; ३ ह्म-
णजे किन्नरेथ समुद्राच्या पूर्वभागापर्यंत जी सपा-
टी तिजवर, आणि बेथयशिमोथाच्या वाटेस पूर्वे-

कडे जो सपाटींतला समुद्र तोच खारट समुद्र
तेथपर्यंतहि, ह्मणजे दक्षिणेस पिसग्याच्या खाल-
च्या ढभडांपर्यंत जो देश त्यावर अधिकार केला.
४ आणि रफाई यांच्या शेषांतला बाशानाचा
राजा ओग, जो आष्टारोथ व एद्रेई यांत राहत
होता, त्याची सीमा; ५ आणि त्याने हेर्मोन
डोंगरावर व साल्खावर, ह्मणजे सर्व बाशा-
नावर गशूरी व माखाथी व अर्धा गिलाद यांच्या
सीमेपर्यंत, ह्मणजे हेश्बोनाचा राजा सीहोन
याच्या सीमेपर्यंत अधिकार केला. ६ परमेश्व-
राचा सेवक मोशे व इस्राएलाचीं संतानें यानी
त्यांस मारिलें; आणि परमेश्वराचा सेवक मोशे
याने रऊबेनी व गादी व अर्धा मनाश्शे या वं-
शांस तो देश वतन करून दिल्हा. ७ आणि
यहोशवा व इस्राएलाचीं संतानें यानी ज्या रा-
जांस मारिलें ते हेच; त्यांचा देश यार्देनेच्या
अलिकडे पश्चिमेस लबानोनाच्या खोऱ्यांतल्या बा-
लगादापासून सेईरास चढून जाण्याच्या हालाक
डोंगरापर्यंतहि होता; आणि यहोशवाने तो इस्रा-
एलाच्या वंशांस त्यांच्या वांटण्यांप्रमाणें वतन क-
रून दिल्हा. ८ डोंगरवटीवर व तळवटीवर
व सपाटीवर व ढभडांच्या ठिकाणीं व रानांत व
दक्षिणेस, हित्ती, अमोरी व खनानी, परिज्जी,
हिव्वी व यबूसी होते. ९ यरीहोचा राजा एक;
बेथएलाच्या बाजूस जें आय त्याचा राजा एक;
१० यरूशलेमाचा राजा एक; हेब्रोनाचा राजा
एक; ११ यार्मूथाचा राजा एक; लाखीशाचा
राजा एक; १२ एग्लोनाचा राजा एक; गेजे-
राचा राजा एक; १३ दबीराचा राजा एक;
गेदेराचा राजा एक; १४ हर्मा याचा राजा एक;
अराद याचा राजा एक; १५ लिब्ना याचा
राजा एक; अदूल्लाम याचा राजा एक; १६ मा-
केदा याचा राजा एक; बेथएल याचा राजा एक;
१७ ताप्पूहा याचा राजा एक; हेफेराचा राजा
एक; १८ अफेक याचा राजा एक; लाश्शारोन
याचा राजा एक; १९ मादोन याचा राजा
एक; हासोराचा राजा एक; २० शिम्रोनमरोन
याचा राजा एक; आक्षाफाचा राजा एक; २१
तानाखाचा राजा एक; मगिद्दो याचा राजा एक;
२२ केदेशाचा राजा एक; कार्मेलाजवळचें
यक्नाम याचा राजा एक; २३ दोराच्या प्रांता-
वरला दोराचा राजा एक; गिल्गालाच्या राष्ट्रां-
चा राजा एक; २४ तिर्सा याचा राजा एक:
असे सर्व राजे एकतीस होते.

## अध्याय १३.

मग यहोशवा वयाने वृद्ध झाला, तेव्हां परमे-
श्वर त्याला बोलला, "तूं वयाने वृद्ध झालास,
तथापि वतन करून घ्यायाचा देश बहुतच राहि-
ला आहे. २ जो देश राहिला तो हाच, समुद्र-
वळणांकडला पलिष्ट्यांचा सर्व प्रांत, आणि गशूरी
सर्व प्रांत; ३ मिसराच्या पूर्वेस जी शीहोर नदी
तिजपासून उत्तरेस जें एक्रोन त्याच्या सीमेपर्यंत-
हि जो देश, तो खनान्यांचा मोजलेला आहे;
गाज्जाथी व आशदोदी, एष्कलोनी, गित्ती व ए-
क्रोनी व आव्वी यांचे पलिष्टी पांच सुभेदार आ-
हेत. ४ दक्षिणेस खनान्यांचा सर्व देश, आणि
सीदोन्यांचें जें म्यारा तें, अफेकपर्यंत ह्मणजे अ-
मोऱ्यांच्या सीमेपर्यंत तो देश; ५ आणि गिबली
यांचा देश, व सूर्याच्या उगवतेस सर्व लबानोन,
हेर्मोन डोंगराखालच्या बालगादापासून हमाथांत
जायाच्या ठिकाणापर्यंत तो देश घ्यायाचा आहे;
६ लबानोनापासून मीस्रफोथमाइमापर्यंत डोंगर-
चे सर्व राहणारे, सर्व सीदोनी, यांस मी इस्रा-
एलाच्या संतानांपुढून वतनांतून घालवीन; त्यांचा
देश इस्राएलाचें वतन होण्यासाठीं, जसी म्या
तुला आज्ञा दिल्ही तशा तूं दैवखुणा मात्र करून
पाड. ७ तर आतां नऊ वंश व अर्धा मनाश्शे
याचा वंश यांस वतन होण्यासाठीं या देशाच्या
वांटण्या कर. ८ त्याच्या संगतींचा अर्धा वंश
व रऊबेनी व गादी हे आपलें वतन पावले; कां कीं
मोश्याने यार्देनेच्या पलिकडे पूर्वेस त्यांस दिल्हें
आहे; परमेश्वराचा सेवक मोशे याने त्यांस
जसें दिल्हें तसें असो. ९ आर्णोन नदीच्या कांठीं
जें अरवेर, ह्मणजे त्या खिंडीच्या मध्यभागीं जें
नगर, तेथून दीबोनापर्यंत मेदब्याची सर्व सपाटी-
हि; १० आणि अमोऱ्यांचा राजा सीहोन
ज्याने हेश्बोनांत राज्य केलें त्याचीं, अम्मोनी
संतानांच्या सीमेपर्यंत सर्व नगरें; ११ गिला-
दहि, आणि गशूरी व माखाथी यांची सीमा,

आणि अवघा हेर्मोन डोंगर, व साल्खापर्यंत सर्व
बाशान; १२ ह्मणजे बाशानांतल्या ओगाचें सर्व
राज्य दिल्हें ; त्यानें आष्टारोथ व एद्रेई यांत
राज्य केलें ; रफाई यांच्या शेषांतला तो राहिला
होता, परंतु मोश्यानें त्यांस मारून त्यांचें वतन
घेतलें." १३ तथापि इस्राएलाच्या संतानांनी ग-
शूरी व माखाथी यांस वतनांतून घालविलें नाहीं;
यास्तव गशूर व माखाथ आजपर्यंत इस्राएलाम-
ध्यें राहत आहेत. १४ लेवीच्या वंशाला मात्र
त्यानें वतन दिल्हें नाहीं; इस्राएलाचा देव परमे-
श्वर याचीं जीं जळायाचीं अर्पणें, तेंच त्याचें व-
तन आहे; जसें त्यानें त्याला सांगितलें तसें. १५
परंतु रऊबेनाच्या संतानांच्या वंशाला त्याच्या
कुळांप्रमाणें मोश्यानें दिल्हें. १६ आणि त्यांस
सीमा असी प्राप्त झाली कीं आर्णोन नदीच्या कांठा-
वर जें अरवेर, ह्मणजे त्या खिंडीच्या मध्यभागीं
जें नगर, तेथून मेदब्याजवळची सर्व सपाटीहि ;
१७ हेश्बोन आणि सपाटीवर त्याकडलीं जीं सर्व
नगरें ; दीबोन व बामोथबाल व बेथबालमौन ;
१८ आणि याहजा व कदेमोथ व मेफाथ; १९
आणि किर्याथाइम व सिब्मा व खिंडीच्या डों-
गरावरचें जेरेथ शहर ; २० आणि पौरवस्ति
व पिस्ग्याचे उभड व बेथयशिमोथ; २१ आणि
सपाटींतलीं सर्व नगरें ; ह्मणजे अमोऱ्यांचा राजा
सीहोन त्याचें सर्व राज्य त्यांत होतें; त्यानें हेश्-
बोनांत राज्य केलें ; त्याला मोश्यानें मारिलें,
आणि देशांत राहणारे सीहोनाकडून अभिषेकलेले
मिद्यानावरले अधिकारी अवी व रेकेम व जूर व
हूर व रेबा यांसहि मारिलें ; २२ आणि त्या-
च्या मारलेल्यांसंगतीं तो जादूगीर बौराचा पुत्र
बलाम, याला इस्राएलाच्या संतानांनी तरवारीनें
जिवें मारिलें. २३ तर रऊबेनाच्या संतानांची
सीमा यार्देन व थडप्रांत असी झाली; रऊबेनाच्या
संतानांच्या कुळांप्रमाणें त्यांचें हेंच वतन, तीं नगरें
व त्यांच्या खालचे गांव. २४ गादाच्या वंशाला-
हि, गादीच्या संतानांस त्यांच्या कुळांप्रमाणें मो-
श्यानें वतन दिल्हें. २५ आणि त्यांची सीमा
याजेर व गिलादांतलीं सर्व नगरें व आम्मोनाच्या
संतानांचा अर्धा देश, राब्बा याच्यापुढें जें अरवेर
तेथपर्यंत झाली. २६ आणि हेश्बोनापासून मि-
ज्पे यांतला रामा तेथपर्यंत, आणि बटोनीम व
माहनाइमापासून दबीराच्या सीमेपर्यंत ; २७
आणि खोऱ्यांतलें बेथहाराम व बेथनिम्रा व सु-
कोथ व जाफोन, ह्मणजे हेश्बोनाचा राजा सी-
होन याच्या राज्याचें शेष यार्देन व त्याची थड
किन्नेरेथ समुद्राच्या कांठापर्यंत, असें यार्देनेच्या
पलिकडे पूर्वेस झालें. २८ गादाच्या संतानांच्या,
कुळांप्रमाणें त्याचें वतन हेंच, तीं नगरें व त्यांच्या
खालचे गांव. २९ आणि मनाश्श्याच्या अर्ध्या
वंशाला मोश्यानें वतन दिल्हें ; तर मनाश्श्याच्या
अर्ध्या संतानांच्या वंशाला त्यांच्या कुळांप्रमाणें
असें झालें ; ३० कीं त्यांची सीमा माहनाइ-
मापासून सर्व बाशान, ह्मणजे बाशानाचा राजा
ओग याचें अवघें राज्य, बाशानांतले याईराचे
जे अवघे गांव साठ नगरें त्यांसुद्धां ; ३१ आणि
अर्धा गिलाद, आणि बाशानांत ओगाच्या राज्यां-
तलीं नगरें आष्टारोथ व एद्रेई यांसुद्धांहि ; असें
मनाश्श्याचा पुत्र माखीर याच्या संतानांस, ह्मणजे
माखीराच्या अर्ध्या संतानांस त्यांच्या कुळांप्रमाणें
प्राप्त झालें. ३२ यरीहोजवळ यार्देन इच्या प-
लिकडे पूर्वेस मोवाबीच्या अरण्यांत मोश्यानें जीं
वतनें दिल्हीं तीं हींच. ३३ लेवीच्या वंशाला
तर मोश्यानें वतन दिल्हें नाहीं ; इस्राएलाचा देव
परमेश्वर यानें जसें त्यांस सांगितलें, तसा तोच
त्याचें वतन आहे.

## अध्याय १४.

आणि खनान देशांत इस्राएलाच्या संतानांस
जीं वतनें झालीं, ह्मणजे एलाजार याजक
व नूनाचा पुत्र यहोशवा व इस्राएलाच्या संताना-
च्या वंशांचे वृद्ध अधिकारी यानी त्यांस जीं
वतनें दिल्हीं तीं हींच. २ परमेश्वरानें मो-
श्याच्या योगें नऊ वंशांविषयीं व अर्ध्या वंशावि-
षयीं जसी आज्ञा दिल्ही, तसें दैवखुणांवरून
त्यांचें वतन झालें. ३ कां तर अडीच वंशांस
मोश्यानें यार्देनेच्या पलिकडे वतन दिल्हें होतें,
परंतु त्यांच्यासंगतीं लेव्यांस वतन दिल्हें नाहीं.
४ कां कीं योसेफाचीं संतानें दोन वंश मनाश्शे
व एफ्राईम असे होते, आणि लेव्यांस देशांतहि
त्यानी वांटा दिल्हा नाहीं, केवळ वस्तीसाठीं नगरें,

आणि त्यांच्या पशूंसाठीं व त्यांच्या मालमतेसाठीं
त्यांजवळचे शिवार दिल्हे. ५ जसी परमेश्व-
राने मोश्याला आज्ञा दिल्ही होती, तसें करून
इस्राएलाच्या संतानानी देश वांटून घेतला.
६ आणि यहूदाचीं संतानें गिल्गालांत यहो-
शवाजवळ आलीं, तेव्हां कनिज्जी यफुन्ने याचा
पुत्र कालेब तो त्याजवळ बोलला, "कादेशबाण्र्या-
मध्यें परमेश्वराने देवाचा माणूस मोशे याला
मजविषयीं व तुजविषयीं जी गोष्ट सांगितली, ती
तूं जाणत आहेस. ७ परमेश्वराचा सेवक
मोशे याने जेव्हां मला कादेशबाण्र्यापासून देश
हेरायाला पाठविलें, तेव्हां मी चाळीस वर्षांचा
होतों, आणि माझ्या मनांत जसी गोष्ट, तसीच
म्या त्याजवळ परत आणिली. ८ तेव्हां माझे
भाऊ जे माझ्यासंगतीं चढून गेले, त्यानी लोकांचें
ह्रदय घाबरें केलें, परंतु मी आपला देव परमे-
श्वर याला पूर्ण अनुसरलों. ९ तेव्हां त्याच
दिवशीं मोश्याने शपथ वाहून सांगितलें कीं, 'ज्या
देशावर तुझा पाय पडला, तो निश्चयेंकरून तुझें
व तुझ्या संतानांचें वतन असा सर्वकाळ होईल;
कारण कीं तूं माझा देव परमेश्वर याला सर्व
प्रकारें अनुसरलास.' १० तर आतां पाहा, इ-
स्राएलाच्या रानांत चालत असतां परमेश्वराने
ती गोष्ट मोश्याला सांगितली होती तेव्हांपासून
जसें परमेश्वराने सांगितलें होतें, तसें त्याने
मला या पंचेताळीस वर्षांत वांचविलें आहे; आ-
णि आतां पाहा, मी आज पंचाएशी वर्षांचा आहें.
११ जेव्हां मोश्याने मला पाठविलें होतें, तेव्हां-
च्या दिवसाप्रमाणें मी आजपर्यंत बळकट आहें;
तेव्हां जसी माझी शक्ति होती, तसीच आतां ल-
ढायास व जाणें येणें करायास माझी शक्ति आहे.
१२ तर परमेश्वराने त्या दिवसीं ज्या डोंगरा-
विषयीं सांगितलें, तो हा आतां मला दे; कां तर
त्या दिवसीं त्वां ऐकिलें कीं, 'तेथें अनाकी, आणि
नगरें मोठीं व बंदोबस्तीचीं आहेत; जर परमे-
श्वर माझ्यासंगतीं असला, तर जसें परमेश्व-
राने सांगितलें, तसें मी त्यांस वतनांतून घालवीन."
१३ तेव्हां यहोशवाने त्याला आशीर्वाद दिल्हा;
आणि यफुन्न्याचा पुत्र कालेब याला हेब्रोनाचें
वतन दिल्हें. १४ यास्तव कनिज्जी यफुन्ना याचा
पुत्र कालेब याचें हेब्रोन वतन आजपर्यंत चालत
आलें; कारण कीं तो इस्राएलाचा देव परमेश्वर
याला पूर्ण अनुसरला. १५ तर पूर्वकाळीं हेब्रो-
नाचें नांव किरयाथअर्बा होतें; तो अर्बा अना-
क्यांमध्यें मोठा माणूस होता; तेव्हां लढाईविष-
यीं देश स्वस्थ झाला.

## अध्याय १५.

तर दक्षिण अंगीं अदोमाच्या सीमेपर्यंत दक्षि-
णेच्या सीन रानाकडे दैवभाग यहूदाच्या सं-
तानांला कुळाकुळाप्रमाणें प्राप्त झाला. २ आणि
त्यांची दक्षिण सीमा खारट समुद्राच्या शेव-
टची खाडी, जिचें तोंड दक्षिणेस आहे, त्या-
पासून झाली. ३ मग मालेआक्राबीमाच्या
दक्षिणेस जाती, आणि ती सीनापर्यंत जाऊन
कादेशबाण्र्याच्या दक्षिणेकडून चढून जाती; नंतर
हेस्रोनास जाऊन आदारास चढून कार्का याकडे
फिरती. ४ मग आज्मोनास जाऊन मिसरी
नदीस जाती; नंतर त्या सीमेच्या गती पश्चिम
समुद्रापर्यंत आहेत; असी तुमची दक्षिण सीमा
व्हावी. ५ आणि पूर्वेची सीमा खारट समुद्रा-
वरून यार्देनेच्या संगमापर्यंत आहे; आणि उत्त-
रेस कोपऱ्याची सीमा समुद्राच्या कांठीं यार्देनेचा
संगम तेथून आहे. ६ मग ती सीमा बेथहग्ला
तेथपर्यंत चढून जाऊन बेथअराबाच्या उत्तरेस
जाती; नंतर ती सीमा रऊबेनाचा पुत्र बोहान
याची धोंड तेथवर चढून जाती; ७ मग ती
सीमा आखोरखोऱ्यापासून दबीरापर्यंत चढून जा-
ऊन उत्तरेस गिल्गालाकडे फिरती; तें अदुम्मी-
माच्या चढणीसमोर, ती नदी दक्षिणेस आहे;
नंतर ती सीमा एनशमेशाच्या पाण्याकडे जाती,
आणि तिची गती एनरोगेलापर्यंत आहे. ८
मग ती सीमा हिन्नोमाच्या पुत्राच्या खिंडींतून
यबूसी तेंच यरूशालेम त्याच्या दक्षिण भागास
चढून जाती; नंतर पश्चिमेस हिन्नोम खिंडीच्या
समोर जो डोंगर, जो रफायांच्या उत्तरेस आहे,
खोऱ्याच्या शेवटीं त्याच्या शिखरावर ती सीमा
चढून जाती. ९ मग डोंगराच्या शिखरापासून
नेफ्तोहा पाण्याच्या झऱ्यापर्यंत ती सीमा आंक-
लेली आहे; आणि एफ्रोन डोंगरावरल्या नगरांत

जाऊन, बाला तोच किर्याथ-यारीम तिकडे ती
सीमा अंकलेली आहे; १० मग बाल्यापासून
ती सीमा पश्चिमेस सेईर डोंगराकडे फिरून या-
रीम डोंगर तोच खसालोन त्याच्या उत्तरेकडल्या
भागीं जाती, आणि बेथशेमेश तिकडे उतरून ति-
म्ना याकडे जाती. ११ मग ती सीमा एक्रो-
नाच्या उत्तरेकडल्या भागीं जाती, आणि शिक्रो-
नापर्यंत सीमा अंकलेली आहे; मग बाला डोंग-
रास चालून याब्नेलास जाती; अशा सीमेच्या
गती समुद्रापर्यंत आहेत. १२ आणि पश्चिमेस
मोठा समुद्र तीच सीमा, तसी जी चहुंकडली
सीमा तीच यहूदाच्या संतानांच्या कुळांप्रमाणें
त्यांची सीमा आहे.

१३ आणि यहोशवाने आपल्याला परमेश्व-
राच्या सांगण्याप्रमाणें यफुन्न्याचा पुत्र कालेब
याला यहूदाच्या संतानांमध्यें वांटा, ह्मणजे अ-
नाकाचा बाप आर्बा याचा गांव तेंच हेब्रोन
असा दिल्हा. १४ मग तेथून कालेबाने अना-
कापासून जन्मलेले तीन अनाकी वंशस्थ शेशाय्
व अहीमान व ताल्माय यांस वतनांतून घाल-
विलें. १५ नंतर तो तेथून दबीरांतल्या राह-
णा-यांजवळ चढून गेला; दबीराचें नांव तर पूर्व-
काळीं किर्याथसेफेर होतें. १६ तेव्हां कालेब
बोलला, "जो किर्याथसेफेराचा मोड करून तो
घेईल, त्याला मी आपली कन्या आख्सा बायको
करून देईन." १७ तेव्हां कालेबाचा भाऊ
कनाज याचा पुत्र अथ्नियेल याने तो गांव घे-
तला; यास्तव त्याने आपली कन्या आखसा त्या-
ला बायको करून दिल्ही. १८ आणि ती त्या-
पासीं आली तेव्हां असें झालें कीं तिने आपल्या
बापाजवळ शेत मागायास त्याला बोध केला,
आणि ती गाढवावरून उतरली, तेव्हां कालेबाने
तिला ह्मटलें, "तुला काय पाहिजे?" १९ तेव्हां
तिने ह्मटलें, "मला प्रसाद दे; कारण कीं त्वां
कोरडा प्रांत मला दिल्हा, तर पाण्याचे झरे मला
द्यावे." यास्तव त्याने तिला वरचे झरे व खालचे
झरे दिल्हे.

२० यहूदाच्या संतानांचें वतन त्यांच्या कुळां-
कुळांप्रमाणें हेंच आहे; २१ आणि यहूदाच्या
संतानांला दक्षिणेस अदोमाच्या सीमेजवळ कां-
ठावरलीं हीं नगरें प्राप्त झालीं; काब्जेल व एदेर
व यागूर; २२ आणि कीना व दीमोना व अ-
दादा; २३ आणि केदेश व हाजोर व इथ्नान;
२४ जीफ व टेलेम व बालोथ; २५ आणि
नवें हाजोर व हेज्रोनाकडले गांव तेंच हाजोर;
२६ अमाम व शमा व मोलादा; २७ आणि
हजारगादा व हेष्मोन व बेथपालेट; २८ आणि
हजारशुवाल व बेरशेबा व बिज्योथ्या; २९
बाला व ईयीम व आजेम; ३० आणि एल्-
तोलाद व खसील व हर्मा; ३१ आणि झिक्-
लाग व माद्मान्ना व सान्सान्ना; ३२ आणि
लबावोथ व शिल्हीम व आईन व रिम्मोन,
सर्व नगरें एकुणतीस, आणि गांवहि. ३३
तळवटीवरलीं हीं, एष्टावोल व जारा व अ-
षणा; ३४ आणि जानोहा व एनगान्नीम
ताप्पूहा व एनाम; ३५ यार्मूथ व अदुल्लाम,
सोखो व अजेका; ३६ आणि शाराइम व
अदीथाइम व गदेरा व गदेरोथाइम, असीं नगरें
चवदा, आणि त्यांकडले गांव; ३७ जनान व
हदाशा व मिग्दालगाद; ३८ आणि दिलान
व मिज्पे व यक्थेल; ३९ लाखीश व बजकाथ
व एग्लोन; ४० आणि खाबोन व लाहमास
व खिथ्लीश; ४१ आणि गदेरोथ बेथदागोन
व नामा व माकेदा; असीं नगरें सोळा, आणि
त्यांकडले गांव. ४२ लिब्ना व एथेर व आशान;
४३ आणि इफ्ताह व आष्णा व नजीब; ४४
आणि कईला व आखजीब व मारेशा; असीं
नगरें नऊ, आणि त्यांकडले गांव. ४५ एक्रोन
आणि त्याकडलीं खेडीं व त्याकडले गांव; ४६
एक्रोनाजवळचीं आणि पश्चिमेचीं आश्दोदाच्या
बाजूकडलीं सर्व नगरें, आणि त्यांकडले गांव.
४७ आश्दोद, त्याकडलीं खेडीं व त्याकडले गांव;
गाज्जा, त्याकडलीं खेडीं व त्याकडले गांव, मि-
सराची नदी व मोठा समुद्र ह्मणजे सीमा तेथ-
पर्यंत. ४८ आणि डोंगरांतलीं हीं, शामीर व
यत्तीर व सोखो; ४९ आणि दान्ना व कि-
र्याथसान्ना तेंच दबीर; ५० आणि अनाब व
एष्टमो व अनीम; ५१ आणि गोशेन व हो-
लोन व गिलो; असीं नगरें अकरा, आणि त्यां-
कडले गांव; ५२ अराब व दूमा व एशान;

५३ आणि यानूम व बेथताप्पूहा व अफेका; ५४
आणि हुम्टा व किर्याथार्बा तेंच हेब्रोन व सि-
योर; असीं नगरें नऊ, आणि त्यांकडले गांव.
५५ मावोन, कार्मेल व जीफ व यूट्टा; ५६ आणि
इज्रेल व यक्दाम व जानोहा; ५७ काइन,
गिबा, व थिम्ना; असीं नगरें दाहा, आणि त्यां-
कडले गांव. ५८ हाल्हूल, बेथजूर व गदोर; ५९
आणि मारा व बेथअनोथ व एल्टकोन; असीं
नगरें साहा, आणि त्यांकडले गांव. ६० किर्या-
थबाल तोच किर्याथयारीम व राब्बा असीं नगरें
दोन, आणि त्यांकडले गांव. ६१ रानांतलीं हीं,
बेथार्बा, मिद्दीन व सखाखा; ६२ आणि
निब्शान व मीठनगर व एनगदी; असीं नगरें
साहा, आणि त्यांकडले गांव. ६३ तथापि यरू-
शालेमांतले राहणारे यबूसी यांस यहूदाच्या सं-
तानांनी घालवविलें नाहीं; यास्तव यबूसी यरूशा-
लेमांत यहूदाच्या संतानांजवळ आजपर्यंत राहत
आले.

## अध्याय १६.

आणि योसेफाच्या संतानांच्या दैवभागाची
सीमा यरीहोजवळच्या यार्देनेपासून निघून
यरीहोच्या पूर्वेकडल्या पाण्यावरून रानांतून य-
रीहोपासून डोंगरावर बेथएलास चढून जाती.
२ मग बेथएलापासून लूजास जाऊन अटारोथां-
तले आर्की यांच्या सीमेपर्यंत जाती. ३ मग
पश्चिमेस याफ्लेटी यांच्या सीमेवरून खालच्या
बेथहोरोनाच्या सीमेपर्यंत व गेजेरापर्यंत उतरती;
आणि तिच्या गती समुद्रापर्यंत आहेत. ४ या-
प्रमाणें योसेफाचीं संतानें मनाश्शे व एफ्राइम
यांस वतन मिळालें. ५ अणखी एफ्राइमाच्या
संतानांचे जे त्यांची सीमा कुळांकुळांप्रमाणें असी
पडली कीं त्यांच्या वतनाची सीमा आट्रोथ-आ-
द्दार याच्या पूर्वेपासून वरल्या बेथहोरोनापर्यंत हो-
ती. ६ आणि ती सीमा मिखमथाथाजवळच्या
समुद्राकडे उत्तरेस जाती, आणि पूर्वेस तानाथ
शिलोपर्यंत ती सीमा फिरती, मग त्याजवळून पू-
र्वेस यानोहा तेथवर जाती. ७ नंतर यानोहा-
पासून अटारोथास व नारायास उतरती, मग
यरीहोस मिळून बाहेर यार्देनेस जाती. ८ ताप्पू-
हा यापासून पश्चिमेस काना ओढ्यापर्यंत ती सी-
मा जाती; असा तिच्या गती समुद्रापर्यंत आहेत;
एफ्राइमाच्या संतानांच्या वंशाचें त्यांच्या कुळांप्र-
माणें हेंच वतन आहे. ९ आणि मनाश्श्याच्या
संतानांच्या वतनामध्यें कित्येक नगरें एफ्राइमाच्या
संतानांसाठीं वेगळीं केलेलीं होतीं; तीं सर्व नगरें
त्यांकडल्या गांवांसुद्धां होतीं. १० तथापि जे
खनानी गेजेरांत राहत होते, त्यांस त्यांनी घाल-
विलें नाहीं; यास्तव ते खनानी एफ्राइमामध्यें आ-
जपर्यंत राहत आले; तथापि कराने चाकर झाले.

## अध्याय १७.

आणि मनाश्शे तो योसेफाचा प्रथम पुत्र, या-
स्तव त्याच्या वंशाला, ह्मणजे मनाश्श्याचा
प्रथम पुत्र माखीर गिलादाचा बाप याला दैव-
भाग प्राप्त झाला; हा तर मोठा शूर होता, आणि
त्याला गिलाद व बाशान असा भाग प्राप्त झाला.
२ मनाश्श्याच्या राहिलेल्या संतानांसहि त्यांच्या
कुळांप्रमाणें विभाग प्राप्त झाला, ह्मणजे अबिये-
जेराचीं संतानें व हेलेकाचीं संतानें व आशिये-
लाचीं संतानें व शेखेमाचीं संतानें व हेफेराचीं
संतानें व शमीदा यांचीं संतानें यांस प्राप्त झाला;
योसेफाचा पुत्र जो मनाश्शे त्यापासून जे पुरुष
उत्पन्न झाले ते कुळांकुळांप्रमाणें असे आहेत.
३ मनाश्श्याचा पुत्र माखीर, याचा पुत्र गिलाद,
याचा पुत्र हेफेर, याचा पुत्र जलफहाद, याला
तर पुत्र नव्हते, परंतु कन्या होत्या; आणि त्या-
च्या कन्यांचीं नांवें हींच, माहला व नोवा,
हग्ला, मिल्का व थिर्जा. ४ आणि एलाजार
याजक व नूनाचा पुत्र यहोशवा व अधिकारी
यांपुढें त्या येऊन बोलल्या, "परमेश्वराने मो-
श्याला असी आज्ञा दिल्ही कीं आह्मास आमच्या
भावांबंदांमध्यें वतन द्यावें." यास्तव त्याने परमे-
श्वराच्या सांगण्याप्रमाणें त्यांस त्यांच्या बापाच्या
भावांबंदांमध्यें वतन दिल्हें. ५ आणि यार्देने-
च्या पलिकडे जे गिलाद व बाशान त्या प्रांतां-
खेरीज मनाश्श्याचे सूत्रनेमित दाहा भाग प्राप्त
झाले. ६ कारण कीं मनाश्श्याच्या वंशांतल्या

कन्यांस त्याच्या संतानांमध्यें वतन मिळालें, आणि
मनाश्श्याच्या इतर संतानांस गिलाद प्रांत प्राप्त
झाला होता.

७ आणि मनाश्श्याची सीमा आशेरापासून
शखेमाच्या समोरल्या मिख्मथाथापर्यंत झाली,
आणि ती सीमा एन तापूहाच्या राहणाऱ्यांच्या
उजव्या भागापर्यंत पोहंचली. ८ ताप्पूहा प्रांत
मनाश्श्याचा, परंतु मनाश्श्याच्या सीमेजवळचें ता-
प्पूहा नगर एफ्राइमाच्या संतानांचें झालें. ९ आणि
सीमा काना ओढ्यावरून ओढ्याच्या दक्षिणेस
उतरली; एफ्राइमाचींहि कित्येक नगरें मनाश्श्या-
च्या नगरांमध्यें होतीं; तरी मनाश्श्याची सीमा
ओढ्याच्या उत्तरेस होती, आणि तिच्या गती स-
मुद्रापर्यंत झाल्या. १० दक्षिणभाग एफ्राइमाचा,
आणि उत्तरभाग मनाश्श्याचा, आणि समुद्र
त्याच्या सीमेचा झाला, आणि उत्तरेस आशेरा-
च्या ठायीं व पूर्वेस इस्साखाराच्या ठायीं ते एकत्र
झाले. ११ आणि इस्साखारांत व आशेरांत बे-
थशान व तिजकडलीं खेडीं, आणि इब्लाम व
त्याकडलीं खेडीं, आणि दोर व त्याकडलीं खेडीं
यांतले राहणारे, आणि एन दोर व त्याकडलीं
खेडीं यांतले राहणारे, आणि थानाख व त्याकडलीं
खेडीं यांतले राहणारे, आणि मगिद्दो व त्याकडलीं
खेडीं यांतले राहणारे, हे तीन परगणे मनाश्श्याचे
झाले. १२ तथापि या नगरांचा मोड कराया-
ला मनाश्श्याचीं संतानें समर्थ नव्हतीं; या प्रां-
तांत राहायास खनान्यानी तर निग्रह धरिला.
१३ तरी असें झालें कीं जेव्हां इस्राएलाचीं सं-
तानें बळकट झालीं, तेव्हां त्यानी खनान्यांचा अ-
गदीं मोड न करून त्यापासून कर घेतला. १४
तेव्हां योसेफाच्या संतानानी यहोशवाला असें
ह्मटलें कीं, "त्वां मला वतनासाठीं एकच दैवभाग
ह्मणजे एकच सूत्रप्रदेश कां दिल्हा? मी तर मो-
ठा लोक; परमेश्वराने मला अनेक प्रकारांचा
अशीर्वाद दिल्हा आहे." १५ तेव्हां यहोशवाने
त्यांस ह्मटलें, "जर तूं मोठा लोक अणखी एफ्रा-
इम डोंगरावर तुला संकोच झाला आहे, तर तूं
आपल्या अरण्यांत चढून जा, आणि तेथें परिज्जी
व रफाई यांच्या देशांत आपल्यासाठीं तोडून
टाक." १६ नंतर योसेफाच्या संतानानी ह्म-
टलें, "डोंगरवट आह्मास पुरत नाहीं; आणि जे
खनानी तळप्रांतीं राहतात, त्या सर्वांस लोखंडी
रथ आहेत; ह्मणजे बेथशान व तिजकडलीं खे-
डीं यांतले, आणि इज्रेल तळवट इंतले जे, त्यांस
आहेत." १७ तेव्हां यहोशवाने योसेफाच्या घ-
राण्यास, ह्मणजे एफ्राइम व मनाश्श्ये यांस असें
ह्मटलें कीं, "तूं मोठा लोक, तुझी शक्तिहि मोठी
आहे; तुला एकच दैवभाग नसावा; १८ याक-
रितां डोंगरवट तुला होईल, जरी तें अरण्य आहे,
तरी तूं त्याला तोडसील, त्याचे बाहेरले भाग-
हि तुझे होतील, खनान्यांस जरी लोखंडी रथ
अणखी ते बळकट, तरी तूं त्यांचा पराजय कर-
सील."

## अध्याय १८.

मग शिलोमध्यें इस्राएलाच्या संतानांचा सर्व
समुदाय मिळाला, आणि तेथें त्यानी सभामं-
डप उभा केला, तेव्हां त्यांच्यापुढें देश जिंकलेला
झाला. २ तरी जे आपला वतनवांटा पावले
नव्हते, असे इस्राएलाच्या संतानांमध्यें सात वंश
राहिले होते. ३ यास्तव यहोशवाने इस्राएला-
च्या संतानांस ह्मटलें, "जो देश तुमच्या पूर्वजां-
चा देव परमेश्वर याने तुह्मास दिल्हा, तो व-
सायास जायाला तुह्मी कोठपर्यंत आळशी राहाल?
४ तुह्मी आपल्यासाठीं प्रतिवंशांतलीं तीन माण-
सें द्या; ह्मणजे मी त्यांस पाठवीन, आणि त्यानी
उठून देशांत जाऊन त्यांच्या वतनाच्या विभागा-
प्रमाणें, तो रेखाटून माझ्याजवळ यावें. ५ ह्म-
णजे त्यानी त्याचे सात वांटे करावे; यहूदाने
दक्षिणेस आपल्या सीमेंत राहावें, आणि योसेफा-
च्या घराण्याने उत्तरेस आपल्या सीमेंत राहावें.
६ तसें तुह्मी देश सात वांट्यानी रेखाटून इकडे
माझ्याजवळ आणा; मग एथें आमचा देव पर-
मेश्वर यासमोर मी तुमच्यासाठीं दैवखुणा करून
घालीन. ७ लेव्यांचा तर तुमच्यामध्यें वांटा
नाहीं; कारण कीं परमेश्वराचें याजकपण तेंच
त्यांचें वतन आहे; आणि गाद व रऊबेन व म-
नाश्श्याचा अर्धा वंश यांचें, यार्देनेच्या पलिकडे
पूर्वेस, जें वतन परमेश्वराचा सेवक मोशे याने
त्यांस दिल्हें, तें त्यांस मिळालेंच आहे." ८ ते-
व्हां तीं माणसें उठून गेलीं, का कीं यहोशवाने

त्या जाणाऱ्यांस देश रेखाटण्याची असी आज्ञा
दिल्ही होती कीं, "तुह्मी जाऊन देशांत चालतांना
तो रेखाटून माझ्याजवळ परत या; मग मी एथें
शिलोमध्यें **परमेश्वरा**समोर तुमच्यासाठीं दैव-
खुणा करून घालीन." ९ याप्रमाणें तीं माणसें
जाऊन देशांत फिरलीं, आणि तो नगरांसुद्धां सात-
वांट्यानीं वहींत रेखाटून शिलोंतल्या सैन्यतळांत
यहोशवाजवळ आलीं. १० मग यहोशवानें त्यां-
च्यासाठीं शिलोमध्यें **परमेश्वरा**समोर दैवखुणा
करून घातल्या; असें यहोशवानें तेथें तो देश
इस्राएलाच्या संतानांच्या वांटण्यांप्रमाणें त्यांस वां-
टून दिल्हा.
११ तेव्हां बन्यामीनाच्या संतानांतल्या वंशाची
दैवखूण त्यांच्या कुळांप्रमाणें असी निघाली कीं
त्यांच्या दैवाची सीमा यहूदाच्या संतानांच्या व
योसेफाच्या संतानांच्या मध्यभागीं निघाली. १२
ह्मणजे उत्तर बाजूस त्यांची सीमा यार्देनेपासून
लागली, मग ती सीमा यरीहोच्या उत्तरभागीं
चढून गेली, नंतर पश्चिमेकडे डोंगरावर चडली,
आणि तिच्या गती बेथवेनापर्यंत रानांत झाल्या.
१३ मग तेथून लूजाकडे, लूज तेंच बेथएल त्या-
च्या दक्षिणभागीं ती सीमा गेली; मग खालच्या
बेथहोरोनाच्या दक्षिणेस जो डोंगर त्याकडे आट-
रोथ-आद्दार तेथवर ती सीमा उतरली. १४
नंतर ती सीमा पश्चिम बाजूस दक्षिणेकडे वळून
बेथहोरोनाच्यासमोर दक्षिणेस जो डोंगर तेथून
अंकली गेली; आणि किर्याथबाल तोच किर्याथ
यारीम यहूदाच्या संतानांचें नगर, तेथवर तिच्या
गती झाल्या; असी पश्चिम बाजु. १५ आणि
दक्षिण बाजू किर्याथयारीमाच्या शेवटापासून ला-
गली; आणि ती सीमा पश्चिमेकडे चालून नेफ्तो-
हा पाण्याच्या झऱ्याकडे गेली. १६ मग ती सीमा
हिन्नोमाच्या पुत्राच्या खिंडीसमोरला डोंगर, जो
रफायांच्या तळवटीच्या उत्तरेस, त्याच्या कांठीं
उतरली, आणि यबूस्यांच्या दक्षिण भागीं हिन्नोम
खिंडींत उतरून खालीं एन रोगेलाकडे गेली.
१७ मग उत्तरेकडे अंकली जाऊन एन शेमोस-
कडे गेली, आणि अदुम्मीम चढणेच्या समोरल्या
गलीलोथाकडे गेली; मग रऊबेनाचें संतान बो-
हान याच्या धोंडीकडे उतरली. १८ मग अरा-
बा याच्या समोरल्या भागीं उत्तरेस जाऊन अरा-
ब्यास उतरली. १९ मग ती सीमा बेथ हग्ला-
च्या उत्तर भागीं चालली; आणि त्या सीमेच्या
गती खारट समुद्राच्या उत्तरेच्या खाडीपर्यंत या-
र्देनेच्या शेवटीं दक्षिणेस झाल्या; असी दक्षिण
सीमा. २० आणि पूर्वबाजूस त्याची सीमा या-
र्देन झाली; बन्यामीनाच्या संतानांतल्या कुळां-
वरून त्यांचें वतन आपल्या चहुंकडल्या सीमां-
प्रमाणें हेंच. २१ आणि बन्यामीनाच्या संता-
नांतल्या वंशाला त्यांच्या कुळांप्रमाणें हीं नगरें
प्राप्त झालीं; यरीहो व बेथहग्ला व तळवटींचें
कजीज; २२ आणि बेथ अराबा व जमाराइम
व बेथएल; २३ आणि आव्वीम व पारा व
आफ्रा; २४ आणि खपार आम्मोना व अफ्नी
व गाबा; असीं नगरें बारा, आणि त्यांकडले गांव;
२५ गिबोन व रामा व बैरोथ; २६ आणि मि-
ज्पे व कफीरा व मोजा; २७ आणि रेकेम व
इर्पैल व थारला; २८ आणि जेला, एलेफ व
यबूसी तेंच यरूशालेम, गिबाथ, किर्याथ; असीं
नगरें चवदा, आणि त्यांकडले गांव; बन्यामीनाच्या
संतानांतल्या कुळांप्रमाणें त्यांचें हेंच वतन.

## अध्याय १९.

आणि दुसरा दैवभाग शिमोनासाठीं, ह्मणजे
शिमोनाच्या संतानांतल्या वंशांसाठीं त्यां-
च्या कुळांप्रमाणें निघाला; त्यांचें वतन तर यहूदा-
च्या संतानांतल्या वतनामध्यें झालें. २ आणि
त्यांच्या वतनांत हीं नगरें त्यांस प्राप्त झालीं; बेर-
शेबा ह्मणजे शेबा व मोलादा; ३ आणि ह-
जोर शूवाल व बाला व एजेम; ४ आणि एल्-
तोलाद व बथूल व हर्मा; ५ आणि जिक्लाग
व बेथ मार्काबोथ व हबोरीसूसा; ६ आणि
बेथ लवाबोथ व शारूहेन; असीं नगरें तेरा,
आणि त्यांकडले गांव. ७ एन रिम्मोन व एथेर
व आशान; असीं नगरें चार, आणि त्यांकडले
गांव; ८ ह्मणजे या नगरांच्या चहुंकडले जे गांव,
ते सर्व बालाथ बेर दक्षिणेचा रामाथ एथपर्यंत;
शिमोनाच्या संतानांचे जे त्यांच्या वंशाचें कुळां-
कुळांप्रमाणें हेंच वतन आहे. ९ शिमोनाच्या
संतानांचें वतन यहूदाच्या संतानांतल्या सूत्रनेमांत

झालें; कां तर यहूदाच्या संतानांचा वांटा त्यास
अधिक पडला; यास्तव त्यांच्या वतनामध्यें शिमो-
नाच्या संतानांस वतन मिळालें. १० आणि ति-
सरा दैवभाग जबूलुनाच्या संतानांसाठीं त्यांच्या
कुळांप्रमाणें निघाला; आणि त्यांच्या वतनाची
सीमा सारीदपर्यंत झाली; ११ आणि त्यांची
सीमा पश्चिमेकडे, ह्मणजे मार्गला तेथवर चढून
गेली; मग दाब्बाशेथास पोहंचली; नंतर यक्नामा-
च्यासमोर जो ओहोळ तेथवर पोहंचली. १२
मग सारीद सोडून समोर सूर्याच्या उगवतीस
किस्लोथ ताबोराच्या सीमेपर्यंत फिरली; मग
दाबराथास जाऊन याफ्या तेथवर चढून गेली.
१३ मग तेथून पुढें गित्ताहेफेराच्या पूर्वेकडून इत्ता
काजीन एथवर चालून गेली; मग रिम्मोनमथोवा
व नेया तेथपर्यंत गेली; १४ आणि ती सीमा
त्याला फेरी घालून उत्तरेस हन्नाथोनापर्यंत गेली
आणि तिच्या गती इफ्ताहएल खिंडीपर्यंत झाल्या.
१५ आणि तींत कट्टाथ व नाहलाल व शिम्रो
व इदला व बेथलेहेम आदिकरून बारा नगरें,
आणि त्यांकडले गांव होते. १६ जबूलुनाच्या
संतानांच्या कुळांप्रमाणें त्यांचें हेंच वतन, तीं नगरें
आणि त्यांकडले गांव. १७ इस्साखारासाठीं,
ह्मणजे इस्साखाराच्या संतानांसाठीं त्यांच्या कुळां-
प्रमाणें चवथा दैवभाग निघाला. १८ आणि
त्यांच्या सीमेच्या आंत हीं नगरें होतीं; इज्रेल व
कसुलोथ व शूनेम; १९ आणि हफारीम व
शियोन व अनाहराथ; २० आणि राब्बीथ व
किश्योन व आबेज; २१ आणि रेमेथ व एन-
गान्नीम व एन-हद्दाव बेथ-पाज्जेज, २२ आणि
ती सीमा ताबोर व शाहजीमा व बेथ-शेमेश
एथवर गेली; आणि त्यांच्या सीमेचा शेवट यार्दे-
नेच्या एथें लागला; तीं नगरें सोळा व त्यांकडले
गांव. २३ इस्साखाराच्या संतानांतल्या वंशाचें
त्यांच्या कुळांप्रमाणें हेंच वतन, तीं नगरें आणि
त्यांकडले गांव. २४ आणि पांचवा दैवभाग आ-
शेराच्या संतानांच्या वंशासाठीं त्यांच्या कुळांप्रमाणें
निघून आला. २५ ह्मणजे त्यांची सीमा असी
झाली कीं हेल्काथ व हली व बटेन व आक्षाफ;
२६ आणि आल्लाम्मेलेक व आमाद व मिशाल,
आणि पश्चिमेस कार्मेल व शिहोरलिब्नाथ एथ-
वर गेली; २७ आणि सूर्याच्या उगवतीस बेथ-
दागोनाकडे फिरली, आणि जबूलुन व इफ्ताहएल
खिंड उत्तरेस, व बेथ-एमेक व नयेलयांस पावली,
आणि डाव्या हातीं काबूलास गेली. २८ आणि
एब्रोन व रहोब व हामोन व काना यांस घेऊन
मोठ्या सीदोनापर्यंत गेली. २९ मग रामा आ-
णि बंदिस्तीचें जोर नगर तिकडे ती सीमा फिरली,
नंतर होसा तिकडे सीमा फिरली; आणि तिच्या
गती आख्जीबाच्या सीमेवरून समुद्रापर्यंत झाल्या.
३० आणि उम्मा व अफेक व रहोब तिजकडलीं
आहेत; तीं नगरें बावीस आणि त्यांकडले गांव;
३१ आशेराच्या संतानांतल्या वंशाचें त्यांच्या
कुळांप्रमाणें हेंच वतन, तीं नगरें व त्यांकडले गांव.
३२ नाफ्तालीच्या संतानांविषयीं तर, साहावा
दैवभाग नाफ्तालीच्या संतानांसाठीं त्यांच्या कुळां-
प्रमाणें निघून आला. ३३ ह्मणजे त्यांची सीमा
हेलेफ व आलोन यांपासून जानान्नीम आणि
अदामी नेकेब व याब्नेल यांवरून लाक्कूमापर्यंत
गेली; आणि तिच्या गती यार्देनेपर्यंत झाल्या. ३४
आणि ती सीमा पश्चिमेस आज्नोथताबोराकडे
फिरली; मग तेथून हुक्कोकास चालली, आणि
दक्षिणेस जबूलुनासीं मिळाली, आणि पश्चिमेस
आशेरासीं आणि सूर्याच्या उगवतीस यार्देनेज-
वळ यहूदासीं मिळाली. ३५ आणि तींत बंदि-
स्तीचीं नगरें हींच; जिद्दीम, जेर व हाम्माथ,
राक्काथ व किन्नेरेथ; ३६ आणि अदामा व
रामा व हाजोर; ३७ आणि केदेश व एद्रेई
व एन-हाजोर; ३८ आणि इरोन व मिग्दाल-
एल, होरेम व बेथ-अनाथ व बेथ-शेमेश असीं
नगरें एकुणीस आणि त्यांकडले गांव. ३९ नाफ्-
तालीच्या संतानांतल्या वंशाचें त्यांच्या कुळांप्रमाणें
हेंच वतन; तीं नगरें आणि त्यांकडले गांव. ४०
सातवा दैवभाग दानाच्या संतानांतल्या वंशासाठीं
त्यांच्या कुळांप्रमाणें निघून आला. ४१ आणि
त्यांच्या वतनाच्या सीमेच्या आंत हीं नगरें झालीं;
जरा व एष्टावोल व शेमेशनगर. ४२ आणि
शालाब्बीन व आय्यालोन व इथ्ला; ४३
आणि एलोन व थिम्नाथा व एक्रोन; ४४ आणि
एल्तके व गिब्बथोन व बालाथ; ४५ आणि
इहुद व बराकाचीं संतानें व गाथरिम्मोन. ४६

आणि मीयाकोंन व राक्कोन, यासुद्धां याफोच्या
समोरला कांठ झाला. ४७ आणि दानाच्या
संतानांची सीमा त्यांच्या बाहेरहि झाली, का कीं
दानाच्या संतानांचे बे त्यानी चढून लेशेमासीं ल-
ढून त्याला धरिलें; आणि तरवारीने त्याला मारि-
ल्यावर तें वतनाचें करून त्यांत वस्ति केली, आणि
आपला पूर्वज दान याच्या नांवाप्रमाणें लेशेमाला
दान ह्मटलें. ४८ दानाच्या संतानाच्या वंशाचें
त्यांच्या कुळांप्रमाणें हेंच वतन, तीं नगरें आणि
त्यांकडले गांव. ४९ आणि इस्राएलाच्या संता-
नानी देशाच्या सीमांप्रमाणें वतन करून घेण्याची
समाप्ति केल्यावर नूनाचा पुत्र यहोशवा याला आ-
पल्यांमध्यें वतन दिल्हें. ५० एफ्राइम डोंगरावरलें
तिम्नाथसेरा नगर, जें त्याने मागितलें, तें परमे-
श्वराच्या सांगण्याप्रमाणें त्याला दिल्हें; मग तो
तें नगर बांधून त्यांत राहिला. ५१ एलाजार
याजक व नूनाचा पुत्र यहोशवा व इस्राएलाच्या
संतानांच्या वंशांतले वडील अधिकारी यानी शि-
लोमध्यें सभामंडपाच्या दारीं परमेश्वरासमोर,
देवखुणेकरून जीं वतनें नेमून दिल्हीं तीं हींच;
असी त्यानी देश वांटण्याची समाप्ति केली.

## अध्याय २०.

तेव्हां परमेश्वराने यहोशवाला असें सांगितलें
कीं, २ "तूं इस्राएलाच्या संतानांस याप्रमाणें
सांग, 'तुह्मी आपल्यासाठीं आश्रयाचीं नगरें नेमून
ठेवा,' जसें म्या मोशाच्यायोगें तुह्मास सांगितलें
होतें तसें; ३ ह्मणजे जो चुकून, न जाणतां को-
ण्या माणसाला हाणितो, त्या हत्या करणाऱ्याने
त्यांत पळून जावें; याप्रमाणें तीं नगरें रक्तपाताचा
सूड घेणाऱ्यापासून रक्षण होण्यासाठीं तुह्मास
व्हावीं. ४ तर त्याने त्यांतल्या एका नगराकडे
पळून गेल्यावर नगराच्या वेसीच्या दारासीं उभें
राहून आपलें कार्य त्या नगरच्या वडिलांच्या कानीं
सांगावें; मग त्यानी त्याला नगरांत आपल्यांजवळ
घेऊन त्याला ठिकाण नेमून द्यावें, आणि त्याने
त्यांच्याजवळ राहावें. ५ आणि जो रक्तपातामुळें
सूड घेतो, तो जेव्हां त्याच्या पाठीस लागतो, ते-
व्हां त्यानी तो हत्या करणारा त्याच्या स्वाधीन न
करावा; कारण कीं त्याने न जाणतां आपल्या
शेजाऱ्याला मारिलें, आणि पूर्वकाळापासून त्याचा
द्वेष केला नाहीं. ६ आणि तो न्यायासाठीं सभे-
पुढें उभा राही तोंपर्यंत किंवा जो मुख्य याजक
त्या दिवसांत असेल त्याच्या मरणापर्यंत त्या नग-
रांत त्याने राहावें; नंतर त्या हत्या करणाऱ्यांने
आपल्या नगरांत, ह्मणजे ज्या नगरांतून तो पळा-
ला त्यांत आपल्या घरीं माघारें जावें. ७ या-
स्तव त्यानी गालीलांत नाफ्ताल्याच्या डोंगराव-
रलें केदेश, आणि एफ्राइमाच्या डोंगरावरलें श-
खेम, आणि यहूदाच्या डोंगरावरला किर्याथ-
आर्बा तेंच हेब्रोन, हीं वेगळीं करून ठेविलीं. ८
आणि पूर्वेस यरीहोजवळ यार्देनेच्या पलिकडे रा-
नातल्या सपाटीवर रऊबेनाच्या वंशांतलें बेसेर,
आणि गिलादांत गाद वंशांतलें रामोथ, आणि
बाशानांत मनाश्शाच्या वंशांतलें गोलान हीं ठेवि-
लीं. ९ हीं नगरें इस्राएलाच्या सर्व संतानांसा-
ठीं, आणि त्यांतला राहणारा जो विदेशी त्यासा-
ठीं असीं नेमलेलीं होतीं कीं जो कोणी चुकून मा-
णसाला मारितो, त्याने त्यांत पळून जावें, आणि
तो सभेपुढें उभा राही तोंपर्यंत तेथें राहून जो
रक्तपातामुळें सूड घेतो, त्याच्या हाताने त्याने
न मरावें.

## अध्याय २१.

तेव्हां खनान देशांत शिलोमध्यें एलाजार
याजक व नूनाचा पुत्र यहोशवा व इस्राएला-
च्या संतानांच्या वंशाचे वडील अधिकारी यांज-
वळ लेव्यांचे वडील अध्यक्ष येऊन त्यांस असें
बोलले कीं, २ "परमेश्वराने मोशाच्यायोगें या-
प्रमाणें आज्ञा दिल्ही होती कीं आह्मास राहण्या-
साठीं नगरें, आणि आमच्या पशूंसाठीं त्यांचे शि-
वार द्यावे." ३ यास्तव इस्राएलाच्या संतानानीं
परमेश्वराने सांगितल्याप्रमाणें आपल्या वतनांतून
हीं नगरें आणि यांचे शिवार लेव्यांस दिल्हे.
४ तेव्हां कहाथीच्या कुळांसाठीं देवखूण असी
निघाली कीं लेव्यांतला आहरोन याजक याच्या
संतानांस यहूदाच्या वंशांतलीं व शिमोन्याच्या
वंशांतलीं व बन्यामीनाच्या वंशांतलीं तेरा नगरें
देवखुणेकरून प्राप्त झालीं. ५ आणि कहाथा-
च्या राहिलेल्या संतानांस एफ्राइमाच्या वंशांतल्या

कुळांतलीं व दानाच्या वंशांतलीं व मनाश्श्याच्या
अर्ध्या वंशांतलीं दैवखुणेकरून दाहा नगरें प्राप्त
झालीं. ६ आणि गेर्षोनाच्या संतानांस इस्सा-
खाराच्या वंशांतल्या कुळांतलीं व आशेराच्या
वंशांतलीं व नाफ्तालीच्या वंशांतलीं व बाशानांत
मनाश्श्याच्या अर्ध्या वंशांतलीं, तेरा नगरें दैवखुणे-
करून प्राप्त झालीं. ७ मरारीच्या संतानांस
त्यांच्या कुळांप्रमाणें, रऊबेनाच्या वंशांतलीं, व
गादाच्या वंशांतलीं, व जबूलुनाच्या वंशांतलीं,
बारा नगरें प्राप्त झालीं. ८ म्हणजे असी परमे-
श्वराने मोश्याच्यायोगें आज्ञा दिल्ही होती, तसें
इस्राएलाच्या संतानांनी दैवखुणेकरून हीं नगरें
आणि यांचे शिवार लेव्यांस दिल्हे.

९ असीं यहूदाच्या संतानांच्या वंशांतलीं व
शिमोनाच्या संतानाच्या वंशांतलीं नगरें, ज्यांचीं
नांवें सांगितलेलीं आहेत, तीं हीं त्यानी दिल्हीं.
१० तर लेवीच्या संतानांत कहाथीच्या कुळां-
तल्या आहरोनाच्या संतानांस प्रथम दैवखूण झा-
ली, यास्तव त्यांस असें प्राप्त झालें, ११ कीं
त्यानी यहूद्याच्या डोंगरवटीवर अनोकाचा बाप
आर्बा याचें शहर, तेंच हेब्रोन, तें आणि त्याचे
चहुंकडले शिवार त्यांस दिल्हे. १२ परंतु नग-
राची शेतभूमि व त्याकडलीं खेडीं यफुन्न्याचा
पुत्र कालेब याला वतन करून दिल्हीं होतीं. १३
तसें त्यानी आहरोन याजक याच्या संतानांस ह-
त्या करणाऱ्याच्या आश्रयाचें हेब्रोन नगर व त्या-
चे शिवार दिल्हे, आणि लिब्ना व त्याचे शिवार;
१४ आणि यात्तीर व त्याचे शिवार, आणि एष्टमोवा
व त्याचे शिवार; १५ आणि होलोन व त्याचे
शिवार आणि दबीर व त्याचे शिवार; १६ आ-
णि आइन व त्याचे शिवार, आणि युट्टा व त्या-
चे शिवार, बेथशेमेश व तिचे शिवार; असीं त्या
दोन वंशांतलीं नऊ नगरें दिल्हीं; १७ आणि
बन्यामीनाच्या वंशांतलें गिबोन व त्याचे शिवार;
गेबा व त्याचे शिवार; १८ अनाथोथ व त्याचे
शिवार, आणि आल्मोन व त्याचे शिवार, असीं
नगरें चार. १९ आहरोनाचीं संतानें जे याजक
त्यांचीं सर्व नगरें, तेरा नगरें व त्यांचे शिवार.
२० आणि कहाथाच्या संतानांचीं कुळें, कहाथा-
च्या संतानांतले राहिलेले लेवी, यांस तर यांच्या
दैवभागाचीं नगरें एफ्राइमाच्या वंशांतलीं प्राप्त
झालीं. २१ म्हणजे त्यानी हत्या करणाऱ्याच्या
आश्रयासाठीं एफ्राइमाच्या डोंगराबरलें नगर श-
खेम व त्याचे शिवार त्यांस दिल्हे; आणि गेजेर
व त्याचे शिवार; २२ आणि किब्जाइम व
त्याचे शिवार, आणि बेथहोरोन तिचे शिवार
असीं नगरें चार दिल्हीं; २३ आणि दानाच्या
वंशांतलें एल्टके व त्याचे शिवार, गिब्बथोन व
त्याचे शिवार; २४ आय्यालोन व त्याचे शि-
वार, गाथरिम्मोन व त्याचे शिवार, असीं नगरें
चार दिल्हीं; २५ आणि मनाश्श्याच्या अर्ध्या-
वंशांतलें तानाख व त्याचे शिवार, आणि गाथ-
रिम्मोन व त्याचे शिवार, असीं नगरें दोन दिल्हीं;
२६ कहाथाच्या राहिलेल्या संतानांच्या कुळांस
सर्व नगरें दाहा व त्यांचे शिवार. २७ आणि
लेव्यांच्या कुळांतल्या गेर्षोनाच्या संतानांस मना-
श्श्याच्या दुसऱ्या अर्ध्या वंशांतलें हत्या करणा-
ऱ्याच्या आश्रयाचें नगर बाशानांतलें गोलान व
त्याचे शिवार, आणि बैष्टरा व त्याचे शिवार, अ-
सीं नगरें दोन दिल्हीं; २८ आणि इस्साखारा-
च्या वंशांतलें किश्योन व त्याचे शिवार, दाब्राथ
व त्याचे शिवार; २९ यार्मूथ व त्याचे शिवार,
एनगान्नीम व त्याचे शिवार, असीं नगरें चार
दिल्हीं; ३० आणि आशेराच्या वंशांतलें मि-
शाल व त्याचे शिवार, आब्दोन व त्याचे शिवार,
३१ हेलकाथ व त्याचे शिवार, आणि रहोब व
त्याचे शिवार, असीं नगरें चार दिल्हीं; ३२
आणि नाफ्तालीच्या वंशांतलें हत्या करणाऱ्याच्या
आश्रयाचें नगर गालीलांतलें केदेश व त्याचे
शिवार, आणि हामोथदोर व त्याचे शिवार, आणि
कार्तान व त्याचे शिवार, असीं नगरें तीन दिल्हीं.
३३ गेर्षोन्याचीं सर्व नगरें त्यांच्या कुळांप्रमाणें
तेरा नगरें व त्याचे शिवार. ३४ आणि राहि-
लेले लेवी मरारीचीं संतानें यांच्या कुळांस जबू-
लुनाच्या वंशांतलें यक्नाम व त्याचे शिवार, कार्त
व त्याचे शिवार; ३५ दिम्ना व त्याचे शिवार,
नाहलाल व त्याचे शिवार, असीं नगरें चार दि-
ल्हीं; ३६ आणि रऊबेनाच्या वंशांतलें बेजेर
व त्याचे शिवार, आणि याहजा व त्याचे शिवार;
३७ कदेमोथ व त्याचे शिवार, आणि मेफाथ व

त्याचे शिवार, असीं नगरें चार दिल्हीं; ३८
आणि गादाच्या वंशांतलें हत्या करणाऱ्याच्या
आश्रयाचें नगर गिलादांतलें रामोथ व त्याचे
शिवार, माहनाइम व त्याचे शिवार; ३९ हे-
श्बोन व त्याचे शिवार, याजेर व त्याचे शिवार,
सर्व नगरें चार दिल्हीं. ४० लेव्यांच्या कुळांत-
लीं राहिलेलीं मरारीचीं संतानें त्यांच्या कुळां-
प्रमाणें त्यांचीं सर्व नगरें, ह्मणजे त्यांच्या दैवखु-
णाचीं नगरें बारा होतीं. ४१ इस्राएलाच्या सं-
तानांच्या वतनामध्यें लेव्यांचीं सर्व नगरें, अठ्ठेता-
ळीस नगरें व त्यांचे शिवार. ४२ तीं नगरें अ-
सीं होतीं कीं नगराचें नगर व त्याच्या त्या-
च्या चहुंकडले त्याचे त्याचे शिवार, असे त्या
सर्व नगरांस होतें. ४३ याप्रमाणें परमेश्वराने
इस्राएलास जो देश त्यांच्या पूर्वजांस द्यायाला
शपथ वाहिली होती तो अवघा दिल्हा; आणि ते
त्याला वतनरूपें पावून त्यांत राहिले. ४४ आ-
णि परमेश्वराने त्यांच्या पूर्वजांजवळ जसी श-
पथ वाहिली होती, तसा त्याप्रमाणेंच त्यांस चहुं-
कडून विसांवा दिल्हा, असा कीं त्यांच्या सर्व श-
त्रूंतला कोणी त्यांच्यापुढें टिकला नाहीं; परमे-
श्वराने त्यांचे सर्व शत्रू त्यांच्या हातीं दिल्हे.
४५ परमेश्वराने इस्राएलाच्या घराण्यास जी
कांहीं बरी गोष्ट सांगितली होती, तींतलें कांहीं
राहिलें नाहीं; अवघें प्राप्त झालें.

## अध्याय २२.

तेव्हां यहोशवाने रऊबेनी व गादी व मनाश्श्या-
चा अर्धा वंश यांस बोलाविलें; २ आणि
त्यांस ह्मटलें, "परमेश्वराचा सेवक मोशे याने
जें आज्ञाकरून तुह्मास सांगितलें तें अवघें तुह्मी
पाळिलें; आणि जें म्या आज्ञेने तुह्मास लाविलें,
त्या अवघ्याविषयीं तुह्मी माझी गोष्ट ऐकिली आ-
हे. ३ आजपर्यंत बहुत दिवस तुह्मी आपल्या
भावांस न सोडतांना आपला देव परमेश्वर
याच्या आज्ञेचें पाळन केलें आहे. ४ आणि तुम-
चा देव परमेश्वर याने तुमच्या भावांस जसें
सांगितलें होतें, तसा आतां त्यांस विसांवा दिल्हा
आहे; यास्तव तुह्मी आपला वतनी देश, जो
परमेश्वराचा सेवक मोश्याने यार्देनेच्या पलि-
कडे तुह्मास दिल्हा, त्यांत आपल्या राहोट्यांस
आतां माघारे जा. ५ परंतु ज्या आज्ञा आणि जें
शास्त्र परमेश्वराचा सेवक मोशे याने आज्ञा-
करून तुह्मास सांगितलें, त्याप्रमाणें तुह्मी चालावें,
ह्मणजे तुह्मी आपला देव परमेश्वर यावर प्रीति
करावी, आणि त्याच्या सर्व मार्गांत चालावें, आणि
त्याच्या आज्ञा पाळाव्या, आणि त्यासीं जडून रा-
हावें, आणि आपल्या संपूर्ण अंतःकरणाने व आ-
पल्या संपूर्ण जिवाने त्याची सेवा करावी ह्मणून
फार संभाळा."

६ आणि यहोशवाने त्यांस आशीर्वाद देऊन
निरोप दिल्हा, मग ते आपल्या राहोट्यांस गेले. ७
मनाश्श्याच्या अर्ध्या वंशाला मोश्याने बाशानांत वतन
दिल्हें होतें; परंतु त्याच्या दुसऱ्या अर्ध्याला यहोश-
वाने त्यांच्या भावांसंगतीं पश्चिमेस यार्देनेच्या आलि-
कडे दिल्हें; अणखी जेव्हां यहोशवाने त्यांस त्यां-
च्या राहोट्यांकडे जायाला निरोप दिल्हा, आणि
त्यांस आशीर्वाद दिल्हा. ८ तेव्हां त्याने त्यांस अ-
सें सांगितलें कीं, "बहुत द्रव्य व फारफार पशुधन,
रुपें व सोनें व तांबें व लोखंड व फारफार वस्त्रें
घेऊन तुह्मी आपल्या राहोट्यांस माघारे जा; आ-
पल्या भावांच्यासंगतीं आपल्या शत्रूंची लूट वां-
टून घ्या." ९ यास्तव रऊबेनाचीं संतानें व गा-
दाचीं संतानें व मनाश्श्याचा अर्धा वंश खनानाच्या
देशांतल्या शिलोपासून इस्राएलाच्या इतर संता-
नांतून निघून आपला वतनी गिलाद देश, जो
मोश्याच्या योगें परमेश्वराने सांगितल्यावरून
आपला वतनी झाला, त्यांत जायास माघारें चा-
लले. १० तेव्हां यार्देनेजवळचें गलीलोथ खना-
न देशांत आहे, तेथें रऊबेनाचा वंश व गादाचा
वंश व मनाश्श्याचा अर्धा वंश पोहंचल्यावर, त्यानी
तेथें यार्देनेवर वेदी आकाराने मोठी असी वेदी
बांधिली. ११ मग इस्राएलाच्या इतर संतानांनी
असें ऐकिलें कीं, "पाहा, रऊबेनाचा वंश व गा-
दाचा वंश व मनाश्श्याचा अर्धा वंश यानी खनान
देशासमोर यार्देनेवरलें गलीलोथ, जेथें इस्राए-
लाचीं संतानें उतरून आलीं होतीं तेथें एक वेदी
बांधिली आहे." १२ असें जेव्हां इस्राएलाच्या
संतानानी ऐकिलें, तेव्हां इस्राएलाच्या संतानांचा
सर्व समुदाय त्यांवर सैन्यरूपें जायाला शिलो-

मध्यें मिळाला. १३ आणि इस्राएलाच्या संतानांनी
गिलाद देशांत रऊबेनाचीं संतानें व गादाचीं सं-
तानें व मनाश्शाचा अर्धा वंश यांजवळ एलाजार
याजक याचा पुत्र फीनहास याला पाठविलें. १४
आणि त्याच्यासंगतीं इस्राएलाच्या सर्व वंशांतल्या
पूर्वजांच्या घराण्याचा एकएक अधिकारी असे दाहा
अधिकारी पाठविले; आणि हजार हजार इस्राए-
लांवर ते एकएक आपापल्या पूर्वजांच्या घराण्यांत
मुख्य होते. १५ तेव्हां गिलाद देशांत रऊबेनाचीं
संतानें व गादाचीं संतानें व मनाश्शाचा अर्धा वंश
यांजवळ ते येऊन त्यांस असें बोलले कीं, १६
"परमेश्वराच्या सर्व समुदायानें असें ह्मटलें कीं,
'तुह्मी इस्राएलाच्या देवाविषयीं असें उलंघन कां
केलें? कीं आज परमेश्वराला अनुसरणें यांतून
फिरून आपल्यासाठीं वेदी बांधिली, येणेंकरून
आज तुह्मी परमेश्वराविषयीं फितूर केला आहे.
१७पौर देवावरून जो आह्माकडला अन्याय तो
लाहान कीं काय? त्यापासून आह्मी आजपर्यंत
शुद्ध झालों नाहीं, आणि परमेश्वराच्या समुदा-
यावर पटकी प्राप्त झाली होती. १८ तुह्मीहि पर-
मेश्वराला अनुसरणें यापासून आज वळला,
आणि परमेश्वरावर तुह्मी आज फितूर केला,
ह्मणून असें होईल कीं उद्यां इस्राएलाच्या सर्व
समुदायावर त्याचा क्षोभ होईल. १९ आणि
जर तुमच्या वतनाचा देश अशुद्ध असला, तर
अगत्य परमेश्वरानें वतनास दिल्हेल्या देशांत,
जेथें परमेश्वराचा मंडप दिल्हेला आहे, तेथें
तुह्मी नदी उतरून या, आणि आमच्यामध्यें वतन
घ्या; परंतु तुह्मी आपल्यासाठीं आमचा देव
परमेश्वर याच्या वेदीखेरीज दुसरी वेदी बांधून
परमेश्वरावर फितूर करूं नका, आणि आह्मावर
फितूर करूं नका. २० जेराहाचा पुत्र आखान
यानें उत्सृष्ट वस्तुविषयीं उलंघन केलें, आणि इस्रा-
एलाच्या सर्व समुदायावर क्षोभ झाला, असें नाहीं
कीं काय? आणि तो पुरुष आपल्या अन्यायामुळें
एकटाच मेला नाहीं." २१ तेव्हां रऊबेनाचीं
संतानें व गादाचीं संतानें व मनाश्शाचा अर्धा वंश
यानीं इस्राएलाच्या हजार हजार लोकांवर जे जे
अधिकारी होते त्यांस उत्तर देतां असें ह्मटलें,
२२ "परमेश्वर देव तोच देव, परमेश्वर देव
तोच देव आहे, तो जाणतो; आणि इस्राएल
आहे, तो जाणेल कीं फितुरानें नाहीं, आणि पर-
मेश्वराविषयीं उलंघनानें नाहीं; असली तर, आ-
जच्या दिवसीं तूं आह्मास तारूं नको; २३ ह्मणजे
परमेश्वराकडल्या अनुसरण्यापासून फिरल्यानें
आह्मी आपल्यासाठीं वेदी बांधिली नाहीं; आणि
जर तिजवर होम किंवा नैवेद्य करायाचा असला
किंवा तिजवर शांतिकारक यज्ञ करायाचे असले
तर परमेश्वर स्वतां झाडा घेवो. २४ परंतु नि-
श्चयेंकरून याच गोष्टीच्या भयानें आह्मी हें केलें;
आह्मी असें ह्मटलें कीं, पुढल्या काळीं तुमचीं
संतानें आमच्या संतानांस असें ह्मणतील कीं,
'इस्राएलाचा देव परमेश्वर यासीं तुमचा संबंध
काय आहे? २५ कां कीं रऊबेनाचीं संतानें व
गादाचीं संतानें या तुमच्यामध्यें आणि आमच्या-
मध्यें परमेश्वरानें यार्देन ही सीमा लाविली
आहे; तुह्मास परमेश्वराकडला वांटा नाहीं.'
असीं तुमचीं संतानें आमच्या संतानांस परमे-
श्वराच्या भक्तीपासून फिरवितील. २६ यास्तव
आह्मी ह्मटलें कीं, 'आपण आपल्यासाठीं हें अगत्य
करावें, ह्मणजे वेदी बांधावी; होमासाठीं नव्हे,
आणि यज्ञासाठीं नव्हे; २७ परंतु आमच्या व
तुमच्यामध्यें, आणि आमच्यामागें आमच्या पि-
ढ्यांमध्यें हें साक्ष देण्यासाठीं व्हावें; असी कीं
आह्मी परमेश्वरापुढें आपल्या होमानीं व आपल्या
यज्ञानीं व आपल्या शांतिकारक यज्ञानीं त्याची सेवा
करीत जावी; आणि पुढल्या काळीं तुमच्या संता-
नानीं आमच्या संतानांस असें न ह्मणावें कीं तु-
ह्मास परमेश्वराकडला वांटा नाहीं. २८ या-
स्तव आह्मी ह्मटलें कीं, 'जेव्हां तीं पुढल्या काळीं
आह्मास किंवा आमच्या पिढीच्या पिढीस बोल-
तील, तेव्हां असें होईल कीं आह्मी असें ह्मणूं
कीं तुह्मी परमेश्वराच्या वेदीची प्रतिमा पाहा;
ही आमच्या पूर्वजानीं केली आहे, होमासाठीं नव्हे,
व यज्ञासाठीं नव्हे, परंतु ही आमच्या व तुमच्या-
मध्यें साक्ष देण्यासाठीं आहे. २९ आमचा देव
परमेश्वर याच्या मंडपाच्यासमोर जी त्याची
वेदीखेरीज आह्मी होमासाठीं, नैवेद्यासाठीं, किंवा
यज्ञासाठीं दुसरी वेदी बांधून परमेश्वरावर
फितूर करावा, ह्मणजे आह्मी आज परमेश्वरा-

कडल्या अनुसरण्यापासून फिरावें, हा आह्मास
अति अधर्म आमच्याने व्हायाचा नाहीं."
३० तेव्हां रऊबेनाचीं संतानें व गादाचीं सं-
तानें व मनाश्श्याचीं संतानें यानीं ज्या गोष्टी सां-
गितल्या, त्या फीनहास याजकाने व त्याच्यासं-
गतीं जे समुदायाचे अधिकारी व इस्राएलाचे ह-
जार हजार लोकांमध्यें जे जे मुख्य पुरुष यानीं
ऐकिल्या, तेव्हां त्यांस बरें वाटलें. ३१ यास्तव
एलाजार याजक याचा पुत्र फीनहास याने रऊ-
बेनाचीं संतानें व गादाचीं संतानें व मनाश्श्याचीं
संतानें यांस सांगितलें, "आज आह्मास कळलें
कीं परमेश्वर आमच्यामध्यें आहे; कारण कीं
तुह्मी परमेश्वराविषयीं तें उलंघन केलें नाहीं;
येणेंकरून तुह्मी इस्राएलाच्या संतानांस परमेश्व-
राच्या हातांतून सोडविलें आहे.
३२ मग रऊबेनाचीं संतानें व गादाचीं संतानें
यांपासून गिलाद देशांतून एलाजार याजक याचा
पुत्र फीनहास व ते अधिकारी यानीं खनान देशांत
इस्राएलाच्या संतानांजवळ माघारें येऊन त्यांस
वर्त्तमान सांगितलें. ३३ तेव्हां तें वर्त्तमान इस्राए-
लाच्या संतानांस बरें वाटलें, आणि इस्राएलाच्या सं-
तानानीं देवाची स्तुति केली; आणि ज्या देशांत
रऊबेनाचीं संतानें व गादाचीं संतानें राहिलीं
होतीं, त्याचा नाश करायास त्यांवर सैन्यरूपें जावें
ह्मणून ह्मटलें नाहीं. ३४ तेव्हां रऊबेनाचीं सं-
तानें व गादाचीं संतानें यानीं त्या वेदीला साक्षीचें
असें नांव दिल्हें; कां तर त्यानीं ह्मटलें कीं, "तें
आपल्यामध्यें असी साक्ष देईल कीं परमेश्वरच
देव आहे.

## अध्याय २३.

मग परमेश्वराने इस्राएलास त्यांच्या चहुंकड-
ल्या सर्व शत्रुंविषयीं विसांवा दिल्यावर बहुत
दिवसानीं असें झालें कीं यहोशवा वयाने वृद्ध
झाला. २ यास्तव यहोशवाने सर्व इस्राएल, त्यां-
चे वडील व त्यांचे मुख्य पुरुष व त्यांचे न्याया-
धीश व त्यावरले कारभारी यांस बोलावून त्यांस
सांगितलें, "मी वयाने वृद्ध झालों आहें. ३ आणि
तुमचा देव परमेश्वर याने या सर्व राष्ट्रांस
तुमच्यापुढून घालवून त्यांस जें केलें, तें अवघें
तुह्मीं पाहिलें, कारण कीं तुमचा देव परमेश्वर
यानें स्वतां तुमच्यासाठीं लढाई केली. ४ पाहा,
या उरलेल्या राष्ट्रांचा आणि जीं राष्ट्रें म्या मारून
टाकिलीं त्या अवघ्यांचा देश यार्देनेपासून पश्चिमे-
कडल्या मोठ्या समुद्रापर्यंतहि म्या तुह्मास तुम-
च्या वंशाप्रमाणें वतनासाठीं वांटून दिल्हा आहे.
५ अणखी तुमचा देव परमेश्वर स्वतां त्यांस
तुमच्यापुढून घालवील, आणि त्यांस तुमच्यापुढून
वतनांतून काढीलच, आणि जसें तुमचा देव पर-
मेश्वर यानें तुह्मास सांगितलें, तसें तुह्मी त्यांचा
देश वतनरूपें पावाल. ६ यास्तव मोशाच्या
शास्त्राच्या पुस्तकांत जें लिहिलेलें तें अवघें संभा-
ळून पाळायाला तुह्मी धैर्य धरा; ह्मणजे त्यांपासून
उजव्याकडे किंवा डाव्याकडे वळूं नका. ७ अ-
णखी तुमच्याजवळ जीं राष्ट्रें उरलेलीं, त्यांमध्यें
तुह्मी जाऊं नका, आणि त्यांच्या देवांच्या नांवांची
आठवण करूं नका, आणि त्यांची शपथ घालूं
नका; त्यांची सेवाहि करूं नका, आणि त्यांच्या
पायां पडूं नका. ८ परंतु आजपर्यंत असें तुह्मी
करीत आलां, तसें आपला देव परमेश्वर यासीं
जडून राहा. ९ कारण कीं परमेश्वराने तुम-
च्यापुढून मोठीं व पराक्रमी राष्ट्रें वतनांतून घाल-
विलीं, परंतु तुमची असी गोष्ट आहे कीं तुमच्या-
पुढें आजपर्यंत कोणी टिकला नाहीं. १० तुम-
च्यांतला एक माणूस हजारांची पाठ पुरवील,
कारण कीं तुमचा देव परमेश्वर याने जसें तु-
ह्मास सांगितलें, तसा तो स्वतां तुमच्यासाठीं ल-
ढतो. ११ तर तुह्मी आपला देव परमेश्वर
यावर प्रीति करण्यासाठीं आपल्या चित्ताचा फार
संभाळ करा. १२ कारण कीं जर तुह्मी मार्गे किं-
चितहि सोडाल, आणि जीं तुमच्याजवळ उरलेलीं
राष्ट्रें यांसीं ह्मणजे या शेषासीं जडून राहाल,
आणि त्यांसीं सोयरीक करून त्यांच्यामध्यें जाल,
आणि ते तुमच्यामध्यें येतील; १३ तर तुह्मी
जाणाच जाणा कीं तुमचा देव परमेश्वर या रा-
ष्ट्रांस तुमच्यापुढून वतनांतून अणखी घालविणार
नाहीं; आणि जी ही चांगली भूमि तुमचा देव
परमेश्वर याने तुह्मास दिल्ही, तिजवरून तुह्मी
नाश पावून जाल तोंपर्यंत तीं तुह्मास सांपळा व
फांस व तुमच्या कुशींवर छडी व तुमच्या डो-

त्यांत कांटे असे होतील. १४ तर पाहा, आज
मी सर्व जग जातें त्या वाटेने जात आहें; परंतु
तुह्मी आपल्या संपूर्ण मनांत व आपल्या संपूर्ण
चित्तांत जाणतां कीं ज्या चांगल्या गोष्टी तुमचा
देव परमेश्वर याने तुमच्याविषयीं सांगितल्या,
त्या सर्वांतली एकहि गोष्ट गळाली नाहीं; अवघ्या
तुह्मास प्राप्त झाल्या; त्यांतली एकहि गोष्ट ग-
ळाली नाहीं. १५ तर असं होईल कीं तुमचा
देव परमेश्वर याने तुह्मास सांगितलेली जी
प्रत्येक चांगली गोष्ट, ती जसी तुह्मास प्राप्त झाली
तसी परमेश्वर तुह्मास प्रत्येक वाईट गोष्ट प्राप्त
व्हावी असी करील; जी ही चांगली भूमि तुम-
चा देव परमेश्वर याने तुह्मास दिल्ही आहे,
तिजवरून तो तुमचा नाश करून तुह्मास घालवी
तोंपर्यंत असें करील. १६ तुमचा देव परमेश्वर
याने जो करार तुमच्याजवळ आज्ञेने केला, त्याचें
उल्लंघन जेव्हां तुह्मी कराल, आणि जाऊन दुसऱ्या
देवांची सेवा कराल, आणि त्यांच्या पायां पडाल,
तेव्हां परमेश्वराचा राग तुह्मावर पेटेल, आणि
जो चांगला देश त्याने तुह्मास दिल्हा आहे, त्या-
वरून तुह्मी नाश पावून लवकर जाल.

## अध्याय २४.

तेव्हां यहोशवाने इस्राएलाचे सर्व वंश शखे-
मांत एकवट करून इस्राएलाचे वडील व
त्याचे मुख्य पुरुष व त्याचे न्यायाधीश व त्याव-
रले कारभारी यांस बोलाविलें, ह्मणून ते देवापुढें
सिद्ध झाले. २ तेव्हां यहोशवाने सर्व लोकांला
सांगितलें, "इस्राएलाचा देव परमेश्वर असें
ह्मणतो कीं, 'पूर्वकाळीं तुमचे पूर्वज नदीच्या पलि-
कडे राहत होते; आब्राहामाचा बाप व नाहो-
राचा बाप तेराह तेथें होता; तेव्हां त्यानी दुसऱ्या
देवांची सेवा केली. ३ परंतु म्या तुमचा पूर्वज
आब्राहाम याला नदीच्या पलिकडून आणिलें, आ-
णि त्याला संपूर्ण खनान देशांत फिरविलें; तेव्हां
म्या त्याचें संतान वाढवावें ह्मणून त्याला इझाक
दिल्हा, मग म्या इझाकाला याकोब व एसाव दि-
ल्हा. ४ तेव्हां एसावाला सेईर डोंगर तो वतन
करून दिल्हा, परंतु याकोब व त्याचीं संतानें मि-
सरांत उतरलीं. १५ मग म्या मोशे व आहरोन
यांस पाठवून मिसरांत जें केलें, त्या अवघ्याप्रमाणें
मारिलें, आणि मग म्या तुह्मास काढिलें. ६ तेव्हां
म्या तुमच्या पूर्वजांस मिसरांतून बाहेर आणिलें;
नंतर तुह्मी समुद्रापर्यंत आलां, तेव्हां मिसरी,
रथ व घोडे घेऊन, सूफ समुद्रापर्यंत तुमच्या पूर्व-
जांच्या पाठीस लागले. ७ तेव्हां त्यानी परमे-
श्वराचा धावा केला, मग त्याने तुमच्या व मिस-
ऱ्यांच्या मध्यें काळोख लाविला, आणि समुद्र
त्यांवर आणून त्यांस बुडविलें; म्या मिसरांत जें
केलें, तें तर तुमच्या डोळ्यानी पाहिलें, आणि मग
तुह्मी रानांत बहुत दिवस राहिलां. ८ मग जे
अमोरी यार्देनेच्या पलिकडे राहत होते, त्यांच्या
देशांत म्या तुह्मास आणिलें; तेव्हां त्यानी तुह्मा-
सीं लढाई केली, परंतु म्या ते तुमच्या हातीं दि-
ल्हे, आणि तुह्मी त्यांचा देश वतन करून घेतला;
कां कीं म्या त्यांस तुमच्यापुढून त्यांचा नाश करून
घालविलें. ९ नंतर जिप्पोराचा पुत्र बालाक
जो मोवाबी राजा, त्याने उठून इस्राएलासीं लढाई
केली; तेव्हां त्याने दूत पाठवून बौराचा पुत्र बलाम
याला तुह्मास शाप द्यायासाठीं बोलाविलें. १०
परंतु बलामाचें ऐकायास मी मान्य झालों नाहीं;
यास्तव त्याने तुह्मास आशीर्वादच दिल्हा, आणि
म्या तुह्मास त्याच्या हातांतून सोडविलें. ११ मग
तुह्मी यार्देन उतरून यरीहोजवळ आलां, तेव्हां
यरीहोचे धनी अमोरी, आणि परिज्जी व खना-
नी व हित्ती व गिर्गाशी, हिव्वी व यबूसी, यानीं
तुह्मासीं लढाई केली, परंतु म्या ते तुमच्या हातीं
दिल्हे; १२ ह्मणजे म्या तुमच्यापुढें गांधीलमाशा
उठविल्या, आणि त्यानी त्यांस तुमच्या समोरून
घालविलें; अमोऱ्यांचे दोन राजे यांस घालविलें;
तुझ्या तरवारीने आणि तुझ्या धनुष्यानेहि हें झालें
नाहीं. १३ याप्रमाणें ज्या देशाविषयीं तुह्मी श्रम
केले नाहींत, आणि जीं नगरें तुह्मी बांधिलीं ना-
हींत तीं म्या तुह्मास दिल्हीं आहेत, आणि तुह्मी
त्यांत राहिलां आहां; द्राक्षामुळें व जैतूनबनें जीं
तुह्मी लाविलीं नाहींत, त्यांचें तुह्मी फळ खातां.
१४ तर आतां तुह्मी पूर्णपणाने व सत्यतेने परमे-
श्वराला भिऊन त्याची सेवा करा, आणि नदी-
च्या पलिकडे व मिसरांत तुमच्या पूर्वजानी ज्या
देवांची सेवा केली, त्यांस दूर करून परमेश्वरा-

चीच सेवा करा. १५ किंवा परमेश्वराची
सेवा करणें हें जर तुह्मास वाईट वाटतें, तर तुह्मी
ज्याची सेवा कराल, त्याला आज आपल्यासाठीं
निवडून घ्या; नदीच्या पलिकडे तुमच्या पूर्वजानी
ज्या देवांची सेवा केली, त्यांची सेवा करा, किंवा
ज्या अमोऱ्यांच्या देशांत तुह्मी राहतां त्यांच्या
देवांची सेवा करा, परंतु मी व माझ्या घरचीं मा-
णसें आह्मी परमेश्वराची सेवा करूं." १६
तेव्हां लोकानी असें उत्तर केलें कीं, "तो आह्मा-
ला अति अधर्म! परमेश्वराला सोडून दुसऱ्या
देवांची सेवा आमच्याने करवत नाहीं; १७ कां
तर परमेश्वर आमचा देव आहे; त्यानेच
आह्मास व आमच्या पूर्वजांस मिसर देशांतून,
दास्यांच्या वस्तींतून वर आणिलें; आणि ज्याने
आमच्या देखतां ते मोठे चमत्कार केले, आणि
आह्मी ज्या अवघ्या वाटेने चाललों तींत, व ज्या
राष्ट्रांमध्यें फिरलों त्यांत आह्मास पाळिलें, तोच
तो आहे. १८ आणि देशांतल्या राहणाऱ्या अ-
मोऱ्यांसुद्धां सर्व राष्ट्रांस परमेश्वराने आमच्या-
पुढून घालविलें आहे; अणखी परमेश्वर आमचा
देव आहे ह्मणूनहि आह्मी त्याची सेवा करूं."
१९ तेव्हां यहोशवाने लोकांस सांगितलें, "तुम-
च्याने परमेश्वराची सेवा करवणार नाहीं; का-
रण कीं तो अतिपवित्र देव; तो आपल्या माना-
विषयीं आवेशी असा देव आहे; तो तुमच्या
उल्लंघनाची व तुमच्या पापांची क्षमा करणार नाहीं.
२० निश्चयें तुह्मी परमेश्वराला सोडून अन्य
देवांची सेवा कराल, आणि त्याने तुमचें बरें के-
ल्यानंतर, तो उलटून तुमचें वाईट करील, तुमचा
क्षयहि करील." २१ तेव्हां लोकानी यहोशवाला
ह्मटलें, "असें नाहीं, निश्चयें आह्मी परमेश्वरा-
चीच सेवा करूं." २२ तेव्हां यहोशवाने लोकांला
ह्मटलें, तुह्मी आपल्यावर असे साक्षी आहां कीं
तुह्मी परमेश्वराची सेवा करायास त्याला आ-
पल्यासाठीं निवडून घेतलें आहे." नंतर त्यानी
ह्मटलें, "आह्मी साक्षी आहों." २३ तेव्हां तो
बोलला, "असें आहे तर आतां तुमच्यामध्यें जे
अन्य देव असतील, ते तुह्मी दूर करा, आणि
आपलें अंतःकरण इस्राएलाचा देव परमेश्वर
याकडे लावा." २४ तेव्हां लोकानी यहोशवाला
ह्मटलें, "आमचा देव परमेश्वर याची सेवा
आह्मी करूं; त्याचें वाक्य आह्मी ऐकूं." २५
असा त्याच दिवसीं यहोशवाने लोकांकडून करार
करविला, आणि शखेमांत त्यांच्याजवळ नेम व
नीति स्थापिली. २६ तेव्हां यहोशवाने हीं वाक्यें
देवाच्या शास्त्राच्या पुस्तकांत लिहिलीं, आणि
मोठी धोंड घेऊन, तेथें परमेश्वराच्या पवित्र
स्थानीं जें अला झाड, त्याच्याखालीं ती उभी
केली. २७ आणि यहोशवाने सर्व लोकांस ह्मटलें,
"पाहा, ही धोंड आमच्याविषयीं साक्षिरूप होईल,
कारण कीं परमेश्वराने आपलीं जीं सर्व वाक्यें
आमच्याजवळ सांगितलीं तीं हिने ऐकिलीं आहेत;
तर ही तुह्माविषयीं साक्षिरूप यासाठीं व्हावी कीं
तुह्मी आपल्या देवाविषयीं लबाडी न करावी."
२८ मग यहोशवाने लोकांस त्यांच्या त्यांच्या
वतनाकडे रवाना केलें.

२९ मग ह्या गोष्टी झाल्यावर असें झालें कीं
नूनाचा पुत्र परमेश्वराचा सेवक यहोशवा एकशें
दाहा वर्षांचा होऊन मेला. ३० मग त्याच्या
वतनाच्या सीमेंत एफ्राइमाच्या डोंगरवटीवर जें
थिम्नाथसेराह आहे त्यांत, गाश डोंगराच्या
उत्तरेस लोकानी त्याला पुरिलें. ३१ आणि यहो-
शवाच्या सर्व दिवसांत, आणि जे वडील यहो-
शवाच्या मागें अधिक आयुष्य पावले, ह्मणजे
परमेश्वराने आपलें जें काम इस्राएलासाठीं
केलें होतें, तें अवघें ज्यानी पाहिलें होतें, त्यां-
च्या सर्व दिवसांत इस्राएलानी परमेश्वराची
सेवा केली. ३२ आणि शखेमांत जो शेतभू-
मीचा विभाग याकोबाने शखेमाचा बाप हमोर
याच्या संतानांजवळून शंभर कोकरूं मुद्रिकांवर
विकत घेतला होता, आणि जो योसेफाच्या संता-
नाच्या वतनांचा झाला त्यांत, योसेफाचीं जीं हाडें
इस्राएलाच्या संतानानी मिसरांतून वर आणिलीं
होतीं, तीं त्यानी पुरिलीं. ३३ आणि अहरो-
नाचा पुत्र एलाजार मेला, तेव्हां त्याचा पुत्र
फीनहास याची टेकडी जी एफ्राइमाच्या डों-
गरवटींत, याला दिल्ही होती, तिजवर त्यानी
त्याला पुरिलें.

# न्यायाधीश यांचें पुस्तक.

## अध्याय १.

आणि यहोशवा मेल्यावर असें झालें कीं इस्रा-
एलाच्या संतानानी परमेश्वराजवळ असें
विचारिलें कीं, “आमच्यासाठीं खनान्यांसीं लढावें
ह्मणून त्यांवर पहिल्याने कोणी चढून जावें?”
२ तेव्हां परमेश्वराने सांगितलें, “यहूद्याने च-
ढून जावें; पाहा, म्या त्याच्या हातीं तो प्रांत दि-
ल्हा आहे.” ३ मग यहूद्याने आपला भाऊ
शिमोन याला सांगितलें, “तूं माझ्या विभागामध्यें
माझ्यासंगतीं वर ये, ह्मणजे आपण खनान्यांसीं
लढूं; मग मीहि तुझ्यासंगतीं तुझ्या विभागामध्यें
येईन.” तेव्हां शिमोन त्याच्यासंगतीं गेला.
४ मग यहूदा चढून गेला, आणि परमेश्वराने
खनानी व परिज्जी त्याच्या हातीं दिल्हे, आणि
त्यानी बेजेकांत त्यांतले दाहा हजार पुरुष मारिले.
५ तेव्हां बेजेकाचा धनी त्यांस बेजेकांत सांपडला,
आणि त्यानी त्यासीं लढतांना खनानी व परिज्जी
यांस मारिलें. ६ तेव्हां बेजेकाचा धनी पळाला,
परंतु त्यानी त्याच्या पाठीस लागून त्याला धरिलें,
आणि त्याच्या हातांचे व त्याच्या पायांचे अंगठे
तोडिले. ७ तेव्हां बेजेकाचा धनी बोलला,
“ज्यांच्या हातांचे व पायांचे अंगठे तोडिले होते,
असे सत्तर राजे माझ्या मेजाखालीं अन्न वेचीत
होते; जसें म्या केलें, तसें देवाने माझें फेडिलें
आहे.” तेव्हां त्यानी त्याला यरूशालेमास आ-
णिलें, आणि तेथें तो मेला.

८ नंतर यहूद्याच्या संतानानी यरूशालेमासीं
लढाई करून तें घेतलें, आणि तरवारीने तेथल्यांस
मारून नगराला आग लाविली. ९ आणि त्या-
नंतर यहूद्याचीं संतानें जे खनानी डोंगरावर व
दक्षिणेस व सपाटीवर राहत होते, त्यांसीं लढा-
याला खालतीं गेलीं. १० ह्मणजे जे खनानी
हेब्रोनांत राहत होते, त्यांवर यहूदा गेला; हेब्रो-
नाचें नांव तर पूर्वी किर्याथआर्बा होतें; तेव्हां
त्यानी शेशाय् व अहीमान व तालमाय् यांस
मारिलें. ११ मग तीं तेथून निघून दबीरांतल्या
राहणाऱ्यांवर गेलीं; दबीराचें नांव तर पूर्वी कि-
र्याथसेफेर होतें. १२ तेव्हां कालेब बोलला, “जो
कोणी किर्याथसेफेर मारून तो घेईल त्याला
मी आपली कन्या आख्सा बायको करून देईन.”
१३ तेव्हां कालेबाचा धाकटा भाऊ कनाज, या-
चा पुत्र अथनियेल याने तो घेतला; नंतर त्याने
आपली कन्या आखसा त्याला बायको करून
दिल्ही. १४ तेव्हां ती त्याजवळ आली असतां
असें झालें कीं तिने आपल्या बापाजवळ शेत मा-
गायास त्याला चिथावलें; आणि ती गाढवावरून
उतरली, तेव्हां कालेबाने तिला ह्मटलें, “तुला
काय पाहिजे?” १५ तेव्हां तिने त्याला ह्मटलें,
“तूं मला वर दे, कारण कीं त्वां दक्षिणेकडली
भूमी मला दिल्ही आहे, तर मला पाण्याचे झरे
द्यावे.” यास्तव कालेबाने तिला वरले झरे व
खालचे झरे दिल्हे.

१६ आणि मोशाचा सोयरा जो केनी त्याचीं
संतानें यहूद्याच्या संतानांसंगतीं खारकीच्या नगरा-
पासून अरादाच्या दक्षिणेस जें यहूद्यांतलें रान
तेथें चढून गेलीं, असीं जाऊन त्या लोकांच्याजवळ
तीं राहिलीं. १७ आणि यहूद्याने आपला भाऊ
शिमोन याच्यासंगतीं जाऊन जे खनानी जफा-
थांत राहत होते, त्यांस मारून त्यांचा विनाश
केला; यास्तव त्या नगराचें नांव हर्मा ठेविलें.
१८ आणि यहूद्याने गाज्जा व त्याचा शिवार,
आणि आष्कलोन व त्याचा शिवार, आणि एक्रोन
व त्याचा शिवार घेतला. १९ असा परमेश्वर
यहूद्याला अनुकूळ झाला, आणि त्याने डोंगर वतन
करून घेतला, परंतु खिंडींतल्या राहणाऱ्यांस घाल-
वायास शक्तिमान नव्हता; कारण कीं त्यांस लो-
खंडाचे रथ होते. २० आणि ज्याप्रमाणें मो-

श्याने सांगितलें होतें, त्याप्रमाणें त्यांनी कालेबाला
हेब्रोन दिल्हें, आणि त्याने अनाकाचे तीन वंश
तेथून घालविले. २१ परंतु जे यबूसी यरूशाले-
मांत राहत होते, त्यांस बन्यामीनाच्या संतानांनी
घालविलें नाहीं; यास्तव यबूसी यरूशालेमांत
बन्यामीनाच्या संतानांच्याजवळ आजपर्यंत राह-
तात. २२ तेव्हां योसेफाच्या घराण्याचे तेहि
बेथएलावर चढून गेले, आणि परमेश्वर त्यांस
अनुकूल झाला. २३ तेव्हां योसेफाच्या घराण्यां-
तल्यांनी बेथएल हेरिलें; त्या नगराचें नांव तर
पूर्वी लूज होतें. २४ नंतर पाहरेकऱ्यांनी एक
माणूस नगरांतून येतां पाहिला, आणि त्याला
ह्मटलें, "आतां तूं आह्मास नगरांत जाण्याची
वाट दाखीव, ह्मणजे आह्मी तुजवर दया करूं."
२५ तेव्हां त्याने त्यांस नगरांत शिरायाची वाट
दाखविली; तेव्हां त्यांनी नगराला तरवारीने मा-
रिलें, परंतु त्या मनुष्याला व त्याच्या सर्व कुटुं-
बाला जाऊं दिल्हें. २६ मग त्या मनुष्याने
हित्ती लोकांच्या देशांत जाऊन नगर बांधिलें, आ-
णि त्याचें नांव लूज ठेविलें; आजपर्यंत त्याचें नांव
तेंच आहे. २७ परंतु बेथश्यान व तिचीं खेडीं,
आणि तानाख व त्याचीं खेडीं यांस, आणि दोर
व त्याचीं खेडीं यांतल्या राहणाऱ्यांस, आणि इब्-
लाम व त्याचीं खेडीं यांतल्या राहणाऱ्यांस, आणि
मगिद्दो व त्याचीं खेडीं यांतल्या राहणाऱ्यांस म-
नाश्शाच्या घराण्याने जिंकून घेतलें नाहीं; कां कीं
खनान्यांनी त्या प्रांतांत राहण्याचा निश्चय धरि-
ला. २८ तथापि इस्राएल बळकट झाल्यानंतर
असें झालें कीं त्यांनी खनान्यांस अगदी न घाल-
वून त्यांवर कर बसविला.

२९ आणि एफ्राइमाने गेजेरांतल्या राहणाऱ्या
खनान्यांस घालविलें नाहीं; यास्तव ते खनानी
गेजेरांत त्यांच्यामध्यें राहिले. ३० जबूलुनाने
कट्रोनांतले राहणारे व नाहलोलांतले राहणारे
घालविले नाहींत; यास्तव ते खनानी त्यांच्यामध्यें
राहिले, परंतु कर देते झाले. ३१ आशेराने
आक्को यांतले राहणारे, आणि जीदोन व आह-
लाब व आख्जीब व हेल्बा व अफीक व रहोब
यांतले राहणारे यांस घालविलें नाहीं. ३२ आणि
आशेरी देशांतल्या राहणाऱ्या खनान्यांमध्यें रा-
हिले; कां तर आपण त्यांस घालविलें नाहीं. ३३
नाफ्ताल्यांनी बेथशेमेश यांतले राहणारे व बेथअ-
नाथ यांतले राहणारे यांस घालविलें नाहीं; आणि
आपण देशांतल्या राहणाऱ्या त्या खनान्यामध्यें
राहिले. तथापि बेथशेमेश यांतले व बेथअनाथ
यांतले राहणारे नाफ्ताल्यास कर देते झाले. ३४
आणि अमोऱ्यांनी दानाच्या संतानांस डोंगराच्या
पेंचाटींत घातलें; कारण कीं त्यांनी त्यांस तळवटीं
उतरूं दिल्हें नाहीं. ३५ आणि अमोऱ्यांनी हे-
रेस डोंगरावर व आयालोनांत व शाल्बीमांत
राहण्याचा निश्चय धरिला. तथापि योसेफाच्या
घराण्याचा हात बळकट झाला, तेव्हां ते कर देते
झाले. ३६ आणि अमोऱ्यांची सीमा अक्राबी-
माच्या खडकापासून वर झाली.

## अध्याय २.

तेव्हां परमेश्वराचा दूत गिल्गालापासून बो-
खीमास चढून गेला आणि बोलला, "म्या तु-
ह्मास मिसरांतून वर आणिलें, आणि जो देश
म्या तुमच्या पूर्वजांजवळ शपथ वाहून देऊं केला
होता, त्यांत तुह्मास आणिलें; आणि मी बोललों
होतों कीं, 'मी तुह्मासीं माझा करार कधींहि मो-
डणार नाहीं. २ परंतु तुह्मी या देशांतल्या
राहणाऱ्यांसीं करार करूं नका; त्यांच्या वेद्या
मोडून टाका; परंतु तुह्मी माझी आज्ञा मानिली
नाहीं, असें तुह्मी कां केलें? ३ तर मी हेंहि
बोलतों, 'मी त्यांस तुमच्यापुढून घालविणार नाहीं;
आणि ते तुह्माला प्रतिकूळ असे होतील, आणि
त्यांचे देव तुह्मास फांसा असे होतील." ४ तेव्हां
परमेश्वराच्या दूताने ह्या गोष्टी इस्राएलाच्या
सर्व संतानांस सांगितल्यावर असें झालें कीं लोक
आपला स्वर काढून रडते झाले. ५ यास्तव त्यांनी
त्या ठिकाणाचें नांव बोखीम असें ठेविलें, आणि
तेथें परमेश्वरला यज्ञपशू अर्पिले. ६ यहोश-
वाने तर लोकांस निरोप दिल्हा होता, आणि इ-
स्राएलाचीं संतानें देश वतन करून घ्यायास
प्रत्येक आपापल्या विभागास गेलीं. ७ तेव्हां
यहोशवाच्या सर्व दिवसांत, आणि यहोशवाच्या
मागे जे वडील अणखी आयुष्य पावले, ह्मणजे
ज्यांनी इस्राएलासाठीं परमेश्वराने केलेलें अवघें

मोठें काम पाहिलें होतें, त्यांच्या सर्व दिवसांत
लोकानी परमेश्वराची सेवा केली. ८ परमे-
श्वराचा सेवक नूनाचा पुत्र यहोशवा, तो तर
एकशें दाहा वर्षांचा होऊन मेला. ९ मग एफ्रा-
इमाच्या डोंगरावर गाश डोंगराच्या उत्तरेस ति-
म्नाथहेरेस यांत, त्याच्या वतनाच्या शिवारांत,
त्यानी त्याला पुरिलें. १० आणि ती सर्व पिढीहि
आपल्या पूर्वजांत मिळून गेली, आणि त्यांच्यामागें
दुसरी पिढी जी परमेश्वराला आणि त्याने इस्रा-
एलासाठीं केलेलें जें काम तेंहि जाणत नव्हती,
तसी उत्पन्न झाली. ११ तेव्हां इस्राएलाच्या
संतानानी बाल नामें देवांची सेवा करून परमेश्व-
राच्या दृष्टींत जें वाईट तें केलें. १२ असें
त्यानी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर ज्याने
त्यांस मिसर देशांतून आणिलें, त्याला टाकून दुसरे
देव ह्मणजे आपल्या चहुंकडल्या लोकांचे कित्येक
देव यांच्यामागें लागून त्यांचें भजन करून परमे-
श्वराला चिथाविलें. १३ असें त्यानी परमेश्व-
राला टाकून बाल व आष्टारोथ यांची सेवा केली.
१४ यास्तव परमेश्वर इस्राएलावर रागें भरला
आणि त्याने त्यांस लुटणाऱ्यांच्या हातीं दिल्हें,
आणि यानी त्यांस लुटिलें; आणि त्याने त्यांस
त्यांच्या चहुंकडल्या शत्रुंच्या हातीं दिल्हें. आणि
तेव्हांपासून त्यांच्याने आपल्या शत्रुंच्यासमोर उभें
राहववलें नाहीं. १५ जेथें जेथें ते गेले तेथें तेथें
परमेश्वराचा हात त्यांस प्रतिकूळ होता, जसें
परमेश्वराने त्यांस सांगितलें होतें, आणि जसी
परमेश्वराने त्यांजवळ शपथ वाहिली होती, तसें;
आणि त्यांस फार संकट पडलें. १६ तरी पर-
मेश्वराने त्यांच्यासाठीं न्यायाधीश उत्पन्न केले,
आणि यानी त्यांस त्यांच्या लुटणाऱ्यांच्या हातांतून
सोडविलें. १७ तथापि त्यानी आपल्या न्यायाधी-
शांचेंहि ऐकिलें नाहीं; परंतु दुसऱ्या देवांच्यामागें
लागून व्यभिचार केला, ह्मणजे त्यांचें भजन केलें.
त्यांचे पूर्वज परमेश्वराच्या आज्ञा ऐकून ज्या
मार्गांत चाललें होते, त्यांतून ते लवकर फिरले;
आणि त्यानी त्याप्रमाणें केलें नाहीं. १८ आणि
जेव्हा परमेश्वराने त्यांच्यासाठीं न्यायाधीश उ-
त्पन्न केले, तेव्हां परमेश्वर न्यायाधीशाला अनु-
कूळ होता, आणि त्याने न्यायाधीशाच्या सर्व दि-
वसांत त्यांस त्यांच्या शत्रूंच्या हातांतून राखिलें;
कारण कीं त्यांचे वाचणारे व गांजणारे यांमुळें जीं
त्यांचीं कण्हणीं, त्यांवरून परमेश्वराला दया
आली. १९ तथापि न्यायाधीश मेल्यावर असें
झालें कीं, ते फिरले, आणि आपल्या पूर्वजांपेक्षां
दुष्ट होऊन दुसऱ्या देवांच्यामागें लागून त्यांची
सेवा व त्यांचें भजन करिते झाले; त्यानी आपलीं
उल्लंघनें व आपला हट्टाचा मार्ग सोडिला नाहीं.
२० तेव्हां परमेश्वर इस्राएलावर रागें भरला,
आणि त्याने ह्मटलें, "या लोकानी माझा करार
जो म्या यांच्या पूर्वजांजवळ नेमून दिल्हा त्याचें
उल्लंघन केलें, आणि माझी आज्ञा मानिली नाहीं,
२१ यावरून मीहि जीं राष्ट्रें यहोशवाने मरतानां
ठेविलीं, त्यांतल्या दुसऱ्या एकाला देखील त्यां-
च्यापुढून वतनांतून घालविणार नाहीं. २२ अशा-
साठीं कीं त्यांच्यायोगें आपण इस्राएलाची परिक्षा
घ्यावी कीं जसें त्यांच्या पूर्वजानी परमेश्वराचे
मार्ग पाळिले, तसे ते त्यांत चालून पाळतील किंवा
नाहींत." २३ यास्तव परमेश्वराने त्या राष्ट्रांस
असूं दिल्हें, ह्मणजे त्यांस वतनांतून लवकर घाल-
विलें नाहीं, आणि त्यांस यहोशवाच्या हातीं
दिल्हें नव्हतें.

## अध्याय ३.

इस्राएलांत ज्या सर्वांनी खनानांतल्या अवघ्या
लढाया जाणिल्या नव्हत्या, ह्मणजे ज्यानी पूर्वीं
त्या अगदीं जाणिल्या नव्हत्या, त्यांस लढाई शि-
कवायाला इस्राएलाच्या संतानांतल्या पिढ्यानी आ-
णावें यासाठींच त्यांची परीक्षा ज्याकडून घ्यावी,
असीं जीं राष्ट्रें परमेश्वराने ठेविलीं तीं हींच
३ पलिष्ट्यांचे पांच सुभेदार, आणि जे सर्व ख-
नानी व जीदोनी व हिव्वी बालहेर्मोन डोंगरापा-
सून हमाथास पोहंचेपर्यंत लबानोन डोंगरावर
राहतात ते. ४ ते तर अशासाठीं होते कीं त्यां-
च्यायोगें इस्राएलाची परीक्षा व्हावी, ह्मणजे ज्या
आज्ञा परमेश्वराने मोशाच्या योगाने त्यांच्या
पूर्वजांस दिल्ह्या, त्या ते ऐकतील किंवा नाहींत
हें कळावें ह्मणून. ५ तसें खनानी, हित्ती व
अमोरी व परिज्जी व हिव्वी व यबूसी, यांमध्यें
इस्राएलाचीं संतानें राहिलीं. ६ आणि यानी

त्यांच्या कन्या आपल्यांस बायका करून घेतल्या
आणि आपल्या कन्या त्यांच्या पुत्रांस दिल्या, आणि
त्यांच्या देवांची सेवा केली. ७ असें इस्राए-
लाच्या संतानानी परमेश्वराच्या दृष्टींत जें वा-
ईट तें केलें; ह्मणजे आपला देव परमेश्वर
याला विसरून बाल व आष्टारोथ यांची सेवा
केली. ८ तेव्हां परमेश्वर इस्राएलावर रागें भर-
ला, आणि त्याने अरामनाहाराइम याचा राजा
कुशानरिशाथाइम याच्या हातीं ते दिल्हे; नंतर
इस्राएलाच्या संतानानी आठ वर्षे कुशान रिशाथा-
इमाची सेवा केली. ९ मग इस्राएलाच्या संता-
नानी परमेश्वराजवळ काकुळत केली; तेव्हां
परमेश्वराने इस्राएलाच्या संतानांसाठीं कालेबा-
चा धाकटा भाऊ कनाज याचा पुत्र अथ्‌नियेल
असा तारणारा उत्पन्न केला, आणि त्याने त्यांस
त्यापासून सोडविलें. १० कां, परमेश्वराचा
आत्मा त्याला प्राप्त झाला, आणि त्याने इस्राएला-
चा न्याय केला; तो तर लढायाला गेला, आणि
परमेश्वराने त्याच्या हातीं अरामाचा राजा शु-
शानरिशाथाइम दिल्हा; तसा त्याचा हात शू-
शानरिशाथाइमावर प्रबळ झाला. ११ तेव्हां
देश चाळीस वर्षें स्वस्थ राहिला, मग कनाजा-
चा पुत्र अथ्‌नियेल मेला.

१२ नंतर इस्राएलाच्या संतानानी फिरून
परमेश्वराच्या दृष्टींत जें वाईट तें केलें; तेव्हां
परमेश्वराने मोवाबाचा राजा एग्लोन इस्राए-
लावर बळाविला, कारण कीं त्यानी परमेश्वरा-
च्या दृष्टींत जें वाईट तें केलें होतें. १३ त्याने
तर आपल्याजवळ अम्मोनी लोक व अमालेक
यांस मिळविलें; मग जाऊन इस्राएलाला मारि-
लें, आणि त्यानी खारकीचें नगर घेतलें. १४
आणि इस्राएलाच्या संतानानी मोवाबाचा राजा
एग्लोन याची चाकरी अठरा वर्षें केली. १५
नंतर इस्राएलाचीं संतानें परमेश्वराजवळ ओ-
रडलीं, तेव्हां परमेश्वराने त्यांच्यासाठीं तारणा-
रा उत्पन्न केला; गेरा जो बन्यामीनी त्याचा पुत्र
एहूद, जो उजव्या हाताने अधू असा मनुष्य हो-
ता; तर त्याच्या हातें इस्राएलाच्या संतानानी
मोवाबाचा राजा एग्लोन याला भेट पाठविली.
१६ तेव्हां दोन धारांची व हातभर लांब असी
कटार एहूदाने आपल्यासाठीं केली, आणि त्याने
आपल्या वस्त्राखालीं आपल्या उजव्या मांडीवर
ती अवळून बांधिली. १७ मग त्याने मोवाबा-
चा राजा एग्लोन याजवळ ती भेट नेली; ए-
ग्लोन तर फार पुष्ट मनुष्य होता. १८ तेव्हां
ती भेट देण्याची समाप्ति केल्यावर आणि जीं मा-
णसें भेट घेऊन आलीं होतीं, त्यांस निरोप दिल्या-
वर असें झालें कीं, १९ तो गिल्‌गालाजवळ-
च्या खाणी तेथून माघारा फिरला, आणि बोल-
ला, "हे राजा, तुजसीं माझें गुप्त कार्य आहे."
मग तो बोलला, "उगेच राहा." तेव्हां त्याच्या-
जवळ जे उभे होते ते सर्व त्याजवळून गेले.
२० मग एहूद त्याच्याजवळ गेला, तेव्हां त्या-
ची जी शीतळ माडी तिजवर तो एकटा बसला
होता; आणि एहूद बोलला, "मला तुजसीं
देवाचें कार्य आहे." तेव्हां तो आपल्या सिं-
हासनावरून उठला. २१ मग एहूदाने आ-
पला डावा हात लावून आपल्या उजव्या मांडी-
वरून ती कटार काढून त्याच्या पोटांत खुपसली.
२२ तेव्हां पानाच्या मागें मूठहि आंत गेली, आ-
णि मांदें पानावर असें लगटलें कीं त्याच्याने ती
कटार त्याच्या पोटांतून काढवेना आणि विष्टा बा-
हेर आली. २३ तेव्हां एहूदाने देवडीवर बा-
हेर येऊन त्यावर माडीचीं कवाडें लावून बंद
केलीं. २४ आणि तो निघून गेला, तेव्हां याच्या
चाकरानी जाऊन पाहिलें; तर पाहा, माडीचीं
कवाडें बंद आहेत; तेव्हां त्यानी ह्मटलें, निश्चयें
तो शीतळ खोलींत आपले पाय झांकीत आहे.
२५ मग लाज वाटे तोंपर्यंत त्यानी वाट पाहिली;
तर पाहा, कोणीहि माडीचीं कवाडें उघडिलीं
नव्हतीं; यास्तव त्यानी किल्ली घेऊन उघडिलीं;
तर पाहा, त्यांचा प्रभु भूमीवर मेलेला पडून मे-
ला आहे. २६ तेव्हां त्यानी उशीर केला तित-
क्यांत एहूद पळून खाणींच्या पलिकडे सईरा
तेथवर जाऊन पोहंचला. २७ आणि तो आ-
ल्यावर, असें झालें कीं त्याने एफ्राइमाच्या डों-
गरावर रणशिंग वाजविलें; मग इस्राएलाचीं
संतानें त्याच्या संगतीं डोंगरावरून उतरलीं आणि
तो त्यांच्यापुढें चालला. २८ तेव्हां तो त्यांस
बोलला, "तुह्मी माझ्या पाठीमागें या, कां तर

परमेश्वराने तुमचे शत्रू जे मोवाबी ते तुमच्या
हातीं दिल्हे आहेत." तेव्हा त्यानी त्याच्यामागें
खालीं जाऊन, मोवाबाजवळचे यार्देनेचे उतार
घेऊन कोणाला पार जाऊं दिल्हें नाहीं. २९
आणि त्या वेळेस त्यानी मोवाबांतले सुमारें दाहा
हजार, सर्व लठ्ठ पुरुष व सर्व शूर पुरुष असे
मारिले, आणि कोणी निभावला नाहीं. ३०
असे त्या दिवसीं इस्राएलाच्या हाताखालीं मो-
वाब पराजित झाले, आणि देश ऐशीं वर्षे स्वस्थ
राहिला. ३१ मग त्याच्यामागें अनाथाचा पुत्र
शाम्गार झाला, आणि त्याने बैलाच्या आरका-
ठीने पलिष्ट्यांतले साहाशें पुरुष मारिले; असें
त्यानेहि इस्राएलाला सोडविलें.

## अध्याय ४.

परंतु एहूद मेल्यावर इस्राएलाच्या संतानानी
परमेश्वराच्या दृष्टींत फिरून वाईट केलें.
२ यास्तव परमेश्वराने खनानी राजा याबीन
याच्या हातीं तीं दिल्हीं; तो हाजोरांत राज्य
करीत होता, आणि त्याचा सेनापति सीसरा हो-
ता, आणि हा राष्ट्रांच्या हरोशेथांत राहत होता;
३ मग इस्राएलाचीं संतानें परमेश्वराजवळ ओ-
रडलीं; कां तर त्याला लोखंडाचे रथ नऊशें होते,
आणि त्याने वीस वर्षे इस्राएलाच्या संतानांवर
पराकाष्ठेचा जुलूम केला.

४ आणि दबोराबाइ भविष्यवादीण लापिदो-
थाची स्त्री, ही त्या वेळेस इस्राएलाचा न्याय
करीत होती. ५ आणि ती एफ्राइमाच्या डोंग-
रावर रामा व बेथएल यांच्यामध्यें दबोरेच्या
खारीक झाडाखालीं राहत होती, आणि इस्राए-
लाचीं संतानें न्यायासाठीं तिच्याजवळ चढून
जात होतीं. ६ तेव्हा तिने पाठवून नाफ्ताल्या-
च्या केदेशांतून अबीनवामाचा पुत्र बाराक याला
बोलावून म्हटलें, "इस्राएलाचा देव परमेश्वर
याने तुला असी आज्ञा दिल्ही नाहीं कीं काय!
कीं तूं जाऊन आपल्यासंगतीं नाफ्तालीच्या सं-
तानांतले व जबूलुनाच्या संतानांतले दाहा हजार
पुरुष घेऊन ताबोर डोंगराकडे वळवून जा. ७
आणि मी तुझ्याजवळ किशोन नदीवर याबीनाचा
सेनापति सीसरा याला व त्याच्या रथांस व त्या-
च्या समुदायाला ओढीन, आणि तो तुझ्या हातीं
देईन." ८ तेव्हा बाराक तिला बोलला, "जर
तूं माझ्यासंगतीं येसील, तर मी जाईन; आणि
जर माझ्यासंगतीं येणार नाहींस, तर मी जाणार
नाहीं." ९ तेव्हा ती बोलली, "मी तुझ्यासंगतीं
येईनच येईन; तथापि ज्या वाटेने तूं जातोस,
तेथें तुझेंच गौरव होणार नाहीं; कारण कीं पर-
मेश्वर सीसऱ्याला स्त्रीच्या हातीं देईल." मग
दबोरा उठून बाराकाच्या संगतीं केदेशास गेली.
१० तेव्हां बाराकाने जबूलुन व नाफ्ताली यांस
केदेशाकडे बोलाविलें, आणि त्याच्या पाठीमागें
दाहा हजार पुरुष चढून गेले, दबोराहि त्याच्या-
संगतीं चढून गेली.

११ तेव्हा मोशाचा सोयरा होबाब याच्या
संतानांतला हेबेर जो केनी, तो काइनापासून वेग-
ळा झाला होता, आणि त्याने केदेशाजवळ जें सा-
नीम त्यांतलें एलोन तेथवर जाऊन आपली राहोटी
दिल्ही होती. १२ सीसऱ्याला तर कोणी असें
सांगितलें कीं, "अबीनवामाचा पुत्र बाराक ताबोर
डोंगरावर चढून गेला आहे." १३ तेव्हां सी-
सऱ्याने आपले सर्व रथ, नऊशें लोखंडाचे रथ,
आणि आपल्या संगतीचे जे सर्व लोक त्यांस रा-
ष्ट्रांच्या हरोशेथापासून कीशोन नदीपर्यंत बोलावून
एकवट केलें. १४ तेव्हां दबोरेने बाराकाला
सांगितलें, "तूं ऊठ, कां तर ज्या दिवसीं परमे-
श्वराने सीसरा तुझ्या हातीं द्यावा, तो हाच;
परमेश्वर तुझ्यापुढं निघाला कीं नाहीं?" मग
बाराक व त्याच्यामागें दाहा हजार पुरुष ता-
बोर डोंगरावरून उतरले. १५ तेव्हां परमेश्व-
राने बाराकापुढें तरवारीने सीसरा व सर्व रथ
व सर्व सैन्य यांचा मोड केला; तेव्हां, सीसरा
रथावरून उतरून आपल्या पायानी पळाला. १६
आणि बाराक राष्ट्रांच्या हरोशेथापर्यंत रथांच्या
पाठीं व सैन्याच्या पाठीमागें लागला, आणि सी-
सऱ्याचें सर्व सैन्य तरवारीनें पडलें, एकहि राहि-
ला नाहीं. १७ परंतु सीसरा आपल्या पायानी
हेबेर जो केनी त्याची स्त्री याएल इच्या राहो-
टीकडे पळाला; कां तर हाजोराचा राजा या-
बीन व हेबेर जो केनी त्यांचें घराणें यांमध्यें
समेट होता.

१८ तेव्हां याएल सीसऱ्याला भेटायास बा-
हेर येऊन त्याला बोलली, "हे महाराज, तूं वळून
ये, माझ्याजवळ वळून ये, भिऊं नको." तेव्हां
तो वळून तिच्याजवळ राहोटींत गेला, आणि
तिने त्याला अंथरुणाने झांकिलें. १९ तेव्हां
तो तिला बोलला, कृपा करून मला थोडें पाणी
पाज, कां कीं मला तहान लागली आहे." मग तिने
दुधाची बुधली उघडून त्याला पाजिलें, आणि
त्याला झांकिलें. २० तेव्हां तो तिला बोलला,
"तूं राहोटीच्या दारासीं उभी राहा, आणि असें
व्हावें कीं जर कोणी येऊन तुला विचारून
ह्मणेल, एथें कोणी आहे कीं काय?' तेव्हां 'को-
णी नाहीं' असें सांग." २१ मग हेबेराची
स्त्री याएल इने राहोटीची मेख घेऊन आपल्या
हातीं हातोडा घेतला, आणि त्याच्याजवळ हळूच
जाऊन ती मेख त्याच्या कानसुळांत मारून पार
भूमींत रोवली; कारण तो भागलेला असतां गाढ
झोपेंत पडला होता, आणि तो तसाच मेला. २२
नंतर पाहा, बाराक सीसऱ्याच्या पाठीस लागला
असतां, याएल त्याला भेटायास बाहेर येऊन
त्याला बोलली, "तूं ये, ह्मणजे ज्या पुरुषाला
शोधितोस तो मी तुला दाखवीन." तेव्हां तो
तिच्या संगतीं आंत गेला; तर पाहा, सीसरा
पडून मेला होता, आणि त्याच्या कानसुळांत
मेख होती. २३ असें देवाने त्या दिवसीं ख-
नानाचा राजा याबीन याला इस्राएलाच्या संता-
नांपुढें पराजित केलें. २४ मग खनानी राजा
याबीन यावर इस्राएलाच्या संतानांचा हात इत-
का भारी होत होत चालला कीं खनानी राजा
याबीन याचा नाश झाला.

## अध्याय ५.

मग त्या दिवसीं दबोरा व अबीनवामाचा पुत्र
बाराक यानी असें गायन केलें कीं, २ "इस्रा-
एलांतील अधिकारी पुढें गेले; लोक स्वतां सिद्ध
झाले, यामुळें तुह्मी परमेश्वराची स्तुति करा.
३ अहो राजे, ऐका; अहो श्रीमंत, कान द्या; मी
स्वतां परमेश्वराजवळ गायन करीन; इस्राएला-
चा देव परमेश्वर याची स्तुति करीन. ४ हे
परमेश्वरा, जेव्हां तूं सेईरांतून निघालास, जेव्हां
अदोमाच्या देशापासून चाललास, तेव्हां पृथ्वी
कंपायमान झाली, आकाशानेंहि पाणी पाडिलें;
ह्मणजे ढगानी पाण्याचे मोठे थेंब गाळिले. ५
परमेश्वरापुढें डोंगर थरथरा कांपले; हा सी-
नाय् इस्राएलाचा देव परमेश्वर याच्यापुढें थर-
थरा कांपला.

"६ अनाथाचा पुत्र शामगार याच्या दिवसांत,
याएल इच्या दिवसांत मार्ग बंद झाले; तेव्हां
जे पायमार्गानी चालणारे ते वांकड्या वाटानी चा-
लत गेले. ७ मी दबोरा उत्पन्न झालें, मी इस्रा-
एलांत आई असी उत्पन्न झालें तोंपर्यंत इस्रा-
एलांत अधिकाऱ्याचा अभाव झाला होता. ८
त्यानी नवे देव निवडून घेतले, तेव्हां वेसींत ल-
ढाई झाली; इस्राएलाच्या चाळीस हजारांत ढाल
किंवा भाला दृष्टीस पडला कीं काय? ९ माझें
मन इस्राएलांतल्या अधिकाऱ्यांकडे लागलें आहे;
ते लोकांसाठीं स्वइच्छेने सादर झाले; तुह्मी
परमेश्वराची स्तुति करा. १० अहो पांढऱ्या
गाढवांवर बसून जाणारे, अहो गाद्यांवर बसणारे,
आणि अहो वाटेने चालणारे, तुह्मी गायन करा.
११ पाण्याच्या दोणीजवळ जेथें धनुर्धरांचा शब्द
होता, तेथें ते परमेश्वराचीं न्यायकर्में आणि
इस्राएलांतल्या अधिकाऱ्यांचीं न्यायकर्में वर्णन क-
रितील; त्या काळीं परमेश्वराचे लोक आप-
ल्या गावांत खालीं जातील. १२ अगे दबोरे,
जागी हो, जागी हो, जागी होऊन गीत गा; हे
बाराका, ऊठ; हे आबीनवामाच्या पुत्रा, तूं आ-
पले जे धरून आणिलेले त्यांस पुढें आण. १३
तेव्हां त्याने उरलेल्याला इतर लोकांच्या श्रीमंतां-
वर अधिकार दिल्हा; परमेश्वराने मला परा-
क्रम्यांवर अधिकार दिल्हा. १४ एफ्राइमांतले
ज्यांची वस्ती अमालेकाजवळ होती ते आले तु-
झ्यामागें बन्यामीन तुझ्या लोकांबरोबर आला;
माखीरांतल्याचे अधिकारी खालीं आले, आणि
ज्यानी सरदाराची काठी धरिली ते जबूलनांतून
खालीं आले. १५ आणि इस्साखारांतले सर-
दार दबोरेच्या बरोबर होते; इस्साखार बाराका-
ला आधार होता; ते त्याच्या पाठीमागे खोऱ्यांत
गेले; रऊबेनाच्या ओढ्यांमध्यें मनाचे मोठे निश्चय
झाले. १६ तूं गोठ्यांमध्यें खिलारांजवळचे

पाऱ्याचे शब्द ऐकायाला कां राहिलास? रऊ-
बेनाच्या ——— मनांत मोठे शोध झाले.
१७ गिलाद यार्देनेच्या पलिकडे आपल्या वस्तीस
राहिला, आणि दान तारवांजवळ कां राहिला?
आशेर समुद्रांच्या कांठीं बसला; आपल्या खा-
ड्यांजवळ वस्तीस राहिला. १८ जबूलुनाच्या
लोकानी मरावें एवढी आपल्या जिवांची उपेक्षा
केली; नाफ्ताल्यानेहि भूमीच्या उंचोट्यांवर केली.
१९ राजे आऊन लढले; तेव्हां खनानी राजानी
तानाखांत मगिद्दो याच्या पाण्याजवळ लढाई के-
ली; रुप्याची लूट त्यानी घेतली नाहीं. २०
आकाशांतल्यानीं लढाई केली; तान्यानी आपल्या
फेऱ्यांत सीसऱ्यासीं लढाई केली. २१ कीशोन
नदीने त्यांस गडप केलें; जी बहुकाळची नदी
कीशोन नदी तिने; हे माझ्या जिवा, त्वां पराक्रम
तुडविला आहे. २२ तेव्हां अति घाईने त्यांतल्या
बळवंतांच्या, अति घाईने घोड्यांचे खूर फुटले.
२३ 'तुह्मी मेरोजाला शाप द्या,' परमेश्वरा-
च्या दूताने सांगितलें आहे; 'त्यांतल्या राहणा-
ऱ्यांस शाप द्याच द्या;' कारण कीं ते परमेश्व-
राचें सहाय करायास शूरांमध्यें परमेश्वराचें
सहाय करायास आले नाहीत. २४ हेबेर जो
केनी त्याची स्त्री याएल, ती स्त्रियांमध्यें आशी-
र्वादित असो; राहोटींतल्या स्त्रियांमध्यें ती आ-
शीर्वादित असो. २५ त्याने पाणी मागितलें,
तिने दूध दिल्हें; श्रीमंतांच्या वाटींत दहीं आणि-
लें. २६ तिने आपला हात मेखेला आणि आ-
पला उजवा हात कारागिरांच्या हातोड्याला ला-
विला; तेव्हां तिने सीसऱ्याला मारिलें; त्याचें
डोकें हाणिलें, आणि त्याच्या कपाळाजवळ कान-
सुळांत मारून पार केली. २७ तो तिच्या
पायांजवळ टेंकला, पडला, निजला; तिच्या पायां-
जवळ तो टेंकून पडला; जेथें टेंकला होता, तेथेंच
ठार मारिलेला पडला. २८ सीसऱ्याच्या आ-
ईने खिडकींतून डोकावलें; जाळींतून हाक मारि-
ली; 'येण्याविषयीं त्याच्या रथाला उशीर कां
लागला? त्याच्या रथाच्या चाकांस खोळंबा कां
झाला? २९ तिच्या शाहण्या सरदारणिनी
उत्तर दिल्हें; तिने आपणच आपणाला उत्तर
दिल्हें; ३० त्यानी लूट घेतली आणि वांटितात
कीं नाहीं? शूरांतल्या प्रत्येकाला एकएक दोनदोन
मुलग्या मिळाल्या, सीसऱ्याला लुटीचीं विचित्र
वस्त्रें, लुटीचीं कशिद्याचीं विचित्र वस्त्रें, दोहीं-
कडून कशिद्याचें विचित्र वस्त्र लूट धरणाऱ्यांच्या
मानांसाठीं आहे.' ३१ हे परमेश्वरा, तसे
तुझे सर्व शत्रू नाश पावोत, परंतु तुझ्यावर जे
प्रीति करितात ते, जसा सूर्य आपल्या बळाने
निघतो, तसे होवोत." तेव्हां देश चाळीस वर्षे
स्वस्थ राहिला.

## अध्याय ६.

नंतर इस्राएलाच्या संतानानी परमेश्वराच्या
दृष्टींत वाईट केलें, यास्तव परमेश्वराने तीं
मिद्यानाच्या हातीं सात वर्षे दिल्हीं. २ तेव्हां
मिद्यानाचा हात इस्राएलावर प्रबळ पडता झा-
ला; डोंगरांत जीं विवरें व गुहा व गड आहेत,
ते मिद्यान्यांमुळें इस्राएलाच्या संतानानी आपल्या-
साठीं केले होते. ३ तेव्हां असें झालें कीं जर
इस्राएलानी पेरिलें, तर मिद्यान्यानी व अमाले-
कानी चढून यावें, आणि पूर्वेकडल्या संतानानीहि
त्यांवर चढून यावें. ४ असा त्यानी त्यांवर
तळ धरून गाज्ज्यांत जाईस तोंपर्यंत भूमीचें
उत्पन्न नासिलें, आणि इस्राएलांत कांहीं खाणें
किंवा बकरें किंवा बैल किंवा गाढव असा कांहीं
जीव ठेविला नाहीं. ५ कां तर ते संख्येकरून
टोळांसारिखे आपले पशू व आपल्या राहोट्या
यांसुद्धां आले, आणि त्यांची व त्यांच्या उंटांची
गणती नव्हती; असे ते देशाचा नाश करायास
आले होते. ६ तेव्हां मिद्यान्यांकडून इस्राएल
फार दरिद्री झाले, आणि इस्राएलाच्या संतानानी
परमेश्वराची काकळूत केली.
७ तर जेव्हां इस्राएलाच्या संतानानी मिद्या-
न्यांमुळें परमेश्वराची काकळुत केली, तेव्हां
असें झालें, ८ कीं परमेश्वराने कोणी भवि-
ष्यवादी इस्राएलाच्या संतानांजवळ पाठविला;
तेव्हां तो त्यांस बोलला, "इस्राएलाचा देव पर-
मेश्वर असें ह्मणतो, 'म्या तुह्मास मिसरांतून
आणिलें, दास्याच्या वस्तींतून देखील तुह्मास
काढिलें; ९ असें म्या तुह्मास मिसऱ्यांच्या
हातांतून व तुमच्या सर्व जाचणाऱ्यांच्या हातांतून

सोडविलें; आणि त्यास तुमच्यापुढून घालवून
त्यांचा देश तुह्मास दिल्हा. १० तेव्हां म्या
तुह्मास असें सांगितलें कीं, 'मी तुमचा देव पर-
मेश्वर आहें; ज्या आमोऱ्यांच्या देशांत तुह्मी
राहत आहां, त्यांच्या देवांस तुह्मी भिऊं नका;'
तरी तुह्मी माझी आज्ञा मानिली नाहीं."

११ आणखी परमेश्वराचा दूत येऊन अ-
बीएज्री योवाश याच्या अफ्ऱ्यांत जें एला झाड
त्याखालीं बसला; तेव्हां त्याचा पुत्र गिदोन
गहूं मिद्यान्यांपासून राखायास तेथें घाण्यांत म-
ळींत होता. १२ आणि परमेश्वराचा दूत
त्याला दर्शन देऊन त्याला बोलला, "हे परा-
क्रमी वीरा, परमेश्वर तुला अनुकूळ आहे."
१३ तेव्हां गिदोन त्याला बोलला, "हे माझ्या
प्रभू, जर परमेश्वर आह्मास अनुकूळ आहे,
तर हें अवघें आह्मास कां प्राप्त झालें? आणि
त्याचे सर्व चमत्कार कोठे आहेत? कां आमच्या
पूर्वजानी ते आह्माजवळ वर्णितांना सांगितले
होते, 'परमेश्वराने आह्मास मिसरांतून आणि-
लें नाहीं कीं काय?' आतां तर परमेश्वराने
आमचा त्याग करून आह्मास मिद्यान्यांच्या हातीं
दिल्हें आहे." १४ मग परमेश्वराने त्यावर दृष्टि
लावून ह्मटलें, "तूं आपल्या या बळाने जा, आणि
इस्राएलास मिद्यान्यांच्या हातांतून तार; मी तुला
पाठवीत नाहीं कीं काय?' १५ तेव्हां हा त्याला
बोलला, "हे माझ्या प्रभू, मी इस्राएलाला कसा
तारूं? पाहा, मनाश्श्यांत माझें कूळ धाकटें आहे,
आणि मी आपल्या बापाच्या घरांत लाहान आहें."
१६ तेव्हां परमेश्वर त्याला बोलला, "असो,
परंतु मी तुला अनुकूळ होईन, आणि तूं मिद्यान्यां-
ला एका मनुष्यासारिखा मारसील." १७ तेव्हां
हा त्याला बोलला, "आतां तुझ्या लक्षांत जर
मला कृपा मिळाली आहे, तर तूं मला खूण क-
रून दे कीं तूंच मजसीं बोलत आहेस. १८
आतां, मी तुझ्याजवळ येतों तोंपर्यंत तूं एथून
जाऊं नको; ह्मणजे मी आपलें दान आणून तु-
झ्यापुढें ठेवीन." तेव्हां तो बोलला, "तूं माघारा
येसील तोंपर्यंत मी राहीन." १९ तेव्हां गिदो-
नानें जाऊन शेळ्यांतलें करडूं व पांच पायली
पिठाच्या बेखमीर भाकरी सिद्ध केल्या; त्याने
सागोती टोपलींत घातली, आणि कालवण पाते-
लींत घातलें, मग त्याच्याजवळ एला झाडाखालीं
नेऊन सादर केलें. २० तेव्हां देवाच्या दूताने
त्याला सांगितलें, "तूं सागोती व बेखमीर भाकरी
या खडकावर आणून ठेव, आणि कालवण ओत."
मग त्याने तसें केलें. २१ तेव्हां परमेश्वरा-
च्या दूताने आपल्या हातांतल्या काठीचा अग्रभाग
सागोतीला व बेखमीर भाकरीला लाविला; मग
खडकांतून अग्नि निघाला, आणि त्या अग्नीने सा-
गोती व बेखमीर भाकरी जाळून टाकल्या; पर-
मेश्वराचा दूतहि त्याच्या दृष्टींतून गेला. २२
तेव्हां गिदोनाने पाहिलें कीं तो परमेश्वराचा
दूत होता; मग गिदोन बोलला, "हे प्रभू पर-
मेश्वरा, हाय हाय; कारण कीं म्या परमेश्वरा-
चा दूत तोंडोतोंड पाहिला आहे. २३ तेव्हां
परमेश्वर त्याला बोलला, "तूं सुखी ऐस, भिऊं
नको, मरणार नाहींस." २४ तेव्हां गिदोनाने
तेथें परमेश्वरासाठीं वेदी बांधिली, आणि त्याचें
नांव "परमेश्वर प्रसन्न, असें ठेविलें; ती सांप्रत
आजपर्यंत अबीएज्र्यांच्या अफ्ऱ्यांत आहे.

२५ आणि असें झालें कीं त्याच रात्रीं पर-
मेश्वराने त्याला सांगितलें कीं, "तुझ्या बापाचीं
जीं गुरें त्यांतला गोऱ्हा, ह्मणजे सात वर्षांचा दु-
सरा गोऱ्हा, तो तूं घे, आणि बाल देवासाठीं
तुझ्या बापाची जी वेदी, ती मोडून टाक, आणि
तिच्याजवळ जें भजनवन तें कापून टाक. २६
मग या खडकावर नेमित प्रकारें आपला देव
परमेश्वर यासाठीं वेदी बांधून आणि तो दुसरा
गोऱ्हा घेऊन, जें भजनवन तोडसील, त्याच्या लां-
कडानी होम कर." २७ तेव्हां गिदोनाने आ-
पल्या चाकरांतलीं दाहा माणसें घेऊन, जसें पर-
मेश्वराने त्याला सांगितलें होतें, तसें केलें; परंतु
असें झालें कीं दिवस असतां हें करायाला तो
आपल्या बापाच्या घराण्याला व त्या नगरच्या
माणसांस भ्याला, यास्तव रात्रीं त्याने केलें. २८
मग सकाळीं त्या नगरचीं माणसें उठलीं, तर
पाहा, बालाची वेदी मोडलेली होती, तिच्या-
जवळचें भजनवनहि तोडलेलें होतें, आणि बांध-
लेल्या वेदीवर दुसऱ्या गोऱ्ह्याचा होम केलेला
होता. २९ तेव्हां तीं एकमेकासीं बोललीं, "ही

गोष्ट कोणी केली?" मग त्यांनी विचार व शोध
केल्यावर ह्मटलें, "योवाशाचा पुत्र गिदोन, याने
ही गोष्ट केली आहे." ३० नंतर त्या नगरच्या
माणसांनी योवाशाला सांगितलें, "तूं आपला
पुत्र बाहेर आण, त्याला तर मारायाचें आहे,
कारण कीं त्याने बालाची वेदी मोडून टाकिली,
अणखी तिच्याजवळचें भजनवन तोडून टाकिलें
आहे." ३१ तेव्हां योवाश आपणावर जे उठ-
लेले होते, त्या सर्वांस तो बोलला, "बालासाठीं
तुह्मी वाद करितां कीं काय? तुह्मी त्याचा पक्ष
धरितां कीं काय? जो त्याच्यासाठीं वाद करील
तो आतांच्या सकाळीं इतक्यांत मारला जावो;
जर तो देव आहे, तर त्यानेच आपल्यासाठीं वाद
करावा कीं त्याची वेदी याने मोडून टाकिली."
३२ तेव्हां त्याच दिवशीं त्याने त्याला यरुब्बाल
ह्मटलें, कारण कीं तो बोलला होता, "बालानेच
आपल्यासाठीं वाद करावा कीं त्याची वेदी याने
मोडून टाकिली."

३३ तेव्हां सर्व मिद्यानी व अमालेकी व पूर्वे-
कडल्या प्रजा एकत्र मिळाल्या, आणि त्यांनी अ-
लिकडे येऊन इज्रएल खिंडींत तळ धरिला. ३४
नंतर परमेश्वराच्या आत्म्याने गिदोनाला प्रे-
रिलें; वास्तव त्याने शिंग वाजविलें, तेव्हां अबि-
येजेराचे लोक त्याच्याजवळ एकत्र मिळाले. ३५
मग त्याने सगळ्या मनाश्श्यांत जासुद पाठविले,
तेव्हां तेहि त्याच्याजवळ एकत्र मिळाले; नंतर
आशेरांत व जबूलुनांत व नाफ्ताल्यांत त्याने
जासुद पाठविले, तेव्हां ते यांसीं मिळायास
चढून गेले. ३६ मग गिदोन देवास बोलला,
"जसें त्वां सांगितलें, तसा जर तूं माझ्या हाताने
इस्राएलाला तारणार आहेस; ३७ तर पाहा,
मी खळ्यांत लोकरीचा झुपका ठेवितों; जर
झुपक्यावर मात्र दहिंवर पडेल आणि सर्व भूमी
कोरडी राहील, तर मला कळेल कीं जसें त्वां
सांगितलें, तसा तूं माझ्या हाताने इस्राएलाला
तारसील." ३८ नंतर तसें झालें; ह्मणजे स-
काळीं जेव्हां तो उठला, तेव्हां त्याने तें झुपक्यास
दुमडलें, आणि कात्रणांतून दहिंवर पिळून वाटी-
भर पाणी काढिलें. ३९ मग गिदोन देवाला
बोलला, "तूं मजवर रागें भरूं नको, ह्मणजे मी
या वेळेस मात्र बोलतों; आतां केवळ या वेळेस
झुपक्याने तुझें सत्व पाहतों; कृपेने झुपक्याला
मात्र कोरडेपण होवो, आणि संपूर्ण भूमीवर दहिं-
वर होवो." ४० तेव्हां त्या रात्रीं देवाने तसें
केलें कीं झुपक्याला मात्र कोरडेपण झालें, आणि
संपूर्ण भूमीवर दहिंवर झालें.

## अध्याय ७.

तेव्हां यरुब्बाल तोच गिदोन, आणि त्याच्या
संगतीं जे सर्व लोक त्यांनी सकाळीं उठून ह-
रोद झऱ्याजवळ तळ धरिला, आणि त्यावर मि-
द्यानी तळ मोरे डोंगराच्या उत्तरेस खिंडींत
होता. २ तेव्हां परमेश्वर गिदोनाला बोलला,
"तुझ्यासंगतीं जे लोक ते फार आहेत, यावरून
म्या मिद्यान त्यांच्या हातीं न द्यावा; नाहीं तर
इस्राएल मजविरुद्ध नावाजून घेतांना ह्मणेल कीं
'मी आपल्याच हाताने तरलों.' ३ तर आतां
तूं अगत्य लोकांच्या कानीं असें सांग कीं, 'जो
कोणी भित्रा असेल, त्याने मागें फिरावें, ह्मणजे
मोठ्या सकाळीं गिलाद डोंगरावरून निघावें."
तेव्हां लोकांतून बावीस हजार माघारे फिरले,
आणि दाहा हजार राहिले.

४ मग परमेश्वर गिदोनाला बोलला, "अ-
द्याप लोक फार आहेत; तूं त्यांस खालीं पाण्या-
जवळ ने, ह्मणजे मी तेथें तुझ्यासाठीं त्यांची
परीक्षा घेईन; आणि असें होवो कीं ज्याविषयीं
मी तुला सांगेन कीं, 'याने तुझ्यासंगतीं यावें,'
तो तुझ्यासंगतीं जावो, आणि ज्या प्रत्येकाविषयीं
मी तुला सांगेन कीं, "याने तुझ्यासंगतीं न यावें,
तो न जावो." ५ मग त्याने लोकांस खालीं
पाण्याजवळ नेलें; मग परमेश्वराने गिदोनाला
सांगितलें, "जसा कुत्रा चाटीत पितो, तसा जो
कोणी आपल्या जिभेने चाटीत पाणी पिईल, त्या-
ला तूं एकीकडे ठेव; आणि जो कोणी प्यायास
आपल्या गुडघ्यांवर टेंकेल, त्याला एकिकडे ठेव."
६ तेव्हां जे आपला हात आपल्या तोंडीं लावून
चाटीत प्याले, तसे पुरुष गणतीने तीनशें होते,
आणि वरकड सर्व लोक पाणी प्यायास आपल्या
गुडघ्यांवर टेंकले. ७ नंतर परमेश्वराने गि-
दोनाला सांगितलें, "जे तीनशें पुरुष चाटीत

प्याले, त्यांकडून मी तुह्मास तारीन, आणि मि-
द्यान तुझ्या हातीं देईन; यास्तव वरकड सर्व
लोकांस आपल्या ठिकाणीं जाऊं दे." ८ तेव्हां त्या
लोकानी आपल्या हातीं शिधा व आपलीं रण-
शिंगें घेतलीं, आणि इस्राएलाच्या वरकड सर्व
माणसांस त्याच्या त्याच्या घरांस त्याने पाठविलें;
केवळ तीं तीनशें माणसें राखलीं; तेव्हां मिद्या-
नी तळ त्याच्याखालीं खिंडींत होता.

९ आणि त्या रात्रीं असें झालें कीं परमेश्व-
राने त्याला सांगितलें, "तूं उठून खालीं तळावर
जा, कां तर म्या तो तुझ्या हातीं दिल्हा आहे.
१० आणि जर तूं खालीं जायाला भितोस, तर
आपला चाकर फुरा याला खालीं तळाजवळ
ने. ११ मग ते जें बोलतील, तें तूं एक; आणि
मग तुझे हात बळकट होतील, आणि तूं उतरून
तळावर जासील." तेव्हां तळांत जे हत्यारबंद
होते, त्यांच्या कांठापर्यंत तो आपला चाकर फुरा
याला घेऊन खालीं गेला. १२ तेव्हां मिद्यानी
व अमालेकी व पूर्वेकडल्या सर्व प्रजा खिंडींत पडून
राहिलेल्या असतां, टोळांसारिख्या पुष्कळ होत्या,
आणि त्यांच्या उंटांची गणती नव्हती; संख्येने
समुद्राच्या कांठावरल्या वाळूसारिख्या होत्या. १३
मग गिदोन गेला, आणि पाहा, कोणी आपल्या
सोबत्याला असें स्वप्न सांगितलें कीं, "पाहा, म्या
स्वप्न पाहिलें कीं पाहा, सातूंच्या भाकरीने मिद्यानी
तळांत लोटत लोटत एका राहोटीपर्यंत येऊन
तिने पडावें असें तिला हाणिलें, तिला उलथेंहि
केलें, असी ती राहोटी पडली." १४ तेव्हां त्याच्या
सोबत्याने उत्तर केलें कीं, "इस्राएली माणूस यो-
वाशाचा पुत्र गिदोन याची तरवार, तिजखेरीज
हें कांहीं नाहीं; देवाने मिद्यान व सर्व तळ त्या-
च्या हातीं दिल्हा आहे." १५ तेव्हां असें झालें
कीं गिदोनाने तें स्वप्न व त्याचा अर्थ ऐकिल्यावर
भजन केलें; मग तो इस्राएली तळास माघारा
येऊन बोलला, "तुह्मी उठा, कारण कीं परमेश्व-
राने मिद्यानी तळ तुमच्या हातीं दिल्हा आहे.
१६ तेव्हां त्याने त्या तीनशें माणसांच्या तीन
टोळ्या केल्या, आणि त्या सर्वांच्या हातीं रणशिंगें
व रिकाम्या घागरी दिल्ह्या, आणि त्या घागरींमध्यें
दीवे होते. १७ तेव्हां त्याने त्यांस सांगितलें,
"तुह्मी माझें पाहून तसें करा; आतां पाहा, मी
तळाच्या कांठीं जातों, तर असें होवो कीं जसें
मी करीन तसें तुह्मी करा. १८ ह्मणजे, जें
माझ्यासंगतीं त्या सर्वांसुद्धां जेव्हां मी रणशिंगें
वाजवीन, तेव्हां तुह्मीहि संपूर्ण तळाच्या चहुंकडे
रणशिंगें वाजवीत ह्मणा, "परमेश्वराच्यायोगें व
गिदोनाच्यायोगें."

१९ तेव्हां गिदोन व त्याच्यासंगतीं जीं
शंभर माणसें, तीं मधल्या प्रहराच्या प्रारंभीं
नुक्तेच त्यानी पाहरेकरी उभे केले होते, तेव्हां
तळाच्या कांठीं गेलीं; मग त्यानी रणशिंगें वाज-
विलीं, आणि आपल्या हातांतल्या घागरी फो-
डिल्या. २० असें त्या तीन टोळ्यानी रणशिंगें
वाजविलीं, आणि घागरी फोडिल्या; मग दिवे
आपल्या डाव्या हातीं आणि वाजवायाचीं रण-
शिंगें आपल्या उजव्या हातीं धरिलीं, आणि
"परमेश्वराच्यायोगें व गिदोनाच्यायोगें तरवार,"
असा हाकाटा केला. २१ तेव्हां ते तळा-
च्या चहुंकडे आपापल्या ठिकाणीं उभे राहिले;
आणि तळांतले सर्व लोक धांवत जातां आरोळी
मारीत पळाले. २२ तीं तीनशें माणसें तर रण-
शिंगें वाजवीत होतीं, आणि परमेश्वराने सग-
ळ्याहि तळांत प्रत्येकाची तरवार आपापल्या
शेजाऱ्यावर लागूं केली; आणि जरेरा यांतली
बेथशित्ता तेथवर, आणि अबेलमहोला याच्या
कांठापर्यंत टाब्बाथास तळ पळून गेला. २३
मग नाफ्ताल्यांतलीं व आशेरांतलीं व सगळ्या
मनाश्श्यांतलीं इस्राएली माणसें बोलावलीं असतां
मिद्यान्यांच्या पाठीस लागलीं.

२४ आणि गिदोनाने एफ्राइमाच्या सर्व डोंग
रवटीवर दूत पाठवून सांगितलें, "तुह्मी मिद्यान्यांसीं
भिडायाला खालीं बेथबारा व यार्देन तेथवर या,
आणि त्यांच्यापुढें पाण्याच्या वाटा रोखून धरा."
असीं सर्व एफ्राइमी माणसें बोलावलीं असतां.
त्यानी बेथबारा व यार्देन तेथवर येऊन पाण्याच्या
वाटा रोखून धरिल्या. २५ आणि मिद्यान्याचे
दोन अधिकारी ओरेब व ज्येब यांस त्यानी ध-
रिलें; तेव्हां ओरेबाला ओरेबाच्या खडकावर
मारिलें, आणि ज्येबाला ज्येबाच्या द्राक्षघाण्या-
जवळ मारिलें; असे ते मिद्यान्यांच्या पाठीस

लागले, आणि त्यानीं ओरेबाचें व ज्येबाचें शीर
यार्देनेच्या अलिकडे गिदोनाजवळ आणिलें.

## अध्याय ८.

तेव्हां एफ्राइमी माणसें गिदोनास बोललीं, "त्वां
आह्माविषयीं असी गोष्ट कां केली कीं आह्मास
बोलावल्यावांचून तूं मिद्यान्यांसीं लढायास गेला-
स?" असीं तीं त्यासीं बळें भांडलीं. २ तेव्हां तो
त्यांस बोलला, "म्या आतां तुमच्यासारिखें काय
केलें आहे? अबियेजराच्या द्राक्ष खुडण्यापेक्षां
एफ्राइमाच्या द्राक्षवेचण्या बऱ्या झाल्या नाहींत
कीं काय? ३ मिद्यानाचे अधिकारी ओरेब व
ज्येब यांस देवाने तुमच्या हातीं दिल्हें आहे,
आणि माझ्याने तुमच्यासारिखें काय करवलें?"
तेव्हां तो असी गोष्ट बोलल्यावर त्यांचा त्यावरला
कोप नाहींसा झाला. ४ गिदोन व त्याच्यासंगतीं
जीं तीनशें माणसें तीं तर थकलेलीं असतांहि
पाठीस लागतां यार्देनेस जाऊन पार गेलीं. ५
तेव्हां तो सुकोथांतल्या माणसांस बोलला, "माझे
अनुसारी जे लोक त्यांस तुह्मी कृपेकरून भाक-
रीच्या चांदक्या द्या; कां तर ते थकलेले आहेत,
आणि मिद्यानाचे राजे जेबाह व जाल्मुन्ना यां-
च्या पाठीस मी लागलों आहें." ६ तेव्हां सु-
कोथाचे अधिकारी बोलले, "काय, जेबाह व
जाल्मुन्ना यांचे हात आतां तुझ्या हातीं आहेत
कीं आह्मी तुझ्या सैन्याला अन्न द्यावें कीं काय?"
७ तेव्हां गिदोन बोलला, "यामुळें परमेश्वर
जेबाह व जाल्मुन्ना हे माझ्या हातीं देईल तेव्हां
मी रानांतल्या कांट्यानीं व वीजरंगी झुडपानीं तुम-
चीं अंगें झोडीन." ८ नंतर तो तेथून पनुवेलास
चढून जाऊन तेथल्यांसहि तसें बोलला, परंतु जसें
सुकोथांतल्या माणसानीं उत्तर दिल्हें होतें, तसेंच
पनुवेलांतल्या माणसानीं त्याला उत्तर दिल्हें. ९
तेव्हां तो पनुवेलांतल्या माणसांसहि असें बोलला
कीं, "जेव्हां मी सुखरूप माघारा येईन, तेव्हां
हा बुरूज फोडून टाकीन."

१० तेव्हां जेबाह व जाल्मुन्ना कार्कोरांत
होते, त्यांचे तळहि त्यांच्यासंगतीं होते; पूर्वेकडल्या
लोकांच्या अवघ्या सैन्यांतले जे उरलेले ते सर्व
सुमारानें पंधरा हजार होते; कारण कीं जे तरवा-
रीनें लढणारे एक लाख वीस हजार पुरुष पडलेले
होते. ११ तेव्हां गिदोन राहोट्यांत राहणाऱ्यां-
च्या वाटेनें नोबाह व यग्बहा यांच्या पूर्वेस चढून
गेला; आणि त्यानें तळ मारिला, कां कीं तो तळ
निर्भय होता. १२ जेबाह व जाल्मुन्ना हे तर
पळाले, परंतु तो त्यांच्या पाठीस लागला, आणि
त्यानें मिद्यानाचे ते दोन राजे जेबाह व जाल्-
मुन्ना धरिले, आणि सर्व तळ भडकता केला. १३
मग योवाशाचा पुत्र गिदोन सूर्य उगवल्यापूर्वीं
लढाईपासून माघारा आला. १४ तेव्हां त्यानें
सुकोथांतला एक तरणा माणूस धरिला, आणि
त्याजवळ मागितलें असतां त्यानीं याजवळ सु-
कोथाचे अधिकारी आणि त्यांतले वडील असीं
सत्याहत्तर माणसें लिहून दिल्हीं. १५ मग
तो सुकोथांतल्या माणसांजवळ जाऊन बोलला,
"जेबाह व जाल्मुन्ना हे तुह्मी पाहा; यांविषयीं
तुह्मी माझा अपमान करीत बोलला, 'काय, जेबाह
व जाल्मुन्ना यांचे हात आतां तुझ्या हातांत
आहेत कीं आह्मी तुझ्या थकलेल्या माणसांस अन्न
द्यावें कीं काय?" १६ नंतर त्यानें त्या नगरचे
वडील धरिले, आणि रानांतल्या कांट्या व वीज-
रंगी झुडपें घेतलीं, आणि तिहींकडून सुकोथांतल्या
माणसांस शिक्षा केली. १७ आणि त्यानें पनु-
वेलाचा बुरूज फोडून टाकिला, त्या नगरांतलीं
माणसेंहि मारिलीं.

१८ मग जेबाह व जाल्मुन्ना यांस तो
बोलला, "जीं माणसें तुह्मी ताबोरांत मारिलीं
तीं कसीं?" तेव्हां ते बोलले, "जसा तूं तसींच
तीं; त्यांतला प्रत्येक राजपुत्रांच्या स्वरूपानें
होता." १९ तेव्हां हा बोलला, "ते माझे
भाऊ, माझ्या आईचीं लेंकरें; जर तुह्मी त्यांस
वांचविलें असतें, तर परमेश्वराच्या जितेपणा-
वरून म्या तुह्मास मारिलें नसतें." २० तेव्हां
त्यानें आपला ज्येष्ठ पुत्र येथेर याला सांगितलें,
"तूं उठून त्यांस मार." परंतु त्या कुमारानें
आपली तरवार काढिली नाहीं; कां तर तोंपर्यंत
तो तरुण होता, यास्तव तो भ्याला. २१ तेव्हां
जेबाह व जाल्मुन्ना बोलला, 'तूं उठून आह्मास
मार, कां तर जसा पुरुष, तसा त्याचा पराक्रम
आहे." यास्तव गिदोनानें उठून जेबाह व

झाल्मुन्ना यास मारिलें, आणि त्यांच्या उंटां-
च्या गळ्यांमध्यें ज्या चंद्रकोरा होत्या, त्या
घेतल्या.
२२ तेव्हां इस्राएलांतल्या माणसानी गिदो-
नाला सांगितलें, "त्वां अणखी तुझ्या पुत्राने आ-
णि तुझ्या नाताने आह्मावर अधिकार करावा;
कां तर त्वां आह्मास मिद्यानाच्या हातांतून ता-
रिलें आहे." २३ तेव्हां गिदोन त्यांस बोलला,
"मी तुह्मावर अधिकार करणार नाहीं, माझा
पुत्रहि तुह्मावर अधिकार करणार नाहीं; परमे-
श्वराने तुह्मावर अधिकार करावा." २४ तरी
गिदोन त्यांस बोलला, "मी तुमच्याजवळ एक
मागणें करीन कीं तुह्मी एकएकाने आपापल्या
लुटींतलीं कुंडलें मला द्यावीं." त्यांस तर सो-
न्याचीं कुंडलें होतीं, कां तर ते इश्मएली होते.
२५ तेव्हां ते बोलले, "आह्मी देतोंच देतों."
मग त्यानी वस्त्र पसरिलें, आणि त्यांतल्या एक-
एकाने आपापल्या लुटीचीं कुंडलें त्यावर टाकिलीं.
२६ आणि जीं सोन्याचीं कुंडलें त्याने मागितलीं
त्यांचें सोनें एक हजार सातशें शेकेल वजन
होतें; चंद्रकोरा व बिंदुरूप अलंकार व मिद्यानी
राजांचीं जांबळीं वस्त्रें याखेरीज, आणि त्यांच्या
उंटांच्या गळ्यांतले हार याखेरीज तें होतें.
२७ तेव्हां गिदोनाने तेणेकरून याजकाचें एफोद
केलें, आणि आपलें नगर अफ्रा यांत तें ठेविलें,
मग सर्व इस्राएलानी तेथें त्यामागें लागून व्यभि-
चार केला; असें तें गिदोनाला व त्याच्या घरा-
ण्याला फांसरूप झालें. २८ मिद्यानाचा तर
इस्राएलाच्या संतानांपुढें मोड झाला, आणि त्यानी
आपलें डोकें अणखी वर केलें नाहीं; असें गि-
दोनाच्या दिवसांत देश चाळीस वर्षें स्वस्थ रा-
हिला.
२९ योवाशाचा पुत्र यरुब्बाल तर आपल्या
घरीं जाऊन राहिला. ३० आणि गिदोनाचें
औरस संतान असे त्याला सत्तर पुत्र झाले; कां
तर त्याला स्त्रिया बहुत होत्या. ३१ आणि
शखेमांत जी त्याची उपपत्नी ती त्यापासून पुत्र
प्रसवली, आणि त्याने त्याचें नांव अबीमेलेख
ठेविलें. ३२ मग योवाशाचा पुत्र गिदोन चां-
गल्या म्हातारपणीं मेला, आणि अबीएज्र्याच्या
अफ्र्यांत आपला बाप योवाश याच्या कबरेंत
पुरला गेला.
३३ तेव्हां असें झालें कीं गिदोन मेल्यावर
इस्राएलाच्या संतानानी फिरून स्वामी देवांच्यामागें
लागून व्यभिचार केला, आणि बरीथस्वामी आ-
पला देव असा करून ठेविला. ३४ असें
इस्राएलाच्या संतानानी आपला देव परमेश्वर,
ज्याने त्यांस त्यांच्या चहुंकडल्या सर्व शत्रूंच्या
हातांतून सोडविलें, त्याची आठवण केली नाहीं.
३५ आणि यरुब्बाल जो गिदोन, त्याने इस्रा-
एलावर जे अवघे उपकार केले होते, त्यांप्रमाणें
त्याच्या घराण्यावर त्यानी दया केली नाहीं.

## अध्याय ९.

तेव्हां यरुब्बालाचा पुत्र अबीमेलेख, याने श-
खेमास आपल्या आईच्या भावांजवळ जाऊन
त्यांस आणि आपल्या आईच्या बापाच्या घरा-
ण्यांतल्या सर्व परिवाराला असें सांगितलें कीं,
२ "तुह्मी कृपेंकरून शखेमांतल्या सर्व माणसां-
च्या कानीं बोला, यरुब्बालाचे सर्व पुत्र सत्तर
माणसें यानी तुह्मावर अधिकार करावा, किंवा
एका माणसाने तुह्मावर अधिकार करावा यांतून
तुह्मास कोणतें बरें?' आणि तुह्मी ही आठवण
करा कीं मी तुमच्या हाडाचा व तुमच्या मा-
साचा आहें." ३ तेव्हां त्याच्या आईच्या भा-
वानी त्याविषयीं त्या अवघ्या गोष्टी शखेमांतल्या
सर्व माणसांच्या कानीं सांगितल्या, आणि त्यांचें
मन अबीमेलेखाकडे वळलें, कां तर त्यानी म्ह-
टलें, 'तो आमचा भाऊ आहे. ४ आणि त्यानी
त्याला बरीथ स्वामीच्या देवळांतून सत्तर शेकेल
रुपें दिल्हें, आणि अबीमेलेखाने त्यावरून रिका-
मीं व लुच्चीं माणसें मजुरीने ठेविलीं; यास्तव तीं
त्याच्यामागें चाललीं. ५ मग त्याने अफ्र्यास
आपल्या बापाच्या घरीं येऊन आपले भाऊ यरु-
ब्बालाचे पुत्र असीं सत्तर माणसें एका शिळेवर
मारिलीं; तरी यरुब्बालाचा धाकटा पुत्र योथाम
राहिला, कां तर तो लपलेला होता.
६ मग शखेमांतलीं सर्व माणसें व मिल्लो
वस्तींतले सर्व यानी मिळून जाऊन शखेमांत जो
एलोन खांब त्याजवळ अबीमेलेख राजा असा

करून घेतला. ७ नंतर लोकानी योथामाला
कळविलें, तेव्हां तो गरिज्जीम डोंगराच्या शिख-
रावर जाऊन उभा राहिला, आणि आपला स्वर
उंच करून त्यांस हाक मारीत बोलला, "अहो
शखेमांतलीं माणसें, देवाने तुमचें ऐकावें ह्मणून
तुह्मी माझें ऐका. ८ झाडें आपल्यावर अभिषेकाने
राजा करायास निघून गेलीं; तेव्हां त्यानी जैतु-
नाला सांगितलें, 'तूं आमचा राजा हो.' ९ तेव्हां
जैतुनाने त्यांस ह्मटलें, 'माझें तेलकटपण जेणे-
करून माझ्याने देवाचा व माणसाचा सन्मान
करितात, तें म्या सोडून झाडांवर अधिकार करा-
यास जावें कीं काय?' १० नंतर त्या झाडानी
अंजिराला ह्मटलें, 'तूं चल, आमचा राजा हो.'
११ तेव्हां अंजिराने त्यांस ह्मटलें, 'म्या आपली
गोडी व आपलें चांगलें उत्पन्न सोडून झाडांवर
अधिकार कारायास जावें कीं काय?' १२ नंतर
त्या झाडानी द्राक्षवेलाला ह्मटलें, 'तूं चल, आ-
मचा राजा हो.' १३ तेव्हां द्राक्षवेलाने त्यांस
ह्मटलें, 'म्या आपला ताजा रस जो देवाला व
मनुष्यांस संतुष्ट करितो, तो सोडून झाडांवर
अधिकार करायास जावें कीं काय?' १४ नंतर
त्या सर्व झाडानी कांटेझुडपाला ह्मटलें, 'तूं चल,
आमचा राजा हो.' १५ तेव्हां कांटेझुडपाने त्या
झाडांस ह्मटलें, 'जर तुह्मी खरेपणाने मला अ-
भिषेक करून राजा करितां, तर येऊन माझ्या
छायेंत स्वस्थ राहा; नाहीं तर कांटेझुडपांतून
विस्तू निघून लबानोनावरल्या गंधसुरूंस जाळून
टाकील.' १६ यास्तव आतां जर तुह्मी खरे-
पणाने व शुद्धपणाने वर्त्तणूक करून अबीमेलेख
राजा केला आहे, आणि यरुब्बालासीं व त्याच्या
घराण्यासीं बरें तुह्मी बरें केलें आहे, आणि जर
त्याच्या हातांच्या उपकाराप्रमाणें त्यासीं केलें आहे.
(१७ कां कीं माझ्या बापाने तुमच्यासाठीं लढाई
केली; आपला जीव देखील पुढें ठेविला, आणि
तुह्मास मिद्यानाच्या हातांतून सोडविलें. १८
परंतु तुह्मी आज माझ्या बापाच्या घरावर उठ-
लां, आणि त्याचे पुत्र सत्तर माणसें, यांस तुह्मी
एका शिळेवर जिवें मारिलें, आणि त्याच्या दा-
सीचा पुत्र अबीमेलेख याला शखेमांतल्या माण-
सांवर राजा करून ठेविलें, कां तर तो तुमचा
भाऊ आहे.) १९ तर तुह्मी आजच्या दिव-
सीं यरुब्बालाविषयीं व त्याच्या घराण्याविषयीं
खरेपणाने व शुद्धपणाने जर वर्त्तणूक केली आहे,
तर अबीमेलेखावर संतोष करा; त्यानेहि तुह्मा-
वर संतोष करावा. २० परंतु जर तसें नाहीं,
तर अबीमेलेखांतून विस्तु निघून शखेमांतल्या
माणसांस व मिल्लो वस्तीला जाळून टाको, आणि
शखेमांतल्या माणसांतून व मिल्लो वस्तींतून विस्तू
विघून अबीमेलेखाला जाळून टाको." २१ नंतर
योथाम आपला भाऊ अबीमेलेख यासमोरून
धांवत पळाला, आणि बेरास जाऊन तेथें राहिला.

२२ तेव्हां अबीमेलेखाने इस्राएलावर तीन
वर्षें अधिकार केला. २३ नंतर देवाने अबी-
मेलेख व शखेमांतलीं माणसें यांमध्यें दुष्ट स्व-
भाव लाविला, यास्तव शखेमांतल्या माणसानी
अबीमेलेखासीं दगा केला; २४ तेणेकरून य-
रुब्बालाच्या सत्तर पुत्रांवर केलेला बळात्कार व
त्यांचा रक्तपात त्यांचा भाऊ अबीमेलेख यावर
जाऊन बसावा; कां कीं त्याने त्यांस जिवें मारिलें,
आणि शखेमांतल्या माणसांवरहि बसावा; कां कीं
त्याचे भाऊ मारायासाठीं त्यानी त्याला सहाय
केलें. २५ नंतर शखेमांतल्या माणसानी त्याच्या-
साठीं डोंगरांच्या शिखरावर दबाधारी ठेविले,
आणि त्यानी आपल्याजवळून जो कोणी वाटेवर
चालला, त्याला लुटिलें; आणि हें कोणी अबी-
मेलेखाला सांगितलें.

२६ मग एबेदाचा पुत्र गाल आपल्या भा-
वांसुद्धां आला, आणि ते शखेमांत आल्यानंतर
शखेमांतल्या माणसानी त्यावर विश्वास ठेविला.
२७ तेव्हां त्यानी शेतांत जाऊन आपल्या द्राक्ष-
मळ्यांची खुडणी करून द्राक्षांचें तुडविणें केलें,
आणि ते उत्साह करीत आपल्या देवाच्या घरीं
गेले, आणि खाऊन पिऊन अबीमेलेखाला शाप
दिल्हा. २८ तेव्हां एबेदाचा पुत्र गाल बोलला,
"अबीमेलेख कोण? आणि शखेम कोण कीं आ-
ह्मी त्याची चाकरी करावी? तो यरुब्बालाचा
पुत्र कीं नाहीं? आणि त्याचा कारभारी जबुल
कीं नाहीं? शखेमाचा बाप हमोर, याच्या माण-
सांची सेवा तुह्मी करा; आह्मी अबीमेलेखाची
सेवा तर कशासाठीं करूं? २९ आणि हे

लोक माझ्या हातीं असते तर किती बरें होतें!
ह्मणजे म्या अबीमेलेखाला काढून टाकिलें अ-
सतें." तर त्यानें अबीमेलेखाला सांगितलें, "तूं
आपलें सैन्य वाढवून बाहेर ये."

३० त्या वेळेस त्या नगराचा अधिकारी जबुल
यानें एबेदाचा पुत्र गाल याच्या गोष्टी ऐकिल्या,
यास्तव त्याचा राग पेटला. ३१ मग त्यानें
कपट करून अबीमेलेखाजवळ दूत पाठवून असें
सांगितलें कीं, "पाहा, एबेदाचा पुत्र गाल आप-
ल्या भावांसुद्धां शखेमास आला आहे; आणि
पाहा, ते तुझ्यापुढें नगराची बंदोबस्ती करितात.
३२ तर आतां तूं आपल्या जवळच्या लोकांसुद्धां
रात्रीं उठून शेतांत दबा धर. ३३ मग असें
व्हावें कीं सकाळीं सूर्य उगवतांच तूं उठून नगरा-
वर घाला घाल; मग पाहा, तो आपल्या जवळच्या
लोकांसुद्धां तुझ्याजवळ बाहेर येईल, तेव्हां जसें
तुझ्या हातीं येईल तसें तूं त्याचें कर." ३४ या-
स्तव अबीमेलेखानें आपल्याजवळच्या सर्व लोकां-
सुद्धां रात्रीं उठून चार टोळ्या करून शखेमावर
दबा धरिला. ३५ मग एबेदाचा पुत्र गाल,
बाहेर येऊन नगराच्या वेसीजवळ उभा राहिला,
आणि अबीमेलेख आपल्याजवळच्या लोकांसुद्धां
दबा सोडून उठला. ३६ तेव्हां गालानें त्या
लोकांस पाहून जबुलाला ह्मटलें, "पाहा, लोक
डोंगरांच्या शिखरांवरून उतरतात." मग जबुल
त्यास बोलला, तुला डोंगरांची छाया मनुष्यांसा-
रिखी दिसती." ३७ तेव्हां गालानें फिरून
असें ह्मटलें कीं, "पाहा, देशाच्या उंचोट्यावरून
लोक उतरतात; आणि एक टोळी मौननिमा-
च्या वाटेवरून येत आहे." ३८ मग जबुल
त्याला बोलला, "तूं आपल्या ज्या तोंडानें बोल-
लास, 'अबीमेलेख कोण कीं आह्मी त्याची चा-
करी करावी' तें आतां कोठें आहे? ज्या लोकांस
त्वां तुच्छ केलें, ते हेच कीं नाहींत? आतां मी
मागतों, तूं बाहेर जाऊन त्यांसीं लढाई कर."
३९ मग गालानें शखेमांतल्या माणसांपुढें हो-
ऊन, बाहेर जाऊन अबीमेलेखासीं लढाई केली.
४० तेव्हां अबीमेलेख त्याच्या पाठीस लागला
असतां तो त्याच्यापुढून पळाला, आणि वेसीच्या
दारापर्यंत बहुत लोक मारलेले होऊन पडले.

४१ मग अबीमेलेख आरूम्यांत राहिला,
आणि गालानें व त्याच्या भावांनीं शखेमांत न
राहावें ह्मणून जबुलानें त्यांस घालविलें. ४२
नंतर पुढल्या दिवसीं असें झालें कीं लोक बाहे-
रल्या शेतांत जाते झाले, आणि हें अबीमेलेखाला
कोणी सांगितलें? ४३ तेव्हां त्यानें लोक मि-
ळवून त्यांच्या तीन टोळ्या केल्या; मग शेतांत
दबा धरिला, आणि त्यानें न्याहाळिलें; तर पाहा
लोक नगरांतून बाहेर आले होते, तेव्हां त्यानें
त्यांवर उठून त्यांस मारिलें. ४४ त्या वेळेस
अबीमेलेख आणि त्याच्यासंगतीं जी टोळी, ती
घाला घालून नगराच्या वेसीजवळ उभी राहिली,
आणि दुसऱ्या दोन टोळ्यांनीं शेतांत जे सर्व,
त्यांवर घाला घालून त्यांस मारिलें. ४५ अबी-
मेलेखानें तर त्या सगळ्या दिवसांत नगरासीं
लढाई केली, आणि त्यानें नगर घेतलें व त्यांत,
जे लोक त्यांस जिवें मारिलें, आणि नगर फोडून
त्यावर मीठ पेरून टाकिलें. ४६ तेव्हां शखे-
माच्या बुरजांतल्या सर्व माणसांनीं ऐकिलें, आणि
ते बरीथ देवाच्या घरावरल्या पाहऱ्याच्या माडी-
वर गेले. ४७ मग शखेमाच्या बुरजांतलीं
सर्व माणसें एकवट झालीं आहेत, असें अबीमे-
लेखाला कोणी सांगितलें. ४८ तेव्हां अबीमे-
लेख आपल्याजवळच्या सर्व लोकांसुद्धां जाल्-
मोन डोंगरावर गेला, आणि अबीमेलेखानें आ-
पल्या हातीं कुऱ्हाडी घेऊन झाडाची फांदी तोडि-
ली, मग तिला आपल्या खांद्यावर उचलून घेऊन
त्यानें आपल्या जवळच्या लोकांस सांगितलें, "जें
म्या केलें तें तुह्मी पाहिलें, तें माझ्यासारिखें लव-
कर करा." ४९ तेव्हां सर्व लोकांतल्या एकए-
कानेंहि फांदी तोडून घेतली, आणि ते अबीमेले-
खाच्यामागें चालले; मग त्यांनीं पाहऱ्याच्या मा-
डीवर त्या घालून, ते लोक आंत असतां पाहऱ्या-
च्या माडीला आग लाविली; असीं शखेमाच्या
बुरजांतलींहि सर्व माणसें, पुरुष व स्त्रिया सुमारें
एक हजार, इतकीं मेलीं.

५० नंतर अबीमेलेख थेबेजास गेला, आणि
त्यानें थेबेजावर तळ देऊन त्याला धरिलें. ५१
परंतु त्या नगरांत एक मजबूत बुरूज होता, आ-
णि सर्व पुरुष स्त्रियांसुद्धां ह्मणजे त्या नगरांतलीं

सर्व माणसें त्यांत पळून गेलीं आणि आपल्या
मागें बंदोबस्ती करून बुरजाच्या धाब्यावर चढले.
५२ नंतर अबीमेलेख त्या बुरजाजवळ येऊन
त्यावर लढला, आणि बुरजाला आग लावून जा-
ळायास त्याच्या दाराजवळ गेला. ५३ तेव्हां
एका स्त्रीने अबीमेलेखाची टाळू फोडायास त्या-
च्या डोक्यावर जात्याची वरली तळी टाकिली.
५४ तेव्हां त्याने घाई करून आपला हत्यारें वा-
हणारा जो तरुण त्याला हाक मारून सांगितलें,
"तूं आपली तरवार काढून मला जिवें मार, नाहीं
तर मजविषयीं ह्मणतील कीं बायकोने त्याला
मारिलें." यास्तव त्याच्या तरण्याने त्याला भो-
सकिल्यावर तो मेला. ५५ मग अबीमेलेख मे-
ला हें पाहून इस्राएली माणसें आपापल्या ठि-
काणीं गेलीं. ५६ असी दुष्टाई जी अबीमेले-
खाने आपल्या सत्तर भावांस जिवें मारण्याने
आपल्या बापाविषयीं केली होती, ती देवाने
त्याला उलटून लाविली. ५७ आणि शखेमां-
तल्या माणसांचीहि सर्व दुष्टाई देवाने त्यांच्या
मस्तकावर उलटून लाविली; याप्रमाणें यरुब्बा-
लाचा पुत्र योथाम याचा शाप त्यांस भोवला.

## अध्याय १०.

आणि अबीमेलेखाच्यामागें इस्राएलाच्या सं-
रक्षणासाठीं दोदोचा पुत्र पूवा याचा पुत्र
तोला, जो इस्साखारांतला माणूस तो उत्पन्न
झाला, आणि तो एफ्राइम डोंगरावरल्या शामी-
रांत राहिला. २ त्याने तेवीस वर्षें इस्राएला-
चा न्याय केला, मग तो मेला आणि शामीरांत
पुरला गेला. ३ नंतर त्याच्यामागें गिलादी
याईर उत्पन्न झाला, आणि त्याने बावीस वर्षें
इस्राएलाचा न्याय केला. ४ तेव्हां त्याला तीस
पुत्र झाले; तीस गाढवांवर ते बसत होते; त्यांस
तीस नगरेंहि होतीं; आजपर्यंत त्यांस हावोथ-
याईर ह्मणतात; तीं गिलादाच्या प्रांतांत आहेत.
५ मग याईर मेला, आणि कामोनांत पुरला
गेला.

६ यानंतर इस्राएलाच्या संतानानी फिरून
परमेश्वराच्या दिसण्यांत वाईट केलें; कारण
कीं त्यानी बालीम व आष्टारोथ व अरामांतले
देव व सीदोनांतले देव व मोवाबांतले देव व
आम्मोनी लोकांचे देव व पलिष्ट्यांचे देव, यां-
ची सेवा केली; त्यानी परमेश्वराला टाकिलें,
त्याची सेवा केलीच नाहीं. ७ यास्तव परमे-
श्वराचा राग इस्राएलावर पेटला, आणि त्याने
त्यांस पलिष्ट्यांच्या हातीं व आम्मोनी लोकांच्या
हातीं दिल्हें. ८ तेव्हां त्या वर्षासुद्धां अठरा
वर्षें त्यानी इस्राएलाच्या संतानांस दुःख देऊन
जाचिलें; ह्मणजे जीं इस्राएलाचीं संतानें यार्दे-
नेच्या पलिकडे अमोऱ्यांच्या देशाजवळ गिला-
दांत होतीं त्या सर्वांस. ९ यहूदा व बन्यामीन
व एफ्राइमाचीं घराणें यांसींहि लढायास आम्मो-
नी लोक यार्देनेच्या अलिकडे आले; असी इस्रा-
एलाला फार पीडा झाली.

१० तेव्हां इस्राएलाच्या संतानानी परमेश्व-
राला हाक मारीत ह्मटलें कीं, "आह्मी तुझ्या-
जवळ पाप केलें आहे; तें असें कीं आह्मी
आपल्या देवाला टाकून बालीमाची सेवा केली.
११ तेव्हां परमेश्वराने इस्राएलाच्या संतानांस
ह्मटलें, "मिसऱ्यांपासून व अमोऱ्यांपासून व
आम्मोनी लोकांपासून व पलिष्ट्यांपासून म्या तु-
ह्मास तारिलें कीं नाहीं? १२ आणि सीदोनी
व अमालेक व मावोन यानी तुह्मास दुःख दिल्हें,
तेव्हां तुह्मी मला हाक मारिली, आणि म्या तु-
ह्मास त्यांच्या हातांतून तारिलें. १३ तथापि
तुह्मी मला टाकून दुसऱ्या देवांची सेवा केली;
यास्तव मी तुह्मास फिरून तारणार नाहीं. १४
तुह्मी जा, आणि ज्या देवांस तुह्मी निवडून
घेतलें, त्यांस हाक मारा; तुमच्या दुःखाच्या
वेळेस त्यानी तुह्मास तारावें."

१५ तेव्हां इस्राएलाच्या संतानानी परमेश्व-
राला ह्मटलें, "आह्मी पाप केलें आहे; जें सर्व
तुला बरें वाटेल, त्याप्रमाणें तूं आह्मास कर;
केवळ आजच्या दिवसीं अगत्य आह्मास सोडीव."
१६ तेव्हां त्यानी आपल्यामधून अन्य देवांस दूर
करून परमेश्वराची सेवा केली, नंतर तो इस्रा-
एलाच्या दुःखामुळें खिन्न झाला. १७ आम्मोनी
लोक तर एकत्र मिळाले असतां त्यानी गिलादांत
तळ धरिला, आणि इस्राएलाच्या संतानानी मि-
ळून मिजप्यांत तळ धरिला. १८ तेव्हां गिला-

दांतल्या सरदार लोकांनी एकमेकाला ह्मटलें,
"जो माणूस आम्मोनी लोकांसीं लढाई करायास
लागेल, तो कोणीहि असो, तो गिलादांतल्या
सर्व राहणाऱ्यांचा अधिकारी असा व्हावा."

## अध्याय ११.

त्या वेळेस गिलादी इफ्ताह पराक्रमी वीर
होता, परंतु तो इफ्ताह वेश्या स्त्रीचा
पुत्र, आणि गिलादाच्यापासून जन्मला होता.
२ गिलादाची स्त्रीहि त्यापासून पुत्र प्रसवली,
आणि जेव्हां स्त्रीचे पुत्र वाढले, तेव्हां त्यांनी
इफ्ताहाला घालवितां ह्मटलें,"आमच्या बापाच्या
घरीं तुला वतन प्राप्त होणार नाहीं; कारण कीं
तूं दुसऱ्या स्त्रीचा पुत्र आहेस." ३ यास्तव
इफ्ताह आपल्या भावांपुढून पळाला, आणि टोब
देशांत जाऊन राहिला; तेव्हां रिकामीं माणसें
इफ्ताहाजवळ मिळून त्याच्यासंगतीं चाललीं.
४ मग कांहीं वेळांनंतर असें झालें कीं आ-
म्मोनी लोकांनी इस्राएलासीं लढाई केली. ५
आणि आम्मोनी लोक इस्राएलासीं लढत अस-
तांना असें झालें कीं गिलादाचे वडील इफ्ताहाला
टोब देशांतून आणायाला गेले. ६ तेव्हां त्यांनी
इफ्ताहाला ह्मटलें, "तूं येऊन आमचा सेनापति
असा हो, कां कीं आह्मी आम्मोनी लोकांसीं
लढत आहों." ७ तेव्हां इफ्ताह गिलादाच्या
वडिलांस बोलला, "तुह्मी माझा द्वेष करून मा-
झ्या बापाच्या घरांतून मला घालविलें कीं नाहीं?
तर आतां तुह्मी संकटांत असतां, माझ्याजवळ
कशाला आलां?" ८ तेव्हां गिलादाच्या वडि-
लांनी इफ्ताहाला ह्मटलें,"आह्मी आतां तुझ्याकडे
यासाठीं फिरलों आहों कीं त्वां आमच्यासंगतीं ये-
ऊन आम्मोनी लोकांसीं लढाई करावी, मग तूं गि-
लादांतल्या सर्व राहणाऱ्यांवर आमचा अधिकारी
असा होसील." ९ तेव्हां इफ्ताह गिलादाच्या
वडिलांस बोलला, "जर तुह्मी मला आम्मोनी
लोकांसीं लढायास माघारें नेलें, आणि परमेश्व-
राने ते माझ्या स्वाधीन केले, तर मी तुमचा
अधिकारी असा होईन कीं काय?" १० तेव्हां
गिलादाचे वडील इफ्ताहास बोलले, जर तुझ्या
सांगण्याप्रमाणें आह्मी करीत नाहीं, तर आ-
पल्यामध्यें परमेश्वर साक्षी होवो." ११ मग
इफ्ताह गिलादाच्या वडिलांसंगतीं गेला, आणि
त्या लोकांनी आपल्यावर तो अधिकारी व सेना-
पति असा करून ठेविला; तेव्हां इफ्ताह आपलीं
सर्व वचनें मिज्प्यांत परमेश्वरापुढें बोलला.
१२ मग इफ्ताहाने आम्मोनी लोकांच्या रा-
जाजवळ वकील पाठवून ह्मटलें, "माझें तुझें काय
आहे कीं तूं मजसीं लढायास माझ्या देशांत ये-
तोस?" १३ तेव्हां आम्मोनी लोकांचा राजा
इफ्ताहाच्या वकिलांस बोलला,"कारण कीं जेव्हां
इस्राएल मिसरांतून वर आले, तेव्हां त्यांनी आ-
र्णोनेपासून याब्बोकेपर्यंत व यार्देनेपर्यंत माझा देश
घेतला; तर आतां ते प्रांत सुखाने परत दे."
१४ तेव्हां इफ्ताहाने फिरून दुसरे वकील आ-
म्मोनी लोकांच्या राजाजवळ पाठविले. १५ आणि
त्याला ह्मटलें, "इफ्ताह असें सांगतो कीं 'इस्रा-
एलाने मोवाब देश व आम्मोनी लोकांचा देश
घेतला नाहीं. १६ कां तर जेव्हां इस्राएल मि-
सरांतून वर आले,तेव्हां ते सूफ समुद्राजवळच्या
रानांत चालून कादेशास आले. १७ मग इस्रा-
एलानी अदोमी राजाजवळ वकील पाठवून ह्मटलें,
तूं कृपेकरून आपल्या देशावरून मला जाऊं दे;
परंतु अदोमी राजाने ऐकिलें नाहीं, आणि मो-
वाबी राजाजवळहि पाठविलें, परंतु तोहि मान्य
झाला नाहीं; यास्तव इस्राएल कादेशांत राहिले.
१८ आणि त्यांनी रानांत चालून अदोम देश व
मोवाब देश यांस फेरी घातली; असें सूर्याच्या
उगवतीकडून मोवाब देशास येऊन आर्णोनेच्या
कांठीं तळ धरिला; परंतु ते मोवाब सीमेंत गेले
नाहींत; कां तर आर्णोन मोवाबाची सीमा आहे.
१९ तेव्हां इस्राएलानी अमोऱ्यांचा राजा सी-
होन याजवळ, ह्मणजे हेशबोनांतल्या राजाजवळ
वकील पाठविले, आणि इस्राएलानी त्याला ह्मटलें,
'तूं कृपेने आपल्या देशावरून आह्मास आमच्या
ठिकाणापर्यंत जाऊं दे.' २० तेव्हां सीहोन आ-
पल्या सीमेवरून जाऊं देण्याविषयीं इस्राएलाला
मान्य झाला नाहीं, परंतु सीहोनाने आपले सर्व
लोक मिळवून आणि याहाजांत तळ धरून
इस्राएलासीं लढाई केली. २१ तेव्हां इस्राएला-
चा देव परमेश्वर याने सीहोन व त्याचे सर्व

लोक इस्राएलाच्या हातीं दिल्हे; यास्तव इस्रा-
एलानी त्यांस मारिलें, आणि त्या देशांत राहि-
लेले जे अमोरी त्यांचा सर्व देश वतन करून
घेतला. २२ असें त्यानी आर्णोनेपासून याब्बो-
केपर्यंत आणि रानापासून यार्देनेपर्यंत अमोऱ्यांचे
सर्व प्रांत वतन करून घेतले. २३ तर आतां
इस्राएलाचा **देव परमेश्वर** याने आपले लोक
इस्राएल यांपुढे अमोऱ्यांस घालविलें; तर तो प्रांत
तूं घेतोस काय? २४ तुझा देव कमोश तुला
जें वतन देतो, तें तूं ठेवसील कीं नाहीं? तसें
आमचा देव **परमेश्वर** जें वतन आमच्यापुढें
ठेवून देतो, तें आह्मी ठेवूं. २५ तर आतां जि-
प्पोराचा पुत्र मोवाब राजा यापेक्षां तूं बरा आ-
हेस कीं काय? इस्राएलासीं तो कधीं भांडिला
कीं काय? त्याने त्यांसीं कधीं लढाई केली कीं
काय? २६ जेव्हां इस्राएल हेश्बोनांत व त्या-
च्या गांवांत, आणि अरवेरांत व त्याच्या गावांत,
आणि आर्णोनेच्या कांठावरल्या सर्व नगरांत तीनशें
वर्षें राहिला, त्या वेळेस तर तुह्मी कां काढून
घेतलीं नाहींत. २७ म्या तर तुझा अपराध केला
नाहीं, परंतु तूं मजसीं लढण्याने माझें वाईट
करितोस; **परमेश्वर** जो न्यायाधीश तो आज
इस्राएली लोक व आम्मोनी लोक यांमध्यें न्याय
करो." २८ तथापि आम्मोनी लोकांच्या राजाने
आपल्याजवळ इफ्ताहाने जीं वचनें पाठविलीं तीं
ऐकिलीं नाहींत. २९ तेव्हां **परमेश्वराचा**
आत्मा इफ्ताहाला प्राप्त झाला, नंतर गिलाद व
मनाश्शे यांत तो चहुंकडे गेला, आणि गिलादां-
तलें मिज्पे त्यांत चहुंकडे गेला; मग गिलादांतलें
मिज्पे सोडून आम्मोनी लोकांकडे गेला. ३० आणि
इफ्ताहाने **परमेश्वरा**जवळ नवस करितां ह्मटलें,
"जर तूं माझ्या हातीं आम्मोनी लोक देसीलच
देसील, ३१ तर असें होईल कीं मी आम्मोनी
लोकांपासून सुखरूप माघारा आलों तेव्हां मला
भेटायाला जें कांहीं माझ्या घराच्या दाराबाहेर
येईल, तें तर **परमेश्वराचें** होईल, अथवा मी
त्याचें होमरूपें अर्पण करीन."

३२ तर इफ्ताह आम्मोनी लोकांसीं लढा-
याला त्यांकडे गेला, आणि **परमेश्वराने** ते त्या-
च्या हातीं दिल्हे. ३३ आणि अरवेरापासून
मिन्नीथाजवळ येण्यापर्यंत त्यांस मारून वीस
नगरें घेतलीं, आणि द्राक्षमळ्यांच्या आबेलापर्यंत
फार मोठा मार दिल्हा; असे आम्मोनी लोक
इस्राएलाच्या संतानाच्या स्वाधीन झाले. ३४ मग
इफ्ताह मिज्प्यांत आपल्या घरास आला; तेव्हां
पाहा, त्याची कन्या त्याला भेटायाला डफानी
व ताफ्यानी बाहेर आली; ती तर त्याची एकु-
लती होती; तिजशिवाय त्याला पुत्र किंवा कन्या
नव्हती. ३५ तेव्हां असें झालें कीं त्याने तिला
पाहतांच आपलीं वस्त्रें फाडून ह्मटलें, "अहहा,
माझ्या कन्ये! त्वां मला अगदी पाडिलें आहे;
मला दुःख देणारे यांत तूंहि आहेस; कां म्या
आपलें तोंड **परमेश्वरा**जवळ उघडिलें आहे;
यास्तव मला उलटतां येत नाहीं." ३६ तेव्हां
ती त्याला बोलली, "हे माझ्या बापा, त्वां आपलें
तोंड **परमेश्वरा**जवळ उघडिलें आहे, तर तुझ्या
तोंडांतून जें निघालें, त्याप्रमाणें तूं मजसीं कर;
कारण कीं **परमेश्वराने** तुझे शत्रू आम्मोनी
लोक यांचें तुझ्यासाठीं पक्कें सूड घेतलें आहे."
३७ अणखी तिने आपल्या बापाला ह्मटलें,
"मजसाठीं ही गोष्ट होऊं द्यावी; मला दोन
महिन्यांची रजा दे, ह्मणजे मी आपल्या सोब-
तिणींसुद्धां डोंगरांवर जाऊन आपल्या कुमारपणा-
विषयीं रडेन." ३८ तेव्हां त्याने ह्मटलें, "जा."
असें त्याने तिला दोन महिने सोडिलें, आणि ती
आपल्या सोबतिणींसुद्धां डोंगरांवर जाऊन आप-
ल्या कुमारपणाविषयीं रडली. ३९ मग दोन
महिन्यांच्या शेवटीं असें झालें कीं ती आपल्या
बापाजवळ माघारी आली, नंतर त्याने आपला
केलेला नवस तिजवर फेडिला; असें तिने पुरुष
जाणिला नाहीं, आणि इस्राएलांत असी रीति झा-
ली कीं, ४० प्रत्येक वर्षीं इस्राएलांतल्या कन्यानी
इफ्ताह गिलादी याच्या कन्येचें वर्णन करायाला
वर्षाचे चार दिवस जात जावें.

## अध्याय १२.

तेव्हां एफ्राइमी माणसें एकत्र मिळालीं आणि
उत्तरेस जाऊन इफ्ताहाला ह्मणालीं, "तु-
झ्यासंगतीं यायाला आह्मास बोलावल्यावांचून
तूं आम्मोनी लोकांसीं लढायाला कां पलिकडे

गेलास? आह्मी तुझ्यासुद्धां तुझ्या घराला आग
लावून जाळूं." २ तेव्हां इफ्ताह त्यांस बोलला,
"आम्मोनी लोकांशीं माझें व माझ्या लोकांचें फार
भांडण होत होतें; तेव्हां म्यां तुह्मास बोलाविलें,
परंतु तुह्मी मला त्यांच्या हातांतून सोडविलें नाहीं.
३ तेव्हां तुझ्याकडून तारण होत नाहीं, हें पाहून
मी आपला जीव आपल्या मुठींत घालून आम्मोनी
लोकांजवळ पलिकडे गेलों, आणि **परमेश्वराने**
ते माझ्या हातीं दिल्हे; तर आजच्या दिवसीं
तुह्मी लढायाला मजवर कां चढून आलां?"
४ तेव्हां इफ्ताहाने गिलादी सर्व माणसें मिळ-
वून एफ्राइमाशीं लढाई केली, आणि गिलादी
माणसानी एफ्राइमी मारिले, कां तर ते बोलले
होते, "एफ्राइमामध्यें व मनाश्श्यामध्यें तुह्मी गि-
लादी एफ्राइमींतून पळणारे आहां." ५ तेव्हां
गिलाद्यानी एफ्राइम्यांसमोर यार्देनेचे उतारे रोखून
धरिले, आणि असें झालें कीं जेव्हां कोणी एफ्रा-
इमी पळतांना बोलला, "तुह्मी मला पार जाऊं
द्या," तेव्हां गिलादी माणसें त्यास बोलत असत,
"तूं एफ्राथी आहेस कीं काय?" आणि तो "नाहीं"
जर बोलला, ६ तर तीं त्याला बोलत, "आतां
तूं शिब्बोलेथ असें ह्मण;" मग तो "सिब्बोलेथ"
असें बोले, कां कीं त्याला नीट बोलतां आलें
नाहीं; मग तीं त्याला धरून यार्देनेच्या उताऱ्यां-
जवळ जिवें मारीत असत; तर त्या वेळेस
एफ्राइमांतलीं बेताळीस हजार माणसें पडलीं.
७ इफ्ताहाने तर साहा वर्षें इस्राएलाचा
न्याय केला; मग तो इफ्ताह गिलादी मेला,
आणि गिलादांतल्या एका नगरांत पुरला गेला.
८ मग त्याच्यामागें बेथलेहेमांतल्या इब्जानाने
इस्राएलाचा न्याय केला. ९ तेव्हां त्याला तीस
पुत्र व तीस कन्या होत्या; त्या त्याने बाहेर ला-
वून आपल्या पुत्रांसाठीं बाहेरून तीस कन्या आ-
णिल्या; त्याने तर सात वर्षें इस्राएलाचा न्याय
केला. १० नंतर इब्जान मेला, आणि बेथले-
हेमांत पुरला गेला.
११ आणि त्याच्यामागें जबूलुनी एलोन
इस्राएलाचा न्यायाधीश झाला; त्याने तर दाहा
वर्षें इस्राएलाचा न्याय केला. १२ नंतर तो
जबूलुनी एलोन मेला, आणि जबूलुन देशां-
तल्या आय्यालोनांत पुरला गेला. १३ आणि
त्यानंतर हिल्लेलाचा पुत्र आब्दोन जो पिराथोनी,
तो इस्राएलाचा न्यायाधीश झाला. १४ आणि
त्याला चाळीस पुत्र व तीस नातू होते; ते सत्तर
गाढवांवर बसत असत; त्याने तर आठ वर्षें
इस्राएलाचा न्याय केला. १५ मग तो पिरा-
थोनी हिल्लेलाचा पुत्र आब्दोन मेला, आणि अ-
मालेक्यांच्या डोंगरांवर एफ्राइम प्रांतांतल्या पि-
राथोनांत पुरला गेला.

## अध्याय १३.

तेव्हां इस्राएलाच्या संतानानी **परमेश्वराच्या**
दृष्टींत फिरून वाईट केलें, यास्तव **परमेश्व-
राने** ती पलिष्ट्यांच्या हातीं चाळीस वर्षें दिल्हीं.
२ तेव्हां जरायांतला दानांच्या कुळाचा कोणी
माणूस होता; त्याचें नांव तर मानोहा, आणि
त्याची स्त्री वांझ होती, यास्तव तिला लेंकरूं
झालें नव्हतें. ३ तेव्हां **परमेश्वराच्या** दूताने
त्या स्त्रीला दर्शन दिल्हें, आणि तिला ह्मटलें,
"पाहा, आतां तूं वांझ, ह्मणून तुला लेंकरूं झालें
नाहीं, परंतु तूं गरोदर होऊन पुत्र प्रसवसील.
४ तर आतां तूं अगत्य असें संभाळ कीं द्राक्षा-
रस व दारू पिऊं नको, आणि कांहीं अशुद्ध
खाऊं नको. ५ कां तर पाहा, तूं गरोदर हो-
सील, आणि तूं पुत्र प्रसवसील आणि त्याच्या
डोक्यावर वस्तरा न फिरावा, कारण कीं तो मूल
पोटीं झाल्यापासून देवाचा नेजेरी पुरुष होईल,
आणि तो इस्राएलाला पलिष्ट्यांच्या हातांतून सो-
डवायास लागेल." ६ तेव्हां त्या स्त्रीने जाऊन
आपल्या नवऱ्याला असें सांगितलें कीं, "देवाचा
माणूस माझ्याजवळ आला, आणि त्याचें स्वरूप
देवाच्या दूताच्या स्वरूपासारिखें फार भयंकर
होतें; यास्तव तो कोठला, हें म्यां त्याजवळ
विचारिलें नाहीं, आणि त्याने आपलें नांव मला
सांगितलें नाहीं. ७ परंतु तो मला बोलला,
'पाहा, तूं गरोदर होसील, आणि तूं पुत्र प्रसव-
सील; तर आतां तूं द्राक्षारस व दारू पिऊं नको,
आणि कांहीं अशुद्ध खाऊं नको; कां तर तो मूल
पोटीं झाल्यापासून त्याच्या मरणापर्यंत देवाचा
नेजेरी पुरुष होईल."

८ तेव्हां मानोहाने परमेश्वराजवळ विनंती
करीत ह्मटलें, "हे माझ्या प्रभू, माझें ऐक, जो
देवाचा माणूस त्वां पाठविला होता, त्याने अ-
गत्य आमच्याजवळ फिरून यावें, आणि जो मूल
जन्मेल, त्यासाठीं आह्मी कसें करावें, हें आह्मास
शिकवावें." ९ तेव्हां देवाने मानोहाचा शब्द
ऐकिला, यास्तव देवाचा दूत त्या स्त्रियेजवळ
फिरून आला; परंतु ती शेतांत बसली असतां
तिचा नवरा मानोहा तिच्यासंगतीं नव्हता. १०
तेव्हां ती स्त्री आपल्या नवऱ्याला कळवायास
उतावळी करून धावली, आणि तिने त्याला सां-
गितलें, "पाहा, जो पुरुष त्या दिवसीं माझ्याजवळ
आला होता, तो माझ्या दृष्टीस पडला आहे."
११ मग मानोहा उठून आपल्या स्त्रियेच्यामागें चा-
लून त्या पुरुषाजवळ गेला, आणि त्याला बोलला,
"जो पुरुष या स्त्रीला बोलला होता, तो तूंच
होस काय?" तेव्हां तो बोलला, "मीच." १२ मग
मानोहा बोलला, "आतां तुझें बोलणें प्रत्ययास
येवो; त्या मुलाची रीति व त्याविषयीं कर्म कसें
व्हावें?" १३ तेव्हां परमेश्वराच्या दूताने मा-
नोहाला ह्मटलें, "जें म्या या स्त्रीला सांगितलें,
त्या अवघ्याविषयीं हिने संभाळावें. १४ द्रा-
क्षारसाच्या वेलापासून जें उत्पन्न होतें, त्यांतलें
कांहीं हिने खाऊं नये, आणि द्राक्षारस व दारू
पिऊं नये, आणि कांहीं अशुद्ध खाऊं नये; जें सर्व
म्या आज्ञेकरून तिला सांगितलें तें तिने पाळावें."
१५ तेव्हां मानोहा परमेश्वराच्या दूताला
बोलला, "आह्मी तुला खोळंबा करून शेरडांतलें
करडूं सिद्ध करून तुझ्यापुढें ठेवावें, असें मागतों."
१६ परंतु परमेश्वराचा दूत मानोहाला बो-
लला, "जरी त्वां मला खोळंबा केला, तरी मी तुझें
अन्न खाणार नाहीं; आणि जर तूं होम करसील,
तर तो तुला परमेश्वराजवळ करावा लागेल."
तेव्हां तो परमेश्वराचा दूत, हें मानोहाला
कळलें नव्हतें. १७ मग मानोहाने परमेश्व-
राच्या दूताला ह्मटलें, "तुझें नांव काय? कां
कीं तुझें बोलणें प्रत्ययास आल्यावर आह्मी तुला
मान देऊं." १८ तेव्हां परमेश्वराचा दूत
त्याला बोलला, "तूं माझें नांव कशासाठीं विचा-
रितोस? तें तर अपूर्व आहे." १९ मग मानो-
हाने शेरडांतले करडूं नैवेद्यासुद्धां घेऊन खडका-
वर परमेश्वराजवळ होम केला; तेव्हां मानो-
हा व त्याची स्त्री पाहत असतां, त्याने अपूर्व
केलें. २० ह्मणजे असें झालें कीं जेव्हां ज्वाळ
वेदीवरून आकाशांत चढला, तेव्हां परमेश्वरा-
चा दूत त्या वेदीच्या ज्वाळांत चढला, आणि
मानोहा व त्याची स्त्री यानी पाहून आपलीं तोंडें
भूमीस लावून नमस्कार केला. २१ मग परमे-
श्वराचा दूत मानोहाच्या व त्याच्या स्त्रीच्या
दृष्टीस फिरून पडला नाहीं; तेव्हां मानोहाला
कळलें कीं तो परमेश्वराचा दूत होता. २२
मग मानोहा आपल्या स्त्रीला बोलला, "आह्मी
खचीत मरूं, कां तर आपण देव पाहिला आहे."
२३ तेव्हां त्याची स्त्री त्याला बोलली, "जर
परमेश्वराने आह्मास जिवें मारायास इच्छिलें
असतें, तर त्याने आमच्या हातांतून होम व
नैवेद्य घेतला नसता, आणि हीं अवघीं आह्मास
दाखविलीं नसतीं, आणि या वेळेच्या सारिखें
वर्त्तमान आह्मास कळविलें नसतें." २४ नंतर
त्या स्त्रीला पुत्र झाला, आणि तिने त्याचें नांव
शाम्शोन ठेविलें; तो मूल तर वाढला, आणि
परमेश्वराने त्याला आशीर्वाद दिल्हा. २५
तेव्हां जरा व एष्टावोल यांच्या मध्यभागीं दा-
नाच्या छावणींत त्याला परमेश्वराचा आत्मा
प्रेरणा करूं लागला.

## अध्याय १४.

नंतर शाम्शोन खालीं तिम्नाथास गेला, आ-
णि त्याने तिम्नाथांत पलिष्ट्यांच्या कन्यां-
तली एक स्त्री पाहिली. २ मग त्याने वर येऊन
आपल्या बापाला व आपल्या आईला सांगून ह्म-
टलें, "म्या तिम्नाथांत पलिष्ट्यांच्या कन्यांतली
एक स्त्री पाहिली आहे; तर आतां तुह्मी ती
मला बायको करून घ्या." ३ तेव्हां त्याच्या
आईबापानी त्याला ह्मटलें, "तुझ्या भावाबंदांच्या
कन्यांत व माझ्या सर्व लोकांतहि कोणी स्त्री ना-
हीं ह्मणून तूं असुंती पलिष्ट्यांतली बायको करून
घ्यायाला जातोस कीं काय?" तथापि शाम्शो-
नाने आपल्या बापाला ह्मटलें, "ती मजसाठीं
मिळीव; कां तर ती माझ्या दिसण्यांत चा-

गली आहे." ४ हें तर परमेश्वराकडून झालें कीं त्याने पलिष्ट्यांविषयीं निमित्त शोधून काढावें, असें त्याच्या आईबापांस कळलें नव्हतें; कां कीं त्या वेळेस पलिष्टी इस्राएलावर अधिकार करीत होते.

५ यानंतर शाम्शोन आणि त्याचे आईबाप खालीं तिम्नाथास जात होते, आणि तिम्नाथांतल्या द्राक्षमळ्यांपर्यंत पोहंचले असतां पाहा, सिंहांतला तरणा सिंह त्याजवर येऊन गर्जला. ६ तेव्हां परमेश्वराच्या आत्म्याने त्याला व्यापिलें, यास्तव त्याच्या हातीं कांहीं नसताहि त्याने जसें करडूं फाडावें, तसें त्याला फाडून टाकिलें; परंतु आपण जें केलें होतें तें त्याने आपल्या आईबापांस सांगितलें नाहीं. ७ शाम्शोन तर खालीं जाऊन त्या स्त्रीला बोलला; तेव्हां ती त्याला चांगली दिसून आली.

८ मग कांहीं वेळानंतर तो तिला करून घेण्यास फिरून गेला, तेव्हां त्या सिंहाचें कलेवर पाहायास वळला; तर पाहा, त्या सिंहाच्या कलेवरांत मधमाश्यांचा झुपका व मध होती. ९ तेव्हां त्याने ती आपल्या हातीं घेऊन चालतां चालतां खाली, आणि आपल्या आईबापांजवळ जाऊन त्यांस दिल्ही, आणि त्यांनी खाली; कां कीं त्याने ती मध त्या सिंहाच्या कलेवरांतून घेतली होती, हें त्यांस सांगितलें नाहीं. १० नंतर त्याचा बाप त्या स्त्रीच्याजवळ उतरून गेला आणि शाम्शोनाने तेथें जेवणावळ केली, कां तर नवेतरणे तसी करीत होते. ११ तेव्हां त्यांनी त्याला पाहिल्यावर असें झालें कीं त्यांनी तीस सवंगडी त्याच्यासंगतीं राहायास आणिले. १२ मग शाम्शोन त्यांस ह्मणाला, "आतां मी तुह्मास कोडें घालितों; जेवणावळीच्या सात दिवसांत जर तुह्मी तें मला निश्चयें सांगाल, ह्मणजे उगवाल, तर मी तुह्मास तीस पासोड्या व वस्त्रांचे तीस पोषाक देईन. १३ परंतु जर तुमच्याने माझ्याजवळ न सांगवलें, तर तुह्मी मला तीस पासोड्या व वस्त्रांचे तीस पोषाक द्यावे." तेव्हां ते त्याला बोलले, "तूं आपलें कोडें घाल, ह्मणजे आह्मी तें ऐकूं." १४ तेव्हां तो त्यांस बोलला, "खाणाऱ्यांतून खाद्य निघालें, तसें बळकटांतून गोड निघालें." तीन दिवसांत तर त्यांच्यानी तें कोडें सांगवलें नाहीं. १५ नंतर सातव्या दिवसीं असें झालें कीं त्यांनी शाम्शोनाच्या स्त्रीला सांगितलें, "तूं आपल्या नवऱ्याला अशी फूस लाव कीं त्याने तें कोडें आह्मास कळवावें, नाहीं तर आह्मी तुला व तुझ्या बापाच्या घराला आग लावून जाळूं; तुह्मी आमचें हरण करून घ्यावें ह्मणून आह्मास बोलावलें कीं काय?" १६ तेव्हां शाम्शोनाची स्त्री त्याच्याजवळ रडत बोलली, "तूं केवळ माझा द्वेष करितोस; मजवर प्रीति करीतच नाहींस; त्वां माझ्या लोकांतले तरणे यांस कोडें घातलें आहे, आणि तें मला सांगितलें नाहीं." परंतु तो तिला बोलला, "पाहा, म्या आपल्या आईबापांस सांगितलें नाहीं, तर तुला कसें सांगावें?" १७ आणि ज्या सात दिवसांत त्यांची जेवणावळ होत होती, त्यांत ती त्याजवळ रडली; मग सातव्या दिवसीं असें झालें कीं त्याने तिला सांगितलें, कां तर तिने त्याला पेंचाटींत घातलें होतें; मग तिने तें कोडें आपल्या लोकांतल्या तरण्यांस सांगितलें. १८ यास्तव सातव्या दिवसीं सूर्य मावळल्यापूर्वीं त्या नगरांतल्या माणसांनी त्याला ह्मटलें, "मधापेक्षां गोड काय? आणि सिंहापेक्षां बळकट काय?" तेव्हां तो त्यांस बोलला, "जर तुह्मी माझ्या कालवडीने नांगरिलें नसतें, तर तुह्मी माझें कोडें उगविलें नसतें." १९ नंतर परमेश्वराच्या आत्म्याने त्याला प्रेरिलें, आणि त्याने खालीं आष्कलोनास जाऊन त्यांतले तीस पुरुष मारिले, मग त्यांचीं वस्त्रें घेऊन कोडें सांगणाऱ्यांस ते पोषाक दिल्हे; परंतु त्याचा राग पेटला होता, यास्तव तो आपल्या बापाच्या घरीं गेला. २० मग शाम्शोनाची स्त्री त्याचा सवंगडी जो त्याने आपल्याजवळ मित्ररूपें वागविला होता, त्याची झाली.

## अध्याय १५.

मग कांहीं वेळानंतर गहूं कापण्याच्या दिवसांत शाम्शोन एक करडूं घेऊन आपल्या स्त्रीच्या भेटीस गेला; तेव्हां शाम्शोनाने ह्मटलें, "मी खोलींत आपल्या बायकोजवळ जाईन;" परंतु तिच्या बापाने त्याला जाऊं दिल्हें नाहीं. २

तिचा बाप बोलला, "म्या निश्चयें ह्मटलें कीं त्वां
तिचा अगदी द्वेष केला, ह्मणून म्या ती तुझ्या
सवंगड्याला दिल्ही; तिची धाकटी बहीण तिज-
पेक्षां सुंदर नाहीं कीं काय? आतां ही तिच्या
ठिकाणीं तुला होवो." २ तेव्हां शाम्शोन त्यां-
विषयीं बोलला, "या वेळेस जरी मी पलिष्ट्यांसीं
वाईट करितों, तरी त्यांपेक्षां निर्दोषी होईन."
४ मग शाम्शोनाने जाऊन तीनशें कोल्हे धरिले,
आणि कोलितें घेऊन शेपटाकडे शेपूट फिरवून दोन
दोन शेपटांमध्यें एकएक कोलीत ठेविलें. ५ मग
कोलितांस विस्तू लावून त्याने त्यांस पलिष्ट्यांच्या
उभ्या पिकांत सोडिलें, आणि उभ्या पिकासुद्धां
सुड्या व जैतुनाचे मळे जाळिले. ६ तेव्हां
पलिष्टी बोलले, "हें कोणी केलें?" नंतर त्यानी
ह्मटलें, "तिम्नाथकराचा जावायी शाम्शोन
याने केलें, कां तर त्याने त्याची स्त्री घेऊन या-
च्या सवंगड्याला दिल्ही." मग पलिष्ट्यानी जा-
ऊन तिला व तिच्या बापाला आग लावून जाळिलें.
७ नंतर शाम्शोनाने त्यांस ह्मटलें, "जरी
तुह्मी एवढें केलें, तरी मी तुमचा सूड घेईन,
आणि मग स्वस्थ होईन." ८ तेव्हां त्याने त्यांस
मांडीवर व कटीवर मोठ्या माराने मारिलें, नंतर तो
खालीं जाऊन एटाम खडकाच्या दऱ्यांत राहिला.
९ मग पलिष्ट्यानी चढून जाऊन यहूद्यांत
तळ धरिला, आणि ते लेहींत पसरले. १०
तेव्हां यहूदी माणसें बोललीं, "तुह्मी आह्मावर
कां चढून आलां?" तेव्हां ते बोलले, "शाम्शो-
नाला बंद करावें ह्मणून; जसें त्याने आह्मासीं
केलें, तसें त्यासीं करायाला आह्मी चढून आलों
आहों." ११ नंतर यहूद्यांतलीं तीन हजार
माणसें खालीं एटाम खडकाच्या दऱ्याजवळ जा-
ऊन शाम्शोनाला बोललीं, "पलिष्टी आह्मावर
अधिकार करितात, हें तुला कळलें नाहीं काय?
तर त्वां आह्मास हें काय केलें?" तेव्हां तो त्यांस
बोलला, "जसें त्यानी माझें केलें, तसें म्या त्यांचें
केलें आहे." १२ नंतर त्यानी त्याला ह्मटलें,
"तुला पलिष्ट्यांच्या हातीं द्यायासाठीं आह्मी
तुला बांधायास खालीं आलों आहों." तेव्हां
शाम्शोन त्यांस बोलला, "तुह्मी स्वतां मजसीं
भिडणार नाहीं, ह्मणून माझ्याजवळ शपथ वाहा."
१३ मग त्यानी त्याला असें सांगितलें कीं, "नाहीं,
परंतु आह्मी तुला घट्ट बांधूं, आणि तुला त्यांच्या
हातीं देऊं; तुझा जीव तर घेणारच नाहीं." तेव्हां
त्यानी नव्या दोन दोरानी त्याला बांधून खडका-
तून वर नेलें. १४ तो लेहीस पोहंचला, तेव्हां
पलिष्ट्यानी त्याला भेटून गर्जना केली; परंतु
परमेश्वराच्या आत्म्याने त्याला प्रेरिलें असतां
जसे वाखतंतू अग्नींत जळून जातात, तसे त्याच्या
बाहूंवरले दोर झाले; ह्मणजे तीं बंधनें त्याच्या
हातांतून गळून गेलीं. १५ नंतर त्याला गाढ-
वाचें ओलें चाभाड अढळलें, तेव्हां त्याने आ-
पला हात लावून तें घेतलें, आणि तेणेकरून
हजार माणसें मारिलीं. १६ मग शाम्शोनाने
ह्मटलें, "रासभाच्या चाभाडाने रासींच्या रासी,
ह्मणजे रासभाच्या चाभाडाने म्या हजार माण-
सें मारिलीं. १७ तर त्याने बोलणें संपविल्यावर
असें झालें कीं त्याने आपल्या हातांतून तें चाभड
टाकिलें, यावरून त्या ठिकाणाचें नांव रामाथलेही
ठेविलें. १८ तेव्हां त्याला ताहान फार लागली;
यास्तव त्याने परमेश्वराला हाक मारीत ह्मटलें,
"त्वां आपल्या चाकराच्या हाताने हें मोठें ता-
रण दिल्हें, आहे; तर आतां म्या ताहानेंने मरून
असुंतांच्या हातीं पडावें कीं काय? १९ नंतर
देवाने लेहींतला खळगा फोडिला, आणि त्यां-
तून पाणी निघालें; मग तो प्याला, यास्तव त्याचा
प्राण माघारा आल्याने तो जगला; यावरून त्या
झऱ्याचें नांव एनहाक्कार ह्मटलें गेलें; तो आज-
पर्यंत लेहीमध्यें आहे. २० त्याने तर पलिष्ट्यां-
च्या दिवसांत इस्राएलाचा न्याय वीस वर्षें केला.

## अध्याय १६.

यानंतर शाम्शोन गाजांत गेला. तेव्हां तेथें
एक वेश्या पाहून तो तिच्याजवळ गेला.
२ आणि शाम्शोन आला आहे असें गाजेकरांस
वर्त्तमान आलें; यास्तव त्यानी चहुंकडे जाऊन सा-
री रात्र नगराच्या वेसीजवळ त्याच्यासाठीं दबा
धरिला; आणि ते सारी रात्र स्वस्थ राहत ह्म-
णाले, "सकाळीं उजेड झाला तेव्हां आपण त्याला
जिवें मारूं." ३ आणि शाम्शोन मध्यरात्रीपर्यंत
निजला, मग मध्यरात्रीं त्याने उठून नगराच्या

वेसीचीं कवाडें दोन बाह्यांसुद्धां व अडसरासुद्धां
धरून काढिलीं, मग तीं आपल्या खांद्यावर घेऊन
हेब्रोनाच्यासमोर जो डोंगर त्याच्या शिखरापर्यंत
वर नेलीं.
४ आणि त्यानंतर असें झालें कीं त्याला सो-
रेक ओढ्यावरली एक स्त्री आवडली; तिचें नांव
तर दलीला होतें. ५ यास्तव पलिष्ट्यांच्या अ-
धिकाऱ्यानी तिच्याजवळ जाऊन तिला ह्मटलें,
"तूं त्याला फूस लावून त्याचें मोठें बळ कशांत
आहे, आणि आह्मी त्याला कशाने बळ चालवून
त्याला बांधून स्वाधीन करूं हें पाहा; ह्मणजे
आह्मी एकएक तुला अकरा अकराशें शेकेल रुपें
देऊं." ६ तेव्हां दलीला शाम्शोनाला बोलली,
"तुझें मोठें बळ कशांत आहे, आणि तूं कशाने
बांधला जाऊन स्वाधीन होसील, हें अगत्य मला
सांग." ७ तेव्हां शाम्शोनाने तिला सांगितलें,
"जीं ताजीं सात सालपटें सुकलीं नाहींत, त्यांकडून
जर ते मला बांधितील, तर मी अशक्त होऊन
सामान्य माणसासारिखा होईन." ८ नंतर पलि-
ष्ट्यांच्या अधिकाऱ्यानी सात सालपटें जीं सुकलीं
नव्हतीं, तीं तिच्याजवळ नेलीं, आणि तिने त्यांक-
डून त्याला बांधिलें. ९ तेव्हां तिच्याजवळ खो-
लींत दबाधारी बसले होते, आणि तिने त्याला
ह्मटलें, "हे शाम्शोना, पलिष्टी तुजवर आले
आहेत." तेव्हां जसा तागाचा दोरा अग्नीला
लागतांच तुटून जातो, तसीं तीं सालपटें तुटून
गेलीं; असें त्याचें बळ माहीत झालें नाहीं. १०
नंतर दलीला शाम्शोनाला बोलली, "पाहा, त्वां
मला फसविलें; मजसीं लबाड्याच केल्या; आतां
तूं कशाने बांधला जासील, हें अगत्य मला सांग."
११ तेव्हां त्याने तिला सांगितलें, "ज्या नव्या
दोरानी काम झालें नाहीं, त्यांकडून जर ते मला
घट्ट बांधितील, तर मी अशक्त होऊन सामान्य
माणसासारिखा होईन." १२ तेव्हां दलीलेने
नवे दोर घेऊन त्यांकडून त्याला बांधिलें, आणि
त्याला ह्मटलें, "हे शाम्शोना, पलिष्टी तुजवर
आले आहेत." तेव्हां दबाधारी खोलींत बसले
होते; त्याने तर ते दोर सुतासारिखे आपल्या
बाहूंतून तोडून टाकिले. १३ मग दलीला शा-
म्शोनाला बोलली, "एथवर तूं मला फसवीत
आणि मजसीं लबाड्या करीत आलास; तूं कशाने
बांधला जासील, हें मला सांग.' तेव्हां त्याने
तिला सांगितलें, "जर तूं माझ्या डोक्याच्या सात
बटा मागासंगतीं विणसील तर मी तसा होईन."
१४ तेव्हां तिने खुंटी मारून त्या बंद केल्या;
मग त्याला ह्मटलें, "हे शाम्शोना, पलिष्टी तुज-
वर आले आहेत." तेव्हां तो आपल्या झोंपेंतून
जागा होऊन विणायाची खुंटी व माग यांसुद्धां
निघाला. १५ नंतर ती त्याला बोलली, "तुझें
हृदय मजवर नसतां, तूं कसें बोलतोस कीं मी तु-
जवर प्रीति करितों? आतां तीन वेळा त्वां मला
फसविलें, आणि आपलें मोठें बळ कशांत आहे हें
मला सांगितलें नाहीं." १६ नंतर जेव्हां तिने
आपल्या बोलण्यानी त्याला सारा दिवस पेंचाटींत
घालून त्याजवळ असी जिकीर केली कीं मरणा
एवढा त्याच्या जिवाला त्रास दिल्हा, तेव्हां असें
झालें कीं, १७ त्याने आपलें सर्व मनोगत ति-
ला कळवून ह्मटलें, "माझ्या डोक्यावर वस्तरा
फिरविला गेला नाहीं; कां तर मी आपल्या आ-
ईच्या पोटीं झाल्यापासून देवाचा नेजेरी आहें;
जर माझें मुंडन होईल, तर माझें बळ मज-
पासून जाईल, आणि मी अशक्त होऊन भल-
त्या माणसासारिखा होईन." १८ तेव्हां त्याने
तिला आपलें सर्व मनोगत सांगितलें होतें हें
दलीलेने पाहिलें; यास्तव तिने पाठवून पलिष्ट्यां-
च्या अधिकाऱ्यांस बोलावून ह्मटलें, "तुह्मी या
वेळेस या, कां कीं त्याने आपलें सर्व मनोगत
मला सांगितलें आहे." तेव्हां पलिष्ट्यांचे अधि-
कारि तिच्याजवळ गेले, आणि त्यानी आपल्या
हातीं रुपें नेलें. १९ मग तिने त्याला आपल्या
गुडघ्यांवर निजविलें आणि माणसाला बोलावून
त्याच्या डोक्याच्या सात बटा भादरविल्या; असी
ती त्याला नम्र करूं लागली, आणि त्याचें बळ
त्यांतून गेलें. २० नंतर ती बोलली, "हे शा-
म्शोना, पलिष्टी तुजवर आले आहेत." तेव्हां
तो आपल्या झोंपेंतून जागा होऊन ह्मणाला, "मी
मागल्या वेळोवेळेप्रमाणें बाहेर जाईन आणि सु-
टेन." परंतु परमेश्वराने त्याला सोडिलें होतें,
हें त्याला कळलें नाहीं. २१ पलिष्ट्यानी तर
त्याला धरून त्याचे डोळे फोडून टाकिले; नंतर

याला खालीं गाझांत नेऊन पितळ्याच्या बेड्यानी
बांधिलें; मग तो बंदिवानाच्या घरीं दळीत असे.
२२ तथापि त्याचें मुंडन झाल्यानंतर त्याच्या
डोक्याचे केस वाढूं लागले.
२३ मग पलिष्ट्यांचे अधिकारी आपला देव
दागोन याजवळ मोठा यज्ञ व उत्साह करायास
मिळाले; कारण कीं ते ह्मणाले, "आमच्या देवाने
आमचा शत्रु शाम्शोन आमच्या हातीं दिल्हा
आहे." २४ तेव्हां लोकानी त्याला पाहून आप-
ल्या देवाची स्तुति केली; का कीं त्यानी असें
ह्मटलें कीं, "जो आमचा शत्रु आणि आमचा
देश ओस करणारा देखील, ज्याने आमच्यांतल्या
बहुतांचा घातहि केला, त्याला आमच्या देवाने
आमच्या हातीं दिल्हें आहे." २५ आणि जेव्हां
त्यांचें अंतःकरण संतुष्ट झालें, तेव्हां त्यानी सांगि-
तलें, "तुह्मी शाम्शोनाला बोलावा, ह्मणजे तो
आह्मास हसवील." तेव्हां त्यानी शाम्शोना-
ला बंदिवानांच्या घरांतून बोलाविलें, आणि तो
त्यांच्यापुढें थट्टेचें पात्र झाला, आणि त्यानी त्या-
ला खांबांच्यामध्यें उभें केलें होतें. २६ नंतर
त्या नव्या तरण्याने त्याला हातीं धरिलें होतें,
त्याला शाम्शोन बोलला, "ज्या खांबांचा घराला
आधार आहे, ते म्या चांपसावे ह्मणून तूं मला
त्यांजवळ ने, ह्मणजे मी त्यांवर टेंकेन." २७ तें
घर तर पुरुषानी व स्त्रियानी भरलेलें होतें, आ-
णि पलिष्ट्यांचे सर्व अधिकारी तेथें होते; स्त्रि-
यांसुद्धां सुमारें तीन हजार पुरुष धाब्यावरहि
शाम्शोनाची थट्टा पाहत होते. २८ तेव्हां
शाम्शोनाने परमेश्वराला हाक मारीत ह्मटलें,
"हे प्रभू परमेश्वरा, कृपेकरून माझी आठवण
कर, आणि हे देवा, या वेळेस मात्र कृपेकरून
मला बळकट कर; ह्मणजे मी आपल्या दोन
डोळ्यांविषयीं पलिष्ट्यांचे एकदम सूड उगवून
घेईन." २९ नंतर ज्या दोन मधल्या खांबांवर
घर राहिलेलें, आणि ज्यांचा आधार पावलेलें
होतें, त्यांतला एक शाम्शोनाने आपल्या उजव्या
हाताने आणि दुसरा आपल्या डाव्या हाताने
धरिला. ३० तेव्हां शाम्शोन बोलला, "प-
लिष्ट्यांच्यासंगतीं माझा जीव जावो;" मग तो
बळाने लवला, आणि तें घर त्या अधिकाऱ्यां-
वर व त्यांतल्या सर्व लोकांवर पडलें; असें तो
जीवंत असतांना त्याने जे मारिले होते, त्यांपेक्षां
आपल्या मरणकाळीं जे मारिले ते अधिक झाले.
३१ नंतर त्याचे भाऊ व त्याच्या बापाच्या घरचे
सर्व यानी खालीं जाऊन त्याला उचललें, आणि
त्याला नेऊन जरा व एष्टावोल यांमध्यें त्याचा
बाप मानोहा याच्या कबरेंत पुरिलें; त्याने तर
वीस वर्षें इस्राएलांचा न्याय केला होता.

## अध्याय १७.

एफ्राइमाच्या डोंगरावरला एक माणूस होता;
त्याचें नांव तर मीखा. २ आणि त्याने आ-
पल्या आईला ह्मटलें, "जें अकराशें शेकेल रुपें
तुझ्याजवळून घेतलें गेलें, आणि ज्यामुळें त्वां
शाप दिल्हे, अणखी तूं माझ्या कानासीं बोललीस
पाहा, तें रुपें माझ्याजवळ आहे; म्या तें घेतलें."
तेव्हां त्याची आई बोलली, "हे माझ्या पुत्रा, पर-
मेश्वराकडून तुला आशीर्वाद होवो. ३ मग त्याने
तें अकराशें शेकेल रुपें आपल्या आईला माघारें
दिल्हें; तेव्हां त्याच्या आईने ह्मटलें, "म्या आप-
ल्या पुत्रासाठीं कोरीव व ओतीव मूर्त्ति करायास
आपल्या हाताने हें रुपें परमेश्वराला अर्पण
करून दिल्हें होतें; तर आतां मी हें तुला मा-
घारें देतें." ४ तथापि त्याने तें रुपें आपल्या
आईला माघारें दिल्हें, मग त्याच्या आईने दोनशें
शेकेल रुपें घेऊन तें सोनाराला दिल्हें, आणि
त्याने त्याची कोरीव व ओतीव मूर्त्ति केली; नंतर
ती मीखाच्या घरीं राहिली. ५ तसा तो मा-
णूस मीखा, त्याला देवांचें घर होतें, आणि
त्याने याजकाचें एफोद व मूर्त्ति केल्या होत्या;
अणखी त्याने आपल्या एका पुत्राला कर्मदीक्षा
दिल्ही, आणि हा त्याचा याजक झाला. ६ त्या
दिवसांत इस्राएलावर कोणी राजा नव्हता; प्रत्ये-
काने आपापल्या दिसण्यांत जें योग्य, तें केलें.
७ तेव्हां यहूदी कुळांतला कोणी तरुणा बेथ-
लेहेम यहूदांतला होता; आणि तो लेवी असतांहि
तेथें राहत होता. ८ नंतर तो माणूस जेथें
जागा मिळेल, तेथें राहायाला बेथलेहेम यहूदां-
तल्या नगरांतून निघाला; मग आपल्या मार्गा-
ने चालतांना एफ्राइमाच्या डोंगरावर मीखाच्या

घरापर्यंत पोहंचला· ९ मग मीखा त्याला बो-
लला, "तूं कोठून आलास?" तेव्हां तो त्याला बो-
लला, "बेथलेहेम यहूदांतला लेवी मी आहें;
आणि जेथें जागा मिळेल, तेथें राहायास मी जात
आहें." १० तेव्हां मीखा त्याला बोलला, "तूं
माझ्याजवळ राहा, आणि मला बाप व याजक
असा होऊन ऐस, ह्मणजे मी तुला प्रति वर्षी
दाहा शेकेल रुपें व पोशाक व तुझें उपजीवन
देईन." मग तो लेवी आंत गेला. ११ आणि
त्या माणसाजवळ राहायाला तो लेवी मान्य
झाला; तसा तो तरणा त्याच्याजवळ त्याच्या
एका पुत्रासारिखा झाला· १२ आणि मीखाने
त्या लेवीला कर्मदीक्षा दिल्ही, आणि तो तरणा
त्याचा याजक झाला आणि मीखाच्या घरीं रा-
हिला· १३ नंतर मीखा बोलला, "आतां मला
कळलें कीं परमेश्वर माझें बरें करील, कारण
कीं लेवी माझा याजक झाला आहे·

## अध्याय १८.

त्या दिवसांत इस्राएलावर कोणी राजा नव्हता,
आणि त्या दिवसांत दानाचा वंश वस्ती
करायासाठीं आपलें वतन मिळवायाला पाहत हो-
ता; कां कीं त्या दिवसापर्यंत त्यांस इस्राएलाच्या
वंशांमध्यें वतनांतला भाग मिळाला नव्हता. २
यास्तव दानाच्या संतानानी आपल्या सीमांतून,
ह्मणजे जरा व एष्टावोल यांतून, आपल्या कुळां-
तलीं शूर माणसें असे पांच पुरुष प्रांत हेरायास
व त्याचा शोध करायास पाठविले; तेव्हां त्यानी
त्यांस सांगितलें, "तुह्मी जाऊन तो प्रांत शोधा·'
मग ते एफ्राइमाच्या डोंगरावर मीखाच्या घराप-
र्यंत जाऊन तेथें उतरले· ३ ते मीखाच्या घरा-
जवळ होते, तेव्हां त्यानी त्या तरुण लेव्याचा
शब्द ओळखिला; यास्तव ते तिकडे वळून त्या-
ला बोलले, "तुला इकडे कोणी आणिलें? आणि
तूं एथें काय करितोस? आणि तुझें एथें काय
आहे?" ४ तेव्हां त्याने त्यांस सांगितलें, "मी-
खाने मला असें असें केलें, आणि मला मोलाने
ठेविलें; यास्तव मी त्याचा याजक झालों आहें."
५ तेव्हां त्यानी त्याला सांगितलें, "तूं कृपेने देवाज-
वळ विचार, आणि आह्मी ज्या मार्गावर चाललों
तो सफळ होईल किंवा नाहीं, हें आह्मास
कळावें." ६ तेव्हां तो याजक त्यांस बोलला,
"तुह्मी सुखरूप जा; तुह्मी आपल्या ज्या मार्गाने
चालतां, त्यावर परमेश्वराचें लक्ष आहे·"
७ मग तीं पांच माणसें चालून लाइशास
गेलीं, आणि त्यानी पाहिलें कीं लोक त्यांत निर्भय
सीदोन्यांच्या रीतीप्रमाणें स्वस्थ व निर्भय राहिले
आहेत; आणि देशांत कशाविषयींहि उपद्रव कर-
णारा किंवा निवारण करणारा असा कोणी धनी
नाहीं; अणखी ते सीदोन्यांपासून दूर होते, आ-
णि मनुष्याजवळ त्यांचें कार्य नव्हतें· ८ नंतर ते
जरा व एष्टावोल तेथें आपल्या भावांजवळ आले;
तेव्हां त्यांच्या भावानी त्यांस ह्मटलें, "तुह्मी काय
ह्मणतां?" ९ मग ते बोलले, "तुह्मी उठा, ह्म-
णजे आपण त्यांवर जाऊं; कां कीं आह्मी तो देश
पाहिला, आणि तो फार चांगला आहे, आणि
तुह्मी उगेच राहतां काय? तुह्मी तो प्रांत वतन
करून घेण्यासाठीं निघून जायाला आळस करूं
नका· १० तुह्मी गेलां असतां, स्वस्थ लोकां-
कडे व पसरट प्रांताकडे पोहंचाल; कां कीं जेथें
पृथ्वींतली कोणतीहि वस्तु उणी नाहीं, असें ठि-
काण देवाने तुमच्या हातीं दिल्हें आहे·" ११
मग तेथून, ह्मणजे जरा व एष्टावोल यांतून दा-
नाच्या कुळांतले साहाशें पुरुष लढाईसाठीं हत्या-
रबंद होऊन निघाले· १२ तेव्हां त्यानीं जाऊन
यहूदांतल्या किर्याथयारीमाजवळ तळ धरिला;
यास्तव आजपर्यंत त्या ठिकाणाला माहनेदान
असें ह्मणत आले; पाहा, तें किर्याथयारीमाज-
वळ आहे· १३ मग ते तेथून पुढें एफ्राइमाच्या
डोंगरावर जाऊन मीखाच्या घरापर्यंत पोहंचले.
१४ तेव्हां जीं पांच माणसें लाइश प्रांत हे-
रायास गेलीं होतीं, त्यानी आपल्या भावांस असें
ह्मटलें कीं, "या घरामध्यें याजकाचें एफोद व
कुळदेव, आणि कोरींव व ओतींव मूर्त्ति आहे; हें
तुह्मास कळलें कीं काय? तर आतां काय कराल
तें समजा·" १५ मग त्यानी तिकडे वळून मी-
खाच्या घरीं त्या तरुण लेव्याच्या घरांत जाऊन
त्याजवळ कुशलप्रश्न केलें· १६ नंतर जीं दा-
नाच्या लोकांतलीं साहाशें माणसें तीं आपल्या
लढाईचीं शस्त्रें अवळून दरवाज्यापुढें उभीं राहि-

लीं. १७ आणि जीं पांच माणसें प्रांत हेराया-
ला गेलीं होतीं, तीं चढून आंत शिरलीं, आणि
त्यानी ती कोरींव मूर्त्ति व तें एफोद व ते कुळदेव
व ती ओतींव मूर्त्ति घेतली; तेव्हां तो याजक व
लढायाचीं हत्यारें बांधलेलीं जीं साहाशें माणसें,
तीं दरवाज्यापुढें उभीं राहिलीं. १८ तर त्यानी
मीखाच्या घरांत जाऊन ती कोरींव मूर्त्ति व तें
एफोद व ते कुळदेव व ती ओतींव मूर्त्ति घेतली
असतां, तो याजक त्यांस बोलला, "तुह्मी काय
करितां!" १९ तेव्हां त्यानी त्याला सांगितलें,
"तूं उगाच राहा; आपला हात आपल्या तोंडा-
वर लावून आमच्यासंगतीं चाल, आणि आमचा
बाप व आमचा याजक असा हो; त्वां एका मा-
णसाच्या घराण्याचा याजक व्हावें, किंवा वंशाचा
ह्मणजे इस्राएलांतल्या कुळाचा याजक व्हावें,
कोणतें बरें!" २० तेव्हां त्या याजकाच्या मनास
बरें वाटलें; यास्तव तो तें एफोद व ते कुळदेव
व ती कोरींव मूर्त्ति घेऊन त्या लोकांमध्यें गेला.
२१ मग ते मुरडून चालले, तेव्हां त्यानी लेंकरें
व गुरें व खटलें आपल्यापुढें लाविलें.

२२ ते मीखाच्या घरापासून कांहींसें दूर
गेल्यावर जीं घरें मीखाच्या घराजवळ होतीं, त्यां-
तलीं माणसें बोलावलेलीं असतां, दानाच्या लो-
कांच्या पाठीस लागलीं. २३ आणि त्यानी दा-
नाच्या लोकांस हाक मारिली; तेव्हां ते आपलीं
तोंडें मुरडून मीखाला ह्मणाले, "तुला काय झालें!
ह्मणून तूं समुदाय मिळवून आलास" २४ ते-
व्हां तो बोलला, "जे देव म्या केले होते, ते आ-
णि तो याजक तुह्मी घेऊन गेलां आहां, आणि
मला दुसरें काय आहे! तर तुला काय झालें हें
तुह्मी मला कसें ह्मणतां! २५ मग दानाच्या
लोकानी त्याला ह्मटलें, "तूं आपला शब्द आ-
ह्मास ऐकूं देऊं नको; नाहीं तर कडवट जिवाचीं
माणसें तुह्मासीं भिडतील, आणि तूं आपला
जीव व आपल्या घराण्याचा जीव गमावसील."
२६ मग दानाचे लोक आपल्या मार्गाने चालले,
आणि मीखाने पाहिलें कीं आपल्यापेक्षां ते बळ-
कट आहेत, यास्तव तो माघारा आपल्या घरास
फिरला. २७ असें मीखाने ज्या मूर्त्ती केल्या
होत्या त्यास आणि त्याचा जो याजक होता,
त्याला त्यानी घेतलें; मग लाइशावर, ह्मणजे
स्वस्थ व निर्भय लोकांवर जाऊन त्यांस तरवारीने
मारिलें, आणि नगराला आग लावून जाळिलें.
२८ तेव्हां कोणी सोडविणारा नव्हता, कां तर
तें जीदोनापासून दूर होतें, आणि मनुष्याजवळ
त्याचें कांहीं कार्य नव्हतें; तें तर बेथरहोबाज-
वळच्या खोऱ्यांत होतें; नंतर दानी तें नगर बां-
धून त्यांत राहिले. २९ आणि आपला पूर्वज
दान, जो इस्राएलापासून जन्मला, त्याचें नांव
दान त्या नगराला ठेविलें, परंतु पहिल्याने त्या
नगराचें नांव लाइश होतें. ३० नंतर दानाच्या
लोकानी आपल्यासाठीं ती कोरींव मूर्त्ति मांडिली;
आणि मनाश्शाचा पुत्र गेर्शोम याचा वंशस्थ
यहोनाथान व याचीं संतानें, देश जिंकून नेण्या-
च्या दिवसापर्यंत दानाच्या वंशाचे याजक होतीं.
३१ आणि देवाचें मंदिर शिलोमध्यें होतें,
त्या सर्व दिवसांत त्यानी आपल्यासाठीं मीखाची
कोरींव मूर्त्ति जी त्याने केली होती ती राखिली.

## अध्याय १९.

आणि त्या दिवसांत जेव्हां इस्राएलावर कोणी
राजा नव्हता, तेव्हां असें झालें कीं कोणी
लेवी एफ्राइमाच्या डोंगराच्या बाजूजवळ प्रवास
करीत होता; आणि त्याने आपल्याला बेथलेहेम
यहूदांतून उपपत्नी असी स्त्री करून घेतली. २
नंतर त्याच्या उपपत्नीने त्यावर व्यभिचार केला,
आणि ती त्याला सोडून बेथलेहेम यहूदांत आ-
पल्या बापाच्या घरीं जाऊन तेथें चार महिने
इतके दिवस राहिली. ३ तेव्हां तिचा धनी उठून
तिच्या मनोगताप्रमाणें बोलून तिला माघारें आ-
णावें ह्मणून तिच्या पाठीमागें गेला; आणि त्या-
च्यासंगतीं त्याचा चाकर व गाढवांची जोड हो-
ती, तेव्हां तिने त्याला आपल्या बापाच्या घरांत
नेलें, आणि त्या तरणीचा बाप त्याला पाहून
त्याच्या भेटीवरून संतुष्ट झाला. ४ यास्तव
त्याच्या सासऱ्याने ह्मणजे त्या तरणीच्या बापाने
त्याला फार आग्रह केला; ह्मणून तो त्याजवळ
तीन दिवस राहिला, आणि तीं खाऊन पिऊन तेथें
वस्तीस राहिलीं. ५ मग चवथ्या दिवशीं असें
झालें कीं ते सकाळीं उठल्यावर तो जायाला उभा

राहिला, परंतु त्या तरणीच्या बापाने आपल्या जा-
वायाला सांगितलें, "तूं आपल्या पोटाला भाकरी-
च्या तुकड्याचा आधार कर, आणि मग तुह्मी
जा." ६ यास्तव तीं राहून त्या दोघांनी एकत्र
खाणें केलें; नंतर त्या तरणीच्या बापाने त्या मा-
णसाला ह्मटलें, "तूं तरी मान्य होऊन रात्रीं रा-
हा, आणि तुझ्या मनाला सुख होवो." ७ तरी
तो माणूस जायाला उठला, परंतु त्याच्या सास-
ऱ्याने त्याला आग्रह केला, ह्मणून तो पुन्हां तेथें
रात्रीं राहिला. ८ नंतर पांचव्या दिवशीं सका-
ळीं तो जायाला सिद्ध झाला, परंतु त्या तरणीच्या
बापाने ह्मटलें, "तूं अगत्य आपल्या पोटाला आ-
धार कर." तेव्हां दिवस फिरला तोंपर्यंत त्यांनी
उशीर केला, आणि ते दोघे जेवले. ९ नंतर
तो पुरुष आपली उपपत्नी व आपला चाकर यां-
सुद्धां जायाला उठला, परंतु त्या तरणीचा बाप
त्याचा सासरा त्याला बोलला, "आतां पाहा
मावळतीकडे दिवस उतरला आहे, तुह्मी या
रात्रीं राहा; पाहा, दिवस थोडा राहिला, एथें
वस्ती करून आपल्या मनाला सुख होवो; मग
सकाळीं उठून आपल्या मार्गाने आपल्या घरास
जा." १० परंतु तो माणूस राहायाला मान्य
न होऊन उठून चालला, मग यबूस तेंच यरू-
शालेम त्याच्यासमोर आला; तेव्हां त्याच्या-
संगतीं आवळलेल्या गाढवांची जोड, आणि त्या-
ची उपपत्नी त्याच्यासंगतीं होती. ११ ते यबू-
साजवळ होते तेव्हां दिवस फार उतरला होता,
यास्तव त्या चाकराने आपल्या धन्याला ह्मटलें,
"कृपा करून चाल, ह्मणजे आपण यबूस्यांच्या या
नगराकडे वळून त्यांत वस्ती करूं." १२ परंतु
त्याचा धनी त्याला बोलला, "जे परके इस्राएलाच्या
संतानांतले नाहींत, त्यांच्या नगरांत जायाला एथें
आह्मी वळणार नाहीं; तर गिबा तेथवर जाऊं."
१३ अणखी त्याने आपल्या चाकराला सांगितलें,
"चाल, ह्मणजे आपण एखाद्या ठिकाणीं पोहंचून
गिबा किंवा रामा त्यांत वस्ती करूं." १४ मग
ते पुढें चालत गेले; आणि बन्यामीनाचा जो
गिबा त्याजवळ त्यांस सूर्य मावळला. १५ तेव्हां
गिब्यांत वस्ती करायाला ते तिकडे वळले, नंतर
तो जाऊन नगराच्या चव्हाट्यावर बसला, परंतु
त्यांस रात्रीं राहायास कोणी आपल्या घरीं घेऊन
गेला नाहीं. १६ मग पाहा, संध्याकाळीं एक
ह्मातारा माणूस शेतांतून आपल्या कामावरून येत
होता; तोहि माणूस एफ्राइमाच्या डोंगरावरला
होता, परंतु गिब्यांत प्रवासी होता आणि त्या
ठिकाणांतलीं माणसें बन्यामीनी होतीं. १७
त्याने तर आपली दृष्टि लावून नगराच्या चव्हा-
ट्यावर तो वाटसरू माणूस पाहिला; तेव्हां
तो ह्मातारा माणूस बोलला, "तूं कोणीकडे जा-
तोस, आणि कोठून आलास?" १८ तेव्हां तो
त्याला बोलला, "आह्मी बेथलेहेम यहूद्याहून ए-
फ्राइम डोंगराच्या बाजूंकडे चालत आहों; तेथला
मी आहें; परंतु बेथलेहेम यहूद्यास गेलों होतों,
आणि मला परमेश्वराच्या मंदिरास जायाचें
आहे; तर कोणी मला घरीं घेत नाहीं. १९
तरी आमच्या गाढवांसाठीं वैरण व दाणाहि
आहे, अणखी मजसाठीं व तुझ्या चाकरणीसाठीं
आणि तुझ्या सेवकाच्यासंगतीं जो चाकर त्यासाठीं
भाकर व द्राक्षारस आहे, कोणत्याहि गोष्टीचें
उणें नाहीं." २० तेव्हां तो ह्मातारा माणूस बो-
लला, "तूं सुखरूप ऐस, तुला जें कांहीं पाहिजे
तें मजवर मात्र असो, तूं केवळ चव्हाट्यांत वस्ती
करूं नको." २१ तेव्हां त्याने त्याला आपल्या
घरीं नेलें, आणि गाढवास पुराव केला, नंतर
त्यांनी आपले पाय धुऊन खाल्लें व प्यालें.

२२ त्यांनी आपलें मन स्वस्थ केलें तेव्हां पा-
हा, त्या नगरांतल्या माणसांनी ह्मणजे कोणी दुष्ट
लोक, अशा माणसांनी घराला वेढून दारावर धक्के
दिल्हे, आणि घरधनी तो ह्मातारा माणूस याला
असें सांगितलें कीं, "जो माणूस तुझ्या घरांत आ-
ला आहे, त्याला तूं बाहेर काढ, ह्मणजे आह्मी
त्याला जाणूं." २३ मग तो घरधनी माणूस
बाहेर त्यांजवळ जाऊन त्यांस बोलला, "अ-
हो, माझे भाऊ नका, मी मागतों, तुह्मी दुष्टाई
करूं नका; हा माणूस माझ्या घरीं आला, तर
तुह्मी हें मूर्खपण करूं नका. २४ पाहा, माझी
तरुण कन्या व याची उपपत्नी यांस मी बाहेर
आणीन; मग तुह्मी त्यांस भंगून तुमच्या दिस-
ण्यांत जें बरें, तें त्यांसीं करा; परंतु या पुरुषाला
अशा दुष्टाईचें कृत्य करूं नका." २५ तथापि

तीं माणसें त्याचें ऐकायाला मान्य झालीं नाहींत;
तेव्हां त्या माणसाने आपली उपपत्नी घेऊन बाहेर
त्यांजवळ आणिली, मग त्यानी तिचा अनुभव घेतां
तिजसीं सारी रात्र सकाळपर्यंत कुकर्म केलें; नंतर
पाहाट झाली असतां तिला सोडिलें. २६ तेव्हां
सकाळच्या वेळेस ती स्त्री येऊन जेथें आपला धनी
होता, त्या माणसाच्या घराच्या दाराजवळ उजेड
होई तोंपर्यंत पडून राहिली. २७ तेव्हां सकाळीं
तिच्या धन्याने उठून घराचीं दारें उघडलीं, आणि
आपल्या मार्गाने जायाला तो बाहेर निघाला;
तर पाहा, ती स्त्री त्याची उपपत्नी घराच्या दारा-
जवळ पडलेली आणि तिचे हात उंबऱ्यावर होते.
२८ तेव्हां त्याने तिला ह्मटलें, "ऊठ, ह्मणजे आ-
पण जाऊं." परंतु कोणी उत्तर दिल्हें नाहीं;
नंतर तो पुरुष तिला गाढवावर घालून निघाला
आणि आपल्या ठिकाणीं गेला. २९ मग आपल्या
घरीं पोहंचल्यावर त्याने सुरी घेतली, आणि आ-
पली उपपत्नी घेऊन तिला तिच्या हाडांसुद्धां का-
पून बारा तुकडे केले, मग ती इस्राएलाच्या अवघ्या
स्थानांत पाठविली. ३० नंतर असें झालें कीं
त्या प्रत्येकाने पाहिलें, त्यानी ह्मटलें, "मिसर
देशांतून इस्राएलाचीं संतानें आलीं, त्या दिवसा-
पासून आजपर्यंत यासारिखें झालें नाहीं, आणि
दृष्टीस पडलें नाहीं; यावर तुह्मी आपलें चित्त
देऊन विचार करा, आणि बोला."

## अध्याय २०.

तेव्हां सर्व इस्राएलाचीं संतानें निघालीं आणि
दानापासून बैरशेब्यापर्यंत आणि गिलादाच्या
प्रांतांपर्यंत परमेश्वराजवळ मिजप्यांत त्यांची
सभा एका माणसासारिखी मिळाली. २ असें
इस्राएलाच्या सर्व वंशांतले अवघे लोक यांतले
पुढारी देवाच्या लोकांच्या सभेंत उभे राहिले;
तरवार उपसणारे असे चार लाख पायदळ होते.
३ नंतर बन्यामीन संतानानी ऐकिलें कीं, "इस्राए-
लाचीं संतानें मिजप्यांत चढून गेलीं आहेत." तर
इस्राएलाचीं संतानें ह्मणालीं, "आह्मास सांगा, ही
दुष्टाई कसी झाली?" ४ तेव्हां तो लेवी माणूस
ह्मणजे जी स्त्री मारिली होती तिच्या नवऱ्याने उत्तर
देतां ह्मटलें, "मी आपल्या उपपत्नीसुद्धां बन्यामी-
नाच्या जो गिबा तेथें येऊन वस्तीस उतरलों. ५
नंतर गिब्यांतल्या माणसानी मजवर उठून रात्रीं
मजसाठीं घराला वेढा घातला; त्यानी मला जिवें
मारायास योजिलें आणि माझ्या उपपत्नीवर असा
जुलूम केला कीं ती मेली. ६ नंतर मी आपली
उपपत्नी घेऊन तिचे तुकडे केले, आणि ती इस्राए-
लाच्या सर्व देशाच्या प्रांतांत पाठविली, कारण
कीं त्यानी इस्राएलांत दुष्कर्म व दुष्टाई केली आहे.
७ पाहा, तुह्मी सर्व इस्राएलाचीं संतानें एथें
आपलें सम्मत व बोध काढून द्या." ८ तेव्हां लोक
एका माणसासारिखा उठून बोलले, "आमच्यांतला
कोणी आपल्या घरास जाणार नाहीं, आणि कोणी
आपल्या घराकडे फिरणार नाहीं; ९ परंतु आतां
आह्मी गिब्याविषयीं जी गोष्ट करूं ती हीच;
चिठ्ठ्याप्रमाणें त्यावर जाऊं. १० आणि इस्राए-
लाच्या सर्व वंशांतल्या शंभरांतून दाहा, व हजारां-
तून शंभर, व अयुतांतून हजार, इतकीं माणसें
लोकांसाठीं शिधा आणायाला घेऊं; ह्मणजे त्यानी
जाऊन बन्यामीनाच्या गिब्याने इस्राएलांत जें मूर्ख-
पण केलें, त्या अवघ्याप्रमाणें त्यासीं करावें." ११
मग इस्राएलांतलीं सर्व माणसें एका माणसासारिखीं
जोडलेलीं असतां त्या नगराजवळ मिळालीं. १२
तेव्हां इस्राएलाच्या वंशानी बन्यामीनाच्या सर्व वं-
शांत माणसें पाठवून ह्मटलें, "तुमच्यामध्यें जी दु-
ष्टाई झाली, ती ही कसी? १३ तर आतां तुह्मी
गिब्यांत जीं माणसें ते दुष्ट लोक काढून द्या; ह्म-
णजे आह्मी त्यांस जिवें मारून इस्राएलांत दुष्टाई
नाहींसी करूं." परंतु बन्यामीनानी आपले भाऊ
इस्राएलाचीं संतानें यांची गोष्ट मान्य केली नाहीं.
१४ आणि बन्यामीनाचीं संतानें इस्राएलाच्या सं-
तानांसीं लढायास जायाला आपल्या नगरांतून नि-
घून गिब्याजवळ मिळालीं. १५ तेव्हां त्या दि-
वसीं बन्यामीनाच्या संतानांची झडती नगरांतून
घेतली गेली; ते सवीस हजार तरवारीने लढणारे
पुरुष इतके होते; त्यांखेरीज गिब्यांत राहणारे
यांची झडती घेतली गेली; ते सातशें निवडलेले
पुरुष होते. १६ त्या सर्व लोकांतले सातशें निव-
डलेले पुरुष असे डावरे होते; त्या प्रत्येकाने न
चुकतांना गोफणीने गोटा केसाला देखील मारावा.
१७ आणि बन्यामीन्यांखेरीज इस्राएली माणसांची

झडती घेतली गेली, तेव्हां चार लाख तरवारीने लढणारे पुरुष; ते सर्व लढाऊ पुरुष होते.

१८ मग इस्राएलाचीं संतानें उठून बेथएलास चढून आलीं, आणि त्यानी देवाजवळ विचारितां ह्मटलें, "बन्यामीनाच्या संतानांसीं लढायाला आमच्यांत पहिल्याने कोणी जावें?" तेव्हां परमेश्वराने सांगितलें, "यहूदाने पाहिलें जावें." १९ यास्तव इस्राएलाच्या संतानानी सकाळीं उठून गिब्यावर तळ धरिला. २० मग इस्राएली माणसें बन्यामीन्यासीं लढायाला बाहेर गेलीं, आणि इस्राएली माणसानी त्यासीं लढाई गिब्याजवळ लाविली. २१ तेव्हां बन्यामीनाच्या संतानानी गिब्यांतून निघून त्या दिवसीं इस्राएलांतल्या बावीस हजार पुरुषांस भूमीवर पाडून नाश केला. २२ तथापि लोक ह्मणजे इस्राएलाचीं माणसें धीर धरून जेथें आपण पहिल्या दिवसीं लढाई लाविली होती, त्या ठिकाणीं फिरून करूं लागलीं. (२३ कारण कीं इस्राएलाचीं संतानें चढून जाऊन परमेश्वरापुढें सांजपर्यंत रडलीं होतीं, आणि त्यानी परमेश्वराजवळ असें विचारिलें होतें कीं, माझा भाऊ बन्यामीन याच्या संतानांसीं लढायाला मी फिरून जाऊं कीं काय? तेव्हां परमेश्वराने सांगितलें, "तूं त्यांवर चढून जा.") २४ यास्तव दुसऱ्या दिवसीं इस्राएलाचीं संतानें बन्यामीन्याच्या संतानांवर गेलीं. २५ तेव्हां दुसऱ्या दिवसीं यांसीं भिडायाला बन्यामीनी गिब्यांतून निघाले, आणि त्यानी इस्राएलाच्या संतानांतल्या अणिक अठरा हजार पुरुषांस भूमीवर पाडून नाश केला; हे सर्व तरवारीने लढणारे होते. २६ नंतर सर्व इस्राएलाचीं संतानें ह्मणजे सर्व लोक देवाच्या मंदिराजवळ चढून येऊन रडले, आणि त्यानी तेथें परमेश्वरापुढें राहून त्या दिवसीं सांजपर्यंत उपास केला, आणि परमेश्वरापुढें होम व शांतिकारक यज्ञ केले. २७ आणि इस्राएलाच्या संतानानी परमेश्वराजवळ विचारिलें, कां कीं त्या दिवसांत देवाच्या कराराचा कोश तेथें होता. २८ आणि आहरोनाचा पुत्र एलाजार याचा पुत्र फीनहास त्या दिवसांत त्याच्यापुढें उभा राहत होता; त्यानी असें ह्मटलें कीं, "काय, मी आपला भाऊ बन्यामीन याच्या संतानांसीं लढायाला फिरून जाऊं किंवा राहूं?" तेव्हां परमेश्वराने सांगितलें, "तुह्मी चढून जा; कां कीं उद्यां मी त्यांस तुझ्या हातीं देईन." २९ मग इस्राएलानी गिब्याच्या चहुंकडे दबाधारी ठेविले.

३० मग तिसऱ्या दिवसीं इस्राएलाचीं संतानें बन्यामीन्याच्या संतानांवर चढून गेलीं आणि पूर्वीप्रमाणें त्यानी गिब्याजवळ मांडणूक केली. ३१ तेव्हां बन्यामीन्याचीं संतानें लोकांसीं भिडायाला निघून नगरापासून कांहींसीं दूर गेलीं; आणि पूर्वीप्रमाणें कित्येक लोकांस हाणून पाडूं लागलीं; त्या सडकांतली एक देवाच्या मंदिराकडे आणि दुसरी गिब्याकडे चढून आती, त्याजवळ शेतांत इस्राएलांतल्या लोकांस सुमारें तीस पुरुष त्यानी पाडिले; ३२ यास्तव बन्यामीन्याच्या संतानानी ह्मटलें, "पहिल्यासारिखे ते आमच्यापुढें मारले जातात;" परंतु इस्राएलाच्या संतानानी ह्मटलें "आह्मी पळून त्यांस नगरांतून सडकांवर ओढून आणूं." ३३ नंतर इस्राएलाच्या सर्व माणसानी आपलें ठिकाण सोडून बालतामारांत मांडणूक केली; इस्राएलाचे दबाधारीहि आपल्या ठिकाणांतून ह्मणजे गिब्याजवळच्या माळांतून उठले. ३४ असे सर्व इस्राएलांतले निवडलेले दाहा हजार पुरुष गिब्यापुढें आले, आणि लढाई भारी झाली, तथापि ते समजले नव्हते कीं आपल्यास अनर्थ लागू झाला आहे.

३५ तेव्हां परमेश्वराने बन्यामीनाला इस्राएलापुढें मारिलें; असें इस्राएलाच्या संतानानी त्या दिवसीं बन्यामीन्याच्या पंचवीस हजार आणि शंभर पुरुषांचा नाश केला; ते सर्व तरवारीने लढणारे होते. ३६ बन्यामीन्याच्या संतानानी तर पाहिलें कीं आपण मारले गेलों; हें असें झालें कीं इस्राएली मनुष्यानी गिब्यावर जे दबाधारी ठेविले होते, त्यांचा भरवसा धरिला ह्मणून तीं पळून बन्यामीनी माणसांस ठिकाण दिल्हें. ३७ तेव्हां दबाधाऱ्यानी उतावळी करून गिब्यावर घाला घातला आणि त्यानी धांवत जाऊन त्या सर्व नगराला तरवारीने मारिलें. ३८ तेव्हां दबाधाऱ्यांसंगतीं इस्राएली माणसांचा संकेत होता कीं त्यानी नगरांतून उंच धूर चढवावा. ३९ नंतर इस्राएली माणसानी लढाईंत तोंड फिरविलें; तेव्हां

बन्यामीनी इस्राएली माणसांतले सुमारे तीस पु-
रुष यांस हाणून पाडूं लागले, कां तर त्यानी ह्म-
टलें कीं, "निश्चयें पहिल्या लढाईसारिखे ते आम-
च्यापुढें मारलच जातात." ४० नंतर नगरांतून
धुराचा लोट ऊंच चढूं लागला, तेव्हां बन्यामी-
नानी आपल्या पाठीमागें दृष्टि लाविली, तर पाहा,
संपूर्ण नगराचा जाळ आकाशांत चढला. ४१
तेव्हां इस्राएली माणसें फिरलीं, आणि बन्यामी-
नी माणसांची घालमेल झाली; कारण कीं त्यानी
पाहिलें कीं आपल्यास अनर्थ लागूं झाला आहे.
४२ यास्तव ते फिरून इस्राएलाच्या माणसांपुढून
रानाच्या वाटेने पळाले; तथापि लढाई त्यांसीं
लगटली, आणि जे दुसऱ्या नगरांतले त्यानीहि
आपल्यामध्यें त्यांचा नाश केला. ४३ हे तर
बन्यामीनांस वेढून त्यांच्या पाठीस लागले, आणि
यानी गिब्यासमोर पूर्वेकडे त्यांस अनायासेंकरून
तुडविलें. ४४ असीं बन्यामीनांतलीं अठरा ह-
जार माणसें पडलीं; ते सर्व शूर पुरुष होते.
४५ आणि दुसरे फिरून रानांत रिम्मोन खडका-
वर पळून गेले; तथापि त्यानी त्यांतले पांच हजार
पुरुष सडकांवर वेंचून घेतले, आणि गिदोमापर्यंत
त्यांच्या पाटीसीं लगटून त्यांतले दोन हजार पुरुष
मारिले. ४६ असे त्या दिवसीं बन्यामीनांतले
जे पडले, ते सर्व तरवारीचे लढणारे पंचवीस ह-
जार पुरुष होते; तीं सर्व शूर माणसें होतीं. ४७
परंतु साहाशें पुरुष फिरून रानांत रिम्मोन खड-
कावर पळून गेले, आणि ते रिम्मोन खडकावर
चार महिने राहिले. ४८ नंतर इस्राएली माण-
सानी मागें फिरून बन्यामीन्याच्या संतानांवर जा-
ऊन नगरांतलीं माणसें व पशूंहि जितके सांपडले,
तितक्यांस तरवारीने जिवें मारिलें, अणखी जीं
नगरें अढळलीं त्या सर्वांस आग लाविली.

## अध्याय २१.

इस्राएली माणसानी मिज्प्यांत असी शपथ वा-
हिली होती कीं, "आमच्यांत कोणीहि आपली
कन्या बन्यामीनाला बायको करून न द्यावी." २
नंतर लोक देवाच्या मंदिरास जाऊन तेथें देवापुढें
सांजपर्यंत राहिले, आणि आपली वाणी उंच क-
रून फार रडले. ३ आणि त्यानी ह्मटलें, "हे
इस्राएलाच्या देवा परमेश्वरा, इस्राएलांत असें
कां झालें कीं आज इस्राएलांतून एक वंश नाहीं-
सा झाला आहे." ४ नंतर दुसऱ्या दिवसीं
असें झालें कीं लोकानी पाहटेस उठून तेथें वेदी
बांधिली, आणि होम व शांतिकारक यज्ञ केले.

५ तेव्हां इस्राएलाच्या संतानानी ह्मटलें, "इस्रा-
एलाच्या सर्व वंशांत जो सभेंत परमेश्वराजवळ
चढून आला नव्हता, असा कोण आहे? कां तर
जो परमेश्वराजवळ मिज्प्यांत चढून आला
नाहीं त्याविषयीं असी मोठी शपथ होती कीं, त्या-
ला मारावें." ६ नंतर इस्राएलाच्या संतानानी
आपला भाऊ बन्यामीन याविषयीं पश्चात्ताप क-
रून ह्मटलें, "आज इस्राएलांतला एक वंश छे-
दला गेला; ७ जे उरलेले त्यांस बायका हो-
ण्याविषयीं आह्मी काय करूं? कारण कीं आह्मी
परमेश्वरावरून शपथ वाहिली कीं, आह्मी आ-
पल्या कन्यांतल्या कोणी त्यांस बायका करून दे-
णार नाहीं." ८ यास्तव त्यानी ह्मटलें, "इस्रा-
एलाच्या वंशांतला जो कोणी मिज्प्यांत परमे-
श्वराजवळ चढून आला नाहीं; असा कोण आ-
हे?" तेव्हां पाहा, याबेश गिलादांतून कोणी छा-
वणीच्या सभेंत आला नव्हता. ९ कां कीं लोकां-
ची झडती घेतली गेली, तेव्हां पाहा, याबेश गि-
लाद तेथल्या राहणाऱ्यांतला कोणी तेथें आला
नव्हता. १० यास्तव सभेने शूर तरणे असे बारा
हजार पुरुष तिकडे पाठविले, आणि त्यांस असी
आज्ञा दिल्ही कीं, "तुह्मी जाऊन याबेश गिलादा-
च्या राहणाऱ्यांस बायका पोरांसुद्धां तरवारीने मारा.
११ आणि तुह्माला जें करायाचें तें हेंच कीं सर्व
पुरुषांचा, आणि ज्या सर्व स्त्रियांसीं पुरुषानी संग
केला आहे, त्यांचाहि नाश करावा." १२ तेव्हां
याबेश गिलादाच्या राहणाऱ्यांमध्यें ज्यानी पुरुषा-
चा संगकरून माणसाला जाणिलें नव्हतें, अशा
चारशें कुमारी त्यांस मिळाल्या; आणि त्यानी
त्यांस खनान देशांत शिलोजवळ छावणींत आ-
णिलें.

१३ तेव्हां सर्व सभेने रिम्मोन खडकावर जीं
बन्यामीन्याचीं संतानें होतीं त्यांकडे पाठवून त्यांचें
समाधान करून बोलाविलें. १४ यास्तव त्या वे-
ळेस बन्यामीनी माघारें आले, आणि यानी याबेश

गिलादांतल्या ज्या स्त्रिया वांचविल्या होत्या, त्या
त्यांस बायका करून दिल्या; परंतु त्या त्यांस
पुऱ्या झाल्या नाहींत.
१५ तर लोकांनी बन्यामीनाविषयीं पश्चात्ताप
केला, कारण कीं परमेश्वराने इस्राएलाच्या वं-
शांत खिंडारें केलें होतें. १६ यास्तव सभेच्या
वडिलानीं ह्मटलें, “जे उरलेले त्यांस बायका-
होण्याविषयीं आह्मी काय करावें! कां कीं ब-
न्यामीन्याच्या स्त्रियांचा नाशझाला? १७ अण-
खी त्यांनी ह्मटलें, “इस्राएलांतून एक वंश खो-
डला न जावा, ह्मणून बन्यामीनाच्या उरलेल्यां-
सवतन प्राप्त व्हावें. १८ आणि आमच्याने
आपल्या कन्यांतून त्यांस स्त्रिया करून देववत
नाहींत.” कां तर इस्राएलाच्या संतानांनी असी
शपथ वाहिली होती कीं, “जो बन्यामीनाला
स्त्री करून देतो, त्यावर शाप असो.” १९ नंतर
तें बोलले, “पाहा, शिलोमध्यें परमेश्वरासाठीं
सण वर्षाच्या वर्षीं असतो; तें बेथएलाच्या उत्त-
रेस आहे, जी सडक बेथएलापासून शखेमास
चढून जाती, तिजपासून पूर्वेकडे आणि लबानो
याच्या दक्षिणेस आहे. २० तर त्यांनी बन्या-
मीनाच्या संतानांस असी आज्ञा दिल्ही कीं “तुह्मी
जाऊन द्राक्षमळ्यामध्यें दबा धरा. २१ मग तु-
ह्मी न्याहाळून पाहा; जेव्हां शिलोंतल्या कन्या
नाचायाला ताफ्यांनी निघतात, तेव्हां तुह्मी द्राक्ष-
मळ्यांतून निघून प्रत्येकाने आपापल्यासाठीं शिलों-
तल्या कन्यांतून स्त्री धरून घ्यावी, मग बन्यामीना-
च्या प्रांतास जावें. २२ नंतर जेव्हां त्यांचे बाप
किंवा त्यांचे भाऊ वादी होऊन आमच्याजवळ
येतील, तेव्हां असें होईल कीं आह्मी त्यांसीं बोलूं,
‘तुह्मी त्यांविषयीं आह्मावर कृपा करा, कां तर
लढाईत आह्मी त्यांतील एकएकासाठीं स्त्री धरून
ठेविली नाहीं; अणखी तुह्मी त्यांस देऊन या प्र-
संगीं दोषी झाला नाहीं.” २३ यास्तव बन्यामीन्या-
च्या संतानांनी तसें केलें कीं आपल्या गणतीप्रमाणें
ताफ्यांतून बायका धरिल्या, त्या त्यांनी हिरावल्या.
नंतर तें माघारें आपल्या वतनावर गेले, आणि
तेथलीं नगरें बांधून त्यांत राहिले. २४ तर
त्या वेळेस इस्राएलाचीं संतानें तेथून आपापल्या
वंशाकडे व आपापल्या कुळाकडे निघालीं; असा
एकएक तेथून आपापल्या वतनावर गेला. २५
त्या दिवसांत इस्राएलावर कोणी राजा नव्हता;
प्रत्येक आपापल्या दिसण्यांत जें बरें, तें करीत
होता.

# रूथ हिचें पुस्तक.

## अध्याय १.

आणि न्यायाधीश अधिकार करीत होते, तेव्हां
असें झालें कीं देशांत दुकाळ पडला; तेव्हां
यहूदांतल्या बेथलेहेमांतला कोणी माणूस आपली
स्त्री व आपले दोन पुत्र यांसुद्धां मोवाब देशांत
प्रवास करायास गेला. २ त्या पुरुषाचें नांव तर
अलीमेलेख, व त्याच्या स्त्रीचें नांव नामी, व त्या-
च्या दोघा पुत्रांचीं नांवें माहलोन व खिल्लोन
होतीं; तीं यहूदांतल्या बेथलेहेमांतलीं एफ्राथी
होतीं; तीं तर मोवाब देशांत जाऊन तेथें राहिलीं.
३ नंतर नामीचा नवरा अलीमेलेख मेला, आणि
ती व आपल्या दोघे पुत्रांसुद्धां राहिली. ४ आणि
त्यांनी आपल्यास मोवाबी बायका करून घेतल्या;
एकीचें नांव अर्पा, आणि दुसरीचें नांव रूथ होतें.
असीं तीं तेथें सुमारें दाहा वर्षें राहिलीं. ५ नं-
तर माहलोन व खिल्लोन हे दोघेहि मेले; तसी
ती स्त्री आपले दोघे पुत्र व आपला नवरा यांच्या-
मागें एकटी राहिली. ६ मग ती आपल्या सुना-
सुद्धां उठून मोवाब देशांतून माघारी जायास नि-
घाली; कां तर तिने मोवाब देशांत ऐकिलें होतें
कीं परमेश्वराने आपल्या लोकांवर कृपा करून
त्यांस खायाला दिल्हें आहे. ७ तेव्हां ती ज्या
ठिकाणीं होती, तेथून आपल्या दोघी सुनांसुद्धां नि-
घाली, आणि यहूदा देशांत माघारी जायाला वाटे-
वर चालत होत्या. ८ तेव्हां नामीने आपल्या
दोघी सुनांस सांगितलें, "तुह्मी निघून आपापल्या
माहेरीं माघाऱ्या जा; जसी तुह्मी मेलेले जे त्यांवर
व मजवर दया केली, तसी तुह्मावर परमेश्वर
करो. ९ परमेश्वर तुह्मास असें देवो कीं तुह्मी
आपापल्या नवऱ्याच्या घरीं विसांवा पावावा." ते-
व्हां तिने त्यांचा मुका घेतला, आणि त्या आपला
गळा काढून रडल्या. १० अणखी तिला बोल-
ल्या, "आह्मी निश्चयें तुझ्यासंगतीं तुझ्या लोकांकडे
येऊं." ११ तेव्हां नामीने सांगितलें, "माझ्या
मुलीनो, तुह्मी माघाऱ्या जा; माझ्यासंगतीं कशाला
येतां? तुमचे नवरे व्हायाला मला माझ्या पोटीं
अद्याप पुत्र आहेत कीं काय? १२ माझ्या मुलीनो,
तुह्मी माघाऱ्या जा; कां तर नवरा व्हावा याहून
मी अधिक वृद्ध झालें; जरी ह्मणेन, मला आशा
आहे; जरी याच रात्रीं मी नवऱ्याची होईन,
अणखी मला पुत्र होतील, १३ तर ते वाढत
तोंपर्यंत तुह्मी त्यांची वाट पाहाल कीं काय? तुह्मी
नवऱ्याच्या न होऊन त्यासाठीं खोळंबाल कीं काय?
तेव्हां माझ्या मुलीनो, तर परमेश्वराचा हात
मजवर पडला यामुळें मला तुमच्याविषयीं फार
दुःख वाटतें." १४ तेव्हां त्या फिरून आपला
गळा काढून रडल्या, आणि अर्पा आपल्या सासूचा
मुका घेऊन गेली, परंतु रूथ तिजसीं लगटून रा-
हिली. १५ मग तिने ह्मटलें, "पाहा, तुझी जाऊ
आपल्या लोकांकडे व आपल्या देवांकडे फिरली
आहे; तूं आपल्या जावेमागें फीर." १६ तेव्हां
रूथ बोलली, "मला सोडून माघारा जा, असा
आग्रह मला करूं नको; कां तर जेथें तूं जासील,
तेथें मी येईन; आणि जेथें तूं उतरसील तेथें मी
उतरेन; तुझे लोक ते माझे लोक, आणि तुझा देव
तोच माझा देव. १७ जेथें तूं मरसील तेथें मी
मरेन, आणि तेथें पुरली जाईन; मरणावांचून कशा-
नेहि माझा तुझा वियोग झाला, तर परमेश्वर
मजवर कृपा न करो." १८ तेव्हां ती आपल्या
संगतीं जायाला धैर्याची आहे, हें पाहून तिने
तिजसीं बोलणें सोडिलें.

१९ तेव्हां त्या दोघी बेथलेहेमास तोंपर्यंत
चालत आल्या; त्या बेथलेहेमांत पोहंचल्यावर सर्व
नगर त्यांविषयीं खवळलें, आणि स्त्रिया बोलल्या,
'हीच नामी होय कीं काय?" २० तेव्हां ती
त्यांस बोलली, "तुह्मी मला नामी ह्मणूं नका; म-
ला मारा ह्मणा, कां तर सर्वसमर्थ देव मज-
सीं फार कडूपणाने वागला. २१ मी भरलेली
गेलें, परंतु परमेश्वराने मला माघारें रिकामें आ-

णिलें; तुह्मी मला नामी कशाला ह्मणतां? कां कीं
परमेश्वराने मला खालीं केलें; सर्वसमर्थ देवाने
मला दुःखच दिल्हें आहे. २२ असी नामी
मोवाब देशांतून माघारी आली आणि आपली सून
मोवाबी रूथ तिच्यासुद्धां माघारी आली; त्या
सातू कापण्याच्या प्रारंभीं बेथलेहेमास पोहंचल्या.

## अध्याय २.

तेव्हां नामीच्या नवऱ्याचा कोणी नातलग फार
द्रव्यवान माणूस असा होता; तो अलीमेले-
खाच्या कुळांतला, आणि त्याचें नांव बवाज होतें.
२ त्या काळीं ती मोवाबी रूथ नामीला ह्मणाली,
"कृपेने मला शेतांत जाऊं दे; ह्मणजे ज्याच्या ल-
क्षांत मला मिळेल, त्याच्यामागें मी कणसें वेंचून
घेईन." तेव्हां तिने ह्मटलें, "हे मुली, जा." ३
मग ती निघून गेली, आणि शेतांत कापणाऱ्यांमागें
वेंचूं लागली, तेव्हां अलीमेलेखाच्या कुळांतला जो
बवाज, त्याच्या शेतांतला भाग दैवानें तिला प्राप्त
झाला.
४ तेव्हां पाहा, बवाज बेथलेहेमापासून आला,
आणि तो कापणाऱ्यांस बोलला, "परमेश्वर तुम-
च्यासंगतीं असो." तेव्हां त्यांनी त्याला ह्मटलें,
"परमेश्वर तुला आशीर्वाद देवो." ५ मग बवा-
जाने आपला जो चाकर कापणाऱ्यांवर ठेविला होता,
त्याला ह्मटलें, "ही तरणी कोणाची?" ६ तेव्हां
कापणाऱ्यांवर ठेवलेल्या चाकराने असें उत्तर केलें
कीं, "जी मोवाबी तरणी नामीच्यासंगतीं मोवाब
देशांतून आली ती ही आहे. ७ आणि ही ह्मणाली,
कृपेकरून मला कापणाऱ्यांमागें पेंढ्यांमध्यें वेंचू दे.
मग ती आली, आणि सकाळपासून आतांपर्यंत रा-
हिली, थोडा वेळ घरीं मात्र बसली होती." ८ तेव्हां
बवाजाने रूथेला ह्मटलें, "हे मुली ऐकतीस कीं
नाहीं? तूं दुसऱ्याच्या शेतांत वेंचायाला जाऊं नको,
अणखी एथून ढळूं नको; तर असीच माझ्या चाक-
रिणींजवळ लगटून राहा. ९ हीं जें शेत कापितात,
त्यावर आपली दृष्टि ठेव, आणि या बायकांच्या
पाठीमागें चाल; गडीमाणसांनी तुला त्रास न
द्यावे ह्मणून म्या आज्ञा दिल्ही कीं नाहीं? आणि
जेव्हां तुला ताहान लागेल, तेव्हां तूं पात्रांजवळ
जाऊन, गडी माणसांनी जें भरून ठेविलें त्यांतलेंच
पी." १० तेव्हां ती आपले डोळे भूमीस लावून
पायां पडली, आणि त्याला बोलली, "मी परकी अ-
सतां, मजवर आपण कृपादृष्टि करून माझा समा-
चार कसा घेतला!" ११ तेव्हां बवाजाने तिला
असें उत्तर केलें कीं, "नवरा मेल्यावर तूं आपल्या
सासूजवळ कसी कसी वागलीस तें सर्व साद्यंत
मला कळलें कीं तूं आपला बाप व आपली आई व
आपल्या जन्माचा देश सोडून, जे लोक पूर्वी तुला
माहीत नव्हते, त्या यांत आलीस. १२ परमे-
श्वर तुझ्या कामाची फेड करो, आणि इस्राएलाचा
देव परमेश्वर, ज्याच्या पंखांचा आश्रय कराया-
ला तूं आलीस, त्याजपासून तुला पूर्ण फळ प्राप्त
होवो." १३ तेव्हां ती बोलली, "हे माझ्या धनी,
तुझ्या लक्षांत मला कृपा मिळावी, कां तर त्वां मा-
झें समाधान केलें आहे; अणखी मी तुझ्या एका
दासीसारिखी नसतांहि तूं आपल्या दासीसीं प्रे-
माने बोललास." १४ तेव्हां जेवायाच्या वेळेस
बवाजाने तिला ह्मटलें, "तूं इकडे येऊन कांहीं
भाकर खा, आणि आपला तुकडा कढींत बुचकळ."
यास्तव ती कापणाऱ्यांच्या एका बाजूस बसली,
आणि त्याने तिला हुरपळलेलें धान्य पोहंचविलें;
तिने तर खाऊन तृप्त होऊन उरलें जें तें ठेविलें.
१५ मग ती उठून वेंचायाला गेली; तेव्हां बवा-
जाने आपल्या गडी माणसांस असी आज्ञा दिल्ही
कीं, "हिला पेंढ्यांमध्यें देखील वेंचू द्या, आणि
लाजवूं नका. १६ अणखी वेळोवेळ तिच्यासाठीं
कांहीं मुठी टाकीत जा, आणि ती वेचीत असतां
तिला धमकावूं नका." १७ यास्तव तिने सांज-
पर्यंत शेतांत वेंचिलें; मग जें तिने वेंचिलें होतें,
तें झोडून काढिलें, आणि सुमारें पांच पायली
सातू झाले. १८ मग ती तें घेऊन नगरांत गेली.
तेव्हां जें तिने वेंचून आणिलें होतें, तें तिच्या सा-
सूने पाहिलें; अणखी तिला पुरें होऊन जें उरलें
तेंहि तिने काढून तिला दिल्हें. १९ मग तिच्या
सासूने तिला ह्मटलें, "आज त्वां कोठें वेंचिलें?
काम तरी कोणीकडे केलें? ज्याने तुझा समाचार
घेतला, त्याला आशीर्वाद होवो." तेव्हां तिने
ज्याच्या शेतांत काम केलें होतें, त्याचें वर्त्तमान
सासूला सांगितलें, "ज्या माणसाच्या शेतांत आज
म्यां काम केलें त्याचें नांव बवाज आहे." २० तेव्हां

नामीने आपल्या सुनेला ह्मटलें, "त्याला परमे-
श्वर आशीर्वाद देवो, कां कीं जिवंतांवर व मेलेल्यां-
वर जी त्याची दया ती त्याने सोडिली नाहीं." अ-
णखी नामीने तिला सांगितलें, "तो माणूस आमच्या
कुळांतला जवळचा नातलग आहे." २१ मग
मोआबी रूथ बोलली, "अणखी त्याने मला असें
सांगितलें, माझीं गडी माणसें माझें सर्व पीक
कापून समाप्त करीत तोंपर्यंत तूं त्यांच्याजवळच
राहा." २२ तेव्हां नामीने आपली सून रूथ
इला सांगितलें, "हे मुली, त्वां त्याच्याच चाकरि-
णींच्या बरोबर जावें, आणि त्वां दुसऱ्या शेतांत
लोकांस न अढळावें हें बरें आहे." २३ यास्तव
बवाजाच्या सातूंचीं व गव्हांची कापणी समाप्त
होई तोंपर्यंत ती वेंचणींत त्याच्या चाकरिणींबरो-
बर टिकली, आणि आपल्या सासूजवळ राहिली.

## अध्याय ३.

यानंतर तिची सासू नामी इने तिला ह्मटलें,
"हे मुली, तुझें बरें होण्यासाठीं म्या तुझी
सोय पाहावी कीं नाहीं? २ तर आतां बवाज
ज्याच्या चाकरिणींबरोबर तूं होतीस, तो आमचा
नातलग आहे कीं नाहीं? पाहा, त्याला आज रात्रीं
खळ्यांत सातू उपणायाचे आहेत. ३ यास्तव
तूं आंग धुऊन माखून आपलीं वस्त्रें ले, मग खा-
लीं खळ्याकडे जा; तो माणूस खाणें व पिणें उर-
की तोंपर्यंत त्याच्याजवळ तूं प्रगट होऊं नको.
४ मग तो निजेल तेव्हां असें व्हावें कीं जेथें तो
निजेल तें ठिकाण तूं लक्षांत ठेव; नंतर जाऊन
त्याचे पाय उघडे करून निजीव; तेव्हां तुला जें
करायाचें तें तो तुला सांगेल." ५ मग ही तिला
ह्मणाली, "जें तूं सांगसील, तें अवघें मी करीन."
६ यास्तव तिने खालीं खळ्याकडे जाऊन आपल्या
सासूने बसें जसें सांगितलें होतें, त्याप्रमाणें केलें.
७ बवाजाने तर खालें व तो प्याला आणि त्याचें
मन संतुष्ट झालें, मग तो जाऊन रासीच्या बाजूस
निजला; तेव्हां ती हळूच जाऊन त्याचे पाय उघडे
करून निजली. ८ नंतर मध्यरात्रीं असें झालें
कीं तो माणूस दचकला; कारण कीं तो मुरडला;
तेव्हां पाहा, त्याच्या पायांजवळ स्त्री निजली होती.
९ मग तो बोलला, "तूं कोण?" तेव्हां ती बोलली
"मी आपली दासी रूथ, तर तूं आपला पदर
आपल्या दासीवर विस्तारून घाल, कारण कीं तूं
जवळचा नातलग आहेस." १० तेव्हां तो बोलला,
"हे मुली, तुला परमेश्वर आशीर्वाद देवो; तुझी
ममता पहिल्यापेक्षां शेवटीं बरी झाली, कारण कीं
नवेतरणे, दरिद्री असोत किंवा धनवान असोत,
त्याच्यामागें तूं जात नाहींस. ११ तर, हे मुली,
आतां तूं भिऊं नको; जें तूं सांगसील, तें अवघें
मी तुझ्यासाठीं करीन; कां तर माझ्या नगरांतील
सर्व लोक जाणतात कीं तूं सत्वशीळ स्त्री आहेस.
१२ तर आतां मी जवळचा नातलग आहें खरा,
परंतु माझ्यापेक्षां अधिक जवळचा तुझा एक नात-
लग आहे. १३ तूं या रात्रीं एथें राहा, मग
सकाळीं असें होईल कीं तो तुझ्या जवळचा नात-
लग हें काम करील, तर बरें; त्याने नातलगाचें
काम करावें; परंतु त्याने तुजविषयीं नातलगाचें
काम करायाला न इच्छिलें, तर मी तुजविषयीं
नातलगाचें काम करीन; याविषयीं जीवंत असा जो
परमेश्वर त्याची शपथ; तूं सकाळपर्यंत नीज."
१४ तेव्हां ती त्याच्या पायांजवळ सकाळपर्यंत नि-
जली, मग माणूस आपल्या शेजाऱ्याला ओळखतो
त्या वेळेच्या अगोदर ती उठली; तेव्हां तो बोलला,
"खळ्यांत स्त्री आली, हें कळूं देऊं नको." १५
अणखी तो बोलला, "तूं आपल्या अंगावरली फडकी
पसरून धर." तेव्हां तिने ती पसरली; मग
त्याने तीन पायली सातू मोजून तिच्या खांद्यावर
दिल्हे; मग ती नगरांत आली. १६ आणि आ-
पल्या सासूजवळ आल्यावर तिने ह्मटलें, "तूं कोण?
माझी मूल कीं काय?" मग त्या माणसाकडून आ-
पणास जें जें घडलें, तें सर्व हिने तिला सांगितलें.
१७ अणखी तिने असें ह्मटलें कीं, "त्याने हे तीन
पायली सातू मला दिल्हे; कां कीं त्याने ह्मटलें,
तूं आपल्या सासूजवळ रिकामी जाऊं नको." १८
तेव्हां ती बोलली, "हे मुली, ही गोष्ट कसी घडेल,
हें तुला कळे तोंपर्यंत स्वस्थ ऐस; कां तर तो मा-
णूस ही गोष्ट आज सिद्धीस नेल्यावांचून स्वस्थ
राहणार नाहीं."

## अध्याय ४.

तेव्हां बवाज वेसींत जाऊन तेथें बसला; मग
पाहा, ज्या नातलगाविषयीं बवाज बोलला हो-
ता, तो जवळून जात होता; तेव्हां याने ह्मटलें,
"हे गृहस्था, तूं येऊन एथें बैस." तेव्हां तो येऊन
बसला. २ मग त्याने नगरच्या वडिलांतल्या दाहा
पुरुषांस मिळवून ह्मटलें, "तुह्मी एथें बसा." ते-
व्हां ते बसले; मग त्याने त्या नातलगाला ह्मटलें,
"नामी जी मोवाब देशांतून माघारी आली आहे,
ती आमचा भाऊ अलीमेलेख याच्या शेताचा भाग
विकती. ३ यास्तव माझ्या मनांत होतें कीं तुझ्या
कानावर घालावें, यासाठीं कीं या गांवकऱ्यांसमक्ष
आणि माझ्या लोकांच्या वडिलांसमक्ष त्वां विकत
घ्यावा; जर तूं सोडवून घेसील, तर सोडवून घे;
आणि जर सोडवून घेणार नाहींस, तर मला सांग,
ह्मणजे मला कळेल; कां तर सोडवून घ्याया-
साठीं तुझ्यावांचून कोणी नाहीं, तुझ्यामागें तर
मी आहें." ४ तेव्हां तो बोलला, "मी सो-
डवून घेईन." ५ मग बवाज बोलला, "जेव्हां
तूं तें शेत नामीच्या हातून विकत घेसील, त्या
दिवसीं मेलेल्याचें नांव त्याच्या वतनावर चा-
लावें ह्मणून मेलेल्याची स्त्री मोवाबी रूथ तुला
विकत घेतली पाहिजे." ६ मग तो नातलग बो-
लला, "माझ्याने आपल्यासाठीं सोडवून घेववत
नाहीं, घेतल्यास माझ्या वतनाचा मजकडून बिघड
होईल; माझ्याने सोडवून घेववत नाहीं, यास्तव
तूं आपल्यासाठीं माझा हक्क सोडवून घे." ७ तर
इस्राएलांत सोडवून घेण्याविषयीं व घेण्यादेण्या-
विषयीं पूर्वी असी चाल होती कीं माणूस कोण-
तीहि गोष्ट स्थापायासाठीं आपलें पायतण काढून
आपल्या शेजाऱ्याला देई तें इस्राएलांत प्रमाणच
होतें. ८ यास्तव त्या नातलगाने बवाजाला, "तूं
आपल्यासाठीं विकत घे," असें ह्मणून आपलें पाय-
तण काढिलें. ९ मग बवाज वडिलांस व सर्व
लोकांस बोलला, "आज तुह्मी साक्षी आहां कीं
अलीमेलेखाचें जें तें अवघें, आणि खिल्योन व
माहलोन यांचें जें तें अवघेंहि म्या नामीच्या हा-
तून विकत घेतलें आहे. १० अणखी माहलो-
नाची स्त्री मोवाबी रूथ, तीहि म्या आपल्यासाठीं
बायको करून घेतली आहे; यासाठीं कीं मेले-
ल्याचें नांव त्याच्या वतनावर चालावें, ह्मणजे
मेलेल्याचें नांव त्याच्या बंधुजनामध्यें आणि त्या-
च्या वतनी गांवामध्यें नाहींसें न व्हावें; याविषयीं
तुह्मी आज साक्षी आहां." ११ मग वेसींत जे
सर्व लोक व वडील होते, ते बोलले, "आह्मी
साक्षी आहों; राहेल व लेआ, ज्या दोघींनी इस्रा-
एलाचें घराणें वाढविलें, त्यांसारिखें तुझ्या घरांत
जी स्त्री आली तिलाहि परमेश्वराने करावें,
आणि त्वांहि एफ्राथांत थोरपणा मिळवावा आणि
आपलें नांव बेथलेहेमांत विख्यात करावें. १२
आणि थामारेला यहूदापासून जो फारेज झाला
त्याच्या घरासारिखें या नव्या तरणीच्याठायीं
परमेश्वर तुला संतति देईल तिने तुझें घर व्हावें."
१३ यांप्रकारें बवाजाने रूथ घेतल्यावर ती त्याची
स्त्री असी झाली, आणि तो तिजसीं गेल्यावर प-
रमेश्वराच्या कृपेने ती गरोदर होऊन पुत्र प्रस-
वली. १४ मग स्त्रिया नामीला ह्मणाल्या, "पर-
मेश्वराची स्तुति असो, कां तर त्याने आज तुला
नातलगावांचून राहूं दिलें नाहीं; तर त्याचें नांव
इस्राएलांत विख्यात होवो. १५ आणि तो तुला
वृद्धपणीं जीवन देणारा आणि पाळणारा असा
होवो; कारण कीं तुझी सून, जिची तुजवर प्रीति
आहे, जी सात पुत्रांपेक्षां तुला बरी, तिला तो
झाला आहे." १६ तेव्हां नामीने तें बाळक घेऊन
आपल्या उराशीं धरिलें, आणि ती त्याची दाई
झाली. १७ आणि "नामीला पुत्र झाला," असें
शेजारणिनी बोलून त्याचें नांव ठेविलें; ह्मणजे
त्यांनी त्याचें नांव ओबेद ठेविलें; तो इशायचा
बाप, आणि हा दावीदाचा बाप झाला. १८ तर
फारेजाची असी वंशावळी कीं फारेजापासून
हेस्रोन झाला. १९ नंतर हेस्रोनापासून राम
झाला; मग रामापासून आम्मीनादाब झाला.
२० नंतर आम्मीनादाबापासून नाहाशोन झाला;
मग नाहाशोनापासून साल्मा झाला. २१
नंतर साल्मोनापासून बवाज झाला; मग बवाजा-
पासून ओबेद झाला. २२ नंतर ओबेदापासून
इशाय झाला; मग इशायापासून दावीद झाला.

# शमुवेलाचें पहिलें पुस्तक.

## अध्याय १.

कोणीएक माणूस रामाथाईम सोफीम गांवा-
चा एफ्राइम डोंगरांतील असा होता, आणि
त्याचें नांव एल्काना; तो यरोहामाचा पुत्र, तो अ-
लीहूचा पुत्र, तो तोहूचा पुत्र, तो सूफाचा पुत्र,
तो एफ्राथी असा होता. २ आणि त्याला दोन
बायका होत्या, एकीचें नांव हान्ना आणि दुसरीचें
नांव पनिन्ना; आणि पनिन्नाला लेंकरें होतीं, परंतु
हान्नाला लेंकरें नव्हतीं. ३ आणि तो माणूस
प्रतिवर्षी आपल्या शहरापासून शिलोस सैन्यांच्या
परमेश्वराला भजायास आणि यज्ञहि करायास
जात असे, आणि एलीचे दोन पुत्र हफ्नी व फी-
नहास परमेश्वराचे याजक तेथें होते. ४ आ-
णि वेळ आली असतां एल्कानाने यज्ञ केला,
तेव्हां त्याने आपली बायको पनिन्ना हिला आणि
तिचे सर्व पुत्र व कन्या यांसहि वांटे दिल्हे. ५
परंतु त्याने हान्नाला दुप्पट वांटा दिल्हा, कारण
कीं त्याने तिजवर प्रीति केली; परंतु परमेश्वराने
तिला वांझ केलें होतें. ६ तेव्हां तिच्या वैरिणीने
तिला त्रासिलें आणि छळणूक करून तिचें मन
दुःखित केलें, कारण कीं परमेश्वराने तिला वांझ
केलें होतें. ७ आणि त्याने प्रतिवर्षी असें केलें;
जेव्हां ती परमेश्वराच्या मंदिरास जाई तेव्हां
ही तिला तसाच त्रास देई, ह्मणून ती रडे आणि
खाईना. ८ तेव्हां तिचा नवरा एल्काना तिला
बोलला, "हान्ना तूं कां रडतीस? आणि कां खात
नाहींस? आणि तुझें मन कां दुःखित आहे? मी
दाहा पुत्रांपेक्षां तुला बरा नाहीं कीं काय?"

९ मग शिलोमध्यें खाणें व पिणें झाल्यानंतर
हान्ना उठली, आणि एली जो याजक तो परमे-
श्वराच्या मंदिराच्या खांबाजवळच्या आसनावर
बसला होता. १० तेव्हां ती दुःखाक्रांत मनाची
होती, आणि तिने फार रडून परमेश्वराजवळ
प्रार्थना केली. ११ आणि ती नवस करून बो-
लली, "हे सैन्यांच्या परमेश्वरा, जर तूं आपल्या
दासीचें दुःख पाहसीलच आणि माझी आठवण
करून आपल्या दासीला विसरणार नाहींस, आ-
णि आपल्या दासीला पुत्र देसील, तर मी त्याला
त्याच्या सर्व आयुष्यांत परमेश्वराला अर्पण
करून देईन, आणि वस्तरा त्याच्या डोक्यावर
कधीं फिरणार नाहीं." १२ तेव्हां असें झालें कीं
ती आग्रह करून परमेश्वराची प्रार्थना करीत
असतां एलीने तिच्या तोंडाकडे दृष्टि लाविली.
१३ तेव्हां हान्ना आपल्या मनांत बोलत होती,
तिचे ओंठ मात्र हालत होते परंतु तिचे शब्द ऐकूं
आले नाहींत, ह्मणून एलीला असें वाटलें कीं ती
मस्त आहे. १४ मग एली तिला बोलला कीं,
"किती काळ तूं मस्त होसील? आपल्यापासून
आपला द्राक्षारस दूर कर." १५ तेव्हां हान्ना
उत्तर करून बोलली कीं, "असें नाहीं हे माझ्या
प्रभू, मी दुःखित मनाची बायको आहें, द्राक्षारस
अथवा दारू मी प्यालें नाहीं, परंतु आपला मनो-
भाव परमेश्वराजवळ कळविला आहे. १६
आपली दासी दुष्ट स्त्री आहे असें मोजूं नको,
कारण कीं मला फार क्लेश व यातना झाल्या,
यामुळें या ठिकाणीं मी बोललें आहें." १७ मग
एली उत्तर करून बोलला, "सुखरूप जा, आणि
इस्राएलाचा देव त्याजपाशीं जें विनंती करून त्वां
मागितलें तें तुला देवो." १८ तेव्हां ती बोलली,
"आपल्या दासीवर आपली कृपादृष्टि होऊं द्या."
मग ती बायको निघून आपल्या वाटेने गेली, तेव्हां
तिने खाल्लें आणि तिचें तोंड पुढें म्लान नव्हतें.

१९ आणि सकाळीं उठून परमेश्वरासमोर
त्यांनी भजन केलें, मग तीं निघून रामामध्यें आप-
ल्या घरास गेलीं; आणि एल्कानाने आपली बा-
यको हान्ना हिला अनुभविलें आणि परमेश्वराने
तिला आठविलें. २० आणि हान्ना गरोदर हो-
ऊन तिचे दिवस पूर्ण झाले असतां ती पुत्र प्रसव-
ली, आणि त्याचें नांव शमुवेल असें ठेविलें, कारण

कीं तिने ह्मटलें कीं, "मी त्याला परमेश्वरापा-
सून मागून घेतलें." २१ आणि तो माणूस एलका-
ना आपल्या सर्व कुटुंबासुद्धां प्रतिवार्षीक यज्ञ पर-
मेश्वरापासीं करायास आणि आपला नवस फेडा-
यास गेला. २२ परंतु हान्ना गेली नाहीं, कां कीं ती
आपल्या नवऱ्याला बोलली कीं, "मूल थानतुटक
झाल्यानंतर मी त्याला नेईन, आणि तो परमे-
श्वरासमोर उभा राहील आणि तो तेथें नेहमी
वस्ती करील." २३ तेव्हां तिचा नवरा एलकाना
तिला बोलला, "जें तुला बरें वाटतें तेंच कर, तो
थानतुटक होई तोंपर्यंत राहा, केवळ परमेश्वरा-
ने आपले वचन पूर्ण करावें." आणि ती बायको
राहिली, आणि आपला लेंक थानतुटक होई तों-
पर्यंत तिने त्याला स्तन पाजिलें. २४ आणि तो
मुलगा थानतुटक झाल्यावर तिने आपल्यासंगतीं
त्याला आणि तीन गोऱ्हे व सपिठाचें एक मापभर
व द्राक्षारसाचा एक चबू यांस नेलें, आणि तिने
त्याला शिलोस परमेश्वराच्या मंदिरांत आणिलें;
तेव्हां तो पोर लाहान होता. २५ मग त्यांनी
एका गोऱ्ह्याचा यज्ञ केल्यावर त्या पोराला एली-
जवळ आणिलें. २६ आणि ती बोलली, "हे प्रभू,
माझें ऐकावें, आपण जिवंत आहां हें निश्चित आहे,
तसें हे प्रभू, मी आपल्याला सत्य सांगतें कीं जी
स्त्री एथें तुझ्याजवळ परमेश्वराची प्रार्थना क-
रीत उभी राहिली होती तीच मी आहें. २७
या लेंकासाठीं म्या प्रार्थना केली आणि जी वि-
नंती मी परमेश्वरापासीं केली होती ती त्याने
मला पूर्ण करून दिल्ही; २८ ह्मणून मी त्याला
परमेश्वराजवळ दिल्हें आहे, त्याचें आयुष्य
आहे तोंपर्यंत तो परमेश्वराला दिल्हा आहे;
तेव्हां त्यांनी तेथें परमेश्वराचें भजन केलें.

## अध्याय २.

मग हान्ना प्रार्थनाकरून बोलली कीं, "माझें
मन परमेश्वराच्याठायीं आनंदित आहे, मा-
झें शृंग परमेश्वराने उंच केलें आहे, माझें मुख
माझ्या शत्रूंवर उघडिलें आहे, कां कीं मी तुझ्या-
कडून जें तारण त्यांत आनंद पावतें. २ परमे-
श्वरासारिखा कोणी पवित्र नाहीं, तुझ्याशिवाय
कोणी नाहीं, आमच्या देवासारिखा खडकरूप
असा कोणी नाहीं. ३ अति गर्विष्टपणाने अणखी
बोलूं नका, तुमच्या मुखांतून बढाई न निघो, कां
कीं परमेश्वर ज्ञानाचा देव आहे, तो कृत्यें पार-
खितो. ४ जे पराक्रमी त्यांचीं धनुष्यें मोडलीं
आहेत, आणि जे निर्बल त्यांनी आपणास बळाने
वेष्टीत केलें आहे. ५ जे तृप्त होते ते अन्नासाठीं
मोलमजूरी करीत आहेत, आणि जे भुकेले होते
ते स्वस्थ झाले आहेत; जी वांझ होती ती सात
लेंकरें प्रसवली, आणि जिला फार लेंकरें आहेत
ती अशक्त झाली आहे. ६ जीव घेणारा आणि
जीव देणारा असा परमेश्वर आहे; तो लोकांत-
रांस नेतो आणि तेथून फिरून आणितो. ७ पर-
श्वर दरिद्र करितो आणि द्रव्य देतो, तो नीच
करितो आणि उंच करितो. ८ तो दरिद्र्याला
भूमीपासून उत्थापित करितो आणि भिकाऱ्याला
मळापासून उभा करितो, यासाठीं कीं त्यांनी स-
र्दारांमध्यें बसावें आणि त्यांला गौरवयुक्त राजा-
सन प्राप्त व्हावें; कारण कीं पृथ्वीचा पाया परमे-
श्वराचा आहे, आणि त्यावर त्याने जग ठेविलें
आहे. ९ तो आपल्या भक्तांचे पाय संभाळील,
परंतु जे दुष्ट ते अंधकारांत पडून नाश पावतील
कारण कीं कोणी माणूस बळाने जय पावणार
नाहीं. १० जे परमेश्वरासीं विरुद्ध होतील
ते पराभव पावतील, तो आकाशांतून त्यांवर
गर्जना करील; परमेश्वर पृथ्वींतील सर्व देशांची
न्यायाधिशी करील, आणि तो आपल्या राजाला
शक्ति देईल, आणि आपल्या अभिषिक्ताचें शृंग
उंच करील." ११ मग एलकाना रामांत आ-
पल्या घरास गेला, आणि त्या पोराने एली या-
जक याच्यासमोर परमेश्वराची सेवा केली.

१२ तेव्हां एलीचे पुत्र दुष्ट मनुष्य होते, त्यां-
नी परमेश्वराला जाणिलें नाहीं. १३ आणि
याजकांची रीत असी होती कीं लोकांतील को-
णाएक मनुष्य यज्ञ करूं लागला, मांस शिजत
असतां याजकाच्या चाकराने आपल्या हातीं त्रि-
सूळ घेऊन यावें. १४ आणि परातींत किंवा
गंगाळांत किंवा बहुगुण्यांत किंवा तपेल्यांत मारावा,
आणि जें सर्व त्रिशूळाने धरून ओढिलें तें याज-
काने आपल्यासाठीं घ्यावें; याप्रमाणें शिलोमध्यें
जे सर्व इस्राएली तेथें येत असत त्यांसीं ते करीत

असत. १५ आणि त्यांनी अद्याप मेद जाळाला
नव्हता तेव्हां याजकाचा चाकर येऊन यज्ञ कर्त्या-
जवळ ह्मणत असे कीं, "याजकाला मांस हुरपळ-
ण्यासाठीं दे, कां कीं तो तुझ्यापासून शिजलेलें
मांस घेणार नाहीं, तो कच्चें घेईल." १६ आ-
णि जर कोणीएक मनुष्याने त्याला असें ह्मटलें
कीं, "तो मेद प्रथम जाळावा, मग जेवढें तूं इच्छि-
तोस तेवढें घे;" तेव्हां तो ह्मणे, असें नको पण
आतांच दे, नाहीं तर मी बळात्कार करून घेईन."
१७ असा त्या तरुणांचा दोष परमेश्वराच्या
दृष्टींत फार मोठा होता, कारण कीं त्यामुळें
मनुष्यें परमेश्वराच्या अर्पणास कंटाळलीं.
१८ तेव्हां शमुवेल जो पोर त्याने तागाचें बा-
रीक एफोद कमरेस वेटिलेलें परमेश्वराची सेवा
केली. १९ आणि त्याची आई त्यासाठीं ला-
हान आंगरखा करून आपल्या नवऱ्याबरोबर वा-
र्षिक यज्ञ करायास येत असतां वर्षोवर्षी आणून
त्याला देई. २० तेव्हां एलकाना व त्याची बा-
यको यांस एलीने आशीर्वाद देऊन सांगितलें कीं,
"जें अर्पण तुह्मी परमेश्वराला केलें आहे त्याच्या-
बद्दल परमेश्वर या बायकोपासून तुला संतान
देवो." मग ते आपल्या ठिकाणीं गेले. २१ आ-
णि परमेश्वराने हान्नावर असी कृपा केली कीं
ती गरोदर झाली, आणि तीन पुत्र व दोन कन्या
यांस प्रसवली; आणि शमुवेल जो पोर तो पर-
मेश्वराच्या समोर वाढला. २२ तेव्हां एली
फार ह्मातारा होता, आणि आपल्या पुत्रांनी अव-
घ्या इस्राएलांसीं कसें केलें, आणि सभामंडपाच्या
दाराजवळ ज्या स्त्रिया मिळाल्या त्यांपासीं ते कसे
निजले, हें सर्व त्याने ऐकिलें. २३ तेव्हां तो
त्यांस ह्मणाला कीं, "तुह्मी असीं कृत्यें कां करितां?
कां कीं तुमचीं कुकर्मे या अवघ्या लोकांपासून मी
ऐकत आहें. २४ अहो माझ्या पुत्रांनो, असें
नको, कां कीं जें वर्त्तमान मी ऐकतों तें बरें नाहीं;
परमेश्वराचे लोक तुमच्या योगाने पाप करितात.
२५ जर कोणी माणूस माणसाविरुद्ध पाप करि-
तो तर न्यायाधीश त्याचे न्याय ठरवील, परंतु
जर कोणी माणूस परमेश्वराविरुद्ध पाप करितो
तर त्यासाठीं कोण विनंती करील?" परंतु त्या-
नीं आपल्या बापाचा बोध ऐकिला नाहीं, कां कीं
त्यांचा नाश व्हावा असें परमेश्वराने ठरविलें
होतें. २६ आणि तो मुलगा शमुवेल वाढत
गेला, आणि परमेश्वराच्या व मनुष्यांच्या दृष्टींत
चांगला होता.

२७ तेव्हां देवाकडचा एक माणूस एलीजवळ
येऊन त्याला ह्मणाला, "परमेश्वर असें ह्मणतो
कीं, तुझ्या वडिलाचें कुटुंब मिसरांत फारोच्या
घरीं राहत असतां मी त्याच्या दृष्टीस प्रत्यक्ष पड-
लों नाहीं कीं काय? २८ आणि त्याने याजक
व्हावें व माझ्या वेदीवर यज्ञ करावा व धूप जाळा-
वा व माझ्यासमोर एफोद वेष्टावें, ह्मणून मी त्या-
ला सर्व इस्राएलाच्या वंशांतून काढून आपल्या-
साठीं नेमिलें नाहीं कीं काय? आणि मी तुझ्या
बापाच्या वंशाला इस्राएलाच्या संतानांनी अग्नी-
च्या योगाने केलेलीं सर्व अर्पणें दिल्हीं नाहींत कीं
काय? २९ तर जो माझा यज्ञ व जें माझें अ-
र्पण मी आपल्या मंदिरांत सांगितलें तीं तुह्मी कां
तुच्छ करितां? आणि माझे लोक इस्राएल यांच्या
सर्व अर्पणांतील जीं उत्तम त्यांकडून आपण पुष्ट
होण्याकरितां तूं माझ्यापेक्षां आपल्या पुत्रांस कां
मानितोस? ३० या कारणास्तव इस्राएलाचा
देव परमेश्वर असें ह्मणतो कीं, तुझें कुटुंब व
तुझ्या बापाचें कुटुंब माझ्यासमोर निरंतर चालेल,
असें म्या ह्मटलें खरें; परंतु सांप्रत परमेश्वर
असें ह्मणतो कीं, ही गोष्ट मजपासून दूरच असो,
कारण कीं जे मला मानितात त्यांचा मान मी क-
रीन, परंतु जे मला अपमानितात ते अवमानित
होतील. ३१ पाहा, असे दिवस येणार आहेत
कीं मी तुझा भुज व तुझ्या बापाच्या कुटुंबाचा
भुज कापून टाकीन, आणि तुझ्या घरीं कोणी ह्मा-
तारा असा होणार नाहीं. ३२ आणि जें सर्व
हित इस्राएलांस दिल्हें जाईल त्यामध्यें माझ्या
मंदिरांत तूं एका शत्रूला पाहसील, आणि तुझ्या
कुटुंबांत कोणी ह्मातारा असा कधीं होणार नाहीं.
३३ आणि तुझा जो माणूस मी आपल्या वेदी-
पासून काढून टाकणार नाहीं तो तुझ्या डो-
ळ्यांस दुःख देईल, आणि तुझ्या जिवाला पीडील,
आणि तुझ्या कुटुंबाची सर्व संतति तरुणपणांत
मरेल. ३४ आणि तुला याची खूण ही होईल
कीं तुझे दोन पुत्र हफ्नी व फीन्हास ते दोघे एका

दिवसीं मरण पावतील. ३५ आणि जो माझी
इच्छा व माझी बुद्धि यांप्रमाणें करील असा वि-
श्वासू याजक मी उत्थापित करीन, आणि त्याचें
कुटुंब मी स्थापित करीन, आणि जो माझा अभि-
षिक्त त्यासमोर तो निरंतर चालेल. ३६ तेव्हां
असें होईल कीं तुझ्या घरीं जो कोणी राहिलेला
असेल तो येऊन एक अणीसाठीं व भाकरीच्या
तुकड्यासाठीं त्याच्या पायां पडेल, आणि आर्जव
करून ह्मणेल कीं, मला भाकरीचा तुकडा खा-
यास मिळावा ह्मणून मला याजकसंबंधीं कांहीं
काम सांगावें."

## अध्याय ३.

तेव्हां शमुवेल पोर एलीच्यासमोर परमेश्वरा-
ची सेवा करीत होता, आणि परमेश्वराचा
शब्द त्या दिवसांमध्यें विरळा होता; प्रगटविणें
विस्तारिलें नव्हतें. २ आणि एका दिवशीं असें
झालें कीं एली आपल्या ठिकाणीं निजला होता,
आणि त्याचे डोळे मंद झाले असतां त्याच्यानें
पाहवत नव्हतें; ३ आणि परमेश्वराच्या मं-
दिरांत देवाचा कोश होता, तेथें देवाचा दीप
अद्याप विझला नव्हता, आणि शमुवेल निजला
होता. ४ तेव्हां परमेश्वरानें शमुवेलाला हाक
मारिली, आणि त्यानें उत्तर केलें, "मी एथें आहें."
५ मग तो एलीजवळ धांवत जाऊन ह्मणाला, "मी
एथें आहें, कां कीं त्वां मला बोलाविलें." त्यावर
त्यानें ह्मटलें, "म्या बोलाविलें नाहीं, फिरून जा-
ऊन नीज." तेव्हां तो जाऊन निजला. ६ मग
परमेश्वरानें शमुवेलाला फिरून हाक मारिली;
तेव्हां तो उठला आणि एलीजवळ धांवत जाऊन
बोलला कीं, "मी एथें आहें, कां कीं त्वां मला बो-
लाविलें." त्यावर त्यानें ह्मटलें कीं, "माझ्या पुत्रा,
म्या बोलाविलें नाहीं, परत जाऊन नीज." ७
अद्याप तर शमुवेलानें परमेश्वराला ओळखिलें
नाहीं, आणि अद्याप परमेश्वराचा शब्द त्याला
कळविला गेला नाहीं. ८ मग परमेश्वरानें
शमुवेलाला तिसऱ्यानें हाक मारिली; तेव्हां तो
उठला आणि एलीजवळ धावत जाऊन ह्मणाला
कीं, "मी एथें आहें, कां कीं त्वां मला बोला-
विलें." तेव्हां एलीला समजलें कीं परमेश्वरानें
या पोराला हाक मारिली आहे. ९ मग एली
शमुवेलास ह्मणाला, "तूं जाऊन नीज, आणि
असें होईल कीं जर तो तुला हाक मारील तर
तूं असें ह्मण कीं, हे परमेश्वर बोल, कां कीं
तुझा सेवक ऐकत आहे." तेव्हां शमुवेल जाऊन
आपल्या ठिकाणीं निजला. १० मग परमेश्वर
येऊन उभा राहिला, आणि त्यानें पूर्वीप्रमाणें "श-
मुवेल, शमुवेल," असी हाक मारिली; तेव्हां
शमुवेल ह्मणाला, "बोल, कां कीं तुझा सेवक
ऐकत आहे." ११ मग परमेश्वरानें शमुवे-
लाला सांगितलें कीं, "पाहा, इस्राएलामध्यें मी
असें कार्य करणार आहें कीं जो कोणी तें ऐकेल
त्याचे दोन्ही कान दुखतील. १२ त्या दिवशीं
जें सर्व म्या एलीच्या कुटुंबाविषयीं सांगितलें, तें
आरंभापासून शेवटपर्यंत मी त्याजवळ करीन. १३
कारण म्या त्याला कळविलें कीं जी दुष्टाई त्या-
ला माहीत आहे तिजमुळें मी त्याच्या कुटुंबाला
निरंतर शिक्षा करीन, कां कीं त्याच्या पुत्रांनीं आ-
पणांस बहुत निंद्य केलें आणि त्यानें त्यांस निषे-
धिलें नाहीं. १४ आणि या कारणास्तव एलीच्या
कुटुंबाविषयीं म्या असी शपथ केली आहे कीं
यज्ञ व अर्पण यांकडून एलीच्या कुटुंबाची दुष्टाई
कधींहि दूर केली जाणार नाहीं."

१५ नंतर शमुवेल प्रातःकाळपर्यंत निजला;
मग त्यानें उठून परमेश्वराच्या मंदिराचे दर्वाजे
उघडिले, परंतु शमुवेल हा साक्षात्कार एलीजवळ
सांगायास भ्याला. १६ तेव्हां एलीनें शमुवे-
लाला हाक मारून ह्मटलें कीं, "हे माझ्या पुत्रा
शमुवेला." तेव्हां तो ह्मणाला, "मी एथें आहें."
१७ मग त्यानें ह्मटलें कीं, "जी गोष्ट त्यानें तुला
कळविली होती ती काय आहे? ती आज मज-
पासून गुप्त ठेवूं नको; जी सर्व गोष्ट त्यानें तुला
कळविली तींतून जर कांहीं तूं मजपासून गुप्त ठेव-
सील, तर तसें आणि अधिकहि देव तुजसीं करो.
१८ तेव्हां शमुवेलानें त्या सर्व गोष्टी त्याला सां-
गितल्या, आणि त्यापासून कांहीं गुप्त ठेविलें नाहीं;
मग तो ह्मणाला कीं, "परमेश्वर, त्याच्या मनास
जें बरें वाटेल तें त्यानें करावें." १९ आणि शमु-
वेल वाढला व परमेश्वर त्याला अनुकूळ होता,
आणि त्याच्या सर्व गोष्टींचें कांहीं भूमीस पडलें

नाहीं. २० तेव्हां सर्व इस्राएलांत दानापासून
बैरशेब्यापर्यंत माहीत झालें कीं शमुवेल पर-
मेश्वराने नेमलेला भविष्यवादी असा आहे;
मग परमेश्वर शिलोमध्यें फिरून प्रत्यक्ष झा-
ला, कां कीं परमेश्वर शिलोमध्यें परमेश्व-
राच्या शब्दाकडून शमुवेलास प्रत्यक्ष झाला.

## अध्याय ४.

आणि शमुवेलाचा शब्द सर्व इस्राएलावर
होता; तेव्हां इस्राएली पलिष्ट्यांसीं लढाई
करायास गेले; तेव्हां ते एबेनेजेराजवळ उतरले
आणि पलिष्टी अफेकांत उतरले. २ मग पलिष्टी
इस्राएलांसीं लढायास सिद्ध झाले, आणि लढाई
होऊं लागली असतां इस्राएली पलिष्ट्यांपासून
पराभव पावले, आणि त्यांनी रणभूमींत फोज सु-
मारें चार हजार मारिली. ३ मग लोक छाव-
णींत आले असतां इस्राएलांचे वडील ह्मणाले
कीं, "परमेश्वराने आज आह्मास पलिष्ट्यांपुढें कां
मारिलें? परमेश्वराच्या कराराचा कोश शिलो-
पासून आह्माजवळ आणावा, ह्मणजे आह्मामध्यें
आला असतां तो आमच्या शत्रूंच्या हातून आम-
चें संरक्षण करील." ४ मग लोकानी शिलोस
पाठविलें आणि तेथून सैन्याचा परमेश्वर याच्या
कराराचा जो कोश करूबांमध्यें होता, तो आणि-
ला; आणि एलीचे दोन पुत्र हफ्नी व फीनहास
हे देवाच्या कराराच्या कोशासंगतीं तेथें आले.
५ आणि परमेश्वराच्या कराराचा कोश छावणींत
आला असतां सर्व इस्राएली अशा मोठ्या शब्दाने
ओरडले कीं भूमिहि कांपली. ६ तेव्हां पलिष्टी
या मोठ्या ओरडण्याचा शब्द ऐकून बोलले कीं,
"इब्रींच्या छावणींत हा मोठा पुकारा कशासाठीं
झाला!" मग त्यांस कळलें कीं परमेश्वराचा
कोश त्या छावणींत आला आहे. ७ तेव्हां प-
लिष्टी भयाभीत होऊन बोलले, "देव त्या छाव-
णींत आला आहे." आणि ते बोलले, "आह्मास
हाय हाय, का कीं असी गोष्ट अझून कधीं घडली
नाहीं. ८ आह्मास हाय हाय, या समर्थ देवां-
च्या हातून आह्मास कोण सोडवील? ज्या देवा-
नी मिसऱ्यांस रानांत सर्व पीडांकरून मारिलें, ते
हेच आहेत. ९ अहो पलिष्ट्यांनो, तुह्मी धैर्य
धरा आणि शूर व्हा, जसे इब्री तुमच्या स्वाधीन
होऊन राहिले होते तसे तुह्मी त्यांच्या स्वाधीन न
व्हावे, ह्मणून तुह्मी शूर होऊन लढा." १०
तेव्हां पलिष्टी लढले, आणि इस्राएलांचा पराभव
होऊन ते प्रत्येक माणूस आपापल्या राहोटीस पळून
गेले आणि फार मोठा घात झाला, असें कीं इस्रा-
एलांचे तीस हजार पायदळ पडले. ११ आणि
परमेश्वराचा कोश घेतला होता, आणि एलीचे
पुत्र हफ्नी व फीन्हास हे मरण पावले.
१२ तेव्हां बन्यामीनांतील एक माणूस लढाई-
पासून पळाला, आणि त्याचीं वस्त्रें फाटलेलीं व
त्याच्या डोक्यावर माती घातलेली असा तो त्या
दिवसीं शिलोजवळ आला. १३ आणि तो पो-
हंचला तेव्हां पाहा एली रस्त्याच्या बाजूस एका
आसनावर बसून वाट पाहत होता, कां कीं देवा-
च्या कोशाविषयीं त्याचें मन चिंतातुर होतें; आ-
णि जेव्हां त्या माणसाने नगरांत येऊन लढाई-
चें वर्त्तमान सांगितलें, तेव्हां सर्व नगर विलाप
करूं लागलें. १४ आणि एलीने त्या विलापाचा
शब्द ऐकून विचारिलें कीं, "या गोंगाटाचा शब्द
काय आहे?" मग तो माणूस उतावळी करून
आला व एलीला समजाविलें. १५ तेव्हां एली
अठ्याण्णव वर्षांचा होता, आणि त्याचे डोळे मंद
झाले असतां त्याच्याने पाहवत नव्हतें. १६ आ-
णि तो माणूस एलीला ह्मणाला कीं, "मी लढाई-
पासून आलों आहें, होय मी लढाईपासून आजच
पळून आलों." १७ मग तो ह्मणाला, "माझ्या
पुत्रा, काय झालें आहे?" तेव्हां तो दूत उत्तर
करून बोलला कीं, "इस्राएली पलिश्त्यांपुढून पळा-
ले, आणि लोकांचा बहुत वध झाला, आणि तुझे
दोन पुत्र हफ्नी व फीनहास तेहि मरण पावले,
आणि देवाचा कोश नेला आहे." १८ आणि
असें झालें कीं त्याने, देवाचा कोश, असें उच्चा-
रिला तेव्हांच तो दर्वाज्याच्या बाजूजवळ आसना-
वरून मागें पडला, आणि तो ह्मातारा व धष्टपुष्ट
माणूस असतां त्याची मान मोडून तो मेला, आ-
णि त्याने इस्राएलांची न्यायाधिशी चाळीस वर्षें
केली होती. १९ तेव्हां त्याची सून फीन्हा-
साची बायको गर्भिणी प्रसवोन्मुख झाली असतां,
देवाचा कोश नेला आहे आणि आपला सासरा

व आपला नवरा मेले, असें वर्त्तमान जेव्हां तिने
ऐकिलें तेव्हांच ती लवून प्रसवली, कां कीं तिला
वेदना लागल्या· २० आणि तिच्या मरणाच्या वेळे
स ज्या बायका तिच्याजवळ उभ्या राहिल्या त्यानी
ह्मटलें कीं, "भिऊं नको, कां कीं तूं पुत्र प्रसवली
आहेस·" परंतु तिने उत्तर केलें नाहीं आणि लक्ष
दिल्हें नाहीं· २१ तेव्हां तिने लेंकाचें नांव इखा-
बोद असें ठेवून ह्मटलें कीं, "गौरव इस्राएलापा-
सून गेलें आहे;" (कारण कीं देवाचा कोश नेला
होता, आणि तिचा सासरा व आपला नवरा हे
मेले होते). २२ आणि ती बोलली कीं, "गौरव
इस्राएलापासून गेलें आहे, कारण कीं परमेश्वरा-
चा कोश नेला आहे."

## अध्याय ५.

तेव्हां पलिष्ट्यानी देवाचा कोश घेऊन एबेनेजे-
रापासून आशदोदांत नेला. २ आणि पलि-
ष्ट्यानी देवाचा कोश घेतल्यावर दागोनाच्या देव-
ळांत तो आणिला, आणि तो दागोनाजवळ ठेविला.
३ मग दुसऱ्या दिवशीं आशदोदकरी पाहाटेस
उठले, तेव्हां पाहा देवाच्या कोशापुढें दागोन भू-
मीस पालथा पडला होता; तेव्हां त्यानी दागोन
घेऊन त्याला त्याच्या ठिकाणीं ठेविलें· ४ मग
ते दुसऱ्या दिवशीं पाहाटेस उठले, तेव्हां पाहा
देवाच्या कोशापुढें दागोन भूमीवर पालथा पडला
होता, आणि त्याचें डोकें व त्याचे हात उंबऱ्यावर
मोडून पडले होते; केवळ दागोनाचें धड त्याला
राहिलें· ५ याकरितां दागोनाचे याजक व जे
सर्व दागोनाच्या देवळांत जाणारे ते आजपर्यंत
आशदोदांत दागोनाच्या उंबऱ्यावर पाय ठेवीत
नाहींत· ६ मग परमेश्वराचा हात आश-
दोद कऱ्यांवर भारी झाला आणि जे आशदोदांत
व त्याच्या सीमांमध्यें होते त्यांस त्याने मारिलें,
आणि मूळव्याधीकरून पीडिलें· ७ तेव्हां आश-
दोदाचीं मनुष्यें हें पाहून बोललीं कीं, "इस्राएला-
च्या देवाचा कोश आह्मामध्यें राहणार नाहीं,
कां कीं त्याचा हात आह्मावर व आमचा देव दा-
गोन यावर भारी आहे·" ८ तेव्हां त्यानी दूतांस
पाठवून पलिष्ट्यांच्या सर्व सर्दारांस आपल्याजवळ
एकवट केलें; आणि त्यांस विचारिलें कीं, "इस्रा-
एलाच्या देवाच्या कोशाविषयीं आह्मी काय क-
रावें? तेव्हां ते बोलले कीं, "इस्राएलाच्या देवाचा
कोश गाथांत न्यावा." तेव्हां त्यानी इस्राएलाच्या
देवाचा कोश तेथें नेला· ९ मग असें झालें
कीं त्यानी त्याला तेथें नेल्यावर परमेश्वराचा
हात त्या नगराचे हाल करून फार भारी होता,
आणि त्याने लाहानांपासून मोठ्यांपर्यंत त्यांस पी-
डिलें, आणि त्यांस मूळव्याधि लागली.
१० मग त्यानी देवाचा कोश एक्रोनांत पाठ-
विला, तेव्हां असें झालें कीं देवाचा कोश आला
असतां एक्रोनकरी ओरडून ह्मणाले कीं, "त्यानी
आह्मास व आमच्या लोकांस मारायास इस्राए-
लाच्या देवाचा कोश आह्माजवळ आणिला आ-
हे." ११ मग त्यानी दूतांस पाठवून पलिष्ट्यांच्या
सर्व सर्दारांस एकवट केलें; तेव्हां ते त्यांस बो-
लले कीं, "इस्राएलाच्या देवाचा कोश त्याच्या
ठिकाणास पाठवून द्यावा, नाहीं तर तो आह्मास
व आमच्या लोकांस मारील;" कारण कीं सर्व
नगरांस भयंकर रोग लागला, तेथें देवाचा
हात फार भारी होता. १२ आणि जीं माणसें
मेलीं नाहींत त्यांस मूळव्याधीची पीडा झाली,
आणि त्या नगराचा आकांत आकाशाकडे गेला·

## अध्याय ६.

आणि देवाचा कोश पलिष्ट्यांच्या मुलखांत
सात महिने राहिला· २ तेव्हां पलिष्ट्या-
नी याजकांस व ज्योतिष्यांस बोलावून त्यांस ह्म-
टलें कीं, "परमेश्वराच्या कोशाविषयीं आह्मी
काय करूं? आह्मी त्याला त्याच्या ठिकाणास कसें
पाठवावें, हें आह्मास सांगा." ३ तेव्हां ते बोलले,
"जर तुह्मी इस्राएलाच्या देवाचा कोश माघारें पा-
ठवाल तर तो रिकामा पाठवूं नका, परंतु त्याजबळ
अर्पण अगत्य पाठवावें, ह्मणजे तुह्मी निरोगी व्हाल,
आणि त्याचा हात तुह्मावरून काढिला जात ना-
हीं, याचें कारण तुह्मास माहीत होईल." ४
तेव्हां ते बोलले, "जें अर्पण त्याजवळ आह्मी पा-
ठवायाचें तें काय आहे?" तेव्हां ते बोलले, "प-
लिष्ट्यांच्या सर्दारांच्या गणनेप्रमाणें पांच मूळव्या-
धीच्या मोडांच्या सुवर्णाकृती व पांच सोन्याचे
उंदीर; कां कीं तुह्मा सर्वांस व तुमच्या सर्दारांस

सारिखीच महामारी लागली आहे. ५ आणि
तुमच्या मूळव्याधीच्या मोडांच्या मूर्त्ति आणि जे
उंदीर तुमच्या शेतांचा नाश करितात त्यांच्याहि
मूर्त्ति तुह्मी करा; असा इस्राएलाच्या देवाचा
मान तुह्मी करा, ह्मणजे कदाचित् तो आपला हात
तुह्मावरून आणि तुमच्या देवांवरून आणि तुम-
च्या शेतांवरून काढून घेईल. ६ जसीं मिसरी
व फारो यानीं आपलीं अंतःकरणें कठीण केलीं,
तसीं तुह्मी आपलीं अंतःकरणें कठीण कां करितां?
त्याने त्यांमध्यें अद्भुत कृत्यें केल्यानंतर त्यानी
त्यास जाऊं दिल्हें आणि ते निघाले, असें नाहीं
कीं काय? ७ तर आतां तुह्मी एक नवी गा-
डी सिद्ध करा, आणि दोन दुपत्या गाई ज्यांवर
जूं कधीं आलें नाहीं, अशा घ्या; मग त्या गाईस
गाडीस जुंपा, आणि त्यांचीं वासरें वेगळीं करून
गोठ्यांत ठेवा. ८ मग परमेश्वराचा कोश घे-
ऊन त्या गाडीवर ठेवा, आणि जीं सोन्याचीं पात्रें
तुह्मी अर्पणासाठीं त्याजवळ पाठवितां तीं त्याच्या
बाजूसीं एका डब्यांत ठेवा, आणि ती पाठवून जा-
ऊं द्यावी. ९ मग तुह्मी पाहा, जर बेथशमशा-
कडे त्याच्या सीमेच्या मार्गाने ती गेली, तर त्याने
आह्मास ही मोठी पीडा लाविली खरी; परंतु जर
तसी ती गेली नाहीं, तर आह्मी जाणूं कीं त्याचा
हात आह्मास लागला नाहीं, दैवाने हें आह्मावर
पडलें."

१० तेव्हां त्या माणसानी तसें केलें, ह्मणजे त्या-
नी दोन दुपत्या गाई घेऊन गाडीला जुंपल्या, आ-
णि त्यांचीं वासरें गोठ्यांत ठेविलीं. ११ मग त्यानी
परमेश्वराचा कोश व तो डबा व सोन्याचे उं-
दीर व मूळव्याधीच्या मोडांच्या मूर्त्ति यास गा-
डींत ठेविले. १२ तेव्हां त्या गाई नीट वाट ध-
रून मोठ्या मार्गाने बेथशमशाकडे गेल्या; हुंबरतां
हुंबरतां गेल्या, आणि उजव्याकडे अथवा डाव्या-
कडे फिरल्या नाहींत; आणि पलिष्ट्यांचे सर्दार
त्याच्यामागें बेथशमशाच्या सीमेपर्यंत गेले. १३
तेव्हां बेथशमशाचे शेतकरी खोऱ्यांत गहूं कापीत
होते, आणि त्यानी आपले डोळे वर करितांच तो
कोश त्यांच्या दृष्टीस पडला, आणि तो पाहून ते
आनंद पावले. १४ मग ती गाडी यहोशवा बे-
थशमशी याच्या शेतांत आली, आणि तेथें रा-
हिली; तेव्हां तेथें एक मोठा दगड असतां त्यानी
गाडीचें लाकूड तोडून परमेश्वराजवळ त्या गा-
ईचा यज्ञ केला. १५ मग लेव्यानी परमेश्वरा-
चा कोश व त्यांतला डबा ज्यांत तीं सोन्याचीं
भूषणें होतीं तीं घेऊन त्या मोठ्या दगडावर ठेविलीं,
आणि बेथशमशाच्या माणसानी त्याच दिवसीं
परमेश्वराजवळ होम व यज्ञ केले. १६ तेव्हां
पलिष्ट्यांचे पांच सर्दार तें पाहून त्या दिवशीं
एक्रोनास परत गेले. १७ आणि जे सोन्याच्या
मूळव्याधीचे मोडे पलिष्ट्यानी परमेश्वराजवळ
अर्पणासाठीं पाठविले ते असे होते कीं, आशदो-
दासाठीं एक, गाजासाठीं एक, आशकलोनासाठीं
एक, गाथासाठीं एक, आणि एक्रोनासाठी एक.
१८ आणि अबेलाजवळ जो मोठा दगड ज्यावर
त्यानी परमेश्वराचा कोश ठेविला त्यापर्यंत पलि-
ष्ट्यांतील जीं सर्व नगरें (त्या पांच सर्दाराकडे जीं
सपरिघ नगरें व खेडीं गांवें) त्यांच्या गणनेप्रमाणें
ते सोन्याचे उंदीर होते; तो दगड आजपर्यंत
यहोशवा बेथशमशी याच्या शेतांत आहे. १९
मग परमेश्वराने बेथशमशाच्या मनुष्यांस मा-
रिलें, का कीं त्यानी त्याच्या कोशांत पाहिलें,
ह्मणजे त्याने पन्नास हजार लोकांतील सत्तर
माणसांस मारिलें; मग लोकानी शोक केला,
कारण कीं परमेश्वराने लोकांचा फार नाश
केला होता. २० तेव्हां बेथशमशाचीं माण-
सें बोललीं, परमेश्वर हा पवित्र देव याच्या-
समोर उभा राहण्याची शक्ति कोणाला आहे?
तो आह्मापासून कोणीकडे जाईल? २१ मग
त्यानी किर्याथयारीमाच्या लोकांजवळ दूतास पा-
ठवून ह्मटलें कीं, "पलिष्ट्यानी परमेश्वराचा
कोश माघारीं आणिला आहे, तुह्मी खालीं येऊन
तो आपल्याकडे न्या."

## अध्याय ७.

तेव्हां किर्याथयारीमाचीं माणसें आलीं, आणि
त्यानी परमेश्वराचा कोश नेऊन अबीनादा-
बाच्या घरांत डोंगरावर ठेविला, आणि त्यानी त्या-
चा पुत्र एलाजार याला परमेश्वराचा कोश
राखायास शुद्ध केलें. २ आणि असें झालें
कीं कोश किर्याथयारीमांत ठेविल्यावर बहुत वेळ

चालून गेला, कां कीं वीस वर्षें झालीं, आणि सर्व
इस्राएलाच्या लोकांनी परमेश्वराकडे फिरून
शोक केला. २ मग शमुवेलाने अवघ्या इस्राए-
लाच्या लोकांस असें ह्मटलें कीं, "जर तुह्मी आ-
पल्या सर्व मनाने परमेश्वराकडे फिरतां, तर आ-
पल्यापासून अन्य देव व आष्टारोथ दूर करा, आणि
आपलीं अंतःकरणें परमेश्वराकडे लावा आणि
केवळ त्याची सेवा करा, ह्मणजे तो तुह्मास पलि-
ष्ट्यांच्या हातांतून सोडवील." ४ तेव्हां इस्राएलाच्या
संतानानीं बालीम व आष्टारोथ यांस दूर केलें,
आणि तीं केवळ परमेश्वराची सेवा करूं लागलीं.
५ मग शमुवेल बोलला, "सर्व इस्राएलांस मिज-
पेजवळ एकवट करा, ह्मणजे मी तुह्मासाठीं पर-
मेश्वरापाशीं विनंती करीन." ६ तेव्हां ते मिज-
पेजवळ एकवट मिळाले, आणि त्यानी पाणी काढून
परमेश्वरासमोर ओतिलें, आणि त्या दिवशीं उ-
पास करून ते तेथें बोलले कीं, "आह्मी परमे-
श्वराविरुद्ध पाप केलें." तेव्हां शमुवेलाने मि-
ज्पेंत इस्राएलाच्या संतानांची न्यायाधिशी के-
ली. ७ तेव्हां पलिष्ट्यानी ऐकिलें कीं इस्राएली
मिज्पेजवळ मिळाले, ह्मणून पलिष्ट्यांचे सर्दार
इस्राएलावर चढून आले; तेव्हां इस्राएलाचीं सं-
तानें हें ऐकून पलिष्ट्यांमुळें भयाभीत झालीं. ८
आणि इस्राएलाचीं संतानें शमुवेलास बोललीं
कीं, "आमचा देव परमेश्वर याने आह्मास
पलिष्ट्यांच्या हातांतून सोडवावें ह्मणून त्यापाशीं
विनंती करायास उशीर करूं नको."

९ तेव्हां शमुवेलाने एक तान्हें कोंकरूं घेऊन
त्याचा सांगोपांग यज्ञ परमेश्वराजवळ केला;
आणि शमुवेलाने इस्राएलासाठीं परमेश्वराचा
धांवा केला, आणि परमेश्वराने त्याचें ऐकिलें.
१० आणि शमुवेल यज्ञ करीत असतां पलिष्टी
इस्राएलासीं लढाई करायास जवळ आले, आणि
त्या वेळेस परमेश्वराने पलिष्ट्यांवर मोठ्या श-
ब्दाने गर्जना केली, ह्मणून ते भयाभीत होऊन
इस्राएलापुढें मारिले गेले. ११ मग इस्राएलाचीं
माणसें मिज्पेंतून निघालीं, आणि पलिष्ट्यांच्या
पाठीस लागून बेथकारापर्यंत त्यांस मारीत गेले.
१२ तेव्हां शमुवेलाने एक दगड घेऊन मिज्पे व
शेण यांमध्यें तो उभा केला, आणि त्याला एबे-
नेजेर असें नांव ठेवून ह्मटलें कीं, "एथपर्यंत पर-
मेश्वराने आमचें सहाय केलें आहे." १३
असें पलिष्टी पराभूत होऊन फिरून इस्राएलाच्या
सीमेंत आले नाहींत, आणि शमुवेलाच्या सर्व आ-
युष्यांत परमेश्वराचा हात पलिष्ट्यांविरुद्ध हो-
ता. १४ आणि अक्रोनापासून गाथापर्यंत जीं
नगरें पलिष्ट्यानी इस्राएलापासून घेतलीं होतीं तीं
त्यानी इस्राएलास माघारीं दिल्हीं, आणि त्यांचे
सभोंवतील प्रदेश इस्राएलानी पलिष्ट्यांच्या हा-
तांतून घेतले आणि इस्राएली व आमोरी यांमध्यें
सल्ला होता. १५ आणि शमुवेल जिवंत होता
तोंपर्यंत त्याने इस्राएलाची न्यायाधिशी केली. १६
आणि तो वर्षोंवर्षीं बेथएल व गिल्गाल व मिज्-
पे यांत अनुक्रमाने गेला, आणि त्या अवघ्या ठि-
काणीं त्याने इस्राएलाची न्यायाधिशी केली. १७
परंतु राम्यास तो परतून येत असे, कारण कीं
तेथें त्याचें घर होतें, आणि तेथें त्याने इस्राएला-
ची न्यायाधिशी केली, आणि तेथें त्याने परमे-
श्वरासाठीं वेदी बांधिली.

## अध्याय ८.

तेव्हां असें झालें कीं शमुवेल ह्मातारा झाला
असतां त्याने आपल्या पुत्रांस इस्राएलावर
न्यायाधीश केलें. २ आणि त्याच्या वडील पु-
त्राचें नांव योएल होतें, आणि दुसऱ्या पुत्राचें
नांव अबीया होतें; बेरशेबांत ते न्यायाधीश होते.
३ तेव्हां त्याच्या रीतीप्रमाणें त्याचे पुत्र चालले
नाहींत, परंतु लाभ साधायास फिरले, आणि त्या-
नी लांच घेऊन अन्याय केला. ४ मग इस्राए-
लाचे सर्व वडील एकवट मिळाले, आणि शमु-
वेलाजवळ राम्यामध्यें आले. ५ आणि ते त्यास
असें बोलले कीं, "पाहा, तूं ह्मातारा झाला आहेस,
आणि तुझे पुत्र तुझ्या रीतीप्रमाणें चालत नाहींत;
आतां आमची न्यायाधीशी करायास आह्मावर
राजा नेमावा, तर आह्मी इतर सर्व लोकांसारिखे
होऊं." ६ परंतु "आमची न्यायाधिशी करायास
आह्मास राजा दे," असी जी गोष्ट त्यानी सां-
गितली ती शमुवेलाला वाईट वाटली, यास्तव
शमुवेलाने परमेश्वरापाशीं प्रार्थना केली. ७
मग परमेश्वर शमुवेलाला बोलला, "लोक-

नीं जी सर्व विनंती केली ती ऐक, कारण कीं,
त्यांनीं केवळ तुला नाकारिलें असें नाहीं, म्या
त्यांवर राज्य करावें ह्मणून त्यांनीं मलाहि नाका-
रिलें· ८ म्या त्यांस मिसरांतून आणिलें त्या दि-
वसापासून आजपर्यंत ज्या सर्व कामांप्रमाणें त्यांनीं
केलें आहे, आणि मला सोडून अन्य देवांची सेवा
केली, तसें त्यांनीं तुजसीं केलें आहे. ९ तर
आतां त्यांची विनंती ऐक, परंतु जो राजा त्यां-
वर राज्य करील त्याची वहिवाट त्यांस खचीत
करून सांग आणि त्यांस समजीव."

१० मग शमुवेलानें आपणापासीं ज्या लो-
कांनीं राजा मागितला होता त्यांजवळ परमेश्व-
राचीं सर्व वचनें सांगितलीं· ११ आणि तो
त्यांस बोलला, "जो राजा तुह्मावर राज्य करील
त्याची वहिवाट असी होईल कीं तो तुमचे पुत्र
घेऊन आपल्या रथांसाठीं व आपल्या घोड्यांसाठीं
आपल्याजवळ ठेवील, आणि त्याच्या रथांपुढें ते
धांवतील. १२ आणि तो आपल्याजवळ त्यांस
हजारांचे सर्दार व पन्नासांचे सर्दार ठेवील, आ-
णि आपलीं शेतें नांगरायास आणि आपलीं पिकें
कापायास आणि आपलीं लढाईचीं शस्त्रें व
आपलीं रथाचीं शस्त्रें करायास त्यांस घेईल.
१३ आणि तो हलवाइणी व सैपाकिणी व पोळ्या
करणारिणी अशा होण्यासाठीं तुमच्या कन्या घे-
ईल. १४ आणि तुमचीं शेतें व तुमचे द्राक्ष-
मळे व तुमचे जैतूनाचे मळे यांत जीं उत्तम फळें
तीं घेऊन तो आपल्या चाकरांस देईल. १५
आणि तुमचीं पिकें व तुमचे द्राक्षमळे यांचा दश-
मांश घेऊन तो आपल्या कारभाऱ्यांस व आपल्या
चाकरांस देईल. १६ आणि तुमचे चाकर व
तुमच्या चाकरिणी व तुमच्या तरुणांमध्यें जे उत्तम
व तुमचे गाढव यांस घेऊन तो आपल्या कामास
लावील. १७ तुमच्या मेंढरांचा दशमांश तो
घेईल आणि तुह्मी त्याचे चाकर व्हाल. १८
आणि जो राजा तुह्मी आपल्यासाठीं निवडिलेला
त्यामुळें त्या वेळेस तुह्मी ओरडाल, परंतु पर-
मेश्वर त्या वेळेस तुमचें ऐकणार नाहीं." १९
मग लोक शमुवेलाचा बोध ऐकायास नाकारून
बोलले कीं, "असें नाहीं, परंतु आह्मावर राजा
असावा, ह्मणजे आह्मी अन्य लोकांसारिखे होऊं.
२० आणि आमचा राजा आमची न्यायाधिशी
करील, आणि आमच्यापुढें चालेल, आणि आ-
मच्या लढाया करील." २१ तेव्हां शमुवेलानें
लोकांचे सर्व शब्द ऐकिले आणि परमेश्वरा-
जवळ सांगितले. २२ मग परमेश्वर शमुवे-
लाला बोलला, "त्यांची सर्व विनंती ऐक आणि
त्यांवर राजा ठेव." तेव्हां शमुवेल इस्राएलाच्या
मनुष्यांस बोलला, "तुह्मी प्रत्येक माणूस आपा-
पल्या नगरास जा."

## अध्याय ९.

तेव्हां बन्यामीनांतील एक माणूस होता आणि
त्याचें नांव कीश; तो अबीएलाचा पुत्र, तो
जरोराचा पुत्र, तो बखोराथाचा पुत्र, तो अफीया-
चा पुत्र, आणि तो बन्यामी फार समर्थ माणूस
होता. २ आणि त्याला एक शाऊल नामक पुत्र
होता, तो तरुण व सुंदर होता, आणि सर्व इस्रा-
एलांमध्यें त्याहून कोणी सुंदर नव्हता; त्याच्या
खांद्यांस सर्व लोक लागत, इतका तो उंच होता.
३ तेव्हां शाऊलाचा बाप कीश याचीं गाढवें
बहकलीं होतीं ह्मणून कीश आपला पुत्र शाऊल
याला बोलला कीं, "आतां तूं आपल्यासंगतीं चाक-
रांतील एक घेऊन नीघ, आणि जाऊन गाढवां-
चा शोध कर. ४ मग तो इफ्राइम डोंगराकडून
जाऊन शालीशा प्रांतांत आला, परंतु तीं गाढवें
त्यांस सांपडलीं नाहींत; मग ते शालीम प्रांतांत
आले, आणि तीं गाढवें तेथें नव्हतीं; मग ते
बन्यामीनांच्या प्रांतांत आले, परंतु त्यांस सांप-
डलीं नाहींत.

५ आणि जुफाच्या प्रांतांत आल्यावर शाऊल
आपल्यासंगतीं जो चाकर होता त्याला बोलला
कीं, "या, आपण माघारे जाऊं, नाहीं तर माझा
बाप गाढवांची काळजी सोडून आमची चिंता
करील." ६ आणि तो त्याला बोलला, "आतां
पाहा, या नगरांत देवाचा मनुष्य असा एक आहे,
आणि तो मनुष्य मान्य आहे, जें सर्व तो सांगेल
तें पूर्ण होईलच होईल; आपण आतां तेथें जाऊं,
ह्मणजे आपण कोणत्या वाटेनें जावें हें कदाचित्
तो आपणास सांगेल." ७ मग शाऊल आपल्या
चाकराला बोलला कीं, "आह्मी जाऊं, परंतु पाहा,

त्या मनुष्याला आह्मी काय देऊं? कां कीं आम-
च्या भांड्यांमध्यें कांहीं भाकरी उरल्या नाहींत,
आणि देवाच्या मनुष्याला भेटीसाठीं कांहीं रा-
हिलें नाहीं; आमच्याजवळ काय आहे?" ८
तेव्हां तो चाकर फिरून शाऊलाजवळ उत्तर
करून बोलला कीं, "पाहा माझ्या हातांत एक पाव
शेकेल रुपें आहे, तें मी देवाच्या मनुष्याला दे-
ईन, ह्मणजे तो आमची वाट आह्मास सांगेल."
९ पूर्वी इस्राएलांत कोणी देवाजवळ विचार
करायास जात असतां तो बोलत असे कीं, या,
आपण गुरूपाशीं जाऊं; कारण कीं ज्याला आतां
भविष्यवादी ह्मणतात त्याला पूर्वी गुरु ह्मटलें होतें.
१० मग शाऊल त्या चाकराला बोलला कीं,
"तुझें बोलणें चांगलें आहे, या, आपण जाऊं."
तेव्हां ज्या नगरांत देवाचा मनुष्य होता तेथें
ते गेले. ११ आणि ते डोंगरावर नगराकडे च-
ढत असतां कन्या पाणी काढायास बाहेर येतां
त्यांस भेटल्या. तेव्हां ते त्यांस बोलले कीं, "एथें
गुरु आहे कीं काय?" १२ मग त्या उत्तर करून
त्यांस बोलल्या, "होय तो आहे, पाहा तो तुह्मा-
पुढें आहे, आतां लवकर जा, कां कीं आज तो
नगरांत आला; कारण कीं आज उंचस्थानीं लो-
कांचा यज्ञ आहे. १३ तुह्मी नगरांत जातांनाच
तो उंचस्थानीं खायास चढल्यापूर्वी त्याला भेटाल,
आणि तो येऊन यज्ञाला आशीर्वाद देई तोंपर्यंत
लोक खाणार नाहींत, त्यानंतर जे बोलाविलेले
आहेत ते खातील; तर आतां वर जा, कां कीं
या वेळेस त्याला तुह्मी भेटाल." १४ मग ते
नगरांत गेले, आणि नगरांत पोहंचून पाहा शमु-
वेल उंचस्थानी चढायास निघून त्यांस भेटला.
१५ आणि शाऊलाच्या येण्यापूर्वी एक दिवस
परमेश्वर शमुवेलाला कळवून बोलला कीं, १६
"उद्यां सुमारें या वेळेस बन्यामीन प्रांतांतून एक
माणूस मी तुझ्याजवळ पाठवीन, आणि माझे लोक
इस्राएल यांचा अधिकारी होण्यासाठीं त्याला अ-
भिषेक तूं कर, आणि तो पलिष्ट्यांच्या हातांतून
माझ्या लोकांस सोडवील; कारण कीं म्या आपल्या
लोकांस पाहिलें आहे, आणि त्यांचें ओरडणें मा-
झ्याजवळ आलें आहे." १७ मग शमुवेल शाऊ-
लाला पाहत असतां परमेश्वर त्याला ह्मणाला,
"पाहा, ज्या माणसाविषयीं म्या तुला सांगितलें
तो हाच आहे; हा माझ्या लोकांवर अधिकार
करील." १८ तेव्हां शाऊल शमुवेलाजवळ द-
वाज्यांत येऊन बोलला कीं, "गुरूचें घर कोठें आ-
हे, हें कृपा करून मला सांग. १९ मग शमुवेल
उत्तर करून शाऊलाला बोलला कीं, "मीच गुरु
आहें, माझ्यापुढें उंचस्थानीं वर जा, कां कीं आज
माझ्यासंगतीं तुह्मी जेवाल, आणि तुझ्या मनांत जें
सर्व आहे तें सकाळीं सांगून तुला निरोप देईन.
२० आणि तुझीं जीं गाढवें तीन दिवसांमागें बह-
कलीं त्यांची काळजी करूं नको, कारण कीं तीं
सांपडलीं आहेत; अणखी इस्राएल लोकांची सर्व
इच्छा कोणाकडे आहे? तुझ्याकडे व तुझ्या बा-
पाच्या सर्व घराण्याकडे आहे कीं नाहीं?" २१
तेव्हां शाऊल उत्तर करून बोलला, "मी बन्या-
मीनी, इस्राएलाच्या वंशांमध्यें सर्वांहून धाकट्या
वंशांतील असा मी नाहीं कीं काय? आणि ब-
न्यामीनाच्या वंशामध्यें सर्व घराण्यांपेक्षां माझा घ-
राणा लाहान नाहीं कीं काय? तर मला असी
गोष्ट कां सांगितली?" २२ मग शमुवेलाने शाऊल
व त्याचा चाकर यांस घेऊन भोजनशाळेंत आणिलें
आणि जे बोलाविलेले त्यांमध्यें त्यांस उंच ठिकाणीं
बसविलें; ते सुमारें तीस माणसें होतीं. २३
मग शमुवेल सैपाक्याला बोलला कीं, "जो विभाग
मी तुला देऊन आपल्याजवळ ठेव, असें सांगितलें
तो आण." २४ तेव्हां सैपाक्याने मांडी व जें
तिच्या संबंधीं तें घेऊन शाऊलापुढें ठेविलें; मग
शमुवेल बोलला कीं, "पाहा जें राहिलें आहे तें
आपल्यापुढें ठेवून खा, कां कीं म्या लोकांस बोला-
विलें त्या वेळेपासून तुझ्यासाठीं तें राखिलें आहे."
असें त्या दिवशीं शाऊल शमुवेलासंगतीं जेविला.
२५ आणि त्या उंचस्थानावरून नगरांत उत-
रल्यावर घराच्या अगाशीवर शमुवेलाने शाऊ-
लाशीं संभाषण केलें. २६ आणि ते पाहाटेस
उठले आणि उजेडलें असतां शमुवेलाने शाऊ-
लाला अगाशीवर बोलावून ह्मटलें, "सिद्ध हो,
ह्मणजे मी तुला निरोप देईन." तेव्हां शाऊल
सिद्ध झाला, मग तो व शमुवेल ते दोघेजण बाहेर
गेले. २७ ते नगराच्या शेवटाजवळ उतरले अ-
सतां शमुवेल शाऊलाला बोलला कीं, "चाकराने

आम्हापुढें चालावें ह्मणून त्याला सांग;" (मग
तो तसा चालला), "परंतु तूं अमळ थांब, ह्मणजे
मी तुला देवाचें वाक्य समजावीन."

## अध्याय १०.

तेव्हां शमुवेलाने तेलाची कुपी घेऊन शाऊला-
च्या डोक्यावर ओतिली, आणि त्याचें चुंबन घे-
ऊन ह्मटलें कीं, "परमेश्वराने तुला आपल्या लो-
कांवर अधिकारी अभिषेकिलें आहे, ह्मणून हें झालें
कीं नाहीं? २ माझ्यापासून आज गेला असतां
राहेलेच्या कबरेजवळ बन्यामीनाच्या प्रांतात से-
ल्जाहामध्यें तुला दोन माणसें भेटतील, आणि
तीं तुला ह्मणतील कीं, ज्या गाढवांचा शोध
करायास तूं गेलास तीं सांपडलीं आहेत, आणि
पाहा तुझा बाप गाढवांची काळजी सोडून तुझी
चिंता करून बोलतो कीं, मी आपल्या पुत्रासाठीं
काय करूं? ३ मग तूं तेथून पुढें जाऊन था-
बोराच्या सपाटीवर पोहंचल्यावर तेथें एक तीन
करडें नेणारा व एक तीन भाकरी नेणारा व एक
द्राक्षारसाची बुधली नेणारा, असीं तीन माणसें दे-
वाजवळ बेथएलेस जात असतां तुला भेटतील.
४ आणि तीं तुला कुशळप्रश्न करून तुला दोन
भाकरी देतील, आणि तूं त्या त्यांच्या हातांतून
घेसील. ५ यानंतर देवाचा डोंगर जेथें पलि-
ष्ट्यांची चौकी आहे तेथें जासील, आणि तूं तेथें
नगराजवळ पोहंचला असतां भविष्यवाद्यांचा स-
मुदाय आणि त्यांच्यापुढें सतार व संबळ व सनयी
व सारंगी असे वाजविणारे उंचस्थानावरून उत-
रतां तुला भेटतील, आणि ते स्तवन करितील. ६
मग परमेश्वराचा आत्मा तुजवर येईल, आ-
णि त्यांच्यासंगतीं तूं स्तवन करसील, आणि तूं
पालटून निराळा माणूस होसील. ७ आणि जेव्हां
ह्या अवघ्या खुणा तुला प्राप्त होतील तेव्हां असें
होवो कीं जसें तुझ्या मनास येईल तसें तूं कर, कां
तर तुला देव अनुकूळ होईल. ८ तेव्हां माझ्या
अगोदर तूं खालीं गिल्गालास जा, आणि पाहा
होम करायास व शांतिकारक यज्ञ करायास मी
खालीं तुझ्याजवळ येईन; मी तुझ्याजवळ येईं
तोंपर्यंत सात दिवस तूं राहसील, मग तूं काय
करसील तें मी तुला समजावीन."

९ तेव्हां असें झालें कीं शमुवेलापासून जा-
यास तो फिरला असतां देवाने त्याला नवी बुद्धि
दिल्ही, आणि त्या दिवसीं त्या सर्व खुणा झाल्या.
१० आणि जेव्हां डोंगराजवळ ते आले तेव्हां
पाहा भविष्यवाद्यांचा समुदाय त्याला भेटला, आ-
णि देवाचा आत्मा त्यावर आला आणि तो त्या-
च्यासंगतीं स्तवन करूं लागला. ११ तेव्हां असें
झालें कीं ज्या सर्वांनी पूर्वीं त्याला ओळखिलें
त्यानी जेव्हां पाहिलें कीं तो भविष्यवाद्यांच्यासं-
गतीं स्तवन करीत आहे, तेव्हां तीं माणसें एक-
मेकांस असें बोललीं कीं, "कीशाच्या पुत्राला
काय झालें आहे? शाऊल भविष्यवाद्यांमध्यें आहे
कीं काय?" १२ तेव्हां तेथील एक माणूस उत्तर
करून बोलला कीं, त्यांचा बाप तर कोण आहे?
यावरून असी ह्मण झाली कीं, शाऊल तर भ-
विष्यवाद्यांमध्यें आहे कीं काय? १३ मग स्तवन
करणें समाप्त केल्यावर तो उंचस्थानाजवळ आला.
१४ तेव्हां शाऊलाचा काका त्याला व त्याच्या
चाकराला बोलला कीं, "तुह्मी कोठें गेला होतां?"
तेव्हां तो बोलला कीं, "आह्मी गाढवांचा शोध
करीत गेलों, आणि तीं सांपडत नाहींत असें पा-
हून आह्मी शमुवेलाजवळ गेलों." १५ मग शा-
ऊलाचा काका बोलला कीं, "शमुवेल तुह्मास
काय बोलला हें कृपेकरून मला सांग." १६ तेव्हां
शाऊल आपल्या काकाला बोलला कीं, "त्याने
आह्मास खचीत सांगितलें कीं गाढवें सांपडलीं
आहेत." परंतु राज्याची जी गोष्ट शमुवेल बो-
लला तिजविषयीं त्याने त्याला सांगितलें नाहीं.

१७ मग मिस्पेमध्यें परमेश्वराजवळ श-
मुवेलाने लोकांस बोलाविलें. १८ तेव्हां तो इस्रा-
एलाच्या संतानांस बोलला, "इस्राएलाचा देव
परमेश्वर असें बोलतो कीं, म्या मिसरांतून इ-
स्राएलास आणिलें, आणि मिसरांच्या हातांतून
व ज्या सर्व राजांनी तुह्मास पीडिलें त्यांच्या हा-
तांतून तुह्मास सोडविलें. १९ आणि तुमचा देव
ज्याने तुमच्या सर्व शत्रूंपासून व तुमच्या संकटां-
तून तुह्मास सोडविलें त्याला आज तुह्मी नाका-
रिलें, आणि तुह्मी त्याला बोलला कीं, आह्मावर
राजा करून ठेव; तर आतां तुह्मी आपल्या वंशां-
प्रमाणें व आपल्या हजारांप्रमाणें असे परमेश्वरा-

समोर उभे राहा." २० मग शमुवेलाने इस्राए-
लाच्या सर्व वंशास जवळ आणिलें, आणि बन्या-
मीनाचा वंश घेतला होता. २१ मग त्याने बन्या-
मीनाचा वंश त्यांच्या घराण्यानी जवळ आणिला
आणि मात्रीचा घराणा घेतला होता, आणि की-
शाचा पुत्र शाऊल तो घेतला होता; तेव्हां त्यानी
त्याला शोधिलें परंतु तो त्यांस सांपडला नाहीं.
२२ मग त्यानी परमेश्वराला अणखी विचारिलें
कीं, "तो माणूस इकडे फिरून येईल कीं काय!"
तेव्हां परमेश्वर बोलला, "पाहा तो खटल्यामध्यें
लपला आहे." २३ मग ते धांवत गेले आणि
त्याला तेथून आणून लोकांमध्यें उभें केलें; आणि
त्याच्या खांद्यास सर्व लोक लागत इतका तो
उंच होता. २४ तेव्हां शमुवेल सर्व लोकांस
बोलला, "ज्याला परमेश्वराने नेमलें आहे त्या-
ला तुह्मी पाहत नाहीं कीं सर्व लोकांमध्यें त्या-
सारिखा कोणी नाहीं!" मग सर्व लोक मोठ्या
शब्दाने बोलले कीं, "हा राजा चिरकाळ वांचो."
२५ तेव्हां शमुवेलाने राज्याचे नेम लोकांस सां-
गितले, आणि पुस्तकांत लिहून परमेश्वरासमोर
ठेविले; मग शमुवेलानें सर्व लोकांतील प्रत्येक
माणसाला आपल्या घरास जाण्याची आज्ञा दिल्ही.
२६ आणि शाऊलहि आपल्या घरास गिब्यांत
गेला, आणि ज्यांच्या मनाला देवाने प्रेरिलें असीं
कित्येक माणसें त्याच्यासंगतीं गेलीं. २७ परंतु
कित्येक दुष्ट माणसें बोललीं कीं, हा आमचें रक्षण
कसा करील! आणि असी त्यानी त्याची उपेक्षा
करून त्याजवळ कांहीं भेट आणिली नाहीं;
तथापि तो उगाच राहिला.

## अध्याय ११.

मग नाहाश आम्मोनी याने जाऊन याबेशगिला-
दास वेढा घातला; तेव्हां याबेशांतल्या सर्व
माणसानी त्याला ह्मटलें, "आह्मासीं करार कर,
ह्मणजे आह्मी तुझी सेवा करूं." २ तेव्हां ना-
हाश आम्मोनी त्यांस ह्मणाला, "मी तुह्मासीं
असा करार करीन कीं मी तुह्मामध्यें प्रत्येकाचा
उजवा डोळा फोडून अवघ्या इस्राएलावर निंदा-
रूप बट्टा असा लावीन." ३ तेव्हां याबेशाच्या
वडिलानी त्याला ह्मटलें, "आह्मास सात दिव-
सांचा अवकाश दे, ह्मणजे इस्राएलाच्या सर्व प्रां-
तांत आह्मी दूतांस पाठवूं, आणि जर कोणीएक
आमचें तारण करायास येत नाहीं तर आह्मी
बाहेर तुझ्याजवळ येऊं."

४ आणि त्या दूतानी शाऊलाच्या गिब्याज-
वळ येऊन ह्या गोष्टी लोकांस सांगितल्या, तेव्हां
अवघे लोक मोठ्याने रडून शोक करूं लागले.
५ आणि शाऊल रानांतून ढोरांमागें आला, आ-
णि शाऊल ह्मणाला कीं, "लोकांस काय झालें
ह्मणून रडतात!" मग त्यानी त्याला याबेशांतील
माणसांचें वर्त्तमान सांगितलें. ६ तेव्हां शाऊ-
लाने हें वर्त्तमान ऐकिलें असतां त्याजवर देवाचा
आत्मा आला, आणि तो फार क्रोधयुक्त झाला.
७ मग बैलांची जोडी घेऊन त्याने त्यांचे तुकडे
केले, आणि दूतांच्या हातांकडून इस्राएलाच्या सर्व
प्रांतांत पाठवून सांगितलें कीं, "तुह्मामधील जो
कोणी शाऊल व शमुवेल यांच्यामागें येत नाहीं,
त्याच्या बैलांस तसें केलें जाईल." तेव्हां परमेश्व-
राचें भय लोकांस पडलें आणि ते एकचित्तेंकरून
निघाले. ८ मग त्याने बाजकांत त्यांची पाहणी
केली, आणि इस्राएलाचीं संतानें तीन लाख होतीं,
आणि यहूदाचीं माणसें तीस हजार होतीं. ९
तेव्हां जे दूत आले होते त्यांस त्यानी असें ह्मट-
लें कीं, "तुह्मी याबेशगिलादाच्या माणसांस असें
सांगा कीं, उद्यां सूर्य तप्त होऊं लागेल तेव्हां
तुमचें तारण होईल." मग दूतानी जाऊन याबे-
शाच्या मनुष्यांस तसें सांगितलें; तेव्हां ते आनंद
पावले. १० मग त्यानी नाहाश आम्मोनीला
ह्मटलें कीं, "उद्यां आह्मी तुह्माजवळ बाहेर येऊं,
आणि जें तुमच्या दृष्टींत बरें दिसेल तें तुह्मी
करा. ११ मग सकाळीं असें झालें कीं शाऊ-
लाने लोकांचे तीन विभाग केले, आणि त्यानी
तळांत चौथ्या प्रहरास येऊन आम्मोन्यांस दिव-
साच्या उष्णतेपर्यंत जिवें मारिलें, आणि जे राहिले
त्यांची असी दाणादाण झाली कीं एका ठिकाणीं
दोन मिळाले नाहींत.

१२ तेव्हां लोकानी शमुवेलाला ह्मटलें कीं,
"शाऊल आह्मावर अधिकार करील कीं काय!
असें जो बोलला तो कोण आहे! तीं माणसें
काढून दे, ह्मणजे आह्मी त्यांस जिवें मारूं."

१३ मग शाऊल ह्मणाला, "आज कोणीएक माणूस
जिवें मारिला जाणयाचा नाहीं, कारण कीं आज
परमेश्वराने इस्राएलामध्यें तारण केलें आहे."
१४ तेव्हां शमुवेलाने लोकांस ह्मटलें, "चला, आ-
पण गिल्गालास जाऊं आणि तेथें राज्य फिरून
स्थापूं." १५ मग सर्व लोक गिल्गालास गेले,
आणि गिल्गालांत परमेश्वरासमोर त्यांनी शा-
ऊलाला राजा नेमलें, आणि तेथें परमेश्वरास-
मोर त्यांनी शांतिकारक यज्ञ केले; तेव्हां तेथें
शाऊल व इस्राएलाचीं सर्व माणसें फार आनंद
पावलीं.

## अध्याय १२.

तेव्हां शमुवेलाने अवघ्या इस्राएलास ह्मटलें,
"पाहा, जी सर्व विनंती तुह्मी मजपासीं केली
ती म्या मानिली आहे, आणि तुह्मावर, एक राजा
नेमला आहे. २ तर आतां पाहा, तो राजा
तुह्मासमोर चालत आहे, आणि मी ह्मातारा हो-
ऊन पिकलेल्या केसांचा झालों आहें; आतां पाहा
माझे पुत्र तुमच्याजवळ आहेत आणि मी आपल्या
तरुणपणापासून आजपर्यंत तुमच्यासमोर चाललों
आहें. ३ पाहा, मी एथें आहें; जर म्या कोणी-
एकाचा बैल घेतला आहे, अथवा म्या कोणीएका-
चा गाढव घेतला आहे, अथवा म्या कोणीएकाला
फसविलें, अथवा म्या कोणीएकावर बलात्कार केला,
अथवा कोणीएकाच्या हातून लांच घेऊन त्याविषयीं
म्या आपल्या डोळ्यांस झांकिलें, तर परमेश्वरा-
समोर आणि त्याच्या अभिषेकलेल्यासमोर मला
सांगा, आणि मी तुह्माजवळ परत देईन." ४
तेव्हां त्यांनी ह्मटलें कीं, "त्वां आह्मास फसविलें,
अथवा आह्मावर बलात्कार केला, अथवा कोणी-
एका माणसाच्या हातून कांहीं घेतलें, असें नाहीं."
५ मग तो त्यांस ह्मणाला, "तुह्माविषयीं परमे-
श्वर साक्षी आहे, आणि त्याच्या अभिषेकलेला
साक्षी आहे कीं माझ्या हातीं तुह्मास कांहीं सांप-
डलें नाहीं;" तेव्हां त्यांनी ह्मटलें, "तो साक्षी
आहे."

६ मग शमुवेल लोकांस ह्मणाला, "परमे-
श्वर ज्याने मोशे व आहरोन यांस अधिकारी
करून ठेविलें, आणि ज्याने तुमच्या वडिलांस
मिसर देशांतून आणिलें तो साक्षी आहे. ७
तर आतां तुह्मी राहा, आणि जे सर्व उपकार
परमेश्वराने तुह्मावर व तुमच्या वडिलांवर केले
त्यांविषयीं मी परमेश्वरासमोर तुह्मास बोध
करितों. ८ जेव्हां याकोब मिसरांत गेला आणि
तुमच्या वडिलांनी परमेश्वराजवळ धांवा केला,
तेव्हां परमेश्वराने मोशे व आहरोन यांस
पाठविलें, आणि त्यांनी तुमच्या वडिलांस मिस-
रांतून आणून या ठिकाणीं ठेविलें. ९ परंतु त्यां-
चा देव परमेश्वर याला ते विसरले, ह्मणून
त्याने सीसरा जो हासोराचा सेनापति त्याच्या
हातीं व पलिष्ट्यांच्या हातीं व मोवाबाचा राजा
याच्या हातीं त्यांस दिल्हें, आणि हे त्यांसीं लढले.
१० मग त्यांनी परमेश्वराला हाक मारून असें
ह्मटलें कीं, "आह्मी पाप केलें, कारण कीं आह्मी
परमेश्वराला सोडून बालीम व आश्तारोथ
यांची सेवा केली, परंतु आतां आमच्या शत्रूंपासून
आह्मास तूं सोडीव, ह्मणजे आह्मी तुझी सेवा
करूं." ११ मग परमेश्वराने यरूब्बाल व बा-
राक व इफ्ताह व शमुवेल यांस पाठवून तुम-
च्या सभोंवतील शत्रूंच्या हातांतून तुह्मास सो-
डविलें, आणि तुह्मी स्वस्थ राहिलां. १२ परंतु
आम्मोनी लोकांचा राजा नाहाश आपल्यावर आ-
ला आहे, असें जेव्हां तुह्मी पाहिलें तेव्हां तुह्मी
मला ह्मटलें कीं, आमची अवस्था असी नसो,
तर आह्मावर राजा राज्य करो, आणि तुमचा
देव परमेश्वर तोच तुमचा राजा होता. १३
तर आतां जो राजा तुह्मी निवडून घेतला, ज्याला
तुह्मी इच्छिलें त्याला पाहा, आणि पाहा परमे-
श्वराने तुह्मावर राजा ठेविला आहे. १४ जर
तुह्मी परमेश्वराचें भय धरून त्याला मानाल
आणि परमेश्वराचें वाक्य ऐकून त्याच्या अधि-
काऱ्याविरुद्ध न फिताल, तर तुह्मी व जो राजा
तुह्मावर राज्य करितो तोहि तुमचा देव परमे-
श्वर याला मानीत जाईल. १५ परंतु जर तुह्मी
परमेश्वराचें वाक्य न ऐकून त्याच्या अधिकाऱ्या-
विरुद्ध फिताल, तर परमेश्वराचा हात तुह्मा-
विरुद्ध होईल; जसा तुमच्या वडिलांविरुद्ध, तसा.
१६ तर आतां राहा, आणि जो मोठा उद्योग तुम-
च्या दृष्टीसमोर परमेश्वर करील, तो पाहा. १७

आज गव्हांची कापणी आहे कीं नाहीं? परमेश्व-
राला मी हाक मारीन, आणि तो गर्जना व वृष्टि
करील, मग तुह्मी असें आणाल व पाहाल कीं
तुह्मी आपल्यासाठीं राजा मागण्याने मोठा अपराध
परमेश्वराच्या दृष्टींत केला आहे. १८ तेव्हां
शमुवेलाने परमेश्वराला हाक मारिली, आणि
त्या दिवसीं परमेश्वराने गर्जना व वृष्टि केली,
आणि सर्व लोकांस परमेश्वर व शमुवेल यांचें
फार भय पडलें. १९ तेव्हां अवघ्या लोकांनी
शमुवेलाला ह्मटलें कीं, "आह्मी न मरावें ह्मणून
आमचा देव परमेश्वर यापासीं आपल्या सेव-
कांसाठीं विनंती कर, कारण कीं आह्मी आपल्या-
साठीं राजा मागण्याने आपल्या सर्व पापांवर अ-
णखी पाप केलें आहे."

२० मग शमुवेलाने लोकांस ह्मटलें, "भिऊं
नका, हें सर्व पाप तुह्मी केलें खरें, तथापि परमे-
श्वराचें अनुसरण सोडून फिरूं नका, परंतु आ-
पल्या संपूर्ण मनाने त्याची सेवा करा. २१ आ-
णि तुह्मी फिरूं नका, कां कीं जे उपयोगी नाहींत
आणि ज्यांच्याने रक्षण करवत नाहीं अशांकडे
कशाला जावें? कां कीं ते व्यर्थच आहेत. २२
तुह्मास आपले लोक करणें हें परमेश्वराला बरें
वाटलें, ह्मणून परमेश्वर आपल्या मोठ्या नामा-
मुळें आपले लोक टाकणार नाहीं. २३ आणि
मी तुह्मासाठीं परमेश्वरापासीं प्रार्थना करायास
सोडणें हें पाप मजपासून न घडो, परंतु जो मार्ग
चांगला व खरा तो मी तुह्मास शिकवीन. २४
केवळ परमेश्वराला भ्या, आणि खरेपणाने व
आपल्या संपूर्ण मनाने त्याला माना; कां कीं केव-
ढीं मोठीं कृत्यें त्याने तुह्मासाठीं केलीं आहेत,
तीं ध्यानांत आणा. २५ परंतु जर दुष्टाई तु-
ह्मी कराल तर तुह्मी आपल्या राजासुद्धां नाश
पावाल."

### अध्याय १३.

शाऊलाने एक वर्ष राज्य केलें; आणि दोन
वर्षें इस्राएलावर राज्य करीत असतां, २
शाऊलाने आपल्यासाठीं इस्राएलांतून तीन हजार
माणसें निवडून घेतलीं, आणि त्यांतून दोन हजार
शाऊलासंगतीं मिखमाशांत व डोंगरावरील बेथ-
एलांत होतीं, आणि योनाथानासंगतीं बन्यामीना-
तील गिब्यांत एक हजार होतीं; आणि बाकीच्या
लोकांस त्याने आपापल्या घरांस पाठविलें. ३
यानंतर योनाथानाने पलिष्ट्यांचें जें ठाणें गिब्यांत
होतें तें मारिलें, आणि पलिष्ट्यानी हें ऐकिलें;
तेव्हां शाऊलाने सर्व मुलखांत करणा वाजवून
ह्मटलें कीं, "इब्री ऐकोत." ४ आणि शाऊलाने
पलिष्ट्यांतील एक ठाणें मारिलें आहे आणि पलि-
ष्ट्यांनीं इस्राएल घाणेरेसे मानिलें, असें सर्व इस्रा-
एलानी ऐकिलें, आणि लोक शाऊलाजवळ गिल्-
गालांत एकत्र मिळाले.

५ मग तीस हजार रथ व साहा हजार स्वार
व समुद्राच्या वाळूसारिखे लोक, असे पलिष्टी
इस्राएलासीं लढाई करायास मिळाले, आणि त्यानी
मिखमाशांत जाऊन बेथवेनासमोर आपला मुक्काम
केला. ६ मग इस्राएलाच्या माणसानी पाहिलें
कीं आपणास संकट पडलें आहे, कारण कीं लोक
दुःखित होते, आणि गुहा व झाड्या व खडक व
कडे व विवरें यांमध्यें लोक लपून राहिले. ७
तेव्हां कित्येक इब्री लोक यार्देनेच्या पलिकडे गाद
व गिलाद या प्रांतांत गेले; परंतु शाऊल तोंपर्यंत
गिल्गालांत राहिला, आणि सर्व लोक त्याच्यामागें
कांपत चालले. ८ आणि त्याने जो काळ शमु-
वेलाने सांगितलेला ह्मणजे सात दिवस इतका
उशीर केला, परंतु शमुवेल गिल्गालास आला
नाहीं, आणि लोक त्यापासून जाऊं लागले. ९
तेव्हां शाऊलाने ह्मटलें कीं, "होमपशू व शांति-
कारक यज्ञपशू मजकडे आणा." तेव्हां त्याने होम
केला, १० आणि त्याने होम समाप्त केल्यावर
पाहा शमुवेल आला, आणि शाऊल त्याला स-
लाम करायास जाऊन भेटला.

११ तेव्हां शमुवेलाने ह्मटलें, "त्वां काय केलें
आहे!" मग शाऊलाने ह्मटलें कीं, "लोक मजपा-
सून जाऊं लागले, आणि दिवसाच्या नेमाप्रमाणें
तूं आला नाहींस, आणि मिखमाशाजवळ पलिष्टी
एकत्र मिळाले हें जेव्हां म्या पाहिलें, १२ तेव्हां
म्या ह्मटलें कीं, पलिष्टी मजकडे गिल्गालास येत
आहेत आणि मी परमेश्वरापासीं विनंती अद्याप
केली नाहीं; यास्तव मी आपल्या मनांत धीर धरून
होम केला." १३ तेव्हां शमुवेलाने शाऊ-
लाला ह्मटलें, "त्वां मूर्खपणाने केलें, तुझा देव

परमेश्वर त्याने जी आज्ञा तुला दिल्ही ती त्वां
मानिली नाहीं; मानिली असती, तर आतां परमे-
श्वराने इस्राएलावर तुझें राज्य निरंतर स्थापि-
लें असतें. १४ परंतु आतां तुझें राज्य स्थापित
होणार नाहीं; परमेश्वराने आपल्या इच्छेप्रमाणें
एक माणूस आपल्यासाठीं निवडिला आहे, आणि
परमेश्वराने त्याला आपल्या लोकांचा अधिकारी
नेमलें आहे; कारण कीं परमेश्वराने जी आज्ञा
तुला दिल्ही ती त्वां मानिली नाहीं."
१५ तेव्हां शमुवेल उठून गिल्गालापासून
बन्यामीनांतील गिब्यास गेला, आणि शाऊलाने
आपल्यासंगतीं जे लोक होते त्यांची पाहणी केली,
आणि ते सुमारें साहाशें होते. १६ आणि शा-
ऊल व त्याचा पुत्र योनाथान व त्यांच्यासंगतीं जे
लोक ते बन्यामीनांतील गिब्यांत राहिले, आणि
पलिष्ट्यानी मिखमाशांत छावणी केली.
१७ तेव्हां पलिष्ट्यांच्या छावणींतून लुटारू
तीन टोळ्या करून निघाले; एक टोळी अफ्रा-
च्या वाटेवर शूवालाच्या प्रांताकडे गेली. १८
आणि एक टोळी बेथहोरोनाच्या वाटेवर गेली,
आणि एक टोळी जो प्रांत सबोईमाच्या खिंडी-
कडील आहे त्याच्या वाटेवर रानाकडे गेली. १९
तेव्हां इस्राएलाच्या सर्व देशांत कोणी लोहार
सांपडला नव्हता, का कीं पलिष्ट्यानी म्हटलें होतें
कीं, असें असतां तर इब्री तरवार किंवा भाले
करितील. २० परंतु सर्व इस्राएली एकएक माणूस
आपला फाळ व आपली कुदळ व आपली कुऱ्हाड
व आपला दाताळ यांस शेवटायास पलिष्ट्यांजवळ
गेले. २१ तथापि फाळ व कुदळी व कुऱ्हाडी व
दाताळ यांसाठीं व अरीला शेवटण्यासाठीं कानस
होती. २२ त्या कारणास्तव लढाईच्या समयीं
असें झालें कीं जे सर्व लोक शाऊल व योनाथान
यांच्यासंगतीं होते, त्यांच्या हातीं तरवार व भाला
मिळाला नव्हता, परंतु शाऊल व त्याचा पुत्र
योनाथान यांच्या हातीं मिळाले होते. २३ तेव्हां
पलिष्ट्यांतून ठाणें निघून मिखमाशापलिकडे गेलें.

## अध्याय १४.

आणि कोण्एका दिवशीं असें झालें कीं शाऊ-
लाचा पुत्र योनाथान याने आपला शस्त्र-
वाहक जो तरुण त्याला असें म्हटलें कीं, "चल,
आपण पलिष्ट्यांचें ठाणें जें पलिकडे आहे त्याज-
वळ जाऊं." परंतु हें त्याने आपल्या बापाला सां-
गितलें नाहीं. २ तेव्हां शाऊल गिब्याच्या शेव-
टल्या भागीं मिग्रोनांत दाळिंबाखालीं राहत होता,
आणि त्याजवळचे लोक सुमारें साहाशें होते. ३
आणि एली याचा पुत्र फीनहास याचा पुत्र ईखा-
बोद याचा भाऊ आहीटूब याचा पुत्र अहिया
जो शिलोमध्यें परमेश्वराचा याजक तो एफोद
वेष्टिलेला तेथें होता; तेव्हां योनाथान गेला आहे,
हें लोकांस माहीत नव्हतें. ४ आणि पलिष्ट्यां-
च्या ठाण्याजवळ जाण्यासाठीं जो घाट योनाथा-
नाने निवडिला होता त्याच्या एका बाजूस उंच
कडा होता, आणि त्याच्या दुसऱ्या बाजूस तसा
कडा होता; एकाचें नांव बोसेस व दुसऱ्याचें नांव
सेने असें होतें. ५ एक कडा उत्तरेकडे मिख-
माशासमोर व दुसरा दक्षिणेकडे गिब्यासमोर,
असे ते होते.
६ तेव्हां योनाथानाने आपला तरुण शस्त्र-
वाहक याला म्हटलें कीं, "चल, आपण त्या असुं-
ती लोकांच्या ठाण्याजवळ जाऊं, कदाचित् परमे-
श्वर आमचें सहाय करील; का कीं थोडक्यानी
किंवा बहुतानी रक्षण करणें याविषयीं परमेश्व-
राला कांहीं प्रतिबंध नाहीं." ७ मग शस्त्रवा-
हकाने त्याला म्हटलें कीं, "जें सर्व तुझ्या मनांत
असेल तें कर; जा, पाहा मी तुझ्या इच्छेप्रमाणें
तुझ्यासंगतीं आहें." ८ तेव्हां योनाथानाने म्ह-
टलें, "पाहा, आपण त्या माणसांकडे जाऊं, आणि
त्यांस आपलें दर्शन देऊं. ९ जर ते आम्हांस
असें म्हणतील कीं, आम्ही तुम्हांजवळ येऊं तोंप-
र्यंत थांबा, तर आम्ही आपल्या ठिकाणीं उभे राहूं,
आणि वर त्यांच्याजवळ जाणार नाहीं. १० परंतु
जर ते बोलतील कीं, वर आम्हांकडे या, तर आ-
म्ही वर जाऊं, का कीं परमेश्वराने त्यांस आ-
मच्या हातीं दिल्हें आहे, आणि ती आम्हांस खूण
होईल." ११ मग त्या दोघांनी आपलें दर्शन प-
लिष्ट्यांच्या ठाण्यांतील माणसांस दिल्हें, आणि
पलिष्ट्यानी म्हटलें, "पाहा, त्या गुहांमध्यें इब्री
लपाले होते तेथून निघतात." १२ तेव्हां ठाण्या-
च्या माणसांनी योनाथान व त्याचा शस्त्रवाहक

गांस हाक मारून ह्मटलें कीं, "वर आह्माजवळ
या, ह्मणजे आह्मी तुह्मास कांहीं गोष्ट सांगूं." तेव्हां
योनाथान आपल्या शस्त्रवाहकाला ह्मणाला, "मा-
झ्यासंगतीं वर ये, कां कीं परमेश्वराने त्यांस इस्रा-
एलाच्या हातीं दिल्हें आहे." १३ मग योनाथान
हातांपायांनी चढला, आणि त्याचा शस्त्रवाहक त्या-
च्यामागें चढला; तेव्हां योनाथानासमोर ते पडले,
आणि त्याच्यामागें त्याच्या शस्त्रवाहकाने त्यांस
मारिलें. १४ आणि जो पहिला घात योनाथानाने
व त्याच्या शस्त्रवाहकाने केला यांत एका बिघाभर
भूमीवर सुमारें वीस माणसें पडलीं. १५ तेव्हां
छावणींत व शेतांत व ठाण्याच्या सर्व लोकांत कंप
झाला, आणि लुटारूहि कांपले आणि भूमि कांपली
आणि तो कंप फार मोठा होता.

१६ तेव्हां शाऊलाचे पाहरेकरी जे बन्यामी-
नांतील गिब्यांत होते त्यांनी पाहिलें, आणि पाहा
समुदायाची गडबड होऊन त्याची दाणादाण झा-
ली होती. १७ मग शाऊलाने आपल्यासंगतीं
जे लोक होते त्यांस ह्मटलें कीं, "आमच्यामधून
कोण गेला आहे, हें शोध करून पाहा." तेव्हां
त्यांनी शोध केला, आणि पाहा योनाथान व त्याचा
शस्त्रवाहक तेथें नव्हते. १८ आणि शाऊलाने
अहीयाला ह्मटलें कीं, "देवाचा कोश आण."
कां तर त्या समयीं देवाचा कोश इस्राएलाच्या
लोकांमध्यें होता. १९ आणि असें झालें कीं शा-
ऊल याजकाला बोलत असतां जी गलबल पलि-
ष्ट्यांच्या छावणींत होती ती वाढत वाढत मो-
ठी झाली; तेव्हां शाऊलाने याजकाला ह्मटलें,
"आपला हात काढून घे." २० तेव्हां शाऊल
व त्याबरोबर जे अवघे लोक ते एकत्र मिळून
लढाईस गेले, आणि पाहा प्रत्येक माणसाची तर-
वार आपल्या सोबत्याविरुद्ध झाली, ह्मणून फार
मोठी गडबड झाली. २१ तेव्हां जे इब्री पूर्वी
पलिष्ट्यांमध्यें राहिले होते, जे त्यांच्याबरोबर चहुं-
कडून लढाईस गेले, तेहि जे इस्राएली शाऊल
व योनाथान यांच्यासंगतीं होते त्यांसीं मिळाले.
२२ आणि जीं सर्व इस्राएलाचीं माणसें एफ्राइम
डोंगरांत लपालीं होतीं तीं, पलिष्टी पळत आहेत,
असें ऐकून लढाईंत त्यांच्या पाठीस लागलीं.
२३ याप्रमाणें परमेश्वराने त्या दिवसीं इस्राए-
लाचें तारण केलें, आणि लढाई बेथावेनाकडे गेली.

२४ त्या दिवसीं इस्राएलाच्या माणसांस फार
दुःख झालें, कारण कीं, "शाऊलाने लोकांस शपथ
घालून सांगितलें होतें कीं; म्या आपल्या शत्रूंचा
सूड घ्यावा ह्मणून जो माणूस संध्याकाळपावेतों कां-
हीं खाईल त्याला शाप असो." यास्तव लोकांमध्यें
कोणी कांहीं खाल्लें नाहीं. २५ आणि सर्व माणसें
वनांत आलीं, आणि भूमीवर मध होता. २६ तेव्हां
वनामध्यें लोक आले असतां पाहा मध पडला हो-
ता, परंतु कोणी आपल्या हातीं घेऊन आपल्या तों-
डास लाविला नाहीं, कां कीं लोक त्या शपथेस
भीत होते. २७ परंतु योनाथानाने जी शपथ त्या-
च्या बापाने लोकांस घातली ती ऐकिली नव्हती,
ह्मणून त्याने आपल्या हातीं जी काठी होती तिचें
टोंक पुढें करून मधामध्यें घातलें, आणि आपल्या
तोंडास लाविलें; तेव्हां त्याचे डोळे प्रकाशित झाले.
२८ मग लोकांतील एका माणसाने ह्मटलें, "तुझ्या
बापाने शपथ घालून निक्षून सांगितलें कीं, जो मा-
णूस आज कांहीं खाईल त्याला शाप असो."
२९ त्या वेळेस लोक थकले गेले आणि योनाथा-
नाने ह्मटलें कीं, "माझ्या बापाने लोकांस उपद्रव
केला आहे, म्या एथील मध थोडा चाखला आहे;
आणि आतां पाहा, याने माझे डोळे कसे प्रकाशित
झाले आहेत. ३० जर लोकांनी आपल्या शत्रूंच्या
मिळालेल्या लुटींतून इच्छेप्रमाणें खाल्लें असतें तर
किती बरें होतें? तर आतां पलिष्ट्यांचा अधिक
मोठा घात झाला असता." ३१ आणि ते त्या
दिवसीं मिखमाशापासून आयालोनापर्यंत पलि-
ष्ट्यांच्या पाठीमागें लागून त्यांस मारीत गेले, आणि
लोक फार थकले होते. ३२ मग ते लुटीजवळ
उठावले, आणि मेंढरें व गुरें व वासरें घेऊन भूमी-
वर वधून रक्तासुद्धां खाऊं लागले. ३३ तेव्हां
कोणी शाऊलाला असें सांगितलें कीं, "पाहा,
लोक रक्त खाऊन देवाविरुद्ध पाप करितात." मग
त्याने ह्मटलें, "तुह्मी पाप करीत आहां; मोठा
दगड मजपासीं लवकर लोटून आणा." ३४ आ-
णि त्याने ह्मटलें, "तुह्मी लोकांमध्यें धांवत जाऊन
त्यांस सांगा कीं, प्रत्येक माणसाने आपले बैल व
आपलीं मेंढरें मजपासीं आणावीं, आणि एथें त्यांस
मारावें, मग खावें; परंतु रक्त खाऊन परमे-

श्वराजवळ पाप करूं नका." तेव्हां सर्व लोकां-
तील प्रत्येक माणसाने आपले बैल आपल्या हाताने
त्या रात्रीं आणिले आणि तेथें कापिले. ३५ मग
शाऊलाने परमेश्वराकरितां वेदी बांधिली; जी
पहिली वेदी त्यांने बांधिली ती हीच होती.

३६ मग शाऊल म्हणाला, "आम्ही रात्रीं प-
लिष्ट्यांच्या पाठीस लागूं, आणि उद्याच्या उजेडा-
पर्यंत त्यांस लुटून मारूं, आणि त्यांतील एक मा-
णूस राहूं देणार नाहीं." तेव्हां ते म्हणाले, "जें
सर्व तुला बरें वाटेल तें कर." मग याजकाने
म्हटलें कीं, "आम्ही एथें देवाजवळ विचारूं."
३७ मग शाऊलाने देवाजवळ विचारिलें कीं,
"मी पलिष्ट्यांच्या पाठीस लागूं कीं काय? तूं त्यांस
इस्राएलांच्या हातीं देसील कीं काय?" परंतु त्याने
त्या दिवसीं कांहीं उत्तर दिल्हें नाहीं. ३८ तेव्हां
शाऊल म्हणाला, "अहो लोकांचे सर्व पुढारी,
तुम्ही इकडे या, आणि हें पातक आज कशाने
घडलें आहे, हें शोध करून पाहा. ३९ कारण
कीं परमेश्वर ज्याने इस्राएलाचें संरक्षण केलें
त्याची शपथ मी करितों कीं, हें पातक माझा पुत्र
योनाथान याच्या पदरीं सांपडलें, तरी तो निश्च-
येंकरून मरेल." ४० तेव्हां सर्व लोकांतील
कोणीएकाने उत्तर दिल्हें नाहीं; मग त्याने सर्व
इस्राएलास सांगितलें कीं, "तुम्ही एका बाजूस व्हा,
आणि मी व माझा पुत्र योनाथान आम्ही दुस-
ऱ्या बाजूस होऊं." तेव्हां लोक शाऊलाला म्ह-
णाले, "जें तुला बरें वाटेल तें कर." ४१ मग
शाऊल म्हणाला, "हे इस्राएलाच्या देवा परमे-
श्वरा, खरपण प्रगट कर." तेव्हां योनाथान व
शाऊल हे दोषी असे ठरले, आणि लोक निर्दोषी
असे निघाले. ४२ मग शाऊलाने म्हटलें, "मज-
मध्यें व माझा पुत्र योनाथान यामध्यें ठरा." तेव्हां
योनाथान दोषी असा ठरला. ४३ तेव्हां शाऊल
योनाथानाला म्हणाला, "त्वां काय केलें आहे तें
मला सांग." तेव्हां योनाथान बोलून म्हणाला, "जी
काठी माझ्या हातीं होती तिच्या टोंकावरून म्या
केवळ थोडा मध चाखला, आणि पाहा मला मरण
प्राप्त झालें आहे." ४४ तेव्हां शाऊल म्हणाला,
"असें व अधिकहि देव करो, कां कीं हे योनाथाना,
तूं निश्चयेंकरून मरसील." ४५ मग लोक शा-
ऊलाला म्हणाले, "ज्याने इस्राएलामध्यें हें मोठें
तारण केलें, असा जो योनाथान तो मरेल कीं
काय? असें न होवो. परमेश्वराची शपथ
मी करितों कीं त्याच्या डोक्याचा एक केंस हे-
ठील भूमीस पडणार नाहीं, कां कीं त्याने आज
देवाच्यासंगतीं काम केलें आहे." असें लोकांनी
योनाथानाला सोडविलें, म्हणून त्याचा घात झाला
नाहीं. ४६ तेव्हां शाऊल पलिष्ट्यांचा पाठलाग
सोडून गेला, आणि पलिष्टी आपल्या ठिकाणीं गेले.

४७ याप्रमाणें शाऊल इस्राएलाचा राजा हो-
ऊन त्यांचे सर्व सभोंवतील शत्रू, म्हणजे मोवाब,
व आम्मोनी लोक, व एदोम, व जोबाचे राजे, व
पलिष्टी, यांसीं लढला, आणि जेथें कोठें तो गेला
तेथेंहि त्याने त्यांस त्रासिलें. ४८ आणि त्याने
सैन्य जमा करून अमालेकास मारिलें, आणि
इस्राएलांस त्यांच्या लुटणाऱ्यांच्या हातांतून सोड-
विलें. ४९ आणि योनाथान व इशवी व माल्-
कीशूवा, हे शाऊलाचे पुत्र होते, आणि त्याच्या
दोघी कन्यांचीं नांवें, ज्येष्ठेचें मेराब व धाकटीचें
मीखाल, असीं होतीं. ५० आणि शाऊलाच्या
बायकोचें नांव अहीनोमवाम, ती अहीमाजाची
कन्या होती, आणि शाऊलाचा काका नेर याचा
पुत्र आबनेर तो त्याचा सेनापति होता. ५१
आणि शाऊलाचा बाप कीश व आबनेराचा बाप
नेर हे अबीयेलाचे पुत्र होते. ५२ आणि शा-
ऊलाच्या अवघ्या आयुष्यांत पलिष्ट्यांसीं कठीण
लढाई होती, आणि शाऊलाने कोणीएक पराक्र-
मी माणूस अथवा कोणीएक शूर पाहिला असतां
त्याने त्याला आपल्याजवळ ठेविलें.

## अध्याय १५.

तेव्हां शमुवेलाने शाऊलाला सांगितलें कीं, "प-
रमेश्वराने आपले लोक इस्राएल यांवर त्वां
राजा व्हावें म्हणून तुला अभिषिक्त करायास मला
पाठविलें; यास्तव आतां परमेश्वराचीं वचनें ऐक.
२ सैन्यांचा परमेश्वर असें म्हणतो कीं, इस्रा-
एल मिसरापासून येत असतां अमालेकानी त्यां-
सीं जें केलें आणि त्यांस वाटेंत कसें अडविलें
याची शिक्षा मी त्यांस लावीन. ३ आतां तूं जा-
ऊन अमालेकास मार, आणि त्यांचें जें कांहीं आहे

त्याचा विनाश कर, त्यांवर कृपा करूं नको, परंतु
पुरुष व स्त्रिया व लेंकरूं व तान्हें व गुरें व मेंढ-
रूं व उंट व गाढव, या सर्वांस जिवें मार." ४
तेव्हां शाऊलाने लोकांस जमा करून तलाईमांत
त्यांची पाहणी केली; दोन लक्ष पायदळ व यहू-
द्याचीं माणसें दाहा हजार होतीं. ५ मग शाऊल
अमालेकाच्या एका नगराजवळ पोहंचला, आणि
तो एका ओढ्यांत दबा धरून राहिला. ६ तेव्हां
शाऊलाने केन्यांस झटलें कीं, "सर्व इस्राएलाचीं
संतानें मिसरांतून येत असतां त्यांसीं तुह्मी स्नेहाने
वर्त्तलां, यास्तव म्या अमालेकांच्या बराबर तुह्मांस
न मारावें ह्मणून त्यांतून निघून जा." तेव्हां केनी
अमालेकांतून निघून गेले. ७ मग शाऊलाने हवी-
लापासून मिसराकडील शूरपर्यंत अमालेकांस मा-
रिलें. ८ आणि अमालेकांचा राजा अगाग याला
त्याने जिवंत धरिलें, आणि दुसऱ्या सर्व मनुष्यांस
त्याने तरवारीने जिवें मारिलें. ९ तथापि शा-
ऊलाने व लोकानी अगाग आणि मेंढरें व गुरें व
कोंकरें, यांतील जीं उत्तम व जीं सर्व चांगलीं
तीं राखिलीं, परंतु जी सर्व वस्तू निरुपयोगी व
निर्माल्य त्याचा विनाश त्याने केला.

१० तेव्हां परमेश्वराने शमुवेलाला असें
झटलें कीं, ११ "म्या शाऊलाला राजा केलें या-
वरून मला दुःख होतें, का कीं त्याने माझें मानणें
सोडून माझ्या आज्ञा मोडिल्या आहेत." तेव्हां श-
मुवेलाला खेद झाला, आणि त्याने संपूर्ण रात्रीं
देवापासीं प्रार्थना केली. १२ आणि शमुवेल शा-
ऊलाला भेटायास सकाळीं पाहाटेस उठला, तेव्हां
कोणी शमुवेलाला असें सांगितलें कीं, शाऊलाने
कारमेलास आऊन जयस्तंभ बांधिला, मग तो फि-
रला व गिल्गालास उतरून गेला आहे. १३
मग शमुवेल शाऊलाजवळ गेला; तेव्हां शाऊ-
लाने त्याला झटलें, "परमेश्वर तुझें कल्याण करो;
म्या परमेश्वराची आज्ञा मानिली आहे." १४
तेव्हां शमुवेलाने विचारिलें कीं, "तर मेंढरांचें जें
ओरडणें माझ्या कानीं पडतें, आणि गुरांचा जो
हुंबरडा मी ऐकतों तो कोठून आहे?" १५ मग
शाऊल ह्मणाला कीं, "लोकानी त्यांस अमालेकां-
पासून आणिलें आहे, कारण कीं त्यानी मेंढरें व
गुरें यांतील जीं उत्तम तीं तुझा देव परमेश्वर
याजवळ यज्ञ करण्यासाठीं राखिलीं, आणि आह्मी
बाकीच्यांचा विनाश केला." १६ तेव्हां शमुवेलाने
शाऊलाला झटलें कीं, "तूं राहा, ह्मणजे गेल्या
रात्रीं परमेश्वराने मला काय सांगितलें तें मी
तुला सांगतों." तेव्हां त्याने झटलें, "सांग." १७
मग शमुवेल ह्मणाला, "जेव्हां तूं आपल्या दिष्टी-
बांत हलका होतास, तेव्हां तूं इस्राएलांच्या वंशां-
वर मुख्य झाला नाहींस कीं काय? आणि तेव्हां
परमेश्वराने तुला इस्राएलाचा राजा अभिषिक्त
केलें नाहीं कीं काय? १८ मग परमेश्वराने तुला
एका मार्गावर पाठवून सांगितलें कीं, जा आणि त्या
पापिष्ट अमालेकांचा विनाश कर, आणि ते नाहींसे
होई तोंपर्यंत त्यांसीं लढाई कर. १९ तर पर-
मेश्वराचें वाक्य न मानून त्वां कशासाठीं लूट
घेतली आणि परमेश्वराच्या दृष्टींत अपराध
केला?"

२० तेव्हां शाऊल शमुवेलाला ह्मणाला, "म्या
परमेश्वराचें वाक्य मानिलें आहे, आणि ज्या
मार्गावर त्याने मला पाठविलें त्यांत मी चाललों
आहें; कारण कीं म्या अमालेकांचा विनाश करून
त्यांचा राजा अगाग याला आणिलें आहे. २१
परंतु ज्यांचा विनाश करायाचा होता अशीं जीं
लुटीचीं मेंढरें व गुरें त्यांतील जीं उत्तम तीं लो-
कानी तुझा देव परमेश्वर याजवळ गिल्गालांत
यज्ञ करण्यासाठीं घेतलीं. २२ तेव्हां शमुवेलाने
झटलें कीं, परमेश्वराला आपलें वाक्य मानण्याने
जी संतुष्टता होती तितकी होम व यज्ञ यांकडून
त्याला होती कीं काय? पाहा, यज्ञापेक्षां मानणें बरें,
आणि मेंढरांच्या मांधांपेक्षां वाक्य ऐकणें बरें, असें
आहे. २३ कारण कीं अवज्ञा गारुडाच्या पापा-
सारिखी आहे, आणि दुष्टाई व मूर्त्तिपूजा यांसा-
रिखा हट्ट आहे; त्वां परमेश्वराच्या आज्ञेचा
अपमान केला आहे, यामुळें त्याने तुला राज्य
करण्याविषयीं नाकारिलें आहे."

२४ मग शाऊलाने शमुवेलाला झटलें, "म्या
पाप केलें आहे, कारण कीं लोकांचें भय धरून
मी त्यांची विनंती ऐकून परमेश्वराचें वाक्य व
तुझी आज्ञा मोडिली. २५ तथापि आतां माझ्या
पापाची क्षमा कर, आणि मजबरोबर फीर, ह्मणजे
मी परमेश्वराचें भजन करीन." २६ तेव्हां शमु

वेल्याने शाऊलाला ह्मटलें कीं,“मी तुजबरोबर फि-
रणार नाहीं, कारण कीं त्वां परमेश्वराच्या आज्ञे-
चा अपमान केला आहे, आणि परमेश्वराने
इस्राएलाचें राज्य करण्याविषयीं तुझा अपमान
केला आहे. २७ आणि शमुवेल जायास फिरत
असतां त्याने त्याच्या अंगरख्याची कड धरिली,
आणि ती फाटली. २८ तेव्हां शमुवेलाने त्याला
असें ह्मटलें कीं, “परमेश्वराने आज इस्राएलाचें
राज्य तुजपासून काढून घेऊन तुझा कोणी शेजारी
जो तुझ्यापेक्षां चांगला त्याला दिल्हें आहे. २९
आणि इस्राएलाचा जो आधार तो खोटें बोलणार
नाहीं आणि तो पश्चात्ताप करणार नाहीं; कां कीं
तो मनुष्य नाहीं, मग त्याला पश्चात्ताप कसा हो-
ईल!” ३० तेव्हां शाऊलाने ह्मटलें कीं, “म्यां
पाप केलें आहे, तथापि माझ्या लोकांच्या वडिलां-
समोर व इस्राएलासमोर माझा सत्कार कर, आणि
तुझा देव परमेश्वर याला म्यां भजावें ह्मणून
मजबरोबर फिरून ये.” ३१ मग शमुवेल शा-
ऊलाच्या पाठीमागें गेला, आणि शाऊलाने परमे-
श्वराचें भजन केलें.

३२ तेव्हां शमुवेलाने ह्मटलें, “अमालेकांचा
राजा अगाग याला माझ्याजवळ आणा.” तेव्हां
अगाग त्याजवळ खुशाल आला, आणि अगागाने
ह्मटलें कीं, “मरणाचें दुःख निश्चयेंकरून चुकून गेलें
आहे.” ३३ परंतु शमुवेलाने ह्मटलें, “जसें तुझ्या
तरवारीने स्त्रियांस बाळरहित केलें आहे, तसें
स्त्रियांमध्यें तुझी आई बाळरहित होईल.” आणि
शमुवेलाने गिल्गालांत परमेश्वरासमोर अगा-
गाचे तुकडे केले. ३४ मग शमुवेल राम्यास गेला,
आणि शाऊल आपल्या घरीं शाऊलांतल्या गि-
ब्यास गेला. ३५ यानंतर शमुवेल आपल्या मर-
णाच्या दिवसापर्यंत शाऊलाला फिरून भेटायास
गेला नाहीं; तथापि शमुवेलाने शाऊलासाठीं शोक
केला, आणि परमेश्वराने शाऊलाला इस्राएला-
चा राजा केलें होतें, यावरून त्याला पश्चात्ताप
झाला.

## अध्याय १६.

मग परमेश्वराने शमुवेलाला सांगितलें कीं,
“म्यां इस्राएलावर राज्य करण्यापासून शाऊ-
लाला काढिलें आहे, तर तूं किती काळ त्यासाठीं
शोक करसील! आपलें शिंग तेलाने भरून चल,
इशाय बेथलेहेमी याजवळ मी तुला पाठवितों, कां
कीं म्यां आपल्यासाठीं राजा त्याच्या पुत्रांमध्यें पा-
हिला आहे.” २ तेव्हां शमुवेल ह्मणाला, “मी
कसा जाऊं? जर शाऊल ऐकेल तर तो मला
जिवें मारील.” मग परमेश्वर ह्मणाला, “एक
पाडी आपल्याबरोबर घे, आणि मी परमेश्वरा-
जवळ यज्ञ करायास आलों आहें, असें ह्मण. ३
मग त्या यज्ञाजवळ इशाय बोलाव, नंतर जें त्वां
करावें तें मी तुला समजावीन, आणि जो मी तुला
सांगेन त्याला मजसाठीं अभिषेक कर.” ४ तेव्हां
शमुवेलाने जें परमेश्वराने सांगितलें होतें तें केलें,
आणि बेथलेहेमास पोहंचून नगराचे वडील त्याला
भेटायास कांपत जाऊन ह्मणाले, “तूं शांतीने आ-
ला आहेस कीं काय?” ५ मग त्याने ह्मटलें कीं,
“शांतीने, मी परमेश्वराजवळ यज्ञ करायास आ-
लों आहें, तुह्मी शुद्ध व्हा, मग मजबरोबर यज्ञा-
जवळ या.” तेव्हां त्याने इशाय व त्याचे पुत्र
शुद्ध करविल्यावर त्यांस यज्ञाजवळ बोलाविलें. ६
आणि असें झालें कीं ते आले असतां त्याने अ-
लीयाब पाहून ह्मटलें, “परमेश्वरासमोर त्याचा
अभिषिक्त निःसंशय आहे.” ७ परंतु परमेश्व-
राने शमुवेलाला ह्मटलें कीं, “त्याच्या स्वरूपाकडे
व त्याच्या देहाच्या उंचीकडे पाहूं नको, कारण कीं
म्यां त्याला नाकारिलें आहे; जसें मनुष्य पाहतो
तसें देव पाहत नाहीं, कां कीं मनुष्य रूपाकडे
पाहतो परंतु परमेश्वर हृदयाकडे पाहतो.” ८
मग इशायाने अबीनादाला बोलाविलें, आणि त्या-
ला शमुवेलापुढें चालविलें, परंतु त्याने ह्मटलें,
“यालाहि परमेश्वराने निवडिलें नाहीं.” ९
मग इशायाने शाम्मास पुढें चालविलें, परंतु त्याने
ह्मटलें, “यालाहि परमेश्वराने निवडिलें नाहीं.”
१० असें इशायाने आपल्या सात पुत्रांस शमुवे-
लापुढें चालविलें, परंतु शमुवेलाने इशायाला ह्म-
टलें, “यांतून कोणालाहि परमेश्वराने निवडिलें
नाहीं.” ११ तेव्हां शमुवेलाने इशायाला ह्मटलें,
“हे तुझे सर्व पुत्र आहेत कीं काय?” मग तो
ह्मणाला, “अणखी जो धाकटा तो राहिला आहे,
पाहा तो बकरें राखीत आहे.” तेव्हां शमुवेलाने
इशायाला ह्मटलें, “पाठवून त्याला आण, कां कीं

एथें त्याच्या येण्यापूर्वी आह्मी जेवायास बसणार
नाहीं." १२ मग त्याने पाठवून त्याला आणिलें,
आणि तो तांबूस व सुंदर तोंडाचा व सुरूप होता;
तेव्हां **परमेश्वराने** ह्मटलें कीं, "उठून याला अ-
भिषेक कर, कारण कीं हाच तो आहे." १३ मग
शमुवेलाने तेलाचें शिंग घेऊन त्याच्या भावांमध्यें
त्याला अभिषेक केलें, आणि त्या दिवसापासून
पुढें **परमेश्वराचा** आत्मा दावीदावर येऊन रा-
हिला, आणि शमुवेल उठून राम्यास गेला.
१४ मग **परमेश्वराच्या** आत्म्याने शाऊलास
सोडिलें आणि **परमेश्वरा**पासून एक दुष्ट आत्मा
त्याचा त्रास करूं लागला. १५ तेव्हां शाऊलाचे
चाकर त्याला ह्मणाले कीं, "आतां पाहा, देवापा-
सून एक दुष्ट आत्मा तुला त्रासितो. १६ सारंगी
निपुण वाजविणारा असा माणूस शोधा, असी आज्ञा
आमचा धनी आपल्यासमोर जे चाकर त्यांस करो,
मग जेव्हां देवापासून दुष्ट आत्मा तुला लागेल
तेव्हां तो आपल्या हाताने वाजवील आणि तूं सुख-
रूप होसील." १७ मग शाऊलाने आपल्या चाक-
रांस ह्मटलें कीं, "जो चांगला वाजविणारा असा
माणूस मजसाठीं शोधून मजपासीं आणा." १८
तेव्हां चाकरांतून एकाने असें उत्तर केलें की,"पाहा
निपुण वाजविणारा व फार पराक्रमी व लढाऊ
माणूस व वक्ता व सुंदर व ज्याला **परमेश्वर**
अनुकूल आहे, असा पुरुष म्या पाहिला आहे, तो
इशाय बेथलेहेमी याचा पुत्र आहे." १९ मग
शाऊलाने इशायाजवळ दूतांस पाठवून ह्मटलें
कीं, "तुझा पुत्र दावीद जो बकऱ्यांवर असतो त्या-
ला मजपासीं पाठवावें." २० तेव्हां इशायाने एका
गाढवाचे ओझेंभर भाकरी व द्राक्षारसाची बुधली
व एक करडूं, यांस घेऊन आपला पुत्र दावीद
याच्या हाताकडून शाऊलाजवळ पाठविलें. २१
आणि दावीद शाऊलापासीं येऊन त्यासमोर उ-
भा राहिला, तेव्हां त्याने त्याजवर फार प्रीति केली
आणि तो त्याचा शस्त्रवाहक झाला. २२ मग
शाऊलाने इशायाजवळ पाठवून सांगितलें कीं,
"आतां दावीद माझ्याजवळ राहूं दे, कां कीं तो
मला संतोषित करितो." २३ आणि असें झालें
कीं देवापासून दुष्ट आत्मा शाऊलावर आला
असतां दावीदाने सारंगी घेऊन आपल्या हाताने
वाजविलें, नंतर शाऊलाला समाधान व संतोष
होऊन दुष्ट आत्म्याने त्याला सोडिलें.

## अध्याय १७.

तेव्हां पलिष्ट्यानी आपलें सैन्य लढाईसाठीं एक-
वट केलें, आणि यहूदांतील शोखोस, एकत्र
होऊन त्यानी शोखो व अजेका यांमध्यें एफेसदा-
म्मीमांत छावणी केली. २ मग शाऊल व इस्रा-
एलाचीं माणसें एकवट मिळालीं आणि त्यानी
एलाच्या सपाटींत छावणी करून पलिष्ट्यांसीं ल-
ढायास सैन्य सिद्ध केलें. ३ तेव्हां पलिष्टी एका
बाजूस डोंगरावर उभे राहिले, आणि इस्राएली
दुसऱ्या बाजूस डोंगरावर उभे राहिले, आणि
त्यांमध्यें खोरें होतें. ४ आणि गाथांतील गल्याथ
नामें एक युद्धवीर पलिष्ट्यांच्या छावणींतून निघाला,
त्याची उंची साहा हात व एक वीत असी होती.
५ त्याच्या डोकीवर पितळ्याचा टोप होता, आणि
तो खवलाचें चिलखत ल्यालेला होता, आणि त्या
चिलखताचें वजन पांच हजार पितळ्याचे शेकेल
असे होते. ६ त्याच्या पायांत पितळी मोजे हो-
ते, आणि खांद्यावर पितळ्याची बरची होती. ७
त्याच्या भाल्याची काठी साळ्याच्या तुरीसारिखी
होती, आणि त्याच्या भाल्याच्या फळाचें वजन
साहाशें लोखंडाचे शेकेल असे होते, आणि त्या-
च्यापुढें एक ढालवाहक चालला. ८ तेव्हां तो
उभा राहिला, आणि इस्राएलाच्या सैन्यास हाक
मारून त्यांस ह्मणाला, "तुह्मी लढाई करायास
कां निघालां आहा? मी पलिष्टी आणि तुह्मी
शाऊलाचे चाकर, असे नाहीं कीं काय? तुह्मी
आपल्यांमधून एक माणूस निवडा, आणि तो मज-
पासीं उतरून येवो. ९ जर मजसीं लढाई क-
रून त्याच्याने मला जिवें मारवेल तर आह्मी
तुमचे चाकर होऊं; परंतु जर मी त्याला जिंकून
जिवें मारीन तर तुह्मी आमच्या स्वाधीन होऊन
आमची चाकरी करा." १० अणखी तो पलिष्टी
ह्मणाला, "मी आज इस्राएलाच्या सैन्याची निंदा
करितों, मजपासीं कोणीएक माणसाला द्या, ह्मणजे
आह्मी एकमेकांसीं लढूं." ११ आणि जेव्हां
शाऊलाने व सर्व इस्राएलानी त्या पलिष्ट्यांचे
हे शब्द ऐकिले तेव्हां ते घाबरे होऊन फार भ्याले.

१२ त्या समयीं बेथलेहेम यहूदांतील एक
एफ्राथी माणूस नामें इशाय याचा पुत्र दावीद
होता; त्याला तर आठ पुत्र झाले, आणि शाऊ-
लाच्या दिवसांत तो माणूस ह्मातारा असा लो-
कांमध्यें मोजिला होता. १३ आणि इशायाचे
तीन वडील पुत्र शाऊलामागें लढाईजवळ गेले,
आणि जे तीन पुत्र लढाईजवळ गेले त्यांचीं नामें
हींच, वडीलाचें एलीयाब, व दुसऱ्याचें अबीनादाब,
व तिसऱ्याचें शाम्मा. १४ आणि दावीद धाकटा
होता, आणि तीन वडील शाऊलामागें गेले. १५
परंतु दावीद शाऊलाला सोडून आपल्या बापाचीं
बकरें राखायास बेथलेहेमास परत गेला. १६
तेव्हां तो पलिष्टी सकाळीं व सायंकाळीं जवळ ये-
ऊन चाळीस दिवस पुढें उभा राहिला. १७ आणि
इशायानें आपला पुत्र दावीद याला ह्मटलें कीं,
"आपल्या भावांसाठीं या फुटाण्याचें एक माप व
या दाहा भाकरी यांस घेऊन छावणींत आपल्या
भावांजवळ धांवत जा. १८ आणि हे खव्याचे दाहा
बळे त्यांच्या हजारांच्या सर्दारास नेऊन दे, आणि
आपल्या भावांचा समाचार घेऊन त्यांची खूण आ-
ण." १९ तेव्हां शाऊल व ते व सर्व इस्राएलाचीं
माणसें एलाच्या खोऱ्यांत पलिष्ट्यांसीं लढत हो-
तीं. २० आणि दावीद पाहाटेस उठला, आणि
एका राखणाऱ्याच्या स्वाधीन बकरें ठेवून इशायानें
सांगितल्याप्रमाणें घेऊन गेला; आणि तो छावणी-
जवळ पोहंचला तेव्हां सैन्य लढायास निघून ल-
ढण्यासाठीं पुकारीत होतें; २१ कां कीं इस्राएली
व पलिष्टी सैन्य सैन्यासीं लढणें, असे सिद्ध होते.
२२ तेव्हां दावीद आपल्याजवळ जी वस्तु तीं
राखणाऱ्याच्या हातीं ठेवून सैन्याजवळ धांवला,
आणि आल्यावर त्यानें आपल्या भावांचा समाचार
घेतला. २३ आणि तो त्यांसीं बोलत असतां,
पाहा तो युद्धवीर पलिष्टी गल्याथ नामें गाथकर
पलिष्ट्यांच्या सैन्यांतून निघून मागें ह्मटलेले शब्द
बोलूं लागला, आणि ते दावीदानें ऐकिले. २४ ते-
व्हां सर्व इस्राएलाचीं मनुष्यें त्या माणसाला पाहून
त्यापासून पळालीं आणि फार भ्यालीं. २५ मग
इस्राएलाच्या मनुष्यांनी ह्मटलें, "हा जो मनुष्य पुढें
आला आहे त्याला तुह्मी पाहिले कीं काय? तो
इस्राएलाची निंदा करायास पुढें आला आहे,
आणि असें होईल कीं जो मनुष्य याला मारील
त्याला राजा फार द्रव्यें देईल, आणि आपली
कन्या त्याला देईल, आणि त्याच्या बापाचें कुटुंब
इस्राएलामध्यें नामांकित करील."

२६ तेव्हां दावीदानें आपल्याजवळ जीं मनुष्यें
उभीं राहत होतीं त्यांस ह्मटलें, "जो मनुष्य त्या
पलिष्ट्याला मारील आणि इस्राएलापासून अप-
मान दूर करील त्याला काय प्राप्त होईल? हा
असुंती पलिष्टी कोण आहे कीं त्यानें जिवंत देवा-
च्या सैन्याला निंदावें?" २७ मग तीं मनुष्यें
उत्तर करून सांगितल्याप्रमाणें त्याला ह्मणालीं,
ह्मणजे जो मनुष्य त्याला मारील त्याला तसें प्राप्त
होईल. २८ आणि त्याचा वडील भाऊ एली-
याब यानें त्याला त्या माणसांसीं बोलतां ऐकिलें;
तेव्हां एलीयाब दावीदावर रागें भरून ह्मणाला,
"तूं इकडे कां आला आहेस? आणि त्यां तो ला-
हान कळप रानांत कोणाच्याजवळ ठेविला? तुझा
गर्व आणि तुझ्या अंतःकरणाची दुष्टाई मी जाणत
आहे, लढाई पाहावी ह्मणून तूं आला आहेस."
२९ तेव्हां दावीद ह्मणाला, "म्या काय केलें
आहे? माझ्या येण्याचें कारण नाहीं कीं काय?"
३० मग त्यानें त्याजवळून दुसऱ्याकडे फिरून
तसेंच भाषण करून ह्मटलें, आणि लोकांनी त्या-
ला पूर्वीप्रमाणें उत्तर दिल्हें.

३१ आणि जे शब्द दावीद बोलला ते लो-
कांनी ऐकिले असतां शाऊलाला सांगितले, मग
त्यानें त्याला बोलाविलें. ३२ तेव्हां दावीदानें
शाऊलाला ह्मटलें, "कोणीएका माणसाचें हृदय
आपल्यामध्यें उदासी न होवो; तुझा सेवक जाऊन
त्या पलिष्ट्यासीं लढेल." ३३ तेव्हां शाऊलानें
दावीदाला ह्मटलें, "त्या पलिष्ट्याजवळ जाऊन
त्यासीं लढायास तूं शक्तिमान नाहींस, कारण
कीं तूं तरुण आहेस, परंतु तो तरुणपणापासून
लढाईचा मनुष्य आहे." ३४ मग दावीदानें शा-
ऊलाला ह्मटलें, "तुझा सेवक त्याच्या बापाचीं बकरें
राखीत होता, तेव्हां एक सिंह व एक आस्वल
यानी येऊन एक बकरूं कळपांतून घेतलें. ३५
मग म्या त्याच्या पाठीस लागून त्याला मारिलें,
आणि तें बकरूं त्याच्या मुखांतून काढिलें, आणि
जेव्हां तो माझ्या अंगावर आला तेव्हां म्या त्याची

दाढी धरून त्याला ठार मारिलें. ३६ तुझ्या
चाकराने सिंह व आस्वल यासहि जिवें मारिलें,
आणि हा असुंती पलिष्टी त्यांतील एकासारिखा
होईल, कारण कीं त्यानें जिवंत देवाच्या सैन्या-
ची निंदा केली आहे." ३७ आणखी दावीदाने
ह्मटलें कीं, "परमेश्वर ज्याने तो सिंह व तो
आस्वल यांच्या पंजापासून मला राखिलें तो या
पलिष्ट्याच्या हातापासून मला राखील." मग
शाऊलाने दावीदाला ह्मटलें, "जा, आणि परमे-
श्वर तुझ्यासंगतीं असो."

३८ तेव्हां शाऊलाने आपलीं वस्त्रें दावीदावर
घातलीं, आणि त्याच्या डोकीवर पितळ्याचा टोप
घातला, आणि त्याजवर चिलखत घातलें. ३९
आणि दावीदाने त्याची तरवार आपल्या वस्त्रां-
भोंवतीं बांधिली, मग तो चालूं लागला, कारण कीं
त्याने अद्याप असीं वापरलीं नव्हतीं; तेव्हां दा-
वीदाने शाऊलाला ह्मटलें, "यांसुद्धां माझ्याने
चालवत नाहीं, कारण कीं यांची वहिवाट म्या
कधीं केली नाहीं." मग तीं दावीदाने आपल्या
अंगांतून काढिलीं. ४० आणि त्याने आपली काठी
आपल्या हातीं घेऊन ओहळांतून पांच गुळगुळीत
धोंडे आपल्याला निवडून घेतले, आणि त्याने ते
आपल्याजवळ जी मेंढपाळाची पिशवी होती तींत
ठेविले; आणि आपली गोफण आपल्या हातीं घेऊन
तो पलिष्ट्याजवळ जाऊं लागला. ४१ तेव्हां तो
पलिष्टी पुढें चालून दावीदाजवळ येऊं लागला, आ-
णि जो मनुष्य ढाल वाहत तो त्याच्यापुढें चालला.
४२ आणि त्या पलिष्ट्याने दृष्टि लावून दावीदाला
पाहिलें, तेव्हां त्याने त्याला तुच्छ मानिलें, कारण
कीं हा तरुण व तांबूस व सुंदर तोंडाचा असा
होता. ४३ तेव्हां तो पलिष्टी दावीदाला ह्मणाला,
"मी कुत्रा आहें ह्मणून तूं काठी घेऊन माझ्याजवळ
येतोस काय!" आणि त्या पलिष्ट्याने दावीदाला
आपल्या देवांच्या नांवाने शाप दिल्हा. ४४ आणि
त्या पलिष्ट्यानी दावीदाला ह्मटलें, "माझ्याजवळ
ये, ह्मणजे मी तुझें शरीर आकाशांतील पाखरें व
रानांतील श्वापदें यांस देईन." ४५ मग दावी-
दाने पलिष्ट्याला ह्मटलें, "तूं तरवार व भाला व
ढाल यांस घेऊन मजपासीं येतोस, परंतु मी सै-
न्यांचा परमेश्वर इस्राएलाच्या सैन्यांचा देव, ज्या-
ची निंदा त्वां केली त्याच्या नामाने तुझ्याजवळ
येतों. ४६ परमेश्वर या दिवसीं तुला माझ्या
हातीं देईल, आणि मी तुला जिवें मारीन, आणि
तुझा मस्तक छेदीन, आणि पलिष्ट्यांच्या सैन्याचीं
प्रेतें आकाशांतील पाखरें व रानांतील श्वापदें यांस
मी या दिवसीं देईन; तेव्हां अवघी पृथ्वी जाणेल
कीं इस्राएलामध्यें देव आहे. ४७ आणि हा
सर्व समुदाय जाणेल कीं तरवार व भाला यांकडून
परमेश्वर संरक्षण करीत नाहीं, कारण कीं लढाई
परमेश्वराकडे आहे आणि तो तुह्मास आमच्या
हातीं देईल." ४८ मग असें झालें कीं तो पलिष्टी
उठून दावीदाजवळ पोहंचला असतां दावीद उ-
तावळी करून पलिष्ट्याला भिडायास सैन्याकडे
धांवला. ४९ आणि दावीदाने आपला हात पि-
शवींत घालून तेथून एक धोंडा काढून गोफणीने
मारिला, आणि त्या पलिष्ट्याच्या कपाळावर तो
धोंडा लागला, आणि तो धोंडा त्याच्या कपाळांत
बुडून तो भूमीवर पालथा पडला.

५० तसें दावीदाने गोफण व धोंडा यांकडून
त्या पलिष्ट्याला जिंकिलें, आणि त्याचा पराभव
करून त्याला मारिलें, परंतु दावीदाच्या हातीं
तरवार नव्हती. ५१ तेव्हां दावीद धांवून त्या
पलिष्ट्यापासीं उभा राहिला, आणि त्याची तरवार
धरून तिच्या मेणांतून काढिली, आणि तिजकडून
त्याचें डोकें कापून त्याला ठार मारिलें; मग आ-
पला युद्धवीर वधिला आहे हें पाहून पलिष्टी प-
ळाले. ५२ तेव्हां इस्राएलाच्या व यहूद्यांच्या मा-
णसानी उठून हाक मारिली, आणि खोऱ्यापर्यंत
व एक्रोनाच्या वेसीपर्यंत ते पलिष्ट्यांच्या पाठीस
लागले; आणि पलिष्टी शारीमाच्या वाटेंत गाथ
व एक्रोन यांपर्यंत जखमी होऊन पडले. ५३
मग इस्राएलाचीं संतानें पलिष्ट्यांचा पाठलाग
सोडून माघारें आलीं, आणि त्यानी त्यांची छावणी
लुटली. ५४ आणि दावीदाने त्या पलिष्ट्याचें
डोकें घेऊन यरूशालेमाजवळ आणिलें, पण त्या-
चीं शस्त्रें आपल्या राहोटींत ठेविलीं.

५५ आणि जेव्हां शाऊलाने दावीदाला त्या
पलिष्ट्यासीं लढण्यास जातां पाहिलें तेव्हां त्याने
आबनेर सेनापति याला ह्मटलें, "हे आबनेरा,
तो तरुण कोणाचा पुत्र आहे?" मग आबनेराने

म्हटलें, "हे राजा, तुझ्या जिवाची शपथ मी करितों
कीं मी जाणत नाहीं." ५६ तेव्हां राजानें म्हटलें,
"तो तरुण कोणाचा पुत्र आहे, असें पूस." ५७
आणि त्या पलिष्ट्याला वधल्यानंतर दावीद परत
आला, तेव्हां आबनेरानें त्याला घेऊन शाऊलाज-
वळ आणिलें, आणि त्या पलिष्ट्याचें डोकें त्याच्या
हातीं होतें. ५८ तेव्हां शाऊलानें त्याला म्हटलें,
"हे तरुणा, तूं कोणाचा पुत्र आहेस?" मग दा-
वीदानें म्हटलें, "तुझा चाकर इशाय बेथलेहेमी
याचा पुत्र मी आहें."

## अध्याय १८.

तेव्हां असें झालें कीं दावीदानें शाऊलाशीं बो-
लणें समाप्त केलें असतां योनाथानाचा जीव
दावीदाच्या जिवाशीं जडला होता, आणि योना-
थान आपल्या जिवासारिखी त्याजवर प्रीति करीत
होता. २ आणि त्या दिवशीं शाऊलानें त्याला
ठेविलें, आणि त्याला त्याच्या बापाच्या घरास मा-
घारें जाऊं दिल्हें नाहीं. ३ मग योनाथानानें दा-
वीदाशीं करार केला, कारण कीं तो आपल्या जिवा-
सारिखी त्याजवर प्रीति करीत होता. ४ आणि
योनाथानानें आपल्या अंगांत जो झगा होता तो का-
ढून दावीदाला दिल्हा, आणि आपलीं अंगवस्त्रेंहि
व आपली तरवार व आपलें धनुष्य व आपला
कमरबंद हींहि दिल्हीं.

५ तेव्हां शाऊल दावीदाला जेथें जेथें पाठ-
वी तेथें तो जाई, आणि तो चतुराईनें वर्त्तत असे;
आणि शाऊलानें त्याला लढाईच्या माणसांवर
नेमिलें, आणि तो सर्व लोकांच्या दृष्टींत व शा-
ऊलाच्या चाकरांच्या दृष्टींतहि मान्य झाला. ६
आणि असें झालें कीं ते आले, म्हणजे दावीद त्या
पलिष्ट्याला मारून माघारें आला, तेव्हां बायका
इस्राएलाच्या सर्व नगरांतून गाणें व नाचणें असीं
करून डफ व उत्साह व झांज यांसुद्धां शाऊल
राजाची भेट घ्यायास निघाल्या. ७ आणि त्या
बायका नाचत असतां एकमेकींस उत्तर देऊन
असें बोलल्या कीं, "शाऊलानें हजारांस मारिलें,
आणि दावीदानें दाहा हजारांस मारिलें." ८
तेव्हां शाऊल फार रागें भरला, आणि ती गोष्ट
त्याला वाईट वाटून त्यानें म्हटलें कीं, "त्यांनीं
दावीदाला दाहा हजार दिल्हे, आणि मला ह-
जार मात्र दिल्हे, आणि राज्याशिवाय त्याला अग-
खी काय मिळायास राहिलें? ९ आणि त्या
दिवसापासून पुढें शाऊलानें दावीदावर दृष्टि
लाविली. १० मग दुसऱ्या दिवशीं असें झालें
कीं देवापासून दुष्ट आत्मा शाऊलाला लागला,
तेव्हां तो घरांत स्तवन करीत होता, आणि दावीद
आपल्या वहिवाटीप्रमाणें आपल्या हातानें वाद्य वा-
जवीत होता, आणि शाऊलाच्या हातीं भाला हो-
ता. ११ तेव्हां शाऊलानें भाला मारून म्हटलें,
"मी दावीदाला मारून भिंतीसहि लावीन." परंतु
दावीद त्याच्यासमोरून दोनदां निसटून गेला.

१२ मग शाऊल दावीदाचें भय धरूं लागला,
कारण कीं परमेश्वर शाऊलाला सोडून दावीदा-
च्या संगतीं होता. १३ आणि शाऊलानें त्याला
आपल्यापासून दूर करून त्याला हजारांचा सर्दार
करून ठेविलें, आणि लोकांच्या देखतां तो आंत
बाहेर जात येत असे. १४ आणि दावीद आ-
पल्या सर्व कार्यांमध्यें चतुराईनें वर्त्तला, आणि
परमेश्वर त्याला अनुकूळ होता. १५ आणि
तो फार चतुराईनें वर्त्तत होता, हें शाऊलानें पा-
हून त्याचें भय धरिलें. १६ परंतु सर्व इस्राए-
ली व यहूदी दावीदावर प्रीति करीत, कारण कीं
तो त्यांच्यादेखतां आंत बाहेर जात येत असे.

१७ मग शाऊलानें दावीदाला म्हटलें, "पाहा,
मी आपली वडील कन्या मेराब तुला बायको करून
देईन; माझ्यासाठीं तूं शूर ऐस आणि परमेश्व-
रासाठीं लढाया कर." कां कीं शाऊलानें म्हटलें
कीं, "माझा हात त्याजवर न पडो पण पलिष्ट्यांचा
हात त्याजवर पडो." १८ तेव्हां दावीदानें शा-
ऊलाला म्हटलें कीं, "म्या राजाचा जांवई व्हावें
असा मी कोण आहें? आणि माझा जीव काय?
आणि इस्राएलामध्यें माझ्या बापाचें कूळ काय?"
१९ परंतु असें झालें कीं ज्या वेळेस शाऊलाची
कन्या मेराब दावीदाला द्यावयाची होती, तेव्हां
ती आद्रीयेल महोलाथी याला बायको करून
दिल्ही होती. २० तेव्हां शाऊलाची कन्या मी-
खाल हिनें दावीदावर प्रीति केली, आणि हें शा-
ऊलाला सांगितलें असतां त्याला बरें वाटलें. २१
तेव्हां शाऊलानें म्हटलें, "मी ती त्याला देईन

आणि ती त्याला पाशरूप होईल, आणि पलिष्ट्-
यांचा हात त्याजवर पडेल." मग शाऊलानें
दावीदाला ह्मटलें कीं, "तूं आज दोहींतील एकी-
कडून माझा जांवई होसील."
२२ आणि शाऊलानें आपल्या चाकरांस आ-
ज्ञा केली कीं, "तुह्मी दावीदाला गुप्तरूपें बोलून
ह्मणा कीं, पाहा राजा तुजवर संतुष्ट आहे, आ-
णि त्याचे अवघे चाकर तुजवर प्रीति करितात,
तर आतां राजाचा जांवई हो." २३ आणि शा-
ऊलाच्या चाकरांनी हे शब्द दावीदाला सांगित-
ले; तेव्हां दावीदानें ह्मटलें कीं, "राजाचा जांवई
होणें ही तुमच्या हिशोबांत हलकी गोष्ट आहे कीं
काय? मी तर संपत्तिहीन व मानहीन असा मनुष्य
आहें." २४ मग असें जें दावीदानें ह्मटलें तें
शाऊलाच्या चाकरांनी त्याला सांगितलें. २५
तेव्हां शाऊलानें ह्मटलें, "तुह्मी दावीदाला असें
ह्मणा कीं, राजाच्या शत्रूंचा सूड उगवावा ह्मणून
पलिष्ट्यांचीं शंभर बोंडमांसें यांशिवाय कांहीं
परतहुंडा राजा मागत नाहीं." परंतु दावीदाला
पलिष्ट्यांच्या हातांकडून पाडावें, असें शाऊलानें
इच्छिलें.
२६ मग त्याच्या चाकरांनी हे शब्द दावीदा-
ला सांगितले, तेव्हां राजाचा जांवई होणें हें दा-
वीदाला बरें वाटलें; आणि नेमलेला वेळ अद्याप
समाप्त नव्हता; २७ तेव्हां दावीदानें उठून आप-
ल्या मनुष्यांसुद्धां जाऊन दोनशें पलिष्ट्यांस जिवें
मारिलें, आणि त्यांचीं बोंडमांसें आणून आपण
राजाचा जांवई होण्यासाठीं राजाजवळ त्यांची
मोजणी करून दिल्ही; तेव्हां शाऊलानें आपली
कन्या मीखाल त्याला बायको करून दिल्ही.
२८ मग हें पाहून शाऊलाला कळलें कीं परमे-
श्वर दावीदाच्या संगतीं आहे, आणि शाऊला-
ची कन्या मीखाल इनें त्याजवर प्रीति केली.
२९ तेव्हां शाऊल दावीदाला अधिक भ्याला,
आणि शाऊल दावीदाचा वैरी नेहमी झाला.
३० यावर पलिष्ट्यांचे सर्दार लढायास निघत
असत, आणि असें झालें कीं ते जात असतां
दावीद शाऊलाच्या सर्व चाकरांपेक्षां चतुराईनें
वर्त्तला, आणि त्याचें नांव प्रसिद्ध झालें.

## अध्याय १९.

यानंतर शाऊलानें आपला पुत्र योनाथान याला
व आपल्या सर्व चाकरांस असें सांगितलें कीं,
"दावीदाला जिवें मारावें." २ तथापि शाऊलाचा
पुत्र योनाथान याची दावीदावर फार प्रीति हो-
ती; आणि योनाथानानें दावीदाला ह्मटलें कीं,
"माझा बाप शाऊल तुला जिवें मारायास पाहत
आहे, ह्मणून आतां सकाळपर्यंत सावध होऊन
एकांतीं लपून राहा. ३ आणि मी जाऊन ज्या
शेतांत तूं आहेस तेथें आपल्या बापापाशीं उभा
राहीन, आणि तुझ्याविषयीं मी आपल्याबापाशीं
संभाषण करीन, आणि जें पाहीन तें तुला कळ-
वीन. ४ तेव्हां योनाथानानें आपला बाप शाऊल
याला दावीदाविषयीं बरें ह्मटलें, आणि तो त्याला
बोलला कीं, "राजानें आपला चाकर दावीद याचें
वाईट करूं नये, कारण कीं त्यानें तुझें वाईट केलें
नाहीं, परंतु त्यानें तुझीं फार चांगलीं कृत्यें केलीं
आहेत. ५ त्यानेंहि आपलें शिर हातीं घेऊन
पलिष्ट्याला जिवें मारिलें, आणि परमेश्वरानें
अवघ्या इस्राएलासाठीं मोठें तारण केलें, तें तूं
पाहून हर्षित झालास; तर दावीदाला निष्कारण
मारितांना निर्दोष रक्त तूं कां पाडसील?" ६
तेव्हां शाऊलानें योनाथाची विनंती मानिली आ-
णि शाऊलानें असी शपथ वाहिली कीं परमे-
श्वराची शपथ मी करितों कीं त्याला मारणार
नाहीं." ७ मग योनाथानानें दावीदाला बोलाविलें,
आणि योनाथानानें त्याला ह्या सर्व गोष्टी सांगि-
तल्या; आणि योनाथानानें दावीदाला शाऊला-
जवळ आणिलें, आणि तो त्याच्यासमोर पूर्वी-
सारिखा होता.
८ यानंतर अणखी लढाई झाली, आणि दावी-
दानें जाऊन पलिष्ट्यांसीं लढून त्यांचा फार मोड
केला, आणि ते त्याच्यापुढें पळाले. ९ मग
देवापासून दुष्ट आत्मा शाऊलाला लागला, आणि
तो आपला भाला हातीं धरून आपल्या घरीं बस-
ला असतां दावीद हातानें सारंगी वाजवीत होता.
१० तेव्हां शाऊल भाल्यानें दावीदाला भिंतीसीं
लावायास ह्मटला, परंतु तो शाऊलासमोरून
निसटला, आणि भाला भिंतीस लागला, आणि

दावीदाने पळून आपला जीव त्या रात्रीं राखि-
ला. ११ मग दावीदावर टपून सकाळीं त्याला
जिवें मारावें ह्मणून शाऊलाने त्याच्या घरास दूत
पाठविले, आणि मीखाल दावीदाची बायको हें
वर्त्तमान त्याला सांगून असें बोलली कीं, "जर या
रात्रीं आपल्या जिवाचें रक्षण तूं करीत नाहींस
तर सकाळीं तूं जिवें मारिला जासील." १२ तेव्हां
मीखालीने दावीदाला एका खिडकींतून उतरिलें,
आणि त्याने पळून जाऊन आपल्या जिवाचें रक्षण
केलें. १३ मग मीखालीने एक मूर्त्ति घेऊन प-
लंगावर ठेविली, आणि तिच्या डोकीखालीं बक-
ऱ्यांच्या केंसांची उशी ठेवून तिजवर पांघरूण घा-
तलें. १४ आणि जेव्हां शाऊलाने दूत दावीदाला
धरायास पाठविले तेव्हां तिने ह्मटले कीं, "त्याच्या
जिवाला बरें वाटत नाहीं." १५ मग शाऊलाने
दावीदाला पाहायास दूत पाठवून ह्मटलें कीं, "म्या
त्याला जिवें मारावें ह्मणून त्याला पलंगावर मज-
पासीं आणा." १६ आणि ते दूत घरांत आले
असतां पाहा पलंगावर मूर्त्ति व तिच्या डोकीखालीं
बकऱ्यांच्या केंसांची उशी होती. १७ तेव्हां शा-
ऊलाने मीखालीला ह्मटलें कीं, "त्वां मला कां फ-
सविलें आणि माझ्या वैऱ्याने निर्भय पळून जावें
ह्मणून त्याला लावून दिल्हें?" मग मीखाल शा-
ऊलाला ह्मणाली, "त्याने मला ह्मटलें कीं, मला
जाऊं दे, म्या तुला कां मारावें?"

१८ याप्रमाणें दावीदाने पळून आपल्या जि-
वाचें रक्षण केलें, आणि शमुवेलाजवळ राम्यामध्यें
येऊन त्याने आपणाला जें अवघें शाऊलाने केलें
होतें तें त्याला सांगितलें; तेव्हां तो व शमुवेल
जाऊन नायोथांत राहिले. १९ मग शाऊलाला
कोणी असें ह्मटलें कीं, "पाहा दावीद राम्यांतल्या
नायोथांत आहे." २० तेव्हां शाऊलाने दावी-
दाला धरायास दूत पाठविले, परंतु भविष्यवा-
द्यांची मंडळी स्तवन करितां आणि शमुवेल त्यां-
वर नेमलेला उभा राहतां, हीं जेव्हां त्यांनी पाहि-
लीं तेव्हां देवाचा आत्मा शाऊलाच्या दूतांवर
आला, आणि तेहि स्तवन करूं लागले. २१ मग
तें शाऊलाला सांगितलें असतां त्याने अणखी
दूत पाठविले, आणि तेहि स्तवन करूं लागले;
मग शाऊलाने तिसऱ्या वेळेस अणखी दूत
पाठविले, आणि तेहि स्तवन करूं लागले. २२
तेव्हां तोहि राम्यास जायास निघाला, आणि से-
खूमध्यें एका मोठ्या विहिरीजवळ येऊन त्याने असें
विचारिलें कीं, "शमुवेल व दावीद कोठें आहेत?"
मग कोणीएकाने ह्मटलें, "पाहा ते राम्यांतल्या ना-
योथांत आहेत." २३ तेव्हां तो राम्यांतल्या नायो-
थांत जाऊं लागला, आणि देवाचा आत्मा त्या-
जवरहि आला, आणि तो जातांना राम्यांतल्या
नायोथांत पोहंचला तोंपर्यंत स्तवन करीत गेला.
२४ मग त्यानेहि आपलीं अंगवस्त्रें काढून शमु-
वेलापुढें स्तवन केलें, आणि तो पडून त्या सर्व दि-
वसीं आणि त्या सर्व रात्रीं उघडा राहिला; या का-
रणास्तव ते ह्मणाले, "शाऊलहि भविष्यवाद्यांमध्यें
आहे कीं काय?"

## अध्याय २०.

त्या समयीं दावीद राम्यांतल्या नायोथापासून
पळाला आणि योनाथानाजवळ येऊन ह्मणा-
ला, "म्या काय केलें आहे? माझा अपराध काय?
आणि तुझ्या बापाचा म्या काय अन्याय केला आहे
कीं तो माझा जीव शोधीत आहे?" २ तेव्हां त्याने
त्याला ह्मटलें, "तूं खचीत मरणार नाहींस; पाहा,
माझा बाप लाहान किंवा मोठें असें कांहीं एक कार्य
मला सांगितल्यावांचून करणार नाहीं; तर हें कार्य
माझा बाप मजपासून कसें गुप्त ठेवील? ही गोष्ट
तसी नाहीं. ३ मग दावीद शपथ वाहून ह्मणाला,
"तुझा बाप खचीत जाणतो कीं तूं माझ्याठायीं सं-
तोषित आहेस, ह्मणून तो ह्मणतो, हें कार्य योना-
थानाला कळूं नये, नाहीं तर त्याला दुःख हो-
ईल; परंतु परमेश्वराची शपथ आणि तुझीहि
शपथ मी करितों कीं माझा जीव मरणापासून
केवळ पावलाच्या अंतरावर आहे." ४ तेव्हां
योनाथान दावीदाला ह्मणाला, "जें कांहीं तूं इ-
च्छितोस तें मी तुझ्यासाठीं करीन." ५ मग दावीद
योनाथानाला ह्मणाला, "पाहा उद्यां अमावास्या
होईल, तेव्हां राजाजवळ जेवायास निश्चयेंकरून
म्या बसावें; परंतु मला जाऊं दे, आणि परवांच्या
सांजपर्यंत मी रानांत लपून राहीन. ६ जर तुझा
बाप मजविषयीं कांहीं लक्ष्य लावून विचारील तर
त्याला सांग कीं दावीदाने आपलें गांव बेथलेहेम

तेथें जायाचें मजपाशीं आग्रह करून मागितलें,
कारण कीं तेथें सर्व कुटुंबासाठीं वार्षिक यज्ञ आहे.
७ जर तो, बरें, असें ह्मणेल, तर तुझ्या सेवकाचें
कल्याण होईल, परंतु जर त्याला राग येईल तर
जाण कीं त्याने दुष्टाई करायाचा निश्चय केला
आहे. ८ याप्रमाणें तूं आपल्या सेवकावर कृपा
कर, कारण कीं त्वां आपल्यासंगतीं **परमेश्वराच्या**
करारांत आपला सेवक आणिला आहे; तथापि जर
माझ्याठायीं दुष्टाई आहे तर तूंच मला जिवें मार;
त्वां आपल्या बापाजवळ मला कां आणावें?" ९
तेव्हां योनाथानाने ह्मटलें, "असें तुला खचीत
होणार नाहीं, कारण कीं माझ्या बापानें तुझें वाईट
करण्याचा निश्चय केला आहे, असें मला खचीत
समजलें तर मी तुला सांगणार नाहीं कीं काय?"
१० मग दावीद योनाथानाला ह्मणाला, "तर मला
कोण सांगेल? अथवा जर तुझा बाप तुला निष्ठुरतेने
उत्तर देईल तर काय?"

११ तेव्हां योनाथान दावीदाला ह्मणाला, "चल,
आपण रानांत जाऊं." मग ते दोघे रानांत गेले."
१२ आणि योनाथान दावीदाला ह्मणाला, "हे इ-
स्राएलाच्या देवा **परमेश्वरा**, जेव्हां उद्यां किंवा
परवां या वेळेस मी आपल्या बापाचें मन समजेन,
तेव्हां पाहा जर दावीदाविषयीं चांगलें असेल आ-
णि मी तुझ्यापाशीं पाठवून तें तुला कळवीत नाहीं,
१३ तर तसें आणि अधिकहि **परमेश्वर** योनाथा-
नाला करो; परंतु जर तुझें वाईट करणें माझ्या बापाला
वाटेल, तर मी तुला समजवून तुला रवाना करीन,
आणि तूं सुखरूप जासील; आणि जसा माझ्या
बापाला **परमेश्वर** अनुकूळ होता, तसा तुला हो-
वो. १४ तेव्हां जर मी वांचतों तर माझा घात न
व्हावा, ह्मणून तूं **परमेश्वराची** कृपा मजवर करा-
वी असें केवळ नाहीं; १५ परंतु तूं आपली कृपा
माझ्या कुटुंबावरून कधीं काढूं नको, जेव्हां **परमे-
श्वर** दावीदाच्या प्रत्येक शत्रूंस भूमीवरून काढून
टाकील तेव्हांहि नको." १६ आणि योनाथानाने दा-
वीदाच्या कुटुंबाशीं करार करून ह्मटलें कीं "**पर-
मेश्वर** दावीदाच्या शत्रूंच्या हातून शोध करो."
१७ मग योनाथानाने दावीदाकडून फिरून शपथ
वाहाविली, कारण कीं त्याने त्याजवर प्रीति केली,
आपल्या जिवासारिखीहि त्याजवर प्रीति केली.

१८ तेव्हां योनाथान त्याला ह्मणाला, "उद्यां
अमावास्या होईल, आणि तूं नाहींस ह्मणून कळेल
कां कीं तुझें ठिकाण रिकामें होईल. १९ आणि
परवांपर्यंत राहिल्यावर त्वरेने उतरून ज्या ठिकाणीं
त्या कार्याच्या दिवसीं तूं लपला होतास तेथें ये,
आणि एजेल दगडाजवळ राहा. २० आणि नि-
शाण पाहिल्यासारिखें मी तीन बाण त्याच्या बाजूस
मारीन. २१ मग पाहा मी पोराला पाठवून ह्मणेन,
जा, बाणांचा शोध कर; जर मी पोराला निक्षून
ह्मणेन, पाहा ते बाण तुझ्यापलिकडे आहेत त्यांस
घे, तर तूं ये; कां कीं तुझा बंदोबस्त आहे,
आणि **परमेश्वराची** शपथ मी करितों कीं तुला
कांहीं उपद्रव होणार नाहीं. २२ परंतु जर मी
पोराला ह्मणेन, पाहा ते बाण तुझ्या पलिकडे आ-
हेत तर तूं निघून जा, कां कीं **परमेश्वराने** तुला
बिदा केलें आहे. २३ आणखी ज्या गोष्टीविषयीं
तूं व मी बोललों आहों, पाहा **परमेश्वर** मजमध्यें
व तुजमध्यें निरंतर असो."

२४ मग दावीद रानांत लपून राहिला, आणि
अमावास्या आली असतां राजा जेवायास बसला.
२५ आणि राजा आपल्या चालीप्रमाणें भिंतीजव-
ळील आसनावर बसला, आणि योनाथान उठला
आणि अबनेर शाऊलाच्या बाजूस बसला, परंतु
दावीदाचें ठिकाण रिकामें होतें. २६ तथापि शा-
ऊलाने त्या दिवसीं कांहीं ह्मटलें नाहीं, कां कीं
त्याला वाटलें कीं त्याला कांहीं झालें असेल, तो
शुद्ध नसेल, निश्चय तो शुद्ध नसेल. २७ मग
पुढल्या ह्मणजे महिन्याच्या दुसऱ्या दिवसीं असें
झालें कीं दावीदाचें ठिकाण रिकामें होतें, आणि
शाऊलाने आपला पुत्र योनाथान याला ह्मटलें,
"इशायाचा पुत्र काल व आज जेवायास कां
आला नाहीं? २८ तेव्हां योनाथानाने शाऊलाला
उत्तर केलें कीं, "दावीदाने बेथलेहेमास जाया-
चें आग्रह करून मजपाशीं मागितलें. २९ तो
ह्मणाला, कृपा करून मला जाऊं द्यावें, कारण
कीं आमचें कुटुंब नगरांत यज्ञ करणार आहे,
आणि माझ्या भावाने मला बोलाविलें आहे, ह्म-
णून जर तुझा मजवर संतोष आहे तर मला मा-
झ्या भावांस भेटायास जाऊं दे; या कारणासाठीं
तो राजाच्या पंक्तीस बसायास येत नाहीं." ३०

तेव्हां शाऊलाने योनाथानावर रागें भरून त्या-
ला ह्मटलें, "अरे दुष्ट फितूरखोर पुत्रा, तूं आ-
पल्या फजितीसाठीं आणि आपल्या निर्लज्ज आ-
ईच्या फजितीसाठीं इशायाच्या पुत्रासीं जडला
आहेस हें मला ठाऊक नाहीं कीं काय? ३१
कारण कीं जोंपर्यंत इशायाचा पुत्र पृथ्वीवर वांचेल
तोंपर्यंत तूं व तुझें राज्य स्थापित होणार नाहीं;
तर आतां पाठवून त्याला मजपासीं आण, का कीं
त्याला खचीत मारावावें." ३२ मग योनाथानाने
आपला बाप शाऊल याला उत्तर केलें, "त्याला
कशासाठीं मारावें? ३३ त्याने काय केलें आहे?"
तेव्हां शाऊलाने त्याला वधावास भाला मारिला,
ह्मणून योनाथानाला कळलें कीं दावीदाला जिवें
मारावें, असा निश्चय आपल्या बापाने केला आ-
हे. ३४ आणि योनाथान क्रोधयुक्त होऊन पं-
क्तींतून उठून निघाला, आणि महिन्याच्या दुसऱ्या
दिवसीं तो जेवला नाहीं, का कीं दावीदाविषयीं
त्याला दुःख वाटलें; आपल्या बापाने त्याचा अप-
मान केला ह्मणून.

३५ मग सकाळीं असें झालें कीं योनाथान
दावीदासीं नेमलेल्या वेळेस रानांत गेला, आणि
त्याच्यासंगतीं लाहान पोर होता. ३६ आणि तो
आपल्या पोराला ह्मणाला, "जे बाण मी मारितों
तूं धांवून त्यांचा शोध कर." आणि त्याने तो पोर
धांवत असतां त्याच्यापलिकडे एक बाण मारिला.
३७ आणि जो बाण योनाथानाने मारिला होता
त्याच्या ठिकाणाजवळ तो पोर पोहंचला असतां,
योनाथानाने त्या पोराच्या मागून हाक मारून ह्म-
टलें कीं, "तो बाण तुझ्यापलिकडे आहे कीं नाहीं?"
३८ आणखी योनाथानाने त्या पोराच्या मागून हाक
मारिली कीं, "धांवत जा, थांबूं नको." आणि योना-
थानाचा पोर ते बाण जमा करून घेऊन आपल्या ध
न्याजवळ आला. ३९ परंतु त्या पोराला कांहीं कळलें
नव्हतें, केवळ योनाथान व दावीद यांस ही गोष्ट
ठाऊक होती. ४० मग योनाथानाने आपलीं ह-
त्यारें त्या पोराला देऊन त्याला ह्मटलें, "तीं घेऊन
नगरांत जा." ४१ आणि तो पोर गेला असतां
दावीद दक्षिण प्रदेशीं निघाला, आणि भूमीवर पा-
लथा पडला, मग तो तीन वेळ लवला; तेव्हां त्या-
नी एकमेकाचें चुंबन घेतलें, आणि एकमेकासाठीं
शोक केला; तथापि दावीदानें अधिक केला. ४२
आणि योनाथान दावीदाला ह्मणाला, "सुखरूप
जा, कारण कीं आह्मी दोघानी परमेश्वराच्या
नामाने शपथ वाहून ह्मटलें आहे कीं, मजमध्यें व
तुजमध्यें आणि माझ्या संतानामध्यें व तुझ्या संता-
नामध्यें परमेश्वर सर्वकाळ असो." तेव्हां तो
उठून गेला आणि योनाथान नगरांत आला.

## अध्याय २१.

यानंतर दावीद नोबास अहिमेलेख याजका-
जवळ आला, आणि अहिमेलेख दावीदाला
भेटून भयाभीत असतां त्याला ह्मणाला, "तूं एक-
ला आलास आणि तुझ्यासंगतीं कोणी नाहीं, हें
कसें आहे?" २ तेव्हां दावीद अहिमेलेख याज-
काला ह्मणाला, "राजाने मला एक काम सांगितलें
आहे, आणि त्याने असें ह्मटलें कीं, ज्या कामा-
विषयीं मी तुला पाठवितों आणि जें मी तुला सांगि-
तलें आहे, तें कोणीएकाने कांहीं न समजावें; आणि
अमक्या ठिकाणीं माझ्याजवळ मिळावें ह्मणून म्या
चाकरांस आज्ञा केली. ३ तर आतां तुझ्या स्वा-
धीन काय आहे? पांच भाकरी किंवा जें काय
असेल तें माझ्या हातीं दे." ४ तेव्हां त्या याज-
काने दावीदाला उत्तर केलें कीं, "माझ्याजवळ
कांहीं सामान्य भाकर नाहीं, परंतु पवित्र भाकर
आहे; जर तरुणानी आपल्याला बायकांपासून रा-
खिलें आहे तर." ५ तेव्हां दावीदाने त्या याज-
काला उत्तर केलें कीं, "मी तीन दिवसामागें निघालों
तेव्हांपासून आह्मी बायकांपासून दूर राहिलों आ-
हों, आणि तरुणांचीं पात्रें शुद्ध आहेत; आणि ती
भाकर जर पात्रांत आज पवित्र केली होती तरी
कांहीं प्रकारें सामान्य आहे." ६ मग त्या याज-
काने त्याला अर्पिलेली भाकर दिल्ही, कारण कीं
तो दर्शनीय अपूप परमेश्वरासमोरून काढिला
होता, नवा ठेवावा ह्मणून त्या दिवसीं काढिला
होता, त्याशिवाय दुसरी भाकर नव्हती. ७
आणि त्या दिवसीं तेथें शाऊलाच्या चाकरांतील
एक माणूस परमेश्वरापुढें अडलेला असा होता,
आणि त्याचें नाम दवेग; तो अदोमी व शाऊ-
लाच्या खिल्लाऱ्यांमध्यें मुख्य असा होता. ८
आणखी दावीद अहिमेलेखाला ह्मणाला, "एथें

तुझ्याजवळ भाला किंवा तरवार आहे कीं काय!
राजाचें काम निकडीचें आहे, ह्मणून मी आपल्या
हातीं आपली तरवार किंवा आपलीं शस्त्रें घेतलीं
नाहींत." ९ तेव्हां तो याजक ह्मणाला, "गल्याथ
पलिष्टी, ज्याला त्वां एलाच्या खोऱ्यांत जिवें मारिलें
पाहा त्याची तरवार एफोदाच्यामागें रुमालामध्यें
गुंडाळलेली आहे; ती जर तूं घेसील तर घे, का-
रण कीं तिजशिवाय दुसरी एथें नाहीं." तेव्हां
दावीद ह्मणाला, "तिजसारिखी दुसरी नाहीं, ती
मला दे."

१० आणि त्या दिवसीं दावीद उठून शाऊ-
लापासून पळाला, आणि गाथाचा राजा आखीश
याजवळ गेला. ११ परंतु आखीशाचे चाकर
त्याला ह्मणाले, "या देशाचा राजा दावीद हा
नव्हे कीं काय! शाऊलाने हजार आणि दावी-
दाने दाहा हजार मारिले आहेत, असें नृत्यगायन
करून त्यानी एकमेकांमध्यें त्याविषयीं ह्मटलें कीं
नाहीं?" १२ आणि दावीदाने हे शब्द आपल्या
मनांत ठेविले, आणि गाथाचा राजा आखीश
यापुढें तो फार भ्याला. १३ मग त्याच्या देखतां
त्याने आपली वहिवाट पालटून त्याजवळ वेडेपण
दाखविलें, ह्मणजे त्याने कवाडाच्या फळ्यावर चि-
तरिलें, आणि आपला थुंका आपल्या दाढीवर पडूं
दिल्हा. १४ तेव्हां आखीश आपल्या चाकरांस
ह्मणाला, "पाहा, हा माणूस वेडा आहे, तुह्मी त्या-
ला मजपासीं कां आणिलें? १५ वेड्या माणसां-
ची गरज मला आहे ह्मणून तुह्मी याला माझ्या-
जवळ वेडेपण करायास आणिलें काय! असा
माणूस माझ्या घरीं येईल काय?"

## अध्याय २२.

मग दावीद तेथून निघून अदूलाम गुहेंत पळून
गेला, आणि हें ऐकून त्याचे भाऊ व त्याच्या
बापाचें सर्व कुटुंब त्याजवळ आलें. २ आणि
सर्व जे हैराण व सर्व जे कर्जदार व सर्व जे दुःखित
मनाचे ते त्याजवळ एकत्र मिळाले, आणि तो
त्यांचा सर्दार झाला; याप्रमाणें सुमारें चारशें
माणसें त्याजवळ मिळून राहिलीं. ३ त्यानंतर
दावीद तेथून मोवाबांतील मिस्पास गेला, आणि
मोवाबाच्या राजाला ह्मणाला कीं, "देव माझें कसें
काय करील हें मी जाणें तोंपर्यंत माझ्या बापाला
व माझ्या आईला आपल्याजवळ कृपा करून प्र-
वास करूं द्यावें." ४ आणि त्याने त्यांस मोवा-
बाच्या राजाजवळ आणिलें, मग तें जोंपर्यंत दावीद
गडांत होता तोंपर्यंत त्याजवळ राहिले. ५ मग
गाद भविष्यवादी दावीदाला ह्मणाला, "गडांत
राहूं नको, परंतु उठून यहूदा देशांत जा," तेव्हां
दावीद निघून हारेथ रानांत गेला.

६ त्या वेळेस शाऊल रामांतल्या गिब्यांत
एका झाडीमध्यें राहत होता; त्याचा भाला त्याच्या
हातीं होता, आणि त्याचे चाकर त्याच्या सभोंवते
उभे राहत होते; आणि जेव्हां शाऊलाने ऐकिलें
कीं दावीद व त्याच्या जवळचीं माणसें प्रगट झालीं,
७ तेव्हां शाऊल आपल्या सभोंवते जे आपले
चाकर उभे राहत होते त्यांस ह्मणाला, "अहो
सर्व तुह्मी बन्यामीनी ऐका हो, इशायाचा पुत्र
तुह्मा सर्वांस शेतें व द्राक्षमळे देणार आहे काय!
आणि तो तुह्मा सर्वांस हजारांचे सर्दार व शंभ-
रांचे सर्दार करणार आहे काय! ८ कीं तुह्मी स-
र्व मजविरुद्ध फितुरी झालां, आणि माझ्या पुत्राने
इशायाच्या पुत्रासीं करार केला आहे हें मला
कोणीएक कळवीत नाहीं, आणि तुह्मामध्यें कोणी
एक मजबरोबर दुःखित होत नाहीं, आणि माझ्या-
पुत्राने माझ्या चाकराला मजविरुद्ध जपायास
आजसारिखेंच चेतविलें आहे, याविषयींहि कोणी-
एक मला कळवीत नाहीं."

९ मग दवेग अदोमी जो शाऊलाच्या चाक-
रांवर नेमलेला होता तो उत्तर करून ह्मणाला
कीं, "इशायाचा पुत्र नोबांत अहितूबाचा पुत्र अ-
हिमेलेख याजवळ आला, असें म्यां पाहिलें. १०
आणि याने त्यासाठीं परमेश्वराला विचारिलें
आणि त्याला अन्न दिल्हें, आणि गल्याथ पलिष्टी
याची तरवार त्याला दिल्ही." ११ तेव्हां रा-
जाने निरोप पाठवून अहितूबाचा पुत्र अहिमेलेख
याजक याला आणि त्याच्या बापाच्या सर्व कुटुं-
बांतील जे याजक नोबांत होते त्यांस बोलाविलें,
आणि ते अवघे राजाजवळ आले. १२ तेव्हां
शाऊलाने ह्मटलें, "हे अहितूबाच्या पुत्रा, ऐक."
मग तो ह्मणाला, "हे महाराज, मी ऐकत आहें."
१३ तेव्हां शाऊल त्याला ह्मणाला, "त्वां व इशा-

याच्या पुत्राने कशासाठीं मजविरुद्ध फितूर केला कीं त्वां त्याला भाकर व तरवार दिल्ही, आणि त्यासाठीं देवापाशीं प्रश्न केला, ह्मणून त्याने मजविरुद्ध उठून या वेळेस जपावें?" १४ तेव्हां अहिमेलेख राजाला उत्तर करून ह्मणाला, "जो तुझ्या एकांतांत येत असतो आणि तुझ्या घरीं मान्य आहे असा राजाचा जांवई दावीद त्यासारिखा तुझ्या सर्व चाकरांमध्यें विश्वासू कोण आहे? १५ तर त्या वेळेस मी त्यासाठीं देवाला विचारूं लागलों कीं काय? असी गोष्ट माझ्याने व्हायाची नाहीं; राजाने आपल्या चाकराला किंवा माझ्या बापाच्या कुटुंबांतील कोणीएकाला अपराध लावूं नये, कारण कीं या सर्व गोष्टींविषयीं मी अधिक उणें कांहीं जाणत नाहीं." १६ मग राजा ह्मणाला, "अरे अहिमेलेखा, तूं खचीत मरसील, तूं व तुझ्या बापाचें सर्व कुटुंबहि मरेल."

१७ मग राजा आपल्याभोंवतें जे चाकर उभे राहत होते त्यांस ह्मणाला, "परमेश्वराच्या याजकांच्या अंगावर जाऊन त्यांस जिवें मारा, कारण कीं त्यांनीहि दावीदाचा पक्ष धरिला आहे; अणखी त्यांनी जाणिलें कीं तो पळाला, आणि त्यांनीं मला कळविलें नाहीं." परंतु राजाचे चाकर परमेश्वराच्या याजकांस जिवें मारायाकरितां आपले हात लावायास मान्य झाले नाहींत. १८ तेव्हां राजाने दवेगाला ह्मटलें कीं, "तूं याजकांच्या अंगावर जाऊन त्यांस जिवें मार." मग दवेग अदोमी याने याजकांच्या अंगावर जाऊन त्यांस जिवें मारिलें, आणि त्या दिवशीं त्याने जवसाचें एफोद वेष्टिलेल्या अशा पंचाऐंशीं माणसांस जिवें मारिलें. १९ आणि त्याने नोब याजकांचें नगर याचा नाश तरवारीने केला; त्यांतील पुरुष व बायका व बाळकें व तान्हीं व ढोरें व गाढवें व मेंढरें यांस त्याने तरवारीने जिवें मारिलें. २० परंतु अहितूबाचा पुत्र अहिमेलेख याचा पुत्र एब्याथार पळाला, आणि दावीदाजवळ गेला. २१ आणि शाऊलाने परमेश्वराच्या याजकांस जिवें मारिलें, हें एब्याथाराने दावीदाला कळविलें. २२ तेव्हां दावीदाने एब्याथाराला ह्मटलें कीं, "दवेग अदोमी जो तेथें होता तो शाऊलाला खचीत सांगेल, हें त्याच दिवशीं म्या जाणिलें होतें; मी तुझ्या बापाच्या घरच्या सर्व मनुष्यांस मरणाचें कारण झालों. २३ माझ्यासंगतीं राहा, भिऊं नको; कां कीं जो तुला जिवें मारायास पाहतो तो मला जिवें मारायास पाहतो, परंतु मजबरोबर तुझें रक्षण होईल."

## अध्याय २३.

तेव्हां कोणी दावीदाला सांगितलें कीं, पाहा पलिष्टी कईल्यासीं लढतात आणि ते खळीं लुटतात. २ त्यावर दावीदाने परमेश्वराला विचारिलें कीं, "मी जाऊन त्या पलिष्ट्यांस मारूं कीं काय? मग परमेश्वराने दावीदाला ह्मटलें, "जा आणि पलिष्ट्यांस मारून कईल्याचें रक्षण कर." ३ परंतु दावीदाच्या माणसांनी त्याला ह्मटलें, "पाहा आह्मास एथें यहूद्यांत भय आहे, आणि जर आह्मी कईल्याकडे पलिष्ट्यांच्या सैन्यावर जाऊं तर आह्मास किती अधिक भय होईल? ४ तेव्हां दावीदाने फिरून परमेश्वराला विचारिलें, आणि परमेश्वराने असें उत्तर दिल्हें कीं, "उठून कईल्याजवळ जा, कारण कीं मी पलिष्ट्यांस तुझ्या हातीं देईन." ५ मग दावीद व त्याचीं माणसें कईल्याजवळ जाऊन पलिष्ट्यांसीं लढलीं, आणि त्यांचें मोठें कदन करून त्यांचे पशू घेतले; याप्रमाणें दावीदाने कईल्यांतल्या लोकांचें रक्षण केलें. ६ आणि असें झालें कीं जेव्हां अहिमेलेखाचा पुत्र एब्याथार दावीदाकडे कईल्याजवळ पळून आला, तेव्हां त्याने आपल्या हातीं एक एफोद आणिलें.

७ यानंतर शाऊलाला कोणी सांगितलें कीं दावीद कईल्याजवळ गेला आहे; तेव्हां शाऊल ह्मणाला, "देवाने त्याला माझ्या हातीं टाकून दिल्हें आहे, कारण कीं ज्याला दरवाजे व अडसर आहेत अशा नगरांत जाऊन तो कोंडिला आहे. ८ आणि शाऊलाने कईल्याजवळ उतरावें आणि दावीद व त्याचीं माणसें वेढावीं ह्मणून सर्व लोकांस लढाईसाठीं एकत्र केलें. ९ तेव्हां दावीदाला माहीत झालें कीं शाऊल आपणावर दुष्टाई योजीत आहे; ह्मणून तो एब्याथार याजकाला ह्मणाला, तें एफोद इकडे आण." १० मग दावीदाने ह्मटलें, "हे इस्राएलाच्या देवा परमेश्वरा, तुझ्या चाकराने खचीत ऐकिलें आहे कीं

शाऊल माझ्यामुळें नगराचा नाश करायास कई-
ल्यावर यायास पाहत आहे. ११ तर कईल्याचे
लोक मला शाऊलाच्या हातीं देतील कीं काय?
असें तुझ्या चाकराने ऐकिलें तसें शाऊल येईल
कीं काय? हे इस्राएलाच्या देवा परमेश्वरा, हें
आपल्या चाकरांस कृपा करून सांगावें." तेव्हां
परमेश्वर ह्मणाला, "तो येईल." १२ मग दा-
वीद ह्मणाला, "कईल्याचे लोक मला व माझ्या
मनुष्यांस शाऊलाच्या हातीं देतील कीं काय?"
तेव्हां परमेश्वराने ह्मटलें, "ते देतील." १३
मग दावीद व त्याचीं माणसें सुमारें साहाशें उठून
कईल्यांतून निघालीं, आणि जेथें जायाचें तेथें गे-
लीं; तेव्हां शाऊलास कोणी सांगितलें कीं दावीद
कईल्यापासून पळाला आहे, मग त्याने जाणें सो-
डिलें. १४ त्यानंतर दावीद डोंगरांतील गुहांमध्यें
राहिला, आणि जीफ रानांतील डोंगरावर वस्ती
केली; आणि शाऊल नित्य नित्य त्याचा शोध
करीत होता, परंतु त्याच्या हातीं तो देवाने लागूं
दिल्हा नाहीं. १५ आणि दावीदाने पाहिलें कीं
शाऊल आपला जीव घ्यायास निघाला आहे;
तेव्हां दावीद जीफ रानांतील एका झाडींत होता.
१६ त्या समयीं शाऊलाचा पुत्र योनाथान
उठून झाडींत दावीदाजवळ गेला, आणि त्याने
त्याचे हात देवासंबंधीं सबळ केले. १७ आणखी
तो त्याला ह्मणाला कीं, "भिऊं नको, कारण कीं
शाऊल माझा बाप याच्या हाताला तूं लागणार
नाहींस, आणि तूं इस्राएलावर राज्य करसील,
आणि मी तुझ्याखालीं पहिला होईन; आणि हेंहि
माझा बाप शाऊल जाणत आहे. १८ तेव्हां
त्या दोघानी परमेश्वरासमोर करार केला, मग
दावीद झाडींत राहिला, आणि योनाथान आपल्या
घरास गेला.
१९ त्या समयीं जिफी शाऊलाजवळ गि-
ब्यांत येऊन ह्मणाले कीं, "यशीमोनापासून दक्षि-
णेकडे हाखिलाच्या डोंगरांतील झाडींमध्यें गुहांत
दावीद लपून राहिला आहे कीं नाहीं? २०
तर आतां हे राजा, आपल्या मनाच्या सर्व इच्छे-
प्रमाणें ये, ह्मणजे आह्मी त्याला राजाच्या हातीं
देऊं." २१ तेव्हां शाऊल ह्मणाला, "देवापा-
सून तुह्माला आशीर्वाद असो, कारण कीं तुह्मी
मजवर दया केली आहे. २२ तर जाऊन अण-
खी शोध करा, आणि त्याचें पाऊल कोठें उमटलें
आहे, आणि तेथें त्याला कोणी पाहिलें, असें सम-
जून त्याची जागा पाहा, कारण कीं तो फार चतु-
राईने वर्त्ततो, असें मला सांगितलें आहे. २३
आणि ज्या सर्व गुप्त स्थानांमध्यें तो लपून राहतो
तीं पाहून समजून मजपाशीं खरें वर्त्तमान येऊन
सांगा; मग मी तुमच्यासंगतीं येईन, आणि असें
होईल कीं जर तो मुलखांत आहे तर मी यहूदां-
च्या सर्व हजारांमध्यें त्याचा शोध करीन." २४
तेव्हां ते लोक उठून शाऊलापुढें जीफास गेले,
परंतु दावीद व त्याचीं माणसें यशीमोनापासून
दक्षिणेकडे मावोनाच्या रानांतल्या सपाटींत होतीं.
२५ आणि शाऊल व त्याचीं माणसें शोध करा-
यास आलीं, हें कोणी दावीदाला सांगितलें; तेव्हां
तो एका खडकावरून उतरून मावोनाच्या रानांत
वस्तीस राहिला; हें ऐकिल्यावर शाऊल मावो-
नाच्या रानांत दावीदाचा शोध करूं लागला. २६
आणि शाऊल डोंगराच्या एका बाजूने चालला,
तेव्हां दावीद व त्याचीं माणसें त्या डोंगराच्या
दुसऱ्या बाजूने चाललीं, आणि दावीदाने शाऊ-
लापासून पळायास त्वरा केली, कारण कीं शाऊल
व त्याचीं माणसें दावीदास व त्याच्या माणसांस
धरायास त्यांस वेढूं लागलीं. २७ परंतु एक
दूत शाऊलाजवळ येऊन ह्मणाला, "अहो लवकर
चला, कारण कीं पलिष्टी मुलखांत आले आहेत."
२८ तेव्हां शाऊल दावीदाचा पाठलाग सोडून
पलिष्ट्यांसीं लढायास गेला; या कारणास्तव त्या
जाग्याला सेलाहम्माहलकोत असें त्यानी नांव
ठेविलें; त्यानंतर दावीद तेथून जाऊन एनगेदीच्या
गुहांमध्यें राहिला.

## अध्याय २४.

आणि असें झालें कीं शाऊल पलिष्ट्यांचा
पाठलाग सोडून माघारा आला तेव्हां त्या-
ला कोणी सांगितलें कीं दावीद एनगेदीच्या रा-
नांत आहे. २ तेव्हां शाऊलाने सर्व इस्राएलांतून
तीन हजार निवडलेल्या मनुष्यांस घेतलें, आणि
तो भेकरांच्या खडकांमध्यें दावीद व त्याच्या मनु-
ष्यांचा शोध करायास गेला. ३ आणि मेंढवा-

जांबवळ रस्त्यावर आला असतां तेथील एका
गुहेंत शाऊल आपले पाय झांकायास गेला, आणि
दावीद व त्याचीं माणसें गुहेच्या बाजूंत राहत
होतीं. ४ तेव्हां दावीदाच्या माणसांनीं त्याला
ह्मटलें "पाहा ज्या दिवसाविषयीं परमेश्वराने
तुला असें सांगितलें कीं, पाहा मी तुझा शत्रु तुझ्या
हातीं देईन, आणि तुला जसें बरें वाटेल तसें तूं
त्याचें करशील, तो आला." मग दावीदाने उठून
शाऊलाचा वस्त्रकांठ गुप्तरूपें कापून घेतला. ५
परंतु त्यानंतर असें झालें कीं दावीदाच्या चित्ता-
ला दुःख वाटलें, कारण कीं त्याने शाऊलाचा
वस्त्रकांठ कापिला होता. ६ आणि त्याने आप-
ल्या मनुष्यांस ह्मटलें, "म्या आपल्या धन्याचें
असें करावें, ह्मणजे म्या आपला हात परमेश्वरा-
अभिषेकलेल्यावर घालावा, अशी गोष्ट परमेश्व-
राने मजपासून घडूं देऊं नये; कारण कीं तो
परमेश्वराचा अभिषिक्त आहे." ७ अशा श-
ब्दांकडून दावीदाने आपल्या मनुष्यांस कुंठित केलें,
आणि त्यांस शाऊलावर उठूं दिल्हें नाहीं; मग
शाऊल उठून गुहेंतून निघून वाटेने गेला. ८
त्यानंतर दावीद उठून गुहेंतून निघाला, आणि
शाऊलाच्या पाठीमागें हाक मारून बोलला, "हे
महाराज माझ्या प्रभू." तेव्हां शाऊलाने मागें
फिरून पाहिलें, आणि दावीदाने आपलें तोंड
भूमीकडे लावून नमन केलें.

९ मग दावीदाने शाऊलाला ह्मटलें कीं, "जे-
व्हां माणसें बोलतात कीं, पाहा, दावीद तुझें वा-
ईट करायास पाहतो, असें जें लोकांचें बोलणें तें
तूं कां मानितोस? १० पाहा, याच दिवशीं त्वां
आपल्या डोळ्यांनीं पाहिलें कीं परमेश्वराने गुहे-
मध्यें आज तुला माझ्या हातीं दिल्हें आहे; आणि
जेव्हां तुला जिवें मारावें असें कोणी ह्मटलें, तेव्हां
मी तुजवर कृपा करून बोललों, मी आपला हात
आपल्या प्रभूवर टाकणार नाहीं, कां कीं तो पर-
मेश्वराचा अभिषिक्त आहे. ११ तर हे माझ्या
बापा, पाहा, तुझा वस्त्रकांठ माझ्या हातीं आहे;
पाहा, म्या तुझा वस्त्रकांठ कापिला तेव्हां म्या तुला
जिवें मारिलें नाहीं, यावरून तूं विचार करून
समज कीं माझ्याठायीं दुष्टाई किंवा फितूर नाहीं,
आणि म्या तुझा अपराध केला नाहीं; तथापि तूं
माझा जीव घ्यायास पाहतोस. १२ माझा तुझा
न्याय परमेश्वर करो, आणि माझा सूड परमे-
श्वर तुजवर उगवो, परंतु माझा हात तुजवर घा-
लणार नाहीं. १३ जसी पुरातनांची ह्मण ह्मणती
तसें आहे कीं, दुष्टापासून दुष्टाई उत्पन्न होती.
परंतु माझा हात तुजवर वाहणार नाहीं; कोणाच्या
पाठीमागें इस्राएलाचा राजा निघून आला आहे!
१४ कोणाच्या पाठीस तूं लागतोस? मेलेल्या कु-
त्र्याच्या, एका पिसूच्या. १५ परमेश्वर न्याया-
धीश असो, आणि माझा तुझा न्याय करो; तो
पाहून माझा वाद करो, आणि तुझ्या हातून मला
सोडवो."

१६ आणि असें झालें कीं दावीदाने हें बोलणें
शाऊलाजवळ समाप्त केलें असतां शाऊलाने
ह्मटलें कीं, "हे माझ्या पुत्रा दावीदा, ही वाणी
तुझी आहे कीं काय?" तेव्हां शाऊलाने आपला
स्वर काढून शोक केला. १७ आणखी त्याने दा-
वीदाला ह्मटलें कीं, "मजपेक्षां तूं अधिक न्यायी
आहेस, कारण कीं तूं मजशीं बरें वर्त्तत आहेस,
परंतु मी तुजशीं वाईट वर्त्तत आहें. १८ आणि
तूं मजशीं बरें वर्त्ततोस हें त्वां आज उघडें केलें
आहे, कारण कीं परमेश्वराने मला तुझ्या हातीं
दिल्हें तेव्हां त्वां माझा जीव घेतला नाहीं. १९
जर कोणीएका माणसाला त्याचा शत्रू सांपडेल
तर तो त्याला चांगल्या वाटेने लावील कीं काय?
याकरितां जें बरें त्वां आज मजशीं केलें आहे
त्यावरून परमेश्वर तुझें बरें करो. २० आणखी
आतां पाहा, मी असें जाणत आहें कीं तूं खचीत
राजा होसील, आणि इस्राएलाचें राज्य तुझ्या
हातीं स्थापित होईल. २१ तर आतां माझ्या-
जवळ परमेश्वराची शपथ असी वाहा कीं, मी
तुझ्या मरणानंतर तुझ्या संतानांस नाहींसें करणार
नाहीं, आणि तुझ्या बापाच्या कुळांतून तुझें नांव
मी पुसून टाकणार नाहीं." २२ तेव्हां दावीदाने
शाऊलाजवळ शपथ वाहिली; मग शाऊल आ-
पल्या घरास चढून गेला, आणि दावीद व त्याचीं
माणसें गुहेजवळ गेलीं.

## अध्याय २५.

आणि शमुवेल मेला तेव्हां सर्व इस्राएलाच्या
लोकांनी मिळून त्याविषयीं शोक केला, आ-
णि त्यांनी त्याला राम्यामध्यें त्याच्या घरीं पुरिलें;
आणि दावीद उठून पारानाच्या रानामध्यें खालीं
गेला. २ त्या समयीं मावोनामध्यें एक माणूस
राहिला, त्याचा माल कारमेलास होता आणि तो
माणूस फार मोठा होता, आणि त्याजवळ तीन
हजार मेंढरें व एक हजार बकरीं असीं होतीं;
आणि तो आपल्या मेंढरांची लोंहंकर कारमेलास
कातरीत होता. ३ त्या पुरुषाचें नांव नाबाल व
त्याच्या बायकोचें नांव अबीगाइल असीं होतीं;
आणि ती बायको बुद्धीची व रूपाचीहि चांगली
होती, परंतु तो पुरुष क्रूर व कामांमध्यें दुष्ट असा
होता, आणि तो कालेबाच्या वंशाचा होता.

४ तेव्हां दावीदाने रानांत ऐकिलें कीं नाबाल
आपल्या मेंढरांची लोंहंकर कातरीत आहे. ५
मग दावीदाने दाहा तरुणांस पाठवून त्यांस ह्म-
टलें कीं, “तुह्मी कारमेलास जा, आणि नाबा-
लाजवळ जाऊन माझा सलाम त्याला सांगा. ६
आणि जो जिवाचा सुखी असतां त्याला सांगा
कीं, तुझें कल्याण व तुझ्या घराचें कल्याण व तुझें
जें सर्व आहे त्याचें कल्याण असो. ७ आणखी
म्या ऐकिलें आहे कीं तुझ्या मेंढरांची लोंहंकर
कातरतात, आणि तुझे जे मेंढके आमच्याजवळ
होते त्यांस आह्मी कांहीं उपद्रव केला नाहीं, आ-
णि जितके दिवस ते कारमेलांत होते तितके दिवस
त्यांचें कांहीं चुकलें नाहीं. ८ आपल्या चाकरांस
पूस आणि ते तसें तुला सांगतील, याकरितां या
तरुणांनी तुझ्या दृष्टींत कृपा पावावी, कारण कीं
आह्मी चांगल्या दिवसीं येतों, तुझ्या हातीं जें
सांपडेल तें आपल्या चाकरांस व आपला लेंक
दावीद यांस कृपा करून दे.”

९ आणि दावीदाचे तरुण येऊन या शब्दा-
प्रमाणें दावीदाच्या नांवाने नाबालास बोलले, आ-
णि त्यांनी समाप्त केलें. १० तेव्हां नाबालाने उ-
त्तर देऊन दावीदाच्या चाकरांस ह्मटलें, “दावीद
कोण आहे? आणि इशायाचा पुत्र कोण आहे?
जे आपापल्या धन्यापासून पळतात असे चाकर
यासमयीं बहुत आहेत. ११ माझ्या भाकरी व
माझें पाणी व माझें मांस जें म्या आपल्या कातर-
णाऱ्यांसाठीं सिद्ध केलें तें घेऊन जीं माणसें कोठलीं
आहेत, हें मला माहीत नाहीं, त्यांस म्या द्यावें
कीं काय?” १२ मग दावीदाचे तरुण आपल्या
वाटेने गेले, आणि माघारें येऊन हें सर्व बोलणें
त्याला सांगितलें. १३ तेव्हां दावीदाने आपल्या
माणसांस ह्मटलें कीं, “तुह्मी आपापली तरवार
कंबरेस बांधा.” मग प्रत्येकाने आपली तरवार कं-
बरेस बांधिली, दावीदानेहि आपली तरवार चार-
कंबरेस बांधिली; तेव्हां दावीदाच्या पाठीमागें
शें मनुष्यें गेलीं, आणि दोनशें मनुष्यें सटल्या-
जवळ राहिलीं.

१४ त्या समयीं चाकरांतील एकाने अबीगा-
इल जी नाबालाची बायको तिला असें सांगितलें
कीं, “पाहा दावीदाने रानांतून आमच्या धन्याला
सलाम सांगायासाठीं दूत पाठविले, परंतु त्याने
त्यांचा अपमान केला. १५ तथापि तीं मनुष्यें
आह्मासीं फार चांगलीं वर्त्तलीं, आणि त्यांनी आ-
ह्मास कांहीं उपद्रव केला नाहीं, आणि जितके दि-
वस आह्मी रानामध्यें राहून त्यांच्यासंगतीं वागलों
तितके दिवस आमचें कांहीं चुकलें नाहीं. १६
जोंपर्यंत आह्मी मेंढरें राखून त्यांच्यासंगतीं होतों
तोंपर्यंत तीं आह्मास रात्रंदिवस भिंतीसारिखीं
होतीं. १७ तर आतां काय करायाचें आहे तें
विचार करून समज, कां कीं आमच्या धन्यावर
व त्याच्या सर्व कुटुंबावर वाईट योजिलें आहे,
कां तर तो एवढा दुष्ट आहे कीं कोणाच्याने त्या-
सीं बोलवत नाहीं.” १८ तेव्हां अबीगाइलीने
त्वरा करून दोनशें भाकरी व द्राक्षारसाचे दोन
बुधले व पांच सिद्ध केलेलीं मेंढरें व पांच मापांचे
हुरपळलेले दाणे व द्राक्षाचें शंभर घड व अंजि-
राच्या दोनशें ढेपा, इतके घेऊन गाढवावर घातले.
१९ आणि “तुह्मी माझ्यापुढें चला, मी तुमच्या-
मागें येतें,” असें तिने आपल्या चाकरांस ह्मटलें;
परंतु तिने आपला नवरा नाबाल याला कांहीं
सांगितलें नाहीं. २० आणि असें झालें कीं ती
गाढवावर बसून डोंगराच्या कडेने जात असतां
पाहा दावीद व त्याचीं माणसें तिजकडे येत होतीं
आणि ती त्यांस भेटली.

२१ आणि दावीदानें असें ह्मटलें होतें कीं,
"रानांत जें सर्व त्या मनुष्याचें होतें तें म्यां फु-
कट असें राखिलें कीं जें सर्व त्याचें होतें त्यांतून
कांहीं गमावलें नाहीं, आणि तो उपकाराबद्दल
मला अपकार करितो. २२ त्यापासीं जे सर्व
आहेत त्यांतील उद्यांच्या सकाळपर्यंत जर कोणी
राहील तर तसें व अधिकहि देव दावीदाच्या श-
त्रूंसीं करो. २३ तेव्हां अबीगाइलीनें दावीदाला
पाहिलें असतां ती उतावळीनें गाढवावरून उतर-
ली, आणि दावीदासमोर पालथी पडून भूमीपर्यंत
नमन केलें. २४ आणि त्याच्या पायां पडून ती
असें बोलली कीं, "हे महाराज, हा अन्याय मा-
झ्या पदरीं आहे असें समजावें, आणि आपल्या-
सीं आपल्या दासीला बोलूं द्यावें, आणि आपल्या
दासीचें बोलणें ऐकून घ्यावें. २५ तो दुष्ट माणूस
नाबाल याविषयीं महाराजानें चिंता धरूं नये,
कारण कीं तो त्याच्या नांवासारिखा आहे, त्याचें
नांव नाबाल ह्मणजे मूर्खपण असें आहे, आणि
मूर्खपण त्याच्याठायीं आहे, परंतु ज्या तरुणांस
महाराजानें पाठविलें त्यांस म्यां तुझ्या दासी-
नें पाहिलें नाहीं. २६ तर आतां हे महाराज,
सजीव परमेश्वर याची शपथ आणि तुझ्या जि-
वाची शपथ मी करितें कीं, तूं वध करायास
आणि आपल्या हातानें आपलें रक्षण करायास त्वां
न यावें, असें कारण कीं परमेश्वरानें तुला कुंठित
केलें; याकरितां जे आपले शत्रु व जे महाराजाचें
वाईट पाहतात, ते आतां नाबालासारिखे होवोत.
२७ आणि ही भेट तुझ्या दासीनें महाराजापासीं
आणिली आहे, ती जे तरुण महाराजाबरोबर आ-
हेत त्यांस द्यावी. २८ आपल्या दासीचा अपराध
कृपा करून क्षमा करावा; कारण कीं महाराज
परमेश्वराच्या लढाया करितो, आणि तुझ्याठायीं
अपराध तुझ्या सर्व दिवसांमध्यें सांपडला नाहीं;
या कारणास्तव परमेश्वर महाराजाचें घर नि-
श्चयेंकरून स्थापित करील. २९ तथापि एक म-
नुष्य उठून तुझ्या पाठीस लागत आहे आणि
तुझा जीव घ्यावयास पाहत आहे, परंतु महारा-
जाचा जीव आपला देव परमेश्वर याच्यासंगतीं
जीवनाच्या आळ्यांत बांधिला आहे, परंतु तो तुम-
च्या शत्रूंचे जीव गोफणगुंड्यांतून तसे टाकून देईल.
३० आणि असें होईल कीं जेव्हां परमेश्वर
यानें तुजविषयीं जें चांगलें सांगितलें आहे त्या
सर्वांप्रमाणें महाराजाला करील, आणि तुला
इस्राएलाचा अधिकारी नेमील. ३१ तेव्हां त्वां
कारणावांचून हत्या केली किंवा महाराजानें आ-
पणच सूड घेतला, अशा गोष्टीविषयीं खेद किं-
वा मनाचा संताप महाराजाला होणार नाहीं;
आणि परमेश्वर तुझें बरें करील तेव्हां आ-
पल्या दासीचें स्मरण कर." ३२ तेव्हां दावी-
दानें अबीगाइलीला ह्मटलें, "इस्राएलाचा देव
परमेश्वर, ज्यानें तुला आज मला भेटावयास पा-
ठविलें त्याची स्तुति असो. ३३ आणखी तुझा
बोध आशीर्वादित होवो, आणि जिनें आज वध
करणें व आपल्या हातानें सूड घेणें यांपासून मला
राहविलें असी जी ती तूं आशीर्वादित हो." ३४
कारण कीं तुझें वाईट मी करणार होतों तें त्यानें
मला करूं दिल्हें नाहीं, असा जो इस्राएलाचा
देव परमेश्वर त्याची शपथ मी करितों कीं जर
तूं माझी भेट करण्यासाठीं लवकर आली नसतीस
तर निश्चयें नाबालापासीं सकाळच्या उजेडापर्यंत
कोणी राहिला नसता." ३५ तेव्हां दावीदानें आ-
पल्यासाठीं जें तिनें आणिलें होतें तें तिच्या हातून
घेतलें, आणि तिला ह्मटलें, "तूं आपल्या घरास
सुखरूप जा, पाहा म्यां तुझा बोध ऐकून घेतला
आहे, आणि तूं मला मान्य झाली आहेस." ३६
मग अबीगाइल नाबालाजवळ आली, आणि पाहा
त्यानें आपल्या घरीं राजाच्या मेजवानीसारिखी मे-
जवानी केली होती, तेव्हां नाबालाचें मन फार
संतुष्ट होतें, कारण कीं तो मद्य पिऊन फार मस्त
झाला, याकरितां तिनें उजेडापर्यंत त्याला या गो-
ष्टीविषयीं कांहीं अधिक उणें सांगितलें नाहीं. ३७
परंतु असें झालें कीं सकाळीं नाबालाचा कैफ
उतरला असतां त्याच्या बायकोनें त्या सर्व गोष्टी
त्याला सांगितल्या, तेव्हां त्याचें अंतःकरण अचेतन
होऊन त्यामध्यें दगडासारिखें झालें. ३८ आणि
दाहा दिवसांनंतर परमेश्वरानें नाबालाला मा-
रिलें असतां तो मेला.

३९ आणि नाबाल मेला असें दावीदानें ऐकि-
लें तेव्हां त्यानें ह्मटलें कीं, परमेश्वर ज्यानें मा-
झ्या अपमानाचा सूड नाबालावर उगविला आहे

आणि ज्याने आपल्या सेवकास वाईटापासून रा-
खिलें आहे, त्याची स्तुति असो, कारण कीं परमे-
श्वराने नाबालाची दुष्टाई त्याच्या मस्तकावर
घातली आहे." तेव्हां दावीदाने अबीगाइलीला
आपली बायको करण्याविषयीं तिच्याजवळ निरोप
पाठवून बोली केली. ४० आणि दावीदाचे चा-
कर कारमेलास अबीगाइलीजवळ येऊन तिला
असें ह्मणाले कीं, "दावीदाने त्वां त्याची बायको
व्हावें ह्मणून आह्मास तुह्माजवळ पाठविलें आहे."
४१ तेव्हां ती उठली आणि भूमीपर्यंत लवून नमन
करून बोलली, पाहा महाराजाच्या चाकरांचे पाय
धुवायास असी चाकरीण आपली दासी व्हावी."
४२ मग अबीगाइल त्वरा करून उठली आणि
गाढवावर बसून निघाली, तिच्यामागें तिच्या पांच
दासीहि गेल्या, आणि ती दावीदाच्या दूतांमागें चा-
लली, आणि त्याची बायको झाली. ४३ आणखी
दावीदाने इज्रेलांतील अहीनवाम बायको करून
घेतली, आणि त्या दोघी त्याच्या बायका झाल्या.
४४ परंतु शाऊलाने आपली कन्या मीखाल दा-
वीदाची बायको इला लाईशाचा पुत्र फालटी
जो गालींतील त्याला दिल्हें होतें.

## अध्याय २६.

यानंतर जिफी शाऊलाजवळ गिब्यास येऊन
ह्मणाले, "यशीमोनासमोर हाखीला डोंगरांत
दावीद लपून राहिला आहे कीं नाहीं?" २ तेव्हां
शाऊल उठला आणि इस्राएलाच्या तीन हजार
निवडलेल्या माणसांस बरोबर घेऊन दावीदाचा
शोध करायास जीफ रानांत गेला. ३ आणि
शाऊलाने यशीमोनापुढें मार्गाजवळ हाखीला
डोंगरावर मुक्काम केला; तेव्हां दावीद रानांत रा-
हत होता, आणि जेव्हां त्याने पाहिलें कीं शाऊल
आपल्या पाठीस लागून रानांत आला आहे; ४
तेव्हां दावीदाने हेर पाठविले आणि शाऊल नि-
श्चयेंकरून आला आहे असें जाणिलें.

५ मग दावीद उठला आणि जेथें शाऊलाने
मुक्काम केला होता त्या जाग्याजवळ आला, आणि
दावीदाने जेथें शाऊल व नेराचा पुत्र आबनेर जो
सेनापति तोहि निजला होता तें ठिकाण पाहिलें;
आणि शाऊल गाड्यांच्या गराड्यामध्यें निजला
होता, आणि त्यासभोंवतें लोकांनी तळ धरिला
होता. ६ तेव्हां अहिमेलेख हित्ती व जरूवाचा
पुत्र अबीशाय योवाबाचा भाऊ यांस दावीदाने उ-
त्तर करून ह्मटलें कीं, "छावणीस शाऊलाजवळ
माझ्यासंगतीं कोण येईल?" तेव्हां अबीशाय ह्मणा-
ला, "मी तुझ्यासगंतीं येईन." ७ मग दावीद व अ-
बीशाय रात्रींत लोकांजवळ गेला, आणि पाहा शा-
ऊल गाड्यांच्या गराड्यामध्यें निजला होता, आणि
त्याचा भाला त्याच्या उशीजवळ भूमींत रोंवलेला
होता, आणि त्यासभोंवता आबनेर व लोक निजले
होते. ८ तेव्हां अबीशाय दावीदाला ह्मणाला,
"देवाने तुझा शत्रु तुझ्या हातीं आज दिल्हा आहे,
तर आतां मला भाल्याने एकदां त्याला भूमीवर
ठार मारूं दे, आणि मी त्याला फिरून मारणार
नाहीं." ९ परंतु दावीद अबीशायाला ह्मणाला,
"त्याला वधूं नको, कां की आपला हात परमेश्व-
राच्या अभिषिक्तावर टाकून कोण निर्दोषी रा-
हील? १० आणखी दावीद ह्मणाला, "परमे-
श्वराची शपथ मी करितों कीं परमेश्वर त्या-
ला मारील, किंवा त्याचा काळ आला असतां तो
मरेल, किंवा तो लढाईत जाऊन पडेल. ११
आपला हात परमेश्वराच्या अभिषिक्तावर टाक-
णें हें परमेश्वर मजपासून घडूं न देवो, परंतु
आतां जो भाला त्याच्या उशीपासीं आहे तो आ-
णि पाण्याचा चंबू घे, मग आपण लवकर जाऊं."
१२ तेव्हां शाऊलाच्या उशीपासीं भाला व पा-
ण्याचा चंबू जे होते ते दावीदाने घेतले, मग ते
निघून गेले, आणि सर्व लोक झोंपेंत असतां को-
णीएकाने पाहिलें नाहीं, आणि कोणीएकाला कळलें.
नाहीं, आणि कोणीएक जागा झाला नाहीं, कां कीं
देवापासून गाढ झोंप त्यांस लागली होती.

१३ आणि दावीद पलिकडे दूर डोंगराच्या शिख-
रावर जाऊन उभा राहिला, आणि दावीदाने आप-
ल्या आणि त्याच्यामध्यें मोठें अंतर असतां, १४
लोकांस व नेराचा पुत्र आबनेर याला असी हाक
मारिली कीं, "हे आबनेरा, तूं उत्तर करीत नाहींस
काय?" तेव्हां आबनेराने असें उत्तर केलें कीं,
"राजाला हाक मारणारा असा तूं कोण आहेस?"
१५ मग दावीद आबनेराला ह्मणाला, "तूं वीर
नाहींस काय! आणि इस्राएलामध्यें तुजसारिखा

कोण आहे? तर त्वां राजा जो तुझा प्रभु याला
कां राखिलें नाहीं? कां कीं राजा जो तुझा प्रभु
त्याचा घात करायास लोकांतील कोणीएक आला
होता. १६ जी गोष्ट त्वां केली ती बरी नाहीं,
सजीव परमेश्वर याची शपथ मी करितों तुह्मी
मरायाजोगे आहां, कारण कीं तुमचा प्रभु जो पर-
मेश्वराचा अभिषिक्त त्याला तुह्मी राखिलें नाहीं;
तर आतां राजाचा भाला व जो पाण्याचा चंबू
त्याच्या उशीपाशीं होता तोहि कोठें आहे, हें तुह्मी
पाहा." १७ तेव्हां शाऊलानें दावीदाचा शब्द
ओळखिला आणि ह्मटलें कीं, "हे माझ्या पुत्रा
दावीदा, हा तुझा शब्द आहे कीं काय?" मग
दावीद ह्मणाला, "हे महाराज माझ्या प्रभू, हा
माझा शब्द आहे." १८ अणखी तो ह्मणाला,
"माझा प्रभु त्याच्या चाकराच्या पाठीस कां लाग-
ला आहे? म्या काय केलें आहे? आणि माझ्या
पदरीं काय अन्याय आहे? १९ तर आतां हे
महाराज माझ्या प्रभू, तुझ्या चाकराचें बोलणें
कृपा करून ऐकावें; जर परमेश्वरानें तुला मज-
वर चेतविलें आहे तर त्यानें अर्पण मान्य करावें,
परंतु जर मनुष्यानीं तुला मजवर चेतविलें आहे
तर ते परमेश्वरापासून शापित होवोत; कारण
कीं, जा, अन्य देवांची सेवा कर, असें मला सां-
गून त्यानीं परमेश्वराच्या मुलखांतून मला या
वेळेस काढून टाकिलें आहे. २० आणि आतां
माझें रक्त परमेश्वराच्या देखतां भूमीवर न
पडो, कां कीं पिसूचा शोध करायास, किंवा डों-
गरावर तितराची शिकार करायास इस्राएलाचा
राजा निघाला आहे."
२१ तेव्हां शाऊल ह्मणाला, "म्या पातक
केलें आहे; हे माझ्या पुत्रा दावीदा, माघारें यें,
माझा जीव आज तुझ्या दृष्टींत मोल्यवान होता,
ह्मणून मी तुझें वाईट अणखी करणार नाहीं, पा-
हा मी मूर्खपणानें वर्त्तलों आहें, आणि फार अप-
राध केला आहे." २२ मग दावीदानें असें
उत्तर केलें कीं, "राजाचा भाला पाहा, चाक-
रांतील कोणीएकानें इकडे येऊन घ्यावा. २३
प्रत्येक माणसाचे न्याय व सत्य यांप्रमाणें परमे-
श्वरानें त्यासीं करावें, कां कीं परमेश्वरानें आज
तुला माझ्या हातीं दिल्हें, परंतु म्या आपला हात
परमेश्वराच्या अभिषिक्तावर टाकायास नाका-
रिलें. २४ आणि पाहा, जसा तुझा जीव माझ्या
दृष्टींत आज मोल्यवान् असा मानिला होता तसा
माझा जीव परमेश्वराच्या दृष्टींत मोल्यवान्
होवो, आणि तो मला सर्व संकटांतून राखो."
२५ तेव्हां शाऊलानें दावीदाला ह्मटलें, "हे
माझ्या पुत्रा दावीदा, तुला आशीर्वाद होवो, तूं
मोठीं कार्यें करसील आणि वाढत जासील." मग
दावीद तेथून निघून गेला, आणि शाऊल आ-
पल्या ठिकाणास परत आला.

## अध्याय २७.

यानंतर दावीदानें आपल्या मनांत ह्मटलें कीं,
कधीं तरी शाऊलाच्या हातून मी नाश पा-
वेन, तर पलिष्ट्यांच्या मुलखांत म्या लवकर पळून
जावें, हें मला सर्वांहून उत्तम आहे; मग शाऊल
मजविषयीं निराश होऊन अवघ्या इस्राएलाच्या
प्रांतामध्यें माझा अणखी शोध करणार नाहीं, आ-
णि त्याच्या हातून मी निर्भय राहीन. २ तेव्हां
दावीद उठला, आणि तो व जीं साहाशें माणसें
त्याच्यासंगतीं होतीं तीं मावोखाचा पुत्र आखीश
गाथाचा राजा याजवळ गेलीं. ३ नंतर दावीद
आखीशासंगतीं गाथांत राहिला, तो व त्याचीं
सर्व माणसें व त्याचें कुटुंब; दावीद व त्याच्या
दोन बायका, ह्मणजे अहीनवाम इज्रेली व पूर्वी
नाबालाची बायको ह्मणजे अबीगाइली कारमे-
ली. ४ मग शाऊलाला सांगितलें कीं, दावीद
गाथास पळून गेला, आणि त्यानें त्याचा अणखी
शोध केला नाहीं.
५ आणि दावीद आखीशाला ह्मणाला, "जर
मी तुझ्यापाशीं कृपा पावलों आहें, तर कृपा करून
या मुलखांतील कोणीएका नगरांत मला जागा
द्यावी, ह्मणजे मी तेथें राहीन; तुझ्या चाकरानें
राजधानींत तुझ्यासंगतीं कां राहावें?" ६ मग
आखीशानें दावीदाला त्या दिवशीं सिकलाग दि-
ल्हें, याकरितां सिकलाग आजपर्यंत यहूदाच्या
राजांकडे आहे. ७ आणि जे दिवस दावीद
पलिष्ट्यांच्या मुलखांत राहिला ते एक वर्ष व
चार महिने असे होते. ८ तेव्हां दावीद व
त्याचीं माणसें निघालीं, आणि त्यानीं गशूरी व

गिरजी व अमालेकी जे शूरास व मिसर देशास
जायाच्या वाटेजवळील प्रांतांत पूर्वीपासून राहिले
होते, त्यांवर छप्पा घातला. ९ आणि दावीदाने
त्या प्रांताला मारून पुरुषांस किंवा बायकांस
जिवंत ठेविलें नाहीं, आणि मेंढरें व गुरें व गाढवें
व उंटें व वस्त्रें हीं घेऊन आखीशाजवळ परत
आला. १० तेव्हां आखीशाने ह्मटलें, "तुह्मी
कोणीकडे आज छप्पा घातला?" मग दावीद ह्मणा-
ला, "यहूदाचा दक्षिण प्रांत व याराहमेलींचा
दक्षिण प्रांत व केनींचा दक्षिण प्रांत यांकडे." ११
आणि दावीदाने पुरुष किंवा बायको गाथाजवळ
वर्त्तमान आणायास जिवंत न ठेवून ह्मटलें कीं, "असें
न केलें तर ते आह्माविषयीं असें ह्मणतील कीं,
तसें दावीदाने केलें आहे, आणि जोंपर्यंत तो पलि-
ष्ट्यांच्या मुलखांत राहील तोंपर्यंत त्याची वहिवाट
तसी होईल." १२ तेव्हां आखीशाने दावीदावर
भरंवसा ठेवून ह्मटलें कीं, "त्याने आपल्या इस्राए-
लाच्या लोकांमध्यें आपणाला अगदी घाणेरें करून
घेतलें आहे, यास्तव तो माझी सेवा सर्वकाळ
करील."

## अध्याय २८.

आणि त्या दिवसांत असें झालें कीं पलिष्ट्या-
नी आपलीं सैन्यें इस्राएलासीं लढाई करा-
यास एकत्र केलीं; तेव्हां आखीशाने दावीदाला
ह्मटलें, "तूं निश्चयेंकरून जाण कीं त्वां आपल्या
मनुष्यांसुद्धां लढाईस माझ्यासंगतीं यावेंच." २
मग दावीदाने आखीशाला ह्मटलें, "आपला
चाकर काय करायास समर्थ आहे, हें तूं निश्चयें-
करून जाणसील." तेव्हां आखीशाने दावीदाला
ह्मटलें, "याकरितां त्वां माझ्या मस्तकाचा रक्षक
सर्वकाळ व्हावें असें मी तुला करीन."

३ त्या समयीं शमुवेल मेलेला होता आणि
सर्व इस्राएलानी त्यासाठीं शोक करून त्याला त्या-
च्या नगरांत ह्मणजे राम्यांत पुरिलें होतें, आणि
शाऊलाने जादूगिरांस व मांत्रिकांस मुलखांतून
घालविलें होतें. ४ मग पलिष्टी एकत्र मिळून
निघाले, आणि त्यानी शूनेमांत छावणी केली; ते-
व्हां शाऊलाने सर्व इस्राएलांस एकत्र करून गि-
लबवांत छावणी केली. ५ आणि जेव्हां शा-
ऊल पलिष्ट्यांचें सैन्य पाहून भ्याला, आणि त्याचें
मन फार घाबरें झालें. ६ तेव्हां शाऊलाने पर-
मेश्वराला विचारिलें, परंतु परमेश्वराने त्याला
स्वप्नांकडून किंवा उरीमेकडून किंवा भविष्यवाद्यां-
कडून कांहीं उत्तर दिल्हें नाहीं. ७ मग शाऊलाने
आपल्या चाकरांस ह्मटलें कीं, "माझ्यासाठीं जी
बायको कुविद्यासंपन्न असीचा शोध करा, ह्मणजे
मी तिजपासीं जाऊन तिला पुसेन." तेव्हां त्या-
च्या चाकरानी त्याला ह्मटलें कीं "पाहा कुविद्या-
संपन्न असी एक बायको एनदोरास आहे." ८ मग
शाऊलाने निराळीं वस्त्रें घेऊन सोंग घेतलें, आणि
आपल्याबरोबर दोन माणसें घेऊन तीं त्या बायको-
जवळ रात्रींत गेलीं; आणि त्याने ह्मटलें, "कुविद्येचा
प्रयोग मजसाठीं कृपेने करावा, आणि जो मी तुला
सांगेन त्याला मजसाठीं उठवावें." ९ तेव्हां ती
बायको त्याला ह्मणाली, "पाहा, शाऊलाने काय केलें
आहे, ह्मणजे त्याने कुविद्यासंपन्न व जादूगीर यांस
देशांत नाहींसें केलें आहे, हें तूं जाणतोस; तर तूं
मला वधायासाठीं माझ्या जिवाला फांस कां ला-
वितोस?" १० तेव्हां शाऊलाने परमेश्वराच्या
नामाने तिच्याजवळ शपथ वाहत असें ह्मटलें कीं,
"परमेश्वराची शपथ करितों कीं या कार्यावरून
तुला कांहीं उपद्रव होणार नाहीं." ११ मग त्या
बायकोने ह्मटलें, "तुझ्यासाठीं मी कोणाला उठवूं?"
तेव्हां तो ह्मणाला, "माझ्यासाठीं शमुवेलाला उ-
ठीव." १२ आणि जेव्हां त्या बायकोने शमुवे-
लाला पाहिलें तेव्हां ती मोठ्या शब्दाने ओरडली,
मग ती बायको शाऊलाला ह्मणाली, "त्वां मला
कशासाठीं फसविलें? कां कीं तूं शाऊल आहेस."
१३ तेव्हां राजा तिला ह्मणाला, "भिऊं नको,
तूं काय पाहतीस?" आणि ती बायको शाऊलाला
ह्मणाली, "मी देवांस भूमींतून निघून वर येतां
पाहतें." १४ तेव्हां तो ह्मणाला, "त्याचा आकार
कसा आहे?" मग तिने ह्मटलें, "वृद्ध पुरुष भूमींतून
निघून वर येतो, आणि तो झगा घातलेला आहे."
तेव्हां शाऊलाने जाणिलें कीं, हा शमुवेल आहे,
आणि तो तोंड भूमीकडे करून लवला. १५ मग
शमुवेलाने शाऊलाला ह्मटलें, "त्वां कशासाठीं
मला उठवून त्रास दिला आहे?" तेव्हां शाऊलाने
ह्मटलें, "मी फार संकटांत पडलों आहें, कां कीं

पलिष्टी मजसीं लढायास एकत्र मिळाले आहेत,
आणि देव मला सोडून भविष्यवाद्यांकडून किंवा
स्वप्नांकडून मला अणखी उत्तर देत नाहीं; या-
करितां मला काय करायाचें हें त्वां मला कळ-
वावें ह्मणून मी तुला बोलाविलें आहे." १६ ते-
व्हां शमुवेलाने ह्मटलें, "परमेश्वर तुला सो-
डून तुझा वैरी झाला असतां तूं मला कशा-
साठीं विचारितोस? १७ जसें परमेश्वराने मा-
झ्याकडून तुला सांगितलें तसें त्याने तुजसीं केलें
आहे, कां कीं परमेश्वराने राज्य तुझ्या हातांतून
काढून दावीद तुझा सोबती याला दिल्हें आहे.
१८ कारण कीं त्वां परमेश्वराची आज्ञा न
मानून त्याच्या मोठ्या क्रोधाप्रमाणें अमालेक्यांस
शिक्षा केली नाहीं, ह्मणून या समयीं परमेश्वर
तुला ही शिक्षा लावणार आहे. १९ अणखी
परमेश्वर तुझ्यासंगतीं इस्राएल पलिष्ट्यांच्या
हातीं देणार आहे, आणि उद्यां तूं आपल्या पुत्रां-
सुद्धां माझ्याजवळ येसील, आणि परमेश्वर
इस्राएलाचें सैन्य पलिष्ट्यांच्या हातीं देईल." २०
तेव्हां शमुवेलाचे शब्द ऐकून शाऊल अकस्मात्
आपल्या सर्व अंगाने भूमीवर उपडाच पडला,
आणि फार भयाभीत असतां त्याला कांहीं शक्ति
राहिली नाहीं, कारण कीं त्या सर्व दिवसीं आणि
त्या सर्व रात्रीं त्याने कांहीं खालें नव्हतें. २१
मग त्या बायकोने शाऊलाजवळ येऊन पाहिलें
कीं तो फार घाबरा झाला आहे, आणि तिने त्या-
ला ह्मटलें कीं, "पाहा, तुझ्या दासीने तुझी विनंती
ऐकिली आणि आपला जीव आपल्या हातीं घेऊन
जें त्वां मागितलें त्याप्रमाणें म्या केलें आहे. २२
याकरितां आतां त्वां कृपा करून आपल्या दासी-
ची विनंती ऐकून आपल्यापुढें थोडी भाकरी मला
ठेवूं द्यावी; खाली, ह्मणजे आपल्या वाटेने जायास
आपल्याला शक्ति येईल." २३ परंतु "मला
नको, मी खाणार नाहीं," असें तो बोलला; तथापि
त्याच्या चाकरानी व त्या बायकोनेहि त्याला आ-
ग्रह केला, मग त्याने त्यांची विनंती ऐकिली, आ-
णि भूमीवरून उठून तो बिछान्यावर बसला.
२४ आणि त्या बायकोच्या घरीं पुष्ट वांसरूं होतें
तें तिने लवकर कापून तें सिद्ध केलें, आणि पीठ
घेऊन व मळून बेखमीर भाकरी केल्या. २५ मग
तिने तें शाऊलापुढें व त्याच्या चाकरांपुढें ठेविलें
आणि त्यानी खालें; नंतर ते उठून त्या रात्रीं
निघून गेले.

## अध्याय २९.

त्या समयीं पलिष्ट्यानी आपलीं अवघीं सैन्यें
अफेकांत एकत्र केलीं, आणि इस्राएलाच्या
माणसानी इज्रेलांत एका झऱ्याजवळ छावणी
केली. २ आणि पलिष्ट्यांचे सर्दार आपापल्या
शंभर व हजार मनुष्यांसुद्धां पुढें चालले, आणि
त्यांच्यामागें दावीद व त्याचीं माणसें आखीशा-
बरोबर चाललीं. ३ तेव्हां पलिष्ट्यांचे सर्दार
बोलले, "हे इब्री काय करितात?" मग आखीश
पलिष्ट्यांच्या सर्दारांस बोलला, "इस्राएलाचा
राजा शाऊल याचा चाकर दावीद तो हाच
आहे कीं नाहीं? तो माझ्याबरोबर कांहीं दि-
वस किंवा कांहीं वर्षें राहिला आहे, आणि तो
मजकडचा झाला त्या दिवसापासून आजपर्यंत
त्याच्याठायीं मला कांहीं अपराध सांपडला नाहीं."
४ मग पलिष्ट्यांचे सर्दार त्याजवर रागें भरले;
आणि पलिष्ट्यांचे सर्दार त्याला ह्मणाले, "जें
ठिकाण त्वां या माणसाला दिल्हें, तेथें जाया-
चा निरोप त्याला दे; त्याने आमच्यासंगतीं लढा-
ईस येऊं नये; आला, तर तो लढाईमध्यें आह्मा-
विरुद्ध फितूर करील, कारण कीं तो आपल्या
प्रभूचा समेट कशाने करील बरें? या मनुष्यांच्या
शिरांकडून कीं नाहीं? ५ ज्याविषयीं बायका
नाचणींकरून शाऊलाने हजारांस मारिलें आणि
दावीदाने दाहा हजारांस मारिलें, असें नृत्यगायन
करून ज्याविषयीं एकमेकांस बोलल्या, तो हाच
दावीद कीं नाहीं?" ६ मग आखीशाने दावी-
दाला बोलावून त्याला ह्मटलें, परमेश्वराची
शपथ करितों कीं तूं नीतिने वर्त्तला आहेस, आणि
माझ्याजवळ सैन्यासंबंधी तुझी वर्त्तणूक मला बरी
वाटली आहे, आणि ज्या दिवसीं तूं मजपासीं
आलास त्या दिवसापासून आजपर्यंत कांहीं अप-
राध तुझ्याठायीं मला सांपडला नाहीं; तथापि
सर्दारांच्या दृष्टींत तूं विश्वासूक नाहींस. ७ तरी
पलिष्ट्यांच्या सर्दारांची अवकृपा न व्हावी ह्मणून
आतां तूं निघून सुखरूप जा." ८ तेव्हां दावी-

दाने आखीशाला ह्मटलें कीं, "म्या तर काय केलें
आहे? आणि राजा माझा धनी याच्या शत्रूंसीं
म्या जाऊन न लढावें, ह्मणून ज्या दिवसापासून
मी तुझ्यापुढें वागूं लागलों आजपर्यंत तुला आप-
ल्या चाकराच्याठायीं काय सांपडलें आहे?" ९
तेव्हां आखीशानें असें उत्तर केलें कीं, "तूं देवा-
च्या दूतासारिखा विश्वासूक आहेस हें म्या जा-
णिलें आहे, तथापि पलिष्टयांचे सर्दार ह्मणतात
कीं, त्यानें आमच्याबरोबर लढाईस येऊं नये.
१० याकरितां पाहांटेस त्वां व तुझ्या धन्यानें जे
चाकर तुझ्यासंगतीं आले, त्यांनीहि उठावें आणि
पाहांटेस उठल्यावर उजेड तुह्मास झाला असतां
तुह्मी जावें." ११ तसें दावीद व त्याचीं माणसें
उठलीं आणि उजेडतां निघून तीं पलिष्टयांच्या
मुलखांत परत गेलीं, आणि पलिष्टी इज्रेलास
गेले.

## अध्याय ३०.

आणि दावीद व त्याचीं माणसें तिसऱ्या दिव-
सीं जिकलागास पोहंचलीं, तेव्हां असें झालें
कीं अमालेक्यांनी दक्षिण प्रांतावर व जिकलागा-
वर छप्पा घातला होता, आणि त्यांनी जिकलागा-
वर हल्ला करून त्याला अग्नीनें जाळलें होतें. २
आणि त्यांत ज्या बायका होत्या त्या त्यांनी नेल्या
होत्या लाहान किंवा मोठा अशा कोणीएकास त्यांनी
जिवें मारिलें नव्हतें, परंतु त्यांस घेऊन ते आपल्या
वाटेनें गेले होते.

३ आणि दावीद व त्याचीं माणसें गांवा-
जवळ आलीं असतां पाहा तें अग्नीनें जाळलें होतें,
आणि त्यांच्या बायका व त्यांचे पुत्र व त्यांच्या
कन्या यांचें हरण झालें आहे. ४ मग दा-
वीद व त्याबरोबर जे लोक ते ओरडूं लागले,
आणि जोंपर्यंत शोक करण्याची शक्ति त्यांस हो-
ती तोंपर्यंत ते शोक करीत गेले. ५ आणि दा-
वीदाच्या दोन बायका, ह्मणजे अहिनवाम इज्रेलीण
व अबीगाइल जी पूर्वी नाबाल कारमेली याची
बायको, त्या नेल्या होत्या. ६ तेव्हां दावीद फार
खेदित झाला, कां कीं त्याला धोंडमार करावा असें
लोक बोलूं लागले; कारण कीं अवघे लोक प्रत्येक
आपल्या पुत्रांसाठीं व आपल्या कन्यांसाठीं मनांत
दुःखित होते; परंतु दावीदानें आपला देव परमे-
श्वर याजवर भरंवसा ठेविला. ७ मग दावी-
दानें एब्याथावर याजक अहिमेलेखाचा पुत्र याला
ह्मटलें कीं, "एफोद कृपा करून माझ्याजवळ आ-
णावें." मग एब्याथारानें एफोद दावीदाजवळ
आणिलें. ८ आणि दावीदानें परमेश्वराला असें
विचारिलें कीं, "मी या समुदायाच्या पाठीस लागूं
कीं काय? त्यांस मी आटोपीन कीं काय?" तेव्हां
परमेश्वरानें ह्मटलें कीं, "पाठीस लाग, कारण
कीं तूं निश्चयेंकरून त्यांस आटोपसील आणि
त्यांनी जें नेलें तें घेसील." ९ मग दावीद व
त्याजकडलीं साहाशें माणसें गेलीं, आणि बशोर
नदीजवळ पोहंचल्यावर कोणी तेथें राहिलीं. १०
तथापि दावीद व चारशें माणसें पुढें गेलीं, परंतु
जीं दोनशें माणसें थकलीं असतां बशोर नदीच्या
पलिकडे गेलीं नाहींत, तीं तेथें राहिलीं. ११
यानंतर एक मिसरी माणूस त्यांस रानांत सांप-
डला असतां त्यांनी त्याला दावीदाजवळ आणिलें,
आणि त्याला भाकर दिल्ही आणि ती त्यानें खाल्ली;
अणखी त्यांनी त्याला पाणी पाजिलें. १२ मग
त्यांनीं अंजिरपोळीचा तुकडा व द्राक्षाचे दोन घड
त्याला दिल्हे, आणि त्यानें खाल्ले असतां पुन्हा
त्याची शक्ति त्याला आली; कां कीं तीन दिवस
व तीन रात्रीं त्यानें भाकर खाल्ली नव्हती व तो
पाणी प्याला नव्हता. १३ तेव्हां दावीदानें त्याला
ह्मटलें, "तूं कोणाकडचा आणि कोठून आहेस?"
तेव्हां त्यानें ह्मटलें, "मी मिसरी माणूस एका
अमालेक मनुष्याचा चाकर आहें; परंतु माझ्या
धन्यानें मला टाकून दिल्हें, कां कीं तीन दिवसां-
मागें मी रोगी पडलों. १४ आह्मी करेथींच्या
दक्षिण प्रांतांवर आणि यहूदांतील प्रांतावर आणि
कालेबाच्या दक्षिण प्रांतावर छप्पा घातला, आणि
आह्मी जिकलागाला अग्नीनें जाळलें." १५ मग
दावीदानें त्याला ह्मटलें कीं, "त्या समुदायाजवळ
तूं मला नेसील कीं काय?" तेव्हां त्यानें ह्मटलें,
"जर तूं देवाची शपथ वाहसील कीं तूं मला जिवें
मारणार नाहींस आणि माझ्या धन्याच्या हातीं
मला देणार नाहींस, तर मी तुला त्या समुदाया-
जवळ नेईन."

१६ आणि जेव्हां त्यानें त्यांस नेलें होतें तेव्हां
पाहा ते लोक अवघ्या भूमीवर पसरून खात

व पीत व नाचत होते, कां कीं त्यानी पुष्कळ
लूट पलिष्ट्यांच्या प्रांतांतून व यहूदाच्या प्रांतांतून
घेतली होती. १७ आणि दावीद दुसऱ्या दिव-
साच्या पाहाटेपासून सांजपर्यंत त्यांस मारीत गेला;
आणि त्यांतील चारशें तरुण माणसें जीं उंटांवर
बसून पळालीं त्यांशिवाय कोणीएक जिवंत राहिला
नाहीं. १८ आणि दावीदानें जें अवघें अमाले-
क्यानी नेलें होतें तें माघारें घेतलें, अणखी दावी-
दानें आपल्या दोन बायका माघाऱ्या घेतल्या. १९
आणि लाहान, मोठे, पुत्र, कन्या, आणि जी सर्व लूट
अमालेक्यानी नेली होती त्यांतील कांहीं गमावलें
नाहीं; दावीदानें अवघें माघारें घेतलें. २० आ-
णि दावीदानें सर्व बकरें व गुरें घेतलीं; आणि
त्यांस वर्कड खटल्यापुढें हाकून ही दावीदाची
लूट, असें त्यानी ह्मटलें.

२१ मग जीं दोनशें माणसें थकल्यामुळें
दावीदाबरोबर गेलीं नाहींत परंतु बशोर नदी-
पाशीं राहिलीं, त्यांकडे दावीद येत असतां तीं
दावीदाला भेटायास आणि त्याबरोबर जे लोक
त्यांस भेटायास निघालीं, आणि दावीद त्या मा-
णसांजवळ पोहंचत असतां त्यानें त्यांचा समा-
चार घेतला. २२ तेव्हां जीं माणसें दावीदा-
संगतीं गेलीं होतीं त्यांमधून जीं सर्व दुष्ट व
निष्ठुर तीं असें ह्मणूं लागलीं कीं, "हीं माणसें
आह्माबरोबर आलीं नाहींत ह्मणून जी लूट आ-
ह्मी घेतली त्यांतून कांहीं आह्मी त्यांस देणार
नाहीं, केवळ एकाएकाला त्याचीं त्याचीं बायको
लेंकरें देऊं, मग तीं त्यानी घेऊन निघून जावें."
२३ तेव्हां दावीदानें ह्मटलें, "अहो माझ्या भा-
वानो, जीं परमेश्वरानें आह्मास दिल्हीं आहेत
त्यांविषयीं तुह्मी असें करूं नका, कारण कीं त्यानें
आह्मास राखिलें आहे, आणि जो समुदाय आ-
ह्माविरुद्ध आला तो त्यानें आमच्या हातीं दिल्हा,
याकरितां या गोष्टीविषयीं तुमचें कोण ऐकेल? २४
जो लढाईंत गेला त्याचा जसा वांटा तसा जो
खटल्यापाशीं राहिला त्याचा वांटा होईल, ते
एकसारिखा पावतील." २५ आणि असें झालें
कीं त्यानें त्या दिवसापासून आजपर्यंत असा नियम
व रीत इस्राएलामध्यें स्थापिली.

२६ यानंतर दावीद शिकलागास आला, आ-
णि त्यानें यहूदाच्या वडिलांपाशीं ह्मणजे आपल्या
मित्रांपाशीं लुटींतला वांटा पाठवून सांगितलें कीं,
"पाहा, परमेश्वराच्या शत्रूंच्या लुटींतून ही
असी भेट तुह्मास पाठविलेली आहे." २७ जे
बेथएलांत त्यांस, आणि जे दक्षिण रामोथांत
त्यांस, आणि जे यात्तीरांत त्यांस; २८ आणि जे
अरुएरांत त्यांस, आणि जे सिपमोथांत त्यांस,
आणि जे एष्टमवांत त्यांस; २९ आणि जे राखालांत
त्यांस, आणि जे यराहमेल्यांच्या नगरांत त्यांस,
आणि जे केन्यांच्या नगरांत त्यांस; ३० आणि जे
हर्मांत त्यांस, आणि जे खोराशानांत त्यांस, आ-
णि जे अथाखांत त्यांस; ३१ आणि जे हेब्रोनांत
त्यांस, आणि ज्या सर्व ठिकाणीं दावीद व त्याचीं
माणसें वस्ती करीत होतीं, त्यांजवळ त्यानें लुटींतून
कांहीं पाठविलें.

## अध्याय ३१.

मग पलिष्टी इस्राएलासीं लढले, आणि इस्राए-
लाचीं माणसें पलिष्ट्यांपुढून पळून गेलीं, आणि
गिलबवा डोंगरावर जखमी होऊन पडलीं. २ ते-
व्हां पलिष्टी शाऊलाच्या व त्याच्या पुत्रांच्या पा-
ठीस लागले, आणि पलिष्ट्यानी शाऊलाचे पुत्र
योनाथान व अबीनादाब व मल्कीशूवा यांस जिवें
मारिलें. ३ आणि लढाई शाऊलाला कठीण झा-
ली, आणि धनुर्धरानी त्याला बाण मारिले आणि
त्यानी त्याला जखमी केलें. ४ तेव्हां शाऊलानें
आपल्या शस्त्रवाहकाला ह्मटलें कीं, "तूं तरवार
काढ आणि मला भोंसकून ठार मार, नाहीं तर हीं
असुंती माणसें मला भोंसकून माझा अपमान कर-
तील." परंतु त्याच्या शस्त्रवाहकानें नाकारिलें, का-
रण कीं तो फार भ्याला, मग शाऊल तरवार घे-
ऊन तिजवर पडला. ५ नंतर जेव्हां त्याच्या श-
स्त्रवाहकानें पाहिलें कीं शाऊल मेला आहे, तेव्हां
तो आपल्या तरवारीवर पडला आणि त्याच्या-
संगतीं मेला.

६ याप्रमाणें शाऊल व त्याचे तीन पुत्र व
त्याचा शस्त्रवाहक व त्याचीं सर्व माणसें बरोबर
त्या दिवशीं मरण पावलीं. ७ आणि इस्रा-
एलाचें सैन्य पळालें आणि शाऊल व त्याचे
पुत्र मेले; असें जे इस्राएलाचे लोक खोऱ्या-

ऱ्या पलिकडे व यार्देनेच्या पलिकडे राहत होते
त्यानी पाहिलें, तेव्हां ते आपलीं नगरें सोडून
पळाले आणि पलिष्ट्यानी येऊन त्यांमध्यें वस्ती
केली. ८ आणि पुढील दिवसीं असें झालें कीं
जेव्हां पलिष्टी येऊन मेलेल्यांची लूट घेऊं ला-
गले, तेव्हां त्यांस शाऊल व त्याचे तीन पुत्र
गिल्बवा डोंगरावर पडलेले असे सांपडले. ९
तेव्हां त्यानी त्याचें शिर छेदिलें आणि त्याचीं
शस्त्रें काढिलीं, मग त्यानी आपल्या मूर्त्तींच्या
देवळांत व लोकांस हें वर्त्तमान गाजवायास प-
लिष्ट्यांच्या मुलखांत दूत चहुंकडे पाठविले. १०
आणि त्यानी त्याचीं शस्त्रें अष्टारोथेच्या देवळांत
ठेविलीं, आणि त्याचें प्रेत बेथशानाच्या भिंतीस
टांगिलें. ११ यानंतर पलिष्ट्यानी शाऊलाला
काय केलें होतें हें याबेशगिलादाच्या लोकानी
ऐकिलें, असतां त्यांमध्यें जे अवघे शूर ते उठून
सर्व रात्र चालले. १२ आणि त्यानी शाऊलाचें
प्रेत व त्याच्या पुत्रांचीं प्रेतें बेथशानाच्या भिंती-
वरून घेऊन याबेशास आणिलीं आणि तेथें तीं
जाळलीं. १३ मग त्यानी त्यांचीं हाडें याबेशांत
एका झाडाखालीं पुरिलीं, नंतर त्यानी सात दिवस
उपास केला.

---

II SAMUEL.

# शमुवेलाचें दुसरें पुस्तक.

### अध्याय १.

शाऊलाच्या मरणानंतर असें झालें कीं दावीद
अमालेक्यांस मारून माघारीं आला, आणि
दावीद सिकलागांत दोन दिवस राहिला. २
मग तिसऱ्या दिवसीं असें झालें कीं पाहा, एक
माणूस ज्यानें आपलीं वस्त्रें फाडून आपल्या डो-
क्यावर माती घातली असा छावणींतून शाऊला-
पासून आला; आणि असें झालें कीं त्याने दावी-
दाजवळ येऊन भूमीवर पडून नमस्कार केला. ३
तेव्हां दावीद त्याला बोलला, "तूं कोठून आ-
लास?" मग तो त्याला ह्मणाला, "मी इस्राए-
लाच्या छावणींतून पळून आलों आहें." ४ तेव्हां
दावीद त्याला ह्मणाला, "कसी काय गोष्ट झाली,
हें कृपा करून मला सांग." मग त्याने उत्तर
केलें कीं, "लोक लढाईंतून पळाले, आणि बहुतेक
लोक पडून मेले, आणि शाऊल व त्याचा पुत्र
योनाथान हेहि मेले." ५ मग ज्या तरण्याने हें
दावीदाला सांगितलें, त्याला त्याने पुसलें कीं,
"शाऊल व त्याचा पुत्र योनाथान मेले हें तुला
कसें माहीत झालें?" ६ तेव्हां ज्या तरण्याने
त्याला हें सांगितलें होतें त्याने ह्मटलें, "मी गि-
लबवाच्या डोंगरावर सहज हिंडत असतां पाहा
शाऊल आपल्या भाल्यावर टेंकत होता, आणि
पाहा रथ व स्वार त्याच्या पाठीस लागले होते.
७ तेव्हां त्याने मागें पाहिलें, आणि मला पाहून
मला हाक मारिली; मग मी बोललों, मी एथें
आहें. ८ त्यावर त्याने मला पुसलें कीं, तूं
कोण आहेस? मग म्या त्याला उत्तर दिल्हें, मी
अमालेकी आहें. ९ तेव्हां तो मला ह्मणाला,
कृपा करून मजवर उभा राहून मला जिवें मार,
कारण कीं मी भ्रमाने व्याप्त झालों आहें; तथापि
माझा जीव मजमध्यें अझून पूर्ण आहे. १० तेव्हां
म्या त्याजवर उभा राहून त्याला जिवें मारिलें,
कारण मला ठाऊक होतें कीं तो पडल्यावर वांच-
णार नाहीं; अणखी त्याच्या डोक्यावरचा मुगुट
व त्याच्या बाहूवरचीं भूषणें घेऊन म्या आ-
पल्या प्रभूजवळ एथें आणिलीं आहेत." ११
तेव्हां दावीदाने आपलीं वस्त्रें धरून फाडलीं,
आणि त्याजवळ जीं माणसें त्या सर्वांनीहि तसें
केलें. १२ आणि त्यानी शाऊल व त्याचा
पुत्र योनाथान व परमेश्वराचे लोक व इस्राए-

लाचीं मनुष्यें यांसाठीं शोक व रुदन केलें आणि
सांजपर्यंत उपासहि केला, कां कीं ते तरवारीनें
पडले होते.
१३ मग ज्या तरण्याने दावीदाला हें सां-
गितलें होतें त्याला त्याने ह्मटलें, "तूं कोठला
आहेस?" आणि तो ह्मणाला, "एक विदेशी मनुष्य
जो अमालेकी त्याचा पुत्र मी आहें." १४ तेव्हां
दावीद त्याला ह्मणाला, "ज्याला **परमेश्वराने**
अभिषेक केलें त्याला वधायासाठीं तूं आपला हात
टाकायास कसा भ्याला नाहींस?" १५ मग
दावीदाने आपल्या तरण्यांतून एकाला बोलावून
ह्मटलें कीं, "तूं जवळ जाऊन त्याला मार." मग
त्याने त्याला मारिलें आणि तो मेला. १६ तेव्हां
दावीदाने त्याला ह्मटलें, "तुझें रक्त तुझ्या डोक्या-
वर असो, कां कीं ज्याला **परमेश्वराने** अभिषेक
केलें त्याला म्या जिवें मारिलें, असी त्वां आपल्या
मुखाने आपल्याविषयीं साक्ष दिल्ही आहे."
१७ मग दावीदाने शाऊल व त्याचा पुत्र
योनाथान यांकरितां असें शोकाचें गीत केलें.
१८ त्याने असें ह्मटलें कीं, "यहूदांच्या संतानांनी
धनुर्विद्या शिकावी, पाहा याशाराच्या पुस्तकांत लि-
हिलें आहे. १९ इस्राएलाची शोभा तुझ्या उंच-
स्थानीं मारिली आहे; शूर कसे पडले आहेत.
२० हें गाथांत सांगूं नका, आशकेलोनाच्या चवा-
ठ्यांमध्यें हें प्रगट करूं नका; कां तर पलिष्ट्यां-
च्या कन्या हर्षतील, अणखी असुंत्यांच्या कन्या
आनंद करितील. २१ अहो गिल्बवाच्या डोंगरा-
नो, तुह्मावर दंव व पाऊस न पडो आणि प्रथम
फळांचीं शेतें न होवोत; कां कीं तेथें बळवा-
नांची ढाल, ह्मणजे तेलाने अभिषेक नसल्यासा-
रिख्या शाऊलाची ढाल टाकली गेली. २२
मारलेल्यांच्या रक्तापासून, बळवानांच्या मेदा-
पासून योनाथानाचें धनुष्य मागें फिरलें नाहीं,
आणि शाऊलाची तरवार रिकामी माघारी आ-
ली नाहीं. २३ शाऊल व योनाथान जिवंत
असतां प्रिय आणि आवडते होते, आणि त्यां-
च्या मरणांत वियोग झाला नाहीं; ते गरूडांपेक्षां
चलद आणि सिंव्हांपेक्षां बळकट असे होते.
२४ अहो इस्राएलाच्या कन्यांहो, ज्या शाऊलाने
किरमीजी वस्त्रें तुह्मास सुंदर प्रकारें पांघर-
विलीं, ज्याने सोन्याचीं भूषणें तुमच्या वस्त्रांवर
घालविलीं, त्याकरितां तुह्मी शोक करा. २५ शूर
रणभूमीवर कसे पडले आहेत; हे योनाथाना, तूं
आपल्या उंचस्थानीं मरण पावलास. २६ हे
माझ्या भावा योनाथाना, तुझ्यासाठीं मला दुःख
आहे; तूं मला प्रिय होतास, मजवर तुझी प्रीति
आश्चर्यकारक होती, ती बायकांच्या प्रीतीपेक्षां अ-
धिक होती. २७ शूर कसे पडले आहेत, आणि
लढाईचीं शस्त्रें नाहींसीं झालीं आहेत."

## अध्याय २.

यानंतर असें झालें कीं दावीदाने **परमेश्वरा-**
ला विचारिलें कीं, "मी यहूदांतील कोणी-
एका नगरास जाऊं कीं काय?" आणि **परमेश्व-**
**राने** त्याला ह्मटलें, "जा." मग दावीदाने विचा-
रिलें, "मी कोणीकडे जाऊं?" आणि त्याने ह्मटलें,
"हेब्रोनास जा." २ मग दावीद आपल्या दोन
बायका अहीनवाम इज्रेलीण व जी पूर्वी नाबाल
कारमेली याची बायको होती असी अबीगाइल
यांस घेऊन तेथें गेला. ३ आणि दावीदाने आप-
ल्यासंगतीं जीं मनुष्यें होतीं त्यांतलें प्रत्येक माणूस
व त्याचें कुटूंब त्यांस आणिलें, आणि तीं हेब्रो-
नाच्या नगरांमध्यें राहिलीं.
४ तेव्हां यहूदाचीं मनुष्यें आलीं आणि तेथें
दावीदाला यहूदाच्या वंशावर राजा होण्या-
साठीं अभिषेक केला; आणि त्यानी दावीदा-
ला सांगितलें कीं, "ज्यानी शाऊलाला पुरिलें तीं
याबेशगिलादाचीं मनुष्यें होतीं. ५ तेव्हां दा-
वीदाने दूतांस याबेशगिलादाच्या माणसांपासीं
पाठवून त्यांस असें सांगितलें कीं, "**परमेश्वरा-**
**चा** आशीर्वाद तुह्मास असो; कां कीं तुह्मी
आपला प्रभु शाऊल यावर कृपा करून त्याला
पुरिलें. ६ आणि आतां **परमेश्वर** तुह्मावर
सत्यतेने कृपा करो; अणखी हें जें चांगलें कृत्य
तुह्मी केलें त्यामुळें मी तुह्मावर उपकार क-
रीन. ७ तर आतां तुमचे हात बळकट असोत
आणि तुह्मी धैर्यवान असा, कां कीं तुमचा प्रभु
शाऊल मेला आहे; अणखी यहूदाच्या वंशाने
आपल्यावर राजा होण्यासाठीं मला अभिषेक
केला आहे."

८ तेव्हां नेराचा पुत्र आबनेर जो शाऊ-
लाचा सेनापति त्याने शाऊलाचा पुत्र ईश्बोशेथ
याला घेऊन माहनाईमास नेलें. ९ आणि गि-
लाद व अशूरी व इज्रेल व एफ्राईम व बन्यामीन
व सर्व इस्राएल यांचा राजा त्याने त्याला केला.
१० शाऊलाचा पुत्र ईश्बोशेथ चाळीस वर्षांचा
असतां तो इस्राएलावर राज्य करूं लागला,
आणि त्याने दोन वर्षे राज्य केलें; परंतु यहूदाचा
वंश मात्र दावीदाकडे होता. ११ आणि दा-
वीदाने हेब्रोनांत यहूदाच्या वंशावर राज्य केलें
तो काळ सात वर्षे व साहा महिने इतका
होता.

१२ त्या काळीं नेराचा पुत्र आबनेर व शा-
ऊलाचा पुत्र ईश्बोशेथ याचे चाकर माहनाई-
मापासून गिबोनास गेले. १३ आणि जरूवे-
चा पुत्र योवाब व दावीदाचे चाकर गेले, आणि
हे त्यांस गिबोनाच्या तळ्याजवळ भेटले; हे
तळ्याच्या एका बाजूवर उतरले, आणि ते तळ्या-
च्या दुसऱ्या बाजूवर उतरले. १४ तेव्हां आ-
बनेराने योवाबाला ह्मटलें कीं, "तरण्यानी आतां
उठून आमच्यापुढें खेळ करावा." आणि योवा-
बाने ह्मटलें कीं, "त्यानी उठावें." १५ तेव्हां
शाऊलाचा पुत्र ईश्बोशेथ याकडले बन्यामीनांतील
बारा जण उठून पलिकडे गेले, आणि दावीदाच्या
चाकरांतूनहि बारा जण उठले. १६ आणि प्रत्येक
माणसाने आपापल्या सोबत्याचें मस्तक धरिलें, आ-
णि आपली तरवार आपापल्या सोबत्याच्या कुशींत
खुपसली आणि ते बरोबर पडले, आणि त्या
जाग्याला हेलकाथहाजुरीम ह्मटलें होतें; तें गि-
बोनांत आहे.

१७ मग त्या दिवशीं फार तुंबळ लढाई झा-
ली, आणि आबनेर व इस्राएलाचीं माणसें दावी-
दाच्या चाकरांपुढें पराजित झालीं. १८ आणि
जरूवेचे तीन पुत्र योवाब व अबीशाय व असा-
हेल हे तेथें होते, आणि असाहेल रानांतल्या हरा
णासारिखा पायांचा चपळ होता. १९ आणि
असाहेल आबनेराच्या पाठीस लागला; तो आ-
बनेराच्या पाठीस लागत असतां उजव्याकडे किंवा
डाव्याकडे जायास फिरला नाहीं. २० तेव्हां
आबनेराने आपल्या पाठीमागें पाहून ह्मटलें, "तूं
असाहेल आहेस कीं काय?" आणि हा बोलला
"तोच मी आहें." २१ मग आबनेराने त्याला
ह्मटलें, "तूं उजव्याकडे किंवा डाव्याकडे फीर,
आणि तरण्यांतील कोणीएकाला धरून आपल्या-
साठीं त्याचीं कवचशस्त्रें घे." परंतु असाहेल
त्याच्या पाठीस लागून फिरला नाहीं. २२ तेव्हां
आबनेराने असाहेलाला पुन्हा ह्मटलें, "तूं माझा
पाठलाग सोड, मी तुला भूमीवर कां मारावें? नं-
तर मी आपलें तोंड तुझा भाऊ योवाब याला कसें
दाखवूं?" २३ परंतु तो फिरायास मान्य झाला
नाहीं, यास्तव आबनेराने भाल्याच्या शेवटाने त्या-
ला पोटांत मारिलें, आणि भाला त्याच्या पाठींतून
निघाला, आणि तो तेथें पडून त्या ठिकाणीं मेला;
आणि असें झालें कीं ज्या ठिकाणीं असाहेल प-
डून मेला, तेथें जे आले ते सर्व उभे राहिले. २४
परंतु योवाब व अबीशाय आबनेराच्या पाठीस
लागले, आणि सूर्य मावळला तेव्हां ते आम्मा
डोंगर जो गिहाच्यापुढें गिबोनाच्या रानांतल्या
वाटेवर आहे त्याजवळ पोहंचले.

२५ मग बन्यामीनाचीं संतानें आबनेराच्यामागें
एकत्र मिळून एक जमात झाली, आणि ते एका
डोंगराच्या शिखरावर उभे राहिले. २६ तेव्हां
आबनेराने योवाबाला हाक मारून ह्मटलें कीं,
तरवारीने सर्वकाळ नाश करावा कीं काय? शेवटीं
कडूपण होईल हें तुला ठाऊक नाहीं कीं काय?
तर लोकानी आपल्या भावांचा पाठलाग सोडावा,
असें तूं त्यांस कोठवर सांगणार नाहींस?" २७
तेव्हां योवाबाने उत्तर केलें कीं, सजीव देवाची
शपथ मी करितों कीं जर तूं बोलला नसतास तर
निश्चयेंकरून सकाळीं सर्व लोक आपल्या भावांचा
पाठलाग सोडून गेले असते." २८ मग योवाबाने
करणा वाजविला, आणि सर्व लोक थांबून इस्राए-
लाच्या पाठीस अणखी लागले नाहींत, आणि ते
अणखी लढले नाहींत. २९ आणि आबनेर व
त्याचीं माणसें त्या सर्व रात्रीं रानांतून चालून आ-
णि यार्देनेच्या पलिकडे गेलीं; सर्व बिथोनांतून जा-
ऊन माहनाईमास पोहंचलीं. ३० आणि योवाब
आबनेराचा पाठलाग सोडून माघारें आला, तेव्हां
त्याने सर्व लोक जमा केले, आणि दावीदाच्या चा-
करांत एकुणीस माणसें व असाहेल इतके उणे

होतें. ३१ परंतु दावीदाच्या चाकरांनीं बन्यामी-
नाचीं व आबनेराचीं तीनशें साठ माणसें मारिलीं
असीं कीं तीं मरण पावलीं. ३२ मग त्यानें
असाहेलाला घेऊन बेथलेहेमामध्यें त्याच्या बापा-
च्या कबरेंत त्याला पुरिलें, आणि योवाब व त्याचीं
माणसें त्या सर्व रात्रीं चालून पाहांटेस हेब्रोनास
पोहेंचलीं.

## अध्याय ३.

शाऊलाचें कुटुंब व दावीदाचें कुटुंब यांमध्यें
लढाई बहुकाळ चालली, आणि दावीद
अधिक बळवान् होत चालला, परंतु शाऊलाचें
कुटुंब अशक्त होत चाललें. २ आणि हेब्रो-
नांत दावीदाला पुत्र झाले; त्याचा वडील पुत्र
आम्नोन, तो अहीनवाम इज्रेलिणीपासून जन्मला.
३ आणि त्याचा दुसरा पुत्र खिलाब, तो अबी-
गाइल, जी पूर्वी नाबाल कारमेली याची बायको
होती, तिजपासून जन्मला; आणि तिसरा पुत्र आ-
बशालोम, तो गशूराचा राजा थालमा याची क-
न्या माका हिचा पुत्र होता. ४ आणि चवथा
पुत्र अदोनीया, तो हाग्गीथीचा पुत्र होता; आणि
पांचवा पुत्र शफाट्या, तो अबीटालीचा पुत्र होता;
५ आणि साहावा पुत्र इथ्राम, तो दावीदाची बा-
यको एगला इचा पुत्र होता; हे दावीदाला हेब्रो-
नांत झाले.

६ आणि असें झालें कीं शाऊलाचें कुटुंब व
दावीदाचें कुटुंब यांमध्यें लढाई चालली असतां,
आबनेरानें शाऊलाच्या कुटुंबाचें सहाय केलें.
७ आणि आयेची कन्या रिजफा नामें शाऊलाची
उपपत्नी होती, आणि ईश्बोशेथ आबनेराला बो-
लला, "माझ्या बापाच्या उपपत्नीजवळ तूं कां गे-
लास?" ८ तेव्हां आबनेर ईश्बोशेथाच्या शब्दां-
मुळें फार रागें भरून बोलला, "मी कुत्र्याचें मस्तक
आहें काय? म्या आज यहूद्याविरुद्ध तुझा बाप
शाऊल याच्या कुटुंबावर व त्याच्या भावांवर व
त्याच्या मित्रांवर कृपा करून तुला दावीदाच्या
हातीं दिल्हें नाहीं, असें असतां आज त्या बाय-
कोविषयीं तूं माझ्या पदरीं दोष घालतोस. ९
तसें देव आबनेराला करो आणि यापेक्षां अ-
धिकहि करो, जर मी असें परमेश्वरानें दा-
वीदाला शपथ वाहून ह्मटलें त्याप्रमाणें त्यासीं
करीत नाहीं; १० ह्मणजे शाऊलाच्या कुटुंबा-
पासून राज्य काढावें, आणि दावीदाचें राजासन
इस्राएलावर व यहूद्यावर दानापासून बेरशेबा-
पर्यंत स्थापावें." ११ यावर त्याच्यानें आब-
नेराला कांहीं उत्तर करवेना, कां कीं तो त्याला
भ्याला.

१२ यानंतर आबनेरानें आपल्यासाठीं दूतांस
दावीदाजवळ पाठवून असें ह्मटलें कीं, "देश को-
णाचा आहे?" अणखी त्यानें ह्मटलें कीं, "मजसीं
करार कर, आणि पाहा सर्व इस्राएल तुझ्याकडे
समजावून आणावे ह्मणून मी तुझें सहाय करीन."
१३ तेव्हां त्यानें उत्तर केलें, "बरें, मी तुजसीं
करार करीन, परंतु मी एक गोष्ट तुझ्यापासीं
मागतों कीं मला भेटायास येत असतां, जर तूं
पहिल्यानें शाऊलाची कन्या मीखाल न आणसील
तर माझें तोंड तूं पाहणार नाहींस." १४ आणि
दावीदानें शाऊलाचा पुत्र ईश्बोशेथ याजवळ
दूतांस पाठवून ह्मटलें कीं, "जी माझी बायको मी-
खाल म्या आपल्यासाठीं पलिष्ट्यांचीं दोनशें बोंड
मासे देऊन घेतली ती मला दे." १५ मग ईश्बो-
शेथानें पाठवून लाईशाचा पुत्र फालथीएल
तिचा नवरा यापासून तिला घेतलें. १६ आणि
तिचा नवरा तिच्यासंगतीं चालून बाहुरीमापर्यंत
तिच्यामागें शोक करीत गेला. मग आबनेरानें
त्याला ह्मटलें, "जा, माघारें जा." तेव्हां तो
माघारें गेला.

१७ आबनेरानें इस्राएलाच्या वडिलांसीं असी बो-
ली केली कीं, "पूर्वीं तुह्मी आपला राजा होण्यासाठीं
दावीदाला इच्छीत होतां. १८ तर आतां तसेंच
करा, कारण कीं परमेश्वरानें दावीदाविषयीं असें
ह्मटलें आहे कीं, माझा चाकर दावीद याच्या हा-
तानें मी आपले लोक इस्राएल यांस पलिष्ट्यांच्या
हातून व त्यांच्या सर्व शत्रूंच्या हातून सोडवीन."
१९ आणि तसें आबनेरानें बन्यामीनाच्या कानांत
सांगितलें; मग आबनेर इस्राएलांस व बन्यामीना-
च्या सर्व घराण्यास जें चांगलें वाटलें तें सर्व दा-
वीदाच्या कानांत सांगायास हेब्रोनामध्यें गेला.
२० आणि आबनेर दावीदाजवळ हेब्रोनांत आला
तेव्हां त्याच्यासंगतीं वीस माणसें होतीं, आणि दा-

वीदानें आबनेरासाठीं व त्याच्यासंगतीं जीं माणसें
त्यासाठीं जेवणावळ केली. २१ तेव्हां आबनेरानें
दावीदाला ह्मटलें, "मी उठून जाईन आणि आप-
ला धनी जो राजा त्याजपाशीं सर्व इस्राएलाच्या
लोकांस जमा करीन, यासाठीं कीं त्यांनी तुजसीं
करार करावा, मग जसें तूं इच्छितोस त्याप्रमाणेंच
तूं राज्य करसील." यानंतर दावीदानें आबने-
राला निरोप दिल्हा, आणि तो सुखरूप गेला.

२२ त्या काळीं पाहा, दावीदाचे चाकर व यो-
वाब एका टोळीच्या पाठीस लागून आपल्या बरोबर
फार लूट घेऊन आले, परंतु आबनेर दावीदाच्या
संगतीं हेब्रोनांत नव्हता; कारण कीं त्यानें त्याला
निरोप दिल्हा आणि तो सुखरूप गेला होता. २३
आणि योवाब व त्याच्यासंगतीं सर्व सैन्य आ-
ल्यावर योवाबाला कोणीं सांगितलें कीं, "नेराचा
पुत्र आबनेर राजाजवळ आला, आणि यानें त्याला
निरोप दिल्हा आणि तो सुखरूप गेला आहे."
२४ मग योवाब राजापाशीं येऊन बोलला,"त्वां काय
केलें आहे? पाहा, आबनेर तुझ्याजवळ आला;
त्वां त्याला निरोप दिल्हा आणि तो निघून गेला
आहे, हें कसें झालें? २५ नेराचा पुत्र आबनेर
याला तूं जाणतोस कीं तो तुला फसवायास आणि
तुझें आंत येणें व बाहेर जाणें पाहायास, आणि
जें तूं करितोस तें सर्व जाणायास आला." २६
तेव्हां योवाब दावीदापासून गेला, आणि आब-
नेराच्या पाठीमागें दूतांस पाठवून त्याला सीरा
विहिरीपासून माघारें आणिलें, परंतु हें दावीदानें
जाणिलें नाहीं. २७ आणि आबनेर माघारें हे-
ब्रोनास आला असतां योवाब त्याला एकीकडे
दरवाज्याजवळ एकांतीं बोलायास घेऊन गेला,
आणि त्यानें तेथें आपला भाऊ असाहेल याच्या
रक्तामुळें त्याला त्याच्या पोटांत मारिलें, आणि
तो मेला. २८ आणि दावीदानें हें ऐकिलें तेव्हां
तो असें बोलला कीं, "नेराचा पुत्र आबनेर या-
च्या रक्ताविषयीं मी व माझें राज्य परमेश्वरा-
समोर सर्वकाळ निर्दोषी आहे. २९ योवाबाच्या
डोक्यावर व त्याच्या बापाच्या सर्व घराण्यावर
राहो, आणि जो स्रावी किंवा कोडी किंवा काठीवर
टेंकणारा किंवा तरवारीनें पडणारा किंवा भाकर
मागणारा असा योवाबाच्या घराण्यांत कोणीएक
नेहमी होवो." ३० असें योवाब व त्याचा भाऊ
अबीशाय यांनी आबनेराला जिवें मारिलें, कारण
कीं त्यानें त्याचा भाऊ असाहेल याला गिबोना-
जवळ लढाईंत मारिलें होतें.

३१ त्या समयीं दावीदानें योवाबाला व आ-
पल्यासंगतीं जे सर्व लोक होते त्यांस ह्मटलें कीं,
"तुह्मी आपलीं वस्त्रें फाडा आणि गोणताट नेसून
आबनेरासाठीं शोक करा." आणि दावीद राजा
तिरडीच्या मागें चालला. ३२ आणि त्यांनी हे-
ब्रोनांत आबनेराला पुरिलें, आणि राजानें आब-
नेराच्या कबरेजवळ मोठ्यानें शोक केला, आणि
सर्व लोकांनीहि शोक केला. ३३ आणि राजानें
आबनेरासाठीं शोक करून ह्मटलें कीं,"जसा मूर्ख
मरतो तसाच आबनेर मरण पावला कीं नाहीं!
३४ तुझे हात बांधलेले नव्हते, आणि तुझे पाय
बेड्यांमध्यें घातलेले नव्हते, दुष्ट मनुष्यांपुढें जसा
कोणी पडतो तसा तूं पडलास." मग सर्व लोकांनी
फिरून त्याच्यासाठीं शोक केला. ३५ आणि दा-
वीदानें अन्न खावें ह्मणून सर्व लोकांनी दिवसां
त्याजपाशीं येऊन विनंती केली; तेव्हां दावीदानें
शपथ वाहून असें ह्मटलें कीं, "सूर्य मावळल्या-
पूर्वीं मी भाकरी किंवा कांहींएक खाईन तर तसें
व त्यापेक्षां अधिकहि देव मला करो." ३६ आणि
सर्व लोकांनी हें पाहिलें, आणि राजानें जें सर्व
केलें तें अवघ्या लोकांस चांगलें वाटलें, तसें हेंहि
त्यांस चांगलें वाटलें. ३७ आणि सर्व लोक ह्म-
णजे सर्व इस्राएली त्या दिवसीं समजले कीं ने-
राचा पुत्र आबनेर याला मारणें हें राजाकडून
झालें नाहीं. ३८ आणखी राजानें आपल्या चा-
करांस ह्मटलें कीं, "आज एक सर्दार व परा-
क्रमी मनुष्य इस्राएलांत पडला आहे, हें तुह्मास
ठाऊक नाहीं काय? ३९ आणि आज मी अभि-
षिक्त राजा असतांहि अशक्त आहें, आणि हीं
माणसें जरूवेचे पुत्र माझ्यापेक्षां बळवान् आहेत;
परमेश्वर दुष्ट करणाऱ्याला त्याच्या दुष्टाईप्र-
माणें देईल."

## अध्याय ४.

आणि शाऊलाच्या पुत्रानें ऐकिलें कीं आबनेर
हेब्रोनांत मरण पावला, तेव्हां त्याचे हात

अशक्त झाले व सर्व इस्राएली घाबरे झाले. २
तेव्हां शाऊलाच्या पुत्रापाशीं जमातीचे नायक
असे दोन मनुष्य होते, एकाचें नांव बाना आणि
दुसऱ्याचें नांव रेखाब, ते रिम्मोन बैरोथी जो ब-
न्यामीनाच्या संतानांतील त्याचे पुत्र होते; कां कीं
बैरोथ बन्यामीनाकडे मोजिला होता. ३ आणि
बैरोथी गित्ताईमास पळाले, आणि तेथें आजपर्यंत
प्रवासी आहेत. ४ आणि शाऊलाचा पुत्र योना-
नाथान याला पायांचा पांगळा असा पुत्र होता;
शाऊल व योनाथान यांचें वर्त्तमान इज्रेलापासून
आलें तेव्हां तो पांच वर्षांचा होता, त्या वेळेस
त्याची आया त्याला घेऊन पळाली; आणि असें
झालें कीं ती घाईने पळत असतां तो पडला व
पांगळा झाला, आणि त्याचें नांव मफीबोशेथ होतें.
५ आणि रिम्मोन बैरोथी याचे पुत्र रेखाब व
बाना हे चालून दिवसाच्या उष्ण वेळीं ईश्बोशे-
थाच्या घरांत आले, तेव्हां तो पलंगावर दुपारचा
निजला होता. ६ आणि पाहा, ते गहूं घेणाऱ्यां-
सारिखे घराच्यामध्यें आले, आणि त्यांनी त्याला
त्याच्या पोटांत मारिलें; मग बाना व त्याचा भाऊ
रेखाब पळाले. ७ ते घरांत आले तेव्हां तो आ-
पल्या पलंगावर आपल्या निद्रास्थानीं निजला होता,
आणि त्यांनी त्याला हाणून जिवें मारिलें व त्याचें
शिर कापिलें, मग ते त्याचें शिर घेऊन रानाच्या
वाटेने सर्व रात्रीं चालले. ८ आणि त्यांनी ईश्-
बोशेथाचें शिर दावीदापाशीं हेब्रोनांत आणिलें,
आणि त्यांनी राजाला असें म्हटलें कीं, "शाऊल
तुझा शत्रु जो तुझा जीव घ्यायास पाहत होता
त्याचा पुत्र ईश्बोशेथ याचें शिर पाहा; परमे-
श्वराने माझा प्रभु राजा यासाठीं शाऊलाचा व
त्याच्या संतानाचा सूड आज उगविला आहे."
९ तेव्हां दावीदाने रेखाब व त्याचा भाऊ बा-
ना रिम्मोन बैरोथी याचे पुत्र त्यांस उत्तर
देतां म्हटलें कीं, "परमेश्वर ज्याने माझ्या जि-
वाला सर्व संकटांतून सोडविलें त्याची शपथ मी
वाहतों; १० जेव्हां एकाने मला सांगितलें कीं,
शाऊल मेला आहे, आणि तो आपल्या समज-
ण्यांत चांगलें वर्त्तमान सांगणारा असा होता,
तेव्हां मला वर्त्तमानाचें मोल मिळेल, असें ज्याला
वाटलें त्याला म्या धरून जिकलागांत जिवें मा-
रिलें. ११ तर ज्या दुष्ट मनुष्यांनी एका चांगल्या
माणसाला त्याच्या घरांत त्याच्या पलंगावर जिवें
मारिलें ते विशेषेंकरून मरायाजोगे आहेत; तर
आतां त्याच्या रक्ताचा सूड मी तुमच्या हातून
घेणार नाहीं कीं काय? आणि पृथ्वीवरून तुम्हास
नाहींसें करणार नाहीं कीं काय?" १२ तेव्हां
दावीदाने आपल्या चाकरांस आज्ञा केली असतां
त्यांनी त्यांस जिवें मारिलें, मग त्यांचे हात व पाय
तोडून त्यांस हेब्रोनांत तळापाशीं टांगिलें; परंतु
त्यांनी ईश्बोशेथाचें डोकें घेऊन हेब्रोनामध्यें
आबनेराच्या कबरेंत पुरिलें.

## अध्याय ५.

त्यानंतर इस्राएलाचे सर्व वंश दावीदाजवळ
हेब्रोनांत येऊन असें बोलले कीं, "पाहा
आम्ही तुझें हाड व तुझें मांस असे आहों. २ पूर्वी
शाऊल आम्हावर राज्य करीत असतां ज्याने इ-
स्राएलांस आंत आणिलें व बाहेर नेलें तो तूंच हो-
तास, आणि परमेश्वराने तुला म्हटलें कीं, "तूं
माझे लोक इस्राएल यांस पाळसील आणि तूं इ-
स्राएलावर अधिकारी होसील." ३ तसें इस्राएलाचे
सर्व वडील राजापाशीं हेब्रोनांत आले, आणि दा-
वीद राजाने हेब्रोनांत परमेश्वरासमोर त्यांशीं
करार केला; मग त्यांनी दावीदाला इस्राएलाचा
राजा होण्यासाठीं अभिषेक केला.
४ दावीद राज्य करूं लागला तेव्हां तो तीस
वर्षांचा होता, आणि त्याने चाळीस वर्षें राज्य केलें.
५ हेब्रोनांत त्याने यहूद्यांवर सात वर्षें व साहा
महिने राज्य केलें, आणि यरूशालेमांत तेहतीस
वर्षें सर्व इस्राएलावर व यहूद्यांवर राज्य केलें. ६
आणि राजा आपल्या माणसांसुद्धां यरूशालेमास
यबूसी जे देशाचे राहणारे त्यांवर गेला, आणि ते
दावीदाला असें बोलले कीं, "जर अंधळ्यांस व
पांगळ्यांस तूं दूर करीत नाहींस तर तूं इकडे
णार नाहींस." कारण त्यांस वाटलें कीं दावीद
इकडे येऊं शकत नाहीं. ७ तथापि दावीदाने सी-
योनाचा कोट घेतला; तेंच दावीदाचें नगर आहे.
८ आणि दावीद त्या दिवशीं बोलला, "जो कोणी
यबूस्यांस मारील आणि खंदकांत जाऊन पांगळे
व अंधळे यांसहि मारील तो सेनापति होईल."

त्या अंधळ्यांस व पांगळ्यांस दावीदाने मनापासून
द्वेषिलें होतें; कां कीं ते असें बोलले कीं, "तो को-
टांत येणार नाहीं." ९ यानंतर दावीद त्या कोटांत
राहिला आणि त्याला दावीदाचें नगर असें म्हटलें,
आणि तें दावीदाने मिलोपासून सभोंवतें व आंत
बांधिलें. १० तसा दावीद वाढत वाढत मोठा
झाला, आणि सैन्याचा देव परमेश्वर त्याला अ-
नुकूळ होता.

¶ ११ आणि सोराचा राजा हीराम याने दावी-
दापाशीं दूत व एरेज लांकूड व सुतार व पाथरवट
यांस पाठविलें, आणि त्यांनी दावीदासाठीं वाडा
बांधिला. १२ तेव्हां दावीदाने पाहिलें कीं परमे-
श्वराने मला इस्राएलावर राजा स्थापित केलें
आहे, आणि त्याने आपले लोक इस्राएल यांसाठीं
माझें राज्य थोर केलें आहे. १३ मग दावीदाने
हेब्रोनाहून आल्यानंतर अणखी उपपत्नी व बायका
यरूशालेमांत केल्या, आणि दावीदाला अणखी
पुत्र व कन्या झाल्या. १४ आणि यरूशालेमांत
जे त्याला झाले त्यांचीं नांवें हीं, शाम्मुवा व शो-
बाब व नाथान व शलोमो; १५ आणि इभदार
व अलीशवा व नेफेग व यफिवा; १६ आणि अ-
लीशामा व एल्यादा व अलीफालेट.

१७ आणि पलिष्ट्यांनी ऐकिलें कीं दावीदाला
इस्राएलाचा राजा होण्यासाठीं त्यांनी अभिषेक
केला आहे, तेव्हां सर्व पलिष्टी दावीदाचा शोध
करायास आले; हें ऐकून दावीद एका कोटास गेला.
१८ मग पलिष्टी येऊन रफाईम खोऱ्यांत पस-
रले. १९ तेव्हां दावीदाने परमेश्वराला पुसलें
कीं, "मी पलिष्ट्यांवर जाऊं कीं काय? तूं त्यांस
माझ्या हातीं देसील कीं काय?" मग परमेश्वराने
दावीदाला असें उत्तर दिल्हें कीं, "जा, कां कीं मी
पलिष्ट्यांस तुझ्या हातीं देईनच देईन." २० तेव्हां
दावीद बालपराजीमास आला आणि तेथें दावी-
दाने त्यांस मारिलें; आणि त्याने म्हटलें कीं, "प-
रमेश्वराने माझ्यापुढें माझ्या शत्रूंस पाण्याच्या
पुरासारिखें मोडिलें आहे." यास्तव त्याने त्या ठि-
काणाला बालफराजीम असें नांव ठेविलें. २१
आणि त्यांनी आपल्या मूर्त्ति तेथें टाकिल्या असतां
दावीदाने व त्याच्या माणसांनी त्या जाळिल्या.
२२ मग फिरून पलिष्टी येऊन रफाईमाच्या
खोऱ्यांत पसरले. २३ तेव्हां दावीदाने पर-
मेश्वराला विचारिलें आणि त्याने असें उत्तर
दिल्हें कीं, "पुढें जाऊं नको; त्यांच्या पाठीमागें
फेरा घेऊन जा, मग तुतींच्या झाडांसमोरून त्यां-
कडे या. २४ आणि असें होवो कीं तुतींच्या
शेंड्यांमध्यें चालण्याचा शब्द ऐकतांच चला,
कारण कीं तेव्हांच परमेश्वर तुझ्यापुढें पलिष्ट्-
यांचें सैन्य मारायास जातो." २५ मग जसी
परमेश्वराने आज्ञा दिल्ही तसें दावीदाने केलें,
आणि गेबापासून गाजेरापर्यंत त्याने पलिष्ट्यांस
मारिलें.

## अध्याय ६.

दावीदाने इस्राएलांतील सर्व निवडलेलीं माणसें
फिरून एकत्र केलीं; तीं तीस हजार होतीं.
२ आणि दावीद आपल्या सर्व लोकांसुद्धां यहू-
द्यांतील बालेपासून उठून देवाचा कोश, ज्याला
सैन्यांचा परमेश्वर जो करूबांमध्यें राहणारा,
असें नाम ठेविलें आहे, तो कोश तेथून आणायास
गेले. ३ आणि त्यांनी देवाचा कोश एका नव्या
गाडींत ठेविला, आणि अबीनादाबाचें घर जें गि-
ब्यांत होतें त्यांतून आणिला, आणि अबीनादाबाचे
पुत्र उज्जा व आह्यो यांनी ती नवी गाडी हांकि-
ली. ४ तसें अबीनादाबाचें जें घर गिब्यांत होतें
तेथून त्यांनी देवाचा कोश आणिला, आणि आ-
ह्यो कोशापुढें चालला. ५ आणि दावीदाने व
सर्व इस्राएलाच्या लोकांनी सर्व लांकडीं वाद्यें, म्ह-
णजे सारंगी व सतार व डफ व टाळ व झांज,
हीं वाजवितांना परमेश्वरासमोर उत्साह केला.
६ आणि ते नाखोनाच्या खळ्यापासीं आले तेव्हां
उज्जाने आपला हात देवाच्या कोशावर घालून
त्याला धरिलें, कां कीं बैल त्याला हालवीत होते.
७ तेव्हां परमेश्वर उज्जावर रागें भरला, आणि
देवाने त्याला तेथें त्याच्या अपराधामुळें मारिलें,
आणि तो तेथें देवाच्या कोशाजवळ मेला. ८
आणि दावीदाला वाईट वाटलें, कारण कीं परमे-
श्वराने उज्जावर अवकृपा केली होती, यास्तव
त्याने त्या जाग्याला फारजउज्जा असें नांव आ-
जपर्यंत ठेविलें. ९ आणि दावीद परमेश्वरा-
ला त्या दिवसीं भिऊन म्हणाला, "परमेश्वरा-

चा कोश माझ्यापासीं कसा येईल?" १० आ-
णि दावीदाने **परमेश्वराचा** कोश आपल्याजवळ
दावीदाच्या नगरांत आणूं नये, असें ठरविलें,
यास्तव दावीदाने **ओबेद** अदोम जो **गित्ती** त्या-
च्या घरीं तो नेऊन ठेविला.

११ यानंतर **परमेश्वराचा** कोश **ओबेद**
अदोम जो **गित्ती** त्याच्या घरीं तीन महिने राहि-
ला, आणि **परमेश्वराने ओबेद** अदोमाला व
त्याच्या कुटुंबाला आशीर्वाद दिल्हा. १२ मग
दावीद राजाला कोणी सांगितलें कीं, "**परमेश्व-
राने ओबेद** अदोमाच्या कुटुंबाला व जें सर्व
त्याचें आहे त्याला देवाच्या कोशामुळें आशीर्वाद
दिल्हा आहे." तेव्हां दावीदाने जाऊन देवाचा
कोश ओबेद अदोमाच्या घरांतून दावीदाच्या नग-
रांत हर्षाने आणिला. १३ आणि असें झालें कीं
**परमेश्वराचा** कोश नेणारे साहा पावलें चालले
तेव्हां त्याने बैल व पुष्टपशू यांचा यज्ञ केला.
१४ आणि दावीद **परमेश्वरासमोर** सर्व शक्तीने
नाचत चालला, आणि दावीदाने जवसाचा एफोद
वेष्टिला होता. १५ आणि दावीदाने व सर्व इस्रा-
एलाच्या लोकानी जयजयकार व करण्यांचे शब्द
करीत करीत **परमेश्वराचा** कोश आणिला. १६
आणि **परमेश्वराचा** कोश दावीदाच्या नगरास
आला तेव्हां **शाऊलाची** कन्या **मीखाल** इने खि-
डकींतून पाहिलें, आणि दावीद राजाला **परमे-
श्वरापुढें** उड्या मारितां व नाचतां पाहून त्या-
ला आपल्या अंतःकरणांत तुच्छ मानिलें.

१७ याप्रकारें त्यानी **परमेश्वराचा** कोश आ-
णिला, आणि जो डेरा दावीदाने त्यासाठीं सिद्ध
केला होता तो त्यामध्यें त्याच्या ठिकाणीं ठेविला;
तेव्हां दावीदाने **परमेश्वरासमोर** होम व शांति-
कारक यज्ञ केले. १८ आणि दावीदाने होम
व शांतिकारक यज्ञ समाप्त केल्यावर त्याने सैन्यां-
च्या **परमेश्वराच्या** नामानें लोकांस आशीर्वाद
दिल्हा. १९ आणि त्याने सर्व लोकांस ह्मणजे
सर्व इस्राएलाच्या समुदायांतील प्रत्येकाला, असें
पुरुषाला तसें बायकोला, एकएक भाकर व सागुती-
चा तुकडा व पोळी हीं वांटून दिल्हीं; मग सर्व
लोक आपापल्या घरास गेले. २० मग दावीद
आपल्या कुटुंबाला आशीर्वाद द्यायास माघारा
गेला, तेव्हां **शाऊलाची** कन्या **मीखाल** दावी-
दाला भेटायास येऊन ह्मणाली कीं, "आज इ-
स्राएलाचा राजा किती माननीय दिसला; त्याने
आपल्या चाकरांच्या दासींच्या दृष्टींत आपणाला
आज उघडें केलें; जसा कोणीएक हलका माणूस
आपणाला उघडें करितो, तसें." २१ तेव्हां दा-
वीदाने **मीखालीला** ह्मटलें कीं, "हें **परमेश्वरा-
समोर** झालें; त्याने मला **परमेश्वराचे** लोक
इस्राएल यांचा अधिकारी नेमावें ह्मणून तुझ्या
बपाहून व त्याच्या सर्व कुटुंबाहून मला निवडिलें
आहे, यास्तव **परमेश्वरासमोर** मी नाचेन. २२
आणि यापेक्षां मी हलका होईन, आणि मी आ-
पल्या दृष्टींत नीच होईन, आणि ज्या दासींवि-
षयीं तूं बोललीस त्यांकडून मी माननीय होईन."
२३ आणि **शाऊलाची** कन्या **मीखाल** इला
मरणकाळपर्यंत लेंकरूं झालें नाहीं.

## अध्याय ७.

आणि असें झालें कीं राजा आपल्या घरीं बस-
ला आणि **परमेश्वराने** त्याला त्याच्या
सर्व सभोंवतील शत्रूंपासून स्वस्थ केलें होतें;
२ तेव्हां राजाने **नाथान** भविष्यवाद्याला ह्मटलें
कीं, "आतां पाहा, मी एरेज लांकडाच्या घरांत
राहतों, परंतु **परमेश्वराचा** कोश डेऱ्यामध्यें
राहतो." ३ मग **नाथान** राजाला ह्मणाला,
"जें तुझ्या मनांत आहे तें सर्व कर; कां कीं **पर-
मेश्वर** तुला अनुकूळ आहे."

४ आणि त्या रात्रीं असें झालें कीं **परमे-
श्वराचा** शब्द **नाथानकडे** येऊन ह्मणाला कीं,
५ "तूं जाऊन माझा चाकर दावीद याला सांग,
**परमेश्वर** असें ह्मणतो, तूं मला राहण्यासाठीं
घर बांधसील कीं काय? ६ कारण कीं म्या
इस्राएलाचीं संतानें **मिसर** देशांतून आणिलीं त्या
दिवसापासून आजपर्यंत मी घरांत वर्त्तत आलों
नाहीं परंतु डेऱ्यांत व मंडपांत वस्ती केली आहे.
७ इस्राएलाच्या अवघ्या संतानांमध्यें ज्या सर्व
ठिकाणीं मी राहिलों, तेथें इस्राएलाच्या ज्या अ-
धिकाऱ्यांस माझे लोक इस्राएल यांचें रक्षण करा-
यास म्या नेमिलें, त्यांतील कोणीएकाला, 'तूं मा-
झ्यासाठीं एरेज लांकडाचें घर कां बांधीत नाहींस?

असें वचन मी कधीं बोललों कीं काय? ८ तर
आतां माझा चाकर दावीद याला असें सांग, सै-
न्याचा परमेश्वर असें ह्मणतो कीं माझे लोक
इस्राएल यांवर त्वां अधिकारी व्हावें ह्मणून म्या
तुला मेंढवाड्यांतून व मेंढरांच्या मागून घेतलें. ९
आणि जेथें जेथें तूं गेलास तेथें मी तुला अनुकूळ
होतों, आणि तुझ्या सर्व शत्रूंस तुझ्यापुढून नाहींसें
केलें, आणि पृथ्वीवर जे श्रीमंत आहेत त्यांच्या
नांवांसारिखें तुझें नांव मोठें केलें आहे. १० आ-
णि माझे लोक इस्राएल यांस मी ठिकाण नेमून
त्यांस स्थापीन, आणि ते आपल्या ठिकाणीं वस्ती
करून अणखी फिरणार नाहींत; आणि जसा
दुष्ट मनुष्यांनी त्यांस पूर्वीं उपद्रव केला तसा ते
फिरून करणार नाहींत. ११ आणि ज्या वेळा-
पासून म्या माझे लोक इस्राएल यांच्या अधिका-
ऱ्यांस नेमिलें आणि तुला तुझ्या अवघ्या शत्रूंपा-
सून स्वस्थ केलें जसें माझे लोक राहिले तसें ते
राहतील, अणखी परमेश्वर तुला ह्मणतो कीं
परमेश्वर तुझें घर बांधील. १२ जेव्हां तुझे
दिवस समाप्त होऊन तूं आपल्या पित्यांच्यासंगतीं
निजसील तेव्हां तुझें संतान जें तुझ्यापासून उत्पन्न
होईल, तें तुझ्या मरणानंतर मी स्थापित करीन,
आणि त्याचें राज्य स्थापीन. १३ तो माझ्या ना-
मासाठीं घर बांधील, आणि त्याच्या राज्याचें सिं-
हासन मी सर्वकाळ स्थापित करीन. १४ मी
त्याचा बाप असा होईन, आणि तो माझा पुत्र
असा होईल; जर तो दुष्टाई करील तर मी मनु-
ष्यांपरी छड्यांनी आणि माणसांच्या संतानांपरी
फटक्यांनी त्याला शिक्षा करीन. १५ परंतु म्या
शाऊलाला तुझ्यापुढून काढून त्यावरून जसी
आपली कृपा काढिली, तसी काढणार नाहीं.
१६ आणि तुझें घर व तुझें राज्य तुझ्यादेखतां
सर्वकाळ स्थापित होईल; तुझें राजासन सर्वकाळ
स्थापित होईल." १७ नाथान या सर्व शब्दांनी
व या सर्व दर्शनानें दावीदाला बोलला.

१८ मग दावीद राजा आंत गेला आणि पर-
मेश्वरासमोर बसून असें बोलला कीं, "हे प्रभू
परमेश्वरा, मी कोण आणि माझें घराणें काय कीं
त्वां एथपर्यंत मला आणिलें आहे? १९आणि हे प्रभू
परमेश्वरा, तुझ्या दृष्टींत ही केवळ लाहान गोष्ट
आहे, ह्मणून तूं आपल्या सेवकाच्या घराण्याविषयीं
पुढें पुष्कळ वेळापर्यंत बोलला आहेस; आणि हे
प्रभू परमेश्वरा, ही मनुष्याची रीत आहे कीं
काय? २० आणि दावीदानें तुझ्याजवळ अणखी
काय बोलावें? कारण कीं हे प्रभू परमेश्वरा, तूं
आपल्या सेवकाला जाणतोस. २१ त्वां आपल्या
वचनामुळें व आपल्या इच्छेप्रमाणें हीं सर्व मोठीं
कृत्यें केलीं, आणि आपल्या सेवकाला तीं समजावि-
लीं आहेत. २२ यास्तव हे परमेश्वर देवा, तूं
थोर आहेस, तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि
तुझ्याशिवाय कोणी देव नाहीं; जें अवघें आह्मी
आपल्या कानांनी ऐकिलें तें त्याप्रमाणेंच आहे;
२३ आणि तुझे लोक इस्राएल यांसारिखे पृथ्वी-
वर कोण लोक आहेत? त्यांनी तुझे लोक व्हावें
ह्मणून त्यांस देव मोकळें करायास, आणि आपलें
नाम घ्यायास आणि ज्या आपल्या लोकांस त्वां
आपल्यासाठीं मिसराच्या लोकांपासून व त्यांच्या
देवांपासून मोकळें केलें त्यांच्यादेखत तुह्मासाठीं
मोठीं व भयंकर कृत्यें तुझ्या देशांत करायास
गेला. २४ आणि तुझे लोक इस्राएल यांनी सर्व-
काळ आपलेच लोक व्हावें ह्मणून त्वां त्यांस
स्थापित केलें; आणि हे परमेश्वरा तूं त्यांचा
देव झाला आहेस. २५ तर आतां हे परमेश्वर
देवा, जें वचन त्वां आपल्या सेवकाविषयीं व त्या-
च्या कुटुंबाविषयीं दिल्हें आहे तें सर्वकाळ स्था-
पित कर, आणि जसें त्वां ह्मटलें तसें कर. २६
आणि तुझें नाम सर्वकाळ असें थोर मानिलें
जावो कीं सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा देव
आहे, आणि तुझा सेवक दावीद याचें कुटुंब
तुझ्यासमोर स्थापित होवो. २७ कारण कीं हे
सैन्यांच्या परमेश्वरा इस्राएलाच्या देवा, त्वां
आपल्या सेवकाजवळ असें सांगितलें आहे कीं, मी
तुझ्यासाठीं घर बांधीन,' यास्तव आपल्या सेवकानें
तुझ्यापाशीं ही प्रार्थना करावी असें त्याच्या मनांत
आलें. २८तर आतां हे प्रभू परमेश्वरा, तूं तो
देव आहेस, आणि तुझीं वचनें वास्तविक आहेत,
आणि ही चांगली गोष्ट त्वां आपल्या सेवकाजवळ
सांगितली आहे. २९ आणि तुझ्या सेवकाचें
घराणें तुझ्यासमोर सर्वकाळ राहावें ह्मणून आतां
कृपा करून आशीर्वाद दे; कारण कीं हे प्रभू

परमेश्वरा, त्वां हें ह्मटलें आहे आणि तुझा
आशीर्वाद तुझ्या सेवकाच्या घराण्यावर सर्वकाळ
असावा."

## अध्याय ८.

यानंतर असें झालें कीं दावीदाने पलिष्ट्यांस
मारून जिंकिलें, आणि दावीदाने मथगआम्मा
पलिष्ट्यांच्या हातांतून घेतलें. २ मग त्याने मो-
वाब्यांस मारिलें आणि त्यांस भूमीवर पाडून दो-
ऱ्याने मोजिलें,त्याने मारायास दोन दोऱ्यानी मोजि-
लें, आणि वांचवायास एक पूर्ण दोऱ्याने मोजिलें;
असें मोवाब्यानी दावीदाच्या स्वाधीन होऊन कर
दिल्हा. ३ यानंतर दावीद आपली सीमा घ्या-
यास फराथ नदीजवळ गेला; तेव्हां त्याने रहो-
बाचा पुत्र हदादेजर जो जोबाचा राजा त्याला
मारिलें. ४ आणि दावीदाने त्याजपासून एक
हजार रथ व सातशें स्वार व वीस हजार पाय-
दळ घेतलें, आणि दावीदाने सर्व रथांच्या घोड्यां-
च्या पायशिरा तोडिल्या, त्यांतून केवळ शंभर
रथांच्या घोड्यांस त्याने राखिलें. ५ आणि
दामासेकाचे अरामी जोबाचा राजा हदादेजर
याचें सहाय करायास आले, तेव्हां दावीदाने त्या
अराम्यांतील बावीस हजार माणसें जिवें मारिलीं.
६ मग दावीदाने दामासेकांतील अराम्यांत ठाणीं
बसविलीं, आणि अराम्यानी दावीदाच्या स्वाधीन
होऊन त्याला कर दिल्हे; तसें दावीद जेथें जेथें
गेला तेथें तेथें परमेश्वराने त्याचें सहाय केलें.
७ आणि ज्या सोन्याच्या ढाला हदादेजराच्या
चाकरांजवळ होत्या त्या दावीदाने घेऊन यरूशा-
लेमास आणिल्या. ८ आणि हदादेजराचीं नगरें
बेथा व बरोथा यांपासून दावीद राजाने बहुतच
पितळ घेतलें. ९ तेव्हां हमाथाचा राजा थोई
याने ऐकिलें कीं दावीदाने हदादेजराचें सर्व
सैन्य मारिलें आहे. १० तेव्हां थोईने आपला
पुत्र योराम दावीद राजाजवळ कुशळ गोष्ट सां-
गायास आणि आशीर्वाद द्यायास पाठविला, का-
रण कीं त्याने हदादेजरासीं लढाई करून त्याला
जिंकिलें होतें; कां कीं थोई व हदादेजर यांम-
ध्यें लढाया होत होत्या आणि योरामाने आपल्या-
बरोबर रुप्याचीं व सोन्याचीं व पितळ्याचीं पात्रें
आणिलीं. ११ आणि तीं दावीद राजाने परमे-
श्वराजवळ अर्पित केलीं; जे सर्व लोक त्याने
जिंकिले होते, १२ ह्मणजे अरामी व मोवाब व
अम्मोनींचीं संतानें व पलिष्टी व अमालेक यां-
पासून आणि रहोबाचा पुत्र हदादेजर जोबाचा
राजा, त्यांपासून घेतलेली लूट, त्या सर्वांतलें रुपें
व सोनें जसें त्याने अर्पिलें होतें, तसें.
१३ आणि दावीदाने मिठाच्या खोऱ्यांत अठ-
रा हजार अराम्यांस मारिल्यावर माघारें येऊन
मोठें नांव मिळविलें. १४ आणि त्याने अदोमांत
ठाणीं ठेविलीं, अवघ्या अदोमांत त्याने ठाणीं
बसविलीं, आणि सर्व अदोम दावीदाच्या स्वाधीन
झालें; तसें दावीद जेथें जेथें गेला तेथें परमेश्व-
राने त्याचें सहाय केलें. १५ आणि दावीदाने
सर्व इस्राएलावर राज्य केलें, आणि दावीदाने
आपल्या सर्व लोकांमध्यें न्याय व इनसाफ केला.
१६ आणि जरूवेचा पुत्र योवाब सेनापति हो-
ता, आणि अहीलूदाचा पुत्र यहोशाफाट इतिहा-
सक होता. १७ आणि अहितूबाचा पुत्र सा-
दोक व एब्याथाराचा पुत्र अहिमेलेख हे याजक
होते, आणि शराया चिटनीस होता. १८ आणि
यहोयादाचा पुत्र बनाया करेथी व फलेथी यांवर
होता, आणि दावीदाचे पुत्र सर्दार होते.

## अध्याय ९.

त्या काळीं दावीदाने ह्मटलें कीं, "योनाथाना-
मुळें ज्यावर म्या कृपा करावी असा शा-
ऊलाच्या कुटुंबांतील कोणीएक आजपर्यंत राहिला
आहे कीं काय?" २ आणि शाऊलाच्या कुटुं-
बांतील जीबा नामें एक चाकर होता, आणि त्यानी
त्याला दावीदाजवळ बोलाविलें, आणि राजाने
त्याला ह्मटलें, "तूं जीबा आहेस कीं काय?"
तेव्हां त्याने उत्तर केलें कीं, "आपला चाकर तोच
आहे." ३ मग राजाने ह्मटलें कीं, "म्या ज्या-
वर देवसंबंधी कृपा करावी असा शाऊलाच्या
कुटुंबांतील कोणीएक आजपर्यंत राहिला आहे कीं
काय?" तेव्हां जीबाने राजाला ह्मटलें, "योनाथा-
नाचा एक पुत्र अजून आहे; तो पायानी लंगडा
आहे." ४ तेव्हां राजाने त्याला ह्मटलें, "तो
कोठें आहे?" मग जीबाने राजाला ह्मटलें, "पाहा
तो लोदबारांत अम्मीएलाचा पुत्र माखीर याच्या

घरीं आहे." ५ तेव्हां दावीद राजाने पाठवून
त्याला लोदबाराहून अम्मीएलाचा पुत्र माखीर
याच्या घरांतून आणिलें. ६ आणि शाऊलाचा
पुत्र योनाथान याचा पुत्र मफीबोशेथ दावीदाजवळ
आला, तेव्हां पालथा पडून त्याने नमस्कार केला;
मग दावीद बोलला, "हे मफीबोशेथा." आणि
त्याने उत्तर केलें "पाहा, आपला चाकर आहे."
७ तेव्हां दावीदाने त्याला ह्मटलें, "भिऊं नको
कारण कीं तुझा बाप योनाथान यामुळें मी निश्चयें
करून तुजवर कृपा करीन, आणि तुझा आजा शा-
ऊल याचीं सर्व शेतें मी तुला देईन, आणि मा-
झ्या मेजावर तूं नित्य भोजन करसील." ८ तेव्हां
त्याने नमस्कार करून ह्मटलें कीं, "त्वां मजसारि-
ख्या मेलेल्या कुत्र्यावर लक्ष द्यावें तुझा चाकर
काय आहे?" ९ मग राजाने शाऊलाचा चा-
कर जीबा याला बोलावून ह्मटलें, शाऊलाचें व
त्याच्या सर्व कुटुंबाचें जें होतें तें सर्व म्या तुझ्या
धन्याच्या पुत्राला दिल्हें आहे. १० आणि तूं व तुझे
पुत्र व तुझे चाकर त्याजसाठीं शेत करा आणि
पीक त्याला द्या; तसें तुझ्या धन्याच्या पुत्राला
भाकर व खाणें होईल, परंतु तुझ्या धन्याचा पुत्र
मफीबोशेथ माझ्या मेजावर नित्य भोजन करील."
जीबाला तर पंधरा पुत्र व वीस चाकर होते.
११ तेव्हां जीबाने राजाला उत्तर केलें, "ज्या-
विषयीं माझा धनी राजा याने आपल्या चाकरा-
ला आज्ञा केली आहे त्या सर्वांप्रमाणें आपला
चाकर करील." अणखी राजाने ह्मटलें, "मफीबो-
शेथाने राजाच्या एका पुत्रासारिखें माझ्या मेजा-
वर जेवीत जावें." १२ आणि मफीबोशेथाला मी-
का नामें एक लाहान पुत्र होता, आणि जे जीबा-
च्या घरांत राहिले ते अवघे मफीबोशेथाचे चाकर
झाले. १३ परंतु मफीबोशेथ यरूशालेमांत रा-
हिला, कां कीं तो नित्य राजाच्या मेजावर जेवीत
असे, तो तर दोहों पायांनी लंगडा होता.

## अध्याय १०.

या नंतर असें झालें कीं अम्मोनाच्या संतानांचा
राजा मेला, मग त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र
हानून याने राज्य केलें. २ तेव्हां दावीदाने ह्म-
टलें, "नाहाशाचा पुत्र हानून याजवर मी उपकार
करीन, कारण कीं त्याच्या बापाने मजवर उपकार
केला होता." आणि दावीदाने त्याच्या बापाविष-
यीं त्याचें समाधान करावें ह्मणून आपल्या चा-
करांच्या हातून पाठविलें, आणि दावीदाचे चाकर
अम्मोनाच्या संतानांच्या मुलखांत गेले. ३ तेव्हां
अम्मोनाच्या संतानांच्या सर्दारांनी आपला प्रभु
हानून याला असें ह्मटलें कीं, "दावीद तुझ्या बा-
पाचा सन्मान करितो ह्मणून त्याने तुजपासीं समा-
धान करणाऱ्यांस पाठविलें आहे, असें तुला वाटतें
कीं काय? नगर पाहायास व त्याला हेरायास व
त्याचा नाश करायास त्याने आपल्या चाकरांस
तुजपासीं पाठविलें कीं नाहीं? ४ तेव्हां हानूनाने
दावीदाचे चाकर धरून त्यांची अर्धी दाढी का-
ढिली, आणि त्याने त्यांचीं वस्त्रें अर्धीं ह्मणजे
त्यांच्या कुल्यांपर्यंत कापिलीं, आणि मग त्यांस वा-
टेस लाविलें. ५ तेव्हां हें दावीदाला कोणी सां-
गितलें असतां त्याने त्यांस भेटायास दूत पाठ-
विले, कारण कीं ते मनुष्य फार लज्जित होते;
आणि राजाने त्यांस ह्मटलें, "तुमची दाढी फि-
रून वाढे तोंपर्यंत तुह्मी यरिहोमध्यें राहा, मग
माघारें या."

६ तेव्हां अम्मोनाच्या संतानांनी पाहिलें कीं
आपण दावीदाच्या दिसण्यांत घाणेर झालों; ह्मणून
अम्मोनाच्या संतानांनी पाठविलें आणि बेथरहो-
बाच्या अराम्यांतील व चोबाच्या अराम्यांतील वीस
हजार पायदळ व माका राजाचीं एक हजार
माणसें व ईशतोबाचीं बारा हजार माणसें यांस
रोजमरा देऊन ठेविलें. ७ आणि जेव्हां दावीदाने
हें ऐकिलें तेव्हां त्याने योवाबाला व लढाऊ लो-
कांचें सर्व सैन्य पाठविलें. ८ तेव्हां अम्मोनाच्या
संतानांनी निघून वेसीच्या दरवाज्यापुढें लढाई
सिद्ध केली, आणि जोबाचे व रहोबाचे व ईश-
तोबाचे व माकाचे अरामी एकीकडे शेतांत होते.
९ आणि योवाबाने पाहिलें कीं आपल्याविरुद्ध
लढाईचें तोंड पुढें व पाठीमागें आहे, तेव्हां त्या-
ने सर्व इस्राएलांच्या शूरांतून मनुष्यांस निवडून
त्यांस अराम्यांसीं लढायास सिद्ध केलें. १०
आणि त्याने वरकड मनुष्यांस आपला भाऊ अ-
बीशाय याच्या हाताखालीं ठेविलें, आणि त्याने
त्यांस अम्मोनाच्या संतानांसीं लढायास सिद्ध केलें.

११ तेव्हां तो ह्मणाला, "जर अरामी माझ्यापेक्षां
बळवान असले तर तूं माझें सहाय कर, आणि जर
अम्मोनाचीं संतानें तुझ्यापेक्षां बळवान असलीं तर
मी तुझें सहाय करायास येईन. १२ धैर्य धर,
आणि आह्मी आपल्या लोकांसाठीं व आपल्या दे-
वाच्या नगरांसाठीं शौर्यानें लढूं, आणि परमे-
श्वर त्याच्या दृष्टींत जें बरें दिसेल तें करो."
१३ मग योवाब व त्याच्याबरोबर जे लोक ते
अराम्यांसीं लढाई करायास जवळ गेले आणि ते
त्याच्यापुढून पळाले. १४ आणि अम्मोनाच्या
संतानांनीं पाहिलें कीं अरामी पळाले, तेव्हां ते
अबीशायपुढून पळाले आणि नगरांत शिरले;
मग योवाब अम्मोनाचीं संतानें सोडून माघारें
यरूशालेमास आला. १५ तेव्हां अराम्यांनीं
पाहिलें कीं आपण इस्राएलापुढें मारिले गेलों, आ-
णि ते एकत्र मिळाले. १६ आणि हदादेजेरानें
पाठवून जे अरामी नदीच्या पलिकडे होते त्यांस
आणिलें, आणि ते हेलामास आले आणि शो-
बाक हदादेजेराच्या सैन्यांचा सेनापति त्यांच्या-
पुढें चालला. १७ आणि हें दावीदाला कळलें
असतां त्यानें सर्व इस्राएलाचीं माणसें जमा केलीं
आणि तो यार्देनेच्या पलिकडे जाऊन हेलामास
गेला; मग अरामी सिद्ध होऊन दावीदासीं लढा-
यास आले आणि त्यासीं लढले. १८ आणि
अरामी इस्राएलांच्यापुढून पळाले, आणि दावीदानें
अराम्यांच्या सातशें रथांतील माणसांस व चा-
ळीस हजार स्वारांस मारिलें, आणि शोबाक से-
नापति यालाहि मारिलें आणि तो तेथें मेला. १९
आणि जे अवघे राजे हदादेजेराचे चाकर होते
त्यांनीं जेव्हां पाहिलें कीं आपण इस्राएलापुढें मा-
रिले गेलों तेव्हां ते इस्राएलासीं तह करून त्यां-
च्या स्वाधीन झाले; यानंतर अरामी अम्मोनाच्या
संतानांचें सहाय पुन्हा करायास भ्याले.

## अध्याय ११.

आणि असें झालें कीं वर्षाच्या समाप्तीस ज्या
वेळेस राजे लढाईस जात असतात तेव्हां
दावीदानें योवाब व त्याच्याबरोबर आपले चा-
कर व सर्व इस्राएल यांस पाठविलें, आणि त्यांनीं
अम्मोनाच्या संतानांचा नाश केला आणि रा-
ब्बा नगरास वेढा घातला, परंतु दावीद यरू-
शालेमांत राहिला. २ आणि असें झालें कीं
सायंकाळीं दावीद आपल्या पलंगावरून उठला,
आणि राजाच्या घराच्या गच्चीवर जाऊन फिरत
होता, तेव्हां त्यानें गच्चीवरून एका बायकोला अंग
धुतां पाहिलें; ती बायको तर दिसण्यांत फार सुं-
दर होती. ३ तेव्हां दावीदानें पाठवून त्या बाय-
कोविषयीं पुसलें, आणि कोणीएकानें ह्मटलें कीं,
"एलिमाची कन्या बथशेबा उरीया हित्ती याची
बायको ही आहे कीं नाहीं?" ४ त्यावर दावी-
दानें दूत पाठवून तिला आणिलें, आणि ती त्याज-
पासीं आली आणि तो तिजसीं निजला; कारण कीं
ती आपल्या विटाळापासून शुद्ध झाली होती, मग
ती आपल्या घरास माघारें गेली. ५ आणि ती
बायको गरोदर झाली, आणि तिनें दावीदाला नि-
रोप पाठवून सांगितलें कीं, मी गरोदर आहें. ६
मग दावीदानें योवाबाला असा निरोप पाठविला
कीं, "उरीया हित्ती याला मजपासीं पाठवावें."
आणि योवाबानें उरीयाला दावीदापासीं पाठविलें.
७ मग उरीया त्यापासीं आला आणि दावीदानें
योवाबाचें वर्त्तमान व लोकांचें वर्त्तमान व लढाईचें
वर्त्तमान त्याला पुसलें. ८ नंतर दावीद उरी-
याला बोलला, "तूं आपल्या घरास जाऊन आपले
पाय धू." मग उरीया राजाच्या घरांतून निघून
गेला, आणि राजानें त्याच्या पाठीमागून कांहीं
भेजण पाठविलें. ९ परंतु उरीया राजाच्या घरा-
च्या दरवाज्याजवळ आपल्या धन्याच्या सर्व चा-
करांबरोबर निजला, आणि आपल्या घरास गेला
नाहीं. १० तेव्हां दावीदाला कोणी सांगितलें
कीं उरीया आपल्या घरास गेला नाहीं; मग दावी-
दानें उरीयाला ह्मटलें कीं, "तूं वाट चालून आ-
लास कीं नाहीं? तर तूं आपल्या घरास कां गेला
नाहींस?" ११ तेव्हां उरीयानें दावीदाला ह्म-
टलें, "कोश व इस्राएल व यहूदा डेऱ्यांमध्यें रा-
हत आहेत, आणि माझा धनी योवाब व माझ्या
धन्याचे चाकर माळावर वस्ती करीत आहेत, तर
खायास व प्यायास व माझ्या बायकोबवळ नि-
जायास म्या घरास जावें कीं काय? तुझ्या जी-
विताची व तुझ्या प्राणाची मी शपथ वाहतों
कीं मी तसी गोष्ट करणार नाहीं." १२ मग

दावीदाने उरीयाला ह्मटलें, "आजहि एथें राहा,
आणि उद्यां तुला आज्ञा देईन." यास्तव उरीया
त्या दिवसीं व दुसऱ्या दिवसीं यरूशालेमांत रां-
हिला. १२ आणि दावीदाने उरीयाला बोला-
विलें आणि त्याच्यासमोर तो जेवला व प्याला
आणि त्याने त्याला मस्त केलें; मग सायंकाळीं
तो आपल्या खाटेवर आपल्या धन्याच्या चाकरां-
च्या संगतीं निजायास गेला, परंतु तो आपल्या
घरास गेला नाहीं. १४ तेव्हां असें झालें कीं
सकाळीं दावीदाने योवाबाला पत्र लिहिलें आणि
उरीयाच्या हातून तें पाठविलें. १५ आणि त्याने
पत्रांत असें लिहिलें कीं, "उरीया हाणला जाऊन
मरावा ह्मणून त्याला तुंबळ लढाईच्या तोंडीं ठेवा,
आणि त्याला सोडून मागें हटा." १६ यास्तव
असें झालें कीं योवाब नगर वेढितांना जेथें शूर
माणसें होतीं ह्मणून त्याला कळलें त्या ठिकाणीं
उरीयाला नेमिलें. १७ तेव्हां नगरांतील माणसें
बाहेर निघून योवाबासीं लढलीं, आणि दावीदा-
च्या चाकरांतील कित्येक लोक पडले, आणि उरी-
या हित्ती तोहि मेला.

१८ मग योवाबाने दूत पाठवून दावीदाला
लढाईच्या सर्व गोष्टी कळविल्या. १९ आणि
त्याने दूताला असी आज्ञा केली कीं, "लढाईच्या
सर्व गोष्टी राजाला सांगितल्यावर, २० जर
असें होईल कीं राजा रागास येऊन तुला ह्म-
णेल कीं, लढायास तुह्मी नगराजवळ कां गेलां?
ते भिंतीवरून बाण मारतील हें तुह्मास ठाऊक
नव्हतें कीं काय? २१ यरूबेशेथाचा पुत्र अबी-
मेलेख याला कोणी मारिलें? एका बायकोने भिं-
तीवरून जात्याची पेढ टाकिली आणि येणेंकरून
तो थेबेजांत मेला कीं नाहीं? तुह्मी भिंतीज-
वळ कां गेलां?' तर तेव्हां तूं असें ह्मण कीं, तुझा
चाकर उरीया हित्ती तोहि मेला आहे."

२२ मग तो दूत निघून आला, आणि जें यो-
वाबाने त्याला सांगून ठेविलें होतें तें सर्व त्याने
दावीदाला सांगितलें. २३ ह्मणजे त्या दूताने
दावीदाला असें सांगितलें कीं, "तीं आह्मा-
पेक्षां बळवान् होतीं, आणि आह्मापासीं शिवा-
रांत आलीं, आणि आह्मी त्यांसीं नगराच्या दर-
वाज्यापर्यंत लढत होतों. २४ तेव्हां धनुर्धरानी
भिंतीवरून आपल्या चाकरांवर बाण मारिले, आ-
णि राजाच्या चाकरांतून कोणी मेले; आणखी
आपला चाकर उरीया हित्ती तोहि मेला." २५
तेव्हां दावीदाने दूताला असें ह्मटलें कीं, "यो-
वाबाला असें सांग कीं, ही गोष्ट तुझ्या मनांत
वाईट न वाटावी, कारण कीं तरवारीने लोक एक-
सारिखेच नाश पावतात, नगराविरुद्ध तूं आपली
लढाई कठीण कर, आणि त्याचा विनाश कर;
तसें तूं त्याला धैर्य दे."

२६ आणि उरीयाच्या बायकोने ऐकिलें कीं
आपला नवरा उरीया मेला आहे, तेव्हां तिने
आपल्या धन्याकरितां शोक केला. २७ आणि
तो शोक समाप्त झाला असतां दावीदाने दूत
पाठवून तिला आपल्या घरीं आणिलें आणि ती
त्याची बायको होऊन त्यापासून पुत्र प्रसवली;
परंतु दावीदाने जें कृत्य केलें होतें तें परमे-
श्वराला वाईट वाटलें.

## अध्याय १२.

तेव्हां परमेश्वराने नाथानाला दावीदाजवळ
पाठविलें, आणि त्याने त्याजपासीं येऊन त्याला
ह्मटलें कीं, "एका नगरांत दोन माणसें होतीं, एक
द्रव्यवान व एक दरिद्री. २ आणि त्या द्रव्यवा-
नाजवळ मेंढरें व गुरें फारच होतीं. ३ परंतु त्या
दरिद्र्याजवळ एक लाहान कोंकरी मात्र होती, दु-
सरें कांहीं नव्हतें, ती त्याने विकत घेऊन पाळली
होती, आणि ती त्याच्यासंगतीं व त्याच्या लेंकरांसं-
गतीं वाढली; ती त्याच्या पात्रांतून खाई व त्याच्या
प्याल्यांतून पिई व त्याच्या उरासीं निजे, असी
ती त्याला त्याच्या कन्येसारिखी होती. ४
आणि कोणीएक प्रवासी त्या द्रव्यवान माणसा-
जवळ आला, आणि जो प्रवासी त्याजवळ आला
होता त्यासाठीं सिद्ध करायास त्याने ममतेमुळें
आपल्या मेंढरांतून व आपल्या गुरांतून कांहीं न घे-
ऊन त्या दरिद्री माणसाची कोंकरी घेतली, आणि
ती त्या प्रवास्यासाठीं सिद्ध केली." ५ तेव्हां दा-
वीदाने त्या माणसावर फार रागें भरून नाथा-
नाला ह्मटलें, "सजीव परमेश्वर याची शपथ मी
वाहतों कीं ज्या माणसाने हें केलें तो मरणदंडास
योग्य आहे. ६ आणि तो त्या कोंकरीच्या बदल

चौपट देईल, कारण कीं त्याने असी गोष्ट केली
आणि दया केली नाहीं." ७ मग नाथानने दा-
वीदाला असें ह्मटलें की, "तूंच तो मनुष्य आहेस;
इस्राएलाचा देव परमेश्वर असें ह्मणतो, इस्रा-
एलाचा राजा होण्यासाठीं मी तुला अभिषेक केला,
आणि म्या तुला शाऊलाच्या हातांतून सोडविलें.
८ आणि म्या तुझ्या धन्याचें कुटुंब तुला दिल्हें,
आणि तुझ्या धन्याच्या बायका तुझ्या उरासीं दि-
ल्ह्या, आणि इस्राएलाचा व यहूदाचा घराणा
तुला दिल्हा; आणि जर हीं पुरीं नसतीं तर मी
तुला असीं व तसींहि दिल्हीं असतीं. ९ तर
परमेश्वराची आज्ञा त्वां कां असी तुच्छ केली
कीं त्वां त्याच्या दृष्टींत ही दुष्टाई करावी? उरी-
या हित्ती याला त्वां तरवारीने जिवें मारिलें आ-
णि त्याला अम्मोनी लोकांच्या तरवारीने जिवें
मारिल्यावर त्याची बायको आपल्याला बायको
करून घेतली आहे. १० तर आतां तरवार
तुझ्या घराण्याला कधींहि सोडणार नाहीं, कारण
कीं त्वां मला तुच्छ मानिलें, आणि उरीया हित्ती
याची बायको आपली बायको होण्यासाठीं घेतली
आहे. ११ परमेश्वर असें ह्मणतो कीं, पाहा
मी तुझ्या घराण्यांतून तुझ्यावर अरिष्ट उत्पन्न क-
रीन, आणि तुझ्यादेखतां तुझ्या बायकांस घेऊन
तुझ्या शेजाऱ्याला देईन, आणि तो या सूर्यादेखतां
तुझ्या बायकांसीं निजेल. १२ कारण कीं तें
त्वां गुप्त केलें, परंतु मी ही गोष्ट सर्व इस्राएला-
देखतां आणि सूर्यादेखतां करीन." १३ तेव्हां
दावीदाने नाथानाला ह्मटलें, "म्या परमेश्वरा-
विरुद्ध पाप केलें आहे." मग नाथानाने दावी-
दाला ह्मटलें, परमेश्वराने तर तुझें पाप दूर
केलें आहे, तूं मरणार नाहींस. १४ तथापि त्वां
या कृत्याने परमेश्वराच्या शत्रूंस त्याची निंदा
करण्याचा प्रसंग आणिला, यास्तव जो पुत्र तुला
होईल तो खचीत मरेल."

१५ मग नाथान आपल्या घरास गेला, आणि
जो पुत्र उरीयाच्या बायकोपासून दावीदाला झा-
ला त्याला परमेश्वराने मारिलें आणि तो दुख-
णाईत झाला. १६ तेव्हां दावीदाने त्या मुला-
साठीं देवापासीं विनंती केली, आणि दावीदाने
उपास केला आणि तो आंत जाऊन रात्रभर भूमी-
वर निजला. १७ आणि त्याच्या कुटुंबांतील जे
वडील ते उठून त्याजपासीं आले आणि त्याला
भूमीवरून उठवूं लागले, परंतु तो उठेना आणि
त्याच्याबरोबर भाकर खाईना. १८ मग असें
झालें कीं सातव्या दिवसीं तो मूल मेला; मूल मेला
आहे हें दावीदाचे चाकर त्याला सांगायास भ्याले,
कारण कीं ते बोलले, "पाहा, मूल जिवंत असतां
आह्मी त्याला बोललों आणि त्याने आमचे शब्द
मानिले नाहींत; जर आह्मी त्याला बोलतों कीं
मूल मेला आहे, तर तो केवढा शोक करील!"
१९ तेव्हां दावीदाने पाहिलें कीं आपले चाकर
कुजबुजतात ह्मणून दावीदाला समजलें कीं मूल
मेला, यास्तव दावीदाने आपल्या चाकरांस पुसलें
कीं, "तो मूल मेला कीं काय?" मग त्यानी उ-
त्तर केलें, "तो मेला आहे." २० तेव्हां दावीद
भूमीवरून उठला, आणि अभ्यंग व अंघोळ करून
व आपलीं वस्त्रें बदलून परमेश्वराच्या मंदिरांत
गेला, आणि भजन केलें; मग तो आपल्या घरास
आला आणि त्याने मागितलें तेव्हां त्याच्यापुढें
त्यानीं अन्न ठेविलें व त्याने खाल्लें. २१ तेव्हां
त्याच्या चाकरानी त्याला पुसलें कीं, "ही जी गोष्ट
त्वां केली ती काय आहे? मूल जिवंत होता ते-
व्हां त्वां उपास व शोक केला, परंतु तो मूल मे-
ल्यावर त्वां उठून अन्न खाल्लें." २२ आणि त्याने
उत्तर केलें, "तो मूल जिवंत होता तेव्हां म्या
उपास व शोक केला, कां कीं म्या ह्मटलें, परमे-
श्वर मजवर कृपा करील आणि तो मूल वांचेल
किंवा नाहीं, हें कोण जाणे? २३ परंतु आतां
तो मेला, तर म्या उपास कां करावा? माझ्याने
त्याला माघारें आणवेल कीं काय? मी त्यापासीं
जाईन परंतु तो मजपासीं परत येणार नाहीं."

२४ यानंतर दावीदाने आपली बायको बेथ-
शेबा इचें समाधान केलें, आणि तिजपासीं जा-
ऊन निजला; मग ती पुत्र प्रसवली आणि त्या-
चें शलोमो असें नांव ठेविलें, आणि परमे-
श्वराने त्याजवर प्रीति केली. २५ आणि त्याने
नाथान भविष्यवादी याच्या हातून निरोप पाठ-
विला, आणि त्याने त्याला परमेश्वरामुळें यदी-
दया असें नांव ठेविलें.

२६ त्या काळीं योवाब अम्मोनाच्या संतानचीं

नगर राब्बा यासीं लढला आणि त्याने राज-
धानी घेतली. २७ आणि योवाबाने दावीदाजवळ
दूत पाठवून ह्मटलें कीं, "मी राब्बासीं लढलों
आणि पाण्यांचें नगर घेतलें आहे. २८ तर आ-
तां वरकड लोक जमा कर, आणि नगरास वेढा
घालून तें घे, नाहीं तर तें नगर मी घेईन आणि
त्याला माझें नांव दिल्हें जाईल." २९ तेव्हां दा-
वीद सर्व लोक जमा करून राब्बास गेला आणि
त्यासीं लढून त्याने तें घेतलें. ३० आणि त्याने
त्यांच्या राजाचा मुगूट त्याच्या डोक्यावरून घे-
तला, आणि त्याचें वजन त्याच्या मोल्यवान रत्नां-
सुद्धां एक सोन्याचें तालांत होतें आणि तो दावी-
दाच्या मस्तकावर ठेविला; आणि त्याने त्या नग-
रांतून पुष्कळ लूट बाहेर आणिली. ३१ आणि
जे लोक त्यांत होते त्यांस त्याने बाहेर आणिलें,
आणि त्यांस करवतांखालीं व लोखंडाच्या मळण-
यंत्रांखालीं व लोखंडाच्या कुऱ्हाडींखालीं घातलें
आणि त्यांस विटांच्या भट्टींतून चालविलें; या-
प्रमाणें त्याने अम्मोनाच्या संतानांच्या अवघ्या नग-
रांस केलें; नंतर दावीद व सर्व लोक माघारे यरू-
शालेमास आले.

## अध्याय १३.

आणि यानंतर असें झालें कीं दावीदाचा पुत्र
आबशालोम याला थामार नामें एक सुंदर
बहीण होती, आणि दावीदाचा पुत्र आम्नोन
याने तिजवर प्रीति केली. २ आणि आ-
म्नोन आपली बहीण थामार इजविषयीं असा
व्याकुळ झाला कीं तो आजारी पडला; कारण
कीं ती कुवारी होती, आणि तिजसीं कांहीं
करणें आम्नोनाला अवघड वाटलें. ३ आणि
दावीदाचा भाऊ शिमा याचा पुत्र योनादाब
नामें आम्नोनाचा सोबती होता, आणि योनादाब
फार चतुर मनुष्य होता. ४ आणि त्याने त्याला
ह्मटलें, "तूं राजाचा पुत्र असतां दिवसोंदिवस
असा हैराण कां होतोस? हें तूं मला सांगत
नाहींस कीं काय?" मग आम्नोनाने त्याला
ह्मटलें, माझा भाऊ आबशालोम याची बहीण
थामार इजवर मी प्रीती करितों." ५ तेव्हां
योनादाबाने त्याला ह्मटलें, "आपल्या पलंगावर
निजून रोग्यासारिखा हो; आणि तुझा बाप तुझ्या
समाचारास येईल तेव्हां त्याला सांग, 'ह ।·
करून माझी बहीण थामार इला येऊं द ग
ती माझ्यादेखतां भाकर सिद्ध करून मल ा-
स देईल; तसें मी पाहून तिच्या हातांतू न
खाईन." ६ मग आम्नोन निजून रोग्या सा
झाला, आणि राजा त्याच्या समाचारास ला;
तेव्हां आम्नोनाने राजाला ह्मटलें कीं, " कृपा
करून माझी बहीण थामार इला येऊं द मग
ती माझ्यादेखतां दोन भाकरी सिद्ध करील आणि
मी तिच्या हातांतून खाईन." ७ तेव्हां द ादाने
थामारीजवळ घरीं असा निरोप पाठवि कीं,
"तुझा भाऊ आम्नोन याच्या घरास आ जा,
आणि त्यासाठीं अन्न कर." ८ मग थाम र आ-
पला भाऊ आम्नोन याच्या घरास गेली, ते हां तो
तिजला होता आणि तिने पीठ घेऊन मळि ले, आ-
णि त्याच्यादेखतां भाकरी सिद्ध करून भ जिल्या.
९ मग तिने ताट घेऊन त्यांत त्या भाकरी त्या-
च्यादेखतां ठेविल्या, परंतु तो खाईना; तेव्हां
आम्नोनाने ह्मटलें, "सर्व माणसांस मजपासून बा-
हेर घालवा." मग सर्व माणसें त्याजवळून बाहेर
गेलीं. १० मग आम्नोनाने थामारीला ह्मटलें,
"तें अन्न खोलींत आण आणि मी तुझ्या हातां-
तून खाईन." मग थामारीने ज्या भाकरी भाजल्या
होत्या त्या घेतल्या, आणि तिचा भाऊ आम्नोन
याजवळ खोलींत आणिल्या. ११ आणि तिने
त्या त्याजपासीं खायास आणिल्या तेव्हां त्याने ति-
ला धरून तिला ह्मटलें, "ये माझ्या बहिणी, मा-
झ्याजवळ नीज." १२ परंतु तिने त्याला ह्मट-
लें, "नको, माझ्या भावा, मजवर बलात्कार करूं
नको, कां कीं इस्राएलांत असें होऊं नये; असें
मूर्खपण करूं नको. १३ आणि मी आपली फ-
जिती कसी दूर करावी? आणि तूं इस्राएलांतील
एका मूर्खासारिखा होसील; तर त्वां आतां रा-
जासीं बोलावें असी मी विनंती करितें, कां कीं
तो मला तुजपासून धरणार नाहीं." १४ तथा-
पि तिचे शब्द तो ऐकेना, परंतु तो तिजपेक्षां बल-
वान् असतां तिजवर बलात्कार करून तिजपासं
निजला. १५ यानंतर आम्नोन तिचा अति द्वे
करूं लागला असा कीं जी प्रीति त्याने तिजव
केली होती तिजपेक्षां त्याने तिचा अधिक द्वेष केल

आणि आम्नोनाने तिला ह्मटलें, "उठून जा." १६
मग तिने त्याला ह्मटलें, "जायाचें कारण नाहीं,
जी पहिली दुष्टाई त्वां मजसीं केली तिजपेक्षां
मला घालविणें ही मोठी आहे." परंतु तो तिचें
ऐकेना. १७ तेव्हां त्याने आपल्या चाकर
माणसाला बोलावून ह्मटलें, "इला मजपासून
आतां बाहेर घालीव, आणि तिच्यामागें दार बंद
कर." १८ आणि तिच्या अंगावर विचित्र साडी
होती, कां कीं राजाच्या ज्या कन्या कुमारी होत्या
त्या असीं वस्त्रें नेसत असत; तेव्हां त्याच्या चाक-
राने तिला बाहेर घालविलें आणि तिच्यामागें दार
बंद केलें. १९ मग थामारीने आपल्या डोक्यांत
राख घातली आणि जी विचित्र साडी नेसली
होती ती फाडिली, आणि आपला हात आपल्या
डोक्यावर ठेवून ती रडत चालली. २० तेव्हां
तिचा भाऊ आबशालोम याने तिला ह्मटलें,
"तुझा भाऊ आम्नोन तुजसंगतीं होता कीं काय?
तर आतां माझ्या बहिणी, मौन धर; तो तुझा
भाऊ आहे, या गोष्टीविषयीं काळजी करूं नको."
यानंतर थामार आपला भाऊ आबशालोम याच्या
घरीं अविवाहित राहिली. २१ आणि दावीद
राजाने ह्या सर्व गोष्टी ऐकिल्या तेव्हां त्याला फार
राग आला. २२ आणि आबशालोम आम्नोनासीं
वाईट किंवा चांगलें काहींच बोलला नाहीं, कां
कीं आबशालोमाने आम्नोनाचा द्वेष केला; कारण
कीं त्याची बहीण थामार इजवर त्याने बलात्कार
केला होता.

२३ आणि दोन वर्षांनंतर असें झालें कीं इफ्रा-
ईमांतील बालहाज्रोरांत आबशालोमाजवळ मेंढरें
कातरणारे होते, आणि आबशालोमाने राजाच्या
अवघ्या पुत्रांस बोलाविलें. २४ आणि आबशा-
लोमाने राजापासीं येऊन ह्मटलें, "पाहा, आतां
आपल्या चाकराजवळ मेंढरें कातरणारे आहेत, तर
राजाने व त्याच्या चाकरानी आपल्या चाकरासंगतीं
कृपाकरून यावें." २५ तेव्हां राजाने आबशा-
लोमाला ह्मटलें, "असें नको, माझ्या पुत्रा, आ-
ह्मी अवघे येणार नाहीं, आलों तर तुला भार-
रूप होऊं." मग त्याने त्याला आग्रह केला
परंतु तो येईना, तथापि त्याने त्याला आशीर्वाद
दिला. २६ तेव्हां आबशालोमाने ह्मटलें,
"तर कृपाकरून माझा भाऊ आम्नोन याला
आमच्यासंगतीं येऊं दे." मग राजाने त्याला
ह्मटलें, "त्याने तुझ्यासंगतीं कां यावें?" २७
मग आबशालोमाने त्याला आग्रह केला, ह्मणून
त्याने त्याच्याबरोबर आम्नोन व राजाचे सर्व पुत्र
पाठविले.

२८ आणि आबशालोमाने आपल्या चाकरांस
सांगितलें होतें कीं, "आम्नोनाचें मन द्राक्षारसाने
आनंदित झालें असतां तुह्मी पाहा, आणि मी तु-
ह्मास सांगेन, आम्नोनाला मारा, तेव्हां तुह्मी
त्याला मारा, भिऊं नका, म्याच तुह्मास आज्ञा
केली कीं नाहीं? तुह्मी धीर धरून शूर व्हा."
२९ आणि जसी आबशालोमाने आज्ञा केली हो-
ती तसें त्याच्या चाकरानी आम्नोनास केलें; ते-
व्हां राजाचे सर्व पुत्र उठले, आणि ते एक एक
आपापल्या खेचरावर बसून पळाले. ३० आणि
असें झालें कीं ते वाटेंत असतां दावीदाला असें
वर्त्तमान आलें कीं, "आबशालोमाने राजाच्या सर्व
पुत्रांस जिवें मारिलें आहे, आणि त्यांतून एकहि
राहिला नाहीं." ३१ तेव्हां राजा उठला आणि
आपलीं वस्त्रें फाडून भूमीवर पडून राहिला, आणि
त्याचे सर्व चाकर वस्त्रें फाडून जवळ उभे राहिले.
३२ मग दावीदाचा भाऊ शिमा याचा पुत्र योना-
दाब उत्तर देऊन ह्मणाला, "त्यानी सर्व तरण्यांस
ह्मणजे राजाच्या पुत्रांस जिवें मारिलें असें माझ्या
प्रभूने कल्पूं नये, कारण कीं आम्नोन मात्र मेला
आहे; ज्या दिवसीं त्याने आबशालोमाची बहीण
थामार इजवर बलात्कार केला तेव्हांपासून त्या-
च्या मनांत असा निश्चय होता. ३३ तर आतां
राजाचे सर्व पुत्र मेले आहेत, असी गोष्ट माझा
प्रभु राजा याने मनांत आणूं नये, कां कीं केवळ
आम्नोन मेला आहे.

३४ त्या काळीं आबशालोम पळाला, आणि
जो माणूस पाहरा करीत होता त्याने आपली
दृष्टि लावून पाहिलें, तर पाहा पुष्कळ लोक
त्याच्या मागील डोंगराच्या बाजूस वाटेने येत
आहेत. ३५ तेव्हां योनादाबाने राजाला ह्मटलें,
"पाहा, राजाचे पुत्र येत आहेत, असें तुझा चाकर
बोलला तसें आहे." ३६ आणि असें झालें कीं
त्याचें बोलणें समाप्त झालें तेव्हांच पाहा राजाचे

पुत्र आले, आणि ते आपला गळा काढून मो-
ठ्याने रडले, आणि राजाने व त्याच्या सर्व चाक-
रांनी फारच शोक केला. ३७ परंतु आबशा-
लोम पळाला, आणि आम्मीहूदाचा पुत्र थालमा
गशूराचा राजा यापाशीं गेला, आणि दावीदाने
आपल्या पुत्रासाठीं प्रति दिवशीं शोक केला.
३८ आणि आबशालोम गशूरास पळून गेला
आणि तेथें तीन वर्षे राहिला. ३९ आणि दावीद
राजाने आबशालोमापाशीं जायास फार इच्छिलें,
कां कीं आम्नोन मेला असतां त्याविषयीं तो शांत
झाला होता.

## अध्याय १४.

आणि जरूवेचा पुत्र योवाब याला समजाविलें
कीं राजाचा लोभ आबशालोमावर आहे.
२ आणि योवाबाने तकोवास पाठवून तेथून एक
चतुर बायको आणिली, आणि तिला ह्मटलें, "शो-
काचें मीस घेऊन शोकाचीं वस्त्रें धारण कर, आणि
अभ्यंग न करून जी फार दिवस मेल्यासाठीं शोक
करीत आहे, अशा बायकोसारिखी हो. ३ मग
राजापाशीं जाऊन या कार्याप्रमाणें बोल." ४ तसें
योवाबाने जें बोलायाचें तें तिला सुचवून ठेविलें;
आणि जेव्हां ती तकोवाकरीण स्त्री राजाजवळ
बोलायास आली तेव्हां ती भूमीवर पडून नम-
स्कार करून ह्मणाली, "हे राजा, सहाय कर."
५ तेव्हां राजाने तिला ह्मटलें, "तुला काय झा-
लें? आणि तिने उत्तर केलें, "मी तर विधवा
बायको आहें आणि माझा नवरा मेला आहे.
६ आणि आपल्या दासीला दोन पुत्र होते आणि
ते दोघे शेतांत भांडिले, आणि त्यांस कोणी सो-
डिवणारा नसतां, एकाने दुसऱ्याला हाणून जिवें
मारिलें. ७ आणि पाहा, सर्व घराणा आपल्या
दासीवर उठला आहे, आणि ते ह्मणतात, 'ज्याने
आपल्या भावाला जिवें मारिलें त्याला आमच्या
स्वाधीन कर, आणि ज्याने भावाला मारिलें त्या
भावाच्या जिवाकरितां आह्मी त्याला मारून वा-
रीसदारालाहि नाहींसा करूं.' तसें जो माझा
अंगार राहिलेला त्याला ते विझवितील, आणि ते
माझ्या नवऱ्याचें नांव किंवा स्मरण पृथ्वीवर राहूं
देणार नाहींत." ८ तेव्हां राजाने त्या बायकोला
ह्मटलें, "तूं आपल्या घरास जा, ह्मणजे तुजवि-
षयीं मी आज्ञा देईन." ९ मग त्या तकोवाकरीण
बायकोने राजाला ह्मटलें कीं, "हे माझ्या प्रभू रा-
जा, मजवर व माझ्या बापाच्या कुटुंबावर हा न्याय
असो, आणि राजा व त्याचें सिंहासन निर्दोषी
असो." १० मग राजाने ह्मटलें, "जो कोणी तुला
कांहीं बोलेल त्याला मजपाशीं आण, ह्मणजे तो
तुला फिरून हात लावणार नाहीं." ११ तेव्हां
तिने ह्मटलें कीं, "आतां राजाने आपला देव पर-
मेश्वर याचें स्मरण करून रक्तपाताचा सूड घे-
णाऱ्यांस अधिक नाश करूं न द्यावा, नाहीं तर ते
माझ्या पुत्राला मारितील." मग त्याने ह्मटलें कीं,
सजीव परमेश्वर याची शपथ मी वाहतों कीं
तुझ्या पुत्राचा एक केंसहि भूमीवर पडणार नाहीं."
१२ तेव्हां त्या बायकोने ह्मटलें, "आतां आपल्या
दासीला माझा प्रभू राजा यापाशीं एक शब्द
बोलूं दे." आणि त्याने ह्मटलें, "बोल." १३
मग त्या बायकोने ह्मटलें, "तर देवाच्या लोकांवि-
रुद्ध असी गोष्ट त्वां कां कल्पिली? कां कीं राजाने
एका अपराध्यासारिखें ही गोष्ट ह्मटली, कारण कीं
राजा आपला घालविलेला त्याला माघारें आणीत
नाहीं. १४ कारण कीं आह्मी अवश्य मरूं, आ-
णि जसें भूमीवर पडलेलें पाणी जमा होत नाहीं
त्यासारिखे आहों; परंतु जो घालविलेला त्याचा
जीव न घेतां त्याने आपल्यापासून दूर न राहावें
असा विचार देव करितो. १५ आणि आतां
राजा जो माझा प्रभु त्याला ही गोष्ट बोला-
यास मी आलें आहें, कारण कीं लोकांनी म-
ला भयाभीत केलें आणि आपल्या दासीने ह्मटलें
कीं, आतां मी राजाला बोलेन, कदाचित राजा
आपल्या दासीचें कार्य करील. १६ कारण कीं
राजा ऐकेल आणि जो माणूस मला माझ्या पुत्रा-
सुद्धां देवाच्या वतनांतून नाहींसें करायास पाहत
आहे, त्याच्या हातांतून आपल्या दासीला राखील.
१७ आणखी आपल्या दासीने ह्मटलें कीं, आतां
माझा प्रभु राजा याचा शब्द समाधानरूप होईल;
कारण कीं माझा प्रभु राजा जें चांगलें व जें वा-
ईट त्यांचा भेद जाणण्याविषयीं देवाच्या दूतासा-
रिखा आहे, आणि तुझा देव परमेश्वर तुजला
अनुकूळ होईल." १८ तेव्हां राजाने उत्तर

करून त्या बायकोला ह्मटलें, "जी गोष्ट मी आतां
तुला विचारितों ती मजपासून लपवूं नको." मग
ती बायको बोलली कीं, "माझा प्रभु राजा याने
आतां बोलावें." १९ तेव्हां राजाने ह्मटलें, "या
सर्व गोष्टींविषयीं योवाबाचा हात तुझ्यासंगतीं
आहे कीं नाहीं?" आणि त्या बायकोने उत्तर
करून ह्मटलें, "हे माझ्या प्रभू राजा, तुझ्या
जिवाची शपथ मी करितें कीं जें माझा प्रभु राजा
याने ह्मटलें आहे त्यासर्वांविषयीं कोणीएकाच्याने
उजव्याकडे किंवा डाव्याकडे जाववत नाहीं; कां
कीं आपला चाकर योवाब याने मला आज्ञा केली,
आणि त्याने आपल्या दासीला हे सर्व शब्द मु-
खवून ठेविले. २० ही गोष्ट म्या साधून बो-
लावी ह्मणून आपला चाकर योवाब याने हें कार्य
केलें, आणि पृथ्वीवर जें सर्व आहे तें जाणायास
माझा प्रभु देवाच्या दूताच्या चतुराईसारिखा
चतुर आहे."

२१ मग राजाने योवाबाला ह्मटलें, "पाहा
आतां म्या हें कार्य केलें आहे, तर आतां जाऊन
तो तरुण आबशालोम याला माघारें आण." २२
तेव्हां योवाब भूमीवर पालथा पडला, आणि नम-
स्कार करून त्याने राजाचा उपकार मानिला; आ-
णि योवाब ह्मणाला, "हे माझ्या प्रभू राजा, आज
आपला चाकर जाणतो कीं मी तुझ्या दृष्टींत कृपा
पावलों आहें, कारण कीं राजाने आपल्या चाकराची
विनंती ऐकिली आहे." २३ मग योवाब उठून
गशूरास गेला आणि त्याने आबशालोम यरू-
शालेमास आणिला. २४ परंतु राजाने ह्मटलें,
"त्याने आपल्या घरास जावें, आणि माझ्या दृष्टीस
पडूं नये." तसें आबशालोम आपल्या घरास
गेला आणि त्याने राजाचें तोंड पाहिलें नाहीं.

२५ त्या काळीं अवघ्या इस्राएलांत कोणीएक
माणूस सौंदर्याविषयीं आबशालोमासारिखा स्तु-
ति करायाजोगा नव्हता; त्याच्या तळपायापासून
त्याच्या माथ्यापर्यंत त्याजवर कांहीं डाग नव्हता.
२६ आणि जेव्हां तो आपलें डोकें कातरी, तेव्हां
तो आपल्या डोक्याचे केंस राजाच्या तोलाप्रमाणें
दोनशें शेकेल तोली; प्रत्येक वर्षाच्या शेवटीं का-
तरी, केंस त्याजवर भारी होते ह्मणून कातरी.
२७ आणि आबशालोमाला तीन पुत्र व एक
कन्या झाली होती, तिचें नांव थामार होतें, ती
स्त्री रूपवती होती.

२८ आणि आबशालोम यरूशालेमांत दोन
वर्षें राहिला, परंतु त्याने राजाचें तोंड पाहिलें
नाहीं. २९ तेव्हां आबशालोमाने योवाबाला
निरोप पाठविला कीं त्याने आपल्याला राजाजवळ
पाठवावें, परंतु तो त्याजवळ येईना; मग त्याने
अणखी दोनदां पाठविलें, तरीं तो येईना. ३०
मग त्याने आपल्या चाकरांस ह्मटलें कीं, "पाहा,
योवाबाचें शेत माझ्या जाग्याजवळ आहे, आणि
त्याला तेथें जव आहे; तुह्मी जाऊन त्याला आग
लावा." आणि आबशालोमाच्या चाकरांनी त्या
शेताला आग लाविली. ३१ तेव्हां योवाब उठ-
ला आणि आबशालोमाच्या घरास येऊन त्याला
बोलला, "तुझ्या चाकरांनी माझ्या शेताला आग
कां लाविली?" ३२ मग आबशालोमाने योवा-
बाला उत्तर केलें, "पाहा, म्या तुला निरोप पाठ-
विला कीं इकडे ये, ह्मणजे मी तुला राजापासीं
पाठवीन, त्याला असें पुसावें कीं मी गशूरापासून
कां आलों आहें? मी तेथें आजपर्यंत राहिलों
असतों तर माझें बरें झालें असतें; तर आतां
राजाचें तोंड मला पाहूं दे, आणि माझ्याठायीं
दुष्टाई असली तर त्याने मला जिवें मारावें."
३३ मग योवाबाने राजाजवळ जाऊन त्याला
सांगितलें; तेव्हां त्याने आबशालोमाला बोलाविलें
आणि तो राजापासीं आला, आणि राजासमोर
भूमीवर पालथा पडून त्याने त्याला नमस्कार के-
ला, मग राजाने आबशालोमाचें चुंबन घेतलें.

## अध्याय १५.

यानंतर असें झालें कीं आबशालोमाने आपल्या-
साठीं रथ व घोडे आणि आपल्यापुढें धांवा-
यास पन्नास माणसें ठेविलीं. २ आणि आब-
शालोम मोठ्या सकाळीं उठून दरवाजाच्या वाटेच्या
बाजूस उभा राही, आणि जेव्हां कोणी माणूस
वादामुळें न्यायासाठीं राजापासीं जाई तेव्हां
आबशालोम त्याला बोलावून असें ह्मणे कीं,
"तूं कोणत्या नगरचा आहेस?" तेव्हां तो उत्तर
देई, "आपला चाकर इस्राएलाच्या वंशांतील
एकाचा आहे." ३ मग आबशालोम त्याला

असें ह्मणे कीं, "पाहा तुझे वाद चांगले व सरळ
आहेत, परंतु तुझे ऐकायास राजाने नेमलेला असा
कोणी नाहीं." ४ अणखी आबशालोम ह्मणे कीं,
"जर मी या देशांत नेमलेला न्यायाधीश असतों
तर ज्या सर्व मनुष्यांचा कांहीं वाद किंवा तंटा
असता त्यानी माझ्यापाशीं यावें, आणि मी त्यांचा
न्याय करीन." ५ आणि असें झालें कीं कोणी-
एक माणूस त्याला नमस्कार करायास जवळ आ-
ला असतां तो आपला हात पुढें करून त्याला
धरी व त्याचें चुंबन घेई. ६ आणि इस्राएला-
चीं जीं अवघीं माणसें राजापाशीं न्यायासाठीं आ-
लीं त्यांसीं आबशालोमाने याप्रमाणें केलें, आणि
तसें आबशालोमाने इस्राएलाच्या माणसांचें मन
फितावून घेतलें.

७ यानंतर असें झालें कीं चाळीस वर्षें झा-
ल्यावर आबशालोमाने राजाला असें ह्मटलें कीं,
"कृपा करून मला जाऊं द्यावें, आणि जो नवस म्या
परमेश्वराला केला तो मी हेब्रोनांत फेडीन.
८ कारण कीं तुझ्या चाकराने अरामांतील गशूरांत
राहत असतां असा नवस केला कीं, जर पर-
मेश्वर मला माघारें यरूशालेमास खचीत आ-
णील तर मी परमेश्वराची सेवा करीन." ९
तेव्हां राजाने त्याला ह्मटलें, "सुखरूप जा." मग
तो उठून हेब्रोनास गेला. १० आणि आब-
शालोमाने इस्राएलाच्या अवध्या वंशांत हेरांस
असें सांगून पाठविलें कीं, "जेव्हां तुह्मी करण्या-
चा शब्द ऐकाल तेव्हां असें ह्मणा कीं, आबशा-
लोम हेब्रोनांत राज्य करितो." ११ आणि दो-
नशें माणसें बोलाविलीं असतां यरूशालेमापासून
आबशालोमाबरोबर गेलीं; तीं आपल्या भोळे-
पणाने गेलीं, आणि तीं या सर्व गोष्टींविषयीं कांहीं
समजलीं नाहींत. १२ आणि आबशालोम यज्ञ
करित असतांना त्याने अहीथोफेल गीलोनी दावी-
दाचा मंत्री याचें नगर गिलो यापासून त्याला बो-
लाविलें, आणि बंड वाढून मोठें झालें कारण कीं
आबशालोमाजवळ लोक फार जमले.

१३ त्या काळीं कोणीएकाने येऊन दावीदाला
सांगितलें कीं, "इस्राएलाच्या माणसांचें मन आब-
शालोमाकडे आहे." १४ तेव्हां दावीदाने आ-
पल्यासंगतीं यरूशालेमांत जे चाकर होते त्यांस
ह्मटलें कीं, "उठा, आपण पळूं, नाहीं तर आब-
शालोमापासून आमची सुटका होणार नाहीं;
आपण उतावळीने जाऊं, नाहीं तर तो लवकर ये-
ऊन आह्मास आटोपील आणि आह्मावर अरिष्ट
आणील आणि तरवारीने नगराच्या लोकांस मा-
रील." १५ तेव्हां राजाच्या चाकरानी राजाला
ह्मटलें कीं, "पाहा, आमचा प्रभु राजा याला जें
सर्व चांगलें वाटेल त्याप्रमाणें आपले चाकर करि-
तील." १६ मग राजा व त्याच्यामागें त्याचें सर्व
कुटुंब निघून गेलें, आणि राजा घर राखण्या-
साठीं दाहा बायका ज्या उपपत्नी त्यांस ठेवून
गेला. १७ तसें राजा व त्याच्यामागें सर्व लोक
निघून गेले, आणि ते दूर ठिकाणीं राहिले. १८
आणि त्याचे अवघे चाकर त्याच्याबरोबर चालले,
आणि अवघे करेथी व अवघे फलेथी व अवघे
गित्ती (ह्मणजे जीं साहाशें माणसें त्याच्यासंगतीं
गाथापासून आलेलीं तीं,) हे अवघे राजाच्यापुढें
चालले.

१९ तेव्हां इत्ता गित्ती याला राजाने ह्मटलें,
"आमच्यासंगतीं तूंहि कां येतोस? आपल्या ठिका-
णास माघारें जाऊन राजाजवळ राहा, कारण कीं तूं
विदेशी व प्रवासीहि आहेस. २० काल तूं आला-
स आणि आज आह्माबरोबर फिरायास म्या तुला
न्यावें कीं काय? आणि मला जेथें जावें लागतें
तेथें मी जात आहें; तूं माघारें जा, आणि आपल्या
भावांसहि घेऊन जा; तुजसीं दया व सत्यता
असो." २१ तेव्हां इत्ताने राजाला उत्तर केलें,
"सजीव परमेश्वर याची शपथ आणि माझा प्रभु
राजा याच्या जिवाची शपथ मी वाहून सांगतों कीं,
ज्या ठिकाणीं माझा प्रभु राजा मरणासाठीं किंवा
वांचण्यासाठीं होईल तेथें आपला चाकर राहील."
२२ मग दावीदाने इत्ताला ह्मटलें, "चल, पलि-
कडे जा." तेव्हां इत्ता गित्ता व त्याचीं अवघीं
माणसें व त्याच्यासंगतीं अवघीं जीं लेंकरें तीं प-
लीकडे गेलीं. २३ आणि सर्व देशांतील लोकानी
मोठ्या स्वराने शोक केला, आणि अवघे लोक
पलिकडे गेले आणि राजा किद्रोन ओहोळाच्या
पलिकडे गेला आणि अवघे लोक रानाकडच्या वा-
टेंत पलिकडे गेले.

२४ त्या काळीं पाहा सादोक व त्याच्या

संगतीं सर्व लेवी देवाच्या कराराचा कोश घेऊन
आले, आणि त्यांनी देवाचा कोश खालीं ठेविला,
आणि अवघे लोक नगरांतून निघून पलिकडे जात
तोंपर्यंत एब्याथार वर गेला. २५ मग राजाने
जादोकाला ह्मटलें, "देवाचा कोश माघारा नग-
रांत ने; जर परमेश्वराची कृपादृष्टि मजवर
होईल तर तो मला माघारें आणील, आणि तो व
त्याचें ठिकाण मला पाहूं देईल. २६ परंतु जर
तो असें ह्मणेल कीं, 'तुजवर मी संतुष्ट नाहीं,
तर पाहा मी एथें आहें, जसें त्याला बरें दिसेल
तसें तो मला करो.'"
२७ आणखी राजाने जादोक याजकाला ह्मटलें,
"तूं भविष्यवादी नाहींस काय? नगरांत सुखरूप
माघारा जा, आणि तुझा पुत्र अहीमास व एब्या-
थाराचा पुत्र योनाथान हे दोघे पुत्र तुमच्यासं-
गतीं जावोत. २८ पाहा, तुह्मापासून वर्त्तमान ये-
ऊन मला कळेल तोंपर्यंत मी रानांतील मैदानांत
राहीन." २९ मग जादोक व एब्याथार देवाचा
कोश घेऊन यरूशालेमांत जाऊन तेथें राहिले.
३० आणि दावीद रडत रडत जाईत डोंगरावर
चढला; तो आपलें डोकें आच्छादून अनवाहणी
आणि त्याच्या बरोबर जे सर्व लोक त्यांतील प्र-
त्येक आपलें डोकें आच्छादून शोक करीत चढला.
३१ त्या काळीं दावीदाला कोणी सांगितलें कीं,
अहीथोफेल आबशालोमाच्यासंगतीं बंडकऱ्यांमध्यें
आहे; तेव्हां दावीदाने ह्मटलें, "हे परमेश्वरा,
त्वां अहीथोफेलाची मसलत निरर्थक करावी, मी
असी विनंती करितों." ३२ आणि असें झालें
कीं दावीद डोंगराच्या शिखरावर गेला असतां
तेथें त्याने देवाचें भजन केलें, आणि पाहा हूशा
आर्खी आपलीं वस्त्रें फाडून व आपल्या डोक्या-
वर माती घालून त्याला भेटायास आला. ३३
आणि दावीदाने त्याला ह्मटलें, "जर तूं मजब-
रोबर येसील तर मला भार होसील. ३४ परंतु
जर माघारें नगरांत जाऊन तूं आबशालोमाला
ह्मणसील, हे राजा, मी तुझा चाकर होईन;
मागें मी तुझ्या बापाचा चाकर होतों परंतु आतां
मी तुझा चाकर होईन; तर तूं माझ्यासाठीं अही-
थोफेलाची मसलत निरर्थक करसील. ३५ आ-
णि जादोक व एब्याथार जे याजक ते तुजबरोबर
तेथें राहतील कीं नाहीं? आणि असें होईल कीं
ज्या अवघ्या गोष्टी राजाच्या घरांतून तूं ऐकसील
त्या जादोक व एब्याथार याजकांस तूं सांगसील.
३६ पाहा तेथें त्यांचे दोन पुत्र जादोकाचा पुत्र
अहीमास व एब्याथाराचा पुत्र योनाथान त्यां-
च्यासंगतीं आहेत, आणि ज्या अवघ्या गोष्टी तुह्मी
ऐकाल त्या तुह्मी त्यांच्या हातून निरोप पाठवून
मला कळवाल." ३७ तेव्हां दावीदाचा मित्र
हूशा नगरांत गेला, आणि आबशालोम यरूशा-
लेमास आला.

## अध्याय १६.

आणि दावीद डोंगराच्या शिखरापलिकडे थो-
डासा गेला असतां पाहा, मफीबोशेथाचा
चाकर जीबा त्याला भेटला, आणि खोगीर घात-
लेलीं दोन गाढवें आणि त्यांवर दोनशें भाकरी व
द्राक्षांचे शंभर गोळे व अंजिरांचे शंभर गोळे व
द्राक्षारसाचा एक बुधला हीं त्याने बरोबर आणि-
लीं. २ तेव्हां राजाने जीबाला ह्मटलें, "हीं तु-
झ्यापाशीं काय आहेत?" आणि जीबाने उत्तर
केलें, "गाढवें राजाच्या कुटुंबाला बसण्यासाठीं
आणि भाकरी व फळें चाकरांस खाण्यासाठीं आणि
द्राक्षारस जे रानांत थकतील त्यांस पिण्यासाठीं
आहे." ३ तेव्हां राजाने ह्मटलें, "तुझ्या धन्याचा
पुत्र कोठें आहे?" मग जीबाने राजाला उत्तर
केलें, "पाहा तो यरूशालेमांत राहत आहे, का
कीं त्याने असें ह्मटलें, 'आज इस्राएलाचे लोक
माझ्या बापाचें राज्य मला परत देतील.'" ४ मग
राजाने जीबाला ह्मटलें, "पाहा, जें अवघें मफी-
बोशेथाचें होतें तें तुझें आहे." आणि जीबाने
ह्मटलें, "हे माझ्या प्रभू राजा, मी पायां पडतों,
आपली कृपादृष्टि मजवर असावी."
५ यानंतर दावीद राजा बाहूरीमास आला,
तेव्हां पाहा तेथून शाऊलाच्या घराण्यांतील कुटुं-
बाचा एक माणूस गेराचा पुत्र शिमी नामें आ-
ला; तो येतां येतां शिव्या देत असे. ६ आणि
त्याने दावीदाला व दावीद राजाच्या चाकरांस
धोंडे मारिले, आणि अवघे लोक व अवघे शूर त्या-
च्या उजव्याकडे व डाव्याकडे होते. ७ आणि
शिमी शाप देतांना असें बोलला कीं, "अरे रक्त-

पाती माणसा व दुष्टाईच्या माणसा, जा जा. ८
**शाऊल** ज्याच्या ठिकाणीं त्वां राज्य केलें त्याच्या
कुटुंबाचें सर्व रक्त **परमेश्वराने** तुजवर आणिलें
आहे, आणि **परमेश्वराने** तुझा पुत्र **आब**शा-
लोम याच्या हातीं राज्य दिल्हें आहे; आतां
पाहा तूं आपल्या संकटांत आहेस, कां कीं तूं रक्त-
पाती माणूस आहेस." ९ तेव्हां **जरूवे**चा पुत्र
**अ**बीशाय राजाला बोलला, "माझा प्रभु राजा
याला या मेल्या कुत्र्याने शिव्या कां द्याव्या!
आतां मला जाऊं दे, झणजे मी त्याचें डोकें
कापून टाकीन." १० परंतु राजाने उत्तर केलें,
"अहो जरूवेचे पुत्र, माझा तुह्मासीं काय आहे!
तो शाप देवो, कां कीं **परमेश्वराने** त्याला सां-
गितलें आहे कीं, **दावीदाला** शाप दे; तर त्याला
कोण ह्मणेल कीं, तसें तूं कां करितोस." ११
**आणि दावीदाने अबीशायाला** व आपल्या अव-
घ्या चाकरांस ह्मटलें, "पाहा, माझा पुत्र जो मा-
झ्या कमरेंतून निघाला तो माझा प्राण घ्यायास
पाहत आहे, तर विशेषेंकरून आतां हा **बन्यामि**-
नी असें करील, त्याला असूं द्या, तो शाप देवो,
कां कीं **परमेश्वराने** त्याला सांगितलें आहे. १२
कदाचित **परमेश्वर** माझें दुःख पाहील, आणि
जो शाप तो आज देतो त्याच्याबदल मला चां-
गलें फळ देईल." १३ **आणि दावीद** व त्याचीं
माणसें वाटेंत चालत असतां **शिमी** डोंगराच्या
बाजूवर कांहीं अंतराने चालला, आणि चालतांना
तो शिव्या देत व धोंडे त्याकडे मारीत व माती
टाकीत गेला. १४ **आणि** राजा व त्याच्याबरो-
बर जे लोक ते अवघे दमलेले पोहंचले, आणि
तेथें त्यानी विसांवा घेतला.

१५ **आणि आब**शालोम व अवघे **इस्राएला**चे
लोक **यरू**शालेमांत आले, आणि त्याच्यासंगतीं
**अ**हीथोफेल होता. १६ **आणि** असें झालें कीं
**दावी**दाचा मित्र **हूशा आर्खी आब**शालोमापासीं
आला तेव्हां **हूशा आब**शालोमाला बोलला, "रा-
जा चिरकाळ वांचो, राजा चिरकाळ वांचो." १७
तेव्हां **आब**शालोमाने **हू**शाला ह्मटलें, "तुझ्या
मित्रावर हा तुझा प्रेमा आहे काय? आपल्या
मित्रासंगतीं तूं कां गेला नाहींस?" १८ **आणि**
**हू**शाने **आब**शालोमाला उत्तर केलें कीं, "असें
नाहीं, परंतु ज्याला **परमेश्वर** व हे लोक व
**इस्राएला**चीं सर्व माणसें निवडितील त्याजकडे मी
होईन, आणि त्याजपासीं मी राहीन. १९ अण-
खी म्या कोणाची चाकरी करावी! त्याच्या पुत्रा-
ची कीं नाहीं? जसें म्या तुझ्या बापाच्यासमोर
चाकरी केली तसें तुझ्यासमोर मी करीन."

२० **मग आब**शालोमाने **अ**हीथोफेलाला ह्म-
टलें, "आह्मी काय करावें, याविषयीं तुह्मी मस-
लत सांगा." २१ **आणि अ**हीथोफेलाने **आब**-
शालोमाला ह्मटलें, "तुझ्या बापाच्या ज्या उप-
पत्नी त्याने घर राखण्यासाठीं ठेविल्या, त्यांपासीं
जा, आणि सर्व **इस्राएला**चे लोक ऐकतील कीं
तुझ्या बापाने तुला अगदी कुत्सित मानिलें आहे,
तेव्हां जे अवघे तुझ्यासंगतीं आहेत ते धैर्यवंत
होतील." २२ तेव्हां त्यानी धाब्यावर डेरा **आ**-
बशालोमासाठीं सिद्ध केला, आणि **आब**शालोम
सर्व **इस्राएला**च्या देखतां आपल्या बापाच्या उप-
पत्नीपासीं गेला. २३ **आणि** त्या काळीं जी
मसलत **अ**हीथोफेलाने दिल्ही, ती जसें देवाला
विचारून त्याचें वचन घेतलें तसी होती; तसी
**अ**हीथोफेलाची मसलत **दावी**दाजवळ व **आब**-
शालोमाजवळहि होती.

## अध्याय १७.

**मग** अहीथोफेलाने **आब**शालोमाला ह्मटलें,
"आतां मला बारा हजार माणसें निवडूं दे,
आणि मी उठून या रात्रीं **दावी**दाच्या पाठीस
लागेन. २ **आणि** तो दमलेला व सामर्थ्यहीन
असतां त्यावर पडेन व त्याला भयभीत करीन,
मग त्याच्यासंगतीं जे अवघे लोक ते पळतील,
आणि मी राजाला मात्र मारीन. ३ **आणि** मी
अवध्या लोकांस तुजपासीं माघारें आणीन; ज्या
माणसाचा शोध तूं करितोस त्याला मारणें
सर्वांच्या परतण्याचें कारण होईल, मग अव-
घे लोक स्वस्थ होतील." ४ **आणि** ही मस-
लत **आब**शालोमाला व **इस्राएला**च्या सर्व वडि-
लांस चांगलीं वाटली. ५ **मग आब**शालोमाने
ह्मटलें, "**हूशा आर्खी** यालाहि आतां बोलाव,
आणि तो काय ह्मणेल तेंहि आपण ऐकूं." ६
तेव्हां **हूशा आब**शालोमाजवळ आला आणि

आबशालोमाने त्याला असें ह्मटलें कीं, "अही-
थोफेलाने असी मसलत दिल्ही आहे, त्याच्या
मसलतीप्रमाणें आह्मी करूं कीं काय? जर नाहीं,
तर तूं सांग." ७ तेव्हां हूशाने आबशालोमाला
ह्मटलें, "जी मसलत अहीथोफेलाने दिल्ही ती
या वेळेस चांगली नाहीं. ८ कारण कीं हूशाने
ह्मटलें, तूं आपल्या बापाला व त्याच्या माणसांस
जाणतोस कीं ते शूर आहेत आणि ते मनांत संतप्त
आहेत, रानांत पिलीं हरपलेल्या आस्वलीसारिखे
ते आहेत; अणखी तुझा बाप लढाऊ माणूस
आहे, आणि तो लोकांमध्यें रात्रीं राहणार नाहीं.
९ पाहा, तो आतां कोणीएका भुयारांत किंवा दुस-
ऱ्या ठिकाणीं लपला आहे, आणि असें होईल कीं
जेव्हां प्रथम त्यांतील कित्येक लढाईंत पडतील
तेव्हां जो कोणी ऐकेल तो ह्मणेल कीं, आबशा-
लोमाकडे जे लोक त्यांचा पराभव झाला. १०
तेव्हां जो शूर ज्याचें हृदय सिंहाच्या हृदयासा-
रिखें आहे तो अगदी विरून जाईल, कारण कीं
अवघे इस्राएलाचे लोक जाणतात कीं तुझा बाप
पराक्रमी आहे, आणि जे त्याच्यासंगतीं तेहि शूर
आहेत. ११ या कारणास्तव मी असी मसलत
सांगतों कीं अवघे इस्राएलाचे लोक दानापासून
बेरशेबापर्यंत संख्येने समुद्राच्या वाळूसारिखे तु-
झ्याजवळ जमा व्हावे, आणि मग त्वां स्वतां लढा-
ईस जावें. १२ आणि ज्या ठिकाणीं तो सांप-
डेल तेथें आह्मी त्यावर छप्पा घालूं, आणि जसें
दहिंवर भूमीवर पडतें तसें आह्मी त्यावर पडूं,
आणि तो व त्याच्यासंगतीं जीं अवघीं माणसें
त्यांतील एकहि राहणार नाहीं. १३ अणखी जर
तो कोणीएका नगरांत गेला असेल तर अवघे
इस्राएली त्या नगराजवळ दोर आणतील, आणि
तें नगर आह्मी ओढून नदींत टाकूं, असें कीं तेथें
लाहानसाहि दगड मिळणार नाहीं." १४ मग
आबशालोमाने व इस्राएलाच्या सर्व माणसांनी
असें ह्मटलें कीं, "हूशा आर्खी याची मसलत
अहीथोफेलाच्या मसलतीपेक्षां चांगली आहे."
हें असें झालें कारण कीं आबशालोमावर अरिष्ट
आणावें ह्मणून परमेश्वराने अहीथोफेलाची चां-
गली मसलत निरर्थक करायास निश्चय केला
होता.

१५ तेव्हां सादोक व एब्याथार याजकांस हू-
शाने ह्मटलें कीं, "अहीथोफेलाने आबशालोमाला
व इस्राएलांच्या वडिलांस तसी मसलत सांगि-
तली, आणि असी मसलत म्या सांगितली. १६
तर आतां लवकर पाठवून दावीदाला सांगा कीं,
'आज रात्रीं रानांतील मैदानांत राहूं नये, पलि-
कडे लवकर जा, नाहीं तर राजाचा व त्याच्या-
संगतीं जे अवघे लोक त्यांचाहि नाश होईल."
१७ त्या काळीं योनाथान व अहीमाज एनरो-
गेलापासीं राहत होते, (कां कीं त्यांनी नगरांत जा-
तां दिसूं नये,) आणि एका दासीने जाऊन त्यां-
स हें वर्त्तमान सांगितलें, मग ते दावीद राजाला
सांगायास गेले. १८ परंतु एका पोराने त्यांस
पाहिलें आणि आबशालोमाला सांगितलें; तेव्हां
ते लवकर जाऊन बहूरीमांत एका माणसाच्या
घरास आले; त्याच्या अंगणांत विहीर होती आ-
णि ते तींत उतरले. १९ आणि त्या घरच्या
बायकोने त्या विहिरीवर झांकण घातलें आणि
त्याजवर दळलेलें धान्य पसारिलें, आणि ती गोष्ट
कळली नव्हती. २० नंतर आबशालोमाचे चा-
कर त्या बायकोजवळ घरांत आले आणि त्यांनी
तिला पुसिलें कीं, "अहीमाज व योनाथान कोठें
आहेत?" तेव्हां त्या बायकोने त्यांस उत्तर केलें
कीं, "ते ओहळाच्या पलिकडे गेले." मग त्यांनी
त्यांचा शोध केला परंतु ते त्यांस सांपडले नाहींत,
ह्मणून ते माघारे यरूशालेमास आले. २१ आणि
असें झालें कीं ते गेल्यावर यांनी विहिरींतून निघून
जाऊन दावीद राजाला सांगितलें; त्यांनी दावीदा-
ला ह्मटलें, "उठा आणि नदीच्या पलिकडे लवकर
जा, कारण कीं अहीथोफेलाने तुह्माविषयीं असी
मसलत सांगितली आहे." २२ तेव्हां दावीद व
त्याच्यासंगतीं जे अवघे लोक ते उठले आणि या-
र्देनेच्या पलिकडे गेले; दिवस उगवल्यापूर्वी जो
यार्देनेच्या पलिकडे गेला नाहीं, असा कोणीएकहि
राहिला नाहीं.

२३ आणि जेव्हां अहीथोफेलाने पाहिलें कीं
आपली मसलत मानिली नव्हती, तेव्हां तो आप-
ल्या गाढवावर खोगीर घालून आणि सिद्ध होऊन
आपल्या घरास आपल्या नगरांत गेला, आणि आ-
पल्या घरची व्यवस्था करून आपल्याला गळफास

घेतला; तसा तो मेला, मग त्याच्या बापाच्या
कबरेंत लोकानी त्याला पुरिलें. २४ आणि दा-
वीद माहानाईमास आला आणि आबशालोम
व त्याच्यासंगतीं इस्राएलाचीं जीं अवघीं माणसें
तीं यार्देनेच्या पलिकडे गेलीं. २५ आणि आ-
बशालोमाने योवाबाच्या बदल अमासाला सेना-
पति केलें; योवाबाची आई जरूवा इची बहीण
नाहाशाची कन्या अबीगाइल इजपाशीं जो इस्रा-
एली माणूस यिथ्रा नामें गेला त्याचा पुत्र अमा-
सा होता. २६ आणि इस्राएली व आबशालोम
गिलाद प्रांतांत मुकामास राहिले. २७ आणि
असें झालें कीं दावीद माहानाईमास आला अ-
सतां नाहाश जो अम्मोनाच्या संतानांच्या रा-
ब्बांतील होता त्याचा पुत्र शोबी आणि लोदबा-
रांतील आम्मीएल याचा पुत्र माखीर आणि रो-
गलीमांतील बार्जिल्ला गिलादी; २८ यानी खाटा
व पात्रें व मडकीं व गहूं व जव व पीठ व हुरप-
ळलेलें धान्य व चवळ्या व काठाणें व फुटाणें;
२९ आणि मध व लोणी व मेंढरें व गायीच्या
दुधाचा खवा हीं दावीदाला व त्याच्यासंगतीं जे
लोक त्यास खाण्यासाठीं आणिलीं; कारण कीं
त्यानी ह्मटलें, "हे लोक रानांत भुकेले व दमलेले
व तान्हेले आहेत."

## अध्याय १८.

त्यानंतर दावीदाने आपल्यासंगतीं जे लोक त्यां-
ची पाहणी केली, आणि त्यांवर हजारांचे
सर्दार व शंभरांचे सर्दार नेमिले. २ आणि दा-
वीदाने लोकांचा तिसरा वांटा योवाबाच्या हाता-
खालीं, आणि योवाबाचा भाऊ जरूवेचा पुत्र
अबीशाय याच्या हाताखालीं तिसरा वांटा, आ-
णि इत्ता गित्ती याच्या हाताखालीं तिसरा वांटा,
असें करून त्यांस पाठविलें; अणखी राजाने लो-
कांस ह्मटलें, "मीहि निश्चयेंकरून तुमच्यासंगतीं
येईन." ३ तेव्हां लोकानी ह्मटलें, "तूं येऊं नको,
कां कीं जर आह्मी पळतों तर आह्माकडे ते लक्ष्य
देणार नाहींत, आणि जर आह्मी अर्धे मरतों तर
ते आह्माविषयीं चिंता धरणार नाहींत; परंतु
आतां तूं आमच्यांतील दाहा हजारांसमान आ-
हेस, यास्तव त्वां नगरांतून आमचें सहाय करावें हें
बरें आहे." ४ मग राजाने त्यांस ह्मटलें, "तु-
ह्मास जें बरें वाटेल तें मी करीन." आणि राजा
दरवाज्याच्या बाजूस उभा राहिला, आणि सर्व
लोक शंभर शंभर हजार हजार असे बाहेर नि-
घाले. ५ तेव्हां राजाने योवाब व अबीशाय व
इत्ता यांस असी आज्ञा केली कीं, "तो तरुण
आबशालोम यासीं मजकरितां सौम्यतेने वागा."
असी जी आज्ञा राजाने अवघ्या सर्दारांस आब-
शालोमाविषयीं दिल्ही ती सर्व लोकानी ऐकिली.
६ मग ते लोक इस्राएलासीं भिडायास शिवा-
रांत गेले आणि एफ्राईमाच्या रानांत लढाई होती.
७ आणि तेथें इस्राएलाचे लोक दावीदाच्या चाक-
रांपुढें मारिले होते, आणि तेथें त्या दिवसीं वीस
हजार मनुष्यांचा असा मोठा वध झाला. ८
आणि तेथें लढाई त्या सर्व जाग्यावर पसरिली
होती, आणि त्या दिवसीं जे तरवारीने मेले त्यां-
पेक्षां अरण्याने लोक फार मेले. ९ आणि आब-
शालोम दावीदाच्या चाकरांस आढळला, तेव्हां
आबशालोम खेंचरावर बसला होता, आणि तें
खेंचर मोठ्या झाडाच्या खांद्यांखालून जात असतां
आबशालोमाचें डोकें झाडांत अडकलें, आणि तो
आकाश व पृथ्वी यांच्यामध्यें लोंबत असतां त्या-
च्याखालीं जें खेंचर तें निघून गेलें. १० मग
कोणीएका माणसाने हें पाहून योवाबाला असें
सांगितलें कीं, "पाहा मी आबशालोम झाडामध्यें
लोंबलेला पाहिला." ११ तेव्हां ज्या माणसाने
योवाबाला हें सांगितलें त्याला त्याने ह्मटलें, "अरे
त्वां त्याला पाहिलें, तर तेथें त्याला भूमीवर त्वां
कां मारून टाकिलें नाहीं? मारिलें असतें तर
म्या रुप्याच्या दाहा मुद्रा व एक कंबरपट्टा तुला
दिल्हा असता." १२ मग त्या माणसाने योवा-
बाला असें उत्तर केलें कीं, "जरीं मला आपल्या
हातीं रुप्याच्या हजार मुद्रा मिळाल्या, तरीं मी
राजाच्या पुत्रावर आपला हात टाकणार नाहीं,
कारण कीं राजाने आमच्या ऐकण्यांत तुला व
अबीशायाला व इत्ताला असी आज्ञा केली कीं,
'तुह्मी सर्व त्या तरण्या आबशालोमाचा संभाळ
करा.' १३ ती आज्ञा जर मी मानिली नसती तर
मी आपल्या जिवावर लबाडी केली असती, कां कीं
कांहींच गोष्ट राजापासून गुप्त राहत नाहीं; अणखी

तूंच मला विरुद्ध झाला असतास." १४ मग
योवाबानें ह्मटलें, "मला तुजपाशीं असा उशीर
करायाचा नाहीं." आणि त्यानें तीन भाले आपल्या
हातीं घेतले आणि आबशालोम अद्याप त्या झा-
डाच्यामध्यें जिवंत असतां त्याच्या हृदयांत मा-
रिले. १५ आणि दाहा तरुण पुरुष जे योवाबा-
चीं शस्त्रें वाहणारे होते ते सभोंवतें मिळाले,
आणि त्यांनी आबशालोमाला हाणून त्याला जिवें
मारिलें. १६ मग योवाबानें करणा वाजविला
आणि इस्राएलाचा पाठलाग सोडून लोक माघारे
आले, कां कीं योवाबानें लोकांस राहविलें. १७
आणि त्यांनी आबशालोमाला घेऊन त्याला रा-
नांतील एका मोठ्या खांचेंत टाकिलें आणि त्याज-
वर धोंड्यांचा फार मोठा ढीग केला, मग सर्व इ-
स्राएली आपापल्या डेऱ्यांस पळून गेले. १८ आ-
बशालोमानें त्याच्या आयुष्यांत आपल्यासाठीं रा-
जाच्या खोऱ्यांत एक मनोरा बांधिला होता, कारण
कीं त्यानें ह्मटलें, "माझें नांव राखण्यासाठीं मला
पुत्र नाहीं." आणि त्यानें आपलें नांव त्या मनो-
ऱ्याला दिल्हें, आणि आजपर्यंत त्याला आबशालो-
माची जागा, असें ह्मटलें आहे. १९ तेव्हां सा-
दोकाचा पुत्र अहीमाज ह्मणाला, "आतां मला
धांवत जाऊं दे, आणि मी राजाला सांगेन कीं
परमेश्वरानें तुला तुझ्या शत्रूंच्या हातांतून सो-
डविलें आहे." २० परंतु योवाबानें त्याला ह्म-
टलें, "आज तूं वर्त्तमान नेणार नाहींस, दुसऱ्या
दिवशीं त्वां जाऊन वर्त्तमान सांगावें परंतु आज
तूं सांगूं नये, कां कीं राजाचा पुत्र मेला आहे."
२१ यानंतर योवाबानें कूशीला ह्मटलें, "तूं जा,
त्वां जें पाहिलें तें राजाला सांग." तेव्हां कूशी
योवाबाला नमून धावूं लागला. २२ मग सा-
दोकाचा पुत्र अहीमाज योवाबाला पुन्हा ह्मणाला,
"कसेंहि असो, आतां मलाहि कूशीच्या पाठीमागें
धांवत जाऊं दे." तेव्हां योवाबानें उत्तर केलें,
"माझ्या पुत्रा, त्वां कां धांवावें? कांहीं शुभकारक
वर्त्तमान तुजपाशीं नाहीं." २३ परंतु त्यानें फि-
रून ह्मटलें, "कसेंहि असो तरी मला धांवत जा-
ऊं दे." तेव्हां त्यानें त्याला ह्मटलें, "धांव."
मग अहीमाज मैदानाच्या वाटेनें धांवला आणि
कूशीच्यापुढें गेला.

२४ त्या काळीं दावीद दरवाज्यामध्यें बसला
होता, आणि पाहरेकरी दरवाज्यावरील धाब्या-
वर चढला, आणि वर पाहून अवलोकन केलें;
तेव्हां पाहा कोणी मनुष्य एकला धांवत येत
आहे. २५ तेव्हां पाहरेकऱ्यानें हाक मारून रा-
जाला सांगितलें; मग राजानें ह्मटलें, "जर तो एक-
ला येत आहे तर तो वर्त्तमान आणणारा आहे."
आणि तो येतां येतां जवळ आला. २६ तेव्हां
पाहरेकऱ्यानें दुसऱ्या माणसाला धांवत येतां पा-
हिलें, तेव्हां पाहरेकऱ्यानें दरवाजकऱ्याला हाक
मारून ह्मटलें, "पाहा, दुसरा माणूस एकला धांवत
येत आहे." आणि राजानें ह्मटलें, "तोहि वर्त्त-
मान आणणारा आहे." २७ मग पाहरेकऱ्यानें
ह्मटलें, 'पहिल्याचें धांवणें सादोकाचा पुत्र अही-
माज याच्या धांवण्यासारिखें मला दिसतें." आ-
णि राजानें ह्मटलें, "तो भला माणूस आहे आणि
चांगलें वर्त्तमान आणितो." २८ मग अहीमा-
जानें हाक मारून राजाला सलाम केला, आणि
त्यानें राजापुढें भूमीवर पालथें पडून ह्मटलें,
"आपला देव परमेश्वर याची स्तुति असो, त्यानें
ज्या माणसांनीं आपले हात माझ्या प्रभु राजा या-
वर उचलिले त्यांस हस्तगत केलें आहे." २९
मग राजानें पुसिलें, "तो तरुण आबशालोम त्या-
चें कुशल आहे कीं काय?" तेव्हां अहीमाजानें
ह्मटलें, "जेव्हां योवाबानें राजाच्या चाकराला
ह्मणजे तुझ्या चाकराला ह्मटलें तेव्हां म्यां मोठी
गर्दी पाहिली, परंतु काय होतें तें म्यां जाणिलें
नाहीं." ३० मग राजानें ह्मटलें, "तिकडे जा-
ऊन उभा राहा." आणि तो जाऊन उभा राहिला.
३१ मग पाहा कूशी आला, आणि कूशीनें ह्म-
टलें, "माझ्या प्रभु राजानें वर्त्तमान ऐकावें, कां
कीं परमेश्वरानें जे अवघे तुजवर उठले, त्याच्या
हातांतून तुला आज सोडविलें आहे." ३२ ते-
व्हां राजानें कूशीला पुसिलें, "तो तरुण आब-
शालोम त्याचें कुशल आहे कीं काय?" आणि
कूशीनें असें उत्तर केलें कीं, "हे माझ्या प्रभू रा-
जा, तुझे शत्रू व वाईट करायास जे अवघे तुज-
वर उठतात, ते त्या तरण्यासारिखे होवोत." ३३
मग राजा फार खिन्न झाला, आणि तो चढून
दरवाज्यावरल्या खोलींत रडला; तो जात असतां

शोक करीत असें बोलला, "अरेरे माझ्या पुत्रा
अबशालोमा, अरेरे माझ्या पुत्रा, माझ्या पुत्रा अ-
बशालोमा; जर तुजबदल मी मरण पावलों अस-
तों तर बरें होतें; अरेरे अबशालोमा माझ्या पुत्रा,
माझ्या पुत्रा."

## अध्याय १९.

तेव्हां योवाबाला कोणी सांगितलें कीं, "पाहा,
राजा रडून आबशालोमासाठीं शोक करितो."
२ आणि त्या दिवसीं जो जय झाला तो सर्व
लोकांस शोकरूप झाला, कारण कीं लोकांनी त्या-
दिवसीं ऐकिलें कीं राजा आपल्या पुत्राविषयीं दुः-
खित आहे. ३ आणि जसे लोक लढाईंतून प-
ळाले असतां लज्जित होऊन चोरून येतात, तसे
त्या दिवसीं लोक नगरांत चोरून आले. ४ आ-
णि राजाने आपलें तोंड झांकून घेतलें, आणि त्याने
मोठ्या शब्दाने असा आक्रोश केला कीं, "अरेरे
माझ्या पुत्रा आबशालोमा, अरेरे आबशालोमा
माझ्या पुत्रा माझ्या पुत्रा." ५ तेव्हां योवाब
राजाजवळ घरांत येऊन बोलला, "ज्या चाकरानी
तुझा जीव व तुझ्या पुत्रांचा व तुझ्या कन्यांचा
जीव व तुझ्या बायकांचा जीव व तुझ्या उपपत्नींचा
जीव यांस आज राखिलें, त्यांचीं तोंडें त्वां आज
लज्जित केलीं आहेत. ६ तूं आपल्या शत्रूंवर
प्रीति करितोस आणि आपल्या मित्रांवर द्वेष करि-
तोस, कारण कीं आज त्वां कळविलें आहे कीं स-
र्दार व चाकर तुझ्या लक्षांत कांहीं नाहींत; का-
रण मला आज समजून आलें कीं जर आबशा-
लोम वांचला असता आणि आह्मी अवघे आज
मेलों असतों, तर हें तुला बरें वाटलें असतें. ७
तर आतां उठून बाहेर जा, आणि आपल्या चाक-
रांच्या समाधानासाठीं त्यांस बोल; कारण कीं
मी परमेश्वराची शपथ वाहतों कीं जर तूं बा-
हेर जात नाहींस तर या रात्रीं एकहि मनुष्य
तुझ्याजवळ राहणार नाहीं, आणि ज्या सर्व विप-
त्ति तुझ्या तरुणपणापासून आजपर्यंत तुला प्राप्त
झाल्या त्यांपेक्षां ही विपत्ति अधिक होईल." ८
तेव्हां राजा उठून दरवाज्यांत बसला, आणि अव-
घ्या लोकांस जाहीर झालें कीं, "पाहा राजा दर-
वाज्यांत बसला आहे." तेव्हां सर्व लोक राजा-
समोर आले, इस्राएली तर आपापल्या डेऱ्यांस
पळाले होते.
९ त्या काळीं सर्व लोक इस्राएलाच्या अव-
घ्या वंशांत आवेशी होऊन बोलले कीं, "राजाने
आह्मांस आमच्या शत्रूंच्या हातांतून राखिलें आ-
णि त्याने आह्मांस पलिष्ट्यांच्या हातांतून सोड-
विलें, तरी तो आतां आबशालोमामुळें या देशां-
तून पळाला आहे. १० आणि ज्या आबशालो-
माला आह्मी अभिषेक करून आपला राजा केला
तो लढाईंत मेला; तर आतां राजाला माघारें आ-
णण्याविषयीं तुह्मी कां उगेच राहतां?" ११ तेव्हां
दावीद राजाने सादोक व एब्याथार याजकांस
असा निरोप पाठविला कीं, "यहूदाच्या वडिलांस
सांगा कीं राजाला त्याच्या घरास माघारें आण-
ण्याविषयीं तुह्मी शेवटले कां आहां? कां कीं सर्व
इस्राएलाचें बोलणें राजाला व त्याच्या कुटुंबाला
कळलें आहे. १२ तुह्मी माझे भाऊ आहां,
तुह्मी माझी हाडें व मांस आहां; तर राजाला
माघारें आणायास तुह्मी शेवटले कां आहां?
१३ आणखी अमासाला सांगा कीं तूं माझ्या
हाडाचा व माझ्या मांसाचा आहेस कीं नाहींस?
जर तूं माझ्यासमोर योवाबाच्याबदल नेहमी सेना-
पति नाहींस तर देव असें व यापेक्षां अधिकहि
मला करो." १४ तेव्हां त्याने यहूदाच्या सर्व मा-
णसांचें मन एका माणसाच्या मनासारिखें वळवून
घेतलें, आणि त्यानी राजाला असा निरोप पाठ-
विला कीं, "त्वां व तुझ्या चाकरानी माघारें यावें."
१५ मग राजा माघारा येऊं लागला आणि यार्दे-
नाजवळ पोहंचला, आणि राजाची भेट घ्यायास
व त्याला यार्देनेवरून उतरायास यहूदी लोक गि-
ल्गालास आले.
१६ त्या काळीं बाहूरीमांतील बन्यामिनी गे-
राचा पुत्र शिमी उतावळी करून यहूदाच्या
माणसांसंगतीं दावीद राजाच्या भेटीस आला.
१७ आणि त्याच्यासंगतीं बन्यामिनांतील एक ह-
जार माणसें होतीं, आणि शाऊलाच्या घरचा
चाकर जीबा व त्याच्याबरोबर त्याचे पंधरा पुत्र
व त्याचे वीस चाकर होते, आणि ते राजापुढें
यार्देन उतरून गेले. १८ आणि राजाचें कुटुंब
उतरायास व त्याला जें बरें वाटेल तें करा-

यास एक नाव गेली होती, आणि राजा यार्देन
उतरून आला असतां गेराचा पुत्र शिमी त्या-
च्या पायां पडला. १९ आणि तो राजाला
असें बोलला कीं, "माझ्या प्रभूनें माझ्या पदरीं
दोष न घालावा, आणि ज्या दिवशीं माझा
प्रभु राजा यरूशालेमांतून निघाला तेव्हां जी
दुष्टाई आपल्या चाकरानें केली तिचें स्मरण क-
रून राजानें आपल्या मनांत चिंतन न करावें.
२० कारण कीं तुझा चाकर जाणतो कीं म्यां
पाप केलें आहे, आणि पाहा योसेफाच्या सर्व
वंशामध्यें मी पहिल्यानेंच माझा प्रभु राजा याच्या
भेटीस आज आलों आहें." २१ तेव्हां जरू-
वेचा पुत्र अबीशाय उत्तर करून बोलला, "शि-
मीनें परमेश्वराच्या अभिषिक्ताला शाप दिल्हा
यामुळें त्याला मारावें कीं नाहीं?" २२ मग
राजानें उत्तर केलें, "अहो जरूवेच्या पुत्रांनो,
मला तुह्मांसीं काय आहे? तुह्मी आज मजसीं
विरोध कां करितां? आज इस्राएलांत कोणी म-
नुष्य मरेल काय? कां कीं मी आज इस्राएला-
चा राजा आहें, हें मला ठाऊक नाहीं काय?"
२३ मग राजानें शिमीला ह्मटलें कीं, "तूं मर-
णार नाहींस; आणि राजानें शपथ वाहून त्याला
वचन दिल्हें.

२४ मग शाऊलाचा पौत्र मफीबोशेथ राजा-
च्या भेटीस आला, आणि त्यानें ज्या दिवशीं रा-
जा निघून गेला तेव्हांपासून तो माघारा सुखरूप
येई त्या दिवसापर्यंत आपले पाय धुतले नव्हते व
आपली दाढी केली नव्हती व आपलीं वस्त्रें धु-
तलीं नव्हतीं. २५ आणि असें झालें कीं यरू-
शालेमांत तो राजाच्या भेटीस आला तेव्हां रा-
जानें त्याला असें पुसिलें, "हे मफीबोशेथा, तूं
माझ्यासंगतीं कां आला नाहींस? २६ तेव्हां
त्यानें उत्तर केलें, "हे माझ्या प्रभू राजा, माझ्या
चाकरानें मला फसविलें, कारण कीं तुझा चाकर
बोलला कीं, 'मी आपला गाढव सिद्ध करून त्या-
जवर बसून राजाकडे जाईन,' कां कीं तुझा चा-
कर लंगडा आहे. २७ आणि त्यानें माझा प्रभु
राजा याला तुझ्या चाकराविषयीं खोटें ह्मटलें,
परंतु माझा प्रभु राजा देवाच्या दूतासारिखा
आहे, तर तुझ्या दृष्टीस जें चांगलें दिसेल तें
कर. २८ कारण कीं माझ्या बापाचें सर्व कुटुंब
माझा प्रभु राजा याच्यापुढें केवळ मेलेल्या मनु-
ष्यांसारिखें होतें, परंतु तुझ्या मेजावर जे जेवणारे
त्यांमध्यें त्वां आपल्या चाकराला ठेविलें; तर राजा-
पासीं अणखी अर्जी करायाची आतां मला काय
योग्यता आहे?" २९ मग राजानें त्याला ह्मट-
लें, "तूं आपल्या गोष्टी अणखी कशाला सांगतोस?
म्यां सांगितलें आहे कीं तूं व जीबा शेताचा वि-
भाग कर." ३० तेव्हां मफीबोशेथानें राजाला
ह्मटलें, "त्याला अवघें घेऊं द्या, कारण कीं माझा
प्रभु राजा आपल्या घरास सुखरूप माघारा आ-
ला आहे."

३१ त्या काळीं बर्जिल्ला गिलादी रोगलीमा-
पासून आला, आणि राजाला यार्देनेच्या पलिकडे
पोहंचवावें ह्मणून तो राजाच्याबरोबर यार्देन उत-
रून गेला. ३२ आणि बर्जिल्ला चौऱ्याशीं वर्षांचा
फार ह्मातारा होता, आणि त्यानें राजा माहना-
ईमास राहत असतां त्याचें पोषण केलें, कां कीं
तो फार मोठा माणूस होता. ३३ तेव्हां राजा
बर्जिल्लाला बोलला, "माझ्यासंगतीं ये, ह्मणजे
मी आपल्याबरोबर यरूशालेमांत तुझें पोषण क-
रीन." ३४ मग बर्जिल्लानें राजाला उत्तर केलें,
"माझ्या आयुष्याचीं वर्षें कितीसीं आहेत कीं म्यां
राजाच्यासंगतीं यरूशालेमास यावें? ३५ आज
मी चौऱ्याशीं वर्षांचा आहें; तर काय बरें काय
वाईट याविषयीं मला समजतें काय? मी जो
तुझा चाकर तो जें खातों व पितों त्याची रुचि
मला समजती काय? गाणारे व गाणाऱ्या यांचें
गाणें मी अणखी ऐकेन काय? तर म्यां तुझ्या
चाकरानें माझा प्रभु राजा याजवर पुढें भार कां
घालावा? ३६ तुझा चाकर राजाच्यासंगतीं
यार्देनाच्या पलिकडे थोडसा येईल, आणि राजानें
मजवर एवढा उपकार कां करावा? ३७ तुझ्या
चाकराला माघारें जाऊं द्यावें, ह्मणजे मी आपल्या
नगरांत मरावें आणि आपल्या आईबापाच्या कबरे-
जवळ पुरिलें जावें; परंतु पाहा तुझा चाकर खिम-
म्हाम तो माझा प्रभु राजा याबरोबर येईल,
आणि तुला जें बरें दिसेल तें त्याला कर." ३८
तेव्हां राजानें ह्मटलें, "खिम्हाम मजबरोबर ये-
ईल आणि तुझ्या दृष्टीस जें चांगलें दिसेल तें मी

त्याला करीन, आणि जें कांहीं तूं मला सांगसील
तें मी तुझ्यासाठीं करीन."
३९ त्या काळीं अवघे लोक यार्देन उतरून
पार आले आणि राजाहि आला, तेव्हां राजानें
बार्जिलाचें चुंबन घेतलें, आणि त्याला आशी-
र्वाद दिल्हा, मग तो माघारा आपल्या ठिकाणास
गेला. ४० तेव्हां राजा गिल्गालास आला व
खिम्हाम त्याच्यासंगतीं आला, आणि यहूदाचे
सर्व लोक व इस्राएलाचे अर्धे लोक राजाला पो-
हंचवीत होते. ४१ तेव्हां पाहा इस्राएलाचीं
सर्व माणसें राजापासीं येऊन राजाला ह्मणालीं,
"आमचे भाऊ यहूदाचीं माणसें यानी तुला कां
चोरून घेऊन राजा व त्याचें कुटुंब व त्याच्या-
बरोबर दावीदाचीं सर्व माणसें यांस यार्देनेवरून
आणिलें आहे?" ४२ तेव्हां यहूदाच्या सर्व
माणसानी इस्राएलाच्या माणसांस उत्तर दिल्हें
कीं, "राजा आह्मास जवळचा आहे; तर या
गोष्टीवरून तुह्मास राग कां आला? आह्मी रा-
जाचें कांहीं खालें कीं काय? किंवा त्याने आह्मास
कांहीं बक्षीस दिल्हें कीं काय?" ४३ तेव्हां
इस्राएलाच्या माणसानी यहूदाच्या माणसांस असें
उत्तर केलें कीं, "राजाचे दाहा वांटे आह्माकडे
आहेत, आणि दावीद तुमच्यापेक्षां आमचा अधिक
आहे; तर कशाला तुह्मी आह्मास तुच्छ मानून
आमच्या राजाला माघारें आणण्याविषयीं आ-
ह्मास पहिल्याने विचारिलें नाहीं?" आणि यहू-
दाच्या माणसांचे शब्द इस्राएलाच्या माणसांच्या
शब्दांपेक्षां कठोर होते.

## अध्याय २०

त्या काळीं एक दुष्ट माणूस शिबा नामें ब-
न्यामिनी बिखरीचा पुत्र तेथें होता; आ-
णि त्याने करणा वाजवून असें ह्मटलें कीं, "आ-
ह्मास दावीदसंबंधी वांटा नाहीं, आणि आह्मास
ईशायाच्या पुत्रसंबंधी भाग नाहीं; अहो इस्राएली,
तुह्मी प्रत्येक आपापल्या डेऱ्यांस जा. २ तेव्हां
इस्राएलाचीं अवघीं माणसें दावीदाला सोडून
बिखरीचा पुत्र शिबा याच्यामागें गेलीं, परंतु य-
हूदाचीं माणसें यार्देनेपासून यरूशालेमापावेतों
आपल्या राजाशीं मिळून राहिलीं. ३ आणि
दावीद यरूशालेमांत आपल्या घरास आला, आ-
णि राजाने ज्या दाहा उपपत्नी त्याने घरच्या रक्ष-
णासाठीं ठेविल्या होत्या त्यांस कैदेंत घातलें;
यानंतर त्याने त्यांचें पोषण केलें परंतु त्यांपासीं
तो गेला नाहीं; तसें त्या त्यांच्या मरणापर्यंत
कैदेंत घातलेल्या विधवारूप राहिल्या.
४ मग राजाने अमासाला ह्मटलें, "मजपासीं
यहूदाचीं माणसें तीन दिवसांत जमा करून आ-
णून हजीर हो." ५ तेव्हां अमासा यहूदी माणसें
जमा करायास गेला, परंतु जो वेळ त्याला नेमला
होता त्यापेक्षां तो अधिक राहिला. ६ त्यावर
दावीद अबीशायाला बोलला, "आतां बिखरीचा
पुत्र शिबा आबशालोमापेक्षां आह्मास अधिक
उपद्रव करील; तूं आपल्या धन्याच्या चाकरांस
घेऊन त्याच्या पाठीस लाग, नाहीं तर तो कोट-
युक्त नगरें आपल्याकडे मिळवील, मग आम-
च्या हातीं सांपडणार नाहीं." ७ तेव्हां योवा-
बाचीं माणसें व खरेथी व पलेथी व सर्व शूर
त्याच्या मागें गेले, आणि ते बिखरीचा पुत्र शिबा
याच्या पाठीस लागायास यरूशालेमांतून निघून
गेले. ८ गिबोनाजवळ जो मोठा खडक त्या-
पासीं ते आले तेव्हां त्यांच्यापुढें अमासा चा-
लला, आणि योवाबाने आपलें वस्त्र पांघरून
बांधून वेष्टिलें होतें, आणि त्यावर पडदाळें व
मेण यांसुद्धां तरवार त्याच्या कंबरेला बांधिली
होती; आणि तो पुढें चालत असतां ती बाहेर
निघाली. ९ आणि योवाबाने अमासाला ह्मट-
लें, "हे माझ्या भावा, तूं सुखरूप आहेस कीं
काय?" आणि योवाबाने उजव्या हाताने अमा-
साची दाढी त्याचें चुंबन घ्यायास धरिली. १०
तेव्हां अमासाने योवाबाच्या हातीं जी तरवार
होती तिजविषयीं कांहीं लक्ष दिल्हें नाहीं, आणि
त्याने तिजकडून त्याच्या पोटांत त्याला मारिलें
आणि त्याचीं अंतडीं भूमीवर पाडलीं, त्याने
त्याला फिरून मारिलें नाहीं तरी तो मेला; तेव्हां
योवाब व त्याचा भाऊ अबीशाय ते बिखरी-
च्या पुत्र शिबा याच्या पाठीमागें गेले. ११ आ-
णि योवाबाच्या माणसांतील एक त्यापासीं उभा
राहून बोलला, "जो योवाबाला अनुकूळ व जो
दावीदाला अनुकूळ तो योवाबाच्यामागें यावो."

१२ परंतु अमासा वाटेमध्यें आपल्या रक्तांत पड-
ला होता, आणि जेव्हां त्या माणसानें पाहिलें कीं
सर्व लोक उभे राहिले, तेव्हां त्याने अमासाला
वाटेंतून शेतांत काढून नेलें आणि त्याजवर वस्त्र
घातलें, कारण त्याने पाहिलें कीं जो कोणी त्यापा-
सीं आला तो उभा राहिला. १३ आणि जेव्हां
तो वाटेंतून नेला होता तेव्हां सर्व माणसें बिख-
रीचा पुत्र शिबा याच्या पाठीमागें लागायास यो-
वाबाच्यामागें गेलीं.

१४ आणि शिबा इस्राएलाच्या अवघ्या वं-
शांतून एबेलास व बेथमाखाला व सर्व बेऱ्यांकडे
गेला होता, आणि तेहि एकत्र होऊन त्याच्यामागें
गेले होते. १५ आणि त्यानी येऊन बेथमाखां-
तील एबेल नगर यांत त्याला वेढिलें आणि
त्यानी नगरासमोर मोर्चा केला, आणि तो प्राका-
रावर होता आणि योवाबाबरोबर जे अवघे लोक
ते गांवकुसू पाडण्यासाठीं तें ठोकूं लागले. १६
तेव्हां एका शाहाण्या बायकोनें नगरांतून असी
हाक मारिली कीं, "अहो ऐका ऐका, मी विनंती
करितें योवाबाला सांगा, तूं इकडे ये म्हणजे मी
तुजसीं बोलेन." १७ मग तो तिच्याजवळ गेला
आणि त्या बायकोनें त्याला पुसिलें कीं, "तूं यो-
वाब आहेस कीं काय?" आणि त्यानें उत्तर केलें,
"होय, मी तोच आहें." तेव्हां तिनें त्याला म्हट-
लें, "आपल्या दासीचे शब्द ऐकावे." तेव्हां त्यानें
म्हटलें, "मी ऐकत आहें." १८ तेव्हां ती असें
बोलली, "प्राचीन काळीं लोक म्हणत असत कीं
'त्यानी एबेलांत निश्चयेंकरून विचारावें,' आणि
तसें त्यानी वाद समाप्त केला. १९ इस्राएलांत
जे समेटकर्त्ते व प्रमाणिक त्यांतील मी एक आहें,
तूं इस्राएलामधून एक नगर व एक आई यांचा
नाश करायास पाहत आहेस; देवाचा जो मुलूख
त्याला त्वां कां बुडवावें!" २० तेव्हां योवाबानें
उत्तर केलें, "म्यां बुडवावें किंवा नाश करावा,
असी गोष्ट मजकडून कधीं न होवो. २१ आणि
ही गोष्ट तसी नाहीं, कारण कीं एफ्राईम डोंगरां-
तील एक माणूस जो बिखरीचा पुत्र शिबा नामें
त्याने आपला हात दावीद राजावर उचलिला
आहे, केवळ त्याला स्वाधीन करा, म्हणजे मी
नगर सोडून जाईन." तेव्हां ती बायको यो-
वाबाला बोलली कीं, "त्याचें डोकें भिंतीवरून
तुजकडे टाकलें जाईल. २२ मग ती बायको
आपल्या शाहाणपणानें सर्व लोकांपासीं गेली, आ-
णि त्यानी बिखरीचा पुत्र शिबा याचें डोकें का-
पून योवाबाजवळ टाकिलें; मग त्यानें करणा वा-
जविला आणि ते नगर सोडून सर्व आपापल्या
डेऱ्यांस गेले; यानंतर योवाब माघारा राजाजवळ
यरूशालेमांत आला.

२३ योवाब तर इस्राएलाच्या सर्व सैन्याचा
अधिकारी होता, आणि यहोयादाचा पुत्र बनाया
तो खरेथी व पलेथी यांचा अधिकारी होता.
२४ आणि अदोराम वसुलावर होता, आणि अ-
हीलूदाचा पुत्र यहोशाफाट इतिहासक होता.
२५ आणि शवा चिटनीस होता, आणि जादोक
व एब्याथार ते याजक होते. २६ आणि ईरा
याइरी दावीदाचा मुख्य कारभारी होता.

## अध्याय २१.

दावीदाच्या दिवसांत लागोपाठ तीन वर्षेंपर्यंत
दुकाळ होता, तेव्हां दावीदानें परमेश्वराला
विचारिलें आणि परमेश्वरानें असें उत्तर केलें
कीं, "हा दुकाळ शाऊल व त्याचें रक्त पाडणारें
कुटुंब यामुळें पडला आहे, कारण कीं त्यानें
गिबोन्यांस जिवें मारिलें." २ मग राजानें गि-
बोन्यांस बोलावून त्यांस म्हटलें; (गिबोनी तर
इस्राएलाच्या संतानांतील नव्हते परंतु ते अमो-
ऱ्यांच्या राहिलेल्या कुळांतले होते, आणि इस्रा-
एलाच्या संतानानी त्यांसीं शपथ वाहून वचन
केलें होतें, तरी शाऊल इस्राएलाचीं संतानें व
यहूदी लोक यांसाठीं आवेश धरून त्यांस मारा-
यास झटला). ३ तेव्हां दावीदानें गिबोन्यांस
म्हटलें, "मी तुमच्यासाठीं काय करूं? आणि तु-
म्ही परमेश्वराच्या मुलखाला आशीर्वाद द्यावा
म्हणून कोणतें प्रायश्चित्त मी करूं?" ४ तेव्हां
गिबोनी असें बोलले कीं, "शाऊलापासून किंवा
त्याच्या कुटुंबापासून आम्हास रुपें किंवा सोनें
नको, आणि आम्हासाठीं इस्राएलांतील कोणीएका
माणसाला मारायाचें नाहीं." मग तो बोलला,
"जें तुम्ही सांगाल तें मी तुम्हासाठीं करीन." ५
तेव्हां त्यानी राजाला म्हटलें, "ज्या माणसानें

आमचा नाश केला, आणि इस्राएलाच्या सर्व
सीमेंत आह्मी राहूं नये ह्मणून आह्मी नाहींसे
व्हावे असी आह्माविषयीं योजना केली; ६
त्याच्या संतानांतील सात माणसांस आमच्या
स्वाधीन करावें, आणि परमेश्वराने नेमलेला
शाऊल याच्या गिबा गांवांत आह्मी त्यांस पर-
मेश्वरासमोर फांशीं देऊं." तेव्हां राजाने ह्म-
टलें, "मी देईन." ७ आणि शाऊलाचा पुत्र
योनाथान व दावीद यानी परमेश्वराची जी
शपथ परस्परें वाहिली होती तिजमुळें राजाने
शाऊलाचा पुत्र योनाथान याचा पुत्र मफीबो-
शेथ याला वांचविलें. ८ परंतु आयेची कन्या
रिज्पा जे दोन पुत्र आर्म्मोनी व मफीबोशेथ नामें
शाऊलापासून प्रसवली त्यांस आणि शाऊलाची
कन्या मीखाल जे पांच पुत्र बार्जिल्ला महोलाथी
याचा पुत्र अदरीएल यापासून प्रसवली त्यांसहि
राजाने धरून त्यांस गिबोन्यांच्या हातीं दिल्हें,
आणि त्यानी त्यांस डोंगरावर परमेश्वरासमोर
फांशीं दिल्हें. ९ आणि कापणीच्या दिवसांत
ह्मणजे जवाच्या कापणीच्या प्रारंभीं मरण पावून
ते सात एकवट पडले. १० त्यावर आयेची
कन्या रिज्पा इने गोणताट घेऊन कापणीच्या प्रारं-
भापासून त्या प्रेतांवर पाऊस आकाशांतून पडला
तोंपर्यंत आपल्यासाठीं खडकावर पसरिलें आणि
तिने दिवसां आकाशांतील पांखरांस त्यांवर उतरूं
दिल्हें नाहीं, आणि रात्रीं रानांतील पशूंस त्यांवर
येऊं दिल्हें नाहीं. ११ आणि आयेची कन्या
रिज्पा जी पूर्वी शाऊलाची उपपत्नी होती तिने
जें केलें तें दावीदाला कोणीएकाने सांगितलें.
१२ तेव्हां दावीदाने जाऊन शाऊल व त्याचा
पुत्र योनाथान यांचीं हाडें याबेशगिलादाच्या
माणसांपासून घेतलीं; कारण कीं यानी त्यांचीं
शरिरें बेथशाम, जेथें पलिष्ट्यानी शाऊलाला गि-
लबवांत जिवें मारून त्यांस टाकिलें, त्याच्या र-
स्त्यांतून चोरून नेलीं होतीं. १३ आणि त्याने
तेथून शाऊलाचीं हाडें व त्याचा पुत्र योनाथान
याचीं हाडें आणिलीं, आणि जीं माणसें फांशीं दि-
ल्हेलीं त्यांचीं हाडें त्यानी गोळा केलीं. १४ आ-
णि त्यानी शाऊलाचीं हाडें व त्याचा पुत्र योना-
थान याचीं हाडें बन्यामीनांतील प्रांतांत सेलामध्यें
त्याचा बाप कीश याच्या कबरेंत पुरिलीं, तसें
राजाने जें सर्व सांगितलें तें त्यानी केलें, आणि
यानंतर देव देशास प्रसन्न झाला.

१५ आणि पलिष्टी व इस्राएली यामध्यें अ-
णखी लढाई झाली, आणि दावीद व त्याच्यासंग-
तीं जे चाकर होते ते उतरून जाऊन पलिष्ट्यांसी
लढले आणि दावीद थकून गेला. १६ तेव्हां
इशबीबनोब जो राफाच्या पुत्रांतील होता ज्या-
च्या भाल्याचें वजन तीनशें पितळी शेकेल होतें,
त्याने नवी तरवार बांधिली असतां दावीदाला
मारायास विचार केला. १७ परंतु जरूवेचा
पुत्र अबीशाय याने त्याचें सहाय केलें, आणि त्या
पलिष्ट्याला मारून टाकिलें; तेव्हां दावीदाच्या
माणसानी शपथ वाहून त्याला ह्मटलें, "इस्राए-
लाचा दिवा त्वां न विझवावा ह्मणून तूं आमच्या-
संगतीं लढाईत अणखी येऊं नको."

१८ यानंतर असें झालें कीं गोबाजवळ पलि-
ष्ट्यांसीं अणखी लढाई झाली, त्या काळीं सि-
ब्बखा हुशाथी याने साफ जो राफाच्या पुत्रां-
तील एक होता त्याला मारिलें. १९ आणि गो-
बाजवळ पलिष्ट्यांसीं अणखी लढाई झाली,
तेव्हां यारे ओरगीम बेथलेहेमकर याचा पुत्र एल-
हानान याने गल्याथ गित्ती याचा भाऊ ज्या-
च्या भाल्याची काठी साळ्याच्या तुरीसारिखी
होती, त्याला मारिलें. २० आणि गाथाजवळ अण-
खी लढाई झाली, तेव्हां एक उंच माणूस ज्याच्या
एकएका हाताला साहा बोटें आणि ज्याच्या
एकएका पायाला साहा बोटें, एकंदर चोवीस बोटें,
असा तेथें होता, तोहि राफापासून जन्मला. २१
आणि जेव्हां त्याने इस्राएलाची निंदा केली तेव्हां
दावीदाचा भाऊ शिमा याचा पुत्र योनाथान याने
त्याला जिवें मारिलें. २२ हे चार गाथांत
राफापासून जन्मले; आणि ते दावीदाच्या हाताने
व त्याच्या चाकरांच्या हाताने पडले.

## अध्याय २२.

जेव्हां परमेश्वराने दावीदाला त्याच्या शत्रूं-
च्या हातांतून व शाऊलाच्या हातांतून सोड-
विलें होतें; २ त्या दिवशीं त्याने हें गीत उच्चा-
रून परमेश्वराची स्तुति करून असें ह्मटलें

कीं, "परमेश्वर माझा खडक, माझा दुर्ग, आणि
माझा सोडविणारा आहे. ३ माझ्या खडकाचा
देव, त्याचा आश्रय मी धरीन; तो माझी ढाल व
माझ्या तारणाचा शिंग, माझा गड, माझा आश्रय,
माझा तारणारा आहे; त्वां मला अन्याय करणाऱ्या
पासून सोडविलें आहे. ४ परमेश्वर जो स्तुति-
योग्य त्याची प्रार्थना मी करीन, आणि आपल्या
शत्रूंपासून माझें रक्षण होईल. ५ जेव्हां मृत्यू-
च्या लाटांनी मला वेढिलें आणि अनर्थाच्या पु-
रांनी मला भयभीत केलें. ६ लोकांतराच्या बंध-
नांनी मला वेढिलें, मरणाचे फांस माझ्यापुढें आ-
ले. ७ तेव्हां म्यां आपल्या संकटांत परमेश्वरा-
ला हाक मारिली, आणि म्यां आपल्या देवाची
प्रार्थना केली; आणि त्याने आपल्या मंदिरांतून
माझा शब्द ऐकिला, आणि माझें ओरडणें त्या-
च्या कानीं आलें. ८ तेव्हां पृथ्वी थरथरून कां-
पली आणि आकाशाचे पाये हदरले व थरथरले,
कां कीं तो क्रोधयुक्त झाला. ९ त्याच्या नाकपु-
ड्यांतून धूर निघाला, आणि त्याच्या मुखांतून
अग्नि निघून जाळीत गेला; त्याकडून इंगळ पेटले.
१० आणि तो आकाश लववून उतरला व त्याच्या
पायांखालीं काळोख होता. ११ आणि तो करू-
बावर बसून उडत गेला व तो वायूच्या पक्षां-
वर दृष्टीस पडला. १२ आणि अंधकार व
पाण्याचा संग्रह व निबिड मेघ यांकडून त्याने
आपलें आच्छादन केलें. १३ त्याच्या पुढल्या
तेजाने अग्नीचे कोळसे प्रदीप्त झाले. १४ पर-
मेश्वराने आकाशांत गर्जना केली आणि परात्प-
राने आपला शब्द प्रगट केला. १५ त्याने
बाण मारून त्यांची दाणादाण केलीं, त्याने वीज
चकाकवून त्यांची गडबड गेली. १६ तेव्हां
परमेश्वराच्या धमकावणीकडून आणि त्याच्या
नाकपुड्यांचा श्वास टाकण्याकडून समुद्राचीं तळें
दिसलीं, भुवनाचे पाये उघडे झाले. १७ त्याने
आकाशापासून पाठवून मला घेतलें, त्याने मोठ्या
पाण्यांतून मला काढिलें. १८ त्याने माझ्या बळ-
कट शत्रूंपासून, माझ्या द्वेषकांपासून मला सोड-
विलें, कारण कीं ते मजपेक्षां बळवान् होते. १९
माझ्या विपत्तीच्या दिवसीं ते माझ्या आड आले,
परंतु परमेश्वर मला आधार होता. २० आणि
त्याने मला मोकळ्या ठिकाणीं आणिलें, त्याचा
अनुग्रह मजवर होता म्हणून त्याने मला सोड-
विलें. २१ परमेश्वराने माझ्या नीतिप्रमाणें
माझें बरें केलें, त्याने माझे हात निर्मळ होते त्या-
प्रमाणें मला फळ दिल्हें. २२ कारण कीं म्यां
परमेश्वराचे मार्ग पाळिले, आणि दुष्टाई करून
आपल्या देवाला सोडिलें नाहीं. २३ कारण
कीं त्याच्या सर्व आज्ञा माझ्या लक्षांत असतात,
आणि त्याच्या नियमांपासून मी भ्रष्ट झालों नाहीं,
२४ तसें मी त्याजवळ निर्दोषी राहिलों आणि
म्यां आपल्याला पापापासून राखिलें. २५ या-
स्तव परमेश्वराने माझ्या नीतिप्रमाणें आणि
त्याच्या देखतां माझ्या निर्मळपणाप्रमाणें मला फळ
दिल्हें. २६ धार्मिकासीं तूं धार्मिक असतोस,
निर्दोषी पुरुषासीं तूं निर्दोषी असतोस. २७ निर्म-
ळासीं तूं निर्मळ असतोस, वांकड्यासीं तू वांकडा
असतोस. २८ कां तर तूं दुःखित लोकांस
तारितोस, परंतु जे गर्विष्ट त्यांस त्वां नीच करावें
म्हणून तुझी दृष्टि त्यांवर आहे.

२९ अणखी हे परमेश्वरा, तूं माझा दिवा
आहेस, आणि परमेश्वर प्रकाश करून माझा
अंधार घालवील. ३० कां कीं तुझ्यायोगें मी
सैन्यामधून धांवलों, देवाच्यायोगें म्यां भिंतीवरून
उडी मारिली. ३१ देवाचा मार्ग नीट आहे,
परमेश्वराचें वचन पवित्र आहे, जे सर्व त्याचा
आश्रय करितात त्यांस तो ढालरूप आहे. ३२
कां कीं परमेश्वराशिवाय देव कोण आहे?
आणि आपल्या देवाशिवाय खडकरूप आश्रय
कोण आहे? ३३ देव माझें बळ व शक्ति आहे
आणि तो माझा मार्ग सरळ करितो. ३४ तो
माझे पाय हरणासारिखे चपल करितो, आणि तो
माझ्या उंच ठिकाणावर मला ठेवितो. ३५ तो
माझ्या हातांस लढायास शिकवितो, असें कीं
माझे हात पितळी धनुष्य लववितात. ३६ त्वां
आपली तारणरूप ढाल मला दिल्ही आहे, आणि
तुझ्या प्रसन्नतेने मला थोर केलें आहे. ३७
त्वां माझ्याखालीं माझ्या पावलांसाठीं मोकळी
जागा केली आहे, यास्तव माझे पाय घसरले
नाहींत. ३८ म्यां आपल्या शत्रूंचा पाठलाग
करून त्यांस मारिलें, आणि त्यांचा नाश करीं

तोंपर्यंत मी परत आलों नाहीं. ३९ त्वां त्यांस
मारिलें व खुपसलें असें कीं त्यांच्यानें उठवेना
आणि ते माझ्या पायांखालीं पडले. ४० आणि
त्वा लढाईसाठीं मला बळाने वेष्टिलें, जे मजवर
उठले त्यांस त्वां माझ्याखालीं केलें. ४१ त्वां
माझ्या शत्रूंची मान मला दिल्ही, आणि म्या मा-
झ्या द्वेषकांचा नाश केला. ४२ त्यानी चहुंकडे
पाहिलें परंतु कोणी सोडविणारा नाहीं; परमे-
श्वराकडे त्यानी पाहिलें परंतु त्याने उत्तर दिल्हें
नाहीं. ४३ तेव्हां म्या त्यांस भूमीच्या धुळीसा-
रिखें चुर्ण केलें, म्यां त्यांस मार्गांतल्या चिखला-
सारिखें तुडवून त्यांस विखरिलें. ४४ लोकांच्या
कलहांतून त्वां मला निभाविलें, त्वां मला राष्ट्रांचा
शिरोमणी केलें आहे, ज्या लोकांस म्या जाणिलें
नाहीं, ते माझी सेवा करितात. ४५ परके वंश
मला वश्य आहेत; माझी आज्ञा कानीं ऐकतांच
ते मला मानितात. ४६ परके वंश गळून पडले
आहेत, ते आपल्या सपरिघ जाग्यांच्या बाहेर
घाबरे असतात. ४७ परमेश्वर सजीव आहे,
आणि तो माझा खडक सुवंदित असो, आणि देव
जो माझा तारणरूप खडक तो थोर मानिला
जावो. ४८ जो माझा सूड उगविणारा तो देव
आहे, आणि तो राष्ट्रांस माझ्याखालीं वश्य करि-
तो. ४९ आणि त्याने माझ्या शत्रूंतून मला आ-
णिलें, आणि जे मजवर उठतात त्यांवर मला उंच
केलें; त्वां मला क्रूर माणसापासून सोडविलें. ५०
यास्तव हे परमेश्वरा, राष्ट्रांमध्यें मी तुझी स्तुति
करीन आणि तुझ्या नामाचें कीर्त्तन करीन. ५१
तो आपल्या राजाच्या रक्षणासाठीं कोटरूप आहे,
तो आपला अभिषिक्त जो दावीद त्याजवर व
त्याच्या संतानावर निरंतर कृपा करील.

## अध्याय २३.

दावीदाचे हे शब्द शेवटले आहेत; इशायाचा
पुत्र दावीद याने ह्मटलें, जो माणूस उंच
केलेला होता, जो याकोबाच्या देवाचा अभिषिक्त,
जो इस्राएलाचा मंजूळ गीत करणारा त्याने असें
ह्मटलें कीं, २ "परमेश्वराचा आत्मा माझ्या-
कडून बोलला, आणि त्याचा शब्द माझ्या जिभे-
वर होता. ३ इस्राएलाच्या देवाने मला ह्मटलें,
जो इस्राएलाचा खडकरूप आश्रय त्याने ह्मटलें
कीं, जो मनुष्यांवर अधिकार करितां तो न्यायी
असावा, तो देवाच्या भयाने अधिकार करीत
असावा. ४ सकाळीं सूर्योदयाच्या वेळेस जो
उजेड त्यासारिखा तो होईल; जसी निर्मेघ स-
काळ, आणि जसें भूमीवरचें कोवळें गवत पाऊस
पडल्यावर उन्हाने वाढलेलें, तसा होईल. ५
जरी माझें कुटुंब देवाजवळ असें नाहीं, तरी
त्याने सर्व प्रकारें सुयुक्त व स्थापित असा निरंतर
करार मजसीं केला आहे, आणि हें माझें तारण
व सर्व हर्ष आहे जरी तो वाढवीत नाहीं ६
परंतु दुष्ट लोक जे कांटे हातानी घेववत नाहींत
ह्मणून टाकलेले, त्यांसारिखे आहेत. ७ जो को-
णी त्यांस स्पर्श करील त्याने लोखंड व भाल्या-
ची काठी यांकडून सज्ज असावें, आणि ते अग-
दी नाहींसे होत तोंपर्यंत जळायाचे आहेत."

८ जे दावीदाचे पराक्रमी पुरुष त्यांचीं नावें
हीं आहेत; जो ताखमोनी आसनावर बसला जो
सर्दारांमध्यें पहिला तो अदीणो अझ्नी होता;
त्याने आठशें माणसांवर उठून एका वेळेस त्यांस
मारिलें. ९ आणि दुसरा अहोहीचा पुत्र दोदो
याचा पुत्र एलाजार होता; जेव्हां पलिष्टी ल-
ढाईसाठीं तेथें एकत्र मिळाले होते आणि इस्राए-
लाचे मनुष्य वर गेले होते तेव्हां दावीदाबरोबर
ज्या तीन शूर माणसानी त्यांची निंदा केली, त्यां-
तील तो एक होता. १० तो उठून आपला हात
थके व तरवारीला चिकटे तोंपर्यंत पलिष्ट्यांस
मारीत गेला, आणि परमेश्वराने त्या दिवसीं
मोठें यश दिल्हें, आणि लोक त्याच्यामागें लुटा-
यास मात्र माघारे आले. ११ आणि त्यानंतर
आगे हरारी याचा पुत्र शाम्मा होता; कोणी-
एका वेळेस पलिष्ट्यानी जमून एक टोळी केली,
आणि तेथें काठणानी भरलेला शेतमळा होता
आणि लोक पलिष्ट्यांसमोरून पळाले. १२ तेव्हां
त्याने त्या मळ्याच्या मध्यभागीं उभे राहून त्याचें
रक्षण केलें आणि पलिष्ट्यांस मारिलें, आणि
परमेश्वराने मोठें यश दिल्हें. १३ आणि जे
तीस मुख्य मनुष्य त्यांतून तिघे जण जाऊन काप-
णीच्या वेळेस दावीदापासीं अदूलाम गुहेंत आले,
तेव्हां पलिष्ट्यांची फौज रफाईमाच्या खोऱ्यांत

उतरली होती. १४ आणि दावीद त्या वेळेस
गडांत होता, आणि पलिष्ट्यांचें ठाणें तेव्हां बेथ-
लेहेमांत होतें. १५ आणि दावीद फार उत्कं-
ठित होऊन बोलला कीं, "बेथलेहेमाच्या दरवा-
ज्याजवळच्या विहिरींतून पाणी मला प्यायास कोण
आणून देईल?" १६ तेव्हां ते तिघे पलिष्ट्यां-
च्या छावणींत घुसले, आणि बेथलेहेमाच्या दर-
वाज्याजवळच्या विहिरींतून पाणी त्यांनी काढिलें,
आणि तें घेऊन दावीदाजवळ आणिलें; तरी तो तें
पिईना परंतु त्यानें तें परमेश्वरासमोर ओंति-
लें. १७ आणि त्यानें ह्मटलें, "हे परमेश्वरा,
असलें पाणी पिणें हें मजकडून न घडो; जे मनुष्य
आपल्या जिवांच्या संकटानें गेले त्यांचें रक्त हें
पाणी आहे कीं नाहीं?" याकरितां तो तें पिईना;
हीं कृत्यें त्या तीन शूर मनुष्यांनी केलीं. १८ आणि
जरूवेचा पुत्र योवाब याचा भाऊ अबीशाय
तो तिघांमध्यें पहिला होता; त्यानें आपला भा-
ला तीनशें माणसांवर उचलून त्यांस मारिलें,
आणि त्या तिघांमध्यें त्यानें नांव मिळविलें. १९
त्या तिघांमध्यें तो विशेष नामांकित होता कीं
नाहीं? या कारणासाठीं तो त्यांचा नायक होता;
तथापि तो त्या पहिल्या तिघांची बरोबरी पावला
नाहीं. २० आणि एक काबजेलकर जो फार
शूर व बहुत पराक्रमी कृत्यें करणारा, त्याचा पुत्र
यहोयादा याचा पुत्र बनाया यानें मोवाबांतील
सिंहासारिख्या दोन माणसांस मारिलें, आणि
त्यानें बर्फाच्या दिवसांत भुयारांत उतरून एका
सिंहाला मारिलें. २१ आणखी त्यानें एक मिसरी
माणूस जो बळवान् त्याला जिवें मारिलें; त्या
मिसऱ्याच्या हातीं भाला होता परंतु केवळ काठी
घेऊन तो त्याच्याजवळ गेला, आणि त्या मिस-
ऱ्याच्या हातून भाला हिसकून त्याच्याच भाल्यानें
त्याला जिवें मारिलें. २२ हीं कृत्यें यहोयादाचा
पुत्र बनाया यानें केलीं; आणि त्यानें तिघां शूरां-
मध्यें नांव मिळविलें. २३ तो तिसांपेक्षां नामां-
कित होता, परंतु तो पहिल्या तिघांची बरोबरी
पावला नाहीं, आणि दावीदानें त्याला आपल्या
हुजरावीवर नेमिलें. २४ योवाबाचा भाऊ असा-
हेल तिसांतील होता आणि दोदो बेथलेहेमी
याचा पुत्र एलनान; २५ शाम्मा हरोदी;
एलीका हरोदी; २६ हेलेज पालती; इक्केश थ-
कोरी याचा पुत्र ईरा; २७ आबीयेजर आंथोथी;
मबुनाय हूशाथी; २८ जालमोन अहोही; सा-
हराय नटोफाथी; २९ बाना नटोफाथी याचा पुत्र
हेलेब; बन्यामीनाच्या संतानांतील गिबा एथील
रीबाय याचा पुत्र इत्ती; ३० बनाया पिरा-
थोनी; गाशाच्या नदीकडील हिदय; ३१ अबी-
अलबोन आर्बाथी; अजमावेथ बारहूमी; ३२
एलयाबा शालबोनी; याशेनाच्या पुत्रांतील
यहोनाथान; ३३ शाम्मा हरारी; शारार अ-
रारी याचा पुत्र एहियाम; ३४ मखाथीचा पुत्र
अहासबे याचा पुत्र अलीफलेट; अहिथोफेल
गिलोनी याचा पुत्र एलियाम; ३५ हेत्रो कार-
मेली; फारा आर्बी; ३६ जोबांतील नाथान
याचा पुत्र इगाल; बानी गादी; ३७ जेलक
अम्मोनी; नहर बैरोथी जरूवा इचा पुत्र यो-
वाब याचा शस्त्रवाहक; ३८ ईरा इथ्री; गारेब
इथ्री; ३९ उरीया हित्ती; एकंदर सततीस होते.

## अध्याय २४.

यानंतर परमेश्वराचा क्रोध पुन्हां इस्राएला-
वर झाला, आणि त्यानें दावीदाला त्यांजवर
असें चेतविलें कीं तो ह्मणाला, "जा इस्राएल व
यहूदा यांची मोजणी कर." २ मग राजानें
आपल्याबरोबर योवाब सेनापति होता त्याला असें
सांगितलें कीं, "आतां इस्राएलाच्या अवघ्या वं-
शांत दानापासून बैरशेब्यापर्यंत जा, आणि मला
लोकांची संख्या कळावी ह्मणून त्यांस मोज." ३
तेव्हां योवाबानें राजाला असें ह्मटलें कीं, "लोक
कितीहि असोत तरी आपला देव परमेश्वर
त्यांस शंभरपट अधिक वाढवो, आणि माझा प्रभु
राजा आपल्या डोळ्यांनी तें पाहो, परंतु या गोष्टी-
ची इच्छा माझा प्रभु राजा कां धरितो?" ४
तथापि राजाची आज्ञा योवाबाला व सैन्याच्या
नायकांला दृढ होती, ह्मणून योवाब व सैन्याचे
नायक राजाजवळून निघून इस्राएलाच्या लोकांची
मोजणी करायास गेले. ५ आणि ते यार्देन
वल्हांडून यार्जेराजवळ गादाच्या खोऱ्यांत जें
नगर त्याच्या उजव्याकडे अरोवरांत उतरले. ६
मग ते गिलादास व ताहातीमहादशीच्या प्रांतांत

गेले आणि दानायानास येऊन फेरा घेऊन सिदो-
नाभोंवते गेले. ७ मग ते सोराच्या कोटास हि-
व्वी व कनानी यांच्या सर्व नगरांस जाऊन यहू-
दाच्या दक्षिणेकडे बेरशेब्यास गेले. ८ याप्रमाणें
ते सर्व मुलखांत फिरून नऊ महिने व वीस दि-
वस यरूशालेमास परत आले. ९ आणि यो-
वाबाने राजाला लोकांच्या संख्येची याद दिल्ही;
त्या काळीं इस्राएलाचे तरवार उपसणारे शूर
पुरूष आठ लाख होते, आणि यहूदाचे पांच
लाख पुरुष होते.

१० आणि दावीदाने लोकांस मोजल्यानंतर
त्याचें मन त्याला खाऊं लागलें; तेव्हां दावीदाने
परमेश्वराला असें ह्मटलें कीं, "जें म्या केलें
त्यांत म्या फार पाप केलें आहे, तर आतां, हे
परमेश्वर, मी प्रार्थना करितों कीं तूं आपल्या
सेवकाचें पाप दूर कर, कां कीं म्या फार मूर्खपण
केलें." ११ आणि दावीद सकाळीं उठल्यानंतर
गाद भविष्यवादी जो दावीदाचा गुरु त्याजवळ
परमेश्वराचें वचन असें आलें कीं, १२ "तूं
दावीदापासीं जाऊन त्याला सांग, परमेश्वर
असें ह्मणतो, मी तुजपुढें तीन गोष्टी ठेवितों, त्यांतून
कोणती म्या तुला करावी, ह्मणून तुझी इच्छा
आहे ती सांग." १३ तसें गादाने दावीदाजवळ
येऊन त्याला सांगितलें, आणि त्याने त्याला असें
ह्मटलें, "तुझ्या सर्व मुलखांत सात वर्षांचा दु-
काळ पडावा? किंवा तुझे शत्रू तुझ्या पाठीस ला-
गत असतां त्यांच्यापुढून त्वां तीन महिने पळावें?
किंवा तुझ्या मुलखांत तीन दिवस मरी व्हावी?
आतां विचार कर, आणि ज्याने मला पाठविलें
त्याला म्या कसें उत्तर द्यावें, तें ठरवून सांग."
१४ तेव्हां दावीदाने गादाला ह्मटलें, "मी फार
संकटांत आहें, आतां आह्मी परमेश्वराच्या
हातांत पडूं; कां कीं त्याची दया मोठी आहे,
आणि माणसांच्या हातांत न पडावें." १५ मग
परमेश्वराने इस्राएलांत सकाळपासून नेमलेल्या
वेळापावेतों मरी पाठविली, आणि दानापासून बे-
रशेबापर्यंत लोकांतून सत्तर हजार माणसें मेलीं.
१६ आणि दूताने यरूशालेमाचा नाश करायास
आपला हात त्यावर लांब केला, तेव्हां परमेश्व-
राने त्या अनर्थाचा अनुताप केला, आणि त्याने
जो दूत लोकांचा नाश करीत होता त्याला ह्मटलें,
"पुरे, आतां तुझा हात आटोप." तेव्हां परमे-
श्वराचा दूत अरावना यबूसी याच्या खळ्या-
पासीं होता. १७ आणि जो दूत लोकांस मा-
रीत होता त्याला पाहिल्यावर दावीदाने परमे-
श्वराला असें ह्मटलें कीं, "पाहा म्या पाप केलें
आणि दुष्टाई केली आहे, परंतु हीं मेंढरें त्यांनी
काय केलें आहे? तुझा हात मजवर व माझ्या
बापाच्या कुटुंबावर असो."

१८ आणि त्या दिवसीं गादाने दावीदाजवळ
येऊन त्याला सांगितलें, "जा, अरावना यबूसी
याच्या खळ्यांत परमेश्वरासाठीं वेदी बांध."
१९ तेव्हां दावीद परमेश्वराने गादाच्या मुखा-
कडून आज्ञा केल्याप्रमाणें गेला. २० आणि
अरावनाने अवलोकन करून राजाला व त्याच्या
चाकरांस आपल्याकडे येतां पाहिलें; तेव्हां अराव-
नाने बाहेर जाऊन राजापुढें आपलें तोंड भूमीस
लावून नमस्कार केला. २१ आणि अरावना बो-
लला, "माझा प्रभु राजा आपल्या चाकराजवळ
कां आला आहे?" तेव्हां दावीद बोलला, "लो-
कांमध्यें मरी बंद व्हावी ह्मणून परमेश्वरासाठीं
वेदी बांधण्याकरितां तुजपासून हें खळें विकत
घ्यायास मी आलों आहें." २२ तेव्हां अराव-
नाने दावीदाला ह्मटलें, "माझा प्रभु राजा याने
जें लक्षांत बरें वाटेल तें घेऊन अर्पण करावें; पा-
हा, एथें होमासाठीं बैल आहेत, आणि लांकडां-
साठीं मळनयंत्र व बैलांचें सामान आहे." २३
हें सर्व अरावनाने राजासारिखें राजाला दिल्हें,
आणि अरावनाने ह्मटलें, "तुझा देव परमेश्वर
याने तुजवर प्रसन्न व्हावें." २४ तेव्हां राजाने
अरावनाला ह्मटलें, "असें नाहीं, परंतु मी खचीत
पैका देऊन तें तुजपासून विकत घेईन, आणि मी
आपला देव परमेश्वर यासाठीं फुकट मिळा-
लेल्याचे होम करणार नाहीं." तेव्हां दावीदाने
खळें व बैल यांस पन्नास रुप्याच्या मुद्रांनी विकत
घेतलें. २५ आणि दावीदाने परमेश्वरासाठीं
तेथें वेदी बांधिली, आणि होम व शांतिकारक यज्ञ
केले; तेव्हां परमेश्वर त्या देशावर प्रसन्न झा-
ला, आणि इस्राएलामध्यें मरी बंद झाली.

# राजे यांचें पहिलें पुस्तक.

## अध्याय १.

दावीद राजा तर वयाने वृद्ध झाला होता, ते-
व्हां त्यावर त्यांनी वस्त्रें घातलीं, तरी त्याला
ऊब आली नाहीं. २ यास्तव त्याच्या सेवकांनी
त्याला ह्मटलें कीं, "आमच्या प्रभु राजासाठीं
लोकांनी तरुण कुमारी मिळवावी, मग तिने राजा-
च्यापुढें उभें राहून त्याचा संभाळ करावा; आणि
आमच्या प्रभु राजाला ऊब यावी, ह्मणून तिने
तुझ्या उरासीं निजत जावें." ३ यास्तव त्यांनी
इस्राएलाच्या सर्व सीमेंत सुंदर तरुणीचा शोध
केल्यावर शूनामकरीण अबीशाग मिळाली, मग
त्यांनी तिला राजाजवळ आणिलें. ४ ती तरुणी
तर फारच सुंदर होती, आणि तिने राजाची सेवा
करून संभाळ केला, परंतु राजाने तिला जाणिलें
नाहीं.

५ तेव्हां हाग्गीथाचा पुत्र अदोनिया आपल्या-
ला उंच करून ह्मणाला, "मी राज्य करीन."
मग त्याने आपल्यासाठीं रथ व राऊत आणि
आपल्यापुढें धांवायाला पन्नास माणसें ठेवलीं.
६ त्याच्या बापाने तर, "तूं असें कां करितोस?"
या प्रकारें बोलून त्याच्या जन्मापासून त्याला दु-
खावलें नव्हतें; अणखी तो स्वरूपाने फार सुंदर,
आणि तो तिला आबशालोमाच्या पाठीवर झाला
होता. ७ तेव्हां त्याचीं बोलणीं जरूवेचा पुत्र
योवाब व एब्याथार याजक यांसीं होत होतीं;
यास्तव ते अदोनीयाच्या पाठीमागें सहाय होते.
८ परंतु सादोक याजक व यहोयादाचा पुत्र ब-
नाया व नाथान भविष्यवादी व शिमी व रेयी
आणि दावीदाच्याजवळ जीं शूर माणसें, तीं अ-
दोनीयाच्या पक्षांत नव्हतीं. ९ आणि जोहेले-
थाचा खडक जो एनरोगेलाजवळ तेथें अदोनी-
याने बकरें व गुरें व पुष्ट पशू कापिले; तेव्हां
त्याने राजाचे पुत्र आपले भाऊ या सर्वांस आणि
राजाचीं यहूद्यांतलीं सर्व चाकर माणसें, यांस
बोलाविलें. १० परंतु भविष्यवादी नाथान व
बनाया व शूर माणसें व आपला भाऊ शलमोन,
यांस बोलावलें नाहीं.

११ तेव्हां शलमोनाची आई बाथशेबा इला
नाथानाने असें ह्मटलें कीं, "आमचा प्रभु दा-
वीद याला न कळतां, हाग्गीथाचा पुत्र अदो-
नीया राज्य करितो, असें त्वां ऐकिलें नाहीं कीं
काय? १२ तर आतां चल, मी तुला अगत्ये-
करून बोध करितों; तेणेकरून तूं आपला प्राण
आणि आपला पुत्र शलमोन याचा प्राण वां-
चीव. १३ तूं दावीद राजाजवळ जाऊन त्याला
ह्मण कीं, हे राजा माझ्या प्रभू, 'निश्चयें तुझा
पुत्र शलमोन माझ्यामागें राज्य करील, तोच
माझ्या सिंहासनावर बसेल!' असी शपथ त्वां
आपल्या दासीजवळ वाहिली नाहीं कीं काय?
तर अदोनीया राज्य कां करितो?' १४ पाहा,
तूं तेथें राजाला बोलत आहेस तितक्यांत मीहि
तुझ्यामागें आंत येऊन तुझ्या गोष्टी स्थापीन.
१५ यास्तव बाथशेबा खोलींत राजाजवळ गेली;
राजा तर फार ह्मातारा होता, आणि शूनामकरीण
अबीशाग राजाची सेवा करीत होती. १६ तेव्हां
बाथशेबा लवून राजाच्या पायां पडली; मग राजा
बोलला, "तुला काय पाहिजे?" १७ तेव्हां ती
त्याला बोलली, "हे माझ्या प्रभू, त्वां आपल्या
दासीजवळ आपला देव परमेश्वर याची शपथ
वाहिली कीं 'तुझा पुत्र शलमोन माझ्यामागें राज्य
करील, तोच माझ्या सिंहासनावर बसेल.' १८
तर हे राजा माझ्या प्रभू, आतां पाहा, अदोनीया
राज्य करितो; तर तुला अझून कळलें नाहीं.
१९ आणि त्याने गुरें व पुष्ट पशू व बकरें, हीं
बहुत कापिलीं आहेत, आणि राजाचे सर्व पुत्र व
एब्याथार याजक व योवाब सेनापति, यांस बो-
लाविलें आहे; परंतु तुझा चाकर शलमोन या-
ला बोलाविलें नाहीं. २० तर हे राजा माझ्या
प्रभू, तूं पाहा, माझा प्रभु राजा याच्यामागें या-
च्या सिंहासनावर कोणी बसावें, हें त्वां इस्राए-
लास दाखवावें ह्मणून सर्वांचीं दृष्टि तुझ्याकडे

आहे. २१ अणखी जेव्हां माझा प्रभु राजा
आपल्या वडिलांच्यासंगतीं निजेल, तेव्हां असें हो-
ईल कीं मी व माझा पुत्र शलमोन बट्टयाचे
होऊं." २२ तेव्हां ती राजाशीं बोलत होती
तितक्यांत पाहा, नाथानहि भविष्यवादी आला.
२३ आणि त्यांनी राजाला कळविलें कीं, "पाहा,
भविष्यवादी नाथान आला." मग तो राजापुढें
येऊन आपलें तोंड भूमीला लावून राजाच्या
पायां पडला. २४ तेव्हां नाथान बोलला, "हे
राजा माझ्या प्रभू, 'माझ्यामागें अदोनीयानें रा-
ज्य करावें, त्यानेच सिंहासनावर बसावें, असें
त्वां सांगितलें आहे काय?' २५ कशावरून, तर
त्यानें आज खालीं जाऊन गुरें व पुष्ट पशू व
बकरें, हीं बहुत कापिलीं आहेत; आणि त्यानें
राजाचे सर्व पुत्र व सैन्याचे सरदार व एब्याथार
याजक यांस बोलाविलें आहे; आणि पाहा, ते
त्याच्यापुढें खाऊन पिऊन ह्मणतात, 'अदोनीया
राजा चिरकाल वांचो.' २६ परंतु मला तुझ्या
सेवकाला व जादोक याजक व यहोयादाचा पुत्र
बनाया व तुझा सेवक शलमोन, यांस त्यानें बो-
लाविलें नाहीं. २७ ही गोष्ट माझ्या प्रभु राजा-
कडून झाली कीं काय? तर माझ्या प्रभु राजा या-
च्यामागें कोणी सिंहासनावर बसावें, हें त्वां आ-
पल्या सेवकास कळविलें नाहीं."

२८ तेव्हां दावीद राजानें उत्तर देतां ह्मटलें,
"तुह्मी बाथशेबेला माझ्याजवळ बोलावा." तेव्हां
ती राजापुढें येऊन राजाच्या समोर उभी राहिली.
२९ मग राजानें शपथ वाहून ह्मटलें, "ज्यानें माझा
प्राण सर्व संकटांतून सोडविला, तो सजीव परमे-
श्वर आहे; ३० यावरून म्या तुझ्याजवळ इस्रा-
एलाचा देव परमेश्वर याची जसी शपथ वाहि-
ली होती कीं 'निश्चयें तुझा पुत्र शलमोन मा-
झ्या मागें राज्य करील, तोच माझ्या ठिकाणीं
माझ्या सिंहासनावर बसेल,' तर तसेंच मी
आज करीन." ३१ तेव्हां बाथशेबा आपलें
तोंड खालीं भूमीस लावून राजाच्या पायां पडून
बोलली, "माझा प्रभु दावीद राजा सर्वकाळ वां-
चो." ३२ मग दावीद राजानें सांगितलें, "जादोक
याजक व नाथान भविष्यवादी व यहोयादाचा
पुत्र बनाया, यांस तुह्मी माझ्याजवळ बोलावा."
नंतर ते राजापुढें आले. ३३ मग राजानें त्यांस
सांगितलें, "तुह्मी आपल्यासंगतीं आपल्या धन्या-
च्या चाकरांस घेऊन माझा पुत्र शलमोन याला
माझ्या खेंचरावर बसून खालीं गिहोनापर्यंत न्या.
३४ आणि तेथें जादोक याजक व नाथान भवि-
ष्यवादी यांनी त्याला इस्राएलावर राज्य करायास
अभिषेक करावा; मग तुह्मी करणा वाजवून बोला,
'शलमोन राजा चिरकाळ वांचो.' ३५ नंतर
तुह्मी त्याच्यामागें वरतें या, आणि त्यानें येऊन
माझ्या सिंहासनावर बसावें, त्यानेच माझ्या ठि-
काणीं राज्य करावें; कां कीं तोच इस्राएलावर व
यहूदावर अधिकारी व्हावा, ह्मणून म्या आज्ञा
दिल्ही आहे." ३६ तेव्हां यहोयादाचा पुत्र ब-
नाया यानें राजाला उत्तर देतां ह्मटलें, "आमेन;
माझ्या प्रभु राजाचा देव परमेश्वर तसेंच बोलो.
३७ परमेश्वर माझ्या प्रभु राजाला जसा अ-
नुकूळ होता, तसा शलमोनाला होवो; आणि
माझा प्रभु दावीद राजा याच्या सिंहासनापेक्षां
त्याचें सिंहासन मोठें करो." ३८ मग जादोक
याजक व नाथान भविष्यवादी व यहोयादाचा
पुत्र बनाया आणि खरेथी व पलेथी, यानी खालीं
जाऊन शलमोनाला दावीद राजाच्या खेंचरावर
बसविलें, आणि त्याला गिहोनापर्यंत मिरविलें.
३९ मग जादोक याजकाने देवाच्या मंडपांतून
तेलाचें शिंग घेऊन शलमोनाला अभिषेक केला;
मग ते जयकरणा वाजवीत असतां, सर्व लोकां-
नी ह्मटलें, "शलमोन राजा चिरकाळ वांचो."
४० नंतर सर्व लोक त्याच्यामागें वर गेले,
आणि लोकांनी नळिवाद्यांनी उत्सव करून फारच
आनंद केला; यास्तव त्यांच्या शब्दानें भूमीवरून
प्रतिनाद फुटला.

४१ तेव्हां अदोनीयानें आणि त्याच्यासंगतीं
जे जेवणारे, त्या सर्वांनी आपलें जेवण समाप्त
केल्यावर शब्द ऐकिला; मग योवाबानें करण्याचा
शब्द ऐकून ह्मटलें, "नगरांत गडबडीचा शब्द कां
झाला?" ४२ असें तो बोलत असतां तितक्यांत
पाहा, एब्याथार याजक याचा पुत्र योना-
थान आला; तेव्हां अदोनीया बोलला, "ये कां
तर तूं शूर माणूस आणि चांगलें वर्त्तमान सां-
गसील." ४३ मग योनाथानानें अदोनीयाला

उत्तर देतां ह्मटलें, "आमचा प्रभु दावीद राजा
याने शलमोनाला राजा केलें आहे, खरें. ४४
आणि राजाने जादोक याजक व नाथान भवि-
ष्यवादी व यहोयादाचा पुत्र बनाया आणि खरे-
थी व पलेथी, यांस त्याच्यासंगतीं पाठविलें असतां
त्यांनी त्याला राजाच्या खेचरावर बसविलें आहे.
४५ आणि जादोक याजक व नाथान भविष्य-
वादी यानी त्याला गिहोनांत अभिषेक करून
राजा केलें आहे ; आणि ते तेथून आनंद करीत
वर जात असतां, नगरांत गडबड झाली ; जो
नाद तुह्मी ऐकिला, तो तोच. ४६ असा श-
लमोन राजासनावर बसलाच आहे. ४७ आ-
णखी राजाच्या सेवकानी येऊन आमचा प्रभु
दावीद राजा याला आशीर्वाद देतांना ह्मटलें
कीं, 'देव तुझ्या नांवापेक्षां शलमोनाचें नांव उत्तम
करो, आणि तुझ्या सिंहासनापेक्षां त्याचें सिंहा-
सन मोठें करो." तेव्हां राजाने अंथरुणावरून न-
मन केलें. ४८ आणखी राजाने असें ह्मटलें कीं,
इस्राएलाचा देव परमेश्वर याची स्तुति असो ;
कां तर माझ्या दृष्टीसमोर त्याने माझ्या सिंहास-
नावर बसणारा आज दिल्हा आहे."
४९ तेव्हां अदोनीयाच्यासंगतीं जे जेवणारे, ते
सर्व कांपत असतां उठून आपापल्या मार्गाने गेले.
५० आणि अदोनीया शलमोनाला भ्याला, आणि
उठून जाऊन वेदीचीं शिंगें धरिता झाला. ५१ नंतर
शलमोनाला असें कळविलें कीं, "पाहा, अदोनीया
शलमोन राजाला भीत आहे ; आणि पाहा, त्याने
वेदीचीं शिंगें धरून ह्मटलें, 'शलमोन राजाने
माझ्याजवळ आज असी शपथ वाहावी कीं, आ-
पण आपल्या चाकराला तरवारीने मारणार ना-
हीं." ५२ तेव्हां शलमोनाने ह्मटलें कीं, "जर
तो योग्य पुरुष असा होईल, तर त्याचा एक
केंसहि भूमीवर पडणार नाहीं ; परंतु जर त्या-
कडील दुष्टाई दिसून येईल, तरच तो मरेल."
५३ मग शलमोन राजाने पाठविलें असतां
त्यांनी त्याला वेदीवरून खालीं आणिलें ; असा
तो येऊन शलमोन राजाच्या पायां पडला, ते-
व्हां शलमोनाने त्याला सांगितलें, "तूं आपल्या
घरास जा."

अध्याय २.

तेव्हां दावीदाचे मरायाचे दिवस जवळ आले,
यास्तव त्याने आपला पुत्र शलमोन याला आ-
ज्ञा करून ह्मटलें, २ "मी सर्व जगाच्या मार्गाने
जातों ; तर तूं धीर धरून वीरासारिखा ऐस. ३
आणि आपला देव परमेश्वर याचें पाळनीय
पाळ ; ह्मणजे तूं त्याच्या मार्गांनी चालून त्याचे
नेम, त्याच्या आज्ञा व त्याचे न्याय व त्याचीं
बंधारणें, मोश्याच्या शास्त्रांत लिहिलेल्याप्रमाणें
पाळ ; यासाठीं कीं तूं जें कांहीं करसील त्यांत
आणि ज्या कोणीकडे फिरसील तेथें त्वां सफळ
व्हावें. ४ मग परमेश्वराने जें आपलें वचन
मला दिल्हें आहें, तें तो स्थापील; तें असें कीं
'जर तुझे पुत्र सत्यतेने, आपल्या सर्व मनाने व
आपल्या सर्व जिवाने माझ्यापुढें चालायास आप-
ला मार्ग संभाळतील, तर तेणेकरून इस्राएलाच्या
सिंहासनावर तुझा बसणारा पुरुष नाहींसा होणार
नाहीं.' ५ आणखी जरूवेचा पुत्र योवाब याने
जें माझें केलें, ह्मणजे इस्राएलाच्या सैन्याचे दोन
सर्दार, नेराचा पुत्र आबनेर व येथेराचा पुत्र अ-
मासा, यांस जें केलें कीं त्याने त्यांस जिवें मारतां-
ना सल्लांत लढाईतलें रक्त पाडून आपल्या कंबरे-
ला जो काचा त्यावर व आपल्या पायांत जीं पा-
यतणें त्यांत लढाईतलें रक्त घातलें, तें तुला ठा-
ऊक आहे. ६ यास्तव तूं आपल्या ज्ञानाप्रमाणें
वागत असतां, त्याचें पिकलेलें डोकें लोकांतरीं
सुखाने उतरूं देऊं नको. ७ परंतु बार्जिल्ला गि-
लादी याच्या पुत्रांवर तूं दया करून जे तुझ्या
मेजावरलें खातात, त्यांतले ते होऊं दे; कारण
कीं जेव्हां तुझा भाऊ आब्शालोम याच्या पुढून
मी पळालों होतों, तेव्हां ते त्या प्रकारें मला भेटले
होते. ८ आणि पाहा, बाहुरीमांतला बन्यामिनी
गेरा याचा पुत्र शिमी तुझ्याजवळ आहे ; आणि
त्याने ज्या दिवसीं मी माहनाइमास गेलों होतों,
तेव्हां मला भारी शाप दिल्हा; तथापि यार्देनेस
तो माझ्या भेटीस खालीं आला, आणि म्या त्या-
च्याजवळ परमेश्वराची असी शपथ वाहिली
कीं, मी तुला तरवारीने जिवें मारणार नाहीं. ९
तरी आतां तूं त्याला निर्दोषी मोजूं नको; कां तर
तूं शाहाणा माणूस, ह्मणून त्याला त्वां जें करावें

तें तूं जाणतोस; यास्तव त्याचें पिकलेलें डोकें
लोकांतरीं रक्ताने उतरूं दे."

१० मग दावीद आपल्या वडिलांच्या संगतीं
निजला, आणि दावीदाच्या नगरांत पुरला गेला.
११ तर दावीद राजाने ज्या काळीं इस्राएलावर
राज्य केलें, तो चाळीस वर्षांचा; हेब्रोनांत त्याने
सात वर्षें राज्य केलें, आणि यरूशलेमांत तेहेतीस
वर्षें राज्य केलें. १२ नंतर शलमोन आपला
बाप दावीद याच्या गादीवर बसला, आणि त्याचें
राज्य फार सुस्थापित झालें. १३ मग हाग्गी-
थाचा पुत्र अदोनीया शलमोनाची आई बाथशे-
बा इच्याजवळ आला; तेव्हां तिने झटलें, "तूं
मैत्रीने आलास कीं काय?" मग तो बोलला, "मै-
त्रीणींने आलों." १४ आणखी तो बोलला, "मला
तुझ्याजवळ मागणें आहे." मग ती बोलली, "माग."
१५ तेव्हां तो बोलला, "राज्य माझें होतें, हें
तुला ठाऊक आहे; आणि म्या राज्य करावें, झ-
णून सर्व इस्राएलानी आपली दृष्टि मजवर ठेवि-
ली होती; तथापि राज्य वळून माझ्या भावाकडे
झालें, कारण कीं परमेश्वराकडून तें त्याचें होतें.
१६ तर आतां मी तुझ्याजवळ एक मागणें मा-
गतों; तूं मला विन्मुख करूं नको." तेव्हां तिने
त्याला झटलें, "माग." १७ मग तो बोलला,
"शलमोन राजा तुला विन्मुख करणार नाहीं; या-
स्तव त्याने मला शूनामकरीण अबीशाग बायको
करून द्यावी, झणून तूं त्याला सांग." १८ ते-
व्हां बाथशेबेने झटलें, "बरें, मी तुजविषयीं रा-
जाला बोलेन." १९ नंतर बाथशेबा अदोनीया-
विषयीं शलमोन राजाशीं बोलायास त्याजवळ
आली; तेव्हां राजा तिला भेटायास उठून ति-
च्या पायां पडून आपल्या गादीवर बसला, आ-
णि राजाने आपल्या आईसाठीं गादी मांडली अ-
सतां, ती त्याच्या उजव्याकडे बसली. २० मग
ती बोलली, "मी तुझ्याजवळ एक थोडकें मागणें
मागतें; तूं मला विन्मुख करूं नको." तेव्हां रा-
जाने तिला झटलें, "हे माझे आई, माग, कां तर
मी तुला विन्मुख करणार नाहीं." २१ मग तिने
झटलें, "तुझा भाऊ अदोनीया याला शूनामक-
रीण अबीशाग बायको करून दिल्ही जावी." २२
तेव्हां शलमोन राजाने आपल्या आईला उत्तर
देतां झटलें, "तूं अदोनीयासाठीं शूनामकरीण
अबीशागच कां मागतीस? तो माझा भाऊ मा-
झ्यापेक्षां वडील आहे, यास्तव याच्यासाठीं राज्य-
हि माग; झणजे त्यासाठीं आणि एब्याथार या-
जक व सरूवेचा पुत्र योवाब यासाठीं माग."
२३ नंतर शलमोन राजाने परमेश्वराची शपथ
वाहून झटलें, "अदोनीयाने आपल्या जिवावर हें
मागणें मागितलें आहे, नाहीं तर देव मला तसें
आणि त्यापेक्षां अधिकहि करो. २४ तर आतां
परमेश्वर, ज्याने माझा बाप दावीद याच्या गा-
दीवर मला बसवून स्थापिलें आणि जसें वचन
दिल्हें तसें माझें घर चालतें केलें, त्याची शपथ
मी करितों कीं अदोनीया आजच मारला जा-
ईल." २५ मग शलमोन राजाने यहोयादाचा
पुत्र बनाया याला आज्ञा देऊन पाठविलें; यास्तव
तो त्याशीं भिडला, झणून तो मेला.

२६ तेव्हां एब्याथार याजक याला राजाने
सांगितलें, "तू अनाथोथांत आपल्या शेतांस जा;
कां तर तूं मरायाचा योग्य आहेस; तरी आज मी
तुला जिवें मारणार नाहीं; कारण कीं माझा बाप
दावीद याच्यासमक्ष प्रभु परमेश्वराचा कोश
तूं वाहत होतास, आणखी माझा बाप जेणेकरून
दुःखित होता, त्या सर्व प्रकारें तूं दुःखित होतास."
२७ असें परमेश्वराने शीलोमध्यें एलीच्या घ-
राण्याविषयीं जें वचन सांगून ठेविलें होतें, तें पूर्ण
करायास शलमोनाने एब्याथाराला परमेश्वरा-
जवळच्या याजकपणांतून घालविलें. २८ तेव्हां तें
वर्त्तमान योवाबाजवळ आलें; कां कीं योवाब अ-
री आबशालोमाच्यामागें वळला नव्हता, तरी अ-
दोनीयाच्यामागें वळला होता; मग योवाब परमे-
श्वराच्या मंडपास पळून जाऊन वेदीचीं शिंगें
धरिता झाला. २९ नंतर शलमोन राजाला को-
णी सांगितलें कीं, "योवाब परमेश्वराच्या मंड-
पास पळून गेला, आणि पाहा, तो वेदीजवळ आ-
हे." तेव्हां शलमोनाने यहोयादाचा पुत्र बनाया
याला पाठवून सांगितलें कीं, "तूं जाऊन त्याशीं
भीड." ३० मग बनायाने परमेश्वराच्या
मंडपास जाऊन त्याला झटलें, "राजाने असें
सांगितलें, तू नीघ." तेव्हां त्याने झटलें, "नाहीं;
मी एथेंच मरेन." नंतर बनायाने माघारा राजा-

जवळ येऊन सांगितलें कीं, "यवाबाने असें असें
बोलतांना मला उत्तर दिलें." ३१ तेव्हां राजाने
त्याला सांगितलें, "असें त्याने ह्मटलें, तसें कर,
ह्मणजे त्याला भिडून मार; आणि त्याला पुरून
जें रक्त यवाबाने निष्कारण पाडिलें, तें मजवरून
आणि माझ्या बापाच्या घराण्यावरून दूर कर.
३२ अशाने परमेश्वर त्याकडला रक्तपात त्या-
च्याच डोक्यावर परत घालील; कां तर त्याने
माझा बाप दावीद याला न कळतांना आपल्यापेक्षां
नीतिमान व चांगलीं दोन माणसें, इस्राएलाच्या
सैन्याचा सेनापति नेराचा पुत्र अबनेर व यहूदा-
च्या सैन्याचा सरदार येथेराचा पुत्र अमासा,
यांस भिडून तरवारीने जिवें मारिलें. ३३ असा
त्यांचा रक्तपात उलटून यवाबाच्या डोक्यावर व
त्याच्या संतानाच्या डोक्यावर सर्वकाळ राहील;
परंतु दावीदावर व त्याच्या संतानावर व त्याच्या
घराण्यावर व त्याच्या सिंहासनावर परमेश्वरा-
पासून सलामती सर्वकाळ होईल." ३४ मग
यहोयादाचा पुत्र बनाया याने जाऊन त्याला भि-
डून जिवें मारिलें, आणि तो रानांत आपल्या घरीं
पुरला गेला. ३५ नंतर राजाने त्याच्या ठिका-
णीं सैन्यावर यहोयादाचा पुत्र बनाया याला
ठेविलें; आणि एब्याथाराच्या ठिकाणीं राजाने
सादोक याजक ठेविला.

३६ मग राजाने पाठवून शिमीला बोलाविलें
आणि त्याला सांगितलें, "तूं आपल्यासाठीं यरू-
शलेमांत घर बांधून एथें राहा, आणि एथून को-
णीकडेहि जाऊं नको. ३७ आणि असें होईल
कीं ज्या दिवशीं तूं निघून किद्रोन ओहळाच्या
पलिकडे जासील, तेव्हां मरसीलच मरसील,
असें खचीत जाण; तुझा रक्तपात तुझ्याच डो-
क्यावर होईल." ३८ तेव्हां शिमी राजाला
बोलला, "ही गोष्ट उत्तम, जसें माझ्या प्रभु रा-
जाने सांगितलें, तसेंच तुझा चाकर करील." नंतर
शिमी यरूशलेमांत बहुत दिवस राहिला. ३९
परंतु असें झालें कीं तीन वर्षांच्या समाप्तीस शि-
मीचे दोघे चाकर गाथाचा राजा माखाचा पुत्र
आखीस याजवळ पळून गेले; मग शिमीला असें
कोणी सांगितलें कीं, "पाहा, तुझे चाकर गाथांत
आहेत." ४० तेव्हां शिमी उठून आपलें गाढव
अवळून आपल्या चाकरांचा शोध करायास गा-
थास आखीशाजवळ गेला; असें शिमीने जाऊन
आपले चाकर गाथांतून आणिले. ४१ नंतर
शलमोनाला कळलें कीं, "शिमी यरूशालेमांतून
गाथास जाऊन माघारा आला आहे." ४२ मग
राजाने पाठवून शिमीला बोलाविलें, आणि त्याला
ह्मटलें, "म्या तुला परमेश्वराची शपथ घालून
सांगितलें होतें कीं ज्या दिवशीं तूं कोणीकडेहि
बाहेर जासील, तेव्हां मरसीलच मरसील असें
खचीत जाण, असें म्या तुला निक्षून सांगि-
तलें कीं नाहीं? आणि त्वां ह्मटलें, 'जी गोष्ट
म्या ऐकिली ती उत्तम.' ४३ तर परमेश्वरा-
ची शपथ आणि जी आज्ञा म्या तुला दिल्ही, ती
त्वां कां पाळिली नाहीं?" ४४ आणखी राजाने
शिमीला ह्मटलें, "जें वाईट तुझ्या हृदयांत सम-
जलेलें, ह्मणजे माझा बाप दावीद याचें जें त्वां
केलें, तें अवघें तुला कळलें; तर परमेश्वर तु-
झी दुष्टाई तुझ्याच डोक्यावर परत घालील. ४५
आणि शलमोन राजाला आशीर्वाद होऊन दावी-
दाचें सिंव्हासन परमेश्वरापुढें सर्वकाळ स्थिर
राहील." ४६ मग राजाने यहोयादाचा पुत्र
बनाया याला आज्ञा दिल्ह्यावर त्याने बाहेर जा-
ऊन त्याला भिडून मारिलें; असें तो मेला आणि
राज्य शलमोनाच्या हातीं स्थापित झालें.

## अध्याय ३.

तेव्हां शलमोनाने मिसरी राजा फारो याची
सोयरीक करून फारोची कन्या घेतली; आणि
त्याने आपलें घर व परमेश्वराचें मंदिर व यरू-
शालेमाचें चहुंकडलें गांवकुसूं बांधून समाप्त केलें
तोंपर्यंत तिला दावीदाच्या नगरांत आणून ठेविलें.
२ लोक केवळ उंच स्थानांवर यज्ञ करीत होते,
कारण कीं त्या दिवसांपर्यंत परमेश्वराच्या नामा-
साठीं मंदिर बांधिलें नव्हतें. ३ आणखी शलमोन
आपला बाप दावीद याच्या नेमाप्रमाणें चालून
परमेश्वरावर प्रीति करीत होता, तरी तोहि
उंच स्थानांवर यज्ञ व धूप करीत होता. ४ आ-
णि राजा गिबोनाजवळ तेथें यज्ञ करायास गेला,
कारण कीं तें मोठें उंच स्थान होतें; तेथल्या वेदीवर
शलमोनाने हजार पशूंचे होम केले. ५ गिबो-

नावर परमेश्वराने शलमोनाला रात्रीं स्वप्नांत
दर्शन दिल्हें; तेव्हां देवाने ह्मटलें, "मी तुला काय
देऊं, तूं माग." ६ नंतर शलमोनाने ह्मटलें,
"माझा बाप दावीद जसा तुझ्यापुढें खरेपणाने व
नीतीनें व मनाच्या सरळपणाने तुझ्यासंगतीं चा-
लला, तसी त्वां त्या आपल्या चाकरावर मोठी दया
केली, आणि आजप्रमाणें त्याच्या सिंहासनावर
बसायाला त्याला पुत्र देऊन ती मोठी दया त्या-
वर राखिली. ७ तर आतां हे माझ्या देवा
परमेश्वरा, माझा बाप दावीद याच्या ठिकाणीं
त्वां आपल्या सेवकाला राजा केलें आहे, तथापि
मी लाहान मुलगा जाणेंयेणें समजत नाहीं. ८
आणि तुझे लोक, जे त्वां निवडिले, त्यांमध्यें तुझा
चाकर आहे; ते असे मोठे लोक कीं पुष्कळपणा-
मुळें त्यांची संख्या मोजून करितां येत नाहीं.
९ यास्तव त्वां आपल्या चाकराला तुझ्या लोकांचा
न्याय करायास असी बुद्धि द्यावी कीं त्याने बरें
वाईट यांचा भेद जाणावा; कारण कीं तुझ्या
या बहुत लोकांचा न्याय करायास कोण शक्ति-
मान् आहे!" १० तेव्हां शलमोनाने तसी गोष्ट
मागितली ह्मणून प्रभूच्या दिसण्यांत बरी वा-
टली. ११ यास्तव देव त्याला बोलला, "त्वां
असी गोष्ट मागितली कीं आपल्याला दीर्घ आयु-
ष्य मागितलें नाहीं, आणि आपल्यासाठीं संपत्ति
मागितली नाहीं, आणि आपल्या शत्रूंचा प्राण
मागितला नाहीं, परंतु न्याय करायाचें ज्ञान आप-
ल्यासाठीं मागितलें; १२ यावरून पाहा, म्यां
तुझ्या मागण्याप्रमाणें केलें आहे; पाहा, म्यां तुला
विवेकी व ज्ञानी असें मन दिल्हें आहे कीं तुझ्या-
सारिखा तुझ्यापूर्वी कोणी झाला नाहीं, आणि
तुझ्यानंतर तुझ्यासारिखा कोणी उठणार नाहीं.
१३ आणखी जें त्वां मागितलें नाहीं, ह्मणजे सं-
पत्ति व गौरवहि म्यां तुला दिल्हें, असें कीं तुझ्या
सर्व दिवसांत राजांमध्यें तुझ्यासारिखा कोणी हो-
णार नाहीं. १४ आणि जसा तुझा बाप दावीद
चालला, तसा जर तूं माझे नेम व माझ्या आज्ञा
पाळायास माझ्या मार्गांमध्यें चालसील, तर मी
तुझें आयुष्यहि दीर्घ करीन." १५ नंतर शल-
मोन जागा झाला; तर पाहा, स्वप्न आहे; मग
त्याने यरुशालेमास येऊन परमेश्वराच्या करा-
राच्या कोशापुढें उभें राहून पशूंचे होम केले,
आणि शांतिकारक यज्ञ केले; आपल्या सर्व सेव-
कांसाठीं जेवणावळहि केली.
१६ त्या वेळेस दोघी वेश्या स्त्रिया राजाजवळ
येऊन त्याच्यापुढें उभ्या राहिल्या. १७ तेव्हां
एक स्त्री बोलली, "हे माझ्या प्रभू, मी आणि ही
स्त्री एका घरांत राहतों, आणि इच्याजवळ घरांत
मी प्रसूत झालें. १८ आणि मी प्रसूत झाल्या-
वर तिसऱ्या दिवसीं असें झालें कीं या स्त्रीलाहि
लेंकरूं झालें; तेव्हां आह्मी एका ठिकाणीं असतां,
आमच्यासंगतीं घरांत दुसरा कोणी नव्हता; आ-
ह्मी दोघी मात्र घरांत होतों. १९ आणि या
स्त्रीचा पुत्र रात्रीं मेला, का कीं ती त्यावर निजली.
२० मग मला तुझ्या दासीला झोंप लागली अस-
तां, तिने मध्यरात्रीं उठून माझ्याजवळून माझा पुत्र
घेऊन आपल्या उरासीं निजविला, आणि आप-
ला मेलेला पुत्र माझ्या उरासीं निजविला. २१
नंतर सकाळीं मी आपल्या पुत्राला थान द्यायाला
उठलें, तर पाहा, तो मेला होता; मग सकाळीं
म्यां त्यावर लक्ष लाविलें, तर पाहा, माझा पुत्र,
ज्याला मी प्रसवलें, तो नाहीं." २२ नंतर दुसरी
स्त्री बोलली, "असें नाहीं, परंतु जो जिवंत, तो
माझा पुत्र, आणि मेलेला तुझा पुत्र." तेव्हां ही
बोलली, "असें नाहीं, मेलेला तुझा पुत्र, आणि
जो जिवंत, तो माझा पुत्र." असें राजापुढें त्या
बोलल्या. २३ तेव्हां राजा बोलला, "ही ह्मण-
ती, 'जो जिवंत, तोच माझा पुत्र, आणि मेलेला
तुझा पुत्र.' परंतु ती ह्मणती, 'असें नाहीं, मेले-
ला तुझा पुत्र, आणि जो जिवंत, तो माझा पुत्र.'"
२४ यास्तव राजा बोलला, "माझ्याजवळ तरवार
आणा." तेव्हां त्यांनी तरवार राजापुढें आणिली.
२५ नंतर राजा बोलला, "तुह्मी जिवंत लेंकरूं
चिरून दुभाग करा, आणि एक अर्धे एकीला द्या
आणि एक अर्धे दुसरीला द्या." २६ तेव्हां
जिचा पुत्र जिवंत होता, तिचीं अंतडीं तिच्या
पुत्रावर कळवळलीं; यास्तव ती स्त्री राजाला
बोलतां ह्मणली, "हे माझ्या प्रभू, मजवर कृपा
कर; तुह्मी जिवंत लेंकरूं तिला द्या, पण त्याला
मारूं नका." तथापि दुसरी बोलली, "तें माझा
नसो, आणखी तुझाहि नसो; तुह्मी चिरा." २७

मग राजा उत्तर देतां बोलला, "जिवंत लेंकरूं
तिला द्या; त्याला अगदी मारूंच नका; तीच
त्याची आई आहे." २८ तेव्हां जो न्याय राजाने
केला होता, तो सर्व इस्राएलानी ऐकिला; आणि
ते राजाला भ्याले, कारण कीं त्याच्या ठायीं न्याय
करायास देवाचें ज्ञान आहे, असें त्यानी पा-
हिलें.

## अध्याय ४.

आणखी शलमोन राजा सर्व इस्राएलावर राजा
होता. २ आणि त्याचे जे कारभारी ते
हेच; सादोकाचा नातू अजाऱ्या याजक होता. ३
शिशा याचे पुत्र अलीहोरेफ व अहीया, हे चिट-
नीस होते; अहीलूदाचा पुत्र यहोशाफाट इति-
हासक होता. ४ आणि यहोयादाचा पुत्र बनाया
सैन्याचा अधिकारी होता, आणि सादोक व एब्या-
थार, हे याजक होते. ५ आणि नाथानाचा पुत्र
अजाऱ्या कारभाऱ्यांवर होता, आणि नाथानाचा
पुत्र जाबूद राजाचा मित्र होता. ६ आणि अही-
शार घरावर होता, आणि आब्दाचा पुत्र अदो-
नीराम वसुलावर होता. ७ आणि शलमोनाला
सर्व इस्राएलावर कारभारी बारा होते, असे
कीं त्यानी राजाला व त्याच्या घराला पुरवावें;
वर्षांत महिनाभर एकएकाला पुरविणें काम होतें.
८ त्यांचीं नावें तर हीं; एफ्राइम डोंगरावर हूराचा
पुत्र" ९ आणि माकाज व शालबीम व बेथ-
शेमेश व एलोनबेथहानान यांवर देकेराचा पुत्र.
१० अरुब्बोथावर हेसेदाचा पुत्र, त्याकडे सोखो
व अवघा हेफेर प्रांत होता. ११ अवघ्या दोर ता-
लोक्यांत अबीनादाबाचा पुत्र; त्याची स्त्री शल-
मोनाची कन्या टाफाथ होती; १२ तानाख व
मगिद्दो व अवघी बेथशान, जी सार्तानाजवळ
इज्रेलच्या खालीं बेथशानापासून आबेल म-
होला तेथपर्यंत व यकमामच्या उतारापर्यंत, तेथें
अहीलूदाचा पुत्र बाना; १३ गिलादाच्या उं-
चोट्यांवर गेबेराचा पुत्र; त्याकडे मनाश्शाचा पुत्र
याईर याचे जे गिलादांत गाव ते, आणि त्याकडे
बाशानांत जो आर्गोब प्रांत, त्यांतील साठ मोठीं
नगरें, ज्यांस गांवकुसूं व पितळी अडसर, तीं
होतीं; १४ माहनाइमावर इद्दोचा पुत्र अही-
नादाब; १५ नाफतालीवर अहीमाज; त्यानेंहि
शलमोनाची कन्या बस्माथ बायको करून घेतली;
१६ आशेर व आलोथ यांवर हुशायचा पुत्र
बाना; १७ इस्साखारावर पारूहाचा पुत्र य-
होशाफाट; १८ बन्यामीनावर एलाचा पुत्र
शिमी; १९ अमोऱ्यांचा राजा सीहोन, आणि
बाशानाचा राजा ओग, यांच्या देशांतला गिलाद
प्रांत त्यावर उरीचा पुत्र गेबेर; तो त्या देशांत
एकच कारभारी होता. २० यहूदा व इस्राएल
बहुत होते, समुद्रकांठच्या वाळूसारिखे बहुत, खा-
तां पितां संतोष करीत होते.

२१ तेव्हां नदीपासून पलिष्ट्यांच्या देशापर्यंत
आणि मिसऱ्यांच्या सीमेपर्यंत जीं राष्ट्रें, त्या सर्वां-
वर शलमोनाने अधिकार केला; त्यानी शलमोना-
जवळ भेटी आणिल्या आणि त्याच्या आयुष्याच्या
सर्व दिवसांत त्याची चाकरी केली. २२ शल-
मोनाचें खाद्य तर प्रतिदिवसीं तीस कोर सपीठ व
साठ मापें पीठ. २३ दाहा पुष्ट गुरें व कुरणांतलीं
वीस गुरें व शंभर बकरें; त्यांखेरीज कित्येक सां-
बर व हरिण व याम्हूर व पुष्ट पाखरें, असें होतें.
२४ कारण कीं त्याने नदीच्या अलिकडल्या स-
र्वांवर तिफसाहापासून गाजा तेथपर्यंत नदीच्या
अलिकडल्या सर्व राष्ट्रांवर अधिकार केला; आणि
चहुंकडे त्याच्या सीमापलिकडल्या सर्वांसीं त्याचा
सला होता. २५ आणि शलमोनाच्या सर्व दिव-
सांत दानापासून बैरशेब्यापर्यंत यहूदा व इस्राएल
यांतला प्रत्येक आपापल्या द्राक्षवेलाखालीं व आ-
पापल्या अंजिराखालीं निर्भय राहिला. २६ आणि
शलमोनाला त्याच्या रथांसाठीं घोड्यांच्या चा-
ळीस हजार पागा व बारा हजार स्वार होते. २७
आणि शलमोन राजाला व जे शलमोन राजाच्या
मेजाजवळ जात होते, त्या सर्वांस ते कारभारी
प्रत्येक आपापल्या महिन्यांत असे पुरवीत होते;
त्यांस कांहीं उणें नव्हतें. २८ आणखी घोड्यां-
साठीं व उंटांसाठीं सातू व पेंढा, जेथें राजा होता
त्या ठिकाणीं ते एकएक आपापल्या नेमणुकीप्रमाणें
नेत होते. २९ देवाने तर शलमोनाला फारच
ज्ञान व बुद्धि आणि समुद्रकांठावरल्या वाळूप्रमाणें
मनाचें उदारपण दिल्हें. ३० यास्तव शलमो-
नाचें ज्ञान पूर्वदिशेच्या सर्व लोकांच्या ज्ञानापेक्षां

व मिसर-यांच्या सर्व ज्ञानापेक्षां अधिक झालें. ३१
आणि तो सर्व माणसांपेक्षां एज्राही, एथान व
हेमान व खाल्कोल व दार्दा, माहोलाचे पुत्र,
यांपेक्षाहि ज्ञानी होता; आणि त्याचें नांव चहुं-
कडल्या सर्व राष्ट्रांमध्यें विख्यात झालें. ३२
आणखी त्याने तीन हजार दृष्टांत वचनें सांगितलीं
आणि त्याचीं गीतें एक हजार पांच होतीं. ३३
आणि त्याने लबानोनावर जे देवदारु त्यापासून
जुफा जो भिंतीवर निघतो त्यापर्यंत झाडांचें वर्णन
केलें; आणि पशू व पाखरें व किड्या व मास्या,
यांचें वर्णन केलें. ३४ आणि शलमोनाचें ज्ञान
ऐकायास पृथ्वीच्या सर्व राष्ट्रांतल्या सर्व लोकांचे
जन आले, कां तर त्यांनी त्याच्या ज्ञानाविषयीं
ऐकिलें होतें.

## अध्याय ५.

तेव्हां जोराचा राजा हीराम याने आपले चा-
कर शलमोनाकडे पाठविले; कां तर त्याने
ऐकिलें होतें कीं लोकांनी त्याला त्याच्या बापाच्या
ठिकाणीं राज्याभिषेक केला; हीराम तर दा-
वीदावर सर्वकाळ प्रीति करीत होता. २ आणि
शलमोनाने हीरामाजवळ सांगून पाठविलें कीं,
३ "माझा बाप दावीद याविषयीं तूं असें जाणतोस
कीं लढाया त्याच्या चहुंकडे चालल्या होत्या, या-
मुळें त्याच्याने आपला देव परमेश्वर याच्या
नामासाठीं मंदिर बांधवलें नाहीं; तितक्यांत पर-
मेश्वराने त्यांस त्याच्या तळपायांखालीं घातलें.
४ तर आतां माझा देव परमेश्वर याने माझ्या
चहुंकडे स्वस्थता केली आहे; कोणी शत्रु किंवा
कांहीं वाईट भढळत नाहीं. ५ यास्तव आतां
पाहा, म्या आपला देव परमेश्वर याच्या नामा-
साठीं मंदिर बांधायास योजिलें आहे; त्याप्रमाणें
परमेश्वराने माझा बाप दावीद याला सांगितलें
होतें कीं, 'तुझा पुत्र, ज्याला मी तुझ्या ठिकाणीं
तुझ्या गादीवर ठेवीन, तोच माझ्या नामासाठीं मं-
दिर बांधील.' ६ तर आतां त्यांनी माझ्यासाठीं ल-
बानोनावरले देवदारु तोडावे म्हणून तूं आज्ञा दे,
आणि तुझ्या चाकरांच्यासंगतीं माझे चाकर रा-
हतील, आणि तूं जें कांहीं सांगसील त्याप्रमाणें मी
तुला तुझ्या चाकरांची मजुरी देईन; कारण कीं
सीदोन्यासारिखा लांकडें तासायाला आमच्या
मध्यें कोणी जाणत नाहीं, हें तुला ठाऊक आहे."
७ तेव्हां असें झालें कीं हीराम शलमोनाचीं
वचनें ऐकून फार संतुष्ट झाला, आणि बोलला,
"आज परमेश्वराची स्तुति असो, कां तर त्याने
दावीदाला त्या मोठ्या लोकांवर ज्ञानी पुत्र दिल्हा
आहे." ८ मग हीरामाने शलमोनाजवळ सांगून
पाठविलें कीं, "ज्याविषयीं त्वां मजकडे पाठविलें
त्याविषयीं मी मान्य आहें; देवदारुच्या लांकडां-
विषयीं व भद्रदारु लांकडांविषयीं तुझ्या अवघ्या
इच्छेप्रमाणें मी करीन. ९ माझे चाकर लबा-
नोनावरून खालीं समुद्रापर्यंत नेतील, मग तूं मा-
झ्याजवळ पाठवून जें ठिकाण नेमसील तेथें तराफ्या-
नी तीं समुद्रावरून नेऊन काढीन; मग त्वां तीं
घ्यावीं आणि माझ्या मंदिरासाठीं त्वां अन्न देऊन
माझ्या इच्छेप्रमाणें करावें." १० याप्रमाणें ही-
राम शलमोनाच्या अवघ्या इच्छेप्रमाणें त्याला
देवदारुचीं लांकडें व भद्रदारुचीं लांकडें देता
झाला. ११ आणि शलमोनाने हीरामाला त्या-
च्या घराच्या खाण्यासाठीं वीस हजार मापें गहूं,
आणि वीस हजार मापें निवळ तेल दिल्हें; असें
वर्षोवर्षी शलमोनाने हीरामाला दिल्हें.
१२ परमेश्वराने तर शलमोनाला असें
वचन दिल्हें होतें, तसें त्याला ज्ञान दिल्हें; आणि
हीराम व शलमोन यांमध्यें सल्ला होता, म्हणून
त्या दोघांनी करार केला. १३ तेव्हां शलमो-
नाने सर्व इस्राएलांतून बिगार काढिली; ती बिगार
तर तीस हजार पुरुषांची होती. १४ मग ती
दरमहिन्यांत त्यांतून पाळी पाळीने दाहा दाहा
हजार लबानोनास पाठवीत होता; ते महिनाभर
लबानोनावर आणि दोन महिने आपापल्या घरीं
होते; आणि अदोनीराम त्या बिगारीवर होता.
१५ आणि शलमोनाजवळ ओझें वाहणारे सत्तर
हजार व डोंगरावर तासणारे ऐशीं हजार होते.
१६ त्यांखेरीज शलमोनाच्या कारभाऱ्यांचे अधि-
कारी जे कामावर, असे तीन हजार तीनशें होते;
ते कामकऱ्या लोकांवर अधिकार करीत होते. १७
आणि राजाने आज्ञा केली असतां, त्यांनी मंदि-
राच्या पायासाठीं मोठे धोंडे, मोलाचे धोंडे, असे
घडून घडींव चिरे केले. १८ मग शलमोनाचे

बांधणारे व होरामाचे बांधणारे ह्मणजे गिबलकरी,
यांनी ते नीट घडले; याप्रमाणें त्यांनी मंदिर बां-
धायासाठीं लाकडें व चिरे सिद्ध केले.

## अध्याय ६.

तेव्हां इस्राएलाचीं संतानें मिसर देशांतून नि-
घाल्यावर चारशें ऐशीव्या वर्षी, ह्मणजे इस्राए-
लावर शलमोनाच्या राज्य करण्याच्या चवथ्या
वर्षी, चैत्रमास तोच दुसरा महिना, त्यांत असें
झालें कीं तो परमेश्वरासाठीं मंदिर बांधूं लागला.
२ असें जें मंदिर शलमोन राजाने परमेश्वरा-
साठीं बांधिलें, त्याची लांबी साठ हात व रुंदी
वीस व त्याची उंची तीस हात होती. ३ आ-
णि मंदिराच्या देवळापुढें वीस हातांची देवडी,
तिची लांबी मंदिराच्या रुंदीप्रमाणें तिची रुं-
दी मंदिराच्यापुढें दाहा हात होती. ४ आणि
त्याने मंदिराला धारीं बंद होण्याच्या खिडक्या
केल्या. ५ आणि चहुंकडे मंदिराच्या भिंतीसीं,
ह्मणजे देवळाच्या व गाभाऱ्याच्या चहुंकडल्या
मंदिराच्या भिंतीसीं त्याने कोठड्या बांधिल्या; अ-
शा चहुंकडे पडशाळा केल्या. ६ खालच्या को-
ठड्यांची रुंदी पांच हात, व मधल्याची रुंदी सा-
हा हात, व तिसऱ्याची रुंदी सात हात होती;
कारण कीं त्याने मंदिराला बाहेर चहुंकडून तोडे
टाकून दिल्हे होते; यासाठीं कीं मंदिराच्या भिं-
तींत तुळईघरें न व्हावीं. ७ आणि मंदिर बां-
धल्या वेळेस तें सिद्ध केलेल्या चिऱ्यांनी बांधलें
गेलें; यास्तव मंदिर बांधायाच्या वेळेस त्यांत
हातोडे किंवा कुऱ्हाड किंवा कोणतेंहि लोखंडी
हत्यार ऐकलें गेलें नाहीं. ८ मधल्या मजल्याचें
दार मंदिराच्या उजव्या अंगीं होतें; आणि मधल्या
मजल्यावर व मधल्यांतून तिसऱ्यावर फिरकीच्या
पायऱ्यांनी ते चढत होते. ९ असें त्याने मंदिर
बांधून सिद्ध केलें, आणि त्याने देवदारुच्या फ-
ळ्या व तुळया इहींकरून मंदिर आच्छादिलें.
१० आणि सर्व मंदिरासीं जे मजले, ते त्याने पांच
पांच हात उंच बांधिले, आणि ते देवदारुच्या ला-
कडांनी मंदिराला लगटलेले होते.

११ तेव्हां शलमोनाला परमेश्वराचें असें
वचन प्राप्त झालें कीं. १२ "हें मंदिर जें तूं बां-
धीत आहेस त्याविषयीं असें आहे, जर तूं माझ्या
नेमणुकींप्रमाणें चालसील, ह्मणजे माझ्या न्यायांचें
आचरण करीत असतां माझ्या सर्व आज्ञा पाळून
त्याप्रमाणें चालसील, तर तुझा बाप दावीद याला
म्या आपलें जें वचन दिल्हें, तें मी तुझ्याजवळ
स्थापीन. १३ आणि मी इस्राएलाच्या संताना-
मध्यें राहत असतां, आपल्या इस्राएलाच्या लो-
कांस सोडणार नाहीं." १४ शलमोनाने तर
मंदिर बांधून समाप्त केलें. १५ आणि त्याने मंदि-
राच्या भिंतींस आंतून देवदारुचें पाटण दिल्हें;
मंदिराच्या भिंतीला व भूमीला तसेंच; ह्मणजे
त्याने मंदिर आंतून लाकडाच्या आच्छादनाने मढ-
विलें, आणि मंदिराची भूमि भद्रदारु लाकडाच्या
पाटणाने मढविली. १६ आणि त्याने मंदिराच्या
एका बाजूची वीस हातांची खोली, भिंती व भूमि
देवदारुची केली; असें त्याने गाभारा, ह्मणजे
परमपवित्र स्थान, याच्या आंतून बांधिलें. १७
आणि मंदिर, ह्मणजे पुढें जें देऊळ, त्याची लांबी
चाळीस हात होती. १८ आणि मंदिराच्या
आंतल्या भागीं देवदारुच्या लाकडावर रानकाक-
ड्या व उमललेलीं फुलें कोरून काढलेलीं होतीं;
अवघें देवदारुचें, चिरे कांहीं दिसले नाहींत.
१९ आणि मंदिरामध्यें आंतल्या भागीं, तेथें पर-
मेश्वराच्या कराराचा कोश ठेवायासाठीं गाभारा
सिद्ध केला. २० आणि पुढल्या भागीं गाभाऱ्याची
लांबी वीस हात व रुंदी वीस हात व त्याची
उंची वीस हात, असी होती; आणि त्याने त्या-
ला शुद्ध सोन्याने मढविलें, आणि देवदारुची
वेदी मढविली. २१ असें शलमोनाने मंदिर
आंतून शुद्ध सोन्याने मढविलें; आणि त्याने
गाभाऱ्याच्यापुढें सोन्याच्या सांखळ्यांनी वांटणी
करून तें सोन्याने मढविलें. २२ असें सर्व
मंदिराच्या समाप्तीपर्यंत त्याने संपूर्ण मंदिर सो-
न्याने मढविलें, आणि गाभाऱ्याजवळ जी वेदी
ती अवघी सोन्याने मढविली. २३ आणि त्याने
गाभाऱ्यांत जैतून लाकडाचे दोन करूब केले, एक-
एकाची उंची दाहा हात होती. २४ तेव्हां एका
करूबाचा पंख पांच हातांचा, आणि दुसऱ्या क-
रूबाचा पंख पांच हातांचा होता; त्याच्या एका
पंखाच्या शेवटापासून त्याच्या दुसऱ्या पंखाच्या

शेवटापर्यंत दाहा हात; २५ आणि दुसरा क-
रूब दाहा हातांचा; त्या दोघां करूबांचें एकच
परिमाण व एकच रूप होतें. २६ एका करूबाची
उंची दाहा हात, आणि दुसऱ्या करूबाची तसीच.
२७ तेव्हां त्याने ते करूब मंदिरामध्यें आंत-
ल्या भागीं मांडिले, आणि त्यांनी त्या करूबांचे
पंख असे पसरिले कीं एकाचा पंख या भिंतीस
लागलेला, आणि दुसऱ्या करूबाचा पंख दुसऱ्या
भिंतीस लागलेला, आणि मंदिराच्या मध्यांत त्यां-
चे जे पंख ते पंखासीं पंख लागलेले, असे होते.
२८ आणि त्याने ते करूब सोन्याने मढविलें.
२९ आणि मंदिराच्या सर्व भिंतीवर चहुंकडे आं-
तून व बाहेरून त्याने करूब व खारीक झाडें व
उमललेलीं फुलें यांचीं कोरींव चित्रें काढिलीं.
३० आणि त्याने मंदिराचें भूपाटण आंत व बा-
हेर सोन्याने मढविलें.

३१ आणि त्याने गाभाऱ्याच्या दरवाज्याचीं
कवाडें, जैतून लाकडाचीं केलीं; तीं बाह्या व उंब-
रा यांसुद्धां भिंतीचा पांचवा वांटा होता. ३२
तेव्हां दोन्ही कवाडें जैतून लाकडाचीं होतीं, आ-
णि त्याने त्यांवर करूब व खारीक झाडें व उमल-
लेलीं फुलें यांचीं चित्रें कोरून काढिलीं; मग
त्याने सोन्याने मढविलीं, ह्मणजे करूबांवर व खा-
रीक झाडांवर सोनें चढविलें. ३३ तशाच त्याने
देवळाच्या दरवाज्याला बाह्या जैतून लाकडाच्या
केल्या; त्यांतली रुंदी भिंतीचा चवथा वांटा हो-
ती. ३४ आणि दोन्ही कवाडें भद्रदारु लांक-
डाचीं होतीं; एका कवाडाला दुमडत्या दोन झड-
पा, आणि दुसऱ्या कवाडाला दुमडत्या दोन झड-
पा होत्या. ३५ आणि त्याने त्यांवर करूब व
खारीक झाडें व उमललेलीं फुलें कोरून काढिलीं;
मग त्या खोरींव कामावर सोनें लागूं करून मढ-
विलें. ३६ आणि त्याने घडींव खांबाच्या तीन
ओळी व देवदारुच्या तुळयांची एक ओळ करून
आतलें अंगण बांधिलें. ३७ चवथ्या वर्षी, चैत्र-
मासीं, परमेश्वराच्या मंदिराचा पाया घातला
गेला. ३८ आणि अकराव्या वर्षी, वैशाखमासीं
ह्मणजे आठव्या महिन्यांत, तें मंदिर त्याच्या सर्व
सांगितलेल्याप्रमाणें व त्याच्या लावलेल्या सर्व
नेमाप्रमाणें समाप्त झालें; तसें त्याला तें बांधायास
सात वर्षे लागलीं.

## अध्याय ७.

आणि शलमोनाला आपलें घर बांधायास तेरा
वर्षें लागलीं, आणि त्याने आपलें अवघें
घर समाप्त केलें. २ अणखी त्याने लबानोनाच्या
वनांतील घर बांधिलें; त्याची लांबी शंभर हात व
त्याची रुंदी पन्नास हात व त्याची उंची तीस
हात; त्याला देवदारूंच्या खांबांच्या चार ओळी
होत्या, आणि त्या खांबांवर देवदारुच्या तुळया
होत्या. ३ प्रति ओळीस पंधरा, अशा पंचे-
ताळीस खांबांवर जीं बहालें, त्यांवर त्याने देव-
दारुची पाटणी केली. ४ आणि खिडक्यांच्या
तीन ओळी, उजेडासमोर उजेड, अशा तीन हा-
रींनी होत्या. ५ आणि सर्व दारें बाह्यांसुद्धां
खिडक्यांसीं चौरस, ह्मणजे उजेडासमोर उजेड
असीं तीन हारींनी होतीं. ६ आणि त्याने खां-
बांची देवडी केली; तिची लांबी पन्नास हात व
तिची रुंदी तीस हात, आणि त्यांच्यापुढें देवडी
होती, आणि खांब व खण त्यांच्यापुढें आले. ७
अणखी सिंहासनाची देवडी, जेथें आपण न्याय
करावा तसी न्यायाची देवडी त्याने केली; आणि
त्याने कडीपाठापासून कडीपाठापर्यंत देवदारुची
पाटणी दिल्ही.

८ आणि त्याचें राहायाचें जें घर, त्याला देव-
डीच्या आंत दुसरें अंगण तशा कामासारिखी
होती; अणखी शलमोनाने फारोची कन्या, जी
आपण करून घेतली, तिच्यासाठीं घर या देवडी-
सारिखें सिद्ध केलें. ९ या सर्वांचे चिरे मेजा-
प्रमाणें मोलाचे, करवतानी करवतलेले, घडींव होते;
आतून व बाहेरून, पायापासून वळचणीपर्यंत,
आणि बाहेर मोठ्या अंगणापर्यंत, तसे होते. १०
अणखी त्याचा पाया मोठ्या चिऱ्यांचा, दाहा
हातांच्या चिऱ्यांचा व आठ हातांच्या चिऱ्यांचा,
असा मोठ्या चिऱ्यांचा होता. ११ आणि वर
मेजाप्रमाणें घडींव, असे मोलाचे चिरे व देवदा-
रुचीं लांकडें होतीं. १२ आणि चहुंकडल्या
मोठ्या अंगणाला घडींव खांबांच्या तीन तीन ओ-
ळी व देवदारुच्या तुळयांची एकएक ओळ होती;

आणि परमेश्वराच्या मंदिराच्या आंतल्या अंग-
णाला व मंदिराच्या देवडीला, तसें होतें.
१३ तेव्हां शलमोन राजाने पाठवून सोरांतून
हिरामाला आणिलें. १४ तो नाफ्तालीच्या वं-
शांतल्या विधवा स्त्रीचा पुत्र, आणि त्याचा बाप
सोरांतला पुरुष, पितळ्याच्या कामांत कारागीर
होता; आणि तो पितळ्याचें सर्व काम करायास
कुशळता व बुद्धि व ज्ञान इहींकरून भरलेला
होता; यास्तव त्याने शलमोन राजाजवळ येऊन
त्याचें सर्व काम केलें. १५ आणि पितळ्याचे
दोन खांब घडिले; प्रत्येक खांबाची उंची अठरा
हात, आणि प्रत्येक खांबाच्या घेऱ्याला बारा बारा
हात सूत लागत होतें. १६ आणि त्या खांबां-
च्या मस्तकांवर मांडायास त्याने पितळ्याचे दोन
ओतींव कळस केले; एका कळसाची उंची पांच
हात, आणि दुसऱ्या कळसाची उंची पांच हात
होती. १७ त्या खांबांच्या मस्तकांवरले जे कळस,
त्यांस जाळीदार काम व गोंड्यांसहित गोफाचें काम
असें एका कळसाला सात ठिकाणीं व दुसऱ्या
कळसाला सात ठिकाणीं होतें. १८ आणखी त्याने
त्या खांबांस असें केलें कीं मस्तकांवर जे कळस,
त्यांस दाळिंबानी झांकायास प्रत्येक जाळीवर चहुं-
कडे दोन माळा दिल्या, आणि दुसऱ्या कळसाला
तसें केलें. १९ आणि त्या खांबांच्या मस्तकांवर
जे कळस, त्यांवर कमळाकारी काम होतें; ते खांब
देवडींत होते; त्यांचें गर्भमेज चार हातांचें होतें;
२० आणखी त्या दोन खांबांवरल्या कळसांस,
म्हणजे वरतीं, जाळीच्या वरल्या ठिकाणीं जो फु-
गारा, त्याच्या अंगापाशीं असें होतें कीं एकावर
चहुंकडे ओळींनी दोनशें दाळिंबें होतीं; आणि
दुसऱ्या कळसावर तसींच. २१ तेव्हां त्याने ते
खांब देवळाच्या देवडींत उभारिले; त्याने उजव्या
हाताच्या खांब उभा करून त्याचें नांव याखीन
ठेविलें, आणि डाव्या हाताचा खांब उभा करून
त्याचें नांव बवाज ठेविलें. २२ आणि त्या खांबां-
च्या मस्तकांवर कमळाकार काम घडिलें; असें
त्या खांबांचें काम संपलें.
२३ आणखी त्याने ओतींव समुद्र केला; तो
एका कांठापासून दुसऱ्या कांठापर्यंत दाहा हात
होता; तो चहुंकडे वाटोळा आणि त्याची उंची
पांच हात, आणि त्याला चहुंकडे वेढायास तीस
हात सूत लागत होतें. २४ तेव्हां त्या समुद्रा-
ला सभोंवते त्याच्या चहुंकडल्या कांठाखालीं रान-
काकड्या हाताच्या अंतरामध्यें दाहा, अशा रान-
काकड्यांचा वेढा त्याला होता; जेव्हां तो ओतून
केला, तेव्हां त्या रानकाकड्यांच्या दोन माळा ओ-
तून केल्या होत्या. २५ तो बारा बैलांवर राहि-
लेला होता; तिघांचीं तोंडें उत्तरेस व तिघांचीं
तोंडें पश्चिमेस व तिघांचीं तोंडें दक्षिणेस व ति-
घांचीं तोंडें पूर्वेस होतीं; आणि तो समुद्र त्यांवर
होता; तसें त्या सर्वांचीं मागलीं अंगें आंत होतीं.
२६ त्याची जाडी तर वीतभर होती, आणि त्या-
च्या कांठीं वाटीकांठाच्या कामासारिखा कमळ-
फुलाचा आकार होता, त्यांत दोन हजार बाथ
माव होते. २७ आणखी त्याने पितळ्याचे दाहा
पाये एकएका पायाची लांबी चार हात, व एक-
एकाची रुंदी चार हात, व एकएकाची उंची तीन
हात, असे केले. २८ एकएका पायाचें काम तर
असें कीं त्यास कांठ होते, आणि ते कांठ दांडकां-
मध्यें होते. २९ आणि दांडकांमध्यें जे कांठ, त्यां-
वर सिंह व बैल व करूब आणि दांडकांवर वरचें
मांडणेंघर होतें; आणि सिंह व बैल यांच्याखालीं
लोंबलेल्या कामाच्या झालरी होत्या. ३० आ-
णखी एकएका पायाला पितळ्याचीं चार चाकें व
पितळ्याचे पत्रे आणि त्याच्या चार कोंपऱ्यांस
धिरे, म्हणजे गंगाळाच्या खालीं ओतींव धिरे, ए-
कएका झालरीपाशीं होते. ३१ आणि कळसा-
च्या आंत आणि वरतीं गंगाळासाठीं त्याचें तोंड
हातभर, परंतु पायाच्या कामांत एकएकाचें वा-
टोळें तोंड दीड हाताचें; आणखी एकएकाच्या
तोंडाजवळ कोरलेलीं ठिकाणें होतीं; आणि त्याचे
कांठे चौरस वाटोळे नव्हते. ३२ आणि कांठां-
च्या खालीं चार चाकें होतीं आणि चाकांतले कणे
पायाला जडले होते; एकएका चाकाची उंची तर
दीड हात होती. ३३ आणि त्या चाकांचें काम
रथचाकांच्या कामासारिखें होतें; त्यांचे कणे व
त्यांच्या धावा व त्यांचे आरे व त्यांच्या नाभा सर्व
ओतींव होत्या. ३४ आणि एका पायाच्या चार
कोंपऱ्यांस चार धिरे, आणि ते धिरे पायांतलेच
होते. ३५ आणि एका पायाच्या वरल्या भागीं

चहुंकडे अर्धा हात उंच वाटोळी फरी होती, अ-
णखी पायाच्या वरल्या भागीं ज्या त्याच्या बाह्या
व त्याचे पाट, ते त्यांतलेच होते. ३६ आणि
त्याच्या बाह्यांच्या सपाट्यांवर व त्याच्या पाटांवर
एकएकाच्या उघड्या अंगाप्रमाणें त्यानें करूब,
सिंह व खारीक झाडें कोरून काढिलीं, आणि
चहुंकडे झालरी दिल्ह्या. ३७ याप्रमाणें त्याने ते
दाहा पाये केले, त्या सर्वांची एकच ओतणी,
एकच परिमाण, एकच रूप होतें. ३८ तेव्हां
त्याने पितळ्याचीं दाहा गंगाळें केलीं; प्रत्येक गंगा-
ळांत चाळीस बाथ मात होते; प्रत्येक गंगाळ चार
हातांचें; त्या दाहा पायांतल्या प्रत्येक पायावर एक
गंगाळ होतें. ३९ तेव्हां त्याने पांच पाये मंदि-
राच्या उजव्या भागीं आणि पांच मंदिराच्या डा-
व्या भागीं ठेविले; आणि मंदिराच्या उजव्या
भागीं पूर्वेस दक्षिणेच्या समोर समुद्र ठेविला.
४० असें हीरामाने गंगाळें व चेलणारीं व
शिंपणारीं केलीं, आणि हीरामाने **परमेश्वराच्या**
मंदिराकरितां शलमोन राजासाठीं जें करायाचें
होतें, तें अवघें काम करून समाप्त केलें. ४१ ते
दोन खांब व त्या दोहों खांबांच्या मस्तकांवर बे
पात्राचे दोन कळस ते, आणि त्या खांबांच्या मस्त-
कांवरल्या त्या पात्रांच्या दोहों कळसांस झांकाया-
च्या त्या दोन जाळ्या; ४२ आणि त्या दोन
जाळ्यांसाठीं चारशें दाळिंबें; त्या खांबांच्या म-
स्तकांवर जे पात्रांचे दोन कळस त्यांस झांकाया-
साठीं एकएका जाळीस दाळिंबांच्या दोन माळा;
४३ आणि दाहा पाये व त्या पायांवरलीं दाहा
गंगाळें; ४४ आणि एक समुद्र व त्या समुद्रा-
खालचे बारा बैल. ४५ अणखी भांडीं व चे-
लणारीं व शिंपणारीं केलीं; आणि हीं पात्रें, जीं
हीरामाने **परमेश्वराच्या** मंदिराकरितां शल-
मोन राजासाठीं केलीं, तीं अवघीं ओतींव पित-
ळ्याचीं होतीं. ४६ तीं राजाने यार्देनेजवळच्या
सपाटीवर, सुक्कोथ व सारथान त्यांच्या मध्यें,
चिकण्या मातींत ओतून केलीं. ४७ तेव्हां श-
लमोनाने सर्व पात्रांच्या पितळ्याचें वजन करणें
सोडिलें; का कीं तें फारच फार होतें, यास्तव
त्याचा शोध लागला नाहीं. ४८ असीं परमे-
श्वराच्या मंदिरासाठीं जीं पात्रें तीं अवघीं शल-
मोनाने केलीं; सोन्याची वेदी, व सोन्याचें मेज,
ज्यावर दर्शनीय अपूप, तें. ४९ आणि गाभाऱ्या-
च्या पुढलीं निर्मळ सोन्याचीं दीपझाडें, उजव्या-
कडलीं पांच व डाव्याकडलीं पांच; आणि त्यांचीं
सोन्याचीं फुलें व दिवे व चिमटे; ५० आणि
भांडीं व कातरी व शिंपणारीं व वाट्या व अग्नि-
पात्रें, हीं निर्मळ सोन्याचीं; आणि आतलें मंदिर
ह्मणजे परम पवित्रस्थान, याच्या कवाडांसाठीं व
मंदिरांतल्या देवळाच्या कवाडांसाठीं सोन्याच्या
फिरक्या केल्या. ५१ याप्रमाणें शलमोन राजा-
ला **परमेश्वराच्या** मंदिरासाठीं जें काम करा-
याचें होतें तें अवघें समाप्त झालें; आणि शल-
मोनाने आपला बाप दावीद याच्या पवित्र वस्तु,
ह्मणजे रुपें व सोनें व पात्रें तीं आंत आणून **पर-
मेश्वराच्या** मंदिराच्या भांडारांमध्यें ठेविलीं.

## अध्याय ८.

मग शलमोनाने **परमेश्वराच्या** कराराचा कोश
दावीदाच्या नगरांतून ह्मणजे सीयोनांतून वर
आणायासाठीं इस्राएलाचे वडील व वंशांतले सर्व
मुख्य, ह्मणजे इस्राएलाच्या संतानांतल्या वडि-
लांचे पुढारी, यरूशालेमांत शलमोन राजाजवळ
एकवट केले. २ असीं इस्राएलाचीं सर्व माणसें
अश्विन महिना ह्मणजे सातवा महिना यांतल्या
सणांत शलमोन राजाजवळ मिळालीं. ३ असे
इस्राएलाचे सर्व वडील आले असतां, याजकांनी
तो कोश उचलिला. ४ या प्रकारें याजकांनी व
लेवींनी **परमेश्वराचा** कोश व सभामंडप व मंड-
पांतलीं जीं पवित्र पात्रें, तीं सर्व घेऊन वर आणिलीं.
५ तेव्हां शलमोन राजाने व त्याच्यासंगतीं इस्रा-
एलाचे समुदाय, जे त्याच्याजवळ मिळाले होते,
त्या सर्वांनी त्या कोशाच्यापुढें बकरें व गुरें यांचे
इतके यज्ञ केले कीं तीं गणवत आणि मोजवत
नव्हतीं, एवढीं होतीं. ६ तेव्हां याजकांनी **परमे-
श्वराच्या** कराराचा कोश मंदिरांतल्या गाभाऱ्यांत
ह्मणजे परम पवित्रस्थानांत करूबांच्या पंखांखा-
लीं त्याच्या ठिकाणीं नेऊन ठेविला. ७ का कीं
करूब आपले दोन पंख कोशाच्या ठिकाणावर
पसरित होते; आणि त्या करूबांनी त्या कोशावर
व त्याच्या काठ्यांवर आच्छादन केलें. ८ तेव्हां

त्यांनी त्या काठ्या ओढिल्या होत्या; यास्तव त्या
काठ्यांचे शेवट गाभाऱ्यापुढल्या पवित्रस्थानांतून
दिसत होते परंतु बाहेरून दिसत नव्हते, आणि
आजपर्यंत त्या तेथें आहेत. ९ इस्राएलाचीं सं-
तानें मिसर देशांतून निघालीं आणि परमेश्व-
रानें त्यांसीं करार करून स्थापिला, तेव्हां ज्या
दोन दगडी पाट्या होरेबेस कोशांत ठेविल्या
त्यांवांचून त्यांत कांहीं नव्हतें. १० तेव्हां असें
झालें कीं जेव्हां याजक पवित्रस्थानांतून निघाले,
तेव्हां परमेश्वराचें मंदिर ढगानें भरलें गेलें.
११ आणि त्या ढगामुळें याजकांच्यानी सेवा करा-
यास उभें राहवत नव्हतें, कारण कीं परमेश्वरा-
चें मंदिर परमेश्वराच्या गौरवानें भरलें होतें.
१२ तेव्हां शलमोनानें ह्मटलें, "परमेश्व-
रानें सांगितलें आहे कीं, 'मी काळोखांत राहतों.'
१३ तथापि म्या तुझ्यासाठीं वस्तीचें मंदिर बांधि-
लेंच बांधिलें, हें सर्वकाळच्या सर्वकाळ तुझें राहा-
याचें ठिकाण." १४ तेव्हां राजानें आपलें तोंड
फिरवून इस्राएलाच्या सर्व समुदायाला आशीर्वाद
दिल्हा, आणि इस्राएलाचा सर्व समुदाय उभा
राहिला. १५ तेव्हां तो बोलला, "इस्राएलाचा
देव परमेश्वर याची स्तुति असो; कां तर
त्यानें आपल्या मुखेंकरून माझा बाप दावीद
याला वचन दिल्हें, आणि आपल्या हातानें पूर्ण
केलें; तें असें कीं, १६ 'ज्या दिवसीं म्या आ-
पल्या इस्राएली लोकांस मिसरांतून काढिलें, ते-
व्हांपासून इस्राएलाच्या सर्व वंशांचें कोणतेंहि नगर
निवडिलें नाहीं कीं असें मंदिर बांधावें कीं माझें
नाम तेथें राहावें; परंतु म्या दाविदाला आप-
ल्या इस्राएली लोकांवर असायास निवडिलें.'
१७ तर माझा बाप दावीद याच्या मनांत असें
होतें कीं इस्राएलाचा देव परमेश्वर याच्या ना-
मासाठीं आपण मंदिर बांधावें. १८ तेव्हां माझा
बाप दावीद याला परमेश्वरानें सांगितलें कीं,
'माझ्या नामासाठीं मंदिर बांधायास तुझ्या मनांत
आलें, यावरून मी ह्मणतों, तुझ्या मनांत आल्यानें
त्वां बरें केलें. १९ तथापि तूं मंदिर बांधणार
नाहींस, परंतु तुझा पुत्र जो तुझ्या पोटांतून निघेल,
तो माझ्या नामासाठीं मंदिर बांधील.' २० तर
परमेश्वरानें आपलें जें वचन दिल्हें, तें स्थापलें
आहे; कां कीं मी आपला बाप दावीद याच्या
ठिकाणीं होऊन बसें परमेश्वरानें सांगितलें तसें
इस्राएलाच्या सिंहासनावर बसलों, आणि म्या
इस्राएलाचा देव परमेश्वर याच्या नामासाठीं
मंदिर बांधिलें आहे. २१ आणि जेव्हां परमे-
श्वरानें आमचे वडील मिसर देशांतून काढिले,
तेव्हां त्यानें त्यांसीं जो करार केला, तो करार
ज्या कोशांत आहे त्याच्यासाठीं म्या ठिकाण सिद्ध
केलें आहे."

२२ तेव्हां शलमोनानें परमेश्वराच्या वेदी-
पुढें इस्राएलाच्या सर्व समुदायादेखतां उभें राहून
आपले हात आकाशाकडे पसरिले. २३ आणि
त्यानें ह्मटलें, "हे इस्राएलाच्या देवा परमेश्वरा,
वरतीं आकाशांत किंवा खालीं पृथ्वीवर तुझ्यासा-
रिखा देव कोणी नाहीं; तुझे सेवक, जे आपल्या
सर्व अंतःकरणानें तुझ्यापुढें चालतात, त्यांसीं तूं
करार व दया पाळितोस. २४ त्या त्वां माझा
बाप दावीद तुझा सेवक याला जें वचन दिल्हें,
तें त्यासीं पाळिलें; कां कीं त्वां आपल्या मुखानें
सांगितलें आणि आपल्या हातानें आजच्याप्रमाणें
पूर्ण केलें आहे. २५ तर हे इस्राएलाच्या देवा पर-
मेश्वरा, त्वां माझा बाप दावीद तुझा सेवक याला
जें सांगितलें, तें आतां त्याच्या दृष्टींत पाळावें; तें
असें कीं 'इस्राएलाच्या सिंहासनावर माझ्या दृ-
ष्टींत तुझा बसणारा पुरुष नाहींसा होणार नाहीं;
केवळ जसा तूं माझ्यापुढें चाललास, तसें जर
तुझें संतान माझ्यापुढें चालायास आपला मार्ग
संभाळील, तर तसें होईल.' २६ यास्तव हे
इस्राएलाच्या देवा, त्वां माझा बाप दावीद तुझा
सेवक याला जीं वचनें दिल्हीं, तीं आतां कृपा क-
रून पूर्ण करावीं. २७ तर देव पृथ्वीवर निश्चयें
राहील कीं काय? पाहा आकाश व आकाशा-
वरलें आकाश तुला पुरतच नाहीं, तर जें मंदिर
म्या बांधिलें, तें हें कसें पुरेल! २८ तथापि, हे
माझ्या देवा परमेश्वरा, तूं आपल्या सेवकाच्या
प्रार्थनेकडे व त्याच्या काकुळतीकडे लक्ष लाव,
ह्मणजे जी विनंती व प्रार्थना तुझा सेवक आज
तुझ्यापुढें करीत आहे, ती ऐक. २९ या मंदिरा-
कडे, ह्मणजे ज्याविषयीं त्वां ह्मटलें, 'माझें नाम
तेथें होईल,' त्या ठिकाणाकडे रात्रंदिवस तुझे डोळे

उघडे असावे, यासाठीं कीं तुझा सेवक या ठि-
काणीं जी प्रार्थना करील, ती त्वां ऐकून घ्यावी.
३० म्हणजे तुझा सेवक व तुझे इस्राएली लोक या
ठिकाणीं जी काकुळती करितील, ती त्वां ऐकून घ्या-
वी; आणि त्वां आकाशांत, आपल्या राहायाच्या
ठिकाणीं, ऐकून क्षमाहि करावी.

३१ जर कोणी आपल्या शेजाऱ्याचा अपराध
करून त्याच्या शपथेवरून आपल्यावर शपथ घा-
लून घेईल, आणि ती शपथ या मंदिरीं तुझ्या
वेदीपुढें येईल, ३२ तर त्वां आकाशांत ऐकून
उद्योग करावा; म्हणजे आपल्या सेवकांचा न्याय
करित असतां, दुष्टाला दोषी ठरवून त्याचें आच-
रण त्याच्या मस्तकावर लावावें, आणि नीतिवाना-
ला नीतिवान् ठरवून त्याच्या नीतिप्रमाणें त्या-
ला द्यावें. ३३ तुझे इस्राएली लोक तुझ्याजवळ
पाप केल्यामुळें जर शत्रूपुढें मारले जातील, आणि
तुझ्याकडे फिरून तुझें नाम मानतील, आणि
प्रार्थना व काकुळती या मंदिरीं तुझ्याजवळ क-
रितील, ३४ तर त्वां आकाशांत ऐकून आपल्या
इस्राएली लोकांचें पाप क्षमा करावें आणि त्वां
जी भूमि त्यांच्या वडिलांस दिल्ही तिजवर त्यांस
माघारें आणावें. ३५ त्यांनी तुझ्याजवळ पाप
केल्यामुळें आकाश बंद होऊन पाऊस न पडेल,
आणि ते या ठिकाणीं प्रार्थना करून तुझें नाम
मानतील, आणि त्वां त्यांस दुःख दिल्हें यावरून
ते आपल्या पापापासून फिरतील, ३६ तर त्वां
आकाशांत ऐकून आपले सेवक म्हणजे इस्राएली
लोक यांचें पाप क्षमा करावें; अणखी ज्या चां-
गल्या मार्गानें त्यांनी चालावें, तो त्यांस दाखवावा;
आणि जो आपला देश त्वां आपल्या लोकांस
वतन करून दिल्हा, त्यावर पाऊस पाडावा.

३७ जर देशांत दुकाळ किंवा मरी झाली,
जर काहिनी, तांबारा, टोळ, घुलें झालीं, जर दे-
शांत त्यांच्या शत्रूंनी त्यांच्या नगरांत त्यांस कोंडि-
लें; जर कांहीं पटकी किंवा कांहीं दुखणें झालें;
३८ तर सर्व माणसें, किंवा तुझे सर्व इस्राएली
लोक किंवा जे कोणी आपल्या मनाची खोड जा-
णून या मंदिरीं आपले हात पसरतील, त्यांकडून
जी कांहीं प्रार्थना किंवा कांहीं विनंती होईल, ३९
तीं त्वां आकाशांत, आपल्या राहायाच्या ठिकाणीं,
ऐकून क्षमा करावी, आणि उद्योग करून प्रत्ये-
काला त्याच्या त्याच्या सर्व आचरणांप्रमाणें द्यावें;
(कारण कीं केवळ तूंच मात्र मनुष्यांच्या सर्व संता-
नांचें मन जाणतोस;) ४० म्हणजे, जी भूमि त्वां
आमच्या वडिलांस दिल्ही, तिच्या पाठीवर जि-
तके दिवस ते जगतील त्या सर्वांत त्यांनी तुझें
भय धरावें. ४१ अणखी परका, जो तुझ्या इस्रा-
एली लोकांतला नाहीं, तो दुरल्या देशांतून तुझ्या
नामाकरितां आला असतां, (४२ कां कीं ते तुझें
मोठें नाम व तुझा बळकट हात व तुझा लांब-
विलेला बाहु, याविषयीं ऐकतील,) तो जेव्हां येऊन
या मंदिरीं प्रार्थना करील, ४३ तेव्हां त्वां आ-
काशांत, आपल्या राहायाच्या ठिकाणीं, ऐकून ज्या-
विषयीं परका तुला हाक मारील, त्या अवघ्या-
विषयीं करावें; म्हणजे जसें तुझ्या इस्राएली लो-
कांनी तसें पृथ्वीच्या सर्व लोकांनी तुला भ्यायास
तुझें नाम जाणावें, आणि जें मंदिर म्यां बांधिलें
आहे, त्या या मंदिरीं तुझें नाम घेतलें जातें, हें
जाणावें.

४४ तुझे लोक, जिकडे तूं त्यांस पाठविसील,
त्या वाटेनें आपल्या शत्रूंसीं लढायास जेव्हां बा-
हेर जातील, आणि जें नगर त्वां निवडिलें, आणि
जें मंदिर म्यां तुझ्या नामासाठीं बांधिलें आहे
त्याकडे परमेश्वराजवळ प्रार्थना करितील, ४५
तेव्हां त्वां आकाशांत त्यांची प्रार्थना व त्यांची
काकुळती ऐकून त्यांचा न्याय करावा. ४६ जर
ते तुझ्याजवळ पाप करितील, (कां कीं जो पाप
करीत नाहीं, असा कोणी माणूस नाहीं,) तूं त्यां-
वर रागें भरून त्यांस शत्रूंपुढें असें देसील कीं
ते शत्रू त्यांस पाडाव करून दुरल्या किंवा ज-
वळच्या देशांत नेतील; ४७ मग ज्या देशांत
ते पाडाव करून नेले जातील, तेथें आपल्या ध्या-
नांत घेतील, आणि फिरून आपल्या पाडावपणाच्या
देशांत तुझ्याजवळ काकुळती करून म्हणतील कीं,
आम्ही पाप केलें व विपरित केलें, आम्ही दुष्टाई
केली आहे; ४८ असें ज्या देशांत त्यांच्या श-
त्रूंनी ते पाडाव करून नेले जातील, तेथें ते आ-
पल्या सर्व अंतःकरणानें व आपल्या सर्व जिवानें
तुझ्याकडे फिरतील, आणि त्यांचा देश, जो त्वां
त्यांच्या वडिलांस दिल्हा होता, जें नगर त्वां नि-

वडलें व जें मंदिर म्या तुझ्या नामासाठीं बांधिलें
आहे त्याकडे तुझ्याजवळ प्रार्थना करितील; ४९
तर त्वां आकाशांत, आपल्या राहायाच्या ठिकाणीं,
त्यांची प्रार्थना व त्यांची काकुळती ऐकून त्यांचा
न्याय करावा. ५० आणि तुझ्या लोकांकडून जें
पाप तुझ्याजवळ घडलें होतें, व त्यांचीं उल्लंघनें
जीं त्यांकडून तुझ्याजवळ घडलीं होतीं, त्या सर्वां-
विषयीं त्यांची क्षमा त्वां करावी, आणि त्यांच्या
पाडावकऱ्यांनी त्यांवर ममता व कळवळा करावा,
असें कर. ५१ कारण कीं तुझे लोक व तुझें
वतन, ज्यांस त्वां मिसरांतून ह्मणजे लोखंडाच्या
भट्टींतून काढिलें, असे ते आहेत. ५२ तुझ्या से-
वकाच्या काकुळतीकडे तुझ्या इस्राएली लोकांच्या
काकुळतीकडे तुझे डोळे उघडे असावे ह्मणून
मागतों, असें कीं ज्याविषयीं ते तुला हाक मार-
तील, त्या अवघ्याविषयीं त्वां त्यांचें ऐकावें. ५३
कारण कीं, हे प्रभू परमेश्वरा, जेव्हां त्वां आ-
मच्या वडिलांस मिसरांतून काढिलें, तेव्हां त्वां
आपला सेवक मोशे याकडून जसें सांगितलें, तसें
त्यांस पृथ्वीच्या सर्व लोकांतून वेगळें करून आ-
पल्याजवळ वतनाचें करून ठेविलें."

५४ जेव्हां शलमोनाने परमेश्वराजवळ ही
अवघी प्रार्थना व काकुळती करून समाप्त केल्या-
वर असें झालें कीं त्याचे हात आकाशाकडे पसर-
लेले असतां, तो आपल्या गुडघ्यांवर राहणें सोडून
परमेश्वराच्या वेदीपुढून उठला. ५५ असें
त्याने उभें राहून इस्राएलाच्या सर्व समुदायाला
आशीर्वाद देऊन मोठ्या शब्देंकरून ह्मटलें, ५६
"परमेश्वराची स्तुति असो, का तर जें जें त्या-
ने सांगितलें, त्या सर्वांप्रमाणें आपल्या इस्राएली
लोकांस विसांवा दिल्हा; त्याने आपला सेवक
मोशे याकडून जें जें सांगितलें, त्याच्या त्या सर्व
चांगल्या वचनांतली एकहि गोष्ट पडून गेली ना-
हीं. ५७ आमचा देव परमेश्वर आमच्या
वडिलांस जसा अनुकूळ होता, तसा आह्मांस
अनुकूळ व्हावा; त्याने आह्मांस टाकूं नये, आ-
ह्मांस सोडूंच नये. ५८ ह्मणजे त्याच्या सर्व
मार्गांत चालायास आणि त्याच्या आज्ञा व त्या-
च्या नेमणुकी व त्याचे न्याय, जे त्याने आमच्या
वडिलांस आज्ञा करून लाविले, ते पाळायास
त्याने आपल्याकडे आमचें अंतःकरण वळवावें.
५९ आणि ज्या शब्दांकडून म्या परमेश्वरापुढें
विनंती केली, ते रात्रंदिवस आमचा देव परमे-
श्वर याच्याजवळ व्हावे; ह्मणजे त्याने आपल्या
सेवकाचा न्याय व आपल्या इस्राएली लोकांचा
न्याय दिवसा दिवसाच्या प्रसंगाप्रमाणें करावा;
६० यासाठीं कीं पृथ्वीच्या सर्व लोकांनी जाणावें
कीं परमेश्वर तोच देव, त्यावांचून कोणी देव
नाहीं. ६१ तुह्मी तर आमचा देव परमेश्वर
याच्या नेमणुकींप्रमाणें चालून त्याच्या आज्ञा आ-
जच्यासारिख्या पाळाव्या, ह्मणून तुमचें अंतःकरण
त्याच्याजवळ पूर्ण असावें."

६२ तेव्हां राजाने व त्याच्यासंगतीं सर्व इस्रा-
एलांनी परमेश्वरापुढें यज्ञ केले. ६३ शलमो-
नाने तर परमेश्वराजवळ जे शांतिकारक यज्ञ
केले, त्यांत गुरें बावीस हजार व बकरें एक लाख
वीस हजार होतीं, असें राजाने व इस्राएलाच्या
सर्व संतानांनी परमेश्वराच्या मंदिराचा संस्कार
केला. ६४ त्या दिवसीं राजाने परमेश्वराच्या
मंदिरापुढें जें मधलें अंगण तें पवित्र केलें; कारण
कीं त्याने तेथें होम केले व नैवेद्य व शांतिकारक
यज्ञांचें मांदें अर्पण केलें; कारण कीं परमेश्वरा-
पुढें पितळ्याची जी वेदी ती होम व नैवेद्य व
शांतिकारक यज्ञांचें मांदें मावण्याला लाहान होती.
६५ आणि त्या काळीं शलमोनाने व त्याच्या-
संगतीं सर्व इस्राएलांनी आमचा देव परमे-
श्वर यापुढें दिवसांचीं दोन सात्नें, ह्मणजे चव-
दा दिवस सण केला; हमाथांत शिरायाच्या ठि-
काणापासून मिसऱ्याच्या नदीपर्यंत जे राहणारे
त्यांची मोठी मंडळी मिळाली होती. ६६ आठ-
व्या दिवसीं त्याने लोकांस निरोप दिल्हा; तेव्हां
त्यांनी राजाला आशीर्वाद दिल्हा, मग परमेश्व-
राने आपला सेवक दावीद यावर व आपल्या
इस्राएली लोकांवर जे उपकार केले, त्या सर्वां-
वरून ते आनंद करून मनाच्या संतोषाने आप-
आपल्या राहोटीस गेले.

## अध्याय ९.

तेव्हां शलमोनाने परमेश्वराचें मंदिर व रा-
जाचें घर बांधून समाप्त केलें असतां, आणि

शलमोनाने जो कांहीं मनोरथ पुरवायास इच्छिलें,
तो पूर्ण केला असतां, २ असें झालें कीं जसें
परमेश्वराने गिबोनांत शलमोनाला दर्शन दि-
लें होतें, तसें त्याला दुसऱ्यानें दर्शन दिल्हें. ३
तेव्हां परमेश्वराने त्याला ह्मटलें, "तुझी प्रार्थना
व तुझी काकुळती, जी त्वां माझ्यापुढें केली, ती
म्या ऐकून घेतली; हें मंदिर जें त्वां बांधिलें तें
असें पवित्र केलें आहे कीं मी आपलें नाम
सर्वकाळ तेथें ठेवीन, आणि माझी दृष्टि व मा-
झें मन सदासर्वकाळ तेथें होईल. ४ तर जसा
तुझा बाप दावीद चालला, तसा जर तूं मनाच्या
पूर्णपणाने व सरळपणाने माझ्यापुढें चालसील, जें
म्या तुला आज्ञा करून लाविलें, त्या अवघ्या-
प्रमाणें वागून माझ्या नेमणुकी व माझे न्याय
पाळसील, ५ तर तुझा बाप दावीद याला म्या
जें सांगितलें होतें कीं, 'इस्राएलाच्या सिंहासनावर
तुझा पुरुष नाहींसा होणार नाहीं,' त्याप्रमाणें मी
तुझ्या राज्याचें सिंहासन इस्राएलावर सर्वकाळ
स्थापीन. ६ जर तुह्मी किंवा तुमचे पुत्र माझें
अनुसरण सोडून किंचित् फिराल, आणि माझ्या
आज्ञा व माझ्या नेमणुकी, ज्या म्या तुमच्यापुढें
लाविल्या, त्या न पाळून दुसऱ्या देवाजवळ जाऊन
त्यांच्या पायां पडत असतां त्यांची सेवा कराल;
७ तर जी भूमि म्या इस्राएलांस दिल्ही, तिच्या
पाठीवरून मी त्यांस नाहींसें करीन, आणि जें मं-
दिर म्या आपल्या नामासाठीं पवित्र केलें आहे,
तें मी आपल्या दृष्टींतून घालवीन, आणि इस्राएल
सर्व लोकांमध्यें दृष्टांतरूप व निंद्य असा होईल.
८ अणखी हें मंदिर फार उंच असतांहि याच्या
जवळून जाणारे सर्व विस्मित होऊन सुस्कार टाक-
तील, आणि ह्मणतील, 'परमेश्वराने या देशाला
व या मंदिराला असें कां केलें?' ९ तेव्हां को-
णी सांगतील, 'त्यांचा देव परमेश्वर, ज्याने
त्यांच्या वडिलांस मिसर देशांतून काढिलें होतें,
त्याला त्यांनी सोडून दुसरे देव धरिले, आणि
त्यांच्या पायां पडून त्यांची सेवा केली, यास्तव
परमेश्वराने त्यांवर हें सर्व वाईट आणिलें
आहे."

१० तर शलमोनाने परमेश्वराचें मंदिर व
राजाचें घर, अशीं दोन घरें बांधल्यावर वीस वर्षां-
च्या शेवटीं असें झालें कीं, ११ सोराचा राजा
हीराम याने शलमोनाला देवदारूचीं लाकडें व
भद्रदारूचीं लाकडें व सोनें त्याच्या सर्व इच्छे-
प्रमाणें पुरविलें होतें, यावरून शलमोन राजाने
हीरामाला गालील प्रांतांतलीं वीस नगरें दिल्हीं.
१२ तेव्हां शलमोनाने जीं नगरें हीरामाला दि-
ल्हीं होतीं, तीं त्याने सोरांतून जाऊन पाहिलीं;
परंतु तीं त्याच्या दिसण्यांत नीट वाटलीं नाहींत.
१३ यास्तव त्याने ह्मटलें, "हे माझ्या भावा, हीं
नगरें, जीं त्वां मला दिल्हीं, तीं कशीं?" यास्तव
त्याने त्यांचें नांव काबूल प्रांत ठेविलें; आजपर्यंत
तसें आहे. १४ हीरामाने तर राजाकडे साठ
तालांत सोनें पाठविलें होतें.

१५ आणि शलमोन राजाने परमेश्वराचें
मंदिर, व आपलें घर, व मिल्लो, व यरूशालेमाचें
गांवकुसूं, व हासोर, व मगिद्दो, व गेजेर बांधा-
यास जी पट्टी उगवून घेतली, तिचें कारण असें;
१६ कीं मिसरी राजा फारो याने वर जाऊन
गेजेर घेतलें, आणि त्याला आग लावून जाळिलें;
तेव्हां त्या नगरांत जे कनानी राहत होते, त्यांस
त्याने जिवें मारिलें; नंतर आपली कन्या शलमो-
नाची स्त्री, तिला तें आंदण करून दिल्हें होतें.
१७ यास्तव शलमोनाने गेजेर व खालचें बेथहो-
रोन हीं नगरें बांधिलीं; १८ आणि बालाथ व
देशांतरींच्या रानांतलें तादमोर; १९ आणि
शलमोनाचीं जीं सांठवणाचीं नगरें होतीं, तीं सर्व
व रथांचीं नगरें व स्वारांचीं नगरें, अणखी शल-
मोनाने यरूशालेमांत व लबानोनांत व आपल्या
अधिकाराच्या सर्व देशांत जें बांधायास इच्छा
धरिली, तें बांधिलें. २० जे अमोरी, हित्ती,
परिज्जी, हिव्वी, व यबूसी, त्यांतले उरलेले लोक,
जे इस्राएलाच्या संतानांतले नव्हते ते सर्व; २१
ह्मणजे ज्यांचा विनाश करायास इस्राएलाच्या
संतानांस शक्ति नव्हती, त्यांच्यामागें त्यांचीं जीं
संतानें देशांत राहिलीं, त्यांवर शलमोनाने आज-
पर्यंत बिगार चाकरीची पट्टी बसविली. २२
परंतु इस्राएलाच्या संतानांतल्या कोणाला शलमो-
नाने चाकरींत घातलें नाहीं; कारण कीं लढाईचीं
माणसें व त्याचे सेवक व त्याचे सरदार व त्याचे

सेनापति, आणि त्याच्या रथांवर व स्वारांवर
अधिकारी असे ते होते.
२३ शलमोनाच्या कामावर जे कारभारी,
त्यांतले मुख्य इतके कीं कामकऱ्या लोकांवर अधि-
कार करणारे साडे पांचशें होते. २४ तर फा-
रोची कन्या दावीदाच्या नगरांतून आपलें घर जें
त्यानें तिच्यासाठीं बांधिलें होतें, तेथें चढून गेली;
तेव्हां त्यानें मिल्लो बांधिलें. २५ शलमोनानें
जर जी वेदी परमेश्वरासाठीं बांधिली होती,
तिजवर तो प्रति वर्षांत तीन वेळां पशूंचे होम व
शांतिकारक यज्ञ करीत होता, आणि परमेश्व-
रापुढें जी वेदी तिजवर तो धूप जाळीत असे;
असें त्यानें तें मंदिर समाप्त केलें.
२६ आणखी अदोम देशांत सूफसमुद्राच्या कां-
ठीं एलोथाजवळ जें एज्योनगेबेर, तेथें शलमोन
राजानें तारवांचा तांडा केला. २७ आणि हि-
रामानें आपले चाकर, जीं तारवांचीं माणसें ज्यांस
समुद्र माहीत होता, त्यांस शलमोनाच्या चा-
करांच्यासंगतीं तांड्यांत पाठविलें. २८ तेव्हां
त्यांनीं ओफीरास जाऊन तेथलें चारशें वीस
तालांत सोनें मिळवून शलमोन राजाजवळ आ-
णिलें.

## अध्याय १०.

तेव्हां शबाची राणी परमेश्वराच्या नामावि-
षयीं शलमोनाचें वर्त्तमान ऐकून कोडीं घालून
त्याची प्रचिति पाहायाला आली. २ ती फार
मोठें स्वार घेऊन आणि सुवासिक द्रव्यांनीं व अ-
तिशय सोन्यानें व उंच्या पाषाणांनीं लादलेले उंट
घेऊन यरूशालेमेस आली, आणि शलमोनाजवळ
आल्यावर आपल्या मनांत जें सर्व होतें, त्याविषयीं
ती त्यासीं बोलली. ३ तेव्हां शलमोनानें तिच्या
सर्व गोष्टी तिला फोडून सांगितल्या; जी तिला
सांगितली नाहीं, तसी एकहि गोष्ट राजापुढें गुप्त
राहिली नाहीं. ४ मग शलमोनाचें सर्व ज्ञान व
जें मंदिर त्यानें बांधिलें तें शबाच्या राणीनें पाहिलें.
५ आणि त्याचें मेजावरचें खाणें व त्याच्या सेव-
कांचें बसणें, व त्याच्या कारभाऱ्यांचें उभें राहणें,
व त्यांचें पोषाक व त्याचे पेयकामी, व त्याच्या
ज्या जिन्यानें परमेश्वराच्या मंदिरास चढून
जावें हीं सर्व पाहिल्यावर पुढें तिच्यांत कांहीं
धैर्य राहिलें नाहीं. ६ नंतर ती राजाला बोलली,
“तुझ्या गोष्टींविषयीं व तुझ्या ज्ञानाविषयीं जें वर्त्त-
मान म्या आपल्या देशांत ऐकिलें होतें, तें खरें
झालें. ७ तथापि म्या येऊन आपल्या डोळ्यांनीं
पाहिल्यापूर्वी मी गोष्टींवर विश्वास ठेवीत नव्हतें;
तर पाहा, अर्धें देखील मला सांगितलें नव्हतें;
जें वर्त्तमान म्या ऐकिलें होतें, त्यापेक्षां तुझें ज्ञान
व कुशलता अधिकच आहे. ८ तुझीं माणसें
धन्य! तुझे हे सेवक, जे तुझ्यापुढें उभे राहून तुझें
ज्ञान नेहमीं ऐकतात, ते धन्य! ९ तुझा देव
परमेश्वर याची स्तुति असो, कां तर त्यानें तुजवर
सुप्रसन्न होऊन तुला इस्राएलाच्या सिंहासनावर
बसविलें; परमेश्वर इस्राएलावर सर्वकाळ प्रीति
करीत आहे, ह्मणून त्यानें न्याय व नीति करायास
तुला राजा करून ठेविलें आहे.” १० तेव्हां
तिनें राजाला एकशें वीस तालांत सोनें व फारच
सुगंधद्रव्यें व उंचे पाषाण दिल्हे; असें सुगंध
द्रव्य शबाच्या राणीनें शलमोन राजाला दिल्हें,
तसें पुष्कळ फिरून आलें नाहीं. ११ आणखी
हिरामाचा तारवांचा तांडा, ज्यानें ओफीरांतून सो-
नें आणिलें, त्यानें फारच आलमुग लाकडें व उंचे
पाषाण ओफीरांतून आणिले. १२ तेव्हां राजानें
परमेश्वराच्या मंदिरासाठीं व राजाच्या घरा-
साठीं आलमुग लाकडांचे कटाडे व गवयांसाठीं
तारवाद्यें व पेटीवाद्यें केलीं; तसीं आलमुग लां-
कडें आजपर्यंत आलीं नाहींत, दृष्टीसहि पडलीं
नाहींत. १३ शलमोन राजानें तर शबाच्या
राणीला, जें तिनें मागितलें तें तिच्या सर्व मनो-
रथाप्रमाणें दिल्हें, आणि त्याखेरीज शलमोनानें
जें तिला दिल्हें तें राजाच्या रीतीप्रमाणें होतें;
नंतर ती आपल्या सेवकांसुद्धां माघारी फिरून
आपल्या देशास गेली.
१४ तेव्हां एका वर्षांत शलमोनाजवळ जें
सोनें आलें, तें सोनें वजनानें साहाशें सासष्ट ता-
लांत होतें. १५ त्याखेरीज वाण्यांपासून व सा-
वकारांपासून आणि अरबस्थानाचे सर्व राजे व
देशांचे अधिकारी यांपासून येत होतें. १६
तेव्हां शलमोन राजानें घडीव सोन्याच्या अंगढा-
ला दोनशें केल्या, एकएका अंगढालेला साहाशें

घोटेल सोनें लागलें. १७ आणि त्याने घडींव
सोन्याच्या ढाला तीनशें केल्या; एकएका ढालेला
तीन अडीशेऱ्या सोनें लागलें; मग राजाने लबा-
नोनाच्या वनांतल्या घरीं त्या ठेविल्या.

१८ आणखी राजाने हस्तिदंताचें मोठें सिंहा-
सन केलें, आणि तें निखळ सोन्याने मढविलें.
१९ त्या सिंहासनाला साहा पायऱ्या होत्या, आ-
णि त्या सिंहासनाचा वरला भाग त्याच्यामागें वा-
टोळा, आणि बसायाच्या ठिकाणाच्या दोहोंकडे
हाताचे आधार, आणि त्या आधाराजवळ दोन
सिंह उभे होते. २० तेथें त्या साहा पायऱ्यांवर-
हि दोहींकडे उभे राहिलेले सिंह बारा होते;
त्यासारिखें कोणत्याहि राज्यांत केलें नव्हतें. २१
आणखी शलमोन राजाचीं प्यायाचीं सर्व पात्रें
सोन्याचीं, आणि लबानोनाच्या वनांतल्या घरचीं
सर्व पात्रें निर्मळ सोन्याचीं होतीं; कोणतेंहि रुप्या-
चें नव्हतें; तें शलमोनाच्या दिवसांत कांहीं मानिलें
नव्हतें. २२ कारण कीं हीरामाच्या तारवांच्या
तांड्यासुद्धां राजाचा तार्शिशी तारवांचा तांडा स-
मुद्रांत होता; तो तांडा तीन वर्षांनी एकदां ता-
र्शिशास जाऊन, सोनें व रुपें, हस्तिदंत व वानर
व मोरे आणीत होता. २३ यास्तव शलमोन रा-
जा देशांतरींच्या सर्व राजांपेक्षां धनाने व ज्ञानाने
मोठा झाला. २४ आणि जें ज्ञान देवाने श-
लमोनाच्या मनांत ठेविलें होतें, तें ज्ञान ऐकायास
सर्व पृथ्वीचे लोक त्याच्याजवळ येत होते. २५
तेव्हां ते प्रत्येक आपापली भेट; रुप्याचे डागिने,
व सोन्याचे डागिने, व वस्त्रें, व हत्यारें, व सुगंध
द्रव्य, व घोडे, व खेचरें प्रतिवर्षी नेमाप्रमाणें आ-
णीत होते. २६ आणि शलमोनाने रथ व स्वार
मिळविले; असे त्याच्याजवळ एक हजार चार-
शें रथ व बारा हजार स्वार होते, आणि त्याने
ते रथांच्या नगरांत व राजाजवळ यरूशालेमांत
ठेविले. २७ तेव्हां राजाने यरूशालेमांत रुपें
धोंड्यासारिखें पुष्कळ केलें, आणि देवदारु तळव-
टींतल्या उंबरासारिखें केलें. २८ तेव्हां शल-
मोनाजवळ घोडे व सूत मिसरांतून येत असत;
तें सूत राजाचे सावकार किमतीवर घेत असत.
२९ आणि रथ मिसरांतून वर आल्यावर साहा-
शें शेकेल रुप्यावर व घोडा दीडशें शेकेलांवर
आत होता; आणि तसें हित्त्यांच्या सर्व राजां-
साठीं व अरामाच्या राजांसाठीं त्यांकडून आणीत
असत.

## अध्याय ११.

तथापि शलमोन राजाने फारोची कन्या, मो-
आबिणी, आम्मोनिणी, अदोमिणी, सिदोनिणी,
हित्तिणी, अशा परदेशांतल्या बहुत स्त्रियांची आ-
वड धरिली. २ ज्या राष्ट्रांविषयीं परमेश्वराने
इस्राएलाच्या संतानांस सांगितलें होतें, "तुम्ही
त्यांजवळ जाऊं नका, आणि त्यांनी तुमच्याजवळ
येऊं नये; गेला, तर निश्चयें तीं आपल्या देवांकडे
तुमच्या मनास फिरवितील." त्यांसीं शलमोन प्री-
तीने जडला. ३ आणि त्याला सातशें बायका रा-
ण्या, आणखी तीनशें उपपत्न्या होत्या; आणि त्याच्या
स्त्रियांनी त्याचें मन फिरविलें. ४ म्हणजे शल-
मोनाच्या म्हातारपणाच्या काळीं असें झालें कीं
त्याच्या स्त्रियांनी त्याचें मन दुसऱ्या देवांकडे
फिरविलें; म्हणून त्याचें मन त्याचा बाप दावीद
याच्या मनासारिखें पूर्णपणाने त्याचा देव परमे-
श्वर याकडे नव्हतें. ५ कां कीं सिदोन्यांची
देवी आष्टोरेथ इच्यामागें आणि आम्मोन्यांचें
ओंगळपण मिल्कोम याच्यामागें शलमोन गेला.
६ असें शलमोनाने परमेश्वराच्या दृष्टींत वा-
ईट केलें, आणि तो आपला बाप दावीद यासा-
रिखा परमेश्वराच्या अनुसारें सर्व प्रकारें असा
नव्हता. ७ त्या काळीं शलमोनाने यरूशाले-
माच्या पुढल्या डोंगरावर मोआबाचें ओंगळपण
कमोश याच्यासाठीं आणि आम्मोनी लोकांचें
ओंगळपण मोलेख याच्यासाठीं उंच स्थान बां-
धिलें. ८ आणि त्याच्या परक्या स्त्रिया, ज्या
आपापल्या देवांजवळ धूप व यज्ञ करीत होत्या,
त्या सर्वांसाठीं त्याने तसें केलें. ९ तेव्हां पर-
मेश्वर शलमोनावर रागें भरला; कारण कीं
इस्राएलाचा देव परमेश्वर, ज्याने त्याला दोन
वेळां दर्शन दिल्हें होतें, त्यापासून त्याचें मन
फिरलें. १० आणि त्याने त्याला त्या गोष्टी-
विषयीं आज्ञा केली होती कीं, "तूं दुसऱ्या देवां-
च्यामागें जाऊं नको." तथापि ती आज्ञा परमे-
श्वराने केली होती, ती त्याने पाळली नाहीं.

११ तेव्हां परमेश्वराने शलमोनाला सांगितलें,
"तुझ्याकडून हें झालें, ह्मणजे त्वां माझा करार
व माझ्या नेमणुकी, ज्या म्यां आज्ञा करून तुला
सांगितल्या त्या पाळल्या नाहींत, यावरून मी
तुजपासून राज्य काढून घेईन आणि तें तुझ्या
सेवकाला देईन. १२ तथापि तुझ्या दिवसांत
तुझा बाप दावीद याकरितां मी तसें करणार नाहीं,
वर तुझ्या पुत्राच्या हातांतून तें काढून घेईन.
१३ तरी सर्व राज्य काढून घेणार नाहीं; माझा
सेवक दावीद याकारतां व जें यरूशालेम म्यां
निवडिलें त्याकरितां तुझ्या पुत्राला एक वंश
देईन."

१४ तेव्हां परमेश्वराने शलमोनावर वैरी
उठविला; तो हदाद अदोमी अदोमांतल्या राजा-
च्या संतानांतला होता. १५ जेव्हां दावीद अ-
दोमांत होता आणि योवाब सेनापति अदोमांत-
ल्या सर्व पुरुषांस मारून मेलेल्यांस पुरायाला
गेला होता, तेव्हां हें झालें; १६ कारण कीं
अदोमांतले सर्व पुरुष छेदी तोंपर्यंत साहा महि-
ने योवाब व सर्व इस्राएली तेथें राहिले. १७
तेव्हां हदाद व त्याच्यासंगतीं त्याच्या बापाच्या
सेवकांतलीं अदोमी माणसें पळून मिसरांत जा-
यास निघालीं, आणि हदाद लाहान मुलगा होता.
१८ तीं वर मिद्यानांतून निघून पारानास गेलीं,
मग आपल्यासंगवीं पारानांतलीं माणसें घेऊन मि-
सरांत मिसरी राजा फारो याजवळ गेलीं; तेव्हां
त्याने त्याला घर व अन्नाचें वचन दिल्हें, आणि
त्याला भूमि दिल्ही. १९ तेव्हां हदादावर फारो-
ची कृपादृष्टि फार झाली, असी कीं त्याने आप-
ल्या स्त्रीची बहीण, ह्मणजे ताहपनेस राणीची
बहीण त्याला बायको करून दिल्ही. २० मग
ताहपनेसेची बहीण त्यापासून त्याचा पुत्र गनु-
बाथ मसवली; नंतर ताहपनेसेने फारोच्या घ-
रांत त्याची स्तनतोडणी केली, तेव्हां गनुबाथ फा-
रोच्या घरीं फारोच्या लेंकरांमध्यें होता. २१
मग मिसरांत हदादाने ऐकिलें कीं दावीद आप-
ल्या वडिलांच्यासंगतीं निजला आणि योवाबहि
सेनापति मेला, तेव्हां हदादाने फारोला ह्मटलें,
"तूं मला निरोप दे, ह्मणजे मी आपल्या देशास
जाईन." २२ तेव्हां फारोने त्याला ह्मटलें कीं,
"माझ्याजवळ तुला काय उणें झालें कीं, पाहा,
तूं आपल्या देशास जायाला पाहतोस?" तेव्हां
तो बोलला, "कांहीं नाहीं; तथापि मला अवश्य
जाऊं द्यावें." २३ आणखी देवाने त्यावर दुसरा
शत्रु ह्मणजे एल्यादाचा पुत्र रजोन उठविला;
तो आपला धनी हदादेजेर जोबाचा राजा यापा-
सून पळाला होता. २४ जेव्हां दावीदाने तेथ-
ल्यांस मारिलें, तेव्हां तो आपल्याजवळ माणसें
मिळवून गोटाचा सर्दार झाला; मग ते दामासे-
कास जाऊन तेथें राहिले, आणि त्यांनी दामासे-
कांत राज्य स्थापिलें. २५ असा तो हदादाने
जें वाईट केलें त्याशिवाय शलमोनाच्या सर्व दि-
वसांत इस्राएलाचा शत्रु झाला; या प्रकारें त्याने
इस्राएलावर कोपून अरामावर राज्य केलें.

२६ आणखी जेरेदांतला एफ्राथी नबाट याचा
पुत्र यराबाम शलमोनाचा सेवक, त्याची आई
जरूवा नामें विधवा स्त्री होती, त्यानेंहि राजावर
हात चढविला. २७ तेव्हां त्याने ज्या कारणा-
वरून राजावर हात चढविला, तें हेंच; शलमोन
मिल्लो बांधीत होता, आणि आपला बाप दावीद
याच्या नगराचीं खिंडारीं बुजीत होता. २८ ते-
व्हां तो पुरुष यराबाम फार शूर होता; आणि तो
तरणा उद्योगाने काम करितो, असें शलमोनाने पाहून
त्याला योसेफाच्या वंशाच्या सर्व कामावर ठेविलें.
२९ आणि त्या काळीं असें झालें कीं यराबाम
यरूशालेमांतून निघून गेला, आणि अहीया भवि-
ष्यवादी शिलोकर त्याला वाटेवर सांपडला; ते-
व्हां तो नवें वस्त्र पांघरलेला होता आणि ते दोघे
मात्र शिवारांत होते. ३० आणि अहीयाने त्या-
च्या अंगावरलें जें नवें वस्त्र तें धरिलें, आणि तें
फाडून बारा तुकडे केले. ३१ मग त्याने यराबा-
माला सांगितलें, "तूं आपल्याजवळ दाहा तुकडे
घे, कारण कीं इस्राएलाचा देव परमेश्वर असें
सांगतो, 'पाहा, मी शलमोनाच्या हातांतून राज्य
काढून घेऊन तुला दाहा वंश देईन. ३२ तथा-
पि माझा सेवक दावीद याकारितां आणि यरूशा-
लेम नगर जें म्यां इस्राएलाच्या सर्व वंशांतून नि-
वडिलें त्याकरितां त्याला एक वंश राहील. ३३
कारण कीं त्यांनी मला सोडिलें, आणि सिदोन्यां-
ची देवी आष्टोरेथ, व मोवाबाचा देव कमोश,

व आम्मोनी लोकांचा देव मिल्कोम, यांचें भजन
केलें; आणि माझ्या मार्गांत ते चालले नाहींत;
माझ्या दृष्टींत जें नीट तें, ह्मणजे माझ्या नेमणु-
की व माझे न्याय यांप्रमाणें जसें त्याचा बाप
दावीदानें केलें, तसें त्यानीं केलें नाहीं. ३४ त-
थापि मी त्याच्या हातांतून सर्व राज्य घेणार नाहीं;
परंतु माझा सेवक दावीद ज्याला माझ्या आज्ञा
व माझ्या नेमणुकी पाळिल्यावरून म्यां निवडिलें,
त्याकरितां मी त्याच्या आयुष्याच्या सर्व दिवसांत
त्याला अधिकारी असें ठेवीन. ३५ तरी त्याच्या
पुत्राच्या हातांतून मी राज्य घेऊन त्यांतले दाहा
वंश तुला देईन. ३६ परंतु त्याच्या पुत्राला एक
वंश देईन; यासाठीं कीं यरूशालेम नगर, जें
म्यां आपलें नाम तेथें ठेवायास आपल्यासाठीं
निवडिलें त्यांत माझा सेवक दावीद याला मा-
झ्यापुढें सर्वकाळ दिवा व्हावा ह्मणून. ३७ तुला
तर मी अंगीकारीन, मग इस्राएलावर तूं राजा हो-
सील, आणि जसी तुझ्या जिवाची इच्छा असेल,
त्या सर्वांप्रमाणें तूं राज्य करसील. ३८ नंतर जें
सर्व मी तुला आज्ञा करून सांगेन तें जर तूं ऐ-
कून माझ्या मार्गांत चालसील, ह्मणजे जें माझ्या
दृष्टींत नीट तें करीत असतां, जसें माझा सेवक
दावीदानें केलें तसें माझ्या नेमणुकी व माझ्या
आज्ञा पाळसील, तर असें होईल कीं मी तुला
अनुकूळ होईन, आणि म्यां जसें दावीदासाठीं
बांधिलें, तसें तुझ्यासाठीं स्थितीचें घर बांधीन,
आणि तुला इस्राएल देईन. ३९ आणि तेणें-
करून दावीदाच्या संतानाला मी दुःख देईन,
परंतु सर्वकाळ नाहीं." ४० नंतर शलमोन य-
राबामाला जिवें मारायास झटला, यास्तव यरा-
बाम उठून मिसरांत मिसऱ्याचा राजा शीशाक
याजवळ पळून गेला, आणि शलमोनाच्या मरणा-
पर्यंत मिसरांत राहिला. ४१ शलमोनाच्या
राहिलेल्या गोष्टी आणि त्यानें जें सर्व केलें तें व
त्याचें ज्ञान, तीं तर शलमोनाच्या गोष्टींच्या पुस्त-
कांत लिहिलेलीं नाहींत कीं काय? ४२ तर ज्या
काळीं शलमोनानें यरूशालेमांत सर्व इस्राएला-
वर राज्य केलें, तो चाळीस वर्षांचा होता. ४३
मग शलमोन आपल्या वडिलांच्यासंगतीं निज-
ला, आणि आपला बाप दावीद याच्या नगरांत
पुरला गेला; तेव्हां त्याचा पुत्र रहाबाम यानें
त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय १२.

तेव्हां रहाबाम शखेमास गेला; कारण कीं
त्याला राजा करायाला सर्व इस्राएली शखे-
मांत आले होते. २ तर असें झालें कीं नबाटाचा
पुत्र यराबाम जो शलमोन राजापासून पळून जा-
ऊन मिसरांत राहिला होता त्या यराबामाला
मिसरांत असतां हें वर्तमान लागलें. ३ तेव्हां
त्यांनीं निरोप पाठवून त्याला बोलाविलें, मग य-
राबाम व इस्राएलाचे सर्व समुदाय रहाबामा-
जवळ येऊन त्याला असें ह्मणाले कीं, ४ "तुझ्या
बापानें आह्मावर कठीण जूं घातलें; तर आतां
आपल्या बापाची कठीण चाकरी, तेंच त्याचें भारी
जूं जें त्यानें आह्मावर घातलें तें आतां कांहीं
हलकें कर, ह्मणजे आह्मी तुझी सेवा करूं." ५
तेव्हां त्यानें त्यांस सांगितलें, "तुह्मी तीन दिवस-
पर्यंत जा, मग माझ्याजवळ फिरून या." मग
ते लोक गेले. ६ तेव्हां रहाबाम राजानें आपला
बाप शलमोन जिवंत होता, त्या वेळेस जे वडील
त्याच्यापुढें उभे राहिले होते त्यांस विचार करून
ह्मटलें कीं, "या लोकांस उत्तर देण्याविषयीं
तुह्मी बोध कसा करितां?" ७ तेव्हां त्यांनी त्या-
ला असें सांगितलें कीं, "जर तूं आज या लोकांचा
चाकर होऊन त्यांची सेवा करसील, आणि त्यांस
उत्तर देऊन चांगल्या गोष्टी त्यांसीं बोलसील,
तर ते सर्वकाळ तुझे चाकर होतील." ८ तथापि
त्या वडिलांनी त्याला जो बोध केला, तो बोध
त्यानें सोडिला; आणि जे नवे तरणे त्याच्यासंगतीं
प्रतिपाळ पावून त्याच्यापुढें उभे राहिले होते,
त्यांस त्यानें विचारिलें. ९ आणि त्यानें त्यांस
ह्मटलें, "ज्यांनी मला असें ह्मटलें कीं, 'जें जूं
तुझ्या बापानें आह्मावर घातलें, तें तूं कांहीं हलकें
कर, त्या या लोकांस आह्मी उत्तर करावें, या-
विषयीं तुह्मी काय बोध करितां?" १० तेव्हां
जे नवे तरणे त्याच्यासंगतीं प्रतिपाळ पावले होते,
त्यांनी त्याला असें सांगितलें कीं, "तूं या लोकां-
जवळ असें बोल; ह्मणजे ज्यांनी तुला असें ह्म-
टलें कीं, तुझ्या बापानें आह्मावर भारी जूं घातलें

आतां तूं आह्मावरलें तें हलकें कर, त्यांस तूं
असें बोल कीं, माझें लाहान बोट माझ्या बापा-
च्या कंबरेपेक्षां जाड होईल. ११ माझ्या बापाने
तुह्मावर भारी जूं चढवून घातलें, मी तर आतां
तुमचें जूं वाढवीन; माझ्या बापाने तुह्मास चाब-
कांनी शिक्षा केली, मी तर विंचवानी तुह्मास शि-
क्षा करीन." १२ मग जसें राजाने सांगितलें होतें
कीं, "तुह्मी तिसऱ्या दिवशीं माझ्याजवळ फिरून
या," तसे यराबाम व सर्व लोक तिसऱ्या दिवशीं
रहाबामाजवळ आले. १३ तेव्हां राजाने लोकांस
कठीण उत्तर दिल्हें, ह्मणजे त्या वडिलानी त्याला
जो बोध केला होता, तो त्याने सोडिला. १४ आ-
णि त्याने त्या तरण्यांच्या बोधाप्रमाणें त्यांस असें
सांगितलें कीं, "माझ्या बापाने तुह्मावर भारी जूं
घातलें, मी तर तुमचें जूं वाढवीन; माझ्या बापाने
तुह्मास चाबकांनी शिक्षा केली, मी तर विंचवानी
तुह्मास शिक्षा करीन." १५ असें राजाने लोकांचें
ऐकिलें नाहीं, कारण कीं परमेश्वराकडून तशी
गति झाली; यासाठीं कीं जें वचन परमेश्वराने
अहीया शिलोकर याकडून नबाटाचा पुत्र यरा-
बाम याला सांगितलें होतें, तें आपलें वचन आपण
स्थापावें ह्मणून. १६ तेव्हां राजा आमचें ऐकत
नाहीं, असें सर्व इस्राएलानी पाहिलें; यास्तव त्या
लोकांनी राजाजवळ उलटा निरोप असा पाठविला
कीं, "आह्मास दावीदसंबंधीं काय वांटा? तर
आह्मास इशायाच्या पुत्रसंबंधीं वतन नाहीं; हे
इस्राएली, आपापल्या राहोटीस जा, हे दावीदा,
आतां तूं आपल्या घराण्याविषयीं पाहा." असे
इस्राएली आपापल्या राहोटीस गेले. १७ आणि
जीं इस्राएलाचीं संतानें यहूद्यांच्या नगरांत राहत
होतीं, त्यांवर मात्र रहाबाम राज्य करिता झाला.
१८ आणि रहाबाम राजाने अदोराम जो वसुला-
वर होता त्याला पाठविलें, परंतु सर्व इस्राएलानी
त्याला दगडांचा मार केला असतां, तो मेला;
आणि रहाबाम राजा यरूशालेमांत पळून जायास
उतावळीने रथावर चढला. १९ असें इस्राएला-
नी दावीदाच्या घराण्यावर फितूर केला असतां,
आजपर्यंत चालला.

२० आणि जेव्हां इस्राएलानी ऐकिलें कीं य-
राबाम माघारा आला, तेव्हां असें झालें कीं त्याने
पाठवून त्याला सभेस बोलाविलें, मग त्याला सर्व
इस्राएलावर राजा केला; दावीदाच्या घराण्याचा
अनुसारी यहूदा वंश मात्र होता, त्याशिवाय को-
णी नव्हता. २१ नंतर रहाबामाने यरूशालेमांत
येऊन इस्राएलाच्या घराण्यासीं लढायास सर्व
यहूद्याचा वंश व बन्यामीनाचा वंश यांतले एक
लाख ऐशीं हजार निवडलेले लढणारे गोळा केले;
यासाठीं कीं शलमोनाचा पुत्र रहाबाम याने
आपल्याजवळ राज्य माघारें आणावें. २२ मग
देवाचा माणूस शमाया याला देवाचें वचन
असें प्राप्त झालें कीं, २३ यहूद्याचा राजा शल-
मोनाचा पुत्र रहाबाम याला आणि सर्व यहूद्या-
चा घराणा व बन्यामीन व इतर लोक यांस तूं
याप्रमाणें सांग कीं, २४ परमेश्वर असें सांगतो
कीं, 'तुह्मी जाऊं नका, आणि आपले भाऊ इस्रा-
एलाचीं संतानें यांसीं लढाई करूं नका, तुह्मी
प्रत्येक आपापल्या घरास माघारें जा, कारण कीं
ती गोष्ट मजकडून झालेली आहे." यास्तव त्यानी
परमेश्वराचें वचन ऐकिलें; ह्मणजे परमे-
श्वराच्या आज्ञेप्रमाणें ते माघारे फिरून गेले.

२५ यानंतर यराबाम एफ्राइम डोंगरावर श-
खेम बांधून तेथें राहिला, मग त्याने तेथून जाऊन
पनुवेल बांधिलें. २६ तेव्हां यराबामाने आपल्या
मनांत ह्मटलें, आतां राज्य दावीदाच्या घराण्या-
कडे माघारें जाईल. २७ जर हे लोक यज्ञ
करायास वर यरूशालेमांत परमेश्वराच्या मंदि-
राजवळ जातात, तर या लोकांचें मन आपल्या
धन्याकडे, ह्मणजे यहूद्याचा राजा रहाबाम याकडे
फिरेल; मग हे मला जिवें मारून यहूद्याचा रा-
जा रहाबाम याकडे फिरतील. २८ यास्तव रा-
जाने सम्मत घेऊन सोन्याचीं दोन वासरें केलीं,
मग त्यांस ह्मटलें कीं, "यरूशालेमास चढून
जाणें हें तुह्मास अवघड आहे; हे इस्राएल,
पाहा हे तुझे देव, यानी तुला मिसर देशांतून
वर आणिलें." २९ तेव्हां त्याने बेथेलांत एक
वासरूं ठेविलें, आणि दानांत एक ठेविलें. ३०
मग ती गोष्ट पापरूप झाली; कां कीं लोक दा-
नापर्यंत एकाच्यापुढें गेले. ३१ आणखी त्याने
उंच स्थानांचें घर केलें, आणि नीच लोक, जे
लेवीच्या संतानांतले नव्हते, त्यांतले याजक केले.

३२ आणि जसा सण यहूद्यांत, तसा सण यराबा-
मानें आठव्या महिन्यांत महिन्यांतल्या पंधराव्या
दिवशीं केला, आणि त्यानें वेदीवर होम केले;
तसें बेथेलांत त्यानें केलें, जीं वासरें त्यानें केलीं
होतीं, त्यांजवळ यज्ञ केले, आणि जीं उंच स्थानें
त्यानें केलीं होतीं, तेथले याजक बेथेलांत ठेविले.
३३ अणखी जी वेदी त्यानें बेथेलांत बांधिली
होती तिजवर, जो महिना आपण स्वबुद्धीनेच
योजिला होता, त्या आठव्या महिन्यांतल्या पंधरा-
व्या दिवशीं होम केले; असा त्यानें इस्राएलाच्या
संतानांसाठीं सण स्थापिला आणि वेदीवर होम
करून धूप केला.

## अध्याय १३.

तर यराबाम धूप करायाला वेदीजवळ उभा रा-
हिला होता, तेव्हां पाहा, देवाचा माणूस पर-
मेश्वराच्या आज्ञेनें यहूद्यांतून बेथेलास आला.
२ आणि त्यानें वेदीवर परमेश्वराच्या आज्ञेनें
ओरडून ह्मटलें, "हे वेदी, वेदी, परमेश्वर असें
सांगतो, 'पाहा, दावीदाच्या घराण्यांत योशीया
नामें पुत्र जन्मेल; आणि उंच स्थानांचे जे या-
जक तुजवर धूप करितात त्यांस तो यज्ञानें तुजवर
अर्पील; असें माणसांचीं हाडें तुजवर जाळलीं
जातील.'" ३ अणखी त्यानें त्याच दिवशीं खूण
देऊन ह्मटलें कीं, "परमेश्वरानें तसें सांगितलें
ह्मणून हीच खूण; पाहा, ही वेदी फुटली जा-
ईल, आणि इजवर जी राख, ती कांढिली जा-
ईल." ४ तेव्हां देवाचा जो माणूस बेथेलांत-
ल्या वेदीवर ओरडून बोलला, त्याचें वचन यरा-
बाम राजानें ऐकिलें असतां असें झालें कीं यराबा-
मानें आपला हात वेदीवरून लांबवून सांगितलें
कीं, "त्याला धरा." तेव्हां जो हात त्यानें त्यावर
लांबविला, तो असा वाळला कीं तो मागें आपल्या
जवळ आणायास त्याला शक्ति राहिली नाहीं.
५ आणि देवाच्या माणसानें जी खूण परमेश्व-
राच्या सांगण्यावरून नेमून दिल्ही होती, तिज-
प्रमाणें ती वेदी फुटली आणि वेदीवरली राख कां-
ढिली गेली. ६ यास्तव राजानें देवाच्या माण-
साला उत्तर देऊन सांगितलें कीं, "माझा हात
मजकडे मागें यावा, ह्मणून आतां तूं आपला देव
परमेश्वर यापाशीं माझ्यासाठीं काकुळती करून
प्रार्थना कर." तेव्हां देवाच्या माणसानें परमे-
श्वरापाशीं काकुळती केली; मग राजाचा हात
बरा होऊन पहिल्यासारिखा झाला. ७ नंतर
राजानें देवाच्या माणसाला ह्मटलें, "तूं माझ्या-
संगतीं घरीं येऊन फराळ कर, मग मी तुला इ-
नाम देईन." ८ तेव्हां देवाच्या माणसानें राजा-
ला ह्मटलें, जरी तूं आपलें अर्धें घर मला दे-
सील, तरी मी तुझ्यासंगतीं येणार नाहीं, आणि
या ठिकाणीं अन्न खाणार नाहीं, पाणीहि पिणार ना-
हीं; ९ कारण कीं याप्रमाणें परमेश्वराचें वचन
मला आज्ञा करून झालें कीं, 'तूं अन्न खाऊं नको,
पाणीहि पिऊं नको; आणि ज्या वाटेनें जातोस,
तिजवरून माघारा येऊं नको.'" १० मग ज्या
मार्गानें तो बेथेलास गेला होता, त्यावरून तो मा-
घारा फिरला नाहीं, तर दुसऱ्या मार्गानें चालला.
११ तेव्हां बेथेलांत एक ह्मातारा भविष्यवादी
राहत होता, आणि त्याच्या पुत्रांनीं येऊन जें कर्म
देवाच्या माणसानें त्या दिवशीं बेथेलांत केलें होतें,
तें अवघें त्याला सांगितलें; आणि ज्या गोष्टी त्यानें
राजाला सांगितल्या होत्या, त्याहि त्यांनीं आपल्या
बापाजवळ सांगितल्या. १२ तेव्हां त्याच्या बापानें
त्यांस विचारिलें, "तो कोणत्या वाटेनें गेला?" कां
कीं देवाचा जो माणूस यहूद्यांतून आला होता,
तो ज्या वाटेनें गेला, ती त्याच्या पुत्रांनीं पाहिली
होती. १३ तेव्हां त्यानें आपल्या पुत्रांस सांगि-
तलें, "तुह्मी माझ्यासाठीं गाढव अवळा." यास्तव
त्यांनीं त्याच्यासाठीं गाढव अवळलें, मग तो त्या-
वर बसला. १४ आणि देवाच्या माणसामागें
गेला, आणि एलाझाडाखालीं बसलेला तो त्याला
सांपडला; मग त्यानें त्याला विचारिलें, "देवाचा
जो माणूस यहूद्यांतून आला होता तोच तूं कीं
काय?" तेव्हां तो बोलला, "मीच." १५ तेव्हां
त्यानें त्याला ह्मटलें, "तूं माझ्यासंगतीं घरीं येऊन
अन्न खा." १६ मग त्यानें ह्मटलें, "तुझ्या-
संगतीं फिरायाला किंवा तुझ्यासंगतीं येऊन अन्न
खायाला किंवा तुझ्यासंगतीं या ठिकाणीं पाणी
प्यायाला मला होत नाहीं; १७ कारण कीं
परमेश्वराचें वचन मला आज्ञा करून झालें,
'तूं तेथें अन्न खाऊं नको, पाणीहि पिऊं नको,

आणि ज्या वाटेने आतोस, तिजवरून माघारा ये-
ऊं नको." १८ तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, "मीहि
तुझ्यासारिखा भविष्यवादी आहें, आणि दूताने
मला परमेश्वराची असी आज्ञा सांगितली कीं
'त्याने अन्न खावें व पाणी प्यावें ह्मणून तूं त्याला
माघारें आपल्यासंगतीं आपल्या घरीं आण.'" परंतु
तो त्याला खोटें बोलला. १९ मग तो त्याच्या-
संगतीं मागें फिरला, आणि त्याच्या घरीं अन्न
खाता व पाणी पिता झाला. २० आणि ते मेजा-
बवळ बसले असतां असें झालें कीं ज्या भविष्य-
वाद्याने त्याला माघारें आणिलें होतें त्याला परमे-
श्वराचें वचन प्राप्त झालें; २१ ह्मणून दे-
वाच्या जो माणूस यहूद्यांतून आला होता, त्याला
तो ओरडून बोलला कीं, "परमेश्वर असें सांगतो,
ज्यापेक्षां त्वां परमेश्वराच्या वचनाचें उल्लंघन
केलें, आणि तुझा देव परमेश्वर याने तुला जी
आज्ञा दिल्ही होती, ती पाळली नाहीं, २२ ह्म-
णजे जेथें त्वां अन्न न खावें व पाणी न प्यावें ह्म-
णून तुला सांगितल होतें, त्या ठिकाणीं तूं मागें
फिरून अन्न खाऊन पाणी प्यालास, त्यापेक्षां तुझें
मेत तुझ्या वडिलांच्या कबरेस पोहंचणार नाहीं."
२३ तेव्हां त्याचें खाणें पिणें झाल्यावर असें
झालें कीं ज्या भविष्यवाद्याने त्याला माघारें आ-
णिलें होतें, त्याने त्याच्यासाठीं गाढव अवळलें.
२४ मग तो येल्यावर सिंहाने त्याच्या अंगावर
येऊन त्याला जिवें मारिलें; तेव्हां त्याचें मेत वा-
टेमध्यें पडून राहिलें, आणि गाढव त्याजवळ उभें
राहिलें, सिंहहि मेताजवळ उभा राहिला. २५
तेव्हां पाहा, कोणी वाटसरूनी मार्गावर पाडलेलें
मेत आणि मेताजवळ उभा राहिलेला सिंह पाहिला,
आणि त्यानी ज्या नगरांत तो वडिल भविष्यवादी
राहत होता, तेथें जाऊन सांगितलें. २६ मग ज्या
भविष्यवाद्याने त्याला वाटेवरून माघारें आणिलें
होतें, त्याने ऐकून ह्मटलें, "देवाचा माणूस ज्या-
ने परमेश्वराच्या वचनाचें उल्लंघन केलें, तोच
तो; ह्मणजे परमेश्वराने असें त्याला सांगितलें
होतें, त्या वचनाप्रमाणें परमेश्वराने तो सिंहाला
दिल्हा असतां, त्याने त्याला फाडून जिवें मारिलें
आहे." २७ तेव्हां त्याने आपल्या पुत्रांस असें
सांगितलें कीं, "तुह्मी माझ्यासाठीं गाढव अवळा."
आणि त्यानी अवळलें. २८ मग तो गेला असतां,
त्याला वाटेवर पाडलेलें त्याचें मेत व मेताजवळ
उभें राहिलेलें गाढव व सिंह, हीं सांपडलीं; सिंहाने
मेत खालें नव्हतें, आणि गाढवाला फाडिलें नव्हतें.
२९ तेव्हां त्या भविष्यवाद्याने देवाच्या माणसाचें
मेत उचलिलें आणि गाढवावर घालून माघारें आ-
णिलें; असा तो वडिल भविष्यवादी शोक करा-
यास व त्याला पुरायास नगरांत आला. ३०
तेव्हां त्याने आपल्या कबरेंत त्याचें मेत ठेविलें,
आणि त्यानी त्यासाठीं असा शोक केला कीं, "हे
माझ्या भावा, हाय हाय." ३१ तेव्हां त्याने त्या-
ला पुरल्यावर असें झालें कीं त्याने आपल्या पुत्रांस
या प्रकारें सांगितलें, "जेव्हां मी मरेन तेव्हां ज्या
कबरेंत देवाचा माणूस पुरला आहे, तींत तुह्मी
मला पुरा, त्याच्या हाडांजवळ माझीं हाडें लावा;
३२ कारण कीं परमेश्वराच्या सांगण्यावरून
बेथेलांतल्या वेदीविषयीं व शोमरोनाच्या नगरांत-
ल्या उंच स्थानांच्या सर्व घरांविषयीं जी गोष्ट
त्याने ओरडून सांगितली, ती होईलच होईल."
३३ असी गोष्ट झाल्यावरहि यराबाम आपल्या
वाईट मार्गांतून फिरला नाहीं; परंतु त्याने अधम
लोकांतून उंच स्थानांचे याजक केले, ज्या कोणा-
च्याहि मनावर आलें त्याचा संस्कार त्याने केला,
असे ते उंच स्थानांचे याजक झाले. ३४ तेव्हां
ती गोष्ट यराबामाच्या घराण्याला पापरूप झाली,
असी कीं तें भूमीच्या पाठीवरून छेदलें जाऊन
नाशास जावें.

## अध्याय १४.

त्या काळीं यराबामाचा पुत्र अबीया याला
दुखणें लागलें. २ तेव्हां यराबामाने आ-
पल्या स्त्रीला सांगितलें, "आतां तूं उठून आपण
यराबामाची स्त्री, असें कोणाला न कळायास
आपला वेष पालटून शिलोस जा; पाहा, अही
या भविष्यवादी, ज्याने मला सांगितलें होतें कीं,
तूं या लोकांवर राज्य करसील, तेथें तो आहे. ३
तर तूं आपल्या हातीं दाहा भाकरी व कांहीं पु-
ऱ्या व बुधलीभर मध घेऊन त्याजवळ जा; ह्म-
णजे लेंकराला काय होईल, तें तो तुला सांगेल."
४ मग यराबामाच्या स्त्रीने तसें केलें; ह्मणजे ती

उठून शिलोस अहीयाच्या घरीं गेली; अहीया-
ला तर पाहायाची शक्ति नव्हती, कारण कीं त्या-
ची दृष्टि त्याच्या म्हातारपणामुळें मंद झाली होती.
५ तेव्हां परमेश्वराने अहीयाला सांगितलें
होतें, "पाहा, यराबामाची स्त्री आपल्या पुत्राावि-
षयीं तुझ्याजवळ कांहीं विचारायास येत आहे,
कारण कीं त्याला दुखणें लागलें आहे; तूं तिला
अमुक अमुक सांग, आणखी असें होईल कीं ती
येऊन आपण दुसरी असें दाखवील." ६ नंतर
ती दारासीं आली असतां तिच्या पावलांचा शब्द
अहीयाने ऐकिल्यावर असें झालें कीं त्याने म्हटलें,
"यराबामाचे स्त्रिये, आंत ये, तूं आपल्याला दुस-
री असें कां दाखवितीस? कां कीं मी कठीण नि-
रोप घेऊन तुझ्याजवळ पाठविलेला आहें. ७ तूं
जाऊन यराबामाला सांग, इस्राएलाचा देव पर-
मेश्वर असें सांगतो, 'ज्यापेक्षां म्या तुला लो-
कांतून काढून थोर केलें, आणि आपल्या इस्राए-
ली लोकांवर तुला अधिकारी असें करून ठेविलें;
८ आणि म्या दावीदाच्या घराण्यापासून राज्य
काढून घेऊन तुला दिल्हें, तथापि जो माझा सेवक
दावीद माझ्या आज्ञा पाळून माझ्या दृष्टींत जें नीट
तें मात्र करायास आपल्या सर्व अंतःकरणाने माझ्या
मागें चालला, त्याच्यासारिखा तूं झाला नाहींस;
९ तर तुझ्यापूर्वींचे जे होते, त्या सर्वांपेक्षां त्वां
वाईट केलें, म्हणजे मला चिडवून दुसरे देव व
मूर्त्ति आपल्यासाठीं केल्या, आणि मला आपल्या
पाठीमागें घातलें; १० त्यापेक्षां पाहा, मी यरा-
बामाच्या घराण्यावर वाईट आणितों, म्हणजे यरा-
बामाचा भिंतमुत्या जो इस्राएलांतला कोंडलेला
व टाकलेला, त्याचा विनाश करीन, या प्रकारें
जसा कोणी विष्टा काढून टाकितो, तसी यराबा-
माच्या घरची संतति नाहींसी होईल तोंपर्यंत
मी तिला काढून टाकीन. ११ यराबामाचा जो
नगरांत मरेल, त्याला कुत्रीं खातील, आणि जो
बाहेरल्या ठिकाणीं मरेल, त्याला आकाशांतलीं
पाखरें खातील, कारण कीं परमेश्वरानें तसें सां-
गितलें आहे. १२ तर तूं उठून आपल्या घरास
जा; जेव्हां तुझे पाय नगरास पोहंचतील, तेव्हां तें
लेंकरूं मरेल. १३ आणि सर्व इस्राएली त्यासा-
ठीं शोक करितील आणि त्याला पुरतील; कां तर
यराबामाचें तें मात्र कबरेस पोहंचेल, कारण कीं
यराबामाच्या घरीं त्यांतच इस्राएलाचा देव परमे-
श्वर याजवळ कांहीं बरेपण सांपडलें आहे. १४
आणखी परमेश्वर आपल्यासाठीं इस्राएलावर
असा राजा उठवील कीं तो त्या दिवसीं, तर काय!
आतां देखील यराबामाच्या घराण्याचा विनाश क-
रील. १५ आणि परमेश्वर इस्राएलास हाणून,
जसी काडी पाण्यावर हेलकावली जाती, तसें क-
रील, म्हणजे ही जी चांगली भूमि त्याने इस्राए-
लाच्या वडिलांस दिल्ही, तिजवरून तो त्यांस उ-
पटून नदीच्या पलिकडे त्यांची दाणादाण करील;
कारण कीं त्यांनी परमेश्वराला चिडवून आप-
ल्यासाठीं भजनवनें केलीं. १६ असी यराबामाने
जीं पापें केलीं आणि जीं इस्राएलाकडून करविलीं
त्यांमुळें तो त्यांस टाकून देईल." १७ तेव्हां
यराबामाची स्त्री उठून थिर्जेजवळ गेली; आ-
णि ती घराच्या उंबऱ्यापर्यंत पोहंचली असतां, तें
लेंकरूं मेलें. १८ आणि परमेश्वराचें वचन, जें
त्याने आपला सेवक अहीया भविष्यवादी याकडून
सांगितलें होतें, त्याप्रमाणें सर्व इस्राएलांनी त्याला
पुरलें, आणि त्याविषयीं शोक केला. १९ आणि
यराबामाच्या राहिलेल्या गोष्टी, त्याने लढाई कसी
केली, आणि राज्य कसें केलें, पाहा तीं इस्राए-
लाच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत लिहिलेलीं
आहेत. २० ज्या काळीं यराबामाने राज्य केलें,
तो तर बावीस वर्षांचा होता, मग तो आपल्या व-
डिलांच्यासंगतीं निजला, आणि त्याचा पुत्र नादाब
याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें. २१ तर शल-
मोनाचा पुत्र रहाबाम याने यहूदावर राज्य केलें;
रहाबाम राज्य करूं लागला, तेव्हां तो एकेताळी-
स वर्षांचा होता आणि यरूशालेम, जें नगर पर-
मेश्वराने आपलें नाम तेथें ठेवायास इस्राएला-
च्या सर्व वंशांच्यातून निवडिलें, त्यांत त्याने सतरा
वर्षें राज्य केलें; आणि त्याच्या आईचें नांव नामा,
ती आम्मोनीण होती. २२ तेव्हां यहूदाने पर-
मेश्वराच्या दृष्टींत असें वाईट केलें कीं आपल्या
जीं पापें केलीं, तिहींकरून त्याला आपल्या वडि-
लांनी जें केलें होतें, त्या अवघ्यापेक्षां अधिक सं-
तापविलें. २३ कां कीं त्यांनीहि आपल्यासाठीं
उंच स्थानें बांधिलीं, आणि मूर्त्ति व भजनवनें सर्व

उंच डोंगरांवर व सर्व हिरव्या झाडांखालीं केलीं.
२४ आणि देशांत राखलेले पुरुष होते; जीं राष्ट्रें
परमेश्वराने इस्राएलाच्या संतानांच्या पुढून वत-
नांतून घालविलीं, त्यांच्या सर्व ओंगळ कामांसारि-
खीं त्यांनी केलीं. २५ वास्तव रहाबाम राजाच्या
पांचव्या वर्षीं असें झालें कीं मिसरी राजा शी-
शाक यरूशालेमावर चढून आला. २६ आणि
त्याने परमेश्वराच्या मंदिराचें भांडार व राजा-
च्या घरचें भांडार नेलें, असें अवघें नेलें; सोन्या-
च्या ज्या ढाला शलमोनाने केल्या होत्या, त्या
अवघ्या त्याने नेल्या. २७ नंतर रहाबाम राजा-
ने त्यांच्या ठिकाणीं पितळ्याच्या ढाला करून, जे
पाहरेकरी राजाच्या घराचा दरवाजा राखीत होते,
त्यांच्या सर्दारांच्या स्वाधीन केल्या. २८ आणि
असें होतें कीं जेव्हां राजा परमेश्वराच्या मंदि-
रीं आत असे, तेव्हां ते पाहरेकरी त्या उचलून
येत असत, मग पाहरेकऱ्यांच्या खोलींत फिरून
ठेवीत असत. २९ रहाबामाच्या राहिलेल्या गो-
ष्टी, ज्या अवघ्या त्याने केल्या, यहूदाच्या राजां-
च्या इतिहासाच्या पुस्तकांत त्या लिहिलेल्या ना-
हींत कीं काय? ३० आणि रहाबाम व यराबाम
यांमध्यें लढाई अखंड होत होती. ३१ मग र-
हाबाम आपल्या वडिलांच्यासंगतीं निजला आणि
दावीदाच्या नगरांत आपल्या वडिलांच्यासंगतीं
पुरला गेला, आणि त्याच्या आईचें नांव नामा,
ती आम्मोनीण होती; नंतर त्याचा पुत्र अबीयाम
याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय १५.

तेव्हां नबाटाचा पुत्र यराबाम राजा याच्या अ-
ठराव्या वर्षीं अबीयाम यहूदावर राज्य करूं
लागला. २ त्याने यरूशालेमांत तीन वर्षें राज्य
केलें, आणि त्याच्या आईचें नांव माखा, ती अबी-
शालोमाची कन्या होती. ३ आणि त्याच्यापूर्वी त्या-
च्या बापाने जीं पापें केलीं होतीं, त्या सर्वांत तो
चालला, आणि त्याचें अंतःकरण त्याच्या वडिल
दावीदाच्या अंतःकरणासारिखें त्याचा देव परमे-
श्वर याकडे यथार्थ नव्हतें. ४ तथापि दावी-
दाकरितां त्याचा देव परमेश्वर याने त्याला
यरूशालेमांत दिवा दिल्हा, ह्मणजे त्याच्यामागें
त्याचा पुत्र स्थापिला, आणि यरूशालेम राहविलें.
५ कां तर परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें
दावीदाने केलें, आणि त्याला जी कांहीं आज्ञा
त्याने दिल्ही होती, ती त्याने आपल्या सर्व आयु-
ष्यांत सोडिली नाहीं; केवळ उरीया हित्ती यावि-
षयींच्या गोष्टींत मात्र सोडिली. ६ आणि र-
हाबामाच्या सर्व आयुष्यांत त्याची व यराबामा-
ची लढाई चालली. ७ अबीयामाच्या राहि-
लेल्या गोष्टी, ज्या अवघ्या त्याने केल्या, यहूदाच्या
राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत त्या लिहिलेल्या
नाहींत कीं काय? तर अबीयाम व यराबाम
यांमध्यें लढाई होत होती. ८ नंतर अबीयाम
आपल्या वडिलांच्यासंगतीं निजला, आणि त्यांनी
त्याला दावीदाच्या नगरांत पुरलें; तेव्हां त्याचा
पुत्र आसा याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

९ इस्राएलाचा राजा यराबाम याच्या विसा-
व्या वर्षीं आसा यहूदावर राज्य करूं लागला.
१० आणि त्याने यरूशालेमांत एकेताळीस वर्षें
राज्य केलें; त्याच्या पाळक आईचें नांव तर मा-
खा; ती अबीशालोमाची कन्या होती. ११ आ-
णि आसाने परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें
आपला वडिल दावीद यासारिखें केलें. १२
तेव्हां त्याने ते राखलेले पुरुष देशांतून घालविले,
आणि ज्या मूर्त्ति त्याच्या वडिलांनी केल्या होत्या,
त्या त्याने काढून टाकिल्या. १३ आणि आपली
आई माखा तीहि राणी नसावी ह्मणून दूर केली;
कां तर तिने भजनवनांत मूर्त्ति केली होती; आ-
साने तर तिची मूर्त्ति तोडून किद्रोन ओहळा-
जवळ जाळली. १४ तथापि उंच स्थानें काढून
टाकिलीं नव्हतीं; तरी आसाचें अंतःकरण त्या-
च्या सर्व आयुष्यांत परमेश्वराकडे यथार्थ होतें.
१५ आणि त्याने रुपें व सोनें व भांडीं, अशा
आपल्या बापाच्या पवित्र केलेल्या वस्तू व आपल्या
पवित्र केलेल्या वस्तू परमेश्वराच्या मंदिरांत
आणिल्या.

१६ आणि आसा व इस्राएलाचा राजा बा-
शा यांमध्यें त्यांच्या सर्व दिवसांत लढाई होत
होती. १७ तेव्हां इस्राएलाचा राजा बाशा य-
हूदावर चढून गेला, आणि यहूदाचा राजा आ-
सा याकडे कोणाचें जाणें किंवा येणें होऊं न द्यावें,

ह्मणून रामा बांधू लागला. १८ तेव्हां परमे-
श्वराच्या मंदिराच्या भांडारांत व राजाच्या घर-
च्या भांडारांत जें रुपें व सोनें राहिलें होतें, तें
आसानें घेऊन आपल्या सेवकांच्या हातीं दिल्हें;
आणि हेज्योनाचा पुत्र टाब्रिम्मोन याचा पुत्र बेन-
हदाद अरामाचा राजा, जो दामासेकांत राहत होता
त्याजवळ आसा राजानें त्यांस पाठवून असें ह्म-
टलें कीं, १९ "माझा बाप व तुझा बाप यांच्या
मध्यें जसा करार, तसा माझ्या तुझ्या मध्यें व्हावा;
पाहा, म्यां तुला सोन्यारुप्याची भेट पाठविली
आहे; तर चल, इस्राएलाचा राजा बाशा यासीं
जो तुझा करार, तो तूं मोड यासाठीं कीं त्यानें
मजपासून उठून जावें." २० मग बेनहदादानें
आसा राजाचें ऐकिलें, आणि आपल्या सैन्याचे
जे सर्दार, त्यांस इस्राएलाच्या नगरांवर पाठवून
ईयोन व दान व आबेलबेथमाखा व सर्व किन्न-
रोथ आदिकरून नाफ्ताल्याचा सर्व प्रांत यांस
मारिलें. २१ तेव्हां बाशानें ऐकिल्यावर असें
झालें कीं तो राम्याचें बांधणें सोडून थिर्सेंत रा-
हिला. २२ नंतर आसा राजानें सर्व यहूद्यांत
जाहीर केलें, कोणी सुटा राहिला नाहीं, ह्मणून
त्यांनीं राम्यांतले चिरे व लांकडें, जिहींकरून बा-
शा बांधीत होता, तीं उचलून नेलीं; आणि आ-
सा राजानें तीं घेऊन बन्यामीनांतला गेबा व मि-
ज्पा बांधिला. २३ आसाच्या राहिलेल्या सर्व
गोष्टी, ह्मणजे त्याचा सर्व पराक्रम व त्यानें जें
कांहीं केलें व जीं नगरें बांधिलीं, तीं सर्व यहू-
द्याच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत लि-
हिलेलीं नाहींत कीं काय? असो, तो आपल्या
म्हातारपणाच्या काळीं आपल्या पायांत दुखणाईत
झाला. २४ मग आसा आपल्या वडिलांच्या-
संगतीं निजला, आणि आपला वडील दावीद
याच्या नगरांत आपल्या वडिलांच्यासंगतीं पुरला
गेला, आणि त्याचा पुत्र यहोशाफाट यानें त्याच्या
ठिकाणीं राज्य केलें.

२५ यहूद्याचा राजा आसा याच्या दुसऱ्या
वर्षी यराबामाचा पुत्र नादाब इस्राएलावर राज्य
करूं लागला, आणि त्यानें इस्राएलावर दोन
वर्षें राज्य केलें. २६ परंतु परमेश्वराच्या
दृष्टींत जें वाईट तें त्यानें केलें; का कीं तो आप-
त्या बापाच्या मार्गांत आणि जें पाप त्यानें इस्रा-
एलाकडून करविलें होतें त्यांत चालला.

२७ आणि इस्साखाराच्या घराण्यांतला अही-
या याचा पुत्र बाशा यानें त्यावर फितूर केला,
आणि पलिष्ट्यांचें जें गिब्बथोन तेथें बाशानें त्या-
ला जिवें मारिलें; तेव्हां नादाब सर्व इस्राएला-
सुद्धां गिब्बथोनाला वेढा घालीत होता. २८
असा बाशा यहूद्याचा राजा आसा याच्या तिस-
ऱ्या वर्षी त्याला मारून त्याच्या ठिकाणीं राज्य
करूं लागला. २९ तेव्हां तो राज्यावर येतांच
असें झालें कीं त्यानें यराबामाच्या घराण्याच्या
सर्वांस मारिलें; यराबामाचा कोणी प्राणी ठेविला
नाहीं, एवढां त्याचा निर्वंश परमेश्वराचें जें
वचन त्यानें आपला सेवक अहीया शिलोकर याक-
डून सांगितलें होतें त्याप्रमाणें केला. ३० यराबा-
मानें आपल्या ज्या चिडवणीकडून इस्राएलाचा देव
परमेश्वर याला चिडविलें तिजकडून आपलीं जीं
पापें केलीं आणि इस्राएलाकडून करविलीं त्यांमुळें.
३१ नादाबाच्या राहिलेल्या गोष्टी आणि त्यानें
जें केलें तीं सर्व इस्राएलाच्या राजांच्या इतिहा-
साच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय?
३२ आणि आसा व इस्राएलाचा राजा बाशा
यांमध्यें त्यांच्या सर्व दिवसांत लढाई होत होती.
३३ अहीयाचा पुत्र बाशा यानें यहूद्याचा राजा
आसा याच्या तिसऱ्या वर्षापासून चोवीस वर्षें
सर्व इस्राएलावर थिर्सेमध्यें राज्य केलें. ३४
परंतु तो परमेश्वराच्या दृष्टींत वाईट करीत
असतां, यराबामाच्या मार्गांत आणि जें पाप त्यानें
इस्राएलाकडून करविलें होतें त्यांत चालला.

## अध्याय १६.

तेव्हां हनानी याचा पुत्र येहू याला बाशास
विरुद्ध असें परमेश्वराचें वचन प्राप्त झालें
कीं, २ "म्यां तुला धुळींतून उंच करून आप-
ल्या इस्राएली लोकांवर अधिकारी असें करून
ठेविलें; तथापि तूं यराबामाच्या मार्गानें चाललास
आणि त्वां माझ्या इस्राएली लोकांकडून पाप कर-
विलें, तसें त्यांनीं आपल्या पापांच्या योगें मला
चिडविलें यामुळें, ३ पाहा, बाशाचें कूळ व
त्याच्या घराण्याचें कूळ यांचा मी क्षय करितों;

ह्मणजे त्या तुझें घराणें नबाटाचा पुत्र यराबाम
याच्या घराण्यासारिखें करीन." ४ बाशाचा
जो नगरांत मरेल, त्याला कुत्रीं खातील; आणि
त्याचा जो शेतांत मरेल, त्याला आकाशांतलीं पा-
खरें खातील." ५ बाशाच्या राहिलेल्या गोष्टी
आणि त्यानें जें केलें व त्याचा पराक्रम तीं सर्व
इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत
लिहिलेलीं नाहींत कीं काय! ६ तर बाशा आप-
ल्या वडिलांच्यासंगतीं निजला आणि थिर्सेंत पुरला
गेला, आणि त्याचा पुत्र एला यानें त्याच्या ठिका-
णीं राज्य केलें. ७ अणखी हनान्याचा पुत्र येहू
भविष्यवादी याकडून बाशाविषयीं व त्याच्या घरा-
ण्याविषयीं परमेश्वराचें वचन निघालें; त्यानें
यराबामाच्या घराण्यासारिखें होऊन आपल्या हा-
तांच्या कर्मानें परमेश्वराला चिडवून त्याच्या
दृष्टींत जें सर्व वाईट केलें त्यामुळें, अणखी त्यानें
त्याला मारिलें त्यामुळें.

८ बाशाचा पुत्र एला यानें यहूद्याचा राजा
आसा याच्या सव्विसाव्या वर्षापासून दोन वर्षें
इस्राएलावर थिर्सेमध्यें राज्य केलें. ९ मग त्या-
चा चाकर जिम्री जो अर्ध्या रथांवरला सर्दार,
त्यानें त्यावर दगा केला; तेव्हां तो थिर्सेंतल्या
घरावरला आर्सा याच्या घरीं थिर्सेंत पिऊन मा-
तला होता. १० आणि यहूद्याचा राजा आसा
याच्या सत्ताविसाव्या वर्षीं जिम्रीनें त्यावर येऊन
त्याला हाणून जिवें मारिलें, आणि त्याच्या ठिका-
णीं राज्य केलें. ११ आणि असें झालें कीं तो
आपल्या राज्यांत आपल्या गादीवर बसला अस-
तां, त्यानें बाशाचें सर्व घराणें मारिलें, त्याचा
कोणी भिंतमुत्या किंवा त्याचा पाठिंबा किंवा त्याचा
मित्र राहिला नाहीं. १२ असें परमेश्वराचें
वचन जें त्यानें येहू भविष्यवाद्याकडून बाशावि-
षयीं सांगितलें होतें, त्याप्रमाणें जिम्रीनें बाशा-
च्या सर्व घराण्याचा नाश केला. १३ बाशानें व
त्याचा पुत्र एला यानें आपल्या व्यर्थ देवांकडून
इस्राएलाचा देव परमेश्वर याला चिडवून जीं
सर्व पापें केलीं आणि इस्राएलाकडून करविलीं
त्यामुळें. १४ एलाच्या राहिलेल्या गोष्टी व
त्यानें जें केलें तीं सर्व इस्राएलाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय!

१५ यहूद्याचा राजा आसा याच्या सत्ताविसा-
व्या वर्षीं जिम्रीनें थिर्सेंत सात दिवस राज्य केलें;
तेव्हां लोकानी पलिष्ट्यांच्या गिब्बथोनावर तळ
धरिला होता. १६ आणि तळांतल्या लोकानी
असें ऐकिलें कीं जिम्रीनें दगा केला, अणखी
राजाला मारिलें; तेव्हां सर्व इस्राएलानी त्याच
दिवशीं तळांत आम्री सेनापति याला इस्राएला-
वर राजा केलें. १७ मग आम्री गिब्बथोन
सोडून सर्व इस्राएलासुद्धां चढून गेला, आणि
त्यानी थिर्सेला वेढा घातला. १८ आणि जि-
म्रीनें पाहिलें कीं नगर धरलें गेलें, तेव्हां असें
झालें कीं तो राजाच्या घरांतल्या रंगमाहालांत
गेला आणि राजाच्या घराला आग लावून त्यानें
आपल्यावर जाळून घेतलें. १९ असें यराबा-
माच्या मार्गांत आणि ज्या पापानीं त्यानें इस्राए-
लाकडून पाप करविलें त्या पापांत चालून परमे-
श्वराच्या दृष्टींत जीं पापें त्यानें केलीं त्यामुळें तो
मेला. २० जिम्रीच्या राहिलेल्या गोष्टी आणि
त्यानें जें बंड केलें, तीं इस्राएलाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय?

२१ तेव्हां इस्राएलाचे लोक तडानीं दुभाग
झाले; अर्धे लोक गीनाथाचा पुत्र थिब्नी याला
राजा करायास त्याला अनुसरले, आणि अर्धे
आम्रीला अनुसरले. २२ तेव्हां गीनाथाचा
पुत्र थिब्नी याला अनुसरणाऱ्या लोकांपेक्षां आ-
म्रीला अनुसरणारे लोक बळवान झाले; यास्तव
थिब्नी मेला आणि आम्रीनें राज्य केलें.

२३ आम्रीनें यहूद्याचा राजा आसा याच्या
एकतिसाव्या वर्षापासून बारा वर्षें इस्राएलावर राज्य
केलें; थिर्सेंत त्यानें साहा वर्षें राज्य केलें. २४
मग त्यानें शेमेराजवळून शोमरोन डोंगर दोन
तालांत रुप्यावर विकत घेऊन त्या डोंगरावर नगर
बांधिलें; आणि जें नगर त्यानें बांधिलें, त्याचें नांव
त्या डोंगराचा धनी शेमेर याच्या नांवावरून शोम-
रोन ठेविलें. २५ तरी आम्रीनें परमेश्वराच्या
दृष्टींत दुष्टाई करून जे आपल्या पूर्वींचे होते त्या
सर्वांपेक्षां वाईट केलें. २६ कारण कीं नबाटाचा
पुत्र यराबाम याच्या अवघ्या मार्गांत ह्मणजे
त्यानें इस्राएलाकडून करविलेलीं त्याचीं पापें,
जिहींकरून त्यानी आपल्या व्यर्थ देवाच्या योगें

इस्राएलाचा देव परमेश्वर याला चिडविलें,
त्यांत तो चालला. २७ आम्रीच्या राहिलेल्या
गोष्टी, ज्या त्याने केल्या, आणि जो पराक्रम त्याने
दाखविला तीं सर्व इस्राएलाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय?
२८ तर आम्री आपल्या वडिलांच्यासंगतीं निज-
ला आणि शोमरोनांत पुरला गेला, तेव्हां त्याचा
पुत्र आहाब याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

२९ असा यहूदाचा राजा आसा याच्या अ-
डतिसाव्या वर्षी आम्रीचा पुत्र आहाब इस्राएला-
वर राज्य करूं लागला, आणि तो आम्रीचा पुत्र
आहाब याने शोमरोनांत बावीस वर्षें इस्राएला-
वर राज्य केलें. ३० तरी आम्रीचा पुत्र आ-
हाब याने आपल्या पूर्वीचे जे होते, त्या सर्वांपेक्षां
परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई केली. ३१ कां
कीं त्याने नबाटाचा पुत्र यराबाम याच्या पापांत
चालणें, हें हलकें मोजिलें असतां, असें झालें कीं
त्याने जीदोनाचा राजा एथबाल याची कन्या
ईजेबेल बायको करून घेतली, आणि जाऊन बा-
लाची सेवा व त्याचें भजन केलें. ३२ आणि
त्याने शोमरोनांत बालाचें घर बांधिलें होतें, त्यांत
बालासाठीं वेदी बांधिली. ३३ आणि आहाबाने
भजनवन केलें; असें आहाबाने आपल्या पूर्वी जे
इस्राएलाचे राजे होते, त्या सर्वांपेक्षां अधिक
करून इस्राएलाचा देव परमेश्वर याला चिड-
विलें. ३४ त्याच्या दिवसांत हियेल बेथेली याने
यरीहो बांधिलें; परमेश्वराचें वचन जें त्याने
नूनाचा पुत्र यहोशवा याकडून सांगितलें होतें
त्याप्रमाणें त्याने आपला ज्येष्ट पुत्र अबीराम येणे-
करून त्याचा पाया घातला, आणि आपला धाकटा
पुत्र सगूब येणेकरून त्याचीं कवाडें उभारिलीं.

## अध्याय १७.

तेव्हां एलीया तिश्बी जो गिलादकरांचा त्याने
आहाबाला असें सांगितलें कीं, "इस्राएलाचा
देव परमेश्वर ज्यापुढें मी उभा राहतों, तो जि-
वंत आहे एवढ्या निश्चयाने या वर्षांमध्यें दहिंवर
व पाऊस होणार नाहीं; केवळ माझ्या सांगण्या-
प्रमाणेंच होईल." २ नंतर परमेश्वराचें वचन
त्याला असें प्राप्त झालें कीं, ३ "तूं एथून निघून
पूर्वेस जा, आणि यार्देनेच्यासमोर जो करीथ ओ-
होळ आहे तेथें लपून राहा. ४ मग असें हो-
ईल कीं तूं त्या ओहळांतलें पीत जासील, आणि
कावळ्यांनी तेथें तुझें पोषण करावें ह्मणून म्या
त्यांस आज्ञा केली आहे." ५ मग त्याने जाऊन
परमेश्वराच्या वचनाप्रमाणें केलें; ह्मणजे यार्दे-
नेच्यासमोर जो करीथ ओहोळ, तेथें तो जाऊन
राहिला. ६ तेव्हां कावळे सकाळीं भाकर व सा-
गुती आणि संध्याकाळीं भाकर व सागुती त्याज-
वळ आणीत असत, आणि तो त्या ओहळांतलें
पीत असे. ७ आणि कांहीं वेळानंतर असें झालें
कीं तो ओहोळ अटून गेला, कारण कीं देशांत
पाऊस नव्हता.

८ मग परमेश्वराचें वचन त्याला असें प्राप्त
झालें कीं, ९ "तूं उठून जीदोनाकडल्या सारफा-
थास जाऊन तेथें राहा; पाहा, तेथल्या विधवा स्त्रीने
तुझें पोषण करावें ह्मणून म्या तिला आज्ञा केली
आहे." १० मग तो उठून सारफाथास गेला,
आणि तो नगराच्या वेसीपर्यंत पोहंचला असतां,
पाहा, तेथली विधवा स्त्री लांकडें गोळा करीत
होती; तेव्हां त्याने तिला हाक मारून ह्मटलें,
"तूं कृपेने मला प्यायाला भांड्यांत थोडें पाणी आ-
णून दे." ११ आणि ती आणायाला जात होती
तेव्हां त्याने तिला हाक मारून ह्मटलें, "तूं कृपेने
माझ्यासाठीं आपल्या हातीं भाकरीचा तुकडा घे-
ऊन ये." १२ तेव्हां तिने ह्मटलें, "तुझा देव
परमेश्वर जिवंत आहे एवढ्या निश्चयाने माझ्या-
जवळ चांदकी देखील नाहीं, केवळ मडक्यांत
मूठभर पीठ व कुपींत थोडें तेल आहे; तर पाहा,
मी दोन लांकडें गोळा करून जाऊन आपल्यासा-
ठीं व आपल्या पुत्रासाठीं तें सिद्ध करितें, मग आ-
ह्मी तेवढें खाऊं आणि नंतर आह्मी मरूं." १३
तेव्हां एलीयाने तिला ह्मटलें, "तूं भिऊं नको;
जाऊन त्वां ह्मटलें याप्रमाणें कर, केवळ पहिल्याने
माझ्यासाठीं त्यांतून लहान चांदकी करून बाहेर
माझ्याजवळ आण, आणि त्यानंतर आपल्यासाठीं
व आपल्या पुत्रासाठीं सिद्ध कर; १४ कारण
कीं इस्राएलाचा देव परमेश्वर असें सांगतो कीं,
'भूमीच्या पाठीवर परमेश्वर पाऊस पाडून देईल
त्या दिवसापर्यंत मडक्यांतलें पीठ संपणार नाहीं

आणि कुपींतलें तेल सरणार नाहीं." १५ तेव्हां
तिने जाऊन एलीयाच्या सांगण्याप्रमाणें केलें,
आणि तिने व त्याने व तिच्या घरच्यानें बहुत
दिवसपर्यंत खाल्लें. १६ परमेश्वराचें वचन जें
त्याने एलीयाकडून सांगितलें होतें, त्याप्रमाणें त्या
मडक्यांतलें पीठ संपलें नाहीं, आणि त्या कु-
पींतलें तेल सरलें नाहीं.

१७ तेव्हां या गोष्टीनंतर असें झालें कीं त्या
स्त्रीचा ह्मणजे त्या घरच्या धनणीचा पुत्र रोगी
झाला, आणि त्याचें दुखणें असें फार भारी झा-
लें कीं त्यांत श्वास राहिला नाहीं. १८ मग तिने
एलीयाला ह्मटलें, "हे देवाच्या माणसा, माझें
व तुझें काय? तूं माझें पाप सुचवीत असतां,
माझ्या पुत्राला जिवें मारायासाठीं आलास काय?
१९ तेव्हां त्याने तिला सांगितलें, "तूं आपला
पुत्र माझ्याजवळ दे." आणि त्याने त्याला तिच्या
उरावरून घेऊन ज्या माडीवर आपण राहत हो-
ता तेथें वर नेलें, आणि आपल्या अंथरुणावर त्या-
ला निजाविलें. २० मग त्याने परमेश्वराजवळ
प्रार्थना करीत ह्मटलें, "हे परमेश्वरा माझ्या
देवा, ज्या विधवेजवळ मी प्रवासी आहें, तिचा
पुत्र मारून त्वां तिलाहि दुःख दिल्हें कीं काय?"
२१ तेव्हां त्याने त्या मुलाला आपलें अंग तीन
वेळां लाविलें, आणि परमेश्वराजवळ प्रार्थना
करून ह्मटलें, हे परमेश्वरा माझ्या देवा, त्वां
कृपेने या मुलाचा प्राण यामध्यें माघारा येऊं
द्यावा." २२ आणि परमेश्वराने एलीयाचा
शब्द ऐकिला, ह्मणून त्या मुलाचा प्राण माघारा
त्यामध्यें आला, असा तो जिवंत झाला. २३
मग एलीयाने मुलाला घेतलें आणि घराच्या मा-
डीवरून खालीं आणून त्याच्या आईजवळ त्याला
दिल्हें; आणि एलीयाने ह्मटलें, "पाहा, तुझा पुत्र
जिवंत झाला." २४ तेव्हां त्या स्त्रीने एलीयाला
ह्मटलें, "येणेकरून आतां मला कळलें कीं तूं दे-
वाचा माणूस, आणि परमेश्वराचें वचन खरे-
पणाने तुझ्या तोंडीं आहे."

## अध्याय १८.

तेव्हां बहुत दिवसानी असें झालें कीं तिसऱ्या
वर्षी एलीयाला परमेश्वराचें असें वचन प्राप्त
झालें कीं, "तूं जाऊन आहाबाच्या दृष्टीस पड,
मग मी भूमीच्या पाठीवर पाऊस पाडून देईन."
२ मग एलीया आहाबाच्या दृष्टीस पडायाला
गेला; तेव्हां शोमरोनांत दुकाळ भारी होता; ३
यास्तव आहाबाने आपल्या घरचा कारभारी ओ-
बाद्या याला बोलाविलें; ओबाद्या तर परमेश्व-
राला फार भीत होता; ४ कां कीं जेव्हां ईजे-
बेल परमेश्वराच्या भविष्यवाद्यांस जिवें मारीत
होती, तेव्हां असें झालें कीं ओबाद्यानें शंभर
भविष्यवादी घेऊन पन्नास पन्नास असे गुहेंत लप-
विले, आणि त्यांस अन्न व पाणी पुरविलें होतें. ५
तर आहाबाने ओबाद्याला सांगितलें, "तूं देशांत
पाण्याच्या सर्व झऱ्यांवर व सर्व ओहळांवर जा;
कदाचित घोडीं व खेचरें वांचवायास आह्मास
गवत मिळेल आणि असे सर्व पशू मरणार नाहींत.
६ तेव्हां देशांत फिरायास त्यानी आपल्यामध्यें
तो वाटून घेतला; आहाब एका वाटेने एकटा गेला,
आणि ओबाद्या दुसऱ्या वाटेने एकटा गेला.

७ आणि ओबाद्या वाटेवर असतां, पाहा, ए-
लीया त्याला भेटला, तेव्हां तो त्याला ओळखून
आपल्या तोंडावर पडला, आणि बोलला, "तूं तो
माझा धनी एलीया आहेस कीं काय?" ८ तेव्हां
त्याने त्याला उत्तर दिल्हें "तो मीच; तूं जाऊन
आपल्या धन्याला सांग, पाहा एलीया आहे." ९
तेव्हां त्याने ह्मटलें, "म्या काय अपराध केला
ह्मणून तूं आपल्या सेवकाला जिवें मारायास आ-
हाबाच्या हातीं देतोस? १० तुझा देव परमेश्वर
जिवंत आहे एवढ्या निश्चयाने जेथें माझ्या धन्या-
ने तुझा शोध करायास पाठविलें नाहीं, असें राष्ट्र
किंवा राज्य राहिलें नाहीं; आणि 'तो नाहीं,' असें
त्यानी ह्मटलें, तेव्हां त्याने राज्यावर व राष्ट्रावर
शपथ घालून असें ह्मणविलें कीं, 'तो सांपडला
नाहीं.' ११ तरी आतां तूं सांगतोस, 'तूं जाऊन
आपल्या धन्याला सांग कीं, पाहा, एलीया आहे.'
१२ तर मी तुझ्याजवळून गेलों असतां असें हो-
ईल कीं परमेश्वराचा आत्मा तुला उचलून
कोणीकडे नेईल, हें मला कळणार नाहीं; यास्तव
म्या जाऊन आहाबाला सांगितल्यावर, तूं त्याला
न सांपडलास तर तो मला जिवें मारील; परंतु
मी तुझा सेवक आपल्या बाळपणापासून परमेश्व-

राला भितों. १३ जेव्हां ईजेबेल परमेश्वराच्या
भविष्यवाद्यांस जिवें मारीत होती, तेव्हां जें म्या
केलें, तें माझ्या धन्याला कळलें नाहीं कीं काय?
म्या परमेश्वराचे शंभर भविष्यवादी पन्नास प-
न्नास असे गुहेंत लपविले आणि त्यांस अन्न पाणी
पुरविलें. १४ तर आतां तूं सांगतोस कीं, 'तूं जा-
ऊन आपल्या धन्याला सांग, पाहा, एलीया आहे;'
मग तो मला जिवें मारील." १५ तेव्हां एलीया
बोलला, "सैन्याचा परमेश्वर, ज्यापुढें मी उभा
राहतों, तो जिवंत आहे एवढ्या निश्चयाने मी
आज त्याच्या दृष्टीस पडेन." १६ तेव्हां ओबा-
द्याने आहाबाच्या भेटीस जाऊन त्याला सांगितलें,
मग आहाब जाऊन एलीयाला भेटला.

१७ आणि आहाबाने एलीयाला पाहिल्यावर
असें झालें कीं आहाब त्याला ह्मणाला, "जो इ-
स्राएलास दुःख देतो, तो तूंच कीं काय?" १८
तेव्हां त्याने त्याला उत्तर दिल्हें, "म्या इस्राएलास
दुःख दिल्हें नाहीं, परंतु त्वां आणि तुझ्या बापा-
च्या घराण्याने दिल्हें; तुह्मी परमेश्वराच्या आ-
ज्ञा सोडिल्या, आणि तूं बालाच्यामागें चालत
आहेस. १९ तर आतां तूं पाठवून सर्व इस्राए-
लाला, आणि बालाचे साडेचारशें भविष्यवादी
व अजनवनांतले चारशें भविष्यवादी, जे ईजेबे-
लीच्या मेजावर खातात, त्यांस कारमेल डोंगरावर
माझ्याजवळ मिळीव." २० मग आहाबाने पाठ-
वून इस्राएलाच्या सर्व संतानांस व त्या भविष्य-
वाद्यांस कारमेल डोंगरावर मिळविलें. २१ आणि
एलीयाने सर्व लोकांजवळ जाऊन ह्मटलें, "तुह्मी
कोठपर्यंत दोहों तडांत लंगडतां? परमेश्वर जर
देव तर त्याच्यामागें चाला; पण बाल जर देव,
तर त्याच्यामागें चाला." तेव्हां लोकानी त्याला
कांहींच उत्तर दिल्हें नाहीं. २२ मग एलीयाने
लोकांस ह्मटलें, "परमेश्वराकडला भविष्यवादी
मी केवळ मीच राहिलों, परंतु बालाकडले भवि-
ष्यवादी साडेचारशें पुरुष आहेत. २३ तर आ-
ह्मास दोन गोऱ्हे दिल्हे जावे, आणि त्यानी त्यांतून
एक गोऱ्हा आपल्यासाठीं निवडून घ्यावा, आणि
त्याचे तुकडे करून लाकडांवर लावावे, परंतु वि-
स्तु लावूं नये; मग मीहि दुसरा गोऱ्हा सिद्ध क-
रून लाकडांवर ठेवीन, आणि विस्तु लावणार ना-
हीं. २४ मग तुह्मी आपल्या देवाचें नाम घ्यावें,
आणि मी परमेश्वराचें नाम घेईन; आणि असें
व्हावें कीं जो देव विस्तु करून उत्तर देईल, तोच
देव जाणावा." तेव्हां सर्व लोकानी उत्तर करून
ह्मटलें, "ही गोष्ट बरी." २५ मग एलीयाने
बालाच्या भविष्यवाद्यांस ह्मटलें, "तुह्मी बहुत
आहां, यास्तव पहिल्याने आपल्यासाठीं एक गोऱ्हा
निवडून घेऊन सिद्ध करा; आणि विस्तु न लावून
आपल्या देवाचें नाम घ्या." २६ तेव्हां त्यानी
आपल्यास दिल्हेला जो गोऱ्हा, तो घेऊन सिद्ध
केला; आणि सकाळपासून दुपारपर्यंत बालाचें
नाम घेऊन धावा करून ह्मटलें, "हे बाला, आ-
ह्मास उत्तर दे." तथापि शब्द झाला नाहीं,
उत्तर देणाराहि नाहीं; यास्तव त्यानी जी वेदी
बांधिली होती, तिजवर उडी मारिली. २७ ते-
व्हां दुपारीं असें झालें कीं एलीयाने त्यांची थट्टा
करून ह्मटलें, "तुह्मी मोठ्या शब्दाने हाक मारा,
कारण कीं तो देव आहे; कदाचित् ध्यान करीत
असेल, किंवा कदाचित् तो बाहेर गेला, किंवा
कदाचित् तो वाटेवर चालत असेल, कोण जाणे,
तो निजला असला, तर जागा केला पाहिजे." २८
तेव्हां त्यानी मोठ्या शब्दाने हाक मारिली, आ-
णि आपल्या रीतीप्रमाणें सुऱ्यानी व भाल्यानी आ-
पणास घाव मारून घेतले, एवढे कीं त्यांवर रक्त
वाहिलें २९ आणि दुपार टळून गेल्यावर, असें
झालें कीं यज्ञ करायाच्या वेळेपर्यंत त्यानी आपाप-
ल्यांत उद्गार काढिले; तथापि कांहीं शब्द, किंवा
कांहीं साक्षा, किंवा कांहीं लक्ष लावणें झालें नाहीं.

३० मग एलीयाने सर्व लोकांस सांगितलें, "तु-
ह्मी माझ्याजवळ या." तेव्हां सर्व लोक त्याजवळ
गेले, आणि त्याने परमेश्वराची मोडलेली वेदी
नीट केली; ३१ ह्मणजे ज्या याकोबाला परमेश्व-
राचें वचन असें प्राप्त झालें कीं, "तुझें नांव इस्रा-
एल होईल," त्याच्या पुत्रांच्या वंशांच्या संख्येप्र-
माणें एलीयाने बारा धोंडे घेतले; ३२ आणि पर-
मेश्वराच्या नामाने त्या धोंड्यांची वेदी बांधिली,
आणि वेदीच्या चहुंकडे तीन चार पायली धान्य
मावायाजोगी खळी केली. ३३ नंतर त्याने लां-
कडें मांडिलीं, आणि त्या गोऱ्ह्याचे तुकडे करून
त्या लाकडांवर लाविले; तेव्हां त्याने सांगितलें,

"तुह्मी चार घागरी पाणी भरून होमद्रव्यावर व
लांकडांवर रिचवा." ३४ आणखी त्याने सांगितलें,
"दुसऱ्याने करा." तेव्हां त्यानी दुसऱ्याने केलें;
मग त्याने सांगितलें, "तिसऱ्याने करा," तेव्हां
त्यानी तिसऱ्याने केलें. ३५ आणि पाणी वेदीच्या
चहुंकडे गेलें, आणखी ती खळी पाण्याने भरली.
३६ नंतर यज्ञ करायाच्या वेळेस असें झालें कीं
एलीया भविष्यवादी जवळ जाऊन बोलला, "हे
परमेश्वरा, आब्राहामाच्या, इझाकाच्या, व इस्रा-
एलाच्या देवा, तूं इस्राएलाचा देव, आणि मी
तुझा सेवक आहें, आणि म्या ह्या अवघ्या गोष्टी
तुझ्या आज्ञेप्रमाणें केल्या आहेत, असें आज त्वां
कळवावें. ३७ हे परमेश्वरा, मला उत्तर दे,
मला उत्तर दे; तेणेकरून या लोकानी जाणावें
कीं तूं परमेश्वर देव आहेस, आणि त्वां त्यांचें
मन माघारें फिरविलें आहे." ३८ तेव्हां परमे-
श्वराचा अग्नि पडला, आणि तेणेकरून तें होम-
द्रव्य व तीं लांकडें व ते धोंडे व ती माती भस्म झा-
ली, आणि त्या खळींत जें पाणी, तें शोषलें गेलें.
३९ तेव्हां सर्व लोक पाहतांच आपल्या तोंडांवर
पालथे पडून ह्मणाले, "परमेश्वर तोच देव;
परमेश्वर तोच देव." ४० मग एलीयाने त्यांस
सांगितलें, "तुह्मी बालाच्या भविष्यवाद्यांस धरा;
त्यांतल्या कोणाला पळूं देऊं नका." तेव्हां त्यानी
त्यांस धरिलें आणि एलीयाने त्यांस खालीं कीं-
शोन ओहोळावर नेऊन तेथें वधिलें.

४१ यानंतर एलीयाने आहाबाला सांगितलें,
"तूं वर जाऊन खाणें पिणें कर, कारण कीं भरपूर
पावसाची वाणी झाली." ४२ तेव्हां आहाब
खायाला प्यायाला वर गेला, आणि एलीयाने
कारमेलाच्या शिखरावर जाऊन भूमीवर दुमतें
होऊन आपलें तोंड आपल्या गुडघ्यांमध्यें घातलें.
४३ आणि त्याने आपल्या तरण्याला सांगितलें,
"तूं आतां वर जाऊन पश्चिम दिशेस न्याहाळून पा-
हा." तेव्हां त्याने वर जाऊन पाहिल्यावर ह्मटलें,
"कांहीं नाहीं." आणि त्याने सात वेळां सांगितलें,
"तूं फिरून जा." ४४ मग सातव्या वेळेस असें
झालें कीं तो बोलला, पाहा, माणसाच्या हाता-
एवढा लाहान ढग समुद्रावरून चढत आहे."
तेव्हां त्याने ह्मटलें, "तूं जाऊन आहाबाला सांग
कीं "तूं रथ जुंपून खालीं जा; नाहीं तर पाऊस
तुला अडवील." ४५ इतक्यांत असें झालें कीं
आकाश ढगानी उत्तरोत्तर काळें होत चाललें,
आणि वारा व पाऊस मोठा झाला; आहाब तर
रथावर बसून इज्रेलास चालला होता. ४६ आ-
णि एलीयाला परमेश्वराचा हात असा झाला
कीं तो आपली कंबर बांधून इज्रेलाच्या वेशीपर्यंत
आहाबाच्यापुढें धांवत धांवत चालला.

## अध्याय १९.

आणि एलीयाने काय केलें होतें तें अवघें, आ-
णि त्याने सर्व भविष्यवाद्यांस तरवारीनें कसें
मारून टाकिलें होतें, तेंहि आहाबाने ईजेबेलीला
सांगितलें. २ तेव्हां ईजेबेलीने एलीयाकडे दूत पा-
ठवून असें सांगितलें कीं, "उद्यां या वेळेस तुझा
जीव त्यांतल्या एकाच्या जिवासारिखा जर मी कर-
णार नाहीं, तर देव मला तितकें आणि त्यापेक्षां
अधिकाहि करोत." ३ तेव्हां हें पाहून तो उठून
आपल्या जिवासाठीं गेला, आणि यहूदाकडल्या
बेरशेबापर्यंत जाऊन तेथें त्याने आपला तरणा
ठेविला. ४ परंतु आपण रानांत एका दिवसाची
वाट चालून जाऊन एका रोथेम झाडाखालीं बस-
ला; तेव्हां त्याने आपण मरावें असें मागत असतां
ह्मटलें, "हे परमेश्वरा, आतां पुरे झालें; तूं
माझा जीव घे, कां तर मी आपल्या वडिलांहून
उत्तम नाहीं." ५ नंतर तो एका रोथेम झाडा-
खालीं निजला असतां झोपीं गेला; तेव्हां पाहा,
कोणी दूताने त्याला स्पर्श केला, आणि त्याला
सांगितलें, "तूं उठून खा." ६ मग त्याने पाहिलें,
तर पाहा, त्याच्या डोक्याजवळ इंगळांवरली पो-
ळी व पाण्याची कुपि होती; तेव्हां तो खाऊन
पिऊन फिरून निजला. ७ नंतर परमेश्वराच्या
दूताने फिरून येऊन त्याला स्पर्श करून सांगि-
तलें, "तूं उठून खा; कारण कीं तुझा मार्ग कठीण
आहे." ८ तेव्हां त्याने उठून खाणें पिणें केलें,
आणि त्या खाण्याच्या बळावर चाळीस दिवस
व चाळीस रात्रीं देवाचा डोंगर होरेब तेथवर
तो चालला.

९ आणि तेथल्या गुहेंत जाऊन तेथें तो वस्तीस
राहिला; तर पाहा, त्याला परमेश्वराचें वचन

माप्त होत असतां, त्याने त्याला ह्मटलें, "हे एली-
या, तुझें एथें काय?" १० तेव्हां त्याने ह्मटलें,
"सैन्यांचा देव **परमेश्वर** यासाठीं मला फार
आवेश आला; कारण कीं इस्राएलाच्या संतानानी
तुझा करार सोडून तुझ्या वेद्या मोडिल्या, आणि
तझ्या भविष्यवाद्यांस तरवारीने जिवें मारिलें; आ-
णि मी एकटाच राहिलों, आणि तीं माझा जीव
घ्यायाला पाहतात." ११ तेव्हां त्याने सांगितलें,
"तूं बाहेर जाऊन डोंगरावर **परमेश्वरापुढें** उभा
राहा." तर पाहा, **परमेश्वर** पुढून जात अस-
तां, मोठा व बळकट वारा **परमेश्वराच्यापुढें**
डोंगरांस विदारिता झाला आणि खडकांस फोडिता
झाला, तथापि **परमेश्वर** वाऱ्यांत नव्हता; मग
त्या वाऱ्यामागें भूमिकंप झाला, तरी **परमेश्वर**
भूमिकंपांत नव्हता. १२ नंतर त्या भूमिकंपाच्या-
मागें अग्नि झाला, तरी **परमेश्वर** अग्नीमध्यें न-
व्हता; नंतर त्या अग्नीच्यामागें कोमळ बारीक
शब्द झाला. १३ तेव्हां एलीयाने ऐकिल्यावर
असें झालें कीं त्याने आपलें वस्त्र आपल्या तोंडा-
वर घेतलें, आणि तो बाहेर जाऊन गुहेच्या दारा-
सीं उभा राहिला; आणि पाहा, त्याजवळ वाणी
होऊन असी ह्मणाली, "हे एलीया, तुझें एथें
काय?" १४ तेव्हां त्याने ह्मटलें, "सैन्यांचा देव
**परमेश्वर** यासाठीं मला फार आवेश आला;
कारण कीं इस्राएलाच्या संतानानी तुझा करार सो-
डून तुझ्या वेद्या मोडिल्या, आणि तुझ्या भविष्यवा-
द्यांस तरवारीने जिवें मारिलें; आणि मी एकटाच
राहिलों, आणि तीं माझा जीव घ्यायाला पाहतात."
१५ तेव्हां **परमेश्वराने** त्याला सांगितलें, "तूं
माघारा रानांतल्या वाटेने दामासेकास जा; आ-
णि पोहंचल्यावर हजाएलाला अरामावर राज्य
करायास अभिषेक कर; १६ आणि निम्शी या-
चा पुत्र येहू याला इस्राएलावर राज्य करायास
अभिषेक कर; आणि आबेलमहोला तेथला शा-
फाटाचा पुत्र अलीशा याला आपल्या ठिकाणीं
भविष्यवादी व्हायासाठीं अभिषेक कर. १७
आणि असें होईल कीं जो हजाएलाच्या तरवा-
रीपासून निभावेल, त्याला येहू मारील; आणि ये-
हूच्या तरवारीपासून निभावेल, त्याला अलीशा
मारील. १८ तथापि म्या इस्राएलांत सात हजार
ठेविले आहेत, त्यांतल्या कोणी बालापुढें गुडघे टें-
किले नाहींत, आणि कोणाच्याहि मुखाने त्याला
चुंबिलें नाहीं." १९ मग तो तेथून गेला, आणि
त्याला शाफाटाचा पुत्र अलीशा सांपडला; तेव्हां
तो नांगरीत होता, आणि त्याच्यापुढें बैलांच्या बा-
रा जोड्या असतां, तो बाराव्यासंगतीं होता, आ-
णि एलीयाने त्याच्या जवळून जाऊन त्यावर आ-
पलें वस्त्र घातलें. २० तेव्हां तो बैल सोडून
एलीयाच्यामागें धांवून बोलला, "आतां मला आ-
पल्या बापाचें व आपल्या आईचें चुंबन घेऊं दे,
मग मी तुझ्यामागें चालेन." तेव्हां तो त्याला
बोलला, "तूं माघारा जा; कां तर म्या तुला काय
केलें?" २१ मग तो त्यापासून माघारा गेला,
आणि बैलांची जोडी घेऊन कापिली, आणि बै-
लांच्या सामानाने त्यांचें मांस सिजवून लोकांस
दिल्हें आणि त्यानी खाल्लें, मग तो उठून एली-
याच्यामागें जाऊन त्याची सेवा करिता झाला.

## अध्याय २०.

तर अरामाचा राजा बेनहदाद याने आपलें सर्व
सैन्य मिळवून आपल्यासंगतीं बत्तीस राजे व
घोडे व रथ घेतले असतां शोमरोनावर जाऊन
वेढा घालून त्यांसीं लढाई केली. २ तेव्हां त्या-
ने त्या नगरांत इस्राएलाचा राजा आहाब या-
जवळ दूत पाठविले. ३ आणि त्याला ह्मटलें,
"बेनहदाद असें ह्मणतो, तुझें रुपें व तुझें सोनें,
तें माझें; आणि तुझ्या स्त्रिया व तुझे उत्तम पुत्र, ते
माझे आहेत." ४ तेव्हां इस्राएलाच्या राजाने
उत्तर करून ह्मटलें, "हे माझ्या प्रभू राजा, तुझ्या
ह्मणण्याप्रमाणें मी आणि जें माझ्याजवळ आहे,
तें सर्वहि तुझें आहे." ५ नंतर दूत फिरून
येऊन ह्मणाले, "बेनहदादाने असें सांगितलें कीं,
जरी म्या तुझ्याकडे पाठवून ह्मटलें कीं, 'तुझें रुपें
व तुझें सोनें व तुझ्या स्त्रिया व तुझे पुत्र मला
दे,' ६ तरी उद्यां या वेळेस मी आपल्या चाक-
रांस तुझ्याजवळ पाठवीन आणि ते तुझ्या घरांत
व तुझ्या चाकरांच्या घरांत शोध करितील, आणि
असें होईल कीं जें कांहीं तुला प्रिय वाटतें तें ते
आपल्या हातांत घेऊन नेतील." ७ तेव्हां इस्रा-
एलाच्या राजाने देशाच्या सर्व वडिलांस बोलावून

म्हटलें, "तुम्ही आतां ध्यानांत आणून पाहा कीं तो
दुष्टाई पाहतो; कारण कीं त्यानें माझ्या स्त्रिया व
माझे पुत्र व माझें रुपें व माझें सोनें घ्यायास म-
जकडे पाठविलें, आणि म्या त्याला मना केलें नाहीं."
८ तेव्हां ते सर्व वडील व सर्व लोक त्याला म्ह-
णाले, "तूं ऐकूं नको, आणि राजी होऊच नको."
९ मग त्यानें बेनहदादाच्या दूतांस म्हटलें,
"माझा धनी राजा याला तुम्ही सांगा, त्याविषयीं
त्वां पहिल्यानें आपल्या सेवकाजवळ पाठविलें, तें
अवघें मी करीन; परंतु ही गोष्ट मला करितां
येत नाहीं." तेव्हां त्या दूतांनी माघारा जाऊन
निरोप पोहंचविला. १० नंतर बेनहदादानें त्या-
कडे पाठवून म्हटलें, "माझ्या पायांजवळच्या सर्व
लोकांस शोमरोनाची माती मूठ मूठ जर पुरेल,
तर देव मला तितकें आणि त्यापेक्षां अधिक क-
रोत." ११ तेव्हां इस्राएलाच्या राजानें उत्तर
करून म्हटलें, "जो आपली कंबर बांधितो, त्यानें
सोडणाऱ्यासारिखें नांवाजून न घ्यावें." १२ आ-
णि त्यानें हा निरोप ऐकिला तेव्हां असें झालें कीं
तो आणि ते राजे डेऱ्यांमध्यें पीत होते; तेव्हां
त्यानें आपल्या चाकरांस सांगितलें, "तुम्ही मांड-
णूक करा." आणि त्यांनी नगरावर मांडणूक केली.
१३ तर पाहा, इस्राएलाचा राजा आहाब याजव-
ळ कोणी भविष्यवादी येऊन बोलला, "परमेश्वर
असें सांगतो, 'त्वां हा सर्व मोठा समुदाय पाहिला
कीं काय? पाहा, आज मी तो तुझ्या हातीं देईन,
मग मी परमेश्वर आहें, हें तूं जाणसील.'" १४
तेव्हां आहाब बोलला, "कोणाच्या योगेंकरून?"
आणि त्यानें उत्तर केलें, "परमेश्वर असें सांगतो,
'प्रांतांचे जे तरणे अधिकारी, त्यांच्या योगेंकरून.'"
मग त्यानें विचारिलें, "लढाई कोण मांडील?" ते-
व्हां त्यानें उत्तर केलें, "तूं." १५ यास्तव त्यानें
त्या प्रांतांचे जे तरणे अधिकारी, त्यांची झडती घे-
तली, आणि ते दोनशें बत्तीस होते; नंतर त्यांच्या
मागें त्यानें सर्व लोक, म्हणजे इस्राएलाचीं सर्व
संतानें यांची झडती घेतली, आणि ते सात ह-
जार होते. १६ मग ते दुपारीं बाहेर गेले, आणि
बेनहदाद व त्याच्यासंगतीं त्याचे सहाय ते बत्तीस
राजे डेऱ्यांमध्यें पिऊन माजत होते. १७ तर
त्या प्रांतांतले तरणे अधिकारी पहिल्यानें निघाले,
तेव्हां बेनहदादानें दूत पाठविले असतां, त्यांनी
येऊन त्याला असें सांगितलें कीं, "शोमरोनांतून
माणसें निघतात." १८ तेव्हां त्यानें सांगितलें,
"तीं जर सलुख्यासाठीं बाहेर आलीं असलीं, तर
तुम्ही त्यांस जिते धरा, आणि जरी लढायासाठीं
बाहेर आलीं असलीं, तरी त्यांस जिते धरा." १९
त्या प्रांतांचे ते तरणे अधिकारी तर नगरांतून बा-
हेर आले असतां, जें सैन्य तेंहि त्यांच्यामागें
निघालें. २० आणि एकएकानें एकएक मारि-
ला असतां अरामी पळाले, तरी इस्राएली त्यां-
च्या पाठीं लागले, तेव्हां अरामी राजा बेनहदाद
स्वारांसुद्धां घोड्यावर निभावला. २१ तेव्हां
इस्राएलाच्या राजानें बाहेर येऊन घोड्यावरले व
रथावरले मारिले; असा त्यानें अराम्यांचा मोठा
घात केला.

२२ यानंतर कोणी भविष्यवादी इस्राएलाच्या
राजाजवळ येऊन त्याला म्हणाला, "तूं जाऊन आ-
पला बंदोबस्त कर, आणि जें तुला करायाचें आहे
तें ध्यानांत आणून पाहा; कारण कीं वर्ष फिरलें,
म्हणजे अरामी राजा चढून तुजवर येईल." २३
अरामी राजाच्या चाकरांनी तर त्याला म्हटलें,
"त्यांचे देव डोंगरांचे देव, यास्तव ते आम्हांपेक्षां
बळकट झाले; जर आम्ही सपाटीवर त्यांसीं लढूं,
तर निश्चयें त्यांपेक्षां बळकट होऊं. २४ तर तूं
हें कर, राजास एकएकाला त्याच्या ठिकाणावरून
काढून त्यांच्या ठिकाणीं सुभेदार ठेव. २५ आ-
णि तुझें जें सैन्य पडून गेलें त्याप्रमाणें घोड्यासा-
रिखा घोडा व रथासारिखा रथ, असें सैन्य मो-
जून आपल्याजवळ घे, मग आम्ही सपाटीवर
त्यांसीं लढूं, आणि निश्चयें त्यांपेक्षां बळकट
होऊं." तेव्हां त्यानें त्यांचें ऐकून तसें केलें. २६
मग वर्ष फिरलें तेव्हां असें झालें कीं बेनहदाद
अराम्यांची झडती घेऊन इस्राएलासीं लढायास
अफेकास चढून गेला. २७ तेव्हां इस्राएलाच्या
संतानाची झडती होऊन तीं सर्व सिद्ध झालीं,
आणि त्यांसीं भिडायाला गेलीं; आणि इस्राएला-
च्या संतानांनी त्यांच्यासमोर शेरडांच्या दोन कळ-
पांसारिखा तळ धरिला, परंतु अराम्यांनी देश
भरला. २८ तेव्हां देवाकडचा कोणी माणूस
आला आणि त्यानें इस्राएलाच्या राजाला असें

ह्मटलें कीं, "**परमेश्वर** असें सांगतो कीं, 'अ-
रामी ह्मणाले, '**परमेश्वर** डोंगरांचा देव, आ-
णि तो तळवटींचा देव नाहीं; यावरून सर्व
मोठा समुदाय मी तुझ्या हातीं देईन, मग मी
**परमेश्वर** आहें हें तुह्मी जाणा." २९ तेव्हां त्यांनी
एकमेकासमोर सात दिवस तळ धरिला, मग सा-
तव्या दिवशीं असें झालें कीं लढाई लागली,
आणि इस्राएलाच्या संतानानी एका दिवशीं अरा-
म्यांतलें लाख पायदळ मारिलें. ३० आणि जे
उरले होते, ते अफेक नगरांत पळून गेले, आणि
उरलेल्या सत्तावीस हजार माणसांवर भिंत पड-
ली; तेव्हां बेनहदाद पळून नगरांत आंतल्या खो-
लींत गेला.

३१ मग त्याच्या चाकरानी त्याला ह्मटलें,
"आतां पाहा, इस्राएलाच्या घराण्यांच्या राजा़वि-
षयीं आह्मी ऐकिलें कीं ते दयाळू राजे आहेत;
तर आतां आह्मी आपल्या कंबरांस तरट व आ-
पल्या गळ्यांस दोऱ्या बांधुन इस्राएलाच्या राजा-
जवळ जाऊं; कदाचित तो तुझा जीव वांचवील."
३२ मग ते आपल्या कंबरांस तरट व आपल्या
गळ्यांस दोऱ्या अवळून इस्राएलाच्या राजाजवळ
आले, आणि ते ह्मणाले, "तुझा सेवक बेनहदाद
ह्मणतो, 'त्वां कृपेकरून माझा जीव वांचवावा.'"
तेव्हां त्याने ह्मटलें, "तो अझून जिवंत आहे कीं
काय? तो माझा भाऊ." ३३ तीं माणसें तर
जपत होतीं, आणि लवकर त्यापासून झेलून ह्म-
टलें, "होय, तुझा भाऊ बेनहदाद." तेव्हां त्याने
सांगितलें, "तुह्मी जाऊन त्याला आणा." मग
बेनहदाद त्याजवळ आला, आणि त्याने त्याला
आपल्या रथावर चढविलें. ३४ तेव्हां बेनह-
दादाने त्याला ह्मटलें, "जीं नगरें माझ्या बापाने
तुझ्या बापाजवळून घेतलीं, तीं मी माघारा देईन;
आणि माझ्या बापाने शोमरोनांत जसे चव्हाटे
करून ठेविले, तसे त्वां आपल्यासाठीं दामासेकांत
ठेवावे." तेव्हां आहाबाने ह्मटलें, "मी या क-
रारावर तुला सोडीन; असें त्याने त्याशीं करार
करून त्याला सोडिलें.

३५ तेव्हां तरण्या भविष्यवाद्यांतल्या एका
पुरुषाने **परमेश्वराच्या** सांगण्याप्रमाणें आपल्या
सोबत्याला ह्मटलें, "आतां तूं मला हाण." परी
तो माणूस त्याला मारायाला राजी झाला नाहीं.
३६ मग त्याने त्याला सांगितलें, "त्वां **परमेश्वरा**-
चें वचन ऐकिलें नाहीं, यावरून पाहा, तूं माझ्या
जवळून गेल्यावर सिंह तुला मारील." आणि तो
त्याच्याजवळून गेल्यावर त्याला सिंह अढळला,
आणि त्याने त्याला मारिलें. ३७ मग त्याला दुस-
रा माणूस अढळल्यावर, त्याला त्याने सांगितलें,
"आतां तूं मला हाण." यास्तव त्या माणसाने त्या-
ला असें हाणिलें कीं त्याला जखमी केलें. ३८
मग तो भविष्यवादी जाऊन वाटेवर राजासाठीं
उभा राहिला; आणि त्याने आपल्या तोंडावर राख
घेऊन आपला वेष पालटला. ३९ तेव्हां असें झालें
कीं राजा जवळून जात असतां, त्याने राजाला
हाक मारून ह्मटलें, "मी तुझा चाकर बाहेर ल-
ढाईमध्यें गेलों तेव्हां पाहा, कोणी वळून माझ्या-
जवळ माणूस आणून ह्मटलें, 'तूं या माणसाला
राख; जर हा चुकून गेलाच गेला, तर याच्या
जिवाच्या ठिकाणीं तुझा जीव होईल; नाहीं तर,
तुला एक तालांत रुपें जोखून द्यावें लागेल.' ४०
मग असें झालें कीं तुझा चाकर इकडे तिकडे का-
मांत होता इतक्यांत तो कोणीकडे गेला." तेव्हां
इस्राएलाच्या राजाने त्याला ह्मटलें, "तुझा न्याय
तसाच; त्वांच ठरविला आहे." ४१ तेव्हां त्या-
ने उतावळी करून आपल्या तोंडावरून राख
काढिली; मग इस्राएलाच्या राजाने त्याला असें
ओळखलें कीं, हा भविष्यवाद्यांतला आहे. ४२
तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, "**परमेश्वराने** असें
सांगितलें, म्या ज्याचा नाश नेमला होता, तसा
माणूस त्वां हातांतून सोडिला, यावरून त्याच्या
जिवाच्या ठिकाणीं तुझा जीव, आणि त्याच्या लो-
कांच्या ठिकाणीं तुझे लोक होतील." ४३ मग
इस्राएलाचा राजा खिन्न व रुष्ट होऊन शोमरो-
नास चालून आपल्या घरीं आला.

## अध्याय २१.

आणि या गोष्टीनंतर असें झालें कीं नाबोथ
इज्रेलकर याचा द्राक्षमळा, इज्रेलांत आ-
हाब शोमरोनाचा राजा याच्या माहालाजवळ
होता. २ आणि आहाब नाबोथाला असें
ह्मणाला कीं, "तूं आपला द्राक्षमळा मला दे,

ह्मणजे तो मला शाकमळा होईल, कारण कीं तो
माझ्या घराजवळ लगत आहे; मग मी तुला त्या-
च्याबदल त्यापेक्षां चांगला द्राक्षमळा देईन, किंवा
जर तुला बरें वाटेल तर तुला त्याच्या मोलाचा
पैका देईन." ३ तेव्हां नाबोथाने आहाबाला
ह्मटलें, "म्या आपल्या वडिलांचें वतन तुला द्यावें,
हें परमेश्वराने मजकडून घडूं देऊं नये." ४
मग आहाब नाबोथ इज्रेलकराने त्याला जी गोष्ट
ह्मटली होती तिजमुळें खिन्न व रुष्ट होऊन आ-
पल्या घरास आला; कां कीं त्याने त्याला ह्मटलें
होतें, "मी आपल्या वडिलांचें वतन तुला देणार
नाहीं." तेव्हां त्याने आपल्या अंथरुणावर निजून
आपलें तोंड मुरडलें, आणि अन्न खालें नाहीं.
५ मग त्याची स्त्री ईजेबेल त्याच्याजवळ ये-
ऊन त्याला ह्मणाली, "तुझें मन खिन्न आणि तूं
अन्न खात नाहींस, हें काय?" ६ तेव्हां तो
तिला बोलला, "म्या नाबोथ इज्रेलकर याला
असें ह्मटलें कीं तूं आपला द्राक्षमळा मला पैक्या-
वर दे, किंवा जर तुझी इच्छा असली, तर मी
तुला त्याच्याबदल दुसरा द्राक्षमळा देईन; परंतु
त्याने सांगितलें कीं, मी आपला द्राक्षमळा तुला
देणार नाहीं." ७ तेव्हां त्याची स्त्री ईजेबेल
इने त्याला ह्मटलें, "तूं आतां इस्राएलावर राज्य
करितोस कीं नाहीं! उठून अन्न खा, आणि तुझें
मन संतुष्ट असो; नाबोथ इज्रेलकर याचा द्राक्ष-
मळा मी तुला देईन." ८ मग तिने आहाबा-
च्या नांवाने पत्रें लिहिलीं, आणि तीं पत्रें त्याच्या
शिक्क्याने चिकटावून नाबोथाच्या नगरांतले राह-
णारे वडील व अधिकारी यांजवळ पाठविलीं. ९
आणि त्या पत्रांत तिने असें लिहिलें होतें कीं,
"तुह्मी उपासाची घोषणा करा; आणि नाबोथाला
लोकांतल्या मुख्य ठिकाणीं बसवा. १० मग
दोन दुष्ट माणसें त्याच्यापुढें बसवा, आणि त्या-
नी त्याविषयीं असी साक्ष द्यावी कीं, 'त्वां देवाची
व राजाची निंदा केली.' नंतर तुह्मी त्याला बा-
हेर नेऊन, तो मरे असा त्याला धोंडमार करा."
११ यास्तव त्याच्या नगरांतलीं वडील व अधि-
कारी माणसें, जीं त्याच्या नगरांत राहत होतीं
त्यानीं आपल्याजवळ जसें ईजेबेलीने पाठविलें
होतें, ह्मणजे त्या पाठविलेल्या पत्रांत जसें त्या-
जवळ लिहिलें होतें, तसें केलें. १२ त्यानी उपा-
साची घोषणा केली, आणि नाबोथाला लोकांतल्या
मुख्य ठिकाणीं बसविलें. १३ मग दोन दुष्ट
माणसें आंत येऊन त्याच्यापुढें बसलीं, आणि त्या
दुष्ट माणसानी लोकांच्यापुढें नाबोथाविषयीं असी
साक्ष दिल्ही कीं, "नाबोथाने देवाची व राजा-
ची निंदा केली." नंतर त्यानी त्याला नगराबाहेर
नेऊन तो मेला असा त्याला धोंडमार केला. १४
मग त्यानी ईजेबेलीकडे पाठवून सांगितलें कीं,
"नाबोथ धोंडमाराने मेला." १५ आणि नाबोथ
धोंडमाराने मेला हें ईजेबेलीने ऐकिलें तेव्हां
असें झालें कीं ईजेबेलीने आहाबाला सांगितलें,
"तूं ऊठ आणि नाबोथ इज्रेलकर याचा द्राक्ष-
मळा, जो त्याने तुला पैक्यावर द्यायाला अनमान
केला, तो वतन करून घे, कारण कीं नाबोथ
जिवंत नाहीं, मेलाच आहे." १६ आणि नाबोथ
मेला, हें आहाबाने ऐकिलें तेव्हां असें झालें कीं
आहाब उठून नाबोथ इज्रेलकर याचा द्राक्ष-
मळा वतन करून घ्यायास तेथें उतरून गेला.
१७ तेव्हां एलीया तिश्बी याला परमेश्व-
राचें असें वचन प्राप्त झालें कीं, १८ "तूं
ऊठ आणि इस्राएलाचा राजा आहाब जो शोम-
रोनांत आहे त्याला भेटायास उतरून जा; पाहा,
तो नाबोथाच्या द्राक्षमळ्यांत तेथें वतन करून
घ्यायाला उतरून गेला आहे. १९ तर तूं त्या-
ला असें सांग कीं, "परमेश्वर असें सांगतो, त्वां
घात केला आणि वतनहि घेतलें काय? अणखी तूं
त्याला सांग कीं परमेश्वर असें सांगतो, ज्या
ठिकाणीं कुत्र्यानी नाबोथाचें रक्त चाटून घेतलें,
तेथें कुत्रीं तुझें तुझेंच रक्त चाटून घेतील." २०
मग आहाबाने एलीयाला ह्मटलें, "हे माझ्या
वैऱ्या, मी तुला सांपडलों काय?" तेव्हां तो बो-
लला, "तूं मला सांपडलास, कारण कीं परमे-
श्वराच्या दृष्टींत दुष्टाई करायाला त्वां आपल्या-
ला विकिलें आहे. २१ 'पाहा, मी तुजवर वा-
ईट आणितों, आणि तुझ्या वंशांचा क्षय करीन,
आणि आहाबाचा भिंतमुत्या व जो इस्राएलांत
कोंडलेला व टाकलेला त्याचा नाश मी करीन.
२२ आणि जी चिडणूक त्वां केली आणि इस्रा-
एलाकडून पाप करविलें त्यामुळें नबाटाचा पुत्र

यराबाम याच्या घराण्यासारिखें व अहीयाचा
पुत्र बाशा याच्या घराण्यासारिखें तुझें घराणें
करीन.' २३ आणखी ईजेबेलीविषयीं परमेश्वर
असें सांगतो कीं, 'कुत्रीं ईजेबेलीला इज्रेलाच्या
गांवकुसाजवळ खातील. २४ आहाबाचा जो
नगरांत मरेल त्याला कुत्रीं खातील, आणि जो
बाहेरल्या ठिकाणीं मरेल त्याला आकाशांतलीं
पांखरें खातील."

२५ ज्याने परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई
करायास आपल्याला विकिलें असा आहाबासा-
रिखा कोणी अगदीं झाला नव्हता; आणि त्याची
स्त्री ईजेबेल त्याला प्रेरीत असे. २६ आणि
त्याने मूर्त्तीला अनुसरून फार ओंगळ केलें; जे
अमोरी परमेश्वराने इस्राएलाच्या संतानांच्या
पुढून घालविले, त्यांच्या सर्व दुष्टाईप्रमाणें त्याने
केलें. २७ तरी आहाबाने त्या गोष्टी ऐकिल्या,
तेव्हां असें झालें कीं त्याने आपलीं वस्त्रें फाडून
आपल्या अंगावर तरट घेतलें, आणि तो उपास
करीत असतां तरटासुद्धां निजला व हळू चालला.
२८ मग एलीया तिश्बी याला परमेश्वराचें
असें वचन प्राप्त झालें कीं, २९ "आहाब माझ्या-
पुढें नम्र झाला आहे, हें त्वां पाहिलें कीं काय?
तर तो माझ्यापुढें नम्र झाला, यावरून मी तें
वाईट त्याच्या दिवसांत आणणार नाहीं; त्याच्या
पुत्राच्या दिवसांत त्याच्या घराण्यावर तें वाईट
आणीन."

## अध्याय २२.

तेव्हां अराम व इस्राएल यांमध्यें लढाई न हो-
तांना ते तीन वर्षें स्वस्थ राहिले. २ नंतर
तिसऱ्या वर्षीं असें झालें कीं यहूदाचा राजा यहो-
शाफाट खालीं इस्राएलाच्या राजाजवळ गेला. ३
तेव्हां इस्राएलाचा राजा आपल्या चाकरांस बोल-
ला, "रामोथ गिलाद आपलें, हें तुह्मास ठाऊक
नाहीं काय? तरी आह्मी तें अरामी राजाच्या
हातांतून घेण्याविषयीं निवांत राहिलों." ४ मग
त्याने यहोशाफाटाला विचारिलें, "तूं लढायासाठीं
माझ्यासंगतीं रामोथ गिलादास येसील कीं काय?
तेव्हां यहोशाफाटाने इस्राएलाच्या राजाला ह्मटलें,
"मी आणि तूं, माझे लोक आणि तुझे लोक, माझीं
घोडीं आणि तुझीं घोडीं एकच." ५ आणखी य-
होशाफाटाने इस्राएलाच्या राजाला ह्मटलें, "कृपा
करून परमेश्वराचें सम्मत तूं आज विचारून
घे." ६ मग इस्राएलाच्या राजाने भविष्यवादी मा-
णसें सुमारें चारशें मिळवून त्यांस विचारिलें, "मी
रामोथ गिलादावर लढायाला जाऊं किंवा निवांत
राहूं?" तेव्हां त्यानी सांगितलें, तूं वर जा, ह्मण-
जे प्रभु तें राजाच्या हातीं देईल." ७ आणि
यहोशाफाटाने ह्मटलें कीं, "आह्मी ज्याच्याजवळ
विचारावें, असा आणखी कोणी परमेश्वराचा
भविष्यवादी एथें नाहीं कीं काय?" ८ तेव्हां
इस्राएलाच्या राजाने यहोशाफाटाला ह्मटलें, "अ-
णखी एक माणूस, ज्याकडून परमेश्वराला वि-
चारावें, असा इम्ला याचा पुत्र मीखाया आहे,
परंतु मी त्याचा त्रास करितों, कारण कीं तो
मजविषयीं चांगलें भविष्य सांगत नाहीं, केवळ
वाईट सांगतो." तेव्हां यहोशाफाट बोलला,
"राजाने असें ह्मणूं नये." ९ मग इस्राएलाच्या
राजाने एका कारभाऱ्याला बोलावून सांगितलें,
"इम्लाचा पुत्र मीखाया याला तूं लवकर घेऊन
ये." १० तेव्हां इस्राएलाचा राजा व यहूदाचा
राजा यहोशाफाट पोषाक करून शोमरोनाच्या
वेसीच्या दाराजवळ चव्हाट्यांत आपापल्या गादी-
वर बसले होते, आणि सर्व भविष्यवादी त्यांच्या-
पुढें भविष्य सांगत होते. ११ आणि कनाना
याचा पुत्र सिदकीया याने लोखंडाचीं शिंगें
करून घेऊन ह्मटलें, "परमेश्वर असें सांगतो,
'याकडून अराम्यांचा क्षय होई तोंपर्यंत तूं त्यांस
हुंडारसील.'" १२ आणखी सर्व भविष्यवादी तसें
भविष्य सांगत होते कीं, "तूं रामोथ गिलादावर
चढून जाऊन सफळ हो, ह्मणजे परमेश्वर तें
राजाच्या हातीं देईल." १३ तेव्हां जो दूत
मीखायाला बोलायास गेला होता, त्याने त्याला
असें सांगितलें कीं, "पाहा, आतां भविष्यवाद्यांचीं
वचनें राजाजवळ एकाच तोंडाचीं बरीं आहेत;
तर आतां तुझें वचन त्यांतल्या एकाच्या बोलण्या-
सारिखें व्हावें, ह्मणजे त्वां बरें बोलावें." १४
तेव्हां मीखाया बोलला, "जें परमेश्वर मला
सांगेल, तेंच सजीव परमेश्वर याच्या शपथेने
मी बोलेन."

१५ आणि तो राजाजवळ आल्यावर, राजाने
त्याला विचारिलें, "हे मीखाया, आह्मी लढाया-
ला रामोथ गिलादास जाऊं? किंवा निवांत राहूं?
तेव्हां त्याने त्याला उत्तर केलें, "तूं वर जाऊन
सफळ हो, ह्मणजे परमेश्वर तें राजाच्या हातीं
देईल." १६ तेव्हां राजाने त्याला ह्मटलें, "पर-
मेश्वराच्या नामाने जें खरें तें मात्र त्वां मला
बोलावें, ह्मणून मी किती वेळपर्यंत तुला शपथ
घालून सांगूं?" १७ मग तो बोलला, "ज्या बक-
ऱ्यांस पाळणारा नाहीं त्यांसारिखे सर्व इस्राएली
डोंगरावर पसरलेले असे म्या पाहिले; तेव्हां
परमेश्वराने सांगितलें, 'त्यांस धनी नाहीं; त्यांनी
आपापल्या घरीं सुखरूप जावें.'" १८ मग इस्रा-
एलाच्या राजाने यहोशाफाटाला ह्मटलें, "तो मज-
विषयीं चांगलें भविष्य सांगणार नाहीं, केवळ वा-
ईट सांगेल, असें म्या तुला सांगितलें कीं नाहीं?"
१९ नंतर मीखाया बोलला, "तर तूं परमेश्व-
राचें वचन ऐक; परमेश्वर आपल्या सिंहास-
नावर बसलेला, आणि त्याच्याजवळ त्याच्या उज-
व्याकडे व त्याच्या डाव्याकडे आकाशावली सर्व
मंडळी उभी राहिलेली असें म्या पाहिलें. २०
तेव्हां परमेश्वराने ह्मटलें, 'आहाबाने वरतीं
रामोथ गिलादास जाऊन पडावें, असें त्याला
कोण मनावील?' तेव्हां एकाने एका प्रकारचें उत्तर
दिल्हें, आणि दुसऱ्याने दुसऱ्या प्रकारचें उत्तर
दिल्हें. २१ मग एक आत्मा निघून परमेश्वरा-
च्यापुढें उभा राहून बोलला, 'मी त्याला मना-
वीन.' २२ तेव्हां परमेश्वराने त्याला ह्मटलें,
'कशाने?' तेव्हां तो बोलला, 'मी निघून त्याच्या
सर्व भविष्यवाद्यांच्या मुखांत खोटा आत्मा होईन.'
तेव्हां त्याने ह्मटलें, 'तूं मनावसील अणखी तुझें
चालेल, तूं जाऊन तसें कर.' २३ तर आतां
पाहा, परमेश्वराने तुझ्या या सर्व भविष्यवाद्यां-
च्या मुखांत खोटा आत्मा घातला आहे; परंतु
परमेश्वराने तुझ्याविषयीं वाईट सांगितलें आहे."
२४ मग कनानाचा पुत्र जिद्कीया याने जवळ
येऊन मीखायाच्या गालावर मारून ह्मटलें, "पर-
मेश्वराचा आत्मा तुजसीं बोलायास मजपासून
कोणीकडून गेला?" २५ तेव्हां मीखाया बोल-
ला, "पाहा, जेव्हां तूं आंतल्या खोलींत लपाया-
ला जासील, त्या दिवसीं तुला दिसेल." २६
मग इस्राएलाच्या राजाने सांगितलें, "मीखाया-
ला घेऊन नगराचा अधिकारी आमोन व राजाचा
पुत्र योवाश यांजवळ माघारा ने; २७ आणि
बोल, 'राजा असें सांगतो, तुह्मी याला बंदिशा-
ळेंत घाला, आणि मी सुखरूप येईन तोंपर्यंत
याला दुःखाचें अन्न व दुःखाचें पाणी द्या.'" २८
तेव्हां मीखाया बोलला, "जर तूं माघारा सुख-
रूप कधीं येसील, तर परमेश्वर मजकडून बो-
लला नाहीं." अणखी त्याने ह्मटलें, "अहो सर्व
लोकांनो, तुह्मी ऐका."

२९ मग यहूदाचा राजा यहोशाफाट आणि
इस्राएलाचा राजा रामोथ गिलादास चढून गेले.
३० तेव्हां इस्राएलाच्या राजाने यहोशाफाटाला
ह्मटलें, "मी आपला वेष पालटून लढाईंत जाईन,
परंतु तूं आपलीं वस्त्रें अंगीं धर." असा इस्राए-
लाचा राजा आपला वेष पालटून लढाईंत गेला.
३१ अरामी राजाने तर आपल्या रथांच्या बत्तीस
सर्दारांस असी आज्ञा दिल्ही होती कीं, "तुह्मी
लाहानासीं किंवा मोठ्यासीं लढूं नका; केवळ इ-
स्राएलाच्या राजासीं मात्र लढा." ३२ आणि
असें झालें कीं रथांच्या सर्दारांनी यहोशाफाटाला
पाहिलें, तेव्हां त्यांनी ह्मटलें, "निश्चयें हाच इस्रा-
एलाचा राजा." तेव्हां ते त्यासीं लढायाला वळले,
आणि यहोशाफाट ओरडला. ३३ मग असें
झालें कीं रथांच्या सर्दारांनी पाहिलें कीं हा इस्रा-
एलाचा राजा नाहीं, तेव्हां ते त्याजवळून मुरडले.
३४ नंतर कोणी आपल्या अटकलीने धनुष्य ओढून
इस्राएलाच्या राजाला चिलखताच्या सांध्यांमध्यें
मारिलें; यास्तव त्याने आपल्या सारथ्याला सांगि-
तलें, "मी घायाळ झालों, तर तूं आपले हात फि-
रवून मला सैन्यांतून काढून ने." ३५ तर त्या
दिवसीं लढाई वाढली, आणि राजा रथामध्यें टें-
कून अराम्यांच्यासमोर राहिला, आणि संध्याका-
ळीं मेला आणि घावाचें रक्त रथांतल्या खळग्यांत
वाहून गेलें. ३६ तेव्हां सूर्य मावळतांना सैन्यांत
चहुंकडे असी घोषणा चालली कीं, "प्रत्येकाने
आपापल्या नगरास व आपापल्या प्रांतास जावें."
३७ असा तो राजा मेला असतां, शोमरोनास
नेला गेला, आणि त्यांनी शोमरोनांत राजाला

पुरलें. ३८ मग शोमरोनाच्या तळ्यावर त्यांनी
रथ धुतला, आणि त्यांनी त्याचें सामान धुतलें; ते-
व्हां परमेश्वराचें वचन जें त्याने सांगितलें हो-
तें, त्याप्रमाणें कुत्र्यांनी त्याचें रक्त चाटून घेतलें.
३९ आहाबाच्या राहिलेल्या गोष्टी, ह्मणजे त्याने
जें कांहीं केलें, त्याने हस्तिदंताचें जें घर बांधिलें,
आणि जीं सर्व नगरेंहि बांधिलीं, तीं इस्राएला-
च्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहिले-
लीं नाहींत कीं काय! ४० असा आहाब आ-
पल्या वडिलांच्यासंगतीं निजला, आणि त्याचा
पुत्र अहाज्याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.
४१ तर इस्राएलाचा राजा आहाब याच्या
चवथ्या वर्षी आसा याचा पुत्र यहोशाफाट यहू-
दावर राज्य करूं लागला. ४२ यहोशाफाट
राज्य करूं लागला तेव्हां तो पस्तीस वर्षांचा
होता, आणि त्याने यरुशालेमांत पंचवीस वर्षें
राज्य केलें; त्याच्या आईचें नांव अजूबा, आणि
ती शिल्हीची कन्या होती. ४३ तो आपला बाप
आसा याच्या अवघ्या मार्गांनी चालला, त्यांतून
फिरत नसतां परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें
त्याने केलें; परंतु उंच स्थानें काढलीं गेलीं नव्हतीं,
तोंपर्यंत लोक उंच स्थानांवर यज्ञ व धूप करीत
होते. ४४ आणि यहोशाफाटाने इस्राएलाच्या
राजासीं सल्ला केला. ४५ यहोशाफाटाच्या रा-
हिलेल्या गोष्टी, त्याने जो पराक्रम केला, आणि
ज्या लढाया केल्या, त्या सर्व यहूदाच्या राजांच्या
इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलेल्या नाहींत कीं
काय! ४६ उरलेले राखलेले पुरुष, जे त्याचा
बाप आसा याच्या दिवसांत राहिले होते, ते तर
त्याने देशांतून नाहींसे केले. ४७ तेव्हां अदोमांत
राजा नव्हता; ठेवलेला कारभारी राज्य चालवीत
होता. ४८ सोन्यासाठीं ओफीरास जायाला
यहोशाफाटाने तार्शीशी तारवांचा ताफा केला
होता; परंतु तीं गेलीं नाहींत, कारण कीं तारवें
एज्योनगेबेरांत फुटलीं गेलीं. ४९ तेव्हां आहा-
बाचा पुत्र अहाज्या याने यहोशाफाटाला ह्मटलें
होतें, "तुझ्या चाकरांच्यासंगतीं माझ्या चाकरांनी
तारवांत जावें." तरी यहोशाफाट मान्य झाला
नाहीं. ५० यानंतर यहोशाफाट आपल्या वडि-
लांच्यासंगतीं निजला, आणि आपला वडील दा-
वीद याच्या नगरांत पुरला गेला, आणि त्याचा
पुत्र यहोराम याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.
५१ यहूदाचा राजा यहोशाफाट याच्या सत-
राव्या वर्षी आहाबाचा पुत्र अहाज्या शोमरो-
नांत इस्राएलावर राज्य करूं लागला, आणि त्याने
इस्राएलावर दोन वर्षें राज्य केलें. ५२ परंतु
त्याने परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई केली; ह्मणजे
तो आपल्या बापाच्या मार्गाने व आपल्या आई-
च्या मार्गाने व नबाटाचा पुत्र यराबाम, ज्या-
ने इस्राएलाकडून पाप करविलें, त्याच्या मार्गाने
चालला. ५३ असें त्याने बालाची सेवा करीत
असतां त्याचें भजन केलें, आणि जसें त्याच्या
वडिलांनी केलें होतें त्या अवघ्यांप्रमाणें त्याने
इस्राएलाचा देव परमेश्वर याला चिडविलें.

# राजे यांचें दुसरें पुस्तक.

## अध्याय १.

तेव्हां आहाब मेल्यानंतर मोवाब इस्राएलावर
उलटला. २ त्या वेळेस अहाज्या शोमरो-
नांतल्या माडीवरच्या जाळीवरून पडला असतां
दुखणाईत झाला; यास्तव त्याने दूत पाठवून
त्यांस सांगितलें, "तुह्मी जाऊन एक्रोनाचा देव बा-
लजबूब याला विचारा कीं, मी या दुखण्यांतून
बचेन कीं काय?" ३ मग परमेश्वराच्या दूताने
एलीया तिश्बी याला सांगितलें, "तूं उठून शो-
मरोनाचा राजा याच्या दूतांस भेटायाला वर जा,
आणि त्यांस ह्मण, 'इस्राएलांत कोणी देव नाहीं
ह्मणून एक्रोनाचा देव बालजबूब याला विचारा-
यास तुह्मी जातां, असें आहे कीं काय? ४
तर यावरून परमेश्वर असें सांगतो, 'तूं ज्या
पलंगावर चढलास, त्यावरून उतरणार नाहींस;
तर खचीत मरसील." मग एलीया गेला. ५
यावरून ते दूत माघारे त्याच्याजवळ गेले; तेव्हां
त्याने त्यांस विचारिलें, "तुह्मी माघारें कशासाठीं
आलां?" ६ तेव्हां त्यांनी त्याला सांगितलें, "एक
माणूस आह्मास भेटायास येऊन आह्मास ह्म-
णाला, 'ज्या राजाने तुह्मास पाठविलें, त्याजवळ
तुह्मी माघारें जाऊन त्याला सांगा, परमेश्वर
असें सांगतो, इस्राएलांत कोणी देव नाहीं ह्मणून
एक्रोनाचा देव बालजबूब याला विचारायास तूं
पाठवितोस, असें आहे कीं काय? यास्तव ज्या
पलंगावर तूं चढलास, त्यावरून उतरणार नाहींस;
तर खचीत मरसील." ७ तेव्हां त्याने त्यांस वि-
चारिलें, "ज्याने तुह्मास भेटायास येऊन ह्या
गोष्टी सांगितल्या, तो कोणत्या प्रकारचा माणूस?"
८ तेव्हां त्यांनी त्याला सांगितलें, "तो केंसाळ
पुरुष, आणि त्याच्या कंबरेस कातड्याचा कांचा
अवळलेला होता." यावरून तो बोलला, "तोच
एलीया तिश्बी."

९ मग त्याने पन्नासांचा सरदार त्याच्या पन्नास
माणसांसुद्धां त्याकडे पाठविला, यास्तव तो चढून
त्याच्याजवळ गेला; तेव्हां पाहा, तो डोंगराच्या
शिखरावर बसला होता; आणि त्याने त्याला
ह्मटलें, "हे देवाच्या माणसा, राजाने सांगितलें,
'तूं खालीं ये." १० मग एलीयाने त्या पन्नासांच्या
सरदाराला असें उत्तर केलें कीं, "जर मी देवाचा
माणूस, तर आकाशांतून अग्नि पडावा, आणि
त्याने तुला व तुझ्या पन्नासांला जाळून टाकावें."
तेव्हां आकाशांतून अग्नि पडला, आणि त्याने त्या-
ला व त्याच्या पन्नासांला जाळून टाकिलें. ११
नंतर राजाने फिरून पन्नासांचा दुसरा सरदार
त्याच्या पन्नासांसुद्धां त्याकडे पाठविला; मग त्याने
उत्तर करून त्याला ह्मटलें, "हे देवाच्या माण-
सा, राजाने असें सांगितलें, 'तूं उतावळीने खालीं
ये." १२ तेव्हां एलीयाने त्यांस असें उत्तर केलें,
"जर मी देवाचा माणूस, तर आकाशांतून अग्नि
पडावा, आणि त्याने तुला व तुझ्या पन्नासांला
जाळून टाकावें." तेव्हां देवाचा अग्नि आका-
शांतून पडला, आणि त्याने त्याला व त्याच्या प-
न्नासांला जाळून टाकिलें. १३ नंतर राजाने फि-
रून तिसऱ्या पन्नासांच्या सरदाराला त्याच्या पन्ना-
सांसुद्धां पाठविलें; तेव्हां तो तिसऱ्या पन्नासांचा
सरदार चढून जाऊन पोहंचला, आणि त्याने एली-
यापुढें आपल्या गुडघ्यांवर टेंकून त्याशीं विनंती
करून असें ह्मटलें, "हे देवाच्या माणसा, आतां
माझा जीव व हे तुझे पन्नास सेवक यांचे जीव
तुला मोल्यवान वाटावे. १४ पाहा, आकाशांतून
अग्नि पडला, आणि त्याने त्या पहिल्या पन्नासांच्या
दोन सरदारांस व त्यांच्या पन्नासांस जाळून टाकि-
लें; यास्तव आतां माझा जीव तुला मोल्यवान
वाटावा." १५ तेव्हां परमेश्वराच्या दूताने
एलीयाला सांगितलें, "तूं त्याच्यासंगतीं खालीं
जा, त्याला भिऊं नको." यास्तव तो उठून त्या-
च्यासंगतीं खालीं राजाजवळ गेला. १६ नंतर
त्याने त्याला ह्मटलें "परमेश्वर असें सांगतो कीं,
'ज्याची वाणी विचारून घ्यावी, असा इस्राएलांत
कोणी देव नाहीं ह्मणून तां एक्रोनाचा देव बाल-

जबूब याला विचारायाला ज्यापेक्षां दूत पाठविले,
त्यापेक्षां तूं ज्या पलंगावर चढलास, त्यावरून उत-
रणार नाहींस; तर खचीत मरसील." १७ या-
नंतर परमेश्वराचें जें वचन एलीयाने सांगितलें
होतें, त्याप्रमाणें तो मेला; आणि त्याच्या ठिकाणीं
यहोराम, यहूदाचा राजा यहोशाफाट याचा पुत्र
यहोराम याच्या दुसऱ्या वर्षी, राज्य करूं लाग-
ला; कारण कीं त्याला पुत्र नव्हता. १८ आणि
अहाज्याच्या राहिलेल्या गोष्टी, ज्या त्याने केल्या,
त्या इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्त-
कांत लिहिलेल्या नाहींत कीं काय?

## अध्याय २.

नंतर जेव्हां परमेश्वर एलीयाला वावटळीने
आकाशांत चढून घेणार होता, तेव्हां असें झा-
लें कीं एलीया अलीशासुद्धां गिल्गालापासून गेला.
२ तेव्हां एलीयाने अलीशाला सांगितलें, "परमे-
श्वराने मला बेथेलास पाठविलें आहे, यास्तव
तूं आतां एथें राहा." नंतर अलीशाने ह्मटलें,
"परमेश्वर जिवंत आहे आणि तुझा प्राण जिवंत
आहे एवढ्या निश्चयाने मी तुला सोडणार नाहीं."
३ यास्तव ते खालीं बेथेलास गेले; मग बेथेलांत
जे भविष्यवाद्यांचे शिष्य होते, त्यांनी बाहेर अली-
शाजवळ येऊन त्याला विचारिलें, "आज परमे-
श्वर तुझ्या धन्याला तुझ्या मस्तकावरून घेणार
आहे, हें तुला कळलें कीं काय?" तेव्हां तो बो-
लला, "होय, मला कळलें; तुह्मी उगेच असा."
४ मग एलीयाने त्याला सांगितलें, "हे अलीशा,
परमेश्वराने मला यरीहोस पाठविलें आहे, या-
स्तव आतां तूं एथें राहा." तेव्हां तो बोलला,
"परमेश्वर जिवंत आणि तुझा प्राण जिवंत आहे
एवढ्या निश्चयाने मी तुला सोडणार नाहीं." या-
स्तव ते यरीहोस गेले. ५ नंतर यरीहोंत जे
भविष्यवाद्यांचे शिष्य होते त्यांनी अलीशाजवळ
येऊन त्याला विचारिलें, "परमेश्वर आज तुझ्या
धन्याला तुझ्या मस्तकावरून घेणार आहे, हें तुला
कळलें कीं काय?" तेव्हां तो बोलला, "होय,
मला कळलें, तुह्मी उगेच असा." ६ मग एली-
याने त्याला सांगितलें, "परमेश्वराने मला या-
र्देनेस पाठविलें आहे, यास्तव आतां तूं एथें राहा."
तेव्हां तो बोलला, "परमेश्वर जिवंत आणि तुझा
प्राण जिवंत आहे एवढ्या निश्चयाने मी तुला सो-
डणार नाहीं." यास्तव ते उभयतां चालले. ७
तेव्हां भविष्यवाद्यांच्या शिष्यांतलीं पन्नास माणसें
जाऊन पाहायाच्या ठिकाणीं दूर उभीं राहिलीं;
तर ते दोघे यार्देनेवर उभे राहिले. ८ आणि
एलीयाने आपलें अंगवस्त्र घेऊन दुमडून पाण्यावर
आपटलें; तेव्हां तें इकडे तिकडे होऊन दुभागलें,
आणि ते दोघे कोरड्या भूमीवरून पार गेले. ९
आणि ते पार गेले असतां, असें झालें कीं एली-
याने अलीशाला ह्मटलें, "मला तुझ्याजवळून घेत-
ल्यापूर्वी म्या तुझ्यासाठीं काय करावें, तें तूं माग."
तेव्हां अलीशा बोलला, "तर आतां तुझ्या वाऱ्यांत-
ला दुपट वांटा मला प्राप्त व्हावा." १० तेव्हां हा
बोलला, "त्वां कठीण गोष्ट मागितली; तथापि मी
तुजपासून घेतला जात असतां जर तुला दिसेन,
तर तुला तसें होईल; आणि जर नाहीं, तर
तसें होणार नाहीं." ११ आणि ते चालतां चा-
लतां बोलत असतां असें झालें कीं पाहा, अग्नी-
च्या घोड्यांसुद्धां अग्नीचा रथ दिसला, आणि ति-
हींकरून त्या दोघांमध्यें अंतर झालें, आणि एली-
या वावटळीने आकाशांत चढला. १२ तेव्हां अ-
लीशाने पाहिलें आणि तो मोठ्याने बोलला, "हे
माझ्या बापा, माझ्या बापा; इस्राएलाचे रथ व
त्याचे स्वारहि गेले." नंतर त्याने त्याला पुन्हां पा-
हिलें नाहीं; तेव्हां त्याने आपलीं वस्त्रें धरून फा-
डून दोन दोन तुकडे केले. १३ आणि एलीयाचें जें
अंगवस्त्र त्यावरून पडलें होतें, तें त्याने उचलून
घेतलें, नंतर तो माघारा येऊन यार्देनेच्या कांठीं
उभा राहिला. १४ मग एलीयाचें जें अंगवस्त्र
त्यावरून पडलें होतें, तें त्याने घेऊन पाण्या-
वर आपटून ह्मटलें, "एलीयाचा देव परमेश्वर
कोठें आहे?" तेव्हां त्यानेहि पाण्यावर आपटलें
असतां, तें इकडे तिकडे होऊन दुभागलें, आणि
अलीशा अलिकडे आला. १५ तेव्हां यरीहोंतले
जे भविष्यवाद्यांचे शिष्य, त्यांनी पाहायाच्या ठि-
काणावरून त्याला पाहून ह्मटलें, "एलीयाचें
वारें अलीशावर बसलें आहे." नंतर ते त्याला
भेटायास जाऊन भूमीवर त्याच्या पायां पडले.
१६ तेव्हां त्यांनी त्याला ह्मटलें, "आतां पा-

हा, तुझे सेवक पन्नास बळकट माणसें आहेत;
तर आतां त्यांनी जाऊन तुझ्या धन्याचा शोध
करावा; कदाचित **परमेश्वराच्या** आत्म्याने त्या-
ला उचलून एखाद्या डोंगरावर किंवा एखाद्या
खिंडींत सोडिलें असेल." तेव्हां त्याने सांगि-
तलें, "तुह्मी पाठवूं नका." १७ तरी तो लाज-
ला एवढा त्यांनी त्याला आग्रह केला; यास्तव
तो बोलला, "पाठवा." मग त्यांनी पन्नास माण-
सें पाठविलीं, आणि त्यांनी तीन दिवस शोध
केला, परंतु तो त्यांस सांपडला नाहीं. १८
आणि तो यरीहोंत राहिला असतां, ते त्याच्या
जवळ परत आले, तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें,
"तुह्मी जाऊं नका, असें म्या तुह्मास सांगितलें
नाहीं कीं काय?"

१९ यानंतर त्या नगरांतल्या माणसांनी अ-
लीशाला ह्मटलें, "आतां पाहा, माझ्या प्रभूला
दिसून आल्याप्रमाणें या नगरची वस्ती बरी आहे,
परंतु पाणी वाईट आणि भूमि निष्फळ आहे."
२० तेव्हां त्याने सांगितलें, "तुह्मी नवी वाटी
घेऊन तींत मीठ घालून माझ्याजवळ आणा."
यास्तव त्यांनी त्याच्याजवळ आणिली. २१ मग
तो बाहेर पाण्याच्या झऱ्याजवळ गेला, आणि
तेथें मीठ टाकून बोलला, "**परमेश्वर** असें सां-
गतो, 'म्या हें पाणी बरें केलें आहे; पुढें एथून
मरण किंवा निष्फळपण होणार नाहीं.' २२
तर अलीशाच्या सांगितलेल्या गोष्टीप्रमाणें तें
पाणी आजपर्यंत बरें आहे. २३ नंतर तो ते-
थून चढून बेथेलास गेला; तेव्हां तो वाटेने चा-
लत असतां, त्या नगरांतून लाहान पोरांनी निघून
त्याची थट्टा करून त्याला ह्मटलें, "अरे टकल्या,
तूं वर जा; अरे टकल्या, तूं वर जा." २४
तेव्हां त्याने मुरडून त्यांस पाहिलें, आणि **परमे-
श्वराच्या** नामानें त्यांस शाप दिल्हा; मग दोन
अस्वलीनी रानांतून येऊन त्यांतलें बेताळीस मुलगे
फाडून टाकिले. २५ तो तर तेथून कारमेल
डोंगरावर गेला, मग तेथून माघारा शोमरोनास
आला.

### अध्याय ३.

आणि यहूदाचा राजा यहोशाफाट याच्या
अठराव्या वर्षी आहाबाचा पुत्र यहोराम
शोमरोनांत इस्राएलावर राज्य करूं लागला,
आणि त्याने बारा वर्षें राज्य केलें. २ आणि
त्याने **परमेश्वराच्या** दृष्टींत वाईट केलें; तरी
आपल्या बापाएवढें व आपल्या आईएवढें केलें
नाहीं; का कीं त्याच्या बापाने जी बालाची मूर्त्ति
केली होती, ती त्याने काढून टाकिली. ३ परंतु
नबाटाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएलाला पा-
पांत घातलें, त्याच्या पापांस तो लगटून राहिला,
त्यापासून फिरला नाहीं.

४ आणि मोवाबाचा राजा मेशा मेंढपाळ
होता, आणि तो इस्राएलाच्या राजाला लाख
कोंकरें व लाख एडके लोंकरीसुद्धां देत होता.
५ मग आहाब मेल्यावर असें झालें कीं मोवा-
बाचा राजा इस्राएलाच्या राजावर उलटला. ६
यास्तव यहोराम राजाने त्या दिवशीं शोमरोनांतून
जाऊन सर्व इस्राएलाची झडती घेतली. ७ आ-
णि त्याने जाऊन यहूदाचा राजा यहोशाफाट
याजवळ पाठवून विचारिलें कीं, "मोवाबाचा
राजा मजवर उलटला आहे; तर तूं माझ्यासं-
गतीं मोवाबाशीं लढायाला येसील कीं काय?"
तेव्हां त्याने सांगितलें, "वर येईन; जसा तूं तसा
मी; जसे तुझे लोक तसे माझे लोक; जसे तुझे
घोडे तसे माझे घोडे." ८ मग त्याने विचारिलें,
"आपण कोणत्या वाटेने चढून जावें?" तेव्हां त्याने
सांगितलें, "अदोमाच्या रानांतल्या वाटेने." ९
यास्तव इस्राएलाचा राजा व यहूदाचा राजा व
अदोमाचा राजा, हे फेऱ्याची वाट धरून सात
दिवस चालले, आणि त्यांच्यासंगतीं जें सैन्य व
जे पशू त्यांसाठीं पाणी नव्हतें. १० यास्तव
इस्राएलाच्या राजाने ह्मटलें, 'हायहाय! का कीं
**परमेश्वराने** हे तीन राजे मोवाबाच्या हातीं
द्यायाला बोलावून आणिले आहेत." ११ तेव्हां
यहोशाफाटाने विचारिलें, "ज्याकडून आपण **पर-
मेश्वराला** विचारावें, असा **परमेश्वराचा** कोणी
भविष्यवादी एथें नाहीं कीं काय?" मग इस्राएला-
च्या राजाच्या एका चाकराने असें उत्तर केलें कीं,
"शाफाटाचा पुत्र अलीशा, जो एलीयाच्या हा-
तांवर पाणी ओतीत होता, तो एथें आहे." १२
तेव्हां यहोशाफाट ह्मणाला, "**परमेश्वराची**
गोष्ट त्याच्या ठिकाणीं आहे." यास्तव इस्राए-

लाचा राजा व यहोशाफाट व अदोमाचा राजा,
हे उतरून त्याच्याजवळ गेले. १३ तेव्हां अ-
लीशा इस्राएलाच्या राजाला बोलला, "तुझें माझें
काय आहे? तूं आपल्या बापाच्या भविष्यवाद्यां-
जवळ आणि आपल्या आईच्या भविष्यवाद्यांजवळ
जा." तेव्हां इस्राएलाचा राजा त्याला बोलला,
"असें नव्हे; कां कीं परमेश्वराने हे तीन राजे
मोवाबाच्या हातीं द्यायाला बोलावून आणिले
आहेत." १४ नंतर अलीशाने ह्मटलें, "सै-
न्याचा परमेश्वर, ज्याच्यापुढें मी उभा राहतों,
तो जिवंत आहे एवढ्या निश्चयाने यहूद्याचा
राजा यहोशाफाट याचें तोंड जर म्या मा-
निलें नसतें तर म्या तुला मोजिलें नसतें,
आणि तुझ्याकडे दृष्टिहि लाविली नसती. १५
तरी आतां तुह्मी माझ्याजवळ वाजंत्री आणा."
तेव्हां वाजंत्री वाजवीत असतां असें झालें कीं
परमेश्वराचा हात त्यावर मात्र झाला. १६
आणि तो बोलला, "परमेश्वर असें सांगतो,
'या खोऱ्यांत पुष्कळ खळगे करावे.' १७ का-
रण कीं परमेश्वर असें सांगतो, 'वारा तुमच्या
दृष्टीस पडणार नाहीं, पाऊसहि तुमच्या दृष्टीस
पडणार नाहीं; तथापि हा खोरा पाण्याने भ-
रून जाईल, आणि तुह्मी प्याल अणखी तुमचीं
पाठ्याळें व तुमचीं गुरें पितील.' १८ हें तर
परमेश्वराच्या दृष्टींत हलकें, कां कीं तो तुम-
च्या हातीं मोवाबी देणार आहे; १९ असें कीं
तुह्मी बंदिस्तीचीं सर्व नगरें व सर्व निवडक नगरें
माराल, आणि सर्व चांगलीं झाडें पाडाल, आणि
पाण्याच्या सर्व विहिरी बुजाल, आणि दगडांनी
सर्व चांगल्या शेतांचा नासाडा कराल." २०
नंतर सकाळीं नैवेद्य अर्पायाच्या वेळेस असें झा-
लें कीं पाहा, अदोमाच्या वाटेने पाणी आलें, आ-
णि तो प्रांत पाण्याने भरला.

२१ तर सर्व मोवाबानी ऐकिलें होतें कीं आप-
ल्यावर ते राजे लढायाला आले आहेत; यास्तव
जे हत्यारें अवळायाजोगे, त्या सर्वांस त्याने बोलावून
घेतलें आणि ते चढून येऊन सीमेंत उभे राहिले.
२२ नंतर मोवाबी सकाळीं उठले असतां आणि
त्या पाण्यावर सूर्य प्रकाशला असतां, तें पाणी त्या-
च्यापुढें रक्तासारिखें तांबडें दिसलें. २३ तेव्हां
त्यांनी ह्मटलें, "हें रक्त आहे; त्या राजांचा अतिना-
श झाला आहे, ह्मणजे त्यांनी एकमेकाला मारिलें
आहे; तर अहो मोवाबी, आतां लुटायाला चला."
२४ आणि ते इस्राएलाच्या छावणीजवळ आले,
तेव्हां इस्राएलांनी उठून मोवाब्यांला असें मारिलें
कीं ते त्यांच्या पुढून पळाले; तरी ते मोवाब्यांस
मारीत त्यांच्या देशांत गेले. २५ आणि त्यांनी
नगरें मोडिलीं, आणि सर्व चांगल्या शेतांवर एक-
एकाने आपापले दगड फेंकून त्यांनी त्या भरल्या,
आणि पाण्याच्या सर्व विहिरी त्यांनी बुजल्या, आ-
णि सर्व चांगलीं झाडें पाडलीं; केवळ हरेसेथा-
च्या गांवकुसाचे दगड राहविले, परंतु गोफणदारांनी
त्याच्या चहुंकडे जाऊन त्याला मारिलें. २६ आ-
णि मोवाबाच्या राजाने पाहिलें कीं लढाई आह्मास
दुर्घट आहे, तेव्हां त्याने अदोमाच्या राजाजवळ
फोडून यायाला तरवार उपसलेलीं सातशें माणसें
आपल्यासंगतीं घेतलीं; तथापि त्यांची शक्ति चाले-
ना. २७ मग त्याने आपला ज्येष्ट पुत्र, ज्याने
त्याच्या ठिकाणीं राज्य करावें, त्याला घेऊन गांव-
कुसावर त्याचा होम केला; असा इस्राएलावर
मोठा कोप झाला, मग ते त्यापासून निघून मा-
घारें आपापल्या देशांत आले.

## अध्याय ४.

अणखी भविष्यवाद्यांच्या शिष्यांच्या बायकांतल्या
एका स्त्रीने अलीशाजवळ ओरडून ह्मटलें,
"माझा नवरा तुझा सेवक मेला, आणि तो तुझा
सेवक परमेश्वराला भीत होता, हें तुला ठाऊक
आहे; तर सावकार माझे दोन पुत्र आपले दास
व्हावे ह्मणून घ्यायाला आला आहे." २ तेव्हां
अलीशाने तिला विचारिलें, "म्या तुझ्यासाठीं काय
करावें? घरांत तुला काय आहे? हें मला सांग."
तेव्हां तिने सांगितलें, "तुझ्या चाकरणीला घरांत
कांहीं नाहीं, केवळ तेलाची कुपी आहे." ३ ते-
व्हां त्याने सांगितलें तूं जाऊन आपल्यासाठीं बाहे-
रून भांडीं मागून आण, आपल्या सर्व शेजाऱ्यांपा-
सून रिकामी भांडीं थोडीं आणूं नको. ४ नंतर
तूं आंत जाऊन आपल्या मागून व आपल्या पुत्रां-
च्या मागून दार लावून घे; मग त्या सर्व भांड्यांत
तें तेल ओतून जें भरेल, तें एकीकडे ठेवीत जा."

५ यास्तव तिने त्याच्याजवळून आत जाऊन आ-
पल्या मागून व आपल्या पुत्रांच्या मागून दार ला-
वून घेतलें, आणि त्यानी तिच्याजवळ भांडीं आणून
दिल्हीं असतां, तिने तेल ओतिलें. ६ नंतर तीं
भांडीं भरलीं असतां, असें झालें कीं तिने आपल्या
पुत्राला सांगितलें, "अणखी भांडें माझ्याजवळ
आण." तेव्हां त्याने तिला म्हटलें, "अणखी
भांडें नाहीं." मग तेल राहिलें. ७ नंतर तिने
जाऊन देवाच्या माणसाला कळविलें; तेव्हां त्याने
सांगितलें, "तूं जाऊन तें तेल विकून आपलें कर्ज
फेड, नंतर जें उरेल, तेणेंकरून आपला व आप-
ल्या पुत्राचा निर्वाह कर.

८ अणखी असें झालें कीं एका दिवसीं अली-
शा शूनेमास गेला; आणि तेथें एक मोठी स्त्री
होती, तेव्हां तिने त्याला अन्न खायासाठीं आग्रह
केला; नंतर असें झालें कीं जेव्हां जेव्हां तो जव-
ळून जात होता, तेव्हां तेव्हां अन्न खायाला तेथें
वळून जात होता. ९ मग तिने आपल्या नवऱ्या-
ला सांगितलें, "पाहा, आतां मला कळलें कीं आ-
पल्या जवळून जो नेहेमी जात असतो, तो देवाचा
पवित्र माणूस आहे. १० आतां आपण भिंतीवर
एक लाहान खोली करूं, आणि तेथें त्याच्यासाठीं
अंथरूण व मेज व बैठक व समई मांडून ठेवूं;
मग असें व्हावें कीं तो आपल्याजवळ आला अस-
तां, त्याने तेथें वळून जावें." ११ तेव्हां एका
दिवसीं असें झालें कीं तो तेथें आला, आणि त्या
खोलींत वळून जाऊन तेथें निजला. १२ नंतर
त्याने आपला तरणा गेहजी याला सांगितलें, "तूं
या शूनामिणीला बोलाव." तेव्हां त्याने तिला
बोलाविलें आणि ती त्याच्यापुढें उभी राहिली.
१३ अणखी त्याने त्याला सांगितलें, "तूं आतां
तिला म्हण, 'पाहा, त्वां आम्हाविषयीं ही सर्व का-
ळजी केली आहे; तर तुझ्यासाठीं काय करायाचें?
तुझ्याविषयीं राजाजवळ किंवा सेनापतीजवळ बो-
लायाचें आहे कीं काय?" तेव्हां ती बोलली, "मी
आपल्याच लोकांमध्यें राहतें." १४ मग तो बो-
लला, "तर तिच्यासाठीं काय करायाचें?" तेव्हां
गेहजीने म्हटलें, "तिला पुत्र नाहीं खरें, आणि ति-
चा नवरा म्हातारा आहे." १५ नंतर त्याने सां-
गितलें, "तूं तिला बोलाव." मग त्याने तिला बो-
लाविलें आणि ती दारीं उभी राहिली. १६ ते-
व्हां तो बोलला, "सुमारें वसंतसमयीं जननाच्या
काळाप्रमाणें तूं पुत्राचें आलिंगन करसील." तेव्हां
ती बोलली, "हे देवाच्या माणसा माझ्या प्रभू,
नको; तूं आपल्या चाकरणीजवळ खोटें बोलूं नको."
१७ तर ती स्त्री गरोदर झाली, आणि असें अली-
शाने तिला सांगितलें होतें त्या नेमाप्रमाणें जन-
नाच्या काळाने ती पुत्र प्रसवली.

१८ नंतर तें लेंकरूं वाढल्यावर एका दिवशीं
असें झालें कीं तो बाहेर शेत कापणाऱ्यांकडे आप-
ल्या बापाजवळ गेला होता. १९ तेव्हां तो आ-
पल्या बापाला म्हणाला, "माझें शिर, माझें शिर!"
यास्तव त्याने एका चाकराला सांगितलें, "त्याला
त्याच्या आईजवळ घेऊन जा." २० तेव्हां त्याने
त्याला उचलून त्याच्या आईजवळ नेलें, आणि तो
तिच्या मांडीवर दुपारपर्यंत बसून मेला. २१ नं-
तर तिने त्याला वरतीं नेऊन देवाच्या माणसाच्या
अंथरुणावर घातलें आणि बाहेर येऊन त्यावर
दार लाविलें. २२ मग तिने आपल्या नवऱ्याला
बोलावून सांगितलें, "आतां तूं कोणी एका चाकरा-
ला एका गाढवासुद्धां माझ्याजवळ पाठवून दे, म्ह-
णजे मी देवाच्या माणसाकडे धांवत जाऊन येतें."
२३ तेव्हां तो बोलला, तूं आज त्याच्याजवळ कां
जातीस? अमावास्या नाहीं, आणि शाब्बाथ नाहीं."
तेव्हां ती बोलली, "सुख असो." २४ यास्तव
तिने गाढव अवळविलें आणि आपल्या चाकराला
म्हटलें, "तूं हाकीत चाल, म्या तुला सांगितल्यावां-
चून मजसाठीं तुझें हाकणें कमी करूं नको." २५
असी ती चालून कारमेल डोंगरास देवाच्या
माणसाजवळ पोहंचली; तेव्हां देवाच्या माणसाने
तिला पुढें पाहिलें असतां, असें झालें कीं त्याने
आपला तरणा गेहजी याला म्हटलें, "पाहा, ती
शूनामीण येत आहे. २६ तर आतां तिला भे-
टायास धांवत जा, आणि तिला विचार, तुला कु-
शळ? तुझ्या नवऱ्याला कुशळ? लेंकराला कुशळ
आहे कीं काय?" तेव्हां ती बोलली, "कुशळ आहे."
२७ नंतर तिने डोंगरावर देवाच्या माणसाजवळ
जाऊन त्याचे पाय धरिले; तेव्हां गेहजी तिला प-
लिकडे करायास जवळ गेला; तेव्हां देवाच्या मा-
णसाने सांगितलें, "तिला असूं दे; कां कीं तिचा

जीव खिन्न आहे, आणि परमेश्वराने हें कारण
मजपासून गुप्त राखिलें आहे आणि मला कळविलें
नाहीं." २८ नंतर ती बोलली, "म्या आपल्या
प्रभूजवळ पुत्र मागितला होता काय? मला फसवूं
नको, असें मी बोललें नाहीं कीं काय!" २९
तेव्हां त्यानी गेहजीला सांगितलें, "तूं आपली कंबर
बांधून आपल्या हातीं माझी काठी घेऊन जा; जर
कोणी तुला भेटला, तर तूं त्याला आशीर्वाद देऊं
नको, आणि जर कोणी तुला आशीर्वाद दिल्हा,
तर त्याला उत्तर देऊं नको; नंतर माझी काठी त्या
मुलाच्या तोंडावर लाव." ३० तरी त्या मुला-
च्या आईने ह्मटलें, "परमेश्वर जिवंत आहे आ-
णि तुझा प्राण जिवंत आहे एवढ्या निश्चयाने मी
तुला सोडणार नाहीं. ३१ तेव्हां तो उठून ति-
च्यामागें गेला; गेहजीने तर त्यांच्यापुढें जाऊन ती
काठी त्या मुलाच्या तोंडावर लाविली, परंतु शब्द
किंवा चेतना झाली नाहीं, मग त्याने त्याला भेटायास
माघारें येऊन त्याला असें सांगितलें कीं, "तो मूल
जागा झाला नाहीं." ३२ तेव्हां अलीशा घरांत
गेला; तर पाहा, तो मेलेला मुलगा त्याच्या अंथरु-
णावर निजविला होता. ३३ आणि आंत गेल्यावर
त्याने उभयतांवर दार लावून घेऊन परमेश्वरा-
ची प्रार्थना केली. ३४ नंतर तो चढून त्या लें-
करावर पालथा पडून राहिला, आणि आपलें तोंड
त्याच्या तोंडाला, आणि आपले डोळे त्याच्या
डोळ्यांस, आणि आपले हात त्याच्या हातांस ला-
विले; असी त्यावर पाखर घातली असतां त्या लें-
कराच्या अंगांत ऊब आली. ३५ नंतर तो उत-
रून घरांत एकदां इकडून एकदां तिकडून चाल-
ला, मग त्याने चढून त्यावर पाखर घातली;
नंतर त्या मुलाला सात वेळां शिंका आल्या, आ-
णि मुलाने आपले डोळे उघडले. ३६ तेव्हां
त्याने गेहजीला बोलावून सांगितलें, "तूं या शू-
नामिणीला बोलाव." तेव्हां त्याने तिला बोलाविलें
आणि ती त्याच्याजवळ आली; मग त्याने सांगि-
तलें, तूं आपला पुत्र उचलून घे." ३७ तेव्हां
ती आंत आली आणि भूमीपर्यंत लवून त्याच्या
पायां पडली, मग आपल्या पुत्राला घेऊन बाहेर
गेली.

३८ मग नंतर अलीशा माघारा गिलगालास
गेला; तेव्हां देशांत दुकाळ पडला होता, आणि
तरणे भविष्यवादी ज्याच्या पुढें बसले असतां त्याने
आपल्या तरण्याला सांगितलें, "तूं मोठें बहुगुणें
चुलीवर ठेवून तरण्या भविष्यवाद्यांसाठीं शाक
सिजवून कर." ३९ तेव्हां कोणीएक बाहेर रानांत
शाकभाजी गोळा करायास गेला, आणि त्याला
रानांतला वेल सांपडला असतां त्याने त्यावरून
कडू काकड्या आपल्या ओटीभर तोडून घेतल्या;
मग येऊन चिरून शाक करण्याच्या बहुगुण्यांत
घातल्या, का कीं त्या त्यांस माहीत नव्हत्या. ४०
नंतर त्यानी त्या माणसांच्या खाण्यासाठीं ती ओ-
तून काढिली; तेव्हां ते ती शाक कांहीं खात अ-
सतां असें झालें कीं त्यानी ओरडून ह्मटलें, "हे
देवाच्या माणसा, बहुगुण्यांत मरणावें आहे."
यास्तव त्याच्यानी खाववत नव्हतें. ४१ नंतर
त्याने सांगितलें कीं, "तुह्मी पीठ आणा." मग
त्याने बहुगुण्यांत घालून सांगितलें, "लोकानी खावें
ह्मणून तूं त्यांच्यासाठीं ओतून काढ." तेव्हां
बहुगुण्यांतलें कांहीं वाईट झालें नाहीं. ४२ नंतर
बालशालीशा तेथून कोणी येऊन देवाच्या माण-
साजवळ प्रथम पिकाच्या सातूंच्या भाजलेल्या वीस
भाकरी व ओलें धान्य त्याच्या टरफलांसमट आ-
णिलें; मग याने सांगितलें, "लोकानी खावें ह्मणून
तूं त्यांच्यापुढें वाढ." ४३ तेव्हां त्याच्या चाक-
राने ह्मटलें, "काय, मी शंभर माणसांपुढें एवढेंच
वाढूं!" तरी त्याने सांगितलें, "लोकानी खावें ह्म-
णून त्यांच्यापुढें वाढ; का कीं परमेश्वर असें
सांगतो, त्यानी खाल्ल्यावर उरेल." ४४ नंतर
त्याने त्यांच्यापुढें वाढल्यावर त्यानी खाल्लें, आणि
परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणें उरलें.

## अध्याय ५.

तर अरामाच्या राजाचा सेनापति नामान आप-
ल्या धन्याजवळ मोठा माणूस आणि मान्यतेचा
होता; कारण कीं त्याच्यायोगें परमेश्वराने अ-
रामाला तारण दिल्हें होतें; तो पुरुष तर पराक्र-
माने शूर, परंतु कोडी होता. २ तर अरामाच्या
मोटानी निघून इस्राएलाच्या देशांतून लाहान मुल-
गी पाडाव करून नेली होती; आणि तिने नामा-
नाच्या स्त्रीची चाकरी केली. ३ तेव्हां तिने आ-

त्या धनिणीला झटलें, "माझा धनी शोमरोनां-
तल्या भविष्यवाद्याजवळ असता, तर किती बरें
होतें! तेव्हांच त्याने त्याला त्याच्या कोडापासून
बरें केलें असतें." ४ नंतर कोणी जाऊन त्याच्या
धन्याला असें सांगितलें कीं, "इस्राएलाच्या देशांत-
ली ही मुलगी, तिने असें असें झटलें." ५ ते-
व्हां अरामाच्या राजाने सांगितलें, "तूं निघून जा,
झणजे मी इस्राएलाच्या राजाला पत्र पाठवितों."
मग तो आपल्यासंगतीं दाहा तालांत रुपें, व सो-
न्याच्या साहा हजार मुद्रा, व वस्त्रांचे दाहा पोषाक
घेऊन गेला. ६ तेव्हां त्याने इस्राएलाच्या राजा-
जवळ पत्र पोहंचविलें; तें असें कीं, "विशेष, आतां
हें पत्र तुझ्याजवळ पोहंचलें असतां असें जाण कीं
म्या आपला सेवक नामान तुझ्याजवळ पाठविला
आहे; कशासाठीं? तर त्वां त्याचा कोड बरा क-
रावा." ७ मग इस्राएलाच्या राजाने तें पत्र वाचलें
असतां, असें झालें कीं त्याने आपलीं वस्त्रें फाडून
झटलें, "काय! मारायाला किंवा वांचवायाला मी
देव आहें झणून त्याने त्याचा कोड बरा होण्या-
साठीं माणूस माझ्याजवळ पाठविला आहे! तर
आतां तुह्मी विचार करून पाहा कीं तो केवळ म-
जवर निमित्त ठेवायाला पाहतो."

८ आणि देवाचा माणूस अलीशा याने ऐकि-
लें कीं इस्राएलाच्या राजाने आपलीं वस्त्रें फाडलीं;
तेव्हां असें झालें कीं त्याने राजाजवळ पाठवून
झटलें, "त्वां आपलीं वस्त्रें कां फाडलीं? त्याने
माझ्याजवळ यावें झणजे इस्राएलांत भविष्यवादी
आहे, हें त्याला कळेल." ९ मग नामान आ-
पले घोडे व आपला रथ यांसुद्धां येऊन अली-
शाच्या घराच्या दारासीं उभा राहिला. १० मग
अलीशाने त्याजवळ गडी पाठवून असें सांगितलें
कीं, "तूं जाऊन यार्देनेंत सात वेळां स्नान कर;
झणजे तुझें अंग यथापूर्व होईल आणि तूं शुद्ध
होसील." ११ तेव्हां नामान कोपला आणि जा-
ऊन बोलला, "पाहा, माझ्या मनांत आलें होतें कीं,
तो माझ्याजवळ बाहेर खचीत येईल, आणि
उभा राहून आपला देव परमेश्वर याचें नाम
घेऊन आपला हात ठिकाणाला लावून कोड्याला
बरें करील. १२ दामासेकाच्या नद्या अबाना व
पर्पार इस्राएलाच्या सर्व पाण्यापेक्षां चांगल्या
नाहींत कीं काय? म्यां त्यांत स्नान करून शुद्ध
न व्हावें कीं काय?" असा तो रागें भरून फि-
रून चालला. १३ नंतर त्याचे चाकर त्याच्या
जवळ येऊन असें झणाले कीं, "माझ्या बापा,
भविष्यवाद्याने तुला मोठी गोष्ट सांगितली असती,
तर त्वां केली नसती कीं काय? तर त्याने, 'तूं
स्नान करून शुद्ध हो,' एवढेंच तुला सांगितलें
असतां, त्वां किती विशेषेंकरून करावें!" १४ मग
त्याने खालीं जाऊन देवाच्या माणसाने सांगि-
तल्याप्रमाणें यार्देनेंत सात वेळां बुटकुळी मारिली,
तेव्हां त्याचें अंग लाहान मुलाच्या अंगासारिखें
होऊन उलट आलें; असा तो शुद्ध झाला. १५
नंतर तो आपल्या सर्व जुटासुद्धां माघारा देवाच्या
माणसाजवळ गेला, आणि पोहंचून त्याच्यापुढें उ-
भा राहून बोलला, "पाहा, आतां मला कळलें कीं
इस्राएलांतल्या देवावांचून सर्व पृथ्वींत देव नाहीं;
तर आतां तूं आपल्या सेवकापासून भेट घे." १६
तेव्हां त्याने झटलें, "परमेश्वर, ज्याच्यापुढें मी
उभा राहतों, तो जिवंत आहे एवढ्या निश्चयाने
मी कांहीं घेणार नाहीं." तेव्हां त्याने त्याला घे-
ण्याविषयीं आग्रह केला, परंतु तो मान्य झाला
नाहीं. १७ तेव्हां नामान बोलला, "तर आतां
खेचरांच्या जोडीचें ओझेंभर माती आपल्या सेव-
काला दिल्ही न जावी कीं काय? कारण कीं तुझा
सेवक आतांपासून दुसऱ्या देवांजवळ होम किंवा
यज्ञ करणार नाहीं, केवळ परमेश्वराजवळ क-
रील. १८ माझा धनी रिम्मोनाच्या घरीं भजा-
याला गेला आणि तो माझ्या हातावर टेंकला
त्या काळीं मी रिम्मोनाच्या घरीं पायां पडतों, तेव्हां
परमेश्वराने तुझ्या सेवकाची ती गोष्ट क्षमा क-
रावी; मी रिम्मोनाच्या घरीं पायां पडतों, तेव्हां
त्या गोष्टीविषयीं परमेश्वराने तुझ्या सेवकाची
क्षमा अगत्य करावी." १९ तेव्हां त्याने त्याला
झटलें, "तूं सुखरूप जा." मग तो त्याच्याजव-
ळून कोसभर वाट चालून गेला. २० तेव्हां
देवाचा माणूस अलीशा याचा तरणा गेहजी
याने झटलें, "पाहा, या अरामी नामानाने जें आ-
णिलें होतें तें माझ्या धन्याने त्याच्या हातापासून
न घेऊन त्याला जाऊं दिल्हें आहे; तर परमे-
श्वर जिवंत आहे एवढ्या निश्चयाने मी त्याच्या-

मागें धांवून त्यापासून कांहीं घेईन." २१ मग
गेहजी नामानाच्यामागें गेला, तेव्हां नामान आपल्या
मागें तो धांवत येतो, हें पाहून आपल्या रथावरून
उतरिला आणि त्याला भेटल्यावर त्याला विचारिलें,
"कुशळ आहे कीं काय?" २२ तेव्हां त्याने सां-
गितलें, "कुशळ आहे; माझ्या धन्याने मला पा-
ठवून सांगितलें,'पाहा, भविष्यवाद्यांच्या शिष्यांतले
दोन तरणे एफ्राइम डोंगरावरून मजकडे आले
आहेत; तर आतां त्यांच्यासाठीं एक तालांत रुपें
व वस्त्रांचे दोन पोशाक दे." २३ तेव्हां नामान
बोलला, "तूं राजी होऊन दोन तालांत घे." असा
त्याने त्याला आग्रह केला, आणि त्याने दोन
तालांत रुपें दोन पिशव्यांत बांधून वस्त्रांच्या
दोन पोषाकांसुद्धां आपल्या दोघा तरण्यांजवळ
दिल्हें; मग ते घेऊन त्याच्यापुढें नेते झाले.
२४ मग टेंकडीजवळ पोहंचून त्याने त्यांच्या हा-
तांतून घेतले आणि घरांत ठेविले; मग त्या
माणसांस निरोप दिल्हा असतां तीं गेलीं; नं-
तर तो जाऊन आपल्या धन्याच्यापुढें उभा राहि-
ला. २५ तेव्हां अलीशाने त्याला विचारिलें,
"गेहजी, तूं कोठून आलास?" तेव्हां तो बोलला,
"तुझा चाकर कोणीकडेहि गेला नाहीं." २६
मग तो त्याला ह्मणाला, "जेव्हां तो माणूस तुला
भेटायास आपल्या रथावरून मुरडला, तेव्हां मा-
झें मन तेथें गेलें नव्हतें कीं काय? रुपें घ्यावें,
किंवा वस्त्रें, किंवा जैतूनमळे, किंवा द्राक्षमळे, किं-
वा बकरें, किंवा गुरें, किंवा चाकर, किंवा चाकरि-
णी घ्याव्या, असी वेळ आहे कीं काय? २७ तर
नामानाचा कोड तुला व तुझ्या संतानाला सर्व-
काळ लगटून राहील." तेव्हां तो बर्फाच्या रंगा-
सारिखा कोडी होऊन त्याच्यापुढून निघाला.

## अध्याय ६.

मग भविष्यवाद्यांच्या शिष्यांनी अलीशाला ह्म-
टलें, "पाहा, जेथें आह्मी तुझ्याजवळ राहतों,
तें ठिकाण संकोचित आहे. २ आतां आह्मी
यार्देनेस जाऊन एकएकाने एक वासा तेथून घेऊन
यावें, आणि आपल्यास राहायाला ठिकाण करूं."
तेव्हां त्याने सांगितलें, "जा." ३ नंतर एका-
ने ह्मटलें, "आतां त्वां राजी होऊन आपल्या
सेवकांच्या संगतीं यावें." मग तो बोलला, "मी
येतों." ४ आणि तो त्यांच्यासंगतीं गेला असतां
ते यार्देनेस जाऊन लाकडें तोडायाला लागले.
५ तेव्हां कोणीएक सोट पाडीत असतां, लोखंड
पाण्यांत पडलें; मग तो ओरडून बोलला, "हे
माझ्या धनी, हाय हाय! तें तर मागून आणिलें
होतें." ६ तेव्हां देवाच्या माणसाने विचारिलें,
"कोणीकडे पडलें?" तेव्हां त्याने त्याला ठिकाण
दाखविलें; मग त्याने लाकूड तोडून तेथें टाकिलें,
तेव्हां तें लोखंड तरंगून आलें. ७ तेव्हां त्याने
सांगितलें, "तूं आपल्याजवळ उचलून घे." आ-
णि त्याने आपला हात लांबवून तें घेतलें.

८ अणखी अरामाचा राजा इस्राएलासीं ल-
ढत होता; तेव्हां तो आपल्या सेवकांजवळ असा
विचार करीत असे कीं, "माझा तळ अमुक अ-
मुक ठिकाणीं होईल." ९ इकडे देवाच्या माण-
साने इस्राएलाच्या राजाजवळ पाठवून सांगितलें
कीं, "तूं संभाळ; पलिकडे त्या ठिकाणीं जाऊं
नको, कां तर तेथें अरामाचे तळ आहेत. १०
नंतर ज्या ठिकाणाविषयीं देवाच्या माणसाने
इस्राएलाच्या राजाला सांगितलें होतें, तेथें त्याने
पाठविल्यावर सूचना घेतली; असें त्याने आपलें
संरक्षण केलें, एकदांच किंवा दोनदाच असें नाहीं.
११ तेव्हां अरामाचा राजा त्या गोष्टीमुळें मनांत
फार त्रासला, आणि त्याने आपले सेवक बोला-
वून त्यांस ह्मटलें, "इस्राएलाच्या राजाच्या पक्षांत
आपल्यांतला कोण आहे, हें तुह्मी मला सांगत
नाहीं कीं काय?" १२ तेव्हां त्याच्या एका सेव-
काने सांगितलें, "हे माझ्या प्रभू राजा, कोणी
नाहीं; तरी अलीशा भविष्यवादी जो इस्राएलांत
तो ज्या गोष्टी तूं आपल्या निजायाच्या खोलींत
बोलतोस त्या इस्राएलाच्या राजाला सांगतो."
१३ मग त्याने सांगितलें, "तुह्मी जाऊन तो कोठें
आहे, हें पाहा; ह्मणजे मी पाठवून त्याला धरीन."
तेव्हां त्याला कोणी असें कळविलें कीं पाहा, दो-
थानांत आहे. १४ मग त्याने तेथें स्वार व रथ
व मोठें लष्कर पाठविलें, आणि त्यांनी रात्रीं जाऊन
त्या नगराला वेढिलें.

१५ तेव्हां देवाच्या माणसाचा चाकर पहाटे
होऊन उठला आणि बाहेर गेला, तर लष्कर,

सैन्य व स्वार व रथ, इहींकरून तें नगर वेढलेलें
होतें; मग त्या तरण्याने त्याला ह्मटलें, "हे मा-
झ्या धनी, हाय हाय; आपण कसें करावें?" १६
तेव्हां तो बोलला, "तूं भिऊं नको, कारण कीं जे
त्याच्या पक्षांत त्यापेक्षां आपल्या पक्षांतले अधिक
आहेत." १७ मग अलीशाने असी प्रार्थना
केली कीं, "हे परमेश्वरा, याने पाहावें, ह्मणून
त्वां कृपेने त्याचे डोळे उघडावे." तेव्हां परमे-
श्वराने त्या तरण्याचे डोळे उघडले आणि त्याने
अवलोकन केलें, तर पाहा, अलीशाच्या चहुंकडे
अग्नीच्या स्वारानी व रथानी तो डोंगर भरलेला
होता. १८ त्यानी तर त्यावर तळ धरिला हो-
ता, ह्मणून अलीशाने परमेश्वराची प्रार्थना
करून ह्मटलें; "तूं कृपेने या राष्ट्राला अंधळे-
पणाने मार." तेव्हां अलीशाच्या प्रार्थनेप्रमाणें
त्याने त्यांस अंधळेपणाने मारिलें. १९ नंतर
अलीशाने त्यांस ह्मटलें, "ही वाट नव्हे आणि हें
नगर नव्हे; तुह्मी माझ्यामागें या, ह्मणजे तुह्मी
ज्या माणसाचा शोध करितां, त्याच्याजवळ मी
तुह्मांस नेईन." मग त्याने त्यांस शोमरोनांत नेलें.
२० आणि ते शोमरोनांत पोहंचले असतां असें
झालें कीं अलीशाने ह्मटलें, "हे परमेश्वरा, यानी
पाहावें ह्मणून त्वां यांचे डोळे उघडावे." तेव्हां
परमेश्वराने त्यांचे डोळे उघडले, आणि त्यानी
अवलोकन केलें; तर पाहा, आपण शोमरोनाच्या
मध्यें आहों. २१ नंतर इस्राएलाच्या राजाने त्यांस
पाहिल्यावर अलीशाला विचारिलें, "हे माझ्या
बापा, ह्यांस मारूं? मारूं कीं काय?" २२ तेव्हां
त्याने सांगितलें, "मारूं नको; ज्यांस त्वां आपल्या
तरवारीने व आपल्या धनुष्याने पाडाव केलें, त्यांस
मारावें कीं काय? त्यांच्यापुढें अन्न पाणी वाढ; मग
त्यानी खाल्ल्या पिल्यानंतर आपल्या धन्याजवळ
जावें." २३ तेव्हां त्याने त्यांस मोठी मेजमानी
केली, आणि त्यानी खाणें पिणें केल्यावर त्याने
त्यांस निरोप दिल्हे आणि ते आपल्या धन्याजवळ
गेले; आणि अरामी टोळ्या इस्राएलाच्या देशांत
फिरून आल्या नाहींत.

२४ त्यानंतर असें झालें कीं अरामाचा राजा
बेनहदाद याने आपलें सर्व सैन्य मिळवून वर
जाऊन शोमरोनाला वेढा घातला. २५ वास्तव
शोमरोनांत मोठा दुकाळ झाला, आणि पाहा
गाढवाचें मुंडकें ऐशीं रुपयांवर आणि पावकाब
हिपल पांच रुपयांवर जात होतें. २६ त्यावर
इस्राएलाचा राजा गांवकुसावरून चालत असतां,
असें झालें कीं एका स्त्रीने त्याला ओरडून ह्मट-
लें, "हे प्रभू राजा, रक्षण कर." २७ मग त्याने
ह्मटलें, "परमेश्वर तुझें रक्षण करीत नाहीं, तर
मी तुझें रक्षण कोठून करूं? खळ्यांतून किंवा
द्राक्षकुंडांतून काय? २८ आणखी राजाने तिला
विचारिलें, "तुला काय पाहिजे?" तेव्हां तिने
सांगितलें, "या स्त्रीने मला ह्मटलें, तूं आपला
पुत्र दे, ह्मणजे आपण आज त्याला खाऊं, आणि
उद्यां माझा पुत्र खाऊं. २९ वास्तव माझा पुत्र
आह्मी सिजवून खाल्ला; नंतर दुसऱ्या दिवसीं
म्यां तिला ह्मटलें, "तूं आपला पुत्र दे ह्मणजे
आपण त्याला खाऊं.' तर तिने आपला पुत्र लप-
विला आहे."

३० तेव्हां राजाने त्या स्त्रीच्या गोष्टी ऐकिल्या
असतां, असें झालें कीं त्याने आपलीं वस्त्रें फाड-
लीं, आणि तो गांवकुसावरून चालत असतां, लो-
कानी अवलोकन केलें; तर पाहा, त्याच्या अंगीं
आंत तरट दिसलें. ३१ तेव्हां त्याने ह्मटलें,
"शाफाटाचा पुत्र अलीशा याचें शिर जर आज
त्यावर राहील, तर देव मला तितकें आणि अ-
धिकहि करो." ३२ आणि अलीशा आपल्या
घरीं बसला होता, आणि त्याच्याजवळ वडील
बसले होते; राजाने तर आपल्यापुढें कोणी दूत
पाठविला असतां, तो त्याजवळ आल्यापूर्वी त्याने
त्या वडिलांस ह्मटलें, "त्या घातक पुरुषाने माझा
शिरछेद करायाकरितां पाठविला आहे, हें तुह्मांस
दिसून आलें कीं काय? तुह्मी संभाळा; तो दूत
आला तेव्हां तुह्मी दार लावून त्याला दारासीं
प्रतिबंध करा; त्याच्यामागें त्याच्या धन्याच्या पा-
वलांचा शब्द होत नाहीं कीं काय?" ३३ असा
तो त्यांसीं बोलत असतां, तितक्यांत पाहा, दूत
त्याजवळ आला; तेव्हां हा बोलला, "पाहा, हें
दुःख परमेश्वराकडून आहे; मी परमेश्वराची
आणखी वाट कशाला पाहूं?"

## अध्याय ७.

मग अलीशा बोलला, "तुह्मी परमेश्वराचें
वचन ऐका; परमेश्वर असें सांगतो, 'उद्यां
सुमारें या वेळेस शोमरोनाच्या वेसींत सात शेर
सपीठ व चवदा शेर सातू शेकेलशेकेल रुप्या-
वर होतील." २ तेव्हां ज्या सर्दाराच्या हातावर
राजा टेंकत होता, त्याने देवाच्या माणसाला असें
उत्तर केलें कीं, पाहा, परमेश्वराने आकाशाला
भोकें केलीं असतां, तसी गोष्ट घडेल कीं काय!"
नंतर तो बोलला, "पाहा, तूं आपल्या डोळ्यानी
पाहसील, परंतु त्यांतलें खाणार नाहींस.
३ तेव्हां वेसीच्या दाराशीं चार कोडी माणसें
होतीं, आणि त्यानी एकमेकाला ह्मटलें, आपण
मरूं तोंपर्यंत एथें कां बसावें? ४ जर आपण
नगरांत जाऊं ह्मणतों, तर नगरांत दुकाळ ह्मणून
तेथें मरूं; आणि जर एथें बसतों तरी मरूं; या-
स्तव आतां आपण अराम्यांच्या सैन्याकडे जाऊन
फितावें; जर ते आह्मास वांचवितील तर आपण
जगूं, आणि जर आह्मास मारतील तर आपण
मरूं." ५ असे ते अवशीस उठून अराम्यांच्या
छावणीस गेले; तेव्हां अरामी छावणीच्या कांठा-
सीं पोहंचले असतां, पाहा, तेथें कोणी नव्हता.
६ कां कीं प्रभूने अरामी सैन्यास रथांचा शब्द
व घोड्यांचा शब्द व मोठ्या सैन्याचा शब्द ऐक-
विला होता; यास्तव ते एकमेकासीं बोलले, "पाहा,
इस्राएलाच्या राजाने हित्त्यांचे राजे व मिसऱ्यांचे
राजे आह्मावर यायाला खंडणी करून आमच्या-
विरुद्ध ठेविले आहेत." ७ तेव्हां ते अवशीस उठून
पळाले होते, असे कीं आपल्या राहोट्या व आपले
घोडे व आपलीं गाढवें यांसहित छावणी जसी
होती तसीच टाकून आपल्या जिवासाठीं पळाले
होते. ८ तर ते कोडी छावणीच्या कांठास पोहं-
चले असतां, त्यानी एका राहोटींत जाऊन खाणें
पिणें केलें, नंतर तेथलें रुपें व सोनें व वस्त्रें घेऊन
जाऊन लपविलीं; मग ते माघारे येऊन दुसऱ्या
राहोटींत गेले, आणि त्यानी तेथलेंहि घेऊन जा-
ऊन लपविलें. ९ नंतर ते एकमेकाला ह्मणाले,
"आपण आज बरें करीत नाहीं; हा दिवस सु-
वर्त्तमानाचा आहे, आपण उगेच राहतों, सकाळीं
उजेडे तोंपर्यंत जर आपण उशीर करितों तर आ-
पणास अनर्थ प्राप्त होईल; तर आतां चला,
आपण राजाच्या घरीं जाऊन सांगू." १० असें
त्यानी जाऊन नगराच्या वेसकरास हाक मारिली,
आणि त्यास असें सांगितलें कीं, "आह्मी अरा-
म्यांच्या छावणीस गेलों होतों, तर पाहा, तेथें
कोणी नव्हता, आणि माणसांचा शब्द नव्हता;
केवळ बांधलेले घोडे व बांधलेलीं गाढवें व रा-
होट्या जशा, तशाच होत्या; ११ मग त्याने
दुसऱ्या वेसकरास हाक मारिली आणि त्यानी
आंत जाऊन राजाच्या घरीं सांगितलें.
१२ तेव्हां राजाने रात्रीं उठून आपल्या चाक-
रास ह्मटलें, "अराम्यानी आह्माविषयीं जें केलें
आहे, तें आतां मी तुह्मास सांगतों; आह्मी भुकेले
आहों, हें त्यास ठाऊक आहे, यास्तव ते बाहेरल्या
ठिकाणीं जाऊन लपले असतां ह्मणतात कीं, 'जेव्हां
ते नगरांतून निघतील, तेव्हां आह्मी त्यांस जितेच
धरून नगरांत शिरूं." १३ तेव्हां त्याच्या चा-
करांतून एकाने असें उत्तर केलें कीं, "आतां बा-
कीचे स्वार, जे एथें उरले आहेत त्यांतले पांच,
पाहा, ते इस्राएलाचा सर्व समुदाय जो एथें उर-
लेला आहे, त्यासारिखे आहेत ते कोणी तरी
घ्यावे; पाहा, ते इस्राएलाचा सर्व समुदाय जो
संपला गेला, त्यासारिखे आहेत; तर त्यांस आ-
पण पाठवून पाहूं." १४ मग त्यानी दोन रथांचे
घोडे घेतले आणि राजाने अराम्यांच्या सैन्यामागें
पाठवून ह्मटलें, "तुह्मी जाऊन पाहा." १५ आणि
ते त्यांच्यामागें यार्देनेपर्यंत गेले; तर पाहा, वस्त्रें
व डागिणे, जे अराम्यानी आपल्या घाईने टाकिले
होते, तिहींकरून सर्व मार्ग भरलेला होता; ह्मणून
त्या दूतानी माघारें येऊन राजाला सांगितलें. १६
नंतर लोकानी निघून अराम्यांची छावणी लुटली;
यास्तव परमेश्वराच्या गोष्टीप्रमाणें सात शेर
सपीठ व चवदा शेर सातू शेकेलशेकेल रुप्यावर
झालें. १७ तेव्हां राजा ज्या सर्दाराच्या हातावर
टेंकत होता, त्याला त्याने वेसीवर नेमून ठेविलें;
यास्तव वेसींतल्या लोकानी त्याला तुडविल्यामुळें
तो मेला; जेव्हां राजा देवाच्या माणसावर उत-
रून गेला होता, तेव्हां त्याने जी गोष्ट सांगितली
होती, तिजप्रमाणें मेला. १८ असें देवाच्या मा-

मसाने राजाजवळ सांगितलेल्याप्रमाणें झालें; म्ह-
णजे त्याने सांगितलें होतें कीं, "उद्यां सुमारें यां
वेळेस शोमरोनाच्या वेसींत चवदा शेर सातू व
सात शेर सपीठ शेकेलशेकेल रुप्यावर होईल."
१९ तेव्हां त्या सर्दाराने देवाच्या माणसाला असें
उत्तर केलें होतें कीं, "पाहा, परमेश्वराने आ-
काशाला भोकें केलीं असतां, त्या गोष्टीप्रमाणें
घडेल कीं काय?" मग त्याने म्हटलें होतें कीं,
"पाहा, तूं आपल्या डोळ्यांनी पाहसील, परंतु त्यां-
तलें खाणार नाहींस." २० म्हणून त्याला तसें
झालें, कां कीं वेसींतल्या लोकांनी त्याला तुडवि-
ल्याने तो मेला.

## अध्याय ८.

आणि ज्या स्त्रीचा पुत्र अलीशाने जिवंत केला
होता, तिला त्याने असें सांगितलें कीं, "तूं
आपल्या घरच्यांसुद्धां उठून जाऊन जेथें प्रवास
करसील, तेथें प्रवास कर; कारण कीं परमेश्व-
राने दुकाळ बोलाविला आहे, आणि तो देशावर
सात वर्षे लागूनच राहील." २ त्यावर त्या स्त्रीने
उठून देवाच्या माणसाने सांगितल्याप्रमाणें केलें;
म्हणजे ती आपल्या घरच्यांसुद्धां पलिष्ट्यांच्या
देशांत जाऊन सात वर्षे प्रवासी राहिली. ३
आणि सात वर्षांच्या शेवटीं असें झालें कीं ती
स्त्री पलिष्ट्यांच्या देशांतून माघारी आली, मग ती
आपल्या घरासाठीं व आपल्या शेतासाठीं राजा-
जवळ विनंती करायास बाहेर गेली. ४ राजाने
तर देवाच्या माणसाचा तरणा गेहजी याला असें
म्हटलें होतें कीं, "अलीशाने जीं मोठीं कर्मे केलीं,
तीं अवघीं आतां मला सांग." ५ मग त्याने
मेलेल्याला कसें जिवंत केलें होतें, त्यांविषयीं तो
राजाजवळ सविस्तर सांगत असतां असें झालें कीं
पाहा, ज्या स्त्रीचा पुत्र त्याने जिवंत केला हो-
ता, ती आपल्या घरासाठीं व आपल्या शेतासाठीं
राजाजवळ ओरडली; तेव्हां गेहजीने सांगितलें,
"हे माझ्या प्रभू राजा, ती हीच स्त्री, आणि
तिचा जो पुत्र अलीशाने जिवंत केला होता तो
हाच." ६ नंतर राजाने त्या स्त्रीला विचारिलें,
आणि तिने त्याला सविस्तर सांगितलें; मग राजाने
तिच्याबरोबर एक कारभारी देऊन सांगितलें कीं,
"तिचें जें तें अवघें, आणि तिनें ज्या दिवसीं देश
सोडिला तेव्हांपासून आजपर्यंत शेताचें सर्व उ-
त्पन्न तिला माघारें देवीव."
७ अलीशा तर दामासेकास गेला, तेव्हां अ-
रामाचा राजा बेनहदाद दुखणाईत होता, आणि
त्याला कोणी असें सांगितलें कीं, देवाचा माणूस
इकडे आला आहे. ८ तेव्हां राजाने हजाएला-
ला म्हटलें, "तूं आपल्या हातीं भेट घेऊन देवा-
च्या माणसाला भेटायास जा, आणि मी या दुख-
ण्यापासून बरा होईन किंवा नाहीं, याविषयीं त्या-
कडून परमेश्वराला विचार." ९ मग हजाए-
लाने त्याला भेटायास जाण्यासाठीं आपल्या हातीं
भेट, म्हणजे दामासेकांतल्या सर्व उत्तम वस्तू यां-
तून चाळीस उंटांचीं ओझीं घेतलीं; असें जाऊन
व त्याच्यापुढें उभे राहून त्याने म्हटलें, "तुझें लें-
करूं अरामाचा राजा बेनहदाद याने मला तुझ्या-
जवळ असें विचारायाला पाठविलें आहे कीं, 'मी
या दुखण्यापासून बरा होईन किंवा नाहीं?" १०
तेव्हां अलीशाने त्याला म्हटलें, "तूं जाऊन त्या-
ला सांग 'तूं बरें व्हावेंच खरें;' तरी परमेश्व-
राने मला असें दाखविलें आहे कीं तो खचीत
मरेल." ११ तेव्हां त्याने आपलें तोंड स्थिर
करून असी टक लाविली कीं त्याला लाज वाट-
ली; देवाचा माणूस तर रडला. १२ वास्तव
हजाएलाने विचारिलें, "माझा धनी कां रडतो?"
तेव्हां त्याने सांगितलें, "कारण कीं तूं इस्राएलाच्या
संतानाचें जें वाईट करसील, तें मला कळलें आ-
हे; त्यांच्या बंदिस्तीच्या ठिकाणास आग लावसील,
आणि त्यांच्या नव्या तरण्यांस तरवारीने मार-
सील, आणि त्यांच्या बाळकांस आपटून टाकसील,
आणि त्यांतल्या ज्या गरोदर त्यांस फोडसील."
१३ तेव्हां हजाएल बोलला, "तर तुझा चाकर
कुत्रा आहे म्हणून तसी अघटित गोष्ट करील
काय?" तेव्हां अलीशा बोलला, "तूं अरामावर
राजा होसील, हें परमेश्वराने मला दाखविलें
आहे." १४ मंतर तो अलीशाजवळून निघून
आपल्या धन्याजवळ गेला; तेव्हां त्याने त्याला
विचारिलें, "अलीशाने तुला काय सांगितलें?"
आणि त्याने उत्तर केलें, "तूं बरें व्हावेंच खरें,
म्हणून त्याने मला सांगितलें." १५ मग दुसऱ्या

दिवसीं असें झालें कीं त्याने जाड वस्त्र घेऊन पा-
ण्यांत बुचकळून त्याच्या तोंडावर पसरलें, यास्तव
तो मेला, आणि त्याच्या ठिकाणीं हजाएलाने राज्य
केलें.

१६ इकडे यहोशाफाट यहूदावर राजा असतांहि
इस्राएलाचा राजा आहाबाचा पुत्र योराम याच्या
पांचव्या वर्षी यहूदाचा राजा यहोशाफाट याचा
पुत्र यहोराम राज्य करूं लागला. १७ तो राज्य
करूं लागला, तेव्हां बत्तीस वर्षांचा होता, आणि
त्याने यरुशालेमांत आठ वर्षे राज्य केलें. १८
परंतु तो इस्राएलाच्या राजांच्या मार्गाने चालला,
असें आहाबाच्या घराण्याने केलें, तसें त्याने केलें,
कां तर आहाबाची कन्या त्याची बायको होती,
म्हणून त्याने परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई केली.
१९ तरी परमेश्वराने आपला सेवक दावीद
याकरितां यहूदाचा नाश करायाला इच्छिलें नाहीं;
कां तर त्याने त्याविषयीं सांगितलें होतें कीं, "मी
त्याला त्याच्या संतानांत दिवा देऊन सर्वकाळ
ठेवीन." २० त्याच्या दिवसांत अदोमी यहूदा-
च्या हाताखालून निघून उलटले, आणि त्यांनी
आपल्यांवर राजा करून ठेविला. २१ त्यावर
यहोराम आपल्या सर्व रथांसुद्धां पलिकडे जाई-
रास गेला, आणि तो रात्रीं उठला असतां, त्याने
आपल्या चहुंकडे आलेल्या अदोम्यांस रथांच्या
सर्दारांसुद्धां मारिलें, नंतर ते लोक आपापल्या
राहोटीस पळून गेले. २२ असा अदोम यहूदा-
च्या हाताखालून निघून आजच्या दिवसापर्यंत
उलटलेला राहिला, अपखी त्याच वेळेस लिब्ना
उलटला. २३ यहोरामाच्या राहिलेल्या गोष्टी,
आणि त्याने जें सर्व केलें, तीं यहूदाच्या राजांच्या
इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं
काय? २४ यहोराम तर आपल्या वडिलांच्यासं-
गतीं निजला, आणि दावीदाच्या नगरांत आपल्या
वडिलांच्यासंगतीं पुरला गेला; आणि त्याचा पुत्र
अहाज्या याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

२५ इस्राएलाचा राजा आहाबाचा पुत्र योराम
याच्या बाराव्या वर्षी यहूदाचा राजा यहोराम
याचा पुत्र अहाज्या राज्य करूं लागला. २६
अहाज्या राज्य करूं लागला, तेव्हां तो बावीस
वर्षांचा होता; आणि त्याने यरुशालेमांत एक वर्ष
राज्य केलें; त्याच्या आईचें नांव अथाल्या, आणि
ती इस्राएलाचा राजा अम्री याची कन्या होती.
२७ त्याने तर आहाबाच्या घराण्याच्या मार्गाने
चालून आहाबाच्या घराण्यासारिखें परमेश्वरा-
च्या दृष्टींत दुष्टाई केली, कां तर तो आहाबाच्या
घराण्याचा जावई होता. २८ आणि आहाबाचा
पुत्र योराम अराम्यांचा राजा हजाएल यासीं ल-
ढायास रामोथ गिलादांत गेला, तेव्हां अराम्यांनी
योरामाला हाणिलें. २९ यास्तव योराम राजा
अरामाचा राजा हजाएल यांसीं त्या राम्यांत ल-
ढतांना जे घाव अराम्यांनी त्याला मारिले होते,
त्यांपासून बरा व्हायाला माघारा इज्रेलांत आला;
तेव्हां यहूदाचा राजा यहोरामाचा पुत्र अहाज्या
आहाबाचा पुत्र योराम याला पाहायास खालीं
इज्रेलांत गेला, कारण कीं तो दुखणाईत होता.

## अध्याय ९.

तेव्हां भविष्यवादी अलीशा याने भविष्यवाद्यांत
एक तरणा बोलावून त्याला सांगितलें, "तूं आ-
पली कंबर बांधून, ही तेलाची कुपी आपल्या हातीं
घेऊन रामोथ गिलादास जा. २ आणि तेथें
पोहंचल्यावर, निम्शीचा पुत्र यहोशाफाट याचा
पुत्र येहू याला तेथें शोधून पाहा, मग आंत गेल्या-
वर त्याला त्याच्या सवंगड्यांतून उठवून आंतल्या
खोलींत ने. ३ आणि तेलाची कुपी घेऊन त्या-
च्या मस्तकावर ओतीत असतां असें बोल कीं,
'परमेश्वर असें सांगतो, 'म्यां तुला इस्राएला-
वर राज्य करायास अभिषेक केला आहे; नंतर
दार उघडून पळ, उशीर करूं नको."

४ यावर तो तरणा भविष्यवादी तरणा रामोथ
गिलादास गेला. ५ आणि पोहंचल्यावर पाहा,
सैन्याचे सर्दार बसले असतां तो बोलला, "हे
सर्दारा, मला तुझ्याजवळ कार्य आहे." नंतर येहू
बोलला, "आम्हां सर्वांत कोणाच्या जवळ?" तेव्हां
हा बोलला, "हे सर्दारा, तुझ्याजवळ." ६ मग
तो उठून घरांत गेला, नंतर त्याने त्याच्या मस्तका-
वर तेल ओतितांना त्याला म्हटलें, "इस्राएलाचा
देव परमेश्वर असें सांगतो कीं, 'म्यां तुला पर-
मेश्वराच्या लोकांवर म्हणजे इस्राएलावर राज्य
करायास अभिषेक केला आहे. ७ आणि तूं

आपला धनी आहाब याच्या घराण्याला मारून
माझे सेवक भविष्यवादी यांच्या रक्तपाताचें सूड,
म्हणजे परमेश्वराच्या सर्व सेवकांच्या रक्तपाताचें
सूड ईजेबेलीचा सूड घ्यावा. ८ असा आहा-
बाच्या सर्व घराण्याचा नाश होईल, आणि आ-
हाबाचा भिंतमुत्या आणि इस्राएलांतला कोंडलेला
व टाकलेला यांस मी मारून टाकीन. ९ तेणे-
करून आहाबाच्या घराण्याला नबाटाचा पुत्र य-
राबाम याच्या घराण्यासारिखें आणि अहीयाचा
पुत्र बाशा याच्या घराण्यासारिखें करीन. १०
आणि ईजेबेलीला इज्रेलाच्या शेतांत कुत्रे खातील
तिला कोणी पुरणार नाहीं." मग तो दार उघडून
पळाला.

११ तेव्हां येहू आपल्या धन्याच्या सेवकाजवळ
गेला, तेव्हां कोणी त्याला विचारिलें, "कुशळ आहे
कीं काय? तो वेडा तुझ्याजवळ कां आला होता?"
तेव्हां त्याने त्यांस म्हटलें, "तुम्हास तो पुरुष व
त्याचा विचार ठाऊक आहे." १२ नंतर ते म्ह-
णाले, "हें खोटें; तर आतां तूं आम्हास सांग."
मग तो म्हणाला, "त्याने मला असें म्हटलें कीं,
परमेश्वर असें सांगतो, 'म्या तुला इस्राएलावर
राज्य करायास अभिषेक केला आहे.'" १३ नंतर
त्यांनी उतावळी करून एकएकानें आपापलें वस्त्र
घेऊन त्याच्या ठिकाणीं काळमानांच्या सपाटीवर
घातलें, आणि करणा वाजवून म्हटलें, "येहू राजा
झाला." १४ असा निम्शीचा पुत्र यहोशाफाट
याचा पुत्र येहू याने योरामावर फितूर केला; यो-
राम तर सर्व इस्राएलांसुद्धां आरामाचा राजा ह-
जाएल यामुळें रामोथगिलादावर टपला होता.
१५ परंतु योराम राजा अरामाचा राजा हजाएल
यासीं लढतांना जे घाव अराम्यानी त्याला मारिले
होते, त्यांपासून तो बरा होण्यासाठीं माघारा इ-
ज्रेलास फिरला होता; तेव्हां येहू म्हणाला, "जर
तुमच्या मनांत असेल, तर इज्रेलास जाऊन सां-
गायाला कोणी निभून नगरांतून जाऊं देऊं नये."
१६ मग येहू रथावर बसून इज्रेलाकडे चालला:
कारण कीं योराम तेथें निजला होता, आणि यहू-
दाचा राजा अहाज्या योरामाला पाहायाला खा-
लीं गेला होता. १७ तेव्हां एका पाहेरकऱ्याने
इज्रेलांतल्या बुरुजावर उभें राहून येहूचा थवा
येत आहे असें पाहिलें; मग, "मला थवा दिस-
तो," असें त्याने सांगितलें; तेव्हां योरामाने सां-
गितलें, "स्वार सिद्ध कर आणि त्यांस भेटायाला
पाठवून त्याने विचारावें, 'शांति आहे कीं काय?'"
१८ तेव्हां घोड्याच्या स्वाराने जाऊन त्याला भे-
टून म्हटलें, "राजाने असें विचारिलें आहे, 'शां-
ति आहे कीं काय?'" मग येहू बोलला, "तुला
शांतीचें काय? तूं वळून माझ्यामागें जा." यास्तव
पाहेरकऱ्याने सांगून कळविलें कीं, "दूत त्यांकडे
जाऊन पोहंचला, परंतु माघारा येत नाहीं." १९
नंतर त्याने दुसरा घोड्याचा स्वार पाठविला, आणि
तो त्यांच्याजवळ जाऊन बोलला, "राजाने असें
विचारिलें आहे, "शांति आहे कीं काय?" तेव्हां
येहूने म्हटलें, "तुला शांतीचें काय? तूं वळून
माझ्यामागें जा." २० मग पाहेरकऱ्याने असें
सांगितलें कीं, "तो त्यांच्याजवळ जाऊन पोहंचला,
परंतु माघारा येत नाहीं; हाकणें तर निम्शीचा
पुत्र येहू याच्या हाकण्यासारिखें आहे, कारण कीं
वेगाने हाकितो." २१ तेव्हां योरामाने कोणी-
एकाला "जूंप," असें सांगितलें, आणि त्यानी त्याचा
रथ जुंपला; मग इस्राएलाचा राजा योराम व
यहूदाचा राजा अहाज्या, हे आपापल्या रथाने निघून
येहूला भेटायाला गेले; आणि नाबोथ इज्रेलकर
याच्या शेतांत त्याला भेटले. २२ तेव्हां योरा-
माने येहूला पाहिलें असतां, असें झालें कीं त्याने
विचारिलें, "येहू, शांति आहे कीं काय?" तेव्हां
तो बोलला, "तुझी आई ईजेबेल इचे व्यभिचार
व इचीं जादूकर्मे एवढीं असतां, शांति कसी?"
२३ त्यावर योरामाने आपले हात फिरवून पळ-
तांना अहाज्याला म्हटलें, "अहाज्या, दगा आहे."
२४ तेव्हां येहूने आपल्या हातीं धनुष्य घेऊन
ओढून योरामाला त्याच्या बाहूंमध्यें बाण मारिला,
आणि तो त्याच्या हृदयांतून पार गेला, यास्तव
तो आपल्या रथांत वांकून पडला. २५ मग ये-
हूने आपला सर्दार बिदकार याला सांगितलें, "तूं
त्याला उचलून नाबोथ इज्रेलकर याच्या शेतांत
टाक; कारण तूं आठवण कर कीं त्याचा बाप आ-
हाब याच्यामागें उभयतां मी आणि तूं बसून जात
होतों, तेव्हां परमेश्वराने हा भार त्यावर घात-
ला होता. २६ परमेश्वराने असें सांगितलें

कीं, 'म्या नाबोथाचें रक्त व त्याच्या पुत्रांचें रक्त
काल निश्चयें पाहिलें आहे;' अणखी परमेश्वरा-
ने सांगितलें, 'मी तुझें याच शेतांत फेडून देईन;'
तर आतां तूं परमेश्वराच्या सांगण्याप्रमाणें त्याला
उचलून शेतांत टाक."

२७ यहूदाचा राजा अहाज्या तर पाहून बा-
गांतल्या घराच्या वाटेने पळाला; तरी येहूने त्या-
च्या पाटीस लागून इबलामाजवळच्या गूराच्या चढ-
णीवर सांगितलें, "त्यालाहि रथांत मारा." मग तो
मगिद्दोस पळून गेला, आणि तेथें मेला. २८
नंतर त्याच्या चाकरानी त्याला रथावर यरूशा-
लेमास नेलें, आणि त्याच्या कबरेंत त्याच्या व-
डिलांच्यासंगतीं दावीदाच्या नगरांत त्याला पुरिलें.
२९ तर आहाबाचा पुत्र योराम याच्या अकरा-
व्या वर्षी अहज्या यहूदावर राज्य करूं लागला.
३० आणि येहू इज्रेलास आला तेव्हां ईजेबेलीने
ऐकिलें, आणि आपल्या डोळ्यांस रंग लावून व
आपलें डोकें बनावून तिने खिडकींतून डोका-
वलें. ३१ तेव्हां येहू दरवाज्यासीं आला अस-
तां, तिने ह्मटलें, "जिम्रीने आपल्या धन्याला
मारिलें त्याचें कुशल झालें कीं काय?" ३२ मग
त्याने आपली दृष्टि वरतीं खिडकीकडे लावून ह्म-
टलें, "कोण आहे? माझ्याकडे कोण?" तेव्हां दोघां
तिघां हिजड्यानी त्याच्याकडे डोकावलें. ३३
तेव्हां त्याने सांगितलें, "तुह्मी तिला खालीं टा-
का." मग त्यानी तिला खालीं टाकिलें, आणि ति-
चें कांहीं रक्त भिंतीवर व घोड्यांवर उडालें, आणि
त्याने तिला तुडविलें. ३४ मग तो आंत गेला, आ-
णि खाणें पिणें करून त्याने ह्मटलें, "आतां तुह्मी
त्या शापित बायकोचा शोध करून तिला पुरा;
कारण कीं ती राजाची कन्या आहे." ३५ त्या-
वर ते तिला पुरायाला गेले, परंतु करोटी व पाय
व हातांचे पंजे याखेरीज त्यांस तिचें कांहीं साप-
डलें नाहीं. ३६ नंतर त्यानी माघारें येऊन
त्याला सांगितलें; यास्तव त्याने ह्मटलें, "परमे-
श्वराचें जें वचन त्याने आपला सेवक एलीया
तिश्बी याकडून सांगितलें होतें तें हेंच होतें कीं,
'कुत्रीं इज्रेलाकडल्या शेतांत ईजेबेलीचें शरीर
खातील. ३७ आणि ईजेबेलीचें प्रेत इज्रेला-
कडल्या शेतांत भूमीच्या पाठीवर खतासारिखें
होईल, यास्तव 'ही ईजेबेल', असें कोणी ह्मणणार
नाहींत."

अध्याय १०.

आणखी शोमरोनांत आहाबाचें संतान सत्तर
पुरुष होते; यास्तव येहूने पत्रें लिहून इज्रे-
लांतले सर्दार, जे वडील आणि जे आहाबाच्या
घराण्याचे प्रतिपाळक, त्यांकडे शोमरोनास पाठ-
विलीं कीं, २ "आतां हें पत्र तुह्मांस पोहंचेल
तेव्हां तुमच्याजवळ तुमच्या धन्याचे पुत्र आणि
तुमच्याजवळ रथ व घोडे व बंदिस्तीचें नगर व
हत्यारें आहेत, ३ ह्मणून तुह्मी आपल्या धन्या-
च्या पुत्रांत जो उत्तम व योग्य, त्याला निवडून
त्याच्या बापाच्या राजासनावर बसवा, आणि आ-
पल्या धन्याच्या घराण्यासाठीं लढाई करा." ४
तेव्हां ते फारच भिऊन ह्मणाले, "पाहा, दोन राजे
त्याच्यापुढें टिकले नाहींत, तर आह्मी कसे टिकूं?"
५ मग जो घरावर व जो नगरावर, आणि जे
वडील व प्रतिपाळक, त्यानी येहूकडे पाठवून ह्म-
टलें, "आह्मी तुझे सेवक, आणि जें कांहीं तूं आ-
ह्मांस सांगसील, तें आह्मी करूं; आह्मी कोणा-
ला राजा करणार नाहीं; जें तुला बरें वाटेल, तें
कर." ६ नंतर त्याने त्यांस दुसऱ्याने पत्र लि-
हिलें कीं, "जर तुह्मी माझे आणि तुह्मी माझी
आज्ञा मानितां, तर आपल्या धन्याच्या पुत्रांचीं
मुंडकीं घेऊन उद्यां सुमारें या वेळेस इज्रेलांत
माझ्याजवळ या." राजाचे पुत्र तर सत्तर माणसें,
आणि नगरांतले मोठे लोक ज्यानी त्यांस वाढविलें,
त्यांच्याजवळ होतीं. ७ तेव्हां असें झालें कीं
तें पत्र त्यांच्याजवळ आलें असतां, त्यानी राजा-
चे पुत्र सत्तर माणसें यांस जिवें मारून त्यांचीं
मुंडकीं पाट्यांत घालून इज्रेलांत त्याकडे पाठविलीं.
८ नंतर दूताने जाऊन त्याला असें सांगितलें कीं,
"त्यानी राजपुत्रांचीं मुंडकीं आणिलीं आहेत."
तेव्हां त्याने सांगितलें, "तुह्मी वेसीच्या दारासीं
त्यांच्या दोन राशि करून सकाळपर्यंत ठेवा." ९
मग सकाळीं असें झालें कीं तो बाहेर येऊन उभा
राहिला, आणि सर्व लोकांस बोलला, "तुह्मी निति-
वंत; पाहा, म्या आपल्या धन्यावर फितूर करून
त्याला मारिलें, परंतु या सर्वांस कोणी मारिलें?

१० तर आतां तुह्मी समजा कीं परमेश्वराने
जें वचन आहाबाच्या घराण्याविषयीं सांगितलें
होतें त्यांतलें कांहीं खालीं पडणार नाहीं, कां कीं
परमेश्वराने आपला सेवक एलीया याकडून जें
सांगितलें होतें, तें पूर्ण केलें." ११ तर इज्रेलांत
आहाबाच्या घराण्यांतले जे उरले होते, त्या स-
र्वांस, आणि त्याच्या सर्व थोर मनुष्यांस आणि
त्याच्या नातलगांस, आणि त्याच्या याजकांस ये-
हूने जिवें मारिलें; त्याचें कांहीं शेष राहूं दिल्हें
नाहीं. १२ नंतर तो उठून जाऊन शोमरोनास
चालला; तर तो वाटेवर मेंढपाळांच्या कातरण्या-
च्या घराजवळ होता; १३ तेव्हां यहूदाचा राजा
अहाज्या याचे भाऊ येहूला अढळले, आणि त्याने
विचारिलें, "तुह्मी कोण?" मग त्यांनी सांगितलें,
"आह्मी अहाज्याचे भाऊ, आणि राजाचे पुत्र व
राणीचे पुत्र यांचें कुशल विचारायाला खालीं
आलों." १४ तेव्हां त्याने सांगितलें, "त्यांस
जितेच धरा." आणि त्यांनी त्यांस जितेच धरिलें,
नंतर त्यांस कातरण्याच्या घराच्या गर्त्तेजवळ
जिवें मारिलें; तीं बेताळीस माणसें होतीं, आणि
त्याने त्यांतला कोणी राहूं दिल्हा नाहीं. १५
मग तो तेथून गेल्यावर त्याला रेखाबाचा पुत्र
यहोनादाब त्याच्या भेटीस येतां अढळला; तेव्हां
त्याने त्यासीं क्षेमगोष्ट बोलून त्याला ह्मटलें, "जसें
माझें मन तुझ्या मनाच्या संगतीं नीट, तसें तुझें
मन आहे कीं काय? तेव्हां यहोनादाब बोलला,
"आहे." त्यावर तो बोलला, "असलें तर तूं आ-
पला हात मला दे." तेव्हां त्याने आपला हात
दिल्हा, आणि त्याने त्याला आपल्याजवळ रथांत
चढवून घेतलें. १६ आणि त्याने ह्मटलें, "तूं मा-
झ्यासंगतीं ये आणि परमेश्वरासाठीं जो माझा
आवेश, तो पाहा." असें त्यांनी त्याला त्याच्या रथांत
बसविलें. १७ नंतर शोमरोनांत पोहंचल्यावर
त्याने शोमरोनांत आहाबाचे जे उरले होते, त्यां-
चा नाश होई तोंपर्यंत त्या सर्वांस मारून टाकि-
लें; जसें परमेश्वराने एलीयाला सांगितलें
होतें, तसें केलें. १८ मग येहूने सर्व लोक
मिळवून त्यांस ह्मटलें, "आहाबाने बालाची सेवा
थोडी केली, परंतु येहू याची सेवा फार करील.
१९ तर आतां बालाचे सर्व भविष्यवादी, त्याचे सर्व
सेवक व त्याचे सर्व याजक यांस तुह्मी माझ्या
जवळ बोलावा; कोणी चुकला जाऊं नये, कारण
कीं मला बालाजवळ मोठा यज्ञ करायाचा आहे;
जर कोणी चुकून राहिला, तर तो जगणार नाहीं."
तथापि येहूने कपटाने तसें केलें, यासाठीं कीं आपण
बालाच्या भजणाऱ्यांचा नाश करावा. २० येहूने
तर असें सांगितलें, "तुह्मी बालाच्या पवित्र मेळ्या-
ची घोषणा करा." मग त्यांनी घोषणा केली. २१
आणि येहूने सर्व इस्राएलांकडे पाठविलें, यास्तव
बालाचे भजणारे सर्व आले; ह्मणजे जो आला
नाहीं, तसा कोणी राहिला नाहीं; आणि ते बाला-
च्या घरांत गेले, ह्मणून बालाचें घर जिकडे तिकडे
भरलें गेलें. २२ तेव्हां जो वस्त्रांच्या कोठडीवर
त्याला त्याने सांगितलें, "तूं बालाच्या सर्व भज-
णाऱ्यांसाठीं पोषाक काढ." तेव्हां त्याने त्यांच्या-
साठीं पोषाक काढिले. २३ मग येहूने रेखाबाचा
पुत्र यहोनादाब यासुद्धां बालाच्या घरीं जाऊन
बालाच्या भजणाऱ्यांस सांगितलें, "एथें तुमच्या-
मध्यें परमेश्वराचा कोणी भजणारा नसावा,
केवळ बालाचे भजणारे मात्र असावे, असें तुह्मी
शोध करून पाहा." २४ आणि यज्ञ व होम
करायास ते आंत गेले तेव्हां येहूने आपलीं ऐशीं
माणसें बाहेर ठेविलीं, आणि त्यांस असें सां-
गितलें, "जीं माणसें म्या तुमच्या हातीं आणून
दिल्हीं आहेत, त्यांतला जर कोणी निभावला, तर
त्याच्या जिवाबद्दल सोडणाऱ्याचा जीव जाईल."
२५ मग त्याने होमाची समाप्ति केली असतां,
असें झालें कीं येहूने हुजऱ्यांस व सर्दारांस सांगि-
तलें, "तुह्मी आंत जाऊन त्यांस मारा, कोणी बा-
हेर येऊं नये." यास्तव हुजऱ्यांनी व सर्दारांनी
त्यांस तरवारीने मारून बाहेर टाकिलें; नंतर ते
बालाच्या घराच्या नगरांत गेले. २६ तेव्हां
त्यांनी बालाच्या घरांतल्या मूर्त्ती काढून जाळून
टाकिल्या. २७ आणि बालाची मूर्त्ति फोडून
टाकिली; बालाचें घरहि मोडून त्याचें शेतखाणें
केले; आजपर्यंत तसे आहेत. २८ असा येहूने
बाल इस्राएलांतून नाहींसा केला. २९ तथापि
नबाटाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएलाला पापांत
घातलें, त्याचीं पापें यांपासून येहू फिरला नाहीं;
ह्मणजे बेथएलांत व दानांत जीं सोन्याचीं वासरें

वीं त्याने राखिलीं. ३० नंतर परमेश्वराने येहू-
ला ह्मटलें, "माझ्या दृष्टींत जें चांगलें तें करण्याने
त्वां बरें केलें, ह्मणजे जें माझ्या मनांत त्या अव-
घ्याप्रमाणें आहाबाच्या घराण्याचें केलें, त्याकरितां
चार पिढ्यांतले तुझ्या वंशाचे पुरुष इस्राएलाच्या
राजासनावर बसतील." ३१ तरी येहूने आप-
ल्या सर्व मनाने इस्राएलाचा देव परमेश्वर या-
च्या शास्त्राप्रमाणें चालायास संभाळलें नाहीं;
ज्या पापांत यराबामाने इस्राएलाला घातलें, त्या-
च्या त्या पापांपासून तो फिरला नाहीं. ३२ त्या
दिवसांत परमेश्वर इस्राएलाला कापून टाकूं ला-
गला; कसा? तर हजाएलाने इस्राएलाच्या सर्व
सीमेंत त्यांस मारिलें. ३३ यार्देनेपासून सूर्या-
च्या उगवतीस गादी व रऊबेनी व मनाश्शे यांचा
सर्व गिलाद प्रांत, ह्मणजे आर्णोन ओहळावर जें
अरोएर तेथला प्रांत व गिलाद व बाशान यांस
मारिलें. ३४ येहूच्या राहिलेल्या गोष्टी आणि जें
सर्व त्याने केलें व त्याचा अवघा पराक्रम, हीं इस्रा-
एलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहि-
लेलीं नाहींत कीं काय? ३५ मग येहू आपल्या
वडिलांच्यासंगतीं निजला आणि त्यांनी त्याला
शोमरोनांत पुरिलें, तेव्हां त्याचा पुत्र यहोवाहाज
याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें. ३६ तर ज्या
काळीं येहूने शोमरोनांत इस्राएलावर राज्य केलें
तो अठ्ठावीस वर्षांचा होता.

## अध्याय ११.

आणि अहाज्याची आई अथाल्या इने पाहिलें
कीं आपला पुत्र मेला तेव्हां तिने उठून
सर्व राजसंतानांचा नाश केला. २ तरी योराम
राजाची कन्या अहाज्याची बहीण यहोशेबा, ति-
ने अहाज्याचा पुत्र यहोवाश याला, राजाचे जे
पुत्र मारले जाणार होते त्यांतून चोरून घेतलें,
आणि त्याच्या दाईसुद्धां निजायाच्या खोलींत
ठेविलें; असें तिने त्याला अथाल्येपासून लप-
विलें, यास्तव तो मारला गेला नाहीं. ३ असा
तो तिच्यासंगतीं परमेश्वराच्या मंदिरीं सहा वर्षें
लपून राहिला, आणि अथाल्येने देशावर राज्य केलें.
४ नंतर सातव्या वर्षी यहोयादाने पाठवून शंभर
शंभरांच्या नायकांस हुजरे व दवडकरी यांसुद्धां
आणिलें असतां, आपल्यासंगतीं परमेश्वराच्या
मंदिरीं नेलें, आणि परमेश्वराच्या मंदिरांत त्यांचा
करार व शपथ वाहून घेऊन त्यांस राजाचा पुत्र
दाखविला. ५ तेव्हां त्याने त्यांस असी आज्ञा
केली, "तुह्मांस जें करायाचें तें हेंच आहे; ज्या
तुह्मांस शाब्बाथांत आंत येतात, त्या तुह्मांत ति-
सरा वांटा राजाच्या घराचें संरक्षणहि करावें.
६ आणि तिसरा वांटा सूर वेसीवर असावें; अ-
णखी तिसरा वांटा मागल्या दवडकऱ्यांच्या वेसी-
वर असावें; असें तुह्मी घर मोडलें न जावें ह्म-
णून त्याचें संरक्षण करावें. ७ आणि जे सर्व
तुह्मी शाब्बाथांत बाहेर जात असतां त्या तुह्मां-
तल्या दोन वांटे तर राजाजवळ असून परमेश्व-
राच्या मंदिराचें संरक्षण करावें. ८ आणि तुह्मी
एकएकाने आपापलें हत्यार आपापल्या हातीं ध-
रून राजाला चहुंकडून वेढून राहावें; आणि कोणी
टोळ्यांच्या आंत आला, तर तो मारला जावा;
अणखी जेव्हां राजाला बाहेर जायाचें आणि आंत
यायाचें, तेव्हां तुह्मी त्याच्याबरोबर असत जावें."
९ यास्तव यहोयादा याजकाने ज्या आज्ञा दि-
ल्या, त्या अवघ्यांप्रमाणें शंभर शंभरांच्या नाय-
कांनी केलें; ह्मणजे ते एकएक आपापलीं माणसें,
जीं शाब्बाथीं जाणारीं, अणखी जीं शाब्बाथीं
येणारीं त्यांस घेऊन यहोयादा याजकाजवळ आले.
१० आणि याजकाने परमेश्वराच्या मंदिरांत
दावीद राजाचे जे भाले व ज्या ढाला होत्या, त्या
शंभर शंभरांच्या नायकांस दिल्या. ११ तेव्हां
दवडकरी एकएकाने आपापल्या हातीं आपापलें
हत्यार धरून मंदिराच्या उजव्या कोणापासून मं-
दिराच्या डाव्या कोणापर्यंत वेदीपुढें व मंदिरापुढें
राजाच्या चहुंकडे उभे राहिले. १२ नंतर त्याने
राजाचा पुत्र बाहेर आणून त्याला मुगूट घातला
आणि धर्मपुस्तक दिल्हें; असें त्यांनी त्याला अ-
भिषेक करून राजा केलें, आणि टाळ्या वाजवून
ह्मटलें, "राजा चिरकाळ वांचो." १३ तेव्हां अ-
थाल्या दवडकऱ्यांचा व लोकांचा शब्द ऐकून पर-
मेश्वराच्या मंदिरीं लोकांजवळ आली. १४
आणि तिने अवलोकन केलें, तर पाहा, राजा रीति-
प्रमाणें खांबाजवळ उभा राहिला होता, आणि रा-
जाजवळ नायक व करणेकरी व देशांतले सर्व लोक

आनंद करीत असतां कर्णे वाजवीत होते; तेव्हां
अथल्येने आपलीं वस्त्रें फाडून अरोळी मारिली,
"फितुर फितूर." १५ तेव्हां यहोयादा याजकाने
शंभर शंभरांचे नायक, जे सैन्याचे पाहणेकरी, त्या-
स असी आज्ञा दिल्ही कीं, "तुह्मी तिला टोळ्यांच्या
बाहेर काढा, आणि कोणी तिच्यामागें गेला, तर
त्याला तरवारीने मारा." कां कीं याजकाने सांगि-
तलें होतें, "तिला परमेश्वराच्या मंदिरीं मारूं
नये." १६ तेव्हां त्यानी तिजवर हात टाकिले,
आणि ती घोडे जायाच्या वाटेने राजघरास चा-
लली असतां, तेथें त्यानी तिला मारिलें. १७ ते-
व्हां यहोयादाने राजा व लोक या दोघांकडून पर-
मेश्वराजवळ असा करार करविला कीं आपण
परमेश्वराचे लोक होऊं; नंतर राजा व लोक
यांच्या मध्यें परस्परें करविला. १८ मग देशां-
तल्या सर्व लोकानी बालाच्या घरीं जाऊन तें मो-
डिलें, आणि त्याच्या वेद्या व त्याच्या मूर्त्तीं अग-
दी फोडिल्या, आणि बालाचा याजक मात्तान
याला वेद्यांपुढें जिवें मारिलें; अणखी परमेश्व-
राच्या मंदिरावर याजकाने पाहरे ठेविले. १९
मग त्याने शंभर शंभरांचे नायक व हुजरे व दध-
डकरी व देशांतले सर्व लोक घेतले असतां, रा-
जाला परमेश्वराच्या घराहून खालीं राजघरास
आणून ते दवडकऱ्यांच्या दरवाज्याच्या वाटेने रा-
जाच्या घरांत आले, आणि तो राजांच्या राजा-
सनावर बसला. २० त्यानी तर राजाच्या घरीं
अथाल्या तरवारीने मारिली असतां, देशांतल्या
सर्व लोकांस आनंद झाला, आणि नगर स्वस्थ
राहिलें. २१ यहोवाश राज्य करूं लागला, तेव्हां
तो सात वर्षांचा होता.

## अध्याय १२.

येहूच्या सातव्या वर्षी यहोवाश राज्य करूं ला-
गला, आणि त्याने यरूशालेमांत चाळीस वर्षें
राज्य केलें; त्याच्या आईचें नांव झिब्या, आणि
ती बैरशेबांतली होती. २ आणि ज्या सर्व दि-
वसांत यहोयादा याजक यहोवाशाला शिकवीत
होता, त्यांत त्याने परमेश्वराच्या दृष्टींत जें चां-
गलें तें केलें. ३ तथापि उंच स्थानें काढलीं न-
व्हतीं; लोक तोंपर्यंत उंच स्थानांवर यज्ञ करीत
व धूप जाळीत होते.

४ तेव्हां यहोवाशाने याजकांस सांगितलें, "प-
वित्र वस्तूंचा जो जो पैका परमेश्वराच्या मंदि-
रांत येईल तो सर्व, ह्मणजे जो कोणी मोजपणांत
येतो त्याकडला पैका, आणि प्राणांवर ठरविलेला
कोणाकोणाचा मोलपैका, आणि कोणाच्या मनांत
येईल कीं परमेश्वराच्या मंदिरीं पैका नेऊन द्या-
वा, ५ तो सर्व याजकांतील प्रत्येकानें आपापल्या
ओळख्यांपासून आपल्याजवळ घ्यावा; आणि सर्व
ठिकाणीं जेथें जेथें मंदिराचें मोडकें दिसून येईल,
तेथलें तेथलें मोडकें त्यानी नीट करावें;" ६
तरी यहोवाश राजाच्या तेविसाव्या वर्षी असें
झालें कीं याजकानी मंदिराचें मोडकें नीट केलें
नव्हतें. ७ यास्तव यहोवाश राजाने यहोयादा
याजकाला आणि इतर याजकांस बोलावून त्यांस
विचारिलें, "तुह्मी मंदिराचें मोडकें नीट कां केलें
नाहीं? तर आतां तुह्मी आपल्या ओळख्यांजव-
ळून पैका घेऊं नका; केवळ तो मंदिराच्या मो-
डक्यासाठीं द्या." ८ तेव्हां याजक लोकांजव-
ळून पैका न घ्यायाला आणि मंदिराचें मोडकें
नीट न करायाला मान्य झाले. ९ तथापि य-
होयादा याजकाने एक पेटी घेऊन तिच्या झां-
कणाला भोंक पाडलें, आणि परमेश्वराच्या
मंदिरांत जातांना उजव्या भागीं वेदीजवळ ती ठे-
विली; मग जे याजक राखीत होते ते परमेश्व-
राच्या मंदिरीं जो पैका येत होता, तो सर्व तींत
ठेवीत असत. १० आणि पेटींत पैका बहुत
आहे, असें जेव्हां त्यानी पाहिलें, तेव्हां असें
झालें कीं राजाच्या लेखकाने व मुख्य याजकाने
वर जाऊन परमेश्वराच्या मंदिरीं जो पैका मि-
ळाला होता, तो मोजून बांधून ठेविला. ११ नं-
तर जे काम करवीत होते, जे परमेश्वराच्या
मंदिराची पाहणी करीत होते, त्यांच्या हातीं तो
मोजलेला पैका दिल्हा; मग त्यानी तो काढून
परमेश्वराच्या मंदिरीं जे सुतार व रचणारे
काम करीत होते, त्यांस दिल्हा. १२ आणि पर-
मेश्वराच्या मंदिराची मोडतोड नीट करायाचीं
लाकडें व घडींव धोंडे विकत घ्यायासाठींहि गवं-
डी व पाथरट यांस परमेश्वराचें मंदिर नीट

करायास जें वेचलें होतें त्या सर्वांसाठीं तो दिल्हा.
१३ परंतु परमेश्वराच्या मंदिरासाठीं रुप्याचीं
भांडीं, कातरी, शिपायांचीं पात्रें, करणे व सोन्याचीं
कांहीं भांडीं व रुप्याचीं भांडीं हीं परमेश्वरा-
च्या मंदिरीं आलेल्या पैक्यांतून केलीं नव्हतीं;
१४ केवळ तो कामकऱ्यांस दिल्हा, आणि त्यांनी
तो घेऊन परमेश्वराचें मंदिर नीट केलें. १५
आणखी कामकऱ्यांस द्यायाला ज्यांच्या स्वाधीन
तो पैका केला होता, त्या माणसांजवळून त्यांनी
हिशोब घेतला नाहीं, कारण कीं तीं विश्वासाने
काम करीत होतीं. १६ अपराधांचा पैका व
प्रायश्चित्तांचा पैका परमेश्वराच्या मंदिराला
लावला गेला नाहीं; तो याजकांचा होता.

१७ तेव्हां अरामाचा राजा हजाएल याने वर
जाऊन गाथासीं लढून तें घेतलें, नंतर हजाएलाने
यरुशालेमावर चढायास आपलें तोंड लाविलें.
१८ मग यहूदाचा राजा यहोवाश याने आपले
वडील यहूदाचे राजे यहोशाफाट व यहोराम व
अहाज्या, यांनी पवित्र करून दिल्हेलीं जीं धर्म-
द्रव्यें तीं सर्व, व आपलीं धर्मद्रव्यें आणि जें सोनें
परमेश्वराच्या मंदिराच्या भांडारांत व राजा-
च्या घरांत सांपडलें, तें सर्व घेऊन अरामाचा
राजा हजाएल याकडें पाठविलें; तेव्हां तो य-
रुशालेमावरून निघून गेला. १९ यहोवाशा-
च्या राहिलेल्या गोष्टी आणि जीं सर्व त्याने के-
लीं तीं यहूदाच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्त-
कांत लिहिलेलीं नाहींत कीं काय? २० त्याच्या
चाकरांनी तर फितूर करीत असतां उठून सिल्ला
याकडे उतरणीजवळ मिल्लोंतल्या घरीं यहोवा-
शाला मारिलें; २१ म्हणजे त्याचे चाकर शि-
मथाचा पुत्र योजाखार व शोमेराचा पुत्र यहो-
जाबाद यांनी त्याला मारिलें; असा तो मेला,
आणि त्यांनी त्याला त्याच्या वडिलांच्यासंगतीं
दावीदाच्या नगरांत पुरिलें, आणि त्याचा पुत्र अ-
मज्या याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय १३.

येहूचा पुत्र यहोवाहाज याने यहूदाचा राजा
अहाज्या याचा पुत्र यहोवाश याच्या तेविसाव्या
वर्षांपासून शोमरोनांत इस्राएलावर सत्रा वर्षें
राज्य केलें. २ आणि त्याने परमेश्वराच्या दृष्टींत
दुष्टाई केली, म्हणजे ज्या पापांत नबाटाचा पुत्र
यराबाम याने इस्राएलाला घातलें, त्यांच्या अनुग-
तीने तो चालत असतां त्यांपासून फिरला नाहीं.
३ वास्तव परमेश्वर इस्राएलावर रागें भरला अ-
सतां, त्याने त्यांस अरामाचा राजा हजाएल याच्या
हातीं आणि हजाएलाचा पुत्र बेनहदाद याच्या
हातीं यांच्या सर्व दिवसांत दिल्हें. ४ तेव्हां य-
होवाहाजाने परमेश्वराच्यापुढें काकुळती केली,
आणि परमेश्वराने त्याचें ऐकिलें; कां तर अ-
रामाच्या राजाने इस्राएलास कसा त्रास दिल्हा,
तो त्रास त्याने पाहिला. ५ वास्तव परमेश्वरा-
ने इस्राएलाला तारणारा देऊन इस्राएलाच्या सं-
तानास अराम्यांच्या हाताखालून काढिलें, आ-
णि त्यांस माघारें त्यांच्या राहोट्यांत आणून पूर्व-
काळांसारिखें ठेविलें. ६ तथापि यराबामाच्या
घराण्याचीं पापें, ज्यांत त्याने इस्राएलाला घातलें,
त्यांत ते चालत असतां त्यांपासून फिरले नाहींत,
आणखी शोमरोनांत भजनाचें वन राहिलें. ७
वास्तव परमेश्वराने यहोवाहाजाला पन्नास
स्वार व दाहा रथ व दाहा हजार पायदळ, ए-
वढें मात्र लोक राहूं दिल्हे; कारण कीं अरामा-
च्या राजाने त्यांस मळण्याच्या धुळीसारिखें क-
रून त्यांचा नाश केला होता.

८ यहोवाहाजाच्या राहिलेल्या गोष्टी आणि
त्याने जीं केलीं आणि त्याचा पराक्रम, तीं सर्व
इस्राएलाच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत
लिहिलेलीं नाहींत कीं काय? ९ यहोवाहाज
तर आपल्या वडिलांच्यासंगतीं निजला, आणि
त्यांनी त्याला शोमरोनांत पुरिलें, आणि त्याचा
पुत्र योवाश याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.
१० यहोवाहाजाचा पुत्र योवाश याने यहूदाचा
राजा यहोवाश याच्या सततिसाव्या वर्षांपासून
शोमरोनांत इस्राएलावर सोळा वर्षें राज्य केलें.
११ परंतु त्याने परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई
केली; नबाटाचा पुत्र यराबाम याने इस्राएलाला
ज्या पापांत घातलें, त्या अवघ्या पापांपासून तो
फिरला नाहीं, त्यांत तो चालला. १२ योवाशा-
च्या राहिलेल्या गोष्टी आणि त्याने जीं केलीं,
आणि ज्या पराक्रमाने यहूदाचा राजा अमाज्या

त्या ज्यार्जी लढाई केली तीं सर्व इस्राएलो-
च्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत लिहि-
लेलीं नाहींत कीं काय? १३ योवाश तर आ-
पल्या वडिलांच्या संगतीं निजला, तेव्हां यराबाम
त्याच्या राजासनावर बसला, आणि योवाश
शोमरोनांत इस्राएलाच्या राजासंगतीं पुरला गे-
ला. १४ आणि अलीशा ज्या दुखण्याने मरा-
वयाचा होता, त्यांत तो पडला; तेव्हां इस्राएलाचा
राजा योवाश खालीं त्याजवळ गेला होता, आ-
णि त्याच्या तोंडावर रडतांना बोलला, "हे माझ्या
बापा, माझ्या बापा, तूं इस्राएलाचे रथ व त्यांचे
स्वार." १५ तेव्हां अलीशा त्याला बोलला,
"तूं धनुष्य व बाण घे." मग त्याने आपल्याजवळ
धनुष्य व बाण घेतले. १६ नंतर इस्राए-
लाच्या राजाला त्याने सांगितलें, "तूं आपला हात
धनुष्यावर ठेव." मग त्याने आपला हात ठेविला,
आणि अलीशाने आपले हात राजाच्या हातांवर
ठेविले. १७ नंतर त्याने सांगितलें, "तूं पूर्वेची
खिडकी उघड." तेव्हां त्याने उघडली; मग
अलीशाने सांगितलें, "बाण सोड." त्यावर त्याने
बाण सोडिला; नंतर त्याने ह्मटलें, "परमेश्वरा-
कडल्या तारणाचा बाण, आणि अरामापुढें तारण
होण्याचा बाण, ह्मणजे अरामाच्या क्षयापर्यंत तूं
त्यांस अफेकांत मारसील." १८ आणखी त्याने
सांगितलें, "तूं ते बाण घे." तेव्हा त्याने घेतले,
आणि त्याने इस्राएलाच्या राजाला सांगितलें,
"तूं भूमीवर मार." तेव्हां तो तीन वेळां मारून
राहिला. १९ मग देवाचा माणूस त्यावर को-
पून बोलला, "त्वां पांच किंवा साहा वेळां मारा-
याचें होतें; ह्मणजे अरामाच्या क्षयापर्यंत त्वां
त्याला मारिलें असतें; तर आतां तूं अरामाला
तीन वेळांच मारसील." २० यानंतर अलीशा
मेला, आणि त्यांनी त्याला पुरिलें; आणि वर्ष
लागलें असतां मोआबातल्या टोळ्या देशांत आ-
ल्या. २१ तेव्हां लोक कोणीएकाला पुरणार अ-
सतां, असें झालें कीं पाहा, एक टोळी त्यांच्या
दृष्टीस पडली, यास्तव त्यांनी त्या माणसाला
अलीशाच्या कबरेंत ठेविलें; असा तो माणूस
ठेविला असतां, अलीशाच्या हाडांस लागला,
तेव्हां तो जिवंत होऊन आपल्या पायीं उठला.

२२ आणि अरामाचा राजा हजाएल याने
यहोआहाजाच्या सर्व दिवसांत इस्राएलाला त्रास
दिल्हा. २३ तरी परमेश्वराचा करार आब्राहाम
इसाक व याकोब यांपासीं होता, त्यामुळें त्याने
त्यांवर ममता करून अनुग्रह केला आणि कृपा-
दृष्टि लाविली, यास्तव त्यांचा नाश करायाला
इच्छिलें नाहीं, आणि या वेळेपर्यंत त्यांस आ-
पल्या दृष्टींतून घालविलें नाहीं. २४ मग अरा-
माचा राजा हजाएल मेला, आणि त्याचा पुत्र
बेनहदाद याने त्याच्या ठिकाणीं राज्य केलें. २५
तेव्हां यहोआहाजाचा पुत्र योवाश याचा बाप
यहोआहाज याच्या हातांतून जीं नगरें हजाए-
लाचा पुत्र बेनहदाद याने लढाई करून घेतलीं
होतीं, तीं योवाशाने त्याच्या हातांतून माघारें
घेतलीं; तीन वेळां योवाशाने त्याला जिंकून इ-
स्राएलाचीं नगरें फिरून घेतलीं.

## अध्याय १४.

इस्राएलाचा राजा यहोआहाजाचा पुत्र योवाश
१ याच्या दुसऱ्या वर्षी यहूदाचा राजा यहोवाश
याचा पुत्र अमस्या राज्य करूं लागला. २
तेव्हां राज्य करूं लागला, तेव्हां तो पंचवीस
वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमांत एकुण-
तीस वर्षें राज्य केलें; त्याच्या आईचें नांव यहो-
आद्दान, आणि ती यरूशालेमांतली होती. ३
आणि त्याने परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें
केलें, तथापि आपला वडील दावीद यासारिखें
नाहीं; त्याने आपला बाप यहोवाश याने जें
केलें होतें त्या सर्वांप्रमाणें केलें. ४ तरी उंच
स्थानें काढलीं गेलीं नव्हतीं; लोक तोंपर्यंत उंच
स्थानांवर यज्ञ करीत व धूप जाळीत होते. ५ आ-
णि राज्य त्याच्या हातांत बळावलें गेलें, तेव्हा
असें झालें कीं त्याच्या ज्या चाकरांनी त्याचा
बाप राजा याला मारिलें होतें, त्यांस त्याने
मारिलें. ६ परंतु त्याने मारणाऱ्यांच्या पुत्रांस
जिवें मारिलें नाहीं; असें मोशाच्या शास्त्रपुस्त-
कांत लिहिलेलें आहे, तसें केलें; ह्मणजे परमे-
श्वराने असी आज्ञा दिल्ही होती कीं लेंकरांमुळें
बाप मारले न जावे, आणि बापांमुळें लेंकरें मार-
लीं न जावीं, तर त्याचा तोच आपल्या पापा-

मुळें मारला जावा. ७ त्याने दहा हजार अदो-
मी मिठाच्या खिंडींत मारिले, आणि लढाई करून
सेला घेतली आणि त्याचें नांव यकथेल आजपर्यंत
ठेविलें.

८ यानंतर अमाज्याने येहूचा पुत्र यहोवाहाज
याचा पुत्र यहोवाश इस्राएलाचा राजा याकडे
जासूद पाठवून ह्मटलें, "ये, आपणामध्यें पर-
स्परें ओळख होऊं दे." ९ नंतर इस्राएलाचा
राजा योवाश याने यहूदाचा राजा अमाज्या या
कडे असा निरोप पाठविला, "लबानोनावरल्या एक
कांटाळीने लबानोनावरल्या एका देवदारूकडे
पाठवून ह्मटलें कीं, 'तूं आपली कन्या माझ्या
पुत्राला बायको करून दे;' नंतर लबानोनावर-
ल्या एका वनपशूने जवळून जातांना ती कांटाळी
तुडवून टाकिली. १० त्वां अदोमाला मारिलें
खरें ह्मणून तुझें हृदय उंचावलें गेलें; तूं गौरवून
घेऊन आपल्या घरीं राहा, कां कीं आपण व आप-
ल्यासंगतीं यहूदानेहि पडावें, असी वाईट कल्प-
ना कां करितोस?" ११ तथापि अमाज्याने ऐकिलें
नाहीं परंतु इस्राएलाचा राजा योवाश यावर चढून
गेला; तेव्हां तो व यहूदाचा राजा अमाज्या या-
नी यहूदांतल्या बेथशेमेशास परस्पर एकमेकास
पाहिलें. १२ तेव्हां इस्राएलाच्यापुढें यहूदाचा
मोड झाला; यास्तव ते प्रत्येक आपापल्या राहो-
टीस पळून गेले. १३ इस्राएलाचा राजा यो-
वाश याने अहाज्याचा पुत्र यहोवाश याचा पुत्र
अमाज्या यहूदाचा राजा याला बेथशेमेशास ध-
रून यरूशालेमास नेलें, आणि यरूशालेमाचें
गांवकुसूं एफ्राइम दरवाज्यापासून कोपऱ्याच्या
दरवाज्यापर्यंत चारशें हात फोडिलें. १४ अ-
पखी परमेश्वराच्या मंदिरांत व राजाच्या घर-
च्या भांडारांत जें सोनें व रुपें तें सर्व, आणि जीं
भांडीं सांपडलीं तीं सर्व, आणि ओलीचीं माणसें
घेऊन तो माघारा शोमरोनास गेला.

१५ योवाशाच्या राहिलेल्या गोष्टी आणि
त्याने जें केलें तें व त्याचा पराक्रम आणि यहूदा-
चा राजा अमाज्या यासीं तो कसा लढला, तीं
सर्व इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्त-
कांत लिहिलेलीं नाहींत कीं काय? १६ योवाश
तर आपल्या वडिलांच्या संगतीं निजला, आणि
शोमरोनांत इस्राएलाच्या राजांच्यासंगतीं तो
पुरला गेला; तेव्हां त्याचा पुत्र यराबाम याने
त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

१७ इस्राएलाचा राजा यहोवाहाजाचा पुत्र
योवाश मेल्यानंतर यहूदाचा राजा यहोवाशाचा
पुत्र अमाज्या पंधरा वर्षे जिवंत राहिला. १८
आणि अमाज्याच्या राहिलेल्या गोष्टी यहूदाच्या
राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत लिहिलेल्या
नाहींत कीं काय? १९ तर यरूशालेमांत त्या-
नी त्यावर फितूर केला, यास्तव तो लाखीशास
पळून गेला; तथापि त्यांनी त्याच्यामागें लाखी-
शास पाठवून तेथें त्याला जिवें मारिलें. २० ते-
व्हां त्यांनी त्याला घोड्यांवर घालून आणिलें, आणि
दावीदाचें नगर यरूशालेम यांत त्याला त्याच्या
वडिलांच्या संगतीं पुरिलें. २१ मग यहूदाच्या
सर्व लोकांनी अजाऱ्या घेऊन त्याचा बाप अमा-
ज्या याच्या ठिकाणीं त्याला राजा केलें, तेव्हां तो
सोळा वर्षांचा होता. २२ त्याने एलाथ बांधून
फिरून यहूदाच्या स्वाधीन केलें; त्यानंतर तो रा-
जा आपल्या वडिलांच्या संगतीं निजला.

२३ इस्राएलाचा राजा योवाश याचा पुत्र
यराबाम याने यहूदाचा राजा यहोवाशाचा पुत्र
अमाज्या याच्या पंधराव्या वर्षांपासून एकेताळीस
वर्षें शोमरोनांत राज्य केलें. २४ परंतु त्याने परमे-
श्वराच्या दृष्टींत दुष्टाई केली; नबाटाचा पुत्र यरा-
बाम, ज्याने इस्राएलाला पापांत घातलें, त्याच्या
कोणत्याहि पापापासून तो फिरला नाहीं. २५ त्या-
ने इस्राएलाची सीमा हमाथांत प्रवेशस्थळापासून
अराबांतील समुद्रापर्यंत इस्राएलाचा देव परमे-
श्वर याचें जें वचन त्याने आपला सेवक अमि-
त्तायचा पुत्र भविष्यवादी योना गाथहेफेरकर,
त्याकडून सांगितलें होतें त्याप्रमाणें फिरून घे-
तलें. २६ कारण कीं परमेश्वराने इस्राएला-
चें फार कडू दुःख पाहिलें; असें कीं तो कोंडलेला
आणि टाकलेला होऊन खुंटला, अणखी कोणी
इस्राएलास सहायकारी नव्हता. २७ आणि
परमेश्वराने सांगितलें होतें कीं, "मी इस्राएला-
चें नांव आकाशाखालून खोडून टाकणार नाहीं;"
यास्तव त्याने योवाशाचा पुत्र यराबाम याकडून
त्यास तारिलें. २८ यराबामाच्या राहिलेल्या

गोष्टी आणि त्याने जें कांहीं केलें तें, अणखी त्या-
चा पराक्रम, जेणेकरून त्याने लढाई केली आणि
जेणेकरून दामासेक व हमाथ जीं पूर्वी यहूदाचीं
तीं इस्राएलासाठीं फिरून घेतलीं, तीं सर्व इ-
स्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लि-
हिलेलीं नाहींत कीं काय? २९ यराबाम तर
आपले वडील इस्राएलाचे राजे यांच्यासंगतीं
निजला, आणि त्याचा पुत्र जखाऱ्या याने त्या-
च्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय १५.

इस्राएलाचा राजा यराबाम याच्या सत्ताविसा-
व्या वर्षीं यहूदाचा राजा अमाज्या याचा पुत्र
अजाऱ्या राज्य करूं लागला. २ जेव्हां राज्य
करूं लागला, तेव्हां तो सोळा वर्षांचा होता, आ-
णि त्याने बावन वर्षें यरूशालेमांत राज्य केलें;
त्याच्या आईचें नांव यखल्या, आणि ती यरूशा-
लेमांतली होती. ३ आणि त्याचा बाप अमा-
ज्या याने जसें केलें होतें, त्या सर्वांप्रमाणें त्याने
परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें केलें. ४ तरी
उंच स्थानें काढलीं गेलीं नाहींत; तोंपर्यंत लोक
उंच स्थानांवर यज्ञ करीत व धूप जाळीत होते.
५ आणि परमेश्वराने राजाला असें मारिलें
कीं तो कोडी होऊन त्याच्या मरणाच्या दिवसा-
पर्यंत वेगळ्या घरीं राहिला, आणि राजाचा पुत्र
योथाम घरावर असतां देशांतल्या लोकांचा
न्याय करीत होता. ६ अजाऱ्याच्या राहिलेल्या
गोष्टी आणि त्याने जें कांहीं केलें, तीं सर्व यहूदा-
च्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं
नाहींत कीं काय? ७ अजाऱ्या तर आपल्या वडि-
लांच्यासंगतीं निजला, आणि त्यांनी त्याला त्या-
च्या वडिलांच्यासंगतीं दावीदाच्या नगरांत पुरिलें,
आणि त्याचा पुत्र योथाम याने त्याच्या ठिकाणीं
राज्य केलें.

८ यराबामाचा पुत्र जखाऱ्या याने यहूदाचा
राजा अजाऱ्या याच्या अडतिसाव्या वर्षीं शोम-
रोनांत इस्राएलावर साहा महिने राज्य केलें. ९
परंतु जसें त्याच्या वडिलांनी केलें होतें, तसें
त्याने परमेश्वराच्या दृष्टींत दुष्टाई केली; नबा-
टाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएलाला पापांत
घातलें, त्याच्या पापांपासून तो फिरला नाहीं.
१० तेव्हां याबेशाचा पुत्र शाल्लुम याने त्यावर
फितूर करून त्याला लोकांच्या देखतां मारिलें;
असें त्याने त्याचा जीव घेऊन त्याच्या ठिकाणीं
राज्य केलें. ११ जखाऱ्याच्या राहिलेल्या गो-
ष्टी इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्त-
कांत लिहिलेल्या आहेत, ह्मणून जाणावें. १२
हेंच परमेश्वराचें वचन जें त्याने येहूला सां-
गितलें होतें कीं, "तुझ्या चार पिढ्यांतले वंशस्थ
इस्राएलाच्या राजासनावर बसतील;" तर तसें
झालें.

१३ यहूदाचा राजा उज्जीया याच्या एकुण-
चाळिसाव्या वर्षीं याबेशाचा पुत्र शाल्लुम राज्य
करूं लागला, आणि त्याने शोमरोनांत महिना-
भर राज्य केलें. १४ तेव्हां गादीचा पुत्र मना-
हेम थिर्सा सोडून वर गेला, आणि त्याने शोमरो-
नांत जाऊन याबेशाचा पुत्र शाल्लुम याला शोम-
रोनांत मारिलें; असें त्याचा जीव घेऊन त्याच्या
ठिकाणीं त्याने राज्य केलें. १५ शाल्लुमाच्या
राहिलेल्या गोष्टी आणि त्याने जो फितूर केला,
तीं सर्व इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांच्या
पुस्तकांत लिहिलेलीं आहेत, ह्मणून जाणावें. १६
तेव्हां मनाहेमाने तिफसाह, ह्मणजे त्यांतले जे
ते सर्व, आणि त्याच्या सीमांतले थिर्सेजवळचे
मारिले, कारण कीं त्यांनी तिची वेस उघडली
नाहीं; अणखी त्याने सर्व गरोदरींस फोडून मा-
रिलें. १७ गादीचा पुत्र मनाहेम याने यहूदा-
चा राजा अजाऱ्या याच्या एकुणचाळिसाव्या
वर्षांपासून शोमरोनांत इस्राएलावर दाहा वर्षें
राज्य केलें. १८ आणि त्याने परमेश्वराच्या
दृष्टींत वाईट केलें; नबाटाचा पुत्र यराबाम,
ज्याने इस्राएलाला पापांत घातलें, त्याच्या पापां-
पासून तो आपल्या सर्व आयुष्यांत फिरला नाहीं.
१९ आश्शूराचा राजा फूल देशावर आला
होता, आणि मनाहेमाने आपल्याला फूलाचा
हात अनुकूळ होऊन आपल्या हातीं राज्य स्था-
पावें, ह्मणून त्याला हजार शेकेल रुपें दिल्हें.
२० आणि मनाहेमाने आश्शूराच्या राजाला तें
रुपें द्यायासाठीं इस्राएलांतल्या धनवंत सर्व पुरु-
षांवर ह्मणजे एकएकावर पन्नास पन्नास शेकेल

रुपें घालून घेतलें, नंतर आश्शूराचा राजा तेथें
देशांत उशीर न करून माघारा फिरला. २१
मनाहेमाच्या राहिलेल्या गोष्टी आणि त्याने जें
कांहीं केलें, तीं सर्व इस्राएलाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय?
२२ मनाहेम तर आपल्या वडिलांच्यासंगतीं नि-
जला, आणि त्याचा पुत्र पकाह्या याने त्याच्या
ठिकाणीं राज्य केलें.

२३ यहूदाचा राजा अजाऱ्या याच्या पन्ना-
साव्या वर्षापासून मनाहेमाचा पुत्र पकाह्या याने
शोमरोनांत इस्राएलावर दोन वर्षें राज्य केलें;
२४ आणि त्याने परमेश्वराच्या दृष्टींत वाईट
केलें; नबाटाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएला-
ला पापांत घातलें, त्याच्या पापांपासून तो फिरला
नाहीं. २५ आणि त्याचा सर्दार रमाल्याचा
पुत्र पेकाह याने आर्गोब व आर्ये त्यांतलीं माणसें
आणि गिलादी लोकांतलीं पन्नास माणसें यांस
आपल्यासंगतीं घेऊन त्यावर फितूर करून त्याला
शोमरोनांत राजघरांतल्या रंगमहालांत मारिलें;
असा त्याचा जीव घेऊन त्याच्या ठिकाणीं राज्य
केलें. २६ पकाह्याच्या राहिलेल्या गोष्टी आणि
त्याने जें कांहीं केलें, तीं सर्व इस्राएलाच्या राजां-
च्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं आहेत,
ह्मणून जाणावें.

२७ रमाल्याचा पुत्र पेकाह याने यहूदाचा
राजा अजाऱ्या याच्या बावन्नाव्या वर्षापासून शो-
मरोनांत इस्राएलावर वीस वर्षें राज्य केलें. २८
आणि त्याने परमेश्वराच्या दृष्टींत वाईट केलें;
नबाटाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएलाला पा-
पांत घातलें, त्याच्या पापांपासून तो फिरला नाहीं.
२९ इस्राएलाचा राजा पेकाह याच्या दिवसांत
आश्शूराचा राजा तिग्लाथपलेसेर याने येऊन
ईयोन व आबेल बेथमाखा व यानोहा व का-
देश व हाझोर व गिलाद व गालील व सर्व
नाफ्ताली प्रांत घेतला, आणि त्यांतील लोकांस
पाडाव करून आश्शूरास नेलें. ३० नंतर
एलाचा पुत्र होश्या याने रमाल्याचा पुत्र पे-
काह यावर फितूर करून त्याला मारिलें; असा
त्याचा जीव घेऊन त्याने त्याच्या ठिकाणीं उज्जी-
याचा पुत्र योथाम याच्या विसाव्या वर्षीं राज्य
केलें. ३१ पेकाहाच्या राहिलेल्या गोष्टी आणि
त्याने जें कांहीं केलें, तीं सर्व इस्राएलाच्या राजां-
च्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं आहेत,
ह्मणून जाणावें.

३२ इस्राएलाचा राजा रमाल्याचा पुत्र पे-
काह याच्या दुसऱ्या वर्षीं यहूदाचा राजा उज्जी-
या याचा पुत्र योथाम राज्य करूं लागला. ३३
तो राज्य करूं लागला, तेव्हां पंचवीस वर्षांचा
होता, आणि त्याने यरूशालेमांत सोळा वर्षें रा-
ज्य केलें; त्याच्या आईचें नांव यरूशा, आणि ती
जादोकाची कन्या होती. ३४ आणि परमे-
श्वराच्या दृष्टींत जें नीट, जसें त्याचा बाप उ-
ज्जीयाने केलें होतें, त्या सर्वांप्रमाणें त्याने केलें.
३५ तरी उंच स्थानें काढलीं गेलीं नव्हतीं; अद्याप
लोक उंच स्थानांवर यज्ञ करीत व धूप जाळीत
होते; त्याने परमेश्वराच्या मंदिराचा वरला
दरवाजा बांधिला. ३६ योथामाच्या राहिलेल्या
गोष्टी आणि त्याने जें कांहीं केलें, तीं सर्व यहू-
दाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लिहिले-
लीं नाहींत कीं काय? ३७ त्या दिवसांत पर-
मेश्वर यहूदावर अरामाचा राजा रजीन आणि
रमाल्याचा पुत्र पेकाह यांस पाठवूं लागला. ३८
आणि योथाम आपल्या वडिलांच्यासंगतीं निज-
ला, आणि आपला वडील दावीद याच्या नगरांत
आपल्या वडिलांच्यासंगतीं त्यांनी त्याला पुरिलें,
आणि त्याचा पुत्र आहाज याने त्याच्या ठिकाणीं
राज्य केलें.

## अध्याय १६.

रमाल्याचा पुत्र पेकाह याच्या सत्राव्या वर्षीं
यहूदाचा राजा योथाम याचा पुत्र आहाज
राज्य करूं लागला. २ आहाज राजा झाला
तेव्हां तो वीस वर्षांचा होता, आणि त्याने यरू-
शालेमांत सोळा वर्षें राज्य केलें आणि आपला
देव परमेश्वर याच्या दृष्टींत जें नीट तें, जसें
त्याचा वडील दावीद याने केलें होतें, तसें त्याने
केलें नाहीं. ३ तर तो इस्राएलाच्या राजांच्या
मार्गानें चालला, अणखी जीं राष्ट्रें परमेश्वराने
इस्राएलाच्या संतानांपुढून घालविलीं, त्यांच्या ओं-
गळपणांप्रमाणें त्याने आपल्या पुत्राला अग्नींत घा-

तलें. ४ आणि त्याने उंच स्थानांवर व टेकड्यां-
वर व सर्व पालवट झाडांखालीं यज्ञ केले आणि
धूप जाळिला. ५ तेव्हां अरामाचा राजा रजीन
व इस्राएलाचा राजा रमाल्याचा पुत्र पेकाह हे
लढाई करायाला यरूशालेमावर चढून आले,
आणि त्यानी आहाजाला वेढा घातला, परंतु ल-
ढाईत जिंकलें नाहीं. ६ त्या वेळेस अरामाचा
राजा रजीन याने अरामासाठीं एलाथ माघारें
घेतलें, आणि एलाथांतून यहूद्यांस घालविलें;
नंतर अदोमी एलाथांत येऊन तेथें आजपर्यंत रा-
हिले. ७ तेव्हां आहाजाने आश्शूराचा राजा
तिग्लाथपलेसेर याकडे जासूद पाठवून ह्मटलें,
"मी तुझा सेवक व तुझें लेंकरूं, तूं वर येऊन
मजवर जे उठलेले, अरामाचा राजा व इस्राए-
लाचा राजा, त्यांच्या हातांतून मला तार." ८
आणि आहाजाने परमेश्वराच्या मंदिरीं व रा-
जघरांतल्या भांडारांत, जें रुपें व सोनें सांपडलें
तें घेऊन आश्शूराच्या राजाला भेट पाठविली.
९ तेव्हां आश्शूराच्या राजाने त्याचें ऐकिलें आ-
णि आश्शूराच्या राजाने दामासेकावर जाऊन तें
धरिलें, आणि पाडाव करून लोकांस कीरास
नेलें; रजीनाला तर जिवें मारिलें.

१० तेव्हां आश्शूराचा राजा तिग्लाथपलेसेर
याला भेटायास आहाज राजा दामासेकास गेला,
आणि आहाज राजाने दामासेकांत एक वेदी पा-
हिली; आणि त्याने त्या वेदीचा आकार व तिच्या
सर्व घडलेल्याप्रमाणें तिचा बेत उरीया याजक
याकडे पाठविला. ११ नंतर आहाज राजाने दामा-
सेकाहून पाठविली त्या सर्वांप्रमाणें उरीया याज-
काने वेदी बांधून केली; आहाज राजा दामासे-
काहून येई तोंपर्यंत उरीया याजकाने तसी केली.
१२ मग राजा दामासेकाहून आला तेव्हां राजाने
ती वेदी पाहिली, आणि त्या वेदीजवळ राजाने
जाऊन तिजवर होम केला; १३ ह्मणजे आप-
ला होम व आपला नैवेद्य केला, आणि आपलें
पेय अर्पण केलें, आणि आपले जे शांतिकारक यज्ञ
त्यांचें रक्त त्या वेदीवर शिंपडलें. १४ आणि
जी पितळ्याची वेदी परमेश्वरापुढें होती ती
त्याने मंदिराच्यापुढून, ह्मणजे नवी वेदी व पर-
मेश्वराचें मंदिर यांच्या मधून काढून त्या वेदी-
च्या उत्तरभागीं ठेविली. १५ आणि आहाज
राजाने उरीया याजकाला असी आज्ञा केली कीं,
"तूं त्या मोठ्या वेदीवर सकाळचा होम व संध्या-
काळचा नैवेद्य, आणि राजाचा यज्ञ व त्याचा
नैवेद्य, आणि देशांतल्या सर्व लोकांचा होम व
त्यांचा नैवेद्य व त्यांचीं पेय अर्पणें करीत जा,
आणि होमांचें सर्व रक्त व यज्ञांचें सर्व रक्त
तिजवर शिंपडीत जा; आणि पितळ्याची वेदी
माझ्यासाठीं विचारायाला असावी." १६ आ-
णि आहाज राजाने जसी आज्ञा दिल्ही, त्या
सर्वांप्रमाणें उरीया याजकाने केलें. १७ आणि
आहाज राजाने पायांचे कांठ कापून घेतले आ-
णि त्यावरून गंगाळ काढिलें; आणि समुद्रपात्र
त्याच्या खालच्या पितळ्याच्या बैलांवरून उत-
रिलें, मग तें दगडांच्या चिरेबंदीवर ठेविलें. १८
आणखी शाब्बाथाचें जें छत त्यानी मंदिरीं बां-
धिलें होतें तें आणि राजाचा बाहेरला प्रवेश
तो त्याने आश्शूराच्या राजाकरितां परमेश्वरा-
च्या मंदिरापासून फिरविला. १९ आहाजाच्या
राहिलेल्या गोष्टी, ज्या त्याने केल्या, त्या तर
यहूदाच्या राजांच्या इतिहासांच्या पुस्तकांत लि-
हिलेल्या नाहींत कीं काय? २० आहाज तर
आपल्या वडिलांच्यासंगतीं निजला, आणि दावी-
दाच्या नगरांत त्याच्या वडिलांच्यासंगतीं त्यानी
त्याला पुरिलें; मग त्याचा पुत्र हिज्कीया याने
त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय १७.

एला याचा पुत्र होश्या याने यहूदाचा राजा
आहाज याच्या बाराव्या वर्षापासून शोमरो-
नांत इस्राएलावर नऊ वर्षें राज्य केलें. २ आ-
णि परमेश्वराच्या दृष्टींत वाईट केलें; तरी
त्याच्यापूर्वी जे इस्राएलाचे राजे होते, त्यांच्या
इतकें केलें नाहीं. ३ त्यावर आश्शूराचा राजा
शाल्मानेसेर चढून आला; तेव्हां होश्याने त्या-
चा सेवक होऊन त्याला भेट भरून दिल्ही. ४
नंतर आश्शूराच्या राजाला होश्याच्या ठिकाणीं
फितूरपण दिसून आलें; कां कीं त्याने मिसऱ्याचा
राजा सोव याकडे जासूद पाठविले होते, आणि
आश्शूराच्या राजाला भेट वर्षाच्या वर्षाप्रमाणें

दिल्ही नाहीं; यास्तव **आश्शूराच्या** राजाने
त्याला अडवून बंदिशाळेंत कोंडिलें.
५ आणि **आश्शूराचा** राजा सर्व देशावर च-
ढून आला, तेव्हां त्याने **शोमरोनावर** चढून ये-
ऊन त्याला वेढा घालून तीन वर्षें ठेविलें. ६
**होश्याच्या** नवव्या वर्षी **आश्शूराच्या** राजाने **शो-
मरोन** घेतलें, आणि **इस्राएलाला** पाडाव करून
**आश्शूरास** नेलें, आणि त्यांस **हलाहांत** व **नहर
गोजानांतील हाबोरांत** व **मादाय्** यांतल्या नग-
रांत ठेविलें. ७ हें असें झालें कारण कीं **इस्रा-
एलाच्या** संतानानी आपला देव **परमेश्वर**, ज्या-
ने त्यांस **मिसर** देशांतून **मिसरी** राजा **फारो**
याच्या हाताखालून आणिलें, त्याच्याजवळ पाप
केलें होतें आणि दुसऱ्या देवांचें भय धरिलें होतें.
८ अणखी जीं राष्ट्रें **परमेश्वराने** **इस्राएलाच्या**
संतानांच्यापुढून घालविलीं, त्यांच्या नेमांप्रमाणें
आणि **इस्राएलाच्या** राजानी जे लाविले त्यांप्रमाणें
ते चालत होते. ९ आणि ज्या गोष्टी योग्य ना-
हींत त्या गोष्टी **इस्राएलाच्या** संतानानी आपला
देव **परमेश्वर** याजवळ चोरून केल्या, आणि
राखणाऱ्यांच्या बुरुजापासून बंदिस्तीच्या नगराप-
र्यंत त्यानी आपल्या सर्व नगरांत आपल्यांसाठीं
उंच स्थानें बांधिलीं. १० असे सर्व उंच डोंग-
रांवर व सर्व पालवट झाडांखालीं त्यानी आप-
ल्यासाठीं मूर्त्ती व भजनवनें उभारिलीं. ११
आणि जीं राष्ट्रें **परमेश्वराने** त्यांच्यापुढून घाल-
विलीं होतीं, त्यांप्रमाणें त्यानी तेथें सर्व उंच स्था-
नांवर धूप जाळिला, आणि वाईट गोष्टी करून
**परमेश्वराला** चिडविलें. १२ असें त्यानी नि-
र्जीव देव, ज्यांविषयीं **परमेश्वराने** त्यांस सांगि-
तलें होतें कीं, "तुह्मी ही गोष्ट करूं नका," त्या
मूर्त्तींची सेवा त्यानी केली. १३ तरी **परमेश्व-
राने** सर्व भविष्यवादी व सर्व दर्शक यांकडून
**इस्राएलाजवळ** व **यहूदाजवळ** खचीत करून सां-
गितलें होतें कीं, "तुह्मी आपल्या वाईट मार्गांतून
फिरा, आणि जें शास्त्र म्या तुमच्या वडिलांस
आज्ञा करून दिल्हें, आणि माझे सेवक भविष्यवादी
यांकडून तुमच्याजवळ पाठवून दिल्हें, त्या सर्वां-
प्रमाणें माझ्या आज्ञा व माझे नेम पाळा." १४
तथापि त्यानी ऐकिलें नाहीं, परंतु आपले वडील,
ज्यानी आपला देव **परमेश्वर** याला मानिलें नव्ह-
तें, त्यांच्या मानेसारिखी आपली मान ताठर केली.
१५ आणि त्याचे नेम व त्याचा करार, जो त्याने
त्यांच्या वडिलांसीं केला होता तो व त्याचे विधि
जे त्याने त्यांजवळ स्थापिले होते, ते त्यानी धिः-
कारिले, आणि ते निरर्थक होऊन जें व्यर्थ त्या-
च्यामागें चालले; असें त्यांच्याभोंवतीं जीं राष्ट्रें,
ज्यांविषयीं **परमेश्वराने** त्यांस आज्ञा दिल्ही
होती कीं, "तुह्मी त्यांच्यासारिखे करूं नका,"
त्यांच्यामागें ते चालले. १६ आणि त्यानी आपला
देव **परमेश्वर** याच्या सर्व आज्ञा सोडून आप-
ल्यासाठीं ओतींव दोन वासरें केलीं, आणि भजन-
वन करून आकाशांतल्या अवघ्या समुदायाचें भ-
जन केलें, आणि **बालाची** सेवा केली. १७ अ-
णखी त्यानी आपले पुत्र व आपल्या कन्या हीं
अग्नींत घातलीं, आणि त्यानी मांत्रिकपणें केलीं व
गारुडीपण केलें; असें त्यानी **परमेश्वराच्या**
दृष्टींत वाईट करून त्याला चिडवायासाठीं आ-
पणांस विकिलें. १८ यास्तव **परमेश्वर** **इस्रा-
एलावर** फारच कोपला, आणि त्याने त्यांस आ-
पल्या समक्षपणांतून घालविलें, केवळ **यहूदाचा**
वंश मात्र राहिला. १९ **यहूद्यानी** देखील आ-
पला देव **परमेश्वर** याच्या आज्ञा पाळिल्या
नाहींत, परंतु ते **इस्राएलानी** जे नेम केले होते
त्यांप्रमाणें चालले. २० **इस्राएलाचें** सर्व संतान
तर **परमेश्वराने** अव्हेरलें; ह्मणजे त्यांस खालीं
करून लुटाऱ्यांच्या हातीं दिल्हें, एवढें कीं त्यांस
आपल्यापुढून घालविलें. २१ कां कीं त्याने
**दावीदाच्या** घराण्यापासून **इस्राएलाला** फाडून
काढिलें, मग त्यानी **नबाटाचा** पुत्र **यराबाम**
याला राजा करून ठेविलें, आणि **यराबामाने**
**इस्राएलाला** **परमेश्वरापासून** फिरवून त्यांस
मोठ्या पापांत घातलें. २२ मग **इस्राएलाचीं**
संतानें **यराबामाच्या** केलेल्या सर्व पापांत चाललीं;
त्यांपासून तीं फिरलीं नाहींत. २३ **परमेश्वराने**
आपले सर्व सेवक भविष्यवादी यांकडून असें सां-
गितलें होतें, तसें त्याने **इस्राएलाला** आपल्या दृ-
ष्टीपुढून दूर केलें तोंपर्यंत; असें **इस्राएल** आप-
ल्या देशापासून **आश्शूरांत** नेले जाऊन ते आज-
पर्यंत तसे आहेत.

२४ नंतर आश्शूराच्या राजाने बाबेल व कुथा
व आव्वा व हमाथ व सफारवाइम यांतले लोक
आणून शोमरोनांतील नगरांमध्यें इस्राएलाच्या
संतानांच्या ठिकाणीं वसविले, यास्तव ते शोम-
रोन वतनासाठीं पावून तेथल्या नगरांत राहिले.
२५ आणि त्यांच्या तेथें राहण्याच्या प्रारंभीं
असें झालें कीं त्यानी परमेश्वराचें भय धरिलें
नव्हतें, यास्तव परमेश्वराने त्यांमध्यें सिंह पाठ-
विले आणि त्यानी त्यांस मारिलें. २६ यास्तव
कोणी आश्शूराच्या राजाला सांगितलें कीं, “जीं
राष्ट्रें त्वां पाडाव करून शोमरोनांतील नगरांमध्यें
वसविलीं, तीं त्या देशाच्या देवाचा धर्म जाणत
नाहींत, यास्तव त्याने त्यांवर सिंह पाठविले आ-
हेत, आणि पाहा, ते त्यांस जिवें मारितात का
कीं ते त्या देशाच्या देवाचा धर्म जाणत नाहींत.”
२७ तेव्हां आश्शूराच्या राजाने असी आज्ञा दि-
ल्ही कीं, “तुह्मी जे उपाध्ये तेथून पाडाव करून
आणिले त्यांतून कोणीएक घेऊन जा; ह्मणजे
त्यानी तेथें जाऊन राहावें, आणि त्यांस त्या देशा-
च्या देवाचा धर्म शिकवावा.” २८ मग त्यानी
जे उपाध्ये शोमरोनांतून पाडाव करून नेले होते,
त्यांतला एक बेथेलांत जाऊन राहिला, आणि
परमेश्वराचें भय कसें धरावें, हें त्याने त्यांस शि-
कविलें. २९ तथापि एका एका राष्ट्राने आपापले
देव केले, आणि जीं उंच स्थानें शोमरोन्यानी
केलीं होतीं, त्यांतल्या घरांत एक एक राष्ट्र जेथें
जेथें राहिलें तेथें तेथें त्यानी त्यांस ठेविलें. ३०
ह्मणजे बाबेलांतल्या माणसानी सुक्कोथबनोथ देवी
केल्या, आणि कुथांतल्या माणसानी नेरगाल के-
ला, आणि हमाथांतल्या माणसानी अशीमा केला.
३१ आणि आव्वी यानी निभाज व तार्ताक केला,
आणि सफारावी यानी आद्राम्मेलेक व अनाम्मे-
लेक जे सफरव्यांचे देव, त्यांसाठीं आपलीं लें-
करें अग्नींत जाळिलीं. ३२ आणि त्यानी आ-
पण परमेश्वराची धास्ती धरीत असतांहि नीच
लोक घेऊन आपल्यासाठीं उंच स्थानांवरले उपा-
ध्ये केले; यास्तव ते त्यांच्यासाठीं उंच स्थानां-
च्या घरीं उद्योग करीत होते. ३३ ते लोक पर-
मेश्वराची धास्ती बाळगीत होते; तथापि ज्या
राष्ट्रांतून ते आणिले होते, त्यांच्या धर्माप्रमाणें
आपल्या देवांची सेवा करीत होते. ३४ ते
आपल्या पूर्वीच्या धर्माप्रमाणें आजपर्यंत करीत
आहेत; ते परमेश्वराचें भय धरीत नाहींत,
आणि त्यांस जे नेम व जो धर्म, ह्मणजे शास्त्र
व विधि लाविला, त्याप्रमाणें करीत नाहींत;
तो कोणता? तर ज्या याकोबाचें नांव परमेश्व-
राने इस्राएल ठेविलें, त्याच्या संतानांस जो
लाविला तो. ३५ आणि परमेश्वराने त्यांसीं
करार करून त्यांस आज्ञा देतां सांगितलें होतें
कीं, “तुह्मी दुसऱ्या देवांचें भय धरूं नका, आ-
णि त्यांचें भजन करूं नका, त्यांची सेवाहि करूं
नका, आणि त्यांच्याजवळ यज्ञ करूं नका. ३६
तर केवळ परमेश्वर, ज्याने तुह्मास मिसर दे-
शांतून मोठ्या बळाने व लांबविलेल्या बाहूने आ-
णिलें, त्याचें भय तुह्मी धरा, आणि त्याचें भजन
करा, आणि त्याच्याजवळ यज्ञ करा. ३७ आ-
णि जे नेम व जे विधी व जें शास्त्र व जी जी आ-
ज्ञा त्याने तुमच्यासाठीं लिहिली, त्याप्रमाणें तुह्मी
सर्वकाळ संभाळून चाला, आणि दुसऱ्या देवांचें
भय धरूं नका. ३८ आणि जो करार म्या तु-
ह्मासीं केला, तो तुह्मी विसरूं नका, आणि तुह्मी
दुसऱ्या देवांचें भय धरूं नका. ३९ तर तुह्मी
आपला देव परमेश्वर याचेंच भय धरा; ह्म-
णजे तो तुह्मास तुमच्या सर्व शत्रूंच्या हातांतून
राखील.” ४० तथापि त्यानी ऐकिलें नाहीं, परंतु
त्यानी आपल्या पूर्वीच्या धर्माप्रमाणेंच केलें. ४१
असीं तीं राष्ट्रें परमेश्वराची धास्ती धरीत अस-
तांहि आपल्या मूर्त्तींची सेवा करीत होतीं, अण-
खी त्यांचीं लेंकरें व त्यांच्या लेंकरांचीं लेंकरें,
जसें त्यांचे वडील करीत होते, तसें आजपर्यंत
करीत आहेत.

## अध्याय १८.

तर इस्राएलाचा राजा एलाचा पुत्र होशेया या-
च्या तिसऱ्या वर्षी असें झालें कीं यहूदाचा
राजा आहाब याचा पुत्र हिज्कीया राज्य करूं
लागला. २ तो राज्य करूं लागला तेव्हां पंच-
वीस वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमांत
एकोणतीस वर्षें राज्य केलें; त्याच्या आईचें नांव
अबी, आणि ती जखऱ्याची कन्या होती. ३ आ-

णि परमेश्वराच्या दृष्टींत जें नीट तें, असें त्याच्या
वडील दावीदानें केलें होतें, त्या सर्वांप्रमाणें त्यानें
केलें. ४ त्यानें उंच स्थानें काढून टाकिलीं, आ-
णि मूर्त्ती फोडून टाकिल्या, भजनवनहि तोडून टा-
किलें, आणखी जो पितळ्याचा साप मोशानें केला
होता, तो त्यानें कुटून टाकिला; कारण कीं त्या
दिवसापर्यंत इस्राएलाचीं संतानें त्याजवळ धूप जा-
ळीत होतीं, आणि त्यानें त्याला पितळ्याचा तुक-
डा, असें ह्मटलें. ५ त्यानें इस्राएलाचा देव पर-
मेश्वर यावर आशा ठेविली, असी कीं यहूदाचे
राजे जे त्याच्यामागें आणि त्याच्यापूर्वी झाले त्या
सर्वांमध्यें त्यासारिखा कोणी नव्हता. ६ कां कीं
तो परमेश्वराला चिकटून राहत होता, त्यापा-
सून फिरला नाहीं, आणि परमेश्वरानें आपल्या
ज्या आज्ञा मोशाजवळ दिल्ह्या, त्या त्यानें पाळि-
ल्या. ७ आणि परमेश्वर त्याला असा अनुकूल
होता कीं ज्या कशाला तो गेला त्यांत सफळ झा-
ला, आणि त्यानें आश्शूराच्या राजाविषयीं फितून
त्याची चाकरी केली नाहीं. ८ त्यानें गाज्जा तेथ-
पर्यंत पलिष्टी लोकांस मारिलें, आणि त्याची सीमा
पहरेकऱ्यांच्या बुरुजापासून बंदिस्तीच्या नगरा-
पर्यंत मारिली.

९ आणि हिज्कीया राजाच्या चवथ्या वर्षी,
ह्मणजे इस्राएलाचा राजा एलाचा पुत्र होशा
याच्या सातव्या वर्षी, असें झालें कीं आश्शूराचा
राजा शाल्मानेसेर यानें शोमरोनावर चढून येऊन
त्याला वेढा घातला. १० आणि तीन वर्षांच्या
शेवटीं त्यांनी तें घेतलें; हिज्कीयाच्या साहाव्या
वर्षी, ह्मणजे इस्राएलाचा राजा होशा याच्या न-
वव्या वर्षी, शोमरोन घेतलें गेलें. ११ मग आ-
श्शूराच्या राजानें इस्राएलाला पाडाव करून आ-
श्शूरास नेलें; आणि हलाह व नहरगोझांतील
हाबोरांत आणि मादायूच्या नगरांत त्यांस ठेविलें.
१२ कारण कीं त्यांनी आपला देव परमेश्वर
याचा शब्द मानिला नाहीं, परंतु त्याचा करार
ह्मणजे जें परमेश्वरानें आपला सेवक मोशे या-
कडून आज्ञेनें लाविलें, तें अवघें त्यांनी उल्लंघिलें;
त्यांनी ऐकिलें नाहीं आणि केलेंहि नाहीं.

१३ आणखी हिज्कीया राजाच्या चवदाव्या
वर्षी आश्शूराचा राजा सान्हेरीब यानें यहूदांतल्या
बंदिस्तीच्या सर्व नगरांवर चढून येऊन तीं घेतलीं.
१४ नंतर यहूदाचा राजा हिज्कीया यानें लाखी-
शास आश्शूराच्या राजाजवळ पाठवून ह्मटलें कीं,
"मजपासून अपराध झाला; तूं माझ्याजवळून फि-
रून जा; जें तूं मजवर घालसील, तें मी पत्क-
रीन." यास्तव आश्शूराच्या राजानें यहूदाचा रा-
जा हिज्कीया यावर रुप्याचे तीनशें शेकेल व
सोन्याचे तीस शेकेल घातले. १५ तेव्हां परमे-
श्वराच्या मंदिरांत आणि राजाच्या घरांतल्या
भांडारांत जो पैका निघाला, तो अवघा हिज्कीयानें
दिल्हा. १६ परमेश्वराच्या देवळाच्या कवाडांवर
आणि स्तंभांवर जी मढणी यहूदाचा राजा हि-
ज्कीया यानें केली होती, ती त्या वेळेस हिज्की-
यानें काढिली आणि आश्शूराच्या राजाला दिल्ही.

१७ यानंतर आश्शूराच्या राजानें तार्तान
व राबसारीस व राबशाके यांस मोठ्या लष्करा-
सुद्धां लाखीशाहून यरूशालेमास हिज्कीया रा-
जाजवळ पाठविलें; तेव्हां ते वर यरूशालेमास
आले, आणि वरलें तळें, जें परटाच्या शेताच्या
सडकेवर त्याच्या चढण्याच्या ठिकाणीं येऊन उभे
राहिले. १८ आणि त्यांनी राजाला बोलावणें पा-
ठविलें, यास्तव हिज्कीयाचा पुत्र एल्याकीम, जो
घराचा अधिकारी व शेबना चिटणीस व असा-
फाचा पुत्र योवाह इतिहासक हे त्याजवळ बाहेर
गेले. १९ तेव्हां राबशाक्यानें त्यांस ह्मटलें,
"आतां तुह्मी हिज्कीयाला सांगा, मोठा राजा आ-
श्शूराचा राजा यानें असें ह्मटलें कीं, "जी आशा
तूं धरितोस, ती ही काय? २० तूं असें बोल-
तोस (परंतु बोलणें व्यर्थ आहे) कीं, 'मला लढाया-
साठीं बुद्धि व पराक्रम आहे.' तर आतां त्वां को-
णावर आशा ठेविली आहे, ह्मणून तूं मजवर फि-
तूर करितोस? २१ आतां पाहा, तो चेचलेली
काठी मिसर इजवर तूं आपली आशा ठेवितोस;
तशावर जो कोणी टेंकतो, त्याच्या हाताला ती रु-
तून भोसकील; मिसरी राजा फारो यावर जे
आशा ठेवितात, त्या सर्वांस तो तसाच आहे.
२२ आणि जर तुह्मी मला ह्मणाल कीं, 'आह्मी
आपला देव परमेश्वर यावर आशा ठेवितों;'
तर ज्याचीं उंच स्थानें व वेद्या हिज्कीयानें काढून
यहूदाला व यरूशालेमाला असें सांगितलें कीं,

‘तुह्मी यरूशालेमांत या वेदीपुढें भजन करा,’ तो
तोच कीं नाहीं! २३ तर आतां तूं माझा धनी
आश्शूराचा राजा याची पुरती निशा कर, ह्मणजे
दोन हजार घोडे, जर तुला आपले स्वार त्यांवर
बसवितां येतील तर मी तुला देईन. २४ तर
माझ्या धन्याच्या कनिष्ठ सेवकांतल्या एका सर्दा-
रार्चे तोंड कसें फिरविसील, आणि आपल्याला रथ
व स्वार होण्यासाठीं मिसरावर आशा ठेवसील?
२५ आतां मी या ठिकाणाचा नाश करायाला
यावर परमेश्वरावांचून चढून आलों कीं काय?
परमेश्वराने मला सांगितलें, ‘तूं त्या देशावर
जाऊन त्याचा नाश कर.’” २६ तेव्हां हिज्की-
याचा पुत्र एल्याकीम व शेब्ना व योवाह यांनी
रबशाक्याला ह्मटलें, “आतां तूं आपल्या सेव-
कांजवळ अरामी भाषेने बोल; कारण कीं आह्मी
ती समजतों, आणि गांवकुसावरल्या लोकांच्या
ऐकण्यांत यहूदी भाषेने आह्मासीं बोलूं नको.”
२७ मग रबशाक्याने त्यांस ह्मटलें, “माझ्या
धन्याने मला तुझ्या धन्याजवळच किंवा तुझ्या
जवळच ह्या गोष्टी बोलायास पाठविलें कीं काय?
जीं माणसें गांवकुसावर बसलीं आहेत, त्यांजवळ
नाहीं कीं काय? ह्मणजे त्यांनी तुमच्यासंगतीं आ-
पला गू खावा, आणि आपला मूत प्यावा.
२८ तेव्हां रबशाके उभा राहिला आणि मो-
ठ्या स्वराने ओरडून यहूदी भाषेंत असें ह्मणाला
कीं, “मोठा राजा, आश्शूराचा राजा, याचें वचन
तुह्मी ऐका. २९ त्या राजाने असें सांगितलें
आहे, ‘हिज्कीयाने तुह्मास फसवूं नये, कां तर
तो तुह्मास माझ्या हातांतून सोडवायाला शक्ति-
मान् नाहीं. ३० अणखी हिज्कीयाने परमेश्वर
तुह्मास खचीत सोडवील, आणि हें नगर आश्शू-
राच्या राजाच्या हातीं दिल्हें जाणार नाहीं, असें
ह्मणून तुह्माकडून परमेश्वरावर विश्वास ठेववूं
नये.’ ३१ तुह्मी हिज्कीयाचें ऐकूं नका, कारण
कीं आश्शूराच्या राजाने असें सांगितलें आहे,
‘तुह्मी मजसीं भेट देण्याचा करार करून बाहेर
माझ्याजवळ या; नंतर ज्याचें त्याने आपापल्या
द्राक्षवेलाचें व आपापल्या अंजिराचें खावें, आणि
ज्याचें त्याने आपापल्या विहिरीचें पाणी प्यावें.
३२ मी येऊन जो देश तुमच्या देशासारिखा,
धान्याचा व द्राक्षरसाचा देश, अन्नाचा व द्राक्ष
मळ्यांचा देश, जैतून तेलाचा व मधेचा देश, तेथें
तुह्मास नेईन तोंपर्यंत; ह्मणजे तुह्मी जगाल आ-
णि मरणार नाहीं; तर हिज्कीयाचें तुह्मी ऐकूं
नका, कारण कीं तो तुह्मास फूस लावून ह्मणतो कीं,
‘परमेश्वर आह्मास सोडवील.’ ३३ राष्ट्रांच्या
देवांनी आपापला देश आश्शूराच्या राजाच्या
हातांतून खचीत सोडविला आहे कीं काय? ३४
हमाथ व आर्पाद यांचे देव कोठें? सफारवाइम
हेना व इव्वा यांचे देव कोठें? त्यांनी शोमरो-
नाला माझ्या हातांतून सोडविलें कीं काय? ३५
ज्यांनी आपापला देश माझ्या हातांतून सोडविला,
त्या देशांच्या सर्व देवांत असे कोणते? तर परमे-
श्वराने यरूशालेम माझ्या हातांतून सोडवावें हें
कसें घडेल?” ३६ तेव्हां लोक उगेच राहिले,
त्यांनी एका शब्देंकरूनहि त्याला उत्तर दिल्हें
नाहीं, कारण कीं राजाची आज्ञा असी होती कीं,
“तुह्मी उत्तर देऊं नका.” ३७ नंतर हिल्की-
याचा पुत्र एल्याकीम घराचा अधिकारी व शे-
ब्ना चिटणीस व आसाफाचा पुत्र योवाह इ-
तिहासक यांनी आपलीं वस्त्रें फाडून हिज्कीया-
जवळ जाऊन त्याला रबशाक्याच्या गोष्टी सां-
गितल्या.

## अध्याय १९.

आणि हिज्कीया राजाने हीं ऐकिलीं तेव्हां असें
झालें कीं त्याने आपलीं वस्त्रें फाडलीं, आ-
णि तो आपल्या अंगावर तरट घेऊन परमेश्वरा-
च्या मंदिरास गेला. २ आणि त्याने एल्याकीम
घराचा अधिकारी व शेब्ना चिटणीस व वडील
याजक अंगीं तरट पांघरलेले आमोजाचा पुत्र
यशाया भविष्यवादी याजवळ पाठविले. ३ या-
साठीं कीं त्यांनी त्याला सांगावें कीं, “हिज्कीया
असें सांगतो, ‘हा दिवस संकटाचा व फजितीचा
व धिकाराचा दिवस आहे, कारण कीं लेंकरें ज-
न्मायाला आलीं असतां, प्रसूत होण्याची शक्ति
नाहीं. ४ रबशाके, ज्याला त्याचा धनी आश्शू-
राचा राजा याने जिवंत देवाला निंदायासाठीं
पाठविलें, त्याच्या अवघ्या गोष्टी तुझा देव परमे-
श्वर कदाचित मनांस आणील, आणि ज्या गोष्टी

तुझा देव **परमेश्वर** याने ऐकिल्या आहेत, त्यां-
चा निषेध तो करील; यास्तव तूं जें शेष राहिलें
आहे त्यासाठीं प्रार्थना कर." ५ यास्तव हिज्की-
या राजाचे सेवक यशायाजवळ गेले. ६ तेव्हां
यशायाने त्यांस ह्मटलें, "तुह्मी आपल्या धन्याला
सांगा, '**परमेश्वर** असें सांगतो, 'ज्या गोष्टी त्वां
ऐकिल्या, जिहींकरून आश्शूराच्या राजाच्या
चाकरानी माझी निंदा केली, त्यांवरून तूं भिऊं
नको. ७ पाहा, मी त्यावर वारा उठवीन, आणि
तो वर्त्तमान ऐकून माघारा आपल्या देशांत जा-
ईल; मग मी त्याच्या देशांत त्याला तरवारीने
पाडीन."

८ यानंतर आश्शूराच्या राजाने लाखीश
सोडिलें ह्मणून राबशाकयाने ऐकिल्यावर तो मा-
घारा गेला; तेव्हां त्याला तो लिब्न्यासीं लढतां
सांपडला. ९ आणि त्याने कुशाचा राजा ति-
र्हाका याविषयीं असें ऐकिलें कीं, "पाहा, तो तु-
जसीं लढायाला बाहेर आला आहे." मग त्याने
फिरून जासुदास हिज्कीयाजवळ पाठवून ह्म-
टलें कीं, १० "तुह्मी यहूदाचा राजा हिज्कीया
याला असें सांगा कीं, 'ज्या देवावर तूं भरंवसा
ठेवितोस त्याने यरूशालेम आश्शूराच्या राजा-
च्या हातीं दिल्हें जाणार नाहीं,' असें ह्मणून तुला
फसवूं नये. ११ पाहा, आश्शूराच्या राजानी सर्व
देशांचें जें केलें, ह्मणजे त्यांचा नाशोत्सर्ग केला,
तें त्वां ऐकिलें आहे; तर तूं निभावसील काय?
१२ गोजान व हारान व रेजेफ व थलासारां-
तले एदेनी लोक, अशा ज्या राष्ट्रांचा नाश मा-
झ्या वडिलानी केला, त्यांच्या देवानी त्यांस नि-
भावविलें कीं काय? १३ हमाथाचा राजा व
अर्पादाचा राजा व सफारवाइम नगर, हेना, व
इव्वा, यांचा राजा कोठें आहे?"

१४ आणि हिज्कीयाने जासुदांच्या हातांतून
तीं पत्रें घेऊन वाचिलीं, मग हिज्कीयाने वर पर-
मेश्वराच्या मंदिरांत जाऊन तें **परमेश्वरापुढें**
पसारिलें. १५ तेव्हां हिज्कीयाने **परमेश्वरा-**
पुढें असी प्रार्थना केली कीं, "हे इस्राएलाच्या
देवा **परमेश्वरा**, तूं करुबांमध्यें राहतोस, केवळ
तूंच पृथ्वीच्या सर्व राज्यांवर देव आहेस, त्वां
आकाश व पृथ्वी उत्पन्न केली. १६ हे **परमे-
श्वरा**, तूं आपला कान देऊन ऐक; हे **परमेश्वरा**,
तूं आपले डोळे उघडून पाहा; आणि सान्हेरीब,
ज्याने त्याला जिवंत देवाची निंदा करायासाठीं
पाठविलें, त्याच्या गोष्टी ध्यानांत आण. १७
हे **परमेश्वरा**, आश्शूराच्या राजानी राष्ट्रांचा व
त्यांच्या देशांचा नाश केला आहे, खरें. १८
आणि त्यानी त्यांचे देव अग्नींत टाकिले, कारण
कीं ते देव नव्हते; केवळ मनुष्यांच्या हातांचें
काम, लांकूड व दगड होते, यास्तव त्यानी त्यांचा
नाश केला. १९ तर आतां, हे **परमेश्वरा**
आमच्या देवा, तूं आह्मास त्याच्या हातांतून
अगत्य तार; यासाठीं कीं पृथ्वींतल्या सर्व राज्यांत
कळलें जावें कीं तूं **परमेश्वर**, केवळ तूंच देव
आहेस."

२० नंतर आमोजाचा पुत्र यशाया याने हि-
ज्कीयाजवळ पाठवून ह्मटलें, "इस्राएलाचा देव
**परमेश्वर** असें सांगतो, 'जी प्रार्थना त्वां आ-
श्शूराचा राजा सान्हेरीब याविषयीं माझ्याज-
वळ केली, ती म्या ऐकिली आहे.' २१ पर-
मेश्वराने त्याविषयीं जें वचन सांगितलें तें असें
कीं, जीयोनेच्या कुमारी कन्येने तुला धिकारून
तुच्छ केलें; यरूशालेमाच्या कन्येने तुझ्यामागें
डोकें डोलविलें आहे. २२ त्वां कोणाची निंदा
व विटंबना केली? त्वां कोणावर आपला शब्द
उंचावला आणि आपले डोळे वरती लाविले?
तर इस्राएलाच्या पवित्रावर. २३ त्वां आपल्या
जासुदांकडून प्रभूला निंदून ह्मटलें, 'मी आपले
पुष्कळ रथ घेऊन डोंगरांवरल्या उंच ठिकाणीं ल-
बानोनाच्या बाजूवर चढून जाईन, आणि त्याव-
रले उंच देवदारु व त्यावरले निवडक भद्रदारु
तोडून घेईन, आणि त्याच्या सीमेंतल्या वस्तींत
त्याच्या कार्मेल वनांत जाईन. २४ मी खाणून
परक्यांचें पाणी प्यालों; म्या आपल्या तळपाया-
नी दुर्गांच्या सर्व नद्या कोरड्या केल्या आहेत.
२५ म्या हा संकल्प दीर्घ काळापासून केला, पू-
र्वींच्या दिवसांपासून हा योजिला, हें त्वां ऐकिलें
नाहीं काय? आतां हा म्या सिद्धीस नेला ह्मणून
त्वां बांदिस्तीच्या नगरांच्या उजाडीचे ढीग केले
आहेत. २६ यास्तव त्यांतले राहणारे बळहीन
झाले, ते विस्मित होऊन अधोमुख झाले, कुरणां-

तल चारा व धाब्यांवरल्या गवताची कोवळी हि-
रवळ, व वाढ पावल्यापूर्वी करपलेलें धान्य यांसा-
रिखे ते झाले. २७ तरी तुझें बसणें, व तुझें
बाहेर जाणें, व तुझें आंत येणें, व मजवर जो
तुझा क्रोध तो मला ठाऊक आहे. २८ मजवर
तुझा क्रोध व तुझे गर्व, ते माझ्या कानीं चढून
आले आहेत, यास्तव मी आपली वेसन तुझ्या
नाकांत आणि आपली होटाळी तुझ्या मुखांत घा-
लीन, आणि ज्या वाटेने तूं आलास तिजवरून
तुला फिरवीन. २९ तुला वर हीच खूण, यंदा
जें स्वतां रुझेल तें खाल, आणि दुसऱ्या वर्षी
जें त्यांत सहज रुझेल तें खाल; मग तिसऱ्या
वर्षी तुह्मी पेरा व पीक कापा, आणि द्राक्षबाग
लवा व त्यांतलीं फळें खा. ३० आणि यहूदा-
च्या घराण्याचें राहिलेलें शेष खालीं मुळी धरील,
आणि वर फळ देईल. ३१ कारण कीं यरू-
शालेमांतून शेष आणि सीयोन डोंगरांतून निभाव
निघेल; परमेश्वराच्या आवेशाने हें घडेल.
३२ यास्तव परमेश्वर आश्शूराच्या राजाविषयीं
असें सांगतो कीं, 'तो या नगरांत येणार नाहीं,
एथें बाणहि सोडणार नाहीं ; याच्यापुढें ढाल-
हि धरणार नाहीं, आणि यावर मोरचा बांध-
णार नाहीं. ३३ ज्या वाटेने तो आला, तिज-
वरून माघारा जाईल; असा तो या नगराजवळ
येणार नाहीं;' हें परमेश्वराचें वचन आहे.
३४ अणखी 'मी आपल्याकरितां व आपला सेवक
दावीद याकरितां या नगराला तारून संरक्षण
करीन.'"

३५ तेव्हां त्याच रात्रीं असें झालें कीं परमे-
श्वराच्या दूताने जाऊन आश्शूरी सैन्यांत एक
लाख पंचाशीं हजार मारिले; मग सकाळीं त्यां-
च्या उठायाच्या वेळेस, पाहा, तीं सर्व मेलेलीं
मढीं होतीं. ३६ यावरून आश्शूराचा राजा
सान्हेरीब निघून माघारा गेला आणि निनव्यांत
राहिला. ३७ आणि असें झालें कीं तो आपला
देव निस्रोख याच्या घरीं भजन करीत असतां,
त्याचे पुत्र आद्राम्मेलेख व शारेजेर यांनी त्याला
तरवारीने मारिलें; मग ते अराराट देशांत पळून
गेले, आणि त्याचा पुत्र एसारहाद्दोन याने त्याच्या
ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय २०.

त्या दिवसांत हिज्कीयाला मरणाचें दुखणें ला-
गलें; तेव्हां आमोजाचा पुत्र यशाया भवि-
ष्यवादी याने त्याच्याजवळ येऊन त्याला ह्मटलें,
"परमेश्वर असें सांगतो कीं, 'तूं आपल्या घराला
निरवानिरव कर, कारण कीं तूं मरणार आहेस,
जगणार नाहींसच.'" २ तेव्हां त्याने आपलें तोंड
भिंतीकडे फिरवून परमेश्वराजवळ असी प्रा-
र्थना केली कीं, ३ "हे परमेश्वरा, मी तुझ्या-
पुढें खरेपणाने व शुद्ध हृदयाने चाललों आणि
तुझ्या दृष्टींत बरें केलें, याची आतां तूं अगत्य
आठवण कर." तेव्हां हिज्कीया फार रडला. ४
मग असें झालें कीं यशाया मधल्या चौकापर्यंत
गेला नव्हता तेव्हां त्याला परमेश्वराचें असें व-
चन प्राप्त झालें कीं, ५ "तूं माघारा जाऊन मा-
झ्या लोकांचा अधिकारी हिज्कीया याला ह्मण,
'तुझा वडील दावीद याचा देव परमेश्वर असें
सांगतो, 'म्यां तुझी प्रार्थना ऐकिली, तुझा अश्रुपात
पाहिला आहे; पाहा, मी तुला बरें करितों; तूं
तिसऱ्या दिवशीं परमेश्वराच्या मंदिरास चढून
जाशील. ६ आणि मी तुझ्या आयुष्यावर पंधरा
वर्षें वाढवीन, अणखी मी तुला व या नगराला
आश्शूराच्या राजाच्या हातांतून सोडवीन; मी आ-
पल्याकरितां व माझा सेवक दावीद याकरितां या
नगराचें संरक्षण करीन.'" ७ तेव्हां यशायाने
सांगितलें, "अंजिराची ढेप मिळवावी." नंतर
त्यांनी ती मिळवून फोडावर बसविली आणि तो
जगला. ८ हिज्कीयाने तर यशायाला ह्मटलें,
"परमेश्वर मला बरें करील, आणि मी तिसऱ्या
दिवशीं परमेश्वराच्या मंदिरास चढून जाईन,
याविषयीं खूण काय?" ९ तेव्हां यशायाने ह्म-
टलें, "परमेश्वराने जी गोष्ट सांगितली, ती तो
करील, याविषयीं परमेश्वराकडून तुला हीच
खूण; सावलीने दाहा अंशांवरून पुढें चालावें,
किंवा दाहा अंशांवरून मागें फिरावें, कोणतें व्हा-
वें?" १० तेव्हां हिज्कीयाने ह्मटलें, "सावलीने
दाहा अंशांवरून पुढें चालावें हें हलकें; असें
नको, तर सावलीने दाहा अंशांवरून पाठीमागें
फिरावें." ११ मग यशाया भविष्यवाद्याने

परमेश्वराची प्रार्थना केली, आणि सावली आ-
हाजाच्या कालयंत्रावर ज्या अंशांवरून उतरली
होती, त्या दाहा अंशांवरून पाठीमागें फिरली.
१२ त्या वेळेस बाबेलाचा राजा बालदानाचा
पुत्र बरोदाखबालदान याने हिज्कीयाजवळ पत्रें व
भेट पाठविली; कारण कीं हिज्कीयाला दुखणें
लागलें, हें त्याने ऐकिलें होतें. १३ तेव्हां हि-
ज्कीयाने त्यांचें ऐकून आपल्या उंच वस्तूंचें सर्व
घर, रुपें, व सोनें, व किराणे, व उंची तेल, व
आपल्या डागिण्यांचें सर्व घर, व आपल्या भांडा-
रांत जें कांहीं अढळलें, तें त्यांस दाखविलें; जें
हिज्कीयाने त्यांस दाखविलें नाहीं, असें त्याच्या
घरांत व त्याच्या सर्व राज्यांत कांहीं राहिलें नाहीं.
१४ नंतर यशाया भविष्यवादी याने हिज्कीया
राजाजवळ जाऊन त्याला पुसलें, "हीं माणसें
काय बोललीं? आणि कोठून तुझ्याजवळ आलीं?"
तेव्हां हिज्कीयाने सांगितलें, "तीं दूर देशांतून
बाबेलाहून आलीं." १५ अणखी त्याने पुसलें,
"त्यांनी तुझ्या घरांत काय पाहिलें?" तेव्हां हि-
ज्कीयाने सांगितलें, "माझ्या घरांत जें कांहीं, तें
त्यांनी पाहिलें; जें म्यां त्यांस दाखविलें नाहीं, असें
माझ्या भांडारांत कांहीं राहिलें नाहीं." १६ नंतर
यशायाने हिज्कीयाला ह्मटलें, "तूं परमेश्वराचें
वचन ऐक; १७ पाहा, असे दिवस येतात कीं
तुझ्या वडिलांनी आजपर्यंत जें मिळविलें आणि जें
कांहीं तुझ्या घरांत, तें सर्व बाबेलास नेलें जाईल,
कांहीं राहणार नाहीं," असें परमेश्वर सांगतो.
१८ "तुझे पुत्र, जे तुजपासून उत्पन्न होतील, ज्यांस
तूं जन्म देसील, त्यांतले कित्येक ते घेऊन जा-
तील, मग ते बाबेलाच्या राजाच्या रंगमहालांत
हिजडे होतील." १९ तेव्हां हिज्कीयाने यशा-
याला ह्मटलें, "जें परमेश्वराचें वचन त्वां सां-
गितलें, तें उत्तम आहे." अणखी त्याने ह्मटलें,
"जर माझ्या दिवसांत सुख व सत्यता असली,
तर उत्तम नव्हे कीं काय?" २० हिज्कीयाच्या
राहिलेल्या गोष्टी आणि त्याचा अवघा पराक्रम
आणि जें तळें ह्मणजे वरलें त्याने बांधून नगरांत
पाणी कसें आणिलें, तीं सर्व यहूदाच्या राजांच्या
इतिहासाच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं
काय? २१ हिज्कीया तर आपल्या वडिलांच्या-
संगतीं निजला, आणि त्याचा पुत्र मनाश्शे याने
त्याच्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय २१.

मनाश्शे राज्य करूं लागला, तेव्हां तो बारा
वर्षांचा होता, आणि त्याने पंचावन वर्षें यरू-
शालेमांत राज्य केलें; त्याच्या आईचें नांव हर
हेफजीबा. २ आणि जीं राष्ट्रें परमेश्वराने
इस्राएलाच्या संतानांपुढून घालविलीं, त्यांच्या ओं-
गळपणांप्रमाणें त्याने परमेश्वराच्या दृष्टींत वा-
ईट केलें. ३ आणि ज्या उंच स्थानांचा नाश
त्याचा बाप हिज्कीया याने केला होता, तीं त्याने
फिरून बांधिलीं; बालासाठीं वेद्याहि बांधिल्या,
आणि इस्राएलाचा राजा आहाब याने जसें केलें
होतें, तसें त्याने भजनवन केलें, आणि आकाशां-
तल्या सर्व सैन्यांची भक्ति व सेवा केली. ४
आणि ज्याविषयीं परमेश्वराने सांगितलें होतें
कीं, "मी आपलें नाम यरूशालेमांत ठेवीन," त्या
परमेश्वराच्या मंदिरीं त्याने वेद्या बांधिल्या;
५ ह्मणजे परमेश्वराच्या मंदिराच्या दोन्ही चौ-
कांमध्यें अवघ्या आकाशमंडळासाठीं वेद्या बांधि-
ल्या. ६ अणखी त्याने आपला पुत्र अग्नींत घा-
तला, आणि अभाळ पाहून भाकिलें व गारूडीपण
केलें, आणि भूतसंचार व जादूगिरी केली; या प्रकारें
त्याने परमेश्वराच्या दृष्टींत फार वाईट करून
चिडणूक केली. ७ आणि जें भजनवन त्याने
केलें होतें त्याची मूर्त्ति त्या मंदिरांत मांडिली,
ज्याविषयीं परमेश्वराने दावीदाला व त्याचा
पुत्र शलमोन याला सांगितलें होतें कीं, "या
मंदिरांत आणि जें यरूशालेम म्यां इस्राएलाच्या
सर्व वंशांतून निवडलें त्यांत मी आपलें नाम सर्व-
काळ ठेवीन. ८ आणि जो देश म्यां इस्राएला-
च्या वडिलांस दिल्हा, त्याच्या बाहेर त्यांचे पाय
फिरून फिरते करणार नाहीं; केवळ ज्या आज्ञा
म्यां त्यांस दिल्ह्या त्या अवघ्यांप्रमाणें, आणि
माझा सेवक मोशे याने जें शास्त्र त्यांस दिल्हें
त्या अवघ्यांप्रमाणें करायास जर ते संभाळतील,
तर तसें करीन." ९ तथापि त्यांनी ऐकिलें
नाहीं, आणि ज्या राष्ट्रांस परमेश्वराने इस्राए-
लाच्या संतानांपुढून नाश करून घालविलें होतें,

त्यांपेक्षा अधिक वाईट करायास मनाश्श्याने
त्यांस भुलविलें.
१० मग परमेश्वराने आपले सेवक भवि-
ष्यवादी यांकडून सांगितलें कीं, ११ "यहूदाचा
राजा मनाश्शे याने हीं ओंगळपणें केलीं, आणि
त्याच्यापूर्वी जे अमोरी होते तें जे करीत असत
त्या सर्वांपेक्षां वाईट केलें आहे, आणि आपल्या
मूर्त्तीकडून यहूदालाहि पापांत घातलें; १२ ह्मणून
इस्राएलाचा देव परमेश्वर असें सांगतो, 'पाहा,
मी यरूशालेमावर व यहूदावर असें वाईट आ-
णितों कीं जो कोणी तें ऐकेल, त्याचे दोन्ही कान
भणभणतील. १३ असें मी यरूशालेमावर
शोमरोनाचें प्रमाणसूत्र आहाबाच्या घराण्याचा
ओळंबा लावीन, आणि जसा कोणी वाटी पुसून
पालथी करून ठेवितो, तसा मी यरूशालेमास
पुसून टाकीन. १४ तेव्हां मी आपल्या वतनां-
तल्या राहिलेल्यांचा त्याग करून त्यांस त्यांच्या
शत्रूंच्या हातीं देईन, मग ते आपल्या सर्व शत्रूंला
लूट व लुंघवण असे होतील. १५ कारण कीं
त्यानी माझ्या दृष्टींत वाईट केलें, आणि ज्या
दिवशीं त्यांचे वडील मिसरांतून निघाले, तेव्हां-
पासून आजपर्यंत ते मला चिडवीत आले." १६
आणखी मनाश्श्याने यहूदाला पापांत घालून पर-
मेश्वराच्या दृष्टींत वाईट केलें, त्याच्या त्या
पापाखेरीज त्याने निर्दोष्यांचा रक्तपात फारच
केला, एवढा कीं यरूशालेम जिकडे तिकडे भरलें.
१७ मनाश्श्याच्या राहिलेल्या गोष्टी, त्याने जें
कांहीं केलें, आणि त्याने जीं पापें केलीं तीं सर्व
यहूदाच्या राजांच्या इतिहासाच्या पुस्तकांत लि-
हिलेलीं नाहींत कीं काय? १८ मनाश्शे तर
आपल्या वडिलांच्यासंगतीं निजला आणि आप-
ल्या घरच्या बागांत, ह्मणजे उज्जाच्या बागांत
पुरला गेला, आणि त्याचा पुत्र आमोन याने त्या-
च्या ठिकाणीं राज्य केलें.
१९ आमोन राज्य करूं लागला, तेव्हां तो
बावीस वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमांत
दोन वर्षें राज्य केलें; त्याच्या आईचें नांव मशु-
लेमेथ, आणि ती यट्बांतल्या हारूजाची कन्या
होती. २० आणि त्याचा बाप मनाश्शे या-
ने जसें केलें होतें, तसें त्याने परमेश्वराच्या
दृष्टींत वाईट केलें. २१ आणि त्याचा बाप ज्या
मार्गाने चालला, त्या सर्वांत तो चालला, आणि
त्याच्या बापाने ज्या मूर्त्तींची सेवा केली होती,
त्यांची सेवा व त्यांचें भजन त्याने केलें. २२
असें त्याने आपल्या वडिलांचा देव परमेश्वर
याला टाकिलें, आणि परमेश्वराच्या मार्गांत चा-
लला नाहीं. २३ मग आमोन राजाच्या सेव-
कानी त्यावर फितूर करून त्याला त्याच्या घरीं
जिवें मारिलें. २४ नंतर ज्यानी आमोन राजा-
वर फितूर केला, त्या सर्वांस देशांतल्या लोकानी
मारिलें, आणि देशांतल्या लोकानी त्याच्या ठि-
काणीं त्याचा पुत्र योशीया याला राजा केलें.
२५ आमोनाच्या राहिलेल्या गोष्टी, ज्या त्यापासून
घडल्या, त्या तर यहूदाच्या राजांच्या इतिहासां-
च्या पुस्तकांत लिहिलेल्या नाहींत कीं काय? २६
आणि उज्जाच्या बागांत तो आपल्या कबरेंत पु-
रला गेला, आणि त्याचा पुत्र योशीया याने त्या-
च्या ठिकाणीं राज्य केलें.

## अध्याय २२.

योशीया राज्य करूं लागला तेव्हां तो आठ
वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमांत
एकतीस वर्षें राज्य केलें; त्याच्या आईचें नांव
यदीदा, आणि ती बसकाथांतला अदाया याची
कन्या होती. २ आणि परमेश्वराच्या दृष्टींत
जें नीट, तें त्याने केलें, ह्मणजे तो आपला वडील
दावीद याच्या सर्व मार्गांने असा चालला कीं
उजव्याकडे किंवा डाव्याकडे फिरला नाहीं. ३
तेव्हां योशीया राजाच्या अठराव्या वर्षीं अ-
सें झालें कीं राजाने मशुल्लामाचा पुत्र असल्या
याचा पुत्र शाफान जो चिटणीस, त्याला परमे-
श्वराच्या मंदिरास पाठवून सांगितलें, ४ "मुख्य
याजक हिल्कीया याजवळ तूं जा, आणि जो पैका
परमेश्वराच्या मंदिरीं आणलेला आहे, ह्मणजे
जो लोकांजवळून द्वारपाळानी गोळा केला आहे,
तो त्याने मोजावा. ५ मग त्यानी काम करावि-
णारे, जे परमेश्वराच्या मंदिरावर नेमलेले,
त्यांच्या स्वाधीन तो करावा; मग त्यानी, जे
परमेश्वराच्या मंदिरीं काम करितात, त्यांस
मंदिराची मोडतोड नीट करायासाठीं तो द्यावा.

६ ह्मणजे सुतार व गवंडी व पाथरट यांस आणि
मंदिर नीट करायाचीं लांकडें व घडलेले दगड
विकत घ्यायास द्यावा." ७ तथापि जो पैका
त्यांच्या स्वाधीन केला, त्याचा हिशोब त्यांज-
वळून घेतला गेला नाहीं, कारण कीं ते विश्वासानें
काम करीत होते.
८ नंतर मुख्य याजक हिल्कीया यानें शा-
फान चिटणीसाला सांगितलें, "परमेश्वराच्या
मंदिरीं मला शास्त्राचें पुस्तक सांपडलें." मग
हिल्कीयानें तें पुस्तक शाफानाला दिल्हें, आणि
त्यानें तें वाचिलें. ९ नंतर शाफान चिटणीस
राजाजवळ आला, आणि वर्त्तमान माघारें आणून
त्यानें राजाला सांगितलें, "जो पैका मंदिरीं मि-
ळाला होता, तो तुझ्या सेवकांनीं काढून काम कर-
विणारे, जे परमेश्वराच्या मंदिरावर नेमलेले,
त्यांच्या स्वाधीन केला आहे." १० अणखी शाफान
चिटणीसानें राजाला असें सांगितलें कीं, "हिल्की-
या याजकानें मला पुस्तक दिल्हें आहे." नंतर
शाफानानें तें राजापुढें वाचिलें. ११ तेव्हां
असें झालें कीं राजानें त्या शास्त्रपुस्तकांतल्या गो-
ष्टी ऐकिल्या असतां त्यानें आपलीं वस्त्रें फाडलीं.
१२ नंतर राजानें हिल्कीया याजक, व शाफाना-
चा पुत्र अहीकाम, व मिखायाचा पुत्र आख्बोर
व शाफान चिटणीस, व राजाचा सेवक असाया,
यांस आज्ञा दिल्ही कीं, १३ "तुह्मी जाऊन या
सांपडलेल्या पुस्तकांतल्या गोष्टींविषयीं माझ्यासा-
ठीं व या लोकांसाठीं ह्मणजे सर्व यहूदासाठीं
परमेश्वराजवळ विचार करा; कां तर परमेश्व-
राचा जो कोप आह्मावर जळतो, तो मोठा;
कारण कीं आह्मासाठीं जें लिहिलेंलें, त्या सर्वां-
प्रमाणें करायास आमच्या वडिलांनीं या पुस्तकां-
तल्या गोष्टी ऐकिल्या नाहींत. १४ यास्तव हि-
ल्कीया याजक व अहीकाम व आख्बोर व शा-
फान व असाया, हे हारहासाचा पुत्र तिक्वा
याचा पुत्र शाल्लुम जो वस्त्रांचा राखणारा, त्या-
ची स्त्री हुल्दा भविष्यवादिणी इच्याजवळ जा-
ऊन तिशीं बोलले; ती तर यरूशालेमांतल्या
पाठशाळेंत राहत होती. १५ तेव्हां तिनें त्यांस
ह्मटलें, "इस्राएलाचा देव परमेश्वर असें सां-
गतो, ज्या माणसानें तुह्मास माझ्याजवळ पाठ-
विलें, त्याला तुह्मी सांगा, १६ परमेश्वर असें
सांगतो, 'पाहा, जें पुस्तक यहूदाच्या राजानें वा-
चिलें, त्याच्या सर्व गोष्टींतलें वाईट या ठिकाणा-
वर व यांतल्या राहणाऱ्यांवर मी आणितों; १७
कारण कीं त्यांनीं मला टाकून दुसऱ्या देवां-
जवळ धूप जाळिले, येणेंकरून त्यांनीं आपल्या
हातांच्या सर्व कामानें मला असें चिडविलें कीं
माझा कोप या ठिकाणावर पेटला आहे आणि तो
विझणार नाहीं.' १८ आणि यहूदाचा राजा,
ज्यानें तुह्मास परमेश्वराजवळ विचारायाला
पाठविलें, त्याला तुह्मी हें सांगा, इस्राएलाचा देव
परमेश्वर असें सांगतो, 'ज्या गोष्टी त्वां ऐकिल्या
त्यांविषयीं मी ह्मणतों कीं, १९ जें म्या या
ठिकाणाविषयीं व यांतल्या राहणाऱ्यांविषयीं सां-
गितलें कीं, 'ओसाड व शापित होईल,' हें त्वां
ऐकल्यावरून तुझें मन कोमळ झालें, आणि त्वां
परमेश्वरापुढें असी नम्रता धरिली कीं आपलीं
वस्त्रें फाडून माझ्यापुढें शोक केला, यास्तव म्या-
हि तुझें ऐकिलें आहे, असें परमेश्वर ह्मणतो.
२० ह्मणून पाहा, मी तुला तुझ्या वडिलांशीं मि-
ळवीन, आणि तूं आपल्या कबरेंस सुखानें मिळ-
सील, आणि जें कांहीं वाईट मी या ठिकाणावर
आणीन, तें तुझ्या दृष्टीस पडणार नाहीं." याप्रमा-
णें त्यांनीं वर्त्तमान माघारें राजाजवळ पोहंचविलें.

## अध्याय २३.

मग राजानें दूत पाठविले आणि त्यांनीं यहूदां-
तल्या व यरूशालेमांतल्या सर्व वडिलांस त्या-
जवळ मिळविलें. २ तेव्हां राजा परमेश्वराच्या
मंदिरास चढून गेला, आणि त्याच्यासंगतीं यहू-
दांतलीं सर्व माणसें, व यरूशालेमांतले सर्व राह-
णारे, व याजक, व भविष्यवादी, व लाहानमोठ्या-
सुद्धां सर्व लोक गेले; मग कराराचें जें पुस्तक
परमेश्वराच्या मंदिरीं सांपडलें होतें, त्यांतल्या
सर्व गोष्टी त्यानें त्यांच्या ऐकण्यांत वाचिल्या. ३
तेव्हां राजानें खांबाजवळ उभें राहून परमेश्वरा-
पुढें असा करार केला कीं, आपण परमेश्वराला
अनुसरूं, आणि त्याच्या आज्ञा व त्याचीं प्रमाणें
व त्याच्या नेमणुकी सर्व अंतःकरणानें व सर्व जी-
वानें पाळूं, ह्मणजे त्या पुस्तकांत लिहिलेल्या या

कराराच्या गोष्टी स्थापाव्या, सर्व लोकहि करारा-
साठीं उभे राहिले. ४ मंतर राजाने मुख्य या-
जक हिल्कीया व दुसऱ्या टोळीचे याजक व द्वार-
पाळ, यांस असी आज्ञा दिल्ही कीं, "बाल व
भजनवन व आकाशांतला सर्व समुदाय यांसाठीं
जीं पात्रें केलेलीं होतीं तीं सर्व परमेश्वराच्या दे-
वळांतून बाहेर काढा." मग त्याने तीं यरूशालेमा-
च्या बाहेर किद्रोनाजवळच्या शेतामध्यें जाळिलीं,
आणि त्यांची राख बेथएलास नेली. ५ आणि
उंच स्थानांवर व यहूदांतल्या नगरांत व यरूशाले-
माच्या चहुंकडल्या ठिकाणीं धूप जाळायाला य-
हूदाच्या राजानी जे परके याजक ठेविले होते,
ह्मणजे बाल व सूर्य व चंद्र व ग्रह आदिकरून
आकाशांतला सर्व समुदाय यांपुढें जे धूप जाळीत
होते, ते त्याने नाहींसे केले. ६ आणि परमेश्व-
राच्या मंदिरीं जें भजनवन, तें त्याने काढून य-
रूशालेमाबाहेर किद्रोन ओहळाजवळ नेलें; मग
तें किद्रोन ओहळावर जाळून धुळी एवढें बारीक
केलें, आणि त्याची धूळ सामान्य लोकांच्या कब-
रांवर टाकिली. ७ आणि परमेश्वराच्या मंदिरीं
जीं राखलेल्या पुरुषांचीं घरें, ज्यांत स्त्रिया भज-
नवनासाठीं देव्हारे विणून करीत होत्या, तीं त्याने
मोडिलीं. ८ आणखी त्याने ते सर्व याजक यहू-
दांतल्या नगरांतून बाहेर लाविले, आणि गेब्यापा-
सून बेरशेब्यापर्यंत जीं उंच स्थानें, जेथें त्या या-
जकांनी धूप जाळिला होता, तीं विटाळलीं; आणि
दरवाज्याजवळचीं उंच स्थानें, जीं नगरचा अधि-
कारी यहोशवा याच्या वेसीच्या प्रवेशाजवळ,
ह्मणजे नगराच्या वेसींतून जातांना कोणीएकाच्या
डाव्याकडे होतीं, तीं त्याने मोडिलीं. ९ उंच
स्थानांचे याजक यरूशालेमांत जी परमेश्वरा-
ची वेदी तिच्याजवळ मात्र चढून जात नव्हते,
परंतु ते आपल्या भावांमध्यें बेखमीर भाकरी खात
होते. १० आणखी हिन्नोमाच्या संतानांच्या खि-
ंडींत जें तोफेथ, तें त्याने असें विटाळलें कीं कोणी
आपला पुत्र किंवा आपली कन्या मोलेखासाठीं
अग्नींत न घालावी. ११ आणि बाहेरल्या वस्त्यां-
मध्यें नाथान मेलेक हिजडा याच्या कोठडीजवळ
परमेश्वराच्या मंदिरास जायाचें ठिकाण ते-
थले घोडे, जे यहूदाच्या राजानी सूर्याला दिल्हे
होते, ते त्याने दूर केले, आणि सूर्याचे रथ अग्नींत
घालून जाळिले. १२ आणखी आहाजाच्या माडी-
च्या गच्चीवर ज्या वेद्या यहूदाच्या राजानी केल्या
होत्या, आणि ज्या वेद्या मनाश्शयाने परमेश्वरा-
च्या मंदिराच्या दोहों चौकांत बांधिल्या होत्या,
त्या राजाने मोडून तेथून अपटून टाकिल्या, आ-
णि त्यांची धूळ किद्रोन ओहळांत घातली. १३
आणि यरूशालेमासमोर नासक्या डोंगराच्या
उजव्याकडे जीं उंच स्थानें इस्राएलाचा राजा श-
लमोन याने सिदोन्यांचें ओकटें आष्टोरेथ इच्या-
साठीं, व मोवाबाचें ओकटें खमोश याच्यासाठीं,
व आम्मोनी लोकांचें ओंगळपण मिल्कोम यांच्या-
साठीं बांधिलीं होतीं, तीं राजाने विटाळलीं. १४
आणि त्याने मूर्त्ती फोडल्या, भजनवनेंहि तोडून
टाकिलीं, मग त्यांच्या ठिकाणीं माणसांचीं हाडें
भरिलीं.

१५ आणखी बेथएलाजवळ जी वेदी व उंच
ठिकाण नबाटाचा पुत्र यराबाम, ज्याने इस्राएला-
लाहि पापांत घातलें, त्याने रचून केलें होतें, ती
वेदी व तें उंच ठिकाण त्याने मोडून टाकिलें, आणि
तें उंच ठिकाण जाळून बारीक धूळ केली, भजन-
वनहि जाळिलें. १६ तेव्हां योशीयाने वळून तेथें
डोंगरावर ज्या कबरा होत्या त्या पाहिल्या, मग
त्याने पाठवून त्या कबरांतून हाडें काढून त्या वेदी-
वर जाळिलीं; देवाच्या ज्या माणसाने ह्या गोष्टी
गाजविल्या, त्याने परमेश्वराचें जें वचन घोषण
केलें, त्याप्रमाणें तें विटाळलें. १७ मग त्याने वि-
चारिलें, "जें थडें माझ्या दृष्टीस पडतें तें कोणाचें
आहे?" तेव्हां नगरांतल्या माणसांनी त्याला सां-
गितलें, "देवाच्या ज्या माणसाने यहूदांतून येऊन
बेथएलांतल्या या वेदीविषयींच्या गोष्टी ज्या तुज-
पासून घडल्या, त्या ह्या मोठ्याने सांगितल्या हो-
त्या, त्याचें हें थडें आहे." १८ तेव्हां त्याने
सांगितलें, "तें राहूं द्या, कोणी त्याचीं हाडें ढळवूं
नये." असीं त्याचीं हाडें, जो भविष्यवादी शो-
मरोनांतून आला होता, त्याच्या हाडांसुद्धां असूं
दिल्हीं. १९ आणखी शोमरोनी नगरांमध्यें उंच
स्थानांचीं घरें, जीं इस्राएलाच्या राजानी बांधिलीं
व चिडणूक केली, तीं सर्व योशीयाने काढून टा-
किलीं; जीं कामें त्याजपासून बेथएलांत घडलीं हो-

तीं, त्या सर्वांप्रमाणें त्यांस केलें. २० तेव्हां उंच
स्थानांचे जे याजक तेथें होते त्या सर्वांस त्यानें
त्या वेद्यांवर मारिलें, आणि मनुष्यांचीं हाडें त्यांवर
जाळिलीं; मग तो माघारा यरूशालेमास आला.
२१ तेव्हां राजानें सर्व लोकांस असी आज्ञा
दिल्ही कीं, "या कराराच्या पुस्तकांत लिहिलेल्या-
प्रमाणें तुह्मी आपला देव **परमेश्वर** यासाठीं
वल्हांडण सण करा." २२ तर ज्या न्यायाधिशानी
इस्राएलाचा न्याय केला, त्यांच्या दिवसांत आणि
इस्राएलाचे राजे व यहूदाचे राजे यांच्या सर्व दि-
वसांत असा वल्हांडण सण पाळला गेला नाहीं.
२३ हा वल्हांडण सण योशीया राजाच्या अठरा-
व्या वर्षी यरूशालेमांत **परमेश्वरा**साठीं पाळला
गेला. २४ अणखी भूतसंचारणी व जादूकरी
व मूर्त्ती व पुतळे आणि जीं ओंगळपणें यहूदा
देशांत व यरूशालेमांत दृष्टीस पडलीं, तीं अव-
घीं योशीयानें नाहींसीं केलीं; येणेंकरून हिल्की-
या याजक याला **परमेश्वराच्या** मंदिरीं जें
पुस्तक सांपडलें, त्यांतलीं लिहिलेलीं वचनें स्था-
पिलीं. २५ तर त्यासारिखा राजा, जो मो-
शाच्या सर्व शास्त्राप्रमाणें आपल्या सर्व अंतःकर-
णानें, व आपल्या सर्व जिवानें, व आपल्या सर्व
शक्तीनें **परमेश्वरा**कडे फिरला, तसा कोणी त्या-
च्यापूर्वी नव्हता, आणि त्याच्यापुढें त्यासारिखा
कोणी उत्पन्न झाला नाहीं. २६ तथापि ज्या
चिडणुकींनी मनाश्शेयानें **परमेश्वराला** चिडविलें
होतें, त्या अवघ्यांमुळें त्याचा जो राग यहूदावर
पेटला, त्या आपल्या मोठ्या जळत्या रागांतून तो
फिरला नाहीं. २७ अणखी **परमेश्वरानें** सां-
गितलें होतें, "जसें म्या इस्राएलाला घालविलें,
तसें मी आपल्यापुढून यहूदालाहि घालवीन; आ-
णि हें यरूशालेम नगर, जें म्या निवडिलें त्याचा
आणि ज्या मंदिराविषयीं म्या सांगितलें होतें कीं,
'माझें नाम तेथें होईल,' त्याचा मी अव्हेर करीन."
२८ योशीयाच्या राहिलेल्या गोष्टी आणि त्यानें
जें कांहीं केलें तीं सर्व यहूदाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय?
२९ त्याच्या दिवसांत मिसऱ्यांचा राजा फा-
रो नखो फराथ नदीजवळ आश्शूराच्या राजावर
चढून गेला; तेव्हां योशीया राजा त्यासीं लढा-
यास गेला, आणि त्यानें त्याला मगिद्दोमध्यें पाह-
तांच जिवें मारिलें. ३० नंतर त्याच्या सेवकां-
नी त्याचें प्रेत रथावर घालून मगिद्दोहून यरू-
शालेमास आणिलें, आणि त्याला त्याच्या कब-
रेंत पुरिलें; तेव्हां देशांतल्या लोकांनी योशीयाचा
पुत्र यहोवाहाज याला घेऊन अभिषेक केला,
आणि त्याला त्याच्या बापाच्या ठिकाणीं राजा के-
लें. ३१ यहोवाहाज राज्य करूं लागला, तेव्हां
तो तेवीस वर्षांचा होता, आणि त्यानें यरूशाले-
मांत तीन महिने राज्य केलें; त्याच्या आईचें नांव
हमूटाल, आणि ती लिब्नेंतला इर्म्या याची कन्या
होती. ३२ आणि त्यानें आपल्या वडिलानी जें
केलें त्या सर्वांप्रमाणें **परमेश्वराच्या** दृष्टींत वाईट
केलें. ३३ आणि फारो नखो यानें हमाथ देशां-
तला रिब्ला तेथें त्याला यरूशालेमांतल्या रा-
ज्यांतून काढून बंद केलें, आणि शंभर शेकेल रुपें
व एक शेकेल सोनें असा दंड देशाला लाविला.
३४ आणि फारो नखोनें योशीयाचा पुत्र एल्या-
कीम याला त्याचा बाप योशीया याच्या ठिकाणीं
राजा केलें, आणि त्याचें नांव फिरवून यहोयाकीम
ठेविलें, आणि यहोवाहाजाला नेलें, मग तो मि-
सरांत जाऊन तेथें मेला. ३५ तेव्हां यहोयाकी-
मानें तें रुपें व सोनें फारोला दिल्हें, परंतु त्यानें
फारोच्या सांगण्यावरून तो पैका द्यायाला देशा-
वर पट्टी ठरवून बसविली; त्यानें फारो नखोला तें
सोनें व रुपें द्यायासाठीं देशांतल्या लोकांजवळून
एकएकाच्या ठरविलेल्या धनाप्रमाणें उगवून घेतलें.
३६ यहोयाकीम राजा झाला, तेव्हां तो पंचवीस
वर्षांचा होता, आणि त्यानें यरूशालेमांत अकरा
वर्षें राज्य केलें; त्याच्या आईचें नांव जबूदा,
आणि ती रूमांतला पदाया याची कन्या होती.
३७ आणि त्यानें आपल्या वडिलानी जें केलें त्या
सर्वांप्रमाणें **परमेश्वराच्या** दृष्टींत वाईट केलें.

## अध्याय २४.

त्याच्या दिवसांत बाबेलाचा राजा नबुखाद्-
नेज्जार चढून आला असतां, यहोयाकीम
तीन वर्षें त्यांचा सेवक झाला; नंतर उलटून त्या-
ला प्रतिकूल झाला. २ वास्तव **परमेश्वरानें**
त्यावर खास्द्यांच्या टोळ्या व अरामाच्या टोळ्या

व मोआबाच्या टोळ्या व आम्मोनी लोकांच्या टो-
ळ्या पाठविल्या; असें परमेश्वराने आपले से-
वक भविष्यवादी यांकडून आपलें जें वचन सांगि-
तलें होतें, त्याप्रमाणें यहूदावर त्याचा नाश करा-
याला त्या पाठविल्या. ३ निश्चयें परमेश्वरा-
च्या सांगण्यावरून यहूदावर तसें झालें कीं त्याने
त्यांस मनाश्शाने जीं पापें केलीं त्या सर्व पापांमुळें
आपल्यापुढून घालवावें. ४ आणखी त्याने निर्दो-
ष्यांचा जो रक्तपात केला त्यामुळें कारण कीं त्याने
निर्दोष्यांचें रक्त यरूशालेमांत एवढें भरिलें कीं
परमेश्वर क्षमा करायास मान्य झाला नाहीं.
५ यहोयाकीमाच्या राहिलेल्या गोष्टी आणि त्याने
जें कांहीं केलें, तीं सर्व यहूदाच्या राजांच्या इति-
हासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत कीं काय!
६ यहोयाकीम तर आपल्या वडिलांच्या संगतीं
निजला, आणि त्याचा पुत्र यहोयाखीन यानें त्या-
च्या ठिकाणीं राज्य केलें. ७ मिसरी राजा तर
आपल्या देशांतून फिरून आला नाहीं, कारण कीं
मिसरी ओहळापासून फराथ नदीपर्यंत जें मिसरी
राजाचें होतें, तें अवघें बाबेलाच्या राजाने घेतलें
होतें. ८ यहोयाखीन राजा झाला, तेव्हां तो
अठरा वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमांत
तीन महिने राज्य केलें; त्याच्या आईचें नांव नहु-
ष्टा, आणि ती यरूशालेमांतला एलनाथान याची
कन्या होती. ९ आणि त्याने आपल्या बापाने जें
केलें त्या अवघ्याप्रमाणें परमेश्वराच्या दृष्टींत
वाईट केलें.

१० त्या वेळेस बाबेलाचा राजा नबुखाद्-
नेज्झार याचे सेवक यरूशालेमावर चढून आले,
आणि तें नगर वेढलें गेलें. ११ मग बाबेलाचा
राजा नबुखाद्नेज्झार याचे सेवक त्यावर वेढा
राखीत असतां, आपणहि नगरावर आला. १२
नंतर यहूदाचा राजा यहोयाखीन तो, आपली
आई व आपले सेवक व आपले सर्दार व आ-
पले हिजडे, यांसुद्धां बाहेर बाबेलाच्या राजाज-
वळ गेला; तेव्हां त्याच्या राज्याच्या आठव्या वर्षी
बाबेलाच्या राजाने त्याला धरिलें. १३ आणि
जसें परमेश्वराने सांगितलें होतें तसें त्याने पर-
मेश्वराच्या मंदिराच्या भांडारांतल्या सर्व वस्तू
व राजाच्या घरच्या भांडारांतल्या वस्तू तेथून ने-
ल्या; आणि परमेश्वराच्या देवळांतलीं सोन्या-
चीं भांडीं जीं इस्राएलाचा राजा शलमोन याने
केलीं होतीं तीं सर्व तोडून घेतलीं. १४ आणखी
त्याने सर्व यरूशालेम, ह्मणजे सर्व सर्दार व सर्व
पराक्रमी पुरुष पाडाव करून नेले; ते पाडाव के-
लेले दाहा हजार होते; सर्व सुतार व कासारहि
नेले; देशांतल्या दरिद्री लोकांशिवाय कोणी राहि-
ला नाहीं. १५ असें त्याने यहोयाखीनाला बा-
बेलास नेलें; आणि राजाची आई, व राजाच्या
स्त्रिया, व त्याचे हिजडे, व देशांतले पराक्रमी,
हे त्याने पाडाव करून यरूशालेमाहून बाबेलास
नेले. १६ सर्व पराक्रमी माणसें तर सात हजार,
आणि सुतार व कासार एक हजार होते; सर्व
लढाऊ पुरुष बाबेलाच्या राजाने पाडाव करून
बाबेलाजवळ नेले.

१७ आणि बाबेलाच्या राजाने त्याच्या ठि-
काणीं त्याचा काका मात्तान्या राजा करून त्याचें
नांव फिरवून सिद्कीया ठेविलें. १८ जेव्हां
सिद्कीया राजा झाला, तेव्हां तो एकवीस वर्षां-
चा होता, आणि त्याने यरूशालेमांत अकरा वर्षे
राज्य केलें; त्याच्या आईचें नांव हमूटाल, आणि
ती लिब्नेंतला इर्म्या याची कन्या होती. १९
त्याने तर जसें यहोयाकीमाने केलें होतें त्या अ-
वघ्याप्रमाणें परमेश्वराच्या दृष्टींत वाईट केलें.
२० कां कीं परमेश्वराच्या क्रोधाने यरूशाले-
मांत व यहूदांत असें झालें कीं त्याने त्यांस आ-
पल्या पुढून घालविलें तोंपर्यंत सिद्कीयाने बाबे-
लाच्या राजावर फितूर केला.

## अध्याय २५.

आणखी त्याच्या राज्याच्या नवव्या वर्षी दाहा-
व्या महिन्याच्या शुद्ध दशमीस असें झालें कीं
बाबेलाचा राजा नबुखाद्नेज्झार आपल्या सर्व
सैन्यांसुद्धां यरूशालेमावर आला, आणि त्याने
त्यावर तळ धरून त्याच्या चहुंकडे आवार बां-
धिलें. २ असें तें नगर वेढलें जाऊन सिद्कीया
राजाच्या अकराव्या वर्षापर्यंत राहिलें. ३ तेव्हां
महिन्याच्या शुद्ध नवमीस नगरांत दुष्काळ असा
भारी झाला कीं देशांतल्या लोकांस अन्न नव्हतें.
४ मग नगर फुटलें गेलें, तेव्हां खास्दी नगरावर

चहुंकडे होते, यावरून लढाईचीं सर्व माणसें रा-
जाच्या बागाजवळ दोहो भिंतींमध्यें जी वेस, त्या
वाटेने रात्रीं पळालीं, आणि राजा सपाटीच्या वा-
टेने गेला. ५ तथापि खास्दी सैन्याने राजाच्या
पाठीस लागून त्याचें सर्व सैन्य त्यापासून उधळलें
असतां, यरीहोजवळच्या सपाटीवर त्याला आटो-
पलें. ६ आणि त्यानी राजाला धरून रिब्लास
बाबेलाच्या राजाजवळ नेलें, मग त्यानी त्याचा
न्याय ठरविला. ७ आणि त्यानी झिद्कीयाचे
पुत्र त्याच्या देखतां वधिलें, नंतर झिद्कीयाचे
डोळे फोडिले, आणि पितळ्याच्या दोन बंदानी
त्याला बांधून बाबेलास नेलें.

८ तेव्हां पांचव्या महिन्याच्या शुद्ध सप्तमीस,
ह्मणजे बाबेलाचा राजा नबुखाद्नेज्जार याच्या
राज्याच्या एकुणविसाव्या वर्षी, बाबेलाच्या राजा-
चा सेवक हुजऱ्यांचा सर्दार नबूजारदान यरू-
शालेमास आला. ९ तेव्हां त्याने परमेश्वरा-
चें मंदिर व राजाचें घर जाळिलें, आणि यरू-
शालेमांतलीं सर्व घरें, ह्मणजे सर्व मोठीं घरें अ-
ग्नि लावून जाळिलीं. १० आणि खास्द्यांचें जें
सर्व सैन्य हुजऱ्यांच्या सर्दारासंगतीं त्यानी यरू-
शालेमाचे कोट चहुंकडून पाडून टाकिले. ११
आणखी लोकांचें जें शेष नगरांत राहिलें होतें,
आणि जे फितूरकरी बाबेलाच्या राजाकडे फितले
आणि इतर समुदाय, त्यांस हुजऱ्यांचा सर्दार
नबूजारदान याने नेलें. १२ तथापि देशांतल्या
कित्येक दरिद्र्यांस माळी व शेतकरी होण्यासाठीं
हुजऱ्यांच्या सर्दाराने ठेविलें. १३ आणखी जे
पितळ्याचे खांब परमेश्वराच्या मंदिराला होते
ते, आणि पितळ्याचे पाये व समुद्रपात्र जीं परमे-
श्वराच्या मंदिरीं होतीं, तीं खास्द्यानी फोडून
त्यांचें पितळ बाबेलास नेलें. १४ आणि भांडीं
व कातरी व दिव्याच्या कातरी व वाट्या व पि-
तळ्याचीं सर्व भांडीं, जिहींकरून सेवा करीत
होते, तीं त्यानी नेलीं. १५ आणि अग्निधारक
व शिपायाचीं पात्रें, जें सोन्याचें तें सोनें आणि
जें रुप्याचें तें रुपें हुजऱ्यांच्या सर्दाराने नेलें.
१६ ते दोन खांब, एक समुद्रपात्र, व ते पाये
आणि जीं पात्रें शालमोनाने परमेश्वराच्या मं-
दिरासाठीं केलीं होतीं, त्या सर्वांच्या पितळ्याला
वजन नव्हतें. १७ एका खांबाची उंची अठरा
हात, आणि त्यावर पितळ्याचा कळस होता;
त्या कळसाची उंची तर तीन हात, आणि त्या
कळसाच्या चहुंकडे डाळिंबांसुद्धां जाळी, हें सर्व
पितळ्याचें होतें, आणि त्यासारिखें जाळीसुद्धां
दुसऱ्या खांबालाहि होतें.

१८ आणखी हुजऱ्यांच्या सर्दाराने मुख्य
याजक सराया व दुसरा याजक सफान्या व तीन
द्वारपाळ धरिले. १९ आणि एक हिजडा, जो
लढाईच्या माणसांवर नेमलेला तो, आणि जे
राजाजवळ उभे राहत होते त्यांतलीं पांच माण-
सें जीं नगरांत अढळलीं तीं, आणि सैन्याचा स-
र्दार जो चिटणीस देशांतल्या लोकांस मिळवीत
होता तो, आणि देशाच्या लोकांतलीं साठ माणसें
जीं नगरांत अढळलीं तीं धरिलीं. २० असें हुज-
ऱ्यांचा सर्दार नबूजारदान याने त्यांस धरून रि-
ब्लास तिकडे बाबेलाच्या राजाजवळ नेलें. २१
मग हमाथ देशांतल्या रिब्लाजवळ बाबेलाच्या
राजाने त्यांस हाणून जिवें मारिलें; असा यहू-
दा पराजित होऊन आपल्या देशांतून नेला गेला.
२२ आणि यहूदा देशांत राहिलेले लोक, जे बा-
बेलाचा राजा नबुखाद्नेज्जार याने ठेविले होते,
त्यांवर त्याने शाफानाचा पुत्र अहीकाम याचा
पुत्र गदाल्या अधिकारी केला. २३ मग सैन्या-
च्या सर्व सर्दारानी व त्यांच्या माणसानी असें
ऐकिलें कीं बाबेलाच्या राजाने गदाल्या नेमून
ठेविला, आणि नथान्याचा पुत्र इश्माएल, व का-
रेहाचा पुत्र योहानान, व तान्हुमेथाचा पुत्र नटो-
फाकर सराया, व माखाकराचा पुत्र याजान्याहि,
हे आपल्या माणसांसुद्धां गदाल्याजवळ मिज्-
प्यांत आले. २४ तेव्हां गदाल्याने त्यांजवळ
व त्यांच्या माणसांजवळ शपथ वाहून त्यांस ह्म-
टलें, "तुह्मी खास्द्यांचे सेवक होण्याविषयीं भि-
ऊं नका; देशांत राहा आणि बाबेलाच्या राजाची
सेवा करा, ह्मणजे तुमचें बरें होईल." २५
नंतर सातव्या महिन्यांत असें झालें कीं अली-
शामाचा पुत्र नथान्या याचा पुत्र राजसंतानांतला
इश्माएल याने आणि याच्यासंगतीं दाहा माण-
सानी येऊन गदाल्याला मारिलें; असा तो व
त्याच्यासंगतीं मिज्प्यांत जे यहूदी व खास्दी

होते, ते मेले. २६ नंतर सर्व लोक लाहान व
मोठे व सैन्याचे सर्दार उठून मिसरांत गेले,
कां तर ते खास्द्यांस भ्याले.
२७ मग यहूदाचा राजा यहोयाखीन याच्या
पाडावपणाच्या सततिसाव्या वर्षीं बाराव्या महि-
न्यांत महिन्याच्या सत्ताविसाव्या दिवशीं असें
झालें कीं बाबेलाचा राजा अवीलमरोदाख याने
आपल्या राज्याच्या पहिल्या वर्षी यहूदाचा राजा
यहोयाखीन याला बंदिशाळेंतून काढून याचें म-
स्तक उंचावलें. २८ आणि त्याने त्यासीं मनो-
रम गोष्टी बोलून त्याची गादी त्याच्यासंगतीं बा-
बेलांत जे राजे होते त्यांच्या गादीपेक्षां उंच केली.
२९ अणखी त्याचीं बंदांतलीं वस्त्रें पालटलीं,
मग तो आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत त्या-
च्यापुढें जेवीत असे. ३० आणि त्याचा पुरवठा
त्याच्या आयुष्याच्या सर्व दिवसांत दिवसोंदिवस
नेमाने त्याला राजाकडून पुरवठा नेहमी दिल्हा
गेला.

---

I. CHRONICLES.

# कालवृत्तांत, याचें पहिलें पुस्तक.

## अध्याय १.

आदाम, शेथ, अनोश; २ केनान, माहला-
लेल, यारेद; ३ हनोख, मथूशेलाह, ला-
मेख; ४ नोहा, शेम व हाम, व याफेथ. ५
याफेथाचे पुत्र, गोमेर व मागोग व मादाय व
यावान व थूबाल व मेशेख व थीरास. ६ आ-
णि गोमेराचे पुत्र, अश्कनाज व रीफाथ व थोगा-
र्मा. ७ आणि यावानाचे पुत्र, अलीशा व था-
र्शीश व कित्ती व दोदानी.
८ हामाचे पुत्र, खूश व मिसरी व पूट व
खनान. ९ आणि खूशाचे पुत्र, सबा व हवीला
व साब्ता व रामा व साब्तखा; आणि रामाचे
पुत्र, शबा व ददान. १० आणि खूशाने निम्रो-
दालाहि जन्म दिल्हा; तो पृथ्वीवर पहिला परा-
क्रमी झाला. ११ आणि मिसरीने लूदी व
अनामी व लहाबी व नाफ्तुही, यांस जन्म दिल्हा,
१२ अणखी पात्रुसी व कास्लुही जन्मले; यांपा-
सून पलिष्टी व काफ्तोरी होऊन निघाले. १३
आणि खनानाने, त्याचा ज्येष्ठ पुत्र सीदोन, व हेथ;
१४ आणि यबूसी व अमोरी व गिर्गाशी; १५
आणि हिव्वी व आर्की व सीनी; १६ आणि
आर्वादी व जमारी व हमाथी, यांस जन्म दिल्हा.
१७ शेमाचे पुत्र, एलाम व आश्शूर व
आर्पाक्षाद व लूद व अराम व ऊज व
हूल व गेथेर व मेशेख. १८ आणि आर्पा-
क्षादाने शालाहाला जन्म दिल्हा, मग शा-
लाहाने एबेराला जन्म दिल्हा. १९ नंतर
एबेराने दोन पुत्रांस जन्म दिल्हा; एकाचें नांव
पेलेग, कां कीं त्याच्या दिवसांत पृथ्वीची वांटणी
झाली; आणि त्याच्या भावाचें नांव यकटान. २०
तेव्हां यकटानाने आल्मोदाद व शालेफ व हजा-
रमावेथ व याराह; २१ आणि हदोराम व ऊ-
जाल व दिक्ला; २२ आणि एबाल व अबीमा-
एल व शबा; २३ आणि ओफीर व हवीला व
योबाब, यांस जन्म दिल्हा; हे सर्व यकटानाचे

पुत्र. २४ शेम, आर्पाक्षाद, शालाह; २५ एबेर,
पेलेग, रगू; २६ आणि सरूग, नाहोर, तेराह;
२७ आब्राम, तोच आब्राहाम.

२८ आब्राहामाचे पुत्र, इझाक व इश्माएल.
२९ त्यांच्या ह्या वंशावळ्या; इश्माएलाचा ज्येष्ठ
पुत्र नबायोथ, नंतर केदार व आद्बेल व मिब्-
साम; ३० मिश्मा व दूमा, मास्सा, हदाह व
थेमा; ३१ यटूर, नाफीश व केदमा; इश्माए-
लाचे पुत्र ते हेच. ३२ आणि आब्राहामाची
मागली स्त्री कटूरा, इचे पुत्र; ती झिम्रान व य-
क्षान व मदान व मिद्यान व इश्बाक व शूहा
प्रसवली; आणि यक्षानाचे पुत्र, शबा व ददान.
३३ आणि मिद्यानाचे पुत्र, एफा व एफेर व ह-
नोख व अबीदा व एल्दा; हें सर्व कटुरेचें संतान;
३४ अणखी आब्राहामाने इझाकाला जन्म दिल्हा;
इझाकाचे पुत्र एसाव व इस्राएल.

३५ एसावाचे पुत्र, अलीफाज, रगूवेल व य-
ऊश व यालाम व कोराह. ३६ अलीफाजाचे
पुत्र तेमान व ओमार, झफी व गाताम, कनाज
व तिम्ना व अमालेक. ३७ रगूवेलाचे पुत्र, ना-
हाथ, जेराह, शाम्मा व मिज्जा. ३८ आणि
सेईराचे पुत्र, लोटान व शोबाल व झिबोन व
अना व दीशोन व एजेर व दीशान. ३९ आ-
णि लोटानाचे पुत्र, होरी व होमाम, आणि लो-
टानाची बहीण तिम्ना. ४० शोबालाचे पुत्र,
आल्यान व मानाहाथ व एबाल, शफी व ओ-
नाम; आणि झिबोनाचे पुत्र, आय्या व अना.
४१ अनाचा पुत्र, दीशोन; मग दीशोनाचे पुत्र,
हाम्रान व एश्बान व इथ्रान व खरान. ४२ एझे-
राचे पुत्र, बिल्हान व झावान, याकान; दीशोनाचे
पुत्र, ऊज व अरान.

४३ आणि इस्राएलाच्या संतानावर राजाने राज्य
केल्यापूर्वी ज्या राजानी अदोम देशात राज्य केलें,
ते हेच; बौराचा पुत्र बेला, त्याच्या नगराचें नांव
तर दिन्हाबा. ४४ नंतर बेला मेल्यावर, त्याच्या
ठिकाणीं जेराहाचा पुत्र बझऱ्यांतला योबाब याने
राज्य केलें. ४५ मग योबाब मेल्यावर, त्याच्या
ठिकाणीं तेमानी देशांतला हूशाम याने राज्य के-
लें. ४६ मग हूशाम मेल्यावर, त्याच्या ठिकाणीं
बदादाचा पुत्र हदाद याने राज्य केलें; त्याने
मोवाबी शेतमाळावर मिद्यानाला मारिलें; त्या-
च्या नगराचें नांव तर अवीथ. ४७ नंतर हदाद
मेल्यावर त्याच्या ठिकाणीं मास्रेका यांतला सा-
म्ला याने राज्य केलें. ४८ मग साम्ला मेल्या-
वर, त्याच्या ठिकाणीं नदीवरल्या रहोबोथांतला
शाऊल याने राज्य केलें. ४९ नंतर शाऊल
मेल्यावर, त्याच्या ठिकाणीं आखबोराचा पुत्र बा-
लहानान याने राज्य केलें. ५० मग बालहा-
नान मेल्यावर, त्याच्या ठिकाणीं हदादाने राज्य
केलें; त्याच्या नगराचें नांव तर पाऊ, आणि
त्याच्या स्त्रीचें नांव महेटाबेल; मेझाहाबाची
कन्या मात्रेद, इची कन्या होती. ५१ नंतर
हदाद मेल्यावर अदोमांत नायक झाले; तिम्ना
नायक, आल्वा नायक, यथेथ नायक; ५२
आहलीबामा नायक, एला नायक, पीनोन नायक;
५३ कनाज नायक, तेमान नायक, मिब्झार
नायक; ५४ माग्दियेल नायक, ईराम नायक;
असे अदोमाचे नायक झाले.

## अध्याय २.

इस्राएलाचे हे पुत्र; रऊबेन, शिमोन, लेवी
व यहूदा, इस्साखार व झबुलून; २ दान,
योसेफ व बन्यामीन, नाफ्ताली, गाद, व आ-
शेर.

३ यहूदाचे पुत्र, एर व ओनान व शेला; हे
तिघे त्यापासून शूवाची कन्या खनानीण प्रसवली;
आणि यहूदाचा ज्येष्ट पुत्र एर परमेश्वराच्या
दृष्टींत वाईट होता, यास्तव त्याने त्याला मरण
दिल्हें. ४ नंतर त्याची सून थामार त्यापासून
फारेज व जाराह प्रसवली; यहूदाचे एकंदर
पुत्र पांच होते. ५ फारेजाचे पुत्र, हेज्रोन व
हामूल. ६ आणि जाराहाचे पुत्र, झिम्री व
एथान व हेमान व खाल्कोल व दारा; एकंदर
ते पांच. ७ आणि कार्मीचे पुत्र, आखार
इस्राएलाचा सतावणारा ज्याने उत्सृष्ट वस्तूवि-
षयीं अपराध केला तो. ८ आणि एथानाचे
पुत्र, अजाऱ्या; ९ आणि हेज्रोनाचे पुत्र, ज्यास
त्याने जन्म दिल्हा, ते, यराहमेल व राम व क-
लूबाय्. १० आणि रामाने आम्मीनादाबाला
जन्म दिल्हा; मग आम्मीनादाबाने नाहशोन,

जो यहूदाच्या संतानाचा अधिकारी, त्याला जन्म
दिल्हा. ११ नंतर नाहशोनाने साल्माला जन्म
दिल्हा; मग साल्माने बवाजाला जन्म दिल्हा.
१२ नंतर बवाजाने ओबेदाला जन्म दिल्हा, आ-
णि ओबेदाने इशायाला जन्म दिल्हा. १३ मग
इशायाने त्याचा ज्येष्ट पुत्र, अलियाबाला जन्म
दिल्हा; नंतर दुसरा अबीनादाब, मग तिसरा
शिम्म; १४ चवथा नथानेल, पांचवा राद्दाय्;
१५ साहावा ओझेम, सातवा दावीद जन्मला.
१६ आणि त्यांच्या बहिणी जरूया व अबीगा-
इल; आणि जरूयेचे पुत्र, अबीशाय् व योबाब
व तिसरा असाएल. १७ आणि अबीगाइलेने
अमासाला जन्म दिल्हा; अमासाचा बाप तर
येथेर इश्माएली होता. १८ आणि हेस्रोनाचा
पुत्र कालेब यापासून अजूबा त्याची स्त्री व यरि-
योथ पुत्र प्रसवली; तिचे पुत्र तर हे, येशेर व
शोबाब व आर्दोन. १९ नंतर अजूबा मेल्या-
वर, कालेबाने आपल्याला एफ्राथ नावें बायको
करून घेतली; मग ती त्यापासून हूर प्रसवली.
२० आणि हूराने ऊरीला जन्म दिल्हा; मग
ऊरीने बसालेलाला जन्म दिल्हा.

२१ आणि त्यानंतर हेस्रोन गिलादाचा बाप
माखीर याच्या कन्येजवळहि गेला, आणि साठ
वर्षांचा असतां, त्याने तिला बायको करून घेतलें,
मग ती त्यापासून सगूब प्रसवली. २२ आणि
सगूबाने याईराला जन्म दिल्हा; त्याला तर
गिलाद प्रांतांत तेवीस नगरें होतीं. २३ कां
कीं त्याने गशूरी व अरामी यांपासून कनाथ व
त्याचीं खेडीं यांसुद्धां याईर गांव एकंदर साठ
नगरें घेतलीं होतीं; तीं अवघीं गिलादाचा वडील
माखीर याच्या संतानाचीं झालीं होतीं. २४
आणि कालेबएफ्राथा तेथें हेस्रोन मेल्यावर,
हेस्रोनाची स्त्री अबीया त्यापासून राहिलेला
आश्हूर जो थकोवाचा बाप तो प्रसवली. २५
तर हेस्रोनाचा ज्येष्ठ पुत्र यराहमेल याचे पुत्र
राम तो ज्येष्ठ, मग बुना व ओरेन व ओझेम व
अहीया, हे होते. २६ आणि यराहमेलाला
दुसरी स्त्री होती, आणि तिचें नांव अटारा; ती
ओनामाची आई होती. २७ आणि यराहमे-
लाचा ज्येष्ठ पुत्र राम याचे पुत्र, माब व यामीन
व एकेर, असे होते. २८ आणि ओनामाचे
पुत्र, शाम्माय व यादा असे होते; आणि शा-
म्माय्चे पुत्र, नादाब व अबीशूर. २९ अबी-
शूराच्या स्त्रीचें नांव तर अबीहाइल, आणि ती
त्यापासून आहबान व मोलीद, हे प्रसवली. ३०
अणखी नादाबाचे पुत्र, सेलेद व अप्पाइम;
सेलेद तर पुत्रांवांचून मेला. ३१ आणि अप्पा-
इमाचें संतान, इशी; व इशीचें संतान, शेशान;
व शेशानाचें संतान, आहलाय्. ३२ आणि
शाम्माय्चा भाऊ यादा याचे पुत्र, येथेर व यो-
नाथान; येथेर तर पुत्रांवांचून मेला. ३३ आणि
योनाथानाचे पुत्र, पेलेथ व जाजा; असें यराह-
मेलाचें संतान होतें.

३४ शेशानाला तर पुत्र नव्हते, कन्या मात्र
होत्या; तेव्हां शेशानाला मिसरी चाकर होता,
त्याचें नांव तर यार्हा; ३५ आणि शेशानाने
आपला चाकर यार्हा याला आपली कन्या बाय-
को करून दिल्ही; नंतर ती त्यापासून आत्ताय्
प्रसवली. ३६ मग आत्तायाने नाथानाला
जन्म दिल्हा; आणि नाथानाने जाबादाला जन्म
दिल्हा. ३७ नंतर जाबादाने एफ्लालाला ज-
न्म दिल्हा; मग एफ्लालाने ओबेदाला जन्म दि-
ल्हा. ३८ ओबेदाने तर येहूला जन्म दिल्हा,
आणि येहूने अजार्‍याला जन्म दिल्हा. ३९ आ-
णि अजार्‍याने हालेसाला जन्म दिल्हा; नंतर
हालेसाने एलासाला जन्म दिल्हा. ४० आणि
एलासाने सिस्मायाला जन्म दिल्हा; मग सिस्मा-
याने शाल्लूमाला जन्म दिल्हा. ४१ आणि शा-
ल्लूमाने यकाम्याला जन्म दिल्हा; नंतर यकाम्याने
अलीशामाला जन्म दिल्हा.

४२ यराहमेलाचा भाऊ कालेब याचें संतान
तर, त्याचा ज्येष्ठ मेषा; तो जीफ्याचा बाप, मग
मारेशा व त्याचें संतान, तो हेब्रोनाचा बाप.
४३ आणि हेब्रोनाचे पुत्र, कोराह व तापुहा
व रेकेम व शामा. ४४ आणि शामाने या-
र्कामाचा बाप राहाम याला जन्म दिल्हा, आणि
रेकेमाने शाम्मायाला जन्म दिल्हा. ४५ आणि
शाम्माय्चा पुत्र मावोन, आणि मावोन बेथ-
सूराचा बाप होता. ४६ आणि कालेबाची
मागली स्त्री एफा, हारान व मोजा व गाजेज

हे प्रसवली; आणि हारानाने गाजेजाला जन्म
दिल्हा. ४७ आणि येहदायचे पुत्र, रेगेम व
योथाम व गेशान व फेलेद् व एफा व शाफ.
४८ कालेबाची मागली स्त्री माखा, शेबेर व
तिर्हना हे प्रसवली. ४९ आणखी तो माद्मा-
न्याचा बाप शाफ्, व माखबेन्याचा बाप, व
गिब्याचा बाप शवा हे प्रसवली; आणि काले-
बाची कन्या आक्सा होती. ५० एफ्राथेचा ज्येष्ठ
पुत्र हूर, याचा पुत्र कालेब यार्चे असें संतान
होतें; शोबाल किऱ्याथयारीमाचा बाप होता.
५१ साल्मा बेथलेहेमाचा बाप; हारेफ बेथगादे-
ऱ्याचा बाप होता. ५२ आणि किऱ्याथयारी-
माचा बाप शोबाल याचें संतान, हारवे व मनु-
होथकराचें अर्धे असें होतें. ५३ किऱ्याथ-
यारीम्याचीं कुळें तर इथ्री व पूथी व शूमाथी व
मिश्राई; यांपासून जाराथी व एष्टाउली उत्पन्न
झाले. ५४ साल्माचें संतान, बेथलेहेम व नटो-
पाथी, आटारोथ, योबाबाचें घराणें व मनाह त्यां-
चें अर्धे, जें जारी तें. ५५ आणि लेखकांचीं
कुळें, जीं याबेजांत राहत होतीं तीं, तिराथी,
शिमाथी, सुखाथी, रेखाबाच्या घराण्याचा बाप
हामाथ, यापासून जे कीनी उत्पन्न झाले, ते हेच
होते.

## अध्याय ३.

आणि दावीदाचे पुत्र, ज्यांस त्याने हेब्रोनांत
जन्म दिल्हा, ते हे होते; अहीनवाम इज्रेल-
करीण इजपासून आम्नोन तो ज्येष्ठ; अबीगाइल
कार्मेलकरीण इचा पुत्र दानीयेल, तो दुसरा;
२ गशूराचा राजा ताल्माय याची कन्या माखा
इचा पुत्र आबशालोम, तो तिसरा; हाग्गीथ
इचा पुत्र अदोनीया, तो चवथा; ३ अबीटाली-
चा पुत्र शफाट्या, तो पांचवा; त्याची स्त्री एग्ला
इचा पुत्र इथ्राम, तो साहावा; ४ या साहा
पुत्रांस त्याने हेब्रोनांत जन्म दिल्हा; कां कीं त्याने
तेथें सात वर्षे साहा महिने राज्य केलें; नंतर
यरूशालेमांत तेहेतीस वर्षे राज्य केलें. ५ आणि
यरूशालेमांत, शिमा व शोबाब व नाथान व
शलमोन, हे चौघे आम्मियेलाची कन्या बाथशूवा
इजपासून प्रसवली; ६ आणि इभार व अली-
शामा व अलीफेलेट; ७ आणि नोगा व नेफेग
व याफिया; ८ आणि अलीशामा व एल्यादा
व अलीफेलेट असे नऊ. ९ उपपत्न्यांच्या पुत्रां-
खेरीज हे सर्व दावीदाचे पुत्र; आणि त्यांची ब-
हीण थामार. १० आणि शलमोनाचा पुत्र
रहाबाम, त्याचा पुत्र अबीया, त्याचा पुत्र आसा,
त्याचा पुत्र यहोशाफाट; ११ त्याचा पुत्र यो-
राम, त्याचा पुत्र अहाज्या, त्याचा पुत्र योवाश;
१२ त्याचा पुत्र अमाज्या, त्याचा पुत्र अजाऱ्या,
त्याचा पुत्र योथाम; १३ त्याचा पुत्र आहाज,
त्याचा पुत्र हिज्कीया, त्याचा पुत्र मनाश्शे; १४
त्याचा पुत्र आमोन, त्याचा पुत्र योशीया. १५
नंतर योशीयाचा ज्येष्ठ पुत्र योहानान, दुसरा य-
होयाखीम, तिसरा सिद्कीया, चवथा शालूम.
१६ यहोयाखीमाचे पुत्र तर, त्याचा पुत्र यखन्या,
त्याचा पुत्र सिद्कीया. १७ आणि यखन्याचे
पुत्र आस्सीर, त्याचा पुत्र शल्तियेल; १८
आणि माल्कीराम व फदाया व शेनाज्जार, य-
काम्या, होशामा व नदाब्या. १९ आणि फदा-
याचे पुत्र, जरूब्बाबेल व शिमी; आणि जरू-
ब्बाबेलाचे पुत्र मशुलाम व हनान्या, आणि त्यां-
ची बहीण शलोमीथ; २० आणखी हशुबा व
ओहेल व बेरेख्या व हसाद्या, यूशाबहेसेद, असे
पांच. २१ आणि हनान्याचे पुत्र, पलाट्या व
इशाया, रफायाचे पुत्र, आर्णानाचे पुत्र ओबद्या-
चे पुत्र, शखान्याचे पुत्र. २२ शखान्याचे पुत्र
तर शमाया आदिकरून; आणि शमायाचे पुत्र,
हाट्टुश व इगाल व बारीहा व न्यार्या व शा-
फाट, असे त्यासुद्धां साहा जण. २३ आणि
न्यार्याचा पुत्र एल्योवेनाय्, व हिज्कीया व आ-
ज्रीकाम, असे तीन. २४ आणि एल्योवेनायचे
पुत्र, होदाव्या व एल्याशीब व फलाया व आक्-
कूब व योहानान व दलाया व अनानी, असे
सात.

## अध्याय ४.

यहूदाचे पुत्र, फारेज, हेस्रोन व कार्मी व हूर
व शोबाल. २ मग शोबालाचा पुत्र राया,
याने याहाथाला जन्म दिल्हा, नंतर याहाथाने अ-
हूमाय् व लाहाद यांस जन्म दिल्हा; हीं जाराथी
कुळें. ३ आणि एटामाचे पतील हे; इज्रेल व

इश्मा व इद्बाश; आणि त्यांच्या बहिणीचें नाम
हाज्झेलेल्पोनी होतें. ४ अणखी गदोराचा व-
डील पनुवेल, व एजेराचा वडील हूशा; हूराचे
पुत्र हे, ज्येष्ठ एफ्राथा, तो बेथलेहेमाचा वडील.
५ थकोवा याचा वडील आश्शूर, याला तर
दोन स्त्रिया, हेला व नारा होत्या. ६ तेव्हां
नारा त्यापासून अहुज्जाम व हेफेर व तेमनी व
अहाष्टारी हे प्रसवली; हे नारेचे पुत्र. ७ आणि
हेलेचे पुत्र, जेरेथ व यजोहार व एथ्नान. ८
आणि कोजाने आनूब व हाज्जोबेबा यांस आ-
णि हारुमाचा पुत्र अहार्हेल याच्या कुळांस
जन्म दिल्हा. ९ याबेज तर आपल्या भावांपेक्षां
अधिक सज्जन होता, आणि त्याच्या आईने म्ह-
टलें होतें कीं, "मी कष्टाने प्रसवलें;" यावरून
तिने त्याचें नांव याबेज ठेविलें. १० आणि या-
बेजाने इस्राएलाच्या देवाची असी प्रार्थना केली
कीं, "कृपेकरून मला आशीर्वाद देच दे, आणि
माझी सीमा विस्तीर्ण कर; तुझ्या हाताने मला
अनुकूळ होऊन वाईट असें दूर कर कीं त्याचे कष्ट
मला होऊं नयेत." तर जें त्याने मागितलें तें देवाने
दिल्हें. ११ आणि शूहाचा भाऊ खलूब याने
महीराला जन्म दिल्हा; तो एष्टोनाचा वडील.
१२ नंतर एष्टोनाने राफाचें घराणें, व पासेहा,
व नाहाश नगराचा वडील तहिन्ना यांस जन्म
दिल्हा; हीं रेखा याचीं माणसें. १३ आणि क-
नाजाचे पुत्र, अथ्नीयेल व सराया; नंतर अथ्नीये-
लाचे पुत्र, हथाथ व म्योनोथाय्. १४ मग म्यो-
नोथायाने आफ्राला जन्म दिल्हा; आणि सरायाने
कारागिरांच्या खिंडीचा धनी योवाब याला जन्म
दिल्हा; ते तर कारागीर होते. १५ आणि य-
फुन्ने याचा पुत्र कालेब याचे पुत्र, ईरू, एला व
नाम; आणि एलाचे पुत्र कनाज आदिकरून.
१६ आणि यहालेलेलाचे पुत्र, जीफ व जीफा,
तीर्या व असारेल. १७ आणि एज्रा याचा पुत्र
येथेर, नंतर मेरेद व एफेर व यालोन; अणखी
तिला मिर्याम व शाम्माय् व एष्टमवाचा वडील
इश्बाह झाला. १८ आणि मेरेद याची स्त्री यहु-
दीया, इला गदोराचा वडील येरेद व सोखोचा
वडील हेबेर, व जानोहाचा वडील यकूथियेल झा-
ला; फारोची कन्या बिथ्या, जिला मेरेदाने करून
घेतलें, तिचे तर ते पुत्र. १९ आणि कईला या-
चा वडील नाहाम याची बहीण होदीयाची स्त्री,
इचे पुत्र, गार्मी व माखाकर एष्टमवा. २० आ-
णि शीमोनाचे पुत्र, आम्नोन व रिन्ना, बेनहानान
व थीलोन; आणि इशीचे पुत्र, झोहेथ व बेनझो-
हेथ. २१ यहूदाचा पुत्र शेला याचें संतान, ले-
खाचा वडील एर, व मारेशाचा वडील लादा,
व आश्ब्याच्या घराण्यांतलीं कुळें, अवसी वस्त्रें क-
रणारीं घराणीं; २२ आणि योकीम व खोजे-
बाचीं माणसें व योवाश व साराफ; त्यांनी मोवा-
बात व याशुबीलेहेमात धनीपण केलें; ह्या तर
प्राचीन गोष्टी आहेत. २३ ते कुंभार होते, आणि
मळा व आवार यांत राहत होते; तेथें राजाजवळ
त्याच्या कामासाठीं राहत होते. २४ शीमोनाचे
पुत्र, नमुवेल व यामीन, यारीब, जेरा व शाऊल.
२५ त्याचा पुत्र शाल्लुम, त्याचा पुत्र मिब्साम,
त्याचा पुत्र मिश्मा; २६ आणि मिश्माचें सं-
तान असें कीं त्याचा पुत्र हमुवेल, त्याचा पुत्र
जाकूर, त्याचा पुत्र शिमी. २७ आणि शिमी-
ला सोळा पुत्र व साहा कन्या झाल्या; परंतु त्याच्या
भावांस फार पुत्र नव्हते, आणि त्यांचीं सर्व कुळें
यहूदाच्या संतानाएवढीं वाढलीं नाहींत; २८ तर
बैरशेबा व मोलादा व हजार शवाल; २९ आणि
बिल्हा व एजेम व थोलाद, ३० आणि बथुवेल
व हर्मा व जिक्लाग; ३१ आणि बेथमार्काबोथ
व हजारसुसीम व बेथबिरी व शाराइम, यांत
ते राहत होते; दावीदाच्या राज्यापर्यंत त्यांचीं तीं
नगरें होतीं. ३२ आणि त्यांचे गांव, एटाम व
आइन व रिम्मोन व थोखेन व आशान, अशा
पांच वस्त्या. ३३ आणि त्या वस्त्यांच्या चहुं-
कडे बालापर्यंत जे गांव, ते सर्व त्यांचे होते; त्यां-
विषयीं तर असें त्यांचें राहणें व त्यांची वंशावळी
झाली. ३४ आणि मशोबाब व याम्लेक व अ-
मज्याचा पुत्र योशा; ३५ आणि योवेल व
येहू; तो योशिब्याचा पुत्र, तो सरायाचा पुत्र, तो
असियेलाचा पुत्र; ३६ आणि एल्योवेनाय् व
याकोबा व यशोहाया व असाया व अदियेल व
यसीमियेल व बनाया; ३७ आणि जीजा; तो
शिफीचा पुत्र, तो आल्लोनाचा पुत्र, तो यदायाचा
पुत्र, तो शिम्रीचा पुत्र, तो शमायाचा पुत्र. ३८

ज्यांचीं नांवें घेतलीं, ते आपल्या कुळांत अधिकारी
होते, आणि त्यांच्या वडिलांचीं घराणीं फार वा-
ढिलीं.

३९ आणि ते आपल्या बकऱ्यांसाठीं चारा
शोधीत असतां, खोऱ्याच्या पूर्वेस गदोराच्या प्रवे-
शापर्यंत गेले. ४० तेव्हां त्यांस पौष्टिक व चां-
गला चारा, आणि विस्तीर्ण व शांत व स्वस्थ,
असा प्रांत मिळाला; कां तर जे हामाचे ते पूर्व-
काळीं तेथें राहत होते. ४१ आणि ज्यांचीं नांवें
लिहिलेलीं आहेत, त्यांनी यहूदाचा राजा यहि-
ज्कीया याच्या दिवसांत जाऊन त्यांच्या राहोट्या
व वस्त्या तेथें सांपडल्या, त्यांस त्यांनी मारिलें आ-
णि त्यांचा अगदी नाश करून त्यांच्या ठिकाणीं
आजपर्यंत ते राहत आले, कां कीं त्यांच्या बकऱ्यां-
साठीं तेथें चारा होता. ४२ आणि त्यांच्या तेथून
शिमोनाचे कोणी पुत्र, पांचशें माणसें, तीं इशीच्या
पुत्रांस, ह्मणजे पलाट्या व न्याऱ्या व रफाया व
उज्जियेल, यांस आपले नायक करून सेईर डों-
गरास गेलीं; ४३ आणि अमालेकांतलें निभाव-
लेलें शेष याला मारून आजपर्यंत तेथें राहत
आलीं.

## अध्याय ५.

आतां इस्राएलाचा ज्येष्ठ पुत्र रऊबेन याचें
संतान; तो तर ज्येष्ठच, परंतु त्यानें आपल्या
बापाचें अंथरूण विटाळिलें, यास्तव त्याचें ज्येष्ठ-
पण इस्राएलाचा पुत्र योसेफ याच्या संतानांस
दिल्हें गेलें; तथापि वंशावळी ज्येष्ठपणावरून मो-
जली जात नाहीं. २ कां कीं यहूदा आपल्या
भावांमध्यें पराक्रमी झाला आणि अधिकारी त्यापा-
सून झाला, परंतु ज्येष्ठपण योसेफाचें. ३ इस्राए-
लाचा ज्येष्ठ पुत्र रऊबेन याचे पुत्र, हनोख व
फाल्लू, हेस्रोन व कार्मी. ४ योवेलाचें संतान,
त्याचा पुत्र शमाया, त्याचा पुत्र गोग, त्याचा पुत्र
शिमी; ५ त्याचा पुत्र मीखा, त्याचा पुत्र
ऱ्याया, त्याचा पुत्र बाल; ६ त्याचा पुत्र ब्येरा;
त्याला आश्शूराचा राजा तिल्गाथपिल्नेसेर यानें
पाडाव करून नेलें; तो रऊबेन्यांचा अधिकारी हो-
ता. ७ आणि जेव्हां वंशावळी घेतली गेली, तेव्हां
त्याचे भाऊ यईयेल व जखऱ्या हे आपल्या
कुळांत आपल्या जन्मलेल्यांमध्यें मुख्य निघाले. ८
आणि योवेलाचा पुत्र शेमा, त्याचा पुत्र आजाज,
त्याचा पुत्र बेला, त्याची वस्ति आरोएरांत; आणि
तेथून नबो व बालमवोन तेथपर्यंत होती; ९
आणि त्याचीं गुरें गिलाद प्रांतांत फार झाल्याव-
रून त्यानें पूर्वेस फराथ नदीवर रानांत जायाच्या
ठिकाणापर्यंत वस्ति केली. १० आणि शाऊला-
च्या दिवसांत त्यांनी हाग्री यांसीं लढाई केली;
तेव्हां हे त्यांच्या हातानें पडले, यास्तव ते गिला-
दाच्या पूर्वेकडल्या सर्व देशावर त्यांच्या वस्त्यां-
मध्यें राहिले.

११ आणि त्यांच्यापुढें गादाचें संतान बाशान
प्रांतांत साल्खा तेथपर्यंत राहिलें. १२ बाशानांत
योवेल मुख्य, आणि शाफाम दुसरा, यानाय् व
शाफाटहि होते. १३ आणि त्यांच्या वडिलांच्या
कुळांत त्यांचे भाऊ, मीखाएल व मशुल्लाम व
शेबा व योराय् व याकान व जीया व एबेर, असे
सात होते. १४ हे अबीहाइलाचे पुत्र; तो हूरी-
चा पुत्र, तो गिलादाचें संतान यारोहा याचा पुत्र,
तो मीखाएलाचा पुत्र, तो यशीशाय्चा पुत्र, तो
याहदोचा पुत्र, तो बूजाचा पुत्र. १५ त्यांच्या
वडिलांच्या कुळांत गूनी याचा पुत्र, अब्दीयेल,
त्याचा पुत्र अही हा मुख्य होता. १६ आणि ते
आपल्या वाढण्यांनी गिलादांतल्या बाशानांत व
त्याकडल्या गांवांत व शारोनांतल्या सर्व खेड्यांत
राहत होते. १७ हे सर्व, यहूदाचा राजा यो-
थाम याच्या दिवसांत व इस्राएलाचा राजा यार-
बाम याच्या दिवसांत वंशावळीनें घेतले होते.

१८ रऊबेनाचें संतान व गादी व मनाश्शा-
चा अर्धा वंश, जीं शूर माणसें ढाल व तरवार
वाहत होतीं, आणि धनुष्य सज्य करीत होतीं, आ-
णि लढाई शिकलेलीं तसीं मिळून चवेताळीस ह-
जार सातशें साठ सैन्यरूपें निघत होतीं. १९
आणि त्यांनी हाग्री व यटूर व नाफीश व नो-
दाब यांसीं लढाई केली. २० तेव्हां त्यांस त्यां-
विषयीं असें सहाय झालें कीं ते हाग्री व जे
त्यांच्या संगतीचे, ते सर्व त्यांच्या हातीं दिल्हे
गेले; कारण कीं त्यांनी लढाईच्या वेळेस देवाला
हाक मारिली, आणि त्यावर आशा ठेविली होती,
यास्तव त्यानें त्यांची काकुळत मानिली. २१

आणि त्यानी त्यांचे पशू ह्मणजे त्यांचे उंट पन्नास
हजार व बकरें अडीच लाख व गाढवें दोन हजार,
आणि मनुष्य एक लाख नेले. २२ की लढाई
तर देवाकडून झाली, यास्तव बहुत हाणलेले
होऊन पडले; नंतर ते पाडावपणाच्या प्रवासापर्यंत
त्यांच्या ठिकाणीं राहिले.

२३ मनाश्श्याच्या अर्ध्या वंशाचे लोक, ते तर
बाशान प्रांतांत राहून बालहेर्मोन व सनीर व
हेर्मोन डोंगर तेथपर्यंत वाढत गेले. २४ आणि
त्यांच्या वडील घराण्यांतले हे मुख्य पुरुष, ह्म-
णजे एफेर व इशी व अलियेल व आज्रीयेल व
इर्मया व होदाव्या व याहदियेल; हे मोठे शूर
नामांकित पुरुष आपल्या वडील घराण्यांमध्यें मुख्य
माणसें होतीं. २५ तथापि त्यानी आपल्या वडि-
लांच्या देवाविषयीं अधर्म केले, असें कीं आप-
ल्या पुढून देशांतले जे लोक देवाने नाश करून
घालविले होते, त्यांच्या देवाकडे फिरून व्यभि-
चार केला. २६ यास्तव इस्राएलाच्या देवाने
आश्शूराचा राजा पूल याची प्रेरणा, आणि आ-
श्शूराचा दुसरा राजा तिल्गाथपिल्नेसेर याची प्रे-
रणा केली; ह्मणून त्यानी रऊबेनी व गादी व
मनाश्श्याचा अर्धा वंश यांस पाडाव करून हला-
ह व हाबोर व हारा व गोजानाची नदी तेथें
नेलें; तसेच आजपर्यंत आहेत.

## अध्याय ६.

लेवीचे पुत्र, गेर्षोन, कहाथ व मरारी. २
आणि कहाथाचे पुत्र, आम्राम, इस्हार व हे-
ब्रोन व उज्जियेल. ३ आणि आम्रामाचीं लेंकरें,
आहरोन व मोशे व मिर्याम; आणि आहरो-
नाचे पुत्र, नादाब व अबीहू, एलाजार व ईथामार.
४ एलाजाराने फीनहासाला जन्म दिल्हा;
फीनहासाने अबीशूवाला जन्म दिल्हा. ५ मग
अबीशूवाचे बुक्कीला जन्म दिल्हा; नंतर बुक्की-
ने उज्जीला जन्म दिल्हा. ६ आणि उज्जीने
जराह्याला जन्म दिल्हा; आणि जराह्याने म-
रायोथाला जन्म दिल्हा. ७ मरायोथाने अ-
मार्याला जन्म दिल्हा, आणि अमार्याने अहीटू-
बाला जन्म दिल्हा. ८ मग अहीटूबाने सादो-
काला जन्म दिल्हा; नंतर सादोकाने अहीमाजाला
जन्म दिल्हा. ९ आणि अहीमाजाने अजाऱ्याला
जन्म दिल्हा, मग अजाऱ्याने योहानानाला जन्म
दिल्हा. १० पुढें योहानानाने अजाऱ्या, जो शल-
मोनाने यरूशालेमांत बांधलेलें मंदिर यांतला या-
जक, त्याला जन्म दिल्हा. ११ मग अजाऱ्याने
अमाऱ्याला जन्म दिल्हा, नंतर अमाऱ्याने अही-
टूबाला जन्म दिल्हा. १२ पुढें अहीटूबाने सा-
दोकाला जन्म दिल्हा, आणि सादोकाने शाल्लू-
माला जन्म दिल्हा. १३ आणि शाल्लूमाने हि-
ल्कीयाला जन्म दिल्हा, मग हिल्कीयाने अजा-
ऱ्याला जन्म दिल्हा. १४ नंतर अजाऱ्याने स-
रायाला जन्म दिल्हा, पुढें सरायाने यहोजादाका-
ला जन्म दिल्हा. १५ आणि यहोजादाक, जेव्हां
परमेश्वराने यहूदा व इस्राएल यांस नबूखाद्-
नेज्जाराच्या हातें पाडाव करून नेलें, तेव्हां तोहि
गेला.

१६ लेवीचे पुत्र, गेर्षोन, कहाथ व मरारी.
१७ आणि गेर्षोनाच्या पुत्रांचीं नावें हीं, लि-
ब्नी व शिमी. १८ आणि कहाथाचे पुत्र, आ-
म्राम व इस्हार व हेब्रोन व उज्जियेल. १९
मरारीचे पुत्र, माहली व मुशी; असीं लेवी-
चीं आपापल्या वडिलांप्रमाणें हीं कुळें. २०
गेर्षोनापासून त्याचा पुत्र लिब्नी, त्याचा पुत्र
याहाथ, त्याचा पुत्र जिम्मा; २१ त्याचा पुत्र
योवाह, त्याचा पुत्र इद्दो, त्याचा पुत्र जेराह, त्या-
चा पुत्र यात्राय. २२ कहाथाचें संतान, त्याचा
पुत्र आम्मीनादाब, त्याचा पुत्र कोराह, त्याचा पुत्र
अस्सीर; २३ त्याचा पुत्र एल्काना, व त्याचा
पुत्र एब्यासाफ, व त्याचा पुत्र अस्सीर; २४
त्याचा पुत्र ताहाथ, त्याचा पुत्र ऊरियेल, त्याचा
पुत्र उज्जीया, व त्याचा पुत्र शाऊल. २५ आणि
एल्कानाचे पुत्र, अमासाय् व अहीमोथ. २६
एल्कानापासून एल्कानी संतान; त्याचा पुत्र सो-
फाय्, व त्याचा पुत्र नाहाथ; २७ त्याचा पुत्र
अलियाब, त्याचा पुत्र यरोहाम, त्याचा पुत्र एल्का-
ना; २८ शमुवेलाचे पुत्र; ज्येष्ठ वाश्नी, नंतर
अबीया. २९ मरारीचें संतान; माहली, त्याचा
पुत्र लिब्नी, त्याचा पुत्र शिमी, त्याचा पुत्र उज्जा;

३० त्याचा पुत्र शिमा, त्याचा पुत्र हाग्गीया,
त्याचा पुत्र असाया.

३१ हे तर, कराराचा कोश स्थापीत झाल्या-
वर ज्यांस दावीदाने परमेश्वराच्या मंदिरीं गा-
यनाच्या कामावर ठेविलें, ते आहेत. ३२ आणि
शलमोनाने परमेश्वराचें मंदिर यरुशालेमांत
बांधिलें, तोंपर्यंत ते सभामंडपाची राहोटी इच्या-
पुढें गाऊन सेवा करीत होते; मग आपापल्या पा-
ळीप्रमाणें सेवेंत उभे राहत होते. ३३ तर क-
हाथाच्या संतानांतले जे आपल्या पुत्रांसुद्धां उभे
राहत होते, ते हेच; गवई हेमान योवेलाचा पुत्र,
तो शमुवेलाचा पुत्र; ३४ तो एल्कानाचा पुत्र,
तो यरोहामाचा पुत्र, तो अलियेलाचा पुत्र, तो तो-
हाचा पुत्र; ३५ तो सूफाचा पुत्र, तो एल्का-
नाचा पुत्र, तो माहाथाचा पुत्र, तो अमासाय्चा
पुत्र; ३६ तो एल्कानाचा पुत्र, तो योवेलाचा
पुत्र, तो अजाऱ्याचा पुत्र, तो जफान्याचा पुत्र;
३७ तो ताहाथाचा पुत्र, तो आस्सीराचा पुत्र, तो
एब्यासाफाचा पुत्र, तो कोराहाचा पुत्र; ३८
तो इझाराचा पुत्र, तो कहाथाचा पुत्र, तो लेवी-
चा पुत्र, तो इस्राएलाचा पुत्र. ३९ आणि त्या
हेमानचा भाऊ आसाफ त्याच्या उजव्याकडे उभा
राहत होता; तो आसाफ बेरेख्याचा पुत्र, तो
शिमाचा पुत्र. ४० तो मीखाएलाचा पुत्र, तो
बासेयाचा पुत्र, तो माल्कीयाचा पुत्र; ४१ तो
एथनीचा पुत्र, तो जेराहाचा पुत्र, तो आदायाचा
पुत्र; ४२ तो एथानाचा पुत्र, तो जिम्माचा पुत्र,
तो शिमीचा पुत्र; ४३ तो याहाथाचा पुत्र, तो
गेर्षोनाचा पुत्र, तो लेवीचा पुत्र. ४४ आणि
त्यांचे भाऊ मरारीचे वंशस्थ त्यांच्या डाव्याकडे
होते; एथान किशीचा पुत्र, तो आब्दीचा पुत्र,
तो माल्लुखाचा पुत्र; ४५ तो हशब्याचा पुत्र
तो अमाज्याचा पुत्र, तो हिल्कीयाचा पुत्र; ४६
तो आम्जीचा पुत्र, तो बानीचा पुत्र तो शा-
मेराचा पुत्र; ४७ तो माहलीचा पुत्र, तो मु-
शीचा पुत्र, तो मरारीचा पुत्र, तो लेवीचा पुत्र
४८ आणखी त्यांचे भाऊ दुसरे लेवी देवाच्या
मंदिरीं मंडपाच्या सर्व सेवेस नेमून दिल्हेले होते.

४९ आणि आहरोन, ह्मणजे त्याचे वंशस्थ
होमाच्या वेदीवर व धूपाच्या वेदीवर धूप जाळीत
असतां, परमपवित्र स्थानाच्या सर्व कामावर होते;
आणि देवाचा सेवक मोशे याने जी जी आज्ञा दि-
ल्ही होती, त्या अवघ्यांप्रमाणें इस्राएलासाठीं प्राय-
श्चित्त करीत होते. ५० आहरोनाचे वंशस्थ तर हे;
त्याचा पुत्र एलाजार, त्याचा पुत्र फीनहास, त्या-
चा पुत्र अबीशूवा; ५१ त्याचा पुत्र बुक्की, त्याचा
पुत्र उज्जी, त्याचा पुत्र जराह्या; ५२ त्याचा
पुत्र मरायोथ, त्याचा पुत्र अमाऱ्या, त्याचा पुत्र
अहीटूब; ५३ त्याचा पुत्र सादोक, त्याचा पुत्र
अहीमाज.

५४ आणि त्यांच्या सीमेंत त्यांच्या कोटांतल्या
त्यांच्या ह्या वस्त्या; आहरोनाच्या वंशस्थांतल्या
कहाथीच्या कुळाची असी त्यांस तर देवखूण
झाली; ५५ ह्मणून यहूदा देशांत हेब्रोन, त्याच्या
चहुंकडल्या खेड्यांसुद्धां त्यांस दिल्हें गेलें. ५६
परंतु त्या नगराचीं शेतें व त्याकडले गांव यफुन्ने
याचा पुत्र कालेब याला दिल्हे गेले. ५७ आ-
णि आहरोनाच्या वंशस्थांस रक्षण होण्याचीं नगरें
असीं दिल्हीं गेलीं कीं, हेब्रोन व लिब्ना व त्या-
चीं खेडीं, आणि यात्तीर व एष्टमवा व त्याचीं
खेडीं; ५८ आणि हीलेन व त्याचीं खेडीं,
आणि दबीर व त्याचीं खेडीं; ५९ आणि आ-
शान व त्याचीं खेडीं, आणि बेथशमेश व तिचीं
खेडीं. ६० आणि बन्यामीनाच्या वंशाच्यांतून गेबा
व त्याचीं खेडीं, आणि अलेमेथ व त्याचीं खेडीं,
आणि अनाथोथ व त्याचीं खेडीं, दिल्हीं गेलीं;
त्यांच्या कुळांचीं सर्व नगरें, तेरा नगरें. ६१ आ-
णि कहाथाच्या राहिलेल्या वंशस्थांस दुसऱ्या
वंशांतल्या कुळाच्यांतून, ह्मणजे मनास्स्याचा अर्धा
वंश त्याच्या अर्ध्या वाटणींतून दाहा नगरें देव-
खुणेवरून दिल्हीं गेलीं. ६२ आणि गेर्षोनाच्या
वंशस्थांस त्यांच्या कुळांप्रमाणें इस्साखाराच्या वं-
शाच्यांतून व आशेराच्या वंशाच्यांतून व नाफ्ता-
लीच्या वंशाच्यांतून व मनास्स्याच्या वंशाच्यांतून
बाशानांतलीं तेरा नगरें दिल्हीं गेलीं. ६३ मरा-
रीच्या वंशस्थांस त्यांच्या कुळांप्रमाणें रऊबेनाच्या
वंशाच्यांतून व गादाच्या वंशाच्यांतून व जबुलू-
नाच्या वंशाच्यांतून, असीं बारा नगरें देवखुणेवरून
दिल्हीं गेलीं.

६४ आणि इस्राएलाच्या संतानाने लेवींस

नगरें त्याच्या खेड्यांसुद्धां दिल्हीं. ६५ आणखी त्या-
नी यहूदाच्या संतानांचा वंश यांच्यांतून व शिमो-
नाच्या संतानांचा वंश यांच्यांतून व बन्यामीनाच्या
संतानांचा वंश यांच्यांतून, जीं नगरें आपापल्या
नांवानें म्हटलेलीं, तीं हीं दिल्हीं. ६६ म्हणजे
कहाथाच्या वंशस्थांच्या कित्येक कुळांस त्याच्या
सीमेंतलीं नगरें एफ्राइमाच्या वंशाच्यांतूनहि होतीं.
६७ म्हणजे त्यानीं त्यांस रक्षण होण्याचीं नगरें
दिल्हीं; एफ्राइम डोंगरावरलें शखेम व त्याचीं
खेडीं, आणि गेजेर व त्याचीं खेडीं; ६८ आणि
यक्माम् व त्याचीं खेडीं, आणि बेथहोरोन व ति-
चीं खेडीं; ६९ आणि आय्यालोन व त्याचीं
खेडीं, आणि गाथरिम्मोन व त्याचीं खेडीं. ७०
आणि मनाश्शेयाचा अर्धा वंश याच्यांतून आनेर
व त्याचीं खेडीं, आणि बिलाम व त्याचीं खेडीं,
हीं कहाथाच्या राहिलेल्या वंशस्थांच्या कुळांस
दिल्हीं. ७१ गेर्षोनाच्या वंशस्थांस मनाश्शेयाचा
अर्धा वंश यांतल्या कुळांच्यांतून बाशानांतलें गो-
लान व त्याचीं खेडीं, आणि आष्टारोथ व त्याचीं
खेडीं दिल्हीं. ७२ आणि इस्साखाराच्या वंशा-
च्यांतून केदेश व त्याचीं खेडीं, दाब्राथ व त्याचीं
खेडीं; ७३ आणि रामोथ व त्याचीं खेडीं,
आणि आनेम व त्याचीं खेडीं; ७४ आणि
आशेराच्या वंशाच्यांतून मासाल व त्याचीं खेडीं,
आणि आब्दोन व त्याचीं खेडीं; ७५ आणि
हूकोक व त्याचीं खेडीं, आणि रहोब व त्याचीं
खेडीं; ७६ आणि नाफ्तालीचा वंश याच्यां-
तून गालीलांतलें केदेश व त्याचीं खेडीं, आणि
हाम्मोन व त्याचीं खेडीं, आणि किर्याथाइम व
त्याचीं खेडीं. ७७ मरारीच्या राहिलेल्या वंश-
स्थांस जबुलूनाच्या वंशाच्यांतून रिम्मोन व त्याचीं
खेडीं, ताबोर व त्याचीं खेडीं; ७८ आणि य-
र्देनेच्या पलिकडे यरीहोजवळ यार्देनेच्या पूर्वेस
रऊबेनाच्या वंशाच्यांतून रानांतलें बेजेर व त्याचीं
खेडीं, आणि याहजा व त्याचीं खेडीं; ७९
आणि कदेमोथ व त्याचीं खेडीं, आणि मेफाथ
व त्याचीं खेडीं दिल्हीं. ८० आणि गादाच्या
वंशाच्यांतून गिलादांतलें रामोथ व त्याचीं खेडीं,
आणि माहानाइम व त्याचीं खेडीं; ८१ आणि
हेश्बोन व त्याचीं खेडीं, आणि याजेर व त्याचीं
खेडीं दिल्हीं.

## अध्याय ७.

इस्साखाराच्या पुत्रांविषयीं तर तोला व फुवा,
याशूब व शिम्रोन, असे चार होते. २ आणि
तोलाचे पुत्र, उज्जी व रफाया व यरियेल व या-
हमाय् व इबसाम व शमुवेल; हे तोलाच्या मा-
गें आपापल्या वडिलाच्या घराण्यांत मुख्य आपा-
पल्या जन्मानें शूर पुरुष होते; त्यांकडल्यांची
गणती दावीदाच्या दिवसांत बावीस हजार साहा-
शें होती. ३ आणि उज्जीचें संतान इज्राह्या
आदिकरून, आणि इज्राह्याचे पुत्र मिखाएल व
ओबद्या व योवेल व इश्शीया, असे त्यासुद्धां
पांच जण सर्व मुख्य होते. ४ आणि त्यांज-
वळ आपापल्या जन्माप्रमाणें आपापल्या वडिला-
च्या घराण्यांत लढाईच्या सैन्याच्या टोळ्या छ-
त्तीस हजार होत्या; कां तर त्यांच्या बायका व
त्यांचीं लेंकरें फार होतीं. ५ आणि त्यांचे भाऊ
इस्साखाराच्या सर्व कुळांत शूर पुरुष, एकंदर
सत्याशीं हजार वंशावळींत घेतलेले होते.

६ बन्यामीनाचे हे तिघे, बेला व बेखेर व
यदीयेल. ७ आणि बेलाचे पुत्र एज्बोन व उ-
ज्जी व उज्जीयेल व यरिमोथ व ईरी, हे पांच
वडिलांच्या घराण्यांत मुख्य शूर पुरुष; आणि
त्यांकडले बावीस हजार चौतीस वंशावळींत घेत-
लेले होते. ८ आणि बेखेराचे पुत्र जमीरा
व योवाश व अलियेजेर व एल्योवेनाय् व अम्री
व यरेमोथ व अबीया व अनाथोथ व आलामेथ;
हे सर्व बेखेराचे पुत्र होते. ९ आणि त्यांच्या
वंशावळींत आपापल्या जन्माप्रमाणें आपापल्या व-
डिलांच्या घराण्यांत मुख्य शूर पुरुष वीस हजार
दोनशें होते. १० आणि यदीयेलाचें संतान,
बिल्हान आदिकरून, आणि बिल्हानाचे पुत्र य-
ऊश व बन्यामीन व एहूद व खनाना व जेथान
व थार्षीश व अहीशाहार; ११ हें सर्व यदी-
येलाचें संतान, वडिलांतल्या या मुख्यांकडले शूर
पुरुष, लढायाला सैन्यांत जाणारे, सत्रा हजार
दोनशें होते. १२ आणि ईराचें संतान, शुप्पी व
हुप्पी, आणि आहेराचें संतान हुशी, हेहि होते.

१३ नाफ्तालीचे पुत्र, याहसियेल व गूनी व
येसेर व शाल्लूम ; हें बिल्हेचें संतान. १४ मना-
श्श्याचे पुत्र आस्रियेल त्याची स्त्री प्रसवली,
आणि गिलादाचा बाप माखीर त्याची उपपत्नी
अरामीण प्रसवली. १५ आणि माखीराने हुप्पी
व शुप्पी यांची बहीण बायको करून घेतली;
तिचें नांव तर माखा, आणि त्याच्या धाकट्याचें
नांव सलफहाद, सलफहादाला तर कन्याच हो-
त्या. १६ नंतर माखीराची स्त्री माखा पुत्र
प्रसवली असतां, तिने त्याचें नांव पेरेष ठेविलें,
आणि त्याच्या भावाचें नांव शेरेष होतें; त्याचे
पुत्र तर ऊलाम व रेकेम होते. १७ आणि ऊ-
लामाचें संतान, बदान आदिकरून ; मनाश्श्याचा
पुत्र माखीर, त्याचा पुत्र गिलाद, त्याचें संतान
हेंच. १८ आणि त्याची बहीण हम्मोलेखेथ, ई-
शहोद व अबीयेजेर व माहला, हे प्रसवली. १९
आणि शमिदाचें संतान, आह्यान व शेखेम व
लिखी व अनियाम, असें होतें.

२० आणि एफ्राइमाचें संतान, शूथेलाह, व
त्याचा पुत्र बेरेद, व त्याचा पुत्र थाहाथ, व त्या-
चा पुत्र एलादा, व त्याचा पुत्र थाहाथ. २१
आणि त्याचा पुत्र जाबाद व त्याचा पुत्र शूथे-
लाह, व एजेर व एलाद ; यांस गाथाचे म-
नुष्य जे त्या देशांत जन्मले होते त्यानी जिवें
मारिलें ; कारण कीं ते त्यांचे पशू धरायाला
उतरून गेले होते. २२ नंतर त्याचा वडील
एफ्राइम, त्याच्या भावानी येऊन जरी त्याचें शां-
तवन केलें, तरी त्याने बहुत दिवस शोक केला.
२३ मग तो आपल्या बायकोजवळ गेला, आणि
ती गरोदर होऊन पुत्र प्रसवली असतां, त्याने
त्याचें नाव बरिया ठेविलें ; कारण कीं त्याच्या
घराण्याचा नासाडा झाला होता. २४ तरी त्या-
ची जी कन्या राहिली होती, तिने खालची व
वरची बेथहोरोन व उज्जेनशेरा बांधिला. २५
आणि त्याचा पुत्र रेफाह व रेशेफ, नंतर त्याचा
पुत्र थेलाह, मग त्याचा पुत्र थाहान ; २६ त्या-
चा पुत्र लादान, त्याचा पुत्र आम्मीहूद, त्याचा
पुत्र अलीशामा ; २७ त्याचा पुत्र नोन, त्याचा
पुत्र यहोशवा. २८ आणि त्याच्या वतनाचें व
त्याच्या वस्त्यांचें, बेथेल व त्याचीं खेडीं ; आणि
पूर्वेस नारान आणि पश्चिमेस गेजेर व त्याचीं
खेडीं, आणि गाज्यापर्यंत ह्मणजे त्यांच्या खेड्यां-
पर्यंत शखेम व त्याचीं खेडीं. २९ आणि मना-
श्श्याच्या संतानाच्या बाजूस बेथश्यान व तिचीं
खेडीं, तानाख व त्याचीं खेडीं, मगिद्दो व त्या-
चीं खेडीं, दोर व त्याचीं खेडीं ; इतक्यांमध्यें
इस्राएलाचा पुत्र योसेफ याचें संतान राहिलें.

३० आशेराचे पुत्र, इम्ना व इश्वा व इश्वी व
बरिया आणि त्यांची बहीण सेराह होती. ३१
आणि बरियाचे पुत्र हेबेर व माल्कियेल ; हा
बिर्जाविथाचा वडील. ३२ आणि हेबेराने या-
फ्लेट व शामेर व होथाम, आणि त्यांची बहीण
शूवा, यांस जन्म दिल्हा. ३३ आणि याफले-
टाचे पुत्र पासाख व बिह्माल व आश्वाथ ; हे
याफ्लेटाचे पुत्र. ३४ आणि शामेराचे पुत्र
अही व राहागा व हुब्बा व अराम. ३५ आणि
त्याचा भाऊ हेलेम याचे पुत्र सोफाह व इम्ना
व शेलेश व आमाल. ३६ सोफाहाचे पुत्र
सूहा व हार्नेफेर व शूवाल व बेरी व इम्ना; ३७
बेजेर व होद व शाम्मा व शिल्शा व इथ्रान व
बेरा. ३८ आणि येथेराचे पुत्र यफुन्ने व पिस्पा
व अरा. ३९ आणि उल्लाचे पुत्र आराह व
हान्नियेल व रिज्या. ४० हे सर्व आशेराच्या
संतानांत वडिलावडिलांच्या घराण्यांत मुख्य, नि-
वडलेले शूर पुरुष, मुख्य अधिकारी असे होते;
आणि त्यांच्या वंशावळींत घेतलेलीं लढाईच्या
सैन्यांतलीं माणसें गणतीने सव्वीस हजार होतीं.

## अध्याय ८.

बन्यामीनापासून तर हे जन्मले ; त्याचा पहिला
पुत्र बेला, दुसरा आश्बेल व तिसरा आह-
राह ; २ चवथा नोहा व पांचवा राफा. ३
आणि बेलाला हे पुत्र झाले, आद्दार व गेरा व
अबीहूद ; ४ आणि अबीशूवा व नामान व अ-
होहा ; ५ आणि गेरा व शफूफान व हूराम
होते. ६ आणि एहूदाचे पुत्र, जे गेब्यातल्या रा-
हणाऱ्यांच्या वडिलांत मुख्य, आणि ज्यानी त्यांस
मानाहाथापर्यंत ढळविलें, ते हेच होते ; ७ कीं
नामान व अहीया व गेरा, याने त्यांस ढळवि-
ल्यानंतर त्याने उज्जा व अहीहूद व शाहराइम

यास जन्म दिल्हा. ८ आणि त्याने त्यास पाठ-
विल्यावर शाहराइमाला मोवाब देशांत लेंकरें
झालीं; हूशीम व बारा या त्याच्या बायका. ९
अणखी त्याची स्त्री होदेश त्यापासून योबाब व
झिब्या व मेशा व माल्काम; १० आणि यऊज
व शख्या व मिर्मा हे प्रसवली; हे त्याचे पुत्र
वडिलांमध्यें मुख्य. ११ आणि हूशीमा अबीटूब
व एल्पाल हे त्यापासून प्रसवली. १२ आणि
एल्पालाचे पुत्र एबेर व मिशाम व शामेद, ज्याने
ओनो व लोद व त्याचीं खेडीं बांधिलीं, तो. १३
आणि बरिया व शेमा, हे आय्यालोनांतल्या रा-
हणाऱ्यांच्या वडिलांत मुख्य; त्यानी गाथांतल्या
राहणाऱ्यांचा मोड केला. १४ आणि आह्यो,
शाशाक व यरेमोथ; १५ आणि झबाद्या व आ-
राद व आदेर; १६ आणि मीखाएल व इश्पा
व योहा, हे बरियाचे पुत्र; १७ आणि झबा-
द्या व मशुल्लाम व हिज्की व हाबेर; १८
आणि इश्मराय् व इज्लिया व योबाब, हेहि
एल्पालाचे पुत्र; १९ आणि याकीम व झिख्री
व झाब्दी; २० आणि एलीएनाय् व झिल्थाय्
अलियेल; २१ आणि अदाया व बराया व
शिम्राथ, हे शिमीचे पुत्र, २२ आणि इश्पान
व एबेर व अलियेल; २३ आब्दोन व झिख्री
व हानान; २४ आणि हनान्या व एलाम व
आन्थोथीया; २५ आणि इप्दया व पनुवेल,
हे शाशाकाचे पुत्र; २६ आणि शाम्शराय् व
शहाऱ्या व अथाल्या; २७ आणि यारेश्या
व एलिया व झिख्री, हे यरोहामाचे पुत्र. २८
हे वडिलांमध्यें मुख्य, आपल्या जन्मानी अधिका-
री; हे यरूशालेमांत राहिले. २९ आणि गि-
बोनांत गिबोन्यांचा वडील आदिकरून राहिले,
आणि नांवाने माखा त्याची स्त्री. ३० अणखी
त्याचा प्रथम पुत्र आब्दोन, नंतर जूर व कीश व
बाल व नादाब, ३१ आणि गदोर व आह्यो व
झाखेर होता. ३२ आणि मिक्लोथाने शिमाला
जन्म दिल्हा; अणखी हेहि यरूशालेमांत आप-
ल्या भावांच्या शेजारीं आपल्या भावांसारिखे
राहिले.

३३ आणि नेराने कीशाला जन्म दिल्हा,
मग कीशाने शाऊलाला जन्म दिल्हा, नंतर शा-
ऊलाने यहोनाथानाला व माल्कीशूवा व अबी-
नादाब व एश्बाल यांस जन्म दिल्हा. ३४
आणि यहोनाथानाचा पुत्र मरीब्बाल, मग मरी-
ब्बालाने मीखाला जन्म दिल्हा. ३५ आणि
मीखाचे पुत्र पीथोन व मेलेख व थारेया व
आहाज. ३६ आणि आहाजाने यहोवादाला
जन्म दिल्हा, मग यहोवादाने आलेमेथ व आ-
ज्मावेथ व झिम्री यांस जन्म दिल्हा, आणि झि-
म्रीने मोजाला जन्म दिल्हा. ३७ मग मोजाने
बिनाला जन्म दिल्हा; त्याचा पुत्र राफा, त्याचा
पुत्र एलासा, त्याचा पुत्र आजेल. ३८ मग
आजेलाला साहा पुत्र झाले; त्यांचीं नांवें तर
हींच, आज्रीकाम, बोखरू व इश्मायेल व शा-
ऱ्या व ओबाद्या व हानान; हे सर्व आजेलाचे
पुत्र. ३९ आणि त्याचा भाऊ एशेक याचे पुत्र
हे त्याचा प्रथम ऊलाम, दुसरा यऊश व तिसरा
अलीफेलेट्. ४० ऊलामाचे पुत्र तर बळकट व
शूर माणसें, धनुर्धारी; आणि त्यांस पुत्र व पौत्र
बहुत, दीडशें झाले; हे सर्व बन्यामीनाच्या
संतानांतले.

## अध्याय ९.

तर सर्व इस्राएली वंशावळींत घेतले गेले, ह्मणून
पाहा, इस्राएल व यहूदा यांच्या राजांच्या
पुस्तकांत ते लिहिलेले आहेत; त्यानी उल्लंघन
केलें यामुळें ते पाडाव करून बाबेलांत नेले गेले.
२ मग जे पहिले आपल्या वतनांत आपल्या नग-
रांमध्यें राहिले, ते इस्राएली, याजक, लेवी, व
नथीनीम असे होते. ३ आणि यरूशालेमांत यहू-
दाचें कांहीं संतान, व बन्यामीनाचें कांहीं संतान,
आणि एफ्राइम व मनाश्शे यांचें कांहीं संतान रा-
हत होते; ४ यहूदाचा पुत्र फारेज याच्या सं-
तानांतला ऊथाय्, तो आम्मीहूदाचा पुत्र, तो अ-
म्रीचा पुत्र, तो इम्रीचा पुत्र, तो बानीचा पुत्र;
५ आणि शिलोन्यांतला ज्येष्ठ लेक असाया व
त्याचे पुत्र; ६ आणि जेराहाच्या संतानांतला
यऊवेल व त्याचे साहाशें नव्वद भाऊ. ७ आ-
णि बन्यामीनाच्या संतानांतला साल्लु, तो मशुल्ला-
माचा पुत्र, तो होदाव्याचा पुत्र, तो हास्सनुवाचा
पुत्र; ८ आणि यरोहामाचा पुत्र इब्नया व एला,

तो उज्जीचा पुत्र, तो मिखीचा पुत्र, आणि म-
शुल्लाम शफाट्याचा पुत्र, तो रगूवेलाचा पुत्र, तो
इब्नीयाचा पुत्र; ९ आणि त्यांचे भाऊ आ-
पल्या जन्मांप्रमाणें नऊशें छप्पन, ते राहत होते;
हीं सर्व माणसें आपापल्या बापाच्या घराण्यामध्यें
वडिलांत मुख्य होतीं.

१० आणि याजकांतला यदाया व यहोयारीब
व याखीन; ११ आणि देवाच्या मंदिरचा अ-
धिकारी अजाऱ्या, तो हिल्कीयाचा पुत्र, तो मशु-
ल्लामाचा पुत्र, तो ज्ञादोकाचा पुत्र, तो मरायो-
थाचा पुत्र, तो अहीटूबाचा पुत्र; १२ आणि
अदाया, तो यरोहामाचा पुत्र, तो पाश्हूराचा
पुत्र, तो माल्कीयाचा पुत्र; आणि मासाय्, तो
अदियेलाचा पुत्र, तो याहजेराचा पुत्र, तो मशु-
ल्लामाचा पुत्र, तो मशिल्लेमीथाचा पुत्र, तो इम्मे-
राचा पुत्र; १३ आणि त्यांचे भाऊ, जे आपा-
पल्या वडिलाच्या घराण्यांत मुख्य, एक हजार
सातशें साठ देवाच्या मंदिरीं सेवेच्या कामाला
बळकट पुरुष, ते राहत होते. १४ आणि लेवींत-
ला शमाया तो हाश्शूबाचा पुत्र, तो आज्रीकामा-
चा पुत्र, तो हशाब्याचा पुत्र, हे मरारीच्या संता-
नांतले; १५ आणि बाक्बाक्कार, हेरेश व गालाल;
आणि मात्तान्या, तो मीखाचा पुत्र, तो जिख्रीचा
पुत्र, तो आसाफाचा पुत्र; १६ आणि ओबाद्या,
तो शमायाचा पुत्र, तो गालालाचा पुत्र, तो यदू-
थूनाचा पुत्र; आणि नटोफाथकरांच्या गांवांत रा-
हणारा बेरेख्या, तो आसाचा पुत्र, तो एल्कानाचा
पुत्र; १७ आणि द्वारपाळ, शाल्लुम व आ-
क्कूब व टाल्मोन व अहीमान व त्यांचे भाऊ;
शाल्लुम मुख्य होता. १८ तर हे आतांपर्यंत
राजाच्या दरवाज्याजवळ पूर्वेकडे लेवीच्या संता-
नांतल्या थव्यांकडले द्वारपाळ होते. १९ आणि
शाल्लुम आपल्या वडिलाचें घराणें कऱ्ही यांत
आपल्या भावांसुद्धां राहत होता; तो कोरेचा
पुत्र, तो एब्यासाफाचा पुत्र, तो कोराहाचा पुत्र
हे सेवेच्या कामावर मंडपाचा उंबरा राखणारे,
आणि त्यांचे वडील परमेश्वराच्या सैन्यावर
असतां प्रवेशाचे संभाळणारे होते. २० आणि
एलाजाराचा पुत्र फीनहास, ज्याला परमेश्वर
अनुकूळ, तो मागल्या काळीं त्यांवर अधिकारी
होता. २१ मशेलेम्याचा पुत्र जखऱ्या, तो स-
भामंडपाच्या दारीं द्वारपाळ होता. २२ हे सर्व
उंबऱ्याजवळ द्वारपाळ होण्यासाठीं निवडलेले दो-
नशें बारा; हे आपापल्या गांवीं वंशावळींत घेतले-
ले; यांस दावीदाने व शमुवेल भविष्यवादी याने
त्याच्या त्याच्या नेमणुकीवर ठेविलें होतें. २३
असे ते आपल्या पुत्रांसुद्धां परमेश्वराच्या मंदि-
रीं, मंडपाच्या स्थानीं, रक्षण करायासाठीं द्वारपा-
ळांवर, २४ पूर्वेस, पश्चिमेस, उत्तरेस व दक्षि-
णेस, अशा चहूं दिशांकडे द्वारपाळ होते. २५
आणि त्यांचे भाऊ आपापल्या गांवांतून त्यांच्या
ठिकाणीं वेळोवेळ सात सात दिवसांनी येत होते.
२६ ते जे चार मोठे द्वारपाळ लेवी, ते तर नेम-
णुकीवरच आणि देवाच्या मंदिराच्या खोल्यांवर
व भांडारांवर होते.

२७ आणि ते परमेश्वराच्या मंदिराच्या च-
हुंकडे रात्रीं राहत होते, कां तर त्यांकडे रक्षणाचें
काम आणि ते सकाळच्या सकाळीं उघडायाच्या
कामावर होते. २८ आणि त्यांतले कोणी सेवे-
च्या डागिण्यांवर असे होते कीं त्यांनी ते गणतीने
आणावे आणि गणतीने न्यावे. २९ आणि त्यां-
तले कोणी डागिण्यांवर व सर्व पवित्र वस्तूंवर आ-
णि पीठ व द्राक्षरस व तेल व धूप व दुसरें सुवा-
सिक, यांवर नेमलेले होते. ३० आणि याजका-
च्या वंशस्थांतले कोणी सुवासिकांचें उटणें वाटून
करीत होते. ३१ आणि लेवींतला मत्तिथ्या,
जो शाल्लुमाचा ज्येष्ठ पुत्र कऱ्ही, तो तव्यांवरल्या
कामावर नेमणुकीने होता. ३२ आणि त्यांच्या
भावांतल्या कहाथीच्या वंशस्थांचे कोणी मांडा-
याच्या भाकरी शाब्बाथाच्या शाब्बाथीं सिद्ध करा-
याला त्यांवर होते. ३३ आणि हे लेवींच्या
वडिलांतले मुख्य गवई; हे खोल्यांत राहत अ-
सतां मोकळे होते, कां तर तेंच काम रात्रंदिवस
त्यांच्याकडे होतें. ३४ हे लेवींच्या वडिलांतले
मुख्य आपापल्या जन्मांप्रमाणें अधिकारी; एवढे
यरूशालेमांत राहत होते. ३५ आणि गिबो-
नांत हे राहत होते, गिबोन्यांचा वडील यइयेल
आणि नांवाने माखा त्याची स्त्री; ३६ आणखी
त्याचा ज्येष्ठ पुत्र आब्दोन, नंतर सूर व कीश व
बाल व नेर व नादाब असे. ३७ आणि

मदोर व आखो व जखाऱ्या व मिक्लोथ. ३८
मिक्लोथापासून तर शिमा जन्मला, आणि हे य-
रूशालेमांत आपल्या भावांच्या शेजारीं आपल्या
भावांसारिखे राहत होते. ३९ आणि नेराने
कीशाला जन्म दिल्हा, नंतर कीशाने शाऊलाला
जन्म दिल्हा, मग शाऊलाने यहोनाथान व मा-
ल्कीशूवा व अबीनादाब व एश्बाल यांस जन्म
दिल्हा; ४० आणि यहोनाथानाचा पुत्र मरीब्-
बाल, नंतर मरीब्बालाने मीखाला जन्म दिल्हा.
४१ आणि मीखाचे पुत्र, पीथोन व मेलेख व
थाहरेया व आहाज. ४२ आणि त्याने यारा-
ला जन्म दिल्हा, मग याराने आलेमेथ व आ-
झ्मावेथ व झिम्री यांस जन्म दिल्हा, नंतर झि-
म्रीने मोजाला जन्म दिल्हा. ४३ मग मोजाने
बिनाला जन्म दिल्हा, नंतर त्याचा पुत्र रफाया,
त्याचा पुत्र एलासा, त्याचा पुत्र आजेल. ४४
आणि आजेलाला पुत्र साहा; त्यांचीं नांवें तर हीं-
च, आज्रीकाम, बोखरू व इश्माएल व श्याऱ्या
व ओबाद्या, व हानान; हे आजेलाचे पुत्र.

## अध्याय १०.

आणि पलिष्टी इस्राएलाशीं लढले; तेव्हां इ-
स्राएलाचीं माणसें पलिष्ट्यांच्या पुढून पळून
गिल्बोवा डोंगरावर मारलेलीं पडलीं. २ आणि
पलिष्टी शाऊलाच्या पाठीस व त्याच्या पुत्रांच्या
पाठीस लागले, अणखी पलिष्ट्यानी शाऊलाचे
पुत्र योनाथान व अबीनादाब व माल्कीशूवा, हे
मारिले. ३ आणि शाऊलाशीं लढाई भारी पड-
ली आणि धनुर्धरांचे तीर त्याला लागले आणि तो
धनुर्धरांकडून घायाळ झाला. ४ नंतर शाऊलाने
आपल्या शस्त्रवाहकाला सांगितलें, "तूं आपली
तरवार उपसून मला भोसकून मार, नाहीं तर हे
असुंती मनुष्य येऊन माझी चेष्टा करतील." तरी
त्याच्या शस्त्रवाहकाने मानिलें नाहीं, कारण कीं
तो फार भ्याला; मग शाऊल तरवार मांडून ति-
जवर पडला. ५ तेव्हां शाऊल मेला, हें पाहून
त्याचा शस्त्रवाहकहि तरवारीवर पडून मेला. ६
याप्रमाणें शाऊल व त्याचे तीन पुत्र मेले; असे
त्याच्या घरचे सर्व बरोबर मेले. ७ तर जीं सर्व
इस्राएली माणसें खोऱ्यांत होतीं, त्यानी जेव्हां
पाहिलें कीं इस्राएली पळाले, आणि शाऊल व
त्याचे पुत्र मेले, तेव्हां तीं आपलीं नगरें सोडून
पळालीं; मग पलिष्टी येऊन त्यांत राहिले.
८ आणि दुसऱ्या दिवशीं असें झालें कीं पलि-
ष्टी मारलेल्यांस लुटायाला आले, तेव्हां त्यांस
शाऊल व त्याचे पुत्र गिल्बोवा डोंगरावर पडलेले
सांपडले. ९ तेव्हां त्यानी त्याला लुटलें, आणि
त्याचें शिर व त्याचीं शस्त्रें घेऊन पलिष्ट्यांच्या
देशांत आपल्या मूर्त्तींजवळ व लोकांजवळ चहुं-
कडे वर्तमान कळवायास पाठविलीं. १० मग
त्यानी त्याचीं शस्त्रें आपल्या देवांच्या घरांत ठेवि-
लीं; आणि त्याचें मुंडकें दागोनाच्या देवळावर
बसविलें. ११ नंतर जें पलिष्ट्यानी शाऊलाचें
केलें होतें, तें अवघें सर्व याबेशगिलादकरानी ऐ-
किलें. १२ यास्तव सर्व शूर माणसानी उठून
जाऊन शाऊलाचें प्रेत व त्याच्या पुत्रांचीं प्रेतें
उचलून याबेशास आणिलीं, आणि याबेशांतल्या
अलोन झाडाखालीं त्यांचीं हाडें पुरिलीं; नंतर
सात दिवस उपास केला. १३ असा शाऊल, जें
पाप त्याने परमेश्वरावर केलें होतें, ह्मणजे त्याने
परमेश्वराची आज्ञा मानिली नाहीं आणि भूत-
संचाऱ्यांजवळ विचारायास तो गेला, यामुळें मेला.
१४ याप्रकारें त्याने परमेश्वराजवळ विचारिलें
नाहीं, ह्मणून त्याने त्याला मारविलें, आणि त्याचें
राज्य इशायचा पुत्र दावीद याकडे फिरविलें.

## अध्याय ११.

तेव्हां सर्व इस्राएलानी हेब्रोनांत दावीदाजवळ
मिळून ह्मटलें कीं, "पाहा, आह्मी तुझ्या हा-
डांचे व तुझ्या मांसाचे आहों. २ अणखी बहु-
काळ मागें जेव्हां शाऊल राजा होता, तेव्हां दे-
खील त्वां इस्राएलास बाहेर नेलें आणि आंत
आणिलें; आणि तुझा देव परमेश्वर याने तुला
सांगितलें आहे, तूं माझे लोक इस्राएल यांचें
मेंढपाळण करसील, ह्मणजे माझे लोक इस्राएल
यांवर अधिकारी होसील." ३ तेव्हां इस्राएलाचे
सर्व वडील हेब्रोनांत राजाजवळ आल्यावर दावी-
दाने हेब्रोनांत परमेश्वरापुढें त्यांशीं करार केला,
आणि असें परमेश्वराने शमुवेलाकडून सांगि-
तलें होतें, तसा त्यानी दावीदाला इस्राएलावर
राजा होण्यासाठीं अभिषेक केला.

४ नंतर दावीद सर्व इस्राएलासुद्धां यरूशा-
लेम तेंच यबूस तेथें गेला; तेव्हां देशांतले राह-
णारे यबूसकर तेथें होते. ५ आणि यबूसांतल्या
राहणाऱ्यांनी दावीदाला ह्मटलें, "तुझ्यानें इकडे
येववणार नाहीं." तथापि दावीदानें सीयोन कि-
ल्ला घेतला; तेंच दावीदाचें नगर झालें. ६
दावीदानें तर ह्मटलें होतें, "जो कोणी पहिल्यानें
यबूसकरांस मारील, तो मुख्य व सेनापति असा
होईल." त्यावरून सरूयेचा पुत्र योवाब पहि-
ल्यानें चढून गेला, यास्तव तो मुख्य झाला. ७
नंतर दावीद किल्ल्यांत राहिला, यास्तव लोकांनी
त्याला दावीदाचें नगर ह्मटलें. ८ मग त्यानें
नगराच्या चहुंकडे मिल्लोपासून सभोंवतें बांधिलें,
आणि नगराचा राहिलेला भाग योवाबानें यथा-
स्थित केला. ९ असा दावीद चालतां चालतां
मोठा झाला, कां कीं सैन्यांचा परमेश्वर त्याला
अनुकूळ होता.

१० मग दावीदाकडले मुख्य शूर, ज्यांनी जसें
परमेश्वरानें इस्राएलाविषयीं सांगितलें होतें,
तसें त्याला राजा करावें ह्मणून जे सर्व इस्राएला-
सुद्धां त्यासीं त्याच्या राज्यांत दृढ राहिले, ते
हेच. ११ असे जे दावीदाचे शूर, त्यांचें वर्णन
हेंच; याशबाम हाखमोनी नायकांचा मुख्य,
त्यानें आपला भाला तीनशांवर उचलून एका वे-
ळेस त्यांस मारिलें. १२ आणि त्यानंतर अहोही,
दोदोचा पुत्र एलाजार; तो तिघां शूरांत होता.
१३ तो पासदाम्मीमांत दावीदाच्या संगतीं होता,
तेव्हां पलिष्टी तेथें लढायास मिळून आले होते,
आणि शेताचा विभाग सातूनें भरलेला होता;
तेव्हां लोक पलिष्ट्यांच्या पुढून पळाले. १४
तथापि त्यांनी शेतांत उभें राहून तें राखून प-
लिष्ट्यांस मारिलें; असें परमेश्वरानें मोठें
तारण करून त्यांस तारिलें. १५ आणि त्या
तिसांतले मुख्य तिघेजण खडकाकडे अदुल्लामा-
च्या गुहेस दावीदाजवळ उतरून गेले; तेव्हां
पलिष्ट्यांच्या सैन्यानें रफाईच्या सपाटींत तळ
धरिला होता. १६ त्या काळीं दावीद तर बंदो-
बस्तीच्या ठिकाणीं होता, आणि त्या वेळेस पलि-
ष्ट्यांचे किलेपाळ बेथलेहेमांत होते. १७ तेव्हां
दावीदानें उत्कंठा धरून ह्मटलें, "बेथलेहेमांतल्या
दरवाज्याजवळ जी विहीर, तिचें पाणी मला प्या-
याला कोण देईल! १८ तेव्हां त्या तिघांनी
पलिष्ट्यांच्या सैन्यामधून घुसून जाऊन बेथलेहेमांत
दरवाज्याजवळ जी विहीर होती तींतून पाणी का-
ढिलें, आणि घेऊन दावीदाजवळ आणिलें; परंतु
दावीद तें प्यायाला मान्य झाला नाहीं, तर त्यानें
तें परमेश्वरापुढें ओतिलें; १९ आणि ह्मटलें,
"असें काम करणें माझ्या देवापुढें मला ओंगळ!
या माणसांच्या जिवावरलें रक्त म्या प्यावें कीं का-
य?" तें तर त्यांनी आपल्या जिवांवर आणिलें होतें,
ह्मणून तो तें प्यायाला मान्य झाला नाहीं; तें काम
त्या तिघां शूरांनी केलें. २० आणि योवाबाचा
भाऊ अबीशाय तो तिघांत मुख्य; कां तर त्यानें
आपला भाला तीनशांवर उचलून त्यांस मारिलें,
ह्मणून त्याचें नांव तिघांत झालें. २१ या ति-
घांत दोघांवर त्याचा मान झाला, ह्मणून तो त्यांचा
सर्दार झाला; तथापि तो पहिल्या तिघांपर्यंत पोहं-
चला नाहीं. २२ काब्जेलांतला शूर माणूस जो
बहुत पराक्रमाचा त्याचा पुत्र यहोयादा, त्याचा
पुत्र बनाया, त्यानें मोवाबांतील दोन सिंहासारिख्या
मनुष्यांस मारिलें; अणखी त्यानें बर्फाच्या समयीं
बिळांत उतरून सिंह मारिला. २३ आणि त्यानें
असा एक मिसरी माणूस मारिला कीं तो मेजानें
पांच हातांचा, आणि त्या मिसऱ्याच्या हातीं सा-
ळ्यांच्या तुरीसारिखा भाला होता; परंतु तो काठी
घेऊन त्याच्याजवळ उतरून गेला, मग त्यानें त्या
मिसऱ्याच्या हातांतून भाला हिसकून घेऊन त्या-
च्याच भाल्यानें त्याला मारिलें. २४ यहोयादाचा
पुत्र बनाया यानें एवढें केलें, ह्मणून त्याचें नांव
तिघां शूरांत झालें. २५ पाहा, तिसांत त्याचा
मान झाला, तथापि तो पहिल्या तिघांपर्यंत पोहं-
चला नाहीं; तेव्हां दावीदानें आपल्या हुजऱ्यांवर
त्याला ठेविलें.

२६ आणि सैन्यामध्यें हे शूर पुरुष, योवा-
बाचा भाऊ असाहेल, बेथलेहेमांतला दोदोचा पुत्र
एल्हानान; २७ हारोरकर शाम्मोथ, पलोनकर
हेलेज; २८ तकोवीकर इक्केशाचा पुत्र ईरा, अ-
नाथोथकर अबियेजेर; २९ हुशायकर सिब्ब-
खाय्, अहोहकर ईलाय्; ३० नटोफाथकर मा-
हराय्, नटोफाथकर बानाचा पुत्र हेलेद; ३१

गिबेकर रीबायाचा पुत्र इथाय, बन्यामीनाच्या वं-
शस्थांतला, पिराथोनकर बनाया; ३२ गाशाच्या
ओहळांतला हूराय्, आर्बेकर अबियेल; ३३
बाहरूमकर अज्मावेथ, शाल्बोनकर एल्याहबा;
३४ गिझोनकर हाशेम याचे पुत्र, शागेचा पुत्र
हरारकर योनाथान; ३५ हरारकर साखाराचा
पुत्र अहियाम, ऊराचा पुत्र अलीफाल; ३६ म-
खेरेकर हेफेर, पलोनकर अहीया; ३७ कार्मेल-
कर हेस्रो, एज्बायचा पुत्र नाराय; ३८ नाथा-
नाचा भाऊ योवेल, हाग्रीचा पुत्र मिभार; ३९
आम्मोनी जेलेख, अरूयेचा पुत्र योवाब याचा
शस्त्रवाहक बेरोथकर नाहराय्; ४० इथरकर
ईरा, इथरकर गारेब; ४१ हित्ती ऊरीया, आह-
लाय्चा पुत्र जाबाद; ४२ रऊबेनी शीजा या-
चा पुत्र अदीना, तो रऊबेन्यांवर अधिकारी आणि
त्याकडे तीस जण होते. ४३ माखाचा पुत्र हा-
नान, आणि मिथनकर योशाफाट्; ४४ आष्टरे-
कर उज्जीया, अरवेरकर होथाम याचे पुत्र, शा-
माव यईयेल; ४५ तीजकर शिम्री याचा पुत्र
यदीयेल, आणि त्याचा भाऊ योहा; ४६ एल्-
नामाचे पुत्र, माहवकर अलियेल व यरीबाय् व
योशाव्या, आणि मोवाबी इथ्मा; ४७ अलियेल
व ओबेद, आणि मचोबाय्कर यासियेल.

## अध्याय १२.

तर कीशाचा पुत्र शाऊल यामुळें दावीद बंदो-
बस्तीने राहत असतां, तितक्यांत दावीदाजवळ
झिक्लागांत जे आले ते हेच, आणि ते शूरांच्या सं-
गतीं लढायास सहाय होते. २ ते धनुर्धर आणि
डाव्या व उजव्या हातेकरून गुंडे फेंकणारे व धनु-
ष्याने बाण मारणारे होते, ते बन्यामीनी शाऊला-
च्या भावांतले, असे होते. ३ गिबकर हाश्मा
याचे पुत्र, मुख्य अहियेजेर व योवाश, आणि
आज्मावेथाचे पुत्र यजियेल व पेलेट व बराका व
आथोकर येहू; ४ आणि गिबोनकर इश्माया,
जो शूर, तिसांतला व तिसांत श्रेष्ठ, आणि इर्मया व
याहजियेल व योहानान व गदेरेकर योजाबाद;
५ एलूजाय् व यरीमोथ व बाल्या व शमाऱ्या व
हरूफकर शफाट्या; ६ एल्काना व इशीया व
अजारेल व योवेजेर व कऱ्यांतला याशबाम;
७ आणि गदोरांतल्या यरोहामाचे पुत्र, योवेला
व जबाद्या.

८ आणि गादांतील कोणी शूर, सैन्याचें ल-
ढाऊ मनुष्य, ढाल व बरची धरणारे, असे रानांत-
ल्या दुर्गास दावीदाकडे वेगळे झाले; त्यांचीं तोंडें
सिंहांच्या मुखासारिखीं होतीं, आणि ते डोंगराव-
रल्या हरिणासारिखे वेगी होते. ९ पहिला एजेर,
दुसरा ओबाद्या, तिसरा अलियाब; १० चव-
था मिश्मान्ना, पांचवा इर्मया; ११ साहवा आ-
त्ताय्, सातवा अलियेल; १२ आठवा योहानान,
नव्वा एल्जाबाद; १३ दाहावा इर्मया, अक-
राशा माखबान्नाय्. १४ हे गादाच्या वंशस्थां-
तले, सैन्याचे सर्दार, त्यांतील जो लाहान तो
शंभरांवर, आणि जो मोठा तो हजारांवर होता.
१५ पहिल्या महिन्यांत यार्देन आपल्या सर्व थ-
ड्यांनी भरली असताहि, जे तिच्या पलिकडे गेले
ते तेच; आणि त्यांनी पूर्वेच्या व पश्चिमेच्या
तळवटींतल्या सर्वांस पळविलें. १६ अणखी ब-
न्यामीनाचे व यहूदाचे कोणी वंशस्थ बंदिस्तीस
दावीदाजवळ आले. १७ तेव्हां दावीद त्यांच्या
भेटीस जाऊन त्यांस उत्तर करून ह्मणाला, "मा-
झें सहाय करायास जर तुह्मी माझ्याजवळ सुखा-
ने आलां आहां, तर माझें मन तुह्मांशीं संयुक्त
होईल; परंतु जर मला माझ्या वैऱ्यांच्या स्वाधीन
करायाला आलां असलां, तर माझ्या हातीं बळा-
त्कार नाहीं, यावरून आमच्या वडिलांच्या देवाने
पाहून निषेध करावा. १८ तेव्हां जो मुख्य स-
र्दार अमासाय् त्याच्या अंगीं वारें आलें असतां,
तो बोलला, "हे दावीदा, आह्मी तुझे, आणि हे
इशाय्च्या पुत्रा, आह्मी तुझ्याकडले आहों; तुझें
कुशळच कुशळ; तुझ्या सहाकाऱ्यांचेंहि कुशळ;
कां कीं तुझा देव तुझें सहाय करितो." यास्तव
दावीदाने त्यांस आपल्याकडे घेऊन त्यांस टोळ्यां-
च्या अधिकारावर ठेविलें. १९ आणि दावीद
पलिष्ट्यांच्या संगतीं शाऊलाशीं लढायास जा-
णार होता, तेव्हां मनाश्श्यांतले कित्येक त्याजवळ
आले, परंतु त्यांनी त्याचें सहाय केलें नाहीं, कां
तर पलिष्ट्यांच्या अधिकाऱ्यांनी विचार केल्यावर
त्याला निरोप देऊन असें ह्मटलें कीं, "तो आम-
च्या शिरांकडून आपला धनी शाऊल यासीं स-

मेट करील." २० जेव्हां तो सिक्लागास गेला,
तेव्हां त्याजवळ मनाश्श्यांतले हे जाऊन पडले,
जे मनाश्श्यांतल्या हजारांचे सर्दार, आद्नाह
व योजाबाद व यदीयेल व मीखाएल व योजा-
बाद व अलीहू व जिल्थाय्. २१ मग ते गो-
टावर होऊन दावीदाला सहाय झाले; ते तर सर्व
शूर पुरुष, ह्मणून सैन्यांत सर्दार झाले. २२
कां तर त्या वेळेस देवाच्या लष्करासारिखें मोठें
लष्कर झालें तोंपर्यंत ते दावीदाचें सहाय करा-
यास दिवसोंदिवस त्याजवळ येत होते.

२३ तर सैन्यांतले मुख्य हातेरबंद, जे परमे-
श्वराच्या सांगण्याप्रमाणें दावीदाकडे शाऊलाचें
राज्य फिरायास हेब्रोनास त्याजवळ आले, त्यां-
ची गणती, हीच; २४ यहूदाचे वंशस्थ ढाल
व भाला धरणारे, सैन्यांतले हातेरबंद साहा
हजार आठशें. २५ शिमोनाच्या वंशस्थांच्या
सैन्यांतले शूर पुरुष सात हजार एकशें. २६
लेवीच्या वंशस्थांतले चार हजार साहाशें. २७
अहरोन्यांचा पुढारी यहोयादा, आणि त्याच्या-
संगतीं तीन हजार सातशें. २८ आणि तरणा
शूर पुरुष सादोक, अणखी त्याच्या वडिलाच्या
घराण्यांतले अधिकारी बावीस. २९ आणि ब-
न्यामीनाच्या वंशस्थांतले तीन हजार; ते शाऊ-
लाचे भाऊ; कां कीं एथपर्यंत फार करून त्यां-
तल्यानीं शाऊलाच्या घराचें रक्षण केलें होतें.
३० आणि एफ्राइमाच्या वंशस्थांतले वीस हजार
आठशें; ते शूर पुरुष, आपल्या वडिलांच्या घ-
राण्यांत नामांकित माणसें. ३१ आणि मनाश्श्या-
च्या अर्ध्या वंशांतले अठरा हजार; त्यानीं जाऊन
दावीदाला राजा करावें ह्मणून ते नांवानें नेमलेले
होते. ३२ आणि इस्राएलानें काय करावें त्या-
विषयीं बुद्धि व काळ समजायाला इस्साखाराच्या
वंशस्थांत जे ज्ञानी, त्यांतले मुख्य आणि त्यांच्या
आज्ञेंत त्यांचे सर्व भाऊ दोनशें. ३३ जबुलूनां-
तले पन्नास हजार; जे सैन्यांत जाणारे, लढाया-
च्या सर्व हातेरानीं लढाई मांडणारे व ठिकाणीं
राहणारे, दोन मनांचे नव्हते, असे. ३४ आणि
नाफ्ताल्यांतले हजारांवरले सर्दार अणखी त्यां-
च्यासंगतीं ढालकरी व भालेकरी सततीस हजार.
३५ आणि दानी यांतले लढाई मांडणारे अठ्ठावीस
हजार साहाशें. ३६ आणि आशेराचे चाळीस
हजार; जे लढाई मांडायाला सैन्यांत जाणारे.
३७ आणि यार्देनेच्या पलिकडले लढाईच्या सै-
न्याच्या सर्व हातेरांसहित रऊबेनी व गादी व
मनाश्श्याचा अर्धा वंश, यांतले एक लाख वीस
हजार. ३८ हीं सर्व लढायाचीं माणसें ठिकाणीं
यथास्थित राहणारीं पूर्ण मनाचीं असतां, सर्व
इस्राएलासुद्धां दावीदाला राजा करायाला हेब्रो-
नास आलीं; अणखी सर्व इतर इस्राएली दा-
वीदाला राजा करण्याविषयीं एका मनाचे होते.
३९ आणि ते तेथें दावीदाजवळ तीन दिवस खा-
ऊन पिऊन राहिले, कारण कीं त्यांच्या भावानीं
त्यांसाठीं सिद्ध केलें होतें. ४० अणखी इस्सा-
खार व जबुलून व नाफ्ताली तेथवरचे, जे त्यां-
च्याजवळ होते, त्यानीं गाढवांवर व उंटांवर व
व खेंचरांवर व बैलांवर व खाण्यासाठीं भाकरी व
पीठ व अंजिरांच्या ढेपा व मनुका व द्राक्षरस व
तेल, आणि गुरें व बकरें फारच आणिलीं, कारण
कीं इस्राएलांत आनंद झाला होता.

## अध्याय १३.

आणि दावीदानें हजारांचे व शंभरांचे सर्दार,
आणि जो कोणी श्रेष्ठ, त्याजवळ विचार
मांडिला. २ तेव्हां दावीदानें इस्राएलाच्या सर्व
मंडळीस ह्मटलें, "जर तुह्मास बरें दिसतें, आणि
आमचा देव परमेश्वर याकडून आहे ह्मणून
दिसतें, तर आपले भाऊ, जे इस्राएलाच्या सर्व
देशांत उरलेले आहेत, आणि त्यांच्यासंगतीं या-
जक व लेवी, जे आपापल्या नगरांत व खेड्यांत
त्यानीं आमच्याजवळ मिळावें, ह्मणून आपण चहूं-
कडे त्यांजवळ पाठवूं; ३ नंतर आपल्या देवाचा
कोश आपल्यांजवळ माघारा आणूं; कां तर शा-
ऊलाच्या दिवसांत आपण तिच्याजवळ विचार घे-
तला नाहीं." ४ तेव्हां सर्व सभेनें "तसें करावें,"
ह्मणून ह्मटलें; कारण कीं सर्व लोकांच्या दिस-
ण्यांत ती गोष्ट नीट वाटली. ५ मग देवाचा
कोश किर्याथयारीमापासून आणायासाठीं दावी-
दानें मिसरांतल्या शीहोरापासून हमाथाच्या प्र-
वेशापर्यंत सर्व इस्राएलाला मिळविलें. ६ आणि
दावीद व सर्व इस्राएली यहूदाकडल्या बालेस,

ह्मणजे किर्याथयारीमास चढून गेले; परमेश्वर
देव, जो करुबांमध्यें राहतो, ज्याचें नाम घ्यावें,
त्याचा कोश तेथून वर आणावा ह्मणून. ७ मग
ते देवाचा कोश अबीनादाबाच्या घरांतून काढून
नव्या गाड्यावर नेऊं लागले आणि उज्जा व आह्यो
गाडा हाकीत होते. ८ तेव्हां दावीद व सर्व इस्रा-
एली गीतें गाऊन आणि तंतुवाद्यें व तारपेट्या व
डफ व झांजा व करणे वाजवून सर्व शक्तीनें देवा-
पुढें उत्साह करीत होते. ९ तर ते कीदोनाच्या
खळ्यापर्यंत पोहंचले असतां, उज्जानें आपला हात
लावून कोश धरिला, कां तर बैल त्याला हालवीत
होते. १० तेव्हां परमेश्वराचा क्रोध उज्जावर
तापला, कां तर त्यानें आपला हात कोशाला ला-
विला होता, ह्मणून तो तेथें देवापुढें मेला. ११
तेव्हां दावीदाला कष्ट झाले, कारण कीं परमे-
श्वराने उज्जावर मरण केलें होतें; यास्तव तें
ठिकाण आजपर्यंत पेरीजउज्जा असें ह्मटलें जात
आहे. १२ आणि त्या दिवसीं दावीद देवाचें
भय धरून बोलला, "मी आपल्या ठिकाणीं देवा-
चा कोश कसा नेऊं?" १३ यास्तव दावीदानें
तो कोश दावीदाच्या नगरास आपल्या ठिकाणीं
नेला नाहीं; तर गाथकर ओबेद अदोम याच्या
घरीं नेऊन ठेविला. १४ मग देवाचा कोश
ओबेद अदोमाजवळ त्याच्या घरीं तीन महिने
राहिला; आणि परमेश्वरानें ओबेद अदोमाच्या
घरास व त्याचें जें अवघें, त्यास आशीर्वाद प्राप्त
केला.

## अध्याय १४.

तर सोराचा राजा हीराम यानें दावीदाकडे
जासूद देवदारुचीं लांकडें व गवंडी व सुतार
त्याच्यासाठीं घर बांधायास पाठविलें. २ तेव्हां
दावीदाला समजलें कीं, मला इस्राएलावर राज्य
करायास परमेश्वरानें स्थापिलें आहे; कां तर
त्यानें आपल्या इस्राएली लोकांकरितां त्याचें राज्य
उंचाविलें होतें. ३ तेव्हां दावीदानें यरूशाले-
मांत अणखी स्त्रिया करून घेतल्या, आणि दावी-
दापासून अणखी पुत्र व कन्या जन्मल्या. ४ आ-
णि जीं लेंकरें त्याला यरूशालेमांत झालीं, त्यांचीं
नावें हींच; शम्मूवा व शोबाब, नाथान व शलो-
मोन; ५ आणि इभार व अलीशूवा व एल्पा-
लेट; ६ आणि नोगा व नेफेग व याफीया; ७
आणि अलीशामा व बेल्यादा व अलीफालेट.
८ आणि पलिष्ट्यानीं ऐकिलें होतें कीं दावी-
दाला सर्व इस्राएलावर राज्य करायासाठीं अभि-
षेक झाला, तेव्हां सर्व पलिष्टी दावीदाचा शोध
करायास चढून आले, आणि हें दावीदाला सम-
जलें तेव्हां तो बाहेर त्यांवर गेला. ९ आणि
पलिष्टी रफाईच्या खोऱ्यांत येऊन पसरले होते.
१० तेव्हां दावीदानें देवाला असें विचारिलें कीं,
"मी पलिष्ट्यांवर चढून जाऊं कीं काय? आणि
तूं त्यांस माझ्या हातीं देसील कीं काय?" तेव्हां
परमेश्वरानें त्याला सांगितलें, "तूं चढून जा,
ह्मणजे मी त्यांस तुझ्या हातीं देईन." ११ मग
ते बालपराजीमापर्यंत चढून गेले, आणि दावी-
दानें त्यांस तेथें मारिलें; तेव्हां दावीद बोलला,
"देव पाण्याच्या फुटण्यासारिखें माझ्या हातेकरून
माझ्या शत्रूंवर फोडून गेला." यावरून त्या ठि-
काणाचें नांव बालपराजीम ठेविलें गेलें. १२
त्यानीं तर तेथें आपले देव टाकून दिल्हे, यास्तव
दावीदानें सांगितल्यावरून ते अग्नींत जाळले गेले.
१३ नंतर पलिष्टी फिरून एकत्र होऊन खोऱ्यांत
पसरले. १४ यास्तव दावीदानें फिरून देवाला
विचारिलें; आणि देवानें त्याला सांगितलें, "तूं
त्यांच्यामागें चढूं नको, त्यांजवळून फेरा घेऊन
तुतांच्या झाडांच्या पुढें त्यांवर जा. १५ आणि
असें व्हावें कीं जेव्हां तूं तुतांच्या शेंड्यांमध्यें चाल-
ण्याचा शब्द ऐकसील, तेव्हां तूं लढायाला निघून
जा; कारण कीं देव पलिष्ट्यांच्या गोटास मारा-
याला तुझ्यापुढें जाईल." १६ मग देवानें दा-
वीदाला जसी आज्ञा दिल्ही होती, तसें त्यानें केलें;
आणि त्यानीं गिबोनापासून गाजेरपर्यंत पलिष्ट्यां-
च्या गोटास मारिलें. १७ असें दावीदाचें नांव
सर्व देशांत गेलें, आणि परमेश्वरानें त्याचें भय
सर्व राष्ट्रांस लाविलें.

## अध्याय १५.

तर दावीदानें आपल्या नगरांत आपल्यासाठीं
घरें बांधिलीं, आणि देवाच्या कोशासाठीं ठि-
काण सिद्ध करून त्याच्यासाठीं राहोटी दिल्ही. २

तेव्हां दावीदाने सांगितलें, "देवाचा कोश लेवीं-
शिवाय कोणी वाहूं नये, कारण कीं परमेश्वराने
देवाचा कोश वाहायास आणि आपली सेवा सर्व-
काळ करायास त्यांसच निवडिलें आहे." ३ मग
दावीदाने परमेश्वराचा कोश जें ठिकाण त्याने
त्याच्यासाठीं सिद्ध केलें होतें, तेथें वर आणाया-
साठीं सर्व इस्राएली यरूशालेमांत मिळविले. ४
आणखी दावीदाने आहरोनाचे वंशस्थ व लेवी
मिळविले. ५ कहाथाच्या वंशस्थांतला मुख्य
ऊरीयेल, आणि त्याचे भाऊ एकशें वीस. ६ म-
राराच्या वंशस्थांतला मुख्य असाया, आणि त्याचे
भाऊ दोनशें वीस. ७ गेर्षोमाच्या वंशस्थांतला
मुख्य योवेल, आणि त्याचे भाऊ एकशें तीस. ८
अलीसाफानाच्या वंशस्थांतला मुख्य शमाया, आ-
णि त्याचे भाऊ दोनशें. ९ हेब्रोनाच्या वंशस्थां-
तला मुख्य अलियेल, आणि त्याचे भाऊ ऐशीं.
१० उज्जियेलाच्या वंशस्थांतला मुख्य आम्मीना-
दाब, आणि त्याचे भाऊ एकशें बारा. ११ आ-
णि दावीदाने सादोक व एब्याथार याजक यांस,
आणि लेवींतले ऊरियेल, असाया व योवेल, श-
माया व अलियेल व आम्मीनादाब यांस बोला-
विलें. १२ आणि त्याने त्यांस ह्मटलें, "तुह्मी
लेवींच्या वडिलांत मुख्य; तुह्मी व तुमचे भाऊ
आपणांस शुद्ध करा; नंतर इस्राएलाचा देव पर-
मेश्वर याच्या कोशासाठीं जें ठिकाण म्या सिद्ध
केलें आहे, तेथें तो वर आणा. १३ तुह्मी पहि-
ल्याने तो उचलिला नव्हता, ह्मणजे आह्मी रीति-
प्रमाणें आपला देव परमेश्वर याचा धांवा केला
नाहीं, ह्मणून त्याने आह्मावर मरण केलें." १४
तेव्हां याजकांनी व लेवींनी इस्राएलाचा देव पर-
मेश्वर याचा कोश वर आणायासाठीं आपणास
शुद्ध केलें. १५ मग जसी मोश्याने परमेश्व-
राच्या सांगण्याप्रमाणें लेवींच्या संतानाविषयीं आज्ञा
केली होती कीं, "त्यांनी आपल्या खांद्यांवर का-
ठ्यांनी वाहावा," तसा देवाचा कोश त्यांनी उच-
लिला. १६ आणखी दावीदाने मुख्य लेवींस
सांगितलें कीं, "तुह्मी आपले भाऊ जे गाणारे त्यां-
स तारपेट्या व तंतुवाद्यें व झांजा अशा गाण्याच्या
यंत्रांसुद्धां उत्साहाचे स्वर उंच करून ऐकवायास
उभे करावें." १७ मग लेवींनी योवेलाचा पुत्र
हेमान, आणि त्याच्या भावांतला बेरेख्याचा पुत्र
आसाफ, आणि त्यांचे भाऊ मरारीचें संतान यां-
तला कुशायाचा पुत्र एथान उभा केला. १८
आणि त्यांच्यासंगतीं दुसऱ्या पदाचे त्यांचे भाऊ,
जे द्वारपाळ, जखाऱ्या, बेन व याजियेल व शमी-
रामोथ व यहियेल व उन्नी, अलियाब व बनाया
व मासेया व मात्तिथ्या व अलीफले व मिक्नेया
व ओबेद अदोम व यइयेल, ते उभे केले. १९
असे ते गवई हेमान, आसाफ व एथान पित-
ळ्याच्या झांजा घेऊन ऐकवीत होते. २० आणि
जखाऱ्या व आजियेल व शमीरामोथ व यहियेल
व उन्नी व अलियाब व मासेया व बनाया, हे क-
न्यांच्या स्वरांवरल्या तारपेट्यांवर होते. २१ आणि
मात्तिथ्या व अलीफले व मिक्नेया व ओबेद अ-
दोमी व यइयेल व अजाज्या, हे विशेष अष्टक-
स्वर यावरल्या तंतुवाद्यांवर होते. २२ आणि क-
नान्या समजीक होता, यास्तव तो स्वरधारणा शि-
कवीत असतां स्वरधारणेविषयीं लेवींत मुख्य हो-
ता. २३ आणि बेरेख्या व एल्काना हे कोशाचे
द्वारपाळ होते. २४ आणि शबान्या व योशाफा-
ट व नथानेल व अमासाय् व जखाऱ्या बनाया व
अलियेजेर हे याजक देवाच्या कोशापुढें करणे
वाजवीत होते, आणि ओबेद अदोम व यहीया
हेहि कोशाचे द्वारपाळ होते. २५ आणि दावीद
व इस्राएलाचे वडील व हजारांचे सर्दार हे परमे-
श्वराच्या कराराचा कोश ओबेद अदोमाच्या घरा-
हून उत्साहाने वर आणायासाठीं गेले. २६ आणि
परमेश्वराच्या कराराच्या कोशाचे वाहणारे लेवी
यांस जेव्हां देव सहाय झाला, तेव्हां त्यांनी सात
गोऱ्हे व सात एडके यांचे यज्ञ केले. २७ आणि
दावीद व कोशाचे वाहणारे सर्व लेवी व गाणारे
व गायन करणाऱ्याचा पुढारी कनान्या, हे बारीक
वाखांचे झगे ल्याले होते, आणि दावीदाच्या अंगीं
अळशीचें एफोद होतें. २८ असें सर्व इस्रा-
एलानी परमेश्वराच्या कराराचा कोश गजराने
व शिंगाच्या नादाने व करण्यांनी व झांजांनी, तार-
पेट्यांनी व तंतुवाद्यांनी वर आणिला. २९ तेव्हां
परमेश्वराच्या कराराचा कोश दावीदाच्या नग-
रापर्यंत आला असतां, असें झालें कीं शाऊलाची
कन्या मीखाल इने खिडकींतून डोकावून दावीद

राजा उडी मारीत व उत्साह करीत पाहिला,
तेव्हां तिने आपल्या मनांत त्याला धिःकारिलें.

## अध्याय १६.

त्यानी तर देवाचा कोश आणून जी राहोटी
दावीदाने त्याच्यासाठीं दिल्ही होती, तींत
तो मांडिला, आणि होम व शांतिकारक यज्ञ दे-
वापुढें केले. २ तेव्हां दावीदाने होम व शांति-
कारक यज्ञ वाहून समाप्त केल्यावर परमेश्वरा-
च्या नामाने लोकांस आशीर्वाद दिल्हा. ३ आ-
णि त्याने इस्राएलांतल्या एकएका माणसास, जसें
पुरुषाला तसें स्त्रीला, एक भाकरी व सागोतीचा
तुकडा व पोळी वांटून दिल्ही. ४ तेव्हां त्याने
परमेश्वराच्या कोशापुढें सेवा करायास व सूचना
द्यायास आणि इस्राएलाचा देव परमेश्वर याचा
आभार मानायास व स्तुति करायास कोणी लेवी
ठेविले; ५ मुख्य आसाफ व त्याच्या मागचे
जखाऱ्या, यदयेल व शमीरामोथ व यहियेल व
मात्तिथ्या व अलियाब व बनाया व ओबेद
अदोम व यइयेल, हे तारपेट्या व तंतुवाद्यें अशा
यंत्रांसुद्धां होते; आणि आसाफ झांज घेऊन
ऐकवीत होता. ६ आणि बनाया व याहाझियेल
याजक करण्यांसुद्धां देवाच्या कराराच्या कोशापुढें
अखंडपणाने होते.

७ तेव्हां त्याच दिवसीं दावीदाने आसाफ व
त्याचे भाऊ यांच्या हातीं परमेश्वराचे आभार
मानायास हें गीत पहिल्याने दिल्हें. ८ तुह्मी
परमेश्वराचे उपकार माना; त्याचें नाम घ्या,
राष्ट्रांमध्यें त्याची चरित्रें कळवा. ९ त्याच्या-
जवळ गायन करा; त्याचें कीर्त्तन करा; त्याच्या
सर्व आश्चर्याच्या कृत्यांवर ध्यान करीत जा. १०
त्याच्या पवित्र नामाविषयीं उत्साह करा; जे प-
रमेश्वराला शरण जातात, त्यांचें हृदय संतुष्ट
व्हावें. ११ तुह्मी परमेश्वराला व त्याच्या
शक्तीला शोध करायास यत्न करा: नेहमी त्याला
शोधा. १२ जीं आश्चर्याचीं कृत्यें त्याने केलीं,
त्याचे चमत्कार व त्याच्या तोंडचे न्याय, त्यांची
आठवण करा. १३ त्याचा सेवक इस्राएल याच्या
संतानाहो, त्याचा निवडलेला याकोब याच्या सं-
तानाहो तुह्मी असें करा. १४ तोच परमेश्वर
आमचा देव; त्याचे न्याय सर्व पृथ्वींत आहेत.
१५ तो आपला करार, जें वचन हजार पिढ्यांस
आज्ञेने बोलला, तें सर्वकाळ आठवीत आहे.
१६ त्याच्याविषयीं तो आब्राहामाजवळ करारी
झाला, आणि इझाकाजवळ आपली शपथ झाली,
तें." १७ आणि त्याने तें याकोब नेम, इस्राएला-
जवळ सर्वकाळ करार, स्थापिलें. १८ असें कीं
"मी तुला खनान देश तुझ्या वतनाचा वांटा देईन."
१९ तेव्हां ते गणतीने थोडे, हलके, व त्यांत प्र-
वासी होते. २० आणि ते देशोदेशीं एका रा-
ष्ट्रापासून दुसऱ्या राज्यांत असे फिरत होते. २१
त्यानी त्यापासूनहि त्यांस जांचणूक होऊं दिल्ही
नाहीं, राजांस देखील त्यांसाठीं निषेधिलें; २२
तुह्मी माझ्या अभिषिक्तांस शिवूं नका, माझ्या
भविष्यवाद्यांचें वाईट करूंच नका. २३ अहो
पृथ्वीचे सर्व, तुह्मी परमेश्वराजवळ गा; दिवसो-
दिवस त्याच्या तारणाचें सुवर्त्तमान सांगा. २४
राष्ट्रांमध्यें त्याचें गौरव; सर्व लोकांमध्यें त्याचीं
आश्चर्याचीं कृत्यें वर्णीत जा. २५ कारण कीं
परमेश्वर थोर आणि फार स्तुतियोग्य; सर्व
देवांवर तो भययोग्य आहे. २६ कारण कीं
लोकांचे सर्व देव बाहुल्या आहेत, परंतु परमे-
श्वराने आकाश उत्पन्न केलें. २७ त्याच्या स-
मक्षतेस मान व महत्व; त्याच्या ठिकाणीं परा-
क्रम व आनंद आहे. २८ लोकांच्या कुळाहो,
परमेश्वराला मानून द्या; परमेश्वराला गौरव
व पराक्रम द्या. २९ परमेश्वराला त्याच्या
नामाचें गौरव मानून द्या; अर्पण घेऊन त्याच्या
दर्शनास या; पवित्रतेच्या शोभेने परमेश्वराला
भजा. ३० अहो पृथ्वीचे सर्व, तुह्मी त्याच्या-
पुढें कांप धरा, भूगोळहि न हालावा असा स्थाप-
लेला आहे. ३१ आकाशानी संतोष करावा,
पृथ्वीनेहि हर्ष करावा, आणि परमेश्वर राज्य
करितो असें राष्ट्रांमध्यें सांगितलें जावें. ३२
समुद्र आणि त्यांतलें भरण यानी गर्जावें, भूमि
आणि जें तिजवर, त्या सर्वांनी उत्साह करावा.
३३ तेव्हां जंगलांतल्या झाडानी परमेश्वरापुढें
सुशब्द करावे; कारण कीं तो पृथ्वीचा न्याय करा-
यास आला आहे. ३४ तुह्मी परमेश्वराचें
उपकार माना, कारण कीं तो चांगला, आणि त्या-

ची दया सर्वकाळ आहे. ३५ तर तुह्मी असें
ह्मणा कीं, "हे आमच्या तारणाच्या देवा, आह्मास
तार, ह्मणजे आह्मास राष्ट्रांतून गोळा करून
सोडीव; यासाठीं कीं आह्मी तुझ्या पवित्र नामाने
उपकार मानून तुझ्या स्तुतीने नावाजून घ्यावें.
३६ इस्राएलाचा देव याचे धन्यवाद सर्वकाळा-
पासून सर्वकाळपर्यंतहि व्हावे." तेव्हां सर्व लोकांनी
"आमेन," बोलून परमेश्वराची स्तुति केली.

३७ तेव्हां त्याने आसाफ व त्याचे भाऊ यानी
कोशापुढें प्रतिदिवसाच्या नेमाप्रमाणें नेहेमी सेवा
करावी ह्मणून त्यांस तेथें परमेश्वराच्या करा-
राच्या कोशापुढें ठेविलें. ३८ ओबेद अदोमाहि
व त्याचे भाऊ अडुसष्ट, आणि यदीथूनाचा पुत्र
ओबेद अदोम व होसा, हे द्वारपाळ होते. ३९
आणि त्सादोक याजक व त्याचे भाऊ याजक,
गिबोनांत जें उंचस्थान तेथें परमेश्वराच्या मंड-
पापुढें ठेविले; ४० यासाठीं कीं त्यानी नित्य
सकाळीं आणि संध्याकाळीं होमाच्या वेदीवर पर-
मेश्वरापुढें होम करावे, आणि परमेश्वराने इ-
स्राएलास जें आपलें शास्त्र नेमून लाविलें, त्यांत
जें लिहिलें आहे, त्या अवघ्याप्रमाणें करावें. ४१
आणि त्यांच्यासंगतीं हेमान व यदूथून व दुसरे,
जे निवडलेले जे नांवानी लिहिलेले, तेहि; यासा-
ठीं तर त्यानी परमेश्वराची स्तुति करावी, का-
रण कीं त्याची दया सर्वकाळ आहे. ४२ ह्म-
णजे त्यांच्यासंगतीं हेमान व यदूथून करण्यांसुद्धां
व ऐकविण्यासाठीं झांजांसुद्धां, आणि देवाच्या
गायनाच्या दुसऱ्या यंत्रांसुद्धां ठेविले; आणि यदू-
थूनाचे पुत्र द्वारपाळ होते. ४३ नंतर सर्व
लोक आपापल्या घरीं गेले, आणि दावीद आप-
ल्या घरास आशीर्वाद द्यायाला माघारा आला.

## अध्याय १७.

आणि दावीद आपल्या घरीं बसला असतां असें
झालें कीं नाथान भविष्यवादी याला दावीद
ह्मणाला, "पाहा, मी देवदारूंच्या घरांत राहतों,
परंतु परमेश्वराच्या कराराचा कोश राहोटींत
आहे." २ नंतर नाथानाने दावीदाला ह्मटलें,
"देव तुला अनुकूळ आहे, यास्तव तुझ्या मनांत
जें कांहीं असेल, तें कर." ३ मग त्याच सत्रीं
असें झालें कीं देवाचें वचन नाथानाला प्राप्त
असें झालें कीं, ४ "तूं जाऊन माझा सेवक
दावीद याला सांग, 'परमेश्वर असें सांगतो कीं,
'तुला माझें राहायाचें घर बांधायाचें नाहीं; ५
कारण कीं म्या इस्राएलास वर आणिलें, त्या
दिवसापासून आजपर्यंत मी घरांत राहिलों नाहीं,
तर राहोटींतून राहोटींत व मंडपांतून मंडपांत
असत गेलों. ६ मी सर्व इस्राएलांच्यासंगतीं
जेथें जेथें चालत गेलों, त्या सर्व ठिकाणीं इस्रा-
एलाच्या ज्या ज्या न्यायाधीशाला म्या आज्ञा दि-
ल्ही कीं, 'तूं माझ्या लोकांचें पाळण कर,' त्यांत-
ल्या एखाद्याजवळ 'तुह्मी माझ्यासाठीं देवदारूचें
घर कां बांधीत नाहीं?' असें किंचितहि बोललों
कीं काय? ७ तर आतां माझा सेवक दावीद
याला तूं असें सांग, 'सैन्यांचा परमेश्वर असें
सांगत आहे कीं, 'म्या माझे लोक इस्राएल यां-
वर अधिकारी होण्यासाठीं तुला गोठ्यांतून, बक-
ऱ्यांमागूनहि काढून घेतलें; ८ आणि जेथें जेथें
तूं गेलास, त्या सर्व ठिकाणीं मी तुला अनुकूळ
झालों, आणि म्या तुझे सर्व शत्रू तुझ्यापुढून मा-
रून टाकिले; आणि पृथ्वीवर जे मोठे, त्यांच्या
नांवासारिखें तुझें नांव केलें आहे. ९ अणखी
म्या आपले लोक इस्राएल यांसाठीं ठिकाण नेमून
त्यांस स्थापीन आणि ते आपल्या स्थळीं राहून
अणखी डळमळणार नाहींत, आणि दुष्ट लोक
पहिल्यासारिखा फिरून त्यांचा क्षय करणार ना-
हींत; १० आणि ज्या दिवसीं म्या आपले लोक
इस्राएल यांवर न्यायाधीश लावून दिल्हे, तेव्हां-
पासून जसें झालें तसें होणार नाहीं; वर मी
तुझ्या सर्व शत्रूंचा मोड करीन; अणखी मी तुला
सांगतों, परमेश्वर तुझ्यासाठीं घर बांधील; ११
ह्मणजे जेव्हां आपल्या पूर्वजांजवळ जायाला तुझे
दिवस भरतील, तेव्हां असें होईल कीं तुझ्या
संतानांत जो तुझ्यामागें तुझ्या बीजाचा होईल,
त्याला उठवून त्याचें राज्य स्थापीन. १२ तोच मा-
झ्यासाठीं घर बांधील, आणि मी त्याचें सिंहासन
सर्वकाळ स्थापीन. १३ मी त्याला बाप असा हो-
ईन, आणि तो मला पुत्र असा होईल; अणखी
जो तुझ्यापूर्वीं होता, त्यावरून जसी म्या आपली
दया काढिली, तसी त्यावरून काढणार नाहीं.

१४ तर त्याला मी आपल्या घरावर व आपल्या
राज्यावर सर्वकाळ ठेवीन ; असें त्याचें सिंहासन
सर्वकाळ स्थापिलें जाईल." १५ नसें त्या सर्व
वचनाप्रमाणें, आणि त्या सर्व दर्शनाप्रमाणें ना-
थानानें दावीदाला सांगितलें.

१६ मग दावीद राजा आंत येऊन परमेश्व-
रापुढें बसून ह्मणाला, "हे देवा परमेश्वरा, मी
कोण ? आणि माझें घर काय कीं त्वां मला एथ-
पर्यंत आणिलें आहे ? १७ हे देवा, एवढें तर
तुझ्या दिसण्यांत हलकें असतां, त्वां आपल्या
सेवकाच्या घराविषयीं लांबच्या काळचें सांगितलें
आहे ; हे देवा परमेश्वरा, जसी थोरल्या मा-
णसावर, तसी दृष्टि त्वां मजवर लाविली आहे.
१८ तुझ्या सेवकाच्या गौरवाविषयीं दावीदानें
तुला अणखी काय बोलावें ? तूं तर आपल्या
सेवकाला जाणतोस. १९ हे परमेश्वरा, ह्या
सर्व मोठ्या गोष्टी कळवून त्वां आपल्या इच्छेप्र-
माणें आपल्या सेवकाकारितां हें अवघें मोठेपण
केलें आहे. २० हे परमेश्वरा, तुझ्यासारिखा
कोणी नाहीं, आणि आह्मी आपल्या कानानी जें
ऐकिलें, त्या अवघ्याप्रमाणें तुझ्यावांचून कोणी देव
नाहीं. २१ आणि तुझ्या इस्राएली लोकांसारिखें
पृथ्वीवर असें कोणतें एक राष्ट्र आहे कीं देवानें
जाऊन त्यांस मोकळे करून आपले लोक होण्या-
साठीं घेतलें ? अणखी त्वां आपले जे लोक मिस-
रांतून खंडून घेतले, त्यांच्यापुढून राष्ट्रें घालविलीं,
तेणेंकरून त्वां आपलें नाम अतिमोठें व भययोग्य
केलें आहे. २२ असें त्वां आपले इस्राएली लोक
सर्वकाळासाठीं आपलेच लोक करून ठेविले ;
आणि हे परमेश्वरा, तूं त्यांचाच देव असा
झाला आहेस. २३ तर हे परमेश्वरा, जी गोष्ट
त्वां आपल्या सेवकाविषयीं व त्याच्या घराविषयीं
सांगितली आहे, ती सर्वकाळ खचित करून आ-
पल्या सांगितल्याप्रमाणें कर. २४ अणखी हें
स्थापित व्हावें आणि तुझें नाम असें थोर मानिलें
जावें कीं इस्राएलाचा देव सैन्यांचा परमेश्वर
तोच इस्राएलाचा देव, अणखी तुझा सेवक दा-
वीद याचें घर तुझ्यापुढें स्थापलेलें व्हावें. २५
कारण कीं हे माझ्या देवा, तूं आपल्या सेवका-
साठीं घर बांधावील, असें त्वां त्याला सांगितलें
आहे ; यास्तव तुझ्यापुढें प्रार्थना करायास तुझ्या
सेवकाच्या मनांत आलें आहे. २६ तर आतां
हे परमेश्वरा, तूंच देव आहेस, आणि त्वां आ-
पल्या सेवकाविषयीं या उपकाराचें वचन दिल्हें
आहे. २७ यास्तव आतां तुझ्या सेवकाचें घराणें
तुझ्यापुढें सर्वकाळ राहावें, असा आशीर्वाद प्राप्त
करायाला त्वां मान्य व्हावें ; कारण कीं हे परमे-
श्वरा, त्वां आशीर्वाद दिल्हा तर सर्वकाळचा
आशीर्वाद होईल."

## अध्याय १८.

आणि त्यानंतर असें झालें कीं दावीदानें पलि-
ष्टयांस मारून त्यांचें दमन केलें, तेव्हां
पलिष्टयांच्या हातांतून गाथ व त्याचीं खेडीं घे-
तलीं. २ अणखी मोवाबाला असें मारिलें कीं
मोवाबी भेट आणून दावीदाचे सेवक झाले. ३
आणि जोबाचा राजा हदारेजेर फराथ नदीवर
आपलें राज्य स्थापायाला गेला, तेव्हां दावीदानें
त्याला हमाथापर्यंत मारिलें. ४ आणि दावीदानें
त्यापासून हजार रथ व सात हजार स्वार व वीस
हजार पायदळ घेतलें ; तेव्हां दावीदानें सर्व
रथांच्या घोड्यांच्या पायशिरा तोडिल्या, त्यांतून
केवळ शंभर रथांच्या घोड्यांस राखिलें. ५ आ-
णि जोबाचा राजा हदारेजेर याचें सहाय करा-
यास दामासेकांतले अरामी आले होते, तेव्हां
दावीदानें अराम्यांतले बावीस हजार पुरुष मा-
रिले. ६ आणि दावीदानें दामासेकाच्या अरा-
म्यांत ठाणीं ठेविलीं, ह्मणून अरामी भेट आणून
दावीदाचे सेवक झाले ; असा दावीद जेथें जेथें
गेला, तेथें तेथें परमेश्वरानें त्याचें सहाय केलें.
७ आणि हदारेजेराच्या सेवकांजवळ सोन्याच्या
ज्या ढाला होत्या, त्या दावीदानें घेऊन यरूशा-
लेमास आणिल्या. ८ आणि हदारेजेराचीं नगरें
टिभाथ व कून, तेथून दावीदानें फारच पितळ
घेतलें ; त्याचा शलमोनानें पितळीसमुद्र व ते
खांब व पितळी भांडीं केलीं. ९ आणि हमाथाचा
राजा तोवू यानें ऐकिलें कीं दावीदानें जोबाचा
राजा हदारेजेर याचें सर्व सैन्य मारिलें ; १०
तेव्हां त्यानें आपला पुत्र हदोराम याला दावीद
राजाजवळ त्याचें कुशल विचारायाला आणि

त्याला आशीर्वाद द्यायाला पाठविलें; कारण कीं
त्यानें हदारेजेरासीं लढून त्याला मारिलें होतें;
अणखी तोयू हदारेजेरासीं लढणारा होता; तेव्हां
त्यानें सोनें व रुपें व पितळ यांचीं सर्व वस्तुहि
पाठविलीं. ११ अणखी दावीद राजानें तीं पर-
मेश्वरासाठीं पवित्र करून ठेविलीं; त्यासुद्धां
जें रुपें व सोनें त्यानें सर्व राष्ट्रांपासून ह्मणजे अ-
दोम व मोवाब व आम्मोनी लोक व पलिष्टी व
अमालेक यांपासून घेतलें होतें, तेंहि ठेविलें. १२
आणि जरूयेचा पुत्र अबीशाय यानें मिठाच्या
खोऱ्यांत अठरा हजार अदोमी मारिले. १३ ते-
व्हां त्यानें अदोमांत ठाणीं ठेविलीं, आणि सर्व अ-
दोमी दावीदाचे सेवक झाले; तसें दावीद जेथें
जेथें गेला, तेथें तेथें परमेश्वरानें त्याचें सहाय
केलें.

१४ तर दावीदानें सर्व इस्राएलावर राज्य के-
लें, आणि आपल्या सर्व लोकांचे न्याय व नीति
केली. १५ तेव्हां जरूयेचा पुत्र योवाब सेनापति
होता, आणि अहीलूदाचा पुत्र यहोशाफाट,
इतिहासक होता. १६ आणि अहीटूबाचा पुत्र
जादोक व एब्याथाराचा पुत्र अबीमेलेख हे
याजक होते, आणि शाव्शा चिटणीस होता.
१७ आणि करेथी व पलेथी यांवर यहोयादा-
चा पुत्र बनाया होता, आणि दावीदाचे पुत्र
राजाच्या जवळचे मुख्य होते.

## अध्याय १९.

आणि यानंतर असें झालें कीं आम्मोनी लो-
कांचा राजा नाहाश मेला, आणि त्याचा
पुत्र त्याच्या ठिकाणीं राजा झाला. २ तेव्हां दा-
वीदानें ह्मटलें, "नाहाशाचा पुत्र हानून याजवळ
मी ममता दाखवीन, कारण कीं त्याच्या बापानें
माझ्याजवळ ममता दाखविली होती." मग दावी-
दानें त्याच्या बापाविषयीं त्याचें समाधान करा-
यास जासूद पाठविले; तेव्हां दावीदाचे सेवक
आम्मोनी लोकांच्या देशांत हानूनाजवळ त्याचें
समाधान करायास जाऊन पोंहचले. ३ मग आ-
म्मोनी लोकांच्या सर्दारानी हानूनाला ह्मटलें,
"दावीदानें समाधान करणारे तुझ्याजवळ पाठवि-
ल्यावरून त्यानें तुझ्या बापाचा मान केला, असें
तुला वाटतें कीं काय? शोध करून पाडावा, ह्म-
णजे देश हेरावा, याकरितां त्याचे सेवक तुझ्या-
जवळ आले नाहींत कीं काय?" ४ यास्तव हा-
नूनानें दावीदाचे सेवक धरून त्यांचें मुंडन केलें,
आणि त्यांचीं वस्त्रें अर्धीं ह्मणजे त्यांच्या टिरी-
पर्यंत कापून त्यांस घालविलें. ५ तेव्हां कोणी
जाऊन दावीदाला त्या माणसांविषयीं सांगितलें;
तीं माणसें तर फार लज्जित झालीं होतीं, यास्तव
राजानें त्यांच्या भेटीस पाठवून सांगितलें, "तुम-
च्या दाढ्या वाढतील तोंपर्यंत तुह्मी यरीहोमध्यें
राहा, नंतर माघारे या."

६ मग आम्मोनी लोकांस दिसून आलें कीं,
"आपण दावीदाजवळ घाणेरे झालों;" तेव्हां हा-
नून व आम्मोनी लोक यानी आपल्यासाठीं दोहों
नद्यांच्या मधल्या अरामांतले, व अरामीमाखा व
सोबा तेथले रथ व स्वार मोलानें ठेवायास एक
हजार तालांत रुपें पाठविलें. ७ असे त्यानें
आपल्यासाठीं बत्तीस हजार रथ, आणि माखाचा
राजा व त्याचे लोक मोलानें ठेविले; नंतर त्यानी
येऊन मेदबा याच्यापुढें तळ धरिला, आणि
आम्मोनी लोक आपल्या नगरांतून मिळून लढाया-
ला आले. ८ मग दावीदाला वर्त्तमान कळलें,
आणि त्यानें योवाब व शूर माणसांचें सर्व सैन्य
पाठविलें. ९ तेव्हां आम्मोनी लोकानी निघून
नगराच्या वेसीपुढें लढाई मांडिली, आणि जे राजे
आले होते, ते एकीकडे शेतावर होते. १०
तेव्हां योवाबानें पाहिलें कीं आपल्यासीं जी लढाई
होणार, ती पुढें मागेंहि आहे; यास्तव त्यानें इ-
स्राएलांतल्या सर्व निवडकांतून कित्येक निवडून
त्यांस अराम्यांवर लाविलें. ११ आणि इतर
लोक त्यानें आपला भाऊ अबीशाय् याच्या हातीं
दिल्हे, आणि त्यानें त्यांस आम्मोनी लोकांवर ला-
विलें. १२ तेव्हां त्यानें त्याला सांगितलें, "जर
अरामी मजपेक्षां बळवान झाले, तर तूं माझें स-
हाय कर; आणि जर आम्मोनी लोक तुजपेक्षां
बळवान झाले, तर मी तुझें सहाय करीन. १३
तूं बळवान हो, ह्मणजे आपण आपल्या लोकां-
साठीं व आपल्या देवाच्या नगरांसाठीं धैर्य
करूं; मग परमेश्वराच्या दिसण्यांत जें बरें, तें
तो करो." १४ नंतर योवाब आपल्या संगतीं-

ऱ्या लोकांसुद्धां अराम्यांशीं लढायास जवळ गे-
ला, तेव्हां ते त्याच्यापुढून पळाले. १५ मग
आम्मोनी लोकानी पाहिलें कीं, "अरामी पळाले,"
तेव्हां तेहि त्याचा भाऊ अबीशाय् याच्यापुढून
पळून नगरांत गेले, मग योवाब यरूशालेमास
आला.
१६ तेव्हां अराम्यानी पाहिलें कीं, "आपण
इस्राएलापुढें मारले गेलों;" यास्तव त्यानी दूत
पाठवून, जे अरामी नदीच्या पलिकडे, त्यांस बा-
हेर काढिलें, आणि त्यांच्यापुढें हदारेजेराचा से-
नापति शोफाक होता. १७ आणि हें दावी-
दाला कळलें, तेव्हां तो सर्व इस्राएलास मिळवून
यार्देनेच्या पलिकडे गेला, आणि त्याने त्यांजवळ
जाऊन त्यांवर लढाई लाविली; असी दावीदाने
अराम्यांशीं भिडायाला लढाई लाविली आणि
त्यांशीं ते लढले. १८ मग अरामी इस्राएलाच्या
पुढून पळाले; आणि दावीदाने अराम्यांतले सात
हजार रथ व चाळीस हजार पायदळ मारिलें,
आणि शोफाक सेनापति यालाहि मारिलें. १९
तेव्हां हदारेजेराचे सेवक अरामी यानी पाहिलें
कीं, "आपण इस्राएलापुढें मारले गेलों;" यास्तव
ते दावीदाशीं सल्ला करून त्याचे सेवक झाले,
आणि आम्मोनी लोकांचें फिरून सहाय करायाला
राजी झाले नाहींत.

## अध्याय २०.

तर वर्ष फिरलें असतां, ज्या वेळेस राजे बाहेर
निघतात, त्या वेळेस असें झालें कीं योवाबाने
सैन्यभार नेऊन आम्मोनी लोकांच्या देशाचा नाश
केला; नंतर जाऊन त्याने राब्बा नगर याला वेढा
घातला; दावीद तर यरूशालेमांत राहिला होता,
नंतर योवाबाने राब्बा मारून मोडिला. २
तेव्हां दावीदाने त्यांच्या राजाचा मुगूट त्याच्या
डोक्यावरून घेतला, तर त्याचें वजन एक तालांत
होतें, तो सोन्याचा आणि त्यावर मोल्यवान पा-
षाण होते; तर तो दावीदाच्या डोक्यावर घातला
होता, आणि त्याने त्या नगरांतून फारच लूट का-
ढून घेतली. ३ आणि जे लोक त्यांत होते,
त्यांस दावीदाने बाहेर आणिलें आणि त्यांस कर-
वतांखालीं व लोखंडाच्या मळणयंत्रांखालीं व
कुऱ्हाडींखालीं घातलें, आणि याप्रमाणें त्याने आ-
म्मोनी लोकांच्या सर्व नगरांचें केलें, नंतर दावीद
सर्व लोकांसुद्धां यरूशालेमास माघारा आला. ४
आणि त्यानंतर असें झालें कीं गेजेरांत पलिष्ट्यां-
शीं लढाई झाली, तेव्हां हुशेकर सिब्खाय् याने
शिप्पाय्, जो रेफाच्या पुत्रांतील एक होता, त्याला
मारिलें; तेव्हां त्यांचें दमन झालें.
५ आणखी पलिष्ट्यांशीं लढाई झाली, तेव्हां
याईराचा पुत्र एल्हानान याने लाहमीला मारिलें,
गल्याथ गाथकर, ज्याच्या भाल्याची काठी साळ्यां-
च्या तुरीसारिखी, त्याचा तो भाऊ. ६ आणि
फिरून गाथांत लढाई झाली; तेव्हां तेथें एक
मोठा उंच मनुष्य होता, आणि त्याला बोटें साहा
साहा, असीं चोवीस होतीं, आणखी तोहि रेफा-
च्या पुत्रांतील एक होता. ७ आणि त्याने निंदा-
करून इस्राएलास तुच्छ केलें, तेव्हां दावीदाचा
भाऊ शिमाचा पुत्र यहोनाथान याने त्याला मा-
रिलें. ८ ते गाथांत रेफाच्या पुत्रांतील होते,
तथापि दावीदाच्या हातें व त्याच्या सेवकांच्या
हातें ते पडले.

## अध्याय २१.

तेव्हां साटानाने इस्राएलावर उठून दावीदाला
इस्राएलाची मोजणी करायास प्रेरिलें. २
मग दावीदाने योवाबाला व लोकांच्या अधिका-
ऱ्यांस सांगितलें, "तुह्मी जाऊन बेरशेबा तेथून
दानापर्यंत इस्राएलाची मोजणी करा, आणि मला
त्यांची गणना समजावी ह्मणून माझ्याजवळ याद
आणा." ३ तेव्हां योवाब बोलला, "लोक जि-
तके आहेत त्याहून परमेश्वर शंभरपट वाढवो;
हे माझ्या धनी राजा, ते सर्व माझ्या धन्याचे
सेवक नाहींत कीं काय? माझा धनी हें कां सां-
गतो? तो इस्राएलाला दोषकारण कां होईल?"
४ तथापि राजाचा शब्द योवाबावर प्रबळ झाला,
ह्मणून योवाब बाहेर जाऊन सर्व इस्राएलांत गेला,
नंतर यरूशालेमास आला. ५ आणि योवाबाने
लोकांच्या गणतीची याद दावीदाला दिल्ही; तर
सर्व इस्राएलांत तरवार उपसणारे अकरा लाख
पुरुष, आणि यहूदांत तरवार उपसणारे चारशें
लाख सत्तर हजार पुरुष होते. ६ तरी लेवी

व बन्यामीन यांची पाहणी त्याच्यासंगतीं केत-
ली नाहीं, कारण कीं राजाची आज्ञा योवाबाला
ओंगळ वाटली होती. ७ तेव्हां त्या गोष्टी-
मुळें देवाला वाईट वाटलें, ह्मणून त्याने इस्रा-
एलास मारिलें. ८ मग दावीद देवाला ह्मणाला,
"म्या ही गोष्ट केली, यांत मला फार पाप घडलें;
तथापि जरी मजकडून फार मूर्खपण घडलें आहे,
तरी आतां कृपेकरून आपल्या सेवकाचा अन्याय
दूर कर." ९ तेव्हां परमेश्वराने दावीदाचा
भविष्यवादी गाद याला असें सांगितलें, १०
"तूं जाऊन दावीदाला याप्रमाणें सांग, परमेश्वर
असें सांगतो कीं, 'मी तुझ्यापुढें तीन गोष्टी ठेवि-
तों; त्यांतून एक जी म्या तुझ्याजवळ करावी, ती
तूं आपल्यासाठीं निवडून घे." ११ तेव्हां गा-
दाने दावीदाजवळ जाऊन त्याला ह्मटलें, "परमे-
श्वर असें सांगतो, 'तूं आपल्यासाठीं निवडा घे;
१२ तीन वर्षांचा दुकाळ व्हावा, किंवा तुझ्या
शत्रूंची तरवार पाठीस लागली असतां, तुझ्या
वैऱ्यांकडून तीन महिने नाश व्हावा, किंवा तीन
दिवस परमेश्वराची तरवार, ह्मणजे मरी, दे-
शांत व्हावी, असी कीं परमेश्वराचा दूत इस्रा-
एलाच्या सर्व सीमेंत नाशकर्त्ता व्हावा, यांतून
कोणतें? तर ज्याने मला पाठविलें, त्याजवळ
म्या माघारें जाऊन कोणतें उत्तर द्यावें याविषयीं
तूं आतां विचार करून पाहा. १३ तेव्हां दावीद
गादाजवळ बोलला, "मला फार संकट झालें;
परमेश्वराच्या ठायीं ममता फार आहे, या-
स्तव आतां म्या त्याच्या हातांत पडावें; माणसा-
च्या हातांत पडूं नये." १४ तेव्हां परमेश्वराने
इस्राएलावर असी मरी लाविली कीं इस्राएलांत-
लीं सत्तर हजार माणसें पडलीं. १५ आणि
देवाने दूताला यरूशालेमाचा नाश करायास
तिकडे पाठविलें; आणि तो नाश करीत होता,
तेव्हां परमेश्वराने पाहिलें आणि त्या दुःखा-
वरून त्याला पश्चात्ताप झाला; यास्तव जो दूत
नाश करीत होता, त्याला त्याने सांगितलें, "पुरे,
आतां आपला हात आटोपून धर." तेव्हां अ-
र्णान यबूसकर याच्या खळ्याजवळ परमेश्वरा-
चा दूत उभा होता. १६ तेव्हां दावीदाने आ-
पली दृष्टि वर केली आणि पृथ्वी व आकाश
यांच्यामध्यें उभा राहिलेला परमेश्वराचा दूत,
आणि त्याची उपसलेली तरवार त्याच्या हातांत
यरूशालेमावर काढलेली असी पाहिली; तेव्हां
दावीद आणि तरट पांघरलेले वडील उपडे पडले.
१७ आणि दावीदाने देवाला ह्मटलें, "म्या लो-
कांची मोजणी करायाला सांगितलें नाहीं कीं
काय? ज्याने पाप केलें आणि दुष्टाई केली, तो
मीच; तर या मेंढरानीं काय केलें? हे देवा
परमेश्वरा, आतां तुझा हात मजवर व माझ्या
बापाच्या घराण्यावर पडावा, आणि तो तुझ्या
लोकांवर पटकीरूप नसावा." १८ तेव्हां पर-
मेश्वराच्या दूताने गादाला असें सांगितलें कीं,
"दावीदाने वर जाऊन अर्णान यबूसकर याच्या
खळ्यांत परमेश्वरासाठीं वेदी बांधावी, याप्रमाणें
तूं दावीदाला सांग." १९ तर जें वचन गादाने
परमेश्वराच्या नामाने सांगितलें, त्या वचनावरून
दावीद वरतीं गेला. २० तेव्हां अर्णानाने मुरडून
दूत पाहिला, आणि त्याच्यासंगतीं त्याचे चौघे
पुत्र लपाले; अर्णान तर गव्हाची मळणी करीत
होता. २१ तेव्हां दावीद अर्णानाकडे आला,
आणि अर्णानाने दृष्टि लावून दावीदाला पाहिलें,
आणि त्याने खळ्याबाहेर जाऊन तोंड भूमीस
लावून दावीदाला नमन केलें. २२ तेव्हां दावी-
दाने अर्णानाला ह्मटलें, "खळ्याची जागा मला
दे, ह्मणजे मी तेथें परमेश्वरासाठीं वेदी बांधीन;
ही पूर्ण मोलाने मला दे; यासाठीं कीं पटकी
लोकांवरून आटोपली जावी." २३ तेव्हां अ-
र्णान दावीदाला ह्मणाला, "त्वां आपल्यासाठीं
घ्यावी, आणि माझा धनी राजा याच्या दिसण्यांत
जें बरें, तें करावें; पाहा, होमांसाठीं बैल देतों,
आणि लांकडांसाठीं मळण्याच्या लाटा, आणि
नैवेद्यासाठीं गहूं, हीं अवघीं देतों." २४ तेव्हां
दावीद राजा अर्णानाला ह्मणाला, "नको; तर
मी पूर्ण मोलाने अवश्य विकत घेईन; कां तर जें
तुझें, तें मी परमेश्वरासाठीं घेणार नाहीं, आणि
फुकट घेऊन होम करणार नाहीं." २५ मग
दावीदाने अर्णानाला त्या जाग्यावर साहांशें शे-
केल सोनें जोखून दिल्हें. २६ आणि दावीदाने
तेथें परमेश्वरासाठीं वेदी बांधून होम व शांति-
कारक यज्ञ केले, आणि परमेश्वराची प्रार्थना

केली; तेव्हां त्याने त्याला आकाशांतून होमाच्या
वेदीवर अग्नि पाडून उत्तर दिल्हें. २७ आणि
परमेश्वराने दूताला आज्ञा केली ह्मणून त्याने
आपली तरवार तिच्या मेणांत घातली. २८ त्या
वेळेस दावीदाने पाहिलें कीं अर्णान यबूसकर या-
च्या खळ्यांत आपल्याला परमेश्वराने उत्तर
दिल्हें, तेव्हां त्याने तेथें यज्ञ केले. २९ तर त्या
वेळेस परमेश्वराचा मंडप जो मोशाने रानांत
केला होता, तो होमाच्या वेदीसुद्धां गिबोनाच्या
उंच स्थानावर होता. ३० तथापि त्याच्यापुढें
देवाजवळ विचारायास जायाला दावीदाला शक्ति
नव्हती, कारण कीं तो परमेश्वराच्या दूताच्या
तरवारीला भीत होता.

## अध्याय २२.

तेव्हां दावीदाने ह्मटलें, "हेंच परमेश्वर देव
यांचें मंदिर, आणि हीच इस्राएलाच्या हो-
माची वेदी आहे." २ मग दावीदाने इस्राएला-
च्या देशांत जे विदेशी त्यांस गोळा करायाला
आज्ञा केली, आणि परमेश्वराचें मंदिर बांधा-
यासाठीं त्याने चिरे घडायाला पाथरट ठेविले. ३
आणि दावीदाने दरवाज्यांच्या कवाडांच्या खि-
ळ्यांसाठीं व सुरस्यांसाठीं फार लोखंड सिद्ध
केलें, आणि फार पितळ जोखण्याअगळें एवढें
सिद्ध केलें. ४ आणि देवदारूचीं अगणित लां-
कडेंहि; कारण कीं जीदोनकर व जोरकर यानी
दावीदाजवळ देवदारूंचीं लांकडें फार आणिलीं.
५ तेव्हां दावीदाने ह्मटलें, "माझा पुत्र शलमोन
तरणा व कोवळा आहे, आणि जें मंदिर परमे-
श्वरासाठीं बांधायाचें, तें फार थोर, आणि सर्व
देशांमध्यें विख्यात व शोभायमान झालें पाहिजे;
तर आतां मी त्याच्यासाठीं सिद्ध करीन." यास्तव
दावीदाने आपल्या मरणापूर्वी फार सामग्री सिद्ध
केली.

६ तेव्हां त्याने आपला पुत्र शलमोन याला
बोलाविलें, आणि इस्राएलाचा देव परमेश्वर
याच्यासाठीं मंदिर बांधायास त्याला आज्ञा दिल्ही.
७ तेव्हा दावीदाने आपला पुत्र शलमोन याला
सांगितलें, "मजविषयीं तर असें माझ्या मनांत
होतें कीं आपण परमेश्वर देव याच्या नामा-
साठीं मंदिर बांधावें; ८ तथापि परमेश्वराचें
वचन मला असें झालें कीं, "त्वां बहुत रक्त पा-
डलें आणि मोठया लढाया केल्या, तर तुला
माझ्या नामासाठीं मंदिर बांधायाचें नाहीं; कां कीं
त्वां माझ्या दृष्टींत भूमीवर फार रक्त पाडलें. ९
पाहा, तुजपासून पुत्र जन्मेल, तो शांतीचा माणूस
होईल, आणि मी त्याला त्याच्या चहुंकडल्या सर्व
शत्रूंविषयीं विसांवा देईन; अणखी त्याचें नांव
शलमोन होईल, कां कीं त्याच्या दिवसांत मी
इस्राएलाला सला व शांति देईन. १० तोच
माझ्या नामासाठीं मंदिर बांधील, आणि तो मला
पुत्र होईल, मीहि त्याला बाप होईन, आणि
त्याच्या राज्याचें सिंहासन इस्राएलावर सर्वकाळ
स्थापीन." ११ तर आतां हे माझ्या पुत्रा, पर-
मेश्वराने तुला अनुकूळ व्हावें, आणि त्वां सफळ
होऊन आपला देव परमेश्वर याचें मंदिर, जसें
त्याने तुजविषयीं सांगितलें, तसें बांधावें. १२
परमेश्वराने तुला चातुर्य व ज्ञान अगत्य द्यावें,
आणि आज्ञा करून तुला इस्राएलावर ठेवावें; तर
तुला आपला देव परमेश्वर याचें शास्त्र पाळलें
पाहिजे. १३ जे नेम व न्याय परमेश्वराने
आज्ञा करून मोशाजवळ इस्राएलासाठीं लावून
दिल्हे, ते जर तूं संभाळून पाळसील, तर सफळ
होसील; तूं बळाने धैर्य धर, भिऊं नको, आणि
घाबरूं नको. १४ अणखी पाहा, म्या आपल्या
दुःखामध्येंहि परमेश्वराच्या मंदिरासाठीं एक
लाख तालांत सोनें आणि दाहा लाख ता-
लांत रुपें सिद्ध केलें; आणि पितळ व लोखंड
यांचें वजन नाहीं, कां तर फार झालें; आणि
लांकडें व चिरे म्या सिद्ध केले आहेत, तर त्वां
त्यांवर वाढवावें. १५ अणखी तुझ्याजवळ फार
कामकरी, पाथरट व गवंडी व सुतार, आणि जे
अवघ्या कामांमध्यें निपुण ते सर्व आहेत. १६
सोनें व रुपें व पितळ व लोखंड यांची तर गण-
ना नाहीं; तूं उठून काम कर, आणि परमेश्वर
तुला अनुकूळ होवो."

१७ नंतर दावीदाने आपला पुत्र शलमोन या-
चें सहाय करायाला इस्राएलाच्या सर्व अधि-
काऱ्यांस आज्ञा दिल्ही. १८ "तुमचा देव पर-
मेश्वर तुह्मास अनुकूळ नाहीं कीं काय? त्यानेच

तुह्मास चहुंकडून शांति दिल्ही, कारण कीं त्याने
माझ्या हातीं देशांतले राहणारे दिल्हे आहेत;
असें परमेश्वरापुढें व त्याच्या लोकांपुढें देशाचें
दमन झालें. १९ आतां तुह्मी आपला देव पर-
मेश्वर याचा शोध करायाला आपलें अंतःकरण
व आपला जीव लावा, आणि तुह्मी उठून पर-
मेश्वर देव याचें पवित्र स्थान बांधा; कारण कीं
परमेश्वराच्या नामाकरितां जें मंदिर बांधायाचें,
त्यांत परमेश्वराच्या कराराचा कोश व देवाच्या
पवित्रस्थानांतलीं पात्रें आणून ठेवायाचीं आहेत."

## अध्याय २३.

दावीद तर वृद्ध होऊन आयुष्याने पूर्ण झाला
असतां, त्याने आपला पुत्र शलमोन इस्राए-
लावर राजा केला. २ तेव्हां त्याने इस्राएलाचे
सर्व अधिकारी व याजक व लेवी गोळा केले. ३
आणि लेवी तीस वर्षांचे व त्यावरचे मोजले गे-
ले, तेव्हां त्यांचा एक एक पुरुष मोजून त्यांची
गणती अडतीस हजार झाली. ४ त्यांतले चो-
वीस हजार परमेश्वराच्या मंदिराच्या कामावर
पाहरेकरी, आणि पाहणेकरी व न्यायाधीश साहा
हजार होते. ५ आणि चार हजार द्वारपाळ,
आणि "जीं वाजंत्रें म्या स्तुतीसाठीं केलीं," ह्मणून
दावीदाने ह्मटलें होतें, तिहीं करून परमेश्वराची
स्तुति करणारे चार हजार होते. ६ आणि लेवीं-
चे, ह्मणजे गेर्षोन, कहाथ व मरारी यांचें संतान,
यांची दावीदाने वांटणी केली. ७ गेर्षोन्यांतला
लादान व शिमी; ८ लादान जो श्रेष्ठ, त्याचे
पुत्र यहियेल व जेथाम व योवेल, असे तीन.
९ शिमीचे पुत्र, शलोमीथ व हजियेल व हारान,
असे तीन; हे लादान्यांतले मुख्य वडील. १०
आणखी शिमीचे पुत्र, याहाथ, जीना व यऊश
व बरीया; हे शिमीचे चौघे पुत्र. ११ आणि
याहाथ मुख्य, व जीना दुसरा होता; आणि
यऊश व बरीया यांस बहुत पुत्र झाले नाहींत,
यास्तव ते वडिलाच्या घराण्यांत एका झडतीचे
होते. १२ कहाथाचे पुत्र, आम्राम, इझार, हे-
ब्रोन व उज्जियेल, असे चार. १३ आम्रामाचे
पुत्र, आहरोन व मोशे; आणि आहरोन आपण
व त्याचें संतान परंपरेने परमेश्वराच्या सेवेसाठीं
त्याच्यापुढें धूप करायाला आणि त्याच्या नामाने
आशीर्वाद द्यायाला परमपवित्रस्थानीं आपल्या प-
वित्र कामाकरितां सर्वकाळ वेगळें ठेविलें होतें.
१४ आणि देवाचा माणूस मोशे, याचे पुत्र ले-
वींच्या वंशांत ह्मटले गेले. १५ मोशाचे पुत्र,
गेर्षोम व अलियेजेर. १६ गेर्षोमाचे पुत्र, यांत
शबुवेल मुख्य. १७ आणि अलियेजेराला र-
हब्या आदिकरून संतान झालें, आणखी अलि-
येजेराला दुसरे पुत्र झाले नाहींत, परंतु रहब्या-
ला विशेष फार पुत्र झाले. १८ इझाराचें संतान
यांत शलोमीथ आदिकरून. १९ हेब्रोनाचे पुत्र,
यांत यरीया पहिला, अमाऱ्या दुसरा, याहजिये-
ल तिसरा, व यक्माम् चवथा. २० उज्जिये-
लाचे पुत्र, यांत मीखा पहिला, व यशीया दुसरा.
२१ मरारीचे पुत्र, माहली व मुशी; माहलीचे
पुत्र, एलाजार व कीश. २२ आणि एलाजार
मेला, तर त्याला पुत्र नव्हते, केवळ कन्या झाल्या
होत्या, आणि त्यांचे नातलग कीशाचे पुत्र यांनी
त्या करून घेतल्या. २३ मुशीचे पुत्र, माहली
व एदेर व यरेमोथ, असे तीन. २४ हें लेवींचें
संतान, त्यांच्या वडिलांच्या घराण्याप्रमाणें त्यांच्या
टाळवांवरून नावांच्या गणतीने त्यांच्या झडतीप्र-
माणें वडिलांत मुख्य; हे परमेश्वराच्या मंदि-
राच्या सेवेंत काम करीत होते; केव्हां, तर वीस
वर्षांचे व वरले तेव्हां; २५ कारण कीं दावी-
दाने ह्मटलें होतें, "इस्राएलाचा देव परमेश्वर
याने आपल्या लोकांस असी शांति दिल्ही आहे
कीं त्यांनी यरूशालेमांत सर्वकाळ राहावें." २६
आणखी लेवींविषयींहि "त्यांनी मंडप व त्यांतल्या
सेवेचीं सर्व पात्रें न वाहावीं." २७ तर दावी-
दाच्या शेवटल्या वचनांवरून त्यांनी लेवींचें सं-
तान वीस वर्षांचें आणि वरलें असतां, त्यांची
गणती केली. २८ आणखी ते आपल्या वरल्या
नेमणुकीवरून परमेश्वराच्या मंदिराच्या सेवे-
साठीं आहरोनाच्या संतानाच्या हाताखालीं; वा-
ड्यांवर व खोल्यांवर, आणि जें कांहीं पवित्र,
त्याच्या शुद्धपणावर होऊन देवाच्या मंदिरीं सेवा
करीत होते. २९ ह्मणजे दर्शनीय अपूपावर व नैवे-
द्याच्या सपिठावर व बेखमीरी पोळ्यांवर व तव्यावर
व तळण्यावर व सर्व मापवें व मोजणें यांवर होते.

३० अणखी सकाळच्या सकाळीं परमेश्वराजवळ
उपकार मानायाला व स्तुति करायाला उभे राहत
होते, आणि संध्याकाळीं तसेंच. ३१ आणि
परमेश्वराजवळ शाब्बाथांत, नव्या महिन्यांत,
आणि पर्वकाळांत गणतीने त्याच्या नेमाप्रमाणें सर्व
होम करण्यासाठीं परमेश्वरापुढें नेहमी राहत
होते. ३२ अणखी सभामंडपाचें संरक्षण, आणि
पवित्रस्थानाचें संरक्षण, आणि आपले भाऊ आ-
हरोनाचें संतान यांचें संरक्षण ते करीत होते;
असे परमेश्वराच्या मंदिराच्या सेवेंत होते.

## अध्याय २४.

आतां आहरोनाच्या संतानाच्या वांटण्या अशा
आहेत; आहरोनाचे पुत्र नादाब व अ-
बीहू, एलाजार व ईथामार. २ नादाब व अ-
बीहू हे तर आपल्या बापाच्या पूर्वी मेले, आणि
त्यांस पुत्र झाले नव्हते; नंतर एलाजार व ईथा-
मार यानी याजकपण केलें. ३ तर दावीद व
सादोक यानी एलाजाराच्या संतानांतले जे त्यांस,
आणि ईथामाराच्या संतानांतले अहीमेलेख आ-
दिकरून जे त्यांस त्यांच्या सेवेप्रमाणें नेमून ठेवा-
यास त्यांची वांटणी केली. ४ आणि ईथामाराच्या
संतानापेक्षा एलाजाराच्या संतानांत अधिक मुख्य
पुरुष निघाले, यास्तव त्यानी त्यांची वांटणी त्या-
प्रमाणें केली; एलाजाराच्या संतानामध्यें वडिलां-
च्या घराण्यांत मुख्य असे सोळा, आणि ईथामा-
राच्या संतानामध्यें त्यांच्या वडिलांच्या घराण्यांत
आठ होते. ५ आणि त्यांची परस्परेंकरून वां-
टणी त्यानी देवखुणांवरून केली, कारण कीं एला-
जाराच्या संतानांतले आणि ईथामाराच्या संतानांत-
ले, पवित्रस्थानाचे अधिकारी व आपल्या देवाकड-
चे अधिकारी व्हायाचे होते. ६ आणि नथाने-
लाचा पुत्र शमाया, जो लेवींतला लेखक त्याने
राजा व अधिकारी आणि याजक सादोक व एब्या-
थाराचा पुत्र अहीमेलेख आणि लेवींतले व याज-
कांतले मुख्य वडील यांच्यापुढें ते लिहून घेतले;
एलाजाराचें एक मुख्य घराणें घेतलें, आणि ईथा-
माराचें एक घेतलें गेलें. ७ पहिली देवखूण यहो-
यारीबाविषयीं; दुसरी, यदायाविषयीं निघाली;
८ तिसरी, हारीमाविषयीं; चवथी, शोरीमावि-
षयीं: ९ पांचवी, माल्कीयाविषयीं; साहावी,
मीयामीनाविषयीं; १० सातवी, हाकोजावि-
षयीं; आठवी, अबीयाविषयीं; ११ नववी,
येशूवाविषयीं; दाहावी, शकन्याविषयीं; १२
अकरावी, एल्याशीबाविषयीं; बारावी, याकीमा-
विषयीं; १३ तेरावी, हुप्पाविषयीं; चवदावी,
येशेबाबाविषयीं; १४ पंधरावी, बिल्गाविषयीं;
सोळावी, इम्मेराविषयीं; १५ सत्रावी, हेजीरा-
विषयीं; अठरावी, हाप्पिज्जेजाविषयीं: १६ एकु-
णविसावी, पथाह्याविषयीं; विसावी, यहेज्केला-
विषयीं; १७ एकविसावी, याखीनाविषयीं; बा-
विसावी, गामुलाविषयीं; १८ तेवीसावी, दला-
याविषयीं; चोविसावी, माज्याविषयीं. १९ हे,
इस्राएलाचा देव परमेश्वर याने मोशाला जसी
आज्ञा दिल्ही होती, तसे आपला वडील आहरोन
याच्या हाताखालीं आपल्या सेवेसाठीं परमेश्व-
राच्या मंदिरास पाळीने जायाला नेमले होते.
२० आणि लेवीच्या संतानांत जे राहिले ते हेच,
आम्रामाच्या संतानांत शूबाएल; शूबाएलाच्या
पुत्रांत येहदाया; २१ रहाब्याविषयीं तर रहा-
ब्याच्या संतानांत मुख्य इश्शीया; २२ इस्हारी
यांमध्यें शलोमोथ; शलमोथाच्या पुत्रांत या-
हाथ; २३ आणि हेब्रोनाचे पुत्र यांमध्यें यरीया;
दुसरा, अमाऱ्या; तिसरा, याहजियेल; चवथा, य-
कमाम्; २४ उज्जियेलाचें संतान यांत मीखाच्या
पुत्रांत शामीर; २५ मीखाचा भाऊ इश्शीया
इश्शीयाच्या संतानांत जखाऱ्या; २६ मरारीचे
पुत्र, माहली व मूशी; याजीयाचें संतान यांत
बनो. २७ मरारीचें संतान यांत याजीयावरून
बनो व शोहाम व जाकूर व इब्री. २८ माह-
लीचा एलाजार, त्याला तर पुत्र झाले नव्हते.
२९ कीशापासून कीशाचें संतान यांत यराहमेल.
३० आणि मूशीचे पुत्र, माहली व एदेर व य-
रीमोथ; हे आपापल्या वडिलांच्या घराण्याप्रमाणें
लेवीचें संतान. ३१ आणि त्यानीहि आपले
भाऊ, आहरोनाचें संतान यांच्यासंगतीं, म्हणजे
मुख्य वडिलानी आपल्या धाकट्या बंधुवर्गाच्या
संगतीं दावीद राजा व सादोक व अहीमेलेख
आणि याजकांतले व लेवींतले मुख्य वडील यां-
च्यासमोर देवखुणा पाडून घेतल्या.

## अध्याय २५.

आणि दावीद व समुदायाचे अधिकारी यानी
सेवेंसाठीं आसाफ व हेमान व यदूथून या-
चें संतान, ज्यानी तंतुवाद्यांवर, तारपेट्यांवर व
झांजांवर स्तुति करावी, तसें वेगळें केलें; आणि
त्यांच्या सेवेसाठीं कामकरी माणसें त्यांच्या संख्ये-
प्रमाणें हींच होतीं. २ आसाफाच्या संतानांतला
जाक्कूर व योसेफ व नथान्या व असारेला, हे
आसाफाचे पुत्र, आसाफ जो बोधक त्याच्या हा-
ताखालीं होते; तो राजाच्या हाताखालीं होता.
३ यदूथूनाकडले तर, यदूथूनाचे पुत्र, गदाल्या व
जरी व यशाया, हशाब्या व मात्तिथ्या; हे आ-
पल्या नायकासुद्धां साहा आपला बाप यदुथून
याच्या हाताखालीं तंतुवाद्यांवर वाजवून परमे-
श्वराचे आभार व स्तुति करीत होते. ४ हेमा-
नाकडले तर हेमानाचे पुत्र, बुक्कीया, मात्तान्या,
उज्जियेल, शबुवेल, व यरीमोथ, हनान्या, हनानी,
अलियाथा, गिदाल्ती व रोमामतीएजेर, याशब-
काशा, माल्लोथी, होथीर, माहजियोथ; ५ हे
सर्व हेमान जो राजाजवळचा भविष्यवादी त्याचे
पुत्र देवाच्या स्तवनांमध्यें करणे उंच वाजवायाचे
होते, असे देवाने हेमानाला चवदा पुत्र व तीन
कन्या दिल्ह्या. ६ हे सर्व आपापल्या बापाच्या
हाताखालीं परमेश्वराच्या मंदिरीं गाण्यावर झां-
जांवर, तारपेट्यांवर, व तंतुवाद्यांवर देवाच्या
मंदिराच्या सेवेंत होते; आणि आसाफ व यदुथून
व हेमान हे राजाच्या हाताखालीं होते. ७
असे आपल्या भावांसुद्धां परमेश्वराजवळच्या
गाण्याविषयीं शिकलेले सर्व ज्ञानी यांची गणती
दोनशें अठ्यायशीं होती.

८ आणि त्यानी संभाळण्याविषयीं लाहानमो-
ठ्यांसाठीं सारिख्या आणि गुरुशिष्यांसाठीं सारि-
ख्या दैवखुणा पाडून घेतल्या. ९ तेव्हां योसे-
फ्यांतल्या आसाफाविषयीं पहिली दैवखूण निघाली;
गदाल्या याविषयीं दुसरी; तो व त्याचे भाऊ व
त्याचे पुत्र, बारा; १० जाक्कूर याविषयीं तिसरी;
त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; ११ इज्री
याविषयीं चवथी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बा-
रा; १२ नथान्याविषयीं पांचवी; त्याचे पुत्र व
त्याचे भाऊ, बारा; १३ बुक्कीयाविषयीं साहावी;
त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; १४ यसा-
रेलाविषयीं सातवी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ,
बारा; १५ यशायाविषयीं आठवी; त्याचे पुत्र
व त्याचे भाऊ, बारा; १६ मात्तान्याविषयीं
नव्वी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा. १७
शिमीविषयीं दाहावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ,
बारा. १८ अजारेलाविषयीं अकरावी; त्याचे
पुत्र व त्याचे भाऊ, बारा; १९ हशाब्याविषयीं
बारावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २०
तेरावी खूण इचा शूबाएल; त्याचे पुत्र व त्याचे
भाऊ, बारा; २१ चवदावीचा मात्तिथ्या; त्याचे
पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २२ यरेमोथाविषयीं
पंधरावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २३
हनान्याविषयीं सोळावी; त्याचे पुत्र व त्याचे
भाऊ, बारा; २४ याशबकाशाविषयीं सत्रावी;
त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २५ हनानी
याविषयीं अठरावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ,
बारा; २६ माल्लोथी याविषयीं एकुणवीसावी;
त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २७ अली-
याथाविषयीं विसावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ,
बारा; २८ होथीराविषयीं एकविसावी; त्याचे
पुत्र व त्याचे भाऊ, बारा; २९ गिद्दाल्ती या-
विषयीं बाविसावी; त्याचे पुत्र व त्याचे भाऊ,
बारा; ३० माहजियोथ याविषयीं तेविसावी;
त्याचे पुत्र व त्याचे भाऊ, बारा; ३१ रोमा-
मतीएजेराविषयीं चोविसावी; त्याचे पुत्र व त्याचे
भाऊ, बारा.

## अध्याय २६.

द्वारपाळांच्या वांटण्याची गोष्ट. कोऱ्ही यांतला
मशेलेम्या, तो कोरेज्यांतील वंशी आसे-
फाच्या पुत्रांतला होता. २ आणि मशेलेम्याचे
पुत्र, ज्येष्ठ जखाऱ्या, दुसरा यदियेल, तिसरा
जबाद्या, चवथा याथनियेल; ३ पांचवा एलाम,
साहावा योहोहानान, सातवा एल्योवेनाय्. ४ आणि
ओबेद अदोम याचे पुत्र, ज्येष्ठ शमाया, दुसरा
यहोजाबाद, तिसरा योवाह, व चवथा साखार
व पांचवा नथानेल; ५ साहावा आम्मियेल,
सातवा इस्साखार, आठवा पउल्थाय्, कां तर

देवाने त्याला आशीर्वाद दिल्हा होता. ६ आ-
णि त्याचा पुत्र शमाया यापासून असे पुत्र जन्म-
ले कीं त्यानी आपल्या बापाच्या घराण्यावर अधि-
कार केला, कारण कीं ते शूर पुरुष होते. ७
शमायाचे पुत्र, अथ्नी व रफाएल व ओबेद,
एलजाबाद; त्याचे भाऊ शूर पुरुष अलिया व
समाख्या. ८ हे सर्व ओबेद अदोमाच्या पुत्रां-
तले; ते व त्याचे पुत्र व त्याचे भाऊ सेवेसाठीं
बळाने शूर पुरुष, असे ओबेद अदोमाचे बासष्ट.
९ आणि मशेलेम्याचे पुत्र व भाऊ, शूर पुरुष
अठरा. १० आणि मरारीच्या संतानांतला हो-
सा याचे पुत्र; यांत शिम्री मुख्य, कां तर तो
ज्येष्ठ नसतांहि त्याच्या बापाने त्याला मुख्य केलें
होतें. ११ दुसरा हिल्कीया, तिसरा टबाल्या,
चवथा जखाऱ्या; होसाचे सर्व पुत्र व भाऊ,
तेरा. १२ हीं मुख्य माणसें द्वारपाळ यांच्या
वांटण्या झाल्या; त्यांकडे त्यांच्या भावांच्यासंगतीं
परमेश्वराच्या मंदिराच्या सेवेंत संभाळायाचीं
कामें होतीं.

१३ आणि त्यानी आपापल्या वडिलांच्या घरा-
ण्याप्रमाणें दरवाज्या दरवाज्यासाठीं लाहानमोठ्या-
विषयीं सारिख्या देवखुणा पाडून घेतल्या. १४
तेव्हां पूर्वेस होण्याची देवखूण शेलेम्याविषयीं
पडली; नंतर त्याचा पुत्र जखाऱ्या ज्ञानाने मंत्री,
त्याविषयीं त्यानी देवखुणा पाडल्या, तेव्हां त्याची
देवखूण उत्तरेकडे निघाली. १५ ओबेद अदोम
याची, दक्षिणेकडे आणि त्याच्या पुत्रांची असु-
प्पींच्या घरावर. १६ शुप्पी व होसा यांची,
पाहऱ्यापासून पाहऱ्यास चढून जायाच्या सडके-
वर, जो शालेखेथ दरवाज्या त्यासुद्धां पश्चिम
तिकडे निघाली. १७ पूर्वेस साहा लेवी; उत्तरेस
प्रतिदिवसीं चार, दक्षिणेस प्रतिदिवसीं चार, आ-
णि असुप्पी तिकडे दोन दोन; १८ पश्चिमेस
पारबारावर चार, पारबाराच्या सडकेवर दोन.
१९ कोऱ्हीच्या वंशस्थांतल्या आणि मरारीच्या
वंशस्थांतल्या द्वारपाळांच्या अशा वांटण्या. २०
आणि लेवींतला अहीया देवाच्या मंदिराच्या
भांडारांवर आणि पवित्रवस्तूंच्या भांडारांवर होता.
२१ लादानाचें संतान, म्हणजे जो गेर्षोनी त्याचें
संतान; मुख्य वडील लादानापासून झाले; गेर्षो-
नीलादानापासून यहीएली. २२ यहीएलीचे पुत्र,
जेथाम व त्याचा भाऊ योएल; हे परमेश्वरा-
च्या मंदिराच्या भांडारांवर होते. २३ ते आम्रामी,
त्यांपासून इझारी, त्यांपासून हेब्रोनी, त्यांपासून उ-
ज्जियेली. २४ आणि मोशाचा पुत्र गेर्षोम, त्याचा
पुत्र शबुएल, तो भांडारांवर नायक होता. २५
आणि त्याचा भाऊ अलियेजेर, त्यापासून त्याचा
पुत्र रहब्या, मग त्याचा पुत्र योशाया, मग त्याचा
पुत्र योराम, मग त्याचा पुत्र जिख्री, मग त्याचा
पुत्र शलोमिथ; २६ तो शलोमिथ व त्याचा
भाऊ, दावीद राजाने आणि हजारांचे व शंभरांचे
सर्दार, म्हणजे सैन्याचे सर्दार यांत जे मुख्य
वडील, त्यानी ज्या पवित्र वस्तू पवित्र केल्या होत्या
त्यांच्या सर्व भांडारांवर होता. २७ लढाईच्या लु-
टींतल्या वस्तू त्यानी परमेश्वराचें मंदिर खचित-
पणाने चालवायास पवित्र केल्या. २८ आणि
भविष्यवादी शमुवेल याच्या सर्व पवित्र वस्तू,
आणि कीशाचा पुत्र शाऊल व नेराचा पुत्र
आब्नेर, व जरूयेचा पुत्र योवाब, आणि ज्या
कोणी कांहीं पवित्र केलें होतें, त्याच्या पवित्र
वस्तू शलोमिथाच्या व त्याच्या भावाच्या हातीं
होत्या.

२९ इझारी यांतला कनान्या व त्याचे पुत्र
इस्राएलावर बाहेरल्या कामाविषयीं अधिकारी व
न्यायाधीश यांच्या ठिकाणीं होते. ३० हेब्रोनी
यांतला हशाब्या व त्याचे भाऊ, शूर पुरुष, एक
हजार सातशें; हे यार्देनेच्या अलिकडे पश्चिमेस,
परमेश्वराच्या सर्व सेवेसाठीं व राजाच्या का-
मासाठीं इस्राएलाच्या पाहणीवर होते. ३१
हेब्रोनी यांतला यरीया वडिलापासून त्याच्या
अगोदरच्या जन्मांप्रमाणें हेब्रोन्यांत मुख्य होता;
दावीदाच्या राज्यांतल्या चाळिसाव्या वर्षीं त्यांची
झडती घेतली होती, आणि त्यांमध्यें गिलादांतल्या
याजेरांत शूर पुरुष सांपडले. ३२ आणि त्या-
चे भाऊ दोन हजार सातशें शूर पुरुष मुख्य
वडील असे होते, आणि दावीद राजाने त्यांस,
रऊबेनी व गादी व मनाश्शाचा अर्धा वंश यां-
वर देवाच्या सर्व कार्यासाठीं व राजाच्या कार्या-
साठीं नेमून ठेविलें.

## अध्याय २७.

तर इस्राएलाचीं संतानें त्यांच्या गणतीप्रमाणें
मुख्य वडील आणि हजारांचे व शंभरांचे स-
र्दार, आणि त्यांचे अधिकारी, जे वांटलेल्या कामां-
च्या कार्यासाठीं राजाचे सेवक, जे वर्षाच्या सर्व
महिन्यांत महिन्याच्या महिन्यास येत जात होते,
ते एकएका प्रकरणीं चोवीस हजार होते. २
पहिल्या महिन्याच्या पहिल्या प्रकरणावर जा-
ब्दियेलाचा पुत्र याशबाम, आणि त्याच्या प्रकरणीं
चोवीस हजार होते. ३ तो फारेजाच्या सं-
तानांतला, पहिल्या महिन्यांत सैन्याच्या सर्व स-
र्दारांमध्यें मुख्य होता. ४ आणि दुसऱ्या महि-
न्याच्या प्रकरणावर दोदाय अहोहकर, आणि त्या-
च्या प्रकरणीं मिक्लोथ नायकहि होता; त्याच्याहि
प्रकरणीं चोवीस हजार. ५ तिसऱ्या महिन्यांत
तिसऱ्या सैन्याचा सर्दार यहोयादा मुख्य याजक
याचा पुत्र बनाया; त्याच्याहि प्रकरणीं चोवीस
हजार. ६ हा बनाया तिसांत शूर व तिसांत
वरिष्ठ, आणि त्याच्या प्रकरणीं त्याचा पुत्र आ-
म्मीजाबाद होता. ७ चवथ्या महिन्यांत चवथा
सर्दार योवाबाचा भाऊ असाहेल, आणि त्याच्या-
मागें त्याचा पुत्र जबाद्या होता; त्याच्याहि प्रकर-
णीं चोवीस हजार. ८ पांचव्या महिन्यांत पां-
चवा सर्दार शाम्हूथ इज्राहकर; त्याच्याहि प्रकरणीं
चोवीस हजार. ९ साहाव्या महिन्यांत साहावा
सर्दार इक्केशाचा पुत्र ईरा तकोवेकर; त्याच्याहि
प्रकरणीं चोवीस हजार. १० सातव्या महि-
न्यांत सातवा सर्दार एफ्राइमाच्या संतानांतला
हेलेज पेलोनकर; त्याच्याहि प्रकरणीं चोवीस
हजार. ११ आठव्या महिन्यांत आठवा सर्दार
जाऱ्ह्यांतला सिब्बखाय् हुशेकर; त्याच्याहि प्रक-
रणीं चोवीस हजार. १२ नव्व्या महिन्यांत
नव्वा सर्दार बन्यामीन्यांतला अबियेजेर आंतो-
वेकर; त्याच्याहि प्रकरणीं चोवीस हजार. १३
दाहाव्या महिन्यांत दाहावा सर्दार जाऱ्ह्यांतला
महाराय् नटोफेकर; त्याच्याहि प्रकरणीं चोवीस
हजार. १४ अकराव्या महिन्यांत अकरावा
सर्दार एफ्राइमच्या संतानांतला बनाया पिराथो-
नकर; त्याच्याहि प्रकरणीं चोवीस हजार. १५
बाराव्या महिन्यांत बारावा सर्दार अथनियेला-
चा हेल्दाय नटोफेकर; त्याच्याहि प्रकरणीं चो-
वीस हजार.

१६ आणि इस्राएलाच्या वंशांवर असे होते;
रऊबेन्यांचा नायक, जिख्रीचा पुत्र अलियेजेर,
शिमोन्यांचा नायक माखाचा पुत्र शफाट्या;
१७ लेवींचा नायक, कमुवेलाचा पुत्र हशब्या;
आहरोन्यांचा, जादोक; १८ यहूदाचा नायक
दावीदाच्या भावांतला अलीहू; इस्साखाराचा
नायक, मीखाएलाचा पुत्र आम्री; १९ जबु-
लूनाचा नायक, ओबाद्याचा पुत्र इश्माया; नफ्-
तालींचा नायक, अज्रीयेलाचा पुत्र यरीमोथ; २०
एफ्राइमाच्या संतानाचा नायक, अजाज्याचा पुत्र
होशया; मनाश्श्याच्या अर्ध्या वंशाचा नायक,
पदायाचा पुत्र योवेल; २१ गिलादांतला म-
नाश्श्याचा अर्धा वंश याचा नायक, जखऱ्याचा
पुत्र इद्दो; बन्यामीनाचा नायक, आब्नेराचा पुत्र
यासियेल; २२ दानाचा नायक, यरोहामाचा
पुत्र अजारेल; हे इस्राएलाच्या वंशांचे सर्दार.
२३ तरी दावीदानें वीस वर्षांचे व खालचे यांची
गणती घेतली नाहीं, कारण कीं परमेश्वरानें
सांगितलें होतें कीं, "मी इस्राएलाला आकाशांत-
ल्या ताऱ्यांसारिखें वाढवीन. २४ जरूयेचा
पुत्र योवाब मोजायाला लागला होता, परंतु त्यानें
समाप्ति केली नाहीं; का कीं त्या मोजणीवरून
इस्राएलावर कोप झाला; यास्तव दावीद राजाच्या
दिवसांच्या गोष्टींमध्यें ती गणती लिहून ठेविली
नाहीं.

२५ तर राजाच्या संग्रहांवर अदियेलाचा
पुत्र आज्मावेथ होता, आणि शेतांमध्यें; नगरांमध्यें
व गांवांमध्यें व बुरुजांमध्यें जे संग्रह, त्यांवर उ-
ज्जियाचा पुत्र यहोनाथान होता. २६ आणि
भूमीच्या लागवडीसाठीं शेताचे कामकरी, यांवर
कलूबाचा पुत्र एज्री होता. २७ आणि द्राक्ष-
बागांवर शिमी रामेकर; आणि द्राक्षमळ्यांच्या
उत्पन्नावर द्राक्षरसाच्या संग्रहांसाठीं जाब्दी शि-
फमकर होता. २८ जैतूनझाडांवर व खोऱ्यांत
जीं उंबरझाडें त्यांवर बालहानान गदेरकर; आणि
तेलाच्या संग्रहांवर योवाश होता. २९ आणि
जीं गुरें शारोनावर चरत होतीं, त्यांवर शिट्राय्

शारानेकर, आणि तळवटींवर जीं गुरें, त्यांवर
आद्लायचा पुत्र शाफाट होता. ३० आणि
उंटांवर ओबील इश्मैली, आणि गाढवांवर येह-
द्या मेरोनोकर होता. ३१ आणि बकऱ्यांवर
याजीज हाग्री होता; हे सर्व, दावीदराजाचें
जें धन, त्यावर अधिकारी होते. ३२ आणि
दावीदाचा चुलता यहोनाथान मंत्री, तो ज्ञानी
माणूस व पंडित होता, आणि हाखमोन्याचा पुत्र
यहियेल राजपुत्रांच्या संगतीं होता. ३३ आणि
अहीथोफेल राजाचा मंत्री, आणि हूशाय् आर्की
राजाचा मित्र होता. ३४ आणि अहीथोफेला-
च्या मागें बनायाचा पुत्र यहोयादा व एब्याथार
होता, आणि योवाब राजाचा सेनापति होता.

## अध्याय २८.

तेव्हां दावीदानें इस्राएलाचे सर्व अधिकारी, वं-
शांचे अधिकारी आणि वांटलेल्या कामांचे अ-
धिकारी, जे राजाचे सेवक, आणि हजारांचे सर्दार
व शंभरांचे सर्दार, आणि राजाचें व त्याच्या पुत्रां-
चें सर्व धन व पशू यांचे अधिकारी, आणि त्यां-
च्यासंगतीं जे कारभारी व बलाढ्य व सर्व शूर
पुरुष, त्यांस यरूशालेमांत मिळविलें. २ नंतर
दावीद राजा आपल्या पायांवर उभा राहून बो-
लला, "अहो माझे भाऊ, माझ्या लोकांहो, तुह्मी
माझें ऐका; परमेश्वराच्या कराराच्या कोशा-
साठीं वस्तीचें मंदिर, ह्मणजे आपल्या देवाचें
पदासन, बांधायास म्या आपल्या मनांत आणिलें,
आणि बांधायाची तयारी केली. ३ परंतु देवानें
मला सांगितलें, 'माझ्या नामासाठीं तुला मंदिर
बांधायाचें नाहीं, कारण कीं तूं लढायांचा माणूस
आणि त्वां रक्तपात केले आहेत. ४ तथापि इस्रा-
एलाचा देव परमेश्वर यानें माझ्या बापाच्या
घरच्या सर्वांतून मला इस्राएलावर सर्वकाळ राजा
होण्यासाठीं निवडून घेतलें; कारण कीं अधिकारी
होण्यासाठीं यहूदाचा वंश, आणि यहूदाच्या
घराण्यांत माझ्या बापाचें घर त्यानें निवडलें, आ-
णि त्यानें माझ्या बापाच्या पुत्रांतून मला सर्व इ-
स्राएलावर राज्य करायास मला निवडून नेमलें
आहे. ५ आणि माझ्या सर्व पुत्रांतून, (कां तर
परमेश्वरानें मला बहुत पुत्र दिल्हे आहेत,) त्यानें
माझा पुत्र शलमोन इस्राएलावर परमेश्वराच्या
राज्याच्या सिंहासनावर बसायास निवडून घेत-
ला. ६ आणि त्यानें मला सांगितलें, 'तुझा
पुत्र शलमोन तोच माझें मंदिर व माझे वाडे
बांधील, कारण कीं म्या आपल्याला पुत्र होण्या-
साठीं त्याला निवडलें आहे, आणि मी त्याला बाप
होईन. ७ अणखी जर तो माझे नेम व माझे
न्याय आजप्रमाणें पाळायास झटेल, तर मी त्याचें
राज्य सर्वकाळ स्थिर करीन.' ८ तर आतां
परमेश्वराचा समुदाय सर्व इस्राएल यांच्या
देखतां, आणि आमच्या देवाच्या ऐकण्यांत तुह्मी
आपला देव परमेश्वर याच्या सर्व आज्ञा शोधून
पाळा; यासाठीं कीं तुह्मी या चांगल्या देशाचें
वतन राखावें, आणि आपल्या मागें आपल्या सं-
तानाजवळ वतनासाठीं सर्वकाळ ठेवावें.

९ "आणि हे शलमोना माझ्या पुत्रा, तूं आप-
ल्या बापाच्या देवाला ओळखून पूर्ण मनानें व
जिवाच्या आवडीनें त्याची सेवा कर; कारण कीं
परमेश्वर सर्वांच्या अंतःकरणांचा झाडा घेतो,
आणि कल्पनांचे सर्व विचार जाणतो; जर तूं त्या-
चा शोध करसील, तर तो तुला पावेल; आणि
जर तूं त्याला सोडसील, तर तो तुला सर्वदा
टाकील. १० आतां तूं संभाळ, कारण कीं पवित्र
स्थानाचें मंदिर बांधायास परमेश्वरानें तुला
निवडून घेतलें आहे; तूं झटून काम कर."

११ तेव्हां दावीदानें आपला पुत्र शलमोन
याला ओसरीचा, आणि तिचीं मंदिरें व तिचीं
भांडारें व तिच्या वरल्या खोल्या व तिच्या आंत-
ल्या खोल्या व तिचें दयासनाचें ठिकाण, यांचा
बेत दिल्हा. १२ आणि आत्म्याच्या योगें जें
कांहीं त्याच्याजवळ होतें, त्याचा बेत परमेश्व-
राच्या मंदिराच्या अंगणाचा, आणि चहुंकडल्या
सर्व खोल्यांचा, देवाच्या मंदिराच्या भांडारांचा,
आणि पवित्र वस्तूंच्या भांडारांचा बेत दिल्हा;
१३ आणि याजक व लेवी यांच्या प्रकरणाविषयीं,
आणि परमेश्वराच्या मंदिराच्या सेवेच्या अवघ्या
कामाविषयीं, आणि परमेश्वराच्या मंदिराच्या
सेवेच्या सर्व पात्रांविषयीं लिहून दिल्हें. १४
सोन्याविषयीं तर, सेवेसेवेच्या सर्व पात्रांसाठीं वज-
नानें सोनें; रुप्याच्या सर्व पात्रांविषयीं तर, सेवे-

सेवेच्या सर्व पात्रांसाठीं वजनाने दिल्हें. १५
आणि सोन्याच्या दीपमाळा व त्यांचे सोन्याचे
दिवे यांसाठीं वजन, ह्मणजे एकएक दीपमाळ व
तिचे दिवे यांसाठीं वजनाने दिल्हे, आणि रुप्या-
च्या दीपमाळांसाठीं, ह्मणजे एकएका दीपमाळेच्या
कामाप्रमाणें एकएका दीपमाळेसाठीं वजनाने दिल्हें.
१६ आणि दर्शनीय अपूपाच्या मेजांतल्या एक-
एका मेजासाठीं वजनाने सोनें, आणि रुप्याच्या
मेजासाठीं रुपें दिल्हें. १७ आणि त्रिशुळ व
शिंपायाचीं पात्रें व वाडगे यांच्यासाठीं निर्मळ सो-
नें, आणि डब्यांतल्या एकाएका डब्यासाठीं वज-
नाने सोनें, आणि रुप्याच्या डब्यांतल्या एकएका
डब्यासाठीं वजनाने रुपें दिल्हें. १८ आणि
धुपाच्या वेदीसाठीं वजनाने अतिनिर्मळ सोनें, आ-
णि करुबांचें वाहन करण्यासाठीं सोनें दिल्हें, असें
कीं त्यानी **परमेश्वराच्या** कराराच्या कोशाला
छायेनें आच्छादन करावें. १९ दावीदाने ह्मटलें
कीं, "हें सर्व, ह्मणजे या बेताचीं सर्व कामें **पर-**
**मेश्वराने** त्याचा हात मजवर असतांना लिहि-
ण्यांत समजाविलीं." २० अणखी दावीदाने
आपला पुत्र शलमोन याला ह्मटलें, "तूं दृढ हो,
आणि धैर्य धरून हें काम कर; तूं भिऊं नको,
आणि घाबरूं नको, कारण कीं माझा देव **परमे-**
**श्वर देव** तुला अनुकूळ होईल; तूं **परमेश्वरा-**
**च्या** मंदिराच्या सेवेचें सर्व काम सिद्धीस नेसील
तोंपर्यंत तो तुला सोडणार नाहीं, आणि टाकणार
नाहीं. २१ आणि पाहा, याजकांच्या व लेवीं-
च्या वांटण्या **देवाच्या** मंदिराच्या सर्व सेवेसाठीं
होतील, आणि सर्व कामांत सर्व सेवेसाठीं चातु-
र्यांत सर्व निपुण तुझ्यासंगतीं होतील, आणि अधि-
कारी व सर्व लोक तुझ्या अवघ्या सांगण्याप्रमाणें
वागतील.

## अध्याय २९.

आणि दावीद राजाने सर्व समुदायाला ह्मट-
लें, "माझा पुत्र शलमोन, या एकल्याला
**देवाने** निवडलें; हा तरणा व कोवळा आहे, आ-
णि हें काम मोठें, कारण कीं हें मंदिर मनुष्यासाठीं
नव्हे, तर **परमेश्वर देव** यासाठीं आहे. २
म्या तर आपल्या सर्व शक्तीने आपल्या **देवाच्या**
मंदिरासाठीं तयारी केली आहे; जें सोन्याचें
व्हावें, त्यासाठीं सोनें; आणि जें रुप्याचें, त्या-
साठीं रुपें; आणि जें पितळेचें, त्यासाठीं पितळ;
लोखंडाच्यासाठीं लोखंड, आणि लाकडांच्यासाठीं
लांकडें, शोहाम पाषाण व जडायासाठीं रंगाचे
विचित्र पाषाण, ह्मणजे सर्व उंच पाषाण, आणि
संगमरवरी पाषाण फार सिद्ध केले आहेत. ३
अणखी म्या आपल्या **देवाच्या** मंदिरावर आपलें
चित्त ठेविलें आहे ह्मणून पवित्र मंदिरासाठीं जें
म्या सिद्ध केलें त्या सर्वांखेरीज जी माझी वस्तभाव
आहे तींतून म्या आपल्या **देवाच्या** मंदिरासाठीं
सोनें व रुपें दिल्हें आहे; ४ ह्मणजे तीन हजार
तालांत सोनें, तें ओफीरचें सोनें; आणि सात
हजार तालांत निर्मळ रुपें मंदिरांच्या भिंती मढ-
वायाला दिल्हें. ५ सोन्याचें काम यासाठीं सोनें,
आणि रुप्याचें काम यासाठीं रुपें, ह्मणजे कारा-
गिरांच्या हाताखालच्या अवघ्या कामासाठीं तें
दिल्हें; तर आपल्याच इच्छेने आज **परमेश्वरा-**
साठीं आपल्या द्रव्याचें अर्पण कोण करील?"
६ तेव्हां वडिलांतले अधिकारी व इस्राएलाच्या
वंशांचे अधिकारी, आणि हजारांचे व शंभरांचे
सर्दार, आणि त्यांसुद्धां राजाच्या कामाचे अधि-
कारी, यानी आपल्या इच्छेने दिल्हें; ७ ह्मणजे
त्यानी **देवाच्या** मंदिराच्या सेवेसाठीं सोनें पांच
हजार तालांत, व दाहा हजार दारकांच्या; आणि
रुपें दाहा हजार तालांत, आणि पितळ अठरा ह-
जार तालांत, आणि लोखंड एक लाख तालांत
दिल्हें. ८ आणि ज्याला ज्याला उंच पाषाण
मिळालेले होते त्यानी यहियेल गेर्षोनीच्या हातीं
**परमेश्वराच्या** मंदिराच्या भांडारासाठीं ते दिल्हे.
९ तेव्हां लोकानी आपल्या उदारपणावरून संतोष
केला, कारण कीं त्याने आपल्याच इच्छेने **परमे-**
**श्वरासाठीं** पूर्ण भावाने दिल्हें; आणि दावीद
राजानेहि मोठ्या संतोषेकरून आनंद केला.
१० अणखी दावीदाने सर्व समुदायाच्या दे-
खतां **परमेश्वराची** स्तुति केली; तेव्हां दावी-
दाने ह्मटलें, "हे **परमेश्वरा**, इस्राएलाच्या देवा,
आमच्या बापा, सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत
तुझी स्तुति व्हावी. ११ हे **परमेश्वरा**, मोठे-
पणा व पराक्रम व तेज व जय व मान, हीं तुझीं;

कारण कीं जें आकाशांत व पृथ्वींत तें सर्व तुझें;
हे परमेश्वरा, राज्य आणि सर्वांवरला मुख्य
अधिकार तुझा आहे. १२ संपत्ति व गौरवहि
तुझ्याकडून होतें, आणि तूं सर्वांवर अधिकार
करितोस; तुझ्याच हातीं शक्ति व पराक्रम, आणि
सर्वांस मोठेपण व शक्ति देणें हें तुझ्या हातीं
आहे. १३ तर हे आमच्या देवा, आतां आह्मी
तुझे उपकार मानितों, आणि तुझ्या अति तेजस्वी
नामाची स्तुति करितों. १४ याप्रमाणें इच्छेनें
द्यायाची शक्ति आह्मास व्हावी, तर मी कोण?
आणि माझे लोक कोण? कारण कीं अवघें तुझें;
आणि तुझ्याच हातांतलें तुला दिल्हें आहे. १५
आह्मी तर आपल्या सर्व वडिलांसारिखे तु-
झ्यापुढें विदेशी व प्रवासी आहों; पृथ्वीवर आ-
मचे दिवस सावलीसारिखे आहेत, आणि कांहीं
भरवसा नाहीं. १६ हे परमेश्वरा आमच्या
देवा, हा सर्व संग्रह, जो आह्मी तुझ्या पवित्र
नामासाठीं तुझें मंदिर बांधायास सिद्ध केला, तो
तुझ्या हातापासून झाला, आणि अवघा तुझा
आहे. १७ आणि हे माझ्या देवा, मला समजलें
कीं तूं अंतःकरण शोधितोस, आणि नीटपण तुला
आवडतें; म्या आपल्या मनाच्या नीटपणानें आ-
पल्या इच्छेप्रमाणें हें अवघें दिल्हें आहे; आणि
आतां तुझे लोक, जे एथें मिळाले आहेत, त्यांनीं
आपल्याच इच्छेनें तुला दिल्हें, असें म्या संतो-
षानें पाहिले आहेत. १८ हे परमेश्वरा, आ-
मच्या वडिलांच्या आब्राहामाच्या, इझाकाच्या,
व इस्राएलाच्या देवा, तूं आपल्या लोकांच्या अंतः-
करणाच्या कल्पनांतल्या विचारांत असें सर्वकाळ
राख, आणि त्यांचें अंतःकरण आपल्यासाठीं स्थिर
कर. १९ आणि माझा पुत्र शलमोन त्यानें
तुझ्या आज्ञा, तुझे नेम व तुझे विधि पाळावे,
आणि अवघें करीत असतां ज्या मंदिरासाठीं म्या
तयारी केली आहे, ती त्यानें बांधावी ह्मणून त्या-
ला वास्तविक अंतःकरण दे."
२० मग दावीदानें सर्व समुदायाला सांगि-
तलें, "आतां तुह्मी आपला देव परमेश्वर याची
स्तुति करा." यास्तव सर्व समुदायानें आपल्या वडि-
लांचा देव परमेश्वर याचे धन्यवाद केले, आणि
लवून परमेश्वराला व राजाला नमन केलें. २१
आणि त्यांनीं त्या दिवसाच्या पुढल्या दिवसीं पर-
मेश्वराजवळ यज्ञ केले, आणि होम परमेश्वरा-
जवळ केले, ह्मणजे हजार गोऱ्हे, हजार एडके,
हजार मेंढरें त्यांच्या पेयअर्पणांसुद्धां अर्पिलीं; असे
सर्व इस्राएलासाठीं पुष्कळ यज्ञ झाले. २२ तेव्हां
त्यांनीं मोठ्या संतोषानें त्या दिवसीं परमेश्वरापुढें
खाणें पिणें केलें; आणि त्यांनीं दावीदाचा पुत्र
शलमोन याला दुसऱ्यानें राजा केलें, ह्मणजे
अधिपति होण्यासाठीं त्याला, आणि याजक होण्या-
साठीं सादोकाला परमेश्वरापुढें अभिषेक केला.
२३ असा शलमोन आपला बाप दावीद
याच्या ठिकाणीं राजा होऊन परमेश्वराच्या सिं-
हासनावर बसून सफळ झाला, आणि सर्व इस्रा-
एलानीं त्याचें ऐकिलें. २४ आणि सर्व सर्दार
व शूर पुरुष, अणखी दावीद राजाचे सर्व पुत्र,
यांनीं शलमोन राजाच्या खालीं होऊन हात दि-
ल्हा. २५ असें परमेश्वरानें शलमोनाला सर्व
इस्राएलाच्या देखतां फार थोर केलें, आणि त्याला
राज्याचा मान असा दिल्हा कीं त्याच्यापूर्वीं इस्रा-
एलाच्या कोणत्याहि राजाला तसा झाला नाहीं.
२६ तर इशायाचा पुत्र दावीद यानें सर्व
इस्राएलावर राज्य केलें होतें. २७ आणि ज्या
काळीं त्यानें इस्राएलावर राज्य केलें, तो चाळीस
वर्षांचा; हेब्रोनांत त्यानें सात वर्षें राज्य केलें,
आणि यरूशालेमांत तेहेतीस वर्षें राज्य केलें.
२८ मग तो आयुष्य, धन व मान इहींकरून पूर्ण
झाला असतां चांगल्या ह्मातारपणीं मेला, आणि
त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र शलमोन यानें राज्य
केलें. २९ तर दावीद राजाचे पहिले आणि
शेवटले वृत्तांत शामुवेल भविष्यवादी याच्या पु-
स्तकांत, आणि नाथान भविष्यवादी याच्या पुस्त-
कांत, आणि गाद भविष्यवादी याच्या पुस्तकांत
लिहिलेले आहेत, ते पाहावे. ३० अणखी त्या-
चें सर्व राज्य व त्याचा पराक्रम, आणि त्यावर व
इस्राएलावर व देशादेशाच्या सर्व राज्यांवर जे
प्रसंग चालले होते, तेहि लिहिलेले आहेत.

# कालवृत्तांत याचें दुसरें पुस्तक.

## अध्याय १.

आणि दावीदाचा पुत्र शलमोन आपल्या रा-
ज्यांत बळवान झाला, आणि त्यासीं त्याचा
देव परमेश्वर होता आणि त्याला फार थोर
करीत गेला. २ आणि शलमोनानें सर्व इस्राए-
लाला हजारांचे व शंभरांचे नायक व न्यायाधीश
व सर्व इस्राएलांचे सर्व अधिकारी ह्मणजे वडि-
लांतले मुख्य यांस आज्ञा केली. ३ मग शल-
मोन आणि त्यासंगतीं सर्व समुदाय गिबोनेंतल्या
उंच स्थानास गेले, कां कीं परमेश्वराचा सेवक
मोशे यानें देवाचा जो सभामंडप केला होता
तो तेथें होता. ४ परंतु दावीदानें देवाच्या को-
शासाठीं जें स्थान सिद्ध केलें होतें, तेथें दावी-
दानें तो किर्याथयारीमेहून वरतीं आणिला होता,
कां कीं त्यानें त्यासाठीं यरूशालेमेंत राहोटी
दिल्ही होती. ५ आणि हूराचा पुत्र ऊरी याचा
पुत्र बजालएल यानें जी पितळी वेदी केली होती,
ती दावीदानें परमेश्वराच्या मंडपापुढें ठेविली
होती, आणि तिजकडे शलमोन व समुदाय जात
असे. ६ आणि जी पितळी वेदी सभामंडपास
परमेश्वरापुढें होती, तेथें शलमोनानें वरतीं जा-
ऊन तिजवर एक हजार होम केले.

७ त्या रात्रीं देव शलमोनाला दर्शन देऊन
ह्मणाला, "म्या तुला काय द्यावें तें माग." ८ तेव्हां
शलमोनानें देवाला ह्मटलें, "माझा बाप दावीद
यावर त्वां मोठी दया केली आहे, आणि त्याच्या
ठिकाणीं मला राजा केलें आहे. ९ आतां हे
परमेश्वरा देवा, माझा बाप दावीद यानें जें
तुझें वचन तें खरें केलें जावें, कां कीं त्वां मला
पृथ्वीच्या रजाएवढ्या बहुत लोकांवर राजा केलें
आहे. १० आतां म्या या लोकांपुढें बाहेर जावें
आणि आंत यावें ह्मणून मला बुद्धि व ज्ञान दे,
कां तर तुझ्या या मोठ्या लोकांचा न्याय करा-
यास कोण समर्थ आहे?"

११ मग देवानें शलमोनाला ह्मटलें, "हें
तुझ्या मनांत होतें आणि त्वां धन, द्रव्य, अथवा
गौरव, अथवा आपल्या वैऱ्यांचा जीव, अथवा
दीर्घ आयुष्यहि मागितलें नाहीं, परंतु माझ्या ज्या
लोकांवर म्या तुला राजा केलें आहे त्यांचा न्याय
त्वां करावा ह्मणून त्वां बुद्धि व ज्ञान मागितलें
आहे; १२ यामुळें तुला बुद्धि व ज्ञान दिल्हेलें
आहे, आणि तुजपूर्वीं जे राजे होते त्यांस जसें
प्राप्त झालें नाहीं आणि तुजनंतर जे होतील त्यां-
ला होणार नाहीं, तसें धन व द्रव्य व गौरव
तुला देईन."

१३ मग शलमोन गिबोनेंतल्या उंच स्थाना-
च्या सभामंडपासमोरून यरूशालेमेस आला
आणि इस्राएलावर राज्य करीत गेला. १४ आ-
णि शलमोनानें रथ व स्वार यांचा संग्रह केला,
त्याला एक हजार व चारशें रथ आणि बारा ह-
जार स्वार होते; ते त्यानें रथांच्या नगरांत आ-
णि राजाजवळ यरूशालेमांत ठेविले. १५ आणि
राजानें यरूशालेमेंत रुपें व सोनें धोंड्यासारिखें
बहुत, आणि देवदारु खालाटींतल्या उंबरवृक्षासा-
रिखे होत असें केलें. १६ आणि शलमोनाकडे
घोडीं व सूत हीं मिसरांतून येत असत; राजाचे
व्यापारी मोल देऊन तें सूत घेत असत. १७
आणि रथ साहाशें शेकेल रुप्यावर आणि घोडा
दीडशांवर ते घेऊन मिसरांतून आणीत असत;
आणि तसें त्यांकडून हित्यांच्या सर्व राजांसाठीं
आणि अरामाच्या राजांसाठीं त्यांकडून बाहेर
आणीत असत.

## अध्याय २.

आणि शलमोनानें परमेश्वराच्या नामासाठीं
मंदिर आणि आपल्या राज्यासाठीं घर बां-
धायाला निश्चय केला. २ आणि शलमोनानें
सत्तर हजार ओझें वाहणारे आणि डोंगरांतले
ऐशीं हजार तासणारे आणि त्यांवरचे तीन हजार

आणि साहाशें अधिकारी गणून दिला. ३ आणि
शलमोनाने हूराम जोरेचा राजा याकडे असा
निरोप पाठविला कीं, "जसें त्वां माझा बाप दावीद
यासीं केलें आणि त्यासाठीं वस्तीचें घर बांधा-
याला त्याजकडे देवदारू पाठविले, तसें मजसीं
कर. ४ पाहा मी आपला देव परमेश्वर याच्या
नामासाठीं मंदिर बांधणार आहें, तें त्याजकडे प-
वित्र ठरवावें, त्यापुढें सुगंधद्रव्याचा धूप जाळावा,
आणि नित्याचा दर्शनीय अपूप मांडावा, आणि
शाब्बाथांत व अमावास्यांत व आमचा देव पर-
मेश्वर याच्या सणांत सकाळीं व सायंकाळीं होम
करावे ह्मणून हें सर्वकाळपर्यंत इस्राएलाला करा-
यावें आहे. ५ आणि जें मंदिर मी बांधणार
आहें तें मोठें, कां कीं आमचा देव सर्व देवांपेक्षां
मोठा आहे. ६ आणि त्याला मंदिर बांधायाला
कोण समर्थ आहे? कां तर त्याला आकाशें आणि
आकाशांचीं आकाशें पुरत नाहींत; तर केवळ
त्याच्यापुढें धूप जाळण्याकरितां मंदिर बांधायास
असा मी कोण आहें! ७ तर माझ्याजवळ यहू-
दांत व यरूशालेमांत जे निपुण आहेत जे माझा
बाप दावीद याने मिळवून ठेविले त्यांसंगतीं सोनें,
रुपें, पितळ, लोखंड, अर्गवानी, किरमिजी व नील
यांचें काम करायाला निपुण आणि खोदण्या खो-
दायाला ज्ञानी मनुष्य मजकडे पाठवून दे. ८
आणि देवदारू, भद्रदारू, व अल्गूम यांचीं लां-
कडें लबानोनांतून मजकडे पाठवून दे, कां कीं
लबानोनाचीं लांकडें तोडायाला तुझे चाकर सम-
जात असें मला कळलें आहे; आणि पाहा, माझे
चाकर तुझ्या चाकरांसंगतीं होतील. ९ मजक-
रितां पुष्कळ लांकडें सिद्ध करावीं, कां कीं जें मं-
दिर मी बांधणार आहें तें मोठें व आश्चर्य व्हा-
वयाचें आहे. १० आणि पाहा, तुझे चाकर जे
लांकुड तासणारे त्यांस वीस हजार कोर झोड-
लेले गहूं आणि वीस हजार कोर जव आणि वीस
हजार बाथ द्राक्षारस आणि वीस हजार बाथ
तेल मी देतों."

११ तेव्हां हूराम जोरेचा राजा याने असें उत्तर
लिहून शलमोनाजवळ पाठविलें कीं, "परमेश्व-
राने आपल्या लोकांवर प्रीति ठेविली ह्मणून त्याने
तुला त्यांवर राजा केलें आहे." १२ आणि हू-
रामाने ह्मटलें, "ज्याने परमेश्वरासाठीं आणि
आपल्या राज्यासाठीं मंदिर बांधावें, असा बुद्धि-
मंत व शाहाणा व विवेकी पुत्र, ज्याने दावीद रा-
जाला दिल्हा आहे ज्याने आकाश आणि पृथ्वी
उत्पन्न केली, तो इस्राएलाचा देव परमेश्वर
सुवंदित असावा. १३ आणि आतां एक निपुण
व विवेकी मनुष्य जो माझा बाप हूराम याचा
होतो, त्याला म्या पाठविलें आहे. १४ तो दा-
नाच्या कन्यांतल्या स्त्रियेचा पुत्र व त्याचा बाप
जोरी होता; तो तुझ्या निपुण मनुष्यांसंगतीं आ-
णि माझा प्रभु दावीद तुझा बाप याच्या निपुण
मनुष्यांसंगतीं सोनें, रुपें, पितळ, लोखंड, दगड,
लांकडें, अर्गवानी, नील, कत्तान व किरमिजी यांचें
काम करायाला कोणत्याहि खोदणी खोदायाला,
आणि जी कोणतीहि कल्पना त्यापुढें ठेविली जाईल
ती काढायाला समजतो. १५ तर आतां जे
गहूं व जव व तेल व द्राक्षारस माझ्या प्रभूने
सांगितले आहेत, ते त्याने आपल्या दासांकडे पा-
ठवून द्यावे. १६ आणि तुला पाहिजेत तितकीं
लांकडें आह्मी लबानोनांतून तोडून घेऊन तरी
करून समुद्रावरून याफोस तुजकडे आणूं, आणि
तूं तीं वरती यरूशालेमेस नेसील."

१७ आणि शलमोनाने इस्राएल देशांतले
सर्व विदेशी गणले; त्याचा बाप दावीद याने ते
गणले होते, त्या गणण्यानंतर, तेव्हां ते दीड लाख
तीन हजार व साहाशें सांपडले. १८ आणि
त्याने त्यांतले सत्तर हजार वाहणारे आणि ऐशीं
हजार डोंगरावरले लांकूड तोडणारे आणि लोक
कामास लावायाला तीन हजार व साहाशें पाहणी
करणारे नेमले.

## अध्याय ३.

तेव्हां शलमोन यरूशालेमेस मोरीया डोंगरा-
वर जेथें त्याचा बाप दावीद याला परमेश्वर
प्रगट झाला होता, जें स्थान दावीदाने अर्नान यबू-
शाच्या खळ्यांत सिद्ध केलें होतें, तेथें परमेश्व-
राचें मंदिर बांधूं लागला. २ आणि आपल्या
राज्याच्या चौथ्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या दुस-
ऱ्या दिवसीं तो बांधूं लागला.

३ आणि देवाचें मंदिर बांधण्यांत जे पाये

शलमोनाने केले ते हेच; पहिल्या हाताच्या प-
रिमाणाप्रमाणें त्याची लांबी साठ हात, आणि रुंदी
वीस हात होती. ४ आणि मंदिराच्यापुढें जो मंडप
होता त्याची लांबी मंदिराच्या रुंदीप्रमाणें वीस
हात होती, आणि उंची एकशें वीस होती, आणि
त्याने त्याला आंतून शुद्ध सोन्याने मढिलें. ५
आणि त्याने मोठें मंदिर भद्रदारूच्या काष्ठाने पाट-
लें, आणि चोख्या सोन्याने मढिलें, आणि त्यावर
खजुऱ्या व सांखळ्या चढविल्या. ६ आणि त्याने
मंदिर माहामूल्य पाषाणानी सुशोभित केलें, आणि
सोनें पार्वाइमचें सोनें होतें. ७ आणि त्याने
मंदिराला, तुळयाला, उंबऱ्याला, व त्याच्या भिंती-
ला व त्याच्या कवाटाला सोन्याने मढिलें, आणि
भिंतीवर करूब कोरून काढिलें. ८ आणि त्याने
परम पवित्र मंदिर बनावलें, त्याची लांबी मंदिरा-
च्या रुंदीप्रमाणें वीस हात आणि त्याची रुंदी वीस
हात होती, आणि त्याने त्याला साहाशें तालां-
ताच्या चोख्या सोन्याने मढिलें. ९ आणि खि-
ळ्यांचा तोल पन्नास शेकेल सोनें इतका होता,
आणि त्याने वरच्या कोठड्याला सोन्याने मढिलें.
१० आणि त्याने परम पवित्र मंदिरांत दोन करूब
बहुरूप घडींव कामाचे केले, आणि सोन्याने मढि-
ले. ११ आणि करूबांचे पक्ष वीस हात लांब
होते, एकाचा एक पक्ष पांच हात मंदिराच्या भिं-
तीसीं लागत होता, आणि दुसरा पक्ष पांच हात
दुसऱ्या करूबाच्या पक्षासीं लागत होता. १२
आणि दुसऱ्या करूबाचा एक पक्ष पांच हात मं-
दिराच्या भिंतीसीं लागत होता, आणि दुसरा पक्ष
पांच हात दुसऱ्या करूबाच्या पक्षासीं संसक्त हो-
ता. १३ या करूबांचे पक्ष वीस हात पसरत
होते, आणि ते आपल्या पायांवर उभे होते, आणि
त्यांचीं मुखें आंत होतीं. १४ आणि त्याने पड-
दा, नील व अर्गवानी व किर्मिजी व कत्तान यांचा
केला, आणि त्यावर करूब चढविले. १५ आ-
णि त्याने मंदिराच्यापुढें दोन स्तंभ पस्तीस हात
उंचीचे केले, आणि एकएकाच्या शिरावरचें शिर-
स्क पांच हात होतें. १६ आणि त्याने गाभा-
ऱ्यांतल्या अशा सांखळ्या करून स्तंभांच्या शिरां-
ला लाविल्या, आणि शंभर डाळिंबें करून सांख-
ळ्यांला लाविलीं. १७ आणि त्याने ते स्तंभ
देवळाच्यापुढें एक उजव्याकडे आणि दुसरा डा-
व्याकडे उभे केले, आणि उजव्याकडच्याचें नांव
याखीन आणि डाव्याकडच्याचें नांव बोवाज ठे-
विलें.

## अध्याय ४.

आणि त्याने पितळाची वेदी केली, तिची लांबी
वीस हात आणि तिची रुंदी वीस हात
आणि तिची उंची दाहा हात होती. २ आणि
त्याने ओतींव समुद्र केला, तो एका कांठापासून दु-
सऱ्या कांठापर्यंत दाहा हात होता; चहुंकडे वा-
टोळा होता, त्याची उंची पांच हात होती, आणि
तीस हात सूत त्याच्या परिधीला वेष्टी. ३ आणि
त्याला खालतीं चहुंकडे बैलांचे आकार वेष्टीत
होते, एकएका हातांत दाहा दाहा असे, ते त्या
समुद्राला परिवीत करीत होते, तो ओतिला गेला
तेव्हां दोन ओळी असे ते बैल ओतिले गेले. ४
तो बारा बैलांवर उभा होता, ते उत्तरेस तीन
व पश्चिमेस तीन व दक्षिणेस तीन व पूर्वेस तीन
असे होते, आणि त्यांवरतीं तो समुद्र असतांना
यांचीं सर्व मागलीं अंगें आंत होतीं. ५ त्याची
जाडी चौंगाभर होती, आणि त्याचा कांठ प्याल्या-
च्या कांठाप्रमाणें कमलफुलांचा आकार होता,
त्यांत तीन हजार बाथ मावत होते. ६ आणि
त्याने दाहा गंगाळें करून पांच उजव्याकडे व पांच
डाव्याकडे ठेविलीं, त्यांत धुवावें ह्मणून; त्यांत
होमाचें साहित्य धुत असत, परंतु समुद्र याजकां-
च्या धुण्यासाठीं होता. ७ आणि त्याने सोन्या-
चीं दाहा दीपझाडें त्यांच्या विधीप्रमाणें करून
देवळांत पांच उजव्याकडे व पांच डाव्याकडे ठे-
विलीं. ८ आणि त्याने दाहा मेजें करून देवळांत
पांच उजव्याकडे व पांच डाव्याकडे ठेविलीं, आणि
त्याने सोन्याचे कटोरे शंभर केले.

९ आणि त्याने याजकांचें अंगण व मोठा चौ-
क व चौकाचीं कवाटें केलीं, आणि त्यांचीं कवाटें
पितळानी मढिलीं. १० आणि त्याने तो समुद्र
उजव्या अंगास पूर्वेकडे दक्षिणेच्या समोर मांडि-
ला. ११ आणि हूरामाने थाल्या व पावडी व
तरसाळीं केलीं, आणि शलमोन राजासाठीं दे-
वाच्या मंदिराविषयीं जें काम हूरामाला करा-

यांचें होतें तें त्याने समाप्त केलें. १२ दोन स्तंभ
व पेंच व दोहों स्तंभांच्या शिरावरचीं शिरस्कें
आणि स्तंभांच्या शिरावरच्या शिरस्कांच्या दोहों
पेंचांला वेष्टायासाठीं दोन जाळ्या. १३ आणि
दोहों जाळ्यांस चारशें डाळिंबें एकएका जाळीस
डाळिंबांच्या दोन दोन ओळी स्तंभांवरच्या शिर-
स्कांच्या दोहों पेंचांस वेष्टावें ह्मणून. १४ आणि
त्याने पाये केले आणि पायांवर गंगाळें केलीं. १५
एक समुद्र व त्याखालतीं बारा बैल. १६ आणि
थाल्या व पावडीं व कांटे व त्यांचें सर्व साहित्य
त्यांचा बाप हूराम याने शलमोन राजासाठीं
परमेश्वराच्या मंदिराकरितां ओतींव पितळाचें
केलें. १७ तीं राजाने यार्देनेच्या सपाटीवर सु-
कोथ व जरेदाथा यांच्यामध्यें चिकण्या मातींत
ओतून केलीं. १८ शलमोनाने तर ही सर्व सा-
मग्री अत्यंत बहुत्वाने केली, कां कीं पितळाचा
तोल शोधला गेला नाहीं. १९ आणि शलमो-
नाने देवाच्या मंदिराचीं सर्व भांडीं केलीं, आणि
सोन्याची वेदी आणि ज्यांवर दर्शनीय अपूप असीं
तीं मेजें. २० आणि दीपझाडें व त्यांचीं चाडीं
शुद्ध सोन्याचीं त्यानी विधीप्रमाणें गाभाऱ्यास-
मोर जळावें ह्मणून. २१ आणि फुलें व चाडीं
व चिमटे हींहि सोन्याचीं, तें संसिद्ध सोनें होतें.
२२ आणि कातरी व तरसाळीं व चमचे व क-
ज्जलपात्रें शुद्ध सोन्याचीं आणि मंदिराचा प्रवेश
त्याचीं आंतलीं कवाटें परम पवित्रस्थानाचीं आणि
देऊळ वेश्माचीं कवाटें सोन्याचीं होतीं.

## अध्याय ५.

तर परमेश्वराच्या मंदिराचें जें काम शलमोन
राजा करूं लागला तें अवघें समाप्त झालें,
आणि शलमोनाने आपला बाप दावीद याचीं
पवित्र वस्तू, रुपें व सोनें व भांडीं आंत आणून
परमेश्वराच्या मंदिराच्या निधींत ठेविलीं.
२ तेव्हां दावीदाचें नगर जें सीयोन त्यांतून
परमेश्वराच्या कराराचा कोश वरतीं आणाया-
साठीं शलमोनाने इस्राएलाच्या वडील वंशांचे
सर्व मुख्य, इस्राएलाच्या संतानांच्या बापांचे श्रेष्ठ
यरूशालेमेस जमविले. ३ आणि सातव्या महि-
न्यांतल्या सणांत इस्राएलचीं सर्व मनुष्यें राजा-
जवळ जमलीं. ४ आणि इस्राएलाचे सर्व वडील
आले तेव्हां लेव्यानी कोश उचलून घेतला. ५
आणि कोश व सभामंडप व त्या मंडपांतलीं सर्व
पवित्र भांडीं वरतीं आणिलीं; तीं याजकानी व
लेव्यानी वरतीं आणिलीं. ६ आणि शलमोन
राजा व त्याजवळ जे इस्राएलाच्या समुदायांतले
जमलेले होते ते अवघे कोशापुढें मेंढरांचे व गु-
रांचे यज्ञ करीत होते; तीं गणवत नव्हतीं, मोज-
वत नव्हतीं, एवढीं बहुत होतीं. ७ आणि या-
जकानी परमेश्वराच्या कराराचा कोश त्याच्या
ठिकाणांत ह्मणजे मंदिराच्या गाभाऱ्यांत परम प-
वित्रस्थानांत, करूबांच्या पक्षांखालीं आणिला. ८
कां कीं ते करूब आपले दोन पक्ष कोशाच्या ठि-
काणावर पसरीत होते, आणि करूबानी कोशाला
आणि त्याच्या काठ्यांला वरतीं आच्छादिलें. ९
आणि काठ्या लांब होत्या ह्मणून काठ्यांचीं शेवटें
कोशापासून गाभाऱ्यापुढें दिसलीं परंतु बाहेर दि-
सलीं नाहीं, आणि तेथें तीं आजपर्यंत आहेत.
१० इस्राएलाचीं संतानें मिसरांतून निघाल्यावर
जेव्हां परमेश्वराने त्यांसीं करार केला तेव्हां
होरेबास ज्या दोन दगडी पाट्या मोश्याने कोशांत
ठेविल्या, त्यांवाचून त्यांत कांहीं नव्हतें. ११ जें-
व्हां याजक पवित्रस्थानांतून निघाले, कां कीं जे
याजक समक्ष होते ते अवघे प्रकरणशः सेवा न
करितां पवित्र केलेले होते. १२ आणि लेवी जे
गाणारे ते अवघे आसाफाचे, हेमानाचे, यदूथूनाचे
आपल्या पुत्राभावांसुद्धां पांढरें आळसी वस्त्रें
ल्यालेले, झांजा, वीणा, व चंग वाजवीत वेदीच्या
पूर्वेकडे उभे राहिले, आणि त्यांच्यासंगतीं एकशें
वीस याजक करणे वाजवीत होते. १३ जेव्हां
करणे वाजविणारे व गाणारे एकसारिखे एकाच
शब्दाने गाजवून परमेश्वराचें स्तवन आणि कृत-
ज्ञतानिवेदन करीत होते, आणि करणे, झांजा व
वाद्यें उंच वाजवून "परमेश्वर तो उत्तम आहे,
त्याची दया सनातन आहे," असें स्तवीत होते,
तेव्हां असें झालें कीं मंदिर परमेश्वराचें मंदिर
मेघाने भरलें. १४ आणि त्या मेघामुळें याजका-
च्याने सेवा करायाला उभे राहवेना, कां कीं पर-
मेश्वर देव याच्या गौरवाने मंदिर भरलें.

## अध्याय ६.

तेव्हां शलमोन ह्मणाला, "मी निबिड अंधका-
रांत वस्ती करीन, असें **परमेश्वर** ह्मणाला
आहे. २ **म्या** तर तुजसाठीं निवासाचें मंदिर
तुझ्या सनातन वस्तीकरितां स्थान बांधिलें आहे."
३ **आणि** राजाने आपलें तोंड फिरवून इस्राएला-
च्या सर्व समुदायाला आशीर्वाद दिल्हा, आणि
इस्राएलाचा समुदाय उभा राहिला. ४ **आणि**
त्यानें असें ह्मटलें कीं, "इस्राएलाचा **देव परमे-
श्वर** याची स्तुति असावी, कां तर त्याने जें व-
चन आपल्या मुखाने माझा बाप दावीद याला
दिल्हें, तें त्याने आपल्या हातानी पूर्ण केलें आहे.
५ **तें** वचन असें कीं, 'ज्या दिवसीं म्या आपले
लोक मिसर देशांतून आणिले तेव्हांपासून इस्रा-
एलाच्या सर्व वंशांतील कोणतेंहि नगर तेथें आपलें
नाम राहायासाठीं मंदिर बांधावें ह्मणून म्या निवडलें
नाहीं, आणि आपले लोक इस्राएली यांवर अधि-
कार होण्यासाठीं कोणीएक मनुष्य निवडून घेतला
नाहीं. ६ **परंतु** म्या यरूशालेम तेथें माझें नाम
राहावें ह्मणून निवडली आहे, आणि माझे लोक
इस्राएली यांवर असायासाठीं म्या दावीद निव-
डला आहे. ७ **तर** इस्राएलाचा **देव परमे-
श्वर** याच्या नामासाठीं मंदिर बांधावें, असें मा-
झा बाप दावीद याच्या मनांत होतें. ८ **आणि**
**परमेश्वराने** माझा बाप दावीद याला ह्मटलें,
"माझ्या नामासाठीं मंदिर बांधणें तुझ्या मनांत
होतें, तर हें तुझ्या मनांत होतें ह्मणून त्वां बरें के-
लें. ९ **तथापि** तुला तें मंदिर बांधायाचें नाहीं,
परंतु जो तुझा पुत्र तुझ्या पोटांतून निघेल तो मा-
झ्या नामासाठीं मंदिर बांधील. १० **आणि पर-
मेश्वराने** जें आपलें वचन दिल्हें तें खरें केलें
आहे, आणि **परमेश्वराने** वचन दिल्याप्रमाणें
मी आपला बाप दावीद याच्या ठिकाणीं उभा
होऊन इस्राएलाच्या राजासनावर बसलों आहें,
आणि म्या इस्राएलाचा **देव परमेश्वर** याच्या
नामासाठीं मंदिर बांधिलें आहे. ११ **आणि** जो
करार **परमेश्वराने** इस्राएलाच्या संतानांसीं के-
ला तो ज्याच्याठायीं आहे तो कोश म्या तेथें
ठेविला आहे."

१२ **आणि** त्याने **परमेश्वराच्या** वेदीसमोर
इस्राएलाच्या सर्व समुदायापुढें उभें राहून आपले
हात पसरिले. १३ **कां** कीं शलमोनाने पांच
हात लांब व पांच हात रुंद व तीन हात उंच
असा पितळी माळा करून चौकामध्यें ठेविला
होता; त्यावर तो उभा राहिला आणि इस्राएला-
च्या सर्व समुदायापुढें आपले गुडघे टेंकून त्याने
आपले हात आकाशाकडे पसरिले. १४ **आणि**
त्याने ह्मटलें, "हे इस्राएलाच्या **देवा परमेश्वरा**,
आकाशांत किंवा पृथ्वीवर तुजसारिखा कोणताहि
देव नाहीं; जे तुझे सेवक तुजपुढें जिवाभावाने
वर्त्ततात त्यांसीं तूं करार राखितोस आणि दया
करितोस. १५ **तुझा** सेवक दावीद माझा बाप
त्याला जें वचन त्वां दिल्हें तें त्यांसीं राखिलें आ-
हे, त्वां आपल्या मुखाने वचन देऊन आपल्या
हातानें आजप्रमाणें पूर्ण केलें आहे. १६ **तर**
आतां हे इस्राएलाच्या **देवा परमेश्वरा**, तुझा
सेवक दावीद माझा बाप त्याला जें वचन त्वां
देतांना ह्मटलें तें त्यासीं राख, ह्मणजे बसा तूं
मजपुढें चालत आला आहेस तसें माझ्या
नेमांप्रमाणें चालायास जर तुझें संतान आप-
ल्या मार्गास सावध असलें, तर मजपुढें इस्रा-
एलाच्या राजासनावर बसणारा पुरुष तुला नाहीं-
सा होणार नाहीं. १७ **आतां** तर हे इस्राएला-
च्या **देवा परमेश्वरा**, जें तुझें वचन तूं आपला
सेवक दावीद यासीं बोललास तें खरें केलें जावें.
१८ **परंतु** देव खचीत मनुष्यासीं पृथ्वीवर वस्ती
करील काय? पाहा, आकाशें व आकाशांचीं
आकाशें तुला पुरत नाहींत, मग जें मंदिर म्या
बांधिलें आहे हें कसें पुरेल! १९ **तथापि** हे
माझ्या **देवा परमेश्वरा**, जी विनंती व प्रार्थना
तुझा सेवक तुजपुढें करीत आहे ती ऐकायास तूं
आपल्या सेवकाच्या प्रार्थनेकडे व त्याच्या विनंती-
कडे मन लाव. २० **या** मंदिराकडे ज्या स्थाना-
विषयीं त्वां ह्मटलें कीं, तेथें माझें नाम राहील
असा या मंदिराकडे तुझे डोळे अहोरात्र उघडे
असावे, आणि जी प्रार्थना तुझा सेवक या स्थाना-
कडे करील ती ऐकावी. २१ **आणि** तूं आपल्या
सेवकाच्या आणि आपल्या इस्राएली लोकांच्या
ज्या काकुळती ते या स्थानाकडे करितील त्या

ऐक, तूं आपल्या राहण्याच्या स्थानांतून आकाशांत
ऐक आणि ऐकून क्षमा कर. २२ जर कोणी
आपल्या शेजाऱ्यावर पाप केलें, आणि त्याकडून
शपथ वाहण्यासाठीं त्याला शपथ दिल्ही, आणि
ती शपथ या मंदिरांत तुझ्या वेदीपुढें आली, २३
तर तूं आकाशांत ऐक आणि कार्य कर, ह्मणजे
आपल्या सेवकाचा न्याय करीत असतां दुष्टाला
दोषी ठरवून त्याचें आचरण त्याच्या डोक्यावर
द्यावें, आणि नीतिमानाला नीतिमान ठरवून त्याच्या
नीतिप्रमाणें त्याला द्यावें. २४ तुझ्या इस्राएली
लोकानी तुजमत पाप केलें ह्मणून जर ते वैऱ्यापुढें
पिटले जातील, आणि माघारे फिरून तुझें नाम
मानून या मंदिरांत तुजपुढें प्रार्थना व विनंती क-
रितील, २५ तर तूं आकाशांत ऐक, आणि आप-
ल्या इस्राएली लोकांच्या पापाची क्षमा करून जो
देश त्वां त्यांला आणि त्यांच्या पूर्वजांला दिल्हा
त्याजवर त्यांस माघारे आण. २६ त्यानी तुज-
मत पाप केलें ह्मणून जेव्हां आकाश बंद झालें
आणि वृष्टि नाहीं, तेव्हां तूं त्यांला पीडीत अस-
तांना जर त्यानी तुझें नाम मानून आपलें पाप सो-
डून या स्थानाकडे प्रार्थना केली, २७ तर तूं
आकाशांत ऐक, आणि आपल्या सेवकांच्या आ-
पल्या इस्राएली लोकांच्या पापाची क्षमा करून
ज्या चांगल्या मार्गांत त्यानी चालावें तो त्यांस
शिकीव, आणि जो देश त्वां आपल्या लोकांस
वतनासाठीं दिल्हा त्यावर वृष्टि कर. २८ जर
देशांत दुकाळ असला, जर मरी असली, जर क-
रप, वीट, टोळ, घुलीं असलीं, जर देशांत त्यांच्या
वैऱ्यानी त्यांच्या नगराला वेढा घातला, जर कांहीं
दुःख कांहीं विकार असला, २९ तर जी कांहीं
प्रार्थना, जी कांहीं विनंती कोणत्याहि मनुष्याकडून
किंवा तुझ्या सर्व इस्राएली लोकांकडून होईल,
आणि ते एक एक आपापली पीडा व आपापलें
दुःख जाणून आपापले हात या मंदिराकडे पसर-
तील, ३० ती तूं आकाशांत आपल्या राहण्या-
च्या स्थानांतून ऐकून क्षमा कर, आणि ज्याचें ह-
दय तूं जाणतोस त्या एकएकाला त्याच्या त्याच्या
सर्व आचरणाप्रमाणें दें, कां कीं तूंच मात्र सर्व
मनुष्यांचें हृदय जाणतोस. ३१ अशास कीं जो
देश त्वां आमच्या पूर्वजांला दिल्हा त्याजवर ते
जितके दिवस जगतील तितके त्यानी तुझ्या मार्गांत
चालायास तुला भ्यावें.

"३२ आणखी जे विदेशी तुझ्या इस्राएली लो-
कांतले नाहींत, परंतु तुझें मोठें नाम व तुझा बळ-
वान हात व तुझा प्रतत भुज याकरितां दूर देशां-
तून आलेले आहेत, त्यानी जर येऊन या मंदिरांत
प्रार्थना केली, ३३ तर तूं आकाशांत आपल्या
राहण्याच्या स्थानांतून ऐक, आणि ज्या सर्वांविषयीं
तो विदेशी तुजकडे हाक मारील त्याप्रमाणें कर,
अशास कीं पृथ्वींतल्या सर्व लोकानी तुझें नाम
जाणावें आणि तुझ्या इस्राएली लोकांसारिखें तुला
भ्यावें, आणि जें मंदिर म्या बांधिलें आहे त्याला
तुझें नाम ठेविलेलें आहे असेंहि जाणावें. ३४
जर तुझे लोक जिकडे त्यांस पाठविसील तिकडे
आपल्या वैऱ्यांसीं लढायाला बाहेर गेले, आणि जें
नगर त्वां निवडलें आहे आणि जें मंदिर म्या
तुझ्या नामासाठीं बांधिलें आहे, त्याकडे जर त्यानी
तुझी प्रार्थना केली, ३५ तर तूं आकाशांत त्यां-
ची प्रार्थना व त्यांची विनंती ऐक, आणि त्यांचा
न्याय कर. ३६ जर त्यानी तुजमत पाप केलें
(कां कीं पाप करीत नाहीं असें कोणी मनुष्य नाहीं)
आणि त्वां त्यांवर क्रुद्ध होऊन ते वैऱ्यांपुढें दिल्हे
आणि त्यानी त्यांस पाडाव करून दुरच्या किंवा
जवळच्या देशांत नेलें, ३७ मग ज्या देशांत
ते पाडाव करून नेलेले असतील तेथें जर त्यानी
विचार केला, आणि आपल्या पाडावपणाच्या दे-
शांत पश्चात्ताप पावून तुझ्याजवळ विनंती करि-
तांना, "आह्मी पाप केलें, विपरीत केलें, दुष्ट-
पण केलें," असें जर ह्मटलें, ३८ आणि जेथें
वैऱ्यानी त्यांस नेलें तेथें आपल्या पाडावपणाच्या
देशांत जर त्यानी आपल्या सर्व हृदयानें व आप-
ल्या सर्व जिवानें तुजकडे फिरून त्यांचा जो देश
त्वां त्यांच्या पूर्वजांला दिल्हा, आणि जें नगर त्वां
निवडलें आणि जें मंदिर म्या तुझ्या नामासाठीं
बांधिलें आहे, त्याकडे तुझी प्रार्थना केली, ३९
तर तूं आकाशांत आपल्या राहण्याच्या स्थानांतून
त्यांची प्रार्थना व त्यांची विनंती ऐकून त्यांचा
न्याय कर, आणि ज्या तुझ्या लोकानी तुजमत पाप
केलें असेल त्यांची क्षमा कर. ४० आतां हे
माझ्या देवा, या स्थानांत केलेल्या प्रार्थनेकडे तुझे

डोळे उघडे आणि तुझे कान तत्पर असावे. ४१
आणि आतां हे **परमेश्वरा** देवा, तूं आपल्या
स्वास्थ्यस्थानांत प्रतिष्ठित हो; तूंच आणि तुझा
प्रतापाचा कोश, हे **परमेश्वरा** देवा, तुझे याजक
तारणवेष्टित असोत, आणि तुझे भक्त कृपेने हर्षोत.
४२ हे **परमेश्वरा** देवा, तूं आपला अभिषिक्त
विन्मुख करूं नको, तूं आपला सेवक दावीद या-
वरच्या दया स्मर."

## अध्याय ७.

आणि शलमोनाने प्रार्थना समाप्त केली तेव्हां
अग्नि आकाशांतून उतरून होम व यज्ञ
खाऊन गेला, आणि **परमेश्वराच्या** गौरवाने मं-
दिर भरलें. २ आणि याजकांच्याने **परमेश्व-
राच्या** मंदिरांत जाववेना, कां कीं **परमेश्वराच्या**
गौरवाने **परमेश्वराचें** मंदिर भरलें होतें. ३
आणि अग्नि व **परमेश्वराचें** गौरव मंदिरावर
उतरून आलें, हें इस्राएलाच्या सर्व संतानानी
पाहून तोंड भूमीकडे करून चिरेबंदीवर नमून
भजन केलें, आणि "**परमेश्वर** तो उत्तम आहे,
त्याची दया सनातन आहे," ह्मणून स्तुति केली.
४ तेव्हां राजाने व सर्व लोकानी **परमेश्वरा-
पुढें** यज्ञ केले. ५ आणि शलमोन राजाने बा-
वीस हजार बैल व एक लाख वीस हजार मेंढरें
इतक्यांचे यज्ञ केले; असें राजाने व सर्व लो-
कानी देवाचें मंदिर प्रतिष्ठित केलें. ६ आणि
याजक आपल्या कर्मांवर उभे होते आणि दावी-
दाने लेव्यांकडून स्तवन करविलें, तेव्हां **परमेश्व-
राकडचीं** जीं वाद्यें दावीद राजाने "**परमेश्वरा-
ची** दया सनातन आहे" ह्मणून त्याची स्तुति
करण्यासाठीं केलीं होतीं तीं लेवी वाजवीत होते,
आणि त्यांपुढें याजक करणे वाजवीत होते आणि
सर्व इस्राएली उभे होते. ७ आणि शलमोनाने
**परमेश्वराच्या** मंदिरापुढल्या अंगणाचें मध्यठि-
काण पवित्र केलें; कां कीं तेथें त्याने होम व शां-
तिकारक यज्ञाचे मेद वाहिलें, कारण कीं जी पित-
ळी वेदी शलमोनाने बांधिली होती ती होमाला
व नैवेद्याला व मेदाला पुरेना.
८ आणि त्या वेळेस शलमोनाने व त्याच्या
संगतीं सर्व इस्राएलानी हमाथाच्या प्रवेशापासून
मिसरच्या नदीपर्यंत अत्यंत मोठ्या समुदायाने
सात दिवस सण केला. ९ आणि आठव्या दि-
वशीं त्यानी मेळा केला, कां कीं सात दिवस त्यानी
वेदीचें प्रतिष्ठापन व सात दिवस सण केला. १०
आणि सातव्या महिन्याच्या तेविसाव्या दिवशीं
त्याने लोकांस जी कृपा **परमेश्वराने** दावीदावर
व शलमोनावर व आपल्या इस्राएली लोकांस केली
होती तिजमुळें त्यांस हर्षयुक्त व मनांत आनंदित
जाऊं दिल्हें. ११ असें शलमोनाने **परमेश्वरा-
चें** मंदिर व राजाचें मंदिर समाप्त केलें, आणि
**परमेश्वराच्या** मंदिरांत व आपल्या मंदिरांत क-
रायाला जें शलमोनाच्या मनांत आलें होतें तें
अवघें त्याने सिद्धीस नेलें.
१२ आणि रात्रीं **परमेश्वराने** शलमोनाला
प्रगट होऊन ह्मटलें, "म्या तुझी प्रार्थना ऐकिली
आहे, आणि म्या हें स्थान मला यज्ञाचें मंदिर
व्हायासाठीं निवडलें आहे. १३ वृष्टि न होई
असें जर म्या आकाश बंद केलें, अथवा देश
खायाला जर म्या टोळांला आज्ञा केली, अथवा
जर म्या आपल्या लोकांमध्यें मरी पाठविली, १४
आणि ज्यांला माझें नाम ठेविलेलें आहे त्या
माझ्या लोकानी जर नम्र होऊन प्रार्थना केली,
आणि आपले दुष्ट मार्ग सोडून माझें मुख शोधि-
लें, तर मी आकाशांत ऐकेन, आणि त्यांच्या पापा-
ची क्षमा करून त्यांच्या देशाला बरें करीन. १५
आतां या स्थानांत केलेल्या प्रार्थनेकडे माझे डोळे
उघडे आणि माझे कान सावध असत जातील.
१६ आणि आतां म्या हें मंदिर निवडून पवित्र
ठरविलें आहे, एथें माझें नाम सर्वकाळपर्यंत हो-
ईल आणि एथें माझे डोळे व माझें मन हीं नित्य
लागतील. १७ आणि जसा तुझा बाप दावीद
वर्त्तत असे, तसा जर तूं मजपुढें वर्त्तसील, आणि
जें म्या तुला आज्ञापिलें आहे त्या सर्वांप्रमाणें
करसील, आणि माझे नियम व माझे न्याय पाळ-
सील, १८ तर जसें म्या तुझा बाप दावीद
यासीं करार करून ह्मटलें, 'तुला इस्राएलावरचा
अधिकारी नाहींसा होणार नाहीं' त्याप्रमाणें मी
तुझ्या राज्याचें सिंहासन स्थापीन. १९ परंतु
जर तुह्मी फिरलां, आणि जे माझे नियम व माझे
विधी म्या तुह्मापुढें ठेविले आहेत ते जर तुह्मी

सोडिले आणि जाऊन अन्य देवांची सेवा व भजन
केलें. २० तर जो माझा देश म्या त्यांस दिल्हा
आहे त्यावरून मी त्यांस उपटून टाकीन, आणि
जें मंदिर म्या आपल्या नामासाठीं पवित्र ठरविलें
आहे तें मी आपल्या दृष्टीपुढून टाकून देईन, आ-
णि तें सर्व लोकांमध्यें झण आणि थट्टा असें
करीन. २१ आणि हें मंदिर जें उंच आहे या-
वरून जो कोणी जाईल तो विस्मित होऊन झ-
णेल, "कशामुळें परमेश्वराने या देशाचें व या
मंदिराचें असें केलें आहे? २२ तेव्हां कोणी
उत्तर करितील, "त्यांच्या पूर्वजांचा देव परमे-
श्वर ज्याने त्यांस मिसर देशांतून काढून घेतलें,
त्याला त्यांनी सोडिलें ,आणि अन्य देवांस धरून
त्यांचें भजन व सेवा केली, झणून त्याने त्यांजवर
हें सर्व अरिष्ट आणिलें आहे."

## अध्याय ८.

आणि वीस वर्षे झाल्यावर जेव्हां शलमोनाने
परमेश्वराचें मंदिर व आपलें घर बां-
धिलें होतें तेव्हां असें झालें कीं, २ जीं नगरें
हूरामाने शलमोनाला दिल्हीं होतीं तीं शलमो-
नाने बांधून तेथें इस्राएलाचीं संतानें वसविलीं.
३ आणि शलमोनाने हमाथ जोबेस जाऊन तिला
घेतलें. ४ आणि त्याने रानांतली तादमोर बां-
धिली, आणि हमाथांत जीं भांडारांचीं सर्व नगरें
तीं त्याने बांधिलीं. ५ आणि त्याने वरची बेथ-
होरोन व खालची बेथहोरोन हीं दुर्गपुरें, कोट
कवाडें, व अडसर एतद्युक्त बांधिलीं. ६ आणि
बालाथ आणि शलमोनाकडे जीं सर्व भांडारां-
चीं नगरें आणि रथांचीं सर्व नगरें आणि अ-
श्वारो हांचीं नगरें आणि जें कांहीं शलमोना-
ने यरूशालेमेंत व लबानोनांत व आपल्या अ-
धिकाराच्या सर्व देशांत बांधायाला इच्छिलें तें
बांधिलें. ७ आणि हित्ती, अमोरी, परिज्जी,
हिव्वी व यबूसी यांतले सर्व उरलेले लोक
जे इस्राएलांतले नव्हते; ८ परंतु त्यानंतर जे
देशांत उरले होते, जे इस्राएलाच्या संतानांनी नष्ट
केले नव्हते त्यांच्या संतानांतले होते, त्यांपासून
शलमोनाने आजपर्यंत कर उठविला. ९ परंतु
शलमोनाने आपल्या कामासाठीं इस्राएलाच्या सं-
तानांतले कोणी दास करून ठेविले नाहींत; ते तर
योद्धे व त्याचे मुख्य नायक व त्याच्या रथांचे
व त्याच्या अश्वारोहांचे नायक होते. १० आणि
शलमोन राजाचे जे मुख्य कारभारी लोकां-
वर अधिकार करीत होते ते अडीचशें होते.

११ आणि शलमोनाने फारोच्या कन्येसाठीं जें
घर बांधिलें होतें, त्यांत त्याने तिला दावीदाच्या
नगरांतून वरतीं आणिलें, कां कीं तो झणाला,
"माझ्या बायकोंने इस्राएलाचा राजा दावीद
याच्या घरांत राहूं नये, कारण कीं ज्या स्थानांवर
परमेश्वराचा कोश आला आहे तीं पवित्र
आहेत." १२ तेव्हां शलमोनाने परमेश्वराची
जी वेदी मघनासमोर बांधिली होती तिजवर त्याने
परमेश्वराजवळ होम केले. १३ आणि मो-
श्याच्या आज्ञेप्रमाणें शाब्बाथांत, अमावास्यांत, व
सणांत प्रतिवर्षी तीन वेळा बेखमीर भाकरींच्या
सणांत, सातव्यांच्या सणांत, व मंडपांच्या सणांत
नित्याच्या नेमाप्रमाणें केले. १४ आणि त्याने
आपला बाप दावीद याच्या नेमाप्रमाणें याजकांची
वांटणी त्यांच्या कर्मावर आणि नित्याच्या रीती-
प्रमाणें याजकांपुढें स्तुति व सेवा करायास लेवी
त्यांच्या कर्मांवर आणि द्वारपाळ त्यांच्या वांट-
ण्यांनी एकएका द्वाराकडे नेमून ठेविले, कां कीं
देवाकडचा मनुष्य दावीद याची आज्ञा असीच
होती. १५ आणि कोणीएकाच्या कार्याविषयीं अथ-
वा भांडाराविषयीं याजकांला व लेव्यांला राजाची
जी आज्ञा झाली होती तिजपासून ते वळले नाहींत.
१६ आणि परमेश्वराच्या मंदिराचा पाया
घातला गेला तोंपर्यंत आणि तें समाप्त झालें तों-
पर्यंत शलमोनाचें सर्व काम सिद्ध होत चाललें,
मग परमेश्वराचें मंदिर समाप्त झालें.

१७ यानंतर अदोम देशांत समुद्रतीरीं एलो-
थेजवळ जें एज्योनगाबेर तेथें शलमोन गेला.
१८ आणि त्याजकडे हूरामाने आपल्या सेवकां-
च्या हातून गलबतें व समुद्र जाणणारे चाकर पाठ-
विले, तेव्हां त्यांनी शलमोनाच्या चाकरांसंगतीं
ओफीरास जाऊन तेथून साडे चारशें तालांत
सोनें घेऊन शलमोन राजाजवळ आणिलें.

## अध्याय ९.

आणि शबाच्या राणीने शलमोनाची कीर्त्ति
ऐकिली, तेव्हां ती फार भारी परिवार व
सुवासिक द्रव्य व पुष्कळ सोनें व महामूल्य पाषाण
वाहणारीं उंटें घेऊन कोड्यांकडून शलमोनाची प-
रीक्षा करायाला यरूशालेमेस आली, आणि शल-
मोनाजवळ येऊन जें कांहीं आपल्या मनांत होतें
त्याविषयीं त्यासीं बोलली. २ तेव्हां शलमोनाने
तिला तिच्या सर्व गोष्टी उघड केल्या; शलमोनाने
तिला उघड केली नाहीं, असी एकहि गोष्ट त्या-
पासून गुप्त राहिली नाहीं. ३ आणि शबाच्या
राणीने शलमोनाचें ज्ञान आणि जें मंदिर त्याने
बांधिलें होतें तें; ४ आणि त्याच्या मेजावरचें
अन्न व त्याच्या चाकरांची बैठक व त्याच्या परि-
चरांची सेवा व त्यांचे पोशाक व त्याचे पेयकामी व
त्यांचे पोशाक, आणि परमेश्वराच्या मंदिरास च-
ढण्यासाठीं त्याचा जिना, हीं सर्व पाहिल्यावर तिच्या
ठायीं कांहीं जीव राहिला नाहीं. ५ तेव्हां तिने
राजाला ह्मटलें, "तुझ्या कर्मांविषयीं व तुझ्या ज्ञा-
नाविषयीं जें वर्त्तमान म्या आपल्या देशांत ऐकिलें
तें खरें होतें. ६ परंतु मी आलें आणि माझ्या
डोळ्यांनी पाहिलें तोंपर्यंत म्या त्यांच्या गोष्टींवर
विश्वास ठेविला नाहीं, आणि पाहा तुझ्या बुद्धी-
च्या विशालतेचा अर्धांश मला सांगितला गेला
नव्हता; जें वर्त्तमान म्या ऐकिलें त्यांपेक्षां तूं अधि-
कच आहेस. ७ जीं तुझीं माणसें व जे तुझे
चाकर तुजपुढें उभे राहून तुझें ज्ञान ऐकतात ते
धन्य. ८ तुझा देव परमेश्वर, ज्याने तुला आ-
पल्या राजासनावर तुझा देव परमेश्वर याकडचा
राजा असें बसवायास तुजवर आवड ठेविली, तो
सुवंदित असो; तुझ्या देवाने इस्राएल सर्वकाळ-
पर्यंत स्थापायास त्याजवर प्रीति करून न्याय व
नीति करायाला तुला त्याजवर राजा केलें आहे."

९ तेव्हां तिने राजाला एकशें वीस तालांत
सोनें आणि अत्यंत बहुत सुवासिक द्रव्य व महा-
मूल्य पाषाण दिल्हे; जें सुवासिक द्रव्य शबाच्या
राणीने शलमोन राजाला दिल्हें त्यासारिखें कांहीं
नव्हतें. १० आणि हूरामाच्या ज्या चाकरांनी
आणि शलमोनाच्या ज्या चाकरांनी ओफीराहून
सोनें आणिलें, त्यांनी अल्गूमांचीं लांकडें व महा-
मूल्य पाषाण आणिले. ११ आणि राजाने पर-
मेश्वराच्या मंदिरासाठीं व राजाच्या घरासाठीं
त्या अल्गूमांच्या लांकडांच्या पायऱ्या आणि गाय-
कांसाठीं चंग व वीणा केल्या: त्यांसारिखीं कोण-
तींहि यहूदा देशांत पूर्वीं दृष्टीस पडलीं नव्हतीं.
१२ आणि शलमोन राजाने शबाच्या राणीला
जें कांहीं तिने इच्छून मागितलें तें दिल्हें, जें तिने
राजाजवळ आणिलें होतें त्याशिवाय, मग ती आ-
पल्या चाकरांसुद्धां आपल्या देशास परत गेली.
१३ आणि जें सोनें शलमोनाकडे एकवर्षाचें येई
त्याचा तोल साहाशें सासष्ट तालांत सोनें इतका
असे. १४ जें सावकार व वाणी आणीत असत
त्याशिवाय, आणि अरबदेशाचे सर्व राजे व देशाचे
अधिकारी शलमोनाकडे सोनें व रुपें आणीत
असत.

१५ आणि शलमोन राजाने घडींव सोन्याच्या
दोनशें अंगढाला केल्या, एकएका अंगढालेला सा-
हासाहाशें शेकेल घडींव सोनें लागलें. १६ आणि
त्याने घडींव सोन्याच्या तीनशें ढाली केल्या; एक-
एका ढालीला तीनतीनशें शेकेल सोनें लागलें,
आणि राजाने त्या लबानोनाच्या वनच्या घरांत
ठेविल्या. १७ आणि राजाने हस्तिदंताचें मोठें
सिंहासन केलें, आणि चोख्या सोन्याने मढलें.
१८ त्या सिंहासनाला सोन्याच्या पादासनासुद्धां
साहा पायऱ्या सिंहासनासीं संसक्त होत्या, आणि
बसण्याच्या ठिकाणास दोहींकडे टेंके होते, आणि
टेंक्यांजवळ दोन सिंह उभे होते. १९ आणि
तेथें त्या साहा पायऱ्यांवर दोहों अंगांस बारा सिंह
उभे होते; तसें कोणत्याहि राष्ट्रांत कधीं बनलें नाहीं.
२० आणि शलमोन राजाचीं प्यावयाचीं सर्व
पात्रें सोन्याचीं होतीं, आणि लबानोनाच्या वनच्या
घरचीं सर्व भांडीं शुद्ध सोन्याचीं होतीं; रुप्याचें
कोणतेंहि नव्हतें, शलमोनाच्या दिवसांत तें कांहीं
नाहीं असें मोजलें होतें. २१ कां कीं राजाचीं
गलबतें हूरामाच्या चाकरांसंगतीं तार्शीशास जात
असत; तिहींतिहीं वर्षांनी एकदा तार्शीशचीं गल-
बतें सोनें व रुपें, हस्तिदंत व वानर, व मोर आ-
णीत येत असत. २२ तर धनाविषयीं व ज्ञाना-
विषयीं शलमोनराजा पृथ्वींतल्या सर्व राजांपेक्षा

थोर होता. २३ आणि शलमोनाच्या मनांत
जें ज्ञान देवानें घातलें होतें तें ऐकावें ह्मणून
पृथ्वींतले सर्व राजे शलमोनाची भेट करायास
पाहत असत. २४ आणि ते एकएक आपापली
भेट रुप्याचीं भांडीं व सोन्याचीं भांडीं, आणि
वस्त्रें, शस्त्रें व सुवासिक द्रव्य, घोडीं व खेंचरें प्रति-
वर्षाचें प्रमाण असीं आणीत असत. २५ आणि
शलमोनाला घोडीं व रथ यांचीं चार हजार ठाणें,
आणि बारा हजार स्वार होते, ते त्यानें रथांच्या
नगरांत व राजाजवळ यरूशालेमेंत ठेविले. २६
आणि तो सर्व राजांवर नदीपासून फलिष्ट्यांचा
देश आणि मिसरची सीमा एथपर्यंत अधिकार
करीत होता. २७ आणि राजानें यरूशालेमेंत
रुपें धोंड्यांसारिखें बहुत आणि देवदारु खाला-
टींतल्या उंबरवृक्षांसारिखे होत असें केलें. २८
आणि शलमोनाजवळ मिसरांतून व सर्व देशां-
तून घोडीं आणीत असत.

२९ आणि शलमोनाचीं वर्कड कृत्यें पहिलीं
व शेवटलीं, तीं नाथान भविष्यवाद्याच्या इतिहासांत
आणि अहीया शीलोनी याच्या भविष्यवादांत
आणि नबाटाचा पुत्र यराबाम यांविषयीं यिदो
मदर्शकाचीं जीं मदर्शनें त्यांत लिहिलेलीं नाहींत
काय? ३० शलमोनानें यरूशालेमेंत अवघ्या
इस्राएलावर चाळीस वर्षें राज्य केलें. ३१ आणि
शलमोन आपल्या पूर्वजांसंगतीं निजला, आणि आ-
पला बाप दावीद याच्या नगरांत पुरिला गेला,
आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र रहाबाम यानें
राज्य केलें.

## अध्याय १०.

आणि रहाबाम शेखेमेस गेला, कां कीं त्याला
राजा करायासाठीं अवघा इस्राएल शेखे-
मेस आला होता. २ हें नबाटाचा पुत्र यरा-
बाम जेथें तो शलमोन राजापासून पळून गेला
होता, तेथें मिसरांत असतां त्यानें ऐकिलें, तेव्हां
असें झालें कीं यराबाम मिसरांतून परत आला.
३ तेव्हां त्यांनी निरोप पाठवून त्याला बोलाविलें,
मग यराबाम व सर्व इस्राएल रहाबामाजवळ
येऊन बोलले कीं, ४ "तुझ्या बापानें आमचें
जूं कठीण केलें, तर आतां तूं आपल्या बापाची
कठीण सेवा आणि जें भारी जूं त्यानें आह्मावर
घातलें तें कांहींसें हलकें कर, ह्मणजे आह्मी तुझी
सेवा करूं. ५ तेव्हां त्यानें त्यांला ह्मटलें,
"अणखी तिहीं दिवसांनी मजकडे परत या."
लोक तर गेले.

६ आणि रहाबाम राजा आपला बाप शल-
मोन जिता होता, तेव्हां जे ह्मातारे त्यांपुढें उभे
असत त्यांसीं विचार करीत ह्मणाला, "म्या या
लोकांस कसें उत्तर द्यावें ह्मणून तुह्मी काय मंत्रण
करीत आहां?" ७ तेव्हां ते त्यासीं बोलले कीं,
"जर तूं या लोकांचें बरें करसील, आणि त्यांवर
अनुकूळ होऊन त्यांस सुखदायक वचनें बोलसील,
तर हे सर्वकाळ तुझे सेवक होतील." ८ परंतु
त्यानें त्या ह्मातार्‍यांचें मंत्रण जें त्यांनी त्यासीं
केलें होतें तें सांडिलें, आणि जे तरणे त्याच्या-
संगतीं वाढत आले होते, जे त्यापुढें उभे असत,
त्यांसीं विचार केला. ९ आणि त्यांस ह्मटलें,
"आह्मी या लोकांस उत्तर द्यावें ह्मणून तुह्मी
काय मंत्रण करितां? कां कीं हे मजसीं बोलले
आहेत कीं, जें जूं तुझ्या बापानें आह्मावर घातलें
तें कांहींसें हलकें कर." १० तेव्हां जे तरणे
त्याच्यासंगतीं वाढत आले होते ते त्यासीं बोलत
ह्मणाले, "तुझ्या बापानें आमचें जूं भारी केलें;
तूं तर तें आह्माला हलकें कर, असें जे तुजसीं
बोलले त्या या लोकांस असें सांग, त्यांसीं असें
बोल कीं, माझी करंगुळी माझ्या बापाच्या कटी-
पेक्षां जाड होईल. ११ माझ्या बापानें तर
तुह्मावर भारी जूं लादलें, परंतु आतां मी तुमचें
जूं अधिक करीन; माझा बाप असुडांनी तुह्माला
शिक्षा करी, परंतु मी विंचवांनी करीन." १२
मग तिसरे दिवशीं मजकडे परत या, असें जें
राजानें सांगितलें होतें त्याप्रमाणें यराबाम आणि
सर्व लोक तिसरे दिवशीं रहाबामाजवळ गेले.
१३ तेव्हां राजानें त्यांस निष्ठुर उत्तर केलें, आणि
रहाबाम राजानें ह्मातार्‍यांचें मंत्रण सोडिलें; १४
आणि तरण्यांच्या मंत्रणाप्रमाणें त्यानें त्यांस ह्म-
टलें कीं, "माझ्या बापानें तुमचें जूं भारी केलें, प-
रंतु मी तुमच्या जुंवाला अधिक लावीन; माझा
बाप असुडांनी तुह्माला शिक्षा करी, परंतु मी
विंचवांनी करीन." १५ तर राजानें लोकांचें ऐ-

किलें नाहीं, कां कीं ही गोष्ट देवापासून घडली;
परमेश्वराने जें आपलें वचन अहीया शीलोनी
याकडून नबाटाचा पुत्र यराबाम याला सांगितलें
तें स्थापावें ह्मणून.
१६ आणि राजाने आमचें ऐकिलें नाहीं, असें
सर्व इस्राएलाने पाहिलें, तेव्हां ते लोक राजाला
उत्तर करीत ह्मणाले, "दावीदाकडे आमचा काय
वांटा आहे? आणि यिशायाच्या पुत्राकडे आमचा
कांहीं विभाग नाहीं. हे इस्राएला, एकएक आ-
पापल्या राहोटीजवळ जा; आतां हे दावीदा, तूं
आपल्या घरचें पाहा." मग सर्व इस्राएली आप-
ल्या राहोटीजवळ गेले. १७ परंतु जीं इस्राएला-
चीं संतानें यहूदाच्या नगरांत राहत होतीं त्याज-
वर रहाबाम राज्य करीत गेला. १८ आणि
रहाबाम राजाने हदोराम जो वसुलावर त्याला
पाठविलें, तेव्हां इस्राएलाच्या संतानानी त्याला
दगडमार केला असतां तो मेला; मग रहाबाम
राजाने यरूशालेमेस पळून जाण्यासाठीं रथावर
चढायास उतावळी केली. १९ तर इस्राएली
आजपर्यंत दावीदाच्या कुळाकडून फितलेले आहेत.

## अध्याय ११.

आणि रहाबाम यरूशालेमेस आला तेव्हां
इस्राएलासीं लढायासाठीं रहाबामाकडे रा-
ज्य परत आणावें ह्मणून त्याने यहूदाचा वंश आ-
णि बन्यामीन एक लक्ष ऐशीं हजार निवडलेले
लढणारे जमविले. २ मग देवाकडचा मनुष्य
शमाया याजवळ परमेश्वराचें वचन आलें कीं,
३ "शलमोनाचा पुत्र रहाबाम यहूदाचा राजा
याला व यहूदा व बन्यामीन यांतल्या सर्व इस्रा-
एलाला सांग कीं, ४ परमेश्वर असें ह्मणतो,
वरतीं जाऊं नका आणि आपल्या भावासीं लढूं
नका; तुह्मी एकएक आपापल्या घरास परत
जा, कां कीं ही गोष्ट मजपासून घडली आहे."
तेव्हां ते परमेश्वराचीं वचनें ऐकून यराबामावर
जायाचें सोडून फिरले.
५ आणि रहाबामाने यरूशालेमेस वस्ती केली,
आणि यहूदांत दुर्गपुरें बांधिलीं. ६ त्याने बेथ-
लेहेम व एटाम व तकोवा; ७ आणि बेथजूर व
शोखो व अदुल्लाम; ८ आणि गाथ व मारी-
शा व जीफ; ९ आणि अदोराइम व लाखीश
व अजेका; १० आणि जोरा व अय्यालोन व
हेब्रोन; हीं यहूदांतलीं व बन्यामीनांतलीं दुर्ग-
पुरें बांधिलीं. ११ आणि त्याने किल्ले सुदृढ केले,
आणि त्यांत किल्लेदार, व अन्नाचे, तेलाचे, व द्रा-
क्षारसाचे कोठे ठेविले. १२ आणि एकएका
नगरांत ढाला व भाले ठेवून तीं फार सुदृढ
केलीं, आणि त्याजकडे यहूदा व बन्यामीन होते.
१३ आणि जे याजक व लेवी सर्व इस्राएलांत
होते ते आपल्या सर्व प्रांतांतून त्याजकडे शरण
आले. १४ कां कीं लेवी आपलीं शिवारें व
आपलीं स्थलें सोडून यहूदास व यरूशालेमेस
आले, कारण कीं त्यानी परमेश्वरासाठीं याज-
काची सेवा न करावी ह्मणून यराबामाने व त्या-
च्या पुत्रानी त्यास नाकारून टाकिलें होतें. १५
आणि त्याने उंच स्थानांवर व भुतांसाठीं आणि
जीं वासरें त्याने बनावलीं होतीं त्यांसाठीं याजक
नेमून ठेविले. १६ आणि त्यानंतर इस्राएलाच्या
सर्व वंशांतून ज्यानी इस्राएलाचा देव परमेश्वर
याला शोधायाला आपलें मन दिल्हें, ते आपल्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याजवळ यज्ञ करायाला
यरूशालेमेस आले. १७ त्यानी तर यहूदाच्या
राज्याला दृढ केलें, आणि शलमोनाचा पुत्र रहा-
बाम याला तीन वर्षें बळवान केलें, कां कीं तीन
वर्षें ते दावीदाच्या व शलमोनाच्या मार्गांने
चालले.
१८ आणि रहाबामाने दावीदाचा पुत्र यरी-
मोथ याची कन्या माहलाथ व यिशायाचा पुत्र
एलीब याची कन्या अबीहाइल ह्या बायका क-
रून घेतल्या. १९ ती त्यापासून यरूश व श-
मर्या व जाहम, हे पुत्र प्रसवली. २० आणि
तिजनंतर त्याने आब्शालोमाची कन्या माखा घे-
तली; ती त्यापासून अबीया व अत्थाइ व जीजा
व शलोमीथ, हे प्रसवली. २१ आणि रहाबा-
माने आपल्या सर्व पत्न्या व उपपत्न्या यांपेक्षां
आब्शालोमाची कन्या माखा इजवर अधिक प्रीति
केली; (त्याने तर अठरा पत्न्या व साठ उपप-
त्न्या घेतल्या, आणि अठ्ठाविसां पुत्रांला व साठां
कन्यांला जन्म दिल्हा). २२ आणि रहाबामाने
माखाचा पुत्र अबीया त्याच्या भावांमध्यें अधि-

पति होण्यास श्रेष्ठ ठरविला, कां कीं तो त्याला
राजा करायाला पाहत होता· २३ आणि तो
विवेकाने वर्त्तला, आणि त्याने आपल्या सर्व पुत्रां-
तून कित्येक यहूदाच्या व बन्यामीनांच्या सर्व
प्रांतांतील प्रत्येक दुर्गपुरांत इकडे तिकडे ठेविले,
आणि त्यांला पुष्कळ उपजीवन दिल्हें आणि त्याने
बहुत बायका इच्छून घेतल्या·

## अध्याय १२·

आणि रहाबामाने राज्य स्थापिलें आणि आ-
पल्याला सबल केलें होतें, तेव्हां असें झालें
कीं त्याने आणि त्यासंगतीं सर्व इस्राएलाने परमे-
श्वराचा धर्मविधी सोडिला· २ आणि त्यांनी
परमेश्वराविषयीं अधर्म केला होता, ह्मणून र-
हाबाम राजाच्या पांचव्या वर्षी असें झालें कीं
मिसराचा राजा शीशाक यरूशालेमेवर चढून
आला· ३ त्याबरोबर बाराशें रथ व साठ हजार
घोडेस्वार होते, आणि त्याच्यासंगतीं जे लोक मि-
सरांतून आले, ते लूबी, सुक्की, व कुशी असं-
ख्य होते· ४ तेव्हां तो यहूदाचीं दुर्गपुरें घेऊन
यरूशालेमेस आला. ५ आणि रहाबाम व य-
हूदाचे अधिकारी जे शीशाकामुळें यरूशालेमेस
एकत्र मिळाले होते त्यांजवळ शमाया भविष्यवादी
येऊन ह्मणाला, "परमेश्वर ह्मणतो कीं, तुह्मी
मला सोडिलें आहे ह्मणून म्याहि तुह्मास शी-
शाकाच्या हातीं सोडिलें आहे." ६ मग इस्राए-
लाचे अधिकारी व राजा नम्र होऊन ह्मणाले,
"परमेश्वर न्यायी आहे." ७ आणि ते नम्र
झाले, असें परमेश्वराने पाहिलें तेव्हां शमाया-
कडे परमेश्वराचें वचन आलें कीं, "ते नम्र झाले,
त्यांचा नाश मी करणार नाहीं, त्यांला अमळसी
मुक्ति देईन, आणि माझा क्रोध शीशाकाकडून
यरूशालेमेवर घातला जाणार नाहीं· ८ तथापि
ते त्याचे सेवक होतील, त्यांनी माझी सेवा व
देशांच्या राज्यांची सेवा जाणावी ह्मणून."
९ तर मिसराचा राजा शीशाक याने यरू-
शालेमेवर चढून येऊन परमेश्वराच्या मंदिराचे
निधि व राजाच्या घरचे निधि नेले, अवघेच नेले,
आणि ज्या सोन्याच्या ढाला शलमोनाने केल्या हो-
त्या त्याहि नेल्या· १० आणि त्यांच्या ठिकाणीं र-
हाबाम राजाने पितळाच्या ढाला केल्या, आणि जे
राजपुरुष राजाच्या घराचें दार राखीत होते,
त्यांच्या नायकांच्या हातीं सोंपल्या· ११ आणि
जेव्हां कधीं राजा परमेश्वराच्या मंदिरांत जाई,
तेव्हां ते राजपुरुष येऊन त्या वाहत आणि राज-
पुरुषांच्या अगारांत परत आणीत· १२ आणि
तो नम्र झाला तेव्हां त्याचा सत्यनाश न करावा
ह्मणून त्याजवरून परमेश्वराचा क्रोध फिरला,
आणि यहूदांतहि अवस्था बरी झाली. १३ तर
रहाबाम राजाने आपल्याला यरूशालेमेंत बल-
वान करून राज्य केलें, कां कीं रहाबाम राज्य
करूं लागला, तेव्हां एकेचाळीस वर्षांचा होता,
आणि जें नगर परमेश्वराने आपलें नाम तेथें
ठेवावें ह्मणून इस्राएलाच्या सर्व वंशांतून निवडिलें
होतें, तेथें यरूशालेमेंत सत्रा वर्षें राज्य करीत
गेला, आणि त्याच्या आईचें नाम नामा होतें;
ती आम्मोनीण होती. १४ आणि तो वाईट करी,
कारण कीं परमेश्वरास शोधायाला त्याने आपलें
मन लाविलें नाहीं. १५ तर रहाबामाच्या गोष्टी
आद्य अंत त्या शमाया भविष्यवादी आणि इद्दो
प्रदर्शक यांच्या इतिहासांत लिहिलेल्या नाहींत
कीं काय? आणि रहाबाम व यराबाम यांच्या
परस्पर लढाया नित्य असत· १६ आणि रहा-
बाम आपल्या पूर्वजांसंगतीं निजला आणि दावी-
दाच्या नगरांत पुरिला गेला, आणि त्याच्या ठि-
काणीं त्याचा पुत्र अबीया याने राज्य केलें·

## अध्याय १३·

यराबाम राजाच्या अठराव्या वर्षी अबीया
यहूदावर राज्य करूं लागला· २ त्याने
यरूशालेमेंत तीन वर्षें राज्य केलें, आणि त्याच्या
आईचें नाव मीखाया होतें; ती गिबांतल्या ऊ-
रीएलाची कन्या होती, आणि अबीया व यराबाम
यांची परस्पर लढाई होती· ३ तेव्हां अबीयाने
चार लक्ष शूर रणवीर एवढें सैन्य घेऊन लढाई
सिद्ध केली, आणि त्यांसीं यराबामाने आठ लक्ष
शूर बलवान वीरांनी लढाई सिद्ध केली. ४ आणि
अबीया एफ्राइम पर्वतांतल्या जमाराइम पर्वतावर
उभा राहून ह्मणाला, "अहो यराबाम आणि सर्व
इस्राएलीहो, माझें ऐका· ५ इस्राएलाचा देव पर-

मेश्वर याने दावीदाला व त्याच्या संतानाला इस्रा-
एलाचें राज्य मिठाच्या करारानें सर्वकालपर्यंत दिल्हें,
असें तुह्मी जाणावें कीं नाहीं ! ६ तथापि दावी-
दाचा पुत्र शलमोन याचा चाकर नबाटाचा पुत्र
यराबाम याने उठून आपल्या प्रभूवर फितूर केला
आहे. ७ आणि त्याजवळ हलके व दुष्ट मनुष्य
जमून जेव्हां शलमोनाचा पुत्र रहाबाम तरुण
व मनाचा कोंवळा होता, आणि त्याच्याने त्यांचा
प्रतिरोध करवेना, तेव्हां ते रहाबामावर बलवान झा-
ले. ८ आणि आतां दावीदाच्या संतानांच्या हातीं
जें परमेश्वराचें राज्य त्याचा प्रतिरोध कराया-
ला तुमच्या मनांत आहे, आणि तुह्मी मोठा स-
मुदाय आहां, आणि जीं सोन्याचीं वांसरें यराबा-
मानें तुमचे देव असीं केलीं तीं तुह्माजवळ आहेत.
९ परमेश्वराचे याजक जे आहरोनाचें सं-
तान त्यांस आणि लेव्यांस तुह्मी बाहेर लाविलें
आणि देशांतल्या लोकांसारिखें आपल्यासाठीं या-
जक केले आहेत कीं नाहीं ? जो कोणी गोहरा व
सात मेष घेऊन आपला कार्यसंस्कार करून घ्या-
यास येईल तो जे देव नव्हत त्यांचा याजक होईल.
१० परंतु आमचा देव परमेश्वर आहे ; त्याला
आह्मी सोडिलें नाहीं, आणि जे याजक परमेश्व-
राची सेवा करितात, ते आहरोनाचे संतान आहेत
आणि लेवी स्वकर्मांत असतात. ११ आणि ते
प्रत्येक दिवसीं सकाळीं व सायंकाळीं परमेश्वरा-
जवळ होम व सुवासिक धूप जाळितात, आणि
स्वच्छ मेजावर दर्शनीय अपूप ठेवितात, आणि
प्रत्येक दिवसीं सायंकाळीं सोन्याचें दीपझाड व
त्याचीं चाडीं जाळायाला नीट ठेवितात, कां कीं
आह्मी आपला देव परमेश्वर याचीं पाळनीय
पाळीत आहों ; परंतु तुह्मी त्याला सोडिलें आहे.
१२ आणि पाहा, आह्मासंगतीं देव सेनापति असा
आहे, आणि तुह्मावर प्रणाद करायाला याजक
करणे धरून आहेत ; अहो इस्राएलाच्या संता-
नानो, तुह्मी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर
यासीं लढूं नका, कां कीं तुमचें चालणार नाहीं."
१३ आणि यराबामाने त्यांच्या पाठीमागून दबे
धरणाऱ्यानी फेरा घेऊन यावें असें केलें ; मग ते
यहूदापुढें असतांना दबे धरणारे त्यांच्या मागें होते.
१४ तेव्हां यहूदाने मागें पाहिलें, आणि पाहा आप-
ल्यापुढें व मागेंहि लढाई होती, मग त्यानी परमे-
श्वराला आरोळी केली आणि याजकानी करणे
वाजविले. १५ आणि यहूदाच्या मनुष्यानी प्रणाद
केला, आणि यहूदाच्या मनुष्यानी प्रणाद केल्या-
वर असें झालें कीं देवाने यराबाम व सर्व इस्राएल
यांस अबीया व यहूदा यांपुढें पिटिलें. १६ आणि
इस्राएलाचीं संतानें यहूदापुढें पळालीं, आणि दे-
वाने तीं त्याच्या हातीं दिल्हीं. १७ तेव्हां अबी-
याने व त्याच्या लोकानी त्यांला मोठ्या हननानें
हाणिलें आणि इस्राएलांतले पांच लक्ष शूर मनुष्य
मारलेले पडले. १८ त्या वेळेस तर इस्राएला-
चीं संतानें पराजित झालीं, आणि यहूदाच्या सं-
तानानी आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर यावर
भरंवसा ठेविला ह्मणून ते प्रबल झाले. १९
आणि अबीयाने यराबामाच्या पाठीस लागून त्या-
जवळून बेथएल व तिचे गांव आणि यशाना व
तिचे गांव आणि एफ्राइम व तिचे गांव हीं नगरें
घेतलीं. २० आणि अबीयाच्या दिवसांत यरा-
बामाने अणखी बल धरिलें नाहीं, आणि परमे-
श्वराने त्याला मारिला तेव्हां तो मेला. २१
आणि अबीया बलवान होत चालला, आणि त्या-
ने चौदा बायका करून घेऊन बाविसां पुत्रांला
व सोळा कन्यांला जन्म दिल्हा. २२ आणि
अबीयाच्या वर्कड गोष्टी व त्याचीं कृत्यें व वचनें
इद्दो भविष्यवाद्याच्या पुस्तकांत लिहिलेलीं आहेत.

## अध्याय १४.

अबीया तर आपल्या पूर्वजांसंगतीं निजला आ-
णि त्यानी त्याला दावीदाच्या नगरांत पुरिलें,
आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र आसा यानें
राज्य केलें ; त्याच्या दिवसांत देश दाहा वर्षें
स्वस्थ राहिला. २ आणि आसा आपला देव
परमेश्वर याला जें बरें आणि नीट वाटतें तें
करी. ३ त्याने अन्य देवांच्या वेद्या व उंच स्थानें
काढून दिल्हीं, आणि मूर्त्ति फोडल्या आणि वनें
तोडून टाकिलीं. ४ आणि यहूदाने आपल्या पूर्वजां-
चा देव परमेश्वर याला शोधावें आणि धर्मविधि
व नियोग आचरावें ह्मणून त्याला आज्ञा केली. ५
आणि त्याने यहूदाच्या सर्व नगरांतून उंच स्थानें
व मूर्त्ति हीं दूर केलीं, आणि त्याजपुढें राज्य स्वस्थ

राहिलें. ६ आणि त्याने यहूदांत दुर्गपुरें बांधिलीं,
कां कीं देश स्वस्थ होता आणि त्या वर्षांत त्यासीं
कांहीं लढाई नव्हती, कारण कीं परमेश्वराने
त्याला स्वास्थ्य दिल्हें होतें. ७ तेव्हां त्याने यहू-
दाला ह्मटलें, "आपल्यापुढें देश आहे, तों आपण
हीं नगरें बांधूं आणि यांभोंवतीं कोट व दुर्ग, कवा-
टें व अडसर करूं, कां तर आपण आपला देव
परमेश्वर याला शोधिलें आहे, त्याला आपण
शोधिले आणि त्याने आह्मास चहुंकडें स्वास्थ्य
दिल्हें आहे." मग त्यानीं बांधिलें आणि काम सि-
द्धीस नेलें. ८ आणि यहूदांत आसाजवळ तीन
लक्ष ढाला व भाले धरणारे आणि बिन्यामीनांत
दोन लक्ष ऐशीं हजार ढाल धरणारे व धनुर्धर
एवढें सैन्य होतें; हे अवघे बलवान वीर होते.
९ आणि त्यांजवर जेरह कूशी दाहा लक्ष एवढें
सैन्य व तीनशें रथ घेऊन निघून मारेशापर्यंत
आला. १० तेव्हां आसा त्याजवर निघाला, आ-
णि मारेशाजवळच्या जफाथाच्या खोऱ्यांत त्यानी
लढाई सिद्ध केली. ११ आणि आसा आपला
देव परमेश्वर याला हाक मारीत ह्मणाला, "हे
परमेश्वरा, बहुतांसीं किंवा दुबळांसीं सहाय
करणें तुजपुढें कांहीं नाहीं; हे परमेश्वरा आम-
च्या देवा, आमचें सहाय कर, कां कीं आह्मी
तुजवर भरंवसा ठेविला आहे, आणि तुझ्या नामाने
या समुदायावर जातों; हे परमेश्वरा, आमचा
देव तूंच आहेस, तुजवर मनुष्याने प्रबल होऊं
नये."
१२ मग परमेश्वराने कूशांस आसापुढें व
यहूदापुढें पिटिलें आणि कूशी पळाले. १३
तेव्हां आसा व आपल्यासंगतीं जे लोक ते गरारे-
पर्यंत त्यांच्या पाठीस लागले, आणि कूशी पुन्हां
लढाई न करी असे पडले, कां कीं ते परमेश्वरा-
पुढें व त्याच्या सेनेपुढें मोडले गेले, आणि त्यानी
अत्यंत बहुत लूट नेली. १४ आणि गरारेच्या
चहुंकडचीं सर्व नगरें हाणिलीं, कां कीं त्यांला
परमेश्वराचें भय लागलें आणि त्यानी तीं सर्व
नगरें लुटलीं, कां तर त्यांमध्यें पुष्कळ लूट होती.
१५ आणि त्यानी गुरांच्या डेऱ्यांस हाणिलें आणि
बहुत मेंढरें व उंटें घेऊन ते यरूशालेमेस परत
आले.

## अध्याय १५.

आणि ओदेदाचा पुत्र अजार्या याच्या ठायीं
देवाचा आत्मा आला. २ मग तो आ-
साच्या भेटीस निघाला आणि त्यांस ह्मणाला,
"अहो आसा आणि सर्व यहूदा व बिन्यामीन,
तुह्मी माझें ऐका; तुह्मी परमेश्वरासीं आहां तों-
पर्यंत तो तुह्मासीं आहे, आणि जर तुह्मी त्यांस
शोधाल तर तो तुह्मास पावेल, परंतु जर तुह्मी
त्याला सोडिलें तर तो तुह्मास सोडील. ३
आणि फार दिवस इस्राएलाला सत्य देव व शि-
कविणारा याजक व धर्मविधी नव्हता. ४ परंतु
त्यानी आपल्या संकटांत इस्राएलाचा देव परमे-
श्वर याकडे फिरून त्याला शोधिलें तेव्हां तो
त्यांला पावला. ५ आणि त्या समयांत बाहेर
जाणाऱ्याला व आंत येणाऱ्याला कांहीं समाधान
नसे, परंतु देशांच्या सर्व लोकांस फार त्रास लागत
असत. ६ आणि जाति जातीकडून आणि नगर
नगराकडून अवमर्दित केलें जाई, कां कीं देव त्यां-
ला सर्व कष्टाने व्याहत करी. ७ तुह्मी तर दृढ
असा, तुमचे हात गळूं नयेत, कां कीं तुमच्या
कर्माचें फल होईल."
८ जेव्हां आसाने ओदेद भविष्यवादी याच्या
भविष्यवादाचीं वचनें ऐकिलीं तेव्हां त्याने धैर्य
धरून सर्व यहूदा व बिन्यामीन देशांतून आणि
एफ्राइम पर्वतांतलीं जीं नगरें त्याने घेतलीं होतीं,
त्यांतून अघोर मूर्त्ति दूर केल्या आणि परमेश्व-
राची जी वेदी परमेश्वराच्या मंडपापुढें होती
ती नवी केली. ९ आणि त्याने सर्व यहूदा व
बिन्यामीन व त्यांसंगतीं एफ्राइम व मनाश्शे व
शिमोन यांतले विदेशी यांस जमविले; कां कीं
त्याचा देव परमेश्वर त्यासीं आहे. असें पाहून
ते इस्राएलांतून त्याकडे फार फितले. १० ते
तर आसाच्या राज्याच्या पंधराव्या वर्षी तिसऱ्या
महिन्यात यरूशालेमेस जमले. ११ त्या वेळेस
जी लूट त्यानी आणिली होती तींतून त्यानी पर-
मेश्वराला सातशें गुरें व सात हजार मेंढरें इत-
क्यांचा यज्ञ केला. १२ आणि आपल्या पूर्वजांचा
देव परमेश्वर याला सर्व मनाने व सर्व बुद्धीने
शोधावें, असा करार त्यानी केला; १३ ह्मणजे जो

कोणी, लाहान किंवा मोठा, पुरुष किंवा स्त्री, इस्रा-
एलाचा देव **परमेश्वर** याला शोधणार नाहीं,
तो मरावा. १४ आणि त्यानीं मोठा शब्द व
प्रणाद करून आणि करणे व रणशिंगें वाजवून
**परमेश्वरा**जवळ शपथ केली. १५ आणि त्या
शपथेमुळें सर्व यहूदाने हर्ष केला, का कीं त्यानीं
आपल्या सर्व मनापासून शपथ वाहिली आणि आ-
पल्या सर्व मनोरथानें त्याला शोधिलें, तेव्हां तो त्यां-
ला पावला आणि **परमेश्वराने** त्यांला चहुंकडून
स्वास्थ्य दिल्हें. १६ आणि आसा राजाची आई
माखा तीहि राणी नसावी ह्मणून त्याने दूर के-
ली, कारण कीं तिने वनामध्यें मूर्त्ति केली हो-
ती, आणि आसाने तिची मूर्त्ति तोडून कुटून
किद्रोन ओघळाजवळ जाळून टाकिली. १७
परंतु उंच स्थानें इस्राएलांतून काढलीं गेलीं नाहीं,
तथापि आसाचें मन त्याचा सर्व दिवस यथार्थ
होतें. १८ आणि त्याने आपल्या बापाचीं व
आपलीं पवित्र वस्तु, रुपें व सोनें व भांडीं **परमे-
श्वराच्या** मंदिरांत आणिलीं. १९ आणि
आसाच्या पस्तिसाव्या वर्षापर्यंत अणखी लढाई
नव्हती.

## अध्याय १६.

आसाच्या राज्याच्या छत्तिसाव्या वर्षी इस्रा-
एलाचा राजा बाशा यहूदावर चढून आला,
आणि यहूदाचा राजा आसा याकडे कोणाचें
जाणें येणें होऊं न द्यावें ह्मणून त्याने रामा बांधि-
लीं. २ तेव्हां आसाने **परमेश्वराच्या** मंदिरा-
च्या व राजाच्या घरच्या भांडारांतून रुपें व सोनें
काढिलें, आणि अरामाचा राजा बेनहदाद जो
दम्मेसेकेस राहत होता त्याकडे पाठवून सांगितलें
कीं, ३ "माझा आणि तुझा, माझ्या बापाचा
आणि तुझ्या बापाचा परस्पर करार आहे; पाहा,
म्या तुझ्याजवळ रुपें व सोनें पाठविलें आहे; या,
इस्राएलाचा राजा बाशा त्यासीं जो तुझा करार
आहे तो मोड, याने मजपासून उठून जावें ह्मणून."
४ तेव्हां बेनहदादाने आसा राजाचें ऐकिलें, आणि
आपले सेनापति इस्राएलाच्या नगरांवर पाठवून
इय्योन व दान व आबेलमाइम व नाफ्तालीचीं
सर्व भांडारांचीं नगरें हाणिलीं. ५ आणि असें
झालें कीं हें बाशाने ऐकिलें असतां त्याने रामाचें
बांधणें सोडिलें आणि आपलें काम असूं दिल्हें.
६ मग आसा राजाने सर्व यहूदा घेऊन रामाचे
दगड व तिचीं लांकडें ज्यानीं बाशा बांधीत होता
तीं काढून ठेविलीं आणि त्याने त्यांकडून गेबा व
मिज्पा बांधिलीं.

७ त्या वेळेस हनानी मदर्शक यहूदाचा राजा
आसा याजवळ येऊन ह्मणाला, "त्वां अरामाच्या
राजावर भरंवसा ठेविला, आपला देव **परमेश्वर**
यावर भरंवसा ठेविला नाहीं, ह्मणून अरामाच्या
राजाचें सैन्य तुझ्या हातांतून सुटलें आहे. ८
अत्यंत बहुत रथ व घोडेस्वार यांसुद्धां कूशी व
लूबी फार मोठें सैन्य होतें कीं नाहीं? तथापि त्वां
**परमेश्वरा**वर भरंवसा ठेविला ह्मणून त्याने ते
तुझ्या हातीं दिल्हे. ९ कां कीं **परमेश्वराचे**
डोळे सर्व पृथ्वींतून धांवत फिरतात; ज्याचें हृदय
त्याकडे वास्तविक आहे त्याचें पाठबळ करावें ह्म-
णून; यांत तूं मूर्खपण केलें आहे, यामुळें आतां-
पासून तुजसीं लढाया असत जातील."

१० तेव्हां आसाने मदर्शकावर रागें भरून
त्याला बंदिशाळेंत घातलें, का कीं या गोष्टीमुळें
तो त्याजवर रुष्ट झाला, आणि त्याच वेळेस आ-
साने कित्येक लोक पीडले. ११ आणि पाहा,
आसाच्या गोष्टी आद्य अंत्य, पाहा त्या यहूदा-
च्या व इस्राएलाच्या राजांच्या पुस्तकांत लिहिल्या
आहेत. १२ आणि आसा आपल्या राज्याच्या
एकुणचाळिसाव्या वर्षी आपलें दुखणें फार मोठें
होईपर्यंत पायांचा रोगी होता, तथापि त्याने आप-
ल्या दुखण्यांत **परमेश्वराला** नाहीं, केवळ वैद्यांस
शोधिलें. १३ आणि आसा आपल्या राज्याच्या
एकेचाळिसाव्या वर्षी मरून आपल्या पूर्वजांसंगतीं
निजला. १४ आणि जी गादी सुवासिक द्रव्य
व गंध्याच्या कामाने सिद्ध केलेल्या अनेक प्रकार-
च्या सुगंधींनी भरली होती, तिजवर त्यानीं त्याला
ठेवून जी कबर त्याने दावीदाच्या नगरांत खोदून
केली होती तींत पुरिलें, आणि त्याजकरितां फार
मोठें जाळणें केलें.

## अध्याय १७.

आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र यहोशा-
फाट याने राज्य केलें, आणि त्याने आप-

त्याला इस्राएलावर दृढ केलें. २ आणि यहू-
दाच्या सर्व दुर्गपुरांत बलें ठेविलीं, आणि यहूदा
देशांत व एफ्राइमाचीं जीं नगरें त्याचा बाप
आसा याने घेतलीं होतीं त्यांत ठाणीं ठेविलीं.
३ आणि परमेश्वर यहोशाफाटासीं होता,
कां कीं तो आपला पूर्वज दावीद याच्या प-
हिल्या मार्गांनी चालला, त्याने बालांस शोधिलें
नाहीं. ४ त्याने केवळ आपल्या बापाच्या देवा-
ला शोधिलें आणि त्याच्या आज्ञांप्रमाणें तो चा-
लला, इस्राएलाच्या कर्मांप्रमाणें नाहीं. ५ ह्मणून
परमेश्वराने त्याचें राज्य त्याच्या हातीं स्थापिलें,
आणि सर्व यहूदाने यहोशाफाटाला अर्पणें आ-
णिलीं, आणि त्याला पुष्कळ धन व गौरव प्राप्त
झालें. ६ आणि त्याचें हृदय परमेश्वराच्या
मार्गांत उन्नत झालें, अणखी त्याने यहूदांतून उंच
स्थानें व वनें काढून दिल्हीं.

७ आणि त्याने आपल्या राज्याच्या तिसऱ्या
वर्षी आपल्या अधिकाऱ्यांजवळ बेन्हाइल व ओ-
बाद्या व जखार्या व नथानेल व मीखाया यां-
जवळ यहूदाच्या नगरांत शिकवावें ह्मणून निरोप
पाठविला. ८ आणि त्यांसंगतीं लेवी शमाया व
नथान्या व जबाद्या व असाहेल व शमीरामोथ
व यहोनाथान व अदोनीया व टोबीया व टोबा-
दोनीया, हे लेवी आणि यांसंगतीं एलीशामा व
यहोराम याजक पाठविले. ९ ते तर यहूदांत
शिकविते झाले, आणि त्यांजवळ परमेश्वराच्या
धर्मविधीचें पुस्तक असतांना ते यहूदाच्या सर्व
नगरांतून फिरत फिरत लोकांस शिकवीत गेले.
१० आणि यहूदाच्या चहुंकडील देशांच्या सर्व
राज्यांला परमेश्वराचें भय लागलें ह्मणून तीं
यहोशाफाटासीं लढलीं नाहींत. ११ आणि फ-
लिष्ट्यांतले कित्येक यहोशाफाटाजवळ अर्पणें व
कराचें रुपें आणीत असत, आणि अरब लोक त्या-
जवळ सात हजार सातशें एडके व सात हजार
सातशें बोकड, असे कळप आणीत असत. १२
आणि यहोशाफाट फार मोठा होत चालला,
आणि त्याने यहूदांत किल्ले व भांडारांचीं नगरें
बांधिलीं. १३ आणि त्याला यहूदाच्या नगरांत
बहुत कामें होतीं, आणि योद्धे बलवान वीर यरू-
शालेमेंत असत. १४ आणि त्यांची संख्या
त्यांच्या पूर्वजांच्या कुलाप्रमाणें हीच आहे, यहू-
दाचे सहस्रपति अद्ना मुख्य आणि त्यासहित
तीन लक्ष बलवान वीर. १५ आणि त्यानंतर
यहोहानान नायक होता, आणि त्यासहित दोन
लक्ष ऐशीं हजार. १६ आणि त्यानंतर जो
परमेश्वराकडे स्वयंदत्त झाला तो जिख्रीचा
पुत्र अमास्या होता, आणि त्यासहित दोन लक्ष
बलवान वीर. १७ आणि बन्यामीनांतून एल्यादा
बलवान वीर, आणि त्यासहित धनुर्ढालसज्जित
दोन लक्ष. १८ आणि त्यानंतर यहोजाबाद
होता, आणि त्यासहित एक लक्ष ऐशीं हजार
लढाईस सिद्ध होते. १९ हे राजाची सेवा
करीत, जे राजाने सर्व यहूदांतल्या दुर्गपुरांत ठेवि-
ले त्यांशिवाय.

## अध्याय १८.

यहोशाफाटाला तर पुष्कळ धन व गौरव होतें,
आणि त्याने आहाबासीं सोयरीक केली. २
आणि कित्येक वर्षे झाल्यावर तो खालीं शोमरो-
नेस आहाबाजवळ गेला, तेव्हां त्यासाठीं आणि
त्याच्या संगतीच्या लोकांसाठीं आहाबाने पुष्कळ
मेंढरें व गुरें कापिलीं, आणि रामोथ गिलादेस
चढून यावें ह्मणून त्याला मनावलें. ३ आणि
इस्राएलाचा राजा आहाब यहूदाचा राजा यहो-
शाफाट याला बोलला, "तूं मजसंगतीं रामोथ
गिलादेस येसील काय?" तेव्हां त्याने त्याला
उत्तर केलें, "जसा तूं तसा मी, जसे तुझे लोक
तसे माझे लोक; तर तुजसंगतीं लढाईस जाऊं."

४ आणि यहोशाफाटाने इस्राएलाच्या राजा-
ला ह्मटलें, "कृपा करून आज परमेश्वराच्या
वचनाला विचार कर." ५ तेव्हां इस्राएलाच्या
राजाने भविष्यवादी चारशें मनुष्य जमवून त्यांस
ह्मटलें, "आह्मी रामोथ गिलादेवर लढाईस
जाऊं किंवा राहूं?" आणि ते ह्मणाले, "चढून जा,
ह्मणजे देव ती राजाच्या हातीं देईल." ६ मग
यहोशाफाटाने ह्मटलें, एथें परमेश्वराचा अणखी
भविष्यवादी ज्याजवळ आह्मी विचारावें, असा
कोणी एथें नाहीं काय?" ७ तेव्हां इस्राएलाच्या
राजाने यहोशाफाटाला ह्मटलें, "अणखी एक मनु-
ष्य आहे, इम्लाचा पुत्र मीखाया त्याकडून आपण

परमेश्वराला विचारावें, परंतु तो मला आवडत
नाहीं, कां कीं तो मजविषयीं चांगलें तर नाहीं;
सर्वदां केवळ वाईट भविष्य सांगतो." यहोशा-
फाट ह्मणाला, "राजाने असें ह्मणूं नये." ८
मग इस्राएलाच्या राजाने एका षंढाला बोलावून
ह्मटलें, "इम्लाचा पुत्र मीखाया लवकर घेऊन ये."
९ तेव्हां इस्राएलाचा राजा आणि यहू-
दाचा राजा यहोशाफाट पोशाक घालून एकएक
आपापल्या सिंहासनावर बसून शोमरोनेच्या दर्वा-
ज्याच्यासमोर चौकांत बसले होते, आणि त्यां-
पुढें सर्व भविष्यवादी भविष्य सांगत होते. १०
आणि कनानाचा पुत्र सिद्कीया लोखंडाचीं शृंगें
करून ह्मणाला, "परमेश्वर ह्मणतो कीं, यांकडून
तूं अराम्याला संपवीसपर्यंत हुंदडून देसील." ११
आणि ते सर्व भविष्यवादी तसेंच भविष्य सांगत
होते कीं, "रामोथ गिलादेस चढून जा, आणि
कार्य सिद्धीस ने, कां तर परमेश्वर ती राजाच्या
हातीं देईल." १२ आणि जो दूत मीखाया-
ला बोलावायास गेला तो त्यासीं बोलला कीं,
"पाहा, भविष्यवाद्यांचीं वचनें एका मुखचीं अ-
सीं राजाजवळ चांगलीं आहेत; तुझें वचन तर
त्यांतल्या एकाच्या सारिखें असावें बरें आणि चां-
गलें बोल." १३ तेव्हां मीखाया ह्मणाला,
"सजीव परमेश्वर आहे जें माझा देव ह्मणेल
तेंच मी बोलेन." १४ मग तो राजाजवळ आ-
ला, तेव्हां राजाने त्याला ह्मटलें, "मीखायारे,
आह्मी रामोथ गिलादेवर लढाईस जाऊं किंवा
जायाचें सोडूं?" त्याने त्याला उत्तर केलें, "तुह्मी
चढून जा आणि कार्य सिद्धीस न्या, ह्मणजे ते
तुमच्या हातीं दिल्हे जातील." १५ त्यावर राजाने
त्याला ह्मटलें, "त्वां परमेश्वराच्या नामाने स-
त्यावांचून मला कांहीं न सांगावें, असी शपथ मी
कितीदां तुला घालूं?" १६ तेव्हां तो ह्मणाला,
"ज्याला पालक नाहीं अशा मेंढरांसारिखे म्या सर्व
इस्राएल लोक पर्वतांवर उधळलेले पाहिले, आणि
परमेश्वराने ह्मटलें, "त्यांस धनी नाहीं, त्यांनी
एकएक आपापल्या घरीं सुखरूप जावें." १७ मग
इस्राएलाच्या राजाने यहोशाफाटाला ह्मटलें, "तो
मजविषयीं चांगलें नाहीं, वाईटच भविष्य सांगेल,
असें म्या तुला ह्मटलें कीं नाहीं?" १८ त्या-
नंतर तो ह्मणाला, "याकरितां परमेश्वराचें वचन
ऐका; म्या परमेश्वर त्याच्या सिंहासनावर बस-
लेला आणि त्याच्या उजव्याकडे व त्याच्या डाव्या-
कडे आकाशचें सर्व सैन्य उभें राहिलेलें पाहिलें.
१९ आणि परमेश्वराने ह्मटलें, "इस्राएलाचा
राजा आहाब याने वरतीं रामोथ गिलादेस जा-
ऊन पडावें ह्मणून त्याला कोण मनावील?" तेव्हां
एकाने असें उत्तर दिल्हें आणि दुसऱ्याने तसें
उत्तर दिल्हें. २० आणि एक आत्मा निघून
परमेश्वरापुढें उभा राहून ह्मणाला, "मी त्याला
मनावीन." तेव्हां परमेश्वराने त्याला ह्मटलें,
"कशाने?" २१ तेव्हां तो ह्मणाला, "मी बाहेर
जाऊन त्याच्या सर्व भविष्यवाद्यांच्या मुखांत खोटा
आत्मा होईन." मग त्याने ह्मटलें, "तूं मनावसील
आणि तुझें चालेल; बाहेर जाऊन तसें कर." २२
आतां तर पाहा, परमेश्वराने तुझ्या या भवि-
ष्यवाद्यांच्या मुखांत खोटा आत्मा घातला आहे,
आणि परमेश्वर तुजविषयीं वाईट बोलला
आहे." २३ मग कनानाचा पुत्र सिद्कीया
जवळ जाऊन मीखायाच्या गालावर चपराक मा-
रून ह्मणाला, "तुजसीं बोलायाला परमेश्वराचा
आत्मा मजवळून कोणीकडून गेला?" २४ त्यावर
मीखाया ह्मणाला, "पाहा, ज्या दिवसीं तूं खोलीं-
तून खोलींत लपायाला जासील तेव्हां पाहसील."
२५ तेव्हां इस्राएलाचा राजा ह्मणाला, "तुह्मी
मीखायाला घेऊन नगराचा अधिकारी आमोन व
राजाचा पुत्र योवाश यांकडे परत न्या. २६ आणि
सांगा, राजा ह्मणतो कीं, याला बंदिशाळेंत ठेवा,
आणि मी सकुशल परत येईं तोंपर्यंत याला पीडे-
चें अन्न व पीडेचें पाणी खायाला व प्यायाला
द्या." २७ तेव्हां मीखाया ह्मणाला, "जर तूं
सकुशल परत येसीलच येसील तर परमेश्वर
मजकडून बोलला नाहीं." अणखी तो ह्मणाला,
"अहो लोकानो, तुह्मी अवघे ऐका."

२८ मग इस्राएलाचा राजा व यहूदाचा राजा
यहोशाफाट वरतीं रामोथ गिलादेस गेले. २९
तेव्हां इस्राएलाच्या राजाने यहोशाफाटाला ह्म-
टलें, "मी आपला वेष पालटून लढाईंत जातों,
परंतु तूं आपला पोशाक घाल." मग इस्राएलाच्या
राजाने आपला वेष पालटला आणि ते लढाईंत

गेले. ३० आणि अरामाच्या राजाने आपल्या
रथांच्या नायकांस असी आज्ञा केली कीं, "तुह्मी
लाहानासीं किंवा मोठ्यासीं लढूं नका, केवळ इस्रा-
एलाच्या राजासीं मात्र लढा." ३१ आणि असें
झालें कीं रथांच्या नायकानी यहोशाफाटाला पाहि-
लें, तेव्हां ते ह्मणाले, "तोच इस्राएलाचा राजा."
आणि त्यानी त्यासीं लढायाला त्याला घेरलें,
तेव्हां यहोशाफाटाने आरोळी केली आणि परमे-
श्वराने त्याचें सहाय केलें, आणि त्याजवळून
जावें ह्मणून देवाने त्यांस प्रेरिलें. ३२ आणि
असें झालें कीं तो इस्राएलाचा राजा नाहीं, असें
जेव्हां रथांच्या नायकानी पाहिलें तेव्हां ते त्याच्या
मागून परत गेले. ३३ आणि कोणीएकाने सहज
धनुष्य ओढून इस्राएलाच्या राजाला कवचाच्या
संधींमध्यें हाणिलें; मग त्याने आपल्या सारथ्याला
ह्मटलें, "तूं आपला हात फिरवून मला सैन्यांतून
ने, कां कीं मी दुखण्यास पडलों आहें." ३४ आणि
त्या दिवसीं लढाई वाढत चालली, आणि इस्रा-
एलाचा राजा सांजपर्यंत अराम्यांपुढें रथांत धिरे
दिल्हेला राहून सूर्य मावळण्याच्या वेळेस मेला.

## अध्याय १९.

आणि यहूदाचा राजा यहोशाफाट यरूशाले-
मेस आपल्या घरीं सुखरूप परत आला.
२ तेव्हां हनानीचा पुत्र येहू मदर्शक याने यहो-
शाफाट राजाच्या भेटीस निघून त्याला ह्मटलें,
"त्वां दुष्टाचें सहाय करावें, आणि परमेश्वरा-
च्या द्वेषकांवर प्रीति करावी काय? यामुळें तुज-
वर परमेश्वराचा कोप आहे. ३ परंतु तुझ्या
ठायीं उत्तम गुण सांपडले आहेत, कां कीं त्वां
देशांतून वनें दूर केलीं आहेत आणि देवाविषयीं
शोध करायाला आपलें मन लाविलें आहे." ४
आणि यहोशाफाटाने यरूशालेमेस वस्ती केली,
आणि त्याने पुन्हा निघून लोकांमध्यें बेरशेबापासून
एफ्राइम पर्वतापर्यंत फिरून त्यांस त्यांच्या पूर्व-
जांचा देव परमेश्वर याकडे परत आणिलें.
५ आणि त्याने देशांत यहूदाच्या सर्व दुर्ग-
पुरांत नगरोनगर न्यायाधीश ठेविले. ६ आणि
त्याने न्यायाधीशांस ह्मटलें, "तुह्मी काय करितां
विचार करून पाहा, कां कीं मनुष्यासाठीं नाहीं
परमेश्वरासाठीं तर तुह्मी न्याय करितां, आणि
न्याय ठरविण्यांत तो तुह्मासीं आहे. ७ तर
आतां तुमच्याठायीं परमेश्वराचें भय असावें;
जपून कार्य करा, कां कीं आपला देव परमेश्वर
याजवळ अन्याय अथवा पक्षपात अथवा लांच
घेणें नाहीं." ८ आणि ते माघारे यरूशालेमेस
आले तेव्हां यहोशाफाटाने यरूशालेमेंतहि लेवी
व याजक यांतले आणि इस्राएलाच्या मुख्य वडि-
लांतले कित्येक परमेश्वरन्यायासाठीं आणि वि-
वादासाठीं ठेविले. ९ आणि त्याने त्यांस आज्ञा
करून ह्मटलें, "तुह्मी परमेश्वराचें भय धरून
विश्वासूपणें व वास्तविक मनाने असें करा. १०
आणि जे तुमचे भाऊ आपल्या नगरांत राहतात
त्यांजवळून रक्त व रक्त, धर्मविधी व आज्ञा, नि-
यम व न्याय यांचा कोणाचाहि परस्पर विवाद
तुह्माजवळ आला, ह्मणजे तुह्मी परमेश्वराचा
अपराध करूं नका; केला तर तुह्मावर व तुमच्या
भावांवर कोप होईल, असा संबोध त्यांस करा;
असें करा ह्मणजे तुह्मी दोषी होणार नाहीं. ११
आणि पाहा परमेश्वराच्या सर्व गोष्टींविषयीं
अमार्या मुख्य याजक, आणि राजाच्या सर्व गोष्टीं-
विषयीं यहूदाच्या घराण्याचा अधिकारी इश्माए-
लाचा पुत्र जबाद्या तुह्मावर आहे, आणि तुह्मा-
पुढें लेवी कारभारी आहेत; धीर धरून कार्य
करा, आणि परमेश्वर सुकृत्यासीं असत जाईल."

## अध्याय २०.

त्यानंतर असें झालें कीं मोवाबाचीं संतानें व
आम्मोनाचीं संतानें आणि त्यांसंगतीं आम्मो-
न्यांशिवाय दुसरेहि यहोशाफाटावर लढाईस आ-
ले. २ तेव्हां कित्येकानी येऊन यहोशाफाटाला
सांगितलें कीं, "तुजवर मोठा समुदाय समुद्राच्या
पलिकडून अरामाच्या अलिकडून आला आहे,
आणि पाहा ते हाजजोनतामर ह्मी एनगेदी आहे
तेथें आहेत." ३ मग यहोशाफाटाने भिऊन पर-
मेश्वराला शोधायाला आपलें चित्त लाविलें,
आणि त्याने सर्व यहूदांत उपासाची घोषणा कर-
विली. ४ तेव्हां परमेश्वराचें सहाय मागा-
यास यहूदाचे लोक जमले; यहूदाच्या सर्वांहि
नगरांतून ते परमेश्वराला शोधायाला आले.

५ आणि यहोशाफाट परमेश्वराच्या मंदिरांत
नव्या अंगणापुढें यहूदा व यरूशालेम यांच्या स-
मुदायांत उभा राहिला. ६ आणि त्यानें ह्मटलें,
"हे आमच्या पूर्वजांच्या देवा परमेश्वरा, तूंच
आकाशांतला देव नाहींस काय? आणि तूं रा-
ष्ट्रांच्या सर्व राज्यांवर अधिकार करीत नाहींस
काय? आणि तुजपुढें कोणाच्यानें उभें राहवत
नाहीं, असा पराक्रम व बल तुझ्या हातांत नाहीं
काय? ७ आमचा देव, ज्यानें आपल्या इस्राएल
लोकांपुढून या देशचे राहणारे लोक घालवून हा
आपल्या प्रिय अब्राहामाच्या संततीला सर्वकाल-
पर्यंत दिल्हा, असा तूं नाहींस काय? ८ मग
ते यांत राहिले आणि यांत तुला तुझ्या नामासाठीं
पवित्रस्थान बांधून ह्मणाले, ९ तरवार, शासन,
मरी, अथवा दुकाळ, असें अरिष्ट जर आह्मावर
आलें, तर जेव्हां आह्मी या मंदिरापुढें तुजसमोर
उभे राहूं (कां तर या मंदिरांत तुझें नाम आहे)
आणि आपल्या कष्टामुळें तुला आरोळी करूं
तेव्हां तूं ऐकून तारण कर. १० आणि आतां
पाहा, इस्राएल लोक मिसर देशांतून आले, तेव्हां
ज्यांजवर त्वां त्यांस जाऊं दिल्हें नाहीं, ज्यांज-
वळून त्यांनी वळून त्यांचा नाश केला नाहीं, ह्म-
णजे आम्मोन व मोवाब यांचे वंश आणि सेईर
पर्वतांतले लोक; ११ पाहा, जो तुझा देश त्वां
आह्माला वतनासाठीं दिल्हा त्यांतून आह्माला
घालवायास येऊन ते आह्मावर कसा प्रत्युपकार
करितात? १२ हे आमच्या देवा, तूं त्यांस शा-
सन करणार नाहींस काय? कां तर हा जो मोठा
समुदाय आह्मावर आला आहे त्यापुढें आमचें
कांहीं बल नाहीं, आणि काय करावें तें आह्माला
कळत नाहीं, परंतु आमचे डोळे तुजकडे आहेत."
१३ आणि सर्व यहूदाचे लोक आपलीं बाळें,
बायका, व लेंकरें यांसुद्धां परमेश्वरापुढें उभे
होते. १४ तेव्हां मत्तान्याचा पुत्र यईयेल या-
चा पुत्र बनाया याचा पुत्र जखार्या याचा पुत्र
याहजीएल आसाफाच्या संतानांतला लेवी याज-
वर समुदायांत परमेश्वराचा आत्मा आला.
१५ आणि तो ह्मणाला, "अहो सर्व यहूदा व
यरूशालेमकर व यहोशाफाट राजा; कान द्या,
तुह्माला परमेश्वर असें ह्मणतो, या मोठ्या
समुदायामुळें भिऊं नका, घाबरे होऊं नका, कां कीं
लढाई तुमची नाहीं, देवाची आहे. १६ उद्यां
तुह्मी खालीं त्यांवर जा; पाहा, ते झीझाचे चढ-
णीवरून चढून येत आहेत, आणि ओहळीच्या
शेवटास यरूएलाच्या रानापुढें ते तुह्माला सांपड-
तील. १७ या लढाईंत तुह्माला लढावें लागणार
नाहीं; अहो यहूदा व यरूशालेम, तुह्मी स्थिर
उभे राहा, आणि तुमचें तारण परमेश्वर कसें
करील हें पाहा; भिऊं नका, घाबरे होऊं नका,
उद्यां निघून त्यांवर जा, आणि परमेश्वर तुह्मा-
संगतीं होईल."
१८ मग यहोशाफाटानें तोंड भूमीकडे करून
डोकें लवविलें, आणि सर्व यहूदा व यरूशालेम-
कर परमेश्वराचें भजन करीत परमेश्वरापुढें
दंडवत पडले. १९ आणि कहाथ्यांच्या संतानां-
तले व कोऱ्हींच्या संतानांतले लेवी इस्राएलाचा
देव परमेश्वर याला मोठ्या उंच शब्दानें स्त-
वायास उभे राहिले. २० आणि ते पाहटेस
उठून बाहेर तकोवाच्या रानांत गेले, आणि ते
बाहेर जात असतां यहोशाफाट उभा राहून ह्म-
णाला, "अहो यहूदा व यरूशालेमकर हो ऐका;
तुह्मी आपला देव परमेश्वर यावर विश्वास ठे-
वा, ह्मणजे स्थापिलें जाल; त्याच्या भविष्यवाद्यां-
वर भरंवसा ठेवा, ह्मणजे कुशल व्हाल." २१
आणि त्यानें लोकांसीं विचार करून परमेश्व-
राकडे गाणारे नेमून ठेविले; त्यांनी सैन्यापुढें
बाहेर जातांना पवित्रतेच्या शोभेनें स्तवितां ह्मणावें,
"तुह्मी परमेश्वराला स्तवा, कां कीं त्याची दया
सनातन आहे."
२२ आणि ते गायन व स्तवन करूं लागले
तेव्हां जे आम्मोनी व मोवाबी व सेईर पर्वतांतले
लोक यहूदावर आले होते, त्यांवर परमेश्वरानें
दबे धरणारे ठेविले, मग ते हाणिले गेले. २३
तेव्हां आम्मोन व मोवाब यांचे वंश सेईर पर्व-
तांतले मनुष्यांवर त्यांचा नाश व क्षय करायाला
उभे राहिले, आणि त्यांनीं सेईराच्या मनुष्यांस
समाप्त केल्यावर ते एकमेकाचा नाश करीत गेले.
२४ आणि यहूदा रानाच्या पाहऱ्यांच्या दुर्गास
आला, तेव्हां त्यांनीं त्या समुदायाकडे अवलोकन
केलें, तों पाहा ते भूमीवर पडलेलीं मढीं असे

होते, आणि कोणी सुटला नव्हता. २५ आणि
त्यांची लूट हरायास यहोशाफाट व त्याचे लोक
आले तेव्हां त्यास त्यांमध्यें पुष्कळ संपत्ति व म-
ढ्यांवर मूल्यवान अलंकार सांपडले : ते नेववेनात
एवढे त्यांनी लुंगारून घेतले, आणि तीन दिवस
ते लूट हरून नेत होते, कां कीं ती बहुत होती.
२६ आणि चौथ्या दिवशीं ते बराखाच्या खोऱ्यांत
जमले, कां कीं तेथें त्यांनी परमेश्वराची स्तुति
केली, ह्मणून त्या स्थानाचें नांव आजपर्यंत बरा-
खाचें खोरें ठेविलेलें आहे. २७ मग यहूदाचे
व यरूशालेमेचे सर्व मनुष्य आणि त्यांच्यापुढें
यहोशाफाट, असे ते यरूशालेमेस हर्षानें माघारे
जायाला फिरले, कां कीं ते आपल्या वैऱ्यांवर हर्ष
करीत असें परमेश्वरानें केलें होतें. २८ ते
तर सिणा व चंग व करणे वाजवितांना यरूशाले-
मेस परमेश्वराच्या मंदिरास आले. २९
आणि परमेश्वर इस्राएलाच्या वैऱ्यांसीं लढला,
असें देशांच्या सर्व राज्यांनी ऐकिलें, तेव्हां त्यांस
देवाचें भय लागलें. ३० मग यहोशाफाटाचें
राज्य स्वस्थ राहिलें, कां कीं त्याला त्याच्या दे-
वानें चहुंकडून स्वास्थ्य दिल्हें.

३१ तसें यहोशाफाटानें यहूदावर राज्य केलें;
तो राज्य करूं लागला तेव्हां पस्तिसां वर्षांचा
होता, आणि यरूशालेमेंत पंचवीस वर्षें राज्य
करीत गेला, आणि त्याच्या आईचें नांव अजूबा
होतें, ती शिल्हीची कन्या होती. ३२ आणि तो
आपला बाप आसा याच्या मार्गानें चालला,
आणि परमेश्वराला जें नीट दिसतें तें करण्या-
पासून तो वळला नाहीं. ३३ तथापि उंच स्थानें
काढलीं गेलीं नाहीं, कां कीं अद्याप लोकांनी आ-
पलें मन आपल्या पूर्वजांच्या देवाला शोधायास
लाविलें नव्हतें. ३४ आणि यहोशाफाटाच्या
वर्कड गोष्टी आद्य अंत्य पाहा, त्या हनानीचा पुत्र
येहू बो इस्राएलाच्या राजांच्या पुस्तकांत विख्यात
आहे त्याच्या इतिहासांत लिहिलेल्या आहेत.
३५ त्यानंतर इस्राएलाचा राजा अहाज्या जो
दुराचार करी त्यासीं यहूदाचा राजा यहोशाफाट
यानें संकेत केला. ३६ तार्शीशास जायाचीं गल-
बतें करायाला त्यानें त्यासीं संकेत केला; एज्योन-
गेबेरास त्यांनी गलबतें केलीं. ३७ तेव्हां मा-
रेशांतला दोदाचा पुत्र एलीएजेर यहोशाफाटाला
भविष्य सांगत ह्मणाला, "त्वां अहाज्यासीं संकेत
केला आहे ह्मणून परमेश्वरानें तुझीं कामें मो-
डिलीं आहेत." गलबतें तर मोडलीं गेलीं आणि
त्यांच्यानें तार्शीशास जाववेना.

## अध्याय २१.

आणि यहोशाफाट आपल्या पूर्वजांसंगतीं नि-
जला आणि आपल्या पूर्वजांजवळ दावी-
दाच्या नगरांत पुरिला गेला, आणि त्याच्या ठि-
काणीं त्याचा पुत्र यहोराम यानें राज्य केलें. २
आणि त्याला भाऊ होते, यहोशाफाटाचे पुत्र अ-
जार्या व यहीएल व जखार्या व अजार्याहू व मी-
खाएल व शफाट्या, हे अवघे इस्राएलाचा राजा
यहोशाफाट याचे पुत्र होते. ३ आणि त्यास त्या-
च्या बापानें यहूदांतल्या दुर्गपुरांसुद्धां रुप्याचीं व
सोन्याचीं व महाधनाचीं मोठीं दानें दिल्हीं, परंतु
त्यानें यहोरामाला राज्य दिल्हें, कां तर तो ज्येष्ठ
पुत्र होता. ४ आणि यहोराम आपल्या बापाच्या
राज्यावर उभा झाला, तेव्हां त्यानें आपल्याला दृढ
करून आपल्या सर्व भावांला व इस्राएलाच्या
कित्येक अधिकाऱ्यांसहि तरवारीनें वधिलें. ५
यहोराम राज्य करूं लागला तेव्हां तो बत्तिसां
वर्षांचा होता, आणि त्यानें यरूशालेमेंत आठ वर्षें
राज्य केलें. ६ आणि तो इस्राएलाच्या राजांच्या
मार्गानें चालला ; जसें आहाबाचें कुल करी तसा,
कां कीं त्याची बायको आहाबाची कन्या होती,
आणि परमेश्वराला वाईट वाटतें तें तो करी.
७ तथापि जो करार परमेश्वरानें दावीदासीं के-
ला होता त्यामुळें आणि त्यानें त्याला व त्याच्या
संतानांला सर्वकाळ दिवा देण्याचें वचन दिल्हें
होतें ह्मणून तो दावीदाचें कुल नाहींसें करीना.

८ त्याच्या दिवसांत अदोम्यांनी यहूदाच्या
हाताखालून फितून आपल्यावर राजा केला. ९
तेव्हां यहोराम आपल्या सर्दारांसुद्धां आपले सर्व
रथ संगतीं घेऊन बाहेर गेला, आणि त्यानें रात्रीं
उठून जे अदोमी त्याला घेरीत होते त्यांस व
रथांच्या नायकांस हाणिलें. १० अदोमी तर
यहूदाच्या हाताखालून आजपर्यंत फितले आहेत ;
त्या वेळेस लिब्नाहि त्याच्या हाताखालून फि-

तली, कारण कीं त्याने आपल्या पूर्वजांचा देव
**परमेश्वर** याला सोडिलें होतें. ११ अणखी
त्याने यहूदाच्या पर्वतांवर उंच स्थानें केलीं, आणि
यरूशालेमकरांकडून व्यभिचार करविला आणि
असें करायास यहूदाला प्रेरिलें. १२ आणि
त्याकडे एक लिखित एलीया भविष्यवाद्याकडून
आलें कीं, "तुझा पूर्वज दावीद याचा देव **परमे-
श्वर** असें ह्मणतो, 'तूं आपला बाप यहोशाफाट
याच्या मार्गांनी आणि यहूदाचा राजा आसा या-
च्या मार्गांनी चालला नाहींस; १३ परंतु इस्रा-
एलाच्या राजांच्या मार्गाने चाललास, आणि यहू-
दा व यरूशालेमकर यांकडून आहाबाच्या कुळा-
च्या व्यभिचारासारिखा व्यभिचार त्वां करविला
आहे, आणि तुझ्या बापाच्या कुळचे जे तुझे
भाऊ तुजपेक्षां बरे होते त्यांस वधिलें. १४ पाहा,
**परमेश्वर** तुझ्या लोकांस व तुझ्या लेंकरांस व
तुझ्या बायकांस व तुझ्या सर्व संपत्तीला मोठ्या
आघाताने हाणणार आहे. १५ आणि तूं आपल्या
अंतड्यांच्या रोगाने मोठ्या दुखण्यांत पडसील;
असें कीं त्या रोगाने तुझीं अंतडीं दिवसानदिवस
निघून पडतील."

१६ आणि **परमेश्वराने** यहोरामावर फलि-
ष्ट्यांचा व खुश्यांजवळच्या अरब लोकांचा आत्मा
उत्तेजित केला. १७ तेव्हां ते यहूदावर आले
आणि त्यांत घसून येऊन जी संपत्ति राजाच्या
घरांत सांपडली ती अवघी आणि त्याचे पुत्र व
त्याच्या बायकाहि त्यांनी नेल्या; मग त्याच्या
पुत्रांतला धाकटा यहोवाहाज यावांचून त्याचा
कोणी पुत्र राहिला नाहीं. १८ आणि या सर्वा-
नंतर **परमेश्वराने** त्याला त्याच्या अंतड्यांतल्या
असाध्य रोगाने हाणिलें. १९ आणि कालगतीने
दोन वर्षें झाल्यावर असें झालें कीं त्याच्या रोगाने
त्याचीं अंतडीं निघून पडलीं; तो तर कठीण रो-
गाने मेला, आणि त्याच्या पूर्वजांच्या जाळण्या-
प्रमाणें त्याच्या लोकानी त्याकरितां कांहीं जाळणें
केलें नाहीं. २० तो राज्य करूं लागला तेव्हां
बत्तिसां वर्षांचा होता, आणि त्याने यरूशालेमेंत
आठ वर्षें राज्य केलें आणि कोणीएकालाहि प्रिय
नसतां तो गमावला; तथापि त्यानी त्याला दावी-
दाच्या नगरांत पुरिलें, परंतु राजांच्या कबरांत नाहीं.

## अध्याय २२.

आणि यरूशालेमकरानी त्याच्या ठिकाणीं त्या-
चा धाकटा पुत्र अहाज्या राजा केला, कां
कीं अरब लोकांसंगतीं जी टोळी छावणीवर आ-
ली तिने सर्व वडील पुत्र मारून टाकिले होते;
तर यहूदाचा राजा यहोराम याचा पुत्र अहाज्या
राज्य करूं लागला. २ अहाज्या राज्य करूं
लागला तेव्हां बेचाळीसां वर्षांचा होता, आणि
त्याने यरूशालेमेंत एक वर्ष राज्य केलें, आणि
त्याच्या आईचें नांव अथाल्या होतें, ती ओम्रीची
कन्या होती. ३ तोहि आहाबाच्या कुळाच्या
मार्गांनी चालला, कां कीं दुराचार करायाला त्या-
ची आई त्याला मसलत देत असे. ४ मग
**परमेश्वराला** वाईट वाटतें तें तो आहाबाच्या
कुळासारिखा करी, कां कीं त्याच्या बापाच्या मर-
णानंतर ते त्याचा नाश होई असी मसलत त्याला
देत असत. ५ तो त्यांच्या मसलतीप्रमाणेंहि
चालला, आणि इस्राएलाचा राजा आहाब याचा
पुत्र यहोराम यासंगतीं रामोथ गिलादास अरा-
माचा राजा हजाएल यासीं लढायाला गेला, तेव्हां
अराम्यानी योरामाला जखम केली. ६ आणि
तो अरामाचा राजा हजाएल यासीं लढत होता,
तेव्हां रामास त्याला जे घाय झाले ते बरे करून
घ्यायास तो माघारा इज्रेलेस गेला, आणि यहू-
दाचा राजा यहोराम याचा पुत्र अजार्या आ-
हाबाचा पुत्र यहोराम याला पाहायास खालीं इ-
ज्रेलेस गेला, कां तर तो दुखणाईत होता. ७
आणि योरामाजवळ जाण्याने अहाज्याचा नाश
देवापासून झाला, कां कीं तो गेल्यावर निम्शी-
चा पुत्र येहू, ज्याला **परमेश्वराने** आहाबाचें
कुल नाहींसें करायास अभिषिक्त केलें होतें, त्या-
जवर तो यहोरामासंगतीं बाहेर गेला. ८ आणि
येहू आहाबाच्या कुळाला शासन करीत होता,
तेव्हां असें झालें कीं यहूदाचे सर्दार व अहाज्या-
च्या भावांचे जे पुत्र अहाज्याची सेवा करीत अ-
सत, ते त्याला सांपडले, मग त्याने त्यांस मारून
टाकिलें. ९ आणि त्याने अहाज्याचा शोध केला,
तेव्हां तो शोमरोनेंत लपत असतां कित्येकांनी त्या-
ला धरून येहूजवळ आणिलें, आणि त्यांनी त्याला

जिवें मारून पुरिलें, कां तर ते असें ह्मणाले कीं,
यहोशाफाट ज्याने सर्व बुद्धीने परमेश्वराला
शोधिलें त्याचा पुत्र तो होता; मग राज्य चाल-
वायास अहाज्याच्या कुळाचें कांहीं सामर्थ्य रा-
हिलें नाहीं.

१० आणि अहाज्याची आई अथाल्या इने
आपला पुत्र मेला असें पाहिलें, तेव्हां उठून तिने
यहूदाच्या वंशाच्या सर्व राजसंतानाचा नाश केला.
११ तेव्हां राजाची कन्या यहोशबाथ इने अहा-
ज्याचा पुत्र योवाश, राजाचे जे पुत्र जिवें मारले
जायाचे होते, त्यांमधून चोरून घेतला, आणि त्या-
ला आणि त्याच्या दाईस निजण्याच्या कोठडींत
ठेविलें; तर यहोराम राजाची कन्या यहोशबाथ
यहोयादा याजकाची बायको इने (ही तर अहा-
ज्याची बहीण होती,) त्याला अथाल्यापासून लप-
विलें ह्मणून तिने त्याला जिवें मारिलें नाहीं. १२
आणि तो त्यांजवळ देवाच्या मंदिरांत साहा वर्षे
गुप्त राहिला, आणि अथाल्या देशावर राज्य
करीत गेली.

## अध्याय २३.

आणि सातव्या वर्षी यहोयादाने आपल्याला
दृढ करून आपल्यासीं यरोहामाचा पुत्र अ-
झार्या व यहोहानानाचा पुत्र इश्माएल व ओबेदाचा
पुत्र अजार्या व अदायाचा पुत्र मासाय व जि-
ख्रीचा पुत्र एलीशाफाट हे शतपति करार करून
घेतले. २ आणि ते यहूदांत फिरत फिरत य-
हूदाच्या सर्व नगरांतून लेव्यांस व इस्राएलाच्या
मुख्य वडिलांस जमवून यरूशालेमेस आले. ३
आणि सर्व समुदायाने देवाच्या मंदिरांत राजासीं
करार केला, तेव्हां त्याने त्यांला ह्मटलें, "पाहा
परमेश्वर दावीदाच्या संतानांविषयीं बोलल्या-
प्रमाणें राजाचा पुत्र राज्य करील. ४ जें तुह्माला
करायाचें आहे तें हेंच, याजकांतले व लेव्यांतले
जे शाब्बाथांत आंत येणारे त्या तुह्मांतल्या तिस-
ऱ्या वांट्याने द्वारपाल असावें. ५ आणि तिसऱ्या
वांट्याने राजाच्या घरास आणि तिसऱ्या वांट्याने
पायाच्या द्वारास असावें, आणि सर्व लोकानी
परमेश्वराच्या मंदिराच्या अंगणांत असावें. ६
परंतु याजक व सेवा करणारे लेवी यांवांचून को-
णी परमेश्वराच्या मंदिरांत येऊं नये; त्यानीच
आंत यावें कां कीं ते पवित्र आहेत, आणि सर्व
लोकानी परमेश्वराची सेवा करावी. ७ आणि
लेव्यानी एकएकाने आपापलें शस्त्र आपल्या हातीं
धरून राजाला चहुंकडे घेढावें, आणि जो कोणी
दुसरा मंदिरांत येईल तो जिवें मारला जावा,
आणि राजा आंत येत बाहेर जात असतां त्या-
जवळ तुह्मी असा."

८ मग जें यहोयादा याजकाने आज्ञापिलें होतें
त्या सर्वांप्रमाणें लेव्यानी व सर्व यहूदाने केलें;
त्यानी एकएकाने आपापलें मनुष्य शाब्बाथांत आंत
येणारे आणि शाब्बाथांत बाहेर जाणारे घेतले, कां
कीं यहोयादा याजकाने वांटण्यांस निरोप दिल्हा
नाहीं. ९ आणि यहोयादा याजकाने शतपतींस भाले
व ढाला व उरस्त्राणें जीं दावीद राजाचीं होतीं
जीं देवाच्या मंदिरांत होतीं तीं दिल्हीं. १०
आणि त्याने सर्व लोक एकएकाचें शस्त्र त्याच्या
त्याच्या हातीं असतां मंदिराच्या उजव्या अंगा-
पासून मंदिराच्या डाव्या अंगापर्यंत वेदी व देऊळ
यांपुढें राजाजवळ चहुंकडे ठेविले. ११ मग
त्यानी राजाचा पुत्र बाहेर आणिला, आणि त्याज-
वर मुगुट घालून त्याला संकेतलेख देऊन राजा
केलें, आणि यहोयादाने व त्याच्या पुत्रानी त्याला
अभिषिक्त करून ह्मटलें, "राजा चिरकाळ वाचो."
१२ आणि लोक धांवत आणि राजाची प्रशंसा
करीत असतां अथाल्या त्यांचा शब्द ऐकून लोकां-
जवळ परमेश्वराच्या मंदिरांत आली. १३
आणि तिने पाहिलें, तों पाहा प्रवेशीं राजा आप-
ल्या स्तंभाजवळ उभा होता, आणि राजाजवळ
सर्दार व करणे वाजविणारे होते, आणि देशचे
सर्व लोक हर्ष करीत आणि करणे वाजवीत होते,
आणि गाणारे व स्तवन शिकविणारे वाद्यें वाजवीत
होते; तेव्हां अथाल्येने आपलीं वस्त्रें फाडून अरोळी
मारिली "फितूर फितूर." १४ मग यहोयादाने
जे शतपति सैन्याचे पाहणेकरी त्यांस बाहेर आ-
णून ह्मटलें, "तिला पंक्तीच्या बाहेर न्या, आणि
जो कोणी तिच्यामागें जाईल तो तरवारीने जिवें
मारला जावा;" कां कीं याजकाने ह्मटलें, "तिला
परमेश्वराच्या मंदिरांत जिवें मारूं नका." १५
तेव्हां त्यानी तिला हात लाविले, आणि ती राजा-

च्या घराजवळच्या अश्वद्वाराच्या प्रवेशास आली
तेव्हां तेथें त्यानी तिला जिवें मारिलें·
१६ आणि यहोयादाने आपली व सर्व लोक
व राजा याचा परस्पर असा करार केला कीं आ-
पण परमेश्वराचे लोक असावें· १७ तेव्हां
सर्व लोकानी बालाच्या घरास जाऊन तें मोडिलें,
आणि त्याच्या वेद्या व त्याच्या मूर्त्ति फोडून टा-
किल्या, आणि वेद्यांपुढें बालाचा याजक मात्तान
जिवें मारिला· १८ आणि दावीदाच्या विधाना-
नुसार मोशाच्या धर्मविधींत लिहिलेल्याप्रमाणें हर्ष
व गायन करून परमेश्वराचे होम करायाला
जे याजक लेवी दावीदाने परमेश्वराच्या मंदि-
रांत वांटून ठेविले होते त्यांकडून यहोयादाने पर-
मेश्वराच्या मंदिरचे कर्मविधि नेमिले· १९ आणि
कोणी अशुद्धाने आंत न जावें ह्मणून त्याने परमे-
श्वराच्या मंदिराच्या द्वारांस द्वारपाल ठेविले.
२० आणि त्याने शतपति व महापुरुष व लोकांचे
अधिकारी व देशाचे सर्व लोक घेऊन राजा परमे-
श्वराच्या मंदिरांतून खालीं आणिला, आणि त्या-
नी वरल्या दर्वाज्यांतून राजाच्या मंदिरांत येऊन
राजा राजासनावर बसविला· २१ आणि देश-
च्या सर्व लोकानी हर्ष केला, आणि अथाल्या तर-
वारीने मारिल्यावर नगर शांत राहिलें.

## अध्याय २४·

योवाश राज्य करूं लागला तेव्हां तो सात
वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत चाळीस
वर्षें राज्य करीत गेला, आणि त्याच्या आईचें नांव
जिब्या होतें, ती बेरशेबांतली होती· २ आणि
परमेश्वराला जें बरें वाटतें तें योवाश यहोयादा
याजक याचे सर्व दिवस करीत गेला· ३ आणि
यहोयादाने त्यासाठीं दोन बायका करून घेतल्या,
मग त्याने पुत्रांस व कन्यांस जन्म दिल्हा·
४ आणि यानंतर असें झालें कीं परमेश्वरा-
चें मंदिर यथास्थित करायाला योवाशाच्या मनांत
आलें· ५ तेव्हां त्याने याजकांस व लेव्यांस
जमवून ह्मटलें, “तुह्मी बाहेर यहूदाच्या नगरांस
जाऊन वर्षानवर्ष आपल्या देवाचें मंदिर नीट
करायासाठीं अवघ्या इस्राएलापासून पैका मिळवा,
आणि तुह्मी लवकर हें काम करा.” परंतु लेव्या-
नी तें लवकर केलें नाहीं· ६ मग यहोयादा जो
मुख्य त्याला राजाने बोलावून ह्मटलें, “संकेतले-
खाच्या मंडपासाठीं परमेश्वराचा सेवक मोशे
व इस्राएलाचा समुदाय यांच्या अर्पणांप्रमाणें ले-
व्यानी यहूदांतून व यरूशालेमेंतून अर्पणें आणावीं
ह्मणून त्यांजवळ त्वां कां मागितलें नाहीं?” ७
कां कीं त्या दुष्ट अथाल्याच्या पुत्रानी देवाचें
मंदिर फोडलें होतें, आणि परमेश्वराच्या मंदि-
राच्या सर्व पवित्र वस्तूहि बालाजवळ दिल्ह्या.
८ आणि राजाने आज्ञा केली तेव्हां त्यानी एक
पेटी करून बाहेर परमेश्वराच्या मंदिराच्या
द्वाराजवळ ठेविली. ९ आणि देवाचा सेवक
मोशे याने जें अर्पण इस्राएलावर रानांत सांगि-
तलें तें परमेश्वराजवळ आणावें ह्मणून त्यानी
यहूदांत व यरूशालेमेंत घोषणा केली. १०
मग सर्व अधिकाऱ्यानी व सर्व लोकानी हर्ष केला,
आणि द्रव्य आणून समाप्तीपर्यंत पेटींत टाकिलें·
११ आणि जेव्हां कधीं ती पेटी लेव्यांकडून रा-
जाच्या कचेरींत आणिली गेली आणि बहुत पैका
आहे असें त्यानी पाहिलें, तेव्हां असें झालें कीं
राजाच्या लेखकाने व मुख्य याजकाच्या कारभा-
ऱ्याने येऊन पेटी रिती केली, मग ती परत नेऊन
तिच्या ठिकाणीं ठेविली; असें त्यानी दिवसोदिवस
करून पुष्कळ पैका मिळविला. १२ आणि रा-
जाने व यहोयादाने परमेश्वराच्या मंदिराच्या
सेवेचें काम करणाऱ्यांजवळ तो पैका दिल्हा, आणि
त्यानी परमेश्वराचें मंदिर यथास्थित करायास
पाथरवट व सुतार व परमेश्वराचें मंदिर नीट
करायास लोहार व कांसाराहि ठेविले· १३ मग
काम करणाऱ्यानी काम केलें आणि त्यांच्या हातून
काम यथास्थित झालें, आणि त्यानी देवाचें मं-
दिर त्याच्या परिमाणाप्रमाणें स्थापून सुदृढ केलें·
१४ आणि त्यानी तें समाप्त केल्यावर पैक्याचें
शेष राजा व यहोयादा यापुढें आणिलें, मग त्यानी
परमेश्वराच्या मंदिरासाठीं सेवेचीं पात्रें व अर्प-
णाचीं पात्रें, आणि कटोरे व सोन्याचीं व रुप्याचीं
भांडीं केलीं, आणि यहोयादाचे सर्व दिवस ते
नित्य परमेश्वराच्या मंदिरांत होम करीत गेले.
१५ आणि यहोयादा ह्मातारा होत चालला
आणि वयोवृद्ध होऊन मेला; तो मेला तेव्हां

एकशें तिसां वर्षांचा होता. १६ आणि त्याला
लोकांनी दावीदाच्या नगरांत राजांजवळ पुरिलें,
कारण कीं त्यानें इस्राएलांत देवाविषयीं व त्या-
च्या मंदिराविषयीं बरें केलें होतें. १७ आणि
यहोयादाच्या मरणानंतर यहूदाच्या अधिकाऱ्यांनी
येऊन राजाला मुजरा केला, तेव्हां राजानें त्यांचें
ऐकिलें. १८ आणि ते आपल्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याचें मंदिर सोडून वनांची व मु-
र्तींची सेवा करूं लागले, आणि त्यांच्या या पात-
कामुळें यहूदावर व यरूशालेमेवर कोप झाला.
१९ तथापि त्यांस परमेश्वराकडे परत आणायास
त्यानें त्यांजवळ भविष्यवादी पाठविले, तेव्हां त्यांनी
त्यांस खरावून सांगितलें परंतु ते ऐकेनात. २०
आणि यहोयादा याजकाचा पुत्र जखार्या याला
देवाचा आत्मा प्राप्त झाला, मग त्यानें लोकांवरतीं
उभें राहून त्यांस ह्मटलें, "देव असें ह्मणतो,
तुमचें कल्याण न व्हावें असें तुह्मी परमेश्व-
राच्या आज्ञांचें अतिक्रमण कां करीत आहां?
तुह्मी परमेश्वराला सोडिलें ह्मणून त्यानें तु-
ह्मास सोडिलें आहे." २१ मग त्यांनी त्याजवर
बंड करून राजाच्या आज्ञेनें परमेश्वराच्या घरा-
च्या अंगणांत त्याला धोंडमार केला. २२ तर
योवाश राजानें आपल्यावर जी दया त्याचा बाप
यहोयादा यानें केली होती ती न स्मरून त्याचा
पुत्र मारून टाकिला, आणि तो मरतांना ह्मणाला,
"परमेश्वरानें पाहून न्याय करावा."
२३ आणि वर्ष फिरल्यावर असें झालें कीं
अरामाचें सैन्य त्याजवर चढून आलें, तेव्हां त्यांनी
यहूदा व यरूशालेम यांत शिरून लोकांचे सर्व
अधिकारी लोकांमधून नाहींसे केले, आणि त्यांची
सर्व लूट दाम्मासेकेच्या राजाकडे पाठवून दिल्ही.
२४ अरामांचे सैनिक तर थोडे असतां आले,
तेव्हां परमेश्वरानें फार मोठें सैन्य त्यांच्या
हातीं दिल्हें, कारण कीं त्यांनी आपल्या पूर्वजांचा
देव परमेश्वर याला सोडिलें होतें; असें त्यांनी
योवाशाला शासन केलें. २५ आणि ते त्यापा-
सून गेल्यावर (ते तर त्याला मोठ्या दुखण्यांत
सोडून गेले) त्याच्या चाकरांनी यहोयादा याज-
काच्या पुत्रांच्या रक्तामुळें त्याजवर बंड करून
त्याला त्याच्या अंथरुणावर मारिलें आणि तो मे-
ला, तेव्हां त्यांनी त्याला दावीदाच्या नगरांत पुरि-
लें, परंतु त्याला राजांच्या कबरांत पुरिलें नाहीं.
२६ आणि ज्यांनी त्याजवर बंड केलें ते हेच,
शिमाथ आम्मोनिणीचा पुत्र जाबाद आणि शि-
म्रीथ मोवाबिणीचा पुत्र यहोजाबाद. २७ आणि
त्याच्या पुत्रांची गोष्ट आणि त्यावरल्या भारांचें
मोठेपण आणि देवाचें मंदिर यथास्थित करणें,
पाहा हीं राजांच्या पुस्तकाच्या टीकेंत लिहिलेलीं
आहेत; आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र अमा-
ज्यानें राज्य केलें.

## अध्याय २५.

अमाज्या राज्य करूं लागला तेव्हां पंचवीस
वर्षांचा होता, आणि त्यानें यरूशालेमेंत ए-
कुणतीस वर्षें राज्य केलें; आणि त्याच्या आईचें
नांव यहोवाद्दान होतें, ती यरूशालेमेंतली होती.
२ आणि परमेश्वराला नीट वाटतें तें तो करी,
परंतु सकल मनापासून नाहीं. ३ आणि त्याचें
राज्य दृढ झालें तेव्हां आपला बाप जो राजा,
त्याचा घात ज्या चाकरांनी केला होता त्यांस
त्यानें मारून टाकिलें. ४ परंतु त्यांचीं लेंकरें
त्यानें जिवें मारिलीं नाहीं, मोशाच्या पुस्तकांतल्या
धर्मविधींत जें लिहिलेलें, जें परमेश्वरानें असें
आज्ञापिलें कीं बापांनी लेंकरांमुळें मरूं नये आणि
लेंकरांनी बापांमुळें मरूं नये, ज्याचें त्यानें आपल्या
पापामुळें मरावें, केवळ त्याप्रमाणें त्यानें केलें.
५ आणि अमाज्यानें यहूदा जमवून सर्व यहू-
दा व बन्यामीन यांतून त्यांस पूर्वजांच्या कुलाप्र-
माणें सहस्रपति व शतपति नेमून ठेविले, आणि
त्यानें त्यांची संख्या वीस वर्षांपासून व वरतीं
घेतली; तेव्हां ते त्याला तीन लक्ष निवडक लढा-
ईस जाणारे, भाला व ढाल धरणारे असे सांप-
डले. ६ आणि त्यांनी शंभर तालांत रुपें देऊन
इस्राएलांतून एक लक्ष बलवान वीर घेऊन ठेविले.
७ मग त्याजवळ एक देवाकडचा मनुष्य येऊन
ह्मणाला, "हे राजा, तुजसंगतीं इस्राएलाच्या सै-
न्यानें जाऊं नये, कां तर इस्राएलासीं, एफ्राइमा-
च्या सर्व संतानांसीं, परमेश्वर नाहीं. ८ परंतु
जर तूं जाणार असलास तर तसें कर, लढाईस
दृढ अस, देव तुला वैऱ्यापुढें लटपटवून देईल,

कां कीं सहाय करायास आणि लटपटवून द्यायास
देव समर्थ आहे." ९ तेव्हां अमाज्याने त्या
देवाकडच्या मनुष्याला ह्मटलें, "तर जे शंभर
तालांत म्या इस्राएलाच्या सैन्याला दिल्हे त्यावि-
षयीं काय करायाचें?" देवाकडच्या मनुष्याने उत्तर
केलें, "यापेक्षां अधिक तुला द्यायास परमेश्वर
समर्थ आहे." १० मग अमाज्याने आपल्या-
जवळ जें सैन्य एफ्राइमांतून आलें होतें, त्यानी
आपल्या स्थानास जावें ह्मणून त्यांस वेगळें केलें;
तेव्हां त्यांचा क्रोध यहूदावर फार तापला, आणि
तीव्र क्रोधाने ते आपल्या स्थानास परत गेले.

११ आणि अमाज्याने आपल्याला दृढ करून
आपले लोक बाहेर नेले, आणि मिठाच्या खोऱ्यास
जाऊन सेईराच्या वंशांतले दाहा हजार हाणिले.
१२ आणि यहूदाच्या संतानानी दाहा हजार
जिते धरून खडकाच्या कडेवर नेऊन खडकाच्या
कडेवरून टाकून दिल्हे, तेव्हां ते अवघे फुटले
तुटले गेले. १३ आणि अमाज्याने आपल्या-
संगतीं लढाईस न जावें ह्मणून जें सैन्य माघारें
पाठविलें, त्यानी यहूदाच्या नगरांवर शोमरोने-
पासून बेथहोरोनेपर्यंत छापे घालून त्यांतले तीन
हजार हाणिले, आणि पुष्कळ लूट हरून नेली.
१४ आणि अमाज्या एदोम्यांस हाणून आल्या-
नंतर असें झालें कीं त्याने सेईराच्या वंशांचे देव
आणून आपले देव होण्यास स्थापिले, आणि त्यां-
पुढें प्रणाम केला आणि धूप जाळिला. १५ मग
परमेश्वराचा क्रोध अमाज्यावर तापला, तेव्हां
त्याने त्याजवळ एक भविष्यवादी पाठविला आणि
तो त्याला ह्मणाला, "ज्यानी आपले लोक तुझ्या
हातांतून सोडवेनात त्या लोकांच्या देवांस त्वां कां
शोधिलें आहे?" १६ आणि तो त्यासीं बोलत
असतां असें झालें कीं तो त्याला ह्मणाला, "कोणी
तुला राजाचा मंत्री केलें आहे काय? तूं उगाच
राहा, तुला कां हाणावें?" तेव्हां भविष्यवादी
उभा राहून ह्मणाला, "त्वां असें केलें आहे आणि
माझा बोध ऐकिला नाहीं, यावरून मला कळलें
आहे कीं तुझा नाश करायास देवाने संकल्प
केला आहे."

१७ आणि यहूदाचा राजा अमाज्या याने मंत्रण
करून येहूचा पुत्र यहोवाहाज याचा पुत्र योवाश
इस्राएलाचा राजा याजवळ पाठवून सांगितलें
कीं, "ये, आपणामध्यें परस्परें ओळख होऊं दे."
१८ मग इस्राएलाचा राजा योवाश याने यहूदाचा
राजा अमाज्या याजवळ सांगून पाठविलें कीं, "ल-
बानोनांतल्या बोरीने लबानोनांतल्या देवदारूकडे
निरोप पाठविला कीं, तूं आपली कन्या माझ्या पुत्रा-
ला बायको करून दे, आणि लबानोनांतल्या कोणी
वनपशूने जवळून जातांना बोरीला तुडवून टाकिलें.
१९ पाहा, म्या एदोम्यांस हाणिलें आहे, असें
त्वां ह्मटलें आहे, आणि गौरव मिरवायाला उन्मत्त
झालास; आतां तूं घरीं राहा, तूं आणि तुजसंगतीं
यहूदाहि गळून पडे, असी वाईट कल्पना तूं कां
करितोस?" २० परंतु अमाज्या ऐकेना, कां कीं
देवापासून असें झालें ते शत्रूंच्या हातीं द्यावे
ह्मणून, कारण कीं त्यानी एदोमाच्या देवांस शो-
धिलें होतें. २१ मग इस्राएलाचा राजा योवाश
चढून आला, आणि यहूदाच्या बेथशेमेशेस त्याने
व यहूदाचा राजा अमाज्या याने परस्परें एक-
मेकांस पाहिलें. २२ तेव्हां यहूदा इस्राएलापुढें
पराजित झाला, आणि ते एकएक आपापल्या राहो-
टीस पळून गेले. २३ आणि यहोवाहादाचा
पुत्र योवाश याचा पुत्र अमाज्या यहूदाचा राजा
याला इस्राएलाचा राजा योवाश याने बेथशेमे-
शेस धरून यरूशालेमेस आणिलें, आणि यरू-
शालेमेचा कोट एफ्राइम दर्वाज्यापासून कोंपऱ्या-
च्या दर्वाज्यापर्यंत चारशें हात मोडिला. २४
आणि तो सर्व सोनें व रुपें व सर्व भांडीं जीं
परमेश्वराच्या मंदिरांत ओबेद अदोमाजवळ
सांपडलीं तीं आणि राजाच्या घरचे निधि व
ओलीचीं मनुष्यें घेऊन शोमरोनेस परत गेला.

२५ आणि यहोवाहादाचा पुत्र योवाश इस्रा-
एलाचा राजा याच्या मरणानंतर यहूदाचा राजा
योवाशाचा पुत्र अमाज्या पंधरा वर्षें वांचला.
२६ आणि अमाज्याच्या वरकड गोष्टी आद्य अंत्य,
पाहा यहूदा व इस्राएल यांच्या राजांच्या पुस्त-
कांत लिहिलेल्या नाहींत काय? २७ आणि
अमाज्याने परमेश्वराचें अनुसरण सोडिलें तेव्हां
यरूशालेमेंत त्यानी त्याजवर बंड केलें, *मग तो*
लाखीशेस पळून गेला, आणि त्यानी त्याच्यामागें
लाखीशेस पाठवून तेथें त्याला जिवें मारिलें. २८

आणि त्यांनी त्याला घोड्यांवर आणून त्याच्या
पूर्वजांजवळ यहूदाच्या नगरांत पुरिलें.

## अध्याय २६.

मग उज्जीया सोळा वर्षांचा असतां त्याला यहू-
दाच्या सर्व लोकांनी घेऊन त्याचा बाप अमा-
ज्या याच्या ठिकाणीं राजा केलें. २ राजा आ-
पल्या पूर्वजांसंगतीं निजल्यानंतर त्यानें एलोथ बां-
धून यहूदाकडे परत आणिली. ३ उज्जीया राज्य
करूं लागला तेव्हां सोळा वर्षांचा होता, आणि
त्यानें यरूशालेमेंत बावन्न वर्षें राज्य केलें; त्या-
च्या आईचें नांव यखोल्या होतें, ती यरूशाले-
मेंतली होती. ४ आणि परमेश्वराला नीट
वाटतें तें तो करी, जें त्याचा बाप अमाज्या करी
त्या सर्वांप्रमाणें. ५ आणि जखार्या जो देवा-
च्या दर्शनांत विवेकी होता त्याच्या दिवसांत तो
देवाला शोधीत गेला, आणि जितका वेळ त्यानें
परमेश्वरास शोधिलें तितका वेळ देवानें त्याला
कुशल केलें. ६ आणि त्यानें बाहेर जाऊन प-
लिष्ट्यांशीं लढून गाथेचा कोट व याब्नेचा कोट
व अश्दोदेचा कोट मोडून टाकिला, आणि अ-
श्दोद प्रांतांत व पलिष्ट्यांमध्यें नगरें बांधिलीं. ७
आणि पलिष्ट्यांवर आणि जे अरब लोक गूरबा-
लांत राहत होते त्यांवर आणि मऊन्यांवर देवानें
त्याचें सहाय केलें. ८ आणि आम्मोनी उज्जी-
याला भेटी देत असत, आणि त्याचें यश मिस-
राच्या प्रवेशापर्यंत व्यापून गेलें, कां कीं तो फार
बलवान झाला. ९ आणि उज्जीयानें यरूशाले-
मेंत कोपऱ्याच्या दर्वाज्यास व खोऱ्याच्या दर्वा-
ज्यास व कोनास दुर्गें बांधिलीं आणि सुदृढ केलीं.
१० रानांतहि त्यानें दुर्गें बांधिलीं आणि बहुत
बावड्या खणल्या, कां कीं त्याला खालाटींत व
तळवटांत पुष्कळ जीवधन होतें; डोंगरांत व बागा-
इतांतहि, शेतकरी व मळेकरी होते, कां कीं त्याला
शेतकी आवडली. ११ आणि उज्जीयाला यो-
द्ध्यांचें सैन्य होतें, तें आपली जी गणनी येइयेल
लेखक व मासाया कारभारी यांकडून झाली, ति-
च्या संख्येनें टोळी टोळी होऊन राजाच्या नायकां-
तल्या हनान्या याच्या हाताखालीं लढाईस बाहेर
जात असत. १२ बलवान वीरांच्या मुख्य बडि-
लांची सर्व संख्या दोन हजार व साहाशें होती.
१३ आणि त्यांच्या हाताखालीं तीन लक्ष साडे-
सात हजार एवढें सैन्य होतें; तें वैऱ्यावर राजाचें
सहाय करायास फार पराक्रमानें लढाई करीत अ-
सत. १४ आणि त्यांसाठीं सर्व सैन्यासाठीं उज्जी-
यानें ढाला व भाले व शिरस्त्राणें व उरस्त्राणें व
धनुष्यें व गोफणगोटे सिद्ध केले. १५ आणि
त्यानें यरूशालेमेंत दुर्गांवर व प्राकारांवर असा-
यासाठीं बाण व मोठे धोंडे सोडायासाठीं चतुरांनी
कल्पिलेलीं यंत्रें केलीं, आणि त्याचें यश दूरवर
बाहेर गेलें, कां कीं तो बळवान होईपर्यंत त्याचें
सहाय आश्चर्यानें झालें.

१६ आणि तो बलवान झाल्यावर त्याचा नाश
होई तोंपर्यंत त्याचें हृदय उन्मत्त झालें, कां कीं
तेव्हां त्यानें आपला देव परमेश्वर यावर अधर्म
केला, धूपाच्या वेदीवर धूप जाळायास तो परमे-
श्वराच्या देवळांत गेला. १७ तेव्हां अजार्या
याजक आपल्यासंगतीं परमेश्वराचे ऐशीं बळ-
वान याजक घेऊन त्याच्यामागें आंत गेला. १८
आणि ते उज्जीया राजाचा प्रतिरोध करितांना
त्याला ह्मणाले, "अरे उज्जीया, परमेश्वराला
धूप जाळणें तुझें नाहीं, केवळ याजकांचें; आह-
रोनाचे संतान जे धूप जाळायाला पवित्र केलेले
आहेत त्यांचें आहे; तूं पवित्र स्थानांतून निघून
जा, कां तर त्वां पातक केलें आहे, आणि परमे-
श्वर देवापासून तुझें गौरव होई असें हें झालें
नाहीं." १९ तेव्हां उज्जीया रुसला आणि धूप
जाळायाला त्याच्या हातीं धुपाटणें होतें, आणि
तो याजकांवर रुष्ट असतांना परमेश्वराच्या
मंदिरांत धूपाच्या वेदीजवळ याजकांपुढें त्याच्या
कपाळावर कोड उठलें. २० आणि अजार्या
मुख्य याजकानें व सर्व याजकांनी त्याजवर दृष्टि
लाविली, आणि पाहा तो आपल्या कपाळाचा को-
ड्या झाला, तेव्हां त्यांनी त्याला घाईनें तेथून घाल-
विलें, त्यानेंहि निघायाला उतावळी केली, कां कीं
परमेश्वरानें त्याला झटका मारिला होता. २१
मग उज्जीया राजा आपल्या मरणदिवसापर्यंत
कोड्या होता आणि तो कोड्या असतां निराळ्या
घरांत राहिला, कां कीं तो परमेश्वराच्या मंदि-
रापासून विच्छिन्न झाला, आणि त्याचा पुत्र यो-

थाम राजाच्या घरावर होऊन देशांतल्या लोकांचा
न्याय करीत होता. २२ आणि उज्जीयाच्या वर-
कड गोष्टी आद्य अंत्य आमोजाचा पुत्र यशाया
भविष्यवादी याने लिहिल्या. २३ आणि उज्जीया
आपल्या पूर्वजांसंगतीं निजला, आणि त्यानी त्या-
ला त्याच्या पूर्वजांजवळ राजांच्या श्मशानांत पुरि-
लें, कां कीं तो कोढ्या, असें त्यानी ह्मटलें, आ-
णि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र योथाम याने
राज्य केलें.

## अध्याय २७.

योथाम राज्य करूं लागला तेव्हां तो पंचवीस
वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत सोळा
वर्षें राज्य करीत गेला, आणि त्याच्या आईचें नांव
यरूशा होतें, ती सादोकाची कन्या होती. २ आ-
णि परमेश्वराला नीट वाटतें तें तो करी, जें त्याचा
बाप उज्जीया करी त्या सर्वांप्रमाणें, परंतु तो पर-
मेश्वराच्या देवळांत गेला नाहीं, आणि अद्यापि
लोक दूषण करीत होते. ३ त्याने परमेश्वरा-
च्या मंदिराचा वरला दर्वाजा बांधिला, आणि
ओफेलाच्या कोटावर बहुत बांधिलें. ४ आणि
यहूदाच्या डोंगरवट देशांत त्याने नगरें बांधिलीं,
आणि वनांत किल्ले व दुर्गं बांधिलीं. ५ आणि
तो आम्मोन्यांच्या राजाशीं लढून त्यांजवर प्रबळ
झाला, आणि त्या वर्षी आम्मोनाच्या वंशानी त्या-
ला शंभर तालांत रुपें, व दाहा हजार कोर गहूं,
व जव दाहा हजार दिल्हे; इतकें आम्मोनाच्या
वंशानी त्याला दुसरे व तिसरे वर्षींहि भरून दि-
ल्हें. ६ योथाम तर बळवान होत चालला, कां
कीं त्याने आपले मार्ग आपला देव परमेश्वर
यापुढें सिद्ध केले. ७ आणि योथामाच्या वरकड
गोष्टी, त्याचीं सर्व युद्धें व त्याचीं आचरणें, पाहा
तीं इस्राएल व यहूदा यांच्या राजांच्या पुस्तकांत
लिहिलेलीं आहेत. ८ तो राज्य करूं लागला
तेव्हां पंचविसां वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत
त्याने सोळा वर्षें राज्य केलें. ९ आणि योथाम
आपल्या पूर्वजांसंगतीं निजला आणि त्यानी त्याला
दावीदाच्या नगरांत पुरिलें, आणि त्याच्या ठिकाणीं
त्याचा पुत्र आहाज याने राज्य केलें.

## अध्याय २८.

आहाज राज्य करूं लागला तेव्हां तो वीस
वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत सोळा
वर्षें राज्य करीत गेला, परंतु परमेश्वराला नीट
वाटतें तें त्याने आपला पूर्वज दावीद यासारिखें
केलें नाहीं. २ तो इस्राएलाच्या राजांच्या मार्गा-
नीं चालला, आणि बालांच्या ओतींव मूर्त्तिहि
त्याने केल्या. ३ आणि तो हिन्नोमाच्या पुत्राच्या
खोऱ्यांत धूप जाळी, आणि जीं राष्ट्रें परमेश्व-
राने इस्राएलाच्या संतानांपुढून घालविलीं होतीं
त्यांच्या अघोर कर्मांप्रमाणें त्याने आपलीं लेंकरें
अग्नींत जाळिलीं. ४ आणि तो उंच स्थानांत व
डोंगरांवर व सर्व हिरव्या झाडांखालीं यज्ञ करी
आणि धूप जाळी. ५ ह्मणून त्याचा देव परमे-
श्वर याने त्याला अरामाच्या राजाच्या हातीं दि-
ल्हें, तेव्हां त्यानी त्याला हाणून त्यांतले बहुत म-
नुष्य पाडाव करून दाम्मासेकेस नेले, आणि तो
इस्राएलाच्या राजाच्या हातींहि दिल्हा गेला, ते-
व्हां त्याने त्याला मोठ्या हननाने हाणिलें. ६
रमाल्याचा पुत्र पेकाह याने तर एका दिवशीं य-
हूदांतले एक लक्ष वीस हजार अवघे बलवान म-
नुष्य हाणिले; कां कीं त्यानी आपल्या पूर्वजांचा
देव परमेश्वर याला सोडिलें होतें. ७ आणि
जिख्री एफ्राइमांतला एक वीर याने राजाचा पुत्र
मासाय व घराचा अधिकारी अज्रीकाम व राजा-
चा प्रधान एल्काना यांस जिवें मारिलें. ८ आणि
इस्राएलाच्या संतानानी आपल्या भावांतले दोन लक्ष
बायका, पुत्र, व कन्या, असीं मनुष्यें पाडाव करून
नेलीं, आणि त्यांची पुष्कळ लूटहि हरून ती लूट
शोमरोनेस नेली. ९ तेव्हां तेथें परमेश्वराचा
एक भविष्यवादी ओदेद नामें होता, आणि जें
सैन्य शोमरोनेस आलें त्यापुढें तो निघून त्यांस
ह्मणाला, "पाहा, तुमच्या पूर्वजांचा देव परमे-
श्वर याचा कोप यहूदावर होता ह्मणून त्याने तें
तुमच्या हातीं दिल्हें, आणि आकाशास लागे एव-
ढ्या क्रोधाने तुह्मी त्यांस वधिलें आहे. १० आणि
आतां यहूदा व यरूशालेम यांतल्या लोकांस
तुह्मी आपल्याकडे दास व दासी असें पायांखालीं
घालायास संकल्प करीत आहां, परंतु तुह्मा-

जवळहि तुमचा देव परमेश्वर याजवळ पातकें
नाहींत काय? ११ तर आतां माझें ऐका, आणि
आपल्या भावांतले जे तुह्मी पाडाव करून आणिले
आहेत त्यांस परत जाऊं द्या, कां कीं तुह्मावर
परमेश्वराचा तीव्र क्रोध आहे" १२ तेव्हां
जे लढाईहून आले होते त्यांजवर योहानानाचा
पुत्र अजार्या, मशिल्लेमोथाचा पुत्र बेरेख्या, श-
ल्लूमाचा पुत्र यहिज्कीया व हदूलाईचा पुत्र अमा-
सा, हे एफ्राइमाच्या संतानांच्या मुख्यांतले मनुष्य
उभे राहिले. १३ आणि ते त्यांस ह्मणाले, "तुह्मी
जे पाडाव करून आणिले ते इकडे आणायाचे
नाहींत, कां कीं आह्मी परमेश्वराचे पातकी अ-
सतां तुह्मी आमचीं पापें व पातकें अधिक करा-
यास कल्पना करीत आहां; कां तर आमचें पातक
मोठें आहे, आणि इस्राएलावर तीव्र क्रोध आहे·"
१४ मग सज्जितानी अधिकारी व सर्व समुदाय
यांपुढें जे पाडाव करून आणिले होते ते व लूट
सोडून दिल्ही· १५ तेव्हां ज्यांचीं नांवें प्रसिद्ध
झालीं त्या मनुष्यानी उठून जे पाडाव करून आ-
णिले होते त्यांस धरिलें, आणि लोकांतून त्यांतल्या
नागव्यांवर वस्त्रें घालून त्यांस पांघरविलीं आणि
त्यांच्या पायांत जोडे घातले आणि त्यांस खायाला
प्यायाला दिल्हें आणि अभ्यक्त केलें, आणि त्यांत-
ल्या अशक्तांस गाढवांवर घालून खजुऱ्यांचें नगर
यरीहो इकडे त्याच्या भावांजवळ आणिलें, मग ते
शोमरोनेस परत गेले·

१६ त्या वेळेस आहाज राजाने अश्शूराच्या
राजांनी त्याचें सहाय करावें ह्मणून त्यांजवळ
निरोप पाठविला· १७ कां कीं एदोम्यानी अणखी
येऊन यहूदाला हाणिलें होतें, आणि लोक पाडाव
करून नेले होते· १८ आणि पलिष्टी खाला-
टीच्या व यहूदाच्या दक्षिण देशांतल्या नगरांवर
छप्पा घालून बेथशेमेश व अय्यालोन व गदेरोथ
व सोखो तिच्या गांवांसुद्धां आणि तिम्ना तिच्या
गांवांसुद्धां आणि गिम्झो तिच्या गांवांसुद्धां घेऊन
तेथें वस्ती केली· १९ कां कीं इस्राएलाचा राजा
आहाज यामुळें परमेश्वराने यहूदा धुळीस मि-
ळविला, कारण कीं त्याने परमेश्वरावर अधर्म
करून यहूदाला नीच केलें होतें. २० मग अ-
श्शूराचा राजा तिल्गथ पिल्नेसेर याने त्याज-
वळ येऊन त्याला पीडलें, सबळ केलें नाहीं· २१
तेव्हां आहाजाने परमेश्वराच्या मंदिरांतून कांहीं
आणि राजाच्या व अधिकाऱ्यांच्या घरांतून कांहीं
काढून अश्शूराच्या राजाला दिल्हें, तथापि त्याने
त्याचें सहाय केलें नाहीं. २२ आणि त्याने आ-
पल्या कष्टाच्या समयीं परमेश्वरावर अणखी
अधिक अधर्म केला, तोच आहाज राजा· २३
तेव्हां दाम्मासेकाचे देव ज्यानी त्याला हाणिलें
त्यांजवळ त्याने यज्ञ केले, आणि ह्मटलें, "अरामा-
च्या राजांचे देव त्यांचें सहाय करितात, तर
त्यानी माझें सहाय करावें ह्मणून मी त्यांजवळ
यज्ञ करीन·" ते तर त्याच्या व सर्व इस्राएलाच्या
विपत्तीचें कारण झाले. २४ आणि आहाजाने
देवाच्या मंदिराचीं पात्रें गोळा केलीं, आणि देवा-
च्या मंदिराचीं पात्रें कापून त्यांचे तुकडे तुकडे
केले, आणि परमेश्वराच्या मंदिराचे दरवाजे
लावून बंद केलें, आणि यरूशालेमेंत एकएका
कोनांत वेद्या बांधिल्या· २५ आणि अन्य देवांज-
वळ धूप जाळायासाठीं त्याने यहूदाच्या एकएका
नगरांत उंच स्थानें केलीं, आणि असें त्याने आ-
पल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याला चिडविलें·
२६ आणि त्याच्या वरकड गोष्टी आणि त्याचीं
सर्व आचरणें आद्य अंत्य, तीं पाहा यहूदा व
इस्राएल यांच्या राजांच्या पुस्तकांत लिहिलेलीं
आहेत· २७ आणि आहाज आपल्या पूर्वजां-
संगतीं निजला, तेव्हां त्यानी त्याला यरूशालेम
नगरांत पुरिलें, परंतु इस्राएलाच्या राजांच्या कब-
रांत आणिलें नाहीं, आणि त्याच्या ठिकाणीं त्या-
चा पुत्र हिज्कीया याने राज्य केलें·

## अध्याय २९.

हिज्कीया पंचवीस वर्षांचा होता तेव्हां राज्य
करूं लागला, आणि यरूशालेमेंत एकुणतीस
वर्षें राज्य करीत गेला; त्याच्या आईचें नांव अ-
बीया होतें, ती जखार्याची कन्या होती· २
आणि परमेश्वराला नीट वाटतें तें तो करी,
त्याचा पूर्वज दावीद याने जें केलें होतें त्या सर्वां-
प्रमाणें· ३ त्याने आपल्या राज्याच्या पहिल्या
वर्षीं पहिल्या महिन्यांत परमेश्वराच्या मंदिरा-
चे दरवाजे उघाडिले आणि नीट केले· ४

आणि त्याने याजक व लेवी आणून त्यांस पूर्वे-
कडच्या चौकांत एकत्र मिळविलें. ५ तेव्हां त्यांस
ह्मटलें, "अहो लेव्यानों, माझें ऐका, आतां तुह्मी
आपल्याला पवित्र करून आपल्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याचें मंदिर पवित्र करा, आणि पवित्र-
स्थानांतून अमंगल वस्तु काढून टाका. ६ कां
कीं आमच्या वडिलानी फितून आमचा देव पर-
मेश्वर याला वाईट वाटतें तें केलें, आणि त्याला
सोडून परमेश्वराच्या घरापासून आपलीं मुखें
फिरवून पाठ दाखविली. ७ अणखी त्यानी
मघनाचे दरवाजे लावून बंद केले आणि दिवे
विझविले, आणि पवित्र स्थानांत इस्राएलाच्या दे-
वाला धूप जाळिला नाहीं आणि होम केले नाहीं.
८ ह्मणून परमेश्वराचा कोप यहूदावर व य-
रूशालेमेवर आला आहे, आणि तुह्मी आपल्या
डोळ्यानी पाहत आहां, तसें घाबरेपण, विस्मय, व
फुसफुस यांस त्याने ते सोंपून दिल्हे आहेत. ९
आणि पाहा, यामुळें आमचे वडील तरवारीनें
पडले आहेत, आणि आमचे पुत्र, आमच्या कन्या,
व आमच्या बायका पाडावपणांत आहेत. १०
आतां इस्राएलाचा देव परमेश्वर याचा तीव्र
क्रोध आह्मावरून फिरून जावा ह्मणून त्याशीं
करार करायाला माझ्या मनांत आहे. ११ मा-
झ्या मुलानों, आतां उपेक्षा करूं नका, कां कीं
परमेश्वराने तुह्मी त्याची सेवा करायाला त्या-
पुढें उभें राहावें आणि सेवा करितांना धूप जाळा-
वा ह्मणून तुह्माला निवडिलें आहे.

१२ तेव्हां हे लेवी उठले, ह्मणजे कहाथ्यांच्या
संतानांतले अमासाईचा पुत्र माहाथ व अजार्या-
चा पुत्र योएल व मरारीच्या संतानांतले अब्दी-
चा पुत्र कीश व यहाल्लेलएलाचा पुत्र अजार्या
व गेर्शोन्यांच्या संतानांतले जिम्माचा पुत्र योवाह
व योवाहाचा पुत्र एदेन; १३ आणि एलीजा-
फानाच्या संतानांतले शिम्री व यइयेल व आसा-
फाच्या संतानांतले जखार्या व मत्तान्या. १४
आणि हेमानाच्या संतानांतले यहीयेल व शिमई
व यदूथूनाच्या संतानांतले शमाया व उज्जीएल.
१५ यानी परमेश्वराच्या वचनांवरून राजाच्या
आज्ञेप्रमाणें आपल्या भावांस एकत्र मिळविलें,
आणि आपल्यास पवित्र करून परमेश्वराचें
मंदिर शुद्ध करायास आले. १६ तेव्हां याज-
कानी परमेश्वराच्या मंदिराच्या आंतल्या खो-
लींत तें शुद्ध करायाला जाऊन त्यांस परमेश्व-
राच्या देवळांत जें कांहीं अशुद्ध सांपडलें, तें अ-
वघें बाहेर परमेश्वराच्या मंदिराच्या अंगणांत
काढिलें, आणि लेव्यानी तें बाहेर किद्रोन ओघ-
ळावर काढून न्यावयास घेतलें. १७ पहिल्या
महिन्याच्या पहिल्या दिवसीं ते पवित्र करूं ला-
गले, आणि महिन्याच्या आठव्या दिवसीं परमे-
श्वराच्या मघनास आले; असें त्यानी आठ
दिवसांत परमेश्वराचें मंदिर पवित्र केलें, आणि
पहिल्या महिन्याच्या सोळाव्या दिवसीं त्यानी
समाप्ति केली. १८ तेव्हां ते आंत हिज्कीया
राजाजवळ जाऊन ह्मणाले, "आह्मी परमेश्वरा-
चें सर्व मंदिर व होमाची वेदी व तिचीं सर्व
पात्रें व दर्शनीय अपूपाचें मेज व त्याचीं सर्व पात्रें
शुद्ध केलीं आहेत. १९ आणि जीं पात्रें आहाज
राजाने आपल्या राज्यांत आपल्या अधर्माने अव्हे-
रून टाकिलीं तीं अवघीं आह्मी सिद्ध करून प-
वित्र केलीं आहेत, आणि पाहा तीं परमेश्वरा-
च्या वेदीपुढें आहेत." २० मग हिज्कीया
राजा पाहटेस उठून नगराचे अधिकारी एकत्र
मिळवून वरतीं परमेश्वराच्या मंदिरास गेला.
२१ तेव्हां त्यानी राज्य व पवित्र स्थान व यहूदा
यांकरितां सात बैल व सात मेष व सात कोंक-
रें व सात बोकड पापहारक यज्ञासाठीं आणिले,
आणि परमेश्वराच्या वेदीवर त्यांचे होम क-
रावे ह्मणून त्याने आहरोनाचे संतान जे याजक
त्यांस आज्ञा केली. २२ मग त्यानी बैल का-
पिले, आणि याजकानी रक्त घेऊन वेदीवर शिंप-
डलें आणि मेषहि कापिल्यावर त्यानी रक्त वेदी-
वर शिंपडलें, मग कोंकरें कापिल्यावर त्यानी रक्त
वेदीवर शिंपडलें. २३ आणि राजा व समुदाय
यांपुढें त्यानी पापहारक यज्ञाचे बोकड जवळ
आणिले, तेव्हां त्यानी आपले हात त्यांवर टेंकले.
२४ आणि याजकानी त्यांस कापून अवघ्या इस्रा-
एलाकरितां प्रायश्चित्त करायासाठीं त्यांचें रक्त वे-
दीवर पापहारक यज्ञरूप शिंपडलें, कां कीं होम
व पापहारक यज्ञ अवघ्या इस्राएलाकरितां करावे
ह्मणून राजाने आज्ञा केली. २५ आणि दावीद

व राजाचा प्रदर्शक **गाद** व **नाथान** भविष्यवादी
यांच्या आज्ञेप्रमाणें त्याने लेवी **परमेश्वराच्या**
मंदिरांत झांजा, वीणा, व चंग वाजवावे ह्मणून
ठेविले, कां कीं **परमेश्वराकडून** त्याच्या भविष्य-
वाद्यांच्या योगाने असी आज्ञा होती. २६ लेवी
तर दावीदाचीं वाद्यें आणि याजक करणे धरून
उभे असत. २७ आणि हिज्कीयाने वेदीवर हो-
म करायाला आज्ञा केली, आणि होम होऊं ला-
गला तेव्हां **परमेश्वराकडचें** गायनाहि होऊं ला-
गलें, आणि करणे व इस्राएलाचा राजा दावीद
याने नेमलेलीं वाद्यें वाजूं लागलीं. २८ आणि
सर्व समुदायाने भजन केलें, आणि गाणाऱ्यानी
गीत गाइलें आणि करणेकऱ्यानी करणे वाजविले;
आणि होम समाप्त होईपर्यंत हें सर्व चाललें.
२९ आणि त्यानी होम समाप्त केले तेव्हां राजाने
आणि त्यासंगतीं जे समक्ष होते त्या अवघ्यानी
नमून भजन केलें. ३० आणि दावीद व आ-
साफ प्रदर्शक यांचीं वचनें बोलून **परमेश्वराला**
स्तवावें ह्मणून हिज्कीया राजा व अधिकारी यानी
लेव्यांस आज्ञा केली, मग त्यानी हर्षाने स्तवन
केलें, आणि डोकीं लववून भजन केलें. ३१ तेव्हां
हिज्कीया उत्तर करीत ह्मणाला, "आतां तुह्मी
**परमेश्वराकडे** आपला कार्यसंस्कार केला आहे,
जवळ या, आणि यज्ञ व कृतज्ञतेचीं अर्पणें **परमेश्व-
राच्या** मंदिरास आणा." मग समुदायाने यज्ञ व
कृतज्ञतेचीं अर्पणें आणिलीं आणि जितके उदार
मनाचे होते तितक्यानी होमपशू आणिले. ३२
आणि समुदायाने जे होमपशू आणिले त्यांची
संख्या सत्तर बैल, शंभर मेष, दोनशें कोंकरें, इत-
की होती; हे अवघे **परमेश्वराला** होमरूप होते.
३३ आणि पवित्र बलि साहाशें बैल व तीन ह-
जार मेंढरें, इतके होते. ३४ परंतु याजक थोडे
होते ह्मणून त्यांच्याने सर्व होमपशूंचीं चामडीं का-
ढवेनात, याकरितां काम समाप्त होई आणि दुसरे
याजक आपल्यास पवित्र करीत तोंपर्यंत त्यांचे
भाऊ जे लेवी त्यानी त्यांचें सहाय केलें, कां कीं
आपल्यास पवित्र करायाला लेवी याजकांपेक्षां
अधिक मनाचे यथार्थ होते. ३५ आणि शांति-
कारक यज्ञांचे मेद व होमांचीं पेय अर्पणें यांसुद्धां
होम पुष्कळ होते; असी **परमेश्वराच्या** मंदि-
राची सेवा संस्थापित झाली. ३६ आणि दे-
वाने लोकांस प्रवृत्त केलें होतें ह्मणून हिज्की-
याने व सर्व लोकानी हर्ष केला, कां कीं गोष्ट
एकाएकीं झाली.

## अध्याय ३०.

आणि हिज्कीयाने सर्व इस्राएल व यहूदा यां-
कडे निरोप पाठविला आणि एफ्राइम व
मनश्शे यांकडे पत्रें लिहिलीं; त्यानी इस्राएलाचा
देव **परमेश्वर** याला वल्हांडण सण पाळायास
यरूशालेमेस **परमेश्वराच्या** मंदिरास यावें ह्म-
णून. २ कां कीं दुसऱ्या महिन्यांत वल्हांडण
सण यरूशालेमेंत पाळावा, असें संमंत्रण राजाने
व अधिकाऱ्यानी व सर्व समुदायाने केलें होतें. ३
कां तर त्या वेळेस त्याच्याने तो पाळवेना, कारण
कीं याजकानी आपल्यास पुरतेंपणें पवित्र केलें न-
व्हतें, आणि लोक यरूशालेमेस एकत्र मिळाले
नव्हते. ४ आणि ही गोष्ट राजाला व अवघ्या
समुदायाला नीट वाटली. ५ मग इस्राएलाचा
देव **परमेश्वर** याला वल्हांडण सण पाळायास
यरूशालेमेस यावें ह्मणून सर्व इस्राएलांत बेर-
शेबापासून दानापर्यंत घोषणा करायास त्यानी
निश्चय ठरविला, कां कीं चिरकाल त्यानी तो ने-
माप्रमाणें पाळिला नव्हता. ६ तेव्हां राजा व
अधिकारी यांपासून पायक तीं पत्रें घेऊन राजाच्या
आज्ञेप्रमाणें सर्व इस्राएल व यहूदा यांत सांगत
फिरले कीं, "अहो इस्राएलाच्या संतानानो, आब्रा-
हाम, इझाक व इस्राएल यांचा देव **परमेश्वर**
याकडे फिरा, ह्मणजे तुमचें जें शेष अश्शूराच्या
राजांच्या हातांतून मुक्त राहिलें आहे त्याकडे
तो फिरेल. ७ आणि तुह्मी आपल्या पूर्वजांसा-
रिखे व आपल्या भावांसारिखे असूं नका; त्यानी
तर आपल्या पूर्वजांचा देव **परमेश्वर** यावर
अधर्म केला, मग तुमच्या दृष्टीस पडतें तसें त्याने
ते अवमर्दाला सोंपून दिल्हे. ८ आतां तुह्मी आ-
पल्या पूर्वजांसारिखे आपली मान ताठ करूं नका;
**परमेश्वराला** वश्य व्हा, आणि त्याने आपलें जें
पवित्र स्थान सर्वकालपर्यंत पवित्र ठरविलें आहे
त्यांत या, आणि आपला देव **परमेश्वर** याची
सेवा करा, मग त्याचा तीव्र क्रोध तुह्मांवरून

फिरून जाईल. ९ कां कीं तुह्मी परमेश्वराकडे
फिरला, ह्मणजे तुमचे भाऊ व तुमचीं मुलें त्यां-
च्या नेणाऱ्यांपुढें दयापात्रें होतील, आणि या दे-
शांत परत येतील, कां तर तुमचा देव परमेश्वर
कृपाळू व दयाळू आहे, आणि जर तुह्मी त्याकडे
फिराल तर तो आपलें तोंड तुह्मापासून फिरवि-
णार नाहीं." १० पायक तर एफ्राइम व मनश्शे
यांच्या देशांत जबूलुनापर्यंत नगरोनगर फिरत
गेले, परंतु त्यानी त्यांची थट्टा व उपहास केला.
११ तथापि आशेर व मनश्शे यांतले व जबूलु-
नांतले कित्येक नम्र होऊन यरूशालेमेस आले.
१२ आणि परमेश्वराच्या वचनावरून राजा व
अधिकारी यांची जी आज्ञा झाली तिजप्रमाणें क-
रायाला लोकांस ऐकमत्य द्यावें ह्मणून देवाचा
हात यहूदांत प्रवृत्त होता.

१३ तर दुसऱ्या महिन्यांत बेखमीर भाकरीचा
सण पाळायास बहुत लोक फार मोठा समुदाय
करून यरूशालेमेस एकत्र मिळाले. १४ त्यानी
उठून यरूशालेमेंतल्या वेद्या काढिल्या, आणि सर्व
धूपाच्या वेद्या काढिल्या आणि किद्रोन ओहळींत
टाकिल्या. १५ आणि दुसऱ्या महिन्याच्या चौ-
दाव्या दिवशीं त्यानी वल्हांडणाचा यज्ञपशु का-
पिला, आणि याजकानी व लेव्यानी लज्जित हो-
ऊन आपल्यास पवित्र करून होमपशू परमेश्व-
राच्या मंदिरांत आणिले. १६ आणि ते आप-
ल्या रीतीप्रमाणें देवाकडचा मनुष्य मोशे याच्या
नेमाप्रमाणें आपल्या स्थानावर उभे राहिले; याजक
लेव्यांच्या हातून रक्त घेऊन शिंपडीत होते. १७
कां कीं ज्यानी आपल्यास पवित्र केलें नव्हतें,
असे बहुत समुदायांत होते, याकरितां जे कोणी
शुद्ध नव्हते, त्यांस परमेश्वराकडे पवित्र करावें
ह्मणून त्यांच्या यज्ञपशूंच्या कापण्यावर लेवी होते.
१८ कां कीं एफ्राइम व मनश्शे, इस्साखार व
ज़बूलुन यांतल्या बहुत लोकानी आपल्याला शुद्ध
केलें नसताहि यज्ञपशु नियमाविरुद्ध खाला, ह्म-
णून हिज्कीया त्यांकरितां प्रार्थना करीत ह्मणाला,
१९ "ज्या कोणी आपलें मन देवाला आपल्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याला शोधायास ला-
विलें आहे, तो पवित्र स्थानाच्या शुद्धीप्रमाणें शुद्ध
नसला, तरी कृपाळू परमेश्वराने त्याची क्षमा
करावी." २० तेव्हां परमेश्वराने हिज्कीयाचें
ऐकून लोकांस बरें केलें. २१ आणि जीं इस्रा-
एलाचीं संतानें यरूशालेमेस समक्ष होतीं त्यानी
बेखमीर भाकरीचा सण सात दिवस मोठ्या
हर्षानें पाळिला, आणि लेवी व याजक प्रतिदिवशीं
परमेश्वराला उंच नादाचीं वाद्यें वाजवून परमे-
श्वराला स्तवीत होते. २२ आणि जे लेवी
परमेश्वराचा उत्तम बोध शिकवीत होते त्या
सर्वांशीं हिज्कीया सुखदायक भाषण बोलला, आ-
णि ते शांतिकारक यज्ञ करीत आणि आपल्या
पूर्वजांचा देव परमेश्वर याची स्तुति करीत स-
णाचे सात दिवस खात गेले. २३ आणि दुसरे
सात दिवस सण पाळावा ह्मणून सर्व समुदायाने
संमंत्रण केलें, मग त्यानी सात दिवस हर्षानें सण
पाळिला. २४ कां कीं यहूदाच्या हिज्कीया
राजानें समुदायाला एक हजार बैल व सात ह-
जार मेंढरें दिल्हीं, आणि अधिकाऱ्यानी समुदाया-
ला एक हजार बैल व दाहा हजार मेंढरें दिल्हीं,
आणि बहुत याजकानी आपल्यास पवित्र केलें.
२५ आणि यहूदाच्या सर्व समुदायाने आणि या-
जक व लेवी यानी आणि जो समुदाय इस्राए-
लांतून आला होता त्या सर्वांनी, आणि इस्राएल
देशांतून जे विदेशी आले होते आणि जे यहूदांत
राहत होते त्यानीहि हर्ष केला. २६ तेव्हां य-
रूशालेमेंत मोठा हर्ष होता, कां कीं इस्राएलाचा
राजा दावीद याचा पुत्र शलमोन याच्या दिवसां-
पासून यरूशालेमेंत असें झालें नव्हतें. २७
तेव्हां याजक जे लेवी त्यानी उठून लोकांस आ-
शीर्वाद दिल्हा, आणि त्यांची वाणी ऐकिली गेली;
आणि त्यांची प्रार्थना त्याच्या पवित्र वस्तीस आ-
काशास पावली.

## अध्याय ३१.

आणि हें सर्व समाप्त झाल्यावर जे इस्राएली
समक्ष होते त्या सर्वांनी बाहेर यहूदाच्या
नगरांत जाऊन सर्व यहूदा व बन्यामीन यांत
आणि एफ्राइम व मनश्शे यांत समाप्तीपर्यंत मूर्त्ति
फोडल्या, आणि वनें तोडलीं आणि उंच स्थानें व
वेद्या निर्दाळल्या; मग सर्व इस्राएली एकएक आ-
पापल्या स्थलास आपापल्या नगरास परत गेले

२ आणि हिज्कीयाने याजक व लेवी यांचीं वां-
टणीं यांच्या वांटण्यांप्रमाणें नेमून ठेविली; याज-
कांनी व लेव्यांनी एकएकाने आपापल्या सेवेप्रमाणें
परमेश्वराच्या मंडपाच्या द्वारांत होम व शांति-
कारक यज्ञ करावे आणि सेवा कृतज्ञतानिवेदन
व स्तवन करावें. ३ आणि परमेश्वराच्या
विधींच्या नेमाप्रमाणें होम सकाळचा व संध्याका-
ळचा होम, आणि शाब्बाथ, अमावास्या व सण
यांतले होम करावे, ह्मणून त्याने राजाचा वांटा
त्याच्या धनांतून नेमून दिल्हा. ४ आणि याजक
व लेवी परमेश्वराच्या धर्मविधींत उत्साही अ-
सावे ह्मणून त्यांचा वांटा द्यायाला त्याने यरूशा-
लेमेच्या राहणाऱ्या लोकांस आज्ञा केली. ५
आणि आज्ञा प्रसिद्ध झाल्यावर इस्राएलाच्या सं-
तानानी धान्य, द्राक्षारस व तेल व मध व शेताचा
सर्व उपज यांचा प्रथमांश बहुत आणून दिल्हा,
आणि सर्वांचा दशमांशहि पुष्कळ आणिला. ६
आणि इस्राएल व यहूदा यांचीं जीं संतानें यहू-
दाच्या नगरांत राहत होतीं त्यानीहि गुरें व मेंढरें
यांचा दशमांश ज्या पवित्र वस्तु त्यांचा देव पर-
मेश्वर याकडे पवित्र ठरविलेल्या होत्या त्यांचा
दशमांश आणून राशि राशि असा ठेविला. ७
तिसऱ्या महिन्यांत तें राशींचा पाया घालूं लागले,
आणि सातव्या महिन्यांत ते समाप्त केले. ८
आणि हिज्कीया व अधिकारी यानी येऊन त्या रा-
शि पाहिल्या, तेव्हां त्यानी परमेश्वराला व त्या-
च्या इस्राएल लोकांस आशीर्वाद दिल्हा. ९
आणि त्या राशींविषयीं हिज्कीयाने याजक व
लेवी यांस विचारिलें. १० तेव्हां सादोकाच्या
कुळांतला अजाऱ्या मुख्य याजक त्याला उत्तर
करीत ह्मणाला, “लोक परमेश्वराच्या मंदिरांत
अर्पणें आणूं लागल्यापासून खाणें पुरतेंपणें होत
चाललें आणि पुष्कळ उरलें, कां कीं परमेश्वराने
आपल्या लोकांस आशीर्वाद दिल्हा आहे, आणि
जें उरलें तें हा महासंचय आहे.”

११ तेव्हां परमेश्वराच्या मंदिरांत कोठड्या
सिद्ध कराव्या ह्मणून हिज्कीयाने आज्ञा केली,
मग त्यानी त्या सिद्ध केल्या. १२ आणि विश्वा-
सूपणें अर्पणें व दशमांश व पवित्र वस्तू हीं आंत
आणिलीं; त्यांचा अधिकारी कोनान्या लेवी होता,
आणि त्यानंतर त्याचा भाऊ शिमी होता. १३
आणि हिज्कीया राजा व देवाच्या मंदिराचा
अधिकारी अजाऱ्या यांच्या आज्ञेने कोनान्या व
त्याचा भाऊ शिमी यांच्या हाताखालीं यहीएल
व अजाज्या व नाहाथ व असाएल व यरीमोथ
व योजाबाद व एलीएल व इस्माख्या व माहाथ
व बनाया हे पाहणेकरी होते. १४ आणि परमे-
श्वराकडचीं अर्पणें व परमपवित्र वस्तू हीं वांटून
द्यावीं ह्मणून इम्ना लेवी याचा पुत्र कोरे पूर्वे-
कडचा द्वारपाळ देवाकडच्या स्वबुद्धीने दिल्हेल्या
अर्पणांवर होता. १५ आणि त्यानंतर एदेन व
मिन्यामीन व येशूवा व शमाया, अमार्या व श-
खान्या याजकांच्या नगरांत आपापल्या अधिकारांत
वांटण्यांच्या अनुक्रमाने आपल्या लाहान किंवा
मोठ्या भावांस द्यावयास होते. १६ त्यांच्या
परंपरेशिवाय जे पुरुष तिहीं वर्षांचे व त्यांवरचे
होते, जे अवघे परमेश्वराच्या मंदिरांत जाणारे
त्यांसहि त्यांच्या सेवेसाठीं त्यांच्या ठिकाणांत त्यां-
च्या वांटण्यांप्रमाणें नित्याचा विभाग द्यावा. १७
आणि याजकांच्या परंपरेला त्यांच्या पूर्वजांच्या
कुळाप्रमाणें आणि जे लेवी वीस वर्षांचे व त्यांव-
रचे त्यांस त्यांच्या ठिकाणांत त्यांच्या वांटण्यांप्र-
माणें. १८ आणि सर्व समुदायाला त्यांचीं बाळें,
त्यांच्या बायका, व त्यांचे पुत्र, व त्यांच्या कन्या
यांच्या परंपरेला, कां कीं त्यानी आपल्या अधि-
कारांत आपल्याला पवित्रच पवित्र केलें. १९
आणि आहरोनाचे संतान जे याजक यांतले जे
मनुष्य आपापल्या नगरांच्या शिवारांत एकएका
नगरांत नामानी लिहिलेले होते तेहि होते; त्यानी
याजकांतल्या सर्व पुरुषांस व लेव्यांतल्या सर्व
परंपरेच्यांस वांटे द्यावे ह्मणून. २० असें हि-
ज्कीयाने सर्व यहूदांत केलें; जें चांगलें व नीट व
सत्य तेंच त्याने आपला देव परमेश्वर यापुढें
केलें. २१ आणि आपल्या देवाला शोधणें आ-
णि देवाच्या मंदिराची सेवा व धर्मविधि व आज्ञा
याविषयीं जें कांहीं काम तो करूं लागला तें त्याने
जिवाभावाने केलें आणि सिद्धीस नेलें.

## अध्याय ३२.

ह्या गोष्टी व यांची सिद्धि झाल्यावर अश्शूराचा
राजा सान्हेरीब याने येऊन यहूदांत शि-

रून दुर्गपुरावर तळ धरिला, आणि तीं आपल्या-
कडे फोडून घ्यायाला कल्पिलें. २ आणि सान्हे-
रीब आला आहे आणि यरूशालेमेवर लढायास
पाहत आहे, असें हिज्कीयाने पाहिलें. ३ आणि
त्याने आपले प्रधान व प्रवीर यांसीं संमंत्रण केलें
कीं जे झरे नगराबाहेर होते ते कोंडावे, तेव्हां त्यानी
त्याचें सहाय केलें. ४ मग बहुत लोकानी जमून
सर्व झरे आणि जो ओघळ देशामधून वाहत होता
तोहि कोंडून म्हटलें, "अश्शूराचे राजे आले म्ह-
णजे त्यांस पुष्कळ पाणी कां मिळावें?" ५ आणि
त्याने आपल्याला दृढ करून सर्व मोडलेला कोट
बांधून दुर्गांपर्यंत उंचवला, आणि बाहेर दुसरा
कोट बांधिला आणि दावीदाच्या नगरचें मिल्लो
नीट करून सुदृढ केलें आणि शस्त्रें व ढाला पु-
ष्कळ केल्या. ६ आणि लोकांवर लढाईचे नायक
ठेविले आणि त्यांस तो आपल्याकडे नगरद्वारच्या
चौकांत जमवून त्यांसीं सांत्ववाद बोलला कीं, "७
दृढ असा, धैर्य धरा, अश्शूराच्या राजामुळें आणि
त्यासंगतींच्या सर्व समुदायामुळें भिऊं नका, घा-
बरूं नका, कां तर जे त्याच्यासंगतीं त्यांपेक्षां
आमच्यासंगतीं अधिक आहेत. ८ त्यांसीं मा-
नवी भुज आहे परंतु आह्मासीं आमचें सहाय
करायास आणि आमच्या लढाया लढायास आ-
मचा देव परमेश्वर आहे." तेव्हां लोकानी
यहूदाचा राजा हिज्कीया याच्या वचनांवर भरं-
वसा ठेविला.

९ त्यानंतर अश्शूराचा राजा सान्हेरीब याने
आपल्या सर्व सर्दारांसुद्धां लाखीशेस असतां आ-
पले चाकर यरूशालेमेस यहूदाचा राजा हिज्की-
या याजवळ व यरूशालेमेंतल्या सर्व यहूदाजवळ
पाठवून सांगितलें कीं, १० "अश्शूराचा राजा
सान्हेरीब असें म्हणतो, तुह्मी कशावर भरंवसा
ठेवून वेढ्यामध्यें यरूशालेमेंत राहतां? ११
आपला देव परमेश्वर आह्मास अश्शूराच्या
राजाच्या हातांतून सोडवील, असें म्हणून हिज्की-
या तुह्मास तहानभुकेने मरायास आपल्याला सों-
पून द्यायास मनावतो कीं नाहीं? १२ त्याचीं
उंच स्थानें व त्याच्या वेद्या हिज्कीयाने काढून
टाकून एकाच वेदीपुढें भजन करा आणि तिजवर
धूप जाळा, असें यहूदाला व यरूशालेमेला सां-
गितलें कीं नाहीं? १३ म्या व माझ्या पूर्वजानी
त्या देशांच्या सर्व लोकांचें काय केलें, तें तुह्माला
माहीत नाहीं काय? त्या देशातल्या लोकांचे देव
आपापला देश माझ्या हातांतून सोडवायास कांहीं
समर्थ होते काय? १४ जीं राष्ट्रें माझ्या पूर्व-
जानी नाहींसीं केलीं त्यांच्या सर्व देवांमध्यें जो
आपल्या लोकांस माझ्या हातांतून सोडवूं शकला,
तो कोण होता? तर तुमचा देव तुह्माला माझ्या
हातांतून सोडवूं शकेल काय? १५ आतां तर
हिज्कीयाने तुह्माला असें फसवूं नये, मनावूं नये,
आणि त्याजवर तुह्मी विश्वासूं नका, कां कीं को-
णीएकाहि जातीचा किंवा राष्ट्राचा देव आपल्या
लोकांस माझ्या हातांतून व माझ्या पूर्वजांच्या हा-
तांतून मुक्त करायास समर्थ नव्हता; मग तुमच्या
देवाच्याने तुह्माला माझ्या हातांतून मुक्त कर-
वणार नाहीं."

१६ आणि त्याचे चाकर परमेश्वर देव या-
वर आणि त्याचा सेवक हिज्कीया यावर अणखी
अधिक बोलले. १७ आणि त्याने इस्राएलाचा
देव परमेश्वर याला निंदायास आणि त्याजवर
अपवाद करायास असीं पत्रें लिहिलीं कीं, "असे
परदेशांतल्या राष्ट्रांच्या देवानी आपले लोक मा-
झ्या हातांतून सोडविले नाहींत, तसा हिज्कीयाचा
देव आपल्या लोकांस माझ्या हातांतून सोडवि-
णार नाहीं." १८ आणि यरूशालेमचे जे लोक
कोटावर होते त्यांस त्यानी मोठ्या शब्देंकरून
यहूदी भाषेनें हाक मारिली, त्यांस भयभीत व
त्रासित करून नगर घ्यावें म्हणून. १९ आणि
पृथ्वींतल्या लोकांचे जे देव मनुष्याच्या हातांचें
काम होतें त्यांजवर जसा तसा त्यानी यरूशाले-
मच्या देवावर अपवाद केला. २० यामुळें हि-
ज्कीया राजाने आणि आमोजाचा पुत्र यशाया
भविष्यवादी याने प्रार्थना व आकाशाकडे आरोळी
केली. २१ मग परमेश्वराने दूत पाठवून अ-
श्शूराच्या राजाच्या छावणींतले सर्व बलवान वीर
व सर्दार व नायक जिवें मारिले, तेव्हां तो लाजि-
रवाणा होऊन आपल्या देशास परत गेला, आणि
तो आपल्या देवाच्या घरांत गेला तेव्हां त्यापासून
जे जन्मलेले त्यानी त्याला तरवारीने वधिलें. २२
असें परमेश्वराने हिज्कीयाला व यरूशालेम-

च्या लोकांस अश्शूराचा राजा सान्हेरीब याच्या
हातांतून व सर्वांच्या हातांतून तारिलें आणि चहुं-
कडून संभाळिलें. २३ आणि बहुत लोकानी
परमेश्वराजवळ अर्पणें आणि यहूदाचा राजा
हिज्कीया याजवळ महाधनें यरूशालेमेस आ-
णिलीं, आणि तेव्हांपासून तो सर्व लोकांच्या दृष्टीने
उंचावला गेला.

२४ त्या दिवसांत हिज्कीया मरे एवढा दुख-
ण्यास पडला, तेव्हां त्याने परमेश्वराची प्रार्थना
केली, मग त्याने त्याला कांहीं ह्मटलें, आणि
उत्पात दिल्हा. २५ परंतु आपल्यावर जो उपकार
झाला त्याप्रमाणें हिज्कीयाने परत केलें नाहीं, कां
कीं त्याचें मन उन्मत्त झालें ह्मणून त्याजवर यहू-
दा व यरूशालेम यांवरहि कोप होता. २६ मग
हिज्कीया आपल्या मनाच्या उन्मतेमुळें नम्र झाला;
तो व यरूशालेमेचे लोकहि, ह्मणून हिज्कीयाच्या
दिवसांत परमेश्वराचा कोप त्यांजवर आला
नाहीं.

२७ आणि हिज्कीयाला अति बहुत द्रव्य व
गौरव होतें, त्याने रुपें व सोनें व महामूल्य पाषाण
व सुगंधीं व ढाला व सर्व मनोरम अलंकार यां-
साठीं भांडारें केलीं. २८ आणि धान्य, द्राक्षा-
रस व तेल यांच्या उत्पन्नासाठीं कोठारें आणि
सर्व प्रकारच्या पशूंसाठीं स्थानें आणि कळपांसाठीं
कोंडवाडे केलीं. २९ आणि त्याने नगरें आणि
मेंढरांचें व गुरांचें पुष्कळ धन सिद्ध केलें, कां कीं
देवाने त्याला अति बहुत संपत्ति दिल्ही. ३०
त्याच हिज्कीयाने गीहोनचा वरला झरा कोंडून
त्याचीं जलें दावीदाच्या नगराच्या पश्चिमेकडेस
नीट खालीं आणिलीं, आणि हिज्कीया आपल्या
सर्व कर्मांत कुशल असे. ३१ तथापि जो उत्पात
देशांत झाला होता त्याविषयीं विचारायास बाबे-
लेच्या ज्या अधिपतिनी त्याजकडे निरोप पाठविला
त्यांच्या दूतांच्या कामाविषयीं त्याला पारखाया-
साठीं त्यांच्या मनांत जें कांहीं होतें तें जाणावें
ह्मणून देवाने त्याला सोडून दिल्हें. ३२ आणि
हिज्कीयाच्या वरकड गोष्टी व त्याचे परोपकार,
पाहा हीं आमोजाचा पुत्र यशाया भविष्यवादी या-
च्या प्रदर्शनांत यहूदा व इस्राएल यांच्या राजा-
च्या पुस्तकांतहि लिहिलेलीं आहेत. ३३ आणि
हिज्कीया आपल्या पूर्वजांसंगतीं निजला आणि
त्यानी त्याला दावीदाच्या संतानांच्या कबरांतल्या
श्रेष्ठ कबरेंत पुरिलें, आणि तो मेला तेव्हां सर्व
यहूदाने व यरूशालेमच्या लोकानी त्याचा सन्मान
केला, आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र मनाश्शे
याने राज्य केलें.

## अध्याय ३३.

मनाश्शे राज्य करूं लागला तेव्हां बारा वर्षांचा
होता, आणि यरूशालेमेंत त्याने पंचावन्न वर्षें
राज्य केलें. २ आणि परमेश्वराला वाईट वा-
टतें तें तो करी; जीं राष्ट्रें परमेश्वराने इस्राएला-
च्या संतानांपुढून घालविलीं होतीं त्यांच्या अघोर
कर्मांप्रमाणें. ३ आणि जीं उंच स्थानें त्याचा
बाप हिज्कीया याने मोडून टाकिलीं होतीं तीं त्याने
पुन्हां बांधिलीं, आणि बालांसाठीं वेद्या उभारिल्या
आणि वनें लाविलीं आणि आकाशाच्या सर्व सै-
न्याचें भजन व सेवा केली. ४ आणि ज्याविषयीं
परमेश्वराने ह्मटलें होतें, "यरूशालेमेंत माझें
नाम सर्वकालपर्यंत राहील," तेथें परमेश्वराच्या
मंदिरांत त्याने वेद्या बांधिल्या. ५ आणि परमे-
श्वराच्या मंदिराच्या दोहों अंगणांत त्याने आका-
शाच्या सर्व सैन्यासाठीं वेद्या बांधिल्या. ६ आ-
णि हिन्नोमाच्या पुत्राच्या खोऱ्यांत त्याने आपलीं
लेंकरें अग्नींतून पार केलीं, आणि तो कुविद्या कर्म-
करी व गारूडकरी व चेटककरी व भूतसंचारी व
दैवज्ञ यांसीं वहिवाट करी; परमेश्वराला चिड-
वायास त्याला जें वाईट वाटतें तें तो फार करी.
७ आणि त्याने कोरींव मूर्त्ति जी प्रतिमा त्याने
केली होती ती देवाचें मंदिर, ज्याविषयीं देवाने
दावीदाला व त्याचा पुत्र शलमोन याला ह्मटलें
होतें कीं, "या मंदिरांत आणि जी यरूशालेम म्या
इस्राएलाच्या सर्व वर्गांतून निवडून घेतली आहे,
एथें मी आपलें नाम सर्वकालपर्यंत ठेवीन, त्या मंदि-
रांत ती मूर्त्ति ठेविली. ८ आणि मोश्याच्या यो-
गाने जो सर्व धर्मविधी व जे नियम व न्याय झाले
त्या सर्वांप्रमाणें जें अवघें म्या त्यांस आज्ञापिलें
आहे तें करायास जर ते जपले, तर जी भूमि म्या
तुमच्या पूर्वजांला नेमून दिल्ही तिजवरून मी इस्रा-
एलाचा पाय अणखी सारणार नाहीं. ९ तर जीं

राष्ट्रें परमेश्वरानें इस्राएलाच्या संतानांपुढून ना-
हींसीं केलीं होतीं त्यांच्यापेक्षां वाईट करायास
यहूदा व यरूशालेमेचे लोक भ्रांत होत असें म-
नाश्शेनें केलें. १० आणि परमेश्वर मनाश्शेला व
त्याच्या लोकांस बोलला परंतु ते ऐकेनात. ११
मग परमेश्वरानें त्यांजवर अश्शूराच्या राजाचे
सर्दार आणिले, तेव्हां त्यांनी मनाश्शेला सांखळ्यांत
धरून बिड्यांनी बांधून बाबेलेस नेलें. १२ आ-
णि तो दुःखित होता तेव्हां त्यानें आपला देव पर-
मेश्वर याची प्रार्थना केली, आणि आपल्या पूर्व-
जांच्या देवापुढें फार विनंति केली. १३ आणि
त्याची प्रार्थना केली, मग त्यानें त्याला प्रसन्न हो-
ऊन त्याची काकळूत ऐकून त्याला यरूशालेमेस
त्याच्या राज्यास परत आणिलें, तेव्हां परमेश्व-
रच देव आहे, असें मनाश्शानें जाणिलें. १४
आतां यानंतर त्यानें दावीदाच्या नगराबाहेर गी-
होनाच्या पश्चिमेकडे खोऱ्यांत मत्स दर्वाज्याच्या
प्रवेशापर्यंत कोट बांधून फार उंच करून ओफेल
वेढलें, आणि यहूदाच्या सर्व दुर्गपुरांत सैन्याचे
नायक ठेविले. १५ आणि त्यानें परमेश्वरा-
च्या मंदिरांतून अन्य देव व मूर्त्ति आणि ज्या
वेद्या त्यानें परमेश्वराच्या मंदिराच्या पर्वतावर व
यरूशालेमेंत बांधिल्या होत्या, त्या सर्व काढून नग-
राबाहेर टाकिल्या. १६ आणि त्यानें परमेश्व-
राची वेदी बांधून तिजवर शांतिकारक यज्ञ व
कृतज्ञतेचीं अर्पणें केलीं, आणि इस्राएलाचा देव
परमेश्वर याची सेवा करावी असी आज्ञा य-
हूदाला केली. १७ परंतु लोक अद्यापि उंच
स्थानांवर यज्ञ करीत असत, तथापि केवळ आपला
देव परमेश्वर याला केलें.

१८ आणि मनाश्शेचीं वरकड कृत्यें आणि
त्यानें आपल्या देवाजवळ जी प्रार्थना केली ती आ-
णि त्याला जे प्रदर्शक इस्राएलाचा देव परमेश्वर
याच्या नामानें बोलले त्यांचीं वचनें, पाहा हीं
इस्राएलाच्या राजांच्या इतिहासांत आहेत. १९
आणि त्याची प्रार्थना आणि त्याला देव कसा
प्रसन्न झाला तें, आणि त्याचीं पापें व त्याचें पातक
आणि तो नम्र झाल्यापूर्वी जेथें त्यानें उंच स्थानें
बांधिलीं आणि वनें व मूर्त्ति स्थापिल्या तीं ठिकाणें,
पाहा हीं प्रदर्शकांच्या गोष्टींत लिहिलेलीं आहेत.
२० आणि मनाश्शे आपल्या पूर्वजांसंमतीं निजला
आणि त्यांनी त्याला त्याच्या घरांत पुरिलें, आणि
त्याच्या ठिकाणीं त्याचा पुत्र आमोन यानें राज्य
केलें. २१ आमोन राज्य करूं लागला तेव्हां बा-
वीस वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत दोन वर्षें
त्यानें राज्य केलें. २२ आणि परमेश्वराला वा-
ईट वाटतें तें तो करी; त्याचा बाप मनाश्शे करी
त्याप्रमाणें, आणि त्याचा बाप मनाश्शे यानें ज्या
कोरींव मूर्त्ति केल्या होत्या त्या सर्वांला आमोन
यज्ञ करी आणि त्यांची सेवा करी. २३ आणि
त्याचा बाप मनाश्शे दीन झाला होता, त्याप्रमाणें
तो दीन झाला नाहीं परंतु आमोन उत्तरोत्तर अप-
राध करीत गेला. २४ आणि त्याच्या चाकरांनी
त्याजवर बंड करून त्याला त्याच्या घरांत जिवें
मारिलें. २५ मग ज्यांनी आमोन राजावर बंड
केलें होतें त्या सर्वांस देशाच्या लोकांनी त्याच्या
ठिकाणीं त्याचा पुत्र योशीया राजा केला.

## अध्याय ३४.

योशीया राज्य करूं लागला तेव्हां तो आठ
वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत एकतीस
वर्षें त्यानें राज्य केलें. २ आणि परमेश्वराला
नीट वाटतें तें तो करीत गेला, आणि आपला पूर्वज
दावीद याच्या मार्गांनी चालला, आणि उजव्या-
कडे किंवा डाव्याकडे वळला नाहीं. ३ तो आ-
पल्या राज्याच्या आठव्या वर्षी अद्यापि तो पोर
असतां आपला पूर्वज दावीद याच्या देवाला
शोधूं लागला, आणि बाराव्या वर्षी तो यहूदाला
व यरूशालेमेला उंच स्थानें व वनें आणि को-
रींव व ओतींव मूर्त्ति यांपासून शुद्ध करूं लागला.
४ आणि लोकांनी त्याच्यासमक्ष बालांच्या वेद्या
मोडून टाकिल्या, आणि त्यांवरतीं ज्या मूर्त्ति हो-
त्या त्यांस त्यानें तोडून टाकिलें, आणि वनें व को-
रींव व ओतींव मूर्त्ति त्यानें फोडून कुटून त्यांचें
चूर्ण ज्यांनी त्यांस यज्ञ केला होता त्यांच्या कबरां-
वर विखरिलें. ५ आणि त्यानें याजकांचीं हाडें
त्यांच्या वेद्यांवर जाळिलीं; असें त्यानें यहूदाला
व यरूशालेमेला शुद्ध केलें. ६ आणि मनाश्शे व
एफ्राइम व शिमोन यांच्या नगरांत नफतालीपर्यंत
त्यांच्या उजाड स्थलांत चहूंकडे तसें केलें. ७

आणि त्याने अवघ्या इस्राएल देशांतून वेद्या व
वनें मोडून टाकिली, आणि कोरींव मूर्त्ति कुटून
त्यांचें चूर्ण केलें आणि सर्व प्रतिमा तोडून टाकि-
ल्या, तेव्हां तो यरूशालेमेस परत आला.

८आणि त्याच्या राज्याच्या अठराव्या वर्षी
देश व मंदिर शुद्ध केल्यावर त्याने आपला देव
परमेश्वर याचें मंदिर यथास्थित करायास अज्ञा-
ल्याचा पुत्र शाफान व नगराचा अधिकारी मासा-
या व योवाहाजाचा पुत्र योवा इतिहासक हे पाठ-
विले. ९आणि त्यानी हिल्कीया जो मुख्य या-
जक त्याजवळ जाऊन जो पैका देवाच्या मंदिरांत
आणिलेला होता जो लेवी जे द्वारपाल त्यानी म-
नश्शे व एफ्राइम यांपासून आणि इस्राएलाच्या
सर्व शेषापासून आणि सर्व यहूदा व बन्यामीन
यांपासून मिळविला होता तो दिल्हा, मग ते यरू-
शालेमेस परत आले. १० आणि जे कारभारी
परमेश्वराच्या मंदिराचे पाहणारे होते त्यांच्या
हातीं त्यानी तो दिल्हा, मग जे कारागीर परमे-
श्वराच्या मंदिरांत काम करीत होते त्यानी छिद्रें
भरून मंदिर नीट करावें ह्मणून त्यांस तो दिल्हा.
११ह्मणजे सुतारांस व गवंड्यांस त्यानी तो दि-
ल्हा, चिरे व कड्या विकत घेऊन जीं घरें यहूद्या-
च्या राजानी नासिलीं होतीं त्यांचा कडीपाट करा-
म. १२ आणि त्या मनुष्यानी विश्वासूपणें काम
केलें आणि अधिकार करायास त्यांचे पाहणारे
मरारीच्या संतानांतले लेवी, याहाथ व ओबद्या
व कहाथ्यांच्या संतानांतले जखार्या व मशुल्लाम
व दुसरे लेवी अवघे जे वाजत्रांमध्यें निपुण ते
होते. १३ ते भारवाहकांवरहि होते आणि सर्व
प्रकारच्या सेवेंत जे काम करीत होते त्या सर्वांचे
अधिकारी होते, आणि लेव्यांतले लेखक व का-
रभारी व द्वारपाल होते.

१४आणि जो पैका परमेश्वराच्या मंदिरांत
आणिलेला होता तो त्यानी बाहेर काढिला, तेव्हां
परमेश्वराचा जो धर्मविधि मोश्याकडून दिल्हेला
होता त्याचें पुस्तक हिल्कीया याजकाला सांपडलें.
१५मग हिल्कीया शाफान लेखकाला उत्तर
करीत ह्मणाला, "मला परमेश्वराच्या मंदिरांत
धर्मविधीचें पुस्तक सांपडलें." आणि हिल्कीयाने तें
पुस्तक शाफानाला दिल्हें. १६ आणि शाफानाने
तें पुस्तक राजाकडे नेलें, आणि राजाला वर्त्तमान
पोहंचविलें कीं, "जें तुझ्या सेवकांच्या हातीं सोपलें
गेलें तें अवघें ते करीत आहेत. १७ आणि जो
पैका परमेश्वराच्या मंदिरांत सांपडला तो त्यानी
काढून पाहणाऱ्यांच्या हातीं व कामकऱ्यांच्या हातीं
दिल्हा आहे." १८तेव्हां शाफान लेखकाने रा-
जाला सांगितलें कीं, "हिल्कीया याजकाने मला
पुस्तक दिल्हें आहे." आणि शाफानाने तें राजा-
पुढें वाचिलें. १९ आणि राजाने धर्मविधीचीं
वचनें ऐकिलीं, तेव्हां असें झालें कीं त्याने आपलीं
वस्त्रें फाडलीं. २० आणि राजाने हिल्कीया व
शाफानाचा पुत्र अहीकाम व मीखाचा पुत्र अब्दोन
व शाफान लेखक व राजाचा सेवक असाया
यांस आज्ञा केली कीं, २१ "चला, जें पुस्तक
सांपडलें आहे त्याच्या वचनांविषयीं मजकरितां व
इस्राएल व यहूदा यांतल्या उरलेल्यांकरितां पर-
मेश्वराला विचारा, कां तर जो परमेश्वराचा
क्रोध आह्मावर घातलेला आहे तो मोठा, कारण
कीं या पुस्तकांत जें लिहिलेलें त्या सर्वांप्रमाणें
करायास आमच्या पूर्वजानी परमेश्वराचें वचन
पाळिलें नाहीं." २२ मग हस्राचा पुत्र तिक्वा
याचा पुत्र शाल्लूम जो वस्त्रागाराचा राखणारा
त्याची बायको हुल्दा भविष्यवादिनी जी यरूशा-
लेमेंत नगरोपांतीं राहत होती, तिजकडे हिल्कीया
व राजाचे सेवक जाऊन तिजसीं तसें बोलले. २३
तेव्हां ती ह्मणाली, "इस्राएलाचा देव परमेश्वर
असें ह्मणतो, ज्या मनुष्याने तुह्मास मजकडे पाठ-
विलें त्याला सांगा, २४ परमेश्वर असें ह्मणतो,
पाहा, मी या स्थानावर व याच्या राहणाऱ्यांवर
वाईट आणणार आहें; जें पुस्तक त्यानी यहूदा-
च्या राजापुढें वाचिलें आहे त्यांत जे शाप लिहि-
लेले आहेत, ते अवघेच. २५ कारण कीं त्यानी
मला सोडिलें आणि अन्य देवांस धूप जाळिला
आहे; त्यानी आपल्या हातांच्या सर्व कर्मांकडून
मला चिडविलें ह्मणून माझा क्रोध या स्थानावर
घातला जाईल आणि विझणार नाहीं. २६ आ-
णि यहूदाच्या राज्याने तुह्मास परमेश्वराला
विचारायास पाठविलें त्याला असें सांगा, जीं
वचनें त्वां ऐकिलीं आहेत त्यांविषयीं इस्राएलाचा
देव परमेश्वर असें ह्मणतो, २७ तुझें हृदय

मऊ होतें आणि या स्थानावर व याच्या लोकांवर
जीं देवाचीं वचनें तीं ऐकून तूं त्यापुढें नम्र झा-
लास आणि मजपुढें नम्र होऊन आपलीं वस्त्रें
फाडून मजपुढें रडलास, यामुळें म्याहि ऐकिलें
आहे, असें परमेश्वर ह्मणतो. २८ पाहा, मी
तुला तुझ्या पूर्वजांस मिळवीन, तेव्हां तूं सकुशल
आपल्या कबरेस मिळविला जासील, आणि जें
अवघें वाईट मी या स्थानावर आणि याच्या राह-
ण्यांवर आणणार आहें तें तुझे डोळे पाहणार ना-
हींत." मग त्यानी राजाला वर्त्तमान पोहंचविलें.
२९ तेव्हां राजाने निरोप पाठवून यहूदा व
यरूशालेम यांचे सर्व वडील एकत्र मिळविले.
३० आणि राजा व यहूदाचे सर्व मनुष्य व यरू-
शालेमचे राहणारे व याजक व लेवी व सर्व लोक
श्रेष्ठ कनिष्ठ वरतीं परमेश्वराच्या मंदिरास गेले,
आणि जें कराराचें पुस्तक परमेश्वराच्या मंदि-
रांत सांपडलें होतें त्याचीं सर्व वचनें त्याने त्यां-
च्या कानीं पडायाजोगीं वाचिलीं. ३१ आणि
राजाने आपल्या ठिकाणीं उभें राहून कराराचीं
जीं वचनें या पुस्तकांत लिहिलेलीं आहेत, तीं आ-
चरावीं आणि आपल्या जिवाने व बुद्धीने परमे-
श्वरास अनुसरावे आणि त्याच्या आज्ञा, त्याचीं
प्रमाणें व त्याचे नियम पाळावे असी संधा परमे-
श्वरापुढें केली. ३२ आणि यरूशालेमेंत व
बन्यामीनांत जे अवघे समक्ष होते ते संधेप्रमाणें
वागत असें त्याने केलें, आणि यरूशालेमच्या
राहणाऱ्यानी देवाच्या आपल्या पूर्वजांच्या देवा-
च्या संधेप्रमाणें केलें. ३३ आणि योशीयाने इस्रा-
एलाच्या संतानांच्या सर्व देशांतून सर्व मूर्त्ति
दूर केल्या, आणि इस्राएलांत जे समक्ष होते ते
अवघे आपला देव परमेश्वर याची सेवा करीत
असें त्याने केलें, मग त्याच्या सर्व दिवसांत त्यानी
आपला देव परमेश्वर याचें अनुसरण सोडिलें
नाहीं.

## अध्याय ३५.

आणि योशीयाने यरूशालेमेंत परमेश्वराला
वल्हांडण सण केला, आणि पहिल्या महि-
न्याच्या चौदाव्या दिवशीं लोकानी यज्ञपशु कापि-
ला. २ आणि त्याने याजक त्यांच्या कामांत
ठेविले, आणि परमेश्वराच्या मंदिराची सेवा
करायास त्यांस धीर दिल्हा. ३ आणि जे लेवी
अवघ्या इस्राएलास बोध करीत होते, जे परमेश्व-
राकडे पवित्र होते, त्यांस त्याने ह्मटलें, "इस्राए-
लाचा राजा दावीद याचा पुत्र शलमोन याने
जें मंदिर बांधिलें त्यांत पवित्र कोश ठेवा, त्याचा
भार तुमच्या खांद्यावर असूं नये; आतां तुह्मी
आपला देव परमेश्वर याची आणि त्याचे लोक
इस्राएल यांची सेवा करा. ४ आणि तुह्मी आ-
पल्या पूर्वजांच्या कुळांतून आपल्या वाटण्यांप्रमाणें
इस्राएलाचा राजा दावीद याचा पुत्र शलमोन
याच्या लेखाप्रमाणें आपल्याला सिद्ध करा. ५
तुमचे भाऊ जे लोक त्यांच्या पितृकुलांच्या वि-
भागांप्रमाणें आणि लेव्यांच्या पितृकुलाच्या विभा-
गाप्रमाणें पवित्र स्थानांत उभे राहा. ६ आणि
यज्ञपशु कापा आणि आपल्याला पवित्र करा,
आणि मोशाकडून जो नेम परमेश्वराने केला
त्याप्रमाणें तुमच्या भावानी करावें ह्मणून त्यांस
सिद्ध करा. ७ आणि योशीयाने जे अवघे लोक
समक्ष होते त्यांस कळपांतून कोंकरें व बकरे सर्व
वल्हांडण सणाच्या अर्पणांसाठीं तीस हजार हलके
व तीन हजार बैल दिल्हे; हे राजाच्या धनांतून
होते. ८ आणि त्याच्या प्रधानानी लोकांस, या-
जकांस व लेव्यांस उदारतेने अर्पणें दिल्हीं; दे-
वाच्या मंदिराचे अधिकारी हिल्कीया, जखार्या,
व यहीएल यानी याजकांस वल्हांडण सणाच्या
अर्पणांसाठीं दोन हजार व साहाशें कोंकरें आणि
तीन हजार बैल दिल्हे. ९ आणि कोनान्या व
शमाया व नथानएल, त्याचे भाऊ आणि हशा-
ब्या व यईएल व योजाबाद लेव्यांतले मुख्य
यानी वल्हांडण सणाच्या अर्पणांसाठीं लेव्यांस
पांच हजार कोंकरें आणि पांचशें बैल दिल्हे.
१० मग सेवा सिद्ध झाली आणि राजाच्या
आज्ञेप्रमाणें याजक आपल्या ठिकाणीं आणि ले-
वी आपापल्या वाटण्यांत उभे राहिले. ११ आणि
त्यानी यज्ञपशू कापिले, आणि त्यांच्या हातून या-
जकानी रक्त घेऊन शिंपडलें आणि लेव्यानी चा-
मडीं काढिलीं. १२ आणि त्यानी होम काढिले,
मोशाच्या पुस्तकांत जें लिहिलें त्याप्रमाणें पर-
मेश्वराला अर्पायास लोकांच्या पितृकुलांच्या

विभागप्रमाणें कांहीं द्यावें म्हणून बैलाचेंहि तसें
झालें. १३ आणि त्यानी विधीप्रमाणें यज्ञपशू
अग्नीनें भाजिले आणि दुसरीं पवित्र अर्पणें त्यानी
थाल्यांत, हंड्यांत, व तपेल्यांत, शिजवून लोकांस
लवकर वांटून दिल्हीं. १४ त्यानंतर त्यानी आ-
पल्यासाठीं आणि याजकांसाठीं सिद्ध केलें, कां कीं
याजक जे आहरोनाचे संतान ते रात्रीपर्यंत होम
व मेद अर्पण करण्याच्या कामांत होते, म्हणून
लेव्यानी आपल्यासाठीं आणि याजक जे आहरो-
नाचे संतान त्यांसाठीं सिद्ध केलें. १५ आणि
दावीद व आसाफ व हेमान व राजाचा मदर्शक
यदूथून यांच्या आज्ञेप्रमाणें गाणारे जे आसाफाचे
संतान ते आपल्या ठिकाणीं होते, आणि एकएका
दर्वाज्यास द्वारपाळ होते; त्यानी आपली सेवा
सोडायाची नव्हती, कां कीं त्यांचे भाऊ जे लेवी
त्यानी त्यांसाठीं सिद्ध केलें. १६ तर वल्हांडण
सण पाळयास आणि परमेश्वराच्या वेदीवर
होम करायास योशीया राजाच्या आज्ञेप्रमाणें
परमेश्वराची सर्व सेवा त्याच दिवशीं सिद्ध
झाली. १७ त्या वेळेस जीं इस्राएलाचीं संतानें
समक्ष होतीं त्यानी वल्हांडणसण व बेखमीर भा-
करीचा सण सात दिवस पाळिला. १८ आणि
शमुवेल भविष्यवाद्याच्या दिवसापासून त्यासा-
रिखा वल्हांडण सण इस्राएलांत पाळिला गेला
नव्हता, आणि योशीया व याजक व लेवी व सर्व
यहूदा व इस्राएल जे समक्ष होते, त्यानी आणि
यरूशालेमच्या लोकानी जो वल्हांडण सण पाळि-
ला त्यासारिखा इस्राएलाच्या कोणत्याहि राजानी
कधीं पाळिला नव्हता. १९ योशीयाच्या राजाच्या
अठराव्या वर्षीं हा सण पाळिला गेला.

२० हें सर्व झाल्यानंतर जेव्हां योशीयाने दे-
ऊळ सिद्ध केलें होतें, तेव्हां मिसराचा राजा
नखो फराथेजवळच्या खार्खमीशेवर लढायास
चढून आला, आणि योशीया निघून त्याच्या वि-
रुद्ध गेला. २१ तेव्हां त्याने त्याजकडे दूत पाठ-
वून सांगितलें, "हे यहूदाच्या राजा, माझें तुझें
काय आहे? आज तुजवर मी आलों नाहीं, केवळ
ज्या घराशीं माझें युद्ध आहे त्याजवर आलों,
आणि त्वरा करावी म्हणून देवानें मला आज्ञा
केली आहे; देव जो मजसीं आहे त्याने तुझा
नाश न करावा म्हणून त्यापासून निवृत्त राहा.
२२ तथापि नखोचीं जीं वचनें देवाकडून झालीं
तीं योशीया न ऐकून आपलें तोंड त्यापासून फिर-
वीना परंतु त्यासीं लढावें म्हणून तो आपला वेष
पालटून मगिद्दोच्या खोऱ्यांत लढायास गेला. २३
तेव्हां धनुर्धरानी योशीया राजाला तीर मारिले,
मग राजाने आपल्या चाकरांस म्हटलें, "मला घे-
ऊन जा, कां कीं मी फार दुखण्यास पडलों आ-
हें." २४ तेव्हां त्याच्या चाकरानी त्याला रथां-
तून काढून त्याच्या दुसऱ्या रथावर बसवून यरू-
शालेमेस नेलं, आणि तो मेला आणि आपल्या
पूर्वजांच्या एका कबरेंत पुरिला गेला, आणि सर्व
यहूदा व यरूशालेम यानी योशीयाकरितां शोक
केला. २५ आणि इर्मयाने योशीयाकरितां विलाप
केला, आणि आजपर्यंत सर्व गाणारे व गाणाऱ्या
आपल्या विलापानी योशीयाविषयीं बोलत अस-
तात, आणि त्यानी ते इस्राएलांत नियम असे केले
आहेत, आणि पाहा ते विलापांत लिहिलेले आ-
हेत. २६ आणि योशीयाच्या वरकड गोष्टी आणि
त्याचे परोपकार परमेश्वराच्या धर्मविधींत जे
लिहिलेले त्याप्रमाणें. २७ आणि त्याचीं कृत्यें
आद्य अंत्य पाहा हीं यहूदा व इस्राएल यांच्या
राजांच्या पुस्तकांत लिहिलेलीं आहेत.

## अध्याय ३६.

मग देशाच्या लोकानी योशीयाचा पुत्र यहोवा-
हाज घेऊन यरूशालेमेंत त्याच्या बापाच्या
ठिकाणीं राजा केला. २ यहोवाहाज राज्य करूं
लागला तेव्हां तो तेवीस वर्षांचा होता, आणि
यरूशालेमेंत त्याने तीन महिने राज्य केलें. ३
मग यरूशालेमेंत मिसराच्या राजाने त्याला का-
ढून दिल्हें आणि देशावर शंभर तालांत रुपें व
एक तालांत सोनें एवढा दंड नेमिला. ४ आणि
मिसराच्या राजाने त्याचा भाऊ एल्याकीम यहूदा
व यरूशालेम यांवर राजा केला, आणि त्याचें
नांव फिरवून यहोयाकीम ठेविलें, आणि नखोने
त्याचा भाऊ यहोवाहाज घेऊन मिसरांत नेला.
५ यहोयाकीम राज्य करूं लागला तेव्हां तो
पंचवीस वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत अ-
करा वर्षें राज्य करीत गेला आणि आपला देव

परमेश्वर याला वाईट वाटतें तें तो करी. ६
त्याजवर बाबेलचा राजा नबूखद्रेज्जार चढून
आला आणि त्याला बाबेलेस न्यावें ह्मणून बिड्या-
नी बांधिलें. ७ आणि नबूखद्रेज्जारानें परमेश्वरा-
च्या मंदिरचीं कित्येक पात्रें बाबेलेस नेऊन बाबेलेंत
आपल्या देवळांत ठेविलीं. ८ आणि यहोयाकी-
माच्या वरकड गोष्टी आणि जीं अघोर कर्मे त्यानें
केलीं तीं आणि त्याच्याठायीं जें सांपडलें तें, पाहा
हीं इस्राएल व यहूदा यांच्या राजांच्या पुस्तकांत
लिहिलेलीं आहेत, आणि त्याच्या ठिकाणीं त्याचा
पुत्र यहोयाखीन यानें राज्य केलें.
९ यहोयाखीन राज्य करूं लागला तेव्हां आठ
वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत त्यानें तीन
महिने व दाहा दिवस राज्य केलें, आणि परमे-
श्वराला वाईट वाटतें तें केलें. १० आणि वर्ष
फिरलें तेव्हां नबूखद्रेज्जार राजानें पाठवून त्याला
व परमेश्वराच्या मंदिरचीं मूल्यवान पात्रें बा-
बेलेस आणविलीं, आणि त्याचा भाऊ सिद्कीया
यास यहूदा व यरूशालेम यांवर राजा केलें.
११ सिद्कीया राज्य करूं लागला तेव्हां तो
एकवीस वर्षांचा होता, आणि यरूशालेमेंत अक-
रा वर्षे राज्य करीत गेला. १२ आणि आपला
देव परमेश्वर याला वाईट वाटतें तें तो करी;
परमेश्वराच्या मुखापासून भविष्य सांगणारा इ-
र्मया यापुढें तो नम्र झाला नाहीं. १३ आणि
ज्यानें नबूखद्रेज्जार राजा त्याकडून देवाची श-
पथ वाहविली होती त्यावर त्यानें फितूर केला,
आणि इस्राएलाचा देव परमेश्वर याकडे न
फिरावें असी त्यानें आपली मान ताठ केली, आ-
णि आपलें हृदय दृढ केलें. १४ आणि याजक
व लोक यांतल्या सर्व मुख्यांनी अन्य राष्ट्रांच्या
सर्व अघोर कर्मांप्रमाणें फार पातक केलें, आणि
परमेश्वरानें जें आपलें मंदिर यरूशालेमेंत पवित्र
ठरविलें होतें तें त्यांनी विटाळिलें. १५ आणि
त्यांच्या पूर्वजांचा देव परमेश्वर यानें पाहटेस
उठून आपल्या दूतांकडून वारंवार पाठविलें, कां
कीं त्यानें आपल्या लोकांवर आणि आपल्या वस्ती-
वर ममता केली. १६ परंतु उपाय न चाले एवढा
परमेश्वराचा कोप त्याच्या लोकांवर चढेपर्यंत
ते देवाच्या दूतांची थट्टा करीत आणि त्याचीं
वचनें तुच्छ मानीत आणि त्याच्या भविष्यवाद्यांचा
उपहास करीत असत. १७ मग देवानें त्याज-
वर खास्द्यांचा राजा आणिला, तेव्हां त्यानें त्या-
च्या पवित्रस्थानच्या मंदिरांत त्यांचे तरुण पुरुष
तरवारीनें वधिले, आणि तरुणावर किंवा तरुणीवर
वृद्धावर किंवा वयोधिकावर करुणा केली नाहीं;
त्यानें ते सर्व लोक त्याच्या हातीं दिल्हे. १८
आणि देवाच्या मंदिरचीं सर्व पात्रें मोठीं व ल-
हान आणि परमेश्वराच्या मंदिराचे निधि आणि
राजाचे व त्याच्या प्रधानांचे निधि हीं अवघीं
त्यानें बाबेलेस नेलीं. १९ आणि त्यांनी दे-
वाचें मंदिर जाळिलें आणि यरूशालेमेचा कोट
मोडून टाकिला, आणि तिचीं सर्व महाघरें अग्नीनें
जाळिलीं आणि तिची सर्व मूल्यवान सामग्री ना-
सिली. २० आणि जे तरवारीला चुकून शेष
राहिले ते त्यानें पाडाव करून बाबेलेस नेले, आ-
णि पारसाच्या राजाच्या स्थापनेपर्यंत ते त्याचे व
त्याच्या संतानांचे चाकर होते. २१ जें परमे-
श्वराचें वचन इर्मयाकडून झालें होतें तें पूर्ण
करायासाठीं देश आपले शाब्बाथ फेडीपर्यंत जि-
तका वेळ तो उजाड राहिला, तितका वेळ ह्मणजे
सत्तर वर्षे पूर्ण करून त्यानें शाब्बाथ पाळिला.
२२ आणि इर्मयाकडून जें परमेश्वराचें व-
चन झालें होतें तें सिद्धीस जावें ह्मणून पारसा-
चा राजा कोरेश याच्या पहिल्या वर्षी परमेश्व-
रानें पारसाचा राजा कोरेश याच्या आत्म्याला
प्रेरिलें, मग त्यानें आपल्या सर्व राज्यांतून घों-
षण करविलें आणि लिहवूनाहि दिल्हें कीं,
२३ "पारसाचा राजा कोरेश असें ह्मणतो,
आकाशांतला देव परमेश्वर यानें मला पृथ्वी-
तलीं सर्व राज्यें दिल्हीं आहेत, आणि यहूदांतल्या
यरूशालेमेंत त्याला मंदिर बांधावें ह्मणून त्यानें
मला आज्ञा केली आहे; त्याच्या सर्व लोकांतला
तुह्मामध्यें कोण आहे? त्याशीं त्याचा देव पर-
मेश्वर असावा, आणि तो वरतीं जावो."

# एज्रा.

## अध्याय १.

यिर्मयाकडून जें परमेश्वराचें वचन झालें होतें
तें सिद्धीस जावें ह्मणून पारसाचा राजा को-
रेश याच्या पहिल्या वर्षी परमेश्वराने पारसाचा
राजा कोरेश याच्या आत्म्याला प्रेरिलें, मग त्याने
आपल्या सर्व राज्यांत घोषण करविलें आणि लिह-
वूनहि दिल्हें कीं, २ "पारसाचा राजा कोरेश
असें ह्मणतो, आकाशांतला देव परमेश्वर याने
मला पृथ्वींतलीं सर्व राज्यें दिल्हीं आहेत, आणि
यहूदांतल्या यरूशालेमेंत त्याला मंदिर बांधावें
ह्मणून त्याने मला आज्ञा केली आहे. ३ त्याच्या
सर्व लोकांतला तुह्मामध्यें कोण आहे? त्याच्या-
संगतीं त्याचा देव असो, आणि त्याने वरतीं यहू-
दांतल्या यरूशालेमेस जाऊन इस्राएलाचा देव
परमेश्वर याचें मंदिर बांधावें; जो यरूशालेमेंत
आहे तोच देव आहे. ४ आणि जो कोणी उर-
लेला आहे ज्या कोणत्याहि स्थानांत तो प्रवास
करीत असेल, तेथें त्याला त्याच्या स्थानाच्या मनु-
ष्यांनी देवाचें मंदिर जें यरूशालेमेंत आहे त्या-
विषयींच्या स्वबुद्धीच्या अर्पणासुद्धां रुपें व सोनें व
धन व पशू देऊन त्याचें सहाय करावें."

५ तेव्हां यरूशालेमेंत जें परमेश्वराचें मंदिर
आहे तें बांधायास वरतीं जायाला ज्यांच्या आ-
त्म्याला देवानें प्रेरिलें होतें त्यासुद्धां यहूदा व
बन्यामीन यांचे मुख्य वडील व याजक व लेवी
उठले. ६ आणि त्यांच्या सर्व सभोंवते त्यांनी
सर्व स्वबुद्धीच्या अर्पणाशिवाय रुप्याचीं पात्रें, सो-
नें, द्रव्य, व पशू व मूल्यवान धन देऊन त्यांचे
हात दृढ केले. ७ आणि परमेश्वराच्या मंदिराचीं
जीं पात्रें नबूखादनेज्जाराने यरूशालेमेंतून काढून
नेऊन आपल्या देवांच्या घरांत ठेविलीं होतीं, तीं
कोरेश राजाने बाहेर काढिलीं. ८ तीं पारसा-
च्या कोरेश राजाने मिथ्रदाथ भांडाऱ्याच्या हातून
बाहेर काढून यहूदाचा अधिकारी शेशबज्जार
याजवळ मोजून दिल्हीं. ९ आणि त्यांची संख्या
हीच; सोन्याचीं तीस बहुगुणीं, रुप्याचीं हजार
बहुगुणीं, एकुणतीस सुऱ्या; १० सोन्याचे तीस
करंडे, रुप्याचे दुसरे करंडे चारशें व दाहा, आणि
दुसरीं भांडीं एक हजार; ११ सोन्याचीं व
रुप्याचीं सर्व पात्रें पांच हजार व चारशें होतीं;
तीं अवघीं शेशबज्जाराने जे पाडावकरून प्रवासी
बाबेलेहून यरूशालेमेस वर गेले त्यांच्यासंगतीं
वर आणिलीं.

## अध्याय २.

तर जे बाबेलेच्या नबूखादनेज्जार राजाने पाडाव
करून बाबेलेस नेले होते त्यांतले जे राष्ट्रांत
जन्मलेले पाडावपणाच्या प्रवासांतून वरतीं यरूशा-
लेमेस व यहूदास एकएक आपापल्या नगरास परत
आले. २ जे जरुब्बाबेलासंगतीं आले ते हेच;
येशूवा, नहेम्या, सराया, रएलाया, मोर्दखाइ,
बिल्शान, मिस्पार, बिग्वाइ, रहूम, बाअना, इस्रा-
एल लोकांच्या मनुष्यांची संख्या. ३ फारोशाचे
संतान दोन हजार एकशें व बाहत्तर. ४ शफा-
ट्याचे संतान तीनशें व बाहत्तर. ५ आरहाचे
संतान सातशें व पंच्याहत्तर. ६ फाहथमोवाबाचे
संतान येशूवा व योवाब यांच्या संतानांतले दोन
हजार आठशें व बारा. ७ एलामाचे संतान एक
हजार दोनशें व चौपन्न. ८ जत्तूचे संतान
नऊशें व पंचेताळीस. ९ जक्खाईचे संतान
सातशें व साठ. १० बानीचे संतान साहाशें व
बेचाळीस. ११ बेबाईचे संतान साहाशें व ते-
वीस. १२ अज्गादाचे संतान एक हजार दो-
नशें व बावीस. १३ अदोनीकामाचे संतान सा-
हाशें व सासष्ट. १४ बिग्वाईचे संतान दोन
हजार व छपन्न. १५ आदीनाचे संतान चारशें
व चौपन्न. १६ हिज्कीयाच्या आटेराचे संतान
अठ्याण्णव. १७ बेजाईचे संतान तीनशें व ते-
वीस. १८ योराचे संतान शंभर व बारा. १९

हाशूमाचे संतान दोनशें व तेवीस. २० गिब्बा-
राचे संतान पंच्याण्णव. २१ बेथलेहेमचे संतान
शंभर व तेवीस. २२ नटोफाचीं मनुष्यें छप्पन्न.
२३ अनाथोथचीं मनुष्यें शंभर व अठ्ठावीस. २४
आज्मावेथाचे संतान बेचाळीस. २५ किर्याथा-
रीम खफीरा व बएरोथ यांचे संतान सातशें व
त्रेताळीस. २६ रामा व गेबा यांचे साहाशें व
एकवीस. २७ मिख्मासचीं मनुष्यें शंभर व
बेवीस. २८ बेथएल व आई यांचीं मनुष्यें दोन-
शें व तेवीस. २९ नबोचे संतान बावन्न. ३०
माग्बीशचे संतान शंभर व छप्पन्न. ३१ दुसऱ्या
एलामचे संतान एक हजार दोनशें व चौपन्न.
३२ हारीमचे संतान तीनशें व वीस. ३३ लोद-
हादीद व ओनो यांचे संतान सातशें व पंचवीस.
३४ यरेखोचे संतान तीनशें व पंचेचाळीस. ३५
सनाचे संतान तीन हजार साहाशें व तीस.

३६ याजक; यदायाचे संतान येशूवाच्या कु-
ळांतले नऊशें व त्र्याहत्तर. ३७ इम्मेराचे संतान
एक हजार व बावन्न. ३८ पाश्हूराचे संतान एक
हजार दोनशें व सत्तेचाळीस. ३९ हारीमाचे
संतान एक हजार व सत्रा. ४० लेवी; येशूवा
व काद्मीएल यांचे संतान होदाव्याच्या संतानां-
तले चौऱ्याहत्तर. ४१ गाणारे; आसाफाचे सं-
तान शंभर व अठ्ठावीस. ४२ द्वारपाळांचे सं-
तान, शाल्लूमाचे संतान, आटेराचे संतान, टाल्मो-
नाचे संतान, अक्कूबाचे संतान, हटीटाचे संतान,
शोबाईचे संतान, सर्व मिळून शंभर व एकुण-
चाळीस.

४३ नथीनीम; जीहाचे संतान, हसूफाचे सं-
तान, टब्बाओथाचे संतान; ४४ केरोसाचे सं-
तान, सीअहाचे संतान, पादोनाचे संतान; ४५
लबानाचे संतान, हगाबाचे संतान, अक्कूबाचे
संतान; ४६ हागाबाचे संतान, शाम्लाईचे सं-
तान, हानानाचे संतान; ४७ गिद्देलाचे संतान,
गाहाराचे संतान, रआयाचे संतान; ४८ रजी-
नाचे संतान, नकोदाचे संतान, गज्जामाचे संतान;
४९ उज्जाचे संतान, पासेहाचे संतान, बेसाईचे
संतान; ५० आस्नाचे संतान, मऊनीमाचे सं-
तान, नफूसीमाचे संतान; ५१ बकबूकाचे सं-
तान, हकूफाचे संतान, हर्हूराचे संतान; ५२
बज्लूथाचे संतान, महीदाचे संतान, हर्शाचे
संतान; ५३ बार्कोसाचे संतान, सीसराचे सं-
तान, थामहाचे संतान; ५४ नजीहाचे संतान,
हटीफाचे संतान; ५५ शलमोनाच्या चाकरांचे
संतान, सोटाईचे संतान, सोफेरथाचे संतान,
परूदाचे संतान, ५६ यालाचे संतान, दर्को-
नाचे संतान, गिद्देलाचे संतान; ५७ शफा-
ट्याचे संतान, हट्टीलाचे संतान, अबाइमच्या
पोखेरेथाचे संतान, आमीचे संतान; ५८ सर्व
नथीनीम व शलमोनाच्या चाकरांचे संतान मि-
ळून तीनशें व ब्याण्णव होते. ५९ तेल्मेलाह,
तेल्हार्शा, खरूब, अद्दान, इम्मेर, एथून जे वर
आले ते हेच होते, परंतु ते इस्राएलांतले होते
किंवा नाहीं याविषयीं त्यांच्याने आपापलें पितृकुल
व आपापली वंशावळी दाखवेना. ६० दलायाचे
संतान, टोबीयाचे संतान, नकोदाचे संतान, सा-
हाशें व बावन्न.

६१ आणि याजकांच्या संतानांतले हबाया-
चे संतान, कोजाचे संतान, बार्जिलाईचे संतान,
त्याने बार्जिलाइ गिलादाची एक कन्या बायको
करून घेतली, आणि त्याला त्याचें नांव ठेविलें
गेलें. ६२ ह्यांची वंशपरंपरा गणली गेली त्यां-
मध्यें त्यांनी आपले लेख धुंडले परंतु ते सांपडले
नाहींत, मग ते याजकपणांतून भ्रष्ट झाले. ६३
आणि तिर्शाथाने त्यांस ह्मटलें, "ऊरीम व थुम्मीम
यांहींयुक्त याजक उभा होईपर्यंत तुह्मांला परम-
पवित्र वस्तू खावयाच्या नाहींत."

६४ सर्व समाज मिळून बेचाळीस हजार तीन-
शें साठ इतका होता. ६५ त्यांचे दास व त्यां-
च्या दासी यांशिवाय हीं सात हजार तीनशें व
सततीस होतीं, आणि त्यांमध्यें दोनशें गाणारे व
गाणाऱ्या होत्या. ६६ त्यांचीं घोडीं सातशें व
छत्तीस त्यांचीं खेंचरें दोनशें व पंचेचाळीस. ६७
त्यांचीं उंटें चारशें व पस्तीस गाढवें साहा हजार
सातशें वीस. ६८ आणि यरूशालेमेस जें पर-
मेश्वराचें मंदिर आहे, तेथें कित्येक मुख्य वडि-
लांनी येऊन देवाच्या घराकडे स्वबुद्धीने अर्पणें
केलीं, तें त्याच्या ठिकाणावर उभें करावें ह्मणून.
६९ त्यांनी आपल्या शक्तीप्रमाणें कामाच्या भांडा-
रांत एकसष्ट हजार दारक सोनें, व पांच हजार

शेर रुपें व याजकाचे शंभर अंगरखे दिल्हे. ७०
मग याजक व लेवी व कित्येक लोक व गाणारे व
द्वारपाल व नथीनीम आपल्या नगरांत आणि सर्व
इस्राएल आपल्या नगरांत वसते झाले.

## अध्याय ३.

आणि इस्राएलाचीं संतानें आपल्या नगरांत अस-
तांना सातवा महिना आला, तेव्हां लोक एक
मनुष्यासारिखे यरूशालेमेस एकत्र मिळाले. २
तेव्हां योजादाकाचा पुत्र येशूवा याने व याचे भाऊ
याजक व शाल्तीएलाचा पुत्र जरूब्बाबेल व त्याचे
भाऊ यानी उठून इस्राएलाच्या देवाची वेदी बां-
धिली, देवाकडचा मनुष्य मोशे याच्या नेमशा-
स्त्रांत जें लिहिलेलें त्याप्रमाणें तिजवर होम करावे
ह्मणून. ३ त्यानी वेदी तिच्या आधारांवर स्थापि-
ली, कां कीं देशाच्या लोकांमुळें ते भयाभीत होते,
आणि तिजवर त्यानी परमेश्वराजवळ होम केले;
सकाळीं व सायंकाळीं होम केले. ४ आणि त्या-
नी मंडपांचा सण लिहिलेल्याप्रमाणें पाळिला, आ-
णि प्रतिदिवसाचे होम संख्येने रीतीप्रमाणें प्रति-
दिवसीं जितके नेमलेले तितके केले. ५ यानंतर
नित्याचा होम अमावास्यांचें व परमेश्वराच्या
पवित्र ठरविलेल्या सर्व सणांचें आणि जें कोणीए-
कानें परमेश्वराजवळ स्वबुद्धीने अर्पण केलें त्या-
चेंहि अर्पिलें. ६ सातव्या महिन्याच्या पहिल्या
दिवसापासून परमेश्वराला ते होम करूं ला-
गले, परंतु परमेश्वराच्या देवळाचा पाया घातला
नव्हता. ७ आणि त्यानी पाथरवटांस व सुता-
रांस पैका दिल्हा, आणि जीदोन्यांस व सोऱ्यांस
खाणें पिणें व तेल दिल्हें, त्यांस पारसाचा राजा
कोरेश याची जी आज्ञा होती तिजप्रमाणें त्यानी
देवदारूंचीं लांकडें लबानोनांतून याफोच्या समु-
द्रास आणावीं ह्मणून. ८ आणि यरूशालेमेस जें
देवाचें मंदिर तेथें ते आल्यावर दुसऱ्या वर्षी दुस-
ऱ्या महिन्यांत शाल्तीएलाचा पुत्र जरुब्बाबेल व
योजादाकाचा पुत्र येशूवा व त्यांचे वरकड भाऊ जे
याजक व लेवी त्यानी आणि सर्व जे पाडावपणाच्या
प्रवासांतून यरूशालेमेस आले होते त्यानीहि प्रा-
रंभ केला आणि परमेश्वराच्या मंदिराच्या कामा-
वर अधिकार करायासाठीं लेव्यांस वीस वर्षांपासून
व वरतीं नेमून ठेविले. ९ तेव्हां देवाच्या मंदि-
रांतल्या काम करणाऱ्यांवर अधिकार करायास ये-
शूवा, आपले पुत्र व आपले भाऊ, काद्मीएल व
त्याचे पुत्र, यहूदाचे संतान यांसहित उभा राहि-
ला, हे नादादाचे पुत्रहि आपले पुत्र व आपले
भाऊ जे लेवी त्यांसहित; १० आणि बांधणा-
ऱ्यानी परमेश्वराच्या देवळाचा पाया घातला,
तेव्हां इस्राएलाचा राजा दावीद याच्या नेमाप्रमाणें
परमेश्वराला स्तवायास त्यानी याजक ल्यालेले,
करणें वाजविणारे व लेवी आसाफाचे संतान झां-
जा वाजविणारे उभे केले. ११ आणि त्यानी पर-
मेश्वर चांगला आहे इस्राएलावर त्याची दया
सनातन आहे ह्मणून स्तवीत त्याला आणि कृतज्ञ-
ता निवेदीत अनुक्रमाने गाइलें; आणि परमेश्व-
राच्या मंदिराचा पाया घातला गेला ह्मणून
सर्व लोकानी उंच स्वराने परमेश्वराची स्तुति
केली. १२ परंतु वृद्ध याजक व लेवी व मुख्य
वडील यांतले ज्यानी पहिलें मंदिर पाहिलें होतें,
असे बहुत या मंदिराचा पाया त्यांसमक्ष घातला
गेला तेव्हां मोठ्या शब्दाने रडत होते, आणि
बहुतहि हर्ष करून उंच शब्दाने प्रणाद करीत
होते. १३ ह्मणून लोकांच्याने लोकांचा हर्ष,
प्रणादाचा शब्द व रडण्याचा शब्द यांचा भेद
करवेना, कां कीं लोक मोठा शब्द करीत होते
आणि तो शब्द दूरवर ऐकिला गेला.

## अध्याय ४.

आणि प्रवासापासून परत आलेले लोक इस्रा-
एलाचा देव परमेश्वर याचें देऊळ बां-
धीत आहेत, असें यहूदा व बन्यामीन यांच्या श-
त्रूनी ऐकिलें. २ मग त्यानी जरुब्बाबेल व मुख्य
वडील यांजवळ येऊन ह्मटलें, "तुमच्या संगतीं
आह्मी बांधूं, कां कीं तुह्मासारिखे आह्मी तुमच्या
देवाला शोधितों, आणि अश्शूराचा राजा एसा-
र्हद्दोन याने आह्मास इकडे वर आणिलें त्याच्या
दिवसांपासून त्याजवळ आह्मी यज्ञ करीत अस-
तों." ३ तेव्हां त्यांस जरुब्बाबेल व येशूवा व
इस्राएलाचे वरकड मुख्य वडील ह्मणाले, "आ-
मच्या देवाचें मंदिर बांधायास तुमचा आमचा
कांहीं संबंध नाहीं; असी राजाने पारसाचा राजा

कोरेश याने आह्मास आज्ञा केली याप्रमाणें
आह्मी मात्र इस्राएलाचा देव परमेश्वर याचें
मंदिर बांधूं." ४ तेव्हां देशच्या लोकांनी यहूदा-
च्या लोकांचे हात बांधण्याविषयीं ढिले केले आ-
णि त्यांस त्रासिलें. ५ आणि त्यांचा संकल्प
मोडायासाठीं पारसाचा राजा कोरेश याचे सर्व
दिवस पारसाचा राजा दारयावेश याच्या राज्या-
पर्यंत त्यांजवर मंत्र्यांला मोल देऊन ठेवीत गेले.
६ आणि अहाश्वेरोशाच्या राज्यांत त्याच्या रा-
ज्याच्या प्रारंभीं त्यांनी यहूदा व यरूशालेम यां-
च्या राहणाऱ्यांवर दोषारोप लिहिला.

७ आणि अर्ताह्शश्तेच्या दिवसांत बिश्लाम,
मिथ्रदाथ, टाबएल, यांनी व यांच्या वरकड सो-
बत्यांनी पारसाच्या अर्ताह्शश्ते राजाकडे लिहिलें
आणि पत्राचा लेख अरामी भाषेंत लिहिला होता,
आणि त्याचा तरजुमा अरामींत केलेला होता. ८
रहूम मुख्य अधिकारी व शिम्शाइ लेखक यांनी
यरूशालेमेविषयीं अर्ताह्शश्ते राजाकडे असें एक
पत्र लिहिलें. ९ तेव्हां रहूम मुख्य अधिकारी
व शिम्शाइ लेखक व त्यांचे वरकड सोबती दी-
नाइ व अफार्साथ्खी, टार्पली, अर्फासी, आर्खवी,
बाबेली, शूशान्खी, देहावी व एलामी यांनी; १०
आणि जे वरकड लोक मोठ्या व गौरवित आ-
स्नप्पाराने अलिकडे आणून शोमरोनच्या नग-
रांत वसविले त्यांनी आणि नदीच्या अलिकडील
वरकडांनी अमुक वेळेस लिहिलें. ११ जें पत्र
त्यांनी अर्ताह्शश्ता राजा याजकडे पाठविलें त्या-
ची प्रत हीच आहे: "नदीच्या अलिकडले तुझे
सेवक आणि अमुक वेळेस; १२ राजाला क-
ळावें कीं जे यहूदी तुजजवळून आह्माकडे वर आ-
ले ते यरूशालेमेस येऊन तें फितूरी व दुष्ट नगर
बांधीत आहेत, त्यांनी तिचे कोट समाप्त केले,
आणि पाये जडून नीट केले आहेत. १३ आतां
राजाला माहीत व्हावें कीं जर हें नगर बांधलें
गेलें, आणि इचे कोट समाप्त झाले, तर ते लोक
शुल्क, कर व जकात देणार नाहींत, मग राजांच्या
भांडारांत तोटा येईल. १४ आतां आह्मी रा-
जाचें मीठ खातों आणि राजाची हानि पाहणें
आह्माला साजत नाहीं, ह्मणून आह्मी पाठवून
राजाला कळविलें आहे; १५ अशासाठीं कीं तु-
झ्या पूर्वजांच्या काळवृत्तांताच्या पुस्तकांत शोध क-
रावा ह्मणजे काळवृत्तांताच्या पुस्तकांत तुला साप-
डेल आणि कळेल कीं, हें नगर फितूरी नगर आणि
राजांला व राष्ट्रांला उपद्रव करणारें होतें, आणि
पुरातन कालापासून त्यामध्यें बंड करीत असत,
ह्मणून हें नगर उजाड केलें गेलें. १६ आह्मी
तर राजाला कळवितों आहों कीं जर हें नगर बां-
धलें गेलें आणि त्याचे कोट समाप्त झाले, तर
यावरून तुला नदीच्या अलिकडे कांहीं विभाग
राहणार नाहीं."

१७ मग राजाने रहूम मुख्य अधिकारी व
शिम्शाइ लेखक व त्यांचे वरकड सोबती जे
शोमरोनेंत राहत होते यांकडे आणि नदीपलि-
कडील वरकडांकडे कुशल प्रश्न आणि अमुक वेळ
याप्रमाणें आज्ञा पाठविली. १८ "जें पत्र तुह्मी
आह्माकडे पाठविलें तें मजपुढें स्पष्ट वाचिलें गेलें
आहे. १९ मग शोध करावा ह्मणून म्या आज्ञा
केली, तेव्हां असें सापडलें कीं पुरातन कालापासून
हें नगर राजावर फितुरी होई आणि त्यामध्यें फि-
तूर व बंड केलें जाई. २० आणि यरूशालेमेवर
पराक्रमी राजे होते, आणि नदीपलिकडच्या सर्व
देशांवर अधिकार करीत होते, आणि त्यांस शुल्क,
कर व जकात दिल्ही जाई. २१ आतां त्या मनु-
ष्यांनी तें काम सोडावें, आणि मजपासून आज्ञा
दिल्ही जाईपर्यंत हें नगरें बांधिलें न जावें ह्मणून
तुह्मी आज्ञा करा. २२ तर हें करायाला तुह्मी
न चुकावें ह्मणून सावध असा; राजाला उपद्रव
होई अशी हानि कां वाढावी?" २३ मग रहूम
व शिम्शाइ लेखक व त्यांचे सोबती यांपुढें अ-
र्ताह्शश्ते राजाच्या पत्राची प्रत वाचिली गेल्यावर
त्यांनी लवकर यरूशालेमेस यहूद्यांजवळ जाऊन
त्यांस जुलमाने व जबरीने निवृत्त केलें. २४ तेव्हां
जें देवाचें मंदिर यरूशालेमेस आहे त्याचें काम
निवृत्त झालें, आणि पारसाचा राजा दारयावेश
याच्या राज्याच्या दुसऱ्या वर्षापर्यंत निवृत्त राहिलें.

## अध्याय ५.

तेव्हां जे यहूदी यहूदांत व यरूशालेमेंत होते
त्यांस हाग्गाइ भविष्यवादी व इद्दोचा पुत्र
जखार्या हे भविष्यवादी इस्राएलाच्या देवाच्या

नामाने भविष्य सांगते झाले. २ तेव्हां शाल्तीं-
एलाचा पुत्र जरूब्बाबेल व योजादाकाचा पुत्र
येशूवा उठून यरूशालेमेस जें देवाचें मंदिर
आहे तें बांधूं लागले, आणि त्यांसंगतीं देवाचे
भविष्यावादी त्यांचें सहाय करीत होते. ३ त्या
वेळेस नदीच्या अलिकडील अधिकारी तात्नाइ
व शथार बोज्नाइ व त्यांचे सोबती त्यांजवळ
येऊन असें ह्मणाले, "हें मंदिर बांधायास आणि
हा कोट नीट करायास तुह्माला कोणी आज्ञा केली
आहे?" ४ तेव्हां आह्मी त्यांस असें ह्मटलें, "जे
पुरुष हें बांधणें बांधीत आहेत त्यांचीं नांवें कोणतीं
आहेत." ५ परंतु यहूद्यांच्या वडिलांवर त्यांच्या
देवाचें लक्ष होतें ह्मणून ही गोष्ट दारयावेशाला
पोहंचेपर्यंत त्यांच्याने त्यांस निवृत्त करवेना; तेव्हां
त्यांनी पत्र लिहून या गोष्टीविषयीं उत्तर केलें.

६ नदीच्या अलिकडील अधिकारी तात्नाइ
व शथारबोज्नाइ व त्याचे सोबती अफार्सखी
जे नदीच्या अलिकडे होते त्यांनी जें पत्र दारया-
वेश राजाकडे पाठविलें त्याची प्रत. ७ त्यांनी
त्याजकडे जें पत्र पाठविलें त्यांत असें लिहिलें
होतें, "दारयावेश राजाला सर्व कुशल असावें. ८
राजाला कळावें कीं आह्मी यहूदा राष्ट्रांत मोठ्या
देवाच्या मंदिरास गेलों आणि तें मोठ्या दगडांनी
बांधलेलें आहे आणि भिंतींत लांकडें घातलेलें
आहे आणि हें काम लवकर चालत आहे आणि
त्यांच्या हातीं सिद्धीस जात आहे. ९ तेव्हां
आह्मी त्या वडिलांस विचारितांना असें ह्मटलें,
'हें मंदिर बांधायास आणि हा कोट नीट करायास
तुह्माला कोणी आज्ञा केली?' १० आणि आह्मी
त्यांच्या मुख्य पुरुषांचीं नांवें लिहावीं आणि तुला
कळवावें ह्मणून आह्मी त्यांचीं नांवें पुसलीं. ११
तेव्हां त्यांनी आह्माला असें उत्तर केलें कीं, 'आ-
ह्मी आकाशाच्या आणि पृथ्वीच्या देवाचे सेवक
आहों, आणि बहुत वर्षांमागें जें मंदिर बांधिलें
होतें तें आह्मी बांधीत आहों, तें इस्राएलाच्या
एका मोठ्या राजाने बांधून समाप्त केलें होतें. १२
परंतु आमच्या पूर्वजांनी आकाशाच्या देवाला
चिडविल्यावर त्याने ते बाबेलेचा राजा नबूखद्-
नेज्झार खास्दी याच्या हातीं दिल्हे, तेव्हां त्याने
मंदिराचा नाश केला आणि लोक पाडाव करून
बाबेलेस नेले. १३ तथापि बाबेलेचा राजा को-
रेश याच्या पहिल्या वर्षी कोरेश राजाने हें देवा-
चें मंदिर बांधायास आज्ञा केली. १४ आणि
देवाच्या मंदिराचीं जीं सोन्याचीं व रुप्याचीं पात्रें
नबूखद्नेज्झाराने यरूशालेमेंतल्या देवळांतून का-
ढिलीं आणि बाबेलच्या देवळांत नेऊन ठेविलीं,
तीं कोरेश राजाने बाबेलच्या मंदिरांतून काढिलीं,
आणि ज्याचें नांव शेश्बज्झार ज्याला त्याने अ-
धिकारी केलें होतें त्याजवळ तीं दिल्हीं. १५
आणि त्याला त्याने ह्मटलें, 'तूं हीं पात्रें घेऊन
जाऊन यरूशालेमेंतल्या देवळांत ठेव, आणि दे-
वाचें मंदिर त्याच्या ठिकाणावर बांधलें जावें.'
१६ तेव्हां त्या शेश्बज्झाराने येऊन यरूशाले-
मेंत जें देवाचें मंदिर आहे त्याचा पाया घातला,
आणि तेव्हांपासून आजपर्यंत तें बांधलें जात आहे
आणि समाप्त झालें नाहीं. १७ आतां जर राजाला
बरें वाटेल तर यरूशालेमेंत हें देवाचें मंदिर
बांधायास कोरेश राजाने आज्ञा केली हें वास्त-
विक आहे कीं नाहीं, ह्मणून तेथें बाबेलेस जें
राजाचें भांडागार आहे त्यांत शोध करावा, मग
या गोष्टीविषयीं राजाने आपला मनोरथ आह्मा-
कडे सांगून पाठवावा."

## अध्याय ६.

तेव्हां दारयावेश राजाने आज्ञा केली, मग बा-
बेलेस जेथें निधि ठेविलेले होते, तेथें दफ्तरखा-
न्यांत कित्येकांनी शोध केला. २ आणि मादाइ
राष्ट्रांतल्या अखमथास राजवाड्यांत एक दफ्तर
सांपडलें, त्यांत असें लिहिलें होतें, ३ "कोरेश
राजाच्या पहिल्या वर्षी यरूशालेमेस जें देवाचें
मंदिर त्याविषयीं कोरेश राजाने असी आज्ञा
केली कीं मंदिर जेथें यज्ञ करीत असत तें ठिकाण
त्याचे पाये घातले गेल्यावर बांधलें जावें, त्याची
उंची साठ हात, आणि त्याची रुंदी साठ हात
असावी. ४ मोठ्या दगडांचे तीन थर आणि
नव्या लांकडांचा एक थर असावा, आणि त्याचा
खर्च राजवाड्यांतून दिल्हा जावा. ५ आणि दे-
वाच्या मंदिराचीं सोन्याचीं व रुप्याचीं पात्रें जीं
नबूखद्नेज्झाराने यरूशालेमेंतल्या देवळांतून का-
ढून बाबेलेस नेलीं तीं परत द्यावीं, आणि यरू-

शालेमेंतल्या देवळांस नेऊन त्यांच्या ठिकाणास
देवाच्या मंदिरांत ठेवावीं. ६ आतां नदी प-
लिकडील अधिकाऱ्या तातनाइ, शथारबोजनाइ,
तुह्मी आपले सोबती जे अफार्सखी त्यांसुद्धां
जे नदीच्या पलिकडे आहां तेथून दूर असा.
७ देवाच्या या मंदिराचें काम असूं द्या; यहू-
द्यांच्या अधिकाऱ्याने व यहूद्यांच्या वडिलानी हें
देवाचें मंदिर त्याच्या ठिकाणावर बांधावें. ८
आणि हें देवाचें मंदिर बांधायासाठीं तुह्मी यहू-
द्यांच्या वडिलांस काय करावें याविषयीं म्या असी
आज्ञा केली आहे कीं त्यानी स्तब्ध न व्हावें ह्मणून
राजाच्या द्रव्यांतून ह्मणजे नदीच्या पलिकडील
शुल्कांतून त्या पुरुषांस खर्च लागलाच दिल्हा
जावा. ९ आणि आकाशाच्या देवाच्या होमां-
साठीं त्यांस जें कांहीं पाहिजे ह्मणजे गोऱ्हे, एडके,
व कोंकरें, गहूं, मीठ, द्राक्षरस व तेल यरूशाले-
मेंतल्या याजकांच्या नेमाप्रमाणें त्यांस प्रतिदिवसीं
अखंड दिल्हें जावें. १० अशासाठीं कीं त्यानी
आकाशाच्या देवाला सुवासांचीं अर्पणें करावीं,
आणि राजाच्या व त्याच्या पुत्रांच्या जीवनासाठीं
प्रार्थना करावी. ११ आणि म्या आज्ञा केली
आहे कीं जो कोणी या आदेशाला पालटील त्या-
च्या घरांतून लांकूड काढून उभें करून त्यावर तो
अडकला जावा, आणि यामुळें त्याचें घर उकरडा
केलें जावें. १२ आणि यरूशालेमेस जें देवाचें
मंदिर आहे तें बिघडायास किंवा नासायास जो
कोणी राजा अथवा लोक आपला हात लावील,
त्याला ज्या देवानें आपलें नाम तेथें वसविलें
आहे तो त्याचा नाश करो; म्या दारयावेशानेच
आज्ञा केली आहे, ती लवकर साधली जावी."

१३ तेव्हां जें दारयावेश राजानें सांगून पाठ-
विलें होतें त्याप्रमाणें नदीच्या अलिकडील अधि-
कारी तात्नाइ, शथारबोजनाइ व त्यांचे सोबती
यानी लवकर केलें. १४ आणि हाग्गाइ भविष्य-
वादी व इद्दोचा पुत्र जखार्या यांच्या भविष्य सां-
गण्याकडून यहूद्यांचे वडील बांधीत आणि काम
सिद्धीस नेत गेले, आणि इस्राएलाच्या देवाच्या
आज्ञेवरून आणि कोरेश व दारयावेश व अर्ता-
हशस्ते पारसाचे राजे यांचेहि आज्ञेवरून त्यानी
बांधून समाप्त केलें. १५ आणि दारयावेश रा-
जाच्या राज्याच्या साहाव्या वर्षीं अदार महिन्या-
च्या तिसऱ्या दिवसीं हें मंदिर समाप्त झालें.

१६ आणि इस्राएलाचीं संतानें, याजक व लेवी
व प्रवासचे वरकड लोक यानी देवाच्या या मं-
दिराचें प्रतिष्ठापन आनंदानें केलें. १७ आणि
त्यानी देवाच्या या मंदिराच्या प्रतिष्ठापनास शंभर
बैल, दोनशें मेष, चारशें कोंकरें, आणि अवघ्या
इस्राएलाकरितां इस्राएलाच्या वंशांच्या संख्येप्रमाणें
बारा बोकड पापहारक पशुयज्ञ केले. १८ आणि
मोशाच्या पुस्तकांत जें लिहिलें त्याप्रमाणें त्यानी
यरूशालेमेंतल्या देवाच्या सेवेसाठीं याजक त्यां-
च्या वर्गांप्रमाणें आणि लेवी त्यांच्या वांटण्यांप्रमाणें
स्थापिले. १९ आणि पहिल्या महिन्याच्या चौदा-
व्या दिवसीं प्रवासच्या लोकानी वल्हांडण सण पा-
ळिला. २० कां कीं याजक व लेवी एकसारिखे
शुद्ध झाले होते; ते अवघे शुद्ध होते आणि प्रवा-
सच्या सर्व लोकांसाठीं आणि आपले भाऊ जे
याजक त्यांसाठीं व आपल्यासाठीं त्यानी वल्हांड-
णांत यज्ञपशू कापिले. २१ आणि जीं इस्राएला-
चीं संतानें पाडावपणाच्या प्रवासांतून परत आलीं
होतीं, त्यानी आणि इस्राएलाचा देव परमेश्वर
यास शोधायास जे देशच्या विधर्मजातींच्या अशु-
द्धीपासून वेगळे होऊन त्यांकडे आले होते त्यानींहि
खाल्लें. २२ आणि सात दिवस बेखमीर भाक-
रीचा सण हर्षानें पाळिला, कां कीं देव ह्मणजे
इस्राएलाचा देव याच्या मंदिराच्या कामांत त्यांचे
हात दृढ करायाला परमेश्वरानें अश्शूराच्या रा-
जाचें मन त्यांकडे फिरवून त्यांस हर्षित केलें होतें.

## अध्याय ७.

या गोष्टींनंतर पारसाचा राजा अर्ताहशस्ते या-
च्या राज्यांत एज्रा हा सरायाचा पुत्र, हा
अजार्याचा पुत्र, हा हिल्कीयाचा पुत्र; २ हा
शालूमाचा पुत्र, हा जादोकाचा पुत्र, हा अही-
टूबाचा पुत्र; ३ हा अमार्याचा पुत्र, हा अ-
जार्याचा पुत्र, हा मरोयाथाचा पुत्र; ४ हा
जराह्याचा पुत्र, हा उज्जीचा पुत्र, हा बुक्कीचा
पुत्र; ५ हा अबीशुवाचा पुत्र, हा फीन-
हासाचा पुत्र, हा एलाजाराचा पुत्र, हा मुख्य
याजक आहरोन याचा पुत्र. ६ तोच एज्रा

बाबेलेहून वरतीं गेला, आणि मोशाचें जें शास्त्र
इस्राएलाचा देव परमेश्वर याने दिल्हें होतें
त्यांत तो प्रवीण लेखक होता, आणि त्याजवळ जो
त्याचा देव परमेश्वर याचा हात त्याप्रमाणें
राजाने त्याच्या सर्व अर्जीप्रमाणें त्याला दिल्हें.
७ आणि अर्ताहशास्ते राजाच्या सातव्या वर्षी
इस्राएलाच्या संतानांतले याजक व लेवी व गायक
व द्वारपाल व नथीनीम यांतले कित्येक वरतीं
यरूशालेमेस गेले. ८ राजाच्या सातव्या वर्षी
पांचव्या महिन्यांत तो यरूशालेमेस आला. ९
कां कीं पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवसीं तो
बाबेलेहून वरतीं आऊं लागला, आणि त्याजवर
जो त्याच्या देवाचा चांगला हात त्याप्रमाणें तो
पांचव्या महिन्याच्या पहिल्या दिवसीं यरूशा-
लेमेस आला. १० कां कीं परमेश्वराच्या धर्म-
विधीस शोधायास आणि आचरायास आणि इ-
स्राएलांत नेम व न्याय शिकवायास एज्राने आ-
पलें मन सिद्ध केलें होतें.

११ आणि एज्रा याजक लेखक इस्राएलाजवळ
जे परमेश्वराचे नेम व आज्ञा त्यांच्या वचनांचा
लेखक झाला जें पत्र अर्ताहशास्ते राजाने दिल्हें
त्याची प्रत हीच आहे; १२ "आकाशाच्या देवा-
च्या धर्मविधीचा समापन्न लेखक एज्रा याजक
याला राजांचा राजा अर्ताहशास्ते अमुक वेळेस आ-
ज्ञा देतो. १३ म्या आज्ञा केली आहे कीं माझ्या
राष्ट्रांत इस्राएल लोकांत व त्याचे याजक व लेवी,
यांतले जे यरूशालेमेस जायाला इच्छितात त्या
सर्वांनी तुजसंगतीं जावें. १४ कां कीं राजा व
त्याचे सात मंत्री यांपासून तू अशासाठीं पाठविले-
ला आहेस कीं तुझ्या हातीं जो देवाचा धर्मविधि
आहे त्याप्रमाणें यहूदा व यरूशालेम याविषयीं
शोध करावा. १५ आणि इस्राएलाच्या ज्या दे-
वाचा निवास यरूशालेमेंत आहे त्याला जें रुपें
व सोनें राजाने व त्याच्या मंत्र्यानी स्वमनोरथाने
दिल्हें आहे तें. १६ आणि जे लोक व याजक आप-
ल्या देवाचें जें मंदिर यरूशालेमेंत आहे त्यासाठीं
स्वबुद्धीचें अर्पण करीत असतील त्यांच्या स्वबुद्धी-
च्या अर्पणासुद्धां जें रुपें व सोनें सर्व बाबेल राष्ट्रांत
तुला मिळेल तें अवघेंहि न्यावें. १७ त्यां हा
पैका देऊन बैल, मेष, कोंकरें, व त्यांचीं अन्नार्पणें
व त्यांचीं पेय अर्पणें लवकर विकत घेऊन यरू-
शालेमेंत जें तुमच्या देवाचें मंदिर आहे त्याच्या
वेदीवर अर्पावीं ह्मणून. १८ आणि रुपें व सोनें
यांच्या शेषाचें करायास तुला व तुझ्या भावांस
जें बरें वाटेल, तें तुह्मी आपल्या देवाच्या मनो-
रथाप्रमाणें करा. १९ आणि तुझ्या देवाच्या
मंदिराच्या सेवेसाठीं जीं पात्रें तुला दिल्हेलीं आ-
हेत तीं यरूशालेमच्या देवापुढें सोंपून दे. २०
आणि तुझ्या देवाच्या मंदिराला अणखी जें कांहीं
पाहिजे जें तुला द्यायास पडेल तें राजाच्या भांडा-
रांतून दे. २१ आणि म्या म्याच अर्ताहशास्ते
राजाने नदीपलिकडच्या सर्व भांडाऱ्यांस अशी
आज्ञा केली आहे कीं, जें कांहीं एज्रा याजक आ-
काशाच्या देवाच्या धर्मविधीचा लेखक तुह्माजवळ
मागेल तें लवकर करावें. २२ शंभर तालांत
रुपें, व शंभर कोर गहूं, व शंभर बाथ द्राक्षा-
रस, व शंभर बाथ तेल, व मीठ अपरिमित एवढें.
२३ जें कांहीं आकाशाच्या देवाने आज्ञापिलेलें
आहे तें आकाशाच्या देवाच्या मंदिराला चौकशीने
करावें, कां कीं राजाच्या राष्ट्रावर व त्याच्या पुत्रां-
वर कोप कां असावा? २४ आणि आह्मी तु-
ह्माला कळवितों कीं सर्व याजक व लेवी, गायक,
द्वारपाल, नथीनीम, आणि देवाच्या या मंदिराचे
सेवक यांवर शुल्क कर, किंवा जकात ठेवायास
कोणाला अधिकार नाहीं. २५ आणि हे एज्रा,
जें तुझ्या देवाचें ज्ञान तुझ्या हातीं आहे त्या-
प्रमाणें तूं शास्ते व न्यायाधीश नेमून ठेव, त्या-
नी नदीपलिकडचे जे सर्व लोक तुझ्या देवाच्या
धर्मविधींचे जे सर्व जाणणारे त्यांचा न्याय करावा
ह्मणून आणि जे जाणत नाहींत त्यांस तुह्मी शि-
कवा. २६ आणि जो कोणी तुझ्या देवाचा विधि
व राजाचा विधि आचरणार नाहीं, त्याला शासन
लवकर केलें जावें, तें मरणाचें किंवा निर्वासनाचें
किंवा धनदंडाचें किंवा बंदीचें असो."

२७ आमच्या पूर्वजांचा देव परमेश्वर सुवं-
दित असो; त्याने यरूशालेमेंत जें परमेश्वरा-
चें मंदिर आहे तें सुशोभित करावें असें राजाच्या
मनांत घातलें आहे. २८ अणखी त्याने राजा
व त्याचे मंत्री व राजाचे सर्व पराक्रमी प्रधान
यांची कृपादृष्टि मजवर होई असें केलें; आणि

माझा देव परमेश्वर याचा हात मजवर होता,
त्याप्रमाणें मी सबळ झालों, आणि मजसंगतीं व-
रतीं जायासाठीं म्या इस्राएलाहून मुख्य जन
जमविले.

## अध्याय ८.

आणि अर्ताहशश्ते राजाच्या राजांत जे मजसं-
गतीं बाबेलेहून वरतीं आले त्यांचे मुख्य
वडील हेच, आणि त्यांची परंपरा हीच आहे;
२ फीनहासाच्या संतानांतला गेर्शोम, ईथामारा-
च्या संतानांतला दानीएल, दावीदाच्या संतानां-
तला हट्टूश; ३ शखान्याच्या संतानांतला फा-
रोशाच्या संतानांतला जखार्या, आणि त्यासंगतीं
पुरुषांतले दीडशे वंश परंपरेने गणले गेले; ४
पाहाथमोवाबाच्या संतानांतला जराह्याचा पुत्र
५. एल्यहोएनाइ, आणि त्यासंगतीं दोनशें पुरुष;
शखान्याच्या संतानांतला याहजीएलाचा पुत्र,
आणि त्यासंगतीं तीनशें पुरुष: ६ आदीनाच्या
संतानांतला योनाथानाचा पुत्र एबेद, आणि त्यासं-
गतीं पन्नास पुरुष; ७ आणि एलामाच्या सं-
तानांतला अथाल्याचा पुत्र यशाया, आणि त्या-
संगतीं सत्तर पुरुष; ८ आणि शफाट्याच्या
संतानांतला मीखाएलाचा पुत्र जबद्या, आणि
त्यासंगतीं ऐशीं पुरुष; ९ योवाबाच्या संतानां-
तला यहीएलाचा पुत्र ओबद्या, आणि त्यासंगतीं
दोनशें अठरा पुरुष; १० आणि शलोमीथा-
च्या संतानांतला योसिफ्याचा पुत्र, आणि त्या-
संगतीं एकशें व साठ पुरुष; ११ आणि बे-
बाईच्या संतानांतला बेबाईचा पुत्र जखार्या, आ-
णि त्यासंगतीं अठ्ठावीस पुरुष; १२ आणि अज्-
गादाच्या संतानांतला हक्काटानाचा पुत्र योहानान,
आणि त्यासंगतीं शंभर व दाहा पुरुष; १३
आणि अदोनीकामाच्या संतानांतले शेवटले आणि
त्यांचीं नांवें हींच, एलीफेलेट, यईयेल व शमा-
या आणि त्यासंगतीं साठ पुरुष; १४ आणि
बिग्वाईच्या संतानांतले ऊथाइ व जब्बूद आ-
णि त्यासंगतीं सत्तर पुरुष.

१५ आणि आहवाकडे जी नदी वाहती तिच्या-
जवळ म्या त्यांस जमविलें; तेथें आह्मी डेरे दे-
ऊन तीन दिवस राहिलों, आणि म्या लोकांस व
याजकांस पाहिलें, तेव्हां मला लेवीच्या संतानांतले
कोणी सांपडले नाहीं. १६ मग म्या पाठवून
एलीएजेर, अरीएल, शमाया, एलनाथान व या-
रीब व एल्नाथान व नाथान व जखार्या व मशु-
ल्लाम या मुख्यांस, आणि योयारीब व एल्नाथान
या सुज्ञ मनुष्यांस बोलाविले. १७ आणि खा-
सिफ्या स्थानांतला मुख्य जो इद्दो त्याजकडे म्या
त्यांस आज्ञा दिल्ही, आणि खासिफ्या स्थानांतल्या
इद्दोसीं आणि त्याचे भाऊ जे नथीनीम त्यांसीं बो-
लायाला असीं वचनें त्यांच्या मुखांत घातलीं कीं,
आमच्या देवाच्या मंदिरासाठीं सेवक आह्माकडे
आणावे. १८ मग आह्मावर आमच्या देवाचा जो
चांगला हात त्याप्रमाणें त्यांनी आह्माकडे इस्राए-
लाचा पुत्र लेवी याचा पुत्र माह्ली याच्या संता-
नांतला समंजस मनुष्य आणिला, आणि शेरेब्या
व त्याचे पुत्र व त्याचे भाऊ अठरा. १९ आ-
णि हशाब्या व त्यासंगतीं मरारीच्या संतानांतला
यशाया त्याचे भाऊ व त्याचे पुत्र वीस. २०
आणि दावीदाने व अधिकाऱ्यांनी जे नथीनीम
लेव्यांच्या सेवेसाठीं नेमून दिल्हे होते, त्यांतले
दोनशें व वीस नथीनीम; ते अवघे नामांनी
लिहिलेले होते.

२१ तेव्हां तेथें आहवाच्या नदीजवळ म्या
उपासाची घोषणा करविली; आह्मी आपल्या दे-
वापुढें आत्मपीडन करून त्याजवळ आपल्यासाठीं
व आपल्या पोरांसाठीं व आपल्या सर्व संपत्तीसाठीं
नीट मार्ग मागावा ह्मणून. २२ कां कीं वाटेंत वै-
ऱ्यावर आमचें साहाय करायासाठीं सैन्य व स्वार
राजाजवळ मागायास मला लाज वाटली, कां तर
आह्मी राजाला ह्मटलें होतें कीं, "आमच्या देवा-
चा हात त्याजकडे सर्व पाहणाऱ्यांवर हितासाठीं
आहे परंतु त्याचें बल व त्याचा क्रोध त्याच्या सर्व
सोडणाऱ्यांवर आहे." २३ तर आह्मी उपास
करून याविषयीं आपल्या देवाजवळ प्रार्थना केली,
तेव्हां तो आह्माला प्रसन्न झाला. २४ मग म्या
याजकांच्या मुख्यांतले बारा जण, शेरेब्या, हशा-
ब्या, आणि त्यांसहित त्यांच्या भावांतले दाहा जण
वेगळे केले. २५ आणि त्यांजकडे रुपें व सोनें
व पात्रें आमच्या देवाच्या मंदिराचें जें अर्पण
राजाने व त्याच्या मंत्र्यांनी व त्याच्या अधिका-

त्यानी व अवघ्यासमक्ष इस्राएल्यानी अर्पिलें होतें
तें तोलून दिल्हें. २६ म्या त्याकडे साडे सात-
शें तालांत रुपें व रुप्याचीं पात्रें शंभर तालांतांचीं
व शंभर तालांत सोनें; २७ आणि सोन्याचे वीस
करंडे हजार दारकाचे आणि चांगल्या उजळ
पितळाचीं दोन पात्रें सोन्याएवढीं मूल्यवान, हीं
तोलून दिल्हीं. २८ आणि त्यांस म्हटलें, "तुम्ही
परमेश्वराकडे पवित्र आहां; पात्रेंहि पवित्र आ-
हेत, आणि रुपें व सोनें तुमच्या पूर्वजांचा देव
परमेश्वर याकडे स्वबुद्धीचें अर्पण आहे. २९
यरूशालेमेस परमेश्वराच्या मंदिराच्या कोठ-
ड्यांत याजक व लेवी यांच्या मुख्यांसमोर आणि
इस्राएलाच्या वडिलांतल्या मुख्यांसमोर तुम्ही तीं
तोलून द्याल तोंपर्यंत जागून संभाळा." ३०
मग याजक व लेवी यानी रुपें व सोनें व पात्रें
यांचा तोल घेतला; तीं यरूशालेमेस आमच्या
देवाच्या मंदिरास आणावीं म्हणून.

३१ तेव्हां पहिल्या महिन्याच्या बाराव्या दि-
वशीं आम्ही यरूशालेमेस जायाला आहवाच्या
नदीहून निघून चाललों, आणि आम्हावर आमच्या
देवाचा हात होता आणि त्याने आम्हास वैऱ्या-
च्या व वाटेवरल्या टपणाऱ्यांच्या हातांतून सोड-
विलें. ३२ आणि आम्ही यरूशालेमेस येऊन
तेथें तीन दिवस राहिलों. ३३ आणि चौ-
थ्या दिवशीं आमच्या देवाच्या मंदिरांत रुपें व
सोनें व पात्रें ऊरीया याजकाचा पुत्र मरेमोथ या-
कडे तोललीं गेलीं, आणि यासंगतीं फीनहासाचा
पुत्र एलाजार होता, आणि यांसंगतीं येशूवाचा
पुत्र योजाबाद, आणि बिन्नूयाचा पुत्र नोवाद्या
लेवी होते. ३४ तीं एकएकाच्या संख्येने तोलाने
तोललीं गेलीं, आणि त्या वेळेस सर्व तोल लिहि-
ला गेला. ३५ तेव्हां जे पाडावपणाच्या प्रवासां-
तून आले त्यानी इस्राएलाच्या देवाला होम केला;
अवघ्या इस्राएलाकरितां बारा बैल, शाण्णव मेष,
सत्याहत्तर कोंकरें, बारा बोकड, हे पापहारक यज्ञा-
साठीं आर्पिले; हे अवघे परमेश्वराला होम होते.
३६ आणि नदीच्या अलिकडे जे राजाचे वकील
व अधिकारी होते त्यांकडे त्यानी राजाच्या आज्ञा
दिल्या, मग त्यानी लोकांचा व देवाच्या मंदिरा-
चा उपकार केला.

## अध्याय ९.

ह्या गोष्टी झाल्यावर मुख्यजन माझ्याजवळ ये-
ऊन म्हणाले, "इस्राएल लोक व याजक व
लेवी देशाच्या लोकांपासून वेगळे राहिले नाहींत;
खनानी, हित्ती, परिज्जी, यबूसी, आम्मोनी, मो-
वाबी, मिसरी, व अमोरी, यांच्या अघोर कर्मां-
प्रमाणें ते चालतात. २ कां कीं त्यानी आपल्या-
ला व आपल्या पुत्राला त्यांच्या कन्या घेतल्या
आहेत, येणेंकरून पवित्र प्रजेने आपल्याला देशा-
च्या लोकांशीं मिसळिलें आहे, आणि मुख्य जन
व अधिकारी यांचा हात या पातकांत मुख्य आहे."
३ ही गोष्ट म्या ऐकिली तेव्हां मी आपलें पांघरूण
व आपला झगा फाडून आपल्या डोक्याचे व दा-
ढीचे केंस उपटून विस्मित बसलों. ४ तेव्हां पाडाव
केलेल्यांच्या पातकामुळें जे इस्राएलाच्या देवाच्या
वचनांमुळें कांपत होते ते अवघे माझ्याजवळ एकत्र
मिळाले, आणि संध्याकाळच्या यज्ञाच्या वेळेपर्यंत
मी विस्मित बसलों. ५ आणि संध्याकाळच्या
यज्ञाच्या वेळेस मी आपल्या आत्मपीडनावरून
उठलों, आणि आपलें पांघरूण व झगा फाडून आ-
पले गुढघे टेंकून आपले हात आपला देव परमे-
श्वर याकडे पसरिले. ६ आणि मी म्हणालों,
"हे माझ्या देवा माझ्या देवा, मला तुजकडे आ-
पलें तोंड वर करायास लज्जा व त्रपा वाटती, कां
कीं आमचे अन्याय आमच्या डोक्यावरतीं वाढले
आहेत, आणि आमचा दोष आकाशापर्यंत मोठा
झाला आहे. ७ आम्ही आपल्या पूर्वजांच्या दिव-
सांपासून आजपर्यंत मोठ्या दोषांत राहिलों आहों,
आणि आम्ही आपले अन्यायामुळें आपले राजे व
याजक यांसुद्धा देशांच्या राजांच्या हातीं तरवारी-
ला, पाडावपणाला, लुटीला व मुखत्रपेला आज-
च्याप्रमाणें दिल्हे गेलों आहों. ८ आणि आम्हा-
ला वांचलेलें शेष ठेवायास आणि आपल्या पवित्र
स्थानांत आम्हास मेख द्यायास आतां अल्प मात्र
आमचा देव परमेश्वर यापासून कृपा झाली
आहे: आमच्या देवाने आमचे डोळे प्रकाशित
करावे आणि आमच्या दासपणांत आम्हाला थोडें
संजीवन द्यावें म्हणून. ९ कां कीं आम्ही दास
होतों, तथापि आमच्या दासपणांत आमच्या देवाने

आह्मास सोडिलें नाहीं, परंतु पारसाच्या राजांची
कृपादृष्टि आह्मावर होई असें त्याने केलें आहे;
आमच्या देवाचें मंदिर उंचवायास त्याचे मोड-
लेले ढीग उभारायास आह्मास यहूदांत व यरू-
शालेमेंत भिंत घालवयास आह्मास संजीवन घावें
ह्मणून. १० आणि आतां हे आमच्या देवा,
यानंतर आह्मी काय ह्मणूं? कां कीं आह्मी तुझ्या
आज्ञा सोडिल्या आहेत. ११ ज्या आज्ञा त्वां
आपले सेवक भविष्यवादी यांकडून आज्ञापून असें
ह्मटलें कीं, "ज्या देशाचें धारण करायास तुह्मी
जातां तो देश देशांच्या लोकांच्या विटाळाने त्यां-
च्या अघोरकर्मांनी विटाळलेला आहे, ज्या त्यानी
आपल्या विटाळाने त्याला सर्वत्र भरलें आहे.
१२ तर आतां तुह्मी आपल्या कन्या त्यांच्या
पुत्रांला देऊं नका, आणि आपल्या पुत्रांला त्यां-
च्या कन्या घेऊं नका, आणि कधीं त्यांचें कु-
शल किंवा त्यांचें हित पाहूं नका, अशासाठीं कीं
तुह्मी बलवान असावें आणि देशाचें उत्तम खावें,
आणि आपल्या लेंकरांस तो सर्वकालपर्यंत वतना-
साठीं ठेवावा." १३ आणि आमच्या दुष्कर्मांमुळें
व आमच्या मोठ्या दोषामुळें जें अवघें आह्मावर
आलें आहे, त्यानंतर हे आमच्या देवा, आमच्या
अन्यायांस योग्य त्यापेक्षां थोडा दंड त्वां आह्मास
केला, आणि आह्मास असी सोडवण दिल्ही आहे.
१४ आह्मी या अघोर कर्मांच्या लोकांसीं सोय-
रीक करून पुन्हां तुझ्या आज्ञा मोडाव्या काय!
कांहीं शेष किंवा वांचलेलें न राहे असी समाप्ति
करीसपर्यंत आह्मावर क्रोधयुक्त न होसील काय!
१५ हे इस्राएलाच्या देवा परमेश्वरा, तूं न्यायी
आहेस, कां कीं आजच्याप्रमाणें आह्मी सुटे रा-
हिलेले आहों; पाहा, आह्मी तुजपुढें आपल्या
दोषावस्थेंत आहों, कां तर यामुळें तुजपुढें उभे
राहवत नाहीं."

## अध्याय १०.

आणि एज्राने देवाच्या मंदिरासमोर रडून
दंडवत पडून प्रार्थना आणि पाप कबूल के-
ल्यावर त्याजवळ इस्राएलांतून पुरुष व बायका व
पोरें यांचा फार मोठा समाज जमला, कां कीं
लोक फार रडले. २ आणि एलामाच्या संतानां-
तला यहीएलाचा पुत्र शखन्या एज्राला उत्तर
करीत ह्मणाला, "आह्मी देशाच्या लोकांतून परक्या
बायका घेऊन आपल्या देवाविरुद्ध पाप केलें आहे,
तथापि आतां याविषयीं इस्राएलास आशा आहे.
३ तर आतां माझ्या प्रभूच्या मसलतीप्रमाणें आ-
णि जे आमच्या देवाच्या आज्ञेला कांपतात त्यां-
च्याप्रमाणें सर्व बायका आणि त्यांपासून जीं जन्म-
लेलीं तींहि वेगळीं करायास आपण आपल्या देवा-
सीं संधा करावी, आणि हें नेमशास्त्राप्रमाणें करावें.
४ ऊठ, कां कीं ही गोष्ट तुजकडे आहे आणि आ-
ह्मी तुजसंगतीं असूं; धैर्य धरून कार्य कर." ५
मग एज्राने उठून या वचनाप्रमाणें करावें ह्मणून
याजकांतले मुख्य व लेवी व सर्व इस्राएल यांकडून
शपथ वाहविली. आणि त्यानी शपथ वाहिली.
६ आणि एज्रा देवाच्या मंदिरासमोरून उठून
एल्याशीबाचा पुत्र योहानान याच्या कोठडींत
गेला, आणि तो तेथें गेला तेव्हां त्याने भाकर
खाल्ली नाहीं आणि पाणी प्यालें नाहीं, कां कीं
तो प्रवास्यांच्या पापामुळें शोक करीत होता. ७
मग त्यानी यहूदा व यरूशालेम यांतील प्रवास्यां-
पासून आलेल्या सर्व लोकांस यरूशालेमेंत जमा-
यास असी घोषणा करविली कीं, ८ "जो कोणी
अधिकाऱ्यांच्या व वडिलांच्या मसलतीप्रमाणें ति-
हीं दिवसानी येणार नाहीं त्याचें सर्व धन जप्त
होईल, आणि तो प्रवास्यांपासून आलेल्या समा-
जांतून वेगळा केला जाईल."
९ तेव्हां यहूदा व बन्यामीन यांचीं सर्व म-
नुष्यें तिहीं दिवसांत यरूशालेमेस जमलीं; तो
नववा महिना महिन्याचा विसावा दिवस होता,
आणि सर्व लोक देवाच्या मंदिराच्या चौकांत या
गोष्टीमुळें व पावसामुळें कांपत बसले होते. १०
आणि एज्रा याजक उठून त्यांस ह्मणाला, "तुह्मी
इस्राएलाचा दोष वाढवायास परक्या बायका
घेऊन पाप केलें आहे, ११ तर आतां तुह्मी
आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याजवळ पाप
कबूल करून त्याचा मनोरथ करा; देशाच्या लो-
कांपासून व परक्या बायकांपासून वेगळे व्हा." १२
तेव्हां सर्व समाज मोठ्या शब्दाने उत्तर करीत
ह्मणाले, "असें तूं बोलला आहेस तसें आह्मी-
ला केलें पाहिजे. १३ परंतु लोक बहुत आहेत

आणि वृष्टिकाल आहे ह्मणून बाहेर उभें राहवत
नाहीं, आणि हें काम एका दोहों दिवसांचें नाहीं,
कां कीं या गोष्टींत आह्मी फार पाप केलें आहे.
१४ तर सर्व समाजांतले आमचे अधिकारी उभे
राहावे, आणि आमच्या नगरांत ज्यानी परक्या
बायका घेतल्या ते सर्व आणि त्यांसंगतीं एकएका
नगराचे वडील आणि न्यायाधीश नेमलेल्या सम-
यास यावे; या गोष्टीमुळें जो आमच्या देवाचा
तीव्र क्रोध तो आह्मावरून फिरून जाईपर्यंत."
१५ केवळ असाएलाचा पुत्र योनाथान आणि
तिक्वाचा पुत्र याहज्या या गोष्टीविषयीं उभे रा-
हिले, आणि मशुल्लामाने व शाब्बथाइ लेव्याने
त्यांचें सहाय केलें. १६ आणि प्रवासापासून
आलेल्या लोकानी तसें केलें, आणि एज्रा याजक
व कित्येक मुख्य वडील आपापल्या पूर्वजांच्या
कुलाप्रमाणें सर्व आपापल्या नामानी वेगळे होऊन
दाहाव्या महिन्याच्या पहिल्या दिवसीं या गोष्टी-
चा विचार करायास बसले. १७ आणि ज्यानी
परक्या बायका घेतल्या होत्या त्या सर्वांचा निर्णय
त्यानी पहिल्या महिन्याच्या पहिल्या दिवसाने
समाप्त केला.

१८ आणि याजकांच्या संतानांतले ज्यानी पर-
क्या बायका घेतल्या होत्या असे कित्येक सांपडले;
योजादाकाचा पुत्र येशूवा याच्या आणि याच्या
भावांच्या संतानांतले मासाया व एलीएजेर व
यारीब व गदाल्या; १९ आणि आपल्या बायका
काढून द्याव्या असें त्यानी आपले हात दिल्हे,
आणि ते दोषी होते ह्मणून त्यानी आपल्या दोषा-
मुळें एडका अर्पिला. २० आणि इम्मेराच्या संता-
नांतले हनानी व जबाद्या; २१ आणि हारी-
माच्या संतानांतले मासाया व एलीया व शमाया
व यहीएल व उज्जीया; २२ आणि पाश्हूराच्या
संतानांतले एल्योएनाइ, मासाया, इश्माएल, नथा-
नएल, योजाबाद, व एलासा; २३ आणि ले-
व्यांतले योजाबाद व शिमई व कलाया तोच
कलीटा, पथाह्या, यहूदा व गलीएजेर; २४
आणि गायकांतला एल्याशीब, आणि द्वारपालां-
तले शाल्लूम व टेलेम व ऊरी. २५ आणि
इस्राएलांतून फारोशाच्या संतानांतले रम्या व
यिज्जीया व माल्खीया व मिय्यामीन व एला-
जार व माल्खीया व बनाया; २६ आणि एला-
माच्या संतानांतले मत्तान्या, जखार्या, व यही-
एल व अब्दी व यरेमोथ व एलीया; २७
आणि जतूच्या संतानांतले एल्योएनाइ, एल्या-
शीब, मत्थान्या व यरेमोथ व जाबाद व अजीजा.
२८ आणि बेबाईच्या संतानांतले यहोहानान, ह-
नान्या, जब्बाइ, अथलाइ; २९ आणि बानी-
च्या संतानांतले मशुल्लाम, माल्लूख व अदाया,
याशूब व शआल व रामोथ; ३० आणि
पाहथमो; आबाच्या संतानांतले आद्ना व क-
लाल, बनाया, मासाया, मात्तान्या, बजालएल व
बिन्नूइ व मनाश्शे. ३१ आणि हारीमाच्या सं-
तानांतले एलीएजेर, यिश्शीया, माल्खीया, शमा-
या, शिमोन; ३२ बन्यामीन, माल्लूख, शमार्या;
३३ हाशूमाच्या संतानांतले मात्थनाइ, मात्थाया,
जाबाद, एलीफेलेट, यरेमाइ, मनाश्शे, शिमई;
३४ बानीच्या संतानांतले मादाइ, आम्राम व
ऊएल; ३५ बनाया, बेदया, कलूही; ३६
वन्या, मरेमोथ, एल्याशीब; ३७ मात्तान्या,
मात्थनाइ व यासाव; ३८ आणि बानी व
बिन्नूइ, शिमइ; ३९ आणि शलेम्या व ना-
थान व अदाया; ४० माख्नादबाइ, शाशाइ,
शाराइ; ४१ आजारएल व शेलेम्या, शमार्या;
४२ शाल्लूम, अमार्या, योसेफ; ४३ नबोच्या
संतानांतले यईएल, मात्थिथ्या, जाबाद, जबीना,
याद्दाव, व योएल, बनाया; ४४ या सर्वांनी
परक्या बायका घेतल्या होत्या, आणि ज्यांकडून
त्यानी लेंकरांस जन्म दिल्हा होता, अशा बायका
कित्येकांला होत्या.

NEHEMIAH.

# नहेम्या.

## अध्याय १.

हखाल्याचा पुत्र नहेम्या याच्या गोष्टी; विसाव्या
वर्षी खिसलेव महिन्यांत मी शूशान राजवा-
ड्यांत होतों, तेव्हां असें झालें कीं, २ माझ्या
भावांतला जो एक हनानी तो व यहूदांतले कित्येक
मनुष्य आले, आणि जे यहूदी सुटे झाले होते जे
पाडावपणाच्या प्रवास्यांतून उरले होते त्यांविषयीं
व यरूशालेमेविषयीं म्यां त्यांस पुसलें. ३ तेव्हां
त्यांनी मला ह्मटलें, "तेथें राष्ट्रांत जे पाडावपणा-
च्या प्रवास्यांतून उरलेले आहेत ते मोठ्या दुर्दशेंत
व अप्रतिष्ठेंत आहेत, आणि यरूशालेमेचा कोट
मोडलेला आहे, आणि तिचे दर्वाजे अग्नीने जाळि-
लेले आहेत."

४ हीं वचनें म्यां ऐकिलीं तेव्हां असें झालें कीं
मी बसून रडलों, आणि कित्येक दिवस म्यां शोक
व उपास करून आकाशांतल्या देवापुढें असी
प्रार्थना केली कीं, ५ "हे आकाशांतल्या देवा
परमेश्वरा, मोठ्या व भ्यायास योग्य देवा, जे
तुजवर प्रीति करितात आणि तुझ्या आज्ञा पाळि-
तात त्यांकरितां तूं करार व दया राखितोस. ६
तुझ्या सेवकाची प्रार्थना ऐकायास तुझे कान साव-
धान आणि तुझे डोळे उघडे असावे, ती मी अहो-
रात्र तुजपुढें तुझे सेवक इस्राएलाचीं संतानें यां-
साठीं करीत आहें, आणि जीं पापें आह्मी तुज-
विरुद्ध केलीं आहेत तीं इस्राएलाच्या संतानांचीं
पापें मी कबूल करीत आहें; म्यां आणि माझ्या
बापाच्या कुळानेहि पाप केलें आहे. ७ आह्मी
तुजविरुद्ध फार दुष्टाई केली आहे, आणि ज्या
आज्ञा व जे नेम व न्याय त्वां आपला सेवक मोशे
याला आज्ञापिले ते आह्मी पाळिले नाहींत. ८
जें वचन त्वां आपला सेवक मोशे याला आज्ञा-
पिलें तें स्मर; त्वां असें सांगितलें कीं जर तुह्मी
पाप केलें तर तुह्मास मी लोकांमध्यें उडवीन;
९ परंतु जर तुह्मी मजकडे फिरून माझ्या आज्ञा
पाळाल व आचराल, तर जरी तुह्मांतले कोणी
आकाशाच्या शेवटापर्यंत घालविले गेले तरी मी
त्यांस तेथून गोळा करून जें स्थान म्यां आपलें
नाम तेथें वसवावें ह्मणून निवडिलें आहे त्याकडे
आणीन. १० ते तर तुझे सेवक व तुझे लोक
आहेत जे त्वां आपल्या मोठ्या पराक्रमाने आणि
आपल्या बलवान हाताने खंडणी करून घेतले ते
आहेत. ११ हे परमेश्वरा, तुझ्या सेवकाच्या
प्रार्थनेकडे जे तुझे सेवक तुझ्या नामाला भ्यायास
इच्छीत आहेत, त्यांच्या प्रार्थनेकडे तुझा कान सा-
वध असावा; आज तूं आपल्या सेवकाला कुशल
कर आणि या मनुष्याची कृपादृष्टि त्याजवर होई
असें कर." मी तर राजाचा प्याला देणारा होतों.

## अध्याय २.

आणि असें झालें कीं अर्ताहशश्ते राजाच्या
विसाव्या वर्षी नीसान महिन्यांत त्यापुढें
द्राक्षारस होता, तेव्हां म्यां द्राक्षारस घेऊन राजा-
ला दिल्हा आणि मी त्यासमोर खिन्न पूर्वी कधीं
नव्हतों. २ तेव्हां राजाने मला ह्मटलें, "तूं दुख-
णेकरी नसून तुझें तोंड कां खिन्न दिसतें? हा
केवळ मनाचा खेद आहे." मग मी फार भ्यालों.
३ आणि मी राजाला ह्मणालों, "राजा चिरकाल
वांचो; जें नगर माझ्या पूर्वजांच्या कबरांचें स्थान
तें उजाड असतां आणि त्याचे दर्वाजे अग्नीने ज-
ळले असतां माझें मुख कां खिन्न न दिसावें!"
४ तेव्हां राजाने मला ह्मटलें, "तूं काय माग-
तोस?" मग म्यां आकाशांतल्या देवाची प्रार्थना
केली. ५ आणि म्यां राजाला ह्मटलें, "जर
राजाच्या मनास आलें आणि तुझा दास जर
तुझ्या दृष्टींत कृपा पावला आहे, तर त्वां मला
यहूदांत माझ्या पूर्वजांच्या कबरांच्या नगरास पा-
ठवावें, म्यां तें बांधावें ह्मणून." ६ तेव्हां राणी
त्याजवळ बसलेली असतां राजाने मला ह्मटलें,
"तुला जायाला किती दिवस लागतील आणि

केव्हां परत येसील?" मग मला पाठवायास रा-
जाला बरें वाटलें आणि म्या त्याजवळ समय
ठरविला. ७ अणखी म्या राजाला ह्मटलें, "जर
राजाला बरें वाटतें तर मला नदीपलिकडच्या
अधिकाऱ्यांकडे मी यहूदांत येईपर्यंत त्यांनी मला
पार पोहचवावें ह्मणून पत्रें द्यावीं; ८ आणि
राजाचा वनरक्षक आसाफ याकडे पत्र द्यावें, त्याने
मला घराच्या मंदिराचे दर्वाजे जडायासाठीं आणि
नगराच्या कोटांसाठीं आणि ज्या घरांत मी जाईन
त्यासाठीं लांकडें द्यावीं ह्मणून." मग मजवर जो
माझ्या देवाचा चांगला हात त्याप्रमाणें राजाने
मला दिल्हें.

९ आणि म्या नदीपलिकडच्या अधिकाऱ्यां-
जवळ येऊन त्यांस राजाचीं पत्रें दिल्हीं, आणि
राजाने मजसंगतीं सैन्याचे नायक व स्वार पाठविले
होते. १० आणि जेव्हां सान्बलाट होरोन्याने
व टोबीयादास आम्मोन्याने ऐकिलें कीं इस्राए-
लाच्या संतानांचे बरें शोधायास एक मनुष्य आला
आहे, तेव्हां हें त्यांस फार वाईट वाटलें. ११
मी तर यरूशालेमेस येऊन तेथें तीन दिवस
होतों. १२ आणि मी रात्रीं उठलों, मी व मज-
संगतीं थोडे मनुष्यांहि आणि यरूशालेमेस करा-
यास माझ्या देवानें माझ्या मनांत काय घातलें
होतें तें म्या कोणाला सांगितलें नाहीं, आणि ज्या
पशूवर मी बसलों होतों त्यावांचून मजसंगतीं
पशु नव्हता. १३ आणि रात्रीं म्या खोऱ्याच्या
दर्वाज्याकडून मकरकूपासमोर केरच्या दर्वाज्याकडे
बाहेर जाऊन यरूशालेमेचे जे कोट मोडलेले
होते, आणि तिचे जे दर्वाजे अग्नीने जळले होते ते
लक्ष लावून पाहिले. १४ आणि मी पुढें झऱ्याच्या
दर्वाज्याकडे व राजाच्या तळ्याकडे गेलों, परंतु
माझ्याखालच्या पशूला पार जायाला जागा न-
व्हती. १५ तेव्हां रात्रीं म्या ओहळीकडून वरतीं
जाऊन कोट लक्ष लावून पाहिला, मग मीं फिरून
खोऱ्याच्या दर्वाज्याकडून शिरून परत आलों.
१६ आणि मी कोठें गेलों आणि म्या काय केलें
तें अधिकाऱ्यांस ठाऊक नव्हतें, आणि यहूदी व
याजक व महाजन व अधिकारी यांस आणि बर-
कड जे काम करीत होते त्यांसहि म्या अद्यापि
सांगितलें नव्हतें.

१७ मग म्या त्यांस ह्मटलें, "आपण कशा
दुर्दशेंत आहों ती तुमच्या दृष्टीस पडली आहे
कीं यरूशालेम उजाड आहे, आणि तिचे दर्वाजे
अग्नीनें जाळिले गेले आहेत; याहो अणखी आ-
पली अप्रतिष्ठा नसावी ह्मणून यरूशालेमेचा कोट
बांधूं." १८ आणि मजवर जो माझ्या देवाचा
चांगला हात होता त्याचें आणि राजाने आपलीं
जीं वचनें मला दिल्हीं होतीं तींहि म्या त्यांस
सांगितलीं; तेव्हां "आपण उठून बांधूं," असें त्यांनी
ह्मटलें आणि या चांगल्या कामाला आपले हात
दृढ केले. १९ आणि हें सान्बलाट होरोनी
व टोबीयादास आम्मोनी व गेशेम अरबी यांनी
जेव्हां ऐकिलें तेव्हां आमचा उपहास केला, आ-
णि आह्माला तुच्छ मानून ह्मटलें, "जी गोष्ट
तुह्मी करीत आहां ही काय आहे? तुह्मी राजा-
वर बंड करणार आहां काय?" २० तेव्हां मी
त्यांस उत्तर करीत ह्मणालों, "आकाशांतला दे-
वच आह्माला कुशल करील ह्मणून आह्मी
त्याचे सेवक उठून बांधूं, परंतु तुह्मास यरूशाले-
मेंत कांहीं वांटा किंवा पद किंवा स्मारक नाहीं."

## अध्याय ३.

मग एल्याशीब मुख्य याजक याने आणि त्याचे
भाऊ जे याजक यानीहि उठून मेंढरांचा द-
र्वाजा बांधिला; त्यांनी त्याला पवित्र करून त्या-
चीं कवाडें उभीं केलीं, त्यांनी त्याला मेआ दुर्गा-
पर्यंत हनानएल दुर्गापर्यंतहि पवित्र केलें. २
आणि त्यानंतर यरीहोच्या मनुष्यांनी बांधिलें, आ-
णि त्यानंतर इम्रीचा पुत्र जाक्कूर याने बांधिलें.
३ आणि मत्स्य दर्वाजा हस्सनाआच्या संतानांनी
बांधिला, त्यांनी त्याच्या तुळया बडल्या आणि
त्याच्या कड्या व अडसर यांसुद्धां त्यांचीं कवाडें
उभीं केलीं. ४ आणि त्यानंतर कोजाचा पुत्र
ऊरीया याचा पुत्र मरेमोथ याने नीट केलें, आ-
णि त्यानंतर मशेजबएलाचा पुत्र बेरेख्या याचा
पुत्र मशुल्लाम याने नीट केलें, आणि त्यानंतर
बाअनाचा पुत्र जादोक याने नीट केलें ५ आ-
णि त्यानंतर तकोवानी नीट केलें, परंतु त्यांच्या
महाजनांनी आपली मान आपल्या प्रभूच्या सेवेस
लाविली नाहीं. ६ आणि जुन्या दर्वाज्याला

पासेहाचा पुत्र यहोयादा याने आणि बसोदया-
चा पुत्र मशुल्लाम याने नीट केलें; यानी त्याच्या
तुळया जडल्या, आणि त्याच्या कड्या व अडसर
यांसुद्धां त्यांचीं कवाडें उभीं केलीं. ७ आणि
त्यानंतर मलाठ्या गिबोन्याने व यादोन मेरोनो-
थ्याने गिबोन व मिज्पा यांच्या मनुष्यानी नदी-
च्या पलिकडील अधिकाऱ्याच्या सिंहासनापर्यंत
नीट केलें. ८ त्यानंतर सोनारांतला हार्हयाचा
पुत्र उज्जीएल याने नीट केलें, आणि त्यानंतर
एका गंध्याचा पुत्र हनान्या याने नीट केलें; यानी
विस्तीर्ण कोटापर्यंत यरूशालेम सोडिली. ९
आणि त्यानंतर हूराचा पुत्र रफाया यरूशाले-
मेच्या अर्ध्या मंडळाचा अधिकारी याने नीट केलें.
१० आणि त्यानंतर हरूमाफाचा पुत्र यदाया
याने आपल्या घरासमोरच नीट केलें, आणि त्या-
नंतर हशाब्नयाचा पुत्र हाट्टूश याने नीट केलें.
११ हारीमाचा पुत्र माल्खीया याने आणि पाहा-
थमोवाबाचा पुत्र हाश्शूब याने दुसऱ्या परिमित
प्रदेशाला व भट्टयांच्या दुर्गाला नीट केलें. १२
आणि त्यानंतर हल्लोहेशचा पुत्र शाल्लूम येरूशा-
लेमेच्या अर्ध्या मंडळाचा अधिकारी याने व याच्या
कन्यानी नीट केलें. १३ खोऱ्याच्या दर्वाज्याला
हानूनाने व जानोहच्या लोकानी नीट केलें; त्यानी
त्याला बांधून त्याच्या कड्या व अडसर यांसुद्धां
त्याचीं कवाडें उभीं केलीं, आणि केरच्या दर्वाज्या-
पर्यंत कोट हजार हात इतका बांधिला. १४
आणि केरच्या दर्वाज्याला रेखाबाचा पुत्र मा-
ल्खीया बेथहक्खेरेमच्या मंडळाचा अधिकारी
याने नीट केलें; याने त्याला बांधून त्याच्या क-
ड्या व अडसर यांसुद्धां त्याचीं कवाडें उभीं
केलीं. १५ आणि झऱ्याच्या दर्वाज्याला खो-
ल्होजेचा पुत्र शाल्लून मिज्पाच्या मंडळाचा अ-
धिकारी याने नीट केलें; याने त्याला बांधून
छप्पर देऊन त्याच्या कड्या व अडसर यांसुद्धां
त्याचीं कवाडें उभीं केलीं, आणि राजाच्या बा-
गेच्या शेलाह तळ्याचें कुसूं ज्या पायऱ्या दावी-
दाच्या नगरांतून उतरतात तेथपर्यंत बांधिलें. १६
त्यानंतर आजबूकाचा पुत्र नहेम्या बेथजूरेच्या
अर्ध्या मंडळाचा अधिकारी याने दावीदाच्या कब-
रांसमोरच्या प्रदेशापर्यंत आणि केलेल्या तळ्याप-
र्यंत आणि वीरांच्या घरापर्यंत नीट केलें. १७
त्यानंतर लेव्यानी बानीचा पुत्र रहूम याने नीट
केलें; त्यानंतर हशाब्या कईलाच्या अर्ध्या मंड-
ळाचा अधिकारी याने आपल्या मंडळाला नीट
केलें. १८ त्यानंतर त्यांच्या भावानी हेनादा-
दाचा पुत्र बावाइ कईलाच्या अर्ध्या मंडळा-
चा अधिकारी याने नीट केलें. १९ आणि त्या-
नंतर मिज्पाचा अधिकारी येशूवाचा पुत्र एजेर
याने कोंपऱ्याजवळच्या शस्त्रागाराच्या चढणीस-
मोर दुसऱ्या परिमित प्रदेशाला नीट केलें. २०
त्यानंतर जाब्बाईचा पुत्र बारूख याने दुसऱ्या
परिमित प्रदेशाला कोंपऱ्यापासून एल्याशीब मुख्य
याजक याच्या घराच्या प्रवेशापर्यंत झटून नीट
केलें. २१ त्यानंतर कोजाचा पुत्र ऊरीया याचा
पुत्र मरेमोथ याने दुसऱ्या परिमित प्रदेशाला
एल्याशीबाच्या घराच्या प्रवेशापासून एल्याशीबा-
च्या घराच्या शेवटापर्यंत नीट केलें. २२ आणि
त्यानंतर याजक जे मैदानाचे मनुष्य त्यानी नीट
केलें. २३ त्यानंतर बन्यामीनाने व हाश्शूबाने
आपापल्या घरासमोर नीट केलें; त्यानंतर अना-
न्याचा पुत्र मासाया याचा पुत्र अजार्या याने
आपल्या घराजवळ नीट केलें. २४ त्यानंतर हे-
नादादाचा पुत्र बिन्नूइ याने दुसऱ्या परिमित प्रदे-
शाला अजार्याच्या घरापासून कोंपऱ्यापर्यंत म्हणजे
कोनापर्यंत नीट केलें. २५ ऊजाईचा पुत्र पालाल
याने कोंपऱ्यासमोर आणि जें दुर्ग राजाच्या उंच
घराबाहेर बंदिशाळेच्या अंगणाकडे होतें त्यास-
मोर; त्यानंतर पारोशाचा पुत्र पदाया याने. २६
आणि ओफेलांत उगवतेकडील जलदर्वाजा आणि
बाहेरील दुर्गाच्यासमोरचा प्रदेश यांपर्यंत नथी-
नीम राहत होते. २७ त्यानंतर तकोवानी दुस-
ऱ्या परिमित प्रदेशाला बाहेरील मोठ्या दुर्गास-
मोरून ओफेलाच्या कोठापर्यंत नीट केलें. २८
घोड्यांच्या दर्वाज्यावरतून याजकानी एकएकाने
आपापल्या घरासमोर नीट केलें. २९ त्यानंतर
इम्मेराचा पुत्र जादोक याने आपल्या घरासमोर
नीट केलें, आणि त्यानंतर शखन्याचा पुत्र श-
माया उगवतेकडील दर्वाज्याचा राखणारा याने
नीट केलें. ३० त्यानंतर शलेम्याचा पुत्र हना-
न्या याने आणि जालाफाचा साहावा पुत्र हानून

याने दुसऱ्या परिमित प्रदेशाला नीट केलें; त्या-
नंतर बेरेख्याचा पुत्र मशुल्लाम याने आपल्या को-
ठडीसमोर नीट केलें. २१ त्यानंतर सोनाराचा
पुत्र माल्खीया याने नथीनीम व व्यापारी यांच्या
घरापर्यंत सभेच्या दर्वाज्यासमोर कोनाच्या चढ-
णीपर्यंतहि नीट केलें. ३२ आणि कोनाची च-
ढण व मेंढरांचा दर्वाजा यांच्या अंतरप्रदेशाला
सोनारांनी व व्यापाऱ्यांनी नीट केलें.

## अध्याय ४.

आणि असें झालें कीं आम्ही कोट बांधीत
आहों, असें सान्बल्लटाने ऐकिलें तेव्हां
तो रागें भरला, आणि फार रुष्ट होऊन त्याने
यहूद्यांचा उपहास केला. २ आणि त्याने आपले
भाऊ व शोमरोनचें सैन्य यांसमक्ष असें ह्मटलें
कीं, “ते दुबळे यहूदी काय करीत आहेत? ते
आपल्याला समावृत्त करितील काय? ते यज्ञ
करितील काय? ते एका दिवसीं समाप्ति करितील
काय? ते खचाच्या जाळलेल्या ढिगांतून दगड
काढून सावरितील काय?” ३ तेव्हां टोबीया
आम्मोनी त्याजवळ असतां ह्मणाला, “जें ते बां-
धीत आहेत त्यावर जर कोल्हा चढला तर त्यांचा
दगडी कोट मोडून टाकील.” ४ हे आमच्या
देवा ऐक, कां कीं आम्ही धिक्कारलेले झालों आ-
हों, त्यांची निंदा त्यांच्या डोक्यावर फिरीव,
आणि ते पाडावपणाच्या देशांत हरणार्थ होत
असें कर. ५ त्यांच्या अन्यायास झांकूं नको,
आणि तुजपुढून त्यांचें पाप खोडलें न जावें, कां
तर त्यांनी बांधणाऱ्यांसमोर चिडवणी केली आहे.
६ आम्ही तर कोट बांधीत गेलों आणि सर्व कोट
त्याच्या अर्धापर्यंत जडला गेला, कां कीं काम क-
रावास लोकांचा मनोरथ होता.

७ आणि असें झालें कीं यरूशालेमेचे कोट
बांधिले आहेत, आणि भगाडें बुजलीं आहेत,
असें सान्बल्लाट व टोबीया व अरबी व आम्मो-
नी व अश्दोदी ऐकून फार रागें भरले. ८ आणि
यरूशालेमेवर लढायास आणि तिची विपत्ति
करायास यायाला त्या सर्वांनी मिळून बंड केलें.
९ तथापि आम्ही आपल्या देवाची प्रार्थना केली,
आणि त्यामुळें अहोरात्र त्यांवर पाहरा ठेविला.
१० आणि यहूदाने ह्मटलें, “भार वाहणाऱ्यांची
शक्ति क्षीण झाली आणि खच फार आहे ह्मणून
आह्मी कोट बांधूं शकत नाहीं.” ११ आणि
आमच्या शत्रूंनी ह्मटलें, “आपण त्यांमध्यें जाऊन
त्यांस मारून टाकूं, आणि तें काम बंद करूं तों-
पर्यंत त्यांस कळणार नाहीं आणि दिसणार नाहीं.”
१२ आणि असें झालें कीं त्यांजवळ जे यहूदी
राहत होते ते आले, आणि आह्मास दाहादां
ह्मणाले, “तुह्मी सर्व स्थानांतून आह्माजवळ फि-
रावें.”

१३ मग म्यां कोटामागें स्थानाच्या खालच्या
जाग्यापासून उघड्या ठिकाणावर लोक ठेविले, त्यां-
जवळ त्यांच्या तरवारी, भाले व धनुष्यें असतां ते
म्यां त्यांच्या गोत्राप्रमाणें ठेविले. १४ आणि मी
पाहून उठलों आणि महाजनांस व अधिकाऱ्यांस
व वरकड लोकांस ह्मणालों, “त्यांस भिऊं नका,
मोठा व भयास योग्य जो प्रभू याचें स्मरण
करा, आणि आपले भाऊ आपले पुत्र व आपल्या
कन्या, आपल्या बायका व आपलीं घरें यांसाठीं
लढा.” १५ आणि असें झालें कीं आह्मांला
कळलें आहे असें जेव्हां आमच्या वैऱ्यांनी ऐकि-
लें आणि देवाने त्यांचें मंत्रण मोडिलें होतें,
तेव्हां आह्मी अवघे कोटावर एक एक आपाप-
ल्या कामाला परत गेलों. १६ आणि असें झालें
कीं त्या दिवसापासून माझे अर्धे गडी काम करीत
होते, आणि दुसरे अर्धे भाले, ढाला व धनुष्यें व
उरस्त्राणें धरीत होते, आणि अधिकारी यहूदाच्या
सर्व घराण्यामागें होते. १७ जे कोटावर बांधीत
होते ते आणि ओझीं वाहणारे व घालणारे एक
एक आपापल्या एका हाताने काम करीत होते,
आणि दुसऱ्या हाताने शस्त्र धरीत होते. १८
बांधणारे आपापल्या कमरेस आपापली तरवार
अडकवून बांधीत होते, आणि करणा वाजविणारा
मजपाशीं होता. १९ आणि म्यां महाजनांस व
अधिकाऱ्यांस व वरकड लोकांस ह्मटलें, “काम
मोठें व विस्तीर्ण आहे, आणि आपण कोटावर एक-
मेकापासून दूर वेगळे वेगळे आहों; २० तर
ज्या ठिकाणीं करण्याचा शब्द ऐकाल तेथें आह्मा-
जवळ जमा; आमचा देव आह्मासाठीं लढेल.”
२१ आह्मी तर काम करीत गेलों, आणि अर्धे

लोक पहाट उगवल्यापासून तारे निघतपर्यंत भाले
धरीत होते. २२ अणखी त्या वेळेस म्या लो-
कांस ह्मटलें, "एकएकाने आपापल्या गड्यासुद्धां
यरूशालेमेंत रात्रीं राहावें; त्यानी रात्रीं आह्मा-
ला रक्षणरूप असावें आणि दिवसा काम करावें
ह्मणून." २३ तर मी व माझे भाऊ व माझे
गडी व माझ्यामागें जे रक्षक होते हे आह्मी
आपलीं वस्त्रें अंगावरून काढीत नव्हतों; एक
एक आपापलें शस्त्र धरून पाण्याला जाई.

## अध्याय ५.

आणि लोकांचा व त्यांच्या बायकांचा आपले
भाऊ यहूदी यांवर मोठा आक्रोश झाला. २
कित्येक ह्मणत होते, "आह्मी आपल्या पुत्रांकन्यां-
सुद्धां बहुत आहों, तर आह्मी खाऊन जगावें ह्म-
णून आह्मी धान्य घेतों. ३ आणि कित्येक ह्मणत
होते, "दुकाळीं आह्मी धान्य घ्यावें ह्मणून आपलीं
शेतें, मळे, व घरें गहाण ठेविलीं आहेत." ४ आ-
णि कित्येक ह्मणत होते, "राजाच्या वसुलासाठीं
आह्मी आपल्या शेतमळ्यांवर पैका मागून घेतला
आहे." ५ तथापि आमचा देह आमच्या भावां-
च्या देहासारिखा आणि आमचीं लेंकरें त्यांच्या
लेंकरांसारिखीं आहेत, आणि पाहा आह्मी आपले
पुत्र व आपल्या कन्या दास दासी होण्यास वश्य
करीत आहों आणि आमच्या कित्येक कन्या वश्य
झाल्या आहेत, आणि आमचे कांहीं सामर्थ्य
नाहीं, कां कीं आमचे शेत व मळे अन्यांकडे
आहेत."

६ तेव्हां मी त्यांचा आक्रोश व हीं वचनें ऐ-
कून फार रागें भरलों. ७ आणि म्या आपल्या
मनांत विचार केला आणि महाजनांसीं व अधि-
काऱ्यांसीं विवाद करून त्यांस ह्मटलें, "तुह्मी
एकएक आपापल्या भावापासून व्याज घेतां." मग
म्या त्यांजवर मोठी सभा ठेविली. ८ आणि
त्यांस ह्मटलें, "आमचे जे यहूदी भाऊ विधर्म-
जातींला विकले गेले होते त्यांस आह्मी आपल्या
सामर्थ्याप्रमाणें खंडणी देऊन परत घेतलें आहे,
आणि तुह्मी आपले भाऊ विकाल काय? अथवा
ते आह्माकडे विकिले जातील काय?" तेव्हां ते
उगेच राहिले आणि त्यांस उत्तर सुचेना. ९
अणखी म्या ह्मटलें, "जें तुह्मी करीत आहां तें
बरें नाहीं, आमचे वैरी जे विधर्म लोक त्यांच्या
निंदेमुळें तुह्मी आपल्या देवाच्या भयाने वर्त्तावें
कीं नाहीं? १० मीहि माझे भाऊ व माझे गडी
यांला पैका व धान्य व्याजावर देऊं शकतों; आ-
पण हें व्याज घेणें सोडून द्यावें. ११ आजच
तुह्मी त्यांस त्यांचीं शेतें, त्यांचे द्राक्षींचे मळे,
त्यांचे जैतूनाचे मळे व त्यांचीं घरें, आणि जो पैका व
धान्य, द्राक्षारस व तेल तुह्मी त्यांस व्याजावर
देतां त्यांचा शतमांशहि त्यांस परत द्या." १२
तेव्हां ते ह्मणाले, "आह्मी परत देऊं आणि त्यां-
पासून कांहीं मागणार नाहीं; तूं ह्मणत आहेस
तसेंच आह्मी करूं." मग त्यानी या वचनाप्रमाणें
करावें ह्मणून म्या याजकांस बोलावून त्यांकडून
शपथ वाहविली. १३ अणखी मी आपली ओंटी
झटकून ह्मणालों, "जो कोणी हें वचन खरें कर-
णार नाहीं त्याला देवाने घरातून व त्याच्या कर्म-
फलांतून असें झटकावें, असाच तो झटकला व
रिचवला जावा." तेव्हां सर्व समाजाने आमेन
ह्मटलें, आणि परमेश्वराला स्तविलें आणि लो-
कानी या वचनाप्रमाणें केलें.

१४ अणखी यहूदा देशांत त्यांचा अधिकारी हो-
ण्यास मला आज्ञा झाली तेव्हांपासून अर्ताहशश्त
राजाच्या विसाव्या वर्षापासून बत्तिसाव्या वर्षा-
पर्यंत बारा वर्षे म्या व माझ्या भावानी अधिका-
ऱ्याचें अन्न खालें नाहीं. १५ परंतु मजपूर्वी जे
पहिले अधिकारी होते त्यांचा भार लोकांवर हो-
ता; ते त्यांपासून अन्न व द्राक्षरस अणखी चा-
ळीस शेकेल रुपें घेत असत, त्यांचे चाकरहि लो-
कांवर सत्ता करीत असत, परंतु देवाच्या भया-
मुळें म्या तसें केलें नाहीं. १६ अणखी मी या
कोटाच्या कामांत स्थिर राहिलों, आणि आह्मी
कांहीं भूमि विकत घेतली नाहीं, आणि माझे सर्व
चाकर तेथें कामावर जमलेले होते. १७ आणि
यहूदी व अधिकारी दीडशें मनुष्य आणि आह्मा-
भोंवताल्च्या अन्य लोकांतून जे आह्माकडे आले
तेहि माझ्या मेजावर असत. १८ आणि प्रत्येक
दिवसीं जें सिद्ध केलें जाई तें एक बैल, साहा
निवडक मेंढरें होतें, कोंबडींहि मजकरितां सिद्ध
केलीं जात, आणि दाहा दिवसांच्या अंतराने सर्व

प्रकारचा पुष्कळ द्राक्षारस असें असतांहि म्या
अधिकाऱ्याचें अन्न मागितलें नाहीं, कां कीं सेवा
या लोकांवर भारी होती. १९ हे माझ्या देवा,
जें म्या या लोकांकरितां केलें आहे त्या सर्वांवि-
षयीं हितासाठीं माझें स्मरण कर.

## अध्याय ६.

आणि असें झालें कीं म्या कोट बांधिला आहे
आणि कांहीं भगाड राहिलें नाहीं, असें जे-
व्हां **सान्बल्लाट** व **टोबीया** व **गेशेम अरबी** या-
नी आणि आमच्या वरकड वैऱ्यानी ऐकिलें (त्या
वेळेस म्या दर्वाज्याचीं कवाडें उभीं केलीं नव्हतीं),
२ तेव्हां **सान्बल्लाटाने** व **गेशेमाने** मजकडे सां-
गून पाठविलें कीं, "या, आपण **ओनोच्या** मैदानांतल्या
एकाद्या गांवांत एकत्र मिळूं." परंतु ते माझें वाईट
करायास कल्पीत होते. ३ म्या तर त्यांकडे दूत
पाठवून सांगितलें, "मी मोठें काम करीत आहें
माझ्याने खालीं येववत नाहीं, मी तें सोडून खालीं
तुह्मांकडे येई इतक्यांत काम कां राहूं द्यावें?" ४
तथापि त्यानी चार खेपा मजकडे असा निरोप
पाठविला, आणि म्या त्यांस तसेंच उत्तर केलें.
५ मग **सान्बल्लाटाने** आपल्या चाकराकडून पां-
चवी खेप मजकडे असा निरोप पाठविला, याच्या
हातांत उघडें पत्र होतें. ६ त्यांत असें लिहिलें
होतें कीं, "विधर्म लोकांमध्यें बातमी आहे आणि
**गाश्मू** ह्मणत आहे कीं तूं व **यहूदी** फितूर करा-
यास कल्पीत आहां, याकरितां तूं कोट बांधीत आ-
हेस, या वचनांप्रमाणें त्वां त्यांचा राजा व्हावें ह्म-
णून. ७ अणखी **यहूदांत** राजा आहे, असें तुज-
विषयीं **यरूशालेमेंत** गाजवून सांगायास त्वां भवि-
ष्यवादी ठेविले आहेत, आणि आतां या वचना-
प्रमाणें राजाला सांगितलें जाईल; आतां तर या,
आपण एकत्र मंत्रण करूं." ८ तेव्हां म्या त्याज-
कडे असें सांगून पाठविलें कीं, "ज्या गोष्टी तूं ह्म-
णत आहेस अशा कांहीं घडत नाहींत, त्या तूं
केवळ आपल्या मनांतून कल्पून काढीत आहेस."
९ कां कीं ते अवघे आह्मांला भय दाखवीत
ह्मणाले, "त्यांचे हात कामावरून ढिले हो-
तील, मग तें केलें जाणार नाहीं." आतां तर हे
**देवा**, माझे हात दृढ कर. १० मग **महेटबए-
लाचा** पुत्र **दलाया** याचा पुत्र **शमाया** याच्या
घरास मी आलों, तेव्हां तो आपल्याला कोंडून
घेऊन राहिलेला होता, आणि तो ह्मणाला, "आ-
पण **देवाच्या** मंदिरांत देवळामध्यें एकत्र मिळून
देवळाचीं कवाडें लावूं, कां कीं ते तुला वधायास
येतील, रात्रींच तुला वधायास येतील." ११
तेव्हां मी ह्मणालों, "मजसारिख्या मनुष्याने पळावें
काय? आणि मजसारिखा असतां वांचावा ह्मणून
देवळांत जाईल, असा कोण आहे? मी आंत जा-
णार नाहीं." १२ मग म्या लक्ष देऊन पाहिलें
तों पाहा **देवाने** त्याला पाठविलें नव्हतें; तो
मजवर भविष्यवाद बोलला होता, कां कीं **टोबीया**
व **सान्बल्लाट** यानी त्याला मोल ठरवून ठेविलें
होतें. १३ म्या भ्यावें व तसें करून पाप करावें,
आणि माझी अप्रतिष्ठा करायासाठीं त्यांस अप-
कीर्त्तीचें निमित्त प्राप्त व्हावें ह्मणून तो मोल ठर-
वून ठेविलेला होता. १४ हे माझ्या **देवा**, **टो-
बीया** व **सान्बल्लाट** यांचें स्मरण यांच्या या कर्मां-
प्रमाणें कर, आणि **नोवाद्या** भविष्यवादिनी आणि
वरकड भविष्यवादी जे मला भय दाखवीत होते
त्यांचेंहि.

१५ मग **एलूल** महिन्याच्या पंचविसाव्या दि-
वसीं बावन्न दिवसांत कोट समाप्त झाला. १६
हें आमच्या सर्व वैऱ्यानी ऐकिलें आणि आह्मा
भोंवतालच्या सर्व विधर्म लोकानी पाहिलें, तेव्हां
असें झालें कीं त्यांचा अभिमान फार उतरला, कां
कीं हें काम आमच्या **देवापासून** झालें असें ते
समजले. १७ अणखी त्या दिवसांत **यहूदाचे**
महाजन **टोबीयाकडे** बहुत पत्रें पाठवीत होते,
आणि त्यांकडे **टोबीयाचीं** येत होतीं; १८ कां
कीं **यहूदांत** बहुतानी त्याजवळ शपथ केलेला
होता, कारण कीं तो **आरहाचा** पुत्र **शखन्या**
याचा जांवई होता, आणि त्याचा पुत्र **योहानान**
याने **बेरेख्याचा** पुत्र **मशुल्लाम** याची कन्या घे-
तली होती. १९ अणखी ते त्याचीं चांगलीं कर्में
मजपुढें बोलत असत, आणि मला भय दाखवायास **टो-
बीयाने** पत्रें पाठविलीं.

## अध्याय ७.

आणि कोट बांधला गेला आणि म्या कवाडें
उभीं केलीं आणि द्वारपाळ व गायक व
लेवी नेमिले गेले होते, तेव्हां असें झालें कीं, २
म्या आपला भाऊ हनानी व वाड्याचा अधिकारी
हनान्या यांस यरूशालेमेवर आज्ञा केली, (कां
कीं तो विश्वासू मनुष्य होता आणि बहुतांपेक्षां
देवाला भीत होता); ३ आणि म्या त्यांस
ह्मटलें, सूर्य तापेपर्यंत यरूशालेमेचे दर्वाजे उघ-
डले न जावे, आणि ते उभे राहत असतां कवाडें
लावून बंद करावीं, आणि यरूशालेमकरांतले पा-
हरे एकएक जण आपापल्या पाहऱ्यांत आपापल्या
घरासमोर ठेवावे. ४ नगर तर विस्तीर्ण व मोठें
होतें परंतु त्यामध्यें लोक थोडे होते आणि घरें
बांधलेलीं नव्हतीं.

५ आणि महाजन व अधिकारी व लोक जम-
वायास देवानें माझ्या मनांत घातलें, ते परंपरेनें
गणले जावे ह्मणून, आणि जे पहिल्यानें वर आले
त्यांच्या परंपरेची नावनिशी मला सांपडली त्यांत
लिहिलेलींहि सांपडली. ६ जे बाबेलेच्या नबूख-
द्रेज्जार राजानें पाडाव करून नेले होते त्यांतले जे
राष्ट्रांत जन्मलेले पाडावपणाच्या प्रवासांतून वरतीं
यरूशालेमेस व यहूदास एकएक आपापल्या नग-
रास परत आले; ७ जे जरूब्बाबेल, येशूवा,
नहेम्या, अजार्या, राम्या, नाहमानी, मोर्दखाय,
बिल्शान, मिस्पेरेथ, बिग्वाइ, नहूम, बाना यां-
संगतीं आले ते हेच. इस्राएल लोकांतल्या मनु-
ष्यांची संख्या हीच होती; ८ पारोशाचे संतान
दोन हजार एकशें व बाहत्तर. ९ शफाट्याचे
संतान तीनशें व बाहत्तर. १० आरहाचे संतान
साहाशें व बावन्न. ११ येशूवा व योवाब यांच्या
संतानांतले पाहथमोवाबाचे संतान दोन हजार
आठशें व अठरा. १२ एलामाचे संतान एक
हजार दोनशें व चौपन्न. १३ जत्तूचे संतान
आठशें व पंचेचाळीस. १४ जक्खाईचे संतान
सातशें व साठ. १५ बिन्नुईचे संतान साहाशें
व अठ्ठेचाळीस. १६ बेबाईचे संतान साहाशें
व अठ्ठावीस. १७ अज्गादाचे संतान दोन ह-
जार तीनशें व बावीस. १८ अदोनीकामाचे
संतान साहाशें व सतसष्ट. १९ बिग्वाईचे सं-
तान दोन हजार व सतसष्ट. २० आदीनाचे
संतान साहाशें व पंचावन्न. २१ हिज्कीयाच्या
आटेराचे संतान अठ्ठ्याण्णव. २२ हाशुमाचे
संतान तीनशें व अठ्ठावीस. २३ बेजाईचे संतान
तीनशें व चोवीस. २४ हारिफाचे संतान एक-
शें बारा. २५ गिबोनाचे संतान पंच्याण्णव.
२६ बेथलेहेम व नटोफा यांचीं मनुष्यें शंभर व
अठ्ठ्यायशीं. २७ अनाथोथचीं मनुष्यें शंभर
व अठ्ठावीस. २८ बेथज्मावेथचीं मनुष्यें बेचा-
ळीस. २९ किर्याथयारीम, खफीरा व बएरो-
थ यांचीं मनुष्यें सातशें व त्रेताळीस. ३० रामा
व गेबा यांचीं मनुष्यें साहाशें व एकवीस. ३१
मिख्मासाचीं मनुष्यें शंभर व बावीस. ३२ बेथ-
एल व आइ यांचीं मनुष्यें शंभर व तेवीस. ३३
दुसऱ्या नबोचीं मनुष्यें बावन्न. ३४ दुसऱ्या
एलामाचे संतान एक हजार दोनशें व चौपन्न.
३५ हारिमाचे संतान तीनशें व वीस. ३६
यरेखोचे संतान तीनशें व पंचेचाळीस. ३७
लोदहादीद व ओनो यांचे संतान सातशें व एक-
वीस. ३८ सनावाचे संतान तीन हजार नऊशें
व तीस.

३९ याजक; यादायाचे संतान येशूवाच्या
कुळांतले नऊशें व त्र्याहत्तर. ४० इम्मेराचे सं-
तान एक हजार व बावन्न. ४१ पाश्हूराचे सं-
तान एक हजार दोनशें व सत्येचाळीस. ४२
हारिमाचे संतान एक हजार व सत्रा. ४३ लेवी:
येशूवाचे संतान, काद्मीएलचे होदवाच्या संतानां-
तले चौऱ्याहत्तर. ४४ गाणारे; आसाफाचे सं-
तान शंभर व अठ्ठेचाळीस. ४५ द्वारपाल; शा-
ल्लूमाचे संतान, आटेराचे संतान, टाल्मोनाचे सं-
तान, अक्कूबाचे संतान, हटीटाचे संतान, शो-
बाईचे संतान शंभर व अडतीस. ४६ नथीनीम:
जिहाचे संतान, हशूफाचे संतान, टब्बावोथाचे
संतान; ४७ केरेसाचे संतान, सीवाचे संतान,
पादोनाचे संतान; ४८ लबानाचे संतान, हगा-
बाचे संतान, साल्माईचे संतान; ४९ हाना-
नाचे संतान, गिद्देलाचे संतान, गाहराचे संतान;
५० रायाचे संतान, रजीनाचे संतान, नकोदाचे
संतान; ५१ गज्जामाचे संतान, उज्जाचे संतान,

फासेहाचे संतान; ५२ बेसाईचे संतान, म-
ऊनीमाचे संतान, नफीशसीमाचे संतान; ५३
काक्बूकाचे संतान, हकूफाचे संतान, हार्हूराचे
संतान; ५४ बाजलीथाचे संतान, महीदाचे सं-
तान, हार्शाचे संतान; ५५ बार्कोसाचे संतान,
सीसराचे संतान, तामहाचे संतान; ५६ नजी-
हाचे संतान, हटीफाचे संतान; ५७ शलमो-
नाच्या चाकरांचे संतान, सोटाईचे संतान, सो-
फेरेथाचे संतान, फरीदाचे संतान; ५८ यालाचे
संतान, दार्कोनाचे संतान, गिद्देलाचे संतान; ५९
शफाट्याचे संतान, हाट्टीलाचे संतान, जबाइमा-
च्या पोखेरेथाचे संतान, आमोनाचे संतान; ६०
सर्व नथीनीम व शलमोनाच्या चाकरांचे संतान
मिळून तीनशें व ब्याण्णव होते. ६१ तेल्मेलाह,
तेल्हर्शा, खरूप, अद्दोन व इम्मेर, एथून जे वर
आले ते हेच होते, परंतु ते इस्राएलांतले होते
कीं नाहीं याविषयीं त्याच्याने आपापलें पितृकुल
व आपापली वंशावळी दाखवेना. ६२ दलायाचे
संतान, टोबीयाचे संतान, नकोदाचे संतान, सा-
हाशें व बेताळीस. ६३ आणि याजकांतले ह-
बायाचे संतान, कोदाचे संतान, बार्जिल्लाईचे
संतान, त्यानें बार्जिल्लाई गिलादाची एक कन्या
बायको करून घेतली आणि त्याला त्यांचें नांव
ठेविलें गेलें. ६४ ज्यांची परंपरा गणली गेली
त्यांच्यामध्यें त्यानी आपल्या लेखाचा शोध केला
परंतु ते सांपडले नाहीं; मग ते अशुद्ध, असे
याजकांतून दूर केले गेले. ६५ आणि तिर्शा-
थानें त्यांस असें सांगितलें कीं, ऊरीम व थुम्मीम
या विशिष्ट याजक उभा होईपर्यंत तुह्माला परम
पवित्र वस्तू खावयाच्या नाहींत.

६६ सर्व समाज मिळून बेताळीस हजार ती-
नशें साठ इतका होता. ६७ त्यांचे दास व त्यां-
च्या दासी यांशिवाय हीं सात हजार तीनशें व
सततीस होतीं, आणि त्यांचे दोनशें व पंचेचाळीस
गाणारे व गाणाऱ्या होत्या. ६८ त्यांचीं घोडीं
सावशें व छत्तीस, त्यांचीं खेंचरें दोनशें व पंचे-
चाळीस. ६९ उंटें चारशें व पस्तीस, गाढवें
साहा हजार सातशें व वीस. ७० आणि कि-
त्येक मुख्य वडिलानी कामाला दिल्हें; तिर्शा-
थानें भांडाऱ्याकडे एक हजार दारक सोनें, पन्नास
कटोरे, याजकांचे अंगरखे पांचशें व तीस दिल्हे.
७१ आणि कित्येक मुख्य वडिलानी कामाच्या
भांडाऱ्याकडे वीस हजार दारक सोनें, आणि दोन
हजार व दोनशें शेर रुपें दिल्हें. ७२ आणि
वरकड लोकानी जें दिल्हें ते वीस हजार दारक
सोनें, आणि दोन हजार शेर रुपें, आणि सतसष्ट
याजकांचे अंगरखे, इतकें होतें. ७३ तर याजक
व लेवी व द्वारपाल व गायक व कित्येक लोक व
नथीनीम व सर्व इस्राएल आपल्या नगरांत वसते
झाले, आणि सातवा महिना आला तेव्हां इस्राए-
लाचीं संतानें आपल्या नगरांत होतीं.

## अध्याय ८.

आणि सर्व लोक जलदर्वाज्यापुढल्या चौकांत
एक मनुष्यासारिखे एकत्र मिळून मोशाचें
जें नेमशास्त्र परमेश्वरानें इस्राएलास आज्ञा-
पिलें त्याचें पुस्तक आणावें ह्मणून एज्रा लेखकास
ह्मणाले. २ मग सातव्या महिन्याच्या पहिल्या
दिवशीं पुरुष व स्त्रिया ऐकाया जोगते सर्व समा-
जापुढें एज्रा याजकाने नेमशास्त्र आणिलें. ३
आणि त्याने जलदर्वाज्यापुढल्या चौकासमोर उ-
जेडल्यापासून मध्यान्हापर्यंत पुरुष व स्त्रिया व
समजणारे यांपुढें वाचिलें, आणि सर्व लोकांचे
कान नेमशास्त्र पुस्तकाकडे होते. ४ आणि या
कार्यासाठीं जो लांकडी माळा लोकानी केला होता
त्याजवर एज्रा लेखक उभा राहिला, आणि त्याज-
वळ त्याच्या उजव्याकडे मात्तिथ्या व शेमा व अ-
नाया व ऊरीया व हिल्कीया व मासाया, आणि त्या-
च्या डाव्याकडे पदाया व मीशाएल व माल्खीया
व हाशूम व हाश्बद्दाना, जखार्या मशुल्लाम उभे
राहिले. ५ आणि एज्राने सर्व लोकांच्या समक्ष
तें पुस्तक उघडिलें, कां तीं तो सर्व लोकांवरतीं
होता, आणि त्याने तें उघडिलें तेव्हां सर्व लोक
उभे राहिले. ६ आणि एज्राने परमेश्वर जो
मोठा देव त्याचें भजन केलें, आणि सर्व लोकानी
आपले हात वर करून, "आमेन आमेन," ह्मणून
उत्तर केलें, आणि आपलीं डोकीं लववून आपलीं
मुखें भूमीकडे करून परमेश्वराची स्तुति केली.
७ आणि येशूवा व बानी व शेरेब्या, यामीन,
अक्कूब, शाब्बथाइ, होदीया, मासाया, कलीटा,

अजार्या, योजाबाद, हानान, पलाया व लेवी,
हे लोकांस नेमशास्त्र समजावीत होते, आणि
लोक आपल्या ठिकाणावर उभे राहिले. ८ तेव्हां
त्यानी पुस्तक ह्मणजे देवाचें नेमशास्त्र स्पष्ट वा-
चिलें, आणि जें वाचिलें तें ध्यानांत आणून देऊन
समजाविलें.

९ आणि नहेम्या जो तिर्शाथा त्याने आणि
एज्रा याजक लेखक याने आणि जे लेवी लोकांस
बोध करीत होते, त्यानी सर्व लोकांस असें ह्मटलें
कीं,“हा दिवस तुमचा देव परमेश्वर याला पवित्र
आहे, शोक करूं नका, रडूं नका;” कां कीं सर्व
लोक नेमशास्त्राचीं वचनें ऐकून रडत होते. १०
तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, “जा, स्निग्धपदार्थ खा,
आणि मधुरांश प्या, आणि ज्यांस कांहीं सिद्ध
झालें नाहीं त्यांकडे वांटे पाठवा; हा दिवस आ-
मच्या प्रभूला पवित्र आहे ह्मणून खिन्न असूं
नका, कां कीं परमेश्वराचा आनंद तुमचें सा-
मर्थ्य आहे.” ११ लेवी तर सर्व लोकांस शां-
तवीत ह्मणाले, “मौन धरा, दिवस पवित्र आहे
ह्मणून खिन्न असूं नका.”

१२ मग सर्व लोक खायाला व प्यायाला व
वांटे पाठवायाला व मोठा हर्ष करायास गेले, कां
कीं जीं वचनें त्यांस सांगितलीं गेलीं तीं ते सम-
जले होते. १३ आणि दुसऱ्या दिवसीं एज्रा
लेखकाजवळ सर्व लोकांचे मुख्य वडील याजक
व लेवी नेमशास्त्राच्या गोष्टींचा विचार करायास
एकत्र मिळाले. १४ तेव्हां जें नेमशास्त्र परमे-
श्वराने मोश्याकडून दिल्हें होतें त्यांस असें लि-
हिलेलें सांपडलें कीं, “सातव्या महिन्यांतल्या स-
णांत इस्राएलाच्या संतानानी मंडपांत वस्ती करावी.
१५ आणि आपल्या सर्व नगरांत व यरूशालेमेंत
गाजवून घोषणा करावी कीं, तुह्मी बाहेर पर्वतास
जाऊन जैतूनांचे पल्लव व भद्रदारूंचे पल्लव व सु-
पर्णींचे पल्लव व खजुऱ्यांचे पल्लव व सासाऱ्या वृ-
क्षांचे पल्लव लिहिलेल्याप्रमाणें मंडप करायास घे-
ऊन या.” १६ मग लोकानी बाहेर जाऊन ते
आणून एकएकाने आपापल्या धाब्यावर व आपाप-
ल्या अंगणांत व देवाच्या मंदिराच्या अंगणांत व
जलदर्वाज्याच्या चौकांत व एफ्राइम दर्वाज्याच्या
चौकांत मंडप केले. १७ तेव्हां जे पाडावपणा-
च्या प्रवासांतून परत आले होते त्यांच्या सर्व
समाजाने मंडप करून मंडपांत वस्ती केली, कां
कीं नूनाचा पुत्र येशूवा याच्या दिवसांपासून त्या
दिवसापर्यंत इस्राएलाच्या संतानानी तसें केलें
नव्हतें, आणि फार मोठा हर्ष झाला. १८ आणि
प्रतिदिवसीं पहिल्या दिवसापासून शेवटील दिव-
सापर्यंत तो देवाच्या नेमशास्त्राचें पुस्तक वाची,
आणि त्यानी सात दिवस सण पाळिला, आणि
नेमाप्रमाणें आठव्या दिवसीं मेळा होता.

## अध्याय ९.

आणि या महिन्याच्या चोविसाव्या दिवसीं
इस्राएलाचीं संतानें उपास करून तरट ने-
सून अंगावर माती फांसून एकत्र मिळालीं. २
आणि इस्राएलाचीं संतानें सर्व परक्या लोकांपा-
सून वेगळीं होऊन उभीं राहिलीं, आणि त्यानी
आपलीं पापें व आपल्या पूर्वजांचे अन्याय कबूल
केले. ३ त्यानी आपल्या ठिकाणावर उभें राहून
पाव दिवस आपला देव परमेश्वर याच्या नेम-
शास्त्राचें पुस्तक वाचिलें, आणि पाव दिवस पाप
कबूल करून आपला देव परमेश्वर याचें भजन
केलें.

४ तेव्हां येशूवा व बानी काद्मीएल, शबा-
न्या, बुन्नी, शेरेब्या, बानी, खनानी, या लेव्यानी
उंच स्थलावर उभें राहून मोठ्या शब्दाने आपला
देव परमेश्वर याकडे आरोळी केली. ५ तेव्हां
येशूवा व काद्मीएल, बानी, हशाब्नाया, शेरे-
ब्या, होदीया, शबान्या, पथाह्या, हे लेवी ह्म-
णाले “उठा, तुह्मी आपला देव परमेश्वर या-
ची स्तुति सदासर्वकाल करीत जा, आणि तुझें
गौरवविशिष्ट नाम सर्व स्तुति व प्रशंसा यांवरतीं
उंचावलेलें असतां वंदिलें जावें. ६ तूंच तूं मात्र
परमेश्वर आहेस; त्वां आकाशें आकाशांचीं
आकाशें व त्यांचीं सर्व सैन्यें, पृथ्वी व जें कां-
हीं तिजवर आहे, समुद्र व त्यांतलें सर्व उत्पन्न
केलें व तीं सर्व तूं वाचवितोस व आकाशांचीं
सैन्यें तुझें भजन करितात. ७ तूं परमेश्वर देव
आहेस, ज्या त्वां आब्राहामाला निवडून खास्दा-
च्या ऊरांतून काढून घेतलें, आणि त्याचें नांव आ-
ब्राहाम ठेविलें. ८ आणि त्याचें मन तुजपुढें

विश्वासू असें सांपडलें, आणि खनानी, हित्ती, अ-
मोरी व परिज्जी व यबूसी व गिर्गाशी, यांचा देश
त्याच्या संततीला द्यायाला त्यासीं करार केला
आणि आपलीं वचनें खरीं केलीं आहेत, कां कीं
तूं सात्त्विक आहेस. ९ आणि त्वां मिसरांत
आमच्या पूर्वजांची पीडा पाहिली, आणि सूफस-
मुद्राजवळ त्यांची आरोळी ऐकिली. १० आणि
फारोहावर व त्याच्या सर्व चाकरांवर व त्याच्या
देशच्या सर्व लोकांवर अद्भुतें व उत्पात केले,
कां कीं त्यानी त्यांजवर गर्व केला असें त्वां जाणलें,
आणि आजच्याप्रमाणें आपल्याला नाम प्राप्त केलें.
११ तेव्हां त्वां त्यांपुढें समुद्र दुभागला, मग ते
समुद्रामधून कोरड्या भूमीवरून पार गेले, आणि
त्यांच्या पाठीस जे लागले ते त्वां जसा धोंडा खो-
ल पाण्यांत तसे अगाधांत टाकून दिल्हे. १२
आणि ज्या वाटेने त्यानी जावें तिजवर त्यांस दि-
वसीं मेघस्तंभाने आणि रात्रीं त्यांस प्रकाश पाडून
द्यावा ह्मणून अग्निस्तंभाने नेलें. १३ आणि तूं
सीना पर्वतावर उतरून आकाशांतून त्यांस बो-
ललास, आणि त्यांस नीट कायदा व सत्य विधि,
चांगले नियम व नियोग दिल्हे. १४ आणि त्यांस
आपला पवित्र शाब्बाथ नेमला आणि आपला सेवक
मोशे याकडून त्यांस नियोग व नियम व विधि
आज्ञापिले. १५ आणि त्यांस त्यांच्या भुकेला
आकाशांतून अन्न दिल्हें आणि त्यांच्या तहानेला
खडकांतून पाणी काढिलें, आणि जो देश त्वां आ-
पला हात उचलून त्यांस देऊं केला होता, त्याचें
धारण करायास आंत जावें ह्मणून त्यांस ह्मटलें.
१६ परंतु त्यानी व आमच्या पूर्वजानी उन्मत्त हो-
ऊन आपली मान ताठ केली, आणि तुझ्या आज्ञा
ऐकिल्या नाहींत. १७ ते ऐकेनात आणि त्यांजवळ
त्वां आपलीं जीं आश्चर्य्यं कर्मे केलीं तीं त्यानी स्म-
रलीं नाहीं, आणि आपली मान ताठ करून आ-
पल्या दास्याला परत जावें ह्मणून आपल्या कुटिल
बुद्धीने नायक नेमून ठेविला, परंतु तूं क्षमाशील,
कृपाळू, व दयाळू, मंदक्रोध व बहुप्रसाद देव
आहेस ह्मणून त्यांस सोडिलें नाहीं. १८ होय,
जेव्हां त्यानी ओतींव वासरूं करून ज्याने तुला
मिसरांतून वर आणिलें, तो तुझा देव हाच आहे,
असें ह्मटलें, आणि मोठीं चिडवणीचीं कृत्यें केलीं
होतीं; १९ तेव्हांहि त्वां आपल्या फार दयांमुळें
त्यांस रानांत सोडिलें नाहीं; त्यांस वाटेने न्यावें
ह्मणून दिवसीं जो मेघस्तंभ आणि रात्रीं ज्या
वाटेने त्यानी जावें तिजवर त्यांस प्रकाश पाडावा
जो अग्निस्तंभ तो त्यांवरून सरला नाहीं. २०
आणि त्यांस बोध करायास त्वां आपला सदात्मा
दिल्हा, आणि आपलें मान्ना त्यांच्या मुखापासून
काढिलें नाहीं, आणि त्यांस त्यांच्या तहानेला
पाणी दिल्हें. २१ रानांत चाळीस वर्षे त्वां त्यां-
चा प्रतिपाळ केला, त्यांस कशाचाहि तोटा नव्ह-
ता, त्यांचीं वस्त्रें जीर्ण झालीं नाहींत, त्यांचे पाय
सुजले नाहींत. २२ आणि त्वां त्यांस राष्ट्रें व
लोक दिल्हे आणि सीमानी त्यांचा विभाग केला,
मग त्यानी सीहोनाचा देश व हेश्बोनेच्या राजा-
चा देश व बाशानाचा राजा ओग याचा देश हे
घेतले. २३ आणि त्वां त्यांचीं लेंकरें आकाशां-
तल्या तार्‍यांइतकीं बहुत केलीं, आणि आंत जाऊन
घ्यावें ह्मणून ज्या देशाविषयीं त्वां त्यांच्या पूर्व-
जांस वचन दिल्हें होतें त्यांत त्वां त्यांस आणिलें;
२४ त्या लेंकरानी आंत जाऊन तो देश घेतला,
आणि त्वां त्यांपुढें देशांतले राहणारे खनानी व
त्यांचे राजे व देशचे लोक त्यांच्या हातीं असे
दिल्हे कीं त्यानी आपल्या मनोरथाप्रमाणें त्यांचें
केलें. २५ तेव्हां त्यानी सपरिघ नगरें व पिकाऊ
भूमि घेतली, आणि सर्व उत्तम वस्तूनी भरलेलीं
घरें, खणलेल्या विहिरी, द्राक्षींचे मळे, व जैतूनांचे
मळे व पुष्कळ फलझाडें हीं घेतलीं; मग ते खा-
ऊन तृप्त झाले, पुष्टहि झाले, आणि तुझ्या महा-
सुकृतीने आनंदित झाले. २६ तथापि त्यानी
अमान्य होऊन तुजसीं विरोध केला, आणि तुझें
नेमशास्त्र आपल्या पाठीमागें टाकिलें, आणि त्यांस
तुजकडे फिरवायास जे तुझे भविष्यवादी त्यांस
निक्षून सांगत असत त्यांस त्यानी वधिलें आणि
मोठीं चिडवणीचीं कृत्यें केलीं. २७ ह्मणून त्वां
ते त्यांच्या शत्रूंच्या हातीं दिल्हे, तेव्हां त्यानी
त्यांस पीडलें आणि त्यानी आपल्या पीडेच्या स-
मयीं तुजकडे आरोळी केली, मग त्वां आकाशांतून
त्यांचें ऐकून आपल्या फार दयांप्रमाणें त्यांस तार-
णारे दिल्हे आणि यानी त्यांस त्यांच्या शत्रूंच्या
हातांतून तारिलें. २८ परंतु त्यांस आराम झा-

त्यावर त्यांनी फिरून तुजपुढें वाईट केलें ह्मणून
त्वां त्यांस त्यांच्या वैऱ्यांच्या हातीं सोडिलें, मग
त्यांनी त्यांजवर प्रभुत्व केलें; तेव्हां त्यांनी फिरून
तुजकडे आरोळी केली, आणि त्वां आकाशांतून
त्यांचें ऐकून आपल्या दयाप्रमाणें बहुत वेळा त्यांस
मुक्त केलें. २९ आणि त्यांस तुझ्या नेमशास्त्रा-
कडे परत आणावें ह्मणून तूं त्यांस निक्षून सांगत
होतास, परंतु ते उन्मत्त होऊन तुझ्या आज्ञा ऐके-
नात, आणि जे तुझे नेम ज्यांप्रमाणें जर कोणी आच-
रील तर त्यांकडून तो वांचेल त्यांविरुद्ध ते पाप
करीत आणि खांदा ओढून घेत आणि आपली मान
ताठ करीत आणि ऐकेनात. ३० तथापि त्वां त्यांज-
वर बहुत वर्षे दया केली, आणि आपल्या आत्म्याने
आपल्या भविष्यवाद्यांकडून त्यांस निक्षून सांगि-
तलें, परंतु ते कान देईनात ह्मणून त्वां देशांच्या
लोकांच्या हातीं दिल्हें. ३१ तथापि त्वां आप-
ल्या फार दयांमुळें त्यांस नाहींसें केलें नाहीं, आणि
त्यांस सोडिलें नाहीं, कां कीं तूं कृपाळू व दयाळू
देव आहेस. ३२ आतां तर हे आमच्या देवा,
महा पराक्रमी व भयास योग्य देवा, जो तूं करार
व दया राखितोस, अश्शूराच्या राजांच्या दिवसा-
पासून आजपर्यंत जे सर्व कष्ट आह्मास, आमच्या
राजांस, आमच्या अधिकाऱ्यांस व आमच्या या-
जकांस व आमच्या भविष्यवाद्यांस व आमच्या
वाडिलांस व तुझ्या सर्व लोकांस लागले आहेत,
ते तुला थोडे वाटूं नयेत. ३३ तथापि जें अवघें
आह्मावर आलें आहे त्याविषयीं तूं सात्विक आ-
हेस, त्वां सत्यता केली आहे परंतु आह्मी दुष्टाई
केली आहे. ३४ आमच्या राजांनी, आमच्या
प्रधानांनीं, आमच्या याजकांनी आणि आमच्या
वडिलांनी तुझें नेमशास्त्र मानिलें नाहीं, आणि त्वां
आपल्या ज्या आज्ञा व आपलीं जीं प्रमाणें त्यां-
ला निक्षून सांगितलीं त्यांकडे त्यांनी कान दि-
ल्हा नाहीं. ३५ त्यांनी आपल्या राज्यांत आणि
त्वां आपला जो फार उपकार त्यांवर केला त्यांत
आणि जो विस्तीर्ण व दमदार देश त्वां त्यांपुढें
दिल्हा त्यांत तुझी सेवा केली नाहीं, आणि आप-
ल्या दुष्कर्मांपासून फिरले नाहींत. ३६ पाहा,
आह्मी आज परस्वाधीन आहों, जो देश त्वां आ-
मच्या पूर्वजांला त्यांनी त्याचें फळ व त्याचें चां-
गलें खावें ह्मणून दिल्हा, पाहा त्यांतच आह्मी
परस्वाधीन आहों. ३७ आणि आमच्या पापां-
मुळें जे राजे त्वां आह्मावर ठेविले आहेत त्यांस
तो आपले बहुत उत्पन्न देतो, आणि ते आपल्या
इच्छेप्रमाणें आमच्या शरीरांवर व आमच्या पशूं-
वर प्रभुत्व करितात आणि आह्मी मोठ्या संकटांत
आहों. ३८ आणि या सर्वांकरितां आह्मी दृढ
करार करितों आणि लिहितों आहों, आणि त्यांज-
वर आमचे अधिकारी, लेवी व याजक आपापली
मुद्रा लावितात."

## अध्याय १०.

ज्यांनी आपापली मुद्रा लाविली ते हेच; ह-
खाल्याचा पुत्र नहेम्या तिर्शाथा व सि-
द्कीया; २ सराया, अजार्या, इर्मया; ३
पाश्हूर, अमार्या, माल्खीया; ४ हाट्टूश, श-
बान्या, माल्लूख; ५ हारिम, मरेमोथ, ओब-
द्या; ६ दानीएल, गिन्नथोन, बारूख; ७ म-
शुल्लाम, अबीया, मिय्यामीन; ८ मावाज्या,
बिल्गाइ, शमाया; हे याजक होते. ९ आणि
लेवी; अजान्याचा पुत्र येशूवा, हेनादादाच्या
पुत्रांतला बिन्नुइ, काद्मीएल; १० आणि त्यांचे
भाऊ शबान्या, होदीया, कलीटा, पलाया, हा-
नान; ११ मीखा, रहोब, हशाब्या; १२ जा-
क्खूर, शेरेब्या, शबान्या; १३ हादीया, बानी,
बनीनू; १४ लोकांतले मुख्य पारोश, पाहाथ-
मोवाब, एलाम, जात्तू, बानी; १५ बुन्नी, अ-
ज्गाद, बेबाई; १६ अदोनीया, बिग्वाइ, आ-
दीन; १७ आटेर, हिज्कीया, आजूर; १८
होदीया, हाशुम, बेजाइ; १९ हारीफ, अना-
थोथ, नेबाई; २० माग्पीआश, मशुल्लाम, हेजीर;
२१ मशेजबएल, सादोक, यशूवा; २२ पला-
ट्या, हानान, अनाया; २३ होशेआ, हनान्या,
हश्शूब; २४ हलोहेश, पिल्हा, शोबेक; २५
रहूम, हशाब्ना, मासेया; २६ आणि अ-
हीया, हानान, आनान; २७ माल्लूख, हारिम,
बाअना.

२८ आणि वरकड लोक याजक, लेवी, द्वार-
पाल, गायक, नथीनीम, आणि जे आपल्या देवा-
च्या नेमशास्त्राकडे देशांच्या लोकांपासून वेगळे

झाले होते ते अवघे, त्यांच्या बायका, त्यांचे पुत्र,
आणि त्यांच्या कन्या, सर्व जे जाणत समजत
होते, २९ त्यानी आपले भाऊ, आपले महाजन
यांकडे लगटून असा शाप व शपथ वाहिली कीं,
देवाचें जें नेमशास्त्र देवाचा सेवक मोशे यां-
कडून दिल्हें होतें त्याप्रमाणें चालावें, आणि आ-
पला प्रभु परमेश्वर याच्या सर्व आज्ञा व त्याचे
न्याय व त्याचे नियम पाळावे आणि आचरावे.
३० आणि आपण आपल्या कन्या देशच्या लोकांस
देणार नाहीं, आणि आपल्या पुत्रांसाठीं त्यांच्या
कन्या घेणार नाहीं. ३१ आणि जर देशच्या
लोकानी शाब्बाथ दिवसांत कांहीं जिन्नस किंवा
धान्य विकायास आणिलें तर आपण शाब्बा-
थांत अथवा पवित्र दिवसीं तें घेणार नाहीं,
आणि सातवें वर्ष व सर्वांकडचें ऋण सोडूं.
३२ आणि आह्मी आपल्या देवाच्या मंदिरा-
च्या सेवेसाठीं शेकेलाचा तिसरा वांटा द्यायाला
आपल्यावर नियम केले. ३३ प्रतिवर्षी दर्श-
नीय अपूपासाठीं व नित्य नैवेद्यासाठीं व नित्य
शाब्बाथांच्या व अमावास्यांच्या होमासाठीं, ने-
मीत सणांसाठीं व पवित्र वस्तूंसाठीं व इस्रा-
एलाकरितां प्रायश्चित्त करायास पापहारक यज्ञां-
साठीं व आपल्या देवाच्या मंदिराच्या सर्व का-
र्यांसाठीं. ३४ आणि आह्मी याजक, लेवी व
लोक यानी अशासाठीं पण पाडले कीं नेमशास्त्रांत
लिहिलेल्याप्रमाणें आपला देव परमेश्वर याच्या
वेदीवर जाळायासाठीं आपल्या पूर्वजांच्या कुळां-
प्रमाणें प्रतिवर्षीं नेमलेल्या समयांत आपल्या देवा-
च्या मंदिरास लांकडांचें अर्पण आणावें. ३५
आणि आपल्या भूमीचीं प्रथम फळें व सर्व झा-
डांचीं प्रथम फळें प्रतिवर्षीं परमेश्वराच्या मंदि-
रास आणावीं. ३६ आणि नेमशास्त्रांत लिहि-
लेल्याप्रमाणें आपल्या पुत्रांतले प्रथम जन्मलेले
व आपल्या पशूंचे, आपल्या गुरांचे व आपल्या
मेंढरांचे प्रथम जन्मलेले आपल्या देवाच्या मंदि-
रास जे याजक आपल्या देवाच्या मंदिरांत सेवा
करितात त्यांजवळ आणावे. ३७ आणि आपण
आपल्या मळलेल्या पिठाचा प्रथमांश व आपलीं
अर्पणें व सर्व झाडांचीं फळें, द्राक्षारस व तेल
याजकांकडे आपल्या देवाच्या मंदिराच्या कोठ-
ड्यांत आणावीं, आणि आपल्या भूमीच्या उत्पन्ना-
चा दशमांश लेव्यांकडे आणावा, आणि आपल्या
शेतकीच्या सर्व नगरांत त्या लेव्यांस दशमांश
देत असावे. ३८ आणि लेवी दशमांश घे-
तात तेव्हां लेव्यांच्यासंगतीं आहरोनाचा संतान
याजक असावा, आणि लेव्यानी दशमांशाचा
दशमांश आपल्या देवाच्या मंदिरास भांडागा-
राच्या कोठड्यांत आणावा. ३९ कां तर इस्रा-
एलाच्या संतानानी व लेवीच्या संतानानी धान्य,
द्राक्षारस व तेल यांचें अर्पण कोठड्यांत, जेथें
पवित्रस्थानाचीं पात्रें व सेवा करणारे याजक व
द्वारपाल व गायक असतात तेथें आणावें, आणि
आपण आपल्या देवाचें मंदिर सोडूं नये.

## अध्याय ११.

आणि लोकांच्या अधिकाऱ्यानी यरूशालेमेस
वस्ती केली, आणि यरूशालेम जें पवित्र
नगर त्यांत वस्ती करायासाठीं दाहादाहांतून एक
एक आणावा, आणि नऊ वांटे दुसऱ्या नगरांत
राहावे ह्मणून वरकड लोकानी पण पाडले. २
आणि यरूशालेमेस वस्ती करायास जे स्वतां
मान्य झाले त्या सर्व मनुष्यांस लोकानी आशी-
र्वाद दिल्हा.

३ आणि देशांतले जे मुख्य जन यरूशाले-
मेंत राहिले ते हेच होते, परंतु इस्राएल याजक
व लेवी व नथीनीम व शलमोनाच्या चाकरांचे
संतान यहूदाच्या नगरांत आपापल्या नगरांत एक-
एक आपापल्या स्थलांत राहिले. ४ आणि य-
रूशालेमेस यहूदाच्या वंशांतले व बन्यामीनाच्या
वंशांतले कित्येक राहिले; यहूदाच्या वंशांतले
फारेजाच्या संतानांतला महलालएल याचा पुत्र
शफाट्या याचा पुत्र अमार्या याचा पुत्र जखार्या
याचा पुत्र उज्जीया याचा पुत्र अथाल्या. ५
आणि शीलोनीचा पुत्र जखार्या याचा पुत्र यो-
यारीब याचा पुत्र अदाया याचा पुत्र हजाया
याचा पुत्र कोल्होजे याचा पुत्र बारूख याचा
पुत्र मासाया. ६ फेरेजाचे जे संतान यरूशाले-
मेंस राहत होते ते सर्व चारशें अडसष्ट वीर्यवान
मनुष्य होते. ७ आणि बन्यामीनाचे संतान हेच,
यशायाचा पुत्र ईथीएल याचा पुत्र मासाया या-

चा पुत्र कोलाया याचा पुत्र पदाया याचा पुत्र
योएद याचा पुत्र मशुल्लाम याचा पुत्र साल्लू.
८ आणि त्यानंतर गाब्बाइ, साल्लाइ नऊशें
अठ्ठावीस. ९ आणि त्यांचा अधिकारी जिख्री-
चा पुत्र योएल होता, आणि सनूवाचा पुत्र यदूदा
नगराचा दुसरा अधिकारी होता. १० याजकांतले
योयारीबाचा पुत्र यदाया, याखीन ; ११ अही-
टुबाचा पुत्र मरायोथ याचा पुत्र जादोक याचा
पुत्र मशुल्लाम याचा पुत्र हिल्कीया याचा पुत्र
सराया देवाच्या मंदिराचा अधिकारी होता. १२
आणि त्यांचे जे भाऊ मंदिराचें काम करीत होते
ते आठशें बावीस होते, आणि माल्खीयाचा पुत्र
पाश्हूर याचा पुत्र जखार्‍या, याचा पुत्र अम्‌जी
याचा पुत्र पलाल्या याचा पुत्र यरोहाम याचा
पुत्र अदाया. १३ आणि याचे भाऊ वडिलां-
तले मुख्य दोनशें बेचाळीस, आणि इम्मेराचा
पुत्र मशिल्लेमोथ याचा पुत्र आह्‌जाइ याचा पुत्र
अजारएल याचा पुत्र अमाश्साइ. १४ आणि
त्याचे भाऊ बलवान वीर एकशें अठ्ठावीस, आणि
त्यांचा अधिकारी गदोलीमाचा पुत्र जाब्दीएल
होता. १५ आणि लेव्यांतले बुन्नीचा पुत्र ह-
शाब्या याचा पुत्र अज्रीकाम याचा पुत्र हश्शूब
याचा पुत्र शमाया. १६ आणि लेव्यांच्या मु-
ख्यांतले शाब्बथाइ व योजाबाद देवाच्या मंदि-
रच्या बाहेरल्या कामावर होते. १७ आणि
प्रार्थनेच्या वेळेस उपकारस्तवन आरंभायास आ-
साफाचा पुत्र जाब्दी याचा पुत्र मीखा याचा
पुत्र मात्तान्या मुख्य होता, आणि बाक्‌बुक्या
आपल्या भावांतला दुसरा आणि यदूथूनाचा पुत्र
गालाल याचा पुत्र शाम्मूवा याचा पुत्र अब्दा.
१८ पवित्र नगरांतले सर्व लेवी दोनशें चौऱ्याय-
शीं होते. १९ आणि द्वारपाळ अक्कूब, टाल्मोन,
व त्यांचे भाऊ जे दर्वाज्यांला राखीत होते ते
एकशें बाहत्तर होते.

२० आणि वरकड इस्राएल लोक, याजक, लेवी
यहूदाच्या सर्व नगरांत एकएक आपापल्या विभा-
गांत होते. २१ आणि नथीनीम ओफेलांत राहत
होते, आणि जीहा व गिश्पा नथीनीमांवर होते.
२२ आणि मीखाचा पुत्र मत्तान्या याचा पुत्र
हशाब्या याचा पुत्र बानी याचा पुत्र उज्जी यरू-
शालेमेंतल्या लेव्यांचा अधिकारी होता, आसा-
फाच्या संतानांतले गायक देवाच्या मंदिराच्या
कामावर होते. २३ कां कीं त्याविषयीं राजाची
आज्ञा होती कीं गायकाला ठरलेला नियम प्रति-
दिवसाची मात्रा असावी. २४ आणि यहूदाचा
पुत्र जेराह याच्या संतानांतला मशेजबएल याचा
पुत्र पथाह्या लोकांच्या सर्व गोष्टींविषयीं राजाच्या
हाताकडे होता. २५ आणि खेड्यांविषयीं त्यां-
च्या शेतवाड्यांसुद्धां यहूदाच्या वंशांतले कित्येक
किर्याथ आर्बांत व तिच्या गांवांत व दीबोनेंत
व तिच्या गांवांत व यकाबजएलेंत आणि तिच्या
खेड्यांत; २६ आणि येशूवांत व मोलादांत व
बेथपेलेटेंत ; २७ आणि हजार्शूवालेंत व बेर-
शेबांत व तिच्या गांवांत; २८ आणि सिक्ला-
गेंत व मकोनांत व तिच्या गांवांत; २९ आणि
एन्‌रिम्मोनेंत व जारवांत व यार्मूथेंत; ३० जा-
नोवहेंत अदुल्लामेंत व त्यांच्या खेड्यांत; लाखी-
शेंत व तिच्या शेतवाड्यांत, अजेकांत व तिच्या
गांवांत वस्ती करिते झाले; त्यांनी बेरशेबापासून
हिन्नोमाच्या खोऱ्यापर्यंत वस्ती केली. ३१ आणि
गेबांतले बन्यामीनाचे वंश मिख्‌माशेस व अ-
य्यास व बेथएलेस व त्यांच्या गांवांत; ३२
अनाथोथेस, नोबेस, अनान्यास; ३३ हाजोरेस,
रामास, गित्ताइमेस; ३४ हादीदेस, जबोइ-
मेस, नबल्लाटेस; ३५ लोदस व शिल्प्यांच्या
खोऱ्यांतल्या ओनोस राहते झाले. ३६ आणि
लेव्यांतलीं प्रकरणें यहूदाकडे व बन्यामीनाकडे
होतीं.

## अध्याय १२.

आणि शवाल्‌तीएलाचा पुत्र जरूब्बाबेल व
येशूवा यांसंगतीं जे याजक व लेवी वर
आले ते हेच होते; सराया, इर्मेया, एज्रा; २
अमार्या, माल्लूख, हाट्टूस; ३ शखान्या, रहूम,
मरेमोथ; ४ इद्दो, गिन्नथो, अबीया; ५ मि-
य्यामीन, मावाद्या, बिल्‌गा; ६ शमाया व
योयारीब, यदाया; ७ साल्लू, आमोक, हि-
ल्कीया, यदाया, हे येशूवाच्या दिवसांत याजकां-
तले व त्यांच्या भावांतले मुख्य होते. ८ आणि
लेवी; येशूवा, बिन्नूइ, काद्‌मीएल, शेरेब्या,

यहूदा मत्तान्या, हा व याचे भाऊ स्तुतिगाय-
नांवर होते. ९ आणि त्यांचे भाऊ बाक्बुक्या
व उन्नी त्यांसमोर पाहऱ्यांत होते. १० आणि
येशूवाने योयाकीमाला जन्म दिल्हा, आणि योया-
कीमाने एल्याशीबाला जन्म दिल्हा, आणि एल्या-
शीबाने योयादाला जन्म दिल्हा. ११ आणि
योयादाने योनाथानाला जन्म दिल्हा, आणि यो-
नाथानाने यद्दूवाला जन्म दिल्हा. १२ आणि
योयाकीमाच्या दिवसांत याजक वडिलांतले मुख्य
होते; सरायापासून मराया, इर्मयापासून हना-
न्या; १३ एज्रापासून मशुल्लाम, अमार्यापासून
यहोहानान; १४ मलीखूपासून योनाथान, श-
बान्यापासून योसेफ; १५ हारिमापासून अद्ना,
मरायोथापासून हेल्काइ; १६ इद्दोपासून ज-
खार्या, गिन्नथोनापासून मशुल्लाम; १७ अबी-
यापासून जिख्री, मिन्यामीनापासून मोवद्यापासून
पिल्टाय; १८ बिल्गापासून शम्मूवा, शमा-
यापासून यहोनाथान; १९ योयारीबापासून मा-
त्तनाय, यदायापासून उज्झी; २० सल्लायापासून
कल्लाय, आमोकापासून एबेर; २१ हिल्कीया-
पासून हशब्या, यदायापासून नथानेल; २२
एल्याशीब, योयादा व योहानान व यद्दुवा यांच्या
दिवसांत लेवी वडिलांतले मुख्य आणि दारयावेश
पार्शीच्या राज्यापर्यंत याजक लिहिलेले होते. २३
लेवीचे संतान वडिलांतले मुख्य काळवृत्तांतां-
च्या पुस्तकांत एल्याशीबाचा पुत्र योहानान याच्या
दिवसांपर्यंत लिहिलेले होते. २४ आणि लेव्यां-
तले मुख्य हशब्या, शेरेब्या, व काद्मीएलाचा
पुत्र येशूवा आणि त्यांसमोर त्यांचे भाऊ चौकी-
संमुख चौकी असे देवाकडचा मनुष्य दावीद
याच्या आज्ञेप्रमाणें स्तवनास व उपकारस्तुति क-
रायास होते. २५ मत्तन्या व बाक्बुक्या,
ओबद्या, मशुल्लाम, टाल्मोन, अक्कूब, द्वारपाळ
दर्वाज्यांच्या कोठ्यांचें रक्षण करीत होते. २६
हे योसादाकाचा पुत्र येशूवा याचा पुत्र योया-
कीम याच्या दिवसांत आणि नहेम्या अधिकारी
व एज्रा याजक लेखक यांच्या दिवसांत होते.

२७ आणि यरूशालेमेच्या कोटाच्या प्रति-
ष्ठापणास लोकांनी लेव्यांस त्यांच्या सर्व स्थानांतून
शोधिलें; हर्ष, स्तवन, व गायन करून झांजा,
वीणा व चंग वाजवून प्रतिष्ठापन करायाला त्यांस
यरूशालेमेस आणावें म्हणून. २८ आणि गाय-
कांचे संतान यरूशालेमेभोंवतालच्या ठिकाणांतून
व नटोफाथीच्या खेड्यांतून, २९ आणि गिल्-
गालच्या घरांतून आणि गेबा व अज्मावेथ यांच्या
शेतवाड्यांतून एकत्र मिळाले, कां कीं गायकांनी
आपल्याला यरूशालेमेभोंवतीं खेडीं बांधिलीं होतीं.
३० आणि याजक व लेवी यांनी आपल्याला शुद्ध
करून लोकांला व दर्वाज्यांला व कोटाला शुद्ध
केलें. ३१ तेव्हां म्या यहूदाचे अधिकारी वरतीं
कोटावर आणिले, आणि दोन मोठ्या स्तवणाऱ्या
मंडळ्या ठेविल्या; त्यांतली एक उजव्याकडे कोटा-
वर केरच्या दर्वाज्याकडे चालली; ३२ आणि
त्यांमागें होशाया व यहूदाचे अर्धे अधिकारी;
३३ आणि अजार्या, एज्रा व मशुल्लाम; ३४
यहूदा व बन्यामीन व शमाया व इर्मया; ३५
आणि कित्येक याजक करणे घेऊन चालले; आ-
साफाचा पुत्र जाक्खूर याचा पुत्र मीखाया याचा
पुत्र मात्तन्या याचा पुत्र शमाया याचा पुत्र यो-
नाथान याचा पुत्र जखार्या; ३६ आणि त्याचे
भाऊ शमाया व अजारएल व मिललाइ, गिल-
लाइ, माआइ नथानएल व यहूदा, हनानी हे
देवाकडचा मनुष्य दावीद याचीं वाद्यें घेऊन चा-
लले, आणि त्यांपुढें एज्रा लेखक चालला. ३७
ते जलाकराच्या दर्वाज्यावरून आपल्या मोहरे
दावीदाच्या नगराच्या पायऱ्यांवरून कोटाच्या च-
ढणीवर दावीदाच्या घरावरतीं पूर्वेकडे जलदर्वा-
ज्यापर्यंत चढले. ३८ आणि दुसरी स्तवणारी
मंडळी समोर चालली, आणि तिजमागें मी व
अर्धे लोक कोटावर भट्ट्यांच्या दुर्गावरून विस्तीर्ण
कोटापर्यंत; ३९ आणि एफ्राइम दर्वाज्यावरून
व जुन्या दर्वाज्यावरतीं व मत्स्य दर्वाजा व हना-
नेलाचें दुर्ग व मेवाचें दुर्ग यांवरतीं मेंढरांच्या
दर्वाज्यापर्यंत चालले, आणि बंदिशाळेच्या दर्वा-
ज्यास ते उभे राहिले. ४० अशा दोन्ही स्तव-
णाऱ्या मंडळ्या देवाच्या मंदिरांत उभ्या राहिल्या,
आणि मी व मजसंगतीं अर्धे अधिकारीहि; ४१
आणि याजक; एल्याकीम, मासाया, मिन्यामीन,
मीखाया, एल्योएनाद, जखार्या, हनान्या करणे
धरून, ४२ आणि मासाया व शमाया व

एलाज़ार व उज्जी व योहानान व माल्खीया व
एलाम व एज़ेर; आणि गायकानी उंच स्वराने गा-
इलें, आणि यिज्राह्या अधिकारी होता. ४३
आणि त्या दिवसीं त्याने मोठे यज्ञ करून हर्ष
केला, कां कीं ते मोठा हर्ष करित असें देवाने
केलें होतें; बायकानी व पोरानीहि हर्ष केला, आ-
णि यरूशालेमेचा हर्ष दूरवर ऐकिला गेला.

४४ त्या वेळेस भांडार, अर्पणें, प्रथमफलें, व
दशमांश यांच्या कोठड्यांवर कित्येक ठेविले गेले;
त्यानी त्यांत नगरांच्या शेतांतून याजकांचे व ले-
व्यांचे नेमाने ठरलेले वांटे गोळा करावे ह्मणून,
कां कीं जे याजक व लेवी सेवा करीत होते त्यां-
विषयीं यहूदा हर्ष करीत होता. ४५ आणि
दावीदाच्या व त्याचा पुत्र शलमोन याच्या आज्ञे-
प्रमाणें गायक व द्वारपाल आपल्या देवाचें रक्षण
व शुद्धीकरणाचें रक्षण करीत होते. ४६ कां कीं
पूर्वीं दावीदाच्या व आसाफाच्या दिवसांत मुख्य
गायक व देवाला स्तुतिगायन व उपकारस्तुति
करीत असत. ४७ आणि जरुब्बाबेलाच्या दिव-
सांत व नहेम्याच्या दिवसांत सर्व इस्राएल लोक
गायकांचे व द्वारपालांचे वांटे प्रतिदिवसाची मा-
त्रा देत असत, आणि लेव्यांकडे कांहीं पवित्र ठर-
वीत असत, आणि लेवी आहरोनाच्या संताना-
कडे कांहीं पवित्र ठरवीत असत.

## अध्याय १३.

त्या वेळेस मोशाचें पुस्तक लोकांच्या कानीं पडे
असें वाचिलें गेलें, आणि त्यांत असें लिहि-
लेलें सांपडलें कीं, सर्वकालपर्यंत आम्मोन्याने व
मोवाब्याने देवाच्या समाजांत येऊं नये. २ का-
रण कीं ते अन्नपाणी घेऊन इस्राएलाच्या संता-
नांला भेटले नाहींत, आणि त्यांस बलामाने शापावें
ह्मणून त्याला मोल दिल्हें, परंतु आमच्या देवाने
शापाचा आशीर्वाद केला. ३ आणि त्यानी नेम-
शास्त्र ऐकल्यावर असें झालें कीं त्यानी इस्राएला-
पासून सर्व मिश्रित लोक वेगळे केले. ४ आणि
यापूर्वीं एल्याशीब याजक आमच्या देवाच्या मंदिरा-
च्या कोठडीवर ठेविलेला असतां टोबीयाचा सोय-
रा होता. ५ आणि जेथें पूर्वीं नैवेद्य, धूप व पात्रें
व धान्य, द्राक्षारस व तेल यांचे जे दशमांश ले-
वी, गायक व द्वारपाल यांकडे आज्ञापिलेले होते
ते आणि याजकांचीं अर्पणें ठेवीत होते ती मोठी
कोठडी त्यानें त्यासाठीं सिद्ध केली होती. ६ परंतु
हें सर्व झालें तेव्हां मी यरूशालेमेस नव्हतों, कां
कीं बाबेलेचा राजा अर्तहशश्त याच्या बत्तिसा-
व्या वर्षीं मी राजाकडे गेलों, आणि कांहीं वेळ
झाल्यावर मी राजाजवळ निरोप मागितला. ७
आणि यरूशालेमेस आलों तेव्हां एल्याशीबानें
टोबीयासाठीं देवाच्या मंदिराच्या अंगणांत को-
ठडी सिद्ध करून जें वाईट केलें होतें, तें मी
समजलों. ८ तेव्हां हें मला फार वाईट वाटलें,
आणि म्या टोबीयाच्या घरची सर्व सामग्री कोठ-
डीबाहेर टाकून दिल्ही; ९ आणि कोठड्या शुद्ध
कराव्या ह्मणून म्या आज्ञा केली, आणि तेथें म्या
देवाच्या मंदिराचीं पात्रें, नैवेद्य व धूप हीं परत
आणिलीं.

१० आणि लेव्यांचे वांटे दिल्हे गेले नव्हते,
आणि काम करणारे लेवी व गायक एकएक आपा-
पल्या शेतवाडीस पळून गेले, असें मला माहीत
झालें. ११ तेव्हां म्या अधिकाऱ्यांसीं विवाद क-
रून ह्मटलें, "देवाचें मंदिर कां सोडिलें आहे?"
मग म्या त्यांस जमवून त्यांच्या ठिकाणावर ठेविलें.
१२ तेव्हां सर्व यहूदी लोकानी धान्य, द्राक्षारस
व तेल यांचा दशमांश भांडारांत आणिला. १३
आणि शलेम्या याजक व जादोक लेखक, आणि
लेव्यांतला पदाया म्या भांडारांचे अधिकारी केले,
आणि त्यानंतर मात्तान्याचा पुत्र जाक्कूर याचा
पुत्र हानान होता, कां कीं ते विश्वासू गणले होते,
आणि आपल्या भावांला वांटून देणें त्यांचें काम
होतें. १४ हे माझ्या देवा, याविषयीं माझी आ-
ठवण धर, आणि जे माझे परोपकार म्या आपल्या
देवाच्या मंदिरावर व त्याच्या पालनीयांवर केले
आहेत त्यांस पुसून टाकूं नको.

१५ त्या काळीं यहूदांत कित्येक शाब्बाथांत
द्राक्षें तुडवितां व पेंढ्या आणितां व गाढवांवर ओ-
झीं घालितां, आणि शाब्बाथ दिवसीं द्राक्षारस,
द्राक्षें व अंजीर व सर्व प्रकारचे भार यरूशाले-
मेस आणितां माझे दृष्टीस पडले, आणि ते आहार
विकीत होते, तेव्हां म्या निषेध केला. १६
आणि तेथें जोरी राहत होते, ते मासे व सर्व

प्रकारचे जिन्नस आणून शाब्बाथांत यहूदाच्या
वंशाला आणि यरूशालेमेंत विकीत होते. १७
तेव्हां म्या यहूदाच्या महाजनांसीं विवाद करून
झटलें, “ही वाईट गोष्ट तुह्मी करून शाब्बाथ
दिवसाला बाटवीत आहां ही काय आहे? १८
तुमच्या पूर्वजानी असें केलें कीं नाहीं? मग देवा-
ने आह्मावर आणि या नगरावर हें सर्व वाईट
आणिलें, आणि तुह्मी शाब्बाथाला बाटवून इस्रा-
एलावर अणखी अधिक क्रोध आणीत आहां.”
१९ आणि असें झालें कीं शाब्बाथापूर्वी यरूशा
लेमेच्या दर्वाज्यांत काळोख होऊं लागला, तेव्हां
कवाडें लावून बंद करावीं ह्मणून म्या सांगितलें,
आणि शाब्बाथ होऊन गेल्या अगोदर उघडलीं
न जावीं असेंहि सांगितलें, आणि शाब्बाथ दिव-
सीं कांहीं ओझें आंत आणिलें न जावें ह्मणून
म्या आपले कित्येक गडी दर्वाज्यावर ठेविले. २०
मग व्यापारी व सर्व प्रकारच्या जिन्नसाचे वि-
कणारे एकदां दोनदां यरूशालेमेबाहेर उतरले.
२१ तेव्हां म्या त्यांस निषेध करून ह्मटलें, “तुह्मी
कोटासमोर कां उतरतां? जर तुह्मी पुन्हा असें
केलें तर तुह्माला हात लावीन.” त्या वेळेपासून
ते शाब्बाथांत आले नाहीं. २२ आणि शाब्बाथ
दिवस पवित्र पाळायासाठीं लेव्यानी आपल्याला
शुद्ध करून येऊन दर्वाजे राखावे ह्मणून म्या
त्यांस आज्ञा केली. हे माझ्या देवा, याविषयींहि
माझी आठवण धर, आणि आपल्या दयेच्या मह-
त्वाप्रमाणें मजवर कृपा कर.

२३ अणखी त्या दिवसांत ज्यानी अश्दोदी,
आम्मोनी व मोवाबी बायका करून घेतल्या हो-
त्या, असे यहूदी माझ्या दृष्टीस पडले. २४ आणि
त्यांचीं मुलें अर्धीं अश्दोदी भाषा बोलत होतीं,
त्यांस यहूदी भाषा बोलतां येईना, एकएका लो-
काच्या भाषेप्रमाणें बोलत. २५ तेव्हां म्या त्यां-
सीं विवाद करून त्यांचा धिक्कार केला, आणि
त्यांतल्या कित्येकांस मार देऊन त्यांचे केंस उप-
टून त्यांस देवाची शपथ घालून ह्मटलें, “तुह्मी
आपल्या कन्या त्यांच्या पुत्रांस देऊं नका, आणि
आपल्या पुत्रांस किंवा आपल्याला त्यांच्या कन्या
घेऊं नका. २६ इस्राएलाचा राजा शलमोन याने
अशीं कुकर्मे करून पाप केलें कीं नाहीं? आणि ब-
हुत राष्ट्रांमध्यें त्यासारिखा राजा कोणी नव्हता;
तो आपल्या देवाला प्रिय होता आणि देवाने
त्याला सर्व इस्राएलावर राजा केलें, तथापि त्या-
ला विदेशी स्त्रियानी पापांत पाडलें. २७ तर
हें सर्व मोठें वाईट करूं द्यावें ह्मणजे विदेशी
बायका करून घेऊन आमच्या देवाविरुद्ध पातक
करूं द्यावें, असें आह्मी तुमचें ऐकूं काय?” २८
आणि एल्याशीब मुख्य याजक याचा पुत्र यो-
यादा याच्या पुत्रांतला एक सान्बलाट होरो-
न्याचा जांवई होता ह्मणून त्याला म्या आपल्या-
पासून पळविलें. २९ त्यानी याजकपणाला आ-
णि याजकपणाच्या व लेव्यांच्या कराराला विटा-
ळिलें आहे, ह्मणून हे माझ्या देवा, त्यांस स्मर.
३० म्या तर सर्व पारखे दूर करून त्यांस
शुद्ध केलें, आणि याजकांच्या व लेव्यांच्या चौ-
क्या एकएक त्याच्या त्याच्या कार्यावर, ३१
आणि नेमलेल्या समयांतल्या लांकडाच्या अर्प-
णांसाठीं व प्रथमफलांसाठीं ठेविल्या. हे माझ्या
देवा, हितासाठीं माझी आठवण धर.

# एस्तेर इचें पुस्तक.

## अध्याय १.

अहाश्वेरोशाच्या दिवसांत (जो अहाश्वेरोश हिं-
दापासून खूशापर्यंत एकशें सत्तावीस प्रांतां-
वर राज्य करीत होता तो). २ त्या दिवसांत
असें झालें कीं अहाश्वेरोश राजाने आपल्या रा-
ज्याच्या तिसऱ्या वर्षी आपलें जें राजासन शूशान
राजवाड्यांत होतें त्यावर बसलें असतां, ३
त्यापुढें पारस व मादाइ यांचें बल, प्रांतांचे महा-
जन व अधिकारी असतांना आपल्या सर्व प्रधानांस
व सेवकांस जेवणावळ केली. ४ तेव्हां त्याने
आपल्या गौरवविशिष्ट राज्याचें धन व आपल्या
महत्वाच्या प्रतापाचें वैभव बहुत दिवस, ह्मणजे
एकशें ऐशीं दिवस दाखविलें. ५ आणि ते दि-
वस समाप्त झाले तेव्हां राजाने शूशान राजवा-
ड्यांतल्या सर्व लोकांस लाहान मोठ्यांस सात दि-
वस राजमंदिराच्या भागाच्या अंगणांत जेवणावळ
केली. ६ तेथें कतान व अर्गवानी यांच्या दोऱ्या-
नी रुप्याच्या वलयांस व मर्मराच्या खांबांस अड-
कविलेले पांढरे, हिरवे व निळे पडदे होते; पलंग
सोन्याचे व रुप्याचे ताम्र व श्वेत, शुभ्र व श्याम
मर्मराच्या चिरेबंदीवर होते. ७ आणि सोन्या-
च्या पात्रांत प्यायाला देत होते, आणि पात्रें एकमे-
कांहून निराळीं होतीं आणि राजकीय द्राक्षारस
राजाच्या सत्तेप्रमाणें पुष्कळ होता. ८ आणि
पिणें विधीप्रमाणें होतें; कोणी आग्रह करीत नव्ह-
ता, कां कीं एकएकाच्या मनोरथाप्रमाणें करावें
ह्मणून राजाने आपल्या घरच्या सर्व कारभाऱ्यांस
आज्ञा केली होती. ९ आणि वाश्ती राणीनेहि
अहाश्वेरोश राजाच्या राजकीय मंदिरांत स्त्रियांस
जेवणावळ केली.

१० सातव्या दिवशीं द्राक्षारसाने राजाचें हृ-
दय संतुष्ट होतें, तेव्हां त्याने महूमान, बिज्था,
हार्बोना, बिग्था व अबाग्था, जेथार व खार्खास हे
सात षंड जे अहाश्वेरोश राजापुढें सेवा करीत
असत त्यांस आज्ञा केली कीं, ११ राजापुढें वा-
श्ती राणी राजमुगूटमंडित आणावी, लोकांस व
अधिकाऱ्यांस तिची सुंदरता दाखवावी ह्मणून, का
कीं ती सुदर्शन होती. १२ परंतु राजाने आप-
ल्या षंडांकडून जें सांगितलें त्याप्रमाणें यायाला
वाश्ती राणी मान्य होईना, ह्मणून राजा फार को-
पला आणि त्याच्याठायीं त्याचा राग जळला.
१३ तेव्हां राजाने काळ जाणणारे जे शाहाणे मनुष्य,
त्यांस ह्मटलें, (कां कीं सर्व नेम व न्याय जाणणारे
यांपुढें राजाची रीति असी होती. १४ आणि
त्याजवळ पारस व मादाइ यांचे सात प्रधान,
ह्मणजे खार्शना, शेथार, अद्माथा, तार्शीश,
मेरेस्त, मार्सना, ममूखान जे राजाच्या समक्ष
असत आणि राज्यांत मुख्य बसत असत ते होते)
१५ "नेमाप्रमाणें वाश्ती राणीचें काय करायाचें
आहे, कारण कीं अहाश्वेरोश राजाची जी आज्ञा
षंडांकडून झाली ती तिने मानिली नाहीं." १६
मग ममूखानाने राजा व प्रधान यांपुढें ह्मटलें,
"वाश्ती राणीने केवळ राजाचा मात्र अन्याय केला,
असें नाहीं परंतु तिने सर्व प्रधानांचा व अहाश्वे-
रोश राजाच्या सर्व प्रांतांतल्या लोकांचाहि केला
आहे. १७ कां कीं राणीचें हें वर्त्तमान निघून
सर्व स्त्रियांस पोहंचेल कीं अहाश्वेरोश राजाने
आपल्यापुढें वाश्ती राणी आणावी ह्मणून आज्ञा
केली, आणि ती आली नाहीं असें ह्मटलें, तेव्हां
त्या आपल्या पतींला तुच्छ मानतील. १८ आ-
जच पारस व मादाइ यांच्या ज्या बिब्यांनी रा-
णीचें वर्त्तमान ऐकिलें आहे, तेव्हां राजाच्या सर्व
प्रधानांस त्या तसें ह्मणतील, मग अतिशय अप-
मान व कोप होतील. १९ जर राजाच्या मनास
येईल तर त्यापुढून राजाज्ञा निघावी आणि न
टळावी ह्मणून पारशी व मादाइ यांच्या नेमां-
मध्यें लिहिली जावी कीं, वाश्तीने अहाश्वेरोश
राजापुढें पुन्हा येऊं नये, आणि तिची जी सो-
बतीण तिजपेक्षां चांगली आहे तिला राजाने

तिचें राजपद द्यावें. २० आणि राजा जी आज्ञा
करील ती त्याच्या सर्व राज्यांतून (तें तर मोठें
आहे) विख्यात झाली, ह्मणजे सर्व स्त्रिया आपले
पती लाहान व मोठे यांचे सन्मान करितील."
२१ तेव्हां हें वचन राजाला व प्रधानांला बरें
वाटलें, आणि राजाने ममूखानाच्या वचनाप्रमाणें
केलें. २२ त्याने राजाच्या सर्व प्रांतांत, एक-
एका प्रांतांत त्याच्या त्याच्या लिपीप्रमाणें, आणि
प्रत्येक लोकांकडे त्याच्या त्याच्या भाषेप्रमाणें
पत्रें पाठविलीं; प्रत्येक पुरुषाने आपापल्या घरीं
अधिकार करावा आणि आपापल्या लोकांच्या भा-
षेप्रमाणें असें बोलावें ह्मणून.

## अध्याय २.

ह्या गोष्टी झाल्यावर अहाश्वेरोश राजाचा क्रोध
शमला, तेव्हां त्याने वाश्तीला आणि तिने
जें केलें होतें तें आणि तिजविषयीं जें ठरलें होतें
तेंहि स्मरलें. २ तेव्हां राजाचे सेवक जे त्याची
सेवा करीत होते ते ह्मणाले, "राजासाठीं तरुण
सुदर्शन कुमारींचा शोध करावा. ३ आणि राजाने
आपल्या राज्याच्या सर्व प्रांतांत कारभारी नेमून
ठेवावे, आणि त्यांनी सर्व तरुण सुदर्शन कुमारी
शूशान राजवाड्यास अंतःपुरांत राजाचा शंड हे-
गाय स्त्रीरक्षक याच्या हाताखालीं जमवाव्या, आ-
णि त्यांचीं शुचिसाधनें दिल्हीं जावीं. ४ आणि
जी तरुणी राजाच्या मनास येईल ती वाश्तीच्या
ठिकाणीं राणी व्हावी." तेव्हां ही गोष्ट राजाला
बरी वाटली आणि त्याने तसें केलें.
५ शूशान राजवाड्यांत कीश बन्यामीनी या-
चा पुत्र शिमई याचा पुत्र याईर याचा पुत्र मो-
र्देखाय नांवें कोणीएक यहूदी होता. ६ तो यहू-
दाचा राजा यखन्या याच्यासंगतीं जे पाडाव
करून नेले होते, जे बाबेलाचा राजा नबूखद्ने-
स्सार याने नेले होते, त्यांसुद्धां यरूशालेमेहून
नेला होता. ७ आणि तो आपल्या चुलत्याची
कन्या हदास्सा जी एस्तेर तिचा प्रतिपाल करीत
होता, कां कीं तिला आईबापें नव्हतीं, आणि ती
तरुणी सुरूप व सुदर्शन होती, आणि तिचीं आई-
बापें मेल्यावर तिला मोर्देखायाने आपल्याकडे
कन्या करून घेतलें. ८ आणि राजाची आज्ञा
व त्याचा नेम विख्यात झाल्यावर जेव्हां बहुत
तरुण्या शूशान राजवाड्यास हेगायाच्या हाताखा-
लीं जमविल्या होत्या तेव्हां असें झालें कीं एस्ते-
रहि राजाच्या घरास हेगाय स्त्रीरक्षकाच्या हाता-
खालीं आणिली होती. ९ आणि ती तरुणी त्या-
च्या मनास आली आणि त्याची कृपादृष्टि तिजवर
झाली, आणि लवकर त्याने तिचीं शुचिसाधनें व
तिचे वांटे आणि राजाच्या घरांतून तिला द्याया-
साठीं निवडलेल्या सात तरुण्या हीं दिल्हीं, आणि
तिला तिच्या तरुण्यांसुद्धां नेऊन अंतःपुराच्या उ-
त्तम ठिकाणीं ठेविलें. १० हें एस्तेरेने आपल्या
लोकांस व आपली जात यांविषयीं कोणाला सां-
गितलें नव्हतें, कां कीं सांगूं नये ह्मणून मोर्देखा-
याने तिला आज्ञा केली होती. ११ आणि एस्ते-
रेचें कुशल आणि तिचें काय केलें जाईल तें जा-
णायाला मोर्देखाय प्रत्येक दिवसीं अंतःपुराच्या
अंगणापुढें फिरत असे. १२ आणि एकएका तरु-
णीला स्त्रियांच्या रीतिप्रमाणें बारा महिने झाल्या-
वर अहाश्वेरोश राजाजवळ आंत जायास जेव्हां
तिची पाळी आली, (तसेंच तर त्यांच्या शुचीकर-
णांचे दिवस समाप्त होत, ह्मणजे साहा महिने
बोळाच्या तेलाने आणि साहा महिने सुगंध द्रव्या-
नीं व स्त्रियांच्या दुसऱ्या शुचि साधनांनी; १३
तेव्हां याप्रमाणें प्रत्येक तरुणी राजाजवळ आली,
जें कांहीं तिने मागितलें तें तिला तिच्यासंगतीं
अंतःपुरांतून राजाच्या घरास जायाला दिल्हें गेलें.
१४ संध्याकाळीं ती आंत गेली आणि सकाळीं
दुसऱ्या अंतःपुरांत राजाचा शंड शाशगाज उप-
पत्न्यांचा रक्षक याच्या हाताखालीं परत आली;
जर राजाने तिजवर आवड ठेविली नसली आणि
ती नांवाने बोलाविली गेली नसली, तर ती पुन्हां
राजाजवळ आली नाहीं. १५ आणि मोर्देखा-
याने आपल्याकडे आपला चुलता अबीहाइल या-
ची जी कन्या एस्तेर कन्या करून घेतली होती
तिची पाळी राजाजवळ आंत जायाला आली,
तेव्हां जें राजाचा शंड हेगाय स्त्रीरक्षक याने सां-
गितलें त्याशिवाय तिने कांहीं मागितलें नाहीं, आ-
णि ज्यांनी एस्तेरेला पाहिलें त्या सर्वांची कृपादृष्टि
तिजवर झाली. १६ तर अहाश्वेरोश राजाच्या रा-
ज्याच्या सातव्या वर्षीं दाहावा महिना जो टेबेथ

माहिने त्यांत एस्तेर त्याजवळ त्याच्या राजवाड्यांत
घेतली गेली. १७ आणि राजाने सर्व स्त्रियांपेक्षां
एस्तेरेवर अधिक आवड ठेविली, आणि सर्व कु-
मारींपेक्षां तिजवर त्याचा उपकार व प्रीति झाली,
मग त्याने राजमुगूट तिच्या डोक्यावर घालून ति-
ला वाश्तीच्या ठिकाणीं राणी केलें. १८ तेव्हां
राजाने आपल्या सर्व अधिकाऱ्यांस व आपल्या
सेवकांस मोठी जेवणावळ म्हणजे एस्तेरेची जेव-
णावळ केली, आणि मुलखांची सुटका केली आ-
णि राजाच्या सत्तेप्रमाणें दानें दिल्हीं. १९ आ-
णि दुसऱ्या वेळीं कुमाऱ्या जमविल्या गेल्या तेव्हां
मोर्दखाय राजाच्या दर्वाजीं बसत होता. २०
एस्तेरेने आपली जात व आपले लोक यांविषयीं
सांगितलें नव्हतें, मोर्दखायाने तिला आज्ञापिलें
होतें त्याप्रमाणें, कां कीं एस्तेर मोर्दखायाजवळ
प्रतिपाळलेली असतां त्या वेळेप्रमाणें ती त्याची
आज्ञा सिद्धीस नेई.
२१ त्या दिवसांत मोर्दखाय राजाच्या दर्वा-
जीं बसत होता, तेव्हां राजाचे दोघे शंढ बिग्थान
व तेरेश देवढीरक्षकांतले कोपून अहाश्वेरोश रा-
जावर हात टाकायास पाहत होते. २२ ती गोष्ट
मोर्दखायाला माहीत झाली तेव्हां त्याने एस्तेर
राणीला सांगितली, आणि एस्तेरेने राजाला मो-
र्दखायाच्या नांवाने सांगितली. २३ आणि ती
गोष्ट शोधली गेली तेव्हां उमटली, मग ते दोघे
खांबावर फांशीं दिल्हे गेले आणि हें राजापुढें
इतिहासांच्या पुस्तकांत लिहिलें गेलें.

## अध्याय ३.

ह्या गोष्टी झाल्यावर अहाश्वेरोश राजाने हम्म-
दाथा जो अगागी याचा पुत्र हामान याला
उंचाविलें आणि त्याला थोर करून त्याचें आसन
आपल्याजवळच्या सर्व प्रधानांच्या वरतीं ठेविलें.
२ मग राजाचे सर्व सेवक जे राज्याच्या दर्वाजीं
होते ते हामानाला नमन व मुजरा करीत असत,
कां कीं तसी राजाने त्याविषयीं आज्ञा केली होती,
परंतु मोर्दखायाने त्याला नमन व मुजरा केला
नाहीं. ३ तेव्हां राजाच्या दर्वाज्यांतल्या राज-
सेवकांनी मोर्दखायाला म्हटलें, "तूं राजाची आ-
ज्ञा कां मोडीत आहेस?" ४ आणि ते त्याला
प्रत्येक दिवसीं असें म्हणत असतां, त्याने त्यांचें
ऐकिलें नाहीं; तेव्हां असें झालें कीं मोर्दखाया-
च्या गोष्टी ठरतील किंवा नाहीं हें पाहावें म्हणून
त्यांनी हामानाला सांगितलें, कां कीं आपण य-
हूदी आहें, असें त्याने त्यांस सांगितलें होतें. ५
मग मला मोर्दखाय नमन व मुजरा करीत नाहीं
असें हामानाने पाहिलें, तेव्हां हामान रागें भ-
रला. ६ आणि केवळ मोर्दखायावर मात्र हात
टाकणें हें त्याला तुच्छ वाटलें, कां कीं मोर्दखा-
याचे लोक कोणते ते त्यांनी त्याला सांगितलें होतें,
म्हणून अहाश्वेरोशाच्या सर्व राज्यांतले सर्व यहूदी
म्हणजे मोर्दखायाचे लोक यांचा नाश करायास
हामान पाहता झाला. ७ पहिला महिना जो
नीसान महिना त्यांत अहाश्वेरोश राजाच्या बा-
राव्या वर्षी कोणीएकाने हामानापुढें दिवसोदिवस
आणि महिनोमहिना बारावा महिना जो अदार
महिना त्यापर्यंत पूर म्हणजे पण पाडला.
८ आणि हामानाने अहाश्वेरोश राजाला म्ह-
टलें, "तुझ्या राजाच्या सर्व प्रांतांतल्या लोकांमध्यें
एक फांकलेली व विखरलेली जात आहे, आणि
त्यांचे विधि सर्व लोकांच्याहून वेगळे आहेत, आणि
ते राजाचे विधि आचरीत नाहींत म्हणून त्यांस राहूं
देणें राजाच्या हितासाठीं नव्हें. ९ जर राजाच्या
मनास येईल तर त्यांचा नाश करावा म्हणून लि-
हिलें जावें, आणि मी दाहा हजार तालांत रुपें
तोलून हें काम करणाऱ्यांच्या हातांवर देईन, तें
राजाच्या भांडारांत आणावें म्हणून." १० तेव्हां
राजाने आपली अंगुलिमुद्रा आपल्या हातांतून का-
ढून हम्मदाथा अगागी याचा पुत्र हामान जो
यहूद्यांचा शत्रु त्याला दिल्ही. ११ आणि रा-
जाने हामानाला म्हटलें, "रुपें तुला दिल्हें आहे,
आणि ते लोकहि तुला बरें वाटेल तसें करावें."
१२ तेव्हां पहिल्या महिन्याच्या तेराव्या दिवसीं
राजाचे लेखक बोलाविले गेले आणि हामानाने
जें जें सांगितलें त्या सर्वांप्रमाणें राजाच्या अधि-
काऱ्यांकडे आणि एकएका मुलखाच्या अधिका-
ऱ्यांकडे आणि एकएका प्रांताच्या लोकांच्या अधि-
पतींकडे त्याच्या त्याच्या लिपीप्रमाणें, प्रत्येक लो-
कांच्या भाषेप्रमाणें लिहिलें गेलें; अहाश्वेरोश
राजाच्या नामाने लिहिलें गेलें, आणि राजाच्या

अंगुलिमुद्रेने मुद्रित झालें. १३ आणि पत्रें जा-
सूदांकडून राजाच्या सर्व प्रांतांत पाठविलीं गेलीं;
एका दिवसीं बारावा महिना जो अदार महिना
त्याच्या तेराव्या दिवसीं सर्व यहूदी आबालवृद्ध
व पोरंबायका यांस जिवें मारून टाकून नष्ट क-
रावें, आणि त्यांचें लूट हरून घ्यावें ह्मणून. १४
जो लेख नियमासाठीं प्रत्येक प्रांतांत द्यायाचा
होता त्याची प्रत सर्व लोकांस प्रकट झाली, त्या-
नी त्या दिवसास सिद्ध व्हावें ह्मणून. १५ जा-
सूद राजाच्या आज्ञेने त्वरा करून निघाले, आणि
हुकूम शूशान राजवाड्यांत दिल्हा गेला, आणि
राजा व हामान प्यायाला बसले आणि शूशान
नगर व्याकुल झालें.

## अध्याय ४.

आणि जें झालें तें अवघें मोर्दखाय समजला,
तेव्हां मोर्दखाय आपलीं वस्त्रें फाडून तरट
नेसून राख फांसून बाहेर नगरामध्यें गेला, आणि
मोठ्या तीव्र आक्रोशाने ओरडला. २ आणि
राजद्वारासमोर इतका आला, कां कीं कोणी तरट
नेसून राजद्वारांत जायाचें नव्हतें. ३ आणि
प्रत्येक प्रांतांत जेथें कोठें राजाची आज्ञा व त्याचा
हुकूम आला, तेथें यहूद्यांचा मोठा शोक व उपास
व रडणें व आकांत झाला, आणि बहुत तरट
नेसून राख फांसून बसले.
४ मग एस्तेरेच्या तरुण्यांनी व तिच्या शंडां-
नीं येऊन हें तिला सांगितलें, तेव्हां राणी फार
खिन्न झाली आणि मोर्दखायाच्या अंगावरून
त्याचें तरट काढावें आणि त्याला लेववावें ह्मणून
तिने वस्त्रें पाठविलीं, परंतु त्याने तीं घेतलीं नाहीं.
५ मग एस्तेरेने राजाच्या शंडांतला एक हथाख
जो राजाने तिची सेवा करायास ठेविला होता
त्याला बोलावून मोर्दखायाकडे आज्ञा दिल्ही, हें
काय व कशासाठीं आहे तें जाणावें ह्मणून. ६
तेव्हां हथाक निघून नगराचा जो चौक राजद्वारा-
पुढें होता त्यांत मोर्दखायाकडे गेला. ७ आणि
मोर्दखायाने आपल्याला जें सर्व घडलें होतें तें
आणि यहूद्यांचा नाश करावा ह्मणून किती रुपें
हामानाने राजाच्या भांडारांत तोलून द्यायाला
वचन दिल्हें होतें, तेंहि सांगितलें. ८ आणि
त्यांचा नाश करायासाठीं शूशानांत जो हुकूम
दिल्हा होता त्याच्या लेखाची प्रत त्याने त्याला
दिल्ही; ती एस्तेरेला दाखवून प्रकट करावी ह्म-
णून, आणि तिला आज्ञा करावी कीं तिने राजा-
जवळ आंत जाऊन त्यापुढें आपल्या लोकांकरितां
काकळूत आणि अर्जी करावी. ९ मग हथाखाने
येऊन एस्तेरेला मोर्दखायाचीं वचनें सांगितलीं.
१० आणि एस्तेरेने हथाखाला सांगून मोर्द-
खायाकडे आज्ञा दिल्ही कीं, ११ "राजाच्या सर्व
सेवकांस व राजाच्या प्रांतांतल्या लोकांस कळलें
आहे कीं जो कोणी पुरुष किंवा स्त्री बोलावि-
लेली नसतां राजाकडे आंतल्या अंगणांत जाईल,
त्याला जिवें मारावें, असा त्याविषयीं एकच का-
यदा आहे; केवळ ज्याजकडे राजा सोन्याचा
राजदंड पुढें करील तो वांचावा, आणि आ-
तां तीस दिवस मला राजाजवळ आंत यायाला
आज्ञा झाली नाहीं." १२ त्यांनी तर मोर्दखाया
ला एस्तेरेचीं वचनें सांगितलीं. १३ तेव्हां मोर्द-
खायाने आज्ञा केली कीं "एस्तेरेला असें उत्तर
करावें, राजाच्या घरीं तूं सर्व यहूद्यांपेक्षां अधिक
सुटसील, असें आपल्या मनांत कल्पूं नको. १४
कां कीं या वेळेस जर तूं अगदीं उगीच राहि-
लीस तर यहूद्यांला सुटका व मुक्ति दुसऱ्या ठि-
काणांतून निघेल, आणि तूं व तुझ्या बापाचें कुल
नष्ट होईल, आणि अशा समयासाठीं तूं राज्य
पावलीस कीं नाहीं हें कोण जाणे." १५ तेव्हां
एस्तेरेने मोर्दखायाला उत्तर करूं सांगितलें कीं,
१६ "तूं जाऊन शूशानांतल्या सर्व यहूद्यांस जम-
वून तुह्मी मजकरितां उपास करा, तीन दिवस
रात्रीं किंवा दिवसा कांहीं खाऊं नका, पिऊं नका;
मी व माझ्या तरुण्याहि तसाच उपास करूं,
आणि आंत जाणें कायद्याप्रमाणें जरी नाहीं तरी
मी तसीच राजाजवळ आंत जाईन, आणि जर
माझा नाश होईल तर होवो." १७ मग मोर्द-
खायाने जाऊन जें एस्तेरेने त्याला सांगितलें होतें
त्या सर्वांप्रमाणें केलें.

## अध्याय ५.

आणि तिसऱ्या दिवसीं असें झालें कीं एस्तेर
राजकीय वस्त्र लेऊन राजाच्या घरासमोर

उभी राहिली, आणि राजा राजमंदिरांत घराच्या
दर्वाज्यासमोर आपल्या राजासनावर बसला होता.
२ आणि असें झालें कीं राजाने एस्तेर राणी अं-
गणांत उभी राहतां पाहिली, तेव्हां त्याची कृपा-
दृष्टि तिजवर झाली, आणि राजाने आपल्या हा-
तांत जो सोन्याचा राजदंड होता तो एस्तेरेकडे
पुढें केला, मग एस्तेरेने जवळ जाऊन राजदंडाच्या
टोंकाला स्पर्शिलें. ३ तेव्हां राजाने तिला ह्मटलें,
"अगे एस्तेर राणी, तुला काय पाहिजे? तुझी
विनंती काय आहे? ती अर्ध्या राज्याएवढी अस-
ली तरीं तुला दिल्ही जाईल." ४ तेव्हां एस्तेरेने
असें उत्तर केलें कीं, "जर राजाच्या मनास येईल
तर त्यासाठीं जें भोजन म्या सिद्ध केलें आहे
त्याला राजाने हामानासुद्धां आज यावें." ५ तेव्हां
राजाने ह्मटलें, "एस्तेर जें बोलली आहे तें करा-
यास हामान त्वरा करी असें करा." मग जें
भोजन एस्तेरेने सिद्ध केलें होतें त्याला राजा व
हामान आले. ६ आणि द्राक्षारसाच्या सहपा-
नास राजाने एस्तेरेला ह्मटलें, "तुझी अर्जी काय
आहे? ती तुला दिल्ही जाईल; तुझी विनंती
काय? ती अर्ध्या राज्याएवढी असली तरीं सा-
धली जाईल." ७ तेव्हां एस्तेर उत्तर करीत
ह्मणाली, "माझी अर्जी आणि माझी विनंती हीच;
८ जर राजाची कृपादृष्टि मजवर झाली आणि
माझी अर्जी द्यायाला व माझी विनंती सिद्धीस
न्यायाला जर राजाच्या मनास आलें तर राजा
व हामान यांसाठीं जें भोजन मी सिद्ध करितें
त्याला यावें, ह्मणजे जें राजा बोलला आहे त्या-
प्रमाणें उद्यां करीन."

९ हामान तर त्या दिवसीं हर्षित व आनंदित
निघाला, परंतु जेव्हां हामानाने मोर्दखाय राजा-
च्या दर्वाजीं पाहिला, आणि तो मजकरितां उठला
नाहीं सरकला नाहीं, हेंहि पाहिलें, तेव्हां हामान
मोर्दखायावर क्रोधाने भरला. १० तथापि हा-
मान नियतात्मा राहिला, आणि तो आपल्या घरीं
आला तेव्हां त्याने पाठवून आपल्या मित्रांला व
आपली बायको जेरेश इला बोलाविलें. ११
आणि त्यांस हामानाने आपल्या धनांचें गौरव व
आपल्या लेंकरांचें बहुत्व आणि आपल्याला राजाने
ज्यें मोठें केलें होतें आणि प्रधान व राजसेवक
यांवरतीं कसें थोर केलें होतें तेंहि सांगितलें. १२
अणखी हामानाने ह्मटलें, "होय, एस्तेर राणीने जें
भोजन सिद्ध केलें होतें त्याला तिने मजशिवाय
कोणाला राजासंगतीं येऊं दिल्हें नाहीं, आणि
उद्यांहि मी तिजकडे राजासंगतीं आमंत्रित आहें.
१३ परंतु मी मोर्दखाय यहूद्याला राजाच्या द-
र्वाजीं बसतां पाहत आहें तोंपर्यंत हें अवघें मला
कांहीं सुखदायक नाहीं." १४ तेव्हां त्याची बा-
यको जेरेश व त्याचे सर्व मित्र त्याला ह्मणाले,
"पन्नास हात उंच असा एक खांब कर आणि
सकाळीं राजाला सांग, ह्मणजे त्यावर मोर्दखाया-
ला फांशीं देतील, मग तूं हर्षाने राजासंगतीं भो-
जनास आंत जा." ही गोष्ट तर हामानाला
बरी वाटली आणि त्याने खांब करविला.

## अध्याय ६.

त्या रात्रीं राजाची झोंप उडाली ह्मणून त्या-
ने इतिहासांच्या स्मर्त्तव्यांचें पुस्तक आणूं
सांगितलें, मग तीं राजापुढें वाचिलीं गेलीं. २
तेव्हां असें लिहिलेलें सांपडलें कीं, राजाचे दोघे
शंड बिग्थाना व तेरेश देवढीरक्षकांतले बे अहा-
श्वेरोश राजावर हात टाकायाला पाहत होते, त्यां-
विषयीं मोर्दखायाने सुचना केली होती. ३ मग
राजा ह्मणाला, "यामुळें मोर्दखायाचे काय सन्मान
व महत्व झालें आहे?" तेव्हां राजाचे पोर बे
त्याची सेवा करीत होते ते ह्मणाले, "त्यासाठीं
कांहीं केलें गेलें नाहीं."

४ तेव्हां राजा ह्मणाला, "अंगणांत कोण आ-
हे?" हामान तर आपण जो खांब मोर्दखाया-
साठीं सिद्ध केला होता त्यावर मोर्दखाय फांशीं
द्यावा ह्मणून राजाला सांगायास राजाच्या घराच्या
बाहेरल्या अंगणांत आला होता. ५ राजाचे
सेवक तर त्याला ह्मणाले, "पाहा हामान अंगणांत
उभा आहे." राजा ह्मणाला, "त्याने आंत यावें."
६ हामान तर आंत गेला, तेव्हां राजाने त्याला
ह्मटलें, "ज्याचा सन्मान करावा ह्मणून राजाचा
मनोरथ आहे, त्या मनुष्याचें काय करायाचें आ-
हे?" हामान तर आपल्या ऊर्मीमनांत ह्मणाला, "मा-
झ्यापेक्षां कोणाचा अधिक[illegible] सन्मान करावा ह्मणून
राजाला आवडेल?" ७ ग[illegible] हामानाने राजाला

अर्से उत्तर केलें कीं, “ज्याचा सन्मान करावा ह्म-
णून राजाचा मनोरथ आहे, ८ त्यासाठीं जें
राजकीय वस्त्र राजा अंगीं लेत असतो तें आणि
ज्या घोड्यावर राजा बसत असतो तो आणि जो
राजमुगुट त्याच्या डोक्यावर ठेविला जात असतो
तोहि आणावा. ९ आणि तें वस्त्र व तो घोडा
राजाच्या एकाद्या श्रेष्ठ प्रधानाच्या हातीं द्यावा,
आणि ज्याचा सन्मान करावा ह्मणून राजाला
आवडतें त्याला वस्त्र लेववावें, आणि घोड्यावर
बसवून नगराच्या चौकांत फिरवावें, आणि त्यापुढें
पुकारावें कीं, ज्याचा सन्मान करावा ह्मणून राजाला
आवडतें त्या मनुष्याचें असें केलें जाईल.” १०
तेव्हां राजाने हामानाला ह्मटलें, “तूं त्वरा करून
तूं बोलला आहेस त्याप्रमाणें तें वस्त्र व तो घोडा
घेऊन मोर्दखाय यहूदी जो राजाच्या दर्वाज्यीं ब-
सला आहे त्याचें तसेंच कर; जें अवघें तूं बोल-
ला आहेस त्यांतलें कांहीं गळून पडूं देऊं नको.”
११ मग हामानाने तें वस्त्र व तो घोडा घेऊन
वस्त्र मोर्दखायाच्या अंगांत घातलें, आणि त्याला
घोड्यावर बसवून नगराच्या चौकांत फिरविलें,
आणि त्यापुढें पुकारिलें कीं, ज्याचा सन्मान करावा
ह्मणून राजाला आवडतें त्याचें असें केलें जाईल.
१२ मोर्दखाय तर राजाच्या दर्वाज्यीं परत आला,
परंतु हामान आपलें डोकें झांकून शोक करीत घा-
ईने आपल्या घरीं गेला. १३ आणि हामानाने
जें आपल्याला घडलें होतें तें अवघें आपली बा-
यको जेरेश इला आणि आपल्या सर्व मित्रांला
सांगितलें; तेव्हां त्याचे बुधजन व त्याची बायको
जेरेश हीं त्याला ह्मणालीं, “ज्यापुढें तूं गळून
पडूं लागला आहेस, तो जर यहूद्यांच्या संताना-
तला आहे तर त्याजवर तुझी शक्ति चालणार
नाहीं, परंतु त्यापुढें तूं खचीत गळून पडशील.
१४ ती त्याशीं बोलत होतीं तेव्हां राजाच्या शं-
ढानी येऊन जें भोजन एस्तेरेने सिद्ध केलें होतें
त्याला हामान आणायास घाई केली.

## अध्याय ७.

मग राजा व हामान एस्तेर राणीसंगतीं सहपान
करायास आले. २ आणि दुसऱ्या दिवशीं
द्राक्षारसाच्या सहपानास राजाने एस्तेरेला ह्मटलें,
“अगे एस्तेर राणी, तुझी अर्जी काय आहे? ती
तुला दिल्ही जाईल; तुझी विनंती काय? ती अ-
र्ध्या राज्याएवढी असली तरीं साधली जाईल.
३ तेव्हां एस्तेर राणीने असें उत्तर केलें कीं, “हे
राजा, जर तुझी कृपादृष्टि मजवर झाली आणि
जर राजाच्या मनास येईल, तर मला माझ्या अ-
र्जीमुळें माझा प्राण आणि माझ्या विनंतीमुळें माझे
लोक दिल्हे जावे. ४ कां कीं कदन वधन करून
आमचा नाश करावा ह्मणून मी व माझे लोक
विकिले गेलों आहों; आणि जर आह्मी दास व
दासी असे विकिले गेलों असतों तर मी उगीच
राहिलें असतें, जरी शत्रु राजाची हानि भरून
देऊं न शकता तरीं. ५ तेव्हां अहाश्वेरोश रा-
जाने एस्तेर राणीला असें उत्तर केलें कीं, “तसें
करायाला ज्याने धैर्य धरिलें आहे, तो कोण
आणि कोठें आहे?” ६ तेव्हां एस्तेर ह्मणाली,
“तो शत्रु व वैरी हा दुष्ट हामानच आहे.” तेव्हां
राजा व राणी यांपुढें हामान घाबरा झाला. ७
मग राजा रुसून द्राक्षारसाच्या सहपानाहून उठून
मंदिराच्या बागांत गेला, आणि हामान आपल्या
जिवासाठीं एस्तेर राणीजवळ अर्जी करायाला उभा
राहिला, कां कीं आपलें वाईट राजापासून ठरलें
आहे, असें त्याने पाहिलें. ८ आणि राजा मंदि-
राच्या बागांतून द्राक्षारसाच्या सहपानाच्या घरांत
परत आला, तेव्हां ज्या मंचकावर एस्तेर होती
त्यावर हामान पडला होता; तेव्हां राजा ह्मणा-
ला, “तो मजपुढें राणीचें धर्षणहि करणार आ-
हे काय?” हा शब्द राजाच्या मुखांतून निघतांच
त्यांनीं हामानाचें तोंड झांकिलें. ९ आणि राजा-
च्या शंढांतला एक हार्बोना राजापुढें ह्मणाला,
अणखी पाहा जो राजाकरितां बरें बोलला होता
त्या मोर्दखायासाठीं हामानाने पन्नास हात उंच
जो खांब केला होता तो हामानाच्या घरांत उभा
आहे.” तेव्हां राजा ह्मणाला, “त्यावर त्याला
फांशीं दे.” १० मग जो खांब हामानाने मोर्द-
खायासाठीं सिद्ध केला होता त्याजवर त्यांनी हा-
मानाला फांशीं दिल्हा; तेव्हां राजाचा क्रोध शमला.

## अध्याय ८.

त्या दिवशीं अहाश्वेरोश राजाने यहूद्यांचा शत्रु
हामान याचें घर एस्तेर राणीला दिल्हें,

आणि मोर्दखाय राजापुढें आला, कां कीं एस्तेरेने
तो आपला कोण आहे हें सांगितलें होतें. २
आणि राजाने आपली जी अंगुलिमुद्रा हामानापा-
सून मागें घेतली होती ती काढून मोर्दखायाला
दिल्ही, आणि एस्तेरेने मोर्दखायाला हामानाच्या
घरावर ठेविलें. ३ आणि एस्तेर राजापुढें अ-
णखी बोलली आणि त्याच्या पायां पडून रडून
हामान अगागी याची दुष्टाई व जी कल्पना त्याने
यहूद्यांवर कल्पिली होती तीहि दूर करावी ह्मणून
त्याजवळ विनंती करिती झाली. ४ तेव्हां राजाने
एस्तेरेकडे सोन्याचा राजदंड पुढें केला, मग एस्तेर
उठून राजापुढें उभी राहिली. ५ आणि ह्मणाली,
"जर राजाच्या मनास येईल आणि जर त्याची
कृपादृष्टि मजवर झाली आणि ही गोष्ट राजाला
नीट दिसेल आणि मी त्याला बरी वाटलें, तर
राजाच्या सर्व प्रांतांतल्या यहूद्यांचा नाश कराया-
साठीं हम्मदाथा अगागी याचा पुत्र हामान याने
जीं पत्रें त्याने आपल्या कल्पनांकरून लिहिलीं तीं
रद्द करावीं ह्मणून लिहिलें जावें; ६ कां कीं
माझ्या लोकांस जो अनर्थ प्राप्त होईल तो माझ्याने
कसा पाहवेल? आणि मी आपल्या लोकांचा नाश
कसी पाहूं शकेन?"
७ तेव्हां अहाश्वेरोश राजाने एस्तेर राणीला
व मोर्दखाय यहूद्याला ह्मटलें, "पाहा, म्या ए-
स्तेरेला हामानाचें घर दिल्हें आहे, आणि त्याने
आपला हात यहूद्यांवर टाकिला ह्मणून तो फाशीं
दिल्हा गेला आहे. ८ तर तुह्माला बरें वाटेल
त्याप्रमाणें तुह्मी यहूद्यांविषयीं राजाच्या नांवाने
लिहा, आणि लेख राजाच्या अंगुलिमुद्रेने मुद्रित
करा, कां कीं जो लेख राजाच्या नांवाने लिहिला
आणि अंगुलिमुद्रेने मुद्रित झाला तो कोणाच्याने रद्द
करवायाचा नाहीं." ९ त्या वेळेस तिसरा महिना
जो सिवान महिना त्याच्या तेविसाव्या दिवशीं
राजाचे लेखक बोलाविले गेले, आणि जें मोर्दखा-
याने आज्ञापिलें त्या सर्वांप्रमाणें यहूद्यांकडे आणि
जे प्रांत हिंदापासून कूशापर्यंत एकशें सत्तावीस
प्रांत आहेत त्यांचे जे अधिष्ठाते व अधिकारी व
अधिपति त्यांकडे एकएका प्रांताच्या लिपीप्रमाणें व
एकएका लोकांच्या भाषेप्रमाणें व यहूद्यांकडे त्यांच्या
लिपीप्रमाणें व त्यांच्या भाषेप्रमाणें लिहिलें गेलें.
१० त्याने अहाश्वेरोश राजाच्या नांवाने लिहून
आणि राजाच्या अंगुलिमुद्रेने मुद्रित करून पत्रें
घोड्यांवरल्या जासुदांकडून आणि खेंचरें, उंट, व
तरुण उंट यांच्या स्वारांकडून पाठविलीं, ११ कीं
राजाने प्रत्येक नगरांतल्या यहूद्यांस असें दिल्हें
आहे कीं, त्यांनी जमून आपल्या जिवाकरितां उभें
राहावें, त्यांस जे लोक किंवा राष्ट्र उपद्रव करील
त्याच्या सर्व बलाचें, पोरांचें व स्त्रियांचेंहि कदन
वधन व नाश करावा आणि त्यांची लूट हरून
घ्यावी. १२ अहाश्वेरोश राजाच्या सर्व राष्ट्रांत
एका दिवशीं बारावा महिना जो अदार महिना
त्याच्या तेराव्या दिवशीं तसें करावें. १३ प्र-
त्येक प्रांतांत आज्ञा दिल्ही जावी आणि त्या दि-
वसास यहूदी आपल्या वैऱ्यांचा सूड उगवाया-
स सिद्ध असावे ह्मणून लेखाची प्रत सर्व लो-
कांस प्रख्यात झाली. १४ खेंचरांवर व उंटांवर
बसणारे जासूद राजाच्या आज्ञेने त्वरा केलेले
व दपटलेले निघाले, आणि हुकूम शूशान राज-
वाड्यांत दिल्हा गेला. १५ आणि मोर्दखाय नि-
ळें व पांढरें राजकीय वस्त्र आणि सोन्याचा मोठा
मुगूट आणि बारीक जवसाचा व जांबळी रंगाचा
जामा ल्यालेला राजापुढून निघाला, आणि शूशान
नगराने उत्सव व हर्ष केला. १६ यहूद्यांला
प्रकाश व हर्ष व आनंद व सन्मान झाला. १७
आणि प्रत्येक प्रांतांत व प्रत्येक नगरांत जेथें कोठें
राजाची आज्ञा व त्याचा हुकूम आला, तेथें यहू-
द्यांस हर्ष व आनंद, उत्सव व चांगला दिवस
झाला, आणि देशांतले बहुत लोक यहूदी झाले,
कां कीं त्यांवर यहूद्यांचें भय पडलें होतें.

## अध्याय ९.

आणि बारावा महिना जो अदार महिना त्या-
च्या तेराव्या दिवशीं जेव्हां राजाची आ-
ज्ञा व त्याचा हुकूम सिद्धीस जाण्याच्या लागास
आला, ज्या दिवशीं यहूद्यांच्या वैऱ्यांनी त्यांवर
धनीपण पावायास आशा धरली होती (त्यांचें
तर विपरीत झालें असें कीं यहूदी आपल्या द्वे-
ष्ट्यांवर धनीपण पावले). २ तेव्हां अहाश्वेरोश
राजाच्या सर्व प्रांतांत यहूदी आपल्या नगरांत ए-
कत्र मिळाले; त्यांचें अहित करायास जे पाहत

होते त्यांवर हात टाकावा ह्मणून, आणि त्यापुढें
कोणाच्याने उभें राहवेना, कां कीं त्यांचें भय सर्व
लोकांवर पडलें होतें. ३ आणि प्रांताचे सर्व अ-
धिपति व अधिष्ठाते व अधिकारी व राजाचे कार-
भारी, यानी यहूद्यांचें सहाय केलें, कां कीं त्यांवर
मोर्दखायाचें भय पडलें होतें. ४ कारण कीं
राजाच्या घरीं मोर्दखाय मोठा होता आणि त्या-
ची कीर्त्ति सर्व प्रांतांत पसरली, कां कीं तो मनुष्य
मोर्दखाय उत्तरोत्तर मोठा होत गेला. ५ यहू-
द्यानी तर आपल्या सर्व वैऱ्यांस शस्त्र व वध
व नाश यांकडून हाणिलें, आणि आपल्या मनो-
रथाप्रमाणें आपल्या द्वेष्ट्यांचें केलें. ६ आणि
शूशान राजवाड्यांत यहूद्यानी पांचशें मनुष्य ठार
मारिले. ७ आणि पार्शान्दाथा व दाल्फोन व
आस्पाथा; ८ आणि पोराथा व अदाल्या व
अरीदथा; ९ आणि पार्माश्ता व अरीसाई व
अरीदाइ व वायजाथा; १० हे हम्मदाथाचा
पुत्र हामान यहूद्यांचा शत्रु याचे पुत्र त्यानी मा-
रून टाकिले, परंतु लुटीला त्यानी आपला हात
लाविला नाहीं. ११ त्या दिवशीं जे शूशान
राजवाड्यांत वधले गेले त्यांची संख्या राजापुढें
आली.

१२ आणि राजाने एस्तेर राणीला ह्मटलें,
"शूशान राजवाड्यांत यहूद्यानी पांचशें मनुष्य व
हामानाचे दाहा पुत्र ठार मारिले आहेत; राजा-
च्या वरकड प्रांतांत त्यानी काय केलें आहे? आ-
तां तुझी अर्जी काय आहे, ह्मणजे ती तुला दिल्ही
जाईल, आणि तुझी विनंती अणखी काय आहे,
ह्मणजे ती साधली जाईल." १३ तेव्हां एस्तेर
ह्मणाली, "जर राजाच्या मनास येईल तर
शूशानांत जे यहूदी त्यांस उद्यांहि आजच्या
हुकुमाप्रमाणें करूं दिल्हें जावें, आणि हामा-
नाचे दाहा पुत्र खांबावर फाशीं द्यावे." १४
मग राजाने तसें करूं सांगितलें आणि शूशा-
नांत हुकूम दिल्हा गेला, आणि त्यानी हामा-
नाचे दाहा पुत्र फाशीं दिल्हे. १५ अदार
महिन्याच्या चौदाव्या दिवशींहि शूशानांतल्या
यहूद्यानी एकत्र मिळून शूशानास तीनशें म-
नुष्य मारून टाकिले, परंतु लुटीला त्यानी आ-
पला हात लाविला नाहीं. १६ आणि राजा-
च्या प्रांतांतल्या वरकड यहूद्यानी एकत्र मिळून
आपल्या जिवाकरितां उभें राहून आपल्या वैऱ्यां-
पासून विसांवा पावून आपल्या द्वेष्ट्यांतले पंच्याह-
त्तर हजार मारून टाकिले, परंतु लुटीला त्यानी
आपला हात लाविला नाहीं. १७ अदार महि-
न्याच्या तेराव्या दिवशीं तसें झालें आणि त्याच्या
चौदाव्या दिवशीं त्यानी विसांवा घेतला, आणि तो
उत्सवाचा व हर्षाचा दिवस केला. १८ परंतु
शूशानांतले यहूदी त्या महिन्याच्या तेराव्या व
चौदाव्या दिवशीं एकत्र मिळाले, आणि त्याच्या
पंधराव्या दिवशीं त्यानी विसांवा घेऊन तो उत्स-
वाचा व हर्षाचा दिवस केला. १९ याकरितां
खेडेगांवचे यहूदी जे खेडेगांवांत राहत होते;
त्यानी अदार महिन्याचा चौदावा दिवस हर्षा-
चा व उत्सवाचा व चांगला दिवस आणि एक-
मेकाकडे वांटे पाठविण्याचा दिवस केला.

२० आणि मोर्दखायाने या गोष्टी लिहिल्या
आणि अहाश्वेरोश राजाच्या सर्व प्रांतांत जे यहू-
दी जवळचे व दूरचेहि होते त्या सर्वांकडे पत्रें
पाठविलीं. २१ त्यांमध्यें असें स्थापित व्हावें कीं
त्यानी प्रत्येक वर्षी अदार महिन्याचा चौदावा दि-
वस व त्याचा पंधरावा दिवसहि पाळावा. २२
ज्या दिवसांत यहूदी आपल्या वैऱ्यांपासून विसांवा
पावले, आणि ज्या महिन्यांत त्यांच्या खेदाचा
हर्ष व शोकाचा चांगला दिवस झाला, त्यानी ते
उत्सवाचे व हर्षाचे आणि एकमेकाकडे वांटे पाठ-
विण्याचे आणि दरिद्र्यांस दानें देण्याचे दिवस
करावे ह्मणून. २३ तेव्हां यहूदी आपण जें करूं
लागले होते तें आणि आपल्याकडे जें मोर्दखायाने
लिहिलें होतें तेंहि करायास मान्य झाले. २४
कारण कीं हम्मदाथाचा पुत्र हामान अगागी जो
अवघ्या यहूद्यांचा शत्रू त्याने यहूद्यांचा नाश क-
रायास त्यांजवर कल्पना केली होती, आणि त्यांस
विपादित व नष्ट करावें ह्मणून पूर ह्मणजे पण
पाडला होता. २५ परंतु एस्तेर राजापुढें आली
तेव्हां त्याने पत्रांकडून आज्ञा केली कीं त्याने आप-
ली जी दुष्ट कल्पना यहूद्यांवर कल्पिली होती, ती
त्याच्याच डोक्यावर उलटावी, आणि तो व त्याचे
पुत्र खांबावर फाशीं द्यावे. २६ यामुळें त्यानी
या दिवसाला पूर नावावरून पूरीम ह्मटलें, या-

करितां या पत्राच्या वचनांवरून आणि याविषयीं
जें त्यानी पाहिलें होतें आणि त्यास जें पोहंचलें
होतें त्यावरून. २७ यहूद्यानी ठरवून आपल्या
कडे व आपल्या संतानाकडे आणि आपल्यासीं जे
संयुक्त होते त्या सर्वांकडे असें पतकरून घेतलें
कीं प्रत्येक वर्षीं आपण हे दोन दिवस यांच्या ले-
खाप्रमाणें व यांच्या समयाप्रमाणें न चुकतां पाळावे.
२८ आणि हे दिवस पिढ्यानपिढ्या एकएका गो-
त्रांतून प्रत्येक प्रांतांतून व प्रत्येक नगरांतून स्मरले
व पाळले जावे, आणि हे पूरीमाचे दिवस यहूद्यां-
मधून न टळावे आणि यांची आठवण त्यांच्या
संतानांतून नाहींसी न व्हावी. २९ तेव्हां हे
पूरीमाचें दुसरें पत्र ठरवायासाठीं अबीहाईलाची
कन्या एस्तेर राणी व मोर्दखाय यहूदी, यानी सर्व
अधिकाराने लिहिलें. ३० आणि त्याने सर्व यहू-
द्यांकडे अहाश्वेरोशाच्या राज्याच्या एकशें सत्ता-
वीस प्रांतांकडे पत्रें कुशल सत्याचीं वचनें पाठवि-
लीं. ३१ हे पूरीमाचे दिवस यांच्या समयाप्रमाणें
ठरवावे ह्मणून जसें मोर्दखाय यहूदी व एस्तेर
राणी यानी त्याकडे ठरविलें होतें आणि त्यानी
आपल्याकडे व आपल्या संतानांकडे उपासांच्या
व आपल्या आक्रोशाच्या गोष्टी ठरविल्या होत्या
त्याप्रमाणें. ३२ आणि एस्तेरेच्या आज्ञेने या
पूरीमाच्या गोष्टी ठरविल्या, आणि ती पुस्तकांत
लिहिली गेली.

### अध्याय १०.

आणि अहाश्वेरोश राजाने देशावर व समुद्रां-
तल्या बेटांवर कर ठेविला. २ आणि त्या-
च्या पराक्रमाचीं व त्याच्या विक्रमाचीं सर्व कर्मे व
मोर्दखायाचें महत्व ज्यायोंकरून राजाने त्याला थोर
केलें, हीं मादाय व पारस यांच्या राजांच्या इ-
तिहासांच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत काय?
३ कां कीं मोर्दखाय यहूदी अहाश्वेरोश राजा-
जवळचा आणि यहूद्यामध्यें मोठा आणि आपल्या
भावांच्या समुदायाला मान्य होता, आपल्या लो-
कांचें हित शोधीत आणि आपल्या सर्व जातीसीं
कुशल बोलत होता.

---

THE BOOK OF JOB.

# ईयोब याचें पुस्तक.

### अध्याय १.

ऊज देशांत एक मनुष्य होता, त्याचें नांव ईयोब
होतें, आणि तो मनुष्य साधुशील व यथार्थ,
देवाला भिणारा व पापापासून दूर राहणारा
होता. २ आणि त्याला सात पुत्र व तीन कन्या
झाल्या. ३ आणि त्याचें धन सात हजार मेंढरें
व तीन हजार उंट व बैलांच्या जोड्या पांचशें व
पांचशें गाढवी व घरचीं दारचीं माणसें पुष्कळ
असें होतें, ह्मणून तो मनुष्य पूर्वेच्या सर्व जनांत-
ला मोठा होता. ४ आणि त्याचे पुत्र एकमेका-
च्या घरास एक एक आपापल्या दिवशीं जाऊन
भोजन करीत असत, आणि निरोप पाठवून आप-
ल्या तिघीं बहिणींस आपल्यासंगतीं खायाप्या-
याला बोलावीत असत. ५ आणि असें झालें कीं
त्यांच्या भोजनाचे दिवस फिरत आऊन समाप्त
झाले, तेव्हां ईयोब निरोप पाठवून त्यास पवित्र
करीत असे, आणि मोठ्या पाहटेस उठून त्या
सर्वांच्या संख्येप्रमाणें होम करीत असे; कां कीं
ईयोब ह्मणे, "कदाचित माझ्या लेंकरानी पाप केलें
असेल, आणि आपल्या मनांत देवाला अवमानिलें
असेल ईयोब सर्वदा तसेंच करीत असे.
६ आणि एका दिवशीं असें झालें कीं देवा-
चे पुत्र परमेश्वरासमोर उभे राहायास आले,

आणि त्यांमध्यें सातानहि आला. ७ तेव्हां पर-
मेश्वराने सातानाला ह्मटलें, "तूं कोठून आला
आहेस?" तेव्हां सातान परमेश्वराला उत्तर
करीत ह्मणाला, "पृथ्वीवर इकडे तिकडे फिरून
आणि तिजवर खालीं वर हिंडून मी आलों." ८
आणि परमेश्वराने सातानाला ह्मटलें, "माझा
सेवक ईयोब याजकडे तूं आपलें मन लावून स-
मजला आहेस काय? कीं पृथ्वीवर त्यासारिखा
कोणी नाहीं, तो साधुशील व यथार्थ, देवाला
भिणारा आणि पापापासून दूर राहणारा मनुष्य
आहे." ९ तेव्हां सातान परमेश्वराला उत्तर
करीत ह्मणाला, "ईयोब देवाची भीति फुकट
धरितो काय? १० त्वां त्याजभोंवतें व त्याच्या
घराभोंवतें व जें कांहीं त्याचें आहे त्याजभोंवतें
समंतात कुंपण घातलें नाहीं काय? त्वां त्याच्या हाता-
च्या कामाला आशीर्वाद दिल्हा ह्मणून त्याचें धन
देशांत वाढलें आहे. ११ परंतु तूं आपला हात
पुढें करून जें कांहीं त्याचें आहे त्याला स्पर्श,
ह्मणजे तो निश्चयें तुझ्या तोंडावर तुला शापील."
१२ आणि परमेश्वराने सातानाला ह्मटलें,
"पाहा, जें कांहीं त्याचें आहे तें तुझ्या हातीं दिल्हें
आहे; ईयोबाला मात्र तूं आपला हात लावूं
नको." मग सातान परमेश्वरासमोरून गेला.
१३ आणि एका दिवशीं असें झालें कीं त्याचे
पुत्र व त्याच्या कन्या हीं आपल्या ज्येष्ठ भावाच्या
घरीं खात व द्राक्षारस पीत होतीं. १४ आणि
ईयोबाकडे एक दूत येऊन ह्मणाला, बैल नांगरीत
होते, आणि गाढवें त्याजवळ चरत होतीं; १५
आणि शेबानी दरवडा घालून त्यांस हरून नेलें,
आणि गडी तरवारीने हाणिले आहेत, आणि तुला
वर्त्तमान सांगायाला मी मात्र एकला सुटून आलों
आहें." १६ तो बोलत असतांच दुसरा येऊन
ह्मणाला, "देवाच्या अग्नीने आकाशांतून पडून में-
ढरांस व गड्यांस जाळून नष्ट केलें आहे, आणि
तुला वर्त्तमान सांगायाला मी मात्र एकला वांचलों
आहें." १७ तो बोलत असतांच तिसरा येऊन
ह्मणाला, "खास्द्यानी तीन ठोळ्या केल्या, आणि
उंटांवर दरवडा घालून तीं हरून नेलीं आहेत,
आणि गड्यांस तरवारीने हाणिलें आहे, आणि तुला
वर्त्तमान सांगायाला मी मात्र एकला सुटून आलों
आहें." १८ तो बोलत असतांच अन्य येऊन
ह्मणाला, "तुझे पुत्र व तुझ्या कन्या हीं आपल्या
ज्येष्ठ भावाच्या घरीं खात व द्राक्षारस पीत होतीं.
१९ आणि पाहा अरण्यावरून मोठा वारा आला,
आणि घराच्या चोहों कोंपऱ्याला लागला, तेव्हां तें
त्या तरुण्यांवर पडलें ह्मणून तीं मरून गेलीं आ-
हेत, आणि तुला वर्त्तमान सांगायाला मी मात्र
एकला वांचलों आहें." २० तेव्हां ईयोबाने आ-
पला झगा फाडिला, आणि आपलें डोकें कातरिलें
आणि भूमीवर पडून भजन केलें. २१ आणि
ह्मटलें, मी आपल्या आईच्या उदरांतून नागवा
आलों आणि तिकडेहि नागवा परत जाईन; पर-
मेश्वराने दिल्हें आणि परमेश्वराने परत घेतलें
आहे; परमेश्वराचें नांव सुवंदित असो." २२
या सर्वांत ईयोबाने पाप केलें नाहीं, आणि तो
देवाला अपवाद बोलला नाहीं.

## अध्याय २.

आणखी एका दिवशीं असें झालें कीं देवाचे
पुत्र परमेश्वरासमोर उभे राहायास आले,
आणि त्यांमध्यें सातानहि परमेश्वरासमोर उभा
राहायास आला. २ आणि परमेश्वराने सा-
तानाला ह्मटलें, "तूं कोठून आला आहेस?"
तेव्हां सातान परमेश्वराला उत्तर करीत ह्म-
णाला, "पृथ्वीवर इकडे तिकडे फिरून आणि ति-
जवर खालीं वर हिंडून मी आलों." ३ आणि
परमेश्वराने सातानाला ह्मटलें, "माझा सेवक
ईयोब याजकडे तूं आपलें मन लावून समजला
आहेस काय? कीं पृथ्वीवर त्यासारिखा कोणी
नाहीं; तो साधुशील व यथार्थ, देवाला भिणारा
व पापापासून दूर राहणारा मनुष्य आहे, आणि
निष्कारण त्याचा नाश करावा ह्मणून त्वां जरी मला
त्याजवर उत्तेजित केलें, तरीं अझूनपर्यंत तो आप-
लें साधुत्व अखंडित धरितो. ४ तेव्हां सातान
परमेश्वराला उत्तर करीत ह्मणाला, "त्वचेप्रत
त्वचा, होय, जें कांहीं मनुष्याचें असेल, तें तो
आपल्या जिवाच्या स्थानीं देईल. ५ परंतु आपला
हात पुढें करून त्याच्या हाडाला व त्याच्या
मांसाला स्पर्श, ह्मणजे तो निश्चयें तुझ्या तोंडा-
वर तुला शापील." ६ आणि परमेश्वराने

सातानाला ह्मटलें, "पाहा तो तुझ्या हातीं दिल्हा
आहे, परंतु त्याचा जीव वांचूं दे."
७ मग सातानाने परमेश्वरासमोरून जाऊन
ईयोबाला त्याच्या पायाच्या तळव्यापासून त्याच्या
शेंडीपर्यंत दुःसह व्रणानी पीडिलें. ८ त्यानंतर
त्याने आपलें अंग खाजवावें ह्मणून एक खापरी
घेतली आणि तो राखेवर बसला. ९ तेव्हां
त्याची स्त्री त्याला ह्मणाली, "तूं अझूनपर्यंत आ-
पलें साधुत्व धरितोस काय? देवाला शाप दे,
आणि मरून जा." १० परंतु त्याने तिला ह्म-
टलें, "जसी मूर्ख स्त्रियांतली कोणी बोलत अ-
सती तसी तूं बोलतीस; आह्मी देवापासून चां-
गलें घ्यावें आणि वाईट न घ्यावें काय?" या स-
र्वांत ईयोबाने आपल्या ओंठानी पाप केलें नाहीं.
११ तर जें सर्व अरिष्ट ईयोबावर आलें, याचें
वर्त्तमान जेव्हां त्याच्या तिघा मित्रानी ऐकिलें
तेव्हां ते प्रत्येक, ह्मणजे एलीफाज तेमानी आणि
बिल्दाद शूही आणि जोफार नामाथी, हे आ-
पापल्या स्थानाहून आले, कां कीं त्यानी परस्पर
संकेत केला होता कीं आपण येऊन त्यासंगतीं
शोक करावा आणि त्याचें सांत्वन करावें. १२
जेव्हां त्यानी दुरून आपली दृष्टि लावून त्याला
ओळखिलें नाहीं, तेव्हां ते आपली वाणी उंचावून
रडले, आणि त्यानी प्रत्येकाने आपापला झगा
फाडिला, आणि आपल्या डोक्यांवर आकाशाकडे
धूळ फेंकिली. १३ मग ते त्याजवळ सात दिवस
व सात रात्री भूमीवर बसले, आणि त्यासीं कोणी
कांहीं बोलला नाहीं, कां कीं त्याचें दुःख फार
आहे, असें त्यानी पाहिलें.

## अध्याय ३.

त्यानंतर ईयोब आपलें तोंड उघडून आपल्या
दिवसाला शाप देऊं लागला. २ तर ई-
योब बोलत ह्मणाला, ३ "ज्या दिवसीं मी
जन्मलों तो नष्ट होवो, आणि ज्या रात्रीं कोणी-
एकाने सांगितलें कीं पुरुषाचा जन्म झाला तीहि.
४ तो दिवस अंधकार असो, त्याला देवाने वरून
मानूं नये, आणि त्यावर उजेडाने प्रकाशूं नये.
५ अंधकार व मृत्युछाया त्याजवर स्वत्व करोत,
त्याजवर आभाळ राहो, त्याला सूर्यग्रहण भे-
डावो. ६ त्या रात्रीला काळोख धरो, ती वर्षा-
च्या दिवसांसीं मिळूं नये, महिन्याच्या संख्येंत
येऊं नये. ७ पाहा, ती रात्रि शून्य असो, तींत
हर्षशब्द येऊं नये. ८ दिवसाला शाप देणारे
तिला शापोत, जे अजगराला उत्तेजित करायास
निपुण आहेत तेहि. ९ तिच्या संध्याकाळचे तारे
अंधकारमय असोत, ती प्रकाशाची वाट पाहो,
पण तो तिला न मिळो आणि दिवसाचा उदय
तिला दिसूं नये. १० कां कीं तिने माझ्या आई-
च्या गर्भस्थानाचीं द्वारें बंद केलीं नाहींत, आणि
माझ्या दृष्टीपासून हाल झांकिले नाहींत. ११
मी गर्भस्थानापासून कां मेलों नाहीं? म्या गर्भ-
स्थानांतून निघतांच कां प्राण सोडिला नाहीं?
१२ गुडघ्यानी कां मला आधार दिल्हा? आणि
म्या चोंखावें ह्मणून स्तनें मजपुढें कां आलीं?
१३ असें जर घडलें असतें तर आतां मी निजून
स्वस्थ राहिलों असतों, निद्रायमान झालों असतों,
तेव्हां मी आराम पावलों असतों. १४ पृथ्वी-
तल्या ज्या राजानी व मंत्र्यानी आपणासाठीं ओ-
साड स्थानें बांधिलीं, त्यासीं; १५ अथवा ज्या
अधिकाऱ्याला सुवर्ण होतें, ज्यानी आपलीं घरें
रुप्याने भरलीं, त्यासीं. १६ अथवा मी गुप्त
पतितगर्भासारिखा उत्पन्न झालों नसतों, आणि
ज्या बालांस उजेड कधीं दिसला नाहीं त्यांप्रमाणें
झालों असतों. १७ दुष्ट तेथें त्रास देतां राहतात.
आणि दमलेले तेथें विसांवा पावतात. १८ बंदि-
वान तेथें एकत्र स्वस्थ राहतात, ते पीडकाचा
शब्द ऐकत नाहींत. १९ लाहान व मोठे तेथें
आहेत, आणि दास आपल्या धन्यापासून मुक्त
आहे. २० कष्टयाला उजेड व खेदिताला जीवन
कां दिल्हें आहे? २१ ते मरण इच्छितात परंतु
तें येत नाहीं, आणि ते त्यासाठीं गुप्त द्रव्याच्या
खननापेक्षां अधिक खनन करितात. २२ त्यांस
कबर मिळाली, ह्मणजे उल्लास व आनंद करितात.
२३ ज्या पुरुषाचा मार्ग गुप्त आहे ज्याला देवाने
झांकिलें आहे, त्याला उजेड कां दिल्हा आहे?
२४ कां कीं माझ्या खाण्यापूर्वी माझें कण्हणें येतें
आणि माझ्या ओरडी जलांसारिख्या बाहेर पड-
तात. २५ कारण ज्याविषयीं मला फार भीती
होती तें मजवर आलें आहे, आणि ज्याविषयीं

मी भयभित होतों तें मला लागलें आहे. २६
मी निश्चित नव्हतों स्वस्थ नव्हतों विश्रांत न-
व्हतों, तथापि पीडा आली."

## अध्याय ४.

मग एलीफाज तेमानी उत्तर करीत ह्मणाला,
२ "आह्मी जर तुजसीं बोलायास यत्न केला
तर कंटाळसील काय? परंतु बोलल्याशिवाय को-
णाच्याने राहवेल? ३ पाहा, तूं बहुतांला बोध
करीस, आणि दुर्बल हातांला शक्ति देईस. ४
जो पडणार होता त्याला तुझीं वचनें उभें राखीत
आणि तूं लटपटीत गुडघे दृढ करीस. ५ परंतु
आतां तुजवर आलें ह्मणून कंटाळतोस, तुला
लागलें ह्मणून व्याकुळ झाला आहेस. ६ तुझी
भीति, तुझा भाव, तुझी आशा व तुझ्या आच-
रणाची यथार्थता असीच नाहीं काय? ७ आठ-
वण कर; निर्दोषी असतां कोण कधीं नष्ट झाला?
आणि यथार्थ जन कोठें कधीं नाश पावले? ८
जसेंहि म्या पाहिलें आहे तसें असतें कीं जे अ-
न्याय नांगरितात आणि दुष्कर्म पेरितात, ते त्यां-
चीच कापणी करितात. ९ देवाच्या श्वासाने ते
नाश पावतात, आणि त्याच्या नाकपुड्यांच्या वायूने
नाहींसे होतात. १० सिंहाची गर्जना क्रूर, सिं-
हाचा शब्द व तरुण सिंहाचे दांत हीं मोडलीं
आहेत. ११ आहार नाहीं ह्मणून बलिष्ट सिंह
नाश पावतो, आणि महासिंहाचीं पिलें विखरिलीं
जातात. १२ तर एक गोष्ट हळूच मजकडे आ-
ली, आणि तींतलें कांहींसें माझ्या कानाला पडलें.
१३ रात्रीस्वप्नांतल्या भावनांत, मनुष्याला निद्रा
पडण्याच्या वेळेस, १४ मला भय व कंपण
लागलें, त्याने माझीं सर्व हाडें थरथरविलीं. १५
तेव्हां एक आत्मा माझ्या मुखावरून गेला, मी
रोमांचित झालों. १६ तो उभा राहिला परंतु
मला त्याचें रूप स्पष्ट दिसलें नाहीं, एक आकार
माझ्या डोळ्यांपुढें होता, निवांत होता आणि म्या
वाणी ऐकिली कीं, १७ मनुष्य देवापेक्षां न्यायी
ठरेल काय? पुरुष आपल्या उत्पन्न करणाऱ्यापेक्षां
पवित्र निघेल काय? १८ पाहा, तो आपल्या
सेवकांवर विश्वासत नाहीं, आणि आपल्या दूतांला
मूर्खपणा लावितो. १९ तर मातीच्या घरांत
राहणारे ज्यांचा पाया धुळींत आहे, जे किड्यापुढें
ठेंचिले जातात, त्यांजवर तो विश्वासेल काय?
२० ते सकाळपासून संध्याकाळपर्यंत नाश पाव-
तात, कोणी न मानितां ते सर्वकाळपर्यंत नष्ट हो-
तात. २१ ही विशिष्टता त्यांच्या ठायीं असेल
ती जात नाहीं काय? ते सुबोधसंपन्न नसून म-
रून जातात.

## अध्याय ५.

"हाक मार, कोणी तुला उत्तर करील काय?
आणि पवित्रांतल्या कोणाकडे तूं आपलें मन
लाविसील? २ कां कीं राग मूर्खाला वधितो
आणि मत्सर निर्बुद्धीला मारितो. ३ म्या मूर्खा-
ला मुळावितां पाहिलें, पण लागलेंच म्या त्याच्या
वस्तीला शापित ह्मटलें. ४ त्याचीं लेंकरें कुश-
लापासून दूर आहेत, तीं वेसींत चेंगरलीं जातात
आणि त्यांला मुक्त करायाला कोणी नाहीं. ५
त्याचें कापलेलें पीक भुकेला खातो, आणि कांट्यां-
तूनहि तें काढून घेतो आणि त्याचे धनावर लुटारु
तोंड वासतो. ६ जरीं हाल धुळींतून निघत ना-
हीं आणि कष्ट भूमींतून उगवत नाहीं. ७ तरी
जशा ठिणग्या सहज वर उडतात तसा मनुष्य
कष्टासाठीं जन्मतो. ८ तथापि मी देवाकडे शोध
करीन, आणि देवाजवळ मी आपला वाद निवेदीन.
९ तो असमीक्ष्य व महत्कर्में, असंख्य आश्चर्यें
कर्में करितो. १० तो पृथ्वीवर पाऊस पाडितो,
आणि शेतांवर जलें पाठवितो; ११ अशासाठीं
कीं दीनाला उंचस्थानांत ठेवावें, आणि शोक कर-
णाराला कुशलांत ठेवावें. १२ तो धूर्त्तांचे सं-
कल्प मोडितो ह्मणून त्यांच्या हातांच्याने त्यांचें
सुमंत्रित कार्य साधवत नाहीं. १३ तो शाहा-
ण्यांला त्यांच्या शाहाणपणांत धरितो आणि कुटि-
लांची मसलत उतावळीने फिसकटी. १४ दिव-
सास ते काळोखाने ठोकर खातात, आणि जसें
रात्रीं तसें मध्यान्हींहि चांचपतात. १५ परंतु
तो दरिद्र्याला तरवारीपासून, त्याच्या तोंडापासून
व जबरदस्ताच्या हातापासून तारितो. १६ ह्म-
णून दीनाला आशा होती आणि अन्याय आपलें
तोंड मिटतो. १७ पाहा, ज्या मनुष्याला देव
शिक्षा करितो तो धन्य, ह्मणून तूं सर्वसमर्थाच्या

शिक्षेला कंटाळूं नको. १८ कां कीं तो दुख-
वितो आणि पट्टी बांधितो, तो जखम करितो आ-
णि त्याचेच हात बरें करितात. १९ तो साहा
संकटांतून तुला मुक्त करील; होय, सातांत तुला
कांहीं अहित होणार नाहीं. २० दुष्काळांत तो
तुला मरणापासून आणि युद्धांत तरवारीच्या धारे-
पासून राखील. २१ तूं जिभाच्या चाबुकापासून
गुप्त केला जासील, आणि विपत्ति येईल तेव्हां तूं
भयभीत होणार नाहींस. २२ विपत्तीला व दु-
ष्कालाला हांससील आणि भूमीवरच्या पशूंला
भिणार नाहींस. २३ कां कीं रानांतल्या धोंड्या-
सीं तुझा करार ठरेल, आणि वनपशू तुजसीं मैत्रीने
राहतील. २४ आणि जाणसील कीं तुझा डेरा
खुशाल राहील, आणि तूं आपली वस्ती पाहसील
आणि पाप करणार नाहींस. २५ आणि जाण-
सील कीं तुझी संतति पुष्कळ, आणि तुझा वंश
भूमीच्या गवतासारिखा होईल. २६ तूं फार
म्हातारपणीं कबरेंत जासील, जसा धान्याचा भारा
स्वसमयीं आंत येतो तसा. २७ हें पाहा, आम्हीं
हें शोधून घेतलें आहे, हें तसेंच आहे, हें तूं
ऐकून समजून घे."

## अध्याय ६.

मग ईयोब उत्तर करीत म्हणाला,
२ "जर माझा खेद तोडून पाहिला, आणि
एकदां माझी आपत्ति तागडींत धरिली तर बरें.
३ कां तर आतां तो समुद्राच्या वाळवेपेक्षां भारी
असेल म्हणून माझे शब्द गिळले आहेत. ४
कां कीं सर्वसमर्थाचे तीर माझे अंगीं आहेत,
त्यांचें विष माझे आत्म्यास पिऊन टाकितें; देवा-
चीं भयें मजवर व्यूढ आहेत. ५ रानगाढव
गवतावर ओरडेल काय? अथवा बैल आपल्या
आंबवणावर हंबरेल काय? ६ जें विरस तें मिठा-
वांचून खावें काय? अथवा अंड्याच्या सफेतीला
रुचि आहे काय? ७ ज्या पदार्थांस माझा
जीव स्पर्शायाला अमान्य असे ते माझें दुखाचें
अन्नसे आहेत. ८ हंहंहं माझ्या विनंतीप्रमाणें
मला प्राप्त व्हावें, आणि ज्याची आशंसा धरितों
तें देवाने मला द्यावें. ९ आणि देवाने मान्य
होऊन मला ध्वस्त करावें, त्याने आपला हात सुटूं
देऊन मला नाहींसें करावें. १० म्हणजे मला
पुन्हां सांत्वन प्राप्त होईल आणि मी क्लेशांत उला-
सेन, त्याने शांति करूं नये, कां कीं म्या पवित्राचीं
वचनें गुप्त राखिलीं नाहींत. ११ म्या आशा
धरावी असें माझें बल काय आहे? आणि म्या
आपलें जीवन लांबवावें, असा माझा अंत काय
आहे? १२ माझें बल दगडाचें बलसें आहे काय?
माझा देह पित्तल आहे काय? १३ माझ्या ठायीं
माझा कांहीं उपाश्रय नाहीं काय? आणि उपाय
मजपासून उडून गेला आहे काय? १४ दुःखिता-
वर त्याच्या मित्राने दया करावी, परंतु तो सर्व-
समर्थाची भीति सोडितो. १५ माझ्या भावांनीं
ओघळासारिखें फसविलें आहे, ते ओघळांच्या
प्रवाहासारिखे जातात. १६ ते बर्फाने गढूळ आ-
हेत, आणि त्यांत हिमसंहति गुप्त आहे. १७
कांहीं वेळाने ते क्षीण होऊन नष्ट होतात, त्याच्या
उष्णाने ते आपल्या ठिकाणांतून आटून जातात.
१८ त्याच्या वाटेने चालणारे एकीकडे मार्गांतून
वळतात, ते रिकामे वर येऊन नाश पावतात. १९
तेमाच्या सार्थांनी अवलोकन केलें, शेबाच्या तां-
ड्यांनी त्यांची आशा धरिली. २० त्यांनी आ-
शा धरिली होती म्हणून त्याला लाज वाटली,
ते तेथें पोंहचून लज्जित झाले. २१ तर आतां
तुम्ही कांहीं नाहीं, तुम्ही पाहून भितां. २२
मजसाठीं कांहीं द्या, अथवा तुम्ही आपल्या द्रव्या-
तून मजकरितां लांच द्या, असें म्या म्हटलें काय?
२३ अथवा शत्रूच्या हातांतून मला मुक्त करा,
अथवा बलात्काराच्या हातांतून मला उद्धरा, असें-
हि म्या म्हटलें काय? २४ मला शिकवा म्ह-
णजे उगींच राहीन, आणि ज्याविषयीं मी चुकलों
तें मला समजावा. २५ ठीक बोलणें किती बल-
कट आहे? परंतु तुम्ही वादविवाद करून काय
ठरवितां? २६ माझ्या बोलण्याला तिरस्कृत क-
रायास तुम्ही कल्पितां काय? आणि निराशाचीं
वचनें वायूसारिखीं मानितां काय? २७ होय,
तुम्ही अनाथावर बलात्कार करितां, आणि आप-
ल्या मित्रासाठीं खाच खणितां. २८ तर आतां
तुम्ही मान्य होऊन मला पाहा, म्हणजे मी लबाड
बोलतों कीं काय हें तुम्हाला दिसेल. २९ तुम्हीं
फिरा, कांहीं अन्याय नसो; होय, पुन्हा फिरा,

यांत माझा न्याय आहे. ३० माझ्या जिभेंत
अन्याय आहे काय? माझें तोंड विपरीत गोष्टींचा
विवेक करूं शकत नाहीं काय!"

## अध्याय ७.

"मनुष्याला पृथ्वीवर कष्टस्थिति नाहीं काय? ज-
से मोलकऱ्याचे दिवस तसे त्याचे दिवस ना-
हींत काय? २ जसा सेवक छायेची इछा धरितो
आणि जसा मोलकरी आपल्या वेतनाची आशा
धरितो. ३ तसे मला दुःखाच्या महिने भोगा-
याला दिल्हे आहेत, आणि व्यथेच्या रात्रीं मला
नेमिलेल्या आहेत. ४ मी अडवा पडलों ह्मणजे
ह्मणतों कीं मी केव्हां उठेन? रात्रि केव्हां जाईल?
आणि पाहटेपर्यंत मी लोळत असतों. ५ माझा
देह किड्यांनी व धुळीच्या गोळ्यांनी भरला आहे,
माझी त्वचा उलून ओंगळ होती. ६ माझे दिवस
धोट्यापेक्षां त्वरीत आहेत, आणि आशेविना संपून
जातात. ७ माझा जीव वाराच आहे असें स्मर,
माझा डोळा कुशल पुन्हा पाहणार नाहीं. ८
ज्याने मला पाहिलें त्याचा डोळा मजकडे पुन्हा
दृष्टि लावणार नाहीं, तुझे डोळे मजवर असले
ह्मणजे मी नाहींसा होतों. ९ जसा मेघ नष्ट
होऊन जातो तसा जो कबरेंत उतरला तो पुन्हा
वर येत नाहीं. १० तो आपल्या घरीं परत ये-
णार नाहीं, आणि त्याचें स्थान त्याला पुन्हा ओ-
ळखणार नाहीं. ११ ह्मणून मी आपलें मुख
आवळणार नाहीं, मी आपल्या आत्म्याच्या संक-
टांत बोलेन, मी आपल्या जिवाच्या खेदांत आक्रं-
देन. १२ मी समुद्र अथवा मकर आहें ह्मणून
तूं मजवर पाहरा करितोस कीं काय? १३ माझा
पलंग मला समाधान देईल, माझा मंचक माझें
आक्रंदन शांत करील, असें मी ह्मणालों ह्मणजे.
१४ तूं स्वप्नांनी मला भेडावितोस, आणि दृष्टां-
तांनी मला बिचकावतोस. १५ ह्मणून कोंडमारा
व मरण जीवनापेक्षां मला बरीं वाटतात. १६
मी कंटाळलों आहें, सर्वकाळपर्यंत जगूं नये, मला
असूं दे, कां कीं माझे दिवस व्यर्थता आहेत.
१७ मनुष्य काय आहे कीं त्वां त्याला थोर माना-
वें आणि त्याजकडे आपलें मन लावावें! १८
आणि त्वां दर सकाळीं त्याची भेट घ्यावी आणि
प्रत्येक क्षणीं त्याचें परीक्षण करावें! १९ केव्हां-
पर्यंत तूं मला सोडणार नाहींस? आणि मी आं-
वढा गिळींपर्यंत मला असूं देणार नाहींस. २०
म्या पाप केलें आहे; हे मनुष्य संभाळणाऱ्या,
मी तुझें काय करूं? त्वां आपणापुढें मला निशाणा-
प्रमाणें कां ठेविलें आहे? आणि मी आपणाला
भाररूप आहें. २१ आणि माझ्या पातकाची
क्षमा कां करीत नाहींस? आणि माझा अन्याय
कां दूर करीत नाहींस, कां कीं आतां मी धुळींत
आडवा पडेन, मग तूं मला सकाळीं शोधिसील
परंतु मी नाहींसा होईन."

## अध्याय ८.

मग बिल्हाद शूही उत्तर करीत ह्मणाला, २
"केव्हांपर्यंत अशा गोष्टी बोलसील? आणि
तुझीं मुखवचनें केव्हांपर्यंत मोठ्या वाऱ्यासारिखीं
चालतील. ३ देव न्याय विपरीत करितो काय?
अथवा सर्वसमर्थ यथार्थता कुटिल करितो का-
य? ४ जर तुझ्या लेंकरानी त्याविरुद्ध पाप केलें
आहे, आणि त्याने त्यांस त्यांच्या पातकाच्या स्वा-
धीन केलें असेल, ५ जर मन लावून तूं देवाचा
शोध करितास आणि सर्वसमर्थापासीं विनंती
करितास, ६ जर तूं पुण्यवान व यथार्थ अस-
तास, तर आतां तो तुजसाठीं उत्तेजित होता,
तुझा पुण्यनिवास तो कुशलविशिष्ट करिता. ७ जरी
तुझा प्रारंभ लाहान असता तरी तुझा शेवट फार
वाढता. ८ कां कीं तूं पूर्व पिढीला विचार आणि
त्यांच्या वडिलांचा शोध करायास सिद्ध हो. ९
(कां तर आह्मी कालचे आहों आणि कांहीं जा-
णत नाहीं, कारण आमचे दिवस पृथ्वीवर साव-
लीसारिखे आहेत). १० ते तुला शिकविणार
नाहींत काय? ते सांगणार नाहींत आणि आ-
पल्या मनांतून वचनें बोलणार नाहींत काय?
११ लव्हाळा चिखलावांचून उचंगेल काय?
जलधर पाण्यावांचून वाढेल काय? १२ तो
आपल्या हिरवेपणांत असतांना दुसऱ्या कोणत्या
गवतापूर्वी कापिल्याशिवाय सुकून जातो. १३
जे देवाला विसरतात त्या सर्वांचे मार्ग तसेच
आहेत, आणि अधार्मिकाची आशा नष्ट होईल.
१४ त्याची आशा विलुप्त होईल आणि त्याचा

भाव कोळ्याच्या घरासारिखा निघेल. १५ तो
आपल्या घरावर टेंकेल परंतु तें टिकणार ना-
हीं, तो तें दृढ धरील परंतु तें स्थिर राहणार
नाहीं. १६ तो सूर्यापुढें टवटवीत आसतो आणि
त्याच्या मळ्यांत त्याचा कोंब पसरतो. १७ त्याचीं
मुळें ढिगाभोंवतीं गुंततात आणि तो दगडांचें घर
पाहतो. १८ जर त्याने त्याला त्याच्या स्था-
नांतून खाऊन टाकिलें, तर तो त्याची ओळख
चोरून ह्मणेल, म्या तुला पाहिलें नाहीं. १९
पाहा, त्याच्या मार्गाचा आनंद हाच आहे, आणि
धुळींतून दुसरे उगवतील. २० पाहा, देव य-
थार्थ जनाला अव्हेरणार नाहीं, आणि दुष्कर्म्यांचें
सहाय तो करणार नाहीं. २१ तो तुझें मुख
हास्याने आणि तुझे ओंठ उत्सवाने भरी तोंपर्यंत.
२२ तुझे द्वेषी लाजेने व्याप्त होतील, आणि दु-
ष्टांची वस्ती नाहींसी होईल."

## अध्याय ९.

मग ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "निश्चयें मी जाणतों कीं तसेंच आहे,
परंतु मनुष्य देवाजवळ कसा न्यायी ठरेल? ३
जर त्याने त्यासीं विवाद करायाला इच्छिलें तर
हजार गोष्टींतल्या एका गोष्टीचें उत्तर तो त्याला
देऊं शकणार नाहीं. ४ तो मनाचा विवेकी व
शक्तीचा पराक्रमी आहे; कोण त्याविरुद्ध आ-
पलें मन दृढ करून निभावला आहे? ५ तोच
पर्वतांला सरकावतो आणि ते जाणत नाहींत, तो
आपल्या कोपाने त्याला उलंडितो. ६ तो पृथ्वी-
ला तिच्या स्थानांतून हालवितो आणि तिचे खांब
थरथरतात. ७ तो सूर्याला आज्ञा करितो ह्मणजे
तो उगवत नाहीं, आणि तार्‍यांवर शिक्का घालून
झाकितो. ८ तो एकलाच आकाशें पसरितो,
आणि समुद्राच्या लहरांवर चालतो. ९ त्याने
सप्तर्षि, अगस्त्य व कृत्तिका, हीं नक्षत्रें व दक्षिणांत-
र्गृहें उत्पन्न केलीं. १० तो असमीक्ष्य महत्कर्मे
व असंख्य आश्चर्यकर्मे करितो. ११ पाहा, तो
मजकडून जातो आणि मी त्याला पाहत नाहीं;
होय, तो जवळून जातो पण तो मला दिसत ना-
हीं. १२ पाहा, तो हरून घेतो तेव्हां त्याला
कोण अटकावूं शकेल? तूं काय करितोस, असें
त्याला कोण ह्मणेल? १३ देव आपला क्रोध न
आवरील तर त्याखालीं गर्विष्ट खचतील. १४
तर मी कसा त्याला उत्तर करूं? त्यापासीं मी
आपलीं वचनें कसा निवडूं? १५ जरी मी न्या-
यी असलों तरी मी त्याला उत्तर करणार नाहीं,
परंतु मी आपल्या न्यायाधीशापासीं विनंती करीन.
१६ जरी म्या आरोळी केली असती आणि त्याने
मला उत्तर दिल्हें असतें, तरी त्याने माझ्या श-
ब्दाकडे कान लाविला आहे, असें मी न विश्वास-
तों. १७ कां कीं तो मला वादळाने हाणितो,
आणि एरव्हींच माझीं क्षतें बहुत करितो. १८
तो मला श्वास ओढूं देत नाहीं परंतु मला कडुप-
णाने मारितो. १९ जर पराक्रमाविषयीं बोलेन
तर पाहा तो बलिष्ट आहे, जर न्यायाविषयीं तर
मला वादसमय कोण नेमील? २० मी न्यायी
आहें, असें जर मी ह्मणालों, तर माझेंच मुख
मला अन्यायी ठरवील; मी यथार्थ आहें, असें
जर ह्मटलें, तर हेंच माझ्या कुटिलतेचें प्रमाण
होईल. २१ जरी मी यथार्थ असतों तरी मी
आपल्या आत्म्याला न जाणतों, मी आपल्या जि-
वाला तुच्छ मानितों. २२ ही एक गोष्ट आहे
ह्मणून मी ह्मणालों; तो यथार्थाला व दुष्टाला
नष्ट करितो. २३ जर दंडाने अकस्मात मारून
टाकिलें तर तो निर्दोषांच्या परीक्षेचा उपहास
करील. २४ पृथ्वी दुष्टाच्या हातीं दिल्ही आहे,
तो तींतल्या न्यायाधीशांचीं मुखें झाकितो, नाहीं
तर तो कोठें? तो कोण आहे? २५ तर माझे
दिवस धावणार्‍यापेक्षां त्वरित आहेत, ते पळत
आहेत, ते कांहीं कुशल पाहत नाहींत. २६ ते
चपळ जहाजांसारिखे क्रमून गेले आहेत; जसा
गरुड आहारावर झडप घालितो तसे. २७ मी
आपलें आक्रंदन विसरेन, मी आपला खेद टाकीन
सतेज होईन, असें जर मी ह्मणालों, २८ तर
मी आपल्या सर्व पीडांमुळें भयभीत आहें, तूं
मला निर्दोष मानणार नाहींस, असें मी जाणतों.
२९ जर मी दुष्ट आहें तर हे व्यर्थ श्रम मी कां
करितों? ३० जरी म्या आपलें अंग बर्फाच्या
पाण्याने धुऊन घेतलें आणि आपले हात क्षाराने
स्वच्छ केले, ३१ तरी मला राडींत बुचकळ-
सील आणि माझीं वस्त्रें मला अमंगळ मानितील;

३२ कां कीं म्या त्याला उत्तर करावें अथवा आ-
ह्मी न्यायांत एकत्र यावें, असा तो मजसारिखा
मनुष्य नव्हे. ३३ ज्याने आह्मा उभयतांवर
आपला हात ठेवावा, असा कोणी मध्यस्थ आह्मा-
मध्यें नाहीं. ३४ त्याने मजवरून आपला दंड
सारावा आणि त्याच्या धाकाने मला भेडावूं नये;
३५ ह्मणजे मी बोलेन आणि त्याला भिणार नाहीं,
परंतु मी आपल्या दृष्टींत असा नाहीं."

## अध्याय १०.

"माझा आत्मा माझ्या जीवनाला कंटाळतो, मी
आपणाविषयीं आपलें आक्रंदन सुटूं देईन,
मी आपल्या जिवाच्या खेदांत बोलेन. २ मी
देवाजवळ ह्मणेन, मला दोषी ठरवूं नको; तूं
कशामुळें मजसीं विवाद करितोस, हें मला कळीव.
३ त्वां पीडावें अथवा त्वां आपले हाताचें काम
तुच्छ मानावें आणि दुष्टांच्या मसलतीवर प्रका-
शावें, हें तुला बरें वाटतें काय? ४ तुला चर्म-
चक्षू आहेत काय? जसें मनुष्य पाहतें तसा तूं
पाहतोस काय? ५ जसे मनुष्याचे दिवस तसे
तुझे दिवस आहेत काय? जसे पुरुषाचे दिवस
तसीं तुझीं वर्षें आहेत काय? ६ ह्मणून तूं माझा
अन्याय हुडकतोस आणि माझें पाप शोधितोस कीं
काय? ७ मी दुष्ट नाहीं असें तुला कळलें
आहे, आणि कोणी तुझ्या हातांतून मुक्त करूं
शकत नाहीं. ८ तुझ्या हातानी मला एकसारिखें
सभोंवतें घडून निर्माण केलें, तथापि तूं मला नष्ट
करीत आहेस. ९ त्वां स्मरावें कीं त्वां मला
मातीप्रमाणें घडिलें, आणि तूं मला पुन्हा धुळीस
मिळविसील काय? १० त्वां मला दुधाप्रमाणें
ओतिलें नाहीं काय? आणि खव्यासारिखें मला
आळविलें नाहीं काय? ११ त्वचेने व मांसाने
त्वां मला झांकिलें आहे, आणि हाडानी व नाड्या-
नी त्वां मला वेढिलें आहे. १२ त्वां मला जी-
वंत करून मजवर अनुग्रह केला आहे, आणि
तुझ्या समीक्षेने माझा आत्मा रक्षिला आहे. १३
आणि ह्या गोष्टी त्वां आपल्या मनांत गुप्त राखि-
ल्या आहेत, हें तुजपासीं आहे असें मी जाणतों.
१४ जर म्या पाप केलें तर त्वां मला लक्षिलें
आहे, आणि मला माझ्या अन्यायापासून निर्दोष
मानीत नाहींस. १५ जर मी दुष्ट आहें तर
मला हाय; जरी मी न्यायी असलों तरी मी आ-
पलें डोकें उभारणार नाहीं; मी अप्रतिष्ठेने भर-
लेलों आहें ह्मणून तूं माझें दुःख पाहा. १६ कां
कीं ती वाढती; तूं सिंहासारिखा मला टपून रा-
हतोस, मग तूं फिरून आपणाला मजकडे आश्चर्य
असें दाखवितोस. १७ तूं मजविरुद्ध साक्षी नवे
करितोस, तूं आपला राग मजवर वाढवितोस,
परिवर्त्त व अभिसंपात मजविरुद्ध आहेत. १८ तर
त्वां मला गर्भस्थानांतून कां निघूं दिल्हें? जर म्या
प्राण सोडिला असता आणि कोणत्याहि डोळ्याने
मला पाहिलें नसतें, तर बरें असतें. १९ मी क-
धीं झालों नाहीं असा असतो, मी गर्भस्थानापासून
कबरेला वाहिला गेलों असतों. २० माझें थोडें
आयुष्य संपणार नाहीं काय? मी थोडा विसांवा
घ्यावा ह्मणून तूं मला असूं दे. २१ मग जेथून
मी परत येणार नाहीं, असल्या अंधकाराच्या व
मृत्युछायेच्या देशांत; २२ ज्या देशांत अतिशय
अंधार आहे आणि ज्या मरणाच्या सावळींत अ-
स्ताव्यस्तपणा आहे आणि ज्यांतला प्रकाश अंधा-
रच आहे, त्यांत मी जाईन."

## अध्याय ११.

तेव्हां जोफार नामाथी उत्तर करीत ह्मणाला,
२"वचनांच्या बहुत्वाचें उत्तर देऊं नये काय?
आणि वाचाल मनुष्य न्यायी ठरवावा काय? ३
तुझ्या खोट्या शब्दावरून मनुष्याने उगींच साहावें
काय? जेव्हा तूं उपहास करितोस तेव्हां कोणी
तुला लज्जित करूं नये काय? ४ कारण तूं ह्म-
णालास कीं, "माझा संबोध शुद्ध आहे, आणि मी
तुझ्या दृष्टींत पवित्र आहें. ५ परंतु हंहंहं जर
देव बोलेल आणि आपले ओंठ तुजकडे उघडील,
६ आणि ज्ञानाचीं रहस्यें बुद्धीहून दुप्पट आहेत,
असें तुला दाखवील तर बरें; देव तर तुझ्या
अन्यायापेक्षां थोडें तुजपासून मागून घेतो, असें तूं
जाण. ७ तुझ्याने शोध करून देवाला जाणवेल
काय? सर्वसमर्थाविषयीं तुला पूर्ण ज्ञान होईल
काय? ८ तें आकाशाच्या उंचतेपर्यंत आहे, तूं
काय करिसील? तें पातालापेक्षां खोल आहे, तूं
काय जाणसील? ९ त्याचें परिमाण भूमीपेक्षां

लांब आणि समुद्रापेक्षां रुंद आहे. १० तो जर
पालटील अथवा बंद करील अथवा गोळा करील,
तर त्याचा प्रतिबंद कोण करील? ११ कां कीं
तो दुर्जनाला जाणतो आणि दुराचाराला पाहतो;
तर तो त्याचा विचार करणार नाहीं काय? १२
जरी मनुष्य रानगाढवाच्या शिंगराप्रमाणें जन्मतें
तरी पोकळ मनुष्य आपणाला बुद्धिमान मानितें.
१३ जर त्वां आपलें मन सिद्ध केलें आणि त्याज-
कडे आपले हात पसरिले, १४ आणि तुझ्या
हातांत दुष्कर्म असलें तर तें दूर करावें, आणि
तूं आपल्या डेऱ्यांत अन्याय राहूं देऊं नको. १५
तर तूं निर्दोष आपलें मुख उभारसील; होय,
तूं स्थिर राहसील आणि भिणार नाहींस. १६
कां कीं तूं आपले कष्ट विसरसील, जीं पाणीं वा-
हून गेलीं आहेत त्यांसारिखे ते स्मरसील. १७
आणि तुझें आयुष्य मध्यान्हापेक्षां अधिक चढेल,
तुझा अंधकार सकाळच्या उजेडासारिखा होईल.
१८ आणि आशा आहे ह्मणून तूं निष्काळजी
राहसील, जरी तूं लाजिर्वाणा झालास तरी नि-
र्भय निजसील. १९ जेव्हां तूं आडवा पडसील
तेव्हां कोणी तुला भेडविणार नाहीं, होय बहुत
लोक तुजपाशीं विनंती करितील. २० परंतु दु-
ष्टांचे डोळे थकतील आणि त्यांचा आश्रय नष्ट
होईल, आणि त्यांची आशा प्राण सोडण्यासा-
रिखी होईल."

## अध्याय १२.

आणि ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "निश्चयें तुह्मीच लोक आहां, आणि तु-
ह्मासहित ज्ञान मरून जाईल. ३ तथापि जसी
तुह्माला तसी मलाहि बुद्धि आहे, मी तुह्मापेक्षां
नीच नाहीं, आणि ज्याला असल्या गोष्टी ठाऊक
नाहींत असा कोण आहे? ४ जो आपल्या
शेजाऱ्याला निंदापात्र आहे, जो देवाला आरोळी
करितो आणि त्यापासून उत्तर पावतो, असा मी
झालों आहें, सात्विक व यथार्थ जन निंदापात्र
झाला आहे. ५ जो स्वस्थ आहे आणि पाय
सरकावण्याविषयीं सिद्ध आहे, त्याच्या मतें दीप
तुच्छ मानिला आहे. ६ लुटारूंचे डेरे कुशल
आहेत आणि जे देवाचा राग चेतवितात, त्याला
स्वस्थपण आहे, त्याच्या हातांत देव जें पाहिजे
तें आणितो. ७ परंतु पशूंला पूस ह्मणजे ते
तुला शिकवितील, आणि आकाशांतल्या पक्ष्यांला
विचार ह्मणजे ते तुला सांगतील. ८ अथवा
पृथ्वीशीं बोल ह्मणजे ती तुला सुचवील, आणि
समुद्रांतले मासे तुला कथन करितील. ९ या
सर्वांकडून कोण जाणत नाहीं कीं परमेश्वराच्या
हातानें हें केलें आहे? १० त्याच्या हातांत प्रत्येक
जिवाचा प्राण आणि सर्व मनुष्यांचा आत्मा आहे.
११ कान वचनें पारखीत नाहीं काय? आणि
तालु आपल्या अन्नाचा स्वाद घेत नाहीं काय?
१२ वृद्धांच्या ठायीं ज्ञान असतें आणि दीर्घ आ-
युष्यांत विवेक असतो. १३ देवाच्या ठायीं बुद्धि
व पराक्रम आहेत, त्याला मसलत व विवेक आ-
हेत. १४ पाहा, तो मोडून टाकितो मग तें बां-
धिलें जायाचें नाहीं, तो मनुष्याला बंद करितो
तेव्हां सुटका होत नाहीं. १५ पाहा, तो पाणीं
आवरितो तेव्हां तीं आटून जातात, आणि त्यानें
तीं सुटूं दिल्हीं ह्मणजे तीं भूमि उलंडून टाकितात.
१६ त्याच्या ठायीं सामर्थ्य व सुबोध आहेत,
बहकणारा व बहकावणारा त्याच्या सत्तेंत आहेत.
१७ तो मंत्र्याला पाडाव करून नेतो, आणि न्या-
याधीशाला मूर्ख करितो. १८ तो राजांचा अ-
धिकार मोडितो, आणि त्यांची कमर बंदानें बां-
धितो. १९ तो अधिकाऱ्यांस पाडाव करून नेतो,
आणि समर्थांला पाडून टाकितो. २० तो वि-
श्वासाचें भाषण नाहींसें करितो, आणि ह्मातऱ्यां-
चा विवेक काढून टाकितो. २१ तो सर्दारांवर
अपमान घालितो, आणि पराक्रम्यांचा कमरबंद
सोडितो. २२ तो खोल गोष्टी अंधकारांतून काढून
प्रगट करितो, आणि मृत्युच्छाया प्रकाशाकडे बा-
हेर आणितो. २३ तो राष्ट्रांला वाढवितो मग
त्याला नष्ट करितो, तो राष्ट्रांला विस्तारितो आणि
नंतर त्याला आकळितो. २४ तो पृथ्वीच्या लो-
कांतल्या मुख्यांची बुद्धि भ्रष्ट करितो, आणि
त्याला निर्मार्ग शून्य रानांत भ्रमवितो. २५ ते
अंधकारांत चाचपतात आणि कांहीं प्रकाश मिळत
नाहीं, आणि ते मस्त झालेल्यासारिखे झोकत
चालत असें तो करितो.

## अध्याय १३.

पाहा, हें सर्व माझ्या डोळ्याने पाहिलें आहे,
माझा कान हें ऐकून समजला आहे· २ जें
तुह्माला कळलें तें मलाहि कळलें आहे, मी तु-
ह्मापेक्षां नीच नाहीं· ३ तर मी **सर्वसमर्था**-
जवळ बोलेन, आणि देवासीं वाद करायाला मी
इच्छितों· ४ परंतु तुह्मी खोटा आरोप आणणारे
आहां, तुह्मी सर्व निरुपयोगी वैद्य आहां· ५
हंहंहं, जर तुह्मी उगेच राहिलां तर बरें, हा तु-
मचा शाहाणपणा होईल· ६ माझा तर्क ऐका,
आणि माझ्या ओंठांच्या वादांकडे कान द्या· ७
तुह्मी देवासाठीं अन्याय बोलाल काय? त्याज-
करितां कपटाचें भाषण कराल काय? ८ तुह्मी
त्याचा पक्षपात धराल काय? देवासाठीं विवाद
कराल काय? ९ त्याने तुमची परीक्षा करावी हें
बरें आहे काय? अथवा तुह्मी मनुष्याप्रमाणें त्या-
ला फसवाल काय? १० जर तुह्मी गुप्तरुपें
पक्षपात करितां तर निश्चयें तो तुमचें ग्रहण क-
रील· ११ त्याचें ऐश्वर्य्य तुह्माला भेडविणार
नाहीं काय? त्याचें भय तुह्मावर पडणार नाहीं
काय? १२ तुमचीं स्मर्त्तव्य वाक्यें राखेसारिखीं,
तुमचे बुरूज मातीच्या बुरुजासारिखे आहेत·
१३ मला असूं देऊन उगेच राहा, ह्मणजे मी
बोलेन, मग जें मजवर येईल तें येवो· १४ क-
शामुळें मी आपला देह आपल्या हातांत घेतों,
आणि आपला जीव आपल्या मुठींत ठेवितों? १५
जरी त्याने मला जिवें मारिलें तरी मी त्याजवर
आशा धरीन, होय, मी आपल्या मार्गांविषयीं त्या-
जवळ वाद करीन· १६ तो माझें तारणहि होईल,
कां कीं अधार्मिक त्यापुढें यावयाचा नाहीं· १७
तुह्मी जपून माझें वचन आणि कान देऊन माझी
सूचना ऐका· १८ पाहा, म्या आपला वाद सिद्ध
केला आहे, मी न्यायी ठरेन असें मी जाणतों·
१९ मजसीं वाद करील असा कोण आहे? कां
कीं आतां जर मी मौन धरिलें तर प्राण सोडीन·
२० केवळ दोन गोष्टी मजकडे करूं नको, ह्मणजे
मी तुजपासून लपणार नाहीं· २१ तूं आपला
हात मजवरून काढून घे, आणि तुझ्या भयाने
मला भयभीत करूं नये· २२ मग तूं आरोळी
कर ह्मणजे मी तुला उत्तर करीन, अथवा मी बो-
लेन तेव्हां तूं मला उत्तर दे· २३ माझे अन्याय
व पापें किती आहेत? माझा अपराध व माझें पा-
तक मला कळीव· २४ तूं आपलें मुख कां झां-
कितोस? आणि मला आपला वैरी कां मानितोस?
२५ उडविलेल्या पानाला भेडाविसील काय? सु-
कलेल्या भुंसाच्या पाठीस लागसील काय? २६
कां कीं मजविरुद्ध कडु गोष्टी लिहितोस, आणि
मी आपल्या तरुणपणाच्या अन्यायांचें फल भोगीं
असे करितोस· २७ तूं माझे पाय खोड्यांत घा-
लितोस आणि माझ्या सर्व मार्गांला जपतोस, मा-
झ्या पायांच्या तळव्यांवर चिन्हें करितोस· २८
आणि तो जसा रडीने तसा जीर्ण होतो, आणि
कसरीने खाल्लेल्या वस्त्रासारिखा आहे·”

## अध्याय १४.

“स्त्रियेपासून जन्मलेलें मनुष्य थोड्या दि-
वसांचें व कष्टाने भरलेलें आहे· २
तें फुलासारिखें निघतें आणि कापिलें जातें, तें
छायेप्रमाणें पळतें आणि टिकत नाहीं· ३ तर
तूं अशावर आपले डोळे उघडितोस काय? तूं
आपल्यापुढें मला न्यायांत आणितोस काय? ४
मलिनांतून स्वच्छ पदार्थ कोण काढील? कोणीहि
नाहीं· ५ त्याचे दिवस ठरले आहेत, त्याच्या
महिन्यांची संख्या तुजवळ आहे, त्वां त्याच्या
सीमा नेमिल्या आहेत, आणि त्याच्याने त्या अति-
क्रमवत नाहींत· ६ तर त्याने मोलकऱ्याप्रमाणें
आपला दिवस भरून विसांवा घ्यावा ह्मणून त्या-
पासून तूं फिर· ७ कारण कीं झाड जरी तोडून
टाकिलें तरी पुन्हा फुटेल आणि त्याचा कोंब उग-
वतां राहणार नाहीं, असी त्याची आशा असती·
८ जरी त्याचें मूळ भूमींत जुनें झालें आणि त्याचा
बुंधारा धुळींत मरून गेला; ९ तरी तो पाण्याच्या
वासाने फुटेल आणि रोपासारिखा पालवेल· १०
परंतु पुरुष मरतो आणि क्षीण होऊन जातो; होय,
मनुष्य प्राण सोडितो, मग तो कोठें आहे? ११
जसीं समुद्राचीं पाणीं खचतात आणि नदी आ-
टून सुकती, १२ तसा मनुष्य आडवा पडल्या-
वर पुन्हा उठत नाहीं, आकाशें नाहींसीं होत
तोंपर्यंत ते जागृत होणार नाहींत, आणि आपल्या

निद्रेंतून उठणार नाहींत. १३ हंहंहं, तुझा क्रोध
जाई तोंपर्यंत जर त्वां मला कबरेंत गुप्त केलें, जर
मला झांकून राखिलें, जर मजसाठीं समय नेमिला
आणि मला स्मरले, तर बरें. १४ जर मनुष्य
मेला तर पुन्हा जीवेल काय? माझा पर्यय येई
तोंपर्यंत मी आपल्या कष्टदशेचे सर्व दिवस आशा
धरीत राहीन. १५ तूं हाक मारिसील तेव्हां
मी तुला उत्तर करीन, तूं आपल्या हातांच्या कामा-
वरची दया करसील. १६ कां कीं आतां माझीं
पावलें गणितोस, तूं माझ्या पातकाला जपत नाहींस
काय? १७ माझा अपराध गाठोड्यांत मुद्रित
आहे, आण तूं माझा अन्याय पिशवींत घालून
शिवतोस. १८ परंतु पर्वत पडून नष्ट होतो,
आणि खडक आपल्या स्थानांतून ढळून जातो.
१९ पाणीं दगड झिजवितात, त्यांचे प्रवाह भूमी-
ची धूलि धुऊन नेतात, आणि तूं मनुष्याची आशा
नाहींसी करितोस. २० तूं सदा त्याजवर प्रबल
आहेस आणि तो जातो, तूं त्याचें तोंड पालटून
त्याला पाठवून देतोस. २१ त्याचे पुत्र गौरवित
होतात हें तो जाणत नाहीं, अथवा ते नीच हो-
तात परंतु ही त्यांची दशा त्याला कळत नाहीं.
२२ परंतु त्याचा देह त्याच्या ठायीं दुःखित
होईल, आणि त्याजमध्यें त्याचा जीवात्मा शोक
करील."

## अध्याय १५.

मग एलीफाज तेमानी उत्तर करीत ह्मणाला,
२ "बुद्धिमानाने व्यर्थज्ञान बोलावें आणि आ-
पलें पोट पूर्वेच्या वाऱ्याने भरावें काय? ३
त्याने निरुपयोगी भाषण बोलून वाद करावा काय?
अथवा त्याने निष्फल वचनें उच्चारावीं काय?
४ होय, त्वां भय सोडिलें आहे, आणि देवा-
समोर प्रार्थना कमी करितोस. ५ कां कीं तुझें
मुख तुझी दुष्टाई बोलतें, आणि धुर्तत्ताची जीभ
निवडून घेतोस. ६ तुझेंच मुख तुला अन्या-
यी ठरवितें, मी नाहीं आणि तुझेच ओंठ तुज-
विरुद्ध प्रत्युत्तर करितात. ७ तूं पहिला जन्मले-
ला मनुष्य आहेस काय? आणि डोंगराच्या पूर्वी
प्रसविला गेलास काय? ८ त्वां देवाची गुप्त
गोष्ट ऐकिली आहे काय? तूं आपणासाठीं बुद्धि
मिळून टाकिली आहेस काय? ९ तूं काय जा-
णतोस आणि आह्मी तें जाणत नाहीं? तूं काय
समजतोस आणि तें आमच्या ठायीं नाहीं? १०
तुझ्या बापापेक्षां वडील पांढरें केंशाचे फार ह्मा-
तारे मनुष्य आमच्याजवळ आहेत. ११ तूं दे-
वाचीं सांत्वनें तुच्छ मानितोस काय? तुजपाशीं
कांहीं गुप्त गोष्ट आहे काय? १२ तर तुझ्या
मनाने तुला कां हरण केलें आहे? आणि तुझे
डोळे कशाकडे निमीलन करितात? १३ त्वां
आपलें मन देवाप्रतिकूल फिरविलें आहे, आणि
असीं वचनें आपल्या मुखांतून निघूं दिल्हीं आहेत,
याचें कारण काय? १४ मनुष्य निर्मल ठरावा
एवढा तो काय आहे? आणि जो स्त्रियेपासून
जन्मलेला तो न्यायी ठरावा, एवढा तो काय आहे?
१५ पाहा, तो आपल्या पवित्रांवर विश्वास ठेवीत
नाहीं, आणि आकाशें त्याच्या दृष्टीस स्वच्छ ना-
हींत. १६ तर मनुष्य जो पाण्याप्रमाणें दुष्टाई
पितो, तो केवढा अधिक अमंगल व दूषित आहे.
१७ मी तुला सूचना करीन, माझें ऐक ह्मणजे जें
म्या पाहिलें आहे तें सांगेन. १८ तें बुद्धिमंतानी
आपल्या पूर्वजांपासून ऐकून सांगितलें आहे, गुप्त
राखिलें नाहीं. १९ त्यांस मात्र पृथ्वी दिल्ही
होती, आणि कोणताहि परकीय त्यांमधून गेला
नाहीं. २० दुष्ट आपलें आयुष्यभर कष्टी असतो,
आणि बलात्काराच्या वर्षांची संख्या थोडी असती.
२१ भयांचा शब्द त्याच्या कानांत असतो, तो
कुशल असतांना त्याजवर विध्वंसक येतो. २२
तो अंधकारांतून परत येण्यास विश्वासत नाहीं,
आणि तरवार त्याची वाट पाहत असती. २३
तो भाकरीसाठीं फिरतांना ह्मणतो, ती कोठें आहे?
अंधकाराचा दिवस त्याच्या हाताजवळ सिद्ध आहे,
असें तो जाणतो. २४ क्लेश व संकट त्याला भे-
डवितात, तयार झालेल्या राजाप्रमाणें तीं त्याजवर
प्रबल होतात. २५ कां कीं तो देवाप्रतिकूल
आपला हात प्रतत करितो, आणि सर्वसमर्था-
विरुद्ध गर्वाने वर्त्ततो. २६ तो आपली मान
ताठ करून त्याजवर त्याच्या ढालांच्या दृढ बों-
डांवरहि धांवतो. २७ कां कीं त्याने आपलें तोंड
चर्बीने झांकिलें आहे, आणि आपली कंबर पुष्ट केली
आहे. २८ तो ओसाड गांवांत, ज्या घरांत कोणी

राहत नाहींत, जीं ढीग व्हायाला सिद्ध आहेत,
त्यांत वसत असतो. २९ तो धनवान होणार
नाहीं, आणि त्याचें द्रव्य* टिकणार नाहीं, आणि
त्याची संपत्ति पृथ्वीवर विस्तरणार नाहीं. ३०
तो अंधकारांतून निभावणार नाहीं, ज्वाला त्याचा
कोंब वाळवून टाकील, आणि तो त्याच्या मुखश्वा-
साने नष्ट होऊन जाईल. ३१ जो फसलेला
त्याने शुन्यतेवर भाव ठेवूं नये, कां कीं व्यर्थपणा
त्याची फेड होईल. ३२ त्याचा समय आला
नसतां तें पूर्ण होईल, आणि त्याच्या फांद्या हिर-
व्या असणार नाहींत. ३३ तो द्राक्षीसारिखा
आपलें कोंवळें फल गळूं देईल, आणि जाईताप्र-
माणें आपलें पुष्प उडवील. ३४ कां कीं ढोंग्या-
ची दुष्ट पंक्ति ओसाड होईल, आणि अग्नि लां-
चाचे डेरे खाऊन टाकील. ३५ ते अरिष्टाचें
गर्भधारण करून दुष्कर्म प्रसवितात, आणि त्यांचें
उदर कपट सिद्ध करितें."

## अध्याय १६.

मग ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
"२ म्यां अशा बहुत गोष्टी ऐकिल्या आहेत,
तुह्मी सर्व दुःखाचे सांत्वनकर्त्ते आहां. ३ व्यर्थ
वचनांचा अंत होईल काय? अथवा त्वां उत्तर
करावें ह्मणून तुला काय धैर्य देतें? ४ जर तुमचा
जीव माझ्या जिवाच्या स्थानीं असता तर मीहि
तुह्मासारिखा बोलूं शकतों, तुह्माविरूद्ध वाक्यें
रचूं शकतों, आणि तुह्मावर आपलें डोकें हालवूं
शकतों. ५ तथापि मी आपल्या मुखाने तुह्माला
धीर देतों, आणि मी आपले ओंठ हालवून तुम-
चा खेद शांतवितों. ६ जरी मी बोललों तरी
माझा खेद शांत होत नाहीं, जरी मी उगाच रा-
हिलों तरी माझें काय दुःख जातें? ७ परंतु आ-
तां त्याने मला ग्लान केलें आहे, त्वां माझी सर्व
पंक्ति खेदित केली आहे. ८ आणि त्वां मला
बंद केलें आहे, हें साक्षी झालें आहे, आणि मा-
झें रोडपण माझ्याठायीं उठून माझ्या तोंडावर
उत्तर करितें. ९ त्याने आपल्या क्रोधाने मला
फाडिलें आहे, आणि माझा वैरी झाला आहे,
त्याने मजवर आपले दांत कडकडाविले आहेत,
माझा शत्रु मजवर आपले डोळे तीव्र करितो.
१० त्यांनी मजवर आपलें तोंड वासलें आहे,
त्यांनी निंदा करून माझ्या गालांवर चपराका मा-
रिल्या आहेत, ते मजवर एकत्र मिळाले आहेत.
११ देवाने मला अन्यायाच्या स्वाधीन केलें आहे,
आणि मला दुष्टांच्या हातीं सोंपून दिल्हें आहे.
१२ मी स्वस्थ होतों परंतु त्याने मला विभिन्न
केलें आहे, त्याने माझी मान धरून मला ठेंचून
टाकिलें आहे, आणि मला आपलें निशाण असें
ठेविलें आहे. १३ त्याचे धनुर्धर मला घेरितात,
तो माझीं आंतडीं छेदितो आणि क्षमा करीत नाहीं,
तो माझें पित्त भूमीवर ओतितो. १४ तो भंगा-
नंतर भंगाने मला भग्न करितो, महावीरासारिखा
मजवर धांवतो. १५ म्यां तरट शिवून आपल्या अं-
गावर घातलें आहे, म्यां आपलें शृंग भूमींत खुपसून
अमंगळ केलें आहे. १६ रडून माझें तोंड तांबडें
झालें, आणि माझ्या पापण्यांवर मृत्युछाया आहे.
१७ माझ्या हातांतल्या अन्यायामुळें असें नव्हे,
आणि माझी प्रार्थना शुद्ध आहे. १८ अगे भूमि,
माझें रक्त झांकूं नको, आणि माझ्या आरोळीला
स्थान नसावें. १९ आतांहि पाहा, माझा साक्षी
आकाशांत आहे, आणि माझा प्रत्यक्ष दर्शन वरतीं
आहे. २० माझे मित्र माझा उपहास करितात,
परंतु माझा डोळा देवाकडे आसवें वाहूं देतो.
२१ जसा मनुष्य आपल्या शेजाऱ्यासाठीं वाद
करितो तसा जर पुरुषासाठीं देवापासीं कोणी
वाद केला तर बरें. २२ थोडीं वर्षें आलीं ह्म-
णजे ज्या वाटेने मी परत येणार नाहीं तिने जाईन."

## अध्याय १७.

"माझा श्वास बिघडला आहे, माझे दिवस
मावळले आहेत, मजसाठीं कबरा सिद्ध
आहेत. २ मजपासीं निंदाखोर नाहींत काय? आ-
णि माझा डोळा त्यांच्या चिडविण्यांत राहत नाहीं
काय? ३ तूं ठेव, तूं मला आपणामीं जामीन
कर, माझ्या हातावर टाळी देई असा कोण आहे?
४ कां कीं त्यांच्या ह्रदयांत बुद्धि शिरूं नये
ह्मणून त्वां तें झांकिलें आहे, यामुळें त्याला उंचा-
वणार नाहींस. ५ जर कोणी आपले मित्र शत्रू-
च्या हातीं लुटायाला दिल्हे तर त्याच्या लेंकरां-
चे डोळे खुंटतील. ६ त्याने मला लोकांच्या

दृष्टांतार्थ ठेविलें आहे, आणि मी धिक्कारार्थ झालों
आहें. ७ खेदामुळें माझा डोळा धुंद झाला
आहे, आणि माझे सर्व अवयव छाया असे झाले
आहेत. ८ यथार्थ जन यामुळें विस्मित होतील,
आणि दुष्टावर धार्मिक आपणाला उत्तेजित करील.
९ आणि सात्विक आपला मार्ग धरून चालत
जाईल, आणि हातांचा स्वच्छ उत्तरोत्तर बळकट
होत चालेल. १० परंतु तुह्मी सर्व फिरून या,
कां तर तुह्मामध्यें एकहि बुद्धिमान मला सांपडत
नाहीं. ११ माझे दिवस सरले आहेत, माझे सं-
कल्प माझे मनोरथहि मोडिले आहेत. १२ ते
रात्रीचा दिवस करितात, प्रकाश अंधकारापासून
जवळ आहे. १३ जर मी आशा धरितों तर
कबर माझा आश्रय आहे, निश्चयें मी आपली
गादी अंधकारांत आंथरीन. १४ म्या क्षयाला
ह्मटलें आहे कीं, तूं माझा बाप आहेस, आणि
किडीला, तूं माझी आई व माझी बहीण आहेस.
१५ तर माझी आशा कोठें आहे? आणि माझी
आशा कोण पाहील? १६ त्या कबराच्या दर्वा-
ज्यांत उतरतील, होय, त्यांची विश्रांति धुळींत
एकत्र होईल."

## अध्याय १८.

मग बिल्दाद शूही उत्तर करीत ह्मणाला,
२ "केव्हांपर्यंत बोलून तुह्मी वाक्यांची समाप्ति
कराल? विवेक करा, ह्मणजे आह्मी बोलूं. ३
तुह्मी आह्मास पशूंसारिखें कां मोजितां? आणि
आह्मास कां तुच्छ मानितां? ४ तो आपल्या क्रो-
धाने आपणाला फोडितो, तुजकरितां पृथ्वी ओसाड
होईल काय? आणि खडक आपल्या स्थानांतून
ढळेल काय? ५ होय, दुष्टांचा दिवा विझवून
टाकतील आणि त्याच्या अग्नीची ठिणगी प्रकाश-
णार नाहीं. ६ त्याच्या डेऱ्यांत प्रकाश काळोख
होईल, आणि त्याजवरतीं त्याचा दिवा विझेल.
७ त्याच्या बळाचीं पावलें संकोचित होतील, आ-
णि त्याचा संकल्प त्याचा नाश करील. ८ कां
कीं तो आपल्या पायांनी जाळ्यांत गुंततो, आणि
तो पाशावर चालतो. ९ पाश त्याच्या टांचेला
धरील, सांपळा त्याला गृहीत करील. १० त्या-
साठीं भूमीवर पाश आणि वाटेवर सांपळा गुप्त
केला आहे. ११ सभोंवतीं भयें त्याला बिचका-
वतील आणि त्याच्या पायांला चेष्टवून त्याला भ-
डकवितील. १२ त्याचें बल भुकेने पीडित हो-
ईल, आणि विपत्ति त्याच्या बाजूस सिद्ध असेल.
१३ ती त्याच्या त्वचेचे विभाग खाईल, मरणाचा
प्रथमजात त्याचे अवयव खाऊन टाकील. १४
त्याचा भरंवसा त्याच्या डेऱ्यांतून नाहींसा होईल,
आणि ती त्याला भयांच्या राजाकडे पोंचवील. १५
ती त्याच्या डेऱ्यांत राहील, तो त्याचा नाहीं ह्मणून
त्याच्या वसतीवर गंधक विखरिला जाईल. १६
खालतीं त्याचीं मुळें सुकतील, आणि वरतीं त्याच्या
फांद्या कापिल्या जातील. १७ त्याचें स्मरण पृथ्वींतून
नाहींसें होईल, आणि त्याचें नांव आळींत अस-
णार नाहीं. १८ लोक त्याला प्रकाशांतून अंध-
कारांत घालवितील, आणि जगांतून त्याला पळवि-
तील. १९ त्याला आपल्या लोकांमध्यें लेंक अथवा
नातू असणार नाहीं, आणि त्याच्या वस्तींत कोणी
शेष राहणार नाहीं. २० त्याच्या दशेमुळें त्या-
चे उत्तरज विस्मित होतील, आणि त्याचे पूर्वज
भय पावतील. २१ निश्चयें अन्यायाच्या वस्त्या
अशाच असतात, आणि जो देवाला जाणत
नाहीं त्याचें स्थान असेंच असतें."

## अध्याय १९.

मग ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "केव्हांपर्यंत तुह्मी माझा जीव पीडाल?
आणि शब्दानी मला ठेंचून टाकाल? ३ या दा-
हा वेळा तुह्मी मला निंदिलें आहे, तुह्मी मजवर
क्रूरपणा करितां याविषयीं तुह्माला लाज वाटत
नाहीं काय? ४ आणि निश्चयें मी भ्रांत झालों
असलों तर असो, माझी भ्रांति मजकडे राहील.
५ जर निश्चयें तुह्मी आपलें महत्व मजवर मिरवि-
तां आणि मजविरुद्ध माझ्या अप्रतिष्ठेचा वाद करि-
तां, ६ तर तुह्मी जाणा कीं देवाने मला वळिलें
आहे, आणि आपल्या जाळ्याने मला वेढिलें आहे.
७ पाहा, मी अन्यायामुळें आरोळी करितों परंतु
मला उत्तर मिळत नाहीं, मी ओरडतों परंतु
कांहीं न्याय नाहीं. ८ त्याने माझ्या मार्गाला कुंपण
घातलें आहे ह्मणून मी पार जात नाहीं, आणि
त्याने माझ्या वाटांवर अंधकार पाडिला आहे.

९ त्याने माझें गौरव मजपासून काढिलें आहे, आणि
माझ्या मस्तकावरचा मुगूट दूर केला आहे. १०
तो मला समंतात विपादित करीत आहे आणि
मी नाहींसा होत आहें, त्याने माझी आशा झाडा-
प्रमाणें उपटून टाकिली आहे. ११ आणि मज-
वर त्याने आपला क्रोध संतप्त केला आहे, आणि
मला आपल्या शत्रूंसारिखें मोजिलें आहे. १२
त्याचीं दळें एकत्र येतात आणि ह्मणून मजविरुद्ध
आपला मार्ग बांधितात, आणि माझ्या डेऱ्याभों-
वतीं छावणी घालितात. १३ त्याने माझे भाऊ
मजपासून दूर केले आहेत, आणि निश्चयें माझ्या
ओळखीच्यांचें मन मजसीं तुटलें आहे. १४
माझे भाऊबंद मला सोडून दूर राहिले आहेत,
आणि माझे स्नेही मला विसरले आहेत. १५
माझ्या घरचे राहणारे व माझ्या दासी मला पर-
कीय असें मोजितात, मी त्यांच्या दृष्टींत विदेशी
आहें. १६ म्या आपल्या दासाला बोलाविलें
परंतु त्याने उत्तर केलें नाहीं, म्या आपल्या मुखाने
त्यापासीं विनंती केली. १७ जरी म्या आपल्या
पोटच्या लेंकरांमुळें तिजपासीं विनंती केली, तरी
माझी स्त्री माझ्या श्वासाला कंटाळली. १८
होय, पोरें मला आव्हेरितात, मी उठलों आणि
तीं मजविरुद्ध बोलतात. १९ माझ्या पंक्तीचे
सर्व मला अघोर मानितात, आणि ज्यांला म्या
प्रिय मानिलें ते मजवर उठले आहेत. २०
माझी त्वचा व माझें मांस यांसीं माझीं हाडें चि-
कटलीं आहेत, आणि मी आपल्या दांतांच्या हिर-
ड्यांसुद्धां मुक्त झालों आहें. २१ माझ्या मित्रांनों
तुह्मी मजवर दया करा, करा दया; कां कीं देवा-
चा हात मला बाधिला आहे. २२ तुह्मी देवा-
सारिखे माझ्या पाठीस कां लागतां? आणि माझ्या
मांसाने कां तुह्मी तृप्त होत नाहीं? २३ हंहंहं,
बर माझीं वचनें लिहिलीं; हंहंहं, जर तीं पत्रावर
कोरलीं; २४ जर तीं लोखंडाच्या खचरणीने
आणि शिशाने सर्वकालपर्यंत खडकांत खोदलीं, तर
बरें. २५ कां तर मी जाणतों कीं माझा उद्धर-
णारा जीवंत आहे, आणि अंत्यकालीं भूमीवर उ-
भा राहील. २६ आणि माझी त्वचा नष्ट झा-
ल्यानंतर जरी किड्यानी हें शरीर नासिलें तरी मी
आपल्या देहाच्या ठायीं देवाला पाहीन. २७
त्याला मी आपणासाठीं स्वतां पाहीन आणि मा-
झ्या स्थानीं दुसरा असें नाहीं, परंतु माझेच डोळे
अवलोकन करितील; जरी माझ्या उदरीं माझीं
आंतडीं नष्ट झालीं तरी. २८ तर तुह्मी ह्मणावें
कीं आपण कां त्याच्या पाठीस लागतों आणि
माझ्याठायीं काय वादाचें कारण सांपडलें आहे.
२९ तुह्मी तरवारीमुळें भयभीत असा, कां कीं
कोपाने तरवारीचीं शासनें होत असतात, न्याय
आहे हें तुह्मी जाणावें ह्मणून."

## अध्याय २०.

**म**ग जोफार नामाथी उत्तर करीत ह्मणाला,
२ "याकरितां मी उत्तर करीं असें माझ्या
कल्पना करितात, आणि यामुळें मी उतावळी क-
रितों. ३ म्या आपल्या निंदेचें गर्हण ऐकिलें
आहे, आणि माझ्या विवेकाचा आत्मा मला उत्तर
करितो. ४ आदीपासून जेव्हां मनुष्य पृथ्वीवर
ठेविलें गेलें तेव्हांपासून जें आहे हें तूं जाणत ना-
हींस काय? ५ कीं दुष्टांचा उत्सव अल्पकालिक
असतो, आणि अधार्मिकाचा हर्ष क्षणिक असतो.
६ जरी त्याचा उत्कर्ष आकाशापर्यंत चढला, आ-
णि त्याचें मस्तक आभाळासीं लागलें. ७ तरी
तो आपल्या विष्टेप्रमाणें सर्वकालपर्यंत नष्ट होईल,
ज्यानी त्याला पाहिलें आहे ते ह्मणतील, तो कोठें
आहे? ८ तो स्वप्नासारिखा उडून जाईल आणि
कोणालाहि सांपडणार नाहीं? होय, रात्रींतल्या
स्वप्नदर्शनाप्रमाणें तो उडविला जाईल. ९ जो
डोळा त्याला लक्षी तो पुन्हा त्याला लक्षणार
नाहीं, आणि त्याचें स्थान त्याला पुन्हा पाहणार
नाहीं. १० त्याचीं लेंकरें दरिद्र्यांला संतुष्ट करा-
याला झटतील, आणि त्याचे हात त्याचें द्रव्य
परत देतील. ११ त्याचीं हाडें त्याच्या तरुण-
पणाने भरलीं आहेत, आणि तीं त्यासीं धुळींत
पडून राहतील. १२ जरी दुष्टता त्याच्या मुखा-
ला गोड वाटली, जरी ती त्याने आपल्या जिभे-
खालीं लपविली. १३ जरी त्याने ती राखिली
आणि न सोडितां आपल्या तालूमध्यें अडकवून
ठेविली. १४ तरी त्याचें अन्न त्याच्या आंतड्यांत
बिघडलें आहे, तें त्यामध्यें फुरशांचें विष असें
आहे. १५ त्याने धन गिळिलें आहे आणि तें तो

ओकून देईल, देव तें त्याच्या उदरांतून घालवून
देईल. १६ तो फुरशांचें विष चोखील, कवड्या
सर्पाची जीभ त्याला मारून टाकील. १७ तो
नद्यांला, मध व लोणी यांच्या ओघळांला पाहणार
नाहीं. १८ तो आपलें श्रमफल परत देईल आणि
गिळणार नाहीं, आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्याचें
प्रतिदान होईल आणि तो उल्लासणार नाहीं. १९
त्याने दरिद्री पीडिले आणि त्यांस सांडिलें, आणि
जें घर त्याने बांधिलें नाहीं तें त्याने हरून घेतलें.
२० निश्चयें तो आपल्या पोटांत स्वस्थपणा अनुभ-
वणार नाहीं, जें त्याला गोड वाटत होतें तें तो
वांचविणार नाहीं. २१ त्याच्या अन्नांतलें कांहीं
उरत नाहीं ह्मणून त्याचें कुशल टिकणार नाहीं.
२२ त्याच्या पुष्कलतेच्या पूर्तींत त्याला संकट
पडेल, प्रत्येक कष्ट्याचा हात त्याजवर येईल. २३
जेव्हां तो आपलें पोट भरणार आहे तेव्हां देव
आपल्या क्रोधाची तीव्रता त्याजवर पडूं देईल,
त्याच्या भोजनाच्या वेळेस तो त्याजवर वृष्टि
करील. २४ तो लोखंडी शस्त्रापासून पळेल,
पित्तलाचें धनुष्य तीर त्याच्या अंगांतून आरपार
करील. २५ कोणी तो काढील आणि तो त्या-
च्या अंगांतून निघेल, होय, चमकती तरवार त्या-
च्या पित्तांतून पार जाईल, त्याजवर भयें येतील.
२६ सर्व प्रकारची विपत्ति त्याच्या निधींसाठीं
गुप्तरूपें सिद्ध आहे, जो अग्नि फुंकलेला नाहीं तो
त्याला खाऊन टाकील, जो पळाला तो त्याच्या
डेऱ्याचा फडशा करील. २७ आकाशें त्याचा
अन्याय प्रगट करितील, आणि पृथ्वी त्याजवर
उठेल. २८ त्याच्या घरची संपत्ति जाईल, त्या-
च्या क्रोधाच्या दिवसीं त्याचें द्रव्य गळून जाईल.
२९ दुष्ट मनुष्याला जो वांटा देवापासून प्राप्त
होत असतो आणि त्याचा जो विभाग देवाकडून
नेमिला जातो, तो असाच आहे."

## अध्याय २१.

मग ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "तुमचें सांत्वन हेंच होवो, आणि माझें
वचन कान देऊन ऐका. ३ मला बोलूं द्या ह्म-
णजे मी बोलेन, आणि मी बोलल्यानंतर तुह्मी
थट्टा करीत जा. ४ मी काय ह्मणूं! माझा वि-
लाप मनुष्याकडे आहे काय! जर असता तर
माझा आत्मा कां थकत नाहीं! ५ तुह्मी मज-
कडे पाहा आणि विस्मित व्हा, आणि आपल्या
मुखावर आपला हात ठेवा. ६ जर म्या स्मरण
केलें तर मी व्याकुळ होतों, आणि माझ्या अंगा-
ला कांपरी सुटती. ७ दुष्ट कां जीवंत राहतात!
ते वृद्ध होतात, होय, शक्तीनेंहि दृढ असतात.
८ त्यांची संतति त्यांजवळ त्यांच्या समक्ष आणि
त्यांचे वंश त्यांच्या दृष्टीपुढें स्थिर होतात. ९
त्यांचीं घरें निर्भय सुस्थित असतात, आणि दे-
वाची छडी त्यांजवर नसती. १० त्यांची गाय
गाभती आणि स्राव होऊं देत नाहीं, त्यांची
कालवड विती आणि गाभटत नाहीं. ११ ते
आपलीं पोरें कळपासारिखीं बाहेर पाठवितात, आ-
णि त्यांचीं लेंकरें नाचतात. १२ ते डफ व चंग
हातीं घेतात, आणि यंत्रवाद्याचा शब्द ऐकून हर्ष-
तात. १३ ते सुखांत आपलें आयुष्य दवडितात,
आणि क्षणांत कबरेंत उतरतात. १४ आणि ते
देवाला ह्मणतात, तूं आह्मापासून दूर जा, कां
कीं तुझ्या मार्गांचें ज्ञान आह्माला आवडत नाहीं.
१५ सर्वसमर्थ काय असा आहे कीं आह्मी त्या-
ची सेवा करावी! आणि त्याची प्रार्थना जर आ-
ह्मी केली तर आह्माला काय प्राप्ति होईल! १६
पाहा, त्यांचें कुशल त्यांच्या हातीं नाहीं, दुष्टांचा
संकल्प मजपासून दूर आहे. १७ दुष्टांचा दिवा
कितीदा विझून जातो आणि त्यांची विपत्ति त्यां-
जवर येती! देव आपल्या क्रोधाने पीडा वांटून
देतो. १८ ते वाऱ्यापुढें काडीसारिखे आणि वा-
दलाने उडविलेल्या भुसासारिखे आहेत. १९
देव त्याच्या अन्यायाचें फल त्याच्या लेंकरांसाठीं
ठेवितो, तो त्याला फल देईल हें तो जाणेल. २०
त्याचे डोळे त्याचा हाल पाहतील, आणि तो
सर्वसमर्थाच्या कोपांतला कांहींसा पिईल. २१
कां कीं त्याचे थोडे महिने विलुप्त झाले असतां
त्याच्या मागें त्याच्या घरांत काय त्याचा संतोष
होईल? २२ देव उन्मत्तांचा न्याय करितो, तर
कोणी त्याला ज्ञान शिकवील काय! [illegible]
अगदीं सुखी व शांत असतां आपल्या [illegible]
तच मरून जातो. २४ त्याच्या नाहीं [illegible]
भरलेल्या असत, आणि त्याचीं पाडि[illegible]

सर असत. २५ आणि दुसरा कांहीं सुख न भो-
गितां मनाच्या खेदांत मरून जातो. २६ ते सा-
रिखेच धुळींत आडवे पडतात, आणि किडे त्यांला
झांकितात; २७ पाहा, मी तुमच्या कल्पना जाणतों,
आणि माझा द्रोह करावा ह्मणून जे संकल्प तुह्मी
करितां तेहि. २८ कां कीं तुह्मी ह्मणतां, अधिप-
तीचें घर कोठें आहे? आणि दुष्टांचीं वस्तीस्थानें
कोठें आहेत? २९ तुह्मी वाटसरूला पुसलें नाहीं
काय? आणि त्यांचीं चिन्हें तुह्मी ओळखत नाहीं
काय? ३० कां कीं नाशाच्या दिवसासाठीं दुष्ट
राखिला जातो, ते रोषाच्या दिवसासाठीं बाहेर
आणिले जातील. ३१ त्याच्या तोंडावर त्याचा
मार्ग कोण प्रगट करील? आणि त्यानें जें केलें
आहे त्याचें फल त्याला कोण देईन? ३२
तथापि तो कबरांकडे नेला जाईल, आणि थड्यांत
ठेविला जाईल. ३३ खोऱ्याचीं ढेंकळें त्याला
गोड वाटतील, आणि त्यानंतर प्रत्येक मनुष्य
त्याचें धारण करील आणि त्यापूर्वी असंख्य आ-
हेत. ३४ तुमच्या उदरांत कपट राहतें, तर
मग तुह्मी कसे व्यर्थ माझें सांत्वन करितां!"

## अध्याय २२.

मग एलीफाज तेमानी उत्तर करित ह्मणाला,
२ "जसा बुद्धिमान आपणाला हितकारक अ-
सेल तसा मनुष्य देवाला हितकारक होईल काय?
३ तूं सात्विक आहेस ह्मणून सर्वसमर्थाला
संतोष वाटेल काय? अथवा तूं आपले मार्ग
यथार्थ करितोस यामुळें त्याला लाभ होईल
काय? ४ तो तुला भिऊन तुह्मी शिक्षा करील
काय? तो तुजसीं न्यायविवाद करील काय? ५
तुझी दुष्टता फार आणि तुझे अन्याय अनंत ना-
हींत काय? ६ कां कीं त्वां निष्कारण आपल्या
भावापासून गहाण घेतलें आहे, आणि उघड्यांचीं
वस्त्रें काढून घेतलीं आहेत. ७ तूं तान्हेल्याला
पाणी प्यावयाला देत नसस, आणि भुकेल्यापासून
अन्न अडकवून ठेवीत असस. ८ परंतु बलवान
मनुष्याला भूमि असती, आणि थोर तींत वसत
असतो. ९ त्वां विधवा रिकाम्या आऊं दिल्या
आहेत, आणि पोरक्यांचे बाहु मोडिले आहेत.
१० यामुळें पाश तुजभोंवते आहेत, आणि भय
अकस्मात तुला व्याकुल करितें. ११ अथवा अं-
धकारामुळें तुला दिसत नाहीं, आणि फार पाणी
तुला झांकितें. १२ देव आकाशांच्या उच्चतेवर
नाहीं काय? आणि तारे कीति उंच आहेत ते
पाहा. १३ आणि तूं ह्मणालास कीं, देव कसा
जाणतो? तो मेघतिमिराच्या आड न्याय करूं
शकतो काय? १४ निबिड मेघ त्याला झांकन आ-
हेत ह्मणून त्याला दिसत नाहीं, आणि तो आकाश
मंडलांत वर्त्ततो. १५ ज्या पुरातन मार्गांत दुष्ट
मनुष्य चालत असत त्याला त्वां लक्षिलें आहे
काय? १६ ते अकालीं नाहींसे झाले, त्यांचा
पाया पुरानें ढांसळला. १७ ते देवाला ह्मणत,
तूं आह्मापासून दूर जां; आणि त्याचें सर्वसमर्थ
काय करील? १८ तथापि तो त्यांचीं घरें उत्तम
वस्तूंनी भरीत असे, परंतु दुष्टांचा संकल्प मजपा-
सून दूर आहे. १९ सात्विक हें पाहून हर्षतात
आणि निर्दोष त्यांस उपहासतो. २० निश्चयें
आमचा शत्रु विलुप्त झाला आहे, आणि त्याचा
उत्कर्ष अग्नीनें खाला आहे. २१ तूं त्याची ओ-
ळख करून घे आणि सुखी हो, तेणेंकरून तुला
कुशल प्राप्त होईल. २२ त्याच्या मुखापासून
धर्मविधि घे, आणि त्याचीं वचनें तूं आपल्या हृद-
यांत ठेव. २३ सर्वसमर्थाकडे जर फिरसील
तर तो तुला स्थापील, तूं आपल्या डेऱ्यापासून अ-
न्याय दूर करसील. २४ आणि तूं रुपें धुळी-
सारिखें आणि ओफिरोचें सोनें ओघांतल्या दग-
डांसारिखें जमा करसील. २५ ह्मणजे सर्वस-
मर्थ तुझें बहुद्रव्य असा होईल, आणि तुला
निधींचें रुपें होईल. २६ कां कीं तेव्हां सर्व-
समर्थाविषयीं आनंदसील आणि आपलें मुख
देवाकडे उंचाविसील. २७ तूं त्याला प्रार्थिसील
तेव्हां तो तुझें ऐकेल, आणि तूं आपले नवस फे-
डिसील. २८ आणि तूं गोष्ट संकल्पिसील तेव्हां
ती तुझी ठरेल, आणि उजेड तुझ्या मार्गांवर प्र-
काशेल. २९ कोणी तुला पीडिलें ह्मणजे तूं
ह्मणसील कीं, उंचावणें आहे, आणि तो गरीब
माणसाला तारील. ३० तो निर्दोषाला मुक्त
करील, आणि तुझ्या हाताच्या स्वच्छतेनें तो मुक्त
केला जाईल.

## अध्याय २३.

मग ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "अझून माझा विलाप कडू आहे, माझ्या
कण्हण्यामुळें माझा हात जड आहे. ३ हंहंहं,
तो मला कोठें सांपडेल, असें जर मला कळलें
तर बरें; अशासाठीं कीं म्या त्याच्या आसनाजव-
ळच जावें. ४ ह्मणजे मी त्यासमोर आपला वाद
निवेदीन, आणि आपलें मुख वादसाधनांनी भरीन.
५ ज्या वचनांनी तो मला उत्तर करील तीं मी
जाणेन, आणि तो मला काय ह्मणेल तेंहि सम-
जेन. ६ तो महापराक्रमाने मजसीं विवाद करील
काय? नाहीं, परंतु तो शक्ति माझ्यांत ठेवील.
७ तेथें यथार्थ जनाने त्यासीं विवाद करावा ह्म-
णजे मी आपल्या न्यायाधीशापासून सर्वकालपर्यंत
मुक्त होईन. ८ पाहा, मी पुढें चाललों तरी तो
सांपडत नाहीं, आणि मागें चाललों तरी तो मला
दिसत नाहीं. ९ जेथें तो कर्म करितो तेथें
डाव्याकडे मी चाललों तरी माझ्याने त्याला पाह-
वत नाहीं, उजव्याकडे तो आपणाला समावृत्त
करितो ह्मणून तो मला दिसत नाहीं. १० परंतु
माझा मार्ग त्याला कळला आहे, त्याने मला पार-
खिलें ह्मणजे मी सोन्याप्रमाणें निघेन. ११ मा-
झ्या पायाने त्याचीं पावलें धरिलीं आहेत, त्याच्या
मार्गांत मी जपून चालत आलों आहें, वळलों
नाहीं. १२ त्याच्या ओंठांच्या आज्ञेप्रमाणें चा-
लून म्या ती सोडिली नाहीं, म्या आपल्या अन्ना-
पेक्षां त्याच्या मुखाचीं वचनें अधिक संभाळिलीं
आहेत. १३ परंतु त्याचा संकल्प एकच आहे
तर त्याला कोण फिरवूं शकेल? आणि त्याच्या
जिवाने जें इच्छिलें तेंच तो करितो. १४ कां
कीं मजविषयीं जें ठरलें आहे, तें तो साधितो,
आणि त्याजवळ बहुत अशा गोष्टी आहेत. १५
ह्मणून त्याजमुळें मी घाबरा आहें, म्या ध्यान
केलें ह्मणजे त्याजपुढें मी भयभीत होतों. १६
होय, देवाने माझें हृदय लीन केलें आहे, आणि
**सर्वसमर्थाने** मला भेडविलें आहे. १७ कां
कीं मी अंधकाराच्या पूर्वीं नाहींसा झालों नाहीं,
आणि त्याने माझ्या मुखापासून काळोख झांकिला
नाहीं."

## अध्याय २४.

"सर्वसमर्थापासून समय गुप्त नाहींत, तर जे
त्याला जाणतात ते त्याच्या दिवसाला कां
पाहत नाहींत? २ कित्येक सीमा सारितात,
कळप हरून चारितात. ३ ते अनाथांचा गाढव
नेतात, आणि विधवेचा बैल गहाणवट घेऊन ठेवि-
तात. ४ ते निर्धनाला मार्गांतून ढकलून देतात,
पृथ्वींतल्या दरिद्र्यांला एकत्र लपावें लागतें. ५
पाहा, जसे रानांतले गाढव तसे ते आहार शो-
धीत आपल्या कामासाठीं बाहेर जातात, त्यांला
व त्यांच्या लेंकरांला अरण्य अन्नासाठीं दिल्हें
आहे. ६ ते प्रत्येक आपलें धान्य शेतांत कापि-
तात, आणि दुष्टाच्या मळ्यांतलीं द्राक्षें तोडून
घेतात. ७ ते उघड्यांला रात्रीं वस्त्रांवांचून आणि
थंडींत पांघरुणावांचून राहूं देतात. ८ ते पर्व-
तांतल्या वृष्टीने भिजतात, आणि आश्रय नाहीं
ह्मणून खडकास लगटतात. ९ ते अनाथाला स्त-
नापासून हरून घेतात, आणि दरिद्र्यापासून गहाण
घेऊन ठेवितात. १० त्यांला वस्त्र नाहीं ह्मणून
ते उघडे चालतात, आणि भुकेले आहेत ह्मणून
मूठभर धान्य घेतात. ११ ते आपल्या भिंतींच्या
आंत तेल काढितात, द्राक्षारस पात्रांत तुडवून
तान्हेले राहतात. १२ मनुष्यें नगरांतून कण्हतात
आणि क्षतांचा जीवात्मा आरोळी मारितो, तथापि
देव त्यांला मूर्खपणाचा दोष ठेवीत नाहीं. १३ जे
प्रकाशावर बंड करितात त्यांतले ते आहेत, ते त्या-
च्या मार्गाला अंगीकारीत नाहींत आणि त्याच्या वा-
टांत राहत नाहींत. १४ घातक पाहटे उठून दीन
व दरिद्री यांला वधितो, आणि रात्रीं चोरासारि-
खा असतो. १५ जारकर्म्यांचा डोळा सायंकाळीं
जपतो, कोणत्याहि डोळ्याने मला न पाहावें, असें
ह्मणून तो आपलें मुख झांकितो. १६ अंधकारांत
ते खणून घरें फोडितात, दिवसा ते आपणाला
कोंडून घेतात, ते प्रकाश जाणत नाहींत. १७
कां कीं त्यांस सकाळ केवळ मृत्युच्छाया असें
असतें, कोणी त्याला ओळखिलें ह्मणजे ते मृत्यु-
च्छायेच्या भयांत पडतात. १८ तो जलावरला
हलका पदार्थ असा आहे, पृथ्वींत त्यांचा विभाग
शमलेला आहे, तो द्राक्षींच्या मळ्याच्या वाटेकडे

पाहत नाहीं. १९ अवग्रह व उष्ण हिमजलास
नाहींसें करितात, तसेंच पाप करणाऱ्यास कबर
नाहींसें करिती. २० गर्भस्थान त्याला विसरेल,
किडा रुचीने त्याला खाईल, तो पुढें स्मरला जा-
णार नाहीं, आणि अन्यायवृक्षासारिखा मोडिला
जाईल. २१ जी वांझ प्रसवत नाहीं, तिला तो
उपद्रव करितो, आणि विधवेचें हित करीत नाहीं.
२२ तो आपल्या पराक्रमाने बलवानांस ओढून
घेतो, तो उठतो तेव्हां कोणी आपल्या जिवावर
भरंवसा ठेवीत नाहीं. २३ निर्भय राहावें हें
त्याला दिल्हें आहे ह्मणून तो भरंवसा धरितो,
तथापि त्याचे डोळे त्यांच्या मार्गांवर आहेत. २४
ते अल्पकाल उंचाविले जातात मग नाहींसे हो-
तात, सर्वांसारिखे ते मरतात आणि कणसांच्या
टोंकांप्रमाणें नाहींसे होतात. २५ आणि असें
जर नसलें तर कोण मला लवाड ठरवील आणि
माझें वचन व्यर्थ करील?"

## अध्याय २५.

मग बिल्दाद शूही उत्तर करीत ह्मणाला,
२ "त्याजवळ प्रभुत्व व भय आहेत, तो
आपल्या उंच स्थानांत स्वस्थपणा करितो. ३
त्याच्या सैन्याची कांहीं संख्या आहे काय? आणि
त्याचा प्रकाश कोणावर उगवत नाहीं? ४ तर
मनुष्य देवाजवळ कसा न्यायी ठरेल? आणि जो
स्त्रियेपासून जन्मलेला तो कसा स्वच्छ निघेल?
५ चंद्रहि पाहा, तो प्रकाशत नाहीं, होय, त्याच्या
दृष्टींत तारे स्वच्छ नाहींत. ६ तर मनुष्य जो
किडा आणि मनुष्यसंतान जो कृमि तो कसा स्व-
च्छ निघेल?"

## अध्याय २६.

तेव्हां ईयोब उत्तर करीत ह्मणाला,
२ "त्वां अशक्ताचें सहाय कसें केलें? अब-
लाचा भुज त्वां कसा दृढ केला आहे? ३ त्वां
निर्बुद्धीला कसा उपदेश केला? आणि सबोध त्वां
बहुशः कसा दाखविला आहे? ४ कोणाला त्वां
वचनें सांगितलीं आहेत? आणि तुजपासून को-
णाचा श्वास निघाला? ५ पितर थरथरतात,
खालतीं जलें व त्यांतले निवासीहि. ६ त्यास-
मोर नरक उघडा आहे, आणि नाशाशयावर कांहीं
झांकण नाहीं. ७ त्याने उत्तराकाश शून्यावर पस-
रिलें, आणि पृथ्वी निराधार टांगली आहे. ८
तो आपल्या निबिड मेघांत जलें कोंडितो, आणि
त्याखालीं आभाळ फाटत नाहीं. ९ त्याने आ-
पल्या सिंहासनाचें मुख समावृत केलें, आणि त्या-
जवर आपलें आभाळ विस्तारिलें आहे. १०
दिवस व रात्रि समाप्तीस येत तोंपर्यंत त्याने जलें
सीमेने नेमिलीं आहेत. ११ त्याच्या धमकीमुळें
आकाशाचे खांब कांपतात व घाबरतात. १२
तो आपल्या पराक्रमाने समुद्र दुभागितो, आणि
आपल्या बुद्धीने लहरा दाबून शांत करितो. १३
त्याने आपल्या आत्म्याकडून आकाशें शोभिवंत
केलीं आहेत, त्याच्या हाताने वळवळता सर्प घडि-
ला आहे. १४ पाहा, हे त्याच्या मार्गांचे अंचल
आहेत, आणि त्याजविषयीं कसा अल्पाल्पशब्द
ऐकिला आहे तर त्याच्या बलाची गर्जना कोण
समजेल?"

## अध्याय २७.

ईयोब आपलें वचन पुन्हा आरंभून ह्मणाला,
२ "ज्या देवाने माझा वाद दूर केला आहे
आणि ज्या सर्वसमर्थाने माझा जीव खिन्न केला
आहे, त्याच्या जिवाची शपथ मी वाहतों कीं, ३
जोंपर्यंत माझा श्वास माझ्याठायीं असेल आणि
देवाचा आत्मा माझ्या नाकपुड्यांत असेल, ४
तोंपर्यंत निश्चयें माझे ओंठ अन्याय बोलणार ना-
हींत, आणि माझी जीभ कपट उच्चारणार नाहीं.
५ म्या तुह्माला सत्यवादी ह्मणावें असें मला
होऊं नये, मी प्राण सोडींपर्यंत मी आपलें यथा-
र्थपणा आपणापासून दूर करणार नाहीं. ६ म्या
आपला सात्विकपणा धरिला आहे, तो मी सोडणार
नाहीं, मरणापर्यंत माझें हृदय मजवर दोष आण-
णार नाहीं. ७ माझा वैरी दुष्टासारिखा आणि
माझा शत्रु अन्यायासारिखा होईल. ८ कां कीं
देवाने अधार्मिकाचा जीव विच्छिन्न करून नेला
तेव्हां त्याची आशा काय होईल? ९ तो संक-
टांत पडला तेव्हां देव त्याची आरोळी ऐकेल
काय? १० तो सर्वसमर्थाविषयीं आनंदेल

काय? तो देवाला सर्वदा आरोळी करील काय?
११ जें देवाच्या सत्तेंत आहे तें मी तुह्माला
शिकवीन, जें सर्वसमर्थाजवळ आहे तें मी गुप्त
राखणार नाहीं. १२ पाहा, तुह्मी सर्वांनी हें
पाहिलें आहे, तर तुह्मी कां असे केवळ निरर्थक
आहां? १३ देवाकडे दुष्ट मनुष्याचा वांटा आणि
सर्वसमर्थापासून जो विभाग बळात्कार्‍यांला प्राप्त
होईल तो हाच आहे. १४ जर त्याचीं लेंकरें
बहुत झालीं तर तरवारीसाठीं झालीं, आणि त्या-
ची संतति भाकरीने तृप्त होणार नाहीं. १५
त्याचे जे वांचलेले ते मरून पुरिले जातील, आणि
त्याच्या विधवा रडणार नाहींत. १६ जर तो
धुळीप्रमाणें रुपें सांठवील आणि मातीप्रमाणें वस्त्र
सिद्ध करील, १७ तर सिद्ध करो, परंतु सात्विक
तें धारण करील, आणि निर्दोष तें रुपें वांटून देईल.
१८ त्याने कसरीप्रमाणें आणि जी झोंपडी शेत
राखणारा करीत असतो, त्यासारिखें आपलें घर
बांधिलें आहे. १९ धनवान अडवा पडेल परंतु
त्याला जमा करणार नाहींत, त्याने आपले डोळे
उघडिले ह्मणजे तो नाहीं. २० भयें पाण्यासा-
रिखीं त्याला लागतील, रात्रीं वाहवटळ त्याला
हरून नेईल. २१ पूर्वेचा वारा त्याला घेऊन
जाईल, आणि त्याला वादळासारिखा त्याच्या
स्थानांतून उडवील. २२ तो त्याला तीर मारील
आणि दया करणार नाहीं; तो त्याच्या हातापासून
पळायास झटेलच झटेल. २३ तो त्याजवर
टाळ्या वाजवील आणि छी छी करून त्याला
त्याच्या स्थानांतून घालवील."

## अध्याय २८.

"तर रूप्यासाठीं खाण आणि सोन्यासाठीं गा-
ळण्याचें स्थान आहे. २ लोखंड भूमींतून
काढिलें आहे, आणि दगडांतून पित्तळ गाळिलें
जातें. ३ तो अंधकारासाठीं सीमा नेमितो, आणि
सर्व पूर्णपणा शोधून पाहतो, काळोखाचे दगड व
मृत्युच्छाया हींहि शोधितो. ४ जे कडे पाया-
च्या वहिवाटीवांचून झुकतात, मनुष्यावांचून तोल-
तात, त्यांतून नदी सुटली. ५ भूमींतून अन्न
उत्पन्न होतें आणि तिजखालीं अग्नीसारिखें कांहीं
उकळतें. ६ तींतले दगड नीलमण्यांच्या जागा आ-
हेत, आणि तींत सोन्याची धूळ आहे. ७ ज्या-
ला घार ओळखत नाहीं आणि गीधाच्या डोळ्याने
पाहिलें नाहीं, असा एक मार्ग आहे. ८ त्यांत
सिंहाचीं पिलें कधीं चाललीं नाहींत आणि सिंह
त्याकडून कधीं गेला नाहीं. ९ तो खडकाला
आपला हात लावून पर्वतांला समूल उलंडून टा-
कितो. १० खडकांमध्यें नद्या सुटत असें तो
करितो, आणि त्याचा डोळा हरएक मोलवान प-
दार्थ पाहतो. ११ नद्या न वाहाव्या ह्मणून तो
त्या बंद करितो, आणि जें गुप्त तें प्रकाशांत बाहेर
आणितो. १२ परंतु ज्ञान कोठें सांपडेल? आणि
बुद्धीची जागा कोठें आहे? १३ मनुष्य त्याचें
मोल जाणत नाहीं, आणि तें जीवंतांच्या भूमींत
सांपडत नाहीं. १४ अगाध जलाशय ह्मणतो, तें
माझ्याठायीं नाहीं; आणि समुद्र ह्मणतो, तें मज-
वळहि नाहीं. १५ जरी सोनें दिल्हें तरी तें
मिळणार नाहीं, आणि त्याच्या मोलाजोगें रुपें
तोलायाचें नाहीं. १६ ओफीराचें सोनें, मोलवान
श्वेतधातु व नीलमणी यांसीं तें बरोबर मानायाचें
नाहीं. १७ सोनें व काचमणी त्याबरोबरीस
येत नाहींत, आणि त्याचा मोबदला उत्कृष्ट सो-
न्याच्या अलंकारानी व्हायाचा नाहीं. १८ पोवळें
व मोतीं यांचीं नांवें घ्यायाचीं नाहींत, कां तर
माणिकांच्या मोलापेक्षां ज्ञानाचें मोल श्रेष्ठ आहे.
१९ खूशाचा पीतमणि त्याबरोबर नाहीं, आणि
स्वच्छ सोन्यासीं तें बरोबर गणायाचें नाहीं. २०
तर ज्ञान कोठून यायाचें? आणि बुद्धीची जागा
कोठें आहे? २१ कां तर तें प्रत्येक जीवंताच्या
दृष्टीपासून गुप्त आहे, आणि आकाशांतल्या पक्ष्यां-
पासूनहि लपून ठेविलें आहे. २२ नाश व मरण
ह्मणतात, आह्मी आपल्या कानानी त्याची कीर्त्ति
ऐकिली आहे. २३ देव त्याचा मार्ग समजतो,
तोच त्याची जागा जाणतो. २४ कां कीं तो
पृथ्वीच्या सीमा अवलोकितो आणि सगळ्या आ-
काशाखालीं पाहतो. २५ जेव्हां त्याने वार्‍यासाठीं
वजन नेमिलें आणि पाणीं परिमाणाने तोलिलीं;
२६ जेव्हां त्याने पर्जन्यासाठीं नियम आणि ग-
र्जनेच्या विजेसाठीं मार्ग केला. २७ तेव्हां त्याने
तें पाहून सांगितलें, त्याने तें सिद्ध केलें होय,
त्याचा शोधहि केला. २८ आणि मनुष्याला

म्हटलें, पाहा, प्रभूची सद्भीति हीच ज्ञान, आणि
दुष्कर्म सोडणें बुद्धि आहे."

## अध्याय २९.

आणि ईयोब आपलें वचन पुन्हा आरंभून म्ह-
णाला, २,३"हंहंहं, गेल्या महिन्यांत ज्या
दिवसांत देव माझें संरक्षण करीत होता, जेव्हां
त्याचा दीप माझ्या डोक्यावरतीं प्रकाशत होता
आणि त्याच्या प्रकाशानें मी अंधकारांतून चालत
असें, तेव्हां जसा मी होतों तसा जर आतां अ-
सतों तर बरें. ४ जसा मी आपल्या तरुणपणा-
च्या दिवसांत होतों तसा जेव्हां देवाची मित्रता
माझ्या डेऱ्याकडे होती, ५ जेव्हां सर्वसमर्थ
मजसहित होता आणि माझीं लेंकरें मजभोंवतीं
होतीं, ६ जेव्हां मी आपलीं पावलें सायीनें धूत
असें आणि खडक मजसाठीं तेलनद्या वाहूं देई.
७ जेव्हां मी निघून द्वारांतून नगरांत जाई, आणि
आपलें आसन चौकांत स्थापीं, ८ तेव्हां तरणे
मला पाहून लपत आणि म्हातारे उठून उभे राहत.
९ अधिपति आपली वाचा बंद करीत आणि आ-
पल्या मुखावर हात ठेवीत. १० श्रेष्ठजन उगेच
राहत, आणि त्यांची जीभ त्यांच्या तालूस चि-
कटे. ११ कान माझें ऐकून मला धन्य म्हणे,
डोळा मला पाहून मजसाठीं साक्ष देई. १२
१२ कां कीं मी आरोळी करणाऱ्या दीनाला व
अनाथाला आणि ज्याचें सहाय करायाला कोणी
नव्हता, त्याला मुक्त करीं. १३ जो नाशाच्या
लागास आला होता त्याचा आशीर्वाद मजवर
येई, आणि मी विधवेचें हृदय आनंदामुळें गायन
करी असें करीं. १४ मीं सात्विकपणा परिधान
करीं आणि तें मला झांकी, झगा व मुगूट यांप्रमाणें
माझा न्याय असे. १५ मी आंधळ्याला डोळे
आणि पांगळ्याला पाय असें. १६ मी दरिद्र्यांला
बाप असें, आणि जो विवाद मी समजलों नाहीं
त्याचा शोध करीं. १७ आणि मी बलात्काऱ्या-
ची हनु मोडीं, आणि त्याच्या दांतांमधून लूट
काढून टाकीं. १८ आणि मी आपल्या वस्तींत
प्राण सोडीन आणि आपले दिवस वाळूप्रमाणें
वाढवीन असें म्हणें. १९ माझें मूळ पाण्याकडे
पसरलेलें होतें आणि दहिंवर सर्व रात्र माझ्या
डाहळीवर राही. २० माझें गौरव माझ्याठायीं
ताजें असे, आणि माझें धनुष्य माझ्या हातांत नव्य
होई. २१ लोक माझें ऐकत आणि वाट पाहत,
आणि उगीच राहून माझ्या संबोधाकडे कान देत.
२२ मी बोलल्यानंतर ते प्रत्युत्तर करीनात, आणि
माझें वचन त्यांजवर गळे. २३ आणि ते जशी
पर्जन्याची तशी माझी वाट पाहत आणि जसे
उत्तरपर्जन्यासाठीं तसे ते आपलें तोंड पसरीत.
२४ जरी मी त्यांस हांसलों, तरी ते हें विश्वासेनात
आणि माझें मुखतेज उतरीनात. २५ मी त्यांचा
मार्ग निवडून काढीं आणि मुख्य बसें, होय जसा
राजा सैन्यांत तसा मी बसें, जो शोक करणाऱ्याचें
सांत्वन करितो तो जसा तसाहि."

## अध्याय ३०.

"परंतु जे मजपेक्षा लाहान वयाचे आहेत, त्यांचे
बाप मी आपल्या कळपाच्या कुत्र्यांसहित ठे-
वायाला मान्य होईना, ते मला हांसतात. २ होय,
ज्यांचें वृद्धत्व दुर्गत झालें, त्यांच्या हातांची शक्ति
माझ्या काय कामाची! ३ जी भूमि ओसाड व
उद्ध्वस्त झाली, तिजकडे ते दरिद्रानें व भुकेनें पळून
जातात. ४ ते झुडपांजवळचे पाले खुडून घेत
आणि झुडपांचीं मुळें त्यांचें अन्न असत. ५ ते
मनुष्यांमधून घालविले गेले, त्यांची जसी चोराची
तसी लोकांनी हुर्यो हुर्यो केली. ६ त्यांनी खो-
ऱ्यांच्या कडांत, भूमींतल्या गुहांत व खडकांत वस्ती
करावी म्हणून. ७ ते झुडपांमध्यें गाढवांसारिखे
ओरडत, कांट्यांच्या झाडांखालीं एकत्र मिळत
असत. ८ ते मूर्खांचे लेंक, होय अधमाचे लेंक
होते, ते पृथ्वींतून हुसकले गेले. ९ परंतु आतां
मी त्यांचें गीत झालों आहें; होय, मी त्यांची म्हण
झालों आहें. १० ते मला कंटाळतात, मजपा-
सून दूर राहतात आणि माझ्या मुखावर थुंकाया-
ला भीत नाहींत. ११ त्यानें माझी दोरी फेडून
मला पीडिलें आहे म्हणून त्यांनी मजसमोर लगाम
सोडिला आहे. १२ माझ्या उजव्या हाताकडे
तरणे उभे राहतात, ते माझे पाय ढकलितात
आणि मजविरुद्ध आपले बाधकमार्ग बांधितात.
१३ ते माझी वाट बिघडितात, माझी विपत्ति वाढ-
वितात, त्यांला सहाय करणारा नाहीं. १४ ते

पसरट पुरासारिखे मजवर आले, झपाट्याने ते
मजवर लोटले. १५ भयें मजवर फिरलीं, ते
वाऱ्यासारिखे माझ्या पाठीस लागतात, आणि
माझें कुशल मेघाप्रमाणें उडून जातें. १६ आणि
आतां माझ्याठायीं माझा जीव वितळून गेला आहे,
मला पीडेचे दिवस लागले आहेत. १७ रात्रीं
माझीं हाडें माझ्याठायीं वेधिलीं जातात, आणि
माझ्या शिरा शांत होत नाहींत. १८ माझ्या
रोगाच्या मोठ्या बलाने माझीं वस्त्रें बदललीं आ-
हेत, माझ्या अंगरख्याप्रमाणें तीं मला बांधितात.
१९ त्याने मला चिखलामध्यें टाकिलें आहे, आणि
धूळ व राख यांसारिखा मी झालों आहें. २०
मी तुला आरोळी मारितों परंतु तूं उत्तर करीत
नाहींस, मी उभा राहतों तथापि तूं मला मानीत
नाहींस. २१ तूं मजवर क्रूर झाला आहेस, तूं
आपल्या हाताच्या बलाने माझा द्वेष करितोस.
२२ तूं मला वाऱ्यावर टाकितोस, तूं मला त्याज-
वर वाहवितोस, आणि माझें सत्व नितळितोस.
२३ तर मी जाणतों कीं मरणाकडे आणि जें घर
सर्व जीवंतांसाठीं नेमिलेलें आहे त्यांत मला फिर-
विसील. २४ तथापि विनंती चालायाची नाहीं,
जरी त्याच्या नाशामुळें त्यांनी आरोळी केली तरी
तो आपला हात पसरील. २५ निश्चयें संकटांत
पडलेल्यासाठीं मी रडत नसे काय! दरिद्र्यामुळें
माझा जीव खिन्न असे. २६ जेव्हां म्यां कुश-
लाची वाट पाहिली तेव्हां अरिष्ट आलें, आणि
प्रकाशाची आशा धरिली तेव्हां काळोख आला.
२७ माझीं आंतडीं उकळत आणि शांत होईनात,
पीडेचे दिवस मजपुढें आले. २८ मी निस्तेज
होऊन सूर्यविरहित शोक करीन, मी सभेंत उभा
राहून आरोळी करीं. २९ मी अजगरांचा भाऊ
आणि घुबडांचा मित्र झालों आहें. ३० मजव-
रली माझी त्वचा काळी झाली आहे, आणि उष्ण-
तेने माझीं हाडें जळतात. ३१ आणि माझ्या
चंगाचा शोक झाला आणि माझें यंत्रवाद्य रडणा-
ऱ्यांचा शब्द झाला आहे."

## अध्याय ३१.

"म्यां कुमारिकडे चित्त न लावावें ह्मणून
म्यां आपल्या डोळ्यांसीं करार केला.
२ कां तर वरतून देवाकडचा वांटा आणि उंचून
सर्वसमर्थाकडचा विभाग काय आहे? ३ अ-
न्यायाला नाश व दुष्कर्म्यांला भयंकर दशा प्राप्त
होत नाहीं काय? ४ तो माझे मार्ग पाहत नाहीं
काय? आणि माझीं सर्व पावलें गणीत नाहीं
काय? ५ जर मी खोटेपणाने वर्त्तलों आहें
आणि कपट करायाला माझ्या पायाने त्वरा केली
आहे, ६ तर देवाने माझा यथार्थपणा जाणावा
ह्मणून मला तंत तागडीने तोलावें. ७ जर माझें
पाऊल मार्गांतून वळलें आणि माझें हृदय जर
माझ्या डोळ्यांमागून गेलें आहे, अथवा माझ्या
हातांला जर कांहीं कलंक लागला आहे, ८
तर म्यां पेरावें आणि दुसऱ्याने खावें, आणि माझी
संतति उपटिली जावी. ९ जर माझें चित्त फ-
सून स्त्रीकडे लागलें, अथवा मी आपल्या शेजा-
ऱ्याच्या द्वारासीं जर टपलों. १० तर माझी
स्त्री दुसऱ्याचें दळो, आणि इतर पुरुष तिजसीं
निजोत. ११ कां कीं हें महापातक आहे, होय,
न्यायाधीशानी याचा दंड करावा, एवढा मोठा
अन्याय हें आहे. १२ कारण ज्या अग्नीने नाश
होईपर्यंत खावें आणि माझी सर्व संपत्ति उपटून
टाकावी, तो हें आहे. १३ जेव्हां माझ्या दा-
साने अथवा दासीने मजसीं वाद केला तेव्हां
म्यां जर त्यांचा न्याय तुच्छ मानिला, १४ तर
देव उठेल तेव्हां मी काय करूं? आणि त्याने
झडती केली ह्मणजे त्याला काय उत्तर देऊं!
१५ ज्याने मला पोटांत निर्माण केलें, त्याने त्याला
निर्माण केलें नाहीं काय? आणि एकानेच आह्मा
उभयतांस गर्भस्थानांत घडिलें नाहीं काय? १६
जर म्यां दरिद्र्यांला त्यांचा मनोरथ प्राप्त न व्हा-
वा ह्मणून अडकविलें, अथवा विधवेचे डोळे शि-
णविले, १७ जर म्यां एकट्यानेच आपला तुकडा
खाल्ला आणि अनाथाने त्यांतलें कांहीं खाल्लें नाहीं,
१८ (कां कीं माझ्या तरुणपणापासून तो जसा
बापाजवळ तसा मजजवळ वाढत आला आहे,
आणि मी आपल्या आईच्या उदरांतून आलों
तेव्हांपासून विधवेला संभाळीत आलों आहें)
१९ जर म्यां कोणाला वस्त्र नाहीं ह्मणून नाश
पावतां पाहिलें, अथवा दरिद्र्याला पांघरूण नाहीं
असें पाहिलें तर, २० तेव्हां त्याच्या कटीने

जर मला आशीर्वाद दिल्हा नाहीं, आणि माझ्या
मेंढरांच्या लोंकरीने जर त्याला ऊब आली नाहीं,
२१ जर वेसींत म्या आपलें सहाय पाहून अ-
नाथावर आपला हात उगारिला· २२ तर माझा
बाहु खांद्यापासून गळून पडो, आणि माझा भुज
हाडापासून तोडिला जावो. २३ कां कीं देवा-
पासून घडणारा नाश मला भयंकर झाला, आणि
त्याचें ऐश्वर्य माझ्याने साहवत नाहीं· २४ जर
म्या सोन्यावर आपली आशा ठेविली, अथवा, तूं
माझा भरंवसा आहेस, असें बर उत्कृष्ट सोन्या-
ला ह्मटलें, २५ माझें धन बहुत झालें आणि
माझा हात फार द्रव्य पावला आहे, ह्मणून जर
मी हर्षलों, २६ म्या सूर्याला प्रकाशतां व चं-
द्राला उजेडांत चालतां पाहिलें, २७ तेव्हां जर
माझें ह्रदय गुप्तपणें फसलें आणि माझा हात
माझ्या मुखाने चुंबिला; २८ तर हेंहि न्याया-
धीशाने दंडायाचा अन्याय असतें, कां कीं असें
करून म्या वरच्या देवाला नाकारिलें असतें·
२९ जर मी आपल्या वैऱ्याच्या नाशामुळें हर्षलों,
अथवा त्याजवर अरिष्ट आलें तेव्हां जर मी
उल्हासलों, ३० त्याच्या जिवाला शाप व्हावा,
असें मागून म्या आपल्या मुखाला पाप करूं दिल्हें
नाहीं. ३१ त्याच्या मांसांतलें कांहींसें आह्माला
कोण देईल! आह्मी तृप्त होत नाहीं, असें जर
माझ्या डेऱ्यांतलीं मनुष्यें न ह्मणतीं, ३२ आ-
ळींतल्या वाटेंत विदेशी रात्री वस्ती करीत नसे,
मी आपलें दार वाटसरूला उघडीं, ३३ जर
म्या आपला अन्याय आपल्या उरांत गुप्त राखून
आदामाप्रमाणें आपलीं पातकें झांकिलीं· ३४ तर
म्या मोठ्या समुदायामुळें थरथरावें आणि कुळां-
च्या धिक्काराने मला भेडवावें, आणि म्या मौन ध-
रावें आणि दारांतून बाहेर न जावें· ३५ हंहंहं,
बर कोणी माझें ऐकिलें तर बरें; माझें प्रमाण पा-
हावें ह्मणून सर्वसमर्थाने मला उत्तर द्यावें
आणि माझ्या प्रतिवाद्याने वादपत्र लिहावें. ३६
ह्मणजे मी तें निश्चयें आपल्या खांद्यावर घेईन,
आणि मुगुटाप्रमाणें तें आपणाला बांधीन· ३७
मी आपल्या पाऊलांची संख्या त्याला दाख-
वीन, जसा अधिपति तसा मी त्याला जवळ येऊं
देईन· ३८ जर माझ्या भूमीने मजवर आरोळी
केली, अथवा तिचीं तासें रडलीं· ३९ जर
म्या पैका दिल्ह्यावांचून तिचा सार खाल्ला, अथवा
तिचे धनी आपला प्राण सोडीत असें म्या केलें·
४० तर गव्हांच्या स्थानीं कांटे आणि जवांच्या
स्थानीं निदण निघो, ईयोबाचीं वचनें समाप्त झालीं
आहेत·”

## अध्याय ३२·

तर त्या तिघा जनानी ईयोबाला उत्तर करायाचें
सोडिलें, कां कीं तो आपल्या दृष्टींत सात्विक
होता· २ मग बाराखेल बुजी जो रामाच्या
कुळांतला त्याचा पुत्र अलीहू याचा राग पेटला;
ईयोबावर त्याचा क्रोध तापला, कारण कीं त्याने
देवाला नाहीं, आपणाला सात्विक ह्मटलें· ३
त्याच्या तिघा मित्रांवरहि याचा क्रोध तापला,
कारण कीं त्यांला जरी कांहीं उत्तर सुचलें नाहीं
तरी त्यानी ईयोबाला दोषी ठरविलें होतें· ४ तर
जोंपर्यंत ईयोब बोलत होता तोंपर्यंत अलीहू उ-
गाच राहिला, कां कीं ते जन त्यापेक्षां ह्मातारे
होते· ५ तर त्या तिघा जनांच्या मुखांत कांहीं
उत्तर नाहीं, असें अलीहूने पाहिलें तेव्हां त्याचा
राग पेटला. ६ आणि बाराखेल बुजी याचा
पुत्र अलीहू उत्तर करीत ह्मणाला, “मी लाहान-
वयाचा आहें आणि तुह्मी ह्मातारे आहां ह्मणून
म्या भीड धरिली आणि आपलें मत तुह्माला
दाखवायाला भ्यालों· ७ मी ह्मणालों, फार
दिवसानी बोलावें आणि पुष्कळ वर्षांनी ज्ञान शिक-
वावें· ८ तथापि मनुष्याच्या ठायीं तोच आत्मा
आहे, आणि सर्वसमर्थाचा श्वास त्यांला बुद्धि
देतो· ९ मोठे मनुष्य ज्ञानी आहेत आणि ह्मा-
तारे न्याय समजतात असें नाहीं· १० ह्मणून
मी ह्मणालों, माझें ऐकावें, मीहि आपलें मत दाख-
वीन. ११ पाहा, म्या तुमच्या वाक्यांची वाट
पाहिली; काय बोलावें ह्मणून जोंपर्यंत तुह्मी
विचार करीत होतां तोंपर्यंत म्या तुमच्या वितर्कां-
कडे कान दिल्हा· १२ होय, म्या तुह्माकडे मन
लाविलें, आणि पाहा तुह्मांतल्या कोणत्यानेंहि ई-
योबाला कुंठित केलें नाहीं, आणि त्याच्या वचनां-
चें प्रत्युत्तर केलें नाहीं· १३ आपणाला ज्ञान
प्राप्त झालें असें तुह्मी न ह्मणावें ह्मणून मनुष्य

नाहीं परंतु देव त्याला कुंठित करिल. १४ तो
तर आपलीं वाक्यें रचून मजविरुद्ध बोलला नाहीं,
आणि तुमच्यीं वचनें बोलून मी त्याला उत्तर कर-
णार नाहीं. १५ ते विस्मय पावले, त्यांनी पुन्हा
उत्तर केलें नाहीं, त्यांनी बोलायाचें सोडिलें. १६
तर म्या वाट पाहिली असतां ते बोलेनात, आणि
उभे राहून पुन्हा उत्तर करीनात. १७ मीहि
आपल्या प्रकरणाचें उत्तर करीन, मीहि आपलें
मत दाखवीन. १८ कां कीं मी वाक्यांनी भर-
लेलों आहें, माझा अंतरात्मा माझें संपीडन करितो.
१९ पाहा ज्या उकळल्या द्राक्षारसाला सुटका
मिळत नाहीं त्यासारिखें माझें अंतर्याम आहे, तें
नव्या बुधल्यांप्रमाणें फाटण्याच्या लागास आलें
आहे. २० मी आराम पावावा ह्मणून बोलेन,
मी आपले ओंठ उघडून उत्तर करीन. २१ म्या
कोणीएका मनुष्याचा पक्षपात धरूं नये, आणि
कोणीएकाचें आर्जव करूं नये. २२ म्या आर्जव
करावें असें मी जाणत नाहीं, अल्पकालानें माझा
उत्पन्नकर्त्ता मला घेऊन जाईल."

## अध्याय ३३.

"तर हे ईयोबा, माझीं वाक्यें ऐक, आणि मा-
झ्या सर्व वचनांकडे कान दे. २ पाहा,
म्या आपलें मुख उघडिलें आहे, माझ्या तालूमध्यें
माझी जीभ बोलूं लागली आहे. ३ माझ्या हृद-
याच्या यथार्थतेनें माझीं वचनें होतील आणि माझे
ओंठ ज्ञान स्पष्ट बोलतील. ४ देवाच्या आत्म्यानें
मला उत्पन्न केलें, आणि सर्वसमर्थाच्या श्वासानें
माझ्याठायीं जीव घातला. ५ जर समर्थ आहेस
तर मला प्रत्युत्तर कर, मजसमोर आपली वाद-
रचना कर, उभा ठाक. ६ पाहा, मी तुझ्या इच्छे-
प्रमाणें देवापुढें आहें, मीहि मातीचा घडलेला
आहें. ७ पाहा, माझें भय तुला भेडावणार नाहीं,
आणि माझा हात तुजवर भारी असणार नाहीं.
८ माझ्या कानीं पडायाजोगें तूं असें ह्मणालाच
आहेस आणि असा तुझ्या वचनांचा शब्द म्या
ऐकिला आहे कीं, ९ मी निर्मल निरपराध आहें,
मी स्वच्छ आहें आणि माझ्या ठायीं अन्याय ना-
हीं. १० पाहा, तो मला उपद्रव करण्याचीं कारणें
म्या पुला आपला वैरी मानितो. ११ तो
माझे पाय खोड्यांत घालितो, तो माझ्या सर्व वा-
टांला जपतो. १२ पाहा, यांत तूं सात्विक ना-
हींस, देव मनुष्यापेक्षां थोर आहे, असें मी तुला
उत्तर करितों. १३ तूं त्यासीं कां विवाद करि-
तोस? तो तर आपल्या कोणत्याहि कार्याचें कारण
कळवीत नाहीं. १४ कां कीं देव एकदां गोष्ट बो-
लतो आणि दोनदां तिचा विचार करीत नाहीं.
१५ स्वप्नांत रात्रींतल्या दृष्टांतांत पलंगावरल्या
गाढनिद्रांत जेव्हां मनुष्याला निद्रा पडली आहे,
१६ तेव्हां तो मनुष्यांचा कान उघडितो, त्यांचा
संबोध ठसवितो. १७ अशासाठीं कीं त्यानें मनु-
ष्य आपलें कार्य सोडी असें करावें, आणि पुरुषा-
पासून गर्व झांकावा. १८ तो त्याच्या प्राणाला खा-
चेंत पडायाला आणि त्याच्या जिवाला शस्त्राकडून
नाश पावायाला देत नाहीं. १९ आणि तो आ-
पल्या पलंगावरहि कष्ट भोगून शिक्षा पावतो, आणि
त्याचीं बहुत हाडें भारी दुखतात. २० ह्मणून
त्याचा जीव भाकरीला आणि त्याचा प्राण मिठा-
ईला कंटाळतो. २१ त्याचें मांस दिसेना असें
क्षीण झालें आहे, आणि त्याचीं जीं हाडें दिसत
नसत तीं उघडीं पडलीं आहेत. २२ आणि त्या-
चा प्राण कबरेजवळ आणि त्याचा जीव नाश कर-
णाऱ्याजवळ पोहंचला. २३ जर मनुष्याचें खरेंपण
दाखवायाला हजारांमध्यें एक दूत त्याला मध्यस्थ
असेल; २४ तर तो त्याला प्रसन्न होईल आणि
ह्मणेल, त्याला खांचेपासून उद्धर, मला खंडणी
मिळाली आहे. २५ त्याचा देह बालाच्यापेक्षां
टुलटुलित होईल, तो आपल्या तरुणपणाच्या दि-
वसास परत येईल. २६ त्यानें देवाची प्रार्थना
केली ह्मणजे तो त्याला मान्य करील, आणि तो
त्याचें मुख आनंदानें पाहील आणि तो मनुष्याला
त्याच्या सात्विकपणाचें फल देईल. २७ तो मनु-
ष्यांस पाहतो, आणि म्या पाप केलें आहे आणि
जें यथार्थ तें वांकडें केलें आहे आणि असें करून
माझें हित झालें नाहीं, असें जर कोणी ह्मटलें,
२८ तर तो त्याच्या प्राणाला खांचेपासून उद्ध-
रील, आणि त्याचा जीव प्रकाश पाहील. २९
पाहा, हीं सर्व कर्में देव बहुत वेळा पुरुषाजवळ
करितो. ३० त्याचा प्राण खांचेपासून परत आ-
णायासाठीं तो जीवंतांच्या उजेडानें प्रकाशित व्हा-

वा ह्मणून. ३१ हे ईयोबा, सावधान अस, माझें
ऐक, मौन धर, ह्मणजे मी बोलेन. ३२ कांहीं
जर बोलायाचें असलें तर मला उत्तर कर, बोल,
कां कीं तुला न्यायी ठरवायाला मी इच्छितों. ३३
नाहीं, तर तूं माझें ऐक, उगाच राहा, ह्मणजे मी
तुला ज्ञान शिकवीन."

## अध्याय ३४.

आणखी अलीहू उत्तर करीत ह्मणाला,
२ "विद्वानांनो माझीं वचनें ऐका, आणि ज्ञान्या-
नो मजकडे कान द्या. ३ कां कीं जशी तालु
अन्न चाखिती तसा कान वचनें पारखतो. ४ आ-
पण न्याय निवडून घेऊं, जें उत्तम तें आपणांमध्यें
जाणूं. ५ कारण ईयोब ह्मणाला आहे, मी न्या-
यी आहें आणि देवाने माझा वाद दूर केला
आहे. ६ मी आपल्या वादाविषयीं असत्य बोलेन
काय? अपराध नसतां माझें क्षत दुःसाध्य आहे.
७ कोणता पुरुष ईयोबासारिखा आहे, तो उप-
हास पाण्याप्रमाणें पितो. ८ आणि त्याने दुष्कर्मी
मनुष्याची संगत धरिली, आणि तो दुष्ट मनुष्या-
बरोबर चालला आहे. ९ कां कीं तो ह्मणाला
आहे, देवाकडेस आनंदून मनुष्याचें हित घडत
नाहीं. १० तर बुद्धिमान मनुष्यांनो, माझें ऐका;
देवाच्याने दुष्कर्म आणि सर्वसमर्थाच्याने अ-
न्याय करवत नाहीं, असें मानावें. ११ कां
कीं मनुष्याच्या कर्मांचें फल तो त्याला भरून
देईल, आणि प्रत्येकाच्या आचरणाप्रमाणें त्याला
प्राप्त होई असें तो करील. १२ होय, निश्चयें
देव दुष्कर्म करणारच नाहीं, आणि सर्वसमर्थ
न्याय विपरीत करणार नाहीं. १३ त्याला पृथ्वी-
चा अधिकार कोणी दिल्हा? अथवा सर्व जगाचा
बंदोबस्त कोणी केला आहे? १४ जर त्याने त्याज-
कडे आपलें मत लावून आपला आत्मा व आपला
श्वास आपणाकडे परत घेतला. १५ तर सर्व
लोक एकदांच प्राण सोडितील आणि मनुष्य धु-
ळींत परत जाईल. १६ जर तुला बुद्धि आहे
तर हें ऐक, माझ्या वचनांच्या शब्दाकडे कान दे.
१७ जो न्यायाला द्वेषितो तो अधिकार करील
काय? आणि तूं परम सात्विकाला अन्यायी ठर-
विसील काय? १८ वाईटारे, असें राजाला अथ-
वा दुष्टानोरे, असें प्रधानाला ह्मणणें योग्य आहे
काय? १९ तर जो अधिपतींचा पक्षपात करीत
नाहीं, आणि दरिद्र्यापेक्षा धनवनाला अधिक मानीत
नाहीं; ते सर्व त्याच्या हाताचें कामच आहेत, ह्मणून
त्याला असें ह्मणणें योग्य आहे काय? २० ते
एका क्षणांत मरतील आणि मध्यरात्रीं लोक घाबरे
होतील, आणि नष्ट होऊन जातील आणि परा-
क्रमी काढिले जातील, परंतु हाताने असें नाहीं.
२१ कां कीं त्याचे डोळे मनुष्याच्या मार्गां-
वर आहेत, आणि त्यांच्या सर्व गति तो पाहतो.
२२ दुष्कर्मी त्यांत लपावे असा कांहीं अंधकार
अथवा मृत्युच्छाया नाहीं. २३ कां कीं मनु-
ष्याने देवाकडे जाऊन न्यायविवाद करावा, ए-
वढें अधिक तो त्याजवर घालणार नाहीं. २४ तो
असंख्य महाबलांस भग्न करील, आणि त्यांच्या
स्थानीं इतरांला स्थापील. २५ याकरितां तो त्यां
चीं कर्मे ओळखितो आणि रात्रीं त्यांला उलंडून
टाकितो तेव्हां ते चुरडून जातात. २६ तो त्यां-
ला दुष्कर्मांमुळें पाहणाऱ्यांच्या स्थानांत फटके मा-
रितो. २७ कां कीं ते त्यापासून फिरले आणि
त्याच्या मार्गांतला कोणताहि ध्यानांत आणीनात.
२८ ह्मणून दरिद्र्यांची आरोळी त्याजकडे येई असें
ते करितात, आणि तो दुर्गतांची आरोळी ऐकतो.
२९ तो शांति देत असतां कोण उपद्रव करील?
आणि त्याने आपलें मुख लपविलें ह्मणजे त्याला
कोण पाहील? हें जातीविषयीं असो अथवा एकाच
मनुष्याविषयीं असो. ३० अधार्मिक मनुष्याने रा-
ज्य न करावें, लोक पाशांत न पडावे ह्मणून. ३१
देवाला असें ह्मणणें योग्य आहे कीं, मी शिक्षा
पावलों आहें, मी पुन्हा दुष्टता करणार नाहीं.
३२ जें मला दिसत नाहीं तें मला शिकीव,
म्या जर अन्याय केला तर मी पुन्हा करणार
नाहीं. ३३ तुझ्या मनोरथाप्रमाणें व्हावें काय?
तूं नाकार अथवा स्वीकार मी नाहीं परंतु तोच
फल भरून देईल, तर जें जाणतोस तें बोल.
३४ बुद्धिमान मनुष्यें मला सांगोत आणि विद्वान
पुरुष माझें ऐको. ३५ ईयोब ज्ञानाविना बोलला
आहे आणि त्याचीं वचनें बोधहीन होतीं. ३६
ईयोबाने दुष्ट मनुष्यांचा पक्ष धरून प्रत्युत्तरें केलीं
आहेत ह्मणून तो पुरतेपणें पारखिला जावा असी

माझी इच्छा आहे. ३७ कां कीं तो आपल्या
पातकाला फितुरपण लावितो, तो आह्मामध्यें टा-
ळ्या वाजवितो आणि देवावर आपलीं वचनें वाढ-
वितो."

### अध्याय ३५.

आणखी अलीहू उत्तर करीत ह्मणाला,
२ "त्वां न्यायानें हें कल्पिलें आहे काय? त्वां
ह्मटलें, माझा सात्विकपणा देवाच्यापेक्षां अधिक
आहे. ३ कारण त्वां ह्मटलें, मला काय प्राप्ति
होईल? मी पाप सोडून काय हित पावेन? ४ मी
तुला व तुजसहित तुझ्या सख्यांला प्रत्युत्तर क-
रीन. ५ तूं आकाशाकडे अवलोकन करून पाहा,
आणि जें आभाळ तुजपेक्षां उंच आहे तेंहि ध्यान
करींत पाहा. ६ त्वां जर पाप केलें तर त्याविरुद्ध काय
करितोस? आणि तुझे अपराध जर बहुत झाले तर
त्याविरुद्ध काय साधितोस? ७ तूं जर सात्विक अस-
लास तर त्याला काय देतोस? अथवा तुझ्या हातापा-
सून तो काय घेतो? ८ जो मनुष्य तुजसारिखा आहे
त्याला तुझी दुष्टता बाधेल, आणि तुझा सात्विकपणा
मनुष्याच्या संतानाचें हित करील. ९ बहुत पी-
डांमुळें ते ओरडतात, बलिष्टांच्या भुजामुळें ते आ-
रोळी करितात. १० परंतु देव जो माझा उत्पन्न
करणारा जो रात्रीं गीतें देत असतो, ११ ज्यानें
आह्मांला भूमीवरल्या पशूंपेक्षां अधिक शिकविलें,
आणि आकाशांतल्या पक्ष्यांपेक्षां आह्मांला विद्वान
केलें आहे, तो कोठें आहे? असें कोणी ह्मणत
नाहीं. १२ तेथें ते दुष्टांच्या गर्वामुळें आरोळी
करितात परंतु कोणी उत्तर करीत नाहीं. १३
निश्चयें देव खोटें ऐकणार नाहीं आणि सर्व-
समर्थ त्याकडे मन लावणार नाहीं. १४ मी त्या-
ला पाहणार नाहीं असें जरी ह्मणालास तरी
त्यासमोर न्याय आहे ह्मणून तूं त्याजवर भरंवसा
ठेवीत राहा. १५ परंतु आतां असें नाहीं ह्म-
णून त्यानें आपल्या क्रोधानें शासन केलें आहे, त-
थापि त्यानें अत्यंत तीव्रता जाणली नाहीं. १६
तर ईयोब उगीच आपलें तोंड उघडितो, आणि
ज्ञानाविना वचनांचा विस्तार करितो."

### अध्याय ३६.

अलीहू आणखी उत्तर करीत ह्मणाला,
२ "तूं मजकडे थोडेंसें मन लाव, ह्मणजे मला
देवासाठीं आणखी कांहीं बोलावें लागतें, असें
तुला कळवीन. ३ पुरातन कालापासून मी आ-
पलें मत घेईन आणि आपला उत्पन्न करणारा
न्यायी आहे असें ठरवीन. ४ तर निश्चयें माझीं
वचनें खोटीं असणार नाहींत, जो पूर्णज्ञानी आहे
तो तुजवळ आहे. ५ पाहा, देव बलिष्ट आहे
आणि कोणाला तुच्छ मानीत नाहीं, तो पराक्रमानें
व बुद्धीनें समर्थ आहे. ६ तो दुष्टाला वांचवीत
नाहीं परंतु तो दरिद्र्यांचा न्याय ठरवितो. ७ तो
सात्विकावरून आपले डोळे काढीत नाहीं परंतु ते
सिंहासनावरल्या राजांकडे असतात; होय, तो त्यां-
ला सर्वकालपर्यंत स्थापितो आणि ते उंच होतात.
८ आणि ते जर बिड्यांनी बांधिले आणि पीडेच्या
बंधांनी धरिले. ९ तर तो त्यांला त्यांचें कर्म
आणि त्यांचे अपराध प्रगट करितो, ते फार झाले
आहेत ह्मणून. १० आणि त्यांनी शिक्षा घ्यावी
ह्मणून तो त्यांचा कान उघडितो, आणि ते अन्या-
यापासून फिरावे असी तो त्यांला आज्ञा करितो.
११ जर त्यांनी ऐकून सेवा केली तर ते आपले
दिवस कुशलांत आणि आपलीं वर्षें अनेक आनं-
दांत समाप्त करितील. १२ परंतु त्यांनी जर न
ऐकिलें, तर तरवारीनें नष्ट होतील आणि ज्ञानावां-
चून मरून जातील. १३ परंतु मनाचे अधार्मिक
क्रोध सांठवितात, जरी त्यानें त्यांला बांधिलें तरीं
ते आरोळी करीत नाहींत. १४ तारुणपणांत त्यां-
चा प्राण जातो, आणि त्यांचें जीवन अपवित्रांमध्यें
असतें. १५ तो दरिद्र्याला त्याच्या कष्टांत मुक्त
करितो, आणि पीडेंत त्यांचा कान उघडितो. १६
आणि त्वां जर ऐकिलें असतें तर त्यानें तुलाहि
संकट स्थलांतून ज्या स्थलांत कांहीं संकट नाहीं
त्यांत काढून घेतलें असतें, आणि तुझ्या मेजावर
जें ठेविलेलें तें चर्बीनें भरलेलें असतें. १७ परंतु
त्वां दुष्टाचा वाद पूर्ण केला आहे, वाद व न्याय
तुला ग्रहण करितात. १८ कोप आहे ह्मणून
त्यानें तुला प्रहारानें हरण न करावें ह्मणून सावध
अस, मग मोठ्या खंडणीमुळेंहि तो तुला प्रसन्न
होणार नाहीं. १९ तो तुझें द्रव्य ताडून पाहील
काय? सोनें व सर्व महाधन तो मानणार नाहीं.
२० लोक आपल्या स्थानांत नष्ट होत अस[illegible]
रात्रीची इच्छा धरूं नको. २१ तूं [illegible],

अन्यायाकडे मन लावूं नको, कां कीं त्वां याला
पीडेपेक्षां योग्य मानिलें आहे· २२ पाहा, देव
आपल्या पराक्रमाने उंच करितो, त्यासारिखा कोण
शिकवितो? २३ त्यासाठीं त्याचा मार्ग कोणी
नेमिला आहे? अथवा त्वां अन्याय केला आहे,
असें कोण ह्मणेल? २४ त्याचें जें कर्म मनुष्यें
ध्यान करीत पाहतात, त्याचें महत्व त्वां वर्णावें
असें स्मर. २५ सर्व मनुष्यें तें पाहतात, त्याज-
कडे मनुष्य दुरून अवलोकन करितें· २६ पाहा,
देव थोर आहे आणि आह्मी त्याला जाणत नाहीं,
आणि त्याच्या वर्षांची संख्या अगणित आहे·
२७ कां कीं पाण्याचे थेंब तो बारीक करितो, ते
आपल्या मेघतिमिराप्रमाणें पर्जन्य पडूं देतात.
२८ ज्या त्याला अभ्रें गळूं देतात, तीं मनुष्यावर
बहुत शिंपडतात· २९ आणि मेघांचे विस्तार
अथवा त्याच्या मंडपाचे धडाके कोणी समजूं श-
कतो काय? ३० पाहा, तो त्याजवर आपला
प्रकाश विस्तारितो आणि समुद्राचा तळ झांकितो·
३१ कां कीं तो त्यांकडून लोकांचें शासन करितो,
तो पुष्कळपणें अन्न देतो· ३२ तो आभाळानी
प्रभा झांकितो अथवा तिजवर अंतर्द्धान व्हावें ह्म-
णून आज्ञा करितो· ३३ त्याची गर्जना त्याविषयीं
सुचविती आणि धुकटाविषयीं गुरें सुचवितात."

## अध्याय ३७.

"यामुळेंहि माझें हृदय थरथरतें, आणि आप-
ल्या स्थानांतून स्फुरून उडतें. २ त्याच्या
शब्दाचा धडाड आणि त्याच्या मुखांतून जी गर्ज-
ना निघती तीहि जपून ऐका· ३ तो ती सर्व
आकाशाखालतीं आणि आपला प्रकाश पृथ्वीच्या
सीमांपर्यंत प्रेरितो· ४ त्यानंतर गर्जना होती, तो
आपल्या ऐश्वर्याच्या शब्दाने गडगडवितो; जेव्हां
त्याचा शब्द ऐकूं येतो तेव्हां तो त्याला स्तब्ध
करीत नाहीं· ५ देव आपल्या शब्दाने आश्च-
र्याने गडगडवितो, तो महत्कर्में करितो आणि तीं
आह्मी समजूं शकत नाहीं· ६ कां कीं तो हि-
माला ह्मणतो, तूं भूमीवर पड, आणि पर्जन्यवृष्टी-
ला, होय आपल्या विपुल पर्जन्यवृष्टीला असें
ह्मणतो· ७ तो प्रत्येक मनुष्याच्या हाताला मुद्रा
लावून बंद करितो, सर्व मनुष्यानी त्याचें कर्म जा-
णावें ह्मणून· ८ तेव्हां पशु गुहांत शिरतात,
आणि आपल्या आश्रयांत राहतात· ९ दक्षिणें-
तून वाहवटळ येती, आणि उत्तरेच्या वाऱ्यांकडून
थंडी होती· १० देवाच्या श्वासाकडून हिम
पडतें, आणि पाण्याचा व्यास कोंडून राहतो· ११
आणि शिंपायासाठीं तो निबिड मेघाला प्रेरितो,
त्याचा प्रकाश आभाळ उडवितो· १२ आणि
पृथ्वीभूमीच्या पाठीवर जें कांहीं तो त्या मेघांला
आज्ञापितो तें त्यानी करावें ह्मणून ते त्याच्या
नियोगाप्रमाणें फिरत फिरत चालतात· १३ ते
दंडासाठीं अथवा त्याच्या भूमीसाठीं अथवा प्र-
सादासाठीं येत असें तो करितो· १४ हे ईयो-
बा, याकडे कान दे, उभा राहून देवाच्या आ-
श्चर्यकर्मांचें ध्यान कर. १५ देव त्यांला कसा
रचून ठेवितो आणि आपल्या मेघाचा प्रकाश पडूं
देतो, हें तूं जाणतोस काय? १६ निबिड मेघां-
चीं तोलनें सर्व ज्ञान्याचीं आश्चर्यकर्में तूं समजतोस
काय? १७ जेव्हां दक्षिणेच्या वाऱ्याकडून भूमि
शांत होती तेव्हां तुझीं वस्त्रें कसीं उष्ण होतात,
हें तुला कळलें आहे काय? १८ जें आभाळ
दृढ व ओतींव अरशासारिखें आहे, तें त्वां त्यासं-
गतीं विस्तारिलें आहे काय? १९ आह्मी त्याला
काय ह्मणावें हें आह्माला कळीव, कां तर अंध-
कारामुळें आमच्याने आपलें वचन रचवत नाहीं.
२० मी बोलतों असें त्याला सांगावें काय? जर
मनुष्य बोलला तर त्याचा नाश होईल· २१
तर जो प्रकाश मेघांच्या आड चकचकित आहे
तो लोकांस आतां दिसत नाहीं, परंतु वारा चालूं
लागला ह्मणजे त्यांला स्वच्छ उडवितो. २२
उत्तरेंतून विभासा येती, देवाकडे भयंकर मा-
हात्म्य आहे· २३ सर्वसमर्थाविषयीं काय ह्मणूं?
त्याचा शोध आह्माला लागव नाहीं, तो महापरा-
क्रमी आहे आणि त्याच्याठायीं न्याय व महासा-
त्विकपणा आहे, ह्मणून तो त्रासणार नाहीं· २४
याकरितां मनुष्यें त्याला भिवोत, तो कोणत्याहि
मनाच्या विद्वानांकडे मन लावीत नाहीं."

## अध्याय ३८.

मग परमेश्वर वाहवटळींतून ईयोबाला उत्तर
करीत ह्मणाला,

२ "जो अज्ञान वचनें बोलून उपदेशाला अं-
धारीं आणितो हा कोण आहे? ३ तर तूं पुरुषासा-
रिखा आपली कंबर बांध, ह्मणजे मी तुला विचा-
रीन, मग तूं मला ज्ञानाचें उत्तर कर. ४ जेव्हां
म्या पृथ्वीचा पाया घातला तेव्हां तूं कोठें होतास?
जर तूं बुद्धिसंपन्न असलास तर हें प्रगट कर.
५ तिचीं परिमाणें कोणी नेमिलीं असें जाणतोस
काय? अथवा तिजवर सूत्र कोणी ताणिलें? ६
तिचीं तळें कशावर मांडिलीं आहेत, अथवा ति-
चा कोंपऱ्याचा दगड कोणी घातला? ७ जेव्हां
पाहटेच्या ताऱ्यांनी एकदां गाइलें आणि देवाच्या
पुत्रांनी हर्षनाद केला तेव्हां, ८ आणि समुद्र
द्वारांनी कोणी झांकिला? जेव्हां सुटून तो गर्भ-
स्थानांतून निघाला. ९ जेव्हां म्या मेघ त्याचें
वस्त्र केलें, आणि निबिड अंधकार त्याचें बाळंतें
केलें. १० जेव्हां म्या त्यासाठीं आपली सीमा
परिमित केली, आणि अडसर व द्वारें हीं स्थापिलीं.
११ आणि ह्मटलें, एथपर्यंत तूं येसील, याच्या
आलिकडे नाहीं, आणि एथें तुझ्या लहरांच्या
उंचपणाला मर्यादा ठेविली आहे. १२ त्वां
आपल्या जन्मापासून सकाळीस आज्ञा केली आहे
काय? त्वां पाहटेला तिचें स्थान कळविलें आहे
काय? १३ अशासाठीं कीं तिने पृथ्वीच्या सीमा
धराव्या आणि तींतून दुष्ट झटकून टाकावे. १४
जसी माती मुद्रेने तसी ती आपलें रूप पालटिती
आणि ते वस्त्राप्रमाणें ठीक बसतात. १५ आणि
दुष्टांपासून त्यांचा प्रकाश आकळिला जाईल, आणि
उंच भुज मोडिला जाईल. १६ तूं समुद्रांतल्या
झऱ्यांत शिरलास काय? अथवा डोहांत शोध
करायास चाललास काय? १७ मृत्यूचीं द्वारें
तुला उघडिलीं आहेत काय? अथवा त्वां मृत्यु-
च्छायेचीं द्वारें पाहिलीं आहेत काय? १८ त्वां
पृथ्वीची सर्व रुंदी लक्ष लावून पाहिली आहे
काय? जर ती सर्व तुला कळली तर सांग.
१९ ज्या गतींत प्रकाश राहतो ती कोठें आहे?
आणि अंधकार याचें स्थान कोठें आहे? २०
त्वां त्याला त्याच्या सीमेवर न्यावें आणि त्याच्या
घराकडच्या वाटाला ओळखावें ह्मणून. २१ तूं
तेव्हां जन्मलास आणि तुझ्या दिवसांची संख्या
बहुत आहे ह्मणून तूं जाणतोस काय? २२ तूं
हिमाच्या निधींत शिरलास काय? अथवा त्वां
गारांचे निधि पाहिले आहेत काय? २३ जे
म्या संकटसमयासाठीं आणि संग्राम व युद्ध यां-
च्या दिवसासाठीं राखून ठेविले आहेत ते. २४
ज्या गतींत प्रकाश पसरतो आणि पूर्वेचा वारा
पृथ्वीवर विखरतो, ती कोठें आहे? २५ पाण्या-
च्या पुरासाठीं पाट आणि गर्जनेच्या विजेसाठीं
मार्ग कोणी पाडिला आहे? २६ मनुष्यहीन भू-
मीवर मनुष्यजातिहीन अरण्यावर पर्जन्य पाडा-
याला, २७ उद्दस्त व ओसाड स्थल तृप्त करा-
याला आणि गवताचा अंकुर फुटे असें करायाला,
२८ पर्जन्याला बाप आहे काय? अथवा द-
हिंवराच्या थेंबाला कोणी जन्म दिल्हा आहे?
२९ कोणाच्या गर्भस्थानांतून बर्फ निघालें? आणि
आकाशांतलें बर्फ कोणी जन्मविलें? ३० जसीं
दगडाने तसीं पाणीं गुप्त होतात, आणि डोहाचें
तोंड थिजतें. ३१ तूं कृत्तिकाचें मनोरम उपाधि
बंद करूं शकतोस काय? अथवा तुझ्याने अग-
स्त्याचे बंद सोडवतील काय? ३२ तूं नक्षत्रें
प्रत्येक स्वसमयीं काढूं शकतोस, अथवा सप्तर्षि
पुत्रांसुद्धां तुला चालवितां येतील काय? ३३
तूं आकाशाचीं विधानें जाणतोस काय? त्याचा
अधिकार पृथ्वीवर स्थापूं शकतोस काय? ३४
पाण्याच्या पुष्कळपणाने तुला झांकावें ह्मणून तु-
झ्याने आपला शब्द मेघापर्यंत उंचाववेल काय?
३५ विजा चालाव्या ह्मणून तूं त्या पाठवूं शक-
तोस काय? पाहा, आह्मी एथें आहों, असें त्या
तुला ह्मणतील काय? ३६ अंतःकरणांत ज्ञान
कोणी घातलें? अथवा मनाला बुद्धि कोणी दिल्ही?
३७ ज्ञानाने मेघ कोण गणितो? आणि आकाशांतले
बुधले कोण ओतितो? ३८ जेव्हां धुळि विर-
रून मिळून जाती आणि ढेंकळें एकत्र चिकटतात
तेव्हां. ३९ तूं सिंहासाठीं आहाराची शिकार
करसील काय? आणि तरुण सिंहांचा जीव तृप्त
करसील काय? ४० जेव्हां ते आपल्या आश्र-
यांत अंग टाकून बसतात, आणि आपल्या लप-
ण्याच्या जाळींत राहतात तेव्हां. ४१ कृष्णका-
कासाठीं त्याचा आहार कोण सिद्ध करितो?
जेव्हां त्याचीं पिलें देवाकडे ओरडतात, आणि
खायाला कांहीं नाहीं ह्मणून भ्रमतात तेव्हां."

## अध्याय ३९.

"कड्यांवरील रानशेळ्यांच्या विण्याचा समय
तुला कळला आहे काय? हरिणींचें विणें
तूं लक्ष्य लावून पाहूं शकतोस काय? २ जे
महिने त्या समाप्त करितात ते तुला गणतां येतात
काय? आणि त्यांच्या विण्याचा समय तूं जाण-
तोस काय? ३ त्या ओणवतात, आपलीं पिलें
वितात, आपले गर्भ बाहेर पाडतात. ४ त्यांचीं
पिलें दुलदुलीत होतात, तीं अरण्यांत वाढतात,
तीं बाहेर गेलीं म्हणजे त्यांकडे परत येत नाहींत.
५ रानगाढव कोणी मोकार सोडिला आहे? अ-
थवा अरण्यगाढवाचीं बंदनें कोणी फेडिलीं आ-
हेत? ६ त्याचें घर म्या जंगल केलें आहे आणि
खारस्थळ त्याचें आश्रय असतें. ७ तो नगरां-
तल्या समुदायाचा उपहास करितो, तो हाकणा-
ऱ्याच्या हाका ऐकत नाहीं. ८ पर्वतांचा प्रसर
त्याची चरण आहे, आणि तो सर्व हिरवें हुड-
कतो. ९ गेंडा तुझी सेवा करायाला मान्य
होईल काय? तो तुझ्या गव्हाणीपाशीं राहील
काय? १० तूं गेंड्याला त्याच्या जुंवाळीने ता-
सांत बांधूं शकतोस काय? तो तुझ्या पाठीमागून
खोरीं गुठावील काय? ११ त्याचा पराक्रम मोठा
आहे म्हणून तूं त्याजवर भरंवसा ठेविसील काय?
अथवा तूं आपलें कष्टाचें काम त्याजकडे टाकसील
काय? १२ तो तुझें बीज परत आणील आणि
तुझ्या खळ्यांत तें गोळा करून ठेवील, असा वि-
श्वास तूं त्याजवर ठेविसील काय? १३ मोरांचे
पक्ष फडफडतात, होय शहामृगाचीं पिसें व पि-
सारहि. १४ ती तर आपलीं आंडीं भूमींत
सोडिती आणि धुळींत ऊबविती. १५ आणि
कदाचित कोणीएकाचा पाय तीं ठेंचील, अथवा
वनपशु तीं तुडवील हें विसरती. १६ ती आ-
पल्या पिलांसीं तीं तिचीं नसल्याप्रमाणें कठोर
असती; तिचे श्रम भयाविना व्यर्थ आहेत. १७
कां कीं देवानें तिला ज्ञान दिल्हें नाहीं, आणि
तिला बुद्धि वांटिली नाहीं. १८ जेव्हां ती उंच
होऊन धांवती तेव्हां घोड्याला व त्याच्या स्वारा-
ला हांसती. १९ त्वां घोड्याला पराक्रम दिल्हा
आहे काय? त्वां त्याची मान गडगडाट पांघर-
विली आहे काय? २० तो टोळाप्रमाणें थरथरे
असें तूं करूं शकतोस काय? त्याच्या नाकपुड्या-
चें गौरव भयंकर आहे. २१ तो खोऱ्यांत टांपा
मारितो, आणि आपल्या पराक्रमाविषयीं आनंदतो,
तो हत्यारबंद मनुष्याला भेटायाला पुढें चालतो.
२२ तो भयाला हांसतो आणि भयभीत होत
नाहीं, आणि तरवारीपासून मागें फिरत नाहीं.
२३ भाता, चमकता भाला व ढाल हीं त्याजप्रत
खणखणतात. २४ क्रोध व थैथैपाठ यानी तो
भूमि गिळितो, आणि करण्याचा शब्द आहे असें
तो विश्वासत नाहीं. २५ करणा वाजतांना तो
अहा म्हणतो, लढाई व सर्दारांची गर्जना व आ-
रोळी हीं तो दुरून हुंगतो. २६ ससाणा तुझ्या
बुद्धीने उडतो आणि आपले पक्ष दक्षिणेकडे पस-
रितो काय? २७ तुझ्या आज्ञेने गरुड उंचावतो,
उंच जागीं आपलें कोटें करितो काय? २८ तो
खडकावर वसतो आणि रात्रीं राहतो, खडकाचा
कडा व शिखर यांवरहि. २९ तेथून तो आ-
हाराला निरखितो, त्याचे डोळे दुरून पाहतात.
३० त्याचीं पिलें रक्त चोंखितात आणि जेथें
वधलेले असतील तेथें तो असतो."

## अध्याय ४०.

आणखी परमेश्वर ईयोबाला उत्तर करीत
म्हणाला,
२ "सर्वसमर्थाशीं विवाद करणारा त्याला
शिकवील काय? जो देवाचा परिवाद करितो तो
त्याविषयीं उत्तर करो."
३ तेव्हां ईयोब परमेश्वराला उत्तर करीत
म्हणाला, ४ "पाहा, मी कुत्सित आहें, मी तुला
काय उत्तर करूं? मी आपला हात आपल्या मु-
खावर ठेवीन. ५ मी एकदां बोललों आहें परंतु
मी उत्तर करणार नाहीं; होय, दोनदां परंतु अण-
खी बोलणार नाहीं." ६ मग परमेश्वर ईयो-
बाला वाहवटळींतून उत्तर करीत म्हणाला, ७
"तूं पुरुषासारिखी आपली कंबर बांध, मी तुला
प्रश्न करीन तेव्हां तूं मला ज्ञानाचें उत्तर कर. ८
हूं माझा न्याय नाहींसा करसील काय? तूं न्यायी
ठरावा म्हणून मला दोष लाविसील काय? ९
देवासारिखा तुला भुज आहे काय? त्याच्या

अवाजासारिखी तूं गर्जना करसील काय? १०
तूं ऐश्वर्य व उत्कर्ष लेऊन घे, आणि माहात्म्य व
शोभा धारण कर. ११ तूं आपल्या क्रोधाचे प्रवाह
पसरूं दे, आणि प्रत्येक गर्विष्ठाला पाहून त्याला
नीच कर. १२ प्रत्येक गर्विष्ठाला पाहून त्याला
नीच कर, आणि दुष्टांला त्यांच्या स्थानांत तुडवून
टाक. १३ त्यांला धुळींत एकत्र गुप्त कर, गुप्त
स्थानांत त्यांचीं मुखें बांध. १४ म्हणजे मीहि
तुजवळ अंगीकार करीन कीं तुझा उजवा हात
तुला तारूं शकेल. १५ बहेमोथ पाहा, जो म्या
तुजवळ उत्पन्न केला, तो बैलासारिखा गवत खा-
तो. १६ पाहा, त्याचा पराक्रम त्याच्या कमरेंत
आहे, आणि त्याचें बल त्याच्या उदराच्या दृढ
अवयवांत आहे. १७ तो आपलें शेंपूट ऐरवज
वृक्षाप्रमाणें वांकवितो, त्याच्या मांडीच्या स्नायु एक-
मेकीसीं गुंफलेल्या आहेत. १८ त्याचीं हाडें
पितळ्याचे पन्हळ असीं आहेत, त्याच्या बरगड्या
लोखंडाच्या दांड्यांसारिख्या आहेत. १९ तो
देवाच्या कृत्यांतलें मुख्य आहे, त्याच्या उत्पन्न
करणाऱ्यानेच त्याला त्याचें शस्त्र दिल्हें आहे.
२० पर्वत तर त्यासाठीं चारा रुझूं देतात, आणि
तेथें सर्व अरण्यपशु खेळतात. २१ तो राव-
ळीच्या झाडांखालीं नल व दलदली यांतल्या जा-
ळींत बसत असतो. २२ रावळीचीं झाडें आप-
ल्या छायेने त्याला झांकितात, ओघाजवळचे वाळुंज
त्याला वेढितात. २३ पाहा, नदी लोटून पाहती
परंतु तो घाबरत नाहीं, जरी यार्देन नदी सुटून
त्याच्या मुखापर्यंत लागली तरी तो धैर्य धरितो.
२४ तो आपल्या डोळ्यानी तिला व्यापून पाहतो,
तो रोषाने फांशांतून धसून जातो."

## अध्याय ४१.

"तूं लिव्याथानाला गळाने बाहेर ओढूं शकतोस
काय? अथवा तुला त्याची जीभ दोरीने
आंवळवेल काय? २ त्याच्या नाकांत लव्ह्याची
दोरी घालूं शकतोस काय? अथवा तुला त्याचा
जबडा कांट्याने टोंचवेल काय? ३ तो तुजपासीं
बहुत काकळूत करील काय? तुजवळ तो मृदुव-
चनें बोलेल काय? ४ तो तुजसीं करार करील
काय? तूं त्याला सर्वकाळपर्यंत आपला चाकर
व्हायासाठीं घेसील काय? ५ जसा पक्ष्यासीं
तसा त्यासीं खेळसील काय? तूं आपल्या चाक-
रिणींसाठीं त्याला बांधिसील काय? ६ सोबती
त्याचें भोजन करितील काय? ते त्याला वाटण्यां-
मध्यें वांटून देतील काय? ७ तूं त्याची त्वचा
शल्यानी अथवा त्याचें मस्तक गळानी भरूं शक-
तोस काय? ८ त्याजवर तूं आपला हात ठेव,
लढाई स्मर, अधिक करूं नको. ९ पाहा, त्या-
विषयींची आशा व्यर्थ आहे, कोणी त्याला पाह-
तांच गळून पडणार नाहीं काय? १० त्याला
उत्तेजित करी एवढा तीव्र कोणी नाहीं, तर मजपुढें
उभा राहूं शके असा कोण आहे? ११ म्या
प्रतिदान करावें म्हणून कोणी मला प्रथम कांहीं
दिल्हें आहे? जें कांहीं सगळ्या आकाशाखालीं
आहे तें माझेंच आहे. १२ त्याचे अवयव त्याचें
बलवर्णन, आणि त्याच्या रचनेचें सौंदर्य्य यांविषयीं
मी उगा राहणार नाहीं. १३ त्याच्या पांघरुणाचें
तोंड कोण उघडूं शकेल? त्याच्या दुहेरी गालफ-
टांत कोणाच्याने शिरवेल? १४ त्याच्या मुखाचीं
द्वारें कोण उघडूं शकेल? त्याचे दांत चहुंकडे
भयंकर आहेत. १५ त्याचीं दृढ खवलें त्याचें
गर्व आहेत, जसें घट्ट मुद्रेने तसें प्रत्येक झांकलेलें
आहे. १६ तीं एकमेकासीं एवढीं लागलेलीं आ-
हेत कीं कांहीं वारा त्यांमध्यें शिरूं पावत नाहीं.
१७ तीं एकमेकासीं चिकटतात, तीं चिकटलेलीं
आहेत आणि वेगळीं होत नाहींत. १८ त्याच्या
शिंका प्रकाश चमकवितात आणि त्याचे डोळे स-
काळाच्या पापण्यासारिखे आहेत. १९ त्याच्या
तोंडांतून दीप बाहेर पडतात आणि अग्नीच्या ठि-
णग्या सुटतात. २० जसा उकळत्या हंड्यांतून
अथवा थाळ्यांतून तसा त्याच्या नाकपुड्यांतून धूम
निघत असतो. २१ त्याचा श्वास अंगार पेटवि-
तो आणि त्याच्या तोंडांतून ज्वाला निघती. २२
त्याच्या मानेंत बल राहतें आणि संकट त्यापुढून
उडून जातें. २३ त्याच्या मांसाचे थर घट्ट ला-
गलेले आहेत, तें त्याजवर घट्ट आहे, थलथलत
नाहीं. २४ त्याचें हृदय दगडासारिखें कठीण
आहे, होय तें खालच्या तळीएवढें कठीण आहे.
२५ तो उठला म्हणजे पराक्रमी भितात, ते महा-
भंगाने व्याकूळ होतात. २६ जो त्याला तरवार

लावितो त्याची तरवार,टिकत नाहीं; भाला, शस्त्र
व कवच हींहि टिकत नाहींत. २७ तो लोखंड
गवतासारिखें आणि पित्तल कुजलेल्या लांकडासा-
रिखें मानितो. २८ तीराच्याने त्याला पळववत
नाहीं, गोफणीचे धोंडे त्याला धस असे होतात.
२९ गदा धसांसारिख्या मानिल्या आहेत, तो
भाल्याच्या हालण्यास हांसतो. ३० त्याखालीं
खापरीचीं टोंकें असतात, तो चिखलावर वखर
असें कांहीं विस्तारितो. ३१ तो अगाध डोहाला
हांड्यांप्रमाणें उकळितो, समुद्राला माखण्याच्या
हांड्यासारिखें करितो. ३२ तो आपणामागें मार्ग
प्रकाशमय करितो, डोह पांढरा झाला असें एखा-
द्याला वाटेल. ३३ ज्याला भय वाटत नाहीं,
असें त्यासारिखें बनावर कोणी नाहीं. ३४ तो
सर्व उंच गोष्टी पाहतो, तो गर्विष्टांच्या सर्व वंशां-
वर राजा आहे."

## अध्याय ४२.

मग ईयोब **परमेश्वराला** उत्तर करीत ह्मणाला,
२ "तूं **सर्वसमर्थ** आहेस आणि कोणतीहि
कल्पना तुजपासून लपणार नाहीं, असें मी जाणतों.
३ जो ज्ञानाविना मसलत गुप्त ठेवितो, हा कोण
आहे? तर जें मी समजलों नाहीं तें आणि मज-
पेक्षां वरचढ ज्या आश्चर्य गोष्टी ह्या जाणल्या ना-
हींत,त्याहि मी बोललों आहे. ४ त्वां ऐकावें,ह्मणजे
मी बोलेन; मी तुला विचारीन,मग तूं मला कळीव.
५ ह्या कानाच्या ऐकण्यांत तुजविषयीं ऐकिलें
आहे, परंतु आतां माझा डोळा तुला पाहतो. ६
यामुळें मी आपणाला कंटाळतों आणि धूळ व
राख यांवर बसून अनुतापतों."
७ आणि असें झालें कीं **परमेश्वर** हीं वचनें
ईयोबाला बोलल्यानंतर एलीफाज तेमानी याला
**परमेश्वर** ह्मणाला, "तुजवर आणि तुझ्या दो-
घा मित्रांवर माझा क्रोध पेटला आहे, कां कीं ज-
सा माझा सेवक ईयोब तसे तुह्मी मजविषयीं य-
थार्थ बोलला नाहीं. ८ तर आतां तुह्मी आपणा-
साठीं सात बैल आणि सात बोकड घेऊन माझा
सेवक ईयोब याकडे जा, आणि आपणाकरितां होम
करा,ह्मणजे माझा सेवक ईयोब तुह्मासाठीं प्रार्थना
करील, कां कीं त्याचें मी मान्य करीन; ह्या तुह्मा-
प्रत तुमच्या मूर्खतेप्रमाणें न करावें ह्मणून, कां कीं
जसा माझा सेवक ईयोब तसे तुह्मी मजविषयीं
यथार्थ बोलला नाहीं."
९ मग एलीफाज तेमानी व बिल्दाद शूही
व जोफार नामाथी यांनी जाऊन जसें **परमे-
श्वराने** यांला सांगितलें तसें केलें, आणि **परमे-
श्वराने** ईयोबाचें मान्य केलें. १० तर ईयोबाने
आपल्या मित्रांसाठीं प्रार्थना केली, तेव्हां **परमे-
श्वराने** त्याची दशा फिरविली, आणि जें कांहीं
ईयोबाचें पूर्वीं होतें त्याचें दुप्पट **परमेश्वराने**
त्याला अणखी दिल्हें. ११ तेव्हां त्याचे सर्व
भाऊ व त्याच्या सर्व बहिणी व सर्व जे पूर्वीं त्या-
च्या ओळखीचे होते तेहि त्याकडे आले, आणि
त्याच्या घरांत त्यासंगतीं जेवले; आणि जें अरिष्ट
**परमेश्वराने** त्याजवर आणिलें होतें त्या सर्वांवि-
षयीं त्यांनी त्याकरितां शोक केला आणि त्याचें
सांत्वन केलें, आणि प्रत्येकाने त्याला एक मुद्रा दि-
ल्ही आणि प्रत्येकाने एक सोन्याची कुडकी दिल्ही.
१२ तर **परमेश्वराने** ईयोबाची शेवटली स्थिति
त्याच्या पूर्वस्थितीपेक्षां अधिक चांगली केली, कां
कीं त्याला चौदा हजार मेंढरें व साहा हजार उंट
व बैलांच्या जोड्या एक हजार व एक हजार गा-
ढवी हीं होतीं. १३ आणि त्याला सात पुत्र होते
व तिघी कन्या होत्या. १४ आणि त्याने पहिलीचें
नांव यमीमा व दुसरीचें नांव केजीया व तिसरी-
चें नांव केरेनहप्पूख ठेविलें. १५ आणि सर्व
देशांत ईयोबाच्या कन्यांएवढ्या सुंदर स्त्रिया को-
णी नव्हत्या, आणि त्यांच्या बापाने त्यांस त्यांच्या
भावांमध्यें विभाग दिल्हा. १६ त्यानंतर ईयोब
एकशें चाळीस वर्षे वांचला, आणि त्याने आपले
पुत्र आणि आपल्या पुत्रांचे पुत्र चोहों पिढ्यांपर्यंत
पाहिले. १७ मग ईयोब वृद्ध व आयुस्तृत होऊन
मरून गेला.

THE BOOK OF PSALMS.

# गीतांचें पुस्तक.

## गीत १.

तो माणूस फार धन्य जो दुष्टांच्या विचारा-
प्रमाणें चालत नाहीं, आणि पाप्यांच्या मा-
र्गांत उभा राहत नाहीं, आणि निंदकांच्या आसना-
वर बसत नाहीं. २ परंतु त्याची आवड **परमे-
श्वराच्या** शास्त्रांत आहे, आणि रात्रंदिवस तो
त्याच्या शास्त्राचें मनन करितो. ३ तो पाण्या-
च्या ओहळांजवळ लावलेलें झाड, जें यथाकाळीं
आपलें फळ देतें, आणि ज्याचें पान कोमत नाहीं,
त्यासारिखा तो आहे; आणि जें कांहीं तो करितो,
तें सफळ होतें. ४ जे दुष्ट ते तसे नाहींत,
परंतु ज्या भुसाला वारा उडवितो, त्यासारिखे ते
आहेत. ५ यास्तव न्यायांत दुर्जन आणि नीति-
मानांच्या सभेंत पापी टिकणारच नाहींत. ६
कारण कीं **परमेश्वर** नीतिमानांचा मार्ग जाणतो,
आणि दुष्टांचा मार्ग नाश पावतो.

## गीत २.

राष्ट्रें कां खवळतात? आणि लोक व्यर्थ योजना
कां करितात? २ **परमेश्वरावर** व त्या-
च्या अभिषिक्तावर पृथ्वीचे राजे उभे राहिले आ-
हेत, आणि अधिकाऱ्यानी एकत्र विचार केला आहे
कीं, ३ "आपण त्यांचीं बंदनें तोडूं, आणि आ-
पल्यावरून त्यांचीं बंधारणें टाकून देऊं." ४
जो आकाशांत बसलेला, तो हांसेल; **प्रभु** त्यां-
चा उपहास करील. ५ तेव्हां तो आपल्या रा-
गाने त्यांस बोलेल, आणि आपल्या संतापाने त्यांस
घाबरें करील. ६ पण "म्या आपला पवित्र डोंगर
सीयोन, यावर आपल्या राजाला अभिषेक करून
स्थापिलें आहे. ७ मी नेमाविषयीं सांगेन,
**परमेश्वराने** मला असें सांगितलें आहे, तूं
माझा पुत्र आहेस, आज म्या तुला जन्म दिल्हा
आहे. ८ माझ्याजवळ माग, ह्मणजे मी राष्ट्रें
तुझें वतन आणि पृथ्वीच्या सीमा तुझें धन असें
करून देईन. ९ तूं लोखंडी काठीने त्यांवर
राज्य करसील, कुंभाराच्या मडक्यासारिखें त्यांस
फोडसील." १० तर अहो राजानो, तुह्मी आतां
शाहाणे व्हा; अहो पृथ्वीचे न्यायाधीश, तुह्मी
बोध घ्या. ११ भयानें **परमेश्वराची** सेवा
करा, आणि कांपतांना हर्ष करा. १२ पुत्राचें
चुंबन घ्या; नाहीं तर कदाचित त्याला राग ये-
ईल, आणि त्याचा राग किंचित पेटविला असतां
तुह्मी वाटेने नाश पावाल; त्यावर जे आशा ठेवि-
तात, ते सर्व धन्य आहेत.

## गीत ३.

दावीद आपला पुत्र आबशालोम याच्यासमोरून
पळाला, तेव्हां त्याचें गीत.

हे **परमेश्वरा**, माझे वैरी किती वाढले! जे म-
जवर उठले ते बहुत आहेत. २ माझ्या जि-
वाविषयीं बहुत ह्मणतात कीं, "त्याला देवाजवळ
आश्रय नाहीं." सेलाह. ३ तथापि, हे **परमे-
श्वरा**, तूं माझ्यावरली ढाल, माझें गौरव, आणि
माझ्या मस्तकाला उंच करणारा आहेस. ४ म्या
आपल्या वाणीने **परमेश्वराला** हाक मारिली,
आणि त्याने आपल्या पवित्र डोंगरावरून मला
उत्तर दिल्हें. सेलाह. ५ मी निजलों आणि
झोंप घेऊन जागा झालों, कारण कीं **परमेश्वर**
मला आधार होता. ६ हजारों लोकानी माझ्या-
सभोंवते वेढा घातला, तरी त्यामुळें मी भिणार
नाहीं. ७ हे **परमेश्वरा**, तूं ऊठ; हे माझ्या
देवा, मला तार; कां तर त्वां माझ्या सर्व शत्रूं-
च्या गालावर मारिलें; त्वां दुष्टांचे दांत पाडून
टाकिले आहेत. ८ **परमेश्वराकडून** तारण होतें;
तुझ्या लोकांवर तुझा आशीर्वाद आहे. सेलाह.

## गीत ४.

मुख्य वाजंत्र्याला निगिनोथवर; दावीदाने केलेलें गीत.

हे माझ्या न्यायत्वाच्या देवा, जेव्हां मी हाक
मारितों, तेव्हां तूं मला उत्तर दे; संकटाच्या
वेळेस, त्वां मला मोकळें केलें; तूं मजवर दया

करून माझी प्रार्थना ऐक. २ अहो मनुष्यांनो,
तुम्ही कोठपर्यंत माझ्या गौरवाचा अनादर कराल,
आणि व्यर्थपणाची आवड धरून लबाडी शोधाल?
सेलाह. ३ तर जाणा कीं परमेश्वराने आप-
ल्यासाठीं धार्मिकाला वेगळें केलें आहे; जेव्हां
मी परमेश्वराला हाक मारितों, तेव्हां तो ऐकतो.
४ तुम्ही थरथर करा, आणि पाप करूं नका;
आपल्या अंथरुणावर आपल्या मनासीं विचार
करून स्वस्थ असा. सेलाह. ५ नीतीचे यज्ञ
करा आणि परमेश्वरावर भरंवसा ठेवा. ६
बहुत ह्मणतात कीं, "आह्मास बरें कोण दाख-
वील?" ७ हे परमेश्वरा, तूं आपल्या दृष्टीचा
प्रकाश आह्मावर पाड; त्यांचें धान्य व त्यांचा
द्राक्षरस वाढल्या वेळेस जो आनंद त्यापेक्षा त्वां
माझ्या हृदयांत अधिक आनंद दिल्हा आहे. ८
मी सुखाने निजून झोंप घेईन, कारण कीं हे पर-
मेश्वरा, केवळ तूंच मला निर्भय राहवितोस.

### गीत ५.

मुख्य वाजंत्र्याला; निहिलोथवर; दावीदाने केलेलें गीत.

हे परमेश्वरा, माझ्या गोष्टीकडे कान लाव;
माझी प्रार्थना ध्यानांत आण. २ हे माझ्या
राजा व माझ्या देवा, माझ्या ओरडण्याच्या
शब्दाकडे चित्त दे; कारण कीं तुझ्याजवळ मी
प्रार्थना करीन. ३ हे परमेश्वरा, सकाळीं तूं
माझा शब्द ऐकसील; सकाळीं मी तुझ्यासाठीं
सिद्ध होऊन लक्ष लावीन. ४ कां तर दुष्टाई-
ची आवड धरणारा असा देव तूं नाहींस; तु-
झ्याजवळ वाईट राहणार नाहीं. ५ तुझ्या
दृष्टीसमोर गर्विष्ट टिकणार नाहींत; तूं सर्व दु-
ष्टाई करणाऱ्यांचा द्वेष करितोस. ६ जे खोटें
बोलतात, त्यांचा नाश तूं करसील; रक्तपाती व
कपटी माणूस याचा कंटाळा परमेश्वर करितो. ७
परंतु मी तुझ्या परम कृपेने तुझ्या मंदिरास येईन;
तुझ्या भयाने तुझ्या पवित्र देवळांत भजन करीन.
८ हे परमेश्वरा, माझ्या वैऱ्यांमुळें तूं आपल्या
नीतीने मला चालीव; तुझा मार्ग माझ्यापुढें नीट
कर. ९ कारण कीं त्यांच्या तोंडीं सत्यता नाहीं;
त्यांचें अंतर्गत अति द्वाड आहे; त्यांचा घसा
उघडलेलें थडगें आहे; ते आपल्या जिभेने फुस-
लावतात. १० हे देवा, त्यांस दोषी ठरीव;
ते आपल्या योजना करून पडोत; त्यांच्या बहुत
पापांमुळें तूं त्यांस घालवून दे; कारण कीं त्यांनी
तुजवर फितूर केला आहे. ११ परंतु तुजवर
जे भरंवसा ठेवितात त्या सर्वांनी आनंद करावा;
त्यांनी सर्वकाळ हर्षशब्द करावा; कां तर तूं
त्यांचें रक्षण करितोस; जे तुझ्या नामावर प्रीति
करितात, त्यांनी तुजविषयीं उल्हास करावा; १२
कारण कीं हे परमेश्वरा, तूं नीतिमानाला
आशीर्वाद देतोस; जसें कवचाने तसें आपल्या
प्रसन्नतेने त्याला आच्छादितोस.

### गीत ६.

मुख्य वाजंत्र्याला; शिमिनीथाच्या निगिनोथवर; दावीदाने केलेलें गीत.

हे परमेश्वरा, तूं आपल्या रागाने माझा निषेध
करूं नको, आणि आपल्या संतापाने मला शि-
क्षा करूं नको. २ हे परमेश्वरा, मजवर दया
कर, कारण कीं मी अशक्त आहें; हे परमेश्वरा,
मला निरोगी कर, कारण कीं माझीं हाडें ठणकत
आहेत. ३ माझा जीवहि फार घाबरा झाला;
परंतु हे परमेश्वरा, तूं कोठपर्यंत? ४ हे परमे-
श्वरा, परत येऊन माझ्या जिवाला सोडीव, आ-
पल्या दयेमुळें मला तार. ५ कां तर मरणानंतर
तुझें स्मरण होत नाहीं; कबरेंत तुझी स्तुति कोण
करील? ६ मी आपल्या कण्हण्याने थकलों;
सर्व रात्रीं आपलें अंथरूण पाणीगत करितों; आ-
पल्या अश्रूंनी आपल्या पलंगाला भिजवितों. ७
माझी दृष्टि त्रासाने जर्जर झाली; माझ्या सर्व
वैऱ्यांमुळें ती जीर्ण झाली आहे. ८ अहो सर्व
दुष्कर्मी, मजपासून दूर जा; कारण कीं परमेश्व-
राने माझ्या रडण्याचा शब्द ऐकिला आहे. ९
परमेश्वराने माझी काकळूत ऐकिली आहे, पर-
मेश्वर माझी प्रार्थना अंगीकारील. १० माझे
सर्व शत्रु लाजून घाबरे होतील; ते फिरविले जा-
तील, ते एकाएकीं लाजतील.

### गीत ७.

दावीदाने केलेलें विलापक गीत; हें त्याने बन्यामीनी कुशाच्या गोष्टींविषयीं परमेश्वरापाशीं गायिलें.

हे परमेश्वरा माझ्या देवा म्या तुजवर आशा
ठेविली आहे; जे माझ्या पाठीस लागतात,

त्या सर्वांपासून मला राख आणि माझें तारण कर;
२ नाहीं तर सोडविणारा नसतां तो सिंहासारि-
खा मला फाडून तुकडे करील. ३ हे **परमे-
श्वरा**, माझ्या देवा, जर म्या तें केलें आहे, मा-
झ्या हातीं जर दुष्टपण आहे, ४ जो माझ्या-
जवळ सुखरूपी, त्याचें जर म्या वाईटपणाने फे-
डिलें आहे (याबदल तर जो माझा निष्कारण वैरी
त्याला सोडविलें आहे.) ५ तर शत्रु माझ्या
जिवाच्या पाठीस लागून त्याला आटोपो; भूमी-
सींहि माझा प्राण तुडवून टाको, आणि माझ्या गौर-
वाला मातीसीं वस्ति देवो. सेलाह. ६ हे **परमे-
श्वरा**, तूं आपल्या रागाने ऊठ; माझ्या वैऱ्यां-
च्या क्रोधामुळें उभा राहून मजसाठीं सावध हो;
त्वां न्याय नेमिला आहे. ७ आतां लोकांचा
समुदाय तुला वेढूं पाहतो, यास्तव तूं त्यांवर फि-
रून उंच हो.

८ **परमेश्वर** मुलखांचा निवाडा करील;
हे **परमेश्वरा**, माझ्या नीतिप्रमाणें आणि माझ्या
यथार्थतेप्रमाणें माझा न्याय ठरीव. ९ दुष्टांचें
वाईटपण नाहींसें होवो; परंतु तूं नीतिमानाला
स्थापून ठेव; कां तर नीतिमान देव हृदयांची
व गुर्देकमळांची परीक्षा करितो. १० ज्यांचें
हृदय यथार्थ, त्यांचा तारणारा जो देव, त्याकडून
माझें संरक्षण होतें. ११ देव नीतिमानाचा न्याय
करितो, आणि सर्व दिवस देवाला राग येतो.
१२ जर हा फिरत नाहीं, तर तो आपली तर-
वार पाजवील; त्याने आपलें धनुष्य ताणिलें आहे;
तें सिद्धच केलें आहे. १३ त्याने त्याच्यासाठीं-
हि मृत्युकारक हातेरें सिद्ध केलीं; त्याने आपले
बाण प्रज्वलीत केले आहेत. १४ पाहा, अन्या-
याने प्रसूतदुःख त्याला लागलें; दुष्कर्मगर्भ त्याला
झाला, आणि तो खोटेपण प्रसवला आहे. १५
त्याने खांच केली, ती खणली आहे, आणि जो
खाडा त्याने केला त्यांत तो आपणच पडला आहे.
१६ त्याचें दुष्कर्म त्याच्याच मस्तकावर फिरेल;
त्याचा बलात्कारहि त्याच्याच टाळूवर उतरेल.
१७ **परमेश्वराच्या** नीतिप्रमाणें मी उपकार मा-
नीन, आणि परात्पर **परमेश्वराच्या** नामाने की-
र्त्तन करीन.

## गीत ८.

मुख्य वाजंत्र्याला गित्तीथेवर; दावीदाने केलेलें गीत.

हे **परमेश्वरा** आमच्या **प्रभू**, तुझें नाम सर्व
पृथ्वींत किती महान्! कां तर त्वां आपली स्तुति
आकाशावर लावून दिल्ही आहे. २ शत्रु व
खुनसी यांस निवांत करायास तुझ्या वैऱ्यांमुळें,
त्वां लेंकरें व तान्हीं, त्यांच्या तोंडांतून जयकार
लाविला आहे. ३ तुझें आकाश तुझ्या बोटांचें
काम, चंद्र व तारे जे त्वां स्थापिले त्यांस जेव्हां
मी पाहतों, तेव्हां ४ "माणूस काय आहे कीं
त्वां त्याची आठवण करावी!" मनुष्यजात काय
आहे कीं त्वां त्याची भेट घ्यावी? ५ त्वां त्याला
दूतांहून थोडक्याने उणें केलें, आणि त्यावर मान
व थोरपण, यांचा मुगूट ठेविला आहे. ६ तूं
आपल्या हातांच्या कामांवर त्याला अधिकारी के-
लें; त्याच्या पायांखालीं त्वां अवघीं ठेविलीं आ-
हेत; ७ बकरीं व गुरें हीं सर्व, अणखी रानांतले
पशु; ८ आकाशांतलीं पांखरें व समुद्रांतले मासे
समुद्रमार्गांनी फिरणारे. ९ हे **परमेश्वरा** आम-
च्या **प्रभू**, सर्व पृथ्वींत तुझें नाम किती महान
आहे.

## गीत ९.

मुख्य वाजंत्र्याला; मूथलाब्बेनावर; दावीदाने केलेलें गीत.

हे **परमेश्वरा**, मी आपल्या सर्व हृदयाने स्तुति
करीन; तुझ्या सर्व आश्चर्यकृत्यांचें वर्णन करीन.
२ तुजविषयीं आनंद व उल्हास करीन; हे परा-
त्परा, तुझ्या नामाचें कीर्त्तन करीन. ३ माझे
शत्रु मागें फिरले आहेत, ते ठेंचळून तुझ्यापुढून
नाश पावले. ४ कां तर माझा न्याय व माझा
निवाडा त्वां केला आहे; त्वां सिंहासनावर बसून नी-
तीने न्याय केला आहे. ५ त्वां राष्ट्रांस निषेधिलें:
दुष्टाचा नाश केला, त्याचें नाव सदासर्वका-
ळासाठीं खोडिलें आहे. ६ हे शत्रू, ओसाड
करणीं सर्वकाळासाठीं संपलीं आहेत; त्वां नगरें
उपटिलीं; त्यांची आठवण देखील नाहींसी झाली
आहे. ७ **परमेश्वर** तर सर्वकाळ राहतो; तो
आपलें सिंहासन न्यायासाठीं मांडितो. ८ आणि
तो नीतीने सृष्टीचा न्याय ठरवील; यथार्थतेने
लोकांचा निवाडा करील. ९ जाचलेल्याला

**परमेश्वर** आश्रय आहे, संकटाच्या वेळांत तो
आश्रय आहे· १० आणि जे तुझें नाम जाणतात
ते तुजवर आशा ठेवितील; कारण कीं, हे **परमेश्व-**
**रा**, जे तुला शोधितात, त्यांस तूं सोडीत नाहींस·
११ सीयोनांत वस्ति करणारा जो **परमेश्वर** त्याचें
कीर्त्तन तुह्मी करा; लोकांत त्याचीं कृत्यें सांगा·
१२ कारण कीं जो रक्तपाताचा झाडा घेणारा
तो त्यांची आठवण करितो; तो दुखितांचें ओरडणें
विसरत नाहीं· १३ हे **परमेश्वरा**, जो मरण-
द्वारापासून माझा उठविणारा तो तूं आहेस; मज-
वर दया कर; माझ्या द्वेषकानी केलेलें जें माझें
दुःख तें पाहा· १४ यासाठीं कीं सीयोनाच्या
कन्याच्या दरवाज्यांत मी तुझी स्तुति सविस्तर सां-
गावी, तुझ्या तारणामुळें हर्ष करावा· १५ रा-
ष्ट्रांनी जी खांच केली, तींत तींच बुडालीं; जो फास
त्यानी लपविला, त्यांत त्यांचाच पाय सांपडला.
१६ **परमेश्वर** न्याय करितो असा तो कळला
आहे; दुर्जन आपल्या हातांच्या कामाने गुंतला
गेला· हिगायोन· सेलाह. १७ जे दुष्ट ते अधोगतींत
जातील, ह्मणजे जीं सर्व राष्ट्रें देवाला विसरतात
तीं. १८ कारण कीं दरिद्री सर्वकाळ विसरला
जाणार नाहीं, दुःखितांची आशा सदा निर्फळ हो-
णार नाहीं· १९ हे **परमेश्वरा**, ऊठ; माणसाचें
बळ न चालावें; राष्ट्रांचा न्याय तुझ्यासमोर केला
जावा· २० हे **परमेश्वर**, त्यांस भय घाल; आ-
पण माणसें आह्मों असें राष्ट्रानी जाणावें· सेलाह.

## गीत १०.

हे **परमेश्वरा**, तूं दूर कां उभा राहतोस? संक-
टाच्या वेळेस कां लपतोस? २ दुष्टांच्या गर्वा-
कडून दिनावर जळजळाट होतो; ज्या कुयुक्ति
त्यानी योजिल्या, त्यांत हे गुंतले· ३ कां तर
दुष्ट आपल्या मनोदयाविषयीं गौरव मिळवितो;
आणि लोभिष्ठ **परमेश्वराला** शाप देऊन तुच्छ
मानितो· ४ दुर्जन आपल्या तोंडाच्या उद्धटपणा-
प्रमाणें शोधीत नाहीं; देव नाहीं, असे त्याचे सर्व
विचार आहेत· ५ त्याचे मार्ग सर्वकाळ वाकडे
आहेत; तझे न्याय त्याच्या लक्षाहून वरते आहेत;
त्याच्या सर्व शत्रूंवर तो फुस्कारा टाकितो. ६
त्याने आपल्या हृदयांत ह्मटलें कीं, "पिढोपिढी
मी हलणार नाहीं, कां तर मी वाईटांत येणार
नाहीं. ७ याच्या तोंडांत शाप व कृत्रिम व अप-
हार हीं भरलीं आहेत; त्याच्या जिभेखालीं दुष्कर्म
व दुर्गुण आहेत· ८ खेड्यांच्या लपणींत बसतो;
गुप्तस्थानांमध्यें निर्दोष्याला जिवें मारितो; दुबळांस
त्याचे डोळे टपतात· ९ जसा सिंह आपल्या
गुहेंत तसा तो गुप्तस्थानीं दबा धरितो; दि-
नाला धरायास दबा धरितो; दिनाला आपल्या
जाळींत ओढून धरितो· १० तो नम्र होऊन
पड घेतो; मग आपल्या बळाने दुबळांवर उडी
घालितो· ११ त्याने आपल्या हृदयांत ह्मटलें
कीं, देव विसरला आहे; त्याने आपली दृष्टि लप-
विली आहे; तो कधींहि पाहणार नाहीं·" १२ हे
**परमेश्वरा**, ऊठ; हे देवा, आपला हात उंच कर;
दुःखितांस विसरूं नको· १३ दुर्जन देवाला कां
तुच्छ मानितो? तो आपल्या मनांत ह्मणतो कीं,
"तूं झाडा घेणार नाहींस." १४ त्वां पाहिलें आहे;
कां तर तूं आपला हात लावायासाठीं दुष्कर्म व
त्रास पाहतोस; हलाख्यानी आपणास सोपून दि-
ल्हा आहे; अनाथाचा तूं सहायकारी आहेस· १५
तूं दुष्टाचा व नष्टाचा हात मोड; तुला कांहीं
सांपडणार नाहीं तोंपर्यंत त्याच्या दुष्टाईचा शोध
कर· १६ **परमेश्वर** सदासर्वकाळ राजा आहे;
त्याच्या देशांतून राष्ट्रांचा नाश झाला आहे. १७
हे **परमेश्वरा**, त्वां दीनांचा मनोरथ ऐकून घेत-
ला आहे; त्यांचें हृदय सिद्ध करसील; तूं आ-
पला कान लावसील; १८ यासाठीं कीं त्वां अना-
थाचा व लिनाचा न्याय करावा, इहलोकांतला
माणूस अणखी भय घालणार नाहीं·

## गीत ११.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

ज्या **परमेश्वरावर** आशा ठेविली आहे; तु-
ह्मी माझ्या जिवाला कां सांगतां, "तूं पक्षा-
सारिखा आपल्या डोंगरास पळत जा." २ तर
पाहा, दुष्टानी धनुष्य ताणिलें; जे नीट हृदयाचे
त्यांस काळोखांत विंधायास त्यानी आपला बाण
दोऱ्यावर लाविला आहे· ३ जेव्हां पाये फोडले
आहेत, तेव्हां नीतिमान काय करील? ४ **परमे-**
**श्वर** आपल्या पवित्र देवळांत आहे, **परमेश्वराचें**
सिंहासन आकाशांत आहे; त्याचे डोळे पाहतात,

त्याच्या पापण्या मनुष्यांच्या संतानांची परीक्षा क-
रितात. ५ **परमेश्वर** नीतिमानाची परीक्षा घेतो;
परंतु दुर्जन आणि ज्याला बळात्कार आवडतो,
त्यांस त्याचा जीव द्वेषितो. ६ दुष्टांवर जाळीं,
अग्नि व गंधक व अति झळिचा वारा, यांची वृष्टि
तो करिल; हाच त्यांचा वांटा आहे. ७ कारण
कीं पवित्र **परमेश्वराला** पूर्ण पवित्रता आवडती.
त्याची दृष्टि सरळांकडे लागली आहे.

## गीत १२.

मुख्य वाजंत्र्याला; शेमिनिथावर; दावीदाने
केलेलें गीत.

हे **परमेश्वरा**, सहाय कर; कां तर धार्मिक ना-
हींसा झाला; मनुष्यांच्या संतानांतून सत्यवादी
सरले आहेत; आपल्या आपल्या शेजाऱ्यासीं ते
व्यर्थ बोलतात. २ फुसलावणाऱ्या होटांनी मन
राखून मनाने बोलतात. ३ सर्व फुसलावणाऱ्या
होटांस व कपटी मनाने बोलणाऱ्या जिभेला **पर-
मेश्वर** कापून टाकील. ४ ते ह्मणतात, "आह्मी
आपल्या जिभेविषयीं प्रबळ होऊं; आमचे होट
आमचेच; आमचा धनी कोण?" ५ "दीनांच्या
जाचणुकीमुळें दरिद्र्यांच्या कण्हण्यामुळें मी आतां
उठेन," असें **परमेश्वर** ह्मणतो; "मी त्याला
निर्भय जाग्यांत ठेवीन; तो त्यावर फुस्कारा टा-
कील." ६ **परमेश्वराचीं** वचनें शुद्ध वचनें,
मातीच्या मुसींत गाळलेलें रुपें, सात वेळां निर्मळ
केलेलें, असीं आहेत. ७ हे **परमेश्वरा**, तूं
त्यांस राखसील; प्रत्येकाला या पिढीपासून सर्व-
काळ संभाळसील. ८ मनुष्यांच्या संतानांमध्यें
अधम मनुष्यें उंचावलीं असतांच दुर्जन चहुंकडे
हिंडतात.

## गीत १३.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

हे **परमेश्वरा**, तूं कोठपर्यंत मला विसरसील?
सर्वकाळ कीं काय? मजपासून आपली दृष्टि
कोठपर्यंत झांकसील? २ म्या आपल्या मनांत
विचार कोठपर्यंत करावे? दिवसोदिवस माझ्या
ह्रदयांत खेद पावावा, माझ्या शत्रूने कोठपर्यंत
मजवर उठावें? ३ हे **परमेश्वरा** माझ्या देवा,
पाहा, माझें ऐक; माझ्या डोळ्यांस उजेड दे,
नाहीं तर मरणाची झोंप मला लागेल. ४ आ-
णि माझा शत्रु ह्मणेल कीं, "म्या त्याला जिंकिलें
आहे." मी डळमळतों तेव्हां माझे वैरी हर्षित
होतील. ५ परंतु म्या तुझ्या दयेवर आशा ठे-
विली आहे; तुझ्याकडून जें तारण त्यामुळें माझें
ह्रदय हर्षित होईल. ६ मी **परमेश्वराला** गा-
ईन, कारण कीं त्याने मजवर उपकार केला आहे.

## गीत १४.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

मूर्खांने आपल्या मनांत ह्मटलें कीं, "देव नाहीं."
लोक नासले; त्यानी अमंगळ काम केलें
आहे; चांगलें करणारा कोणी नाहीं. २ कोणी
ज्ञानी, किंवा देवाचा शोध करणारा आहे किंवा
नाहीं, हें पाहायास **परमेश्वराने** आकाशांतून
मनुष्यांच्या संतानांकडे न्याहाळून पाहिलें. ३
तर त्या सर्वांनी सन्मार्ग सोडिला; तीं सर्व बि-
घडलीं आहेत; चांगलें करणार कोणी नाहीं.
एक देखील नाहीं. ४ सर्व दुष्कर्म्यांस समज
नाहीं कीं काय? अन्न जसें खातात तसें माझ्या
लोकांस खातात; ते **परमेश्वराचें** नाम घेत
नाहींत. ५ तेथें ते फार भ्याले, कारण कीं सा-
त्विक पिढीमध्यें देव आहे. ६ तुह्मी दीनाचा
विचार तुच्छ केला, परंतु **परमेश्वर** त्याचें आ-
श्रयस्थान आहे. ७ इस्राएलाचें तारण जीयोनांतून
कोण देईल? जेव्हां **परमेश्वर** आपले पाडाव
केलेले लोक परत आणील, तेव्हां याकोब हर्षित
होईल, इस्राएल संतुष्ट होईल.

## गीत १५.

दावीदाने केलेलें गीत.

हे **परमेश्वरा**, तुझ्या मंडपांत कोण राहील?
तुझ्या पवित्र डोंगरावर कोण वस्ति करील? २
जो यथार्थ चालून नीति करितो, आणि आपल्या
मनापासून खरें बोलतो; ३ आपल्या जिभेने च-
हाडी करीत नाहीं; आपल्या शेजाऱ्याचें वाईट
करीत नाहीं, आणि आपल्या शेजाऱ्याविषयीं अ-
पकीर्त्ति धरीत नाहीं; ४ ज्याच्या दिसण्यांत
नाकारा माणूस अमान्य आहे, परंतु जे परमे-
श्वराला भितात, त्यांचा सन्मान करितो; शपथ
वाहिल्यावर दुःख असताहि ढळटत नाहीं; ५

आपला पैका व्याजावर देत नाहीं, आणि निर्दो-
ष्यास विरुद्ध असें दान घेत नाहीं; जो यांप्रमाणें
करितो, तो कधींहि ढळणार नाहीं.

### गीत १६.

दावीदाकडून मिक्ताम.

हे देवा, मला राख, कां तर म्या तुजवर आ-
शा ठेविली आहे. २ त्वां परमेश्वराला
ह्मटलें आहे कीं, "तूं माझा प्रभु आहेस; तुज-
वांचून माझें कल्याण होत नाहीं; ३ पृथ्वीवर
जे पवित्र त्यांसच मात्र; तेच मान्य; त्यांवर
माझी पूर्ण आवड आहे. ४ जे दुसऱ्या देवाच्या
पाठीं धांवतात, त्यांस खेद फार होतील; त्यां-
चीं रक्तमय पेयअर्पणें मी करणार नाहीं आणि
आपल्या होटांत त्यांचीं नांवें घेणार नाहीं. ५
हे परमेश्वरा, माझा भाग व माझी वाटी यांचें
भरण; तूं माझ्या दैवाचा आधार आहेस. ६
माझे विभाग रमणीय जाग्यांत पडले; होय, वतन
मला फार आवडतें. ७ मी परमेश्वराला धन्य
धन्य ह्मणेन, कां तर तो मला बोधितो; रात्रीं
माझीं गुर्देकमळें देखील मला बोध करितात. ८
म्या आपल्यासमोर परमेश्वर नेहमी ठेविला
आहे; तो माझ्या उजव्याकडे यास्तव मी ढळ-
णार नाहीं. ९ याकरितां माझें हृदय आनंद
पावलें, आणि माझें गौरव हर्षित झालें आहे;
माझा देह देखील निर्भय राहील. १० कां तर
तूं मला कबरेंत सोडून देणार नाहींस; आ-
पल्या भक्ताला सडलेपण अनुभवूं देणार नाहींस.
११ तूं मला जीवनाची वाट कळविसील; तुझ्या-
समोर संतोषांचें पुरेपण; तुझ्या उजव्या हातीं
सुखें सर्वकाळ आहेत.

### गीत १७.

दावीदानें केलेली प्रार्थना.

हे परमेश्वरा, नीति ऐक; माझ्या रडगाण्याचें
श्रवण कर; माझ्या प्रार्थनेकडे कान दे, कां
तर ती कपट होटांतून नाहीं. २ माझा न्याय
तुझ्यापुढून प्रगट व्हावा; जीं नीट, तीं तुझ्या डो-
ळ्यांनीं पाहावीं. ३ त्वां माझ्या अंतःकरणाची
परीक्षा केली, रात्रींत चौकसी केली, मला आटि-
लें; तरी तुला कांहीं सांपडणार नाहीं, म्या नेम
केला आहे, माझ्या तोंडानें उलंघन होणार नाहीं.
४ मनुष्याच्या करण्याविषयीं तुझ्या होटांच्या
शब्दाकडून म्या बलात्काऱ्याच्या वाटा संभाळून
पाहिल्या. ५ माझे पाय न सरकावे ह्मणून तूं
आपल्या मार्गांत माझी चाल स्थिर कर. ६ हे
देवा, म्या तुला हाक मारिली; कां तर तूं मला
उत्तर देत असतोस; तूं आपला कान मजकडे
लाव; माझें बोलणें ऐक. ७ जे तुजवर आशा
ठेवितात त्यांस त्यांवर उठणाऱ्यांपासून जो तूं आप-
ल्या उजव्या हातानें तारितोस तो तूं आपली दया
दाखीव. ८, ९ डोळ्याच्या बुबळांतल्या पुत-
ळीसारिखें मला राख; तूं आपल्या पंखांच्या छा-
येनें मला आच्छादन करून जे माझा नाश करूं
पाहतात, जे माझे जिवाचे वैरी मला वेढितात,
त्यांपासून मला राख. १० ते आपल्या पुष्टप-
णानें भरले आहेत, ते गर्वानें बोलतात. ११
त्यांनीं आतां आह्मास पदोपदीं वेढिलें आहे;
त्यांनीं भूमीवर पाडायास आपले डोळे लाविले
आहेत. १२ जसा सिंह, तसा तो विदारण
करायास बुभुक्षित असतो, आणि जसा तरणा
सिंह तसा गुप्तस्थानीं बसतो. १३ हे परमे-
श्वरा, ऊठ; त्याचा तूं विरोध कर; त्याला खा-
लीं कर; दुर्जन जो तुझी तरवार, त्यापासून मा-
झ्या जिवाचा निभाव कर. १४ हे परमेश्वरा,
जे पुरुष तुझा हात, त्यांपासून; इहलोकाचे मनुष्य
ज्यांचा भाग आयुष्यांत आहे, यांपासून निभाव
कर; आणि त्यांचें पोट तूं आपल्या संग्रहानें
भरितोस, ते लेंकरांविषयीं तृप्त होतात, आणि
उरलेलें आपल्या मुलांसाठीं ठेवितात. १५ मी
तर नीतिमत्वांत तुझें तोंड पाहीन, जागृत होण्या-
च्या वेळेस मी तुझ्यासारिखें होऊन तृप्त होईन.

### गीत १८.

मुख्य वाजंत्र्याला; परमेश्वराचा सेवक दावीद याकडून, ज्या दिवसीं परमेश्वरानें त्याला त्याच्या सर्व शत्रूंच्या हातांतून आणि शाऊलाच्या हातांतून सोडविलें, तेव्हां त्यानें परमेश्वराजवळ या गितांतल्या गोष्टी उच्चारून असें ह्मटलें कीं,

हे परमेश्वरा, तूं माझी शक्ति; मी तुझी आ-
वड धरीन. २ परमेश्वर माझा खडक,
माझा दुर्ग व माझें निभावण, माझा देव, माझा

**खडक**रूप आश्रय; त्यावर मी आशा ठेवीन;
माझी ढाल व माझ्या तारणाचें शिंग, माझा गड
आहे. ३ **परमेश्वर** जो स्तुतिमान्य त्याचें नाम
मी घेईन, आणि आपल्या शत्रूंपासून तारला जा-
ईन. ४ **म**रणबंदानी मला आवळिलें, आणि
नाशकारक लोंढ्यानी मला भय झालें. ५ **लोकां**-
तराच्या बंदानी मला वेढिलें; मरणाचे फास मज-
पुढें आले. ६ **ह्या** आपल्या संकटांत **परमेश्व-
राला** हाक मारिली, आणि मी आपल्या देवाजवळ
ओरडलों, त्याने आपल्या देवळांतून माझा शब्द
ऐकिला, माझें ओरडणें त्याच्यापुढें, त्याच्या कानांत
गेलें. ७ **ते**व्हां पृथ्वी कांपून गडबडली; पर्वतांचे
पायहि हदरून कांपले; कां तर त्याला राग आला.
८ **त्याच्या** नाकांतला धूर चढला, आणि त्याच्या
तोंडांतून अग्नि भस्म करिता झाला; तेणेकरून
तप्त विंगळ झाले. ९ **तो** आकाश लववून उत-
रला; आणि त्याच्या पायांखालीं काळोख होता.
१० **अण**खी तो करूबावर बसून उडाला; त्याने
वायुरूप पंखानी झडपाहि घातलों. ११ **त्याने** अं-
धारास आपलें आच्छादन केलें; आपल्याभोंवतें
अंधकारकयुक्त पाणी व निबिड अभाळ, यांस
आपला मंडप केला. १२ **त्याच्या** पुढल्या तेजाने
त्याचे ढग चालले; गारावृष्टि व धगधगीत विंगळ
झाले. १३ **ते**व्हां **परमेश्वराने** आकाशांत गड-
गडाट केले; **आणि परात्पराने** आपला शब्द
काढिला; गारावृष्टि आणि धगधगीत विंगळ केले.
१४ **असे** त्याने आपले बाण सोडून त्यांची दाणा-
दाण केली; विजांचा भडिमार करून त्यांची गड-
बड केली. १५ **ते**व्हां पाण्यांतले तळ दिसलें;
भुवनाचे पाये देखील उघडे झाले; हे **परमे-
श्वरा**, तुझ्या निषेध व तुझ्या नाकाचा श्वास यां-
कडून तसें झालें.. १६ **त्याने** वरून पाठवून मला
घेतलें; मोठ्या पाण्यांतून मला काढिलें. १७
**त्याने** माझे बळकट शत्रु व माझे द्वेषी यांपासून
मला सोडविलें, कारण कीं ते मजहून शक्तिमान
होते. १८ **माझ्या** विपत्तीच्या दिवसीं ते मला
आडवे आले, परंतु **परमेश्वर** मला आधार हो-
ता. १९ **आणि** त्याने मला काढून मोकळ्या ठि-
काणीं नेलें; त्याचा आग्रह मजवर होता ह्मणून
मला सोडविलें. २० **परमेश्वराने** माझ्या नी-
तिप्रमाणें माझें चांगलें केलें; माझ्या हातांच्या
निर्मळपणाप्रमाणें मला परत दिल्हें. २१ **कारण**
कीं म्या **परमेश्वराचे** मार्ग पाळिले, आणि आ-
पल्या देवाविषयीं दुष्टपण केलें नाहीं. २२ **कां**
कीं त्याचे सर्व न्याय म्या आपल्या लक्षांत रा-
खिले; आणि त्यांचे नेम आपल्यापासून दूर
केले नाहींत. २३ **असा** मी त्यासीं निर्दोषी
होतों; म्या आपणाला अन्यायापासून राखिलें.
२४ **आणि परमेश्वराने** माझ्या नीतिप्रमाणें
त्याच्या दृष्टीपुढें माझ्या हातांच्या निर्मळपणा-
प्रमाणें मला दिल्हें. २५ **धार्मिकासीं** तूं धा-
र्मिक असतोस; निर्दोषी पुरुषासीं तूं निर्दोषी
असतोस; २६ **निर्मळासीं** तूं निर्मळ असतोस;
आणि वावग्यासीं तूं विरुद्ध असतोस. २७ **कां**
तर तूं दीन लोकांस तारितोस, आणि उंच डो-
ळ्यांस नीच करितोस. २८ अणखी तूं माझा
दिवा तेजस्वी करितोस; **परमेश्वर** माझा देव
माझ्या अंधाराचा प्रकाश करितो. २९ **कां** तर
तुझ्यायोगें मी सैन्याच्या गोटांतून धांवतों, आणि मी
आपल्या देवाच्यायोगें भिंतीवरून उडी मारितों.
३० **जो देव** त्याचा मार्ग पूर्ण आहे:
**परमेश्वराचें** वचन आटून पाहिलेलें आहे; जे
त्यावर आशा ठेवितात, त्या सर्वांस तो ढाल आहे.
३१ **कां** तर **परमेश्वराखेरीज देव** कोण आहे!
आणि आमच्या देवावांचून कोण **खडकरूप** आ-
श्रय आहे! ३२ **देव** माझी कमर बांधितो,
आणि माझा मार्ग पूर्ण करितो. ३३ **माझे** पाय
हरणाच्या पायांसारिखे करितो, आणि माझ्या
उंच स्थानांवर मला उभें करितो. ३४ **माझ्या**
हातांस लढणें शिकवितो, आणि पितल धनुष्य
माझ्या भुजानी मोडलें जातें. ३५ **तुझ्या** तार-
णाची ढाल मला देतोस, आणि तुझा उजवा हात
मला आधार देतो; तुझ्या प्रसन्नतेने मला मोठे-
पण झालें आहे. ३६ **तूं** माझीं पावलें **मोकळीं**
केलीं, आणि माझे घोटे डळमळत नाहींत. ३७
**मी** आपल्या शत्रूंच्या पाठीं लागून त्यांस **आटो**-
पितों, आणि ते संपे तोंपर्यंत मी फिरत **नाहीं**
३८ **मी** त्यांस खुपसतों, आणि त्यांच्याने **उठवे**
नाहीं; माझ्या पायांखालीं ते पडतात. ३९ **कां**
तर मला लढण्यासाठीं बळ आवळिलें; **माझ्या**-

वर जे उठतात त्यांस तूं माझ्याखालीं करितोस.
४० त्वां माझ्या शत्रूंची मान मला दिल्ही, आणि
मी आपले द्वेषी यांस मारिले. ४१ त्यांनी हाक
मारिली, परंतु कोणी तारणारा नाहीं; परमेश्व-
राला हाक मारिली, परंतु त्याने त्यांस उत्तर
दिल्हें नाहीं. ४२ म्या त्यांस वाऱ्यापुढल्या धु-
ळीसारिखें चूर्ण केलें; मार्गांतल्या चिखलासारिखें
त्यांस रिचविलें. ४३ लोकांच्या कलहापासून
तूं माझा निभाव करितोस; मला राष्ट्रांचा शिरो-
मणी करितोस; ज्या लोकांस मी ओळखीत न-
व्हतों, ते माझे सेवक झाले. ४४ कानीं ऐकतांच
मला मान्य झाले; परके लोक माझ्याजवळ आ-
र्जव करितात. ४५ परक्या वंशांचा क्षय झाला,
आणि ते आपल्या लपण्याच्या ठिकाणीं घाबरे
झाले. ४६ परमेश्वर जिवंत आहे, आणि मा-
झा खडकरूप आश्रय स्तुतियोग्य आहे; माझ्या
तारणाचा देव थोरच मानला असावा. ४७
देव माझ्यासाठीं सूड उगवितो; तो माझ्याखालीं
राष्ट्रें वश्य करितो. ४८ माझ्या शत्रूंपासून माझा
निभाव करितो; जे मजवर उठतात त्यांपेक्षांहि तूं
मला थोर करितोस; बळात्कारी माणसापासून
मला सोडवितोस. ४९ यास्तव, हे परमेश्वरा,
राष्ट्रांमध्यें मी तुझी स्तुति करीन; तुझ्या नामाचें
कीर्त्तनहि करीन. ५० तो आपल्या राजाला मोठीं
तारणें देतो; अभिषिक्ताला दावीद व त्याची सं-
तति यांवर सर्वकाळ दया करितो.

## गीत १९.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदानें केलेलें गीत.

आकाश देवाचें गौरव वर्णितें, आणि अंतराळ
त्याच्या हातांचें कृत्य दाखवितें. २ दिव-
सास दिवस गोष्ट सांगतो, आणि रात्रीस रात्रि
ज्ञान सुचविती. ३ वाचा नाहीं, शब्द नाहींत,
त्यांची वाणी ऐकली जात नाहीं. ४ त्यांची
वळ सर्व पृथ्वींत गेली, आणि त्यांचीं वाक्यें सृष्टी-
च्या सीमेस पावलीं; त्यामध्यें त्याने सूर्याची वस्ति
ठेविली आहे. ५ आणि हा नवऱ्यासारिखा आ-
पल्या खोलींतून निघतो; बळवान माणसासारिखा
वाटेने धांवायास हर्षतो. ६ त्याचें निघणें आका-
शाच्या शेवटापासून आणि त्याच्या शेवटापर्यंत
त्याची फेरी असती, आणि त्याच्या उन्हापुढें कांहीं
लपलें जात नाहीं. ७ परमेश्वराचें नेमशास्त्र
पूर्ण आहे, जिवाला ठिकाणीं आणितें; परमेश्व-
राचा प्रमाणनेम खरा आहे, भोळ्याला ज्ञानी
करितो. ८ परमेश्वराचीं बंधारणें नीट आहेत,
हृदयाला आनंदवितात; परमेश्वराची आज्ञा
निर्मळ आहे, डोळ्यांस उजेड करिती. ९ परमे-
श्वराचें भय शुद्ध, सर्वकाळ स्थिर आहे; परमे-
श्वराचे न्याय खरे, अगदी नीतिवंत आहेत. १०
सोन्यापेक्षां, आणि पुष्कळ निर्मळ सोन्यापेक्षां
आवडीचे आहेत; मधेपेक्षां, मोहळाच्या पाझरापे-
क्षांहि गोड आहेत. ११ आणखी त्यांकडून तुझा
सेवक बोध पावतो; ते पाळल्याने बहुत सार्थक
होतें. १२ आपल्या चुक्या कोण समजतो?
गुप्त दोषांविषयीं तूं मला निर्दोषी कर. १३ आण-
खी आपल्या सेवकाला उद्धटपणापासून आवरून
धर; त्यांस मजवर धनीपण करूं देऊं नको;
मग मी पूर्ण होईन, आणि मोठ्या अतिक्रमाविषयीं
निर्दोषी होईन. १४ हे परमेश्वरा, हे माझ्या
खडकरूप आश्रया, आणि माझ्या खंड भरणाऱ्या,
तुझ्याजवळ माझ्या तोंडांतलीं वाक्यें आणि माझ्या
हृदयांतलें ध्यान मान्य होवो.

## गीत २०.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदानें केलेलें गीत.

संकटाच्या दिवसीं परमेश्वराने तुझें ऐकावें;
याकोबाच्या देवाच्या नामाने तुझें संरक्षण क-
रावें. २ त्याने तुजवळ पवित्र स्थानांतून सहाय
पाठवावें, आणि सीयोनांतून तुला आधार द्यावा.
३ तुझीं सर्व अर्पणें आठवावीं, आणि तुझा होम
मानून घ्यावा. सेलाह. ४ त्याने तुझ्या मनो-
रथाप्रमाणें तुला द्यावें, आणि तुझी प्रत्येक योजना
सिद्धीस न्यावी. ५ आह्मी तुझ्या तारणामुळें
हर्षनाद करूं, आणि आमच्या देवाच्या नामाने
झेंडा उभारूं; परमेश्वराने तुझीं सर्व मागणीं
पूर्ण करावीं. ६ आतां मी जाणतों कीं परमेश्वर
आपल्या अभिषिक्ताला तारितो; तो आपल्या प-
वित्र आकाशांतून आपल्या सहायकारक हाताने
पराक्रम करून त्याला उत्तर देईल. ७ कोणी
रथांचें आणि कोणी घोड्यांचें स्मरण करितात,
परंतु आह्मी आमचा देव परमेश्वर याच्या

नामाचें स्मरण करूं. ८ ते लवून पडले, परंतु
आह्मी उभे होऊन यथास्थित राहिलों. ९ हे
**परमेश्वरा**, तारण कर; आह्मी हाक मारितों,
त्या दिवशीं राजाने आह्मास उत्तर द्यावें.

## गीत २१.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

**हे परमेश्वरा**, तुझ्या सामर्थ्याने राजा आनंद
करितो; आणि तुझ्या तारणाने तो किती हर्ष
करितो. २ **त्वां** त्याला त्याच्या हृदयांतली इच्छा
प्राप्त केली आहे; आणि त्याच्या होटांतली विनंती
कांहींच वर्जिली नाहीं. सेलाह. ३ **कां** तर
अगोदर तूं चांगलीं वरदानें त्याला देतोस; निर्मळ
सोन्याचा मुगूट त्याच्या डोक्यावर ठेवितोस. ४
**त्याने** तुझ्याजवळ जीवन मागितलें; त्वां त्याला
दिल्हें, सर्वकाळचें दीर्घ आयुष्य दिल्हें. ५ **तुझ्या**
तारणामुळें त्याचें गौरव मोठें आहे; तूं मान व
महत्व त्याला पुरवितोस. ६ **कां** तर तूं त्याला
सर्वकाळ आशीर्वाद नेमितोस; आपल्या दर्शना-
च्या आनंदाने त्याला संतोषवितोस. ७ **कारण**
कीं राजाने **परमेश्वरा**वर आशा ठेविली आहे,
आणि **परात्पराच्या** दयेने त्याची कांहीं डळमळ
होणार नाहीं. ८ तुझे सर्व शत्रु तुझ्या हातांत
सांपडतील; तुझे द्वेषी तुझ्या उजव्या हातांत सां-
पडतील. ९ तूं आपल्या प्रत्यक्ष होण्याच्या वेळेस
त्यांस धगधगित भट्टीसारिखें करसील; **परमे-
श्वर** आपल्या रागाने त्यांस गिळील, आणि अग्नि
त्यांस खाईल. १० **तूं** पृथ्वींतून त्यांचें फळ
व मनुष्यांच्या संतानांतून त्यांचा वंश नाहींसा कर-
सील. ११ **कां** तर त्यानी तुजवर वाईट योजिलें;
त्यानी कुयुक्ति काढिली; त्यांच्याने साधवत नाहीं.
१२ **कारण** कीं जेव्हां तूं त्यांच्या तोंडासमोर आ-
पल्या दोऱ्यांसीं बाण सिद्ध करितोस, तेव्हां त्यांस
पराङ्मुख करितोस. १३ **हे परमेश्वरा**, त्वां
आपल्या बळाने थोर असावें; आह्मी गाऊन
तुझ्या पराक्रमाचें कीर्त्तन करूं.

## गीत २२.

मुख्य वाजंत्र्याला; एजलेथ शाहारावर;
दावीदाने केलेलें गीत.

**हे** माझ्या **देवा**, माझ्या **देवा**, त्वां मला कां टा-
किलें? माझ्या तारणापासून, माझ्या ओरडणा-
च्या शब्दांपासून दूर कां राहतोस? २ हे माझ्या
**देवा**, दिवसा मी हाक मारितों, आणि तूं मला
उत्तर देत नाहींस; रात्रींहि ओरडतों आणि मला
दमच नाहीं. ३ **तथापि** तूं पवित्र इस्राएलाच्या
स्तवनांमध्यें राहतोस. ४ **आमच्या** वडिलानी तु-
जवर आशा ठेविली, त्यानी आशा ठेविली, आ-
णि त्वां त्यांचा निभाव केला. ५ **ते** तुझ्याजवळ
ओरडले आणि सोडविले गेले; त्यानी तुजवर
आशा ठेविली आणि लज्जित झाले नाहींत.
६ **परंतु** मी कीडा आहें, मनुष्य नाहींच; माण-
सांचा धिक्कारपात्र, लोकांत तुच्छच आहें. ७ **जे**
सर्व मजकडे पाहतात, ते माझा उपहास करि-
तात; होट काढितात; ते डोकें डोलवितात. ८ **ते**
ह्मणतात कीं, "याने **परमेश्वरा**वर आशा ठेवि-
ली, तो याचा निभाव करो; त्याने त्याला सोड-
वावें, कारण कीं याने त्यावर आवड ठेविली." ९
**त्वां** तर मला पोटांतून काढिलें; मी आपल्या आ-
ईच्या स्तनांसीं होतों, तेव्हां त्वां मला आशा
दाखविली. १० **गर्भापासून** मी तुजवर घातला
गेलों; आपल्या आईच्या पोटीं झाल्यापासून तूं
माझा **देव** आहेस. ११ **मज**पासून दूर होऊं
नको, कां तर संकट जवळ आलें आहे, अणखी
कोणी सहायकारी नाहीं. १२ **बहुत** गोऱ्हे माझ्या
भोंवते लागले; बाशानांतल्या बळाढ्यानी मला
वेढिलें. १३ **गर्जणाऱ्या** व फाडणाऱ्या सिंहासा-
रिखें त्यानी आपलें तोंड मजवर वासलें. १४ **मी**
पाण्यासारिखा रिचवता गेलों, आणि माझीं सर्व
हाडें खिळखिळीं झालीं; माझें हृदय मेणासारिखें
होऊन माझ्या आंतड्यांमध्यें विरलें. १५ **माझें**
बळ खापरासारिखें सुकून जातें; माझी जीभहि
माझ्या जबड्यांत चिकटती, आणि तूं मला मर-
णाच्या मातीस लावितोस. १६ **कां** तर कुत्रे
माझ्याभोंवते आले; दुष्टांच्या समुदायाने मला
वेढिलें; त्यानी माझे हात व माझे पाय यांस खों-
चिलें. १७ **माझीं** सर्व हाडें मला मोजतां येवाव,
ते मजकडे न्याहाळून पाहतात. १८ **ते** आपाप-
ल्यांत माझीं वस्त्रें वांटितात; माझ्या पांघरूणावर
पणहि पाडितात. १९ **परंतु** तूं **परमेश्वर** माझ्या
शक्तिदाता, दूर होऊं नको; माझ्या सहायासाठीं
उतावळी कर. २० **तरवारीपासून** माझा प्राण

सोडीव; कुत्र्याच्या पंजापासून माझा एकुलता सो-
डीव. २१ सिंहाच्या तोंडापासून आणि रेमाच्या
शिंगांपासून मला राख; माझें ऐक. २२ मी आ-
पल्या भावांमध्यें तुझ्या नामाचें वर्णन करीन; मंड-
ळीमध्यें तुझी स्तुति करीन. २३ अहो परमेश्व-
राचे भिणारे, तुह्मी त्याची स्तुति करा; याकोबाच्या
सर्व संतानांहो, तुह्मी त्याचें गौरव माना; इस्राए-
लाच्या सर्व संतानांहो, तुह्मी त्याची भीडहि राखा.
२४ कां तर त्यानें दुःखिताच्या दुःखाचा धिक्कार
केला नाहीं; कंटाळा केला नाहीं, आणि त्यानें आ-
पलें तोंड त्याच्यापुढें लपविलें नाहीं; परंतु जेव्हां
हा त्याबवळ ओरडला, तेव्हां त्यानें ऐकिलें. २५
मोठ्या मंडळींत माझें स्तवन तुजविषयीं होईल;
त्याच्या भिणाऱ्यांसमोर मी आपले नवस फेडीन.
२६ दरिद्री जेवून तृप्त होतील; जे परमेश्वरा-
ला शोधितात, ते त्याची स्तुति करितील; तुमचें
मन सर्वकाळ जगेल. २७ पृथ्वीच्या सर्व सीमां-
तले आठवण धरून परमेश्वराकडे फिरतील;
तुझ्यापुढेंच राष्ट्रांतलीं सर्व कुटुंबें भजतील. २८
कां तर राज्य परमेश्वराचें आहे; तोच राष्ट्रां-
वर अधिकार करितो. २९ पृथ्वींतले सर्व पुष्ट जे-
वून भजतील; मातींत उतरणारे सर्व त्याच्यापुढें
लवतील; कोणाच्यानेंहि आपला प्राण वांचवणार
नाहीं. ३० कांहीं संतान त्याची सेवा करील;
तें प्रभूची पिढी असें मोजलें जाईल. ३१ तीं
जाऊन जे जन्मतील त्या लोकांस त्याचा न्याय
सांगतील कीं, "त्यानें केला आहे."

## गीत २३.

दावीदानें केलेलें गीत.

परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, मला उणें हो-
णार नाहीं. २ मला कोंवळ्या कुरणांत बस-
वितो; निवांत पाण्यावर मला नेतो. ३ तो आ-
पल्या नामासाठीं माझ्या जिवाला माघारें आणितो;
तो मला नीतीच्या मार्गांवर चालवितो. ४ अण-
खी मी मरणछायेच्या खिंडींत चालतों, तरी वाई-
टाला भिणार नाहीं; कां तर तूं माझ्यासंगतीं
आहेस; तुझी काठी व तुझा टेंका, हीं माझें समा-
धान करितील. ५ माझ्या वैऱ्यांदेखतां तूं माझ्या-
पुढें मेज मांडितोस; माझ्या डोक्याला तेल ला-
वितोस; माझी वाटी भरलेली आहे. ६ निश्चयें
माझ्या आयुष्याच्या सर्व दिवसांत बरेंपण व
दया होतील, आणि चिरकाल मी परमेश्वरा-
च्या घरीं राहीन.

## गीत २४.

दावीदानें केलेलें गीत.

पृथ्वी व तिचा भरणा, भूमि व तींतले राहणारे
परमेश्वराचे आहेत. २ कां तर त्यानें
तिचा पाया पाण्यांवर घातला, आणि पुरांवर ति-
ला स्थापिलें आहे. ३ परमेश्वराच्या डोंगरावर
कोण चढेल? आणि त्याच्या पवित्र स्थानांत कोण
उभा राहील? ४ ज्याचे हात स्वच्छ व हृदय
निर्मळ; ज्यानें आपला जीव व्यर्थ कार्यासाठीं
उठविला नाहीं, आणि कपटानें शपथ वाहिली
नाहीं. ५ तो परमेश्वरापासून आशीर्वाद आणि
आपल्या तारणाच्या देवापासून नितिमत्त्व पावेल.
६ ही त्याला विचारणाऱ्यांची पिढी आहे; तुझ्या
मुखाचे शोधक याकोबच आहेत. सेलाह. ७
अहो दरवाजे, तुह्मी आपले शिरोभाग उंच करा;
सर्वकाळचीं दारेंहो, तुह्मी उंचाविलीं जा; मग
गौरवाचा राजा आंत जाईल. ८ "हा गौरवाचा
राजा कोण?" बळवान् व पराक्रमी परमेश्वर,
युद्धांत पराक्रमी परमेश्वर तो. ९ अहो दर-
वाजे, तुह्मी आपले शिरोभाग उंच करा; सर्व-
काळचीं दारेंहो, तुह्मी उंच व्हा; मग गौरवाचा
राजा आंत जाईल. १० "जो गौरवाचा राजा
हा कोण?" सैन्यांचा परमेश्वर, तो गौरवाचा
राजा आहे. सेलाह.

## गीत २५.

दावीदानें केलेलें गीत.

हे परमेश्वरा, मी आपला जीवात्मा तुझ्याकडे
वर लावितों. २ हे माझ्या देवा, म्यां तुज-
वर आशा ठेविली आहे; म्यां लज्जित न व्हावें,
माझ्या शत्रूंस मजवर हर्षूं देऊं नये. ३ जे तु-
झ्या आशेवर राहतात, ते सर्व लज्जित न व्हावे;
जे उगेच दगा करितात, ते लज्जित व्हावे. ४
हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला कळीव;
आपल्या वाटा मला शिकीव. ५ तूं आपल्या
सत्यतेच्या मार्गानें मला चालीव आणि मला
शिकीव, कारण कीं तूं माझ्या तारणाचा देव आ-
हेस; सर्व दिवस मी तुजवर आशा ठेवितों.

६ **हे परमेश्वरा**, तूं आपल्या फार ममतेची, आ-
पल्या फार दयेची आठवण कर, कां तर त्या
सर्वकाळापासून आहेत. ७ **हे परमेश्वरा**, तूं
माझ्या बाळपणांतलीं पापें, आणि माझे अतिक्रम
आठवूं नको; तुझ्या दयेप्रमाणें, तुझ्या चांगले-
पणामुळें माझी आठवण कर. ८ **परमेश्वर** चां-
गला व नीट आहे; यास्तव तो पाप्यांस मार्गीं
लावितो. ९ दिनांस न्यायाने नेतो; आपलाच
मार्ग दिनांस शिकवितो. १० जे **परमेश्वराचा**
करार व त्याचे नेम पाळितात, त्यांसीं त्याच्या
सर्व वाटा दयारूप व सत्यतारूप आहेत. ११
**हे परमेश्वरा**, तूं आपल्या नामामुळें माझा अ-
न्याय क्षमा कर, कारण कीं तो मोठा आहे. १२
जो माणूस **परमेश्वराला** भितो, तो कोण?
त्याला तो निवडलेल्या मार्गांत शिकवील. १३
त्याचा जीव सुखी राहील, आणि त्याचें संतान
पृथ्वीचें वतन पावेल. १४ **परमेश्वराचें** रहस्य
त्याच्या भिणाऱ्यांसीं आहे, आणि तो आपला
करार त्यांस कळवील. १५ माझे डोळे **परमे-
श्वराकडे** नेहमी आहेत, कारण कीं तो माझे
पाय जाळ्यांतून काढितो. १६ तूं मजकडे पाहा
आणि मजवर दया कर; कारण कीं मी एकला
व दुःखित आहें. १७ माझ्या हृदयांतलीं संकटें
वाढविलेलीं आहेत; तूं माझ्या पेचांतून मला
काढ. १८ माझें दुःख व माझे कष्ट पाहा, आणि
माझीं सर्व पापें क्षमा कर. १९ माझ्या शत्रूंवर
पाहा, कां कीं ते बहुत आहेत, आणि त्यानीं क-
ठोर द्वेषाने मला द्वेषिलें आहे. २० तूं माझा
जीव राख आणि मला सोडीव; म्या लज्जित
न व्हावें, कां तर तुजवर आशा ठेविली आहे.
२१ यथार्थपण व नीटपण यानीं मला राखावें,
कां तर मी तुजवर आशा ठेवितों. २२ हे
देवा, इस्राएलाला त्याच्या सर्व संकटांतून
खंडून काढ.

## गीत २६.

दावीदाने केलेलें गीत.

**हे परमेश्वरा**, माझा न्याय कर; कां तर मी
आपल्या यथार्थपणाने चाललों आहें, आणि
म्या **परमेश्वरावर** आशा ठेविली आहे, म्या न
निसरावें. २ **हे परमेश्वरा**, माझी परीक्षा कर
आणि माझी प्रचीति घे; माझीं गुर्देकमळें व माझें
हृदय यांस आटून पाहा. ३ कां तर तुझी दया
माझ्या डोळ्यांपुढें आहे; आणि तुझ्या सत्यतेने
मी वर्त्तलों आहें. ४ हलक्या मनुष्यांच्यासंग-
तीं मी बसलों नाहीं, आणि कपट्यांच्यासंगतीं
जात नाहीं. ५ म्या वाईटांच्या मंडळीचा द्वेष
केला आहे, आणि दुष्टांच्यासंगतीं मी बसत
नाहीं. ६ **हे परमेश्वरा**, मी आपले हात निर्दो-
षतेने धुऊन तुझ्या वेदीजवळ येत जाईन. ७
यासाठीं कीं म्या स्तुतीचा शब्द ऐकवावा, आणि
तुझ्या सर्व चमत्कारांचें वर्णन करावें. ८ हे
**परमेश्वरा**, तुझी मंदिरवास्ति, म्हणजे तुझें गौरव
राहण्याचें ठिकाण, तें मला आवडलेलें आहे.
९ माझा जीवात्मा पाप्यांच्यासंगतीं आणि माझा
प्राण रक्तपाती माणसांच्यासंगतीं मिळवूं नको.
१० कां तर त्यांच्या हातीं दुर्युक्ति आहे, आणि
त्यांचा उजवा हात लोभलांचाने भरला आहे.
११ परंतु मी आपल्या यथार्थपणाने चालेन; तूं
मला खंडून काढ आणि मजवर कृपा कर. १२
माझा पाय सरळपणांत राहिलेला आहे; मंडळ्यां-
मध्यें मी **परमेश्वराला** स्तवीन.

## गीत २७.

दावीदाने केलेलें गीत.

**परमेश्वर** माझा प्रकाश व माझें तारण आहे,
म्या कोणाला भ्यावें? **परमेश्वर** माझ्या जि-
वाचा आश्रय आहे, म्या कोणाविषयीं धास्ती ध-
रावी? २ माझे जाचणारे व माझे शत्रु [illegible]
दुर्जन जेव्हां माझा देह खायास मजसीं भिडले,
तेव्हां ते अटकळून पडले. ३ जरी सैन्याने म-
ला वेढा घातला, तरी माझ्या हृदयीं भय हो-
णार नाहीं; लढाई मजवर उठेल, तेव्हांहि त्या
बलामुळें मला धीर होईल. ४ म्या **परमेश्व-
राजवळ** एक गोष्ट मागितली आहे; [illegible]
शोधितों कीं **परमेश्वराचें** आवडतें पा[illegible]
आणि त्याच्या देवळांत शोध करायास [illegible]
आयुष्याच्या सर्व दिवसांत **परमेश्वरा**[illegible]
दिरांत माझें राहणें व्हावें. ५ कां त[illegible]
दिवसीं तो आपल्या मांडवाने मला झांकि[illegible]
पल्या मंडपाच्या गुप्त स्थानीं मला लपवि[illegible]
खडकावर उंच करील. ६ आतांहि [illegible]

कडल्या शत्रूंवर माझें मस्तक उंच केलें जाईल,
यास्तव मी हर्षनादाचीं जीवार्पणें त्याच्या मंडपांत
वाहीन; **परमेश्वराला** गाईन आणि कीर्त्तन
करीन. ७ **हे परमेश्वरा**, मी हाक मारितों;
तूं माझा शब्द ऐक, मजवर कृपा कर, आणि मला
उत्तर दे. ८ **माझ्या हृदयाने** तुला सांगितलें
कीं, "तुह्मी माझें दर्शन शोधा." हे **परमेश्वरा**,
मी तुझें दर्शन शोधीन. ९ **तूं** आपलें मुख मज-
पासून लपवूं नको; आपल्या सेवकाला रागाने
दूर करूं नको; तूं माझें सहाय झालास, मला
सोडूं नको; हे माझ्या तारणाच्या **देवा**, मला
टाकूं नको. १० **माझा** बाप व माझी आई
यानी मला टाकिलें, तरी **परमेश्वर** मला घेईल.
११ **हे परमेश्वरा**, तूं आपला मार्ग मला दा-
खीव, आणि माझ्या वैऱ्यांमुळें मला नीट वाटेवर
ने. १२ **माझ्या** जाचणाऱ्यांच्या मनोरथावर मला
ठेवूं नको, कारण कीं खोटे साक्षी मजवर उठले
आहेत, आणि जो बलात्कार करायाचे श्वास टा-
कितो तोहि. १३ **जिवंतांच्या** लोकीं **परमेश्व-
राचें** चांगलेपण मला दिसूं येईल, असा विश्वास
जर म्या धरिला नसतां, तर काय केलें असतें?
१४ **तूं परमेश्वरावर** आशा ठेव; धीर धर,
मग तो तुझ्या हृदयाला बळावील; **परमेश्व-
रावर** आशा ठेव.

## गीत २८.

दावीदाने केलेलें गीत.

**हे परमेश्वरा**, हे माझ्या खडकरूप आश्रया,
मी तुला हाक मारितों; तूं न ऐकता असा
मजविषयीं उगाच राहूं नको, तूं उगाच राहिला
असतां, मी खाचेंत उतरणाऱ्यांसारिखा होईन.
२ **जेव्हां** मी तुझ्याजवळ ओरडतों, जेव्हां मी आ-
पले हात तुझ्या पवित्र गाभाऱ्याकडे उभारितों, ते-
व्हां तूं माझ्या काकळुतीची वाणी ऐक. ३ **दुष्टांच्या**
संगतीं, ह्मणजे जे दुष्कर्मी आपल्या हृदयांत वाईट
असतांहि आपल्या शेजाऱ्यांसीं सुखाचें बोल-
तात, त्यांच्यासंगतीं मला ओढूं नको. ४ **त्यांच्या**
वर्त्तणुकीप्रमाणें त्यांस दे; त्यांच्या वाईट कर्मां-
प्रमाणें त्यांच्या हातांच्या कामाप्रमाणें त्यांस दे;
त्यांचें प्रतिफळ त्यांस दे. ५ **कारण कीं** ते **पर-
मेश्वराच्या** कृत्यांकडे, त्याच्या हातांच्या कामा-
कडे ध्यान लावणार नाहींत; तो त्यांस पाडील
आणि त्यांस उभारणार नाहीं. ६ **परमेश्वराची**
स्तुति असो, कां कीं त्याने माझ्या काकळुतीची
वाणी ऐकिली आहे. ७ **परमेश्वर** माझें बळ
व माझी ढाल; माझ्या हृदयांतली आशा त्यावर
होती, आणि मी सहाय पावलों; यास्तव माझें
हृदय हर्षित झालें, आणि मी आपल्या गायनाने
त्याची स्तुति करीन. ८ **परमेश्वर** यांसीं बळ,
आणि जो आपल्या अभिषिक्तांचीं तारणें बळकट-
पणाने करितो, तो तोच आहे. ९ **तूं** आपल्या
लोकांस तार, आणि आपल्या वतनाला आशी-
र्वाद दे; त्यांचा मेंढपाळ असा हो, आणि त्यांस
सर्वकाळ वाहा.

## गीत २९.

दावीदाने केलेलें गीत.

**अहो** दिव्य वंश, तुह्मी **परमेश्वराला** द्या,
**परमेश्वराला** गौरव व वैभव द्या. २ **पर-
मेश्वराला** त्याच्या नामाचें गौरव द्या; पवित्र
शोभेने **परमेश्वराला** भजा. ३ **परमेश्वराची**
वाणी पाण्यावर आहे; गौरवाचा देव गर्जना
करितो; **परमेश्वर** मोठ्या पाण्यांवर आहे. ४
**परमेश्वराची** वाणी बळयुक्त आहे; **परमेश्व-
राची** वाणी वैभवयुक्त आहे. ५ **परमेश्वरा-
ची** वाणी एरजवृक्ष मोडिती; **परमेश्वर** लबा-
नोनावरले एरजवृक्ष मोडितो. ६ **वासरासारि-**
खें उड्या मारित असे त्यांस करितो; लबानोन
व शिर्योन यांस लाहान रीमासारिखें. ७ **परमे-
श्वराची** वाणी अग्नीचे जाळ चिरितो. ८ **पर-
मेश्वराची** वाणी रान हालविती; **परमेश्वर**
**कादेश** रान हालवितो. ९ **परमेश्वराची** वाणी
हरिण्यांस विवविती, आणि झाड्यांस उजाड क-
रिती, यास्तव त्याच्या देवळांत सर्व त्याचें गौ-
रव वर्णितात. १० **परमेश्वर** जलपुरांवर बसले-
ला **परमेश्वर** राजा असा सर्वकाळ बसलेला
आहे. ११ **परमेश्वर** आपल्या लोकांस सा-
मर्थ्य देवो; **परमेश्वर** आपल्या लोकांस कल्या-
णयुक्त आशीर्वाद देवो.

## गीत ३०.

दावीदाकडून घराच्या संस्कारांत गायाचें गीत.

हे **परमेश्वरा**, मी तुला थोर मानीत जाईन,
कारण कीं त्वां मला वरतें काढिलें आहे, आणि
माझ्या शत्रूंस मजवर संतोष पावूं दिल्हा नाहीं.
२ **हे परमेश्वरा माझ्या देवा**, मी तुझ्याजवळ
ओरडलों, आणि त्वां मला निरोगी केलें आहे.
३ **हे परमेश्वरा**, त्वां माझ्या जिवाला कबरे-
पासून चढविले आहे; म्या खाचेंत न उतरावें,
असें त्वां मला वांचविलें आहे. ४ **अहो परमे-
श्वराचे** भक्त, तुह्मी त्याचें कीर्त्तन करा, आणि
त्याचें पवित्रपण आठवून त्याची स्तुति करा. ५
**कां** तर तो आपल्या रागांत क्षणमात्र आहे; त्या-
च्या प्रसन्नतेने जीवन होतें; संध्याकाळीं अश्रुपात
होत असेल, परंतु सकाळीं हर्ष होतो. ६ **तर**
म्या आपल्या समाधानाच्या वेळेस ह्मटलें, "मी
कधीं ढळणार नाहीं." ७ **हे परमेश्वरा**, त्वां
आपल्या प्रसन्नतेने माझ्या डोंगराला बळकट उ-
भें राहविलें होतें; मग आपलें मुख लपविलें;
तेव्हां मी भयाभीत झालों. ८ "**हे परमेश्वरा**,
मी तुला हाक मारितों आणि **प्रभू**जवळ काक-
ळुती करितों. ९ **मी** खाचेंत उतरलों असता
माझ्या रक्ताकडून काय लाभ? माती तुझी स्तुति
करील कीं काय? तुझ्या सत्यतेचें वर्णन करील कीं
काय? १० **हे परमेश्वरा**, ऐक आणि मजवर
दया कर; हे **परमेश्वरा**, माझें सहाय कर."
११ **त्वां** माझ्या शोकास मजसाठीं हर्षनृत्यांत
फिरविलें; माझें तरट काढून मला आनंदरूप
पांघरूण घातलें आहे. १२ **यासाठीं** कीं माझ्या
गौरवाने तुझें कीर्त्तन करावें, आणि उगेंच राहूं
नये; हे **परमेश्वरा माझ्या देवा**, मी सर्वकाळ
तुझी स्तुति करीत जाईन.

## गीत ३१.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

हे **परमेश्वरा**, म्या तुजवर आशा ठेविली आहे;
म्या कधींहि न लाजावें; तूं आपल्या न्यायाने
माझा निभाव कर. २ **आपला** कान मजकडे
लाव; उतावळी करून मला सोडीव; मजसीं
सबळ खडक असा हो; माझ्या तारणासाठीं दुर्ग-
पर्वत व शरणगृह हो. ३ **कां** कीं तूं माझा खडक
व गड आहेस; तर तूं आपल्या नामासाठीं मला
नेऊन चालीव. ४ **जें** जाळें त्यांनी मजसाठीं
गुप्त ठेविलें, त्यांतून मला काढ; कां तर तूं मा-
झा गड आहेस. ५ **हे परमेश्वरा** सत्यतेच्या
देवा, मी आपला आत्मा तुझ्या हातांत निरवून
देतों; त्वां मला खंडून सोडविलें आहे. ६ **जे**
व्यर्थ शून्यें मानितात, त्यांचा द्वेष म्या केला आहे,
आणि म्या **परमेश्वरावर** आशा ठेविली आहे.
७ **मी** आनंद करीन आणि तुझ्या दयेमुळें मी हर्ष
पावेन; कारण कीं त्वां माझें दुःख पाहिलें; संक-
टांमध्यें माझ्या जिवाला ओळखिलें आहे. ८
**शत्रूच्या** हातांत मला बंद केलें नाहीं; माझे पाय
मोकळ्या ठिकाणीं उभे केले आहेत. ९ **हे पर-
मेश्वरा**, मजवर कृपा कर, कारण कीं मला संकट
पडलें; त्रासाने माझा डोळा, माझा जीव व माझें
उदर क्षीण होत आहे. १० **कां** तर माझें आ-
युष्य खेदाने आणि माझीं वर्षें कण्हण्याने संपतात;
माझ्या अन्यायाने माझी शक्ति खुंटती, आणि
माझीं हाडें क्षय पावतात. ११ **मी** आपल्या
सर्व वैऱ्यांसमोर विशेषेंकरून आपल्या शेजाऱ्यां-
सींहि तुच्छ झालों, आणि आपल्या ओळख्यांसीं
भयकारक झालों; जे मला बाहेर पाहतात, ते
मजपासून पळतात. १२ **मी** मेलेल्यासारिखा
मनांतून विसरला गेलों; फुटक्या पात्रासारिखा
झालों. १३ **कां** कीं म्या बहुताकडून विटंबना
ऐकिली; त्यांनी मिळून मजवर कट केला, तेव्हां
चहुंकडे भय झालें; त्यांनी माझा जीव घ्यावाला
योजना केली. १४ **परंतु** हे **परमेश्वरा**, म्या
तुजवर आशा ठेविली आहे, "तूं माझा देव," असें
म्या ह्मटलें आहे. १५ **माझे** काळ तुझ्या हातीं
आहेत; माझ्या शत्रूंच्या हातापासून व माझ्या
पाठीस लागणाऱ्यांपासून मला तूं सोडीव. १६
**आपल्या** सेवकावर आपली दृष्टि प्रकाशित कर,
आपल्या कृपेने मला तार. १७ **हे परमेश्वरा**,
म्या तुला हाक मारिली आहे, यास्तव म्या ल-
ज्जित न व्हावें; दुष्टांनी लज्जित व्हावें; [illegible]
निवांत व्हावें. १८ **खोटे** होट, [illegible] व
धिक्काराने नीतिमानाविषयीं ताठर[illegible] ते न

बोलते व्हावे. १९ त्वां आपलें जें उत्तम आप-
ल्या भिणाऱ्यांसाठीं साठवून ठेविलें, मनुष्यांच्या
संतानांच्या देखत तुजवर आशा ठेवणारे यांच्या-
साठीं सिद्ध केलें, तें किती मोठें आहे! २० तूं
त्यांस मनुष्यांच्या जुटापासून आपल्या समक्षपणा-
च्या गुप्तस्थानीं लपविसील; जिभांच्या भांडण्या-
पासून त्यांस मांडवांत गुप्त राखिसील. २१
**परमेश्वराची** स्तुति असो, कारण कीं त्यानें आ-
पली मोठी दया मजवर सबळ नगरांत चमत्का-
रिक केली आहे. २२ परंतु मी आपल्या घाबरे-
पणानें बोललों कीं, 'मी तुझ्या दृष्टीपुढून छेदून
टाकला गेलों, तथापि जेव्हां तुजसीं ओरडलों,
तेव्हां त्वां माझ्या काकळुतीची वाणी ऐकिली. २३
अहो **परमेश्वराचे** भक्त, तुह्मी सर्व त्यावर
प्रीति करा; जे विश्वासू त्यांस **परमेश्वर** पा-
ळितो, आणि गर्विष्टाला निश्शेष फळ भरून देतो.
२४ अहो **परमेश्वराचे** वाट पाहणारे, तुह्मी
सर्व धीर धरा, ह्मणजे तो तुमचें हृदय सबळ
करील.

## गीत ३२.

दावीदानें केलेलें गीत; मास्कील.

ज्यांसीं अतिक्रमाची क्षमा झाली, ज्यांचें पाप
झांकिलें आहे ते धन्य. २ ज्या माणसा-
कडे **परमेश्वर** अन्याय मोजीत नाहीं, आणि
ज्याच्या आत्म्यांत कपट नाहीं, तो धन्य. ३
जेव्हां मी उगा राहिलों, तेव्हां सर्व दिवस माझ्या
गर्जनेनें माझीं हाडें जरजर झालीं होतीं. ४ कां
तर दिवसा व रात्रीं तुझा हात मजवर भारी
होता; माझें ओलेपण उन्हाळ्याचें सुकेपण असें
झालें. सेलाह. ५ तुझ्याजवळ म्यां आपलें पाप
कबूल केलें, आपला अन्याय झांकिला नाहीं; म्यां
ह्मटलें कीं, "**परमेश्वरा**जवळ मी आपले अति-
क्रम आपल्यावर पत्करीन." मग त्वां माझ्या पाप-
दोषाची क्षमा केली. सेलाह. ६ यामुळें पावा-
याच्या वेळेस प्रत्येक धार्मिक तुझ्याजवळ प्रार्थना
करील; मोठ्या पाण्यांत बुडायाच्या वेळेस निश्चयें
तें त्याला शिवणार नाहीं. ७ तूं मजसीं गुप्तस्थान
आहे; मला संकटापासून राखिसील; निभावण्या-
चे हर्षशब्दांनीं मला वेढिसील. सेलाह. ८ "मी
तुला शिकवीन, आणि ज्या वाटेनें त्वां चालावें,
ती तुला दाखवीन; तुजवर आपली दृष्टि इक-
कडून बोध करीन. ९ घोडा किंवा खेंचर,
ज्यांस बुद्धि नाहीं ज्यांच्या तोंडीं आकळायासाठीं
होटाळी व वागदोर असताहि तुझ्याजवळ येत
नाहीं, त्यांसारिखे तुह्मी होऊं नका." १० दुष्टा-
ला बहुत खेद होतील, परंतु जो **परमेश्वरावर**
आशा ठेवितो, त्याच्या चहुंकडे दया होईल.
११ अहो नीतिमान, तुह्मी **परमेश्वरा**विषयीं
संतुष्ट होऊन हर्ष करा; अहो हृदयाचे नीट,
तुह्मी सर्व हर्षशब्द करा.

## गीत ३३.

अहो नीतिमान, तुह्मी **परमेश्वरा**विषयीं हर्ष-
शब्द करा; कीर्त्तन करणें हें सरळांस शोभतें.
२ तुह्मी विण्यावर **परमेश्वराची** स्तुति करा;
तारपेटी, दशतंतुवाद्य त्याजवळ वाजवा. ३ त्याज-
वळ नवें गायन गा; तुह्मी हर्षनादानें उत्तम प्रकारें
वाजवा. ४ कारण कीं **परमेश्वराचें** वचन नीट,
आणि त्याचें सर्व काम सत्यतेचें आहे. ५ तो
नीतिमत्वावर व न्यायावर प्रीति करितो; **परमेश्व-
राच्या** दयेनें पृथ्वी भरलेली आहे. ६ **परमे-
श्वराच्या** शब्दानें आकाश, त्याच्या मुखश्वासानें
त्यांतलें सर्व मंडळाहि उत्पन्न झालें. ७ तो समु-
द्राचें पाणी राशीरूप करितो; अगाध जलें सांठव-
णांमध्यें घालितो. ८ अहो पृथ्वींतले सर्व, तुह्मी
**परमेश्वराचें** भय धरा; अहो सृष्टींतले सर्व
राहणारे, तुह्मी त्याची भीड धरा. ९ कारण
कीं तो बोलताच, ती झाली; त्यानें आज्ञा करिताच
स्थीर राहिली. १० **परमेश्वर** लोकांचा विचार
नाहींसा करितो; मुलुखांच्या योजना निरस करि-
तो. ११ **परमेश्वराचा** विचार सर्वकाळ टिकतो;
त्याच्या मनांतल्या योजना पिढीपिढी चालतात.
१२ ज्या लोकांचा देव **परमेश्वर**, जे लोक त्यानें
आपलें वतन होण्यासाठीं निवडिले, ते धन्य. १३
**परमेश्वर** आकाशांतून अवलोकन करितो, मनु-
ष्याचीं सर्व संतानें पाहतो. १४ आपल्या राह-
ण्याच्या ठिकाणांतून पृथ्वींतल्या सर्व राहणाऱ्यांकडे
दृष्टि लावितो. १५ त्यांचें हृदय एकसारिखें
घडितो; त्यांचीं सर्व कामें ध्यानांत आणितो. १६
मोठ्या सैन्यानें कोणी राजा तारला जात नाहीं;

मोठ्या बळाने बळाढ्य सुटत नाहीं. १७ तार-
णासाठीं घोडा व्यर्थ; तो आपल्या मोठ्या बळाने
तारणार नाहीं. १८ पाहा, **परमेश्वराची** दृष्टि
त्याच्या भिणाऱ्यांकडे, त्याच्या दयेचे वाट पाहणारे
यांकडे आहे. १९ यासाठीं कीं आपण त्यांचा
जीव मरणापासून सोडवावा; दुष्काळांतहि त्यांस
वांचवावें. २० आमचा जीव **परमेश्वराची** वाट
पाहतो; तो आमचें सहाय व आमची ढाल आहे.
२१ वास्तव आमच्या हृदयाचा संतोष त्यावर
होईल, कां तर आह्मी त्याच्या पवित्र नामावर
आशा ठेविली आहे. २२ हे **परमेश्वरा**, जसें
आह्मी तुजवर आशा ठेविली आहे तसी तुझी
दया आह्मावर होवो.

## गीत ३४.

दावीदाने केलेलें गीत; जेव्हां त्याने आपली वृत्ति अबीमे-
लेखाच्या पुढें विपरीत केली आणि त्याने त्याला घालवि-
ल्याने तो निघाला तेव्हांचें.

**मी** सर्व वेळां **परमेश्वराची** स्तुति करीन;
त्याचें स्तवन नेहमी माझ्या मुखांत होईल.
२ **परमेश्वरा**विषयीं माझा जीव नावाजून घेईल;
जे दीन ते ऐकून संतोष पावतील. ३ तुह्मी मा-
झ्यासंगतीं **परमेश्वराला** थोर माना; आह्मी
एकत्र त्याचें नाम उंचावूं. ४ मी **परमेश्व-
राला** शरण गेलों, तेव्हां त्याने मला उत्तर दिल्हें
आणि माझ्या सर्व भयापासून मला सोडविलें.
५ हे त्याकडे लक्ष लावून प्रकाश पावले; त्यांचीं
तोंडें लज्जित झालीं नाहींत. ६ या दिनाने
हाक मारिली, तेव्हां **परमेश्वराने** ऐकिलें आणि
त्याला त्याच्या सर्व संकटांतून तारिलें. ७ **पर-
मेश्वराच्या** भिणाऱ्यांभोंवतीं त्याचा दूत वस्ती
करून त्यांचें संरक्षण करितो. ८ तुह्मी चव
घेऊन पाहा, कां कीं **परमेश्वर** चांगला आहे;
जो माणूस त्याजवर आशा ठेवितो, तो धन्य. ९
अहो **परमेश्वराचे** पवित्र, तुह्मी त्याला भ्या,
कारण कीं त्याच्या भिणाऱ्यांस कांहीं उणें नाहीं.
१० तरणे सिंह दुर्बळ होतात, आणि भूक त्यांस
लागती, परंतु जे **परमेश्वराला** शरण जातात,
त्यांस कांहीं उत्तमाचें उणेपण होणार नाहीं. ११
अहो लेंकरें, तुह्मी येऊन माझें ऐका; मी तुह्मास
**परमेश्वराचें** भय शिकवीन. १२ जो माणूस
आयुष्याची इच्छा धरितो, ज्याला उत्तम अनुभ-
वायास दिवस आवडतात, तो कोण? १३ तो तूं
आपली जीभ वाईटापासून आणि आपले होट
कपट बोलण्यापासून राख. १४ वाईटापासून
फीर आणि चांगलें कर; शांति शोध आणि तिला
अनुसर. १५ **परमेश्वराचे** डोळे नीतिवंतांकडे
आणि त्याचे कान त्यांच्या हाक मारण्याकडे आ-
हेत. १६ परंतु **परमेश्वराचें** तोंड वाईट कर-
णाऱ्यांविरुद्ध यासाठीं आहे कीं, त्यांची आठवण
पृथ्वींतून काढून टाकावी. १७ ते ओरडतात,
तेव्हां **परमेश्वर** ऐकून त्यांस त्यांच्या सर्व संक-
टांतून सोडवितो. १८ ज्यांचें हृदय फुटलेलें, त्यां-
च्याजवळ **परमेश्वर** आहे, आणि ज्यांचा आत्मा
भंगलेला, त्यांस तो तारितो. १९ नीतिमानाला
बहुत दुःखें होतात, परंतु त्या सर्वांतून त्याला
**परमेश्वर** सोडवितो. २० तो त्याचीं सर्व हाडें
राखितो, त्यांतलें एकहि मोडलें जात नाहीं. २१
जें वाईट तें दुष्टाला जिवें मारील; जे नीतिमाना-
चा द्वेष करितात, त्यांची ओसाडी होईल. २२
**परमेश्वर** आपल्या सेवकांचा जीव खंडून सोड-
वितो, जे त्यावर आशा ठेवितात, त्यांतल्या कोणा-
चीहि ओसाडी होणार नाहीं.

## गीत ३५.

दावीदाने केलेलें गीत.

**हे परमेश्वरा**, जे मजसीं भांडतात, त्यांसीं तूं
विवाद कर; जे मजसीं लढतात, त्यांसीं तूं
लढाई कर. २ ढाल व कवच धरून माझ्या
सहायासाठीं ऊठ. ३ आणि भाला काढून मा-
झ्या पाठीस लागणाऱ्यांचा प्रतिबंध कर; माझ्या
जिवाला ह्मण कीं, "मी तुझें तारण." ४ जे
माझा जीव घेऊं पाहतात, ते फसून लाजोत; जे
माझें वाईट योजितात, ते मागें फिरविले जाऊन
लज्जित होवोत. ५ वाऱ्यासमोर भुसासारिखे
होवोत, आणि **परमेश्वराचा** दूत त्यांस उडवो.
६ त्यांचा मार्ग काळोखाचा व निसरडा व्हावा,
आणि **परमेश्वराच्या** दूतानीं त्यांच्या पाठीस ला-
गावें. ७ कारण कीं त्यानी निष्कारण आपल्या
जाळ्याची खांच माझ्यासाठीं गुप्तपणें केली; त्यानी
माझ्या जिवासाठीं निष्कारण खाणिली आहे.
८ त्याला न कळतां त्याचा नाश व्हावा; आणि

त्याच्या गुप्त ठेवलेल्या सापळ्याने त्याला धरावें,
त्यांत पडून त्याचा नाश व्हावा. ९ मग मा-
झा जीव परमेश्वराविषयीं हर्ष करील; त्या-
च्या तारणाने संतोष पावेल. १० माझीं सर्व
हाडें ह्मणतील कीं, "हे परमेश्वरा, तुझ्या-
सारिखा कोण? दिनापेक्षा जो शक्तिमान त्या-
पासून आणि दिनाला व दरिद्र्याला त्याच्या
लुटणाऱ्यापासून तूं सोडवितोस." ११ खोटे सा-
क्षी मजवर उठले आणि जें मला ठाऊक न-
व्हतें, त्याविषयीं माझ्याजवळ शोध विचारिले.
१२ माझ्या जिवाचा नाश होण्यासाठीं त्यांनी
बऱ्याबद्दल माझें वाईट केलें. १३ परंतु त्यांच्या
दुखण्याच्या वेळेस म्यां अंगावर तरट घेतलें;
उपासाने आपल्या जिवाला दुःख दिल्हें, आणि
माझी प्रार्थना माझ्या उरांत परत आली. १४ आ-
पला मित्र व आपला भाऊ यासारिखा त्यांसीं
वागलों; आईच्या खेदासारिखा मी शोक करीत
ओणवा झालों. १५ परंतु जेव्हां मी अडखळलों
तेव्हां त्यांस संतोष झाला, आणि ते एकवट झाले;
मला न कळतां ते चहाड मजवर एकवट झाले;
त्यांनी निंदा केली आणि उगेच राहिले नाहींत.
१६ मेजवानींतील थट्टेखोर भ्रष्ट यांसुद्धां त्यांनी
मजवर आपले दांत खाले. १७ हे प्रभू, कोठपर्यंत
पाहसील? माझ्या जिवाला त्यांच्या नाशांपासून,
माझ्या एकुलत्याला सिंहांपासून माघारा फिरीव.
१८ मोठ्या मंडळींत मी तुझे उपकार स्तवीन;
बहुत लोकांमध्यें तुझा उत्सव करीन. १९ जे
निष्कारण माझे शत्रु, त्यांचा मजवर संतोष न
व्हावा; जे निष्कारण माझा द्वेष करितात, त्या-
नी डोळा न मिचकावा. २० कारण कीं ते
समाधानाने बोलत नाहींत; परंतु जे देशांत
शांतीने राहतात त्यांवर कपटांच्या गोष्टी योजि-
तात. २१ आणि ते आपलें तोंड मजवर व-
सून ह्मणतात कीं, "वाहवा, वाहवा; आह्मी
प्रत्यक्ष पाहिलें आहे." २२ हे परमेश्वरा, त्वां
पाहिलें आहे, तूं उगा राहूं नको; हे प्रभू, मज-
पासून दूर होऊं नको. २३ हे माझ्या देवा व
माझ्या प्रभू, माझ्या न्यायासाठीं, माझ्या वादासा-
ठीं तूं जागा हो आणि सावध ऐस. २४ हे पर-
मेश्वरा माझ्या देवा, तूं आपल्या नीतिप्रमाणें
माझा न्याय ठरीव; त्यांचा मजवर संतोष न
व्हावा. २५ त्यांनी आपल्या मनांत न ह्मणावें
कीं, "वाहवा, आमचा मनोरथ तसाच." त्यांनी न
ह्मणावें कीं, "आह्मी त्याला गिळून टाकिलें आहे."
२६ जे माझ्या वाईटामुळें संतोष करितात, ते
एकत्र फसून लज्जित होवोत; जे मजवर मोठेपण
धरितात, ते फसणें व लाज यांकडून झांकले
जावोत. २७ ज्यांस माझी नीति आवडती, त्या-
नी हर्षशब्द काढून संतोष करावा; आणि त्यांनी
नेहमी ह्मणावें कीं, "परमेश्वर, ज्याला आपल्या
सेवकाचें कल्याण आवडतें, तो थोर मानिला जा-
वा." २८ मग माझी जीभ सर्व दिवस तुझा न्याय
वर्णील आणि तुझी स्तुति करील.

## गीत. ३६.

मुख्य वाजंत्र्याला; परमेश्वराचा सेवक दावीद याने केलेलें गीत.

दुष्टाचा अतिक्रम माझ्या हृदयीं सांगतो कीं, त्या-
च्या डोळ्यांपुढें देवाचें भय नाहीं. २ कां
कीं त्याचा अन्याय द्वेषायायोग्य असा त्याला सां-
पडल्यावर, तो त्याविषयीं आपल्या लक्षांत खुशा-
मत करितो. ३ त्याच्या तोंडातल्या गोष्टी दुष्टा-
ईच्या व कपटाच्या आहेत; ज्ञानी व्हावें व बरें
करावें हें त्याने सोडिलें. ४ तो आपल्या अंथ-
रूणावर दुष्टाई योजितो; जो मार्ग चांगला नाहीं,
तो त्यांत उभा राहतो, वाईटाला नाकारीत नाहीं.
५ हे परमेश्वरा, तुझें चांगलेपण आकाशांत;
तुझी सत्यता अभ्राळापर्यंतहि आहे. ६ तुझी
नीति सबळ डोंगरांसारिखी, तुझा न्याय मोठा
समुद्र आहे; हे परमेश्वरा, तूं मनुष्याचें व
पशूंचें संरक्षण करितोस. ७ हे देवा, तुझी कृपा
किती मोलाची! यास्तव मनुष्यांचीं संतानें तु-
झ्या पंखांच्या छायेंत आश्रय करितात. ८ ते
तुझ्या घरांतल्या मधुरपणाने तृप्त होतात आणि
तूं आपल्या सुखांची नदी त्यांस पिऊं देतोस.
९ कां तर तुझ्याजवळ जीवनाचा उगम आहे;
तुझ्या प्रकाशाने आमच्या दृष्टीस प्रकाश असतो.
१० जे तुला ओळखितात, त्यांवर तूं आपली द-
या, आणि जे हृदयाचे नीट, त्यांवर आपले न्याय
करीत जा. ११ गर्वांचा पाय मजवर येऊं नये,
आणि दुष्टांच्या हाताने मला हिंडवूं नये. १२

तेथें दुष्कर्मी पडले, ते पडून मेले, आणि उठूं
शकणार नाहींत.

## गीत ३७.

दावीदाने केलेलें गीत.

तूं दुष्टांच्यामुळें जळफळूं नको; जे वाईट करि-
तात, त्यांवर ईजा करूं नको. २ कां तर
ते गवतासारिखे लवकर छेदले जातील, आणि
कोंवळ्या चाऱ्यासारिखे वाळतील. ३ तूं परमे-
श्वरावर आशा ठेव आणि बरें कर; देशांत
राहा, आणि विश्वासूपणाने चाल. ४ आणि तूं
परमेश्वरावर आवड ठेव, ह्मणजे तो तुझ्या
हृदयांतल्यीं मागणीं तुला देईल. ५ तूं आपला
मार्ग परमेश्वराला सोपून दे; त्यावर आशा
ठेव, ह्मणजे तो करील. ६ आणि तो तुझें नी-
तिमत्व उजेडासारिखें व तुझा न्याय दुपारच्या
प्रकाशासारिखा प्रगट करील. ७ तूं परमेश्व-
रासाठीं दम धर, आणि त्याची वाट पाहा; जो
आपल्या कार्यांत सभाग्य, जो माणूस योजिलेलीं
दुष्कर्मै साधितो, त्यामुळें जळफळूं नको. ८ रागा-
पासून सुटा ऐस आणि संताप सोड; विशेषेंकरून
दुष्टपणाने जळफळूं नको. ९ कारण कीं दुष्ट
छेदले जातील, परंतु जे परमेश्वराची वाट पाह-
तात, ते पृथ्वीचें वतन पावतील, पुढें थोड्या वेळे-
नेहि मग दुर्जन नाहींसा होईल. १० आणि तूं
त्याच्या ठिकाणाविषयीं आपल्या ध्यानांत आण-
सील कीं तो नाहीं. ११ परंतु जे दीन, ते पृथ्वीचें
वतन पावतील, आणि बहुत कल्याणामुळें संतुष्ट
होतील. १२ दुर्जन नीतिमानावर कुयुक्ति यो-
जितो, आणि आपले दांत त्यांवर खातो. १३
प्रभु त्याला हांसतो; कां तर त्याचा काळ येत
आहे, हें पाहतो. १४ दिनाला व दरिद्र्याला
पाडायासाठीं आणि जे चालीने नीट त्यांस वधा-
यासाठीं दुर्जन तरवार उपसतात, आणि आपलें
धनुष्य ताणितात. १५ त्यांची तरवार त्यांच्याच
पोटांत जाईल, आणि त्यांचीं धनुष्यें मोडलीं जा-
तील. १६ बहुत दुर्जनांच्या द्रव्यापेक्षा नीतिमा-
नाचें थोडें, हें बरें आहे. १७ कारण कीं दुर्ज-
नांचे हात मोडले जातील, परंतु नीतिमानास पर-
मेश्वर आश्रय आहे. १८ परमेश्वर यथार्थि-
कांचे दिवस जाणतो, आणि त्यांचें वतन सर्वकाळ
राहील. १९ वाईट वेळेस ते लाजणार नाहींत,
आणि दुकाळाच्या दिवसांत तृप्त होतील. २०
परंतु दुर्जन नाश पावतील; परमेश्वराचे शत्रु
मेंढ्र्यांच्या मेंदाप्रमाणें नाहींसे होतील; धूर होऊन
संपतील. २१ दुर्जन उसणें घेऊन फेडीत नाहीं,
परंतु नीतिमान कृपेने देतो. २२ वास्तव ज्यास
तो आशीर्वाद देतो, ते पृथ्वीचें वतन पावतील;
परंतु ज्यांस तो शाप देतो, ते छेदले जातील.
२३ चांगल्या मनुष्याचीं पावलें परमेश्वराकडून
निटवलेलीं आहेत, आणि त्याच्या चालीवरून
त्याला संतोष आहे. २४ जरी तो पडतो, तरी
अपदी पडणार नाहीं; कां तर परमेश्वर आप-
ल्या हाताचा आश्रय देतो. २५ मी तरुण होतों
आतां वृद्ध झालों, तरी नीतिमान् टाकलेला अ-
थवा त्याचें संतान अन्न मागतें, असें म्या पाहिलें
नाहीं. २६ सर्व दिवस कृपेने उसणें देतो, आणि
त्याचें संतान आशीर्वादित आहे. २७ तूं वाई-
टापासून दूर हो आणि चांगलें कर, मग सर्वकाळ
वस्ति पाव. २८ कां तर परमेश्वराला न्याय
आवडतो, आणि तो आपल्या भक्तांस टाकीत
नाहीं; ते सर्वकाळ राखिले जातात, परंतु दुष्टांचें
संतान छेदलें जातें. २९ जे नीतिमान, ते पृथ्वी-
चें वतन पावतील आणि त्यावर निरंतर राहतील.
३० नीतिमानाचें तोंड ज्ञानाचा विचार काढितें,
आणि त्याची जीभ न्याय बोलती. ३१ त्याच्या
हृदयांत त्याच्या देवाचें नेमशास्त्र आहे; त्याच्या
पावलांतलें एकहि निसरणार नाहीं. ३२ दुर्जन
नीतिमानावर टपतो, आणि त्याला जिवें मारायास
झटतो. ३३ परमेश्वर त्याला त्याच्या हातांत
सोडणार नाहीं, आणि त्याच्या न्यायांत त्याला
दुष्ट असें ठरविणार नाहीं. ३४ तूं परमेश्वरा-
ची वाट पाहा आणि त्याचा मार्ग पाळ, ह्मणजे
तो तुला पृथ्वीचें वतन घ्यावयास उंच करील;
जेव्हां दुर्जन छेदले जातील, तेव्हां तूं पाहसील.
३५ दुर्जनाला बळाविलेलें आणि स्वठिकाणच्या
हिरव्या झाडासारिखें पसरलेलें, असें म्या पाहिलें
होतें. ३६ परंतु तो होऊन गेला; पाहा, तो
नाहींच; म्या त्याचा शोधहि केला, परंतु तो सां-
पडला नाहीं. ३७ तूं यथार्थिकावर लक्ष लाव;
सरळाला पाहा; कां तर त्या माणसाच्या परिणाम

कल्याणाचा आहे. ३८ परंतु उल्लंघणारे एक-
सारिखा नाश पावतील; दुष्टांचा परिणाम छेद-
ण्याचा आहे. ३९ परंतु नीतिमानांचें तारण
**परमेश्वरापासून** आहे; संकटाच्या वेळेस तो
त्यांचा आश्रय आहे. ४० **परमेश्वर** त्यांचें
सहाय व त्यांचा निभाव करील; दुष्टापासून त्यां-
स सोडवून त्यांचें तारण करील, कां तर त्यांनी
त्यावर आशा ठेविली आहे.

## गीत ३८.

दावीदाकडून सुचविण्याचें गीत.

**हे परमेश्वरा,** तूं आपल्या रागाने मला धम-
कावूं नको, आणि आपल्या संतापाने मला शि-
क्षा करूं नको. २ **कां** तर तुझे बाण मजमध्यें
रुतले, आणि तुझ्या हाताचें मजवर दडपण आहे.
३ तुझ्या कोपामुळें माझ्या अंगीं कांहीं आरोग्य
नाहीं, माझ्या पापामुळें माझ्या हाडांमध्यें कांहीं
स्वस्थपण नाहीं. ४ **कां** तर माझे अन्याय मा-
झ्या डोक्यावर आले; ते ओझ्यासारिखे माझ्या
शक्तीहून फार झाले आहेत. ५ **माझ्या** मूर्ख-
पणामुळें माझे फोड घाणेरे झाले आणि सडले
आहेत. ६ **मी** ओणवा होऊन फार लवलों
आहें; मी सर्व दिवस शोक करीत चाललों. ७
कारण कीं माझी कंबर जळजळण्याने भरली;
माझ्या अंगीं कांहीं आरोग्य नाहीं. ८ **मी** निर्बळ
झालों, आणि फार चेंचरलों; आपल्या हृदयाच्या
कण्हण्याने ओरडलों. ९ **हे प्रभू,** माझी सर्व
इच्छा तुझ्यापुढें आहे; आणि माझें स्फुंदणें तुज-
पासून गुप्त नाहीं. १० **माझें** हृदय धगधगतें,
माझी शक्ति गेली आहे आणि माझ्या डोळ्याचा
उजेड देखील मजसीं राहिला नाहीं. ११ **माझे**
प्रियकर व माझे मित्र माझ्या फोडापुढून दूर उभे
राहतात, आणि माझे शेजारी लांब उभे राहतात.
१२ **आणि** जे माझा जीव घ्यायाला शोधितात, ते
फास घालितात; आणि जे माझें वाईट करूं पा-
हतात, ते अनर्थांविषयीं बोलतात; सर्व दिवस
कृत्रिमाचे प्रकार योजितात. १३ **परंतु** म्या बहि-
ऱ्यासारिखें ऐकिलें नाहीं, आणि जसा मुका आ-
पलें तोंड मोकळें करीत नाहीं, तसा मी होतों.
१४ **जो** माणूस ऐकत नाहीं, ज्याच्या मुखीं धम-
कावण्याची शक्ति देखील नाहीं, त्यासारिखा मी
झालों. १५ **कारण** कीं, हे **परमेश्वरा,** म्या
तुजवर आशा ठेविली आहे; हे माझ्या **प्रभू,**
माझ्या **देवा,** माझें ऐक. १६ **नाहीं** तर ते मज-
वर संतोष करितील; जेव्हां माझा पाय निसरेल
तेव्हां त्यांनी मजवर थोरपण धरूं नये ह्मणून मी
असें बोललों. १७ **कां** तर मी पडायाच्या
लागास झालों आहें, आणि माझा खेद माझ्यापुढें
नेहमी आहे. १८ **मी** आपला अन्याय कबूल
करीन; आपल्या पापाविषयीं कष्टी होईन. १९
परंतु माझे शत्रु जीववट व बळकट आहेत; जे
माझा द्वेष निष्कारण करितात आणि बऱ्याच्या-
बद्दल माझें वाईट करितात, ते बहुत झाले आहेत.
२० **मी** बरेपणाने वागलों, यावरून ते माझें वैर
करितात. २१ **हे परमेश्वरा,** तूं मला टाकूं
नको; हे माझ्या **देवा,** मजपासून दूर होऊं नको,
२२ **हे** माझ्या तारणाच्या **प्रभू,** माझें सहाय
करायासाठीं उतावळी कर.

## गीत ३९.

मुख्य वाजंत्री ह्मणजे यदुथून याला; दावीदाने
केलेलें गीत.

**म्या** ह्मटलें आहे कीं, "म्या आपल्या जिभेने
पाप न करावें, ह्मणून मी आपल्या मार्गां-
विषयीं जपून चालेन; दुर्जन माझ्यासमोर आहे,
तेव्हां आपलें तोंड बंद राखीन." २ **मी** मौन
धरून मुका झालों, बऱ्यापासून उगा राहिलों;
तेव्हां माझा खेद ढवळला. ३ **मी** विचार क-
रीत होतों, तेव्हां मजमध्यें माझें हृदय तापलें;
आग पेटली; आपल्या जिभेने बोललों. ४ **हे**
**परमेश्वरा,** माझा शेवट मला कळीव, आणि
माझ्या दिवसांचें परिमाण हें काय आहे, असें
मला समजूं दे; मी किती अशक्त हें मला
कळावें. ५ **पाहा,** त्वां माझे दिवस चवंगाभर
केले आहेत; माझें आयुष्य तुजपुढें कांहीं नाहीं
यासारिखें आहे; निश्चयें सर्व व्यर्थ, अशी प्रत्येक
माणसाची स्थिति आहे. सेलाह. ६ **मनुष्य** साव-
लीरूपाने चालतो; होय, ते फुकट चटपट करि-
तात, कोणी संग्रह करितो, परंतु त्याचा अनुभव
कोण घेईल, हें जाणत नाहीं. ७ **तर** हे **प्रभू,**
आतां म्या कशाची वाट पाहावी? माझी आशा
तुजवर आहे. ८ **माझ्या** सर्व अतिक्रमांपासून

मला सोडीव, मला मूर्खांचें तुच्छपात्र करूं नको.
९ **मी** उगा राहिलों, म्या आपलें तोंड उघडलें
नाहीं, कारण कीं तसें त्वां केलें. १० **तूं** आ-
पली पटकी मजवरून दूर कर; तुझ्या हाताच्या
लागण्याने मी क्षय पावतों. ११ **तूं** अन्यायामुळें
धमकावण्यानी माणसाला शिक्षा करितोस, त्याचें
सुंदरपण कसरीसारिखें विरवितोस; निश्चयें सर्व
माणसें श्वासरूप आहेत. सेलाह. १२ **हे परमे-
श्वरा,** तूं माझी प्रार्थना ऐक, आणि माझ्या ओ-
रडण्याकडे कान दे; माझ्या अश्रुपाताविषयीं उ-
गाच राहूं नको, कां तर मी आपल्या सर्व वडि-
लांसारिखा तुझ्या जवळचा विदेशी प्रवासांत आहें.
१३ **मी** जाईन व नाहींसा होईन यापूर्वी मा-
झा उदय व्हावा ह्मणून मला असूं दे.

### गीत ४०.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

**मी परमेश्वराची** वाट पाहत पाहत आलों.
आणि त्याने मजकडे वळून माझें ओरडणें
ऐकिलें. २ **आणि** मला नाशाच्या खांचेंतून
गाळाच्या चिखलांतून वर काढिलें; त्याने माझे
पाय खडकावर स्थिर केले आणि माझीं पावलें
यथास्थित केलीं. ३ **असें** त्याने माझ्या तोंडीं
नवें गायन आमच्या **देवाची** स्तुति ठेविली आ-
हे; बहुत लोक पाहून भय धरितील, आणि **पर-
मेश्वरावर** आशा ठेवितील. ४ **जो** माणूस
**परमेश्वराला** आपलें आशापात्र करितो, आणि
उद्धटांकडे व खोटेपणास वळणारे यांकडे लक्ष
लावीत नाहीं, तो धन्य आहे. ५ **हे परमेश्व-
रा,** माझ्या **देवा,** त्वां महत्कर्मे केलीं आहेत;
आमच्यासाठीं तुझे चमत्कार व तुझ्या योजना
त्यांचें वर्णन तुजपासीं कोणाच्याने करवत नाहीं;
मी दाखवूं अथवा सांगूं लागलों, तेव्हां गणनेपेक्षां
अधिक होतात. ६ **त्वां** यज्ञ व अर्पण इच्छिलें
नाहीं; त्वां माझे कान उघडले आहेत; त्वां होम
व पापहारक यज्ञ मागितला नाहीं. ७ **तेव्हां** म्या
ह्मटलें, "पाहा, मी आहें; पुस्तकाच्या भेंडोळ्यांत
मजविषयीं लिहिलेलें आहे. ८ **हे** माझ्या **देवा,**
तुझें आवडतें करायास मी संतुष्ट आहें; तुझें
शास्त्र माझ्या मनांत आहे. ९ **म्या** मोठ्या मं-
डळींत नीति गाजविली; पाहा, म्या आपले होट
आटोपिले नाहींत, हे **परमेश्वरा,** तुला कळलें
आहे. १० **म्या** आपल्या हृदयामध्यें तुझी नीति
झांकून ठेविली नाहीं; तुझें विश्वासुपण व तुझें
तारण सांगितलें आहे; तुझी दया व तुझी सत्यता
मोठ्या मंडळीपुढें गुप्त राखिली नाहीं. ११ **हे
परमेश्वरा,** तूं आपला कळवळा मजवरून आ-
टोपूं नको; तुझ्या दयेने व तुझ्या सत्यतेने मला
अखंड राखावें. १२ **कां** तर मोजवत नाहींत
इतकीं अरिष्टें मजवर चहुंकडून आलीं; माझे
अन्याय मला असे लागूं झाले कीं मला पाहाया-
ची शक्ति नाहीं; माझ्या डोक्याच्या केसांपेक्षां ते
अधिक झाले; यास्तव माझें मन थकून गेलें आहे.
१३ **हे परमेश्वरा,** मला सोडवायास प्रसन्न हो:
हे **परमेश्वरा,** माझें सहाय करायास उतावळी
कर. १४ **जे** माझ्या जिवाचा घात करायास
त्याला शोधितात, ते एकत्र फसून लाजोत. १५
**जे** माझ्या दुःखाने संतुष्ट, ते मागें फिरून लज्जा
पावोत; जे मजविषयीं, "वाहवा वाहवा," ह्मण-
तात, त्यांची लाजरूप फेड होण्यासाठीं त्यांची
ओसाडी होवो. १६ **जे** तुला शरण येतात त्या
सर्वांनी तुजविषयीं संतुष्ट होऊन आनंद करावा:
ज्यांस तुझें तारण आवडतें, त्यांनी अखंड ह्मणावें
कीं, "**परमेश्वराचें** मोठेंपण मानिलें जावो." १७
**मी** तर दीन व दरिद्री; **प्रभूने** मजविषयीं विचार
करावा; तूं माझें सहाय व माझा निभाव करणारा
आहेस; हे माझ्या **देवा,** उशीर करूं नको.

### गीत ४१.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदाने केलेलें गीत.

**जो** दरिद्र्याची चिंता करितो, तो धन्य; दुःखा-
च्या दिवसांत **परमेश्वर** त्याचा निभाव
करील. २ **परमेश्वर** त्याला राखील आणि त्या-
ला वांचवील; तो देशांत धन्य होईल, आणि तूं
त्याला त्याच्या शत्रूंच्या मनोरथावर सोपणार ना-
हींस. ३ **रोगाच्या** खाटेवर **परमेश्वर** त्याला
आश्रय होईल; तूं त्याच्या दुखण्यांत त्याचें सर्व
अंथरूण उलटून नीट करसील. ४ **म्या** ह्मटलें
कीं, "हे **परमेश्वरा,** मजवर कृपा कर; माझ्या
जिवाला निरोगी कर, कां कीं म्या तुजविरुद्ध
पाप केलें आहे." ५ **माझे** शत्रु मजविषयीं असें
वाईट बोलतात कीं, "तो केव्हां मरेल आणि

त्याच्या नांवाचा नाश केव्हां होईल." ६ आणि
पाहायास येतो, तरी तो खोटें बोलतो; तो आ-
पल्यासाठीं आपल्या हृदयांत दुष्टाई सांठवितो,
मग बाहेर जाऊन सांगतो. ७ माझे सर्व द्वेष-
णारे आपापल्यांत मजविषयीं कुजबूज करितात;
मजवर माझें वाईट योजितात. ८ ते ह्मणतात
कीं, "अनर्थ त्याला लागला आणि तो पडला,
यास्तव फिरून उठणार नाहीं." ९ आणि माझा
मित्र, ज्यावर माझा भरवसा होता, ज्याने माझें अन्न
खाल्लें, त्याने मजवर लात उचलिली आहे. १०
परंतु हे परमेश्वरा, तूं मजवर कृपा करून मला
असें उठीव कीं म्या त्यांची फेड करावी. ११ मा-
झा शत्रु मजवर हर्षशब्द पावला नाहीं, येणेंकरून
मला कळलें कीं त्वां मजवर आवड ठेविली आहे.
१२ आणि मी आपल्या यथास्थितपणाने आहें; तूं
मला आधार देतोस आणि आपल्यासमोर मला
सर्वकाळ ठेवितोस. १३ इस्राएलाचा देव पर-
मेश्वर सर्वकाळापासून सर्वकाळापर्यंत स्तुति-
योग्य आहे. आमेन व आमेन.

## गीत ४२.

मुख्य वाजंव्याला; मास्कील; कोराहाच्या पुत्रांसाठीं.

हे देवा, जसी हरिणाची इच्छा पाण्याच्या ओ-
होळांवर आहे, तसी माझ्या जिवाची इच्छा
तुझ्याकडे आहे. २ देवासाठीं, जिवंत देवासाठीं
माझा जीव तान्हेला आहे; मी केव्हां देवासमोर
जाऊन दर्शन पावेन? ३ "तुझा देव कोठें आहे?"
असें ते सर्व दिवस मला बोलत असतां रात्रंदिवस
माझीं आसवें माझें अन्न झालीं. ४ हें आठवून मी
आपला जीव आपल्यासीं ओतितों, कां तर मी
थव्यासुद्धां चाललों; सण पाळणाऱ्या समुदायाच्या
संगतीं हर्ष व स्तुति या शब्दाने देवाच्या मंदिरा-
कडे गेलों. ५ हे माझ्या जिवा, तूं कां खिन्न झा-
ला आहेस? आणि मजमध्यें कां तळमळतोस?
देवाची वाट पाहा, कां तर त्याच्या दर्शनाने जें
तारण, त्यामुळें त्याची स्तुति मी पुढें करीन. ६ हे
माझ्या देवा, माझा जीव मजमध्यें खिन्न झाला
आहे, यास्तव यार्देन व हेर्मोनी यांच्या देशांत
मिसार डोंगरावर असूनहि मी तुझें स्मरण करि-
तों. ७ तुझ्या प्रवाहांच्या नादाने समुद्र समुद्रासीं
गर्जतो, तुझ्या सर्व लाटा व लहरी मजवर चा-
लल्या. ८ दिवसा परमेश्वर आपली दया प्रगट
करील, आणि रात्रीं त्याचें गायन मजकडून हो-
ईल; माझ्या जिवाच्या देवाची प्रार्थना मजकडून
होईल. ९ देव जो माझा खडक त्याला मी
ह्मणेन, "तूं मला कां विसरलास? शत्रूच्या काचा-
मुळें म्या शोक करीत कां चालावें? १० तुझा
देव कोठें?" असें सर्व दिवस मला ह्मणण्याने
माझे वैरी माझ्या हाडीं घाव घालून मला गांजि-
तात. ११ हे माझ्या जिवा, तूं खिन्न कां झाला
आहेस? आणि मजमध्यें कां तळमळतोस? देवा-
ची वाट पाहा; कां तर जो मला दर्शनाने तारण
व माझा देव, त्याची स्तुति मी पुढें करीन.

## गीत ४३.

हे देवा, माझा न्याय कर, आणि अधर्मी राष्ट्रासीं
माझा वाद कर; कपटी व द्वाड माणूस यापा-
सून माझा निभाव कर. २ कां तर तूं माझ्या
सामर्थ्याचा देव आहेस; त्वां मला कां अव्हेरिलें?
शत्रूच्या काचामुळें म्या कशासाठीं शोक करीत
चालावें? ३ तूं आपला प्रकाश व सत्यता पाठवून
दे; यांनी मला नेऊन तुझ्या पवित्र डोंगराकडे व
तुझ्या वस्तिस्थानाकडे मला चालवावें. ४ मग मी
देवाच्या वेदीजवळ, आपल्या परमानंदाच्या देवा-
जवळ जाईन; मग हे देवा, माझ्या देवा, तंतुवा-
द्यावर मी तुझी स्तुति करीन. ५ हे माझ्या जिवा,
तूं कां खिन्न झाला आहेस? आणि मजमध्यें कां
तळमळतोस? देवाची वाट पाहा; कां तर जो
मला दर्शनाने तारण व माझा देव, त्याची स्तुति
मी पुढें करीन.

## गीत ४४.

कोराहाच्या पुत्रांतल्या मुख्य वाजंव्याला; मास्कील.

हे देवा, आह्मी आपल्या कानानी ऐकिलें, आ-
मचे वडील जें काम त्यांच्या दिवसांत पूर्वकाळीं
त्वां केलें होतें, तें त्यानी आह्माजवळ सविस्तर
सांगितलें. २ त्वां आपल्या हाताने राष्ट्रांस घा-
लवून ते स्थापिले; लोकांची दुर्दशा करून त्यांस
वाढविलें. ३ कां तर त्यानी आपल्या तरवारीने
देश वतन करून घेतला नाहीं, आणि आपल्या
भुजेने आपलें तारण केलें असें नाहीं, परंतु तुझ्या

उजव्या हाताने, तुझ्याच भुजेने व तुझ्या मुखते-
जाने झालें; कां तर तूं त्यांवर प्रसन्न होतास. ४
**हे देवा**, तूंच माझा राजा, याकोबाचें तारण हो-
ण्यास आज्ञा दे. ५ **तुझ्या** योगें आह्मी आपल्या
वैऱ्यांस लोटून देऊं; जे आह्मावर उठतात, त्यांस
तुझ्या नामानें तुडवून टाकूं. ६ **कां** तर मी आप-
ल्या धनुष्यावर आशा ठेवीत नाहीं, आणि माझी
तरवार मला तारीत नाहीं. ७ **परंतु** त्वां आम-
च्या वैऱ्यांपासून आह्मास तारिलें, आणि आम-
च्या द्वेष्ट्यांस लाजविलें. ८ **देवा**विषयीं आह्मी
सर्व दिवस उत्सव करितों, आणि आह्मी तुझ्या
नामाची स्तुति सर्वदा करूं. सेलाह. ९ **तथापि**
आतां त्वां आह्मास आव्हेरिलें आणि लाजविलें
आहे; कां तूं आमच्या सैन्यांबरोबर बाहेर जात
नाहींस. १० **आह्मास** वैऱ्यापुढून मागें फिर-
वितोस, आणि जे आमचा द्वेष करितात ते आ-
पल्यासाठीं लुटून घेतात. ११ **तूं** आह्मास मेंढ-
रांसारिखें खाण्यास देतोस, आणि राष्ट्रां-
मध्यें आमची दाणादाण करितोस. १२ **तूं** मो-
लावांचून आपले लोक विकितोस, आणि त्यांच्या
विक्रयानें तुला लाभ नाहीं. १३ **आमच्या** शे-
जाऱ्यांजवळ धिक्कारपात्र आमच्या चहुंकडल्यासीं
थट्टापात्र व तुच्छ असें आह्मास ठेवितोस. १४
**आह्मास** राष्ट्रांमध्यें ह्मण, लोकांमध्यें डोकें डो-
लविणें असें ठेवितोस. १५ **सर्व** दिवस माझें
तुच्छपण माझ्यापुढें आहे, आणि माझ्या तोंडाच्या
लाजेने मला झांकिलें आहे. १६ **धिःकारणारा**
व निंदणारा याच्या शब्दावरून, शत्रु व खुनसी
याच्या समक्षतेवरून असें झालें. १७ **हें** अवघें
आह्मावर आलें, तथापि आह्मी तुला विसरलों
नाहीं, आणि तुझ्या कराराविषयीं खोटेपण केलें
नाहीं. १८ **आमचें** हृदय मागें सरकलें नाहीं,
आणि आमचें आचरण तुझ्या मार्गांपासून फिरलें
नाहीं. १९ **परंतु** त्वां आह्मास अजगरांच्या ठि-
काणीं चेंचरलें, आणि मरणाच्या सावलीने झां-
किलें आहे. २० **जर** आह्मी आपल्या देवाचें
नाम विसरलों असतों, अथवा आपले हात अन्य
देवाजवळ पसरले असते, २१ **तर** देव हें हुड-
कून न काढिता कीं काय? कां तर तो हृदयांतल्या
गुप्त गोष्टी जाणतो. २२ **तथापि** तुझ्यामुळें आह्मी
सर्व दिवस जिवें मारले जातों; मरणास नेमले-
ल्या मेंढरांसारिखे मोजिले आहों. २३ **हे प्रभू**,
तूं जागा हो, कशाला निजतोस? सावध हो, स-
र्वदा अव्हेरूं नको. २४ **तूं** आपलें मुख कां
लपवितोस? आमचें दुःख व आह्मावरला काच
कां विसरतोस? २५ **कां** कीं आमचा जीव माती-
पर्यंत खालीं झाला, आमचें पोट भूमीस ला-
गलें आहे. २६ **तूं** आमच्या सहायासाठीं ऊठ,
आणि आपल्या दयेमुळें आह्मास खंडून सोडीव.

## गीत ४५.

मुख्य वाजंत्र्याला; शोशान्नीम; कोराहाच्या पुत्रां-
साठीं; मास्कील; प्रियपणाचें गीत.

**मा**झ्या हृदयीं चांगल्या गोष्टीची उकळी नि-
घाली; मी राजाविषयीं आपल्या रचना बो-
लतों; माझी जीभ चपळ लिहिणाऱ्याची लेखणी
आहे. २ **मनुष्याच्या** संतानांपेक्षां तूं अति सुंदर
आहेस; तुझ्या होटांत प्रसन्नता घातली आहे,
यास्तव **देवाने** सर्वकाळचा आशीर्वाद तुला दि-
ल्हा आहे. ३ **हे** पराक्रमी, तूं आपल्या मान्य-
तेने व आपल्या वैभवाने आपली तरवार कटीवर
बांध. ४ **आणि** आपल्या वैभवाने सत्यता व
नीति व लीनता यांकरितां बसून जाऊन सभाग्य
ऐस, आणि तुझा उजवा हात तुझ्याजवळ अद्भुतें
दाखवील. ५ **तुझे** तिखट बाण राजाच्या शत्रूंच्या
हृदयीं लागतात; लोक तुझ्या खालीं पडतात. ६
**हे देवा**, तुझें सिंहासन सदासर्वकाळचें आहे;
तुझ्या राज्याची काठी सरळपणाची काठी आहे.
७ **तूं** नीतीची प्रीति करितोस, आणि दुष्टपणाचा
द्वेष करितोस; यास्तव, हे **देवा**, तुझ्या **देवाने** तु-
झ्या सोबत्यांपेक्षां तुला हर्षरूप तेलाचा अभिषेक
केला आहे. ८ **बोळ** व कार्ष्टें व साली हस्तिदंती
राजवाड्यांतून तुझ्या सर्व वस्त्रांस आहेत; त्यांत-
ल्यानी तुझा संतोष केला आहे. ९ **तुझ्या** उत्तम
स्त्रियांमध्यें राजकन्या आहेत; राणी ओफीरांतलें
सोनें ल्यालेली असती, तुझ्या उजव्या हाताकडे
उभी आहे. १० **हे** कन्ये, ऐक व पाहा; आपला
कान लाव; आपले लोक व आपल्या बापाचें घर
विसर. ११ **मग** राजा तुझ्या सुंदरपणाची आ-
वड धरील; तो तर तुझा प्रभु, यास्तव तूं त्याला
भज. १२ **सोराची** कन्या दान घेऊन येईल;

लोकांमध्यें जे धनवान ते तुजपुढें आर्जव करितील.
१३ राजकन्या आंत पूर्णगौरवी; तिचें वस्त्र सो-
न्याचें भरजरी आहे. १४ कशिद्याचीं वस्त्रें
ल्यालेली असतां राजाजवळ मिरवत जाईल;
तिच्या पाठीमागल्या कन्या तिच्या संगतीं तुझ्या-
जवळ आणिल्या जातील. १५ आनंदानें व ह-
र्षानें मिरवत जातील; राजाच्या वाड्यांत जा-
तील. १६ तुझ्या वडिलांच्या ठिकाणीं तुझीं लें-
करें होतील; त्यांस तूं सर्व पृथ्वीवर अधिकारी
असें ठेविसील. १७ मी सर्व पिढ्यापर्यंत स-
र्वांस तुझ्या नावाचें स्मरण केलें जाई असें क-
रीन, यास्तव लोक सदासर्वकाळ तुझी स्तुति
करितील.

## गीत ४६.

कोराहाच्या पुत्रांतल्या मुख्य वाजंत्याला;
अलामोथावर गीत.

देव आमचा आश्रय व सामर्थ्य, संकटांमध्यें
फार सुलभ सहाय आहे. २ यास्तव पृथ्वी-
ची उलथापालथ झाली असतां, डोंगर समुद्रांच्या
पोटांत ढळले गेले असतांहि, आह्मी भिणार
नाहीं. ३ त्यांचें पाणी ढवळो, खवळो; त्याच्या
उचंबळण्यानें पर्वत कांपोत. सेलाह. ४ अशी
नदी आहे कीं तिच्या पाटांनीं देवाचें नगर, पवि-
त्रस्थान, परात्पराच्या वस्त्या, यांस संतोष हो-
ईल. ५ त्या नगरामध्यें देव आहे, ह्मणून तें
कांहीं ढळणार नाहीं; उदय फांकतो इतक्यांत
देव त्याचें सहाय करील. ६ राष्ट्रें खवळलीं;
राज्यें डळमळलीं; त्यानें आपला शब्द काढिला,
पृथ्वी विघरली. ७ सैन्यांचा परमेश्वर आम-
च्यासंगतीं आहे; याकोबाचा देव आह्मास आ-
श्रय आहे. सेलाह. ८ तुह्मी या परमेश्वरा-
चीं कृत्यें पाहा; त्यानें पृथ्वींत किती ओसाडी के-
ल्या आहेत. ९ तो पृथ्वीच्या शेवटपर्यंत लढाया
शांत करितो; धनुष्य तोडितो आणि भाल्याचीं
खंडें करितो; रथांस अग्नीनें जाळून टाकितो.
१० तुह्मी दम धरा आणि जाणा कीं, मी देव
आहें; राष्ट्रांमध्यें थोर होईन, पृथ्वीवर थोर
होईन. ११ सैन्यांचा परमेश्वर आह्मास अनु-
कूळ; याकोबाचा देव आह्मास आश्रय आहे.
सेलाह.

## गीत ४७.

कोराहवंशजांतल्या मुख्य वाजंत्यासाठीं गीत.

अहो सर्व लोकांहो, तुह्मी टाळ्या वाजवा; हर्ष-
नादानें देवाजवळ जयशब्द करा. २ कां
तर परमेश्वर परात्पर भययोग्य; सर्व पृथ्वीवर
थोर राजा आहे. ३ तो मुलखांस आमच्या
खालीं आणि राष्ट्रांस आमच्या पायांखालीं घा-
लील. ४ तो आमच्यासाठीं आमचें वतन निव-
डील; ज्या याकोबावर त्यानें प्रीति केली, त्याचें
जें उत्कृष्ट तेंच. सेलाह. ५ देव जयनादानें, पर-
मेश्वर करण्याच्या शब्दानें चढला. ६ तुह्मी
देवाचें कीर्त्तन करा, कीर्त्तन करा; आमच्या रा-
जाचें कीर्त्तन करा, कीर्त्तन करा. ७ कारण कीं
देव सर्व पृथ्वीचा राजा आहे; चतुरपणें कीर्त्तन
करा. ८ राष्ट्रांवर देव राजा आहे, देव आपल्या
पवित्र सिंहासनावर बसला आहे. ९ मुलखांतले
कुलीन आब्राहामाच्या देवाच्या लोकांकडे मिळा-
ले, कां कीं पृथ्वींतल्या ढाली देवाच्या; तो फार
वरिष्ठ मानिला जावो.

## गीत ४८.

कोराहाच्या पुत्रांसाठीं गीत.

आमच्या देवाच्या नगरीं, त्याच्या पवित्र डों-
गरीं, परमेश्वर थोर आणि फार स्तुति-
योग्य आहे. २ सीयोन डोंगर विस्तारानें सुंदर,
सर्व पृथ्वीला संतोषकारी आहे; उत्तर बाजूस
मोठ्या राजाचें नगर आहे. ३ त्यांतल्या राज-
वाड्यांत देव गडरूप असा कळलेला आहे. ४
कां तर पाहा, राजे मिळून एकदांच दूर गेले. ५
ते पाहतांच गडबडले, घाबरून भडकले. ६
तेथें कांपण्यानें व प्रसवणारणीच्यासारिख्या तिड-
कीनें त्यांस व्यापिलें. ७ तूं पूर्वेच्या वाऱ्यानें ता-
र्शीशाचीं तारवें फोडितोस. ८ ज्याप्रमाणें आ-
ह्मी ऐकिलें, त्याप्रमाणें सैन्यांचा परमेश्वर या-
च्या नगरांत आमच्या देवाच्या नगरांत पाहिलें
आहे; देव त्याला सर्वदा यथास्थित राखितो.
सेलाह. ९ हे देवा, तुझ्या देवळामध्यें आह्मी
तुझ्या दयेचें ध्यान केलें आहे. १० हे देवा,
जसें तुझें नाम, तसी पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुझी
स्तुति असो; तुझ्या उजव्या हातांत नीति भ-
रली आहे. ११ सीयोन डोंगरानें आनंद क-

रावा ; तुझ्या न्यायांमुळें यहूदाच्या कन्यानी ह-
र्षावें. १२ सीयोनाच्या भोंवतें तुह्मी फिरा,
आणि त्याला फेरी घालून त्याचे बुरूज मोजा.
१३ त्याच्या बळकटीकडे आपलें लक्ष लावा;
त्यांतले राजवाडे वेगळे वेगळे पाहा, यासाठीं कीं
तुह्मी पुढल्या पिढीजवळ वर्णन करावें. १४ कां
तर हाच देव सदासर्वकाळ आमचा देव आहे;
तो आह्मास मरणपर्यंत नेईल.

## गीत ४९.

मुख्य वाजंत्र्याला; कोराहाच्या पुत्रांसाठीं गीत.

अहो सगळे मुलूख, तुह्मी हें ऐका; अहो इह-
लोकचे सर्व राहणारे, तुह्मी कान लावा. २
अहो उंच व नीच, अहो धनवान् व दरिद्री,
तुह्मी एकत्र ऐका. ३ माझें तोंड ज्ञान बोलेल,
आणि माझ्या हृदयांतला विचार बुद्धीचा होईल.
४ मी आपला कान दाखल्याकडे लावीन; तंतु-
वाद्यावर आपलें गूढ फोडीन. ५ वाईटाच्या दि-
वसांत, माझ्या टपणाऱ्यांचा अन्याय मला वेढितो,
तेव्हां मी कां भ्यावें? ६ जे आपल्या पराक्रमावर
भरंवसा ठेवितात आणि आपल्या फार धनावि-
षयीं नावाजून घेतात, ७ त्यांतील कोणाच्याने
भावाला खंडून सोडववतच नाहीं; त्याविषयीं
क्षमासाधन देवाजवळ देववत नाहीं. ८ त्यांच्या
जिवाची खंडणी तर मोलवान आहे, आणि कधींहि
व्हावयाची नाहीं. ९ त्याने निरंतर वांचावें व
क्षय कधीं न अनुभवावा ह्मणून. १० कां तर असें
दिसतें कीं ज्ञानी मरतात; मूर्ख व पशुरूपी यां-
सुद्धां सरसगट नाश पावतात, आणि आपापल्या
सत्तेचें आपल्या मागल्यांसाठीं ठेवितात. ११
त्यांचें मन असें आहे कीं आपलीं घरें सर्वकाळ,
आपल्या वस्त्या पिढोपिढीं राहतील; ते आपलीं
नावें आपल्या भूमींवर ठेवितात. १२ परंतु मा-
णूस उत्तमपणांत राहत नाहीं; तो नाश पावणा-
ऱ्या पशूंच्यासारिखा आहे. १३ त्यांची ही
चाल त्यांच्या मूर्खपणाची आहे; तथापि त्यांचीं
संतानें त्यांच्या सम्मतावर संतुष्ट आहेत. सेलाह.
१४ जसें मेंढरांस तसें त्यांस कबरेंत ठेवितात;
मरण त्यांस चरून खातें; सकाळीं सरळ लोक
त्यांवर धनीपण करितील, कां कीं त्यांचें रूप
त्यांच्या वस्तींतून कबरांतल्या नाशासाठीं आहे.
१५ परंतु देव माझ्या जिवाला कबराच्या श-
क्तींतून खंडून काढील, कां तर तो मला घेईल.
सेलाह. १६ जेव्हां कोणी धनवान् होतो, आणि
त्याच्या घरांतला संभार वाढतो, तेव्हां तूं भिऊं
नको. १७ कारण कीं तो आपल्या मरणाच्या
वेळेस कांहींच घेऊन जाणार नाहीं; त्याचें गौ-
रव त्याच्यामागें उतरणार नाहीं. १८ जरी
त्याने आपल्या आयुष्यांत आपल्या जिवाला धन्य
ह्मटलें, तुला तर स्तवितील कीं त्वां आपल्यासा-
ठीं बरें केलें आहे; १९ तरी त्याचा जीव त्या-
च्या पूर्वजांच्या घोळक्यांत जाईल; ते कधींहि
उजेड पाहणार नाहींत. २० जो माणूस उत्तम-
पणांत असतां समजत नाहीं, तो नाश पावणाऱ्या
पशूंच्यासारिखा आहे.

## गीत ५०.

आसाफाने केलेलें गीत.

सर्वसमर्थ देव जो परमेश्वर तो बोलला आ-
हे, आणि त्याने सूर्याच्या उगवण्यापासून
त्याच्या मावळण्यापर्यंत पृथ्वी बोलाविली; परि-
पूर्ण शोभेचा सीयोन यांतून देव प्रकाशला. २
आमचा देव येईल आणि उगा राहणार नाहीं.
३ त्याच्यापुढें अग्नि खातखात येईल, आणि त्या-
च्याभोंवतें फार वादळ होईल. ४ तो आपल्या
लोकांचा निवाडा करण्यासाठीं वरल्या आकाशा-
ला व पृथ्वीला हाक मारील कीं, ५ "माझे
भक्त, ज्यानी यज्ञावरून मजसीं करार केला, त्यां-
स तुह्मी माझ्याजवळ एकवट करा." ६ तेव्हां
आकाश त्याचें नीतिपण सांगेल, कां तर देव
तोच न्यायाधीश आहे. सेलाह. ७ "हे माझ्या
लोका, तुह्मी ऐका, कां मी बोलतों; हे इस्राएला,
ऐक, कां मी तुजवर साक्ष देतों, मी देव तुझा
देव आहें. ८ तुझे यज्ञ व तुझे होम जे माझ्या-
पुढें नेहमी व्हावे, त्यांवरून मी तुला धमकावणार
नाहीं. ९ मी तुझ्या घरांतून खोंड व तुझ्या
कोंडण्यांतून बोकड घेणार नाहीं. १० कां तर
वनांतलीं सर्व श्वापदें व हजार डोंगरांवरले पशु
माझेच आहेत. ११ डोंगरांवरलीं सर्व पांखरें
मी जाणतों, आणि भूमिगत माझ्यास्वाधीन आहे.
१२ मला भूक लागली, तरी मी तुला सांगणार

नाहीं; कां तर सृष्टि व तिचें भरण माझें आहे.
१३ मी बलाढ्य पशूंचें मांस खाईन कीं काय?
अथवा बोकडांचें रक्त पिईन कीं काय? १४
तूं देवाला स्तुतिरूप अर्पण वाहा आणि आपले
नवस परात्पराजवळ फेड. १५ आणि संक-
टाच्या दिवसीं मला हाक मार; मी तुला सो-
डवीन, मग त्वां माझें गौरव करावें." १६ परंतु
दुष्टाला देव ह्मणतो, "माझे नेम सांगणें आणि
माझा करार आपल्या तोंडांत घेणें, हें तुझें काय?
१७ कां कीं त्वां उपदेशाचा द्वेष केला आहे, आ-
णि माझ्या गोष्टी आपल्यामागें टाकिल्या आहेत.
१८ जेव्हां चोर तुझ्या दृष्टीस पडला, तेव्हां तूं
त्यासीं सन्मुख झालास; आणि जारकर्मांच्या सं-
गतीं तुझा भाग झाला आहे. १९ त्वां आपलें
तोंड वाईटांत सोडिलें, आणि तुझी जीभ कपट
योजती. २० तूं बसून आपल्या भावाच्या वि-
रुद्ध बोलतोस; आपल्या आईच्या पुत्राची च-
हाडी करितोस. २१ त्वां असीं कर्मे केलीं आणि
मी उगाच राहिलों; तुझ्यासारिखा मी आहेंच
आहें, असें त्वां कल्पिलें, परंतु मी तुला धमका-
वीन आणि तुझ्या दृष्टीपुढें नीट दाखवीन. २२
अहो देवाला विसरणारे, तुह्मी हें ध्यानांत आ-
णा; नाहीं तर मी फाडून टाकीन, आणि कोणी
सोडविणारा मिळणार नाहीं. २३ जो स्तुतीचें
अर्पण करितो, तो मला गौरवितो; आणि जो
आपला मार्ग संभळतो, त्याला मी देवाचें तारण
दाखवीन.

## गीत ५१.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदानें केलेलें गीत; तो बथशे-
बेजवळ गेल्यावर, जेव्हां नाथान भविष्यवादी त्यापासीं
गेला होता, तेव्हांचें.

हे देवा, तूं आपल्या दयेप्रमाणें मजवर कृपा कर;
आपल्या फार ममतेप्रमाणें माझे अतिक्रम खो-
डून टाक. २ माझा अन्याय जावा ह्मणून मला
पक्कें धू; माझ्या पापापासून मला शुद्ध कर. ३
कां तर मी आपले अतिक्रम कबूल करितों, आ-
णि माझें पाप नेहमी माझ्यापुढें आहे. ४ तुज-
विरुद्ध केवळ तुजविरुद्ध म्यां पाप केलें आहे,
आणि तुझ्या दिसण्यांत हें वाईट केलें आहे, असें
कीं तूं आपल्या सांगण्यांत नीतिमान आहेस, आ-
पल्या न्याय करण्यांत निर्दोषी आहेस. ५ पाहा,
मी अन्यायांत जन्मलों आणि माझ्या आईनें मा-
झा गर्भ पापांत धरिला. ६ पाहा, अंतर्यामांतली
सत्यता तुला आवडती, आणि तूं मला गुप्त अं-
गांत ज्ञान कळवितोस. ७ तूं जुफा घेऊन मला
प्रायश्चित्त दे, ह्मणजे मी शुद्ध होईन; मला धू,
ह्मणजे बर्फापेक्षां पांढरा होईन. ८ मला संतो-
षाचें व उल्हासाचें ऐकूं दे; जीं हाडें त्वां चेंच-
रलीं, तीं हर्षित व्हावीं. ९ तूं आपली दृष्टि
माझ्या पापापासून झांक, आणि माझे सर्व अन्या-
य खोडून टाक. १० हे देवा, मजमध्यें शुद्ध
हृदय उत्पन्न कर, आणि यथास्थित आत्मा मज-
मध्यें नवाच कर. ११ मला आपल्या दृष्टीपा-
सून घालवूं नको, आणि आपला पवित्र आत्मा
मजपासून काढूं नको. १२ आपल्या तारणाचा
संतोष मला फिरून दे, आणि उदार आत्म्यानें
मला आश्रय हो. १३ मग मी उल्लंघणाऱ्यांस
तुझे मार्ग शिकवीन, आणि पापी तुजकडे फिरतील.
१४ हे देवा, माझ्या तारणाच्या देवा, मला र-
क्तहत्येपासून सोडीव, ह्मणजे माझी जीभ तुझ्या
पुण्याविषयीं हर्षशब्द करील. १५ हे प्रभू,
माझे होट उघड, मग माझें तोंड तुझें स्तवन क-
रील; १६ कारण कीं तूं यज्ञ इच्छीत नाहींस,
नाहीं तर म्यां दिल्हा असता; होम तुला आव-
डत नाहीं. १७ देवाला जीं अर्पायाचीं तीं फु-
टलेला आत्मा असीं आहेत; हे देवा, फुटलेलें
व चेंचरलेलें हृदय तूं धिःकारणार नाहींस. १८
आपल्या प्रसन्नतेनें सीयोनाचें बरें कर; यरू-
शालेमाचीं गांवकुसें बांध. १९ तेव्हां नीतीचे
यज्ञ, होम व सर्वांग होम तुला आवडेल; तेव्हां
तुझ्या वेदीवर खोंडाचे होम करतील.

## गीत ५२.

मुख्य वाजंत्र्याला; मास्कील; दावीदानें केलेलें गीत.
"दावीद अहीमेलेखाच्या घरीं गेला आहे," असें दोवेग
जो अदोमी, त्यानें जेव्हां जाऊन शाऊलाजवळ निवेदन
करितां त्याला सांगितलें, तेव्हांचें.

हे शूरा, तूं दुष्टाईमुळें कां नांवाजून घेतोस? दे-
वाचें उपकारीकपण सर्व दिवस आहे. २
तुझी जीभ वाईट योजिती आणि पाजलेल्या वस्त-

त्यासारिखी कपट करिती. ३ चांगल्यापेक्षां वा-
ईट, आणि नीतिच्या बोलण्यापेक्षां खोटेपण तुला
आवडतें. सेलाह. ४ अरे कपट जिभी, बुडवा-
याच्या सर्व गोष्टी तुला प्रिय आहेत; ५ ह्मणून
देव तुला सर्वकाळासाठीं पाडून टाकील; तुला
झोंबून वस्तींतून काढील, आणि जिवंताच्या देहां-
तून उपटील. सेलाह. ६ मग नीतिवंत पाहून
भय धरितील, आणि त्यावर हासून ह्मणतील.
७ "पाहा, त्या माणसाने देवाला आपला आश्रय
केलें नाहीं, परंतु आपल्या फार धनावर आशा ठे-
विली, तो आपल्या द्वाडपणाने बळकट झाला."
८ परंतु मी देवाच्या मंदिरीं पालवल्या जाइत
झाडासारिखा आहें; सदासर्वकाळ देवाच्या द-
येवर आशा ठेवितों. ९ मी सर्वकाळ तुझी
स्तुति करीन; कां तर त्वां तसें केलें आहे; आणि
मी तुझ्या नांवाच्या आशेवर राहीन; कां तर तें
तुझ्या भक्तांच्या लक्षांत बरें आहे.

## गीत ५३.

माहलाथेवर मुख्य वाजंत्र्याला; मास्कील; दावीदाने
केलेलें गीत.

मूर्खाने आपल्या मनांत ह्मटलें कीं, "देव नाहीं,"
ते नासले त्यानी अमंगळ काम केलें आहे;
चांगलें करणारा कोणी नाहीं. २ ज्ञानी कोणी
देवाचा शोध करणारा असा आहे किंवा नाहीं,
हें पाहायास देवाने आकाशांतून मनुष्याच्या सं-
तानांकडे न्याहाळून पाहिलें. ३ तीं सर्व बहकलीं,
तीं एकंदर बिघडलीं; उत्तम करणारा कोणी नाहीं,
एक देखील नाहीं. ४ दुष्कर्म्यांस समज नाहीं
कीं काय? अन्न जसें खातात, तसें ते माझ्या
लोकांस खातात; त्यानी देवाची प्रार्थना केली
नाहीं. ५ तेथें भयकारण नसतां ते फार भ्याले
होते; कां तर ज्याने तुजवर तळ धरिला होता,
त्याच्या हाडांची दाणादाण देवाने केली; त्वां
त्यांस लाजविलें, कां तर देवाने त्यांस धिःकारिलें;
होतें. ६ इस्राएलाचें तारण सीयोनांतून कोण
करील? जेव्हां देव आपल्या पाडाव केलेल्या लो-
कांस माघारा आणील, तेव्हां याकोब हर्षित हो-
ईल, इस्राएल संतोष पावेल.

## गीत ५४.

मुख्य वाजंत्र्याला; निगीनोथावर मास्कील; दावीदाने
केलेलें गीत, जेव्हां जीफ्यानी शाऊलाजवळ येऊन सां-
गितलें कीं, "दावीद आमच्या इकडे लपत नाहीं कीं
काय?" तेव्हांचें.

हे देवा, तूं आपल्या नामामुळें मला तार, आणि
आपल्या पराक्रमाने माझा निवाडा कर. २
हे देवा, माझी प्रार्थना ऐक; माझ्या तोंडच्या
वचनांकडे कान लाव. ३ कां तर परके मजवर
उठले, आणि क्रूर माझा जीव शोधित आहेत.
त्यानी आपल्या लक्षांत देव ठेविला नाहीं. सेलाह.
४ पाहा, देव मला सहाय आहे; जे माझ्या जि-
वाला आधार देतात, त्यांकडे प्रभु आहे. ५
त्याने माझ्या वैऱ्यांची फेड वाईटाने करावी; तूं
आपल्या सत्यतेने त्यांस काढून टाक. ६ मी
आवडीने तुझ्याजवळ यज्ञ करीन; हे परमेश्वरा,
तुझ्या नामाची स्तुति करीन, कारण कीं तें चांगलें
आहे; ७ कां तर तो मला सर्व संकटांतून का-
ढितो आणि माझे डोळे माझ्या शत्रूंस पाहतात.

## गीत ५५.

मुख्य वाजंत्र्याला; निगीनोथावर मास्कील; दावीदाने
केलेलें गीत.

हे देवा, माझ्या प्रार्थनेकडे कान लाव, आणि
माझ्या काकुळतीपासून लपूं नको. २ मज-
कडे लक्ष लाव आणि मला उत्तर दे. ३ मी
आपल्या घराण्यांत कष्टी होऊन गडबडतों; हें
शत्रूच्या शब्दामुळें, दुष्टाच्या जुलमामुळें आहे;
कां तर ते मजवर अनर्थ लोटितात. आणि रागाने
माझें वैर करितात. ४ मजमध्यें माझें हृदय
धडधडत आहे, आणि मरणाचें फार घाबरेपण
मजवर पडलें आहे. ५ भय व कांप मला प्राप्त
झाला, आणि फार थरथराटाने मला व्यापिलें
आहे. ६ आणि म्या ह्मटलें कीं, "मला पार-
व्यासारिखे पंख कोण देईल असें कीं मी उडून
शांत राहीन? ७ पाहा, मी उडत उडत दूर
जाऊन रानांत राहीन. सेलाह. ८ सुसाट वा-
ऱ्यापेक्षां, वादळापेक्षां वेगाने मी आपलें पलायन
करीन. ९ हे प्रभू, त्यांचें भाषण भिन्नभिन्न

करून घालमेल कर, कां तर म्या नगरांत बळा-
त्कार व भांडण पाहिलें आहे. १० दिवसा व
रात्रीं त्याच्या गांवकुसांवर त्याभोंवतें फिरतात,
आणि त्याच्या मध्यभागीं अनर्थ व कष्ट आहेत.
११ त्यांत उत्पात होतात, आणि ठकविणें व कपट
त्याच्या मार्गाला सोडीत नाहीं. १२ जो मला
गांजीत असतो, तो तर शत्रु नाहीं; असता, तर
म्या साहिलें असतें; ज्याने मजवर थोरपण धरिलें
आहे, तो माझा द्वेषी नाहीं; असता तर मी त्या-
च्यापुढें लपलों असतों. १३ परंतु तो तूंच,
माझ्या समान असा माणूस, माझा मित्र व माझा
ओळखी आहेस. १४ कां तर आह्मी गोडप-
णाने एकत्र विचार केला; देवाच्या घरास घोळ-
क्यांत चाललों. १५ मरणाने त्यांस फसवावें;
त्यांनी जितेंच कबरेंत उतरावें; कां कीं दुष्टाई
त्यांच्या वस्तींत व त्यांच्या मध्यें आहेत. १६
मी देवाचें नाम घेईन, आणि परमेश्वर मला
तारील. १७ संध्याकाळीं व सकाळीं व दुपारीं
मी ध्यान करितां ह्मणून सांगेन, आणि तो माझा
शब्द ऐकेल. १८ मला प्रतिकूळ जी लढाई
होती तिजपासून त्याने माझा जीव सलामत मुक्त
केला आहे कां कीं मजसीं बहुत होतें. १९
देव, ह्मणजे जो पूर्वकाळापासून बसला आहे, तो
ऐकून त्यांस खालीं करील. सेलाह. त्यांस पालट
नाहींत, यास्तव ते देवाला भीत नाहींत. २०
त्याने आपल्यासीं जे शांत त्यांवर आपले हात
टाकिले, आपला करार मोडिला आहे. २१
त्याचें तोंड लोण्यापेक्षां गुळगुळीत, परंतु त्याच्या
हृदयीं झगडा; त्याचे शब्द तेलापेक्षां मृदु, परंतु
ते उपसलेल्या तरवारी, असे होते. २२ अरे
आपलें दैव परमेश्वराला सोपून दे, ह्मणजे तो
तुला पुरवील, नीतिमानाची डळमळ कधींहि होऊं
देणार नाहीं. २३ परंतु हे देवा, तूं त्यांस ना-
शाच्या खांचेंत उतरविसील; रक्तपाती व कपटी
माणसें आपलें अर्धे आयुष्य पावणार नाहींत;
मी तर तुजवर आशा ठेवीन.

## गीत ५६.

मुख्य वाजंव्याला; योनाथ एलेम रिहोकीम यावर दावीदाकडून मिकताम् जेव्हां पलिष्ट्यांनी त्याला गाथांत धरिलें तेव्हां त्याने केलेलें गीत.

हे देवा, मजवर दया कर; कां तर माणूस मज-
वर उमासा टाकितो; तो सर्व दिवस लढून म-
ला गांजितो. २ हे वरिष्ठा, माझे वैरी सर्व दिवस
उमासा टाकितात; अणखी बहुत गर्वाने मजसीं
लढतात. ३ ज्या दिवसीं मला भय होतें, त्यांत
मी तुजवर आशा ठेवीन. ४ देवाविषयीं त्याच्या
वचनामुळें मी उत्साह करीन; म्या देवावर आ-
शा ठेविली आहे, मी भिणार नाहीं; देहिक माझें
काय करणार आहे? ५ ते सर्व दिवस माझ्या
गोष्टी विपरित करितात; मजविषयीं त्यांचे सर्व
विचार वाईटासाठीं आहेत. ६ ते मिळून दबा
धरितात; माझ्या जिवाची प्रतीक्षा करीत असतां
माझ्या पावलांवर टपतात. ७ त्यांस अनर्थांत
पडूं दे; हे देवा, रागाने लोकांस खालीं कर. ८
त्वां माझीं भ्रमणें मोजिलीं आहेत; तूं आपल्या
बुधलींत माझीं आसवें घाल; तुझ्या गणण्यांत
आहेत कीं नाहींत? ९ ज्या दिवसीं मी हाक
मारितों, तेव्हां माझे शत्रु मागें फिरतात, हें मला
कळलें; कां देव मजकडे आहे. १० देवाविषयीं
त्याच्या वचनामुळें मी गौरव करीन; परमेश्वरा-
विषयीं त्याच्या वचनामुळें मी गौरव करीन. ११
देवावर म्या आशा ठेविली आहे; मी भिणार
नाहीं; माणूस माझें काय करणार! १२ हे देवा,
तुझे नवस मजकडे आहेत; तुझ्या स्तुति करून
फेडीन. १३ कारण कीं त्वां माझा जीव मरणा-
पासून सोडविला आहे; म्या जिवंताकडल्या उजे-
डाने देवासमोर चालावें, ह्मणून त्वां माझे पाय
खरकण्यापासून राखिले नाहींत कीं काय?

## गीत ५७.

मुख्य वाजंव्याला; अलतास्कीथ दावीदाकडून मिकताम; जेव्हां तो शाऊलापासून गुहेंत पळाला, तेव्हांचें.

हे देवा, मजवर कृपा कर, मजवर कृपा कर;
कां तर माझ्या जिवाने तुजवर आशा ठेविली
आहे, आणि अरिष्टें, पार होतात तोंपर्यंत मी
तुझ्या पंखांच्या छायेंत निवारा घेईन. २ परा-
त्पर देवाला ह्मणजे देव, जो माझ्यासाठीं सि-
द्धीस नेतो, त्याला मी हाक मारीन. ३ तो आ-
काशांतून पाठवून मजवर उमासा टाकणार याच्या
धिःकारापासून मला तारितो. सेलाह. देव आपली

दया व आपली सत्यता पाठवितो. ४ माझा जीव सिंहामध्यें आहे; जाळणाऱ्या मनुष्याच्या संतानांमध्यें मी निजतों; त्यांचे दांत भाले व बाण आणि त्यांची जीभ तिखट तरवार आहे. ५ हे देवा, आकाशावर उंच ऐस; संपूर्ण पृथ्वीवर तुझें गौरव असो. ६ त्यांनी माझ्या पावलांसाठीं जाळें लाविलें, माझा जीव फार ओणवा झाला; त्यांनी माझ्यापुढें खांच खाणिली; तींत तेच पडले आहेत. सेलाह. ७ माझें मन स्थिर, हे देवा, माझें मन स्थिर आहे; मी गाऊन कीर्त्तन करीन. ८ हे माझ्या गौरवा, जागा हो; अहो तारपेटी व तंतुवाद्या, तुह्मी जागे व्हा; मी पाहटेस जागा होईन; ९ हे प्रभू, मी लोकांमध्यें तुझी स्तुति करीन; राष्ट्रांमध्यें तुझें कीर्त्तन करीन. १० कां तर तुझी दया आकाशापर्यंत आणि तुझी सत्यता आभाळापर्यंत एवढी मोठी आहे. ११ हे देवा, आकाशावर उंच ऐस; संपूर्ण पृथ्वीवर तुझें गौरव असो.

## गीत ५८.

मुख्य वाजंत्र्याला; अलतस्कीत; दावीदाकडून मिकताम.

अहो मनुष्याच्या वंशानो, तुह्मी नीतीचा निर्बंध खरा सांगतां कीं काय? तुह्मी नीट न्याय करितां कीं काय? २ निश्चयें तुह्मी हृदयानें अशास्त्र कर्में करितां; तुह्मी आपल्या हातांचा बळात्कार पृथ्वीवर तोलून देतां. ३ दुर्जन गर्भापासून बहकून जातात; ते जन्मापासून लबाडी बोलत मोकार फिरतात. ४ सर्पांच्या विषाप्रमाणें त्यांस विष आहे; ते बहिरा पेंथेन साप जो आपला कान बंद करितो, ५ आणि गारुड्यानी चतुरपणें मांत्रिकी केली असतांहि त्यांचा शब्द ऐकत नाहीं, त्यासारिखे आहेत. ६ हे देवा, त्यांच्या तोंडांत त्यांचे दांत पाड; हे परमेश्वरा, तरण्या सिंहांच्या दाढा फोड. ७ जसें पाणी आपल्या आपण चालतें, तसें ते निघरून जावे; तो आपले बाण लावितो, ते तोडिले असे व्हावे. ८ गोगलगाय जी विरत चालती, तसे होवोत; स्त्रियेच्या गर्भपातासारिखें त्यांनी सूर्य पाहूं नये. ९ तुमच्या भांड्यांनी कांटेजळण अनुभविल्यापूर्वी तो संतप्त होतांच, जोंपर्यंत जितेंच तितक्यांत त्याला वादळेंकरून उडवील. १० मूढ पेणें पाहिल्यावर नीतिवान् संतोष पावेल; दुष्टाच्या रक्तांत तो आपले पाय धुईल. ११ तेव्हां माणूस ह्मणेल, 'निश्चयें नीतिमानाला फळ आहे; जो न्याय ठरवितो, असा देव पृथ्वींत आहे खरा.'

## गीत ५९.

मुख्य वाजंत्र्याला; अलतस्कीत; दावीदाकडून, मिकताम; जेव्हां त्याला जिवें मारायास शाऊलानें माणसें पाठविलीं, आणि त्यांनी घरावर पाळत केली, तेव्हांचें.

हे माझ्या देवा, माझ्या शत्रूंपासून मला सोडीव; जे मजवर उठतात, त्यांपासून माझें संरक्षण कर. २ दुष्कर्म्यांपासून मला सोडीव, आणि रक्तपाती माणसांपासून मला तार; ३ कां तर पाहा, ते माझ्या जिवावर दबा धरितात; हे परमेश्वरा, माझा अतिक्रम नसतां, माझें पापहि नसतां, जे बळकट ते मजविरुद्ध मिळतात. ४ माझ्या अन्यायावांचून ते धांवतात आणि सिद्ध होतात; तूं मला भेटून पाहायास सावध हो. ५ हे सैन्यांच्या परमेश्वर देवा, हे इस्राएलाच्या देवा, तूं सर्व राष्ट्रांची पाहणी करायास उठ; सर्व दुष्ट फितुऱ्यांवर कृपा करूं नको. सेलाह. ६ संध्याकाळीं ते माघारे येतात; कुत्र्यासारिखे ओरडतात आणि नगराला वेढितात. ७ पाहा, ते आपल्या तोंडानी उद्गारितात; त्यांच्या होटांत तरवारी आहेत, कां तर ते ह्मणतात, कीं 'कोण ऐकतो?' ८ तर हे परमेश्वरा, तूं त्यांस हाससील; सर्व परराष्ट्रांचा धिःकार करसील. ९ त्याच्या बळामुळें मी तुजकडे लक्ष लावीन, कां तर देव माझें संरक्षण आहे. १० माझा दयाळू देव माझ्यापुढें येईल; देव माझ्या वैऱ्यांवर मला पाहूं देईल. ११ तूं त्यांस जिवें मारूं नको; नाहीं तर माझे लोक विसरतील; हे प्रभू, तूं आमची ढाल, आपल्या बळानें त्यांस भडकाव आणि त्यांस खालीं कर. १२ त्यांच्या तोंडाचें पाप, त्यांच्या होटांचें बोलणें, यामुळें ते आपल्या गर्वेंकरून धरिले जावे; कां ते शापानें व लबाडीनें सविस्तर बोलतात. १३ तूं रागानें त्यांचा क्षय कर; असे ते नाहींसे व्हावे; आणि पृथ्वीच्या सीमांपर्यंत कळावें कीं देव याकोबावर अधिकार करितो. सेलाह. १४ आणि संध्याकाळीं ते मा-

घारे येतात; कुत्र्यासारिखे ओरडतात आणि नग-
राला वेढितात. १५ ते खाण्यासाठीं हिंडतात,
परंतु तृप्त न होऊन कुरकुरतात. १६ पण मी
तर तुझें बळ गायीन आणि सकाळीं तुझ्या दये-
विषयीं हर्षशब्द करीन; कारण कीं तूं माझा आ-
श्रय आणि माझ्या संकटाच्या दिवसीं माझें शरण
झाला आहेस. १७ हे माझ्या सामर्थ्या, मी
तुझ्याजवळ कीर्त्तन करीन; कां तर देव माझा
कोठ, तो माझ्या दयेचा देव आहे.

## गीत ६०.

मुख्य वाजंत्र्याला; भालशूशान एदूथ; दावीदाकडून, मिकताम; उपदेशार्थ; जेव्हां तो अरामनहरायिमासीं व आरमजोबासीं भांडत होता, आणि योवाबाने माघारें फिरून क्षारखिंडींत अदोमांतले बारा हजार मारिले, तेव्हांचें.

हे देवा, त्वां आह्मास अव्हेरिलें, आह्मास फो-
डिलें आहे; तूं रागें भरलास; तथापि तूं आ-
ह्माजवळ परत ये. २ त्वां देशाला कांपविलें,
तिला पाडिलें; तूं त्यांतलीं मोडकीं नीट कर, कां
तर त्याची डळमळ झाली आहे. ३ त्वां आ-
पल्या लोकांस कठीण दाखविलें; विस्मयाचा द्रा-
क्षरस आह्मास पाजिला. ४ सत्यामुळें झेंडा
उभारावा ह्मणून त्वां तो आपल्या भिणाऱ्यांस दि-
ल्हा आहे. सेलाह. ५ तुझे प्रियकर सोडविले
जावे ह्मणून तूं आपल्या उजव्या हाताने तार,
आणि मला उत्तर दे. ६ देव आपल्या पवित्र
स्थानांत बोलला आहे, "मी उल्हास करीन; श-
खेमाची वांटणी करीन, आणि सुक्कोथ खोऱ्याची
मोजणी करीन. ७ गिलाद माझा व मनाश्शे
माझा, आणि एफ्राइम माझा मुख्य सामर्थ्य; य-
हूदा माझा नियमकर्त्ता आहे. ८ मोवाब माझ्या
स्नानाचें गंगाळ; अदोमावर मी आपला जोडा फें-
कीन; हे पलेशेथा, मजमुळें उल्हास कर. ९
मला बंदोबस्तीच्या नगरास कोण नेईल? अदो-
मापर्यंत मला वाटाडी कोण होईल? १० हे
देवा, तो तूंच कीं नाहीं? ज्याने आह्मास अव्हे-
रिलें, हे देवा, जो आमच्या सैन्यासहित गेला
नाहीं, तो तूंच कीं नाहीं? ११ संकटांतून सो-
डवून आमचें सहाय कर; कां तर माणसाच्याने
जें तारण, तें व्यर्थ आहे. १२ देवाच्याने आह्मी
पराक्रम करूं; तोच आमच्या वैऱ्यांस तुडवील

## गीत ६१.

मुख्य वाजंत्र्याला निगिनोथावर; दावीदाने केलेलें गीत.

हे देवा, माझा विलाप ऐक; माझ्या प्रार्थनेकडे
लक्ष लाव. २ मी पृथ्वीच्या शेवटापासून
तुला हाक मारीन; जेव्हां माझें मन बुडतें, तेव्हां
माझ्यापेक्षां जो उंच, त्या खडकावर तूं मला ने.
३ कां तर तूं माझा आश्रय; शत्रुपुढें बळाचा
बुरूज आहेस. ४ मी तुझ्या मंडपांत सर्वकाळ
राहीन, तुझ्या पंखांच्या गुप्तस्थानीं निवारा घेईन.
सेलाह. ५ कां तर, हे देवा, त्वां माझे नवस
ऐकिले; जे तुझ्या नामाचें भय धरितात, त्यांतलें
वतन मला दिल्हें आहे. ६ तूं राजाच्या दिव-
सांवर दिवस वाढवून देसील; पिढीमागें पिढी
इतकीं त्याचीं वर्षे होतील. ७ तो सर्वकाळ
देवाच्या समक्ष राहील; दया व सत्यता यानीं
त्याला राखावें ह्मणून तूं आज्ञा दे. ८ असें मी
दिवसोदिवस आपले नवस पूर्ण करायासाठीं तु-
झ्या नामाचें कीर्त्तन सर्वकाळ करीन.

## गीत ६२.

मुख्य वाजंत्री ह्मणजे यदूथूनाला; दावीदाने केलेलें गीत.

निश्चयें माझ्या जिवाची आशा देवाकडे आहे;
त्यापासून माझें तारण आहे. २ निश्चयें
तो माझा खडक व माझें तारण, तो माझा आ-
श्रय आहे, माझी फार डळमळ होणार नाहीं.
३ तुह्मी कोठपर्यंत मनुष्यावर घाला घालाल? झु-
कलेली भिंत, ढकललेलें कुसूं, यांसारिखे तुह्मी
सर्व घात पावाल. ४ त्याच्या थोरपणापासून पा-
डावयास मात्र ते योजितात; लबाडी त्यांस आव-
डती; तोंडानें आशीर्वाद देतात परंतु आपल्या
अंतःकरणांत शाप देतात. सेलाह. ५ हे माझ्या
जिवा, तूं केवळ देवासाठीं दम धर; कारण कीं
त्यापासून माझी आशा पूर्ण होईल. ६ केवळ
तोच माझा खडक व माझें तारण, माझा गड
आहे; मी ढळणार नाहीं. ७ देवापासीं माझें
तारण व माझें गौरव आहे; तो माझ्या बळाचा
खडक; माझी आशा देवावर आहे. ८ अहो लोक,
तुह्मी सर्वकाल त्यावर भरंवसा ठेवा; आपलें ह्र-
दय त्याच्यापुढें ओता, देव आमचा आश्रय

आहे. सेलाह. ९ परंतु नीच मनुष्य व्यर्थ, थोर
मनुष्य लबाड; ते तागडींत चढविल्यास एकंदर
शून्यापेक्षां हलके आहेत. १० तुह्मी बलात्कारा-
वर आशा ठेवूं नका, आणि लुटण्याने तोरा करूं
नका; समर्थता वाढली, तरी तिजकडे मन लावूं,
नका. ११ देव एकदां बोलला; दोनदां म्या हें
ऐकिलें कीं, 'देवाला शक्ति आहे.' १२ आणि
हे प्रभू, तुला दया आहे; कां कीं तूं मत्येकाची
फेड त्याच्या कामाप्रमाणें करितोस.

## गीत ६३.

दावीदाने केलेलें गीत; जेव्हां तो यहूदानल्या रानांत
होता तेव्हांचें.

हे देवा, तूं माझा देव; मी तुजसाठीं पाहाटेस
शोध करितों, माझा जीव तुजसाठीं तान्हेला
आहे; पाण्यावांचून कोरडा व थकण्याचा देश,
यांत माझा देह तुझ्यासाठीं उत्कंठा धरितो. २या-
साठीं कीं म्या जसें पवित्र स्थानीं तुला पाहिलें,
तसें तुझी शक्ति व तुझें गौरव पाहावें. ३ कारण
कीं तुझी दया जिवापेक्षां चांगली; माझे होट तुझी
स्तुति करितील. ४ असें मी जगें तोंपर्यंत तुझी
स्तुति करीन; तुझ्या नामाने आपले हात उभारीन.
५ माझा जीव जसा दुधाने व पौष्टिकाने तसा तृप्त
होईल, आणि माझें तोंड हर्षित होटांनी उत्साह
करील. ६ मी आपल्या अंथरुणावर देखील तुझी
आठवण करीन, पाहऱ्यांच्या वेळेस तुझें ध्यान
करीन. ७ कारण कीं तूं मला सहाय झालास
आणि तुझ्या पंखांच्या छायेंत मी हर्षशब्द करीन.
८ माझा जीव तुजकडे लागला आहे; तुझा उज-
वा हात मला आधार देईल. ९ परंतु जे नाश
करायास माझा जीव शोधितात, ते पृथ्वींतल्या
खालच्या ठिकाणांत जातील. १० ते तरवारीने
पडतील; ते कोल्ह्यांचा विभाग होतील. ११ परंतु
राजा देवाविषयीं आनंद करील; त्याजवळ शपथ
वाहतात, ते सर्व उत्साह करितील, पण जे खोटें
बोलतात त्यांचें तोंड कुंठित होईल.

## गीत ६४.

मुख्य वाजंप्याला; दावीदाने केलेलें गीत.

हे देवा, मी गाऱ्हाणें करितों तेव्हां तूं माझा
शब्द ऐक; माझा जीव शत्रूच्या भयापासून
राख. २ वाईटांच्या एकोप्यापासून, दुष्कर्म्यांच्या दं-
ग्यापासून मला झांक. ३ कारण कीं ते आपली जीभ
तरवारीसारिखी तिखट करितात, ते आपले बाण
ह्मणजे कडू शब्द लावितात; ४ यासाठीं कीं
आपण गुप्त ठिकाणांमध्यें यथार्थाला विंधावें; एका-
एकीं त्याला बाण मारितात आणि भीत नाहींत. ५
ते वाईट कामासाठीं आपल्यांस धैर्य देतात; जाळीं
गुप्त लावण्याविषयीं सविस्तर बोलतात; ते ह्मण-
तात, "आपल्यांस कोण पाहील?" ६ ते ठलंघनें
योजितात, ते फार शोध करितात, आणि प्रत्ये-
काची बुद्धि व अंतःकरण खोल आहे. ७ परंतु
देव त्यांस एकाएकीं बाण मारील; त्यांस पटक्या
होतील. ८ आणि ते आपली जीभ आपल्यांवरच
पाडून घेतील; जे त्यांस पाहतात, ते सर्व पळून
जातील. ९ तेव्हां सर्व माणसें भितील, आणि
देवाचें काम दाखवीत असतां त्याचीं कृत्यें ध्या-
नांत आणितील. १० जो नीतिमान तो परमे-
श्वराविषयीं आनंद करील, आणि त्यावर आशा
ठेवील; जे हृदयाचे नीट, ते सर्वींहि नावाजतील.

## गीत ६५.

मुख्य वाजंप्याला; दावीदाने केलेलें गीत.

हे देवा, सीयोनांत तुझ्यासाठीं स्तुति सादर आ-
हे; आणि तुझ्याजवळ नवस फेडला जाईल.
२ हे प्रार्थनेच्या ऐकणारा, सर्व मनुष्यांनी तुझ्याजवळ
यावें. ३ माझ्या शक्तिपेक्षां अन्यायाच्या गोष्टी भा-
री झाल्या, परंतु आमच्या उलंघनांची क्षमा तूं
करसील. ४ ज्याला तूं निवडून आपल्याजवळ घे-
सील, तो धन्य; तो तुझ्या वाड्यामध्यें वस्ति पावेल:
तुझें मंदीर, तुझें पवित्र देऊळ, याच्या उत्तमतेने
आह्मी तृप्त होऊं. ५ हे आमच्या तारणाच्या
देवा, तूं न्यायाने आह्मास भयंकर उत्तर देसील:
तूं पृथ्वीच्या सर्व सीमांचा आणि समुद्रावर जे दूर
त्यांचा आश्रय आहेस. ६ त्याने आपल्या श-
क्तीने डोंगरांस स्थापिलें; तो पराक्रमाने वेष्टलेला
आहे. ७ समुद्रांची गर्जना, त्याच्या लाटांची
गर्जना आणि राष्ट्रांची गडबड यांची शांति करि-
तो. ८ आणि सिमांतील राहणारे तुझ्या खुणां[illegible]
भितात; तूं सकाळचीं व संध्याकाळचीं [illegible]
हर्षनादाने करवितोस. ९ तूं या पृथ्वीची पाह-

णी करून तिजवर पाऊस पाडितोस; तिला
फार सधन करितोस; देवाचा झरा पाण्याने भर-
लेला आहे; तिला सिद्ध केल्यावर, तूं त्यांचें धान्य
सिद्ध करितोस. १० तूं तिचे दंड भिजीव; तिचीं
तासें बसीव; पाहाळ्यानी तिला विरीव; तिच्या
वाढीला आशीर्वाद दे. ११ तूं आपल्या चांगले-
पणाने वर्ष संपन्न करितोस, आणि तुझ्या वाटा पी-
ष्टिक गाळितात. १२ रानांतल्या कुरणांवर गाळि-
तात, आणि टेंकडें हर्षांने वेष्टलेलीं आहेत. १३
चरणी कळपानी पांघरलेल्या, आणि तळवटी धा-
न्याने झांकलेल्या आहेत; फार उल्हासी आहेत,
गाणेंहि गातात.

## गीत ६६.

मुख्य वाजंव्याला; कीर्त्तनाचें गीत.

अहो पृथ्वींतले सर्व, तुह्मी देवाजवळ हर्षनाद
करा; २ त्याच्या नामाचें गौरव कीर्त्तनाने
करा; त्याच्या स्तुतीने गौरव करा. ३ देवाला
ह्मणा कीं, "तुझीं कृत्यें किती भयंकर! तुझ्या फार
सामर्थ्यामुळें तुझे शत्रू तुझ्याजवळ आर्जव करि-
तील." ४ पृथ्वींतले सर्व तुझ्या पायां पडतील;
तुझें कीर्त्तनहि करितील; तुझ्या नामाचें कीर्त्तन
करितील. सेलाह. ५ तुह्मी चला, आणि देवाचीं
कृत्यें पाहा; तो मनुष्यांच्या संतानासाठीं चरित्राने
भयंकर आहे. ६ त्याने समुद्र पालटून कोरडी
भूमि असा केला; ते नदीवरून पायीं पार गेले;
तेथें आह्मी त्याच्याविषयीं आनंद केला. ७ तो
आपल्या पराक्रमाने सर्व अधिकार करितो; त्याचे
डोळे राष्ट्रांस न्याहळितात; फितुऱ्यानी आपणांस
उंच न करावें. सेलाह. ८ अहो राष्ट्रें, तुह्मी आ-
मच्या देवाचें स्तवन करा; त्याच्या स्तुतीचा शब्द
ऐकावा. ९ तो आह्मास जिवंत राखितो, आणि
आमचे पाय सरकूं देत नाहीं. १० हे देवा, त्वां
आह्मास पारखिलें; जसें रुपें गाळून पाहतात,
तसें आह्मास पाहिलें. ११ त्वां आह्मास जाळ्यांत
आणिलें; आमच्या कंबरांवर दडपण घातलें. १२
त्वां मनुष्यांस आमच्या डोक्यांवर बसविलें,
आह्मी अग्नींतून व पाण्यांतून गेलों; तरी त्वां
आह्मास काढून समृद्धींत आणिलें आहे. १३,१४
मी होमार्पणें घेऊन तुझ्या मंदिरास येत जाईन;
माझ्या संकटांत माझ्या होटांनी जे नवस उदा-
रिले, आणि माझ्या तोंडाने उच्चारिले, ते मी
तुझ्याजवळ फेडीन. १५ पुष्ट होमार्पणें तुला अ-
र्पीन, एडके बोकडें व गोऱ्हे हे धुपासुद्धां वाहीन.
सेलाह. १६ अहो देवाचे सर्व भिणारे, तुह्मी
येऊन ऐका; ह्मणजे त्याने माझ्या जिवासा-
ठीं जें केलें त्याचें वर्णन मी करीन. १७ म्या
आपल्या तोंडाने त्याला हाक मारिली, आणि तो
माझ्या जिभेने थोर मानला गेला. १८ जर मी
आपल्या मनांत कपट राखितों तर प्रभु ऐकणार
नाहीं. १९ परंतु निश्चयें देवाने ऐकिलें आहे;
माझ्या प्रार्थनेच्या शब्दाकडे लक्ष लाविलें आहे.
२० देवाची स्तुति असो, का तर त्याने माझी
प्रार्थना घालविली नाहीं, आणि आपली दया
मजवरून घालविली नाहीं.

## गीत ६७.

मुख्य वाजंव्याला; निगिनोथावर गायनाचें गीत.

देवाने आह्मावर कृपा करावी; आणि आह्मास
आशीर्वाद द्यावा; आपलें मुख आह्मावर प्रका-
शित करावें. सेलाह. २ यासाठीं कीं पृथ्वींत तुझा
मार्ग कळावा; सर्व राष्ट्रांस तुझें तारण कळावें.
३ हे देवा, लोकानी तुझी स्तुति करावी सर्व
लोकानी तुझी स्तुति करावी. ४ राष्ट्रानी आनंद
करून हर्षशब्द करावे; कारण कीं तूं लो-
कांचा न्याय यथार्थ करसील, आणि पृथ्वींतल्या
प्रजा, यांस चालविसील. सेलाह. ५ हे देवा,
लोकानी तुझी स्तुति करावी, सर्व लोकानी तुझी
स्तुति करावी. ६ पृथ्वी आपलें उत्पन्न देईल;
देव, आमचाच देव आह्मास आशीर्वाद देईल.
७ देव आह्मास आशीर्वाद देईल, आणि पृथ्वी-
च्या सर्व सीमा त्याचें भय धरतील.

## गीत ६८.

मुख्य वाजंव्याला; दावीदाने केलेलें गायनाचें गीत.

देवाने उठावें; त्याच्या शत्रूंनी भडकावें; त्याच्या
द्वेष्यानी त्याच्या पुढून पळावें. २ जसा धूर
उडविला जातो, तसें त्वां त्यांस उडवावें; जसें
मेण अग्नीपुढें वितळून जातें, तसें दुष्टानी देवापुढें
नाश पावावा. ३ परंतु नीतिमानानी देवापुढें
आनंद करून हर्षावें, आणि आनंदाने उल्हास
करावा. ४ तुह्मी देवाजवळ गायन करा; त्या-

ऱ्या नामाचें कीर्त्तन करा; जो आरूढ होऊन अर-
ण्यांत चालतो, त्यासाठीं मार्ग सिद्ध करा, त्याचें
नाम अनंत असें आहे, आणि त्याच्या समोर
उत्साह करा. ५ देव आपल्या पवित्र वस्तींत
पोरक्यांचा बाप व विधवांचा न्यायाधीश आहे.
६ देव अनाथास कुटुंबांत बसवितो; बंदिवानांस
काढून यथास्थितपणामध्यें ठेवितो, परंतु फितूरी
शुष्क ठिकाणीं राहतात. ७ हे देवा, जेव्हां तूं
आपल्या लोकांपुढें निघालास, जेव्हां अरण्यांत
चाललास. सेलाह. ८ तेव्हां पृथ्वी कांपली;
देवासमोर आकाशहि पाझरलें; देव, इस्राएलाचा
देव यासमोर सीनायहि कांपला. ९ हे देवा,
त्वां आपल्या वतनावर उदारपणें पाऊस पाडिला,
आणि तें कोमलेलें असतां, त्याला यथास्थित केलें.
१० तुझे प्राणी त्यावर राहतात; हे देवा, त्वां
आपल्या कृपेने दरिद्र्यांसाठीं सिद्ध केलें आहे.
११ प्रभूने निरोप दिल्हा; वर्त्तमान सांगणाऱ्यांचा
मोठा समुदाय झाला. १२ सैन्यांचे राजे उ-
ड्या मारीत मारीत पळाले, आणि घरीं राहणारी,
तिला लूट मिळाली. १३ तुह्मी चुलींमध्यें जरी
निजलां, तरी रुप्याने मढविलेले पारव्याचे पं-
ख, आणि पिवळ्या सोन्याने मढविलेले त्याचे
पर यांसारिखे व्हाल. १४ जेव्हां सर्वसम-
र्थाने यांत राजे भडकाविले, तेव्हां जालमोनावरल्या
बर्फासारिखें झालें. १५ बाशान डोंगर देवाचा
डोंगर आहे; बाशान डोंगर शिखरांचा डोंगर
आहे. १६ अहो शिखरांचे डोंगर, जो डोंगर
देवाने आपल्या वस्तीसाठीं इच्छिला, त्याचा हेवा
तुह्मी कां करितां? परमेश्वर त्यावर सर्वकाळ
वस्ति करील. १७ देवाचे रथ दोन अयुतें,
बहुपट हजारों आहेत; त्यांमध्यें प्रभु आहे,
सीनाय् पवित्र स्थानीं आहे. १८ तूं उंचावर
चढलास; त्वां पाडाव करून नेले; मनुष्यासाठीं
दानें मिळविलीं, फितुरी यांसाठीं देखील; असे
कीं परमेश्वर देव याने त्यांमध्यें वस्ति करावी.
१९ प्रभूची स्तुति असो, दिवसोदिवस तो आ-
ह्मास उपकार लादून देतो, तो आमच्या तारणा-
चा देव आहे. सेलाह. २० हा आमचा देव,
तो तारणांचा देव आहे, मरणापासून निभावणें
प्रभु परमेश्वर याकडूनच आहे. २१ निश्चयें
देव आपल्या शत्रूंचा मस्तक फोडील, जो आपले
दोष धरीत चालतो, त्याची केसाळ टाळू फोडील.
२२ प्रभूने ह्मटलें कीं, "मी त्यांस बाशानापासून मा-
घारें आणीन समुद्राच्या तळांपासून माघारें आणीन.
२३ यासाठीं कीं तुझा पाय रक्तांत बुचकळावा,
तुझ्या कुत्र्यांच्या जिभेस शत्रूंपासून वांटा व्हावा.
२४ हे देवा, त्यानी तुझ्या चाली, माझा देव, माझा
राजा, याच्या चाली पवित्रस्थानांत पाहिल्या आहेत.
२५ पुढें गवई, मागें तुणतुणेकरी, मध्यें डफवाज-
विणाऱ्या कुमारी चालल्या. २६ अहो, तुह्मी
मंडळींमध्यें देवाची स्तुति करा. अहो इस्राएली
उत्पन्नस्थानाचे तुह्मी प्रभूची स्तुति करा. २७तेथें
धाकटा बन्यामीन व त्यांचा अधिकारी, यहूदांचे
सर्दार व त्यांची न्यायसभा, जबुलूनाचे सर्दार, व
नाफताली याचे सर्दार आहेत. २८ तुझ्या
देवाने तुझ्या शक्ति होण्याची आज्ञा दिल्ही आ-
हे; हे देवा, जें त्वां आह्मासाठीं केलें, तें शक्तीने
स्थापित कर. २९ यरूशालेमांत तुझें देऊळ,
यामुळें राजे तुला भेटी आणितील. ३० बनां-
तले पशु, बलाढ्यांचा समुदाय व लोकांचीं वा-
सरें यांस तूं निषेध कर; ते रुप्याचे तुकडे घेऊन
पायां पडतात, जे लोक मारामारीची इच्छा ध-
रितात, त्यांची दाणादाण तूं कर. ३१ मिसरांतून
सर्दार येतील; कूश देशांतील लोक उतावळी क-
रून आपले हात देवाजवळ उभारतील. ३२ अहो
पृथ्वींचीं राज्यें, तुह्मी देवाला गायन करा; प्र-
भूचें कीर्त्तन करा. सेलाह. ३३ जो पूर्वकाळ-
च्या आकाशांवरल्या आकाशांवर बसून जातो,
त्याचें कीर्त्तन करा; पाहा, तो आपली वाणी जी
मोठी वाणी ती काढितो. ३४ जो देव त्याला
पराक्रमाचा मान द्या; त्याची उत्कृष्टता इस्राए-
लावर व त्याचा पराक्रम अभाळांपर्यंत आहे.
३५ हे देवा, तूं आपल्या पवित्र स्थानीं भयंकर
आहेस; जो लोकांस शक्ति व सामर्थ्य देतो,
तोच इस्राएलाचा देव आहे; देवाची स्तुति
असो.

## गीत ६९.

मुख्य वाजंत्र्याला शोशान्नीमावर दावीदानें केलेलें गीत.

हे देवा, मला तार; कां तर पाणी माझ्या जि-
वापर्यंत पोहंचलें. २ मी खोल चिखलांत

गचावलों, आणि उभें राहणें होत नाहीं; मी खोल
पाण्यांत आलों, आणि लोंढ्याने मला बुडविलें.
३ **मी** हाक मारून दमलों; माझा गळा कोरडा
झाला; माझे डोळे माझ्या देवाची वाट पाहून
क्षय पावले. ४ **जे** मला निष्कारण द्वेषितात, ते
माझ्या डोक्याच्या केसांपेक्षा अधिक आहेत; जे
माझा नाश करितात जे उगेच माझे शत्रू, ते पुष्क-
ळ आहेत; जें म्या हिरावलें नाहीं, तें म्या त्या
वेळेस परत दिल्हें. ५ **हे देवा,** माझें मूर्खपण तुला
कळलें, आणि माझे दोष तुझ्यापुढें गुप्त नाहींत. ६
**हे प्रभू** सैन्यांच्या **परमेश्वरा,** जे तुजवर आशा
ठेवितात, त्यांनी माझ्यामुळें लाजूं नये; हे इस्रा-
एलाच्या **देवा,** जे तुला शरण येतात, त्यांनी मा-
झ्यामुळें फजिती पावूं नये. ७ **कां** तर तुझ्या-
साठीं म्या धिक्कार साहिला; माझें तोंड फजितीनें
झांकिलें आहे. ८ **मी** आपल्या भावांसीं परका,
आपल्या आईच्या पुत्रांसीं विदेशी असा झालों. ९
**कां** तर तुझ्या मंदिराच्या आवेशानें मला खाऊन
टाकिलें, आणि तुझ्या धिक्कारणाऱ्यांचे धिक्कार मज-
वर पडले. १० **जेव्हां** माझ्या जिवाच्या उपासांत
मला अश्रुपात झाला, तेव्हां तें माझ्या धिक्काराचें
कारण झालें. ११ **जेव्हां** म्या आपल्या अंगावर
तरट घेतलें, तेव्हां मी त्यांस ह्मण असा झालों.
१२ **वेशींत** बसणाऱ्यांनी मजविषयीं गोष्टी काढि-
ल्या, आणि मद्यपी यांचें गायन असा मी झालों.
१३ **परंतु** मजविषयीं **हे परमेश्वरा,** प्रसन्नतेच्या
वेळेस माझी प्रार्थना केली आहे; हे **देवा,** तूं
आपल्या पुष्कळ दयेनें, आपल्या तारणाच्या सत्य-
तेनें मला उत्तर दे. १४ **मला** गाळांतून काढ,
मला गडूं देऊं नको; मला माझ्या द्वेष्यांपासून आ-
णि पाण्याच्या खोल पाण्यापासून त्वां काढावें.
१५ **पाण्यांच्या** लोंढ्याने मला बुडवूं नये, आणि
डोहानें मला गिळूं नये, आणि खांचेनें आपलें
तोंड मजवर मिटूं नये. १६ **हे परमेश्वरा,**
मला उत्तर दे, कां तर तुझी दया चांगली; तूं
आपल्या फार ममतेप्रमाणें मजकडे लक्ष लाव.
१७ **आणि** आपल्या सेवकापासून आपलें तोंड
झांकूं नको; कां तर मी संकटांत आहें; तूं लवकर
उत्तर दे. १८ **माझ्या** जिवाजवळ येऊन, त्याला
खंडून काढ; माझ्या शत्रूंमुळें माझी सुटका कर.
१९ **माझा** धिक्कार व माझी लाज व माझी फजि-
ती तुला कळली; माझे सर्व वैरी तुझ्यासमोर
आहेत. २० **माझें** हृदय धिक्कारानें फुटलें, आ-
णि मी कासाविस झालों; तेव्हां म्या दया करणा-
ऱ्याची वाट पाहिली, परंतु कोणी नाहीं, आणि
समाधान करणाऱ्यांची वाट पाहिली, परंतु ते मला
मिळाले नाहींत. २१ **तेव्हां** माझ्या खाण्यासाठीं
त्यांनी कडू दिल्हें; आणि माझ्या तान्हेसाठीं
त्यांनी मला आंब पाजिली. २२ **त्यांचें** मेज त्यां-
च्यापुढें जाळ व स्वस्थतेबदल फांस, असें व्हावें.
२३ **त्यांस** दिसूं नये ह्मणून त्यांचे डोळे काळोख-
मय होवोत; आणि तूं त्यांच्या कंबरांत अखंड कचक
भरूं दे. २४ **तुझा** क्रोध त्यांवर ओत, आणि
तुझ्या रागाच्या संतापानें त्यांस आटोपावें. २५
**त्यांची** वस्ति ओसाड व्हावी; त्यांच्या राहोट्यांत
राहणारा न व्हावा. २६ **कां** तर ज्याला त्वां मा-
रिलें, त्याच्या पाठीस ते लागतात; आणि तुझ्या
घायाळांस चिडवायासाठीं भाषण करितात. २७
**तूं** त्यांच्या दोषावर दोष लाव; आणि त्यांनी
तुजकडे न यावें. २८ **जिवंतांच्या** पुस्तकांतून ते
खोडले जावे; आणि नीतिमानांच्या संगतीं लि-
हिले न जावे. २९ **मी** तर दुःखित व खिन्न
आहें; हे **देवा,** तुझ्या तारणानें मला उचलून
ठेवावें. ३० **मी** गायनानें **देवाच्या** नामाची
स्तुति करीन, उपकार वर्णून त्याला थोर मानीन.
३१ **आणि** गुरूं, ह्मणजे शिंगांचा खुरांचा खोंड
यापेक्षां तें **परमेश्वराजवळ** उत्तम होईल. ३२
**जे** दुःखित ते पाहून संतोष करितील; जे **देवा-
ला** शरण येतात, त्या तुमचें हृदय सजीव होईल.
३३ **कां** तर **परमेश्वर** दुबळ्यांचें ऐकतो, आणि
आपल्या बंदिवानांची उपेक्षा करीत नाहीं. ३४
**आकाश** व पृथ्वी व समुद्र व त्यांमध्यें सर्व फिर-
णारे, यांनी त्याची स्तुति करावी. ३५ **कां** तर
**देव** जियोनाला तारील, आणि यहूदांतलीं नगरें
बांधील, आणि ते त्यांत राहतील, त्याचें वतन पा-
वतील. ३६ **त्याच्या** सेवकांच्या संतानास त्यांत
विभाग मिळेल, आणि त्याच्या नामाची प्रीति कर-
णारे त्यांत राहतील.

## गीत ७०.

मुख्य वाजंत्र्याला; दावीदानें केलेलें गीत; सूचनार्थक.

हे देवा, मला सोडवायास, हे **परमेश्वरा,**
माझें सहाय करायास तूं त्वरा कर. २ जे
माझा जीव शोधितात, त्यांनी लाजावें व ओशा-
ळावें; जे माझ्या वाईटानें संतुष्ट होतात, त्यांनी
माघारें फिरून फजित व्हावें. ३ जे, वाह्वा,
वाह्वा, ह्मणतात, त्यांनी आपली लाजरूप फेड
घेण्यासाठीं मुरडावें. ४ जे तुला शोधितात, त्या
सर्वांनी तुजविषयीं हर्षून आनंद करावा, आणि
ज्यांस तुझें तारण आवडतें, त्यांनी नेहमी ह्मणावें
कीं, "देव थोर मानला असावा." ५ मी तर
दुःखी व दुबळा आहें; हे **देवा,** माझ्यासाठीं
त्वरा कर; तूं माझा सहाय व माझा निभाववि-
णारा आहेस; हे **परमेश्वरा,** उशीर करूं नको.

## गीत ७१.

हे **परमेश्वरा,** म्यां तुजवर आशा ठेविली आहे;
म्यां कधींहि लज्जित होऊं नये. २ तूं
आपल्या कृपेनें मला काढ आणि माझा नि-
भाव कर; आपला कान मजकडे लाव आणि
मला तार. ३ ज्याच्या वस्तीस म्यां नेहमी जावें,
असा तूं मजसीं हो; मला तारावें ह्मणून त्वां
आज्ञा दिल्ही आहे, कां तर तूं माझा खडक व
माझा गड आहेस. ४ हे माझ्या **देवा,** दुष्टाच्या
हातापासून माझा निभाव कर, अधर्म करणारा व
व बळात्कारी याच्या पंज्यापासून निभाव कर. ५
कां तर हे **प्रभू परमेश्वरा,** तूं माझें आशापात्र,
माझ्या बाळपणापासून माझा आश्रय आहेस. ६
जन्मापासून तूं मला आधार झालास; मला मा-
झ्या आईच्या आंतड्यांपासून माझा सांभाळ त्वां
केला; माझें स्तुति करणें तुजविषयीं नेहमी होईल.
७ मी बहुतांस आश्चर्य असा झालों; कां कीं तूं
माझा बळकट आश्रय आहेस. ८ माझें तोंड तुझ्या
स्तवनानें, तुझ्या वैभवानें सर्व दिवस भरावें. ९
ह्मातारपणाच्या वेळेस तूं मला घालवूं नको; माझी
शक्ति गेल्यावर मला टाकूं नको. १० कां तर
माझे शत्रु मजविषयीं बोलतात; आणि माझ्या
जिवावर जे टपतात, ते एकत्र विचार करीत आ-
हेत; ११ असा कीं, "**देवानें** त्याला टाकिलें आहे;
त्याला पाठीस लागून धरा; कां तर कोणी सोड-
विणारा नाहीं." १२ हे **देवा,** तूं मजपासून दूर
होऊं नको; हे माझ्या **देवा,** माझ्या सहाया-
साठीं त्वरा कर. १३ माझ्या जिवाचे वैरी लज्जित
होवोत व क्षय पावोत; जे माझ्या वाईटासाठीं
यत्न करितात, त्यांस धिक्काराचें व लाजेचें पांघ-
रूण होवो. १४ परंतु मी नेहमी वाट पाहीन आणि
तुझी सर्व स्तुति वाढवीन. १५ तुझ्या नीतिम-
त्त्वाचें, तुझ्या तारणाचें वर्णन सर्व दिवस माझें
तोंड करील; कां तर त्यांच्या संख्या मला कळल्या
नाहींत. १६ मी **प्रभु परमेश्वर** याच्या साम-
र्थ्यानें चालेन; हे **परमेश्वरा,** तुझ्या केवळ तुझ्या
नीतिमत्त्वाचें स्मरण करीन. १७ हे **देवा,** त्वां
मला बाळपणापासून शिकविलें आहे, आणि आज-
पर्यंत मी तुझीं आश्चर्यकृत्यें दाखवीत आहें. १८
आणखी, हे **देवा,** ह्मातारा व केंस पिकलेला असा
असतां मला टाकूं नको; मी या पिढीला तुझें
बळ व जो येईल त्याला तुझा पराक्रम दाखवितों
तोंपर्यंत मला टाकूं नको. १९ हे **देवा,** तुझें न्याय
फार उंच आहेत; त्वां मोठालीं कामें केलीं आहेत;
हे **देवा,** तुजसारिखा कोण आहे? २० ज्या
त्वां मला मोठीं व वाईट संकटें अनुभवूं दिल्हीं,
तो तूं मला फिरून जिवंत करसील आणि पृथ्वी-
च्या खोलस्थळांतून फिरून वरतें आणविसील.
२१ माझें थोरपण वाढविसील आणि तूं फिरून तु-
झें समाधान करसील. २२ आणि हे माझ्या **देवा,**
मी तुझी स्तुति, तुझ्या सत्यतेची स्तुति तारपेटीवर
करीन; हे इस्राएलाच्या **पवित्रा,** तंतुवाद्यावर
तुझ्याजवळ कीर्त्तन करीन. २३ जेव्हां मी तुझ्या-
जवळ कीर्त्तन करीन, तेव्हां माझे होट हर्षशब्द
करितील; आणि माझा जीव, जो त्वां खंडून सो-
डविला, तोहि करील. २४ आणखी माझी जीभ
सर्व दिवस तुझ्या नीतिमत्त्वाचें ध्यान उच्चारील,
कारण कीं ते लज्जित झाले; जे माझ्या वाईटा-
साठीं यत्न करीत होते, ते लज्जित झाले.

## गीत ७२.

शलमोनाविषयीं.

हे **देवा,** तूं आपले न्याय राजा[illegible]
नीति राजपुत्राला दे. २ तू[illegible] लो-

कांचा, आणि न्यायाने तुझ्या दरिद्र्यांचा निवाडा
करील. ३ डोंगर लोकांस कल्याण वाहून देतील;
नीतिकरून टेकड्याहि. ४ तो लोकांतल्या दरि-
द्र्यांचा न्याय करील, तो दुबळ्याचा लेंकरांस ता-
रील आणि जाचणाऱ्याला कुटील. ५ सूर्य आ-
णि जोंपर्यंत चंद्राच्या फेऱ्या आहेत तोंपर्यंत पिढी-
पिढी तुला भितील. ६ जसा कापिलेल्या कुरणा-
वर पाऊस व जसी भूमीवर सुवृष्टि तसें तो उत-
रील. ७ त्याच्या दिवसांत नीतिमान आबाद
होतील आणि बहुत कल्याण होईल. ८ आणि
समुद्रापासून समुद्रापर्यंत नदीपासून पृथ्वीच्या शेव-
टांपर्यंतहि तो राज्य करील. ९ रानवट त्याच्या-
पुढें लववील, आणि त्याचे शत्रू धूळ चाटतील.
१० तार्शीश व द्वीप यांतील राजे दान भरून
देतील; शबा व सबा यांतले राजे भेट आणतील.
११ सर्व राजेहि त्याच्या पायां पडतील; सर्व
राष्ट्रें त्याची सेवा करतील. १२ कां तर ओरड-
णारा दरिद्री व दीन, यांस सहाकारी नसतांना तो
सोडवील. १३ दरिद्री व दुबळा यांवर तो
करुणा करील, आणि दरिद्र्यांचे जीव तारील.
१४ त्यांच्या जिवाला ठकण्यापासून व बळात्कारा-
पासून खंडून सोडवील, आणि त्यांचें रक्त त्याच्या
दृष्टींत फार मोलाचें होईल. १५ आणि तो
जगेल, आणि त्याला शब्यांतलें सोनें दिल्हें जा-
ईल; त्याच्यासाठीं प्रार्थना नेहमी केली जाईल;
सर्व दिवस त्याची स्तुति करतील. १६ पृथ्वीवर
डोंगरांच्या शिखरावर बहुत धान्य होईल; त्याचें
पीक लबानोनासारिखें हलेल; आणि जे नगरां-
तले, त्यांस भूमीच्या गवतासारिखा फुलवरा प्राप्त
होईल. १७ त्याचें नाम सर्वकाळ राहील; सूर्य
आहे तोंपर्यंत त्याचें नाम विख्यात होईल, आणि
त्याकडून लोक आशीर्वादित होतील; सर्व राष्ट्रें
त्याची स्तुति करतील. १८ परमेश्वर देव
इस्राएलाचा देव, याची स्तुति असावी; केवळ
तोच आश्चर्यकृत्यें करितो. १९ त्याच्या गौरवी
नामाची स्तुति सर्वकाळहि असावी, आणि त्याच्या
गौरवानें सर्व पृथ्वी भरली जावी. आमेन व आ-
मेन. २० इशायूचा पुत्र दावीद याच्या प्रार्थना
तमाम झाल्या आहेत.

## गीत ७३.

आसाफानें केलेलें गीत.

देव इस्राएलाला, म्हणजे हृदयाचे निर्मळ यांला,
चांगला आहे खरा. २ मजविषयीं तर थोड-
क्यांत माझ्या पायांनी मार्ग सोडिला असता;
थोडेंच चुकलें नाहींतर माझीं पावलें निसरलीं
असतीं; ३ कां तर मी फुशारी करणाऱ्याचा
हेवा केला; दुष्टांचें कल्याण मला दिसलें; ४
असें कीं त्यांच्या मरणांत तिडका नाहींत, आणि
त्यांचा पिंड पुष्ट आहे. ५ ते मानवी कष्टांत ना-
हींत, आणि माणसाबरोबर पिडले जात नाहींत.
६ यास्तव त्यांस अहंकार हाररूप होतो; त्यांस
पोषाकरूपें बळात्काराचें आच्छादन आहे. ७
त्यांचे डोळे पुष्टतेनें तरतरलेले आहेत; ते मनो-
रथांच्या पलिकडे पावतात. ८ ते थट्टा करितात,
आणि जांचून दुष्टाईने बोलतात; थोरपणें बोल-
तात. ९ आकाशाच्याविरुद्ध आपलें तोंड टा-
कितात, आणि त्यांची जीभ पृथ्वीमधून चालती.
१० यास्तव त्याचे लोक इकडे येतात, आणि
त्यांस भरपूर पाणी पाजलें जातें. ११ आणि ते
म्हणतात "देवाला कसें कळलें? परात्पराला
ज्ञान आहे कीं काय?" १२ पाहा, हे दुष्ट आहेत,
तरी ते नेहमी सभाग्य असून, समर्थ होतात. १३
'निश्चयें म्या फुकट आपलें हृदय निर्मळ केलें,
आणि आपले हात निर्दोषतेनें धुतले. १४ कां
तर मी सर्व दिवस पिडला जातों, आणि सकाळ-
च्या सकाळीं शिक्षा पावतों. १५ तर पाहा,
याप्रमाणें मी बोलेन, असें म्या सांगितलें असतें
तर तुझ्या लोकांच्या संतानासीं कपटानें वागलों
असतों. १६ तर म्या हें समजायास विचार
केले, ते माझ्या मनास अवघड वाटले. १७ सि-
तक्यांत मी देवाच्या पवित्र स्थानीं गेलों, नंतर
त्यांचा परिणाम समजलों. १८ निश्चयें त्वां
त्यांस निसरड्या ठिकाणीं ठेविलें; त्यांस नाशांत
पाडिलें. १९ क्षणांत त्यांची ओसाडी कसी
झाली? उत्पातांनी ते झाडून टाकिले, नाहींसे झाले.
२० जो जागा होतो, त्याच्या स्वप्नासारिखे झाले;
हे प्रभू, तूं सावध होऊन त्यांची सावली तुच्छ
करसील. २१ जेव्हां माझें मन कष्टी झालें, आ-

णि मी आपल्या गुर्देकमळीं खोंचला गेलों. २२
तेव्हां मी जड व असमंजस, तुजसमोर पशुसा-
रिखा होतों. २३ परंतु मी नेहमी तुझ्याजवळ
आहें; त्वां माझा उजवा हात धरिला आहे. २४
तूं आपल्या संबोधानें मला चालविसील, आणि
परिणामीं मला गौरवांत घेसील. २५ आका-
शांत मला कोण आहे? पृथ्वींतहि तुझ्याहून दुस-
ऱ्यावर माझा संतोष नाहीं. २६ माझें शरीर
व माझें धैर्य खुंटतें, तेव्हां देव माझ्या धैर्याचा
आश्रय व माझा भाग सर्वकाळ होईल. २७
परंतु पाहा, जे तुझ्यापासून दूर, ते नाश पावतील;
जे व्यभिचारानें तुला सोडितात, त्या प्रत्येकाला
तूं छेदून टाकितोस. २८ म्या तर देवाजवळ
यावें, हें मला बरें आहे. प्रभु परमेश्वरावर
म्या आपली आशा ठेविली, म्या तुझ्या सर्व चरि-
त्रांचें वर्णन करावें ह्मणून.

## गीत ७४.

आसाफाकडून मास्कील.

हे देवा, त्वां सर्वकाळ कां अव्हेरिलें? तुझ्या
चारायाच्या मेंढरांवर तुझा राग कां धुमसतो?
२ जी आपली मंडळी त्वां पूर्वी विकत घेतली,
खंडून सोडविली, आपल्या वतनाचा वंश, व हा
सीयोन डोंगर ज्यावर तुझी वस्ति आहे, त्यांची
आठवण तूं कर. ३ निरंतर नाशांमुळें आपले
पाय उचल. पवित्रस्थानीं शत्रूनें अवघें वाईट
केलें आहे. ४ तुझे वैरी तुझ्या सभांमध्यें गर्जना
करितात; झेंड्याकरितां त्यांनी आपलेच झेंडे ला-
विले आहेत. ५ कोणी दाटझाडीवर कुऱ्हाडी
जशा जशा चालविल्या, तसा तसा तो विख्यात
झाला. ६ परंतु आतां ते कुऱ्हाडींनी व हातव-
ड्यांनी त्या स्थानांतलीं कोरींव कामें एकत्र फोडि-
तात. ७ त्यांनी तुझ्या पवित्र स्थानांस आग ला-
विली; तुझें नाम राहायाची भूमि भ्रष्ट केली.
८ ते आपल्या मनांत ह्मणतात, "आह्मी मिळून
त्यांस जाचूं." त्यांनी देशांतील देवाच्या सर्व
सभा जाळिल्या. ९ आमचे झेंडे आह्मास दि-
सत नाहींत; आतां कोणी भविष्यभाषी नाहीं,
आणि कोठपर्यंत असें होईल, हें आमच्यांत को-
णाला समजत नाहीं. १० हे देवा, वैरी कोठ-
पर्यंत धिक्कार करील? शत्रु सर्वकाळ तुझें नाम
तुच्छ मानील कीं काय? ११ तूं आपला हात,
आपला उजवा हातहि कां आटपतोस? तो आप-
ल्या उरापासून काढून त्यांस निःशेष कर. १२
देव तर पूर्वीपासून माझा राजा पृथ्वींमध्यें तारणें
करीत आहे. १३ त्वां आपल्या बळानें समुद्र
दुभागिला, पाण्यांत सुसरींचीं डोकीं फोडिलीं.
१४ त्वां लिव्याथानाचीं डोकीं ठेंचून, तो रानटी
लोकांस खायाला दिल्हा. १५ त्वां झरा व
ओघ फोडून काढिला; त्वांच मोठ्या नद्या सुकवि-
ल्या. १६ दिवस तुझा, रात्रि तुझी; त्वां प्रकाश
व सूर्य सिद्ध केले. १७ त्वां पृथ्वीच्या सर्व सी-
मा स्थापिल्या; त्वां उन्हाळा व हिंवाळा हे केले.
१८ हे परमेश्वरा, तूं असी आठवण कर कीं
शत्रूनें धिक्कार केला; आणि मूर्ख लोकांनी तुझें
नाम तुच्छ मोजिलें आहे. १९ तूं आपल्या हो-
ल्याचा जीव श्वापदांस देऊं नको; आपल्या दीनां-
चा जीव निरंतर विसरूं नको. २० कराराकडे
लक्ष लाव; कां तर पृथ्वींतलीं काळोखमय ठिकाणें
बलात्काराच्या वस्त्यांनी भरलीं आहेत. २१ पि-
डलेले लज्जित होऊन माघारे न फिरोत; दीन व
दरिद्री तुझ्या नामाचें स्तवन करोत. २२ हे
देवा, ऊठ; आपला वाद कर. मूर्खाकडून सर्व
दिवस तुझा धिक्कार होतो, याची आठवण कर.
२३ आपल्या वैऱ्यांचा शब्द विसरूं नको; जे
तुजवर उठतात, त्यांचा दंगा अखंड वाढत आहे.

## गीत ७५.

मुख्य वाजंत्र्याला; आलतास्कीथ; आसाफाकडून
कीर्तनाचें गीत.

हे देवा, आह्मी तुला स्तवितों, आह्मी स्तवितों
आणि तुझें नाम जवळ आहे; तुझीं आश्चर्याचीं
कृत्यें उघडें करून दाखवितात. २ "जेव्हां मी नेम-
णूक पावेन, तेव्हां न्याय नीट करीन. ३ पृथ्वी व
तींतले सर्व राहणारे गळून गेले, मी तिचे
खांब निटावितों. सेलाह. ४ मी पाखंड्यांस,
'तुह्मी पाखंड करूं नका,' आणि दुष्टांस, 'तुह्मी
शिंग उभारूं नका; ५ तुह्मी आपलीं शिंगें वरतीं
करूं नका; आपली मान ताठर करून बोलूं नका."
असें बोललों. ६ कां तर थोरपण उगवती-
पासून किंवा मावळतीपासून प्राप्त होत नाहीं;

दक्षिणेपासून होत नाहीं. ७ कारण कीं देव ठर-
विणारा आहे; तो एकाला नीच करितो, आणि
एकाला उंच करितो. ८ अणखी परमेश्वराच्या
हातीं वाटी आहे, आणि द्राक्षरस भेळीने भरले-
ला असतां, त्याला ऊत आला आहे; तर तींतून
तो ओतील; तथापि पृथ्वींतले सर्व दुष्ट तिचा
गाळ पिळून पितील. ९ मी तर सर्वकाळ प्रगट
करीन, याकोबाच्या देवाचें कीर्त्तन करीन. १०
आणि दुष्टांचीं सर्व शिंगें तोडून टाकीन; नीति-
मानाचीं शिंगें उंचावलीं जातील.

## गीत. ७६.

मुख्य वाजंत्र्याला; नगीनोथावर; आसाफाकडून
कीर्त्तनी गीत.

यहूदांत देव कळला आहे; इस्राएलांत त्याचें
नाम मोठें आहे. २ आणि शालेमांत त्याचा
मंडप आणि सीयोनांत त्याची वस्ति आहे. ३
तेथें त्याने धनुष्याचे बाण, व ढाल व तरवार व
लढाई मोडून टाकिली. सेलाह. ४ घाताच्या
डोंगरांपेक्षां तूं तेजस्वी व सन्मान्य आहेस. ५
जे मनाने शूर ते लुटले गेले; आपल्या झोंपीं
गेले; आणि कोणत्याहि बळवान माणसाला आ-
पले हात सांपडले नाहींत. ६ हे याकोबाच्या
देवा, तुझ्या निषेधाने स्वार व घोडाहि गाढ झोंपीं
गेला. ७ तूं, तूंच भयंकर; तर तुला राग आल्या-
वर तुझ्यासमोर कोण टिकेल? ८ त्वां आकाशां-
तून निवाडा ऐकविला; पृथ्वी भिऊन निवांत झाली.
९ देव न्याय करून पृथ्वींतल्या सर्व दिनांचें तारण
करायास उठला तेव्हां. सेलाह. १० कां कीं
माणसाच्या संतापाने तुझी स्तुति होईल, आणि
बाकीच्या संताप तूं आवरसील. ११ तुम्ही आ-
पला परमेश्वर देव याच्या चहुंकडले सर्व त्या-
च्याजवळ नवस करा आणि फेडा; ज्याला भ्यावें
त्याजवळ भेटी आणाव्या. १२ तो अधिकाऱ्यां-
चा आत्मा छेदून टाकितो; पृथ्वीच्या राजांस तो
भयंकर आहे.

## गीत ७७.

मुख्य वाजंत्र्याला; यदूथूनावर; आसाफाने केलेलें गीत.

मी आपल्या शब्दाने देवाजवळ, आपल्या श-
ब्दाने देवाजवळच ओरडलों, आणि त्याने
मजकडे कान लाविला. २ मी आपल्या संकटा-
च्या दिवसीं प्रभूला शरण गेलों; रात्रीं माझा
हात पसरला होता आणि अखडला नाहीं; माझा
जीव शांतवन पावेना. ३ मी देवाचें स्मरण
करूं लागलों, तेव्हां घाबरा झालों; हरद्र सांगूं
लागलों, तेव्हां माझा आत्मा बुडाला. सेलाह. ४
तूं माझे डोळे जागृत राखितोस; मी असा गड-
बडलों कीं माझ्याने बोलवेना. ५ पूर्वींचे दिवस,
गतकाळांतलीं वर्षें यांचा विचार म्यां केला. ६
रात्रीं म्यां आपल्या तुणतुणवाद्याची आठवण करून
आपल्या मनांत विचार केला, आणि माझ्या आ-
त्म्याने शोध केला. ७ प्रभु सर्वकाळ अव्हेरील
आणि फिरून कधीं प्रसन्न होणार नाहीं काय?
८ त्याची दया निरंतर खुंटली काय? त्याचें
वचन पिढोपिढीपर्यंत टळलें काय? ९ देव कृपा
करायाला विसरला कीं काय? त्याने आपली मम-
ता रागानें आटोपली कीं काय? सेलाह. १०
तेव्हां म्यां म्हटलें, "हीच माझी अशक्तता; परा-
त्पराच्या उजव्या हाताचीं वर्षें आहेत; ११ मी
परमेश्वराचीं कृत्यें आठवीन; होय, पूर्वींचें
तुझें आश्चर्याचें काम स्मरेन. १२ आणि तुझ्या
सर्व कृत्यांविषयीं विचार करीन; तुझ्या चरित्रांचें
मननहि करीन. १३ हे देवा, तुझी चाल पवित्र-
स्थानीं आहे; देवासारिखा दुसरा देव कोण थोर
आहे? १४ जो देव आश्चर्याचीं कृत्यें करितो,
तो तूंच आहेस; त्वां आपला पराक्रम लोकांमध्यें
कळविला आहे. १५ त्वां आपल्या भुजेने आ-
पल्या लोकांला याकोबाच्या व योसेफाच्या वंश-
स्थांस खंडून सोडविलें आहे. सेलाह. १६ हे
देवा, पाण्याने तुला पाहिलें; पाणी तुला पाहून
थरथर झालें; समुद्रडोह देखील डळमळले. १७
ढगांनी पाणी रिचविलें; अभाळानी शब्द केला;
तुझे बाणहि चालते झाले. १८ तुझ्या गडगडा-
टाचा शब्द चक्राकाराने झाला; विजा भूमंडळीं
प्रकाशल्या; पृथ्वी थरथरून कांपली. १९ समु-
द्रांत तुझा मार्ग, तुझी वाट मोठ्या पाण्यांतहि
आहे; आणि तुझीं पावलें कळलीं नाहींत. २०
त्वां आपल्या लोकांस मोशे व आहरोन यांच्या
हातांकडून कळपांसारिखें वाटेवर नेलें.

## गीत ७८.

आसाफानें केलेलें गीत, मास्कील.

हे माझ्या लोका, माझें शास्त्र श्रवण करा, तुह्मी
आपला कान माझ्या तोंडच्या वाक्याकडे ला-
वा. २ मी दाखला देण्यास आपलें तोंड उघ-
डीन; पूर्वकाळाच्या गोष्टी मी उघड करीन, ३
कारण कीं आह्मी त्या ऐकून जाणिल्या, आणि
आमच्या वडिलानी आमच्याजवळ सांगितल्या.
४ आह्मी त्याच्या संतानापासून गुप्त राखणार
नाहीं; परमेश्वराचीं स्तोत्रें आह्मी पुढल्या पिढी-
ला आणि त्याचा पराक्रम, व जीं आश्चर्याचीं कृत्यें
त्यानें केलीं, तीं आह्मी सांगूं. ५ कां तर त्यानें
याकोबाच्या वंशांत नेम स्थापिला, आणि इस्राए-
लास शास्त्र दिल्हें तें आमच्या वडिलानी आपल्या
लेंकरांस कळवावें असी त्यानें त्यांस आज्ञा केली.
६ यासाठीं कीं पुढल्या पिढींत जीं लेंकरें जन्मणार
आहेत त्यानी जाणावीं, आणि उठून आपल्या लेंक-
रांजवळ वर्णन करावें; ७ हेतु हा कीं त्यानी
आपला भरवसा देवावर ठेवावा, आणि देवाचीं
चरित्रें न विसरतां त्याच्या आज्ञा पाळाव्याच. ८
आणि अमार्गी व फितुरी पिढी, आपलें ह्रदय नीट
न लावणारी पिढी आणि जीचें मन देवावर वि-
श्वासी नाहीं, असे आपले वडील त्यांसारिखें न
व्हावें. ९ एफ्राइमाचे वंश हत्यारबंद धनुर्धारी
असतांहि, लढाईच्या दिवसीं हटले. १० त्या-
नी देवाचा करार पाळिला नाहीं; त्यानी त्याच्या
नेमशास्त्राप्रमाणें चालायास अनमान केला. ११
आणि त्याचीं चरित्रें व त्याचीं जीं आश्चर्याचीं
कृत्यें त्यानें त्यांस अनुभवूं दिल्हीं होतीं, तीं ते
विसरले. १२ त्यांच्या वडिलांसमोर मिसर
देशांतल्या सोवानाच्या शिवारांत, त्यानें आश्चर्या-
चीं कृत्यें केलीं. १३ त्यानें समुद्र दुभागून त्यांस
पार जाविलें आणि पाणी ढिगासारिखें उभें
केलें. १४ आणि त्यानें दिवसां ढगाच्या योगें व
सर्वरात्रीं अग्नीच्या प्रकाश योगें त्यांस नेलें. १५
त्यानें रानांतले खडक फोडून मोठ्या समुद्रडोहां-
सारिखें पाणी वाहविलें. १६ त्यानें खडकांतून
ओहोळ देखील निघते केले, आणि नद्यांसारिखें
प्रवाह तरतें केलें. १७ तथापि त्यानी त्याजवळ
अणखी पाप केलें; ह्मणजे अरण्यांत परात्पराला
कडूपण दाखविलें. १८ आणि आपल्या छंदानें
अन्न मागतांना आपल्या ह्रदयीं देवाची छळणूक
केली. १९ त्यानी देवाविरुद्ध बोलून ह्मटलें,
"रानांत मेज मांडायास देव शक्तिमान् आहे कीं
काय? २० पाहा, त्यानें खडक फोडिला आणि
पाणी वाहतें झालें; ओहळ पुरानें चालले; अण-
खी तो भाकरहि द्यायाला शक्तिमान् आहे काय!
आपल्या लोकांसाठीं मास सिद्ध करील कीं काय!
२१ यास्तव परमेश्वर ऐकून कोपला, आणि या-
कोबाला अग्नि जाळूं लागला; ह्मणजे रागच
इस्राएलास जाळिता झाला. २२ कारण कीं ते
देवावर विश्वासले नव्हते; आणि त्याच्या तारणा-
च्या आशेवर राहिले नव्हते. २३ त्यानें वरल्या
अभाळांस आज्ञा देऊन आकाशांतलीं द्वारें मोक-
ळीं केलीं; २४ आणि खाण्यासाठीं त्यानें त्यांज-
वर मान्ना वर्षिलें आणि आकाशांतलें धान्य त्यांस
दिल्हें. २५ माणसानी समर्थांचें अन्न खाल्लें;
त्यांच्या तृप्तिपर्यंत त्यानें शिधा पाठविला. २६
त्यानें आकाशांत पूर्वेचा वारा वाहविला, आणि
आपल्या शक्तिनें दक्षिणेचा वारा आणिला. २७
आणि त्यानें त्यांजवर धुळीसारिखी मासाची
वृष्टि व समुद्राजवच्या वाळूसारिखी उडत पक्ष्यां-
ची वृष्टि केली. २८ आणि त्यांच्या तळांत त्यां-
च्या वस्त्यांच्या चहुंकडे पक्षी पाडिले. २९ तेव्हां
लोक खाऊन फार तृप्त झाले, असा त्यानें इष्टविषय
त्यांस आणिला. ३० ते आपल्या इष्टविषया-
पासून सुटेनात; त्यांच्या तोंडांत त्यांचें खाणें आहे
इतक्यांत, ३१ देखील देवाचा राग त्यांस जा-
ळिता झाला; त्यांतल्या पुष्टांस त्यानें जिवें मारिलें
आणि इस्राएलांतल्या निवडलेल्यांस पाडिलें. ३२
हें सर्व असतांहि ते पाप करीत गेले, आणि त्याच्या
आश्चर्याच्या कृत्यांवरून विश्वास धरिला नाहीं.
३३ यास्तव त्यानें त्यांचे दिवस व्यर्थपणांत त्यां-
चीं वर्षें विस्मयांत घालविलीं. ३४ जेव्हां त्यानें
त्यांस जिवें मारिलें, तेव्हां ते त्याला शरण गेले
आणि त्यानी माघारें येऊन देवाचा शोध केला.
३५ तेव्हां त्यानी आठवण केली कीं देव आप-
ला खडकरूप आश्रय आणि परात्पर देव आप-
ला सोडविणारा आहे. ३६ तरी त्यानी आपल्या

तोंडाने त्याला फुसलाविलें आणि आपल्या जिभेने
त्याजवळ लबाडी केली. ३७ त्यांचें मन त्याकडे
नीट लागलें नव्हतें, आणि त्याच्या कराराविषयीं
ते विश्वासी नव्हते. ३८ तथापि तो ममताळू
होता, यास्तव त्याने अन्यायाची क्षमा केली, नाश
केला नाहीं; त्याने बहुत वेळ आपला राग टाळि-
ला आणि आपला सर्व संताप चेतविला नाहीं.
३९ त्याने आठविलें कीं 'ते मांस आहेत, वारा
गेल्यावर माघारा येत नाहीं.' ४० रानांत त्यांनी
त्याला किती चिडविलें अरण्यांत त्याला किती
खेद दिल्हा; ४१ त्यांनी फिरून देवाची परीक्षा
केली, आणि इस्राएलाच्या पवित्राला दुःख दिल्हें.
४२ ज्या दिवशीं त्याने त्यांस संकटांतून खंडून
काढिलें, तेव्हांचा त्याचा पराक्रम त्यांनी आठवि-
ला नाहीं; ४३ त्याने मिसरांत आपले उत्पात,
सोअनाच्या शिवारांत आपले चमत्कार लाविले
होते; ४४ त्यांच्या नद्या व त्यांचे पाट रक्तरूप
केले; त्यांच्याने पिववेना. ४५ त्यांच्यामध्यें त्याने
माश्या पाठविल्या आणि त्या त्यांस डसल्या;
बेडूक पाठविले, आणि त्यांनी त्यांचा नाश केला.
४६ अणखी त्याने त्यांचें उत्पन्न घुल्यांस व त्यांचें
कष्टफळ टोळांस दिल्हें. ४७ त्याने गारांकडून
त्यांच्या द्राक्षवेली व धुंग्यांकडून त्यांचीं उंबरझाडें
नासविलीं. ४८ गारांला त्यांचीं गुरें व वीजांला
त्यांचीं खिलारें सोंपून दिल्हीं. ४९ त्याने दुष्ट
दूत पाठवून आपल्या रागाची तप्तता, क्षोभ, तळ-
तळाट व संकट त्यांस लागूं केलें. ५० त्याने
आपल्या रागासाठीं वाट केली; त्यांचा जीव मर-
णापासून राखिला नाहीं; त्यांचा प्राण मरणास
सोंपून दिल्हा. ५१ त्याने मिसरांतले सर्व ज्येष्ठ,
हामाच्या राहोट्यांतले जे, त्यांच्या शक्तिचें मूळ
मारिलें. ५२ मग त्याने मेंढरांसारिखें आपल्या
लोकांस काढिलें आणि कळपासारिखें त्यांस राना-
तून नेलें. ५३ त्याने त्यांस सुखरूप असें चा-
लविलें कीं त्यांस भय नव्हतें; परंतु त्यांचे शत्रू
समुद्राने बुडविले. ५४ मग त्याने आपल्या पवित्र
सीमेंतला हा डोंगर, जो आपल्या उजव्या हाताने
घातला, एथें त्यांस आणिलें. ५५ आणि त्यां-
च्यापुढून राष्ट्रांस घालविलें, आणि त्यांस प्रमाण-
सूत्राने वतन लावून दिल्हें, आणि इस्राएलचे
वंश त्यांच्या राहोट्यांत वसविले. ५६ तथापि
यांनी परात्पर देवाची परीक्षा करितांना त्याला
चिडविलें, आणि त्याचे प्रमाणनेम पाळिले नाहींत.
५७ त्यांने आपल्या वडिलांसारिखें फिरून दगा
केला; फसविणाऱ्या धनुष्यासारिखे ते वांकडे फि-
रले. ५८ त्यांनी आपल्या उंच स्थानांकडूनहि
त्याला त्रासविलें, आणि आपल्या कोरींव मूर्त्ती-
कडून त्याला संतापविलें. ५९ देव ऐकून कोप-
ला, आणि इस्राएलावर फार कंटाळला. ६०
त्याने शिलोंतला मंडप जी राहोटी आपण मनु-
ष्यांमध्यें दिल्ही होती, ती सोडिली. ६१ त्याने
आपली शक्ति पाडावपणास व आपलें तेज वैऱ्या-
च्या हातीं दिल्हें. ६२ त्याने आपला लोक तर-
वारीला सोंपून दिल्हा आणि आपल्या वतनावर
कोप केला. ६३ त्यांचे नवतरणे अग्नीने भस्म
झाले, आणि त्यांच्या तरण्या विवाहित झाल्या
नाहींत. ६४ त्यांचे याजक तरवारीने पडले,
आणि त्यांच्या विधवा रडल्या नाहींत. ६५
तेव्हां प्रभु निजलेल्यासारिखा उठला, द्राक्षरसाने
ललकारणारा बळाढ्य यासारिखा झाला, ६६
आणि त्याने आपल्या वैऱ्यांच्या पाठीवर हाणिलें;
त्यांस निरंतर धिक्कार दिल्हा. ६७ त्याने योसे-
फाची राहोटी अव्हेरिली, आणि एफ्राइमाचा
वंश निवडून घेतला नाहीं. ६८ परंतु त्याने
यहूदाचा वंश, आणि ज्या सीयोन डोंगरावर
आपण प्रीति केली, तो निवडून घेतला. ६९
त्याने आपलें पवित्रस्थान उंच आकाशासारिखें
रचिलें; पृथ्वीसारिखा त्याचा पाया सर्वकाळासा-
ठीं घातला. ७० त्याने आपला सेवक दावीद
याला निवडिलें आणि मेंढरांच्या कोंडाळ्यांपासून
काढून घेतलें. ७१ आपला याकोबलोक यांस
आपल्या इस्राएलाच्या वतनासहि मेंढरूपें पाळा-
यास त्याला गाभण्यांच्या पाठीमागून आणिलें.
७२ आणि त्याने आपल्या हृदयाच्या यथास्थित-
पणाने त्यांचें मेंढपाळण केलें, आणि आपल्या हा-
तांच्या युक्तीने त्यांस नेलें.

## गीत ७९.

आसाफाने केलेलें गीत.

हे देवा, राष्ट्रें तुझ्या वतनावर आलीं; त्यांनी
तुझें पवित्र देऊळ विटाळिलें; यरूशालेमाचे

ढिगारे केले. २ तुझ्या सेवकांचीं प्रेतें आकाशा-
तल्या पाखरांस, तुझ्या भक्तांचे देह रानांतल्या
जनावरांस खाण्यासाठीं दिल्हे. ३ त्यांचें रक्त
पाण्यासारिखें यरूशालेमाच्या चहुंकडे ओघळ-
विलें आणि पुरणारा कोणी नाहीं. ४ आह्मी आ-
पल्या शेजाऱ्यांजवळ धिक्कारांचें, आपल्या चहुंक-
डल्यांजवळ थट्टा व तुच्छपणा असें झालों. ५
**हे परमेश्वरा**, कोठपर्यंत राग करसील? तुझा
क्रोधावेश सर्वकाळ अग्निसारिखा जळेल कीं काय?
६ **ज्या** राष्ट्रांनी तुला जाणिलें नाहीं त्यांवर आ-
णि ज्या राज्यांनी तुझें नाम घेतलें नाहीं, त्यांवर
तूं आपला संताप ओत. ७ **कां** तर त्यांनी **या-**
**कोबाला** खाऊन टाकिलें आणि त्याची वस्ति ओ-
साड केली आहे. ८ **पूर्वींचे** अन्याय आह्मावर
तूं आठवूं नको; तुझी फार ममता आह्मास लव-
कर प्राप्त होऊं दे; कां तर आह्मी फार दुबळे
झालों. ९ **हे देवा**, आमचें सहाय कर; आप-
ल्या नामाच्या गौरवासाठीं आह्मास तार; आप-
ल्या नामासाठीं आमच्या पापांची क्षमाकरून आ-
ह्मास सोडीव. १० "**त्यांचा देव कोठें?**" रा-
ष्ट्रांनी कशाला ह्मणावें? तो राष्ट्रांमध्यें आमच्या
दृष्टीपुढें, आपल्या सेवकांच्या ओघळलेल्या रक्तांचें
सूड घेणें, यावरून कळो. ११ **बंदिवानाचें** क-
ण्हणें तुझ्या लक्षांत येऊं दे; आपल्या पराक्रमा-
च्या मोठेपणाप्रमाणें मरणपात्रांस वांचीव. १२
**आणि** हे **प्रभू**, जो तुझा धिक्कार आमच्या शेजा-
ऱ्यांनी केला, तो धिक्कार सातपट त्यांच्या पदरीं
घाल. १३ **मग** आह्मी तुझे लोक व तुझ्या चा-
रण्याचीं मेंढरें तुझा उपकार सर्वकाळ मानूं; पि-
ढीपिढी तुझ्या स्तुतीचें कथन करूं.

## गीत ८०.

मुख्य वाजंत्र्याला; शोशान्नीम एदूथ; आसाफानें केलेलें गीत.

**हे** इस्राएलाच्या मेंढपाळा, तूं कान लाव; जसें
कळपाला तसें योसेफाला नेतोस; जो करूबां-
मध्यें बसतो, तो तूं प्रकाशित हो. २ एफ्राइम
व बन्यामीन व मनाश्शे यांच्यापुढें आपले पराक्रम
प्रगट कर, आणि आह्मास तारायाला ये. ३
**हे देवा**, आह्मास माघारें फिरीव, आणि आपल्या
मुखाचें तेज पडूं दे, मग आह्मी तरूं. ४ **हे**
**परमेश्वरा** सैन्यांच्या देवा, आपल्या लोकांच्या
प्रार्थनेवर कोठपर्यंत धुमसतोस? ५ **त्यांस** अश्रु-
पाताचें अन्न खायाला देतोस, आणि तिपटीच्या
मापाने अश्रुपाणी देतोस. ६ **आह्मास** आमच्या
शेजाऱ्यांचें भांडणमूळ करितोस, आणि आमचे
शत्रू आपल्यामध्यें उपहास करितात. ७ **हे**
सैन्यांच्या **देवा**, तूं आह्मास माघारें फिरीव, आ-
णि आपल्या मुखाचें तेज पडूं दे, मग आह्मी
तरूं. ८ **त्वां मिसरांतून** द्राक्षवेल काढिली
आणि राष्ट्रांस घालवून ती लाविली. ९ **तिच्या-**
पुढें अवकाश केला आणि तिच्या मुळ्या विस्ता-
रिल्या; यास्तव तिने देश भरला गेला. १०
**तिच्या** छायेने डोंगर झांकले गेले, आणि तिचे
उंच फांटे एरज वृक्षासारिखे झाले. ११ **तिने**
आपल्या फांद्या समुद्रापर्यंत, आणि आपले डाहळे
नदीपर्यंत लांबविले. १२ **त्वां** तिचीं आवारें
**कां मोडिलीं?** सर्व वाटसरू तिला तोडितात.
१३ **रानडुकर** तिला नाशितो, आणि वनपशु
तिजवर चरतो. १४ **हे** सैन्यांच्या **देवा**, अगत्य
फीर; आकाशांतून न्याहाळून पाहा आणि या
द्राक्षवेलीची पाहणी कर आणि तिला नीट कर.
१५ **आणि** जें तुझ्या उजव्या हाताने लाविलें
आणि जें रोप त्वां आपल्यासाठीं बळवान केलें,
त्याचें संरक्षण कर. १६ **अग्नीने** जळला आहे:
छेदला आहे; तुझ्या दृष्टीच्या धमकावण्याने नाश
पावतात. १७ **तुझ्या** उजव्या हातचा पुरुष
जो मनुष्य त्वां आपल्यासाठीं बळवान केला त्याज-
वर तुझा हात असावा. १८ **मग** आह्मी तुला
सोडणार नाहीं; तूं आह्मास सजीव कर, मग
आह्मी तुझें नाम घेऊं. १९ **हे परमेश्वरा** सै-
न्यांच्या देवा, आह्मास माघारें फिरीव; आपल्या
मुखाचें तेज पडूं दे, मग आह्मी तरूं.

## गीत ८१.

मुख्य वाजंत्र्याला; गित्तीथेवर; आसाफानें केलेलें गीत.

**जो** देव आमचें सामर्थ्य त्याजवळ तुह्मी हर्ष-
शब्द करा; याकोबाच्या देवाजवळ जय-
कार करा. २ **कीर्त्तनवाद्य** घ्या; तारवेंटीसुद्धां

डफ व मंजुळ तंतुवाद्य द्या. ३ चंद्रतिथीस व
पौर्णिमेस, आमच्या सणाच्या दिवशीं करणा वा-
जवा. ४ कां तर हा इस्राएलाजवळ नेम, या-
कोबाच्या देवाचा ठराव आहे. ५ योसेफावर
साक्षी जेव्हां तो बाहेर मिसरदेशांत गेला, तेव्हां
त्यानें लाविला. "जी बोली मला कळली नव्हती,
ती म्या ऐकिली. ६ म्या त्याचा खांदा ओझ्या-
पासून दूर केला; त्याचे हात मडक्यापासून मो-
कळे झाले. ७ त्वां संकटांत हाक मारिली, आ-
णि म्या तुला सोडविलें; गडगडाटाच्या गुप्त स्था-
नांतून तुला उत्तर दिल्हें; वादाच्या पाण्याजवळ
म्या तुझी परीक्षा घेतली. सेलाह. ८ अहो मा-
झ्या लोकां, तुह्मी ऐका, मग मी तुह्माला साक्षी
देईन; हे इस्राएला, त्वां माझें ऐकावें. ९ तुह्मा-
मध्यें अन्य देव नसो, आणि इतर देवाला भजूं
नको. १० मी तुझा देव परमेश्वर ज्यानें तुला
मिसर देशांतून वर आणिलें, तो मी आहें; तूं
आपलें तोंड उघड ह्मणजे मी तें भरीन. ११
माझ्या लोकांनीं तर माझा शब्द ऐकिला नाहीं,
आणि इस्राएलानें मला मानिलें नाहीं. १२ मग
म्या त्यांस त्यांच्या ह्रदयाच्या हटपणांत सोडिलें,
आणि ते आपल्या विचारांनीं चालले. १३ माझ्या
लोकांनीं माझें ऐकिलें असतें, इस्राएल माझ्या मा-
र्गांत चालला असता, तर हें किती बरें होतें!
१४ म्या थोडक्यांत त्यांच्या शत्रूंचा मोड केला
असता, आणि त्यांच्या वैऱ्यांवर आपला हात फि-
रून टाकिला असता. १५ परमेश्वराच्या द्वे-
ष्यांनीं त्याच्याजवळ आर्जव केलें असतें, आणि
यांचा वेळ सर्वकाळपर्यंत असता. १६ आणि
त्यानें त्यांस पौष्टिक गहूं खाऊं दिल्हे असते.
"म्या खडपेंतली मधहि तुला पुरविली असती."

## गीत ८२.

आसाफानें केलेलें गीत.

देव श्रेष्ठांच्या सभेंत उभा राहतो; तो देवांच्या
मध्यें न्याय ठरवितो. २ तुह्मी कोठपर्यंत अ-
धर्मी न्याय कराल आणि दुष्टांचें तोंड कोठपर्यंत
अंगीकाराल. सेलाह. ३ दरिद्री व पोरका यांचा
न्याय ठरवा, दीन व दुबळा यांचा निवाडा नीतीनें
करा. ४ दरिद्री व दुबळे यांस मुक्त करा, दुष्टां-
च्या हातून त्यांस सोडवा. ५ ते समजत नाहींत,
आणि विचार करीत नाहींत; काळोखांत चाल-
तात; पृथ्वीचे सर्व पाये हालतात. ६ तुह्मी
देव, आणि तुह्मी सर्व परात्पराचे पुत्र असें मी
बोललों; ७ तथापि तुह्मी मनुष्यासारिखे मराल;
तुह्मी अधिकाऱ्यांतल्या एकासारिखे पडाल. ८
हे देवा, तूं ऊठ; पृथ्वीचा न्याय कर, कारण कीं
तूं सर्व राष्ट्रें वतनरूप पावसील.

## गीत ८३.

आसाफानें केलेलें कीर्तनाचें गीत.

हे देवा, तुला मौन नसावें, मुका राहूं नको; हे
देवा, तूं स्वस्थ राहूं नको. २ कां तर पाहा,
तुझे शत्रु गडबड करितात, आणि तुझे द्वेष्टे डोकें
उचलतात. ३ ते तुझ्या लोकांवर धूर्तपणें संकल्प
करितात; आणि तुझ्या गुप्त राखलेल्यांवर मनसोबा
करितात. ४ ते ह्मणतात, "चला, ह्मणजे आह्मी
त्यांस राष्ट्रांतून असें नाहींसें करूं कीं पुढें इस्रा-
एलाच्या नांवाची आठवण राहणार नाहीं." ५
कां तर ते एकचित्तानें योजना करितात; त्यांनीं
तुजवर एकोपा केला आहे. ६ अदोमाच्या राहोट्यां-
तले, व इश्मेली, मोवाब व हाग्री; ७ गबाल
व आम्मोन व अमालेक, पलेशेथ, यानीं जोरांत-
ल्या राहणाऱ्यांसुद्धां एकोपा केला आहे. ८ अ-
णखी आश्शूर त्यांसीं मिळाला आहे; ते लोटा-
च्या वंशस्थांचे सहाय झाले आहेत. सेलाह. ९
जसें मिद्यानासीं, जसें किशोन ओहळाजवळ
सीसरा व याबीन यांसीं केलें, तसें त्यांसीं तूं कर.
१० ते एन्दोराजवळ नाश पावले; भूमिला खत
असे झाले. ११ त्यांस त्यांच्या सर्दारांस ओरेब
व जेब यांप्रमाणें कर; आणि जेबा व झाल्मुन्ना
यांप्रमाणें त्यांच्या सर्व अभिषिक्तांस तूं कर. १२
त्यांनीं ह्मटलें, "आह्मी देवाच्या वस्त्या आपल्या-
साठीं वतनरूप घेऊं." १३ हे माझ्या देवा,
त्यांस धुरोळ्यासारिखें, वाऱ्यापुढल्या धसकटासा-
रिखे कर. १४ जसा अग्नि वन जाळितो, जसा
वणवा डोंगरांस व्यापितो; १५ तसा तूं आप-
ल्या वादळानें त्यांच्या पाठीस लाग, आणि आप-
ल्या वावटळीनें त्यांस घाबरें कर. १६ हे परमे-
श्वरा, तूं त्यांचें तोंड लज्जित कर, यासाठीं कीं

त्यानी तुझें नाम शोधावें. १७ सदासर्वकाळ
त्यानी लज्जा पावून घाबरे व्हावें; त्यानी लाजावें
आणि नाश पावावा. १८ जाणावें कीं तूं केवळ
तुझेंच नाम **परमेश्वर**, संपूर्ण पृथ्वीवर **परात्पर**
आहेस.

## गीत ८४.

मुख्य वाजंत्र्याला गित्तीथेवर कोराहाच्या पुत्रासाठीं गीत.

हे सैन्यांच्या **परमेश्वरा**, तुझ्या वस्त्या किती
रमणीय आहेत! २ माझा जीव **परमेश्व-
राच्या** वाड्यांची उत्कंठा धरितो, आणि क्षीणहि
होत आहे; माझें हृदय व माझा देह जिवंत दे-
वासाठीं ओरडत आहे. ३ हे सैन्यांच्या **परमे-
श्वरा**, माझ्या राजा व माझ्या देवा, तुझ्या वेदी-
जवळ चिमणीला देखील घर व पाकोळीला
आपलीं पिलें ठेवायासाठीं कोटें मिळालें आहे.
४ जे तुझ्या घरांत राहतात, ते धन्य; ते नेहमीं
तुझा उत्सव करितील. सेलाह. ५ ज्या माणसाचें
बळ तुझ्यायोगें, तो धन्य; ज्यांच्या ध्यानांत तुझे
मार्ग आहेत. ६ ते बाखा खिंडींतून चालतांना,
तींत झरे करितात, आणि तींतलीं तळीं पाऊस
भरितो. ७ ते अधिक अधिक शक्ति पावतात,
आणि सीयोनांत देवाजवळ दर्शनास येतात. ८
हे **परमेश्वरा**, सैन्यांच्या देवा, माझी प्रार्थना
ऐक; हे याकोबाच्या देवा, कान लाव. सेलाह.
९ हे देवा, जो आमची ढाल तो तूं पाहा, आणि
आपल्या अभिषिक्ताच्या तोंडाकडे लक्ष लाव.
१० कां तर तुझ्या वाड्यांतला एक दिवस हजार
दुसऱ्या दिवसांपेक्षां चांगला आहे; दुष्टाच्या डे-
ऱ्यांत राहण्यापेक्षां माझ्या देवाच्या मंदिरीं उंब-
ऱ्याजवळ राहणें मला अधिक आवडतें. ११ का-
रण कीं **परमेश्वर** देव सूर्य व ढाल आहे; **पर-
मेश्वर** कृपा व गौरव देईल, जे पूर्णपणानें चाल-
तात, त्यांस तो जें कांहीं उत्तम तें द्यावयास नाका-
रणार नाहीं. १२ हे सैन्यांच्या **परमेश्वरा**, जो
माणूस तुजवर आशा ठेवितो तो धन्य.

## गीत ८५.

कोराहाच्या पुत्रासाठीं मुख्य वाजंत्र्याला गीत.

हे **परमेश्वरा**, तूं आपल्या देशावर प्रसन्न हो-
तास; त्वां याकोबाच्या पाडावांस माघारें आ-
णिलें होतें. २ आपल्या लोकांच्या अन्यायाची
क्षमा केली, त्यांचें अवघें पाप झांकिलें. सेलाह. ३
तूं आपला सर्व कोप अटोपिलास आणि आपल्या
कठिण रागापासून फिरलास. ४ हे आमच्या
तारणाच्या देवा, आम्हास माघारें फिरीव, आणि
आम्हावरलें आपलें वितुष्टपण मोड. ५ सर्वकाळप-
र्यंत आम्हावर कोपून आपला राग पिढीपिढी लांब-
विसील कीं काय? ६ तूं आम्हास फिरून सजीव
करणार नाहींस कीं काय? आणि तुझा लोक
तुझ्यानें संतुष्ट होणार नाहीं कीं काय? ७ हे
**परमेश्वरा**, तूं आपली दया आम्हास दाखीव,
आणि आपलें तारण आम्हास दे. ८ **परमेश्वर**
देव काय बोलेल, तें मी ऐकेन; तो तर आपल्या
लोकांसीं म्हणजे आपल्या भक्तांसीं समाधानानें
बोलेल, परंतु त्यानी मूर्खपणांत फिरूं नये. ९
आमच्या देशांत गौरव राहावें, म्हणून त्याकडलें
तारण निश्चयें त्याच्या भिणाऱ्यांस जवळ आहे.
१० दया व सत्यता एकत्र मिळाली आहे; नीति
व शांति यानी चुंबन घेतलें आहे. ११ सत्यता
भूमींतून वाढेल, नीति आकाशांतून डोकावती असें
दिसेल. १२ आणखी **परमेश्वर** उत्तम देईल,
आणि आमचा देश आपलें उत्पन्न देईल. १३
त्याच्यापुढें नीति चालेल आणि त्याचीं पावलें
मार्गांत लावील.

## गीत ८६.

दावीदाकडून प्रार्थना.

हे **परमेश्वरा**, तूं आपला कान लावून माझें
ऐक; कारण कीं मी दुःखित व दुबळा आहें.
२ तूं माझा जीव राख; कारण कीं मी भाविक
आहें; हे माझ्या देवा, तुझा जो सेवक तुजवर
आशा ठेवितो, त्या मला तूं तार. ३ हे प्रभू,
मजवर कृपा कर; कां तर सर्व दिवस मी तुला
हाक मारितों. ४ हे प्रभू, तूं आपल्या सेवका-
चा जीव संतुष्ट कर; कारण कीं मी आपला जीव
तुजकडे वर लावितों. ५ कां तर, हे प्रभू, तूं
चांगला व क्षमाशील आणि जे तुला हाक मारि-
तात, त्या सर्वांवर फार दयाळू आहेस. ६ हे
**परमेश्वरा**, माझ्या प्रार्थनेकडे कान दे, आणि
माझ्या काकळुतींच्या शब्दावर चित्त लाव. ७

मी आपल्या संकटाच्या दिवशीं तुला हाक मारीन,
कां तर तूं मला उत्तर देतोस. ८ हे प्रभू,
देवांमध्यें तुझ्यासारिखा कोणी नाहीं, आणि तुझ्या
कृत्यांसारिखें कांहीं काम नाहीं. ९ हे प्रभू,
जीं राष्ट्रें त्वां केलीं, तीं सर्व तुझ्यासमोर येऊन
पायां पडतील, आणि तुझ्या नामाचें गौरव करि-
तील. १० कारण कीं तूं मोठा आणि आश्चर्याचीं
कृत्यें करणारा आहेस; तूं, केवळ तूंच देव, आ-
हेस. ११ हे परमेश्वरा, तूं आपले मार्ग मला
शिकीव; मी तुझ्या सत्यतेने चालेन; तूं मला
आपल्या नामाला भिण्यासाठीं एकचित्त कर. १२
हे प्रभू, माझ्या देवा, मी आपल्या सर्व हृदयानें
तुझी उपकारस्तुति करीन, आणि सर्वकाळ तुझ्या
नामाचें गौरव करीन. १३ कां तर मजवर तुझी
दया मोठी, यास्तव त्वां माझा जीव अधोगतीच्या
लोकांतरापासून सोडविला आहे. १४ हे देवा,
मजवर गर्विष्ठ उठले; जबरदस्तांच्या समुदायानें-
हि माझ्या जिवाचा शोध केला आहे; आणि
त्यांनी आपल्यासमोर तुला ठेविलें नाहीं. १५
परंतु हे प्रभू, तूं ममताळू व कृपाळू देव; तूं
मंदक्रोध आहेस; तूं फार दयेचा व सत्यतेचा
आहेस. १६ मजकडे दृष्टि लाव आणि मजवर
कृपा कर; आपल्या सेवकाला आपली शक्ति दे;
आणि आपल्या दासीच्या पुत्राला तार. १७
मजसीं बरें होण्याची खूण कर आणि माझ्या
द्वेष्यानी पाहून लाजावें; कारण कीं हे परमेश्व-
रा, त्वां माझें सहाय व माझें समाधान केलें आहे.

## गीत ८७.

कोराहाच्या पुत्रासाठीं गाण्याचें गीत.

त्याचा पाया पवित्र डोंगरांवर आहे. २ या-
कोबाच्या सर्व वस्त्यांपेक्षां सीयोनाचे दर-
वाजे परमेश्वराला आवडतात. ३ हे देवाच्या
नगरा, तुजविषयीं गौरवी गोष्टी सांगायाच्या आ-
हेत. सेलाह. ४ जे मला ओळखतात, त्यांच्या-
संगतीं राहाब व बाबेल, यांस मी नामावळींत
घेईन; पाहा, कूशासुद्धां पलेशेथ व शोर, तेथें
हा जन्मला होता. ५ आणि सीयोनाविषयीं
असें म्हटलें जाईल कीं, "त्यांत अमुक तमुक ज-
न्मला;" आणि परात्पर तें स्थापील. ६ जेव्हां
परमेश्वर आपले लोक लिहून घेईल, तेव्हां तो
मोजील कीं, "हा तेथें जन्मला." सेलाह. ७
आणि गवई व वाजंत्री तेथें होतील. माझे सर्व
झरे तुझ्यांत आहेत.

## गीत ८८.

कोराहाच्या पुत्रांतल्या मुख्य वाजंत्र्याला कीर्तनाचें गीत; दुःखरूप माहलाथ लियान्नोथावर मस्कील; हेमान जो एज्राही त्याकडून.

हे परमेश्वरा, माझ्या तारणाच्या देवा, रात्रंदि-
वस मी तुझ्यासमोर ओरडत आहें. २ तूं
माझी प्रार्थना आपल्या लक्षांत येऊं दे; माझ्या
गर्जनेकडे आपला कान लाव; ३ कां तर माझा
जीव दुःखानी धाला; माझा प्राण कबरेजवळ
पोहंचला. ४ खांचेंत उतरतात त्यांच्यासंगतीं
मी मोजला गेलों; बळाविरहित पुरुष असा झालों
आहें; ५ मेलेल्यांमध्यें मोकळा, वधलेले, कब-
रेंत निजलेले, ज्यांस तूं फिरून आठवीत नाहींस
जे तुझ्या हातापासून नाश पावले त्यांसारिखा मी
झालों आहें. ६ त्वां मला फार खोल खांचेंत,
काळोखस्थानांमध्यें डोहांमध्यें ठेविलें आहे. ७
मजवर तुझा क्रोध भारी आहे, आणि त्वां आप-
ल्या लाटांनी मला पिडिलें आहे. सेलाह. ८ त्वां
माझ्या ओळखीचे मजपासून दूर केले; मी त्यांस
फार कुत्सित असें त्वां केलें; मी बंद झालों, आ-
णि माझ्याने बाहेर जाववत नाहीं. ९ माझ्या
दुःखामुळें माझी दृष्टि मंद झाली; हे परमेश्वरा,
सर्व दिवस म्यां तुला हाक मारिली, म्यां आपले
हात तुजकडे पसरिले आहेत. १० तूं मेलेल्यास
आश्चर्यकर्मे दाखविसील कीं काय? गतप्राण
उठून स्तुति करितील कीं काय? सेलाह. ११
कबरेंत तुझ्या दयेचें, नासकेपणांत तुझ्या सत्य-
तेचें वर्णन होईल कीं काय? १२ तुझीं आश्चर्य-
कर्मे काळोखांत, किंवा तुझें नीतिमत्त्व विसरलेपणा-
च्या लोकांत कळेल कीं काय? १३ तर, हे पर-
मेश्वरा, मी तुझ्याजवळ ओरडतों; सकाळीं
माझी प्रार्थना तुझ्या कानीं येती. १४ हे परमे-
श्वरा, त्वां माझ्या जिवाला कां अव्हेरिलें, आपलें
तोंड मजपासून कां लपविलें? १५ मी बाळप-
णापासून दुःखित व प्राण सोडीं असा आहें; तुझे

भयप्रकार सोसून भ्रमिष्ट झालों. १६ तुझा
क्रोध मजवर फार आला, तुझ्या भीती मला नि-
र्दाळून टाकितात. १७ सर्व दिवस पाण्यासारि-
ख्या मला वेढितात, मिळून मला घेरितात. १८
त्वां मित्र व सखा मजपासून दूर केला: माझे
ओळखी काळोखांत आहेत.

## गीत ८९.

मस्कील, एथान जो एज्राही त्याकडून.

**मी** परमेश्वराच्या दयांचें गायन सर्वकाळ
करीन, पिढोपिढीं आपल्या तोंडाने तुझा वि-
श्वासूपणा कळवीन. २ कां तर म्या ह्मटलें कीं,
'दया सर्वकाळ आकाशापर्यंत रचिली आहे;' तूं
आपला विश्वासूपणा आकाशांत स्थापिला आहे.
३ "म्या आपल्या निवडलेल्याजवळ करार केला
आहे; आपला सेवक दावीद याजवळ शपथ वा-
हिली आहे; ४ मी तुझें संतान सर्वकाळ स्था-
पीन, पिढोपिढीं तुझें सिंहासन स्थीर करीन."
सेलाह. ५ आकाश, हे परमेश्वरा, तुझ्या आ-
श्चर्यकामांची स्तुति करील; निश्चयें तुझा विश्वासू-
पणा तुझ्या पवित्रांच्या मंडळींत स्तुति पावेल; ६
कां तर आभाळांत, परमेश्वरासमान कोण
आहे? पराक्रमी मनुष्यांमध्यें, परमेश्वराला को-
णाची उपमा दिल्हीं जाईल? ७ पवित्रांच्या
सभेमध्यें देव फार भयंकर आहे: तूं आपल्या
सर्व चहुंकडल्यांसहि भययोग्य आहेस. ८ हे
परमेश्वरा, सैन्यांच्या देवा, तुझ्यासारिखा शक्ति-
मान् ईश्वर कोण? आणि तुझा विश्वासूपणा तुझ्या
चहुंकडे आहे. ९ तूं समुद्राच्या गर्वावर अधि-
कार करितोस; त्याच्या लाटा उंच होतात, तेव्हां
तूं त्यांस शांत करितोस. १० त्वां आपल्या
भूजबळाने राहाबाला घायाळासारिखें ठेचलें;
त्वां आपल्या शत्रूंची दाणादाण केली. ११
आकाश तुझें, पृथ्वीहि तुझी; सृष्टि व तिचें भरण,
हीं तुझीं आहेत; यांचा पाया त्वां घातला आहे.
१२ उत्तर व दक्षिण त्वां उत्पन्न केलीं; ताबोर व
हेर्मोन, हे तुझ्या नावाने गजर करितात. १३
तुझी भूज पराक्रमी, तुझा हात बळकट आहे;
तुझा उजवा हात उंच आहे. १४ नीति व न्याय
तुझ्या सिंहासनाचा आधार आहे; दया व सत्यता,
ह्या तुझ्या दृष्टीपुढें आहेत. १५ जे लोक उत्साह
शब्द जाणतात ते धन्य, हे परमेश्वरा, तुझ्या
मुखतेजाने ते चालतील. १६ तुझ्या नामाने
सर्व दिवस हर्ष करितील, आणि तुझ्या नीतीने
उंच होतील. १७ कां तर तूं त्यांच्या शक्तीचें
गौरव आहेस; तुझ्या प्रसन्नतेने आमचें शिंग उंच
असतें. १८ कारण कीं परमेश्वर आमची
ढाल, इस्राएलाचा पवित्र आमचा राजा आहे.
१९ एका वेळेस त्वां साक्षात्कारांत आपल्या भक्ता-
ला बोलून ह्मटलें कीं, "म्या शूराचें सहाय केलें:
लोकांतून जो निवडला, त्याला उंचाविलें आहे.
२० माझा सेवक दावीद मला मिळाला; म्या
आपल्या पवित्र तेलाने त्याला अभिषेक केला
आहे. २१ त्याजकडे माझा हात होईल; माझी
भुजच त्याला बळावील. २२ शत्रु त्यावर भार
घालणार नाहीं, आणि दुष्ट जन त्याला दुखावणार
नाहीं. २३ मी त्याच्या वैऱ्यांस त्याच्यापुढें
कुटीन; त्याच्या द्वेष्ट्यांस हाणीन. २४ आणि
माझी सत्यता व माझी दया त्यावर होईल, आ-
णि माझ्या नामानेंहि त्याचें शिंग उंच होईल.
२५ आणि मी त्याचा हात समुद्रावर, आणि त्या-
चा उजवा हात नद्यांवर ठेवीन. २६ तो मला
हाक मारील कीं, हे माझ्या बापा, तूं माझा देव
व माझ्या तारणाचा खडक आहेस. २७ आण-
खी मी त्याला ज्येष्ठ पुत्र पृथ्वीच्या राजांवर वरिष्ठ
असें करीन. २८ त्यावर आपली दया सर्वका-
ळपर्यंत राखीन; आणि माझा करार त्याजवळ
सत्यपूर्वक होईल. २९ मी त्याचें संतान निरंतर
ठेवीन, आणि त्याचें सिंहासन आकाशांतल्या दि-
वसांसारिखें करीन. ३० जर त्याचे पुत्र माझें
शास्त्र सोडितील आणि माझ्या न्यायाने न चाल-
तील. ३१ जर माझी नेमणूक मोडून माझ्या
आज्ञा न पाळतील, ३२ तर मी त्यांच्या अति-
क्रमाचें शासन दंडाने, व त्यांच्या अन्यायाचें शा-
सन पटक्यानी करीन. ३३ परंतु मी आपली
दया त्यावरून दूर करणार नाहीं, आणि आपला
विश्वासूपणा खोटा करणार नाहीं. ३४ आपला
करार मोडणार नाहीं, आणि आपल्या होटांतून
जें निघालें, तें फिरविणार नाहीं. ३५ म्या आप-
ल्या पवित्रतेने शपथ एकदा वाहिली आहे कीं,

निश्चयें मी दावीदाजवळ लबाडी करणार नाहीं.
३६ त्याचें संतान सर्वकाळ आणि त्याचें सिंहासन
माझ्यासमोर सूर्यासारिखें असत जाईल. ३७
चंद्र, ह्मणजे अभाळांत प्रमाणिक साक्षी, यासा-
रिखें सर्वकाळ स्थापिलें जाईल." सेलाह. ३८
परंतु त्वां नकारिलें, त्वां अव्हेरिलें, त्वां आपल्या
अभिषिक्तावर कोप धरिला आहे. ३९ **तूं** आप-
ल्या सेवकाजवळच्या कराराला कंटाळलास; त्वां
त्याचा मुगूट भूमीवर भ्रष्ट केला. ४० **त्याचीं**
सर्व आवारें मोडून टाकिलीं; त्याच्या दुर्गांचा
नाश केला. ४१ **सर्व** वाटसरू त्याला लुटि-
तात; तो आपल्या शेजाऱ्यांजवळ निंद्य असा
झाला. ४२ **त्वां** त्याच्या वैऱ्यांचा उजवा हात
उंच केला, त्याच्या सर्व शत्रूंस संतोषविलें आहे;
४३ **अणखी** त्याच्या तरवारीची धार फिरविली,
आणि लढाईत त्याला उभें राखिलें नाहीं. ४४
**त्याचें** तेज नाहींसें केलें, आणि त्याचें सिंहासन
भूमीवर पाडिलें आहे. ४५ **त्याच्या** तरुणपणां-
तले दिवस अखडिले; त्याजवर लज्जेचें आच्छा-
दन घातलें. सेलाह. ४६ **हे परमेश्वरा**, तूं
कोठपर्यंत गुप्त राहसील? तुझा संताप आगीसारिखा
सर्वकाळ जाळील काय? ४७ **माझें** आयुष्य
किती आहे, याची आठवण कर; त्वां मनुष्याच्या
सर्व संतानांस कशासाठीं व्यर्थ उत्पन्न केलें? ४८
**कोणता** पुरुष जगून मरण न पाहतां, आपल्या
जिवाला कबरांच्या सत्तांतून निभववील. सेलाह.
४९ **हे प्रभू**, पूर्वीची तुझी दया कोठें आहे? त्वां
आपल्या सत्यतेने दावीदाजवळ शपथ वाहिली
होती. ५० **हे प्रभू**, तूं आपल्या सेवकांच्या
धिक्काराची आठवण कर; मी आपल्या ओठींत
सर्व मोठ्या राष्ट्रांकडला धिक्कार सोसितों, ५१
कसा तर हे **परमेश्वरा**, तुझ्या शत्रूंनी धिक्का-
रिलें, तुझ्या अभिषिक्ताचीं पावलें धिक्कारिलींच
आहेत. ५२ **परमेश्वराची सर्वकाळ** स्तुति अ-
सो; आमेन व आमेन.

## गीत ९०.

देवाचा माणूस मोशे याची प्रार्थना.

**हे प्रभू**, तूं पिढोपिढीं आमचा आश्रय आहेस.
२ **डोंगर** उपजले आणि त्वां पृथ्वी व सृष्टि
याचा प्रारंभ केला यापूर्वी तूं सर्वकाळापासून स-
र्वकाळपर्यंत तूं **देव** आहेस. ३ **तूं** मनुष्याला
भुगेपणांत माघारें फिरवितोस आणि ह्मणतोस कीं,
"अहो मनुष्याचीं संतानें तुह्मी फिरा." ४ **कां**
तर तुझ्या दृष्टींत हजार वर्षे गेलेला कालचा दि-
वस व रात्रींतला प्रहर यासारिखीं आहेत. ५
**तूं** त्यांस वाहवून टाकितोस; ते झोपेंत असतात;
सकाळीं गवतासारिखे वाढितात. ६ **तें** सकाळीं
फुलतें आणि वाढतें, परंतु संध्याकाळीं तोडलें जा-
ऊन वाळतें. ७ **कां** तर तुझ्या रागानें आह्मी
क्षय पावतों, आणि तुझ्या संतापानें व्याकूळ हो-
तों. ८ **तूं** आपल्यापुढें, आमचे अन्याय आपल्या
दृष्टीच्या उजेडांत आमचे गुप्त अपराध ठेवितोस.
९ **कां** तर आमचे सर्व दिवस तुझ्या कोपांत जा-
तात; आह्मी आपलीं वर्षे कल्पनेसारिखीं घाल-
वितों. १० **आमच्या** आयुष्याचे दिवस एकंदर
सत्तर वर्षे; आणि शक्तीकडून ऐशीं वर्षे असतीं,
तरी त्यांचा ताठा कष्टरूप व अनर्थरूप आहे;
कां तर तें लौकर सरतें, आणि आह्मी उडून
जातों. ११ **तुझ्या** रागाचें सामर्थ्य कोण जाणतो!
आणि तुझ्या भयाप्रमाणेंच तुझा क्रोध आहे. १२
**तूं** आह्मास आमचे दिवस मोजावयास असें स-
मजीव कीं, आह्मी ज्ञानाकडे चित्त लावावें. १३
**हे परमेश्वरा**, कोठपर्यंत? माघारा फीर! तर
तुझ्या सेवकांविषयीं तुला अनुताप होवो. १४
**तूं** आपल्या दयेनें लवकर आह्मास तृप्त कर,
आणि आह्मी आपल्या सर्व दिवसांत उत्सव व
संतोष करावा. १५ **ज्या** दिवसांत त्वां आह्मास
दुःख दिल्हें, ज्या वर्षी आह्मी वाईट अनुभविलें,
त्यांप्रमाणें आह्मास संतुष्ट कर. १६ **आपल्या**
सेवकांस आपलीं कृत्यें; व त्यांच्या संतानांस आ-
पलें महत्व दाखीव. १७ **आणि प्रभु** आमचा
**देव** याची प्रसन्नता आह्मावर होवो; आणि तूं
आमच्या हातांचें काम आह्मासाठीं सिद्धीस ने;
आमच्या हातांचें काम सिद्धीसच ने.

## गीत ९१.

**जो परात्पराच्या** आच्छादनाखालीं राहतो,
तो **सर्वसमर्थाच्या** छायेंत वस्ति पावेल.
२ **परमेश्वराविषयीं** मी असें ह्मणतों कीं, तो

माझ्या आश्रयाचा व माझा दुर्ग; माझा देव, त्या-
जवर मी आशा ठेवीन; ३ कां तर तो तुला
पारध्याच्या फांसापासून, मरीच्या अनर्थांपासून
सोडवील; ४ तो आपल्या पिसानी तुला झां-
कील, आणि त्याच्या पंखांखालीं तुला आश्रय
होईल; त्याची सत्यता अंगढाल व कवच असें
होईल. ५,६ रात्रींतल्या भयाविषयीं, व दिवसां
उडत्या बाणाविषयीं, काळोखांत चालत्या मरी-
विषयीं, दुपारीं घातकरणाऱ्या अरिष्टाविषयीं तुला
धास्ती होणार नाहीं. ७ तुझ्या बाजूस हजार
व तुझ्या उजवीकडे दाहा हजार पडतील, तरी
तुला लागणार नाहीं. ८ तूं आपल्या दृष्टीने
मात्र न्याहाळून दुष्टांची फेड पाहसील; ९
कारण कीं माझा आश्रय जो **परमेश्वर, परा-
त्पर,** तो त्वां आपल्याला वस्तिस्थान केला. १०
वाईट तुला प्राप्त होणार नाहीं; आणि तुझ्या
राहोटीस पटकी लागणार नाहीं; ११ कां तर
तुझ्या सर्व मार्गींत तुला राखावें, ह्मणून तो आ-
पल्या दूतांस तुजविषयीं आज्ञा देईल. १२ त्वां
आपला पाय धोंड्यावर न अपटावा, ह्मणून ते
आपल्या हातांवर तुला धरितील. १३ तूं सिंहा-
वर व पेंतेन सर्पावर पाय देसील; तरण्या सिंहा-
ला व अजगराला तुडविसील. १४ त्याने माझी
आवड धरिली आहे ह्मणून मी त्यास निभाववीन;
त्याने माझें नाव जाणिलें, यास्तव मी त्यास उच-
लीन. १५ तो मला हाक मारील, आणि मी
त्याला उत्तर देईन; मी त्याला संकटांत अनुकूळ
होईन आणि मी त्याचें गौरव करीन. १६ दीर्घ
आयुष्याने मी त्याला तृप्त करीन; आणि माझ्या
तारणाचा अनुभव त्याला देईन.'

## गीत ९२.

शाब्बाथ दिवसीं गाण्याचें गीत.

**परमेश्वराची** स्तुति करणें, हे **परात्परा,** तुझ्या
नांवाचें कीर्त्तन करणें बरें आहे. २,३ दशतार-
वाद्यावर, व तारपेटीवर, ध्यानवाद्यावर व विण्या-
वर सकाळीं तुझी दया, व रात्रीच्या रात्रीं तुझी
सत्यता, प्रगट करणें बरें आहे; ४ कारण कीं
हे **परमेश्वरा,** त्वां आपल्या करण्याने मला सं-
तुष्ट केलें आहे; तुझ्या हातांच्या कृत्यावरून मी
उल्हासाचा शब्द करीन. ५ हे **परमेश्वरा,**
तुझीं कृत्यें मोठीं आहेत; तुझे विचार फार खोल
आहेत. ६ पशुशील मनुष्य जाणत नाहीं; आ-
णि मूर्ख हें समजत नाहीं. ७ जेव्हां दुष्ट गव-
तासारिखे फुटतात, आणि सर्व दुष्कर्मी फुलतात,
तेव्हां तें त्याच्या सदा सर्वकाळ नाशासाठीं आहे.
८ पण हे **परमेश्वरा,** तुला सर्वकाळ थोर मानावें.
९ कां तर हे **परमेश्वरा,** पाहा, तुझे शत्रू, पाहा
तुझे शत्रू नाश पावतील; सर्व दुष्कर्मी विसक-
ळीत होतीस. १० परंतु माझें शिंग मेंढ्याच्या-
सारिखें तूं उंच करसील मी ताजुक तेलाने ना-
हीन. ११ आणि मजवर टपणारे, मजवर उठणारे
यांस माझे डोळे पाहतील; दुष्टांविषयीं माझे
कान ऐकतील. १२ पुण्यवान खजुरी झाडासा-
रिखा फुलेल; लबानोनावरल्या एरेजसारिखा वा-
ढेल. १३ जे **परमेश्वराच्या** घरीं लावलेले,
ते आमच्या **देवाच्या** वाड्यांत पालवतील; १४
वृद्धपणांत देखील फळ देतील; रसाळ व हिरवे
होतील; १५ यासाठीं कीं **परमेश्वर** सरळ
हें दाखवावें तो माझा खडक आणि त्यामध्यें कां-
हीं वावगें नाहीं.

## गीत ९३.

**परमेश्वर** राज्य करितो; तो उत्कृष्टता ल्यालेला;
**परमेश्वर** ल्यालेला आहे, त्याने आपल्याला
पराक्रम वेष्टिला आहे. अणखी पृथ्वी स्थीर स्था-
पलेली आहे; ती हालणार नाहीं. २ प्राचीन
काळापासून तुझें सिंहासन स्थापलेलें आहे; तूं
अनादि आहेस. ३ हे **परमेश्वरा,** ओघानी
उंचाविला, ओघानी आपला शब्द उंचाविला
आहे; ओघ आपल्या लाटांस उंचावितात. ४
मोठ्या महान् पाण्याच्या घोषांपेक्षां, समुद्राच्या
लहरींपेक्षां **परमेश्वर** उंचावर महान् आहे. ५
हे **परमेश्वरा,** तुझ्या नेमणुकी अतिसत्य आहेत;
तुझ्या घरीं पवित्रता सदा सुशोभित आहे.

## गीत ९४.

**हे** सूड घेणाऱ्या देवा, हे **परमेश्वरा,** सूड घे-
णाऱ्या देवा, तूं प्रकाशित हो. २ हे पृथ्वी-
च्या न्यायाधीशा, तूं ऊठ, अभिमान्यांस प्रतिफळ

फेडून दे. ३ दुष्ट कोठपर्यंत! हे परमेश्वरा,
दुष्ट कोठपर्यंत उल्हास करितील! ४ ते उचं-
बळून, उद्धट बोलतात; सर्व दुष्कर्मी नांवाजून
घेतात. ५ हे परमेश्वरा, ते तुझ्या लोकाला
चेंचरतात; आणि तुझ्या वतनाला दुःख देतात.
६ विधवा व विदेशी, यांस जिवें मारितात; आणि
पोरक्यांची हत्या करितात. ७ आणि ह्मणतात
'परमेश्वर पाहत नाहीं; याकोबाचा देव समजत
नाहीं.' ८ अहो पशुशील लोकानो तुह्मी संमजा;
अहो मूर्खांहो, तुह्मी कधीं ज्ञानी व्हाल. ९ ज्याने
कान बसविला, तो ऐकणार नाहीं कीं काय! ज्याने
डोळा घडविला, तो पाहणार नाहीं कीं काय!
१० जो राष्ट्रांस शिक्षा करितो, जो माणसाला
विद्या शिकवितो, तो निषेध करणार नाहीं कीं
काय! ११ परमेश्वर माणसांचे विचार जाणतो
कीं, ते व्यर्थ आहेत. १२ हे परमेश्वरा, ज्या
पुरुषाला तूं शिक्षा करितोस, आणि आपलें शास्त्र
शिकवितोस, तो धन्य. १३ तेणेंकरून, दुष्टासाठीं
खांच खाणली जाती तोंपर्यंत, तूं त्याला वाईट
दिवसीं स्वस्थ राखितोस; १४ कां तर परमे-
श्वर आपल्या लोकाला सोडीत नाहीं; आणि
आपल्या वतनाला टाकीत नाहीं, १५ तर नी-
तिमत्वाकडे न्याय फिरेल, आणि जे हृदयाचे स-
रळ ते सर्व त्याच्यामागें लागतील. १६ माझ्या-
साठीं दुष्टांविरुद्ध कोण उठेल! माझ्यासाठीं दुष्क-
र्म्यांविरुद्ध कोण उभा राहील! १७ जर परमे-
श्वर मला सहाय नसता, तर थोडक्याने माझा
जीव निवांत वस्तींत उतरला असता. १८ जे-
व्हां मी बोललों कीं, 'माझा पाय निसरतो,' तेव्हां
हे परमेश्वरा, तुझी दया आधार झाली. १९
जेव्हां मजमध्यें मला चिंता फार लागतात, तेव्हां
तुझीं समाधानें माझ्या जिवाला शांतवितात. २०
अनर्थाचें सिंहासन जें नेमावर दुष्कर्म योजतें त्याचें
तुझें सख्य होईल कीं काय! २१ ते पुण्यवाना-
च्या जिवावर गर्दी करून निर्दोषी रक्ताला दोषी
ठरवितात. २२ परंतु परमेश्वर माझा गड व
माझा देव, माझ्या भरवस्याचा खडक असा झाला.
२३ आणि तो त्यांची दुष्टाई त्यांजवर फिरवील;
आणि त्याच्या वाईटपणाने त्यांचा निःपात करील,
परमेश्वर आमचा देव त्यांचा निःपात करील.

## गीत ९५.

चला आपण परमेश्वराजवळ उल्हासाचे शब्द
करूं; आपल्या तारणाच्या खडकाजवळ गजर
करूं. २ आपण स्तुति करायास त्याच्यापुढें
येऊं; कीर्त्तनानी त्याजवळ गजर करूं. ३ कां
तर परमेश्वर थोर देव; सर्व देवांवर तोच थोर
राजा आहे. ४ त्याच्या हातीं पृथ्वीचीं खोल
स्थानें आहेत, आणि डोंगरांच्या राशी त्या-
च्या आहेत. ५ समुद्र त्याचा, त्यानेच तो उत्पन्न
केला, आणि त्याच्या हातानी कोरडी भूमि घडि-
ली. ६ या, आपण आपल्या उत्पन्न करणाऱ्या
परमेश्वरासमोर लवूं, गुडघे टेकूं व पायां पडूं;
७ कां तर तो आमचा देव, आणि आह्मी त्याचा
पाळणाचा लोक, आणि त्याच्या हाताचा कळप
आहों. आज तुह्मी त्याची वाणी अगत्य ऐका.
८ जसीं रानांत भांडणस्थळीं; जसीं परीक्षेच्या
दिवसीं, तसीं आपलीं अंतःकरणें कठीण करूं
नका. ९ तेथें तुमच्या वडिलानी माझी परीक्षा
केली, माझा अनुभव घेतला, आणि माझीं कर्में पा-
हिलीं. १० चाळीस वर्षें त्या पिढीविषयीं मी
खेद पावलों; आणि बोललों कीं हे लोक भ्रष्ट
मनाचे, ते माझे मार्ग जाणत नाहींत; ११ यास्तव
म्या आपल्या रागाने शपथ वाहिली कीं, 'निश्चयें
माझ्या विसाव्यांत जाणार नाहींत.'

## गीत ९६.

तुह्मी परमेश्वराला नवें गायन गा; अहो
पृथ्वींतले सर्व तुह्मी परमेश्वराला गा. २
परमेश्वराला गा; त्याचें नाम सुवंदित ह्मणा;
दिवसोदिवस त्याच्या तारणाचें सुवर्त्तमान सांगा.
३ राष्ट्रांमध्यें त्याचें गौरव, सर्व लोकांमध्यें त्याच्या
आश्चर्याचीं कृत्यें वर्णीत जा; ४ कारण कीं
परमेश्वर थोर, आणि फार स्तुतियोग्य; सर्व
देवांवर तो भययोग्य आहे; ५ कां तर राष्ट्रां-
चे सर्व देव व्यर्थ देव आहेत; परंतु परमेश्व-
राने आकाश उत्पन्न केलें. ६ मान व महत्व
त्याच्यापुढें; बळ व शोभा त्याच्या पवित्रस्थानांत
आहे. ७ अहो लोकांचीं कुळें, परमेश्वराला
द्या, परमेश्वराला गौरव व पराक्रम द्या.

८ **परमेश्वराला** त्याच्या नावाचें गौरव द्या;
नैवेद्य घेऊन त्याच्या वाड्यांत या. ९ पवित्रतेच्या
शोभेने **परमेश्वराला** भजा; अहो पृथ्वीचे सर्व,
तुह्मी त्याच्यासमोर भय धरा. १० राष्ट्रांमध्यें
सांगा कीं, '**परमेश्वर** राज्य करितो, अणखी
पृथ्वी स्थीर स्थापलेली आहे; ती हलणार नाहीं;
तो नीतीने लोकांचा निवाडा करील.' ११ आ-
काशाने आनंद करावा; आणि पृथ्वीने हर्षावें, समु-
द्र व त्याचें भरणें यानी गर्जना करावी. १२,१३
अरण्य व त्यांत जें अवघें त्याने उल्हास करावा,
तेव्हां वनांतल्या सर्व झाडानी **परमेश्वरासमोर**
हर्षनाद करावा, कारण कीं तो येईल, पृथ्वीचा
न्याय करायास येईल, तेव्हां तो जगाचा न्याय
नीतीने व लोकांचा न्याय सत्यतेने करील.

## गीत ९७.

**प**रमेश्वर राज्य करितो, पृथ्वीने हर्ष करावा;
बेटांच्या समूहानी संतोष करावा. २ त्याच्या
सभोंवतीं ढग व निबिडता आहे; पवित्रता व
न्याय त्याच्या सिंव्हासनाचा आधार आहे. ३
त्याच्यापुढें अग्नि चालतो आणि त्याच्या वैऱ्यांस
चहुंकडून जाळितो. ४ त्याच्या बिजानी सृष्टि
प्रकाशित झाली, पृथ्वी पाहून कांपली. ५ परमे-
श्वरासमोर, सर्व पृथ्वीच्या **प्रभू**समोर डोंगर मे-
णासारिखे विघरले. ६ आकाशाने त्याची नीति
प्रगट केली आणि सर्व राष्ट्रानी त्याचें गौरव पा-
हिलें. ७ सर्व मूर्त्तींचे सेवक जे ह्मणविलेल्या दे-
वाचे उत्सव करितात, ते लाजतील, अहो सर्व
देवानो, तुह्मी त्याला भजा. ८ हे **परमेश्वरा**,
सीयोन ऐकून संतोष पावला, आणि तुझ्या न्याया-
मुळें यहूद्याच्या कन्यानी हर्ष केला. ९ कारण
कीं हे **परमेश्वरा**, तूं सर्व पृथ्वीवर **परात्पर**, सर्व
देवांवर फार उंच आहेस. १० अहो परमे-
श्वराचे प्रीति करणारे तुह्मी दुष्टाईचा द्वेष करा,
तो आपल्या भक्तांचे जीव राखितो, दुष्टांच्या हा-
तापासून त्यांस सोडवितो. ११ नीतिमानासाठीं
उजेड, आणि हृदयाचे सरळ यांसाठीं संतोष
पेरलेला आहे. १२ अहो नीतिमान तुह्मी पर-
मेश्वराविषयीं संतोष करा; आणि त्याच्या पवि-
त्रतेच्या आठवणीवरून उपकार माना.

## गीत ९८.

कीर्त्तन.

**तु**ह्मी **परमेश्वराला** नवें गायन गा, कारण कीं
त्याने आश्चर्य कर्मे केलीं आहेत, त्याच्या उज-
व्या हाताने, आणि त्याच्या पवित्र भुजेने त्याक-
रितां तारण केलें आहे. २ **परमेश्वराने** आ-
पलें तारण कळविलें; त्याने राष्ट्रांच्या दृष्टीस आ-
पलें नीतिमत्व प्रगट केलें आहे. ३ त्याने इस्रा-
एलाच्या घराण्यावरली आपली दया, व आपली
सत्यता आठविली आहे; पृथ्वीच्या सीमांतल्या
सर्वांनी आमच्या **देवाचें** तारण पाहिलें आहे.
४ अहो पृथ्वींतले सर्व, तुह्मी **परमेश्वराजवळ**
गजर करा, हाक फोडा, आणि हर्षशब्द काढून
कीर्त्तन करा. ५ तंतुवाद्यावर, कीर्त्तनीय शब्दाने
तंतुवाद्यावर **परमेश्वराजवळ** स्तुतिनाद करा,
६ **परमेश्वर** जो **राजा** त्यासमोर करण्याच्या
शब्दाने तुताऱ्यानी गजर करा. ७ समुद्र व
त्याचीं भरणें, पृथ्वी व तींतील राहणारे यानी ग-
र्जना करावी. ८ नद्यानी टाळी वाजवावी; त्यां-
बरोबर **परमेश्वरासमोर** डोंगरानी हर्षनाद क-
रावा. ९ कारण कीं तो पृथ्वीचा न्याय करा-
यास येतो, तो नीतीने जगाचा, व सरळपणाने
राष्ट्रांचा न्याय करील.

## गीत ९९.

**प**रमेश्वर राज्य करितो, राष्ट्रानी कांपावें, तो
करूबांवर बसतो, पृथ्वीने थरथरावें. २ सी-
योनांत **परमेश्वर** थोर; आणि तो सर्व राष्ट्रांवर
उंच आहे; ३ त्यानी तुझे थोर व भयंकर नावा-
ची स्तुति करावी; तें पवित्र आहे. ४ राजाच्या
सामर्थ्याला न्याय अवडतो तूं सरळपण स्थापि-
तोस, **याकोबांत** न्याय व नीति करितोस. ५
**परमेश्वर** आमचा **देव**, याला तुह्मी उंच माना.
आणि त्याच्या पायांच्या आसनाजवळ भजा; तो
पवित्र आहे. ६ त्याच्या याजकांमध्यें मोशे व
आहरोन, आणि त्याच्या नांव घेणाऱ्यांमध्यें शमुवेल
त्यानी **परमेश्वराला** हाक मारिली, आणि त्यास
त्याने उत्तर दिल्हें. ७ तो ढगाच्या खांबांतून
त्यांसीं बोलला, त्याने जे आपले विधि. व जो नेम

त्यांस लावून दिल्हा, तो त्यांनी पाळिला. ८ हे **परमेश्वरा** आमच्या देवा, त्वां त्यांस उत्तर दिल्हें, त्यांसीं तूं क्षमा करणारा देव असा होतास; तथापि त्वां त्यांच्या दुष्कर्मांमुळें सूड घेतला. ९ **परमेश्वर** आमचा देव, याला तुह्मी उंच माना; आणि त्याच्या पवित्र डोंगरावर भजा; कां तर **परमेश्वर** आमचा देव पवित्र आहे.

### गीत १००.

उपकार मानायाचें कीर्त्तन.

अहो पृथ्वीतले सर्व तुह्मी **परमेश्वरा**जवळ गजर करा. २ संतोषानें **परमेश्वराची** सेवा करा; हर्षनादानें त्याच्यासमोर या. ३ हें जाणा कीं, तोच **परमेश्वर**, तोच देव; त्यानें आह्मास उत्पन्न केलें; आह्मी आपल्या आपणच झालों नाहीं. आह्मी त्याचा लोक, आणि त्याच्या चारण्याचा कळप. ४ त्याच्या दरवाज्यांत स्तुतीनें, त्याच्या वाड्यांत उत्सवानें तुह्मी या; त्याचा उपकार माना; त्याचें नाम सुवंदित ह्मणा; ५ कां तर **परमेश्वर** उत्तम, त्याची दया सर्वकाळपर्यंत, आणि त्याची सत्यता पिढीपिढी असी आहे.

### गीत १०१.

दावीदानें केलेलें गीत.

मी दया व न्याय गाईन; हे **परमेश्वरा**, तुझें कीर्त्तन करीन. २ यथार्थमार्गी चातुर्यानें चालेन, तूं केव्हां मजकडे येसील? मी आपल्या घरामध्यें आपल्या हृदयाच्या यथार्थपणें चालेन. ३ मी आपल्या दृष्टीपुढें अनुचित गोष्ट ठेवणार नाहीं; द्वाडांचें काम द्वेषितों; तें मला लगटणार नाहीं. ४ विपरीत हृदय मजपासून दूर होईल; मी वाईटाला ओळखणार नाहीं. ५ जो गुप्तपणें आपल्या शेजाऱ्याची चहाडी करितो, त्याचा निःपात करीन; जो दृष्टीचा उंच, व हृदयाचा उद्धट, त्याला मी साहणार नाहीं. ६ माझ्या संगतीं राहण्यासाठीं, देशांतील जे विश्वासू त्यांजवर माझें लक्ष आहे; जो यथार्थ मार्गानें चालतो, तोच माझी चाकरी करील. ७ जो कपट करितो, तो माझ्या घरांत राहणार नाहीं; जो लबाड बोलतो, तो माझ्या दृष्टीपुढें टिकणार नाहीं; ८ मी देशांतल्या सर्व दुष्टांचा निःपात लवकर करीन; यासाठीं कीं सर्व दुष्कर्म्यांस छेदून, **परमेश्वराच्या** नगरांतून नाहींसें करावें.

### गीत १०२.

दुःखितासाठीं प्रार्थना; जेव्हां तो बुडतो आणि परमेश्वरापुढें आपलें हाद्र ओतून काढितो, तेव्हांची.

हे **परमेश्वरा**, तूं माझी प्रार्थना ऐक, आणि माझें ओरडणें तुझ्याजवळ येऊं दे. २ माझ्या संकटाच्या दिवसीं तूं आपलें तोंड मजपासून लपवूं नको; आपला कान मजकडे लाव; मी तुला हाक मारितों, त्याच दिवसीं लवकर मला उत्तर दे, ३ कारण कीं माझे दिवस धुरासारिखे जातात, आणि माझीं हाडें सर्पणासारिखीं जळतात; ४ गवतासारिखें माझें हृदय हाणलेलें होऊन वाळलें आहे; कां कीं मी आपलें अन्न खायाला विसरलों. ५ माझ्या कण्हण्याच्या शब्दानें माझीं हाडें माझ्या मासाला लगटून राहतात. ६ मी रानांतल्या ओकणाऱ्या पक्षीसारिखा झालों; ओसाडींतल्या कोशवाहकपक्षीसारिखा आहें. ७ मी जागा राहतों, आणि धाब्यावरल्या एकट्या चिमणीसारिखा असतों. ८ सर्व दिवस माझे शत्रू माझा धिक्कार करितात, जे मजवर पिसळलेले त्यांनी माझी शपथ केली आहे; ९ ह्मणून म्यां अन्नासारिखी राख खाली, आणि आपलें पिणें आपल्या अश्रूंनी भेळिलें. १० तुझा तळतळाट व तुझा कोप, यांमुळें; कां कीं त्वां मला उचलून आपटिलें आहे. ११ माझे दिवस फिरलेल्या सावलीसारिखे आहेत; आणि मी गवतासारिखा वाळत आहें. १२ परंतु हे **परमेश्वरा**, तूं सर्वकाळपर्यंत राहतोस; आणि तुझी आठवण पिढीपिढी आहे. १३ तूं उठून सीयोनावर ममता करसील; कां तर त्यांजवर कृपा करण्याची वेळ आहे; कां कीं वायदा देखील भरला आहे; १४ कारण कीं त्याचे चिरे तुझ्या सेवकांस आवडतात; आणि त्याच्या मातीवर ते ममता करितात. १५ राष्ट्रें तर **परमेश्वराच्या** नांवाला, आणि पृथ्वीतले सर्व राजे तुझ्या गौरवाला भितील; १६ कां तर **परमेश्वर** सीयोन बांधितो; तो आपल्या गौरवानें दिसेल. १७ देव अनाथाच्या प्रार्थनेकडे लक्ष लावितो; अशांची प्रार्थना तो धिक्कारीत नाहीं. १८ हें पुढल्या पिढीसाठीं

लिहिलें आहे; यास्तव उत्पन्न होणार जे लोक ते
**परमेश्वराला** स्तवितील; १९ **कां** कीं **परमे-
श्वराने** आपल्या उंच पवित्र स्थानांतून दृष्टि ला-
विली; आकाशांतून पृथ्वीवर न्याहाळिलें; २०
**यासाठीं** कीं आपण बंदिवानांचें कण्हणें ऐकून मर-
णास जे नेमलेले त्यांस मोकळें करावें.' २१
**असें** कीं सीयोनांत **परमेश्वराचें** नांव, आणि
यरूशालेमांत त्याचें स्तवन प्रगट केलें जाईल.
२२ **राष्ट्रें** व राज्यें **परमेश्वराची** सेवा करायास
एकत्र मिळतील तेव्हां. २३ **त्याने** माझें बळ
वाटेवर दाबिलें; माझे दिवस अखंडिले. २४
**मी** बोललों कीं, 'हे माझ्या **देवा**, माझ्या दिव-
सांच्या मध्यांत मला नेऊं नको; तुझीं वर्षें पिढो-
पिढीं आहेत. २५ **प्रारंभीं** त्वां पृथ्वीचा पाया
घातला, आणि आकाश तुझ्या हातांचें काम आहे.
२६ **तीं** नाश पावतील, परंतु तूं टिकून राहसील;
तीं सर्वहि वस्त्रासारिखीं जीर्ण होतील; तूं त्यांस
पांघरुणासारिखें फिरविसील, आणि तीं पालटलीं
जातील; २७ **परंतु** तूं तसाच आहेस, आणि
तुझीं वर्षें समाप्त होणार नाहींत. २८ **तुझ्या** से-
वकांचें संतान राहील; आणि त्यांचें बीज तुझ्या-
समोर स्थापलें जाईल.

## गीत १०३.

दावीदाकडून.

**हे** माझ्या जीवा, तूं **परमेश्वराची** स्तुति कर;
आणि माझ्यांतल्या अवघ्याने त्याच्या पवित्र
नामाची स्तुति करावी. २ **हे** माझ्या जिवा, तूं
**परमेश्वराची** स्तुति कर, आणि त्याचे सर्व उप-
कार विसरूं नको. ३ **तो** तुझ्या सर्व अन्या-
यांची क्षमा करितो; तुझे सर्व रोग बरे करितो.
४ **तुझें** आयुष्य नाशापासून खंडून सोडवितो;
दयेचा व अति ममतेचा मुगुट तुजवर घालितो.
५ **तो** उत्तम देऊन तुझ्या आशा तृप्त करितो;
तुझें तरुणपण गरुडाच्यासारिखें नवें होतें. ६
**सर्व** जांचलेल्यांसाठीं **परमेश्वर** नीति व न्याय
करितो. ७ **त्याने** आपले मार्ग मोशेला, आ-
पलीं चरित्रें इस्राएलाच्या संतानांस कळविलीं.
८ **परमेश्वर** ममताळू व कृपाळू; तो मंदक्रोध
व बहुप्रसाद आहे. ९ **तो** निरंतर वाद करणार
नाहीं, आणि राग सर्वकाळपर्यंत धरणार नाहीं.
१० **त्याने** आमच्या पापांप्रमाणें आह्मासीं केलें
नाहीं; आणि आमच्या अपराधांप्रमाणें आह्माला
फळ दिल्हें नाहीं; ११ **कारण** कीं असें आ-
काश भूमीपासून उंच, तसी त्याची दया त्याच्या
भिणाऱ्यांवर अत्यंत आहे. १२ **जसी** मावळती-
पासून उगवती दूर, तसीं आमचीं उल्लंघनें आ-
ह्मापासून त्याने दूर केलीं आहेत. १३ **बाप**
पुत्रावर जसी ममता करितो, तसी **परमेश्वर**
आपल्या भिणाऱ्यांवर ममता करितो; १४ **कां**
तर तो आमची रचना जाणतो; आह्मी मातीचे
आहों, ही आठवण तो करितो. १५ **मनुष्य**
तर त्याचे दिवस गवताच्यासारिखे आहेत; असें
कुरणांतलें फूल, तसा तो फुलतो; १६ **कां** तर
वारा त्यावरून जातो, आणि तें नाहींसें होतें;
आणि त्याचें ठिकाण त्याला पुढें ओळखत नाहीं.
१७ **परंतु** **परमेश्वराची** दया त्याच्या भिणाऱ्यां-
वर सर्वकाळापासून सर्वकाळपर्यंत, व त्याची नीति
लेंकरांच्या लेंकरांस आहे; १८ **ह्मणजे** जे त्या-
चा करार पाळितात, आणि त्याच्या बंधारणाप्र-
माणें करायास तीं आठवितात, त्यांस आहे. १९
**परमेश्वराने** आपलें सिंहासन आकाशांत स्था-
पिलें आहे, आणि त्याचें राजपण सर्वांवर आहे.
२० **अहो** **परमेश्वराचे** दूत, सामर्थ्याने पराक्रमी,
त्याची वाणी ऐकून त्याची गोष्ट पाळणारे, तुह्मी
त्याची स्तुति करा. २१ **अहो** **परमेश्वराचे**
सर्व सैन्यांनो, त्याचे सेवक, त्याचा संतोष करणारे
तुह्मी त्याची स्तुति करा. २२ **परमेश्वराच्या**
अधिकारांतल्या सर्व ठिकाणचीं त्याचीं सर्व कामें
हो, तुह्मी त्याची स्तुति करा. हे माझ्या जीवा,
तूं **परमेश्वराची** स्तुति कर.

## गीत १०४.

**हे** माझ्या जीवा, तूं **परमेश्वराची** स्तुति कर,
हे **परमेश्वरा** माझ्या **देवा**, तूं फार थोर
आहेस, तेज व महत्व यांनी वेष्टलेला आहेस. २
तो तूं वस्त्रासारिखा उजेड पांघरितोस, चांदव्या-
सारिखें आकाश ताणितोस. ३ **तो** आपल्या
माड्या पाण्यांत रचतो; आपला रथ [illegible];
वाऱ्याच्या पंखांवर चालतो. ४ वायु

दूत, अग्नीची ज्वाला आपले सेवक असे करितो·
५ त्याने पृथ्वीचा पाया तिच्या ठिकाणीं घातला,
ती सदासर्वकाळ हलणार नाहीं· ६ खोल स-
मुद्राने वस्त्रासारिखें आच्छादिलें; पाणी डोंगरां-
वर उभें राहिलें· ७ तुझ्या निषेधाने तें पळालें;
तुझ्या गडगडाटाच्या शब्दाने भडकलें. ८ तें डों-
गरांवर चढलें; जें ठिकाण त्वां त्यासाठीं सिद्ध
केलें, तेथें खिंडींने उतरलें· ९ त्वां मर्यादा ला-
विली, त्याने उल्लंघन करूं नये, व पृथ्वीला
बुडवायास फिरून येऊं नये ह्मणून. १० तो
झरे काढून, खोऱ्यांत पाठवितो; ११ ते डोंगरांमधून
वाहवात; रानांतल्या सर्व जिवांस पाणी पुरवि-
तात; रानगर्दभ आपली तहान निवारितात· १२
त्याजवळ आकाशांतलीं पांखरें वस्ति करून डा-
हळ्यामध्यें स्वर काढितात· १३ तो आपल्या
माड्यांवरून डोंगरांस शिंपितो; तुझ्या कामां-
च्या फळांनीं पृथ्वी तृप्त होती· १४ तो पशू-
साठीं गवत, व मनुष्याच्या उपयोगासाठीं हि-
रवळ वाढवितो; यासाठीं कीं त्याने पृथ्वीं-
तून अन्न काढावें; १५ आणि द्राक्षारस जो
मनुष्याच्या हृदयाला संतोषवितो; आणि तेल
जें त्याचें तोंड टवटवीत करितें, आणि भाकर जी
माणसाच्या पोटास आधार देती· १६ परमे-
श्वराचीं झाडें, लबानोनावर जे एरेज वृक्ष त्याने
लाविले, ते तृप्त होतात. १७ त्यांवर तेथलीं
पांखरें कोठीं करितात; कुळसेवी पक्षीण ब-
रोश झाडावर आपलें घर करिती. १८ भेंक-
रांस उंच डोंगरांचा, शाफानांस खडप्यांचा आ-
श्रय आहे. १९ त्याने काळनेमासाठीं चंद्र के-
ला; सूर्य आपलें मावळणें जाणतो. २० तूं
काळोख करितोस, तेव्हां रात्र होती; तींत वनां-
तले सर्व जीव बाहेर निघतात· २१ तरुण सिंह
शिकारीसाठीं गर्जतात, आणि देवाजवळ आपलें
भक्ष्य मागतात. २२ सूर्य उगवत असतां, ते
एकत्र मिळून आपल्या गुहांत निजतात· २३
माणूस निघून, आपल्या कार्यावर व उद्योगावर
सांजपर्यंत राहतो· २४ हे परमेश्वरा, तुझीं
कृत्यें कितीं आहेत! तीं सर्व त्वां चातुर्याने केलीं;
पृथ्वी तुझ्या संपत्तीने भरली आहे· २५ तसाच
हा मोठा व विस्तीर्ण समुद्र; यांत वळवळणारा
समुदाय व असंख्य लहान मोठे जीवजंतु आहेत·
२६ तेथें तारवें चालतात; त्यांत खेळायास तो
लिव्याथान त्वां घडिला आहे. २७ ते सर्व तुज-
कडे लक्ष लावितात, त्वां यथाकाळीं त्यांस भक्ष्य
द्यावें ह्मणून· २८ तूं त्यांस देतोस; ते टिपून
घेतात· तूं आपला हात उघडतोस, ते उत्तमप-
णाने तृप्त होतात· २९ तूं आपलें मुख झांकि-
तोस, ते घाबरे होतात, तूं त्यांचा प्राण काढितोस,
ते मरतात आणि आपल्या मातीस फिरून मिळ-
तात· ३० तूं आपला आत्मा पाठवितोस, ते उत्प-
न्न होतात· असें तूं भूमीची पाठ नवी करितोस·
३१ परमेश्वराचें गौरव सर्वकाळपर्यंत होत जा-
ईल; परमेश्वर आपल्या कृत्यावर संतुष्ट हो-
ईल· ३२ तो पृथ्वीवर दृष्टि लावितो, तेव्हां ती
कांपती; तो डोंगरांस स्पर्श करितो, तेव्हां ते धुम-
तात· ३३ मी आपल्या आयुष्यापर्यंत परमेश्व-
राचें गायन करीन; मी आहें तोंपर्यंत आपल्या
देवाचें कीर्त्तन करीन· ३४ त्याविषयीं माझें
ध्यान आवडतें होईल; मी परमेश्वराविषयीं
संतुष्ट होईन. ३५ पापी पृथ्वींतून संपतील;
दुष्ट नाहींसेच होतील· हे माझ्या जीवा, तूं पर-
मेश्वराची स्तुति कर, तुह्मी परमेश्वराला
स्तवा.

## गीत १०५·

तुह्मी परमेश्वराचे उपकार माना; त्याचें नांव
घ्या; राष्ट्रांमध्यें त्याचीं चरित्रें कळवा; २
त्याच्याजवळ गायन करा; त्याचें कीर्त्तन करा;
त्याच्या सर्व आश्चर्य कृत्यांवर ध्यान करीत
जा; ३ त्याच्या पवित्र नांवाविषयीं उत्सव करा;
जे परमेश्वराला शरण जातात, त्यांचें हृदय
संतुष्ट व्हावें· ४ तुह्मी परमेश्वराला व त्या-
च्या शक्तीला साधायास यत्न करा; नेहमी त्याला
शोधा. ५ जीं आश्चर्य कृत्यें त्याने केलीं, त्याचे
चमत्कार व त्याच्या तोंडचे न्याय, त्यांची आठ-
वण करा· ६ त्याचा सेवक आब्राहाम याच्या
संतानांहो, त्याचा निवडलेला याकोब याच्या सं-
तानांहो, तुह्मी असें करा; ७ तोच परमेश्वर
आमचा देव; त्याचे न्याय सर्व पृथ्वींत आहेत.
८ तो आपला करार, जी गोष्ट हजार पिढ्यांस
आज्ञेने बोलला, ती सर्वकाळ आठवीत आहे·

९ जिच्याविषयीं तो आब्राहामाजवळ करारी झा-
ला; आणि इझाकाजवळ आपली शपथ झाली ती.
१० आणि ती त्याने याकोबाजवळ नेम, इस्राएला-
जवळ सर्वकाळ करार असी स्थापिली; ११
असीं कीं, "मी तुला खनान देश तुझा वतनाचा
वांटा देईन." १२ तेव्हां ते गणतीने थोडे, हलके
व त्यांत प्रवासी होते. १३ आणि ते देशोदेशीं
एका राज्यापासून दुसऱ्या राज्यांत असे फिरत
होते. १४ त्याने कोणापासूनहि त्यांस जांचणूक
होऊं दिल्ही नाहीं; राजांस देखील त्यांसाठीं नि-
षेधिलें; १५ तुह्मी माझ्या अभिषिक्तांस शिवूं
नका; आणि माझ्या भविष्यवाद्यांचें वाईट करूं
नका." १६ तेव्हां त्याने देशावर दुकाळाला बो-
लाविलें, त्याने सर्व अन्नआधार मोडिला. १७
त्याने माणसाला त्यांच्यापुढें पाठविलें; योसेफ
चाकर होण्यास विकला गेला. १८ लोकांनी
त्याचे पाय बेडीने दुखविले; लोखंड त्याच्या जी-
वांत शिरलें. १९ त्याचें बोलणें पूर्ण होईपर्यंत
परमेश्वराच्या वचनाने त्याला पारखलें. २०
राजाने पाठवून त्याला सोडविलें; लोकांच्या अ-
धिकाऱ्याने त्याला मोकळें केलें. २१ त्याने त्याला
आपल्या घराचा धनी आणि आपल्या सर्व संप-
त्तीवर अधिकारी केलें. २२ असें कीं, त्याने आ-
पल्या मनाप्रमाणें त्याच्या कारभाऱ्यांस बंद करावें,
आणि त्याच्या वडिलांस ज्ञान शिकवावें. २३ मग
इस्राएल मिसरांत गेला, याकोब हामाच्या देशांत
प्रवासी झाला. २४ मग त्याने आपला लोक
फार सफळ केला; आणि ते आपल्या वैऱ्यांपेक्षां
प्रबळ झाले. २५ आपल्या लोकांचा द्वेष करा-
यास, आपल्या सेवकांवर धूर्त्तपण करायास त्याने
त्यांचें मन फिरविलें. २६ त्याने आपला सेवक
मोशे व आहरोन जो आपण निवडिला, त्यांस
पाठविलें. २७ यानी त्याच्या खुणांच्या गोष्टी
त्यांमध्यें केल्या, आणि हामाच्या देशांत चमत्कार
केले. २८ त्याने काळोख पाठविला, आणि काळोख-
मय केलें; कां त्यानी त्याच्या गोष्टीचा अनमान केला
नव्हता. २९ त्याने त्यांचें पाणी रक्त केलें; आ-
णि त्यांतले मासे मारिले. ३० त्यांच्या देशाने
त्यांच्या राजाच्या खोल्यांत बेडूक उपजविले. ३१
तो बोलला, मग माश्या व उवा त्यांच्या सर्व
सीमेंत आल्या. ३२ त्याने त्यांच्या देशांत, त्यां-
च्या पावसाबदल गारा व अग्निज्वाळा पाठविल्या.
३३ आणि त्याने त्यांचे द्राक्षवेल व त्यांचे अंजीर
मारिले; आणि त्यांच्या सीमेंतलीं झाडें मोडिलीं.
३४ तो बोलला, मग असंख्य टोळ व धुलीं आ-
लीं. ३५ आणि यानी त्यांच्या देशांतली सर्व
हिरवळ खाल्ली; आणि त्यांच्या भूमीवरलीं फळें
खाऊन टाकिलीं. ३६ मग त्याने त्यांच्या सर्व
सामर्थ्याचें मूळ, देशांतले ज्येष्ठ पुत्र मारिले.
३७ आणि ह्यांस सोन्यारुप्यासुद्धां बाहेर आ-
णिलें; ह्यांच्या वंशामध्यें कोणी दुर्बळ नव्हता. ३८
हे निघाले, तेव्हां मिसरी संतुष्ट झाले; कारण
कीं, यांचें भय त्यांजवर पडलें होतें. ३९ त्याने
आच्छादनासाठीं ढग आणि रात्रीं उजेड कराया-
साठीं अग्नि विस्तारिला. ४० यानी मागितलें,
तेव्हां त्याने लाव्हे पक्षी आणिले; आणि आका-
शाच्या अन्नाने त्यांस तृप्त केलें. ४१ त्याने ख-
डक फोडिला, तेव्हां पाणी वाहतें झालें; तें नदी-
सारिखें कोरड्या भूमीवरून चाललें; ४२ कां
तर त्याने आपलें पवित्र वचन आपला सेवक आ-
ब्राहाम यासीं आठविलें; ४३ असें त्याने आप-
ल्या लोकाला उत्सवयुक्त आपल्या निवडलेल्यांस
हर्षनादयुक्त काढिलें. ४४ आणि ह्यांस राष्ट्रांचे
देश दिल्हे; आणि हे लोकांचे कष्टफळ वतनरूप
पावले; ४५ यासाठीं कीं ह्यानी त्याच्या नेमणुकी
व त्याचीं शास्त्रें संभाळून पाळावीं. तुह्मी पर-
मेश्वराला स्तवा.

## गीत १०६.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; परमेश्वराचे उप-
कार माना; कारण कीं तो उत्तम, आणि त्या-
ची दया सर्वकाळपर्यंत आहे. २ परमेश्वराचीं
चमत्कारिक कृत्यें कोण वर्णील! त्याचें सर्व स्तवन
कोण ऐकवील! ३ जे न्याय पाळितात, ते धन्य; जो
सर्व वेळेस नीति करितो तो धन्य. ४ हे परमेश्व-
रा, तूं आपल्या लोकांच्या आवडीने माझी आठवण
कर; आपल्या तारणाने माझी भेट घे; ५ यासा-
ठीं कीं म्या तुझ्या निवडलेल्यांचें उत्तमपण पाहावें;
तुझ्या राष्ट्रांच्या संतोषाने संतुष्ट व्हावें; तुझ्या
वतनाबरोबर उत्सव करावा. ६ आह्मी आपल्या
पूर्वजांसारिखें पाप केलें, अन्याय केला, दुष्टाई

केली आहे. ७ मिसरांत आमच्या पूर्वजानी
तुझीं आश्चर्याचीं कृत्यें ध्यानांत आणिलीं नव्हतीं;
तुझी मोठी दया आठविली नव्हती, आणि
समुद्राजवळ, सूफ समुद्राच्या कांठीं फितूर
केला. ८ तथापि त्याने आपल्या नावासाठीं,
आपला पराक्रम कळवायासाठीं, त्यांस तारिलें.
९ आणि त्याने सूफ समुद्र निषेधिला, तेव्हां तो
कोरडा झाला, आणि जसें रानांत तसें त्याने समुद्र
डोहांमधून त्यांस चालविलें. १० असें त्याने
द्वेष्याच्या हातांतून त्यांस तारिलें, आणि शत्रूच्या
हातांतून त्यांस खंडून सोडविलें. ११ आणि
पाण्याने त्यांच्या वैऱ्यांस बुडविलें; त्यांतून एकहि
राहिला नाहीं. १२ तेव्हां त्यानी त्याच्या वच-
नांवर विश्वास ठेविला; त्याच्या स्तवनाचें गायन
केलें. १३ परंतु ते त्याचीं कृत्यें लवकरच विस-
रले; त्यानी त्याच्या बोधाची वाट पाहिली नाहीं.
१४ रानांत त्यानी अति हांव धरिली; आणि अर-
ण्यांत देवाची परीक्षा केली. १५ तेव्हां त्याने
त्यांचें मागणें त्यांस दिल्हें, परंतु त्यांच्या आत्म्यांत
रोडपण घातलें. १६ आणि त्यानी तळांत मो-
शाचा व परमेश्वराचा पवित्र आहरोन याचा
हेवा केला. १७ पृथ्वीने फाटून दाथानाला गि-
ळिलें; आणि अबीरामाची टोळी झांकली; १८
आणि त्यांच्या मंडळीमध्यें अग्नि पेटला; ज्वाळाने
दुष्टांस जाळून टाकिलें. १९ त्यानी होरेबाजवळ
गोळ केला, आणि त्यानी ओतींवाचें भजन केलें.
२० असें त्यानी आपलें गौरव बदलून त्याच्या ठि-
काणीं चारा खाणाऱ्या गुराचा आकार केला. २१
ते आपल्या तारणाऱ्या देवाला विसरले; ज्याने
मिसरांत मोठालीं कृत्यें केलीं होतीं त्याला. २२
त्याने हामाच्या देशांत आश्चर्याचीं कृत्यें, सूफ
समुद्रावर भयंकर कृत्यें केलीं होतीं. २३ तेव्हां
त्याने ह्मटलें कीं, "त्यांचा संव्हार करावा;" परंतु
त्याचा संताप नाश करण्यापासून फिरवायास.
त्याचा निवडलेला मोशे, त्याच्यासमोर फुटक्यांत
उभा राहिला. २४ त्यानी तर आवडत्या देशा-
चा उपेक्षा करून, त्याच्या वचनावर विश्वास
ठेविला नाहीं. २५ आणि आपल्या राहोट्यांत
कुरकूर करून, परमेश्वराचा शब्द मानिला ना-
हीं. २६ तेव्हां त्याने आपला हात त्यांवर उच-
लला यासाठीं कीं, त्यांस रानांत पाडावें; त्यांच्या
संतानालाहि राष्ट्रांमध्यें पाडावें, २७ आणि
देशांमध्यें त्यांची दाणादाण करावी. २८ आणि
ते बालपीराकडे जडले गेले, आणि मेलेल्यांचीं
अर्पणें खाल्लीं. २९ आणि आपल्या करण्यानी
त्याला त्रासविलें; यास्तव पटकी फुटून त्यांस ला-
गली. ३० तेव्हां फीनहासाने उठून निवाडा
केला; मग पटकी राहिली. ३१ आणि हें पिढो-
पिढीं सर्वकाळपर्यंत त्यासीं पुण्य असें मोजलें गेलें.
३२ आणि भांडणाच्या पाण्याजवळ त्यानी त्याला
रागें भरविलें; आणि त्यांच्यामुळें मोशाचें वाईट
झालें; ३३ कारण कीं त्याच्या आत्म्याला त्यानी
असें कडवट केलें कीं, तो आपल्या होटानी अवि-
चाराने बोलला. ३४ ज्या लोकांचा नाश करावा
ह्मणून परमेश्वराने त्यांस आज्ञा दिल्ही, त्यांचा
नाश त्यानी केला नाहीं; ३५ परंतु आपण राष्ट्रां-
मध्यें मिसळले जाऊन त्यांचीं कामें शिकले; ३६
त्यानी त्यांच्या मूर्त्तींची सेवा केली; आणि त्या
त्यांसीं फांस झाल्या. ३७ आणि त्यानी आपले
पुत्र व आपल्या कन्या त्यांच्या भूतांस बळिरूपें
अर्पिल्या. ३८ असें त्यानी निर्दोषी रक्त, ह्मणजे
आपले पुत्र व आपल्या कन्या, ज्या त्यानी खना-
नांतल्या मूर्त्तींस बळिरूपें अर्पिल्या, त्यांचें रक्त
ओघळविलें; आणि तो देश रक्तपाताने भ्रष्ट झा-
ला. ३९ या प्रकारें ते आपल्या करण्यानी विटा-
ळले गेले; आणि आपल्या अनाचारानी व्यभिचा-
री झाले. ४० यास्तव परमेश्वराचा राग त्या
च्या लोकांवर पेटला, आणि तो आपल्या वतनावर
कंटाळला. ४१ मग त्याने त्यांस राष्ट्रांच्या हातीं
दिल्हें; आणि त्यांच्या शत्रूनी त्यांजवर अधिकार
केला. ४२ त्यांच्या शत्रूनी त्यांस जाचिलें; आ-
णि ते त्यांच्या हाताखालीं नीच झाले. ४३ बहुत
वेळां त्याने त्यांस सोडविलें, परंतु ते आपल्या
मताने फितले; आणि आपल्या अन्यायामुळें नीच
केले गेले. ४४ तथापि त्याने त्यांचें ओरडणें ऐ-
कून, त्यांच्या संकटावर दृष्टि लाविली. ४५ आ-
णि त्यांच्यासाठीं त्याने आपला करार आठवून,
आपल्या मोठ्या दयेप्रमाणें अनुताप केला; ४६
आणि त्यांच्या सर्व नेणाऱ्यांच्या मनांत त्यांवर
फार ममता आणली. ४७ हे परमेश्वरा, आम-

च्या देवा, आह्मी तुझ्या पवित्र नांवाने उपकार
मानावे, आणि तुझ्या स्तुतीने उत्सव करावा, ह्मणून
तूं आह्मास तार; आणि राष्ट्रांमधून आह्मास एक-
वट कर. ४८ **परमेश्वर** इस्राएलाचा देव सर्वका-
ळापासून सर्वकाळपर्यंत धन्य असो; आणि सर्व लो-
काने आमेन ह्मणावें. तुह्मी **परमेश्वराला** स्तवा.

### गीत १०७.

तुह्मी **परमेश्वराचे** उपकार माना; कारण कीं
तो उत्तम, आणि त्याची दया सर्वकाळपर्यंत
आहे. २ **परमेश्वराचे** खंडून सोडलेले यानी
तसें ह्मणावें; कां तर त्याने त्यांस वैऱ्यांच्या हाता-
तून सोडविलें. ३ आणि देशांमधून, पूर्वेपासून व
पश्चिमेपासून, उत्तरेपासून व दक्षिणेपासून त्यांस ए-
कवट केलें आहे. ४ ते रानांत, अरण्यवाटेने फि-
रत गेले; राहण्याचें नगर त्यांस मिळालें नाहीं.
५ ते भुकेले व तान्हेले असतां त्यांचा जीव त्यांम-
ध्यें हलाक झाला. ६ तेव्हां ते आपल्या संकटांत
**परमेश्वराजवळ** ओरडले, आणि त्याने त्यांस त्यां-
च्या पेंचांतून काढिलें; ७ आणि त्यांस राहण्या-
च्या नगरास जायासाठीं नीट मार्गाने चालविलें.
८ **परमेश्वराची** मनुष्यावरली दया व त्याचीं
आश्चर्य कृत्यें पाहून त्यानी त्याची स्तुति करावी.
९ कां तर तो वांच्छा झालेल्या प्राण्याला तृप्त क-
रितो; आणि भुकेल्या प्राण्याला उत्तम पुरवितो;
१० जे काळोखांत व मरणछायेंत राहतात, जे दुः-
खाने व लोखंडाने बांधलेले, त्यांस पुरवितो. ११
जेव्हां कोणी देवाच्या गोष्टी मोडितांना, परात्परा-
चा बोध धिःकारितात. १२ तेव्हां तो कष्ट देण्याने
त्यांच्या हृदयाचें दमन करितो; ते अटकळतात, आ-
णि कोणी सहाय नाहीं. १३ मग ते आपल्या सं-
कटांत **परमेश्वराजवळ** ओरडले असतां त्याने
त्यांच्या पेंचांतून पार केलें; १४ आणि त्यांस का-
ळोखांतून, व मरणछायेंतून काढिलें; आणि त्यांचीं
बंधनें तोडिलीं. १५ **परमेश्वराची** मनुष्यावरली
दया व त्याचीं आश्चर्य कृत्यें पाहून त्यानी त्याची
स्तुति करावी; १६ कारण कीं त्याने तांब्याचे द-
रवाजे फोडून टाकिले; आणि लोखंडी अडसर मो-
डून टाकिले. १७ मूर्ख आपल्या उल्लंघनामुळें
व आपल्या अन्यायांमुळें आपणास दुःख करून घे-
तात. १८ त्यांचा जीव अवघ्या भक्ष्याला कंटा-
ळतो, आणि ते मरणद्वारांजवळ पोंहचतात. १९
मग ते आपल्या संकटांत **परमेश्वराजवळ** ओर-
डले असतां, तो त्यांस त्यांच्या पेंचांतून पार करि-
तो. २० तो आपला शब्द लागूं करून त्यांस
बरें करितो; आणि त्यांस त्यांच्या नाशापासून नि-
भावितो. २१ **परमेश्वराची** मनुष्यावरली दया
व त्याचीं आश्चर्य कृत्यें पाहून त्यानी त्याची स्तुति
करावी; २२ आणि त्यानी स्तुतीचीं अर्पणें करा-
वीं; आणि त्याच्या कामांचें वर्णन हर्ष शब्दाने क-
रावें. २३ जे उतरून तारवांनी समुद्रावर जा-
तात, मोठ्या पाण्यावर काम करितात, २४ ते स-
मुद्रडोहांत **परमेश्वराचीं** कामें, आणि त्याचीं आ-
श्चर्य कामें पाहतात; २५ कां तर, तो बोलून
वायुवादळ उठवितो; आणि तें त्याच्या लाटा उंचा-
वितें. २६ ते आकाशीं चढतात, अगाधस्थळीं
उतरतात; त्यांचा जीव कष्टाने विघरतो. २७ ते
भ्रमतात, आणि मद्यप्यासारिखे डुलतात; आणि
त्यांचें सर्व ज्ञान बुडून जातें. २८ तेव्हां ते आ-
पल्या संकटांत **परमेश्वराजवळ** ओरडले असतां,
तो त्यांस त्यांच्या पेंचांतून काढितो. २९ तो वा-
दळाला निवांत करितो; आणि त्याच्या लाटा शांत
होतात. ३० मग ते स्वस्थ झाल्यावरून संतोष
पावतात; आणि तो त्यांस त्यांच्या इच्छलेल्या बंद-
रास नेतो. ३१ **परमेश्वराची** मनुष्यावरली दया
व त्याचीं आश्चर्य कृत्यें पाहून त्यानी त्याची स्तुति
करावी. ३२ आणि लोकांच्या मंडळींत त्यानी
त्याला थोर मानावें; आणि वडिलांच्या सभेंत त्याचे
उत्सव करावे. ३३ तो ओहळांस रा[illegible]न, आणि
पाण्याच्या उगमांस शुष्क स्थळ असें [illegible] करितो.
३४ सफळ देशांतल्या राहणाऱ्यांच्या दुष्ट[illegible]पणामुळें,
त्याला ओसाड करितो. ३५ रान पा[illegible]ण्याचें तळें
असें, आणि कोरडा देश पाण्याचे उगम[illegible] असा क-
रितो; ३६ आणि तेथें कंगालांस वस[illegible]विले; म[illegible]
ते राहायासाठीं नगर सिद्ध करितात. [illegible] ३७ [illegible]
शेतें पेरितात, आणि द्राक्षमळे लाव[illegible]; आणि ते
उपजाचीं फळें देतात. ३८ अ[illegible] ये; [illegible] ते [illegible]
ल्याण करितो, आणि ते फार वा[illegible] उत्तम[illegible]; तो त्यांचे
पशूहि थोडे होऊं देत नाहीं. [illegible] ३९ [illegible]
होतात आणि कांचाने, खेदाने [illegible] अ[illegible]
तात. ४० तो श्रीमंतांचा धिाय के[illegible] आणि

त्यांस मार्गरहित ओस ठिकाणीं फिरवितो. ४१
परंतु दुबळ्यास दुःखांतून उंच करितो, आणि त्यां-
चीं कुटुंबें कळपासारिखीं करितो. ४२ जे सरळ
त्यांनी पाहून संतोष करावा; आणि सर्व दुष्टतेनें
आपलें तोंड बंद करावें. ४३ ज्ञानी कोण? आणि
तो यांवर लक्ष लावील; आणि असे जे ते परमे-
श्वराची फार दया समजून घेतील.

## गीत १०८.

दावीदाकडून कीर्त्तनाचें गीत.

हे देवा, माझें चित्त लावलेलें आहे; मी गाईन
आणि आपल्या गौरवानें कीर्त्तन करीन. २ हे
तारपेटी, हे तंतुवाद्या, जागृत हो; मी पाहाटेस जा-
गृत होईन. ३ हे परमेश्वरा, मी मुलखांमध्यें
तुझी स्तुति करीन; आणि राष्ट्रांमध्यें तुझें कीर्त्तन
करीन. ४ कारण कीं तुझी दया आकाशावरतीं
मोठी, आणि तुझी सत्यता अभाळापर्यंत आहे.
५ हे देवा, तूं आकाशावरतीं उंच ऐस; आणि तु-
झें गौरव सर्व पृथ्वीवर होवो. ६ तुझे प्रिय लोक
सोडविले जावे, म्हणून तूं आपल्या उजव्या हातानें
तार आणि मला उत्तर दे. ७ देव आपल्या प-
वित्रतेनें बोलला कीं मी उल्हास करीन; शखेमाची
वांटणी करीन; आणि सुक्कोथ खोऱ्याची मोजणी क-
रीन. ८ गिलाद माझा; मनाश्शे माझा; व एफ्रा-
इम माझा मुख्य शक्तिकारी; यहूदा माझा नियम-
कर्ता आहे. ९ मवाब माझ्या स्नानाचें गंगाळ;
अदोमावर मी आपला जोडा फेंकीन; पलेशेथावर
जयजयकार मिळवीन. १० मला बंदोबस्तीच्या
नगरास कोण नेईल? अदोमापर्यंत मला वाटाडी
कोण होईल? ११ हे देवा, त्वां आम्हास अव्हे-
रिलें नाहींस कीं काय? हे देवा, तूं आपल्या सै-
न्यांबरोबर जाणार नाहींस कीं काय? १२ तूं
संकटांतून सोडून आमचें सहाय कर; कां कीं मनु-
ष्याकडलें तारण व्यर्थ आहे; १३ देवाच्या यो-
गानें आह्मी पराक्रम करूं; तोच आमच्या वैऱ्यांस
तुडवील.

## गीत १०९.

मुख्य वाजंत्र्यास, दावीदानें केलेलें गीत.

हे माझ्या स्तवनाच्या देवा, तूं मुका राहूं नको; २
कारण कीं ते दुष्ट मुख व कपटयुक्त मुख मज-
वर सोडितात; खोट्या जिभेनें मजसीं बोलतात.
३ आणि द्वेषाच्या शब्दांनी ते मला वेढून मजसीं
निष्कारण लढतात. ४ माझ्या प्रीतिबदल ते म-
जसीं वैर करितात; परंतु मी प्रार्थना करितों. ५
तरी ते बऱ्याबदल दुष्टाई, माझ्या प्रीतिबदल द्वेष
मजवर लावितात. ६ त्यावर दुष्ट माणूस ठेवावा;
आणि विरोधी त्याच्या उजवीकडे उभा राहावा.
७ जेव्हां त्याविषयीं न्यायठरविणें होतें, तेव्हां तो
दुष्ट निघावा; आणि त्याची प्रार्थना पापच असावी.
८ त्याचे दिवस थोडे व्हावे; त्याचें पाहण्याचें
काम दुसऱ्यानें घ्यावें. ९ त्याचे पुत्र अनाथ, आ-
णि त्याची स्त्री विधवा व्हावी. १० त्याच्या लें-
करांनी हिंडत हिंडत भीक मागावी आणि आपल्या
ओसाडींतून शोध करावा. ११ जें त्याचें आहे,
तें सर्व ऋणकऱ्यानें घ्यावें; आणि परक्यांनी त्याचें
कष्टफळ लुटावें. १२ त्यावर दया राखणारा को-
णी नसावा; आणि त्याच्या पोरक्यांवर कृपा कर-
णारा कोणी नसावा. १३ त्याचे वंशस्थ छेदिले
जावे; पुढल्या पिढींत त्याचें नांव खोडून टाकलें
जावें. १४ त्याच्या पूर्वजांच्या अन्यायाची आठ-
वण परमेश्वराजवळ असावी; आणि त्याच्या आ-
ईचें पाप खोडलें न जावें. १५ तीं परमेश्व-
राच्या लक्षांत निरंतर असावीं, आणि त्यानें त्यां-
ची आठवण पृथ्वींतून छेदून टाकावी; १६ या-
साठीं कीं दया करावी, असें त्यानें आठविलें नाहीं;
परंतु दुःखित मनुष्य, व दरिद्री, व हृदय फुटलेला
याला जिवें मारायास, तो पाठीस लागला. १७
त्यानें तर शाप देण्याची प्रीति केली, तो त्यावरच
येवो; आणि आशीर्वाद देणें त्याला आवडलें नाहीं,
यास्तव तो त्यापासून दूर असो. १८ ज्यापेक्षां
तो आपल्या वस्त्रासारिखा शाप ल्याला, त्यापेक्षां
हा पाण्यासारिखा त्याच्या पोटांत, आणि तेलासा-
रिखा त्याच्या हाडांत शिरो; १९ त्याला झांक-
णाऱ्या पांघरूणासारिखा असो; मेखलेप्रमाणें अ-
खंड वेष्टलेला असो. २० माझे विरोधी, आणि
जे माझ्या जिवावर वाईट बोलतात, त्यांस परमे-
श्वरापासून हेंच कर्मफळ होवो. २१ तर हे
परमेश्वरा, हे प्रभू, तूं आपल्या नांवामुळें माझें
कार्य कर; मला सोडीव, कां तर तुझी दया उत्तम.
२२ अणखी मी दुःखित व दुबळा, आणि माझें

**हृदय** मजमध्यें घायाळ झालें. २३ **मी** सावली-
सारिखा तिच्या फिरण्याप्रमाणें होऊन जातों; टोळा-
सारिखा उडविला जातों. २४ उपासाने माझे गुडघे
कचकतात; आणि माझें अंग पुष्टताहीन झालें. २५
**असा** मी त्यांसीं धिक्कारपात्र झालों; ते मला पाहून
आपलें मस्तक डोलवितात. २६ **हे परमेश्वरा**
माझ्या **देवा**, तूं माझा सहाय हो; आपल्या दये-
प्रमाणें मला तार. २७ **हे परमेश्वरा**, त्यांस
कळीव कीं, हें तुझ्या हाताचें; हें त्वां केलें आहे.
२८ **ते** शाप देवोत, परंतु तूं आशीर्वाद दे; ते उ-
ठून लाजोत; परंतु तुझा सेवक संतुष्ट असो. २९
**माझे** विरोधी लाज लेवोत; आपलें तुच्छपण वस्त्रा-
सारिखें पांघरोत. ३० **मी** आपल्या तोंडाने **पर-
मेश्वराची** स्तुति फार करीन; आणि बहुतांच्या-
मध्यें त्याचा उत्सव करीन; ३१ **कां** कीं तो दुब-
ळ्याला त्याच्या जिवें दंडणाऱ्यांपासून तारायास,
त्याच्या उजवीकडे उभा राहतो.

## गीत ११०.

दावीदाकडून कीर्त्तन.

**परमेश्वराने** माझ्या **प्रभूला** ह्मटलें कीं, 'मी
तुझे शत्रू तुझ्या पायांचें आसन करीन, तोंपर्यंत
तूं माझ्या उजवीकडे बैस.' २ **परमेश्वर** सीयो-
नांतून तुझी सामर्थ्याची काठी चालवील; तूं आपल्या
शत्रूंमध्यें धनीपण कर. ३ **तुझ्या** पराक्रमाच्या दि-
वसीं, तुझे लोक, पवित्रतेच्या शोभेने खुशी होती-
ल, पाहटेच्या उदरांतून तुला आपल्या तरुणपणाचें
दहिंवर आहे. ४ **परमेश्वराने** शपथ वाहिली,
आणि तो पश्चात्ताप करणार नाहीं, असी कीं, 'तूं
**मलखीजेदेकाच्या** नेमाप्रमाणें सर्वकाळपर्यंत याजक
आहेस.' ५ **प्रभु** आपल्या रागाच्या दिवसीं, तु-
झ्या उजव्या हातीं राजांस फोडील. ६ **तो** रा-
ष्ट्रांमध्यें निवाडा करील; प्रेतानी भरील; बहुत दे-
शावरल्याचें मस्तक फोडील. ७ **वाटेने** ओहो-
ळांतलें पिईल; यास्तव मस्तक उंच करील.

## गीत १११.

**तुह्मी परमेश्वराला** स्तवा; मी पूर्ण अंतःकर-
णाने सरळांची सभा व समुदाय यांमध्यें **परमे-
श्वराची** स्तुति करीन. २ **परमेश्वराचीं** कृत्यें
मोठीं; त्यांवर ज्यांची आवड आहे, त्या सर्वांकडून
तीं शोधलेलीं आहेत. ३ **त्याचें** काम मानाचें व
वैभवाचें आणि त्याची नीति सर्वकाळपर्यंत टिकती.
४ **त्याने** आपल्या आश्चर्य कृत्यांविषयीं सूचना के-
ली आहे; **परमेश्वर** कृपाळू व ममताळू आहे.
५ **तो** आपल्या भिणाऱ्यांस भक्ष्य देतो; तो आपला
करार सर्वकाळ आठवील. ६ **तो** आपल्या लो-
काला राष्ट्रांचें वतन देऊन, आपल्या कामांचें सा-
मर्थ्य दाखवितो. ७ **त्याच्या** हातांचीं कृत्यें सत्य-
तेचीं व न्यायाचीं; त्याच्या सर्व नेमणुकी विश्वासा-
च्या; ८ **सदासर्वकाळ** स्थिरावलेल्या, सत्य-
तेने व सरळपणाने केलेल्या आहेत. ९ **त्याने**
आपल्या लोकांकडे तारण पाठविलें, आपला करार
सर्वकाळासाठीं आज्ञेने केला; त्याचें नाव पवित्र व
भययोग्य आहे. १० **परमेश्वराचें** भय ज्ञा-
नाचा प्रारंभ आहे. त्याप्रमाणें जे करितात, त्यां-
स चांगला तर्क होतो. त्याची स्तुति सर्वकाळपर्यंत
स्थिर राहती.

## गीत ११२.

**तुह्मी परमेश्वराला** स्तवा. जो **परमेश्वरा-
ला** भितो, तो माणूस धन्य; त्याला त्याच्या
आज्ञा फार आवडतात. २ **त्याचें** संतान पृथ्वींत
पराक्रमी होईल, सरळांचा वंश आशीर्वाद पावेल.
३ **त्याच्या** घरांत वस्तभाव व संपत्ति आहे; आ-
णि त्याचें पुण्य सर्वकाळ टिकतें. ४ **जो** सरळ,
त्यांसाठीं काळोखांत प्रकाशाचा उदय होता; तो
कृपाळू व दयाळू व नीतिमान आहे. ५ **चांगला**
माणूस कृपा करितो आणि उसणें देतो; तो न्याय-
सभेंत आपला वाद निभावितो. ६ **यास्तव** त्या-
ची डळमळ कधींहि होणार नाहीं; नीतिमान सर्व-
काळ आठविण्याजोगा होईल. ७ **तो** वाईट बा-
तमीला भिणार नाहीं; **परमेश्वरावर** भरवसा ठे-
वल्याने, त्याचें हृदय स्थिर आहे. ८ **त्याचें** हृदय
आश्रय पावलें असतां, तो आपल्या वैऱ्यांवर दृष्टि
लावील, तोंपर्यंत तो भिणार नाहीं. ९ **तो** विखर-
तो आणि दरिद्र्यांस देतो; त्याचें पुण्य सर्वकाळ
टिकतें; त्याचें शिंग गौरवाने उंच होईल. १०
दुष्ट पाहून त्रास पावेल; आपले दांत खाईल, आ-
णि विरून जाईल. दुष्टांची आस नाश पावेल.

## गीत ११३.

तुह्मी परमेश्वराला स्तवा. अहो परमेश्वराचे
सेवक हो, तुह्मी स्तुति करा, परमेश्वराच्या
नांवाची स्तुति करा. २ आतांपासून सर्वकाळप-
र्यंत परमेश्वराचें नांव धन्यधन्य ह्मटलें जावो.
३ सूर्याच्या उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत
परमेश्वराच्या नांवाची स्तुति असो. ४ सर्व
राष्ट्रांवर परमेश्वर उंच आहे; त्याचें गौरव आ-
काशांत आहे. ५ परमेश्वर आमचा देव या-
सारिखा कोण? तो स्थितीनें उंच असतो; ६ आ-
णि आकाशांत व पृथ्वींत पाहण्यानें खालीं आहे;
७ दरिद्र्याला धुळींतून उठवितो; दुबळ्याला खत-
राशींतून असें उंच करितो, ८ कीं अधिकाऱ्यां-
च्यासंगतीं, आपल्या लोकांच्या अधिकाऱ्यांसंगतीं
बसवितो. ९ वांझ घरीं बसवून, लेंकरांची सं-
तुष्ट आई असी करितो. तुह्मी परमेश्वराची
स्तुति करा.

## गीत ११४.

जेव्हां इस्राएल मिसरांतून, याकोबाचें घराणें
अन्यभाषेच्या लोकांपासून निघालें, २ तेव्हां
यहूदा त्याचा पवित्र, इस्राएल त्याचा अधिकार
असा होता. ३ समुद्र पाहून पळाला; यार्देन
नदी माघारें फिरली. ४ डोंगर मेंढ्यांसारिखे, टें-
कड्या कळपांतल्या कोंकरांसारिख्या उडल्या झाल्या.
५ हे समुद्रा, तुला काय झालें, ह्मणून तूं पळा-
लास? हे यार्देने, तुला काय झालें, ह्मणून तूं मा-
घारें फिरलीस? ६ अहो डोंगर, तुह्मी मेंढ्यांसा-
रिखे कां उडते झालां? टेंकड्याहो, तुह्मी कळपांत-
ल्या कोंकरांसारिख्या कां उडल्या झालां? ७ हे
पृथ्वी, तूं प्रभूसमोर, ह्मणजे याकोबाच्या देवास-
मोर कंपायमान हो. ८ त्यानें खडक पाण्याचें
तळें, कठीण पाषाण त्याचा पाणीमय उगम असा
पालटिला.

## गीत ११५.

हे परमेश्वरा, आह्मास नको, आह्मास नको;
परंतु तूं आपल्या नांवाला, आपल्या दयेवरून,
आपल्या सत्यतेवरून, गौरव दे. २ राष्ट्रांनी कां
ह्मणावें? कीं 'त्यांचा देव आतां कोठें आहे!' ३
तर आमचा देव आकाशांत; त्याला जें आवडलें,
तें सर्व त्यानें केलें आहे. ४ त्यांच्या मूर्त्ती रु-
प्याच्या व सोन्याच्या; मनुष्याच्या हातांचें काम
अशा आहेत. ५ त्यांस तोंडें आहेत, तरीं त्या
बोलत नाहींत. त्यांस डोळे आहेत, तरीं त्या पा-
हत नाहींत. ६ त्यांस कान आहेत तरीं त्या ऐ-
कत नाहींत; अणखी त्यांस नाकें आहेत, तरीं त्या
हुंगत नाहींत. ७ त्यांस हात आहेत, तरीं त्या चा-
पसत नाहींत. त्यांस पाय आहेत, तरीं त्या चा-
लत नाहींत; आपल्या गळ्यांतून उच्चार काढीत
नाहींत; ८ त्यांचे घडणारे, त्यांची आशा धरणारे
सर्व त्यांच्यासारिखे आहेत. ९ हे इस्राएला, तूं
परमेश्वरावर आशा ठेव; तोच त्यांचा सहाय व
ढाल. १० आहरोनाचे घराण्याहो, तुह्मी परमे-
श्वरावर आशा ठेवा; तोच त्यांचा सहाय व ढाल.
११ अहो परमेश्वराचे भिणारे, तुह्मी परमेश्व-
रावर आशा ठेवा; तोच त्यांचा सहाय व ढाल.
१२ परमेश्वरानें आमची आठवण केली आहे;
तो आशीर्वाद देईल; इस्राएलाच्या घराण्याला आ-
शीर्वाद देईल. आहरोनाच्या घराण्याला आशी-
र्वाद देईल. १३ परमेश्वर आपल्या भिणाऱ्या
आबालवृद्धांस आशीर्वाद देईल. १४ परमे-
श्वर तुह्मास, व तुमच्या लेंकरांस वाढवी-
ल. १५ आकाश व पृथ्वी, यांच्या उत्पन्न कर-
णाऱ्या परमेश्वराकडून तुह्मी आशीर्वाद पावलेले
आहां. १६ आकाशांवरलीं आकाशें परमेश्व-
राचीं आहेत; आणि त्यानें पृथ्वी आदामाच्या सं-
तानांस दिल्ही आहे. १७ मेलेलीं नाहींत, ह्मणजे
शांतस्थळीं उतरलेलीं हीं सर्व परमेश्वराला स्त-
वीत नाहींत. १८ परंतु आह्मी आतांपासून सर्व-
काळपर्यंत परमेश्वराची स्तुति करूं. तुह्मी पर-
मेश्वराला स्तवा.

## गीत ११६.

परमेश्वर माझ्या काकुळतींचा शब्द ऐकतो, या-
स्तव मी त्यावर प्रीति करितों. २ त्यानें आ-
पला कान मजकडे लाविला, यास्तव मी आपल्या
आयुष्यभर हाक मारीन. ३ मरणाच्या वेदनांनी
मला वेष्टिलें; लोकांतराच्या बंधनांत मी सांपडलों;

मला संकट व खेद प्राप्त झाला. ४ यास्तव म्या
**परमेश्वराचें** नांव घेतां प्रार्थना केली कीं, 'हे **प-
रमेश्वरा**, तूं कृपेनें माझ्या जिवाचा निभाव कर.
५ **परमेश्वर** कृपाळू व नीतिमान आणि आमचा
**देव** ममताळू आहे. ६ **परमेश्वर** भोळ्यांचें
संरक्षण करितो; मी दुबळा होतों, परंतु त्यानें म-
ला तारिलें. ७ हे माझ्या जिवा, तूं आपल्या वि-
सांव्याकडे फीर; कारण कीं **परमेश्वरानें** तुजवर
उदारपण केलें आहे. ८ कां तर त्वां माझ्या जि-
वाला मरणापासून, माझ्या डोळ्यांस अश्रुपातापासून,
माझ्या पायाला ठेंच लागण्यापासून वांचविलें आहे.
९ मी जिवंतांच्या देशांमध्यें **परमेश्वराच्या** स-
मोर चालेन. १० मी विश्वासलों, यास्तव बो-
ललों; मी फार दुःखित झालों. ११ म्या आपल्या
घाईनें ह्मटलें कीं, सर्व माणसें लबाड. १२ मी
आपल्यावरले **परमेश्वराचे** सर्व उपकार त्याज-
वळ कसे फेडूं! १३ तारणाची वाटी घेऊन, **प-
रमेश्वराच्या** नांवानें हाक मारिन. १४ मी आ-
पले नवस **परमेश्वरा**जवळ, तर त्याच्या सर्व
लोकांदेखतां फेडीन. १५ **परमेश्वराच्या** दिस-
ण्यांत त्याच्या भक्तांचें मरण मोलाचें आहे. १६
हे **परमेश्वरा**, मी प्रसन्नता मागतों कारण कीं मी
तुझा सेवक, मी तुझा सेवक, तुझ्या दासीचा
पुत्र; त्वां माझीं बंधनें मोकळीं केलीं आहेत; १७
तुला स्तुतीचें अर्पण अर्पीन; आणि मी **परमेश्व-
राच्या** नांवानें हाक मारिन. १८ मी आपले न-
वस **परमेश्वरा**जवळ, त्याच्या सर्व लोकांदेखतां
फेडीन; १९ हे यरूशालेमा, तुझ्यामध्यें, **परमे-
श्वराच्या** घरवाड्यांत फेडीन. तुह्मी **परमेश्व-
राला** स्तवा.

## गीत ११७.

अहो सर्व राष्ट्रें, तुह्मी **परमेश्वराला** स्तवा.
सर्व लोकांहो, तुह्मी त्याची स्तुति करा. २
कारण कीं त्याची दया आह्मावर भारी आहे;
आणि **परमेश्वराची** सत्यता सर्वकाळपर्यंत आहे.
तुह्मी **परमेश्वराला** स्तवा.

## गीत ११८.

तुह्मी **परमेश्वराची** स्तुति करा; कारण कीं
तो चांगला आणि त्याची दया सर्वकाळ आ-
हे. २ इस्राएलानें ह्मणावें कीं, 'त्याची दया स-
र्वकाळ आहे.' ३ आहरोनाच्या घराण्यानें ह्मणावें
कीं, 'त्याची दया सर्वकाळ आहे.' ४ **परमेश्व-
राच्या** भिणाऱ्यांनीं ह्मणावें कीं, 'त्याची दया सर्व-
काळ आहे.' ५ म्या दुःखबंदांतून **परमेश्वराला**
हाक मारिली; **परमेश्वरानें** सुटका करितांना
मला उत्तर दिल्हें. ६ **परमेश्वर** मजकडे आहे;
मी भिणार नाहीं; माणूस माझें काय करील!
७ **परमेश्वर** मजकडे, माझ्या सहायकाऱ्यांच्यासं-
गतीं आहे; यास्तव मी आपल्या द्वेष्यांवर आ-
पली दृष्टि लावीन. ८ मनुष्यावर भरंवसा ठे-
वण्यापेक्षां, **परमेश्वरावर** आशा ठेवणें बरें आहे.
९ अधिकाऱ्यांवर भरंवसा ठेवण्यापेक्षां, **परमेश्व-
रावर** आशा ठेवणें बरें आहे. १० सर्व राष्ट्रांनीं
मला वेढिलें; तरी म्या **परमेश्वराच्या** नांवानें
त्यांस छेदिलें. ११ त्यांनीं मला वेढिलें, होय
मला वेढिलें; तथापि म्या **परमेश्वराच्या** नांवानें
त्यांस छेदिलें; १२ तीं मधमाश्यांसारिखीं मा-
झ्या चहुंकडे आलीं; आणि कांट्यांच्या अग्निसा-
रिखीं विझालीं; कारण कीं म्या **परमेश्वराच्या**
नांवानें तीं छेदिलीं. १३ त्वां मला पाडायास
धक्क्यावर धक्का दिल्हा; परंतु **परमेश्वर** मला
सहाय झाला. १४ जो **परमेश्वर** तो माझें
बळ व कीर्त्तन; आणि माझें तारण असा झाला
आहे. १५ हर्षाचा व तारणाचा शब्द नीति-
मानांच्या राहोट्यांत आहे; **परमेश्वराचा** उजवा
हात पराक्रम करितो. १६ **परमेश्वराचा** उजवा
हात उंच आहे; **परमेश्वराचा** उजवा हात परा-
क्रम करितो. १७ मी मरणार नाहीं, परंतु जगून,
**परमेश्वराच्या** कृत्यांचें वर्णन करीन. १८ **पर-
मेश्वरानें** मला फार शिक्षा केली; परंतु मला
मरूं दिल्हें नाहीं. १९ तुह्मी मजसाठीं पवित्र
दरवाजे उघडा; मी त्यांतून आंत जाऊन **परमे-
श्वराची** स्तुति करीन. २० हा **परमेश्वरा-
चा** दरवाजा; यांतून नीतिमान आंत जातात. २१
मी तुझी स्तुति करीन; कां तर त्वां मला उत्तर
दिल्हें; आणि तूं माझें तारण असा झाला
आहेस. २२ जो धोंडा बांधणाऱ्यांनीं अव्हे-
रिला, तो कोंपऱ्याच्या मुख्यस्थानचा झाला. २३
हें **परमेश्वराकडून** झालें, तें आमच्या दृष्टींत

आश्चर्य आहे. २४ जो दिवस परमेश्वराने
केला तो हाच; ह्यांत आह्मी हर्ष व संतोष
करूं. २५ हे परमेश्वरा, आह्माला तार; हे
परमेश्वरा, मी मागतों, अगत्य कल्याण कर. २६
जो परमेश्वराच्या नांवाने येतो, तो धन्य. आ-
ह्मी परमेश्वराच्या घरांतून तुह्मास आशीर्वाद
दिल्हा आहे. २७ परमेश्वर देव आहे; आणि
त्याने आह्मावर प्रकाश केला आहे; तुह्मी स-
णाचा यज्ञपशु वेदीच्या शिंगासीं दोऱ्यानी बांधा.
२८ तूं माझा देव, आणि मी तुझी स्तुति करीन;
हे माझ्या देवा, तुला उंच मानीन. २९ तुह्मी
परमेश्वराची स्तुति करा; कारण कीं तो चां-
गला, आणि त्याची दया सर्वकाळ आहे.

## गीत ११९.

जे चालीने पूर्ण, जे परमेश्वराच्या शास्त्राप्रमा-
णें चालतात, ते धन्य. २ जे त्याचे नेम
पाळीत असतां, सर्व ह्रदयाने त्याला शरण जातात,
ते धन्य. ३ निश्चयें ते अनुचित न करितां, त्या-
च्या मार्गानी चालतात. ४ त्वां आपल्या नेमणू-
कींचा फार संभाळ करायाची आज्ञा दिल्ही आहे.
५ तुझ्याकडले नेम संभाळायासाठीं माझ्या चाली
स्थापल्या तर किती बरें! ६ जेव्हां मी आपलें
लक्ष तुझ्या सर्व आज्ञांवर लावीन, तेव्हां लाजणार
नाहीं. ७ तुझ्या नीतीचे न्याय शिकल्यावर मी
सरळ ह्रदयाने तुझी स्तुति करीन. ८ मी तुझे
नेम पाळीन, तूं मला अगदी सोडूं नको.

९ नव्या तरुणाने आपला मार्ग कशाने निर्मळ
राखावा? तर तुझ्या वाक्याप्रमाणें संभाळ-
ण्याने. १० मी आपल्या संपूर्ण ह्रदयाने तुला
शरण आलों; तूं आपल्या आज्ञांपासून मला ब-
हकूं देऊं नको. ११ मजपासून तुझ्याजवळ पाप
न व्हावें, ह्मणून म्या आपल्या ह्रदयांत तुझी
गोष्ट सांठवून ठेविली आहे. १२ हे परमेश्वरा,
तूं धन्य; तूं आपले नेम मला शिकीव. १३
म्या आपल्या होटानी तुझ्या तोंडचे सर्व न्याय
सविस्तर सांगितले आहेत. १४ जसा सर्व संप-
त्तीने, तसा तुझ्या नेमांच्या आचरणाने मी हर्ष
पावलों. १५ तुझ्या नेमणूकींवर ध्यान लावीन;
आणि तुझ्या रीतींवर लक्ष लावीन. १६ तुझ्या
नेमांवरून मी उल्हास करीन; तुझी गोष्ट विस-
रणार नाहीं.

१७ तूं आपल्या सेवकावर उपकार कर; ह्म-
णजे मी जगून तुझी गोष्ट पाळीन. १८ माझे
डोळे उघड, मग मी तुझ्या शास्त्रांतलीं आश्चर्यें
पाहीन. १९ मी पृथ्वींत प्रवासी; तूं आपल्या
आज्ञा मजपासून गुप्त राखूं नको. २० सर्व वेळेस
माझा जीव तुझ्या न्यायांविषयीं फार इच्छेने भं-
गला जातो. २१ अभिमानी, शापग्रस्त, जे तुझ्या
आज्ञांपासून बहकतात, त्यांस त्वां निषेधिलें आहे.
२२ धिक्कार व तुच्छपण मजपासून दूर कर;
कारण कीं म्या तुझे नेम पाळिले आहेत. २३
अधिकाऱ्यानी देखील बसून मजवर वटवट केली
आहे; परंतु तुझा चाकर तुझ्या नेमाकडे ध्यान
लावितो; २४ आणखी तुझे नेम मला उल्हास-
कारक, माझीं बोधक माणसें असे आहेत.

२५ माझा जीव मातीस लगटला आहे; तूं
आपल्या वचनाप्रमाणें मला सजीव कर. २६
म्या आपल्या चाली सविस्तर सांगितल्या, आणि
त्वां मला उत्तर दिल्हें; तूं आपले नेम मला शि-
कीव. २७ तूं आपल्या नेमणुकींचा मार्ग मला
समजीव; मग मी तुझ्या आश्चर्यकृत्याकडे ध्यान
लावीन. २८ खेदामुळें माझा जीव गळाला; तूं
आपल्या वचनाप्रमाणें मला स्थिर कर. २९ खो-
टी चाल मजपासून दूर कर; आणि आपल्या
शास्त्रांतली कृपा मजवर कर. ३० म्या सत्यते-
चा मार्ग निवडिला; मी तुझ्या न्यायांस अनुसर-
लों आहें. ३१ हे परमेश्वरा, मी तुझ्या नेमांस
लगटून राहिलों; मला लाज नसावी. ३२ जर
तूं माझें मन मोकळें करसील, तर मी तुझ्या आ-
ज्ञांच्या मार्गाने धांवत चालेन.

३३ हे परमेश्वरा, तूं आपल्या नेमांच्या मा-
र्गांत मला लाव, ह्मणजे मी शेवटपर्यंत तो धरीन.
३४ तूं आपलें शास्त्र मला समजीव, ह्मणजे मी
संभाळीन; आणि संपूर्ण ह्रदयाने तें पाळीन. ३५
तूं आपल्या आज्ञांच्या वाटेने मला चालीव; का-
रण कीं तिजवर माझी आवड आहे. ३६ तूं

आपल्या नेमांकडे माझें मन वळीव; परंतु लोभा-
कडे नको. ३७ जें व्यर्थ त्याकडे पाहण्यापासून
माझे डोळे फिरीव; आपल्या मार्गांत मला सजीव
कर. ३८ आपल्या सेवकाजवळ आपलें वचन
खचीत कर; तो तुझें भय धरीत आहे. ३९
मी आपल्या ज्या धिक्काराला भितों, तो तूं दूर कर;
कारण कीं तुझे न्याय उत्तम आहेत. ४० पाहा,
म्यां तुझ्या नेमणुकींची फार इच्छा धरिली आहे;
तूं आपल्या नीतीनें मला सजीव कर.

४१ हे परमेश्वरा, तुझ्या वचनाप्रमाणें तुझी
बहुत दया, आणि तुझें तारण मला प्राप्त व्हावें;
४२ म्हणजे मी आपल्या धिक्कारणाऱ्याला कांहीं
उत्तर करीन; कां तर तुझ्या वचनावर म्यां भरंवसा
ठेविला आहे. ४३ तर तूं सत्यतेचें वचन मा-
झ्या तोंडापासून अगदी दूर करूं नको; कारण
कीं तुझ्या न्यायांच्या आशेवर मी राहिलों आहें.
४४ आणि तुझ्या शास्त्राचें पाळन मी अखंड
सदासर्वकाळ करीन. ४५ आणि मी मोकळे-
पणानें चालेन; कारण कीं म्यां तुझ्या नेमणुकींकडे
लक्ष दिल्हें आहे. ४६ आणि मी राजापुढें
तुझ्या नेमाविषयीं बोलेन, लाजणारच नाहीं. ४७
तुझ्या आज्ञांविषयीं उल्हासहि करीन; कां, त्यांवर
म्यां प्रीति ठेविली आहे. ४८ आणि मी आपले
हात तुझ्या आज्ञांविषयीं उभारीन; कां, त्यांवर
म्यां प्रीति ठेविली आहे; आणि तुझ्या नेमांकडे
ध्यान लाविलें आहे.

४९ त्वां ज्या वचनावर माझी आशा ठेवविली,
त्याची आठवण तूं आपल्या सेवकाविषयीं कर.
५० ते माझ्या दुःखांत माझें समाधान; कारण कीं
तुझ्या वचनानें मला सजीव केलें आहे. ५१
अभिमान्यांनीं मला फारच तुच्छ केलें; परंतु मी
तुझ्या शास्त्रापासून वळलों नाहीं. ५२ हे पर-
मेश्वरा, मी तुझे पूर्वींचे न्याय आठवून, समाधान
पावलों. ५३ जे दुष्ट तुझें शास्त्र सोडितात,
त्यांमुळें बळजळाटानें मला व्यापिलें आहे. ५४
माझ्या प्रवासाच्या वस्तींत, तुझे नेम मला कीर्त्तन
असें झाले आहेत. ५५ हे परमेश्वरा, मी रात्रीं
तुझ्या नांवाचें स्मरण करितों, आणि तुझें शास्त्र
पाळितों. ५६ तुझ्या नेमणुकी संभाळल्यावरून
हें मला प्राप्त झालें.

५७ हे परमेश्वरा, तूं माझा विभाग; तुझीं
वचनें पाळायास म्यां निश्चय केला आहे. ५८
म्यां संपूर्ण हृदयानें तुझी विनंती केली आहे; तूं
आपल्या वचनाप्रमाणें मजवर कृपा कर. ५९ म्यां
आपल्या चालींविषयीं विचार केला, आणि आप-
लीं पावलें तुझ्या नेमांकडे फिरविलीं आहेत. ६०
तुझ्या आज्ञा पाळायास म्यां त्वरा केली; आणि
उशीर केला नाहीं. ६१ दुष्टांच्या बंधनांनीं मला
अंवळिलें परंतु मी तुझें शास्त्र विसरलों नाहीं.
६२ तुझ्या नीतियुक्त न्यायांमुळें, तुझी स्तुति करा-
यास मी मध्यरात्रीं उठतों. ६३ जे तुला भितात,
आणि तुझ्या नेमणुकी पाळितात, त्या सर्वांचा मी
सखा झालों. ६४ हे परमेश्वरा, तुझ्या उपका-
रानें पृथ्वी भरली; तूं आपले नेम मला शिकीव.

६५ हे परमेश्वरा, त्वां आपल्या वचनाप्रमाणें
आपल्या सेवकाचें बरें केलें आहे. ६६ तूं मला
उत्तम तर्क व ज्ञान शिकीव; कां तर तुझ्या आज्ञां-
वर म्यां विश्वास ठेविला आहे. ६७ दुःखित झाल्या-
पूर्वीं मी वावगा चाललों; परंतु आतां तुझें वचन
पाळितों. ६८ तूं चांगला आहेस, आणि चांगलें
करितोस; आपले नेम मला शिकीव. ६९ ग-
र्विष्ठांनीं युक्तिकरून मजवर खोटेपण आणिलें
आहे; परंतु मी संपूर्ण हृदयानें तुझ्या नेमणुकी
पाळितों. ७० त्यांचें हृदय मांद्यासारिखें पुष्ट
झालें; परंतु मी तुझ्या शास्त्रानें उल्हास पावतों.
७१ मी दुःखित झालों, यावरून माझें बरें झालें;
यासाठीं कीं म्यां तुझे नेम शिकावे. ७२ सोनें
व रुपें यांच्या हजारोंपेक्षां, तुझ्या तोंडचें शास्त्र
मला बरें आहे.

७३ तुझ्या हातांनीं मला घडिलें, आणि रचलें
आहे; तूं मला असा समज दे कीं म्यां तुझ्या
आज्ञा शिकाव्या. ७४ जे तुला भितात, ते मला
पाहून संतोष पावतील; कारण कीं मी तुझ्या वच-
नाच्या आशेवर राहिलों आहें. ७५ हे परमे-
श्वरा, मला कळलें कीं तुझे न्याय नीतीचे आ-
हेत; आणि त्वां विश्वासूकपणानें, मला दुःख दि-

ल्हें. ७६ तुझ्या सेवकाजवळच्या तुझ्या वचनाप्र-
माणें, तुझी दया त्याचें शांतवन होण्यासाठीं अगत्य
होवो; ७७ तुझी ममता मजवर यावी, ह्मणजे मी
जगेन. कारण कीं तुझें शास्त्र मला उल्हासकारक
आहे. ७८ अभिमानी लाजावे; कां तर ते उगेच
मजसीं प्रतिकूळ झाले; परंतु मी तुझ्या नेमणुकीं-
कडे ध्यान लावीन. ७९ जे तुला भितात, आणि
तुझे नेम जाणतात, त्यांनी मजकडे परत यावें. ८०
म्या न लाजावें ह्मणून माझें हृदय तुझ्या नेमांवि-
षयीं यथास्थित व्हावें.

८१ तुझ्या तारणासाठीं माझा जीव क्षीण हो-
तो; मी तुझ्या वचनाच्या आशेवर राहिलों आहें;
८२ तूं माझें शांतवन केव्हां करसील? असें ह्मण-
तांना तुझ्या वचनाविषयीं माझे डोळे क्षीण हो-
तात. ८३ कां कीं मी धुरांतल्या बुधल्यासारिखा
झालों, तरी तुझे नेम विसरलों नाहीं. ८४ तुझ्या
सेवकाचे दिवस किती आहेत! माझ्या पाठीं ला-
गणाऱ्यांचा न्याय तूं केव्हां करसील? ८५ अ-
भिमान्यांनी मजसाठीं खांचा खाणिल्या; हें तुझ्या
शास्त्राप्रमाणें नाहीं. ८६ तुझ्या सर्व आज्ञा
सत्यता आहेत; ते उगेच माझ्या पाठीं लागले आ-
हेत; तूं माझें सहाय कर; ८७ त्यांनी थोडक्यांत
पृथ्वीवर माझी समाप्ति केली होती; तथापि म्या
तुझ्या नेमणूकी सोडिल्या नाहींत. ८८ तूं आप-
ल्या दयेप्रमाणें मला सजीव कर; ह्मणजे मी
तुझ्या तोंडचा नेम पाळीन.

८९ हे परमेश्वरा, तुझें वचन सर्वकाळासाठीं
आकाशांत स्थिर केलेलें आहे. ९० तुझी सत्यता
पिढोपिढी आहे; त्वां पृथ्वी स्थापली, आणि ती
स्थिर राहती. ९१ तुझ्या ठरविण्यांप्रमाणें, अ-
वघीं आजपर्यंत टिकून राहतात; कारण कीं तीं
तुझे सेवक आहेत. ९२ जर तुझें शास्त्र मला
उल्हासकारक नसतें, तर मी आपल्या दुःखाने
नाश पावलों असतों. ९३ मी तुझ्या नेमणुकी
कधींहि विसरणार नाहीं; कां तर त्यांकडून त्वां
मला सजीव केलें आहे. ९४ मी तुझा आहें;
मला तार; कारण कीं म्या तुझ्या नेमणूकीकडे
लक्ष लाविलें आहे. ९५ दुष्ट माझा नाश करा-
यास माझी वाट पाहतात; परंतु मी तुझ्या नेमांचें
ध्यान करितों. ९६ म्या सर्व पूर्णतेचें शेवट पा-
हिलें आहे; तुझी आज्ञा फार व्यापक आहे.

९७ मला तुझ्या शास्त्राची किती आवड आ-
हे; सर्व दिवस तें माझ्या मननाचें आहे; ९८
त्वां आपल्या आज्ञांयोगें मला शत्रूंपेक्षां ज्ञानी केलें
आहे; कारण कीं तें सर्वकाळ मजपासीं आहे.
९९ मी आपल्या सर्व शिकविणाऱ्यांपेक्षां शाहाणा
झालों; कारण कीं तुझे नेम माझ्या मननाचे आ-
हेत. १०० मी वडिलांपेक्षां अधिक समजतों;
कां तर म्या तुझ्या नेमणुकी पाळिल्या आहेत.
१०१ म्या तुझी गोष्ट पाळावी, ह्मणून आपले
पाय सर्व वाईट मार्गांपासून अटोपून धरिले आ-
हेत. १०२ मी तुझ्या न्यायांपासून फिरलों
नाहीं; कारण कीं त्वां मला शिकविलें आहे.
१०३ तुझीं वचनें माझ्या रसनेला किती गोड?
तीं माझ्या तोंडीं मधेपेक्षां गोड आहेत. १०४
मी तुझ्या नेमणुकींविषयीं विवेकी झालों, यास्तव
सर्व खोट्या मार्गांचा द्वेष करितों.

१०५ तुझें वचन माझ्या पायांस दीप, व मा-
झ्या वाटेस प्रकाश असें आहे. १०६ म्या
तुझ्या नीतीचे न्याय पाळावे, ह्मणून शपथ वा-
हिली आहे, आणि मी ती खरी करीन. १०७
हे परमेश्वरा, मी फारच दुःखित झालों;
तूं आपल्या वचनाप्रमाणें मला सजीव कर.
१०८ हे परमेश्वरा, तूं कृपेने माझ्या तोंडच्या
स्वेच्छ अर्पणांवर प्रसन्न हो, आणि आ-
पले न्याय मला शिकीव. १०९ माझा जीव
माझ्या हातावर अखंड आहे; तथापि मी तुझें
शास्त्र विसरलों नाहीं. ११० दुष्टांनी मजसाठीं
पाश मांडिला आहे; परंतु मी तुझ्या नेमणुकीं-
पासून वळत नाहीं. १११ तुझे नेम म्या आपलें
सर्वकाळचें वतन असे घेतले आहेत; कारण कीं
ते माझ्या हृदयाला हर्षकारक आहेत. ११२
तुझे नेम सर्वकाळ शेवटपर्यंत पाळायाला म्या
आपलें हृदय वळून लाविलें आहे.

११३ मी विपक्षांचा द्वेष करितों, परंतु तुझ्या
शास्त्रावर प्रीति करितों. ११४ माझा आश्रय
व माझें संरक्षण तूं आहेस; मी तुझ्या वचनाच्या

आशेवर राहिलों आहें. ११५ **अहो** दुष्कर्मी,
तुह्मी मजपासून दूर व्हा; कां, मी आपल्या दे-
वाच्या आज्ञा पाळितों. ११६ **म्या** जगावें ह्मणून
तूं आपल्या वचनाप्रमाणें माझा आधार ऐस,
आणि प्रतीक्षा करण्याविषयीं मला लाजूं देऊं
नको. ११७ **तूं** मला आधार हो, ह्मणजे मी
तरेन, आणि तुझ्या नेमांवर लक्ष नेहमी लावीन.
११८ **जे** तुझ्या नेमापासून वळतात, त्या सर्वांस
तूं तुच्छ मानितोस, कारण कीं त्यांचें कपट उगेंच
होतें. ११९ **तूं** पृथ्वींतल्या सर्व दुष्टांस धातुमळां-
सारिखें दूर करितोस; यास्तव मी तुझ्या नेमांवर
प्रीति करितों. १२० **तुझ्या** धाकानें माझा देह
थरथरतो; आणि मी तुझ्या न्यायांविषयीं भय
धरितों.

१२१ **म्या** न्याय व नीति आचरिली आहे;
तूं मला माझ्या कांचणाऱ्याच्या स्वाधीन ठेवूं नको.
१२२ **तूं** आपल्या सेवकाला बरें होण्याचा विसार
दे; अभिमान्यांनी मला जाचूं नये. १२३ **तुझ्या**
तारणासाठीं व तुझ्या नीतीच्या वचनासाठीं माझे
डोळे क्षीण होतात. १२४ **तूं** आपल्या दयेप्र-
माणें आपल्या सेवकाजवळ कर, आणि आपले
नेम मला शिकीव. १२५ **मी** तुझा सेवक; मला
समज दे, ह्मणजे मी तुझे नेम समजेन. १२६
**परमेश्वराची** काम करण्याची वेळ आहे, त्यांनी
तुझें शास्त्र मोडिलें आहे; १२७ **यामुळें** म्या
सोन्यापेक्षां, निर्मळ सोन्यापेक्षांहि तुझ्या आज्ञांवर
अधिक प्रीति केली आहे; १२८ **यामुळें** म्या
तुझ्या सर्व नेमणुकी सर्वांविषयीं सरळ मोजिल्या
आहेत, सर्व खोटे मार्ग द्वेषिले आहेत.

१२९ **तुझे** नेम आश्चर्याचे; यास्तव माझा जीव
त्यांस पाळीत आहे. १३० **तुझ्या** वचनांचें उ-
घाड करणें उजेड पाडितें; भोळ्यांस समज देतें.
१३१ **मी** आपलें तोंड उघडून धापा देतों; कारण
कीं तुझ्या आज्ञांची फार इच्छा मला झाली.
१३२ **तूं** मजकडे दृष्टि लाव, आणि आपल्या
नांवावर प्रीति करणारे त्यांजवळच्या रीतिप्रमाणें
मजवर कृपा कर. १३३ **आपल्या** वचनाप्रमाणें
माझीं पावलें सिद्ध कर, आणि कोणत्याहि द्वाड-
पणाला मजवर धनीपण करूं देऊं नको. १३४
**मनुष्याच्या** जुलुमापासून मला सोडीव, ह्मणजे
मी तुझ्या नेमणुकी पाळीन. १३५ **तूं** आपल्या
सेवकावर आपल्या दृष्टीचा प्रकाश कर, आणि
आपले नेम मला शिकीव. १३६ **ते** तुझें शास्त्र
पाळीत नाहींत, यास्तव पाण्याचे ओघळ माझ्या
डोळ्यांतून उतरतात.

१३७ **हे परमेश्वरा**, तूं नीतिमान, आणि
तुझे न्याय सरळ आहेत. १३८ **त्वां** नीतीचे
व अति विश्वासाचे नेम आज्ञेने लाविले आहेत.
१३९ **माझे** वैरी तुझीं वचनें विसरले, यामुळें
माझ्या आवेशानें मला खाऊन टाकिलें आहे.
१४० **तुझें** वचन फार शोधलेलें आहे, यास्तव
तुझा सेवक त्यावर प्रीति करितो. १४१ **मी**
लाहान व तुच्छ आहें; परंतु तुझ्या नेमणुकी
विसरलों नाहीं. १४२ **तुझी** नीति सर्वकाळ
नीतीच; आणि तुझें शास्त्र सत्य आहे. १४३
**संकट** व पेंच मला प्राप्त झाला; परंतु तुझ्या
आज्ञा मला उल्हासकारक आहेत. १४४ **तुझे**
नेम सर्वकाळ नीतीचे; तूं मला समज दे, ह्मणजे
मी सजीव होईन.

१४५ **म्या** आपल्या संपूर्ण हृदयानें हाक मा-
रिली; हे **परमेश्वरा**, मला उत्तर दे; मी तुझे
नेम संभाळीन. १४६ **म्या** तुला हाक मारिली;
तूं मला तार, ह्मणजे मी तुझे नेम पाळीन.
१४७ **मी** पाहाटेच्यापूर्वी लागून ओरडतों, तुझ्या
वचनाच्या आशेवर राहिलों आहें. १४८ **तुझ्या**
वचनाचें ध्यान करायास माझे डोळे रात्रीच्या
प्रहराची वाट पाहतात. १४९ **हे परमेश्वरा**,
तूं आपल्या दयेप्रमाणें माझा शब्द ऐक; आपल्या
न्यायांप्रमाणें मला सजीव कर. १५० **जे** दुर्वि-
चाराला अनुसरतात, ते जवळ येतात; परंतु
तुझ्या शास्त्रापासून दूर आहेत. १५१ **हे पर-
मेश्वरा**, तूं जवळ आहेस, आणि तुझ्या सर्व
आज्ञा सत्य आहेत. १५२ **म्या** तुझ्या नेमांवि-
षयीं पूर्वी जाणिलें आहे कीं त्वां ते सर्वकाळचे
स्थापिले आहेत.

१५३ **तूं** माझें दुःख पाहून मला सोडीव; कां
तर मी तुझें शास्त्र विसरलों नाहीं. १५४ **माझ्या**

वादाचा निवाडा करून, मला सोडीव; आपल्या
वचनाप्रमाणें मला सजीव कर. १५५ तारण
दुष्टांपासून दूर आहे, कारण कीं त्यांनी तुझ्या ने-
मांचा विचार केला नाहीं. १५६ हे परमेश्व-
रा, तुझी ममता फार आहे; तूं आपल्या न्याया-
प्रमाणें मला सजीव कर. १५७ माझ्या पाठीं
लागणारे व वैरी बहुत आहेत; तथापि मी तुझ्या
नेमांपासून बहकलों नाहीं. १५८ मी दगेखो-
रांस पाहून फार खेद पावलों; कारण कीं त्यांनी
तुझें वचन पाळिलें नाहीं. १५९ हे परमेश्वरा,
पाहा म्यां तुझ्या नेमणुकींवर प्रीति केली; तूं आ-
पल्या दयेप्रमाणें मला सजीव कर. १६० तुझ्या
वचनाचें तात्पर्य तर सत्यता आहे; आणि तुझ्या
नीतीचे सर्व न्याय सर्वकाळपर्यंत आहेत.

१६१ अधिकारी माझ्या पाठीं निष्कारण ला-
गले; परंतु माझ्या हृदयानें तुझ्या वचनाची भीड
राखिली आहे. १६२ मला मोठी लूट सांपडल्या
सारिखा तुझ्या वचनाविषयीं हर्ष होतो. १६३
मी खोटेपणाचा द्वेष व कंटाळा करितों; परंतु
तुझ्या शास्त्रावर प्रीति करितों. १६४ तुझ्या
नीतीच्या न्यायांवरून मी प्रतिदिवशीं सात वेळां
तुझें स्तवन करितों. १६५ जे तुझ्या शास्त्रावर
प्रीति करितात, त्यांचें फार कल्याण आहे; आणि
त्यांस कांहीं अडखळा नाहीं. १६६ हे परमे-
श्वरा, मी तुझ्या तारणाची वाट पाहतों, आणि
तुझ्या आज्ञांप्रमाणें करितों. १६७ माझा जीव
तुझे नेम पाळितो, आणि मी त्यांवर फार प्रीति
करितों. १६८ मी तुझ्या नेमणुकी व तुझे नेम
पाळितों; कारण कीं माझ्या सर्व चाली तुझ्यापुढें
आहेत.

१६९ हे परमेश्वरा, तूं आपल्याजवळ प्रत्यक्ष
माझी आरोळी येऊं दे; आपल्या गोष्टीप्रमाणें
मला समज दे. १७० माझी काकळूत आपल्या
समोर येऊं दे; आपल्या वचनाप्रमाणें मला सो-
डीव. १७१ जर तूं आपले नेम मला शिकवि-
सील, तर माझे होठ स्तवनाचा उद्गार काढि-
तील. १७२ माझी जीभ तुझ्या वचनाविषयीं
बोलेल; कां तर तुझ्या सर्व आज्ञा नीतीच्या आ-
हेत; १७३ तुझ्या हातानें माझें सहाय करावें;
कारण कीं म्यां तुझ्या नेमणुकी निवडून घेतल्या
आहेत. १७४ हे परमेश्वरा, मला तुझ्या तार-
णाची फार इच्छा लागली आहे; आणि तुझें
शास्त्र मला उल्लासकारक आहे. १७५ माझ्या
जिवानें जगावें आणि तुझें स्तवन करावें, आणि
तुझ्या न्यायानी माझें सहाय करावें. १७६ मी
चुकलेल्या मेंढरासारिखा बहकलों; तूं आपल्या
सेवकाचा शोध कर; कारण कीं मी तुझ्या आज्ञा
विसरलों नाहीं.

## गीत १२०.

चढण्याचें गीत.

म्यां आपल्या संकटांत परमेश्वराला हाक
मारिली, आणि त्यानें मला उत्तर दिल्हें.
२ हे परमेश्वरा, खोटा होट, व कपटी
जीभ यांपासून तूं माझ्या जीवाला सोडीव. ३
अगे कपटी जिभे, तुला काय दिल्हें जाईल? आ-
णि तुला काय प्राप्त होईल? ४ शुराचे तिखट
बाण, अणखी रोथेम झाडांचे विंगळ. ५ मला
हाय हाय, कां तर मी मेशेखांत राहतों; माझी
वस्ति केदारांतल्या राहोट्यांजवळ आहे. ६ मा-
झ्या जिवानें आपली वस्ति शांतीच्या द्वेषणाऱ्याज-
वळ फार धरिली आहे. ७ मी शांत आहें,
परंतु जेव्हां बोलतों, तेव्हां ते लढायास लागतात.

## गीत १२१.

चढण्याचें गीत.

डोंगरांकडे मी आपली दृष्टि लावितों; माझें
सहाय कोठून येतें? २ परमेश्वर, ज्यानें
आकाश व पृथ्वी उत्पन्न केली, त्याकडून मला स-
हाय होतें. ३ तो तुझा पाय सरकूं देणार नाहीं;
तुझा राखणारा निजत नाहीं. ४ पाहा, इस्राए-
लाचा राखणारा निजत नाहीं, आणि झोंप घेत
नाहीं. ५ परमेश्वर तुझा राखणारा; परमे-
श्वर तुझ्या उजव्या हाताकडे तुझी छाया आहे.
६ दिवसां सूर्य व रात्रीं चंद्र तुला बाधणार नाहीं.
७ परमेश्वर तुला सर्व वाईटापासून राखील,
तुझा प्राण राखील; ८ तुझें बाहेर जाणें व तुझें
आंत येणें, आतांपासून सर्वकाळपर्यंतहि, परमे-
श्वर राखील.

## गीत १२२.

दावीदाकडून; चढण्याचें गीत.

जेव्हां लोक मला बोलले कीं, 'आपण **परमे-
श्वराच्या** मंदिरीं जाऊं,' तेव्हां मी संतुष्ट
झालों. २ **हे** यरूशालेमा, आमचे पाय तुझ्या
द्वारामध्यें उभे होतील. ३ **संगत** जडलेल्या नग-
राप्रमाणें यरूशालेम बांधलेलें आहे. ४ **तिकडे**
**परमेश्वराच्या** नामाची स्तुति करायास वंश,
**परमेश्वराचे** वंश, इस्राएलाजवळच्या नेमाप्रमाणें
चढतात. ५ **कारण** कीं तेथें न्यायासाठीं सिंहा-
सनें, दावीद घराण्याचीं सिंहासनें मांडलेलीं आ-
हेत. ६ **यरूशालेमाच्या** कल्याणासाठीं तुह्मी वि-
नंती करा; जे तुजवर प्रीति करितात, ते सुखी
होतील. ७ **तुझ्या** कोटामध्यें कल्याण, तुझ्या
राजवाड्यांत सुख होईल. ८ **मी** आपल्या भा-
वासाठीं व आपल्या मित्रांसाठीं बोलेन, 'तुझ्याम-
ध्यें कल्याणच असो.' ९ **आमचा** देव **परमे-
श्वर** याच्या मंदिरासाठीं मी तुझें बरें पाहीन.

## गीत १२३.

चढण्याचें गीत.

जो आकाशांत राहतो, त्या तुजकडे मी आपली
दृष्टि वर लावितों. २ **पाहा**, जसी चाकरांची
दृष्टि आपल्या धन्यांच्या हाताकडे, जसी चाकरि-
णीची दृष्टि आपल्या धनिणीच्या हाताकडे असती,
तसी आमची दृष्टि, आमचा देव **परमेश्वर** आ-
ह्मावर कृपा करी तोंपर्यंत, त्याकडे आहे. ३ **हे
परमेश्वरा**, तूं आह्मावर कृपा कर आह्मावर कृपा
कर; कारण कीं आह्मी फार तुच्छ झालों. ४ **जे**
निष्काळजी, त्यांच्या निंदेने आणि गर्विष्टांच्या तुच्छ-
तेने आमचा प्राण आह्मामध्यें फार व्यापला आहे.

## गीत १२४.

दावीदाकडून चढण्याचें गीत.

जो आह्माकडे होता, तो **परमेश्वर** नसता,'
इस्राएलाने ह्मणावें. २ '**जो** आह्माकडे
होता, तो **परमेश्वर** नसता, तर जेव्हां माणसें
आह्मावर उठलीं, ३ **जेव्हां** त्यांचा राग आ-
ह्मावर पेटला, तेव्हां त्यांनी आह्मास जितेंच गि-
ळून टाकिलें असतें; ४ **तेव्हां** पाण्याने आह्मास
बुडवून घेतलें असतें; ओघ आमच्या प्राणावर
चालला असता; ५ **तेव्हां** उंचबळलेलें पाणी
आमच्या प्राणावर चाललें असतें.' ६ **परमे-
श्वर** ज्याने आह्मास शिकाररूपें त्यांच्या दांतांसीं
दिल्हें नाहीं, त्याची स्तुति असो. ७ **आमचा**
प्राण पांखरासारिखा पारध्यांच्या फांसांतून निभा-
वला; फांस तुटला आणि आह्मी निभावलों. ८
**आकाशाचा** व पृथ्वीचा उत्पन्न करणारा जो **परमे-
श्वर** त्याच्या नामाने आह्मास सहाय आहे.

## गीत १२५.

चढण्याचें गीत.

जे **परमेश्वरावर** भरंवसा ठेवितात, ते सीयोन
डोंगरासारिखे आहेत; तो हालत नाहीं,
सर्वकाळ राहतो. २ **यरूशालेम**, याच्या चहुंकडे
डोंगर आहेत; आणि **परमेश्वर** आतांपासून
सर्वकाळपर्यंतहि आपल्या लोकांच्या चहुंकडे आहे.
३ **कां** तर दुष्टाची छडी नीतिमानांच्या वतनावर
बसणार नाहीं, यासाठीं कीं नीतिमानांनी आपले
हात अनुचितांत न घालावे. ४ **हे परमेश्वरा,**
जे चांगले, जे आपल्या हृदयाचे सरळ, त्यांचें
तूं बरें कर. ५ **जे** आपल्या वांकड्या वाटांकडे
वळतात, त्यांस तर **परमेश्वर** दुष्कर्म्यांसंगतीं
चालवील; परंतु इस्राएलावर समधान होईल.

## गीत १२६.

चढण्याचें गीत.

सीयोनांतून नेलेल्या पाडावांस जेव्हां **परमे-
श्वराने** परत आणिलें तेव्हां आह्मी स्वप्न
पाहणाऱ्यांसारिखे होतों. २ **तेव्हां** आमच्या तोंडीं
हासूं, आणि आमच्या जिभीं हर्षशब्द दाटला;
तेव्हां राष्ट्रांत ह्मटलें, '**परमेश्वराने** त्यांसाठीं
मोठीं कृत्यें केलीं आहेत.' ३ **परमेश्वराने** आ-
ह्मासाठीं मोठीं कृत्यें केलीं आहेत; आह्मी संतुष्ट
झालों. ४ **हे परमेश्वरा**, तूं दक्षिणेंतल्या ओह-
ळांसारिखें आमच्या नेलेल्या पाडावांस परत आण.
५ **जे** अश्रुपाताने पेरितात, ते हर्षशब्दाने कापि-
तील. ६ **जो** बीज घेऊन रडतांना पेरितच जा-
तो, तो आपल्या पेंढ्या घेऊन हर्षशब्दाने येतच
येईल.

## गीत १२७.

शलमोनाकडून; चढण्याचें गीत.

**ज**र **परमेश्वर** मंदिर बांधीत नाहीं, तर त्याचे
बांधणारे त्याविषयीं व्यर्थ कष्ट करितात. जर
**परमेश्वर** नगराचा पाहरा करीत नाहीं, तर पाह-
रेकरी व्यर्थ जागतो. २ **मोठ्या** सकाळीं उठणें,
रात्रीं फार वेळ बसणें, कष्टाचें अन्न खाणें, हेंहि
तुह्मास व्यर्थ आहे, कां, तो निश्चयें आपल्या प्रि-
यास झोप देतो. ३ **पाहा,** लेंकरें **परमेश्वरा-**
पासून वतन आहेत; पोटचें फळ त्यापासून मोल
आहे. ४ **जसे** शूराच्या हातीं बाण, तसीं तर-
ण्यांचीं लेंकरें आहेत. ५ **जो** पुरुष ह्यांकडून
आपला भाता भरितो, तो धन्य; ते लाजणार ना-
हींत; तर दरवाज्यांत शत्रूंसीं बोलतील.

## गीत १२८.

चढण्याचें गीत.

**जो** कोणी **परमेश्वराला** भितो, जो त्याच्या
मार्गांत चालतो, तो धन्य. २ **कारण** कीं
तूं आपल्या हातांचें कष्टफळ खासील; तूं धन्य;
आणि तुझें बरें होईल. ३ **तुझी** स्त्री तुझ्या घ-
राच्या बाजूंच्या सफळ द्राक्षवेलासारिखी होईल;
तुझीं लेंकरें तुझ्या मेजासभोंवतीं जाइत रोंपांसा-
रिखीं होतील. ४ **पाहा,** जो पुरुष **परमेश्व-**
**राला** भितो, तो असा आशीर्वाद पावतो. ५
**सीयोनांतून** **परमेश्वर** तुला असा आशीर्वाद दे-
ईल कीं तूं आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसांत
यरूशालेमाचें बरें पाहसील; ६ **आपल्या** लेंकरां-
च्या लेंकरांसुद्धां इस्राएलावर समाधानहि पाहसील.

## गीत १२९.

चढण्याचें गीत.

‘**मा**झ्या तरुणपणापासून त्यांनी मला बहुत त्रा-
स दिल्हा,’ इस्राएलाने ह्मणावें, २ ‘**मा-**
झ्या तरुणपणापासून त्यांनी मला बहुत त्रास दि-
ल्हा, परंतु माझा पराजय केला नाहीं. ३ **नांग-**
र्‍यांनी माझ्या पाठीवर नांगरून आपलीं तासें
लांब पाडिलीं.’ ४ **परमेश्वर** नीतिमान; त्याने
दुष्टांचे दोर तोडिले आहेत. ५ **जे** **सीयोनाचा**
द्वेष करितात, ते सर्व लाजून माघारें फिरतील.
६ **ते** धाब्यावरल्या गवतासारिखे होतील; तें का-
ढल्यापूर्वीं वाळतें. ७ **तेणेकरून** कापणार्‍याच्याने
आपली मूठ, आणि बांधणार्‍याच्यानी आपली कव
भरवत नाहीं. ८ **आणि** जवळून जाणारे असें
ह्मणणार नाहींत कीं, **परमेश्वराचा** आशीर्वाद
तुह्मास होवो; आह्मी **परमेश्वराच्या** नांवाने
तुह्मास आशीर्वाद देतों.’

## गीत १३०.

चढण्याचें गीत.

**हे** **परमेश्वरा,** मी खोलस्थानांतून तुला हाक
मारीत आहें. २ **हे** **प्रभू,** तूं माझा शब्द ऐ-
क; माझ्या काकुळतींच्या शब्दाकडे तुझे कान त-
त्पर व्हावे. ३ **हे** **परमेश्वरा,** हे **प्रभू,** जर तूं
अन्यायांची झडती घेतोस; तर कोण उभा राहील?
४ **परंतु** तुजपासीं क्षमा आहे; असें कीं तुझें भय
धरलें जावें. ५ **मी** **परमेश्वराची** वाट पाहत
आहें; माझा जीव वाट पाहत आहे; आणि मी
त्याच्या वचनाची आशा धरून राहिलों आहें. ६
**जो** सकाळची वाट पाहतात, जे सकाळचीच वाट
पाहतात त्यांपेक्षां माझा जीव **प्रभूची** वाट पाहतो.
७ **हे** इस्राएला, तूं **परमेश्वराची** आशा धर;
कारण कीं **परमेश्वराला** दया; आणि त्याच्याज-
वळ पूर्ण तारण आहे. ८ **तोच** इस्राएलाला त्या-
च्या सर्व अन्यायांतून खंडून घेईल.

## गीत १३१.

दावीदाकडून; चढण्याचें गीत.

**प**रमेश्वरा, माझें ह्रदय उंच नाहीं; माझे डोळेहि
वर केलेले नाहींत; आणि मी आपल्यापेक्षां मो-
ठ्या गोष्टींत व खोलपणांमध्यें गेलों नाहीं. २
**म्या** आपला जीव शांतवून, निवांत केला. जसें
आईजवळ स्तन तुटलेलें लेंकरूं, तसा माझा जीव
मजसीं स्तन तुटलेल्यासारिखा आहे. ३ **इस्राए-**
लाने आतापासून सर्वकाळपर्यंतहि **परमेश्वराची**
आशा धरावी.

## गीत १३२.

चढण्याचें गीत.

**हे** **परमेश्वरा,** तूं दावीदाची व त्याच्या सर्व
दुःखांची आठवण कर; २ **त्याने** **परमेश्व-**

राजवळ शपथ वाहिली, याकोबाचा पराक्रमी या-
जवळ त्याने नवस केला, ३ कीं मी आपल्या
घरवस्तीस जाणार नाहीं; मी आपल्या पलंगाव-
रल्या आंथरूणावर जाणार नाहीं: ४ मी आ-
पल्या डोळ्यास झोप, आपल्या पापण्यांस सुस्ती
येऊं देणार नाहीं; ५ जोंपर्यंत परमेश्वरासाठीं
ठिकाण, याकोबाचा पराक्रमी यासाठीं वस्ति-
स्थानें मिळवीन तोंपर्यंत. ६ पाहा, आह्मी त्या-
विषयीं एफ्राथांत ऐकिलें; वनांतल्या भूमीवर तें
आह्मास मिळालें. ७ आह्मी त्याच्या वस्तींस
जाऊं; त्याच्या पायांच्या आसनाजवळ भजूं. ८
हे परमेश्वरा, तूं आपल्या सामर्थ्याच्या कोशा-
सुद्धां आपल्या विसाव्यासाठीं ऊठ. ९ तुझ्या
याजकानी नीतिमत्व पांघरावें, आणि तुझ्या भ-
क्तानी हर्षशब्द करावा. १० तूं आपला सेवक
दावीद यामुळें, आपल्या अभिषिक्ताचें तोंड वि-
न्मुख करूं नको. ११ परमेश्वराने दावीदाज-
वळ खरेपणाने शपथ वाहिली आहे, तो तिजपा-
सून फिरणार नाहीं; ती असी कीं, 'मी तुझ्या
सिंहासनावर तुझ्या पोटफळांतला बसवीन. १२
तुझे पुत्र माझा करार व माझे नेम जे मी त्यांस
शिकवीन त्यांचें पाळण जर करितील, तर त्यांचेहि
पुत्र सर्वदा तुझ्या सिंहासनावर बसतील.' १३
कां तर परमेश्वराने सीयोन निवडून घेतलें, आप-
ल्या राहण्यासाठीं इच्छिलें आहे. १४ त्याने ह्म-
टलें, 'हें सर्वदा माझा विसावा असे; एथें मी रा-
हीन, कारण कीं माझी इच्छा ह्यावर झाली आहे.
१५ मी एथल्या आहाराला आशीर्वाद देईनच
देईन, एथल्या दरिद्र्यांस अन्नाने तृप्त करीन. १६
एथल्या याजकांवरहि तारणाचें पांघरूण घालीन;
एथले भक्तहि हर्षशब्द फार करितील. १७
मी एथें दावीदाचें शिंग वाढवीन; म्या आपल्या
अभिषिक्ताचा दिवा लाविला आहे. १८ त्या-
च्या शत्रूंवर लाजेचें पांघरूण घालीन; परंतु त्या-
जवर त्याचा मुगूट फुलेल.'

## गीत १३३.

दावीदाकडून; चढण्याचें गीत.

पाहा, भावांचें केवळ ऐक्यतेने राहणें हें किती
बरें! आणि किती सुंदर आहे! २ तें डो-
क्यावरलें उत्तम तेल जें दाढीवर, आहरोनाच्या
दाढीवर उतरलें; जें त्याच्या वस्त्रांच्या कांठा-
पर्यंत उतरलें, त्यासारिखें आहे. ३ तें हेर्मो-
नावरलें दहिंवर जें सीयोनादिक डोंगरांवर पडतें
त्यासारिखें आहे; कारण कीं तेथें परमेश्वराने
आशीर्वाद ह्मणजे जीवन सर्वकाळपर्यंत आज्ञेने
दिल्हें आहे.

## गीत १३४.

चढण्याचें गीत.

अहो परमेश्वराचे सर्व सेवक, पाहा, जे तुह्मी
रात्रीं परमेश्वराच्या मंदिरांत उभे राहतां,
ते तुह्मी परमेश्वराची स्तुति करा. २ आपले
हात पवित्रस्थानीं उभारून परमेश्वराची स्तुति
करा. ३ आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्न करणारा
परमेश्वर, याने सीयोनांतून तुला आशीर्वाद
द्यावा.

## गीत १३५.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; परमेश्वराच्या
नांवाचें स्तवन करा; अहो परमेश्वराचे
सेवक त्याचें स्तवन करा; २ जे तुह्मी परमे-
श्वराच्या मंदिरांत आमच्या देवाच्या घरच्या
वाड्यांमध्यें उभे राहतां ते. ३ तुह्मी परमेश्व-
राला स्तवा; कारण कीं परमेश्वर चांगला;
त्याच्या नांवाचें कीर्त्तन करा; कां तें सुंदर आहे.
४ कां कीं परमेश्वराने आपल्यासाठीं याकोब,
आपलें स्वकीय धन होण्यासाठीं इस्राएल निव-
डून घेतला आहे. ५ कारण मी जाणतों कीं
आमचा प्रभु, परमेश्वर सर्व देवांपेक्षां थोर
आहे. ६ जें परमेश्वराने इच्छिलें, तें सर्व
त्याने आकाशांत व पृथ्वींत, समुद्रामध्यें व अवघ्या
डोहांमध्यें केलें आहे. ७ तो पृथ्वीच्या पाठी-
पासून धुकीं चढवितो; पावसासाठीं विजा उत्पन्न
करितो; आपल्या संग्रहांतून वारा काढितो. ८
मनुष्यापासून पशूपर्यंत त्याने मिसरांतलें प्रथम
जन्मलेलें मारिलें. ९ हे मिसरा, तुजमध्यें फा-
रो व त्याचे सर्व सेवक यांवर उत्पात व चमत्कार
त्याने लाविले. १० त्याने मोठीं राष्ट्रें मारिलीं,
आणि बलाढ्य राजे जिवें मारिले. ११ अमो-
ऱ्यांचा राजा सीहोन व बाशानाचा राजा ओग
व खनानांतलीं सर्व राज्यें यांस मारिलें. १२

आणि त्यांचा देश आपल्या इस्राएल लोकाला
वतन करून दिल्हा. १३ हे परमेश्वरा, तुझें
नाम सर्वकालिक आहे; तुझें स्मरण, हे परमेश्व-
रा, पिढोपिढीं आहे. १४ कारण कीं परमेश्व-
र आपल्या लोकांचा निवाडा करील, आणि आ-
पल्या सेवकांवर दया करील. १५ राष्ट्रांच्या
मूर्त्ती रुप्याच्या, व सोन्याच्या; मनुष्यहातानी
केलेल्या आहेत. १६ त्यांस तोंड आहे, तरी
त्या बोलत नाहींत; त्यांस डोळे आहेत, तरी
पाहत नाहींत; १७ त्यांस कान आहेत, तरी
ऐकत नाहींत; त्यांच्या तोंडीं श्वासहि नाहीं.
१८ त्यांचे करणारे, व त्यांजवर आशा ठेवणारे,
ते सर्व त्यांसारिखे आहेत. १९ हे इस्राएला-
च्या घराण्या, तुह्मी परमेश्वराची स्तुति करा;
हे आहरोनाच्या घराण्या, तुह्मी परमेश्वराची
स्तुति करा. २० हे लेवीच्या घराण्या, तुह्मी
परमेश्वराची स्तुति करा; जे परमेश्वराचें
भय धरितात, ते तुह्मी परमेश्वराची स्तुति करा.
२१ यरूशालेमांत वस्ति करितो जो परमेश्वर
त्याची जीयोनांतून स्तुति असो. तुह्मी परमे-
श्वराचें स्तवन करा.

## गीत १३६.

तुह्मी परमेश्वराची स्तुति करा; कारण कीं
तो चांगला: कारण कीं त्याची दया सर्व-
काळची आहे. २ देवांचा देव याची स्तुति क-
रा: कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.
३ प्रभुंचा प्रभु याची स्तुति करा: कारण
कीं त्याची दया सर्वकाळची आहे. ४ जो
आपण मात्र मोठीं आश्चर्यकृत्यें करितो, त्याची:
कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. ५
ज्याने बुद्धीने आकाश उत्पन्न केलें, त्याची:
कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. ६
ज्याने पृथ्वी पाण्यावर विस्तारिली, त्याची: कारण
कीं त्याची दया सर्वकाळची आहे. ७ ज्याने
मोठीं ज्योतीं उत्पन्न केलीं, त्याची: कारण कीं त्या-
ची दया सर्वकाळची आहे. ८ त्याने दिवस
चालवायास सूर्य उत्पन्न केला: कारण कीं त्याची
दया सर्वकाळची आहे. ९ रात्र चालवायास
चंद्र व तारेहि: कारण कीं त्याची दया सर्वकाळ-
ची आहे. १० ज्याने मिसऱ्यांचे ज्येष्ठ पुत्र
मारिले, त्याची: कारण कीं त्याची दया सर्वका-
ळची आहे. ११ आणि त्यांमधून इस्राएल का-
ढिला: कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.
१२ बळकट हाताने, व उभारलेल्या भुजेने का-
ढिला: कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.
१३ ज्याने सूफ समुद्राला विभाग करून चिरलें,
त्याची: कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.
१४ आणि त्याने त्यामधून इस्राएलाला पार नेलें:
कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. १५
आणि फारोला व त्याच्या सैन्याला सूफ समु-
द्रांत पाडून टाकिलें: कारण कीं त्याची दया सर्व-
काळची आहे. १६ ज्याने आपला लोक राना-
तून चालविला, त्याची: कारण कीं त्याची दया
सर्वकाळची आहे. १७ ज्याने मोठ्या राजांस
मारिलें, त्याची: कारण कीं त्याची दया सर्वका-
ळची आहे. १८ महान राजेहि जिवें मारिले:
कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे. १९
अमोऱ्यांचा राजा सीहोन याला मारिलें: कारण
कीं त्याची दया सर्वकाळची आहे. २० बाशा-
नाचा राजा ओग यालाहि: कारण कीं त्याची
दया सर्वकाळची आहे. २१ आणि त्यांचा देश
वतन करून दिल्हा: कारण कीं त्याची दया सर्व-
काळची आहे. २२ आपला सेवक इस्राएल
याला वतन दिल्हें: कारण कीं त्याची दया सर्व-
काळची आहे. २३ त्याने आमच्या नीचपणांत
आमची आठवण केली: कारण कीं त्याची दया
सर्वकाळची आहे. २४ आणि आमच्या वैऱ्यां-
पासून आह्मास हिसकून घेतलें: कारण कीं त्याची
दया सर्वकाळची आहे. २५ तो सर्व जिवांस
अन्न देतो: कारण कीं त्याची दया सर्वकाळची
आहे. २६ तुह्मी आकाशांतल्या देवाची स्तुति
करा: कारण कीं त्याची दया सर्वकाळची आहे.

## गीत १३७.

बाबेलच्या नद्यांजवळ आह्मी तिकडे बसलों;
होय, जीयोनाची आठवण करून आह्मी
रडलों. २ त्यांतल्या वाळूंजांवर आह्मी आपले
विणे टांगून ठेविले; ३ कारण कीं ज्यानी आ-
ह्मास पाडाव करून नेलें, त्यानी तेथें आमच्या-

जवळ गायन मागितलें; ज्यांनी आह्मास पिडलें,
ते हर्ष मागत बोलले, 'आमच्याजवळ ज़ीयोनाचें
एखादें गीत गा.' ४ **आह्मी** अन्य देशांत **पर-
मेश्वराचें** गीत कसें गाऊं! ५ **हे यरूशलेमा,**
जर मी तुला विसरेन, तर माझा उजवा हात मला
विसरो. ६ **जर** मी तुला आठवीत नाहीं, जर
मी आपल्या विशेष आवडत्यापेक्षां **यरूशलेम** अ-
धिक मोजीत नाहीं, तर माझी जीभ माझ्या टाळूस
जडो. ७ **हे परमेश्वरा,** तूं **अदोम** संतानांची
आठवण कर; **यरूशलेमाच्या** दिवसीं त्यांनी सां-
गितलें कीं, 'फोडा, त्याच्या पायापर्यंत फोडा.' ८
**हे** नाश पावणाऱ्या **बाबेलेच्या** कन्ये त्वां आमचें
जें केलें, त्याची फेड जो तुला पूर्ण करून देईल,
तो धन्य. ९ **जो** तुझीं बाळकें धरून खडकावर
अपटील, तो धन्य.

## गीत १३८.

दावीदाकडून.

**मी** आपल्या संपूर्ण अंतःकरणानें तुझी स्तुति क-
रीन; देवांसमक्ष तुझें कीर्त्तन करीन. २
तुझ्या पवित्र देवळाकडे भजन करीन; आणि
तुझ्या दयेमुळें व तुझ्या सत्यतेमुळें तुझ्या नांवाची
स्तुति करीन; कारण कीं त्वां आपल्या सगळ्या
नांवापेक्षां आपलें वचन मोठें मोजिलें आहे. ३
**ज्या** दिवसीं म्यां हाक मारिली, त्यांतच त्वां मज-
सीं उत्तर करून माझ्या जिवाला सामर्थ्य देऊन
मला ताठर केलें. ४ **हे परमेश्वरा,** जेव्हां पृथ्वी-
तले सर्व राजे तुझ्या तोंडचीं वचनें ऐकतील, तेव्हां
तुझी स्तुति करितील; ५ **आणि परमेश्वराच्या**
मार्गी गातील; कारण कीं **परमेश्वर** मोठ्या गौ-
रवाचा आहे. ६ **जरी परमेश्वर** थोर आहे,
तरी निचाकडे पाहतो; परंतु गर्विष्टाला दुरून
जाणतो. ७ **जरी** मी संकटांत असून चालतों,
तरी तूं मला जगविसील; माझ्या शत्रूंच्या रागा-
मुळें, तूं आपला हात लाविसील; आणि तुझा
उजवा हात मला तारील. ८ **परमेश्वर** माझें
कार्य सिद्धीस नेईल. हे **परमेश्वरा,** तुझी दया
सर्वकाळची आहे; त्वां आपल्या हातांचीं कामें
सोडूं नये.

## गीत १३९.

मुख्यवाजंत्र्यास; दावीदानें केलेलें गीत.

**हे परमेश्वरा,** त्वां मला शोधून जाणिलें आहे.
२ तूं माझें बसणें व माझें उठणें जाणतोस;
माझा विचार दुरून समजतोस. ३ तूं माझें
चालणें व निजणें वेढितोस; आणि माझ्या सर्व
चाली सलगरूपें जाणतोस. ४ **हे परमेश्वरा,**
शब्द माझ्या जिभेवर आला नाहीं, तितक्यांत तूं
त्याला पूर्ण जाणतोस. ५ तूं मला मागून व पुढून
वेढितोस, आणि आपला हात मजवर ठेवीत आ-
हेस. ६ **हा** समज माझ्याहून आश्चर्याचा, उंच
आहे; मला प्राप्त व्हावयाचें नाहीं. ७ **मी**
तुझ्या आत्म्यापासून कोणीकडे जाईन! आणि तु-
झ्या समक्षपणांतून कोणीकडे पळेन! ८ **जर** आ-
काशांत चढतों, तर तूं तेथें आहेस, किंवा मृत-
लोक आंथरूण धरितों, तर पाहा, तूं तेथेंहि आ-
हेस. ९ **मी** उदयाचा पंख धरून समुद्राच्या
पलिकडे वस्तीस जातों, १० तेथें देखील तुझा
हात मला नेईल; आणि तुझा उजवा हात मला
धरील. ११ **आणि** काळोख मला निश्चयें झां-
कील, असें जर ह्मणतों, तर माझ्या चहुंकडे रात्रीं
उजेड होईल. १२ **काळोख** तुजपासून आच्छा-
दित नाहीं; रात्र देखील दिवसासारिखी प्रकाशमय
होती; जसा उजेड तसा काळोख आहे. १३
**कारण** कीं त्वां माझीं गुर्देकमळें सिद्ध केलीं; मा-
झ्या आईच्या पोटीं मला झांकिलें. १४ **मी**
तुझी स्तुति करितों; कां तर मी विस्मित प्रकारें
घडलेला आहें; तुझीं कामें आश्चर्याचीं, ह्मणून
माझा जीव निश्चयें जाणतो. १५ **जेव्हां** मी गुप्त-
पणें उत्पन्न झालों, पृथ्वीच्या आंतल्या ठिकाणीं
सुरचित झालों, तेव्हां माझी आकृति तुजपासून
गुप्त नव्हती. १६ **माझां** अंगें यांतलें एक देखील
नव्हतें, तेव्हां त्यांस तुझ्या डोळ्यानी पाहिलें; आ-
णि तीं दिवसानुदिवस होत होतीं तेव्हां तीं अवघीं
तुझ्या पुस्तकांत लिहिलेलीं होतीं. १७ **तर हे**
देवा, मजविषयीं तुझे विचार किती सूक्ष्म आहेत!
त्यांची संख्या किती मोठी आहे! १८ **मी** त्यां-
ची गणना करूं जातों, तर ते वाळूंपेक्षां अधिक
होतात. मी जागा होतों, तेव्हां मी अजूनहि तुझ्या-

संगतीं आहें. १९ हे देवा, निश्चयें तूं दुष्टाला
तोडून टाकसील; तर अहो हिंसक माणसांनो,
तुह्मी मजपासून दूर व्हा. २० ते तर तुजविषयीं
दुर्विचाराने बोलतात; तुझे वैरी व्यर्थ उठले आ-
हेत. २१ हे परमेश्वरा, जे तुझा द्वेष करितात,
त्यांचा द्वेष मी करितों कीं नाहीं? आणि जे तुज-
वर उठतात, त्यांचा कंटाळा करितों कीं नाहीं?
२२ मी पूर्ण द्वेषाने त्यांचा द्वेष करितों; ते
माझे शत्रू असे त्यांस मोजितों. २३ हे देवा,
तूं मला शोधून माझें ह्रदय जाण; मला पारखून
माझ्या भावना जाण. २४ आणि मजमध्यें विप-
रीत चाल आहे किंवा नाहीं, हें पाहून त्वां मला
सर्वकालिक चालीने वागवावें.

## गीत १४०.

मुख्य वाजंत्र्यास; दावीदाने केलेलें गीत.

हे परमेश्वरा, तूं मला दुष्ट माणसापासून सो-
डीव; बळात्कारी माणसापासून मला राख. २
ते ह्रदयांत दुष्टाई योजितात; सर्व दिवस लढायां-
साठीं मेळा करितात. ३ सापासारिखे ते आप-
ल्या जिभा तीक्ष्ण करितात; आख्शूब सर्पाचें विष
त्यांच्या होटांच्या आंत आहे. सेलाह. ४ हे
परमेश्वरा, तूं मला दुष्टाच्या हातांपासून राख;
बळात्कारी माणसापासून माझें रक्षण कर; त्यांनी
माझीं पावलें ढकलायास योजिलें. ५ गर्विष्ठांनी
मजसाठीं फांस व रज्जु गुप्त ठेविले, वाटेंत जाळें
पसरिलें; मजसाठीं सांपळे मांडिले. सेलाह. ६
म्यां परमेश्वराला ह्मटलें, 'तूं माझा देव हे पर-
मेश्वरा; तूं माझ्या काकुळतींच्या शब्दाकडे कान
लाव.' ७ हे प्रभू, माझ्या तारणाच्या शक्तिका-
री परमेश्वरा, त्वां लढाईच्या दिवशीं माझें डोकें
झांकिलें. ८ हे परमेश्वरा, दुष्टाच्या इच्छा
पूर्ण होऊं देऊं नको; त्याचा दुर्विचार सिद्धीस
जाऊं देऊं नको; ते उंचपण धरितील. सेलाह.
९ जे मला घेरितात त्यांच्या विषाने, त्यांच्या हो-
टांतल्या द्वाडपणाने त्यांस झांकावें. १० त्यांवर
इंगळ पडावे; त्यांनी त्यांस खोल खांचातल्या अ-
ग्नीमध्यें पाडावें, ते उठणार नाहींत. ११ जिभा-
ळ्या माणसाने पृथ्वींत स्थिर न व्हावें; आपत्तीने
नाशापर्यंत बळात्कारी माणसाच्या पाठीस लागावें.
१२ मी जाणतों कीं, परमेश्वर दिनांचा निवाडा,
दुबळ्यांचा न्याय करील. १३ निश्चयें नीतिमान
तुझ्या नांवाची स्तुति करितील; सरळ तुझ्यास-
मोर राहतील.

## गीत १४१.

दावीदाकडून गीत.

हे परमेश्वरा, मी तुला हाक मारितों; तूं मज-
साठीं उतावळी कर; मी तुला हाक मारितों,
तेव्हां माझ्या शब्दाकडे कान लाव. २ माझी
प्रार्थना धूपासारिखी, माझें हातउभारणें संध्याका-
ळच्या नैवेद्यासारिखें तुझ्यासमोर सादर होवो. ३
हे परमेश्वरा, तूं माझ्या तोंडावर पाहरा ठेव;
माझ्या होटांच्या द्वाराचें रक्षण कर. ४ माझें
ह्रदय कुकर्मी माणसांच्यासंगतीं दुष्टपणावर न
वळावें; दुराचरण करायास, कोणत्याहि वाईटाकडे
वळूं देऊं नको; आणि त्यांचीं मिष्टान्नें मला खाऊं
देऊं नको. ५ नीतिमानाने तर मला हाणावें;
उपकार होईल; त्याने माझा निषेध करावा;
मस्तकाचें उटणें होईल; माझें मस्तक अव्हेरणार
नाहीं; अणखी त्यांच्या अनर्थांत माझी प्रार्थना
होईल. ६ त्यांचे न्यायाधीश डोंगराच्या कड्या-
वरून सोडले गेले, तेव्हां त्यांनी माझीं वाक्यें
ऐकिलीं, कारण कीं गोड होतीं. ७ जसें कोणी
भूमी उखळितांना व फोडितांना घडतें तसीं, आ-
मचीं हाडें प्रेतस्थळाच्या तोंडीं पसरलेलीं आ-
हेत. ८ तथापि, हे प्रभू परमेश्वरा, माझे डोळे
तुजकडे आहेत; मी तुझी आशा धरून राहिलों
आहें; तूं माझ्या जिवाला उघडें ठेवूं नको. ९
जो फांस त्यांनी मजसाठीं लाविला, त्यापासून,
आणि दुष्कर्म्यांच्या जाळ्यांपासून मला राख. १०
दुष्टांनी आपल्याच जाळ्यांमध्यें पडावें; इतक्यांत
म्यां पार जावें.

## गीत १४२.

दावीदाकडून; मास्कील; जेव्हां तो गुहेंत होता,
तेव्हांची प्रार्थना.

मी आपल्या शब्दाने परमेश्वराजवळ ओरडेन;
मी आपल्या शब्दाने परमेश्वराजवळ काकु-
ळती करीन. २ मी आपलें हरद्र त्याच्यापुढें ओ-
तून काढीन; त्याच्यापुढें आपल्या संकटाचें निवे-

दन करीन. ३ जेव्हां माझा आत्मा मजमध्यें
बुडतो, तेव्हां माझी वाट तुला कळली आहे; ज्या
मार्गानें म्या चालावें, त्यांत त्यांनीं मजसाठीं फांस
गुप्त मांडिला आहे. ४ तूं उजव्या हाताकडे न्या-
हाळून पाहा, माझा कोणी ओळखणारा नाहीं;
मला आश्रय नाहींसा झाला; माझ्या जिवाला
विचारणारा कोणी नाहीं. ५ हे परमेश्वरा, मी
तुझ्याजवळ ओरडतों; मी ह्मणालों कीं, तूं माझा
आश्रय, जिवंतांच्या लोकीं माझा वांटा आहेस;
६ माझ्या रडगाण्याकडे लक्ष लाव; कां तर मी
फार दुबळा झालों; माझ्या पाठीं लागणाऱ्यांपासून
मला सोडीव, कारण कीं ते मजपेक्षां बळकट आ-
हेत. ७ तुझ्या नांवाची स्तुति करायास, माझा
जीव कोंडींतून काढ; त्वां मजवर उपकार केल्या-
वरून नीतिमान माझ्या चहुंकडे येतील.

## गीत १४३.

दावीदानें केलेलें गीत.

**हे परमेश्वरा**, तूं माझी प्रार्थना ऐक; आपल्या
सत्यतेनें माझ्या काकुळतींकडे कान लाव; आ-
पल्या नीतीनें मला उत्तर दे. २ आपल्या सेवका-
विषयीं न्यायांत जाऊं नको; कां तर तुझ्यापुढें
कोणी जीव नीतिमान ठरणार नाहीं; ३ अणखी
शत्रु माझा प्राण घ्यायाला पाठीं लागला; त्यानें
माझा जीव धुळीस मिळविला; पूर्वी मेलेले यांसा-
रिखीं मला अति काळोखांत वस्ति दिल्ही आहे.
४ आणि माझा आत्मा माझ्यांत बुडून जातो;
माझ्यामध्यें माझें ह्रदय घाबरें आहे. ५ मी
पूर्वीच्या दिवसांची आठवण करितों; तुझ्या सर्व कृ-
त्यांवर ध्यान लावितों; तुझ्या हातांच्या कामाचा
निजध्यास मला लागला आहे. ६ मी आपले
हात तुझ्याजवळ पसरितों; तुझ्यासाठीं माझा प्राण
शुष्क देशासारिखा झाला आहे. सेलाह. ७ हे
परमेश्वरा, तूं उतावळीनें मला उत्तर दे; माझ्या
आत्म्याचा क्षय होतो; तूं आपली दृष्टि मजपासून
लपवूं नको; कां, खांचेंत उतरणाऱ्यासारिखा मी
झालों. ८ तूं आपली दया सकाळीं मला ऐकूं
दे; कां तर माझा भरवसा तुजवर आहे. ज्या
मार्गानें म्या चालावें, तो मला कळीव; कारण कीं
आपला प्राण तुजकडे वर लाविला आहे.
९ हे परमेश्वरा, तूं माझ्या शत्रूंपासून मला सो-
डीव; म्या तुझा आश्रय धरिला आहे. १० तुला
जें आवडतें, तें करायास मला शिकीव; कारण कीं
तूं माझा देव तुझा आत्मा चांगला आहे, मला
सरळ भूमीवर ने. ११ हे परमेश्वरा, तूं आ-
पल्या नांवासाठीं मला सजीव कर; आपल्या नी-
तीनें माझा जीव संकटांतून काढ. १२ आणि
आपल्या दयेनें माझ्या शत्रूंचा संहार कर; आणि
माझ्या जिवाच्या सर्व वैऱ्यांचा नाश कर; कारण
कीं मी तुझा सेवक आहें.

## गीत १४४.

दावीदाकडून.

**परमेश्वराची** स्तुति करावी; तो माझा आश्रय;
माझ्या हातांस युद्ध करायास, माझ्या बोटांस
लढायास शिकवितो. २ तो माझा दयाकारी
व माझा गड, माझें संरक्षण, आणि माझें पळून
जाण्याचें ठिकाण असा मजसीं आहे; तो माझी
ढाल, म्या त्यावर आशा ठेविली आहे; तो माझ्या
लोकाला माझ्याखालीं ठेवणारा. ३ हे परमे-
श्वरा, माणूस काय! कीं त्वां त्याला जाणावें;
मनुष्य वंश काय! कीं त्वां तो मानावा. ४ मा-
णूस शून्यासारिखा आहे; त्याचे दिवस लयास
जाणाऱ्या सावलीसारिखे आहेत. ५ हे परमे-
श्वरा, तूं आपलें आकाश मुरडून उतर; डोंग-
रानीं धूर काढावा, ह्मणून त्यांस शिव. ६ तूं
वीज पाडून त्यांची दाणादाण कर; आपले बाण
सोडून, त्यांस घाबरें कर. ७ आपले हात वरून
लावून मला सोडीव; ह्मणजे मोठ्या पाण्यांतून,
परक्यांच्या हातांतून मला काढ; ८ त्यांचें तोंड
व्यर्थ बोलतें; आणि त्यांचा उजवा हात लबाडी-
चा उजवा हात आहे. ९ हे देवा, मी तुझ्या-
जवळ नवें गायन गायीन; तारपेटीवर दशतंतु
वाद्यावर तुझें कीर्त्तन करीन. १० तो राजांस
तारण देतो; तोच आपल्या सेवक दावीदाला दुष्ट
तरवारीपासून सोडवितो. ११ तूं मला सोडीव
आणि परक्यांच्या हातापासून माझी सुटका कर;
त्यांचें तोंड व्यर्थ बोलतें, आणि त्यांचा उजवा
हात लबाडीचा उजवा हात आहे. १२ यासाठीं
कीं, आमच्या पुत्रांनीं आपल्या तरुणपणांत उफा-
ळाच्या रोंपासारिखें व्हावें; आमच्या कन्यांनीं रा-

जवाळ्याच्या घडलेल्या कोपऱ्यांसारिखें व्हावें. १३
आमच्या कोठ्या भरलेल्या असून वेगवेगळे प्रकार
पुरविणाऱ्या व्हाव्या; आमच्या कुरणांत आमच्या
कळपानीं सहस्रावधि आयुतावधि द्यावीं. १४
आमचीं ढोरें वाहतीं व्हावीं; कांहीं फोडून येणें,
किंवा कांहीं निघून जाणें, आणि आमच्या चव्हा-
ट्यांत कांहीं आरोळी न व्हावी. १५ ज्या लो-
कांस असें आहे, ते धन्य; ज्या लोकांचा देव
**परमेश्वर** आहे, ते धन्य.

## गीत १४५.

दावीदाकडून.

हे माझ्या देवा, तूं राजा, मी तुला उंचावीन;
आणि सदासर्वकाळ तुझ्या नांवाची स्तुति क-
रीन. २ सर्व दिवसीं तुझी स्तुति करीन; आणि
सदासर्वकाळ तुझ्या नांवाचें स्तवन करीन. ३
**परमेश्वर** थोर, आणि फार स्तुतिमान आहे;
त्याचें थोरपण अपार आहे. ४ पिढ्यानपिढी
तुझ्या कृत्यांची प्रशंसा करील, आणि तुझ्या परा-
क्रमाचें निवेदन करील. ५ तुझी स्तुति गौरवी
महानपणाची, आणि मी तुझ्या आश्चर्यकृत्यांच्या
गोष्टींचे विचार काढीन. ६ लोक तुझ्या भयंकर
कृत्यांतला पराक्रम सांगतील आणि मी तुझें थोर-
पण वर्णीन. ७ ते तुझ्या मोठ्या बरेपणाची आ-
ठवण फार करितील, तुझें नीतिमत्त्व गाजवितील.
८ **परमेश्वर** कृपाळू व ममताळू; मंदक्रोध आणि
मोठ्या दयेचा आहे. ९ **परमेश्वर** सर्वांसीं
चांगला; आणि त्याच्या सर्व कृत्यांवर त्याची फार
ममता आहे. १० हे **परमेश्वरा**, तुझीं सर्व
कृत्यें तुला स्तवितात, आणि तुझे भक्त तुझी स्तु-
ति करितात; ११ तुझ्या राज्यांतलें गौरव सां-
गतात, आणि तुझ्या पराक्रमाविषयीं बोलतात;
१२ यासाठीं कीं आपण त्याच्या पराक्रमाचीं कृत्यें
व त्याच्या राज्यांतलें वैभवी गौरव आदामाच्या
संतानांस कळवावें. १३ तुझें राज्य सर्व युगांचें
राज्य; आणि तुझा अधिकार पिढीच्या पिढींतल्या
सर्वांवर आहे. १४ जे पडत आहेत, त्या स-
र्वांस **परमेश्वर** आधार देतो; आणि सर्व ओ-
णव्यांस तो उभें करितो. १५ सर्वांचे डोळे
आशेने तुजकडे लागतात; आणि तूं त्यांचें भक्ष्य
यथाकाळीं त्यांस देतोस. १६ तूं आपल्या मुठी
उघडून सर्व जिवांची इच्छा पूर्ण करितोस. १७
**परमेश्वर** आपल्या सर्व चालींनी पवित्र; आणि
आपल्या सर्व कृत्यांवर उपकारीक आहे. १८
जे सर्व **परमेश्वराला** हाक मारितात, जे सत्य-
तेने त्याला हाक मारितात, त्या सर्वांस तो जवळ
आहे. १९ जे त्याचें भय धरितात, त्यांचा
मनोरथ तो पूर्ण करितो; आणि त्यांचें ओरडणें
ऐकून त्यांस तारितो. २० जे **परमेश्वरावर**
प्रीति करितात, त्या सर्वांस तो राखितो; परंतु
सर्व दुष्टांचा नाश करील. २१ माझें तोंड **पर-**
**मेश्वराची** स्तुति उच्चारील; आणि सर्व देहिक
त्याच्या पवित्र नामाची स्तुति सदासर्वकाळ करील.

## गीत १४६.

तुम्ही **परमेश्वराला** स्तवा; हे माझ्या जिवा,
तूं **परमेश्वराचें** स्तवन कर. २ मी आप-
ल्या आयुष्यभर **परमेश्वराचें** स्तवन करीन;
मी आहें तोंपर्यंत, आपल्या देवाचें कीर्त्तन करीन.
३ अधिकारी, आदामाचा वंशस्थ ज्याकडे तारण
नाहीं, त्यावर तुम्ही भरवसा ठेवूं नका. ४ त्याचा आ-
त्मा निघून जातो; तो आपल्या मातीस फिरून मिळतो;
त्याच दिवशीं त्याच्या योजना नाश पावतात. ५
ज्याला आपल्या सहायावर याकोबाचा देव, ज्या-
ची आशा आपला देव **परमेश्वर** यावर आहे,
तो धन्य. ६ त्याने आकाश व पृथ्वी व समुद्र व
त्यांमध्यें जीं अवघीं तीं उत्पन्न केलीं. तो सत्यता
सर्वकाळ पाळितो. ७ जाचलेल्यांसाठीं न्याय क-
रितो; भुकेल्यांस अन्न देतो. **परमेश्वर** बंदिवा-
नांची सुटका करितो. ८ **परमेश्वर** अंधळ्यांस
दिसे असें करितो. **परमेश्वर** ओणव्यांस उभें
करितो. **परमेश्वर** नीतिमानावर प्रीति करितो.
९ **परमेश्वर** विदेश्यांस पाळितो; अनाथ व वि-
धवा यांस यथास्थित करितो; परंतु दुष्टांची गति
विपरीत करितो. १० **परमेश्वर** सर्वकाळ राज्य
करितो. हे सीयोना, तुझा देव पिढोपिढीं आहे.
तुम्ही **परमेश्वराला** स्तवा.

## गीत १४७.

तुम्ही **परमेश्वराचें** स्तवन करा; कारण कीं उ-
त्तम आहे; आमच्या देवाचें कीर्त्तन करावें,

का तर तें गोड; त्याचें स्तवन रमणीय आहे· २
परमेश्वर यरूशालेम रचितो; इस्राएलांतून जे
घालविलेले, त्यांस तो एकत्र मिळवितो· ३ हृ-
दय फुटलेल्यांस बरें करितो; आणि त्यांच्या जख-
मांवर पट्टी बांधितो· ४ तो तान्यांची गणना क-
रितो; त्या सर्वांस नांवें ठेवितो· ५ आमचा प्र-
भु थोर, आणि मोठ्या बळाचा; त्याचें ज्ञान अप-
रमित आहे· ६ परमेश्वर दुःखितांस यथास्थित
करितो; दुष्टांस भूमीस मिळवितो· ७ तुह्मी
परमेश्वराजवळ स्तुतीने गा; तंतुवाद्यावर आमच्या
देवाचें कीर्त्तन करा· ८ तो ढगानी आकाशाला
झांकितो; भूमीवर पाऊस यथास्थित पाडितो; डों-
गरांवर गवत वाढवितो· ९ तो पशूला आणि
कावळ्याच्या ओरडणाऱ्या, पिलांला भक्ष्य देतो·
१० तो घोड्याच्या पराक्रमाने संतोष पावत नाहीं;
मनुष्याच्या पायानी संतुष्ट होत नाहीं· ११ जे
परमेश्वराचें भय धरितात, जे त्याच्या दयेची
आशा धरून राहतात, त्यांवर तो संतुष्ट आहे.
१२ हे यरूशालेमा, तूं परमेश्वराला वाखाण;
हे सीयोना, तूं आपल्या देवाचें स्तवन कर; १३
कारण कीं त्याने तुझ्या वेसींचे अडसर बळकट
केले; तुझ्यांतील तुझ्या प्रजा यांस आशीर्वाद दि-
ल्हा आहे· १४ तो तुझी सीमा शांत ठेवितो;
पौष्टिक गव्हानी तुला तृप्त करितो· १५ तो आ-
पलें वचन पृथ्वीवर पाठवितो; त्याचा शब्द वेगाने
धावत चालतो. १६ तो लोंकरीसारिखें बर्फ
पाडितो; थिजलेलें दहिंवर राखेसारिखें पसरितो·
१७ आपल्या गारा तुकड्यांसारिख्या पाडितो;
त्याच्या गारापुढें कोण उभा राहील! १८ तो
आपली आज्ञा पाठवून त्यांस विघरितो; आपला
वारा फिरता करितो, पाणी वाहतें. १९ तो आ-
पल्या गोष्टी याकोबाला, आपल्या नेमणुकी व आ-
पले न्याय इस्राएलाला विदित करितो· २० त्या-
ने कोणत्याहि राष्ट्रास असें केलें नाहीं, न्याय तर
त्यानी ते अगदी जाणिले नाहींत. तुह्मी परमे-
श्वराला स्तवा·

## गीत १४८.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; अहो आकाशातले
तुह्मी परमेश्वराला स्तवा; उंच ठिकाणामध्यें
त्याचें स्तवन करा· २ अहो त्याचे सर्व दूत, तु-
ह्मी त्याला स्तवा; अहो त्याचीं सर्व सैन्यें, तुह्मी
त्याला स्तवा· ३ हे सूर्या व चंद्रा, तुह्मी त्याला
स्तवा, अहो प्रकाशमान सर्व तारे, तुह्मी त्याला
स्तवा· ४ आकाशांच्या आकाशांहो, आणि आका-
शांवरलें पाणी, तुह्मी त्याला स्तवा. ५ त्यानी पर-
मेश्वराच्या नांवाला स्तवावें; कारण कीं त्याने
आज्ञा दिल्ही ह्मणजे तीं उत्पन्न झालीं. ६ आ-
णि त्याने त्यांस सदासर्वकाळपर्यंत स्थापिलें; त्याने
नेम लाविला आणि तो टळत नाहीं. ७ अहो
पृथ्वींतले मोठे उरग, आणि समुद्रडोहांतले सर्वहो
तुह्मी परमेश्वराला स्तवा· ८ त्याचें वचन पा-
ळणारा, अग्नि व गारावृष्टि, बर्फ व धुकें, वादळी
वारा· ९ पर्वत व सर्व डोंगर, फळझाडें, व सर्व
एरेजवृक्ष, १० श्वापदें व सर्व पशू, वळवळ-
णारे जंतू व उडणारे पक्षी; ११ पृथ्वींतले राजे,
व सर्व प्रजा, अधिकारी व पृथ्वींतले सर्व
न्यायाधीश, १२ नवेतरणे व तरण्या, आबाळ
वृद्ध, १३ यानी परमेश्वराच्या नांवाला स्तवावें;
कारण कीं केवळ त्याचेंच नांव उंच मानायाचें;
त्याचें गौरव पृथ्वीवरतीं व आकाशावरतीं आहे·
१४ आणि तो आपल्या लोकाचें शिंग उभारितो;
त्याचे सर्व भक्त, त्याच्या जवळचा लोक इस्राएल
संतानें यानी स्तवन करावें. तुह्मी परमेश्वराला
स्तवा·

## गीत १४९.

तुह्मी परमेश्वराला स्तवा; परमेश्वराजवळ
नवें गायन गा; त्याच्या भक्तमंडळींत त्याची
स्तुति करा; २ इस्राएलाने आपल्या उत्पन्नकर-
णाऱ्याविषयीं संतोष करावा; सीयोनातल्या प्रजेने
आपल्या राजाविषयीं हर्षावें· ३ उत्साह मंड-
ळींत त्यानी त्याचें नांव स्तवावें; डफावर व तंतु-
वाद्यावर त्याचें कीर्त्तन करावें; ४ कां तर पर-
मेश्वर आपल्या लोकावर प्रसन्न आहे; तो
दुःखितांस तारणाने शोभमान करितो. ५ भक्तानी
गौरव करून उल्हास करावा; आपल्या अंथरू-
णांवर हर्ष करावा· ६ त्यांच्या गळ्यांत देवाचीं
उंच स्तवनें, आणि त्यांच्या हातांत दुधारी तरवार
असावी; ७ ह्मणजे त्यानी राष्ट्रांचा सूड घ्यावा;

मुलखांस शासनें करावीं; ८ त्यांच्या राजांस
साखळ्यानी; त्यांतल्या श्रीमंतांस लोखंडाच्या
बेड्यानी बंद करावें. ९ त्यांस लिहिलेला न्याय
लागू करावा ह्मणून. हें वैभव त्याच्या सर्व भ-
क्तांसाठीं नेमलेलें आहे. तुह्मी **परमेश्वराला**
स्तवा.

### गीत १५०.

**तु**ह्मी **परमेश्वराला** स्तवा; देवाच्या पवित्र
स्थानीं त्याला स्तवा; त्याच्या सामर्थ्याच्या
अंतराळीं त्याला स्तवा. २ त्याच्या पराक्रमांमुळें
त्याला स्तवा; त्याच्या फार मोठेपणाप्रमाणें त्याला
स्तवा. ३ करणा वाजवितां त्याला स्तवा; तार-
पेटीवर व तंतुवाद्यावर त्याला स्तवा. ४ डफाने
व उत्साह मंडळींत त्याला स्तवा; सारमंडळ व
मनोरंजक यांवर त्याला स्तवा. ५ उंच टाळानी
त्याला स्तवा; नादाच्या झांजानी त्याला स्तवा.
६ प्रत्येक श्वासवानाने **परमेश्वराला** स्तवावें.
तुह्मी **परमेश्वराला** स्तवा.

PROVERBS.

# नीति.

### अध्याय १.

**इ**स्राएलाचा राजा दावीद याचा पुत्र शलमोन
याचीं वचनें. २ असीं कीं ज्ञान आणि विद्या
हीं जाणावीं, बुद्धीचीं वचनें समजावीं; ३ ज्ञान,
न्याय व नीति व प्रमाणिकपण यांची विद्या प्राप्त
करून घ्यावी; ४ भोळ्यांस चातुर्य, तरण्याला
विद्या व विवेक हीं द्यावीं. ५ बुद्धिमान ऐकेल
आणि विद्या वाढवील, आणि विवेकी सत्संकल्प पा-
वेल; ६ असें कीं ह्मण व तिचा अर्थ ज्ञान्यांचीं
वचनें, व त्यांचीं दृष्टकूटें समजावीं.

७ **परमेश्वराचें** भय ज्ञानाचा प्रारंभ आहे.
परंतु मूर्ख हें ज्ञान व उपदेश अवमानितात. ८
माझ्या लेंकरा, तूं आपल्या बापाचा उपदेश ऐकून
घे, आणि आपल्या आईचा नेम अव्हेरूं नको. ९
कां कीं ते तुझ्या डोईला सुशोभित वेष्टन, आणि
तुझ्या गळ्यांत माळा असे होतील.

१० माझ्या लेंकरा, जर पापी तुला भुलथाप
देऊं लागले तर तूं ऐकूं नको. ११ जर ते
ह्मणतात कीं, "आह्मासंगतीं ये, आपण रक्त पाडा-
याला टपूं, उगीच निर्दोषासाठीं लपूं; १२ मृतलो-
कावाणीं त्यांस जितेंच आणि खाचेंत जाणाऱ्यांसा-
रिखें सगळेंच गिळूं; १३ आपण सर्व मोलवान
द्रव्य पावूं; आपलीं घरें लुटीने भरूं; १४ तूं
आह्मामध्यें आपलें वतन घे, आह्मा सर्वांस एकच
पिशवी असो;" १५ तर माझ्या लेंकरा, त्यांसं-
गतीं मार्गांत चालूं नको, त्यांच्या वाटेपासून तूं आ-
पला पाय आकळून घे. १६ कां कीं त्यांचे पाय
दुष्कर्माकडे धांवतात, आणि रक्त पाडायाला त्वरा
करितात. १७ निश्चयें कोणत्याहि पक्ष्याच्यादेखतां
जाळें पसरणें व्यर्थ आहे. १८ ते तर त्यांच्याच
रक्तासाठीं टपतात, ते त्यांच्याच जीवांसाठीं लपतात.
१९ प्रत्येक लाभपरायण जो द्रव्यधन्याचा प्राण
घेतो त्याचे मार्ग तसेच आहेत.

२० ज्ञान बाहेर गाजतें, तें आळ्यांत आपला
शब्द उच्चारितें. २१ मेळ्याच्या चवाठ्यांत, द्वा-

रमार्गांत तें घोषण करितें, नगरांत तें आपलीं
वचनें बोलतें. २२ अविवेक्यानों, तुह्माला कोठ-
पर्यंत अविवेक आवडेल? आणि निंदक निंदा क-
रीत आनंदतील, आणि मूर्ख ज्ञानाला द्वेषितील?
२३ माझ्या संबोधावरून तुह्मी फिरा; पाहा, मी
आपला आत्मा तुह्माला पोहंचवीन, मी आपलीं
वचनें तुह्माला कळवीन.

२४ म्यां बोलाविलें, आणि तुह्मी उपेक्षा केली;
म्यां आपला हात पुढें केला, आणि कोणी मानिलें
नाहीं; २५ परंतु तुह्मी माझा सर्व बोध अव्हेरला,
आणि माझा निषेध पत्करिला नाहीं; २६ यामुळें
मीहि तुमच्या दुर्दशेला हांसेन, तुह्माला भय वा-
टेल, तेव्हां उपहास करीन; २७ जेव्हां तुह्माला
वादळासारिखें भय लागेल, आणि तुह्मावर दुर्दशा
तुफानाप्रमाणें येईल, संकट व संकोच जेव्हां तु-
ह्मावर येतील; २८ तेव्हां ते मला हाक मारि-
तील, परंतु मी उत्तर देणार नाहीं; ते झटून मला
शोधतील, परंतु मी त्यांला प्राप्त होणार नाहीं.
२९ कारण कीं त्यांनी ज्ञान द्वेषिलें, आणि परमे-
श्वराचें भय निवडिलें नाहीं. ३० ते माझा
बोध घेईनात, त्यांनी माझा सर्व निषेध अवमानि-
ला. ३१ तर ते आपल्या मार्गाच्या फळांतलें
खातील, आणि आपल्या संकल्पांनी तृप्त होतील.
३२ कां कीं निर्बुद्धांचें एकीकडे फिरणें हें त्यांला
वधील; आणि मूर्खांचें स्वस्थपण त्यांला नाशील.
३३ परंतु जो माझें ऐकतो, तो सुरक्षित वसेल,
आणि अरिष्टाच्या भयावांचून स्वस्थ राहील.

## अध्याय २.

माझ्या लेंकरा, तूं जर माझीं वचनें घेसील,
आणि माझ्या आज्ञा आपल्याजवळ ठेवि-
सील; २ अशासाठीं कीं, त्वां आपला कान ज्ञा-
नाकडे द्यावा, आणि बोधाकडे आपलें मन लावावें;
३ होय जर तूं विवेकासाठीं आरोळी करसील,
आणि बुद्धीसाठीं आपला शब्द मोठ्याने उच्चार-
सील; ४ तूं जसें रुप्याचें तसें तिचा शोध,
आणि जसें गुप्त ठेवीचें तसें तिचें समीक्षण जर
करसील; ५ तर तूं परमेश्वराचें भय समज-
सील, आणि देवाचें ज्ञान तुला प्राप्त होईल. ६
कां कीं परमेश्वर ज्ञान देतो, त्याच्या मुखांतून
विद्या व विवेक येतात. ७ तो प्रमाणिकांसाठीं
कुशल राखितो, जे यथार्थतेने वर्त्ततात त्यांला तो
ढाल असा आहे. ८ न्यायाच्या वाटा जपाव्या
ह्मणून तो आपल्या पवित्रांचा मार्ग रक्षितो. ९
तेव्हां न्याय व नीति व प्रमाणिकपण, प्रत्येक स-
न्मार्ग समजसील.

१० ज्ञान तुझ्या मनांत आलें, आणि विद्या
तुझ्या जीवास रम्य झाली, ह्मणजे ११ विचार
तुला रक्षील, विवेक तुला संभाळील, १२ तुला
दुष्कर्म्यांच्या मार्गापासून कपटी मनुष्यापासून मुक्त
करावें ह्मणून; १३ ते अंधकाराच्या मार्गांत चा-
लायाला सत्यतेच्या वाटा टाकितात; १४ ते
दुष्कर्म करायाला हर्षतात, आणि दुष्कर्म्यांच्या
कुटिलाचाराविषयीं उल्लासतात; १५ त्यांच्या
वाटा वांकड्या आहेत, आणि ते आपल्या मार्गांत
वावगे चालतात. १६ तुला परनारीपासून, जी
परस्त्री आपल्या वचनांनी आर्जव करिती, १७
जिने आपल्या तरुणपणाचा संभाळणारा सोडिला
आणि जी आपल्या देवाची संधा विसरली आहे,
तिजपासून मुक्त करावें ह्मणून. १८ कां कीं
तिचें घर मरणाकडे, आणि तिचे मार्ग मेलेल्यां-
कडे जातात. १९ तिजकडे कोणी गेले, तर परत
येत नाहींत, आणि जीवनाचे मार्ग पावत नाहींत.
२० अशासाठीं कीं त्वां चांगल्या मनुष्यांच्या मा-
र्गांत जावें आणि न्यायींच्या वाटा धरून चालावें.
२१ कां कीं प्रमाणिक देशांत वसतील, आणि
यथार्थजन त्यांत शेष राहतील. २२ परंतु दुष्ट
पृथ्वींतून नाहींसे होतील, आणि अधार्मिकांस तीं-
तून उपटून टाकितील.

## अध्याय ३.

माझ्या लेंकरा, माझा नेम विसरूं नको, आणि
तुझें मन माझ्या आज्ञा संभाळो. २ कां
कीं त्याकडून तुला दीर्घायुष्य व वयोवृद्धि व कुशल
प्राप्त होईल. ३ दया आणि सत्यता यांनी तुला
न सोडावें, यांस तूं आपल्या गळ्यांत बांध, यांस
तूं आपल्या हृदयाच्या पाठीवर लिही. ४ असें
तूं देवाच्या व मनुष्याच्या दृष्टींत प्रसाद व कुशल
पावसील.

५ तूं आपल्या सर्व हृदयाने परमेश्वरावर

भाव ठेव, आणि आपल्या विवेकाचा भरंवसा धरूं
नको. ६ तूं आपल्या सर्व मार्गांत त्याला जाण,
म्हणजे तो तुझ्या वाटा निटावील.
७ तूं आपल्या दृष्टीने ज्ञानी असूं नको, **परमे-
श्वराचें** भय धर, आणि दुष्कर्मापासून दूर ऐस.
८ हें तुझ्या नाभीला आरोग्य आणि तुझ्या हाडां-
ला मज्जा असें होईल. ९ तूं आपल्या द्रव्याने
आणि आपल्या सर्व उत्पत्तीच्या प्रथमफलाने **पर-
मेश्वराचा** सन्मान कर; १०. म्हणजे तुझीं
कोठारें पुष्कळपणें भरतील, आणि तुझीं कुंडें नव्या
द्राक्षारसाने उतटतील.
११ माझ्या लेंकरा, तूं **परमेश्वराची** शिक्षा
अवमानूं नको, आणि त्याच्या शासनाला कंटाळूं
नको. १२ कां कीं ज्याजवर **परमेश्वर** आवड
ठेवितो, त्याला तो शासितो, जसा बाप आपल्या
प्रिय पुत्रास तसा.
१३ ज्या मनुष्याला ज्ञान सांपडलें, आणि जो
मनुष्य विवेक पावला आहे, तो धन्य. १४ कां कीं
त्याची प्राप्ति रुप्याच्या प्राप्तिपेक्षां, आणि त्याचा
लाभ उत्कृष्ट सोन्यापेक्षां उत्तम आहे. १५ तें
माणिकांपेक्षां मोलवान आहे, आणि जे सर्व पदार्थ
तुला इष्ट असतात ते त्यासीं बरोबरी करायाजोगे
नाहींत. १६ त्याच्या उजव्या हातांत दीर्घायुष्य
आणि त्याच्या डाव्या हातांत धन व गौरव आहे.
१७ त्याचे मार्ग आनंदाचे मार्ग, आणि त्याच्या
सर्व वाटा कुशल आहेत. १८ जे तें धरितात,
त्यांला तें जीवनाचें झाड आहे, आणि जे तें बाळ-
गतात, ते प्रत्येक धन्य आहेत. १९ **परमेश्व-
राने** ज्ञानाकडून पृथ्वीचा पाया घातला, बुद्धीकडून
त्याने आकाशें स्थापिलीं. २० त्याच्या विद्येने पृथ्वी
फुटून डोह झाले; आणि आभाळांतून धुई गळती.
२१ माझ्या लेंकरा, हे तुझ्या डोळ्यापासून
दूर जाऊं नयेत, तूं सुबोध व विवेक संभाळीत
जा; २२ म्हणजे हे तुझ्या प्राणाला जीवन,
आणि तुझ्या गळ्याला शोभा असे होतील. २३
तेव्हां तूं आपल्या मार्गांत सुखरूप चालसील,
आणि तुझा पाय ठेंचळणार नाहीं. २४ तूं निज-
सील तेव्हां भिणार नाहींस, होय, तूं निजलास
म्हणजे तुझी निद्रा सुखाची होईल. २५ तूं
अकस्मात झालेल्या भयामुळें अथवा दुष्टाचा नाश
आला तरीं त्याजमुळें डचकूं नको. २६ कां कीं
**परमेश्वर** तुझें भावपात्र होईल, आणि तुझा पाय
न सांपडावा म्हणून त्याला राखील.
२७ तूं हित करायाला समर्थ असलास तर
ज्यांचें हित करावयाचें आहे, त्यांपासून अडकवून
ठेवूं नको. २८ तुझ्याजवळ द्रव्य असलें तर
तूं जा, मग परत ये, म्हणजे उद्यां मी देईन, असें
तूं आपल्या शेजाऱ्याला म्हणूं नको. २९ तूं आ-
पल्या शेजाऱ्यावर वाईट योजूं नको, तो तुजजवळ
निर्भय राहतो म्हणून.
३० मनुष्यांने जर तुझें वाईट केलें नाहीं, तर
त्यासीं उगीच विवाद करूं नको.
३१ तूं पीडकाची हेवा करूं नको, आणि त्या-
च्या मार्गांतला कोणताहि निवडूं नको. ३२ कां
कीं **परमेश्वराला** कुटिलाचा वीट वाटतो, परंतु
प्रमाणिकासीं त्याचें मित्रत्व आहे.
३३ **परमेश्वराचा** शाप दुष्टाच्या घरात आहे,
परंतु तो न्यायींच्या निवासाला आशीर्वाद देतो.
३४ निश्चयें तो निंदकांला निंदितो, परंतु दीनांवर
प्रसाद करितो. ३५ ज्ञानी गौरवाचा विभाग पा-
वतील, परंतु मूर्खांचें पदवीवर चढणें लज्जाच
होईल.

## अध्याय ४.

लेंकरानों, बापाचा उपदेश ऐका, आणि बोध
जाणायाला मन लावा. २ कां कीं मी तुम्हा-
ला उत्तम विद्या देतों, माझा नेम सोडूं नका. ३
कारण मी आपल्या बापाचा पुत्र होतों, आपल्या
आईच्या दृष्टींत सुकुमार व लाडका होतों. ४
तो तर मला शिकवी, आणि मला म्हणे, तुझें मन
माझीं वचनें धरो, माझ्या आज्ञा पाळून जिवंत
ऐस. ५ ज्ञान प्राप्त कर, बोध प्राप्त कर, याला
विसरूं नको, आणि माझ्या मुखच्या वचनांपासून
वळूं नको. ६ त्याला सोडूं नको, म्हणजे तें तुला
राखील, त्याजवर आवड ठेव, म्हणजे तें तुला
संभाळील. ७ मुख्य अर्थ ज्ञान आहे, म्हणून
ज्ञान प्राप्त कर, आणि आपल्या सर्व प्राप्तीसहित
बोध प्राप्त कर. ८ त्याला उंचाव म्हणजे तें तुला
थोर करील; त्वां त्याला आलिंगिलें, म्हणजे तें
तुला गौरवील. ९ तें तुझ्या डोईला शोभेचें

वेष्टन देईल, सुंदरमुकुट तुला सोंपील. १० माझ्या
लेंकरा, माझीं वचनें ऐकून घे, म्हणजे तुझे आयु-
ष्याचीं वर्षें बहुत होतील. ११ म्यां तुला ज्ञा-
नाचा मार्ग शिकविला आहे, म्यां तुला प्रमाणिक-
पणाच्या वाटांत चालविलें आहे. १२ तूं चाल-
तांना तुझीं पावलें संकुचित होणार नाहींत, आणि
धांवसील तेव्हां अडखळणार नाहींस. १३
उपदेश धरून ठेव सोडूं नको, तो संभाळ, कां तर
तो तुझें जीवनच आहे.
१४ दुष्टांच्या वाटेंत शिरूं नको, आणि दुष्क-
र्म्यांच्या मार्गांत चालूं नको. १५ त्याला वर्ज,
त्याकडून जाऊं नको, त्यापासून वळून जा. १६
कां कीं ते दुष्कर्म केल्यावांचून झोंप घेत नाहींत,
आणि कोणाला पाडल्याशिवाय त्यांला झोंप ला-
गत नाहीं. १७ कां तर ते दुष्टतेचें अन्न खातात,
आणि बलात्काराचा द्राक्षारस पितात. १८ परंतु
जो प्रकाशणारा उजेड उत्तरोत्तर दुपारपर्यंत प्रका-
शत चालतो, त्यासारिखी न्यायींची गति असती.
१९ दुष्टांचा मार्ग काळोखावाणीं असतो, ते कशा-
सीं अडखळतात, हें त्यांला कळत नाहीं.
२० माझ्या लेंकरा, माझ्या गोष्टींकडे मन लाव,
माझ्या वचनांकडे कान दे. २१ तीं तुझ्या डो-
ळ्यांपासून दूर न जावीं, तीं तूं आपल्या हृदयामध्यें
राख. २२ कां कीं ज्यांला तीं सांपडतात, त्यांला
तीं जीवनच आहेत, आणि त्यांच्या सर्व देहाला
आरोग्य आहेत.
२३ प्रत्येक रक्षणार्थापेक्षां तूं फार चौकशीनें
आपलें हृदय राख, कां कीं त्यांतून वर्त्तणुकीचे झरे
निघतात. २४ तूं आपणापासून कुटिल बोलणें
टाक, आणि ओंठांचा वाकडेपणा तूं आपणापासून
दूर कर. २५ तुझे डोळे नीट समोर अवलोकन
करोत, आणि तुझ्या पापण्या तुजपुढें धोपट पाहोत.
२६ तूं आपल्या पायांच्या गतीविषयीं सावध ऐस,
आणि तुझे सर्व मार्ग सिद्ध असोत. २७ उज-
व्याकडे अथवा डाव्याकडे वळूं नको, तूं आपला
पाय दुराचारापासून दूर राख.

## अध्याय ५.

माझ्या लेंकरा, माझ्या ज्ञानाकडे मन लाव, माझ्या
बोधाकडे तूं आपला कान दे. २ यासाठीं
कीं, त्वां विवेक बाळगावा, आणि तुझ्या ओंठांनी
विद्या राखावी.
३ कां कीं परनारीचे ओंठ मधाच्या शिशासा-
रिखे गळतात, आणि तिचें मुख तेलापेक्षां मऊ
असतें. ४ परंतु तिचा परिणाम किराइतासा-
रिखा कडू, दुधार तरवारीसारिखा तिखट आहे. ५
तिचे पाय मरणाकडेस उतरतात, तिचीं पावलें
मृतलोकास लागतात. ६ त्वां जीवनाच्या वाटेला
सावध नसावें म्हणून तिच्या गति चंचल असतात,
त्या तुझ्यानें जाणवत नाहींत. ७ तर आतां लें-
करानों, माझें ऐका, आणि माझ्या मुखच्या वचनां-
पासून दूर जाऊं नका. ८ तूं आपला मार्ग तिज-
पासून दूर राख, आणि तिच्या घराच्या दाराजवळ
जाऊं नको. ९ यासाठीं कीं, त्वां आपलें गौरव
दुसऱ्यांला, आणि आपलीं वर्षें क्रूरांला न द्यावीं.
१० तुझ्या धनानें परकीय तृप्त न व्हावे, आणि
तुझीं श्रमफलें अन्याच्या घरांत नसावीं. ११
आणि त्वां आपल्या अंतकाळीं आपलें मांस व आ-
पलें शरीर नष्ट झाल्यावर शोक करीत १२ न
म्हणावें कीं, म्यां संबोधाला कसें द्वेषिलें, आणि
माझ्या हृदयानें शासन कसें अवमानिलें. १३
आणि म्यां आपल्या शिक्षकांचा शब्द ऐकिला
नाहीं, आपल्या बोधकांकडे आपला कान लाविला
नाहीं. १४ मेळा आणि सभा यांमध्यें मी बहुत-
करून सर्व दुष्कर्मांत असें.
१५ तूं आपल्या कूपांतून पाणी आणि आपल्या
आडांतून वाहतीं पाणी पी. १६ तुझे झरे बा-
ळींत आणि पाण्याचे ओघळ चवाठ्यांत वाहोत.
१७ ते तुझेच मात्र असोत, आणि तुजसहित अ-
न्यांचे नसोत. १८ तुझा झरा आशीर्वादित असो,
आणि तूं आपल्या तरुणपणाच्या स्त्रीसीं हर्षित ऐस.
१९ आवडती हरिणी व प्रिय रानशेळी यांप्रमाणें
तिचे स्तन तुला सर्वदा तृप्त करोत, आणि नित्य
तिच्या आवडीनें सुमद ऐस. २० तर माझ्या लें-
करा, त्वां परनारीकडून कां मोहित व्हावें, आणि
परस्त्रीच्या उराचें आलिंगन कां करावें? २१ कां
कीं मनुष्याचे मार्ग परमेश्वराच्या डोळ्यांसमोर
आहेत, आणि तो त्याच्या सर्व गतींला जपतो.
२२ दुष्टाचे अन्याय त्यालाच धरितील, आणि
तो आपल्या पापाच्या बंधांत सांपडेल. २३ तो

संबोधावांचून मरेल, आणि आपल्या मूर्खपणाने
बहकेल.

## अध्याय ६.

माझ्या लेंकरा, जर तूं आपल्या मित्राचा जा-
मीन झालास, जर परकीयाला त्वां टाळी
दिल्ही, तर २ तूं आपल्या मुखच्या वचनांकडून
पाशांत पडला आहेस, तूं आपल्या मुखच्या वच-
नांकडून सांपडला आहेस. ३ तर माझ्या लें-
करा, तूं आपल्या मित्राच्या हातीं आलास, ह्मणजे
हें करून मुक्त हो, तूं जा, आणि नम्र होऊन आ-
पल्या मित्राला आग्रह कर. ४ तूं आपल्या डो-
ळ्यांला निद्रा, आणि आपल्या पांपण्यांला तंद्रा
घेऊं देऊं नको. ५ जसें शिकाऱ्याच्या हातांतून
हरिणाला, अथवा जसें फांसेपारध्याच्या हातांतून
पक्ष्याला, तसें तूं आपणाला मुक्त कर.

६ आळशारे, मुंगीकडेस जा, तिचे मार्ग पाहून
तूं विद्वान हो. ७ तिला कोणी नायक, मोकादम,
अथवा अधिकारी नसतां ८ ती उन्हाळ्यांत
आपलें अन्न सिद्ध करिती, आणि कापणीच्या स-
मयीं आपलें खाणें गोळा करून ठेविती. ९ अरे
आळशा, कोठपर्यंत निजसील? तूं आपल्या झोंपें-
तून केव्हां उठसील? १० अणखी थोडसी निद्रा,
अणखी थोडशा डुकल्या, अणखी निजायाला हात
थोडेसे पोटाळावे. ११ ह्मणजे तुझें दरिद्र वाट-
सरूसारिखें आणि तुझी गरिबी हत्यारबंद मनु-
ष्यासारिखी येईल.

१२ दुर्जन मनुष्य, वाईट पुरुष कपटवाणीने
चालतो. १३ तो आपले डोळे मिचकाविते आ-
पल्या पायानी बोलतो, आपल्या बोटानी शिकविती.
१४ त्याच्या मनांत कपट असतें, तो नित्य दुष्कर्म
योजितो, झगडे उठवितो. १५ यामुळें त्याची वि-
पत्ति अकस्मात् येईल, तो एकाएकीं निरुपाय चुरा-
डा होईल.

१६ ह्या साहा गोष्टी परमेश्वर द्वेषितो, होय
सात त्याला वीट अशा आहेत. १७ गर्वदृष्टि,
लबाड बोलणारी जीभ, आणि निर्दोषरक्त पाड-
णारे हात, १८ दुष्टसंकल्प योजणारें हृदय,
दुष्कर्माकडे त्वरित धांवणार पाय, १९ खोटें
बोलणारा असा असत्य साक्षी, आणि भावांमध्यें
तंटे उठविणारा.

२० माझ्या लेंकरा, तूं आपल्या बापाची आ-
ज्ञा पाळ, आणि आपल्या आईचा नेम अव्हेरूं
नको. २१ तीं तूं नीत्य आपल्या हृदयासीं आंव-
ळून धर, आणि तीं तूं आपल्या गळ्यांत बांध.
२२ तूं चालत असतां ती तुला नेईल, तूं निज-
लास ह्मणजे ती तुला रक्षील, आणि जागृत हो-
सील तेव्हां ती तुसीं संभाषण करील. २३ कां
कीं आज्ञा दीप आहे, आणि नेम प्रकाश आहे,
आणि संबोधाचे निषेध हें जीवनाचा मार्ग असे
आहेत. २४ तुला दुष्ट स्त्रियेपासून, परनारीच्या
जिभेच्या खुशामतीपासून रक्षायाला. २५ तूं
आपल्या हृदयांत तिच्या सुंदरतेची इच्छा धरूं
नको, आणि तिने आपल्या पापण्यांकडून तुला
धरूं नये. २६ कां कीं व्यभिचारिणीच्या
योगाने मनुष्य भाकरीवर येतो, आणि जारक-
र्मिणी प्रिय जीवाची पारध करील. २७ मनु-
ष्याने आपल्या ओंटींत अग्नि घेतला, तर त्याचीं
वस्त्रें जळणार नाहींत काय? २८ कोणी
जर निखाऱ्यांवर चालला, तर त्याचे पाय
पोळणार नाहींत काय? २९ जो आपल्या
शेजाऱ्याच्या स्त्रियेपासीं जातो, तो तसाच आहे,
जो कोणी तिला स्पर्शितो तो निर्दोष अस-
णार नाहीं. ३० चोर भुकेला असतां, जर
त्याने आपला जीव तृप्त करायासाठीं कांहीं चो-
रलें, तर लोक त्याला अव्हेरीत नाहींत. ३१
परंतु जर सांपडला, तर तो सातपट परत भरून
देईल, तो आपल्या घरचें सर्व द्रव्य देईल. ३२
परंतु जो स्त्रीसीं जारकर्म करितो, तो बुद्धिहीन
आहे, जो असें करितो, तो आपल्या जीवास ना-
शितो. ३३ पीडा आणि अप्रतिष्ठा त्याला प्राप्त
होतील, आणि त्याची अपकीर्त्ति बुडणार नाहीं.
३४ कां कीं शंका पुरुषाचें संतापन आहे, ह्मणून
सूड घेण्याच्या दिवसीं तो क्षमा करणार नाहीं.
३५ तो कांहीं खंडणीला मानणार नाहीं, आणि
त्वां जरी बहुत दानें दिल्हीं, तरी तो अनुकूल हो-
णार नाहीं.

## अध्याय ७.

माझ्या लेंकरा, माझीं वचनें राख, आणि मा-
झ्या आज्ञा तूं आपल्याजवळ ठेव. २ तूं

आज्ञा पाळ, ह्मणजे वांचसील, आणि तूं आपल्या
डोळ्याच्या पुतळीप्रमाणें माझा नेम पाळ. ३ तीं
तूं आपल्या बोटांला बांध, तीं तूं आपल्या हृदया-
च्या पाटीवर लिही. ४ तूं माझी बहीण आहेस,
असें ज्ञानाला ह्मण, आणि बोधाला आपला ज्ञाति
ह्मण. ५ त्यानी तुला परनारीपासून, जी परस्त्री
आपल्या वचनानी आर्जव करिती; तिजपासून
रक्षावें ह्मणून.

६ कां कीं म्या आपल्या घराच्या खिडकींतून
आपल्या जाळींतून अवलोकन केलें. ७ आणि
मूर्खांमध्यें पाहिलें, म्या तरुणांमध्यें एक बुद्धिहीन
तरुण देखिला. ८ तो आळींतून तिच्या कोनाज-
वळून जात होता, आणि तो तिच्या घराकडच्या
वाटेनें ९ तिनसांजा, संध्याकाळीं, मध्यरात्रीं, आ-
णि काळोखांत चालला. १० तेव्हां पाहा, एक
कळवंतिणीचा पोषाग केलेली आणि मनाची धूर्त्त
स्त्री त्याला भेटली. ११ ती मोठ्याने बोलणारी
आणि हट्टी आहे, आणि तिचे पाय तिच्या घरीं
राहत नाहींत. १२ ती कधीं कधीं बाहेर, कधीं कधीं
आळ्यांत आहे, आणि प्रत्येका कोनाजवळ टपती.
१३ तिने त्याला धरिलें, आणि त्याला चुंबिलें,
तिने निर्लज्ज तोंडाने त्याला ह्मटलें, १४ मजज-
वळ शांतिकारक यज्ञ आहेत, आज म्या आपले
नवस फेडिले आहेत. १५ याकारितां तुला भेटा-
याला, तुला शोधायाला मी बाहेर आलें आहें,
आणि तूं मला सांपडला आहेस. १६ म्या आ-
पला पलंग अंथरुणानी वेलबुटीच्या वस्त्रानी, मि-
सरी स्वच्छ पांढऱ्या वस्त्राने मऊमऊ केला आहे.
१७ म्या आपल्या गादीला बोळ, अगरु, दाल-
चिनी, फांसल्या आहेत. १८ तूं ये, आपण
सकाळपर्यंत प्रीतीने रमून तृप्त होऊं, आपण परस्पर
आवडीने उल्हासूं. १९ कां कीं पति घरीं नाहीं,
तो दूर प्रवासास गेला आहे. २० त्याने आप-
णासंगतीं पैक्याचें गांठोडें घेतलें आहे, तो नेम-
लेल्या वेळेस घरीं येईल. २१ तिने आपल्या महा-
चातुर्याने त्याला भुलविलें, आपल्या ओंठांच्या
खुशामतीने त्याला मोहिलें. २२ लागलाच तो
तिच्या पाठीमागून चालला, जसा बैल खाटीक-
याला अथवा जसा मूर्ख खोड्याच्या शिक्षेला
जसा. २३ तीर त्याच्या काळजाच्या पार
जाईपर्यंत, जसा पक्षी पाशाकडे त्वरा करितो, आ-
णि तो त्याच्या जीवासाठीं आहे, हें जाणत
नाहीं तसा.

२४ तर आतां लेंकरानों, माझें ऐका, आणि
माझ्या मुखच्या वचनांकडे मन लावा. २५ तुझें
मन तिच्या मार्गांकडे वळूं नये, तूं तिच्या वाटांत
बहकून शिरूं नको. २६ कां कीं तिने घायाळ
करून बहुत पाडिले आहेत, होय, तिने बहुत
पराक्रमी पुरुषाला मारिलें आहे. २७ तिचें
घर मृतलोकाकडचा मार्ग आहे, तो मरणाच्या
खोल्यांकडे उतरतो.

## अध्याय ८.

ज्ञान हाक मारीत नाहीं काय? आणि बोध
आपला शब्द गाजवीत नाहीं काय? २
तें उंच जाग्यांच्या शिखरीं मार्गांजवळ वाटांच्या
प्रदेशीं उभें राहतें, ३ तें वेशीजवळ, नगराच्या
मुखावर, दारांच्या प्रवेशीं गाजतें; ४ मनुष्या-
नों, तुह्माला मी हाक मारितों, आणि मनुष्यवंशां-
कडे माझा शब्द आहे. ५ मूढानों, विवेक सम-
जा; आणि मूर्खांनों, बुद्धि उमजा. ६ मी उत्तम
गोष्टी बोलतों, आणि माझ्या ओंठांचें उघडणें
प्रमाणिक गोष्टींविषयीं आहे, ह्मणून तुह्मी ऐका.
७ कां कीं माझें मुख खरें बोलेल, आणि माझ्या
ओंठांला दुष्टपणाचा वीट वाटतो. ८ माझ्या
मुखचीं सर्व वचनें न्यायाचीं आहेत, त्यांत कांहीं
वांकडें अथवा कुटिल नाहीं. ९ विवेक्याला तीं
सर्व ठीक आहेत, आणि विद्या पावलेल्यांला प्रमा-
णिक आहेत. १० रुपें तर घेऊं नका, परंतु मा-
झा संबोध घ्या; आणि निवडक सोन्यापेक्षां विद्या
घ्या. ११ कां तर ज्ञान माणिक्यांपेक्षां उत्तम
आहे, आणि सर्व इष्ट पदार्थ त्यासीं बरोबरीस
येण्याजोगे नाहींत. १२ मी ज्ञान विवेकासीं राह-
तों, आणि सद्युक्तींची विद्या काढितों. १३ पर-
मेश्वराचें भय दुष्कर्मांचें द्वेषणें आहे, गर्व व
अभिमान व कुमार्ग व कुटिलमुख यांला मी द्वेषि-
तों. १४ मसलत व सुबोध हीं माझीं आहेत,
मी बुद्धि आहें, मला सामर्थ्य आहे. १५ मज-
कडून राजे राज्य करितात, आणि अधिकारी [illegible]
नेमून ठेवितात. १६ मजकडून अधिपति, [illegible].

व पृथ्वीचे सर्व न्यायाधीश आधिकार करितात·
१७ जे मजवर प्रीति करितात त्यांजवर मी प्रीति
करितों, आणि जे झटून मला शोधितात त्यांला मी
सांपडेन. १८ धन व गौरव, टिकणारें द्रव्य व
न्याय हीं मजजवळ आहेत· १९ माझें फल
सोन्यापेक्षां, निर्मळ सोन्यापेक्षांहि, आणि माझी
प्राप्ति निवडक रुप्यापेक्षां उत्तम आहे· २० न्या-
याच्या मार्गांत नीतीच्या वाटांमध्यें मी चालवितों,
२१ जे मजवर प्रीति ठेवितात, ते संपत्ति मिळ-
वीत असें म्या करावें ह्मणून; आणि त्यांचीं भं-
डारें मी भरीन· २२ **परमेश्वराने** आपल्या
मार्गाच्या आदीं, आपल्या पुरातन कर्मीपूर्वी माझें
धारण केलें· २३ अनादि कालापासून, आदीपा-
सून पृथ्वीच्या पूर्वी मी अभिषिक्त झालों· २४
जेव्हां डोह नव्हते, जेव्हां पाणी वाहते झरे नव्हते,
तेव्हां मी जन्मलों· २५ पर्वत ठाम झाल्यापूर्वी,
डोंगरांच्या पूर्वी मी जन्मलों· २६ जेव्हां त्याने
पृथ्वी व शेतें व भूमिधूलीचा परमाणु, हीं उत्पन्न
केलीं नव्हतीं तेव्हां· २७ जेव्हा त्याने आकाशें
सिद्ध केलीं, जेव्हां त्याने डोहाच्या व्यासावर परि-
धि नेमिला, तेव्हां मी तेथें होतों. २८ जेव्हा
त्याने वरतीं आभाळें दृढ केलीं, जेव्हां डोहाचे
झरे बळाविले; २९ पाण्यें त्याच्या सीमेवर न
उल्लंघावीं ह्मणून जेव्हां त्याने समुद्रासाठीं मर्यादा
ठेविली, त्याने जेव्हा पृथ्वीचे पाये नेमिले, ३०
तेव्हां मी त्याजवळ पाळलेल्यासारिखा होतों, आ-
णि नित्य मी त्याचें आनंदपात्र असें मी त्यासमोर
सर्वदा संतोष करीं· ३१ त्याच्या पृथ्वीच्या वसण्या
योग्या भूमीविषयीं मी संतोष करीं, आणि मनुष्य-
जातीवर माझे आनंद असत· ३२ तर आतां
लेंकरानों, माझें ऐका, कां तर जे माझे मार्ग धरून
चालतात, ते धन्य आहेत· ३३ संबोध ऐकून
घ्या, आणि ज्ञानवान व्हा, त्याला अव्हेरूं नका·
३४ जो मनुष्य माझ्या दारशाखांजवळ जागत,
माझ्या दारस्तंभांजवळ वाट पाहत माझें ऐकतो तो
धन्य. ३५ कां कीं ज्याला मी सांपडतों, त्याला
जीवन सांपडतें, आणि तो परमेश्वराजवळून अनु-
ग्रह पावतो· ३६ परंतु जो मजविरुद्ध पाप करि-
तो, तो आपल्या जीवाला उपद्रव करितो, जे मला
द्वेषितात त्या सर्वांला मरण आवडतें.

## अध्याय ९·

ज्ञानाने आपलें घर बांधिलें आहे, त्याने आपले
सात खांब तोडून सिद्ध केले आहेत· २
त्याने आपले पशु मारिले आहेत, त्याने आपला
द्राक्षारस मिसळिला आहे, आणि आपलें मेज
तयार केलें आहे· ३ त्याने आपल्या तरण्या
बाहेर पाठविल्या आहेत, तें नगरांतल्या उंचस्था-
नांवर हाक मारितें; ४ जो कोणी मूर्ख असेल
तो इकडे वळो, जो बुद्धिहीन आहे त्याला तें ह्म-
णतें; ५ याहो, माझ्या अन्नांतलें कांहीं खा, आ-
णि जो द्राक्षारस म्यां मिसळिला आहे त्यांतला
कांहीं प्या· ६ मूर्खांला वर्जा, आणि वांचा, आणि
बुद्धीच्या मार्गांत नीट चाला· ७ जो निंदकाचा
निषेध करितो तो आपण अप्रतिष्टा पावतो, आणि
जो दुष्टाला बोध करितो त्याला डाग लागतो·
८ निंदकाचा निषेध करूं नको, केला तर कदाचित
तो तुला द्वेषील; ज्ञान्याला बोध कर, ह्मणजे तो
तुला प्रिय मानील· ९ ज्ञान्याला बोध दे, ह्मणजे
तो अणखी ज्ञानवान होईल; न्यायीला शिकीव,
ह्मणजे तो अधिक विद्वान होईल· १० **परमे-
श्वराचें** भय ज्ञानाचा प्रारंभ आहे, आणि पवि-
त्राला जाणणें बुद्धि आहे· ११ कां कीं मजकडून
तुझे दिवस बहुत होतील, आणि तुझ्या आयु-
ष्याचीं वर्षें वाढतील· १२ जर ज्ञानी असलास
तर आपणासाठीं ज्ञानी अससील, परंतु जर निंदा
केली तर तूंच मात्र तिचें फळ भोगिसील·

१३ मूर्ख स्त्री मोठ्याने बोलणारी असती, ती
मूर्ख आहे आणि कांहीं जाणत नाहीं· १४ कां
कीं ती नगराच्या उंचस्थलांत आपल्या घराच्या
दाराजवळ आसनावर बसती· १५ जे वाट-
सरू आपल्या वाटांत नीट चालतात त्यांला बोल-
वावें ह्मणून; १६ जो कोणी मूर्ख असेल तो
इकडे वळो, आणि जो बुद्धिहीन आहे त्यालाहि
ती ह्मणती; १७ चोरलेलीं पाण्यें गोड आहेत,
आणि गुप्तांत खाल्लेली भाकर चांगली लागती·
१८ परंतु मेलेले तेथें आहेत, आणि तिचे पाहुणे
मृतलोकाच्या खोल स्थानांत आहेत, असें तो जा-
णत नाहीं·

## अध्याय १०.

शलमोनाचीं दृष्टांतवचनें. ज्ञानी पुत्र बापाला सं-
तुष्ट करितो, परंतु मूर्ख पुत्र आपल्या आईला
दुःखदायक आहे. २ दुष्टतेचीं भंडारें कांहीं हित
करीत नाहींत, परंतु न्यायत्व मरणापासून मोकळें
करितें. ३ परमेश्वर न्यायीच्या जीवाला भुकेलें
असूं देणार नाहीं, परंतु तो दुष्टाची इच्छा निर-
र्थक करितो. ४ जो सैल मुठीने कार्य करितो तो
दरिद्री होतो, परंतु उद्योग्यांचा हात धन मिळ-
वितो. ५ उन्हाळ्यांत गोळा करितो तो पुत्र बु-
द्धिमान आहे, परंतु कापणीच्या समयीं निद्रायमान
राहतो, तो पुत्र लज्जाकर आहे. ६ न्यायीच्या
डोईवर आशीर्वाद असतात, परंतु बलात्कार दुष्टां-
च्या मुखाला आच्छादितो. ७ न्यायीचें स्म-
रण आशीर्वादित असतें, परंतु दुष्टांचें नाम कुजून
जाईल. ८ मनाचा बुद्धिमान आज्ञा मानून घेईल,
परंतु वाचाल मूर्ख खालीं पडेल. ९ जो यथार्थ-
तेने वागतो तो निर्भय वागतो, परंतु जो आपले
मार्ग कुटिल करितो तो उघडा होईल. १०
जो डोळे मिचकावितो तो दुःख देतो, परंतु वा-
चाल मूर्ख खालीं पडेल. ११ न्यायीचें मुख जी-
वनकूप आहे, परंतु दुष्टांचें मुख बळात्कार आच्छा-
दितो. १२ द्वेष झगडे उठवितो, परंतु प्रीति
सर्व अपराधांला आच्छादिती. १३ बुद्धिमानाच्या
ओंठांत ज्ञान सांपडतें, परंतु निर्बुद्धीच्या पाठीस
काठी पाहिजे. १४ ज्ञानी जन विद्येचा संग्रह
करून ठेवितात, परंतु मूर्खाचें मुख नाशास लगत
आहे. १५ धनवानाचें द्रव्य त्याचें सुदृढनगर
आहे, गरिबांचा नाश त्यांचें दरिद्र आहे. १६
न्यायीचें कार्य जीवनार्थ आहे, दुष्टाची प्राप्ति
पापासाठीं असती. १७ जो संबोध पाळितो तो
जीवनाच्या मार्गांत आहे, परंतु जो निषेधाला अ-
व्हेरितो तो भ्रांत आहे. १८ जो लबाड ओं-
ठानी द्वेष गुप्त राखितो तो आणि जो चहाडी
करितो तोहि मूर्ख आहे. १९ बहुत बोलण्यांत
पापाचा तोटा नाहीं, पण जो आपले ओंठ आक-
ळितो तो शहाणा. २० न्यायीची जीभ उत्तम
रुपें आहे, दुष्टांचें हृदय कवडीचा माल आहे.
२१ न्यायीचे ओंठ बहुतांला चारतात, परंतु मूर्ख
अबुद्धीने मरतात. २२ परमेश्वराचा आशी-
र्वाद कोणीएकाला धनवान करितो, आणि तो त्या-
सुद्धां कांहीं दुःख लावीत नाहीं. २३ दुष्कर्म
करणें मूर्खाला खेळ असें आहे, परंतु बुद्धिमान
मनुष्य ज्ञानसंपन्न आहे. २४ ज्याला दुष्ट भितो
तें त्याजवर येईल, परंतु न्यायी जें इच्छितात तें
त्यांला मिळेल. २५ जसा वावटूळ होऊन जाती
तसा दुष्ट नाहींसा होतो, परंतु न्यायी सर्वकाळ
टिकण्याचा पाया आहे. २६ जसा अम्ल दां-
तांला आणि जसा धूर डोळ्यांला लागतो, तसा
कामचोर जे त्याला पाठवितात त्यांला वाटतो.
२७ परमेश्वराचें भय आयुष्य वाढवितें, परंतु
दुष्टांचीं वर्षें उणीं होतील. २८ न्यायींची आ-
शा हर्ष असी होईल, परंतु दुष्टांची अपेक्षा ना-
हींसी होईल. २९ परमेश्वराचा मार्ग यथार्थ
जनाला आश्रय आहे, परंतु दुष्कर्म्यांला नाश
प्राप्त होईल. ३० न्यायी कधीं ढळणार नाहीं.
परंतु दुष्ट पृथ्वींत स्वस्थ वसणार नाहींत. ३१
न्यायीचें मुख ज्ञान उच्चारितें, परंतु वांकडें बोल-
णारी जीभ तुटेल. ३२ जें मान्य तें न्यायीच्या
ओंठांला कळतें, परंतु दुष्टांचें मुख कुटिल बोल-
णारें आहे.

## अध्याय ११.

खोटी तागडी परमेश्वराला वीट असी वाटती,
परंतु खरें वजन त्याला मान्य आहे. २ गर्व
आला म्हणजे अप्रतिष्ठा येती, परंतु विनीतांच्या
ठायीं ज्ञान असतें. ३ प्रमाणिकांची यथार्थता
त्यांला संभाळीत चालवील, परंतु कपट्यांची कु-
टिलता त्यांचा नाश करील. ४ रोषाच्या दिवसीं
धन हित करीत नाहीं, परंतु न्याय मरणापासून
सोडवितो. ५ यथार्थाचें न्यायत्व त्याचा मार्ग
नीट करील, परंतु दुष्ट आपल्या दुष्टतेने गळून
पडेल. ६ प्रमाणिकांचें न्यायत्व त्यांला मोकळें
करील, परंतु अधार्मिक आपल्या दुर्व्यसनांत सां-
पडतील. ७ दुष्ट मनुष्य मरतो तेव्हां त्याची अपे-
क्षा नष्ट होती, आणि अन्यायाची आशा नाहींशी
होती. ८ न्यायी संकटांतून पार पडतो, आणि
त्याच्या स्थानीं दुष्ट येतो. ९ अधार्मिक आपल्या
तोंडाने आपल्या शेजाऱ्याला नाशितो, परंतु निर्भे-

करून न्यायी मुक्त होतील. १० **न्यायींचें** कुशल
असतां नगर उल्लासतें, परंतु दुष्ट नष्ट होतात
तेव्हां उत्सव होतो. ११ **प्र**माणिकांच्या आशी-
र्वादानें नगर उंच होतें, परंतु दुष्टांच्या तोंडाने
ध्वस्त होतें. १२ **निर्बुद्धि** आपल्या शेजाऱ्याला
तुच्छ मानितो, परंतु विवेकी मनुष्य उगीच राहतो.
१३ **लुबरा** गुह्य गोष्ट उघडी करितो, परंतु आत्म्या-
चा विश्वासू गोष्ट गुप्त राखितो. १४ **मसलत**
नसल्यामुळें लोक नाश पावतात, परंतु मसलत
पुष्कळ देणारे असल्याने कुशळ होतें. १५ **कोणी**
परक्याचा जामीन झाला तर हानि पावेल, परंतु
जो टाळी देणाऱ्यास अनुकूल होत नाहीं तो निर्भय
राहतो. १६ **सुरेख** स्त्री सन्मान पावती, आणि
बलवान धन संपादितात. १७ **दयालु** मनुष्य
आपल्या जीवावर उपकार करितो, परंतु क्रूरजन
आपल्या देहावर दुःख आणितो. १८ **दुष्ट** खोटें
कर्म करितो, परंतु जो न्यायत्व पेरितो त्याला नि-
श्चयें करून फळ मिळेल. १९ **तसेंच** न्यायत्व
जीवनसाधक आहे, परंतु दुष्कर्मानुसारी आपलें
मरण साधितो. २० **कुटीलमनाचे परमेश्वराला**
वीट असे आहेत, परंतु खऱ्या मार्गांवर तो आवड
ठेवितो. २१ **युगानुयुग** दुष्कर्मी अदंडित अस-
णार नाहीं, परंतु न्यायींची संतति तरेल. २२
**सुंदर स्त्री** विवेकहीन असली तर जसी डुकराच्या
नाकांडांत सोन्याची नथ तसी ती आहे. २३
**न्यायींची** इच्छा केवळ शुभ आहे, दुष्टांची अपे-
क्षा रोष आहे. २४ **विखरितो** आणि द्रव्य वा-
ढवितो असा कोणी आहे, आणि जें योग्य त्यापे-
क्षां अधिक राखून ठेवितो, तथापि परिणाम दरिद्र
होतो असाहि कोणी आहे. २५ **उपकारी** मनाचा
पुष्ट होईल, आणि जो पाणी पाजितो त्यालाहि
पाणी पाजितील. २६ **जो** धान्य अडकवून ठेवि-
तो त्याला लोक शापितील, परंतु जो धान्य विकि-
तो त्याच्या डोईवर आशीर्वाद होईल. २७ **जो**
झटून हित पाहतो तो कृपा पावतो, परंतु जो अ-
रिष्ट शोधितो त्याजवर तें येईल. २८ **जो** आ-
पल्या धनावर भरवसा ठेवितो तो नाश पावेल,
परंतु न्यायी पालवतील. २९ **जो** आपलें घर
रडवितो त्याचें वतन वारा होईल, आणि मूर्ख
बुद्धिमानाचा सेवक होईल. ३० **न्यायींचें** फल
जीवनाचें झाड आहे, आणि जो जीवात्म्यांस मिळ-
वितो तो ज्ञानी. ३१ **पाहा**, पृथ्वींत न्यायीला
कर्मफल प्राप्त होईल, दुष्ट आणि पातकी यांला
तर निश्चयें.

## अध्याय १२.

ज्याला संबोध आवडतो त्याला विद्या आवड-
ती, परंतु जो निषेधाला द्वेषितो तो पशु-
शील. २ **चांगला** मनुष्य **परमेश्वरा**जवळून
कृपा पावतो, परंतु वाईट योजणाऱ्या मनुष्याला तो
दोषी ठरवील. ३ **दुष्टतेने** मनुष्य स्थिर होणार
नाहीं, परंतु न्यायींचें मूळ ढळणार नाहीं. ४
**सद्गुणी** स्त्री आपल्या पतीला मुगुट आहे, परंतु
लज्जा करणारी त्याच्या हाडांत सडी असी आहे.
५ **न्यायींच्या** कल्पना नीति आहेत, दुष्टांचे संकल्प
कपट आहेत. ६ **दुष्टांचीं** वचनें घातासाठीं दडी
मारण्याचीं आहेत, परंतु प्रमाणिकांचें मुख त्यांला
मुक्त करील. ७ **दुष्ट** उलंडून नाहींसे होतात,
परंतु न्यायींचें घर टिकेल. ८ **मनुष्याला** त्याच्या
सुबोधाप्रमाणें प्रशंसा मिळेल, परंतु जो कुटिलम-
नाचा त्याला तुच्छ मानितील. ९ **जो** आपल्या-
जवळ भाकराहि नसतां आपल्याला प्रतिष्ठित मा-
नितो, त्यापेक्षां जो अप्रतिष्ठित असून चाकराचा
धनी आहे तो उत्तम आहे. १० **न्यायी** आपल्या
पशूच्या जीवाला मानितो, परंतु दुष्टांच्या करुणा
क्रूरच आहेत. ११ **जो** आपली भूमि राबतो
तो अन्नाने तृप्त होईल, परंतु जो लुच्च्यांस अनु-
सरतो तो निर्बुद्धि आहे. १२ **दुष्ट** दुष्कर्म्यांची
लूट इच्छितो, परंतु न्यायींचें मूळ फल देतें. १३
**ओंठांच्या** पातकाने दुष्कर्मी फांसांत सांपडतो, परंतु
न्यायी संकटांतून निभावेल. १४ **मुखाच्या** फ-
लाकडून मनुष्य हिताने तृप्त होईल, आणि मनु-
ष्याच्या हातांचें प्रतिफल त्याला परत मिळेल.
१५ **मूर्खाला** स्वमार्ग नीट दिसतो, परंतु जो उप-
देश ऐकून घेतो तो सुज्ञ. १६ **मूर्खाचा** राग
लागलाच कळतो, परंतु विवेकी अप्रतिष्ठा आच्छा-
दितो. १७ **जो** सत्य बोलतो तो न्यायत्व प्रगट
करितो, परंतु असत्य साक्षी कपट. १८ **तरवारी**-
च्या भोंसकण्याप्रमाणें बकतो असा कोणी आहे,
परंतु सुज्ञांची जीभ आरोग्य आहे. १९ **सत्य**-

तेचा ओंठ सदा ठरेल, परंतु खोटी जीभ केवळ
क्षणभर राहील. २० जे अरिष्ट योजितात त्यां-
च्या हृदयांत कपट आहे, परंतु कुशलाच्या मसलत
देणाऱ्यांस हर्ष होईल. २१ न्यायीला कांहीं
विपत्ति लागणार नाहीं, परंतु दुष्ट संकटांत बुड-
तील. २२ खोटे ओंठ परमेश्वराला वीट असे
आहेत, परंतु जे सत्यतेने वर्त्ततात त्यांजवर त्याची
आवड आहे. २३ चतुर मनुष्य विद्या गुप्त रा-
खितो, परंतु मूर्खांचें मन मूर्खपणा प्रगट करितें.
२४ उद्योग्यांचा हात अधिकार चालवील, परंतु
आळशी कर देणारे होतील. २५ मनुष्याच्या
मनांतली काळजी त्याला ओणवें करिती, परंतु सुव-
चन त्याला संतुष्ट करितें. २६ न्यायी आपल्या
शेजाऱ्याहून उत्तम आहे, परंतु दुष्टांचा मार्ग त्यांला
बहकवितो. २७ आळशी आपली केलेली शि-
कार भाजीत नाहीं, परंतु उद्योगी मनुष्याचें द्रव्य
मोलवान आहे. २८ न्यायत्वाच्या मार्गांत जीवन
आहे, आणि त्याच्या सडक वाटेंत मरण नाहीं.

## अध्याय १३.

सुज्ञपुत्र आपल्या बापाचा उपदेश ऐकून घेतो,
परंतु निंदक निषेध ऐकत नाहीं. २ मुखाच्या
फलाकडून मनुष्य हित भोगील, परंतु पातक्यांचा
जीवात्म्याला बलात्कार होईल. ३ जो आपलें
मुख संभाळितो तो आपला जीव रक्षितो, परंतु
जो आपले ओंठ वासितो त्याचा नाश होईल.
४ आळशाचा जीव इच्छितो आणि कांहीं मिळत
नाहीं, परंतु उद्योग्यांचा जीव पुष्ट होईल. ५
न्यायी खोटेपण द्वेषितो, परंतु दुष्ट कुत्सित कर्म
करितो आणि अप्रतिष्ठा पावतो. ६ यथार्थ मा-
र्ग्याला न्यायत्व संभाळितें, परंतु दुष्टता पाप्याचा
नाश करिती. ७ आपणाला धनवान करितो तथापि
त्याला कांहीं नाहीं असा कोणी आहे, आणि आ-
पणाला दरिद्री करितो तथापि त्याला फार द्रव्य
आहे असाहि एखादा आहे. ८ मनुष्याच्या जी-
वाची खंडणी त्याचें धन आहे, परंतु दरिद्री धमकी
ऐकत नाहीं. ९ न्यायींचा प्रकाश उजळेल, परंतु
दुष्टांचा दीप विझून जाईल. १० केवळ गर्वाने
कोणी झगडा उठवितो, परंतु जे संबोध ऐकून घेतात
त्यांच्या ठायीं ज्ञान आहे. ११ द्रव्य व्यर्थ अप्र-
रणाने उणें होतें, परंतु जो आपल्याजवळ संग्रह
करितो तो वाढेल. १२ विलंबित आशा हृदय
रोगी करिती, परंतु पुरविलेली इच्छा जीवनाचें
झाड आहे. १३ जो वचन तुच्छ मानितो तो
नाहींसा होईल, परंतु जो आज्ञेला भितो तो सुखी
राहील. १४ मरणाच्या पाशांपासून दूर राहावें
म्हणून सुज्ञाचा नेम जीवनाचा झरा आहे. १५
सुबोध कृपा मिळवितो, परंतु पातक्यांचा मार्ग
कठीण आहे. १६ प्रत्येक विवेकी विवेकेने वर्त्ततो,
परंतु मूर्ख आपला मूर्खपणा प्रगट करितो. १७
दुष्ट दूत अरिष्टांत पडतो, परंतु विश्वासू जासूद
सुखकारक असा आहे. १८ जो संबोध अव्हे-
रितो त्याला दरिद्र व अप्रतिष्ठा प्राप्त होतील,
परंतु जो निषेध मानितो तो सन्मान पावेल. १९
पुरविलेली इच्छा जीवाला गोड वाटती, परंतु दुष्क-
र्म सोडणें हें मूर्खांस वीट असें वाटतें. २०
जो ज्ञान्यांची संगत धरितो तो ज्ञानी होईल,
परंतु मूर्खांचा सहवासी नाश पावेल. २१ अरिष्ट
पाप्यांच्या पाठीस लागेल, परंतु न्यायींला बरें कर-
ण्याची फेड होईल. २२ सत्पुरुष आपल्या
लेंकरांच्या लेंकरांला वतनदारी देऊन मरतो, आणि
जें द्रव्य पाप्याने आपणासाठीं ठेविलें तें न्यायींला
मिळेल. २३ दरिद्र्यांच्या कृषीने पुष्कळ अन्न उत्पन्न
होतें, परंतु अन्यायाने नाश पावतो असा कोणी
आहे. २४ जो आपली काठी आकळितो
तो आपल्या लेंकराला द्वेषितो, परंतु जो त्याला
प्रिय मानितो तो त्याच्या शासनाला झटतो. २५
न्यायी तृप्त होईपर्यंत खातो, परंतु दुष्टांचें पोट
रिकामें राहील.

## अध्याय १४.

सुज्ञ स्त्रिया आपलें घर बांधितात, परंतु मूर्ख
स्त्री आपल्या हातांनी तें पाडून टाकिती. २
जो प्रमाणिकपणें वर्त्ततो तो परमेश्वराला भितो,
परंतु जो आपल्या मार्गांत कुटिल आहे तो त्याला
अवमानितो. ३ मूर्खांच्या मुखांत गर्वाची काठी
आहे, परंतु सुज्ञांचे ओंठ त्यांला रक्षितील. ४
बैल नसले तर गोठा स्वच्छ राहतो, परंतु बैला-
च्या बलेंकरून पुष्कळ संपत्ति होती. ५ वि-
श्वासू साक्षी लबाडी बोलणार नाहीं, परंतु असत्य

साक्षी खोटें उच्चारील. ६ निंदक ज्ञान शोधितो
आणि त्याला कांहीं सांपडत नाहीं, परंतु समज-
णाऱ्याला विद्या सोपी पडती. ७ मूर्खाला विद्येचे
ओंठ नाहींत, असें समजून तूं त्यासमोरून जा.
८ विवेक्याचें ज्ञान आपला मार्ग समजणें आहे,
परंतु मूर्खांचा मूर्खपणा कपट आहे. ९ मूर्ख पा-
तकाविषयीं थट्टा करितात, परंतु प्रमाणिकांमध्यें
करुणा आहे. १० हृदय आपला खेद जाणतें,
आणि त्याचा हर्ष परके जाणत नाहींत. ११
दुष्टांचें घर उलंडेल, परंतु प्रमाणिकांचा डेरा बळ-
कट राहील. १२ मनुष्याला शुद्ध दिसतो असा
एक मार्ग आहे, परंतु त्याचा परिणाम मरणाचा
मार्ग आहे. १३ हसण्यांत देखील हृदय खिन्न
असेल, आणि अश्या हर्षाचा परिणाम शोक अस-
तो. १४ बिघडलेल्या हृदयाचा मनुष्य आप-
ल्या मार्गांनी, व चांगला माणूस आपल्याने तृप्त
होईल. १५ मूर्ख प्रत्येक गोष्टीवर विश्वासतो,
परंतु विवेकी आपल्या गतीला जपतो. १६ सुज्ञ
भितो आणि वाइटापासून दूर जातो, परंतु मूर्ख
अभिमानी व धीट असतो. १७ रागीट मनुष्य
मूर्खपणा करितो, आणि दुष्ट संकल्पाचा मनुष्य
द्वेषपात्र होतो. १८ मूर्ख मूर्खपणाचें धारण क-
रितात, परंतु विवेकी ज्ञानाने मुकुटमंडित असतात.
१९ वाईट बऱ्यांपुढें आणि दुष्ट न्यायीच्या दारा-
जवळ नमतात. २० दरिद्री आपल्या शेजाऱ्या-
नेहि द्वेषित असतो, परंतु धनवान पुष्कळांस प्रिय
आहे. २१ जो आपल्या शेजाऱ्याला अवमानि-
तो तो पाप करितो, परंतु जो दरिद्र्यांवर दया
करितो तो धन्य. २२ जे दुष्कर्म योजितात ते
भ्रांत नाहींत काय? परंतु जे चांगलें योजितात
त्यांला दया आणि सत्यता प्राप्त होतील. २३
सर्व श्रमांत प्राप्ति होत असती, परंतु ओंठांचें बो-
लणें केवळ तोटा घडवितें. २४ सुज्ञानांचा
मुगुट त्यांचें धन आहे, मूर्खांची मूर्खता मूर्खताच.
२५ खरा साक्षी जीवांला सोडवितो, परंतु कपटी
साक्षी खोटें बोलतो. २६ परमेश्वराच्या भ-
यांत दृढ भरवसा आहे, आणि त्याच्या लेंकरांला
आश्रय आहे. २७ मरणाच्या पाशांपासून दूर
राहावें म्हणून परमेश्वराचें भय जीवनाचा झरा
आहे. २८ लोक बहुत असल्याने राजास प्रति-
ष्ठा आहे, परंतु लोकांचा तोटा असला तर अधि-
पतीचा नाश होतो. २९ जो मंदक्रोध तो महा-
बुद्धीचा आहे, परंतु जो उतावळा तो मूर्खता प्रगट
करितो. ३० स्वस्थ हृदय देहाचें जीवन आहे,
परंतु हेवा हाडांची सडी आहे. ३१ जो दरि-
द्र्याला पीडितो तो आपल्या उत्पन्न करणाऱ्याला
निंदितो, परंतु जो त्याचा सन्मान करितो तो गरी-
बावर दया करितो. ३२ दुष्ट आपल्या दुष्टतेंत
बुडतो, परंतु न्यायी आशा धरून मरतो. ३३
बुद्धिमानाच्या मनांत ज्ञान लपतें, परंतु मूर्खांच्या
ठायीं जें असेल तें सहज कळतें. ३४ न्यायत्व
प्रजेला उंचावितें, परंतु पातक लोकांची अप्रतिष्ठा
आहे. ३५ राजाचा प्रसाद सुज्ञ सेवकावर होतो,
परंतु जो लाज करणारा आहे त्याजवर त्याचा
रोष होतो.

## अध्याय १५.

गोड उत्तर कोप हटवितें, परंतु कठोर भाषण
क्रोध चढवितें. २ सुज्ञांची जीभ उत्तम ज्ञान
बोलती, परंतु मूर्खांचें मुख मूर्खपणा उच्चारितें.
३ परमेश्वराचे डोळे वाईट आणि बरें पाहत
सर्वत्र आहेत. ४ जिभेचा विनय जीवनाचें झाड
आहे, परंतु तींतलें द्वाडपण आत्म्याला मोडणारें
आहे. ५ मूर्ख आपल्या बापाचा उपदेश अव्हे-
रितो, परंतु जो निषेध मानितो तो विवेकी आहे.
६ न्यायीच्या घरांत पुष्कळ धन आहे, परंतु दुष्टा-
च्या प्राप्तद्रव्यांत संकटाचें मूळ आहे. ७ सुज्ञा-
नांचे ओंठ विद्या पसरितात, परंतु मूर्खांचें मन
असें नाहीं. ८ दुष्टांचा यज्ञ परमेश्वराला वीट
असा आहे, परंतु प्रमाणिकांची प्रार्थना त्याला
आनंद असी आहे. ९ दुष्टाचा मार्ग परमेश्व-
राला वीट असा आहे, परंतु जो न्यायत्व अनुस-
रतो त्याजवर तो प्रीति करितो. १० जो मार्ग
सोडितो त्याला भारी शासन प्राप्त होईल, जो
निषेधाला द्वेषितो तो मरेल. ११ मृतलोक आ-
णि नाशस्थल परमेश्वरासमोर आहेत, तर नि-
श्चयें मनुष्यवंशांचीं हृदयेंहि आहेत. १२ निं-
दक आपल्या निषेध करणाऱ्यावर प्रीति करीत
नाहीं, तो सुज्ञानांकडेस जात नाहीं. १३ हृदयां-
तील संतोषाने तोंडाला तेज येतें, परंतु हृदयाच्या

क्लेशाने आत्मा मोडतो. १४ बुद्धिमानाचें मन
विद्या शोधितें, परंतु मूर्खांचें मुख मूर्खता भक्षितें.
१५ खेदिताचे सर्व दिवस वाईट आहेत, परंतु
आनंदीहृदयाच्याला नित्य सम्भोजन आहे. १६
**परमेश्वराचें** भय असून थोडें धन हें त्रासयुक्त
बहुत द्रव्यापेक्षां उत्तम आहे. १७ प्रीतियुक्त
शाकभोजन हें द्वेषयुक्त पुष्ट बैलाच्या भोजनापेक्षां
उत्तम आहे. १८ कोपी मनुष्य झगडा उठवितो,
परंतु जो मंदक्रोध तो तंटा शांतवितो. १९ आळ-
शाचा मार्ग कांट्यांचें कुंपण असा आहे, परंतु
सरळांची वाट सडक आहे. २० सुज्ञपुत्र बापा-
ला आनंदवितो, परंतु मूर्ख मनुष्य आपल्या आ-
ईला अवमानितो. २१ बुद्धिहीनाला मूर्खता हर्ष
असी आहे, परंतु विवेकी मनुष्य नीट वर्त्ततो. २२
मसलतीवांचून संकल्प बिघडतात, परंतु मसलत
देणारे पुष्कळ असल्याने ठरतात. २३ मनुष्याला
आपल्या मुखच्या उत्तराने हर्ष होतो, आणि सुस-
मयींचें वचन किती उत्तम आहे? २४ सुज्ञाना-
ला जीवनाचा मार्ग वरच्याकडे आहे, तो खालच्या
मृतलोकांपासून दूर जावा ह्मणून. २५ **परमे-
श्वर** गर्विष्ठांचें घर नष्ट करील, परंतु तो विधवेची
सीमा स्थापील. २६ दुष्कर्म्यांच्या कल्पना **परमे-
श्वराला** वीट अशा आहेत, परंतु पवित्रांचीं
वचनें मनोरम आहेत. २७ लोभिष्ट आपलें घर
कष्टी करितो, परंतु जो दानें द्वेषितो तो वांचेल.
२८ न्यायींचें मन उत्तर करायाला विचार करितें,
परंतु दुष्टांचें मुख वाईट गोष्टी उच्चारितें. २९
**परमेश्वर** दुष्टांपासून दूर आहे, परंतु तो न्यायीं-
ची प्रार्थना ऐकतो. ३० डोळ्यांचा प्रकाश हृदय
संतुष्ट करितो, शुभवार्त्ता हाडें मज्जापूर्ण करिती.
३१ जो कान जीवनाचा निषेध ऐकतो तो सुज्ञानां-
मध्यें असतो. ३२ जो संबोधाचा तिरस्कार
करितो तो आपल्या जीवाला तुच्छ मानितो, परंतु
जो निषेध ऐकतो तो बुद्धि पावतो. ३३ **परमे-
श्वराचें** भय ज्ञानाचा संबोध आहे, आणि सन्मा-
नापूर्वीं नम्रता असती.

## अध्याय १६.

मनाचे संकल्प मनुष्याचे, परंतु **परमेश्वरापासून**
जिभेचें उत्तर आहे. २ मनुष्याला आपले सर्व
मार्ग शुद्ध दिसतात, परंतु **परमेश्वर** आत्मे ताडून
पाहतो. ३ तूं आपलीं कार्यें **परमेश्वराच्या** स्वा-
धीन कर, ह्मणजे तुझे संकल्प सिद्धीस जातील.
४ **परमेश्वराने** आपणासाठीं सर्व केलें, दुष्टाहि
अरिष्टाच्या दिवसासाठीं केला. ५ प्रत्येक गर्विष्ठ
हृदयाचा **परमेश्वराला** वीट असा आहे, युगानु-
युग तो शिक्षा पावल्याशिवाय राहणार नाहीं. ६
दया आणि सत्यता यांकडून अन्याय हरण होतो,
आणि **परमेश्वराच्या** भयाने कोणी दुष्कर्मांपासून
दूर राहतो. ७ मनुष्याचे मार्ग **परमेश्वराच्या**
मनास आले, ह्मणजे त्याचे वैरीहि त्यासीं शांतीने
राहत असें तो करितो. ८ न्यायत्वाने पावलेलें
थोडकें द्रव्य अन्यायाने पावलेल्या महासंपत्तीपेक्षां
उत्तम आहे. ९ मनुष्याचें मन त्याच्या मार्गाचा
विचार करितें, परंतु **परमेश्वर** त्याचीं पावलें
निटावितो. १० निर्णय राजाच्या ओंठांवर आ-
हे, न्यायांत त्याच्या मुखाने विपरीत बोलूं नये.
११ न्यायाची तागडी आणि पारडीं हीं **परमेश्व-
राचीं** आहेत, पिशवींतलीं सर्व वजनें त्याचें कर्म
आहेत. १२ दुष्टता करण्याचा वीट राजाला
येवो, कां कीं सिंहासन न्यायत्वाने स्थिर राहतें.
१३ न्यायाचे ओंठ राजाला संतोषकारक असे
आहेत, आणि जो प्रमाणिक बोलतो त्याला ते
प्रिय मानितात. १४ राजाचा कोप मरणाचे
दूत असे आहेत, परंतु सुज्ञान मनुष्य त्याला शां-
तवील. १५ राजाचें मुखतेज जीवन आहे, आणि
त्याचा अनुग्रह शेवटल्या पावसाच्या आभाळासा-
रिखा आहे. १६ सोन्यापेक्षां ज्ञानप्राप्ति केव-
ढी उत्तम आहे! आणि रुप्यापेक्षां बोधप्राप्ति
श्रेष्ठ आहे. १७ दुष्कर्मांपासून वळणें हें प्रमा-
णिकांची सडक वाट आहे, जो आपल्या मार्गाकडे
लक्ष्य ठेवितो तो आपल्या जीवाला रक्षितो. १८
भंगाचा पुढारी गर्व, आणि नाशाचा पुढारी अ-
भिमानी आत्मा आहे. १९ गर्विष्ठांसीं लूट वां-
टण्यापेक्षां दीनांसीं नम्रात्मा असणें उत्तम आहे.
२० जो सुबुद्धीने गोष्टीकडे लक्ष्य लावितो तो हित
पावेल, आणि जो **परमेश्वरावर** भाव ठेवितो तो
सुखी. २१ जो सुज्ञमनाचा त्याला विवेकी असें
ह्मणतील, आणि ओंठाचा मधुरपणा विद्या वाढ-
वितो. २२ ज्याला सुबोध प्राप्त झाला आहे त्या-

ला तो जीवनाचा झरा असा आहे, परंतु मूर्खपणा मूर्खांला शासन आहे· २३ सुज्ञानाचें मन त्याच्या मुखाला शिकवितें, आणि त्याच्या ओंठांला विद्यायुक्त करितें· २४ मनोरम वचनें मधाचा शिसा असीं आहेत, तीं जीवाला गोड आणि हाडांला आरोग्य आहेत· २५ मनुष्याला नीट दिसतो असा एक मार्ग आहे, परंतु त्याचा परिणाम मरणाचे मार्ग असा आहे. २६ कामकरी आपणासाठीं काम करितो, कां कीं त्याचें तोंड तें त्याजवर लादतें. २७ दुष्ट मनुष्य दुष्टाई खणितो, आणि त्याच्या ओंठांवर जाणो हुरपळता अग्नि आहे. २८ द्वाड मनुष्य विवाद उठवितो, आणि कुजबुजा मित्रांला वेगळें करितो· २९ बळात्कार करणारा मनुष्य आपल्या शेजाऱ्याला भुलथाप देतो, आणि त्याला वाईट मार्गांत घेऊन जातो· ३० तो द्वाडचाळे कल्पायासाठीं आपले डोळे मिटितो, दुष्कर्म साधायाला तो आपले ओंठ आवळून धरितो· ३१ पिकलेले केंस न्यायत्वाच्या मार्गांत असले तर शोभेचा मुगुट असे आहेत. ३२ मंदक्रोध पराक्रम्यापेक्षां, आणि जो आपला आत्मा स्वाधीन ठेवितो तो नगर हल्ला करून घेणाऱ्यापेक्षां उत्तम आहे· ३३ ओंटींत पण घालितात, परंतु त्याचा सर्व निर्णय परमेश्वराकडून होतो.

## अध्याय १७.

शांतिसहित कोरडा तुकडा हा कलहसहित घरभर मिष्टान्नापेक्षां उत्तम आहे· २ बुद्धिमान सेवक लज्जाकरणाऱ्या पुत्रावर धनीपणा करील, आणि भावांमध्यें विभाग पावेल· ३ रुप्यासाठीं मूस आणि सोन्यासाठीं भट्टी आहे, परंतु परमेश्वर हृदयें पारखितो· ४ दुष्कर्मी खोट्या ओंठांला जपून ऐकतो, आणि लबाड दुष्टजिभेकडे कान देतो· ५ जो दरिद्र्याला उपहासतो तो आपल्या उत्पन्न करणाऱ्याला निंदितो, आणि जो विपत्तीमुळें हर्षतो तो दंडावांचून राहणार नाहीं· ६ लेंकरांचीं लेंकरें वृद्धांचा मुगुट आहेत, आणि लेंकरांची शोभा त्यांचे बाप आहेत. ७ उत्कृष्ट बोलणें मूर्खाला शोभत नाहीं, अधिपतीला तर निश्चयें खोटें भाषण साजत नाहीं· ८ ज्याला दान मिळालें आहे, त्याच्या दृष्टींत तें मोलवान मणि असें आहे, जिकडे जिकडे तें वळतें तिकडे तिकडे सफळ असतें· ९ जो अपराध झांकितो तो प्रीति हुडकतो, परंतु जो गोष्ट घोकतो तो मित्रांला वेगळें करितो· १० मूर्खाच्या मनांत शंभर फटक्याच्या ठसण्यापेक्षां निषेध बुद्धिमानाच्या मनांत अधिक ठसतो. ११ दुष्कर्मी केवळ फितूर पाहतो, ह्मणून लोक क्रूर दूताला त्याजकडे पाठवितील. १२ पिलीं हरण केलेली आस्वल मनुष्याला भेटो, परंतु मूर्खानें आपल्या मूर्खपणांत त्याला भेटूं नये· १३ जो बऱ्याबद्दल वाईट करितो त्याच्या घरापासून अरिष्ट सरणार नाहीं. १४ कोणी पाण्यें सुटूं देतांना जसें घडतें तसा विवादाचा प्रारंभ आहे, ह्मणून कज्जा उठण्यापूर्वी त्याला सोड· १५ जो दुष्टाला न्यायी ठरवितो, आणि जो न्यायीला दोषी ठरवितो, ते उभयतां परमेश्वराला वीट असे आहेत· १६ मूर्खाला कांहीं बुद्धि नसतां ज्ञान पावायाला त्याच्या हातांत मोल कां असावें? १७ सखा सर्वदा प्रीति करितो, आणि भाऊ कष्टाला जन्मला आहे· १८ बुद्धिहीन मनुष्य आपल्या मित्राच्या समक्ष टाळी देऊन जामीन होतो. १९ ज्याला कज्जा आवडतो त्याला अपराध आवडतो, आणि जो आपलें दार उंचावितो तो नाश शोधितो. २० द्वाडमनाचा हित पावत नाहीं, आणि वांकड्या जिभेचा अरिष्टांत पडतो· २१ जो मूर्खाला जन्म देतो तो तें आपल्या शोकासाठीं करितो, आणि मूर्खाच्या बापाला हर्ष वाटणार नाहीं. २२ संतुष्ट हृदय पौष्टिक औषधाप्रमाणें कुशल करितें, परंतु मोडलेला आत्मा हाडें सुकवितो. २३ न्यायाचे मार्ग विपरित करावे ह्मणून दुष्ट पदरांतून लांच घेतो· २४ सुबुद्धीपुढें ज्ञान आहे, परंतु मूर्खाचे डोळे पृथ्वीच्या सीमेकडे आहेत· २५ मूर्ख पुत्र आपल्या बापाला शोककारक, आणि आपल्या प्रसवणारीला खेदकारक आहे· २६ न्यायीला दंडणें आणि प्रमाणिकपणामुळें अधिपतींला हाणणें उत्तम नाहीं. २७ जो आपलीं वचनें आकळितो तो ज्ञानवान, आणि जो नम्र आत्म्याचा तो बुद्धिमान मनुष्य आहे· २८ मूर्ख देखील उगीच राहतांना सुज्ञ भासेल, आणि जो आपले ओंठ मिटून धरितो तो सुबुद्धि असें मानितात·

## अध्याय १८.

एकांतीं बसणारा आपल्या इच्छेने हुडकितो तो
सर्व विद्याभ्यास करितो. २ मूर्ख बोधांत नाहीं,
परंतु त्याचें हृदय प्रगट व्हावें यांत संतोषवितो.
३ दुष्ट येतो तेव्हां अपमानहि येतो, आणि अप्र-
तिष्ठेसहित निंदा येती. ४ मनुष्याच्या मुखचीं
वचनें खोलपाणी असीं आहेत, ज्ञानाचा झरा वा-
हत्या ओहळासारिखा आहे. ५ न्यायीचा न्याय
उलटा करायासाठीं दुष्टाचा पक्षपात करणें उत्तम
नाहीं. ६ मूर्खाचे ओंठ विवादांत शिरतात, आ-
णि त्याचें मुख फटके मागतें. ७ मूर्खाचें मुख
त्याला नाशकारक आहे, आणि त्याचे ओंठ त्या-
च्या जीवाला पाश असे आहेत. ८ कुजबुज्याचीं
वचनें जखमांसारिखीं आहेत तीं पोटाच्या आंत
उतरतात. ९ जो आपल्या धंद्यांत आळशी आहे
तो उधळ्याचा भाऊ आहे. १० परमेश्वराचें
नाम बळकट किल्ला आहे, त्यांत न्यायी धावून नि-
र्भय राहतो. ११ धनवानाचें द्रव्य त्याचें गांवकु-
सवी नगर आहे, आणि त्याच्या मतें तें उंच कोट
असें आहे. १२ नाश होण्यापूर्वीं मनुष्याचें मन
गर्विष्ठ असतें, आणि गौरवापूर्वीं नम्रता असती.
१३ गोष्ट ऐकिल्यापूर्वीं कोणी उत्तर करितो, तर
हें त्याची मूर्खता आणि अप्रतिष्ठा आहे. १४
मनुष्याचा आत्मा त्याची विकृति साहील, परंतु
जखमी आत्मा कोणाच्याने सोसवेल? १५ सुबुद्धीचें
मन ज्ञान पावतें, आणि सुज्ञाचा कान विद्या शो-
धितो. १६ मनुष्याचें दान त्यासाठीं आश्रय क-
रितें, आणि त्याला महाजनांसमोर पोहंचवितें. १७
जो आपल्या वादांत प्रथम आहे तो न्यायी दि-
सतो, परंतु त्याचा शेजारी येऊन त्याची परी-
क्षा करितो. १८ चिवादाला पण खुंटवितो,
आणि सामर्थांमध्यें वियोग करितो. १९ रुष्ट
झालेल्या भावाला शांत करणें हें दुर्गपूर घेण्या-
पेक्षां अवघड आहे, आणि त्याचे विवाद कोठा-
च्या अडसरांसारिखे आहेत. २० मनुष्याच्या
मुखाच्या फलाने त्याचें पोट भरेल, आणि तो
आपल्या ओंठांच्या प्राप्तीने तृप्त होईल. २१
मरण आणि जीवन जिभेच्या सत्तेंत आहेत, आ-
णि ज्यांला ती आवडती ते तिचें फळ खातील.
२२ ज्याला बायको मिळाली त्याला उत्तम अर्थ
मिळाला आहे, आणि त्याला परमेश्वराजवळून
अनुग्रह प्राप्त झाला आहे. २३ दरिद्री काकळूत
करीत बोलतो, परंतु धनवान कठोरपणें उत्तर क-
रितो. २४ ज्याला मित्र आहेत त्याला मित्रपणा
दाखविणें भाग आहे, परंतु भावापेक्षां अधिक लग-
टून राहतो असा सखा आहे.

## अध्याय १९.

जो दरिद्री आपल्या यथार्थतेने वर्त्ततो तो वां-
कड्या ओंठांच्या मूर्खापेक्षां बरा आहे. २
जीवात्मा ज्ञानाविना असला तर बरें नाहीं, आ-
णि जो आपल्या पायांनी त्वरा करितो तो पापांत
पडतो. ३ मनुष्याची मूर्खता त्याचा मार्ग विप-
रीत करिती, आणि त्याचें मन परमेश्वरावर
खिजतें. ४ द्रव्य बहुत मित्र जोडून देतें, परंतु
गरिबाचे शेजारी त्यास सोडून जातात. ५ खो-
टा साक्षी दंडावांचून राहणार नाहीं, आणि जो
खोटें बोलतो तो सुटणार नाहीं. ६ अधि-
पतीला बहुत आर्जवतात, आणि दात्याचे सर्व
मित्र होतात. ७ दरिद्र्याचे सर्व भाऊ त्याला
द्वेषितात, होय त्याचे मित्रहि त्यापासून दूर जा-
तात, तो वचनें बोलत त्यांच्या पाठीस लागतो,
परंतु ते अनुकूल होत नाहींत. ८ जो बुद्धि पा-
वतो तो आपल्या जीवाला प्रिय मानितो, जो विवेक
संभाळितो त्याला हित प्राप्त होईल. ९ खोटा
साक्षी दंडावांचून राहणार नाहीं, आणि जो खोटीं
बोलतो तो नाश पावेल. १० मूर्खाला सुख
शोभत नाहीं, विशेषें अधिपतींवर धनीपण करणें
हें सेवकाला साजत नाहीं. ११ मनुष्याचा विवेक
त्याच्या क्रोधाला मंद राखितो, आणि अपराधाची
क्षमा करणें त्याची शोभा आहे. १२ राजाचा
रोष सिंहाच्या गर्जनेसारिखा आहे, परंतु त्याचा
अनुग्रह गवतावरच्या दहिंवरासारिखा आहे. १३
मूर्ख पुत्र आपल्या बापाला विपत्तीच आहे, आणि
बायकोचे कज्जे निरंतर टपके असे आहेत. १४
घर आणि धन वडिलांपासून आलेला विभाग
आहेत, परंतु शहाणी बायको परमेश्वरापासून
देणें आहे. १५ आळस भारी झोंपेंत पाडितो,
आणि कामचोर उपाशी मरतो. १६ जो आज्ञा
पाळितो तो आपला जीव पाळितो, परंतु जो त्याचे

मार्ग अवमानितो तो मरेल. १७ जो दरिद्र्यावर
दया करितो तो **परमेश्वराला** उसनें देतो, आणि
त्याची फेड तो त्याला भरून देईल. १८ जों-
पर्यंत आशा आहे, तोंपर्यंत तूं आपल्या पुत्राचें
शासन कर, आणि त्याच्या ओरडण्याविषयीं तूं
कांहीं काळजी करूं नको. १९ जो रागीट स्व-
भावाचा तो दंड पावेल, कां कीं जरी त्वां त्याला
मोकळें केलें तरीं तुला पुन्हा असें करावें लागेल.
२० तूं आपल्या अंतकालीं सुज्ञान व्हावें ह्मणून उप-
देश ऐक, आणि संबोध मान्य करून घे. २१
मनुष्याच्या मनांत बहुत कल्पना असतात, परंतु
जो **परमेश्वराचा** संकल्प तोच ठरेल. २२
मनुष्याची इच्छा त्याची प्रियता आहे, आणि
लबाडापेक्षां दरिद्री बरा आहे. २३ **परमेश्व-
राचें** भय जीवनदायक आहे, जो त्याजकडून
तृप्त आहे त्याजवर अरिष्ट येणार नाहीं. २४
आळशी आपला हात पात्रांत घालून ठेवितो, आ-
णि आपल्या मुखाकडेसहि तो परत करीत नाहीं.
२५ निंदकाला तडाका मार ह्मणजे भोळा सावध
होईल, आणि बुद्धिमानाला निषेध कर ह्मणजे
तो ज्ञान समजेल. २६ जो आपल्या बापाला
लुटून आपल्या आईस पळवितो, तो पुत्र लज्जा
व अपकिर्ति करणारा आहे. २७ माझ्या लेंकरा,
ज्ञानाच्या वचनांपासून बहकावें असा उपदेश
ऐकूं नको. २८ दुष्ट साक्षी नीतीची थट्टा क-
रितो, आणि पापिष्ठांचें मुख अन्याय गिळितें.
२९ निंदकांसाठीं शासनें आणि मूर्खांच्या पाठी-
साठीं फटके तयार आहेत.

## अध्याय २०.

द्राक्षारस निंदक, मद्य क्षोभचेतविणारें आहे;
जो कोणी त्यानें डगमगतो तो सुज्ञ नाहीं. २
राजाचा धाक सिंहाच्या गर्जनेसारिखा आहे, जो
त्याला रुसवितो तो आपल्या जीवावर पाप करितो.
३ विवाद सोडणें मनुष्याला शोभवितें; परंतु प्र-
त्येक मूर्ख त्यांत गुंततो. ४ आळशी थंडीमुळें
नांगरीत नाहीं, ह्मणून तो कापणीच्या समयीं भीक
मागेल; आणि त्याला कांहीं मिळणार नाहीं. ५
मनुष्याच्या मनांतला संकल्प खोल पाण्यासारिखा
आहे, परंतु विवेकी जन तो बाहेर काढील. ६
बहुतकरून मनुष्यें आपआपले सद्गुण गाजवितात,
परंतु विश्वासू मनुष्य कोणाला सांपडेल? ७
न्यायी आपल्या यथार्थतेने वर्त्ततो, त्याच्या मागें
त्याचीं लेंकरें सुखी असतात. ८ राजा न्याया-
च्या सिंहासनावर बसला असतां आपल्या डो-
ळ्यांनी सर्व दुष्कर्म उडवून टाकितो. ९ म्यां आ-
पलें हृदय शुद्ध केलें, मी आपलें पाप दूर करून
स्वच्छ झालों आहें, असें कोण ह्मणेल? १०
भिन्न भिन्न माड आणि भिन्न भिन्न मापें दोन्ही
**परमेश्वराला** वीट असीं आहेत. ११ त्याचें
करणें योग्य व यथार्थ आहे, कीं नाहीं, याविषयीं
पोर देखील आपल्या वर्तणुकीने कळतें. १२ ऐ-
कता कान आणि पाहता डोळा हीं दोन्ही **परमे-
श्वरानें** उत्पन्न केलीं. १३ तूं दरिद्री नव्हावें
ह्मणून तुला निद्रा आवडूं नये, तूं आपले डोळे
उघडे राखून भाकरीने तृप्त ऐस. १४ वाईट
वाईट असें विकतघेणारा ह्मणतो, आणि तो गेला
ह्मणजे फुशारतो. १५ सोनें आणि बहुत माणकें
आहेत, परंतु ज्ञानाचे ओंठ मोलवान रत्न आहेत.
१६ जो परक्याचा जामीन झाला आहे त्याचें
वस्त्र घे, आणि परस्त्रीकरितां त्यापासून गहाण घे.
१७ कपटाचें अन्न माणसाला गोड वाटतें, परंतु
त्यानंतर त्याचें तोंड खड्यांनी भरेल. १८ मस-
लतीने निश्चय ठरतात; आणि चांगला विचार
करून लढाई आरंभावी. १९ लुबरा गुप्त गोष्टी
उघड्या करितो, यास्तव जो आपल्या ओंठांनी आ-
र्जव करितो त्याची संगत करूं नको. २० जो
आपल्या बापाला अथवा आपल्या आईला शापितो
त्याचा दीप निबिड अंधारांत विझून जाईल.
२१ द्रव्य पाहिल्याने लोभेंकरून प्राप्त झालें असेल,
परंतु त्याचा परिणाम आशीर्वादित होणार नाहीं.
२२ मी दुष्कर्माचा सूड उगवीन, असें ह्मणूं नको;
**परमेश्वरावर** आशा ठेव ह्मणजे तो तुला तारी-
ल. २३ भिन्नभिन्न माड **परमेश्वराला** वीट
असे आहेत, आणि खोटी तागडी बरी नाहीं.
२४ पुरुषाच्या गति **परमेश्वराकडून** आहेत, तर
मनुष्य आपला मार्ग कसा समजेल? २५ उता-
वळीने पवित्र वचन बोलणें आणि नवस केल्यानंतर
विचार करणें मनुष्याला केवळ पाश असें आहे.
२६ सुज्ञ राजा दुष्टांला उडवून टाकितो, आणि

त्यांजवर चक्र फिरवितो. २७ **मनुष्याचा** आत्मा **परमेश्वराचा** दीप आहे, तो पोटांतल्या सर्व कोठ्यांचा शोध करितो. २८ दया आणि खरेपण राजाचें रक्षण करितात, आणि तो आपलें सिंहासन दयेनें संभाळील. २९ **तरण्यांची** शोभा त्यांचा पराक्रम आहे, आणि ज्ञात्यांची प्रतिष्ठा पिकलेले केंस आहे. ३० **घायाचे** वळ दुषणाचें शुद्ध करणारे आहेत, आणि फटके पोटाच्या कोठ्यांचें.

## अध्याय २१.

जसे पाण्याचे पाट तसें **परमेश्वराच्या** हातीं राजाचें मन आहे, जिकडे तो इच्छितो तिकडे तो तें वळवितो. २ **मनुष्याचा** प्रत्येक मार्ग त्याच्या दृष्टीनें नीट आहे, परंतु **परमेश्वर** हृदयें ताडून पाहतो. ३ **न्यायत्व** व नीति करणें हें यज्ञापेक्षां **परमेश्वराला** आवडतें. ४ उन्मत्त दृष्टि आणि गर्विष्ठ हृदय आणि दुष्टांचा दीपहि पाप आहे. ५ उद्योग्याचे संकल्प केवळ द्रव्यवाढविणारे आहेत; परंतु प्रत्येक उतावळ्याचे केवळ दरिद्र आणितात. ६ खोटें बोलणाऱ्या जिभेनें द्रव्य प्राप्त करणें मरण शोधकांचें इकडे तिकडे उडविलेलें मृगजळ असें आहे. ७ दुष्टांचें लुटणें त्यांचा नाश करील, कां कीं नीति करायाला ते मान्य होत नाहींत. ८ **मनुष्याचा** मार्ग वांकडा व विलक्षण असतो, परंतु जो शुद्ध त्याचें करणें सरळ असतें. ९ झगडाळूस्त्रीच्या संगतीनें राहावें यापेक्षां धाब्याच्या एका कोणावर वसावें हें बरें आहे. १० दुष्टाचा जीवात्मा वाईट इच्छितो, त्यासमक्ष त्याचा शेजारी दया पावत नाहीं. ११ **निंदक** दंड भोगितो तेव्हां भोळा सुज्ञ होतो, आणि सुज्ञानाला बोध केला ह्मणजे तो विद्या पावतो. १२ दुष्टाच्या घराकडे न्यायी लक्ष्य लावितो, परंतु देव दुष्टांचा नाश त्यांच्या दुष्कर्मामुळें करितो. १३ दरिद्याच्या आरोळीपासून जो आपले कान झांकितो तोहि आरोळी मारिल, परंतु त्याला उत्तर देणार नाहींत. १४ एकांतीं दिलेलें दान क्रोधाला, आणि ओटींत घातलेला नजराणा तीव्रकोपाला शांतवितो. १५ **न्याय** करणें न्यायीला हर्षकारक, परंतु दुष्कर्म्यांला भीतिकारक आहे. १६ **सुबोधाच्या** मार्गांतून जो बहकतो तो मेलेल्याच्या समाजांत मिळून राहील. १७ **ज्याला** ख्याल खुशाली आवडती तो दरिद्री होईल, ज्याला द्राक्षारस व तेल आवडतात तो धनवान होणार नाहीं. १८ **न्यायीसाठीं** दुष्ट आणि प्रमाणिकासाठीं अधार्मिक खंडणी असा होईल. १९ **झगडाळू** आणि रागीट स्त्रियेसीं राहण्यापेक्षां अरण्यांत राहणें हें बरें आहे. २० **इच्छेस** योग्य द्रव्य आणि तेल सुज्ञाच्या वस्तींत असतात, परंतु मूर्ख मनुष्य तीं वेचून टाकितो. २१ **जो** न्यायीपणें आणि उपकारिकपणें वर्ततो त्याला जीवन, पुण्य, आणि गौरव प्राप्त होतील. २२ **पराक्रम्यांच्या** नगरावर सुज्ञ चढतो, आणि त्याच्या निर्भयाच्या बुरुजाला मोडून पाडितो. २३ **जो** आपलें तोंड आणि आपली जीभ आवरितो तो आपला जीव संकटांपासून संरक्षितो. २४ **जो** गर्वयुक्त क्रोधानें वर्त्ततो त्याचें नाम गर्विष्ठ व उन्मत्त निंदक असें आहे. २५ **आळशाची** इच्छा त्याला मारून टाकिती, त्याचे हात उद्योग करायाला मान्य नाहींत ह्मणून. २६ **तो** सारादिवस लोभ करितो, परंतु न्यायी देतो व राखून ठेवीत नाहीं. २७ **दुष्टांचा** यज्ञ वीट असा आहे, विशेषें जेव्हां तो दुष्ट संकल्पानें आणितात तेव्हां. २८ **खोटा** साक्षी नाश पावेल, परंतु जो खरेपण ऐकतो तो तें बोलतो. २९ **दुष्ट** मनुष्य आपलें मुख कठीण करितो, परंतु जो प्रमाणिक तो आपला मार्ग निटावितो. ३० **कांहीं** ज्ञान कांहीं बुद्धि कांहीं मसलत **परमेश्वराविरुद्ध** चालत नाहीं. ३१ **लढाईच्या** दिवसासाठीं घोडा तयार होतो, परंतु तारण **परमेश्वराकडून** घडतें.

## अध्याय २२.

पुष्कळ धनापेक्षां प्रतिष्ठा, आणि रुपें व सोनें यांपेक्षां सत्प्रसाद उत्तम आहे. २ **धनवान** आणि दरिद्री एकमेकांसीं मिळतात, त्या सर्वांचा उत्पन्न करणारा **परमेश्वर** आहे. ३ **विवेकी** अरिष्ट पाहून लपतो, परंतु भोळे पुढें चालून दंड भोगितात. ४ **नम्रपणा** आणि **परमेश्वराचें** भय यांचें फल धन व गौरव आणि जीवनहीं आहे. ५ **कांटे** व फास वांकड्या स्वभावाच्या

मार्गांत असतात; जो आपला जीव राखितो तो
त्यांपासून दूर राहील. ६ ज्या मार्गांत चालावें
त्यांत मूल लाव ह्मणजे तो प्रौढ झाल्यावर त्यांतून
वळणार नाहीं. ७ धनवान दरिद्र्यांवर प्रभुत्व
करितो, आणि उसनें घेणारा उसनें देणाऱ्याचा से-
वक आहे. ८ जो अन्याय पेरितो तो कष्ट का-
पील आणि त्याच्या रोषाची काठी नाहींसी होईल.
९ जो उदारदृष्टीचा तो आशीर्वादित होईल, तो
आपल्या अन्नांतलें कांहीं दरिद्र्याला देतो ह्मणून.
१० निंदकाला घालवून दे ह्मणजे विवाद निघून
जाईल, आणि कज्जा व शिवीगाळी बंद हो-
तील. ११ ज्याला मनाचा शुद्धपणा आवडतो
त्याच्या गोड भाषणामुळें राजा त्याचा मित्र हो-
ईल. १२ परमेश्वराचे डोळे ज्ञान राखितात,
आणि तो विश्वासघातकाचीं वचनें व्यर्थ करितो.
१३ आळशी ह्मणतो बाहेर सिंह आहे, मला
रस्त्यांमध्यें ठार मारील. १४ परस्त्रियांचें मुख
खोल खांच आहे, ज्याचा वीट परमेश्वराला
वाटतो तो तींत पडेल. १५ पोराच्या हृदयांत
मूर्खपणा बांधलेला असतो, परंतु शिक्षेची काठी
तिला त्यापासून दूर करील. १६ जो आपलें
द्रव्य वाढवायासाठीं दरिद्र्याला पीडितो तो, आणि
जो धनवानाला देतो तोहि दरिद्री होईल. १७
तूं आपला कान देऊन ज्ञान्यांचीं वचनें ऐक,
आणि माझे विद्येकडे आपलें मन लाव. १८ कां
कीं तीं जर तूं आपल्या हृदयांत राखिसील तर
चांगलें होईल, तीं एकंदर तुझ्या ओंठांवर सिद्ध
होतील. १९ परमेश्वरावर तुझा भाव असावा
ह्मणून म्या आज तुला तुलाच ज्ञान कळविलें
आहे. २० मसलती व ज्ञान यांतल्या उत्कृष्ट
गोष्टी म्या तुजसाठीं लिहिल्या नाहींत काय?
२१ खरेपणाच्या वचनांचा निश्चय म्या तुला कळ-
वावा, जे तुजकडे प्रश्न पाठवितील त्यांला त्वां स-
त्याच्या वचनांचें उत्तर करावें ह्मणून. २२ दरि-
द्र्याचें हरण करूं नको तो दरिद्री आहे ह्मणून,
आणि वेशींत दीनाला पीडूं नको. २३ कां कीं
परमेश्वर त्यांचा वाद करील, आणि त्याच्या
हरणाऱ्यांचा जीव हरण करील. २४ क्रोध्यासीं
मित्रपण करूं नको, आणि कोप्यासीं वर्त्तूं नको.
२५ वर्त्तलास तर कदाचित त्याचें आचरण
शिकसील, आणि आपल्या जीवाला पाश पावसील.
२६ टाळीदेणाऱ्यांतला अथवा ऋणांसाठीं जे जामीन
यांतला एक तूं होऊं नको. २७ फेडायाला जर
तुझ्याजवळ कांहीं नाहीं, तर त्यानें तुजखालून तुझें
अंथरूण कां काढून घ्यावें? २८ जो जुना बांध
तुझ्या वडिलांनीं घालून ठेविला आहे तो सारूं
नको. २९ मनुष्याला त्याच्या धंद्यांत निपुण अ-
सतां पाहिलें काय? तो राजांसमोर उभा रा-
हील, नीचांसमोर उभा राहणार नाहीं.

## अध्याय २३.

अधिकाऱ्यासंगतीं जेवायाला बसतोस तेव्हां तु-
जपुढें काय आहे हें ध्यानांत आण. २ आ-
णि जर खादाड आहेस तर तूं आपल्या गळ्यास
सुरी लाव. ३ त्याचीं मिष्टान्नें इच्छूं नको, कां
तर तीं भुलविणारें भक्ष्य आहेत. ४ धनवान
व्हायाला श्रम करूं नको, तूं आपल्या बुद्धीवर
भरवसा ठेवूं नको. ५ तूं आपली दृष्टि त्याज-
कडे लाविसील आणि तें नाहींच काय? कां कीं
धन निश्चयें आपणासाठीं पंख करितें जसा गरुड
आकाशाकडे तसें तें उडून जातें. ६ हेवाखोराचें
अन्न खाऊं नको, आणि त्याचीं मिष्टान्नें इच्छूं
नको. ७ कां कीं तो आपल्या मनांत कल्पित
असता, खा पी असें तुला ह्मणेल, परंतु त्याचें
हृदय तुजकडे नाहीं. ८ जो तुकडा तूं खाल्ला
अससील, तो ओकून टाकिसील, आणि आपलीं
गोड वचनें गमावसील. ९ मूर्खाच्या कानांत बोलूं
नको, कां कीं तो तुझें बोलण्याचें शहाणपण तुच्छ
मानील. १० जुना बांध सारूं नको, आणि अना-
थांच्या शेतांत शिरूं नको. ११ कां कीं त्यांचा
उद्धरणारा बलवान आहे, तो तुजसीं त्यांचा वाद
करील. १२ तूं आपलें मन संबोधाकडे, आणि
आपले कान ज्ञानाच्या वचनांकडे लाव. १३
पोरापासून शासन अटकावूं नको, कां कीं त्वां काठीनें
त्याला मारिलें तर तो मरणार नाहीं. १४
तूं काठीनें त्याला मार, ह्मणजे त्याचा जीव मृत-
लोकापासून सोडविसील. १५ माझ्या लेंकरा,
तुझें हृदय जर सूज्ञ असलें तर माझें हृदय माझें-
च हर्षेल. १६ होय तुझे ओंठ यथार्थ बोलत
असतां माझें अंतर्याम उल्लासेल. १७ तुझ्या

हृदयाने पाप्यांचा हेवा करूं नये, परंतु सारादि-
वस **परमेश्वराचें** भय धरावें. १८ **कां** कीं
निश्चयें परिणाम आहे, आणि तुझी आशा नाहींसी
होणार नाहीं. १९ **माझ्या** लेंकरा, तूं ऐकून सुज्ञ
हो, आणि आपलें मन मार्गांत नीट संभाळ. २०
**द्राक्षारस** पिणाऱ्यांसीं आणि जे ख्यालखुशालीने
मांस खाणारे त्यांची संगत करूं नको. २१
**कां** कीं मद्यपी आणि खादाड दरिद्री होतील,
व डुकल्यानीं मनुष्याचें पांघरूण चिंध्या असें होईल.
२२ **ज्या** बापाने तुला जन्म दिल्हा त्याचें ऐक,
आणि तुझी आई म्हातारी झाली असतां तिला
अवमानूं नको. २३ **खरेपण** विकत घे, विकूं नको;
ज्ञान, शिक्षा, आणि बुद्धिहि. २४ **न्यायी**चा बाप
फार उल्लासेल, आणि सुज्ञाचा जन्मविणारा त्या-
विषयीं हर्षेल. २५ **तुझे** आईबाप हर्षतील, जी
तुला प्रसवली ती उल्लासेल. २६ **माझ्या** लेंकरा,
तूं आपलें हृदय मला दे, आणि तुझे डोळे माझ्या
मार्गीला जपोत. २७ **कां** कीं व्यभिचारिणी खोल
खड्डा आहे, आणि परस्त्री संकोचित खांच आहे.
२८ **तीहि** जसी लुटीसाठीं तसी टपती, आणि
मनुष्यांमध्यें पातक्यांस वाढविती. २९ **कोणाला**
हाय? कोणाला अहा? कोणाला विवाद? कोणाला
कुज्जा? कोणाला निष्कारण जखमा? कोणाला डो-
ळ्यांची लाली आहे? ३० **जे** द्राक्षारस पीत
पीत फार वेळ राहतात, आणि मिश्रितमद्य शोधा-
याला जातात त्यांला. ३१ **द्राक्षारस** तांबडा
असतां आणि प्याल्यांत चमकतां व यथायोग्य
उततां तूं पाहूं नको. ३२ **शेवटीं** तो सर्पासारिखा
डसतो, आणि फुरशाप्रमाणें झोंबतो. ३३ **तुझे**
डोळे परस्त्रियांला पाहतील, आणि तुझें हृदय
वाईट गोष्टी बोलेल. ३४ **होय** जो समुद्रामध्यें
पडला त्यासारिखा, अथवा डोलकाठीच्या माथ्या-
वर जो निजला त्यासारिखा होसील. ३५ **तूं**
म्हणसील, त्यांनी मला तडाका मारिला असतां
मी दुःखित झालों नाहीं, त्यांनी मला पिटिलें अ-
सतां म्या जाणलें नाहीं, मी केव्हां जागृत होईन?
मी त्याला अणखी शोधीन.

## अध्याय २४.

दुष्ट मनुष्यांचा हेवा करूं नको, आणि त्यांची
संगत इच्छूं नको. २ **कां** कीं त्यांचें हृदय
नाश योजितें, आणि त्यांचे ओंठ उपद्रव बोलतात.
३ **ज्ञानें**करून घर बांधितात, आणि बुद्धीकडून
तें स्थिर राहतें. ४ **आणि** विद्येकरून कोठड्या
सर्व मोलवान व मनोरम द्रव्यानें भरतील. ५
**ज्ञानी** पुरुष बलवान आहे, आणि विद्वान मनुष्य
पराक्रम दृढ करितो. ६ **कां** कीं सुविचारानें
तूं आपली लढाई करिसील, आणि प्रधान बहुत
असल्यानें सुरक्षण होत असतें. ७ **मूर्खाला**
ज्ञान उंच आहे, वेशींत तो आपलें मुख उघडीत
नाहीं. ८ **जो** दुष्कर्म करायाला योजितो, त्याला
लोक उपद्रव करणारा असें म्हणतील. ९ **मूर्खते**चा
संकल्प पापच आहे, आणि मनुष्याला निंदकाचा
वीट वाटतो. १० **संकटा**च्या दिवसीं जर तूं
ग्लान होतोस, तर तुझी शक्ति थोडी आहे. ११
**जे** मारायाला नेलेले, आणि वधाच्या लागास आ-
लेले, त्यांस सोडवायाला जर झटत नाहींस, १२
**पाहा**, आम्ही हें जाणलें नाहीं, असें जर म्हण-
तोस, तर जो हृदयें ताडून पाहतो तो समजणार
नाहीं काय? आणि जो तुझ्या जीवाला संरक्षितो
तो जाणणार नाहीं? आणि प्रत्येक मनुष्याला त्या-
च्या कर्मांप्रमाणें फल देणार नाहीं काय? १३
**माझ्या** लेंकरा, मध चांगला आहे म्हणून तो तूं
खा, आणि मधाचा शिसा तुझे तालूस गोड वाटो.
१४ **तसेंच** ज्ञान तुला प्राप्त झालें, म्हणजे तुझ्या
जीवाला वाटेल, असें जाण; आणि सत्परिणाम
होईल, आणि तुझी आशा नाहींसी होणार नाहीं.
१५ **अरे** दुष्टा, न्यायीच्या वस्तीवर टपूं नको,
त्याच्या झोंपडीचा नाश करूं नको. १६ **कां**
तर न्यायी सात वेळा पडला तरीं पुन्हा उठेल, परंतु
दुष्ट अरिष्टांत पडतील. १७ **तुझा** वैरी पडला
असतां हर्षूं नको, आणि तो मळून पडला असतां
तुझें हृदय उल्लासूं नये. १८ उल्लासलें तर क-
दाचित **परमेश्वर** पाहील आणि त्याला वाईट
वाटेल, आणि तो आपला क्रोध त्यापासून फिर-
वील. १९ **दुष्कर्म्यां**मुळें चिडूं नको, आणि दु-
ष्टांचा हेवा करूं नको. २० **कां** कीं दुष्कर्म्यांचा
सत्परिणाम होणार नाहीं, दुष्टांचा दीप विझून
जाईल. २१ **माझ्या** लेंकरा, **परमेश्वराचें** आ-
णि राजाचें भय धर, चंचलांसीं मिळूं नको. २२
**कारण** त्यांची विपत्ति अकस्मात येईल, आणि त्या

दोघांचा नाश कोण जाणे? २३ हे अर्थहि सु-
ज्ञांचे आहेत, न्यायांत पक्षपात करणें बरें नाहीं.
२४ जो दुष्टाला ह्मणतो, कीं तूं न्यायी आहेस,
त्याला लोक गालि देतील, समुदाय त्याला अघोर
मानितील. २५ परंतु जे दुष्टाला निषेधितात त्यां-
चा आनंद होईल, आणि त्यांजवर उत्तम आशी-
र्वाद येईल. २६ जो उत्तर करित यथार्थवचनें
बोलतो, तो ओंठांचें चुंबन घेतो. २७ तूं बाहेर
आपली सामग्री सिद्ध कर, आणि शेतांत तूं आ-
पणासाठीं ती सोईवार कर, नंतर आपलें घर बांध.
२८ तूं आपल्या शेजाऱ्याविषयीं निष्कारण साक्षी
होऊं नको, आणि आपल्या ओंठानी फसवूं नको.
२९ जसें त्याने मला केलें तसें त्याला करीन,
त्या मनुष्याला त्याच्या करण्याप्रमाणें भरून देईन,
असें ह्मणूं नको. ३० आळशी जनाच्या शेताक-
डून, आणि निर्बुद्धि मनुष्याच्या मळ्याकडून मी
गेलों; ३१ तेव्हां पाहा, त्या सर्वांवर निदण
रुझलें होतें, आणि कांट्यांच्या झाडांनी त्याची
भूमि झांकिली होती, आणि त्याचें दगडी कुसूं
मोडलें होतें. ३२ तेव्हां म्या देखून आपलें मन
लाविलें, म्या पाहून संबोध घेतला. ३३ अणखी
थोडशी निद्रा घ्यावी, थोडश्या डुकल्या खाव्या,
निजायाला हात थोडसे पोटाळावे; ३४ ह्मणजे
तुझें दरिद्र वाटसरूसारिखें आणि तुझी गरीबी
हत्यारबंद मनुष्यासारिखी येईल.

## अध्याय २५.

यहूदाचा राजा हिज्कीया याच्या मनुष्यानी श-
लमोनाचीं हीं वचनें उतरून घेतलीं तीं हींच
आहेत. २ गोष्ट गुप्त राखणें हें देवाचें गौरव,
परंतु गोष्ट शोधणें राजांचें गौरव आहे. ३ आकाश
उंच आणि पृथ्वी खोल आहे, आणि राजांच्या
हृदयाचा शोध लागत नाहीं. ४ रुप्याचा गाळ
दूर करावा, ह्मणजे गाळणाऱ्यासाठीं पात्र निघेल.
५ राजासमोरून दुष्ट दूर करावा, ह्मणजे त्याचें
सिंहासन न्यायानें स्थापित होईल. ६ राजास-
मोर तूं आपली प्रतिष्ठा मिरवूं नको, आणि महा-
जनांच्या स्थानीं उभा राहूं नको. ७ कां कीं
तुझ्या डोळ्यानी जो अधिपति पाहिला त्यासमोर
तुला नीच करावें यापेक्षां तूं इकडे वर ये, असें
तुला ह्मणावें हें बरें आहे. ८ विवाद करायाला
त्वरेनें बाहेर जाऊं नको, गेलास तर त्याच्या शे-
वटीं तुझ्या शेजाऱ्यानें तुला लज्जित केलें असतां
तूं काय करिसील? ९ तूं आपला वाद आपल्या
शेजाऱ्यासींच कर, आणि दुसऱ्याला गुप्त गोष्ट
प्रगट करूं नको. १० केली तर कदाचित
ऐकणारा तुझी अप्रतिष्टा करील आणि तुझी अ-
कीर्त्ति जाणार नाहीं. ११ योग्य बोललेलें व-
चन रुप्याच्या चित्रांत खोदलेलें सोनेरीफळ
असें आहे. १२ जसी सोन्याची कुडकी आण
उत्कृष्ट सोन्याचें भूषण तसा सुज्ञ निषेधक ऐक-
णाऱ्या कानाला आहे. १३ कापणीच्या समयीं
जसें बर्फाचें शीत तसा विश्वासु दूत त्याच्या
पाठविणाऱ्यांस आहे, कां कीं तो आपल्या धन्यां-
चा जीव आनंदवितो. १४ जो खोट्या दाना-
विषयीं फुशारतो तो वृष्टिहीन आभाळ व वायु
असा आहे. १५ सहनतेकरून अधिपतीला मा-
नवितात; आणि मऊजीभ हाड मोडिती. १६
तुला मध सांपडला ह्मणजे तुला पुरे एवढा खा,
नाहीं तर कदाचित तूं अतितृप्त होऊन तो ओकून
टाकिसील. १७ तूं आपला पाय आपल्या शे-
जाऱ्याच्या घरांत केवळ कधींमधीं जाऊं दे, नाहीं
तर कदाचित तो तुला कंटाळून तुला द्वेषील.
१८ जो आपल्या शेजाऱ्यावर खोटी साक्ष भरितो,
तो घण आणि तरवार आणि तिखट तीर असा
आहे. १९ संकटसमयीं अविश्वासूवर भरवसा
ठेवणें हें मोडलेला दांत आणि पेंचलेला पाय
असें आहे. २० जो हिमकालीं वस्त्र काढितो
आणि जसा क्षारावर अम्ल तसा जो खिन्न हृद-
याला गीतें गातो तो आहे. २१ तुझ्या द्वेषकाला
जर भूक लागली तर त्याला अन्न खायाला घाल,
जर त्याला तहान लागली तर त्याला पाणी प्या-
याला दे. २२ ह्मणजे त्याच्या डोईवर निखाऱ्यां-
ची रास घालसील, आणि परमेश्वर तुला फल
भरून देईल. २३ उत्तरेकडचा वारा पाऊस
उडवून दूर करितो, तसें रागीट तोंड चुगल जि-
भेला. २४ झगडाळू स्त्रीच्या संगतीने घरांत
राहण्यापेक्षां धाब्याच्या एका कोणावर वसावें हें
बरें आहे. २५ तान्हेल्या जीवाला जसें गारपा-
ण्यें तसें दूरदेशांतून आलेलें चांगलें वर्त्तमान

आहे. २६ दुष्टाच्या समक्ष न्यायी भ्रष्ट झाला
असतां, गढुळलेलें उमळट आणि दूषित झरा अ-
सा आहे. २७ पुष्कळ मध खाणें बरें नाहीं,
आणि आपलें गौरव शोधणें हें शोभत नाहीं. २८
जो आपला आत्मा स्वाधीन ठेवीत नाहीं, तो कु-
सावांचून मोडलेलें नगर असा आहे.

## अध्याय २६.

उष्णकाळीं जसें बर्फ आणि कापणीच्या समयीं
जसा पाऊस तसें गौरव मूर्खाला शोभत नाहीं.
२ जसा पक्षी भ्रमत, जसी निळवी उडत येती,
तसा शाप निष्कारण येत नाहीं. ३ घोड्याला
चाबूक गाढवाला लगाम आणि मूर्खांच्या पाठीस
काठी पाहिजे. ४ मूर्खाला त्याच्या मूर्खतेप्रमाणें
उत्तर करूं नको, केलें तर कदाचित तूंहि त्या-
सारिखा होसील. ५ मूर्खाला त्याच्या मूर्खते-
प्रमाणें उत्तर कर, नाहीं तर तो आपल्या मतें
सुज्ञान होईल. ६ जो मूर्खाच्या हातीं निरोप
पाठवितो तो पाय कापून उपद्रव पितो. ७ व्यं-
गाचे पाय लंगडतात, तसी मूर्खांच्या मुखांत ह्मण
आहे. ८ गोफणींत धोंडा बांधणाऱ्यासारिखा
मूर्खाचा सन्मान करणारा आहे. ९ जसा झिंग-
लेल्याच्या हातांत रुतलेला कांटा, तशी मूर्खां-
च्या मुखांत ह्मण आहे. १० पराक्रम्यानें सर्व
उत्पन्न केलें, तो मूर्खाला आणि पापिष्ठांलाहि फल
भरून देतो. ११ जसा कुत्रा आपल्या ओकी-
कडे फिरतो, तसा मूर्ख आपली मूर्खता पुन्हा क-
रील. १२ मनुष्य आपल्या मतें सुज्ञान असतां
पाहतोस तर त्यापेक्षां मूर्खाविषयीं अधिक आशा
आहे. १३ मार्गांत सिंह आहे, आळ्यांत सिंह
आहे, असें आळशी ह्मणतो. १४ जसें दार
आपल्या कुंसावर फिरतें तसा आळशी आ-
पल्या अंथरुणावर फिरतो. १५ आळशी
आपला हात पात्रांत ठेवितो, त्याला आपल्या मु-
खाकडे परत आणायाला तो कंटाळतो. १६
आळशी आपल्या मतें सात योग्य उत्तर देणा-
ऱ्यापेक्षां सुज्ञान आहे. १७ जसा कुत्र्याचे कान
धरणारा तसा जो जवळून जातांना परक्यांच्या
विवादांत शिरतो तो आहे. १८ जसा खेळतांना
अग्निकाष्ठ, तीर, व मरण फेंकणारा, १९ तसा
जो आपल्या शेजाऱ्याला फसवून, मी विनोद क-
रीत नव्हतों काय? असें ह्मणतो तो आहे. २०
सर्पण नसतां अग्नि विझतो, आणि कुजबुज्या नस-
तां झगडा शमतो. २१ जसे कोळसे निखाऱ्यांला
आणि लांकडें अग्नीला, तसा झगडाळू मनुष्य
विवाद चेतवायाला आहे. २२ कुजबुज्याचीं
वचनें जखमांसारिखीं आहेत, तीं पोटाच्या को-
ट्यांत उतरतात. २३ जसी गाळाच्या रुप्यानें
मढलेली खापरी, तसे जळणारे ओंठ आणि दुष्ट
हृदय आहेत. २४ द्वेषक आपल्या ओंठानी कपट
करितो, आणि आपल्या अंतर्यामांत कपट ठेवितो.
२५ जरीं तो दयेने बोलतो तरीं त्याजवर विश्वासूं
नको, कां कीं त्याच्या हृदयांत सात कुत्सित भा-
वना असतील. २६ ज्याचा द्वेष कपटानें झांकिला
आहे, त्याची दुष्टाई सभेंत प्रकट होईल. २७
जो खांच खणितो तो तींत पडेल, आणि जो धोंडा
लोटितो त्याजवर तो उलटून येईल. २८ खोटें
बोलणारी जीभ आपल्याकडून पिडलेल्यास द्वेषिती.
आणि खुशामतीचें तोंड धक्का देतें.

## अध्याय २७.

उद्यांच्या दिवसाविषयीं फुशारूं नको, कां कीं
एक दिवस काय प्रसवेल, हें तुला ठाऊक ना-
हीं. २ दुसऱ्यानें तुला स्तवावें, आपल्या मुखानें
नको, अन्यानें, तुझ्याच ओंठानीं नको. ३ दगड
जड, आणि वाळू भारी आहे, परंतु मूर्खाचा राग
त्या दोहोंपेक्षांहि भारी आहे. ४ कोपाची ती-
व्रता आणि क्रोधाचा प्रवाह असो, परंतु हेव्यापुढें
कोण उभा राहील? ५ उघडा निषेध गुप्तप्रीती-
पेक्षां बरा आहे. ६ प्रियकरानें केलेल्या जखमा
विश्वासू आहेत, परंतु द्वेषकाचीं चुंबनें कपटी
आहेत. ७ तृप्त जीव मधाच्या शिस्याला कंटाळतो.
परंतु भुकेल्या जीवाला कोणताहि कडू पदार्थ गोड
वाटतो. ८ जो पक्षी आपल्या कोट्यापासून भ्र-
मतो, त्यासारिखा जो मनुष्य आपल्या स्थानापासून
भ्रमतो तो आहे. ९ तेल व सुरभि हीं हृदय आ-
नंदित करितात, आणि त्याच्या मित्राचें गोड बो-
लणेंहि मनापासून उपदेश करण्यानें तसें करितें.
१० तूं आपला मित्र आणि आपल्या बापाचा मित्र
यांस सोडूं नको, आणि आपल्या विपत्तीच्या दिवसीं

आपल्या भावाच्या घरास जाऊं नको; जो भाऊ दूर
राहतो त्यापेक्षां जवळ राहणारा परका बरा आहे.
११ **माझ्या** लेंकरा, सुज्ञ ऐस, आणि माझें हृदय
संतोषित कर, म्हणजे मी आपल्या निंदकाला उत्तर
करीन. १२ **विवेकी** अरिष्ट पाहून लपतो, परंतु
मूर्ख पुढें चालून दंड भोगितात. १३ **जो** पर-
क्याचा जामीन झाला आहे, त्याचें वस्त्र घे;
आणि परस्त्रीकरितां त्यापासून गहाण घे. १४
**पहांटे** जो आपल्या मित्राला मोठ्या शब्दानें आ-
शीर्वाद देतो, तो त्यासाठीं शाप असा मानितील.
१५ **पाउसाच्या** दिवसीं निरंतर टबके आणि झग-
डाळू बायको सारिखींच आहेत. १६ **जो**
तिला आवरितो तो वाऱ्याला आवरितो, आणि
आपल्या उजव्या हातांतलें सुगंध तेल जें प्रत्य-
यास येईलच तेंहि. १७ **लोखंड** लोखंडाला
तिखट करितें, आणि मनुष्य आपल्या मित्राचें
मुख तिखट करितो. १८ **जो** अंजीराच्या झा-
डाला संभाळितो तो त्याचें फळ खाईल, आणि
जो आपल्या धन्याला जपतो तो सन्मान पावेल.
१९ **जसें** पाण्यांत मुखाला मुखाचें प्रतिबिंब होतें,
तसेंच मनुष्याला मनुष्याच्या हृदयाचें. २० **मृतलोक**
व नाश तृप्त होत नाहींत, आणि मनुष्याचे डोळेहि
तृप्त होत नाहींत. २१ **रुप्यासाठीं** मूस आणि
सोन्यासाठीं भट्टी आहे, तर मनुष्य आपल्या स्तु-
तीप्रमाणें असावा. २२ **जरीं** मूर्खाला गव्हांबरो-
बर उखळांत मुसळानें कुटिलें, तरीं त्याची मूर्खता
त्यापासून जाणार नाहीं. २३ **तूं** आपल्या मेंढरांची
अवस्था निश्चयें जाण, आपल्या कळपांकडे आपलें
मन लाव. २४ **कां** कीं धन सर्वकालपर्यंत टिकत
नाहीं, आणि मुगुट युगानुयुग टिकेल कीं काय?
२५ **गवत** उगवतें आणि हिरवळ दृष्टीस पडती,
आणि पर्वतांतलें गवत कापितात. २६ **कोंकरें**
तुझ्या वस्त्रासाठीं आहेत, आणि बकरे शेताचें
मोल आहेत. २७ **आणि** तुला आपल्या खाण्या-
साठीं आणि आपल्या घरच्या खाण्यासाठीं आणि
आपल्या दासींच्या उपजीवनासाठीं शेळ्यांचें पुरतें
दूध मिळेल.

## अध्याय २८.

**को**णी पाठीस लागला नसतां दुष्ट पळतात,
परंतु न्यायी सिंहासारिखे निर्भय असतात.
२ देशाच्या पातकामुळें त्याचे बहुत अधिपती हो-
तात, परंतु सुबुद्धि व सुज्ञान मनुष्याकडून तो फार
दिवस यथास्थित राहील. ३ **जो** दरिद्री पुरुष
दरिद्र्यांला पीडितो, तो जो पाऊस सुसाट्यानें येऊन
धान्यें नासून टाकितो त्यासारिखा आहे. ४ **जे**
नेम सोडितात ते दुष्टांला स्तवितात, परंतु जे नेम
पाळितात ते त्यांशीं भांडतात. ५ **दुष्ट** मनुष्य
न्याय समजत नाहींत, परंतु **परमेश्वराचे** शोध-
णारे अवघीं समजतात. ६ **जो** दरिद्री आपल्या
सरळपणानें वर्त्ततो, तो कुटिल धनवानापेक्षां उत्तम
आहे. ७ **जो** नेम पाळितो, तो सुबुद्धि पुत्र
आहे; परंतु जो सोद्यांचा सोबती आहे, तो आ-
पल्या बापाची अप्रतिष्ठा करितो. ८ **जो** व्याजानें
व वृद्धीनें आपलें धन वाढवितो, तो गरीबांवर
दया करणाऱ्यासाठीं तें साठवितो. ९ **नेम** न
ऐकावा म्हणून जो आपला कान फिरवितो, त्याची
प्रार्थनाहि वीट असी वाटेल. १० **जो** प्रमाणि-
कांस कुमार्गांत बहकवितो तो आपल्याच खांचेंत
पडेल, परंतु जे यथार्थ ते चांगलें वतन पावतील.
११ **धनवान** आपल्या मोजण्यांत ज्ञानवान असतो,
परंतु कोणी सुबुद्धि दरिद्री त्याला पारखतो. १२
**न्यायी** उल्लासतात तेव्हां मोठी शोभा असती, परंतु
दुष्ट उठले म्हणजे मनुष्यें लपतात. १३ **जो**
आपलीं पातकें झांकितो तो कल्याण पावणार नाहीं,
परंतु जो पाप अंगिकारून सोडितो तो दया पावेल.
१४ **जो** मनुष्य नित्य भय धरितो तो धन्य, परंतु
जो आपलें हृदय कठोर करितो तो अरिष्टांत
पडेल. १५ **जसा** भुरकणारा सिंह अथवा फि-
रणारा आस्वल तसा दुष्ट अधिकारी दरिद्री लो-
कांवर राज्य करितो. १६ **बुद्धिहीन** अधिपति
जबरदस्त असतो, परंतु जो लोभाला द्वेषितो तो
आपलें आयुष्य वाढवील. १७ **मनुष्य** कोणीएका-
च्या रक्तामुळें पीडलेला असतां त्यानें खांचेकडे
पळावें, त्याला कोणी अटकावूं नये. १८ **जो**
यथार्थतेनें वर्त्ततो तो तरेल, परंतु कुटिलाचारी
एकाएकीं पडेल. १९ **जो** आपली भूमि राबितो
तो भाकरीनें तृप्त होईल, परंतु जो लुच्चांस अनुस-
रतो तो दरिद्रानें तृप्त होईल. २० **विश्वासू**
मनुष्य बहुत आशीर्वाद पावेल, परंतु धनवान व्हा-
याला जो त्वरा करितो तो निर्दोष असणार नाहीं.

२१ पक्षपात करणें बरें नाहीं, असा मनुष्य भाक-
रीच्या तुकड्यासाठीं पातक करील. २२ जो धन-
वान व्हायासाठीं उतावळी करितो तो कुदृष्टि
आहे, आणि आपल्याला दरिद्र येईल असें तो
जाणत नाहीं. २३ जो मनुष्याला निषेध करितो,
तो पुढें जिभेने आर्जव करणाऱ्यापेक्षां अधिक अनु-
ग्रह पावेल. २४ जो आपल्या बापाला अथवा
आईला लुटून, कांहीं पातक झालें नाहीं, असें
ह्मणतो, तो नाशकाचा सोबती आहे. २५ जो
मनाचा गर्विष्ठ तो विवाद चेतवितो, परंतु जो पर-
मेश्वरावर भाव ठेवितो तो पुष्ट होईल. २६
जो आपल्या बुद्धीवर भरवसा ठेवितो तो मुर्ख
आहे, परंतु जो ज्ञानाने वर्त्ततो तो मुक्त होईल.
२७ जो दरिद्र्याला देतो त्याला तोटा पडणार ना-
हीं, परंतु जो आपले डोळे झांकितो त्याला बहुत
शाप मिळतील. २८ दुष्ट उठतात तेव्हां मनुष्यें
लपतात, परंतु ते नष्ट झाले ह्मणजे न्यायी वाढतात.

## अध्याय २९.

जो बहुत निषेध पावून आपली मान ताठ
करितो तो अकस्मात नाश पावेल, आणि
कोणताहि उपाय मिळणार नाहीं. २ न्यायी प्र-
धान आहेत तेव्हां लोक हर्षतात, परंतु दुष्ट अधि-
कारी असले ह्मणजे प्रजा शोक करिती. ३ ज्याला
ज्ञान आवडतें तो आपल्या बापाला संतोषवितो,
परंतु कसबिणीची संगत धरणारा धन उधळि-
तो. ४ राजा न्यायाने राष्ट्र स्थिरावितो, परंतु जो
नजराणा घेतो तो तें निर्दाळितो. ५ जो पुरुष
आपल्या शेजाऱ्याला आर्जवितो, तो त्याच्या पाव-
लांसाठीं जाळें पसरितो. ६ दुष्ट मनुष्याच्या
पातकांत पाश आहे, परंतु न्यायी जय करून हर्ष-
तो. ७ न्यायी दरिद्र्यांचा वाद जाणतो, परंतु दुष्ट
जाणायास विवेक करीत नाहीं. ८ निंदक मनुष्य
नगर चेतवितात, परंतु सुज्ञ जन क्रोध शांतवितात.
९ सुज्ञ मनुष्य मूर्ख मनुष्याशीं वाद करितो, आणि
तो चडफडतो व हसतो आणि शांति पावत नाहीं.
१० घातक मनुष्य यथार्थाला द्वेषितात, परंतु प्रमा-
णिक त्याच्या जीवाच्या रक्षणाविषयीं झटतात. ११
मूर्ख आपलें सारें मन प्रकट करितो, परंतु सुज्ञान
तें आकळून राखितो. १२ जो अधिकारी खोट्या
गोष्टींकडे कान देतो, त्याचे सर्व सेवक दुष्ट होतात.
१३ दरिद्री आणि पीडक एकत्र मिळतात परमे-
श्वर त्या उभयांचे डोळे प्रकाशित करितो. १४
जो राजा खरेपणाने दरिद्र्यांचा न्याय करितो,
त्याचें सिंहासन सर्वकालपर्यंत स्थिर राहील. १५
छडी व निषेध ज्ञान देतात, परंतु स्वतंत्र सोडिलेलें
पोर आपल्या आईला लाजवितें. १६ दुष्ट वाढ-
तात तेव्हां पातक वाढतें, परंतु न्यायी त्यांचें पतन
पाहतील. १७ तूं आपल्या पुत्राला शिक्षा कर,
ह्मणजे तो तुला चैन पडूं देईल, होय तो तुझ्या
जीवाला आनंद वाटूं देईल. १८ उपदेश नसला
तर लोक लंपट होतात, परंतु जो नेम पाळितो तो
धन्य. १९ सेवक केवळ वचनानी शिक्षा भोगीत
नाहीं, कां कीं जरी समजला तरी उत्तर करणार
नाहीं. २० आपल्या बोलण्यांत उतावळा अशा
मनुष्यास पाहतोस, तर त्याच्यापेक्षां मूर्खाविषयीं
अधिक आशा आहे. २१ कोणी आपला सेवक
बाळपणापासून लाडकाविला, तर शेवटीं तो त्याचा
पुत्र असा होईल. २२ क्रोधी मनुष्य झगडा चेत-
वितो, आणि कोपी जन बहुत दोषी होतो. २३
मनुष्याचा गर्व त्याला नीच करील, परंतु जो नम्र
त्याला गौरव आधार होईल. २४ जो चोराला
भागी होतो तो आपल्या जीवाला द्वेषितो; तो
शाप ऐकून तो प्रगट करीत नाहीं. २५ मनुष्याचें
भय पाश घालितें, परंतु जो परमेश्वरावर भरव-
सा ठेवितो तो सुरक्षित राहील. २६ अधिका-
ऱ्याचा प्रसाद बहुत इच्छितात, परंतु प्रत्येकाचा
न्याय परमेश्वरापासून आहे. २७ अन्यायी
मनुष्य न्यायींला वीट, आणि सरळ मार्गी दुष्टाला
अघोर असा आहे.

## अध्याय ३०.

याकेचा पुत्र आगूर याचीं वचनें, ह्मणजे हीं
वाक्यें त्या पुरुषाने ईथीएलाला ईथीयेला-
लाच व उखालाला सांगितलीं तीं. २ मी तर
कोणत्याहि मनुष्यापेक्षां पशुशील आहें, आणि
मनुष्यबुद्धि मला नाहीं. ३ मी ज्ञान शिकलों
नाहीं, आणि पवित्रांची विद्या मला कळली
नाहीं. ४ आकाशावर कोण चढला? अथवा
उतरला? कोणी आपल्या ओंजळींत वारा एकवटून

घेतला? कोणी वस्त्रांत पाण्यें बांधून ठेविलीं?
पृथ्वीच्या सर्व सीमा कोणी स्थापिल्या? त्याचें नांव
काय? अथवा त्याच्या पुत्राचें नांव काय? हें तुला
कळलें कीं काय? ५ **देवाचें** प्रत्येक वचन शुद्ध
आहे, त्याजवर जे भाव ठेवितात त्यांला तो ढाल
असा आहे. ६ **त्याचीं** वचनें वाढवूं नको, वाढविलीं
तर कदाचित तो तुला निषेध करील आणि तूं खोटें
बोलणारा असा निघसील. ७ **दोन** गोष्टी म्या
तुजपासीं मागितल्या आहेत, मी मरें त्यापूर्वी त्या
मजपासून अडकवून ठेवूं नको. ८ **खोटेंपण** व
लबाड बोलणें मजपासून दूर राख; दरिद्र अथवा
फार द्रव्य मला देऊं नको, अन्न लागेल तितकें
मला पुरीव. ९ **नाहीं** तर कदाचित मी तृप्त
असतां नाकारीन, आणि परमेश्वर कोण? असें
ह्मणेन; अथवा दरिद्री असतां चोरी करीन, आणि
आपल्या देवाचें नाम अधर्मानें घेईन. १० **सेव**-
काची चहाडी त्याच्या धन्याजवळ करूं नको,
केली तर कदाचित तो तुला शापील आणि तूं
दोषी निघसील. ११ **आपल्या** बापाला शापिती
आणि आपल्या आईला आशीर्वाद देत नाहीं,
असी एक जाति आहे. १२ **आपल्या** दृष्टीनें
शुद्ध आहे पण आपल्या मळापासून धुतली नाहीं,
असी एक जाति आहे. १३ **जिचे** डोळे किती
उंच आणि जिच्या पापण्या उन्नत आहेत, असी
एक जाति आहे. १४ **दीनांस** पृथ्वींतून आणि
दरिद्र्यांस मनुष्यांतून खायाला जिचे दांत तरवारी-
सारिखे आणि जिच्या दाढा सुऱ्यांसारिख्या आ-
हेत, असी एक जाति आहे. १५ **जळवेच्या**
दोन कन्या आहेत, दे दे असें ह्मणतात; कधीं
तृप्त होत नाहींत, असे तीन पदार्थ आहेत, होय
चार पुरे असें ह्मणत नाहींत. १६ **ह्मणजे** मृत-
लोक, व वांझेचें पोट, जी पृथ्वी पाण्यानें पूर्ण होत
नाहीं ती, आणि जो अग्नि पुरे असें ह्मणत नाहीं
तो. १७ **जो** डोळा बापाचा उपहास करितो,
आणि आईची आज्ञा तुच्छ मानितो, त्याला खो-
ऱ्यांतले डोमकावळे टोंचितील, आणि गरुडाचीं
पिलें त्याला खातील. १८ **मला** फार आश्चर्य
वाटतें अशा तीन गोष्टी आहेत, होय मला कळत
नाहींत अशा चार आहेत. १९ **गरुडाचा** मार्ग
आकाशांत, सर्पाचा मार्ग खडकावर, गलबताचा
मार्ग समुद्रामध्यें, आणि पुरुषाचा मार्ग कुमारी
संगतीं. २० **जारकर्मिणी** स्त्रियेचा मार्ग असा
आहे, ती खाऊन आपलें तोंड पुसती, आणि ह्म-
णती, म्या कांहीं दुराचार केला नाहीं. २१ **तीन**
गोष्टींमुळें पृथ्वी विव्हल आहे, आणि चोहोंमुळेंहि
तिच्यानें साहवत नाहीं. २२ **सेवक** अधिकार
करितो तेव्हां त्याजमुळें, आणि मूर्ख अन्नानें तृप्त
झाला तेव्हां त्याजमुळें, २३ **द्वेषपात्र** स्त्री विवाहित
होती तेव्हां तिजमुळें, आणि दासी आपल्या बा-
ईची भागीदार होती तेव्हां तिजमुळें. २४
**पृथ्वींतले** चार जीव लहान, परंतु ते अत्यंत शा-
हणे; २५ **मुंग्या** अशक्त जाति आहेत, तथापि
त्या आपलें खाणें उष्णकाळीं तयार करून ठेवि-
तात; २६ **शाफान** निर्बल प्राणी आहेत, तथापि
ते आपलीं घरें खडकांत कोरून ठेवितात; २७
**टोळांस** कोणी राजा नाहीं, तथापि ते सर्व टोळी
टोळीनें बाहेर जातात; २८ **कोळी** आपल्या
हातानी धरितो, आणि राजांच्या मंदिरांत असतो.
२९ **चांगले** चालतात असे तीन जीव आहेत,
होय चार सुंदर क्रमतात; ३० **सिंह** जो पशूं-
मध्यें परम पराक्रमी आहे, आणि कोणापासूनहि
परान्मुख होत नाहीं तो; ३१ **शिकारीकुत्रा**; व
सांबर; आणि ज्या राजापुढें कोणाच्यानें उभें ठा-
कवत नाहीं तो. ३२ **त्वां** आपणाला उंचावून
जर मूर्खता केली, अथवा दुष्टता संकल्पिली तर
आपला हात आपल्या मुखावर लाव. ३३ **दूध**
घुसळण्यानें लोणी निघतें, आणि नाक पिळण्यानें
रक्त निघतें; तसें राग चेतविल्यानें झगडा होतो.

## अध्याय ३१.

लमुवेल राजाचीं वचनें, ह्मणजे जीं वाक्यें त्याच्या
आईनें त्याला शिकविलीं तीं. २ **काय** मा-
झ्या लेंकरा! काय माझ्या पोटच्या लेंकरा! काय
माझ्या नवसांच्या लेंकरा! ३ **तूं** आपलें बल
स्त्रियांला, आणि आपले मार्ग राजांच्या नाशकणा-
ऱ्याला देऊं नको. ४ **हे** लमुवेला, द्राक्षारस पिणें
राजांला शोभत नाहीं, नाहीं राजांला शोभत, आ-
णि दारु अधिपतींला साजत नाहीं. ५ **तो** प्याला
तर कदाचित तो नियमाला विसरेल, आणि एका-
द्या दीनाचा वाद उलटा करील. ६ **जो** नाशाच्या

लागास आला आहे त्याला दारु, आणि खिन्ना-
त्म्याला द्राक्षारस दे. ७ **त्याने** पिऊन आपलें
दरिद्र विसरावें, आणि आपले कष्ट पुन्हा न स्मरावे.
८ **मुक्यां**साठीं सर्व अनाथांच्या वादासाठीं तूं आ-
पलें मुख उघड. ९ **तूं** आपलें मुख उघड,
नीतीने न्याय कर; दीन व दरिद्री यांचा वाद
ठरीव.

१० **सद्गुणी** स्त्री कोणाला सांपडेल? तिचें
मोल माणिकांपेक्षां थोर आहे. ११ **तिचा** नवरा
मनापासून तिजवर भरवसा ठेवितो, आणि त्याला
संपत्तीचा तोटा पडत नाहीं. १२ **ती** आपल्या
आयुष्याचे सर्व दिवस त्याचें हित करील, वाईट
करणार नाहीं. १३ **ती** लोंकर आणि ताग शो-
धून घेती, आणि आपल्या हातानी खुशीने कार्य
करिती. १४ **ती** व्यापाऱ्यांच्या गलबतांसारिखी आ-
हे, ती आपलें अन्न दूरून आणिती. १५ **रात्र**
गेली नाहीं इतक्यांत ती उठून आपल्या घराण्याला
आहार, आणि आपल्या दासींला शिधा देती. १६
**ती** शेताचा विचार करून तें विकत घेती, ती आ-
पल्या कष्टाच्या फळाने द्राक्षमळा लाविती. १७
**ती** आपली कंबर बलाने गुंडाळती, आणि आपले
बाहू बळकट करिती. १८ **आपला** व्यापार उत्तम
आहे असें ती समजती, रात्रीं तिचा दिवा विझत
नाहीं. १९ **ती** आपले हात चातीला लाविती,
आणि तिच्या मुठी पेळा धरितात. २० **ती** आ-
पली मूठ दीनाकडे पसरिती, होय ती आपले हात
दरिद्र्याकडे पुढें करिती. २१ **आपल्या** घराण्या-
विषयीं तिला बर्फाचें भय वाटत नाहीं, कां कीं ति-
चें सर्व घराणें दुप्पट वस्त्र ल्यालेलें असतें. २२
**ती** आपल्यासाठीं वेलबुटीचे पडदे करिती, तिचें
पांघरूण स्वच्छ पांढरें वस्त्र आणि किर्मिजीरंगाचें
वस्त्र असतें. २३ **तिच्या** नवऱ्याला वेशींत ओ-
ळखतात, तो देशांतल्या वडिलांमध्यें बसला अ-
सतो तेव्हां. २४ **ती** स्वच्छ पांढरें वस्त्र करून
विकिती, आणि कमरबंध वाण्याला विकत देती.
२५ **सामर्थ्य** व शोभा तिचें पांघरूण आहेत,
आणि ती पुढल्या काळाला हांसती. २६ **ती**
ज्ञानाने आपलें मुख उघडिती, आणि दयेचा नेम
तिच्या जिभेवर असतो. २७ **ती** आपल्या घरा-
ण्याच्या आचारांला जपती, आणि आळसाचें अन्न
ती खात नाहीं. २८ **तिचीं** लेंकरें उठून तिला
धन्य ह्मणतात, तिचा नवराहि उठून तिला स्त-
वितो. २९ **बहुतकन्यानी** पुष्कळ द्रव्य मिळविलें,
परंतु त्वां त्या सर्वांस जिंकिलें आहे. ३० **सुं**-
दरता कपटी आणि सुरूपता व्यर्थ आहे, जी स्त्री
**परमेश्वराचें** भय धरिती तिची प्रशंसा होईल.
३१ **तिच्या** कष्टाचें फळ तिला द्या, आणि वेशींत
तिचीं कर्मे तिला स्तवोत.

# उपदेशक.

## अध्याय १.

यरूशालेमेंतला राजा दावीद याचा पुत्र जो उ-
पदेशक त्याचीं वचनें. २ व्यर्थतांची व्यर्थता,
असें उपदेशक ह्मणतो, व्यर्थतांची व्यर्थता, सर्व
व्यर्थताच आहे. ३ सूर्याखालतीं मनुष्य जो सर्व
कष्ट करितो, त्याचें त्याला फल काय? ४ एक
पिढी जाती आणि दुसरी पिढी येती परंतु पृथ्वी
सर्वकालपर्यंत टिकती. ५ सूर्य तर उगवतो आणि
सूर्य मावळतो, आणि जेथें तो उगवला तिकडे
आपल्या स्थानाकडे त्वरेनें चालतो. ६ तो दक्षि-
णेकडे जातो आणि फिरून उत्तरेकडे येतो; वारा
फिरत फिरत जातो आणि वारा आपल्या फिरण्यां-
प्रमाणें परत येतो. ७ सर्व नद्या वाहत समुद्रांत
जातात, तथापि समुद्र भरला नाहीं; ज्या स्थानां-
तून नद्या निघतात तिकडे त्या फिरून जातात. ८
सर्व गोष्टी श्रमाच्या आहेत, मनुष्याच्याने सांगवत
नाहीं; डोळा पाहून तृप्त होत नाहीं, कान ऐकून
पूर्त्त होत नाहीं. ९ जें झालें आहे तेंच होणार;
आणि जें केलें आहे तेंच करितील; आणि सू-
र्याखालतीं कांहीं नवें नाहीं. १० ज्याविषयीं
कोणी ह्मणेल कीं, पाहा हें नवें आहे, असें
कांहीं आहे काय? आह्मापूर्वीं जो पुरातनकाल
होता, त्यांत तें आदींच झालें आहे. ११ पूर्वीं
झालेल्यांचें कांहीं स्मरण नाहीं; आणि जीं पुढें
होणार आहेत, त्यांचें स्मरण पुढं होणाऱ्या लो-
कांस राहणार नाहीं.

१२ मी उपदेशक यरूशालेमेंत इस्राएलाचा
राजा होतों. १३ आणि आकाशाखालतीं जें
कांहीं करितात, त्याचें शोधणें आणि पाहणें ज्ञाना-
कडून करायाला म्या आपलें मन लाविलें, हें अ-
वघड कार्य देवानें मनुष्याला दिल्हें आहे, यांत
उद्योग करावा ह्मणून. १४ सूर्याखालतीं जीं सर्व
कर्में करितात तीं म्या पाहिलीं आहेत, आणि पाहा
सर्व व्यर्थता आणि रिकामी खटपट आहे. १५
जें वांकडें त्याच्यानें नीट होववत नाहीं, जें उणें
तें गणवत नाहीं. १६ म्या आपल्या मनांत बो-
लत ह्मटलें, पाहा मी फार मोठा झालों आहें;
आणि जे सर्व मजपूर्वीं यरूशालेमेंत होते त्यांच्या-
पेक्षां मला अधिक ज्ञान प्राप्त झालें आहे; होय
माझ्या मनानें बहुत ज्ञान आणि विद्या अनुभविलीं
होतीं. १७ आणि ज्ञान समजायाला आणि उन्म-
त्तता व मूर्खपण जाणायाला म्या आपलें मन दिल्हें,
मग हेंहि रिकामी खटपट आहे, असें मी समज-
लों. १८ कां कीं बहुत ज्ञानांत बहुत खेद अ-
सतो, आणि जो विद्या वाढवितो तो शोक वाढ-
वितो.

## अध्याय २.

म्या आपल्या मनांत ह्मटलें, ये हो मी तुला
हर्षेकडून पारखितों, ह्मणून तूं सुख भोगीत
जा; मग पाहा हेंहि व्यर्थता आहे. २ मी हा-
स्याविषयीं ह्मणालों तें उन्मत्त आहे, आणि हर्षा-
विषयीं तो काय करितो? ३ म्या आपलें मन
ज्ञानाकडे लावीत असतांहि आपला देह द्राक्षारसा-
नें पोसावा, आणि मूर्खपण धरावें जें मनुष्याला
उत्तम आहे, जें त्यानीं आकाशाखालतीं आपल्या
आयुष्याचे सर्व दिवस करावें, तें मी पाहीं तोंपर्यंत
असा विचार म्या आपल्या मनांत केला. ४
म्या मोठीं कार्यें केलीं, म्या आपणासाठीं घरें बां-
धिलीं, म्या आपणासाठीं द्राक्षमळे लाविले. ५
म्या बाग व मळे केले, आणि त्यांत सर्व प्रकार-
च्या फलांचीं झाडें लाविलीं. ६ म्या आपणा-
साठीं तळीं केलीं, त्यांकडून झाडें उत्पन्न करणारी
राई शिंपावी ह्मणून. ७ म्या दास आणि दासी
घेतलीं, आणि मला घरांतलीं लेंकरें होतीं; आणि
जे सर्व मजपूर्वीं यरूशालेमेंत होते त्यांच्यापेक्षां
मला गुरांचें आणि शेरडांमेंढरांचें बहुत धन होतें.
८ म्या आपणासाठीं रुप्याच्या आणि सोन्याच्या
आणि राजे व राष्ट्रें यांच्या विशेष धनाचा संग्रह
केला, म्या आपणासाठीं गाणारे व गाणाऱ्या ठेवि-

ल्या, आणि मनुष्यांचे मनोरम विषय व सर्व प्रका-
रचीं वाजंत्रें घेतलीं. ९ **मी** तर मोठा झालों,
आणि जे सर्व मजपूर्वी यरूशालेमेंत होते, त्यांपेक्षां
अधिक वाढलों, आणि माझें ज्ञान माझ्या ठायीं रा-
हिलें. १० **आणि** जें कांहीं माझ्या डोळ्यांनी
इच्छिलें तें त्यांपासून म्या अटकाविलें नाहीं, आ-
णि म्या आपलें मन कशाहि हर्षापासून आकळिलें
नाहीं; कां कीं माझ्या सर्व कर्मांमुळें माझें हृदय
हर्षे; आणि माझ्या सर्व श्रमफलांतून माझा वांटा
हाच होता. ११ **मग** जीं सर्व कर्मे माझ्या हा-
तानी केलीं होतीं त्यांजकडे, आणि जें सर्व कार्य
साधायाला म्या श्रम केले होते, त्याजकडे म्या
पाहिलें; आणि पाहा सारें व्यर्थता आणि रि-
कामी खटपट आहे, आणि सूर्याखालतीं कांहीं
फल नाहीं.

१२ **आणि** ज्ञान व उन्मत्तता व मूर्खपणा पा-
हायाला मी फिरलों; कां कीं जो मनुष्य राजामागें
येतो त्याच्याने काय करवेल? जें दुसऱ्यानी पूर्वी
केलें होतें तेंच. १३ **मग** अंधकारापेक्षां प्रकाश
जितका श्रेष्ठ आहे, तितकें मूर्खपणापेक्षां ज्ञान श्रेष्ठ
आहे, असें म्यां पाहिलें. १४ **सुज्ञानाचे** डोळे
त्याच्या मस्तकांत असतात; परंतु मूर्ख अंधकारात
चालतो, आणि त्यां सर्वांस एकसारखें दैव घडतें,
असेंहि मी समजलों. १५ **तेव्हां** मी आपल्या
मनांत ह्मणालों, जसें मूर्खाला घडतें तसें मलाहि
घडतें; तर मी कां अधिक सुज्ञान आहें? मग हेंहि
व्यर्थता आहे, असें म्या आपल्या मनांत ह्मटलें.
१६ **कां** कीं सर्वकालपर्यंत मूर्खापेक्षां सुज्ञानाचें
कांहीं अधिक स्मरण नाहीं; आणि नुक्तें जें झालें
आहे तें सर्व पुढल्या दिवसांत विसरतील, आणि
मूर्खासारिखा सुज्ञान कसा मरतो? १७ **तर**
म्या जीवन द्वेषिलें, कारण जें कर्म सूर्याखालतीं
होत आहे तें मला वाईट वाटलें; कां कीं सर्व
व्यर्थता आणि रिकामी खटपट आहे.

१८ **होय** माझें जें कार्य म्या सूर्याखालतीं
केलें होतें तें सर्व म्या द्वेषिलें; कारण जो मनुष्य
माझ्यामागें होईल त्याकडे मला तें सोडून जावें
लागतें. १९ **आणि** तो सुज्ञान अथवा मूर्ख अ-
सेल, हें कोण जाणे? तथापि माझें जें सर्व कार्य
सूर्याखालतीं केलें आहे, आणि ज्यांत म्या
आपलें ज्ञान दाखविलेलें आहे, त्याचा अधिकार
तो करील; हेंहि व्यर्थता आहे. २० **तर** माझें
जें सर्व कार्य म्या सूर्याखालतीं केलें होतें, त्याज-
विषयीं मी आपलें मन निराश करायाला फिरलों.
२१ **कां** कीं ज्याचें कार्य ज्ञानाने विद्येने आणि
सीद्धीने बनतें असा मनुष्य आहे; तथापि त्यांत
ज्याने कांहीं श्रम केला नाहीं, त्याकडे त्याच्या
विभागासाठीं तें तो सोडून जाईल; हेंहि व्यर्थता
आणि मोठें अरिष्ट आहे. २२ **कां** कीं मनुष्याने
आपलें जें सर्व कार्य आणि आपल्या मनाचें जें
चिंतन सूर्याखालतीं केलें आहे, त्यांकडून त्याला
काय प्राप्त होतें? २३ **कां** तर त्याचे सर्व दिवस
शोकांचे आणि त्याचा उद्योग खेदाचा असतो;
होय त्याचें मन रात्रीं स्वस्थ राहत नाहीं; हेंहि
व्यर्थता आहे.

२४ **मनुष्याने** खावें, प्यावें, आणि आपल्या
कामांत आपल्या जीवाला सुख भोगूं द्यावें, यापेक्षां
त्याला कांहीं उत्तम नाहीं; हेंहि **देवाच्या** हाता-
पासून घडतें, असें म्या पाहिलें. २५ **कां** कीं
मजपेक्षां कोण उत्तम भोजन करील, अथवा तें
अधिक सुखाने भोगील? २६ **तर** जो मनुष्य
**देवासमोर** चांगला आहे त्याला तो ज्ञान विद्या व
हर्ष देतो; परंतु तो पाप्याला कष्ट देतो, त्याने
संग्रह करून आणि सांठवून, जो **देवासमोर** चां-
गला आहे, त्याला द्यावें ह्मणून; हेंहि व्यर्थता
आणि रिकामी खटपट आहे.

## अध्याय ३.

**प्र**त्येक गोष्टीला समय आहे, आणि आकाशा-
खालतीं प्रत्येक हेतूला वेळ आहे. २ **जन्म**-
ण्याची वेळ, आणि मरण्याची वेळ, लावण्याची
वेळ, आणि जें लाविलेलें त्याच्या उपटण्याची
वेळ, ३ **वधण्याची** वेळ, आणि बरें करण्याची
वेळ, मोडण्याची वेळ, आणि बांधण्याची वेळ,
४ **रडण्याची** वेळ, आणि हंसण्याची वेळ, आक्रं-
दण्याची वेळ, आणि नाचण्याची वेळ, ५ **धोंडे**
फेंकून देण्याची वेळ, आणि धोंडे गोळा करण्याची
वेळ, आलिंगन करण्याची वेळ, आणि आलिंगना-
पासून दूर राहण्याची वेळ, ६ **मिळविण्याची**
वेळ, आणि गमावण्याची वेळ, राखण्याची वेळ,

आणि टाकून देण्याची वेळ, ७ फाडण्याची
वेळ, आणि शिवण्याची वेळ, मौन धरण्याची वेळ,
आणि बोलण्याची वेळ, ८ आवड धरण्याची
वेळ, आणि द्वेषण्याची वेळ, लढाईची वेळ, आणि
सल्याची वेळ, ९ कार्यकरणारा ज्यांत श्रमतो
तेणेंकरून त्याला प्राप्ति काय? १० जो उद्योग
देवानें मनुष्यांला दिला आहे, त्यांत त्यांनी खपावें
ह्मणून तो म्या पाहिला आहे. ११ त्यानें सर्व
त्याच्या समयीं सुंदर केलें आहे, आणि त्यानें
त्यांच्या मनांत जग ठेविलें आहे, जें सर्व कर्म दे-
वानें केलें आहे, तें प्रारंभापासून शेवटापर्यंत मनु-
ष्याच्यानें शोधून पाहवत नाहीं ह्मणून. १२
मनुष्यानें हर्षावें आणि आपल्या आयुष्यांत चांगलें
करावें यावांचून त्यांत कांहीं हित नाहीं असें मी
जाणतों. १३ आणि प्रत्येक मनुष्यानें खावें प्यावें
आणि आपल्या सर्व उद्योगांतलें हित भोगावें हें
देवाचें दान आहे. १४ जें कांहीं देव करितो
तें सर्वकाळपर्यंत ठरेल, त्यासीं कांहीं लाववत नाहीं,
आणि त्यापासून कांहीं काढवत नाहीं; आणि
देवानें तें केलें आहे, त्यासमक्ष मनुष्यानें भय
धरावें ह्मणून; असें मी जाणतों. १५ जें कांहीं
पूर्वीं झालें तें आतां आहे, आणि जें व्हायाचें आहे
तें आधीं झालें, आणि जें होऊन गेलें त्याची झ-
डती देव करील.

१६ आणखी सूर्याखालतीं न्यायाचें स्थान म्या
पाहिलें, तेव्हां तेथें दुष्टता होती, आणि प्रमाणिक-
पणाचें स्थान, तों तेथेंहि दुष्टता होती. १७
म्या आपल्या मनांत ह्मटलें, देव न्यायीचा आणि
दुष्टाचाहि न्याय करील; कां कीं प्रत्येक हेतूसाठीं
समय आहे, आणि तेथें तो प्रत्येक कर्माचा निर्णय
ठरवील. १८ त्यांला देवानें स्पष्ट करावें, आणि
आपण पशु आहों, असें त्यांला दिसावें, हें मनु-
ष्यांच्या अवस्थेविषयीं म्या आपल्या मनांत ह्मटलें.
१९ कां कीं जें मनुष्यांला घडतें तें पशूला घडतें,
त्यांला तर एकसारखेंच घडतें; जसे हे मरतात
तसे ते मरतात, आणि सर्वांचा एकच श्वास आहे,
तर पशूपेक्षां मनुष्याला कांहीं विशेष नाहीं, कां कीं
सर्व व्यर्थता आहे. २० सर्व एका स्थानाकडे
जातात, सर्व धुळींतून उत्पन्न झाले, आणि सर्व
फिरून धुळीस मिळतात. २१ मनुष्यांचा जो
आत्मा वरतीं चढतो, तो आणि पशूचा जो आत्म
खालतीं भूमीकडेस उतरतो, तो कोण जाणतो? २२
तर मनुष्यानें आपल्या कामांत हर्षावें यापेक्षां
कांहीं उत्तम नाहीं; कां कीं हें त्याचा विभाग
आहे, असें मला दिसलें; कां कीं तो गेल्यावर जें
कांहीं होईल तें पाहायाला त्याला कोण आणील?

## अध्याय ४.

तर म्या फिरून जीं सर्व पीडनें सूर्याखालतीं
करितात त्यांचा विचार केला; आणि पाहा
पिडलेल्यांचीं आंसवें, आणि त्यांला कोणी समा-
धान करणारा नव्हता, आणि त्यांच्या पिडणाऱ्यां-
कडे बल होतें; परंतु त्यांला कोणी समाधान कर-
णारा नव्हता. २ ह्मणून जे जीवंत आजपर्यंत
जीवंत आहेत, त्यांपेक्षां जे मेलेले आधीं मरून
गेले आहेत, त्यांची अधिक प्रशंसा म्या केली. ३
होय जो अद्यापि उत्पन्न झाला नाहीं, जें वाईट
कर्म सूर्याखालतीं करितात, तें ज्यानें पाहिलें नाहीं,
तो त्या उभयांपेक्षां बरा आहे.

४ आणि सर्व कार्य आणि कर्माची सिद्धि,
यांमुळें मनुष्याचा हेवा त्याचा शेजारी करितो, असें
म्या विचारकरून पाहिलें; हेंहि व्यर्थता आणि
रिकामी खटपट आहे. ५ मूर्ख आपले हात
पोटाळून धरितो, आणि आपला देह खातो. ६
कष्टाचें व खटपटीचें ओंजळ भर यापेक्षां स्वस्थ-
पणाचें मूठभर बरें.

७ मग म्या फिरून सूर्याखालतीं व्यर्थता पा-
हिली. ८ कोणी एकटा आहे, आणि त्यासंगतीं
दुसरा नाहीं; होय त्याला पुत्र नाहीं, भाऊ नाहीं;
तथापि त्याच्या सर्व कष्टाचा कांहीं अंत नाहीं,
आणि त्याचा डोळा धनानें तृप्त होत नाहीं, आणि
कोणासाठीं मी खपून आपला जीव सुखहीन करि-
तों? असें तो ह्मणत नाहीं; हेंहि व्यर्थता आहे,
होय हें मोठा कष्टच आहे.

९ दोघे एकापेक्षां बरे आहेत, कारण त्यांला
त्यांच्या उद्योगामुळें बरें वेतन प्राप्त होतें. १०
कां कीं ते जर गळून पडले तर एक आपल्या सो-
बत्याला उठवील; परंतु जो एकलाच असून गळून
पडतो त्याला हाय हाय; कारण त्याला उठवा-
यास दुसरा कोणी नाहीं. ११ आणखी दोघे

जर एकत्र निजले, तर त्यांला ऊब येईल; परंतु
एकल्यास ऊब कसी येईल? १२ **आणि** त्याज-
वर जर एक बळवान झाला, तर त्याजपुढें दोघे
उभे ठाकतील; आणि तिहेरी दोरी लवकर तुटत
नाहीं·

१३ **जो** म्हातारा व मूर्ख राजा उपदेश घ्या·
याला मान्य होत नाहीं, त्याजपेक्षां दरिद्री आणि
सुज्ञान पोर बरा आहे. १४ **कां** कीं तो बंदि-
शाळेंतून राज्य करायाला बाहेर येतो; तर जो
त्याच्या राष्ट्रांत जन्मला आहे तो दरिद्री होतो·
१५ **जे** सर्व जीवंत सूर्याखालतीं वर्त्ततात, त्यांस जें
त्यांच्या स्थानीं दुसरें संतान उभें राहील त्यासुद्धां
म्या विचार करून पाहिलें· १६ **सर्व** लोकांचा
त्यांपूर्वीं जे सर्व होते त्यांचाहि कांहीं अंत नाहीं;
जे पुढें होणार आहेत तेहि त्यांजविषयीं हर्षणार
नाहींत; तर हेंहि व्यर्थता आणि रिकामी खटपट
आहे·

## अध्याय ५.

**तूं** देवाच्या घरास जातांना आपला पाय संभाळ,
आणि मूर्खांसारिखें अर्पण द्यायाला नको,
परंतु ऐकायाला जवळ ये; कां कीं ते वाईट करीत
असतां जाणत नाहींत. २ **तूं** आपल्या मुखाने
उतावळा असूं नको; आणि तुझ्या हृदयाने देवा-
समोर कांहीं उच्चारायाला त्वरा करूं नये; कां
कीं देव आकाशांत आहे आणि तूं पृथ्वीवर आ-
हेस, यामुळें तुझीं वचनें थोडीं असोत· ३ **कां**
तर काम पुष्कळ असल्याने स्वप्न पडतें; आणि
पुष्कळ बोलल्याने मुर्खांची वाणी कळती· ४ **तूं**
**देवाला** नवस केला असतां तो फेडायाला उशीर
करूं नको; कां कीं मूर्खांविषयीं त्याचा कांहीं सं-
तोष नाहीं; जें त्वां नवसलें आहे तें भरून द्यावें·
५ **त्वां** नवसल्यावर भरून दिल्हें नाहीं, तर यापे-
क्षां त्वां न नवसावें हें बरें आहे· ६ **तूं** आपल्या
मुखाला आपलें अंग पापिष्ठ ठरवूं देऊं नको, आ-
णि ती चूक होती असें दूतासमक्ष म्हणूं नको;
तुझ्या शब्दामुळें देवाने कां कोपित होऊन तुझ्या
हातांचें काम बिघडावें. ७ **कां** कीं स्वप्नांचें बहु-
त्व आणि वचनें वाढविणें यांत अनेक व्यर्थता अस-
तात; तर तूं देवाचें भय धर.

८ दरिद्र्याचें पीडन आणि नीति व न्याय
यांचें उलटेपण जर राष्ट्रांत पाहिलें, तर यामुळें
विस्मित होऊं नको; कां कीं परात्पर जपतो, आ-
णि त्यांपेक्षां अनेक उंच आहेत.

९ **पृथ्वीचें** फल सर्वांसाठीं आहे; राजालाहि
शेतकीचें अगत्य आहे· १० **ज्याला** रुपें आव-
डतें तो रुप्याने, आणि ज्याला पुष्कळ धन आवडतें
तो संपत्तीने तृप्त होणार नाहीं; हेंहि व्यर्थता
आहे· ११ **संपत्ति** वाढली म्हणजे तिचे खाणारे
वाढतात; तर तिच्या धन्याला आपल्या डोळ्यानी
ती पाहण्यावांचून अणखी फल काय? १२ **उद्यो-**
ग्याने थोडकें अथवा बहुत खाल्लें असलें, तरी
त्याची झोंप गोड असती; परंतु धनवानाचें बहुत
द्रव्य त्याला झोंप घेऊं देत नाहीं. १३ **जें** म्या
सूर्याखालतीं पाहिलें आहे, असें एक मोठें अरिष्ट
आहे, म्हणजे द्रव्य त्याच्या धन्यांसाठीं त्यां-
च्या वाईटासाठीं राखलेलें. १४ **तर** तें द्रव्य
व्यर्थ कामांत बुडतें, आणि तो पुत्राला जन्म देतो,
आणि त्याच्या हातांत कांहीं नाहीं· १५ **जसा**
तो आपल्या आईच्या उदरांतून निघाला, जसा तो
आला तसाच नागवा जायाला फिरेल; आणि तो
आपल्या श्रमफलांतलें कांहीं आपल्या हातांत
घेऊन जाणार नाहीं· १६ **तर** जसा तो आला
तसाच सर्वथा जाईल, हेंहि मोठें अरिष्ट आहे;
आणि ज्याने वाऱ्यासाठीं उद्योग केला आहे त्याला
फल काय? १७ **आणि** तो आपल्या आयुष्यभर
अंधकारांत खातो; आणि आपला रोग व भंग हे
फार क्षोभाने सोसितो.

१८ **जें** म्या पाहिलें आहे, तें पाहा; मनुष्याने
खावें प्यावें, आणि देवाने त्यांचें जें आयुष्य त्या-
ला दिल्हें आहे, त्याचे सर्व दिवस तो जो आपला
सर्व उद्योग करितो, त्यांतलें हित भोगावें हें बरें
आणि शुभच आहे, कां कीं हें त्याचा वाटा आहे·
१९ **आणि** ज्या कोणाहि मनुष्याला देवाने धन
व द्रव्य दिल्हें आहे, आणि त्यांतलें कांहींसें भोगा-
याला आणि आपला वांटा घ्यायाला आणि आप-
ल्या उद्योगांत हर्षायाला शक्ति दिल्ही आहे, हें
देवाचें दान आहे· २० **कां** कीं तो आपल्या आ-
युष्याचे दिवस फार स्मरणार नाहीं; कां तर देव
त्याच्या हृदयाच्या हर्षास अनुकूल आहे·

## अध्याय ६.

जें म्या सूर्याखालतीं पाहिलें, असें एक अरिष्ट
आहे, आणि तें मनुष्यामध्यें फार असतें. २
तो मनुष्य ज्याला देवानें धन व द्रव्य आणि गौ-
रव दिल्हें आहे, आणि तो आपल्यासाठीं जें कांहीं
इच्छितो, त्याचा त्याला कांहीं तोटा नाहीं; तथा-
पि देव त्याला त्यांतलें किंचितहि भोगायाला श-
क्ति देत नाहीं; परंतु परका मनुष्य तें भोगितो, हें
व्यर्थता, आणि वाईट विकृति आहे.
३ जर मनुष्यानें शंभर लेंकरांला जन्म दिल्हा,
आणि तो बहुत वर्षें वांचला, आणि त्याच्या
वर्षांचे दिवस बहुत असले, तथापि त्याचा जीव
हितानें तृप्त झाला नाहीं, आणि त्याचें पुरणें झालें
नाहीं, तर त्यापेक्षां पतितगर्भ बरा आहे, असें मी
ह्मणतों. ४ कां कीं तो व्यर्थतेनें येतो, आणि
अंधकारांत जातो, आणि त्याचें नाम अंधकारानें
व्याप्त होईल. ५ आणि यानें सूर्य पाहिला ना-
हीं, आणि कांहीं जाणलें नाहीं, याला त्याच्यापेक्षां
अधिक समाधान आहे.
६ होय तो जरी हजार वर्षें दुप्पट वांचला,
तरी त्यानें कांहीं हित अनुभविलें नाहीं; सर्व
एकाच स्थानाकडे जात नाहींत काय? ७ मनु-
ष्याचा सर्व उद्योग त्याच्या पोटासाठीं आहे;
तथापि इच्छा पूर्त्त होत नाहीं. ८ कां कीं सुज्ञा-
नाला मुर्खापेक्षां काय अधिक आहे? जो दीन जी-
वंतांपुढें चालायाला जाणतो त्याला काय आहे?
९ डोळ्यांचें पाहणें इच्छेच्या चलनापेक्षां बरें
आहे; हेंहि व्यर्थता आणि रिकामी खटपट आहे.
१० जें कांहीं झालें त्याचें नाम आधीं ठेविलें
आहे, आणि तें मनुष्य आहे, असें कळलें आहे;
आणि जो त्यापेक्षां प्रबल आहे त्यासीं विवाद
करायाला तो समर्थ नाहीं.
११ व्यर्थता वाढविणाऱ्या गोष्टी बहुत आहेत,
तर मनुष्याला काय विशेष आहे? १२ कां कीं
मनुष्याचें जें व्यर्थ आयुष्य तो छायेवाणीं घालवि-
तो, त्या आयुष्याच्या सर्व दिवसपर्यंत त्याला काय
उत्तम आहे, हें कोण जाणे? कारण मनुष्याच्या
मागें सूर्याखालतीं काय होईल, हें त्याला कोण
सांगेल?

## अध्याय ७.

अत्युत्कृष्ट तेलापेक्षां, आणि एकाद्याच्या ज-
न्म दिवसापेक्षां, त्याचा मरणदिवस उत्तम
आहे.
२ संभोजनाच्या घरास जाण्यापेक्षां आक्रंदना-
च्या घरास जाणें, बरें आहे; कां तर तें सर्व मनु-
ष्यांचा शेवट आहे, आणि जीवंत हें आपल्या मनांत
ठेवील. ३ हसण्यापेक्षां खेद बरा आहे; कां
कीं तोंडाच्या उदासपणानें हृदय शुद्ध होतें. ४
सुज्ञानांचें मन आक्रंदनाच्या घराकडे लागतें;
परंतु मूर्खांचें मन हर्षाच्या घराकडे. ५ मूर्खांचें
गीत ऐकण्यापेक्षां सुज्ञानांचा निषेध ऐकणें, मनुष्या-
ला बरें आहे. ६ कां कीं थालीखालतीं जसा
कांट्यांचा कडकडाट तसें मूर्खांचें हंसणें असतें;
हेंहि व्यर्थता आहे.
७ पीडन सुज्ञानालाहि उन्मत्त करितें; आणि
दान हृदयाला बिघडितें. ८ गोष्टीच्या प्रारंभापे-
क्षां तिचा शेवट बरा आहे; आणि गर्विष्टापेक्षां
नम्र उत्तम. ९ तूं आपल्या आत्म्यानें रुसायाला
उतावळा असूं नको; कां कीं रोष मूर्खांच्या हृद-
यांत राहतो. १० यांपेक्षां पूर्वदिवस बरे होते,
याचें कारण काय असेल? असें ह्मणूं नको; कां-
कीं याविषयीं तूं शाहणपणें विचारीत नाहींस.
११ ज्ञान वतनासुद्धां उत्तम आहे, तेणेंकरून
सूर्य पाहणाऱ्यांला फल प्राप्त होतें. १२ कां कीं
ज्ञान आश्रय असें आहे व पैका आश्रय असा
आहे; परंतु विद्या विशेषेंकरून असी चांगली
आहे, कीं ज्ञान तें पावलेल्यास जीवन देतें. १३
देवाचें कर्म पाहून विचार कर; कां कीं त्यानें जें
वांकडें केलें आहे, तें कोणाच्यानें नीट करवेल?
१४ सुखाच्या वेळीं आनंदित ऐस, आणि संकटा-
च्यावेळीं विचार कर; देवानेंहि एकापुढें एक ठे-
विला आहे, यासाठीं कीं पुढें मनुष्याला कांहीं न
सांपडावें. १५ म्या आपल्या व्यर्थतेच्या दिव-
सांत सर्व पाहिलें आहे, आपल्या न्यायत्वांत नष्ट
होतो, असा एकादा न्यायी आहे; आणि आपल्या
दुष्टाईंत आयुष्य दीर्घ करितो, असा एकादा दुष्ट
आहे. १६ तूं अतिशयित न्यायी असूं नको;
आणि आपणाला फार ज्ञानी करूं नको; त्वां आ-

पला नाश कां करून घ्यावा? १७ तूं अतिशयितं
दुष्ट असूं नको; आणि मूर्ख असूं नको; त्वां आ-
पल्या समयापूर्वी कां मरावें? १८ त्वां हें धरिलें तर
बरें, होय यापासून तूं आपला हात सोडूं नको;
कां कीं जो देवाचें भय धरितो तो त्या सर्वांतून
निभावेल. १९ जो दाहा पराक्रमी नगरांत अस-
तील, त्यांपेक्षां ज्ञान सुज्ञानाला बलवान करितें.
२० तर उत्तम करितो आणि पाप नाहीं करीत,
असा कोणी न्यायी मनुष्य पृथ्वीवर नाहीं. २१
जे सर्व शब्द लोक बोलतात त्यांकडे तूं आपलें
मन लावूं नको; लाविलें तर कदाचित तूं आपला
सेवक तुला शापितां ऐकसील. २२ कां कीं
बहुधा त्वांहि दुसऱ्यांस शाप दिल्हा आहे, असें
तुझ्या मनाला कळतें.

२३ हें सर्व म्यां ज्ञानेकरून शोधिलें आहे;
म्यां ज्ञानी व्हावें असें मी ह्मणालों, परंतु तें मजपा-
सून दूर राहिलें. २४ जें दूर आणि फार खोल
आहे, तें कोणाला सांपडेल? २५ म्यां जाणावें
आणि पाहावें आणि ज्ञान व तत्व हुडकावें आणि
मूर्खपणाची होय मूर्खपणाची व उन्मत्ततेची दुष्टता
समजावी, ह्मणून म्यां आपलें मन लाविलें; २६
आणि ज्या स्त्रियेचें ह्रदय पाश व जाळीं असें
आहे आणि तिचे हात बंधनें असे आहेत, ती
मरणापेक्षां कडु आहे, असें म्यां अनुभविलें आहे;
जो देवाला बरा दिसतो तो तिजपासून मोकळा
राहील, परंतु पापी तिच्या हातांत सांपडेल. २७
उपदेशक ह्मणतो, पाहा मला तत्व सांपडावें ह्म-
णून म्यां एक एक पाहून शोधून घेतलें आहे. २८
जें माझा जीव अझूनपर्यंत शोधित आला आहे,
परंतु तें मला सांपडलें नाहीं, एक मनुष्य हजारां-
मध्यें मला सांपडला आहे, परंतु त्या सर्वांमध्यें
एक स्त्री मला सांपडली नाहीं, २९ पाहा हेंच
मात्र मला सांपडलें आहे, कीं देवानें मनुष्य
प्रमाणिक असा उत्पन्न केला, परंतु त्यांनी बहुत
कल्पना काढिल्या आहेत.

## अध्याय ८.

ज्ञान्यासारिखा कोण आहे? आणि गोष्टीचा
उलगडा कोण जाणतो? मनुष्याचें ज्ञान
त्याचें मुख तेजस्वी करितें, आणि त्याच्या मुखाचें
धैर्य पालटेल. २ राजाची आज्ञा पाळ, देवा-
च्या शपथेमुळें ती पाळ, असें मी ह्मणतों. ३
त्यासमोरून जायाला उतावळा असूं नको; वाईट
गोष्टींत उभा राहूं नको; कां कीं जें कांहीं त्याला
बरें वाटतें तें तो करितो. ४ जेथें राजाचें वचन
आहे तेथें सामर्थ्य आहे; आणि तूं काय करि-
तोस, असें त्याला कोण ह्मणेल? ५ जो आज्ञा
पाळितो तो कांहीं वाईट अनुभवणार नाहीं; सुज्ञा-
नाचें मन समय आणि न्यायहि समजतें.

६ प्रत्येक गोष्टीसाठीं समय व नेम आहे,
ह्मणून मनुष्याचा कष्ट त्याजवर भारी आहे. ७
कां कीं जें होईल तें त्याला कळलें नाहीं; तर
तें केव्हां कसें होईल, हें त्याला कोण सांगेल?
८ आत्मा अडकवून राखायाला कोणी मनुष्य आ-
त्म्यावर प्रबल नाहीं, आणि मरणदिवसीं त्याचें
कांहीं सामर्थ्य नाहीं, आणि त्या लढाईंतून सुटका
होत नाहीं, आणि दुष्ट दुष्टाईनें सुटणार नाहींत.
९ हें सर्व म्यां पाहिलें आहे, आणि कोणतेंहि
कर्म जें सूर्याखालतीं होत आहे, त्याजकडे म्यां
आपलें मन लाविलें आहे; एक समय आहे, त्यांत
एक मनुष्य आपल्या वाइटासाठीं दुसऱ्यावर अधि-
कार करितो. १० आणि असेंच म्यां दुष्ट पुरि-
लेले पाहिले, ते येऊन पवित्राच्या स्थानांतून गेले
होते, आणि ज्या नगरांत त्यांनी तसें केलें होतें,
त्यांत त्यांचा विसर पडला; हेंहि व्यर्थता आहे.
११ दुष्कर्माचा निर्णय होऊनहि लवकर सिद्धीस
जात नाहीं, याकरितां मनुष्यांचें ह्रदय त्यांच्या ठायीं
वाईट करायाला तत्पर असतें.

१२ पापी जरीं शंभरवेळा दुष्कर्म करून दीर्घ
आयुष्यपर्यंत वांचला, तरीं जे देवाला भितात, जे
त्याच्या समक्ष भितात, त्यांचें हित होईल, असें
मी निश्चयें जाणतों. १३ परंतु दुष्टाचें हित हो-
णार नाहीं, आणि तो आपलें छायेसारिखें आयुष्य
दीर्घ करणार नाहीं; कारण तो देवाच्या समक्ष
भीत नाहीं. १४ जी पृथ्वीवर घडत आहे, असी
एक व्यर्थता आहे, ह्मणजे ज्याला दुष्टांच्या कर्मा-
प्रमाणें घडतें, असे न्यायीजन आहेत, आणि ज्या-
ला न्यायींच्या कर्माप्रमाणें घडतें, असे दुष्टजन
आहेत; हेंहि व्यर्थता आहे, असें मी ह्मणालों.
१५ आणि म्यां हर्षाची प्रशंसा केली; कां कीं

खावें प्यावें आणि हर्षावें यापेक्षां सूर्याखालतीं मनुष्याला कांहीं उत्तम नाहीं; कां तर त्याच्या आयुष्याचे जे दिवस देव त्याला सूर्याखालतीं देतो त्यांपर्यंत त्याच्या श्रमफलांतलें हें त्याजवळ राहील.

१६ ज्ञान समजायाला आणि जें कार्य पृथ्वीवर चाललें आहे तें पाहायाला जेव्हां म्या आपलें मन लाविलें, कां कीं अहोरात्र ज्याच्या डोळ्यांस निद्रा येत नाहीं, असाहि एखादा आहे, १७ तेव्हां मी देवाचें सर्व कर्म पाहून समजलों, कीं जें कर्म सूर्याखालतीं चाललें आहे, तें मनुष्याला पुरतें शोधवत नाहीं; कां कीं तें शोधायाला जरीं मनुष्यानें श्रम केला तरीं तें त्याला सांपडणार नाहीं; होय तें मी जाणेन, असें जरीं ज्ञान्यानें ह्मटलें, तरीं त्याला तें पुरतें समजणार नाहीं.

## अध्याय ९.

तर हें सर्व म्या आपल्या मनास आणिलें, हें सर्व शोधून समजायाला, कीं न्यायी आणि सुज्ञान आणि त्यांचीं कार्यें देवाच्या सत्तेंत आहेत; मनुष्यांच्या दृष्टीस जें कांहीं पडतें, त्यावरून त्याची प्रीति अथवा द्वेष जाणवत नाहीं. २ सर्वांस सारें सारिखेंच घडतें; न्यायीस आणि दुष्टास भल्यास आणि पवित्रास, आणि अपवित्रास, यज्ञकर्त्यास आणि जो यज्ञ करीत नाहीं, त्यास एकसारखें दैव घडतें; जसा चांगला तसा पापी, आणि जसा शपथ वाहणारा तसा शपथेस भिणारा असतो. ३ जें सर्व सूर्याखालतीं चाललें आहे त्यांत हें अरिष्ट आहे, कीं सर्वांस एकसारखें दैव घडतें; होय मनुष्यांचें हृदय दुष्टतेनें भरलें आहे, आणि त्यांचें आयुष्यभर त्यांच्या मनांत उन्मत्तता असती, आणि त्यानंतर ते मेलेल्यांसीं मिळतात.

४ तर सर्व जीवंतांसीं जो जडलेला आहे, त्याला भरंवसा धरितां येतो, कां कीं मेलेल्या सिंहापेक्षां जीवंत कुत्रा बरा आहे. ५ कां कीं आपण मरणार आहों, असें जीवंत जाणतात, परंतु मेलेले कांहीं जाणत नाहींत; आणि त्यांला अणखी कांहीं प्राप्ति नाहीं; कां तर त्यांचें स्मरण कोणी करीत नाहीं. ६ आणि त्यांची प्रीति आणि त्यांचा द्वेष आणि त्यांचा हेवा हीं आतां नष्ट झालीं आहेत; आणि जें कांहीं सूर्याखालतीं चाललें आहे, त्यांतला त्यांला सर्वकालपर्यंत अणखी कांहीं वांटा नाहीं.

७ तूं जा, हर्षानें आपली भाकर खा, आणि आनंदित हृदयानें आपला द्राक्षारस पी, कां कीं आतां देव तुझीं कर्मे मान्य करितो. ८ सर्वदा तुझीं वस्त्रें पांढरीं असावीं, आणि तुझ्या डोईस तेलाचा तोटा नसावा. ९ तुझ्या व्यर्थतेच्या आयुष्याचे जे दिवस त्यानें तुला सूर्याखालतीं दिल्हे आहेत, तुझे व्यर्थतेच्या सर्वच दिवसांत तुझी जी स्त्री तुला आवडती तिजसीं तूं आयुःसुख भोगीत जा; कां कीं आयुष्यांत, आणि तूं जो आपला उद्योग सूर्याखालतीं करितोस, त्यांतहि तुझा विभाग हाच आहे. १० जें कांहीं करायाला तुझ्या हाताला प्राप्त होतें, तें तूं आपल्या पराक्रमानें कर; कां कीं ज्याकडे तूं जात आहेस, त्या मृतलोकांत कांहीं कर्म अथवा संकल्प अथवा विद्या अथवा ज्ञान नाहीं.

११ म्या फिरून सूर्याखालतीं असें पाहिलें, कीं वेग्यांला धांव व बलवानांला युद्ध साधत नाहीं आणि ज्ञान्यांला अन्न आणि विवेक्यांला धन आणि निपुणांला अनुग्रह विशेष नाहीं; परंतु समय आणि दैव हीं सर्वांला घडतात. १२ कां कीं मनुष्य आपला समय जाणत नाहीं, जे मासे कठीण जाळ्यांत सांपडतात, ते जसे, आणि जे पक्षी फांशांत गावतात, ते जसे, तसे मनुष्य अरिष्टाच्या समयीं फांशांत गावतात, तो अकस्मात त्याजवर येऊन पडतो तेव्हां.

१३ हें ज्ञानहि म्या सूर्याखालतीं पाहिलें आहे, आणि हें मला मोठें वाटलें. १४ एक धाकटी नगरी होती, आणि तींत थोडकीं मनुष्यें होतीं; तिजकडे एका मोठ्या राजानें येऊन तिला वेढा घातला, आणि तिजवर मोठाले मोरचे बांधिले. १५ तेव्हां तींत एक सुज्ञान दरिद्री मनुष्य सांपडला, आणि त्यानें आपल्या ज्ञानेंकरून ती नगरी वांचविली; तथापि त्या दरिद्री मनुष्याचें स्मरण कोणी केलें नाहीं. १६ मग मी ह्मणालों, बलापेक्षां ज्ञान उत्तम आहे; तथापि दरिद्र्याच्या ज्ञानाला तुच्छ मानितात आणि त्याचीं वचनें ऐकत नाहींत. १७ जो मूर्खांमध्यें अधिकार करितो,

त्याच्या आरोळीपेक्षां सुज्ञानांचीं वचनें शांतपणांत
अधिक ऐकतात· १८ लढाईच्या शस्त्रापेक्षां ज्ञान
उत्तम आहे; परंतु एक पातकी पुष्कळ हित ना-
शितो·

## अध्याय १०

मेलेल्या माशा रसायनाचें तेल दुर्गंध करून बि-
घडवितात; तसेंच जो ज्ञान व गौरव यांमुळें
प्रतिष्ठित आहे, त्याला थोडकें मूर्खपण बिघडवितें·
२ सुज्ञानाचें हृदय त्याच्या उजव्या हातास आहे;
परंतु मूर्खाचें हृदय त्याच्या डाव्या हातास· ३
होय जो मूर्ख आहे तो मार्गांत चालतांनाहि
त्याची बुद्धि उणी पडती आणि मी मूर्ख आहें,
असें तो प्रत्येकाला ह्मणतो· ४ जर अधिकाऱ्या-
चा आत्मा तुजवर चढला तर तूं आपलें स्थान
सोडूं नको, कां कीं विनय मोठे अपराध शांतवितो.
५ एक अनर्थ आहे, तो म्यां सूर्याखालतीं अधि-
काऱ्यापासून जी भ्रांति निघती तिजसारिखा पा-
हिला आहे· ६ मूर्खपण थोर पदवीवर स्थापि-
लेलें आहे, आणि द्रव्यवान नीच ठिकाणीं बसतात.
७ म्यां सेवक घोड्यांवर, आणि अधिपति सेवकां-
वाणीं भूमीवर चालतां पाहिले आहेत· ८ जो
खांच खाणितो तोच तींत पडेल, आणि जो कुंपण
मोडितो त्याला सर्प डसेल· ९ जो दगड का-
ढितो तो त्यांजकडून चोळवटेल; जो लांकडें
तोडितो त्याला त्यांजकडून लागेल. १० जर
शस्त्र बोंथलें, आणि त्याने धार न पाजविली, तर
अधिक बल लावावें लागेल; परंतु साधायासाठीं
ज्ञान उपयोगी पडतें· ११ निश्चयें गारुडाविना
सर्प डसेल, आणि त्यापेक्षां बकबक्या बरा नाहीं·
१२ सुज्ञानाच्या मुखचीं वचनें मनोरम आहेत;
परंतु मूर्खाचे ओंठ त्यालाच नाशितील· १३
त्याच्या मुखच्या वचनांचा प्रारंभ मूर्खपणा अस-
तो, आणि त्याच्या भाषणाचा परिणाम अनर्थाचें
वेड असतो· १४ आणि मूर्ख वाचाल असतो;
काय घडेल हें मनुष्याला कळत नाहीं; आणि
त्याच्या मागें जें होईल, तें त्याला कोण सांगेल?
१५ मूर्खांची खटपट त्यांतल्या प्रत्येकास श्रमवि-
ती; कारण कीं तो नगरास जायाला जाणत नाहीं.
१६ हे देशा, ज्या तुझा राजा पोर आहे, आ-
णि तुझे अधिपति सकाळीं खातात, त्या तुला हाय
हाय. १७ हे देशा, ज्या तुझा राजा कुलीनांचा
पुत्र आहे, आणि तुझे अधिपति कैफासाठीं नाहीं,
परंतु बळासाठीं सुसमयीं खातात, तो तूं धन्य
आहेस· १८ आलस्याने रचना झिजून जाती,
आणि हातांच्या आळसाने घर गळतें. १९
लोक हसण्याकरितां भोजन करीत असतात, आणि
द्राक्षारस जीवाला संतोषीत करितो; परंतु पैका
सर्व गोष्टीला उपयोगी पडतो· २० तूं आ-
पल्या भावनेंत देखील राजाला शापूं नको, आणि
आपल्या निजण्याच्या खोलींतहि धनवानाला गालि
देऊं नको; कां कीं पाखरूं शब्द घेऊन जाईल,
आणि पक्षी गोष्ट सांगेल.

## अध्याय· ११

तूं आपलें अन्न पाण्यावर टाक; कां कीं बहुत
दिवसानंतर तें तुला मिळेल. २ तूं सातां-
जणांला आणि आठांजणांलाहि वांटा दे; कां कीं
पृथ्वीवर काय अनर्थ होईल, हें तुला कळत नाहीं·
३ जर आभाळें पावसाने भरलीं तर तीं पृथ्वीवर
गळून रिकामीं होतात; आणि झाड जर दक्षिणे-
कडे अथवा उत्तरेकडे पडलें, तर ज्या स्थानीं झाड
पडलें आहे, तेथेंच राहील· ४ जो वाऱ्याला
जपतो तो पेरणार नाहीं, आणि जो आभाळांला
पाहतो तो कापणी करणार नाहीं· ५ आत्म्याची
गति काय आहे हें, आणि गर्व्हारीच्या पोटांत
हाडें कशीं निपजतात, हेंहि जसें तुला कळत ना-
हीं, तसें जो देव सर्व साधितो त्याचें कर्म तुला
कळत नाहीं. ६ सकाळीं तूं आपलें बीज पेर,
आणि संध्याकाळीं तूं आपला हात रिकामा असूं
देऊं नको; कां कीं कोणतें सफल होईल, हें किंवा
तें, अथवा तीं दोन्ही एकसारिखीं बरीं होतील
कीं नाहीं, हें तुला कळत नाहीं.
७ प्रकाश सुंदर आहे, आणि सूर्य पाहणें डो-
ळ्यांस गोड आहे· ८ मनुष्य जरी बहुत वर्षें
वांचला आणि त्या सर्वांत हर्षला, तरी तो अंध-
काराचे दिवस स्मरो; कां कीं ते बहुत होतील;
जें सर्व येतें तें व्यर्थता आहे· ९ हे तरुणा,
तूं आपल्या तरुणपणांत हर्षित जा, आणि आपल्या
तरुणपणाच्या दिवसांत तुझें हृदय तुला आनंदमय

करो, आणि तूं आपल्या हृदयाच्या मार्गांत आणि
आपल्या डोळ्यांच्या दृष्टीने चाल; परंतु या सर्व
कर्मांविषयीं देव तुला न्यायांत आणील, असें तूं
जाण. १० तर तूं आपल्या हृदयांतून खेद काढून
टाक आणि जें वाईट तें तूं आपल्या देहापासून दूर
कर; कां कीं बाळपण व तरुणपण व्यर्थपण आहेत.

### अध्याय १२.

**तूं** आपल्या तरुणपणाच्या दिवसांत आपल्या
**उत्पन्न करणाऱ्याला** स्मर, जोंपर्यंत अनर्थाचे
दिवस आले नाहींत, आणि ज्यांविषयीं तूं ह्मण-
सील, कीं यांत मला कांहीं संतोष नाहीं, तीं वर्षें
पोंचलीं नाहींत; २ जोंपर्यंत सूर्य व प्रकाश
आणि चंद्र व तारे अंधारमय झाले नाहींत, आ-
णि पाऊस झाल्यावर आभाळें परत आलीं नाहींत.
३ ज्या वेळीं घर राखणारे थरथर कांपतील, आ-
णि बलवान मनुष्य नमतील, आणि दळणाऱ्या
थोडक्या झाल्या आहेत, ह्मणून स्तब्ध होतील;
आणि खिडक्यांतून पाहणाऱ्या अंधारमय होतील.
४ आणि दळण्याचा शब्द धिमा असतां आळींत
दारें बंद करितील, आणि तो पक्ष्याच्या शब्दास
उठेल, आणि गायनाच्या सर्व कन्या खिन्न हो-
तील; ५ आणि जें उंच, त्यामुळें ते भितील,
आणि भयें मार्गांत होतील, आणि बदाम फुलेल,
आणि टोळ भार असा वाटेल, आणि इच्छा भा-
गेल, कां कीं मनुष्य आपल्या सनातन घरास जा-
तो, आणि आळ्यांत रडणारे फिरतात; ६ जों-
पर्यंत रुप्याची तार फिटली नाहीं, आणि सो-
न्याचा लोटा फुटला नाहीं, अथवा झऱ्यावरची
घागर फुटली नाहीं, आणि आडावरला रहाट मो-
डला नाहीं; ७ मग धूळ पूर्वींसारिखी भूमीस
पुन्हा मिळेल, आणि ज्या देवानें जीवात्मा घातला
त्याजकडे तो परत जाईल.

८ व्यर्थतांची व्यर्थता, सारें व्यर्थता आहे, अ-
सें उपदेशक ह्मणतो. ९ अणखी उपदेशक ज्ञानी
होता, ह्मणून तो लोकांला ज्ञान शिकवी, होय
त्याने विचार व शोध करून बहुत ह्मणा रचि-
ल्या. १० चांगले शब्द सांपडावे, ह्मणून उप-
देशकाने शोधिलें, आणि जें लिहिलें आहे, तें
यथार्थ सत्यतेचीं वचनें आहे. ११ ज्ञान्यांचीं
वचनें आरी व खिळे असीं आहेत, तीं सभापती
रोंवतात, तीं एक पालक देतो. १२ अणखी माझ्या
लेंकरा, याकडून संबोध घे; बहुत पुस्तकें करण्या-
चा कांहीं अंत नाहीं, आणि पुष्कळ विद्याभ्यास
शरीराला कंटाळवितो.

१३ साऱ्या गोष्टीचे शेवट आपण ऐकूं; देवा-
चें भय धर, आणि त्याच्या आज्ञा पाळ; कां कीं
मनुष्याचें सगळें करायाचें तें हेंच आहे. १४
कां कीं प्रत्येक कर्म, प्रत्येक गुप्त गोष्टीसुद्धां बरें
असो वाईट असो, देव न्यायांत आणील.

THE SONG OF SOLOMON.

# शलमोनाचें गीत.

### अध्याय १.

**गी**तांचें गीत जें शलमोनाचें तें. २ तो आ-
पल्या मुखाच्या चुंबनांनी मला चुंबो; कां कीं
तुझी प्रीति द्राक्षारसापेक्षां उत्तम आहे. ३
तुझ्या उत्तम तेलाच्या सुवासाने तुझें नाम ओतले-
ल्या तेलासारिखें आहे; यामुळें कुमारी तुजवर
प्रीति करितात. ४ मला आकर्ष; आह्मी तुज-
मागें धावूं; राजाने आपल्या कोठड्यांत मला आ-
णिलें आहे; आह्मी तुजविषयीं उल्लासूं, आणि
हर्षूं; तुझी प्रीति द्राक्षारसापेक्षां अधिक आह्मी
स्मरूं, प्रमाणिक तुजवर आवड ठेवितात. ५

यरूशालेमेच्या कन्यानो, मी काळी परंतु सुंदर
आहें, जसे केदाराचे डेरे, जसे शलमोनाचे पडदे
तसी. ६ मला पाहूं नका, कां कीं मी काळी
ठिक्कर आहें, सूर्याने मजकडे दृष्टि लाविली आहे,
माझ्या आईच्या लेंकरानी मजवर रुसून मला
द्राक्षींच्या मळ्यांची राखणारी केलें, परंतु म्या
आपला द्राक्षींचा मळा राखिला नाहीं. ७ ज्या
तुजवर माझ्या जीवाने आवड ठेविली आहे, तो
तूं कोठें चारितोस, आणि दूपारीं आपला कळप
कोठें बसूं देतोस, हें मला सांग; कां कीं तुझ्या
सोबत्याच्या कळपांजवळ मी एकीकडे वळणारीसा-
रिखी कां असावी? ८ अगे स्त्रियांतल्या पर-
मसुंदर, तुला बर कळत नाहीं, तर तूं कळपाच्या
पावलांकडून बाहेर जा, आणि पालकांच्या डेऱ्यां-
जवळ आपलीं बकरीं चार. ९ अगे वल्लभे, फारो-
च्या रथांच्या घोड्यांची उपमा म्या तुला दिल्ही आहे.
१० तुझे गाल रत्नमालानी, तुझी मान मोत्यांच्या
हारानी सुंदर आहे. ११ सोन्याचे हार रुप्या-
च्या टिकांसुद्धां आह्मी तुजसाठीं करूं.

१२ राजा आपल्या मेजाजवळ बसला असतां
माझी जटामांसी आपला घमघमाट व्यापूं देती.
१३ माझा वल्लभ मला बोळाची गाठोडी असा
आहे, तो सारीरात्र माझ्या स्तनांमध्यें निजेल.
१४ एन्गेदीच्या द्राक्षींच्या मळ्यांतल्या कापराचा
गोंडा असा माझा वल्लभ मला आहे. १५ अगे
माझ्या प्रिये, पाहा तूं सुंदर आहेस, पाहा सुरूप
आहेस, तुझे डोळे कपोतांचे आहेत. १६ हे
माझ्या कांता, पाहा तूं सुंदर आहेस, होय मनो-
हर; आपला पलंगहि हिरवा आहे. १७ आ-
पल्या घराच्या तुळया एरेज लांकडाच्या आपल्या
फळ्या देवदारूंच्या आहेत.

## अध्याय २.

मी शारोनांतला गुलाब, खोऱ्यांतली कमळीण
आहें. २ जसी कमळीण कांटेऱ्या झाडां-
मध्यें तसी माझी कांता कन्यांमध्यें आहे. ३
जसें सेवि झाड रानांतल्या झाडांमध्यें तसा माझा
वल्लभ पुत्रांमध्यें आहे; मी त्याच्या छायेची इच्छा
धरून तिजखालतीं बसलें, आणि त्याचें फल मा-
झ्या रसनेला गोड वाटलें. ४ त्याने मला मेज-
वानीच्या घरांत आणिलें, आणि मजवर त्याचा
झेंडा प्रीतिचा होता. ५ द्राक्षीच्या घडानी माझें
पाठबळ करा, सेवींनी माझें समाधान करा, कां कीं
मी प्रीतीने दुःखित आहें. ६ त्याचा डावा हात
माझ्या डोईखालतीं आहे, आणि त्याचा उजवा
हात मला आलिंगितो. ७ यरूशालेमेच्या क-
न्यानो, तुह्माला रानांतल्या हरिणींचा, आणि मृगीं-
चा शपथ करून मी ह्मणतें, तुह्मी माझ्या कांताला
उठवूं नका, जागृत करूं नका, त्याची इच्छा अ-
सेल तोंपर्यंत.

८ माझ्या वल्लभाचा शब्द, पाहा तो पर्वतांवर
उडी मारीत, डोंगरांवर कुदत येतो. ९ माझा
वल्लभ हरिणासारिखा, अथवा हरिणीच्या पोरासा-
रिखा आहे, पाहा तो आमच्या भिंतीच्या आड
उभा राहून खिडक्यांतून टेहेळतो, जाळींच्या आं-
तून दृष्टि लावितो. १० माझा वल्लभ मला बोलत
ह्मणाला, अगे माझ्या प्रिये, माझ्या सुंदरे, तूं उ-
ठून ये. ११ कां कीं पाहा हिंवाळा सरला आहे,
पाऊस होऊन गेला आहे. १२ फुलें भूमीवर
दिसतात, पक्षिगाण्याचा वेळ जवळ आला आहे,
आणि आमच्या देशांत होल्याचा शब्द ऐकूं येतो.
१३ अंजीरझाड आपले हिरवे अंजीर पिकूं देतें,
आणि द्राक्षींला सुवासिक फुलें आलीं; अगे माझ्या
कांते माझ्या सुंदरे, तूं उठून ये.

१४ अगे माझ्या कपोते, जी तूं खडकाच्या
कड्यांत चढणीच्या गुह्यस्थलांत आहेस, ती तूं
आपलें मुख मला दाखीव, आपला शब्द मला
ऐकूं दे; कां कीं तुझा शब्द मंजुल आणि तुझें मुख
सुंदर आहे. १५ जीं कोंकडें, जीं लहान कोंकडें
द्राक्षींच्या मळ्यांस, आमच्या पुष्पित द्राक्षींच्या
मळ्यांसच नाशितात, तीं आह्मासाठीं धरा.

१६ माझा वल्लभ माझाच आहे, आणि मी
त्याचीच आहें, तो कमळिणींमध्यें चारतो. १७
दिवस उगवे, आणि छाया पळून जात, तोंपर्यंत
हे माझ्या वल्लभा, तूं फीर, आणि बेथराच्या पर्व-
तांवर हरिणासारिखा, अथवा हरणीच्या पोरासा-
रिखा ऐस.

## अध्याय ३.

ज्याजवर माझ्या जीवाने आवड ठेविली आहे,
त्याजला म्या आपल्या पलंगावर रात्रीं शे

धिलें, म्या त्याला शोधिलें, परंतु तो मला सांप-
डला नाहीं. २ मी उठून नगरांतल्या आळ्यांत
व चवाठ्यांत फिरेन, ज्याजवर माझ्या जीवानें
आवड ठेविली आहे, त्याजला शोधीन; म्या त्या-
ला शोधिलें, परंतु तो मला सांपडला नाहीं. ३
जे राखणारे नगरांत फिरत असत त्यांला मी
सांपडलें, तेव्हां मी ह्मणालें, ज्याजवर माझ्या जी-
वानें आवड ठेविली आहे, तो तुह्मीं पाहिला आहे
काय? ४ मी त्यांजपासून गेलें, इतक्यांत ज्या-
जवर माझ्या जीवानें आवड ठेविली आहे, तो
मला सांपडला, म्या त्याला धरिलें, आणि म्या
आपल्या आईच्या घरांत, आणि जिनें माझें गर्भ-
धारण केलें, तिच्या कोठडींत त्याला आणिलें तों-
पर्यंत त्याला सोडिलें नाहीं. ५ यरूशालेमेच्या
कन्यांनो, तुह्मांला रानांतल्या हरिणींचा, आणि
मृगींचा शपथ करून मी ह्मणतें, तुह्मी माझे कांता-
ला उठवूं नका, जागृत करूं नका, त्याची इच्छा
असेल तोंपर्यंत.

६ जी धुराच्या खांबांसारिखी बोळानें व रसा-
लानें, व्यापाऱ्याच्या सर्व भुग्यांनीं सुवासित अ-
सतां, अरण्यांतून चढत येती, ही कोण आहे?
७ पाहा त्याचा पलंग जो शलमोनाचा आहे,
त्याभोंवते इस्राएलाच्या वीरांतले साठ वीर अस-
तात. ८ ते सर्व लढाईविषयीं शहाणे असतां
तरवार धरितात, रात्रींतल्या भयामुळें प्रत्येकाची
तरवार त्यांच्या मांडीस असती. ९ शलमोन
राजानें आपणासाठीं लबानोनाच्या लांकडाचा एक
रथ केला. १० त्यानें त्याचे खांब रुप्याचे केले,
त्याचा आधार सोन्याचा, त्याची मढवणी किर्मि-
जीरंगाच्या वस्त्राची, त्याचा मध्यभाग यरूशाले-
मेच्या कन्यांकरितां प्रीतीनें पसरलेला होता. ११
सीयोनेच्या कन्यांनो, तुह्मी बाहेर जा, आणि
ज्या मुगुटानें त्याच्या आईनें त्याच्या लग्नाच्या दि-
वशीं, त्याच्या हृदयहर्षाच्या दिवसींच त्याला
शोभित केलें, त्यानें वेष्टिलेल्या शलमोन राजाला
पाहा.

## अध्याय ४.

अगे माझ्या प्रिये, पाहा, तूं सुंदर आहेस, पाहा,
तूं सुरूप आहेस, तुझ्या कुरळांच्या आंत तुझे
डोळे कपोतांचे आहेत, जो शेरडांचा कळप गि-
लाद पर्वतावर बसला आहे, त्यासारिखे तुझे केश
आहेत. २ ज्या कातरलेल्या मेंढ्या धुण्यापासून
वर आल्या आहेत, ज्यांतल्या प्रत्येकीस जुळें आहे,
आणि त्यांतली कोणी वांझ नाहीं, त्यांच्या कळपावाणीं
तुझे दांत आहेत. ३ तुझे ओंठ किर्मिजीरंगाच्या
सुतासारिखे आहेत, आणि तुझी वाचा गोड आहे,
तुझ्या कुरळांच्या आंत तुझें कानशील डाळिंबाच्या
तुकड्यासारिखें आहे. ४ दावीदाचा जो बुरूज
हत्यारखान्यासाठीं बांधिलेला आहे, ज्यास एक
हजार ढाली त्या सर्व वीरांचें वारण असतांना
टांगलेल्या आहेत, त्यासारिखी तुझी मान आहे.
५ जी दोन हरिणीचीं जुळीं पोरें कमळणींमध्यें
चरतात, त्यांसारिखे तुझे दोन स्तन आहेत, ६
दिवस उगवे, आणि छाया पळून जात तोंपर्यंत
बोळाच्या पर्वताकडे, व धुपाच्या डोंगराकडे मी
जातों. ७ अगे माझ्या प्रिये, तूं सर्व सुंदर आ-
हेस, तुझ्या अंगीं कोणताहि डाग नाहीं.

८ मजसंगतीं लबानोनाहून अगे माझ्या प्रिये,
लबानोनाहून मजसंगतीं ये; अमानाच्या माथ्या-
वरून शनीर आणि हर्मोन यांच्या माथ्यावरून,
सिंहांच्या आश्रयांवरून, चित्त्यांच्या पर्वतांवरून
पाहा. ९ अगे माझ्या बहिणी, माझ्या नवऱ्ये,
त्वां माझें हृदय हरिलें आहे, त्वां आपल्या डोळ्यां-
तल्या एकानें, आपल्या हाराच्या एक्या पदरानें,
माझें हृदय हरून घेतलें आहे. १० अगे
माझ्या बहिणी, माझ्या नवऱ्ये, तुझी प्रीति किती
सुंदर आहे? द्राक्षारसापेक्षां तुझी प्रीति, आणि
सर्व सुगंधींपेक्षां तुझ्या तेलांचा वास किती अधिक
उत्तम आहे? ११ अगे माझ्या नवऱ्ये, तुझे ओंठ
मधाच्या शिशासारिखे गळतात, तुझ्या जिभेखा-
लतीं मध व दूध आहेत, आणि तुझ्या वस्त्रांचा
वास लबानोनाच्या वासासारिखा आहे. १२
माझी बहीण, माझी नवरी, कुडलेला बाग वेष्टि-
लेला झरा, शिक्का मारिलेलें कुंड, असी आहे.
१३ तुझीं रोपें डाळिंबींच्या सुरसफलयुक्त बाग
कापराचें झाड जटामांशांसुद्धां असीं आहेत. १४
जटामांसी आणि कुंकुम नलिका, आणि दालचिनी
सर्व धुपाच्या झाडांसुद्धां, रसगंध आणि अगरु सर्व
श्रेष्ठ सुरभींसुद्धां; १५ बागांचा झरा, जिवंत पा-

ण्यांची विहीर आणि लबानोनाहून वाहते ओघळ.
१६ हे उत्तरेच्या वाऱ्या, जागृत हो, हे दक्षि-
णेच्या वाऱ्या, तूं ये, माझ्या बागांवर वहा, ह्मणजे
त्याचे सुरभि व्यापितील; माझा प्रिय आपल्या
बागांत येवो, आणि आपलीं गोड फळें खावो.

## अध्याय ५.

अगे माझ्या बहिणी, माझ्या नवऱ्ये, मी आपल्या
बागांत आलों आहें, म्या आपला बोळ आ-
पल्या सुगंधींसुद्धां सांठविला आहे, म्या आपल्या
मधासुद्धां आपला मधाचा शिसा खाल्ला आहे, मी
आपल्या दुधासुद्धां आपला द्राक्षारस प्यालों आहें,
माझ्या मित्रानों, तुह्मी खा, माझ्या प्रियानो, तुह्मी
पिऊन तृप्त व्हा.
२ मी निजतें, परंतु माझें हृदय जागतें, माझ्या
वल्लभाचा शब्द, तो दार ठोकीत ह्मणतो, अगे
माझ्या बहिणी, माझ्या प्रीये, माझ्या कपोते, मा-
झ्या निर्दोषे, तूं मजसाठीं दार उघड; कां कीं माझें
मस्तक दहिंवराने, आणि माझे कुरुल रात्रिबिंदूनी
भरले आहेत. ३ म्या आपलें पांघरूण काढलें
आहे, तें कसें घालूं? म्या आपले पाय धुतले
आहेत, ते कसे माखूं? ४ माझ्या वल्लभाने आ-
पला हात भोंकांतून आंत पुढें केला, तेव्हां माझीं
आंतडीं त्यासाठीं कळवळलीं. ५ मी आपल्या
वल्लभाला दार उघाडायाला उठलें, तेव्हां माझ्या
हातानी बोळ, आणि माझ्या बोटानी घमघमता बोळ,
कुलुपाच्या मुठीवर गळूं दिला. ६ म्या आपल्या
वल्लभाला दार उघडिलें; परंतु माझा प्रिय सरून
गेला होता, तो बोलिला, तेव्हां माझा जीव निघा-
ला, म्या त्यास शोधिलें, परंतु तो मला सांपडला
नाहीं, म्या त्याला हाक मारिली, परंतु त्याने मला
उत्तर केलें नाहीं. ७ नगरांत जे राखणारे फिरत
असतात, त्यांला मी सांपडलें, त्यानी मला हाणिलें,
मला जखमी केलें, कोटांच्या राखणाऱ्यानी मजपा-
सून माझा बुरखा काढून घेतला. ८ यरूशालेमे-
च्या कन्यानो, मी तुह्मास खरावून सांगतें, जर
माझा वल्लभ तुह्माला सांपडला, तर मी प्रीतीने
रोगी आहें, असें तुह्मी त्याला सांगा.
९ अगे स्त्रियांतल्या परमसुंदरे, तुझा वल्लभ
इतरवल्लभापेक्षां काय विशेष आहे? तूं आह्मास
एवढें खरावून बोलिली आहेस, ह्मणून तुझा प्रिय
अन्यप्रियाहून काय श्रेष्ठ आहे? १० माझा
वल्लभ गोरा, आणि लाल आहे, दाहा हजारांमध्यें
श्रेष्ठ आहे. ११ त्याचें डोकें उत्कृष्ट सोनें असें
आहे, त्याचे कुरळ दाट आणि डोमकावळ्यासा-
रिखे काळे आहेत. १२ त्याचे डोळे पाण्यांच्या
ओघांजवळच्या कपोतांचे असे आहेत, ते दुधाने
धुतलेले व चांगले लावलेले आहेत. १३ त्याचे
गाल सुगंधांचे वाफे, सुगंध फुलझाडांचे कुंब असे
आहेत, त्याचे ओंठ कमळिणी असे आहेत, ते
घमघमता बोळ गळूं देतात. १४ त्याचे हात
लसण्यानी जडलेलीं, सोन्याचीं कडीं असे आहेत,
त्याचें पोट नीलमणिखचित हस्तिदंताचा कारुज
असें आहे. १५ त्याचे पाय उत्कृष्ट सोन्याच्या
उथळ्यांवर स्थापिलेले मरमरी खांब असे आहेत,
त्याचें रूप लबानोनासारिखें आहे, एरेज झाडा-
सारिखें श्रेष्ठ आहे. १६ त्याचें मुख परम मधूर
आहे, होय तो केवळ प्रीतिपात्र आहे, अहो यरू-
शालेमेच्या कन्यानो, हाच माझा वल्लभ, हाच माझा
सखा आहे.

## अध्याय ६.

तुझा वल्लभ कोणीकडे गेला आहे? अगे स्त्रियां-
तल्या परमसुंदरे, तुझा प्रिय कोणीकडे वळला
आहे? तुजसंगतीं आह्मी त्याला शोधूं. २ माझा
वल्लभ आपल्या बागांत सुगंधांच्या वाफ्यांकडे, बा-
गांत चारायाला कमळिणी तोडून घ्यायाला उत-
रून गेला आहे. ३ मी आपल्या वल्लभाची आहें,
आणि माझा वल्लभ माझा आहे, तो कमळिणींमध्यें
चारतो आहे.
४ अगे माझे प्रिये, तूं तिर्सासारिखी सुंदर,
यरूशालेमेसारिखी सुरूप, झेंडे उभारलेल्या
सेनेसारिखी भयंकर आहेस. ५ तूं आपले
डोळे मजपुढून फिरीव, कां कीं त्यानी मला जिंकलें
आहे; जो शेरडांचा कळप गिलाद पर्वतावर
बसला आहे, त्यासारिखे तुझे केश आहेत. ६
ज्या मेंढ्या धुण्यापासून वर आल्या आहेत,
ज्यांतल्या प्रत्येकीस जुळें आहे, आणि त्यांतली
कोणी वांझ नाहीं, त्यांच्या कळपावाणी तुझे दांत
आहेत. ७ तुझ्या कुरळांच्या आंत तुझें [illegible]

शील डाळिंबाच्या तुकड्यासारिखें आहे. ८
साठ राण्या व ऐशीं उपपत्न्या व असंख्य
कुमारी आहेत. ९ माझी कपोती, माझी निर्दोषी
एकली आहे, ती आपल्या आईची एकुलती,
आपल्या प्रसवणारीची आवडती आहे, कन्यांनी
तिला पाहून धन्य ह्मटलें, राण्यांनी व उपपत्न्यांनी
तिला पाहून स्तविलें.
१० जी चंद्रासारिखी सुंदर, सूर्यासारिखी
स्वच्छ, झेंडे उभारलेल्या सेनेसारिखी भयंकर अ-
सतांना प्रातःकाळाप्रमाणें बाहेर पाहती, ही कोण
आहे? ११ ओघाजवळचीं हिरवीं झाडें पाहा-
याला, आणि द्राक्षी फुटली, व डाळिंबी फुलल्या
आहेत कीं नाहींत, हें पाहायाला सारफलांच्या
बागांत मी उतरलों. १२ मी नजाणतां माझ्या
जीवानें मला अम्मीनादीबाच्या रथांसारिखें केलें.
१३ फीर, फीर, अगे शूलम्मींथे, आह्मी तुला
पाहावें, ह्मणून फीर, तूं फीर; शूलम्मींथेचें काय
पाहाल? दोहों सैन्यांचा समुदाय असें.

## अध्याय ७.

अगे अधिपतीच्या कन्ये, तुझे जोडे घातलेले
पाय किती सुंदर आहेत! जे अलंकार कुशल
सोनाराच्या हातचें काम आहेत, त्यांसारिखे तु-
झ्या मांड्यांचे संधि आहेत. २ रस भरलेल्या
वाटोळ्या पात्रासारिखी तुझी नाभि आहे, गव्हां-
चीं सभोंवतीं कमळें घातलेली रास तिजसारिखें
तुझें उदर आहे. ३ हरिणीचीं दोन जुळीं पोरें
आहेत, त्यांसारिखे तुझे दोन स्तन आहेत. ४
तुझी मान हस्तिदंताच्या बुर्जासारिखी आहे, हे-
श्बोनेंत बथरब्बीमेच्या वेशीजवळ जीं तळीं आ-
हेत, त्यांसारिखे तुझे डोळे आहेत, दम्मासेकेच्या
समोर जो लबानोनाचा बुरुज आहे, त्यांसारिखें
तुझें नाक आहे. ५ तुजवरलें तुझें डोकें कार्मे-
लासारिखें आहे, आणि तुझ्या डोईचे केश किर्मि-
जीरंगाच्या रेशमासारिखे आहेत, त्यांतील कुरु-
लांनी राजा अटकला आहे. ६ अगे प्रिये, आ-
नंदाकरितां तूं किती सुंदर व किती गोड आहेस!
७ ही तुझी उंची खाजराच्या झाडासारिखी आ-
हे, आणि तुझे स्तन द्राक्षीघोसांसारिखे आहेत.
८ मी ह्मणालों, खाजराच्या झाडावर चढेन, त्या-
च्या फांद्यांला धरीन, तेव्हां तुझे स्तन द्राक्षीच्या
घोंसांसारिखे असोत, आणि तुझे नाकाचा वास
सेविफलांचा असा असो. ९ आणि जो उत्तम
द्राक्षारस माझ्या प्रियेसाठीं असतांना, गळ्यांत
नीट उतरतो, व निजलेल्यांच्या ओंठांवर सहज
चालतो, त्यासारिखी तुझी ताळू असो.
१० मी आपल्या वल्लभाची आहें, आणि त्या-
ची ओढ मजकडे आहे. ११ हे माझे वल्लभा,
ये; आपण बाहेर पटांगणांत जाऊं; रात्रीं गांवांत
मुकाम करूं. १२ पहांटे उठून द्राक्षींच्या म-
ळ्यांत जाऊं; द्राक्षी फुटली, तिला फुलें आलीं
आणि डाळिंबी फुलल्या आहेत कीं नाहींत हें
पाहूं; तेथें मी तुला आलिंगीन. १३ दूदझाडें
घमघमतात, आणि आमच्या वेशींजवळ सर्वप्र-
कारचीं गोड फळें नवीं आणि जुनीं आहेत; तीं,
हे माझ्या वल्लभा, म्या तुजसाठीं राखून ठेविलीं
आहेत.

## अध्याय ८.

हंहं जो माझा भाऊ, माझ्या आईचे स्तन चों-
खी, त्यासारिखा जर तूं असतास, तर बरें
होतें; तूं जर मला बाहेर सांपडतास, तर मी
तुला चुंबितें, होय कोणी मला अवमानितेना. २
मी तुला नेऊन आपल्या आईच्या घरास आणितें,
ती मला शिकविती, मी तुला सुरभित द्राक्षारसां-
तला, आपल्या डाळिंबाच्या रसांतला प्यायाला
देतें. ३ त्याचा डावा हात माझ्या डोईखालतीं
असता, आणि त्याचा उजवा हात मला आलिं-
गिता. ४ यरूशालेमेच्या कन्यांनों, मी तुह्माला
खरावून सांगतें, तुह्मी माझ्या कांताला उठवूं नका,
जागृत करूं नका, त्याची इच्छा असेल तोंपर्यंत.
५ जी आपल्या वल्लभावर टेंकत रानांतून चढत
येती आहे, ही कोण आहे? सेविझाडाखालीं म्या
तुला उठविलें, तेथें तुझी आई, तुझ्या जन्माची
प्रसूतिवेदना पावली, जी तुला प्रसवली, ती तेथें
प्रसूतिवेदना पावली.
६ तूं आपल्या हृदयावर मला शिक्याप्रमाणें,
शिक्यासारिखी आपल्या बाहूवर ठेव; कां कीं
प्रीति मरणासारिखी बलिष्ठ आहे, शंका मृतलो-
कासारिखी कठोर आहे, तिच्या ज्वाला अग्नीच्या

ज्वाला, अति तीव्र दाह अशा आहेत. ७ बहुत
पाण्याच्यानी प्रीति विझवत नाहीं, आणि महापुरा-
च्यानी तिला बुडववत नाहीं, जरीं मनुष्याने आ-
पल्या घरचें सर्व धन प्रीतीबद्दल दिल्हें, तरीं तें
अगदी तुच्छ होईल.

८ आमची एक धाकटी बहीण आहे, आणि
तिला स्तन नाहींत; जेव्हां तिची मागणी होईल,
तेव्हां आह्मी आपल्या बहिणीकरितां काय करूं!
९ ती जर कुंसूं असली, तर तिजवर रुप्याची
मुंढेरी आह्मी बांधूं; आणि ती जर दाराचें झडप
असली, तर तिला एरेजलांकडाच्या फळ्यानी
झांकूं. १० मी कुंसूं आहें, आणि माझे स्तन
बुर्जांसारिखे आहेत; तेव्हां अनुग्रह पावलेल्या
सारिखी मी त्याच्या दृष्टीस होतें. ११ बाल्-
हामोनेस शलमोनाचा एक द्राक्षींचा मळा होता;
त्याने तो मळा राखणाऱ्यांच्या स्वाधीन केला, त्या-
च्या फलासाठीं प्रत्येकास एक हजार रुपये आ-
णून द्यावे लागत. १२ जो माझा द्राक्षींचा मळा
मजकडे आहे, तो मजपुढें आहे; हे शलमोना,
एक हजार तुझीं आहेत, आणि त्याचें फल जे
राखितात, त्यांचीं दोनशें आहेत. १३ जी तूं
बागांत वसतीस, त्या तुझ्या शब्दाकडे सोबती
कान देतात, तो मला ऐकूं दे. १४ हे माझ्या
वल्लभा, तूं पळ; आणि सुरभींच्या पर्वतांवर हरि-
णासारिखा अथवा हरणीच्या पोरासारिखा एस.

THE BOOK OF THE PROPHET ISAIAH.

# यशायाचा भविष्यवाद.

## अध्याय १.

आमोजाचा पुत्र जो यशाया याने उजीया यो-
थाम आहाज हिज्किया या यहूदाच्या
राजांच्या दिवसांत यहूदा व यरूशालेम यांविष-
यीं जें दर्शन पाहिलें तें. २ अहो आकाशानों, तुह्मी
ऐका, अगे पृथ्वी, तूं कान दे, कां तर परमेश्वर
ह्मणतो, म्या लेंकरें पोशिलीं व वाढविलीं, आणि
त्यानी मजवर फितूर केला आहे. ३ बैल आप-
ल्या स्वामीला आणि गाढव आपल्या धन्याच्या
कोंडिला ओळखितो, परंतु इस्राएल जाणत नाहीं,
माझे लोक विचार करीत नाहींत. ४ अहा पापी
राष्ट्र, अन्यायाने भारावलेले लोक, दुष्कर्म्यांचा वंश,
दुष्ट लेंकरें, यानी परमेश्वराला सोडिलें आहे,
इस्राएलाच्या पवित्राला तुच्छ मानिलें आहे, तीं
मागें सरलीं आहेत.

५ तुह्मास अणखी कां मारावें? अणखी
अधिक फिताल; सर्व मस्तक दुःखित आहे, आणि
सर्व हृदय रोगी आहे. ६ पायांच्या तळव्यापा-
सून मस्तकापर्यंत त्यांमध्यें कांहीं आरोग्य नाहीं;
ठेंचा व जखमा व वाहते व्रण आहेत; हीं चेपिलीं
नाहींत, यांला पट्टी बांधिली नाहीं, आणि मलमाने
नरम केलीं नाहींत. ७ तुमचा देश ओसाड
आहे, तुमचीं नगरें अग्नीने जाळून टाकिलीं आहेत;
तुमच्या देखतां तुमच्या भूमीला परदेशस्थ खाऊन
टाकितात, जसें परदेशस्थांच्या उपद्रवाने तसी ती
ओसाड पडली आहे. ८ आणि सीयोनेची
कन्या द्राक्षमळ्यांतल्या खोपटीसारिखी टाकिली
आहे, जसी कांकड्यांच्या फडांतली झोंपडी अथवा
वेढलेलें नगर तसी. ९ सैन्यांच्या परमेश्वराने
जर आह्मासाठीं किंचित् शेष राखिलें नसतें, तर
आह्मी केवळ सदोमाप्रमाणें पडलों असतों, गमो-
रासारिखे झालों असतों.

१० अहो सदोमाच्या अधिकाऱ्यांनों, परमेश्व-
राचें वचन ऐका; गमोराच्या लोकांनों, आमच्या
देवाच्या नेमाकडे कान द्या· ११ परमेश्वर ह्मणतो,
तुमचे बहुत यज्ञ माझ्या काय उपयोगी? मेंढ्यांचे
अग्निष्टोम व पुष्टपशूंचा मेद यांनी मी तृप्त झालों;
आणि बैल व कोंकरें व बोकड यांच्या रक्ताने मी
संतुष्ट होत नाहीं· १२ जेव्हां तुह्मी माझें दर्शन
घ्यावयास येतां, तेव्हां माझीं अंगणें तुह्मी तुडवा-
वीं, हें तुह्मापासीं कोणी मागितलें? १३ तुह्मी
अणखी व्यर्थ अर्पणें आणूं नका; धुपाचा मला
वीट येतो; अमावास्या व शाब्बाथ, मेळा मिळ-
विणें हीं मला सोसत नाहींत, धर्मसभा देखील
दुष्टाईच आहे· १४ माझा जीव तुमच्या अमा-
वास्यांचा व तुमच्या सभांचा द्वेष करितो; त्या
मला भार अशा झाल्या आहेत, मी सोसून
थकलों आहें· १५ जेव्हां तुह्मी आपले हात
पसराल, तेव्हां मी आपले डोळे तुह्मापासून झां-
कीन; आणि जरी तुह्मी बहुत प्रार्थना केल्या,
तरी मी ऐकणार नाहीं; तुमचे हात रक्ताने
भरले आहेत· १६ तुह्मी धुवा, आपणांस स्वच्छ
करा, आपल्या आचारांचें दुष्टपण माझ्या डोळ्यां-
पुढून दूर करा; दुष्ट करणें सोडा; १७ उत्तम
करावयास शिका, नीति करायास झटा, जांच-
लेल्यांस सुखी करा, अनाथाचा न्याय करा, विध-
वेचा वाद धरा· १८ परमेश्वर ह्मणतो, याहो,
आपण विवाद करूं; तुमचीं पापें जरी लाक्षेसा-
रिखीं असलीं तरी तीं बर्फासारिखीं पांढरीं हो-
तील; किर्मिजाप्रमाणें जरी तांबडीं असलीं तरी
स्वच्छ लोंकरीसारिखीं होतील. १९ तर तुह्मी
अनुकूळ व मान्य व्हाल, तर तुह्मी भूमीचें उत्तम
फल खाल· २० परंतु प्रतिकूल व अमान्य जर
असाल, तर तरवारीने नाश पावाल; कां तर परमे-
श्वराचें मुख हें बोललें आहे.

२१ विश्वासू नगरी कशी व्यभिचारिणी झाली
आहे! ती नीतीने भरली होती, तींत न्याय राहत
असे, परंतु आतां घातक राहतात· २२ तुझें
रुपें गाळ असें झालें आहे, तुझ्या द्राक्षारसांत
पाणी भेळिलें आहे· २३ तुझे अधिकारी फितु-
री आहेत, चोरांचे सहाय आहेत; त्यांतला
प्रत्येक लांचेची आवड धरितो; आणि प्रत्येक दानें
इच्छितो; अनाथाचा न्याय ते करीत नाहींत, वि-
धवेचा वाद त्यांपुढें येत नाहीं. २४ याकरितां
प्रभु सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा पराक्रमी
ह्मणतो, अहा मी आपले शत्रु दूर करून स्वस्थ
राहीन, आणि आपल्या वैऱ्यांचा सूड उगवीन· २५
आणि तुजवर मी आपला हात फिरवीन, आणि
जसें खाराने तसें तुझा गाळ घालवीन, आणि तुझें
सर्व कथील काढून टाकीन· २६ आणि जसे
पूर्वी तसे तुझे न्यायाधीश व जसे प्रारंभीं तसे
तुझे मंत्री पुन्हा स्थापीन, त्यानंतर न्यायाची नग-
री विश्वासू पुरी असें तुला ह्मणतील· २७ सी-
योन नीतीकरून उद्धरेल, आणि तिचे परत आ-
लेले न्यायेंकरून उद्धरतील· २८ आणि फितूरी
व पापी यांचा एकाएकीं नाश होईल, आणि जे
परमेश्वराला सोडितात ते नाहींसे होतील.
२९ कां तर जीं निंबर झाडें तुह्मी इच्छिलीं,
त्यांविषयीं ते लज्जित होतील; आणि जे बाग
तुह्मी निवडिले त्यांविषयीं तुह्मी लाज पावाल.
३० कां कीं ज्या निंबर झाडाचीं पानें वाळून गेलीं
आहेत, त्यासारिखे तुह्मी व्हाल, आणि ज्या बा-
गाला कांहीं पाणी नाहीं तसे व्हाल· ३१ आणि
बळवान पिंजलेला ताग असें होईल, आणि त्याचें
काम ठिणगी असें होईल, आणि तीं उभयतां
एकत्र जळतील, आणि कोणी विझविणार नाहीं·

## अध्याय २.

आमोझाचा पुत्र यशाया याने यहूदा व यरू-
शालेम, यांविषयीं जी गोष्ट पाहिली ती·
२ शेवटल्या दिवसांत असें होईल कीं, परमेश्व-
राच्या घराचा डोंगर पर्वतांच्या माथ्यावर स्था-
पित होईल आणि डोंगरांवरतीं उंचावेल; तेव्हां
त्याकडे सर्व राष्ट्रें लोटतील· ३ आणि बहुत
लोक जाऊन ह्मणतील, अहो या, आपण परमे-
श्वराच्या पर्वतावर याकोबाच्या देवाच्या घरांत
चढूं, ह्मणजे तो आपले मार्ग आह्मास शिकवील,
तेव्हां आह्मी त्याच्या वाटांत चालूं; कां कीं सी-
योनेंतून नेमशास्त्र आणि यरूशालेमेंतून परमेश्व-
राची गोष्ट निघेल· ४ आणि राष्ट्रांमध्यें तो
न्यायाधीशी करील, आणि बहुत लोकांचा निषेध
करील, तेव्हां ते आपल्या तरवारी मोडून फाल

करितील, व आपल्या भाल्यांचीं पातीं मोडून को-
यत्या करितील, राष्ट्र राष्ट्रांविरुद्ध तरवार उचल-
णार नाहीं, आणि लोक फिरून लढाई शिकणार
नाहींत.

५ अहो याकोबाच्या वंशाहो, या, आपण पर-
मेश्वराच्या प्रकाशांत चालूं. ६ तर तुझे लोक
जे याकोबाचा वंश ते त्वां सोडिले, कारण ते पूर्वे-
तल्या वस्तूंनी परिपूर्ण झाले आहेत, आणि पलि-
ष्टींसारिखे मंत्रवादी आहेत, आणि विदेशी यांचे
वंशांच्या हातांवर टाळी देतात. ७ त्यांची भू-
मिहि रुपें व सोनें यांहींकरून भरलेली आहे,
आणि त्यांच्या द्रव्यांचा कांहीं अंत नाहीं, आणि
त्यांचा देश घोड्यांनी भरलेला आहे, आणि त्यां-
च्या रथांचा कांहीं अंत नाहीं. ८ आणि त्यांचा
देश मूर्तींनी भरला आहे, ते आपल्या हातांचें
कार्य जें आपल्या बोटांनी निर्माण केलें त्याला भज-
तात. ९ आणि नीच मनुष्य ओणवतो, आणि
थोर मनुष्य आपल्याला अधम करितो, ह्मणून
त्यांस क्षमा करूं नको.

१० परमेश्वराच्या भयामुळें व त्याच्या
प्रतापाच्या ऐश्वर्यामुळें तूं खडकांत शीर, आणि
धुळींत लप. ११ मनुष्यांचे उंच डोळे खालीं
पाहतील, आणि मनुष्यांचा गर्व नाहींसा होईल,
आणि परमेश्वर मात्र त्या दिवसीं उंचावेल. १२
कां तर सैन्यांच्या परमेश्वराचा दिवस सर्व
गर्विष्ठ व उन्नत यांजवर व प्रत्येक प्रतिष्ठितावर
होईल, तेव्हां प्रत्येक नीच होईल; १३ आणि
लबानोनाच्या सर्व उंच व उच्छ्रित एरेज झाडांवर
आणि बाशानाच्या सर्व निबर झाडांवर, १४
आणि सर्व उंच पर्वतांवर व सर्व उच्छ्रित डोंग-
रांवर, १५ आणि प्रत्येक उंच गडावर व प्रत्येक
अगम्य कोटावर, १६ आणि तार्शीशाच्या सर्व
गलबतांवर व सर्व मनोहर रूपांवर होईल. १७
आणि मनुष्याचा अभिमान उतरेल, व मनुष्यांचा
गर्व नाहींसा होईल, आणि त्या दिवसीं परमेश्वर
मात्र उंचावेल. १८ आणि मूर्त्ति अगदीं नाहींशा
होतील. १९ आणि परमेश्वराच्या भयामुळें
व त्याच्या प्रतापाच्या ऐश्वर्यामुळें खडकांच्या
गुहांत व भूमीच्या बिळांत शिरतील, जेव्हां तो
पृथ्वी कांपवायाला उठेल तेव्हां. २० त्या दिव-
सीं मनुष्य आपल्या रुप्याच्या मूर्त्ति व आपल्या
सोन्याच्या मूर्त्ति व ज्या त्यानी आपणासाठीं भ-
जायाला निर्माण केल्या आहेत त्या उंदीर व वाघूळ
यांजवळ टाकून देईल; २१ आणि परमेश्वरा-
च्या भयामुळें व त्याच्या प्रतापाच्या ऐश्वर्यामुळें
खडकांच्या गुहांत व कड्यांच्या कपारींत जाईल,
जेव्हां तो पृथ्वी कांपवायाला उठेल तेव्हां. २२
मनुष्य ज्याच्या नाकपुड्यांत श्वास आहे त्याची
आशा सोडा, कां तर तें काय मोजावयाचें आहे!

## अध्याय ३.

कां तर पाहा, प्रभु सैन्यांचा परमेश्वर यरू-
शालेम व यहूदा यांपासून आधार व टेंकण
काढितो, ह्मणजे भाकरीचें सर्व टेंकण व पाण्याचा
सर्व आधार; २ शूर व युद्धाचा वीर, न्याया-
धीश व भविष्यवादी, गणक व वडील; ३ पन्ना-
शीचा नायक आणि सभासद आणि मंत्री आणि
प्रवीण शिल्पी आणि निपुण गारुडी यांस काढितो.
४ आणि पोरें त्यांचे अधिकारी करीन, आणि धाकले
पोर त्यांजवर धनीपण करितील. ५ आणि लोक
एकमेकांस व प्रत्येक आपल्या शेजाऱ्याला पिडि-
तील, पोर वडिलावर, आणि हलका सन्मान्या-
वर दांडगाई करितील. ६ जेव्हां कोणीएक आप-
ल्या भावास, आपल्या बापाच्या कुटुंबाच्यास
धरून ह्मणेल, तुला वस्त्र आहे, तूं आमचा अ-
धिकारी हो, आणि ही ओसाडी तुझ्या हाताखालीं
असावी. ७ त्या दिवसीं तो मोठ्याने बोलत ह्मणेल,
मी यथास्थितकर्त्ता होणार नाहीं; कां तर माझ्या
घरीं अन्न नाहीं, वस्त्रहि नाहीं, मला लोकांचा
अधिकारी करूं नका. ८ कां कीं यरूशालेम
कोसळली, आणि यहूदा नाश पावला आहे, कां-
तर त्यांची जीभ व त्यांचीं कृत्यें परमेश्वराचि-
रुद्ध आहेत, त्याच्या गौरवाच्या डोळ्यांस विरुद्ध
व्हावें ह्मणून.

९ त्यांचो मुखचर्या त्याविषयीं सुचविती,
आणि त्यानी आपलें पाप सदोमाप्रमाणें प्रगट
केलें आहे, लपविलें नाहीं; त्याच्या जिवाला हाय
हाय, कारण कीं त्यानी आपलें अरिष्ट घडविलें
आहे. १० न्यायीविषयीं ह्मणा, कीं त्याचें बरें
होईल, कारण ते आपले कर्मांचें फल भोगितील.

११ दुष्टाला हाय हाय, त्यास अरिष्ट होईल, का-
रण कीं तो आपल्या हातांच्या कामाचें फळ भोगील.
१२ पोर माझ्या लोकांचे पिडणारे आहेत;
आणि स्त्रिया त्यांवर धनीपण करितात; अहो
माझे लोक हो, तुमचे नायक तुह्माला बहकावि-
तात, आणि तुमच्या गतींचा मार्ग बिघडितात.
१३ विवाद करायास **परमेश्वर** उभा राहतो;
आणि लोकांची न्यायाधीशी करायास उभा ठाकतो.
१४ **परमेश्वर** आपल्या लोकांचे वडील व त्यांचे
अधिकारी यांसीं न्यायविवाद करील; कां कीं तुह्मी
द्राक्षमळा खाऊन टाकिला आहे, आणि दरिद्र्याची
लूट तुमच्या घरांत आहे. १५ माझ्या लोकांस
ठेंचून आणि दरिद्र्यांचीं मुखें घासून तुमचें तात्पर्य
काय आहे? असें **प्रभु** सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो.

१६ आणि **परमेश्वर** ह्मणतो, सीयोनेच्या
कन्या गर्विष्ट आहेत, आणि मान ताठवून चाल-
तात, आणि डोळे चमकावून ठमकत चालतात,
आणि आपल्या पायानी छमछम करितात. १७
यामुळें सीयोनेच्या कन्यांच्या डोक्याचे केश ग-
ळत, असें **प्रभु** करील, व त्यांचे गुप्त अवयव
**परमेश्वर** उघडे करील. १८ त्या दिवसीं **प्रभु**
तोरड्यांची शोभा काढील, आणि राखड्या व चं-
द्रकोरी, १९ आणि मोत्यें व तोंडे व बुरखे,
२० आणि शिरोवेष्टनें व साखळ्या व रेशमी
पट्ट्या व सुवासाच्या कुप्या आणि गंडे, २१
आणि वळीं व नथा, २२ आणि सणाचीं वस्त्रें व
पासोड्या व दुलया व बटवे, २३ आणि पातळ
व शेलाऱ्या व टोप्या व शाला काढील. २४
आणि असें घडेल, कीं सुवासाच्या ठिकाणीं घाण
होईल, आणि मेखलेच्या ठिकाणीं दोरी आणि
वेणीच्या ठिकाणीं टक्कल आणि झग्याच्या ठिकाणीं
गोणताटाचें वेष्टन आणि सुंदरपणाच्या ठिकाणीं
डाग होईल. २५ तुझे पुरुष तरवारीने पडतील,
आणि तुझे पराक्रमी पुरुष लढाईत पडतील. २६
आणि तिचे दरवाजे आकांत व शोक करितील,
आणि ती उजाड होऊन धुळीस मिळेल.

## अध्याय ४.

आणि त्या दिवसीं सात स्त्रिया कोणीएक पुरु-
षाला धरून ह्मणतील, कीं आह्मी आपलें
अन्न खाऊं, आणि आपलें वस्त्र लेऊं; परंतु आ-
मची अपकीर्त्ति दूर व्हावी, ह्मणून केवळ तुझें
नाम मात्र आह्माला ठेवावें. २ त्या दिवसीं इस्रा-
एलांतील मोकळे झालेल्यांसाठीं **परमेश्वराचा**
कोंब सुंदर व गौरवी होईल, आणि पृथ्वीचें फल
उत्तम व सुशोभित होईल. ३ आणि असें हो-
ईल, कीं सीयोनेंत जो वांचलेला व यरूशालेमेंत
जो उरलेला, त्याला पवित्र ह्मणतील, प्रत्येक जो
यरूशालेमेंतल्या जीवंतांमध्यें लिहिलेला आहे तो.
४ जेव्हां **प्रभु** सीयोनेच्या कन्यांचा मळ धुऊन
टाकील, आणि नीतीचा आत्मा व दहनाचा आ-
त्मा, यांकडून यरूशालेमेचें हिंसारक्त तींतून
घालवील तेव्हां. ५ आणि **परमेश्वर** सीयोन
पर्वताच्या प्रत्येक स्थानावर व तिच्या सभांवर
दिवसा ढग व धूर, आणि रात्रीं जळत्या अग्नीचा
प्रकाश उत्पन्न करील; कां सर्व गौरवावर आ-
च्छादन होईल. ६ आणि दिवसास ऊन्ह लागूं
नये, ह्मणून छायेसाठीं मंडप होईल, आणि वाद-
ळ व पाऊस यांपासून निवारा व आश्रय यांसा-
ठीं होईल.

## अध्याय ५.

मी आपल्या प्रियाला आपल्या प्रियाचें गीत त्या-
च्या द्राक्षमळ्याविषयीं गाईन; माझ्या प्रिया-
ला फार पिकाऊ टेंकडावर द्राक्ष्यांचा मळा होता.
२ तेव्हां त्याने तो कुदळिला, आणि त्यांतले धोंडे
काढिले, आणि त्यांत उत्तम जातीची द्राक्षी ला-
विली, आणि त्यामध्यें माळा बांधिला, आणि त्यां-
त कुंडहि खणिलें; मग द्राक्षें उत्पन्न करावीं, ह्म-
णून त्याने वाट पाहिली, पण त्याने रानटी द्राक्षें
उत्पन्न केलीं. ३ तर आतां अहो यरूशालेमेचे
निवासी, व यहूदाचे पुरुष हो, मी व माझा द्राक्ष-
मळा आह्मा उभयतांची न्यायाधीशी करा. ४
जें म्या त्यासाठीं केलें आहे, त्यापेक्षां माझ्या द्रा-
क्षमळ्याला अणखी काय करायाचें होतें? द्राक्षें
उत्पन्न करावीं, ह्मणून जेव्हां म्या वाट पाहिली,
तेव्हां त्याने रानटी द्राक्षें कां उत्पन्न केलीं? ५ तर
आतां जें मी आपले द्राक्ष्यांच्या मळ्याला करितों,
तें तुह्माला कळवितों; त्याचें कुंपण काढीन, ह्मणजे
पशू खाऊन टाकितील, त्याचें कुसूं मोडीन, तेव्हां

तुडवून टाकितील. ६ आणि त्याला उजाड क-
रीन, त्याला खसी करणार नाहींत, व कुदळणार
नाहींत, तेव्हां कांट्यांचीं झाडें व कांटेरीं झाडें त्या-
त उगवतील, आणि त्याजवर पाऊस पाडूं नये,
ह्मणून आभाळांला आज्ञा करीन. ७ कारण कीं
सैन्यांच्या **परमेश्वराचा** द्राक्षमळा इस्राएलाचें
घराणें आहे, आणि त्याचा रमणीय बाग यहूदा-
चे लोक आहेत; तर त्याने नीतीची वाट पाहिली,
आणि पाहा, रक्त पाडणें; न्यायाची वाट पाहिली
तों पाहा आरोळी चालती.

८ जे घरासीं घर जडितात, आणि जागा न
उरे तोंपर्यंत शेतासीं शेत जोडितात, आपण मात्र
देशामध्यें राहावें, ह्मणून त्यांला हाय हाय. ९
सैन्यांचा **परमेश्वर** माझ्या कानांत असें बोलला,
कीं खचीत बहुत मोठीं व उत्तम घरें लोकरहित
होऊन ओसाड पडतील. १० कां कीं दाहा बिघे
द्राक्षमळा एक शेर रस देईल, आणि मणभर बीज
शेरभर उपज करील.

११ जे पहाटेस उठून मद्य पीत जातात, आ-
णि द्राक्षारस त्यांला संतप्त करीपर्यंत सांजपावेतों
पीत राहतात, त्यांला हाय हाय. १२ आणि
सारंगी व वीणा, डफ व पोंवा, व द्राक्षारस हीं
त्यांच्या जेवणावळींत असतात; परंतु ते **परमे-
श्वराची** कृति मन घालून पाहत नाहींत, आणि
त्याच्या हातांचीं कर्मे ते ध्यानांत आणीत नाहींत.

१३ ह्मणून माझे लोक अज्ञानामुळें पाडाव हो-
ऊन प्रवासांत गेले आहेत, आणि त्यांचे सन्मान्य
जन भुकेले आहेत, आणि त्यांचा समुदाय तापलेला
व तान्हेला आहे. १४ ह्मणून मृतलोकाने आ-
पणाला विस्तीर्ण केलें, आणि आपलें तोंड पराका-
ष्ठेचें वासलें आहे, आणि त्यांचें वैभव व त्यांचा
समुदाय आणि त्यांची दाटी व उत्साह करणारा
हीं त्यांत खालीं जातील. १५ आणि नीच मनुष्य
ओणवा होईल, व थोर मनुष्य आपल्याला अधम
करील, आणि गर्विष्ठांचे डोळे खालीं होतील. १६
परंतु सैन्यांचा **परमेश्वर** नीतीने उंचावेल, आणि
**देव** जो पवित्र त्याला न्यायाने पवित्र मानितील. १७
तेव्हां कोंकरें आपल्या कुरणाप्रमाणें चरतील, आणि
पुष्टांचीं ओसाड स्थलें विदेशी खातील.

१८ जे दुष्टपणाच्या दोऱ्यानी अन्याय ओढि-
तात, आणि जसें गाडीच्या दोराने तसें पाप ओढि-
तात, त्यांला हाय हाय; १९ जे ह्मणतात, कीं
आह्मी पाहावें, ह्मणून तो आपलें काम लवकर आ-
टपो; आणि आह्मीं जाणावें, ह्मणून इस्राएलाच्या
**पवित्राचा** संकल्प समीप होऊन येवो, त्यांला.

२० जे वाईटाला उत्तम व उत्तमाला वाईट
ह्मणतात, जे प्रकाशाच्या ठिकाणीं अंधकार व अंध-
काराच्या ठिकाणीं प्रकाश ठेवितात, जे गोडाच्या
ठिकाणीं कडू, आणि कडूच्या ठिकाणीं गोड ठेवि-
तात, त्यांला हाय हाय. २१ जे आपल्या दृष्टींत
बुद्धिवंत, व आपल्या लक्ष्यांत शाहाणे आहेत,
त्यांला हाय हाय. २२ जे द्राक्षारस प्यायाला
शूर, आणि मद्य मिसळायास बळकट आहेत,
त्यांला हाय हाय; २३ जे लांचासाठीं दुष्टाला
न्यायी ठरवितात, आणि न्यायींचें न्यायीपण त्या-
पासून दूर करितात, त्यांलाहि. २४ याकरितां
जसी ज्वाळा धस खाऊन टाकिती, आणि बळतें
गवत राख होऊन पडतें, तसें त्यांचें मूळ कुजक्या
पदार्थासारिखें होईल, आणि त्यांचें फूल धुळीसा-
रिखें उडून जाईल, कारण कीं त्यांनी सैन्यांच्या
**परमेश्वराचें** नेमशास्त्र नाकारिलें, आणि इस्रा-
एलाच्या **पवित्राचें** वचन तुच्छ मानिलें आहे.
२५ ह्मणून **परमेश्वराचा** क्रोध त्याच्या लोकां-
वर पेटला आहे, आणि त्याने आपला हात त्यां-
वर लांबवून त्यांला हाणिलें आहे, पर्वतहि कांपले,
आणि त्यांचीं प्रेतें आळ्यांतील चिखलासारिखीं
झालीं; हें सर्व झालें असताहि त्याचा क्रोध फि-
रला नाहीं, आणि अझूनहि त्याचा हात तसाच
लांबविलेला आहे.

२६ आणि तो राष्ट्रांसाठीं दुरून झेंडा उभा-
रील, आणि पृथ्वीच्या शेवटापासून त्यांला सीत्कार
करीत, बोलावील, तेव्हां पाहा तीं त्वरेंकरून लव-
कर येतील. २७ त्यांमध्यें कोणी थकलेला व
भागलेला होणार नाहीं, कोणी डुकल्या खाणार
नाहीं, व झोंपी जाणार नाहीं, आणि त्याचा कंबर-
कसा सुटणार नाहीं, आणि त्यांच्या वहाणांची वाधी
तुटणार नाहीं. २८ त्यांचे बाण तिखट, आणि
त्यांचीं सर्व धनुष्यें वांकविलेलीं आहेत, त्यांच्या
घोड्यांचे खुर गारेप्रमाणें मानिले आहेत, व त्यां-
चीं चाकें वावटळीसारिखीं आहेत. २९ त्यांची

गर्जना सिंहाच्या सारिखी आहे, आणि तरुण सिं-
हाप्रमाणें तीं गर्जतील, तीं ओरडतील, आणि
लूट करून निर्भय नेतील, आणि ती कोणी सोड-
विणार नाहीं· ३० त्या दिवसीं समुद्राच्या गर्ज-
नेप्रमाणें तीं त्याजवर गर्जतील, तेव्हां ते भूमीला
दृष्टि लावितील; परंतु पाहा, अंधकार व संकट
आणि तिजवरील आकाशांतील प्रकाश अंधकार-
मय झाला आहे·

## अध्याय ६·

**ज्या** वर्षीत उज्जीया राजा मेला, त्यांत म्या **प्र-**
**भूला** सिंहासनावर बसलेलें उंच व थोरा-
वलेलें पाहिलें, आणि त्याच्या पोशाकाच्या विस्ता-
रानें देऊळ भरलें· २ त्यावर सराफीम उभे
राहिले, त्यांतल्या प्रत्येकाला सहा पक्ष होते, दो-
होंनी तो आपलें मुख झांकी, आणि दोहोंनी आपले
पाय झांकी, आणि दोहोंनी उडे. ३ आणि ते
एकमेकाला मोठ्यानें बोलत ह्मणाले, पवित्र, पवित्र,
पवित्र, सैन्यांचा **परमेश्वर** आहे, सर्व पृथ्वी त्या-
च्या गौरवानें भरली आहे· ४ तेव्हां मोठ्यानें
बोलणाऱ्याच्या शब्देंकरून दरवाजाचे खांब कांप-
ले, आणि घर धुरानें भरलें·

५ तेव्हां मी ह्मणालों, मला हाय हाय, कीं
मी नष्ट झालों आहें; कारण कीं मी अशुद्ध ओं-
ठांचा मनुष्य आहें, आणि अशुद्ध ओठांच्या लो-
कांमध्यें मी राहतों, आणि माझ्या डोळ्यांनी रा-
जा सैन्यांचा **परमेश्वर** पाहिला आहे· ६
मग सराफांतला एक मजकडे उडून आला, आ-
णि त्याच्या हातांत निखारा होता, तो त्यानें चिम-
ट्यानें वेदीवरून घेतला होता. ७ तेव्हां त्यानें
माझ्या मुखास स्पर्शिलें, आणि ह्मटलें, पाहा, हा
तुझ्या ओंठांस लागला आहे, ह्मणून तुझा अन्याय
दूर झाला, आणि तुझ्या पापाची क्षमा झाली
आहे· ८ मग म्या **प्रभूचा** शब्द ऐकिला, तो
असें बोलला, मी कोणाला पाठवूं? आणि आ-
ह्मासाठीं कोण जाईल? तेव्हां मी ह्मणालों, पाहा,
मी आहें, मला पाठीव·

९ तेव्हां तो बोलला, तूं जाऊन या लोकांस
सांग; तुह्मी खचीत ऐका, परंतु समजूं नका; आ-
णि खचीत पाहा, परंतु जाणूं नका· १० या लो-
कांचें हृदय घट्ट कर, आणि यांचे कान जड कर,
आणि यांचे डोळे झांक, यांनी आपल्या डोळ्यांनी
न पाहावें, आणि आपल्या कानांनी न ऐकावें, आ-
णि आपल्या हृदयानें न समजावें, आणि न फि-
रावें, आणि बरें न व्हावें, ह्मणून. ११ मग मी
ह्मणालों, **प्रभो**, किती वेळापर्यंत? तेव्हा तो
ह्मणाला, नगरें लोकरहित आणि घरें मनुष्यरहित
होऊन ओसाड पडतील, आणि भूमि अगदीं
उजाड होईल, १२ आणि **परमेश्वर** मनुष्या-
ला दूर करील, आणि देशामध्यें मोठी उजाडी
होईल तोंपर्यंत·

१३ तथापि त्यांत दाहावा भाग राहील, आ-
णि फिरून चरायासाठीं होईल, जसें निंबर झाड
व डोंगरी निंबर झाड जें तोडिलें असतां त्याचा
बुडखा राहतो, तसा पवित्र वंश त्याचा बुडखा
होईल.

## अध्याय ७.

**आ**णि उज्जीयाचा पुत्र योथाम, त्याचा पुत्र
आहाज यहूदाचा राजा, त्याच्या दिवसांत
असें झालें, कीं अरामाचा राजा रजीन, आणि
रमाल्याचा पुत्र पेकाह जो इस्राएलाचा राजा, हे
यरूशालेमेस तिजवर लढाई करायाला आले;
परंतु ते तिजवर प्रबल व्हायास समर्थ नव्हते·
२ तेव्हां दावीदाच्या घराण्याला कळलें कीं, अराम
एफ्राइमासीं जडला आहे; मग त्याचें हृदय व
त्याच्या लोकांचें हृदय घाबरें झालें, जसीं रानांत-
लीं झाडें वाऱ्यानें हालतात तसें· ३ तेव्हां **पर-**
**मेश्वरानें** यशायाला ह्मटलें, आहाजास भेटाया-
ला तूं व तुझा पुत्र शयार याशूब निघून वरील
तळ्याचा नळ जो परिटाच्या शेताच्या वाटेवर
आहे, त्याच्या शेवटाकडेस जा; ४ आणि त्या-
ला सांग, तूं सावध ऐस, आणि स्वस्थ राहा, भिऊं
नकों, आणि त्या धुमणाऱ्या कोलितांच्या दोहों शे-
पटांमुळें, रजीन व अराम आणि रमाल्याचा पुत्र,
यांच्या संतप्तक्रोधामुळें, तुझ्या हृदयानें थकूं नये.
५ कां कीं अराम, एफ्राइम, व रमाल्याचा पुत्र,
यांनी तुजवर अरिष्ट योजिलें आहे कीं, ६ आ-
पण यहूदांत चढूं, आणि त्याला गांजूं, आणि
आपणांसाठीं त्याला भेदूं, आणि जो ताबालाचा

पुत्र तो त्यामध्यें राजा नेमून ठेवूं. ७ प्रभु पर-
मेश्वर ह्मणतो कीं, असें ठरणार नाहीं, आणि
घडणार नाहीं. ८ कां तर अरामाचें मस्तक
दमेशेक आहे, आणि दमेशेकेचें मस्तक रजीन
आहे, तर अणखी पांसष्ट वर्षांनी एफ्राइम
लोक न राही, असा मोडून जाईल. ९ आणि
एफ्राइमाचें मस्तक शोमरोन आहे, आणि शोम-
रोनेचें मस्तक रमाल्याचा पुत्र आहे; जर तुह्मी
विश्वास धरणार नाहीं, तर तुह्मी स्थिर होणार
नाहीं.

१० मग आहाजाला परमेश्वर अणखी ह्म-
णाला कीं, ११ परमेश्वर तुझा देव यापासीं
तूं आपणासाठीं चिन्ह माग, तें खालतीं खोल
स्थलांत, अथवा वरतीं उंच स्थलांत माग. १२
तेव्हां आहाज बोलला, मी मागणार नाहीं, आ-
णि परमेश्वराची परीक्षा मी करणार नाहीं.
१३ तेव्हां त्याने ह्मटलें, अहो दावीदाच्या वंशहो,
तुह्मी ऐका, मनुष्यांस कंटाळा देणें तुह्माला हलकें
वाटतें, ह्मणून माझ्या देवालाहि कंटाळा देतां
काय? १४ याकरितां प्रभु स्वतां तुह्माला चि-
न्ह देतो; पाहा, कुमारी गरोदर होईल, आणि
पुत्र प्रसवेल, आणि त्याचें नाम इम्मानुवेल, असें
देईल. १५ जें वाईट तें टाकायास, आणि जें
चांगलें तें निवडायास, त्याला समजूं लागेल, ते-
व्हां तो लोणी व मध खाईल. १६ कां कीं जें
वाईट तें टाकायास, आणि जें चांगलें तें निवडा-
यास, तो पोर समजूं लागेल. त्यापूर्वी ज्या भूमी-
च्या दोघां राजांमुळें तूं व्याकुळ आहेस, ती लोक-
रहित होईल.

१७ ज्या दिवसीं एफ्राइम यहूदापासून फित-
ला, तेव्हांपासून आजपर्यंत, जे कधीं आले नाहींत
असे दिवस तुजवर, व तुझ्या लोकांवर, व तुझ्या
बापाच्या घराण्यावर परमेश्वर आणील, ह्मणजे
अश्शूराच्या राजाला आणील. १८ त्या दिवसीं
असें होईल कीं, मिसराच्या नद्यांच्या शेवटावर
जी माशी आहे तिला व अश्शूराच्या देशांत जी
मधमाशी आहे तिला परमेश्वर सीत्कार करीत
बोलावील. १९ तेव्हां त्या येतील, आणि सर्व
उजाड खोऱ्यांत, व कड्यांच्या छिद्रांत व सर्व झुड-
पांत व सर्व कुरणांत स्वस्थ बसतील. २० त्या
दिवसीं प्रभु भाड्याच्या वस्तऱ्याने, ह्मणजे नदीच्या
पलिकडच्यानी व अश्शूराच्या राजाने डोकें व पा-
यांचे केस मुंडील, आणि दाढीहि काढून टाकील.
२१ आणि त्या दिवसीं असें होईल कीं, पुरुष
गुरांतली एक कालवड, आणि दोन मेंढरें पा-
ळील; २२ आणि असें होईल कीं, त्यानी पुष्कळ
दूध दिल्ह्यामुळें तो लोणी खाईल; कां कीं प्रत्येक
जो देशांत चुकून राहील, तो लोणी व मध
खाईल. २३ आणि त्या दिवसीं असें होईल,
कीं ज्या प्रत्येक स्थलांत हजार रुप्यखंडांच्या
हजार द्राक्षा असत, तें कांट्यांचीं झाडें, व कांटेरीं
झाडें असें होईल. २४ तेथें कोणीएक धनुष्य
व बाण घेऊन जाईल; कारण कीं सर्व भूमि कां-
टयांचीं झाडें, व कांटेरीं झाडें असी होईल. २५
आणि सर्व डोंगर, जे कुदळीने कुदळतील, तेथें
कांट्यांचीं झाडें, व कांटेरीं झाडें, यांचें भय येणार
नाहीं; परंतु त्यांत बैलानी चरावें, व शेरडा मेंढ-
रानी तुडवावें, अशांसाठीं होईल.

## अध्याय ८.

आणि परमेश्वराने मला ह्मटलें, तूं आपणा-
साठीं मोठें पत्र घेऊन, त्यावर मनुष्याच्या
लेखणीने महेर शालाल हाश बाज याविषयीं लि-
ही. २ तेव्हां म्या आपणासाठीं विश्वासू साक्षी
ह्मणजे ऊरीया याजक आणि जखार्या यबेरेख्या-
चा पुत्र त्यास बोलाविलें. ३ मग मी भविष्यवा-
दिनीपासीं गेलों; आणि ती गरोदर होऊन पुत्र
प्रसवली; तेव्हां परमेश्वराने मला ह्मटलें,
त्याचें नाम महेर शालाल हाश बाज असें ठेव.
४ कारण कीं तो पोर, हे माझ्या बापा, आणि
अगे माझ्या आई, असें ह्मणायाला जाणेल, त्या-
पूर्वी दमेशेकेचें धन व शोमरोनची लूट, हीं अ-
श्शुराच्या राजापुढें हरण होतील.

५ मग परमेश्वराने मला अणखी ह्मटलें
कीं, ६ हे लोक शिलोहाचें पाणी जें हळू वा-
हतें तें नाकारितात, आणि रजीन व रमाल्याचा
पुत्र यांविषयीं हे आनंदतात; ७ यामुळें पाहा,
प्रभु नदीचीं बलवान व बहुत पाण्यें, ह्मणजे अ-
श्शुराचा राजा याला त्याच्या सर्व वैभवासहित
त्यांवर आणील; तेव्हां तो आपल्या सर्व पात्रांवर

चढेल, आणि आपल्या सर्व कांठांवर वाहील. ८
तो यहूदांत चालेल, भूमीवर वाहील, पार जाईल,
मानेपर्यंत लागेल; आणि हे इम्मानुवेला, तुझ्या
अवघ्या भूमीला त्याच्या पंखांचा विस्तार व्यापील.
९ अहो लोकांनों, एकत्र व्हा, मग मोडून जा;
अहो पृथ्वीच्या सर्व दूर देशांनो, तुह्मी कान द्या,
आपली कंबर बांधा, मग मोडून जा; कंबर बांधा,
मग मोडून जा. १० मसलत करा, परंतु ती
व्यर्थ होईल; वचन बोला, परंतु तें ठरणार नाहीं;
कां कीं देव आह्मापाशीं आहे.
११ कां तर परमेश्वराने बळयुक्त हातानें
मला असें समजाविलें, आणि या लोकांच्या
मार्गांत चालूं नये, ह्मणून त्याने मला असा संबोध
केला कीं, १२ हे लोक ज्या कोणाला बंड आहे,
असें ह्मणतात, त्याला तुह्मी बंड, असें ह्मणूं
नका, आणि त्याच्या भयासाठीं भिऊं नका, व थर-
थरूं नका. १३ सैन्यांच्या परमेश्वरालाच प-
वित्र माना, आणि ज्यापुढें तुह्मी भ्यावें व कांपावें
तो असावा. १४ आणि तो आश्रय असा
होईल; परंतु इस्राएलाच्या दोहों घराण्यांला ध-
क्क्याचा दगड, व ठेंचेचा खडक असा होईल,
आणि यरूशालेमेच्या राहणाऱ्यांला फांस व सां-
पळा असा होईल. १५ आणि त्यांतले बहुत
आडखळतील, व पडतील, व मोडून जातील, आ-
णि गुंततील, व सांपडतील. १६ विधान आंवळून
बांधा, माझ्या शिष्यांमध्यें नेमशास्त्रावर शिक्का
मारा. १७ आणि परमेश्वर जो आपलें मुख
याकोबाच्या घराण्यापासून झांकितो, त्याची वाट
मी पाहीन, आणि त्याची प्रतिक्षा मी करीन. १८
पाहा, मी आणि माझीं लेंकरें जीं मला परमेश्व-
रानें दिल्हीं आहेत, तीं आह्मी इस्राएलांत चिन्हें
व उत्पात असीं आहों, सैन्यांचा परमेश्वर जो
जीयोन पर्वतांत राहतो, त्यापासून असीं आहों.
१९ आणि जेव्हां तुह्माला ह्मणतील, कीं भूत-
संचारकांजवळ व गारुडी जे मिणमिणतात, व बुर-
बुरतात, त्यांजवळ शोधा, तेव्हां ह्मणा, कीं लोकां-
नीं आपल्या देवाजवळ शोध न करावा काय!
जीवंतांकरितां मेलेल्यांजवळ शोध करावा काय!
२० नेमशास्त्र व विधान या वचनांप्रमाणें जर ते
बोलत नाहींत, तर हेंच कारण, कीं त्यांच्या मनांत
कांहीं प्रकाश नाहीं. २१ आणि ते देशांतून कष्टी
व भुकेले असे जातील, आणि असें होईल, कीं
जेव्हां त्यांला भूक लागेल, तेव्हां ते तळमळतील,
आणि आपल्या राजाला व आपल्या देवाला शाप
देऊन वरतीं पाहतील. २२ मग ते पृथ्वीला
दृष्टि लावितील; आणि पाहा, क्लेश व अंधकार व
संकटाचा काळोख होईल; आणि ते अंधकारांत
ढकलून जातील.

## अध्याय ९.

तथापि जेव्हां त्याने पहिल्याने जबुलून व नफ्-
तालीं हे देश नीच केले, तेव्हां असें देशाला
संकट होतें, तसा काळोख होणार नाहीं, परंतु
पुढें तो समुद्राचा तीरप्रदेश यार्देनेच्या पलिकडचा
प्रांत विदेशी यांचा गालील यांस गौरवयुक्त क-
रील. २ जे लोक अंधकारांत चालत होते,
त्यांनीं मोठा प्रकाश पाहिला आहे, जे मृत्युछा-
येच्या देशांत बसले होते, त्यांवर उजेड उगवला
आहे. ३ त्वां राष्ट्र मोठें केलें, आणि त्याचा हर्ष
वाढविला आहे, कापणीच्या हर्षाप्रमाणें जसे लोक
लूट वांटून घेतांना उल्हास करितात, तसें ते तुज-
समोर हर्षले आहेत. ४ कां कीं जसें मिद्या-
नाच्या दिवसांत तसें त्वां त्याच्या भाराचें जूं, त्या-
च्या खांद्यावरची काठी, त्यावर जुलूम करणा-
ऱ्याचा सोटा यांस मोडलें आहे. ५ कां तर
कवचयुक्तांचें सर्व कवच खडाडेल, आणि वस्त्र
रक्तांत लोटून जाईल, आणि जाळण्यासाठीं व
अग्नीच्या सरपणासाठीं होईल. ६ कारण कीं
आह्मासाठीं बाल जन्मला आहे, आह्मासाठीं पुत्र
दिला आहे, आणि त्याच्या खांद्यावर अधिकार हो-
ईल, आणि त्याचें नाम आश्चर्यवान, मंत्री, स-
मर्थ देव, अनंतकालाचा बाप, कल्याणाचा अ-
धिकारी, असें ठेवण्यांत येईल. ७ त्याच्या अधि-
काऱ्याच्या वृद्धीचा व कल्याणाचा कांहीं अंत हो-
णार नाहीं, तो दावीदाच्या सिंहासनावर, व त्या-
च्या राज्यावर, तें नीतीनें व न्यायानें आजपासून
सर्वकालपर्यंत सुस्थित, व दृढ करायाला राहील;
सैन्यांच्या परमेश्वराचा आवेश हें साधील.
८ प्रभूनें याकोबांत वचन पाठविलें, आणि इ-
स्राएलांत तें पडलें आहे. ९ आणि सर्व लोक

आणतील, ह्मणजे एफ्राइम व शोमरोनेंतील रा-
हणारे जे गर्वाने व अभिमानाने ह्मणतात
कीं, १० इटा मोडून पडल्या आहेत, परंतु
आह्मी चिऱ्यानी बांधूं; उंबराचीं झाडें तोडलीं
आहेत, परंतु त्यांच्या ठिकाणीं एरेज झाडें लावूं.
११ आणि परमेश्वर रजीनाचे शत्रू त्यावर उठ-
वील, आणि त्याचे वैरी हत्यारबंद करील; १२
अरामी पुढें, आणि पलिष्टी मागून होतील; आ-
णि हे तोंड वासून इस्राएलास खातील; हें सर्व
झालें असतांहि त्याचा क्रोध फिरला नाहीं, आणि
अझूनहि त्याचा हात तसाच लांबविलेला आहे.
१३ कारण कीं लोक आपल्या मारणाऱ्याकडे
फिरत नाहींत, आणि सैन्यांच्या परमेश्वराचा
शोध करीत नाहींत. १४ ह्मणून परमेश्वर ए-
क्या दिवसीं इस्राएलाचें डोकें व शेपूट, खांदी
व नाडी कापून टाकील. १५ वडील व श्रेष्ट हाच
डोकें, आणि भविष्यवादी जो खोटें शिकवितो
हाच शेपूट. १६ आणि या लोकांचे नायक त्यांस
बहकवितात, आणि त्यांकडून जे नेलेले ते नाश
पावतात. १७ याकरितां त्यांच्या तरण्यांविषयीं
प्रभु हर्षणार नाहीं, आणि त्यांच्या पोरक्यांवर व
त्यांच्या विधवांवर तो दया करणार नाहीं; कां
कीं ते सर्व अधार्मिक व दुष्कर्मी आहेत, आणि प्र-
त्येक मुख निरर्थ भाषण बोलतें; हें सर्व झालें
असतांहि त्याचा क्रोध फिरला नाहीं, आणि अ-
झूनहि त्याचा हात तसाच लांबविलेला आहे.
१८ कारण कीं दुष्टपण अग्नीप्रमाणें जळतें,
तें कांटयांचीं झाडें व कांटेरीं झाडें खाऊन टाकील,
आणि वनांतील झाड्या जाळील; तेव्हां ते धुराच्या
चढण्याप्रमाणें नाहींसे होऊन जातील. १९
सैन्याच्या परमेश्वराच्या क्रोधाने भूमि अंधका-
रमय झाली आहे, आणि लोक अग्नीच्या सरप-
णासारिखे होतील, ते एकमेकांस वांचूं देणार
नाहींत. २० आणि कोणी उजवेकडे हिसकून घे-
ईल, परंतु भुकेला राहील; आणि डावेकडे खाईल,
परंतु ते तृप्त होणार नाहींत, ते प्रत्येक आपल्या
भुजाचें मांस खातील; २१ मनाश्शे एफ्राइमाला,
आणि एफ्राइम मनाश्श्याला हिसकील, आणि ते
उभयतां यहूदावर उठतील; हें सर्व झालें अस-
तांहि त्याचा क्रोध फिरला नाहीं, आणि अझूनहि
त्याचा हात तसाच लांबविलेला आहे.

## अध्याय १०.

न्यायाधीशीपासून दुबळ्यांस दूर करावें, आ-
णि माझ्या लोकांतल्या दरिद्र्यांचा न्याय
हरावा, विधवांचें धन आपल्याला लूट व्हावी,
आणि अनाथ पोरक्याला नाडावें, ह्मणून; २
जे अन्यायाचे नियम करून ठेवितात, आणि जो
उपद्रव त्यानी लिहून ठरविला आहे, तो लिहवून
ठेवितात, त्यांस हाय हाय. ३ शासनाच्या दि-
वसीं आणि दुरून जो नाश येतो, त्यांत तुह्मी
काय कराल? साहायासाठीं कोणाजवळ पळाल?
आणि आपलें गौरव कोठें सोडून ठेवाल? ४ जर
बंदिवानाप्रमाणें प्रत्येक पाया पडत नाहीं, आणि वध-
लेल्यांप्रमाणें जर ते गळून पडत नाहींत, तर त्यां-
तला कोणी वांचणार नाहीं; हें सर्व झालें अस-
तांहि त्याचा क्रोध फिरला नाहीं, आणि अझूनहि
त्याचा हात तसाच लांबविलेला आहे.
५ अश्शूर जो माझ्या क्रोधाचा दंड आणि
ज्याच्या हातांतली काठी माझा रोषच आहे त्याला
हाय हाय. ६ अधार्मिक राष्ट्रावर मी त्याला पाठ-
वीन, आणि माझ्या कोपाच्या लोकांवर त्याला आज्ञा
देईन; त्याने हरण करावें आणि लूट घ्यावी, आणि
आळ्यांतल्या चिखलाप्रमाणें त्यांस तुडवावें ह्मणून.
७ तथापि तो असें संकल्पित नाहीं, आणि त्याचें
मन असा विचार करीत नाहीं; परंतु नाश करावा,
आणि अनेक राष्ट्रें नाहींसीं करावीं, हेंच त्याच्या
मनांत आहे. ८ तर तो ह्मणतो, मजखालचे अ-
धिकारी सर्वथा राजे नाहींत काय? ९ कर्कमीशे-
सारिखी कल्नो नाहीं काय? अर्पदेसारिखी हमाथ
नाहीं काय? दमेशेकेसारिखी शोमरोन नाहीं काय?
१० ज्यांच्या मूर्त्ति यरूशालेमेच्या व शोमरोनेच्या
कोरींव मूर्त्तींपेक्षां उत्कृष्ट होत्या, तीं मूर्त्तींचीं राज्यें
जसीं माझ्या हातीं सांपडलीं आहेत; ११ जसें
शोमरोनेला व तिच्या मूर्त्तींला म्या केलें आहे, तसें
यरूशालेमेला व तिच्या मूर्त्तींला मी करणार ना-
हीं काय? १२ याकारितां असें होईल, कीं सी-
योन पर्वतावर व यरूशालेमेवर प्रभूने आपलें
सर्व कार्य समाप्त केल्यावर मी अश्शूराच्या रा-

ज्याच्या अभिमानी अंतःकरणाचें फल व त्याच्या
गर्विष्ट डोळ्यांचें वैभव यांचें शासन करीन. १३
कारण कीं तो ह्मणतो, मी आपल्या हाताच्या परा-
क्रमाने व आपल्या ज्ञानाने असें केलें आहे; कां तर
मी बुद्धिवान आहें, आणि लोकांच्या सीमा म्यां
सारिल्या आहेत, आणि त्यांचें द्रव्य म्यां हरण
केलें आहे, आणि शूराप्रमाणें म्यां त्यांतले राह-
णारे धुळीस मिळविले आहेत. १४ आणि को-
ट्यासारिखें लोकांचें धन माझे हातीं सांपडलें आ-
हे, आणि सोडलेलीं आंडीं जसा कोणी गोळा क-
रितो, तसें म्यां सर्व पृथ्वीस गोळा केलें आहे,
आणि कोणी पंख हालविला नाहीं, व तोंड उघ-
डिलें नाहीं, व मिणमिणला नाहीं. १५ कुऱ्हा-
डीने जो तोडितो, त्याजवर ती फुशारकी करील
काय? जो करवतीला चालवितो, त्याजवर ती
आपलें मोठेपण मिरवील काय? जर कदाचित
सोटा आपल्या उचलणाऱ्यांवर आपणाला हाल-
वितो, किंवा काठी लांकूड नसल्याप्रमाणें आपणाला
उंचाविती तर. १६ याकरितां प्रभु, सैन्यांचा प्रभु
त्याच्या पुष्टांमध्यें रोडपण पाठवील, आणि त्याच्या
गौरवाच्या स्थानीं अग्नीच्या जळण्याप्रमाणें जळ-
जळाट होईल. १७ आणि इस्राएलाचा प्रकाश
अग्नि असा होईल, आणि त्याचा पवित्र जो तो
ज्वाळ असा होईल; तेव्हां तो एका दिवसीं जळून
त्याचीं कांटेरीं झाडें व कांट्यांचीं झाडें खाईल;
१८ आणि त्याच्या वनाचें व पिकाऊ भूमीचें गौरव
निःशेष नाहींसें करील, आणि तो क्षयार्ता-
च्या क्षयाप्रमाणें होईल. १९ आणि त्याच्या
वनाच्या झाडांचें शेष असें थोडें होईल, कीं तीं
पोराला गणतां येतील.

२० आणि असें होईल, कीं त्या वेळेस इस्रा-
एलाचें शेष, आणि याकोबाच्या घराण्यांतील सुट-
लेले आपल्या मारणाऱ्यावर पुन्हा टेंकणार नाहींत;
परंतु परमेश्वर जो इस्राएलाचा पवित्र त्यावर
सत्यतेने टेंकतील. २१ शेष परत येईल, याको-
बाचें शेष परमसमर्थ देवाकडे परत येईल. २२
कां कीं जरीं तुझे इस्राएल लोक समुद्राच्या वाळू-
इतके असले, तरीं त्यांतलें शेषच परत येईल;
नेमिलेला क्षय न्यायाने परिपूर्ण होईल. २३
कारण कीं सैन्यांचा परमेश्वर प्रभु नेमिलेलाच
क्षय सर्व पृथ्वींत करील.

२४ याकरितां सैन्यांचा परमेश्वर प्रभु असें
ह्मणतो, माझ्या लोकांनों, जे तुह्मी सीयोनेंत रा-
हतां, ते अश्शूराला भिऊं नका; तो मिसराप्रमाणें
सोट्याने तुला हाणील, तुजवर आपली काठी उच-
लील. २५ कां तर अणखी थोड्या वेळानंतर
त्यांच्या नाशाने माझा रोष व क्रोध संपतील.
२६ आणि ओरेबाच्या खडकाजवळ जो मिद्या-
नाचा वध झाला त्याप्रमाणें सैन्यांचा परमेश्वर
त्याजवर कोरडा उगारील, आणि जसें समुद्रावर
व जसें मिसरावर तसी तो आपली काठी उच-
लील. २७ आणि त्या दिवसीं असें होईल, कीं
तुझ्या खांद्यावरून त्याचें ओझें, आणि तुझ्या मा-
नेवरून त्याचें जूं सरेल, आणि पुष्टपणामुळें जूं
अनुपयोगी पडेल. २८ तो अय्याथेस आला,
तो मिग्रोनेस पार गेला, त्याने आपलें खटलें
मिखमाशेस ठेविलें आहे. २९ ते उतारावर
गेले आहेत, गेबांत उतरले आहेत, रामा घाबरी
झाली आहे, शाऊलाची गिबया पळाली. ३०
अगे गाल्लीमेच्या कन्ये, तूं कैंकत ओरड; अरे
बिचाऱ्या अनाथोथे, लाईशेपर्यंत तूं आपला शब्द
ऐकूं जाऊं दे. ३१ मद्मेना पळून गेली, गेबी-
मेंतील राहणारे शरणास गेले आहेत. ३२
अणखी त्या दिवसीं तो नोबेस राहायाचा आहे;
सीयोनेच्या पर्वतावर, यरूशालेमेच्या डोंगरावर
तो आपला हात उगारील. ३३ पाहा, प्रभु
सैन्यांचा परमेश्वर कंपनें करून खांदी तोडील,
आणि उंचीचे उन्नत तुटून जातील, आणि गर्वि-
ष्ठ नीच होतील. ३४ आणि तो लोखंडाने वनां-
तील झाड्या तोडील, आणि बलवानेंकरून लबा-
नोन गळून पडेल.

## अध्याय ११.

आणि इशायाच्या बुडख्यापासून कोंब निघेल,
आणि त्याच्या मुळांतून अंकूर फुटेल; २
आणि परमेश्वराचा आत्मा, ज्ञानाचा व बुद्धीचा
आत्मा, बोधाचा व पराक्रमाचा आत्मा, विद्येचा
व परमेश्वराच्या भयाचा आत्मा त्याजवर रा-
हील; ३ आणि परमेश्वराच्या भयांत त्याचा

संतोष होईल; आणि तो आपल्या डोळ्यांच्या
पाहण्याप्रमाणें न्याय करणार नाहीं, आणि आपल्या
ऐकण्याप्रमाणें ठरविणार नाहीं. ४ तर तो प्रमा-
णिकपणें दुर्बलांचा न्याय करील, पृथ्वींतल्या दरि-
द्र्यांसाठीं यथार्थ ठरवील, आणि तो आपल्या मु-
खाच्या काठीने पृथ्वीला हाणील, आणि आपल्या
ओंठाच्या श्वासाने दुष्टाला मारील. ५ आणि
न्याय त्याचा कंबरकसा, आणि विश्वासूपण त्याचें
कटीवेष्टन होईल. ६ तेव्हां लांडगा कोंकरापाशीं
राहील, आणि बकऱ्यापाशीं चित्ता बसेल, आणि
वासरूं व सिंह व पुष्टपशु एकत्र बसतील, आणि
धाकटा पोर त्यांस नेईल. ७ आणि कालवड
व आस्वल एकत्र चरतील, त्यांचीं वासरें एकत्र
निजतील, आणि सिंह बैलासारिखा गवत खाईल.
८ आणि तान्हें बाळक नागाच्या बिळावर खे-
ळेल, आणि थानसुटलेला पोर सापाच्या गुहेवर
आपला हात ठेवील. ९ माझ्या सर्व पर्वतांत
उपद्रव व नाश कोणी करणार नाहींत; कां कीं
पृथ्वी **परमेश्वराच्या** ज्ञानाने भरेल, जसें पाणी
समुद्राचा व्यास झांकितें तसी.

१० आणि त्यावेळीं इशायाचें एक मूळ होई-
ल, जो लोकांसाठीं झेंडा असा उभा राहील, त्या-
जकडे राष्ट्रें शोधीत येतील, आणि त्याचा विसांवा
गौरवी होईल. ११ आणि त्या दिवसीं असें हो-
ईल, कीं **प्रभु** आपल्या लोकांचें शेष जें अश्शू-
रापासून व मिसरापासून व पाथ्रोसापासून व खु-
शापासून व एलामापासून व शिनारापासून व
हमाथापासून व समुद्रांतल्या द्वीपांपासून उरलें
आहे, तें परत घ्यायास आपला हात पुन्हा ला-
वील. १२ आणि तो राष्ट्रांसाठीं झेंडा उभारील,
आणि इस्राएलाच्या पाडावांस एकत्र मिळवील,
आणि पृथ्वीच्या चोहों दिशांपासून यहूदाच्या पांग-
लेल्यांस एकवटील. १३ तेव्हां एफ्राइमाचा हेवा
जाईल, आणि यहूदाचे शत्रु नाहींसे होतील,
एफ्राइम यहूदाचा हेवा करणार नाहीं, आणि
यहूदा एफ्राइमाला पीडणार नाहीं. १४ मग
ते पश्चिमेकडे पलिष्टींच्या खांद्यांवर उडतील, ते
मिळून पूर्वेतल्या लोकाला लुटतील, अदोम व मो-
वाब यांजला ते आपले हात लावितील, आणि
अम्मोनाचे लोक त्याला वश्य होतील. १५ आणि
मिसराच्या समुद्राची जीभ **परमेश्वर** कापून
टाकील, आणि आपल्या शुष्क वाऱ्यासहित आप-
ला हात नदीवर हालवील, आणि तिला तिच्या
सात फांद्यांसहित हाणील, आणि लोकाला जोड्यां-
सहित उतरवील. १६ आणि त्याच्या लोकांचें
शेष जें अश्शूरापासून उरलें असेल, त्याला सडक
मार्ग होईल, जसा इस्राएलाला, तो जेव्हां मिसर
देशांतून चढत आला तेव्हां होता, तसा.

## अध्याय १२.

आणि त्या दिवसीं तूं ह्मणसील, कीं हे **परमे-
श्वरा**, मी तुला स्तवीन; कां कीं जरीं तूं
मजवर रागें भरलास तरीं तुझा क्रोध फिरला
आहे, आणि तूं माझें सांत्वन करितोस. २ पाहा,
देव माझें तारण आहे, मी भाव ठेवीन, आणि
भिणार नाहीं; कारण कीं **प्रभु परमेश्वर** माझें
सामर्थ्य व गीत आहे, आणि माझें तारण असा
झाला आहे. ३ आणि तारणाच्या विहिरींतून
तुह्मी आनंदाने पाणी ओढाल. ४ आणि त्या
दिवसीं ह्मणाल, कीं **परमेश्वराला** स्तवा; त्याचें
नाम घेऊन हाक मारा; लोकांमध्यें त्याचीं कर्मे
कळवा; त्याचें नाम उंचावलें आहे, असें कथन
करा. ५ तुह्मी **परमेश्वराला** गा, कारण कीं
त्याने आश्चर्याचीं कर्मे केलीं आहेत; हें सर्व पृथ्वींत
कळलें आहे. ६ अगे जीयोनेच्या राहणारिणी,
मोठ्याने ओरड, आणि उत्सव कर, कां कीं तुज-
मध्यें इस्राएलाचा पवित्र मोठा आहे.

## अध्याय १३.

बाबेलेविषयींचा प्रवाद जो आमोजाचा पुत्र
यशाया याने पाहिला तो. २ तुह्मी उघ-
ड्या पर्वतावर झेंडा उभारा, त्यांस मोठ्याने हाक
मारा, हात हालवा, ह्मणजे ते महाजनांच्या दर-
वाज्यांत शिरतील. ३ म्यां आपल्या नेमलेल्यांस
आज्ञा केली आहे, म्यां आपल्या क्रोधासाठीं आ-
पले वीरहि बोलाविले आहेत, जे माझे अभि-
मानी उल्लासकर्त्ते आहेत, ते. ४ डोंगरांमध्यें
जसा बहुत लोकांचा तसा समुदायाचा शब्द, ह्म-
णजे एकत्र मिळविलेल्या राष्ट्रांच्या राज्यांच्या गों-
गाटाचा शब्द आहे; सैन्यांचा **परमेश्वर** ल-

ढाईसाठीं फौज सिद्ध करितो. ५ दूर देशांतून
आकाशाच्या शेवटापासून **परमेश्वर** व त्याच्या
रोषाचीं शस्त्रें सर्व देशाचा नाश करायाला येतात.
६ केंकत ओरडा, कारण कीं **परमेश्वराचा**
दिवस जवळ आहे, जसा **सर्वसमर्थापासून** वि-
नाश तसा तो येईल. ७ यामुळें सर्व हात गळ-
तील, आणि मनुष्यांचीं सर्व हृदयें विघरतील.
८ तेव्हां ते व्याकुल होतील, क्लेश व वेदना त्यांला
लागतील, प्रसवणाऱ्या स्त्रियेप्रमाणें तळमळतील,
एकमेकावर विस्मित होतील, त्यांचीं तोंडें ज्वाळे
प्रमाणें होतील. ९ पाहा, **परमेश्वराचा** दिवस
भूमि ओसाड करायाला येतो, तो रूक्ष, आणि
राग व संतप्त क्रोध यांसहित आहे; तींतून तिच्या
पातक्यांचा नाश तो करील. १० तर आका-
शाचे तारे व त्यांचा समुदाय आपला प्रकाश च-
कांकूं देणार नाहींत. सूर्य आपल्या उदयांत अंध-
कारमय होईल, आणि चंद्र आपला प्रकाश पाड-
णार नाहीं. ११ आणि जगाचें त्याच्या दोषा-
मुळें, व दुष्टांचें त्यांच्या अन्यायामुळें शासन करीन,
व गर्विष्ठांचा अभिमान उतरीन, आणि क्रूरांचा
गर्व नाहींसा करीन. १२ पुरुष निर्दम सोन्यापेक्षां
आणि मनुष्य ओफीराच्या श्रेष्ठ सोन्यापेक्षां मोल-
वान होई, असें करीन. १३ याकरितां सैन्याच्या
**परमेश्वराच्या** रोषेंकडून त्याच्या संतप्त क्रोधा-
च्या दिवशीं मी आकाश हालवीन, आणि पृथ्वी
आपल्या ठिकाणांतून ढळेल. १४ तेव्हां हाकलेला
हरण आणि मेंढरूं, जें कोणी आश्रयांत घेत ना-
हीं, त्यांसारिखा प्रत्येक होईल; ते प्रत्येक आप-
ल्या लोकांकडे फिरतील, व प्रत्येक आपल्या दे-
शांत पळतील. १५ प्रत्येक जो सांपडेल त्याला
भोंसकतील; आणि प्रत्येक ज्याला धरतील तो
तरवारीने पडेल. १६ आणि त्यांचीं बालकें त्यां-
च्या देखतां आपटतील, त्यांचीं घरें लुटतील आणि
त्यांच्या स्त्रियांस बाटवितील. १७ पाहा, मी
त्यांजवर मादी लोक उठवितों; ते रुपें मानणार
नाहींत, आणि सोन्याची आवड धरणार नाहींत.
१८ तेव्हां त्यांचीं धनुष्यें पोरांला ठेंचतील, आणि
गर्भस्थानाच्या फलावर ते दया करणार नाहींत,
त्यांचा डोळा लेंकरांस वांचूं देणार नाहीं.
१९ आणि बाबेल जी राज्यांची प्रभा, व
खास्द्यांच्या वैभवाची शोभा ती जसें देवाने स-
दोम व गमोरा यांस उजाड केलें; तसी होईल.
२० ती कधीं वसणार नाहीं, आणि अग-
णित पिढ्यांपर्यंत तींत कोणी राहणार नाहीं; आ-
णि तेथें अरबी तंबु मारणार नाहीं, आणि तेथें
मेंढपाळ मेंढरें बसूं देणार नाहींत. २१ आणि
जंगली पशु तेथें निजतील, आणि अघोर जंतूनी
त्यांचीं घरें भरतील, आणि तेथें उष्ट्रपक्षी राहतील,
व केशट तेथें नाचतील. २२ आणि कोल्हे त्यांचे
मंदिरांत, व विकराल जंतु त्यांच्या रम्य वाड्यांत
केंकतील, आणि तिची वेळ येण्याला जवळ आहे,
आणि तिचे दिवस वाढणार नाहींत.

## अध्याय १४.

तर **परमेश्वर** याकोबावर दया करील, आणि
इस्राएलास पुन्हा निवडून घेईल, आणि त्यांला
त्यांच्या भूमीवर ठेवील, तेव्हां त्यांसीं विदेशी
जडतील, आणि याकोबाच्या घराण्यासीं ते मिळ-
तील. २ आणि लोक त्यांला घेऊन त्यांच्या
स्थानावर आणितील; तेव्हां इस्राएलाचा वंश
**परमेश्वराच्या** भूमीवर त्यांला दास व दासी
असें राखील, आणि ते आपल्या पाडाव करणा-
ऱ्यांस पाडाव करितील, आणि आपल्या पिडणा-
ऱ्यांवर धनीपण करितील. ३ आणि तुझ्या पीडे-
पासून व तुझ्या तळमळीपासून आणि ज्या कठीण
दासपणाने तुजकडून सेवा घडली, त्यापासून जेव्हां
**परमेश्वर** तुला विसावा देईल, तेव्हां असें हो-
ईल कीं,
४ बाबेलेच्या राजाविषयीं तूं ही कथा घेऊन
बोलसील, पिडणारा कसा नाहींसा झाला, सुवर्ण-
मय नगर कसें नाहींसें झालें? ५ जो दुष्टांची
काठी आणि अधिकाऱ्यांचा दंड असे, तो **परमे-
श्वराने** मोडला आहे. ६ जो रागाने लोकांस
निरंतर हाणून मारीत असे, क्रोधाने राष्ट्रांवर धनी-
पण करित असे, त्याचा आतां पाठलाग होतो,
आणि कोणी अडवीत नाहीं. ७ सर्व भूमि वि-
सांवा व शांति पावली आहे, लोक उत्सवशब्द
करीत सुटले आहेत. ८ होय देवदारु आणि
लबानोनाचीं एरेज झाडें तुजविषयीं हर्षत म्हण-
तात, तूं निजलास, तेव्हांपासून आम्हावर कोणी

तोडणारा चढला नाहीं· ९ खालतीं मृतलोक
तुजसाठीं तुझ्या येण्याची भेट घ्यायाला तळमळ-
ला आहे, तो तुजसाठीं मेतांला पृथ्वीच्या सर्व
अधिकाऱ्यांस उत्तेजित करितो, राष्ट्रांच्या सर्व
राजांस त्यांच्या सिंहासनांवरून उठवितो. १०
ते सर्व बोलतांना तुला ह्मणतील, तूंहि आह्माप्र-
माणें रोगी पडला होतास काय? तूं आह्मासारि-
खा झाला आहेस काय? ११ तुझें वैभव मृत
लोकांत उतरलें आहे, तुझ्या वाद्यांचा गोंगाट स्त-
ब्ध झाला आहे, तुजखालतीं किडे विस्तरले आ-
हेत, आणि किडे तुला झांकितात. १२ अरे
सकाळच्या शुक्रताऱ्या, तूं आकाशांतून कसा पड-
लास, अरे राष्ट्रांच्या जिंकणाऱ्या, तूं कसा धुळीस
मिळविला आहेस! १३ कां तर तूं आपल्या
मनांत ह्मणालास, मी आकाशांत चढेन, देवाच्या
ताऱ्यांवरतीं मी आपलें सिंहासन उंचावीन, आणि
समाजाच्या पर्वतावर उत्तरेच्या कडांवर बसेन.
१४ मी आभाळांच्या शिखरांवरतीं चढेन, परा-
त्परासारिखा होईन· १५ तथापि मृतलोकांत
खोल खांचेच्या कडांत उतरून जासील· १६
जे तुला पाहतील, ते तुजवर डोळे वटारतील;
तुजविषयीं विचार करितील, कीं जो पुरुष पृथ्वी-
ला व्याकूळ करी, आणि राज्यांची डळमळ करी,
तो हाच आहे काय? १७ जो जग जंगलासा-
रिखें करीत असे, व त्याचीं नगरें मोडीत असे,
जो आपल्या बंदिवानांचें घर उघडीना तो? १८
राष्ट्रांचे जे सर्व राजे ते अवघे गौरवाने प्रत्येक
आपल्या घरांत निजतात· १९ परंतु तूं विटाळ-
ल्या खांदीप्रमाणें आपल्या कबरेंतून टाकलेला आ-
हेस, जे वधलेले, तरवारीने भोंसकलेले असतां
खांचेंतल्या दगडांमध्यें उतरतात, त्यांच्या वस्त्रा-
सारिखा, जसें पायांनी तुडविलेलें मढें तसा· २०
कबरेच्या स्थितींत तूं त्यांसीं एकत्र होणार ना-
हींस; कां कीं त्वां आपल्या देशाचा नाश केला,
त्वां आपले लोक वधिले आहेत, दुष्कर्म्यांचा वंश
कधीं कीर्त्तिमान होणार नाहीं· २१ त्याच्या
लेंकरांसाठीं, त्यांच्या बापांच्या अन्यामुळें वध
सिद्ध करा; त्यांनी न उठावें, आणि देश सत्तेंत
न घ्यावा, आणि पृथ्वीची पाठ नगरांनी न भरा-
वी ह्मणून· २२ आणि सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो, मी त्यांजवर उठेन; आणि बाबेलेपासून
नाम व शेष व पुत्र व संतान नाहींसें करीन,
असें **परमेश्वर** ह्मणतो· २३ आणि तिला
बगळ्याचें क्षेत्र व पाण्याचीं तळीं असें करीन, आ-
णि नाशाच्या झाडूने तिला झाडीन, असें सैन्यांचा
**परमेश्वर** ह्मणतो·

२४ सैन्यांच्या **परमेश्वराने** शपथ केली
आहे कीं, निश्चयें जसें म्यां कल्पिलें आहे, तसेंच
होईल; आणि म्यां जसें योजिलें आहे, तसेंच
ठरेल; २५ ह्मणजे मी आपल्या भूमींत अश्शूर
मोडीन, आणि आपल्या पर्वतांवर त्याला तुडवीन;
तेव्हां त्याचें जूं त्यांजवरून सरेल, आणि त्याचें
ओझें त्यांच्या खांद्यांवरून सरकेल· २६ जी
योजना सर्व पृथ्वीविषयीं योजली आहे, ती
हीच आहे; आणि जो हात सर्व राष्ट्रांवर लांब-
विलेला आहे, तो हाच आहे. २७ तर सैन्यां-
च्या **परमेश्वराने** योजना केली आहे, आणि ती
फिसके असें कोण करील? आणि त्याचा हात
लांबविलेला आहे, तो कोण फिरवील? २८
ज्या वर्षांत आहाज राजा मेला, त्यांत हा प्रवाद
झाला·

२९ अगे सर्व पलेशेथे, तुझ्या मारणाऱ्याची
काठी मोडली आहे, ह्मणून तूं हर्षूं नको; कां कीं
नागाच्या मुळांतून साप निघेल, आणि त्याचें पिलूं
उडता सर्प होईल. ३० आणि दुर्बलांचे वडील
पुत्र भक्षितील, आणि दरिद्री निर्भय निजतील;
आणि तुझें मूळ भुकेने मारीन, आणि तुझ्या शेषा-
ला तो वधील· ३१ अरे दरवाज्या, केंकत ओ-
रड; अरे नगरा, आरोळी कर; पलेशेथे, तूं अव-
घी भयाने व्याकूळ हो; कारण उत्तरेकडून धूर
येतो, आणि त्याच्या समुदायांतून कोणी वेगळा
होणार नाहीं. ३२ तर राष्ट्राच्या दूतांला कोणी-
एक काय उत्तर देईल? असें कीं परमेश्वराने
सीयोनेचा पाया घातला आहे, आणि त्याच्या
लोकांतले दरिद्री तींत आश्रय पावतात·

## अध्याय १५.

मोआबाविषयींचा प्रवाद; कीं रात्रीं मोआबाची
आर नाश पावली, आणि शून्य झाली आहे,
आणि मोआबाची कीर रात्रीं नाश [illegible], आणि

शून्य झाली आहे. २ बाइथ व दीबोन जीं उंच-
स्थलें त्याजवर तो रडायाला चढला आहे, नबो
व मेदबा यांविषयीं मोवाब केंकत आरडेल, त्या-
च्या सर्व माथ्यांवर टकल होईल, प्रत्येक दाढीचें
मुंडण होईल. ३ ते आपल्या आळ्यांत गोण-
ताट नेसतील, आपल्या धाब्यांवर व आपल्या बा-
जारांत ते सर्व फार रडत केंकतील. ४ हेश्बोन
व एलाले आरोळी करितील, त्यांचा शब्द यहज-
पर्यंत ऐकूं जाईल; यामुळें मोवाबाचे वीर ओर-
डतील, त्यांचा जीव त्याकारितां खिन्न होईल. ५
मोवाबाकारितां माझें हृदय ओरडतें, जघरेपर्यंत
त्याचे अधिकारी तिहीं वर्षांच्या कालवडीसारिखे
आहेत; कां तर लुहीथेच्या उंचवट्यावर ते रडत
चढतील; कारण होरोनाइमेच्या मार्गांत नाशाची
आरोळी उठवितील. ६ कां तर निम्रीमेचीं पाण्यें
आटून गेलीं, ह्मणून गवत सुखलें, रोपें नाहींसीं झा-
लीं, कांहीं हिरवें नाहीं. ७ यामुळें जें शेष त्यानी
केलें आहे तें, व वाळूंजांच्या ओहोळांवर जें त्याचें
सांठवण आहे तें ते घेऊन जातील. ८ तर मो-
वाबाच्या सीमांत आरोळी व्यापली आहे, एग्ला-
इमेपर्यंत त्याचें केंकणें, व बयेरेलीमेपर्यंत त्याचें
केंकावणें आहे. ९ दीमोनेचीं पाण्यें रक्ताने भ-
रलीं आहेत, ह्मणून दीमोनेवर अधिक दंड ला-
वीन, मोवाबांतील पळणाऱ्यांस आणि भूमीच्या
शेषाला सिंह पीडितील.

## अध्याय १६.

जो तूं सेलापासून रानापर्यंत भूमीचें राज्य
करितोस, तो तूं जीयोनेच्या कन्येच्या पर्वतास
कोंकरें पाठीव. २ आणि असें होईल, कीं जसें
कोठ्यांतून काढलेलें पांखरूं बहकतें, तशा मोवा-
बाच्या कन्या अर्नोनेच्या उताराजवळ होतील. ३
विचार कर, न्याय कर, दुपारीं तूं आपली छाया
रात्रीसारिखी कर, घालविलेल्यांस झांक, बहकणा-
ऱ्याला उघडें सोडूं नको. ४ हे मोवाबा, तुजपासीं
माझे घालविलेले राहावे, तूं त्यांस नाशकरणाऱ्या-
पासून आश्रय हो; कारण कीं पिडणारा अवसान
पावला आहे, नाश करणारा नाहींसा झाला, तुड-
विणारे भूमीवरून संपले आहेत. ५ आणि दयें-
करून सिंहासन स्थापित होईल, आणि नीतींत
तत्पर, व न्यायांत निपुण जो न्यायाधीश तो
सत्यतेने दावीदाच्या मंडपांत त्याजवर बसेल.
६ मोवाबाचा गर्व आह्मीं ऐकिला, तो अति-
गर्विष्ठ आहे, त्याची उन्नतता व त्याचा अभिमान
व त्याचा रोष, आणि त्याच्या निरर्थ लबाड्या
ऐकिल्या. ७ यामुळें मोवाब मोवाबाकरितां केंकत
ओरडेल, तो सर्व केंकत ओरडेल, कीरहरेसेथे-
च्या तलाकरितां तुह्मी केवळ व्याकूळ होऊन आ-
क्रंदाल. ८ हेश्बोनाचीं शेतें म्लान झालीं आहेत,
सिब्माची द्राक्षी; तिचीं झाडें राष्ट्रांच्या अधिका-
ऱ्यानी मोडून टाकिलीं आहेत, ते याजेरेस पोंचले
आहेत, रानामधून गेले आहेत, तिच्या खांद्या
उतरल्या आहेत, समुद्रावर गेल्या आहेत.
९ यामुळें याजेरेच्या रडण्याने सिब्माच्या
द्राक्षेकरितां मी रडेन; अहो हेश्बोन व एलाले,
मी आपल्या आंसवानी तुह्माला शिंपीन, कारण
कीं तुझ्या उन्हाळ्याच्या फलांमुळें व तुझ्या काप-
णीमुळें जो गजर तो खालावला आहे. १०
आणि पिकाऊ भूमीपासून हर्ष व उल्हास नाहीं-
से होतील, आणि द्राक्षमळ्यांत गायन व गोंगाट
होणार नाहीं, आणि तुडविणारा तुडवून कुंडांत
द्राक्षारस गाळणार नाहीं, उत्सवशब्द म्यां नाहींसा
केला आहे. ११ यामुळें मोवाबाकरितां माझीं
आंतडीं चंगाप्रमाणें वाजतील, आणि कीर हरे-
सेकरितां माझें हृदय वाजेल.
१२ आणि असें होईल, कीं मोवाब उंचस्थ-
लावर थकला आहे, आणि प्रार्थना करायाला आ-
पल्या पवित्रस्थानांत गेला आहे, परंतु त्याचा उपाय
चालत नाहीं, असें दृष्टीस पडेल. १३ तेव्हां-
पासून मोवाबाविषयीं जें वचन परमेश्वर बोलि-
ला आहे, तें हेंच आहे. १४ आणि आतां पर-
मेश्वर बोलला आहे, कीं तीन वर्षें मोलकऱ्याच्या
वर्षांप्रमाणें झालीं, ह्मणजे मोवाबाचें गौरव त्या
बहुत समुदायासहित तुच्छ होईल, आणि शेष
फार थोडें व अशक्त होईल.

## अध्याय १७.

दमेशेकेविषयींचा प्रवाद. पाहा, दमेशेक नगरी न
राही, असी नाहींसी होईल; आणि ओसा-
डीचा ढीग असी होईल. २ अरोएराचीं नगरें

ओसाड होतील, तीं कळपांसाठीं होतील, ते अंग
टाकून बसतील, आणि कोणी भेडावणार नाहीं.
२ आणि एफ्राइमापासून कोट नाहींसा होईल,
आणि दमेशेकेपासून व अरामाच्या शेषापासून रा-
ज्य नाहींसें होईल; हीं इस्राएलाच्या गौरवासा-
रिखीं होतील, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो.
४ आणि त्या वेळेस असें होईल, कीं याकोबाचें
गौरव शीर्ण होईल, आणि त्याच्या देहाचें पुष्ट-
पण क्षीण होईल. ५ आणि जसें कापणारा पीक
गोळा करितांना आपल्या हाताने कणसें तोडितो,
तसें होईल; आणि जसें रफाईमाच्या खोऱ्यांत
कोणी कणसें ठिपतो, तसें होईल.

६ तथापि जसें जाइत झाडाला धक्का माराया-
च्या वेळेस घडतें, तसीं चुकलेलीं फळें त्यांत
राहतील, दोन तीन फळें सर्वांहून ऊंच शिखरावर,
चार पांच कडेच्या पिकाऊ खांद्यांवर, असें **परमे-
श्वर** इस्राएलाचा देव ह्मणतो. ७ त्या वेळेस मनु-
ष्य आपल्या उत्पन्न करणाऱ्याकडे मन लावील,
आणि त्याचे डोळे इस्राएलाच्या पवित्राकडे पाह-
तील. ८ आणि तो वेद्यांला आपल्या हातांच्या
कर्मीला मन लावणार नाहीं, आणि आपल्या बो-
टांनी जें केलेलें तें, आणि पुतळे व मूर्त्ति यांस तो
पाहणार नाहीं.

९ त्या वेळेस त्याचीं गांवकुसवी नगरें खांदीच्या
अथवा ऊंच शिखराच्या टाकलेल्या फळासारिखीं,
जें फल इस्राएलाच्या वंशाकरितां त्यांनी सोडिलें,
त्यासारिखीं होतील; आणि ओसाडी होईल.
१० तूं आपल्या तारणाच्या देवाला विसरला-
स, आणि त्वां आपल्या सामर्थ्याच्या खडकाची
आठवण केली नाहीं; यामुळें जरीं त्यांत त्वां
रम्य रोपें लाविलीं, आणि अन्यजातीचीं कलमें
ठेविलीं; ११ दिवसा आपलें रोप मुळावें, अ-
सें केलें; आणि पहाटेस आपलें बीज रुझविलें;
तरीं दुर्दशेच्या दिवसांत व भारी शोकांत कापणी
नाहींसी होईल.

१२ बहुत लोकांचा समुदाय जे समुद्रांच्या ग-
र्जनेप्रमाणें गाजतात, आणि समाजाची गर्दी जी
विशाल पाण्यांसारिखीं गोंगाट करिती त्यांस हाय
हाय. १३ बहुत पाण्यांच्या गोंगाटाप्रमाणें समाज
गोंगाट करितील; परंतु देव त्याला धमकावील,
तेव्हां ते दूर पळतील, आणि वाऱ्यापुढें डोंगरांव-
रच्या भुंसासारिखे, व वादळापुढें धुळीसारिखे ते
भडकतील. १४ तेव्हां पाहा, संध्याकाळीं एका-
एकीं विपत्ती पहाटेपूर्वीं तो नाहींसा झाला; जे
आह्माला लुटतात त्यांचा वांटा, आणि आह्माला
जे नाडितात त्यांचा विभाग हाच आहे.

## अध्याय १८.

जो खूशाच्या नद्यांच्या पलिकडेस पंखांच्या
फडफडाटाचा देश त्याला हाय हाय; २
जो समुद्राच्या पार लव्हाळ्यांच्या नावांमध्यें पा-
ण्यांवर दूतांस पाठवितो त्याला हाय हाय; अहो
चपळ दूतानो, पांगलेल्या व लुचाडलेल्या राष्ट्रा-
कडे, जे लोक पहिल्यापासून आजपर्यंत भयंकर
त्यांजकडे, मापलेलें व तुडवलेलें राष्ट्र, ज्याच्या
भूमीला नद्या धुपून टाकितात, त्याजकडे तुह्मी जा.
३ अहो जगांतले सर्व लोकानो व पृथ्वींतले राह-
णारे हो, तो पर्वतांवर झेंडा उभारील, तेव्हां पाहा;
आणि करणा वाजवील, तेव्हां ऐका. ४ कारण
कीं **परमेश्वर** मला ह्मणाला आहे, कीं मी शांत
राहीन: आणि जसें स्वच्छ उन्ह सूर्यप्रकाशांत, अ-
थवा जसें धुकटाचें अभाळ कापणीच्या उन्हांत,
तसा आपल्या निवासांत ध्यान करीन. ५ तर
कापणीच्या पूर्वीं फूल संपलें असतां, जेव्हां कों-
वळीं द्राक्षें पिकत आहेत, तेव्हां तो कोयत्यांनी
डाहळ्या कापील, व खांद्या काढून दूर करील.
६ त्या एकत्र पर्वतांतल्या पांखरांसाठीं, व भूमी-
वरल्या पशूंसाठीं राहतील, आणि पांखरें त्यांवर
उन्हाळा घालवितील, आणि भूमीवरले सर्व पशु
त्यांवर हिंवाळा घालवितील.

७ त्या वेळेस पांगलेले व लुचाडलेले लोक,
आणि जे लोक पहिल्यापासून आजपर्यंत भयंकर
आहेत, त्यांपासून, आणि मापलेलें व तुडविलेलें
राष्ट्र, ज्याच्या भूमीला नद्या धुपून टाकितात, त्या-
पासून सैन्यांच्या **परमेश्वराकडे** अर्पण येईल,
जीयोनेचा पर्वत जो सैन्यांच्या **परमेश्वराच्या**
नामाचें स्थल त्याकडे.

## अध्याय १९.

मिसराविषयींचा प्रवाद. पाहा, **परमेश्वर** चपळ
अभाळावर बसून मिसरांत येईल; तेव्हां

त्यापुढें मिसराच्या मूर्त्ति व्याकूळ होतील, आणि
मिसराचें हृदय त्यामध्यें विरघळून जाईल. २
आणि मिसराला मिसराप्रतिकूल मी सज्जित करीन;
तेव्हां ते प्रत्येक आपल्या भावासीं, आणि प्रत्येक
आपल्या शेजाऱ्यासीं, नगर नगरासीं, राज्य राज्या-
सीं लढतील. ३ आणि मिसराचा आत्मा त्या-
मध्यें थकेल, आणि मी त्याची मसलत मोडीन;
तेव्हां ते मूर्त्तीजवळ व मांत्रिकांजवळ व भूतसंचा-
कांजवळ आणि गारुड्यांजवळ विचारतील. ४
आणि मिसराला कठोर धन्याच्या स्वाधीन करीन,
आणि बलात्कारी राजा त्यांजवर राज्य करील,
असें प्रभु सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो. ५
आणि समुद्रांतील पाण्यें खचतील, आणि नदी
आटून सुकेल. ६ आणि नद्या दुर्गंध होतील,
कोटाजवळचे खंदक खचून आटतील; वेखंड व
लव्हाळा सुकून जाईल. ७ नदीजवळचीं, व
नदीमुखाजवळचीं कुरणें, आणि नदीजवळचे सर्व
पेरींव पदार्थ सुकून उडून जातील, व नाहींसें हो-
तील. ८ आणि धीवर उच्छ्वासतील; आणि
सर्व जे नदींत गळ टाकितात, ते शोक करितील;
आणि जे पाण्यांत जाळीं पसरितात, ते ग्लान हो-
तील. ९ जे पिंजलेला ताग सिद्ध करितात,
आणि स्वच्छ पांढरें कापड जे विणितात, ते लज्जित
होतील. १० आणि त्यांचे पाय मोडतील; सर्व
मोलकरी उदासीन होतील.

११ तर जोवनेचे अधिकारी मूर्ख झाले आ-
हेत; फारोच्या प्रधानांतल्या बुद्धिवानांची मस-
लत पशूच्यासारिखी झाली आहे; फारोजवळ
तुह्मी कसें ह्मणतां, कीं मी विद्वानांचा वंश, मी पुरा-
तन राजांचा वंश आहें? १२ ते कोठें? तुझे बुद्धि-
वान कोठें? तर ते तुला दाखवोत; आणि सैन्यांच्या
परमेश्वराने जो मिसराविषयीं संकल्प केला
आहे, तो ते जाणोत. १३ जोवनेचे अधिकारी
निर्बुद्धि झाले; नोफेचे अधिकारी फसले आहेत;
आणि जे त्याच्या वर्गांचा आधार असे आहेत,
त्यांनी मिसराला भ्रांत केलें आहे. १४ त्याम-
ध्यें परमेश्वराने विपरीत बुद्धि मिसळली आहे;
आणि त्यांनी मिसराला त्याच्या सर्व कामांत
भ्रांत केलें आहे, जसा मद्यपी आपल्या विकारांत
भ्रमतो तसें. १५ आणि जें कांहीं काम मिसर
करील, त्यांतली डोकी अथवा शेपूट, खांदी
अथवा लव्हाळा, त्याला प्राप्त होणार नाहीं. १६
त्या दिवसीं मिसर स्त्रियांसारिखा होईल; आणि
सैन्यांचा परमेश्वर जो हात त्यावर उगारितो,
त्याच्या उगारण्याकारणें तो भयभीत व विस्मित
होईल. १७ आणि यहूदाची भूमि मिसराला
भयकारक होईल; जर कोणी त्याजवळ तिचें
नाम काढील, तर सैन्यांच्या परमेश्वराचा जो
संकल्प त्याने त्याविषयीं संकल्पिला आहे, त्याक-
रितां तो भिईल.

१८ त्यासमयीं मिसर देशांतील पांच नगरें
खनानाची भाषा बोलतील, आणि सैन्यांच्या पर-
मेश्वराजवळ शपथ करितील; एक नाशाचें नगर
असें ह्मणतील. १९ त्यासमयीं मिसर देशा-
मध्यें परमेश्वरासाठीं वेदी होईल, आणि त्या-
च्या सीमेजवळ परमेश्वरासाठीं खांब होईल.
२० आणि सैन्यांच्या परमेश्वरासाठीं तो मिसर
देशांत चिन्ह व साक्षी असा होईल; कारण कीं
ते पिडणाऱ्यांमुळें परमेश्वराजवळ आरोळी करि-
तील; तेव्हां तो त्यांजवळ तारणारा, व धनी पाठ-
वून त्यास सोडवील. २१ आणि मिसराला
परमेश्वर कळेल, आणि त्या दिवसीं मिसरी
परमेश्वराला जाणतील; आणि यज्ञ व अर्पण
करितील, आणि परमेश्वराजवळ नवस करून
फेडतील. २२ आणि परमेश्वर मिसऱ्यास
हाणील, आणि हाणून बरें करील; तेव्हां ते पर-
मेश्वराकडे फिरतील, मग तो प्रसन्न होऊन त्यास
बरें करील.

२३ त्या समयीं मिसरापासुन अश्शूरापर्यंत
सडक मार्ग होईल; मग अश्शूरी मिसरांत, व
मिसरी अश्शूरांत येतील, आणि मिसरी अश्शू-
ऱ्यांसंगतीं भक्ति करितील. २४ त्या वेळीं इस्राएल
मिसरासीं, व अश्शूरासीं तिसरा भूमीमध्यें आशी-
र्वाद असा होईल. २५ त्याला सैन्यांचा परमेश्वर
आशीर्वाद देत ह्मणेल, मिसर जो माझे लोक,
आणि अश्शूर जो माझ्या हातचें कृत्य, आणि
इस्राएल जो माझें वतन, ते आशीर्वादित असोत.

अध्याय २०.

ज्या वर्षी तर्तान अश्दोदेस आला, त्या वर्षी
जेव्हां सर्गोन अश्शूराचा राजा याने त्या-

का पाठविलें, आणि त्याने अश्दोदेवर लढून ती घेतली; २ तेव्हां आमोजाचा पुत्र यशाया याच्या योगाने परमेश्वर बोलला, कीं तूं जाऊन आपल्या कंबरेचें गोणताट फेड; आणि आपले जोडे आपल्या पायांतून काढ; तेव्हां तसें करून तो नग्न व अनवाहणी चालला. ३ तेव्हां परमेश्वराने ह्मटलें, माझा सेवक यशाया जसा मिसर व कूश यांविषयीं चिन्ह व उत्पात, असा तीन वर्षें नग्न व अनवाहणी चालला आहे; ४ तसें अश्शूराचा राजा मिसराच्या बंदिवानांला आणि कूशाच्या पाडावांस, तरुण व ह्मातारे यांस नग्न व अनवाहणी असे नेईल; आणि मिसऱ्यांला त्यांचे नितंब व अवस्कर उघडे असतां नेईल. ५ आणि त्यांचा आश्रय जो कूश, आणि त्यांचा प्रताप जो मिसर, यांकरितां ते उदास व लज्जित होतील. ६ आणि त्या वेळेस या समुद्राजवळच्या देशांतला राहणारा ह्मणेल, पाहा, आमचा आश्रय ज्याकडे साहायासाठीं, व अश्शूराच्या राजापासून मुक्त व्हायासाठीं आह्मी पळालों, तो असाच आहे; तर आह्मी कशाने मुक्त होऊं?

## अध्याय २१.

समुद्राजवळच्या रानाविषयींचा प्रवाद. जसीं दक्षिणेंतील वादळें सुटतात तसा तो रानांतून, भयंकर देशांतून येतो. २ कष्टाचा दृष्टांत मला दाखविला आहे; लुटणारा लुटतो, आणि नाशकरणारा नाश करितो; हे एलामा, चढ; हे मादया, वेढा घाल; सर्व उच्छ्वास राही, असें म्या केलें आहे. ३ याकरितां माझी कंबर दुखाने भरली आहे; प्रसवणारीच्या वेदनेप्रमाणें मला वेदना लागली आहे; मी ऐकून घाबरा झालों, पाहून भयभीत झालों आहें. ४ माझें हृदय स्फुरलें, मला भय लागलें, त्याने माझ्या सुखाची रात्र व्याकुलपणा असी केली आहे. ५ मेज सिद्ध करा; पाहरा करा; खा, प्या; अहो अधिकाऱ्यांनों, तुह्मी उठून ढालीला अभ्यंग करा. ६ कारण कीं प्रभूने मला असें सांगितलें आहे, कीं तूं जाऊन पाहरेकरी ठेव; जें तो पाहील, तें दाखवो. ७ तेव्हां त्याने घोड्यांवर बसणारे ओळीने दोन दोन, व गाढवांवर बसणारे, व उंटांवर बसणारे, अस्यांस पाहिलें; मग त्याने कान लावून एकाग्रचित्तें ऐकिलें; ८ तेव्हां त्याने, सिंह, ह्मणून आरोळी केली; हे प्रभो, दिवसास मी आपल्या पाहऱ्याच्या उंचस्थलावर नेहमी उभा राहतों, आणि सर्व रात्र मी आपल्या रक्षणस्थानांत स्थिर उभा असतों. ९ आणि पाहा, एथें घोड्यांवर बसणाऱ्यांपैकीं जोडींतील एक मनुष्य येतो; मग तो बोलत ह्मणाला, बाबेल ओसाड झाली, ओसाड झाली आहे, आणि तिच्या देवांच्या सर्व कोरींव मूर्त्ति त्याने मोडून भूमीवर टाकिल्या आहेत. १० हे माझ्या झोडण्या, आणि माझ्या खळ्यांतील धान्या; सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा देव, यापासून जें म्या ऐकिलें तें म्या तुह्माला दाखविलें आहे.

११ दूमाविषयींचा प्रवाद. सेईरांतून कोणी हांक मारून माझ्याजवळ बोलतो, पाहरेकऱ्या, रात्रीचें काय? पाहरेकऱ्या, रात्रीचें काय? १२ पाहरेकरी ह्मणाला, सकाळ येती, आणि रात्रिहि येती; जर शोधाल, तर शोधा; फिरा, या.

१३ अरबस्थानाविषयींचा प्रवाद. अहो ददानीमाच्या चालणाऱ्या व्यापाऱ्यांनो, तुह्मी अरबस्थानांतल्या जंगलांत रात्रीं राहाल. १४ तेमादेशांतल्या राहणाऱ्यांनी तान्हेल्यास भेटायाला येतांना पाणी आणिलें; ते आपली भाकर घेऊन पळणाऱ्यास भेटले. १५ कारण कीं तरवारींपासून, उपसलेल्या तरवारीपासून आणि वांकविलेल्या धनुष्यांपासून, व लढाईच्या संकटापासून ते पळाले; १६ कां कीं प्रभूने मला असें सांगितलें आहे, कीं मोलकऱ्याच्या वर्षाप्रमाणें अणखी एक वर्ष झालें, ह्मणजे केदाराचें सर्व वैभव संपून जाईल. १७ धनुष्याच्या गणतीचें शेष केदाराच्या वंशाचे वीर थोडकासतील; कारण कीं परमेश्वर इस्राएलाचा देव असें ह्मणाला आहे.

## अध्याय २२.

दर्शनाच्या खोऱ्याविषयींचा प्रवाद. तर तुझें काय झालें, कीं तूं अवघा धाब्यांवर चढला आहेस? २ जो तूं गडबडीने भरलेलें, गर्दीचें नगर, उल्हासणारी वस्ती आहेस, त्या तुझे वधलेले तरवारीने वधलेले अथवा लढाईत मेलेले

असे नाहींत. ३ तुझे सर्व अधिकारी एकदा प-
ळाले, धनुष्यें करून ते बंदिवान झाले, तुजमध्यें
जे सांपडले ते सर्व मिळून बंदिवान झाले. ते दूर
पळाले आहेत. ४ याकरितां मी ह्मणालों, मला
असूं द्या, म्या कष्टानें रडावें, माझ्या लोकांच्या
कन्येच्या नाशाविषयीं माझें समाधान करायाला
झटूं नको. ५ कारण कीं सैन्यांचा **परमेश्वर**
**प्रभु** यापासून दर्शनाच्या खोऱ्यांत गडबडीचा व
विनाशाचा व व्याकुलपणाचा दिवस, भिंत फोड-
ण्याचा व पर्वतांस ओरडण्याचा दिवस आहे. ६
आणि एलामानें मनुष्यांचे रथ आणि घोडेस्वार
घेऊन बाणांचा भाता वाहिला, आणि कीराने ढा-
ल उघडी केली. ७ आणि असें होईल, कीं
तुझे उत्कृष्ट खोरे रथांनी भरतील, आणि दरवाजा-
कडेस घोडेस्वार व्यूह करितील.

८ आणि त्याने यहूदाचें आच्छादन उघडिलें
आहे, आणि त्या दिवशीं त्वां वनाच्या घराच्या
शस्त्रांवर दृष्टि लाविली. ९ आणि दावीदाच्या नग-
राचीं भगाडें तुह्मी पाहिलीं आहेत, कीं तीं बहुत
आहेत; आणि तुह्मी खालच्या तळ्यांतलें पाणी एक-
वटिलें. १० आणि यरूशालेमेचीं घरें तुह्मी गणि-
लीं, आणि कोट नीट करावयासाठीं तुह्मी घरें मो-
डलीं. ११ आणि जुन्या तळ्याच्या पाण्यासाठीं तुह्मी
दोहों भिंतींमध्यें डोह केला; परंतु ज्याने तो केला
होता त्याजकडे तुह्मी दृष्टि लाविली नाहीं, आणि
पुरातनकाळीं ज्याने तो रचिला होता त्याकडे
तुह्मी पाहिलें नाहीं. १२ रडावें, आकांत करावा,
टक्कल पाडावें, गोणताट नेसावें, असी त्या दिवशीं
सैन्यांचा **परमेश्वर प्रभु** याने आज्ञा दिल्ही;
१३ परंतु पाहा, आनंद व हर्ष, बैल मारणें, मेंढरें
कापणें, मांस खाणें, व द्राक्षारस पिणें, असें करि-
तां खावें, प्यावें, कारण कीं उद्यां मरूं, असें तुह्मी
ह्मणतां. १४ आणि सैन्यांच्या **परमेश्वराने**
माझ्या कानांत सुचविलें, कीं तुह्मी मराल तोंपर्यंत
या अन्यायाची क्षमा तुह्माला होणार नाहीं, असें
सैन्यांचा **परमेश्वर प्रभु** ह्मणतो.

१५ सैन्यांचा **परमेश्वर प्रभु** ह्मणाला, कीं
हा प्रधान शेबना जो घरच्या कारभारावर आहे,
याजवळ आंत जाऊन बोल, १६ एथें तुझें काय
आहे, आणि एथें तुझा कोण आहे, कीं असा कोणी
आपली कबर उंचस्थलांत खोदितो, व आपलें
राहण्याचें स्थान खडकांत करितो, तसें त्वां आप-
णासाठीं एथें कबर खोदिली आहे? १७ पाहा,
**परमेश्वर** तुला पराक्रम्यासारिखा वेगाने फेंकून
देईल, आणि तुला अगदीं झांकील. १८ तो
तुला गुंडाळ्याप्रमाणें गुंडाळून मोठ्या देशांत गो-
ळ्याप्रमाणें झुगारील; तेथें तूं मरसील, आणि तेथें
तुझ्या गौरवाचे रथ तुझ्या धन्याच्या घराची
अप्रतिष्ठा असे होतील. १९ आणि मी तुला
तुझ्या स्थानापासून भ्रष्ट करीन, आणि तो तुला
तुझ्या पदापासून घालवील.

२० आणि त्यावेळेस असें होईल, कीं माझा
सेवक जो एल्याकीम हिल्कीयाचा पुत्र त्याला मी
बोलावीन. २१ तेव्हां त्याच्या अंगांत तुझा झगा
घालीन, आणि तुझा कंबरकसा त्याला वेष्टीन, आणि
तुझा अधिकार त्याच्या हातीं देईन; तेव्हां तो
यरूशालेमेच्या राहणाऱ्यांस व यहूदाच्या घरा-
ण्याला बाप होईल. २२ आणि दावीदाच्या
घराण्याची किल्ली मी त्याच्या खांद्यावर ठेवीन;
मग तो उघडील, तेव्हां कोणी बंद करणार नाहीं;
आणि बंद करील, तेव्हां कोणी उघडणार नाहीं.
२३ आणि मी त्याला बळकट ठिकाणीं खिळ्या
सारिखा बसवीन, तेव्हां तो आपल्या बापाच्या
घराण्याला गौरवाचें सिंहासन असा होईल. २४
आणि त्यावर त्याच्या बापाच्या घराण्याचें सर्व गौरव,
लेंकरें व संतति, सर्व धाकलीं पात्रें, प्याल्यांपासून
झाऱ्यांपर्यंत ते टांगून ठेवितील. २५ सैन्यांचा
**परमेश्वर** ह्मणतो, जो खिळा बळकट ठिकाणीं
बसविलेला तो त्या दिवशीं ढळेल, आणि मोडेल, आ-
णि पडेल, आणि जो भार त्यावर होता तो नाश
पावेल; कारण कीं **परमेश्वर** असें बोलला आहे.

## अध्याय २३.

जोरेविषयींचा प्रवाद. तार्शीशाच्या गलबतांनो,
कूकत ओरडा; कारण कीं जोर घर नाहीं,
प्रवेश नाहीं, असी नाशिली आहे; हें त्यांस खि-
त्तीम देशापासून सिद्ध झालें आहे. २ द्वीपांतील
राहणाऱ्यांनो, उगे राहा; ज्या तुला सीदोनेच्या समु-
द्रावर चालणाऱ्या व्यापाऱ्यांनी द्रव्याने भरलें आहे.
३ बहुत पाण्यांजवळ शिहोराचें बीज व नदीजवळ-

चें पीक हें तिची प्राप्ति आहे; आणि ती बहुत
राष्ट्रांचा बाजार आहे. ४ अगे जीदोने, तूं ल-
ज्जित हो; कां कीं समुद्र, समुद्राची बळकट वस्ती
ह्मणाली आहे, कीं मी वेणा देत नाहीं, आणि प्र-
सवत नाहीं, व तरुणपुरुष वाढवीत नाहीं, कुमा-
ऱ्या संभाळीत नाहीं. ५ जसे मिसराच्या वर्त्त-
मानाविषयीं तसे ते जोरेच्या वर्त्तमानाविषयीं
कष्टी होतील. ६ तुह्मी तार्शीशास पार जा;
द्वीपाच्या राहणाऱ्यानो, केंकत ओरडा. ७ हीच
तुमची उल्हास करणारी नगरी आहे काय, जि-
ची पुरातनता पुरातन दिवसांपासून आहे? तिला
वसायासाठीं आपले पाय दूर वाहतील. ८ मु-
गुट देणारी जी जोर, जिचे सावकार अधिकारी,
जिचे व्यापारी पृथ्वींतले संभावित आहेत, तिज-
विषयीं हें कोणीं योजिलें आहे? ९ हें सैन्यां-
च्या **परमेश्वराने** योजिलें आहे, अवघ्या शोभेचें
वैभव नासावयासाठीं, व पृथ्वींतल्या सर्व संभावि-
तांस नीच करायासाठीं. १० अगे तार्शीशाच्या
कन्ये, तूं आपल्या देशांतून नदीप्रमाणें वाहत जा,
यापुढें कांहीं प्रतिबंध नाहीं. ११ त्याने आपला
हात समुद्रावर लांबविला, त्याने राज्यें हालविलीं,
ठदिमाच्या नगरीविषयीं **परमेश्वराने** आज्ञा दि-
ली आहे, कीं तिचे कोट मोडावे. १२ आणि
तो ह्मणाला, अगे पीडलेल्या कुमारी जीदोनेच्या
कन्ये, तूं अणखी उल्लासणार नाहींस; तूं ऊठ,
खित्तीमास पार जा; तेथेंहि तुला समाधान हो-
णार नाहीं. १३ खास्द्यांचा देश पाहा, कीं हे
लोक पूर्वी नव्हते; तो अश्शूराने जंगलांतल्या
राहणाऱ्यांसाठीं योजिला आहे; त्यांनी आपले
बुरूज बांधून त्याचीं मंदिरें मोडिलीं आहेत,
त्याने तो ओसाड केला आहे. १४ तार्शीशा-
च्या गलबतानो, केंकत ओरडा; कां कीं तुमचें
सामर्थ्य ओसाड झालें आहे. १५ आणि
त्यावेळीं असें होईल, कीं जोर सत्तर वर्षें एका
राजाच्या दिवसांएवढा विसर पावेल; मग सत्तर
वर्षांच्या शेवटीं जोर कळवंतिणीप्रमाणें गाऊं ला-
गेल. १६ अगे विसरलेल्या कळवंतिणी, सारंगी
घेऊन नगराभोंवती फीर, उत्तम प्रकारें वाजीव,
तुझी आठवण व्हावी ह्मणून बहुत गायन कर.
१७ आणि सत्तर वर्षांच्या अंतीं असें होईल,
कीं जोरेकडेस **परमेश्वर** मन लावील, तेव्हा ती
आपल्या वेतनास फिरेल, आणि भूमीच्या सर्व पा-
ठीवर पृथ्वींतल्या सर्व राज्यांसीं व्यभिचार करील.
१८ आणि तिची संपत्ति व तिचें वेतन **परमेश्व-
राला** पवित्र होईल, त्यांचें सांठवणें व राखून
ठेवणें होणार नाहीं; परंतु जे **परमेश्वरा**समोर
राहतात, त्यांसाठीं तिची संपत्ति होईल, त्यांनी
पुरतेपणीं खावें, आणि टिकाऊ वस्त्र नेसावें ह्मणून.

## अध्याय २४.

**पा**हा, **परमेश्वर** पृथ्वीला रिकामी करितो, ति-
ला ओसाड करितो, आणि तिची पाठ पाल-
टितो, व तिचे राहणारे विखरितो. २ आणि
जसे लोक तसा याजक, जसा सेवक तसा धनी,
जसी दासी तसी तिची धनीण, जसा विकत घे-
णारा तसा विकणारा, जसा उसनें देणारा तसा
उसनें घेणारा, जसा उधार घेणारा तसा जो त्या-
ला उधार देतो तो होईल. ३ भूमि अगदीं
रिकामी होईल, आणि अगदीं लुटून टाकितील,
कां तर **परमेश्वर** हें वचन बोलला आहे. ४
भूमि शोक करिती व सुकून गेली आहे, जग वा-
ळून व सुकून गेलें आहे, भूमीवरल्या लोकांतले
थोर सुकले आहेत. ५ आणि भूमि आपल्या
राहणाऱ्यांकडून बाटली आहे; कारण कीं त्यांनी
शास्त्राचें उलंघन केलें आहे, त्यांनी नेम पाल-
टिला आहे, सर्वकाळचा करार त्यांनी मोडला
आहे. ६ याकारितां भूमि शापाने खाल्ली आहे,
आणि तिजवर जे राहतात ते दंड पावले आहेत,
ह्मणून भूमीवरले राहणारे बळून गेले, आणि
मनुष्यें थोडीं उरलीं आहेत. ७ नवा द्राक्षारस
रडतो, द्राक्षी वाळून गेली आहे, हर्षित हृदयाचे
सर्व उच्छ्वास टाकितात. ८ डफांचा उत्सव
खुंटला आहे, उल्हास करणाऱ्यांचा गोंगाट होऊन
संपला, सारंगीचा उत्सव खुंटला आहे. ९ ते
गात असतांना द्राक्षारस पिणार नाहींत, जे मद्य
पितात त्यांस तें कडू होईल. १० वस्ती मोडून
शून्य झाली आहे, आंत जाऊं नये ह्मणून प्रत्येक
घर बंद केलें आहे. ११ द्राक्षारसासाठीं आ-
ळ्यांत बोभाटा पडला आहे, सर्व हर्ष मावळला
आहे, भूमीचा उत्सव होऊन गेला आहे. १२

नगरांत ओसाडी उरली आहे, आणि दरवाजा मोडून तुकडे असा झाला आहे.

१३ तर जाइत झाडाला धक्का मारिला असतां जसें घडतें, द्राक्षांचें तोडणें समाप्त झालें असतां जशीं चुकलेलीं फळें राहतात, तसें देशांत लोकांमध्यें होईल. १४ ते आपला शब्द उंचावतील, परमेश्वराच्या गौरवामुळें उत्सव करितील, समुद्रापासून मोठ्यानें आरोळी मारितील. १५ याकरितां उत्तर देशांत तुह्मी परमेश्वराला गौरवा, समुद्रद्वीपांत जो परमेश्वर इस्राएलाचा देव त्याच्या नामाला गौरवा.

१६ पृथ्वीच्या सीमेपासून आह्मी गीतें ऐकिलीं, न्यायीला तेज आहे, परंतु मी ह्मणालों, मला रोडपण, मला रोडपण आहे, मला हाय हाय; ठकानी ठकपण केलें आहे, ठकानी फार ठकपण केलें आहे. १७ हे भूमीच्या राहणाऱ्या, भय व खांच व पाश हीं तुझ्यापुढें आहेत. १८ आणि असें होईल, कीं जो भयाच्या शब्दापासून पळेल, तो खांचेंत पडेल, आणि जो खांचेंतून वर चढेल, तो पाशांत सांपडेल; कारण कीं वरतीं खिडक्या उघडल्या आहेत, आणि पृथ्वीचे पाये हालविले आहेत. १९ पृथ्वी मोडून गेली आहे, पृथ्वी विदारली आहे, पृथ्वी फार हालविली आहे. २० पृथ्वी मद्यपीप्रमाणें झोंकेल, आणि चौपाळ्याप्रमाणें डोलेल, आणि तिचा अपराध तिजवर भारी होईल, तेव्हां ती पडेल, आणि पुन्हा उठणार नाहीं. २१ आणि त्या दिवसीं असें होईल, कीं परमेश्वर श्रीमंतांच्या सैन्याला उंच ठिकाणीं दंड करील, आणि भूमीच्या राजांस भूमीवर दंडील. २२ तेव्हां जसे बंदिवान खांचेंत एकवट होतात, तसे ते एकवट होतील, आणि बंदिशाळेंत त्यांस कोंडून टाकितील, आणि बहुत दिवसांनंतर ते शिक्षा पावतील. २३ मग परमेश्वर जेव्हां जीयोन पर्वतांत व यरूशालेमेंत व आपल्या वडिलांसमोर गौरवानें राज्य करील, तेव्हां चंद्र ओशाळा होईल, आणि सूर्य लाजेल.

## अध्याय २५.

हे परमेश्वरा, तूं माझा देव आहेस, तुला मी थोर मानीन, तुझ्या नामाला स्तवीन, कारण कीं त्वां आश्चर्यकर्में केलीं आहेत, तुझे पुरातन विचार विश्वासूपणा व सत्यता आहेत. २ कां कीं त्वां नगर ढीग असें केलें आहे, कोटाचें शहर ओसाडी असें केलें आहे, परदेशस्थांचें मंदिर हें नगर न राही असें केलें आहे, त्याला कधीं बांधणार नाहींत. ३ याकरितां पराक्रमी लोक तुला गौरवितील, क्रूर राष्ट्रांची वस्ती तुला भिईल. ४ कारण कीं तूं दुबळ्याचा आश्रय आहेस, दरिद्र्याला त्याच्या संकटसमयीं आश्रय आहेस, वादळापासून निवारा व उन्हापासून सावली आहेस, जेव्हां क्रूरांचा झपाटा भिंतीस लागणाऱ्या पुरासारिखा आहे, तेव्हां. ५ जसें वाळलेल्या भूमींतलें उन्ह तसी शत्रूंची गडबड मोडसील, जसी अभाळाच्या सावलीनें उन्ह तसें क्रूरांचें गायन खालावेल.

६ आणि सैन्यांचा परमेश्वर या पर्वतावर सर्व लोकांसाठीं मिष्टान्नांचें भोजन, मलवर्जित द्राक्षारसाचें प्राशन, रुचिकर मिष्टान्न परमस्वच्छ मलवर्जित द्राक्षारस यांचें भोजन करील. ७ आणि जें आच्छादन सर्व लोकांवर पसरिलें आहे, त्याच्या विस्ताराला आणि सर्व राष्ट्रांवर जो पदर व्याप्त आहे, त्याला तो या पर्वतावर नाशीसा करील. ८ तो मरणाचा सत्यनाश करील, आणि प्रभु परमेश्वर सर्व मुखांवरील आसवें पुसील, आणि आपल्या लोकांची निंदा सर्व पृथ्वीवरून दूर करील; कां कीं परमेश्वर असें बोलला आहे.

९ त्या दिवसीं ह्मणतील, पाहा, आमचा देव हाच आहे, आह्मी याची वाट पाहिली आहे, आणि हा आह्माला तारील, हा परमेश्वर आहे, आह्मी याची वाट पाहिली आहे, याच्या तारणाविषयीं आह्मी उल्हास व आनंद करूं. १० कारण कीं परमेश्वराचा हात या पर्वतावर राहील, आणि तो मोवाबाला आपल्याखालीं तुडवील, जसें उकरड्यावर गवत तुडवितात तसा; ११ आणि जसा पोंहणारा पोंहायासाठीं आपले हात पसरितो, तसा तो त्यामध्यें आपले हात पसरील, आणि त्यांचा गर्व त्यांच्या हातांच्या युक्तींसहित उतरील. १२ आणि तुझ्या कोटांच्या बुरुजांचें सुदृढस्थान तो पाडील, नीच करील, धुळीपर्यंत भुईस मिळवील.

## अध्याय २६.

त्या दिवसीं यहूदा देशांत हें गीत गातील;
आह्मांला सुदृढ नगर आहे, देव तारण
कोट व मोरचा असें करील. २ तुह्मी दरवाजे
उघडा, ह्मणजे जें न्यायीराष्ट्र खरेपण पाळितें तें
आंत जाईल. ३ **स्थिर** मनाला तूं पूर्ण समाधानानें
राखसील; कारण कीं तें तुजवर भाव ठेवितें. ४
तुह्मी सदासर्वकाल **परमेश्वरावर** भाव ठेवा;
कां कीं **प्रभु** जो **परमेश्वर** त्याच्या ठायीं सर्व-
काळचा आश्रय आहे. ५ तर उंचस्थानीं जे
वसतात, त्यांला तो भ्रष्ट करितो; उंचवस्ती नीच
करितो, तिला भूमीपर्यंत नीच करितो, तिला धु-
ळीस मिळवितो. ६ पाय, दरिद्र्यांचे पायच, दुर्ब-
ळांचीं पावलें तिला तुडवितील. ७ न्यायीचा मार्ग
प्रमाणिकपणच आहे; हे **परमप्रमाणिका**, तूं न्या-
यीची वाट नीट करितोस. ८ हे **परमेश्वरा**,
तुझ्या नेमांचा मार्ग धरून आह्मी तुझी वाट पाहिली
आहे; आमच्या जिवाची इच्छा तुझ्या नामाकडे
व तुझ्या स्मरणाकडे आहे. ९ रात्रीं मी आपल्या
जिवभावानें तुझी इच्छा धरिली आहे, पहांटेस-
हि मी आपल्या जीवात्म्यानें एकाग्रचित्तें तुला शो-
धीन; कां तर ज्योप्रमाणें तुझे नेम पृथ्वीवर अस-
तील, तदनुसार जगांतले राहणारे न्याय शिकतील,
१० दुष्टावर जरी कृपा केली, तरी तो न्याय शि-
कणार नाहीं; प्रमाणिकपणाच्या देशांत तो अध-
र्मानें वर्त्तेल, आणि **परमेश्वराचा** थोरपणा पाह-
णार नाहीं. ११ हे **परमेश्वरा**, जेव्हां तुझा
हात उंचावलेला आहे, तेव्हां ते पाहत नाहींत;
तर ते पाहतील, आणि तुझ्या लोकांविषयीं जो
तुझा आवेश त्यामुळें लज्जित होतील; होय,
आग तुझ्या शत्रूंस खाऊन टाकील.

१२ हे **परमेश्वरा**, तूं आह्मासाठीं शांति ठर-
विसील; कां तर आमचीं सर्वच कर्मे त्वां आह्मा-
साठीं घडविलीं आहेत. १३ हे **परमेश्वरा**
आमच्या देवा, तुजवांचून दुसऱ्या प्रभूंनी आह्मा-
वर धनीपण केलें आहे, तुझ्याजवळ मात्र आह्मी
तुझें नाम उच्चारूं. १४ ते मेलेले आहेत, जी-
वंत नाहींत; ते प्रेत आहेत, उठत नाहींत; याक-
रितां तूं त्यांस दंड करून नाश करसील; त्यांची
आठवण अगदीं नाहींसी करसील. १५ हे **परमे-
श्वरा**, त्वां राष्ट्र वाढविलें आहे, त्वां राष्ट्र वाढविलें
आहे; तूं गौरविला आहेस, भूमीच्या सर्व सीमा
त्वां दूर दूर केल्या आहेत. १६ हे **परमेश्वरा**,
संकटसमयीं त्यानी तुजकडे मन लाविलें; तुझी शिक्षा
त्यांजवर असतां त्यानी प्रार्थना केली. १७ जसी
गरोदर स्त्री प्रसूतीची वेळ जवळ आली असतां
वेणा देती, आपल्या तिडकांमध्यें ओरडती, तसे
हे **परमेश्वरा**, आह्मी तुझ्या दृष्टींत झालों. १८
आह्मी गरोदर होतों, आह्मी वेणा दिल्ह्या, आह्मी
जणू वारा असें फळ प्रसवलों, पृथ्वींत आह्मी कां-
हीं तारण केलें नाहीं, आणि जगांतले राहणारे
पडले नाहींत. १९ तुझे मेलेले जीवंत होतील;
माझ्या प्रेतासहित उठतील; अहो धुळींतल्या रा-
हणाऱ्यानों, जागे होऊन उत्सव करा; कारण कीं
तुझें दहिंवर हिरवळीच्या दहिंवरासारिखें आहे,
आणि पृथ्वी प्रेतांला बाहेर पाडील.

२० माझ्या लोकानों, तुह्मी आपल्या खोल्यांत
जाऊन, आपण आंत राहून, आपले दरवाजे बंद
करा; क्रोध टळेपर्यंत थोडा वेळ लपा. २१
कां कीं पाहा, पृथ्वींतल्या राहणाऱ्यांस त्यांच्या
अन्यायामुळें दंडायास **परमेश्वर** आपल्या स्था-
नांतून निघतो; तेव्हां पृथ्वी आपणांतलें रक्त प्रगट
करील, आणि आपणांतल्या वधलेल्यांस पुढें गुप्त
राहूं देणार नाहीं.

## अध्याय २७.

त्या दिवसीं चपलसर्प जो **लिव्याथान**, वळ-
वळता सर्प जो **लिव्याथान** त्याजला **पर-
मेश्वर** आपल्या कठोर व मोठ्या व बळकट तर-
वारीनें दंडील, आणि समुद्रामध्यें जो मगर आहे
त्याला मारील. २ त्या दिवसीं तांबड्या रसाच्या
द्राक्षींचा जो मळा त्याविषयीं तुह्मी गा. ३ मी
**परमेश्वर** तो नेहमी राखितों; मी तो शिंपितों,
त्याला कोणी उपद्रव करूं नये ह्मणून रात्रंदिवस
त्याला राखीत जाईन. ४ माझ्या ठायीं क्रोध
नाहीं; लढाईंत मजपुढें कांट्यांचीं झाडें व कांटेरीं
झाडें कोण ठेवील? त्यांजवर झपाटा मारीन;
एकाएकीं तीं जाळीन. ५ अथवा त्यानें माझा
आश्रय धरावा, त्यानें मसीं समेट करावा, समेट

मसीं करावा. ६ जे येतात त्यांतून याकोब मु-
ळावेल, इस्राएल फुलेल, व विकसेल; तेव्हां ते
जगाची पाठ फळांनी भरितील.
७ त्याने त्याच्या हाणणाऱ्यांच्या हाणण्याप्रमाणें
त्याला हाणिलें आहे काय? तो त्याच्या वधलेल्यांच्या
वधाप्रमाणें वधला आहे काय? ८ तूं तिला टाकीत
असतांना, तिजसीं हळू हळू विवाद करितोस,
पूर्वेच्या वाऱ्याच्या दिवसीं तो आपला प्रचंड वारा
दूर करितो. ९ याकरितां येणेंकरून याकोबाचा
अन्याय दूर होईल, आणि त्याचें पाप दूर करणें
हेंच सर्व फळ आहे, जेव्हां तो वेदीचे सर्व दगड
खडूच्या ठेंचलेल्या धोंड्यांसारिखे करील, तेव्हां
पुतळे व मूर्त्ति हीं उभीं राहणार नाहींत. १०
कारण कीं गांवकुसवी नगर ओसाड पडेल, वस्ति
जंगलासारिखी उजाड होईल, वासरूं तेथें चरेल
व तेथें बसेल, आणि त्याच्या खांद्या खाऊन टा-
कील. ११ त्याच्या डाहळ्या सुकतील, तेव्हां
लोक तोडतील, स्त्रिया येऊन त्यांला जाळितील;
कां तर हे लोक बुद्धिवान नाहींत, ह्मणून यांचा
उत्पन्नकरणारा यांवर दया करणार नाहीं, आणि
यांचा निर्माण कर्त्ता यांवर कृपा करणार नाहीं.
१२ आणि त्या समयीं असें होईल, कीं फरा-
तेच्या प्रवाहापासून मिसराच्या नदीपर्यंत परमे-
श्वर पिटील; तेव्हां इस्राएलाच्या संतांना, तुह्मा
एकएकाला आटपून घेईल. १३ आणि त्या समयीं
असें होईल, कीं मोठा करणा वाजेल, तेव्हां जे
अश्शूर देशामध्यें नाशाच्या लागास आलेले ते,
आणि मिसर देशांत जे घालविलेले ते येतील,
आणि यरूशालेमेस पवित्र पर्वतावर परमेश्वरा-
ला भजतील.

## अध्याय २८.

एफ्राइमाचे मद्यपी यांच्या गर्वाचा मुगुट याला
हाय हाय; ज्यांचा सुशोभित सुंदरपणा सुक-
लेलें फूलच आहे, जे द्राक्षारसाने माजलेले अस-
तांना पिकाऊ खोऱ्याच्या वरील प्रदेशावर आहेत
त्यांस हाय हाय. २ पाहा, प्रभूजवळ एक सु-
दृढ बलवान आहे, तो गारांच्या पाउसाप्रमाणें,
नाश करणाऱ्या वादळाप्रमाणें, मोठ्या व्यापणाऱ्या
पाण्यांच्या पुराप्रमाणें भूमीवर हाताने पाडील.
३ एफ्राइमाचे मद्यपी यांचा गौरवाचा मुगुट पा-
यांनी तुडवितील. ४ आणि पिकाऊ खोऱ्याच्या
वरील प्रदेशावर जो आहे, त्याचा सुशोभित सुं-
दरपणा सुकलेलें फुलच होईल, जसा उन्हाळ्या-
पूर्वीं आगसलेला अंजीर ज्याकडे पाहणारा दृष्टि
लावितो, तो त्याच्या हातांतल्या हातांत एथपर्यंत
असताच, तो त्याला गिळितो तसा.
५ त्या वेळीं सैन्यांचा परमेश्वर आपल्या लो-
कांच्या शेषाला सुंदरपणाचा मुगुट, व सुशोभित
शिरोवेष्टन असा होईल, ६ आणि जो न्याया-
धीशीच्या कामावर बसतो, त्याला न्यायाचा आ-
त्मा; आणि जे लढाई दरवाज्याकडे फिरवून
निवारितात, त्यांला पराक्रम असा होईल.
७ तर तेहि द्राक्षारसाने मस्त आहेत, मद्याने
बहकले आहेत; याजक आणि भविष्यवादी म-
द्याने भ्रांत आहेत, ते द्राक्षारसग्रस्त आहेत, म-
द्याने बहकले आहेत, दर्शनांत भ्रमतात, न्याया-
धीशींत अडखळतात. ८ कारण कीं सगळीं मेजें
ओक व मळ यांनी भरलीं आहेत; कांहीं निर्मल
जागा नाहीं.
९ कोणत्याला तो ज्ञान शिकवील? आणि
कोणत्याला विद्या समजवील? जे दुधापासून दूर
केलेले, जे थानांपासून सुटलेले त्यांला काय?
१० कां तर नेमावर नेम, नेमावर नेम; ओळीवर
ओळ, ओळीवर ओळ; एथें थोडें, तेथें थोडें, असें
असावें लागतें; ११ कारण कीं बोबड्या ओंठांनी,
आणि अन्यभाषेने तो या लोकांस बोलेल. १२
त्यांस तो ह्मणाला, हाच विसावा आहे, दमलेला
विसावा घेई असें करा, आणि हेंच विसाव्याचें
स्थान आहे; परंतु ते ऐकेनात. १३ आणि पर-
मेश्वराची गोष्ट नेमावर नेम, नेमावर नेम; ओ-
ळीवर ओळ, ओळीवर ओळ; एथें थोडी, तेथें
थोडी, असी त्यांला होती; अशासाठीं कीं त्यांनीं
जावें, व मागें पडावें, व मोडकळीस यावें, व गुंतावें,
व सांपडावें.
१४ याकरितां अहो थट्टेखोर मनुष्यांनो, जे
तुह्मी हे जे लोक यरूशालेमेंत आहेत, यांवर
धनीपण करितां, ते तुह्मी परमेश्वराचें वचन
ऐका. १५ तुह्मी ह्मणालां आहां, कीं आह्मी
मरणासीं करार केला, आणि मृतलोकासीं संकेत

केला आहे; जेव्हां व्यापकदंड पार येईल, तेव्हां
तो आह्माजवळ येणार नाहीं, कारण कीं आह्मी
लबाडीचा आश्रय धरिला आहे, आणि खोटेपणा
खालीं आह्मी लपालों आहों;
१६ याकरितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
मी झीयोनेंत आधारासाठीं दगड, पारखलेला दगड,
अमोलिक कोंपऱ्याचा दगड स्थिर पाया घालितों,
जो विश्वासेल, तो घाबरणार नाहीं. १७ आणि
दोरीला नीति व ओळंब्याला न्याय लावीन, तेव्हां
गारांचा पाऊस लबाडीच्या आश्रयाला झाडून
उडवील, आणि पाण्यें लपण्याच्या ठिकाणावर
वाहतील.
१८ आणि मरणासीं जो तुमचा करार तो मो-
डून जाईल, व मृतलोकासीं जो तुमचा संकेत तो
ठरणार नाहीं; जेव्हां व्यापकदंड पार येईल, ते-
व्हां तो तुह्मास तुडवून टाकील. १९ जेव्हां
कधीं तो पार येईल, तेव्हां तुह्माला लागेल; कां
कीं प्रत्येक सकाळीं दिवसा रात्रीं तो पार येईल,
आणि केवळ वर्त्तमान समजणें भयंकर होईल.
२० कां तर खाट पाय पसरायाला न पुरे, एवढी
आखूड आहे, आणि पासोडी पांघरायाला नयेई,
एवढी अरुंद आहे. २१ कां कीं जसा परा-
जीम पर्वतांत तसा **परमेश्वर** उभा राहील, जसा
गिबोनाच्या खोऱ्यांत तसा क्रोधयुक्त होईल, आ-
पलें कार्य, आपलें अपूर्व कार्य करायाला आपला
व्यवहार, आपला अपूर्व व्यवहार साधायाला.
२२ तर तुमचीं बंधनें घट्ट होऊं नयेत, ह्मणून
आतां निंदूं नका; कारण कीं नाश सर्व पृथ्वीविष-
यीं ठरलेला नाश सैन्यांचा **परमेश्वर प्रभु** या-
पासून म्या ऐकिला आहे.
२३ तुह्मी कान देऊन माझा शब्द ऐका, पारिसून
माझें वचन ऐका. २४ शेतकरी पेरणी कराया-
साठीं सर्व दिवस नांगरतो काय? तो आपली
भूमि उखळितो, व गुठावतो कीं काय? २५
त्याने तिची पाठ सपाट केली असतां तो तूर टा-
कित नाहीं, व जिरें पखरीत नाहीं काय? आणि
त्या त्याच्या ठिकाणीं गहूं व नेमिलेला जव व देव-
गोधूम गोधून पेरीत नाहीं काय? २६ कां तर त्या-
चा देव हें त्याला शुद्ध समजावितो, आणि शिक-
वितो. २७ तर यंत्राने तूर मळीत नाहींत, आणि
जिऱ्यावर गाडीचें चाक फिरवीत नाहीं, परंतु तूर
काठीने झोडितात, आणि जिरें दंडाने झोडितात.
२८ भाकरीचें धान्य दळितात; कारण कीं तें
त्याला पुरतेपणें तुडवितां येत नाहीं; जरी त्याने
आपल्या गाडीचें चाक व आपले घोडेस्वार त्याव-
रून हाकिले तरी त्यांकडून त्याच्याने तें दळवत
नाहीं. २९ जो सैन्यांचा **परमेश्वर** विचारांत आ-
श्चर्यवंत व कर्मांत श्रेष्ठ आहे, त्यापासून हेंहि निघतें.

## अध्याय २९.

अरीएलेस, अरीएलेस ज्या शहरांत दावीद रा-
हत असे, त्याला हाय हाय; वर्षाला वर्ष लावा,
सण फिरत फिरत येवोत. २ तरी मी अरीएलेला
पीडीन, तेव्हां शोक व खेद होतील, आणि मला
अरीएलेसारिखी होईल. ३ आणि तुजभोंवता
घेरा घालीन, आणि मोरचा लावून तुला वेढीन,
आणि तुजविरुद्ध दुर्गं बांधीन. ४ तेव्हां तूं नीच
होसील, भूमींतून बोलसील, आणि तुझी वाणी
धुळींतून बुडबुडेल, आणि जसा भूतसंचारकाचा
तसा तुझा शब्द भूमींतून निघेल, आणि तुझी वाणी
धुळीतून मिणमिणेल. ५ आणि तुझे विदेशी
यांचा समुदाय बारिक धुळीसारिखा आणि क्रूरां-
चा समुदाय उडत्या भुंसासारिखा होईल, आणि
हें एकाएकीं पटकन घडेल. ६ आणि सैन्यांच्या
**परमेश्वराचा** गडगडाट व भूमिकंप व मोठा
शब्द, वाहटूळ व वादळ आणि नाशक अग्नीची
ज्वाला यांकडून तुला पीडील.
७ आणि जीं सर्व राष्ट्रें अरीएलेवर लढतात,
तिजवर व तिच्या दुर्गांवर जे लढतात, आणि जे
तिला पीडितात, त्यांचा समुदाय रात्रींतल्या दर्श-
नस्वप्नासारिखा होईल. ८ आणि असें होईल,
कीं जसा भुकेला स्वप्न पाहतो, तेव्हां पाहा तो
त्यांत खातो, परंतु जागा झाला असतां त्याचा
जीव अतृप्त आहे; अथवा तान्हेला स्वप्न पाहतो,
तेव्हां पाहा, तो त्यांत पितो, परंतु जागा झाला
असतां पाहा, तो कासावीस आहे, व त्याचा जीव
व्याकुल आहे, तसा जीं सर्व राष्ट्रें झीयोनपर्वता-
विरुद्ध लढतात, त्यांचा समुदाय होईल.
९ उभे राहा, व आश्चर्य माना, विस्मित व
चकित व्हा, ते मस्त आहेत, परंतु द्राक्षारसाने

नाहींत, ते झोंकतात, परंतु मद्याने नाहींत. १०
तर तुह्मामध्यें परमेश्वराने झोंपेचा स्वभाव घा-
तला आहे, आणि तुमचे डोळे झांकिले आहेत,
भविष्यवादी व तुमचे मुख्यजन व दर्शविणारे यांस
त्याने आच्छादिलें आहे. ११ आणि तुह्माला
सर्वांचें दर्शन शिक्का मारलेल्या पुस्तकाच्या शब्दां-
सारिखें झालें आहे, जें पुस्तक वाचणाऱ्याजवळ
देऊन कोणी ह्मणतात, त्वां हें वाचावें; तेव्हां तो
ह्मणतो, माझ्याने हें वाचवत नाहीं, कां कीं शिक्का
मारलेलें आहे. १२ मग जो पुस्तक वाचणारा
नाहीं, त्याजवळ कोणी तें पुस्तक देऊन ह्मणतो, कीं
त्वां हें वाचावें, तेव्हां तो ह्मणतो, मी पुस्तक वाच-
णारा नाहीं.

१३ आणि प्रभु ह्मणतो, हे लोक आपल्या
मुखाच्या शब्दाने जवळ येतात, आणि आपल्या
ओंठानीं माझे मान करितात, परंतु त्यांचें हृदय
मजपासून दूर आहे, आणि मजविषयीं जी भीति
धरितात, ती मनुष्यांच्या आज्ञेने शिकविलेली
आहे; १४ याजकरितां पाहा, मी या लोकां-
जवळ अणखी फार आश्चर्याचें कर्म व अद्भुतकर्म
करीन, तेव्हां त्यांच्या ज्ञान्यांची बुद्धि नाहींसी हो-
ईल, आणि त्यांच्या विवेक्यांचा विवेक गुप्त हो-
ईल. १५ जे परमेश्वरापासून लपवावी, ह्मणून
आपली मसलत खोल करितात, आणि ज्यांचीं
कर्मे अंधारांत असतात, आणि जे ह्मणतात, आ-
ह्माला कोण पाहतो, आणि कोण आह्माला जा-
णतो? त्यांस हाय हाय. १६ अहा, तुमचें वां-
कडेपण कुंभाराच्या मातीप्रमाणें मानितील; कर्म
आपल्या कर्त्याविषयीं, त्याने मला केलें नाहीं, असें
ह्मणेल कीं काय? आणि निर्मित आपल्या निर्माण-
कर्त्याविषयीं, तो कांहीं समजत नाहीं, असें ह्म-
णेल कीं काय? १७ अणखी थोडा थोडा वेळ
नाहीं काय, तेव्हां लबानोन पालटून पिकाऊ
भूमि होईल, आणि पिकाऊ भूमि रानासारिखी
मानितील?

१८ आणि त्यावेळीं बहिरे पुस्तकांतलीं वाक्यें
ऐकतील, आणि आंधळ्यांचे डोळे काळोखांतून व
अंधारांतून पाहतील. १९ आणि परमेश्वरा-
विषयीं दरिद्री आपला हर्ष वाढवितील, आणि
मनुष्यांतले गरीब इस्राएलाच्या पवित्राविषयीं
उल्लासतील. २० कारण कीं बलात्कारी नाहींसा
झाला, आणि निंदक नाश पावला आहे, आणि
सर्व जे अन्यायाला जागतात, ते नाहींसे झाले
आहेत. २१ जे शब्दामुळें मनुष्याला दोषी
ठरवितात, आणि जो वेशींत निषेध करितो, त्याला
पाश मांडितात, आणि न्यायीला एरव्हींच एकी-
कडे सारितात ते. २२ याकरितां ज्या परमे-
श्वराने आब्राहामाला उद्धरिलें, तो याकोबाच्या
घराण्याविषयीं ह्मणतो, कीं आतां याकोब लाज-
णार नाहीं, आणि त्याचें तोंड आतां पांढरें हो-
णार नाहीं. २३ परंतु जेव्हां तो आपलीं लेंकरें
जीं माझ्या हातांचें कर्मच आहेत, तीं आपल्या-
मध्यें पाहील, तेव्हां तीं माझें नाम पवित्र मानि-
तील, आणि याकोबाच्या पवित्राला पवित्र मानि-
तील, आणि इस्राएलाच्या देवाला भितील. २४
तेव्हां जे भ्रांत आत्म्याचे ते बुद्धि पावतील, आणि
जे गुरमळतात, ते विद्या शिकतील.

## अध्याय ३०.

परमेश्वर ह्मणतो, जे पापाला पाप लावायाक-
रितां मजवांचून मसलत करितात, आणि मा-
झ्या आत्म्यावांचून करार ठरवितात, त्या फितुरी
लेंकरांस हाय हाय; २ जे फारोच्या बळानें
बलवान होण्याकरितां आणि मिसराच्या छायेंत
आश्रय पावण्याकरितां मला न विचारून मिस-
रांत उतरायाला सिद्ध होतात त्यांस हाय हाय.
३ तर फारोचें बल तुह्माला लाजेचेंकारण आणि
मिसराच्या छायेंत आश्रय पावणें हें अप्रतिष्ठेचें
कारण होईल. ४ तर त्याचे अधिकारी जवानेंत
होते, आणि त्याचे दूत हानेसेला पोहंचले. ५
ज्या लोकांच्याने त्यांचें हित करवत नाहीं, जे
सहायासाठीं व हितासाठीं नव्हते, परंतु लाजे-
साठीं व निंदेसाठीं होते, त्यांविषयीं ते सर्व ल-
ज्जित झाले. ६ दक्षिणेंतल्या पशूंविषयींचा प्र-
वाद; ज्या कष्टांच्या व संकटांच्या भूमींत धाकला
व मोठा सिंह, फुरसें व जळता उडता सर्प उत्पन्न
होतात, तींत जे लोक त्यांचें हित करणार नाहींत,
त्यांकडे ते आपलें धन गाढवांच्या खांद्यांवर व
आपलें द्रव्य उंटांच्या पाठीवर घालून वाहतील.
७ आणि मिसरी निरर्थक व फुकट सहाय करि-

तील, याकरितां मी याविषयीं मोठ्याने बोललों
आहें, कीं जे मिसरी ते स्वस्थ बसलेले आहेत.
८ आतां तूं त्यांजवळ जाऊन हें पाटीवर लि-
हि, आणि धातुपत्रावर कोर, ह्मणजे पुढल्या वेळा-
पर्यंत सदासर्वकालपर्यंत हें राहील; ९ कीं हे
स्वतंत्र लोक, लटकें बोलणारीं लेंकरें आहेत, जे
**परमेश्वराचें** नेमशास्त्र ऐकायाला मान्य नाहींत,
असीं लेंकरें आहेत; १० जे दर्शविणाऱ्यास ह्मण-
तात, पाहूं नका; आणि भविष्यवाद्यांस आह्माजवळ
प्रमाणिक गोष्टी भविष्य सांगूं नका; आह्माला गोड
गोष्टी बोला, ठकविण्याच्या गोष्टी सांगा, ११
मार्गापासून सरा, वाटेंतून एकीकडे वळा, इस्राए-
लाचा **पवित्र** आमच्यासमोरून नाहींसा होई,
असें करा. १२ याकरितां इस्राएलाचा **पवित्र**
ह्मणतो, कीं तुह्मी हें वचन अवमानून बलात्कार
व कुटिलाचार यांवर भाव ठेवितां, आणि यांवर
टेंकितां; १३ ह्मणून तुह्माला हा अन्याय जें
झोंकणारें भगाड उंच भिंतीपासून तोलतें, ज्याचें
कोसळणें अकस्मात पटकन होतें, त्यासारिखा हो-
ईल. १४ आणि कुंभाराच्या मडक्याच्या फुट-
ण्याप्रमाणें तो तिला फोडील, जें ठेंचून तो कांहीं
राखून ठेवीत नाहीं, आणि त्याच्या फोडींत चुलीं-
तून विस्तव घ्यावयास अथवा डबकींतून पाणी
उपसायास खापरीहि सांपडत नाहीं. १५ तर
**प्रभु परमेश्वर** इस्राएलाचा **पवित्र** ह्मणतो,
कीं फिराल व स्वस्थ राहाल तर ताराल, आणि
शांति व भाव धरिला असतां तुमचें सामर्थ्य हो-
ईल, परंतु तुह्मी ऐकाना. १६ आणि तुह्मी,
नाहीं, ह्मटलें; परंतु आह्मी घोड्यांवर बसून पळूं,
ह्मणून तुह्माला पळावें लागेल; आणि चपळ
घोड्यांवर बसूं; यामुळें जे तुमच्या पाठीस लाग-
तील ते चपळ होतील. १७ एकाच्या धमकीनें
एक हजार पळतील, पांचा जणांच्या धमकीनें
तुह्मी पळाल, पर्वताच्या शिखरावरच्या ढालकाठी-
सारिखे अथवा डोंगरावरच्या झेंड्यासारिखे तुह्मी
उरा तोंपर्यंत.
१८ तर याकरितां **परमेश्वर** तुह्मावर कृपा
करायाला वाट पाहील, आणि यामुळें तो तुह्मा-
वर दया करायाला उंचावेल; कारण कीं **परमे-
श्वर** न्यायाचा देव आहे, सर्व जे त्याची वाट
पाहतात, ते धन्य आहेत. १९ तर लोक सी-
योनेंत यरूशालेमेस राहतील, तूं अणखी रडणार
नाहींस, तो तुझ्या आरोळीचा शब्द ऐकून तुजवर
फार कृपा करील, तो ऐकतांच तुला उत्तर देईल.
२० जरी **परमेश्वर** तुह्माला संकटाची भाकर
व हालाचें पाणी देईल, तरी तुझे शिकविणार
पुन्हा लपणार नाहींत, परंतु तुझे डोळे तुझ्या शि-
कविणाऱ्यांस पाहतील; २१ आणि जेव्हां तुह्मी
उजव्याकडे अथवा डाव्याकडे वळूं लागाल, ते-
व्हां तुझे कान तुजमागून असा येणारा शब्द ऐक-
तील, कीं हाच मार्ग आहे, यांत तुह्मी चालत
जा. २२ आणि तुह्मी आपल्या रुप्याच्या को-
रींव मूर्तींचा मुलामा आणि आपल्या सोन्याच्या
ओतींव मूर्तींची मढवणी यांचा वीट मानाल, तूं
त्यांला रजस्वलेप्रमाणें घालविसील, निघून जा,
असें त्याला ह्मणसील. २३ आणि जेव्हां तूं
भूमि पेरिसील तेव्हां तो तुझ्या पेरणीवर पाऊस
पाडील, आणि भूमीच्या उपजांचें अन्न देईल,
आणि तें सफळ व आबादान होईल, तेव्हां तुम-
चीं गुरें मोठ्या कुरणांत चरतील. २४ आणि
जे बैल व गाढव भूमीला नांगरतात, ते जें सुपा-
ने पाखडलेलें व वारावलेलें तें आंबवण खातील.
२५ आणि पुष्कळ मारण्याच्या दिवसीं जेव्हां
दुर्गे पडतील, तेव्हां प्रत्येक उंच पर्वतावर व प्रत्येक
उंच डोंगरावर पाण्याचे ओघ व ओघळ होतील.
२६ अणखी जेव्हां **परमेश्वर** आपल्या लोकांचा
भंग नीट बांधील, आणि त्यांच्या क्षताची जखम
बरी करील, तेव्हां चंद्राचा प्रकाश सूर्याच्या प्रका-
काशाप्रमाणें होईल, आणि सूर्याचा प्रकाश सात-
पट जसा सात दिवसांचा प्रकाश तसा होईल.
२७ पाहा, **परमेश्वराचें** नाम त्याच्या क्रो-
धानें व जाळाच्या वेगानें दुरून जळत येतें, त्याचे
ओंठ क्रोधानें भरले आहेत, आणि त्याची जीभ
जळत्या अग्नीसारिखी आहे. २८ आणि त्याचा
श्वास हालाच्या सुपानें राष्ट्रांस पाखडायाला पूर
आलेल्या नदीप्रमाणें मानेच्या मध्यभागीं लागेल,
आणि लोकांच्या तोंडामध्यें बहकविणारा लगाम
असा होईल. २९ जसें सण पाळण्याच्या रा-
त्रीस तसें तुह्माला गीत होईल; आणि जो **पर-
मेश्वराच्या** पर्वतावर इस्राएलाच्या **समर्थाक**-

वळ जायास पोंवा वाजवीत चालतो, त्याच्यासा-
रिखा तुमचा हर्ष होईल. ३० आणि परमे-
श्वर आपल्या प्रभावाचा शब्द ऐकूं जाऊं देईल,
आणि क्रोधाचा क्षोभ व जाळती अग्निज्वाला उड-
वणी व पर्जन्य व गारा यांकडून तो आपल्या भु-
जाचा झपाटा दाखवील. ३१ तर परमेश्वरा-
च्या शब्दामुळें अश्शूर खिन्न होईल, तो काठीनें
हाणील. ३२ आणि नेमिलेल्या काठीचा जो
प्रत्येक झपाटा परमेश्वर त्याजवर लावील, तो
डफ, व सारंग्या वाजतांना होईल, आणि तुमच्या
लढायांत तो तिने लढेल. ३३ तर पुरातनकाळीं
तोफेतें सिद्ध झालें, होय, तें राजासाठीं सिद्ध
झालें आहे, तें त्यानें खोल व मोठें केलें आहे;
त्याचें सरण आग लावलेल्या बहुत लांकडाचें
आहे, आणि परमेश्वराचा श्वास गंधकाच्या प्र-
वाहासारिखा त्याला पेटवितो.

## अध्याय ३१.

जे सहायासाठीं मिसरांत उतरत जातात,
आणि घोड्यांवर टेंकतात, आणि रथ बहुत
आहेत, ह्मणून त्यांजवर, आणि घोडेस्वार फार
पराक्रमी आहेत, ह्मणून त्यांजवर भाव ठेवितात,
आणि इस्राएलाच्या पवित्राकडे मन लावीत ना-
हींत, आणि परमेश्वराला शोधीत नाहींत, त्यांस
हाय हाय. २ तथापि तो ज्ञानी आहे, आणि
अरिष्ट येई असें करील, आणि आपलीं वचनें
टळूं देणार नाहीं; परंतु दुष्कर्म्यांच्या वंशावर व
अन्याय करणाऱ्याच्या सहायाविरुद्ध उठेल. ३
तर मिसरी मनुष्यें आहेत, देव नव्हत, आणि
त्यांचे घोडे देह आहेत, आत्मा नव्हत, परमे-
श्वर जेव्हां आपला हात लांबवील तेव्हां सहाय
करणारा अडखळेल, आणि ज्याचें सहाय केलें
आहे तो पडेल, आणि ते सर्व मिळून नाहींसे
होतील. ४ तर परमेश्वरानें मला सांगितलें
आहे, कीं जसा सिंह किंवा तरुण सिंह आपल्या
आहारावर गाजतांना त्याजवर गोपालांचा समु-
दाय बोलावून आणिला असताहि त्यांच्या शब्दानें
तो भयभीत होत नाहीं, आणि त्यांच्या कोलाह-
लानें दबत नाहीं, तसा सैन्यांचा परमेश्वर सी-
योन पर्वतासाठीं व त्याच्या डोंगरासाठीं लढायाला
उतरेल. ५ जसीं उडणारीं पांखरें तसा सैन्यांचा
परमेश्वर यरूशालेमेस आवरील, आणि आ-
वरून सोडवील, आणि रक्षून तारील.
६ ज्यापासून इस्राएलाचीं संतानें फार फित-
लीं आहेत त्याजकडे तुह्मी फिरा. ७ तर त्या
वेळेस ते प्रत्येक आपल्या रुप्याच्या मूर्त्ति आणि
आपल्या सोन्याच्या मूर्त्ति ज्या तुमच्या हातानीं
तुह्मासाठीं पाप घडावें, ह्मणून निर्माण केल्या, त्या
टाकितील.
८ आणि जी तरवार थोर मनुष्याची नव्हे,
तिनें अश्शूर पडेल, आणि जी तरवार नीच मनु-
ष्याची नव्हे, ती त्याला नाहींसें करील, तेव्हां तो
तरवारीपासून पळेल, आणि त्याचे तरुणपुरुष
हात पाय गाळून पडतील. ९ आणि भयामुळें
तो आपल्या पर्वताच्या दुर्गांत जाईल, आणि झें-
ड्याकरितां त्याचे अधिकारी भयाभीत होतील,
असें परमेश्वर ह्मणतो, ज्याचा अग्नि सीयोनेंत
व ज्याची भट्टी यरूशालेमेंत आहे तो.

## अध्याय ३२.

पाहा, एक राजा न्यायानें राज्य करील, आणि
अधिकारी नीतीनें अधिकार करितील. २
आणि वाऱ्यापासून शरण, व पर्जन्यापासून आ-
च्छादन एक मनुष्य होईल, सुक्या भूमींत जसे
पाण्याचे ओघळ, रूक्ष देशांत जसी मोठे पर्वताची
छाया तसा होईल. ३ आणि पाहणाऱ्याचे डोळे
मंद होणार नाहींत, आणि ऐकणाऱ्याचे कान ऐक-
तील. ४ आणि उतावळ्यांचें मन ज्ञानाचा विवेक
करील, आणि बोबड्यांची जीभ त्वरेनें स्पष्ट बो-
लेल. ५ जो अधार्मिक त्यास फिरून सुजन
असें ह्मणणार नाहींत, आणि कृपण यास उदार
असें ह्मणणार नाहींत. ६ कारण कीं अधार्मिक
दुष्टता बोलेल, आणि त्याचें मन अधर्म आचराया
ला व परमेश्वराविषयीं पाखंड बोलायाला व
भुकेल्याचा जीव शून्य करायाला अन्याय करील,
आणि तान्हेल्यांचें पाणी तो काढील. ७ आणि
कृपणाचे उपाय दुष्ट आहेत, तो खोट्यावाक्यानीं
दरिद्र्यांस बुडवायाला दुष्ट संकल्प योजितो, जेव्हां
दरिद्री न्याय बोलतो तेव्हांहि. ८ परंतु उदार

उदारपणाच्या गोष्टी योजितो, आणि उदारपणाच्या
गोष्टींनी तो स्थिर राहील.
९ **अहो** स्वस्थ राहणाऱ्या स्त्रियानो, उठा;
माझा शब्द ऐका, निश्चिंत कन्यानो; माझ्या वच-
नाकडे कान द्या. १० **निश्चिंत** स्त्रियानो, तुह्मी
बहुत दिवस वर्षपर्यंत व्याकुळ व्हाल, कारण कीं
द्राक्षीचा उपज थकेल, गोळा करणें येणार नाहीं.
११ **स्वस्थ** राहणाऱ्या स्त्रियानो, कांपा; निश्चिं-
तानो, व्याकुल व्हा; वस्त्र काढा, आणि उघड्या
होऊन गोणताटानें कंबर बांधा. १२ रम्य शेतां-
करितां व पिकाऊ द्राक्षेकरितां त्या आपले स्तन
बडवितील. १३ **माझ्या** लोकांच्या भूमीवर
कांटेरीं झाडें व कांट्यांचीं झाडें रुझतील; होय,
उल्लासी वस्तींतल्या सर्व आनंदाच्या घरांवर रुझ-
तील. १४ **कारण** कीं मंदिर सोडून जातील,
नगरांतल्या समुदायाला टाकून जातील, कोट व दुर्गे
सर्वकालपर्यंत कपारें असीं होतील, तीं रानांतील
गाढवांच्या आनंदासाठीं व कळपांच्या चरण्या-
साठीं होतील, १५ **आह्मावर** आत्मा वरतून
उतरेपर्यंत असें होईल, मग रान पिकाऊ शेत
असें होईल, आणि पिकाऊ शेत वन असें मानि-
तील. १६ तेव्हां नीति रानांत राहील, आणि
न्याय पिकाऊ शेतांत वस्ती करील. १७ **आणि**
न्यायाचें कर्म कुशल व न्यायाचें फळ स्वस्थपण
व समाधान सर्वकाळपर्यंत होईल. १८ **आणि**
माझे लोक कुशलाच्या वस्तींत आणि निर्भय निवा-
सांत आणि समाधानांच्या विसाव्याच्या स्थानांत
राहतील. १९ जेव्हां वनाच्या उतरवणांत गारा
पडतील, आणि नीचतेने नगर नीच होईल तेव्हां.
२० बैल व गाढव यांचे पाय चालवून जे तुह्मी
सर्व पाण्यांजवळ पेरितां, ते तुह्मी सुखी आहां.

## अध्याय ३३.

**जो** तूं लुटतोस, परंतु त्यांनी तुला लुटलें ना-
हीं, आणि तूं हरितोस, परंतु त्यांनी तुला
हरलें नाहीं, तर त्या तुला हाय हाय; जेव्हां लु-
टतां राहसील, तेव्हां तुला लुटतील, आणि हरण
समाप्त करिसील, तेव्हां तुला हरतील. २ **हे**
**परमेश्वरा**, आह्मावर कृपा कर, आह्मी तुझी वाट
पाहिली आहे, प्रत्येक सकाळीं तूं त्यांचा बाहु
हो, संकटाच्या समयीं आमचें तारणहि हो. ३
**गडबडीच्या** शब्दामुळें लोक पळाले, तूं उंचाव-
लास ह्मणून राष्ट्रें विखरून गेलीं. ४ **कुसरूड**
जसा संहार करितो, तसी तुमची लूट न्याश पावेल,
टोळांच्या हिकडे तिकडे उडण्याप्रमाणें तो त्यावर
उडेल. ५ **परमेश्वर** उंचावला आहे, कां कीं
तो उंचस्थानांत वसतो, नीति व न्याय यांकडून
त्यानें जीयोन भरली आहे. ६ **आणि** ज्ञान व
विद्या यांच्या सामर्थ्यांचें बल तुझ्या समयांचें सु-
रक्षण होईल, **परमेश्वराचें** भय हें त्यांचें द्रव्य
आहे. ७ **पाहा**, त्यांचे पराक्रमी बाहेर ओर-
डतील, कुशलाचे दूत फार रडतील. ८ **वाटा**
ओसाड पडल्या आहेत, वाटसरू होऊन राहिला
आहे, त्यानें करार मोडला आहे, नगरें तुच्छ मा-
निलीं आहेत, तो मनुष्याला मानीत नाहीं. ९
पृथ्वी उदास व ग्लान झाली आहे, लबानोन नि-
स्तेज व म्लान झाला आहे, **शारोन** जंगलासा-
रिखें झालें आहे, **बाशान** व **कार्मेल** आपलीं
फळें गाळितात. १० **परमेश्वर** ह्मणतो, मी
आतां उठेन, आतां उंचावेन, आतां उंच होईन.
११ **तुह्मी** सुकें गवत गर्भधारण कराल, धस प्रस-
वाल, तुमचा श्वास तुह्माला अग्नीप्रमाणें जाळील.
१२ **आणि** लोक चुन्याच्या भाजण्यासारिखे हो-
तील, जसीं तोडलेलीं कांटेरीं झाडें तसे ते अग्नींत
जळून जातील.
१३ **अहो** दूरच्यानो, जें म्या केलें तें ऐका;
आणि जवळच्यानो, माझें सामर्थ्य जाणा. १४
**जीयोनेंतले** पापी भयभीत आहेत, अधार्मिकांला
कांपरी सुटली आहे; आह्मांतला कोण जाळत्या
अग्नींत राहील? आह्मांतला कोण सर्वकाळच्या
जळण्यांत वस्ती करील? १५ **जो** न्यायानें
वर्त्ततो, व प्रमाणिकपणें बोलतो, बलात्काराच्या
लाभाला अव्हेरितो, लांच घेण्यापासून आपले
हात झाडितो, हिंसा ऐकूं नये ह्मणून आपले कान
झांकितो, आणि दुष्टता न पाहावी ह्मणून आपले
डोळे मिटतो, १६ **तो** उंच स्थानांत वसेल, पर्वतांचीं
निर्भयस्थलें त्याचें दुर्ग असीं होतील, त्याचें अन्न
त्याला मिळेल, त्याचें पाणी त्याला निश्चयें होईल.
१७ **राजा** आपल्या शोभेंत असतांना त्यास तुझे
डोळे पाहतील, ते दुरची भूमि पाहतील. १८

तुझें मन भय स्मरेल; लेखक कोठें? परी-
क्षक कोठें? जो दुर्ग गणितो तो कोठें? १९ उग्र
लोकांस ज्यांची बोली तुला न समजे एवढी गं-
भीर आहे, ज्यांची बोबडी भाषा तुला समजत
नाहीं, अशा लोकांस तूं पाहणार नाहींस. २०
आमच्या सभांची नगरी जी सीयोन तिला पाहा,
तुझे डोळे यरूशालेमेस स्वस्थपणाची वस्ती डेरा
जो पाडणार नाहींत, ज्याच्या खुंट्या कधीं उपट-
णार नाहींत, आणि ज्यांच्या दोऱ्यांतली कोणती-
हि तुटणार नाहीं, असें पाहतील. २१ कां तर
तेथें प्रभावाचा **परमेश्वर** आह्मांला मोठा ओघ
व नद्या आणि यांचें स्थान असा होईल, ज्या
त्यांत वल्ह्यांचें तारूं चालणार नाहीं, आणि मोठें
गलबत त्यांतून जाणार नाहीं. २२ कारण कीं
**परमेश्वर** आमचा न्यायाधीश, **परमेश्वर** आ-
मचा नेम करणारा, **परमेश्वर** आमचा राजा
आहे, तो आह्मांला तारील. २३ तुझे नाडे
फिटले आहेत, त्यांला आपली डोलकाठी बळकट
करवेना, त्यांच्याने सीड पसरवेना, तेव्हां मोठ्या
लुटीचा हार वांटिला, जे पांगळे त्यांनी लूट लुट-
ली. २४ आणि राहणारा मी रोगी असें ह्मण-
णार नाहीं, जे लोक त्यांत राहतात यांच्या अन्या-
याची क्षमा झाली आहे.

## अध्याय ३४.

अहो राष्ट्रांनो, ऐकायाला जवळ या; आणि
लोकांनो, कान द्या; पृथ्वी व तिचें भरणें
ऐको; जग व त्याजवर उपजलेले सर्व पदार्थ
ऐकोत. २ कारण कीं सर्व राष्ट्रांवर **परमेश्वर**
कोपलेला आहे आणि त्यांच्या सर्व सैन्यांवर तो
रागें भरलेला आहे, त्यांचा तो अति नाश
करील, वधास सोंपून देईल. ३ तेव्हां त्यांच्या
वधलेल्यांस बाहेर टाकून देतील, आणि त्यांच्या
मढ्यांची घाण चढेल, आणि त्यांच्या रक्तेंकरून
पर्वत विघरतील. ४ आणि आकाशांतलें सर्व
सैन्य गळून जाईल, आणि आकाश पत्राप्रमाणें
गुंडाळण्यांत येईल, आणि जसें द्राक्षीवरून पान
अथवा अंजीराच्या झाडावरून नासलेला अंजीर
गळतो, तसें त्याचें सर्व सैन्य गळून पडेल. ५
कां तर आकाशांत माझी तरवार भिजेल; पाहा,
ती शासनासाठीं अदोमावर आणि माझ्या शापा-
च्या लोकांवर उतरेल. ६ **परमेश्वराची** तर-
वार रक्तानें भरलेली आहे; ती चरबीनें, कोंकरें
व बोकड यांच्या रक्तानें, मेंढ्यांच्या गुडद्यांच्या
चरबीनें बुळबुळीत झालेली आहे कारण कीं
**परमेश्वरा**साठीं बोजरांत मोठा यज्ञ आणि
अदोम देशांत मोठा वध आहे. ७ तेव्हां त्यां-
संगतीं गेंडा आणि बैलांसंगतीं पोळ उतरतील,
आणि त्यांची भूमि रक्तानें भिजेल, आणि त्यांची
धूळ चरबीनें बुळबुळीत होईल. ८ कारण कीं
**परमेश्वराचा** सूड घेण्याचा दिवस आहे, सी-
योनेच्या विवादासाठीं फेड करण्याचें वर्ष आहे.
९ आणि त्याचे ओवळ पालटून डामर होतील,
आणि त्याची धूळ पालटून गंधक होईल, आणि
त्याची भूमि जळतें डामर असी होईल. १०
ती रात्रंदिवस विझणार नाहीं, सदासर्वकाल तिचा
धूर चढत जाईल, ती युगोयुग ओसाड राहील,
सर्वकालपर्यंत कोणी तिजवरून चालणार नाहीं.

११ आणि काथपक्षी व किंपोध पक्षी ती वतन
करून घेतील, आणि घुबड व डोमकावळा तींत
वसतील, आणि तो तिजवर शून्यपणाची दोरी व
ओसाडीचे दगड पसरून देईल. १२ आणि
जे त्यांनी राज्यांत बोलवावे, असे राजपुत्र तेथें
कोणी असणार नाहींत, आणि तिचे सर्व अधिका-
री नाहींसे होतील. १३ आणि तिच्या मंदिरांत
कांटेरीं झाडें, आणि तिच्या दुर्गांत विषकंटकांचीं
झाडें, आणि रिंगण्यांचीं झाडें रुझतील, आणि
ती अघोर जीवांची वस्ती, शहामृगाचें अंगण
असी होईल. १४ आणि तरस कोल्ह्यांसीं मि-
ळतील, आणि केशट आपल्या सोबत्याला आरो-
ळी करील, नक्तंचरहि तेथें स्वस्थ राहील, आ-
णि आपणासाठीं बिऱ्हाड पावेल. १५ तेथें सा-
पटोळी घर करील, आणि अंडीं घालील, आणि
पिलें काढून आपल्या आश्रयांत पाळील, गिधडि-
णीहि तेथें प्रत्येक आपापल्या सोबतिणीबरोबर
जमतील.

१६ **परमेश्वराच्या** पुस्तकांत शोधून वाचा,
त्यांतली एकहि उणी पडणार नाहीं, कोणी आप-
ल्या सोबतिणीवांचून राहणार नाहीं, कारण कीं
माझ्या मुखानें आज्ञा दिल्ही, आणि त्याच्या आ-

ल्याने त्याला एकवटलें आहे. १७ आणि त्यां-
साठीं त्याने पण पाडिला आहे, आणि त्यांसाठीं
त्याच्या हाताने ती दोरीने वांटिली आहे, ते ती
वतन करून सर्वकालपर्यंत भोगितील, आणि पि-
ढ्यानपिढ्या तींत वसतील.

## अध्याय ३५.

त्यांविषयीं रान व कोरडी भूमि आनंदतील,
आणि जंगल उल्लासेल, व कमळाप्रमाणें
फुलेल. २ तें फार फुलेल, आणि हर्ष व उत्सव
करीत उल्लासेल, लबानोनाचें गौरव आणि कार्मेल
व शारोन यांचें ऐश्वर्य त्याला मिळेल, ते परमे-
श्वराचें गौरव आमच्या देवाचें ऐश्वर्य पाहतील.
३ गळते हात बलयुक्त करा, लटपटीत गुडघे
बलवान करा. ४ जे घाबऱ्याहृदयाचे त्यांला
ह्मणा, कीं धैर्यवान असा, भिऊं नका, पाहा, तुम-
चा देव सूड उगवीत येईल, देव फेड करीत
येईल, तोच येऊन तुह्मांला तारील. ५ तेव्हां
आंधळ्याचे डोळे उघडतील, आणि बहिऱ्यांचे
कान मोकळे होतील. ६ आणि पांगळा हरिणा-
प्रमाणें उडी मारील, आणि मुक्याची जीभ गाईल,
कारण कीं रानांत पाण्यें आणि जंगलांत ओघळ
उतून निघतील. ७ मग सुकी भूमि तळें असी
होईल, आणि रुक्ष भूमि पाण्याचे झरे असी हो-
ईल, अघोर जीवांच्या वस्तींत त्यांच्या निजण्या-
च्या जाग्यांत बोरु व पयोधर यांसहित गवत
रुझेल. ८ आणि तेथें सडक वाट होईल, आ-
णि मार्ग तोहि पवित्रतेचा मार्ग असें ह्मणतील,
अपवित्र त्यांत चालणार नाहींत, परंतु तो त्या
पवित्रांसाठीं होईल, वाटसरू जरी मूर्ख असले
तरी त्यांत बहकणार नाहींत. ९ तेथें कोणी सिंह
असणार नाहीं, आणि हिंसक पशु त्याजवर चढ-
णार नाहीं, आणि तेथें सांपडणार नाहीं, परंतु
उद्धरलेले तेथें चालतील. १० आणि परमेश्व-
राचे उद्धरलेले उत्सवाने जीयोनेस परत येतील,
आणि त्यांच्या माथ्यांवर अक्षय हर्ष होईल, ते
आनंद व हर्ष पावतील, आणि शोक व कण्हणें
पळून जातील.

## अध्याय ३६.

तर हिज्कीया राजाच्या चौदाव्या वर्षीत असें
झालें, कीं अश्शूराचा राजा सान्हेरीब यहू-
दाच्या सर्व कोटयुक्त नगरांवर येऊन तीं घेऊं ला-
गला. २ तेव्हां अश्शूराच्या राजाने राबशाके
मोठ्या सैन्यासहित लाकीशाहून यरूशालेमेस
हिज्कीयाजवळ पाठविला, मग तो वरच्या तळ्या-
च्या नळाजवळ धोब्याच्या शेताच्या वाटेवर उ-
भा राहिला होता. ३ तेव्हां हिल्कीयाचा पुत्र
एल्याकीम जो घरच्या कारभारावर असे, आणि
शेबना चिटणीस आणि आसाफाचा पुत्र योवाह
इतिहासक हे निघून त्याजवळ आले.
४ मग राबशाके त्यांजवळ बोलला, तुह्मी
हिज्कीयाला सांगा, राजा अश्शूराचा मोठा राजा
ह्मणतो, कीं ज्यावर तूं भाव ठेवितोस, हा कसा
भावविषय आहे? ५ मी ह्मणतों, लढाईची
मसलत व सामर्थ्य आहे, हें वचन पोकळ आहे
खरें, आतां कोणावर भाव ठेवीत असून फितून
मजवर उठतोस? ६ पाहा, या ठेंचलेल्या
बोरूच्या टेंकणावर ह्मणजे मिसरावर भाव ठेवि-
तोस, याजवर जर कोणी टेंकेल, तर त्याचे हा-
तांत रुतून जाईल, तसाच जे सर्व त्याजवर भाव
ठेवितात, त्यांला मिसराचा राजा फारो होत
असतो. ७ परंतु परमेश्वर जो आमचा देव
त्याजवर आह्मी भाव ठेवितों, असें जर ह्मणसील
तर ज्याचीं उंचस्थलें व वेद्या हिज्कीयाने काढि-
ल्या, आणि यहूदाला व यरूशालेमेला ह्मटलें,
कीं याच वेदीसमोर भजन करा, तोच नाहीं काय?
८ तर आतां माझा धनी जो अश्शूराचा राजा
त्याला ओली दे, ह्मणजे मी तुला दोन हजार
घोडे देईन, जर त्यांजवर तूं आपणासाठीं स्वार
ठेवायाला समर्थ आहेस तर. ९ मग माझ्या
धन्याच्या धाकट्या सेवकांच्या एका नायकाला कसें
पराङ्मुख करून रथ व स्वार यांविषयीं मिस-
रावर तूं आपला भाव ठेविसील? १० तर
आतां इला नाशायाला मी परमेश्वरावांचून या
भूमीवर आलों आहें काय? या भूमीवर चढत
जाऊन इला नाशून टाक, असें परमेश्वराने म-
ला सांगितलें आहे.
११ तेव्हां एल्याकीम व शेबना व योवाह
यानी राबशाकेला ह्मटलें, तूं आपल्या सेवकांसीं
अरामी भाषा बोल, कां कीं ती आह्मी समजतों,
परंतु जे लोक कोटावर आहेत, त्यांच्या कानांत

पडे असी आह्माजवळ यहूदी भाषा बोलूं नको.
१२ मग रावशाके ह्मणाला, केवळ तुझ्या
धन्याकडे व तुजकडे हीं सर्व वचनें बोलायाला
माझ्या धन्यानें मला पाठविलें आहे काय? आणि
जीं मनुष्यें कोटावर बसलीं त्यांजकडे मला अशा-
साठीं पाठविलें, कीं त्यानी तुह्मासंगतीं आपली
विष्ठा खावी, आणि आपलें मूत्र प्यावें असें नाहीं
कीं काय? १३ तेव्हां रावशाके उभा राहून मोठ्या
शब्दानें यहूदी भाषा बोलत ह्मणाला, कीं मोठा
राजा जो अश्शूराचा राजा त्याचीं वचनें ऐका.
१४ राजा ह्मणतो, कीं हिज्कीयानें तुह्माला फसवूं
नये, कां तर तो तुह्माला पार पाडायाला समर्थ नाहीं.
१५ आणि परमेश्वर निश्चयें आह्मास पार पा-
डील, हें नगर अश्शूराच्या राजाच्या हातीं लाग-
णार नाहीं, असें बोलून तुह्माला हिज्कीयानें
परमेश्वरावर विश्वासवूं नये. १६ हिज्की-
याचें ऐकूं नका, अश्शूराचा राजा ह्मणतो, कीं
मजसीं साम दान करून मजकडे निघून या, आ-
णि प्रत्येक आपल्या द्राक्षीचें व आपल्या अंजि-
राचें फळ खा, आणि प्रत्येक आपल्या विहिरीचें
पाणी प्या; १७ मी येईं, आणि जी भूमि तुम-
च्या भूमीसारिखी धान्य व द्राक्षारस याची भूमि
आहे, अन्न व द्राक्षींचे मळे यांची भूमि आहे
तींत तुह्माला नेईं तोंपर्यंत. १८ परमेश्वर आ-
ह्माला सोडवील, असें बोलून हिज्कीया तुह्मास
उत्तेजित करील, असें न व्हावें ह्मणून सावध
असा; राष्ट्रांच्या देवानी प्रत्येकानें आपला देश
अश्शूराच्या राजाच्या हातांतून सोडविला आहे
काय? १९ हमाथ व अर्पाद यांचे देव कोठे?
सफार्वाईमाचे देव कोठे आहेत? त्यानी तरीं
शोमरोन माझ्या हातांतून सोडविली आहे काय?
२० ज्यानी आपला देश माझ्या हातांतून सोड-
विला, असे त्या देशांच्या सर्व देवांतले कोणते
आहेत? तर परमेश्वर माझ्या हातांतून यरूशा-
लेम सोडवील काय? २१ तेव्हां त्यानी मौन
धरून त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं, कारण कीं
राजाची आज्ञा असी होती कीं त्याला उत्तर देऊं
नका.

२२ मग हिल्कीयाचा पुत्र एल्याकीम जो घर-
च्या कारभारावर होता, आणि शेबना चिटणीस
आणि आसाफाचा पुत्र योवाह इतिहासक, यानी
आपलीं वस्त्रें फाडून हिज्कीयाजवळ येऊन त्या-
ला रावशाकेचीं वचनें कळविलीं.

## अध्याय ३७.

तेव्हां असें झालें कीं हिज्कीया राजानें ऐकून
आपलीं वस्त्रें फाडिलीं, मग तो गोणताट पां-
घरून परमेश्वराच्या घरांत गेला. २ नंतर
त्यानें एल्याकीम जो घरच्या कारभारावर होता,
तो आणि शेबना चिटणीस तो, आणि याजकांतले
वडील या सर्वांस गोणताट पांघरवून आमोजाचा
पुत्र यशाया भविष्यवादी याजकडे पाठविलें. ३
तेव्हां त्यानी याला ह्मटलें हिज्कीया ह्मणतो, कीं
हा दिवस संकटाचा व फजीतीचा व धिक्काराचा
दिवस आहे, कां तर बाल जन्माच्या लागास आले
आहेत, आणि प्रसवायाला कांहीं शक्ति नाहीं. ४
परमेश्वर तुझा देव कदाचित रावशाकेचीं वचनें
ऐकेल, ज्याला त्याचा धनी अश्शूराचा राजा यानें
जीवंत देवास निंदायाला आणि जीं वचनें पर-
मेश्वर तुझा देव यानें ऐकिलीं आहेत, त्यांकडून
गर्हायाला पाठविलें आहे; ह्मणून जें शेष रा-
हिलें आहे, त्यासाठीं प्रार्थना कर. ५ मग हि-
ज्कीया राजाचे सेवक यशायाजवळ आले.

६ तेव्हां यशाया त्यांस ह्मणाला, तुह्मी आ-
पल्या धन्याला सांगा, कीं परमेश्वर ह्मणतो, जीं
वचनें त्वां ऐकिलीं आहेत, ज्यांकडून अश्शूराच्या
राजाच्या सेवकानी मजविषयीं दुर्भाषण केलें आहे,
त्यांकरितां भिऊं नको. ७ पाहा, मी त्याजवर
बाधकवायु पाठवीन, तेव्हां तो अवई ऐकून आप-
ल्या देशांत परत जाईल, आणि तो आपल्या दे-
शांत तरवारीनें पडे असें करीन.

८ मग रावशाके परत गेला, तेव्हां त्याला
अश्शूराचा राजा लिब्नावर लढतां सांपडला,
कारण कीं त्यानें ऐकिलें होतें, कीं तो लाखीशेहून
गेला आहे. ९ मग त्यानें तिर्हाका जो कूशाचा
राजा त्याविषयीं ऐकिलें, कीं तो तुजसीं लढायाला
निघाला आहे, तेव्हां असें ऐकून त्यानें हिज्कीया-
कडे दूत पाठवितांना सांगितलें, १० यहूदाचा
राजा हिज्कीया याला तुह्मी असें सांगा, कीं
ज्या तुझ्या देवावर तूं भाव ठेवितोस, त्यानें यरू-

शालेम अश्शूराच्या राजाच्या हातीं लागणार
नाहीं, असें सांगून तुला फसवूं नये. ११ पाहा,
अश्शूराच्या राजानी सर्व देशांला नाशून जें केलें
आहे, तें त्वां ऐकिलें, तर मग तूं सुटसील काय?
१२ जीं राष्ट्रें माझ्या वडिलानी नाशिलीं, ह्मणजे
गोजान व हारान व रेजेफ आणि एदेनाचे वंश
जे तलस्सारांत असत, त्यांच्या देवानी त्यांला
सोडविलें आहे काय? १३ हमाथाचा राजा,
व अर्पादाचा राजा, व सफार्वाईम नगर यांचा
राजा, हेना, व इव्वा, कोठे आहे?

१४ हिज्कीयाने दूतांच्या हातांतून तें पत्र घे-
ऊन वाचिलें, मग हिज्कीयाने परमेश्वराच्या
घरांत चढत जाऊन तें परमेश्वरासमोर पस-
रिलें. १५ मग हिज्कीया परमेश्वराजवळ प्रार्थना
करीत ह्मणाला. १६ हे सैन्यांच्या परमेश्वरा
इस्राएलाच्या देवा, जो करूबांमध्यें वसतोस,
केवळ तूंच मात्र पृथ्वींतल्या सर्व राज्यांचा देव
आहेस, त्वां आकाश व पृथ्वी उत्पन्न केलीं. १७
हे परमेश्वरा, तूं आपला कान लावून ऐक, हे
परमेश्वरा, तूं आपले डोळे उघडून पाहा, आणि
जीं वचनें सान्हेरीबाने जीवंत देवास निंदायाला
पाठविलीं आहेत तीं सर्व ऐक. १८ खचीत हे
परमेश्वरा, अश्शूराच्या राजानी सर्व राष्ट्रें व
त्यांची भूमि ओसाड केलीं आहेत, १९ आणि
त्यांचे देव अग्नींत टाकिले आहेत, कां ते देव
नव्हते, परंतु मनुष्याच्या हाताचें काम लांकूड व
दगडच होते, ह्मणून ते त्यानी नष्ट केले आहेत.
२० तर हे परमेश्वरा आमच्या देवा, आतां
त्यांच्या हातापासून आह्माला तार, ह्मणजे तूं
एकलाच परमेश्वर आहेस, असें पृथ्वींतलीं सर्व
राज्यें जाणतील.

२१ नंतर आमोजाचा पुत्र यशाया याने हि-
ज्कीयाकडे सांगून पाठविलें, परमेश्वर इस्राए-
लाचा देव ह्मणतो, कीं सान्हेरीब जो अश्शू-
राचा राजा त्याजविषयीं त्वां मजकडे प्रार्थना
केली आहे; २२ ह्मणून परमेश्वर जें वचन
त्याविषयीं बोलिला आहे, तें हेंच आहे, कीं सी-
योनेच्या कुमारी कन्येने तुला तुच्छ मानून उपहा-
सिलें आहे; यरूशालेमेच्या कन्येने तुजमागें मान
हालविली आहे. २३ कोणाला त्वां निंदिलें?
व दुर्भाषण केलें? कोणावर त्वां आपला शब्द
उंचावला आणि आपले डोळे वरतीं लाविले?
इस्राएलाच्या पवित्रावर कीं नाहीं? २४ त्वां
आपल्या सेवकांकडून परमेश्वराला निंदिलें आ-
हे, आणि ह्मटलें, मी आपल्या रथांच्या समुदा-
याने पर्वताच्या उंच भाग्यावर लबानोनाच्या बा-
जूंवर चढलों आहें, आणि त्याचीं उंच एरेज
झाडें त्याचीं निवडक देवदारूचीं झाडें तोडीन,
आणि त्याच्या सीमेंतल्या उंच ठिकाणीं त्याच्या
निबिड वनांत शिरेन. २५ मी कूप खाणून पा-
णी प्यालों आहें, आपल्या तळपायानी दुर्गांचे
सर्व खंदक सुके केले आहेत, २६ हा संकल्प
म्या पुरातनकालीं केला, आणि पूर्वकालीं हा यो-
जिला, हें त्वां ऐकिलें नाहीं काय? आतां हा म्या
प्रत्ययास आणिला आहे, कीं कोट्टयुक्त नगरें ओ-
साडीचे ढीग होत असीं मोडायाला तूं होस.
२७ ह्मणून त्यांतले राहणारे अल्पशक्तीचे होते,
ते भितरे व घाबरे होते, माळावरचें गवत, व
हिरवळ धाब्यावरचें तृण, व उंचीस आल्यापूर्वी
करपलेलें पीक, यांसारिखे ते झाले. २८ परंतु
तुझें बसणें, व तुझें बाहेर निघणें, व तुझें आंत
येणें, आणि मजवरील तुझा राग हीं मी जाणतों.
२९ मजवरला तुझा राग, व तुझा अभिमान, हें
माझ्या कानावर आले आहेत, ह्मणून मी आपली
वेसण तुझ्या नाकांत व आपला लगाम तुझ्या
ओंठांत घालीन, आणि ज्या वाटेने तूं आलास,
तिकडूनच तुला परत नेईन. ३० आणि हें
तुला चिन्ह होईल, जें यंदां स्वतां रुझेल, तें
खाल, आणि दुसऱ्या वर्षी जें त्यांत सहज रुझेल,
तें खाल, मग तिसऱ्या वर्षी पेरा, आणि कापा,
आणि द्राक्षमळे लावून त्यांचें फल खा. ३१
ह्मणजे यहूदाच्या घराण्याचें निभावून राहिलेलें
शेष पुन्हा खालतीं मुळावेल, आणि वरतीं फल
देईल; ३२ कारण कीं यरूशालेमेंतून शेष,
आणि सीयोनेच्या पर्वतांतून निभावलेलें निघेल.
सैन्यांच्या परमेश्वराचा आवेश हें साधील.
३३ याकरितां अश्शूराच्या राजाविषयीं परमेश्वर
ह्मणतो, कीं तो या नगरांत येणार नाहीं. आणि
एथें बाण मारणार नाहीं, आणि याच्यापुढें ढाल
धरणार नाहीं, आणि याजवर मोरचा रचणार

नाहीं· ३४ ज्या वाटेनें तो आला तिने परत
जाईल, आणि या नगरांत तो येणार नाहीं असें
परमेश्वर ह्मणतो. ३५ मी आपणाकरितां व
माझा सेवक जो दावीद याकरितां हें नगर वां-
चावें, ह्मणून याजला रक्षीन· ३६ नंतर परमे-
श्वराच्या दूताने निघून अश्शूराच्या छावणींत
एक लाख पंच्यायशीं हजार मनुष्य मारिले; मग
पहांटेस जेव्हां लोक उठले, तेव्हां ते सर्व मेलेलीं
मढीं असे झाले होते·

३७ तेव्हां अश्शूराचा राजा सान्हेरीब निघून
परत गेला, आणि नीनवेस जाऊन राहिला· ३८
आणि असें झालें कीं तो निस्रोख जो त्याचा
देव त्याच्या घरांत भजन करीत असतां त्याचे
पुत्र जे अद्राम्मेलेख व शारेजेर यानीं त्याला तर-
वारीने मारिलें, आणि ते अरारात देशांत पळून
गेले; मग त्याचा पुत्र एसारहद्दोन त्याच्या स्थानीं
राज्य करिता झाला.

## अध्याय ३८.

त्या दिवसांत हिज्कीया मरणाच्या लागास
येईपर्यंत रोगी होता, तेव्हां आमोजाचा
पुत्र यशाया भविष्यवादी त्याजवळ येऊन त्याला
बोलिला, परमेश्वर ह्मणतो, कीं तूं आपल्या
घराण्याला आज्ञा दे, कारण कीं तूं मरसील आ-
णि वांचणार नाहींस. २ तेव्हां हिज्कीया आ-
पलें मुख भिंतीकडेस फिरवून परमेश्वराकडे
प्रार्थना करीत ह्मणाला, ३ हे परमेश्वरा, मी
कसा तुजपुढें सत्यतेने व वास्तविक मनाने वर्त्तलों,
आणि तुझ्या दृष्टींत जें उत्तम तें करीत आलों
आहें, ह्मणून स्मर; आणि हिज्कीया मोठ्या
रडीनें रडला·

४ तेव्हां परमेश्वराचें वचन यशायाकडेस
आलें कीं, ५ तूं जाऊन हिज्कीयाला सांग,
परमेश्वर जो तुझा बाप दावीद याचा देव तो
ह्मणतो, कीं तुझी प्रार्थना म्या ऐकिली आहे, आ-
णि तुझीं आंसवें पाहिलीं आहेत; पाहा, तुझ्या
आयुष्याला मी अणखी पंधरा वर्षें लावितों· ६
आणि अश्शूराच्या राजाच्या हातापासून तुला व
या नगराला सोडवीन, आणि या नगराचें संरक्षण
करीन· ७ आणि जें वचन परमेश्वर बोलिला
आहे, तें तो खरें करील, याविषयीं परमेश्वरा-
पासून तुला हें चिन्ह होईल; ८ पाहा पदांची
छाया जी आहाजाच्या सूर्यघटींत उतरली आहे,
ती मी दाहा पदें परत आणीन; मग जीं पदें
सूर्य उतरला होता त्यांतलीं दाहा पदें तो मागें
आला·

९ हिज्कीया यहूदाचा राजा रोगी होऊन
आपल्या रोगांतून जेव्हां उतरला, तेव्हां त्याने जें
लिहिलेलें तें, १० माझें आयुष्य आटपत आलें
असतां मी ह्मणालों, कीं मृत लोकांच्या दरवाजांत
जाईन; माझ्या वर्षांचा शेष मला कमी झाला
आहे. ११ मी ह्मणालों, मी परमेश्वराला
जिवंताच्या भूमींत अणखी पाहणार नाहीं; जगां-
तील राहणाऱ्यांसंगतीं असून मी मनुष्याला अणखी
देखणार नाहीं· १२ माझें आयुष्य मेंढपालाच्या
डेऱ्याप्रमाणें काढिलेलें व मजपासून दूर केलेलें
आहे; म्यां कोष्ट्याप्रमाणें आपलें आयुष्य तोडिलें
आहे; तो मला वाण्यापासून कापील; सकाळींपासून
रात्रींपर्यंत तूं माझी समाप्ती करसील. १३ सकाळीं-
पर्यंत माझ्या मनांत असी काळजी होती कीं तो
माझीं सर्व हाडें सिंहाप्रमाणें मोडील; दिवसा-
पासून रात्रींपर्यंत तूं माझी समाप्ती करसील. १४
जसा पिंगळा अथवा निळवी तसा मी किचकिच-
तों; पारव्याप्रमाणें घुमतों; वरतीं पाहून माझे
डोळे थकले आहेत; हे परमेश्वरा, मी पिडले-
लों आहें, माझें सहाय कर· १५ मी काय
ह्मणूं? तर त्यानें मला वचन दिलें आहे, आणि
तो तें खरें करील; मी आपल्या मनाच्या कडुप-
णाने आपलीं सर्व वर्षें हळू हळू चालेन· १६
हे परमेश्वरा, त्यांकडून लोक वांचतात, आणि
त्यांतल्या प्रत्येकांत माझ्या आत्म्याचें जीवन
आहे; तर मला गुण पाडून वांचीव· १७ पाहा,
कुशलाच्या स्थानीं मला फार कडूपणा होता, परंतु
त्वां माझ्या जीवाला प्रिय मानून, नाशाच्या खांचें-
तून काढिलें आहे; कारण कीं माझीं सर्व पापें
त्वां आपल्या पाठीमागें टाकिलीं आहेत· १८
कां तर मृत लोकांला तुझें स्तवन करवत नाहीं;
मरणाला तुझी प्रशंसा करवत नाहीं, जे खांचेंत
उतरतात त्यांच्याने तुझ्या सत्याची आशा धरवत
नाहीं· १९ जीवंत, जीवंत, तोच तुला स्तवील;

जसा मी आज स्तवितों तसा; बाप लेंकरांस तुझें
सत्य जाणवील. २० **परमेश्वर** मला तारायाला
मान्य झाला; ह्मणून आह्मी आपल्या आयुष्याचे
सर्व दिवस **परमेश्वराच्या** घरांत वाद्यें वाजवून
माझीं गीतें गाऊं.

२१ तर यशायाने ह्मटलें होतें, कीं त्यानी
अंजिरांचा गोळा घेऊन मलम करावें, आणि उबा-
ळवाला लावावें, ह्मणजे तो बरा होईल. २२
हिज्कीयानेंहि ह्मटलें होतें, मी **परमेश्वराच्या**
घरांत चढून जाईन, याविषयीं काय चिन्ह असेल?

## अध्याय ३९.

त्या वेळेस बलदानाचा पुत्र मरोदाख बल-
दान जो बाबेलेचा राजा त्याने पत्रें व भे-
टी हिज्कीयाकडे पाठविलीं; कां कीं तो रोगी हो-
ऊन बरा झाला आहे, असें त्याने ऐकिलें होतें.
२ तेव्हां हिज्कीया त्यांविषयीं हर्षला, आणि त्या-
ला त्याने आपलें भांडार, रुपें, व सोनें, व सुगंधि
पदार्थ, व उत्तम तेल, व आपल्या शस्त्रांचें सारें
घर आणि जें कांहीं त्याच्या निधींत सांपडलें, तें
सर्व दाखविलें; हिज्कीयाने त्याला न दाखविला
असा त्याच्या घरांत, व त्याच्या साऱ्या राज्यांत
कोणताहि पदार्थ नव्हता.

३ मग यशाया भविष्यवादी हिज्कीया राजा-
जवळ येऊन त्याला ह्मणाला, ते मनुष्य काय
बोलले? आणि ते तुजकडे कोठून आले आहेत?
तेव्हां हिज्कीया ह्मणाला, ते दूर देशांतून ह्मणजे
बाबेलेहून मजकडे आले आहेत. ४ तेव्हां तो
ह्मणाला, त्यानी तुझ्या घरांत काय पाहिलें? मग
हिज्कीया ह्मणाला, जें कांहीं माझ्या घरांत आहे,
तें सर्व त्यानी पाहिलें आहे; म्या त्यांस दाख-
विला नाहीं असा कोणताहि पदार्थ माझ्या निधींत
नाहीं. ५ नंतर यशायाने हिज्कीयाला ह्मटलें,
सैन्यांच्या **परमेश्वराचें** वचन ऐक, ६ पाहा, ते
दिवस येतात, ज्यांत सारें जें तुझ्या घरांत आहे,
आणि जें तुझ्या वडिलानी आजपर्यंत सांठविलें
आहे, तें बाबेलेस नेतील, कांहीं उरणार नाहीं,
असें **परमेश्वर** ह्मणतो. ७ आणि तुझे पुत्र
जे तुजपासून उत्पन्न होतील, ज्यांला तूं जन्म दे-
शील, त्यांतले कित्येक ते घेतील; मग ते बाबे-
लेच्या राजाच्या वाड्यांत षंड असे राहतील.
८ तेव्हां हिज्कीया यशायास ह्मणाला **परमे-
श्वराचें** जें वचन तूं बोलिला आहेस, तें उत्तम
आहे; अणखी ह्मणाला, कीं माझ्यां दिवसांत
कुशल व सत्यता हीं राहतील.

## अध्याय ४०.

माझे लोकांचें सांत्वन करा, करा सांत्वन, असें
तुमचा देव ह्मणतो. २ यरूशालेमेस सां-
त्वनाची गोष्ट सांगा, आणि तिला मोठ्याने बोला,
कीं तुझें युद्धकरण समाप्त झालें आहे, तुझ्या अ-
न्यायाची क्षमा केली आहे, आणि त्वां आपल्या
सर्व पापांसाठीं **परमेश्वराच्या** हातून दुप्पट घे-
तलें आहे.

३ रानांत ओरडणाऱ्याची वाणी, **परमेश्वरा-
चा** मार्ग सिद्ध करा, आमच्या देवासाठीं बंग-
लांत सडक वाट नीट करा. ४ प्रत्येक खळगा
उंचवट होईल, आणि प्रत्येक डोंगर व टेंकाड
खोलवट होतील, कडा माळच होईल, आणि
खडक शेत असे होतील; ५ आणि **परमेश्व-
राचें** गौरव प्रगट होईल, आणि तें सर्व मनुष्यें
मिळून पाहतील; कां कीं **परमेश्वराने** असें
सांगितलें आहे. ६ वाणी ह्मणाली, तूं हाक
मार; तेव्हां त्याने ह्मटलें, काय हाक मारूं? सर्व
मनुष्यजाति गवतच आहे, आणि तिची सर्व शोभा
माळांतल्या फुलासारिखी आहे. ७ गवत को-
मतें, फूल गळतें; कारण कीं **परमेश्वराचा** वारा
त्याजवर वाहतो; निश्चयें लोक गवतच आहेत.
८ गवत कोमतें, फूल गळतें; परंतु आमच्या
देवाची गोष्ट सर्वकाळ टिकेल.

९ अगे सीयोने सुवार्त्ता सांगणाऱ्ये, तूं उंच
डोंगरावर चढ; अगे यरूशालेमे सुवार्त्ता सांगणा-
ऱ्ये, तूं बलेंकरून आपली वाणी उंच कर, कर
उंच, भिऊं नको, यहूदाच्या नगरांस सांग, पाहा
तुमचा देव. १० पाहा, प्रभु **परमेश्वर** परा-
क्रमाने येईल, आणि त्याचा भूज त्याचें राज्य
करील; पाहा, त्याचें मोल आपल्यापाशींच आहे,
आणि त्याचें वेतन आपल्यापुढेंच आहे. ११ मेंढ-
क्यासारिखा तो आपला कळप चारील,

बाहूने कोंकरें एकवटील, आणि आपल्या उरासीं
धरून वाहील, आणितान्ह्या मेंढ्या जपून नेईल.
१२ कोणी आपल्या तळहातांत पाण्यें मो-
बलीं, व आपल्या वितीने आकाश मोजलें, व पृ-
थ्वीची सर्व धुळि मापाने मापिली, आणि धटाने
पर्वत व ताजव्याने डोंगर तोलले आहेत? १३
कोणी परमेश्वराच्या आत्म्याचा शोध केला,
अथवा त्याचा मंत्री होऊन त्याला शिकविलें
आहे? १४ कोणासीं त्याने मसलत पुसली?
आणि कोणी त्याला संबोध केला? अथवा त्यास
न्यायाचा मार्ग शिकविला; अथवा त्याला ज्ञान
पढविलें? आणि त्याला बुद्धीची वाट दाखविली?
१५ पाहा, राष्ट्रें मोटेंतल्या बिंदूप्रमाणें आहेत, आणि
पारड्यांतल्या बारिकधुळीप्रमाणें मोजल्या आहेत;
पाहा, तो द्वीपें तिळासारिखीं उचलितो. १६
आणि लबानोन जाळायाला पुरत नाहीं, आणि
त्यांतले पशू होमास पुरत नाहींत. १७ त्याच्या
दृष्टींत सर्व राष्ट्रें कांहीं नाहीं, तीं त्याच्याजवळ
अभाव व शून्यता यांजपेक्षां तुच्छ आहेत.
१८ तर तुह्मी देवाची बरोबरी कोणासीं क-
राल? आणि कोणती प्रतिमा त्यासीं लावून पा-
हाल? १९ कारिगार ठसा कोरून मूर्त्ति ओ-
तितो, आणि सोनार तिला सोन्याने मढितो, आणि
रुप्याच्या सांखळ्या ओतितो. २० ज्याच्याने
अर्पण करवत नाहीं, एवढा जो दरिद्री आहे, तो
न कुजणारें लांकूड निवडतो; आणि ढळणार
नाहीं, असी कोरींव मूर्त्ति साधायाला तो आपणा-
साठीं निपुण शिल्पी शोधितो. २१ काय तुह्मी
जाणलें नाहीं? तुह्मी ऐकिलें नाहीं काय? पहि-
ल्यापासून तुह्माला दाखविलें नाहीं काय? पृथ्वीचे
पाये मांडल्यापासून तुह्मी समजला नाहीं काय?
२२ जो पृथ्वीमंडलावर बसतो, आणि तिचे राह-
णारे टोळांसारिखे आहेत जो आकाशें मलमली
पडद्याप्रमाणें पसरितो, आणि बसायासाठीं तीं
डेऱ्याप्रमाणें विस्तारितो, २३ जो अधिकाऱ्यांस
अभावास आणितो, पृथ्वींतले न्यायाधीश शून्यता
असे करितो, तो हाच आहे. २४ खचीत
त्यांची लावणी होणार नाहीं, खचीत त्यांची पेर-
णी होणार नाहीं, निश्चयें त्यांचें कांड भूमींत मु-
ळावणार नाहीं, आणि तो त्यांजवर फुंकर घाली-
ल, तेव्हां ते सुकून जातील, आणि वादळ त्याला
धसासारिखें उडवून नेईल. २५ तर तुह्मी को-
णासीं माझी बरोबरी कराल? आणि मी समान
होईन? असें पवित्र ह्मणतो. २६ तुह्मी आपले
डोळे वरतीं लावून पाहा, त्याला कोणी उत्पन्न
केलें, जो त्यांचें सैन्य गणून बाहेर आणितो, जो
त्या सर्वांस नामाने बोलावितो, तो महासमर्थ व
पराक्रमाचा प्रबल आहे, ह्मणून त्यांतला कोणी
उणा पडत नाहीं. २७ हे याकोबा, कां ह्मण-
तोस, आणि इस्राएला, कां बोलतोस, कीं माझा मार्ग
परमेश्वरापासून गुप्त आहे, आणि देवापासून
माझा न्याय सरला आहे?
२८ काय त्वां जाणलें नाहीं, त्वां ऐकिलें नाहीं
काय? कीं सनातन देव परमेश्वर पृथ्वीच्या
सीमांचा उत्पादक थकत नाहीं, आणि भागत ना-
हीं, त्याच्या बुद्धीचा शोध लागत नाहीं. २९
तो थकलेल्याला शक्ति देतो, आणि अशक्ताचें
बल वाढवितो. ३० तरुण दमतील, व भाग-
तील, आणि तरुणपुरुष अगदीं थकून जातील;
३१ परंतु परमेश्वरावर आशा ठेवणारे आपली
शक्ति नवी करितील; ते गरुडासारिखे पंखांनी
उंचावतील; ते धांवतील, आणि भागणार नाहींत;
चालतील, आणि थकणार नाहींत.

## अध्याय ४१.

अहो द्वीपानो, मजजवळ उगीं राहा; आणि
लोक आपली शक्ति नवी करोत, जवळ ये-
वोत, आणि बोलोत, न्याय करायाला आह्मी एक-
मेकांजवळ येऊं. २ पूर्व दिशेंतून न्यायीला
कोणी उठविलें, त्याला आपल्या पायाजवळ बो-
लाविलें, राष्ट्रें त्याजपुढें दिल्हीं; आणि त्याला
राजे वश्य होत असें केलें? ते धूळीसारिखे त्या-
च्या तरवारीला, व उडविलेल्या धसांसारिखे
त्याच्या धनुष्याला दिले. ३ तो त्याच्या पाठीस
लागला, आणि ज्या वाटेने तो आपल्या पायांनी
गेला नव्हता, तिने तो खुशाल पार गेला. ४
पहिल्यापासून पिढ्या बोलावून कोणी काम केलें,
व साधिलें आहे? म्या परमेश्वरानेच, जो मी
पहिला, आणि शेवटल्यांसीं तोच मी आहें. ५
द्वीपें पाहून भ्यालीं, पृथ्वीच्या सीमा कांपल्या, त्या

समीप होऊन आल्या. ६ तर त्यांनीं एकेकाने
आपल्या सोबत्याचें सहाय केलें, आणि आपल्या
भावाला ह्मटलें, तूं धीर धर. ७ तेव्हां मुता-
रानें सोनाराला धीर दिल्हा, आणि जो हातो-
ड्यानें गुळगुळीत करणारा त्यानें घण मारणाऱ्या-
ला धीर दिल्हा, कीं तें सांधायाला तयार आहे;
मग तें न सरकावें, ह्मणून त्याला त्यानें खिळ्या-
नीं बळकट बसविलें. ८ परंतु हे इस्राएला, तूं
माझा सेवक आहेस; याकोबा, ज्या तुला म्यां
निवडिलें आहे, जो आब्राहाम मजवर प्रीति करी,
त्याच्या संताना; ९ ज्या तुला पृथ्वीच्या सी-
मांपासून म्यां घेतलें, आणि तींतल्या मुख्यजनां-
तून बोलाविलें, आणि तुला ह्मटलें, तूं माझा से-
वक आहेस; तुला म्यां निवडिलें आहे, अव्हे-
रलें नाहीं.

१० भिऊं नको, कारण कीं मी तुजपाशीं आहें;
घाबरूं नको, कां तर मी तुझा देव आहें; मी
तुला बळावीन; होय तुझें साहाय्य करीन, होय
मी आपल्या न्यायाच्या उजव्या हातानें तुला उ-
द्धरीन. ११ पाहा, जे सर्व तुजवर रागावले, ते
लाजतील व शरमतील; जे तुजसीं कज्जा क-
रितात, ते अभाव असे व नाहींसे होतील. १२
त्वां आपल्या भांडणाऱ्यांचा शोध केला, तरी ते
तुला सांपडणार नाहींत; तुजसीं लढणारे अभाव
व नाहींत असे होतील. १३ कां तर मी पर-
मेश्वर तुझा देव तुझा उजवा हात धरीन, जो
मी तुला ह्मणतों भिऊं नको, तो मी तुझें साहाय्य
करीन. १४ हे याकोबा किड्या, अहो इस्राए-
लाच्या मनुष्यांनो, भिऊं नका; परमेश्वर इस्रा-
एलाचा पवित्र जो तुझा तारणारा तो ह्मणतो,
मी तुझें सहाय करीन. १५ पाहा, मी तुला नवें
दुधारी तिखट मळण्याचें यंत्र असें करीन; तेव्हां
तूं पर्वत मळून पीठ करसील, आणि डोंगर भुसां-
सारिखे करसील. १६ तूं त्यांस वारावसील
तेव्हां वारा त्यांस घेऊन जाईल, आणि वावटूळ
त्यांस उडवून विखरील; मग तूं परमेश्वरा-
विषयीं उल्लाससील, आणि इस्राएलाच्या पवित्रा-
विषयीं गौरव मानसील. १७ दरिद्री व गरीब
पाणी शोधीत असतां कांहीं सांपडलें नाहीं, ह्म-
णून त्यांची जीभ तहानेनें सुकली, ह्मणजे मी
परमेश्वर त्यांचें ऐकेन, मी इस्राएलाचा देव
त्यांस सोडणार नाहीं. १८ उंचवट्यांत नद्या
आणि खोऱ्यामध्यें झरे उघडीन; रान पाण्याचें
तळें होई, आणि सुकीभूमि पाण्याचे झरे होत
असें करीन. १९ मी रानांत एरेज झाड बाभूळ व
सुरू व तेलाचें झाड लावीन; आणि जंगलांत देव-
दारु, भद्रदारु, व सरल एकत्र ठेवीन, २०
अशासाठीं कीं त्यांनीं एकदां पाहावें, व जाणावें,
व विचारावें, व समजावें, कीं परमेश्वराच्या
हातानें हें घडिलें आहे, आणि इस्राएलाच्या पवि-
त्रानें हें उत्पन्न केलें आहे.

२१ परमेश्वर ह्मणतो, तुह्मी आपला वाद
पुढें करा, याकोबाचा राजा ह्मणतो, तुह्मी आ-
पलीं बळकट प्रमाणें जवळ आणा. २२ जें
जें घडेल, तें तें त्यांनीं प्रमाण जवळ आणून
आह्माला दाखवावें; पूर्वींचीं वर्त्तमानें काय हो-
तीं तीं तुह्मी दाखवा, ह्मणजे आह्मी विचार
करून त्यांचा परिणाम जाणूं, अथवा भविष्य
वर्त्तमानें आह्माला सांगा. २३ जें जें पुढें या-
याचें आहे, तें तें तुह्मी दाखवा, ह्मणजे आह्मी
जाणूं, कीं तुह्मी देव आहां; होय बरें करा,
किंवा वाईट करा, मग आपण विस्मित होऊं
व एकत्र पाहूं. २४ पाहा, तुह्मी अभावाचे
आहां, आणि तुमचें कर्म नष्टतेचें आहे, जो कु-
त्सित तो तुह्मास निवडील. २५ म्यां उत्तरेपा-
सून एकास उठविलें आहे, तर तो येईल; तो
सूर्योदयापासून माझ्या नामास हाक मारील.
आणि जसा चिखलावर तसा अधिपतींवर येईल,
जसा कुंभार गारा तुडवितो तसा. २६ आह्मी
जाणावें, ह्मणून पहिल्यापासून कोणीं दाखविलें
आहे? आणि तो न्यायी असें आह्मी ह्मणावें,
ह्मणून पूर्वींपासून कोणी प्रगटविलें आहे? तर
कोणी दाखवीत नाहीं, आणि कोणी सांगत नाहीं,
आणि तुमचीं वचनें कोणी ऐकत नाहीं. २७
प्रथम जीयोनेला ह्मणेल, पाहा, त्यांला पाहा;
आणि यरूशालेमेस मी सुवार्त्तिक देईन. २८
तर म्यां पाहिलें, परंतु कोणी नव्हता; त्यांतल्या-
सहि पाहिलें, परंतु कोणी मंत्री नव्हता, तेव्हां
त्यांनीं कांहीं उत्तर द्यावें असें म्यां मागितलें.
२९ पाहा, ते सर्व व्यर्थपणाच आहेत; कार्यें

कर्मे नष्टताच आहेत, त्यांच्या ओतींव मूर्त्ति वारा
व शून्यताच आहेत.

## अध्याय ४२.

पाहा, माझा सेवक ज्याला मी संभाळितों, मा-
झा निवडलेला ज्याविषयीं माझा जीव संतुष्ट
आहे, म्या आपला आत्मा त्यांत घातला आहे, तो
राष्ट्रांसाठीं न्याय निघे असें करील. २ **तो** ओ-
रडणार नाहीं, आणि वाणी उंचाविणार नाहीं,
आणि आळींत आपला शब्द गाजविणार नाहीं.
३ **तो** ठेंचलेल्या बोरूला मोडणार नाहीं, आणि
धुमसत्या तागाला विझविणार नाहीं, सत्यासाठीं
न्याय निघे असें करील. ४ **तो** पृथ्वींत न्याय
स्थापीपर्यंत थकणार नाहीं, व उदास होणार
नाहीं; आणि द्वीपें त्याच्या नेमशास्त्राची वाट
पाहतील.

५ **देव परमेश्वर** ज्याने आकाशें उत्पन्न केलीं,
व तीं पसरिलीं, ज्याने पृथ्वीस तिच्या उत्पन्नप-
दार्थांसुद्धां विस्तारिलें, जो तींतल्या लोकांस श्वास,
व तिजवरल्या चालणाऱ्यांस आत्मा देतो, तो ह्म-
णतो कीं, ६ **म्या परमेश्वराने** तुला न्यायेंक-
डून बोलाविलें आहे, मी तुझा हात धरीन, व
तुला रक्षीन, आणि तूं लोकांचा करार, व राष्ट्रां-
चा प्रकाश होस, असें करीन; ७ **आंधळे** डोळे
उघडायास, बंदिशाळेंतून बंदिवानांस, कोंडींतून
अंधारांत बसणाऱ्यांस बाहेर आणायाला. ८
**मी परमेश्वर**, हें माझें नाम आहे, आणि दुस-
ऱ्याला मी आपलें गौरव, आणि कोरींव मूर्त्तीला
मी आपली प्रशंसा देणार नाहीं. ९ **पाहा**, पू-
र्वींच्या गोष्टी प्रत्ययास आल्या आहेत, आणि
नव्या गोष्टी मी प्रगट करितों, त्या निघाल्यापूर्वी
मी तुह्माला सांगतों. १० **तुह्मी परमेश्वराला**
नवें गीत गा, पृथ्वीच्या सीमेपासून त्याची प्रशंसा
करा, समुद्रावर जाणारे व त्याचें भरण, द्वीपें व
त्यांतले राहणारे असें करोत. ११ **रान** व त्यां-
तल्या वस्त्या, केदारजाति ज्या ग्रामांत राहती
तेंहि आपला शब्द उंचावोत, खडकावरचे राह-
णारे उत्सव करोत, पर्वतांच्या शिखरांवरून
आरोळी करोत. १२ **ते परमेश्वराचें** गौरव
करोत, आणि त्याची प्रशंसा द्वीपांत वर्णोत. १३
**परमेश्वर** शूरासारिखा बाहेर जाईल, तो लढा-
ऊप्रमाणें आवेश चेतवील, तो ओरडेल, होय हाक
मारील, आपल्या वैऱ्यांवर प्रबळपणा मिरवील.
१४ **मी** फार वेळ उगाच राहिलों, म्या मौन धरिलें,
म्या आपणास आकळिलें आहे, मी प्रसवत्या
स्त्रियेप्रमाणें कण्हतों, मी एकदांच उच्छ्वासतों
व धापतों. १५ **पर्वत** व डोंगर मी बोडके करीन,
आणि त्यांचे सर्व उपज वाळवीन, आणि नद्या बेटें
होत असें करीन, आणि तळीं आटवीन. १६ **आणि**
अंधळ्यांस जो मार्ग कळला नाहीं त्याने मी त्यांस
नेईन, ज्या वाटा त्यानी जाणल्या नाहींत, त्यानी
मी त्यांस चालवीन, अंधकार त्यांपुढें प्रकाश होई,
व वांकड्या वाटा नीट होत असें करीन; हीं कर्मे
त्यांसाठीं मी साधीन, आणि त्यांस सोडणार नाहीं.

१७ **जे** कोरींव मूर्त्तींवर भाव ठेवितात, ते ए-
कीकडे पाहतील, व फार लज्जित होतील, तुह्मी
आमचे देव, असें जे ओतींव मूर्त्तींला ह्मणतात,
तेंहि. १८ **बहिऱ्यानो**, ऐका; आणि आंधळ्यानो,
तुह्माला दिसावें ह्मणून पाहा. १९ **माझ्या** से-
वकावांचून कोण आंधळा आहे? आणि जो दूत
मी पाठवितों, त्यासारिखा कोण बहिरा आहे?
पूर्णमनुष्यासारिखा कोण आंधळा? आणि **परमे-
श्वराच्या** सेवकासारिखा आंधळा कोण आहे?
२० **तूं** बहुत गोष्टी पाहत असून त्या ध्यानांत
धरीत नाहींस; कान उघडीत असतां तो ऐकत
नाहीं. २१ **त्याच्या** न्यायाकरितां **परमेश्वर**
संतोषित आहे; तो नेमशास्त्रास मोठेपणा देऊन
प्रतिष्ठित करील. २२ **तर** हे लोक लुटलेले व
नाडलेले आहेत, हे सर्व खांचांत सांपडलेले आ-
हेत, आणि कोंडींत गुप्त आहेत; हे लुटीस पात्र
झाले आहेत, आणि कोणी सोडविणारा नाहीं,
नाडण्यास पात्र झाले आहेत, आणि परत दे, असें
कोणी ह्मणत नाहीं. २३ तुह्मांतला कोण याला कान
देईल? तो पुढल्या काळासाठीं कान देऊन ऐको.
२४ **नाडण्यास** पात्र **याकोब** व लुटणाऱ्यांस इस्रा-
एल कोणी दिल्हा? ज्या **परमेश्वरा**विरुद्ध आह्मी
पाप केलें त्यानेच कीं नाहीं? कारण कीं ते त्याच्या
मार्गांत चालेनात, आणि त्याचें नेमशास्त्र ऐकेनात.
२५ **याकरितां** त्याने आपल्या क्रोधाचा ताप आणि
युद्धाचा पराक्रम त्याजवर घातला आहे; आणि

त्याने त्याला सभोंवतें दाहिलें, तथापि तो जाणेना;
आणि जाळिलें, तथापि मनांत आणीना.

## अध्याय ४३.

**त**र आतां हे **याकोबा**, ज्या **परमेश्वराने** तुला
उत्पन्न केलें; आणि हे इस्राएला, तुला निर्माण
केलें, तो ह्मणतो, कीं भिऊं नको; कारण कीं म्या
तुला उद्धरिलें आहे, म्या तुला नामाने बोलाविलें
आहे, तूं माझा आहेस. २ जेव्हां पाण्यांतून पार
जासील, तेव्हां मी तुजपासीं असेन, आणि नद्यां-
तून पार जासील, तेव्हां त्या तुला बुडविणार ना-
हींत, जेव्हां अग्नींतून चालशील, तेव्हां जळणार
नाहींस, आणि ज्वाला तुला जाळणार नाहीं. ३
कारण कीं मी **परमेश्वर** तुझा देव आहें, मी
इस्राएलाचा **पवित्र** तुझा **तारणारा** आहें, म्या
तुझ्या खंडणीस **मिसर** दिल्हा, तुझ्या स्थानीं **खूश**
व **सबा** दिल्हे. ४ तूं माझ्या दृष्टींत मोलवान हो-
तास, ह्मणून सन्मान पावलास, आणि म्या तुला
प्रिय मानिलें आहे, याकरितां मी तुझ्या स्थानीं
मनुष्यें व तुझ्या जीवाच्या स्थानीं लोक देईन. ५
**मी** तुजपासीं आहें, ह्मणून भिऊं नको, मी पूर्वे-
तून तुझी संतति आणीन, पश्चिमेंतून तुला एकवटून
घेईन; ६ **मी** उत्तरेला सांगेन, तूं दे; आणि
दक्षिणेला ह्मणेन, तूं राखून ठेवूं नको; दुरून
माझे पुत्र व पृथ्वीचा सीमेपासून माझ्या कन्या
आण; ७ **ज्या** प्रत्येकास माझें नाम ठेविलेलें
आहे, त्याला आण; कारण कीं म्या आपल्या
गौरवासाठीं त्याला उत्पन्न केलें, निर्माण केलें, व
घडविलें आहे.

८ **जे** लोक डोळे असून आंधळे आहेत, आणि
कान असून बहिरे आहेत, त्यांस बाहेर आण.
९ **सर्व** राष्ट्रें एकत्र मिळोत, आणि लोक जमोत;
त्यांतला कोण हें दाखवील? आणि आह्माला
पूर्व गोष्टी वदेल? त्यांनी न्यायी ठरावें, ह्मणून
आपले साक्षी पुढें आणावे; अथवा त्यांनी ऐकून
ह्मणावें कीं खरें आहे. १० **परमेश्वर** ह्मणतो,
तुह्मी माझे साक्षी आहां, आणि जो माझा सेवक
म्या निवडिला आहे तोहि; अशासाठीं कीं तुह्मी
जाणावें, व मला विश्वासावें, आणि समजावें, कीं
मीच तो आहें; कोणी निर्माण झालेला देव मा-
झ्या पूर्वीं नाहीं, आणि माझ्यानंतर कोणी व्हाया-
चा नाहीं. ११ **मी** मीच **परमेश्वर** आहें;
आणि मजवांचून कोणी **तारणारा** नाहीं. १२
**म्या** प्रमाण दिल्हें, व तारण केलें आहे, आणि
जेव्हां तुह्मामध्यें कोणी परका देव नव्हता, तेव्हां
हें म्या वदिलें; तर तुह्मी माझे साक्षी आहां, कीं
मीच देव आहें, असें **परमेश्वर** ह्मणतो. १३
**होय** काळापूर्वींचा तो मीच आहें; आणि माझ्या
हातांतून सोडविणारा कोणी नाहीं; मी कृत्य क-
रीन, आणि त्याला नड कोण आणील?

१४ **परमेश्वर** तुमचा **उद्धारणारा** इस्राए-
लाचा **पवित्र** ह्मणतो, कीं तुह्माकरितां मी बाबे-
लेस पाठवून जे पळणारे ते सर्व आणि खास्दी
ज्यांचा उत्साहशब्द नौकांत आहे ते उतरत
असें करीन, १५ **मी परमेश्वर** तुमचा पवित्र
इस्राएलाचा **उत्पन्न करणारा** तुमचा राजा
आहें. १६ **परमेश्वर** जो समुद्रांत मार्ग व
पुष्कळ पाण्यांतून वाट करितो, १७ **जो** रथ व
घोडा, सैन्य व प्रतापी, यांस बाहेर आणितो, तो
ह्मणतो, कीं ते एकत्र गळून पडतील, ते उठणार
नाहींत, ते मालवतील; तागाप्रमाणें विझून जातील.

१८ **मागील** गोष्टी स्मरूं नका, व पुरातन व-
र्त्तमानें ध्यानांत आणूं नका. १९ **पाहा**, मी नवें
कृत्य करितों, आतां तें उगवेल, तुह्मी तें न जाणा-
ल काय? हां मी रानांत मार्ग व जंगलांत नद्या
करीन. २० **रानांतले** पशू, नाग, व शहामृग
मला गौरवितील; कारण कीं मी आपल्या निवड-
लेल्या लोकांस पाजायाला रानांत पाणी व जंग-
लांत नद्या ठेवीन. २१ **म्या** आपणासाठीं हे
लोक निर्माण केले, हे माझी प्रशंसा वर्णितील.

२२ तर हे **याकोबा**, त्वां मला हाक मारिली
नाहीं, परंतु हे इस्राएला, तूं मला कंटाळला आ-
हेस. २३ **त्वां** आपल्या होमाचीं शेरडें व मेंढरें
मजजवळ आणिलीं नाहींत, आणि आपल्या य-
ज्ञांनी मला गौरविलें नाहीं; म्या अर्पण मागून
तुला दासाप्रमाणें राबविलें नाहीं, आणि धुपाची
आज्ञा करून तुला श्रमविलें नाहीं. २४ त्वां
मजसाठीं पैका देऊन ऊंस घेतला नाहीं, आणि
आपल्या यज्ञाच्या चरबीने मला तृप्त केलें नाहीं.
परंतु त्वां आपल्या पापांनी मला दासाप्रमाणें राब-

विलें, आणि आपल्या अन्यायांनी मला श्रमविलें
आहे. २५ जो तुझे अपराध आपण होऊन
पुसून टाकितो, तो मी मीच आहें, आणि तुझीं
पातकें मी स्मरणार नाहीं. २६ मला आठवण
कर, आह्मी परस्पर वाद करूं, तूं न्यायी ठरावें
ह्मणून निवेदन कर. २७ तुझ्या पहिल्या बापानें
पाप केलें आहे, तुझ्या उपदेशकांनी माझा अपराध
केला आहे. २८ याकरितां म्या पवित्रस्थानाचे
अधिकारी भ्रष्ट केले आहेत, आणि याकोब शा-
पास, व इस्राएल दुर्भाषणांस दिला आहे.

## अध्याय ४४.

तर आतां हे याकोबा माझ्या सेवका, आणि
इस्राएला, ज्या तुला मी निवडिलें आहे, तो
तूंहि ऐक, २ ज्या परमेश्वरानें तुला उत्पन्न
केलें, व गर्भस्थानापासून तुझें स्वरूप केलें, जो
तुझें सहाय करितो, तो ह्मणतो, कीं हे याकोबा मा-
झ्या सेवका, व यशूरूना, ज्या तुला म्या निवडिलें
आहे, तो तूं भिऊं नको. ३ कारण कीं मी तान्हे-
ल्यांवर पाणी, व सुक्याभूमीवर पूर ओतीन; तुझ्या
संततीवर मी आपला आत्मा व तुझ्या उपजांवर
आपला आशीर्वाद घालीन; ४ तेव्हां तीं गव-
तामधील पशूंसारिखीं आणि पाण्याच्या ओघांज-
वळच्या वाळुंजांसारिखीं उगवतील. ५ एक मी
परमेश्वराचा आहें, असें ह्मणेल, आणि दुसरा
याकोबाचें नाम आपणास ठेवील, आणि दुसरा
मी परमेश्वराचा आहें असी सही घालील,
आणि आपणाला इस्राएल ह्मणून उपनाम ठेवील.
६ परमेश्वर इस्राएलाचा राजा आणि त्याचा
उद्धारणारा सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं मी
पहिला व शेवटलाहि मी आहें, आणि मजवांचून
कोणी देव नाहीं. ७ तर माझ्यासारिखा कोण वदेल,
व दाखवील, आणि म्या पुरातन लोक ठेविले,
तेव्हांपासून मजपुढें अनुक्रम करील? आणि ज्या
गोष्टी घडत आहेत, आणि पुढें ज्या घडतील त्या
हे त्यांस दाखवोत. ८ भिऊं नका, व घाबरे
होऊं नका; तेव्हांपासून म्या तुला सांगितलें नाहीं,
व दाखविलें नाहीं काय? तर तुह्मी माझे साक्षी
आहां; मजवांचून कोणी देव आहे काय? तर
कोणी आधार नाहीं, मी कोणाला जाणत नाहीं.
९ जे कोरींव मूर्त्ति घडितात ते सर्व शून्यताच
आहेत, आणि त्यांचे प्रियपदार्थ कांहीं कामाचे
नाहींत, आणि त्यांचे साक्षी तेच आहेत; ते आ-
पण लज्जित होऊं, असें पाहत नाहींत, आणि
जाणतहि नाहींत. १० देव कोणी घडिला आणि
कांहीं कामाची नाहीं असी जी कोरींव मूर्त्ति ती
कोणी ओतिली? ११ पाहा, त्याचे सर्व सोब-
ती लज्जित होतील, आणि जे कारिगार ते मनु-
ष्यांतले आहेत; ते सर्व एकत्र मिळून उभे रा-
हिले, तरी ते एकदांच भयभीत व लज्जित हो-
तील. १२ लोहार चिमटा घेऊन कोळसे ताप-
वून काम करितो, आणि हातोड्यानीं तिचें रूप
करितो, व आपल्या बळकट बाहूनें ती घडितो,
हां तो भुकेला व शक्तिहीन होतो, तो पाणी पीत
नाहीं, ह्मणून शिणतो. १३ सुतार सूत्र ताणितो,
खचरणीनें तिला बेततो, किंकऱ्यानीं तिला घडितो,
आणि कर्कटानें तिला आंकितो, तिला मनुष्याकार
मनुष्याच्या सुंदरपणाप्रमाणें करितो, ती घरांत रा-
हावी ह्मणून. १४ तो आपल्यासाठीं एरेज झाडें
तोडितो, आणि सरळ व निबर झाड घेऊन रान-
झाडांमध्यें आपल्यासाठीं बळकट करितो, तो आ-
रेन् झाड लावितो, आणि तें पाऊस वाढवितो.
१५ तेव्हां तें मनुष्याला सर्पणासाठीं होतें, आ-
णि तो त्यांतलें कांहीं घेऊन शेक घेतो, आणि
पेटवून भाकर भाजितो, मग देव घडून भजतो,
त्याला कोरींव मूर्त्ति असें करून तिच्या पायां
पडतो. १६ त्याचा एक भाग तो अग्नींत जा-
ळितो, त्याच्या दुसऱ्या भागावर मांस सिद्ध
करून खातो, तो भृष्ट भाजून तृप्त होतो, आणि
धग घेऊन ह्मणतो, अहा मी शेक घेतला आहे,
मी अग्नि पाहिला आहे; १७ तो त्याच्या शे-
षाला देव ह्मणजे आपली कोरींव मूर्त्ति असें
करितो; तो तिला पायां पडून भजतो, व तिला
प्रार्थितांना ह्मणतो, तूं माझा देव आहेस, ह्मणून
मला तार. १८ ते जाणत नाहींत, व समजत
नाहींत, कारण कीं त्यांनी पाहूं नये, ह्मणून त्यानें
त्यांचे डोळे मिटविले, आणि समजूं नये, ह्मणून
त्यांचीं हृदयें झांकिलीं आहेत. १९ आणि तो
ध्यानांत आणीत नाहीं, आणि एवढें ज्ञान व बुद्धि
नाहीं, कीं म्या त्यांतला एक भाग अग्नींत जाळि-

ला, अणखी त्याच्या निखाऱ्यांवर म्या भाकर
भाजली, मांस भाजून खाल्लें, तर त्याचें शेष
अघोर मूर्त्ति करीन, लांकडाच्या ओंड्याच्या पायां
पडेन काय? २० तो राख भक्षितो, मूर्खहृदयाने
त्याला बहकविलें आहे, ह्मणून त्याला आपणास
तारवत नाहीं, आणि ह्मणवत नाहीं, कीं माझ्या
उजव्या हातांत खोटेपणा आहे कीं नाहीं?
२१ हे याकोबा, व इस्राएला, ह्या गोष्टी आ-
ठीव; का कीं तूं माझा सेवक आहेस, म्या तुला
निर्माण केलें, तूं माझा सेवक आहेस, हे इस्राए-
ला, मला विसरूं नको. २२ म्या तुझे अपराध
दाट ढगाप्रमाणें व तुझीं पातकें अभाळाप्रमाणें
पुसून टाकलीं आहेत, म्या तुला उद्धारिलें ह्मणून
मजकडेस परत ये. २३ परमेश्वराने हें केलें
आहे ह्मणून अहो आकाशानो, गायन करा, अहो
पृथ्वीच्या खालील स्थानानो, ओरडा, अहो पर्वत,
रान व त्यांतलीं सर्व झाडेंहो, गायन करीत सुटा;
कारण कीं परमेश्वराने याकोब उद्धरिला आहे,
आणि इस्राएलाविषयीं आपलें गौरव प्रगट केलें
आहे. २४ ज्या परमेश्वराने तुला उद्धारिलें
व तुला गर्भस्थानापासून घडिलें, तो ह्मणतो, कीं
मीच परमेश्वर आहें, ज्याने सर्व उत्पन्न केलें,
ज्यानेच आकाशें पसरिलीं, आणि स्वतां पृथ्वी
विस्तारिली; २५ जो ठकांचीं चिन्हें कुंठित
करितो, आणि दैवज्ञांस वेडे करितो, जो ज्ञान्यांस
मागें फिरवितो, आणि त्यांचें ज्ञान मूर्खपण होई
असें करितो; २६ जो आपल्या सेवकाचें वचन
ठरवितो, आणि आपल्या दूतांचा संकल्प साधि-
तो; जो यरूशालेमेस ह्मणतो, तूं वससील,
आणि यहूदाच्या नगरांस, तुह्मास बांधितील, आ-
णि त्याच्या उजाड जागा यथास्थित करीन; २७
जो डोहास ह्मणतो, तूं आटून जा, आणि तुझ्या
नद्या आटवीन; २८ जो यरूशालेमेस ह्मणतो,
तुला बांधितील, आणि मंदिराला, तुझा पाया घाल-
तील, असें ह्मणतांना खोरेशाविषयीं ह्मणतो,
तो माझ्या हाताखालचा पालक आहे, तो माझा
सर्व मनोरथ साधील, तो.

## अध्याय ४५.

परमेश्वर आपल्या अभिषिक्ताला ह्मणजे खो-
रेशाला (ज्याचा उजवा हात म्या धरिला
आहे, त्यापुढें राष्ट्रें दांत करायाला आणि राजां-
च्या कंबरा मी सोडीन, त्यापुढें दुझांपी कवाडें
उघडायाला, आणि दारें लावणार नाहींत) असें
ह्मणतो कीं, २ मी तुजपुढें चालेन, आणि खर-
बरीत जागा सपाट करीन, पितळाच्या कवडांचे
तुकडे करीन, आणि लोखंडाचे अडसर तोडून
टाकीन; ३ आणि तुला मी अंधकारांतलीं द्रव्यें
व गुप्तस्थलांतल्या ठेवी देईन, अशासाठीं कीं मी
जो परमेश्वर तुला नामाने बोलावितों, तोच मी
इस्राएलाचा देव आहें, असें त्वां जाणावें. ४
माझा सेवक जो याकोब आणि माझा निवडलेला
जो इस्राएल यांच्या कारणें म्या तुला तुझ्या नामाने
बोलाविलें आहे, जरीं त्वां मला जाणलें नाहीं,
तरीं म्या तुला उपनाम ठेविलें आहे.
५ मीच परमेश्वर, दुसरा कोणी नाहीं, मज-
वांचून कोणी देव नाहीं, जरीं त्वां मला जाणलें
नाहीं, तरीं म्या तुझी कंबर बांधिली आहे, ६
अशासाठीं कीं सूर्यउगवतो तेथपासून तो माव-
ळतो तेथपर्यंत मनुष्यांनी जाणावें, कीं मजवांचून
कोणी नाहीं मीच परमेश्वर, दुसरा कोणी नाहीं.
७ मी प्रकाश निर्माण करितों, आणि अंधकारास
उत्पादितों, मी कुशल घडवितों आणि अरिष्ट
उत्पादितों, मी परमेश्वर हीं सर्व कर्में करितों.
८ अहो आकाशानो, वरतून गळा, आणि आभाळ
न्यायास खालीं वाहवो, पृथ्वी फुटो, आणि एक-
दांच तारण निघो, व न्याय उगवो, म्या परमे-
श्वराने तो उत्पन्न केला आहे. ९ जो आपल्या
निर्माणकरणाऱ्यासीं विवाद करितो, त्याला
हाय हाय; खापर भूमींतल्या खापरांसीं विवाद
करो; तूं काय करितोस? असें चिखल आपल्या
घडणाऱ्याला ह्मणेल काय? आणि त्याला हात
नाहींत, असें तुझें कृत्य ह्मणेल काय? १० तूं
कोणाला जन्म देतोस? असें बापाला, व तूं काय
प्रसवलीस? असें स्त्रीला जो बोलतो, त्याला
हाय हाय. ११ परमेश्वर इस्राएलाचा पवित्र
व त्याचा निर्माण करणारा ह्मणतो, कीं पुढें
होणाऱ्यांविषयीं मला विचारा, माझ्या लेंकरां-
विषयीं व माझ्या हाताच्याकर्माविषयीं मला आज्ञा
द्या. १२ पृथ्वी म्या घडिली, तिजवर
मनुष्य उत्पन्न केले; आकाशें म्या [illegible] हातानी

पसरिलीं, व त्याच्या सर्व सैन्यास आज्ञापिलें.
१३ म्यां न्यायानें त्याला उठविलें आहे, आणि
त्याचे सर्व मार्ग मी निटावीन; तोच माझें नगर
बांधील, आणि कांहीं मोल अथवा फेड न घेतां
माझ्या पाडावास सोडवील, असें सैन्यांचा **परमे-
श्वर** ह्मणतो. १४ **परमेश्वर** असें ह्मणतो, कीं
**मिसराचें** श्रमफल व **खूशाची** मिळखत आणि
**सबाई** जे उंचीचे मनुष्य आहेत, त्यांचीहि हीं
आलीकडेस तुजकडे येतील, व तुझीं होतील, ते
तुजमागें चालतील, बेड्यांत असतां आलीकडेस
येतील, आणि तुझ्या पायां पडून तुजजवळ विनंती
करितील, कीं खचीत तुझ्या ठायीं देव आहे,
आणि दुसरा कोणी नाहीं, कोणी देव नाहीं. १५
**खचीत** हे इस्राएलाच्या देवा तारणाऱ्या, तूं आ-
पणास गुप्त ठेवणारा देव आहेस. १६ **जे**
मूर्त्तींचे कारिगार आहेत, ते सगळे लाजतील व
शरमतील, ते एकदांच लज्जित होऊन जातील.
१७ **इस्राएल** **परमेश्वराकडून** सर्वकाळच्या उ-
द्धारानें उद्धरेल, सदासर्वकाळ तुह्मी लाजणार व
शरमणार नाहीं. १८ **तर** ज्या **परमेश्वरानें** आका-
शें उत्पन्न केलीं, ज्या देवानें पृथ्वी निर्माण केली व
घडिली, ज्यानें स्वतः तिला स्थापिलें, व्यर्थ नाहीं
उत्पन्न केलें, तरंतु वसायासाठीं निर्माण केलें, तो
आपण असें ह्मणतो, कीं मीच **परमेश्वर** आहें,
आणि दुसरा कोणी नाहीं. १९ **गुप्तांत** पृथ्वीच्या
अंधकारस्थानांत मी बोलिलों; असें नाहीं, तुह्मी
व्यर्थ मला शोधा, असें मी याकोबाच्या संतानाला
ह्मणालों नाहीं, मी **परमेश्वर** न्याय बोलतों,
प्रमाणिकपणा दाखवितों.

२० **जे** तुह्मी राष्ट्रांतून निभावलेले ते एकवटून
या, एकत्र जवळ या; जे आपल्या कोरींव मूर्त्तींच्या
लांकडावर चित्त ठेवितात, आणि ज्या देवाच्यानें
तारवत नाहीं, त्याची प्रार्थना करितात, ते कांहीं
जाणत नाहींत. २१ **त्यांस** जवळ आणून दा-
खवा, तेहि एकत्र मसलत करोत, पूर्वीपासून हें
कोणी सांगितलें? पुरातनकालापासून हें कोणी
दाखविलें? म्यां **परमेश्वरानेच** कीं नाहीं? तर
जो मी न्यायी **देव** व **तारणारा** त्या मजवांचून
कोणी दुसरा **देव** नाहीं, मजविना कोणी नाहीं.
२२ **अहो** पृथ्वीच्या सर्व सीमानों, मजकडे मन
लावून तरा, कां कीं मीच **देव** आहें, आणि दुस-
रा कोणी नाहीं. २३ **म्यां** आपणावर शपथ
केली आहे, न्यायानें, माझ्या मुखांतून वचन नि-
घालें आहे, तें फिरणार नाहीं, कीं मजपुढें प्रत्येक
गुडघा टेंकेल, प्रत्येक जीभ शपथ वाहील. २४
**निश्चयें परमेश्वराच्या** ठायीं माझा न्याय व
सामर्थ्य आहे, असें ह्मणून एकादा त्याजकडे ये-
ईल, परंतु जे त्याजवर रागावलेले आहेत ते सर्व
लाजतील. २५ **परमेश्वराकडून इस्राएलाचे**
सर्व संतान न्यायी ठरतील, व गौरव मानितील.

## अध्याय ४६.

**बे**ल वांकला, **नबो** लवला, त्यांच्या मूर्त्ति पशूं-
वर व गुरांवर होत्या; तुमच्या मिरवण्याच्या
मूर्त्ति भाराप्रमाणें ठकलेल्या पशूंवर लादलेल्या
होत्या. २ **ते** एकत्र लवले आणि वांकले, त्यां-
च्यानें भार काढवेना, आणि ते आपण पाडाव हो-
ऊन प्रवासांत गेले आहेत.

३ **याकोबाच्या** घराण्या, व **इस्राएलाच्या** सर्व
शेषा, जे तुह्मी उदरस्थितीपासून वाहलेले व ग-
र्भस्थितीपासून संभाळलेले ते तुह्मी माझें ऐकां,
४ **आणि** ह्मातारपणापर्यंत मी तोच, आणि केश
पिकत तोंपर्यंत मी तुह्माला वाहत जाईन, म्यां
उत्पन्न केलें मीच संभाळीन, मीच वाहीन, आणि
सोडीन.

५ **कोणासीं** माझी बरोबरी कराल व लावून
पाहाल? आणि आह्मी परस्पर सारिखे व्हावें,
ह्मणून कोणासी माझी बरोबरी कराल? ६ **ते**
सोनें व रुपें पिशवींतून काढून ताजव्यानें तोलून
त्याजवर सोनारास योजितात, मग तो त्याला
देव असें करितो, ते पायां पडून भजनाहि करि-
तात. ७ **ते** त्याला खांद्यावर घेऊन वाहतात;
आणि त्याला त्याच्या स्थानावर ठेवितात, तेव्हां
तो उभा राहतो; तो आपल्या ठिकाणापासून स-
रत नाहीं; जरीं कोणी त्याजकडे आरोळी केली
तरीं तो उत्तर देणार नाहीं, त्याला त्याच्या संक-
टांतून तारणार नाहीं. ८ **हें** तुह्मी आठवा,
आणि आपलें वीरपणा दाखवा; अपराध्यानो, हें
ध्यानांत परत आणा. ९ **चिरकालापासून** केलेलीं
पूर्वीचीं कर्में आठवा, कारण कीं मीच **देव** आहें,

आणि दुसरा कोणी नाहीं; मी देव आहें, माझ्या
सारिखा कोणी नाहीं; १० मी प्रारंभापासून
शेवट, व पुरातनकालापासून अजूनपर्यंत जीं वर्त्त-
मानें झालीं नाहींत, तीं दाखवितों; आणि ह्मणतों,
माझा संकल्प ठरेल, आणि मी आपला सर्व मनो-
दय करीनच करीन; ११ मी पूर्वेपासून गीध-
पक्षी आणि दूरदेशांतून, जो पुरुष माझा संकल्प
साधील त्याला बोलावितों, जें मी बोलिलों आहें,
तें घडवीनच; जें म्या कल्पिलें आहे, तें साधी-
नच.

१२ अहो बळकट हृदयाच्यानो, जे तुह्मी
न्यायापासून दूर आहां, ते माझें ऐका; मी आप-
ला न्याय जवळ आणितों, तो दूर राहणार नाहीं,
आणि माझें तारण उशीर करणार नाहीं, आणि
माझें वैभवपात्र जो इस्राएल त्यासाठीं सीयोनेंत
उद्धार ठेवीन.

## अध्याय ४७.

अगे बाबेलेच्या कुमारी कन्ये, तूं उतरून धुळी-
वर बैस, भूमीवर बैस; अगे खास्द्यांचे कन्ये,
सिंहासन नाहीं; कां कीं तुला अणखी सुकुमार व
कोमल ह्मणायाचें नाहीं. २ तूं जातें घेऊन पीठ
दळ, बुरखा सार, वस्त्राचा कांठ आटपून घे,
मांडी उघडी कर, नद्यांतून पार जा. ३ तुझें
नागवेपण उघडें होईल, तुझी लज्जाहि दिसेल;
मी सूड घेईन, आणि मनुष्यास भेटणार नाहीं.
४ आमचा उद्धारणारा कोण? तर त्याचें नाम
सैन्यांचा परमेश्वर, इस्राएलाचा पवित्र आहे.
५ अगे खास्द्यांच्या कन्ये, अंधारांत जाऊन उगीच
बैस, कारण कीं तुला राज्यांची धनीण अणखी
ह्मणणार नाहींत.

६ मी आपल्या लोकांवर रागें भरलों, मी
आपलें वतन बाटविलें आहे, आणि त्यांस तुझ्या
हातीं दिलें, त्वां त्यांजवर दया केली नाहीं, त्वां
आपलें जोकड वडिलांवर फार जड केलें.

७ आणि ह्मटलें, मी सर्वकालपर्यंत धनीण
राहीन, ह्मणून त्वां ह्या गोष्टी ध्यानांत धरिल्या
नाहींत, त्वां यांचा परिणाम आठविला नाहीं. ८
तर आतां अगे सुकुमारे, जी निश्चित राहतीस ती
तूं हें ऐक, जी तूं आपल्या मनांत ह्मणतीस कीं
मी आहें, आणि मजवांचून कोणी नाहीं, मी वि-
धवा बसणार नाहीं, मी पोरगमाऊ होणार नाहीं;
९ परंतु या दोन स्थिति तुला क्षणांत एक्या
दिवसीं येतील, ह्मणजे पोरगमाऊ व विधवा
यांच्या तुझ्या फार चेटकांमुळें व तुझ्या बहुत गा-
रुडांमुळें या तुला पुरतेपणें येतील.

१० आणि त्वां आपल्या दुष्टकर्मांवर भाव ठेवि-
ला, आणि ह्मणालीस, मला कोणी पाहत नाहीं;
तुझी बुद्धि व तुझें ज्ञान यानीं तुला फिरविलें आहे,
ह्मणून तूं आपल्या मनांत ह्मणालीस, मी आहें,
आणि दुसरा कोणी नाहीं;

११ याकरितां ज्याचा उदय तूं जाणणार ना-
हींस, असें अरिष्ट तुजवर येईल, आणि जिचें
निवारण तुझ्यानें करवणार नाहीं, असी विपत्ति
तुजवर पडेल, तुला नकळत अकस्मात तुजवर
नाश येईल; १२ तूं आपलीं गारुडें व आपलीं
फार चेटकें ज्यांत त्वां आपल्या तरुणपणापासून
श्रम केला आहे, तीं करीत उभी राहा; कदाचि-
त तुझा उपाय चालेल, कदाचित तूं बलवान हो-
सील. १३ तूं बहुत संकल्प करून थकली
आहेस; तर ज्या विपत्ति तुजवर येणार आहेत,
त्यांपासून विहायसज्ञ, ज्योतिषी, पंजिकाकर्त्ते उभे
राहून तुजला तारोत. १४ पाहा, ते धसांप्रमाणें
होतील, अग्नि त्यांस जाळील, ज्वालेच्या जोरा-
पासून त्यांच्यानें आपणास सोडवणार नाहीं, शेक
घ्यायासाठीं कोलीत, अथवा तिजसमोर बसाया-
साठीं धग राहणार नाहीं. १५ तसेच ज्यांसीं त्वां
आपल्या तरुणपणापासून श्रम केला आहे, ते तुझे
उदमी तुला होतील; ते प्रत्येक आपल्या वाटेंत
बहकून जातील, कोणी तुला तारणार नाहीं.

## अध्याय ४८.

याकोबाच्या वंशानो, हें ऐका, ज्यांस इस्राएला-
चें नाम ठेविलेलें, आणि जे यहूदाच्या पा-
ण्यांतून निघालेले, जे परमेश्वराच्या नामानें श-
पथ वाहतात, आणि इस्राएलाच्या देवाचें स्मरण
करितात खरें, परंतु हें खरेपणानें व न्यायानें क-
रीत नाहींत, ते ऐकोत. २ कां ते आपणांस
पवित्रनगरावरून नांव देतात, आणि ज्याचें नाम
सैन्यांचा परमेश्वर असा जो इस्राएलाचा देव

आहे त्यावर टेंकतात. ३ पहिल्यापासून म्या
पूर्वींचीं वर्त्तमानें प्रकट केलीं, आणि तीं माझ्या
मुखांतून निघालीं, तीं म्या सांगितलीं, तीं पटकन
म्या केलीं, तेव्हां प्रत्ययास आलीं. ४ तूं हट्टी
आहेस, आणि तुझी मान लोखंडी स्नायु, आणि
तुझें कपाळ पितळच आहे, असें म्या जाणलें
ह्मणून; ५ म्या पहिल्यापासून तुला दाखविलें,
प्रत्ययास आल्यापूर्वी म्या तुला वर्त्तमान सांगि-
तलें; माझ्या मूर्त्तीने तीं कर्में केलीं, आणि माझ्या
कोरींव व ओतींव मूर्त्तीनें तीं आज्ञापिलीं, असें त्वां
ह्मणूं नये ह्मणून. ६ हें सर्व पाहा, असें त्वां
ऐकिलें; तर तुह्मी हें दाखवणार नाहीं काय? म्या
तुला आतांपासून नवीं वर्त्तमानें व गुप्तवर्त्तमानेंहि
सांगितलीं, आणि तूं तीं जाणलीं नाहींस. ७ तीं
आतांच उत्पन्न झालीं आहेत, पहिल्यापासून व
जेव्हां त्वां तीं ऐकिलीं नव्हतीं त्या दिवसापूर्वी न-
व्हे; अशासाठीं कीं पाहा, तीं म्या जाणलीं होतीं,
असें त्वां ह्मणूं नये. ८ त्वां ऐकिलेंहि नव्हतें, व
त्वां जाणलेंहि नव्हतें, व तुझा कानहि उघडला
नव्हता; तेव्हांपासूनच तूं फार फितूर करसील,
आणि गर्भस्थानापासून अपराधी ह्मटलेला आहेस,
असें म्या जाणलें.

९ तुझा विनाश न करावा, ह्मणून मी आपल्या
नामासाठीं आपल्या क्रोधाला विलंब करीन, आणि
आपल्या प्रशंसेकरितां तुजविषयीं आटपता धरीन.
१० पाहा, म्या तुला गाळून पाहिलें आहे, परंतु
रुप्याप्रमाणें नव्हे; म्या तुला पीडेच्या भट्टींतून
निवडिलें आहे. ११ मी आपणाकरितां आपणा-
करितांच असें करीन; कां तर माझें नामाला
बट्टा लागूं नये, आणि मी आपलें गौरव इतराला
देणार नाहीं.

१२ हे याकोबा, माझ्या बोलाविलेल्या इस्रा-
एला, माझें ऐक; मी, मीच पहिला, आणि शेव-
टलाहि मी आहें. १३ होय, माझ्या हाताने
पृथ्वीचा पाया घातला, आणि माझ्या उजव्या
हाताने आकाशें विस्तारिलीं; जेव्हां त्यांजला मी
मोठ्याने बोलतों, तेव्हां तीं एकत्र उभीं राहतात.
१४ तुह्मी सर्व मिळून ऐका, त्यांतल्या कोणत्याने
ह्या गोष्टी सांगितल्या आहेत? त्याला परमेश्व-
राने प्रिय मानिलें आहे, तो बाबेलेवर व त्याचा
बाहु खास्द्यांवर त्याचा मनोदय साधील. १५
मी, मीच बोललों आहें; आणि म्या त्याला
बोलाविलें आहे; त्याला म्या आणिलें आहे,
आणि तो आपला मार्ग कुशलाचा करील.

१६ मजजवळ येऊन हें ऐका; मी प्रारंभापा-
सून एकांतीं बोललों नाहीं, तें वर्त्तमान झालें
तेव्हांपासून मी तेथें आहें; आणि आतां प्रभु
परमेश्वर याने व त्याच्या आत्म्याने मला पाठ-
विलें आहे. १७ परमेश्वर तुझा उद्धारणारा
इस्राएलाचा पवित्र असें ह्मणतो, कीं मी परमे-
श्वर तुझा देव आहें, जो तुला तुझें हित साधा-
याला शिकवितों, ज्या मार्गांत त्वां चालावें त्यांतच
तुला चालवितों, तो. १८ जर त्वां माझ्या आ-
ज्ञांकडे कान दिल्हा असता, तर तुझें कुशल नदी-
सारिखें, व तुझा न्याय समुद्राच्या लाटांप्रमाणें
झालें असतें, १९ आणि वाळवेप्रमाणें तुझी
संतति, व तिच्या रेंवेप्रमाणें तुझ्या आंतड्यांचे
उपज झाले असते; त्यांचें नाम मजसमोरून
बुडालें नसतें व नाहींसें झालें नसतें.

२० बाबेलेंतून निघून जा, खास्द्यांपासून पळा,
गाण्याच्या शब्दाने दाखवा, घोषण करा, हें पृथ्वी-
च्या सीमेपर्यंत गाजवून बोला, कीं परमेश्वराने
आपला सेवक याकोब याचा उद्धार केला आहे.
२१ आणि जेव्हां त्याने त्यांला सुक्या जंगलांमधून
नेलें, तेव्हां ते तान्हेले राहत नसत, त्याने त्यांसा-
ठीं खडकांतून पाणी वाहविलें; आणि खडक फो-
डिला, तेव्हां पाण्यें धावत वाहूं लागलीं. २२
दुष्टांस कांहीं कुशल नाहीं, असें परमेश्वर
ह्मणतो.

## अध्याय ४९.

द्वीपानो, माझें ऐका; आणि लोकानो, दूरून
कान लावा; परमेश्वराने गर्भस्थानापासून
मला बोलाविलें आहे, त्याने माझ्या आईच्या आं-
तड्यांपासून माझें नाम प्रख्यात केलें आहे. २
त्याने माझें मुख तिखट तरवारीसारिखें केलें
आहे, आपल्या हाताच्या छायेंत मला गुप्त केलें
आहे, आणि मला घोटींव बाण असें केलें आहे,
आपल्या भात्यांत मला झांकिलें आहे; ३ आ-
णि त्याने मला ह्मटलें आहे, कीं हे इस्राएला, तूं

माझा सेवक आहेस, ज्या तुजविषयीं मी गौरव
पावेन. ४ तेव्हां मी ह्मणालों, म्या व्यर्थ श्रम
केला आहे, म्या निरर्थक व फुकट आपली शक्ति
खर्चिली आहे; तथापि **परमेश्वरा**पाशीं माझा
न्याय व माझ्या देवापाशीं माझें कर्मफल आहे.
५ **आणि** ज्या **परमेश्वरानें** मला गर्भस्थिती-
पासून आपला सेवक व्हावयासाठीं, व **याकोब**
आपल्याजवळ परत आणायासाठीं निर्माण केलें,
तो ह्मणतो, जरी **इस्राएल** एकवट झाला नाहीं
तरी मी सन्मान्य होईन, आणि माझा **देव** माझें
ऐश्वर्य होईल. ६ तेव्हां तो ह्मणाला, **याकोबाचे**
वंश स्थापायाला, व **इस्राएलाचे** रक्षिलेले परत
आणायाला त्वां माझा सेवक व्हावें हें केवल हलकें
आहे; परंतु राष्ट्रांच्या प्रकाशासाठीं पृथ्वीच्या
सीमेपर्यंत माझें तारण व्हावयासाठीं म्या तुला
नेमून दिल्हें आहे. ७ **इस्राएलाचा** उद्धारणा-
रा त्याचा **पवित्र**, **परमेश्वर** मनुष्यानें तुच्छ
मानलेल्यास, राष्ट्रानें वीट मानलेल्यास, अधिका-
ऱ्यांच्या सेवकास ह्मणतो, कीं **परमेश्वर** जो वि-
श्वासु, **इस्राएलाचा** **पवित्र**, ज्यानें तुला निव-
डिलें आहे, त्याजकारणें राजे पाहून उठतील,
आणि अधिकारी भजन करितील. ८ **परमेश्वर**
असें ह्मणतो कीं, प्रसादाच्या वेळेस म्या तुला
उत्तर दिल्हें, आणि तारणाच्या दिवशीं म्या तुझें
सहाय केलें आहे; आणि तुला मी रक्षीन, व
लोकांस कराराकरितां नेमून देईन; पृथ्वीस स्था-
पायाला, आणि ओसाड वतनें वसवायाला; ९
**बंदिवानांस** बाहेर जा, व **जे** अंधकारांत आहेत
त्यांस दृष्टीस पडा, असें ह्मणायाला; ते मार्गांवर
चरतील, आणि सर्व उंचवट्यांवर त्यांची चरण
होईल. १० **ते** तान्हेले व भुकेले राहणार ना-
हींत, आणि उन्ह व सूर्य त्यांस बाधणार नाहीं,
कारण कीं जो त्यांजवर दया करितो तो त्यांस
चालवील, आणि त्यांस पाण्याच्या झऱ्यांजवळ
नेईल. ११ **आणि** मी आपले सर्व पर्वत मार्ग
करीन, आणि माझ्या सडक वाटा उंचावतील. १२
**पाहा**, ते दूरून येतील; आणि पाहा, ते उत्तरे-
पासून व पश्चिमेपासून, आणि ते **सीनीम** देशापा-
सून येतील.
१३ **अहो** आकाशानों, गायन करा; अगे पृ-
थ्वी, तूं उल्लास; आणि पर्वतानो, गायन करीत
सुटा; कां कीं **परमेश्वरानें** आपल्या लोकांचें
सांत्वन केलें आहे, आणि आपल्या पिडलेल्यांवर
दया केली आहे. १४ **परंतु सियोन** ह्मणती,
**परमेश्वरानें** मला सोडिलें आहे, आणि **प्रभु**
मला विसरला आहे. १५ **काय**? स्त्री आप-
ल्या पोटच्या पुत्रावर दया न करून आपल्या ता-
न्ह्या बाळकाला विसरेल? होय त्या कदाचित
विसरतील, परंतु मी तुला विसरणार नाहीं. १६
**पाहा**, म्या आपल्या तळहातांवर तुला कोरिलें
आहें; तुझे कोट मजपुढें नित्य आहेत. १७
**तुझीं** लेंकरें त्वरा करितील, जे तुला मोडितात व
ओसाड करितात ते तुजमधून निघून जातील.
१८ **तूं** आपले डोळे सभोंवते लावून पाहा; ते
सर्व एकवटून तुजवर येतील; **परमेश्वर** ह्मणतो,
कीं मी जिवंत आहें या निश्चयानें तूं त्या सर्वांस
भूषणाप्रमाणें लेसील, आणि नवरीसारिखी त्यांस
बांधून पांघरवसील. १९ **तर** तूं आपल्या ओ-
साड्या व उजाड्या व आपली पड पडलेली भूमि
पाहा, कां तर आतां तूं राहणाऱ्यांस संकोचित
होसील, आणि जे तुला गिळीत असत ते दूर
होतील. २० **तुझीं** गमावलेलीं लेंकरें फिरून
तुझ्या कानांत ह्मणतील, कीं मला जागेची फार
अडचण आहे, म्या वसावें ह्मणून मजसाठीं स्थल
शोध. २१ **तेव्हां** तूं आपले मनांत ह्मणसील,
मी पोर गमावू आणि वांझ, पाडाव केलेली, व
बहकणारी असतां मजसाठीं यांस कोणी जन्म
दिल्हा? व यांस कोणी वाढविलें? पाहा, मी एक-
लीच उरलें होतें, हीं कोठें होतीं? २२ **प्रभु**
**परमेश्वर** असें ह्मणतो, कीं पाहा, मी राष्ट्रांक-
डेस आपला हात उंचावीन, आणि लोकांकडेस
आपला झेंडा उभारीन; तेव्हां ते तुझ्या पुत्रांस
कांखेस धरून आणितील, आणि तुझ्या कन्या
खांद्यांवर वाहतील. २३ **आणि** राजे तुझे पोस-
णारे व त्यांच्या राण्या तुझ्या दाया होतील; तीं
भूमीवर नाक घांसून तुझ्या पायां पडतील, आणि
तुझ्या पायांची धूळ चाटतील, तेव्हां तूं जाणसील,
कीं ज्या **परमेश्वरावर** जे आशा ठेवितात, ते
लाजणार नाहींत, तो मीच आहें.
२४ **पराक्रम्यापासून** लूट घेतील काय? अ-

थवा न्यायीपासून जें हरलेलें तें मोकळें होईल काय?
२५ तर **परमेश्वर** ह्मणतो, कीं पराक्रम्याने जें
नेलें तें परत घेतील, आणि बलात्काऱ्याने जें हरलें
तें मोकळें होईल; आणि जे तुजसीं भांडण करि-
तात, त्यांसीं मी भांडण करीन, आणि तुझ्या लेंक-
रांस तारीन. २६ आणि तुझ्या पिडणाऱ्यांस मी
त्यांचेंच मास खायाला देईन, आणि जसें नव्या
द्राक्षारसाने तसे ते आपल्या रक्ताने मस्त होतील,
तेव्हां सर्व मनुष्यजाति जाणेल कीं मी **परमेश्वर**
तुझा तारणारा आहें, आणि याकोबाचा **प्रतापी**
तुझा **उद्धारणारा** आहें.

## अध्याय ५०.

**परमेश्वर** असें ह्मणतो, कीं ज्या तुमच्या आ-
ईला म्या सोडिलें आहे तिचें सूटपत्र कोठें?
अथवा ज्याकडे म्या तुह्माला विकलें आहे, तो
माझ्या घेणेदारांतला कोणता आहे? पाहा, तुह्मी
आपल्या अन्यायाकरितां विकिलां आहां; तुमच्या
अपराधांमुळें तुमची आई टाकिलेली आहे. २
जेव्हां मी आलों, तेव्हां कां कोणी नव्हता? म्या
बोलाविलें तेव्हां कां कोणी उत्तर दिल्हें नाहीं? न
उद्धरी एवढा तोकडा माझा हात आहे काय? आणि
मोकळें करायाला माझ्याठायीं पराक्रम नाहीं काय?
पाहा, मी आपल्या धमकीने समुद्र आटवितों;
नद्या जंगल करून ठेवितों; तेव्हां कांहीं पाणी
नाहीं ह्मणून त्यांतले मासे घाणतात, व तहानेने
मरून जातात. ३ मी आकाशास काळोखी पां-
घरवितों, आणि त्यांचें वस्त्र गोणताट करितों. ४
म्या वाक्याने श्रमलेल्याचें समाधान करायाला
जाणावें ह्मणून **प्रभु परमेश्वर** याने मला विद्वा-
नांची जीभ दिल्ही आहे; रोज सकाळीं तो जागें
करितो, विद्वानाप्रमाणें ऐकायाला माझ्या कानाला
जागें करितो.

५ **प्रभु परमेश्वर** याने माझा कान उघडिला
आहे, मीहि अमान्य झालों नाहीं, मी मागें हट-
लों नाहीं. ६ म्या मारणाऱ्यांस आपली पाठ
दिल्ही, आणि केश उपटणाऱ्यांस आपले गाल
दिल्हे; थट्टा व थुंकणें यांजपासून म्या आपलें तोंड
आवरिलें नाहीं.

७ **प्रभु परमेश्वर** माझें सहाय करील, या-
करितां मला लाज वाटणार नाहीं; याकरितां
म्या आपलें तोंड गारेसारिखें ठेविलें आहे, आणि
मी दबकणार नाहीं, असें मी जाणतों. ८ माझा
न्याय ठरविणारा जवळ आहे, मजसीं विवाद
कोण करील? तर आह्मी दोघे एकत्र उभे राहूं,
माझा वादी कोण आहे? तर तो मजजवळ येवो.
९ पाहा, **प्रभु परमेश्वर** माझें सहाय करील,
तर जो मला अन्यायी ठरवील तो कोण आहे?
पाहा, ते सर्व वस्त्राप्रमाणें जीर्ण होतील, त्यांस
कसर खाईल.

१० तुह्मामध्यें **परमेश्वराला** कोण भितो,
आणि त्याच्या सेवकाचें भाषण कोण ऐकतो, जो
अंधकारांत चालतो आणि त्याला कांहीं प्रकाश
नाहीं? तो **परमेश्वराच्या** नामावर भाव ठेवो,
व आपल्या देवावर टेंको. ११ पाहा, तुह्मी
सर्व विस्तव झाडणारे, आणि टेंभा बांधणारे, तुह्मी
आपल्या विस्तवाच्या प्रकाशांत चाला, आणि जे
टेंभे तुह्मी पाजळिले त्यांनी चाला; हें माझ्या
हातून तुह्माला प्राप्त होईल, तुह्मी क्लेशांत लो-
ळत राहाल.

## अध्याय ५१.

जे तुह्मी न्यायास अनुसरतां, व **परमेश्वरास**
शोधितां, ते तुह्मी माझें ऐका; ज्या खडकां-
तून तुह्मी छेदिलेले होतां, आणि ज्या खाचेंतल्या
खाणींतून खाणिलेले होतां त्यांकडे पाहा. २
आब्राहाम जो तुमचा बाप आणि सारा जी तुह्मा-
ला प्रसवली त्यांकडे पाहा; कारण कीं तो एकला
असतां म्या त्याला बोलाविलें, आणि त्याला आ-
शीर्वाद दिल्हा, आणि त्याला वाढविलें. ३ तर
**परमेश्वर** सीयोनेचें सांत्वन करील, आणि ति-
च्या सर्व ओसाड्यांचें सांत्वन करील, आणि
तिचें रान एदेनासारिखें व तिचें जंगल **परमे-
श्वराच्या** बागासारिखें करील; तिजमध्यें आ-
नंद व हर्ष, उपकार मानणें व गायनाचा शब्द
हीं होतील.

४ माझ्या लोकांनो, मजकडे मन लावा; आ-
णि माझ्या प्रजानो, मजकडे कान द्या; कां मज-
पासून नेमशास्त्र निघेल, आणि लोकांच्या प्रका-
शासाठीं मी आपली नीति संस्थापित करीन. ५

माझा न्याय जवळ आहे; माझें तारण निघालें
आहे, आणि माझे बाहु लोकांचीं न्यायाधीशी क-
रितील, द्वीपें माझी वाट पाहतील, आणि माझ्या
बाहूची आशा धरितील. ६ तुह्मी आपले डोळे
आकाशाकडे लावा, आणि खालतीं पृथ्वीस पाहा,
कां आकाशें धुराप्रमाणें विरघळून जातील, आणि
पृथ्वी वस्त्राप्रमाणें जीर्ण होईल, आणि तिचे राह-
णारे तसेच मरतील, परंतु माझें तारण सर्वकाळ-
पर्यंत राहील, आणि माझा न्याय थकणार नाहीं.
७ जे तुह्मी न्याय जाणतां, ज्या तुह्मा लोकांच्या
मनांत माझें नेमशास्त्र आहे, ते तुह्मी माझें ऐका;
मनुष्यांच्या निंदेला भिऊं नका, आणि त्यांच्या
शिव्यांस दबकूं नका. ८ कां तर कसर त्यांस
वस्त्राप्रमाणें खाईल, आणि कीड त्यांस लोंकरी-
प्रमाणें भक्षील; परंतु माझा न्याय सर्वकालपर्यंत
आणि माझें तारण पिढ्यानपिढ्या असत जाईल.
९ हे परमेश्वराच्या बाहु, जागा हो, जागा
हो; पराक्रम धारण कर; जसा पूर्वदिवसांत पुरा-
तन पिढ्यांत तसा जागा हो; ज्याने राहाब कापून
टाकिला व मगरास भोंकसलें तो तूं नाहींस काय?
१० ज्याने समुद्र, मोठ्या डोहाचीं पाण्यें आटवून
समुद्राचीं खोल स्थानें उद्धरलेल्यांच्या उतरण्या-
करितां मार्ग असीं केलीं; तो तूं नाहींस काय?
११ तर परमेश्वराचे उद्धरलेले गायन करीत
सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या माथ्यांवर
सर्वकाळचा हर्ष राहील; ते आनंद व हर्ष पाव-
तील; शोक व कण्हणें पळून जातील. १२ जो
तुझें सांत्वन करितो, तो मी, मीच आहें; तूं कसी
आहेस, कीं मनुष्य जो मरतो आणि मनुष्याचा पुत्र
जो गवतासारिखा होतो, त्याजला भितीस, १३
आणि परमेश्वर जो तुझा उत्पन्नकरणारा
ज्याने आकाशें विस्तारलीं, व पृथ्वीचा पाया घा-
तला, त्याला विसरतीस, आणि नेहमी प्रतिदिवसीं
पिंडणाऱ्याच्या कोपामुळें भयभीत असतीस, तो
नाश करायास सिद्ध आहे, असें समजत अस-
तांना परंतु पिडणाऱ्याचा कोप कोठें आहे? १४
पिडलेला बंदिवान मोकळा व्हायाला त्वरा करो,
तो खांचेंत मरूं नये, त्याचें अन्न उणें पडूं नये.
१५ मी परमेश्वर तुझा देव आहें, जो समुद्रास
जेव्हां त्याच्या लाटा गर्जतात, तेव्हां खवळवितो,
त्याचें नाम सैन्यांचा परमेश्वर आहे. १६
आणि म्या आपलीं वचनें तुझ्या मुखांत घातलीं
आहेत, आणि आपल्या हाताच्या छायेंत तुला
झांकिलें आहे, आकाशें ताणायाला, पृथ्वीचा पाया
घालायाला, आणि तूं माझे लोक आहेस, असें
सीयोनेला ह्मणायाला.
१७ अगे यरूशालेमे, जागी हो, हो जागी,
ऊठ, ज्या त्वां परमेश्वराच्या हातापासून त्या-
च्या क्रोधाचा प्याला पिऊन घेतला आहे, कंपना-
च्या प्याल्यांतला गाळ चोंखून प्याला आहे. १८
जे सर्व पुत्र ती प्रसवली आहे, त्यांतला कोणी
तिला चालवीत नाहीं; आणि जे सर्व पुत्र तिने
वाढविले आहेत, त्यांतला कोणी तिचा हात ध-
रीत नाहीं. १९ या दोन गोष्टी तुला झाल्या
आहेत; तुजकरितां कोण शोक करील? नाश
व मोडतोड, व दुकाळ व तरवार हीं होतील,
कोणाकडून मी तुझें सांत्वन करवूं? २० तुझे
पुत्र मूर्छित झाले आहेत, जसा गवा जाळ्यांत
तसे ते सर्व आळ्यांतल्या चवाट्यांवर आडवे प-
डले आहेत; परमेश्वराच्या क्रोधाने, तुझ्या दे-
वाच्या धमकीने भरले आहेत.
२१ याजकरितां जी तूं पीडित व मस्त आहेस,
परंतु द्राक्षारसाने नव्हे, ती तूं हें ऐक; २२
तुझा प्रभु परमेश्वर व तुझा देव जो आपल्या
लोकांचा वाद सांगतो तो असें ह्मणतो, कीं पाहा,
म्या कंपनाचा प्याला, माझ्या क्रोधाच्या प्याल्यां-
तला गाळ तुझ्या हातांतून घेतला आहे; तो तूं
पुन्हा पिणार नाहींस; २३ आणि जे तुझे पिड-
णारे तुझ्या जीवाला आह्मी तुजवर चालावें ह्म-
णून आडवा पड, असें ह्मणाले आहेत, त्यांच्या
हातांत मी तो ठेवीन; आणि चालणाऱ्यांस त्वां
आपलें शरीर भूमीप्रमाणें, आळीच्या वाटेप्रमाणें
ठेविलें आहे.

## अध्याय ५२.

अगे सीयोने, जागी हो, हो जागी; तूं आपला
पराक्रम धारण कर; अगे यरूशालेमे पवित्रनग-
री, तूं आपलीं शोभिवंत वस्त्रें लेऊन घे; कारण यापुढें
असुंती व अपवित्र पुन्हा तुजमध्यें शिरणार नाहीं.
२ अगे यरूशालेमे, धुळींतून अंग झटकून ऊ-

ठ; उठून बैस; अगे जीयोनेच्या पाडाव कन्ये, तूं
आपल्या मानेचीं बंधनें तोडून टाक. ३ कारण
कीं **परमेश्वर** असें ह्मणतो, कीं तुह्मी आपणास
फुकट विकिलें आहे, आणि पैक्यावांचून तुमची
खंडणी होईल. ४ कां तर **प्रभु परमेश्वर** असें
ह्मणतो, कीं माझे लोक पहिल्याने **मिसरांत** प्रवा-
स करायाला तेथें उतरले; आणि कारणावांचून
**आश्शूराने** त्यांस पीडिलें आहे. ५ तर **परमे-
श्वर** ह्मणतो, कीं आतां एथें मला काय आहे,
असें कीं माझे लोक फुकट नेलेले आहेत; जे
त्यांजवर धनीपण करितात ते त्यांजला केंकवितात,
आणि नेहेमी प्रतिदिवशीं माझ्या नामाची निंदा होत
आहे, असें **परमेश्वर** ह्मणतो. ६ याकरितां माझे
लोक माझें नाम जाणतील; ह्मणून त्या दिवसीं ते
जाणतील कीं जो बोलतो तो मीच आहें; पाहा,
मी आहें.

७ जो सुवार्त्ता सांगतो, जो कल्याण पुकारितो,
जो कुशलाची सुवार्त्ता सांगतो, जो तारण वदतो,
जो जीयोनेला, तुझा **देव** राज्य करितो, असें ह्म-
णतो, त्याचे पाय पर्वतांवर किती रमणीय आहेत.
८ तुझे पाहरेकरी आपला शब्द उंचावितील; श-
ब्दाने एकदांच गायन करितील; कारण कीं **पर-
मेश्वर** जीयोनेला यथास्थित करील, तेव्हां ते
सारख्या दृष्टीने पाहतील.

९ यरूशालेमेच्या ओसाड्यानो, एकदांच गा-
यन करीत सुटा; कां तर **परमेश्वराने** आपल्या
लोकांचें सांत्वन केलें आहे, यरूशालेम त्याने
खंडून घेतली आहे. १० सर्व लोकांच्या देखतां
**परमेश्वराने** आपला पवित्र बाहु उघडा केला
आहे; आणि पृथ्वीच्या सर्व सीमानी आमच्या
**देवाचें** तारण पाहिलें आहे.

११ तेथून निघून जा, जा निघून; मलिनास
शिवूं नका; तिच्या मध्यांतून जा; जे तुह्मी **पर-
मेश्वराचीं** पात्रें वाहतां ते तुह्मी पवित्र असा.
१२ तर तुह्मी घाईने निघणार नाहीं, आणि धां-
वत धांवत चालणार नाहीं; कां कीं **परमेश्वर**
तुह्मापुढें चालेल, आणि इस्राएलाचा **देव** तुमच्या
मागें संभाळील.

१३ पाहा, माझा सेवक सुबुद्धीने वर्तेल, तो
उंचावेल, आणि उंच व अत्यंत थोर होईल.
१४ जसे बहुत तुजविषयीं विस्मित होते, तसें
त्याचें दर्शन मनुष्यांपेक्षां व त्याचें रूप मनुष्यपुत्रां-
पेक्षां बिघडलेलें होतें; १५ तसा तो बहुत राष्ट्रां-
ला शिंपील; त्याविषयीं राजे आपलें मुख मिट-
तील; कारण कीं जें त्यांस सांगितलें नव्हतें तें ते
पाहतील; आणि जें त्यानी ऐकिलें नव्हतें तें ते
ध्यानांत आणितील.

## अध्याय ५३.

आमची वार्त्ता कोणी विश्वासली? आणि
कोणाला **परमेश्वराचा** बाहु प्रगट झा-
ला आहे? २ तर तो त्याजपुढें कोंबासारिखा,
व जसें सुक्या भूमींतून मूळ तसा रुजेल; त्याला
रूप नाहीं, शोभा नाहीं; जेव्हां आह्मी त्याला
पाहतों, तेव्हां तो आह्माला आवडावा असा सुं-
दरपणा नाहीं. ३ तो धिक्कारलेला, व मनुष्यानी
नाकारलेला, शोकांचा पुरुष, व खेद अनुभव-
लेला होता, आणि त्याजपासून जसें मुखाच्छादन
होत असे; तो धिक्कारलेला होता, आणि आह्मी
त्याला मानिलें नाहीं.

४ निश्चयें त्याने आमचीं दुःखें साहिलीं, व
आमचे शोक वाहिले आहेत; आणि आह्मी
त्याला धकावलेला, **देवाने** ताडिलेला, व पिड-
लेला, असें मानिलें. ५ परंतु तो आमच्या अप-
राधांमुळें घायाळ, व आमच्या अन्यायांमुळें चेंग-
रलेला असा होता; त्याजवर आमची कुशल सा-
धण्याची शिक्षा होती; आणि त्याच्या घायांकडून
आह्मास आरोग्य झालें आहे. ६ सर्व आह्मी
मेंढरांसारिखे बहकलों, आह्मी प्रत्येक आपल्या
मार्गांत वळलों; आणि **परमेश्वराने** आह्मा स-
र्वांचा अन्याय त्याजवर लाविला आहे. ७ तो
त्रासविलेला व पिडलेला होता, तथापि त्याने आ-
पलें मुख उघडिलें नाहीं; त्याला कोंकरासारिखें
कापणीस नेलेलें होतें, आणि जसी मेंढी आपल्या
कातरणाऱ्यांपुढें मुकी असती तसें त्याने आपलें
तोंड उघडिलें नाहीं. ८ जुलुमाने व फैसलना-
म्याकडून तो हरलेला होता; मग त्याचें आयुष्य
कोण विचारील? कां तर त्याला जीवंतांच्या भू-
मींतून नाहींसें केलें; माझ्या लोकांच्या अप-
राधामुळें तो धकावलेला होता. ९ आणि त्याने
आपल्या मरण समयीं आपली कबर अधार्मिकांसीं

व धनवानांसीं केली; कारण कीं त्याने कांहीं ब-
ळात्कार केला नव्हता, आणि त्याच्या तोंडांत क-
पट नव्हतें.

१० **तथापि परमेश्वर** त्याला चेंचायाला
मान्य झाला, त्याने त्याला दुखविलें आहे; जेव्हां
तूं त्याचा जीव पापामुळें बलि करिसील, तेव्हां
तो आपली संतति पाहील, आपले दिवस वाढ-
वील, आणि **परमेश्वराचा** मनोदय त्याच्या हा-
ताकडून साधेल. ११ **तो** आपल्या जीवाच्या
श्रमाचें फल पाहून तृप्त होईल; माझा न्यायी
सेवक आपल्या ज्ञानेंकरून बहुतांस न्यायी ठरवील,
कारण कीं तो त्यांच्या अन्यायांचा भार साहील.
१२ **या**करितां मी त्याजला थोरांसीं वांटा देईन,
तोहि सामर्थींसीं लूट विभागील; यामुळें कीं त्याने
आपला जीव मरणापावेतों ओतून दिल्हा; आणि
तो अपराध्यांसीं मोजलेला होता; आणि त्याने
बहुतांच्या पापाचा भार साहिला, आणि अपरा-
ध्यांसाठीं मध्यस्थपणा केला.

## अध्याय ५४.

अगे वांझे, जी तूं प्रसवली नाहींस, ती गायन कर,
जी तूं प्रसूतिवेदना पावली नाहींस, ती गा-
यन करीत सूट, आणि मोठ्या शब्दाने बोल;
कां कीं जिला नवरा नाहीं तिचीं लेंकरें विवाहित
स्त्रीच्या लेंकरांपेक्षां बहुत आहेत, असें **परमे-
श्वर** ह्मणतो. २ **तूं** आपल्या डेऱ्याचें स्थान वि-
स्तीर्ण कर, तुझ्या निवासाचे पडदे तीं लांबवोत;
तूं खळूं नको, आपल्या काढण्या लांब कर, व
आपल्या मेखा बळकट कर; ३ **कारण** कीं तूं
डाव्या उजव्याकडे फुटसील, आणि तुझें संतान
राष्ट्रांस वतन करून घेईल, आणि तें ओसाड
नगरें वसवतील. ४ **भिऊं** नको, कारण कीं तूं
लाजणार नाहींस; व्याकुल होऊं नको, कारण
कीं तूं शरमणार नाहींस; तर तूं आपल्या तरुण-
पणाची लाज विसरसील, आणि तूं आपल्या वि-
धवापणाची निंदा अणखी स्मरणार नाहींस. ५
**कारण** कीं तुझा **उत्पन्न करणारा** तुझा नवरा
आहे, त्याचें नाम सैन्यांचा **परमेश्वर** आहे,
आणि इस्राएलाचा **पवित्र** तुझा **उद्धारणारा** आहे,
त्याला सर्व पृथ्वीचा देव असें ह्मणतील. ६
**तर** जसें सोडलेल्या व खेदित स्त्रीला तसें **पर-
मेश्वराने** तुला बोलाविलें आहे, आणि जेव्हां
तूं टाकलेली होतीस, तेव्हां तरुणपणाच्या स्त्री-
प्रमाणें तुला बोलाविलें, असें तुझा **देव** ह्मणतो.
७ **म्या** तुला अल्पक्षणभर सोडिलें आहे, परंतु
मोठ्या दयानी तुला एकवटून घेईन. ८ **क्रोधा-**
च्या क्षोभाने जरीं तुजपासून म्या आपलें **मुख**
क्षणभर आवरिलें, तथापि मी सर्वकाळच्या कृपेने
तुजवर दया करीन, असें **परमेश्वर** तुझा **उद्धा-
रणारा** ह्मणतो. ९ **तर** हें मला **नोहाच्या** पा-
ण्यांसारिखें आहे; जसी म्या शपथ वाहिली,
कीं **नोहाचीं** पाण्यें पुन्हा भूमीवर चालणार ना-
हींत, तसी म्या शपथ वाहिली आहे, कीं मी तुज-
वर कोपित होणार नाहीं, आणि तुला धमकावणार
नाहीं. १० **कां** तर पर्वत सरतील, व डोंगर
ढळतील; परंतु माझी कृपा तुजवरून सरणार
नाहीं, आणि माझ्या सल्ल्याचा करार ढळणार
नाहीं, असें जो **परमेश्वर** तुजवर दया करितो,
तो ह्मणतो.

११ **अगे** पीडिलेले, तळमळलेले, व शांतविले-
ली नाहीं असी तूं पाहा, मी तुझे दगड नीलावर
मांडीन, आणि तुझे पाये नीलमण्यांचे घालीन.
१२ **आणि** मी तुझ्या खिडक्या स्फटिकाच्या, आ-
णि तुझे दरवाजे अग्निमणींचे, आणि तुझ्या सर्व
सीमा रमणीय दगडाच्या करीन. १३ **आणि**
तुझीं सर्व लेंकरें **परमेश्वराने** शिकविलेलीं हो-
तील; आणि तुझ्या लेंकरांचें अत्यंत कुशल हो-
ईल. १४ **तूं** न्यायेंकरून स्थापित होसील;
बलात्कारापासून तूं दूर राहसील, कां कीं तूं भि-
णार नाहींस; आणि भीतीपासून, कारण कीं ती तुज-
कडे येणार नाहीं. १५ **पाहा**, कोणीएक निश्चयें
लोकांस एकत्र करील, परंतु मजकडून नव्हे; जो
कोणी तुजवर लोकांस एकत्र करील, तो तुजक-
रितां पडेल. १६ **पाहा**, जो अग्नींतल्या निखा-
ऱ्यांस फुंकितो, आणि आपल्या कामासाठीं हत्यार
घडितो, त्या लोहाराला म्या उत्पन्न केलें, आणि
नाश करायाला म्या नाशकरणाऱ्यालाहि उत्पन्न
केलें आहे.

१७ **कोणतेंहि** हत्यार जें तुजविरुद्ध घडिलेलें
आहे, तें साधणार नाहीं, आणि जी कोणती जीभ

तुजसीं वाद करायाला उठेल, तिला तूं अन्यायी
ठरविसील, हाच **परमेश्वराच्या** सेवकांचा वि-
भाग, आणि हेंच मजपासून त्याचें न्यायीपण आ-
हे, असें **परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ५५.

अहो सर्व तान्हेल्यानों, तुह्मी प्रत्येक पाण्याज-
वळ या, आणि ज्यांस कांहीं नाहीं, ते तुह्मी
या, विकत घेऊन खा, होय या, पैक्यावांचून
व मोलावांचून द्राक्षारस व दूध विकत घ्या.
२ जें अन्न नव्हे, त्यासाठीं तुह्मी आपला पैका
कां खर्चितां? आणि जें तृप्त करीत नाहीं,
त्यासाठीं तुह्मी श्रम कां करितां? तुह्मी कान
लाऊन माझें ऐका, आणि जें उत्तम तें खा,
आणि तुमचा जीव मिष्टअन्नानी संतुष्ट होवो. ३
तुह्मी आपला कान लावा, आणि मजकडे या;
ऐका, ह्मणजे तुमचा जीव वांचेल; आणि मी
तुह्मासीं सर्वकाळचा करार करीन, व तुह्मावर
दावीदाचे विश्वासु अनुग्रह करीन. ४ पाहा,
म्या त्याला लोकांचा साक्षी, लोकांचा नायक, व
आज्ञा करणारा केलें आहे. ५ पाहा, जें राष्ट्र
तूं जाणत नाहींस, तें तूं बोलाविसील; आणि
ज्या राष्ट्रांनी तुला जाणिलें नाहीं, तीं तुजकडे
धांवतील, **परमेश्वर** जो तुझा देव, जो इस्राएला-
चा पवित्र त्याजकरितां; कारण कीं त्यानें तुला
गौरविलें आहे.
६ **परमेश्वर** सांपडेल त्या काळीं त्याला शो-
धा; तो जवळ असतां त्यास हाक मारा; ७
दुष्ट आपल्या मार्गास, व अन्यायी मनुष्य आपल्या
संकल्पांस सोडो, आणि **परमेश्वराकडे** फिरो,
ह्मणजे तो त्याजवर दया करील, आणि आमच्या
देवाकडे फिरो, कां कीं तो फार क्षमा करील.
८ कां तर माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांसारि-
ख्या नाहींत, आणि तुमचे मार्ग माझ्या मार्गांसारिखे
नाहींत, असें **परमेश्वर** ह्मणतो. ९ कारण कीं
जसीं आकाशें पृथ्वीपेक्षां उंच आहेत, तसे तुमच्या
मार्गांपेक्षां माझे मार्ग, आणि तुमच्या कल्पनांपेक्षां
माझ्या कल्पना उंच आहेत. १० तर आकाशा-
पासून जसा पाऊस व बर्फ उतरतें, आणि तिकडे
परत जात नाहीं, परंतु भूमीस भिजवितें, आणि
तींतून पदार्थ उत्पन्न होत व उगवत असें करून
पेरणाऱ्यास बीज व खाणाऱ्यास अन्न देतें; ११
तसी जी माझी गोष्ट माझ्या मुखांतून निघती, ती
होईल; ती मजकडे फुकट परत येणार नाहीं,
परंतु जें मी इच्छितों तें करील, आणि ज्यासाठीं
म्या ती पाठविली आहे तें साधील. १२ तर
तुह्मी हर्षानें निघाल, आणि तुमचें चालविणें कु-
शलानें होईल; तुह्मापुढें पर्वत व डोंगर गायन
करीत सुटतील, आणि सर्व वनांतील झाडें टाळ्या
वाजवितील. १३ कांटेऱ्या झाडाच्या स्थानीं दे-
वदारु रुझेल, आणि बहुकंटक झाडाच्या स्थानीं
सुरु उगवेल; आणि **परमेश्वरासाठीं** नाम व
सर्वकाळचें अविनाशी चिन्ह होईल.

## अध्याय ५६.

**परमेश्वर** असें ह्मणतो, कीं तुह्मी नीति पाळा,
आणि न्याय आचरा; कारण कीं माझें तारण
यावयास, व माझा न्याय प्रगट व्हावयास जवळ
आला आहे. २ जो मनुष्य हें करितो, व जो
मनुष्य संतान हें धरितो, जो शाब्बाथास न बाट-
वितां पाळितो, आणि कोणतेंहि दुष्कर्म करण्याप-
सून आपला हात आकळितो, तो धन्य आहे.
३ आणि जो विदेशी याचा पुत्र **परमेश्वरा**-
पासीं जडला आहे, त्यानें ह्मणूं नये; कीं मला
**परमेश्वरानें** त्याच्या लोकांपासून वेगळें केलें
आहे; आणि शंडानें न ह्मणावें, कीं पाहा, मी
वाळलेलें झाड आहें. ४ कां कीं जे शंड माझे
शाब्बाथ पाळितात, आणि जें मला आवडतें तें
निवडितात, व माझा करार धरितात, त्यांजविषयीं
**परमेश्वर** असें ह्मणतो कीं, ५ त्यांला मी
आपल्या घरांत व आपल्या कोटांत पदवी व
नाम जें पुत्र व कन्या यांच्यापेक्षां उत्तम आहे
तें देईन; सनातन नाम त्यांस देईन, जें नाहींसें
व्हावयाचें नाहीं तें. ६ आणि जे विदेशी-
याचें संतान **परमेश्वरापासीं** त्याची सेवा करा-
याला, व त्याचें नाम प्रिय मानायाला, त्याचे
सेवक व्हायाला जडले आहेत, जो कोणी शाब्बा-
थास न बाटवितां पाळितो, व माझा करार धरितो,
७ त्यांसहि मी आपल्या पवित्रपर्वतास आणीन,
आणि आपल्या प्रार्थनेच्या घरांत त्यांस हर्षित

करीन; त्यांचे होम व त्यांचे बलि माझ्या वेदीवर
मला मान्य होतील; कारण कीं माझें घर सर्व
लोकांसाठीं प्रार्थनेचें घर, असें ह्मणतील. ८ **प्रभु**
**परमेश्वर** जो इस्राएलाच्या घालविलेल्यांस एक-
वटितो तो ह्मणतो, कीं त्यासाठीं त्याच्या एकवट-
लेल्यांशीं अणखी दुसऱ्यांस एकवटीन.

९ **कुरणांतल्या** सर्व पशूनों, आणि रानांतल्या
सर्व पशूनों, खायाला या. १० **त्याचे** पाहरेकरी
आंधळे आहेत; ते सर्व अज्ञानी आहेत; ते सर्व
मुके कुत्रे आहेत; त्यांच्याने भुंकवत नाहीं; ते
डूलकीखोर, निजणारे, झोंपाळू आहेत. ११ **ते**
खादाड कुत्रे आहेत, त्यांच्याने तृप्त होववत नाहीं,
आणि ज्यांच्यानी समजवत नाहीं, असे पालक ते
आहेत; ते सर्व आपल्या वाटेस प्रत्येक आपल्या-
कडच्या लाभास पाहतात. १२ **याहो**, मी द्रा-
क्षारस घेऊन येतों, मग आपण मस्त होऊं तोंपर्यंत
दारु पिऊं; आणि उद्यांचा दिवस यासारिखा
होईल, यापेक्षांहि फारच अधिक मोठा होईल.

## अध्याय ५७.

**न्या**यी नाश पावतो, आणि हें कोणी हृदयांत
ठसवीत नाहीं; आणि कृपाळू मनुष्यें का-
दून घेतलीं आहेत, परंतु कोणी समजत नाहीं, कीं
न्यायी संकटापूर्वीं घेतला आहे. २ **तो** समाधा-
नांत जाईल; ते आपल्या गाद्यांवर सुखरूप बस-
तील, प्रत्येक जो आपल्या यथार्थतेने चालतो तो.
३ **तर** गारुडिणीच्या लेंकरानों, जाराच्या व
व्यभिचारिणीच्या संतानानों, तुह्मी इकडे जवळ
या. ४ **कोणाची** तुह्मी थट्टा करितां? कोणावर
तोंड वासतां? व कोणाला जीभ दाखवितां? तुह्मी
अपराधी लेंकरें, लटकें संतान नाहीं काय, ५
**जे** तुह्मी प्रत्येक हिरव्या झाडाखालीं मूर्त्तींसीं
हाव भाव करितां, आणि खोऱ्यांत खडकांच्या
कड्यांखालतीं लेंकरांस जिवें मारितां? ६ **खोऱ्यां**-
तले गुळगुळीत दगडांमध्यें तुझा वांटा आहे, ते
तेच तुझा विभाग आहे; त्यांसच त्वां पेय अर्पण
ओतिलें व अन्नार्पण वाहिलें आहे; या कर्मीं-
विषयीं मी समाधान पावूं काय? ७ **उंच** व
तेर्थेच पर्वतावर त्वां आपली खाट ठेविली आहे;
उन्नत तूं यज्ञ करायाला चढलीस. ८ **दाराच्या**
व खांबाच्या आड त्वां आपलें स्मारक ठेविलें;
तर मजवांचून दुसऱ्यापासीं त्वां आपणास उघडें
केलें, आणि चढलीस, त्वां आपली खाट पसरट
केली, व आपणासाठीं त्यांसीं करार केला; त्वां
त्यांची खाट प्रिय केली, त्वां स्थान निवडिलें. ९
**आणि** तूं तेल घेऊन राजाजवळ जास, आणि
आपले सुवास बहुत करीस, आणि आपले दूत
दूर पाठवीस, आणि त्वां आपणास मृतलोकापर्यंत
नीच केलें आहे. १० **तूं** आपल्या मार्गाच्या
मोठेपणाने दमलीस, तरीं निराशा आहे, असें तूं
ह्मणेनास; त्वां आपली हाताची शक्ति अनुभवली,
ह्मणून तूं खिन्न होत नाहींस. ११ **तर** तूं को-
णाकरितां एवढी व्याकुल व भयभीत आहेस, कीं
खोटें बोललास, व मला स्मरलें नाहीं, व आप-
ल्या हृदयांत ठसविलें नाहीं? मी पुरातन काला-
पासून उगीच राहिलों नाहीं काय, आणि तूं मला
भीत नाहींस? १२ **तुझा** न्याय व तुझीं कर्मे
मी प्रगट करीन, परंतु तीं तुझें हित करणार
नाहींत.

१३ **जेव्हां** तूं आरोळी करितीस, तेव्हां तुझे
समुदाय तुला सोडवोत; परंतु वारा त्यांस घेऊन
जाईल, शुन्यता त्यांस ग्रहण करील; परंतु जो
माझा आश्रय धरितो तो भूमीचा विभाग पावेल,
आणि माझा पवित्रपर्वत वतन करून घेईल,
१४ **आणि** तो ह्मणेल, सडक बांधा, बांधा सडक,
मार्ग सिद्ध करा, माझ्या लोकांच्या वाटेंतून ठेचाड
उचलून काढा. १५ **तर** उंच व थोरावलेला
जो सर्व काळची वस्ती करितो, ज्याचें नाम पवित्र
आहे, तो असें ह्मणतो, कीं मी उंच व पवित्रस्था-
नांत वसतों, आणि चेंचरलेल्या व नम्र आत्म्या-
च्या जनासींहि वसतों, नम्रांच्या आत्म्याला जीव
आणायाला आणि चेंचरलेल्यांच्या हृदयाला जीव
आणायास; १६ **कां** तर मी सर्वकालपर्यंत
विवाद करणार नाहीं, आणि सदां राग ठेवणार
नाहीं; असें असलें तर आत्मा मजसमोरून
थकून जाईल, आणि जे जीव म्या उत्पन्न केले
आहेत, तेहि. १७ **मी** त्याला त्याच्या लोभाच्या
अन्यायामुळें कोपित होऊन हाणिलें, मी आपलें
तोंड झाकून कोपित झालों, तथापि तो वांकडेपणें
आपल्या हृदयाच्या मार्गांत चालत गेला. १८

म्या त्याचे मार्ग पाहिले आहेत, आणि त्याला
आरोग्य करीन; मी त्याला चालवीन, आणि त्या-
ला व त्याच्या शोक करणाऱ्यांस सांत्वनें भरून
देईन. १९ मी ओंठांचें फल उत्पन्न करितों,
जो दूर आणि जो जवळ त्याला समाधान समा-
धानच होईल, असें परमेश्वर ह्मणतो, आणि
मी त्याला आरोग्य करीन. २० परंतु दुष्ट ख-
वळलेल्या समुद्रासारिखे आहेत, कां तर त्याच्यानें
स्वस्थ राहवत नाहीं, आणि त्याचीं पाण्यें मळ व
रेब घालवितात. २१ दुष्टांस कांहीं शांति नाहीं,
असें माझा देव ह्मणतो.

## अध्याय ५८.

तूं गळा काढून ओरड, नियमन करूं नको, तूं
१ आपला शब्द कर्ण्याप्रमाणें उंचाव, माझ्या
लोकांस त्यांचे अपराध, व याकोबाच्या घराण्यास
त्यांचीं पातकें दाखीव. २ तथापि ते मला प्र-
तिदिवशीं शोधितात, आणि माझ्या मार्गांचें ज्ञान
प्रिय मानितात, ज्या राष्ट्रानें न्याय केला आहे,
आणि आपल्या देवाची नीति वर्जिली नाहीं, त्या-
प्रमाणें ते न्यायाच्या विधींविषयीं मजजवळ वि-
चारितात, देवाजवळ आणें त्यांस आवडतें.

३ आह्मी कां उपास केला, आणि तूं पाहत
नाहींस? आह्मी आपल्या जीवाचें पीडन केलें,
आणि तूं मानीत नाहींस? पाहा, तुह्मी आपल्या
उपासाच्या दिवशीं आनंद पावतां, आणि आपल्या
सर्व कामकऱ्यांस श्रमवितां. ४ पाहा, तुह्मी
विवाद व भांडण यांसाठीं, व दुष्टतेच्या मुठीनें
हाणायासाठीं उपास करितां; तुमचा शब्द उंच
स्थानांत ऐकूं जावा, असें करायाला तुह्मी आज
उपास करीत नाहीं. ५ जो उपास ह्मणजे मनु-
ष्याचा स्वजीव पीडनाचा दिवस मी निवडितों, तो
असाच आहे काय? लव्हयाप्रमाणें आपलें डो-
सकें लवविणें व आपल्याखालीं राख व गोणताट
विस्तरणें आहे काय? याला उपास व परमेश्व-
राचा मान्य दिवस ह्मणसील कीं काय? ६
जो उपास मी निवडितों, तो हाच नाहीं काय?
ह्मणजे दुष्टतेच्या बेड्या तोडणें, जोखडाचे बंध
सोडणें, व पिडलेल्यांस मोकळें करणें, व तुह्मी
प्रत्येक जोखड मोडावें? ७ हाच आहे कीं
नाहीं, ह्मणजे त्वां आपलें अन्न भुकेल्यास वाटावें,
आणि घालविलेल्या दरिद्र्यांस घरीं आणावें? जेव्हां
तूं कोणाला उघडें पाहतोस, तेव्हां त्याला वस्त्र
द्यावें; आणि तूं आपल्या सारिख्या माणसापासून
न लपावें, असें करिसील?

८ तेव्हां पहाटेप्रमाणें तुझी प्रभा फांकेल व
तुझें आरोग्य लवकर उगवेल, आणि तुझा न्याय
तुजपुढें चालेल, आणि परमेश्वराचें गौरव
तुझ्या मागें संभाळील. ९ मग तूं हाक मारि-
सील, आणि परमेश्वर उत्तर देईल; तूं आ-
रोळी करिसील, आणि तो ह्मणेल, पाहा मी
आहें; तूं आपल्या मधून जर जोखड व बोट दा-
खविणें व खोटें बोलणें दूर करिसील; १० जर
तूं भुकेल्यास आपला जीव वाढसील, व दुबळ्या
जीवास तृप्त करिसील, तर अंधारांत तुझा प्रकाश
उगवेल, आणि तुझा काळोख दुपारीसारिखा हो-
ईल. ११ आणि परमेश्वर तुला सर्वदा संभा-
ळील, व सुक्यास्थानांत तुझ्या जीवास तृप्त क-
रील, व तुझीं हाडें बळावत असें करील; तेव्हां
तूं शिंपलेल्या मळ्यासारिखा, व ज्या झऱ्यांचीं
पाण्यें कधीं थकत नाहींत, त्यासारिखाहि होसील.
१२ आणि जे तुजसंबंधी ते पुरातन ओसाड्या
बांधितील, तूं बहुत पिढ्यांचे पाये रचून स्थापि-
सील; तेव्हां तुला भगाडाचा भरणारा, राहण्या-
च्या आळ्यांचा यथास्थित करणारा, असें
ह्मणतील.

१३ माझ्या पवित्रदिवशीं तूं आपला मनोरथ
न करावा, ह्मणून शाब्बाथापासून जर तूं आपला
पाय फिरविसील; आणि शाब्बाथाला आनंदाचा
दिवस, परमेश्वराचा पवित्र सन्मान्य दिवस
ह्मणसील, आणि आपलें काम काज न करून,
आपला आनंद न पावून, व आपली गोष्ट न बो-
लून, त्याचा आदर राखसील तर; १४ मग
तूं परमेश्वराकडे आपला आनंद पावसील, आ-
णि पृथ्वीच्या उंचवट्यांवर तुला चढवीन, आणि
तुझा बाप जो याकोब त्याचा विभाग तुला भोगूं
देईन; कारण कीं परमेश्वराचें मुख हें बोललें
आहे.

## अध्याय ५९.

पाहा, तरण्याविषयीं **परमेश्वराचा** हात तो-
कडा झाला नाहीं, आणि ऐकण्याविषयीं त्या-
चा कान जड झाला नाहीं; २ परंतु तुमच्या
अन्यायानी तुह्माला तुमच्या देवापासून दूर केलें
आहे, आणि तुमच्या पापानी तुह्मापासून त्याचें
मुख आवरविलें आहे ह्मणून तो ऐकत नाहीं. ३
कारण कीं तुमचे हात रक्ताने व तुमचीं बोटें
अन्यायाने मळकटलीं आहेत, तुमचे ओंठ खोटें
बोलतात, तुमची जीभ मुळमुळून सांगती. ४
न्यायाविषयीं कोणी उपदेशीत नाहीं, आणि खरे-
पणाकरितां कोणी वाद करीत नाहीं; ते शुन्यते-
वर भाव ठेवितात, व खोटें बोलतात, ते दुष्टाईचें
गर्भधारण करून दुष्कर्म प्रसवितात. ५ ते सा-
पाचीं आंडीं पाखर घालून फोडितात, व कोळिणी-
चीं जाळीं विणितात; जो त्यांचीं आंडीं खातो
तो मरेल, आणि जें चुरडलेलें त्यांतून फुरसें नि-
घेल. ६ त्या विणणाऱ्यांचे ताके पांघरूण हो-
णार नाहींत, आणि ते आपल्या कर्मांनी आपणांस
झांकणार नाहींत, त्यांचीं कर्मे अन्यायाचीं कर्मे
आहेत, आणि त्यांच्या हातांत जुलमाचें काम
आहे. ७ त्यांचे पाय दुष्कर्मांपुढें धांवतात, व
निर्दोष रक्त पाडायाला निकड करितात, त्यांच्या
कल्पना अन्यायाच्या कल्पना आहेत, विघात व
नाश त्यांच्या वाटांत आहेत. ८ त्यानी कुशला-
चा मार्ग जाणला नाहीं, आणि त्यांच्या गतींत
कांहीं नीति नाहीं, त्यानी आपल्यांसाठीं आपल्या
वाटा वांकड्या केल्या आहेत, त्यांत जो कोणी चा-
लतो, तो कुशल अनुभवणार नाहीं.

९ याकरितां नीति आह्मापासून दूर राहती,
न्याय आह्मास आटपत नाहीं; आह्मी प्रकाशाची
वाट पाहतों, परंतु पाहा, अंधार; प्रभेची वाट पा-
हतो, परंतु काळोखांत चालत जातों. १० आ-
ह्मी आंधळ्यांसारिखें भिंतीस चांसपतों, व डोळे
नसल्याप्रममाणें चांपतों, रात्रींप्रमाणें दुपारीं अड-
खळतों, पुष्टांमध्यें मेलेल्यांसारिखें आहों. ११
आह्मी सर्व आस्वलांप्रमाणें गाजतों, आणि खबु-
त्रांसारिखें फार घुमतों; आह्मी न्यायाची वाट
पाहतों, परंतु कांहीं नाहीं; तारणाची वाट पाहतों,
परंतु तें आह्मापासून दूर राहतें. १२ कारण
कीं तुजसमोर आमचे अपराध बहुत झाले आहेत,
आणि आमचीं पापें आह्माविरुद्ध साक्ष देतात;
कां आमचे अपराध आमच्यापासीं आहेत, व
आह्मी आपले अन्याय जाणतों; १३ ह्मणजे
**परमेश्वरा**विरुद्ध अपराध करणें व खोटें बोलणें,
आमच्या देवापासून फितणें, बलात्कार व फितूर
बोलणें, खोटीं वाक्यें हृदयांतून कल्पून उच्चारणें.
१४ आणि नीति मागें फिरली आहे, आणि न्याय
दूर उभा राहतो; कां कीं खरेपण आळीमध्यें प-
ळून पडलें आहे, आणि यथार्थपणाच्याने आंत
जाववत नाहीं. १५ आणि खरेपण उणें पडलें
आहे, आणि जो दुष्टाईपासून दूर राहतो तो लु-
टीस पात्र होतो; तर कांहीं न्याय नाहीं, असें
**परमेश्वराने** पाहिलें, तेव्हां त्याच्या दृष्टींत वा-
ईट पडलें.

१६ आणि कोणी सज्जन नाहीं, असें त्याने
पाहिलें, आणि कोणी मध्यस्थ नाहीं, ह्मणून त्यास
आश्चर्य वाटलें; तेव्हां त्याच्याच बाहुने त्यासाठीं
तारण केलें, आणि त्याच्याच न्यायाने त्याला धा-
रण केलें. १७ आणि त्याने न्याय उरस्त्राणा-
प्रमाणें घातला, व तारण शिरस्त्राणाप्रमाणें आप-
ल्या डोईवर ठेविलें, आणि तो सूड उगवण्याचीं
वस्त्रें पांघरुणासारिखीं त्याला, मग झग्याप्रमाणें
आवेशाने वेष्टिलेला होता. १८ जसें त्यांस
योग्य असेल, तसें तो भरून देईल, तो आपल्या
शत्रूंस कोप, आपल्या वैऱ्यांस फेड देईल; द्वीपांस
फेड भरून देईल. १९ आणि **परमेश्वराच्या**
नामाला, व त्याच्या गौरवाला पश्चिमेपासून सूर्यो-
दयस्थानापावेतों मनुष्यें भितील; जेव्हां पुराप्रमाणें
शत्रु येईल, तेव्हां **परमेश्वराचा** आत्मा त्याला
पळवील.

२० आणि **उद्धारणारा** सीयोनेस येईल, व
याकोबांत जे अपराधापासून फिरतात, त्यांजकडे
येईल, असें **परमेश्वर** ह्मणतो. २१ आणि
**परमेश्वर** ह्मणतो, त्यांसीं माझा करार हाच
आहे, जो माझा आत्मा तुझ्या ठायीं आहे, व जे
माझे शब्द म्या तुझ्या मुखांत घातले आहेत, ते
तुझ्या मुखांतून, अथवा तुझ्या संतानाच्या मुखां-
तून, अथवा तुझ्या संतानाच्या संतानाच्या मुखां-

तून, आतांपासून सर्वकालपर्यंत सरणार नाहींत, **असें परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ६०.

**उ**ठ, तेजस्वी हो, कां कीं तुझी प्रभा आली आहे, आणि तुजवर **परमेश्वराचें** गौरव उगवलें आहे. २ **कां** कीं पाहा, अंधार पृथ्वीला, व गाढ अंधार लोकांस आच्छादील, परंतु तुजवर **परमेश्वर** उदय करील, आणि त्याचें गौरव तुजवर दिसेल. ३ तेव्हां राष्ट्रें तुझ्या प्रकाशाकडेस व राजे तुझ्या उदयाच्या प्रभेकडेस येतील. ४ **तूं** सभोंवतें आपली दृष्टि लावून पाहा; ते सर्व एकत्र मिळून तुजकडेस येतात, तुझे पुत्र दुरून येतील; आणि तुझ्या कन्या तुझ्या कडेवर बसतील. ५ **मग** तूं पाहून हर्षित होसील, आणि तुझें हृदय भिऊन विकसित होईल; कारण कीं समुद्राचें बहुत धन तुजकडे फिरेल, राष्ट्रांचीं बलें तुजकडे येतील. ६ उंटांचा समुच्चय **मिद्यानाचे** व एफाचे तरुण उंट तुजला झांकितील; जे शेबांतले ते सर्व तुजकडे येतील; ते सोनें व धूप आणितील; आणि **परमेश्वराचीं** स्तवनें प्रशस्त करितील. ७ **केदाराचीं** सर्व मेंढरें तुजकडे एकवट होतील, **नबायोथाचे** मेंढे तुझी सेवा करितील; ते मला मान्य होऊन माझ्या वेदीवर चढतील; आणि मी आपलें गौरवाचें मंदिर गौरवीन. ८ **जे** आभाळाप्रमाणें व जशीं खबुतरें आपल्या खिडक्यांकडे उडत असतात तसे उडतात, हे कोण आहेत? ९ **तर** द्वीपें, आणि पहिल्याने तार्शीशाचीं गलबतें माझी वाट पाहतील, **परमेश्वर** तुझा **देव** याच्या नामासाठीं **इस्राएलाच्या पवित्रा**साठीं त्यांनी आपलें रुपें व सोनें संगतीं घेऊन तुझ्या पुत्रांस दुरून आणावें ह्मणून; कां कीं त्याने तुला गौरविलें आहे. १० **आणि** परक्याचे वंश तुझे कोट बांधितील, व त्यांचे राजे तुझी सेवा करितील; कां तर म्या आपल्या क्रोधानें तुला हाणिलें, परंतु आतां मी आपल्या कृपेनें तुजवर दया केली आहे. ११ **तुझीं** दारें सर्वदां उघडीं राहतील, रात्रंदिवस बंद होणार नाहींत, अशासाठीं कीं राष्ट्रांचीं बलें व त्यांचे राजे स्वारीसुद्धां तुजकडे आणावे. १२ **परंतु** राष्ट्र अथवा राज्य जें तुझी सेवा करणार नाहीं, तें नाहींसें होईल, तीं राष्ट्रें अगदी लयास जातील. १३ **माझ्या** पवित्रमंदिराचें स्थान सुशोभित करायाला लबानोनाचें गौरव ह्मणजे देवदारु, भद्रदारु, व सरल हीं मिळून तुजकडे येतील; आणि मी आपल्या पदासनाला गौरवीन. १४ **आणि** तुझ्या पिडणाऱ्याचे वंश तुजकडे नमन करीत येतील, व तुझे सर्व तुच्छ करणारे तुझ्या तळपायांजवळ पडतील, आणि तुला **परमेश्वराचें** नगर, **इस्राएलाच्या पवित्राची सीयोन**, असें ह्मणतील. १५ **तूं** सोडलेली, व द्वेषिलेली, व तुझ्या मधून कोणी जाईना असी होतीस; तथापि आतां मी तुला सर्वकाळचें ऐश्वर्य, बहुत पिढ्यांचा आनंद असें करीन. १६ **आणि** तूं राष्ट्रांचें दूध चोखिसील, आणि राजांचें थान चोंखिसील; आणि मी **परमेश्वर** तुझा तारणारा आहें, व **याकोबाचा प्रतापी** तुझा **उद्धारणारा** आहें, असें जाणसील. १७ **पित्तलाच्या** स्थानीं सोनें आणीन, आणि लोखंडाच्या स्थानीं रुपें, व लांकडाच्या स्थानीं पित्तल, व दगडांच्या स्थानीं लोखंड आणीन; आणि तुझे अधिकारी कुशळ व तुझे कर घेणारे न्याय, असे मी करीन. १८ **तुझ्या** भूमींत जुलूम, व तुझ्या सीमांत विघात व नाश पुन्हा ऐकण्यांत येणार नाहीं; आणि तूं आपल्या कोटांस तारण, व आपल्या दारांस प्रशंसा असें ह्मणसील. १९ **दिवसांस** तुजला प्रकाशासाठीं सूर्य अणखी असणार नाहीं, आणि तुला प्रभेसाठीं चंद्र प्रकाश पाडणार नाहीं; **परंतु परमेश्वर** तुझी सर्वकाळची प्रभा, व तुझा **देव** तुझें तेज होईल. २० **तुझा** सूर्य पुन्हा मावळणार नाहीं, व तुझा चंद्रहि मावळणार नाहीं; कां कीं **परमेश्वर** तुझी सर्वकाळची प्रभा असत जाईल, आणि तुझ्या आक्रंदनाचे दिवस समाप्त होतील. २१ **तुझे** सर्व लोक न्यायी होतील; आणि म्या गौरविलेलें व्हावें ह्मणून, जसें माझ्या लावण्याचें रोप माझें हाताचें कर्म, तसे ते सर्वकालपर्यंत भूमीचें **वतन** भोगितील. २२ **जो** लहान तो हजार असा होईल, आणि **जो** धाकला तो मोठें राष्ट्र असा होईल; हें आपल्यासमयीं लवकर **घडे**, असें मी **परमेश्वर** करीन.

## अध्याय ६१.

**प्र**भु **परमेश्वर** याचा **आत्मा** माझ्या ठायीं
आहे; कारण कीं गरीबांस सुवार्त्ता सांगाया-
ला **परमेश्वराने** मला अभिषिक्त केलें आहे;
हृदय फुटलेल्यांस बरें करायाला, पाडावांस सुटी,
व बंदिवानांस मोकळीक गाजवून सांगायाला,
त्याने मला पाठविलें आहे; २ **परमेश्वराच्या**
प्रसन्नतेचें वर्ष व आमच्या **देवाचा** सूड घेण्याचा
दिवस गाजवून सांगायाला, सर्व शोक करणाऱ्यांस
शांतवन करायाला; ३ **सीयोनेंतल्या** शोक कर-
णाऱ्यांस राखेच्या स्थानीं शोभा, शोकाच्या स्था-
नीं आनंदाचें तेल, विषण्ण आत्म्याच्या स्थानीं प्रशं-
सेचें वस्त्र नेमून द्यायाला, आणि त्याने गौरविलेलें
व्हावें, ह्मणून त्यांस न्यायाचीं झाडें, **परमेराचें**
लावणें, असें ह्मणतील.

४ तेव्हां ते पुरातन ओसाड्या बांधितील, पू-
र्वींच्या उजाड्या यथास्थित करितील, मोडलेलीं
नगरें, बहुत पिढ्याच्या उजाड्या नवसरतील.
५ आणि विदेशी उभे राहून तुमचीं मेंढरें पाळि-
तील, व परदेश्याचे वंश तुमचे शेतकरी व तुमचे
माळी होतील. ६ आणि तुह्माला **परमेश्व-
राचे** याजक ह्मणतील; लोक तुह्मास आमच्या
**देवाचे** सेवक ह्मणतील; तुह्मी राष्ट्रांचें धन
खाल, आणि त्यांच्या गौरवांत आपला मोठेपणा
मिरवाल.

७ तुमच्या लज्जेच्या स्थानीं दुप्पट मिळेल;
आणि अप्रतिष्ठा गेली, ह्मणजे ते आपल्या विभागा-
विषयीं हर्ष करितील; ह्मणून ते आपल्या भूमींत
दुप्पट वतन पावतील; सर्वकाळचा हर्ष त्यांस प्राप्त
होईल. ८ कां मी **परमेश्वर** न्यायाला प्रिय
मानितों, होमाच्या स्थानीं लुट मी द्वेषितों; तर मी
खरेपणाने त्यांच्या कामाचें फल देईन, आणि त्यांसीं
सर्वकाळचा करार करीन. ९ आणि राष्ट्रांमध्यें
त्यांची संतति व लोकांमध्यें त्यांचे उपज कळतील;
सर्व जे त्यांस पाहतील, ते त्यांस अंगीकारून
ह्मणतील, **परमेश्वराने** जे संतान आशीर्वादित
केले आहेत, ते हेच आहेत. १० **मी परमे-
श्वरा**विषयीं फार आनंदेन, माझ्या देवाविषयीं
माझा जीव उल्लासेल; कारण कीं त्याने मला ता-
रणाचीं वस्त्रें नेसविलीं आहेत, न्यायाचा झगा
मला पांघरविला आहे, जसा नवरा आपलें बा-
शिंग सुशोभित करितो, व नवरी जसीं आपलीं
भूषणें लेती तसें. ११ तर जसी भूमि आपला
कोंब निघे असें करिती, व जसा मळा आपले
पेरलेले पदार्थ उगवत असें करितो, तसा **परमे-
श्वर** सर्व राष्ट्रांच्या देखतां न्याय व प्रशंसा
उगवत असें करील.

## अध्याय ६२.

**सी**योनेविषयीं मी मौन धरणार नाहीं, आणि
यरूशालेमेविषयीं मी उगा राहणार नाहीं,
तिचा न्याय तेजाप्रमाणें व तिचें तारण बळत्या
दिव्याप्रमाणें निघेपर्यंत; २ आणि राष्ट्रें तुझ्या
न्यायाला, व सर्व राजे तुझ्या गौरवाला पाहतील;
आणि तुला नवें नाम ठेवितील, जें **परमेश्वराचें**
मुख उच्चारील तें. ३ आणि तूं **परमेश्वरा-
च्या** हातांत गौरवाचा मुगुट, व आपल्या देवा-
च्या हातांत राजाचा किरीट होसील. ४ तुला
पुन्हा सोडलेली ह्मणणार नाहींत, आणि तुझ्या
भूमीला पुन्हा ओसाड ह्मणणार नाहींत; परंतु
तुला हेफ्जीबा ह्मणतील, व तुझ्या भूमीला बऊला
ह्मणतील; कारण कीं **परमेश्वर** तुला प्रसन्न
आहे, आणि तुझी भूमि विवाहित होईल.

५ कां कीं जसा तरुण कुमारीसीं लग्न करितो,
तसे तुझे पुत्र तुसीं लग्न करितील; आणि जसा
नवरा नवरीविषयीं आनंदतो, तसा तुजविषयीं
तुझा देव आनंदेल. ६ अगे यरूशालेमे, म्या
तुझ्या कोटांवर पहारेकरी ठेविले आहेत, ते सर्व
दिवस कधीं उगे राहणार नाहींत; जे तुह्मी **परमे-
श्वराचें** स्मरण करितां ते तुह्मी मौन धरूं नका;
७ आणि तो यरूशालेम स्थापी व तिची पृथ्वीवर
प्रशंसा करीपर्यंत त्याला असूं देऊं नको. ८
**परमेश्वराने** आपल्या उजव्या हाताची व आप-
ल्या बळवान बाहूची शपथ केली आहे, कीं मी
पुन्हा तुझें धान्य तुझ्या वैऱ्यांचें खाणें होऊं देणार
नाहीं, आणि ज्यासाठीं त्वां श्रम केला आहे, तो
तुझा द्राक्षारस विदेश्याच्या वंशास प्यायाला मिळ-
णार नाहीं; ९ परंतु ज्याने तें एकवटलें आहे,
तेच तें खातील, आणि **परमेश्वराला** स्तवितील;

आणि ज्यांनी तो गोळा केला आहे, तेच त्याला
माझ्या पवित्र अंगणांत पितील.
१० जा, दरवाज्यांतून जा, माझ्या लोकांचा मार्ग
सिद्ध करा; बांधा, सडक मार्ग बांधा; धोंडे का-
ढून टाका; लोकांसाठीं झेंडा उभारा. ११ पाहा,
परमेश्वराने पृथ्वीच्या सीमेपर्यंत प्रसिद्ध केलें
आहे, कीं सीयोनेच्या कन्येला ह्मणावें, पाहा,
तुझें तारण येतें आहे; पाहा, त्याचें वेतन त्यासं-
गतींच आहे, व त्याचें कर्माचेंफल त्याजपुढें आहे.
१२ आणि मनुष्यें त्यांस पवित्रलोक, परमेश्वरा-
चे उद्धरलेले, असें ह्मणतील; आणि तुला शो-
धलेली, न सोडलेली नगरी, असें ह्मणतील.

## अध्याय ६३.

जो अदोमाहून येतो आहे, जो तांबडीं वस्त्रें
ल्यालेला बोस्राहून येतो आहे, हा कोण?
हा जो आपल्या पांघरुणाने विराजित असून मोठ्या
पराक्रमाने चालत आहे? मी जो न्यायाने बोल-
णारा, तारायाला समर्थ आहें तो. २ तूं आप-
ल्या पांघरुणाने तांबडा कां आहेस? आणि द्राक्षें
तुडविण्याच्या कुंडांत तुडविणाऱ्यासारिखीं कां तुझीं
वस्त्रें आहेत? ३ म्या एकल्यानेच कुंड भरून
द्राक्षें तुडविलीं, आणि लोकांतला कोणी मजसंगतीं
नव्हता; तर त्यांस मी आपल्या क्रोधाने तुडवीन,
आणि आपल्या रागाने मी त्यांस तुंदडीन; त्यांचें
रक्तहि माझ्या वस्त्रांवर उसळेल, आणि मी आ-
पलीं सर्व पांघुरणें रंगवीन. ४ कां तर सूड घे-
ण्याचा दिवस माझ्या मनांत आहे, आणि माझ्या
उद्धरलेल्यांचें वर्ष आलें आहे. ५ तर कोणी
सहायकरणारा नाहीं, असें म्या पाहिलें; आणि
कोणी उद्धारणारा नाहीं, ह्मणून मला आश्चर्य
वाटलें; तेव्हां माझ्याच हाताने मजसाठीं तारण
केलें, व माझ्या रागानेच मला उद्धरिलें. ६ आणि
मी आपल्या क्रोधाने लोकांस रगडून तुडवीन, आणि
आपल्या रागाने त्यांस मस्त करीन, आणि त्यांचें
रक्त भूमीवर पाडीन.
७ मी परमेश्वराच्या उपकारांची आठवण
करीन; परमेश्वराने जें आमचें सर्व हित केलें
आहे, आणि इस्राएलाच्या वंशाचें जें त्याने दयेने
व परमकरुणेंकरून अत्यंत हित केलें आहे, त्या-
विषयीं परमेश्वराची स्तुति करीन. ८ आणि
तो ह्मणाला, ते माझे लोक आहेत खरे, जीं लेंकरें
खोटें बोलणार नाहींत, असे ते आहेत; ह्मणून
तो त्यांचा तारणारा झाला. ९ त्यांच्या सर्वक-
ष्टांत तो कष्ट पावे, आणि त्याचा समक्ष राहणारा
दूत त्यांस तारी; तो आपल्या प्रीतीने व लीनतेने
त्यांस उद्धरी; आणि सर्व पुरातन दिवसांत त्यांस
उचलून वाही.
१० तथापि ते स्वतंत्र होत असत, आणि त्या-
च्या पवित्र आत्म्यास गांजीत असत; याकरितां
उलटून त्यांचा तो शत्रु झाला, आणि त्यांसीं त्याने
लढाई केली. ११ मग पुरातनदिवस, मोशे व
आपले लोक यांचें स्मरण तो करी; ज्याने त्यांस
त्याच्या कळपाच्या पालकांसंगतीं समुद्रांतून वर
आणिलें, तो कोठें आहे? ज्याने त्याजमध्यें आप-
ला पवित्र आत्मा घातला तो कोठें आहे? १२
जो आपल्या गौरवी बाहूने मोशेच्या उजव्या हा-
तास वागवीत असे, ज्याने आपणासाठीं सनातन
नाम करायाला त्यांजपुढें समुद्र विभागला? १३
ज्याने त्यांस डोहांमधून नेलें, तेव्हां जसा घोडा
माळावर तसे ते आडखळले नाहींत? १४
जसा पशु खोऱ्यांत उतरत असतो, ज्याला परमे-
श्वराचा आत्मा विसांवा देतो, तसें त्वां आपणा-
साठीं गौरवी नाम करायाला आपले लोक नेले.
१५ आकाशांतून दृष्टि लाव, आणि आपल्या
पवित्र व गौरवी वस्तींतून पाहा; तुझा आवेश व
तुझा पराक्रम कोठें आहेत? तुझ्या अंतड्यांचा क-
ळवळा व तुझी करुणा मजविषयीं बंद झाली आ-
हेत काय? १६ तूं तर आमचा बाप आहेस,
आब्राहाम जरी आह्मास जाणत नाहीं, आणि इ-
स्राएल आह्मास अंगीकारीत नाहीं, तरी हे
परमेश्वरा, तूं आमचा बाप, आमचा उद्धार-
णारा आहेस; तुझें नाम सर्वकालचें आहे.
१७ हे परमेश्वरा, त्वां आपल्या मार्गांपासून
आह्माला कां बहकूं दिल्हें आहे? त्वां आपल्या
भयापासून आमचीं ह्रदयें कठोर कां होऊं दिल्हीं
आहेत? तूं आपल्या सेवकांकरितां आपल्या वत-
नाचे वंश परत आण. १८ थोडा वेळ तुझ्या
पवित्रलोकांनी वतन भोगलें आहे; तुझें पवित्र-
स्थान आमच्या शत्रूंनी तुडविलें आहे. १९

आह्मी पुरातन परंपरेचे आहों; त्वां त्यांजवर
राज्य केलें नाहीं; त्यांजवर तुझें नाम ठेविलें
नाहीं.

## अध्याय ६४.

अहा त्वां आकाशें फाडून उतरावें, आणि पर्वत
तुजसमोर गळून पडावे, २ जसा अग्नि
काड पेटवितो, जसा अग्नि पाणी उतवितो, तसें
आपल्या शत्रूंस तूं आपलें नाम कळीव, राष्ट्रें तुज-
पुढें थरथरां कांपोत. ३ ज्या भयंकर कर्मांची
आह्मी वाट पाहिली नव्हती, तीं जेव्हां तूं करूं
लागलास तेव्हां उतरलास, पर्वत तुजसमोर गळून
पडले. ४ तर जो त्याची आशा धरितो, त्या-
साठीं जें त्यानें सिद्ध केलें आहे, तें उत्पत्तिकाला-
पासून मनुष्यांनी ऐकिलें नाहीं, व त्यांच्या कानीं
पडलें नाहीं, आणि हे देवा, तुजवांचून कोणाच्या
डोळ्यानें तें पाहिलें नाहीं. ५ जो आनंदतांना व
न्यायीपण करितांना तुझ्या मार्गांत तुझी आठवण
करितात, त्यांस तूं भेटतोस; पाहा, आह्मी पाप
केलें ह्मणून तूं कोपित झालास; तथापि त्यांसहित
आह्मी सर्वकाळ तरावें. ६ परंतु आह्मी सव
विटाळल्या पदार्थांसारिखे आहों, आणि आमचीं
सर्व पुण्यकर्में विटाळाच्या फडक्याप्रमाणें आहेत;
आणि सर्व आह्मी पानासारिखे सुकून जातों;
आणि आमच्या अन्यायांनी आह्मांला वाऱ्याप्रमाणें
उडवून नेलें आहे. ७ आणि कोणी तुझ्या नामानें
हाक मारीत नाहीं, व तुला आग्रह करायाला
उत्तेजित होत नाहीं; कारण कीं त्वां आपलें मुख
आह्मापासून झांकिलें आहे, आणि आमच्या अ-
न्यायांमुळें आह्मास खंडण केलें आहे. ८ परंतु
आतां हे परमेश्वरा, तूं आमचा बाप आहेस;
आह्मी गारा व तूं आमचा कुंभार; आणि आ-
ह्मी सर्व तुझ्या हाताचें काम आहों.

९ हे परमेश्वरा, अतिशयें कोपित होऊं
नको, आणि सर्वकालपर्यंत अन्याय स्मरूं नको;
पाहा, दृष्टि लाव, आह्मी सर्व तुझे लोक आहों.
१० तुझीं पवित्र नगरें रान झालीं, सीयोन जंगल
झाली, यरूशालेम ओसाड झाली आहे. ११
आमचें पवित्र व सुशोभित मंदिर ज्यांत तुला आ-
मचे वडील स्तवीत असत, तें अग्नीनें जाळिलें
आहे, आणि आमचीं सर्व रमणीयस्थलें ओसाड
झालीं आहेत. १२ हे परमेश्वरा, या गोष्टीं-
करितां तूं आपणाला आकळिसील काय? तूं उगा
राहसील, व आह्मास अतिशयें पीडिसील
काय?

## अध्याय ६५.

जे मला पुसत नसत, ते मला शोधितील; जे
मला हुडकीत नसत, त्यांस मी सांपडेन; ज्या
राष्ट्राला माझें नाम ठेविलें नव्हतें, त्याजला, मला
पाहा, पाहा मला, असें ह्मणेन. २ जे फितुरी
लोक आपल्या कल्पनांप्रमाणें वाईट मार्गांत चाल-
तात, त्यांजकडे सर्व दिवस म्या आपले हात पुढें
केले आहेत; ३ जे लोक माझ्या तोंडावर नित्य
मला क्षोभवितात, जे बागांत यज्ञ करितात, आणि
इटांच्या वेद्यांवर धूप जाळितात; ४ जे कबरां-
मध्यें वसतात, व थड्यांमध्यें राहतात, जे डुकरांचें
मांस खातात, व ज्यांच्या पात्रांत अमंगळ पदार्थां-
चा रस असतो; ५ जे ह्मणतात, तूं दूर राहा,
मला शिवूं नको; कां तर मी तुजपेक्षां पवित्र आहें;
ते माझ्या नाकपुड्यांत धूर, सर्व दिवस जळता अ-
ग्नि, असे आहेत. ६ पाहा, मजसमोर लिहि-
लेलें आहे; मी उगा राहणार नाहीं, परंतु भरून
देईन, त्यांच्या पदरीं भरून देईल; ७ तुमच्या
अन्यायांचे दंड व तुमचे पूर्वज जे पर्वतांवर धूप
जाळीत असत, व डोंगरांवर मला निंदीत असत,
त्यांच्या अन्यायांचे दंडहि पूर्ण करीन; आणि
त्यांच्या पूर्वकर्मांचें फल त्यांच्या पदरीं मोजून देईन,
असें परमेश्वर ह्मणतो.

८ परमेश्वर ह्मणतो, कीं जसा द्राक्षांच्या
घोंसांत रस सांपडतो, आणि कोणी ह्मणतो.
त्याचा नाश करूं नका, कारण कीं त्यांत आशी-
र्वाद आहे; तसें मी आपल्या सेवकांसाठीं करीन,
त्या सर्वांचा नाश न करावा ह्मणून. ९ आणि
याकोबापासून संतान, व यहूदापासून माझ्या पर्व-
तांचा वतनदार उत्पन्न होईल असें करीन; तेव्हां
माझे निवडलेले त्याचें वतन पावतील, व माझे
सेवक तेथें वसतील. १० आणि माझ्या ज्या लो-
कांनी माझा शोध केला आहे, त्यांसाठीं शारोन

मेंढरांचें कुरण होईल, आणि आखोरांचें खोरें
गुरांची गोठण होईल.
११ परंतु जे **परमेश्वरास** सोडितात, व मा-
झ्या पवित्रपर्वतास विसरतात, जे लक्ष्मीसाठीं ताट
सिद्ध करितात, व दैवासाठीं पेयअर्पण पात्रांत
भरितात, ते तुह्मी आहां. १२ याकरितां मी तु-
ह्माला तरवारीसाठीं गणीन, आणि तुह्मी सर्व
वधासाठीं उपडे पडाल; कां कीं जेव्हां म्या बोलाविलें,
तेव्हां तुह्मी उत्तर दिल्हें नाहीं; मी जेव्हां बोललों,
तेव्हां तुह्मी ऐकिलें नाहीं; परंतु माझ्या दृष्टींत वाईट
केलें, आणि ज्यांत मला संतोष वाटेना तें निवडिलें.
१३ याकरितां **प्रभु परमेश्वर** असें ह्मणतो, कीं
पाहा, माझे सेवक खातील, परंतु तुह्मी भुकेले
राहाल; पाहा, माझे सेवक पितील, परंतु तुह्मी
तान्हेले राहाल; पाहा, माझे सेवक हर्षतील,
परंतु तुह्मी लाजाल; १४ पाहा, माझे सेवक
मनाच्या हर्षानें गायन करतील, परंतु तुह्मी म-
नाच्या खेदानें ओरडाल, आणि आत्म्याच्या भं-
गानें केंकाल. १५ आणि तुह्मी आपलें नाम मा-
झ्या निवडलेल्यांसाठीं शाप असें सोडून ठेवाल;
आणि **प्रभु परमेश्वर** तुला जिवें मारील, आणि
आपल्या सेवकांस दुसरें नाम ठेवील. १६ ह्मणून
जो भूमीवर आपणास आशीर्वाद करितो, तो ख-
ऱ्या **देवाच्या** नामानें आपणास आशीर्वाद करील;
आणि भूमीवर जो शपथ वाहतो, तो खऱ्या **देवा-
ची** शपथ वाहील; कारण कीं पूर्वीच्या पीडा वि-
सरलेल्या आहेत, आणि माझ्या दृष्टीपासून गुप्त
झाल्या आहेत.
१७ कां तर पाहा, मी नवीं आकाशें व नवी
पृथ्वी उत्पन्न करितों; आणि जीं पूर्वीचीं तीं लोक
स्मरणार नाहींत, आणि तीं मनांत येणार नाहींत.
१८ तर जें मी उत्पन्न करितों, त्याविषयीं तुह्मी
सदासर्वकाल आनंद व उल्लास करा; कां तर पा-
हा, मी यरूशालेमेस उल्लास व तिच्या लोकांस
आनंद उत्पन्न करीन. १९ आणि यरूशालेमे-
विषयीं उल्लास करीन, व आपल्या लोकांविषयीं
आनंद करीन; आणि तींत रडण्याचा शब्द, आ-
रोळीचा शब्द पुन्हा ऐकणार नाहींत. २० ज्याने
आपलें आयुष्य पूर्ण केलें नाहीं, असा तींतला
बालक अथवा ह्मातारा कोणीहि फिरून होणार
नाहीं; कां कीं मुलगा शंभर वर्षांचा होऊन मरे-
ल; परंतु पापी शंभर वर्षांचा असून शापग्रस्त
होईल. २१ आणि ते घरें बांधून त्यांत वसती-
ल, आणि द्राक्षींचे मळे लावून त्यांचें फल खा-
तील. २२ त्यांनी घर बांधिलें असतां दुसरा
त्यांत वसणार नाहीं; त्यांनी झाडें लाविलीं अ-
सतां दुसरा त्यांचें फल खाणार नाहीं; कारण कीं
झाडाच्या आयुष्याप्रमाणें माझ्या लोकांचें आयुष्य
होईल, आणि माझे निवडलेले चिरकाल आपलें
हातांचें काम भोगितील. २३ ते व्यर्थ श्रम कर-
णार नाहींत, आणि कष्ट भोगायाला लेंकरें जन्म-
विणार नाहींत; कारण कीं ते आपल्या संततिसहित
**परमेश्वराच्या** आशीर्वादितांचे संतान आहेत.
२४ आणि असें होईल, कीं त्यांनी हाक मारल्या-
पूर्वी मी उत्तर देईन; ते बोलतांच मी ऐकेन. २५
लांडगा व कोंकरूं एकत्र चरतील, आणि सिंह
बैलाप्रमाणें गवत खाईल; आणि धूळ सर्पाचें
खाणें होईल; माझ्या पवित्र पर्वतांत कोणी
उपद्रव अथवा नाश करणार नाहींत, असें **परमे-
श्वर** ह्मणतो.

## अध्याय ६६.

**परमेश्वर** ह्मणतो, कीं आकाश माझें सिंहासन,
आणि पृथ्वी माझें पादासन आहे; तर मजसा-
ठीं जें तुह्मी घर बांधाल, तें कोठें असेल? आणि
कोठें माझें विसाव्याचें स्थान आहे? २ तर ते
सर्व पदार्थ माझ्या हातानें उत्पन्न केले, ह्मणून ते
सर्व आहेत, असें **परमेश्वर** ह्मणतो; परंतु जो
दीन व अनुतापी आत्म्याचा असून माझ्या वचना-
चें भय धरितो, त्याजकडे मी पाहीन. ३ जो
बैलाला कापून मारितो तो मनुष्यघातकासारिखा
आहे; जो कोंकरूं बलि करून मारितो, तो कु-
त्र्याची मान कापणाऱ्यासारिखा आहे; जो अर्प-
ण करितो, तो डुकराचें रक्त अर्पणाऱ्यासारिखा
आहे; जो धूप जाळितो, तो मूर्तीची स्तुति कर-
णाऱ्यासारिखा आहे; होय त्यांनी आपले मार्ग
निवडिले आहेत, आणि त्यांचा जीव त्यांच्या अ-
मंगळकर्मांत संतोषतो. ४ मीहि त्यांच्या विप-
त्ति निवडीन, आणि त्यांचीं भयें त्यांजवर आणीन;
कारण कीं जेव्हां म्या बोलाविलें, तेव्हां कोणी

उत्तर दिल्हें नाहीं; जेव्हां मी बोललों, तेव्हां
त्यानी ऐकिलें नाहीं; परंतु जें माझ्या दृष्टींत वा-
ईट तें त्यानी केलें, व ज्यांत मी संतोषत नाहीं,
तें त्यानी निवडिलें.
५ जे तुह्मी त्याच्या वचनाचें भय बाळगतां
ते तुह्मी **परमेश्वराचें** वचन ऐका; तुमच्या ज्या
भावानी माझ्या नामाकरितां तुह्मास द्वेषिलें व बा-
हेर टाकलें, ते ह्मणाले, **परमेश्वराला** गौरव
असो; परंतु तो तुमच्या हर्षासाठीं प्रगट होईल,
आणि ते लाज पावतील. ६ नगरांतून प्रणादाचा
शब्द, देवळांतून शब्द, जो **परमेश्वर** आपल्या
वैऱ्यांला फेड भरून देतो, त्याचा शब्द येतो. ७
तिने तिडका यायाच्या पूर्वीं ती प्रसूत झाली; तिला
वेदना लागायाच्या पूर्वी ती पुत्र प्रसवली. ८
असी गोष्ट कोणी ऐकिली? असीं वर्त्तमानें कोणी
पाहिलीं काय? एकाच दिवसीं पृथ्वी प्रसवे, असें
कोणी करील काय? राष्ट्र एकाएकीं जन्मेल काय?
तथापि ज्ञीयोन जेव्हां प्रसूतिवेदना पावली, ते-
व्हांच ती आपलीं लेंकरें प्रसविली. ९ **परमे-
श्वर** ह्मणतो, काय, मी प्रसूतीच्या लागास आ-
णून जन्मविणार नाहीं? मी जन्मवून गर्भस्थान
बंद करीन काय? असें तुझा देव ह्मणतो. १०
जे तुह्मी यरूशालेमेवर प्रीति ठेवितां, ते सर्व
तुह्मी तिजसंगतीं हर्षा व उल्लासा; जे तुह्मी ति-
जविषयीं शोक करितां ते सर्व तुह्मी तिजसीं हर्षे-
करून आनंदा: ११ अशासाठीं कीं तुह्मी ति-
च्या शांतवनाचें थान पिऊन तृप्त व्हावें, आणि
तिच्या गौरवाचें पुष्कळपण चोखून संतुष्ट व्हावें.
१२ कारण कीं **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी
तिजकडे नदीसारिखें कुशल, व भरलेल्या ओघा-
सारिखें राष्ट्रांचें गौरव पोंचवीन, तेव्हां तुह्मी थान
चोखाल; ती तुह्मास कडेवर वाहील, आणि मां-
ड्यांवर लाडावील. १३ जसी कोणेकाची आई
त्याचें शांतवन करिती तसा मी तुमचें शांतवन क-
रीन; आणि यरूशालेमेंत तुह्मी शांतवन पावाल.
१४ हें जेव्हां पाहाल, तेव्हां तुमचें हृदय आनंदेल,
आणि हिरवळीप्रमाणें तुमचीं हाडें नवसरतील;
आणि **परमेश्वराचा** हात त्याच्या सेवकांकडेस
कळेल, परंतु त्याच्या वैऱ्यांवर त्याचा क्रोध हो-
ईल. १५ तर पाहा, **परमेश्वर** अग्निसुद्धां ये-
ईल, व वावटुळीप्रमाणें त्याचे रथ येतील, क्षोभें-
कडून त्याचा क्रोध आणि अग्निज्वालांकडून त्याची
धमकी पोंचवायाला. १६ कारण कीं **परमेश्वर**
अग्नीकडून, व आपल्या तरवारीकडून सर्व मनुष्य-
जातीसीं वाद करील; आणि **परमेश्वराने** जे
वधलेले ते बहुत होतील. १७ जे डुकराचें मास,
व अमंगळ पदार्थ, व उंदीर खाऊन बागाच्या मध्य-
भागांतल्या एका झाडाच्या आड आपणास पवित्र
व स्वच्छ करितात, ते एकदांच नाहींसे होतील,
असें **परमेश्वर** ह्मणतो. १८ तर त्यांचीं कर्मे
व त्यांच्या कल्पना मी जाणतों; आणि असें प्रत्य-
यास येईल, कीं सर्व राष्ट्रें व सर्व भाषांचे लोक मी
एकत्र मिळवीन, तेव्हां ते येऊन माझें गौरव पाहतील.
१९ आणि त्यांजमध्यें चिन्ह ठेवीन, आणि त्यांतल्या
वांचलेल्यांस मी राष्ट्रांकडे, ह्मणजे तारशीश, पूल, व
लूद, जे धनुष्य ओढितात, त्यांजकडे, आणि तूबाल,
व यावान, व दूरचीं द्वीपें, ज्यानी माझी कीर्त्ति ऐकि-
ली नाहीं, व माझें गौरव पाहिलें नाहीं, त्यांजकडे-
हि पाठवीन; मग ते राष्ट्रांमध्यें माझें गौरव प्रगट
करितील. २० तेव्हां तुमच्या सर्व भावांला घो-
ड्यांवर, व रथांत, व पालख्यांत, व खेचरांवर, व
चपल उंटांवर, बसवून सर्व राष्ट्रांतून माझ्या पवित्र
पर्वतास, यरूशालेमेस **परमेश्वराजवळ** अर्पणाप्र-
माणें आणितील, जसे इस्राएलाचे वंश स्वच्छपा-
त्रांत अर्पण ठेवून **परमेश्वराच्या** घरांत आणितात
तसे, असें **परमेश्वर** ह्मणतो. २१ आणि त्यांतल्या
कित्येकांस याजक व लेवी व्हायासाठीं घेईन, असें
**परमेश्वर** ह्मणतो. २२ कारण कीं जीं नवीं आकाशें
व जी नवी पृथ्वी मी उत्पन्न करीन, तीं जसीं मज-
समोर टिकतील, तसीं तुमची संतति व तुमचें नाम
हीं टिकतील, असें **परमेश्वर** ह्मणतो. २३
आणि असें होईल, कीं प्रत्येका अमावास्येस व
प्रत्येका शाब्बाथास सर्व मनुष्यजाति मजसमोर
भजायाला येत जाईल, असें **परमेश्वर** ह्मणतो.
२४ आणि ज्या मनुष्यानी माझा अपराध केला
त्यांचीं मढीं ते बाहेर जाऊन पाहतील; कारण कीं
त्यांचा किडा मरणार नाहीं, आणि त्यांचा अग्नि
विझणार नाहीं; आणि तीं सर्वमनुष्यजातीला
वीट असीं होतील.

THE BOOK OF THE PROPHET JEREMIAH.

# इर्मयाचा भविष्यवाद.

## अध्याय १.

हिल्कीयाचा पुत्र इर्मया जो बन्यामीन देशांत-
ल्या अनाथोथांतल्या याजकांतला होता त्याचे
वाद; २ ज्या त्याजवळ यहूदाचा राजा आमोन
याचा पुत्र जो योशीया त्याच्या दिवसांत, त्याच्या रा-
ज्याच्या तेराव्या वर्षांत **परमेश्वराचें** वचन आलें.
३ आणि यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र जो
यहोयाकीम त्याच्या दिवसांत आलें, यहूदाचा
राजा योशीया याचा पुत्र जो जिद्कीया याच्या
अकराव्या वर्षाच्या समाप्तीपर्यंत, जो यरूशाले-
मचा प्रवास पांचव्या महिन्यांत झाला त्यापर्यंतहि
आलें. ४ तर **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, ५ म्यां तुला उदरांत निर्माण करायाच्या
पूर्वीं म्यां तुला जाणिलें, आणि तूं गर्भस्थानांतून
निघायाच्या पूर्वीं म्या तुला पवित्र केलें, आणि
राष्ट्रांसाठीं भविष्यवादी असें नेमिलें. ६ तेव्हां
मी ह्मणालों, अहा **प्रभु परमेश्वरा**, पाहा, मी
बोलायाला समर्थ नाहीं, कारण कीं मी पोर आहें.
७ तेव्हां **परमेश्वराने** ह्मटलें, मी पोर आहें,
असें बोलूं नको; कां कीं ज्या सर्वांकडे मी तुला
पाठवीन त्यांजजवळ जासील, आणि जें मी तुला
आज्ञापीन तें सर्व बोलसील. ८ त्यांस भिऊं नको,
कां तर तुला पार पाडायासाठीं मी तुझ्याजवळ
आहें, असें **परमेश्वर** ह्मणतो. ९ मग **परमे-
श्वराने** आपला हात पुढें करून माझ्या मुखास
स्पर्शिलें; तेव्हां **परमेश्वराने** मला सांगितलें,
पाहा, म्या तुझ्या मुखांत आपलीं वचनें घातलीं
आहेत. १० पाहा, उपटायाला व पाडायाला
व नाशायाला व मोडायाला, बांधायाला व लावा-
याला म्या तुला या दिवसीं राष्ट्रांवर व राज्यांवर
ठेविलें आहे.
११ नंतर **परमेश्वराचें** वचन मजजवळ आ-
लें, कीं हे इर्मया, तुला काय दिसतें? तेव्हां मी
ह्मणालों, मला बदामीची काठी दिसती. १२
तेव्हां **परमेश्वराने** मला ह्मटलें, तुला बरें दि-
सलें; कां कीं मी आपलें वचन साधायाला ज-
पतों. १३ मग पुन्हा **परमेश्वराचें** वचन मज-
जवळ आलें, कीं तुला काय दिसतें? तेव्हां मी
ह्मणालों, एक शिजती थाली मला दिसती, आणि
तिचें मुख उत्तरेकडे आहे. १४ तेव्हां **परमे-
श्वराने** मला ह्मटलें, देशांतल्या सर्व राहणाऱ्यां-
वर उत्तरेंतून विपत्ति निघेल. १५ कां तर **पर-
मेश्वर** ह्मणतो, पाहा, मी उत्तरेंतल्या राज्यांतल्या
सर्व वंशांस बोलावीन; तेव्हां ते येतील, आणि
प्रत्येक आपलें सिंहासन यरूशालेमेच्या दरवाजां-
जवळ व भोंवती तिच्या सर्व कोटांच्या समोर व
यहूदाच्या सर्व नगरांच्या समोर ठेवितील. १६
आणि ज्यानी मला सोडून इतर देवांपुढें धूप जा-
ळिला, आणि आपल्या हातांच्या कर्मांस भजिलें
आहे, त्यांजवर त्यांच्या दुष्टाईमुळें मी आपलीं
शासनें उच्चारीन.
१७ तूं तर आपली कंबर बांध, आणि उठून
जें सर्व मी तुला आज्ञापीन तें त्यांस सांग; त्यांज-
करितां भयभीत होऊं नको, झालास तर कदाचित
मी तुला त्यांसमोर उदास करीन. १८ तर पाहा,
मी आज तुला सर्व देशाप्रत व यहूदाच्या राजां-
प्रत व त्याच्या सरदारांप्रत व त्याच्या याजकांप्रत
व देशांतल्या लोकांप्रत गांवकुस्वी नगर व लोखं-
डाचा खांब व पितळाचे कोट असें केलें आहे.
१९ आणि ते तुजसीं लढतील, परंतु तुजवर प्रबल
होणार नाहींत, कारण कीं तुला पार पाडायाला
मी तुजजवळ आहें, असें **परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय २.

आणि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ तूं जाऊन यरूशालेमेच्या कानांत
गाजवून सांग, **परमेश्वर** ह्मणतो, कीं मी तुझ्या
तरुणपणाची दया, तुझ्या वाङ्निश्चयाची प्रीति
स्मरतों, ज्या त्वां रानांत न पेरलेल्या भूमींत मला
अनुसरून केली ती. ३ इस्राएल आपल्या उत्प-
त्तीच्या प्रथमफलासुद्धां **परमेश्वरासाठीं** पवित्र

आहे; जे सर्व त्याला खाऊन नाशितात, ते दोषी
होतील; त्यांजवर अरिष्ट येईल, असें **परमेश्वर**
ह्मणतो. ४ **याकोबाच्या** घराण्या, व **इस्राएलाच्या**
वंशाच्या सर्व कुलानों, तुह्मी **परमेश्वराचें** वचन
ऐका.

५ **परमेश्वर** ह्मणतो, कीं तुमच्या वडिलांस
माझ्या अंगीं कोणता अन्याय सांपडला ह्मणून ते
मजपासून दूर गेले आहेत, आणि व्यर्थपणाप्रमाणें
चालून व्यर्थ झाले आहेत? ६ **आणि** ते ह्मणाले
नाहींत, कीं ज्या **परमेश्वराने** आह्मास **मिसर**
देशांतून वर आणिलें, ज्याने आह्मास रानांत शू-
न्यतेच्या व खांचांच्या भूमींत, सुक्या व मरण
छायेच्या भूमींत चालविलें, ज्या भूमींतून कोणी
चालेना व जींत मनुष्य वसेना तींत आह्मास चा-
लविलें, तो कोठें आहे? ७ **आणि** म्या तुह्मास
पिकाऊ भूमींत तिचें फळ व तिचे उत्तमपदार्थ खा-
याला आणिलें; परंतु तुह्मी तींत शिरून माझी
भूमि बाटविली, आणि माझें वतन वीट असें क-
रून ठेविलें. ८ **परमेश्वर** कोठें आहे? असें
याजक ह्मणेनात; आणि नेमशास्त्राच्या उपदेश-
कानी मला जाणिलें नाहीं; आणि पालकानी माझा
अपराध केला आहे; आणि भविष्यवाद्यानी **बा-**
**लाच्या** नामाने भविष्य सांगितलें आहे; आणि
ज्यांच्याने हित करवत नाहीं त्यांस ते अनुसरले
आहेत.

९ **या**करितां मी तुह्मासीं अणखी विवाद करी-
न, असें **परमेश्वर** ह्मणतो, तुमच्या लेंकरांच्या
लेंकरांसींहि विवाद करीन. १० **कां** तर **खित्ती-**
**माच्या** द्वीपांस पार जाऊन पाहा; आणि **केदारास**
पाठवून पुरता विचार करा; आणि असी गोष्ट
आहे किंवा नाहीं हें पाहा. ११ **कोण**त्याहि रा-
ष्ट्राने आपले देव पालटिले आहेत काय? आणि
ते देव नाहींत; परंतु ज्याच्याने कांहीं हित करवत
नाहीं त्यासाठीं माझ्या लोकानी आपलें गौरव पा-
लटिलें आहे. १२ **अहो** आकाशानों, तुह्मी या-
विषयीं विस्मित व्हा, आणि भयाने कांपून अत्यंत
घाबरे व्हा, असें **परमेश्वर** ह्मणतो. १३ **का-**
**रण** कीं माझ्या लोकानी दोन दुष्कर्मे केलीं आ-
हेत, त्यानी आपणांसाठीं कूप, मोडके कूप जे कांहीं
पाणी धरायाला समर्थ नाहींत, ते खोदले आहेत;
आणि जीवंत पाण्यांचा झरा जो मी त्या मला
सोडिलें आहे.

१४ **काय**, **इस्राएल** सेवक आहे? तो घरीं
जन्मलेला दास आहे काय? तो लुटीस पात्र
कां झाला आहे? १५ **तरुण** सिंह त्याजवर ग-
र्जले, त्यानी आपला शब्द उद्धारला, आणि त्या-
ची भूमि ओसाड केली; आणि त्याचीं नगरें जा-
ळिलीं असतां त्यांमध्यें कोणी राहत नाहीं. १६
**नोफ** व **ताहफनस** यांचे वंश तुझ्या माथ्यावर
चरले आहेत. १७ **जेव्हां** **परमेश्वर** तुझा देव
तुला मार्गांत चालवीत होता तेव्हां त्याला सोडून
त्वां आपणासाठीं हें केलें नाहीं काय? १८ **तर**
आतां तुला **शिहोरेचें** पाणी प्यायाला **मिसरा-**
**च्या** मार्गांत काय आहे? अथवा नदीचें पाणी
प्यायाला तुला **अश्शूराच्या** मार्गांत काय आहे?
१९ **तुझें** दुष्टपण तुला शिक्षील, व तुझे फितूर तु-
ला निषेधितील; तर जाण व पाहा, कीं त्वां **पर-**
**मेश्वराला** आपल्या **देवाला** सोडिलें, आणि
तुझ्या अंगीं माझें भय नाहीं, हें वाईट व कडू
आहे, असें **प्रभु** सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो.

२० **तर** पूर्वीं जेव्हां म्या तुझें जोखड मोडिलें,
व तुझीं बंधनें तोडिलीं, तेव्हां ह्मणालीस, कीं मी
उलंघणार नाहीं; परंतु प्रत्येक उंच डोंगरावर व
प्रत्येक हिरव्या झाडाखालीं तूं लवून व्यभिचार
करितीस. २१ **तथापि** म्या तुजला उत्कृष्ट द्राक्षी,
अगदीं खरें बीज असें लाविलें असतां तूं पालटून
मजसाठीं विजाती द्राक्षेचें रोप कसी झाली आहेस?
२२ **जरीं** त्वां आपणास सोऱ्याने धुतलें आणि पु-
ष्कळ साबूण आपल्या अंगाला लाविला तरीं मज-
पुढें तुझा अन्याय तुझ्या अंगीं मुरला आहे, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो. २३ **मी** विटाळलें
नाहीं, मी **बालांस** अनुसरलें नाहीं, असें कसें
ह्मणतील? तूं खोऱ्यांत आपला मार्ग पाहा, जें
त्वां केलें आहे तें जाण; जी चपळ उंटीण आपल्या
मार्गांत भ्रमती तसी तूं आहेस; २४ **आणि** जंगलांत
वहिवाटलेली रानगाढवी जी आपल्या इच्छेप्रमाणें
वारा झुरकून पिते, तिला तिच्या हात्यणांत कोण
फिरवील? सर्व जे तिला शोधितील त्यांस श्रमावें
लागणार नाहीं; ती आपल्या महिन्यांत त्यांस
सांपडेल. २५ **तूं** आपल्या पायांस अनालवंदी

व आपल्या गळ्यास तहान होऊं देऊं नको; तथा-
पि तूं ह्मणाली आहेस, आशा नाहीं, नाहीं खरी;
कां कीं म्या परपुरुषांवर प्रीति ठेविली आहे, आ-
णि मी त्यांच्या पाठीस लागेन. २६ जसा चोर
सांपडला ह्मणजे लाजतो तसे इस्राएलाचे जे वंश
ते व त्यांचे राजे, त्यांचे सरदार, त्यांचे याजक व
त्यांचे भविष्यवादी लाजतील; २७ जे ते लांक-
डाला ह्मणतात, तूं माझा बाप आहेस; आणि
दगडाला ह्मणातात, त्वां मला जन्म दिल्हें; कारण
कीं मजकडे त्यांनी मुख नव्हे, परंतु पाठ फिरविली
आहे; तथापि ते आपल्या संकटाच्या समयीं
ह्मणतील, तूं उठून आह्मास तार. २८ जे तुझे
देव त्वां आपल्यासाठीं केले ते कोठें आहेत? ते
जर तुला तुझ्या संकटाच्या समयीं तारायास समर्थ
आहेत तर उठोत; कां कीं हे यहूदा, तुझ्या नग-
रांच्या गणतीप्रमाणें तुझे देव आहेत. २९ तुह्मी
कशाला मजसीं वाद कराल? सर्वांनी तुह्मी माझा
अपराध केला आहे, असें **परमेश्वर** ह्मणतो.
३० व्यर्थ तुमच्या लेंकरांस म्या हाणिलें आहे;
तीं शिक्षा घेईनात; तुमच्या तरवारीनें नाश कर-
णाऱ्या सिंहाप्रमाणें तुमचे भविष्यवादी खाल्ले
आहेत.

३१ अहो वंश हो, तुह्मी **परमेश्वराचें** वचन
पाहा; काय, मी इस्राएलास जंगल अथवा अंधा-
राची भूमी होतों? आह्मी इकडे तिकडे धावून
भ्रमलों आहों, आह्मी फिरून जवळ येणार
नाहीं, असें कां माझे लोक ह्मणतात? ३२
कुमारी आपलीं भूषणें, अथवा नवरी आपला
पोषाक विसरेल काय? तथापि माझे लोक असं-
ख्य दिवस मला विसरले आहेत. ३३ शृंगार
शोधायाला, तूं आपला मार्ग निटावितीस काय?
असें करून त्वां दुष्टस्त्रियांसहि आपले मार्ग शि-
कविले आहेत. ३४ तुझ्या पदरांतहि दुर्बळ
निर्दोषांच्या जीवांचें रक्त सांपडलें आहे; खणती
लावून तें मला सांपडलें, असें नव्हे; परंतु या
सर्वांवर तें आहे. ३५ तथापि तूं ह्मणतीस, मी
निर्दोष आहें, ह्मणून त्याचा क्रोध मजवरून ख-
चीत फिरेल; पाहा, म्या पाप केलें नाहीं, असें
तूं ह्मणतीस, ह्मणून मी तुजसीं वाद करीन. ३६
तूं आपला मार्ग पालटायाला एवढी कां वळून
जातीस? जसी तूं अश्शूराविषयीं लज्जित झा-
लीस तसी मिसराविषयींहि लज्जित होसील.
३७ आणि तूं आपले हात आपल्या डोईवर ठेवून
त्याजपासून निघून जासील; कां तर **परमेश्व-
राने** ज्यांजवर त्वां विश्वास ठेविला होता त्यांस
नाकारिलें आहे, ह्मणून त्यांकडून तूं आपलें हित
साधणार नाहींस.

## अध्याय ३.

लोक ह्मणतात, जर पुरुषाने आपली स्त्री
सोडिली, आणि ती त्याजपासून निघून जा-
ऊन इतर पुरुषाची स्त्री झाली, तर तो पुन्हा
तिजपासीं परत जाईल काय? असें असलें तर
ती भूमि फार बाटणार नाहीं काय? परंतु त्वां
बहुत सख्यांसीं व्यभिचार केला आहे; तथापि
मजकडे परत ये, असें तुला **परमेश्वर** ह्मणतो.
२ तूं उंचस्थानांकडे आपली दृष्टि लाव, आणि
पाहा, तुजसीं कोठें व्यभिचार झाला नाहीं; जसा
अरब जंगलांत तसी तूं त्यांसाठीं वाटांवर बसत
असस; आणि तूं आपल्या व्यभिचारानी व आ-
पल्या दुष्टाईने भूमि बाटविली आहेस. ३ या-
करितां पाहळ्या आवरून धरिल्या आहेत, आ-
णि वळवांचा पाऊस पडला नाहीं; परंतु तुला
कसबिणीचें कपाळ असे, ह्मणून तूं लाजेनास. ४
तर काय, तूं आजपासून मला ह्मणणार नाहींस,
कीं माझ्या बापा, तूं माझ्या तरुणपणाचा सहाय
आहेस? ५ काय, तो सर्वकाळपर्यंत क्रोध
धरील? त्याला सर्वदा बाळगील काय? पाहा, तूं
आपल्या शक्तीप्रमाणें वाईट गोष्टी बोललीस, व
त्वां त्या आचरल्या आहेत.

६ आणि योशीया राजाच्या दिवसांत **परमे-
श्वराने** मला ह्मटलें, मागें फिरणाऱ्या इस्राए-
लेने जें केलें आहे तें त्वां पाहिलें काय? तिने
प्रत्येक उंच पर्वतावर व प्रत्येक हिरव्या झाडा-
खालीं जाऊन तेथें व्यभिचार केला आहे. ७
आणि तिने हीं सर्व कामें केल्यानंतर मी ह्मणालों,
तूं मजकडे फीर; परंतु ती फिरली नाहीं; आणि
तिची अविश्वासु बहीण जी यहूदा तिने हें पा-
हिलें. ८ आणि म्या पाहिलें, कीं सर्व खेपांस
जेव्हां मागें फिरणाऱ्या इस्राएलेने जारकर्म केलें

असतां म्या तिचा त्याग करून तिला तिचें सूट-
पत्र दिल्हें; तेव्हां तिची अविश्वासु बहीण जी
यहूदा ती भ्याली नाहीं, आणि तिनेहि जाऊन
व्यभिचार केला. ९ आणि असें झालें, कीं ति-
ने आपल्या व्यभिचाराच्या हलकेपणेंकरून भूमि
बाटविली, आणि धोंड्यांसीं व लांकडांसीं जारकर्म
केलें. १० हें सर्व झालें असतांहि तिची अवि-
श्वासु बहीण जी यहूदा ती आपल्या सर्व हृद-
यानें नव्हे, परंतु ढोंगानें मजकडे फिरली आहे,
असें परमेश्वर ह्मणतो. ११ आणि परमे-
श्वरानें मला ह्मटलें, अविश्वासु यहूदेपेक्षां मागें
फिरणाऱ्या इस्राएलेनें आपणाला न्यायी दाख-
विलें आहे.

१२ तूं जाऊन हीं सर्व वाक्यें उत्तरेकडे गाज-
वून सांग, परमेश्वर ह्मणतो, अगे मागें फिरणारे
इस्राएले, तूं फीर, मी तुह्मावर उग्रदृष्टि लावून
पाहणार नाहीं; कां मी दयाळु आहें, मी सर्व-
कालपर्यंत क्रोध धरणार नाहीं, असें परमेश्वर
ह्मणतो. १३ परमेश्वर जो तुझा देव त्याचा
त्वां अपराध केला आहे, आणि प्रत्येक हि-
रव्या झाडाखालीं परक्यांसाठीं आपले मार्ग
फुटत असें केलें आहे, आणि तुह्मी माझा शब्द
ऐकाना, हा आपला अन्याय तूं केवळ पदरीं घेऊन
बोल, असें परमेश्वर ह्मणतो. १४ परमेश्वर
ह्मणतो, मागें फिरणाऱ्या लेंकरांनों, फिरा; कां कीं
मी तुह्मासीं विवाहित आहें; आणि मी तुह्माला
नगरांतून एक, व वर्गांतून दोघे असें घेईन, आणि
तुह्माला सीयोनेस आणीन; १५ आणि जे
पालक माझ्या मनोरथाप्रमाणें आहेत ते तुह्माला
देईन, तेव्हां ते तुह्मास ज्ञान व बोध चारितील.
१६ आणखी परमेश्वर ह्मणतो, जेव्हां त्या दि-
वसांत तुह्मी भूमींत बहुत व वाढलेले व्हाल,
तेव्हां असें होईल, कीं परमेश्वराच्या कराराचा
कोश असें पुन्हा कोणी ह्मणणार नाहींत; आणि
तो मनांत येणार नाहीं; आणि त्याला ते स्मर-
णार नाहींत, व भेटणार नाहींत; आणि फिरून
असें कर्म कोणी करणार नाहीं. १७ आणि त्या
वेळेस यरूशालेमेला परमेश्वराचें सिंहासन
असें ह्मणतील, आणि सर्व राष्ट्रें तिजकडे येऊन
एकत्र मिळतील, परमेश्वराच्या नामासाठीं यरू-
शालेमेस मिळतील; आणि ते आपल्या दुष्ट हृद-
याच्या कठिणपणाप्रमाणें पुन्हा वर्त्तणार नाहींत.
१८ त्या दिवसांत इस्राएलाच्या वंशासंगतीं यहू-
दाचे वंश चालतील, आणि जी भूमि म्या तुमच्या
पूर्वजांस वतन करून दिल्ही, तींत ते उत्तरेच्या
भूमींतून एकत्र येतील. १९ आणि मी ह्मणालों,
तुला लेंकरांमध्यें कसें ठेवीन? आणि रमणीय
भूमि ह्मणजे राष्ट्रांच्या सैन्यांचें सुशोभित वतन
तुला कसें देईन? तेव्हां म्या ह्मटलें, मला तूं
आपला बाप असें ह्मणसील, आणि मजपासून मागें
फिरणार नाहींस.

२० निश्चयें जसी स्त्री अविश्वासु होऊन आ-
पला पति सोडिती तसे अहो इस्राएलाच्या वंशा-
नों, तुह्मी मजसीं अविश्वासुपणें वर्त्तला आहां,
असें परमेश्वर ह्मणतो. २१ उंचस्थानांवर
शब्द ऐकण्यांत आला, ह्मणजे इस्राएलाच्या वंशा-
चें रडणें व काकुळती हीं; कारण कीं त्यानीं आप-
ला मार्ग वांकडा केला आहे, परमेश्वर जो आ-
पला देव त्याला ते विसरले आहेत. २२ मागें-
फिरणाऱ्या लेंकरानों, तुह्मी परत या, मी तुमचीं
मार्गेफिरणीं निटावीन; पाहा, आह्मी तुजजवळ
येतों; कां कीं तूं परमेश्वर आमचा देव आहेस.
२३ निश्चयें डोंगरांपासून अथवा पर्वतांच्या समु-
दायापासून तारणाची आशा धरणें व्यर्थ आहे;
खचीत परमेश्वर जो आमचा देव त्याच्याठायीं
इस्राएलाचें तारण आहे. २४ तर आमच्या
तरुणपणापासून आमच्या वडिलांच्या श्रमाचें फल,
त्यांचीं मेंढरें व त्यांचीं गुरें, त्यांचे पुत्र व त्यांच्या
कन्या, हीं लाजेनें खालीं आहेत. २५ आह्मी
आपल्या लज्जेंत आडवे पडतों, आणि आमचा
व्याकुळपणा आह्माला झांकितो; कारण कीं आह्मी
व आमचे वडील आपल्या तरुणपणापासून या
दिवसापर्यंत परमेश्वर जो आमचा देव त्यावि-
रुद्ध पाप करीत आलों आहों, आणि परमेश्वर
जो आमचा देव त्याचा शब्द आह्मी मानिला
नाहीं.

## अध्याय ४.

परमेश्वर ह्मणतो, हे इस्राएला, जर फिरसील,
तर मजकडे फीर; आणि त्वां आपले कुत्सित-

पदार्थ जर मजसमोरून दूर केले तर तूं हिंडणार
नाहींस. २ आणि जीवंत परमेश्वर आहे,
असी शपथ तूं खरेपणानें, नीतीनें व न्यायानें वाह-
सील; आणि त्याजविषयीं राष्ट्रें आपणांस आशी-
र्वादित ह्मणतील, व त्याजविषयीं गौरव मानितील.
३ कां तर यहूदांतल्या व यरूशालेमेंतल्या
मनुष्यांला परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी आपली
पडीत भूमि लागवडीस आणा, आणि कांटेऱ्या झा-
डांमध्यें पेरूं नका. ४ अहो यहूदांतल्या मनु-
ष्यानो, व यरूशालेमेंतल्या राहणाऱ्यानों, तुह्मी
परमेश्वरासाठीं आपली सुंता करा, व आपल्या
ह्रदयांचीं बोंडमासें काढून टाका; नाहीं तर कदा-
चित तुमच्या वर्त्तणुकीच्या दुष्टपणामुळें माझा कोप
अग्नीसारिखा निघून जळेल, आणि तो कोणाच्यानें
विझववणार नाहीं. ५ यहूदांत प्रगट करा, व
यरूशालेमेंत प्रसिद्ध करा, आणि सांगा, तुह्मी
देशांत करणा वाजवा, आरोळी करा, पूर्णशब्द
करून ह्मणा, तुह्मी एकत्र मिळा, आणि आपण
गांवकुसवी नगरांत जाऊं. ६ सीयोनेकडे झेंडा
उभारा; शरण जा, राहूं नका; कारण कीं मी
उत्तरेपासून विपत्ति व मोठा नाश आणितो. ७
सिंह आपल्या झाडींतून वर आला आहे, आणि
राष्ट्रांचा नाश करणारा निघाला आहे, तुझी भूमि
ओसाड करायाला तो आपल्या स्थानांतून बाहेर
गेला आहे; आणि तुझीं नगरें उजाड होतील,
त्यांत कोणी राहणार नाहीं. ८ याकरितां तुह्मी
गोणताट नेसा, आक्रंदन करा, व केंका; कारण कीं
परमेश्वराचा संतप्तक्रोध आह्मापासून फिरला
नाहीं. ९ आणि परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसीं
असें होईल, कीं राजाचें मन व सरदारांचें मन
नाहींसें होईल; आणि याजक विस्मित होतील, व
भविष्यवादी घाबरे होतील. १० आणि मी ह्म-
णालों, अहा प्रभो परमेश्वरा, तुह्माला कुशल
होईल, असें बोलून त्वां या लोकांस व यरूशालेमेस
फसविलें आहे; कां कीं तरवार जीवापर्यंत पोहंचली
आहे. ११ आणि त्या वेळेस या लोकांस व यरूशा-
लेमेस असें सांगण्यांत येईल, कीं रानांतील उंचस्थ-
लांचा झळेचा वारा माझ्या लोकांच्या कन्येकडे येईल,
वारवायाला अथवा स्वच्छ करायाला असें नव्हे;
१२ मजसाठीं त्या स्थलांपासून पूर्ण वारा येईल;
मीहि आतां त्यांचीं शासनें सांगतों. १३ पाहा
तो अभाळांप्रमाणें वर येईल, आणि त्याचे रथ वाव-
टळीसारिखे होतील; त्याचे घोडे गरुडांपेक्षां चप-
ळ आहेत; आह्माला हाय हाय, कां तर आह्मी
लुटलेलों आहों. १४ अगे यरूशालेमे, त्वां
तरावें ह्मणून तूं आपल्या ह्रदयाचें दुष्टपण धुवून
टाक: किती वेळ तुझ्यामध्यें तुझ्या व्यर्थ कल्पना
राहतील? १५ कां तर शब्द दानापासून प्रगट
करितो, आणि एफ्राइम पर्वतापासून पीडा वदतो.
१६ राष्ट्रांला स्मरण करा; पाहा, यरूशालेमेविषयीं
असें सांगा, कीं दूर देशांतून वेढणारे येत आहेत,
आणि यहूदाच्या नगरांविरुद्ध ते आपला शब्द
उच्चारितात. १७ जसे शेत राखणारे तसे ते
सभोंवती तिजविरुद्ध होतील; कारण कीं ती मज-
सीं फितूरीनें वर्त्तली आहे, असें परमेश्वर ह्म-
णतो. १८ तुझा मार्ग व तुझीं कर्मे यानीं तुला
हीं केलीं आहेत; ही तुझी दुष्टाई आहे, तर हें
कडु आहे, कां कीं हें तुझ्या ह्रदयापर्यंत पोहंचलें
आहे.

१९ माझीं आंतडीं, माझीं आंतडीं, मी आ-
पल्या ह्रदयाच्या तिडका देतों, मजमध्यें माझें ह्रदय
धडधडतें, माझ्यानें उगीच राहवत नाहीं; कारण
कीं हे माझ्या जीवा, त्वां करण्याचा शब्द, लढा-
ईचा गजर ऐकिला आहे. २० नाशावर नाश
घडतो, ह्मणून सर्वभूमि लुटलेली आहे; अकस्मात
माझे डेरे, पटकन माझे पडदे लुटलेले आहेत.
२१ केवढा वेळ मी झेंड्याला पाहीन, आणि कर-
ण्याचा शब्द ऐकेन? २२ कां कीं माझे लोक
मूर्ख आहेत, ते मला जाणत नाहींत; ते मूर्ख लें-
करें आहेत, आणि ते निर्बुद्धि आहेत; वाईट करा-
याला ते निपुण आहेत, परंतु उत्तम करायास जा-
णत नाहींत. २३ म्या पृथ्वीस पाहिलें, तेव्हां
पाहा, ती अस्ताव्यस्त व शून्य होती; आणि आ-
काशें पाहिलीं, तों त्यांत कांहीं प्रकाश नव्हता.
२४ म्या पर्वत पाहिले, तों पाहा, ते कांपत होते,
आणि सर्व डोंगर थरथरत होते. २५ म्या पा-
हिलें, तेव्हां पाहा, कोणी मनुष्य नव्हता, आणि
आकाशांतले सर्व पक्षी पळाले होते. २६ म्या
पाहिलें, तेव्हां पाहा, पिकाऊ भूमि जंगल झाली
होती, आणि तिचीं सर्व नगरें परमेश्वरासमो-

रून व त्याचे संतप्त क्रोधाकडून मोडिलेलीं होतीं·
२७ **कारण** कीं **परमेश्वर** ह्मणाला आहे, कीं
सर्व भूमि ओसाड होईल, तथापि तिचें अवसान
मी करणार नाहीं. २८ **याजकरितां** पृथ्वी शोक
करील, आणि वरतीं आकाशें काळवटतील; कां
कीं मी बोलिलों आहें, म्या संकल्प केला आहे,
आणि अनुतापणार नाहीं, व त्यापासून फिरणार
नाहीं· २९ **स्वार** व धनुर्धर यांच्या शब्दामुळें
सर्व नगर पळेल; ते झाड्यांमध्यें शिरतील, व
कड्यांवर चढतील; सर्व नगर सोडलेलें होईल,
व कोणीएक मनुष्य त्यांत राहणार नाहीं. ३० **तर**
तूं लुटलेली असतां काय करिसील? किर्मिजी रं-
गाचें वस्त्र जरीं घातलें, सोन्याचीं भूषणें जरीं
ल्यालीस, तूं आपले डोळे फार घांसून जरीं त्यांत
काजळ घातलें तरीं तूं व्यर्थ आपणास सुशोभित
करिसील; तुझ्या प्रियानी तुला नाकारिलें आहे,
ते तुझ्या जीवास टपतात· ३१ **कां** तर जसा
प्रसविणाऱ्या स्त्रीचा शब्द जसी पहिलटकरणीची
वेदना तसी म्या ऐकिली आहे, ह्मणजे सीयोनेच्या
कन्येचा शब्द, ती धापा देती, आपले हात पस-
रती; मला हाय हाय, कां कीं घातकांमुळें माझा
जीव थकला आहे, असें ह्मणती.

### अध्याय ५.

यरूशालेमेच्या आळ्यांमध्यें इकडे तिकडे धांवा,
व पाहा, व जाणा, व तिच्या चौकांत शोधा,
जर कोणी सांपडेल, जर कोणी न्याय करणारा अ-
थवा खरेपण शोधणारा असेल, तर मी तिची क्षमा
करीन· २ **आणि** जीवंत **परमेश्वर** आहे, असें
जरीं ते ह्मणतात, तरी ही ते खोटेपणें शपथ वाह-
तात· ३ **हे परमेश्वरा**, तुझे डोळे खरेपणाक-
डेस नाहींत काय? त्वा त्यांस हाणिलें, परंतु ते
दुःखित होईनात; त्वां त्यांस क्षीण केलें, तथापि ते शि-
क्षा घेईनात; त्यानी आपलीं मुखें खडकापेक्षां कठीण
केलीं आहेत, ते फिरेनात· ४ तेव्हां मी ह्मणालों,
निश्चयें ते दरिद्री आहेत, ते मूर्ख आहेत; कां तर
त्यानी **परमेश्वराचा** मार्ग, आपल्या **देवाची** नीति
जाणली नाहीं. ५ **मी** महाजनांजवळ जाईन,
आणि त्यांसीं बोलेन; कां कीं त्यानी **परमेश्वरा-
चा** मार्ग, आपल्या **देवाची** नीति जाणली आहे;
तथापि त्यानी एकदां जोखड मोडिलें आहे, त्यानी
बंधनें तोडिलीं आहेत· ६ **याकरितां** रानांतला
सिंह त्यांस वधील; संध्याकाळींचा लांडगा त्यांस
लुटील, चित्ता त्यांच्या नगरांवर टपेल; जो कोणी
त्यांतून बाहेर जाईल त्याला तो फाडील; कारण
कीं त्यांचे अपराध बहुत, व त्यांचीं मार्गें फिरणीं
फार झालीं आहेत·

७ **याविषयीं** मी तुझी कसी क्षमा करूं? तुझ्या
लेंकरानी मला सोडिलें आहे, आणि जे देव नाहींत
त्यांची शपथ वाहिली आहे; जेव्हां म्या त्यांस
तृप्त केलें होतें तेव्हां ते जारकर्म करूं लागले, व
कसबिणींच्या घरांत एकत्र मिळूं लागले. ८ **जसे**
कामातुर घोडे तसे ते लालसालु झाले आहेत; ते
प्रत्येक आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीला पाहून हिंस-
तात· ९ **या** गोष्टींविषयीं मी शासन करणार
नाहीं काय? माझा जीव असल्या राष्ट्रांचा सूड
उगवणार नाहीं काय? असें **परमेश्वर** ह्मणतो.

१० **तिच्या** भिंतींवर चढा, आणि नाश करा;
परंतु समाप्ति करूं नका; तिच्या खांद्या काढा,
कां कीं त्या **परमेश्वराच्या** नाहींत. ११ **कां**
तर इस्राएलाचे वंश व यहूदाचे वंश मजसीं फार
अविश्वासुपणें वर्त्तले आहेत, असें **परमेश्वर**
ह्मणतो· १२ **परमेश्वराविषयीं** त्यानी खोटें
मानिलें आहे, आणि ह्मटलें आहे, कीं तो नाहीं;
आणि आह्मावर अरिष्ट येणार नाहीं; आणि
आह्मी तरवार व दुकाळ पाहणार नाहीं;
१३ **आणि** भविष्यवादी वायु झाले आहेत, आणि
त्यांच्या ठायीं कांहीं वचन नाहीं; असेंच त्यांस
प्राप्त होईल· १४ **याकरितां** **परमेश्वर** सैन्या-
चा देव ह्मणतो, कीं तुह्मी हें वाक्य बोलतां, ह्म-
णून पाहा, मी आपलीं वचनें तुझ्या तोंडांत अग्नि
असीं करीन, आणि हे लोक लांकडें असे करीन,
तेव्हां तो यांजला खाईल. १५ **परमेश्वर** ह्म-
णतो, इस्राएलाच्या वंशानो, मी तुह्मावर दुरू-
न एक राष्ट्र आणितों, तें पराक्रमी राष्ट्र, तें पुरातन
राष्ट्र, ज्या राष्ट्राची भाषा तूं जाणत नाहींस, व तें
काय बोलतें हें समजतहि नाहींस तें· १६ **त्यां-
चा** भाता उघड्या कबरांसारिखा आहे, ते सर्व
वीर आहेत· १७ **आणि** जें तुझें पीक व तुझें
अन्न तुझ्या पुत्रानी व तुझ्या कन्यानी खावें तें ते

खातील; ते तुझीं मेंढरें व तुझीं गुरें खातील; ते
तुझ्या द्राक्षा व तुझीं अंजिराचीं झाडें खातील;
ज्या तुझ्या गांवकुसवी नगरांवर तूं भाव ठेवीत
असस तीं ते लढाई करून मोडितील. १८
तथापि त्या दिवसांत मी तुह्मासीं समाप्ति करणार
नाहीं, असें परमेश्वर ह्मणतो.
१९ आणि असें होईल, कीं परमेश्वर आ-
मचा देव याने ह्या गोष्टी कशासाठीं आह्मास
घडविल्या आहेत? असें जेव्हां तुह्मी ह्मणाल,
तेव्हां तूं त्यांस सांग, जसी तुह्मी मला सोडून
आपल्या देशांत परक्या देवांची सेवा केली आहे,
तसी जी भूमि तुमची नाहीं तींत तुह्मी परदेश्यां-
ची सेवा कराल. २० याकोबाच्या वंशांत हें
प्रगट करा, आणि यहूदांत हें सांगा कीं, २१
मूर्ख व निर्बुद्धि लोकांनो, जे तुह्मी डोळस असून
पाहत नाहीं, व कान असून ऐकत नाहीं, ते तुह्मी
हें ऐका; २२ परमेश्वर ह्मणतो, मला तुह्मी
भिणार नाहीं काय? मजसमोर थरथरां कांपणार
नाहीं काय? ज्या म्या सर्वकालिक नेमाने समुद्रा-
साठीं वाळू सीमा असी ठेविली आहे, ह्मणून
त्याच्याने ती उल्लंघवत नाहीं; जरी त्याच्या लाटा
लोटतात तरी त्या प्रबळ होत नाहींत; जरी गा-
जतात तरी तिला उल्लंघवत नाहीं. २३ परंतु
या लोकांस फितुरी व स्वतंत्र ह्रदय आहे, हे फि-
तुर गेले आहेत. २४ आणि हे आपल्या मनांत
ह्मणत नाहींत, कीं परमेश्वर आमचा देव, जो
सुसमयीं आगोठींचा व वळवांचा पाऊस देतो, जो
आह्मासाठीं कापणीचीं नेमिलेलीं सप्तकें राखतो,
त्याला आह्मी भिऊं.
२५ तुमच्या अन्यायानी ह्या गोष्टी दूर केल्या
आहेत, तुमच्या पातकानी तुह्मापासून हित आव-
रीलें आहे. २६ कां तर माझ्या लोकांमध्यें
दुष्टजन सांपडतात; ते लपल्या फासेपारध्यांसा-
रिखे टपतात, ते सांपळा मांडून मनुष्यें धरितात.
२७ जसा पिंजरा पाखरानी भरलेला असतो
तसीं त्यांचीं घरें ठकपणाने भरलेलीं आहेत; ह्म-
णून ते थोर व मातबर झाले आहेत. २८ ते पुष्ट
तेजवंत आहेत, आणि ते दुष्टांचीं कर्मे उल्लंघितात;
न्याय, बाप पोरक्याचा न्याय देखील करीत ना-
हींत, तथापि ते खुशाल असतात; आणि ते दरि-
द्र्यांचा इनसाफ ठरवीत नाहींत. २९ परमेश्वर
ह्मणतो, या गोष्टींविषयीं मी शासन करणार नाहीं
काय? माझा जीव असल्या राष्ट्राचा सूड घेणार
नाहीं काय?
३० विस्मयाची व अघोर गोष्ट देशांत झाली
आहे; ३१ भविष्यवादी खोटें बोलतात, आ-
णि त्यांच्या योगाने याजक अधिकार करितात;
आणि असेंच माझ्या लोकांस आवडतें; परंतु
याच्या परिणामाविषयीं काय कराल.

## अध्याय ६.

बन्यामीनाच्या वंशानो, तुह्मी यरूशालेमेंतून
पळून जा, आणि तकवांत करणा वाजवा, व
बेथहक्करेमावर झेंडा उभारा; कारण कीं उत्तरेंतून
अरिष्ट व मोठा नाश येणार आहे. २ जी स्त्री
सुंदर व कोमळ आहे, तिची उपमा मी जीयोने-
च्या कन्येला देईन. ३ पालक व त्यांचे कळप
तिजकडे येतील; ते तिजवर सभोंवते आपले
तंबू मारितील; ते प्रत्येक आपापल्या जाग्यांत
चारितील. ४ तिजवर लढाई तयार करा; उठा,
आपण दुपारीं चढूं; आह्मास हाय हाय, कां तर
दिवस कलला आहे, आणि रात्रीच्या छाया वाढत
आहेत. ५ उठा, आपण रात्रीं चढूं, आणि ति-
चीं मंदिरें नाशून टाकूं.
६ कां तर सैन्यांचा परमेश्वर ह्मणाला
आहे, कीं तुह्मी झाडें तोडून यरूशालेमेविरुद्ध
मोरचा बांधा; ही शिक्षा पावायाची नगरी आहे;
ही सर्व आपल्यामध्यें बलात्कारच आहे. ७ जसा
झरा आपलें पाणी वाहूं देतो तसी ती आपली
दुष्टाई वाहूं देती; तिजमध्यें जुलूम व लूट ऐक-
ण्यांत येतात; पीडा व हाणणें हीं मजसमोर नि-
त्य आहेत. ८ अगे यरूशालेमे, तुजविषयीं
माझें मन तुटूं नये ह्मणून शिक्षा घे; नाहींतर
कदाचित मी तुला ओसाड, नवसलेली भूमि,
असें ठेवीन.
९ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं ते इस्रा-
एलाचें शेष द्राक्षीसारिखें पुरतेपणें काढितील;
तूं आपला हात द्राक्षें काढणाऱ्यासारिखा पाट्यां-
वर फिरीव. १० त्यानी ऐकावें ह्मणून कोणाला
बोलूं, व साक्ष देऊं? पाहा, त्यांचा कान असुंती

आहे, ह्मणून त्यांच्याने ऐकवत नाहीं; पाहा, **पर-
मेश्वराची** गोष्ट त्यांस निंदा असी झाली आहे;
ती त्यांस आवडत नाहीं. ११ तर मी **परमे-
श्वराच्या** कोपाने भरलों आहें; दाबून मी थकलों
आहें; मी बाहेरच्या पोरांवर, व तरुणांच्या मंड-
ळीवर तो एकदांच ओतीन; कां तर पुरुष व
स्त्री ह्मातारा व आयुष्य भरलेला हे धरण्यांत
येतील. १२ आणि त्यांचीं घरें, शेतें व स्त्रिया,
हीं सर्व इतरांकडेस फिरतील; कारण कीं मी दे-
शांतल्या राहण्यांवर आपला हात लांबवीन, असें
**परमेश्वर** ह्मणतो. १३ कां तर लहानांपासून
मोठ्यांपर्यंत ते सर्व लोभिष्ट आहेत; आणि भवि-
ष्यवाद्यापासून याजकापर्यंत ते सर्व लबाडी करतात.
१४ आणि कांहीं कुशल नसतां, कुशल कुशल,
असें ह्मणून त्यांनी माझ्या लोकांच्या कन्येची जखम
हलकेपणाने बरी केली आहे. १५ जेव्हां त्यांनी
कुत्सितकर्म केलें होतें तेव्हां ते लज्जित झाले काय?
ते कांहीं लज्जा पावले नाहीं; ते शरमेनात; या-
मुळें ते पडणाऱ्यांसंगतीं पडतील; जेव्हां मी
त्यांचें शासन करीन तेव्हां ते गळून पडतील, असें
**परमेश्वर** ह्मणतो. १६ **परमेश्वर** ह्मणतो, कीं
तुह्मी मार्गांवर उभे राहून पाहा, आणि पुरातन
वाटा पुसा, तो उत्तममार्ग कोठें आहे, असें सम-
जून त्यांत चाला, आणि आपल्या जीवांसाठीं समा-
धान पावा; परंतु ते ह्मणाले, आह्मी चालणार
नाहीं. १७ म्या तुह्मासाठीं पाहरेकरी ठेविले,
आणि करण्याच्या शब्दास कान द्या, असें ह्मटलें;
परंतु ते ह्मणाले, आह्मी कान देणार नाहीं.

१८ याकरितां राष्ट्रांनो, ऐका; आणि अगे
सभे, जें त्यांजमध्यें आहे तें जाण. १९ अगे
पृथ्वी, ऐक; पाहा, मी या लोकांवर अरिष्ट, ह्मणजे
त्यांच्या कल्पनांचें फल आणीन; कां कीं त्यांनी
माझे शब्द ऐकिले नाहींत, आणि माझें नेमशास्त्र
न ऐकतां त्याला नाकारिलें आहे. २० शबाहून
धूप व दूर देशांतून उत्तम दालचिनी मजकडे
कशाला येती? तुमचे होम मान्य होत नाहींत,
आणि तुमचे यज्ञ मला आवडत नाहींत. २१
याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा; मी या
लोकांपुढें अडखळे ठेवीन, तेव्हां ते बाप व पुत्र
मिळून त्यांसीं अडखळतील; शेजारी व त्याचे
सोबती नाहींसे होतील. २२ **परमेश्वर** ह्मणतो,
कीं पाहा, उत्तरदेशांतून लोक येत आहेत, आणि
पृथ्वीच्या सीमांतून मोठें राष्ट्र उठेल. २३ ते
धनुष्य व भाला धरितात; ते क्रूर आहेत, आणि
दया करीत नाहींत; त्यांचा शब्द समुद्रासारिखा
गाजतो, आणि ते घोड्यांवर बसतात, अगे सीयो-
नेच्या कन्ये, जसे वीर लढाईसाठीं, तसे ते तुजवर
सिद्ध आहेत. २४ आह्मी त्यांची वार्त्ता ऐकिली,
तेव्हां आमचे हात गळाले; आह्मांला पीडा ला-
गली, वेदना लागली, जसी प्रसवतीची तसी. २५
बाहेर शिवारांत जाऊं नका, मार्गांत चालूं नका;
कारण कीं वैऱ्याची तरवार व चहूंकडे भय आहे.

२६ अगे माझ्या लोकांच्या कन्ये, गोणताट ने-
सून घे, आणि आपणास राखेंत लोळवून जसी
एकुलत्या पुत्रासाठीं तसी शोक कर, कडु आक्रंदन
कर; कां तर आह्मावर अकस्मात लुटणारा ये-
ईल. २७ म्या आपल्या लोकांमध्यें तुला दुर्ग
असें परीक्षक ठेविलें आहे, अशासाठीं कीं त्यां
त्यांचें आचरण जाणून पारखावें. २८ ते सर्व
मोठे फितणारे आहेत, ते चहाडी करीत फिरतात;
ते पितळ व लोखंड आहेत; ते सर्व नाश करणारे
आहेत. २९ भाता जाळिला आहे, त्यांच्या अ-
ग्नींतून शिसें निघालें आहे; गाळणाऱ्याने व्यर्थ
गाळिलें आहे; आणि जे दुष्ट ते काढून टाकलेले
नाहींत. ३० लोक त्यांस टाकाऊ रुपें असें ह्म-
णतील, कां कीं **परमेश्वराने** त्याला टाकिलें आहे.

## अध्याय ७.

जी गोष्ट **परमेश्वरापासून** इर्मयाकडे आली
ती असी कीं, २ तूं **परमेश्वराच्या** घराच्या
दरवाज्यांत उभा राहा, आणि तेथें ही गोष्ट मो-
ठ्याने बोलत सांग, अहो यहूदाचे सर्व लोक हो,
जे तुह्मी **परमेश्वरास** भजायाला या दरवाज्यांतून
आंत जातां ते तुह्मी **परमेश्वराचें** वचन ऐका.
३ सैन्यांचा **परमेश्वर**, जो इस्राएलाचा देव, तो
ह्मणतो, कीं तुह्मी आपले मार्ग व आपलीं कृत्यें
नीट करा; ह्मणजे मी या स्थानांत तुह्मांला राहूं
देईन. ४ **परमेश्वराचें** देऊळ, **परमेश्वराचें**
देऊळ, **परमेश्वराचें** देऊळ, तीं आहेत, असें
बोलून तुह्मी खोट्या वचनांवर भाव ठेवूं नका. ५

कां तर निश्चयें जर तुह्मी आपले मार्ग व आपलीं
कृत्यें शुद्ध कराल, आणि मनुष्यासीं व त्याच्या शे-
जाऱ्यासीं न्याय कराल; ६ जर तुह्मी विदेश्याला,
बाप पोरक्याला, व विधवेला पीडणार नाहीं, आणि
या स्थानांत निर्दोष रक्त पाडणार नाहीं, आणि
आपल्या अरिष्टासाठीं इतर देवांस अनुसरणार
नाहीं; ७ तर या स्थानांत जी भूमि तुमच्या पू-
र्वजांस म्यां दिल्ही, तींत तुह्माला मी सदासर्वका-
लपर्यंत राहूं देईन.
८ पाहा, तुह्मी निरुपयोगी खोट्या वचनांवर
भाव ठेवितां. ९ काय? चोरून, हाणून, व जा-
रकर्म करून, व खोटी शपथ वाहून, व बालास
धूप जाळून, आणि ज्या देवांस तुह्मी जाणलें नाहीं
त्यांस अनुसरून, १० ज्या घराला माझें नाम
ठेविलें आहे त्यांत तुह्मी याल, आणि मजसमोर
उभे राहून ह्मणाल, कीं हीं सर्व कुत्सितकर्मे करा-
यासाठीं आह्मी मोकळे झालों आहों? ११
ज्या घराला माझें नाम ठेविलें आहे तें तुमच्या
दृष्टींत लुटाऱ्यांची गुहा झालें आहे कीं काय? पा-
हा, म्याहि हें पाहिलें आहे, असें परमेश्वर ह्म-
णतो. १२ तर शीलोस जें माझें स्थान होतें
ज्यांत म्यां पहिल्याने आपलें नाम वसविलें, त्याला
तुह्मी जा, आणि जें म्यां आपले लोक जे इस्राएल
यांच्या दुष्टपणामुळें त्याला केलें तें पाहा. १३
आणि आतां परमेश्वर ह्मणतो, तुह्मी हीं सर्व कर्मे
केलीं आहेत, आणि जेव्हां मी पहांटेस उठून बो-
लून तुह्माला बोललों, तेव्हां तुह्मी ऐकिलें नाहीं;
आणि तुह्माला बोलाविलें, परंतु तुह्मी उत्तर दि-
ल्हें नाहीं; १४ याजकरितां ज्या घरास माझें
नाम ठेविलें आहे, ज्याजवर तुह्मी भाव ठेवितां,
त्याला, आणि जें स्थान म्यां तुह्माला व तुमच्या
वडिलांस दिल्हें त्यास जसें म्यां शीलोस केलें त-
सें करीन. १५ आणि जसें म्यां तुमच्या सर्व भा-
वांस एफ्राइमाच्या सर्व वंशांस घालविलें तसें तु-
ह्मास मी आपल्या दृष्टीपासून घालवीन. १६
तर तूं या लोकांसाठीं विनंती करूं नको, आणि
यांसाठीं आरोळी व प्रार्थना वर करूं नको; आ-
णि मजसीं मध्यस्थपण करूं नको; कारण कीं मी
तुझें ऐकणार नाहीं.
१७ यहूदाच्या नगरांत व यरूशालेमेच्या आ-
ळ्यांमध्यें जें ते करितात तें त्वां पाहिलें नाहीं काय?
१८ लेंकरें लांकडें एकवटतात, आणि बाप अग्नि
पेटवितात, आणि स्त्रिया पीठ मळितात, आकाशा-
च्या राणीसाठीं पोळ्या करायाला, व इतर देवांस
पेयअर्पणें ओतायाला मला कोपित करावें ह्मणून.
१९ परमेश्वर ह्मणतो, ते मला कोपित करितात
काय? ते आपल्या मुखांच्या लाजेसाठीं आपणांस
क्षोभित करितात कीं नाहीं? २० याकरितां प्रभु
परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, माझा क्रोध व मा-
झा कोप या स्थानावर, याच्या मनुष्यांवर व पशूं-
वर व रानांतील झाडांवर व भूमीच्या फलावर पे-
टेल, आणि तो जळत राहील, विझणार नाहीं.
२१ सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मण-
तो, कीं तुह्मी आपल्या यज्ञांसीं आपले होम जडा,
आणि मास खा. २२ कां तर जेव्हां म्यां तुमच्या
पूर्वजांस मिसर देशांतून बाहेर आणिलें तेव्हां मी
त्यांस होम व यज्ञ यांविषयीं बोललों नाहीं, आ-
णि आज्ञा दिल्ही नाहीं. २३ परंतु म्यां त्यांस ही
गोष्ट आज्ञापिली, कीं तुह्मी माझा शब्द ऐका, ह्म-
णजे मी तुह्मासाठीं देव असत जाईन, आणि तुह्मी
मजसाठीं लोक असत जाल; आणि तुमचें हित
व्हावें ह्मणून ज्याविषयीं म्यां तुह्माला आज्ञापिलें
आहे, त्या सर्व मार्गांत चाला. २४ परंतु ते ऐ-
केनात, आणि आपला कान देईनात, आणि आप-
ल्या संकल्पांप्रमाणें, आपल्या दुष्ट हृदयाच्या कठि-
णपणाप्रमाणें चालले, आणि पुढें नव्हे परंतु मागें
गेले. २५ ज्या दिवसीं तुमचे पूर्वज मिसर दे-
शांतून बाहेर आले, त्यापासून या दिवसापर्यंत मी
नित्य पहांटेस उठून पाठवून, माझे सेवक जे भवि-
ष्यवादी यांस तुह्माजवळ पाठवीत आलों आहें;
२६ तथापि ते माझें ऐकेनात, आणि आपला कान
देईनात, परंतु त्यांनी आपली मान ताठ केली,
आणि आपल्या पूर्वजांपेक्षां वाईट आचरिलें. २७
आणि हीं सर्व वचनें जरीं तूं त्यांस बोललास,
तरीं ते तुझें ऐकणार नाहींत; जरीं त्यांस बोला-
विलें तरीं ते तुला उत्तर देणार नाहींत. २८
तथापि तूं त्यांस असें सांग, कीं जें राष्ट्र परमे-
श्वर जो आपला देव याचा शब्द ऐकत नाहीं,
आणि शिक्षा घेत नाहीं तें हेंच आहे; खरेपण ना-
हींसें झालें, आणि त्यांच्या मुखापासून बुडालें आहे.

२९ अगे यरूशालेमे, तूं आपले केश कापून
टाक, आणि उंच स्थानांवर शोक कर; कां कीं
**परमेश्वराने** आपल्या क्रोधाचा वंश नाकारून
सोडिला आहे. ३० कां तर **परमेश्वर** ह्मणतो,
माझ्या दृष्टींत यहूदाच्या वंशानी वाईट केलें आहे;
ज्या घराला माझें नाम ठेविलें आहे तें घर बाट-
वायाला त्यानी आपले कुत्सित पदार्थ त्यांत ठेविले
आहेत. ३१ आणि त्यानी आपले पुत्र व आपल्या
कन्या अग्नींत जाळायासाठीं हिन्नोमाच्या पुत्राच्या
खोऱ्यांत जें तोफेथ आहे त्याची उंचस्थानें बांधि-
लीं आहेत; हें कर्म म्या आज्ञापिलें नाहीं, आणि
माझ्या मनांतहि आलें नाहीं.
३२ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, ते
दिवस येतात, ज्यांत तें खोरें तोफेथ आणि हिन्नो-
माच्या पुत्राचें खोरें पुन्हा ह्मणणार नाहींत, परंतु
तें वधाचें खोरें असें ह्मणतील; तेव्हां लोक जागा
नमिळेपर्यंत तोफेथांत मढीं पुरतील. ३३ आणि
या लोकांचीं मढीं आकाशांतल्या पक्ष्यांसाठीं व
भूमींतल्या पशूंसाठीं आहार होतील, आणि त्यांस
भेडावयाला कोणी असणार नाहीं. ३४ आणि
यहूदाच्या नगरांपापासून आणि यरूशालेमेच्या
आळ्यांपासून आनंदाचा शब्द व हर्षाचा शब्द,
आणि नवऱ्याचा शब्द व नवरीचा शब्द नाहींसें
होत असें करीन; कारण कीं भूमि ओसाड होईल.

## अध्याय ८.

**परमेश्वर** ह्मणतो, त्या वेळेस ते यहूदाच्या रा-
जांचीं हाडें, व त्यांच्या सरदारांचीं हाडें, आणि
याजकांचीं हाडें, आणि भविष्यवाद्यांचीं हाडें, आणि
यरूशालेमेच्या राहणाऱ्यांचीं हाडें त्यांच्या कबरां-
तून बाहेर आणितील. २ आणि सूर्य व चंद्र, व
आकाशांतलें सर्व सैन्य, ज्यांची आवड त्यानी ध-
रली, ज्यांची सेवा त्यानी केली, ज्यांस ते अनु-
सरले, ज्यांस त्यानी शोधिलें, व ज्यांस त्यानी भजि-
लें, त्यांकडे तीं पसरितील; तीं एकवट होणार
नाहींत, आणि लोक तीं पुरणार नाहींत; आणि
तीं भूमीच्या पाठीवर खतासाठीं होतील. ३
आणि या दुष्टवंशांतले जे शेष उरले आहेत, जे
सर्वस्थानांत जेथें म्या त्यांस घालविलें तेथें शेष
उरले आहेत, त्या सर्वांस जीवनापेक्षां मरण निव-
डायाजोगें होईल, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्म-
णतो.
४ आणि तूं त्याला सांग, **परमेश्वर** ह्मणतो,
कीं ते पडून पुन्हा उठणार नाहींत काय? तो मागें
फिरून पुन्हा फिरणार नाहीं काय? ५ हे यरू-
शालेमेंतले लोक कां निरंतर मागें फिरण्याने मागें
फिरले आहेत? यानी कपट धरिलें आहे, हे फि-
रायाला अमान्य आहेत. ६ म्या लक्ष देऊन ऐ-
किलें, ते ठीक बोलले नाहींत; म्या काय केलें!
असें ह्मणून कोणी आपल्या दुष्टपणाचा अनुताप
केला नाहीं; जसा घोडा लढाईंत वेगाने धांवतो
तसे ते सर्व आपल्या धांवेस फिरले. ७ आका-
शांतला बगळा देखील आपला नेमलेला वेळ जा-
णतो, आणि पारवा व पिंगळा व निळवी आपला
येण्याचा समय पाळितात; परंतु माझे लोक **पर-
मेश्वराची** नीति जाणत नाहींत. ८ आह्मी
विद्वान आहों, आणि **परमेश्वराचें** नेमशास्त्र आ-
ह्माजवळ आहे, असें तुह्मी कसे ह्मणतां? पाहा,
निश्चयें तें त्याने व्यर्थ केलें आहे; लेखकांची ले-
खणी व्यर्थ आहे. ९ ज्ञानी लज्जित झाले, ते
खिन्न झाले व गुंतले आहेत; पाहा, त्यानी **परमे-
श्वराचें** वचन नाकारिलें आहे, तर त्यांचें ज्ञान
कसें आहे? १० याकरितां मी त्यांच्या स्त्रिया
इतरांस, आणि त्यांचीं शेतें दुसऱ्या वतनदारांस
देईन; कारण कीं लहानापासून मोठ्यापर्यंत ते सर्व
लोभी आहेत, भविष्यवाद्यापासून याजकापर्यंत ते
सर्व लबाडी करितात. ११ आणि कांहीं कुशल
नसतां, कुशल, कुशल, असें ह्मणून त्यानी माझ्या
लोकांच्या कन्येची जखम हलकेपणाने बरी केली
आहे. १२ जेव्हां त्यानी कुत्सितकर्म केलें तेव्हां
ते लज्जित झाले काय? ते कांहीं लज्जा पावले
नाहींत, ते शरमेनात; यामुळें ते पडणाऱ्यांसमवेत
पडतील; जेव्हां मी त्यांचें शासन करीन तेव्हां ते
गळून पडतील, असें **परमेश्वर** ह्मणतो.
१३ **परमेश्वर** ह्मणतो, मी खचीत त्यांस ना-
हींसें करीन; द्राक्षीवर कांहीं द्राक्षें होणार नाहींत,
आणि अंजिराच्या झाडावर कांहीं अंजीर होणार
नाहींत, आणि पान वाळेल; आणि जें कांहीं म्या
त्यांस दिल्हें आहे तें त्यांपासून सरून जाईल.
१४ आह्मी कशासाठीं बसतों? तुह्मी एकत्र मि-

ळा, आणि आपण मांवकुसवीं नगरांत जाऊन तेथें
मुके राहूं; कारण कीं **परमेश्वर** आमचा देव
याने आह्मास मुके केलें आहे, आणि आह्माला
विषाचें पाणी प्यायाला दिल्हें आहे, कां कीं आ-
ह्मी **परमेश्वरा**विरुद्ध पाप केलें आहे. १५ आ-
ह्मी कुशलाची वाट पाहिली, परंतु कांहीं हित
येईना; बरें होण्याच्या वेळाची, परंतु पाहा, वि-
पत्ति. १६ त्याच्या घोड्यांचा फुरफुराट दाना-
पासून ऐकण्यांत आला आहे, त्याच्या पराक्रम्यां-
च्या हिंसण्याच्या शब्दाने सारी भूमि कांपली
आहे; आणि ते येऊन भूमि व तिचें भरण, नगर
व त्यांतले राहणारे यांस खाऊन टाकितील.
१७ कां तर पाहा, मी नाग व फुरसीं ज्यांस
कोणाच्याने मोहवत नाहीं तीं तुह्मामध्यें पाठवीन;
तेव्हां तीं तुह्माला डसतील, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

१८ माझ्या आनंदाचा खेद झाला आहे, मा-
झ्याठायीं माझें हृदय मूर्च्छित झालें आहे. १९
पाहा, माझ्या लोकांच्या कन्येच्या आरोळीचा श-
ब्द दूर देशांतून येतो; जीयोनेंत **परमेश्वर** नाहीं
काय? तिचा राजा तिजमध्यें नाहीं काय? त्यांनी
आपल्या कोरींव मूर्त्तींकडून, व परक्या व्यर्थपणांक-
डून, मला कां कोपित केलें आहे? २० कापणी
सरून गेली आहे, उन्हाळा समाप्त झाला आहे,
आणि आह्मी तरलों नाहीं. २१ माझ्या लोकां-
च्या कन्येच्या मोडण्यामुळें मी मोडलों आहें, मी
काळवटलों आहें, मला विस्मय लागला आहे.
२२ गिलादांत कांहीं सुरस नाहीं काय? तेथें
कोणी वैद्य नाहीं काय? तर माझ्या लोकांच्या क-
न्येचें आरोग्य कां झालें नाहीं?

## अध्याय ९.

म्या आपल्या कन्येच्या वधलेल्यांकरितां अहो-
रात्र रडावें ह्मणून माझें मस्तक पाण्यें व
माझे डोळे आसवांचा झरा कोण करील? २
मला अंगलांत वाटसरूंचा आश्रय कोण देईल?
ह्मणजे मी आपले लोक सोडून त्यांपासून दूर जा-
ईन; कारण कीं ते सर्व जारकर्मी, अविश्वासूंच्या
सभा आहेत. ३ आणि ते लबाडीसाठीं आपली
जीभ आपल्या धनुष्याप्रमाणें लववितात; आणि ते
पृथ्वींत खरेपणासाठीं पराक्रम करीत नाहींत; परंतु
दुष्कर्मापासून दुष्कर्माला पुढें चालले जातात, आणि
मला जाणत नाहींत, असें **परमेश्वर** ह्मणतो. ४
तुह्मी प्रत्येक आपल्या शेजाऱ्याविषयीं सावध असा,
आणि कोणत्याहि भावावर विश्वास ठेवूं नका; कां कीं
निश्चयें प्रत्येक भाऊ ठकपणा करील, आणि प्रत्येक
शेजारी चहाडी आचरील. ५ आणि ते प्रत्येक
आपल्या शेजाऱ्याला फसवितात, आणि खरें बोलत
नाहींत; त्यांनी आपल्या जिभेला खोटें बोलायाला
शिकविलें आहे, ते दुष्टाई करून थकले आहेत. ६
तुझी वस्ती ठकपणामध्यें आहे, ठकपणाने ते मला
जाणायाला अमान्य झाले आहेत, असें **परमेश्वर**
ह्मणतो. ७ यामुळें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो,
कीं पाहा, मी त्यांस गाळून पारखीन; मग मी आ-
पल्या लोकांच्या कन्येकरितां कसें करूं? ८
त्यांची जीभ सोडलेला तीर आहे, ती कपट बो-
लती; कोणी आपल्या मुखाने आपल्या शेजाऱ्या-
सीं मित्रपणें बोलतो, परंतु आपल्या मनांत त्याज-
वर टपत असतो.

९ **परमेश्वर** ह्मणतो, या गोष्टींविषयीं मी
त्यांचें शासन करणार नाहीं काय? माझा जीव
असल्या राष्ट्रांचा सूड घेणार नाहीं काय? १०
मी पर्वतांकरितां रडणें व आक्रंदन, आणि रानांत-
ल्या कुरणांकरितां शोक करीन, कां तर तीं जाळून
टाकिलीं आहेत, त्यांवरून कोणी जात नाहीं,
आणि गुरांचा शब्द ऐकत नाहींत, आकाशांतल्या
पक्ष्यांपासून पशूंपर्यंत सर्व पळून गेले आहेत. ११
आणि यरूशालेम ढीग, अघोरजीवांचा आश्रय
असी करीन; आणि यहूदाचीं नगरें ओसाड रा-
हणाऱ्यांशिवाय करीन.

१२ कशामुळें भूमि नाश पावली आहे, आणि
जंगलासारिखी वाटसरूंशिवाय होऊन जाळिली
आहे? हें समजावें ह्मणून असा बुद्धिमान कोण
आहे? आणि ज्याला **परमेश्वराचें** मुख बोललें
आहे त्याने हें दाखवावें, असा कोण आहे? १३
**परमेश्वर** ह्मणतो, जें माझें नेमशास्त्र म्या त्यांज-
पुढें ठेविलें तें त्यांनी सोडिलें आहे, आणि त्यांनी
माझा शब्द मानिला नाहीं, आणि ते त्याप्रमाणें
वर्त्तले नाहींत; १४ परंतु ते आपल्या हृदया-
च्या कठिणपणाप्रमाणें आणि जे बाल त्यांच्या वडि-

लानी त्यांस शिकविलें त्याप्रमाणें वर्त्तले आहेत.
१५ याकरितां सैन्यांचा **परमेश्वर** इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं पाहा, मी या लोकांस कडूदवणा
खायाला देईन, आणि विषाचें पाणी यांस पाजीन.
१६ आणि यानी अथवा यांच्या वडिलानी जीं
राष्ट्रें जाणिलीं नाहींत त्यांमध्यें यांस विखरीन;
आणि मी यांस नाहींसें करींपर्यंत यांजमागें तर-
वार पाठवीन.

१७ सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मी
विचार करा, आणि आक्रंदन करणाऱ्या स्त्रियानी
यावें ह्मणून त्यांस बोलावा, आणि शाहाण्या स्त्रि-
यानी यावें ह्मणून त्यांजकडे आमंत्रण पाठवा; १८
मग त्या त्वरा करून आह्माकरितां आक्रंदन क-
रोत, आणि आमच्या डोळ्यांतून आंसवें वाहोत, व
आमच्या पापण्यांवरून पाण्यें गळोत; १९ कां
तर सीयोनेंतून आक्रंदनाचा शब्द ऐकिला आहे,
आह्मी कसे लुटलेले आहों? आह्मी अत्यंत ल-
ज्जित झालों आहों, कारण कीं आह्मी आपला
देश सोडिला आहे, आणि आमच्या वस्त्यानी
आह्माला घालविलें आहे. २० तर स्त्रियानों,
**परमेश्वराचें** वचन ऐका, व तुमचा कान त्याच्या
मुखाचें वाक्य ऐकून घेवो, आणि तुह्मी आपल्या
कन्यांस आक्रंदन शिकवा, व प्रत्येक स्त्री आपल्या
शेजारिणीला शोक शिकवो. २१ कारण कीं आ-
ळ्यांतून पोर, आणि चौकांतून तरुण नाहींसे करा-
याला मरण आमच्या खिडक्यांत चढलें आहे, तें
आमच्या वाड्यांत शिरलें आहे. २२ तूं बोल,
**परमेश्वर** ह्मणतो, कीं जसें शेताच्या तळावर
खत, व कापणाऱ्यामागें पेंढी पडत जाती तसीं मनु-
ष्यांचीं मढीं पडतील, आणि तीं एकवटायाला
कोणी असणार नाहीं.

२३ **परमेश्वर** ह्मणतो, कीं ज्ञान्यानें आप-
ल्या ज्ञानाविषयीं गौरव मानूं नये, व बलवानानें
आपल्या बलाविषयीं गौरव मानूं नये, व धनवा-
नानें आपल्या धनाविषयीं गौरव मानूं नये. २४
परंतु जो गौरव मानितो तो याविषयीं मानो, कीं
तो समजतो व मला जाणतो, कीं मी **परमेश्वर**
आहें, जो मी पृथ्वीवर दया, नीति व न्याय करि-
५. कां कीं यांत मी संतोषतों, असें **परमेश्वर**
उरले
तो,
ह्मणतो.

२५ **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, ज्यांत मी सुं-
तींचें आणि असुंतींचें शासन करीम, ते दिवस
येतात; २६ ह्मणजे मिसराचें व यहूदाचें व
अदोमाचें व अम्मोनाच्या वंशाचें व मोवाबाचें व
सर्व जे केंस कापलेले रानांत वसतात त्यांचें शासन
करीन; कां कीं हीं सर्व राष्ट्रें असुंती आहेत, आ-
णि इस्राएलाचे सर्व वंश असुंती हृदयाचे आहेत.

## अध्याय १०.

इस्राएलाच्या वंशानों, जें वचन **परमेश्वर** तुह्मा-
ला बोलतो, तें ऐका. २ **परमेश्वर** ह्मणतो,
कीं राष्ट्रांचा मार्ग शिकूं नका, आणि आकाशांच्या
उत्पातांमुळें भयभीत होऊं नका, कां तर त्यांमुळें
राष्ट्रें भयभीत असतात. ३ लोकांच्या रीति तर
व्यर्थ आहेत; कां कोणी रानांतलें झाड तोडितो,
कारीगाराच्या हाताचें कर्म जें तासणीनें केलेलें.
४ त्याला रुप्यानें व सोन्यानें तो सुशोभित
करितो, तें सरकूं नये ह्मणून ते त्याला ठोकण्या-
नी खिळे मारून स्थिरावितात. ५ त्या मूर्त्ति
कोरलेल्या खांबासारिख्या आहेत, आणि त्यांच्यानें
बोलवत नाहीं, त्या वाहून न्याव्या लागतात; कां
कीं त्यांस चालवत नाहीं; त्यांस भिऊं नका, कां
त्यांच्यानें वाईट करवत नाहीं, आणि त्यांच्या अंगीं
चांगलें करण्याची शक्ति नाहीं. ६ तर हे **परमे-
श्वरा**, तुजसारिखा कोणी नाहीं, तूं थोर आहेस,
आणि शक्तीविषयीं तुझें नाम थोर आहे. ७ हे
राष्ट्रांच्या **राजा**, तुला कोण न भिई? कां कीं तुला
योग्य आहे; कां तर राष्ट्रांच्या सर्व ज्ञान्यांमध्यें, व
त्यांच्या सर्व राज्यांत तुजसारिखा कोणी नाहीं.
८ ते लोक तर अगदी पशुशील व मूर्ख आहेत;
मूर्त्ति व्यर्थपणाचें उदाहरण आहे, ती केवळ लांकूड
आहे. ९ तार्शीशाहून पत्रे केलेलें रुपें आणि उफा-
जाहून सोनें कारीगाराच्या व ओताऱ्याच्या हातांचें
कर्म आणितात; त्यांचें वस्त्र नील व किर्मिजी
आहे; त्या सर्व चतुरांचें कर्म आहेत. १० परंतु
**परमेश्वर** खरा देव आहे, तो जीवंत देव व सर्व-
काळचा **राजा** आहे; त्याच्या कोपानें पृथ्वी कां-
पेल, आणि त्याचा रोष राष्ट्रांच्यानें साहवणार
नाहीं. ११ त्यांस असें सांगा, कीं ज्या देवांनी
आकाशें व पृथ्वी उत्पन्न केलीं नाहीं ते पृथ्वीवरून

व या आकाशांखालून नाहींसे होतील. १२
त्याने आपल्या शक्तीकडून पृथ्वी उत्पन्न केली, आ-
पल्या ज्ञानेंकडून जग स्थापिलें, आणि आपल्या
बुद्धीकडून आकाशें पसरिलीं. १३ जेव्हां तो
आपला शब्द उच्चारितो, तेव्हां आकाशांत बहुत
पाण्यें होतात, आणि तो पृथ्वीच्या सीमेपासून
धुकटें चढवितो, तो पाउसासंगतीं विजा उत्पन्न
करितो, आणि आपल्या भंडारांतून वारा निघूं देतो.
१४ ज्ञानाविषयीं प्रत्येक मनुष्य पशुशील आहे;
प्रत्येक ओतारी आपल्या कोरींव मूर्तींकरितां ल-
ज्जित होवो; कां तर त्याची ओतींव मूर्त्ति खोटे-
पण आहे, आणि त्यांत कांहीं जीवात्मा नाहीं. १५
त्या व्यर्थपणच आहेत, भ्रांतींचें कर्मच आहेत;
त्यांच्या शासनाच्या वेळेस त्या नाहींशा होतील.
१६ जो याकोबाचा विभाग तो यांसारिखा नाहीं;
कां तो सर्वांचा **निर्माणकर्त्ता**; आणि इस्राएल
त्याची वतनाची काठी आहे; त्याचें नाम सैन्यां-
चा **परमेश्वर** आहे.

१७ अगे दुर्गांतल्या राहणाऱ्ये, तूं आपलें
द्रव्य देशांतून एकवटून घे. १८ कारण कीं पर-
मेश्वर ह्मणतो, कीं पाहा, मी या खेपेस देशां-
तले राहणारे गोफणून टाकितों, आणि त्यांनी अनु-
भव घ्यावा ह्मणून त्यांस पीडीन.

१९ माझ्या भंगाकरितां मला हाय हाय; माझी
जखम अवघड आहे; ह्मणून मी ह्मणालों, निश्चयें
ही माझी विकृती आहे आणि मला सोसावी लाग-
ती. २० माझा डेरा नाशिलेला आहे, आणि
माझ्या सर्व दोऱ्या तुटल्या आहेत; माझीं लेंकरें
मजपासून बाहेर गेलीं आहेत, आणि नाहींसीं झा-
लीं आहेत; माझा डेरा पुन्हा ताणायाला, आणि
माझे पडदे बांधायाला कोणी नाहीं. २१ कां तर
पालक पशुशील झाले आहेत, त्यांनी परमेश्व-
राला शोधिलें नाहीं; याकरितां ते बुद्धि पावले
नाहींत, आणि त्यांचा सर्व कळप विखरून गेला
आहे. २२ पाहा, अवईचा शब्द आला आहे,
आणि यहूदाचीं नगरें ओसाड, अघोरजीवांची
वस्ती असीं करायाला उत्तरदेशांतून मोठा गलका
येतो.

२३ हे परमेश्वरा, मी जाणतों, कीं मनुष्याचा
मार्ग त्याच्या सत्तेंत नाहीं; चालत्या मनुष्याला
आपलीं पावलें देखील निटावयत नाहीं. २४ हे
परमेश्वरा, जर मला शिक्षा करिसील, तर न्या-
यानें कर; कोपानें नको; कोपानें केली असेल, तर
मला नाहींसें करिसील. २५ जीं राष्ट्रें तुला
जाणत नाहींत आणि जे वंश तुझ्या नामानें हाक
मारीत नाहींत त्यांजवर तूं आपला राग पडूं दे;
कां तर त्यांनी याकोबाला खालें, त्याला खाऊन
टाकिलें आहे, त्यांनी त्याला नाहींसें केलें, आणि
त्याची वस्ती ओसाड केली आहे.

## अध्याय ११.

जें वचन परमेश्वरापासून इर्मयाबवळ आलें
तें असें, २ कीं या कराराचीं वचनें तुह्मी ऐका,
आणि यहूदाच्या मनुष्यांस व यरूशालेमेच्या राह-
णाऱ्यांस सांगा; ३ आणि त्यांस तूं सांग, परमे-
श्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं जो मनुष्य या
कराराचीं वचनें ऐकत नाहीं, तो शापग्रस्त असो;
४ जो तो म्या तुमच्या पूर्वजांस आज्ञापिला, जेव्हां
त्यांस मिसर देशांतून लोखंडाच्या भट्टींतून म्या
आणिलें, आणि तुह्मी माझा शब्द ऐका, आणि हीं
वचनें साधा, जें सर्व मी तुह्मांस आज्ञापितों त्याप्र-
माणें; ह्मणजे तुह्मी माझे लोक असत जाल, आणि
मी तुमचा देव असत जाईन; ५ अशासाठीं कीं
जी शपथ म्या तुमच्या पूर्वजांपाशीं, त्यांस जसा
या दिवसीं आहे, तसा दूध व मध वाहण्याचा देश
द्यावा ह्मणून वाहिली, ती साधावी, असें सांगितलें
तेव्हां; मग म्या उत्तर देतांना ह्मटलें, आमेन, हे
परमेश्वरा. ६ आणि परमेश्वराने मला ह्म-
टलें, हीं सर्व वचनें यहूदाच्या नगरांत, व यरूशा-
लेमेच्या आळ्यांत गाजवून सांग, कीं तुह्मी या
कराराचीं वाक्यें ऐका, आणि तीं साधा. ७ कां
तर ज्या दिवसीं म्या त्यांस मिसर देशांतून वर
आणिलें, त्यापासून या दिवसापर्यंत मी पहांटेस
उठून व निर्देशून तुमचे पूर्वजांस निर्देशून सांगत
आलों आहें, कीं तुह्मी माझा शब्द ऐका. ८
परंतु ते ऐकेनात, आणि आपला कान लावीनात,
आणि ते प्रत्येक आपल्या दुष्ट हृदयाच्या कठिणप-
णाप्रमाणें चालले; यामुळें या कराराचीं जीं सर्व
वाक्यें साधावीं ह्मणून म्या आज्ञापिलीं, परंतु त्यांनी
साधिलीं नाहींत, तीं त्यांजवर आणीन. ९ आणि

**परमेश्वराने** मला सांगितलें, **यहूदाच्या** मनुष्यां-
मध्यें, आणि **यरूशालेमेच्या** राहणाऱ्यांमध्यें बंड
सांपडलें आहे. १० **जे** त्यांचे पूर्वज माझीं वचनें
ऐकायाला अमान्य असत, आणि इतर देवांस
त्यांची सेवा करायाला अनुसरत असत, त्या पूर्व-
जांच्या अन्यायांकडे ते मागें फिरले आहेत; **इस्रा-
एलाच्या** वंशाने व **यहूदाच्या** वंशाने जो करार
म्या त्यांच्या वडिलांसीं केला तो मोडिला आहे.

११ **याकारितां परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
ज्यांतून त्यांच्याने निघवणार नाहीं असें अरिष्ट मी
त्यांजवर आणीन; तेव्हां ते मला आरोळी करिती-
ल, परंतु मी त्यांचें ऐकणार नाहीं. १२ **आणि
यहूदाचीं** नगरें व **यरूशालेमेचे** राहणारे हे ज्या
देवांसाठीं धूप जाळितात, त्यांजवळ जाऊन आरो-
ळी करितील, परंतु ते यांस यांच्या संकटसमयीं
तारणारच नाहींत. १३ **कां** तर हे **यहूदा**, तुझ्या
नगरांच्या गणतीप्रमाणें तुझे देव झाले आहेत;
आणि **यरूशालेमेंतल्या** आळ्यांच्या गणतीप्रमाणें
तुह्मी त्या लज्जेसाठीं वेद्या ठेविल्या, **बालास** धूप
जाळायासाठीं वेद्या ठेविल्या आहेत. १४ **तूं** तर
या लोकांसाठीं प्रार्थना करूं नको, आणि यांसाठीं
आरड व विनंती निवेदूं नको; कां कीं जेव्हां ते
आपल्या कष्टांमुळें मला ओरडतील, तेव्हां मी ऐक-
णार नाहीं. १५ **माझ्या** प्रियेने बहुतांसीं दुरा-
चार केला आहे, आणि तुजवरून पवित्र मास स-
रून गेलें आहे, ह्मणून आतां माझ्या घरांत तिचें
काय आहे? जेव्हां तुझें दुष्टपण चालतें तेव्हां
हर्षतीस. १६ **परमेश्वराने** तुझें नाम हिरवें
गार सुदर सुशोभितफलाचें जाईतझाड, असें ठे-
विलें होतें; मोठ्या गलक्याच्या शब्दासहित त्याने
त्यांजवर अग्नि पेटविला आहे, आणि त्याच्या डा-
हळ्या तोडल्या आहेत. १७ **आणि** सैन्यांचा
**परमेश्वर**, ज्याने तुला लाविलें, तो तुजविषयीं
अरिष्ट बोलला आहे, **इस्राएलाच्या** वंशाच्या व
**यहूदाच्या** वंशाच्या दुष्टाईमुळें, जी त्यांनी मला
कोपित करायाला **बालासाठीं** धूप जाळून आप-
णाला केली आहे ती.

१८ **आणि परमेश्वराने** मला हें जाणूं दिल्हें
आहे, ह्मणून मी जाणतों, तेव्हां त्वां मला त्यांचीं
कृत्यें दाखविलीं. १९ **मी** तर जसा पाळलेला
मेंढा जो कापायासाठीं नेतात तसा होतों; आणि म्या
जाणलें नाहीं, कीं त्यांनी मजविषयीं असे संकल्प
केले होते, कीं आह्मी झाडाला त्याच्या फळा-
सुद्धां नाशूं, आणि पुढें त्याचें नाम न स्मरावें ह्म-
णून त्याला जीवंतांच्या भूमींतून काढून टाकूं. २०
**तर** हे सैन्यांच्या **परमेश्वरा**, न्यायी न्यायाधीशा,
अंतर्यामाच्या व हृदयाच्या परीक्षका, त्यांजवर तुझा
उगवलेला सूड म्या पाहावा; कां कीं म्या आपला
वाद तुजजवळ उघड केला आहे. २१ **याकारितां अ-
नाथोथाच्या** मनुष्यांविषयीं **परमेश्वर** असें ह्मणतो,
जे तुझ्या जीवास टपत असून ह्मणतात, तूं **परमे-
श्वराच्या** नामाने भविष्य सांगूं नको, ह्मणजे तूं
आमच्या हाताकडून मरणार नाहींस. २२ **त्यां-**
**जविषयीं** सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
मी त्यांचें शासन करीन; त्यांचे तरुणपुरुष तर-
वारीने मरतील; त्यांचे पुत्र व त्यांच्या कन्या भुकेने
मरतील; २३ **आणि** त्यांतलें कांहीं शेष राह-
णार नाहीं; कारण कीं मी **अनाथोथाच्या** मनुष्यां-
वर अरिष्ट, त्यांच्या शासनाचें वर्ष आणितों.

## अध्याय १२.

**हे परमेश्वरा**, तूं न्यायी आहेस, ह्मणून मी
तुजसीं विवाद करीन; होय मी तुजसीं न्यायां-
विषयीं बोलेन; दुष्टांचा मार्ग कां सफळ आहे?
जे केवळ विश्वासघाताने वर्त्ततात ते सर्व कां स्वस्थ
असतात? २ **त्वां** त्यांस लाविलें आहे, आणि
ते मुळावले आहेत; ते वाढतात, आणि फल दे-
तात; तूं त्यांच्या मुखांत जवळ असून त्यांच्या
अंतर्यामापासून दूर आहेस. ३ **परंतु हे परमे-
श्वरा**, तूं मला जाणतोस; त्वां मला पाहिलें आहे,
माझें हृदय तुजकडे कसें आहे, तर पारखिलेलें
आहे; तूं त्यांस मेंढरांसारिखें कापायासाठीं काढ,
आणि हिंसेच्या दिवसासाठीं त्यांस सिद्ध कर. ४
**केवढा** वेळ भूमि रडेल, आणि प्रत्येक शेताची
हिरवळ सुकून जाईल, तींतल्या राहणाऱ्यांच्या
दुष्टाईमुळें! पशू व पक्षी नाहींसे झाले आहेत;
कां तर त्यांनी ह्मटलें, तो आमचा अंत पाहणार
नाहीं.

५ **जेव्हां** तूं पादचाऱ्यांसीं धांवलास तेव्हां जर
त्यांनी तुला दमविलें आहे, तर घोड्यांसीं कसा

झटून धांवसील? आणि स्वस्थपणाची भूमि जींत
तूं निर्भय राहिलास तींतच जर थकलास, तर यार्दे-
नेच्या पुरांत कसें करिसील? ६ कां तर जे तुझे
भाऊ व तुझ्या बापाचा जो घराणा त्यानी तुसीं
कपट आचारिलें आहे, त्यानी तुझ्या पाठीमागें समु-
दाय बोलाविला आहे; जरीं तुला ते गोड गोष्टी
बोलले, तरीं त्यांजवर विश्वासूं नको.

७ म्या आपलें घर सोडिलें आहे, म्या आ-
पलें वतन टाकिलें आहे; म्या आपली जीवकांता
तिचे वैऱ्यांच्या हातीं दिल्ही आहे. ८ मला मा-
झें वतन जंगलांतल्या सिंहासारिखें झालें आहे,
त्याने आपला शब्द मजवर उद्गारिला आहे; झ-
णून म्या त्याचा द्वेष धरिला आहे. ९ माझें
वतन मला ठिपक्यांचा पक्षी असें आहे, त्याज-
विरुद्ध पक्षी भोंवते आहेत; अहो या, रानांतल्या
सर्व पशूंला एकत्र मिळवा, त्यानी खावें झणून ते
आणा. १० बहुत पालकानी माझा द्राक्षमळा ना-
शिला आहे, त्यानी माझा विभाग तुडविला आहे,
त्यानी माझा रमणीय विभाग ओसाड जंगल केला
आहे. ११ त्यानी त्याला ओसाड केलें आहे,
आणि तो ओसाड असतांना मजजवळ शोक क-
रितो, सर्व भूमि ओसाड झाली आहे, कां कीं
कोणी मनांत विचार करीत नाहीं. १२ रानांतल्या
सर्व उंचस्थानांवर लुटणारे आले आहेत; कां पर-
मेश्वराची तरवार भूमींच्या एका सीमेपासून भू-
मीच्या दुसऱ्या सीमेपर्यंत खाईल; कोणत्याहि मनु-
ष्यास स्वस्थपण प्राप्त होणार नाहीं. १३ त्यानी
गहूं पेरिले, परंतु कांटेरीं झाडें कापिलीं आहेत;
ते श्रम करून कांहीं हित पावले नाहींत, आणि
परमेश्वराच्या संतप्त क्रोधामुळें ते तुमच्या संप-
त्तीविषयीं लज्जित होतील.

१४ जे माझे दुष्ट शेजारी, जें माझें वतन म्या
आपल्या लोकांस, इस्राएलास भोगायाला दिल्हें
यांस हात लावतात, त्यांविषयीं परमेश्वर झ-
णतो, पाहा, मी त्यांस भूमींतून उपटीन, आणि
त्यांजमधून यहूदाचा वंश उपटून काढीन. १५
आणि म्या त्यांस उपटल्यानंतर असें होईल, कीं
मी फिरून त्यांजवर दया करीन, आणि त्यांस प्र-
त्येक त्याच्या वतनास, व प्रत्येक त्याच्या भूमीस
परत आणीन. १६ आणि असें होईल, कीं जसें
त्यानी माझ्या लोकांस बालाची शपथ करायाला
शिकविलें, तसें जीवंत परमेश्वर आहे, असी
माझ्या नामाची शपथ करायाला जर माझ्या लो-
कांचे मार्ग ते निश्चयें शिकतील, तर ते माझ्या
लोकांमध्यें स्थिर वस्ती पावतील. १७ परंतु जर
ऐकणार नाहींत, तर मी त्या राष्ट्राला निःशेष उप-
टून टाकीन, व नाहींसें करीन, असें परमेश्वर
झणतो.

## अध्याय १३.

परमेश्वराने मला झटलें, कीं तूं जाऊन आप-
णासाठीं पांढऱ्या कापडाचा कंबरबंध घे, आणि
तो आपल्या कंबरेस बांध, आणि पाण्यांत घालूं
नको. २ तेव्हां म्या परमेश्वराच्या वचनाप्रमाणें
कंबरबंध घेतला, आणि आपल्या कंबरेस बांधिला.
३ मग पुन्हा परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, ४ जो कंबरबंध त्वां घेतला, जो तुझ्या
कंबरेवर आहे, तो घे, आणि उठून फराथेस जा,
आणि तेथें खडकाच्या भेगेंत तो लपवून ठेव. ५
तेव्हां जसें मला परमेश्वराने आज्ञापिलें, त्याप्र-
माणें म्या जाऊन तो फराथेजवळ लपविला. ६
मग बहुत दिवस गेल्यानंतर असें झालें, कीं
परमेश्वर मला झणाला, तूं उठून फराथेस जा,
आणि जो कंबरबंध म्या तुला तेथें लपवायाला सां-
गितला तो तेथून काढून घे. ७ नंतर मी फराथे-
स गेलों, आणि ज्या ठिकाणांत म्या तो कंबरबंध
लपविला होता त्यांतून म्या तो खाणून घेतला;
तेव्हां पाहा, तो कंबरबंध नासून गेला आहे, आ-
णि कांहीं कामाच्या उपयोगी नाहीं. ८ तेव्हां
परमेश्वराचें वचन मजकडे आलें कीं, ९ पर-
मेश्वर झणतो, कीं याप्रमाणें मी यहूदाचा अभि-
मान, आणि यरूशालेमेचा मोठा अभिमान नासून
टाकीन. १० हे दुष्टलोक जे माझीं वचनें ऐका-
याला अमान्य आहेत, जे आपल्या हृदयाच्या क-
ठीनपणाने चालतात, आणि त्यांची सेवा कराया-
ला व त्यांस भजायाला इतरदेवांस अनुसरतात,
हे जो हा कंबरबंध कांहीं कामाच्या उपयोगी नाहीं
यासारिखे होतील. ११ कां तर जसा कंबरबंध
मनुष्याच्या कंबरेस लागतो, तसा इस्राएलाचा सर्व
वंश व यहूदाचा सर्व वंश मी आपणास लगट-

विणार होतों, ते मजसाठीं लोक व नाम व प्रशंसा
व शोभा व्हावे ह्मणून; परंतु ते ऐकेनात, असें
**परमेश्वर** ह्मणतो.

१२ तूं तर त्यांस हें वचन सांग, **परमेश्वर**
**इस्राएलाचा देव** ह्मणतो, कीं प्रत्येक बुधला द्राक्षा-
रसाने भरतील; तेव्हां ते तुला ह्मणतील, काय,
आह्मी जाणत नाहीं, कीं प्रत्येक बुधला द्राक्षारसाने
भरतील? १३ तेव्हां तूं त्यांस सांग, **परमेश्वर**
ह्मणतो, कीं पाहा, मी या देशांतले सर्व राहणारे,
व जे राजे दावीदाच्या स्थानीं त्याच्या सिंहासना-
वर बसतात ते, व याजक, व भविष्यवादी, व यरू-
शालेमेंतले सर्व राहणारे झिंगीनें भरीन. १४
**आणि** मी त्यांस एकमेकासीं, आणि बाप व पुत्रहि
एकत्र आदळीन, मी कळवळा अथवा काकळूत
अथवा दया करणार नाहीं, परंतु त्यांस नाशीन,
असें **परमेश्वर** ह्मणतो.

१५ तुह्मी ऐका, कान द्या; अभिमानी असूं
नका; कां कीं **परमेश्वर** बोलला आहे. १६
**तो** अंधार पडे असें करील, आणि अंधारमय प-
र्वतांवर तुमचे पाय अडखळतील, आणि तुह्मी
प्रकाशाची वाट पाहतांना तो त्याची मरणाची सा-
वली करील, व त्याचा दाट अंधार करून ठेवील,
यापूर्वीं तुह्मी **परमेश्वराला** तुमच्या **देवाला**
गौरव द्या. १७ **परंतु** जर तुह्मी हें ऐकणार ना-
हीं, तर तुमच्या गर्वामुळें माझा जीव गुप्तांत रडेल;
आणि माझा डोळा फार अश्रुपात करील, व त्यां-
तून आंसवें वाहतील, कारण कीं **परमेश्वराचा**
कळप पाडाऊ झाला आहे. १८ **राजाला** व रा-
णीला सांग, तुह्मी लीन होऊन बसा, कां कीं तुम-
चीं छत्रें आणि तुमचा सुशोभित मुगूट उतरतील.
१९ दक्षिणेंतील नगरें बंद करतील, आणि उघडा-
याला कोणी राहणार नाहीं; सर्व यहूदा पाडाव
होऊन प्रवासांत जाईल, निःशेष पाडाव होऊन
प्रवासांत जाईल. २० **जे** उत्तरेंतून येत आहेत
त्यांस तुह्मी आपले डोळे लावून पाहा; जो कळप
तुला दिल्हा होता तो तुझा सुंदर कळप कोठें आ-
हे? २१ जेव्हां तो तुला शासील तेव्हां काय
ह्मणसील? त्वां तर आपणावर त्यांस मुख्य अधिप
व्हायाला शिकविलें आहे; तर जशा प्रसवणाऱ्या
स्त्रियेला तशा तुला वेदना लागणार नाहींत काय?

२२ **आणि** या गोष्टी मला कां लागल्या आ-
हेत? असें जर तूं आपल्या मनांत ह्मणसील, तर
तुझ्या फार अन्यायांमुळें तुझ्या वस्त्रांचे पदर उघ-
डिले आहेत, आणि तुझ्या टांचा बोडक्या झाल्या
आहेत. २३ **खुशी** आपलें कातडें, अथवा चित्ता
आपले ठिपके पालटायास समर्थ होईल काय?
मग ज्या तुह्मास वाईट करण्याची सवई आहे ते
उत्तम करायास समर्थ व्हाल.* २४ **तर** जें भूंस
जंगलच्या वाऱ्याकडून सरून जातें त्यासारिखें त्यां-
स उडवीन. २५ **हाच** मजपासून तुझा वांटा,
तुझा नेमलेला विभाग आहे, कारण कीं तूं मला
विसरली आहेस, आणि लबाडीवर भाव ठेविला
आहे, असें **परमेश्वर** ह्मणतो. २६ **तर** मींहि
तुझ्या समोर तुझे वस्त्रांचे पदर उघडीन, तेव्हां
तुझी लज्जा दिसेल. २७ **तुझीं** जारकर्मे व तुझीं
हिंसणीं तुझ्या व्यभिचाराची दुष्टाई रानांतल्या डों-
गरांवर तुझीं कुत्सितकर्मे म्या पाहिलीं आहेत;
अगे यरूशालेमे, तुला हाय हाय, तूं स्वच्छ होत
नाहींस काय? अझून किति वेळ लागेल?

## अध्याय १४.

दुकाळाविषयीं जें **परमेश्वराचें** वचन इर्मयाज-
वळ आलें तें. २ **यहूदा** शोक करिती, तिचीं
दारें ग्लान झालीं आहेत; तीं धुळीस मिळत इ-
तकीं काळवटलीं आहेत; आणि यरूशालेमेची
आरड उंचावली आहे. ३ **आणि** त्यांच्या महा-
जनानी आपलीं धाकटीं पोरें पाण्यासाठीं पाठविलीं,
तीं कूपांजवळ आलीं, त्यांस पाणी सांपडलें नाहीं,
तीं आपलीं भांडीं रिकामीं घेऊन परत आलीं; तीं
लाजलीं व शरमलीं, त्यानी आपलीं डोसकीं झां-
किलीं. ४ देशांत पाऊस पडला नाहीं ह्मणून
भूमि भेगलली, याकरितां शेतकरी लज्जित झाले,
त्यानी आपलीं डोसकीं झांकिलीं. ५ **कां** तर
हरिणीने देखील रानांत प्रसवून पाडस सोडिलें,
कारण कीं कांहीं हिरवळ नव्हती. ६ **आणि** रा-
नगाढव उंचस्थानांवर उभे राहिले, त्यानी अजग-
रांसारिखा वायु भक्षिला; त्यांचे डोळे थकले,
कां कीं कांहीं गवत नव्हतें.

७ **हे परमेश्वरा**, जरी आमचे अन्याय आ-
ह्माविरुद्ध साक्ष देतात तरी तूं आपल्या नामासा-

ठीं कार्य कर; का तर आमचीं मार्गे फिरणीं बहुत
झालीं आहेत, आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे.
८ हे इस्राएलाच्या आशा, संकट समयीं त्याच्या
तारणाऱ्या, तूं देशांत आगंतुकासारिखा अथवा जो
वाटसरू रात्रीं राहायाला वळतो त्यासारिखा का
असावास? ९ कुंठित मनुष्यासारिखा जो वीर
तारायाला समर्थ नाहीं त्यासारिखाहि का असा-
वास? परंतु हे **परमेश्वरा**, तूं आमच्या मध्यभा-
गीं आहेस, आणि तुझें नाम आह्मास ठेविलें
आहे; आह्माला सोडूं नको.
१० तर या लोकांविषयीं **परमेश्वर** ह्मणतो,
कीं असेंच यांस भटकणें आवडलें आहे, यानी
आपले पाय आकळिले नाहींत, ह्मणून **परमेश्वर**
यांस प्रसन्न झाला नाहीं; आतां तो यांचा अ-
न्याय स्मरेल, आणि यांच्या पापांचें शासन करील.
११ आणि **परमेश्वराने** मला सांगितलें आहे,
या लोकांसाठीं हिताविषयीं प्रार्थना करूं नको.
१२ जेव्हां हे उपास करितील तेव्हां मी यांची
आरोळी ऐकणार नाहीं; आणि जेव्हां मजसाठीं
होम व अर्पण करितील, तेव्हां यांस मी प्रसन्न
होणार नाहीं; परंतु तरवार व दुकाळ व मरी यां-
कडून मी यांस नाहींसें करीन.
१३ तेव्हां मी ह्मणालों, अहा **प्रभु परमे-
श्वरा**, पाहा, भविष्यवादी यांस सांगतात, कीं
तुह्मी तरवार पाहणार नाहीं, आणि तुह्माला
दुकाळ पडणार नाहीं; परंतु तुह्माला या स्थानांत
निश्चित स्वस्थपण देईन. १४ आणि **परमेश्वर**
मला ह्मणाला, भविष्यवादी माझ्या नामाने खोटें
भविष्य सांगतात; म्या त्यांस पाठविलें नाहीं,
आणि त्यांस आज्ञापिलें नाहीं, आणि मी त्यांस
बोललों नाहीं; ते खोटें दर्शन व दैवप्रश्न व
व्यर्थपण व आपल्या मनाचें कपट तुह्माला
भविष्य सांगतात. १५ याकरितां जे भविष्यवादी
म्या त्यांस पाठविले नसतां भविष्य सांगतात, आ-
णि या देशांत तरवार व दुकाळ पडणार नाहीं,
असें ह्मणतात, त्यांविषयीं **परमेश्वर** ह्मणतो, कीं
तरवार व दुकाळ यांकडून ते भविष्यवादी नाहींसे
होतील. १६ आणि ज्या लोकांस ते भविष्य
सांगतात, त्यांस दुकाळ व तरवार यांच्याकरितां
यरूशालेमेच्या आळ्यांत लोक बाहेर टाकितील;
आणि त्यांस व त्यांच्या स्त्रिया व त्यांचे पुत्र व
त्यांच्या कन्या यांसहि कोणी पुरणारा असणार
नाहीं, आणि मी त्यांजवर त्यांची दुष्टाई घालीन.
१७ आणि त्यांस हें वचन सांग, माझ्या डो-
ळ्यांतून रात्रंदिवस आसवें वाहावीं, आणि बंद
न राहावीं; कारण कीं माझ्या लोकांची कुमारी
कन्या मोठ्या मोडणीने मोडली आहे, तिची जखम
फार अवघड आहे. १८ जर मी बाहेर शेतांत
जातों, तर पाहा, तरवारीने वधलेले; आणि नग-
रांत जर शिरतों तर पाहा, दुकाळाच्या पीडा;
ह्मणून ज्या देशास ओळखत नाहींत त्यांत भवि-
ष्यवादी व याजकहि फिरतात. १९ काय, त्वां
यहूदा अगदी नाकारिला आहे? तुझा जीव सी-
योनेस कंटाळला आहे काय? त्वां आह्माला कां
हाणिलें, आणि आह्मास कांहीं वैद्यपण नाहीं?
स्वस्थपणाची वाट पाहिली असतां कांहीं हित
झालें नाहीं; वैद्यपणाच्या समयाची वाट पाहि-
ली असतां पाहा, भय. २० हे **परमेश्वरा**,
आह्मी आपली दुष्टाई व आपल्या वडिलांचा अ-
न्याय अंगीकारितों; का कीं आह्मी तुजविरुद्ध
पाप केलें आहे. २१ तूं आपल्या नामाकरितां
आह्माला धिक्कारूं नको, तूं आपलें गौरवी सिंहासन
अप्रतिष्ठित होऊं देऊं नको; स्मरण कर, आह्मा-
सीं जो तुझा करार तो मोडूं नको. २२ राष्ट्रां-
च्या व्यर्थपणांमध्यें कोणी पाऊस पाडणारे आहेत
काय? अथवा आकाशें स्वतां पाहळ्या द्यायास
समर्थ आहेत काय? हे **परमेश्वरा** आमच्या
देवा, तो तूंच आहेस कीं नाहीं? तर आह्मी
तुझी वाट पाहत जाऊं, का कीं हीं सर्व त्वां उत्पन्न
केलीं आहेत.

## अध्याय १५.

आणि **परमेश्वराने** मला ह्मटलें, जरीं मोशे
व शमुवेल मजसमोर उभे राहते, तरीं माझें
चित्त या लोकांकडे न वळतें; मजपुढून यांस घा-
लीव, आणि हे निघून जावोत. २ आणि असें
होईल, कीं जेव्हां ते तुला ह्मणतील, आह्मी कोठें
निघून जाऊं? तेव्हां तूं त्यांस सांग, **परमेश्वर**
ह्मणतो, कीं जो मरणासाठीं आहे तो मरणास,
आणि जो तरवारीसाठीं आहे तो तरवारीस,

आणि जो दुकाळासाठीं तो दुकाळास, आणि जो
पाडावांच्या प्रवासासाठीं तो पाडावांच्या प्रवासास
जावो. ३ आणि परमेश्वर ह्मणतो, मी त्यांजवर
चार प्रकार नेमून ठेवीन; ह्मणजे वधायाला तर-
वार, आणि ओढून खायाला कुत्रीं, आणि खायाला
व नाशायाला आकाशांतले पक्षी, व भूमीवरले
पशु. ४ आणि मी त्यांस पृथ्वींतल्या सर्व राज्यांत
हांकून देववीन, यहिज्कीयाचा पुत्र जो मनाश्शे य-
हूदाचा राजा त्याच्या कारणें जें आचरण त्याने
यरूशालेमेंत केलें त्याजमुळें. ५ तर अगे यरू-
शालेमे, तुजवर कोण करुणा करील? आणि तुज-
करितां कोण शोक करील? आणि तुला कुशलप्रश्न
करायाला कोण वळेल? ६ परमेश्वर ह्मणतो,
त्वां मला सोडिलें आहे, तूं माघारीं गेली आहेस;
ह्मणून मी आपला हात तुजवर पुढें करून तुला
नाशीन, मी अनुतापून थकलों आहें. ७ आणि
देशाच्या दरवाजांमध्यें मी त्यांस सुपानें वारावीन;
मी आपल्या लोकांस पोरगमाऊ व नाहींसें करीन,
कां ते आपल्या मार्गांपासून फिरले नाहींत. ८
मला त्यांच्या विधवा समुद्राच्या वाळवेपेक्षां अधिक
झाल्या आहेत; म्या त्यांजकडे आईवर तरुण,
दुपारचा लुटणारा आणिला आहे; म्या तिजवर
अकस्मात शंका व भयें पडत असें केलें आहे.
९ जी सात पुत्र प्रसविली ती ग्लान झाली, तिने
प्राण सोडिला, दिवसांतला काल शेष असतांहि
तिचा सूर्य मावळला, ती लाजली व शरमली;
आणि त्यांचें शेष त्यांच्या वैऱ्यांपुढें तरवारिला सों-
पून देईन, असें परमेश्वर ह्मणतो.
१० अगे माझ्या आई, मला हाय हाय, कां
तर तूं मला सर्व देशासाठीं भांडण्याचा पुरुष व
विवादाचा पुरुष असा प्रसवली आहेस; म्या
व्याजासाठीं द्रव्य दिल्हें नाहीं, आणि त्यांनी मला
व्याजासाठीं दिल्हें नाहीं; तथापि ते सर्व मला शा-
पितात. ११ परमेश्वराने मला ह्मटलें, निश्चयें
मी तुला तुझ्या हितासाठीं शेष होईन, आणि
विपत्तीसमयीं व संकटसमयीं वैरी तुजजवळ विनंती
करीत येई, असें करीन.
१२ लोखंड उत्तरेंतल्या लोखंडास व पित-
ळास मोडील काय? १३ आणि तुझ्या सर्व पा-
पांमुळें, तुझ्या सर्व सीमांत, मोलावांचून तुझें धन
व तुझें द्रव्य लुटीसाठीं देईन. १४ आणि जो
देश तूं जाणत नाहींस त्यांत तुझे वैरी तुला नेत
असें करीन; कां कीं माझ्या क्रोधाने अग्नि पेटला
आहे, तो तुह्मावर जळेल.
१५ हे परमेश्वरा, तूं जाणतोस; मला स्मर,
मजकडे मन लाव, आणि जे माझ्या पाठीस लाग-
तात त्यांचा सूड मजसाठीं घे, तूं मंदक्रोध आहेस,
ह्मणून माझा संहार करूं नको; म्या तुजकरितां
निंदा साहिली आहे, असें जाण. १६ तुझीं
वचनें मला सांपडलीं, तेव्हां म्या तीं खाल्लीं;
आणि तुझीं वचनें मजसाठीं माझ्या हृदयाचा आ-
नंद व हर्ष झालीं; कां तर तुझें नाम मजवर ठेविलें
आहे, हे परमेश्वरा सैन्यांच्या देवा. १७ मी
निंदकांच्या मंडळींत बसून उल्लासलों नाहीं; तुझ्या
हातामुळें मी एकटा बसलों आहें; कां त्वां रोषानें
मला भरलें आहे. १८ माझा खेद कां निरंतर
आहे? आणि माझी जखम कां असाध्य आहे?
ती बरी होण्यास अमान्य आहे; तूं मला खोट्या
सारिखा, जसीं अविश्वासु पाण्यें तसा, निश्चयें हो-
सील काय?
१९ याजकरितां परमेश्वर ह्मणतो, कीं जर
फिरसील तर तुला फिरवीन, आणि तूं मजपुढें
उभा राहसील; आणि जर हलक्यांतून मोलवान
काढसील तर माझ्या मुखाप्रमाणें होसील; ते तु-
जकडे फिरोत; परंतु तूं त्यांजकडे फिरूं नको.
२० आणि या लोकांसाठीं तुला पित्तलाचा बळकट
कोट असें करीन; आणि हे तुजसीं लढतील,
परंतु तुजवर प्रबल होणार नाहींत; कारण कीं
तुला तारायाला व तुला पार पाडायाला मी तुज-
जवळ आहें, असें परमेश्वर ह्मणतो. २१ आ-
णि दुष्टांच्या हातापासून तुला सोडीन, व बलात्का-
ऱ्यांच्या मुठीपासून तुला उद्धरीन.

## अध्याय १६.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ तूं आपणासाठीं बायको करूं नको,
आणि या स्थानांत तुजला पुत्र व कन्या होऊं न-
येत. ३ कां तर या स्थानांत जन्मलेल्या पुत्रां-
विषयीं व कन्यांविषयीं, आणि त्यांच्या माता ज्या
त्यांस प्रसविल्या व त्यांचे पिते ज्यांनी त्यांस या

देशांत जन्म दिल्हा, त्याविषयीं **परमेश्वर** ह्मणतो
कीं, ४ ते पीडांच्या मरणानी मरतील, त्यांक-
रितां आक्रंदन कोणी करणार नाहीं, त्यांस पुरणार
नाहींत; ते भूमीच्या पाठीवर खतासाठीं होतील;
आणि तरवार व दुकाळ यांकडून ते नाहींसे हो-
तील; आणि त्यांचीं मढीं आकाशांतल्या पक्ष्यांस
व भूमींतल्या पशूंस आहारासाठीं होतील. ५
कां तर सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं आक्रं-
दनाच्या घरांत जाऊं नको, व शोक करायाला जा-
ऊं नको, आणि त्यांसाठीं शोचन करूं नको; का-
रण कीं या लोकांपासून मी आपलें कुशल, आणि
दया व करुणा काढिलीं आहेत, असें **परमेश्वर**
ह्मणतो. ६ आणि या देशांत मोठे व लहान
मरतील; त्यांस पुरणार नाहींत, आणि त्यांजक-
रितां कोणी शोचना करणार नाहींत, आणि त्यांज-
करितां कोणी आपलें अंग चोंचावणार नाहीं, व
आपणास खल्वाट करणार नाहीं. ७ आणि मेले-
ल्याविषयीं त्यांचें सांत्वन करायाला लोक त्यांजक-
रितां शोककरून आपलें अंग फाडणार नाहींत;
आणि त्यांस त्यांच्या बापाविषयीं अथवा आई-
विषयीं सांत्वनाचा प्याला प्यायाला देणार नाहींत.
८ आणि त्यांजवळ खायाला व प्यायाला बसाया-
साठीं सुभोजनाच्या घरांत जाऊं नको. ९ कारण
कीं सैन्यांचा **परमेश्वर** इस्राएलाचा देव ह्मणतो,
कीं पाहा, मी या स्थानापासून तुमच्या दृष्टींत व
तुमच्या दिवसांत आनंदाचा शब्द व हर्षाचा
शब्द, नवऱ्याचा शब्द व नवरीचा शब्द नाहींसा
करीन.

१० आणि असें होईल, कीं जेव्हां या लो-
कांस हीं सर्व वचनें सांगसील तेव्हां ते तुला ह्म-
णतील, कशामुळें **परमेश्वर** आह्माविषयीं हें सर्व
मोठें अरिष्ट बोलला आहे? आणि आमचा अ-
न्याय काय? आणि **परमेश्वर** जो आमचा देव
त्याजविरुद्ध जें आह्मी पातक केलें तें काय आहे?
११ तेव्हां त्यांस सांग, **परमेश्वर** ह्मणतो, कीं
अशामुळें कीं तुमच्या वडिलानी मला सोडून इत-
रदेवांचें अनुसरण केलें, आणि त्यांस सेविलें, व
भजिलें, व मला सोडिलें, व माझें नेमशास्त्र पा-
ळिलें नाहीं; १२ आणि तुह्मी आपल्या वडि-
लांपेक्षां वाईट केलें आहे; आणि पाहा, माझें न
ऐकावें ह्मणून तुह्मी प्रत्येक आपल्या दुष्ट हृदयाच्या
कठिणपणाप्रमाणें वर्त्ततां; १३ ह्मणून मी तुह्मा-
ला या देशांतून घालवून, तुह्मी व तुमच्या वडि-
लानी जो देश जाणला नाहीं त्यांत टाकीन; आणि
तेथें रात्रंदिवस इतरदेवांची सेवा कराल; कां मी
तुह्मावर अनुग्रह करणार नाहीं.

१४ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, ते
दिवस येतात, ज्यांत, जीवंत **परमेश्वर** आहे, ज्या
त्याने इस्राएलाचे वंश मिसर देशांतून वर आ-
णिले, असें अणखी ह्मणणार नाहींत. १५ परंतु,
जीवंत **परमेश्वर** आहे, ज्या त्याने इस्राएलाचे
वंश उत्तरेच्या देशांतून, आणि ज्या सर्व देशांत
त्याने त्यांस भडकविलें होतें, त्यांतूनहि वर आणिलें;
आणि त्यांची जी भूमि म्या त्यांच्या पूर्वजांस दि-
ल्ही तिजवर त्यांस परत आणीन.

१६ **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, मी बहुत धी-
वर आणावे ह्मणून पाठवीन, मग ते येऊन त्यांस
मास्यांसारिखे धरतील; त्यानंतर बहुत पारधी आ-
णावे ह्मणून पाठवीन, तेव्हां ते येऊन त्यांस प्रत्येक
पर्वतावरून व प्रत्येक डोंगरावरून व खडकांच्या
भेगांतून दामटतील. १७ कां तर त्यांच्या सर्व
मार्गांवर माझे डोळे आहेत; ते मजसमोरून लपाले
नाहींत, आणि त्यांचा अन्याय माझ्या डोळ्यांस-
मोरून गुप्त नाहीं. १८ आणि पहिलें त्यांच्या
अन्यायाची व त्यांच्या पापाची फेड दुप्पट करीन;
कारण कीं माझी भूमि यानी बाटविली आहे, आ-
णि आपल्या कुत्सित व अघोर पदार्थांच्या मढ्यानी
माझें वतन भरिलें आहे. १९ हे **परमेश्वरा**,
संकट समयीं माझ्या सामर्थ्या, माझ्या दुर्गा, आणि
माझ्या आश्रया, पृथ्वीच्या शेवटांपासून राष्ट्रें तुजकडे
येतील व ह्मणतील, निश्चयें आमचे वडील लबा-
डीचें धारण करीत आले आहेत, व्यर्थपण आणि
ज्यांत कांहीं हितकारण नाहीं त्याचें. २० मनुष्य
आपणासाठीं देव करील काय, आणि ते देव ना-
हींत? २१ याकरितां पाहा, मी त्यांस कळवीन,
या खेपेस मी आपला हात व आपलें सामर्थ्य
त्यांस जाणवीन; तेव्हां माझें नाम **परमेश्वर**
आहे, असें ते जाणतील.

## अध्याय १७.

यहूदाचें पातक लोखंडी खचरणीने व हिऱ्याच्या
टोंकाने लिहिलेलें आहे; तें त्यांच्या हृदयाच्या
पाटीवर व तुमच्या वेद्यांच्या शिंगांवर कोरलेलें
आहे; २ त्यांचे वंश त्यांच्या वेद्या व त्यांच्या
मूर्त्ति हिरव्या झाडांजवळ उंच डोंगरावर स्मरत
असतांना. ३ हे माझ्या रानांतल्या पर्वता, तुझें
धन व तुझें द्रव्य मी लुटीसाठीं देईन; तुझ्या सर्व
सीमांत तुझीं उंचस्थानें पापयुक्त आहेत. ४
आणि तूं स्वतां जें तुझें वतन म्या तुला दिल्हें
तें खंडित पाडसील; आणि ज्या देशास तूं
ओळखत नाहींस, त्यांत तुजकडून तुझ्या वैऱ्यांची
सेवा करवीन; कारण कीं सर्वकाळपर्यंत बळत
राही असा जो अग्नि तो तुह्मीं माझ्या क्रोधांत
पेटविला आहे.

५ परमेश्वर ह्मणतो, कीं जो पुरुष मनुष्यावर
भाव ठेवितो, व मनुष्यजातीच्यास आपला बाहु
असा करितो, व ज्याचें हृदय परमेश्वरापासून
फिरतें, तो शापग्रस्त असो. ६ आणि तो जंग-
लांतल्या झुडपासारिखा होईल, आणि जेव्हां
कुशल येतें तेव्हां तें तो अनुभवणार नाहीं, आणि
रानांतल्या सुक्या जाग्यांत, खाऱ्या न वसलेल्या
भूमींत वस्ती करील.

७ जो पुरुष परमेश्वरावर भाव ठेवितो आ-
णि ज्याचा भाव परमेश्वर आहे, तो आशीर्वा-
दित आहे. ८ आणि तो पाण्याजवळ लाविले-
ल्या झाडासारिखा होईल, जें आपलीं मुळें ओ-
घाजवळ पसरितें, आणि जेव्हां झळ येती, तेव्हां
तिला अनुभवित नाहीं, आणि त्याचें पान हिरवें
गार राहतें; आणि सुकव्याच्या वर्षांत तें चिंता-
क्रांत होत नाहीं, आणि फल देणें सोडीत नाहीं.
९ सर्व जें कांहीं त्यापेक्षां हृदय कपटी आहे,
आणि तें अति दुष्ट आहे; त्याला कोण जाणे?
१० मी परमेश्वर हृदय शोधितों, मी अंतर्याम
पारखितों, प्रत्येकाला त्याच्या आचरणाप्रमाणें त्या-
च्या कर्मांच्या फलाप्रमाणें द्यायासाठीं. ११ जसी
तित्तिरी अंडांवर बसती, आणि तीं फोडीत नाहीं,
तसा जो न्यायावांचून द्रव्य मिळवितो तो आपल्या
अर्द्धायुष्यांत तें सोडील, आणि आपल्या अंतकाळीं
मूर्ख निघेल.

१२ आमच्या पवित्र मंदिराचें स्थान पहिल्या-
पासून गौरवी सिंहासन उंच स्थल आहे. १३
हे परमेश्वरा, इस्राएलाच्या आशा, सर्व जे तुला
सोडितात, ते लज्जित होतील; जे मजपासून फि-
रतात, ते भूमींत लिहिण्यांत येतील, कारण कीं
जो परमेश्वर जिवंत पाण्यांचा झरा त्याला त्यांनी
सोडिलें आहे. १४ हे परमेश्वरा, मला निरो-
गी कर, ह्मणजे मी बरा होईन; मला तार, ह्म-
णजे तरेन; कां तूं माझा स्तुतिपात्र आहेस.

१५ पाहा, ते मला ह्मणतात, परमेश्वराचें
वचन कोठें? तें आतां येवो. १६ परंतु तुजमागें
पालक होण्यापासून मी मागें हटलों नाहीं; आणि
म्या दुर्दिवस इच्छिला नाहीं, असें तूं जाणतोस; जें
माझ्या ओंठांतून निघालें तें तुजसमक्ष होतें. १७
मला भयंकर होऊं नको; विपत्तीच्या दिवशीं तूं
माझा आश्रय आहेस. १८ माझे पिडणारे
लज्जित होवोत, परंतु मी लज्जित होऊं नये;
त्यांस भय लागो, परंतु मला भय लागूं नये; त्यां-
जवर विपत्तीचा दिवस येऊं दे, आणि दुप्पट मो-
डणीने त्यांस मोडून टाक.

१९ परमेश्वराने मला सांगितलें, कीं यहू-
दाचे राजे ज्यांतून आंत जातात, आणि ज्यांतून ते
बाहेर येतात, त्या लौकिक दारांत व यरूशाले-
मेच्या सर्व दारांत तूं जाऊन उभा राहा; २० आणि
त्यांस सांग, अहो यहूदाचे राजेहो, आणि सर्व
यहूदा, आणि यरूशालेमेंतले सर्व राहणारे, जे
तुह्मी या दारांतून आंत जातां, ते तुह्मी परमे-
श्वराचें वचन ऐका. २१ परमेश्वर ह्मणतो,
कीं तुह्मी आपणांविषयीं सावध असा, आणि शा-
ब्बाथाच्या दिवसीं कांहीं भार वाहूं नका, आणि
यरूशालेमेच्या दारांत आणूं नका; २२ आ-
णि शाब्बाथाच्या दिवसीं तुह्मी आपल्या घरां-
तून कांहीं भार बाहेर आणूं नका, आणि कांहीं
उद्योग करूं नका, आणि जसें म्या तुमच्या पूर्व-
जांस आज्ञापिलें तसें शाब्बाथाचा दिवस पवित्र
मानून पाळा. २३ परंतु ते ऐकेनात, आणि आ-
पला कान लावीनात, आणि शिक्षा न ऐकावी व न
घ्यावी ह्मणून त्यांनी आपली मान ताठ केली.
२४ आणि परमेश्वर ह्मणतो, शाब्बाथाच्या दि-
वसीं या नगराच्या दारांत कांहीं भार न आण-

ण्यास, आणि शाब्बाथाचा दिवस पवित्र मानून पा-
ळण्यास, आणि त्यांत कांहीं उद्योग न करण्यास
जर निश्चयें तुह्मी माझें ऐकाल, तर असें होईल
कीं, २५ या नगराच्या दारांतून दावीदाच्या सिं-
हासनावर बसणारे राजे व सरदार, रथांत व
घोड्यांवर बसून ते, व त्यांचे सरदार यहूदाचे
जन व यरूशालेमेचे राहणारे आंत जातील;
आणि हें नगर सर्वकालपर्यंत राहील. २६ आ-
णि यहूदाच्या नगरांतून, व यरूशालेमेच्या चोंहीं-
कडील प्रदेशांतून, व बन्यामीनाच्या देशांतून, आ-
णि खोलवट देशांतून, व डोंगरवट देशांतून, आणि
दक्षिणेंतून, होम व यज्ञ व अर्पणें व धूप आणीत,
व स्तुतीचीं अर्पणें करीत लोक परमेश्वराच्या
घरास येतील. २७ परंतु शाब्बाथाचा दिवस
पवित्र मानून पाळायाला, आणि शाब्बाथाच्या दि-
वशीं भार वाहून यरूशालेमेच्या दारांत न जा-
याला, जर तुह्मी माझें ऐकणार नाहीं, तर मी
तिच्या दारांत अग्नि पेटवीन; तेव्हां तो यरूशाले-
मेचे वाडे खाईल, आणि विझणार नाहीं.

## अध्याय १८.

जें वचन परमेश्वरापासून इर्मयाजवळ आलें
तें असें कीं, २ तूं उठून कुंभाराच्या घरांत
उतरून जा, आणि तेथें मी आपलीं वचनें तुला ऐक-
वीन. ३ मग मी कुंभाराच्या घरांत उतरून गेलों,
तेव्हां पाहा, तो चाकावर एक काम करीत होता.
४ आणि जें पात्र तो करीत होता तें, जसा कुंभा-
राच्या हातांत गारा बिघडतो तसें, बिघडलें; ते-
व्हां त्यानें पुन्हा दुसरें पात्र केलें, तें करायाला
जसें कुंभाराच्या दृष्टीस योग्य झालें, तसें केलें.
५ तेव्हां परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, ६ परमेश्वर ह्मणतो, अहो इस्राएलाच्या
वंशानों, जसा हा कुंभार तसा मी तुह्माला
करायास समर्थ नाहीं काय? अहो इस्राएलाच्या
वंशानों, पाहा, जसा गारा कुंभाराच्या हातांत तसे
तुह्मी माझ्या हातांत आहां. ७ जेव्हां मी राष्ट्रा-
विषयीं अथवा राज्याविषयीं उपटावें व पाडावें व
नाशावें ह्मणून बोलतों, तेव्हां, ८ ज्याविषयीं
मी बोललों, तें राष्ट्र जर तेव्हांच आपल्या दुष्टप-
णापासून फिरेल, तर जें अरिष्ट मी त्याला करा-
याला कल्पीत होतों, त्याविषयीं अनुतापेन. ९
आणि जेव्हां मी राष्ट्राविषयीं अथवा राज्याविषयीं
बांधावें व लावावें ह्मणून बोलतों, १० तेव्हांच जर
तें माझा शब्द न ऐकून जें माझ्या दृष्टीस वाईट
तें करील, तर ज्या कुशलानें त्याचें हित करायाला
मी ह्मणालों, त्याविषयीं अनुतापेन.

११ तर आतां यहूदाच्या जनांस व यरूशाले-
मेच्या राहणाऱ्यांस सांग, कीं परमेश्वर ह्मणतो,
कीं पाहा, मी तुह्मावर अरिष्ट सिद्ध करीत आहें,
व तुह्माविषयीं संकल्प कल्पीत आहें; ह्मणून तुह्मी
प्रत्येक आपल्या वाईट मार्गापासून फिरा, आणि
आपले मार्ग व आपलीं कर्में नीट करा. १२ परंतु
ते ह्मणाले, आशा धरायाची नाहीं; कां तर आ-
ह्मी आपल्या संकल्पांप्रमाणें वर्तूं, आणि आह्मी
प्रत्येक आपल्या दुष्ट हृदयाच्या कठीणपणाप्रमाणें
करूं. १३ याकरितां परमेश्वर ह्मणतो, कीं
तुह्मी राष्ट्रांमध्यें विचारा, असल्या गोष्टी कोणी ऐ-
किल्या आहेत? इस्राएलाच्या कन्येनें अतिअघोर-
कर्म केलें आहे. १४ लबानोनाचें बर्फ पठाराच्या
खडकाला सोडील काय? खोल थंड वाहणारीं
पाण्यें आटून जातील काय? १५ परंतु माझे लोक
मला विसरले आहेत, ते व्यर्थपणाला धूप जाळि-
तात, आणि त्यांनी आपणाला आपल्या मार्गांत पुरा-
तन वाटांपासून अडखळविलें आहे, न बांधलेल्या वा-
टांत व मार्गांत चालायाला, १६ आपला देश ओ-
साड निरंतर फूत्कारासाठीं करावा ह्मणून, जो कोणी
त्याजकडून जाईल, तो विस्मित होईल, व आपलें
डोसकें हालवील. १७ जसें पूर्वेच्या वाऱ्यानें
तसें त्यांस वैऱ्यांपुढें उडवीन; त्यांच्या कष्टांच्या
दिवशीं त्यांस मुख नव्हे परंतु पाठ दाखवीन.

१८ आणि ते ह्मणाले आहेत, अहो या, आपण
इर्मयावर संकल्प कल्पूं; कां तर याजकापासून नें-
मशास्त्र, व ज्ञान्यापासून मसलत, व भविष्यवाद्या-
पासून वचन नाहींसें होणार नाहीं; अहो या,
आपण त्याला जिभेनें हाणूं, आपण त्याच्या को-
णत्या वचनांकडे मन लावूं नये. १९ हे परमे-
श्वरा, मजकडे मन लाव, आणि जे मजशीं विवाद
करितात त्यांचा शब्द ऐक. २० उत्तमाच्या स्थानीं
वाईटाची फेड करतील काय? कां कीं त्यांनी मा-
झ्या जिवासाठीं खांच खणिली आहे; त्यांसाठीं

उत्तम बोलायाला तुझा रोष त्यांजपासून फिरवा-
याला मी तुजसमोर उभा राहिलों, असें स्मर.
२१ याकरितां त्यांचीं लेंकरें दुकाळाला दे, आणि
तरवारीच्या सत्तेकडे त्यांस सोंप, आणि त्यांच्या
स्त्रिया पोरगमाऊ व विधवा होवोत, व त्यांच्या
पुरुषांस ठार मारोत, व त्यांच्या तरुण पुरुषांस
लढाईत तरवारीने हाणोत. २२ जेव्हां त्यांजवर
अकस्मात टोळी आणिशील, तेव्हां त्यांच्या घरां-
तून आरोळी, ऐकूं येवो, कां तर मला धरायाला
त्यानी खांच खणिली आणि माझे पायांसाठीं पाश
मांडिले आहेत. २३ तर हे **परमेश्वरा**, मला
मारावें ह्मणून जी मजविषयीं त्यांची सर्व मसलत
ती तूं जाणतोस; त्यांच्या अन्यायाची क्षमा करूं
नको, आणि तूं आपल्या समोरून त्यांचें पातक
पुसून टाकूं नको, परंतु ते तुजसमोर गळून पडोत;
तूं आपल्या क्रोधाच्या समयीं त्यांस असें कर.

## अध्याय १९.

**परमेश्वर** ह्मणतो, कीं तूं जाऊन कुंभाराचें मडकें
घे, आणि लोकांतले कित्येक वडील व याजकांतले
कित्येक वडील घेऊन, २ हिन्नोमाच्या पुत्राचें जें
खोरें, कुंभाराच्या वाड्याच्या दाराच्या प्रवेशाजवळ
आहे, त्यांत निघून जा, आणि तेथें जीं वचनें मी
तुला बोलेन, तीं मोठ्याने बोलत, ३ **सांग**, अ-
हो यहूदाचे राजे व यरूशालेमेचे राहणारे हो,
**परमेश्वराचें** वचन ऐका; सैन्यांचा **परमेश्वर**
इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं पाहा, जी विपत्ति
जो कोणी ऐकेल तेव्हां त्याचे कान भणभणतील,
ती मी या स्थानावर आणितों. ४ कारण कीं त्या-
नी मला सोडिलें आहे, आणि हें स्थान दुसऱ्या-
साठीं केलें आहे, आणि त्यानी अथवा त्यांच्या
पूर्वजानी अथवा यहूदाच्या राजानी जे जाणिले
नाहींत, त्या इतरदेवांस यांत धूप जाळिला आहे,
आणि हें स्थान त्यानी निर्दोष्यांच्या रक्ताने भरिलें
आहे. ५ आणि बालासाठीं आपले पुत्र होम
असे अग्नींत जाळायाला त्यानी बालाचीं उंचस्थळें
बांधिलीं आहेत, जें तें म्या आज्ञापिलें नाहीं, व
सांगितलें नाहीं, व माझ्या मनांतहि आलें नाहीं.
६ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, ज्यांत हें
स्थान तोफेथ अथवा हिन्नोमाच्या पुत्राचें खोरें
असें पुढें ह्मणणार नाहींत, परंतु वधाचें खोरें ह्म-
णतील, ते दिवस येतात. ७ आणि या स्थानांत
यहूदाची व यरूशालेमेची मसलत व्यर्थ करीन;
आणि त्यांस त्यांच्या वैऱ्यांपुढें तरवारीने, आणि
जे त्यांच्या जीवास टपतात त्यांच्या हाताने पा-
डीन; आणि आकाशातल्या पक्ष्यांस व भूमींतल्या
पशूंस त्यांचीं मढीं आहारासाठीं देईन. ८ आ-
णि हें नगर विस्मय व फूत्कार असें करीन; प्र-
त्येक जो याजकडून जाईल तो याच्या भंगाकरितां
विस्मित होऊन फुसफुसेल. ९ आणि ज्या वे-
ढ्याने व संकटाने त्यांचे वैरी व जे त्यांच्या जीवास
टपतात ते त्यांस पीडितील, त्या वेढ्यांत व संक-
टांत ते आपल्या पुत्रांचे व आपल्या कन्यांचे देह
खात असें करीन, आणि ते प्रत्येक आपल्या शे-
जाऱ्याचा देह खातील. १० आणि जे मनुष्य
तुजसंगतीं जातात त्यांच्या देखतां तें मडकें फोड;
११ आणि त्यांस सांग, सैन्यांचा **परमेश्वर** ह्म-
णतो, कीं याप्रमाणें मी या लोकांचा व या नग-
राचा भंग करीन, जसा कोणी कुंभाराचें मडकें
फोडितो, जें पुन्हा यथास्थित होत नाहीं. तसा;
आणि पुरायाला जागा न मिळे इतकीं मढीं लोक
तोफेथांत पुरितील. १२ आणि हें नगर तोफे-
थासारिखें करायासाठीं मी या स्थानाला व यांत-
ल्या राहणाऱ्यांस तसेंच करीन, असें **परमेश्वर**
ह्मणतो. १३ आणि ज्या घरांच्या धाब्यांवर
त्यानी आकाशांच्या सर्व सैन्यांसाठीं धूप जाळिला,
आणि इतर देवांसाठीं पेयअर्पणें ओतिलीं, त्या
घरांमुळें यरूशालेमेंतलीं घरें व यहूदाच्या राजां-
चीं घरें तोफेथाच्या स्थानासारिखीं विटाळतील.
१४ त्यानंतर इर्मया जेथें त्याला **परमेश्वराने**
भविष्य सांगायाला पाठविलें होतें, तेथून ह्मणजे
तोफेथापासून आला; आणि **परमेश्वराच्या** घ-
राच्या अंगणांत उभा राहून सर्व लोकांस बोलला,
१५ सैन्यांचा **परमेश्वर** इस्राएलाचा देव ह्मण-
तो, कीं पाहा, मी या नगरावर व तिच्या सर्व गां-
वांवर जें सर्व अरिष्ट मी याजविषयीं बोललों आहें,
तें आणीन; कारण कीं माझीं वचनें न ऐकण्यास
यानी आपली मान ताठ केली आहे.

## अध्याय २०.

मग इम्मेराचा पुत्र पाशहूर जो याजक, जो पर-
मेश्वराच्या घरांतला मुख्य अधिकारी त्याने
इर्मयाला ह्या गोष्टी भविष्य सांगतां ऐकिलें. २
तेव्हां पाशहूराने इर्मया जो भविष्यवादी याला
हाणिलें, आणि बिन्यामीनाचें वरील दार, जें पर-
मेश्वराच्या घराजवळ होतें, त्यांत जो खोडा
होता त्यांत त्याला घातलें. ३ आणि असें झालें,
कीं दुसऱ्या दिवशीं पाशहूराने इर्मया खोड्यांतून
बाहेर आणिला; तेव्हां त्याला इर्मया ह्मणाला,
परमेश्वराने तुझें नाम पाशहूर नाहीं, परंतु मा-
गोर मिस्साबीब ठेविलें आहे. ४ कारण कीं
परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, तूं आपणाला, व
तुझ्या सर्व मित्रांस भयासाठीं होस असें मी क-
रीन; आणि ते आपल्या वैऱ्यांच्या तरवारीने पड-
तील, व तुझे डोळे हें पाहतील; आणि मी सर्व
यहूदा बाबेलेच्या राजाच्या हातीं देईन, तेव्हां
तो त्यांस बाबेलेस पाडाव करून नेईल, व त्यांस
तरवारीने मारील. ५ आणि या नगराचें सर्व
धन, व याचें सर्व श्रमफल, व याचे सर्व मोलवान
पदार्थ देईन, आणि यहूदाच्या राजांचीं सर्व द्रव्यें
त्यांच्या वैऱ्यांच्या हातीं देईन; तेव्हां ते त्यांस
हरितील, व त्यांस घेऊन बाबेलेस नेतील. ६
आणि हे पाशहूरा, तूं व तुझ्या घरांतले सर्व राह-
णारे पाडावांच्या प्रवासांत जाल; आणि तूं बाबे-
लेस जाऊन तेथें मरसील, आणि तेथें तुला पुर-
तील, तुला व तुझे सर्व मित्र ज्यांस त्वां खोटें
भविष्य सांगितलें आहे त्यांसहि.

७ हे परमेश्वरा, त्वां मला फसविलें ह्मणून
मी फसलों आहें; मजपेक्षां तूं बलवान आहेस
ह्मणून प्रबल झालास; मी नित्य हसण्यासाठीं
झालों आहें, ते सर्व मला निंदितात. ८ कां तर
जेव्हां कधीं मी बोलला तेव्हां म्या आरोळी केली,
बळात्कार व नासडा ह्मणून ओरडलों; कारण कीं
परमेश्वराचें वचन नित्य मला निंदेसाठीं व उप-
हासासाठीं झालें आहे. ९ तेव्हां पुन्हा मी ह्म-
णालों, मी त्याचें स्मरण करणार नाहीं, आणि
त्याच्या नामाने पुन्हा बोलणार नाहीं; मग त्याचें
वाक्य माझ्या हृदयांत माझ्या हाडांत कोंडलेल्या
जळत्याअग्नीसारिखें होतें, ह्मणून मी आपणास आ-
कळून थकलों, आणि उगें राहवलें नाहीं.

१० कां कीं म्या बहुतांची चहाडी ऐकिली,
सभोंवार भय होतें; वर्तमान प्रगट करा, ह्मणजे
आह्मी तें प्रगट करूं, असें ह्मणतात; माझे सर्व
मित्र माझ्या पडण्यासाठीं जपतात, आणि ह्मण-
तात, कदाचित तो फसेल, तेव्हां आह्मी त्याजवर
प्रबळ होऊं, आणि त्याजपासून आपला सूड घेऊं.
११ परंतु परमेश्वर मजजवळ पराक्रमी वीरासा-
रिखा आहे; याकरितां जे माझ्या पाठीस लाग-
तात, ते ग्रळून पडतील, आणि प्रबल होणार ना-
हींत; ते सुबुद्धीने वर्त्तले नाहींत; ह्मणून जी सना-
तन लाज विसरणार नाहींत तिने ते फार लज्जित
होतील. १२ तर हे सैन्यांच्या परमेश्वरा,
न्यायीच्या परीक्षका, अंतर्यामाच्या व हृदयाच्या
पाहणाऱ्या, त्यांजवर तुझा सूड म्या पाहावा; कां
तुजजवळ म्या आपला वाद उघडा केला आहे.
१३ तुह्मी परमेश्वराला गा, परमेश्वराला
स्तवा; कारण कीं त्याने गरीबाचा जीव दुष्कर्म्यां-
च्या हातापासून सोडविला आहे.

१४ ज्या दिवशीं मी जन्मलों तो दिवस शापित
असो, ज्या दिवशीं मला माझी आई प्रसविली तो
आशीर्वादित नसावा. १५ तुला पुत्र जन्मला
आहे, असें वर्त्तमान ज्या मनुष्याने माझ्या बापाला
सांगून त्याला फार हर्षित केलें, तो शापित असो.
१६ आणि जीं नगरें परमेश्वराने न अनुतापून
नाहींसीं केलीं त्यांसारिखा तो मनुष्य होवो; आणि
पहांटेस आरोळी व दुपारीं प्रणाद ऐको; १७
अशामुळें कीं जेव्हां मी जन्मलों तेव्हांच त्याने
मला मारून टाकिलें नाहीं, अथवा जर माझी आई
माझी कबर झाली असती, आणि तिचें गर्भस्थान
सदा गरोदर राहिलें असतें तर बरें असतें. १८
कष्ट व दुःख भोगावें, आणि लज्जेने माझे दिवस
संपून जावे, ह्मणून मी गर्भस्थानांतून कां निघालों?

## अध्याय २१.

जेव्हां जिद्कीया राजाने मल्कीयाचा पुत्र पा-
शहूर, आणि मासेया जो याजक त्याचा पुत्र
जफान्या, हे दोघे इर्मयाजवळ पाठवून, २ तूं
आह्मासाठीं परमेश्वराला विचार, कारण कीं

बाबेलेचा राजा नबुखद्रेज्जार आह्माविरुद्ध लढाई
करितो, जर कदाचित परमेश्वर आपल्या सर्व
आश्चर्यकर्माप्रमाणें आमचें कार्य करील, तर तो
आह्मापासून निघून चढत जाईल, असें त्याला
सांगितलें, तेव्हां जें वचन परमेश्वरापासून इर्म-
याकडे आलें, तें पुढें येतें.
३ तेव्हां त्यांस इर्मया ह्मणाला, तुह्मी जिद्की-
याला सांगा कीं, ४ परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं जीं लढाईचीं शस्त्रें तुमच्या हा-
तांत आहेत, ज्यांकडून तुह्मी बाबेलेच्या राजासीं,
व जे खास्दी कोटाबाहेर तुह्माला वेढा घालून
युद्ध करितात, त्यांसीं लढतां तीं मी फिरवीन,
आणि या नगरामध्यें त्यांस एकवटीन. ५ आणि
लांबविलेल्या हाताने व बलवान बाहूने आणि क्रो-
धाने व रोषाने व महाकोपाने मी तुह्मासीं लढाई
करीन. ६ आणि या नगरांतल्या राहणाऱ्यांस,
मनुष्यांस व पशूंस हाणीन; ते मोठ्या मरीने मर-
तील. ७ आणि परमेश्वर ह्मणतो, त्यानंतर मी
यहूदाचा राजा जिद्कीया, व त्याचे सेवक, व
लोक आणि जे या नगरांत मरीपासून, तरवारी-
पासून, व दुकाळापासून वांचलेले, ते बाबेलेचे न-
बुखद्रेज्जार राजाच्या हातीं, व त्यांच्या वैऱ्यांच्या
हातीं, आणि जे त्यांच्या जीवास टपतात त्यांच्या
हातीं, देईन; तेव्हां तो त्यांस तरवारीने हाणील,
तो त्यांजवर कळवळा अथवा करुणा अथवा दया
करणार नाहीं.
८ आणि या लोकांस सांग, परमेश्वर ह्म-
णतो, कीं पाहा, मी तुह्मापुढें जीवनाचा मार्ग व
मरणाचा मार्ग ठेवितों. ९ जो या नगरांत राह-
तो तो तरवारीने व दुकाळाने व मरीने मरेल;
परंतु जे खास्दी तुह्मास वेढा घालून लढतात त्यां-
जकडे जो निघून शरण जाईल तो वांचेल, आणि
त्याला त्याचा जीव लूट असा होईल. १० कां
तर परमेश्वर ह्मणतो, म्यां आपलें मुख या न-
गराकडे हितासाठीं नव्हे परंतु अरिष्टासाठीं ठेविलें
आहे; हें बाबेलेच्या राजाच्या हातीं देण्यांत ये-
ईल, तेव्हां तो याला अग्नीने जाळील.
११ आणि यहूदाच्या राजाच्या घराण्याला
सांग, तुह्मी परमेश्वराचें वचन ऐका; १२ हे
दावीदाच्या घराण्या, परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी
सकाळीं न्याय करून ठरवा, आणि जो हरलेला
त्याला पिडणाऱ्याच्या हातांतून सोडवा; नाहीं तर
कदाचित तुमच्या कर्मांच्या दुष्टपणामुळें माझा रोष
अग्नीप्रमाणें सुटेल व जळेल, आणि तो विझवाया-
ला कोणी असणार नाहीं. १३ अगे खोऱ्यांतल्या
व पटांगणाच्या खडकांतल्या राहणाऱ्ये, परमेश्वर
ह्मणतो, पाहा, मी तुजविरुद्ध आहें; जे तुह्मी ह्म-
णतां, कीं आह्मावर कोण उतरेल? आणि आम-
च्या वस्त्यांत कोण शिरेल? त्यांसहि. १४ आणि
परमेश्वर ह्मणतो, मी तुमच्या कर्मांच्या फला-
प्रमाणें तुह्माला शासीन; आणि तिच्या वनांत मी
अग्नि पेटवीन, तेव्हां तो आपल्याभोंवतालचे सर्व
पदार्थ जाळून टाकील.

## अध्याय २२.

परमेश्वर ह्मणतो, कीं तूं यहूदाच्या राजाच्या
घरास उतरून जा, आणि तेथें हें वचन बो-
लत, २ सांग, हे यहूदाच्या राजा, जो दावी-
दाच्या सिंहासनावर बसतोस, परमेश्वराचें वचन
ऐक, तूं ऐक, आणि जे तुझे सेवक व तुझे लोक या
दारांतून आंत जातात तेहि ऐकोत; ३ परमेश्वर
ह्मणतो, कीं तुह्मी नीति व न्याय करा, आणि जो
हरलेला त्याला पिडणाराच्या हातांतून सोडवा;
आणि विदेशी, बापपोरका, व विधवा यांस पिडूं
नका, बळात्कार करूं नका, आणि या स्थानांत
निर्दोषरक्त पाडूं नका. ४ कां कीं जर तुह्मी ही
गोष्ट निश्चयें कराल, तर दावीदाच्या सिंहासनावर
बसणारे राजे, रथांत व घोड्यांवर बसून, या घरा-
च्या दारांतून आंत जातील, तो व त्याचे सेवक व
त्याचे लोकहि. ५ परंतु जर तुह्मी हीं वचनें न
ऐकाल, तर परमेश्वर ह्मणतो, कीं मी आपणावर
शपथ वाहतों, कीं हें घर ओसाडी होईल. ६
कां कीं यहूदाच्या राजाच्या घराला परमेश्वर
ह्मणतो, कीं तूं मजसाठीं गिलाद, लबानोनाचा
माथा आहेस, तथापि खचीत मी तुला जंगल, न
वसलेलीं नगरें, असें करीन. ७ आणि तुजसाठीं
नाश करणारे प्रत्येक आपल्या शस्त्रांसुद्धां सिद्ध
करीन; तेव्हां ते तुझीं निवडक एरेज झाडें तोडून
अग्नींत टाकितील. ८ आणि बहुत राष्ट्रांचे
लोक या नगराकडून जातील, आणि एकमेकांसीं

बोलतील, कशामुळें परमेश्वराने या मोठ्या नग-
राला असें केलें आहे! ९ तेव्हां ह्मणतील,
अशामुळें कीं त्यानीं परमेश्वर आपला देव याचा
करार सोडिला व इतर देवांस भजिलें, व त्यांची
सेवा केली.

१० मेलेल्यांकरितां रडूं नका, व त्यांसाठीं शोक
करूं नका; परंतु जो प्रवासांत जातो, त्याजकरितां
फार रडा; कारण कीं तो परत येणार नाहीं, व
आपला जन्मदेश पुन्हा पाहणार नाहीं. ११ कां
कीं यहूदाचा राजा जो योशीया त्याचा पुत्र श-
ल्लूम जो आपल्या योशीया बापाच्या स्थानीं राज्य
करीत होता, जो या स्थानांतून निघून गेला आहे,
त्याविषयीं परमेश्वर ह्मणतो, कीं तो पुन्हा तेथें
परत येणार नाहीं; १२ परंतु ज्या स्थानांत
त्यानीं त्याला पाडाव करून नेलें आहे, तेथें तो
मरेल, आणि या देशाला पुन्हा पाहणार नाहीं.

१३ जो आपलें घर न्यायावांचून व आपल्या
माड्या नीतिवांचून बांधितो, जो आपले शेजाऱ्याची
सेवा फुकट घेतो, व त्याला त्याची मजूरी देत
नाहीं, त्याला हाय हाय. १४ जो ह्मणतो, मी
आपणासाठीं विशाल घर व विस्तीर्ण माड्या बांधीन,
मग तो आपणासाठीं खिडक्या पाडितो; नंतर
तें एरेजाच्या फळ्यानीं झांकलेलें व हिंगुळाने
रंगवलेलें आहे. १५ तूं एरेजाच्या लांकडामध्यें
फिशारतोस, ह्मणून राज्य करिसील काय? जेव्हां
तुझा बाप खाई, पिई, आणि नीति व न्याय करी,
तेव्हां त्याला बरें नव्हतें काय? १६ तो दिनाचा
व दरिद्र्याचा न्याय करी, तेव्हां बरें होतें; मला
जाणणें हेंच नव्हे कीं काय? असें परमेश्वर
ह्मणतो. १७ परंतु तुझे डोळे व तुझें हृदय
यावांचून कोणत्याहि गोष्टीवर नाहीं, ह्मणजे तुझ्या
लाभावर, आणि तें पाडावें ह्मणून त्या निर्दोषरक्ता-
वर, आणि हीं करावीं ह्मणून पीडेवर व बळात्कारा-
वर. १८ याकरितां यहूदाचा राजा योशीया
त्याचा पुत्र जो यहोयाकीम त्याविषयीं परमेश्वर
ह्मणतो, कीं त्याजकरितां, अहा भाऊ, अथवा अहा
बहीण, असें बोलून लोक आक्रंदन करणार नाहींत,
अहा प्रभु, अथवा अहा त्याचें ऐश्वर्य, असें बो-
लून त्याबद्दल उर बडविणार नाहींत. १९
तो यरुशलेमेच्या दारांबाहेर ओढून टाकिला ज-
सतां गाढवाच्या पुरण्याप्रमाणें त्याला पुरतील.

२० तूं लबानोनावर चढून आरोळी मार, आ-
णि बाशानांत आपला शब्द कर, आणि उतारां-
पासून ओरड; कां कीं तुझे सर्व प्रिय मोडलेले
आहेत. २१ मी तुझ्या कुशळपणांत तुला बो-
ललों, तेव्हां ह्मणालीस, मी ऐकणार नाहीं; तूं
माझा शब्द ऐकेनास, असें तुझ्या तरुणपणापासून
तुझें आचरण असे. २२ वारा तुझ्या सर्व पा-
लकांस चारील, आणि तुझे प्रिय पाडावांच्या प्र-
वासांत जातील, मग तेव्हां तूं आपल्या सर्व दुष्ट-
पणामुळें लज्जित व शरमलेला होसील. २३
अगे लबानोनाच्या राहणारे, जी तूं एरेजझाडावर
आपलें कोटें बांधितीस, त्या तुला जशा प्रसव-
णाऱ्या स्त्रीला तशा जेव्हां तिडका व वेदना
लागतील, तेव्हां किती कृपणीय होसील. २४
परमेश्वर ह्मणतो, मी आपल्या जीवनाची शपथ
वाहतों, कीं यहोयाकीम यहूदाचा राजा याचा
पुत्र कोन्या, माझ्या उजव्या हातांतली मुद्रा जरीं
असता, तरीं मी त्यांतून तुला हांसडून घेतों. २५
आणि जे तुझ्या जीवास टपतात, त्यांच्या हातीं,
आणि ज्यांमुळें तूं भयभीत आहेस, त्यांच्या हातीं,
आणि बाबेलेचा राजा नबूखद्रेज्जार याच्या हातीं,
आणि खास्द्यांच्या हातीं तुला देईन. २६ आ-
णि तुला व जी तुझी आई तुला प्रसविली तिला,
ज्या अन्यदेशांत तुह्मी जन्मला नव्हतां त्यांत दूर
करीन, आणि तेथें मराल. २७ आणि ज्या दे-
शांत परत यायाला ते आपलें मन लावितात, यांत
ते परत येणार नाहींत. २८ हा मनुष्य कोन्या
अवमानिलेला मोडका पुतळा आहे काय? ज्या
पात्राविषयीं धन्याचा संतोष नाहीं असा तो आहे
काय? तो व त्याचे संतान कां दूर केलेले आहेत
आणि जो देश ते ओळखत नाहींत त्यांत कां टा-
कलेले आहेत? २९ अगे पृथ्वी, पृथ्वी, पृथ्वी,
तूं परमेश्वराचें वचन ऐक; ३० परमेश्वर
ह्मणतो, कीं हा मनुष्य असंतती पुरुष, जो आपल्या
आयुष्यांत क्षेमयुक्त होणार नाहीं, असा लिहा,
कां कीं याच्या संतानांतला कोणी दावीदाच्या सिंहा-
सनावर बसतांना, व यहूदांत पुढें प्रभुत्व करि-
तांना, क्षेमयुक्त असणार नाहीं.

## अध्याय २३.

जे पालक माझ्या कुरणांतला कळप नाशून वि-
सकळितात त्यांस हाय हाय, असें परमेश्व-
र ह्मणतो. २ याकरितां जे पालक माझ्या लो-
कांस चारितात, त्यांस परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं तुह्मी माझीं मेंढरें विसकळिलीं
व उडविलीं आहेत, आणि त्यांची पाहणी केली
नाहीं; पाहा, तुमच्या कर्मांच्या दुष्टपणामुळें मी
तुमची पाहणी करीन, असें परमेश्वर ह्मणतो.
३ आणि ज्या सर्व देशांत म्या आपलीं मेंढरें उड-
विलीं आहेत त्यांतून त्यांचें शेष मी एकवटीन, व
त्यांस त्यांच्या कोंडवाड्यांत परत आणीन; मग तीं
संततीकरून बहुत होतील. ४ आणि त्यांजवर
पालक ठेवीन, तेव्हां ते त्यांस चारितील; ह्मणून
तीं पुढें भिणार नाहींत, व धाबरणार नाहींत, व
उणीं पडणार नाहींत, असें परमेश्वर ह्मणतो.
५ परमेश्वर ह्मणतो, पाहा, ज्यांत मी दावी-
दासाठीं न्यायी कोंब उगववीन, आणि राजा राज्य
करील, व कार्य साधील, आणि पृथ्वींत नीति व
न्याय करील, ते दिवस येतात. ६ त्याच्या दिवसांत
यहूदा तरेल, व इस्राएल निर्भय वस्ती करील,
आणि त्याचें जें नाम त्याला ह्मणतील तें हेंच,
ह्मणजे परमेश्वर आमचें न्यायत्व. ७ याकरितां
परमेश्वर ह्मणतो, पाहा, ते दिवस येतात, ज्यांत,
जीवंत परमेश्वर आहे, ज्या त्यानें इस्राएलाचे
वंश मिसर देशांतून वर आणिले, असें पुढें ह्मण-
णार नाहींत. ८ परंतु, जीवंत परमेश्वर आहे,
ज्या त्यानें इस्राएलाच्या घराण्याचें संतान उत्तरें-
तल्या देशांतून, आणि ज्या सर्व देशांत म्या त्यांस
उडविलें त्यांतून वर चालवून आणिलें, असें ह्मण-
तील, ते आपल्या भूमीवर वसतील.
९ भविष्यवाद्यांकरितां माझें हृदय माझेठायीं
फुटलें आहे, माझीं सर्व हाडें थरथरतात, परमे-
श्वराकरितां व त्याच्या पवित्रवचनांकरितां मी
मस्तमनुष्यासारिखा व द्राक्षारसानें झिंगलेल्या पुरु-
षासारिखा झालों आहें. १० कां तर देश
जारकर्म्यांनीं भरिला आहे, आणि शापामुळें
भूमि शोक करिती, रानांतलीं कुरणें सुकलीं आहेत,
...नी धांव दुष्ट व त्यांचें बल ठीक नाहीं.
११ कां कीं भविष्यवादी आणि याजकहि भ्रष्ट
आहेत, माझ्या घरांत देखील त्यांचें दुष्टपण मला
सांपडलें आहे, असें परमेश्वर ह्मणतो. १२
याकरितां जसी निसरडीं स्थानें काळोखांत तसा
त्यांचा मार्ग त्यांस होईल; त्यांत ते ढकललेले अ-
सतां पडतील ; कां कीं त्यांजवर अरिष्ट आणीन,
ह्मणजे त्यांच्या शासनाचें वर्ष, असें परमेश्वर
ह्मणतो. १३ अणखी शोमरोनेच्या भविष्य-
वाद्यांत म्या मूर्खपणा पाहिला आहे, त्यांनी बालानें
भविष्य सांगितलें आहे, आणि माझ्या इस्राएल लो-
कांस बहकाविलें आहे. १४ म्या यरूशालेमेंतल्या
भविष्यवाद्यांतहि अघोर काम पाहिलें आहे; ते
जारकर्म करितात, व लबाडपणें वर्त्ततात, आणि
ते दुष्कर्म्यांच्या हातांस असें बळावितात कीं कोणी
आपल्या दुष्टपणापासून फिरत नाहीं; ते सर्व मज-
जवळ सदोमासारिखे, आणि तींतले राहणारे
गमोरासारिखे झाले आहेत. १५ याकरितां भ-
विष्यवाद्यांविषयीं सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं
पाहा, मी त्यांस खायाला कडूपणा व प्यायाला
विषाचें पाणी देईन; कारण कीं यरूशालेमेंतल्या
भविष्यवाद्यांपासून अवघ्या देशांत भ्रष्टपणा निघा-
ला आहे. १६ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो,
कीं जे भविष्यवादी तुह्माला भविष्य सांगतात,
त्यांचीं वचनें ऐकूं नका; ते तुह्माला फुसलावि-
तात; परमेश्वराच्या मुखचें नव्हे, परंतु आप-
ल्या हृदयांतलें दर्शन बोलतात. १७ जे मला
तुच्छ मानितात त्यांस ते सांगत जातात, परमे-
श्वर बोलिला आहे, तुह्माला कुशल होईल;
आणि जे आपल्या हृदयाच्या कठीणपणानें वर्त्त-
तात, त्या सर्वांस ते सांगतात, तुह्मावर अरिष्ट
येणार नाहीं. १८ तर परमेश्वराचे मसलती-
च्या सभेंत कोणी उभें राहून त्याचें वचन पाहिलें
व ऐकिलें आहे? कोणी त्याचें वाक्य लक्ष देऊन
ऐकिलें आहे? १९ पाहा, परमेश्वराची वाव-
टूळ, भोंवती वावटूळ, ह्मणजे रोष सुटला आहे;
तो दुष्टांच्या डोईवर भोंवेल. २० परमेश्वर
आपल्या मनाचे संकल्प करून ठरवीपर्यंत त्याचा
क्रोध फिरणार नाहीं; पुढील दिवसांत तुह्मी याचा
पक्का विचार कराल. २१ म्या ते भविष्यवादी
पाठविले नाहींत, तथापि ते धांवले; मी त्यांस बो-

ल्लों नाहीं, तथापि त्यानी भविष्य सांगितलें आहे.
२२ परंतु जर ते माझ्या मसलतीच्या सभेंत उभे
राहिले असते, तर त्यानी माझ्या लोकांस माझीं
वचनें ऐकविलीं असतीं, आणि त्यांस त्यां-
च्या कुमार्गांपासून व त्यांच्या कर्मांच्या दुष्टपणापा-
सून फिरविलें असतें. २३ **परमेश्वर** ह्मणतो,
मी केवळ जवळचा देव आहें, आणि दुरचाहि
देव नाहीं काय? २४ **परमेश्वर** ह्मणतो, मनुष्य
गुप्तस्थानांत लपेल आणि त्याला मी पाहणार नाहीं
काय? मी आकाशांत व पृथ्वींत व्याप्त नाहीं काय?
असें **परमेश्वर** ह्मणतो. २५ जे भविष्यवादी
माझ्या नामाने खोटें भविष्य सांगतात, त्यानी जें
ह्मटलें, कीं म्या स्वप्न पाहिलें आहे, म्या स्वप्न पा-
हिलें आहे, तें म्या ऐकिलें. २६ जे भविष्यवादी
खोटें भविष्य सांगतात, त्यांच्या हृदयांत हें केवढा
वेळपर्यंत राहील? ते आपल्या हृदयाच्या कपटाचे
भविष्यवादी आहेत; २७ ते जीं आपलीं स्वप्नदर्शनें
एकमेकाला कथितात, त्यांकडून माझे लोक माझें
नाम विसरत, असें करायाला कल्पितात, जसे
त्यांचे पूर्वज बालाकरितां माझें नाम विसरले तसें.
२८ ज्या भविष्यवाद्याजवळ स्वप्नदर्शन आहे तो
स्वप्नदर्शन कथो; आणि ज्याजवळ माझें वचन
आहे तो माझें वचन खरेपणें बोलो; गव्हाशीं
काडेला काय आहे? असें **परमेश्वर** ह्मणतो.
२९ **परमेश्वर** ह्मणतो, माझें वचन अग्नीसारिखें,
अथवा जो घण खडकाला ठेंचितो, त्यासारिखें
नाहीं काय? ३० याकरितां **परमेश्वर** ह्मणतो,
पाहा, जे भविष्यवादी माझें वचन एकमेकापासून
चोरून घेतात, त्यांविरुद्ध मी आहें. ३१ **परमे-
श्वर** ह्मणतो, पाहा, जे भविष्यवादी आपली जीभ
योजून, तो ह्मणतो, असें बोलतात, त्यांजविरुद्ध
मी आहें. ३२ **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, जे
खोटीं स्वप्नदर्शनें सांगतात, व कथितात, व आप-
ल्या लबाड्यानी व लुच्चाईने माझ्या लोकांस बह-
कवितात, त्यांजविरुद्ध मी आहें; आणि त्यांस
म्या पाठविलें व आज्ञापिलें नाहीं; ह्मणून ते या
लोकांचें कांहीं हित करणार नाहींत, असें **परमे-
श्वर** ह्मणतो.

३३ आणि **परमेश्वराचा** प्रवाद काय आहे?
असें जेव्हां हे लोक अथवा भविष्यवादी अथवा
याजक तुला पुसतील, तेव्हां काय प्रवाद आहे, तो
त्यांस सांग, कीं म्या तुह्माला सोडिलें आहे, असें
**परमेश्वर** ह्मणतो. ३४ आणि **परमेश्वराचा** प्र-
वाद, असें जो कोणी भविष्यवादी अथवा याजक
अथवा लोक सांगेल, त्या मनुष्याला व त्याच्या घरा-
ण्याला मी शासीन. ३५ आणि **परमेश्वराने**
काय उत्तर दिल्हें आहे? आणि **परमेश्वर** काय
बोलला आहे? असें तुह्मी प्रत्येक आपल्या शेजा-
ऱ्याला व प्रत्येक आपल्या भावाला ह्मणतां. ३६
आणि **परमेश्वराच्या** प्रवादाचें स्मरण तुह्मी पुढें
करणार नाहीं; कां कीं प्रत्येकाला आपआपलें
वचन प्रवाद होईल; कां तर जीवंत देव सैन्यां-
चा **परमेश्वर** आमचा देव याचीं वचनें तुह्मी
विपरीत केलीं आहेत. ३७ **परमेश्वराने** तुला
काय उत्तर दिल्हें? आणि **परमेश्वर** काय बोल-
ला आहे? असें भविष्यवाद्याजवळ बोल. ३८
परंतु **परमेश्वराचा** प्रवाद, असें तुह्मी ह्मणतां,
ह्मणून **परमेश्वर** ह्मणतो, कीं जरी म्या तुह्माज-
वळ पाठवून सांगितलें, कीं **परमेश्वराचा** प्रवाद
ह्मणून सांगूं नका, तरी हें वाक्य ह्मणजे **परमे-
श्वराचा** प्रवाद तुह्मी सांगतां; ३९ याकरितां
पाहा, मी तुह्मास अगदीं विसरेन, आणि तुह्माला,
व जें नगर म्या तुह्माला व तुमच्या पूर्वजांस दिल्हें,
त्याजला मी आपल्या दृष्टीपासून वर्जीन. ४०
आणि निरंतर निंदा आणि जी सर्वकालिक अप्र-
तिष्ठा विसरणार नाहींत ती तुह्मावर ठेवीन.

## अध्याय २४.

नबुखद्रेज्जार बाबेलेचा राजा याने यहोयाकीम
यहूदाचा राजा याचा पुत्र यकोन्या आणि
यहूदाचे सरदार आणि सुतार व लोहार पाडाव
करून यरूशालेमेहून बाबेलेस नेल्यानंतर **परमे-
श्वराने** मला दाखविलें, तेव्हां पाहा, अंजिरांच्या
दोन पाट्या **परमेश्वराच्या** देवळासमोर ठेविल्या
होत्या. २ एका पाटींतील अंजीर पहिल्याने पिक-
लेल्या अंजिरासारिखे फार चांगले होते; परंतु
दुसऱ्या पाटींतील अंजीर फारच वाईट होते,
एवढे वाईट होते कीं ते कोणाच्याने खाववेनात.
३ तेव्हां **परमेश्वराने** मला ह्मटलें, इर्मया, तूं
काय पाहतोस? तेव्हां मी ह्मणालों, अंजीर; जे

अंजीर चांगले ते फार चांगले आहेत; आणि जे
वाईट ते अत्यंत वाईट, कोणाला खाववणार नाहीं-
त, एवढे वाईट आहेत.
४ तेव्हां **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, ५ **परमेश्वर** इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं
जसे हे चांगले अंजीर तसा यहूदाचा जो पाडा-
वांचा समुदाय म्या या स्थानांतून खास्द्यांच्या
देशांत हितासाठीं पाठविला आहे, तो असतां
त्याला अंगीकारीन. ६ आणि मी आपले डोळे
त्यांजवर हितासाठीं ठेवीन, आणि त्यांस या देशांत
परत आणीन; तेव्हां मी त्यांस बांधीन, आणि पा-
डणार नाहीं; व त्यांस लावीन, आणि उपटणार
नाहीं. ७ आणि मी **परमेश्वर** आहें, असें
मला जाणायाला त्यांस बुद्धि देईन; तेव्हां ते
माझे लोक असत जातील, आणि मी त्यांचा देव
असत जाईन; कां तर ते आपल्या पूर्ण ह्रदयानें
मजकडे फिरतील.
८ तर **परमेश्वर** ह्मणतो, कीं जसे ते वाईट
अंजीर जे इतके वाईट आहेत कीं कोणाच्याने खा-
ववणार नाहींत, तसे सिद्कीया यहूदाचा राजा,
व त्याचे सरदार, व यरूशालेमेचें शेष, जे या
देशांत उरलेले आहेत, आणि मिसर देशांत वसत
आहेत, त्यांस होऊं देईन; ९ आणि त्यांस अ-
रिष्टासाठीं पृथ्वीवरल्या सर्व राज्यांत ढकलायास
देईन; आणि ज्या सर्व स्थानांत त्यांस घालवीन
त्यांत ते निंदेसाठीं व दृष्टांतासाठीं व अपशब्दासाठीं
व शापासाठीं होत, असें करीन. १० आणि जी
भूमि म्या त्यांस व त्यांच्या पूर्वजांस दिल्ही,
तिजवरून ते संपतपर्यंत त्यांजमध्यें तरवार व दु-
काळ व मरी पाठवीन.

## अध्याय २५.

यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र जो यहोया-
कीम त्याच्या चौथ्या वर्षांत ह्मणजे नबुखद्रे-
ज्झार बाबेलेचा राजा याच्या प्रथम वर्षांत यहू-
दाच्या सर्व लोकांविषयीं जें वचन इर्मयाजवळ
आलें; २ जें इर्मया भविष्यवादी यहूदाच्या सर्व
लोकांस, व यरूशालेमेंतल्या सर्व राहणाऱ्यांस बो-
लला, तें कीं, ३ यहूदाचा राजा आमोन याचा
पुत्र जो योशिया त्याच्या तेराव्या वर्षापासून या
दिवसापर्यंत तेवीस वर्षें, **परमेश्वराचें** वचन मज-
जवळ होत आलें आहे, आणि मी पहांटेस
उठून बोलून तुह्माला बोलत आलों आहें, परंतु
तुह्मी ऐकिलें नाहीं. ४ आणि **परमेश्वराने**
पहांटेस उठून पाठवून आपले सर्व सेवक भविष्य-
वादी तुह्माजवळ पाठविले, परंतु तुह्मी ऐकिलें
नाहीं, आणि ऐकायाला आपला कान लाविला
नाहीं. ५ ते ह्मणाले, तुह्मी प्रत्येक आपल्या
कुमार्गापासून व आपल्या कर्मांच्या दुष्टपणापासून
फिरा, आणि जी भूमि **परमेश्वराने** तुह्मास व
तुमच्या पूर्वजांस सर्वकालपर्यंत दिल्ही तिजवर
वस्ती करा. ६ आणि इतर देवांस, त्यांस सेवा-
याला व भजायाला, अनुसरूं नका, आणि तुह्मी
आपल्या हातांच्या कामांकडून मला रुसवूं नका;
ह्मणजे मी तुह्माला अरिष्ट करणार नाहीं. ७
परंतु आपल्या अरिष्टासाठीं तुह्मी आपल्या हातां-
च्या कामांकडून मला रुसवावें ह्मणून माझें ऐ-
किलें नाहीं, असें **परमेश्वर** ह्मणतो.
८ याकरितां सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं
तुह्मी माझीं वचनें ऐकिलीं नाहींत यामुळें, ९
**परमेश्वर** ह्मणतो, पाहा, मी पाठवून उत्तरेंतलीं
सर्व कुटुंबें आणि नबुखद्रेज्झार बाबेलेचा राजा
माझा सेवक घेईन, आणि त्यांस या देशावर व
यांतल्या राहणाऱ्यांवर आणि या सर्व चोहींकडल्या
राष्ट्रांवर आणीन, व यांस नाहींसें करीन, आणि
विस्मय व फूत्कार व सनातन ओसाडी करून ठे-
वीन. १० आणि यांतून आनंदाचा शब्द व
हर्षाचा शब्द ,नवऱ्याचा शब्द व नवरीचा शब्द,
जात्याचा शब्द व दिव्याचा प्रकाश नाहींसा
करीन. ११ आणि ही सर्व भूमि पडीत व ओ-
साड होईल, आणि हीं राष्ट्रें सत्तर वर्षें बाबेले-
च्या राजाची सेवा करितील.
१२ आणि असें होईल, कीं सत्तर वर्षें जेव्हां
समाप्त होतील तेव्हां मी बाबेलेच्या राजाला, व
त्या राष्ट्राला, व खास्द्यांच्या देशाला त्यांच्या
अन्यायामुळें शासीन, आणि त्याला सर्वकाळच्या
ओसाड्या करून ठेवीन. १३ आणि त्या देशा-
वर मी आपलीं सर्व वचनें जीं मी त्याविषयीं
बोललों आहें, तीं प्रत्ययास आणीन, ह्मणजे जें
सर्व या पुस्तकांत लिहिलें आहे, जें अवघ्या राष्ट्रां-

विषयीं इर्मयानें भविष्य सांगितलें आहे तें. १४
कां तर बहुत राष्ट्रें आणि मोठे राजे त्यांची सेवा
घेतील; आणि त्यांस त्यांच्या कृतीप्रमाणें व त्यांच्या
हातांच्या कर्मांप्रमाणें परत करीन.

१५ तर **परमेश्वर** इस्राएलाचा देव मला
ह्मणाला आहे, कीं तूं हा कोपाच्या द्राक्षारसाचा
प्याला माझ्या हातून घे, आणि ज्या राष्ट्रांजवळ
मी तुला पाठवितों, त्या सर्वांस हा प्यायाला दे.
१६ मग ते पितील, व जी तरवार मी त्यांजमध्यें
पाठवितों तिजमुळें कांपतील व वेडे होतील. १७
तेव्हां तो प्याला म्या **परमेश्वराच्या** हातून घे-
तला, आणि ज्या राष्ट्रांजवळ **परमेश्वरानें** मला
पाठविलें त्या सर्वांस प्यायाला दिल्हा; १८
ह्मणजे यरूशालेमेला, व यहूदाच्या नगरांस, व
त्याच्या राजांस, व त्याच्या सरदारांस, जसें आ-
तां झालें तसें त्यांस उजाडी, विस्मय, फूत्कार,
व शाप करून ठेवायाला, १९ मिसराचा राजा
जो फारो त्याला, व त्याच्या सेवकांस, व त्याच्या
सरदारांस, आणि त्याच्या सर्व लोकांस, २० आणि
सर्व मिश्रित लोकांस, आणि ऊजदेशांतल्या सर्व रा-
जांस, आणि पलिश्त्यांच्या देशांतल्या सर्व राजांस,
आणि अश्कलोनेला, व अज्जाला, व एक्रोनेला, व
अश्दोदेच्या शेषाला, २१ अदोमाला, व मोवाबा-
ला, व आम्मोनाच्या वंशांस, २२ आणि सोरेच्या
सर्व राजांस, व सीदोनाच्या सर्व राजांस, व समु-
द्राच्या पलिकडे जीं बेटें आहेत त्यांच्या राजांस,
२३ ददानाला, व तेमाला, व बूजाला, व सर्व
केंस कापिलेल्यांस, २४ व अरबस्थानाच्या सर्व
राजांस, व जे मिश्रित लोक रानांत वसतात त्यांच्या
सर्व राजांस, २५ व जिम्रीच्या सर्व राजांस, व
एलामाच्या सर्व राजांस, व मादायाच्या सर्व राजांस,
२६ आणि उत्तरेंतले सर्व राजे जे परस्परांजवळ
व दूर आहेत, त्या सर्वांस व पृथ्वींतलीं सर्व रा-
ज्यें जीं भूमीच्या पाठीवर आहेत, त्या सर्वांस प्या-
याला दिल्हा, आणि त्यानंतर शेशकाचा राजा तो
पिईल. २७ तर तूं त्यांस सांग, सैन्यांचा **पर-
मेश्वर** इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं तुह्मी प्या,
आणि मस्त होऊन ओका, आणि जी तरवार मी
तुह्मामध्यें पाठवितों तिजकरितां पडा, व पुन्हा उठूं
नका. २८ आणि असें होईल, कीं जर ते तो
प्याला प्यायाला तुझ्या हातून घ्यायास अमान्य
होतील, तर त्यांस सांग, सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो, कीं तुह्मांला प्यावें लागेलच लागेल. २९
कां तर पाहा, ज्या नगरास माझें नाम ठेविलें आ-
हे, त्याजवर मी अरिष्ट करूं लागलों, तर तुह्मी
दंडावांचून निघाल काय? तुह्मी दंडावांचून निघ-
णारच नाहीं; कां कीं मी भूमींतल्या सर्व राहणा-
ऱ्यांवर तरवार बोलावितों, असें सैन्यांचा **परमे-
श्वर** ह्मणतो. ३० तर तूं त्यांसीं हीं सर्व वचनें
भविष्य बोल, आणि त्यांस सांग, **परमेश्वर** उंच
स्थानांतून ओरडेल, आणि आपल्या पवित्र निवा-
सांतून आपला शब्द करील, तो आपल्या वस्ती-
वर मोठ्यानें ओरडेल, जसे द्राक्षें तुडविणारे तसा
तो भूमींतल्या सर्व राहणाऱ्यांवर प्रणाद करील.
३१ पृथ्वीच्या सीमेपर्यंत गर्ज्जना पोहंचेल, कारण
कीं राष्ट्रांसीं **परमेश्वराचा** वाद आहे, तो सर्व
मनुष्यजातीसीं न्यायविवाद करील; जे दुष्ट ते तो
तरवारीस देईल, असें **परमेश्वर** ह्मणतो, ३२
सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, राष्ट्रापा-
सून राष्ट्राला अरिष्ट बाहेर जाईल, आणि पृथ्वी-
च्या बाजूंपासून मोठें वादळ उठेल. ३३ आणि
त्यावेळेस **परमेश्वराचे** वधलेले पृथ्वीच्या एका
सीमेपासून पृथ्वीच्या दुसऱ्या सीमेपर्यंत होतील;
त्यांजकरितां आक्रंदन कोणी करणार नाहीं, आणि
त्यांस एकवटणार नाहींत, व पुरणार नाहींत, ते
भूमीच्या पाठीवर खत असे होतील.

३४ अहो पालकांनों, केंकत ओरडा, आणि
कळपाच्या नायकांनो, तुह्मी आपल्या अंगाला रा-
ख फांसा; कारण कीं वधण्याचे व विखरण्याचे
तुमचे दिवस पूर्ण झाले आहेत; ह्मणून तुह्मी
मनोरम पात्राप्रमाणें पडाल. ३५ आणि पालकांपा-
सून आश्रय, व कळपाच्या धन्यांपासून शरण ना-
हींसें होईल. ३६ पालकांच्या आरोळीचा शब्द,
व कळपाच्या नायकांचें केंकणें होईल; कारण कीं
**परमेश्वरानें** त्यांचें चरगण ओसाड केलें आहे;
३७ आणि **परमेश्वराच्या** संतप्त क्रोधामुळें शां-
तीच्या वस्ती उजाड झाल्या आहेत. ३८ त्यानें
सिंहाप्रमाणें आपली जाळी सोडिली आहे; कां
कीं पिडणाऱ्याच्या कोपामुळें व त्याच्या क्रोधाच्या
तापामुळें त्यांची भूमि ओसाड झाली आहे.

## अध्याय २६.

यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र जो यहोया-
कीम त्याच्या राज्याच्या आरंभीं हें वचन
**परमेश्वरा**पासून आलें कीं, २ **परमेश्वर** म्ह-
णतो, कीं तूं **परमेश्वराच्या** घराच्या अंगणांत उ-
भा राहून यहुदाच्या सर्व नगरांतले जे लोक **पर-**
**मेश्वराच्या** घरांत भजायाला जातात, त्यांस सर्व
जीं वचनें मी तुला त्यांजवळ बोलायास आज्ञा-
पितों, तीं बोल; कांहीं बोलल्याशिवाय ठेवूं नको.
३ कदाचित ते ऐकून प्रत्येक आपल्या मार्गापासून
फिरतील, तेव्हां जें अरिष्ट मी त्यांजला त्यांच्या
कर्मांच्या दुष्टपणामुळें करायास कल्पितों आहें,
त्याविषयीं अनुतापेन. ४ आणि त्यांस सांग,
**परमेश्वर** म्हणतो, कीं माझें जें नेमशास्त्र म्यां
तुम्हापुढें ठेविलें आहे त्याप्रमाणें वर्त्तायाला, ५
जे माझे सेवक भविष्यवादी म्यां पहाटेस उठून
पाठवून तुम्हाजवळ पाठविले, आणि तुम्ही ऐकिलें
नाहीं, त्यांचीं वचनें मानायाला जर माझें न ऐकाल,
६ तर हें घर शीलोसारिखें करीन, आणि हें नगर
पृथ्वींतल्या सर्व राष्ट्रांस शापासाठीं करून ठेवीन.
७ तेव्हां याजक व भविष्यवादी व सर्व लोक यानी
इर्मयाला हीं वचनें **परमेश्वराच्या** घरांत बोलतां
ऐकिलें.

८ आणि असें झालें, कीं इर्मयाने जीं वचनें
लोकांजवळ बोलावीं म्हणून **परमेश्वराने** त्याला
आज्ञापिलें होतें, तीं सर्व जेव्हां बोलून समाप्त के-
लीं, तेव्हां याजक व भविष्यवादी व सर्व लोक
यानी त्याला धरून म्हटलें, कीं तूं मरसीलच मर-
सील. ९ त्वां **परमेश्वराच्या** नामाने कां भविष्य
सांगितलें आहे, कीं हें घर शीलोसारिखें होईल,
आणि हें नगर त्यांत कोणी न राहील असें ओ-
साड पडेल? तेव्हां सर्व लोक इर्मयाविरुद्ध **परमे-**
**श्वराच्या** घरांत एकत्र मिळाले.

१० यहूदाच्या सरदारानी जेव्हां ह्या गोष्टी
ऐकिल्या, तेव्हां ते राजाच्या घरांतून वरतीं **परमे-**
**श्वराच्या** घरास येऊन, **परमेश्वराच्या** घराच्या
नव्या दाराच्या प्रवेशांत बसले. ११ तेव्हां याजक
व भविष्यवादी सरदारांस व सर्व लोकांस म्हणाले,
कीं या मनुष्याला प्राणांत दंडकरणें योग्य आहे;
कारण कीं असें तुम्ही आपल्या कानानी ऐकिलें, तसें
त्याने या नगराविरुद्ध भविष्य सांगितलें आहे.

१२ मग इर्मयाने सर्व सरदारांस व सर्व लो-
कांस म्हटलें, कीं जीं सर्व वचनें तुम्ही ऐकिलीं,
तीं या घराविरुद्ध व या नगराविरुद्ध भविष्य सां-
गायाला **परमेश्वराने** मला पाठविलें. १३ तर
आतां तुम्ही आपले मार्ग निटावा, व **परमेश्वर** जो
तुमचा देव त्याचा शब्द ऐका; म्हणजे **परमेश्वर**
जें अरिष्ट तुम्हाविरुद्ध बोलला आहे, त्याविषयीं
तो अनुतापेल. १४ तर मी काय करूं! पाहा,
मी तुमच्या हातीं आहें; जसें तुमच्या दृष्टींत चां-
गलें व सरळ असेल, तसें मला करा. १५
तथापि तुम्ही खचीत जाणा, कीं जर तुम्ही मला
वधाल तर तुम्ही आपणांवर, व या नगरावर, व
यांतले सर्व राहणाऱ्यांवर निर्दोषरक्ताचा दोष आ-
णाल; कां कीं हीं सर्व वचनें तुमच्या कानांत
बोलायाला निश्चयें **परमेश्वराने** मला पाठविलें
आहे.

१६ तेव्हां सर्दार व सर्व लोक याजकांस व
भविष्यवाद्यांस म्हणाले, या मनुष्याला प्राणांत दंड
करणें योग्य नाहीं; कारण कीं **परमेश्वर** जो आमचा
देव त्याच्या नामाने हा आम्हाला बोलला आहे.
१७ मग देशांतल्या वडिलांतले कित्येक जन उठून
लोकांच्या सर्व समाजाला म्हणाले कीं, १८
यहूदाचा राजा हिज्कीया याच्या दिवसांत मीखा
मोरश्थी भविष्य सांगत असे, तो यहूदाच्या सर्व
लोकांस म्हणाला, कीं सैन्यांचा **परमेश्वर** म्हणतो,
कीं सीयोन शेताप्रमाणें नांगरितील, आणि यरू-
शालेमेचे ढीग होतील, आणि मंदिराचा पर्वत,
जंगलाचे उंचस्थलांसारिखा होईल. १९ तर
यहूदाचा राजा हिज्कीया व सर्व यहूदा यानी
त्याला वधिलें काय! त्या हिज्कीयाने **परमेश्व-**
**राचें** भय धरिलें नाहीं, आणि **परमेश्वराला**
विनविलें नाहीं काय? तेव्हां **परमेश्वर** जें अरिष्ट
त्यांविरुद्ध तो बोलला होता त्याविषयीं अनुतापला;
तर आम्ही असें करून आपणांस कदाचित मोठें
अरिष्ट करून घेऊं.

२० आणखी एक मनुष्य म्हणजे शमायाचा
किर्याथयारीमकर त्याचा पुत्र ऊरीया **परमेश्व-**
**राच्या** नामाने भविष्य सांगत असे, आणि या नग-

राविरुद्ध व या देशाविरुद्ध त्याने इर्मयाच्या सर्व
वचनांप्रमाणें भविष्य सांगितलें. २१ जेव्हां य-
होयाकीम राजा व त्याचे सर्व वीर व सर्व सर्दार
यानी त्याचीं वचनें ऐकिलीं, तेव्हां राजाने त्याला
वधायास पाहिलें, मग ऊरीया हें ऐकून भ्याला,
आणि मिसरांत पळून गेला. २२ तेव्हां यहो-
याकीम राजाने मिसरांत मनुष्यें पाठविलीं, ह्मणजे
अक्बोराचा पुत्र जो एल्नाथान तो व त्यासंगतीं
कित्येक जन मिसरांत पाठविले. २३ मग त्यानी
ऊरीयाला मिसरांतून काढून यहोयाकीम राजाज-
वळ आणिलें, तेव्हां त्याने त्याला तरवारीने मार-
विलें, आणि त्याचें मडें बाहेर नीचलोकांच्या कब-
रांमध्यें टाकविलें. २४ तथापि इर्मयाला मारा-
यास लोकांच्या हातीं न द्यावें ह्मणून शाफानाचा
पुत्र जो अहीकाम त्याचें त्याला पाठबळ होतें.

## अध्याय २७.

यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र जो यहो-
याकीम त्याच्या राज्याच्या आरंभीं हें वचन
परमेश्वरापासून इर्मयाजवळ आलें कीं, २
परमेश्वराने मला सांगितलें आहे, कीं तूं आप-
ल्यासाठीं बंधनें व जोखडें करून आपल्या मानेला
लाव. ३ आणि यरूशालेमेस यहूदाचा राजा
जिद्कीया याजकडे जे दूत येतात, त्याच्या हातून
अदोमाच्या राजाजवळ व मोवाबाच्या राजाजवळ
व अम्मोनाच्या वंशाच्या राजाजवळ व त्सोरेच्या
राजाजवळ व जीदोनाच्या राजाजवळ तीं पाठीव.
४ आणि त्यानी आपल्या धन्याजवळ सांगावें ह्म-
णून त्यांस आज्ञा कर, सैन्यांचा परमेश्वर इस्रा-
एलाचा देव ह्मणतो, कीं तुह्मी आपल्या धन्यांस
सांगा कीं, ५ म्या आपल्या महाशक्तीने व आ-
पल्या लांबविलेल्या बाहूने पृथ्वी व पृथ्वीच्या पाठी-
वर जी मनुष्यजाति व पशुजाति ती उत्पन्न केली,
आणि जो माझ्या दृष्टींत योग्य होता त्याला ती
म्या दिली. ६ आणि आतां म्या हे सर्व देश
नबुखद्रेज्जार जो बाबेलेचा राजा माझा सेवक
त्याच्या हातीं दिल्हे आहेत, आणि त्याची सेवा
करायास म्या रानांतले पशूहि त्याला दिल्हे आ-
हेत. ७ आणि त्याला व त्याच्या पुत्राला व
त्याच्या पुत्राच्या पुत्राला सर्व राष्ट्रें त्याच्या देशाची
वेळ येईपर्यंत सेवितील; मग बहुत राष्ट्रें व मोठे
राजे त्याची सेवा घेतील. ८ आणि असें होईल,
कीं जें राष्ट्र अथवा जें राज्य त्याची ह्मणजे नबु-
खद्रेज्जार जो बाबेलेचा राजा याची सेवा करणार
नाहीं, आणि जें आपली मान बाबेलेच्या राजाच्या
जोखडाला देणार नाहीं, त्या राष्ट्राला मी त्याच्या
हाताकडून नाहींसें करींपर्यंत तरवारीने व दुकाळाने
व मरीने शासीन, असें परमेश्वर ह्मणतो. ९
तर तुह्मी आपले भविष्यवादी व आपले दैवज्ञ व
आपले स्वप्नपाहणारे व आपले मंत्रज्ञ व आपले
गारुडी जे तुह्माला ह्मणतात, कीं तुह्मी बाबेलेच्या
राजाची सेवा करणार नाहीं, त्यांचें ऐकूं नका.
१० कां कीं त्यानी तुह्माला तुमच्या भूमीवरून
दूर करावें, व म्या तुह्माला घालवावें, व तुह्मी
नाहींसें व्हावें, ह्मणून ते तुह्माला खोटें भविष्य सां-
गतात. ११ आणि जें राष्ट्र त्याला सेवायाला
बाबेलेच्या राजाचे जोखडाला आपली मान लव-
वील त्याला त्याच्या भूमीवर राहूं देईन; आणि
तें तिला राबील, व तींत वसेल, असें परमेश्वर
ह्मणतो.

१२ आणि जिद्कीया जो यहूदाचा राजा
त्याजवळ मी या सर्व वचनांप्रमाणें बोललों, कीं
तुह्मी आपल्या माना बाबेलेच्या राजाच्या जोख-
डाला लववा, आणि त्याला व त्याच्या लोकांस
सेवा, ह्मणजे वांचाल. १३ जें राष्ट्र बाबेलेच्या
राजाची सेवा करणार नाहीं, त्याजविषयीं जसें
परमेश्वर बोलला आहे, तसें तूं व तुझे लोक, हे
तुह्मी तरवारीने व दुकाळाने व मरीने कां मराल?
१४ आणि जे भविष्यवादी तुह्माला ह्मणतात, कीं
तुह्मी बाबेलेच्या राजाची सेवा करणार नाहीं,
त्यांचीं वचनें ऐकूं नका; कां तर ते तुह्माला खो-
टें भविष्य सांगतात. १५ कारण कीं परमेश्वर
ह्मणतो, म्या त्यांस पाठविलें नाहीं, आणि म्या
तुह्माला घालवावें, आणि तुह्मी व जे भविष्यवादी
तुह्माला भविष्य सांगतात, त्यानीहि नाहींसें व्हावें,
ह्मणून ते माझ्या नामाने खोटें भविष्य सांगतात.
१६ आणि याजकांजवळ व या सर्व लोकांजवळ
मी बोललों, कीं परमेश्वर ह्मणतो, कीं जे तुमचे
भविष्यवादी तुह्माला भविष्य सांगतात, कीं पाहा,
परमेश्वराच्या घरचीं पात्रें बाबेलेहून आतां लव-

कर परत आणितील, त्यांचीं वचनें ऐकूं नका; कां
कीं ते तुह्माला खोटें भविष्य सांगतात. १७ त्यांचें
ऐकूं नका; बाबेलेच्या राजाची सेवा करा, ह्मणजे
वांचाल; हें नगर कशाकरितां ओसाड पडावें?
१८ आणि जर ते भविष्यवादी आहेत, आणि जर
**परमेश्वराचें** वचन त्यांजजवळ आहे, तर **परमे-
श्वराच्या** घरांत व **यहूदाच्या** राजाच्या घरांत व
**यरूशालेमेंत** जीं पात्रें उरलीं आहेत, तीं **बाबेलेस**
न जावीं, ह्मणून ते सैन्यांच्या **परमेश्वराजवळ**
विनंती करोत.

१९ कां तर जे खांब व जें समुद्रपात्र व जे
आधार व जीं वरकड पात्रें या नगरांत उरलीं आ-
हेत, २० जीं **बाबेलेचा** राजा **नबुखद्रेज्जार**
यानें **यहूदाचा** राजा जो **यहोयाकीम** त्याचा पुत्र
**यकोन्या** व **यहूदाचे** व **यरूशालेमेचे** सर्व महा-
जन **यरूशालेमेहून बाबेलेस** पाडाव असे नेले अ-
सतां, हरलीं नव्हतीं; २१ जीं **परमेश्वराच्या**
घरांत व **यहूदाच्या** राजाच्या घरांत व **यरूशाले-
मेंत** उरलीं आहेत, त्या पात्रांविषयीं सैन्यांचा **पर-
मेश्वर इस्राएलाचा देव** ह्मणतो कीं, २२ तीं
**बाबेलेस** नेतील, आणि मी त्यांचीं पाहणीं करीं
त्यादिवसापर्यंत तेथें राहतील; मग तीं परत आण-
वून या स्थानांत पुन्हा ठेवीन, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

## अध्याय २८.

आणि त्या वर्षांत, ह्मणजे **यहूदाचा** राजा **सि-
दकीया** याच्या राज्याच्या आरंभीं, चौथ्या
वर्षांत, पांचव्या महिन्यांत, **गिबोनकर** जो **अज्जूर**
भविष्यवादी त्याचा पुत्र **हनान्या परमेश्वराच्या**
घरांत याजक व सर्व लोक यांच्या देखतां मजज-
वळ ह्मणाला कीं, २ सैन्यांचा **परमेश्वर**
**इस्राएलाचा देव** असें ह्मणतो, कीं म्यां **बाबेलेच्या**
राजाचें जोखड मोडिलें आहे. ३ अणखी दोहों
वर्षांनी **परमेश्वराच्या** घरचीं जीं सर्व पात्रें **नबू-
खद्रेज्जार बाबेलेचा** राजा यानें या स्थानांतून ह-
रून **बाबेलेस** नेलीं, तीं मी या स्थानांत परत आ-
णवीन. ४ आणि **यहोयाकीम** जो **यहूदाचा**
राजा त्याचा पुत्र **यकोन्या** व **यहूदाचे** जे सर्व पा-
कीं **बाबेलेस** गेले, त्यांचा समुदाय मी या स्था-
नांत परत आणीन; कां कीं मी **बाबेलेच्या** राजाचें
जोखड मोडीन, असें **परमेश्वर** ह्मणतो.

५ तेव्हां जे याजक व जे सर्व लोक **परमेश्व-
राच्या** घरांत उभे राहिलेले होते, त्यांच्या देखतां
**इर्मया** भविष्यवादी **हनान्या** भविष्यवाद्याजवळ
ह्मणाला; ६ तेव्हां **इर्मया** भविष्यवादी ह्मणाला,
आमेन, असें **परमेश्वरानें** करावें; **परमेश्वरानें**
**परमेश्वराच्या** घरचीं पात्रें आणि पाडावाचा
सर्व समुदाय **बाबेलेहून** या स्थानांत परत आणून,
जीं तुझीं वचनें त्वां भविष्य सांगितलीं आहेत, तीं
खरीं ठरवावीं. ७ तथापि जें वचन मी तुझ्या
कानांत व सर्व लोकांच्या कानांत बोलतों हें ऐक;
८ जे भविष्यवादी मजपूर्वीं व तुजपूर्वीं पुरातनका-
लापासून असत, ते बहुत देशांविरुद्ध व मोठ्या
राज्यांविरुद्ध लढाई व दुकाळ व मरी यांविषयीं
भविष्य सांगत असत. ९ जो भविष्यवादी कुशला-
विषयीं भविष्य सांगतो, त्या भविष्यवाद्याचें वचन
जेव्हां सत्यास येईल, तेव्हां तो भविष्यवादी
कळेल कीं निश्चयें त्याला **परमेश्वरानें** पाठविलें
आहे.

१० तेव्हां **हनान्या** जो भविष्यवादी त्यानें
**इर्मया** भविष्यवाद्याच्या मानेवरून जोखड काढून
मोडिलें. ११ आणि सर्व लोकांच्या देखतां **हना-
न्या** ह्मणाला, कीं **परमेश्वर** ह्मणतो, कीं याप्रमाणें
अणखी दोहों वर्षांनी **बाबेलेचा** राजा जो **नबूख-
द्रेज्जार** याचें जोखड सर्व राष्ट्रांच्या मानेवरून
काढून मोडीन; तेव्हां **इर्मया** भविष्यवादी आपल्या
वाटेनें गेला.

१२ आणि **हनान्या** भविष्यवाद्यानें **इर्मया** भ-
विष्यवाद्याच्या मानेवरून जोखड काढून मोडिल्या-
नंतर **परमेश्वराचें** वचन **इर्मयाजवळ** आलें कीं,
१३ तूं **हनान्याजवळ** जाऊन सांग, कीं **परमेश्वर**
ह्मणतो, कीं त्वां लांकडाचीं जोखडें मोडिलीं आहेत,
परंतु त्यांच्या स्थानीं तुला लोखंडाचीं जोखडें क-
रावीं लागतील. १४ कारण कीं सैन्यांचा **परमे-
श्वर इस्राएलाचा देव** ह्मणतो, कीं **बाबेलेचा** राजा
जो **नबूखद्रेज्जार** त्याची सेवा करावी ह्मणून या
सर्व राष्ट्रांच्या मानेवर म्यां लोखंडी जोखड ठेविलें
आहे; आणि यांस त्याची सेवा करावी लागेल

लागेल; आणि त्याला म्या रानांतले पशूहि दिल्हे
आहेत.
१५ मग **इर्मया** भविष्यवाद्याने **हनान्या** भवि-
ष्यवाद्याला ह्मटलें, हे **हनान्या**, ऐक, तुला **परमे-
श्वराने** पाठविलें नाहीं; आणि हे लोक लबाडीवर
भाव ठेवीत असें त्वां केलें आहे. १६ **याकरितां**
**परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी तुला भूमीच्या
पाठीवरून दूर करितों; या वर्षांत तूं मरसील;
कारण कीं तूं **परमेश्वरा**विरुद्ध फितूर बोलला
आहेस. १७ **मग** त्याच वर्षाच्या सातव्या महि-
न्यांत **हनान्या** भविष्यवादी मेला.

## अध्याय २९.

पाडावांच्या प्रवासांतल्या वडिलांचें शेष, आणि
याजक व भविष्यवादी व **नबुखद्रेज्जाराने** पा-
डाव करून **यरूशालेमेहून बाबेलेस** नेले होते, जे
सर्व लोक, त्यांजवळ जें पत्र **इर्मया** भविष्यवाद्याने,
२ **यकोन्या** जो राजा तो व राणी व शंड व **यहूदाचे**
व **यरूशालेमेचे** सर्दार व शिल्पी व लोहार, हे
**यरूशालेमेहून** निघून गेल्यानंतर, ३ **शाफानाचा**
पुत्र **एलासा** व **हिल्कीयाचा** पुत्र **गमार्या**, जे ते
**यहूदाचा** राजा **जिद्कीया** याने **बाबेलेस नबूख-
द्रेज्जार बाबेलेचा** राजा याजवळ पाठविले, या
दोघांच्या हातांकडून पाठविलें, त्याचीं वाक्यें हींच
आहेत ह्मणजे, ४ जे पाडाव प्रवासी म्या **य-
रूशालेमेहून बाबेलेस** नेवविले आहेत, त्या सर्वांस
सैन्यांचा **परमेश्वर इस्राएलाचा देव** ह्मणतो
कीं, ५ तुह्मी घरें बांधून त्यांत वसा; आणि
मळे लावून त्यांचें फल खा. ६ बायका करा, व
पुत्रांस व कन्यांस जन्म द्या; आणि आपल्या पुत्रां-
साठीं नवऱ्या करा, व आपल्या कन्या वरांस द्या,
आणि त्या पुत्र व कन्या प्रसवोत; आणि तेथें
तुह्मी बहुत व्हा, व उणे होऊं नका. ७ **आणि**
ज्या नगरास म्या तुह्माला पाडाव नेवविलें, त्याचें
कल्याण शोधा, आणि त्यासाठीं **परमेश्वरा**जवळ
प्रार्थना करा, कां कीं त्याच्या कल्याणांत तुमचें
कल्याण होईल.
८ **कां** तर सैन्यांचा **परमेश्वर इस्राएलाचा
देव** ह्मणतो, कीं जे तुमचे भविष्यवादी तुह्मामध्यें
आहेत, त्यानी आणि तुमच्या दैवज्ञानी तुह्माला
ठकवूं नये, आणि तुह्मी आपलीं जीं स्वप्नदर्शनें
करवितां तीं ऐकूं नका. ९ **कां** कीं ते लबाडीने
माझ्या नामाने तुह्माला भविष्य सांगतात; म्या ते
पाठविले नाहींत, असें **परमेश्वर** ह्मणतो.
१० तर **परमेश्वर** ह्मणतो, कीं जेव्हां सत्तर
वर्षें **बाबेलेस** पूर्ण होतील, तेव्हां मी तुमची पाह-
णी करीन, आणि तुह्माला या स्थानांत परत आ-
णून तुह्मासाठीं आपलें उत्तम वचन खरें करीन.
११ **कां** कीं म्या जे संकल्प तुह्माविषयीं केले, ते
मी जाणतों, तुह्माला परिणाम व आशा द्यायाला
ते अरिष्टाचे संकल्प नव्हत, परंतु कुशलाचे आ-
हेत, असें **परमेश्वर** ह्मणतो. १२ **आणि** तुह्मी
मजकडे आरोळी कराल, आणि मजजवळ येऊन
प्रार्थना कराल, तेव्हां मी तुमचें ऐकेन. १३ **आ-
णि** जेव्हां तुह्मी आपल्या पूर्ण हृदयाने मला शो-
धाल, तेव्हां तुह्मी हुडकाल व पावाल. १४ **आणि**
**परमेश्वर** ह्मणतो, मी तुह्माला प्राप्त होईन;
आणि तुमचें पाडावपण फिरवीन, आणि ज्या सर्व
राष्ट्रांत व स्थानांत म्या तुह्माला घालविलें आहे,
त्यांतून तुह्माला एकवटीन, आणि ज्यांतून म्या
तुह्माला पाडाव असें नेवविलें आहे, त्या स्थानांत
तुह्माला परत आणीन, असें **परमेश्वर** ह्मणतो.
१५ **परमेश्वराने** आह्माकरितां **बाबेलेंत** भ-
विष्यवादी स्थापिले आहेत, असें तुह्मी ह्मटलें
आहे; १६ **याकरितां** जो राजा **दावीदाच्या**
सिंहासनावर बसतो, त्याविषयीं आणि जे लोक
या नगरांत राहतात, ह्मणजे जे तुमचे भाऊ तुह्मा-
संगतीं पाडावांच्या प्रवासांत निघून गेले नाहींत,
त्या सर्वांविषयीं **परमेश्वर** ह्मणतो, १७ **सै-
न्यांचा परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी त्यांमध्यें
तरवार, दुकाळ, व मरी पाठवून, जे कुत्सित अं-
जीर कोणाच्याने खाववणार नाहींत एवढे वाईट
आहेत त्यांसारिखे, त्यांस करीन. १८ **आणि**
तरवार, दुकाळ, व मरी यांकडून मी त्यांच्या पाठीस
लागेन, आणि ज्या राष्ट्रांमध्यें म्या त्यांस घालविलें
आहे, त्या सर्वांमध्यें ते पृथ्वींतल्या सर्व राज्यांस
भयासाठीं, शापासाठीं व विस्मयासाठीं व फूत्कारा-
साठीं निंदेसाठीं होत, असें करीन. १९ **कारण**
कीं **परमेश्वर** ह्मणतो, कीं म्या पहाटेस उठवळ
पाठवून माझे सेवक भविष्यवादी यांकडून सी, कीं

वळ पाठविलीं, तीं माझीं वचनें त्यानी ऐकिलीं
नाहींत; आणि तुह्मी ऐकाना, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

२० तर जे पाडाव प्रवासी म्या **यरूशालेमे**-
**हून बाबेलेस** पाठविले, ते तुह्मी सर्व **परमेश्वरा**-
**चें** वचन ऐका; २१ जे **कोलायाचा** पुत्र **अ**-
**हाब** व **मासेयाचा** पुत्र **जिद्कीया** तुह्माला मा-
झ्या नामाने खोटें भविष्य सांगतात, त्यांविषयीं
सैन्यांचा **परमेश्वर इस्राएलाचा देव** ह्मणतो, कीं
पाहा, मी त्या दोघांस **बाबेलेच्या नबूखद्रेज्जार**
राजाच्या हातीं देईन, तेव्हां तो तुमच्या देखतां
त्यांस वधील. २२ आणि त्यांविषयीं **यहूदाचे**
जे पाडाव प्रवासी **बाबेलेंत** आहेत, ते हा शाप
वहिवाटींत घेतील, कीं जे **जिद्कीया** व **अहाब**
**बाबेलेच्या** राजाने अग्नीवर भाजिले, त्यांसारिखें
**परमेश्वर** तुला करो. २३ कारण कीं त्यानी
**इस्राएलांत** दुष्टपण केलें आहे, व आपल्या शेजा-
ऱ्यांच्या स्त्रियांसीं जारकर्म केलें आहे, व जें म्या
त्यांस आज्ञापिलें नाहीं तें वचन ते खोटेपणें माझ्या
नामाने बोलले आहेत; हें मला कळलें आहे, व
याचा साक्षी मी आहें, असें **परमेश्वर** ह्मणतो.

२४ आणि **शमाया** जो **नहलामी** त्याला सांग
कीं, २५ सैन्यांचा **परमेश्वर इस्राएलाचा देव**
असें ह्मणतो, कीं त्वां आपल्या नामाने जे सर्व
लोक **यरूशालेमेंत** आहेत, त्यांजवळ व **मासे**-
**याचा** पुत्र **जफान्या** जो याजक व सर्व याजक
यांजवळ पत्रें पाठवून ह्मटलें आहे कीं, २६
**यहोयादा** जो याजक त्याच्या स्थानीं तुला **परमे**-
**श्वराने** याजक नेमिलें आहे, अशासाठीं कीं तु-
ह्मी **परमेश्वराच्या** घरांतले अधिकारी व्हावें,
मग जो कोणी वेडा मनुष्य आपणास भविष्यवादी
ह्मणवितो, त्याला त्वां बंदिशाळेंत व खोड्यांत ठे-
वावें. २७ तर आतां **अनाथोथकर इर्मया** जो
आपणास तुह्मासाठीं भविष्यवादी ह्मणवितो, त्या-
ला त्वां कां धमकाविलें नाहीं? २८ कां कीं
त्याने **बाबेलेस** आह्माकडे पाठवून ह्मटलें आहे,
कीं हा प्रवास दीर्घ होईल; ह्मणून तुह्मी घरें
बांधून वस्ती करा, आणि मळे लावून त्यांचें फल
खा. २९ आणि **जफान्या** याजकाने हें पत्र **इर्म**-
डाव भविष्यवाद्याच्या कानांत पडे, असें वाचिलें.

३० तेव्हां **परमेश्वराचें** वचन **इर्मयाजवळ**
आलें कीं, ३१ सर्व पाडाव प्रवाशांजवळ पाठ-
वून सांग, **शमाया** जो **नेहलामी** त्याविषयीं **परमे**-
**श्वर** ह्मणतो, कीं **शमायाने** तुह्माला भविष्य सां-
गितलें आहे, आणि म्या तो पाठविला नाहीं, आ-
णि तुह्मी खोट्यावर भाव ठेवा, असें त्याने केलें
आहे. ३२ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, कीं
पाहा, मी **शमाया नेहलामीला** व त्याच्या संतती-
ला शासीन; त्याचा या लोकांमध्यें वसायाला
कोणी राहणार नाहीं, आणि जें हित मी आपल्या
लोकांस करीन, तें तो पाहणार नाहीं; कारण कीं
तो **परमेश्वराविरुद्ध** फितूर बोलला आहे, असें
**परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ३०.

जें वचन **परमेश्वरापासून इर्मयाजवळ** आलें
तें असें कीं, २ **परमेश्वर इस्राएलाचा**
देव असें ह्मणतो, कीं जीं वचनें मी तुजजवळ बो-
ललों आहें, तीं सर्व तूं आपणासाठीं पुस्तकांत
लिहून ठेव. ३ कां कीं **परमेश्वर** ह्मणतो, पा-
हा, ते दिवस येतील ज्यांत मी आपल्या **इस्राएल**
व **यहूदा** लोकांचे पाडाव परत आणीन; आणि
जो देश म्या त्यांच्या पूर्वजांस दिल्हा त्यांत
ते परत आणीन, तेव्हां ते त्याचे वतनदार होतील,
असें **परमेश्वर** ह्मणतो.

४ आणि **इस्राएल** व **यहूदा** याविषयीं जीं
वचनें **परमेश्वर** बोलला, तीं हींच आहेत. ५
तर **परमेश्वर** ह्मणतो, कीं आह्मी थरथर कांप-
ण्याचा शब्द ऐकिला आहे, भय आहे, आणि
कांहीं कुशळ नाहीं. ६ पुरुष प्रसवत आहे कीं
नाहीं, ह्मणून विचारून पाहा; कशामुळें म्या
प्रत्येक पुरुषाला, प्रसवणाऱ्या स्त्रीप्रमाणें त्याचे
हात त्याच्या कंबरेवर ठेवितां पाहिलें आहे, आणि
सर्व मुखें पालटून म्लान झालीं आहेत? ७ अहा
तो एवढा मोठा दिवस आहे, कीं त्यासारिखा कोण-
ताहि नाहीं; आणि तो **याकोबाचा** संकटसमय
आहे, तथापि तो त्यांतून निभावेल. ८ सैन्यांचा
**परमेश्वर** ह्मणतो, त्या दिवसीं असें होईल, कीं
मी त्याचें जोखड तुझ्या मानेवरून काढून मोडीन,
आणि तुझीं बंधनें तोडीन, आणि परदेशी पुन्हा

त्याची सेवा घेणार नाहींत. ९ आणि परमेश्वर
त्याचा देव त्याची, आणि दावीद जो त्या-
चा राजा मी त्यांसाठीं स्थापीन त्याचीहि सेवा ते
करितील.

१० तर परमेश्वर ह्मणतो, हे याकोबा मा-
झ्या सेवका, तूं भिऊं नको; आणि इस्राएला, तूं
खिन्न होऊं नको; कां तर पाहा, मी तुला दूर
स्थानांतून, आणि तुझ्या संतानांस त्यांच्या पाडाव-
पणाच्या देशांतून तारीन; तेव्हां याकोब परत
येईल, आणि स्वस्थ व समाधानपणें राहील, आणि
त्याला भयभीत करायाला कोणी असणार नाहीं.
११ कां कीं परमेश्वर ह्मणतो, मी तुला ताराया-
साठीं तुझ्याजवळ आहें; ज्या राष्ट्रांमध्यें म्यां तु-
ह्मास विखरिलें, त्या सर्वांचें जरीं म्यां अवसान
केलें तरीं तुझें अवसान मी करणार नाहीं; परंतु
न्यायानें तुला शिक्षीन, आणि तुला दंडावांचून
निघूं देणार नाहीं. १२ कारण कीं परमेश्वर
ह्मणतो, कीं तुझी जखम अवघड आहे, आणि
तुझा घाय कठीण आहे. १३ जखम आंवळा-
[illegible]ा न्याय कोणी करीत नाहीं; तुला बरें
[illegible]षधें नाहींत. १४ तुझे सर्व प्रिय
[illegible]ले आहेत, ते तुला हुडकीत नाहींत,
[illegible]या तुला तुझ्या फार अन्यायामुळें वैऱ्या-
[illegible]क्षमेनें क्रूराच्या शिक्षेनें हाणिलें आहे; तुझीं
[illegible] पुष्कळ झालीं आहेत. १५ तूं आपल्या
[illegible]करितां कां ओरडतीस? तुझ्या बहुत अन्या-
यामुळें तुझें दुःख अवघड आहे; तुझीं पातकें
पुष्कळ झालीं आहेत, ह्मणून म्यां ह्या गोष्टी तुला
केल्या आहेत. १६ याकरितां जे तुला खातात
त्या सर्वांस खातील, आणि तुझे सर्व शत्रु निःशेष
पाडावपणांत जातील, आणि तुझे हरणारे हरणा-
साठीं होतील, आणि मी तुझ्या सर्व लुटणाऱ्यांस
लुटीसाठीं देईन. १७ जरीं त्यांनी तुला घाल-
विलेली ह्मटलें, ती सीयोन आहे, तिला कोणी
विचारित नाहीं, असें ह्मटलें तरीं तुझे घाय बरे
करून तुला आरोग्य देईन, असें परमेश्वर
ह्मणतो.

१८ परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, मी याको-
बाच्या डेऱ्यांतले पाडाव परत आणीन, आणि त्या-
च्या वस्त्यांवर दया करीन, तेव्हां नगर त्याच्या
उंचाडावर बांधितील, आणि मंदिर त्याच्या रीती-
प्रमाणें वसवतील. १९ आणि त्यांतून स्तवन व
हर्षकांचा शब्द निघेल; आणि मी त्यांस बहुत
करीन, मग ते थोडे होणार नाहींत, आणि त्यांस
मान देईन, तेव्हां ते हलके होणार नाहींत. २०
आणि त्यांचीं लेंकरें पूर्वीप्रमाणें होतील, आणि
त्यांची सभा मजसमोर स्थापित होईल, आणि मी
त्यांच्या सर्व पिडणाऱ्यांस शासीन. २१ आणि
त्यांचा महापुरुष त्यांतलाच होईल, व त्यांचा अ-
धिकारी त्यांजमधूनच उत्पन्न होईल; आणि त्याला
जवळ येऊं देईन, तेव्हां तो मजजवळ येईल; तर
जो मजजवळ यावयास आपलें मन उद्युक्त करि-
तो, हा कोण आहे? असें परमेश्वर ह्मणतो.
२२ आणि तुह्मी माझे लोक असत जाल, आणि
मी तुमचा देव असत जाईन. २३ पाहा, परमे-
श्वराची वावटूळ, उडवती वावटूळ, ह्मणजे रोष
सुटला आहे; तो दुष्टांच्या डोईवर भोंवेल. २४
परमेश्वर आपल्या मनाचे संकल्प करून ठरवी-
पर्यंत त्याचा संतप्तक्रोध फिरणार नाहीं; पुढील
दिवसांत तुह्मी याचा विचार कराल.

## अध्याय ३१.

परमेश्वर ह्मणतो, त्यावेळीं मी इस्राएलाच्या
सर्व वंशाचा देव असत जाईन, आणि ते माझे
लोक असत जातील. २ परमेश्वर ह्मणतो, कीं
जेव्हां मी इस्राएलास स्वस्थ करायास गेलों, तेव्हां
जे लोक तरवारीपासून वांचले, ते रानांत प्रसाद
पावले. ३ पुरातनकाळीं परमेश्वर माझ्या दृष्टीस
पडून ह्मणाला, म्यां सर्वकालिक प्रीतिनें तुजवर
प्रीति केली; ह्मणून म्यां प्रसादेंकरून तुला ओ-
ढिलें आहे. ४ अगे इस्राएलाच्या कन्ये, मी
तुला पुन्हा बांधीन, तेव्हां तूं बांधिलेली होसील;
तूं पुन्हा आपले डफ भूषण असे घेऊन बाहेर
हर्षकांच्या नाचण्यांत चालसील. ५ तूं पुन्हा
शोमरोनेच्या डोंगरांवर द्राक्ष्यांचे मळे लाविसील;
लावणारे ते लावून त्यांचें साधारण फल खातील.
६ तर तो दिवस येईल, ज्यांत एफ्राइम पर्वतांचे
पाहरेकरी आरोळी करितील, कीं उठा, आपण
सीयोनेस, परमेश्वर जो आपला देव त्याजवळ
चढत जाऊं. ७ कां कीं परमेश्वर ह्मणतो, कीं

याकोबासाठीं हर्षानें गायन करा, आणि राष्ट्रांतल्या
मुख्यांमध्यें गजर करा; वदा, स्तवा, आणि ह्मणा,
हे परमेश्वरा, तूं आपल्या लोकांस, इस्राएलाच्या
शेषास तार· ८ पाहा, मी त्यांस उत्तरेंतल्या
देशांतून आणीन, आणि पृथ्वीच्या बाजूंपासून एक-
वटीन, त्यांसहित आंधळे, पांगळे, गर्भिणी व प्रस-
विणारी एकत्र आणीन; मोठा समुदाय इकडे परत
येईल· ९ ते रडत येतील, आणि ते विनंत्या
करीत असतां त्यांस आणीन; ज्यांत ते अडखळ-
णार नाहींत त्या नीट मार्गांत पाण्याच्या ओघांज-
वळ त्यांस चालवीन; कां मी इस्राएलाचा बाप
आहें, आणि एफ्राइम माझा वडील पुत्र आहे·
१० अहो राष्ट्रांनों, परमेश्वराचें वचन ऐका,
आणि तें दुरच्या द्वीपांत प्रसिद्ध करा, व ह्मणा,
ज्याने इस्राएल विखरिला तो त्याला एकवटील,
आणि पालक जसा आपल्या कळपाला तसा तो
त्याला रक्षील· ११ कां कीं परमेश्वराने या-
कोब उद्धरिला आहे, आणि त्याजपेक्षां जो बलवान
होता त्याच्या हातांतून त्याला सोडविलें आहे·
१२ आणि ते येऊन सीयोनेच्या उंचस्थलावर गा-
यन करितील, आणि धान्यासाठीं व द्राक्षारसा-
साठीं व तेलासाठीं आणि मेंढरें व गुरें यांच्या
उपजांसाठीं परमेश्वराच्या चांगलेपणाकडे लोट-
तील; तेव्हां त्यांचा जीव शिंपलेल्या मळ्यासारिखा
होईल, आणि ते पुन्हा कधीं ग्लान होणार नाहींत.
१३ तेव्हां कुमारी नाचणाऱ्या मंडळींत हर्षेल,
आणि तरुण व ह्मातारें मिळून हर्षतील; आणि
त्यांचा शोक पालटून आनंद करीन, आणि त्यांचें
सांत्वन करीन, आणि त्यांचा खेद दूर करून
त्यांस हर्षित करीन· १४ आणि याजकांच्या
जीवाला चरबीनें तृप्त करीन, आणि माझ्या उत्तम
पदार्थांनी माझे लोक तृप्त होतील, असें परमेश्वर
ह्मणतो·
१५ परमेश्वर ह्मणतो, कीं रामांत नाद ऐकि-
ला होता, आक्रंदन, व अति खेदाचें रडणें ऐकिलीं
होतीं; राहेल आपल्या लेंकरांकरितां रडत होती,
तीं नाहींत, ह्मणून ती आपल्या लेंकरांविषयीं सां-
त्वन घेईना· १६ परमेश्वर ह्मणतो, कीं रडण्या-
पासून तूं आपली वाणी, व अश्रुपातापासून तूं आ-
पले डोळे आटोप; कां कीं परमेश्वर ह्मणतो,
तुझ्या कर्मांची फेड मिळेल, आणि तीं वैऱ्यांच्या
देशांतून परत येतील· १७ आणि परमेश्वर
ह्मणतो, तुझ्या परिणामाविषयीं आशा आहे, आणि
तुझीं लेंकरें आपल्या सीमेवर परत येतील.
१८ खचीत म्या एफ्राइमाला असें आक्रंदन
करितां ऐकिलें, कीं त्वां मला शिक्षिलें, तेव्हां म्या
अपेट बैलाप्रमाणें शिक्षा घेतली; तूं मला फिरीव,
ह्मणजे मी फिरेन; कां तूं परमेश्वर माझा देव
आहेस· १९ तर मी फिरल्यानंतर अनुतापलों,
आणि म्या संबोध घेतल्यानंतर मांडीवर हात आप-
टला; म्या आपल्या तरुणपणाची अपकीर्ति भोगिली,
ह्मणून मी लाजलों, होय शरमलों· २० काय,
एफ्राइम माझा प्रिय पुत्र आहे? आणि मनोरम लें-
करूं आहे कीं नाहीं? तर मी त्याला बोललों,
तेव्हांपासून एव्हांपर्यंत मी त्याला खचीत स्मरतों;
यांकरितां माझें अंतर्याम त्याजविषयीं कळवळतें;
निश्चयें त्याजवर दया करीन, असें परमेश्वर
ह्मणतो· २१ तूं आपणासाठीं मार्गाच्या खुणा
ठेव, खांब उभे कर; तूं सडक मार्गाकडे, ह्मणजे
ज्या मार्गानें तूं गेलीस त्याकडे आपलें मन लाव;
अगे इस्राएलाच्या कुमारी, परत ये, या तुझ्या नग-
रांत परत ये. २२ अगे मार्गें फिरणारे कन्ये, के-
व्हांपर्यंत भ्रमसील? परमेश्वराने तर पृथ्वींत
अपूर्व गोष्ट उत्पन्न केली आहे; स्त्री पुरुषाला
घेरील· २३ सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं मी जेव्हां त्यांचे पाडाव प्रवासी
परत आणीन, तेव्हां यहूदाच्या देशांत व त्याच्या
नगरांत लोक पुन्हा हें वचन बोलतील, कीं हे न्या-
याच्या निवासा, पवित्र पर्वता, तुला परमेश्वर आ-
शीर्वादित करो· २४ आणि त्यांत यहूदा व त्या-
चीं सर्व नगरें मिळून राहतील, आणि शेतकरी
कळप घेऊन बाहेर जातील· २५ कां कीं मी
प्रत्येक थकलेल्या जीवाला इच्छापूर्ण करीन, आणि
प्रत्येक ग्लान जीवाला तृप्त करीन· २६ हें झा-
ल्यावर मी जागृत झालों, आणि पाहिलें, आणि
माझी झोंप मला गोड होती.
२७ परमेश्वर ह्मणतो, पाहा, ते दिवस ये-
तात, ज्यांत मी इस्राएलाच्या घराण्यांत मनुष्यबीज
आणि पशुबीज पेरीन. २८ आणि असें होईल,
कीं जसा त्यांस उपटायाला व पाडायाला व मोडा-

याला व नाशायाला व पीडायाला मी त्यांजवर
जागत असें, तसा त्यांस बांधायाला व लावायाला
मी त्यांजवर जागत जाईन, असें परमेश्वर ह्म-
णतो. २९ त्या दिवसांत ते पुन्हा ह्मणणार ना-
हींत, कीं बापानीं हिरवीं द्राक्षें खाल्लीं, आणि लें-
करांचे दांत आंबले आहेत. ३० परंतु प्रत्येक
आपल्या अन्यायामुळें मरेल; जो प्रत्येक मनुष्य
हिरवीं द्राक्षें खाईल त्याचेच दांत आंबतील.
३१ परमेश्वर ह्मणतो, पाहा, ज्यांत मी इ-
स्राएलाच्या वंशासीं, व यहूदाच्या वंशासीं नवा
करार करीन, ते दिवस येतील; ३२ जेव्हां म्यां
त्यांच्या पूर्वजांस मिसर देशांतून बाहेर आणाया-
साठीं त्यांचा हात धरिला, तेव्हां जो म्यां त्यांसीं
करार केला त्याजसारिखा नव्हे, जो तो माझा क-
रार, मी त्यांचा भर्त्ता झालों असताहि, त्यांनीं
मोडिला, असें परमेश्वर ह्मणतो; ३३ परंतु
परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसानंतर जो करार
मी इस्राएलाच्या वंशासीं करीन, तो हाच आहे,
कीं मी आपलें नेमशास्त्र त्यांच्या अंतर्यामांत ठेवीन,
आणि त्यांच्या ह्रदयांत तें लिहीन; आणि मी
त्यांचा देव असत जाईन, आणि ते माझे लोक
असत जातील. ३४ आणि तुह्मी परमेश्वराला
जाणा, असें सांगून ते पुढें प्रत्येक आपल्या शेजा-
ऱ्याला, व प्रत्येक आपल्या भावाला शिकविणार
नाहींत; कारण कीं ते त्यांतल्या लाहानापासून
मोठ्यापर्यंत सर्व मला जाणतील; कां कीं त्यांच्या
अन्यायाची क्षमा करीन, आणि पुढें मी त्यांचें पा-
तक स्मरणार नाहीं.
३५ ज्या परमेश्वरानें दिवसा प्रकाशायास
सूर्य, व रात्रीं प्रकाशायास चंद्र व तारे यांचीं
विधानें नेमिलीं, जो समुद्राला त्याच्या लाटा गर्ज-
तांना खवळवितो, ज्याचें नाम सैन्यांचा परमेश्व-
र आहे, तो ह्मणतो. ३६ हीं विधानें जर मज-
समोरून ढळतील, तर इस्राएलाचे संतानहि
मजसमोर राष्ट्र न राही असे नाहींसे होतील,
असें परमेश्वर ह्मणतो. ३७ परमेश्वर ह्म-
णतो, कीं जर वरतीं आकाशें मापितील, आणि
खालतीं पृथ्वीच्या पायांचा जर शोध काढितील,
तर मीहि जें सर्व इस्राएलाच्या संतानानीं केलें
आहे, त्यामुळें त्यांस टाकीन, असें परमेश्वर
ह्मणतो.
३८ परमेश्वर ह्मणतो, पाहा, ते दिवस ये-
तील, ज्यांत परमेश्वरासाठीं हें नगर हनानेला-
च्या दुर्गापासून कोंपऱ्याच्या दारापर्यंत बांधितील.
३९ आणि त्यासमोर गारेबाच्या डोंगरापर्यंत पुन्हा
मापनसूत्र निघून गवाथास फिरत येईल. ४०
आणि मढ्यांचें व राखेचें सर्व खोरें, व किद्रोनाच्या
ओघापर्यंत व पूर्वेकडे घोड्यांच्या दाराच्या कोंपऱ्या-
पर्यंत जीं शेतें, तीं सर्व परमेश्वरासाठीं पवित्र
होतील, हें स्थान पुन्हा सर्वकालपर्यंत उपटणार
नाहींत, व मोडणार नाहींत.

## अध्याय ३२.

यहूदाचा राजा जिद्कीया याचें दाहावें वर्ष,
जें नबूखद्नेसाराचें अठरावें वर्ष, त्यांत जें
वचन परमेश्वरापासून इर्मयाजवळ आलें तें. २
तर त्यावेळेस बाबेलेच्या राजाचें सैन्य यरूशाले-
मेस वेढा घालून लढत होतें, आणि यहूदाच्या
राजाच्या घरांत जी बंदिशाळा होती, तिच्या अं-
गणांत इर्मया भविष्यवादी कोंडलेला होता. ३
ज्या त्याला यहूदाच्या जिद्कीया राजानें कोंडलें,
आणि ह्मटलें, त्वां कां भविष्य सांगितलें आहे, कीं
परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, हें नगर मी बाबेलेच्या
राजाच्या हातीं देईन, आणि तो हें घेईल; ४ आणि
जिद्कीया यहूदाचा राजा खास्द्यांच्या हातांतून
निभावणार नाहीं, कां कीं तो खचीत बाबेलेच्या
राजाच्या हातीं देण्यांत येईल, आणि त्यासीं मु-
खाभिमुख बोलेल, आणि त्याचे डोळे त्याच्या
डोळ्यांस पाहतील; ५ आणि तो जिद्कीयाला
बाबेलेस नेईल, आणि मी त्याची पाहणी करीं-
पर्यंत तो तेथें राहील, असें परमेश्वर ह्मणतो;
जरीं तुह्मी खास्द्यांसीं लढलां तरीं तुमचा उपाय
चालणार नाहीं.
६ आणि इर्मया ह्मणाला, परमेश्वराचें वचन
मजजवळ आलें कीं, ७ पाहा, शल्लूम जो तुझा
काका त्याचा पुत्र हनामेल तुजजवळ येऊन ह्म-
णेल, कीं जें माझें शेत अनाथोथांत आहे तें तूं
आपणासाठीं विकत घे; कां कीं तें खंडणी देऊन
विकत घेणें तुझें धर्मकार्य आहे. ८ तर परमेश्व-

राच्या वचनाप्रमाणें माझ्या काकाचा पुत्र हना-
मेल बंदिशाळेच्या अंगणांत मजजवळ येऊन ह्म-
णाला, बन्यामीन देशांतल्या अनाथोथांत जें माझें
शेत आहे, तें तूं विकत घे, कां कीं वतन करून
घेणें, आणि खंडणी देणें, हीं तुझीं धर्मकार्यें आहेत;
तर तें तूं आपणासाठीं विकत घे; तेव्हां म्या आ-
णिलें, कीं हें वचन परमेश्वराचें होतें. ९ मग
जें शेत अनाथोथांत होतें तें म्या आपल्या काका-
चा पुत्र हनामेल यापासून विकत घेतलें, आणि
सत्रा शेकेल रुपें त्याला मोल तोलून दिल्हें. १०
आणि म्या आपलें नाम खरीदखतावर लिहिलें,
आणि त्यावर शिक्का केला, आणि साक्षी बोला-
वून रुपें ताजव्याने तोलून दिल्हें. ११ तेव्हां म्या
खरीदखत जें विधीप्रमाणें व नियमाप्रमाणें शिक्का
मारलेलें तें, आणि जें उघडें तेंहि घेतलें. १२
आणि महसेयाचा पुत्र जो नेरीया त्याचा पुत्र
जो बारूख त्याजवळ माझ्या काकाचा पुत्र जो हना-
मेल त्याच्या समक्ष, आणि ज्या साक्ष्यानी खरीद-
खतावर सही घातली, त्यांच्या समक्ष, आणि जे
सर्व यहूदी बंदिशाळेच्या अंगणांत बसले होते,
त्यांच्या समक्ष म्या तें खरीदखत दिल्हें.

१३ आणि त्यांच्या देखतां म्या बारूखाला
आज्ञापिलें कीं, १४ सैन्यांचा परमेश्वर इस्रा-
एलाचा देव ह्मणतो, कीं तूं हीं पत्रें, हें खरीदखत,
ह्मणजे जें शिक्का मारलेलें हें आणि जें उघडें पत्र
हेंहि घे; आणि हीं बहुत दिवस टिकावीं ह्मणून
मातीच्या पात्रांत ठेव. १५ कां कीं सैन्यांचा
परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं घरें व
शेतें व द्राक्षमळे हीं या देशांत पुन्हा वतन करून
भोगितील.

१६ आणि नेरीयाचा पुत्र जो बारूख त्याजवळ
म्या तें खरीदखत दिल्यानंतर परमेश्वराजवळ म्या
प्रार्थना केली कीं, १७ अहा प्रभू परमेश्वरा,
त्वां आपल्या महाशक्तीने व आपल्या लांबविलेल्या
बाहुने पृथ्वी व आकाशें उत्पन्न केलीं, आणि तुला
कांहीं अवघड नाहीं. १८ तूं हजारोंवर अनुग्रह
करितोस, आणि बापांच्या अन्यायांचें फल त्यां-
च्या मागें त्यांच्या लेंकरांच्या पदरीं भरून देतोस;
जो तूं महामहिमा व महासमर्थ देव आहेस,
त्या तुझें नाम सैन्यांचा परमेश्वर आहे, १९
जो संकल्पांत मोठा आणि कर्मांत समर्थ आहेस,
ज्या तुझे डोळे मनुष्यांच्या सर्व मार्गांवर उघडे
आहेत; प्रत्येकास त्याच्या मार्गांप्रमाणें व त्याच्या
कर्मांच्या फलाप्रमाणें द्यावें ह्मणून; २० जो तूं
या दिवसापर्यंत मिसर देशांत व इस्राएलांत व
इतर मनुष्यांत चिन्हें व उत्पात करीस, आणि
असें या दिवसीं तुला प्राप्त झालें तसें तूं आपणाला
नाम प्राप्त करून घेस; २१ आणि त्वां आपले
इस्राएल लोक चिन्हानी व उत्पातानी व पराक्रमी
हाताने व लांबविलेल्या बाहूने व मोठ्या भयाने
मिसर देशांतून बाहेर आणिलें; २२ आणि
दूध मध वाहण्याचा देश त्यांस द्यावा, ह्मणून त्वां
त्यांच्या पूर्वजांजवळ शपथ केली, तो हाच देश,
त्वां त्यांस दिल्हा आहे; २३ आणि ते येऊन
त्याचें वतन पावले, परंतु ते तुझा शब्द ऐकेनात,
व तुझ्या नेमशास्त्राप्रमाणें चालेनात, जें सर्व त्वां
त्यांस करायाला आज्ञापिलें तें ते करीनात; ह्म-
णून त्यांस हें सर्व अरिष्ट त्वां लागूं दिल्हें आहे.
२४ पाहा, नगरास तें घ्यायाला मोरचे आले आ-
हेत, आणि त्याजवर जे खास्दी लढतात, त्यांच्या
हातीं तरवार व मरी व दुष्काळ यांकारणें नगर
देण्यांत येतें; आणि जें तूं बोललास, तें घडलें
आहे; आणि पाहा, तें त्वां पाहिलें आहे. २५
तथापि हे प्रभू परमेश्वरा, तूं मला ह्मणालास,
कीं तूं आपणाला रुप्याने शेत विकत घे, आणि
साक्षी बोलावून आण; आणि नगर खास्द्यांच्या
हातीं देण्यांत येतें.

२६ आणि परमेश्वराचें वचन यिर्मयाजवळ
आलें कीं, २७ पाहा, मी परमेश्वर सर्व मनुष्य-
जातीचा देव आहें; मला कोणतेंहि अवघड आहे
काय? २८ याकरितां परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा,
हें नगर मी खास्द्यांच्या हातीं, व नबूखद्नेस्सार जो
बाबेलेचा राजा त्याच्या हातीं देतों, ह्मणजे तो हें
घेईल. २९ आणि जे खास्दी या नगरावर लढ-
तात, ते येऊन हें नगर अग्नीने पेटवितील, आणि हें
व ज्या घरांच्या धाब्यांवर त्यांनी मला कोपवायासाठीं
बालास धूप जाळिला, व इतर देवांस पेय अ-
र्पणें ओतिलीं आहेत, तींहि जाळून टाकितील.
३० कां कीं इस्राएली व यहूदी आपल्या तरुणपणा-
पासून माझ्या दृष्टींत केवळ दुष्टाई करीत आले

आहेत; आणि इस्राएली आपल्या हातांच्या का-
मांकडून केवळ मला कोपवीत आले आहेत, असें
**परमेश्वर** ह्मणतो. ३१ कां कीं ज्यावेळीं त्यांनी
हें नगर बांधिलें, तेव्हांपासून या वेळापर्यंत मज-
साठीं हें क्रोधाचें व कोपाचें कारण होत आलें
आहे; म्या आपल्या दृष्टीपासून हें दूर करावें ह्म-
णून, ३२ इस्राएलांचें व यहूदांचें जें दुष्टपण
मला कोपवायासाठीं त्यांनी, त्यांच्या राजांनी,
त्यांच्या सरदारांनी, त्यांच्या याजकांनी, व त्यांच्या
भविष्यवाद्यांनी, व यहूदाच्या मनुष्यांनी, व यरू-
शालेमेच्या राहणाऱ्यांनी केलें आहे, त्या सर्वांमुळें.
३३ आणि त्यांनी मजकडे मुख नव्हे, परंतु पाठ
फिरविली आहे; आणि मी त्यांस शिकवितांना पहां-
टेस उठून शिकवितांना ते शिक्षा घ्यायाला ऐकेनात.
३४ आणि ज्या घराला माझें नाम ठेविलें आहे
त्यांत तें बाटवायासाठीं त्यांनी आपल्या अघोर वस्तु
ठेविल्या. ३५ आणि बालाचीं जीं उंचस्थलें हि-
न्नोमाच्या पुत्राच्या खोऱ्यांत आहेत, तीं त्यांनी
आपले पुत्र व आपल्या कन्या मोलेखास अग्नींत
अर्पायाला बांधिलीं, जें हें म्या त्यांस आज्ञापिलें
नाहीं, आणि यहूदा पाप करी असें करायासाठीं
त्यांनी हें अघोर कर्म करावें, असें माझ्या मनांत-
हि आलें नाहीं.

३६ तर याजकरितां आतां ज्याविषयीं तुह्मी
ह्मणतां, हें तरवार व दुकाळ व मरी यांकारणें
बाबेलेच्या राजाच्या हातीं देण्यांत येईल, अशा
या नगराविषयीं **परमेश्वर** इस्राएलाचा देव
ह्मणतो कीं, ३७ पाहा, ज्या सर्व देशांत म्या
आपल्या क्रोधाने व कोपाने व महारोषाने त्यांस
पिटून घालविलें आहे, त्यांतून मी त्यांस एकवटून
या स्थलांत परत आणीन, आणि ते निर्भय वसत
असें करीन; ३८ आणि ते माझे लोक असत
जातील, आणि मी त्यांचा देव असत जाईन;
३९ आणि त्यांनी आपल्या, व आपल्यामागें आ-
पल्या लेंकरांच्या हितासाठीं माझें भय सर्वदा
धरावें, ह्मणून मी त्यांस एकच हृदय आणि एकच
मार्ग देईन; ४० आणि त्यांचें हित करीत अ-
सतांना मी त्यांजवळून फिरणार नाहीं, असा स-
नातन करार त्यांशीं करीन, आणि त्यांनी मजपा-
सून फितूं नये ह्मणून त्यांच्या हृदयांत मी आपलें
भय घालीन. ४१ आणि त्यांचें हित करायाला
त्यांविषयीं आनंदेन, आणि मी आपल्या सर्व हृद-
याने व आपल्या सर्व जीवाने त्यांस या देशांत
खरेपणें स्थापीन. ४२ कां तर **परमेश्वर** ह्म-
णतो, कीं जसें म्या हें सर्व मोठें अरिष्ट या लोकांवर
आणिलें आहे, तसें ज्या कुशलाविषयीं मी त्यांस
बोललों आहें, तें सर्व त्यांजवळ आणीन. ४३
आणि ज्याविषयीं तुह्मी ह्मणतां, हा देश मनुष्य-
हीन व पशुहीन होऊन ओसाड आहे, खास्-
द्यांच्या हातीं दिल्हा आहे, यांत शेतें विकत घे-
तील. ४४ आणि बन्यामीन देशांत, व यरूशाले-
मेच्या भोंवतालच्या प्रदेशांत, व यहूदाच्या नग-
रांत, व डोंगरवट देशाच्या नगरांत, व खोलवट
देशाच्या नगरांत, व दक्षिणेच्या नगरांत, लोक
रुप्याने शेतें विकत घेतील, आणि खरीदखतावर
सही घालितील, व त्यावर शिक्का मारितील, आणि
साक्षी बोलावून आणितील, कारण कीं मी त्यांचे
पाडाव प्रवासी परत आणीन, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

## अध्याय ३३.

आणि जेव्हां इर्मया बंदिशाळेच्या अंगणांत कों-
डलेला होता, तेव्हां **परमेश्वराचें** वचन
त्याजवळ दुसऱ्याने आलें कीं, २ **परमेश्वर** जो
याचा उत्पन्नकर्त्ता, हें स्थापायासाठीं ज्या **परमे-
श्वराने** हें निर्माण केलें, ज्याचें नाम **परमेश्वर**
आहे, तो ह्मणतो कीं, ३ तूं मजकडे आरोळी
कर, ह्मणजे तुला उत्तर देईन, आणि ज्या मोठ्या
व गुप्त गोष्टी तूं जाणत नाहींस, त्या तुला दाख-
वीन. ४ तर या नगराचीं जीं घरें व यहूदाच्या
राजांचीं जीं घरें मोरच्यांकडून व आयुधांकडून
पाडलेलीं आहेत, त्यांविषयीं **परमेश्वर** इस्राए-
लाचा देव ह्मणतो कीं, ५ लोक खास्द्यांशीं
लढायाला, व जीं मनुष्यें म्या आपल्या क्रोधाने व
आपल्या कोपाने हाणिलीं, व ज्यांच्या सर्व दुष्टपणा-
मुळें म्या आपलें मुख या नगरापासून झांकिलें आहे,
त्यांच्या मढ्यांनी तीं घरें भरायाला येतात. ६ पा-
हा, मी याला आरोग्य व वैद्योपचार आणून देईन,
आणि त्यांस निरोगी करीन, आणि त्यांस कुशल
व खरेपण यांचें पूर्णपण प्रगट करीन. ७ आणि

यहूदाचे पाडाव प्रवासी व इस्राएलाचे पाडाव
प्रवासी परत आणीन, आणि पूर्वीप्रमाणें त्यांस बां-
धीन. ८ आणि ज्याकडून त्यांनी मजविरुद्ध पाप
केलें, तो त्यांचा सर्व अन्याय दूर करून त्यांस स्व-
च्छ करीन; आणि त्यांनी आपल्या ज्या सर्व अन्या-
यांकडून मजविरुद्ध पाप केलें, व ज्यांकडून त्यांनी
माझा अपराध केला, ते सर्व मी क्षमा करीन.

९ आणि त्यांस जें सर्व हित मी करितों, तें
पृथ्वींत जीं सर्व राष्ट्रें ऐकतील, त्यांजवळ हें मला
आनंदाचें नाम, प्रशंसा, व गौरव असें होईल;
आणि याला जें सर्व हित व जें सर्व कुशल मी
करितों, त्याकरितां तीं भयभीत होतील, आणि
कांपतील. १० परमेश्वर ह्मणतो, कीं ज्यावि-
षयीं तुह्मी ह्मणतां, हें मनुष्यहीन व पशुहीन हो-
ऊन ओसाड आहे, अशा या स्थलांत ह्मणजे
यहूदाचीं जीं नगरें, व यरूशालेमेच्या ज्या आ-
ळ्या मनुष्यहीन व निवासिहीन व पशुहीन होऊन
उजाड आहेत त्यांतहि, ११ आनंदाचा शब्द, व
हर्षाचा शब्द, व नवऱ्याचा शब्द, व नवरीचा शब्द,
सैन्यांच्या परमेश्वराला स्तवा, कारण कीं परमे-
श्वर उत्तम आहे, आणि त्याची दया सनातन
आहे, असें जे ह्मणतील त्यांचा शब्द, आणि जे
परमेश्वराच्या मंदिरांत स्तुतीचें अर्पण आणितील,
त्यांचा शब्दहि पुन्हा ऐकण्यांत येईल; कां कीं देशा-
चे पाडाव प्रवासी पूर्वीप्रमाणें परत आणीन, असें
परमेश्वर ह्मणतो.

१२ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं जें मनु-
ष्यहीन व पशुहीन होऊन ओसाड आहे, अशा
या स्थलांत, व यांतल्या सर्व नगरांत कळप बस-
विणाऱ्या पालकांची वस्ति पुन्हा होईल. १३
डोंगरवट देशाच्या नगरांत, खोलवट देशाच्या नग-
रांत, व दक्षिणेच्या नगरांत, व बन्यामीन देशांत,
व यरूशालेमेच्या भोंवतालच्या प्रदेशांत, व यहू-
दाच्या नगरांत, कळप पुन्हा गणणाऱ्याच्या हातां-
वरून क्रमून जातील, असें परमेश्वर ह्मणतो.
१४ परमेश्वर ह्मणतो, पाहा, ते दिवस येतात,
ज्यांत मी जी उत्तम प्रतिज्ञा इस्राएलाच्या वंशाला,
आणि यहूदाच्या वंशाला बोललों, ती स्थापित
करीन.

१५ त्या दिवसांत, व त्या वेळेस दावीदाला
न्यायाचा कोंब फुटे असें करीन; आणि तो पृथ्वीं-
त नीति व न्याय करील. १६ त्या दिवसांत य-
हूदा तरेल, व यरूशालेम निर्भय राहील; आणि
तिला जें नाम ह्मणतील तें हेंच आहे, ह्मणजे
परमेश्वर आमचें न्यायत्व.

१७ कारण कीं परमेश्वर ह्मणतो, कीं इस्रा-
एलाच्या वंशाच्या सिंहासनावर बसता पुरुष दा-
वीदाला नाहींसा होणार नाहीं. १८ आणि या-
जक जे लेवी त्यांसाठीं होम वाहणारा, व अर्पण
जाळणारा, आणि नित्य यज्ञ करणारा पुरुष मज-
समोर नाहींसा होणार नाहीं.

१९ आणि परमेश्वराचें वचन इर्मयाजवळ
आलें कीं, २० परमेश्वर ह्मणतो, कीं दिवस
व रात्रि यांनी आपापल्या समयीं न व्हावें, ह्मणून
जर माझ्या दिवसाचा करार व माझ्या रात्रीचा
करार तुमच्यानें मोडवेल तर, २१ दावीद जो
माझा सेवक यासीं जो माझा करार आहे, तोहि
त्याला त्याच्या सिंहासनावर राज्यकर्त्ता पुत्र न व्हा-
वा, असा मोडून जाईल, आणि लेवी जे याजक
माझे सेवाकर्त्ते त्यांसीं जो माझा करार आहे तोहि
मोडून जाईल. २२ जसें आकाशांचें सैन्य गणितां
येत नाहीं, व समुद्राची वाळू मापितां येत नाहीं,
तसी माझा सेवक दावीद याची संतति, व लेवी
जे मला सेवितात तेहि बहुत करीन.

२३ आणखी परमेश्वराचें वचन इर्मयाजवळ
आलें कीं, २४ हे लोक जें बोलले आहेत, तें त्यां
ध्यानांत आणिलें नाहीं काय? तें असें कीं जे दोन
वंश परमेश्वरानें निवडिले, ते त्यानें टाकिले आ-
हेत; आणि त्यांसमोर माझ्या लोकांनी पुन्हा राष्ट्र
होऊं नये, असें ते माझ्या लोकांस तुच्छ मानितात.
२५ परमेश्वर ह्मणतो, कीं जर माझा दिवसाचा व
रात्रीचा करार नाहीं, जर म्या आकाशांचे व पृ-
थ्वीचे नियम स्थापिले नाहींत तर, २६ याकोब
व दावीद माझा सेवक यांची संतति असी टाकीन,
कीं याच्या संततींतून आब्राहाम व इज्हाक व या-
कोब यांच्या वंशावर राज्यकर्त्ते व्हायासाठीं त्या
कोणाला घेऊं नये; कां तर त्यांचे पाडाव प्रवासी
परत आणीन, आणि त्यांजवर दया करीन.

## अध्याय ३४.

जेव्हां नबुखद्रेज्झार बाबेलेचा राजा, व त्याचें
सर्व सैन्य, व त्याच्या धनीपणाखालची भूमि-
वरलीं सर्व राज्यें, व सर्व लोक यरूशालेमेवर, व
तिच्या सर्व नगरांवर लढत होते, तेव्हां जें वचन
परमेश्वरापासून इर्मयाजवळ आलें, तें हेंच आहे
कीं, २ परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो,
कीं यहूदाचा राजा जिद्कीया याजवळ तूं जा, व
याला बोलत सांग, परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा,
हें नगर मी बाबेलेच्या राजाच्या हातीं देतों, आणि
हें तो अग्नीने जाळील. ३ आणि तूं त्याच्या हा-
तांतून सुटणार नाहींस, परंतु तूं निश्चयें सांपड-
सील, आणि त्याच्या हातीं लागसील; आणि तुझे
डोळे बाबेलेच्या राजाच्या डोळ्यांस पाहतील,
आणि तो तुजसीं मुखाभिमुख बोलेल, आणि तूं
बाबेलेस जासील. ४ तथापि हे जिद्कीया य-
हूदाच्या राजा, परमेश्वराचें वचन ऐक, तुज-
विषयीं परमेश्वर ह्मणतो, कीं तूं तरवारीने मर-
णार नाहींस. ५ तूं शांतींत मरसील, आणि तुझे
जे पूर्वज जे पूर्वराजे तुजपूर्वी होते, त्याच्या जाळ-
ण्याप्रमाणें तुजकरितां लोक जाळणें करितील, आणि
अहा प्रभो, असें बोलून तुजसाठीं आक्रंदन करि-
तील, कां कीं हें वचन मीच बोललों आहें, असें
परमेश्वर ह्मणतो. ६ मग इर्मया भविष्यवाद्याने
जिद्कीया जो यहूदाचा राजा त्याला हीं सर्व
वचनें बोलून यरूशालेमेंत सांगितलें. ७ त्यावे-
ळेस बाबेलेच्या राजाचें सैन्य यरूशालेमेवर, व
यहूदांतल्या उरलेल्या नगरांवर, लाखीशेवर, व
अजेकावर लढत होते; कां कीं तीं गांवकुसवी नगरें
यहूदांतल्या नगरांतून उरलीं होतीं.

८ यरूशालेमेंत जे लोक होते त्यांस सुटी
सांगायाला, ह्मणजे प्रत्येकाने आपल्या इब्री दासाला
व प्रत्येकाने आपल्या इब्री दासीला सुटी द्यावी,
कोणी त्यांकडून, ह्मणजे आपल्या यहूदी भावांकडून
सेवा करवून घेऊं नये, ९ असा करार त्या सर्व
लोकांसीं जिद्कीया राजाने केल्यानंतर जें वचन
परमेश्वरापासून इर्मयाजवळ आलें, तें हेंच आहे.
१० तर प्रत्येकाने आपल्या दासाला व प्रत्येकाने
आपल्या दासीला सुटी द्यावी, पुढें त्यांजकडून सेवा
करवून घेऊं नये, असें जेव्हां सर्व जे सर्दार व
सर्व जे लोक करारांत आले त्यांनी ऐकिलें, तेव्हां
त्यांनी मान्य होऊन त्यांस सुटी दिल्ही. ११
परंतु त्यानंतर ते फिरले, आणि ज्या दासांस व
ज्या दासींस त्यांनी सुटी दिल्ही होती, त्यांस
त्यांनी परत आणून घेतलें, आणि दास व दासी
करून ठेविलें.

१२ तेव्हां परमेश्वराचें वचन परमेश्वरा-
पासून इर्मयाजवळ आलें कीं, १३ परमेश्वर
इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं जेव्हां म्या मिसर
देशांतून, दासांच्या घरांतून तुमचे पूर्वज बाहेर आ-
णिले, तेव्हां त्यांसीं म्या करार केला कीं, १४
जो तुझा इब्री भाऊ तुला विकिला होता त्याला
तुह्मी प्रत्येक सातव्या वर्षाच्या शेवटीं सोडा, जे-
व्हां त्याने साहा वर्षें तुझी सेवा केली तेव्हां तूं आ-
पल्याकडून त्याला सुटी दे; परंतु तुमचे पूर्वज
माझें ऐकेनात, व आपले कान लावीनात. १५
तर तुह्मी आतां फिरलां होतां, आणि जें माझ्या
दृष्टींत सरळ तें तुह्मी प्रत्येक आपल्या भावाला
सुटी सांगून केलें होतें, आणि ज्या घराला माझें
नाम ठेविलें आहे, त्यांत तुह्मी मजसमोर करार
केला होता. १६ परंतु तुह्मी फिरलां आहां, आणि
माझें नाम अप्रतिष्ठित केलें आहे, आणि ज्यांस
त्यांच्या इच्छेप्रमाणें तुह्मी सुटी दिल्ही होती, तीं
तुह्मी प्रत्येकाने आपला दास व प्रत्येकाने आपली
दासी परत घेतलीं आहेत, आणि तीं तुह्मासाठीं दास
व दासी व्हावीं ह्मणून स्वाधीन करून ठेविलीं आ-
हेत. १७ याकरितां परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी
प्रत्येकाने आपल्या भावाला, व प्रत्येकाने आप-
ल्या शेजाऱ्याला सुटी द्यायाला माझें ऐकिलें नाहीं;
ह्मणून पाहा, मी तुह्मासाठीं तरवारीला व मरीला
व दुकाळाला सुटी सांगतों, आणि तुह्माला पृथ्वीं-
तल्या सर्व राज्यांत ढकलायास देईन, असें परमे-
श्वर ह्मणतो. १८ आणि ज्या मनुष्यांनी माझा
करार उल्लंघिला आहे, ज्यांनी मजसमोर वासरूं
दुभाग कापून, त्याच्या दोहों भागांमधून क्रमून जो
करार केला, त्याचीं वचनें खरीं करून साधिलीं
नाहींत; १९ ह्मणजे यहूदाचे सरदार, व यरू-
शालेमेचे सरदार, व शंड, व याजक, व देशांतले
जे सर्व लोक, वासराच्या भागांमधून गेले, २०

ते त्यांच्या वैऱ्यांच्या हातीं, व त्यांच्या जीव शोध-
णाऱ्यांच्या हातीं देईनच देईन; आणि त्यांचीं
मढीं आकाशांतल्या पक्ष्यांस, व पृथ्वींतल्या पशूंस
आहार होतील. २१ आणि यहूदाचा राजा
सिद्कीया, व त्याचे सरदार त्यांच्या वैऱ्यांच्या
हातीं, व त्यांचा जीव शोधणाऱ्यांच्या हातीं, व
बाबेलच्या राज्याचें जें सैन्य तुह्मांपासून वर गेलें
आहे, त्याच्या हातीं देईन. २२ परमेश्वर ह्म-
णतो, पाहा, मी आज्ञा करीन, आणि ते या नगरा-
कडे परत आणीन, तेव्हां ते याजवर लढतील, व
हें घेतील, व अग्नीने जाळून टाकितील; आणि
यहूदाचीं नगरें त्यांत कोणी न राही असीं ओसाड
करून ठेवीन.

## अध्याय ३५.

यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र यहोयाकीम
याच्या दिवसांत जें वचन परमेश्वरापासून
इर्मयाजवळ आलें तें, कीं, २ तूं रेखाबांच्या
घरास जा, आणि त्यांस बोलून परमेश्वराच्या
मंदिरांत, कोठड्यांतल्या एकींत आण, आणि त्यांस
द्राक्षरस प्यायाला दे. ३ तेव्हां हबाजिन्याचा पुत्र
इर्मया याचा पुत्र याजन्या, व त्याचे बंधू, व त्याचे
सर्व पुत्र, व रेखाबांचें सर्व घराणें यांस घेऊन मी,
४ परमेश्वराच्या मंदिरांत इग्दाल्या जो देवाचा
भक्त त्याचा पुत्र हनान याच्या पुत्रांची जी कोठ-
डी सरदारांच्या कोठडीजवळ आहे, जी, शल्लूमा-
चा पुत्र जो मासेया द्वारपाल त्याच्या कोठडीवर-
तीं आहे, तींत आणिलें. ५ आणि म्या रेखाब्यां-
च्या घराण्यांतल्या जनांपुढें द्राक्षारसाने भरलेलीं
पात्रें व प्यालें ठेवून त्यांस ह्मटलें, द्राक्षारस प्या.
६ तेव्हां ते ह्मणाले, आह्मी द्राक्षारस पिणार नाहीं;
कारण कीं रेखाबाचा पुत्र योनादाब आमचा बाप
याने आह्मास आज्ञा दिल्ही, कीं तुह्मी व तुमचे
पुत्र सर्वकालपर्यंत द्राक्षारस पिऊं नका; ७ आणि
घर बांधू नका, व बीज पेरूं नका, व द्राक्षमळा
लावूं नका, व तुह्मांला कोणताहि न व्हावा; परंतु
तुह्मी आपले सर्व दिवस डेऱ्यांत वस्ती करा, अशा-
साठीं कीं जेथें तुह्मी आगंतुक आहां, त्या भूमीवर
तुमचे दिवस बहुत असावे. ८ तर रेखाबाचा
पुत्र यहोनादाब आमचा बाप याने ज्याविषयीं
आह्मास आज्ञा दिल्ही, कीं तुह्मी, तुमच्या स्त्रिया-
नी, तुमच्या पुत्रानी, व तुमच्या कन्यानी, आपले
सर्व दिवस द्राक्षारस पिऊं नये; ९ आपल्या रा-
हण्यासाठीं घरें बांधूं नयेत; त्या सर्वांविषयीं
आह्मी त्याच्या शब्दाला मान्य असत आलों
आहों, आणि आह्मांला द्राक्षमळा अथवा शेत
अथवा बीज नाहीं; १० आणि आह्मी डेऱ्यांत
वसत आलों आहों, आणि जें योनादाबाने आ-
ह्मास आज्ञापिलें, त्या सर्वांप्रमाणें आह्मी मान्य
असून करीत आलों आहों. ११ आणि असें
झालें, कीं नबुखद्रेज्झार बाबेलेचा राजा देशांत
चढून आला, तेव्हां आह्मी ह्मणालों, याहो, आ-
पण खास्द्यांच्या सैन्यामुळें व अराम्यांच्या सैन्या-
मुळें यरूशालेमेस जाऊं; ह्मणून आह्मी यरूशा-
लेमेस राहतों.

१२ नंतर परमेश्वराचें वचन इर्मयाजवळ
आलें कीं, १३ सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं तूं जाऊन यहूदाच्या मनुष्यांस व
यरूशालेमेच्या राहणाऱ्यांस सांग, परमेश्वर
ह्मणतो, कीं तुह्मी माझीं वचनें ऐकायाला शिक्षा घे-
णार नाहीं काय? १४ रेखाबाचा पुत्र जो यहो-
नादाब त्याने ज्या आपल्या आज्ञा आपल्या पुत्रांस,
द्राक्षारस पिऊं नये, ह्मणून दिल्ह्या, त्या त्यानी सा-
धिल्या आहेत, आणि या दिवसापर्यंत त्यानी द्रा-
क्षारस प्याला नाहीं, ते आपल्या बापाची आज्ञा
पाळीत आले आहेत; परंतु मी पहाटेस उठून
बोलून तुह्मांला बोललों आहें, तथापि तुह्मी माझें
ऐकिलें नाहीं. १५ आणि म्या पहाटेस उठून
माझे सेवक जे भविष्यवादी ते सर्व पाठवून तुह्मा-
जवळ पाठविले, व ह्मटलें, तुह्मी प्रत्येक आपल्या
दुष्टमार्गापासून फिरा, आणि आपलीं कर्मे बरीं
करा, आणि इतर देवांस त्यांस सेवायाला अनु-
सरूं नका, ह्मणजे जी भूमि म्या तुह्मांस व तुमच्या
पूर्वजांस दिल्ही, तिजवर राहाल; परंतु तुह्मी आ-
पला कान लाविला नाहीं, आणि माझें ऐकिलें
नाहीं. १६ तर रेखाबाचा पुत्र यहोनादाब या-
च्या पुत्रानी आपल्या बापाची आज्ञा जी त्याने त्यांस
दिल्ही ती पाळिली आहे, परंतु या लोकानी माझें
ऐकिलें नाहीं. १७ याकरितां परमेश्वर सैन्यां-
चा देव, इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं पाहा, जें

अरिष्ट मी त्यांविषयीं बोललों आहें, तें सर्व मी
यहूदावर व यरूशालेमेच्या राहणाऱ्यांवर आणीन;
कारण कीं जेव्हां मी त्यांस बोललों, तेव्हां त्यांनीं
ऐकिलें नाहीं; आणि म्या त्यांस आरोळी केली,
परंतु त्यांनीं उत्तर दिल्हें नाहीं.
१८ आणि इर्मयानें रेखाब्यांच्या घराण्याला
ह्मटलें, सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा देव
ह्मणतो, कीं तुह्मी आपल्या यहोनादाब बापाच्या
आज्ञेस मान्य झालां, व त्याच्या सर्व आज्ञा पाळि-
ल्या, आणि जें सर्व त्यानें तुह्मास आज्ञापिलें त्या-
प्रमाणें केलें आहे. १९ याकरितां सैन्यांचा पर-
मेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं रेखाबाच्या
योनादाब पुत्राला मजसमोर उभा राहणारा मनुष्य
कधीं नाहींसा होणार नाहीं.

## अध्याय ३६.

आणि यहूदाचा राजा जो योशीया त्याचा
पुत्र यहोयाकीम याच्या चौथ्या वर्षीं असें
झालें, कीं परमेश्वरापासून इर्मयाजवळ हें वचन
आलें कीं, २ तूं आपणासाठीं पुस्तकाची गुंडाळी
घे, आणि ज्या दिवसापासून मी तुला बोललों,
योशीयाच्या दिवसांपासून या दिवसापर्यंत इस्राए-
लाविषयीं व यहूदाविषयीं व सर्व राष्ट्रांविषयीं जीं
वचनें मी तुला बोललों आहें, तीं सर्व तिजवर
लिही. ३ जें सर्व अरिष्ट मी त्यांस करायाला
कल्पितों, तें कदाचित यहूदाचे वंश ऐकतील, अ-
शासाठीं कीं त्यांनीं प्रत्येकानें आपल्या कुमार्गापासून
फिरावें, ह्मणजे मी त्यांच्या अन्यायाची व त्यांच्या
पापाची क्षमा करीन. ४ तेव्हां इर्मयानें नेरीयाचा
पुत्र बारूख बोलाविला; आणि परमेश्वराचीं
सर्व वचनें जीं तो त्याला बोलला होता, तीं इर्म-
याच्या मुखापासून बारूखानें पुस्तकाच्या गुंडाळी-
वर लिहिलीं.
५ आणि इर्मया बारूखाला आज्ञा देतांना बो-
लला, मी कोंडलेला आहें, माझ्यानें परमेश्वरा-
च्या मंदिरांत जाववत नाहीं. ६ याकरितां तूं
जा, व जी गुंडळी त्वां माझ्या मुखापासून लिहिली,
तिजवरून परमेश्वराचीं वचनें परमेश्वराच्या
मंदिरांत, उपासाच्या दिवशीं, लोकांच्या कानीं पडत
असीं वाच; आणि जे सर्व यहूदी आपल्या नगरां-
तून येतात, त्यांच्याहि कानीं जात असीं तीं वाच.
७ कदाचित त्यांची विनंती परमेश्वरासमोर
येईल, आणि ते आपल्या कुमार्गापासून फिरतील;
का कीं जो क्रोध व जो कोप परमेश्वरानें या
लोकांविषयीं सांगितला आहे, तो मोठा आहे. ८
तेव्हां इर्मया भविष्यवाद्यानें नेरीयाचा पुत्र बारूख
याला जें सर्व आज्ञापिलें त्याप्रमाणें त्यानें, परमे-
श्वराचीं वचनें त्या पुस्तकावरून परमेश्वरा-
च्या मंदिरांत वाचून, केलें. ९ आणि यहूदाचा
राजा जो योशीया त्याच्या यहोयाकीम पुत्राच्या
पांचव्या वर्षीं नवव्या महिन्यांत असें झालें, कीं
यरूशालेमेंतल्या सर्व लोकांस व जे सर्व लोक
यहूदाच्या नगरांतून यरूशालेमेस आले, त्यांस
अधिकाऱ्यांनीं परमेश्वरासमोर उपास प्रसिद्ध
केला. १० तेव्हां बारूखानें त्या पुस्तकावरून
इर्मयाचीं वचनें परमेश्वराच्या मंदिरांत, शा-
फान चिटणीसाच्या गमार्या पुत्राच्या कोठडींत,
वरील अंगणांत परमेश्वराच्या मंदिराच्या नव्या
दाराच्या प्रवेशाजवळ, लोकांच्या कानीं पडत असीं
वाचिलीं.
११ तेव्हां शाफानाचा पुत्र गमार्या याच्या
मीखाया पुत्रानें परमेश्वराचीं सर्व वचनें त्या
पुस्तकावरून ऐकिलीं. १२ मग तो राजाच्या
घरांत चिटणीसाच्या कोठडींत उतरला; आणि
पाहा, तेथें सर्व सरदार, ह्मणजे अलीशामा जो
चिटणीस तो, व शमायाचा पुत्र दलाया, व अख्-
बोराचा पुत्र एल्नाथान, व शाफानाचा पुत्र गमा-
र्या, व हनान्याचा पुत्र सिद्कीया, हेच सर्व सर-
दार बसले होते. १३ तेव्हां मीखायानें जीं सर्व
वचनें बारूख पुस्तकावरून लोकांच्या कानीं पडत
असीं वाचीत होता, तेव्हां ऐकिलीं, तीं त्यानें त्यांस
दाखविलीं. १४ मग सर्व सरदारांनीं खूशीचा
पुत्र शलेम्या त्याचा पुत्र नथान्या त्याचा पुत्र
यहूदी बारूखाजवळ पाठवून सांगितलें, कीं ज्या
गुंडाळीवरून त्वां लोकांच्या कानीं पडे असें वा-
चिलें, ती तूं आपल्या हातांत घेऊन ये; तेव्हां
नेरीयाचा पुत्र बारूख ती गुंडाळी आपल्या हा-
तांत घेऊन त्यांजवळ आला. १५ आणि ते
त्याला ह्मणाले, तूं बैस, व तीं आमच्या कानीं
येई असी वाच; तेव्हां बारूखानें ती त्यांच्या

कानीं पडे असी वाचिली. १६ आणि असें
झालें, कीं तीं सर्व वचनें ऐकून ते परस्पर भ्याले,
व बारूखाला ह्मणाले, निश्चयें आह्मी हीं सर्व
वचनें राजाला सांगूं. १७ तेव्हां त्यानी बारू-
खाला पुसलें, कीं त्वां त्याच्या मुखापासून हीं सर्व
वचनें कशीं लिहिलीं, तें आह्माला सांग. १८
नंतर बारूख त्यांस ह्मणाला, त्याने हीं सर्व वचनें
आपल्या मुखाने मजजवळ उच्चारिलीं, तेव्हां म्या
हीं पत्रावर शाईने लिहिलीं. १९ मग सरदार
बारूखाला ह्मणाले, तूं जा, तूं आणि इर्मया गुप्त
राहा, आणि तुह्मी कोठें आहां, हें कोणाला कळूं
नये.

२० मग ते ती गुंडाळी एलीशामा चिटणीसा-
च्या कोठडींत ठेवून अंगणांत राजापासीं गेले, आ-
णि त्यानी तीं सर्व वचनें राजाच्या कानावर घात-
लीं. २१ तेव्हां राजाने ती गुंडाळी आणायाला
यहूदी पाठविला, आणि त्याने ती एलीशामा चिट-
णीसाच्या कोठडींतून आणिली; तेव्हां यहूदीने
राजा ऐके, आणि जे सरदार राजाजवळ उभे रा-
हिले होते, ते सर्व ऐकत, अशी ती वाचिली. २२
राजा तर नववे महिन्यांत हिंवाळ्याच्या घरांत
बसला होता, आणि त्याजपुढें शेगडी जळत होती.
२३ तेव्हां असें झालें, कीं यहूदीने तीन चार पत्रें
वाचिलीं असतां राजाने ती गुंडाळी लेखकाच्या
चाकूने कापिली, आणि शेगडींतल्या अग्नींत टाकि-
ली, ती सर्व गुंडाळी शेगडींतल्या अग्नीकडून नष्ट
होऊन जाईपर्यंत. २४ आणि राजा व त्याच्या
ज्या सर्व सेवकानी हीं सर्व वचनें ऐकिलीं, ते
भ्याले नाहींत, आणि त्यानी आपलीं वस्त्रें फाडि-
लीं नाहींत. २५ परंतु त्याने ती गुंडाळी जाळूं
नये, ह्मणून एल्नाथान व दलाया व गमार्या यानी
राजाजवळ विनंती केली होती, तथापि त्याने त्यांचें
ऐकिलें नाहीं. २६ नंतर बारूख चिटणीस आ-
णि इर्मया भविष्यवादी यांस धरावें ह्मणून राजाने
हम्मेलेखाचा पुत्र यराह्मेल आणि अज्रीएलाचा
पुत्र सराया आणि अब्देलाचा पुत्र शेलेम्या यांस
आज्ञापिलें, परंतु त्यांस परमेश्वराने लपविलें.

२७ मग ती गुंडाळी व बारूखाने जीं वचनें
इर्मयाच्या मुखापासून लिहिलीं होतीं, तींहि रा-
जाने जाळिल्यानंतर परमेश्वराचें वचन इर्मयाज-
वळ आलें कीं, २८ तूं पुन्हा आपणासाठीं दुस-
री गुंडाळी घे, आणि जीं पूर्ववचनें पहिल्या गुंडा-
ळीवर होतीं, जीं यहूदाच्या यहोयाकीम राजाने
जाळिलीं, तीं सर्व इजवर लिही. २९ आणि
यहूदाचा राजा यहोयाकीम याला सांग, परमे-
श्वर ह्मणतो, कीं त्वां इजवर कां लिहिलें आहे,
कीं निश्चयें बाबेलेचा राजा येईल, आणि या दे-
शास नासील, आणि यांतले मनुष्य व पशु नाहींसे
करील, असें बोलून ही गुंडाळी त्वां जाळिली
आहे. ३० याकरितां यहोयाकीम जो यहूदाचा
राजा त्याविषयीं परमेश्वर ह्मणतो, कीं त्याला
दावीदाच्या सिंहासनावर बसायाला कोणी राहणार
नाहीं; आणि त्याचें प्रेत दिवसांतल्या उन्हाला व
रात्रींतल्या हिंवाला बाहेर टाकितील. ३१ आणि
त्याला व त्याच्या संतानाला व त्याच्या सेवकांस
त्यांच्या अन्यायामुळें शासीन, आणि जें अरिष्ट मी
त्याविषयीं बोललों आहें, आणि त्यानी ऐकिलें
नाहीं, तें सर्व त्यांजवर व यरूशालेमेच्या राहणा-
ऱ्यांवर व यहूदाच्या मनुष्यांवर आणीन.

३२ नंतर इर्मयाने दुसरी गुंडाळी घेऊन नेरी
याचा पुत्र जो बारूख चिटणीस त्याला दिल्ही,
तेव्हां त्याने जें पुस्तक यहूदाच्या यहोयाकीम रा-
जाने अग्नींत जाळिलें होतें, त्यांतलीं सर्व वचनें
इर्मयाच्या मुखापासून तिजवर लिहिलीं; आणि
त्यांस अणखी बहुत तसलीं वचनें लाविलीं होतीं.

## अध्याय ३७.

तर यहोयाकीमाचा पुत्र कोन्या जो नबुखद्रेज्जार
बाबेलेचा राजा याने यहूदाच्या देशांत राजा
केला होता, त्याच्या स्थानीं योशीयाचा पुत्र जि-
द्कीया राजा राज्य करीत होता. २ परंतु पर-
मेश्वराने जीं आपलीं वचनें इर्मया भविष्यवाद्या-
कडून बोलविलीं, तीं तो, व त्याचे सेवक, व देशां-
तले लोक ऐकेनात. ३ आणि जिद्कीया राजाने
शेलेम्याचा पुत्र यहूखल, व मासेया याजकाचा
पुत्र जो सफान्या, हे इर्मया भविष्यवाद्याकडे पाठ-
वून सांगितलें, तूं आह्मासाठीं परमेश्वर जो आ-
मचा देव त्याजवळ प्रार्थना कर. ४ तेव्हां इर्म-
या लोकांमध्यें येत जात होता; कां कीं त्यानी
त्याला बंदिशाळेंत घातलें नव्हतें. ५ आणि फा-

रोचें सैन्य मिसरांतून निघून आलें; तेव्हां बे
खास्दी यरूशालेमेवर वेढा घालून लढत होते, ते
त्यांचें वर्त्तमान ऐकून यरूशालेमेहून गेले.
६ नंतर परमेश्वराचें वचन इर्मया भविष्य
वाद्याजवळ आलें कीं, ७ परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं यहूदाच्या ज्या राजानें तुह्मांला
मजजवळ मला पुसायाला पाठविलें, त्याला सांगा,
कीं पाहा, तुमचें सहाय करायाला जें फारोचें
सैन्य निघून आलें आहे, तें आपल्या मिसर देशांत
परत जाईल. ८ आणि खास्दी परत येतील, आणि
या नगरावर लढतील, आणि हें घेऊन अग्नीनें जा-
ळितील. ९ परमेश्वर ह्मणतो, कीं निश्चयें
खास्दी आह्मापासून जातील, असें बोलून तुह्मी
आपणास फसवूं नका; कां कीं ते जाणार नाहींत.
१० कां तर जे खास्दी तुह्मासीं लढतात, त्यांचें
सर्व सैन्य जरी तुह्मी हाणितेत, आणि त्यांतून के-
वळ घायाळ मनुष्य उरते, तरी ते प्रत्येक आपल्या
डेऱ्यांत उठून हें नगर अग्नीनें जाळितें.
११ आणि फारोच्या सैन्यामुळें खास्द्यांचें
सैन्य यरूशालेमेपासून उठविलेलें असतां असें
झालें कीं, १२ इर्मया यरूशालेमेंतून बन्यामीन
देशांत जायास निघाला, तेथें लोकांमध्यें शेतांचा
वांटा घ्यावा ह्मणून. १३ मग तो बन्यामीनाच्या
दारांत गेला असतां तेथें हनान्याचा पुत्र शेलेम्या
याचा पुत्र इरीया नामें एक नायक होता, त्यानें
इर्मया भविष्यवाद्याला धरून ह्मटलें, तूं खास्द्यां-
कडे फितत आहेस. १४ तेव्हां इर्मया बोलला,
खोटें बोलतोस, मी खास्द्यांकडे फितत नाहीं;
तथापि तो त्याचें ऐकेना; मग इरीयानें इर्मयाला
धरून सरदारांजवळ नेलें. १५ आणि सरदा-
रांनी इर्मयावर कोपित होऊन त्याला हाणिलें,
आणि बंदिशाळेंत यहोनाथान जो चिटणीस त्या-
च्या घरांत घातलें; कारण कीं तें त्यांनी बंदिशा-
ळा केलें होतें.
१६ तेव्हां इर्मया खांचेच्या घरांत व कोंड्यांत
गेला, आणि तेथें बहुत दिवस इर्मया राहिला
होता; १७ तेव्हां जिद्कीया राजानें पाठवून त्या-
ला काढिलें; आणि राजानें त्याला आपल्या घरांत
गुप्तपणें पुसून ह्मटलें, परमेश्वरापासून कांहीं वचन
आहे काय? तेव्हां इर्मया ह्मणाला, आहे; मग
तो ह्मणाला, तूं बाबेलेच्या राजाच्या हातीं दे-
ण्यांत येसील. १८ आणि इर्मया जिद्कीया
राजाला ह्मणाला, तुझा अथवा तुझ्या सेवकांचा
अथवा या लोकांचा म्या काय अपराध केला आहे,
कीं तुह्मी मला बंदिशाळेंत घातलें आहे? १९
तर तुमच्या ज्या भविष्यवाद्यांनी तुह्मांला भविष्य
सांगितलें, कीं बाबेलेचा राजा तुह्मांजवळ व या
देशावर येणार नाहीं, ते कोठें आहेत? २० तर
आतां प्रभो राजा, माझें ऐक; माझी विनंती तुज-
समोर येवो; आणि म्या तेथें मरूं नये, ह्मणून
मला यहोनाथान चिटणीसाच्या घरास परत पाठवूं
नको. २१ तेव्हां त्यांनी इर्मयाला बंदिशाळेच्या
अंगणांत ठेवावें, व नगरांतली सर्व भाकर संपेपर्यंत
भाकर करणाऱ्यांच्या आळींतून त्याला नित्य भाक-
रीचा तुकडा द्यावा, असी राजानें आज्ञा केली;
मग इर्मया बंदिशाळेच्या अंगणांत राहिला.

## अध्याय ३८.

तेव्हां इर्मया सर्व लोकांजवळ जीं सर्व वचनें
बोलला, कीं परमेश्वर ह्मणतो, कीं जो या
नगरांत राहतो तो तरवारीनें, दुकाळानें व मरीनें
मरेल, आणि जो खास्द्यांकडे निघून जाईल तो
वांचेल, आणि त्याचा जीव त्याला लूट असा हो-
ईल, आणि तो वांचेल, २ परमेश्वर ह्मणतो,
कीं निश्चयें हें नगर बाबेलेच्या राजाच्या सैन्या-
च्या हातीं देण्यांत येईल, आणि तें हें घेईल, ३
तीं वचनें मत्तानाचा पुत्र शफाट्या आणि पाश्-
हूराचा पुत्र गदाल्या आणि शेलेम्याचा पुत्र यु-
खाल आणि माल्खीयाचा पुत्र पाश्हूर यांनी
ऐकिलीं. ४ मग सरदार राजाजवळ बोलले, या
मनुष्याला जिवें मारावें; कारण कीं जे लढाईचीं
माणसें या नगरांत उरलीं आहेत त्यांचे हात आणि
सर्व लोकांचे हात हा त्यांजवळ असलीं वचनें
बोलून दुर्बल करितो, कां कीं हा मनुष्य या लो-
कांचें कुशल नव्हे, परंतु यांचें अरिष्ट शोधितो.
५ तेव्हां जिद्कीया राजा ह्मणाला, तो तुमच्या
हातांत आहे; तर राजाच्यानें तुमचें कांहीं करवत
नाहीं. ६ मग त्यांनी इर्मयाला घेऊन हम्मेले-
खाचा पुत्र माल्खीया याची जी खांच बंदिशाळे-
च्या अंगणांत होती तींत टाकिलें; तेव्हां दोऱ्यां-

कडून त्यानीं इर्मयाला उतरिलें; आणि खांचेंत
पाणी नव्हतें, परंतु चिखल होता; तर इर्मया
चिखलांत रुतला.
७ नंतर राजा बन्यामीनाच्या दारांत बसला
असतां इर्मया त्याने खांचेंत घातला आहे, असें
एबेद्मेलेख जो खूशी जो राजाच्या घरांतला एक
शंड होता, त्याने ऐकिलें. ८ तेव्हां एबेद्मेलेख
राजाच्या घरांतून निघून राजाजवळ येऊन बोलला
कीं, ९ हे प्रभो राजा, या मनुष्यानीं जें इर्मया
भविष्यवाद्याला केलें आहे, तें सर्व वाईट केलें
आहे, ज्या त्याला त्यानीं खांचेंत घातलें आहे;
आणि तो आपल्या स्थानावर भुकेने मरतो; कां कीं
नगरांत अणखी कांहीं भाकर नाहीं. १० तेव्हां
राजाने एबेद्मेलेख खूशीला आज्ञा देतांना सांगि-
तलें, तूं आपल्या हाताखालीं एथून तीस मनुष्य
घे, आणि इर्मया भविष्यवादी मेला नाहीं, तों खां-
चेंतून वर काढ. ११ मग एबेदमेलेखाने आपल्या
हाताखालीं मनुष्य घेऊन राजाच्या घरांत भांडा-
राखालीं जाऊन तेथून जीर्ण फडके व कुजक्या
चिंध्या काढिल्या, आणि दोऱ्यांकडून खांचेंत इर्म-
याजवळ उतरिल्या. १२ आणि एबेद्मेलेख खू-
शी इर्मयाला ह्मणाला, ते जीर्ण फडके व त्या
कुजक्या चिंध्या दोऱ्यांखालीं आपल्या काखांस
लाव; मग इर्मयाने तसें केलें. १३ तेव्हां
त्यानीं इर्मया दोऱ्यांकडून ओढून खांचेंतून वर का-
ढिला; मग इर्मया बंदिशाळेच्या अंगणांत राहिला.
१४ नंतर जिद्कीया राजाने पाठवून इर्मया
भविष्यवादी **परमेश्वराच्या** घराच्या तिसऱ्या प्रवे-
शांत आपल्याजवळ घेतला; आणि राजा इर्मयाला
ह्मणाला, मी तुला एक गोष्ट पुसतों; मजजवळ
कांहीं गुप्त राखूं नको. १५ तेव्हां इर्मयाने राजा-
ला ह्मटलें, जर मी ती तुला प्रगट करीन, तर
खचीत मला मारविणार नाहींस ना? आणि जर
तुला बोध करीन, तर माझें ऐकसील कीं नाहीं?
१६ तेव्हां जिद्कीया राजाने इर्मयाजवळ गुप्तपणें
शपथ केली, कीं ज्या जीवंत **परमेश्वराने** आ-
मचा हा जीव उत्पन्न केला, त्याचीच शपथ मी
करितों, कीं मी तुला मारविणार नाहीं, आणि जे म-
नुष्य तुझा जीव घ्यायास इच्छितात, त्यांच्या हातीं
मी तुला देणार नाहीं. १७ मग इर्मयाने जिद्कीया-
जवळ सांगितलें, **परमेश्वर** सैन्यांचा देव इस्राए-
लाचा देव ह्मणतो, कीं जर बाबेलेच्या राजाच्या सर-
दारांजवळ खचीत बाहेर जासील, तर तुझा जीव
वांचेल, आणि हें नगर अग्नीकडून जाळणार नाहींत;
आणि तूं वांचसील, व तुझें घराणें वांचेल. १८
परंतु जर बाबेलेच्या राजाच्या सरदारांजवळ नि-
घून मेला नाहींस, तर हें नगर खास्द्यांच्या हातीं
देण्यांत येईल, मग ते हें अग्नीने जाळितील, आ-
णि तूं त्यांच्या हातांतून सुटणार नाहींस. १९
तेव्हां जिद्कीया राजा इर्मयाजवळ ह्मणाला, जे
यहूदी खास्द्यांकडे फितले आहेत ते मला त्यांच्या
हातीं देतील, मग ते माझ्या चेष्टा करितील, ह्म-
णून मला भय आहे. २० मग इर्मया बोलला,
ते देणार नाहींत; जो **परमेश्वराचा** शब्द मी
तुजवळ बोलतों, तो ऐक; ह्मणजे तुला बरें हो-
ईल, आणि तुझा जीव वांचेल. २१ परंतु जर
बाहेर जायाला अमान्य होसील, तर जें वचन
मला **परमेश्वराने** दाखविलें आहे, तें हेंच आ-
हे; २२ आणि पाहा, ज्या स्त्रिया यहूदाच्या
राजाच्या घरांत उरल्या आहेत, त्या सर्वांस बा-
बेलेच्या राजाच्या सरदारांकडे बाहेर नेतील, ते-
व्हां त्या बोलतील, तुझ्या मित्रानीं तुला उत्तेजित
केलें आहे, आणि ते तुजवर प्रबल झाले आहेत,
तुझे पाय चिखलांत रुतले आहेत, ते मागें फिरले
आहेत. २३ आणि तुझ्या सर्व स्त्रिया व तुझीं
लेंकरें ते खास्द्यांजवळ बाहेर नेतील; आणि तूं
त्यांच्या हातांतून सुटणार नाहींस, परंतु बाबेलेच्या
राजाच्या हातांत सांपडसील; आणि हें नगर जा-
ळून टाकीत, असें करिसील.
२४ मग जिद्कीयाने इर्मयाला ह्मटलें, या
गोष्टी कोणास कळूं नयेत, ह्मणजे तूं मरणार ना-
हींस. २५ आणि मी तुजसीं बोललों आहें, असें
जर सरदार ऐकतील, व तुजजवळ येऊन जें तूं
राजाजवळ बोलला आहेस, तें आणि राजा काय
तुला बोलला असेल तें आह्माला सांग, आह्मा-
जवळ गुप्त राखूं नको, ह्मणजे आह्मी तुला मार-
णार नाहीं, असें जर तुला ह्मणतील, २६ तर
त्यांस सांग, यहोनाथानाच्या घरांत मला तेथें म-
रायाला परत पाठवूं नये, ह्मणून मी आपली
विनंती राजापुढें निवेदीत होतों. २७ नंतर सर्व

सरदारानी इर्मयाजवळ येऊन त्याला पुसलें; तेव्हां
जीं सर्व वचनें राजाने आज्ञापिलीं होतीं त्याप्रमाणें
त्याने सांगितलें, मग ते त्यापासून उगे राहिले;
कां कीं गोष्ट समजली नव्हती· २८ तर ज्या दि-
वसीं यरूशालेम घेतली, त्या दिवसापर्यंत इर्मया
बंदिशाळेच्या अंगणांत राहिला; आणि जेव्हां
यरूशालेम घेतली, तेव्हां तेथें होता·

## अध्याय ३९.

यहूदाचा राजा जिद्कीया याच्या नवव्या वर्षांत,
दहाव्या महिन्यांत नबूखद्रेज्जार बाबेलेचा
राजा आणि त्याचें सर्व सैन्य यानी यरूशाले-
मेस येऊन तिला वेढा घातला· २ मग जिद्की-
याच्या अकराव्या वर्षांत, चौथ्या महिन्यांत, महि-
न्याच्या नवव्या दिवसीं नगर मोडून टाकिलें.
३ तेव्हां बाबेलेच्या राजाचे सर्व सरदार जे ने-
र्गाल शारेबेर, साम्गारनबू, सार्सखीम, राब्-
सारीस, नेर्गाल शारेजेर, राबमाग, व बाबेलेच्या
राजाचे सर्व वरकड सरदार ते येऊन मधल्या
दारांत बसले·

४ आणि असें झालें, कीं यहूदाचा राजा जि-
द्कीया आणि सर्व लढाईचीं माणसें यानी त्यांस
पाहिलें, तेव्हां हे पळाले, आणि रात्रीं राजाच्या
बागाच्या वाटेने दोहों कोटांच्या मधल्या दाराकडून
नगरांतून निघून गेले; आणि तो पटांगणाच्या वाटेने
निघून गेला. ५ तेव्हां खास्द्यांचे सैनिक त्यांच्या
पाठीस लागले, आणि यरेहोच्या पटांगणांवर त्यानी
जिद्कीयाला आटपलें; मग त्याला घेऊन हमाध
देशांतल्या रिब्लास बाबेलेच्या नबूखद्रेज्जार रा-
जाजवळ वर आणिलें, तेव्हां त्याने त्याला शासनें
सांगितलीं· ६ आणि रिब्लांत बाबेलेच्या राजाने
जिद्कीयाचे पुत्र त्याच्या देखतां वधिले; आणि
यहूदाचे सर्व श्रेष्ठ जनहि बाबेलेच्या राजाने व-
धिले· ७ आणि त्याने जिद्कीयाचे डोळे अंधळे
केले, आगि त्याला बाबेलेस नेण्यासाठीं त्याला
दोहों पितळाच्या बेड्यानी बांधिलें·

८ आणि खास्द्यानी राजाचें घर व लोकांचीं
घरें अग्नीकडून जाळिलीं, आणि यरूशालेमेचे
कोट पाडिले· ९ तेव्हां जे लोक नगरांत उरले
त्यांचें शेष व जे फितणारे त्याजकडे फितले होते
ते व उरलेल्या लोकांचें शेष यांस नबूजरदान रा-
जरक्षकांचा नायक याने पाडावकरून बाबेलेस
नेलें· १० परंतु ज्या नीच लोकांस कांहीं नव्हतें,
त्यांतून कित्येकांस राजरक्षकांच्या नबूजरदान नाय-
काने यहूदा देशांत राहूं दिल्हें, आणि त्यावेळेस
त्यांस द्राक्षमळे व शेतें दिल्हीं.

११ आणि राजरक्षकांचा नायक नबूजरदान
याला बाबेलेच्या नबूखद्रेज्जार राजाने इर्मयावि-
षयीं आज्ञा दिल्ही कीं, १२ तूं त्याला घेऊन
त्याजवर आपलें लक्ष्य ठेव, आणि त्याचें कांहीं
वाईट करूं नको; परंतु जसें तो तुला सांगेल
तसें त्याला कर· १३ तेव्हां नबूजरदान राजर-
क्षकांचा नायक याने पाठविलें, आणि नबूशाज्-
बाज, राब्सारीस, व नेर्गाल शारेजेर, राबूमाग
यानी व बाबेलेच्या राजाच्या सर्व नायकानी पाठ-
वून, १४ इर्मया बंदिशाळेच्या अंगणांतून बाहेर
काढिला, आणि घरीं न्यावा, म्हणून शाफानाचा
पुत्र अहीकाम याचा पुत्र गदाल्या याजजवळ
सोंपून दिल्हा; मग तो लोकांमध्यें राहिला·

१५ तर जेव्हां इर्मया बंदिशाळेच्या अंगणांत
कोंडलेला होता, तेव्हां परमेश्वराचें वचन त्या-
जवळ आलें कीं, १६ तूं जाऊन एबेद्मेलेख
जो कूशी त्याला सांग, कीं सैन्यांचा परमेश्वर
इस्राएलाचा देव म्हणतो, कीं पाहा, मी आपलीं
वचनें या नगरावर कुशलासाठीं नव्हे, परंतु अरि-
ष्टासाठीं आणीन; आणि त्यावेळेस तीं तुजसमक्ष
घडतील· १७ आणि परमेश्वर म्हणतो, मी
तुला त्या दिवसीं सोडवीन; म्हणजे ज्या मनुष्यां-
मुळें तूं भयभीत आहेस, त्यांच्या हातीं तूं सांपड-
णार नाहींस· १८ कारण कीं मी तुला खचीत
सोडवीन, म्हणून तरवारीकडून पडणार नाहींस,
परंतु तुझा जीव तुला लूट असा होईल; कां कीं
त्वां मजवर भाव ठेविला आहे, असें परमेश्वर
म्हणतो·

## अध्याय ४०.

यहूदा व यरूशालेम यांतील जे सर्व पाडाव
बाबेलेस नेले, त्यांजमध्यें जेव्हां इर्मया बेड्यानी
बांधलेला होता, तेव्हां नबूजरदान राजरक्षकांचा
नायक याने त्याला घेऊन रामाहून सोडून पाठ-

विलें, त्यानंतर जें वचन इर्मयाजवळ आलें तें. २
तर राजरक्षकांच्या नायकानें इर्मयाला घेऊन त्याला
ह्मटलें, परमेश्वर तुझा देव हें सर्व अरिष्ट या
स्थानावर बोलला. ३ आणि जसें परमेश्वर
बोलला, तसें त्यानें हें मत्ययास आणून साधिलें
आहे; कां तुह्मी परमेश्वराविरुद्ध पाप केलें,
आणि त्याचा शब्द ऐकिला नाहीं, ह्मणून तुह्मा-
ला असी गोष्ट झाली आहे. ४ तर आतां पाहा,
ज्या बेड्या तुझ्या हातांस होत्या, त्यांपासून म्यां
तुला या दिवसीं सोडविलें आहे; मजसंगतीं बाबे-
लेस येणें जर तुझ्या दृष्टीस उत्तम असेल, तर ये,
ह्मणजे मी आपलें लक्ष्य तुजवर ठेवीन; परंतु
मजसंगतीं बाबेलेस येणें, जर तुझ्या दृष्टीस वाईट
असेल तर येऊं नको; पाहा, सर्व देश तुजपुढें
आहे; जेथें जायाला तुझ्या दृष्टीस उत्तम व ठीक
असेल तेथें जा. ५ मग तो परत गेला नसतां
नबूजरदान ह्मणाला, शाफानाचा पुत्र अहीकाम
याचा पुत्र गदाल्या जो बाबेलेच्या राजानें यहूदां-
तल्या नगरांवर अधिकारी केला आहे, त्याजकडे
परत जा, आणि त्यासीं लोकांमध्यें वस्ती कर; अ-
थवा जेथें कोठें जायाला तुझ्या दृष्टीस ठीक अ-
सेल तेथें जा; मग राजरक्षकांच्या नायकानें त्याला
अन्न व दान देऊन जाऊं दिल्हें. ६ तेव्हां इर्मया
अहीकामाचा पुत्र गदाल्या याजकडे मिज्पास
गेला; आणि जे लोक देशांत उरले होते त्यांमध्यें
त्याजजवळ राहिला.

७ तर बाबेलेच्या राजानें अहीकामाचा पुत्र
गदाल्या देशावर अधिकारी नेमिला आहे, आणि
त्याजजवळ पुरुष व स्त्रिया व पोरें व देशांतल्या
नीच लोकांतले जे बाबेलेस पाडाव असे नेले न-
व्हते, त्यांतून कित्येक ठेविले आहेत, असें जेव्हां
सैन्यांचे जे सर्व नायक रानांत होते, त्यांनी व त्यां-
च्या मनुष्यांनी ऐकिलें, ८ तेव्हां ते जे नथान्या-
चा पुत्र इश्माएल, व कारेहाचे पुत्र योहानान, व
योनाथान व तन्हुमेथाचा पुत्र सराया, व एफै जो
नतोफाथी त्याचे पुत्र, व यजन्या जो कोणीएका
माखाथ्याचा पुत्र ते, व त्यांचे मनुष्य मिज्पास
गदाल्याजवळ आले. ९ तेव्हां शाफानाचा पुत्र
अहीकाम याचा पुत्र गदाल्या त्यांस, व त्यांच्या
मनुष्यांस शपथ करून ह्मणाला, खास्द्यांला से-
वायाला भिऊं नका; देशांत वस्ती करा, आणि
बाबेलेच्या राजाची सेवा करा, ह्मणजे तुह्माला
बरें होईल. १० आणि पाहा, जे खास्दी आ-
ह्माजवळ येतील, त्यांचा उपचार करायाला मी
मिज्पास वस्ती करीन; परंतु तुह्मी द्राक्षारस व
फळें व तेल गोळा करा, आणि आपल्या पात्रांत
सांठवा, आणि जीं तुमचीं नगरें तुह्मी घेतलीं आ-
हेत, त्यांत वसा. ११ आणि बाबेलेच्या राजानें
यहूदांतलें शेष ठेविलें आहे, आणि त्यांजवर शा-
फानाचा पुत्र अहीकाम याचा पुत्र गदाल्या अधि-
कारी नेमिला आहे, असें जे सर्व यहूदी मोवाबांत
व अम्मोनी लोकांत व अदोमांत व सर्व देशांत
जे होते त्यांनी जेव्हां ऐकिलें, १२ तेव्हां ज्या
सर्व स्थानांत ते पिटून घालविले होते, त्यांतले सर्व
यहूदी फिरून यहूदा देशांत मिज्पास गदाल्या-
जवळ आले, आणि पुष्कळ द्राक्षारस व फळें गोळा
करिते झाले.

१३ मग कारेहाचा पुत्र योहानान व जे सर्व
सैन्यांचे नायक रानांत होते, ते मिज्पास गदाल्या-
जवळ येऊन, १४ त्याला ह्मणाले, अम्मोनी
लोकांचा राजा बालीस यानें नथान्याचा पुत्र इ-
श्माएल तुला जिवें मारायाला पाठविला आहे,
असें तूं खचीत जाणतोस कीं नाहीं? परंतु अही-
कामाचा पुत्र गदाल्या याविषयीं त्यांजवर विश्वा-
सला नाहीं. १५ नंतर कारेहाचा पुत्र योहा-
नान मिज्पास गदाल्याजवळ गुप्तपणें बोलला, कीं
म्यां जाऊन नथान्याच्या इश्माएल पुत्राला हा-
णावें, आणि हें कोणाला कळणार नाहीं; त्यानें
कां तुला हाणावें, मग जे यहूदी तुजजवळ एकवट-
लेले आहेत, ते सर्व विखरतील, आणि यहूदाचें
शेष नष्ट होईल? १६ तेव्हां अहीकामाच्या
गदाल्या पुत्रानें कारेहाच्या योहानान पुत्राला ह्म-
टलें, असें कर्म करूं नको; कां कीं तूं इश्माएला-
विषयीं खोटें बोलतोस.

## अध्याय ४१.

मग सातव्या महिन्यांत असें झालें, कीं अलीशामा
जो राजकीय वंशांतला, व राजाच्या सर्दारांत-
ला याचा पुत्र नथान्या याचा पुत्र इश्माएल आ-
पणासंगतीं दाहा मनुष्य घेऊन मिज्पास अहीका-

माच्या गदाल्या पुत्राजवळ आला, आणि तेथें मि-
ज्पांत ते एकत्र जेविले. २ तेव्हा नथान्याचा
पुत्र इश्माएल, व त्यासंगतीं जे दाहा मनुष्य होते,
त्यानी उठून शाफानाचा पुत्र अहीकाम याचा पुत्र
गदाल्या जो बाबेलेच्या राजाने देशांत अधिकारी
नेमिला होता, तो तरवारीने हाणून जिवें मारिला.
३ आणि जे सर्व यहूदी त्यापासीं, ह्मणजे गदा-
ल्यापाशीं मिज्पांत होते त्यांस, व जे खास्दी तेथें
सांपडले त्यांस, आणि जे लढाईचीं माणसें तेथें
होतीं त्यांस इश्माएलाने हाणिलें. ४ आणि त्याने
गदाल्याला जिवें मारिल्यानंतर दुसऱ्या दिवसीं,
जेव्हा हें कोणास कळलें नव्हतें, तेव्हा असें झालें
कीं, ५ शखेमेहून, शीलोहून व शोम्रोनेहून
ऐशीं जण मनुष्य आपल्या दाढ्या कापिलेल्या अ-
सतां, वस्त्रें फाडिलेलीं असतां, आणि आपलीं अंगें
आपण जखमी केलेलीं असतां, परमेश्वराच्या
घरांत आणायासाठीं अर्पण व धूप आपल्या हातांत
घेऊन आले. ६ तेव्हा नथान्याचा पुत्र इश्माएल
त्यांस भेटायाकरितां मिज्पांतून चालत रडत निघा-
ला, आणि तो त्यांस भेटला असतां असें झालें,
कीं त्याने त्यांस ह्मटलें, अहीकामाचा पुत्र जो ग-
दाल्या त्याजजवळ या. ७ मग ते नगरामध्यें
आले असतां असें झालें, कीं नथान्याचा पुत्र जो
इश्माएल त्याने व त्यासंगतीं जे मनुष्य होते त्यानी
त्यांस वधून खाचेमध्यें टाकिलें. ८ परंतु त्यांमध्यें
असे दाहा मनुष्य सांपडले, जे इश्माएलाला ह्म-
णाले, आह्माला गहूं, यव, तेल, व मध अशांच्या
ठेवी शेतांत आहेत, याकरितां आह्माला जिवें
मारूं नको; तेव्हां त्याने त्यांस सोडिलें, आणि
त्यांच्या भाव्वांमध्यें जिवें मारिलें नाहीं. ९ तर
जे मनुष्य गदाल्यासहित इश्माएलाने हाणिले,
त्यांचीं सर्व मडीं ज्या खांचेंत त्याने टाकिलीं, ती
तीच होती, जी आसा राजाने बाशा जो इस्राए-
लाचा राजा याच्या भयामुळें केली होती, ती न-
थान्याचा पुत्र इश्माएल याने वधलेल्यानी भरिली.
१० तेव्हां लोकांतलें जें सर्व शेष मिज्पांत होतें,
राजाच्या कन्या, व जे सर्व लोक मिज्पांत उरले
होते, जे नबूजरदान राजरक्षकांचा नायक याने
अहीकामाच्या गदाल्या पुत्राजवळ ठेविले होते, ते
इश्माएलाने पाडाव करून नेले, त्यांस नथान्याचा
पुत्र इश्माएल पाडाव करून अम्मोनी लोकांकडे
पार जायासाठीं गेला.

११ मग नथान्याच्या इश्माएल पुत्राने जी
सर्व दुष्टाई केली होती, ती जेव्हां कारेहाच्या
योहानान पुत्राने व त्याजजवळ जे सर्व सैन्यनायक
होते त्यानी ऐकिली, १२ तेव्हां ते आपले सर्व
मनुष्य घेऊन नथान्याचा पुत्र इश्माएल यासीं ल-
ढायाला गेले, आणि गिबोनेस जीं पुष्कळ पाण्यें
आहेत, त्यांजजवळ तो त्यांस सांपडला. १३ आणि
असें झालें, कीं जे सर्व लोक इश्माएलाकडे होते,
त्यानी जेव्हां योहानान जो कारेहाचा पुत्र त्याला,
व त्यासहित जे सर्व सैन्यनायक होते, त्यांसहि
पाहिलें, तेव्हां ते हर्षले. १४ मग मिज्पाहून जे
सर्व लोक इश्माएलाने पाडाव करून नेले होते, ते
माघारें फिरले, व फिरून कारेहाचा पुत्र योहानान
याजकडे गेले. १५ तेव्हां इश्माएल नथान्याचा
पुत्र आठ मनुष्यांसहित योहानानापासून पळून
अम्मोनी लोकांकडे गेला. १६ मग इश्माएलाने
अहीकामाचा पुत्र गदाल्या हाणिल्यानंतर लोकां-
तलें जें सर्व शेष योहानानाने नथान्याचा पुत्र
इश्माएल यापासून मिज्पांतून परत घेतलें, आणि
गिबोनेहून जे वीर, लढाईचीं माणसें, व स्त्रिया, व
पोरें, व शंड त्याने परत घेतले, त्यांस कारेहाचा
पुत्र जो योहानान तो व त्यासहित जे सर्व सैन्य-
नायक होते ते घेऊन, १७ गेले, आणि खिह्मा-
माची जी वस्ती बेथलेहेमेजवळ आहे, तींत खा-
स्द्यांमुळें मिसरांत जावें ह्मणून राहिले, १८
कां तर ते त्यांमुळें भयभीत होते; कारण कीं अही-
कामाचा पुत्र गदाल्या जो बाबेलेच्या राजाने देशांत
अधिकारी नेमिला होता, तो नथान्याच्या इश्माएल
पुत्राने हाणिला होता.

## अध्याय ४२.

तर सैन्यांचे सर्व नायक, व कारेहाचा पुत्र यो-
हानान, व होशायाचा पुत्र यजन्या, व सर्व
लोक, लहान मोठे, जवळ येऊन, २ इर्मया भवि-
ष्यवाद्याला ह्मणाले, आमची विनंती तुजसमोर
यावी, आणि आह्मासाठीं, या सर्व शेषासाठीं पर-
मेश्वर जो तुझा देव त्याजवळ प्रार्थना कर, कां-
कीं जसे तुझे डोळे आह्माला पाहतात, तसे आ-

ह्मी बहुतांतून थोडे उरलों आहों. ३ ह्मणजे
कोणत्या वाटेंत आह्मी जावें, आणि कोणतें काम
आह्मी करावें, हें परमेश्वर तुझा देव आह्माला
दाखवील. ४ तेव्हां इर्मया भविष्यवादी त्यांस
ह्मणाला, म्यां तुमचें ऐकिलें आहे; पाहा, परमे-
श्वर जो तुमचा देव त्याजजवळ मी तुमच्या
वचनांप्रमाणें प्रार्थना करीन; मग असें होईल, कीं
जें कांहीं उत्तर परमेश्वर तुह्मासाठीं देईल, तें
तुह्माला सांगेन; मी तुह्माजवळ कांहीं गुप्त राख-
णार नाहीं. ५ तेव्हां ते इर्मयाला ह्मणाले, पर-
मेश्वर आह्मामध्यें खरा व विश्वासु साक्षी होवो,
कीं जें कांहीं परमेश्वर तुझा देव तुजकडून आ-
ह्माकडे पाठवील, त्याप्रमाणें आह्मी निश्चयें करूं.
६ तें उत्तम अथवा वाईट असलें, तरी परमेश्वर
आमचा देव ज्याजजवळ आह्मी तुला पाठवितों,
त्याचा शब्द आह्मी ऐकूं; अशासाठीं कीं परमे-
श्वर आमचा देव याचा शब्द जेव्हां आह्मी
ऐकतों, तेव्हां आह्माला बरें व्हावें.

७ मग दाहा दिवसांनंतर असें झालें, कीं पर-
मेश्वराचें वचन इर्मयाजवळ आलें. ८ तेव्हां
त्यानें योहानान जो कारेहाचा पुत्र तो, व त्याज-
जवळ जे सर्व सैन्यनायक होते ते, व सर्व लोक,
लहान मोठे, बोलाविले. ९ आणि त्यांस ह्मटलें,
ज्याजजवळ तुह्मी मला त्यासमोर तुमची विनंती
निवेदायाला पाठविलें, तो परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो कीं, १० जर खचीत या देशांत
राहाल, तर मी तुह्माला बांधीन, व पाडणार नाहीं,
आणि तुह्माला लावीन, व उपटणार नाहीं; कारण
कीं जें अरिष्ट म्यां तुह्माला केलें, त्याविषयीं मी
अनुतापलों आहें. ११ ज्यामुळें तुह्मी भयभीत
आहां, त्या बाबेलेच्या राजामुळें भयभीत असूं
नका; परमेश्वर ह्मणतो, त्यामुळें भयभीत असूं
नका; कां तर तुह्मास तारायाला व त्याच्या हा-
तांतून सोडवायाला मी तुह्माजवळ आहें. १२
आणि तुह्मावर दया करीन ह्मणजे तो तुह्मावर
दया करील, आणि तुह्माला तुमच्या भूमीवर
पुन्हा स्थापील.

१३ परंतु परमेश्वर जो तुमचा देव त्याचा
शब्द न ऐकून आह्मी या देशांत राहणार नाहीं,
असें जर तुह्मी ह्मणाल, १४ आणि, नाहीं,
परंतु जेथें आह्मी लढाई पाहणार नाहीं, व कर्ण्यां-
चा शब्द ऐकणार नाहीं, व भाकरीचे भुकेले राह-
णार नाहीं, तेथें मिसर देशांत जाऊन राहूं, असें
हि जर ह्मणाल, १५ तर यहूदाच्या उरले-
ल्यानो, आतां परमेश्वराचें वचन ऐका, सैन्यांचा
परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं जर
खचीत तुह्मी आपलीं मुखें मिसर देशांत जाया-
ला लावाल, व तेथें प्रवास करायाला जाल, १६
तर असें होईल, कीं ज्या तरवारीला तुह्मी भितां,
ती तेथें मिसर देशांत तुह्माला आटपील, व ज्या
दुकाळाविषयीं तुह्मी चिंताक्रांत आहां, तो तेथें
मिसरांत तुमच्या पाठीस लागेल, व तेथें मराल.
१७ जे सर्व मनुष्य मिसरांत जायाला तेथें प्रवा-
सांत राहायाला आपलीं मुखें लावितात ते असे
होतील; ते तरवारीनें, दुकाळानें, व मरीनें मर-
तील; आणि जें अरिष्ट मी त्यांजवर आणीन,
त्यापासून त्यांतला कोणी वांचणार नाहीं, सुटणार
नाहीं. १८ कां तर सैन्यांचा परमेश्वर इस्रा-
एलाचा देव ह्मणतो, कीं जसा माझा क्रोध व मा-
झा कोप यरूशालेमेच्या राहणाऱ्यांवर ओतला
आहे, तसा जेव्हां मिसरांत जाल, तेव्हां माझा
कोप तुह्मावर ओतेल; आणि तुह्मी शपथेसाठीं, व
विस्मयासाठीं, व शापासाठीं, व निंदेसाठीं व्हाल;
आणि तुह्मी या स्थानाला पुन्हा पाहणार नाहीं.

१९ यहूदाच्या उरलेल्यानों, तुह्माला परमे-
श्वर बोलला आहे, मिसरांत जाऊं नका; आज
म्यां तुह्माला संबोध दिल्हा आहे, असें खचीत
जाणा. २० तर परमेश्वर जो आमचा देव
त्याजवळ आह्मासाठीं प्रार्थना कर, आणि जें कांहीं
परमेश्वर आमचा देव सांगेल, तें आह्माला
सांग, ह्मणजे आह्मी तें करूं, असें बोलून जेव्हां
तुह्मी मला परमेश्वर तुमचा देव याकडे
पाठविलें, तेव्हां तुह्मी आपणांस फसविलें. २१
कां आज म्यां तें तुह्माला सांगितलें; परंतु
परमेश्वर जो तुमचा देव याचा शब्द, अथवा
जें कांहीं त्यानें मजकडून तुह्माकडे पाठविलें, तें
तुह्मी ऐकिलें नाहीं. २२ तर आतां खचीत जाणा,
कीं जेथें तुह्मी जाऊन प्रवास करायाला इच्छितां,
त्या स्थानांत तरवारीनें, दुकाळानें, व मरीनें
मराल.

## अध्याय ४३.

तर परमेश्वर जो त्यांचा देव त्याचीं जीं सर्व
वचनें, परमेश्वर त्यांचा देव याने त्याजक-
डून त्यांजवळ पाठविलीं, तीं तींच सर्व वचनें
जेव्हां इर्मयाने त्या सर्व लोकांजवळ बोलून समाप्त
केलीं, तेव्हां असें झालें कीं, २ होशायाचा पुत्र
अजार्या, व कारेहाचा पुत्र योहानान, हे व सर्व
गर्विष्ठ मनुष्य इर्मयाला बोलत ह्मणाले, तूं लबाड
बोलतोस; मिसरांत तेथें प्रवास करायाला जाऊं
नका, असें सांगायाला परमेश्वर आमचा देव
याने तुला पाठविलें नाहीं. ३ परंतु आह्माला
जिवें मारावें, अथवा पाडाव करून बाबेलेस
न्यावें, ह्मणून आह्माला खास्द्यांच्या हातीं द्याया-
साठीं नेरीयाचा पुत्र बारूख तुला आह्माविरुद्ध
उत्तेजित करितो. ४ तर कारेहाचा पुत्र योहा-
नान, व सर्व सैन्यनायक व ते सर्व लोक यहूदा
देशांत राहावे, अशा परमेश्वराच्या शब्दास
मान्य झाले नाहींत. ५ परंतु उरलेले जे सर्व
यहूदी ते जेथें जेथें पिटून घालविले होते, त्या त्या
सर्व राष्ट्रांतून यहूदा देशांत राहायाला परत आले
त्यांस. ६ पुरुषांस, स्त्रियांस, व पोरांस, व रा-
जाच्या कन्यांस, व राजरक्षकांचा नायक नबूजरदान
याने जे सर्व जन शाफानाचा पुत्र अहीकाम या-
च्या गदाल्या पुत्राजवळ ठेविले होते, त्यांस व
इर्मया भविष्यवाद्याला, व नेरीयाच्या बारूख पु-
त्राला, कारेहाचा पुत्र योहानान, व सर्व सैन्यना-
यक घेऊन, ७ मिसर देशांत गेले; कां कीं ते
परमेश्वराच्या शब्दास मान्य झाले नाहींत;
आणि ते तहपान्हेसेला पोहंचले.

८ मग तहपान्हेसेंत परमेश्वराचें वचन
इर्मयाजवळ आलें कीं, ९ तूं आपल्या हातांत
मोठे धोंडे घेऊन फारोच्या घराच्या दाराजवळ
तहपान्हेसेंत, जी इटांची भट्टी आहे, तींतल्या मातींत
यहूदी मनुष्यांच्या देखतां लपवून ठेव. १० आ-
णि त्यांस सांग, सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं पाहा, मी पाठवून नबूखद्रेज्जार
बाबेलेचा राजा माझा सेवक आणवीन, आणि जे
धोंडे म्या लपविले आहेत, यांजवरतीं त्याचें सिं-
हासन स्थापीन; आणि तो आपला डेरा यांवरतीं
ताणील. ११ आणि तो येऊन मिसर देशाला
हाणील, आणि जो मरणासाठीं असेल तो मरणा-
ला देईल; आणि जो पाडावपणासाठीं तो पाडा-
वपणाला; आणि जो तरवारेसाठीं तो तरवारीला
देईल. १२ आणि मिसराच्या देवांच्या घरांत
अग्नि पेटवीन; आणि तो त्यांस जाळील, अथवा
हरून नेईल; आणि जसा मेंढपाळ आपलें वस्त्र
पांघरून घेतो, तसा तो मिसर देशाला पांघरून
घेईल; आणि कुशलाने तेथून निघून जाईल. १३
आणि जें बेथशेमेश मिसर देशांत आहे, त्यांत-
ल्या मूर्त्ति तो मोडून टाकील; आणि मिसराच्या
देवांचीं घरें अग्नीनें जाळील.

## अध्याय ४४.

जे सर्व यहूदी मिसर देशांत राहत होते, जे
मिग्दोलेस, व तहपान्हेसेस, व नोफेस, व
पाथ्रोस प्रांतांत राहत होते, त्यांविषयीं जें वचन
इर्मयाजवळ आलें तें असें कीं, २ सैन्यांचा
परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं जीं
सर्व दुष्टाई त्यानी मला कोपवायाला केली, जे
इतर देव त्यानी, तुह्मी, अथवा तुमचे वडिलानी
जाणिले नाहींत, त्यांस सेवायासाठीं धूप जाळा-
याला जाऊन केली; ३ तिजमुळें जें सर्व अरिष्ट
म्या यरूशालेमेवर, व यहूदाच्या सर्व नगरांवर
आणिलें आहे, तें तुह्मी पाहिलें आहे. आणि
पाहा, तीं या दिवसीं ओसाड आहेत, व त्यांत
कोणी वसत नाहीं. ४ परंतु मी द्वेषितों, असें जें
हें अघोरकर्म तें करूं नका, असें सांगून म्या पहा-
टेस उठून पाठवून आपले सर्व सेवक भविष्यवादी
तुह्माकडे पाठविले. ५ तथापि ते आपल्या दुष्टा-
ईपासून फिरायाला, इतरदेवांसाठीं धूप न जाळा-
याला ऐकेनात, आणि आपला कान लावीनात.
६ मग माझा कोप व माझा क्रोध सुटले, आणि
यहूदाच्या नगरांत व यरूशालेमेच्या आळ्यांत
जळले; आणि जसीं या दिवसीं आहेत, तसीं तीं
ओसाड व उजाड झालीं. ७ तर आतां परमे-
श्वर, सैन्यांचा देव, इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं
तुह्मी आपणासाठीं कांहीं शेष न राहूं देऊन आप-
णांपासून पुरुष व स्त्री, पोर व तान्हें बाळक यांस
यहूदांतून नाहींसें करवावें, तुह्मी आपणांसहि ना-

हीसें करावें, आणि पृथ्वींतल्या सर्व राष्ट्रांमध्यें शा-
पासाठीं व निंदेसाठीं व्हावें ह्मणून; ८ जेथें तुह्मी
प्रवास करायाला गेलां आहां, तेथें मिसर देशांत
इतरदेवांपुढें धूप जाळून तुमच्या हातांच्या कर्मांक-
डून मला कोपित करून आपणांस फार अरिष्ट कां
करितां? ९ काय, तुह्मी आपल्या वडिलांचीं
दुष्कर्में व यहूदाच्या राजांचीं दुष्कर्में, व त्यांच्या
स्त्रियांचीं दुष्कर्में, व तुमचीं दुष्कर्में, व तुमच्या
स्त्रियांचीं दुष्कर्में जीं त्यांनी यहूदा देशांत व यरू-
शालेमेच्या आळ्यांत केलीं, तीं विसरलां आहां?
१० ते आजपर्यंत नम्र झाले नाहींत, व भ्याले ना-
हींत, आणि माझें जें नेमशास्त्र, व माझे जे नियम
म्या तुह्मांपुढें व तुमच्या वडिलांपुढें ठेविले, त्यांप्र-
माणें वर्त्तले नाहींत.

११ याजकरितां सैन्यांचा परमेश्वर इस्राए-
लाचा देव ह्मणतो, कीं पाहा, मी आपलें मुख
तुह्मांविरुद्ध अरिष्टासाठीं, व सर्व यहूदा नाहींसा
करण्यासाठीं ठेवीन, १२ आणि ज्या उरलेल्या
यहूद्यांनी मिसर देशांत तेथें प्रवास करायाला
जावें, ह्मणून आपलीं तोंडें केलीं आहेत, त्यांस
धरीन, तेव्हां ते सर्व नाहींसे होतील, मिसर दे-
शांत पडतील; ते तरवारीनें, व दुकाळानें नाहींसे
होतील; लहान मोठे तरवारीनें, व दुकाळानें मर-
तील; आणि शपथेसाठीं, विस्मयासाठीं, व शापा-
साठीं, व निंदेसाठीं, होतील. १३ आणि जसें
म्या यरूशालेमेला शासिलें, तसें जे मिसर देशांत
राहतात, त्यांला तरवारीनें, दुकाळानें, व मरीनें
शासीन. १४ ह्मणून जे उरलेले यहूदी मिसर
देशांत तेथें प्रवास करायाला गेले आहेत, त्यांतला
कोणी ते जेथें राहायासाठीं परत जायास इच्छि-
तात तेथें यहूदा देशांत परत जायाला मोकळा
होणार नाहीं, वांचणार नाहीं; कां बे मोकळे हो-
तील, त्यांजवांचून दुसरे कोणी परत जाणार ना-
हींत.

१५ तेव्हां आपल्या स्त्रिया इतरदेवांसाठीं धूप
जाळितात, असें जे सर्व पुरुष समजले, त्यांनी व
ज्या सर्व स्त्रिया उभ्या राहिल्या होत्या, त्यांनी
मोठा समुदाय होऊन, आणि मिसर देशांत पा-
थ्रोसेंत जे लोक राहत होते, त्या सर्वांनी इर्मयाला
उत्तर करून ह्मटलें, १६ जी गोष्ट तूं परमे-
श्वराच्या नामानें आह्मांबद्दल बोलला आहेस,
तिजविषयीं आह्मी तुझें ऐकणार नाहीं. १७ परंतु
जसें आह्मी करीत असों, व आमचे वडिल, आ-
मचे राजे, व आमचे सरदार यहूदाच्या नगरांत
व यरूशालेमेच्या आळ्यांत करीत असत, तसें
आकाशाच्या राणीसाठीं धूप जाळायाला, व तिज-
साठीं पेय अर्पणें ओतायाला, जें कांहीं आह्मी
ठरविलें आहे, तें निश्चयें करूं; कां तर पूर्वीं आ-
ह्मी भाकरीनें तृप्त असों, व बरे होतों, व कांहीं
अरिष्ट पाहिलें नाहीं. १८ परंतु आकाशाच्या
राणीसाठीं धूप जाळणें, व तिला पेय अर्पणें ओ-
तणें जेव्हां आह्मी सोडिलें, तेव्हांपासून आह्मांला
सर्व पदार्थांचा तोटा पडला आहे, आणि तरवारीनें,
व दुकाळानें नाहींसे झालों आहों. १९ तर जे-
व्हां आह्मी आकाशाच्या राणीसाठीं धूप जाळिला,
व तिजसाठीं पेय अर्पणें ओतिलीं, तेव्हां तिला
घडायाला व तिजसाठीं पेय अर्पणें ओतायाला
आह्मी आपल्या पुरुषांवांचून तिजकरितां पक्वान्नें
केलीं कीं काय?

२० तेव्हां ज्या सर्व लोकांनी त्याला उत्तर
दिल्हें त्या सर्व लोकांस, पुरुषांस, व स्त्रियांस इ-
र्मया ह्मणाला कीं, २१ तुह्मी यहूदाच्या नगरांत
व यरूशालेमेच्या आळ्यांत जो धूप जाळीत असां,
आणि तुमचे वडील, तुमचे राजे, व तुमचे सर-
दार, आणि देशांतले लोक जाळीत असत, तो
परमेश्वर स्मरला नाहीं? आणि त्याच्या मनांत
आला नाहीं कीं काय? २२ तर तुमच्या कर्मां-
च्या दुष्टपणामुळें, व जीं अघोरकर्में तुह्मी केलीं
त्यामुळेंहि परमेश्वराच्यानें पुढें सहन करवेना;
ह्मणून जसा या दिवसीं आहे तसा तुमचा देश
ओसाड व विस्मयासाठीं व शापासाठीं व निवासि-
हीन झाला आहे. २३ तुह्मी धूप जाळिला, व
परमेश्वराविरुद्ध पाप केलें आहे, व परमेश्वरा-
चा शब्द ऐकिला नाहीं, व त्याचें नेमशास्त्र,
त्याचे नियम, व त्याचीं विधानें याप्रमाणें वर्त्तलां
नाहीं; याकरितां जसें या दिवसीं तसें हें अरिष्ट
तुह्मांला झालें आहे. २४ आणि त्या सर्व लो-
कांस व त्या सर्व स्त्रियांस इर्मया ह्मणाला, बे
तुह्मी यहूदी मिसर देशांत आहां, ते सर्व परमे-
श्वराचें वचन ऐका. २५ सैन्यांचा परमेश्वर

इस्त्राएलाचा देव असें ह्मणतो, कीं आकाशाच्या
राणीसाठीं धूप जाळायाला, व तिजसाठीं पेय अ-
र्पणें ओतायाला जे नवस आह्मी केले, ते निश्चयें
फेडूं, असें तुह्मी आपल्या स्त्रियांसहित आपल्या
मुखानें बोलला आहां, आणि आपल्या हातानी
साधिलें आहे; तुह्मी आपले नवस निश्चयें फेडाल,
व खचीत आपले नवस साधाल· २६ याकरितां
जे यहूदी मिसर देशांत राहतां, ते सर्व तुह्मी
**परमेश्वराचें** वचन ऐका, **परमेश्वर** ह्मणतो,
पाहा, म्या आपल्या मोठ्या नामाची शपथ केली
आहे, कीं सर्व मिसर देशांत कोणत्याहि यहूदी
मनुष्याच्या मुखाकडून, **प्रभु परमेश्वर** जीवंत
आहे, असें ह्मणून माझें नाम पुन्हा घेण्यांत येणार
नाहीं· २७ पाहा, मी हितासाठीं नव्हें, परंतु
अरिष्टासाठीं त्यांस जपेन; आणि जे सर्व यहूदी
मिसर देशांत आहेत, ते नाहींसे होतपर्यंत तरवा-
रीनें व दुकाळानें नष्ट होतील· २८ तथापि थोडे
जन तरवारीपासून सुटून मिसर देशांतून यहूदा
देशांत परत जातील, आणि कोणत्याचें वचन ठरे-
ल, माझें कीं त्यांचें, हें जे सर्व उरलेले यहूदी
मिसर देशांत तेथें प्रवास करायाला गेले आहेत,
ते जाणतील·

२९ आणि **परमेश्वर** ह्मणतो, कीं मी या
स्थानांत तुह्माला शासीन, याविषयीं तुह्मासाठीं
चिन्ह होईल, अशास कीं अरिष्टासाठीं जीं तुह्मा-
विषयीं माझीं वचनें तींच निश्चयें ठरतील, असें
तुह्मी जाणावें, तें हेंच आहे· ३० **परमेश्वर**
ह्मणतो, कीं पाहा, जसें म्या यहूदाच्या सिद्कीया
राजाला त्याचा वैरी व त्याचा जीव शोधणारा जो
नबूखद्रेज्जार बाबेलेचा राजा याच्या हातीं दिल्हें,
तसा मी फारो होफ्रा मिसराचा राजा त्याच्या
वैऱ्यांच्या हातीं, व त्याच्या जीव शोधणाऱ्यांच्या
हातीं देईन·

## अध्याय ४५·

यहूदाचा राजा योशीया याचा पुत्र यहोयाकीम
याच्या चौथ्या वर्षांत, जेव्हां नेरीयाचा पुत्र
बारूख यानें हीं सर्व वचनें इर्मयाच्या मुखापासून
पुस्तकांत लिहिलीं होतीं, तेव्हां जी गोष्ट इर्मया
भविष्यवादी त्याला बोलला, ती ही कीं, २ हे
बारूखा, तुला **परमेश्वर** इस्त्राएलाचा देव ह्म-
णतो कीं, ३ तूं ह्मणालास, मला हाय हाय,
कां कीं **परमेश्वरानें** माझ्या खेदाला क्लेश लावि-
ला आहे; मी कण्हून थकलों आहें, आणि कांहीं
समाधान मला सांपडत नाहीं·

४ त्याला सांग, कीं **परमेश्वर** ह्मणतो, कीं
पाहा, जें म्या बांधिलें तें मी पाडीन, व जें म्या
लाविलें तें, व हा सर्व देशहि उपटीन· ५ तर
तूं आपणासाठीं मोठ्या गोष्टी शोधितोस काय?
शोधूं नको; कां तर **परमेश्वर** ह्मणतो, पाहा, मी
सर्व मनुष्यजातीवर अरिष्ट आणीन; परंतु ज्या सर्व
स्थानांत तूं जासील, तेथें तुला तुझा जीव लुटी-
साठीं देईन·

## अध्याय ४६·

राष्ट्रांविषयीं, मिसराविषयीं, फारोनखो मिसरा-
चा राजा याचें जें सैन्य फराथ नदीजवळ
खार्खमीशांत होतें, जें बाबेलेच्या नबुखद्रेज्जार
राजानें यहूदाचा राजा योशीया याच्या यहोया-
कीम पुत्राच्या चौथ्या वर्षांत हाणिलें, त्याविषयीं,
२ जें **परमेश्वराचें** वचन इर्मया भविष्यवाद्याज-
वळ आलें तें· ३ ढाल व कवच तयार करा,
आणि लढाईसाठीं जवळ चला· ४ अहो स्वा-
रांनों, घोडे जुंपून चढा, आणि शिरस्त्राणें घालून
उभे राहा, भाल्यांस घोंटा, उरस्त्राणें अंगीं ल्या.
५ म्या त्यांस घाबरे व पाठ दिल्हेले असे कां पा-
हिलें आहे? त्यांचे वीरहि पिटिले आहेत, व
पळून गेले आहेत, व मागें वळून पाहत नाहींत;
चहुंकडे भय होतें, असें **परमेश्वर** ह्मणतो. ६
चपळानें पळूं नये, व वीरानें सुटूं नये; ते उत्तरे-
कडे फराथ नदीजवळ गळून पडतील· ७ जो
नदीप्रमाणें वर येतो, ज्याचीं पाण्यें प्रवाहांप्रमाणें
उततात, हा कोण आहे? ८ मिसर नदीसा-
रिखा वर येतो, आणि त्याचीं पाण्यें प्रवाहासारि-
खीं उततात; आणि तो ह्मणतो, मी वर जाईन,
भूमीस झांकीन; नगर व त्यांतले राहणारे शासीन.
९ घोड्यानों, वर या; व रथानों, चरफडा; आ-
णि वीर निघून येवोत; जे कूशी व फूटी ढाल
धरणारे आहेत ते; आणि जे लूदी धनुर्धर व धनुष्य
वांकविणारे आहेत ते. १० आणि सैन्यांचा जो
**परमेश्वर प्रभु** त्याला त्यानें आपल्या शत्रूंचा
सूड घ्यावा ह्मणून तो दिवस सुडाचा दिवस हो-

ईल; तेव्हां तरवार खाऊन तृप्त होईल, व रक्ताने
भरेल; कां तर सैन्यांचा **परमेश्वर प्रभु** याला
उत्तरेच्या भूमीवर फराथ नदीजवळ यज्ञ कराया-
चा आहे. ११ अगे मिसराच्या कुमारी कन्ये,
गिलादावर चढून सुरस घे; तूं व्यर्थ बहुत औ-
षधें घेसील; तुला आरोग्य होणार नाहीं. १२
तुझी अप्रतिष्ठा राष्ट्रांनी ऐकिली आहे, व तुझी
आरोळी भूमीवर व्यापली आहे; कां वीर एक-
मेकांवर रेलले आहेत, ते उभयतां एकत्र पडले
आहेत.

१३ मिसर देश हाणायाला बाबेलेच्या नबु-
खद्रेज्जार राजाच्या येण्याविषयीं जें वचन **परमे-
श्वर** इर्मया भविष्यवाद्याला बोलला तें. १४
मिसरांत कळवा, आणि मिग्दोलांत गाजवून सांगा,
नोफेंत व तह्पान्हेसेंत गाजवून सांगा; ह्मणा,
तूं स्थिर उभा राहा, आणि आपणास सिद्ध कर;
कारण कीं तुजभोंवतीं तरवार खाईल. १५ तुझे
शूर कां उडविले आहेत? ते स्थिर उभे राहिले
नाहींत, कां कीं **परमेश्वराने** त्यांस पिटिलें. १६
त्याने बहुत पडत असें केलें, एकावर एकहि पड-
ला; तेव्हां ते ह्मणाले, आपण उठून आपल्या
लोकांत, आपल्या जन्मदेशांत पिडणाऱ्या तरवारी-
पासून परत जाऊं. १७ तेथें ते मोठ्याने बोलत ह्म-
णाले, फारो मिसराचा राजा केवळ गोंगाट आहे;
त्याने आपला समय क्रमून समाप्त केला आहे.
१८ ज्या राजाचें नाम सैन्यांचा **परमेश्वर** आहे,
तो ह्मणतो, मी आपल्या जीवाची शपथ करितों,
कीं जसा डोंगरांमध्यें ताबोर, व जसा समुद्राजवळ
कार्मेल आहे, तसा तो येईल. १९ अगे मिसरें-
तल्या राहणाऱ्या कन्ये, तूं आपणासाठीं पाडावांच्या
प्रवासाची सामग्री सिद्ध कर; कां तर नोफ ओ-
साड होईल, व उजाड होऊन निवासिहीन पडेल.
२० मिसर परमसुंदर कालवड आहे, उत्तरेंतून
नाश येईलच येईल. २१ तिचे वेतनी तिजमध्यें
माजीवलेल्या बैलांसारिखे आहेत; परंतु तेहि पाठ
देऊन एकदाच पळतील; ते स्थिर उभे राहणार
नाहींत, कारण कीं त्यांच्या विपत्तीचा दिवस, त्यांच्या
शासनाचा समय त्यांजवर आला आहे. २२
तिचा शब्द सर्पाप्रमाणें चालेल; कां तर ते सै-
न्यासहित क्रमतील, आणि लांकूड तोडणाऱ्यां-
प्रमाणें कुऱ्हाडी घेऊन तिजवर येतील. २३ **पर-
मेश्वर** ह्मणतो, तिच्या वनाचा जरी कांहीं अंत
नाहीं तरी तें ते तोडितील; कां कीं ते टोळांपेक्षां
बहुत व अगणित आहेत. २४ मिसरेची कन्या
लज्जित होईल; उत्तरेंतल्या लोकांच्या हातीं दे-
ण्यांत येईल. २५ सैन्यांचा **परमेश्वर** इस्राए-
लाचा देव ह्मणतो, पाहा, मी नोवेंतल्या बहुत
लोकांस, व फारोला, व मिसरेला, व तिच्या
देवांस, व तिच्या राजांस, फारोलाच, व त्याज-
वर भाव ठेवणाऱ्यांस शासीन. २६ आणि त्यांस
त्यांचा जीव शोधणाऱ्यांच्या हातीं, ह्मणजे बाबेले-
च्या नबुखद्रेज्जार राजाच्या हातीं, व त्याच्या
सेवकांच्या हातीं देईन; त्यानंतर ती जशी पूर्व दि-
वसांत तशी वसेल, असें **परमेश्वर** ह्मणतो.

२७ तर हे याकोबा माझ्या सेवका, तूं भिऊं
नको, आणि इस्राएला, घाबरूं नको; कां कीं मी
तुला दूर देशांतून, आणि तुझ्या संतानाला त्यांच्या
पाडावपणाच्या देशांतून तारीन; तेव्हां याकोब
परत येईल, आणि स्वस्थ व निष्काळजी राहील,
आणि त्याला कोणी भेडावणार नाहीं. २८ **पर-
मेश्वर** ह्मणतो, माझ्या सेवका याकोबा, तूं भिऊं
नको; कां तर मी तुजजवळ आहें; आणि ज्यां-
कडे म्या तुला पिटून घालविलें त्या सर्व राष्ट्रांचें
अवसान करीन; परंतु मी तुझें अवसान करणार
नाहीं, तर न्यायाने तुझी शिक्षा करीन; आणि
तुला केवळ दंडावांचून सोडणार नाहीं.

## अध्याय ४७.

फारोने गज्जाला हाणिल्यापूर्वीं पलिष्ट्यांविषयीं
जें **परमेश्वराचें** वचन इर्मया भविष्यवाद्याज-
वळ आलें तें. २ **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, पाण्यें
उत्तरेंतून वर येतील, आणि व्यापक प्रवाह होऊन
भूमीवर, व तिच्या भरणविर, नगरावर, व त्यांत-
ल्या राहणाऱ्यांवर, व्यापून वाहतील; तेव्हां मनुष्यें
आरोळी करितील, व भूमीवरले सर्व राहणारे
केंकतील. ३ त्याच्या पराक्रमी घोड्यांच्या खुरां-
च्या आपटण्याच्या शब्दामुळें, त्याच्या रथांच्या
गडबडीमुळें, त्याच्या चाकांच्या घडघडाटामुळें,
त्यांचे हात गळाले, ह्मणून बापांनी मागें वळून
आपल्या लेंकरांस पाहिलें नाहीं. ४ सर्व पलि-

ष्ट्यांस नाशायाला प्रत्येक उरलेला साह्यकर्त्ता
जोर व जीदोन यांपासून नाहींसें करायाला जो
दिवस येतो, त्यामुळें; कां तर **परमेश्वर** पलि-
ष्ट्यांस खामोर, देशांतल्या शेषाला नाशणार आहे.
५ गज्जाला टकल आलें आहे, अश्कलोन त्यांच्या
खोऱ्याच्या शेषासहित नाहींसी झाली आहे; के-
व्हांपर्यंत आपणाला कापसील! ६ अगे **परमे-
श्वराच्या** तरवारी, कोठपर्यंत बसणार नाहींस?
तूं आपल्या मेणांत शीर, शांत होऊन उगी राहा.
७ **परमेश्वराने** तिला अश्कलोन व समुद्रतीर
यांविषयीं आज्ञा दिल्ही, तेथें त्याने ती नेमिली
आहे, तर ती कसी बसेल?

### अध्याय ४८.

सैन्यांचा **परमेश्वर** इस्राएलाचा देव मोवा-
बेविषयीं ह्मणतो, कीं नबो उजाड झाली
आहे, ह्मणून तिला हाय हाय; किर्याथाइम ल-
ज्जित होऊन घेतलेली आहे; मिस्गाब लज्जित
व भयभीत झाली आहे. २ मोवाबेची स्तुति
पुढें होणार नाहीं; हेश्बोनेंत त्यांनी तिजविरुद्ध
अरिष्ट संकल्पिलें आहे; याहो, ती राष्ट्र असी न
राहावी, ह्मणून आपण तिला नाहींसी करूं; अगे
मद्मेने, तूं नष्ट होसील; तरवार तुझ्या पाठीस
लागेल. ३ होरोनाइमेंतून आरोळीचा शब्द ये-
ईल, तेथें ओसाडी व मोठा नाश होतील. ४
मोवाब मोडली आहे; तिच्या धाकल्यांनी आरो-
ळी गाजविली आहे. ५ कां तर लूहीथेच्या
चढणीवर सतत रडणें चढेल; कारण कीं होरो-
नाइमेच्या उतरणीवर वैऱ्यांनी नाशाची आरोळी
ऐकिली आहे. ६ पळा, आपणाला वांचवा,
व रानांतल्या झुडपांसारिख्या व्हा.

७ कां तर त्वां आपल्या कर्मांवर, व आपल्या
द्रव्यांवर भाव ठेविला आहे, ह्मणून तुलाहि घे-
तील; आणि खमोश आपले याजक व सरदार
यांसहित पाडावपणाच्या प्रवासांत निघून जाईल.
८ आणि प्रत्येक नगरावर ओसाडी करणारा येईल,
व कोणतेंहि नगर चुकणार नाहीं; आणि असें
**परमेश्वराने** ह्मटलें आहे, तसें खोरें नाहींसें
होईल, व पटांगण नाश पावेल. ९ मोवाबेने
उडून जावें, ह्मणून तिला पक्ष द्या; कां तर ति-
च्या नगरांत कोणी राहायाला नाहीं, ह्मणून तीं
ओसाड होतील. १० जो कपटाने **परमेश्व-
राचें** कर्म करितो, तो शापित असो; आणि जो
आपली तरवार रक्तापासून आकळितो, तोहि शा-
पित असो.

११ मोवाब आपल्या तरुणपणापासून स्वस्थ
राहिला आहे, तो आपल्या गाळावर बसलेला आ-
हे, व पात्रांतून पात्रांत ओतिलेला नाहीं, व पाडा-
वपणाच्या प्रवासांत गेला नाहीं; ह्मणून त्यांत
त्याची रुचि टिकती, आणि त्याचा वास पालटला
नाहीं. १२ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, पाहा,
ते दिवस येतात, ज्यांत मी त्याजकडे उलटणारे
पाठवीन, तेव्हां ते त्याला उलटतील, आणि त्याचीं
पात्रें रिकामीं करितील, व त्याचे बुधले फाडितील.
१३ आणि ज्या बेथेलावर इस्राएलाचे वंश भाव
ठेवीत असत, त्याविषयीं जसे ते लज्जित झाले,
तसा मोवाब खमोशाविषयीं लज्जित होईल.

१४ आह्मी वीर व लढाई करायाला शूर आ-
हों, असें तुह्मी कसे ह्मणतां? १५ ज्या राजाचें
नाम सैन्यांचा **परमेश्वर** आहे, तो ह्मणतो, मो-
वाब ओसाड झाला आहे, आणि त्याचीं नगरें
धूर होऊन गेलीं आहेत, आणि त्याचे निवडक
तरणे वधासाठीं उतरले आहेत. १६ मोवाबाची
विपत्ति येण्यास जवळ आहे, आणि त्याचें अरिष्ट
फार त्वरा करितें. १७ जे सर्व त्याजभोंवते आ-
हां, व सर्व जे त्याचें नाम जाणतां, ते तुह्मी त्याज-
करितां आक्रंदन करा; ह्मणा, शक्तीचा दंड,
शोभेची काठी कसी मोडली आहे. १८ अगे
दीबोनेच्या कन्येंतल्या वसणारीये, तूं गौरवापासून
उतर, सुक्या भूमींत राहा; कारण कीं मोवाबाचा
नाश करणारा तुजवर आला आहे, तो तुझीं दुर्गें
नाशून टाकील. १९ अगे अरवेरेंतल्या राहणारीये,
तूं मार्गावर उभी राहून वाट पाहा; काय झालें!
असें बोलून पळत्याला व पळणारीला पूस. २०
मोवाब मोडावला आहे, ह्मणून लज्जित झाला
आहे; केंकत ओरडा; मोवाबाचा नासाडा झाला
आहे, असें अर्नोनेंत दाखवा, २१ आणि सपाट
देशावर, होलोनेवर व याहजावर व मेफाथेवर,
२२ आणि दीबोनेवर व नबोवर व बेथदिब्ला-
थाइमेवर, २३ आणि किर्याथाइमेवर व बेथगा-

मुलेवर व बेथमीनेवर, २४ आणि करीयोथेवर
व बोज्रावर, आणि मोवाब देशांतल्या सर्व दुर-
च्या व जवळच्या नगरांवर शासन आलें आहे.
२५ मोवाबाचें शिंग तोडिलें आहे, व त्याचा बाहु
मोडला आहे, असें परमेश्वर ह्मणतो.

२६ त्याने परमेश्वरावर आपलें महत्व मिर-
विलें आहे, ह्मणून त्याला मस्त करा; मग तो
आपली वांति वमून टाकील, आणि तोहि हसण्या-
साठीं होईल. २७ तर तुला इस्राएल हसण्या-
साठीं होता कीं नाहीं? तो चोरांमध्यें सांपडला
काय? कां कीं जेव्हां कधीं त्याविषयीं बोलस, ते-
व्हां तूं आपली मान हालवीस. २८ मोवाबां-
तल्या राहणाऱ्यांनों, तुह्मी नगरें सोडून खडकावर
वस्ती करा; आणि जी पारवी आपलें कोटें खां-
चेच्या मुखाच्या कडांत बांधिती, तिजसारिखे व्हा.
२९ आह्मी मोवाबाचा गर्व ऐकिला आहे, तो
अतिगर्विष्ठ आहे, त्याची उच्चटा व त्याचा गर्व व
त्याचा अभिमान व त्याच्या मनाचा उन्नतपणा, हीं-
हि ऐकिलीं आहेत. ३० परमेश्वर ह्मणतो, मी
त्याचा रोष जाणतों, तो यथायोग्य नाहीं, त्याच्या
लबाड्यानी ठीक केलें नाहीं. ३१ ह्मणून मोवा-
बाकरितां कैंकेन, व अवघ्या मोवाबाकरितां ओर-
डेन; कीरहेरेसेंतल्या मनुष्यांकरितां माझें ह्रदय
आक्रंदेल. ३२ अगे सिब्माच्या द्राक्षे, तुजक-
रितां याजेरेच्या रडण्याने रडेन; तुझ्या खांद्या
डोहावर गेल्या आहेत, याजेरेच्या डोहापर्यंत पों-
हंचल्या आहेत; तुझ्या फलांवर व तुझ्या द्राक्षा-
वर नासाडी करणारा पडला आहे. ३३ आणि
पिकाऊ भूमींतून व मोवाब देशांतून हर्ष व उल्लास
दूर झाले आहेत; आणि म्या कुंडांतून द्राक्षारस
नाहींसा केला आहे; कोणी गजर करून द्राक्षें
तुडविणार नाहीं; कांहीं गजर होणारच नाहीं.
३४ हेश्बोनेच्या आरोळीकडून एलालेपर्यंत, यहा-
जेपर्यंत, सोवारेपासून होरोनाइमेपर्यंत त्यानी, ति-
हीं वर्षांच्या कालवडीप्रमाणें, आपला शब्द केला
आहे; कां तर निम्रीमेचीं पाण्यें आटून गेलीं आ-
हेत. ३५ आणि परमेश्वर ह्मणतो, जो उंच-
स्थानांत यज्ञ करितो, व आपल्या देवांसाठीं धूप
जाळितो, त्याला मोवाबेंतून नाहींसें करीन. ३६
ह्मणून मोवाबाकरितां माझें ह्रदय पोंव्याप्रमाणें
वाजेल, आणि कीरहेरेसेंतल्या मनुष्यांकरितां माझें
ह्रदय पोंव्यांप्रमाणें वाजेल; कां तर जें शेषधन
त्याने केलें होतें, तें नष्ट झालें. ३७ तर प्रत्येक
मस्तकावर टक्कल होईल, व प्रत्येक दाढीचें मुंडण
होईल; सर्व हातांवर घाय होतील, व कंबरांस
गोणताट बांधितील. ३८ अवघ्या मोवाबेच्या
सर्व धाब्यांवर व तिच्या आळ्यांत आकांत होईल;
कां कीं जसें पात्र ज्याविषयीं कांहीं संतोष नाहीं,
तसें म्या मोवाबेला मोडिलें आहे, असें परमे-
श्वर ह्मणतो. ३९ ती कसी मोडावली आहे!
ह्मणून ते कैंकतील, मोवाबेने लज्जेंकरून कसी
पाठ दिली आहे? ह्मणून मोवाब आपल्या सर्व
भोंवतालच्यांस हसण्यासाठीं व विस्मयासाठीं हो-
ईल. ४० तर परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा,
तो गरुडाप्रमाणें उडेल, व आपले पक्ष मोवाबावर
पसरील. ४१ करीयोथ घेतील, व दुर्गें धरतील;
आणि त्यादिवसीं मोवाबाच्या वीरांचें ह्रदय वे-
णादेणाऱ्या स्त्रीच्या ह्रदयासारिखें होईल. ४२
आणि मोवाब जाति न राहीं, असा नाश पावेल;
कारण कीं त्याने आपलें महत्व परमेश्वराविरुद्ध
मिरविलें आहे. ४३ हे मोवाबेंतल्या राहणाऱ्या,
तुला भय व खांच व पाश होतील, असें परमे-
श्वर ह्मणतो. ४४ जो भयापासून पळतो, तो
खांचेंत पडेल; आणि जो खांचेंतून वर येतो, तो
पाशांत सांपडेल; कां तर मी तिजवर, ह्मणजे
मोवाबेवर, त्याच्या शासनाचें वर्ष आणीन, असें
परमेश्वर ह्मणतो. ४५ जे बलात्कारापासून
पळत होते, ते हेश्बोनेच्या छायेखालीं उभे रा-
हिले; परंतु हेश्बोनेंतून अग्नि, व सीहोनेंतून ज्वाल
निघून मोवाबेच्या सीमेला व गलका करणाऱ्यांच्या
माथ्याला खाईल. ४६ हे मोवाबा, तुला हाय
हाय; खमोशाचे लोक नाहींसे झाले आहेत;
कां तर तुझे पुत्र पाडाव असे धरले आहेत, व
तुझ्या कन्या पाडाव अशा धरल्या आहेत.

४७ तथापि पुढील दिवसांत मोवाबाचे पाडाव
परत आणीन, असें परमेश्वर ह्मणतो. एथपर्यंत
मोवाबाचें शासन आहे.

## अध्याय ४९.

अम्मोनी लोकांविषयीं परमेश्वर ह्मणतो, कीं
इस्राएलाला पुत्र नाहींत काय? त्याला वि-

भागी नाहीं कीं काय? तर त्यांचा राजा गादाचें
वतन कां भोगितो? आणि त्याचे लोक गादाच्या
नगरांत कां वसतात? २ याकरितां परमेश्वर
ह्मणतो, पाहा, ते दिवस येतात, ज्यांत अम्मोनी
लोकांच्या रब्बांत लढाईचा गोंगाट ऐकत, असें
करीन; तेव्हां ती ओसाडीचा ढीग होईल, आणि
तिच्या कन्यांस अग्नीनें जाळतील; आणि इस्राएल,
जे त्याचे विभागी होते, त्यांचा विभागी होइल,
असें परमेश्वर ह्मणतो. ३ अगे हेश्बोने, आय
ओसाड झाली आहे, ह्मणून बोंब मार; रब्बाच्या
कन्यांनों, ओरडा, गोणताट नेसा, आकांत करा, व
कंपणामध्यें इकडे तिकडे धांवा; कारण कीं त्यांचा
राजा, त्याचे याजक, व सरदार यांसहित पाडाव-
पणाच्या प्रवासांत जाईल. ४ अगे फितणाऱ्या
कन्ये, जी तूं आपल्या द्रव्यांवर भाव ठेवून, मजकडे
कोण येईल? असें ह्मणतीस, ती तूं खोऱ्यांत आ-
पल्या वाहणाऱ्या खोऱ्यांत आपलें गौरव कां मिर-
वितीस? ५ प्रभु सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो,
पाहा, मी तुजवर तुझ्या सर्व भोंवतालच्यांपासून
भय आणीन; तेव्हां तुह्मा प्रत्येकांस पुढें पिटतील;
आणि पळणाऱ्याला कोणी आश्रय देणार नाहीं.
६ आणि त्यानंतर अम्मोनी लोकांचे पाडाव परत
आणीन, असें परमेश्वर ह्मणतो.

७ अदोमाविषयीं सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो,
कीं तेमानांत आतां कांहीं बुद्धि नाहीं काय? विवे-
क्यांपासून मसलत गळून गेली आहे काय? त्यांचें
ज्ञान गमावलें आहे काय? ८ ददानेंतल्या राह-
णाऱ्यांनों, पळा, पाठ द्या, खोल स्थानांत वसा; कां
तर एसावाची विपत्ति, ज्यासमयीं मी त्याला शा-
सणार आहें, तो समयहि त्याजवर आणीन. ९
जर द्राक्षें काढणारे तुजकडे येते, तर ते वगळ
द्राक्षें सोडिते नाहीं काय? जर रात्रीं चोर येते,
तर त्यांस पुरे वाटे एवढेंच नाशिते. १० परंतु
म्यां एसाव बोडका केला आहे, म्यां त्याचे गुप्त
प्रदेश उघडे केले आहेत, ह्मणून त्याच्याने लपवत
नाहीं; त्याचें संतान व त्याचे भाऊ व त्याचे शे-
जारी नाशिलेले आहेत, आणि तो नाहींच. ११
तूं आपलीं अनाथ पोरें सोड, मी त्यांस जीवंत
रक्षीन; आणि तुझ्या विधवा मजवर भाव ठेवोत.
१२ तर परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, ज्यांचें
प्याला पिण्याचें शासन नव्हतें, त्यांनी तो निःशेष
पिऊन घेतला आहे; मग तूंच केवल दंडावांचून
राहसील काय? तूं दंडावांचून राहणार नाहींस,
परंतु निश्चयें पिसील. १३ आणि परमेश्वर
ह्मणतो, म्यां आपली शपथ केली आहे, कीं बोस्रा
ओसाड स्थल, निंदेसाठीं, उजाडी, व शापासाठीं
होईल; आणि तिचे सर्व गांव सर्वकालिक उजा-
ड्या होतील. १४ म्यां परमेश्वरापासून वर्त्त-
मान ऐकिलें आहे, आणि राष्ट्रांमध्यें दूत पाठवि-
लेला आहे, तो ह्मणतो, तुह्मी एकत्र मिळून तिज-
वर या, आणि लढाई करायाला उठा. १५ तर
पाहा, मी तुला राष्ट्रांमध्यें कनिष्ठ, मनुष्यांमध्यें कु-
त्सित करीन. १६ जो तूं खडकाच्या कड्यामध्यें
वसतोस, व डोंगराच्या माथ्यावर वर्त्ततोस, तुझ्या
भयंकरपणानें व तुझ्या मनाच्या गर्वानें तुला फस-
विलें आहे; जरी गरुडाप्रमाणें त्वां आपलें कोटें
उंच केलें, तरी तेथून तुला उतरीन, असें परमे-
श्वर ह्मणतो. १७ आणि अदोम ओसाड स्थल
होईल; जो कोणी तिजकडून जाईल, तो विस्मित
होईल, आणि तिच्या सर्वभंगांविषयीं फुसफुसेल.
१८ परमेश्वर ह्मणतो, जसें सदोम व गमोरा
व त्यांजवळच्या गांवांच्या नाशांत झालें, तसें तेथें
कोणी वसणार नाहीं, व कोणी मनुष्यवंश तींत राह-
णार नाहीं. १९ पाहा, जसा सिंह यार्देनेच्या
झाडींतून वर येतो, तसा तो बलवानाच्या वस्तीवर
येईल; कां तर तो तिजवर त्वरेनें धावे, असें
करीन; आणि जो तिजवर नेमून ठेवीन, तो निव-
डक कोणता आहे? तर मजसारिखा कोण आहे?
आणि मजसाठीं समय कोण नेमील? आणि जो
पालक मजसमोर उभा राहील, तो कोण आहे?
२० तर परमेश्वराची जी मसलत त्यानें अदो-
माविषयीं केली आहे, ती व थेमानेच्या राहणाऱ्यां-
विषयीं जे त्याचे संकल्प त्यानें संकल्पिले आहेत,
तेहि ऐका; निश्चयें कळपांतले कनिष्ठ त्यांस ओ-
ढून हरितील; खचीत तो त्यांसहित त्यांच्या
वस्त्यांस ओसाड करील. २१ त्यांच्या पडण्या-
च्या शब्दानें पृथ्वी कांपली, आरोळीचा शब्द तां-
बड्या समुद्रांत ऐकिलेला आहे. २२ पाहा, तो
गरुडासारिखा वरतीं जाऊन उडेल, व बोस्रावर
आपले पक्ष पसरील; आणि त्या दिवशीं अदोमा-

च्या वीरांचें हृदय वेणादेणाऱ्या स्त्रीच्या हृदयासा-
रिखें होईल.

२३ दमेशेकेविषयींची गोष्ट. हमाथ व अर्पाद
लज्जित झाल्या आहेत; त्यानी वाईट वर्त्तमान
ऐकिलें आहे, ह्मणून ते विरून गेले आहेत; समु-
द्रांत डळमळ आहे; त्याच्याने शांत राहवत नाहीं.
२४ दमेशेक ग्लान झाली आहे, पळायाला माघारें
फिरली आहे, शंकेने तिला धरिलें आहे; जसीं
प्रसविणारीला तसीं तिला संकट व वेदना लागलीं
आहेत. २५ प्रशंसेची नगरी माझ्या आनंदाची
वस्ती कसी सोडिलेली नाहीं? २६ याकरितां
तिचे तरणे तिच्या आळ्यांत पडतील, आणि त्या
दिवसीं सर्व लढाईचीं माणसें नाहींसीं होऊन
जातील, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो. २७
आणि दमेशेकेच्या कोटांत अग्नि पेटवीन, तेव्हां तो
बेनहदादाचे वाडे खाऊन टाकील.

२८ केदाराविषयीं व हाजोराचीं जीं राज्यें बा-
बेलेचा नबूखद्रेज्झार राजा हाणील, त्यांविषयीं
**परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मी उठून केदारास वर
जा, आणि पूर्वेतल्या लोकांचा नाश करा. २९
ते त्यांच्या डेऱ्यांस व त्यांच्या कळपांस नेतील;
त्यांचे पडदे व त्यांची सर्व सामग्री व त्यांचीं
उंटें ते आपणांसाठीं हरून घेतील; आणि, चहुं-
कडे भय आहे, असें त्यांस मोठ्याने बोलतील.

३० **परमेश्वर** ह्मणतो, हाजोरांतल्या राहणा-
ऱ्यानों, पळा, दूर पांगून जा, खोल स्थानांत वसा;
कारण कीं बाबेलेच्या नबुखद्रेज्झार राजाने तुह्मा-
विषयीं मसलत केली आहे, व तुह्माविषयीं संक-
ल्प योजिला आहे. ३१ **परमेश्वर** ह्मणतो, जे
स्वस्थ लोक निर्भय राहतात, ज्यांस दारें नाहींत,
अडसर नाहींत, जे वेगळे वसतात, त्यांकडे तुह्मी
उठून जा. ३२ आणि त्यांचीं उंटें लुटीसाठीं, व
त्यांचीं बहुत गुरें मेंढरें हरणासाठीं होतील; आ-
णि केस कापलेल्यांस सर्व दिशांकडे विखरीन;
आणि त्यांच्या चहुंकडून त्यांची विपत्ति आणीन,
असें **परमेश्वर** ह्मणतो. ३३ आणि हाजोर
सर्वकालपर्यंत अघोर पशूंचा आश्रय, ओसाडी
होईल; तेथें कोणी वसणार नाहीं, व तींत कांहीं
मनुष्यवंश राहणार नाहीं.

३४ यहूदाचा राजा सिद्कीया याच्या राज्या-
च्या आरंभीं एलामाविषयीं **परमेश्वराचें** जें
वचन इर्मेया भविष्यवाद्याजवळ आलें तें. ३५
सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी एला-
माचें धनुष्य, त्यांचा श्रेष्ठपराक्रम मोडीन. ३६ आ-
णि आकाशाच्या चोहों दिशांतून चार वारे एलामावर
आणीन, आणि त्या सर्व वाऱ्यांकडे त्यांस विखरीन;
आणि ज्याजकडे एलामाचे घालविलेले जाणार ना-
हींत, असें राष्ट्र असणार नाहीं. ३७ आणि
त्यांच्या वैऱ्यांपुढें, व त्यांच्या जीव शोधणाऱ्यांपुढें
एलामाला भयभीत करीन; आणि मी अरिष्ट,
आपला संतप्तक्रोधच त्यांजवर आणीन, असें **परमे-
श्वर** ह्मणतो; आणि मी त्यांस नाहींसे करींपर्यंत,
त्यांच्या पाठीमागून तरवार पाठवीन; ३८ आणि
एलामांत मी आपलें सिंहासन मांडीन, आणि
तेथून राजा व सरदार नाहींसे करीन, असें **परमे-
श्वर** ह्मणतो.

३९ तथापि पुढील दिवसांत असें होईल, कीं
एलामाचे पाडाव परत आणीन, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

## अध्याय ५०.

बाबेलेविषयीं व खास्द्यांच्या देशाविषयीं जें
वचन **परमेश्वराने** इर्मेया भविष्यवाद्याकडून
सांगितलें तें. २ राष्ट्रांमध्यें प्रगट करा, व गाज-
वून सांगा, व झेंडा उभारा; गाजवून सांगा, गुप्त
राखूं नका; ह्मणा, बाबेल घेतली आहे, बेल
लज्जित झाला आहे, मरोदाख मोडला आहे;
तिच्या मूर्त्ति लज्जित झाल्या, तिचे पुतळे फोडले
आहेत. ३ कारण कीं तिजवर राष्ट्र उत्तरेकून
वरतीं येतें, तें तिच्या भूमीला ओसाड करून
ठेवील, मग तींत कोणी वसणार नाहीं; मनुष्यें
व पशुहि पळून जातील.

४ **परमेश्वर** ह्मणतो, त्या दिवसांत त्यासम-
यींच जे इस्राएलाचे वंश ते, व यहूदाचे वंश
एकत्र येतील, ते चालत रडत येऊन **परमेश्वरा-
ला** आपल्या देवाला शोधितील. ५ त्यांचीं
मुखें सीयोनेकडे असतांना ते तिची वाट पुसतील,
ते ह्मणतील, याहो, जो सर्वकालिक करार विस-
रायाचा नाहीं, त्याजकडून आपण **परमेश्वराशीं**
जडूं. ६ माझे लोक बहकलेलीं मेंढरें झाले आ-

हेत; त्यांच्या पालकांनीं त्यांस बहकविलें आहे,
त्यांस पर्वतांवर फिरविलें आहे; ते पर्वतापासून डों-
गरास चालले, ते आपलें बसण्याचें स्थान विसरले
आहेत. ७ ज्यांस ते सांपडले, ते सर्व त्यांस खात
असत; आणि त्यांचे शत्रु ह्मणत असत, आह्मी
अपराधी नाहीं; कारण कीं परमेश्वर, जो न्या-
याश्रय, परमेश्वर जो त्यांच्या पूर्वजांची आशा,
त्याजविरुद्ध त्यांनीं पाप केलें आहे. ८ बाबेलें-
तून पळा, खास्द्यांच्या देशांतून निघून जा, आणि
जसे कळपापुढें बोकड तसे व्हा.

९ कां तर पाहा, मी मोठ्या राष्ट्रांचा समुदाय
उठवून बाबेलेवर उत्तरेंतून वरतीं आणीन; तेव्हां
त्या तिजवर सिद्ध होतील; तेथून तिला घेतील;
त्यांचे तीर निपुणशूराच्या तीरांसारिखे आहेत;
कोणताहि व्यर्थ फिरणार नाहीं. १० आणि खा-
स्द्यांचा देश लुटीसाठीं होईल; जे सर्व त्याला
लुटतात, ते तृप्त होतील, असें परमेश्वर ह्म-
णतो. ११ कां कीं माझ्या वतनाच्या लुटणाऱ्यांनो,
तुह्मी हर्षतां व उल्लासतां, आणि गवतामध्यें मा-
जत्या कालवडीप्रमाणें माजतां, व बळकट घोड्यां-
सारिखे हिंसतां. १२ तुमची आई फार लाजेल,
जी तुह्माला प्रसविली ती शरमेल; पाहा, राष्ट्रां-
तलें जें शेवटलें, त्याचा देश रान, सुकी भूमि, व
जंगल होईल. १३ परमेश्वराच्या कोपामुळें
तें वसणार नाहीं, परंतु तें अवघें ओसाड पडेल;
जो कोणी बाबेलेकडून जाईल, तो विस्मित होईल,
आणि तिच्या सर्व भंगांविषयीं फुसफुसेल. १४
सर्व धनुर्धरानो, बाबेलेभोंवते सिद्ध व्हा; तिज-
वर तीर मारा, तीरांचा तोटा करूं नका; कां तर
तिने परमेश्वराविरुद्ध पाप केलें आहे. १५
तिजभोंवते आरोळ्या करा; तिने आपला हात
दिल्हा आहे; तिचे पाये ढळले आहेत, तिचे कोट
पाडले आहेत, कां कीं हा परमेश्वराचा सूड
आहे; तिचा सूड घ्या; जसें तिने केलें, तसें
तिला करा. १६ पेरणाऱ्याला, व जो कापणीच्या स-
मयीं इळा चालवितो, त्याला बाबेलेपासून नाहींसा
करा; पिडणाऱ्या तरवारीमुळें ते प्रत्येक आपल्या
लोकांकडे फिरतील, व प्रत्येक आपल्या देशास
पळून जातील.

१७ इस्राएल विखरलेलें मेंढरूं आहे; सिंहानीं
त्याला भडकाविलें आहे; प्रथम अश्शूराच्या रा-
जाने त्याला खाल्लें; आणि आतां शेवटीं नबूख-
द्रेज्जार बाबेलेचा राजा याने त्याचीं हाडें खाऊन
टाकिलीं आहेत. १८ याकरितां सैन्यांचा परमे-
श्वर इस्राएलाचा देव ह्मणतो, कीं पाहा, जसें
म्या अश्शूराच्या राजाला शासिलें, तसें बाबेलेच्या
राजाला व त्याच्या देशाला शासीन. १९ आणि
इस्राएलाला त्याच्या निवासस्थानांत परत आणीन,
तेव्हां तो कार्मेलावर व बाशानावर चरेल, आणि
त्याचा जीव एफ्राइमावर व गिलादावर तृप्त हो-
ईल. २० परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसांत, त्या
समयींच, इस्राएलाचा अन्याय शोधण्यांत येईल,
परंतु कांहीं नाहीं; आणि यहूदाचीं पातकें शोध-
ण्यांत येतील, परंतु तीं सांपडणार नाहींत; कारण
कीं ज्यांस मी रक्षून ठेवितों, त्यांस क्षमा करीन.

२१ मराथाइम देशावर जा, त्याजवरच जा,
आणि पकोदाच्या राहणाऱ्यांवर वरतीं जा; त्यांच्या
पाठीस लागून त्यांस ओसाड व नाहींसें कर, आणि
सर्व जें म्या तुला आज्ञापिलें आहे, त्याप्रमाणें कर,
असें परमेश्वर ह्मणतो. २२ लढाईचा शब्द,
व मोठा नाश देशांत आहेत. २३ अवघ्या पृथ्वी-
चा घण कसा भिन्न व भग्न झाला आहे! बाबेल
कसी राष्ट्रांमध्यें ओसाड स्थल झाली आहे! २४
अगे बाबेले, म्या तुजसाठीं पाश मांडिला, व तूं
न जाणून गुंतली आहेस; त्वां परमेश्वराविरुद्ध
भांडण केलें, याजकरितां तूं सांपडून धरलेली
आहेस. २५ परमेश्वराने आपलें भांडार उघ-
डून आपल्या रोषाचीं शस्त्रें काढिलीं आहेत;
कां तर प्रभु सैन्यांचा परमेश्वर याला हें कार्य
खास्द्यांच्या देशांत करायाचें आहे. २६ शेव-
टच्या सीमेपासून तिजवर या, तिचें भंडार उघडा;
तिला ढिगांप्रमाणें उचला; व तिला नाहींसी करा;
तिचें कांहीं शेष राहूं नये. २७ तिचे सर्व बैल
नाहींसे करा; ते कापण्यासाठीं उतरोत; त्यांस
हाय हाय; कारण कीं त्यांचा दिवस, त्यांच्या
शासनाची वेळ आली आहे. २८ जे बाबेल
देशांतून पळून निभावतात, त्यांचा शब्द, सीयोनेंत
परमेश्वराचा आमच्या देवाचा सूड, व त्याच्या
मंदिराचा सूड दाखवायाला, २९ बाबेलेवर
बहुत लोकांस बोलावा, सर्व धनुष्य वांकविणाऱ्यां-

नों, तिला वेढा घाला; तींतला कोणी सुटूं नये:
तिला तिच्या कर्माप्रमाणें फल भरून द्या; जें
सर्व तिने केलें आहे, त्याप्रमाणें तिला करा; कां
तर तिने **परमेश्वरावर**, **इस्राएला**च्या पवित्रावर
गर्व मिरविला आहे. ३० **या**करितां तिचे तरुण
पुरुष तिच्या आळ्यांत पडतील, आणि त्या दिवसीं
तिचीं सर्व लढाईचीं माणसें नाहींसीं होतील,
असें **परमेश्वर** ह्मणतो. ३१ **प्रभु** सैन्यांचा
**परमेश्वर** ह्मणतो, अरे गर्विष्ठा, पाहा, मी तुज-
विरुद्ध आहें; ह्मणून तुझा दिवस, ज्यावेळेस मी
तुझें शासन करणार आहें, तीच आली आहे.
३२ **आणि** गर्विष्ठ गळून पडेल, तेव्हां कोणी त्या-
ला उठविणार नाहीं; आणि त्याच्या नगरांत
अग्नि पेटवीन, मग तो त्याच्या सर्व भोंवतालच्यांस
खाऊन टाकील.

३३ **सैन्यांचा परमेश्वर** ह्मणतो, कीं **इस्राए**-
**ला**चे वंश व **यहूदा**चे वंश एकत्र पिडिलेले आ-
हेत; आणि ज्यानी ते पाडाव केले, त्यानी ते
हटेंच धरिले आहेत; त्यांस जाऊं देईनात. ३४
**त्यांचा उद्धारणारा** बळकट आहे; त्याचें नाम
सैन्यांचा **परमेश्वर** आहे; तो निश्चयें त्यांचा
वाद करील, अशासाठीं कीं त्याने देश स्वस्थ करा-
वा, व **बाबेले**च्या राहणाऱ्यांस कांपवावें.

३५ **परमेश्वर** ह्मणतो, **खास्द्यां**वर व **बाबे**-
**ले**च्या राहणाऱ्यांवर व तिच्या सरदारांवर व ति-
च्या विद्वानांवर तरवार होईल. ३६ **खोटें** बोल-
णाऱ्यांवर तरवार होईल; तेव्हां ते मूर्ख होतील;
तिच्या वीरांवर तरवार होईल; तेव्हां ते भय-
भीत होतील. ३७ **तिच्या** घोड्यांवर व तिच्या
रथांवर व तिजमध्यें जे सर्व मिसळलेले लोक
आहेत, त्यांजवर तरवार होईल; तेव्हां ते स्त्रि-
या असे होतील; तिच्या द्रव्यांवर तरवार हो-
ईल, तेव्हां तीं लुटीस जातील. ३८ **तिच्या**
पाण्यांवर झळ होईल, तेव्हां तीं आटतील; का-
रण कीं ती कोरीव मूर्त्तींची भूमि आहे, आणि ते
आपल्या अघोर मूर्त्तींविषयीं वेडे आहेत. ३९
**या**करितां जंगली पशु कोल्ह्यांसहित तेथें वसतील,
आणि शहामृग तींत राहतील; ती पुन्हां कधीं
वसणार नाहीं, आणि पिढ्यानापिढ्यांपर्यंत तींत
वस्ती होणार नाहीं. ४० **परमेश्वर** ह्मणतो,
जेव्हां **देवाने सदोम** व **गमोरा** व त्यांजवळचीं
गांवें यांचा नाश केला, तेव्हां जसें झालें, तसें को-
णी तेथें वसणार नाहीं, व कोणी मनुष्यवंश तिज-
मध्यें राहणार नाहीं. ४१ **पाहा**, उत्तरेंतून लोक
येतील, व मोठें राष्ट्र, व बहुत राजे पृथ्वीच्या बा-
जूंवरून उठतील. ४२ **ते** धनुष्य व भाला धरि-
तील; ते क्रूर आहेत, दया करणार नाहींत; त्यां-
चा शब्द समुद्राप्रमाणें गाजेल, आणि, अगे **बाबे**-
**ले**च्या कन्ये, मनुष्य जसा लढाईसाठीं तसे ते तुज-
वर सिद्ध होऊन घोड्यांवर बसतील. ४३
**बाबेले**च्या राजाने त्यांचें वर्तमान ऐकिलें आहे.
ह्मणून त्याचे हात गळाले आहेत; जसीं प्रसव-
णाऱ्या स्त्रीला तसीं त्याला संकट व वेदना प्राप्त
झालीं आहेत. ४४ **पाहा**, जसा सिंह **यार्दे**ने-
च्या झाडींतून वर येतो, तसा तो बलवानाच्या
वस्तीवर येईल; कां तर तो तिजवर त्वरेने धांवे,
असें करीन; आणि जो तिजवर नेमून ठेवीन, तो
निवडक कोणता आहे? तर मजसारिखा कोण
आहे? आणि मजसाठीं समय कोण नेमील? आ-
णि जो पालक मजसमोर उभा राहील, तो कोण
आहे? ४५ **तर परमेश्वराची** जी मसलत
त्याने **बाबेले**विषयीं केली आहे ती, व जे त्याचे
संकल्प त्याने **खास्द्यां**च्या देशाविषयीं संकल्पिले
आहेत, तेंहि ऐका; निश्चयें कळपांतले कनिष्ठ
त्यांस ओढून हरतील; खचीत तो त्यांसहित
त्यांची वस्ती ओसाड करील. ४६ **बाबेल** घेत-
लेली आहे, ह्मणून याच्या शब्दामुळें पृथ्वी कांप-
ली आहे, आणि राष्ट्रांमध्यें आरोळी ऐकिली
आहे.

## अध्याय ५१.

**परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी **बाबेले**वर, व
जे मजविरुद्ध उठतात, त्यांजमध्यें जे राहतात,
त्यांजवर नाशाचा वारा उठवीन; २ **आणि बा**-
**बेले**वर पाखडणारे पाठवीन, तेव्हां ते तिला पाख-
डतील, आणि तिचा देश रिकामा करितील; कां
कीं अरिष्टाच्या दिवसीं ते तिजविरुद्ध चहुंकडे
होतील. ३ **जो** धनुष्य लववितो, त्याजवर, व
जो आपलें कवच लेऊन आपणाला उंचावितो, त्या-
जवर धनुर्धर आपलें धनुष्य लववो; आणि तिच्या

तरुण पुरुषांवर दया करूं नका; तिच्या सर्व सैन्या
चा विनाश करा; ४ आणि जखमी केलेले खास्-
द्यांच्या देशांत, व भोंसकलेले तिच्या आळ्यांत
पडतील. ५ कां तर त्यांचा देश जरी इस्राए-
लाच्या पवित्राविरुद्ध पातकाने भरलेला होता,
तरी इस्राएल व यहूदा यांस त्यांच्या देवाने, सै-
न्यांच्या परमेश्वराने सोडिलें नाहीं. ६ बाबे-
लेंतून पळा, आणि प्रत्येक आपला जीव सोडवा;
तिच्या अन्यायाच्या शासनांत बुडूं नका; कां हा
परमेश्वराला सूड घेण्याचा समय आहे; तो
तिचा फल भरून देईल. ७ बाबेल सोन्याचा
प्याला, असी परमेश्वराच्या हातांत होती;
तिने सर्व पृथ्वी मस्त केली आहे; राष्ट्रांनी तींतला
द्राक्षारस प्याला आहे; यामुळें राष्ट्रें मस्त झालीं
आहेत. ८ बाबेल अकस्मात् पडून मोडून गेली
आहे; तिजकरितां केंकत ओरडा; तिच्या दुःखाला
लावायासाठीं सुरस घ्या, कदाचित ती बरी हो-
ईल. ९ आह्मी बाबेल बरी केली असती, परंतु
ती बरी होईना; तिला सोडा, आणि आपण प्र-
त्येक आपल्या देशास जाऊं; कां तर तिचें शासन
आकाशाला पोहंचलें आहे, व आभाळांपर्यंत उंचा-
वलें आहे. १० परमेश्वराने आमचे न्याय
निघत, असें केलें आहे; याहो, आपण जीयोनेंत
परमेश्वराचें, आमच्या देवाचें कार्य कथूं. ११
तीर घोंटा; ढाला हातांत धरा; परमेश्वराने
माद्यांच्या राजांचा आत्मा उत्तेजित केला आहे;
कां त्याचा संकल्प बाबेलेविषयीं असा आहे, कीं
ती नाशावी; कारण कीं हा परमेश्वराचा सूड,
त्याच्या मंदिराचा सूड आहे. १२ बाबेलेच्या
कोटांवर झेंडा उभारा, पाहारा बळकट करा, पाहा-
रेकरी स्थापा, टपून बसणारे सिद्ध करा; कारण
कीं परमेश्वराने संकल्प केला आहे, आणि जें
त्याने बाबेलेच्या राहणाऱ्यांविषयीं सांगितलें आहे,
तें निश्चयें करील. १३ अगे जी तूं पुष्कळ पा-
ण्याजवळ वसतीस, जिचीं द्रव्यें बहुत आहेत,
त्या तुझा शेवट आला आहे, तुझ्या लाभाची म-
र्यादा आली आहे. १४ परमेश्वराने आपली
शपथ केली आहे, कीं निश्चयें जसें धुल्यानी तसें
मनुष्यानी तुला भरीन; तेव्हां ते तुजवर आरोळी
करितील. १५ त्याने आपल्या शक्तीने पृथ्वी उ-
त्पन्न केली, त्याने आपल्या बुद्धीने भूमि स्थापिली,
व आपल्या विवेकाने आकाशें पसरलीं आहेत.
१६ जेव्हां तो आपला शब्द करितो, तेव्हां आ-
काशांत पाण्यांचा समुदाय होतो; आणि पृथ्वीच्या
सीमेपासून धुकटें वर जात, असें करितो; तो पा-
उसासुद्धां वीज उत्पन्न करितो, आणि वारा आ-
पल्या भांडारांतून बाहेर आणितो. १७ प्रत्येक
मनुष्य आपल्या विद्येकडून पशुशील झाला आहे;
कोरींव मूर्त्तींकडून प्रत्येक ओतणारा लज्जित झा-
ला आहे; कां तर त्याची ओतींव मूर्त्ति खोटे-
पणच आहे, आणि तींत कांहीं श्वास नाहीं. १८
त्या व्यर्थपणच आहेत, भ्रांतींचीं कृत्यें आहेत;
त्यांच्या शासनाच्या वेळेस त्या नाहींशा होतील.
१९ जो याकोबाचा विभाग तो त्यांसारिखा नाहीं;
कां तो सर्वांचा निर्माणकर्त्ता आहे; आणि इ-
स्राएल त्याच्या वतनाचा वांटा आहे; त्याचें नाम
सैन्यांचा परमेश्वर आहे. २० तूं मजसाठीं
परशू व लढाईचीं शस्त्रें आहेस; आणि तुजक-
डून राष्ट्रांस तोडून तुकडे करीन, व तुजकडून
राज्यें नाशीन. २१ आणि तुजकडून घोड्याचे,
व त्याजवर जो बसला त्याचे तुकडे करीन; व
तुजकडून रथाचे, व त्याजवर जो बसला त्याचे
तुकडे करीन. २२ आणि तुजकडून स्त्री व पुरुष
यांचे तुकडे करीन, व तुजकडून ह्मातारा व पोर
यांचे तुकडे करीन, व तुजकडून तरुण व तरुणी
यांचे तुकडे करीन. २३ आणि तुजकडून पालकाचे
व त्याच्या कळपाचे तुकडे करीन, व तुजकडून शेत-
कऱ्याचे व त्याच्या बैलांच्या जोडीचे तुकडे करीन,
व तुजकडून सेनापतींचे व अधिकाऱ्यांचे तुकडे करी-
न. २४ आणि परमेश्वर ह्मणतो, तुमच्या समक्ष
बाबेलेला व खास्दीम देशांतल्या सर्व राहणा-
ऱ्यांस जें अरिष्ट त्यांनी जीयोनेंत केलें आहे,
त्या सर्वांचें फल भरून देईन. २५ परमेश्वर
ह्मणतो, अरे नाश करणाऱ्या पर्वता, जो अवघ्या
पृथ्वीला नाशितोस तो, पाहा, मी तुजविरुद्ध आहें;
आणि मी आपला हात तुजवर लांबवून तुला ख-
डकांवरून लोटून देईन, आणि तुला जाळिलेला
पर्वत करीन. २६ आणि तुजमधून कोंपऱ्यासाठीं
दगड अथवा पायांसाठीं दगड कोणी घेणार नाहींत;
परंतु तूं सर्वकालपर्यंत ओसाड राहसील, असें

**परमेश्वर** ह्मणतो. २७ देशांत झेंडा उभारा,
राष्ट्रांमध्यें कर्णा वाजवा, तिजवर राष्ट्रांस सिद्ध
करा, तिजवर **अरारट**, **मिन्नी**, व **अश्कनाज** हीं
राज्यें बोलावा; तिजवर सेनापति नेमून ठेवा;
घोडे **कुसळांच्या** घुल्यांप्रमाणें वर येत, असें करा.
२८ तिजवर राष्ट्रांस **मादयांचे** राजे, त्यांचे सेना-
पति, व त्यांचे सर्व अधिकारी, व त्यांच्या अवघ्या
राज्याचा देश यांसुद्धां सिद्ध करा. २९ आणि
पृथ्वी कांपेल, व घाबरी होईल; कां तर **बाबेलेचा**
देश ओसाड व त्यांत कोणी न राहीं असें करायाला
**बाबेलेविषयीं परमेश्वराचे** संकल्प ठरून सि-
द्धीस जातील. ३० **बाबेलेचे** वीर लढाई करा-
याला उदासीन झाले, ते दुर्गांत राहिले आहेत;
त्यांचा पराक्रम थकला आहे; ते स्त्रिया, असे
झाले आहेत; त्यांनी तिचीं राहण्याचीं स्थानें जा-
ळिलीं; तिचे अडसर तोडिले आहेत. ३१
त्याचें नगर एका शेवटास घेतलें आहे, उतार
धरिले आहेत, आणि त्यांनी अग्नि लावून दुर्गें जा-
ळिलीं आहेत, आणि लढाईचीं माणसें भयभीत
झालीं आहेत, ३२ असें **बाबेलेच्या** राजाला
सांगून दाखवायाला दूत दूताला भेटून, व सूचक
सूचकाला भेटून धांवेल. ३३ तर सैन्यांचा **पर-
मेश्वर इस्राएलाचा देव** ह्मणतो, कीं **बाबेलेची**
कन्या खळ्यासारिखी आहे, तिच्या मळण्याची
वेळ आली आहे; अजून थोडा अवकाश आहे,
नंतर तिच्या कापणीचा समय येईल. ३४ **नबु-
खद्रेज्जार बाबेलेचा** राजा याने मला खालें आहे,
त्याने मला पाडिलें आहे, मला रिकामें पात्र केलें
आहे, त्याने अजगराप्रमाणें मला गिळिलें आहे,
त्याने माझीं मिष्टान्नें खाऊन आपलें पोट भरिलें
आहे, त्याने मला घालविलें आहे. ३५ मला
व माझ्या देहाला जो जुलूम केला तो **बाबेलेवर**
असो, असें **झीयोनेची** राहणारी ह्मणेल; आणि
माझ्या घाताचा दोष **खास्दीम** देशाच्या राहणा-
ऱ्यांवर असो, असें **यरूशालेम** ह्मणेल. ३६
याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी तुझा
वाद करीन, आणि तुजसाठीं सूड उगवीन; आणि
तिचा समुद्र आटवीन, व तिचा झरा सुकवीन.
३७ आणि **बाबेल** ढीग, अघोर पशूंचा आश्रय,
विस्मयासाठीं, फुत्कारासाठीं, व निवासिहीन होईल.
३८ ते एकदांच सिंहाप्रमाणें गाजतील; सिंहाच्या
पिलांप्रमाणें केंकतील. ३९ त्यांच्या तापांत त्यां-
चीं भोजनें करीन, आणि त्यांनी उल्हासावें, व सर्व-
कालिक झोंप घ्यावी, व जागें होऊं नये, ह्मणून
त्यांस मस्त करीन, असें **परमेश्वर** ह्मणतो. ४०
त्यांस मेंढ्यांसारिखें, बोकडांसुद्धां मेंढे यांसारिखेंहि
कापायासाठीं उतरून आणीन. ४१ **शेशाख**
कसी घेतली आहे? जी सगळ्या पृथ्वीच्या प्रशं-
सेसाठीं होती, ती कसी धरली आहे? **बाबेल**
कसी राष्ट्रांमध्यें विस्मयासाठीं झाली आहे? ४२
**बाबेलेवर** समुद्र आला आहे; त्याच्या लाटांच्या
समुदायाने ती झांकली आहे. ४३ तिचीं नगरें
ओसाडस्थलें, सुकी भूमि, व जंगल झालीं आ-
हेत; ज्यांत कोणी मनुष्य वसणार नाहीं, ज्यांक-
डून कोणी मनुष्यवंश चालणार नाहीं, असी भूमि
तीं झालीं आहेत. ४४ आणि **बाबेलेंत बेलाला**
शासीन, आणि त्याने जें गिळलें आहे तें त्याच्या
मुखांतून काढीन; आणि राष्ट्रें त्याजकडे पुन्हा
लोटणार नाहींत; आणि **बाबेलेचा** कोट गळून
पडेल. ४५ माझ्या लोकांनो, तिजमधून निघून
जा, आणि प्रत्येक आपल्या जीवाला **परमेश्वरा-
च्या** संतप्त क्रोधापासून सोडवा. ४६ आणि
तुमचें मन थकूं नये, आणि जे वर्त्तमान लोक दे-
शांत ऐकतील, त्यामुळें तुह्मी भयभीत होऊं नये;
कां कीं एका वर्षांत वर्तमान येईल, आणि त्यानंतर
पुढल्या वर्षांत वर्त्तमान येईल, आणि अधिकारी
अधिकाऱ्याविरुद्ध झाला असतां देशांत बलात्कार
होईल. ४७ ह्मणून पाहा, ते दिवस येतील,
ज्यांत मी **बाबेलेच्या** कोरींव मूर्त्तींला शासन करीन;
तेव्हां तिचा सर्व देश लज्जित होईल, आणि तिचे
सर्व वधलेले तिजमध्यें पडतील. ४८ तेव्हां आ-
काश व पृथ्वी हीं, व त्यांत जें कांहीं आहे, तें **बा-
बेलेविषयीं** उत्सव करितील; कारण कीं तिजवर
उत्तरेंतून नाशकरणारे येतील, असें **परमेश्वर**
ह्मणतो. ४९ **बाबेलेने** जसें **इस्राएलाचे** वधलेले
पडत, असें केलें आहे; तसें सर्व देशाचे वधलेले
**बाबेलेस** पडतील. ५० जे तुह्मी तरवारीपासून
सुटलां आहां, ते जा, उभे राहूं नका; दुरून
**परमेश्वराला** स्मरा, व **यरूशालेम** तुमच्या
मनांत येवो. ५१ आह्मी निंदा ऐकिली आहे,

ह्मणून लज्जित झालों आहों; लाजेने आम-
च्या तोंडांस झांकिलें आहे; कां तर **परमे-
श्वराच्या** मंदिराच्या पवित्रस्थानांत परके शिरले
आहेत. ५२ याकारितां **परमेश्वर** ह्मणतो, पाहा,
ते दिवस येतील, ज्यांत मी तिच्या मूर्त्तींस शासन
करीन; आणि तिच्या सर्व देशांत घायाळ क-
ण्हेल. ५३ बाबेल जरीं आकाशापर्यंत उंच
झाली, व जरीं तिने आपलें मोठें उंचस्थान बळकट
केलें, तरीं मजकडून तिजवर नाश करणारे येतील,
असें **परमेश्वर** ह्मणतो. ५४ बाबेलेहून आरो-
ळीचा शब्द, आणि खास्द्यांच्या देशांतून मोठ्या-
भंगाचा शब्द येतो. ५५ कां तर **परमेश्वराने**
बाबेलेचा नाश केला आहे, आणि तींतून मोठा
शब्द नाहींसा केला आहे; त्याच्या लाटा पुष्कळ
पाण्याप्रमाणें गाजत असत, त्याच्या शब्दाचा गों-
गाट होत असे. ५६ तर तिजवर, बाबेलेवरच
नाश करणारा आला आहे, आणि तिचे वीर धरले
आहेत, त्यांचीं धनुष्यें मोडलीं आहेत; कां तर
**परमेश्वर** सुडांचा देव आहे, तो निश्चयें फल
भरून देईल. ५७ आणि तिचे सरदार व तिचे
ज्ञानी, तिचे सेनापति व तिचे अधिकारी व तिचे
वीर मस्त करीन; तेव्हां निरंतर झोंप घेतील, व
जागे होणार नाहींत, असें तो **राजा**, ज्याचें नाम
सैन्यांचा **परमेश्वर** आहे, तो ह्मणतो. ५८
सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं बाबेलेचे रुंद
कोट निःशेष मोडावतील, आणि तिचीं उंच दारें
अग्नीकडून जाळतील; आणि लोक केवळ शून्य-
पणासाठीं, व समुदाय केवळ अग्नीसाठीं श्रम करि-
तील व थकतील.

५९ मह्सेयाचा पुत्र नेरिया याचा पुत्र जो
सराया, तो जेव्हां सिद्कीया यहूदाचा राजा या-
संगतीं, याच्या राज्याच्या चौथ्या वर्षांत, बाबेलेस
गेला, तेव्हां जें वचन इर्मया भविष्यवाद्याने त्याला
आज्ञापून सोंपिलें तें. सराया तर शांतशील सर-
दार होता. ६० तर जें सर्व अरिष्ट बाबेलेवर
यायाचें होतें, तें इर्मयाने एका पुस्तकांत लिहिलें,
बाबेलेविषयीं जीं सर्व वचनें लिहिलीं आहेत तीं
हींच. ६१ आणि इर्मयाने सरायाला ह्मटलें,
जेव्हां तूं बाबेलेस जाऊन पाहसील, आणि हीं
सर्व वचनें वाचसील, ६२ तेव्हां ह्मण, हे
**परमेश्वरा**, हें नाहींसें करावें, यांत कोणी मनुष्याने
अथवा पशूने न राहावें, परंतु हें सर्वकालपर्यंत
ओसाड व्हावें, असें या स्थानाविषयीं बोलला आ-
हेस. ६३ मग असें होईल, कीं जेव्हां या पुस्त-
काचें वाचणें समाप्त करिसील, तेव्हां याला एक
धोंडा बांधून हें फराथेमध्यें फेंकून देसील. ६४
आणि ह्मण, याप्रमाणें बाबेल बुडेल, आणि जें
अरिष्ट मी तिजवर आणणार आहें, त्यांतून ती उठ-
णार नाहीं; आणि ते लोक थकून जातील. एथपर्यंत
इर्मयाचीं वचनें आहेत.

## अध्याय ५२.

जेव्हां सिद्कीया राज्य करूं लागला, तेव्हां तो
एकवीस वर्षांचा होता, आणि त्याने अकरा
वर्षेपर्यंत यरूशालेमेंत राज्य केलें; आणि त्याच्या
आईचें नाम हमूटाल होतें, ती इर्मया जो लिब्ना-
कर त्याची कन्या होती. २ आणि सिद्कीया
**परमेश्वराच्या** दृष्टींत जें वाईट तें करी, जें कांहीं
यहोयाकीम करी त्याप्रमाणें तो करी. ३ कां
कीं **परमेश्वर** आपल्या समोरून त्यांस टाकी-
पर्यंत, हें **परमेश्वराच्या** क्रोधाने यरूशालेमेंत व
यहूदांत झालें, आणि सिद्कीयाने बाबेलेच्या रा-
जावर फितूर केला.

४ मग त्याच्या राज्याच्या नवव्या वर्षांत, दा-
हाव्या महिन्यांत, महिन्याच्या दाहाव्या दिवसीं
नबूखद्रेज्जार बाबेलेचा राजा याने व त्याच्या सर्व
सैन्याने येऊन यरूशालेमेस वेढा घातला, आणि
तिजभोंवता मोरचा बांधिला. ५ नंतर सिद्की-
या राजाच्या अकराव्या वर्षापर्यंत तें नगर वेढलेलें
होतें. ६ आणि चौथ्या महिन्यांत, महिन्याच्या
नवव्या दिवसीं, नगरांत दुकाळ फार कठीण होऊं
लागला, आणि देशांतल्या लोकांसाठीं कांहीं अन्न
नव्हतें. ७ मग नगर फुटलें, आणि सर्व लढाईचीं
माणसें पळालीं, आणि दोहों भिंतींमधील जें दार
राजाच्या बागाजवळ होतें त्याच्या वाटेने रात्रीं
नगरांतून निघून गेलीं; आणि खास्दी नगराभोंवते
होते, ह्मणून तीं पटांगणाच्या वाटेने गेलीं.

८ मग खास्द्यांचें सैन्य राजाच्या पाठीस ला-
गलें, आणि यरेखोच्या पटांगणांवर सिद्कीयाला
आटपलें; तेव्हां त्याचें सर्व सैन्य त्याजपासून

विखरलेलें होतें. ९ तेव्हां त्यांनी राजाला धरून
हामाथ देशांतल्या रिब्लास बाबेलेच्या राजाज-
वळ वर नेलें; मग त्यानें त्याजला शासन सांगि-
तलें. १० आणि बाबेलेच्या राजानें सिद्कीं-
याचे पुत्र त्याच्या दृष्टीपुढें वधिले; आणि यहू-
दाचे सर्व सरदारहि त्यानें रिब्लांत वधिले. ११
आणि त्यानें सिद्कीयाचे डोळे अंधळे केले;
आणि त्या बाबेलेच्या राजानें त्याला पितळाच्या
दोहों बिड्यांनी बांधवून बाबेलेस नेवविलें, आणि
त्याच्या मरण दिवसापर्यंत बंदिशाळेंत घातलें.

१२ तर पांचव्या महिन्यांत, महिन्याच्या दाहा-
व्या दिवशीं, नबूखद्रेज्जार बाबेलेचा राजा याच्या
एकुणिसाव्या वर्षांत, नबूजरदान राजरक्षकांचा ना-
यक, जो बाबेलेच्या राजाचा एक प्रधान होता,
तो यरूशालेमेस आला. १३ तेव्हां त्यानें पर-
मेश्वराचें मंदिर, व राजाचें घर जाळिलें, व
यरूशालेमेंतलीं सर्व घरें, व सर्व मोठ्या लोकांचीं
घरेंहि अग्नीकडून जाळिलीं. १४ आणि खास्द्यां-
चें, जें सर्व सैन्य राजरक्षकांच्या नायकासंगतीं होतें,
त्यानें यरूशालेमेचे सर्व कोट सभोंवते पाडिले.
१५ तेव्हां लोकांतले कित्येक दरिद्री, व जे लोक
नगरांत उरले होते, त्यांचें शेष, व जे फितणारे
बाबेलेच्या राजाकडे फितले होते, त्यांस व समु-
दायाचें शेष यांस नबूजरदान जो राजरक्षकांचा
नायक त्यानें पाडाव करून नेलें. १६ आणि
नबूजरदान राजरक्षकांचा नायक यानें देशांतले
कित्येक दरिद्री, मळेकरी व शेतकरी व्हायासाठीं
ठेविले. १७ आणि परमेश्वराच्या मंदिराचे
जे पितळी खांब व उथळीं, आणि परमेश्वराच्या
मंदिरांत जें पितळी समुद्रपात्र होतें, त्यांस खा-
स्द्यांनीं फोडून त्यांचें सर्व पितळ बाबेलेस नेलें.
१८ आणि थाल्या व शिपतरें व समईच्या कातरी
व वाडगे व चमचे, आणि ज्या सर्व पितळी पा-
त्रांनीं ते सेवा करीत असत, तीं त्यांनी घेतलीं.
१९ आणि बहुगुणीं व शेगड्या व वाट्या व हंड्या
व समया व प्याले व लोटे, जें सोन्याचें तें सोनें
असें, आणि जें रुप्याचें तें रुपें असें राजरक्षकांच्या
नायकानें घेतलें. २० जे दोन खांब ते, जें एक
समुद्रपात्र तें, आणि जे बारा पितळी बैल पायां-
खालतीं होते, जे शलमोन राजानें परमेश्वराच्या
मंदिरासाठीं करविले होते तेहि घेतले; या सर्व
पात्रांच्या पितळ्याची तुळणा कळली नव्हती. २१
आणि जे खांब होते, त्यांतल्या प्रत्येक खांबांची
उंची अठरा हात होती; आणि बारा हातांचें कडें
त्याजभोंवतें वेष्टित होतें; त्याची रुंदी चार बोटें
होती; तें पोकळ होतें. २२ आणि त्याजवर
पितळी कळस होता; आणि प्रत्येक कळसाची
उंची पांच हात होती; आणि कळसांवर सभों-
वती जाळीची नकसी होती व डाळिंबें होतीं, हें
सर्व पित्तलाचें होतें; आणि यासारिखे दुसऱ्या
खांबांचीं डाळिंबें इत्यादिक होतीं. २३ आणि
प्रत्येक अंगास शाण्णव डाळिंबें होतीं; आणि जा-
ळीच्या नकशीवर सभोंवतीं सर्व डाळिंबें शंभर
होतीं.

२४ आणि सराया जो मुख्य याजक व जफा-
न्या जो दुसरा याजक हे व तिघे द्वारपाल राज-
रक्षकांच्या नायकानें नेले, २५ आणि एक षंड,
जो लढाईच्या माणसांचा अधिकारी होता, तो व
राजाच्या अंगाजवळचे जे सात मनुष्य नगरांत
सांपडले, ते व जो सैन्याचा मुख्यलेखक देशांतल्या
लोकांस मिळवीत असे, तो व देशाच्या लोकांतले
जे साठ मनुष्य नगरामध्यें सांपडले, ते त्यानें नग-
रांतून नेले. २६ त्यांस तर नबूजरदान जो राज-
रक्षकांचा नायक, त्यानें घेऊन रिब्लास बाबेलेच्या
राजापाशीं नेलें. २७ तेव्हां बाबेलेच्या राजानें
त्यांस हमाथ देशांतल्या रिब्लांत हाणवून ठार
मारविलें. तसाच यहूदा आपल्या भूमीवरून पाडा-
वपणाच्या प्रवासांत नेला. २८ जे लोक नबूख-
द्रेज्जारानें पाडाव करून नेले, ते हेच आहेत;
सातव्या वर्षीं तीन हजार व तेवीस यहूदी नेले.
२९ नबूखद्रेज्जाराच्या अठराव्या वर्षांत त्यानें
आठशें बत्तीस जन यरूशालेमेहून नेले. ३०
नबूखद्रेज्जाराच्या तेविसाव्या वर्षांत नबूजरदान,
जो राजरक्षकांचा नायक, त्यानें यहूदांतले सातशें
पंचेताळीस लोक पाडाव करून नेले; सर्व जन
मिळून चार हजार साहाशें होते.

३१ आणि असें झालें, कीं यहोयाखीन जो
यहूदाचा राजा त्याच्या पाडावपणाच्या प्रवासा-
च्या सत्तातिसाव्या वर्षांत, बाराव्या महिन्यांत,
महिन्याच्या पंचविसाव्या दिवशीं अवीलमरो-

दाख **बाबेले**चा राजा याने आपल्या राज्याच्या
पहिल्या वर्षी **यहोयाखीन** जो **यहूदा**चा राजा
त्याचें मस्तक उंचाविलें, आणि बंदिशाळेंतून बाहेर
आणिलें; ३२ **आणि** त्यासीं शांत्वनाचीं वचनें
बोलला; आणि जे सर्व राजे त्यासंगतीं **बाबेलें**त
होते, त्यांच्या गादीपेक्षां त्याची गादी उंच केली;
३३ **आणि** त्याचीं बंदींतलीं वस्त्रें बदलविलीं;
नंतर तो आपल्या आयुष्याच्या सर्व दिवसपर्यंत
त्यासमक्ष जेवीत असे· ३४ **आणि** **बाबेले**च्या
राजाकडून त्याला याचा शिधा, नित्याचा शिधा,
प्रतिदिवसाचा वांटा त्यांच्या आयुष्याच्या सर्व दिव-
सांत त्याच्या मरणदिवसापर्यंत मिळत असे·

THE LAMENTATIONS OF JEREMIAH.

# इर्मयाचा विलाप.

### अध्याय १.

जी वस्ती लोकानी भरलेली असे ती कसी ए-
कलीच बसली आहे! कसी विधवेसारिखी
झाली आहे? जी राष्ट्रांमध्यें श्रेष्ठ व पर्गण्यांमध्यें
मुख्य होती ती कसी कर देणारी झाली आहे?
२ **ती** रात्रीं फार रडती, व तिचीं आसवें तिच्या
गालांवर असतात; तिच्या सर्व प्रियांतून तिचें
शांत्वन करायाला कोणी नाहीं; तिच्या सर्व मि-
त्रानी तिसीं कपट केलें आहे, ते तिचे वैरी झाले
आहेत· ३ **यहूदा** कष्टांमुळें व कठीण सेवेमुळें
पाडावपणाच्या प्रवासांत गेली आहे; ती राष्ट्रांमध्यें
वसती, तिजला विसांवा सांपडत नाहीं; जे तिच्या
पाठीस लागले त्या सर्वांनी तिला खिंडींमध्यें आ-
टपिलें· ४ **स**णाच्या सभेस कोणी येत नाहींत,
ह्मणून **जीयोने**चे मार्ग शोक करितात; तिच्या
सर्व वेसी ओसाड पडल्या आहेत; तिचे याजक
कण्हतात, तिच्या कुमारी पिडलेल्या आहेत, आणि
ती खिन्न आहे· ५ **तिचे** शत्रु मुख्य झाले आहेत,
तिचे वैरी खुशाल आहेत; कां तर **परमेश्वराने**
तिच्या बहुत अपराधांमुळें तिला पीडिलें आहे;
तिचीं लेंकरें शत्रूंपुढें पाडावपणाच्या प्रवासांत गेलीं
आहेत. ६ **आणि** **जीयोने**च्या कन्येची सर्व शो-
भा तिजपासून गेली आहे; ज्या हरिणांला चारा
सांपडत नाहीं त्यांसारिखे तिचे सर्दार झाले आ-
हेत, आणि पाठीस लागणाऱ्यापुढें शक्तिहीन हो-
ऊन गेले आहेत· ७ **यरूशालेम** आपल्या कष्टां-
च्या व पीडांच्या दिवसांत पूर्वदिवसांतल्या ज्या
आपल्या मनोरम गोष्टी होत्या त्या स[illegible]स्मरली,
जेव्हां तिचे लोक शत्रूच्या हातीं सांपडले, आणि
तिचें सहाय करायाला कोणी नव्हता, तेव्हां तिच्या
शत्रूनी तिला पाहिलें, व तिच्या शाब्बाथ दिवसांचा
उपहास केला· ८ **यरूशालेमे**ने फार पातक केलें
आहे; याकरितां ती भडकत फिरत आहे; जे
तिचा आदर करीत असत त्यानी तिला तुच्छ
मानिलें आहे, कां त्यानी तिचा नागवेपणा पाहिला
आहे, तर ती कण्हती, आणि पाठमोरी होती· ९
**ति**चा विटाळ तिच्या पदरांत आहे; ती आपला
अंतकाल स्मरली नाहीं; ह्मणून ती आश्चर्यप्रकारें
उतरली आहे; तिला शांत्वन करायाला कोणी
नाहीं; हे **परमेश्वरा**, माझे कष्ट पाहा, कां कीं
वैऱ्याने आपलें मोठेपण मिरविलें आहे· १०
तिच्या सर्व मनोरम पदार्थांवर शत्रूने आपला हात
लांबविला आहे; तर ज्या राष्ट्रांविषयीं त्वां आज्ञा
केली, कीं त्यानी माझ्या सभेंत शिरूं नये, ते
तिच्या पवित्रस्थानांत शिरले आहेत, असें तिने पा-

हिलें आहे. ११ तिचे सर्व लोक कण्हत असतां
भाकरीला शोधितात; त्यानीं आपला जीव वांच-
वावा ह्मणून अन्नासाठीं आपले मनोरम पदार्थ दि-
ल्हे आहेत; हे **परमेश्वरा**, मी नीच झालें आहें,
ह्मणून पाहा, मन लाव.
१२ जे तुह्मी इकडून चालतां त्या तुह्माला
हें कांहीं नाहीं, असें वाटतें काय? जें माझें दुःख
मला दिल्हें आहे, ज्याकडून **परमेश्वराने** आप-
ल्या संतप्तक्रोधाच्या दिवशीं मला पीडिलें आहे,
त्यासारिखें कांहीं दुःख आहे कीं नाहीं, हें सम-
जावें ह्मणून दृष्टि लावून पाहा. १३ त्याने वर-
तून माझ्या हाडांत अग्नि पाठविला आहे, तर तो
त्यांजवर प्रबल होतो; त्याने माझ्या पायांसाठीं
जाळें पसरिलें आहे, त्याने मला पाठमोरें केलें;
मला ओसाड केलें आहे, मी सर्व दिवस रोगी
असतें. १४ त्याच्या हाताने माझ्या पातकांचें
जोखड बांधलेलें आहे; तीं वळलेलीं असतां मा-
झ्या मानेवर आलीं आहेत; त्याने माझी शक्ति
मोडिली आहे, ज्यांतून माझ्याने उठवत नाहीं
अशा हातांत **प्रभूने** मला दिल्हें आहे. १५
**प्रभूने** मजमध्यें माझे सर्व वीर तुडविले आहेत;
त्याने माझ्या तरण्यांस चुरडण्यासाठीं समुदाय
मजवर बोलाविला आहे; जसें द्राक्षे तुडविण्याच्या
पात्रांत तसें **प्रभूने** यहूदाच्या कन्येच्या कुमारिला
तुडविलें आहे. १६ या गोष्टींमुळें मी रडतें;
माझ्या डोळ्यांतून, माझ्या डोळ्यांतून पाणी वाहतें;
कां तर ज्याने माझ्या जीवाला शांत्वन व समाधान
करावें तो मजपासून दूर आहे; वैरी प्रबल झाला,
ह्मणून माझीं लेंकरें अनाथ झालीं आहेत. १७
जीयोन आपले हात पसरिती, तिला शांत्वन करा-
याला कोणी नाहीं; **परमेश्वराने** याकोबाविषयीं
आज्ञा केली आहे, कीं त्याचे शत्रु त्याजभोंवते ये-
वोत; त्यांजमध्यें यरूशालेम विटाळशी झाली
आहे.
१८ **परमेश्वर** न्यायीच आहे; कां कीं म्या
त्याची आज्ञा मानिली नाहीं; अहो सर्व लोकांनों,
ऐका, आणि माझें दुःख पाहा; माझ्या कुमारी व
माझे तरणे पाडावपणांत गेलीं आहेत. १९ म्या
आपल्या प्रियांस बोलाविलें, परंतु त्यानीं मला फ-
सविलें; माझ्या याजकानी व वडिलानी आपला
जीव वांचवावा, ह्मणून आपणासाठीं अन्न शोधीत
असतां नगरांत प्राण सोडिला. २० हे **परमे-
श्वरा**, पाहा, कां मी संकटांत आहें; माझीं आं-
तडीं उकळतात; मजमध्यें माझें हृदय पालटलें
आहे; कारण कीं मी फार फितुरी असें; बाहेर
तरवार बाळरहित करिती, आंत मरणाची स्थिति
आहे. २१ मी कण्हतें, असें त्यानी ऐकिलें आ-
हे; माझें शांत्वन करायाला कोणी नाहीं; माझ्या
सर्व वैऱ्यानी माझें अरिष्ट ऐकिलें आहे; त्वां तें
केलें ह्मणून ते आनंदतात; जो दिवस त्वां नेमिला
आहे तो येईं, असें करिसील, तेव्हां ते मजसारि-
खे होतील. २२ त्यांची सर्व दुष्टाई तुजपुढें येवो;
आणि त्वां जसें मला माझ्या सर्व पातकांमुळें केलें
आहे, तसें त्यांस करावें; कां तर माझीं कण्हणीं
बहुत आहेत, आणि माझें हृदय ग्लान आहे.

## अध्याय २.

**प्र**भूने आपल्या क्रोधेंकरून जीयोनेची कन्या क-
सी झांकिली आहे? त्याने इस्राएलाची शो-
भा आकाशापासून पृथ्वीवर टाकिली आहे, आणि
तो आपल्या क्रोधाच्या दिवशीं आपलें पादासन
स्मरला नाहीं. २ **प्रभूने** कळवळा न करितां या-
कोबाच्या सर्व वस्त्या बुडविल्या आहेत; त्याने
आपल्या कोपेंकरून यहूदाच्या कन्येचीं सर्व दुर्गें
पाडिलीं; धुळीस मिळविलीं आहेत; त्याने राज्य
व त्यांतले सर्दार बाटविले आहेत. ३ त्याने आ-
पल्या संतप्तक्रोधेंकरून इस्राएलाचें सर्व शिंग का-
पून टाकलें आहे; त्याने त्याचा उजवा हात वै-
ऱ्यापासून मागें फिरविला आहे, आणि जो पेटलेला
अग्नि सभोंवार खातो त्यासारिखा तो याकोबावि-
रुद्ध जळाला आहे. ४ त्याने वैऱ्याप्रमाणें आ-
पलें धनुष्य वांकविलें; तो आपला हात उगारून
शत्रूसारिखा उभा राहिला, आणि जे जीयोनेच्या
कन्येच्या डेऱ्यांत दृष्टीस मनोरम होते त्या सर्वांस
त्याने वधिलें आहे; त्याने आपला कोप अग्नीसा-
रिखा ओतिला आहे. ५ **प्रभु** वैऱ्यासारिखा
झाला; त्याने इस्राएल बुडविली, तींतलीं सर्व
मंदिरें बुडविलीं आहेत; त्याचीं दुर्गें नाशिलीं आ-
हेत, आणि यहूदाच्या कन्येच्या ठायीं त्याने शोक
व खेद वाढविले आहेत. ६ आणि त्याने बसी

मळ्यांतली खोपटी तसा आपला मंडप वेगाने का-
ढिला आहे; आपलें सभामंदिर नाशिलें आहे;
**परमेश्वराने** सीयोनेंत सण व शाब्बाथ विसरत
असें केलें, आणि आपल्या रोषयुक्त क्रोधाने रा-
जा व याजक अवमानिले आहेत. ७ **प्रभु** आ-
पल्या वेदीला कंटाळला, त्याने आपल्या पवित्रस्था-
नाचा वीट मानिला आहे, त्याने तिच्या मंदिरांच्या
भिंती वैऱ्याच्या हातीं सोंपून दिल्ह्या; मग जसा
सणाच्या दिवसीं तसा त्यानी **परमेश्वराच्या** घ-
रांत गोंगाट केला आहे. ८ सीयोनेच्या कन्येचा
कोट नाशायाला **परमेश्वराने** संकल्प केला आहे;
त्याने दोरी ताणून आपला हात संहार करण्या-
पासून आकळिला नाहीं; ह्मणून प्राकार व कोट
आक्रंदन करीत, असें त्याने केलें; ते एकदांच
ग्लान झाले. ९ तिचीं दारें भूमींत रुतलीं आ-
हेत; त्याने तिचे अडसर तोडून नाशिले आहेत;
तिचा राजा व तिचे सरदार राष्ट्रांमध्यें आहेत:
नेमशास्त्र नाहींसें झालें; आणि तिच्या भविष्यवा-
द्यांस **परमेश्वरापासून** दर्शन प्राप्त होत नाहीं.
१० सीयोनेच्या कन्येचे वडील भूमीवर बसून उ-
गींच राहतात; त्यानी आपल्या डोक्यांवर धूळ च-
ढविली आहे; ते गोणताट नेसले आहेत; यरूशाले-
मेच्या कुमारीनी आपलीं डोकीं धुळींत घातलीं आहेत.
११ माझे डोळे आंसवें गाळून थकले, माझीं आंत-
डीं उकळतात, पोर व तान्हें बाळक गांवाच्या आ-
ळ्यांत मुर्च्छित होत असतां, माझ्या लोकांच्या
कन्येच्या भंगामुळें माझें काळीज भूमीवर ओतिलें
आहे. १२ तीं नगराच्या आळ्यांत घायाळाप्र-
माणें मुर्च्छित होऊन आपल्या मातांच्या उरावर
प्राण सोडीत असतां, धान्य व द्राक्षारस कोठें
आहेत? असें आपल्या मातांला ह्मणतात. १३
अगे यरूशालेमेच्या कन्ये, तुझा साक्षी कोण करूं?
तुला काय उपमा देऊं? अगे सीयोनेच्या कुमारी-
कन्ये, म्यां तुझें सांत्वन करावें ह्मणून तुला कशाची बरो-
बरी करूं? तुझा भंग समुद्रासारिखा मोठा आहे,
तर तुला कोण बरें करील? १४ तुझ्या भविष्य-
वाद्यानी तुजसाठीं व्यर्थता व मूर्खता पाहिल्या
आहेत; आणि तुझे पाडाव प्रवासीं परत आणा-
याला त्यानी तुझा अन्याय उघडा केला नाहीं;
परंतु त्यानी तुजसाठीं खोटे प्रवाद, व घालविणीं
हीं पाहिलीं आहेत. १५ जे तुजकडून चालतात
ते सर्व तुजविषयीं टाळ्या वाजवितात; ते यरू-
शालेमेच्या कन्येवर फुसफुसतात, व आपली मान
हालवितात, ज्या नगराला सुंदरपणाची पूर्णता,
अवघ्या पृथ्वीचें आनंदपात्र लोक ह्मणत असत,
तें हेंच आहे काय? असें बोलतात. १६ तुझ्या
सर्व वैऱ्यानी तुजवर आपलें तोंड वासलें आहे; ते
फुसफुसतात, व आपले दांत कडकडवितात; आ-
ह्मी तिला गिळिलें आहे, ज्या दिवसाची आह्मी
वाट पाहत होतों तो निश्चयें हाच आहे, तो आ-
ह्माला प्राप्त झाला आहे, त्याला आह्मी पाहिलें
आहे, असें ह्मणतात. १७ जें **परमेश्वराने**
संकल्पिलें होतें, तें त्याने साधिलें आहे; त्याने जें
आपलें वचन पूर्वदिवसांत आज्ञापिलें होतें, तें
त्याने समाप्त केलें आहे; त्याने कांहीं न रक्षितां
तुला पाडिलें आहे; तुझा वैरी तुजवर हर्षे, असें
त्याने केलें आहे; तुझ्या शत्रूंचें शिंग उभारिलें
आहे. १८ त्यांचें हृदय **प्रभू**कडे ओरडलें, हे
सीयोनेच्या कन्येच्या कोटा, अहोरात्र आंसवें नदी-
प्रमाणें वाहूं दे; तूं आपणाला विसांवा देऊं नको;
तुझ्या डोळ्याच्या बाहुलीने स्वस्थ राहूं नये. १९
तूं रात्रीं उठून ओरड; प्रहरांच्या आरंभीं **प्रभू**-
समोर तूं आपलें हृदय पाण्यासारिखें ओत; जीं
तुझीं पोरें सर्व आळ्यांच्या चवाठ्यांत भुकेने मू-
र्च्छित होतात, त्यांच्या जीवाकरितां तूं त्याजकडे
आपले हात उभार.

२० हे **परमेश्वरा**, दृष्टि लावून पाहा, त्वां
कोणाला असें केलें आहे; स्त्रिया आपल्या उप-
जांस, वीतभर बालकांस खातील काय? याजक
व भविष्यवादी यांस **प्रभू**च्या पवित्रस्थानांत वध-
तील काय? २१ पोर व ह्मातारा आळ्यांतल्या
भूमीवर गळून पडले आहेत; माझ्या कुमारी व
माझे तरणे तरवारीने पडले आहेत; त्वां आप-
ल्या क्रोधाच्या दिवसीं वध केला; त्वां दया न
करितां हनन केलें आहे. २२ जसें सभेच्या
दिवसीं तसें त्वां माझीं भयें सभोंवार बोलाविलीं
आहेत, **परमेश्वराच्या** क्रोधाच्या दिवसीं कोणी
सुटला नाहीं, वांचला नाहीं; ज्यांस म्यां लाडका-
विलें, व वाढविलें, त्यांस माझ्या वैऱ्याने नाहींसें
केलें आहे.

## अध्याय ३.

त्याच्या कोपाच्या काठीकडून ज्याने कष्ट भो-
गिले, तो पुरुष मीच आहें. २ त्याने
मला नेऊन प्रकाशांत नव्हे, परंतु अंधारांत चाल-
विलें आहे. ३ होय तो मजवर उलटला आहे;
सर्व दिवस तो आपला हात फिरवितो. ४ त्याने
माझा देह व माझीं कातडीं जीर्ण केलीं आहेत;
त्याने माझीं हाडें मोडिलीं आहेत. ५ त्याने मला
प्रतिबंध केला, आणि विष व कष्ट यांकडून मला
वेष्टिलें आहे. ६ त्याने मला पुरातन मेलेल्यांसा-
रिखें अंधारस्थलांत बसविलें आहे. ७ त्याने मज-
भोंवतें कुंपण घातलें आहे, ह्मणून माझ्याने निघवत
नाहीं; त्याने माझी बिडी भारी केली आहे. ८
जेव्हां मी आरोळी करितों, व ओरडतों, तेव्हांहि
तो माझ्या प्रार्थनेस अटक करितो. ९ त्याने ता-
शींव दगडाने माझे मार्ग बंद केले आहेत, त्याने
माझ्या वाटा वांकड्या केल्या आहेत. १० तो
मला टपता आस्वल, गुप्तांत बसलेला सिंह असा
झाला आहे. ११ त्याने माझे मार्ग सारून
मला फाडिलें आहे; त्याने मला अनाथ केलें आहे.
१२ त्याने आपलें धनुष्य वांकवून मला तीराचें
लक्ष्य, असें ठेविलें आहे. १३ त्याने आपल्या
भात्यांतले बाण माझ्या आंतड्यांत शिरविले आहेत.
१४ मी आपल्या सर्व लोकांजवळ उपहासासाठीं
व सर्व दिवस त्यांच्या गायनासाठीं झालों आहें.
१५ त्याने मला कडूपणाने भरिलें, मला कडूदव-
ण्याने मस्त केलें आहे. १६ त्याने खड्यांकडून
माझे दांत मोडिले आहेत, त्याने मला राखेने झां-
किलें आहे. १७ त्वां माझा जीव स्वस्थपणापासून
दूर केला आहे; मी कुशलास विसरलों आहें.
१८ मी आपले कष्ट व आपला पाठलाग कडूदव-
णा व विष स्मरतांना, १९ ह्मणालों. कीं माझा
भाव व माझी आशा परमेश्वरापासून नाहींशीं
झालीं आहेत. २० माझा जीव त्यांचें स्मरण
करितांना मजमध्यें उदास झाला आहे. २१ हें
मी मनांत आणितों, ह्मणून आशा धरितों.

२२ परमेश्वराचा महाप्रसाद आहे, आणि
त्याच्या दया थकत नाहींत, याकरितां आह्मी ना-
हींसे झालों नाहीं. २३ त्या रोज सकाळीं नव्या
होतात; तुझें विश्वासूपण अत्यंत आहे. २४
परमेश्वर माझा विभाग आहे, ह्मणून त्याजवर
आशा ठेवीन, असें माझा जीव ह्मणाला आहे. २५
जे त्याची वाट पाहतात, जो जीव त्याला शोधितो,
त्यांस परमेश्वर चांगला आहे. २६ मनुष्याने
धीर धरावा, आणि परमेश्वराच्या तारणाची आ-
शा धरावी, हें योग्य आहे. २७ पुरुषाला बरें
आहे, कीं त्याने आपल्या तरुणपणांत जूं साहावें.
२८ तें परमेश्वराने त्याजवर ठेविलें आहे, ह्म-
णून तो एकांतीं बसून उगा राहतो. २९ तो आ-
पलें तोंड धुळींत ठेवितो; कदाचित आशा असेल,
असें ह्मणतो. ३० जो त्याला हाणितो, त्याजकडे
तो आपला गाल देतो; त्याला फार निंदा प्राप्त
झाली आहे. ३१ तर प्रभु वीट मानून सर्वकाल-
पर्यंत टाकणार नाहीं. ३२ परंतु जरीं दुःख दि-
ल्हें, तरी तो आपल्या परम करुणांप्रमाणें दया
करील. ३३ कां तर तो मनोदयाने मनुष्यांस
पीडित व दुखवीत नाहीं. ३४ पृथ्वींतल्या सर्व
बंदिवानांस आपल्या पायांखालीं तुडवावें, ३५
अथवा परात्परासमक्ष पुरुषाचा न्याय दूर करा-
वा, ३६ अथवा मनुष्याचा वाद बिघडावा, हें
प्रभूला बरें वाटत नाहीं.

३७ परमेश्वराची आज्ञा नसतां, ज्याने सां-
गितलें, तर ठरेल, असा कोण आहे? ३८
परात्पराच्या आज्ञेकडून अरिष्ट व कुशल ठरत
नाहींत काय? ३९ जीवंत मनुष्याने, पुरुषाने आ-
पल्या पापाच्या दंडामुळें कां विलाप करावा? ४०
आह्मी आपले मार्ग शोधून व पारखून परमेश्वरा-
कडे फिरावें. ४१ आह्मी हात उंचावून आका-
शांतील देवाकडे आपलें मन लावावें. ४२ आ-
ह्मी अपराध व फितूर केला; त्वां क्षमा केली ना-
हीं. ४३ तूं आपणाला क्रोधाने वेष्टून आमच्या
पाठीस लागलास; त्वां दया न करितां वधिलें
आहे. ४४ प्रार्थनेने पार जाऊं नये, ह्मणून त्वां
आपणाला आभाळाने झांकिलें आहे. ४५ लो-
कांमध्यें त्वां आह्माला केर कचरा, असें केलें आहे.
४६ आह्मावर आमच्या सर्व वैऱ्यानी आपलें तोंड
वासलें आहे. ४७ भय व खांच, नाश व भंग
आह्मावर आले आहेत. ४८ माझ्या लोकांच्या
कन्येच्या भंगामुळें माझ्या डोळ्यांतून पाण्याच्या

नद्या वाहतात. ४९ परमेश्वर आकाशांतून दृष्टि
लावून पाही तोंपर्यंत, ५० माझा डोळा गळेल,
आणि अवकाश न होऊं देतां अटपणार नाहीं.
५१ माझ्या नगरांतल्या सर्व कन्यांमुळें माझा डोळा
माझ्या जीवाला दुखवितो. ५२ जे निष्कारण
माझे वैरी आहेत, त्यानी जसी पक्ष्याची तसी
माझी फार पारध केली आहे. ५३ त्यानी माझा
जीव खांचेंत नाहींसा केला, आणि मजवर धोंडा
फेंकिला आहे. ५४ पाण्यें माझ्या डोक्यावरून
वाहिलीं; तेव्हां मी ह्मणालों, मी नाहींसा झालों
आहें.

५५ हे परमेश्वरा, म्या खोल खांचेंतून तुझ्या
नामाला हाक मारिली आहे. ५६ त्वां माझा
शब्द ऐकिला आहे; मी श्वास टाकितांना, अथवा
आरोळी करितांना, तूं आपला कान झांकूं नको.
५७ जेव्हां म्या तुजकडे हाक मारिली, तेव्हां तूं
जवळ आलास; भिऊं नको, असें त्वां ह्मटलें.
५८ हे प्रभू, त्वां माझ्या जीवाल्याचे वाद केले;
त्वां माझा जीव उद्धरिला आहे. ५९ हे परमे-
श्वरा, मजकडे जो अन्याय केलेला तो त्वां पाहि-
ला आहे; माझा न्याय कर. ६० त्यानी माझा
जो सर्व सूड उगविला त्याला, मजविरुद्ध ज्या
सर्व कल्पना केल्या त्यांस त्वां पाहिलें आहे. ६१
हे परमेश्वरा, त्यानी जी माझी निंदा केली तिला,
व मजविरुद्ध ज्या कल्पना केल्या त्यांस त्वां ऐकिलें
आहे. ६२ जे मजवर उठले त्यांचीं वचनें,
आणि त्यानी जी मजविरुद्ध सर्व दिवस योजना
केली ती, हीं त्वां ऐकिलीं आहेत. ६३ त्यांचें
बसणें उठणें तूं पाहा; मी त्यांच्या गायनासाठीं
आहें.

६४ हे परमेश्वरा, त्यांच्या हातांच्या कर्मा-
प्रमाणें त्यांस फल भरून दे. ६५ त्यांस मनाचा
खेद दे; त्याला तुझा शाप असो. ६६ क्रोधाने
त्यांच्या पाठीस लाग, आणि परमेश्वराच्या आ-
काशाखालून त्यांस नाहींसें कर.

## अध्याय ४.

सोनें कसें निस्तेज झालें? उत्कृष्ट सोनें कसें पा-
लटलें आहे! पवित्र मंदिराचे दगड सर्व
आळ्यांच्या चवाटयांत विखरले आहेत. २ जी-
योनेचे जे मोलवान पुत्र निर्मळ सोन्याबरोबर होते,
ते कुंभाराच्या हातानी घडलेल्या मडक्यांसारिखे
कसे मानिलेले आहेत? ३ अघोरपशूहि थान
काढून आपल्या पिलांस दूध पिऊं देतात; परंतु
माझ्या लोकांची कन्या रानांतल्या शहामृगांसारिखी
निर्दय झाली आहे. ४ तान्ह्याची जीभ तान्हेने
त्याच्या तालूस चिकटती; पोरें भाकर मागतात,
आणि त्यांस कोणी ती वांटून देत नाहीं. ५ जे
मिष्टान्न भोजन करीत असत, ते आळ्यांत दुर्बळ
पडले आहेत; जे किर्मिजी वस्त्र नेसवून पाळिले
होते, त्यानी उकरड्यांचा आश्रय घेतला आहे.
६ आणि जी सदोम तिला कोणतेहि हात लागले
नसतां अकस्मात पाडिली होती, तिच्या पापाच्या
दंडापेक्षां माझ्या लोकांच्या कन्येचा अन्यायदंड
मोठा झाला आहे. ७ तिचे नाजीर बर्फापेक्षां
स्वच्छ होते, ते दुधापेक्षां गोरे होते, ते माणिकांपेक्षां
शरीराने तांबडे होते, त्यांचें सुंदरपण इंद्रनीलाचें
होतें. ८ त्यांचा तोंडवळा कोळशापेक्षां काळा
झाला आहे, त्यांस आळ्यांत ओळखत नाहींत;
त्यांची कातडी त्यांच्या हाडांस मिळाली आहे;
ती सुकून गेली, लांकडासारिखी झाली आहे. ९
जे भुकेने मारिलेले त्यांपेक्षां तरवारीने वधलेले
सुखी आहेत; कारण कीं ते शेतांतले उपज नस-
ल्यामुळें झुरझुरून क्षीण होतात. १० दयामय
स्त्रियांच्या हातानी त्यांचीं पोरें शिजविलीं; माझ्या
लोकांच्या कन्येच्या भंगाच्या वेळीं तीं त्यांचें खाणें
झालीं. ११ परमेश्वराने आपला रोष संपविला;
त्याने आपला संतप्त क्रोध ओतिला आहे, व त्याने
सीयोनेंत अग्नि पेटविला, तेव्हां त्या अग्नीने तिचे
पाये जाळून टाकिले. १२ शत्रु व वैरी यरू-
शालेमेच्या दारांत शिरतील, असें पृथ्वीचे राजे व
पृथ्वीचे सर्व राहणारे विश्वासेनात.

१३ तिच्या भविष्यवाद्यांच्या पातकांमुळें, तिच्या
याजकांच्या अन्यायांमुळें, ज्या त्यानी तिजमध्यें
न्यायींचें रक्त पाडिलें, १४ ते आंधळ्यांप्रमाणें
आळ्यांत भ्रमले, ते एवढे रक्ताने माखलेले होते
कीं कोणाच्याने त्यांच्या वस्त्राला स्पर्शवेना. १५
दूर जा, अमंगल आहे, असें लोक त्यांस
ह्मणाले; दूर जा, दूर जा, स्पर्शूं नका; जेव्हां
ते पळून भ्रमले, तेव्हां ते राष्ट्रांमध्यें ह्मणाले,

कीं ते तेथें प्रवास पुन्हा करणार नाहींत. १६
**परमेश्वराच्या** मुखानें त्यांस विखरिलें आहे, तो
त्यांजकडे पुन्हां मन लावणार नाहीं; त्यांनी याज-
कांची मर्यादा राखिली नाहीं, त्यांनी वडिलांवर
कृपा केली नाहीं. १७ **आजपर्यंत** आमचे डोळे
वृथा, आमच्या सहायाची वाट पाहून थकले आहेत;
जें राष्ट्र आह्मांला तारीना, त्याची वाट आह्मी
जपून पाहिली आहे. १८ **ते** आमच्या पावलां-
च्या मागें असें लागतात कीं आह्मांला आपल्या
आळ्यांत चालतां येत नाहीं, आमचा अंत जवळ
आला आहे, आमचे दिवस समाप्त झाले आहेत;
आमचा अंत आलाच आहे. १९ **जे** आमच्या
पाठीस लागले ते आकाशांतल्या गरुडांपेक्षां चपळ
होते; त्यांनी आह्मांला डोंगरांवर वेगानें पिटलें,
रानांत आह्मांसाठीं टपले. २० **आमच्या** नाकपु-
ड्यांतला श्वास, **परमेश्वराचा** अभिषिक्त, ज्या-
विषयीं आह्मी ह्मणत असों, कीं त्याच्या छाये-
खालीं आह्मी राष्ट्रांमध्यें जीवूं, तो त्यांच्या खांचांत
सांपडला आहे.

२१ **अगे अदोमाच्या** कन्ये, जी तूं ऊज देशांत
वसतीस, ती आनंद व हर्ष कर; तुलाहि प्याला
येईल; तेव्हां तूं मस्त होसील, आणि आपणाला
नागवें करिसील.

२२ **अगे जीयोनेच्या** कन्ये, तुझ्या अन्यायाचें
शासन समाप्त झालें आहे; तो तुला पुन्हां पाडाव-
पणाच्या प्रवासांत घालविणार नाहीं; अगे अदो-
माच्या कन्ये, तो तुझ्या अन्याचें शासन करील;
तुझीं पातकें उघडीं करील.

## अध्याय ५.

**हे परमेश्वरा,** जें आह्मांला झालें तें स्मर, मन
लावून आमची निंदा पाहा. २ **आमचें** वतन
परक्यांकडे, आमचीं घरें इतरांकडे फिरलीं आहेत.
३ **आह्मी** अनाथ बापपोरके झालों आहों, आमच्या
माता विधवांसारिख्या झाल्या आहेत. ४ **आह्मी**
पैसे देऊन आपलें पाणी प्यालों आहों; आमचीं फां-
टीं मोलानें येतात. ५ **आमच्या** मानेवर आमचा
पाठलाग होत आहे; आह्मी श्रम करितों, आह्मां-
ला विसांवा घ्यावयास सांपडत नाहीं. ६ **आह्मी**
भाकरीनें तृप्त व्हायाला **मिसरी** व **अश्शूरी** यांच्या
हातावर हात दिल्हा आहे. ७ **आमच्या** पूर्वजा-
नी पाप केलें, ते नाहींत; आणि आह्मी त्यांच्या
अन्यायांचा भार वाहिला आहे. ८ **दासांनी** आ-
ह्मावर प्रभुत्व केलें आहे; आणि आह्मांला त्यां-
च्या हातांतून सोडवायाला कोणी नाहीं. ९ **रा**-
नांतल्या तरवारीमुळें आह्मी आपल्या जीवाच्या
जोखिमानें आपलें अन्न आणिलें. १० **दुकाळाच्या**
झळीनें आमची कातडी भट्टीसारिखी तापली. ११
**शत्रूंनी** जीयोनेंतल्या स्त्रिया, **यहूदाच्या** नगरांतल्या
कुमारी बाटविल्या. १२ **सरदार** त्यांच्या हातानी
टांगले होते; वडिलांचीं मुखें आदरलीं नव्हतीं.
१३ **तरण्यांनी** दळण्याचे श्रम भोगिले, आणि पोरें
लांकडाच्या भाराखालीं गळालीं आहेत. १४
**वडील** वेशींतून, आणि तरणे आपल्या गायनवाद-
नापासून सुटून राहिले. १५ **आमच्या** हृदयाचा
आनंद होऊन गेला; आमचें नाचणें पालटून आ-
क्रंदन झालें आहे. १६ **आमच्या** डोक्यावरला
मुगूट पडला आहे; आह्मी पाप केलें आहे, ह्म-
णून आह्मांला हाय हाय. १७ **याकरितां** आमचें
हृदय मुर्च्छित झालें आहे; या कारणांमुळें आम-
च्या डोळ्यांवर काळोखी आली आहे. १८ **जो**
**जीयोन** पर्वत ओसाड पडला आहे, त्याजमुळेंच
त्याजवर कोल्हे फिरतात. १९ **हे परमेश्वरा,**
तूंच सर्वकालपर्यंत राहतोस; तुझें सिंहासन युगा-
युगच आहे. २० **आह्मांला** सर्वकाल कां विस-
रतोस? चिरकाल आह्मांला कां टाकून देतोस?
२१ **हे परमेश्वरा,** आह्मांला तुजकडे फिरीव,
ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस
नवे कर. २२ **परंतु** त्वां आह्मांला अगदीं टाकून
दिल्हें आहे; तूं आह्मावर फार कोपला आहेस.

# यहेज्केलाचा भविष्यवाद.

## अध्याय १.

तर तिसाव्या वर्षांत, चौथ्या महिन्यांत, महि-
न्याच्या पांचव्या दिवशीं मी खबार नदीजवळ
पाडाव प्रवाशांमध्यें असतांना असें झालें, कीं आ-
काशें उघडलीं, तेव्हां म्या देवाचे दृष्टांत पाहिले.
२ यहोयाखीन राजाच्या पाडावपणाच्या प्रवासा-
च्या पांचव्या वर्षांत, महिन्याच्या पांचव्या दिवशीं,
३ बूजीचा पुत्र यहेज्केल याजक याजवळ खा-
ल्द्यांच्या देशांत, खबार नदीवर, परमेश्वराचें
वचन निश्चयें आलें, आणि तेथें परमेश्वराचा
हात त्याजवर होता.

४ तेव्हां म्या पाहिलें, आणि पाहा, वावटूळ,
मोठें अभाळ आणि वळवळता अग्नि उत्तरेंतून येत
होता, आणि त्याभोंवती प्रभा होती, आणि त्याज-
मधून त्या अग्नीमधून काचमणीचा रंग असा दि-
सला. ५ आणि त्याजमधून चोहों जीवांची प्र-
तिमा आली; आणि त्यांचा आकार हाच, कीं
त्यांस मनुष्याची प्रतिमा होती. ६ आणि त्यांत-
ल्या प्रत्येकाला चार मुखें होतीं, व प्रत्येकाला
चार पक्ष होते. ७ आणि त्यांचे पाय सरळ पाय
होते; आणि त्यांचे तळपाय वासराच्या तळपायां-
सारिखे होते; आणि घोंटलेल्या पित्तलाच्या रंगा-
प्रमाणें चमकत होते. ८ आणि त्यांच्या पक्षां-
खालीं त्यांच्या चोहों अंगांस मनुष्याचे हात होते;
आणि त्या चौघांस आपापलीं मुखें व पक्ष हीं हो-
तीं. ९ त्यांचे पक्ष एकमेकांसीं लगत होते; ते
आपल्या गतींत वळत नसत; ते प्रत्येक नीट स-
मोर चालत असत. १० आणि त्यांच्या मुखां-
ची प्रतिमा कसी? तर त्या चौघांस उजव्या अं-
गास मनुष्याचें मुख व सिंहाचें मुख होतें; आणि
त्या चौघांस डाव्या अंगास बैलाचें मुख होतें;
आणि त्या चौघांस गरुडाचें मुखहि होतें. ११
असींच त्यांचीं मुखें होतीं; आणि त्यांचे पक्ष
वरतीं पसरलेले होते; प्रत्येकाचे दोन पक्ष एकमे-
कांसीं लगत होते, आणि दोन पक्ष त्यांच्या अं-
गांस झांकीत होते. १२ ते प्रत्येक नीट समोर
चालत असत; जिकडे आत्मा चालायाचा असे,
तिकडे ते चालूं लागत; ते आपल्या गतींत वळत
नसत. १३ आणि जीवांची प्रतिमा कसी? तर
त्यांचा आकार पेटल्याअग्नीच्या निखाऱ्यांसारिखा,
दिव्याच्या आकारासारिखा होता; ती त्या जीवां-
मध्यें फिरत होती; आणि अग्नि चकचकीत होता,
आणि अग्नींतून वीज निघत असे. १४ आणि
ते जीव विजेच्या आभासासारिखे धांवत फिरत
असत.

१५ जेव्हां मी त्या जीवांस पाहत होतों, तेव्हां
पाहा, एक चाक आपल्या चोहों मुखांसहित त्या
जीवांजवळ भूमीवर होतें. १६ त्या चाकांचा
आकार व त्यांची रचना हीं लसण्याच्या रंगासा-
रिखीं होतीं; आणि त्या चौघांस एकच प्रतिमा
होती; आणि जसें चाकामध्यें चाक तसीं त्यांचा
आकार व त्यांची रचना हीं होतीं. १७ तीं
चालतांना त्यांच्या चोहों अंगांसीं चालत; तीं आ-
पल्या गतींत वळत नसत. १८ आणि त्यांच्या
धांवा उंच व भयंकर होत्या; आणि त्या चोहों-
भोंवत्या त्यांच्या धांवा डोळ्यांनीं भरलेल्या होत्या.
१९ जेव्हां ते जीव चालत, तेव्हां त्यांसंगतीं तीं
चाकेंहि चालत; आणि जेव्हां ते जीव उंचावत,
तेव्हां तीं चाकेंहि उंचावत. २० जिकडे आ-
त्मा चालायाचा असे, तिकडे तीं चालूं लागत, ति-
कडे त्यांतला आत्मा चालायाचा असे; आणि त्या
जीवांसंगतीं तीं चाकें उंचावत असत; कारण कीं
त्या जीवांचा आत्मा चाकांत होता. २१ जेव्हां
ते चालत, तेव्हां तीं चालत; आणि जेव्हां ते उभे
राहत, तेव्हां तीं उभीं राहत; आणि जेव्हां ते
भूमीवरून उंचावत, तेव्हां त्यांसंगतीं तीं चाकेंहि
उंचावत; कारण कीं त्या जीवांचा आत्मा चाकांत
होता. २२ आणि त्या जीवांच्या माथ्यांवर अं-
तराळाचा आभास भयंकर स्फटिकाच्या रंगासारि-

खा होता, तो त्यांच्या माथ्यांवर वरतीं पसरलेला
होता· २३ आणि अंतराळाखालीं त्यांचे पक्ष
एकमेकाकडे सरळ होते; प्रत्येकाला दोन पक्ष
होते, जे या बाजूस त्यांच्या अंगांस झांकीत होते;
आणि प्रत्येकाला दोन पक्ष होते, जे त्या बाजूस
त्यांच्या अंगांस झांकीत होते· २४ जेव्हां ते
चालले, तेव्हां म्या त्यांच्या पक्षांचा शब्द, जसा
पुष्कळ पाण्यांचा शब्द, जसा सर्वसमर्थाचा शब्द,
गलक्याचा शब्द, जसा सैन्याचा शब्द तसा ऐ-
किला; जेव्हां ते उभे राहिले, तेव्हां त्यानी आपले
पक्ष मिटून घेतले· २५ आणि जेव्हां त्यानी उभें
राहून आपले पक्ष मिटून घेतले, तेव्हां जें अंतराळ
त्यांच्या माथ्यांवर होतें, त्यांतून शब्द आला·
२६ आणि त्यांच्या माथ्यांवर जें अंतराळ हो-
तें, त्यावरतीं इंद्रनील पाषाणाच्या आभासासारिखी
सिंहासनाची प्रतिमा होती; आणि सिंहासनाच्या
प्रतिमेवर मनुष्याच्या आकारासारिखी प्रतिमा त्या-
जवर वरतीं होती· २७ आणि म्या तिजमध्यें
सभोंवार काचमणीच्या रंगासारिखा, अग्नीच्या आ-
भासासारिखा कोणीएक पाहिला; आणि त्याच्या
कंबरेच्या आकारापासून वरतीं, व त्याच्या कंबरे-
च्या आकारापासून खालतीं म्यां अग्नीच्या आभा-
सासारिखें कांहीं पाहिलें, आणि त्याभोंवती वि-
भासा होती· २८ पावसाच्या दिवसीं जें धनुष्य
आभाळांत असतें, त्याचा जसा आभास तसा त्या
प्रभेचा आभास सभोंवार होता; तो परमेश्वरा-
च्या गौरवाच्या प्रतिमेचा आभास होता; जेव्हां
म्या तो पाहिला, तेव्हां मी उपडा पडलों, आणि
बोलणाऱ्याचा शब्द म्या ऐकिला·

## अध्याय २.

तेव्हां त्याने मला ह्मटलें, हे मनुष्याच्या पुत्रा,
तूं आपल्या पायांवर उभा राहा, ह्मणजे मी
तुला बोलेन· २ मग जेव्हां तो मला बोलला,
तेव्हां आत्म्याने माझ्याठायीं येऊन मला माझ्या
पायांवर उभें केलें, तेव्हां म्या त्याला मजसीं बोलता
ऐकिलें· ३ तेव्हां त्याने मला ह्मटलें, हे मनुष्या-
च्या पुत्रा, मी तुला इस्राएलाच्या वंशाकडे, जें रा-
ष्ट्र मजविरुद्ध फितूरी असे, त्याकडे पाठवितों; ते
व त्यांचे पूर्वज आजपर्यंतहि माझा अपराध करीत
आले आहेत· ४ तर धीट व हट्टीहृदयाचे जे वंश
त्यांजकडे मी तुला पाठवितों; आणि, प्रभु पर-
मेश्वर असें ह्मणतो, हें तूं त्यांस सांग· ५ ह्मणजे
ते ऐकून किंवा न ऐकूनहि, कां कीं ते फितुरी वंश
आहेत, जाणतील, कीं भविष्यवादी त्यांजमध्यें
होता·
६ आणि हे मनुष्याच्या पुत्रा, जरीं तुजजवळ
कांटेरीं व कांटेधोत्रे असले, आणि तूं विंच्वांमध्यें
राहिलास, तरीं त्यांस भिऊं नको, व त्यांच्या व-
चनांमुळें भिऊं नको; जरीं ते फितूरी वंश आहेत,
तरीं त्यांच्या वचनांमुळें भिऊं नको, व त्याजमुळें
भयाभीत होऊं नको· ७ आणि त्यानी ऐकिलें
किंवा न ऐकिलें, तरीं त्यांस माझीं वचनें सांग;
कां कीं ते फितूरी आहेत· ८ तर हे मनुष्याच्या
पुत्रा, जें मी तुजजवळ बोलतों, तें तूं ऐक; त्या
फितूरी वंशासारिखा फितूरी होऊं नको; तूं आप-
लें तोंड उघड, आणि जें मी तुला देतों, तें खा·
९ तेव्हां म्या दृष्टी लाविली, आणि पाहा,
एक हात मजकडे लांबविलेला होता; आणि पा-
हा, त्यांत पुस्तकाची गुंडाळी होती· १० मग
त्याने ती मजपुढें विस्तारिली; आणि ती पाठपोट
लिहिली होती, आणि तिजवर विलाप व आक्रांत
व हाय हे लिहिले होते·

## अध्याय ३.

आणि त्याने मला ह्मटलें, हे मनुष्याच्या पुत्रा,
जें तुला सांपडतें आहे, तें खा; ही गुंडा-
ळी खा, आणि जाऊन इस्राएलाच्या वंशाला
बोल· २ मग म्या आपलें तोंड उघडिलें, तेव्हां
त्याने मला ती गुंडाळी खाऊं दिल्ही· ३ आणि
त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें
पोट खाई, असें कर; आणि जी गुंडाळी मी
तुला देतों, इने तूं आपलीं आंतडीं भर; तेव्हां
म्या ती खाल्ली, आणि ती माझ्या तोंडांत मधा-
सारिखी गोड होती·
४ आणि त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा.
इस्राएलाच्या वंशाकडे चालत जा, आणि त्यांजवळ
माझीं वचनें बोल· ५ कां तर परक्या बोलीच्या
व अवघड भाषेच्या लोकांजवळ नव्हे, परंतु इस्रा-
एलाच्या वंशाजवळ पाठविलेला आहेस; ६

वचनें तूं समजत नाहींस, अशा परवया बोलीच्या व
अवघड भाषेच्या लोकांजवळ पाठविलेला नाहींस;
निश्चयें जर म्या तुला त्यांजकडे पाठविलें असतें,
तर त्यानी तुझें ऐकिलें असतें. ७ **आणि** इस्राए-
लाचे वंश तुझें ऐकायाला मान्य होणार नाहींत;
कां तर ते माझें ऐकायाला मान्य होणार नाहींत;
कारण कीं इस्राएलाचे सर्व वंश धीट व कठिन हृद-
याचे आहेत. ८ **पाहा**, म्या तुझें मुख त्यांच्या
मुखांविरुद्ध बळकट केलें आहे, आणि त्यांच्या
कपाळांविरुद्ध तुझें कपाळ बळकट केलें आहे. ९
**म्यां** तुझें कपाळ हिऱ्यासारिखें गारेपेक्षां बळकट
केलें आहे; जरी ते फितुरी वंश आहेत, तरी
त्यांस भिऊं नको, आणि त्यांजकरितां भयभित हो-
ऊं नको. १० **आणि** त्याने मला ह्मटलें, मनुष्या-
च्या पुत्रा, माझीं जीं वचनें मी तुजजवळ बोलतों,
तीं सर्व तूं आपल्या हृदयांत घे, आणि आपल्या
कानानी ऐक. ११ **आणि** पाडाव प्रवाशांकडे,
तुझ्या लोकांच्या वंशांकडे चालत जा, आणि त्यांज-
वळ बोल, आणि त्यानी ऐकिलें किंवा न ऐकिलें,
तरी, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, हें त्यांस सांग.
१२ **तेव्हां** आत्म्याने मला उंचावलें, आणि म्या आ-
पल्या पाठीमागून मोठा गोंगाटाचा शब्द ऐकिला, तो
असा, कीं त्याच्या स्थानांतून **परमेश्वराचें** गौरव
सुवंदित असो. १३ **आणि** जे त्या जीवांचे पक्ष
एकमेकांसीं लागलेले होते त्यांचा शब्द, व त्यांसं-
गतीं जीं चाकें होतीं त्यांचा शब्द, आणि मोठा
गोंगाटाचा शब्द म्या ऐकिला. १४ **आणि** आ-
त्म्याने मला उंचावून नेलें, तेव्हां मी खिन्न होऊन
आपल्या जीवात्म्याच्या संतापाने गेलों; आणि **पर-
मेश्वराचा** हात मजवर बळकट होता.

१५ **मग** तेलाबीबेस खबार नदीजवळ जे पा-
डाव प्रवासी राहत होते, त्यांजवळ मी आलों;
आणि जेथें ते बसले होते, तेथें त्यांजमध्यें मी
सात दिवस खेद करीत बसलों. १६ **मग** सात
दिवसांनंतर असें झालें, कीं **परमेश्वराचें** वचन
मजजवळ आलें कीं, १७ **मनुष्याच्या** पुत्रा, म्या
तुला इस्राएलाच्या वंशाचा पाहरेकरी केलें आहे;
ह्मणून माझ्या मुखापासून वचन ऐकून त्यांस मज-
कडचा बोध कर. १८ **जेव्हां** मी दुष्टाला, तूं
निश्चयें मरसील, असें ह्मणेन; तेव्हां जर तूं त्या-
ला बोध करणार नाहींस, आणि दुष्टाला त्याच्या
कुमार्गाविषयीं बोध करायाला, त्याला वांचवायाला
बोलणार नाहींस; तर तो दुष्ट आपल्या अन्यायाने
मरेल; परंतु त्याचें रक्त तुझ्या हातापासीं मागेन.
१९ **आणि** तूं जेव्हां दुष्टाला बोध करिसील, तेव्हां
जर तो आपल्या दुष्टपणापासून व आपल्या कुमार्गा-
पासून फिरला नाहीं, तर तो आपल्या अन्यायाने
मरेल; परंतु त्वां आपला जीव वांचविला आहे.
२० **आणि** जेव्हां न्यायी आपल्या न्यायीपणापासून
फिरून अन्याय करील, आणि मी त्याजपुढें अड-
खूळ ठेवीन, तेव्हां तो मरेल; त्वां त्याला बोध
केला नाहीं, ह्मणून तो आपल्या पापाने मरेल,
आणि त्याचें जें न्यायीपण त्याने केलें तें मी स्मर-
णार नाहीं; परंतु त्याचें रक्त तुझ्या हातापासीं
मागेन. २१ **आणि** न्यायीने पाप करूं नये, ह्म-
णून जर तूं न्यायीला बोध करिसील, आणि तो
पाप करणार नाहीं, तर तो वांचेलच वांचेल, कां
कीं त्याला बोध केला होता; त्वांहि आपला जीव
वांचविला आहे.

२२ **आणि** तेथें **परमेश्वराचा** हात मजवर
होता; तेव्हां त्याने मला ह्मटलें, तूं उठून खो-
ऱ्यांत निघून जा, ह्मणजे तेथें तुजबवळ बोलेन.
२३ **मग** मी उठून खोऱ्यांत निघून गेलों; आ-
णि पाहा, जें गौरव म्या खबार नदीजवळ पाहिलें,
त्यासारिखें **परमेश्वराचें** गौरव तेथें उभें राहिलें
होतें; तेव्हां मी उपडा पडलों. २४ **मग** आ-
त्म्याने माझ्याठायीं येऊन मला माझ्या पायांवर
उभें केलें, तेव्हां त्याने मसीं बोलून मला ह्मटलें,
तूं आंत जाऊन आपणाला आपल्या घरामध्यें झां-
कून घे. २५ **आणि** हे मनुष्याच्या पुत्रा, तूं पाहा,
ते तुला बंधनें लावितलि, आणि त्यानी तुला बां-
धितील, ह्मणजे त्यांजमध्यें निघून जाणार नाहींस.
२६ **आणि** तुझी जीभ तुझ्या टाळूस चिकटे, असें
करीन, तेव्हां तूं मुका होसील, आणि त्यांचा धम-
कावणारा असणार नाहींस; कां तर ते फितुरी वंश
आहेत. २७ **जेव्हां** मी तुजजवळ बोलेन, तेव्हां
तुझें तोंड उघडीन, ह्मणजे, असें **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, हें त्यांस सांगसील, जो ऐकेल तो ऐको;
आणि जो न ऐकेल तो न ऐको; कां तर ते फितूरी-
वंश आहेत.

## अध्याय ४.

आणि हे मनुष्याच्या पुत्रा, तूं आपणासाठीं
एक कौल घेऊन तें आपणापुढें ठेव, आणि
त्याजवर यरूशालेम नगरीचें चित्र काढ; २
आणि तिला वेढा घाल, आणि तिजभोंवता आवार
बांध, आणि तिजवर मोरचा रच; आणि तिज-
जवळ छावणी दे, आणि तिजवर सभोंवार धक्का
देण्याचीं यंत्रें मांड. ३ आणि तूं आपणाला
लोखंडाची कढई घेऊन ती लोखंडी भिंत तु-
झ्या व नगराच्या मध्यें ठेव; आणि तूं आपलें
मुख तिजकडे कर, ह्मणजे तिला घेरा पडेल, आणि
तिला वेढा घालसील; हें इस्राएलाच्या वंशाला
चिन्ह होईल. ४ आणि तूं आपल्या डाव्या कुशी-
वर नीज, आणि तिजवर इस्राएलाच्या वंशाचा
अन्याय ठेव; ज्या दिवसांच्या गणतीपर्यंत तिजवर
निजसील, तोंपर्यंत त्यांचा अन्याय साहसील. ५
कां कीं दिवसांच्या गणतीप्रमाणें तीनशें नव्वद
दिवस म्या तुजवर त्यांच्या अन्यायाचीं वर्षें ठेवि-
लीं आहेत; मग इस्राएलाच्या वंशाचा अन्याय
साहसील. ६ त्वां ते दिवस समाप्त केले, ह्मणजे
तूं फिरून आपल्या उजव्या कुशीवर नीज, ह्मणजे
चाळीस दिवसपर्यंत यहूदाच्या वंशाचा अन्याय
साहसील; म्या तुजसाठीं प्रत्येक दिवस एका
वर्षाच्या स्थानीं नेमिला आहे. ७ तर यरूशाले-
मेच्या वेढ्याकडे तूं आपलें मुख ठेव, आणि तुझा
बाहु उघडा असतां तिजवर भविष्य सांग. ८
आणि पाहा, मी तुला बंधनें लावीन; मग तूं आ-
पला वेढा समाप्त करीस, तोंपर्यंत आपल्या एका
कुशीवरून दुसरीवर फिरणार नाहींस.
९ आणि तूं आपणासाठीं गहूं व जव व पावटे
व मसुरा व बाजरी व देवगोधूम घेऊन एका पात्रांत
घाल, आणि त्यांची तूं आपणासाठीं भाकर कर,
आणि जितके दिवसांच्या गणतीपर्यंत तूं आपल्या कुशी-
वर निजसील, तोंपर्यंत तीनशें नव्वद दिवस ती खा.
१० आणि जें आपलें अन्न खासील, तें तोलून
प्रति दिवसीं वीस तोळे खासील; तें वारंवार खा-
सील. ११ आणि पाणी मापानें, हिनाचा साहावा
भाग पिसील; तें वारंवार पिसील. १२ आणि
तूं ती जवांच्या भाकरीप्रमाणें खासील, आणि त्यां-
च्या समक्ष मनुष्यगू घालून ती सिद्ध करिसील.
१३ आणि परमेश्वरानें ह्मटलें, याप्रमाणेंच
इस्राएलाचे वंश ज्या राष्ट्रांमध्यें त्यांस घालवीन,
त्यांमध्यें आपली अमंगल भाकर खातील. १४
तेव्हां मी ह्मणालों, अहा प्रभु परमेश्वरा, पाहा,
माझा जीव कधीं विटाळलेला नाहीं; आणि म्या
आपल्या तरुणपणापासून आतांपर्यंत जें आपसुक
मेलेलें अथवा फाडलेलें तें खाल्लें नाहीं; आणि
अमंगळ मास माझ्या तोंडांत कधीं आलें नाहीं.
१५ मग तो मला ह्मणाला, पाहा, म्या तुला मनु-
ष्यगुवाच्या स्थानीं गाईचें शेण नेमिलें आहे, तर तें
घालून तूं आपली भाकर सिद्ध कर. १६ आणि
तो मला ह्मणाला, मनुष्याच्या पुत्रा, पाहा, मी
यरूशालेमेंत भाकरीची काठी मोडीन; तेव्हां ते
भाकर तोलून व चिंतेनें खातील; आणि पाणी मापानें
व खेदानें पितील; १७ अशासाठीं कीं त्यांस
भाकर व पाणी यांचा तोटा पडावा, आणि ते एक-
मेकांसीं खेदित व्हावे, आणि आपल्या अन्यायामुळें
क्षीण होऊन जावे.

## अध्याय ५.

आणि मनुष्याच्या पुत्रा, तूं आपणाला तिखट
सुरी घे, ती आपणाला न्हाव्याच्या वस्त्या-
प्रमाण घे, आणि आपल्या डोक्यावर व आपल्या
दाढीवर फिरीव; नंतर तूं आपणाला तोलायाचा
ताजवा घे, आणि ते केंस वांट. २ आणि वे-
ढ्याचे दिवस समाप्त होतील, तेव्हां नगराच्या
मध्यें एक तिसराविभाग अग्नीनें जाळ, मग अन्य
तिसराविभाग घेऊन त्याभोंवतीं सुरीनें मार, नंतर
इतर तिसराविभाग वाऱ्याकडे विखरून दे, ह्म-
णजे मी तरवार उपसून त्यांच्या पाठीस लावीन.
३ आणि तूं त्यांतून थोडक्या गणतीचे घेऊन आ-
पल्या पदरांत बांध. ४ आणि त्यांतून कित्येक
पुन्हा घेऊन अग्नीमध्यें टाक, आणि ते अग्नींत
जाळ; कां तर त्यांतून अग्नि निघून इस्राएलाच्या
सर्व वंशांत जाईल.
५ प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं ही यरूशा-
लेम आहे; म्या ही राष्ट्रांमध्यें स्थापिली आहे,
आणि इजभोंवते देश आहेत. ६ परंतु ही रा-
ष्ट्रांपेक्षां वाईट करून माझ्या न्यायांविषयीं, आणि

जे देश इजभोंवते आहेत त्यांपेक्षां वाईट करून
माझ्या नियमांविषयीं फितूरी झाली आहे; कां
तर इंतल्या लोकांनी माझे न्याय अवमानिले,
आणि माझे जे नियम त्यांप्रमाणें ते वर्त्तले नाहींत.
७ **याकरितां प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मा-
भोंवतीं जीं राष्ट्रें आहेत त्यांपेक्षां तुह्मी अधिक
अन्याय केले, आणि माझ्या नियमांप्रमाणें वर्त्तलां
नाहीं, आणि माझे न्याय तुह्मी पाळिले नाहींत,
आणि जीं राष्ट्रें तुह्माभोंवतीं आहेत त्यांच्या न्या-
यांप्रमाणेंहि तुह्मी केलें नाहीं ह्मणून; ८ **याक-
रितां प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी,
मीच तुजविरुद्ध आहें, आणि राष्ट्रांच्या समक्ष मी
तुजमध्यें शासनें करीन. ९ **आणि** जें म्या पूर्वी
केलें नाहीं, आणि ज्यासारिखें मी पुन्हा करणार
नाहीं, तें मी तुझ्या सर्व कुत्सितकर्मीमुळें तुजमध्यें
करीन. १० **याकरितां** तुजमध्यें बाप आपलीं
लेंकरें खातील, आणि लेंकरें आपल्या बापांस
खातील, आणि मी तुजमध्यें शासनें करीन, आणि
तुझें सर्व शेष सर्व दिशांत विखरीन. ११ **या-
करितां प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं मी आपल्या
जीवाची शपथ वाहतों, कीं त्वां आपल्या सर्व कु-
त्सित पदार्थांनी आणि आपल्या सर्व अघोरकर्मांनी
माझें पवित्र स्थान बाटविलें आहे, ह्मणून निश्चयें
मीहि तुला कमी करीन; आणि माझा डोळा
कळवळा करणार नाहीं, आणि मीहि दया कर-
णार नाहीं.
१२ **जो** तुझा तिसरा विभाग ते मरीनें मरतील,
आणि तुजमध्यें दुकाळाने नाहींसे होतील; आणि
जे इतर तिसरा विभाग ते तुजभोंवते तरवारीने
पडतील; आणि जे अन्य तिसरा विभाग त्यांस
मी सर्व दिशांत विखरीन, आणि तरवार उपसून
त्यांच्या पाठीस लावीन. १३ **आणि** माझा राग
समाप्त होईल, आणि मी आपला क्रोध त्यांजवर
बसूं देईन; तेव्हां मी समाधान पावेन; आणि
म्या आपला कोप त्यांजवर समाप्त केला, ह्मणजे
मी **परमेश्वर** आपल्या आवेशाने बोललों आहें,
असें ते जाणतील. १४ **आणि** जीं राष्ट्रें तुजभों-
वतीं आहेत, त्यांमध्यें प्रत्येक वाटसरूच्या समक्ष
तुला ओसाड व निंदापात्र करीन. १५ **आणि**
जेव्हां मी रागाने व क्रोधाने व कोपाच्या धमक्यांनी
तुजमध्यें शासनें करीन, तेव्हां जीं राष्ट्रें तुजभोंवतीं
आहेत त्यांजजवळ ती ओसाडी निंदेसाठीं व
धिक्कारासाठीं संबोधासाठीं व विस्मयासाठीं हो-
ईल; मी **परमेश्वर** हें बोललों आहें. १६
**जे** दुकाळाचे कठीण तीर त्यांस नाशायाला हो-
तील, जे तुह्मालाहि नाशायाला पाठवीन, ते जे-
व्हां त्यांमध्यें पाठवीन, तेव्हां मी तुह्मावर दुकाळ
वाढवीन, आणि तमच्या भाकरीची काठी मोडीन.
१७ **आणि** मी तुह्मावर दुकाळ व दुष्टपशु पाठवीन,
तेव्हां ते तुला बाळरहित करितील; आणि मरी
व रक्त हीं तुजमधून जातील; आणि तरवार तु-
जवर आणीन; मी **परमेश्वर** हें बोललों आहें.

## अध्याय ६.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ **मनुष्याच्या** पुत्रा, तूं आपलें मुख
इस्राएलाच्या पर्वतांकडे कर, आणि, त्यांजकडे भ-
विष्य सांग, ३ **तूं** ह्मण, कीं इस्राएलाच्या पर्व-
तांनों, **प्रभु** जो **परमेश्वर** त्याचें वचन ऐका;
**प्रभु परमेश्वर** पर्वतांस व डोंगरांस, ओघांस व
खोऱ्यांस ह्मणतो, कीं पाहा, मी तुह्मावर तरवार
आणीन, आणि तुमचीं उंचस्थानें नाशीन. ४ **आ-
णि** तुमच्या वेद्या ओसाड होतील, आणि तुमचे
पुतळे फुटतील; आणि तुमच्या मूर्त्तीसमोर तुमचीं
घायाळ मनुष्यें पाडीन. ५ **आणि** इस्राएलाच्या
वंशाचीं मढीं त्यांच्या मूर्त्तीसमोर ठेवीन; आणि
तुमचीं हाडें तुमच्या वेद्यांभोंवतीं विखरीन. ६
**तुमच्या** सर्व राहण्याच्या स्थानांत नगरें उजाड
होतील, आणि उंचस्थानें ओसाड पडतील; अ-
शासाठीं कीं तुमच्या वेद्या ओसाड होऊन नाशास
जाव्या, आणि तुमच्या मूर्त्ति फुटून नाहींशा व्हा-
व्या, आणि तुमचे पुतळे तुटून पडावे, आणि
तुमचीं कर्में पुसून टाकावीं. ७ **आणि** तुह्मामध्यें
घायाळ पडतील, आणि, मी **परमेश्वर** आहें,
असें तुह्मी जाणाल.
८ **तथापि** मी शेष राखून ठेवीन, अशासाठीं
कीं तुह्मी देशांमध्यें विखरिलेले असतां तुह्मा-
साठीं राष्ट्रांमध्यें तरवारिपासून सुटलेले असे कि-
त्येक असावे. ९ **आणि** ज्या राष्ट्रांमध्यें त्यांस
अशामुळें पाडाव करून नेतील, कीं त्यांचें जें व्य-

भिचारी हृदय मजपासून फितलें आहे त्याकडून,
आणि जे त्यांचे डोळे त्यांच्या मूर्तींकडेस व्यभि-
चार करितात त्यांकडूनहि मी मोडावलों आहें,
त्या राष्ट्रांमध्यें तुमचे सुटलेले मला स्मरतील;
आणि त्यांनी आपल्या सर्व अघोर पदार्थांत जीं
दुष्कर्में केलीं आहेत, त्यांमुळें ते आपणांस कंटा-
ळतील. १० **आणि** ते जाणतील, कीं मी **परमे-
श्वर** आहें, आणि हें अरिष्ट मी त्यांस करीन,
असें मी उगीच बोललों नाहीं, हेंहि जाणतील.
११ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं तूं आपल्या
हातावर हात मार, आणि आपला पाय भूमीवर
आपट, आणि इस्राएलाच्या वंशाच्या सर्व दुष्ट
अघोरकर्मांमुळें अहा ह्मण, कारण कीं ते तरवा-
रीनें, दुकाळानें व मरीनें गळून पडतील. १२ **जो**
दूर तो मरीनें मरेल; आणि जो जवळ तो तर-
वारीनें पडेल; आणि जो राहिलेला व कोंडलेला
तो दुकाळानें मरेल; आणि मी आपला क्रोध
त्यांजवर समाप्त करीन. १३ **आणि** जेव्हां त्यांचे
घायाळ त्यांच्या मूर्तींमध्यें त्यांच्या वेद्यांभोंवते प्रत्येक
उंच डोंगरावर, पर्वतांच्या सर्व माथ्यांवर, आणि
प्रत्येक हिरव्या झाडाखालीं व प्रत्येक साताऱ्या
एला झाडाखालीं ज्या स्थानांत ते आपल्या सर्व
मूर्तींस सुगंधी अर्पण करीत असत त्यांस होतील,
तेव्हां तुह्मी जाणाल, कीं मी **परमेश्वर** आहें.
१४ **आणि** मी आपला हात त्यांजवर लांबवून
देश ओसाड करीन, होय त्यांच्या सर्व राहण्या-
च्या स्थानांतली भूमि दिब्लाथेकडच्या जंगलापेक्षां
ओसाड करीन; आणि मी **परमेश्वर** आहें, असें
ते जाणतील.

## अध्याय ७.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ **आणि** हे तूं मनुष्याच्या पुत्रा, **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं इस्राएलाच्या भूमीचा अंत
आला आहे, देशाच्या चोहों अंगांचा अंत आला
आहे. ३ **आतां** तुझा अंत आला आहे, आणि
मी आपला क्रोध तुजवर पाठवीन, आणि तुझ्या
आचारांप्रमाणें तुझें शासन करीन, आणि तुझ्या
अघोरकर्मांचें फल तुला भरून देईन. ४ **आणि**
माझा डोळा तुजवर कळवळा करणार नाहीं, आणि
मी दया करणार नाहीं; परंतु तुझ्या आचारांचें
फल तुला भरून देईन, आणि तुझे अघोर पदार्थ
तुजमध्यें होतील; आणि, मी **परमेश्वर** आहें,
असें तुह्मी जाणाल. ५ **प्रभु परमेश्वर** ह्मण-
तो, कीं पाहा, विपत्ति, एक विपत्ति आली आहे.
६ **अंत** आला आहे, तो अंत आला आहे; तो
तुजसाठीं जागला आहे; पाहा, तो आला आहे.
७ **हे** देशांतल्या वसणाऱ्या, तुला सकाळ उमवली
आहे; समय आला आहे, खेदाचा दिवस जवळ
आहे, आणि पर्वतांचा प्रतिशब्द नाहीं. ८ **आतां**
लवकर मी आपला क्रोध तुजवर घालीन, आणि
मी आपला राग तुजवर समाप्त करीन; आणि
तुझ्या आचारांप्रमाणें तुझें शासन करीन, आणि
तुला तुझ्या अघोरकर्मांचें फल भरून देईन. ९
**आणि** माझा डोळा कळवळा करणार नाहीं, आणि
मी दया करणार नाहीं; आणि तुझ्या आचारां-
प्रमाणें व तुझे जे अघोर पदार्थ तुजमध्यें आहेत
त्यांप्रमाणेंहि तुला फल भरून देईन; आणि जो
हाणितो तो मी **परमेश्वर** आहें, असें तुह्मी
जाणाल. १० **पाहा** दिवस, पाहा, तो आला
आहे; सकाळ निघाली आहे; काठी फुलली
आहे, गर्व फुटला आहे. ११ **बळात्कार** दुष्टप-
णाची काठी होऊन उठला आहे; त्यांतून व त्यां-
च्या समुदायांतून व त्यांच्या तुमुलांतून कोणी रा-
हणार नाहीं; आणि त्यांकरितां कोणी शोक कर-
णार नाहीं. १२ **समय** आला आहे, दिवस
जवळ पोहंचला आहे; विकत घेणाऱ्यानें हर्षूं नये,
आणि विकणाऱ्यानें शोचूं नये; कां तर तिच्या
सर्व समुदायावर कोप आहे. १३ **कां** कीं बरीं
ते जीवंत असले तरीं विकणारा विकत दिल्हे-
ल्या पदार्थाला फिरणार नाहीं; कां कीं तिचा जो
समुदाय परत यायाचा नाहीं, त्या सर्वाविषयीं
दर्शन आहे; आणि आपल्या आयुष्यांतल्या अ-
न्यायांत कोणी आपणाला बळकट करणार नाहीं.
१४ **सर्व** सिद्ध करायासाठीं त्यांनी करणा वाज-
विला आहे; परंतु कोणी लढाईस जात नाहीं:
कां तर तिच्या सर्व समुदायावर माझा कोप आ-
हे. १५ **बाहेर** तरवार आहे, आणि आंत मरी
व दुकाळ आहेत; जो शेतांत असेल, तो तरवा-

रीने मरेल, आणि जो नगरांत असेल, त्याला दु-
काळ व मरी खातील.
१६ आणि त्यांतले सुटलेले पळून सुटतील,
आणि ते सर्व खोऱ्यांतल्या पारव्यांप्रमाणें पर्व-
तांवर प्रत्येक आपल्या अन्यायामुळें घुम-
तील. १७ सर्व हात गळतील, आणि सर्व गुडघे
पाण्याप्रमाणें लीन होतील. १८ आणि ते गोण-
ताट नेसतील, आणि भय त्यांस झांकील; आणि
सर्व मुखांवर लज्जा होईल, आणि त्यांच्या सर्व
डोक्यांवर टक्कल पडेल. १९ ते आपलें रुपें
आळ्यांत टाकून देतील, आणि आपलें सोनें ओं-
गळ मानितील; परमेश्वराच्या कोपाच्या दिवशीं
त्यांचें रुपें व त्यांचें सोनें यांच्याने त्यांस सोड-
ववणार नाहीं; ते आपल्या जीवांस तृप्त करणार
नाहींत, व आपलीं आंतडीं भरणार नाहींत; का-
रण कीं तें त्यांच्या अन्यायाचें अडखूळ झालें
आहे.
२० आणि त्याने आपलें जें शोभिवंत भूषण
तें ऐश्वर्यानें स्थापिलें; परंतु त्यामध्यें त्यांनी आप-
ल्या अघोर व कुत्सित पदार्थांच्या मूर्त्ति केल्या;
याकरितां म्या त्यांसाठीं तें अमंगळ होऊं दिल्हें
आहे. २१ आणि तें म्या विदेश्यांच्या हातीं
हरणासाठीं व पृथ्वींतल्या दुष्टांस लुटीसाठीं दि-
ल्हें आहे; आणि त्यांनी तें बाटविलें आहे. २२
आणि म्या आपलें मुख त्यांजपासून फिरविलें
आहे, आणि त्यांनी माझा गाभारा बाटविला आ-
हे; लुटारूंनी त्यांत शिरून तो बाटवून टाकिला
आहे.
२३ सांखळी कर; कां तर देश घाताच्या दो-
षानी भरला आहे, आणि नगर बळात्काराने भरलें
आहे. २४ तर मी राष्ट्रांतले दुष्ट आणीन, तेव्हां
ते त्यांचीं घरें वतन करून घेतील; आणि बळवा-
नांचें ऐश्वर्य नाहींसें करीन; आणि त्यांचीं पवि-
त्रस्थानें बाटतील. २५ नाश येईल; तेव्हां ते
कुशल शोधितील, परंतु कांहीं सांपडणार नाहीं. २६
विपत्तीवर विपत्ति येईल, आणि अवाईवर अवाई
होईल; तेव्हां ते भविष्यवाद्याजवळ दृष्टांत शो-
धितील; परंतु याजकापासून नेमशास्त्र, व वडि-
लांपासून मसलत नाहींसी होईल. २७ राजा
शोक करील, आणि सरदार विस्मय धरील, आ-
णि देशांतल्या लोकांचे हात दुर्बळ होतील; त्यां-
च्या आचाराप्रमाणें मी त्यांस करीन, व त्यांच्या
न्यायांप्रमाणें त्यांस शासीन; तेव्हां, मी परमे-
श्वर आहें, असें ते जाणतील.

## अध्याय ८.

आणि साहाव्या वर्षांत, साहाव्या महिन्यांत,
महिन्याच्या पांचव्या दिवशीं मी आपल्या
घरांत बसलों होतों, आणि यहूदांतले वडील मज-
समोर बसले होते, तेव्हां तेथें प्रभु जो परमेश्वर
त्याचा हात मजवर पलडा. २ आणि म्या दृष्टि
लाविली, तेव्हां पाहा, अग्नीच्या प्रभेसारिखी प्रतिमा;
त्याच्या कंबरेच्या आकारापासून खालच्याकडे अग्नि
होता; आणि त्याच्या कंबरेपासूनें वरच्याकडे प्रभे-
च्या आकारासारिखें व कांचमणीच्या रंगासारिखें
कांहीं होतें. ३ मग त्याने हाताचा आकार पुढें
करून मला माझ्या डोईच्या केंसांकडून धरिलें;
आणि आत्म्याने मला पृथ्वीच्या व आकाशाच्या
मध्यें उंचावून मला देवाच्या दृष्टांतांत यरूशालेमेस,
जें आंतलें दार उत्तरेकडे होतें, जेथें आवेशाची
मूर्त्ति जी आवेश चेतविती, तिचें आसन होतें, त्या-
च्या प्रवेशाजवळ आणिलें. ४ आणि पाहा, जो
आकार म्या पटांगणांत पाहिला होता, त्यासारिखें
इस्राएलाच्या देवाचें गौरव तेथें होतें.
५ तेव्हां तो मला ह्मणाला, मनुष्याच्या पुत्रा,
तूं आपले डोळे उत्तरेकडे लाव; मग म्या आपले
डोळे उत्तरेकडे लाविले, तों पाहा, उत्तरेकडे वेदी-
च्या दारास प्रवेशांत ही आवेशाची मूर्त्ति. ६
आणि त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, ते जें
करितात तें तूं पाहतोस काय? आणि म्या आप-
ल्या पवित्रस्थानापासून दूर जावें ह्मणून जीं मोठीं
अघोरकर्मे इस्राएलाचे वंश एथें करितात तींहि
पाहतोस काय? परंतु तूं अणखी फीर, ह्मणजे
यांहून अधि अघोर कर्मे पाहसील.
७ मग त्याने मला अंगणाच्या प्रवेशाजवळ
आणिलें; आणि म्या दृष्टि लाविली, तों पाहा,
भिंतींत एक भोंक. ८ तेव्हां त्याने मला ह्मटलें,
मनुष्याच्या पुत्रा, भिंत खोद; तेव्हां म्या भिंत खो-
दिली, तों पाहा, एक दार. ९ नंतर त्याने मला
ह्मटलें, तूं आंत जाऊन ते जीं दुष्ट अघोरकर्मे एथें

करितात तीं पाहा. १० आणि म्या आंत जाऊन
दृष्टि लाविली; तेव्हां पाहा, वळवळणाऱ्यांचा व
अघोर पशूंचा प्रत्येक आकार आणि इस्राएलाच्या
वंशाच्या सर्व मूर्त्ति भिंतीवर सभोंवार काढिलेल्या
होत्या. ११ आणि त्यांसमोर इस्राएलाच्या वंशा-
च्या वडिलांतले सत्तर जन उभे होते, आणि त्यांम-
ध्यें शाफानाचा पुत्र याजन्या उभा होता, आणि
प्रत्येकाचें धुपाटणें प्रत्येकाच्या हातांत होतें; आणि
धूपाच्या धुराचा दाट ढग चढत होता. १२ तेव्हां
त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, इस्राएलाच्या
वंशाचे वडील प्रत्येक आपल्या प्रतिमांच्या कोठ-
ड्यांत अंधारांत जें करितात तें तूं पाहतोस काय?
कां तर ते ह्मणतात, कीं **परमेश्वर** आह्माला
पाहत नाहीं, **परमेश्वराने** पृथ्वी टाकिली आहे.
१३ मग त्याने मला ह्मटलें, तूं अणखी फीर,
ह्मणजे जीं यांहून मोठीं अघोर कर्मे ते करितात तीं
पाहसील. १४ मग त्याने **परमेश्वराच्या** मंदि-
राचें जें दार उत्तरेकडे होतें, त्याच्या प्रवेशाजवळ
मला आणिलें; तों पाहा, तेथें तम्मूजाकरितां स्त्रि-
या रडत बसल्या होत्या.

१५ नंतर त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या
पुत्रा, हें त्वां पाहिलें आहे काय? तूं अणखी
फीर, ह्मणजे यापेक्षां मोठीं अघोर कर्मे पाहसील.
१६ मग त्याने मला **परमेश्वराच्या** मंदिराच्या
आंतल्या अंगणांत आणिलें, तों पाहा, **परमेश्व-
राच्या** मंदिराच्या प्रवेशाजवळ देवडीच्या व वेदी-
च्या मध्यें पंचवीस एक माणसें होतीं, त्यांच्या
पाठी **परमेश्वराच्या** मंदिराकडे व त्यांचीं तोंडें
पूर्वेकडे होतीं, आणि ते पूर्वेकडे सूर्याला भजत
होते.

१७ तेव्हां तो मला ह्मणाला, मनुष्याच्या
पुत्रा, त्वां हें पाहिलें आहे काय? यहूदाच्या
वंशाने एथें जीं अघोरकर्मे केलीं आहेत, तीं
करून त्याला हलकी गोष्ट वाटते काय? कां तर
त्यानी देश बलात्काराने भरिला आहे, आणि
मला कोपित करायाला ते फिरले आहेत; आणि
पाहा, ते आपल्या नाकाला फांदी लावितात. १८
याकरितां मीहि क्रोधाने वर्त्तेन; माझा डोळा
कळवळा करणार नाहीं, आणि मी दया करणार
नाहीं; जरी त्यानी मोठ्या शब्दाने माझ्या कानां-
जवळ आरोळी केली, तरी त्यांचें मी ऐकणार
नाहीं.

## अध्याय ९.

आणि त्याने माझ्या कानांजवळ मोठ्या शब्दाने
आरोळी करून ह्मटलें, नगराचे अधिकारी
जवळ येवोत, आणि प्रत्येकाचें नाश करणारें शस्त्र
त्याच्या हातांत असो. २ तेव्हां पाहा, जें वरलें
दार उत्तरेकडे आहे त्याच्या वाटेकडून साहा मनुष्य
आले, आणि प्रत्येकाचें नाश करणारें शस्त्र त्याच्या
हातांत होतें; आणि पांढरीं वस्त्रें ल्यालेला एक
मनुष्य त्यांमध्यें होता, आणि त्याच्या कंबरेस
एक लेखकाची दऊत होती, आणि ते आंत जा-
ऊन पितळाच्या वेदीजवळ उभे राहिले. ३
आणि ज्या खरूबावर इस्राएलाच्या देवाचें गौ-
रव होतें त्याजवरून तें मंदिराच्या उंबऱ्यावर
गेलें; आणि ज्या पांढरीं वस्त्रें ल्यालेल्या मनुष्या-
च्या कंबरेस लेखकाची दऊत होती त्याला त्याने
हाक मारिली. ४ आणि **परमेश्वराने** त्याला
ह्मटलें, तूं नगरामध्यें, यरूशालेमेमध्यें फिरत जा,
आणि तिजमध्यें जीं सर्व अघोरकर्मे करितात त्यां-
मुळें जीं मनुष्यें कण्हतात व आक्रंदन करितात,
त्यांच्या कपाळाला एक चिन्ह लाव.

५ आणि मी ऐकत असतां त्याने त्या वरक-
डांस ह्मटलें, तुह्मी त्याच्या पाठीमागून नगरामध्यें
जा, आणि मारा; तुमच्या डोळ्याने कळवळा
करूं नये, आणि तुह्मी दया करूं नका. ६ ह्मा-
तारा, तरणा, व कन्या, व पोरें, व स्त्रिया या सर्वांस
ठार मारून यांचा नाश करा; परंतु ज्या को-
णेकावर चिन्ह आहे, त्याजवळ जाऊं नका, आणि
माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा; तेव्हां
त्यानी मंदिरासमोर जे ह्मातारे मनुष्य होते त्यां-
पासून आरंभ केला. ७ आणि त्याने त्यांस ह्म-
टलें, कीं तुह्मी मंदिर विटाळा, आणि वधलेल्या-
नीं अंगणें भरा; मग निघून जा; तेव्हां ते जाऊन
नगरांत मारूं लागले.

८ आणि असें झालें, कीं जेव्हां ते मारीत
होते, आणि मी चुकून राहिलों, तेव्हां मी उपडा
पडलों, आणि आरोळी करून ह्मणालों, अहा,
**प्रभो परमेश्वरा**, यरूशालेमेवर तूं आपला

कोप घालून इस्राएलाचें सर्व शेष नाहींसें करि-
सील काय? ९ तेव्हां त्याने मला ह्मटलें, इस्रा-
एलाच्या व यहूदाच्या वंशाचा अन्याय फारच
मोठा झाला आहे, आणि देश घाताने भरला
आहे, आणि नगर विपरीत न्याय करण्याने भरलें
आहे; कां तर ते ह्मणतात, **परमेश्वराने** पृथ्वी
टाकली आहे, आणि **परमेश्वर** पाहत नाहीं. १०
**ह्मणून** माझा डोळा कळवळा करणार नाहीं, आणि
मी दया करणार नाहीं, त्यांच्या आचाराचें फल
त्यांच्या माथ्यावर ठेवीन. ११ **नंतर** पाहा, जो
पांढरीं वस्त्रें ल्यालेला मनुष्य ज्याच्या कबरेस
दऊत होती, तो वर्त्तमान कळवितांना ह्मणाला,
त्वां मला आज्ञा दिल्ह्याप्रमाणें म्या केलें.

## अध्याय १०.

आणि म्या दृष्टि लाविली, तेव्हां पाहा, जें
अंतराळ त्या **खरूबांच्या** माथ्यावर होतें,
त्यांत नीळमण्यासारिखें, सिंहासनाच्या प्रतिमेच्या
आकारासारिखें कांहीं त्यांजवरतीं दिसलें. २
तेव्हां त्याने त्या पांढरीं वस्त्रें ल्यालेल्या मनुष्या-
ला बोलतां ह्मटलें, तूं चाकांच्या मध्यें **खरूबा**-
खालतीं जा, आणि आपली ओंजळ आगीच्या
निखाऱ्यांनी **खरूबांमधून** भरून नगरावर विखरून
टाक; तेव्हां तो माझ्या देखतां आंत गेला. ३
**तर** जेव्हां तो मनुष्य आंत गेला, तेव्हां ते **खरूब**
मंदिराच्या उजव्याकडे उभे होते; आणि आंतलें
अंगण ढगाने भरिलें. ४ **मग परमेश्वराचें** गौरव
**खरूबावरून** चढून मंदिराच्या उंबऱ्यावर राहिलें;
तेव्हां मंदिर ढगाने भरलें, आणि अंगण **परमे-
श्वराच्या** गौरवाच्या तेजाने भरलें. ५ **मग** जसा
**सर्वसमर्थ देवाचा** शब्द त्याच्या बोलण्यांत
असतो, तसा **खरूबांच्या** पक्षांचा शब्द बाहेर-
ल्या अंगणापर्यंत ऐकूं आला. ६ **आणि** असें
झालें, कीं त्याने त्या पांढरीं वस्त्रें ल्यालेल्या मनु-
ष्याला जेव्हां आज्ञापिलें, कीं तूं चाकांच्या मध्यां-
तून **खरूबांच्या** मध्यांतून अग्नि घे, तेव्हां तो
आंत जाऊन चाकांजवळ उभा राहिला. ७ **तेव्हां**
एका **खरूबाने खरूबांच्या** मध्यांतून जो अग्नि
**खरूबांच्या** मध्यें होता, त्याजकडे आपला हात
पुढें केला, आणि थोडासा घेऊन त्या पांढरीं वस्त्रें
ल्यालेल्या मनुष्याच्या ओंजळींत ठेविला, आणि
तो त्याला घेऊन निघाला.
८ **आणि खरूबांत** त्यांच्या पक्षांखालीं मनुष्या-
च्या हाताचा आकार दिसला. ९ **आणि** म्या
दृष्टी लाविली, तेव्हां पाहा, **खरूबांजवळ** चार
चाकें, एका **खरूबाजवळ** एक चाक, आणि दुस-
ऱ्या **खरूबाजवळ** दुसरें चाक असीं; आणि चा-
कांचा आभास लसण्याच्या रंगासारिखा होता.
१० **आणि** त्यांच्या आकारांविषयीं, त्या चोहोंची
प्रतिमा एकच होती, जसें चाकामध्यें चाक तसी
होती. ११ **तीं** चालतांना त्यांच्या चोहों अंगां-
सीं चालत; तीं आपल्या गतींत वळत नसत, प-
रंतु ज्या स्थानाकडे मस्तक वळे, त्याकडे तीं त्याला
अनुसरत; तीं आपल्या गतींत वळत नसत. १२
**आणि** त्यांचें सर्व अंग, आणि त्यांच्या पाठी,
आणि त्यांचे हात, आणि त्यांचे पक्ष, आणि **तीं**
चाकें सभोंवार डोळ्यांनी भरलेलीं होतीं, त्या चौ-
घांस आपापलीं चाकें होतीं. १३ **जीं** चाकें त्यांस
हे चाका, असी आरोळी मी ऐकायाजोगी केली
होती. १४ **आणि** प्रत्येकाला चार मुखें होतीं;
पहिलें मुख **खरूबाचें** मुख होतें, आणि दुसरें
मुख मनुष्याचें मुख होतें, आणि तिसरें सिंहाचें
मुख, आणि चौथें गरुडाचें मुख होतें. १५ **आ-
णि** ते **खरूब** उंचावत; **खबारनदीजवळ** जो
जीव म्या पाहिला, तो हाच आहे. १६ **जेव्हां**
ते **खरूब** चालत, तेव्हां त्यांसंगतीं तीं चाकें चा-
लत; आणि जेव्हां ते **खरूब** पृथ्वीवरून वर
चढायास आपले पक्ष उंचावीत, तेव्हांहि तीं चाकें
त्यांजवळून फिरत नसत. १७ **जेव्हां** ते उभे रा-
हत, तेव्हां तीं उभीं राहत; आणि जेव्हां ते च-
ढत, तेव्हां तींहि त्यांसंगतीं उंचावत; कारण कीं
त्या जीवाचा आत्मा त्यांच्याठायीं होता. १८
**मग परमेश्वराचें** गौरव मंदिराच्या उंबऱ्यावरून
गेलें, आणि त्या **खरूबांवर** उभें राहिलें. १९
**आणि** माझ्या देखतां ते **खरूब** आपले पक्ष
उंचावून पृथ्वीवरून वर चढले; जेव्हां ते
निघून गेले, तेव्हां त्यांसंगतीं तीं चाकें गेलीं,
आणि प्रत्येक **परमेश्वराच्या** मंदिराच्या पूर्वे-
कडील दाराच्या प्रवेशाजवळ उभा राहिला;
आणि **इस्राएलाच्या देवाचें** गौरव त्यांजवर वरतीं

होतें. २० जो जीव म्या इस्राएलाच्या देवाखा-
लीं खबार नदीजवळ पाहिला, तो हाच आहे;
आणि ते खरूब आहेत, असें म्या जाणिलें. २१
एकेकाला चार चार मुखें होतीं, आणि प्रत्येकाला
चार पक्ष होते; आणि त्यांच्या पक्षांखालीं मनु-
ष्याच्या हातांची प्रतिमा होती. २२ आणि त्यां-
च्या मुखांची प्रतिमा त्याच मुखांची होती, जीं
म्या खबार नदीजवळ पाहिलीं, त्यांचे आकार आ-
णि ते तसेच होते; ते प्रत्येक नीट समोर चालत
असत.

## अध्याय ११.

आणि आत्म्याने मला उंचावून **परमेश्वराच्या**
मंदिराचें जें पूर्वेकडलें दार पूर्वेकडे होतें,
त्याजवळ मला आणिलें, तों पाहा, त्या दाराच्या
प्रवेशांत पंचवीस मनुष्य; आणि म्या त्यांमध्यें
अज्जूराचा पुत्र याजन्या आणि बनायाचा पुत्र
पलत्या जे लोकांतले सरदार ते पाहिले. २ ते-
व्हां त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, या नग-
रांत जे मनुष्य अन्याय संकल्पितात, आणि वाईट
मसलत करितात, ते हेच आहेत. ३ जे ते ह्म-
णतात, जवळ नाहीं; आपण घरें बांधूं; हें नगर
थाली आहे, आणि आपण मास आहों.

४ याकरितां त्यांविरुद्ध भविष्य सांग, हे मनु-
ष्याच्या पुत्रा, भविष्य सांग. ५ मग **परमेश्व-
राचा** आत्मा मजवर उतरला, आणि त्याने मला
ह्मटलें, तूं सांग, कीं अहो इस्राएलाच्या वंशानो,
**परमेश्वर** ह्मणतो, कीं तसें तुह्मी ह्मटलें आहे;
कां कीं ज्या भावना तुमच्या मनांत येतात, त्या
मी जाणतों. ६ तुह्मी या नगरांत तुमचे वधलेले
वाढविले आहेत, आणि याच्या आळ्या वधले-
ल्यानी भरिल्या आहेत. ७ याकरितां **प्रभु पर-
मेश्वर** ह्मणतो, कीं जे तुमचे वधलेले तुह्मी या-
मध्यें ठेविले आहेत, तेच मास आहेत, आणि हें
नगर थाली आहे; आणि त्याच्या मध्यांतून मी
तुह्माला काढीन. ८ तुह्मी तरवारीला भ्यालां
आहां; आणि मी तुह्मावर तरवार आणीन, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो. ९ आणि याच्या म-
ध्यांतून तुह्माला काढीन, आणि तुह्माला विदेश्यां-
च्या हातीं देईन, आणि तुमचीं शासनें करीन.
१० तुह्मी तरवारीने पडाल; इस्राएलाच्या सीमे-
वर तुमचें शासन करीन; तेव्हां, मी **परमेश्वर**
आहें, असें तुह्मी जाणाल. ११ हें नगर तुह्मा-
साठीं थाली होणार नाहीं, आणि याच्यामध्यें
तुह्मी मास असें होणार नाहीं, परंतु इस्राएला-
च्या सीमेवर मी तुमचें शासन करीन. १२ तेव्हां
तुह्मी जाणाल, कीं मी **परमेश्वर** आहें; ज्या
माझ्या नियमांप्रमाणें तुह्मी वर्त्तलां नाहीं, आणि
माझ्या नीति तुह्मी आचरिल्या नाहींत; परंतु जीं
राष्ट्रें तुह्माभोंवतीं आहेत, त्यांच्या नीतींप्रमाणें
तुह्मी केलें आहे.

१३ आणि जेव्हां मी भविष्य सांगत होतों,
तेव्हां असें झालें, कीं बनायाचा पुत्र पलत्या मेला;
तेव्हां मी उपडा पडलों, आणि मोठ्याने ओरडून
ह्मणालों, आहा **प्रभो परमेश्वरा**, तूं इस्राएला-
च्या शेषाचा पुरा नाश करिसील काय?

१४ आणि **परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, १५ मनुष्याच्या पुत्रा, तुझे भाऊ, तुझे
बंधु, तुझ्या कुळांतले मनुष्य, आणि इस्राएलाचें
अवघेच वंश ते हे आहेत, ज्यांस यरुशालेमें-
तले राहणारे ह्मणाले आहेत, कीं तुह्मी परमेश्व-
रापासून दूर जा; हा देश वतनासाठीं आह्माला
दिल्हा आहे. १६ याकरितां तूं सांग, प्रभु पर-
मेश्वर ह्मणतो, कीं जरीं म्या त्यांस राष्ट्रांमध्यें
दूर घालविलें आहे, आणि जरीं त्यांस देशांमध्यें
म्या विखरिलें आहे, तरीं ज्या देशांत ते गेले आ-
हेंत, तेथें मी त्यांसाठीं धाकलें पवित्रस्थान असा
होईन. १७ याकरितां तूं सांग, प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं मी तुह्माला लोकांतून एकवटीन, आ-
णि ज्या देशांत तुह्मी विखरिलेले आहां, त्यांतून
तुह्माला एकत्र मिळवीन, आणि तुह्माला इस्राए-
लाची भूमि देईन. १८ आणि ते तेथें येऊन
तींतले सर्व कुत्सित पदार्थ व तींतले सर्व अमंगळ
पदार्थ तींतून दूर करितील. १९ आणि मी त्यां-
स एक हृदय देईन, आणि तुह्मामध्यें नवा आत्मा
घालीन; आणि मी त्यांच्या देहांतून दगडाचें हृ-
दय काढून त्यांस मांसाचें हृदय देईन; २०
अशासाठीं कीं त्यानी माझ्या नियमांप्रमाणें वर्त्तावें,
आणि माझ्या नीति पाळून आचराव्या; ह्मणजे
ते माझे लोक असे होतील, आणि मी त्यांचा

देव असत जाईन. २१ परंतु ज्यांचें हृदय आ-
पल्या कुत्सित पदार्थांवरच्या, आणि आपल्या अघोर
पदार्थांवरच्या मनोरथाप्रमाणें वर्त्ततें, त्यांच्या आ-
चाराचें फल मी त्यांच्या माथ्यांवर ठेवीन, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

२२ **मग** त्या खरूबानी आपले पक्ष उंचा-
विले, आणि त्यांसंगतीं तीं चाकें चाललीं; आ-
णि इस्राएलाच्या देवाचें गौरव त्यांजवर वरतीं
होतें. २३ **आणि परमेश्वराचें** गौरव नगराच्या
मध्यावरून चढून नगरा या पूर्वेकडे जो पर्वत आ-
हे, त्याजवर उभें राहिलें.

२४ **नंतर** आत्म्याने मला उंचाविलें, आणि
मला दृष्टांतांत देवाच्या आत्म्याकडून खास्द्यां-
च्या देशांत पाडाव प्रवाशांजवळ आणिलें; तेव्हां
जो दृष्टांत मला दिसला होता, तो माझ्या वर-
तून उडाला. २५ **मग** ज्या सर्व गोष्टी **परमे-
श्वराने** मला दाखविल्या होत्या, त्या म्या पा-
डाव प्रवाशांजवळ सांगितल्या.

## अध्याय १२.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ **मनुष्याच्या** पुत्रा, तूं फितूरी वं-
शामध्यें वसतोस, ज्या त्यांस पाहायास डोळे
असून ते पाहत नाहींत; त्यांस ऐकायास कान
असून ते ऐकत नाहींत; कां कीं ते फितूरी वंश
आहेत. ३ **तर** मनुष्याच्या पुत्रा, तूं आपणा-
साठीं प्रवासांत जाण्याचें खटलें तयार कर, आणि
दिवसा त्यांच्या देखतां प्रवासास जा; त्यांच्या
देखतां तूं आपल्या मुकामाहून दुसऱ्या मुकामीं प्र-
वास्यासारिखा जा; ह्मणजे जरी ते फितूरी वंश
असले, तरीं कदाचित विचार करून पाहतील.
४ **आणि** दिवसा त्यांच्या देखतां तूं आपलें खटलें
प्रवासाच्या खटल्याप्रमाणें बाहेर काढ; आणि
तूं संध्याकाळीं त्यांच्या देखतां प्रवासास जाया-
च्या निघण्याप्रमाणें निघून जा. ५ **तूं** त्यांच्या
देखतां आपणासाठीं भिंतीला खोदून भोंक पाड,
आणि तिकडून खटलें बाहेर काढ. ...त्यांच्या
देखतां तूं तें आपल्या खांद्यावर ...
बाहेर काढ; आणि त्वां भूमि ...
तूं आपलें मुख झांक; कारण ...

एलाच्या वंशासाठीं दाखला असें ठेविलें आहे
७ **मग** जसी मला आज्ञा केली होती, तसें म्या
दिवसा आपलें खटलें प्रवासाच्या खटल्याप्रमाणें
बाहेर काढिलें, आणि संध्याकाळीं म्या आपल्या
हाताने भिंतीला खोदून भोंक पाडिलें; आणि
आवोसीं म्या त्यांच्या देखतां खटलें बाहेर काढून
आपल्या खांद्यावर घेतलें.

८ **नंतर** सकाळीं **परमेश्वराचें** वचन मजज-
वळ आलें कीं; ९ **मनुष्याच्या** पुत्रा, इस्राएला-
च्या वंशाने, त्या फितुरी वंशाने, तूं काय करितोस?
असें तुला ह्मटलें नाहीं काय? १० **त्यांस**
सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं यरूशालेमें-
तल्या अधिकाऱ्याविषयीं, आणि इस्राएलाचे जे
सर्व वंश त्यांजमध्यें आहेत त्यांविषयीं हा प्रवाद
आहे. ११ **तूं** सांग, कीं मी तुमचा दाखला
आहें; जसें म्या केलें आहे, तसें त्यांस प्राप्त
होईल, ते पाडावपणाच्या प्रवासांत जातील. १२
**आणि** जो अधिकारी त्यांमध्यें आहे, तो आपल्या
खांद्यावर खटलें घेऊन आवोसीं निघून जाईल;
तिकडून खटलें बाहेर न्यावें, ह्मणून ते भिंतीला
खोदून भोंक पाडितील; त्याने आपल्या डोळ्या-
नी भूमि पाहूं नये, ह्मणून तो आपलें मुख झां-
कील. १३ **आणि** मी आपलें जाळें त्यांवर पस-
रीन, आणि तो फांसात सांपडेल; तेव्हां मी
त्याला खास्द्यांच्या देशांत बाबेलेस आणीन;
तथापि तो तिला पाहणार नाहीं, आणि तो तेथें
मरेल. १४ **आणि** त्याचें सहाय करायाला जे
त्याभोंवते आहेत त्यांस, आणि त्याच्या सर्व
सैन्यांस मी प्रत्येक दिशेकडे विखरीन; आणि
तरवार उपसून त्यांच्या पाठीस लावीन. १५
**आणि** जेव्हां मी त्यांस राष्ट्रांमध्यें विखरीन, आ-
णि देशांमध्यें उडवीन, तेव्हां, मी **परमेश्वर**
आहें, असें ते जाणतील. १६ **तथापि** त्यांतून
थोडक्या मनुष्यांस तरवार, दुकाल, व मरी यांपा-
सून शेष राहूं देईन; अशासाठीं कीं ज्या राष्ट्रां-
मध्यें ते जातील, त्यांमध्यें त्यानी आपलीं अघोर-
कर्मे कथावीं; मग, मी **परमेश्वर** आहें, असें ते
जाणतील.

... **आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ
... मनुष्याच्या पुत्रा, तूं कंपनाने

आपली भाकर खा, आणि थरथराटाने व चिं-
तेने आपलें पाणी पी; १९ आणि देशांतल्या
लोकांस सांग, यरूशालेमेंतल्या राहणाऱ्यांविषयीं
आणि इस्राएलाच्या भूमीविषयीं प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं ते चिंतेने आपली भाकर खातील,
आणि विस्मयाने आपलें पाणी पितील; अशासा-
ठीं कीं तींत जे सर्व वसतात, त्यांच्या बलात्कारा-
मुळें तिचा देश त्याचें भरण नाहींसें झालें असतां
ओसाड व्हावा. २० आणि जीं नगरें वसलेलीं
आहेत, तीं उजाड होतील, आणि देश ओसाड
होईल, तेव्हां, मी परमेश्वर आहें, असें तुह्मी
जाणाल.
२१ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, २२ मनुष्याच्या पुत्रा, इस्राएलाच्या
भूमीवर तुमची ही काय ह्मण आहे, कीं दिवस
विलंब करितात, आणि प्रत्येक दर्शन व्यर्थ झालें
आहे? २३ याकरितां त्यांस सांग, प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं ही ह्मण नाहींसी होई, असें
करीन, आणि इस्राएलांत लोक पुन्हा ही बोलणार
नाहींत; परंतु त्यांस सांग, दिवस जवळ आहेत,
आणि प्रत्येक दर्शनाचा प्रत्यय जवळ आहे. २४
नर इस्राएलाच्या वंशामध्यें कोणतेंहि व्यर्थ दर्शन,
अथवा उगीच चिट्या घालणें पुन्हा होणार नाहीं.
२५ कां कीं मी परमेश्वर आहें, मी बोलतों,
आणि जें वचन मी बोलतों, तें साधेल; तें पुढें
विलंबित होणार नाहीं; परंतु फितुरी वंशानों, तुम-
च्या दिवसांत मी वचन बोलेन, आणि तें सा-
धीन, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
२६ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, २७ मनुष्याच्या पुत्रा, पाहा, इस्रा-
एलाचे वंश ह्मणतात, जो दृष्टांत तो पाहतो, तो
बहुत दिवसांचा आहे, आणि तो दूर कालांविष-
यीं भविष्य सांगतो. २८ याकरितां त्यांस सांग,
प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं माझ्या वचनांतलें
कोणतेंहि पुढें विलंबित होणार नाहीं, जें वचन
मी बोलतों तें साधेल, असें प्रभु परमेश्वर
ह्मणतो.

## अध्याय १३.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, इस्राएलाचे जे
भविष्यवादी भविष्य सांगतात, त्यांविरुद्ध भवि-
ष्य सांग, आणि जे केवळ आपल्याच बुद्धीची
गोष्ट भविष्य सांगतात, त्यांस सांग, तुह्मी परमे-
श्वराचें वचन ऐका: ३ प्रभु परमेश्वर ह्म-
णतो, कीं जे मूर्ख भविष्यवादी आपल्या आत्म्या-
प्रमाणें वर्त्ततात, आणि त्यानी कांहीं पाहिलें नाहीं,
त्यांस हाय हाय. ४ हे इस्राएला, तुझे भविष्य-
वादी जंगलांतल्या कोल्ह्यांसारिखे आहेत. ५
तुह्मी भगाडांत चढलां नाहीं, आणि परमेश्व-
राच्या दिवसीं लढाईंत टिकायाला, इस्राएलाच्या
घराण्याभोंवती कुंपण घातलें नाहीं. ६ त्यानी
व्यर्थपण आणि खोटें चिट्याघालणें हीं पाहि-
लीं आहेत, परमेश्वर ह्मणतो, असें ते बोलतात,
परंतु परमेश्वराने त्यांस पाठविलें नाहीं; ते
वचन ठरवितील, असी आशा लोकानी धरावी,
असें त्यानी केलें आहे. ७ तुह्मी व्यर्थ दृष्टांत
पाहिला नाहीं काय? आणि खोटें चिट्याघा-
लणें सांगितलें नाहीं काय? तथापि मी बोललों
नसतांहि, परमेश्वर ह्मणतो, असें तुह्मी बोलतां.
८ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी
व्यर्थपण बोललां आहां, आणि खोटा दृष्टांत
पाहिला आहे, ह्मणून पाहा, मी तुह्मांविरुद्ध आ-
हें, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो. ९ आणि जे
भविष्यवादी व्यर्थ दृष्टांत पाहतात, आणि मांत्रिक
कर्मेंकरून खोटें सांगतात, त्यांविरुद्ध माझा हात
होईल; ते माझ्या लोकांच्या सभेंत राहणार ना-
हींत, आणि इस्राएलाच्या घराण्याच्या लेखामध्यें
लिहिण्यांत येणार नाहींत, आणि इस्राएलाच्या
भूमीवर येणार नाहींत; आणि, मी प्रभु परमे-
श्वर आहें, असें तुह्मी जाणाल.
१० त्यानी कांहीं कुशल नसतांहि, कुशल,
असें बोलून माझ्या लोकांस फसविलें आहे;
आणि कोणीएकाने भिंत बांधिली, तेव्हां पाहा,
त्यानी ती कच्च्या चुन्याने लेपिली. ११ याक-
रितांच ज्यानी ती कच्च्या चुन्याने लेपिली आहे,
त्यांस सांग, कीं ती पडेल; पुराचा पाऊस हो-
ईल; आणि मोठाल्या गारानो, तुह्मी पडाल;
आणि वादळ तिला भेदील. १२ पाहा, जेव्हां
ती भिंत पडेल, तेव्हां ज्या लेपाने तुह्मी तिला
लेपिलें, तो कोठें आहे? असें तुह्माला ह्मणणार

नाहींत कीं काय? १३ याकरितां **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं मी तर आपल्या कोपाने तिला वादळें-
करून भेदीन; आणि माझ्या क्रोधाने पुराचा पा-
ऊस होईल, आणि तिला नाहींसें करायाला
माझ्या रोषाने मोठाल्या गारा पडतील. १४
तसाच जी भिंत तुह्मी कच्च्या चुन्याने लेपिली
आहे, ती मी पाडून धुळीस मिळवीन, तेव्हां
तिचा पाया उघडा होईल, आणि ती पडेल,
तेव्हां तुह्मी तिजमध्यें नाहींसे व्हाल; आणि, मी
**परमेश्वर** आहें, असें तुह्मी जाणाल. १५ या-
प्रमाणें त्या भिंतीवर, आणि ज्यांनी ती कच्च्या
चुन्याने लेपिली आहे, त्यांजवर मी आपला क्रोध
समाप्त करीन, तेव्हां मी तुह्माला सांगेन, कीं भिंत
नाहींसी झाली, आणि ती ज्यांनी लेपिली, तेहि
नाहींसे झाले आहेत; १६ ह्मणजे जे इस्राए-
लाचे भविष्यवादी यरूशालेमेविषयीं भविष्य
सांगतात, आणि तिजसाठीं कुशलाचे दृष्टांत पाह-
तात ते, परंतु कांहीं कुशल नाहीं, असें **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो.

१७ आणि मनुष्याच्या पुत्रा, तुझ्या लोकां-
च्या ज्या कन्या केवळ आपल्याच बुद्धीची गोष्ट
भविष्य सांगतात, त्यांजकडे तूं आपलें मुख कर;
आणि त्यांजविषयीं भविष्य सांग. १८ तूं सांग,
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं ज्या स्त्रिया जीवा-
त्म्यांची पारध करायाला सर्व कांखांस गिरद्या
शिंवितात, आणि प्रत्येक उंचीचे मस्तकास उशा
करितात, त्यांस हाय हाय; तुह्मी माझ्या लोकांच्या
जीवात्म्यांची पारध कराल काय? आणि जे जीवात्मे
तुह्माकडे येतील, त्यांजला वांचवाल काय? १९ आ-
णि जे जीव न मरावे ते मरायाला, आणि जे जीव
न वांचावे त्यांस वांचवायाला, माझे जे लोक तुमचें
खोटें ऐकतात, त्यांस खोटें बोलून तुह्मी जवांच्या
पसांसाठीं आणि भाकरीच्या तुकड्यांसाठीं मला
माझ्या लोकामध्यें विटाळ कराल काय? २०
याकरितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
जीवांनी उडावें, ह्मणून तुह्मी आपल्या ज्या गि-
रद्यांनी त्यांची पारध करितां, त्यांविरुद्ध मी आहें,
आणि त्या तुमच्या बाहूंपासून मी हिसकून घेईन,
आणि ज्या जीवात्म्यांची पारध त्यांनी उडावें, ह्म-
णून तुह्मी करितां, त्या जीवात्म्यांस मी सोडीन. २१
आणि मी तुमच्या उशाहि हिसकून घेईन, आणि
मी आपल्या लोकांस तुमच्या हातांतून सोडीन,
आणि ते पारधीसाठीं तुमच्या हातीं पुन्हा सांप-
डणार नाहींत; आणि, मी **परमेश्वर** आहें, असें
तुह्मी जाणाल. २२ तर तुह्मी खोटेपणाने न्या-
यीचें हृदय खिन्न केलें आहे, आणि म्यां त्याला
खिन्न केलें नाहीं; आणि दुष्टाने आपला जीव
वांचवायाला आपल्या कुमार्गापासून फिरूं नये,
ह्मणून तुह्मी त्याचे हात बळावले आहेत. २३
याकरितां यापुढें तुह्मी व्यर्थ दृष्टांत पाहणार ना-
हीं, आणि चिटया घालणार नाहीं; आणि मी
आपल्या लोकांस तुमच्या हातांतून सोडीन; तेव्हां,
मी **परमेश्वर** आहें, असें तुह्मी जाणाल.

## अध्याय १४.

आणि इस्राएलाच्या वडिलांतले कित्येक येऊन
मजसमोर बसले; २ तेव्हां **परमेश्व-
राचें** वचन मजजवळ आलें कीं, ३ मनुष्याच्या
पुत्रा, या मनुष्यांनी आपल्या मूर्त्ति आपल्या हृद-
यांत उभारिल्या आहेत, आणि आपल्या अन्या-
याचें अडखूळ आपल्या मुखासमोर ठेविलें आहे;
तर मग मी आपणाला त्यांस कांहीं विचारूं दे-
ईन काय? ४ याकरितां तूं त्यांजवळ बोलतांना
त्यांस सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं इस्रा-
एलाच्या वंशांतला प्रत्येक जो आपल्या मूर्त्ति आ-
पल्या हृदयांत उभारितो, आणि आपल्या अन्या-
याचें अडखूळ आपल्या मुखासमोर ठेवितो, आणि
भविष्यवाद्याजवळ येतो, त्या येणाऱ्याला त्याच्या
मूर्त्तींच्या समुदायाप्रमाणें मी **परमेश्वर** उत्तर
देईन; ५ अशासाठीं कीं म्यां इस्राएलाच्या
वंशाला त्यांच्या हृदयेंकडून धरावें; कां कीं ते सर्व
आपल्या मूर्त्तींकडून मजपासून फितले आहेत.

६ याकरितां इस्राएलाच्या वंशाला सांग, **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मी पश्चात्ताप करा,
आणि आपल्या मूर्त्तींपासून फिरा; आणि आपल्या
सर्व अघोर पदार्थांपासून आपलीं मुखें फिरवा. ७
कां कीं इस्राएलाच्या वंशांतला प्रत्येक आणि जे
विदेशी इस्राएलांत प्रवास करितात, त्यांतला प्र-
त्येक जो मजपासून वेगळा होतो, आणि आपल्या
मूर्त्ति आपल्या हृदयांत उभारितो, आणि आपल्या

अन्यायाचें अडखूळ आपल्या मुखासमोर ठेवितो,
आणि भविष्यवाद्याकडे त्याजवळ मजविषयीं वि-
चारायाला येतो, त्याला मी **परमेश्वर** आपणच
उत्तर देईन. ८ **आणि** त्या मनुष्याविरुद्ध मी
आपलें मुख स्थापीन; आणि त्याला चिन्ह व
ह्मण, असें करून ठेवीन; आणि त्याला माझ्या
लोकांमधून नाहींसें करीन; तेव्हां, मी **परमेश्वर**
आहें, असें तुह्मी जाणाल. ९ **आणि** जर भवि-
ष्यवादी गोष्ट बोलून फसला, तर म्या **परमेश्व-
रानें** त्या भविष्यवाद्याला फसविलें आहे; मग
मी आपला हात त्याजवर पुढें करून माझ्या
इस्राएल लोकांमधून त्याचा नाश करून टाकीन.
१० **आणि** ते आपल्या अन्यायाचा दंड पावतील;
भविष्यवाद्याचा दंड विचारणाऱ्याच्या दंडाप्रमाणें
होईल; ११ अशासाठीं कीं इस्राएलाच्या वं-
शानी पुढें मजपासून बहकूं नये, आणि आपल्या
सर्व दोषांकडून पुन्हा विटाळूं नये, परंतु त्यानी
माझे लोक असत जावें, आणि म्या त्यांचा देव
असत जावें, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

१२ **आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, १३ **मनुष्याच्या** पुत्रा, जेव्हां देश
फार अपराध करून मजसीं पाप करितो, तेव्हां
मी त्याजवर आपला हात पुढें करून त्याच्या
भाकरीची काठी मोडीन, आणि त्यांत दुकाळ
पाठवून त्यांतून मनुष्य व पशू नाहींसे करीन. १४
जरीं ते तिघे जण, ह्मणजे नोहा, दानीयेल, आ-
णि ईयोब त्यामध्यें असले, तरीं ते आपल्या न्या-
यीपणानें आपल्या जीवांस मात्र सोडवतील, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

१५ जर मी दुष्टपशु देशावर पाठवीन, आणि
ते त्याला बाळरहित करितील, आणि त्या पशूं-
मुळें तो कोणी येता जाता नाहीं, असा होऊन
ओसाड पडेल; १६ तर जरीं ते तिघे जण
त्यामध्यें असले, तरीं **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
मी आपल्या जीवाची शपथ करितों, ते पुत्रांस
अथवा कन्यांस सोडवणार नाहींत; ते आपण
मात्र सुटतील, परंतु देश ओसाड होईल.

१७ अथवा जर त्या देशावर मी तरवार आ-
णीन, आणि अगे तरवारी, देशावर फीर, असें
सांगेन; आणि त्यांतून मनुष्य व पशु नाहींसे क-
रीन तर; १८ जरीं ते तिघे जण त्यामध्यें अ-
सले, तरीं **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, मी आपल्या
जीवाची शपथ वाहतों, ते पुत्रांस अथवा कन्यांस
सोडवणार नाहींत, परंतु ते आपण मात्र सुटतील.

१९ अथवा जर मी त्या देशांत त्यांतून मनुष्य
व पशु नाहींसे करायाला मरी पाठवीन, आणि
रक्त पाडून त्याजवर मी आपला रोष घालीन तर;
२० जरीं नोहा, दानीयेल, आणि ईयोब त्यामध्यें
असले, तरीं **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, मी आप-
ल्या जीवाची शपथ करितों, ते पुत्राला अथवा
कन्येला सोडवणार नाहींत, ते आपल्या न्यायी-
पणानें आपल्या जीवांस मात्र सोडवतील.

२१ तर **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं जरीं
मी आपलीं चार भारी शासनें, ह्मणजे तरवार व
दुकाळ व दुष्टपशु व मरी यरूशालेमेंत तींतून
मनुष्य व पशु नाहींसीं करायाला पाठविलीं; २२
तरीं पाहा, तींत सुटलेलें शेष राहील, आणि
तें पुत्र व कन्या यांसुद्धां बाहेर येईल; पाहा, ते
निघून तुह्माकडे येतील, तेव्हां तुह्मी त्यांचें आच-
रण आणि त्यांचीं कर्में पाहाल; आणि जें अरिष्ट
म्या यरूशालेमेवर आणिलें आहे, जें सर्व म्या
तिजवर आणिलें आहे, त्याविषयीं तुह्मी शांतवन
पावाल. २३ आणि जेव्हां तुह्मी त्यांचें आचरण
आणि त्यांचीं कर्में पाहाल, तेव्हां ते तुमचें शांत-
वन करितील; आणि जें सर्व म्या तिजसीं केलें
आहे, तें म्या व्यर्थ केलें नाहीं, असें तुह्मी जा-
णाल, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय १५.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें कीं,
२ **मनुष्याच्या** पुत्रा, द्राक्षवेल भलत्या
कोणत्याहि झाडापेक्षां अथवा रानझाडामध्यें जी
कोणतीहि डहाळी असेल, तिजपेक्षां विशेष आहे
काय? ३ कांहीं कर्म करायाला तींतून लांकूड
कोणी घेईल काय? अथवा त्याजवर कोणतेंहि पात्र
टांगायाला कोणी तींतून खुंटी तरी घेतील काय?
४ पाहा, ती सर्पणासाठीं अग्नींत घालितात; ति-
चीं दोन्हीं शेवटें अग्नि खाऊन टाकितो, आणि
तिचा मध्यभाग जळतो; तर ती कांहीं कामास
उपयोगी आहे काय? ५ पाहा, ती शाबूत

सून कांहीं कामास उपयोगी नाहीं; तर मग जेव्हां
अग्नीने ती खाली आहे, आणि ती जळाली आहे,
तेव्हां ती पुढें एकाद्या कामास कसी उपयोगी
पडेल?
६ तर **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं जसी रा-
नझाडांमध्यें द्राक्षवेल जी म्या अग्नीला सर्पणा-
साठीं दिल्ही आहे, तसे यरूशालेमेंतले राहणारे
देईन. ७ **आणि** मी त्यांविरुद्ध आपलें मुख ठे-
वीन; ते एका अग्नींतून निघाले असतां दुसरा
अग्नि त्यांस खाईल; आणि जेव्हां मी आपलें
मुख त्यांविरुद्ध ठेवीन, तेव्हां, मी **परमेश्वर** आहें,
असें तुह्मी जाणाल. ८ **आणि** त्यांनीं अपराध
केला आहे, ह्मणून मी देश ओसाड करून ठेवीन,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय १६.

**आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, यरूशालेमेला
तिचीं अघोरकर्में कळीव, ३ **आणि** सांग, **प्रभु
परमेश्वर** यरूशालेमेला ह्मणतो, कीं तुझी उ-
त्पत्ति, तुझा जन्म खनान देशांतली होती; तुझा
बाप अमोरी होता, तुझी आई हित्तीण होती.
४ **आणि** तुझा जन्म कसा, जेव्हां तूं जन्मलीस,
तेव्हां तुझें नाळ कापलें नव्हतें, तुला स्वच्छ क-
रायाला पाण्याने धुतलें नव्हतें; तुला कांहीं मीठ
लाविलें नव्हतें, आणि तुला बाळंत्याने कांहींच
गुंडाळलें नव्हतें. ५ **या** कर्मांतलें कोणतेंहि तुला
करायाला, अथवा तुझा कळवळा करायाला, को-
णत्याहि डोळ्याने तुजवर दया केली नाहीं;
परंतु जेव्हां तूं जन्मलीस, तेव्हां तुझा वीट मानून
तुला शेतावर टाकिलें.
६ **मग** म्या तुजकडून जातांना तुला रक्ताने
माखलेलें पाहिलें, तेव्हां तूं आपल्या रक्तामध्यें
असतां म्या तुला ह्मटलें, वांच; होय तूं आ-
पल्या रक्तामध्यें असतां म्या तुला ह्मटलें, वांच.
७ **म्या** तुला शेताच्या कोंबाप्रमाणें वाढविलें आहे,
आणि तूं वाढून मोठी झाली आहेस, आणि उ-
त्कृष्ट अलंकारांस आली आहेस; तुझीं थानें वर
आलीं आहेत, आणि तुझे केंस वाढले आहेत,
तूं असतांहि तूं पूर्वी नागवी व उघडी होतीस.
८ **जेव्हां** म्या तुजकडून जातांना तुला पाहिलें,
तेव्हां पाहा, तुझा समय प्रीतीचा समय होता;
आणि म्या आपला पदर तुजवर पसरून तुझा
नागवेपणा झांकिला; मग म्या तुजजवळ शपथ
वाहिली, आणि तुसीं करार केला, तेव्हां तूं माझी
झालीस, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. ९
**आणि** म्या तुला पाण्याने धुतलें; आणि तुझें रक्त
तुजवरून धुऊन टाकिलें, आणि तुला तेलाने म-
र्दिलें. १० **आणि** तुला वेलबुटीचें वस्त्र पांघ-
रविलें, आणि लाल चांबड्याचा जोडा तुझ्या पायांत
घातला, आणि म्या तुला स्वच्छ पांढऱ्या वस्त्राने
वेष्टिलें, आणि रेशमी वस्त्राने झांकिलें. ११
**आणि** म्या तुला अलंकारानी भूषिलें, आणि कडीं
तुझ्या हातांत घातलीं, आणि सांखळी तुझ्या ग-
ळ्यांत घातली. १२ **आणि** म्या तुझ्या नाकांत
नथ घातली, आणि तुझ्या कानांत काप घातले,
आणि तुझ्या डोईस शोभिवंत मुगुट घातला. १३
तर तूं सोन्याने व रुप्याने भूषिली असस, आणि
तुझें पांघरूण स्वच्छ पांढरें वस्त्र व रेशमी व
वेलबुटीचें वस्त्र असे; आणि तूं उत्कृष्ट पीठ व
मध व तेल खाईस; आणि तूं अत्यंत सुंदर
झालीस, आणि राज्य होण्यापर्यंत वाढलीस.
१४ **आणि** तुझ्या सुंदरपणामुळें तुझी कीर्त्ति बा-
हेर राष्ट्रांमध्यें गेली; कारण कीं माझी जी शोभा
म्या तुजवर घातली होती, तिजकडून ती पूर्ण
होती, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
१५ **आणि** त्वां आपल्या सुंदरपणावर भाव
ठेविला, आणि आपल्या कीर्तीमुळें व्यभिचार के-
ला, आणि प्रत्येक येत्याजात्यावर आपले व्यभि-
चार घातले; तो त्याचा झाला. १६ **आणि**
त्वां आपल्या वस्त्रांतलीं कित्येक घेऊन आपणासा-
ठीं विचित्र उंचस्थानें केलीं, आणि त्यांजवर व्य-
भिचार केला; अशा गोष्टी घडूं नयेत, असें कर्म
होऊं नये. १७ **आणि** तुझे जे शोभिवंत अलंकार
माझ्या सोन्याचे व माझ्या रुप्याचे होते, जे म्या
तुला दिल्हे होते, ते त्वां घेऊन आपणासाठीं पुरुष
मूर्त्ति केल्या, मग त्यांसीं त्वां व्यभिचार केला,
१८ **आणि** त्वां आपलीं वेलबुटीचीं वस्त्रें घेऊन
त्यांस झांकिलें; आणि माझें तेल व माझा धूप हीं
त्यांपुढें ठेविलीं. १९ **आणि** माझें जें अन्न म्या

तुला दिल्हें, जें उत्कृष्ट पीठ व तेल व मध म्या
तुला खायाला दिल्हें, तें त्वां त्यांपुढें सुगंधासाठीं
ठेविलें; असें झालें, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
२० **आणि** तुझे पुत्र व तुझ्या कन्या जीं तूं मज-
साठीं प्रसविलीस, तीं त्वां घेऊन तीं त्यानी खावीं,
ह्मणून त्यांपुढें बलि असीं अर्पिलीं; तुझ्या व्यभिचा-
रांतली ही हलकी गोष्ट आहे काय? २१ **आणि**
त्वां माझीं लेंकरें वधिलीं आहेत, आणि तीं अग्नीं-
तून पार घालवून त्यांस दिल्हीं आहेत. २२ **आ-
णि** तूं आपल्या ज्या तरुणपणाच्या दिवसांत नाग-
वी व उघडी असून आपल्या रक्ताने माखलेली
होतीस, ते दिवस त्वां आपल्या सर्व अघोरकर्मांत
व आपल्या व्यभिचारांत असतांना स्मरले नाहींत.
२३ **आणि** तुझ्या सर्व दुष्टाईनंतर, तुला हाय
हाय, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, २४ **असें** झालें,
कीं त्वां आपणासाठीं घुमट बांधिला, आणि प्रत्येक
आळींत त्वां आपणासाठीं उंचस्थान केलें आहे.
२५ **त्वां** आपलें उंचस्थान मार्गाच्या प्रत्येक शेव-
टास बांधिलें आहे, आणि तुझा सुंदरपणा अघोर
मानीत, असें त्वां केलें आहे, आणि त्वां आपले
पाय प्रत्येक येत्याजात्याला पसरिले आहेत, आ-
णि आपले व्यभिचार बहुत केले आहेत. २६
**आणि** तुझे शेजारी जे मोठया देहाचे **मिसरी**
त्यांसीं त्वां व्यभिचार केला आहे; आणि मला
कोपीत करायाला त्वां आपले व्यभिचार बहुत
केले आहेत. २७ **तर** पाहा, म्या आपला हात
तुजवर पुढें केला आहे, आणि तुझें नित्याचें अन्न
उणें केलें आहे, आणि तुझ्या वैरिणी **पलिष्टयांच्या**
कन्या ज्या तुझ्या वाईट आचाराविषयीं लाज-
तात, त्यांच्या इच्छेच्या स्वाधीन तुला केलें आहे.
२८ **आणि** तुझी तृप्ति होईना, ह्मणून त्वां **अश्शू-
र्यांसीं** व्यभिचार केला आहे; होय त्यांसीं त्वां
व्यभिचार केला आहे, तथापि तुझ्याने तृप्त होव-
वेना. २९ **आणि** त्वां आपला व्यभिचार **खनान**
देशांत आरंभून **खास्द्यांच्या** देशापर्यंत वाढविला
आहे; तथापि तेणेंकरूनाहि तूं तृप्त होईनास. ३०
**धीट** व्यभिचारिणी स्त्रीच्या कर्माप्रमाणें तूं हीं
कर्में करितीस, तर मग तुझें हृदय किती दुर्बल
आहे! असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. ३१ **त्वां**
आपला घुमट प्रत्येक वाटेच्या शेवटास बांधिला
आहे, आणि प्रत्येक आळींत आपलें उंचस्थान
केलें आहे, आणि तूं कसबिणीसारिखी नसस, कां
तूं वेतन धिक्कारीस. ३२ **परंतु** जी जारकर्मिणी
स्त्री आपल्या पतीच्या स्थानीं जार आपल्याजवळ
घेती, तिजसारिखी असस. ३३ **मनुष्य** सर्व क-
सबिणींस देणगी देत असतात; परंतु तूं आपल्या
सर्व प्रियांस दानें देतीस, आणि त्यानी चहुंकडून
तुझ्या व्यभिचारांसाठीं तुजजवळ यावें, ह्मणून तूं
त्यांस वेतन देऊं करितीस. ३४ **तर** तुझ्या व्य-
भिचारांत तुझ्या अंगीं इतर स्त्रियांपेक्षां विपरीत-
पण आहे, कां तर व्यभिचार करायाला तुला
कोणी अनुसरत नाहीं; परंतु तूं वेतन देतीस, आ-
णि तुला वेतन देत नाहींत, ह्मणून तूं विपरीत
आहेस.

३५ **याकरितां** अगे व्यभिचारिणी, तूं **परमे-
श्वराचें** वचन ऐक; ३६ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं तुझे पैसे दवडिलेले आहेत, आणि तुझ्या
प्रियांजवळ आणि तुझ्या अघोरपदार्थांच्या मूर्त्तीं-
जवळ जे तुझे व्यभिचार झाले त्यांकडून, आणि
जीं तुझीं लेंकरें त्वां त्यांस दिल्हीं, त्यांच्या रक्ते-
कडून तुझा नागवेपणा उघडा झाला ह्मणून; ३७
**याकरितां** पाहा, तुझ्या ज्या प्रियांसीं तूं संतुष्ट
होत असस, त्यांस आणि ज्या सर्वांवर प्रीति
ठेवींत असस, व ज्या सर्वांचा द्वेष करीत अ-
सस, त्यांस मी एकत्र मिळवीन, होय त्यांस सभों-
वार तुजकडेस एकवटीन, आणि त्यांसाठीं तुझा
नागवेपणा उघडा करीन, तेव्हां ते तुझा अवघा
नागवेपणा पाहतील. ३८ **आणि** ज्या स्त्रिया
जारकर्म करितात, व रक्त पाडितात, त्यांच्या
न्यायाप्रमाणें तुझा न्याय करीन, आणि क्रोधानें
व आवेशाने तुला रक्त देईन. ३९ **आणि** तुला
त्यांच्या हातीं देईन, आणि ते तुझा घुमट पाडि-
तील, व तुझीं उंचस्थानें मोडितील; आणि तुज-
पासून तुझीं वस्त्रें हिसकून घेतील, व तुझे शोभि-
वंत अलंकार काढून घेतील, आणि तुला नागवी
व उघडी सोडितील. ४० **आणि** ते तुजवर स-
मुदाय आणितील, आणि तुला दगडमार करि-
तील, आणि आपल्या तरवारीनी तुला भोंसकितील.
४१ **आणि** ते तुझीं घरें अग्नीने जाळितील, आणि
बहुत स्त्रियांच्या देखतां तुला शासनें करितील;

आणि तूं व्यभिचार सोडीस, असें मी करीन,
मग तूं पुन्हा वेतन देणार नाहींस· ४२ आणि
तुजवर जो माझा क्रोध आहे, तो शांतवीन, आणि
माझा आवेश तुजपासून जाईल, आणि मी शांत
होईन, आणि पुन्हा रागें भरणार नाहीं· ४३
तर तूं आपल्या तरुणपणाचे दिवस स्मरली नाहींस,
आणि या सर्व कर्मांत मला त्रासवीत असस;
यामुळें पाहा, मी तुझ्या डोईवर तुझ्या आचारांचें
फल ठेवीन, मग तूं आपल्या सर्व अघोर पदार्थां-
जवळ दुष्कर्म करणार नाहींस, असें **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो·

४४ पाहा, प्रत्येक ह्मण बोलणारा तुजविषयीं
ही ह्मण बोलेल, कीं जसी आई तसी कन्या·
४५ जी तुझी आई आपल्या पतीला व आपल्या
लेंकरांस कंटाळली, तिचीच कन्या तूं आहेस;
आणि ज्या तुझ्या बहिणी आपल्या पतींस व
आपल्या लेंकरांस कंटाळल्या, त्यांचीच बहीण तूं
आहेस; तुमची आई **हित्तीण** होती, आणि
तुमचा बाप **अमोरी** होता· ४६ तर जी तुझी
वडील बहीण तुझ्या डाव्याकडे वसती, ती **शो-
मरोन** तिच्या कन्यांसुद्धां आहे; आणि तुजपेक्षां
धाकटी जी तुझी बहीण तुझ्या उजव्याकडे वसती,
ती **सदोम** तिच्या कन्यांसहित आहे· ४७
तथापि तूं त्यांच्या आचारांप्रमाणें वर्त्तली नाहींस,
आणि त्वां त्यांच्या अघोर कर्मांप्रमाणें केलें नाहीं;
परंतु तें कांहीं नव्हतें, असें समजून त्वां आपल्या
सर्व आचारांत त्यांपेक्षां अधिक दुष्टपण केलें
आहे· ४८ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, मी आप-
ल्या जीवाची शपथ वाहतों, कीं जसें त्वां व तु-
झ्या कन्यांनी केलें आहे, तसें तुझी बहीण जी
**सदोम** तिने व तिच्या कन्यांनी केलें नाहीं· ४९
पाहा, तुझी बहीण जी **सदोम** तिचा अन्याय
हाच होता, गर्व, अन्नाची तृप्ति, व स्वस्थ समा-
धान हीं तिला व तिच्या कन्यांस होतीं, आणि
ती दीन व दरिद्री यांचा हात धरीना· ५० आ-
णि त्या दांडग्या असत, आणि मजसमक्ष अघोर
कर्म करीत असत, ह्मणून जसें मला बरें वाटलें,
तसें म्या त्यांस काढून टाकलें· ५१ आणि **शो-
मरोनेने** तुझ्या पापांच्या अर्धाएवढें पाप केलें ना-
हीं; परंतु त्यांपेक्षां त्वां आपलीं अघोर कर्में बहुत
केलीं आहेत, आणि जीं तुझीं सर्व अघोर कर्में
त्वां केलीं आहेत, त्यांकडून त्वां आपल्या बहिणींस
न्यायी ठरविलें आहे· ५२ ज्या त्वां आपल्या
बहिणींचा न्याय केला आहे, ती तूं जीं तुझीं पापें
त्वां त्यांपेक्षां अधिक अघोरपणानें केलीं आहेत,
त्यांमुळें आपली अप्रतिष्ठा भोगून घे; त्या तुजपे-
क्षां न्यायी आहेत; तर त्वां आपल्या बहिणींस
न्यायी ठरविलें, ह्मणून तूं लज्जित होऊन आपली
अप्रतिष्ठा भोगून घे· ५३ जेव्हां मी त्यांचे पा-
डाव प्रवासी, ह्मणजे **सदोमेचे** व तिच्या कन्यांचे
पाडाव प्रवासी, आणि **शोमरोनेचे** व तिच्या क-
न्यांचे पाडाव प्रवासी परत आणीन, तेव्हां त्यांम-
ध्यें तुझे पाडाव प्रवासीहि मी परत आणीन;
५४ अशासाठीं कीं त्वां आपली अप्रतिष्ठा भो-
गावी, आणि त्यांस शांतवन देऊन जें सर्व त्वां
केलें आहे, त्यामुळें त्वां लज्जित व्हावें· ५५
जेव्हां तुझ्या बहिणी ज्या **सदोम** व तिच्या कन्या
आपल्या पूर्वस्थितीस परत येतील, आणि जेव्हां
**शोमरोन** व तिच्या कन्या आपल्या पूर्वस्थितीस
परत येतील, तेव्हां तूं व तुझ्या कन्या आपल्या
पूर्वस्थितीस परत याल· ५६ तर **अरामेच्या**
ज्या कन्या, आणि तिच्या भोंवतालचे जे सर्व,
आणि **पलिष्ट्यांच्या** ज्या कन्या, तुला चोहींकडून
अव्हेरितात, त्या सर्वांच्या निंदेच्या वेळेस जसी
तुझी बहीण **सदोम** इचें नाव निघत असे, ५७
तसी तुझ्या गर्वाच्या वेळेस तुझें दुष्टपण उघडें
झाल्यापूर्वी तुझ्या तोंडांतून तिचें नांव निघालें
नाहीं· ५८ त्वां आपल्या दुष्कर्मांचें व आपल्या
अघोर कर्मांचें फल भोगिलें आहे, असें **परमे-
श्वर** ह्मणतो· ५९ कां कीं **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं त्वां करार मोडून शपथ तुच्छ मानि-
ली आहे, ह्मणून जसें त्वां केलें आहे, तसा मी
तुजकडे वर्त्तेन·

६० तथापि तुझ्या तरुणपणाच्या दिवसांत जो
माझा करार तुजसीं झाला, तो मी स्मरेन, आणि
तुसीं सर्वकाळचा करार ठरवीन· ६१ तेव्हां तूं तुझ्या
ज्या बहिणी तुजहून वडील व तुजहून धाकट्या
आहेत, त्या आपणाजवळ घेसील, तेव्हां तूं आ-
पले आचार स्मरून लज्जित होसील, आणि त्या
तुला कन्या व्हाव्यासाठीं देईन, परंतु तुझ्या करा-

रामुळें असें नव्हे. ६२ आणि मी आपला करार
तुजसीं ठरवीन; तेव्हां, मी परमेश्वर आहें, असें
तूं जाणसील. ६३ अशासाठीं कीं जें सर्व त्वां
केलें आहे, त्याविषयीं जेव्हां मी तुझी क्षमा क-
रीन, तेव्हां त्वां स्मरण करावें, व लज्जित व्हावें,
आणि तुझ्या लाजेमुळें तुझें तोंड पुन्हा न उघडावें,
असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.

## अध्याय १७.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, इस्राएलाच्या
वंशाला कोडें घाल, आणि दाखला बोल, ३
आणि सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं मोठ्या
व लांब पंखांच्या व विचित्र पिसानी भरलेल्या गरु-
डानें लबानोनावर येऊन एरेजझाडाची तिटाळी कुर-
तुडून घेतली. ४ त्यानें त्याच्या कोंवळ्या पा-
ट्यांचा शेंडा तोडिला, आणि तें व्यापाऱ्यांच्या
देशांत आणून वाण्यांच्या नगरांत लाविलें, ५
आणि त्यानें देशाच्या बीजांतलें कांहींसें घेऊन
पिकाऊ शेतांत पेरिलें; त्यानें तें फार पाण्यांजवळ
नेऊन वाळुंजासारिखें लाविलें. ६ मग तें उगवून
पसरती, नीच उंचीची द्राक्षी झालें, त्याच्या डा-
हळ्या त्याजकडे वळत असतां त्याचीं मुळें त्या-
जखालीं होतीं; आणि तिनें द्राक्षी होऊन खांद्या
केल्या, आणि पाले फुटूं दिल्हे. ७ आणि दुसरा
मोठा, लांब पंखांचा, व फार पिसांचा गरुड हो-
ता; आणि पाहा, या द्राक्षीनें आपलीं मुळें त्या-
जकडे वळविलीं, आणि आपल्या डाहळ्या त्याज-
कडे फुटूं दिल्ह्या, अशासाठीं कीं त्यानें तिला
तिच्या लावण्याच्या पाटांकडून शिंपावें. ८ तिनें
खांद्या कराव्या, व पाले द्यावे, आणि सुंदरद्राक्षी
व्हावें, ह्मणून ती पिकाऊ शेतांत फार पाण्यांजवळ
लाविलेली होती. ९ तूं सांग, प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं ती साधेल काय? तो तिचीं मुळें
उपटणार नाहीं, आणि तिचें फल सुकून जावें,
ह्मणून तें तो तोडणार नाहीं काय? ती आपल्या
फुटव्याच्या पाल्यांसुद्धां सुकून जाईल, परंतु मो-
ठ्या बाहूकडून अथवा बहुत लोकांकडून असें नव्हे,
तिला मुळांसुद्धां उपटावें ह्मणून. १० तर पाहा,
ती लाविली असून साधेल काय? जेव्हां तिला
पूर्वेकडचा वारा लागेल, तेव्हां ती निस्तुक सुकून
जाणार नाहीं काय? ज्या पाटांजवळ ती उगवली
त्यांजवळ ती सुकून जाईल.

११ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आ-
लें कीं, १२ तूं फितूरी वंशाला ह्मण, या गोष्टींचें
तात्पर्य तुह्मी जाणत नाहीं काय? तूं सांग, पाहा,
बाबेलेचा राजा यरूशालेमेस आला आहे, आ-
णि त्यानें तिचा राजा व तिचे सरदार यांस घे-
ऊन आपणासंगतीं बाबेलेस नेलें आहे; १३
आणि त्यानें राजाच्या वंशांतला कोणी घेऊन
त्यासीं करार केला आहे, आणि तो शपथ वाही
असें केलें आहे; आणि त्यानें देशांतले मुख्यजन
घेतले आहेत. १४ अशासाठीं कीं राज्यानें नीच
होऊन आपणाला उंचावूं नये, आणि टिकावें,
ह्मणून त्याचा करार पाळावा. १५ परंतु मिस-
ऱ्यानी त्याला घोडे, आणि बहुत लोक द्यावे, ह्म-
णून तो मिसरांत दूत पाठवून त्याजविरुद्ध फि-
तूरी झाला, त्याचें हित होईल काय? जो असीं
कर्मे करितो, तो सुटेल काय? आणि करार मो-
डून तो निभावेल काय? १६ प्रभु परमेश्वर
ह्मणतो, मी आपल्या जीवाची शपथ करितों, कीं
निश्चयें ज्या राजानें तो राजा केला, ज्याची श-
पथ त्यानें तुच्छ मानिली, आणि ज्याचा करार
त्यानें मोडिला, त्याजवळ त्याच्या राहण्याच्या
स्थानांत बाबेलेमध्यें तो मरेल. १७ आणि ब-
हुत जीव नाहींसे करायाला, मोरचा रचून अ-
थवा आवार बांधून फारो मोठें सैन्य व मोठा
समुदाय यांसंगतीं लढाईकरून त्यासाठीं कांहीं
साधणार नाहीं. १८ तर त्यानें करार मोडून
शपथ तुच्छ मानिली आहे, आणि पाहा, जरीं
त्यानें हातावर हात दिल्हा होता, तरीं त्यानें हीं
सर्व कर्मे केलीं आहेत, ह्मणून तो निभावणार
नाहीं. १९ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो,
कीं मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं मा-
झी जी शपथ त्यानें तुच्छ मानिली आहे, तिचें
आणि जो माझा करार त्यानें मोडिला आहे, त्या-
चें फल मी त्याच्या डोईवर ठेवीन. २० आणि
त्याजवर मी आपलें जाळें पसरीन, आणि तो
माझ्या फांसांत सांपडेल, आणि मी त्याला बाबे-
लेस आणीन, आणि ज्या अपराधेंकरून त्याला

माझा अपराध केला आहे, त्याविषयीं त्यासीं तेथें
वाद करीन. २१ आणि त्याचे सर्व पळालेले
त्याच्या सर्व समुदायांसुद्धां तरवारीनें पडतील,
आणि जे उरलेले ते अवघ्या दिशांकडे विखरतील;
मग, मी परमेश्वर बोललों आहें, असें तुह्मी
जाणाल.

२२ प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं उंच एरेज-
झाडाच्या तिटाळीचें कांहींसें घेऊन स्थापीन; त्या-
च्या फाट्यांच्या शेंड्यांतली एक कोंवळी कुरतुडून
उंच व उच्छ्रित पर्वतावर लावीन; २३ ती इस्राए-
लाच्या उंचस्थानांतल्या पर्वतावर लावीन; मग ती
खांद्या करील, व फल देईल, व सुंदर एरेजझाड
होईल; आणि त्याखालीं प्रत्येक प्रकारच्या पक्षाचे
सर्व पक्षी राहतील; त्याच्या डाहळ्यांच्या छा-
येंत ते वसतील. २४ तेव्हां रानांतलीं सर्व झाडें
जाणतील, कीं म्या परमेश्वराने उंच झाड नीच
केलें, आणि नीच झाड उंच केलें आहे, ओलें
झाड सुकें केलें, आणि सुकें झाड फुले असें केलें
आहे; मी परमेश्वर हें बोललों, आणि म्या हें
साधिलें आहे.

## अध्याय १८.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ बापानीं आंबट द्राक्षें खाल्लीं, आ-
णि लेंकरांचे दांत आंबाले, ही ह्मण तुह्मी इस्रा-
एलाच्या भूमीविषयीं बोलत असतांना तुमचें
तात्पर्य काय असेल? ३ प्रभु परमेश्वर ह्मण-
तो, मी आपल्या जीवाची शपथ करितों, कीं नि-
श्चयें तुह्माला इस्राएलांत ही ह्मण यापुढें बोला-
याची नाहीं. ४ पाहा, सर्व जीव माझे आहेत;
जसा बापाचा जीव तसा पुत्राचा जीवहि माझा
आहे; जो जीव पाप करितो, तो मरेल.

५ परंतु जर कोणी न्यायी आहे, आणि त्याने
जर नीति व न्याय केला आहे; ६ त्याने जर
पर्वतांवर खाल्लें नाहीं, आणि इस्राएलाच्या वंशा-
च्या मूर्त्तींकडे आपले डोळे लाविले नाहींत, आणि
आपल्या शेजाऱ्याची स्त्री बाटविली नाहीं, आणि
विटाळशीपासीं गेला नाहीं; ७ आणि कोणाला
पीडिलें नाहीं, कर्ज घेणाऱ्याला त्याचें गाहाण परत
दिल्हें आहे, हरण केलें नाहीं, आपलें अन्न भुके-
ल्यास दिल्हें आहे, आणि उघड्याला वस्त्रानें
झांकिलें आहे; ८ व्याजाने पैका दिल्हा नाहीं,
आणि वाढ घेतली नाहीं, अन्यायापासून आपला
हात फिरविला आहे, आणि एकमेकांमध्यें खरेप-
पणानें न्याय केला आहे; ९ माझ्या नियमांप्र-
माणें वर्त्तला आहे, आणि खरेपण आचरून माझे
न्याय पाळिले आहेत, तर तो न्यायी आहे, तो
वांचेलच वांचेल, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.

१० जो लुटारू व घातक आहे, आणि या
दुष्कर्मांतल्या कोणाएकासारिखें कर्म करितो; ११
आणि या सत्कर्मांतलें कांहीं करीत नाहीं, परंतु
त्याने पर्वतांवर खाल्लें आहे, आणि आपल्या शे-
जाऱ्याची स्त्री बाटविली आहे, १२ दीन व
दरिद्री पीडिले आहेत, हरण केलें आहे, गहाण
परत दिल्हें नाहीं, आणि आपले डोळे मूर्त्तींकडे
लाविले आहेत, अघोर कर्म केलें आहे, १३
व्याजाने पैका दिल्हा आहे, व वाढ घेतली आहे,
अशा पुत्राला जर तो न्यायी जन्म देईल, तर तो
पुत्र वांचेल काय? तो वांचणार नाहीं; त्याने हीं
सर्व अघोर कर्मे केलीं आहेत; तो मरेलच मरेल;
त्याचें रक्त त्याजवरच येईल.

१४ आणि पाहा, जो आपल्या बापाचीं सर्व
पापें जीं त्याने केलीं आहेत, तीं पाहून विचार
करितो, आणि असीं कर्मे करीत नाहीं, १५
ज्याने पर्वतांवर खाल्लें नाहीं, आणि आपले डोळे
इस्राएलाच्या वंशाच्या मूर्त्तींकडे लाविले नाहींत,
आपल्या शेजाऱ्याची स्त्री बाटविली नाहीं, १६
आणि कोणाला पीडिलें नाहीं, गहाण अडकवून
धरिलें नाहीं, आणि हरण केलें नाहीं, आपलें अन्न
भुकेल्यास दिल्हें आहे, आणि उघड्याला वस्त्राने
झांकिलें आहे, १७ दीनापासून आपला हात
फिरविला आहे, व्याज व वाढ हीं घेतलीं नाहींत,
माझे न्याय आचरिले आहेत, माझ्या नियमांप्र-
माणें वर्त्तला आहे, अशा पुत्राला जर तो जन्म
देईल, तर तो पुत्र आपल्या बापाच्या अन्यायामुळें
मरणार नाहीं, तो वांचेलच वांचेल. १८ परंतु
जर त्याच्या बापाने बलात्कार केला, आपल्या भा-
वाचें हरण केलें, आणि जें उत्तम नव्हे तें आपल्या
लोकांमध्यें केलें, तर पाहा, तो आपल्या अन्या-
यानें मरेल.

१९ तथापि तुह्मी ह्मणतां, कां, पुत्र आपल्या
बापाच्या अन्यायाचें फल भोगीत नाहीं काय?
जेव्हां पुत्राने नीति व न्याय हीं केलीं आहेत,
माझे सर्व नियम पाळिले आहेत, आणि ते आच-
रिले आहेत, तेव्हां तो वांचेलच वांचेल. २०
जो जीव पाप करितो, तो मरेल; बापाच्या अ-
न्यायाचें फल पुत्र भोगणार नाहीं, आणि पुत्रा-
च्या अन्यायाचें फल बाप भोगणार नाहीं; न्यायी-
च्या न्यायाचें फल त्यालाच प्राप्त होईल, आणि
दुष्टाच्या दुष्टपणाचें फल त्यालाच प्राप्त होईल.
२१ परंतु दुष्ट जीं सर्व पापें करीत आला
आहे, तीं जर तो सोडील, आणि माझे सर्व नि-
यम पाळील, आणि नीति व न्याय आचरील,
तर तो वांचेलच वांचेल, तो मरणार नाहीं. २२
त्याचे जे सर्व अपराध त्याने केले आहेत, त्यांचें
त्याला स्मरण देण्यांत येणार नाहीं, त्याचा जो
न्याय त्याने केला आहे, त्याने तो वांचेल. २३
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो, दुष्टाच्या मरणाविषयीं
मी कांहींच संतोषतों कीं काय? त्याने आपले
मार्ग सोडून वांचावें, याविषयीं मी संतोषतों कीं
नाहीं?
२४ तर जेव्हां न्यायी आपलें न्यायीपण सो-
डून अन्याय करील, आणि जीं सर्व अघोरकर्में
दुष्टजन करितो, त्यांप्रमाणें आचरील, तेव्हां तो
वांचेल काय? त्याचें जें सर्व न्यायीपण त्याने
केलें आहे, त्याचें स्मरण देण्यांत येणार नाहीं;
त्याचें जें पातक त्याने केलें आहे, तेणेंकरून आणि
जें पाप त्याने आचरिलें आहे, तेणेंकरून तो मरेल.
२५ तथापि तुह्मी ह्मणतां, कीं **प्रभु**चा मार्ग
बराबर नाहीं; अहो इस्राएलाच्या वंशानो, ऐका;
माझा मार्ग बराबर नाहीं काय? तुमचे मार्ग गैर-
शिस्त नाहींत काय? २६ न्यायी जेव्हां आपलें
न्यायीपण सोडून अन्याय करितो, आणि त्यांत
मरतो, तेव्हां जो अन्याय त्याने केला आहे, त्या-
नेच तो मरतो. २७ आणि दुष्टजन जें आपलें
दुष्टपण त्याने आचरिलें आहे, तें सोडून जेव्हां
नीति व न्याय करितो, तेव्हां तो आपला जीव
वांचवितो. २८ तो विचार पाहून आपले जे
सर्व अपराध त्याने केले आहेत ते सोडितो, ह्मणून
तो वांचेलच वांचेल, तो मरणार नाहीं. २९
तथापि इस्राएलाचे वंश ह्मणतात, **प्रभू**चा मार्ग
बराबर नाहीं; अहो इस्राएलाच्या वंशानो, माझे
मार्ग बराबर नाहींत काय? तुमचे मार्ग गैरशिस्त
नाहींत काय? ३० याकरितां **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, अहो इस्राएलाच्या वंशानो, मी तुह्माला
प्रत्येकाला त्याच्या आचारांप्रमाणें शासीन; तुह्मी
फिरा, आणि आपणांस आपल्या सर्व अपराधांपा-
सून फिरवा; ह्मणजे अन्याय तुह्मास बाधक
असणार नाहीं.
३१ अहो इस्राएलाच्या वंशानो, ज्यांकडून
तुह्मी पातक केलें आहे, ते तुमचे सर्व अपराध
तुह्मी आपणांपासून टाकून द्या; आणि तुह्मी आ-
पणांसाठीं नवें हृदय व नवा आत्मा करा; तुह्मी
कां मराल? ३२ कां कीं जो मरतो, त्याच्या मरणा-
विषयीं मी संतोषत नाहीं; ह्मणून तुह्मी आपणां-
ला फिरवा, आणि वांचा, असें **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो.

## अध्याय १९.

आणि तूं इस्राएलाच्या अधिकाऱ्यांविषयीं वि-
लाप कर, २ आणि ह्मण, तुझी आई
कसली आहे? ती सिंही आहे, ती सिंहांमध्यें
बसत असे, तिने तरुण सिंहांमध्यें आपलीं
पिलीं वाढविलीं. ३ तर तिने आपल्या पिल्यां-
तून एक वाढविलें; ह्मणजे तें तरुण सिंह
झालें; तो पारध फाडायाला शिकला; तो
मनुष्याला खाऊं लागला. ४ तेव्हां राष्ट्रांनी
त्याविषयीं ऐकिलें; मग तो त्यांच्या खांचेंत सां-
पडला; नंतर त्यांनी त्याला वेसणा घालून मिसर
देशांत आणिलें. ५ तर आपण अपेक्षा धरिली,
परंतु आशा मोडली आहे, असें तिने पाहून आ-
पल्या पिल्यांतून दुसरें घेऊन तरुण सिंह केलें.
६ तेव्हां तें सिंहांमध्यें वर्त्तून तरुण सिंह झालें;
मग तो पारध फाडायाला शिकला; तो मनुष्या-
ला खाऊं लागला. ७ आणि त्याने त्यांचे वाडे
ओळखिले, आणि त्यांचीं नगरें उजाड केलीं;
आणि त्याच्या गर्जनेच्या शब्देंकरून भूमि व तिचें
भरण ओसाड झालें. ८ मग राष्ट्रांनी प्रांतांतू-
येऊन त्याभोंवता वेढा घातला, आणि त्याजवर
आपलें जाळें पसरिलें; तेव्हां तो त्यांच्या खां-

त सांपडला· ९ आणि त्यानी त्याला वेसणा
घालून पिंजऱ्यांत ठेविलें, आणि बाबेलेच्या राजा-
कडे आणिलें; त्यानी त्याला दुर्गांत आणिलें,
अशासाठीं कीं त्याचा शब्द इस्राएलाच्या पर्वतां-
वर पुन्हा ऐकूं येऊं नये·

१० तुझी आई तुजसारिखी द्राक्षीप्रमाणें पा-
ण्यांजवळ लाविलेली होती, तिला बहुत पाण्यानी
फळें चांगलीं आलीं व ती पुष्कळ फांध्यानी भर-
ली· ११ आणि अधिकाऱ्यांच्या राजदंडांसाठीं
तिला बळकट कोंब होते, आणि फांद्यांमधून तिची
उंची उंचावली, आणि ती आपल्या डाहाळ्यांच्या
दाटीसुद्धां आपल्या उंचपणाने दिसली· १२
परंतु ती क्रोधाकडून उपटिली, भूमीवर पाडिली,
आणि पूर्वेकडच्या वाऱ्याने तिचें फल वाळविलें;
तिचे बळकट कोंब तोडिले, व सुकून गेले; अ-
ग्नीने ते खाऊन टाकिले· १३ आणि आतां ती
जंगलांत, सुक्या व तान्हेल्या भूमींत लाविली
आहे· १४ आणि तिच्या फांद्यांच्या एका कों-
बांतून अग्नीने निघून तिचें फल खाल्लें आहे, ह्मणून
राजदंड व्हायाला तिला एकहि बळकट कोंब रा-
हिला नाहीं; हा विलाप आहे, आणि विलाप
असत जाईल·

## अध्याय २०·

आणि सातव्या वर्षांत, पांचव्या महिन्यांत,
महिन्याच्या दाहाव्या दिवशीं असें झालें,
कीं इस्राएलाच्या वडिलांतून कित्येक परमेश्वरास
विचारायाला येऊन मजसमोर बसले· २ तेव्हां
परमेश्वराचें वचन मजजवळ आलें कीं, ३
मनुष्याच्या पुत्रा, तूं इस्राएलाच्या वडिलांसीं बोल,
आणि त्यांस सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं
तुह्मी मला विचारायाला आला आहां काय?
मी आपल्या जीवाची शपथ करितों, कीं निश्चयें मी
तुह्माला मला विचारूं देणार नाहीं·

४ मनुष्याच्या पुत्रा, तूं त्यांचा न्याय करिसील
काय? त्यांचा न्याय करिसील कीं नाहीं? त्यांच्या
पूर्वजांचीं अघोरकर्में त्यांस कळीव· ५ आणि
त्यांस सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं ज्या
दिवशीं म्या इस्राएल निवडिला, आणि याकोबा-
च्या घराण्याच्या संततीजवळ आपला हात उंचा-
विला, आणि मिसर देशांत त्यांकडे आपणाला
जाणविलें, आणि, मी परमेश्वर तुमचा देव
आहें, असें सांगून त्यांजवळ आपला हात उंचा-
विला; ६ जो दूध व मध वाहण्याचा देश म्या
त्यांसाठीं शोधिला होता, जो सर्व देशांची शोभा
आहे, त्यांत त्यांस मिसरांतून आणायाला त्या
दिवशीं म्या त्यांजवळ आपला हात उंचाविला·
७ आणि म्या त्यांस ह्मटलें, तुह्मी प्रत्येक आप-
ल्या डोळ्यांचे कुत्सित पदार्थ टाकून द्या, आणि
मिसरांतल्या मूर्तींकडून तुह्मी आपणांस विटाळूं
नका; मी परमेश्वर तुमचा देव आहें· ८
तथापि ते मजविरुद्ध फितुरी झाले, आणि ते
माझें ऐकेनात; ते प्रत्येक आपल्या डोळ्यांचे कु-
त्सित पदार्थ टाकिनात, आणि ते मिसरांतल्या
मूर्त्ति सोडिनात; तेव्हां म्या मिसर देशामध्यें
त्यांजवर आपला क्रोध समाप्त करावा, ह्मणून मी
आपला रोष त्यांजवर घालीन, मी असें ह्मणालों·
९ तथापि म्या आपल्या नामाकरितां कार्य साधिलें,
अशासाठीं कीं ज्या राष्ट्रांमध्यें ते होते, ज्यांच्या दे-
खतां म्या त्यांस मिसरांतून आणितांना त्यांजकडे
आपणाला जाणविलें, त्यांपुढें त्याला बट्टा लागूं
नये·

१० मग म्या त्यांजला मिसर देशांतून काढून,
जंगलांत आणिलें; ११ आणि जे जर कोणी
आचरील, तर तो त्यांकडून वांचेल, ते माझे नि-
यम म्या त्यांस दिल्हे, आणि ते माझे न्याय म्या
त्यांस कळविले· १२ आणि माझ्या व त्यांच्या
मध्यें खूण व्हावयासाठीं, म्या आपले शाब्बाथहि
त्यांस दिल्हे, अशासाठीं कीं, मी परमेश्वर त्यां-
चा पवित्रकर्त्ता आहें, असें त्यानी जाणावें· १३
परंतु इस्राएलाचे वंश रानांत मजकडे फितुरी
झाले; ते माझ्या नियमांप्रमाणें वर्त्तले नाहींत;
आणि जे जर मनुष्य आचरील, तर तो त्यांजक-
डून वांचेल, त्या माझ्या न्यायांस त्यानी तुच्छ
मानिलें; आणि त्यानी माझे शाब्बाथ फार बाट-
विले; तेव्हां त्यांस नाहींसें करावें, ह्मणून जंग-
लांत मी आपला रोष त्यांजवर घालीन, असें मी
ह्मणालों· १४ तथापि म्या आपल्या नामाकरितां
कार्य साधिलें, अशासाठीं कीं ज्यांच्या देखतां म्या
त्यांस बाहेर आणिलें होतें, त्या राष्ट्रांपुढें त्याला

बट्टा लागूं नये. १५ तथापि जो दूध व मध वाह-
ण्याचा देश मी त्यांस देणार होतों, जो सर्व
देशांची शोभा आहे, त्यांत मी त्यांस आणणार
नाहीं, असें सांगतांना मी आपला हात त्यांजवळ
उंचाविला; १६ कारण कीं त्यांनी माझे न्याय
तुच्छ मानिले, आणि ते माझ्या नियमांप्रमाणें
वर्त्तले नाहींत, आणि त्यांनी माझे शाब्बाथ बाट-
विले; कां कीं त्यांचें हृदय त्यांच्या मूर्त्तींला अनु-
सरलें. १७ तथापि त्यांस नाशूं नये, ह्मणून
माझ्या डोळ्यानें त्यांजवर कळवळा केला, आणि
म्या जंगलांत त्यांचें अवसान केलें नाहीं. १८
आणि म्या जंगलांत त्यांच्या लेंकरांस ह्मटलें,
तुह्मी आपल्या बापांच्या नियमांप्रमाणें वर्त्तूं नका,
आणि त्यांचे न्याय पाळूं नका, आणि त्यांच्या
मूर्त्तींकडून तुह्मी आपणांला विटाळूं नका. १९
मी **परमेश्वर** तुमचा देव आहें; तुह्मी माझ्या
नियमांप्रमाणें वर्त्ता, आणि माझे न्याय पाळा,
आणि ते आचरा. २० आणि माझे शाब्बाथ
पवित्र माना; ह्मणजे ते माझ्या आणि तुमच्या
मध्यें खूण होतील; मी **परमेश्वर** तुमचा देव
आहें, असें तुह्मी जाणावें ह्मणून. २१ तथापि
तीं लेंकरें मजकडे फितूरी झालीं; तीं माझ्या नि-
यमांप्रमाणें वर्त्तलीं नाहींत; आणि जे जर मनुष्य
आचरील, तर तो त्यांजकडून वांचेल, ते माझे
न्याय ते आचरायाला त्यांनी पाळिले नाहींत;
त्यांनी माझे शाब्बाथ बाटविले; मग रानांत मा-
झा क्रोध त्यांजवर समाप्त करावा, ह्मणून मी त्यां-
जवर आपला रोष घालीन, असें मी ह्मणालों.
२२ तथापि म्या आपला हात फिरविला, आणि
आपल्या नामाकारितां कार्य साधिलें, अशासाठीं कीं
ज्यांच्या देखतां म्या त्यांस बाहेर आणिलें होतें,
त्या राष्ट्रांपुढें त्याला बट्टा लागूं नये. २३ आणि
त्यांस राष्ट्रांमध्यें उडवावें, आणि त्यांस देशामध्यें
विखरावें, ह्मणून म्या रानांत त्यांजवळ आपला
हात उंचाविला; २४ कारण कीं त्यांनी माझे
न्याय साधिले नाहींत, परंतु त्यांनी माझे नियम
तुच्छ मानिले, आणि माझे शाब्बाथ बाटविले,
आणि त्यांच्या बापांच्या मूर्त्तींकडे त्यांचे डोळे
असत. २५ याकारितां जे नियम उत्तम नव्हते
ते, आणि ज्यांकडून त्यांच्याने वांचवेना ते न्याय
म्या त्यांस दिल्हे; २६ आणि पोटचें प्रत्येक
प्रथम झालेलें त्यांनी अग्नीमध्यें घालविलें, ह्मणून
म्या त्यांच्याच दानांकडून त्यांस विटाळिलें, म्या
त्यांस अनाथ करावें ह्मणून; अशासाठीं कीं, मी
**परमेश्वर** आहें, असें त्यांनी जाणावें.

२७ याकारितां मनुष्याच्या पुत्रा, तूं इस्राएलाच्या
वंशाला बोल, आणि त्यांस सांग, **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं तुमच्या पूर्वजांनी मजविरुद्ध पातक
केलें, येणेंकरून त्यांनी अझूनपर्यंत मला निंदिलें
आहे. २८ ज्या देशाविषयीं म्या आपला हात
उंचाविला, तो त्यांस द्यावा, ह्मणून त्या देशांत
जेव्हां म्या त्यांस आणिलें, तेव्हां त्यांनी प्रत्येक
उंच डोंगर आणि प्रत्येक सातारें झाड पाहून, तेथें
आपले बलि अर्पिले, आणि तेथें आपलें राग आ-
णणारें अर्पण निवेदिलें; आणि तेथें आपला सुवास
केला, आणि तेथें आपलीं पेय अर्पणें ओतिलीं.
२९ तेव्हां म्या त्यांस ह्मटलें, ज्या उंचस्थानाकडे
तुह्मी जातां तें कोणतें आहे? मग या दिवसा-
पर्यंत त्याचें नाम बामा असें ह्मणत आले आहेत.
३० याकारितां इस्राएलाच्या वंशास सांग, **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मी आपल्या पूर्वजांप्र-
माणें विटाळलां आहां काय? त्यांच्या कुत्सित
कर्मांप्रमाणें तुह्मी व्यभिचार करितां काय? ३१
आणि तुह्मी आपलीं दानें वाहतांना, आणि आप-
लीं लेंकरें अग्नीमध्यें घालवितांना, आजपर्यंत आ-
पणांस आपल्या सर्व मूर्त्तींकडून विटाळितां; तर
मग इस्राएलाच्या वंशानों, मी तुह्मांला मला वि-
चारूं देऊं काय? मी आपल्या जीवाची शपथ वा-
हतों, कीं मी तुह्मांला मला विचारूं देणारच नाहीं,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. ३२ आणि जें
तुमच्या मनांत येतें, जें तुह्मी ह्मणतां, कीं लांकडा-
ची व दगडाची सेवा करायाला आह्मी राष्ट्रांसा-
रिखे, देशांच्या वंशांसारिखे होऊं, तें घडणारच
नाहीं.

३३ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, मी आपल्या
जीवाची शपथ करितों, कीं निश्चयें मी बळकट
हातानें व लांबविलेल्या बाहूनें व घातलेल्या रो-
षानें तुमचें राज्य करीन. ३४ आणि बळकट
हातानें व लांबविलेल्या बाहूनें व घातलेल्या रो-
षानें मी तुह्मांला लोकांतून आणीन, आणि ज्या

देशांत तुह्मी विखरिलेले आहां, त्यांतून तुह्माला
एकवटीन. ३५ आणि मी तुह्माला लोकांच्या
जंगलांत आणीन, आणि तेथें तुह्मांसीं तोंडा तों-
डीं वाद करीन. ३६ जसा म्या मिसर देशां-
तल्या जंगलांत तुमच्या पूर्वजांसीं वाद केला, तसा
तुह्मांसीं वाद करीन, असें **प्रभु परमेश्वर** ह्म-
णतो. ३७ आणि तुह्मी काठी खालून पार जा,
असें करीन, आणि तुह्माला कराराच्या बंधांत
आणीन. ३८ आणि जे फितूरी त्यांस, आणि
जे मजविरुद्ध पातक करितात त्यांसहि मी तुह्मां-
तून वेगळे करीन; ते त्यांच्या प्रवासदेशांतून जात,
असें करीन; आणि ते इस्राएलाच्या भूमीवर
येणार नाहींत; आणि, मी **परमेश्वर** आहें,
असें तुह्मी जाणाल. ३९ तर इस्राएलाच्या
वंशानो, तुह्माला **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
जा, तुह्मी प्रत्येक आपल्या मूर्तींची सेवा करा,
आणि यानंतरहि जर तुह्मी माझें ऐकत नाहीं,
तर करा; परंतु पुन्हा तुह्मी आपल्या दानांकडून व
आपल्या मूर्तींकडून माझ्या पवित्र नामाला बट्टा
लावूं नका. ४० कारण कीं **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं माझ्या पवित्रपर्वतांत, इस्राएलाच्या
उंचपणाच्या पर्वतांत, तेथें इस्राएलाचे सर्व वंश,
ते सर्वच त्या देशांत माझी सेवा करितील; तेथें
मी त्यांस प्रसन्न होईन, आणि तेथें मी तुमचीं
दानें आणि तुमच्या अर्पणाच्या प्रथम भागाला
तुमच्या सर्व पवित्र पदार्थांसुद्धां शोधीन. ४१
जेव्हां मी तुह्माला लोकांतून आणीन, आणि ज्या
देशांत तुह्मी विखरिलेले आहां त्यांतून तुह्माला
एकवटीन, तेव्हां सुवासेंकरून तुह्माला प्रसन्न
होईन; आणि राष्ट्रांच्या देखतां तुह्माकडून आप-
णाला पवित्र मानवीन. ४२ जेव्हां इस्राएलाच्या
भूमींत, ह्मणजे ज्या देशाविषयीं तो तुमच्या पूर्व-
जांस द्यावा, ह्मणून म्या आपला हात उंचाविला
त्या देशांत मी तुह्माला आणीन, तेव्हां, मी **पर-
मेश्वर** आहें, असें तुह्मी जाणाल. ४३ आणि
त्यांकडून तुह्मी विटाळलां आहां, ते तुमचे आ-
चार व तुमचीं सर्व कर्में तेथें स्मराल; आणि
तुमचीं जीं सर्व दुष्कर्में तुह्मी केलीं आहेत, त्यां-
मुळें तुह्मी आपल्या दृष्टींत आपणाला कंटाळाल.
४४ तर इस्राएलाच्या वंशानों, म्या तुह्माला तु-
मच्या दुराचाराप्रमाणें अथवा तुमच्या दुष्टकर्मां-
प्रमाणें नव्हे, परंतु माझ्या नामाकरितां केलें, ह्म-
णजे, मी **परमेश्वर** आहें, असें तुह्मी जाणाल,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
४५ आणि **परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, ४६ मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें
मुख दक्षिणेकडे कर, आणि याम्येकडे आपलीं
वचनें पडूं दे, आणि दक्षिण प्रांताच्या रानाकडे
भविष्य सांग, ४७ आणि दक्षिणेंतल्या रानाला
सांग, तूं **परमेश्वराचें** वचन ऐक; **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी तुजमध्यें अग्नि पेट-
वीन, तेव्हां तो तुझ्यांतलें प्रत्येक ओलें झाड व
प्रत्येक सुकें झाड खाऊन टाकील; जळणारा जाळ
विझणार नाहीं, आणि दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत
त्याकडून सर्वमुखें हुरपळतील. ४८ आणि म्या
**परमेश्वरानें** तो पेटविला आहे, असें सर्व मनु-
ष्यजाति पाहील; तो विझणार नाहीं. ४९ मग
मी ह्मणालों, अहा **प्रभू परमेश्वरा**, ते मज-
विषयीं ह्मणतात, तो दृष्टांत बोलतो आहे कीं
नाहीं?

## अध्याय २१.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं; २ मनुष्याच्या पुत्रा, तूं यरूशाले-
मेकडे आपलें मुख कर, आणि पवित्र स्थानांक-
डे आपलीं वचनें पडूं दे, आणि इस्राएलाच्या
भूमीविषयीं भविष्य सांग, ३ आणि इस्राएला-
च्या भूमीला सांग, **परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
मी तुजविरुद्ध आहें, आणि मी आपली तरवार
तिच्या मेणांतून उपसून तुजपासून न्यायी व दुष्ट
नाहींसे करीन; ४ तर मी तुजपासून न्यायी
व दुष्ट नाहींसे करीन, ह्मणून याकरितां माझी तर-
वार आपल्या मेणांतून निघून सर्व मनुष्यजातीवि-
रुद्ध दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत चालेल. ५ जेव्हां
सर्व मनुष्यजाति जाणेल, कीं म्या **परमेश्वरानें**
आपली तरवार तिच्या मेणांतून उपसली आहे;
ती परत फिरणार नाहीं. ६ तर मनुष्याच्या पुत्रा,
तूं कण्ह, कंबरमोडेतों व कडुपणें त्यांच्या देखतां
कण्ह; ७ आणि असें होईल, कीं तूं कशामुळें
कण्हतोस? असें जेव्हां ते तुह्माला ह्मणतील,

तेव्हां वर्त्तमानामुळें असें तूं सांग, कां कीं तें आ-
लें आहे, आणि प्रत्येक ह्रदय विघरेल, आणि
सर्व हात गळतील, आणि प्रत्येक आत्मा थकेल,
आणि सर्व गुडघे पाण्यासारिखे गळतील; पाहा,
तें येईल, आणि घडेल असें **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो.

८ **आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ आ-
लें कीं; ९ **मनुष्याच्या** पुत्रा, भविष्य बोल,
आणि सांग, **परमेश्वर** ह्मणतो, कीं सांग, तर-
वार, तरवार तिखट केलेली, व घोंटलेली आहे.
१० **वध** करावा ह्मणून ती तिखट केलेली आहे;
ती चमकावी ह्मणून घोंटलेली आहे; तर आह्मी
आनंदूं काय? ती माझ्या पुत्राच्या दंडाला को-
णत्याहि काठीसारिखी तुच्छ मानिती. ११ **ती**
हातांत धरावी, ह्मणून त्याने ती घोंटायासाठीं
दिल्ही आहे; ती तरवार वधणाऱ्याच्या हातांत
द्यावी, ह्मणून ती तिखट केलेली, व घोंटलेली
आहे. १२ **मनुष्याच्या** पुत्रा, ओरड आणि केंक;
**कां** कीं ती माझ्या लोकांस लागेल, ती इस्राएला-
च्या सर्व अधिकाऱ्यांस लागेल; तरवारीमुळें मा-
झ्या लोकांस भयें लागतील; ह्मणून तूं मांडी
थापट; १३ **कां** कीं परीक्षा आहे, आणि जर
तरवार दंडाला देखील तुच्छ मानील तर काय
होईल? तो असणार नाहीं, असें **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो. १४ **आणि** मनुष्याच्या पुत्रा, तूं भवि-
ष्य सांग, आणि हातावर हात मार, आणि ति-
सऱ्या खेपेस तरवार, वधलेल्यांची तरवार दुप्पट
व्हावी; थोर वधलेल्यांची जी तरवार त्यांसाठीं
लपती ती आहे. १५ **ह्रदय** मूर्च्छित व्हावें, आ-
णि मोड बहुत करावी, ह्मणून म्या त्यांच्या सर्व दा-
रांजवळ तरवारीचें उगारणें ठेविलें आहे; अहा,
ती चमकती केलेली आहे, ती वधासाठीं लपे-
टलेली आहे. १६ **जिकडे** तुझें मुख ठेविलें
असेल, जर उजव्याकडे असेल, अथवा डाव्या-
कडे असेल, तर तिकडे एकच वाट धरून ज-
पत जा; १७ **आणि** मीहि हातावर हात मारीन,
आणि मी आपला रोष राहूं देईन, मी **परमे-
श्वर** हें बोललों आहें.

१८ **आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, १९ **मनुष्याच्या** पुत्रा, तर बाबेलेच्या
राजाची तरवार यावी, ह्मणून तूं आपणासाठीं
दोन मार्ग नेमून ठेव, ते दोन्ही एकाच देशांतून
निघतील, आणि तूं स्थान निवड, तें नगराच्या
मार्गाच्या मुख्य तोंडावर निवड. २० **अम्मोनी**
लोकांच्या रब्बास, आणि गांवकुसवी यरूशालेमें-
तल्या यहूदास तरवार यावी, ह्मणून मार्ग नेमून
ठेव; २१ **कां** कीं बाबेलेचा राजा मार्गाच्या दु-
फांट्यास, दोहों मार्गांच्या टोंकांस शकुन पाहायास
उभा राहिला; त्याने बाण परजिले, मूर्त्तीला वि-
चारिलें, काळिजास पाहिलें. २२ **माराच्या** वे-
ळेस तोंड उघडावें, गर्जनेकरून वाणी उंचावावी.
दारांवर धक्का मारण्याचीं यंत्रें स्थापावीं, मोरचा
रचावा, आवार बांधावें, ह्मणून सेनापति नेमाया-
साठीं त्याच्या उजव्या हाताकडे यरूशालेमें-
विषयींचा शकून झाला. २३ **आणि** तो त्यांस
त्यांच्याच समक्ष खोटा शकून असा होईल, ज्या-
नीं शपथा वाहिल्या, त्यांसहि असा होईल;
आणि त्यांस धरावें, ह्मणून तो अन्यायाचें
स्मरण करील. २४ **याकरितां प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं तुमचे अपराध उघडे झाले असतां,
तुमच्या सर्व कर्मांत तुमचीं पापें दृष्टीस पडलीं
असतां, तुह्मी आपला अन्याय स्मरे, असें केलें
आहे, आणि तुह्मी स्मरलेले आहां, ह्मणून तु-
ह्मास हाताने धरितील.

२५ **आणि** हे इस्राएलाच्या अधार्मिक दुष्ट
अधिकाऱ्या, ज्या तुझा दिवस शेवट होणाऱ्या
अन्यायाच्या समयीं आला आहे, २६ **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं तूं पागोटें दूर कर, आणि
मुगुट काढून ठेव; हा तसाच राहणार नाहीं;
जो नीच त्याला उंच कर आणि जो उंच त्याला
नीच कर. २७ **मी** याला उलटून, उलटून, उल-
टून ठेवीन; आणि ज्याची न्यायसत्ता आहे, तो
येई तोंपर्यंत हा पुन्हा असणार नाहीं; तो येईल,
तेव्हां हा मी त्याला देईन.

२८ **आणि** मनुष्याच्या पुत्रा, तूं भविष्य बोल,
आणि सांग, कीं अम्मोनी लोकांविषयीं, आणि
त्यांच्या निंदेविषयीं **प्रभु परमेश्वर** असें ह्म-
णतो; तूं सांग, तरवार, तरवार उपसलेली आहे.
ती वधासाठीं घोंटलेली आहे, तिने विजेएवढें स-
मर्थ व्हावें ह्मणून; २९ **ज्यांचा** दिवस शेवट

होणाऱ्या अन्यायाच्या समयीं आला आहे, त्या
दुष्टांच्या वधलेल्यांच्या मानांवर तुला ठेवावें, ह्म-
णून जेव्हां ते तुजसाठीं व्यर्थपण पाहतात, आणि
शकुनेंकरून तुला खोटें सांगतात; ३० तेव्हां मी
तिला तिच्या मेणांत फिरवीन काय? ज्या स्थानांत
तूं उत्पन्न झालीस, त्या तुझ्या जन्मदेशांत तुझें
शासन करीन. ३१ आणि मी आपला रोष तुज-
वर घालीन, आणि आपल्या कोपाचा अग्नि तुज-
वर फुंकीन, आणि जे पशुशील व नाश करण्यांत
निपुण अशा मनुष्यांच्या हातीं तुला देईन. ३२
तूं अग्नीला सर्पणासाठीं होसील; तुझें रक्त दे-
शामध्यें पडेल; तुला स्मरणार नाहींत; कां कीं
मी परमेश्वर हें बोललों आहें.

## अध्याय २२.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं; २ मनुष्याच्या पुत्रा, तर तूं न्याय
करिसील काय? रक्त पाडणाऱ्या नगरीचा न्याय
करिसील काय? होय तूं तिला तिचीं अघोर-
कर्में कळीव. ३ आणि सांग, प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं तिची वेळ यावी, ह्मणून नगरी आ-
पणामध्यें रक्त पाडिती, आणि तिनें आपणाला
विटाळायास आपल्यासाठीं मूर्त्ति केल्या आहेत.
४ जें तुझें रक्त त्वां पाडिलें आहे, त्याकडून तूं
दोषी झाली आहेस; आणि तुझ्या ज्या मूर्त्ति
त्वां केल्या आहेत, त्यांकडून त्वां आपणाला विटा-
ळिलें आहे; आणि त्वां आपले दिवस जवळ
आणिले आहेत, आणि तूं आपल्या वर्षांस पोहं-
चली आहेस; याकरितां म्या तुला राष्ट्रांला निं-
देसाठीं आणि सर्व देशांला धिक्कारासाठीं केलें
आहे. ५ जे जवळ आहेत, आणि जे तुजपासून
दूर आहेत, ते तुला धिक्कारितील, जी तूं नाम बु-
डवलेली व फार त्रासलेली आहेस. ६ पाहा,
प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणें रक्त पाडावें, ह्म-
णून तुजमध्यें इस्राएलाचे अधिकारी होते. ७
तुजमध्यें त्यानी आईबापांस तुच्छ मानिलें; त्या-
नी तुजमध्यें विदेश्यांवर बलात्कार केला; तुजम-
ध्यें त्यानी अनाथाला व विधवेला पीडिलें आहे.
८ त्वां माझे पवित्र पदार्थ तुच्छ मानिले आहेत,
आणि माझे शाब्बाथ बाटविले आहेत. ९ रक्त
पाडायासाठीं तुजमध्यें चहाड होते; आणि तु-
जमध्यें लोकानी पर्वतांवर खालें आहे; त्यानी
तुजमध्यें दुराचार केला आहे. १० तुजमध्यें
कितीएकानीं आपल्या बापाचा नागवेपणा उघडा
केला आहे; तुजमध्यें त्यानी विटाळसीला नम-
विलें आहे. ११ आणि कितीएकानी आपल्या
शेजाऱ्याच्या स्त्रीसीं अघोरकर्म केलें आहे; आणि
कितीएकानी दुराचारेंकरून आपल्या सुनेला बा-
टविलें आहे; आणि तुजमध्यें कितीएकानी आ-
पल्या बहिणीला, आपल्या बापाच्या कन्येला नम-
विलें आहे. १२ रक्त पाडायासाठीं तुजमध्यें
कित्येकानी लांच घेतली आहे; त्वां व्याज व वाढ
घेतलीं आहेत, आणि त्वां पीडा देऊन आपल्या
शेजाऱ्यांपासून लोभाने नफा घेतला आहे, आणि
तूं मला विसरली आहेस, असें प्रभु परमेश्वर
ह्मणतो.

१३ तर पाहा, तुझा जो लाभ त्वां केला आहे
त्याला, आणि तुझें जें रक्त तुजमध्यें झालें आहे,
त्यालाहि म्या आपली टाळी मारिली आहे. १४
तर ज्या दिवसांत मी तुझें कार्य करीन, त्यांत
तुझें हृदय सावध राहील, अथवा तुझे हात बळ-
कट राहतील काय? मी परमेश्वर हें बोललों
आहें, आणि हें मी साधीन. १५ आणि मी
तुला राष्ट्रांमध्यें उडवीन, आणि देशांमध्यें तुला
विखरीन, आणि तुजमधून तुझा बिटाळ नाहींसा
करीन. १६ आणि तूं आपणाला राष्ट्रांच्या देखतां
बाटविसील; आणि, मी परमेश्वर आहें, असें
तूं जाणसील.

१७ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं; १८ मनुष्याच्या पुत्रा, इस्राएलाचे
वंश मला गाळ झाले आहेत; ते सर्व भट्टीमध्यें
पितळ व कथील व लोखंड व शिसें आहेत;
ते रुप्याचा गाळ आहेत. १९ याकरितां प्रभु
परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी सर्व गाळ झालां
आहां, ह्मणून याकरितां पाहा, मी तुह्माला य-
रूशालेममध्यें एकत्र मिळवीन. २० अग्नि फुंकून
त्याला विघरवावें, ह्मणून जसें रुपें व पित्तल व
लोखंड व शिसें व कथील भट्टीमध्यें कोणी एकव-
टितात, तसा मी आपल्या क्रोधाने व आपल्या
कोपाने तुह्माला एकवटीन, आणि तुह्माला ठेवून

विघरवीन. २१ आणि मी तुह्माला एकत्र मिळ-
वून तुह्मावर आपल्या रोषाचा अग्नि फुंकीन, आ-
णि तुह्मी त्यामध्यें विघराल. २२ जसें रुपें
भट्टीमध्यें विघरतें, तसे तुह्मी त्यामध्यें विघराल;
मग तुह्मी जाणाल, कीं म्या **परमेश्वराने** आ-
पला कोप तुह्मावर घातला आहे.
२३ आणि **परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं; २४ मनुष्याच्या पुत्रा, तिला सांग,
जी भूमि स्वच्छ झाली नाहीं, जिजवर रोषाच्या
दिवसीं पाऊस पडला नाहीं, ती तूं आहेस. २५
तिजमध्यें तिच्या भविष्यवाद्यांचें बंड आहे, ते
गर्जत्या पारधफाडत्या सिंहासारिखे आहेत; त्या-
नी जीवात्मे खाल्ले आहेत; त्यानीं धन व मोलवान
द्रव्य हरून घेतलें आहे; त्यानी तिजमध्यें तिच्या
विधवा बहुत केल्या आहेत. २६ तिच्या याजका-
नी माझें नेमशास्त्र मोडिलें आहे, आणि माझे
पवित्र पदार्थ बाटविले आहेत; त्यानी पवित्र व
अपवित्र यांचा भेद केला नाहीं, आणि मलिन व
निर्मल यांचा भेद दाखविला नाहीं, आणि त्यानी
माझ्या शाब्बाथापासून आपले डोळे मिटिले आ-
हेत, आणि त्यांमध्यें मी अप्रतिष्ठित झालों आहें.
२७ लाभ मिळवावा, ह्मणून रक्त पाडून जीवात्मे
नाशून तिचे सरदार तिजमध्यें पारध फाड-
त्या लांडग्यांसारिखे आहेत. २८ आणि ति-
च्या भविष्यवाद्यानी व्यर्थपण पाहून, आणि
त्यांस शकुनेकरून खोटें सांगून त्यांस क-
च्च्या चुन्याने लेपिलें आहे, **प्रभु परमेश्वर** ह्म-
णतो, असें ते सांगतात, परंतु **परमेश्वर** बोलला
नाहीं. २९ देशांतल्या लोकानी बलात्कार केला
आहे, आणि हरण केलें आहे, आणि त्यानी दीन
व दरिद्री यांस पीडिलें आहे; आणि अन्यायें-
करून विदेश्याला उपद्रव केला आहे. ३०
तर म्या देशाला नाशूं नये, ह्मणून त्याने कुंपण
यथास्थित करावें, आणि देशासाठीं मजसमोर
खिंडारांत उभें राहावें, अशा मनुष्याला म्या त्यां-
मध्यें शोधिलें; परंतु मला असा कोणी सांपडला
नाहीं. ३१ ह्मणून म्या आपला रोष त्यांजवर
घातला आहे; म्या आपल्या कोपाच्या अग्नीक-
डून त्यांस नाहींसें केलें आहे; म्या त्यांच्या आ-
चारांचें फल त्यांच्या डोईवर ठेविलें आहे, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय २३.

आणि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं; २ मनुष्याच्या पुत्रा, दोघी स्त्रिया
एका आईच्या कन्या होत्या. ३ आणि त्यानी
मिसरांत व्यभिचार केला; त्यानी आपल्या तरुण-
पणांत व्यभिचार केला; तेथें त्यांचीं थानें दा-
बिलीं, आणि तेथें कित्येकानी त्यांच्या कुमार-
पणाच्या थानांच्या बोंड्या चेपिल्या. ४ आणि
त्यांचीं नामें हीं होतीं, वडील अहोला होती.
आणि तिची बहीण अहोलीबा होती; आणि
त्या माझ्या होत्या, आणि पुत्र व कन्या प्रसवि-
ल्या; त्यांचीं नामें हीं होतीं, अहोला शोमरोन
होती, आणि अहोलीबा यरूशालेम होती. ५
आणि अहोलाने माझ्या सत्तेंत असून व्यभिचार
केला; आणि ती आपल्या प्रियांस, आपल्या अ-
श्शूरी शेजाऱ्यांस आसक्त झाली. ६ ते सेनापति
व अधिकारी असून निळें वस्त्र ल्यालेले होते, ते
सर्व मनोरम तरुण, घोड्यांवर बसणारे स्वार होते.
७ आणि त्यांसीं तिने आपले व्यभिचार केले, ते
सर्व अश्शूराचे निवडक मनुष्य होते, आणि ज्यां-
ला ती आसक्त होती, त्या सर्वांपासीं आणि त्यां-
च्या सर्व मूर्तीपासीं तिने आपणाला विटाळिलें.
८ आणि तिचे जे व्यभिचार तिने मिसरांतून आ-
णिले, ते तिने सोडिले नाहींत; का कीं तिच्या
तरुणपणांत ते तिजपासीं निजले, आणि त्यानी
तिच्या कुमारपणाच्या थानाच्या बोंड्या चेपिल्या.
आणि तिजवर आपला व्यभिचार घातला. ९ याक-
रितां म्या ती तिच्या प्रियांच्या हातीं, ज्या अ-
श्शूऱ्यांस ती आसक्त होती त्यांच्या हातीं दिल्ही
आहे. १० त्यानी तिचा नागवेपणा उघडा केला;
त्यानी तिचे पुत्र व तिच्या कन्या हीं घेतलीं,
आणि त्यानी तिला तरवारीने वधिलें; मग तिचें
नांव स्त्रियांमध्यें गाजलें; का कीं त्यानी तिला
शासनें केलीं होतीं. ११ आणि हें पाहून तिची
बहीण अहोलीबा तिजपेक्षां आपल्या आसक्तीने
दुष्ट झाली, आणि तिने आपल्या बहिणीच्या व्य-
भिचारांपेक्षां आपले व्यभिचार अधिक केले.

१२ तिचे शेजारी जे अश्शूरी सेनापति व आधि-
कारी चांगला पोषाक घातलेले, घोड्यांवर बसणारे
स्वार, जे सर्व मनोरम तरुण त्यांस ती आसक्त
झाली. १३ मग म्यां पाहिलें, कीं ती विटाळलेली
आहे, त्या दोघींचा आचार एकच आहे. १४
आणि तिने आपले व्यभिचार वाढविले; आणि
तिने भिंतींवर रेखिलेले मनुष्य पाहिले, खास्-
द्यांच्या ज्या प्रतिमा हिंगुळाने रेखिलेल्या त्या
पाहिल्या. १५ त्यांच्या कंबरा कंबरकश्यानी बां-
धलेल्या होत्या, समल्यांचीं रंगलेलीं पागोटीं
त्यांच्या डोयांवर होतीं, त्यांची जन्मभूमि जी
खास्द्यांची बाबेल तींतल्या पुरुषांसारिखे ते सर्व
डौलाने सरदार होते. १६ ती तर त्यांस आ-
पल्या डोळ्यानी पाहतांच त्यांस आसक्त झाली,
मग तिने त्यांजकडे खास्द्यांच्या देशांत दूत पाठ-
विले. १७ आणि बाबेलेचे पुरुष तिजजवळ
शृंगाराच्या पलंगावर आले, तेव्हां त्यानी आपल्या
व्यभिचाराने तिला बाटविलें, आणि ती त्यांज-
कडून विटाळिली होती, मग तिचें चित्त त्यांज-
पासून फिरलें. १८ तेव्हां तिने आपले व्यभि-
चार उघडे केले, आणि आपला नागवेपणा उघडा
केला; मग जसें माझें चित्त तिच्या बहिणीवरून
सरलें, तसें माझें चित्त तिजवरूनहि सरलें.
१९ तथापि ज्या आपल्या तरुणपणाच्या दिव-
सांत तिनें मिसर देशांत व्यभिचार केला हो-
ता, ते दिवस आठवून तिने आपले व्यभिचार
वाढविले. २० आणि ती त्यांच्या जारांस आ-
सक्त झाली, ज्या त्यांचा देह गाढवांच्या देहा-
सारिखा होता, आणि त्यांचें रेत घोड्यांच्या
रेतासारिखें होतें. २१ तर त्वां आपल्या तरुण-
पणाच्या थानांकरितां आपल्या थानांच्या बोंड्या
मिसऱ्यांकडून चेंपूं देतांना, आपल्या तरुणपणाच्या
दुराचारास आपलें मन लाविलें.

२२ याकरितां अगे अहोलीबे, प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं पाहा, ज्यांपासून तुझें चित्त फि-
रलें आहे, त्या तुझ्या मित्रांस मी तुजवर उठवीन,
आणि त्यांस तुजकडे चहूंकडून आणीन. २३
बाबेलकर व सर्व खास्दी, अधिकारी व धनवान
व अधिपति, आणि त्यांसंगतीं सर्व अश्शूरी आ-
णीन; ते सर्व मनोरम तरुण सेनापति व अधि-
कारी आहेत, ते सर्व श्रेष्ठ व नामांकित, घोड्यांवर
बसणारे आहेत. २४ आणि ते शस्त्रें, रथ व
चाकें, आणि लोकांचा समुदाय घेऊन तुजकडे
येतील; ते उरस्त्राण व ढाल व शिरस्त्राण तुज-
विरुद्ध सभोंवार ठेवितील; आणि मी त्यांपुढें शा-
सन ठेवीन, मग ते आपल्या शासनांकडून तुला
शासितील. २५ आणि मी आपला आवेश तुज-
विरुद्ध ठेवीन, आणि ते तुजपाशीं रोषाने वर्त्ततील;
ते तुझें नाक व तुझे कान कादून टाकितील; आणि
तुझें शेष तरवारीने पडेल; ते तुझे पुत्र व तुझ्या
कन्या हरितील; आणि तुझें शेष अग्नि जाळील.
२६ ते तुझीं वस्त्रें तुझ्या अंगावरून हिसकून
घेतील, आणि तुझे शोभिवंत अलंकार हरि-
तील. २७ आणि मी तुजपासून तुझा दुराचार,
आणि तुझा मिसरांतून आणिलेला व्यभिचार
नाहींसा करीन; मग तूं आपले डोळे त्यां-
जकडे लावणार नाहींस, आणि पुढें मिसराला
स्मरणार नाहींस. २८ कारण कीं प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं पाहा, ज्यांस तूं द्वेषितीस त्यां-
च्या हातीं, ज्यांपासून तुझें चित्त फिरलें आहे
त्यांच्या हातीं मी तुला देईन. २९ मग ते तुज-
पाशीं द्वेषाने वर्त्ततील, आणि तुझें सर्व श्रमाचें
फल हरितील, आणि तुला नागवी व उघडी सो-
डितील; मग तुझ्या व्यभिचारांचा नागवेपणा उघडा
होईल; आणि तुझा दुराचार व तुझे व्यभिचारहि
उघडे होतील. ३० तूं राष्ट्रांप्रमाणें व्यभिचार
करून त्यांच्या मूर्त्तींकडून विटाळिली आहेस, ह्म-
णून मी ह्या गोष्टी तुला करीन. ३१ तूं आपल्या
बहिणीच्या आचाराप्रमाणें वर्त्तली आहेस; ह्मणून
मी तिचा प्याला तुझ्या हातांत देईन. ३२ प्रभु
परमेश्वर ह्मणतो, कीं तूं आपल्या बहिणीचा
खोल व मोठा प्याला पिसील; तुला हसतील व
उपहास करतील; त्यांत पुष्कळ मावतें. ३३
तूं मस्तपणें व शोकाने भरसील, विस्मयाच्या व
उजाडपणाच्या प्याल्याने, तुझी बहीण जी शोम-
रोन इच्या प्याल्यानेहि भरसील. ३४ तो पिसील,
व चोखिसील; आणि त्याच्या खापऱ्या फोडिसील,
आणि तूं आपलीं थानें हिसकून काढिसील; कां कीं
मी हें बोललों आहें, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
३५ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं तूं मला

विसरली आहेस, आणि मला त्वां आपल्या पाठी-
मागें टाकिलें आहे, ह्मणून याकरितां तूं आपल्या
दुराचाराचें व आपल्या व्यभिचाराचें फल भोगून घे.
३६ **आणि परमेश्वराने** मला ह्मटलें,
मनुष्याच्या पुत्रा, तूं **अहोलाचा** व **अहो-
लीबाचा** न्याय करसील काय? तर त्यांस त्यां-
चीं अघोरकर्मैं प्रगट कर. ३७ **कां** कीं त्यानी
जारकर्म केलें आहे, आणि रक्त त्यांच्या हातांत
आहे, त्यानी आपल्या मूर्त्तींपासीं जारकर्म केलें
आहे; आणि त्यानी जे आपले पुत्र त्या मजसा-
ठीं प्रसविल्या, ते खावे ह्मणून त्या मूर्त्तींपुढें
अग्नीमध्यें घालविले आहेत. ३८ **अणखी** त्यानी
मला हें केलें आहे; त्यानी त्याच दिवसीं माझें
पवित्र स्थान विटाळिलें, आणि माझे शाब्बाथ बा-
टविले. ३९ **आणि** त्यानी जेव्हां आपल्या
मूर्त्तींसाठीं आपलीं लेंकरें वधिलीं, तेव्हां त्याच
दिवसीं ते माझें पवित्रस्थान बाटवावें, ह्मणून त्यांत
आले; तर पाहा, त्यानी असेंच माझ्या घरामध्यें
केलें आहे. ४० **आणि** दुरून मनुष्य यावे ह्मणून
तुह्मी निरोप पाठविला; मग ज्यांकडे दूत पाठवि-
ला होता, ते, पाहा, आले; ज्या त्यांसाठीं त्वां
आपलें अंग धुऊन घेतलें, आपल्या डोळ्यांत अं-
जन घातलें, आणि आपणाला अलंकारानी भूषविलें.
४१ **आणि** तूं शोभिवंत पलंगावर बसलीस,
आणि ज्याजवर त्वां माझा धूप व माझें तेल हीं
ठेविलीं होतीं, असें सिद्ध केलेलें मेज त्यासमोर
होतें. ४२ **आणि** त्याजवळ स्वस्थ बसलेल्या
समुदायाचा गोंगाट होता; आणि सामान्य मनु-
ष्यांसुद्धां रानांतून आणिलेले साबाई होते, आणि
त्यानी आपल्या हातांत कडीं घातलीं, आणि आ-
पल्या डोयांवर सुंदर मुगुट घातले. ४३ **मग**
जी जारकर्मांत ह्मातारी तिजविषयीं मी ह्मणालों,
आतां ते तिसीं व्यभिचार करितील, आणि ती
त्यांपासीं काय? ४४ **तथापि** ते तिजपासीं गेले,
जसा कोणी व्यभिचारिणी स्त्रीपासीं जातो, तसे
त्या **अहोला** व **अहोलीबा** व्यभिचारिणी स्त्रिया
नाह्मपासीं ते गेले.
घातल॰ **आणि** जे न्यायी मनुष्य ते त्यांचा न्याय
डून त्यांसींच्या न्यायाप्रमाणें, आणि रक्तपाडणाऱ्यां-
पाणें करितील; कारण कीं त्या जार-
कर्मिणी आहेत, आणि रक्त त्यांच्या हातांत आहे.
४६ **तर प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं मी त्यांज-
वर समुदाय आणीन, आणि त्यांची गांजणूक व
लूट होई असें करीन. ४७ **आणि** त्या समुदायाचे
लोक त्यांस दगडमार करितील, आणि आपल्या
तरवारीनी त्यांजला छेदितील; ते त्यांच्या पुत्रांस
व त्यांच्या कन्यांस वधितील, आणि त्यांचीं घरें
अग्नीने जाळून टाकितील. ४८ **आणि** दुराचार
मी देशांतून नाहींसा करीन; मग सर्व स्त्रिया
बोधित होतील, आणि तुमच्या दुराचाराप्रमाणें
करणार नाहींत. ४९ **आणि** ते लोक तुह्माला
तुमच्या दुराचाराचें फल भरून देतील; आणि
तुह्मी आपल्या मूर्त्तींच्या पापांचें फल भोगून घ्याल;
मग, मी **प्रभु परमेश्वर** आहें, असें तुह्मी
जाणाल.

## अध्याय २४.

**आ**णि नवव्या वर्षांत, दाहाव्या महिन्यांत
महिन्याच्या दाहाव्या दिवसीं **परमेश्वराचें**
वचन मजजवळ आलें कीं; २ **मनुष्याच्या** पुत्रा,
तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें
नाम लिहून ठेव; याच दिवसीं **बाबेलेच्या** राजाने
**यरूशालेमेस** वेढा घातला. ३ **तर** फितूरी वंशां-
ला दाखला बोल, आणि त्यांस सांग, **प्रभु पर-
मेश्वर** ह्मणतो, कीं थाली अग्नीवर ठेव, ठेव
अग्नीवर, आणि तींत पाणी घाल. ४ **तींत** घाला-
याचे तुकडे एकवटून तींत घाल, प्रत्येक उत्तम
तुकडा, मांडी आणि खांदा घाल; ती श्रेष्ठ हा-
डानी भर. ५ **कळपांतलें** श्रेष्ठ मेंढरूं घे, आ-
णि तिजखालीं हाडांची रास घाल, तिला बरें
उकळीव, आणि तींतलीं हाडें तिजमध्यें शिजवावीं.
६ **याकरितां प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
रक्त पाडणाऱ्या नगरीला हाय हाय, ज्या थाली-
चा तवंग तींत आहे, आणि जिचा तवंग तींतून
निघाला नाहीं, तिला हाय हाय; तिचे तुकडे
तुकडे करून त्याला काढ; तिजवर पण पडूं नये.
७ **कां** कीं तिचें रक्त तिजमध्यें आहे; तिने तें
खडकाच्या पाठीवर ठेविलें आहे; तें धुळीने झां-
कावें, ह्मणून तिने तें भूमीवर घातलें, असें नाहीं.
८ **सूड** उगवायासाठीं क्रोध चढवावा ह्मणून; म्या

तें खडकाच्या पाठीवर ठेविलें आहे, तें न झांकावें
ह्मणून. ९ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो,
कीं रक्तपाडणाऱ्या नगरीला हाय हाय; मीच स-
रण मोठें करीन. १० बहुत फांटीं घाल, अग्नि
पेटीव, मांस नाहींसें कर, आणि तिखट सिद्ध कर,
आणि हाडें जाळावीं. ११ ती तिच्या निखाऱ्यां-
वर रिकामी ठेव, अशासाठीं कीं तिचें पितळ ता-
पून जळावें, आणि तिजमध्यें तिचा मळ विघरावा,
व तिचा तवंग नाहींसा होऊन जावा. १२ तिने
श्रम करून आपणाला श्रमविलें आहे, आणि
तिचा बहुत तवंग तींतून निघाला नाहीं; तिचा
तवंग अग्नींत होईल. १३ तुझ्या विटाळांत दुरा-
चार आहे; मी तुला स्वच्छ करीत होतों, परंतु
तूं स्वच्छ होईनास, ह्मणून मी आपला रोष तुज-
वर बसूं देईं तोंपर्यंत तूं आपल्या विटाळापासून
पुन्हा स्वच्छ होणार नाहींस. १४ मी परमे-
श्वर हें बोललों आहें; हें प्रत्ययास येईल,
आणि हें मी साधीन; मी मागें फिरणार नाहीं,
आणि मी कळवळा करणार नाहीं, आणि मी अ-
नुतापणार नाहीं; तुझ्या दुराचारांप्रमाणें व तुझ्या
कर्मांप्रमाणें ते तुझें शासन करितील, असें प्रभु
परमेश्वर ह्मणतो.

१५ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं; १६ मनुष्याच्या पुत्रा, पाहा, मी तुज-
पासून तुझ्या दृष्टीस प्रिया इला झपाट्याने का-
ढून घेतों; परंतु तूं आक्रंदन करूं नको, आणि
रडूं नको, आणि तुझीं आंसवें वाहूं नयेत. १७ तूं
न कण्हतां उगा राहा, मेलेल्यांमुळें शोक करूं
नको, तूं आपलें पागोटें आपल्या डोक्याला बांध,
आणि आपले जोडे आपल्या पायांत घाल, आणि
आपली हनुवटी झांकूं नको, आणि मनुष्यांचें अन्न
खाऊं नको. १८ आणि मी सकाळीं लोकांस
बोललों; आणि संध्याकाळीं माझी बायको मेली;
नंतर जसी मला आज्ञा केली होती, तसें म्या स-
काळीं केलें.

१९ आणि लोकांनी मला ह्मटलें, तूं असें करि-
तोस, तर मग त्या गोष्टी आह्माला काय सुच-
वितात, हें तूं आह्माला उघड करणार नाहींस कीं
काय? २० तेव्हां म्या त्यांस सांगितलें, परमे-
श्वराचें वचन मजजवळ आलें कीं; २१ तूं
इस्राएलाच्या वंशाला सांग, प्रभु परमेश्वर ह्म-
णतो, कीं पाहा, मी आपलें पवित्रस्थान, तुमच्या
गौरवाचें ऐश्वर्य, तुमच्या दृष्टीस प्रिय तें, आणि
तुमचें जिवलग बाटवूं देईन; आणि तुमचे पुत्र व
तुमच्या कन्या ज्यां तुह्मी सोडिलीं आहेत, तीं तर-
वारीने पडतील. २२ तर जसें म्या केलें आहे,
तसें तुह्मीहि करा; आणि तुह्मी आपल्या हनुव-
ट्या झांकूं नका, आणि मनुष्यांचें अन्न खाऊं नका.
२३ आणि तुह्मी आपलीं पागोटीं आपल्या डोयां-
ला बांधा, आणि आपले जोडे आपल्या पायांत
घाला; तुह्मी आक्रंदन करूं नका, आणि रडूं
नका; आणि तुह्मी आपल्या अन्यायांमुळें क्षीण
होऊन जाल, आणि एकमेकांकडे ओरडाल. २४
तसाच तुह्माला यहेज्केल उत्पाताचें चिन्ह आहे;
जें सर्व त्याने केलें आहे, त्याप्रमाणें तुह्मी करा;
जेव्हां हें प्रत्ययास येईल, तेव्हां तुह्मी जाणाल,
कीं मी प्रभु परमेश्वर आहें. २५ तर मनु-
ष्याच्या पुत्रा, ज्या दिवसीं मी त्यांपासून त्यांचा
आश्रय, त्यांच्या गौरवाचें आनंदपात्र, त्यांच्या
दृष्टीस प्रिय तें, आणि त्यांचें जिवलग, त्यांचे पुत्र,
त्यांच्या कन्या काढून घेईन, २६ त्या दिवसीं जो
निभावलेला, तो तुला कानांकडून वर्त्तमान ऐकवा-
यासाठीं तुजजवळ येणार नाहीं काय? २७ त्या
दिवसीं तुझें मुख निभावलेल्याजवळ उघडेल, मग
तूं बोलसील, आणि पुढें मुका राहणार नाहींस;
आणि तूं त्यांस उत्पाताचें चिन्ह होसील; मग, मी
परमेश्वर आहें, असें ते जाणतील.

## अध्याय २५.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं; २ मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें मुख
अम्मोनी लोकांकडे कर, आणि त्याविरुद्ध भविष्य
सांग. ३ तर अम्मोनी लोकांस सांग, जो प्रभु
परमेश्वर त्याचें वचन तुह्मी ऐका; प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं माझें पवित्रस्थान बाटविलें होतें
ह्मणून त्याविषयीं, आणि इस्राएलाची भूमि ओ-
साड पडली ह्मणून तिजविषयीं, आणि यहूदाचे
वंश पाडावपणाच्या प्रवासांत गेले ह्मणून त्यावि-
षयीं तूं अहा ह्मणालीस. ४ याकरितां पाहा,
मी तुला पूर्वेंतल्या लोकांस वतन असें देईन, आ-

णि तुजमध्यें ते आपले वाडे घालितील, आणि
आपल्या वस्त्या तुजमध्यें करितील, ते तुझें फल
खातील, आणि ते तुझें दूध पितील. ५ **आणि**
मी रब्बा उंटखाना, आणि **अम्मोनी** लोकांचा देश
कळप बसण्याचें स्थान करीन; मग, मी **परमे-**
**श्वर** आहें, असें तुह्मी जाणाल. ६ तर **प्रभु**
**परमेश्वर** ह्मणतो, कीं त्वां इस्राएलाच्या भूमी-
विषयीं टाळी वाजविली, आणि पाय आपटला,
आणि आपल्या सर्व अवहेलानें मनांत हर्ष केला
आहे. ७ ह्मणून याकरितां पाहा, मी आपला
हात तुजवर पुढें करीन, आणि तुला राष्ट्रांस लूट
देईन; आणि तुला लोकांतून नाहींसें करीन, आ-
णि देशांतून तुला नाहींसें करीन, तुला नाहींसें
करीन; मग तूं जाणसील, कीं मी **परमेश्वर**
आहें.

८ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं **मोवाब** आणि
**सेईर** ह्मणतात, पाहा, **यहूदाचा** वंश सर्व राष्ट्रां-
सारिखा आहे. ९ ह्मणून याकरितां पाहा, **मो-**
**वाबाच्या** नगरांपासून त्याच्या सीमांतलीं जीं **बे-**
**थयशीमोथ**, **बालमीन**, आणि **किर्याथाइम** नगरें
देशाची शोभा आहेत, त्यांपासून मी **मोवाबाची**
कूस **अम्मोनी** लोकांसहित, १० पूर्वेतल्या लो-
कांसाठीं उघडीन, आणि मी तो देश वतन असें
देईन, अशासाठीं कीं **अम्मोनी** लोकांचें स्मरण
राष्ट्रांमध्यें राहूं नये. ११ आणि **मोवाबाला** शा-
सनें करीन; मग ते जाणतील, कीं मी **परमेश्वर**
आहें.

१२ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं **अदोम** सूड
घेऊन **यहूदाच्या** वंशांविरुद्ध वर्त्तला आहे, त्यानें
अपराध केला, आणि त्यांचा सूड उगवला आहे.
१३ ह्मणून याकरितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं **अदोमेवर** मी आपला हात पुढें करीन, आणि
तींतून मनुष्य आणि पशु नाहींसे करीन; आणि
**तेमानेपासून** तिला ओसाड करून ठेवीन, आणि
**ददानेंतले** लोक तरवारीनें पडतील. १४ आणि
मी आपल्या **इस्राएल** लोकांच्या हाताकडून **अदो-**
**मावर** आपला सूड उगवून ठेवीन; आणि ते मा-
झ्या क्रोधाप्रमाणें, व माझ्या कोपाप्रमाणें **अदोमाचें**
कार्य करितील; मग ते माझा सूड जाणतील,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

१५ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं **पलिष्टी** सूड
उगवण्यानें वर्त्तले आहेत, आणि त्यांनी **यहूदाला**
पुरातन द्वेषामुळें नाशावें, ह्मणून मनांत अवहेला
धरून सूड घेतला आहे. १६ याकरितां **प्रभु**
**परमेश्वर** ह्मणतो, कीं मी आपला हात **पलि-**
**ष्ट्यांवर** पुढें करीन, आणि **करेथी** लोक नाहींसे
करीन, आणि समुद्रतीरीं राहणाऱ्यांचें शेष नष्ट क-
रीन. १७ आणि रागाच्या दटावण्यांनी मी त्यांचे
मोठे सूड उगवीन; मग म्या त्यांजवर आपला
सूड उगवून ठेविल्यावर ते जाणतील, कीं मी **पर-**
**मेश्वर** आहें.

## अध्याय २६.

आणि अकराव्या वर्षी, महिन्याच्या पहिल्या
दिवसीं असें झालें, कीं **परमेश्वराचें** व-
चन मजजवळ आलें कीं; २ मनुष्याच्या पुत्रा,
**सोरेनें यरूशालेमेविषयीं** ह्मटलें आहे, कीं अहा,
जी लोकांचीं दारें असी होती ती मोडून गेली आहे;
ती मजकडे फिरविलेली आहे; ती उजाड झाली
आहे, ह्मणून मी परिपूर्ण होईन. ३ ह्मणून याक-
रितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं अगे **सोरे**,
पाहा, मी तुजविरुद्ध आहें; आणि जसा समुद्र
आपल्या लाटा भूमीवर जाऊं देतो, तसा मी तुज-
वर बहुत राष्ट्रें आणीन. ४ आणि **सोरेच्या** को-
टांस तीं नाशितील, आणि तिचीं दुर्गें पाडतील;
आणि मी तिची धूळ तिजवरून खरवडून टाकीन,
आणि तिला खडकाची पाठ असें करीन. ५ ती
समुद्रामध्यें जाळीं पसरण्याचें स्थान होईल; का
कीं मी हें बोललों आहें, असें **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो; आणि ती राष्ट्रांस लूट असी होईल.
६ आणि तिच्या ज्या कन्या भूमीवर आहेत, त्यांस
तरवारीनें वधितील; मग ते लोक जाणतील, कीं
मी **परमेश्वर** आहें.

७ तर **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा,
**नबूखद्रेजार बाबेलेचा** राजा, राजांचा राजा, घोडे
व रथ व स्वार व समुदाय व बहुत लोक यांसुद्धां
उत्तरेंतून **सोरेकडे** आणीन. ८ तुझ्या ज्या क-
न्या भूमीवर आहेत, त्यांस तो तरवारीनें वधील;
आणि तो तुजविरुद्ध आवार ठेवील, आणि तुज-
विरुद्ध मोरचा रचील, आणि तुजविरुद्ध ढाल

उभारील. ९आणि तो आपल्या यंत्राचा झपाटा
तुझ्या कोटांवर घालील, आणि आपल्या शस्त्रांनी
तुझीं दुर्गें पाडून टाकील. १०त्याच्या घोड्यांच्या
समुदायाने त्यांची उडती धूळ तुला झांकील;
भगाड केलेल्या नगराच्या शिरण्यांप्रमाणें जेव्हां
तो तुझ्या दारांत शिरेल, तेव्हां स्वारांच्या व चा-
कांच्या व रथांच्या शब्दाने तुझे कोट कांपतील.
११तो आपल्या घोड्यांच्या खुरांकडून तुझ्या सर्व
आळ्यांच्या वाटा तुडवील; तो तुझ्या लोकांस
तरवारीने वधील, आणि तुझीं बळकट ठाणीं भू-
मीस गळून पडतील. १२आणि ते लोक तुझें
धन हरितील, आणि तुझा विकण्याचा माल लुटि-
तील; आणि ते तुझे कोट पाडून टाकितील; आणि
तुझीं मनोरम घरें ओसाड करितील; आणि तुझे
दगड व तुझीं लांकडें व तुझी माती पाण्यांमध्यें
घालितील. १३आणि मी तुझ्या गीतांचा गोंगाट
नाहींसा करीन; आणि तुझ्या विण्यांचा शब्द पुढें
कोणी ऐकणार नाहीं. १४आणि मी तुला ख-
डकाची पाठ असें करीन; तूं जाळीं पसरण्याचें
स्थान होसील, तुला पुन्हा बांधणार नाहींत; कां
कीं मी **परमेश्वर** हें बोललों आहें, असें **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो.

१५**प्रभु परमेश्वर** सोरेला ह्मणतो, कीं जे-
व्हां तुजमध्यें घायाळ झालेले ओरडतील, आणि
वध होईल, तेव्हां तुझ्या नाशाच्या शब्दामुळें द्वीपें
कांपणार नाहींत काय? १६तेव्हां समुद्रांतले
सर्व अधिकारी आपल्या सिंहासनांवरून उतरतील,
आणि आपले झगे दूर करितील, आपलीं वेलबु-
टीचीं वस्त्रें काढून ठेवितील; ते आपल्या अंगीं
कांप लेऊन घेतील; ते भूमीवर बसतील, आणि
क्षणोक्षणीं कांपतील, आणि तुजविषयीं विस्मित
होतील. १७आणि ते तुजविषयीं विलाप करि-
तील, आणि तुला ह्मणतील, अगे खलाशीलोक
वसलेल्या कीर्त्तिमान नगरी, जी तूं समुद्रांत बळ-
कट होतीस, जी तूं व तुझे सर्व राहणारे आपल्या
सर्व येत्याजात्यांस भीड घालीत असां, ती तूं कसी
नाहींसी झाली आहेस! १८आतां तुझ्या ना-
शाच्या दिवसीं द्वीपें कांपतील; आणि जीं द्वीपें
समुद्रांत आहेत, तीं तुझ्या निर्गमामुळें व्याकुल
होतील. १९तर **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
जीं नगरें वसलेलीं नाहींत, त्यांसारिखें जेव्हां मी
तुला ओसाड नगर करीन; जेव्हां मी तुजवर
खोल समुद्र आणीन, आणि पुष्कळ पाण्यें तुला
झांकितील; २०जेव्हां मी तुला खांचेंत उतर-
णाऱ्यांजवळ, पुरातन लोकांजवळ उतरीन; जेव्हां
मी तुला पृथ्वीच्या खालच्या स्थानांत, पुरातन
ओसाड्यांत खांचेंत उतरणाऱ्यांजवळ बसवीन,
अशासाठीं कीं तूं वसूं नयेस; जेव्हां मी जीवं-
तांच्या भूमींत शोभा ठेवीन; २१तेव्हां तूं भय
होस, असें करीन, आणि तूं असणार नाहींस;
जरीं तुझा शोध केला तरीं तूं पुन्हा कधीं सांपड-
णार नाहींस, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय २७.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २तर मनुष्याच्या पुत्रा, तूं सोरेवि-
षयीं विलाप कर. ३आणि सोरेला सांग, अगे
तूं जी समुद्राच्या प्रवेशाजवळ वसली आहेस,
जी तूं बहुत द्वीपांसाठीं लोकांची व्यापारी आहेस,
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं अगे सोरे, तूं ह्म-
णाली आहेस, मी परिपूर्ण सुंदरपणाची आहें.
४तुझ्या सीमा समुद्रामध्यें आहेत, तुझ्या बांधणा-
ऱ्यांनी तुझा सुंदरपणा पूर्ण केला आहे. ५त्यांनी
तुझ्या गलबतांच्या सर्व फळ्या सनीराच्या देव-
दारूंच्या केल्या आहेत; तुजला डोलकाठ्या करा-
याला त्यांनी लबानोनांतून एरेज झाडें घेतलीं
आहेत. ६त्यांनी तुझीं वल्हीं बाशानाच्या निबर
झाडांचीं केलीं आहेत; त्यांनी तुझ्या असनांच्या
फळ्या खित्तीम द्वीपांतून आणिलेल्या खोदींव
हस्तिदंताच्या केल्या आहेत. ७तूं आपलें शीड
व्हावयासाठीं जें वस्त्र पसरीस, तें मिसरी स्वच्छ
पांढरें वेलबुटीचें वस्त्र असें; अलीशा द्वीपांतून
आणिलेलें नील व किर्मिजी रंगाचें वस्त्र तुझें झां-
कण होतें. ८सीदोन व अर्वाद यांचे राहणारे
तुझे वल्हेकरी होते; अगे सोरे, तुजमध्यें जे विद्वान
होते, ते तुझे तांडेल होते. ९तुजमध्यें गबालेचे
वडील आणि तिचे ज्ञानी तुझे फटी बुजविणारे
होते; तुझ्या व्यापाराचा व्यवहार करायाला समु-
द्रावरलीं सर्व गलबतें त्यांच्या खलाशांसहित तुज-
कडे असत. १०पारसी व लूदी व फूती तुझ्या

सैन्यांत तुझीं लढाईचीं माणसें होतीं; तीं तुजमध्ये
ढाल व शिरस्त्राण टांगून ठेवीत असत; त्यांनी
तुझी शोभा प्रशस्त केली. ११ अर्वादी व तुझें
सैन्य सभोंवार तुझ्या कोटांवर असत, आणि ग-
म्मादी तुझ्या दुर्गांत होते; ते आपल्या ढाला
चहुंकडे तुझ्या कोठांसीं टांगून ठेवीत असत;
त्यांनी तुझा सुंदरपणा पूर्ण केला. १२ सर्व प्रका-
रचीं धनें फार असल्यामुळें तार्शीश तुझी व्यापा
री असे; रुपें, लोखंड, कथील, व शिसें यांकडून
तिचे लोक तुझ्या बाजारांत व्यापार करीत असत.
१३ जे यावानी, तूबाली, व मेशेखी ते तुझे व्यापा-
री होते; ते मनुष्यजीव व पित्तलाचीं पात्रें यांचा
व्यापार तुजसीं करीत असत. १४ जे तोगार्माच्या
वंशांतले ते घोडीं व स्वार व खेचरें यांकडून तुझ्या
बाजारांत व्यापार करीत असत. १५ ददानाचे
वंश तुझे व्यापारी असत; बहुत द्विपें तुजकडलीं
व्यापरी होतीं; त्यांतले लोक शिंगें, हस्तिदंत, व
कालस्कंध तुजबवळ भेट आणीत असत. १६
तुझे कारिगारीचे पदार्थ फार असल्यामुळें अराम
तुझी व्यापारी होती; तिचे लोक हरिन्मणि, कि-
र्मिजी रंगाचें वस्त्र, व वेलबुटीचें वस्त्र, व स्वच्छ
पांढरें वस्त्र, व रक्तकंद, व तैलस्फटिक यांकडून
तुझ्या बाजारांत व्यापार करीत असत. १७ जे
यहूदा व इस्राएल देश त्यांतले लोक तुझे व्यापारी
होते; ते मिन्नीथ व फन्नाग यांचे गहूं व मध व
तेल व सुरस यांचा व्यापार तुजसीं करीत असत.
१८ तुझे कारिगारीचे पदार्थ फार असल्यामुळें, सर्व
प्रकारच्या धनामुळें हेल्बोनेचा द्राक्षारस व पांढरी
लोंकर यांकडून दमेशेक तुझी व्यापारी होती. १९
वेदानी व यावानी विणींव वस्तु तुझ्या बाजारांत
मांडीत असत; सिद्ध केलेलें लोखंड, दालचिनी,
व ऊंस तुझ्या बाजारांत असत. २० ददान रथ
मढविण्याचीं वस्त्रें विकीत तुझी व्यापारी होती.
२१ जे अरब व केदाराचे सर्व महाजन ते तुज-
कडले व्यापारी होते; कोंकरें मेंढे व बोकड यां-
कडून ते तुझे व्यापारी असत. २२ शबा व
रामा यांचे जे व्यापारी ते तुझे व्यापारी होते, ते
सर्व प्रकारचे श्रेष्ठ सुगंधपदार्थ व सर्व प्रकारचे मो-
लवान पाषाण व सोनें यांकडून तुझ्या बाजारांत
व्यापार करीत असत. २३ हारान व कन्ने व
एदेन, शबा, अश्शूर, व खिल्माद यांचे व्यापारी
तुझे व्यापारी होते. २४ शोभिवंत अलंकार, नी-
लवस्त्रें व वेलबुटीचें वस्त्र, व विचित्र वस्त्रांचे गठ्ठे,
जे काढण्यांनी बांधलेले व बळकट केलेले, यांकडून
ते तुझ्या बाजारांत तुझे व्यापारी असत. २५
तुझ्या व्यापारामुळें तार्शीशेचीं गलबतें तुजविषयीं
गात असत; आणि तूं समुद्रामध्यें भरलेली व
फार गौरव पावलेली होतीस.

२६ तुझ्या वल्हेकऱ्यांनी तुला मोठ्या पाण्यांत
आणिलें आहे; पूर्वेच्या वाऱ्याने तुला समुद्रामध्यें
मोडलें आहे. २७ तुझें धन व तुझ्या बाजारां-
च्या वस्तु, तुझा व्यापार, तुझे खलाशी, व तुझे
तांडेल, तुझे फटी बुजविणारे, व तुझे व्यापारी, व
तुझीं जीं सर्व लढाईचीं माणसें तुजकडे, व तुजम-
ध्यें जा सर्व समुदाय त्याजकडे आहेत, ते तुझ्या
पडण्याच्या दिवसीं समुद्रामध्यें पडतील. २८
तुझ्या तांडेलांच्या आरोळीच्या शब्दाने शिवारें
कांपतील. २९ आणि सर्व वल्हेकरी, खलाशी,
व समुद्रावरले सर्व तांडेल गलबतांवरून उतरून
भूमीवर उभे राहतील. ३० आणि तुजविषयीं
ते आपला शब्द ऐकवितील, आणि अतिखेदाने
ओरडतील, आणि ते आपल्या मस्तकांवर धूळ
चढवितील, आणि आपल्या अंगाला राख फांसि-
तील. ३१ आणि तुजविषयीं ते आपणांला ट-
कल करून घेतील, आणि गोणताट नेसतील,
आणि ते तुजविषयीं मनाच्या अतिखेदाने व खे-
दाच्या आक्रंदनाने तुजकरितां रडतील. ३२ आणि
ते आपल्या आक्रंदनांत तुजकरितां विलाप करि-
तील, आणि तुजविषयीं विलाप करीत ह्मणतील,
जोरेसारिखें जी समुद्रामध्यें नाहींसी झाली आ-
हे, तिजसारिखें कोणतें नगर आहे? ३३ जेव्हां
तुझ्या बाजारांच्या वस्तु समुद्रांतून निघून बाह
असत, तेव्हां तूं बहुत लोक तृप्त करीस, तूं आप-
ल्या द्रव्याच्या व आपले विकण्याचे पदार्थ फार
असल्याने पृथ्वींतले राजे धनवंत करीस. ३४ तूं
ज्यावेळेस पाण्यांच्या खोल स्थानांत समुद्राकडून
मोडून जासील, तेव्हां तुझा व्यापार व तुजमधील
सर्व समुदाय हीं नाहींसीं होतील. ३५ द्वीपां-
तले सर्व राहणारे तुजविषयीं विस्मित होतील
आणि त्यांचे राजे फार भयभीत होतील, त्यांचे

मुखें व्याकूळ असतांना ते विव्हल होतील. ३६
लोकांतले व्यापारी तुजवर फुसफुसतील; तूं भयं-
कर अशी होसील, आणि पुन्हा कधीं असणार
नाहींस.

## अध्याय २८.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, ज़ोरेच्या अ-
धिकाऱ्याला सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं
तुझें ह्रदय गर्विष्ट झालें आहे, आणि तूं ह्मणाला
आहेस, कीं मी देव आहें, मी समुद्रामध्यें देवा-
च्या आसनावर बसलों आहें; आणि तूं जरीं
मनुष्य आहेस, आणि देव नाहींस; तरीं तूं आ-
पलें ह्रदय देवाच्या ह्रदयासारिखें करितोस. ३
पाहा, तूं दानीयेलापेक्षां विद्वान आहेस; लोकां-
च्यानें तुजपासून कांहीं गुप्त गोष्ट लपववेना. ४
त्वां आपल्या ज्ञानानें व आपल्या बुद्धीनें आपणा-
साठीं द्रव्य मिळविलें आहे, आणि त्वां आपल्या
भांडारांत सोनें व रुपें प्राप्त करून ठेविलीं आहेत.
५ त्वां आपल्या मोठ्या ज्ञानानें व आपल्या व्या-
पारानें आपलें धन वाढविलें आहे, आणि तुझ्या
धनामुळें तुझें ह्रदय गर्विष्ट झालें आहे. ६ ह्म-
णून याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं त्वां
आपलें ह्रदय देवाच्या ह्रदयासारिखें केलें आहे.
७ याकरितां पाहा, मी विदेशी, राष्ट्रांतले बळा-
त्कारी तुजवर आणीन; आणि ते तुझ्या ज्ञानाच्या
शोभेवर आपल्या तरवारी उपसतील, आणि तुझा
सुंदरपणा निस्तेज करितील. ८ ते तूं खाचेंत
उतरस, असें करितील; आणि तूं समुद्रामध्यें
वधलेल्यांच्या मरणानें मरसील. ९ तर तुझ्या
वधणाऱ्यापुढें, मी देव आहें, असें निश्चयें ह्मण-
सील काय? तर तूं आपल्या वधणाऱ्याच्या हातीं
देव नाहीं, परंतु मनुष्य होसील. १० विदेश्यां-
च्या हाताकडून तूं असुंतांच्या मरणानें मरसील;
कां कीं मी हें बोललों आहें, असें प्रभु परमे-
श्वर ह्मणतो.
११ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, १२ मनुष्याच्या पुत्रा, ज़ोरेच्या रा-
जाविषयीं विलाप कर, आणि त्याला सांग, प्रभु
परमेश्वर ह्मणतो, कीं तूं परिष्कार समापन क-
रितोस, तूं ज्ञानानें भरलेला व शोभेनें पूर्ण आहें-
स. १३ एदेन जो देवाचा बाग त्यांत तूं असस;
प्रत्येक मोलवान पाषाण, ह्मणजे लोहितक, पीत-
मणि, व हीरक, लसण्या, गोमेद, व मणिरत्न,
नीलमणि, हरिन्मणि, व अग्निमणि, व सोनें तुझें
झांकण असे; ज्या दिवसीं तूं उत्पन्न झालास, त्या
दिवसींच तुजसाठीं तुझ्या डफांचें व तुझ्या पों-
व्यांचें निर्माण सिद्ध झालें. १४ तूं अभिषिक्त
झांकणारा खरूब असस; आणि म्या तुला स्था-
पिलें; तूं देवाच्या पवित्र पर्वतावर असस; तूं
अग्निपाषाणांमध्यें वर्त्तत असस. १५ तूं आप-
ल्या उत्पन्न होण्याच्या दिवसापासून तुजमध्यें अ-
न्याय सांपडला, तोंपर्यंत आपल्या मार्गांत यथार्थ
होतास. १६ तुझा व्यापार फार असल्यामुळें
लोकांनीं तुझा मध्यभाग बळात्कारानें भरिला आहे,
आणि त्वां पाप केलें आहे; ह्मणून मी तुला बाट-
वून देवाच्या पर्वतांतून टाकीन; आणि अरे झांक-
णाऱ्या खरूबा, मी तुला अग्निपाषाणांमधून नाहीं-
सा करीन. १७ तुझ्या शोभेकरून तुझें ह्रदय
गर्विष्ट झालें, त्वां आपल्या प्रभेकरितां आपली बुद्धि
बिघडिली आहे; मी तुला भूमीवर टाकून देईन,
तुला राजांपुढें ठेवीन, अशासाठीं कीं त्यांनीं तुला
पाहावें. १८ त्वां आपल्या बहुत अन्यायांनीं,
आपल्या व्यापाराच्या अन्यायानें तुझीं पवित्रस्थानें
बाटविलीं आहेत; ह्मणून मी तुजमधून अग्नि का-
ढीन, तो तुला खाईल; आणि जे तुला पाहत
असतील, त्या सर्वांच्या देखतां मी तुला भूमीवर
राखेंत ठेवीन. १९ लोकांमध्यें जे तुला जाण-
तात, ते सर्व तुजविषयीं विस्मित होतील; तूं भ-
यंकर होसील, आणि पुन्हा कधीं असणार नाहींस.
२० आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, २१ मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें
मुख सीदोनेकडे कर, आणि तिजविषयीं भविष्य
बोल २२ आणि सांग, प्रभु परमेश्वर ह्मण-
तो, कीं अगे सीदोने, मी तुजविरुद्ध आहें; आ-
णि मी तुजमध्यें गौरव पावेन; आणि म्या तिजम-
ध्यें शासनें केलीं असलीं, आणि मी तिजमध्यें गौ-
रव पावलों असलों, ह्मणजे ते जाणतील, कीं मी
परमेश्वर आहें. २३ आणि मी तिजमध्यें मरी
आणि तिच्या आळ्यांमध्यें रक्त पाठवीन; आलि-

तिजवर सभोंवार जी तरवार होईल, तिजकडून
तिजमध्यें घायाळ झालेले पडतील; मग ते जाण-
तील, कीं मी **परमेश्वर** आहें.
२४ आणि इस्राएलाच्या वंशाच्या भोंवतालचे
जे सर्व त्यांस तुच्छ मानीत असत, त्यांतून कोण-
तेंहि बोंचणें शल्य अथवा दुःखदायक कांटा पुन्हा
त्यांस होणार नाहीं; मग ते जाणतील, कीं मी
**परमेश्वर** आहें. २५ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं इस्राएलाचे वंश ज्या लोकांमध्यें विखरिलेले
आहेत, त्यांतून म्या ते एकवटिले, आणि मी त्यांज-
कडून राष्ट्रांच्या देखतां पवित्र मानिलेला असा
झालों, ह्मणजे ते आपल्या भूमीवर वसतील, जी
ती म्या माझा सेवक जो याकोब त्याला दिल्ही
होती. २६ आणि ते तिजवर निर्भय वसतील,
आणि घरें बांधितील, व द्राक्षमळे लावितील; होय
त्यांभोंवते जे सर्व त्यांस तुच्छ मानितात, त्यांजला
शासनें केलीं, ह्मणजे ते निर्भय वसतील; मग ते
जाणतील, कीं मी **परमेश्वर** त्यांचा देव आहें.

## अध्याय २९.

दाहाव्या वर्षांत, दाहाव्या महिन्यांत, महिन्याच्या
बाराव्या दिवशीं **परमेश्वराचें** वचन मजज-
वळ आलें कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें
मुख मिसराच्या फारो राजाकडे कर, आणि त्या-
विषयीं व सर्व मिसराविषयीं भविष्य बोल. ३
बोल, आणि सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
अरे फारो मिसराच्या राजा, त्याच्या नद्यांमध्यें
बसणाऱ्या मोठ्या मगरा, पाहा, मी तुजविरुद्ध आ-
हें, जो तूं ह्मणाला आहेस, कीं नदी माझी आहे,
आणि म्या आपणासाठीं ती उत्पन्न केली. ४ तर
मी तुझ्या चाभाडांमध्यें गळ घालीन, आणि तुझ्या
नद्यांतले मासे तुझ्या खवलांस चिकटूं देईन, आणि
तुला तुझ्या नद्यांच्या मध्यांतून उठवून काढीन,
आणि तुझ्या नद्यांतले सर्व मासे तुझ्या खवलांस
चिकटतील. ५ आणि मी तुला, तुलाच, व तुझ्या
नद्यांतले सर्व मासे जंगलांत सोडून टाकीन; तूं
रानाच्या भूमीवर पडसील; तूं एकवट होणार ना-
हींस, आणि आटपण्यांत येणार नाहींस; म्या
तला भूमीवरल्या पशूंस व आकाशांतल्या पक्ष्यांस
खाण्यासाठीं दिल्हें आहे. ६ आणि, मी **परमे-
श्वर** आहें, असें मिसरांतले राहणारे जाणतील:
कारण कीं ते इस्राएलाच्या वंशाला नळाची काठी
असे झाले. ७ जेव्हां त्यांनी तुला हातानें धरि-
लें, तेव्हां तूं तुटलास, आणि त्वां त्यांचा सर्व खां-
दा फाडिला; आणि जेव्हां ते तुजवर टेंकले, तेव्हां
तूं मोडलास, आणि त्यांच्या सर्व कंबरेस ओढ
लागली.
८ याकरितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पा-
हा, मी तुजवर तरवार आणीन, आणि तुजपासून
मनुष्य व पशु नाहींसे करीन. ९ आणि मिसर
देश ओसाड व उजाड होईल; आणि, मी **परमे-
श्वर** आहें, असें ते जाणतील; कारण कीं तो
ह्मणाला आहे, कीं नदी माझी आहे, आणि म्या
ती उत्पन्न केली. १० याकरितां पाहा, मी तुज-
विरुद्ध, व तुझ्या नद्यांविरुद्ध आहें; आणि सवे-
नेच्या दुर्गापासून खूशाच्या सीमेपर्यंत मिसर देश
अगदीं उजाड व ओसाड करून ठेवीन. ११
त्यांतून मनुष्याचा पाय चालणार नाहीं, आणि
पशूचा पायहि त्यांतून चालणार नाहीं, आणि चा-
ळीस वर्षांपर्यंत तो वसणार नाहीं. १२ आणि
जे देश ओसाड झाले आहेत, त्यांमध्यें मी मिसर
देश ओसाड करून ठेवीन, आणि जीं नगरें उजाड
झालीं आहेत, त्यांमध्यें त्यांतलीं नगरें चाळीस
वर्षांपर्यंत ओसाड राहतील; आणि मी मिस-
ऱ्यांस राष्ट्रांमध्यें उडवीन, आणि त्यांस देशांमध्यें
विखरीन.
१३ तथापि **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं ज्या
लोकांमध्यें मिसरी विखरिले होते, त्यांतून चाळीस
वर्षांनंतर मी त्यांस एकवटीन. १४ आणि मी
मिसराचे पाडाव प्रवासी परत आणीन, आणि
त्यांस पाथ्रोस देशांत, त्यांच्या मूळ देशांत परत
जाऊं देईन; आणि तेथें ते नीच राज्य होतील.
१५ तें राज्यांमध्यें फार नीच होईल; आणि तें
आपणाला राष्ट्रांवर पुन्हा उंचाविणार नाहीं; आ-
णि त्यांनी राष्ट्रांवर प्रभुत्व करूं नये, ह्मणून मी
त्यांस कनिष्ठ करीन. १६ आणि तें इस्राएलाच्या
वंशाला पुन्हा आश्रय होणार नाहीं, जेव्हां इस्रा-
एलाचे वंश त्यांमागें पाहतील, तेव्हां तें अन्यायाचें
सुचविणारें होईल; मग ते जाणतील, कीं मी **प्रभु
परमेश्वर** आहें.

१७ आणि सत्ताविसाव्या वर्षांत, पहिल्या
महिन्यांत, महिन्याच्या पहिल्या दिवसीं असें झालें,
कीं परमेश्वराचें वचन मजजवळ आलें कीं;
१८ मनुष्याच्या पुत्रा, बाबेलेच्या नबुखद्रेज्जार
राजाने आपल्या सैन्याकडून झोरेवर मोठी सेवा
करविली; प्रत्येक मस्तकाला टक्कल आलें, आणि
प्रत्येक खांद्याचें कातडें निघालें; तथापि जी सेवा
त्याने झोरेवर केली, तिजमुळें त्याला व त्या-
च्या सैन्याला झोरेंतून कांहीं वेतन प्राप्त झालें
नाहीं. १९ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो,
कीं पाहा, मी बाबेलेच्या नबुखद्रेज्जार राजाला
मिसर देश देईन; मग तो त्यांतला समुदाय
घेईल, आणि त्याचें हरण करील, आणि त्याला
लुटून टाकील; आणि तो देश त्याच्या सैन्याला
वेतन होईल. २० त्याने आपल्या ज्या उद्योगाने
तिजवर सेवा केली, त्यामुळें म्या त्याला मिसर
देश दिल्हा आहे; कां कीं त्यानी माझें काम केलें,
असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
२१ त्या समयीं इस्राएलाच्या वंशाचें शिंग
उगवे, असें करीन; आणि तुला त्यांमध्यें मुख
उघडणें देईन; मग ते जाणतील, कीं मी परमे-
श्वर आहें.

## अध्याय ३०.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, भविष्य बोल,
आणि सांग, प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी
केंकत ओरडा, दिवसाला हाय हाय; ३ कारण
कीं दिवस जवळ आहे, परमेश्वराचा दिवस,
अभाळाचा दिवस जवळ आहे, राष्ट्रांचा समय
येतो आहे. ४ आणि मिसरेवर तरवार येईल,
आणि जेव्हां मिसरेंत घायाळ झालेले पडतील,
तेव्हां खूशांत थरथराट होईल, आणि शत्रु तिचा
समुदाय हरून घेतील, आणि तिचे पाये मोडून
जातील. ५ आणि यांसुद्धां खूश व फूत व
लूद व सर्व मिश्रित लोक व खूब व कराराच्या
देशांतले लोक तरवारीने पडतील. ६ परमेश्वर
ह्मणतो, कीं जे मिसरेचें पाठबळ करितात, तेहि
पडतील; आणि तिच्या पराक्रमाचा अभिमान
उतरेल, सवेनेच्या दुर्गापासून आरंभून ते तींत
तरवारीने पडतील, असें प्रभु परमेश्वर ह्म-
णतो. ७ आणि ते ओसाड झालेल्या देशांमध्यें
ओसाड होतील, आणि तिचीं नगरें उजाड
नगरांमध्यें होतील. ८ आणि म्या मिसरेंत
अग्नि ठेविला, आणि तिचे सर्व सहाय कर-
णारे मोडले, ह्मणजे ते जाणतील, कीं मी पर-
मेश्वर आहें. ९ त्या वेळेस निश्चित खूशाला
भयभीत करायाला मजपासून दूत गलबतांत ब-
सून निघून जातील, मग जसा मिसराच्या दि-
वसीं तसा त्यांस थरथराट लागेल; कां कीं पाहा,
तो येतो आहे. १० प्रभु परमेश्वर ह्मणतो,
कीं मिसरेंतला समुदाय बाबेलेच्या नबूखद्रेज्जार
राजाच्या हाताने नाहींसा करीन. ११ तो व
त्यासंगतीं त्याचे लोक जे राष्ट्रांतले उग्र ते देशाचा
नाश करायासाठीं आणण्यांत येतील; आणि ते
आपल्या तरवारी मिसरेवर उपसतील, आणि वध-
लेल्यानी देशाला भरितील. १२ आणि मी न-
द्या कोरड्या करीन, आणि देश दुष्टांच्या हातीं
विकत देईन; आणि देशाला व त्याच्या भरणाला
विदेश्यांच्या हाताने ओसाड करून ठेवीन; मी
परमेश्वर हें बोललों आहें. १३ प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं मी मूर्त्तीस नाहींसें करीन,
आणि नोफेंतून प्रतिमा नाहींशा करीन; आणि
मिसर देशाचा कोणताहि अधिकारी पुन्हा होणार
नाहीं; आणि मी मिसर देशांत भय घालीन.
१४ आणि मी पाथ्रोसेला ओसाड करून ठेवीन,
आणि जवानेंत अग्नि घालीन, आणि नोवेंत शा-
सनें करीन; १५ आणि मिसरेचें बळकट स्थान,
जी सीन तिजवर मी आपला रोष घालीन;
आणि नोवेचा समुदाय नाहींसा करीन. १६
आणि मी मिसरेंत अग्नि घालीन; आणि सीनेला
फार वेदना लागेल, आणि नो छिन्नभिन्न होईल,
आणि नोफेला पीडा नित्य येतील. १७ आवेन
व फीबेसेथ यांतले तरणे तरवारीने पडतील;
आणि या दोघी पाडावपणाच्या प्रवासांत जातील.
१८ आणि मी जेव्हां तहफ्नहेसेस मिसरेचीं
जोखडें तोडीन, तेव्हां दिवस तेथें अंधारमय
होईल; आणि तींत तिच्या सामर्थ्याचें ऐश्वर्य
नाहींसें होईल; तिला आभाळ झांकील, आणि
तिच्या कन्या पाडावपणाच्या प्रवासांत जातील.

१९ तर मिसरेंत शासनें करीन; मग ते जाणतील,
कीं मी परमेश्वर आहें.
२० आणि असें झालें, कीं अकराव्या वर्षांत,
पहिल्या महिन्यांत, महिन्याच्या सातव्या दिवशीं
परमेश्वराचें वचन मजजवळ आलें कीं, २१
मनुष्याच्या पुत्रा, मिसरेचा राजा जो फारो
त्याचा बाहु म्या मोडला आहे; आणि पाहा,
त्यानें तरवार धरावी, ह्मणून त्याला बरें व बळकट
करायासाठीं पट्टी लावून त्याला कोणी बांधणार
नाहीं. २२ याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो,
कीं पाहा, मी मिसरेच्या फारो राजाविरुद्ध आ-
हें, आणि मी त्याच्या बाहूंला, जो बळकट होता
त्याला व जो मोडलेला त्यालाहि तोडीन; आणि
त्याच्या हातांतून तरवार पाडीन. २३ आणि मी
मिसऱ्यांस राष्ट्रांमध्यें उडवीन, आणि त्यांस दे-
शांमध्यें विखरीन. २४ आणि बाबेलेच्या रा-
जाचे बाहु बळकट करीन, आपली तरवार त्याच्या
हातीं देईन; आणि फारोचे बाहु तोडीन, मग
तो त्यासमोर घायाळ झालेल्याच्या आरोळ्यांनी
कण्हून ओरडेल. २५ तर मी बाबेलेचे बाहु
बळकट करीन, आणि फारोचे बाहु गळून पडती-
ल; आणि जेव्हां मी आपली तरवार बाबेलेच्या
राजाच्या हातीं देईन, आणि तो ती मिसर दे-
शावर पुढें करील, तेव्हां ते जाणतील, कीं मी
परमेश्वर आहें. २६ आणि मी मिसऱ्यांस
राष्ट्रांमध्यें उडवीन, आणि त्यांस देशांमध्यें विख-
रीन; मग, मी परमेश्वर आहें, असें ते जाणतील.

## अध्याय ३१.

आणि अकराव्या वर्षांत, तिसऱ्या महिन्यांत,
महिन्याच्या तिसऱ्या दिवशीं असें झालें,
कीं परमेश्वराचें वचन मजजवळ आलें कीं, २
मनुष्याच्या पुत्रा, मिसरेच्या फारो राजाला व
त्याच्या समुदायाला ह्मण, तूं आपल्या मोठेपणानें
कोणासारिखा आहेस?
३ पाहा, अश्शूर लबानोनांत चांगल्या फांद्यांचें
व दाट छायेचें व उंचउंचीचें एरेज झाड असा
होता; आणि त्याची तिटाळी दाट डाहाळ्यांमध्यें
होती. ४ पाण्यांनी त्याला वाढविलें, डोहानें
त्याच्या लावण्याभोंवतें आपले ओघळ वाहूं देऊन
त्याला उंच केलें, आणि त्यानें आपले ओढे रानां-
तल्या सर्व झाडांकडे पोहंचूं दिल्हे. ५ याकरितां
रानांतल्या सर्व झाडांपेक्षां त्याची उंची उंच झा-
ली, आणि त्याच्या डाहळ्या बहुत झाल्या; आ-
णि जेव्हां तो फुटला, तेव्हां बहुत पाण्यांनी त्याच्या
डाहळ्या लांब झाल्या. ६ त्याच्या डाहळ्यांत
आकाशांतले सर्व पक्षी कोटीं बांधीत असत, आणि
त्याच्या फांद्यांखालीं रानांतले सर्व पशु पोरें वीत
असत, आणि त्याच्या छायेखालीं सर्व मोठीं राष्ट्रें
वसत असत. ७ आणि तो आपल्या मोठेपणानें,
आपल्या डाहळ्यांच्या फार लांबीनें सुंदर होता;
कारण कीं त्याचें मूळ पुष्कळ पाण्यांजवळ होतें.
८ देवाच्या बागांतल्या एरेज झाडांच्यानें त्याला
झांकवेना; देवदारु त्याच्या डाहळ्यांएवढे नव्हते,
आणि अर्मोनी झाडें त्याच्या फांद्यांएवढीं नव्हतीं;
देवाच्या बागांतलें कोणतेंहि झाड आपल्या सुंदर-
पणानें त्यासारिखें नव्हतें. ९ म्या त्याला डाह-
ळ्या पुष्कळ देऊन सुंदर केलें; आणि एदेनांतलीं
जीं सर्व झाडें देवाच्या बागांत होतीं, तीं त्याचा
हेवा करीत असत.
१० याकरितां प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं
तूं उंचीनें उंच झाला आहेस, आणि त्यानें आप-
ली तिटाळी दाट डाहाळ्यांमध्यें निसवूं दिल्ही
आहे, आणि त्याच्या उंचपणानें त्याचें हृदय उंचा-
विलेलें आहे. ११ ह्मणून याकरितां म्या त्याला
राष्ट्रांच्या बलिष्ठाच्या हातीं दिल्हें आहे; तो नि-
श्चयें त्याचें कार्य करील; म्या त्याला त्याच्या
दुष्टपणामुळें घालवून दिल्हें आहे. १२ आणि
विदेश्यांनी राष्ट्रांतल्या भयंकरांनी त्याला कापून
टाकिलें आहे, आणि त्याला सोडिलें आहे; त्या-
च्या डाहळ्या पर्वतांवर व सर्व खोऱ्यांत पडल्या
आहेत, आणि त्याच्या फांद्या भूमींतल्या सर्व नद्यां-
जवळ तोडून टाकिल्या आहेत; आणि पृथ्वींतले
सर्व लोक त्याच्या छायेंतून उतरले आहेत, आणि
त्यांनी त्याला सोडिलें आहे. १३ त्याच्या तोड
मोडीवर आकाशांतले सर्व पक्षी वस्ति करितील,
आणि रानांतले सर्व पशु त्याच्या डाहळ्यांवर रा-
हतील. १४ अशासाठीं कीं पाण्याजवळच्या सर्व
झाडांनी आपल्या उंचीनें उंच होऊं नये, आणि
आपली तिटाळी दाट डाहळ्यांमध्यें निसवूं देऊं

नये, आणि त्यांच्या निबर झाडांनी सर्व पाणी पि-
णाऱ्यांनी आपल्या उंचपणाने उभें राहूं नये; कां
कीं ते सर्व मनुष्यवंशामध्यें, खांचेंत उतरणाऱ्यांसुद्धां
पृथ्वींतल्या खालच्या स्थानांत मरणाला सोंपून दि-
ल्हे आहेत. १५ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
ज्या दिवसीं तो मृतलोकांत उतरला, त्यांत म्या
आक्रंदन करविलें; म्या त्याकरितां डोह झांकिला,
आणि त्याच्या नद्या आवरिल्या, आणि मोठीं पाण्यें
आकळलीं, आणि त्यामुळें लबानोन शोक करी
असें म्या केलें, आणि त्यामुळें रानांतलीं सर्व झाडें
म्लान झालीं. १६ जेव्हां म्या त्याला मृतलो-
कांत खांचेंत उतरणाऱ्यांसुद्धां पाडिलें, तेव्हां म्या
त्याच्या पडण्याच्या शब्देंकरून राष्ट्रांस कांपविलें;
आणि एदेनांतलीं सर्व झाडें लबानोनांतले निवडक
व श्रेष्ठ सर्व पाणी पिणारीं पृथ्वींतल्या खालच्या
स्थानांत शांतवन पावतील. १७ आणि ते त्यासु-
द्धां मृतलोकांत तरवारीने वधलेल्यांकडे उतरले;
आणि जे त्याचा बाहु असतांना राष्ट्रांमध्यें त्याच्या
छायेखालीं वसत असत तेहि उतरले.

१८ तर एदेनांतल्या झाडांमध्यें तूं गौरवाने व
मोठेपणाने असा कोणासारिखा आहेस? तथापि
तूं एदेनांतल्या झाडांसुद्धां पृथ्वींतल्या खालच्या
स्थानांत उतरसील; तूं तरवारीने वधलेल्यांबरोबर
असुंतींमध्यें निजसील. हा फारो व त्याचा सर्व
समुदाय आहे, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ३२.

आणि बाराव्या वर्षांत, बाराव्या महिन्यांत,
महिन्याच्या पहिल्या दिवसीं असें झालें,
कीं **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें कीं,
२ मनुष्याच्या पुत्रा, मिसरेच्या फारो राजाविषयीं
विलाप कर, आणि त्याला सांग, तूं राष्ट्रांतल्या
तरुण सिंहासारिखा आहेस, आणि तू समुद्रांतला
मगर असा आहेस; आणि तूं आपल्या प्रवाहांसं-
गतीं सुटून चाललास, आणि त्वां आपल्या पायांनी
पाण्यें खडुळिलीं, आणि त्यांच्या नद्या मळगावि-
ल्या. ३ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं मी बहुत
लोकांच्या समुदायाकडून आपलें जाळें तुजवर प-
सरीन; आणि ते तुला माझ्या जाळ्यांत गुंतवून
वर काढितील. ४ मग मी तुला भूमीवर सो-
डीन, जंगलाच्या भूमीवर तुला पसरून ठेवीन,
आणि आकाशांतले सर्व पक्षी मी तुजवर बसूं दे-
ईन, आणि तुजकडून सर्व भूमीवरल्या पशूंस तृप्त
करीन. ५ आणि मी तुझा देह पर्वतांवर ठेवीन,
आणि तुझ्या उंचपणाने खोरीं भरीन. ६ आणि
ज्या भूमींतून तूं पोंहतोस, तिला मी पर्वतांपर्यंत
तुझ्या रक्ताने शिंपीन; आणि तुजकडून नद्यांचीं
पात्रें भरतील. ७ आणि जेव्हां मी तुला विझ-
वून टाकीन, तेव्हां आकाशें झांकीन, आणि त्यां-
तलीं नक्षत्रें काळीं करीन; मी सूर्याला आभाळाने
झांकीन, आणि चंद्र आपला प्रकाश पाडणार
नाहीं. ८ मी आकाशांतल्या सर्व प्रकाशमय ज्यो-
ति तुजवरतीं काळ्या करीन, आणि तुझ्या भूमी-
वर अंधार ठेवीन, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
९ आणि जेव्हां मी तुझा भंग राष्ट्रांमध्यें, ज्या
देशांला त्वां ओळखिलें नाहीं, त्यांत आणीन,
तेव्हां मी बहुत लोकांचें हृदय त्रासवीन. १०
आणि मी बहुत लोकांस तुजविषयीं विस्मित क-
रीन, आणि त्यांचे राजे, जेव्हां मी आपली तर-
वार त्यांच्या समक्ष परजीन तेव्हां भयभीत होतील;
आणि तुझ्या पडण्याच्या दिवसीं ते प्रत्येक आ-
पल्या जीवासाठीं क्षणोक्षणीं कांपतील.

११ कारण कीं **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
बाबेलेच्या राजाची तरवार तुजवर येईल. १२
बलवानांच्या तरवारींकडून मी तुझा समुदाय पा-
डीन, ते सर्व राष्ट्रांतले भयंकर आहेत; आणि ते
मिसरेच्या ऐश्वर्याचा नासाडा करितील, आणि
तींतला सर्व समुदाय नाहींसा होईल. १३
आणि मी तींतले पशु पुष्कळ पाण्यांजवळून ना-
हींसे करीन; मग मनुष्याचा पाय पुन्हा त्यांस
खडुळणार नाहीं, आणि पशूचे खुर त्यांस गढु-
ळणार नाहींत. १४ मग मी त्यांचीं पाण्यें ख-
चवीन; आणि त्यांच्या नद्या तेलाप्रमाणें वाहत,
असें करीन; असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
१५ जेव्हां मी मिसर देशाला ओसाड करीन,
आणि भूमि तिचें भरण नाहींसें झालें असतां
उजाड होईल; जेव्हां मी तींतले सर्व राहणारे
हाणीन; तेव्हां ते जाणतील, कीं मी **परमेश्वर**
आहें. १६ विलाप हाच आहे, आणि लोक
हा करितील, आणि राष्ट्रांतल्या कन्या हा विलाप

करितील, मिसरेविषयीं आणि तींतल्या सर्व स-
मुदायाविषयीं त्या हा विलाप करितील, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो·
१७ **आणि** बाराव्या वर्षांत; महिन्याच्या पं-
धराव्या दिवसीं **परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, १८ **मनुष्याच्या** पुत्रा, मिसरेंतल्या
समुदायाविषयीं आक्रंदन कर, आणि त्याला ति-
ला मोठ्या राष्ट्रांच्या कन्यांस खांचेंत उतरणाऱ्यां-
सुद्धां पृथ्वींतल्या खालच्या स्थानांत पाडून टाक·
१९ **तूं** कोणत्यापेक्षां मनोरम आहेस? तूं उतरून
असुंतींबरोबर नीज· २० **ते** तरवारीनें वधले-
ल्यांमध्यें पडतील; ती तरवारीला सोंपून दिल्ही
आहे; तिला व तिच्या सर्व समुदायांस ओढा·
२१ **पराक्रम्यांतले** बलिष्ठ त्याला व त्याच्या स-
हायकरणाऱ्यांस मृतलोकाच्या मध्यांतून बोलतील;
ते उतरले आहेत, ते असुंती, तरवारीनें वधलेले,
असे निजले आहेत· २२ **तेथें** अश्शूर व तिचा
सर्व समुदाय आहे; त्याच्या कबरा त्याभोंवत्या
आहेत; ते सर्व वधलेले, तरवारीनें पडलेले आ-
हेत· २३ **ज्या** तिच्या कबरा खांचेच्या कडांत
ठेविल्या आहेत, आणि तिचा समुदाय तिच्या
कबरेभोंवता आहे; ते सर्व वधलेले, तरवारीनें
पडलेले आहेत, जे ते जीवंतांच्या भूमींत भय
घालीत असत· २४ **तेथें** एलाम आहे, आणि
तिचा सर्व समुदाय तिच्या कबरेभोंवता आहे, ते
सर्व वधलेले, तरवारीनें पडलेले आहेत, जे ते
असुंती असतांना पृथ्वींतल्या खालच्या स्थानांत
उतरले आहेत, जे ते आपलें भय जीवंतांच्या
भूमींत घालीत असत; ह्मणून ते खांचेंत उतर-
णाऱ्यांबरोबर आपली अप्रतिष्ठा पावले आहेत·
२५ **त्यांनी** वधलेल्यांमध्यें तिच्या सर्व समुदायांत
तिजसाठीं पलंग ठेविला आहे; त्याजभोंवत्या ति-
च्या कबरा आहेत; ते सर्व असुंती व तरवारीनें
पडलेले आहेत; जरी त्यांचें भय जीवंतांच्या
भूमींत घातलें असे, तरी ते खांचेंत उतरणाऱ्यां-
बरोबर आपली अप्रतिष्ठा पावले आहेत; तो
वधलेल्यांमध्यें ठेविला आहे· २६ **तेथें** मेशेख,
तूबाल, आणि तिचा सर्व समुदाय आहे; तिच्या
कबरा त्याजभोंवत्या आहेत; जरी ते आपलें भय
जीवंतांच्या भूमींत घालीत असत, तरी ते सर्व
असुंती असतांना तरवारीनें वधलेले आहेत· २७
**आणि** जे असुंतींतले पडलेले पराक्रमी आपल्या
लढाईच्या शस्त्रांसुद्धां मृतलोकांत उतरले आहेत,
त्यांबरोबर ते निजणार नाहींत; आणि **जरी** ते
जीवंतांच्या भूमींत पराक्रम्यांच्या भयाचें कारण
असत, तरी त्यांनी आपल्या तरवारी आपल्या म-
स्तकांखालीं ठेविल्या आहेत, आणि त्यांचे अन्याय
त्यांच्या हाडांवर राहतील· २८ **तर** तूं असुंतीं-
मध्यें मोडून जासील, आणि तरवारीनें वधलेल्यां-
बरोबर निजसील· २९ **तेथें** अदोम, तिचे राजे,
आणि तिचे सर्व अधिकारी आहेत, जे ते आपल्या
बळासुद्धां तरवारीनें वधलेल्यांपासीं ठेविले आहेत:
ते असुंतींबरोबर आणि खांचेंत उतरणाऱ्यांबरोबर
निजतील· ३० **तेथें** उत्तरेंतले अधिकारी आहेत,
ते सर्व आणि सर्व सीदोनी आहेत, जे ते वध-
लेल्यांसुद्धां उतरले आहेत; ते आपल्या भयेंकरून
आपल्या पराक्रमाविषयीं लज्जित झाले आहेत:
आणि ते असुंती असतांना तरवारीनें वधलेल्यां-
बरोबर निजले आहेत, आणि ते खांचेंत उतरणा-
ऱ्यांबरोबर आपली अप्रतिष्ठा पावले आहेत· ३१
**फारो** त्यांस पाहील, तेव्हां तो आपल्या सर्व
समुदायाविषयीं सांत्वन पावेल, जे तरवारीनें वध-
लेले ह्मणजे फारो आणि त्याचें सर्व सैन्य ते
त्यांस पाहतील, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो·
३२ **कारण** कीं म्या आपलें भय जीवंतांच्या
भूमींत घातलें आहे; आणि फारो व त्याचा
सर्व समुदाय हे तरवारीनें वधलेल्यांसुद्धां असुं-
तींमध्यें निजतील, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो·

## अध्याय ३३.

**आणि** परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ **मनुष्याच्या** पुत्रा, तूं आपल्या लोकां-
च्या वंशांस बोल, आणि त्यांस सांग, जेव्हां मी
देशावर तरवार आणितों, आणि त्या देशांतले लोक
आपल्या सीमांतला एक मनुष्य घेऊन त्याला आ-
पणांसाठीं पाहरेकरी असें ठेवितील; ३ **तो** जर
देशावर तरवार येतां पाहून करणा वाजवील, आ-
णि लोकांस सुचना देईल तर; ४ **तेव्हां** जो
कोणी कर्ण्याचा शब्द ऐकून सुचना घेत नाहीं,
त्याला जर तरवार येऊन घेऊन आली, तर

त्याचें रक्त त्याच्याच डोईवर राहील. ५
त्याने कर्ण्याचा शब्द ऐकून बोध घेतला नाहीं,
त्याचें रक्त त्याजवरच राहील, परंतु जो बोध
घेईल तो आपला जीव सोडवील. ६ परंतु पाह-
रेकरी तरवार येतां पाहून जर कर्णा वाजवीत
नाहीं, आणि लोकांस बोध करीत नाहीं, आणि तर-
वार येऊन त्यांतून कोणत्यालाहि घेऊन जाईल,
तर तो आपल्या अन्यायांत नाश पावेल, परंतु मी
त्याचें रक्त पाहरेकऱ्यापासून मागून घेईन. ७
तसाच हे मनुष्याच्या पुत्रा, तूं आहेस; म्या
तुला इस्राएलाच्या वंशासाठीं पाहरेकरी ठेविलें
आहे; ह्मणून तूं माझ्या मुखापासून वचन ऐक-
सील, आणि मजपासून त्याला बोध करिसील.
८ जेव्हां मी दुष्टाला ह्मणतों, अरे दुष्टा, तूं नि-
श्चयें मरसील; तेव्हां जर दुष्टाला त्याच्या मा-
र्गापासून बोध करायाला बोलत नाहींस, तर तो
दुष्ट आपल्या अन्यायांत मरेल; परंतु त्याचें रक्त मी
तुजपासून मागून घेईन. ९ तथापि दुष्टाने आपल्या
मार्गापासून फिरावें, ह्मणून जेव्हां त्वां त्याविषयीं
त्याला बोध केला आहे; तेव्हां जर तो आपल्या
मार्गापासून फिरत नाहीं, तर तो आपल्या अन्यायांत
मरेल; परंतु त्वां आपला जीव सोडविला आहे.
१० आणि मनुष्याच्या पुत्रा, तूं इस्राएलाच्या
वंशाला सांग, तुह्मी असें ह्मणतां, कीं जर आ-
मचे अपराध आणि आमचीं पापें आह्मावर राह-
तील, आणि त्यानी आह्मी क्षीण होऊन जाऊं,
तर आह्मी कसे वांचूं? ११ त्यांस सांग, प्रभु
परमेश्वर ह्मणतो, कीं मी आपल्या जीवाची
शपथ वाहतों, कीं निश्चयें मी दुष्टाच्या मरणावि-
षयीं संतोषत नाहीं; परंतु जर दुष्ट आपल्या
मार्गापासून फिरला, आणि वांचला, तर संतोषतों;
अहो इस्राएलाच्या वंशानो, तुह्मी फिरा, आपल्या
कुमार्गापासून फिरा, तुह्मी कां मराल? १२ आणि
मनुष्याच्या पुत्रा, तूं आपल्या लोकांच्या वंशास
सांग, न्यायीचें न्यायीपण त्याच्या अपराधाच्या
दिवसीं त्याला सोडवणार नाहीं; आणि दुष्ट
जेव्हां आपल्या दुष्टपणापासून फिरतो, तेव्हां तो
आपल्या दुष्टपणामुळें पडणार नाहीं; आणि न्या-
यी आपल्या पाप करण्याच्या दिवसीं आपल्या
न्यायीपणामुळें वांचायास समर्थ होणार नाहीं.
१३ जेव्हां मी न्यायीला ह्मणेन, कीं तो निश्चयें
वांचेल; तेव्हां जर तो आपल्या न्यायीपणावर
भाव ठेवून अन्याय करील, तर त्याचें सर्व न्या-
यीपण स्मरणांत राहणार नाहीं; त्याचा जो अ-
न्याय त्याने केला आहे, त्यामुळें तो मरेल. १४
आणि तूं निश्चयें मरसील, असें जेव्हां मी
दुष्टाला ह्मणतों, तेव्हां जर तो आपल्या पापापा-
सून फिरेल, आणि नीति व न्याय करील; १५
जर दुष्ट गहाण परत देईल, आणि जें हरिलेलें
तें परत भरून देईल, अन्याय केल्यावांचून जीवा-
च्या नियमांप्रमाणें वर्त्तेल; तर तो वांचेलच वां-
चेल, तो मरणार नाहीं. १६ त्याने जीं आपलीं
पापें केलीं आहेत, तीं त्याला स्मरविण्यांत येणार
नाहींत; त्याने नीति व न्याय केला आहे; तो
वांचेलच वांचेल.
१७ तथापि तुझ्या लोकांचे वंश ह्मण-
तात, कीं प्रभूचा मार्ग बराबर नाहीं; परंतु
त्यांचाच मार्ग बराबर नाहीं. १८ जेव्हां न्या-
यी आपल्या न्यायीपणापासून फिरून अन्याय
करील, तेव्हां तो त्याने मरेल. १९ परंतु दुष्ट
जर आपल्या दुष्टपणापासून फिरून नीति व न्याय
करील, तर तो त्यानी वांचेल.
२० तथापि तुह्मी ह्मणतां, कीं प्रभूचा मार्ग
बराबर नाहीं; अहो इस्राएलाच्या वंशानो, मी
तुमचा प्रत्येकाचा न्याय त्याच्या मार्गांप्रमाणें
करीन.
२१ आणि आमच्या पाडाव प्रवासाच्या बारा-
व्या वर्षांत, दाहाव्या महिन्यांत, महिन्याच्या पां-
चव्या दिवसीं असें झालें, कीं एक जो यरूशा-
लेमेंतून सुटला होता, त्याने मजजवळ येऊन
सांगितलें, कीं नगर हाणिलेलें आहे. २२ तर
संध्याकाळीं तो सुटलेला आल्यापूर्वी परमेश्वरा-
चा हात मजवर होता; आणि तो सकाळीं मज-
जवळ येईपर्यंत त्याने माझें मुख उघडिलें होतें;
मग माझें मुख उघडल्यावर पुढें मी मुका राहिलों
नाहीं. २३ तेव्हां परमेश्वराचें वचन मजज-
वळ आलें कीं, २४ मनुष्याच्या पुत्रा, जे इस्रा-
एलाच्या भूमीवरल्या त्या ओसाड स्थानांत वस-
तात ते ह्मणतात, कीं आब्राहाम एकच होता;
आणि त्याने देशाचें वतन केलें; परंतु आह्मी

बहुत आहों; देश आह्मालां वतनासाठीं दिल्हा
आहे. २५ **या**करितां त्यांस सांग, **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो, कीं तुह्मी रक्तासुद्धां मास खातां,
आणि तुह्मी आपले डोळे आपल्या मूर्त्तींकडे ला-
वितां, आणि रक्त पाडितां; तर मग तुह्मी देशाचें
वतन कराल काय? २६ **तु**ह्मी आपल्या तरवा-
रीवर उभे राहतां, तुह्मी अघोरकर्म करितां, आणि
प्रत्येक आपल्या शेजाऱ्याच्या स्त्रीला बाटवितां;
तर मग तुह्मी देशाचें वतन कराल काय? २७
**तूं** त्यांस सांग, कीं **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं निश्चयें
जे ओसाड स्थानांत आहेत ते तरवारीने पडतील,
आणि जो पटांगणावर आहे त्यास मी पशूंस खा-
यासाठीं देईन, आणि जे दुर्गांत व गुहांत आहेत ते
मरीने मरतील. २८ **आ**णि मी देश ओसाड
करून ठेवीन, आणि यांतल्या बळाचें ऐश्वर्य ना-
हींसें होईल; आणि इस्राएलाचे पर्वत त्यांजवरून
कोणी न चाले एवढे ओसाड होतील. २९
**आणि** त्यांनी जीं आपलीं सर्व अघोर कर्मे केलीं
आहेत, त्यांमुळें म्या देश ओसाड करून ठेविला,
ह्मणजे ते जाणतील, कीं मी **परमेश्वर** आहें.

३० **तर** मनुष्याच्या पुत्रा, तुझ्या लोकांचे वंश
भिंतींजवळ आणि घरांच्या दारांत तुजविषयीं सं-
भाषण करितात; एक एकाला, आणि प्रत्येक आ-
पल्या भावाला बोलतो, कीं याहो, जें वचन **पर-
मेश्वरा**पासून निघतें आहे, तें आपण ऐकूं. ३१
**आणि** जसे लोक येत असतात, तसे ते तुजकडे
येतात; आणि ते माझ्या लोकांप्रमाणें तुजपुढें बस-
तात, आणि तुझीं वचनें ऐकतात, परंतु ते तीं
आचरीत नाहींत; जरी ते आपल्या मुखाने फार
प्रीति दाखवितात, तरी त्यांचें चित्त त्यांच्या ला-
भाकडे जातें. ३२ **आ**णि पाहा, ज्याचा स्वर
मंजुळ आणि जो वाद्य चांगलें वाजवितो, त्याच्या
मनोहर गीताप्रमाणें तूं त्यांस आहेस; कां कीं ते
तुझीं वचनें ऐकतात, परंतु ते तीं आचरीत नाहींत.
३३ **जे**व्हां हें वर्त्तमान घडेल, पाहा, हें घडेलच,
तेव्हां ते जाणतील, कीं त्यांमध्यें भविष्यवादी होता.

## अध्याय ३४.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ **म**नुष्याच्या पुत्रा, इस्राएलाच्या पाल-
कांविषयीं भविष्य बोल, भविष्य बोल, आणि त्यांस
सांग, **प्रभु परमेश्वर** पालकांस ह्मणतो, कीं जे
इस्राएलाचे पालक आपणांस पोषितात, त्यांस हाय
हाय; पालकानी कळपाला पोषावें कीं नाहीं? ३ **तु-**
**ह्मी** चरबी खातां, आणि लोंकरीने तुह्मी आपणांला
झांकितां, तुह्मी पुष्ट पशूंला वधितां; तुह्मी कळप
पाळीत नाहीं. ४ **जीं** दुबळीं त्यांजला तुह्मी
बलवान केलीं नाहींत, आणि जें रोगी त्याला
तुह्मी बरें केलें नाहीं, आणि जें मोडलेलें त्याला
तुह्मी पट्टी बांधिली नाहीं, आणि जें दवडिलेलें तें
तुह्मी परत आणिलें नाहीं, आणि जें गमावलेलें तें
तुह्मी शोधिलें नाहीं; परंतु तुह्मी बलात्काराने व
क्रूरपणें त्यांजवर धनीपण केलें आहे. ५ **आ**णि
पालक नव्हता, ह्मणून त्यांची दाणादाण झाली:
आणि जेव्हां तीं उडविलेलीं होतीं, तेव्हां तीं रा-
नांतल्या सर्व पशूंस आहार झालीं. ६ **माझीं**
मेंढरें सर्व पर्वतांतून, आणि प्रत्येक उंच डोंगरावर
बहकून गेलीं; आणि पृथ्वीच्या सर्व पाठीवर माझीं
मेंढरें उडविलेलीं होतीं, आणि त्यांस कोणी शो-
धिलें नाहीं, कोणी हुडकिलें नाहीं.

७ **या**करितां अहो पालकानो, तुह्मी **परमेश्व-
राचें** वचन ऐका. ८ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं माझा
कळप लूट झाला, आणि पालक नसल्यामुळें माझीं
मेंढरें रानांतल्या सर्व पशूंस आहार झालीं, आणि
पालकानी माझीं मेंढरें शोधिलीं नाहींत, परंतु पा-
लकानी आपणांस पोषिलें आहे, आणि माझ्या
कळपाला पोषिलें नाहीं; ९ **ह्म**णून याकरितां अहो
पालकानो, तुह्मी **परमेश्वराचें** वचन ऐका; १०
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, मी निश्चयें पा-
लकांविरुद्ध आहें; आणि मी आपला कळप त्यां-
पासून मागेन, आणि ते कळपाच्या पालनापासून रा-
हत असें करीन; मग पालक आपणांला पुढें पोष-
णार नाहींत; आणि मी आपलीं मेंढरें त्यांच्या मुखां-
तून सोडवीन, मग तीं त्यांस आहार होणार नाहींत.

११ **कारण कीं प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
पाहा, मी, मीच आपल्या मेंढरांस शोधीन, आणि
त्यांस हुडकीन. १२ **पालक** जेव्हां आपल्या वि-
खरलेल्या मेंढरांमध्यें असतो, तेव्हां जसा तो
आपल्या कळपाला शोधितो; तसाच मी आपला

कळप शोधीन, आणि ज्या सर्व स्थानांत तीं आभा-
ळाच्या व काळोखाच्या दिवशीं उडविलेलीं होतीं,
त्यांतून त्यांस सोडवीन. १२ आणि त्यांस मी
लोकांतून काढीन, आणि देशांतून त्यांस एकवटीन,
आणि त्यांस त्यांच्या भूमीवर आणीन, आणि
इस्राएलाच्या पर्वतांवर नद्यांजवळ आणि देशांत-
ल्या सर्व वसविलेल्या स्थानांत त्यांस चारीन.
१४ त्यांस उत्तम चरगणांत चारीन, आणि
त्यांचें कुरण इस्राएलाच्या उंच पर्वतांवर होईल;
तेथें तीं उत्तम कुरणांत बसतील, आणि इस्राए-
लाच्या पर्वतांवर तीं भरदार चरगणांत चरतील.
१५ मी आपल्या कळपाला पाळीन, आणि मी
त्याला बसवीन, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
१६ जें गमावलेलें त्याला मी शोधीन, आणि जें
दवडिलेलें त्याला परत आणीन, आणि जें मोड-
लेलें त्याला मी पट्टी बांधीन, आणि जें रोगी त्या-
ला बळाववीन; परंतु पुष्टाला व बळकटाला मी
नाहींसें करीन; त्यांस शासन चारीन. १७
आणि प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं हे माझ्या
कळपा, पाहा, धाकटा पशु व धाकटा पशु यांच्या
मध्यें, ह्मणजे मेंढा व बोकड यांच्या मध्यें मी
न्याय करीन. १८ तर तुह्मी उत्तम चरगण
खाऊन टाकून आपल्या चरगणांचें शेष आपल्या
पायानी तुडवितां, आणि गंभीर पाण्यें पिऊन जीं
उरलेलीं तीं आपल्या पायानी गढुळितां, हें तुह्मा-
ला हलकें वाटतें कीं काय? १९ आणि जीं
माझीं मेंढरें तीं तुमच्या पायानी जें तुडविलेलें तें
खातात; आणि जें तुमच्या पायानी गढुळिलेलें
तें तीं पितात.

२० याकरितां प्रभु परमेश्वर त्यांस ह्मणतो,
कीं पाहा, मी, मीच पुष्टपशु व रोडपशु यांच्या-
मध्यें न्याय करीन. २१ तुह्मी कुसीने व खांद्याने
धसिलें आहे, आणि तुह्मी सर्व क्षीणांस बाहेर
उडविल्यापर्यंत आपल्या शिंगानी त्यांस ढकलिलें
आहे; २२ ह्मणून मी आपल्या कळपाला तारीन,
आणि तो पुन्हा लूट असा होणार नाहीं; आणि
धाकटा पशु व धाकटा पशु यांच्यामध्यें मी न्याय
करीन. २३ आणि मी त्यांजवर एक पालक,
ह्मणजे माझा सेवक दावीद ठेवीन; मग तो त्यां-
ला चारील; तो त्यांस पाळील, आणि तोच
त्यांचा पालक असत जाईल. २४ आणि मी
परमेश्वर त्यांचा देव असत जाईन, आणि मा-
झा सेवक दावीद त्यांमध्यें अधिकारी असत जा-
ईल; मी परमेश्वर हें बोललों आहें. २५
आणि मी त्यांसीं स्वस्थपणाचा करार करीन, आ-
णि दुष्टपशु देशांतून नाहींसे करीन; मग तीं
निर्भय जंगलांत राहतील, आणि रानांत निजतील.
२६ आणि मी त्यांस आणि माझ्या डोंगराभोंवता-
लच्या स्थानांस आशीर्वादित करीन; आणि मी
पाऊस त्याच्या समयीं पडूं देईन; आशीर्वादाच्या
पाहळ्या होतील. २७ आणि शेतांतलें झाड
आपलें फल देईल, आणि भूमि आपला उपज
देईल, आणि ते लोक आपल्या भूमीवर निर्भय
राहतील; आणि म्या त्यांच्या जोकडाचे बंध
तोडिले, आणि ज्यानी त्यांची सेवा घेतली, त्यां-
च्या हातांतून म्या त्यांस सोडविलें, ह्मणजे ते
जाणतील, कीं मी परमेश्वर आहें. २८ आणि
ते राष्ट्रांस पुन्हा लूट असे होणार नाहींत, आणि
भूमीवरले पशु त्यांस खाणार नाहींत; परंतु ते
निर्भय राहतील, आणि कोणी त्यांस भयभीत
करणार नाहीं. २९ आणि त्यांसाठीं सुकीर्त्तीचें
लावणें स्थापीन, मग ते पुन्हा देशांत भुकेने क्षीण
होणार नाहींत, आणि पुन्हा राष्ट्रांपासून अप्रतिष्ठा
पावणार नाहींत. ३० तेव्हां ते जाणतील, कीं
मी परमेश्वर त्यांचा देव त्यांजवळ आहें, आ-
णि ते ह्मणजे इस्राएलाचे वंश माझे लोक आहेत,
असेंहि ते जाणतील, असें प्रभु परमेश्वर
ह्मणतो. ३१ आणि जे तुह्मी माझा कळप, माझ्या
चरगणांचा कळप आहां, ते तुह्मी मनुष्य आहां,
आणि मी तुमचा देव आहें, असें प्रभु परमे-
श्वर ह्मणतो.

## अध्याय ३५.

आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें मुख
सेईर पर्वताकडे कर, आणि त्याविषयीं भविष्य
बोल. ३ आणि त्याला सांग, प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं हे सेईर पर्वता, पाहा, मी तुजवि-
रुद्ध आहें, आणि मी आपला हात तुजवर पुढें
करीन, आणि तुला ओसाड व उजाड करून ठे-

वीन. ४ मी तुझीं नगरें उजाड करून ठेवीन,
आणि तूं ओसाड होसील, मग तूं जाणसील,
कीं मी **परमेश्वर** आहें. ५ तुझ्याठायीं पुरातन
द्वेष असे, आणि त्वां इस्राएलाच्या वंशांस त्यां-
च्या विपत्तीच्या वेळेस, त्यांच्या अन्यायाच्या दं-
डाच्या वेळेस तरवारीच्या धारांवर घालविलें;
६ ह्मणून याकरितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
मी आपल्या जीवाची शपथ वाहतों, कीं मी तुला
वधासाठीं सिद्ध करीन, आणि वध तुझ्या पाठीस
लागेल; त्वां घाताचा द्वेष केला नाहीं, ह्मणून
निश्चयें घात तुझ्या पाठीस लागेल. ७ तर मी
सेईर पर्वताला अगदीं ओसाड करून ठेवीन,
आणि त्यापासून येत्याजात्याला नाहीं असें करीन.
८ आणि मी त्याचे पर्वत त्याच्या वधलेल्यानी
भरीन; तुझ्या डोंगरांवर व तुझ्या खोऱ्यांत व
तुझ्या सर्व नद्यांच्या पात्रांत तरवारीनें वधलेले
पडतील. ९ मी तुला सनातन ओसाड स्थानें
असें करीन, आणि तुझीं नगरें यथास्थित होणार
नाहींत; आणि तुह्मी जाणाल, कीं मी **परमेश्वर**
आहें. १० हीं दोन राष्ट्रें आणि त्या दोन भूमि
माझ्या होतील, आणि आह्मी त्यांचें वतन करूं,
असें **परमेश्वर** जरीं तेथें होता तरीं तूं ह्मणाला
आहेस; ११ ह्मणून याकरितां **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं मी आपल्या जीवाची शपथ वाहतों,
कीं तुझा जो क्रोध व तुझा जो हेवा त्वां आपल्या
द्वेषानें त्यांजवर केले आहेत, त्याप्रमाणें मी
कार्य करीन; आणि म्या तुझा न्याय केला, ह्मणजे
मी त्यांस ठाऊक होईन. १२ आणि ते ओ-
साड झाले आहेत, ते आह्माला खायाला दि-
ल्हे आहेत, असीं जीं तुझीं गर्विष्ठपणाचीं भाषणें
तूं इस्राएलाच्या पर्वतांविषयीं बोलला आहेस, तीं
सर्व म्या **परमेश्वरने** ऐकिलीं आहेत, असें तूं
जाणसील. १३ तर तुह्मी आपल्या मुखानें आ-
पलें मोठेंपण मजविरुद्ध मिरविलें आहे, आणि
तुह्मी आपलीं वचनें मजविरुद्ध वाढविलीं आहेत,
तीं म्या ऐकिलीं आहेत. १४ **प्रभु परमेश्वर**
ह्मणतो, कीं जेव्हां सर्व पृथ्वी हर्षेल, तेव्हां मी
तुला ओसाड करीन. १५ इस्राएलाच्या वंशाचें
वतन ओसाड झालें, ह्मणून त्याविषयीं जसा तूं
हर्षलास, तसेंच तुला मी करीन; हे सेईर पर्वता,
तूं ओसाड होसील, आणि सर्व अदोम ती अव-
घीच ओसाड होईल; मग ते लोक जाणतील, कीं
मी **परमेश्वर** आहें.

## अध्याय ३६.

आणि मनुष्याच्या पुत्रा, तूं इस्राएलाच्या पर्व-
तांस भविष्य बोल, आणि सांग, इस्राए-
लाच्या पर्वतानो, तुह्मी **परमेश्वराचें वचन** ऐका.
२ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं वैऱ्यानें तुह्मावि-
षयीं अहा, आणि उंचस्थानें आमचें वतन झालीं
आहेत, ह्मणून ह्मटलें आहे. ३ ह्मणून याक-
रितां तूं भविष्य बोल, आणि सांग, **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो, कीं त्यानी तुह्माला ओसाड केलें,
आणि तुह्मी राष्ट्रांच्या शेषाला वतन व्हावें, ह्मणून
त्यानी चहुंकडे तुह्मावर तोंड वासिलें, आणि तु-
मचें नाम वाचालांच्या तोंडांतून फार निघतें, आणि
तुह्मी लोकांस अपकीर्त्ति असे झालां आहां. ४
ह्मणून याकरितां इस्राएलाच्या पर्वतानो, तुह्मी
**प्रभु** जो **परमेश्वर** त्याचें वचन ऐका, पर्वतांस
व डोंगरांस, नद्यांच्या पात्रांस व खोऱ्यांस व उ-
जाड व ओसाड स्थानांस व जीं राष्ट्रें सभोंवतीं
आहेत त्यांच्या शेषाला जीं सोडलेलीं नगरें लुटी-
साठीं व उपहासासाठीं झालीं आहेत, त्यांस **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो. ५ तर **प्रभु परमेश्वर**
ह्मणतोच, कीं निश्चयें मी आपल्या आवेशाच्या
अग्नीनें राष्ट्रांच्या शेषाविषयीं आणि सर्व अदो-
माविषयीं बोललों आहें, ज्या त्यानी माझ्या देशाला
लुटीसाठीं रिकामें करावें, ह्मणून आपणासाठीं पूर्ण-
हृदयाच्या हर्षानें, मनाच्या गर्विष्ठपणें वतन असें
नेमिलें आहे. ६ याकरितां इस्राएलाच्या भूमीविषयीं
भविष्य बोल, आणि पर्वतांस व डोंगरांस, नद्यांच्या
पात्रांस व खोऱ्यांस सांग, **प्रभु परमेश्वर** ह्म-
णतो, कीं तुह्मी राष्ट्रांपासून अप्रतिष्ठा पावलां आ-
हां, ह्मणून पाहा, मी आपल्या आवेशानें व आप-
ल्या रोषानें बोललों आहें. ७ याकरितां **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं मी आपला हात उंचावून
ह्मणालों आहें, कीं तुह्माभोंवतीं जीं राष्ट्रें आहेत,
तीं निश्चयें आपली अप्रतिष्ठा पावतील.

८ परंतु इस्राएलाच्या पर्वतानो, तुह्मी आपल्या
फांद्या फुटूं द्याल, आणि माझ्या इस्राएल [illegible]

तुह्मी आपलें फल द्याल; कां तर ते येण्यास
जवळ आहेत. ९ कां कीं पाहा, मी तुह्मास
अनुकूल आहें, आणि मी आपलें मुख तुह्माकडे
करीन, मग तुह्मी राबलेले व पेरिलेले असे व्हाल.
१० आणि मी तुह्मावर मनुष्य ह्मणजे इस्राएलाचा
सर्व वंश तो सर्वच वाढूं देईन, आणि नगरें वस-
तील, आणि लोक ओसाड स्थानें बांधतील. ११
आणि मी तुह्मावर मनुष्य व पशु बहुत करीन;
आणि ते वाढतील, व फल देतील; आणि मी
तुह्माला तुमच्या पूर्वस्थितीप्रमाणें वसूं देईन, आ-
णि तुमच्या प्रथमदशांपेक्षां तुमची दशा बरी क-
रीन; मग तुह्मी जाणाल, कीं मी परमेश्वर आहें.
१२ आणि तुह्मावर मनुष्य ह्मणजे माझे इस्राएल
लोक चालूं देईन; आणि ते तुझें वतन करितील,
आणि तूं त्यांचें वतन होसील, आणि तूं पुन्हा
त्यांस कधीं बाळरहित करणार नाहींस. १३
प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं लोक तुह्माला, हे
देशा, तूं मनुष्याला खाईस, आणि आपल्या रा-
ष्ट्रांस बाळरहित करीस, असें ह्मणतात. १४
ह्मणून याकरितां तूं पुन्हा मनुष्याला खाणार ना-
हींस, आणि पुन्हा आपल्या राष्ट्रांस बाळरहित
करणार नाहींस, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
१५ आणि मी पुन्हा राष्ट्रांची अपकीर्त्ति तुजकडे
ऐकूं देणार नाहीं, आणि तुला लोकांची निंदा
पुन्हा सोसावी लागणार नाहीं, आणि तूं पुन्हा
आपल्या राष्ट्रांस बाळरहित करणार नाहींस,
असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.

१६ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ
आलें कीं, १७ मनुष्याच्या पुत्रा, जेव्हां इस्रा-
एलाचे वंश आपल्या भूमीवर वसले, तेव्हां
त्यांनी आपल्या मार्गानें व आपल्या कर्मांनी तिला
बाटविलें; त्यांचा मार्ग मजपुढें विटाळशीच्या
विटाळासारिखा होता. १८ मग त्यांनी जें रक्त
देशावर पाडिलें होतें त्यामुळें, आणि त्यांनी आ-
पल्या मूर्त्तींनी तिला बाटविलें होतें यामुळेंहि
म्यां आपला राग त्यांजवर घातला. १९ आणि
म्यां त्यांस राष्ट्रांमध्यें उडविलें, आणि ते नाना-
देशांत विखरून गेले; त्यांच्या आचाराप्रमाणें
व त्यांच्या कर्मांप्रमाणें म्यां त्यांचा न्याय केला.
२० आणि ज्या राष्ट्रांमध्यें ते गेले होते, त्यांस
वर्त्तमान पोहंचलें, मग त्यांनी हे परमेश्वराचे
लोक असून त्याच्या देशांतून निघाले आहेत, असें
त्यांविषयीं सांगून माझें पवित्र नाम अप्रति-
ष्ठित केलें.

२१ परंतु जें माझें पवित्र नाम इस्राएलाच्या
वंशांनी, जेथें ते गेले तेथें राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठित केलें
होतें, त्याविषयीं म्यां करुणा केली. २२ यामुळें
तूं इस्राएलाच्या वंशांस सांग, प्रभु परमेश्वर ह्म-
णतो, कीं इस्राएलाच्या वंशांनो, तुह्माकरितां नव्हे,
परंतु जें माझें पवित्रनाम तुह्मी जेथें तुह्मी गेलो
तेथें राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठित केलें आहे, त्याजक-
रितां मी असें करितों आहें. २३ आणि माझें
जें मोठें नाम राष्ट्रांमध्यें अप्रतिष्ठित केलें होतें,
जें तुह्मी त्यांमध्यें अप्रतिष्ठित केलें आहे, तें पवि-
त्र मानीत असें करीन, मग मी त्यांच्या समक्ष
तुह्मामध्यें पवित्र मानिलेला असा होईन, तेव्हां
राष्ट्रें जाणतील, कीं मी परमेश्वर आहें, असें
प्रभु परमेश्वर ह्मणतो. २४ तर मी तुह्माला
राष्ट्रांतून काढून घेईन, आणि सर्व देशांतून तुह्मा-
ला एकवटीन, आणि तुह्माला तुमच्या भूमीवर
आणीन. २५ आणि तुह्मावर स्वच्छ पाणी शिं-
पीन, मग तुह्मी स्वच्छ व्हाल; मी तुह्माला तु-
मच्या सर्व विटाळांपासून आणि तुमच्या सर्व
मूर्त्तींपासून निर्मल करीन. २६ आणि मी तु-
ह्माला नवें हृदय देईन, आणि नवा आत्मा तुह्मा-
मध्यें घालीन; आणि मी तुमचें दगडाचें हृदय
तुमच्या देहांतून दूर करून तुह्माला मांसाचें
हृदय देईन. २७ आणि मी आपला आत्मा
तुह्मामध्यें घालीन, आणि तुह्मी माझ्या नियमां-
प्रमाणें वर्त्तां असें करीन, मग तुह्मी माझे न्याय
पाळाल, आणि आचराल. २८ आणि जो देश
म्यां तुमच्या पूर्वजांस दिल्हा, त्यांत तुह्मी वसाल;
आणि तुह्मी माझे लोक असत जाल, आणि मी
तुमचा देव असत जाईन. २९ आणि मी तुह्माला
तुमच्या सर्व विटाळांपासून तारीन; आणि धान्य
बोलावून तें वाढवीन, आणि तुह्माला दुकाळ पडूं
देणार नाहीं. ३० आणि मी झाडाचें फळ व
शेताचा उपज बहुत करीन, मग तुह्मी पुन्हा रा-
ष्ट्रांमध्यें दुकाळाची निंदा पावणार नाहीं. ३१
आणि तुह्मी आपले दुराचार व तुमचीं जीं कर्मे

चांगलीं नव्हतीं तीं स्मराल, आणि तुह्मी आपल्या
समक्ष आपल्या अन्यायांमुळें आणि आपल्या अ-
घोरकर्मांमुळें आपणांस कंटाळाल. ३२ **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं मी तुह्माकरितां हें करितों,
असें नव्हे, ह्मणून तुह्माला कळो, इस्राएलाच्या
वंशानो, तुह्मी आपल्या आचारामुळें लज्जित व
शरमलेले व्हा. ३३ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं जेव्हां मी तुह्माला तुमच्या सर्व अन्यायांपा-
सून स्वच्छ करीन, तेव्हां तुह्माला नगरांत वस-
वीन, आणि उजाड स्थानें लोक बांधितील. ३४
**आणि** जी भूमि प्रत्येक वाटसरूच्या देखतां ओ-
साड होती, ती ओसाड झालेली भूमि स्थिति पा-
लटून राबलेली होईल. ३५ **तेव्हां** लोक ह्मण-
तील, कीं ही भूमि जी ओसाड पडलेली होती,
ती एदेनाच्या बागासारिखी झाली आहे; आणि
जीं नगरें उजाड व ओसाड व मोडलेलीं होतीं,
तीं गांवकुसवी होऊन वसलीं आहेत. ३६ **मग**
जीं राष्ट्रें तुह्माभोंवतीं उरलेलीं असतील तीं जा-
णतील, कीं म्या **परमेश्वराने** मोडलेलीं स्थानें
बांधिलीं आहेत, आणि ओसाड भूमि लाविली
आहे, मी **परमेश्वर** हें बोललों आहें, आणि हें
साधीनच साधीन. ३७ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो,
कीं म्या त्यांसाठीं हें साधावें, ह्मणून याविषयीं
इस्राएलाच्या वंशाला माझी अणखी प्रार्थना
करायाची आहे; ते कळपासारिखे मनुष्यानी
भरलेले होत असें करीन. ३८ **जसा** पवित्र
कळप, जसा यरूशालेमेच्या सभेच्या दिवसांत
तिचा कळप, तशा मनुष्यकळपानी उजाड झा-
लेलीं नगरें भरतील; मग ते जाणतील, कीं मी
**परमेश्वर** आहें.

## अध्याय ३७.

**परमेश्वराचा** हात मजवर होता, आणि त्याने
**परमेश्वराच्या** आत्म्याकडून मला बाहेर नेलें,
आणि मला खोऱ्यामध्यें ठेविलें, आणि तें हाडानी
भरिलें होतें. २ **आणि** त्याने मला त्यांजवरून
सभोंवार चालविलें; आणि पाहा, खोऱ्याच्या भू-
मीवर फार फारच होतीं, आणि पाहा, तीं फार
सुकलेलीं होतीं. ३ **आणि** त्याने मला ह्मटलें,
मनुष्याच्या पुत्रा, हीं हाडें सजीव होतील काय?
तेव्हां मी ह्मणालों, हे **प्रभू परमेश्वरा**, तूंच
जाणतोस. ४ **मग** त्याने मला ह्मटलें, तूं या
हाडांवर भविष्य बोल, आणि त्यांस सांग, सुक-
लेल्या हाडानो, तुह्मी **परमेश्वराचें** वचन ऐका.
५ **प्रभु परमेश्वर** या हाडांस ह्मणतो, कीं पाहा.
मी तुमच्याठायीं आत्मा घालीन, तेव्हां तुह्मी
सजीव व्हाल. ६ **आणि** मी तुह्माला स्नायु ला-
वीन, आणि तुह्मावर मास आणीन, आणि तुह्मा-
ला कातडीनें झांकीन, आणि तुमच्या ठायीं श्वास
घालीन, तेव्हां तुह्मी सजीव व्हाल; नंतर जाणाल.
कीं मी **परमेश्वर** आहें. ७ **तर** जसी मला
आज्ञा झाली, तसा मी भविष्य बोललों; आणि
मी भविष्य बोलत असतांना शब्द होता, आणि
पाहा, कंपन झालें; तेव्हां हाडें एकमेकासीं, ह्म-
णजे प्रत्येक हाड आपल्या हाडासीं येऊन जडलीं.
८ **आणि** म्या पाहिलें, तेव्हां पाहा, स्नायु आणि
मास त्यांजवर आलीं, आणि कातडीने त्यांस वरतीं
झांकिलें; परंतु त्यांच्या ठायीं कांहीं श्वास नव्हता.
९ **मग** त्यान मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, तूं
आत्म्याला भविष्य बोल, भविष्य बोल, आणि
आत्म्याला सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
हे आत्म्या, तूं चोहों दिशांतून ये, आणि या वध-
लेल्यांच्या ठायीं श्वास घाल, ह्मणजे हे जीवंत
होतील. १० **तर** जसें त्याने मला आज्ञापिलें,
तसें मी भविष्य बोललों, तेव्हां त्यांच्या ठायीं
श्वास आला, आणि ते जीवंत झाले, आणि
फार मोठें सैन्य असे आपल्या पायांवर उभे रा-
हिले.

११ **मग** त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा,
हीं हाडें इस्राएलाचा सर्व वंश आहेत; पाहा,
ते ह्मणतात, कीं आमचीं हाडें सुकलेलीं आहेत.
आणि आमची आशा बुडाली आहे; आह्मी
आपण नाहींसे झालों आहों. १२ **याजकरितां**
भविष्य बोल, आणि त्यांस सांग, **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो, कीं माझ्या लोकानो, पाहा, मी
तुमच्या कबरा उघडीन, आणि तुह्माला तुमच्या
कबरांतून वर चढवीन, आणि तुह्माला इस्राएला-
च्या भूमीवर आणीन. १३ **आणि** माझ्या लो-
कानो, म्या तुमच्या कबरा उघडून तुह्माला तुम-
च्या कबरांतून वर चढविलें, ह्मणजे तुह्मी जाणाल.

कीं मी **परमेश्वर** आहें. १४ **आणि** मी आ-
पला आत्मा तुमच्या ठायीं घालीन, मग तुह्मी
जीवाल, आणि मी तुह्माला तुमच्या भूमीवर
ठेवीन; तेव्हां तुह्मी जाणाल, कीं मी **परमेश्वर**
हें बोललों आहें, आणि म्या हें साधिलें आहे,
असें **परमेश्वर** ह्मणतो.

१५ **आणि परमेश्वराचें** वचन मजजवळ
आलें कीं, १६ तर मनुष्याच्या पुत्रा, तूं एक
काठी घे, आणि, यहूदासाठीं व जे इस्राएलाचे
वंश त्याचे सहाय आहेत त्यांसाठीं, असें तिज-
वर लिही; मग तूं दुसरी काठी घे, आणि, यो-
सेफासाठीं व जे इस्राएलाचे सर्व वंश त्याचे
सहाय आहेत त्यांसाठीं, एफ्राइमाची काठी, असें
तिजवर लिही. १७ **आणि** त्या एक काठी
व्हाव्या, ह्मणून त्यांस एकमेकींसीं जोड; ह्मणजे
त्या तुझ्या हातीं एक होतील.

१८ **आणि** यांत तुझें तात्पर्य काय असेल, हें
तूं आह्माला दाखविणार नाहींस काय? असें
जेव्हां तुझ्या लोकांचे वंश तुला ह्मणतील, १९
तेव्हां त्यांस सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
पाहा, योसेफाची जी काठी एफ्राइमाच्या हातीं
आहे, तिला आणि इस्राएलाचे जे वंश त्याचे
सोबती आहेत त्यांस मी घेईन, आणि त्यांस
त्यांसीं ह्मणजे यहूदाच्या काठीसीं जोडीन, आ-
णि त्यांस एक काठी करीन, तेव्हां ते माझ्या
हातीं एक होतील.

२० **आणि** ज्या काठ्यांवर तूं लिहिसील, त्या
त्यांच्या समक्ष तुझ्या हातांत असोत. २१ **आ-
णि** त्यांस सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं
पाहा, मी इस्राएलाचे वंश जेथें ते गेले आहेत,
तेथून राष्ट्रांमधून काढून घेईन, आणि त्यांस चहुं-
कडून एकवटीन, आणि त्यांस त्यांच्या भूमीवर
आणीन. २२ **आणि** मी त्यांस देशांत इस्राए-
लाच्या पर्वतांवर एक राष्ट्र करीन; आणि एकच
राजा त्या सर्वांचा राजा होईल; आणि ते पुढें
दोन राष्ट्रें असणार नाहींत, आणि ते पुन्हा दोन
राज्यें असें वेगळे होणार नाहींत. २३ **आणि**
ते पुन्हा आपल्या मूर्त्तींनीं, अथवा आपल्या कुत्सित
पदार्थांनीं, अथवा आपल्या पातकांतल्या कोण-
त्यानेहि आपणांस विटाळणार नाहींत; आणि
त्यांनीं आपल्या ज्या राहण्याच्या स्थानांत पाप केलें
आहे, त्या सर्वांतून त्यांस तारीन, आणि त्यांस
निर्मळ करीन; मग ते माझे लोक असत जातील,
आणि मी त्यांचा देव असत जाईन. २४ **आ-
णि** माझा सेवक दावीद त्यांचें राज्य करील;
आणि त्या सर्वांचा एकच पालक असत जाईल;
आणि ते माझ्या न्यायांप्रमाणें वर्त्ततील, आणि
माझ्या नियमांस पाळितील, आणि त्यांस आच-
रितील. २५ **आणि** जो देश म्या आपल्या या-
कोब सेवकाला दिल्हा, ज्यांत तुमचे पूर्वज वसले,
त्यांत ते वसतील, तेच व त्यांचीं लेंकरें व त्यां-
च्या लेंकरांचीं लेंकरें त्यांत सर्वकाळपर्यंत वस-
तील; आणि माझा सेवक दावीद सर्वकालपर्यंत
त्यांचा अधिकारी असत जाईल. २६ **आणि**
मी त्यांसीं कुशलाचा करार करीन; तो त्यांसीं
सर्वकाळचा करार होईल; आणि मी त्यांस स्था-
पीन, व त्यांस बहुत करीन, आणि मी आपलें
पवित्रस्थान त्यांमध्यें सर्वकालपर्यंत ठेवीन. २७
**आणि** माझी वस्ती त्यांसीं होईल; आणि मी
त्यांचा देव असत जाईन, आणि ते माझे लोक
असत जातील. २८ **आणि** माझें पवित्रस्थान
त्यांमध्यें सर्वकाळपर्यंत असतांना राष्ट्रें जाणतील,
कीं मी **परमेश्वर** इस्राएलास पवित्र करितों.

## अध्याय ३८.

**आ**णि **परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें
कीं, २ मनुष्याच्या पुत्रा, मेशेख आणि
तूबाल यांचा मुख्य अधिकारी जो मागोग त्या-
च्या गोग देशाकडे तूं आपलें मुख कर, आणि
त्याविषयीं भविष्य बोल; ३ **आणि** सांग, **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो, कीं अरे गोगा, मेशेख आ-
णि तूबाल यांच्या मुख्य अधिकाऱ्या, पाहा, मी
तुजविरुद्ध आहें. ४ **आणि** मी तुला पाठमोरा
करीन, आणि तुझ्या चाभाडांत आंकडे घालीन,
आणि तुला व तुझ्या सर्व सैन्याला, घोड्यांस व
स्वारांस, ते सर्वे पूर्णकवचयुक्त, उरस्त्राणयुक्त व
ढालयुक्त मोठा समुदाय असतांना ते सर्व तरवा-
रीचे निपुण असतांना बाहेर काढीन. ५ **त्यांस-**
हित पारसाला, कूशाला, आणि फूताला, ते सर्व
ढालयुक्त व शिरस्त्राणयुक्त असतांना, ६ **गोमे-**

राला आणि त्याच्या सर्व समुदायांस, उत्तरेच्या प्रदेशांतल्या तोगर्माच्या वंशाला, आणि त्याच्या सर्व समुदायांस, तुजसुद्धां बहुत लोकांस बाहेर काढीन. ७ तूं सिद्ध हो, आणि तूं आपणाला सिद्ध कर, आणि तुझे जे सर्व समुदाय तुजजवळ एकत्र मिळाले आहेत, तेहि सिद्ध होवोत, आणि तूं त्यांचा नायक हो.

८ बहुत दिवसांनंतर तूं शिक्षा पावसील; आणि जो देश तरवारीपासून परत घेतलेला, आणि बहुत लोकांपासून मिळविलेला आहे, त्यांत इस्राएलाचे जे पर्वत सर्वदा ओसाड होत असत, त्यांजवर तूं पुढल्या वर्षांत येसील, तथापि तो देश लोकांतून काढिलेला आहे, आणि ते सर्व निर्भय वसतील. ९ आणि तूं चढून वादळासारिखा येसील, तूं देशाला झांकून आभाळासारिखा होसील, तूं आणि तुझे समुदाय आणि तुजसुद्धां बहुत लोक हे तुह्मी असे व्हाल. १० **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं त्यावेळेस असें होईल, कीं तुझ्या मनांत भावना येतील, आणि तूं वाईट कल्पना कल्पिसील. ११ आणि तूं ह्मणसील, कीं मी गांवकुसांखेरीज गांव आहेत अशा देशावर चढेन; जे स्वस्थ असून निर्भय वसतात, जे सर्व कोटांवांचून आणि अडसर व दारें यांवांचून वसतात, त्यांजवर मी जाईन, १२ अशासाठीं कीं त्वां हरण हरावें, व लूट लुटावी, आणि जीं उजाड स्थानें वसलीं आहेत, त्यांजवर आणि जे लोक राष्ट्रांतून एकवटलेले आहेत, ज्यांस गुरें व धन हीं प्राप्त झालीं आहेत, जे पृथ्वीच्या नाभीवर वसतात, त्यांजवरहि त्वां आपला हात फिरवावा. १३ शबा व ददान व तार्शीशेचे व्यापारी व तिचे सर्व तरुण सिंह तुला ह्मणतील, तूं हरण हरायाला आलास काय? लूट लुटावी, रुपें व सोनें हरावें, गुरें व धन हीं हरून घ्यावीं, मोठी लूट करावी, ह्मणून त्वां आपले समुदाय एकत्र मिळविले आहेत काय?

१४ याकरितां मनुष्याच्या पुत्रा, भविष्य बोल, आणि गोगाला सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं त्यावेळेस जेव्हां माझे इस्राएल लोक निर्भय वसतील, तेव्हां तूं जाणणार नाहींस काय? १५ आणि तूं आपल्या स्थानांतून, उत्तरेच्या प्रदेशांतून येसील, तूं आणि तुजबरोबर बहुत लोक, जे सर्व घोड्यांवर बसले असतांना मोठा समुदाय व विशाल सैन्य होतील, हे तुह्मी याल. १६ आणि तूं देशाला आभाळासारिखा झांकून माझ्या इस्राएल लोकांवर येसील, हें पुढल्या दिवसांत घडेल, आणि अरे गोगा, मी तुला माझ्या देशावर आणीन, अशासाठीं कीं मी राष्ट्रांच्या समक्ष तुजकडून पवित्र मानिलेला असा होईन, तेव्हां त्यांनी मला जाणावें. १७ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं ज्याविषयीं मी आपले सेवक, जे इस्राएलाचे भविष्यवादी, त्यांकडून पुरातन दिवसांत बोलत असें, जे ते त्या दिवसांत बहुत वर्षांपर्यंत भविष्य सांगत असत, कीं मी तुला त्या लोकांवर आणणार होतों, तो तूंच आहेस काय? १८ आणि त्यासमयीं जेव्हां गोग इस्राएलाच्या भूमीवर येईल, तेव्हां माझा कोप माझ्या क्रोधासुद्धां चढेल, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. १९ तर मी आपल्या आवेशाने आणि आपल्या रागाच्या अग्नीने बोललों आहें, निश्चयें त्या दिवशीं इस्राएलाच्या भूमीवर मोठें कंपन होईल. २० तेव्हां समुद्रांतले मासे आणि आकाशांतले पक्षी आणि रानांतले पशु आणि भूमीवर सर्व वळवळणारे जंतु, आणि भूमीच्या पाठीवर जीं सर्व मनुष्यें असतील, तीं मजपुढें कांपतील, आणि पर्वत पडतील, आणि कडे गळून पडतील, आणि प्रत्येक भिंत भूमीवर कोसळेल. २१ आणि **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं मी आपल्या सर्व पर्वतांत त्याजवर तरवार बोलावीन, प्रत्येकाची तरवार आपल्या भावाविरुद्ध होईल. २२ आणि मी त्याला मरीने व रक्ताने शासीन; आणि मी त्याजवर आणि त्याच्या समुदायांवर आणि त्यासुद्धां जे बहुत लोक असतील, त्यांजवर पुराची वृष्टि आणि मोठ्या गारा, अग्नि आणि गंधक वर्षीन. २३ आणि मी आपलें मोठेपण दाखवीन, आणि आपणाला पवित्र मानवीन; आणि मी बहुत राष्ट्रांच्या समक्ष जाणिलेला असा होईन, आणि तीं जाणतील, कीं मी **परमेश्वर** आहें.

## अध्याय ३९.

आणि मनुष्याच्या पुत्रा, तूं गोगाविषयीं भविष्य बोल, आणि सांग, **प्रभु परमेश्वर**

ह्मणतो, कीं अरे गोगा, मेशेख व तूबाल यांच्या
मुख्य अधिकाऱ्या, पाहा, मी तुजविरुद्ध आहें.
२ आणि मी तुला फिरवीन, आणि मी तुला
चढवीन, आणि तूं उत्तरेच्या प्रदेशांतून वर येस
असें करीन, आणि तुला इस्राएलाच्या पर्वतांवर
आणीन. ३ आणि मी तुझें धनुष्य तुझ्या डाव्या
हातांतून झपाट्याने उडवीन, आणि तुझे बाण
तुझ्या उजव्या हातांतून पाडीन. ४ तूं इस्राए-
लाच्या पर्वतांवर पडसील, तूं व तुझे समुदाय
व जे लोक तुजबरोबर असतील हे तुह्मी पडाल;
आणि मी तुला सर्व प्रकारच्या मास खाणाऱ्या
पक्ष्यांस व रानांतल्या पशूंस खायासाठीं देईन.
५ तूं रानाच्या भूमीवर पडसील; कां कीं मी हें
बोललों आहें, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
६ आणि मागोगावर आणि जे द्वीपांत निर्भय
वसतात त्यांजवर मी अग्नि पाठवीन; तेव्हां ते जा-
णतील, कीं मी परमेश्वर आहें. ७ आणि मी
आपलें पवित्र नाम आपल्या इस्राएल लोकांमध्यें
कळवीन, आणि मी आपलें पवित्र नाम पुन्हा अप्र-
तिष्ठित करूं देणार नाहीं; आणि राष्ट्रें जाणतील,
कीं मी परमेश्वर इस्राएलाचा पवित्र आहें.

८ प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, गोष्ट
प्रत्ययास आली, आणि घडली आहे; ज्या दिव-
साविषयीं मी बोललों, तो हाच आहे. ९ आ-
णि इस्राएलाच्या नगरांतले राहणारे बाहेर
जातील, आणि कवच व ढाल व उरस्त्राणें, ध-
नुष्यें व बाण व सोटे व भाले यांस अग्नि लावि-
तील, आणि यांस ते सात वर्षांपर्यंत जाळीत
जातील. १० आणि ते लांकडें रानांतून काढून
घेणार नाहींत, आणि जंगलांतून कांहीं तोडणार
नाहींत; कारण कीं ते अग्नीने शस्त्रें जाळितील;
आणि ज्यानी त्यांचें हरण केलें, त्यांचें हरण ते
करितील; आणि ज्यानी त्यांस लुटिलें, त्यांस ते
लुटितील; असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.

११ आणि त्या वेळेस असें होईल, कीं मी
तेथें इस्राएलांत समुद्राच्या पूर्वेकडच्या वाटसरू-
चें खोरें गोगाला कबरांचें स्थान देईन; आणि
तें वाटसरूंचीं नाकें कोंडील; आणि तेथें ते गो-
गाला आणि त्याच्या सर्व समुदायाला पुरितील;
आणि त्या स्थानाला हामोन गोगाचें खोरें ह्मण-
तील. १२ आणि देश निर्मल करावा, ह्मणून
इस्राएलाचे वंश सात महिन्यांपर्यंत त्यांस पुरि-
तील. १३ आणि देशांतले सर्व लोक त्यांस
पुरितील, आणि हें त्यांस कीर्त्ति असें होईल,
माझा गौरव पावण्याचा दिवस होईल, असें प्रभु
परमेश्वर ह्मणतो. १४ आणि देश निर्मल
करावा, ह्मणून ते निरंतर उद्योगाच्या मनुष्यांस
वेगळें करून नेमितील, ज्या त्यानी वाटसरूंसं-
गतीं देशांतून जाऊन देशाच्या भूमीवर जे उरलेले
असतील, त्यांस पुरावें, ते सात महिन्यांच्या शे-
वटास शोध करूं लागतील. १५ आणि जे
वाटसरू देशांतून जातील, त्यांतला कोणी जेव्हां
मनुष्याचें हाड पाहील, तेव्हां पुरणारे तें हामोन
गोगाच्या खोऱ्यांत पुरीत तोंपर्यंत राहायासाठीं
तो त्याजवळ चिन्हाचा खांब उभारून ठेवील.
१६ आणि नगराचें नाम हामोना होईल; तसेच
ते देशाला निर्मल करितील.

१७ अणखी मनुष्याच्या पुत्रा, प्रभु परमे-
श्वर ह्मणतो, कीं तूं सर्व प्रकारच्या पक्ष्यांस आ-
णि रानांतल्या सर्व पशूंस सांग, मी आपला जो
यज्ञ, मोठा यज्ञच इस्राएलाच्या पर्वतांवर तुह्मा-
साठीं करितों, त्याजकडे तुह्मी एकवटून या;
चहुंकडुन एकत्र मिळा, ह्मणजे तुह्मी मास खाल,
आणि रक्त प्याल. १८ तुह्मी शूरांचें मास खा-
ल, आणि पृथ्वींतल्या अधिकाऱ्यांचें रक्त प्याल,
मेंढे, कोंकरें, बोकड, बैल, ते सर्व बाशानाचे पुष्ट-
पशु असतांना तुह्मी खाल. १९ आणि माझा
जो यज्ञ म्या तुह्मासाठीं केला आहे, त्यांतली च-
रबी तुह्मी तृप्तीपर्यंत खाल, आणि त्यांतलें रक्त
मस्तीपर्यंत प्याल. २० आणि माझ्या मेजावर
घोडे व रथ, शूर व सर्व लढाईचीं माणसें यानी
तुह्मी तृप्त व्हाल, असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.
२१ आणि मी आपलें गौरव राष्ट्रांमध्यें ठेवीन,
आणि माझा जो न्याय म्या केला आहे तो, आ-
णि माझा जो हात म्या त्यांस लाविला आहे
तो सर्व राष्ट्रें पाहतील. २२ आणि त्या दिवसा-
पासून पुढें इस्राएलाचे वंश जाणतील, कीं मी
परमेश्वर त्यांचा देव आहें.

२३ आणि राष्ट्रें जाणतील, कीं इस्राएलाचे
वंश आपल्या अन्यायामुळें पाडावपणाच्या प्रवा-

सांत गेले; त्यानी माझा अपराध केला, याकरि-
तां म्या आपलें मुख त्यांपासून झांकून घेतलें, आणि
म्या त्यांस त्यांच्या हातीं दिल्हें; मग ते सर्व तर-
वारीने पडले· २४ त्यांच्या अमंगळपणाप्रमाणें
आणि त्यांच्या पातकांप्रमाणें म्या त्यांचें कार्य के-
लें आहे, आणि म्या आपलें मुख त्यांपासून
झांकून घेतलें आहे· २५ याकरितां **प्रभु पर-
मेश्वर** ह्मणतो, कीं मी आतां याकोबाचे पाडाव
प्रवासी परत आणीन, आणि इस्राएलाच्या
सर्व वंशावर दया करीन, आणि मी आपल्या
पवित्र नामाविषयीं आवेशी असत जाईन· २६
तर ते आपली अप्रतिष्ठा पावले आहेत, आणि·
जेव्हां ते आपल्या भूमीवर निर्भय वसले, आणि
कोणी त्यांस भयभीत केलें नाहीं, तेव्हां त्यानी
आपल्या ज्या पातकानी माझा अपराध केला,
त्यांचें फलहि पावले आहेत· २७ म्या त्यांस
लोकांतून परत आणिलें, आणि त्यांस त्यांच्या वै-
ऱ्यांच्या देशांतून एकवटिलें, आणि बहुत राष्ट्रांच्या
समक्ष मी त्यांजकडून पवित्र मानिलेला असा
झालों ह्मणजे, २८ ते जाणतील, कीं मी **पर-
मेश्वर** त्यांचा देव आहें, म्या त्यांस राष्ट्रांमध्यें
पाडाव असें नेवविलें असतां त्यांस त्यांच्या भू-
मीवर एकत्र मिळविलें आहे, आणि मी पुढें त्यां-
तला कोणताहि तेथें सोडून ठेविणार नाहीं· २९
आणि मी पुन्हा आपलें मुख त्यांपासून झांकणार ना-
हीं; कां कीं मी आपला आत्मा इस्राएलाच्या वंशा-
वर घातला आहे, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो·

## अध्याय ४०·

आमच्या पाडावपणाच्या प्रवासाच्या पंचवि-
साव्या वर्षांत, वर्षाच्या आरंभीं, महिन्या-
च्या दाहाव्या दिवसीं, नगर घेतल्यानंतर जें
चौदावें वर्ष त्यांत, त्याच दिवसीं **परमेश्वराचा**
हात मजवर होता, आणि त्याने मला तिकडे
नेलें· २ देवाच्या दृष्टांतांत त्याने मला इस्रा-
एलाच्या देशांत आणिलें, आणि मला फार उंच
पर्वतावर ठेविलें, आणि त्याजवर दक्षिणेच्या अं-
गास नगराची रचना असी होती· ३ तर त्याने
मला तेथें आणिलें, तेव्हां पाहा, ज्याचा आभास
पित्तलाच्या आभासासारिखा होता, असा एक
मनुष्य होता; आणि त्याच्या हातांत ताग्याचें
सूत्र व मोजण्याची काठी हीं होतीं; आणि तो
दारांत उभा राहिला· ४ आणि तो मनुष्य मला
बोलला, मनुष्याच्या पुत्रा, तूं आपल्या डोळ्यांनी
पाहा, आणि आपल्या कानानी ऐक, आणि जें मी
तुला दाखवीन, त्या सर्वांकडे तूं आपलें मन लाव;
कां कीं म्या तें तुला दाखवावें, ह्मणून तुला इकडे
आणिलें आहे; जें कांहीं तूं पाहतोस, तें इस्राए-
लाच्या वंशाला प्रगट कर· ५ आणि पाहा, मं-
दिराच्या बाहेर सभोंवतीं भिंत होती, आणि
त्या मनुष्याच्या हातांत, हाताने साहा हात,
आणि एक चौंगा लांब असी मोजण्याची काठी
होती; आणि त्याने बंदिस्तीची रुंदी एक काठी
व उंची एक काठी मापिली·

६ आणि जें दार पूर्वेकडेस होतें, त्याकडे तो
आला; आणि त्याच्या पायऱ्यांवर चढला; मग
त्याने दाराचा एक उंबरा एक काठी रुंद, आणि
दुसरा उंबरा एक काठी रुंद मापिला· ७ आणि
प्रत्येक कोठडी एक काठी लांब, व एक काठी रुंद
होती; आणि दोहों कोठड्यांच्या मध्यें पांच हात
अंतराल होतें; आणि दाराचा उंबरा दाराच्या
देवडीजवळून आंतून एक काठी होता· ८ आणि
त्याने दाराची देवडी आंतून एक काठी मापिली·
९ मग त्याने दाराची देवडी आठ हात मापिली,
आणि त्याचे खांब दोन हात मापिले, आणि दा-
राची देवडी आंतून होती· १० आणि पूर्वेकड-
च्या दाराच्या कोठड्या एका अंगास तीन, व
दुसऱ्या अंगास तीन होत्या; त्या तिहींचें एकच
परिमाण होतें; आणि एका अंगास व दुसऱ्या
अंगास खांबांचें एकच परिमाण होतें· ११ आ-
णि त्याने दाराच्या प्रवेशाची रुंदी दाहा हात,
आणि दाराची लांबी तेरा हात मापिली· १२
आणि कोठड्यांसमोर एका अंगास एक हात
अवकाश होता, आणि दुसऱ्या अंगास एक हात
अवकाश होता; आणि कोठड्या एका अंगास
साहा हात, आणि दुसऱ्या अंगास साहा हात
होत्या· १३ मग त्याने दार एका कोठडीच्या
छप्परापासून दुसऱ्या कोठडीच्या छप्परापर्यंत
पंचवीस हात रुंद मापिलें, व समोर वेस होती·
१४ आणि त्याने अंगणाच्या खांबापर्यंत, दारास-

भोंवते साठ हात खांब केले. १५ आणि प्रवे-
शाच्या दारासमोरून आंतल्या दाराच्या देवडी-
च्या मुखापर्यंत पन्नास हात होते. १६ आणि
कोठड्यांस व त्यांच्या खांबांस दाराच्या आंत
सभोंवार, आणि देवड्यांसहि जाळीदार खिडक्या
होत्या; आणि आंतल्याकडे सभोंवार खिडक्या
होत्या; आणि प्रत्येक खांबावर खजुरी झाडांचे
आकार होते. १७ मग त्याने मला बाहेरच्या
अंगणांत आणिलें, आणि पाहा, अंगणाला सभों-
वार कोठड्या केलेल्या होत्या, आणि चिरेबंदीहि
केलेली होती; चिरेबंदीवर तीस कोठड्या होत्या.
१८ दाराच्या दोहों अंगांस दारांच्या लांबीसुद्धां
जी चिरेबंदी होती, ती खालची चिरेबंदी होती.
१९ मग त्याने खालच्या दाराच्या मुखापासून
आंतल्या अंगणाच्या मुखापर्यंत बाहेरून शंभर
हात रुंदी पूर्वेकडे आणि उत्तरेकडे मापिली.

२० आणि बाहेरच्या अंगणाचें जें दार उत्त-
रेकडे होतें, त्याची लांबी व त्याची रुंदी त्याने
मापिली. २१ आणि त्याच्या कोठड्या एका
अंगास तीन, आणि दुसऱ्या अंगास तीन होत्या;
आणि त्याचे खांब व त्याच्या देवड्या पहिल्या
दाराच्या परिमाणाप्रमाणें होतीं; त्याची लांबी
पन्नास हात, व त्याची रुंदी पंचवीस हात होती.
२२ आणि जें दार पूर्वेकडेस होतें, त्याच्या परि-
माणाप्रमाणें त्यांच्या खिडक्या, आणि त्यांच्या
देवड्या, आणि त्यांचे खजूरी झाडांचे आकार
होते, आणि सात पायऱ्यांनी लोक त्यांत चढून
जात असत; आणि त्याच्या देवड्या त्यांसमोर
होत्या. २३ आणि आंतल्या अंगणाचें दार
उत्तरेकडे व पूर्वेकडे दारासमोर होतें; आणि
त्याने एका दारापासून दुसऱ्या दारापर्यंत शंभर
हात मापिले.

२४ मग त्याने मला दक्षिणेकडेस नेलें, आणि
पाहा, दक्षिणेकडेस एक दार होतें; आणि त्याने
त्याचे खांब आणि त्याच्या देवड्या याच परिमा-
णांप्रमाणें मापिलीं. २५ आणि त्याला व त्या-
च्या देवड्यांस सभोंवार याच खिडक्यांसारिख्या
खिडक्या होत्या; लांबी पन्नास हात, व रुंदी
पंचवीस हात होती. २६ आणि त्यावर चढाया-
साठीं सात पायऱ्या होत्या, आणि त्याच्या देव-
ड्या त्यांसमोर होत्या; आणि त्याला त्याच्या
खांबांवर खजूरी झाडांचे आकार होते, एका अं-
गास एक, आणि दुसऱ्या अंगास एक होता.
२७ आणि आंतल्या अंगणाला दक्षिणेकडेस एक
दार होतें; आणि त्याने दारापासून दारापर्यंत
दक्षिणेकडेस शंभर हात मापिले. २८ मग त्याने
मला दक्षिणेकडच्या दारांतून आंतल्या अंगणांत
आणिलें; आणि त्याने दक्षिणेकडचें दार या
परिमाणांप्रमाणें मापिलें. २९ आणि त्याच्या
कोठड्या व त्याचे खांब व त्याच्या देवड्या यांस
या परिमाणांप्रमाणें त्याने मापिलें; आणि त्याला
व त्याच्या देवड्यांस सभोंवार खिडक्या होत्या;
लांब पन्नास हात, आणि रुंदी पंचवीस हात हो-
ती. ३० आणि सभोंवतीं देवड्या पंचवीस हात
लांब, आणि पांच हात रुंद होत्या. ३१ आणि
त्याच्या देवड्या बाहेरच्या अंगणाकडे होत्या,
आणि त्याच्या खांबांवर खजूरी झाडांचे आकार
होते, आणि त्याच्या चढणीस आठ पायऱ्या
होत्या.

३२ नंतर त्याने मला आंतल्या अंगणांत पूर्वे-
कडेस आणिलें; आणि त्याने दार या परिमाणां-
प्रमाणें मापिलें. ३३ आणि त्याच्या कोठड्या व
त्याचे खांब आणि त्याच्या देवड्या या परिमाणां-
प्रमाणें होत्या; आणि त्याला व त्याच्या देव-
ड्यांस सभोंवार खिडक्या होत्या; लांबी पन्नास
हात, आणि रुंदी पंचवीस हात होती. ३४
आणि त्याच्या देवड्या बाहेरच्या अंगणाकडे
होत्या; आणि त्याच्या खांबांवर एका अंगास, व
दुसऱ्या अंगास खजूरी झाडांचे आकार होते;
आणि त्याच्या चढणीस आठ पायऱ्या होत्या.

३५ आणि त्याने मला उत्तरेकडच्या दाराक-
डे आणिलें, आणि त्याने तें या परिमाणांप्रमाणें
मापिलें. ३६ त्याच्या कोठड्या, त्याचे खांब,
व त्याच्या देवड्या यांस त्याने मापिलें; आणि
त्याला सभोंवार खिडक्या होत्या; लांबी पन्नास
हात, आणि रुंदी पंचवीस हात होती. ३७
आणि त्याचे खांब बाहेरच्या अंगणाकडे होते;
आणि त्याच्या खांबांवर एका अंगास आणि दु-
सऱ्या अंगास खजूरी झाडांचे आकार होते;
आणि त्याच्या चढणीस आठ पायऱ्या होत्या.

३८ आणि कोठड्या आपल्या प्रवेशांसुद्धां दारां-
च्या खांबांपासीं होत्या, तेथें लोक होमबलि
धूत असत.
३९ आणि दाराच्या देवड्यांत एका अंगास
दोन मेजें, आणि दुसऱ्या अंगास दोन मेजें होतीं,
अशासाठीं कीं त्यांजवर होमबलि आणि पातकबलि
आणि अपराध बली वधावे. ४० आणि बाहेरच्या
अंगास, उत्तरेकडचे दाराच्या प्रवेशास चढण्या-
च्या वाटेवर दोन मेजें होतीं, आणि जें दुसरें अंग
दाराच्या देवडीकडे होतें, त्यासहि दोन मेजें हो-
तीं. ४१ दाराच्या बाजूस एका अंगास चार मेजें,
आणि दुसऱ्या अंगास चार मेजें होतीं; असीं
आठ मेजें होतीं, त्यांजवर लोक बलि वधीत
असत. ४२ आणि होमबलीसाठीं तासींव दग-
डाचीं चार मेजें दीड हात लांब, आणि दीड
हात रुंद, आणि एक हात उंच होतीं; ज्या
शस्त्रांनीं लोक होमबलि व यज्ञबलि वधीत असत,
तीं ते त्या मेजांवर ठेवीत असत. ४३ आणि
आंत सभोंवार एक चौंगा रुंद कडीं बसविलेलीं
होतीं, आणि मेजांवर अर्पणाचें मास असे.
४४ आणि आंतल्या दाराच्या बाहेर जें आंत-
लें अंगण उत्तरेकडच्या दाराच्या बाजूस होतें,
त्यांत गाणाऱ्यांच्या कोठड्या होत्या; आणि त्या
दक्षिणेकडेस होत्या; एक पूर्वेकडच्या दाराच्या
बाजूस होती, ती उत्तरेकडेस होती. ४५ आणि
तो मला बोलला, दक्षिणेकडेस जी कोठडी आहे,
ती जे याजक मंदिराचें रक्षण करितात त्यांसाठीं
आहे. ४६ आणि उत्तरेकडेस जी कोठडी आहे,
ती जे याजक वेदीचें रक्षण करितात त्यांसाठीं
आहे; ते सादोकाचे वंश आहेत, जे ते लेवी-
च्या वंशांतून परमेश्वराजवळ त्याची सेवा करा-
याला येतात. ४७ आणि त्याने अंगण शंभर
हात लांब, व शंभर हात रुंद चौरस मापिलें;
आणि वेदी मंदिरासमोर होती.
४८ मग त्याने मला मंदिराच्या देवडीकडे
आणिलें, तेव्हां त्याने देवडीचा प्रत्येक खांब एका
अंगास पांच हात, आणि दुसऱ्या अंगास पांच
हात मापिला; आणि दाराची रुंदी एका अंगास
तीन हात, आणि दुसऱ्या अंगास तीन हात हो-
ती. ४९ देवडीची लांबी वीस हात, आणि
रुंदी अकरा हात होती; आणि ज्या पायऱ्यांनी
लोक त्यावर चढत असत, त्यांकडून त्याने मला
नेलें; आणि दाराच्या खांबांपासीं खांब एका
अंगास एक, आणि दुसऱ्या अंगास एक होते.

## अध्याय ४१.

आणि त्याने मला मंदिराकडे आणिलें, तेव्हां
त्याने खांब एका अंगास साहा हात रुंद,
आणि दुसऱ्या अंगास साहा हात रुंद डेऱ्याच्या
रुंदीप्रमाणें मापिले. २ आणि प्रवेशाची रुंदी
दाहा हात होती; आणि प्रवेशाच्या बाजू एका
अंगास पांच हात, आणि दुसऱ्या अंगास पांच
हात होत्या; आणि त्याने त्याची लांबी चाळीस
हात, आणि रुंदी वीस हात मापिली. ३ मग
त्याने आंत जाऊन प्रवेशाचा खांब दोन हात मा-
पिला, आणि प्रवेश साहा हात मापिला, आणि
प्रवेशाची रुंदी सात हात मापिली. ४ नंतर
त्याने त्याची लांबी वीस हात, आणि रुंदी वीस
हात मंदिरासमोर मापिली; तेव्हां त्याने मला
ह्मटलें, हें परमपवित्र स्थान आहे. ५ आणि
त्याने मंदिराची भिंत साहा हात मापिली; आ-
णि बाजूकडच्या प्रत्येक कोठडीची रुंदी चार हात
मंदिरासभोंवतीं चहुंकडे मापिली. ६ आणि
बाजूकडच्या कोठड्या एकीवर एक तीन, आणि
अनुक्रमाने तीस होत्या; आणि मंदिराची जी
भिंत बाजूकडच्या कोठड्यांसाठीं सभोंवार होती,
तींत त्या शिरल्या होत्या, अशासाठीं कीं त्या
जडून राहाव्या, परंतु मंदिराच्या भिंतीसीं त्या
जडल्या नव्हत्या. ७ आणि बाजूकडच्या कोठ-
ड्यांस वरच्याकडे उत्तरोत्तर विस्तीर्णता आणि
परिवृति होती; कां कीं मंदिराची परिवृति मंदि-
रासभोंवतीं उत्तरोत्तर वरचेकडे होती; याकारितां
मंदिराची रुंदी वरचेकडे वाढली, ह्मणजे तें
मध्याकडून खालच्या कोठडीपासून वरच्या कोठ-
डीपर्यंत चढली. ८ आणि म्या मंदिराची उंची
सभोंवार पाहिली; बाजूकडच्या कोठड्यांचे पाये
साहा हात लांब काठीभर होते. ९ जी भिंत
बाजूकडच्या कोठडीला बाहेरल्याकडे होती,
तिची रुंदी पांच हात होती; आणि जी राखून
ठेविलेली, ती बाजूकडच्या ज्या कोठड्या आंत-

त्याकडे होत्या त्यांचें स्थल होतीं. १० आणि
मंदिराभोंवतीं सभोंवार कोठड्यांच्यामध्यें वीस हात
व्यास होता. ११ आणि बाजूकडच्या कोठडीचा
प्रवेश राखून ठेविलेल्या अवकाशांत होता, एक
प्रवेश उत्तरेकडेस, आणि दुसरा प्रवेश दक्षिणे-
कडेस होता; आणि राखून ठेविलेल्या स्थलाची
रुंदी पांच हात सभोंवार होती. १२ आणि जी
बंदिस्त वेगळें केलेल्या स्थलासमोर पश्चिमेकडच्या
शेवटास होती, ती सत्तर हात रुंद होती; आणि
बंदिस्तीची भिंत पांच हात रुंद सभोंवार होती,
आणि तिची लांबी नव्वद हात होती. १३
आणि त्याने मंदिर शंभर हात लांब मापिलें;
आणि वेगळें केलेलें स्थल आणि बंदिस्त व ति-
च्या भिंती हींहि शंभर हात लांब मापिलीं. १४
आणि त्याने मंदिराच्या मुखाची आणि पूर्वेकड-
च्या वेगळें केलेल्या स्थलाची रुंदी शंभर हात
मापिली. १५ आणि त्याने बंदिस्तीची लांबी,
तिच्यामागें जें वेगळें केलेलें स्थल होतें, त्यास-
मोर मापिली; आणि तिचे वरंडे एका अंगास,
व दुसऱ्या अंगास शंभर हात मापिले; आणि
आंतलें मंदिर आणि अंगणाच्या देवड्या हींहि
मापिलीं. १६ उंबरे व जाळीदार खिडक्या व
वरंडे हीं त्यांच्या तिहीं माड्यांवर सभोंवार मापिलीं,
ते वरंडे उंबऱ्यासमोर असतांना सभोंवार आणि
भूमीपासून खिडक्यांपर्यंत फळ्यानी झांकलेले होते,
आणि खिडक्याहि झांकलेल्या होत्या. १७
जी प्रवेशावरती होती, तिजपर्यंत आणि आंतल्या
मंदिरापर्यंत, आणि बाहेरल्याकडे आणि सर्व भिं-
तीवर सभोंवार आंत व बाहेर त्याने परिमाणानी
मापिलें. १८ आणि मंदिर, खरूब व खजूरी
झाडांचे आकार यानी केलेलें होतें, आणि दोहों
खरूबांमध्यें खजुरी झाडाचा आकार होता;
आणि प्रत्येक खरूबाला दोन मुखें होतीं. १९
तर एका अंगास मनुष्याचें मुख खजूरी झा-
डाच्या आकाराकडे होतें, आणि दुसऱ्या अंगास
तरण्या सिंहाचें मुख खजूरी झाडाच्या आका-
राकडे होतें; सर्व मंदिरांतून सभोंवार असा प-
रिष्कार केलेला होता. २० भूमीपासून प्रवेशाव-
रच्या प्रदेशापर्यंत खरूब आणि खजूरीझाडांचे
आकार केलेले होते, आणि मंदिराची भिंत यानी
केलेली होती. २१ मंदिराच्या दाराचे खांब
चौरस होते, आणि पवित्र स्थानाचें मुख चौरस
होतें; जसा एकाचा आकार तसा दुसऱ्याचा आ-
कार होता. २२ लांकडाची वेदी तीन हात उंच
होती, आणि तिची लांबी दोन हात होती; आणि
तिचे कोंपरे, व तिची लांबी, व तिच्या भिंती हीं
लांकडाचीं होतीं; आणि तो मला बोलला, कीं
जें मेज परमेश्वरासमोर असतें, तें हेंच आहे.
२३ आणि मंदिराला व पवित्र स्थानाला दोन क-
वाडें होतीं. २४ आणि प्रत्येक कवाडाला दोन
झडपें, दोन फिरतीं झडपें होतीं; एका कवाडाला
दोन झडपें, आणि दुसऱ्या कवाडाला दोन झडपें
होतीं. २५ आणि जसे भिंतीवर केलेले होते,
तसे त्यांजवर मंदिराच्या झडपांवर खरूब आणि
खजूरीझाडांचे आकार केलेले होते; आणि दे-
वडीसमोर बाहेर जाड लांकडी खांब होते. २६
आणि देवडीच्या बाजूंकडे एका अंगास, व दु-
सऱ्या अंगास जाळीदार खिडक्या आणि खजूरी
झाडांचे आकार हीं होतीं, आणि मंदिराच्या
बाजूकडच्या कोठड्या आणि जाड खांब हीं होतीं.

## अध्याय ४२.

मग त्याने मला उत्तरेकडच्या वाटेने बाहेरच्या
अंगणांत बाहेर आणिलें; आणि जी कोठ-
डी वेगळें केलेल्या स्थलासमोर, आणि जी बंदि-
स्तीसमोर उत्तरेकडेस होती, तींत त्याने मला
आणिलें. २ शंभर हात लांबीसमोर उत्तरेकडचा
प्रवेश होता, आणि रुंदी पन्नास हात होती. ३
जो वीस हात आंतल्या अंगणाला होते त्यांसमोर,
आणि जी चिरेबंदी बाहेरच्या अंगणाला होती
तिजसमोर वरंड्यासमोर वरंडा तिहीं माड्यानी
होता. ४ आणि कोठड्यांसमोर फिरण्याचें स्थान
दाहा हात रुंद आंतल्याकडे होतें, वाट एक हात
होती; आणि त्यांचे प्रवेश उत्तरेकडेस होते.
५ आणि वरच्या कोठड्या तोकड्या होत्या; का
कीं यांपेक्षां, बंदिस्तीच्या खालच्यांपेक्षां, आणि म-
ध्यमांपेक्षां वरंडे उणे होते. ६ कां कीं त्या तिहीं
माड्यानी होत्या, आणि त्यांस अंगणाच्या खांबां-
सारिखे खांब नव्हते; याकारितां बंदिस्त खाल-
च्यांपेक्षां आणि मध्यमांपेक्षां भूमीपासून आंखुड-

लेली होती. ७ आणि जें कुंसूं बाहेरल्याकडे
कोठड्यांसमोर, बाहेरच्या अंगणाकडे, कोठड्यां-
पुढें होतें, त्याची लांबी पन्नास हात होती. ८
कां कीं ज्या कोठड्या बाहेरच्या अंगणाला होत्या,
त्यांची लांबी पन्नास हात होती; आणि पाहा,
मंदिरासमोर शंभर हात होते. ९ आणि या
कोठड्यांच्या खालतून पूर्वेकडचा प्रवेश होता,
ज्या त्यांतून कोणी बाहेरच्या अंगणांतून त्या को-
ठड्यांत जातो. १० अंगणाच्या कुंसाच्या रुंदींत
पूर्वेकडेस, वेगळें केलेल्या स्थलासमोर आणि बंदि-
स्तीसमोर कोठड्या होत्या. ११ आणि त्यांपु-
ढची वाट, ज्या कोठड्या उत्तरेकडेस होत्या,
त्यांच्या आकाराप्रमाणें होती, त्यांच्या लांबीप्र-
माणें, आणि त्यांच्या रुंदीप्रमाणेंहि होती; आणि
त्यांची सर्व निषण्याचीं ठिकाणें त्यांच्या बेतांप्रमा-
णें, आणि त्यांच्या प्रवेशांप्रमाणेंहि होतीं. १२
आणि ज्या कोठड्या दक्षिणेकडेस होत्या, त्यां-
च्या प्रवेशांसारिखा वाटेच्या तोंडास एक प्रवेश
होता, जेथें दक्षिणेकडून कोणी त्यांत शिरतो, तेथें
कुंसाच्या समोरासमोर ती वाट होती.

१३ आणि त्याने मला ह्मटलें, उत्तरेकडच्या
कोठड्या आणि दक्षिणेकडच्या कोठड्या, ज्या
वेगळें केलेल्या स्थलासमोर आहेत, त्या पवित्र
कोठड्या आहेत; ज्या त्यांत जे याजक परमे-
श्वराजवळ येतात, ते परमपवित्र पदार्थ खातील;
तेथें ते परमपवित्र पदार्थ आणि अन्नार्पण आणि
पापाविषयींचें अर्पण व अपराधाविषयींचें अर्पण
ठेवितील; कां कीं तें स्थान पवित्र आहे. १४
जेव्हां याजक त्यांत शिरतील, तेव्हां त्यांनी पवित्र
स्थानांतून बाहेरच्या अंगणांत जाऊं नये, परंतु
ज्या वस्त्रांनी ते सेवा करीत असतात, तीं आप-
लीं वस्त्रें त्यांनी तेथें ठेवावीं; कां कीं तीं पवित्र
आहेत; मग ते इतरवस्त्रें लेऊन घेतील, आणि
जें कांहीं लोकांसाठीं असेल त्याजजवळ जातील.

१५ जेव्हां त्याने आतल्या मंदिराचीं परि-
माणें समाप्त केलीं होतीं, तेव्हां जें दार पूर्वेकडेस
आहे त्याकडे त्याने मला बाहेर आणिलें, आ-
णि त्याने तें सभोंवार मापिलें. १६ त्याने पूर्वेक-
डेस मोजण्याच्या काठीने पांचशें काठ्या मो-
जण्याच्या काठीने सभोंवार मापिल्या. १७ त्याने
उत्तरेकडेस पांचशें काठ्या मोजण्याच्या काठीने
सभोंवार मापिल्या. १८ त्याने दक्षिणेकडेस पां-
चशें काठ्या मोजण्याच्या काठीने मापिल्या. १९
मग त्याने पश्चिमेकडेस फिरून पांचशें काठ्या
मोजण्याच्या काठीने मापिल्या. २० त्याने तें
चोहों दिशांकडे मापिलें; त्याला सभोंवार पां-
चशें काठ्या लांब, आणि पांचशें काठ्या रुंद
कुंसूं होतें; अशासाठीं कीं त्याने पवित्र स्थान व
सामान्य स्थान यांमध्यें वियोग करावा.

## अध्याय ४३.

मग जें दार पूर्वेकडे होतें, त्या दाराकडे त्याने
मला नेलें. २ तेव्हां पाहा, इस्राएलाच्या
देवाचें गौरव पूर्वेकडून आलें; आणि त्याचा
शब्द बहुत पाण्यांच्या शब्दासारिखा होता, आणि
त्याच्या गौरवाने पृथ्वी प्रकाशित झाली. ३ आ-
णि जो दृष्टांत म्यां पाहिला, ह्मणजे जेव्हां मी
नगर नाशायाला आलों, तेव्हां जो दृष्टांत म्यां
पाहिला, त्याच्या अभासासारिखें तें होतें; आणि
जो दृष्टांत म्यां खबार नदीजवळ पाहिला, त्या-
सारिखे दृष्टांत होते; तेव्हां मी उपडा पडलों. ४
आणि जें दार पूर्वेकडे होतें, त्याकडून परमेश्व-
राचें गौरव मंदिरांत आलें. ५ मग आत्म्याने
मला उचलून घेतलें, आणि मला आतल्या अंग-
णांत आणिलें; आणि पाहा, परमेश्वराच्या गौ-
रवाने मंदिर भरिलें. ६ आणि म्यां त्याला मंदि-
रांतून मला बोलतां ऐकिलें; आणि तो मनुष्य
मजजवळ उभा राहिला होता.

७ आणि त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या
पुत्रा, माझ्या सिंहासनाच्या स्थानाला आणि मा-
झ्या तळपायांच्या स्थानाला, ज्या त्यांत मी इस्राए-
लाच्या वंशामध्यें सर्वकालपर्यंत वस्ती करीन, आ-
णि माझ्या पवित्रनामाला इस्राएलाचे जे वंश, ते
अथवा त्यांचे राजे आपल्या व्यभिचारेंकरून
अथवा आपल्या राजांच्या मढ्यांकडून आपल्या
उंचस्थानांत पुन्हा अप्रतिष्ठित करणार नाहींत.
८ यांनी माझ्या उंबऱ्याजवळ आपला उंबरा, आ-
णि माझ्या खांबाजवळ आपला खांब, आणि
माझ्या आणि त्यांच्यामध्यें भिंत स्थापून घीं अ-
घोर कर्मे त्यांनी केलीं आहेत, त्याकडून त्यांनी

पवित्र नाम अप्रतिष्ठित केलें आहे; ह्मणून म्या
आपल्या क्रोधानें त्यांस नाहींसें केलें आहे. ९
आतां त्यानी आपला व्यभिचार आणि आपल्या
राजांचीं मढीं मजपासून दूर करावीं, ह्मणजे मी
यांमध्यें सर्वकालपर्यंत वसेन.
१० मनुष्याच्या पुत्रा, तूं इस्राएलाच्या वंशा-
ला मंदिर दाखीव, ह्मणजे ते आपल्या अन्यायां-
मुळें लज्जित होतील; आणि त्यानी बेत मापा-
वा. ११ आणि जें सर्व त्यानी केलें आहे, त्या-
मुळें जर ते लज्जित होतील, तर त्यांस मंदि-
राचें रूप, व त्याची रचना, व त्याचीं निघण्या-
चीं ठिकाणें, व त्याचे प्रवेश, व त्याचे सर्व आकार,
व त्याचे सर्व नियम, व त्याचे सर्व प्रकार, व
त्याचे सर्व नेम दाखीव; आणि त्यांच्या समक्ष
लिह, आणि त्यानी त्याचा सर्व आकार, व त्याचे
सर्व नियम पाळावे, आणि ते आचरावे. १२
हा मंदिराचा नेम आहे, पर्वताच्या माथ्यावर
त्याचा सर्व प्रांत सभोंवार परमपवित्र होईल;
पाहा, मंदिराचा नेम हाच आहे.
१३ आणि वेदीचीं परिमाणें हाताप्रमाणें हींच
आहेत; हात हात आणि चौंगा आहे; आणि
तिचें घर एक हात होईल, आणि रुंदी एक हात,
आणि तिची कड तिच्या कांठापाशीं सभोंवती एक
वीत होईल; आणि हा वेदीचा उंच प्रदेश हो-
ईल. १४ आणि भूमीकडच्या तळापासून खा-
लच्या पर्याधारापर्यंत दोन हात होतील, आणि
रुंदी एक हात होईल, आणि धाकल्या पर्याधारा-
पासून मोठ्या पर्याधारापर्यंत चार हात होतील,
आणि रुंदी एक हात होईल. १५ आणि वेदी
चार हात होईल; आणि वेदीपासून वरचेकडे
चार शिंगें होतील. १६ आणि वेदी बारा हात
लांब, आणि बारा हात रुंद होईल, तें आपल्या
चोहों चौकटींत चौरस होईल. १७ आणि
पर्याधार आपल्या चोहों चौकटींत चौदा हात
लांब, आणि चौदा हात रुंद होईल; आणि
त्याजसभोंवती कड अर्धा हात होईल; आणि
त्याचा तळ सभोंवता एक हात होईल; आणि
वेदीच्या पायऱ्या पूर्वेकडे होतील.
१८ आणि त्यानें मला ह्मटलें, मनुष्याच्या
पुत्रा, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं जेव्हां वेदी
तिजवर होम करावे, आणि तिजवर रक्त शिंपावें,
ह्मणून करितील, तेव्हां नियम हेच होतील.
१९ आणि **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं जे याजक
लेवी जादोकाच्या संततीचे माझी सेवा कराया-
ला मजजवळ येत असतात, त्यांस तूं एक तरुण
बैल पापाचें अर्पण असा देसील. २० आणि
तूं त्याच्या रक्तांतलें कांहींसें घेऊन वेदीच्या चो-
हों शिंगांवर, व पर्याधाराच्या चोहों कोंपऱ्यांवर,
व कडेवर सभोंवतीं घालिसील; तसाच तूं तिला
पावन व शुद्ध करिसील. २१ आणि तूं पापाचें
अर्पण असा तरुण बैल घेसील, आणि कोणी
त्याला मंदिराच्या नेमिलेल्या स्थलांत पवित्रस्था-
नाच्या बाहेर जाळील. २२ आणि दुसऱ्या दि-
वसीं तूं शेरडांतील निर्दोष बकरूं पापाचें अर्पण
असें अर्पिसील; आणि याजक वेदीला पावन
करितील, जसें त्यानी तरुण बैलेंकरून तिला पा-
वन केलें तसें. २३ त्वां पावन करणें समाप्त केलें,
ह्मणजे तूं एक निर्दोष तरुण बैल, व कळपांतून
एक निर्दोष मेंढा अर्पिसील. २४ आणि तूं ते **पर-
मेश्वरा**समोर अर्पिसील, आणि याजक त्यांजवर
मीठ टाकितील, आणि त्यांस **परमेश्वरा**जवळ
होम असे अर्पितील. २५ सात दिवसपर्यंत
प्रतिदिवसीं तूं एक बोकड पापाच्या अर्पणासाठीं
सिद्ध करिसील; आणि याजक एक तरुण बैल
व कळपांतून एक मेंढा असे दोन्ही निर्दोष सिद्ध
करितील. २६ सात दिवसपर्यंत ते वेदीला पा-
वन करितील, आणि तिला शुद्ध करितील; आ-
णि ते आपणांस संस्कार करितील. २७ आणि
त्यानी ते दिवस समाप्त केल्यावर असें होईल, कीं
आठव्या दिवसीं आणि पुढें याजक तुमचे होम
व तुमचीं कुशलाचीं अर्पणें वेदीवर अर्पितील;
आणि मी तुह्माला प्रसन्न होईन, असें **प्रभु
परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ४४.

मग बाहेरील पवित्रस्थानाचें जें दार पूर्वेकडेस
आहे, त्याच्या वाटेकडून त्यानें मला परत
आणिलें, आणि तें बंद केलेलें होतें. २ तेव्हां
**परमेश्वरानें** मला ह्मटलें, हें दार बंद केलेलें
राहील, उघडणार नाहींत, आणि यांतून कोणी

आंत जाणार नाहीं; कारण कीं **परमेश्वर** इस्राएलाचा देव यांतून आंत गेला आहे, ह्मणून हें बंद केलेलें राहील. २ हें अधिकाऱ्यासाठीं आहे, जो अधिकारी तोच यांत **परमेश्वरासमोर** भाकर खायाला बसेल; या दाराच्या देवडीच्या वाटेकडून तो आंत जाईल, आणि याच्या वाटेकडून बाहेर जाईल.

४ मग त्यानें मला उत्तरेकडच्या दाराकडून मंदिरासमोर आणिलें; तेव्हां म्या पाहिलें, आणि पाहा, **परमेश्वराच्या** गौरवानें **परमेश्वराचें** मंदिर भरिलें; मग मी उपडा पडलों. ५ आणि **परमेश्वरानें** मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, तूं आपलें मन लाव, आणि **परमेश्वराच्या** मंदिराच्या सर्व नियमांविषयीं व त्याच्या सर्व विधींविषयीं जें कांहीं मी तुला बोलणार आहें, तें तूं आपल्या डोळ्यांनी पाहा, आणि आपल्या कानांनी ऐक; आणि तूं मंदिराच्या प्रवेशाकडे, व पवित्रस्थानाच्या सर्व निघण्याच्या ठिकाणांकडे आपलें लक्ष्य लाव. ६ आणि तूं फितूऱ्यांस, इस्राएलाच्या वंशांस सांग, **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं इस्राएलाच्या वंशांनो, तुह्माला तुमच्या सर्व अघोर कर्मांतलीं पुष्कळ झालीं आहेत. ७ कां कीं तुह्मी माझी भाकर, चरबी, आणि रक्त अर्पीत असतांना असुंती हृदय व असुंती देह जे विदेशी यांस माझ्या पवित्रस्थानांत राहायाला तें माझें मंदिर बाटवायाला आणिलें आहे, आणि तुमच्या सर्व अघोर कर्मांमुळें त्यांनी माझा करार मोडिला आहे. ८ आणि तुह्मी माझ्या पवित्रपदार्थांचें रक्षण केलें नाहीं; परंतु तुह्मी आपणांसाठीं माझ्या पवित्रस्थानांत माझ्या रक्षणाचे कर्त्ते ठेविले आहेत.

९ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं इस्राएलाच्या वंशामध्यें जो कोणी विदेशी असेल, त्याकडचा कोणताहि असुंती हृदय अथवा असुंती देह विदेशी माझ्या पवित्रस्थानांत शिरणार नाहीं. १० आणि जे इस्राएल मजपासून बहकून आपल्या मूर्त्तींकडे गेले, ते जेव्हां बहकले, तेव्हां जे लेवी मजपासून दूर गेले, ते आपल्या अन्यायाचें फल पावतील. ११ तथापि ते मंदिराच्या दारांजवळ रक्षण करितांना, आणि मंदिराची सेवा करितांना माझ्या पवित्रस्थानांत सेवक होतील; तेच लोकांसाठीं होमबलि व सामान्यबलि वधितील, आणि ते त्यांपुढें त्यांसाठीं सेवा करायाला उभे राहतील. १२ त्यांनी त्यांच्या मूर्त्तींसमोर त्यांसाठीं सेवा केली, आणि ते इस्राएलाच्या वंशाला अन्यायांत पडण्याचें कारण झाले, ह्मणून याकरितां म्या आपला हात त्यांजवर उंचाविला आहे, आणि ते आपल्या अन्यायाचें फल पावतील, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. १३ आणि मजकडे याजकपण करायाला, अथवा पवित्र स्थानांत माझ्या पवित्र पदार्थांस समीप व्हायाला. ते मजजवळ येणार नाहींत; परंतु ते आपली अप्रतिष्ठा, आणि जीं अघोर कर्मे त्यांनी केलीं आहेत, त्यांचें फलहि पावतील. १४ आणि मी त्यांस मंदिराच्या रक्षणाचे कर्त्ते त्याच्या सर्व सेवेसाठीं, आणि त्यांत जें कांहीं काम करायाचें त्यासाठीं करीन.

१५ परंतु जेव्हां इस्राएलाचे वंश मजपासून बहकून गेले होते, तेव्हां जे याजक लेवी सादोकाचे संतान माझ्या पवित्रस्थानाचें रक्षण करीत राहिले, तेच माझी सेवा करायाला मजजवळ येतील, आणि मला चरबी व रक्त अर्पावें, ह्मणून मजसमोर उभे राहतील, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. १६ ते माझ्या पवित्रस्थानांत शिरतील, आणि माझी सेवा करायाला ते माझ्या मेजाजवळ येतील, आणि ते माझें रक्षण राखितील.

१७ आणि असें होईल, कीं जेव्हां ते आंतल्या अंगणाच्या दारांत शिरतील, तेव्हां ते स्वच्छ पांढरीं वस्त्रें लेऊन घेतील; आणि ते आंतल्या अंगणाच्या दारांत आणि आंतल्याकडे सेवा करीत असतां त्यांच्या अंगावर कांहीं लोंकर येऊं नये. १८ स्वच्छ पांढऱ्या वस्त्राचीं पागोटीं त्यांच्या डोयांवर असोत, आणि स्वच्छ पांढऱ्या वस्त्राच्या इजारा त्यांच्या कंबरांस असोत; त्यांनी घाम येण्याजोगें वस्त्र नेसूं नये. १९ आणि ते बाहेरच्या अंगणांत, बाहेरच्या अंगणांत लोकांकडे बाहेर जात असतां आपल्या ज्या वस्त्रांनी ते सेवा करीत होते, तीं काढितील, आणि तीं पवित्र कोठड्यांत ठेवितील, आणि इतर वस्त्रें लेऊन घेतील; आणि त्यांनी आपल्या वस्त्रांनी लोकांस पवित्र

करूं नये. २० **आणि** ते आपलीं मस्तकें मुंड-
णार नाहींत, आणि आपल्या मस्तकांचे केश लांब
होऊं देणार नाहींत, ते केवळ आपल्या मस्तकांचे
केश कातरितील. २१ **आणि** याजक जेव्हां आं-
तल्या अंगणांत जातात, तेव्हां कोणत्याहि याज-
काने द्राक्षरस पिऊं नये. २२ **आणि** त्यानी
विधवा, अथवा सोडिलेली स्त्री आपल्या स्त्रिया
व्हायासाठीं घेऊं नये; परंतु त्यानी इस्राएलाच्या
वंशाच्या बीजाच्या कन्या घ्याव्या, अथवा याजका-
ची जी विधवा ती विधवा घ्यावी. २३ **आणि**
ते माझ्या लोकांस पवित्राचा व अपवित्राचा भेद
शिकवितील, आणि अशुद्धाचा व शुद्धाचा भेद
त्यांस कळवितील. २४ **आणि** वादाविषयींचा
न्याय करायाला ते उभे राहतील; आणि माझ्या
न्यायांप्रमाणें तो ठरवितील; आणि ते माझ्या सर्व
सभांत माझे विधि आणि माझे नियम पाळितील;
आणि माझे शाब्बाथ दिवस पवित्र रक्षितील.
२५ **आणि** त्यांस विटाळ लागूं नये, ह्मणून ते
कोणत्याहि मेलेल्या मनुष्याजवळ जाऊं नयेत;
तथापि बापाकरितां, अथवा आईकरितां, अथवा
पुत्राकरितां, अथवा कन्येकरितां, भावाकरितां, अ-
थवा जी बहीण पुरुषासीं विवाहित नव्हती तिज-
करितां ते आपणांस विटाळोत. २६ **आणि** त्या-
च्या पावनानंतर त्याला याजक सात दिवस गणि-
तील. २७ **आणि** ज्या दिवसीं तो पवित्र स्थानांत,
आंतल्या अंगणांत, पवित्र स्थानांत सेवा करायाला
आंत जातो, त्या दिवसीं त्याने आपलें पापाचें
अर्पण अर्पावें, असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.
२८ **आणि** हें त्यांस वतन होईल; मी त्यांचें
वतन आहें; आणि तुह्मी त्यांस इस्राएलांत वि-
भाग देणार नाहीं; मी त्यांचा विभाग आहें.
२९ **ते** अन्नाचें अर्पण व पापाचें अर्पण व अप-
राधाचें अर्पण खातील; आणि इस्राएलांत प्रत्येक
अर्पिलेला पदार्थ त्यांचा होईल. ३० **आणि**
सर्व पदार्थांच्या प्रथम फलाचा प्रथम भाग, आ-
णि सर्वांचें प्रत्येक अर्पण, तुमच्या सर्व अर्पणांतलें
कांहींसें हीं याजकाचीं होतील; आणि तुह्मी
आपल्या उंड्याचा प्रथम भाग याजकाला द्याल,
अशासाठीं कीं त्याने तुझ्या घरांत आशीर्वाद रा-
हवावा. ३१ पक्ष्यांतलें अथवा पशूंतलें जें
कांहीं आपसूक मेलेलें अथवा फाडिलेलें असेल,
तें याजकानी खाऊं नये.

## अध्याय ४५.

**जे**व्हां तुह्मी वतनासाठीं पण पाडून देश विभा-
गाल, तेव्हां **परमेश्वराला** देशाचा पवित्र
भाग अर्पण कराल; लांबी पंचवीस हजार का-
ठ्या, आणि रुंदी दाहा हजार काठ्या होईल;
हा आपल्या सर्व सीमेंत सभोंवार पवित्र होईल.
२ **यां**तला पांचशें हात लांब, आणि पांचशें हात
रुंद प्रदेश पवित्र स्थानासाठीं सभोंवार होईल;
आणि त्याला सभोंवार पन्नास हात शिवार होईल.
३ **आणि** या परिमाणांतून तूं लांबी पंचवीस ह-
जार, व रुंदी दाहा हजार मापिसील; आणि
त्यांत पवित्र स्थान व परमपवित्र स्थान हीं होतील.
४ **जो** याजक पवित्रस्थानाचे सेवक असतांना **पर-
मेश्वराची** सेवा करायाला त्याजवळ येतील,
त्यांस भूमीचा पवित्र भाग होईल; तो त्यांस
घरांसाठीं स्थल, आणि पवित्र स्थानासाठीं पवित्र-
स्थल होईल. ५ **आणि** जे लेवी मंदिराचे से-
वक आहेत, त्यांस वीस कोठड्यांच्या विभागासा-
ठीं पंचवीस हजार लांब, आणि दाहा हजार रुंद
प्रदेश होईल.

६ **आणि** अर्पिलेल्या पवित्र प्रदेशासुद्धां तुह्मी
पांच हजार रुंद, आणि पंचवीस हजार लांब
प्रदेश नगराचा विभाग नेमून द्याल; तो इस्राए-
लाच्या सर्व वंशाला होईल. ७ **आणि** अर्पिले-
ल्या पवित्र प्रदेशाच्या व नगराच्या विभागाच्या
एका अंगास, आणि दुसऱ्या अंगास अर्पिलेल्या
पवित्र प्रदेशासमोर, आणि नगराच्या विभागा-
समोर, पश्चिम सीमेपासून पश्चिमेकडेस, आणि
पूर्वसीमेपासून पूर्वेकडेस अधिकाऱ्याला विभाग हो-
ईल; आणि लांबी विभागांतले एकासमोर पश्चि-
मसीमेपासून पूर्वसीमेपर्यंत होईल. ८ **त्याला**
इस्राएलांत देशांतला विभाग भोगायासाठीं हो-
ईल; आणि माझे अधिकारी पुन्हा माझ्या लो-
कांस पीडणार नाहींत; आणि ते देशाचें शेष
इस्राएलाच्या घराण्यास त्यांच्या वंशांप्रमाणें
देतील.

९ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं इस्राएलाच्या

अधिकाऱ्यांनो, तुह्मांला पुरें वाटो; बलात्कार व
नासाडी दूर करा, आणि नीति व न्याय आचरा,
तुह्मी आपलीं पीडनें माझ्या लोकांवरून उठवा,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो. १० तुह्मांला
न्यायी तागडी, आणि न्यायी एफा, आणि न्यायी
बाथ असो. ११ एफाचें व बाथाचें परिमाण
एकच असो, ह्मणजे बाथांत होमेराचा दाहावा
भाग, आणि एफांत होमेराचा दाहावा भाग मावो;
त्याचें परिमाण होमेराप्रमाणें असो. १२ आ-
णि शेकेल वीस गेरा असो; वीस शेकेल, पंच-
वीस शेकेल, पंधरा शेकेल तुमचा माने असोत.
१३ जें अर्पण तुह्मी अर्पाल तें हेंच, होमेरांतून
एफाचा साहावा भाग गहूं, आणि होमेरांतून एफा-
चा साहावा भाग यव द्याल. १४ आणि ते-
लाचा, तेलाच्या बाथाचा नियम हाच, ह्मणजे
खोरांतून बाथाचा दाहावा भाग अर्पाल, तो दा-
हा बाथांचा होमेर आहे; कां कीं दाहा बाथ
एक होमेर आहेत. १५ आणि दोनशें मेंढरांच्या
कळपांतून, इस्राएलाच्या भरदार चरगणांतून एक
कोंकरूं अन्नार्पण व होम व कुशलाचें अर्पण अ-
सें त्यांसाठीं प्रायश्चित्त करायाला अर्पाल, असें
**प्रभु परमेश्वर** ह्मणतो. १६ देशांतले सर्व
लोक इस्राएलांतल्या अधिकाऱ्यासाठीं या अर्प-
णाकडे असत जातील. १७ आणि सणांत, आणि
अमावास्यांत, आणि शाब्बाथांत, आणि इस्राए-
लाच्या वंशाच्या सर्व सभा दिवसांत होम व
अन्नार्पण व पेय अर्पण हीं अधिकाऱ्याला द्यावीं
लागतील; तो पापार्पण व अन्नार्पण व होम व कुश-
लाचीं अर्पणें इस्राएलाच्या वंशासाठीं प्रायश्चित्त
करावें, ह्मणून सिद्ध करील. १८ **प्रभु परमे-
श्वर** ह्मणतो, कीं पहिल्या महिन्यांत, महिन्या-
च्या पहिल्या दिवसीं तूं निर्दोष तरुण बैल घेऊन
पवित्र स्थानाला पावन कर. १९ आणि याजक पाप-
बलीच्या रक्तांतलें कांहींसें घेऊन मंदिराच्या दारा-
च्या खांबांस, आणि वेदीच्या पर्याधाराच्या चोहों
कोंपऱ्यांस, आणि आंतल्या अंगणाच्या दाराच्या
खांबांस घालील. २० आणि महिन्याच्या सा-
तव्या दिवसीं प्रत्येक चुकलेल्या अथवा भोळ्या-
जनाकरितां तूं तसेंच करसील; आणि तुह्मी मं-
दिराला प्रायश्चित्त कराल. २१ पहिल्या महिन्यांत,
महिन्याच्या चौदाव्या दिवसीं तुह्मांला सात
दिवसांचा वल्हांडण सण पाळावा लागेल; आंबु-
गलेली भाकर खातील. २२ आणि त्याच दि-
वसीं अधिकारी आपणासाठीं, आणि देशांतल्या
सर्व लोकांसाठीं पापबलि असा एक बैल सिद्ध
करील. २३ आणि सणाच्या साता दिवसांत,
तो **परमेश्वराला** निर्दोष सात बैल व सात मेंढे
सात दिवसपर्यंत, प्रतिदिवसीं होमासाठीं सिद्ध
करील; आणि प्रतिदिवसीं पापबलिसाठीं शेरडां-
तलें करडूं सिद्ध करील. २४ आणि तो बैला-
साठीं एफाभर अन्नार्पण, आणि मेंढ्यासाठीं एफा-
भर, आणि एफासाठीं हीनभर तेल सिद्ध करील.
२५ सातव्या महिन्यांत, महिन्याच्या पंधराव्या
दिवसीं सणांत सात दिवसपर्यंत तो याप्रमाणें,
ह्मणजे पापार्पणाप्रमाणें, होमाप्रमाणें, आणि अन्ना-
र्पणाप्रमाणें, आणि तेलाप्रमाणें सिद्ध करील.

## अध्याय ४६.

**प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं आंतल्या अंगणाचें
जें दार पूर्वेकडेस आहे, तें साहा उद्योग दि-
वसपर्यंत बंद केलेलें राहील; आणि शाब्बाथ
दिवसीं उघडतील, आणि अमावास्येच्या दिवसीं
उघडतील. २ आणि अधिकारी त्या दाराच्या देव-
डीच्या वाटेने बाहेरून आंत जाईल, आणि तो दारा-
च्या खांबाजवळ उभा राहील, तेव्हां याजक त्याचा
होम व त्याचीं कुशलाचीं अर्पणें सिद्ध करितील,
आणि तो दाराच्या उंबऱ्याजवळ भजन करील:
नंतर निघून जाईल; परंतु तें दार संध्याकाळप-
र्यंत बंद करणार नाहींत. ३ आणि शाब्बाथांत
व अमावास्यांत देशांतले लोकहि त्या दाराच्या
प्रवेशाजवळ **परमेश्वरासमोर** भजन करितील.
४ आणि शाब्बाथाच्या दिवसीं जो होम अधि-
कारी **परमेश्वराला** अर्पील, तो साहा निर्दोष
कोंकरें आणि एक निर्दोष मेंढा असो. ५ आणि
मेंढ्यासाठीं एक एफा अन्नार्पण असो, आणि कों-
करांसाठीं जसें तो द्यायाला समर्थ असेल तसें
अन्नार्पण असो, आणि एफासाठीं हीनभर तेल
असो. ६ आणि अमावास्येच्या दिवसीं त्याला
निर्दोष तरुण बैल, आणि साहा कोंकरें, आणि
एक मेंढा निर्दोष हीं द्यावीं लागतील. ७ आणि

तो बैलासाठीं एक एफा, आणि मेंढ्यासाठीं एक
एफा अन्नार्पण सिद्ध करो, आणि कोंकरांसाठीं
जसा त्याचा हात चालेल, तसें सिद्ध करो;
आणि एफासाठीं हीनभर तेल सिद्ध करो. ८
आणि अधिकारी आंत जायाचा असतां त्या दा-
राच्या देवडीच्या वाटेनें आंत जाईल, आणि
त्याच्या वाटेनें निघून जाईल.
९ परंतु देशांतले लोक सभादिवसांत **परमे-
श्वरा**समोर येत असतां, जो उत्तरदाराच्या वा-
टेनें भजन करायाला आंत जातो, तो दक्षिणदा-
राच्या वाटेनें निघून जाईल; आणि जो दक्षिण-
दाराच्या वाटेनें आंत जातो, तो उत्तरदाराच्या
वाटेनें बाहेर जाईल; ज्या दारांतून तो आंत
गेला, त्याच्या वाटेनें तो परत जाणार नाहीं, प-
रंतु त्याच समोरच्या दारांतून बाहेर जाईल.
१० आणि ते आंत जायाचे असतां, अधिकारी
त्यामध्यें आंत जाईल; आणि ते बाहेर जायाचे
असतां, बाहेर जातील. ११ आणि सणांत व
सभादिवसांत अन्नार्पण बैलासाठीं एक एफा, आ-
णि मेंढ्यासाठीं एक एफा होईल, आणि कोंकरां-
साठीं जसें तो द्यायाला समर्थ असेल तसें देईल,
आणि एफासाठीं हीनभर तेल देईल. १२ जे-
व्हां अधिकारी स्वेच्छापूर्वक होम अथवा स्वेच्छा-
पूर्वक कुशलाचीं अर्पणें **परमेश्वराला** सिद्ध
करील, तेव्हां जें दार पूर्वेकडेस आहे तें द्वारपाळ
त्यासाठीं उघडील, मग जसा तो शाब्बाथ दिव-
सांत करी तसा तो आपला होम आणि आपलीं
कुशलाचीं अर्पणें सिद्ध करील; नंतर तो बाहेर
जाईल; आणि तो बाहेर गेल्यानंतर द्वारपाळ
दार बंद करील. १३ आणि तूं प्रतिदिवशीं
**परमेश्वराला** एका वर्षाचें निर्दोष कोंकरूं
होमासाठीं सिद्ध करसील; रोज सकाळीं तें
सिद्ध करसील. १४ आणि रोज सकाळीं त्या-
साठीं एफाचा साहावा भाग अन्नार्पण सिद्ध क-
रसील, आणि हीनाचा तिसरा भाग तेल पिठांत
घालायाला सिद्ध करसील; हें निरंतर नियमानें
नित्य **परमेश्वराला** अन्नार्पण असत जाईल.
१५ याप्रमाणें याजक रोजसकाळीं कोंकरूं, आ-
णि अन्नार्पण, आणि तेल निरंतर होमासाठीं
सिद्ध करीत जातील.

१६ **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं जर अधि-
कारी आपल्या पुत्रांतल्या कोणीएकाला दान देई-
ल, तर तो भाग त्याच्या पुत्रांचा असत जाईल;
तो भाग त्यांचें वतनच असत जाईल. १७
परंतु तो जर आपल्या विभागांतून आपल्या से-
वकांतल्या कोणीएकाला दान देईल, तर तें सु-
टीच्या वर्षापर्यंत त्याचें राहील; नंतर तें अधि-
काऱ्याकडे परत येईल; तर मग त्याचा विभाग
त्याच्या पुत्रांसच राहील. १८ आणि अधि-
काऱ्यानें लोकांच्या विभागांतून त्यांस त्यांच्या
वतनांतून पीडून घालवायाला कांहीं घेऊं नये;
तो आपल्याच वतनांतून आपल्या पुत्रांस विभाग
देईल; अशासाठीं कीं माझ्या लोकांस प्रत्येक
आपल्या वतनांतून उडवूं नये. १९ मग दारा-
च्या बाजूकडेस जो प्रवेश होता, त्यांतून त्यानें
मला याजकांच्या ज्या पवित्र कोठड्या उत्तरेकडे
होत्या त्यांत आणिलें; आणि पाहा, तेथें दोहों
बाजूंस पश्चिमेकडे स्थान होतें. २० तेव्हां
त्यानें मला ह्मटलें, ज्या स्थानांत याजक अपरा-
धार्पण व पापार्पण शिजवितील, ज्यांत ते अन्नार्प-
ण भाजितील, तें हेंच आहे; अशासाठीं कीं
लोकांस पवित्र करायाला ते तीं घेऊन बाहेरच्या
अंगणांत बाहेर जाऊं नयेत. २१ मग त्यानें
मला बाहेरच्या अंगणांत बाहेर आणिलें, आणि
मला अंगणाच्या चोहों कोंपऱ्यांकडून जाऊं दिलें;
आणि पाहा, अंगणाच्या प्रत्येक कोंपऱ्यांत एक
अंगण होतें. २२ अंगणाच्या चोहों कोंपऱ्यांत
जडलेलीं अंगणें चाळीस हात लांब, आणि तीस
हात रुंद होतीं, त्या चोहों कोंपऱ्यांचें एकच
परिमाण होतें. २३ आणि त्यांत सभोंवतें, त्या
चोहों सभोंवतें कुसूं होतें; आणि कुसाच्या खा-
लच्या प्रदेशास सभोंवार चुली केलेल्या होत्या.
२४ मग त्यानें मला ह्मटलें, हीं शिजविणाऱ्यां-
चीं स्थलें आहेत, ज्या यांत मंदिराचे सेवक
लोकांकडचा बलि शिजवितील.

## अध्याय ४७.

**म**ग त्यानें मला मंदिराच्या प्रवेशाकडे परत
आणिलें, तेव्हां पाहा, मंदिराच्या उंबऱ्या खा-
लतून पूर्वेकडेस पाण्यें निघत होतीं; कां कीं मंदि-

राचें मुख पूर्वेकडेस होतें, आणि मंदिराच्या
उजव्या बाजूखालतून, वेदीच्या दक्षिणांगाकडून
पाण्यें उतरत वाहत होतीं. २ त्यानंतर त्याने
मला उत्तरदाराच्या वाटेने बाहेर नेलें, आणि
मला बाहेरच्या वाटेने पूर्वेकडच्या वाटेने बाहेर-
च्या दाराकडे फिरवून नेलें; आणि पाहा, उज-
व्या बाजूकडून पाण्यें वाहत होतीं. ३ ज्या
मनुष्याच्या हातांत मापनसूत्र होतें, त्याने पूर्वेक-
डेस बाहेर जाऊन एक हजार हात मापिले;
आणि तो मला पाण्यांतून नेऊं लागला; तेव्हां
पाण्यें घोंट्यांपर्यंत होतीं. ४ आणि तो दुसरे
हजार मापून मला पाण्यांतून नेत चालिला, तेव्हां
पाण्यें गुडघ्यांपर्यंत होतीं; मग तो तिसरे हजार
मापून मला पाण्यांतून नेत चालिला, तेव्हां पाण्यें
कंबरेपर्यंत होतीं. ५ त्यानंतर त्याने चौथे हजार
मापिले; तेव्हां जिच्या पार मला जावत नव्हतें,
असी नदी झाली; कां कीं पाण्यें पोंहायाचीं
पाण्यें तुंबून चालिलीं, जिच्या पार जावेना एवढी
नदी झाली.

६ तेव्हां त्याने मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा,
त्वां हें पाहिलें आहे काय? मग त्याने मला चा-
लवून नदीच्या कांठीं परत आणिलें. ७ जेव्हां
मी परत आलों, तेव्हां पाहा, नदीच्या कांठीं एका
अंगास, आणि दुसऱ्या अंगास फारफारच झाडें
होतीं. ८ मग त्याने मला ह्मटलें, हीं पाण्यें
निघून पूर्वदेशांत जातात, आणि जंगलांतून उतरून
समुद्रांत जातात; हीं समुद्रांत बाहेर आणिलीं,
ह्मणजे पाण्यें बरीं होतील. ९ आणि असें होईल,
कीं जेथें कोठें नद्या येतील, तेथें जो कोणी जीवंत
प्राणी वागत असेल तो वांचेल; आणि फारफारच
मासे होतील, कारण कीं हीं पाण्यें तेथें पोहंच-
तील; तेव्हां तीं बरीं होतील; आणि जेथें नदी
येईल, तेथें सर्व वांचेल. १० आणि असें होईल,
कीं त्याजजवळ एनगदीपासून एनएग्लाइमापर्यंत धी-
वर उभे राहतील; तीं जाळीं पसरण्याचीं स्थानें
होतील; मोठ्या समुद्रांतल्या माशांसारिखे त्यांतले
मासे प्रकाराप्रमाणें अत्यंत बहुत होतील. ११
त्याची चिखलवट व दलदलीत जागा बऱ्या
होणार नाहींत; हीं खारस्थळें होतील. १२
आणि नदीजवळ तिच्या कांठावर, एका अंगास
आणि दुसऱ्या अंगास, सर्व प्रकारचीं खाणें देणारीं
झाडें रुझून वाढतील; त्यांचीं पानें वाळणार ना-
हींत; त्यांचीं फळें संपणार नाहींत; ते आपल्या महि-
न्यांप्रमाणें नवें फळ देतील; कां कीं त्याकडचीं पाण्यें
पवित्र स्थानांतून निघालीं; आणि त्यांचें फळ खा-
ण्यासाठीं, आणि त्यांचें पान औषधासाठीं होईल.
१३ प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं ज्या सी-
मेंत तुह्मी इस्राएलाच्या बारा वंशांप्रमाणें देशाचें
वतन कराल, ती हीच आहे; योसेफाला दोन
विभाग होतील. १४ आणि ज्या देशाविषयीं
म्या तो तुमच्या पूर्वजांस द्यावा, ह्मणून आपला
हात उंचाविला, त्याचें वतन तुह्मी एकसारिखे
कराल; आणि हा देश तुह्माला विभाग असा
पडेल. १५ आणि देशाच्या उत्तरेकडची सीमा
हेथ्लोनाकडच्या मोठ्या समुद्रापासून जदादाच्या
प्रवेशापर्यंत हीच आहे. १६ हमाथ, बेरोथा,
जें सिब्राइम दम्मेशेकेची सीमा आणि हमाथेची
सीमा यांमध्यें आहे तें, जें हाजेरहत्तीकोन हौ-
रानाच्या सीमेकडे आहे तें. १७ आणि स-
मुद्रापासून जी सीमा ती हजाएनोन दम्मेशेकेची
सीमा, आणि उत्तरेकडेस आणि हमाथेची सीमा
होईल; आणि हें उत्तरेकडचें शेवट आहे. १८
आणि तुह्मी पूर्वेकडचें शेवट हौरानापासून, आ-
णि दम्मेशेकेपासून, आणि गिलादापासून, आणि
यार्देनेच्या इस्राएल देशापासून, आणि सीमेपासून
पूर्वसमुद्रापर्यंत मापाल; आणि हें पूर्वेकडचें शेवट
आहे. १९ आणि दक्षिण शेवट दक्षिणेकडेस,
तामारापासून कादेशांतल्या विवाद पाण्यांपर्यंत
नदीकडे मोठ्या समुद्रापर्यंत होईल; आणि हें
दक्षिण शेवट दक्षिणेकडेस आहे. २० आणि
पश्चिमेकडचें शेवट सीमेपासून हमाथाच्या प्रवे-
शाच्या समोरच्या प्रदेशापर्यंत मोठा समुद्र होई-
ल; हें पश्चिम शेवट आहे. २१ तर तुह्मी आ-
पणांसाठीं हा देश इस्राएलाच्या वंशांप्रमाणें वि-
भागाल.

२२ आणि असें होईल, कीं तुह्मी आपणा-
साठीं, आणि जे विदेशी तुह्मामध्यें प्रवास करीत
असतां तुह्मामध्यें लेंकरांस जन्म देतील त्यांसाठीं
हा देश पण पाडून वतनासाठीं विभागाल; ते
तुह्माला इस्राएलाच्या वंशांमध्यें स्वदेशीयांप्रमाणें

असत जातील; त्यांस तुह्माबरोबर इस्राएलाच्या
वंशांमध्यें विभाग प्राप्त होईल. २३ आणि असें
होईल, कीं ज्या वंशांत विदेशी प्रवास करीत
असेल, तेथें तुह्मी त्याला त्याचा विभाग द्याल,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ४८.

आणि वंशांचीं नामें हींच आहेत; उत्तर
शेवटापासून हेथ्लोनाकडच्या प्रदेशापर्यंत,
हमाथेच्या प्रवेशाकडेस, हजारएनान, दम्मेशेकची
सीमा उत्तरेकडेस, हमाथेच्या प्रदेशापर्यंत; तर
हीं त्याचे पूर्वपश्चिम शेवट आहेत; असा एक
विभाग दानाला प्राप्त होईल. २ आणि दान-
च्या सीमेपासीं पूर्व शेवटापासून पश्चिम शेवटाप-
र्यंत, आशेराला एक विभाग प्राप्त होईल. ३
आणि आशेराच्या सीमेपासीं पूर्व शेवटापासून
पश्चिम शेवटापर्यंत, नाफ्तालीला एक विभाग प्राप्त
होईल. ४ आणि नाफ्तालीच्या सीमेपासीं पूर्व
शेवटापासून पश्चिम शेवटापर्यंत, मनाश्शेला एक
विभाग प्राप्त होईल. ५ आणि मनाश्शेच्या सी-
मेपासीं पूर्व शेवटापासून पश्चिम शेवटापर्यंत, ए-
फ्राइमाला एक विभाग प्राप्त होईल. ६ आणि
एफ्राइमाच्या सीमेपासीं पूर्व शेवटापासून पश्चिम
शेवटापर्यंत, रऊबेनाला एक विभाग प्राप्त होईल.
७ आणि रऊबेनाच्या सीमेपासीं पूर्व शेवटापा-
सून पश्चिम शेवटापर्यंत, यहूदाला एक विभाग
प्राप्त होईल.

८ आणि जें अर्पण तुह्मी पूर्व शेवटापासून प-
श्चिम शेवटापर्यंत, पंचवीस हजार काठ्या रुंद,
आणि विभागांतल्या एकाप्रमाणें लांब अर्पाल, तें
यहूदाच्या सीमेपासीं पूर्वशेवटापासून पश्चिम शेव-
टापर्यंत होईल; आणि त्याच्या मध्यें पवित्र स्थान
होईल. ९ जें अर्पण तुह्मी **परमेश्वरा**साठीं
कराल, तें पंचवीस हजार लांब, आणि दाहा
हजार रुंद होईल. १० आणि यांस, ह्मणजे
याजकांस हें पवित्र अर्पण होईल; हें उत्तरे-
कडेस पंचवीस हजार लांब, आणि पश्चिमेकडेस
दाहा हजार रुंद, आणि पूर्वेकडेस दाहा हजार
रुंद, आणि दक्षिणेकडेस पंचवीस हजार लांब
होईल; आणि त्याच्यामध्यें **परमेश्वराचें** पवित्र
स्थान होईल. ११ सादोकाच्या वंशांतले जे
याजक पवित्र झालेले, जे माझें रक्षण राखीत
आले आहेत जेव्हां इस्राएलाचे वंश बहकले
तेव्हां जसे लेवी बहकले तसे जे बहकले नाहींत,
त्यांस हें होईल. १२ आणि भूमीच्या अर्पणांतून
जें अर्पिलेलें, तें त्यांस लेवींच्या सीमेकडेस परम-
पवित्र होईल. १३ आणि याजकांच्या सीमेपासीं
लेवींला पंचवीस हजार लांब, आणि दाहा हजार
रुंद प्रदेश प्राप्त होईल; अवघी लांबी पंचवीस
हजार, आणि रुंदी दाहा हजार होईल. १४
आणि त्यानीं त्यांतलें कांहीं विकूं नये, आणि
बदलून देऊं नये, आणि भूमीचें प्रथमफल अन्या-
धीन करूं नये; कां कीं तें **परमेश्वराला** पवित्र
आहे.

१५ आणि रुंदीनें पांच हजारांचा जो प्रदेश
पंचवीस हजारांच्या प्रदेशासमोर उरलेला आहे,
तो नगरसंबंधी सामान्यस्थल वस्तीसाठीं, अथवा
शिवारासाठीं होईल; आणि नगर त्याच्या मध्यें
होईल. १६ आणि त्याचीं परिमाणें हींच हो-
तील; उत्तर कांठ चार हजार आणि पांचशें,
आणि दक्षिण कांठ चार हजार आणि पांचशें,
आणि पूर्व कांठास चार हजार आणि पांचशें,
आणि पश्चिम कांठ चार हजार आणि पांचशें.
१७ आणि नगरचें शिवार उत्तरेकडेस दोनशें
पन्नास, आणि दक्षिणेकडेस दोनशें पन्नास, आणि
पूर्वेकडेस दोनशें पन्नास, आणि पश्चिमेकडेस दो-
नशें पन्नास होईल. १८ आणि पवित्र अर्पि-
लेल्या प्रदेशासमोर जो उरलेला प्रदेश, तो लां-
बीनें पूर्वेकडेस दाहा हजार; आणि पश्चिमक-
डेस दाहा हजार होईल; आणि तो पवित्र अ-
र्पिलेल्या प्रदेशासमोर होईल; आणि त्याचा
उपज नगरसेवकांच्या अन्नासाठीं होईल. १९
आणि जे नगराची सेवा करितील, ते इस्राएला-
च्या सर्व वंशांतून त्याची सेवा करितील. २०
सर्व अर्पण पंचवीस हजार लांब, आणि पंचवीस
हजार रुंद होईल; तुह्मी नगराच्या विभागासुद्धां
पवित्र अर्पण चौरस करून अर्पाल.

२१ आणि पवित्र अर्पणाच्या, आणि नगरा-
च्या विभागाच्या एका अंगास, आणि दुसऱ्या
अंगास, पंचवीस हजारांच्या अर्पणासमोर पूर्व-

सीमेपर्यंत, आणि पश्चिमेकडेस पंचवीस हजारां-
समोर पश्चिमसीमेपर्यंत, जो उरलेला प्रदेश तो
अधिकाऱ्याच्या विभागांसुद्धां अधिकाऱ्यास हो-
ईल; तर असेंच पवित्र अर्पण होईल; आणि
त्यामध्यें मंदिराचें पवित्र स्थान होईल. २२ आ-
णि जें अधिकाऱ्याचें आहे, त्यामध्यें लेवींचा वि-
भाग आणि नगराचा विभाग असल्यामुळें यहू-
दाची सीमा आणि बन्यामीनाची सीमा यांच्या
अंतरप्रदेशीं अधिकाऱ्यास कांहींसें होईल.

२३ आणि वरकड जे वंश त्यांस असें प्राप्त
होईल, ह्मणजे पूर्व शेवटापासून पश्चिम शेवटा-
पर्यंत, बन्यामीनाला एक विभाग प्राप्त होईल.
२४ आणि बन्यामीनाच्या सीमेपासीं पूर्व शेवटापा-
सून पश्चिम शेवटापर्यंत, शिमोनाला एक विभाग
प्राप्त होईल. २५ आणि शिमोनाच्या सीमेपासीं
पूर्व शेवटापासून पश्चिम शेवटापर्यंत, इस्साखारा-
ला एक विभाग प्राप्त होईल. २६ आणि इस्सा-
खाराच्या सीमेपासीं पूर्व शेवटापासून पश्चिम
शेवटापर्यंत, जबूलुनाला एक विभाग प्राप्त होईल.
२७ आणि जबूलुनाच्या सीमेपासीं पूर्व शेवटापा-
सून पश्चिम शेवटापर्यंत, गादाला एक विभाग
प्राप्त होईल. २८ आणि गादाच्या सीमेपासीं
दक्षिण शेवटास दक्षिणेकडेस, तामारापासून का-
देशांतल्या विवाद पाण्यांपर्यंत नदीकडे मोठ्या
समुद्रापर्यंत सीमा होईल. २९ जो देश तुह्मी
पण पाडून इस्राएलाच्या वंशांला वतनासाठीं वि-
भागाल, तो हाच आहे; आणि त्यांचे विभाग
हेच आहेत; असें प्रभु परमेश्वर ह्मणतो.

३० आणि नगराच्या निघण्याचे प्रदेश हेच
आहेत, उत्तर कांठास चार हजार पांचशें मानें.
३१ आणि नगराचीं दारें इस्राएलाच्या वंशांच्या
नामांप्रमाणें होतील; उत्तरेकडेस तीन दारें होतील:
एक रऊबेनाचें दार, एक यहूदाचें दार, एक लेवीचें
दार. ३२ आणि पूर्व कांठास चार हजार पांचशें
मानें; आणि तीन दारें होतील; आणि एक यो-
सेफाचें दार, एक बन्यामीनाचें दार, एक दानाचें
दार. ३३ आणि दक्षिण कांठास चार हजार पांचशें
मानें; आणि तीन दारें होतील; एक शिमोनाचें
दार, एक इस्साखाराचें दार, एक जबूलुनाचें दार.
३४ पश्चिम कांठास चार हजार पांचशें मानें, आणि
त्यांचीं तीन दारें होतील; एक गादाचें दार, एक
आशेराचें दार, एक नाफ्तालीचें दार. ३५
सभोंवतीं अठरा हजार मानें होतील; आणि
त्या दिवसापासून नगराचें नाम, परमेश्वर तेथें
आहे, असें असत जाईल.

# दानीयेलाचें पुस्तक.

## अध्याय १.

यहूदाचा राजा यहोयाकीम याच्या राज्याच्या
तिसऱ्या वर्षांत बाबेलेच्या नबूखद्रेज्झार रा-
जाने यरूशालेमेस येऊन तिला वेढा घातला. २
आणि प्रभूने यहूदाचा राजा यहोयाकीम आणि
देवाच्या घरच्या पात्रांतला भाग त्याच्या हातीं
दिल्हा; मग त्याने त्यांस शिनार देशांत आपल्या
देवाच्या घरास नेलें; आणि तीं पात्रें त्याने आ-
पल्या देवाच्या भांडागारांत आणिलीं.
३ आणि राजाने शंडांच्या अश्पनाज अधि-
काऱ्याला सांगितलें, कीं त्याने इस्राएलाच्या वं-
शांतले, आणि राजकीय संततींतले, आणि अधि-
पतींतले कितीएक मुलगे आणावे; ४ ते मुलगे
असे असावे कीं, ज्यांच्या अंगीं कांहीं कलंक
नाहीं, आणि जे सुंदर, आणि सर्व बोधांत निपुण,
आणि ज्ञानाने संपन्न, आणि विद्येंत प्रवीण, अ-
णखी ज्यांच्या ठायीं राजाच्या वाड्यांत उभें रा-
हण्याचें सामर्थ्य असेल, आणि ज्यांस खास्-
द्यांची विद्या आणि भाषा शिकवावी. ५ आणि
राजाने त्यांसाठीं राजाच्या अन्नांतला आणि त्या-
च्या पिण्याच्या द्राक्षारसांतला नित्याचा वांटा
नेमिला; अशासाठीं कीं त्यांस तीन वर्षें पोषिलें,
ह्मणजे तीं समाप्त झाल्यावर ते राजापुढें उभे
राहावे. ६ आणि त्यांमध्यें यहूदाच्या वंशांतले
दानीयेल, हनान्या, मीशाएल, आणि अजार्या
हे होते. ७ आणि शंडांच्या अधिकाऱ्याने त्यांस
नामें ठेविलीं, तीं दानीयेलाला बेलटशाज्झार,
आणि हनान्याला शद्राख, आणि मीशाएलाला
मेशाख, आणि अजार्याला अबेद्नगो, अशीं ना-
में ठेविलीं.
८ आणि दानीयेलाने आपल्या मनांत निश्चय
केला, कीं मी आपणाला राजाच्या अन्नाने अ-
थवा त्याच्या पिण्याच्या द्राक्षारसाने विटाळणार
नाहीं; ह्मणून त्याने शंडांच्या अधिकाऱ्याजवळ
विनंती केली, कीं म्या आपणाला विटाळूं नये.
९ तर देवाने दानीयेलाला शंडांच्या अधिका-
ऱ्यापुढें कृपा आणि करुणा दिल्ही होती. १०
मग शंडांच्या अधिकाऱ्याने दानीयेलाला ह्मटलें,
माझ्या ज्या प्रभु राजाने तुमचें खाणें व तुमचें
पिणें नेमिलें आहे, त्याला मी भितों; कां कीं
तुमच्या प्रकारचे जे मुलगे त्यांच्या मुखांपेक्षां तु-
मचीं मुखें त्याला कां म्लान दिसावीं? मग मी
राजाकडे डोकें गमावायाजोगा दोषी होईं असें
कराल. ११ नंतर जो शंडांच्या अधिकाऱ्याने
दानीयेल, हनान्या, मीशाएल, आणि अजार्या
यांजवर नेमिला होता, त्या मेलजाराला दानी-
एलाने ह्मटलें, १२ त्वां आपल्या सेवकांस दाहा
दिवसपर्यंत पारखावें; आणि त्या आह्माला द्वि-
दलधान्य खायाला आणि पाणी प्यायाला द्यावें.
१३ मग आमचीं रूपें, आणि जे मुलगे राजाचें
अन्न खातात त्यांचीं रूपें तुजसमक्ष पाहण्यांत
यावीं; मग जसें तुला दिसेल तसें तूं आपल्या
सेवकांस कर. १४ तेव्हां त्याने या गोष्टीविषयीं
त्यांचें ऐकिलें, आणि त्यांस दाहा दिवस पार-
खिलें. १५ मग दाहा दिवस समाप्त झाल्यावर
त्यांचीं रूपें, जे सर्व मुलगे राजाचें अन्न खात
असत, त्यांच्या रूपांपेक्षां चांगलीं आणि पुष्ट
दिसलीं. १६ ह्मणून मेलजाराने त्यांचा अन्नाचा
भाग आणि त्यांचा प्यायाचा द्राक्षारस काढिला;
आणि त्यांस द्विदलधान्य देता झाला.
१७ आणि देवाने त्या चौघां मुलग्यांस सर्व
विद्येंत आणि बोधांत ज्ञान आणि समज हीं
दिल्हीं; आणि दानीयेल सर्व दृष्टांत आणि स्वप्न
यांविषयीं विवेकी होता. १८ मग ज्या दिव-
सांच्या समाप्तीस त्यांस आंत आणावें, ह्मणून
राजाने आज्ञा केली होती, ते गेल्यावर शंडांच्या
अधिकाऱ्याने त्यांस नबूखद्रेज्झारापुढें आंत आणि-
लें. १९ तेव्हां राजाने त्यांसीं संभाषण केलें;
आणि त्या सर्वांमध्यें दानीयेल, हनान्या, मीशा-

एल, आणि अजार्या यांसारिखा कोणी सांपडला
नाहीं; मग ते राजापुढें उभे राहते झाले. २०
आणि ज्या कोणत्याहि बोधाच्या अथवा विवे-
काच्या गोष्टीविषयीं राजाने त्यांस पुसिलें, तींत
ते त्याला, जे सर्व दैवज्ञ आणि ज्योतिषी त्याच्या
सर्व राष्ट्रांत होते, त्यांपेक्षां दसपट उत्कृष्ट सांप-
डले. २१ आणि खोरेश राजाच्या पहिल्या
वर्षापर्यंत दानीयेल होता.

## अध्याय २.

आणि नबूखद्रेज्जाराच्या राज्याच्या दुसऱ्या व-
र्षांत नबूखद्रेज्जाराने स्वप्न पाहिले, मग
त्याचा आत्मा व्याकुल झाला, आणि त्याला
निद्रा लागेना. २ तेव्हां राजाने आज्ञा केली, कीं
दैवज्ञ आणि ज्योतिषी आणि दैवप्रश्नी आणि
खास्दी यांस बोलवावें, अशासाठीं कीं त्यानी
राजाला त्याचे स्वप्न प्रगट करावे; मग ते आंत
येऊन राजापुढें उभे राहिले. ३ तेव्हां राजा
त्यांस ह्मणाला, म्या स्वप्न पाहिला आहे, आणि
तो स्वप्न म्या जाणावा ह्मणून माझा आत्मा व्याकुल
झाला आहे. ४ मग खास्दी अरामी भाषेने
राजाला बोलले, हे राजा, सदासर्वकाळपर्यंत जी-
वत ऐस; तूं आपल्या सेवकांस स्वप्न सांग, ह्म-
णजे आह्मी त्याचें व्याख्यान सुचवून दाखवूं.
५ राजाने खास्द्यांला उत्तर करितांना ह्मटलें,
गोष्ट माझ्या मनांतून गेली; जर स्वप्न आणि त्या-
चें व्याख्यान मला तुह्मी कळविणार नाहीं, तर
तुमचे तुकडे तुकडे करण्यांत येतील, आणि तु-
मचीं घरें ढीग करण्यांत येतील. ६ परंतु जर
तुह्मी मला स्वप्न आणि त्याचें व्याख्यान सुचवून
दाखवाल, तर तुह्माला मजकडून दानें व वसनें
व मोठा सन्मान प्राप्त होतील; तर मग मला
स्वप्न आणि त्याचें व्याख्यान सुचवून दाखवा.
७ ते पुन्हा उत्तर करीत ह्मणाले, राजाने आपल्या
सेवकांस स्वप्न सांगावा, ह्मणजे आह्मी त्याचें व्या-
ख्यान सुचवून दाखवूं. ८ राजा उत्तर करीत
ह्मणाला, तुह्मी पाहतां, कीं गोष्ट माझ्या मनांतून
गेली, याकरितां तुह्मी वेळ घालवीत आहां, असें
मी निश्चयें जाणतों. ९ परंतु जर तुह्मी मला
स्वप्न कळविणार नाहीं, तर तुह्माविषयीं एकच
ठराव आहे; आणि काल फिरे तोंपर्यंत तुह्मी
खोटी व दुष्ट गोष्ट मजपुढें सांगायाला सिद्ध
केली आहे; तर मग मला स्वप्न सांगा, ह्मणजे
मी जाणेन, कीं तुह्मी त्याचें व्याख्यान सुचवाया-
ला समर्थ आहां.

१० खास्दी राजापुढें उत्तर करीत ह्मणाले,
राजाची गोष्ट सुचवायाला समर्थ आहे असा
मनुष्य पृथ्वीवर नाहीं; ह्मणून कोणत्याहि दैवज्ञा-
ला, ज्योतिष्याला, अथवा खास्द्याला कोणत्याहि
राजाने, प्रभूने, अथवा अधिकाऱ्याने असी गोष्ट
कधीं पुसली नाहीं. ११ आणि ज्या गोष्टीवि-
षयीं राजा पुसतो ती भारी आहे, आणि ज्या दे-
वांचें राहणें मनुष्यजातीसीं नाहीं, त्यांवांचून ती
राजापुढें सुचवायास समर्थ आहे असा दुसरा
कोणी नाहीं. १२ यामुळें राजाने फार क्रोधयुक्त
व कोपित होऊन बाबेलेंतल्या सर्व विद्वानांचा
नाश करायाला आज्ञा केली. १३ मग विद्वानास
वधावें, ह्मणून ठराव निघाला; आणि त्यानी दा-
नीयेल व त्याचे सोबती यांस वधावें, ह्मणून
शोधिलें.

१४ तेव्हां राजरक्षकांचा नायक जो अर्योक
बाबेलेंतल्या विद्वानांस वधायास निघाला, त्याला
दानीयेलाने शहाणपणाने व विवेकाने उत्तर दिल्हें.
१५ तो राजाच्या अर्योक नायकाला उत्तर करीत
ह्मणाला, राजापासून ठराव एवढ्या उतावळीनं
कां निघाला? तेव्हां अर्योकाने दानीयेलाला गोष्ट
कळविली. १६ मग दानीयेलाने आंत जाऊन
राजापासीं मागितलें, कीं मला वेळ द्यावा, ह्मणजे
मी राजाला व्याख्यान सुचवून दाखवीन. १७
तेव्हां दानीयेलाने आपल्या घरास जाऊन आपले
सोबती जे हनान्या, मीशाएल, आणि अजार्या
त्यांस गोष्ट कळविली. १८ अशासाठीं कीं त्यानी
आकाशांतील देवाजवळ या रहस्याविषयीं दया
मागाव्या; दानीयेल आणि त्याचे सोबती यांचा
नाश बाबेलेंतल्या वरकड विद्वानांबरोबर न व्हावा
ह्मणून.

१९ नंतर तें रहस्य दानीयेलाला रात्रींतल्या
दृष्टांतांत प्रगट झालें; तेव्हां दानीयेलाने आका-
शांतील देवाचें सुवंदन केलें. २० दानीयेल
उत्तर करीत ह्मणाला, देवाचें नाम सदास

सुवंदित असो; कां कीं बुद्धि व शक्ति त्याच्या
आहेत. २१ आणि तो कालांस व समयांस
फिरवितो; तो राजांस स्थानभ्रष्ट करितो, आणि
राजांस स्थापितो; तो विद्वानांस बुद्धि, आणि वि-
वेकाच्या कुशलांस ज्ञान देतो. २२ तो गंभीर
व गुप्त गोष्टी प्रगट करितो; जें अंधारांत असेल
तें तो जाणतो, आणि प्रकाश त्यासीं राहतो. २३
हे माझ्या पूर्वजांच्या देवा, त्वां मला बुद्धि व श-
क्ति दिल्ह्या आहेत, आणि जें आह्मी तुजजवळ
मागितलें, तें त्वां आतां मला कळविलें आहे, ह्म-
णून मी तुझा उपकार मानितों आणि तुला स्त-
वितों; कां कीं त्वां आह्माला राजाची गोष्ट कळ-
विली आहे.

२४ याकरितां राजाने जो अर्योक बाबेलेंतल्या
विद्वानांस वधायास नेमिला होता, त्याजकडे
दानीयेल आंत गेला; तो आंत जाऊन त्याला
असें ह्मणाला, कीं त्वां बाबेलेंतल्या विद्वानांचा
नाश करूं नये; मला राजाजवळ आंत ने; ह्म-
णजे मी राजाला व्याख्यान सुचवून दाखवीन.
२५ तेव्हां अर्योकाने त्वरेंकरून दानीयेलाला रा-
जासमोर आंत नेलें, आणि त्याला असें सांगित-
लें, कीं जो पुरुष राजाला व्याख्यान कळवील,
असा यहूदाच्या पाडावांमध्यें मला सांपडला
आहे. २६ ज्याचें नाम बेलटशाज्जार त्या दा-
नीयेलाला राजा उत्तर करितां ह्मणाला, जो
दृष्टांत म्यां पाहिला तो आणि त्याचें व्याख्यान
मला कळवायास तूं समर्थ आहेस काय? २७ दा-
नीयेल राजापुढें उत्तर करीत ह्मणाला, ज्या रह-
स्याविषयीं राजा पुसतो, तें राजाला सुचवायाला
विद्वान, ज्योतिषी, दैवज्ञ, अथवा अंत्रज्ञ समर्थ
नाहींत; २८ परंतु जो रहस्यें प्रगट करितो,
असा देव आकाशांत आहे, आणि जें पुढल्या
दिवसांत घडायाचें आहे, तें नबूखद्रेज्जार राजा-
ला तो कळवितो आहे; तुझा स्वप्न आणि तुझ्या
पलंगावर तुझ्या मस्तकांतले दृष्टांत हेच होते.
२९ हे राजा, यापुढें काय घडायाचें असेल, अशा
कल्पना तुझ्या पलंगावर तुझ्या मनांत आल्या; आणि
जें घडायाचें आहे, तें जो रहस्य प्रगट करणारा
आहे तो तुला कळवितो आहे. ३० तर कोणत्याहि
जीवंत मनुष्यापेक्षां अधिक जी बुद्धि माझ्या ठायीं
असेल, तिजमुळें हें रहस्य मला प्रगट झालें
आहे, असें नव्हे, परंतु जे राजाला व्याख्यान कळ-
विणार आहेत, त्यांकरितां आणि त्वां आपल्या ह्र-
दयाच्या कल्पना जाणाव्या, ह्मणून हें मला प्रगट
झालें आहे.

३१ हे राजा, तूं दृष्टांत पाहत होतास, तेव्हां
पाहा, एक मोठी मूर्त्ति; ज्या मोठ्या मूर्त्तीचें तेज
उत्कृष्ट होतें, ती तुजसमोर उभी राहिली; आ-
णि तिचें रूप भयंकर होतें. ३२ त्या मूर्त्तीचें
शिर उत्तम सोन्याचें होतें, आणि तिचा ऊर व
तिचे बाहु रुप्याचे होते, आणि तिचें पोट व
तिच्या मांड्या हीं पित्तलाचीं होतीं. ३३ तिच्या
नळगुड्या लोखंडाच्या होत्या, आणि तिच्या पा-
यांतला एक अंश लोखंडाचा, आणि त्यांतला दु-
सरा अंश मातीचा होता. ३४ एक दगड हा-
तांच्या कर्मावांचून छेदिला, आणि त्याने त्या
मूर्त्तीला तिच्या लोखंडाच्या व मातीच्या पायां-
वर हाणिलें, आणि ते ठेंचून टाकिले, तोंपर्यंत तूं
पाहत होतास. ३५ तेव्हां एकदांच लोखंड,
माती, पित्तल, रुपें, आणि सोनें ठेंचून गेलीं, आ-
णि उन्हाळ्याच्या खळ्यांतल्या भुसासारिखीं
झालीं; आणि वाऱ्याने तीं उडविलीं, आणि त्यां-
स कांहीं ठिकाणा सांपडला नाहीं; मग ज्या दग-
डाने मूर्त्तीला हाणिलें, तो मोठा पर्वत झाला,
आणि त्याने सर्व पृथ्वी भरिली.

३६ हाच स्वप्न आहे; आणि याचें व्याख्यान
आह्मी राजापुढें सांगूं. ३७ हे राजा, तूं राजांचा
राजा आहेस, कां कीं आकाशांतल्या देवाने तुला
राज्य, सामर्थ्य, व पराक्रम, आणि गौरव दिल्हीं
आहेत. ३८ आणि जेथें कोठें मनुष्यजाति व-
सती, तेथल्या भूमीवरले पशु आणि आकाशांतले
पक्षी त्याने तुझ्या हातीं दिल्हे आहेत; आणि त्या
सर्वांवर तुला प्रभुत्व दिल्हें आहे; तें सोन्याचें
शिर तूं आहेस. ३९ आणि तुझ्यानंतर तुझ्या-
पेक्षां नीच, असें दुसरें राज्य उत्पन्न होईल;
मग जें सर्व पृथ्वीवर प्रभुत्व करील, असें अन्य
तिसरें राज्य पित्तलाचें उत्पन्न होईल. ४०
आणि चौथें राज्य लोखंडासारिखें बळकट हो-
ईल; जसें लोखंड सर्व पदार्थांस ठेंचितें, आणि
दांत करितें तसें; आणि जसें लोखंड या सर्वांचा

चुराडा करितें, तसें तें ठेंचील आणि चुराडा क-
रील. ४१ आणि जसें त्वां तिच्या पायांचा
आणि तिच्या पायांच्या बोटांचा एक अंश कुंभा-
राच्या मातीचा, आणि त्यांचा दुसरा अंश
लोखंडाचा पाहिला, तसें राज्य भिन्न होईल;
तथापि त्यांत लोखंडाचा बळकटपणा होईल,
जसें त्वां लोखंड चिकण मातीसीं मिसळलेलें पा-
हिलें तसें. ४२ आणि जसा तिच्या पायांच्या
बोटांचा एक अंश लोखंडाचा, आणि त्यांचा दु-
सरा अंश मातीचा होता, तसा राज्याचा एक
भाग बळकट होईल, आणि त्याचा दुसरा भाग
मोडका होईल. ४३ आणि जसें त्वां लोखंड
चिकण मातीसीं मिसळलेलें पाहिलें, तसे ते लोक
आपणांस मनुष्यसंततीसीं मिश्रित करितील;
परंतु जसें लोखंड मातीसीं मिसळत नाहीं, तसे
ते एकमेकासीं लगटणार नाहींत. ४४ आणि या
राजांच्या दिवसांत जें कधीं नाहींसें होणार नाहीं,
असें राज्य आकाशांतला देव स्थापील; आणि
तें राज्य अन्यलोकांकडे सोडण्यांत येणार नाहीं,
तें हीं सर्व राज्यें मोडून नाहींसीं करील, आणि
तें सर्वकालपर्यंत टिकेल. ४५ जसें तो दगड
हातांच्या कर्मावांचून पर्वतांतून छेदिला, आणि
त्याने लोखंड, पित्तल, माती, रुपें, आणि सोनें
हीं ठेंचून टाकिलीं, असें त्वां पाहिलें; तर यानं-
तर जें व्हायाचें आहे, तें मोठ्या देवाने राजाला
कळविलें आहे; आणि स्वप्न निश्चित आहे, आ-
णि त्याचें व्याख्यान विश्वासास योग्य आहे.
४६ तेव्हां नबूखद्रेज्जार राजाने उपडें पडून
दानीयेलाचें भजन केलें, आणि आज्ञा केली, कीं
त्याला अर्पण व सुगंधि वाहावे. ४७ राजा
दानीयेलाला उत्तर करीत ह्मणाला, तूं हें रहस्य
प्रगट करायास समर्थ झालास; तर निश्चयें
तुमचा देव देवांचा देव, आणि राजांचा प्रभु,
आणि रहस्य प्रगट करणारा आहे. ४८ तेव्हां
राजाने दानीयेल श्रेष्ठजन केला, आणि त्याला
बहुत मोठीं दानें दिल्हीं, आणि त्याला बाबेलेच्या
सर्व परगण्यावर अधिकारी, आणि बाबेलेंतल्या
सर्व विद्वानांवरच्या अधिपतींचा मुख्य केलें. ४९
मग दानीयेलाने राजाजवळ विनंती केली, तेव्हां
राजाने शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो बाबे-
लेच्या परगण्याच्या कारभारावर नेमिले, आणि
दानीयेल राजाच्या दरबारांत बसे.

## अध्याय ३.

नबूखद्रेज्जार राजाने एक सोन्याची मूर्त्ति केली.
तिची उंची साठ हात, आणि तिची रुंदी
साहा हात होती; त्याने ती बाबेल परगण्यांत-
ल्या दूरा पटांगणांत स्थापिली. २ तेव्हां नबूख-
द्रेज्जार राजाने जी मूर्त्ति स्थापिली होती, तिच्या
प्रतिष्ठा करण्यास अधिपति, अधिकारी, आणि से-
नापति, न्यायाधीश, भांडारी, मंत्री, प्रांताध्यक्ष,
आणि सर्व देशाध्यक्ष, यावे, ह्मणून त्यांस एकव-
टायाला नबूखद्रेज्जार राजाने पाठविलें. ३ मग
जी मूर्त्ति नबूखद्रेज्जार राजाने स्थापिली होती,
तिच्या प्रतिष्ठा करण्यास अधिपति, अधिकारी,
आणि सेनापति, न्यायाधीश, भांडारी, मंत्री, प्रांता-
ध्यक्ष, आणि सर्व देशाध्यक्ष, एकत्र मिळाले; आणि
जी मूर्त्ति नबूखद्रेज्जाराने स्थापिली होती, तिज-
समोर उभे राहिले. ४ तेव्हां एक आव्हायक
मोठ्याने पुकारला, कीं अहो लोकानो, जातीनो,
आणि भाषानो, तुह्माला आज्ञा केली आहे कीं,
५ ज्या वेळेस तुह्मी करणा, बांसरी, चंग, अलगुजें,
वीणा, तंबुरा, यांचा शब्द आणि सर्व प्रकारांचें
वादन ऐकाल, तेव्हां तुह्मी पायां पडावें, आणि
जी सोन्याची मूर्त्ति नबूखद्रेज्जार राजाने स्थापि-
ली आहे, तिजला भजावें. ६ आणि जो कोणी
पायां पडत नाहीं, आणि भजन करीत नाहीं, तो
त्याच घटिकेस जळत्या अग्नीच्या भट्टीमध्यें टा-
कण्यांत येईल. ७ याकरितां ज्या वेळेस लोकानी
करणा, बांसरी, चंग, अलगुजें, वीणा, यांचा श-
ब्द आणि सर्व प्रकारांचें वादन ऐकिलें, तेव्हां
सर्व लोकानी, जातीनी, आणि भाषानी पायां पडून
जी सोन्याची मूर्त्ति नबूखद्रेज्जार राजाने स्था-
पिली होती, तिला भजिलें.
८ याकरितां त्या वेळेस कितीएक खास्दानी
जवळ येऊन यहूद्यांस दोष लाविला. ९ त्यानी
नबूखद्रेज्जार राजाला बोलतां ह्मटलें, हे राजा,
सर्वकालपर्यंत जीवत ऐस. १० हे राजा, त्वां
ठराव केला, कीं प्रत्येक जो करणा, बांसरी, चंग,
अलगुजें, वीणा, आणि तंबुरा, यांचा शब्द आ-

णि सर्व प्रकारांचें वादन ऐकेल, त्याने सोन्याच्या
मूर्त्तीला पायां पडून भजावें. ११ आणि जो
कोणी पायां पडत नाहीं, आणि भजन करीत
नाहीं, तो जळत्या अग्नीच्या भट्टीमध्यें टाकण्यांत
येईल. १२ त्वां बाबेल परगण्याच्या कारभा-
रावर नेमिले, असे जे कितीएक यहूदी, शद्राख,
मेशाख, आणि अबेद्नगो आहेत; त्या पुरुषानी
हे राजा, तुला मानिलें नाहीं; ते तुझ्या देवांची
सेवा करीत नाहींत, आणि त्वां जी सोन्याची
मूर्त्ति स्थापिली आहे, तिला भजत नाहींत.
१३ तेव्हां नबूखद्रेज्जाराने रोषाने व कोपाने
आज्ञा केली, कीं शद्राख, मेशाख, आणि अबे-
द्नगो आणावे; तेव्हां त्यानी ते पुरुष राजापुढें
आणिले. १४ नबूखद्रेज्जार त्यांस बोलत ह्म-
णाला, अहो शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो,
तुह्मी संकल्प करून माझ्या देवांची सेवा करीत
नाहीं काय? आणि जी सोन्याची मूर्त्ति म्या
स्थापिली आहे, तिला तुह्मी भजत नाहीं काय?
१५ तर ज्या वेळेस तुह्मी करणा, बांसरी, चंग,
अलगुजें, वीणा, आणि तंबुरा, यांचा शब्द आणि
सर्वप्रकारांचें वादन ऐकाल, तेव्हां पायां पडाया-
ला आणि जी मूर्त्ति म्या केली आहे तिला भजा-
याला जर तुह्मी आतां सिद्ध आहां, तर बरें;
परंतु जर तुह्मी भजन करणार नाहीं, तर त्याच
घटकेस तुह्मी जळत्या अग्नीच्या भट्टीमध्यें टाक-
ण्यांत याल; आणि जो देव तुह्माला माझ्या
हातांतून सोडवील, तो कोणता आहे? १६
शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो राजाला
उत्तर करीत ह्मणाले, हे नबूखद्रेज्जारा, तुला या
आज्ञेविषयीं उत्तर द्यायाला आह्मी अगत्य धरीत
नाहीं. १७ जर असें असेल, तर आमच्या ज्या
देवाची सेवा आह्मी करितों, तो आह्माला जळ-
त्या अग्नीच्या भट्टींतून सोडवायाला समर्थ आहे;
आणि हे राजा, तो आह्माला तुझ्या हातांतून
सोडवील. १८ परंतु जरी नाहीं, तरी हे राजा,
तुला कळो, कीं आह्मी तुझ्या देवांची सेवा कर-
णार नाहीं, आणि जी सोन्याची मूर्त्ति त्वां स्था-
पिली आहे, तिला आह्मी भजणार नाहीं.
१९ तेव्हां नबूखद्रेज्जार कोपाने भरिला, आ-
णि शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो यांकडे
त्याच्या मुखाचें रूप पालटलें: मग त्याने बोल-
तांना आज्ञा केली, कीं भट्टीला जेवढें तापन करीत
असत, तेवढ्यापेक्षां सातपट तापन तिला करावें.
२० आणि त्याच्या सैन्यांत जे बलिष्ठ पुरुष होते,
त्यांस त्याने आज्ञा दिल्ही, कीं त्यानी शद्राख,
मेशाख, आणि अबेद्नगो यांस बांधून जळत्या
अग्नीच्या भट्टीमध्यें टाकावें. २१ तेव्हां ते पुरुष
आपले अंगरखे, मोजे, पागोटीं यांत आणि आप-
ल्या दुसऱ्या वस्त्रांत बांधिले, आणि जळत्या
अग्नीच्या भट्टीमध्यें टाकिले. २२ तर राजाची
आज्ञा तीव्र होती, आणि भट्टी फारच तापली
होती, यामुळें ज्या पुरुषानी शद्राख, मेशाख,
आणि अबेद्नगो यांस चढविलें, त्यांस अग्नीच्या
जाळाने ठार मारिलें. २३ आणि ते तिघे पुरुष
शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो जळत्या अ-
ग्नीच्या भट्टीमध्यें बांधिलेले पडले. २४ तेव्हां
नबूखद्रेज्जार राजा विस्मित झाला, आणि त्वरेने
उठून आपल्या मंत्र्यांस बोलत ह्मणाला, आह्मी
तिघे पुरुष अग्नीमध्यें बांधिलेले टाकिले नाहींत
काय? ते राजाला उत्तर करीत ह्मणाले, निश्चयें,
हे राजा. २५ तो उत्तर करीत बोलला, पाहा,
मी चौघे पुरुष मोकळे अग्नीमध्यें फिरतां पाहतों,
आणि त्यांस कांहीं उपद्रव झाला नाहीं; आणि
चौथ्याचें रूप देवाच्या पुत्रासारिखें आहे.
२६ तेव्हां नबूखद्रेज्जार जळत्या अग्नीच्या
भट्टीच्या दाराजवळ जाऊन बोलत ह्मणाला,
अहो शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो, परात्पर
देवाचे सेवकहो, तुह्मी निघून या; तेव्हां श-
द्राख, मेशाख, आणि अबेद्नगो अग्नीच्या मध्यां-
तून निघाले. २७ आणि अधिपति, अधिकारी,
आणि सेनापति, आणि राजमंत्री, यानी एकत्र मि-
ळून ते पुरुष पाहिले, ज्यांच्या शरीरांवर अग्नि
प्रबल झाला नव्हता, आणि त्यांच्या डोयांचे
केशहि हुरपळले नव्हते, आणि त्यांचीं वस्त्रें
पालटलीं नव्हतीं, आणि अग्नीचा वासहि त्यांज-
वर गेला नव्हता. २८ मग नबूखद्रेज्जार बो-
लत ह्मणाला, शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो
यांच्या ज्या देवाने आपला दूत पाठवून,
आपल्या ज्या सेवकानी त्याजवर भाव ठेविला,
आणि राजाची आज्ञा पालटली, आणि त्यानी

आपल्या देवावांचून कोणत्याहि देवाला सेवूं नये,
भजूं नये ह्मणून आपलीं शरीरें दिल्हीं, त्यांस
सोडविलें आहे, तो सुवंदित असो. २९ याक-
रितां मी ठराव करितों, कीं जे कोणतेहि लोक,
जाती, अथवा भाषा, शद्राख, मेशाख, आणि
अबेद्नगो यांच्या देवाविरुद्ध कांहीं अनुचित ह्म-
णतील, यांचे तुकडे तुकडे करण्यांत येतील, आ-
णि त्यांचीं घरें ढीग करण्यांत येतील; कां कीं
जो याप्रमाणें सोडवायास समर्थ आहे, असा दुस-
रा कोणताहि देव नाहीं. ३० तेव्हां राजाने
शद्राख, मेशाख, आणि अबेद्नगो यांस बाबेल
परगण्यांत वाढविलें.

## अध्याय ४.

सर्व लोक, जाति, भाषा जीं सगळ्या पृथ्वीवर
वसतात, त्यांस नबूखद्रेज्झार राजा ह्मणतो,
कीं तुमचें कुशल वाढो. २ परात्पर देवाने
मजकडे जे उत्पात आणि चमत्कार केले आहेत,
ते सांगून दाखवायाला मला बरें वाटलें आहे.
३ त्याचे उत्पात केवढे मोठे, आणि त्याचे चम-
त्कार केवढ्या पराक्रमाचे आहेत? त्याचें राज्य
सनातन राज्य, आणि त्याचें प्रभुत्व युगानुयुगच
आहे.

४ मी नबूखद्रेज्झार आपल्या घरांत स्वस्थ,
आणि आपल्या वाड्यांत टवटवीत होतों. ५
म्यां स्वप्न पाहिला, आणि त्याने मला भयभीत
केलें, आणि माझ्या कल्पना आणि माझ्या मस्त-
कांतले दृष्टांत यानीं मला माझ्या पलंगावर व्या-
कुळ केलें. ६ मग म्या ठराव केला, कीं बाबे-
लेंतल्या सर्व विद्वानांस मजसमोर आंत आणावें,
अशासाठीं कीं त्यानीं मला स्वप्नाचें व्याख्यान
कळवावें. ७ तेव्हां दैवज्ञ, ज्योतिषी, खास्दी,
आणि अंत्रज्ञ आंत आले; आणि म्या त्यांसमोर
स्वप्न सांगितला, परंतु त्यानी मला त्याचें व्या-
ख्यान कळविलें नाहीं.

८ परंतु शेवटीं ज्याचें नाम माझ्या देवाच्या
नामाप्रमाणें बेलटशाज्झार आहे, आणि ज्याच्या
ठायीं पवित्र देवांचा आत्मा आहे, तो दानीयेल
मजसमोर आंत आला; आणि मी त्यासमोर
स्वप्न सांगत बोललों, ९ हे बेलटशाज्झारा, दै-
वज्ञांच्या अधिकाऱ्या, मी जाणतों, कीं पवित्र देवां-
चा आत्मा तुझ्याठायीं आहे, आणि कोणतेंहि
रहस्य तुला अवघड वाटत नाहीं, ह्मणून माझा
जो स्वप्न म्या पाहिला आहे, त्यांतले दृष्टांत
आणि त्याचें व्याख्यान मला सांग. १० माझ्या
पलंगावर माझ्या मस्तकांतले दृष्टांत हेच होते:
म्या पाहिलें, तेव्हां पाहा, पृथ्वीमध्यें एक झाड
आणि त्याची उंची फार होती. ११ तें झाड
वाढलें, आणि बलिष्ठ झालें, आणि त्याची उंची
आकाशापर्यंत आणि त्याचा विस्तार सर्व पृथ्वी-
च्या सीमेपर्यंत पोहंचला. १२ त्याचीं पानें सुं-
दर होतीं, आणि त्याचें फल पुष्कळ होतें, आणि
त्याच्या ठायीं सर्वांसाठीं खाणें होतें; त्याखालीं
रानांतल्या पशूंस सावली मिळे, आणि आकाशां-
तले पक्षी त्याच्या फांद्यांवर वसत, आणि त्याव-
रून सर्व प्राणी पोषण पावत असत. १३ म्या
आपल्या पलंगावर आपल्या मस्तकांतले दृष्टांत
पाहिले, तेव्हां पाहा, एक जागणारा आणि पवि-
त्रजन आकाशांतून उतरला; १४ तो मोठ्याने
पुकारून असें ह्मणाला, कीं त्या झाडाला तोडा,
आणि त्याच्या फांद्या कापून टाका, त्याचीं पानें
उडवा, आणि त्याचें फल विखरा; त्याच्या खा-
लतून पशु पळोत, आणि त्याच्या फांद्यांवरून
पक्षी उडोत. १५ तथापि त्याच्या मुळांचें खोड
भूमींत माळांतल्या कोमळ गवतामध्यें लोखंडी
व पित्तली बंधनयुक्त सोडून ठेवा; आणि तो
आकाशांतल्या दहिंवराने भिजत जावो, आणि
पशूंसंगतीं भूमीवरल्या गवतामध्यें त्याचा विभाग
असो; १६ त्याचें हृदय पालटून अमनुष्य हो-
वो, आणि पशुहृदय त्याला प्राप्त होवो; आणि
त्याजवर सात समय क्रमून जावोत. १७ आज्ञा
जागणाऱ्यांच्या ठरावाने, आणि प्रश्न पवित्रांच्या
वचनाने आहे; अशासाठीं कीं जीवंतानी जाणावें,
कीं मनुष्यांच्या राज्यावर परात्पर प्रभुत्व करि-
तो, आणि ज्या कोणाला तो इच्छितो, त्याला तें
देतो, आणि त्याजवर मनुष्यांतला नीचजन स्था-
पितो. १८ हा स्वप्न म्या नबूखद्रेज्झार राजानें
पाहिला; तर हे बेलटशाज्झारा, तूं याचें व्या-
ख्यान सांग, कां कीं माझ्या राष्ट्रांतले सर्व वि-
द्वान मला व्याख्यान कळवायास समर्थ नाहींत;

परंतु तूं समर्थ आहेस, कारण कीं पवित्र देवांचा
आत्मा तुझ्या ठायीं आहे.
१९ तेव्हां ज्याचें नाम बेलटशाज्जार तो
दानीयेल एक घटकापर्यंत बिस्मित होता, आणि
त्याच्या कल्पनानीं त्याला व्याकुल केलें; राजा
बोलत ह्मणाला, हे बेलटशाज्जारा, स्वप्नानें अथ-
वा त्याच्या व्याख्यानानें तुला व्याकुल करूं नये;
बेलटशाज्जार उत्तर करीत ह्मणाला, हे माझ्या
प्रभो, स्वप्न तुझ्या द्वेष्यांस, आणि त्याचें व्या-
ख्यान तुझ्या वैऱ्यांस असो. २० जें झाड त्वां
पाहिलें, जें वाढलें, आणि बलिष्ठ झालें, आणि
ज्याची उंची आकाशापर्यंत व ज्याचा विस्तार
सर्व पृथ्वीवर पोहंचला, २१ ज्याचीं पानें सुंदर
होतीं, आणि फळ पुष्कळ होतें, ज्याच्या ठायीं
सर्वांसाठीं खाणें होतें, ज्याखालीं रानांतले पशु
राहत, आणि ज्याच्या फांद्यांवर आकाशांतले
पक्षी वसत असत; २२ तो, हे राजा, तूंच
आहेस, जो वाढला आहेस, आणि बलिष्ठ झा-
ला आहेस; आणि तुझें मोठेंपण वाढलें आहे,
आणि तें आकाशापर्यंत व तुझें प्रभुत्व पृथ्वीच्या
सीमेपर्यंत पोहंचलें आहे. २३ आणि राजानें
असें पाहिलें, कीं जागणारा आणि पवित्रजन आ-
काशांतून उतरला, आणि ह्मणाला, तुह्मी त्या
झाडाला तोडून नाहींसें करा; तथापि त्याच्या
मुळांचें खोड भूमींत माळांतल्या कोमळ गवता-
मध्यें लोखंडी व पित्तली बंधनयुक्त सोडून ठेवा;
आणि तो आकाशांतल्या दहिंवरानें भिजत जावो,
आणि त्याजवर सात समय क्रमून जात तोंपर्यंत
त्याचा विभाग रानांतल्या पशूंसंगतीं असो. २४
तर हे राजा, व्याख्यान हेंच आहे, आणि **परा-
त्पराचा** जो ठराव माझ्या प्रभु राजावर आला
आहे, तो हाच आहे कीं; २५ ते तुला मनु-
ष्यांपासून घालवितील, आणि रानांतल्या पशूं-
संगतीं तुझी वस्ती होईल, आणि तुला बैलांप्रमा-
णें गवत चारितील, आणि तुला आकाशांतल्या
दहिंवरानें भिजूं देतील; आणि मनुष्यांच्या राज्या-
वर **परात्पर** प्रभुत्व करितो, आणि ज्या कोणाला
तो इच्छितो त्याला तें देतो, असें तूं जाणसील
तोंपर्यंत सात समय तुजवर क्रमून जातील. २६
आणि झाडाच्या मुळांचें स्थाणु सोडावें, ह्मणून
त्यांनीं आज्ञा केली; तर आकाशें प्रभुत्व करि-
तात, असें त्वां जाणल्यावर तुझें राज्य तुजकडे
ठरेल. २७ याकरितां हे राजा, माझी मसलत
तुला मान्य असो, तूं न्यायीपण करून आपलीं
पापें, आणि दीनांवर दया करून आपले अन्याय
दूर कर; असें केल्यानें कदाचित तुझें स्वस्थपण
लांबेल.
२८ हें सर्व नबूखद्रेज्जारावर आलें. २९
बारा महिन्यांनंतर तो बाबेलेंतल्या राजमंदिरा-
वर चालत होता. ३० राजा बोलत ह्मणाला,
जी म्यां आपल्या राजवाड्याकरितां, आणि आप-
ल्या महिम्याच्या गौरवासाठीं आपल्या बलाच्या
सामर्थ्यानें बांधिली आहे, ती मोठी बाबेल हीच
आहे कीं नाहीं? ३१ हें वचन राजाच्या मु-
खांत असतांच आकाशांतून वाणी येऊन बोलली,
हे नबूखद्रेज्जार राजा, तुजपासून राज्य गेलें
आहे. ३२ आणि ते तुला मनुष्यांपासून घाल-
वितील, आणि तुझी वस्ती रानांतल्या पशूंसंगतीं
होईल; ते तुला बैलांप्रमाणें गवत चारतील;
आणि मनुष्यांच्या राज्यावर **परात्पर** प्रभुत्व क-
रितो, आणि ज्या कोणाला तो इच्छितो त्याला तें
देतो, असें तूं जाणसील, तोंपर्यंत सात समय
तुजवर क्रमून जातील. ३३ त्याच घटिकेस
नबूखद्रेज्जारावर गोष्ट प्रत्ययास आली; मग तो
मनुष्यांपासून घालविला, आणि बैलांप्रमाणें गवत
खाऊं लागला, आणि त्याचें शरीर आकाशांत-
ल्या दहिंवरानें भिजत गेलें, एथपर्यंत कीं त्याचे
केंस गरुडांच्या पिसांसारिखे, आणि त्याचीं नखें
पक्ष्यांच्या नखांसारिखीं वाढलीं.
३४ आणि ते दिवस समाप्त झाल्यावर म्यां
नबूखद्रेज्जारानें आपले डोळे आकाशाकडे वर
केले, आणि माझी बुद्धि मला परत आली; ते-
व्हां म्यां **परात्पराचें** सुवंदन केलें, आणि **स-
दाजीवंताची** स्तुति व प्रशंसा केली, ज्या त्याचें
प्रभुत्व सर्वकाळचें प्रभुत्व आहे, आणि त्याचें
राज्य युगानुयुगच आहे. ३५ आणि पृथ्वींतले
सर्व राहणारे कांहीं नाहीं, असे मानिलेले आहेत;
आणि तो आपल्या इच्छेप्रमाणें आकाशांतल्या
सैन्यांत आणि पृथ्वींतल्या राहणाऱ्यांमध्यें करितो;
आणि त्याचा हात कोणाच्यानें आकळवत नाहीं;

अथवा तूं काय करितोस? असें कोणाच्यानें त्या-
ला ह्मणवत नाहीं. ३६ त्याच वेळेस माझी
बुद्धि मला परत आली; आणि माझ्या राज्या-
च्या गौरवासाठीं माझें ऐश्वर्य व तेज मला परत
आलें; आणि माझे मंत्री व प्रधान मला शोधूं
लागले; आणि मी आपल्या राज्यावर स्थापित
झालों, आणि मला उत्कृष्ट महत्व प्राप्त झालें.
३७ आतां मी नबूखद्नेज्जार आकाशांतल्या रा-
जाला स्तवितों, आणि थोर ह्मणतों, आणि गौ-
रवितों, ज्या त्याचीं सर्व कर्मे खरेपण, आणि
त्याचे मार्ग न्यायीपण असीं आहेत; आणि
जे गर्वाने वर्त्ततात, त्यांस नीच करावयास तो
समर्थ आहे.

## अध्याय ५.

बेलशाज्जार राजाने आपल्या महाजनांतल्या
एका हजारासाठीं भोजन सिद्ध केलें, आणि
त्या हजारासमक्ष द्राक्षरस प्याला. २ बेलशा-
ज्जाराने द्राक्षरस पितांना आज्ञा केली, कीं यरू-
शालेमेंत जें मंदिर होतें, त्यांतून जीं सोन्याचीं
आणि रुप्याचीं पात्रें त्याच्या नबूखद्नेज्जार बापाने
काढून नेलीं होतीं, तीं आणावीं, अशासाठीं कीं
राजाने आणि त्याच्या महाजनानी, त्याच्या स्त्रि-
यानी आणि त्याच्या उपपत्नीनी त्यांतून प्यावें. ३
तेव्हां देवाच्या घरचें जें मंदिर यरूशालेमेंत
होतें, त्यांतून जीं सोन्याचीं पात्रें काढून नेलीं
होतीं, तीं त्यानी आणिलीं; मग राजाने व त्या-
च्या महाजनानी त्याच्या स्त्रियानी व त्याच्या
उपपत्नीनी त्यांतून प्यालें. ४ ते द्राक्षारस
प्याले, आणि सोन्याच्या व रुप्याच्या, पित्तला-
च्या, लोखंडाच्या, लांकडाच्या, आणि दगडाच्या
देवांस स्तविलें.

५ त्याच घटकेस मनुष्याच्या हाताच्या बोटानी
निघून समईसमोर राजमंदिराच्या भिंतीच्या गिला-
व्यावर लिहिलें; आणि जो हात लिहीत होता,
त्याचा पंजा राजाने पाहिला. ६ तेव्हां राजाची
मुखचर्या पालटली, आणि त्याच्या कल्पनानी त्याला
व्याकुळ केलें, आणि त्याच्या कंबरेचे संधि लट-
पटीत पडले, आणि त्याचे गुडघे एकमेकासीं आ-
पटूं लागले. ७ राजा मोठ्याने ओरडून बोल-
ला, कीं ज्योतिषी, खास्दी, आणि अंत्रज्ञ यांस
आंत आणावें; मग राजाने बोलतां बाबेलेंतल्या
विद्वानांस ह्मटलें, जो कोणी हा लेख वाचील,
आणि याचें व्याख्यान मला सांगेल, तो किरमी-
जीरंगाचें वस्त्र धारण करील, आणि त्याच्या ग-
ळ्यांत सोन्याची सांखळी घालण्यांत येईल, आ-
णि तो राज्यांतला तिसरा अधिकारी होईल. ८
तेव्हां राजाचे सर्व विद्वान आंत आले; परंतु वो
लेख वाचायास, अथवा त्याचें व्याख्यान राजा-
ला कळवायास ते समर्थ नव्हते. ९ तेव्हां बेल-
शाज्जार राजा फारच व्याकुल झाला, आणि
त्याच्या अंगीं त्याची मुखचर्या पालटली, आणि
त्याचे महाजन विस्मित झाले.

१० मग राजाच्या आणि त्याच्या महाजनां-
च्या वचनांमुळें राणी भोजनशालेंत आली; तेव्हां
राणी बोलत ह्मणाली, हे राजा, सर्वकाळपर्यंत
जीवत ऐस; तुझ्या कल्पनानी तुला व्याकुल करूं
नये, आणि तुझी मुखचर्या पालटूं नये. ११
पवित्र देवांचा आत्मा ज्याच्या ठायीं आहे, असा
एक पुरुष तुझ्या राज्यांत आहे; आणि तुझ्या
बापाच्या दिवसांत त्याच्या ठायीं प्रकाश आ-
णि बुद्धि आणि ज्ञान देवांच्या ज्ञानासारिखें
सांपडलें; मग तुझा बाप, नबूखद्नेज्जार राजा,
तुझा बाप राजाच याने त्याला दैवज्ञ, ज्योतिषी,
खास्दी, अंत्रज्ञ यांचा अधिकारी नेमून ठेविलें;
१२ कां कीं उत्तम आत्मा व ज्ञान व बुद्धि, स्व-
प्नव्याख्यान व गुह्य दृष्टांत प्रगट करणें व गांठ
सोडणें हीं त्याच दानीयेलाच्या ठायीं सांपडलीं,
ज्या त्याला राजाने बेलटशाज्जार नाम ठेविलें;
आतां दानीयेलाला बोलावावें, ह्मणजे तो व्या-
ख्यान सांगेल. १३ तेव्हां दानीयेल राजासमोर
आंत नेला; राजा बोलतां दानीयेलास ह्मणाला,
कीं माझा बाप राजा याने जे यहूदाचे पाडाव
यहूदा देशांतून आणिले, त्यांतला जो दानीयेल
तो तूंच आहेस काय? १४ तर म्या तुजवि-
षयीं ऐकिलें आहे, कीं देवाचा आत्मा तुझ्या
ठायीं आहे, आणि प्रकाश व बुद्धि व उत्कृष्ट
ज्ञान हींहि तुझ्या ठायीं सांपडलीं आहेत. १५
आणि आतां विद्वान व ज्योतिषी मजसमोर आंत
आणिले आहेत, अशासाठीं कीं त्यानी हा लेख

वाचावा, आणि याचें व्याख्यान मला कळवावें;
परंतु ते गोष्टीचें व्याख्यान दाखवायास समर्थ
नाहींत. १६ परंतु म्या तुजविषयीं ऐकिलें आहे,
कीं तूं व्याख्यानें करायाला आणि गांठ सोडायाला
समर्थ आहेस; आतां हा लेख वाचायाला, आ-
णि याचें व्याख्यान मला कळवायाला जर तूं
समर्थ आहेस, तर किरमिजीरंगाचें वस्त्र धारण
करिसील, आणि सोन्याची सांखळी तुझ्या ग-
ळ्यांत घालण्यांत येईल, आणि राज्यांतला ति-
सरा अधिकारी होसील.
१७ तेव्हां दानीयेल राजासमोर उत्तर करीत
ह्मणाला, तुझीं दानें तुलाच असोत, आणि तूं
आपल्या देणग्या इतराला दे; तथापि मी राजा-
साठीं लेख वाचीन, आणि त्याचें व्याख्यान त्या-
ला कळवीन. १८ हे राजा, परात्पर देवानें तु-
झ्या नबूखद्नेज्जार बापाला राज्य व महत्व व
गौरव व ऐश्वर्य दिल्हें. १९ आणि जें महत्व
त्यानें त्याला दिल्हें, त्यामुळें सर्व लोक, जाति,
आणि भाषा त्यासमोर कांपत व भयभीत असत;
ज्याला तो इच्छी त्याला वधी; आणि ज्याला
इच्छी त्याला वांचूं देई; आणि ज्याला इच्छी
त्याला थोर करी; आणि ज्याला इच्छी त्याला
नीच करी. २० परंतु जेव्हां त्याचें हृदय गर्विष्ठ
झालें, आणि त्याचें मन गर्वानें कठोर झालें, ते-
व्हां तो आपल्या राज्यसिंहासनावरून भ्रष्ट झा-
ला, आणि त्यांनीं त्याचें गौरव त्यापासून काढिलें.
२१ आणि त्याला मनुष्यजातीपासून घालविलें;
आणि त्याचें हृदय पशूंच्या हृदयासारिखें झालें;
आणि त्याची वस्ती रानगाढवांसंगतीं झाली;
लोक त्याला बैलांप्रमाणें गवत चारीत; आणि
त्याचें शरीर आकाशांतल्या दहिंवरानें भिजत
गेलें; एथपर्यंत कीं त्यानें जाणलें, कीं परात्पर
देव मनुष्यांच्या राज्यावर प्रभुत्व करितो, आणि
ज्या कोणाला तो इच्छितो, त्याला त्याजवर स्था-
पितो. २२ आणि हे बेलशाज्जारा, जो तूं त्या-
चा पुत्र आहेस, जरीं त्वां हें सर्व जाणलें, तरीं
त्वां आपलें मन नम्र केलें नाहीं; २३ परंतु त्वां
आपणाला आकाशांतल्या प्रभूविरुद्ध उंच केलें
आहे; आणि कित्येकांनीं त्याच्या मंदिरचीं पात्रें
तुजपुढें आणिलीं आहेत, आणि त्वां आणि तुझ्या
महाजनांनी, तुझ्या स्त्रियांनीं व तुझ्या उपपत्नींनीं
त्यांतून द्राक्षारस प्याला आहे; आणि जे रुप्याचे
व सोन्याचे, पित्तळाचे, लोखंडाचे, लांकडाचे
व दगडाचे देव पाहत नाहींत, ऐकत नाहींत, जा-
णत नाहींत, त्यांस त्वां स्तविलें आहे; आणि
ज्या देवाच्या हातांत तुझा श्वास आहे, आणि
ज्याच्या स्वाधीन तुझे सर्व मार्ग आहेत, त्याला
त्वां गौरविलें नाहीं. २४ मग हाताचा पंजा
त्यापासून पाठविला होता, आणि हा लेख लि-
हिला होता.
२५ आणि जो लेख लिहिला होता, तो
हाच, मने मने तकेल व फारसीन. २६
गोष्टीचें व्याख्यान हेंच, मने, ह्मणजे देवानें
तुझें राज्य मोजून समाप्त केलें. २७ तकेल,
ह्मणजे तूं तागडींत तोलिला आहेस, आणि उणा
निघाला आहेस. २८ फरेस, ह्मणजे तुझें राज्य
विभागलें आहे, आणि मादी व फारसी यांस
दिल्हें आहे. २९ तेव्हां बेलशाज्जारानें आज्ञा
केली, आणि दानीयेलाला त्यांनीं किरमिजीरंगाचें
वस्त्र लेवविलें, आणि त्याच्या गळ्यांत सोन्याची
सांखळी घातली, आणि त्याविषयीं गाजविलें,
कीं तो राज्यांतला तिसरा अधिकारी असत जा-
याचा आहे. ३० त्याच रात्रीं खास्द्यांचा
राजा बेलशाज्जार याचा वध झाला. ३१ आणि
दारयावेश जो मादी त्यानें राज्य घेतलें; त्या
वेळेस तो सुमारें बासष्ट वर्षांचा होता.

## अध्याय ६.

दारयावेशाला बरें वाटलें, कीं जे सगळ्या
राज्यावर असावे, असे एकशें वीस अधि-
कारी राज्यावर स्थापावे; २ आणि ज्यांतला
मुख्य दानीयेल होता, असे तिघे अधिपति त्यां-
जवर स्थापावे; अशासाठीं कीं अधिकाऱ्यांनीं
त्यांस निवेदन करावें, आणि राजाला हानि प्राप्त
होऊं नये. ३ तेव्हां हा दानीयेल अधिपतींवर
आणि अधिकाऱ्यांवर विशिष्ट झाला; कां कीं
त्याच्या ठायीं उत्तम आत्मा होता; आणि त्या-
ला सगळ्या राज्यावर स्थापावें, असी कल्पना
राजा करीत होता.
४ तेव्हां अधिपति आणि अधिकारी यांनीं

दानीयेलाविरुद्ध राज्याविषयीं निमित्त सांपडावें,
ह्मणून शोधिलें; परंतु ते कांहीं निमित्त अथवा
दोष काढायास समर्थ नव्हते; कां कीं तो विश्वा-
सू होता, आणि त्याच्या ठायीं कांहीं चूक अथवा
दोष निघेना. ५ तेव्हां ते पुरुष ह्मणाले, जर
आमच्याने या दानीयेलाविरुद्ध याच्या देवाच्या
धर्मविधीविषयीं निमित्त काढवत नाहीं, तर या-
विरुद्ध आह्माला कांहीं निमित्त काढवणार नाहीं.
६ तेव्हां ते अधिपति आणि अधिकारी राजाज-
वळ एकत्र मिळाले, आणि त्याला असें ह्मणाले,
कीं हे दारयावेश राजा, सर्वकाळपर्यंत जीवत
ऐस. ७ राज्यांतले सर्व अधिपति, देशाध्यक्ष,
आणि अधिकारी, मंत्री, आणि सेनापति, यांनी
मसलत केली आहे, कीं राजाचा नियम ठरवावा
आणि बसकट ठराव करावा, कीं हे राजा, जो
कोणी तीस दिवसांपर्यंत तुजजवळच्या वांचून को-
णत्याहि देवाजवळ अथवा मनुष्याजवळ विनंती
करील, तो सिंहांच्या गुहेंत टाकावा. ८ आतां
हे राजा, ठराव ठरीव आणि लेखावर सई घाल,
अशासाठीं कीं मादी आणि फारसी यांचा जो
विधि ढळत नाहीं, त्याप्रमाणें तें पालटूं नये. ९
याकरितां दारयावेश राजाने लेखावर आणि ठरा-
वावर सई घातली.

१० तर जेव्हां दानीयेलाने जाणलें, कीं ले-
खावर सई घातली आहे, तेव्हां आपल्या घरांत
गेला; आणि त्याच्या कोठडीच्या खिडक्या य-
रूशालेमेकडे उघडल्या असतां, जसा तो पूर्वीं
करीत असे, तसा प्रतिदिवशीं तीन वेळा आपले
गुडघे टेंकून आपल्या देवासमोर प्रार्थना करीत
आणि उपकार मानीत गेला. ११ तेव्हां ते पुरुष
एकत्र मिळाले, आणि त्यांजला दानीयेल आप-
ल्या देवासमोर प्रार्थना व विनंती करीत अस-
तांना सांपडला. १२ तेव्हां ते जवळ येऊन
राजासमोर राजाच्या ठरावाविषयीं ह्मणाले, हे
राजा, तुजजवळच्या वांचून कोणत्याहि देवाजवळ
अथवा मनुष्याजवळ जो कोणी तीस दिवसांपर्यंत
विनंती करील, तो सिंहांच्या गुहेंत टाकावा, अशा
ठरावावर त्वां सई घातली कीं नाहीं? राजा
उत्तर करीत ह्मणाला, मादी आणि फार-
सी यांचा जो विधि ढळत नाहीं, त्याप्रमाणें गोष्ट
निश्चित आहे. १३ मग ते राजासमोर उत्तर
करीत ह्मणाले, हे राजा, यहूद्यांच्या पाडावांतला
जो दानीयेल आहे, तो तुला आणि ज्या ठरावा-
वर त्वां सई घातली आहे, त्यालाहि मानीत
नाहीं; परंतु प्रतिदिवशीं तीन वेळा तो विनंती
करीत जातो. १४ तेव्हां ही गोष्ट ऐकून राजा
फार अनुतापला, आणि त्याने दानीयेलास सोड-
वावें, ह्मणून त्याकडे आपलें मन लाविलें; आणि
सूर्य मावळल्यापर्यंत त्याला सोडवायास प्रयत्न
केला. १५ तेव्हां ते पुरुष राजाजवळ एकत्र
मिळून राजाला ह्मणाले, हे राजा, तूं जाण, कीं
मादी आणि फारसी यांचा विधि असा आहे,
कीं जो कोणताहि ठराव अथवा नियम राजा ठर-
वितो, तो पालटायाचा नाहीं. १६ तेव्हां राजाने
आज्ञा केली, मग त्यांनी दानीयेल आणून सिंहां-
च्या गुहेंत टाकिला; राजाने तर दानीयेलाला
ह्मटलें होतें, कीं तूं आपल्या ज्या देवाची सेवा
नित्य करितोस, तो तुला सोडवील. १७ मग
लोकांनी एक दगड आणून गुहेच्या मुखावर घात-
ला; आणि राजाने आपल्या मुद्रेने आणि आप-
ल्या महाजनांच्या मुद्रेने त्याला मुद्रित केलें; अ-
शासाठीं कीं दानीयेलाविषयीं जो संकल्प ठरला,
तो पालटूं नये. १८ नंतर राजा आपल्या वा-
ड्यांत गेला, आणि सर्व रात्र उपासीं राहिला;
आणि त्यापुढें वाद्यें आंत आणिलीं नव्हतीं; आणि
त्याची झोंप त्यापासून गेली. १९ मग राजा
मोठ्या पहांटेस उठून त्वरेने सिंहांच्या गुहेस
गेला. २० आणि त्याने गुहेजवळ येऊन शोक-
वाणीने दानीयेलाला आरोळी मारिली; राजा
दानीयेलास बोलत ह्मणाला, हे दानीयेला, जि-
वंत देवाच्या सेवका, तूं आपल्या ज्या देवाची
सेवा नित्य करीस, तो तुला सिंहांपासून सोडवा-
यास समर्थ आहे काय? २१ तेव्हां दानीयेल राजा-
ला बोलला, हे राजा, सर्वकालपर्यंत जीवत ऐस.
२२ माझ्या देवाने आपला दूत पाठवून सिंहांचीं
मुखें झांकिलीं आहेत, ह्मणून त्यांनी मला उपद्रव
केला नाहीं; कां कीं त्यासमोर माझ्याठायीं निर्दो-
षता सांपडली; आणि हे राजा, तुजसमोरहि
म्या कांहीं वाईट केलें नाहीं. २३ तेव्हां राजा
त्याविषयीं अत्यंत हर्षित झाला, आणि त्याने

आज्ञा केली, कीं दानीयेलाला गुहेंतून काढावें;
मग दानीयेलास गुहेंतून काढिलें, आणि त्याच्या
अंगावर कांहीं क्षत सांपडलें नाहीं, कारण कीं
याने आपल्या देवावर विश्वास ठेविला होता.
२४ मग राजाने आज्ञा केली, तेव्हां ज्या
रुषानी दानीयेलाला दोष ठेविला होता, त्यांस
यानी आणिलें, आणि त्यांस, त्यांच्या लेंकरांस
ा त्यांच्या स्त्रियांस सिंहांच्या गुहेंत टाकिलें;
आणि तीं गुहेच्या तळास पोंहचल्यापूर्वी सिंहा-
नी त्यांजवर प्रबल होऊन त्यांच्या सर्व हाडांचें
चूर्ण केलें.
२५ तेव्हां दारयावेश राजाने सर्व लोक,
जाति, आणि भाषा, जीं सर्व पृथ्वीवर वसत होतीं,
यांजकडे लिहिलें, कीं तुमचें कुशल वाढो. २६
मी ठराव करितों, कीं माझ्या राज्याच्या सर्व
राष्ट्रांत मनुष्यानी दानीयेलाच्या देवासमोर कांपत
व भय धरीत जावें; कां कीं तो जीवंत देव आहे,
आणि सदासर्वकालपर्यंत अढळ आहे, आणि
क्षीण व्हायाचें नाहीं, असें त्याचें राज्य आहे,
आणि त्याचें प्रभुत्व शेवटपर्यंत आहे. २७
तो सोडवितो आणि पार पाडितो, आणि आका-
शांत व पृथ्वींत उत्पात व आश्चर्यकर्मै करितो,
ज्या त्यानें दानीयेलाला सिंहांपासून सोडविलें
आहे. २८ तर हा दानीयेल दारयावेशाच्या
राज्यांत, व खोरेश फारसी याच्या राज्यांत
वाढला.

## अध्याय ७.

बाबेलेचा राजा बेलशाज्जार याच्या पहिल्या
वर्षांत दानीयेलाने आपल्या पलंगावर स्वप्न
पाहिला, आणि त्याला आपल्या मस्तकांतले दृष्टांत
झाले; तेव्हां त्याने स्वप्न लिहिला, आणि गोष्टीं-
चा सारांश सांगितला. २ दानीयेल बोलत
म्हणाला, रात्रीं मी आपल्या दृष्टांतांत पाहत
होतों, तेव्हां पाहा, आकाशांतले चार वारे मो-
ठ्या समुद्रावर सुटले. ३ आणि चार मोठे जीव
समुद्रांतून निघाले, ते परस्पर निराळे होते. ४
पहिला सिंहासारिखा होता, आणि त्याला गरु-
डाचे पंख होते; मी एथपर्यंत पाहत होतों, कीं
त्याचे पंख हिसकून काढिले, आणि तो पृथ्वीवरून
उंचाविला, आणि मनुष्यासारिखा पायांवर उभा
केला, आणि त्याला मनुष्यहृदय दिल्हें. ५
आणि पाहा इतरजीव, दुसरा अस्वलासारिखा
होता, आणि त्याने आपणाला एका अंगावर
उभारिलें, आणि त्याच्या मुखांत त्याच्या दांतां-
मध्यें तीन बरगड्या होत्या; आणि कितीएक
त्याला म्हणाले, कीं तूं उठून पुष्कळ मास खा.
६ त्यानंतर मी पाहत होतों, आणि पाहा, चि-
त्यासारिखा इतर होतां, आणि त्याला आपल्या
पाठीवर पक्ष्याचे चार पंख होते; आणि त्या
जीवाला चार मस्तकें होतीं; आणि त्याला प्रभु-
त्व दिल्हेलें होतें. ७ त्यानंतर मी रात्रींतल्या दृष्टां-
तांत पाहत होतों, आणि पाहा, भयंकर व बळ-
कट व फार पराक्रमी असा चौथा जीव होता,
आणि त्याला लोखंडाचे मोठे दांत होते; त्याने
खाल्लें, आणि तुकडे तुकडे केले, आणि शेष आ-
पल्या पायानी तुडविलें; आणि त्याच्या पूर्वींचे
जे जीव होते, त्या सर्वांहून तो निराळा होता;
आणि त्याला दाहा शिंगें होतीं. ८ मी त्या
शिंगांचें ध्यान करीत होतों, आणि पाहा, इतर
एक धाकलें शिंग त्यांमध्यें उगवलें, आणि त्या-
पुढें पूर्वशिंगांतलीं तीन शिंगें उपटिलीं; आणि
पाहा, या शिंगांच्या ठायीं मनुष्याच्या डोळ्यां-
सारिखे डोळे होते, आणि मोठ्या गोष्टी बोल-
णारें मुखहि होतें.
९ मी एथपर्यंत पाहत होतों, कीं सिंहासनें
पाडून टाकिलीं, आणि दिवसांचा पुरातन बस-
ला, त्याचें वस्त्र बर्फासारिखें पांढरें होतें, आणि
त्याच्या डोईचे केस स्वच्छ लोकरीसारिखे होते;
त्याचें सिंहासन अग्निज्वालांसारिखें होतें, आणि
त्याचीं चाकें जळत्या अग्नीसारिखीं होतीं. १०
त्यासमोरून अग्नीचा प्रवाह निघून येत होता;
हजारों हजार त्याची सेवा करीत होते, आणि
लाखो लाख त्यासमोर उभे राहिले होते; न्या-
यसमारंभ बसविला, आणि पुस्तकें उघडिलीं.
११ तें शिंग ज्या मोठ्या गोष्टी बोलत होतें,
त्याच्या शब्दामुळें मी तेव्हां पाहत होतों; मी
एथपर्यंत पाहत होतों, कीं तो जीव वधिला,
आणि त्याचें शरीर नाशिलें, आणि जळत्या अ-
ग्नीला दिल्हें. १२ आणि जे बरकड जीव त्यांचें

प्रभुत्व काढिलें; परंतु समय व कालपर्यंत जीव-
नाची वृद्धि त्यांस दिल्ही. १३ मी रात्रींतल्या
दृष्टांतांत पाहत होतों, आणि पाहा, मनुष्याच्या
पुत्रासारिखा एक आकाशाच्या आभाळासुद्धां येत
होता, आणि दिवसांच्या **पुरातनाकडेस** पोहं-
चला, आणि कितिएकांनी त्याला त्यासमोर जवळ
आणिलें. १४ आणि त्याला प्रभुत्व व राज्य
व गौरव दिल्हें, आणि सर्व लोक, जाति, व भाषा
हीं त्याची सेवा करितीं झालीं; त्याचें प्रभुत्व
सनातन प्रभुत्व आहे, तें ढळायाचें नाहीं, आणि
जें क्षीण व्हायाचें नाहीं असें त्याचें राज्य आहे.
१५ मी दानीयेल आपल्या अंगामध्यें आप-
ल्या आत्म्यांत खिन्न झालों, आणि माझ्या मस्त-
कांतल्या दृष्टांतांनी मला व्याकुल केलें. १६ जे
उभे राहिले होते, त्यांतल्या एकाजवळ मी गेलों,
आणि म्यां त्याजवळ या सर्वांविषयीं निश्चय पुसला;
तेव्हां त्याने मला तो सांगितला, आणि गोष्टींचें
व्याख्यान मला कळविलें. १७ ते मोठे जीव जे
चार आहेत, ते चार राजे आहेत, जे पृथ्वींतून
उठतील. १८ परंतु **परात्पराचे** पवित्रजन राज्य
घेतील, आणि सर्वकालपर्यंत सदासर्वकालपर्यंत
राज्य भोगितील. १९ तेव्हां जो चौथा जीव
सर्व इतरांपेक्षां निराळा आणि फारच भयं-
कर होता, ज्याचे दांत लोखंडाचे होते, आणि
ज्याचीं नखें पित्तळाचीं होतीं, ज्याने खाल्लें, तुकडे
तुकडे केले, आणि शेष आपल्या पायांनी तुडविलें
त्यांविषयीं; २० आणि त्याच्या मस्तकाच्या
ठायीं जीं दाहा शिंगें होतीं, त्यांविषयीं आणि
जें इतर उगवलें, ज्यापुढें तीन पडलीं होतीं, ह्म-
णजे ज्या शिंगाला डोळे होते, आणि मोठ्या गो-
ष्टी बोलणारें मुखहि होतें, ज्याची दृष्टि आपल्या
सोबत्यांच्या दृष्टीपेक्षां बळकट होती, त्यांविषयीं
निश्चय जाणायाला म्यां इच्छिलें. २१ मी पा-
हत होतों, आणि जोंपर्यंत दिवसांचा पुरातन
आला, आणि **परात्पराच्या** पवित्रांस न्यायाधि-
कार दिल्हा, आणि समय आला असतां पवित्र-
जन राज्य घेऊन भोगिते झाले, २२ तोंपर्यंत
तें शिंग पवित्रजनांसीं लढाई करीत गेलें, आणि
त्यांजवर प्रबल होत गेलें. २३ तो ह्मणाला,
कीं चौथा जीव पृथ्वींतलें चौथें राज्य होईल, तें
सर्व राज्यांहून निराळें होईल, आणि सर्व पृथ्वी-
ला खाईल, आणि तिला तुडवून टाकील, आणि
तिचें चूर्ण करील. २४ आणि जीं दाहा शिंगें
त्या राज्यांतून उगवलीं, तीं दाहा राजे आहेत,
जे ते उठतील; आणि त्यानंतर एक अन्य उठेल;
आणि तो पूर्वींहून निराळा होईल, आणि तो ति-
हीं राजांस दांत करील. २५ आणि तो **परात्प-
राविरुद्ध** वचनें बोलेल, आणि **परात्पराच्या**
पवित्रजनांस पाडील, आणि समय व विधि पाल-
टायाला कल्पना करील; आणि समय व अनेक
समय व समयांच्या विभागापर्यंत ते त्याच्या
हातीं देण्यांत येतील. २६ परंतु न्यायसभा
बसेल, तेव्हां ते त्याचें प्रभुत्व काढितील, शेवट-
पर्यंत नासावें व बुडवावें ह्मणून. २७ आणि रा-
ज्य व प्रभुत्व आणि सर्व आकाशांखालच्या रा-
ज्यांचें मोठेपण **परात्पराच्या** पवित्र लोकांस मि-
ळेल, त्याचें राज्य सर्वकाळचें राज्य आहे, आणि
सर्व प्रभुत्वें त्याची सेवा आणि मान्यता करितील.
२८ एथपर्यंत गोष्टीची समाप्ति आहे. तर मी
दानीयेल काय ह्मणूं? माझ्या कल्पनांनी मला
अत्यंत व्याकुळ केलें, आणि माझ्या ठायीं माझी
मुखचर्या पालटली; तथापि म्यां आपल्या हृद-
यांत गोष्ट राखिली.

## अध्याय ८.

जो दृष्टांत मला प्रथम दिसला, त्यानंतर बेल-
शाज्जार राजाच्या राज्याच्या तिसऱ्या व-
र्षांत एक दृष्टांत मला, मला दानीयेलाला दिस-
ला. २ तर म्या दृष्टांतांत पाहिलें, आणि असें
झालें, कीं जेव्हां मी पाहत होतों, तेव्हां एलाम
परगण्यांत जी शूशान आहे, तींतल्या वाड्यांत
मी होतों; अणखी म्या दृष्टांतांत पाहिलें, तेव्हां
मी ऊलाई नदीजवळ होतों. ३ आणि म्या
दृष्टि लावून पाहिलें, आणि पाहा, एक मेंढा नदी-
समोर उभा राहिला होता, आणि त्याला दोन
शिंगें होतीं, आणि तीं शिंगें उंच होतीं; आणि
एक दुसऱ्यापेक्षां उंच होतें, आणि जें उंच तें
शेवटीं उगवलें. ४ म्या त्या मेंढ्याला पश्चिमे-
कडे व उत्तरेकडे व दक्षिणेकडे टकर मारितां पा-
हिलें; आणि कोणत्याहि पशूंच्याने त्यासमोर उभें

राहवत नव्हतें, आणि त्याच्या हातांतून सोडवा-
याला कोणी नव्हता; आणि तो आपल्या मनो-
दयाप्रमाणें करीत गेला, आणि मोठा झाला. ५
जेव्हां मी ध्यान करीत होतों, तेव्हां पाहा, एक
बोकड पश्चिमेंतून पृथ्वीच्या सर्व पाठीवर आला,
आणि तो भूमीला स्पर्शीत नव्हता; आणि त्या
बोकडाच्या डोळ्यांमध्यें एक पाहण्याजोगें शिंग
होतें. ६ आणि जो दोन शिंगांचा मेंढा म्या
नदीसमोर उभा राहतां पाहिला होता, त्याकडे
तो आला, आणि आपल्या पराक्रमाच्या रागानें
त्याजवर धावला. ७ आणि म्या त्याला त्या
मेंढ्याजवळच येतां पाहिलें, आणि तो त्याजवर
फार रागावला, आणि त्यानें मेंढ्यास हाणिलें,
आणि त्याचीं दोन शिंगें मोडिलीं; आणि त्यास-
मोर उभें राहायाला मेंढ्याच्या अंगीं शक्ति नव्ह-
ती, मग त्यानें त्याला भूमीस पाडिलें, आणि तुड-
वून टाकिलें; आणि त्याच्या हातांतून मेंढा सोड-
वायाला कोणी नव्हता. ८ मग तो बोकड
फारच मोठा झाला; आणि जेव्हां तो बलिष्ठ
झाला, तेव्हां तें मोठें शिंग मोडून गेलें, आणि
त्याच्या स्थानीं आकाशाच्या चोहों दिशांकडे
चार पाहण्याजोगीं शिंगें उगवलीं. ९ आणि
त्यांतल्या एकांतून एक धाकलें शिंग उगवलें, तें
दक्षिणेकडेस आणि पूर्वेकडेस आणि सुंदर देशा-
कडेस अधिक मोठें झालें. १० आणि तें आका-
शांतल्या सैन्यापर्यंत मोठें झालें; आणि त्यानें
सैन्यांतल्या कितीएकांस आणि ताऱ्यांतल्या किती-
एकांस भूमीवर पाडिलें, आणि तुडवून टाकिलें.
११ आणि त्यानें आपणाला सैन्याच्या अधिपती-
पावेतों मोठें केलें, आणि त्यापासून नित्याचा यज्ञ
काढिला, आणि त्याच्या पवित्र मंदिराचें स्थान
पाडिलें. १२ आणि पातकामुळें नित्याच्या यज्ञा-
विरुद्ध सैन्य त्याला मिळालें, तेव्हां त्यानें खरेपणा
भूमीस पाडिला; आणि तें कार्य करीत आणि
सफळ होत गेलें.

१३ आणि म्या एक पवित्रजन बोलतां ऐकिला,
आणि जो अमुक बोलत होता, त्याला एक पवित्र-
जन ह्मणाला, कीं नित्याच्या यज्ञाविषयीं आणि
पवित्र स्थान व सैन्य तुडवूं द्यावें, ह्मणून जें ओ-
साड करणारें पातक त्याविषयीं केवढ्या वेळापर्यंत
दृष्टांत होईल? १४ आणि त्यानें मला ह्मटलें,
कीं दोन हजार तीनशें दिवसपर्यंत; मग पवित्र
स्थान पावन होईल.

१५ आणि असें झालें, कीं जेव्हां म्या, म्याच
दानीयेलानें दृष्टांत पाहिला होता, आणि तो सम-
जायाला मी शोधीत होतों, तों पाहा, पुरुषरूप
असा एक मजसमोर उभा राहिला. १६ तेव्हां
म्या ऊलाईमध्यें मनुष्यवाणी ऐकिली, ती मो-
ठ्यानें ह्मणाली, हे गाब्रीयेला, याला दृष्टांत सम-
जीव. १७ मग जेथें मी उभा राहिलों होतों,
तेथें तो मजजवळ आला; जेव्हां तो आला,
तेव्हां मी भयभीत झालों, आणि उपडा पडलों;
मग त्यानें मला ह्मटलें, मनुष्याच्या पुत्रा, तूं सम-
जून घे; का कीं दृष्टांत शेवटच्या काळाविषयीं
आहे. १८ तर तो मला बोलत असतांना मी
भूमीवर उपडा राहून गाढ झोंपेंत होतों; मग
त्यानें मला स्पर्शून मला उभें केलें. १९ आणि
त्यानें ह्मटलें, पाहा, जें क्रोधाच्या समाप्तीस हो-
ईल, तें मी तुला कळविणार आहें; का कीं नेमि-
लेल्या समयीं शेवट होईल. २० आणि जो
दोहों शिंगांचा मेंढा त्वां पाहिला, तो मादाई
आणि फारस यांचे राजे आहेत. २१ आणि
तो केंसाळू बोकड यावानाचा राजा आहे; आणि
जें मोठें शिंग त्याच्या डोळ्यांच्या मध्यें होतें,
तें पहिला राजा आहे. २२ आणि तें मोडिलें,
तेव्हां त्याच्या स्थानीं चार उगवून उभीं राहिलीं,
मग त्या राष्ट्रांतून चार राज्यें उभीं राहतील,
परंतु त्याच्या बळाचीं असें नव्हे. २३ आणि
त्यांच्या राज्यांच्या शेवटीं पातकी परिपूर्ण झाले,
ह्मणजे उग्रमुख आणि कोडीं समजणारा असा
राजा उभा राहील. २४ आणि त्याचें बळ
पराक्रमी होईल, परंतु आपल्या शक्तीनें असें
नव्हे; आणि तो आश्चर्य वाटण्याजोगा नाश क-
रील, आणि सफळ होईल, आणि कार्य करील,
आणि बलवान व पवित्र लोकांस तो नाशील.
२५ आणि तो आपल्या धूर्तपणानें आपल्या हातांत
कपट साधे, असें करील; आणि तो आपल्या
मनांत आपणाला थोर मानील, आणि स्वस्थपणा-
च्या वेळीं बहुतांस नाशील, आणि अधिपतींच्या
अधिपतीविरुद्ध उभा राहील; परंतु हातावां-

चून तो मोडून जाईल· २६ आणि संध्याकाळ-
चा व सकाळचा जो दृष्टांत सांगितला आहे, तो
खरा आहे; आणि तूं दृष्टांत झांकून ठेव; कां
कीं तो बहुत दिवसांचा आहे· २७ मग मी
दानीयेल मूर्छित झालों, आणि कितीएक दिवस
रोगी पडलों; नंतर मी उठून राजाचें काम करूं
लागलों; आणि दृष्टांताविषयीं मी विस्मित हो-
तों, परंतु कोणी समजला नाहीं·

## अध्याय ९.

मादी बीजांतल्या अहाश्वेरोषाचा पुत्र दारया-
वेश जो खास्द्यांच्या राज्यावर राजा
झाला, त्याच्या पहिल्या वर्षांत; २ त्याच्या रा-
ज्याच्या पहिल्या वर्षांत मी दानीयेल पुस्तकांव-
रून वर्षांची संख्या समजलों, ह्मणजे परमेश्व-
राचें वचन इर्मया भविष्यवाद्याजवळ आलें हो-
तें, कीं तो यरूशालेमेच्या ओसाडीचीं सत्तर
वर्षें समाप्त करणार होता·

३ मग गोणताट नेसून आणि राख फांसून
उपास व प्रार्थना व विनंत्या यांकडून मागणें क-
रावें, ह्मणून म्यां आपलें मुख प्रभु देवाकडे
केलें· ४ आणि परमेश्वर जो माझा देव त्या-
ला मी प्रार्थना आणि अंगीकार करीत ह्मणालों,
हे प्रभू, थोर व भयंकर देवा, जो तूं आपल्या
प्रीति करणाऱ्यांसाठीं आणि आपल्या आज्ञा पाळ-
णाऱ्यांसाठीं करार व दया रक्षितोस· ५ आ-
ह्मी पाप केलें, आणि अन्याय केला, आणि दुष्टपण
केलें, आणि तुझे नियम व तुझे न्याय सोडून फितूरी
असत आलों आहों; ६ आणि जे तुझे सेवक
भविष्यवादी तुझ्या नामाने आमच्या राजांस, आम-
च्या सरदारांस, आणि आमच्या वडिलांस आ-
णि देशांतल्या सर्व लोकांस बोलत असत, त्यांचें
आह्मी ऐकिलें नाहीं· ७ हे परमेश्वरा, तुला
न्यायीपण आहे, परंतु जसें यावेळेस तसें आ-
ह्माला, यहूदाच्या मनुष्यांस, आणि यरूशालेमें-
तल्या राहणाऱ्यांस, आणि जे इस्राएल लोक
ज्या देशांत त्वां त्यांस, ज्या अपराधेंकरून त्या-
नी तुझा अपराध केला त्यामुळें उडविलें आहे,
त्या सर्व देशांत दूर अथवा समीप असतील,
त्यांसहि तोंडाची लाज आहे· ८ हे प्रभू,
आह्मी तुजविरुद्ध पाप केलें आहे, ह्मणून आ-
ह्माला, आमच्या राजांस, आमच्या सरदारांस,
आणि आमच्या वडिलांस तोंडांची लाज आहे.
९ प्रभु जो आमचा देव त्याला दया आणि
क्षमा आहेत, जरीं आह्मी त्याविरुद्ध फितूरीनें
वर्त्तलों आहों. १० आणि परमेश्वर आमचा
देव त्याने जे आपले धर्मविधि आपले सेवक जे
भविष्यवादी त्यांकडून आह्मांपुढें ठेविले, त्यांप्र-
माणें वर्त्तायाला आह्मी त्याचा शब्द मानिला
नाहीं तरीं. ११ होय सर्व इस्राएल लोकांनी
तुझ्या नेमशास्त्राचें अतिक्रमण केलें आहे, आणि
त्यांनी तुझा शब्द ऐकूं नये, ह्मणून ते फितून
गेले आहेत; ह्मणून आह्मावर शाप घातला आहे,
आणि देवाचा सेवक जो मोशे त्याच्या नेमशास्त्रांत
जी शपथ लिहिली आहे, तीहि घातली आहे,
कारण कीं आह्मी पाप केलें आहे· १२ आणि तो
जीं आपलीं वचनें आह्मांविषयीं, आणि आमचे जे
न्यायाधीश आमचा न्याय करीत असत त्यांविषयीं
बोलला, तीं त्याने आह्मावर हें मोठें संकट आ-
णून ठरविलीं आहेत; कां कीं जसें यरूशाले-
मेवर केलें आहे, तसें सर्व आकाशाखालतीं
कोठेंहि केलें नाहीं· १३ जसें मोशाच्या नेम-
शास्त्रांत लिहिलें आहे, तसें हें सर्व संकट आ-
ह्मावर आलें आहे; तथापि आह्मी आपले अ-
न्याय सोडावे, आणि तुझें खरेपण समजावें, असें
आह्मी परमेश्वराला आमच्या देवाला विन-
विलें नाहीं· १४ ह्मणून देवाने संकटाला जपून
तें आह्मावर आणिलें आहे; कां कीं परमेश्वर
आमचा देव आपलीं जीं सर्व कर्मे करितो, त्यांत
तो न्यायी आहे; आणि आह्मी त्याचा शब्द
ऐकिला नाहीं. १५ तर आतां हे प्रभो
आमच्या देवा, ज्या त्वां आपले लोक मिसर
देशांतून बळकट हाताने बाहेर आणिले, आणि
जसी या वेळेस तसी आपणाला कीर्त्ति प्राप्त क-
रून घेतली आहे; आह्मी पाप केलें आहे, आ-
णि आह्मी दुष्टाईने वर्त्तलों आहों·

१६ हे प्रभो, तुझ्या पूर्णन्यायीपणाप्रमाणें तु-
झा क्रोध व तुझा कोप तुझ्या यरूशालेम नगरा-
वरून, तुझ्या पवित्र पर्वतावरून फिरोत; कारण
कीं आमच्या पापामुळें, आणि आमच्या वडिलां-

च्या अन्यायांमुळें यरूशालेम व तुझे लोक आ-
मच्या सर्व सभोंवतालच्यांस निंदा असे झाले
आहेत. १७ तर आतां हे आमच्या देवा, तूं
आपल्या सेवकाची प्रार्थना व त्याच्या विनंत्या
ऐक, आणि तुझें जें पवित्रस्थान ओसाड पडलें
आहे, त्यावर प्रभूकरितां तूं आपलें मुखतेज
पडूं दे. १८ हे माझ्या देवा, तूं आपला कान
लावून ऐक; तूं आपले डोळे उघड, आणि आ-
मचीं ओसाड स्थानें, आणि ज्या नगराला तुझें
नाम ठेविलेलें आहे, तेंहि पाहा; कां कीं आह्मी
आपल्या न्यायीपणामुळें नाहीं, परंतु तुझ्या फार
दयांमुळें आपल्या विनंत्या तुजपुढें करितों. १९
हे प्रभो, ऐक; हे प्रभो, क्षमा कर; हे प्रभो,
कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे
माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं
तुझ्या नगराला, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम
ठेविलें आहे.

२० तर मी बोलत आणि प्रार्थना करीत, आ-
णि आपल्या पापाचा व आपल्या इस्राएल लो-
कांच्या पापाचा अंगीकार करीत, आणि आपल्या
देवाच्या पवित्रपर्वताकरितां परमेश्वर जो आप-
ला देव त्यापुढें विनंती करीत असतां, २१ मी
प्रार्थनेंत बोलत असतांच, जो गाब्रीयेल पुरुष म्या
पहिल्यानें दृष्टांतांत पाहिला होता, त्यानें त्वरेनें
उडण्याची प्रेरणा पावून संध्याकाळच्या अर्पणाच्या
वेळेस मला स्पर्शिलें. २२ आणि तो मला सू-
चना करितांना मजसीं बोलत ह्मणाला, दानीयेला,
तुला बोध समजावयासाठीं मी निघून आलों
आहें. २३ तुझ्या विनंत्यांच्या आरंभीं वचन
निघालें, आणि तें प्रगट करायाला मी आलों
आहें; कां कीं तूं फार प्रिय आहेस; तर वचन
समजून घे, आणि दृष्टांत ध्यानांत आण. २४
तुझ्या लोकांविषयीं आणि तुझ्या पवित्र नगरावि-
षयीं सत्तर सप्तकें ठरविलेलीं आहेत, पातक
नाहींसें करावें, आणि पापें समाप्त करावीं, आणि
अन्यायाचें प्रायश्चित्त करावें, आणि सर्वकालिक
न्यायीपण आंत आणावें, आणि दृष्टांत व भवि-
ष्यवाद शिक्का मारून ठेवावे, आणि परमपवि-
त्राला अभिषिक्त करावें ह्मणून. २५ तर तूं
जाण, आणि समजून घे, कीं यरूशालेम यथास्थित
करावी, आणि बांधावी, असी आज्ञा निघाल्यापा-
सून अभिषिक्त जो अधिपति त्याच्या समयापर्यंत
सात सप्तकें, आणि बासष्ट सप्तकें होतील; आणि
संकटसमयांतहि आळी आणि प्राकार हीं बांधती-
ल. २६ आणि बासष्ट सप्तकांनंतर अभिषिक्त
नाहींसा करतील, परंतु आपणासाठीं असें नव्हे;
आणि जो अधिपति येईल, त्याचे लोक नगर
आणि पवित्रस्थान नाशितील; आणि त्याचा अंत
प्रवाहानें होईल, आणि लढाईच्या शेवटापर्यंत
ओसाड्या ठरविलेल्या आहेत. २७ आणि तो
एका सप्तकापर्यंत बहुतांसीं करार ठरवील; आणि
त्या सप्तकाच्या अर्धसमयीं तो यज्ञ आणि अर्पण
बंद करील, उजाड करणाऱ्यानें घातलेल्या अघोर
पदार्थांच्या झांकणामुळें ठरविलेली समाप्ति उजा-
डकरणाऱ्यावर घातली असें होई तोंपर्यंत.

## अध्याय १०.

फारसाचा राजा खोरेश याच्या तिसऱ्या
वर्षांत, ज्याचें नाम बेलटशाज्जार ह्मटलें
होतें, त्या दानीयेलाला एक गोष्ट प्रगट झाली;
आणि ती गोष्ट खरी होती, आणि कष्टकाल दी-
र्घ व्हायाचा होता; आणि तो ती गोष्ट समज-
ला, आणि दृष्टांताची समज त्याला प्राप्त झाली.
२ त्यावेळीं मी दानीयेल तिहीं सप्तकांपर्यंत शोक
करीत होतों. ३ तीं तीन सप्तकें समाप्त झाल्या-
पर्यंत म्या आवडतें अन्न खालें नाहीं, आणि
मांस अथवा द्राक्षारस माझ्या मुखांत आला ना-
हीं, आणि म्या अभ्यंग केला नाहीं. ४ आणि
पहिल्या महिन्याच्या चोविसाव्या दिवसीं, जेव्हां
मी हिद्देकेल मोठ्या नदीच्या कांठावर होतों, ५
तेव्हां म्या डोळे लावून पाहिलें, आणि पाहा,
एक पांढरें वस्त्र ल्यालेला मनुष्य होता, आणि
त्याची कंबर ऊफाजाच्या उत्कृष्ट सोन्यानें वेष्टि-
ली होती. ६ त्याचा देह लसण्यासारिखा
होता, आणि त्याचें मुख विजेच्या आभासासा-
रिखें होतें, आणि त्याचे डोळे अग्निदीपांसारिखे
होते, आणि त्याचे हात व पाय उजळलेल्या
पित्तळाच्या आभासासारिखे होते, आणि त्याच्या
वचनांचा शब्द समुदायाच्या शब्दासारिखा होता.
७ आणि म्या दानीयेलाने मात्र दृष्टांत पाहिला;

आणि जे मनुष्य मजसंगतीं होते, त्यांनी दृष्टांत
पाहिला नाहीं; परंतु त्यांस मोठें कांपरें सुटलें,
तेव्हां ते आपणांस लपवायाकरितां पळाले. ८
ह्मणून मी एकलाच राहिलों, आणि म्या हा
मोठा दृष्टांत पाहिला, मग माझ्या ठायीं शक्ति
राहिली नाहीं, आणि माझें तेज माझ्याठायीं
पालटून म्लानपण झालें, आणि मी बलहीन झा-
लों. ९ आणि म्या त्याच्या वचनांचा शब्द
ऐकिला; आणि जेव्हां मी त्याच्या वचनांचा
शब्द ऐकत होतों, तेव्हां मी उपडा असून माझें
मुख भूमीकडे असून गाढ झोपेंत होतों.

१० आणि पाहा, एका हाताने मला स्पर्शि-
लें, आणि मला माझ्या गुडघ्यांवर आणि माझ्या
तळहातांवर उठवून ठेविलें. ११ आणि त्याने
मला ह्मटलें, हे दानीयेला फार प्रियमनुष्या, जीं
वचनें मी तुला बोलतों, तीं समजून घे, आणि
उभा राहा; कां कीं आतां मी तुजकडे पाठविले-
ला आहें; आणि तो हें वचन मजसीं बोलल्या-
वर मी कांपत उभा राहिलों. १२ तेव्हां त्याने
मला ह्मटलें, हे दानीयेला, भिऊं नको; कां कीं
ज्या प्रथम दिवसीं त्वां समजून घ्यायाला, आणि
आपणाला आपल्या देवासमोर पीडायाला आप-
लें मन लाविलें, त्या दिवसापासून तुझीं वचनें
ऐकिलीं, आणि तुझ्या वचनांमुळें मी आलों आहें.
१३ परंतु फारसाच्या राज्याच्या अधिपतीने एक-
वीस दिवसपर्यंत मला अडविलें; आणि पाहा,
मुख्य अधिपतींतला एक जो मीखाएल तो माझें
सहाय करायाला आला; मग मी तेथें फार-
साच्या राजांजवळ राहिलों. १४ तर जें तुझ्या
लोकांस पुढल्या दिवसांत घडेल, तें तुला सम-
जावयास मी आलों आहें; कां कीं अजून दृष्टांत
बहुत दिवसांचा आहे. १५ आणि तो असलीं
वचनें मजसीं बोलल्यावर म्या आपलें मुख भू-
मीकडे केलें, आणि मी मुका राहिलों. १६
आणि पाहा, कोणीएक जो मनुष्यपुत्ररूप त्याने
माझ्या ओठांस स्पर्शिलें; तेव्हां मी आपलें मुख
उघडून बोलूं लागलों, आणि जो मजसमोर उभा
राहिला होता, त्याला ह्मणालों, हे माझ्या प्र-
भो, दृष्टांतेंकडून माझ्या वेदना मजवर उलटल्या
त्यांस, तोंड मी बलहीन झालों आहें. १७
तर या माझ्या प्रभूचा सेवक या माझ्या प्रभू
कसा बोलायास समर्थ होईल? कां कीं आ
माझ्याठायीं शक्ति राहिली नाहीं, आणि श्वास
हि माझ्याठायीं राहिला नाहीं. १८ मग म
ष्यरूप जो कोणीएक त्याने मला पुन्हा स्पर्शि
आणि मला बलवान केलें, १९ आणि ह्मट
हे फार प्रियमनुष्या, भिऊं नको; तुझें कुश
असो, तूं सबल ऐस, ऐस सबल; मग मजसीं
बोलल्यानंतर मी सबल झालों, आणि ह्मणाल
माझा प्रभु बोलो; कां कीं त्वां मला बलवान के
आहे. २० तेव्हां त्याने मला ह्मटलें, मी तुजक
आलों आहें, याचें कारण तूं जाणतोस काय? आ
आतां मी फारसाच्या अधिपतीसीं लढायाल
परत जातों; आणि मी निघून गेलों, ह्मणजे पाहा
यावानाचा अधिपति येईल. २१ परंतु जें सत्या
लेखांत लिहिलें आहे, तें मी तुला प्रगट करितों;
आणि तुमचा अधिपति मीखाएल यावांचून या
गोष्टींविषयीं मजसीं संबंध धरणारा कोणी नाहीं.

## अध्याय ११.

आणि दारयावेश मादी याच्या पहिल्या व-
र्षांत त्याला दृढ व बलवान करायाला
मी उभा राहिलों. २ आणि आतां मी तुला
खरें प्रगट करितों; पाहा, फारसांत अणखी तीन
राजे उभे होतील; आणि चौथा सर्वांपेक्षा फारच
द्रव्याने धनवान होईल; आणि तो आपल्या
बलाप्रमाणें आपल्या द्रव्यांकरून यावानाच्या रा-
ज्यावर सर्वांस उठवील. ३ आणि एक प्रता
राजा उभा होईल, आणि मोठ्या प्रभुत्वाने रा
करील, आणि आपल्या मनोदयाप्रमाणें करी
४ आणि तो उभा राहिल्यावर त्याचें रा
मोडून जाईल, आणि आकाशाच्या चोहों दिश
डेस विभागून जाईल; आणि तें त्याच्या सं
तीला प्राप्त होणार नाहीं, आणि तो आप
ज्या प्रभुत्वाने राज्य करी त्याप्रमाणें तें राह
नाहीं; कां कीं त्याचें राज्य उपटून जाईल, आणि
यांवांचून इतरांस प्राप्त होईल.

५ आणि दक्षिणेंतला राजा बलवान होईल,
आणि त्याच्या सरदारांतलाहि एक बलवान हो-
ईल; आणि तो त्याजवर प्रबल होईल, आणि

प्रभुत्व करील; त्याचें प्रभुत्व मोठें प्रभुत्व होईल.
६ आणि कितीएक वर्षें समाप्त झाल्यावर ते एक-
मेकासीं संकेत करितील; आणि दक्षिणेंतल्या
राजाची कन्या उत्तरेंतल्या राजाकडे सम्मति
करायाला येईल; परंतु तिला बाहुबळ राहणार
नाहीं; आणि तोहि व त्याचा बाहु टिकणार
नाहीं; आणि ती हातीं देण्यांत येईल, आणि
तिचे आणणारे आणि तिचा जनक आणि त्या
समयांत जो तिचें पाठबळ करी, हेहि हातीं
देण्यांत येतील. ७ परंतु तिच्या मुळांतल्या
एका कोंबापासून एक त्याच्या स्थानीं उभा होईल,
आणि तो सैन्यासुद्धां येईल, आणि उत्तरेंतल्या
राजाच्या कोटांत शिरेल, आणि तो त्यांविरुद्ध
वर्त्तेल, आणि प्रबल होईल. ८ आणि तो
त्यांचे देव, त्यांच्या ओतींव मूर्त्ति, आणि त्यांचीं
रुप्याचीं व सोन्याचीं मनोरम पात्रें यांसुद्धां पाडाव
करून मिसरांत नेईल, आणि तो उत्तरेंतल्या
राजापेक्षां अधिक वर्षें टिकेल. ९ तर दक्षिणें-
तला राजा त्याच्या राज्यांत येईल, आणि आप-
ल्या देशांत परत जाईल. १० मग त्याचे पुत्र
उत्तेजित होतील, आणि बहुत सैन्यांचा समु-
दाय एकवटितील; आणि एक निश्चयें येईल,
आणि व्यापेल, आणि पार जाईल; मग तो फि-
रेल, आणि त्याच्या कोटापर्यंत शौर्य दाखवील.
११ आणि दक्षिणेंतला राजा क्रोधयुक्त होईल,
आणि निघून जाऊन त्यासीं, ह्मणजे उत्तरेंतल्या
राजासीं लढाई करील, आणि तो मोठा समुदाय
लावून देईल; परंतु तो समुदाय त्याच्या हातीं
देण्यांत येईल. १२ आणि त्याने तो समुदाय
हरण केला, ह्मणजे त्याचें हृदय गर्विष्ठ होईल;
आणि तो हजारों हजारांस पाडून टाकील; त-
थापि तो बलवान राहणार नाहीं. १३ कां कीं
उत्तरेंतला राजा परत येईल, आणि पूर्वीपेक्षां मो-
ठा समुदाय लावून देईल, आणि कितीएक वर्षां-
नंतर तो मोठें सैन्य आणि बहुत द्रव्य यांसुद्धां
निश्चयें येईल. १४ आणि त्या समयांत दक्षि-
णेंतल्या राजाविरुद्ध बहुत उभे होतील; आणि
दृष्टांत ठरवायाला तुझ्या लोकांतले लुटारू उठ-
तील; परंतु ते मळून पडतील. १५ आणि उत्त-
रेंतला राजा येईल, आणि मोरचे रचून कोटांचीं
नगरें घेईल; आणि दक्षिणेंतले बाहु आणि त्याचे
निवडलेले लोक उभे राहणार नाहींत, आणि
उभें राहायाला शक्ति असणार नाहीं. १६
आणि जो त्याविरुद्ध येईल, तो आपल्या मनो-
दयाप्रमाणें करील; आणि त्यासमोर कोणी उभा
राहणार नाहीं; आणि तो सुंदर देशांत उभा रा-
हील, आणि तो त्याच्या हाताकडून नाहींसा हों-
ईल. १७ आणि तो आपल्या सर्व राज्याच्या
बलासुद्धां शिरायाला आपलें मुख करील, आणि
त्यासंगतीं प्रमाणिकजन असून तो असें करील;
आणि तो त्याला स्त्रियांची कन्या ती दूषित
करावी, ह्मणून देईल; परंतु ती त्याच्या पक्षाक-
डेस उभी राहणार नाहीं, आणि त्याची होणार
नाहीं. १८ मग तो आपलें मुख द्वीपांकडे
करील, आणि कितीएक घेईल; परंतु एक अधि-
पति आपली त्याने केलेली निंदा नाहींसी करील;
तो आपल्या निंदेवांचून ती त्याजवर फिरवील.
१९ आणि तो आपल्या देशांतल्या दुर्गांकडे आ-
पलें मुख करील; परंतु तो अडखळून पडेल,
आणि सांपडणार नाहीं. २० आणि त्याच्या
स्थानीं राज्याच्या वैभवांत एक कर घेणारा उभा
होईल; परंतु तो थोडक्या दिवसानी मोडून जा-
ईल, तथापि कोपेंकरून अथवा लढाई करून
असें नव्हे. २१ मग त्याच्या स्थानीं एक कु-
त्सित उभा होईल, आणि लोक त्याला राज्याचें
वैभव देणार नाहींत; परंतु तो हळू शिरेल,
आणि आर्जवानी राज्य प्राप्त करून घेईल.
२२ आणि प्रवाहाच्या बाहूनी लोक त्यासमोरून
व्याप्त होतील, आणि मोडून जातील, आणि
कराराचा अधिपतिहि असा होईल. २३ आणि
त्यासीं संकेत केल्यावर तो कपट करील; आणि
चढेल, आणि अल्प राष्ट्रांकडून बलिष्ट होईल.
२४ तो परगण्यांतील पिकाऊ स्थानांत हळू शि-
रेल; आणि जें त्याच्या पूर्वजानी अथवा त्याच्या
पूर्वजांच्या पूर्वजानी कधीं केलें नाहीं, तें तो क-
रील; तो हरण व लूट आणि द्रव्य त्यांमध्यें
विखरील; आणि कांहींसा वेळपर्यंत तो दुर्गांवि-
रुद्ध आपले संकल्प कल्पील. २५ आणि तो
मोठ्या सैन्यासुद्धां आपला पराक्रम व आपलें
शौर्य दक्षिणेंतल्या राजावर उत्तेजित करील;

आणि दक्षिणेंतला राजाहि फार मोठ्या व प्रतापी
सैन्यासुद्धां लढाई करायाला उत्तेजित होईल;
परंतु तो उभा राहणार नाहीं; कां कीं ते त्यावि-
रुद्ध आपले संकल्प कल्पितील. २६ आणि
त्याचें अन्न खाणारे त्याला चूर्ण करितील, आणि
त्याचें सैन्य व्यापेल; आणि बहुत वधलेले पड-
तील. २७ आणि ते दोघे राजे आपल्या हृद-
यांत दुष्कर्म करायाला इच्छितील, आणि ते
एका मेजाजवळ खोटें बोलतील; परंतु तें सा-
धणार नाहीं; कां कीं पुढें नेमलेल्या समयीं अंत
होईल. २८ आणि तो पुष्कळ द्रव्य घेऊन आ-
पल्या देशांत परत जाईल; आणि त्याचें हृदय
पवित्र कराराविरुद्ध होईल; तर तो कार्य करून
आपल्या देशांत परत जाईल. २९ नेमिलेल्या
वेळेस तो फिरून दक्षिणेंत येईल; परंतु तें येणें
पूर्वासारिखें अथवा अपरासारिखें होणार नाहीं.
३० आणि खित्तीमाचीं गलबतें त्याविरुद्ध
येतील; ह्मणून तो खिन्न होईल, आणि फिरेल,
आणि पवित्र कराराविषयीं कोपित होईल; आणि
कार्य करील; नंतर तो फिरेल, आणि पवित्रकरार
सोडणाऱ्यांविषयीं समजून घेईल. ३१ आणि
त्याकडे समुदाय उभे राहतील, आणि ते आ-
श्रयाचें पवित्रस्थान बाटवितील, आणि नित्याचा
यज्ञ दूर करितील, आणि ओसाड करणारे अघो-
रपदार्थ स्थापितील. ३२ आणि जे कराराविरुद्ध
दुष्टपण करितात, त्यांस तो आर्जवाने भ्रष्ट करील;
परंतु जे लोक आपला देव जाणतात, ते बलवान
होतील, आणि कार्य करितील. ३३ आणि
लोकांमध्यें जे समजतील, ते बहुतांस बोध करि-
तील; परंतु बहुत दिवसपर्यंत ते तरवारीने व
ज्वालाने, पाडावपणाने आणि हरणाने गळून पड-
तील. ३४ आणि ते गळून पडतांना थोडें सहाय
पावतील, आणि बहुत त्यांस आर्जवानी जड-
तील. ३५ आणि शेवटच्या समयापावेतों सम-
जणाऱ्यांतले कितीएक त्यांस पारखावें, आणि स्व-
च्छ करावें, आणि पांढरें करावें, ह्मणून गळून
पडतील; कां कीं अजून गोष्ट नेमिलेल्या समया-
ची आहे. ३६ आणि राजा आपल्या मनो-
दयाप्रमाणें करील; आणि प्रत्येक देवावर आप-
णाला उंचावील, व महान करील; आणि देवां-
च्या देवाविरुद्ध आश्चर्यगोष्टी बोलेल; आणि
रोष समाप्त होईपर्यंत तो सफळ राहील; कां
कीं जें ठरविलेलें आहे, तें होईल. ३७ आणि
तो आपल्या पूर्वजांच्या देवाला, आणि स्त्रियां-
च्या मनोरथाला मानणार नाहीं, आणि तो को-
णत्याहि देवाला मानणार नाहीं; कां कीं तो आ-
पणाला सर्वांवर उंचावील. ३८ आणि तो आ-
पल्या स्थानांत बलांच्या देवाला गौरवील; आणि
जो देव त्यांच्या पूर्वजानी जाणिला नाहीं, त्याला
तो सोन्याने व रुप्याने आणि मोलवान पाषाणानी
आणि मनोरम पदार्थानी गौरवील. ३९ आणि
बळकट कोटांच्या स्थानांत तो अन्यदेवासीं असें
करील, ज्या त्याला तो अंगीकारील व त्याचें
गौरव वाढवील; आणि तो त्यांस बहुतांवर प्रभु-
त्व देईल, आणि तो भूमि मोलासाठीं वांटून
देईल. ४० आणि शेवटच्यावेळीं दक्षिणेंतला
राजा टक्कर मारीत त्यासीं लढेल; आणि उत्त-
रेंतला राजा रथ व घोडेस्वार व बहुत गलबतें
घेऊन झपाट्याने त्याजवर येईल, आणि तो अने-
क देशांत शिरेल, आणि व्यापेल, आणि पार जा-
ईल. ४१ आणि तो सुंदर देशांत शिरेल,
आणि बहुत देश नाश पावतील; परंतु हे त्या-
च्या हातांतून सुटतील, ह्मणजे अदोम आणि
मोवाब आणि अम्मोनी लोकांतले मुख्य हे. ४२
आणि तो आपला हात देशांवर लांब करील;
आणि मिसर देशहि चुकणार नाहीं. ४३ आणि
तो सोन्याच्या व रुप्याच्या द्रव्यांवर आणि मि-
सरांतल्या सर्व आवडत्या पदार्थांवर प्रभुत्व करील:
आणि लूबी व खूशी त्याच्या पावलांत चाल-
तील. ४४ परंतु पूर्वेतून आणि उत्तरेंतून अवाया
येऊन त्याला व्याकुल करितील; ह्मणून तो बहु-
तांस नष्ट व नाहींसें करायाला मोठ्या कोपाने
बाहेर जाईल. ४५ आणि तो आपल्या राजवा-
ड्याचे डेरे समुद्रांच्या अंतरप्रदेशीं सुंदर पवित्र-
पर्वतावर मांडील; तथापि तो आपल्या अंतास
येईल, आणि त्याचें सहाय कोणी करणार नाहीं.

## अध्याय १२.

आणि जो मीखाएल मोठा अधिपति तुझ्या
लोकांच्या वंशासाठीं उभा राहत असतो,

तो त्यावेळीं उभा राहील; आणि राष्ट्र झाल्या-
पासून त्या वेळापर्यंत जसा कधीं झाला नाहीं,
तसा कष्टाचा समय होईल; आणि त्यावेळेस
तुझे लोक सुटतील, प्रत्येक जो पुस्तकांत लिहि-
लेला सांपडेल, तो सुटेल. २ **आणि** जे भूमी-
च्या धुळींत निजलेले आहेत, त्यांतले बहुत जागे
होऊन उठतील, कितीएक सर्वकाळच्या जीवना-
साठीं, आणि कितीएक निंदेसाठीं व सर्वकाळच्या
धिक्कारासाठीं उठतील. ३ **आणि** जे ज्ञानी, ते अंत-
राळाच्या प्रकाशासारिखे, आणि ज्यांनी बहुतांस
न्यायी केलें, ते तान्यांसारिखे सदासर्वकालपर्यंत
प्रकाशतील. ४ **आणि** हे **दानीयेला**, तूं शेवटा-
च्या समयापर्यंत वचनें झांकून ठेव, आणि पुस्तक
मुद्रित कर; बहुत लोक शोध करितील, आणि
ज्ञान वाढेल.

५ **मग** म्या **दानीयेलाने** पाहिलें, आणि पाहा,
इतर दोघेजण, एक नदीच्या कांठाच्या एका
अंगास, आणि दुसरा नदीच्या कांठाच्या दुसऱ्या
अंगास, असे उभे राहिले होते. ६ **आणि** जो
पांढरें वस्त्र ल्यालेला मनुष्य नदींतल्या पाण्यांवर-
ती होता, त्याला एकाने ह्मटलें, कीं या आश्चर्य
गोष्टींच्या समाप्तीस केवढा वेळ असेल? ७
**आणि** जो पांढरें वस्त्र ल्यालेला मनुष्य नदींतल्या
पाण्यांवरतीं होता, त्याचें म्या ऐकिलें, आणि
त्याने आपला उजवा हात आणि आपला डावा
हात आकाशाकडे उंचाविला, आणि जो सर्व-
काळपर्यंत जिवतो त्याची शपथ वाहून ह्मटलें,
कीं गोष्ट एकसमय, अनेकसमय, आणि अर्धसमय-
पर्यंत होईल; आणि पवित्र लोकांच्या बळाचें
विखरणें समाप्त होईल, तेव्हां या सर्व गोष्टी
समाप्त होतील. ८ **तर** म्या ऐकिलें, परंतु मी
समजलों नाहीं; तेव्हां मी ह्मणालों, हे माझ्या
प्रभो, या गोष्टींचा अंत कसा काय होईल?
९ **मग** तो ह्मणाला, हे **दानीयेला**, तूं जा; कां
कीं अंताच्या समयापावेतों वचनें झांकून ठेविलेलीं,
आणि मुद्रित केलेलीं आहेत. १० **बहुत** लोक
स्वच्छ आणि पांढरें करण्यांत येतील, आणि
पारखिलेले असे होतील; परंतु दुष्ट दुष्टपण
करितील, आणि दुष्टांतले कोणी समजणार नाहीं-
त; परंतु ज्ञानी समजतील. ११ **आणि** नित्या-
चा यज्ञ बंद होईल, आणि ओसाड करणारा
अघोरपदार्थ स्थापित होईल, तेव्हांपासून एक ह-
जार दोनशें नव्वद दिवस होतील. १२ **जो**
वाट पाहील, आणि त्या एक हजार तीनशें पस-
तीस दिवसांला पोहंचेल, तो धन्य. १३ **परंतु**
अंत पावेतों तूं जा; आणि विसावा पावसील,
आणि दिवसांच्या अंतास तूं आपला विभाग
पावायाला उभा राहसील.

HOSEA.

# होशेहा.

### अध्याय १.

उज्जीया, **योथाम**, आहाज, व **यहिज्कीया** जे
यहूदाचे राजे यांच्या दिवसांत, आणि **यो-**
वाशाचा पुत्र **यारोबाम इस्राएलाचा** राजा याच्या
दिवसांत **बेरीचा** पुत्र **होशेहा** याजवळ जें **परमे-
श्वराचें** वचन आलें तें. २ **होशेहाकडून** जें
**परमेश्वराचें** वचन आलें, त्याचा आरंभ; तर
**परमेश्वराने होशेहाला** ह्मटलें, तूं जाऊन व्य-
भिचारांची स्त्री व व्यभिचारांचीं लेंकरें आपणा-
जवळ घे; कां कीं देशाने **परमेश्वरापासून** फि-
तून व्यभिचार फार केला आहे. ३ **मग** त्याने
जाऊन दिबलाईमाची कन्या **गोमेर** घेतली; आ-
णि ती गरोदर होऊन त्यासाठीं पुत्र प्रसविली.
४ **आणि परमेश्वराने** त्याला ह्मटलें, तूं
त्याचें नाम **इज्रेल** ठेव; कां कीं अणखी थोड्या
वेळानंतर मी **इज्रेलाच्या** रक्ताची फेड **यहूच्या**
वंशावर करीन, आणि **इस्राएलाच्या** वंशाचें राज्य
नाहींसें करीन. ५ **आणि** त्या दिवसीं असें हो-

ईल, कीं मी इस्राएलाचें धनुष्य इज्रेलाच्या खो-
ऱ्यांत भग्न करीन·
६ आणि ती पुन्हा गरोदर होऊन कन्या प्र-
सविली; तेव्हां देवानें त्याला ह्मटलें, तूं तिचें
नाम लोरुहामा ठेव; कां कीं यापुढें मी इस्राए-
लाच्या वंशावर अणखी दया करणार नाहीं;
परंतु त्यांस अगदी काढून टाकीन· ७ तथापि
यहूदाच्या वंशावर मी दया करीन, आणि परमे-
श्वर जो त्यांचा देव त्याकडून त्यांस तारीन,
आणि मी त्यांस धनुष्यानें अथवा तरवारीनें अ-
थवा लढाईनें, घोड्यांनी, स्वारांनी तारणार नाहीं·
८ मग तिनें लोरुहामाचें दूध तोडल्यावर ती
पुन्हा गरोदर होऊन पुत्र प्रसविली· ९ तेव्हां
देवानें ह्मटलें, त्याचें नाम लोअम्मी ठेव; कां
कीं तुह्मी माझे लोक नाहीं, आणि मी तुमचा
देव असत जाणार नाहीं·
१० तथापि जी समुद्राची वाळू मापवत नाहीं,
आणि गणवत नाहीं, तिजसारिखी इस्राएलाच्या
संतानाची संख्या होईल; आणि असें होईल,
कीं ज्या स्थानांत त्यांस, तुह्मी माझे लोक नाहीं,
असें ह्मणत असत, तेथें त्यांस जीवंत देवाचीं
लेंकरें असें ह्मणतील· ११ तेव्हां यहूदाचीं
संतानें आणि इस्राएलाचीं संतानें एकत्र मिळती-
ल, आणि तीं आपणासाठीं एक मुख्य नेमितील,
आणि देशांतून चढत येतील; कारण कीं इज्रे-
लाचा दिवस मोठा होईल·

## अध्याय २.

तुह्मी आपल्या भावांस अम्मी ह्मणा, आणि
आपल्या बहिणींस रुहामा ह्मणा, २
तुह्मी आपल्या आईसीं वाद करा, करा वाद;
कां कीं ती माझी बायको नाहीं, आणि मी तिचा
नवरा नाहीं; ती तर आपल्या समोरून आपले
व्यभिचार, आणि आपल्या स्तनांच्या मध्यांतून
आपलीं जारकर्में दूर करो, ३ नाहीं तर कदा-
चित तिचें वस्त्र काढून तिला नागवी करीन, आ-
णि जसें तिच्या जन्मदिवसीं तसें तिला ठेवीन,
आणि तिला रान व सुकीभूमि यांसारिखें करीन,
आणि तिला तहानेनें मारीन· ४ आणि तिच्या
लेंकरांवर मी दया करणार नाहीं; कां कीं तीं
व्यभिचारांचीं लेंकरें आहेत· ५ कारण कीं त्यां-
च्या आईनें व्यभिचार केला आहे; जिनें त्यांचें
गर्भधारण केलें, तिनें लाजेचीं कर्में केलीं आहेत;
कां कीं ती ह्मणाली, कीं जे माझे प्रिय मला
माझी भाकर व माझें पाणी, माझी लोंकर व
माझा ताग, माझें तेल व माझीं पिणीं देतात,
त्यांच्या पाठीमागून मी जाईन·
६ याकरितां पाहा, मी तुझ्या मार्गाला कांटे-
ऱ्या झाडांचें कुंपण घालीन, आणि त्याला भिंत
बांधीन, ह्मणजे तिला तिच्या वाटा सांपडणार
नाहींत· ७ आणि ती आपल्या प्रियांच्या पाठी-
मागून जाईल, परंतु ती त्यांस आटपणार नाहीं;
आणि ती त्यांस शोधील, परंतु ते तिला सांपडणार
नाहींत; मग ती ह्मणेल, मी आपल्या पहिल्या
नवऱ्याकडे परत जाईन; कां कीं मला आतांपेक्षां
तेव्हां बरें होतें· ८ आणि तिनें जाणलें नाहीं,
कीं मीच तिला धान्य व द्राक्षरस व तेल देत
असें, आणि तिचें रुपें आणि सोनें वाढवीत असें,
जी त्यांनी बालासाठीं सिद्ध केलीं आहेत हीं· ९
याकरितां मी फिरेन, आणि आपलें धान्य त्याच्या
वेळीं, आणि आपला द्राक्षरस त्याच्या समयीं
काढून घेईन, आणि माझी लोंकर आणि माझा
ताग जीं तिचा नागवेपणा झांकायाला दिल्हीं हो-
तीं, तींहि काढीन. १० आणि आतां तिचें
कुत्सितपण तिच्या प्रियांच्या दृष्टींत उघडें करीन,
आणि कोणी तिला माझ्या हातांतून सोडविणार
नाहीं· ११ आणि मी तिचा सर्व आनंद, तिचे
सण, तिच्या अमावास्या, तिचे शाब्बाथ, आणि
तिच्या सर्व सभा बंद करीन· १२ आणि ती
आपल्या ज्या द्राक्षांविषयीं आणि आपल्या त्या
अंजिरांविषयीं ह्मणाली आहे, कीं जीं माझ्या
प्रियांनी मला वेतनें दिल्हीं, तीं हींच आहेत, तीं
मी उजाड करीन; आणि तीं जंगल असें करीन,
मग रानांतले पशु त्यांस खातील· १३ आणि
मी तिजवर बालांच्या दिवसांचें शासन करीन,
ज्या त्यांत ती त्यांसाठीं धूप जाळी, आणि ती
आपलीं कुंडलें आणि आपले अलंकार अंगीं ले-
ऊन आपल्या प्रियांच्या पाठी मागून जाई, आणि
ती मला विसरली, असें परमेश्वर ह्मणतो.
१४ याकरितां पाहा, मी तिचें मन मनवीन

आणि तिला जंगलांत आणीन, आणि तिला गोड
वचन बोलेन. १५ आणि तेथून तिला तिचे
द्राक्षमळे देईन, आणि आखोराचें खोरें आशे-
च्या प्रवेशासाठीं देईन; आणि तेथें ती जसी
आपल्या तरुणपणाच्या दिवसांत, आणि ज्या दि-
वशीं ती मिसर देशांतून वर आली, त्या दिवशीं
जसी तसी गाईल. १६ आणि परमेश्वर ह्म-
णतो, कीं त्यावेळेस असें होईल, कीं तूं मला
ईशी ह्मणसील; आणि पुन्हा मला बाली ह्मण-
णार नाहींस. १७ आणि मी तिच्या मुखापासून
बालांचीं नामें दूर करीन, आणि त्यांस त्यांच्या
नामानी पुन्हा स्मरणार नाहींत. १८ आणि त्या
समयीं मी त्यांसाठीं रानांतल्या पशूंसीं, आणि
आकाशांतल्या पक्ष्यांसीं, आणि भूमीवरल्या वळव-
ळणाऱ्यांसीं करार करीन; आणि धनुष्य व तर-
वार व लढाई पृथ्वींतून मोडून टाकीन, आणि
त्यांस निर्भय निजूं देईन. १९ आणि मी आप-
णासाठीं तुला सर्वकालपर्यंत वाग्दत्त करून घेईन;
होय मी आपणासाठीं तुला न्यायाने आणि नी-
तीने आणि प्रसादाने आणि करुणानी वाग्दत्त
करून घेईन. २० आणि मी आपणासाठीं तुला
विश्वासूपणें वाग्दत्त करून घेईन; आणि तूं पर-
मेश्वराला जाणसील. २१ आणि परमेश्वर
ह्मणतो, कीं त्यासमयीं असें होईल, कीं मी उत्तर
करीन, मी आकाशांस उत्तर करीन, आणि तीं
पृथ्वीला उत्तर करितील. २२ आणि पृथ्वी धा-
न्याला, आणि द्राक्षारसाला, आणि तेलाला
उत्तर करील, आणि तीं इज्रेलाला उत्तर करि-
तील. २३ आणि मी आपणासाठीं तिला पृथ्वींत
पेरीन; आणि जिजवर दया केली नव्हती, तिज-
वर मी दया करीन; आणि जे माझे लोक नव्हते,
त्यांस मी ह्मणेन, कीं तुह्मी माझे लोक आहां;
आणि ते ह्मणतील, कीं तूं आमचा देव आहेस.

## अध्याय ३.

आणि परमेश्वराने मला ह्मटलें, तूं पुन्हा
जाऊन प्रियप्रीत आणि जारकर्मिणी अशा
स्त्रीवर प्रीति कर, जसा परमेश्वर इस्राएलाच्या
वंशांवर प्रीति करितो तसा, आणि ते इतर देवांस
पाहतात, आणि द्राक्षांच्या पक्वान्नांवर आवड ठेवि-
तात. २ मग म्या आपणासाठीं तिला पंधरा रुप-
यांनी आणि एक होमेर यवानी, आणि अर्ध होमेर
यवानी विकत घेतलें. ३ आणि मी तिला ह्मणा-
लों, तूं मजजवळ बहुत दिवस राहसील; तूं
व्यभिचार करूं नको; आणि इतर पुरुषाची होऊं
नको; ह्मणजे मीहि तुजजवळ राहीन.

४ कां कीं इस्राएलाचे वंश बहुत दिवसपर्यंत
राजाहीन, आणि अधिपतिहीन, आणि यज्ञहीन,
आणि प्रतिष्ठापितहीन, आणि एफोद व तराफीम
यांहींहीन, राहतील. ५ त्यानंतर इस्राएलाचे
वंश फिरतील, आणि परमेश्वर जो त्यांचा देव
त्याला, आणि दावीद जो त्यांचा राजा त्याला ते
शोधितील; आणि पुढल्या दिवसांत ते परमे-
श्वराचें आणि त्याच्या चांगलेपणाचें भय धरि-
तील.

## अध्याय ४.

इस्राएलाच्या वंशानो, परमेश्वराचें वचन ऐका;
कां कीं परमेश्वराला देशांतल्या राहणाऱ्यां-
सीं वाद करायाचा आहे, कारण कीं देशांत कांहीं
खरेंपण, कांहीं दया, कांहीं देवाचें ज्ञान नाहीं. २
ते शपथ वाहत, आणि खोटें बोलत, आणि हत्या,
व चोरी, आणि जारकर्म करीत सुटले आहेत,
आणि रक्त रक्ताला आटपतें. ३ याकरितां देश
शोक करील, आणि त्यांतला प्रत्येक राहणारा
रानांतल्या पशूंसुद्धां आणि आकाशांतल्या प-
क्ष्यांसुद्धां ग्लान होईल; आणि समुद्रांतले मासे-
हि हरण होतील. ४ तथापि कोणी वाद करूं
नये, आणि कोणाचा निषेध करूं नये; कां कीं
जे याजकासीं वाद करितात, त्यांसारिखे तुझे लोक
आहेत. ५ याकरितां तूं दिवसा गळून पडसील,
आणि तुजसुद्धां भविष्यवादीहि रात्रीं गळून पडेल,
आणि मी तुझी आई नाहींसी करीन.

६ माझे लोक ज्ञान नसल्यामुळें नाहींसे हो-
तात; त्वां ज्ञान नाकारिलें, ह्मणून मजसाठीं या-
जकपण करण्यापासून नाकारीन; तूं आपल्या दे-
वाचें नेमशास्त्र विसरला आहेस, ह्मणून मीहि
तुझीं लेंकरें विसरेन. ७ जसे ते वाढले, तसे ते
मजविरुद्ध पाप करीत गेले; ह्मणून मी त्यांचें
गौरव पालटून अप्रतिष्ठा करीन. ८ ते माझ्या

लोकांचें पाप खातात, आणि त्यांच्या अप-
राधाकडे आपलें चित्त लावितात. ९ आ-
णि जसे लोक तसा याजक होईल; आणि मी
त्यांस त्यांच्या आचारांमुळें शासीन, आणि त्यांस
त्यांच्या कर्मांचें फल देईन. १० तर ते खातील,
आणि तृप्त होणार नाहींत; ते व्यभिचार करि-
तील, आणि वाढणार नाहींत; कां कीं त्यानी
**परमेश्वराकडे** सावध असणें सोडिलें आहे.
११ व्यभिचार आणि द्राक्षारस आणि नवा द्राक्षा-
रस हृदय हरण करितात.

१२ माझे लोक आपल्या ठोकळ्याजवळ प्रश्न
करितात, आणि त्यांची काठी त्यांस गोष्ट प्रगट
करिती; कां कीं व्यभिचारांच्या आत्म्याने त्यांस
बहकविलें आहे; आणि त्यानी आपल्या देवा-
च्या हाताखालतून व्यभिचार केला आहे. १३
ते पर्वतांच्या माथ्यांवर यज्ञ करितात, आणि डों-
गरांवर अल्लोन झाड व लिबनें झाड व एला
झाड यांखालीं यांची छाया चांगली आहे, म्ह-
णून धूप जाळितात; याकरितां तुमच्या कन्या
व्यभिचार करितील, आणि तुमच्या सुना जार-
कर्म करितील. १४ जेव्हां तुमच्या कन्या व्य-
भिचार करितील, आणि तुमच्या सुना जारकर्म
करितील, तेव्हां मी त्यांस शासणार नाहीं; कां
कीं ते आपण वेगळे होऊन कसबिणींसीं जडले
आहेत, आणि कळवंतिणींसीं यज्ञ करितात; तर
जे लोक समजत नाहींत, ते नाश पावतील.

१५ हे इस्राएला, जरीं त्वां व्यभिचार केला,
तरीं यहूदाने पातक करूं नये; आणि तुम्ही
गिलगालेस येऊं नका, आणि बेथावेनेस चढूं
नका; आणि, जीवंत **परमेश्वर** आहे, असी
शपथ वाहूं नका. १६ मार्गे हटणाऱ्या कालव-
डीसारिखा इस्राएल हटणारा झाला आहे; आ-
तां **परमेश्वर** त्यांस कोंकराप्रमाणें पसरटस्थलांत
चारील. १७ एफ्राइम मूर्त्तीसीं जडला आहे;
त्याला असूं दे. १८ त्यांचा द्राक्षारस सरला
आहे; ते निश्चयें व्यभिचार करितील; तिच्या
अधिकाऱ्यांस अप्रतिष्ठा आवडली आहे; द्या.
१९ वाऱ्याने तिला आपल्या पक्षांत बांधिलें
आहे, आणि ते आपल्या यज्ञांमुळें लज्जित
होतील.

## अध्याय ५.

हे याजकानो, हें ऐका; आणि इस्राएलाच्या
वंशानो, लक्ष लावा; आणि राजाच्या वंशा-
नो, कान द्या; कां कीं तुमचें शासन करायाचें
आहे; कारण कीं तुम्ही मिज्पावर पाश आणि
ताबोरावर पसरिलेलें जाळें असा. २ तर त्या-
नी वध करून गंभीरपणें अन्याय केले आहेत,
म्हणून मी त्या सर्वांस शिक्षा करीन. ३ मी
एफ्राइमाला जाणतों, आणि इस्राएल मजपासून
गुप्त नाहीं; कां कीं आतां हे एफ्राइमा, तूं व्यभि-
चार करितोस, आणि इस्राएल विटाळला आहे.
४ ते आपल्या देवाकडे [illegible] त्या आपलीं कर्मे
नीट करित नाहींत; [illegible] यांचा आत्मा
त्यांच्याठायीं आहे [illegible]-
णत नाहींत. ५ [illegible]
वर साक्ष देतो; म्हणून [illegible]
आपल्या अन्यायाने गळून पडतील; [illegible]
यांसंगतीं गळून पडेल. ६ ते आपल्या [illegible]-
सुद्धां आणि आपल्या गुरांसुद्धां **परमेश्वरास**
शोधायाला जातील; परंतु तो त्यांस सांपडणार
नाहीं; त्याने त्यांस सोडिलें आहे. ७ ते पर-
**मेश्वरासीं** कपटाने वर्त्तले आहेत; कां कीं
त्यानी जारपुत्रांस जन्म दिल्हा आहे; आतां एक
महिना त्यांस आणि त्यांच्या विभागांस खाईल.
८ तुम्ही गिबांत करणा, आणि रामांत शिंग वा-
जवा; बेथावेनेस आरोळी करा, हे बन्यामीना,
तुझ्या पाठीमागून असें करितील. ९ एफ्राइम
शिक्षेच्या समयीं ओसाड होईल; जें निश्चित
तें म्या इस्राएलाच्या वंशांमध्यें कळविलें आहे.
१० जे सीमा सारितात, त्यांसारिखे यहूदाचे
अधिपति झाले आहेत; म्हणून मी त्यांजवर आ-
पला कोप पाण्यासारिखा घालीन. ११ एफ्रा-
इम शासनाकडून पिडलेला व मोडलेला आहे; कां
कीं तो खुशीने आज्ञाप्रमाणें वर्त्तला. १२ म्हणून
मी एफ्राइमाला कसरीसारिखा, आणि यहूदाच्या
वंशाला क्षयासारिखा होईन. १३ जेव्हां एफ्रा-
इमाने आपला रोग, आणि यहूदाने आपला घाय
पाहिला, तेव्हां एफ्राइम अश्शूराकडे गेला,

आणि त्याने यारेब राजाकडे निरोप पाठविला;
परंतु तो तुह्माला बरें करायास, आणि तुमचा
घाय दूर करायास समर्थ नव्हता. १४ तर मी
एफ्राइमाला सिंहासारिखा, आणि यहूदाच्या वं-
शाला तरुणसिंहासारिखा होईन; मी, मीच
त्याला फाडून जाईन; मी त्याला हरण करीन,
आणि कोणी सोडवणार नाहीं.
१५ ते आपलें पातक अंगीकारितील, आणि
माझें मुख शोधितील, तोंपर्यंत मी आपल्या स्था-
नांत परत जातों; ते आपल्या संकटसमयीं मना-
पासून मला शोधितील.

## अध्याय ६.

याहो, आपण परमेश्वराकडे फिरूं; कां कीं
त्याने आह्माला फाडिलें आहे, आणि तोच
आह्माला बरें करील; त्याने हाणिलें, आणि
तोच आह्माला पट्टी बांधील. २ दोहों दिवसा-
नी तो आह्माला जिवंत करील; आणि तिसऱ्या
दिवशीं आह्माला उठवील; आणि आह्मी त्यास-
मोर जीवंत जाऊं. ३ आणि जर आह्मी परमे-
श्वरास जाणायाला झटत जाऊं; तर जाणूं, त्या-
चें निघणें पहांटेसारिखें निश्चित आहे, आणि
जसा पाऊस, जसा शेवटला व पहिला पाऊस
भूमीवर येतो, तसा तो आह्माकडे येईल.
४ हे एफ्राइमा, मी तुला काय करूं? हे य-
हूदा, मी तुला काय करूं? कां कीं तुमचें चां-
गलेपण सकाळच्या आभाळासारिखें, आणि प-
हांटेच्या दहिंवरासारिखें उडून जातें. ५ याक-
रितां म्या त्यांस भविष्यवाद्यांकडून तोडिलें आहे;
आणि आपल्या मुखाच्या वचनांकडून त्यांस व-
धिलें आहे; जो प्रकाश निघतो, त्यासारिखे तुझे
धर्मविधि आहेत. ६ कां कीं यज्ञ नाहीं आवडत,
परंतु दया मला आवडती; आणि होमापेक्षां
देवाचें ज्ञान मला अधिक आवडतें. ७ परंतु
त्यानी मनुष्याप्रमाणें माझ्या करारांचें अतिक्रमण
केलें आहे; तेथें ते मजकडे अविश्वासूपणें वर्त्तले
आहेत. ८ गिलाद दुष्कर्म्यांची वस्ती आहे, ती
रक्ताने माखलेली आहे. ९ आणि जशा लुटा-
ऱ्यांच्या टोळ्या मनुष्याला टपतात, तसें याज-
कांची मंडळी एकचित्तें मार्गावर हत्या करिती;
कां कीं त्यानी दुष्ट संकल्प केला आहे. १०
म्या इस्राएलाच्या वंशामध्यें भयंकर गोष्ट पा-
हिली आहे; तेथें एफ्राइमाचा व्यभिचार आहे,
इस्राएल विटाळलेला आहे. ११ आणि हे यहूदा,
म्या आपल्या लोकांचा पाडाव समुदाय परत
आणिला, ह्मणजे तो तुला पीक देईल.

## अध्याय ७.

जेव्हां मी इस्राएलास बरें करणार होतों, ते-
व्हां एफ्राइमाचा अन्याय आणि शोमरो-
नेची दुष्टाई उघडी पडली; कां कीं त्यानी ल-
बाडी केली आहे; चोर आंत येतो, आणि बा-
हेर लुटाऱ्यांची टोळी लुटिती. २ आणि त्यांची
सर्व दुष्टाई मी स्मरतों, असें ते ध्यानांत आणीत
नाहींत; आतां त्यांच्या कर्मांनी त्यांस घेरिलें
आहे; तीं माझ्यासमक्ष आहेत. ३ ते आपल्या
दुष्टाईने राजाला, आणि आपल्या लबाड्यांनी
सरदारांस हर्षित करितात. ४ ते सर्व जारकर्मी
आहेत; जेव्हां रोटीकरणारा पीठ मळून तें फुगे-
पर्यंत त्याचें उठविणें सोडितो, तेव्हां जसी त्या-
ची भट्टी तापत असती, तसे ते असतात. ५
आमच्या राजाच्या दिवशीं सरदार द्राक्षारसाच्या
बुधल्यानी रोगी पडले, त्याने निंदकांशीं आपला
हात लांब केला. ६ त्यानी टपतांना आपलें मन
भट्टीसारिखें तापवून लाविलें; त्यांचा रोटीकर-
णारा सर्व रात्र निजला; सकाळीं ती जळत्या
अग्नीसारिखी होती. ७ ते सर्व भट्टीप्रमाणें ता-
पलेले असतात, त्यानी आपले न्यायाधीश खा-
ल्ले आहेत; त्यांचे सर्व राजे पडले आहेत;
त्यांतला कोणी मजकडे हाक मारीत नाहीं. ८
एफ्राइम आपणाला लोकांशीं मिसळतो; जी भा-
कर पालथलेली नाहीं, असा एफ्राइम आहे. ९
परक्यानी त्याची शक्ति खाल्ली आहे, आणि तो
हें जाणत नाहीं; होय त्याजवर कांहीं पिकलेले
केंस आहेत, तथापि तो हें जाणत नाहीं. १०
आणि इस्राएलाचा गर्व त्याच्या मुखावर साक्ष
देतो; हें सर्व असतांना ते आपला परमेश्वर
देव याकडे फिरत नाहींत, आणि त्याला शो-
धीत नाहींत.
११ आणि एफ्राइम भोळ्या निर्बुद्धि पारवी

सारिखा आहे; त्यांनीं मिसराला हाक मारिली
आहे, ते अश्शूराकडे गेले आहेत. १२ ते जे-
व्हां जातील, तेव्हां मी आपलें जाळें त्यांवर पस-
रीन; मी त्यांस आकाशांतल्या पक्षांसारिखें उ-
तरीन; मी जसी त्यांच्या सभेनें ऐकिली आहे,
तसी त्यांची सिक्षा करीन. १३ ते मजपासून
पळून गेले आहेत, ह्मणून त्यांस हाय हाय;
त्यांनीं मजविरुद्ध पातक केलें आहे, ह्मणून त्यांस
नाश प्राप्त होईल; म्या जरीं त्यांस उद्धरिलें आहे,
तरीं ते मजविरुद्ध लबाड्या बोलले आहेत.
१४ आणि जेव्हां ते आपल्या पलंगांवर केंकले,
तेव्हां त्यांनीं आपल्या मनापासून मजकडे आरो-
ळी मारिली नाहीं; धान्य व द्राक्षारस यांसाठीं
ते एकत्र मिळून मजकडून वळवात. १५ जरीं
म्या शिक्षा केली, आणि त्यांच्या बाहूंला बळकट
केलें आहे, तरीं ते मजविरुद्ध वाईट कल्पितात.
१६ ते फिरतात, परंतु परात्पराकडे नव्हे; ते
ठकविणाऱ्या धनुष्यासारिखे आहेत; त्यांचे सर-
दार आपल्या जिभेच्या तीव्रपणामुळें तरवारीनें
पडतील; हें त्यांच्या निंदेसाठीं मिसर देशांत
होईल.

## अध्याय ८.

तूं आपल्या मुखास करणा लाव. तो परमेश्व-
राच्या घरावर गरुडासारिखा येईल, का-
रण कीं त्यांनीं माझ्या करारांचें अतिक्रमण केलें
आहे, आणि माझ्या नेमशास्त्राविरुद्ध पातक
केलें आहे. २ माझ्या देवा, आह्मी तुला
जाणतों, असी आरोळी इस्राएल मजकडे मारि-
तील, ३ जें उत्तम तें इस्राएलानें धिक्कारिलें
आहे; वैरी त्याच्या पाठीस लागले. ४ त्यांनीं
राजे नेमिले आहेत, परंतु मजकडून असें नव्हे;
त्यांनीं सरदार नेमिले आहेत, आणि मी मान्य
झालों नव्हतों; त्यांनीं आपणासाठीं आपल्या रु-
प्याच्या आणि आपल्या सोन्याच्या मूर्त्ति केल्या
आहेत, ते नाहींसे व्हावे ह्मणून.
५ अगे शोमरोने, तुझ्या वांसरानें तुला धि-
क्कारिलें आहे; माझा क्रोध त्यांवर संतप्त झाला
आहे; केवढा वेळपर्यंत त्यांच्यानें निर्दोषपणा
पाळवणार नाहीं? ६ कां कीं तेंहि इस्राएलाक-
डून झालें; कारीगारानें तें केलें; ह्मणून तें देव
नव्हे; तर शोमरोनेच्या वांसराचे तुकडे तुकडे
होतील. ७ कारण कीं त्यांनीं वारा पेरिला
आहे, आणि ते वावटूळीची कापणी करितील;
त्याला कांडी नाहीं; कणीस कांहीं धान्य देणार
नाहीं; कदाचित जर देईल, तर परकी त्याला
गिळतील. ८ इस्राएल गिळून टाकलेला आहे;
आतां ते राष्ट्रांमध्यें अप्रिय पात्रासारिखे झाले
आहेत. ९ कां कीं ते अश्शूराकडे चढत गेले
आहेत, तो एकला रानगाढव आहे; एफ्राइमानें
वेतन देऊन प्रियता घेतल्या आहेत. १० होय
जरीं त्यांनीं राष्ट्रांमध्यें वेतन दिल्हें आहे, तरीं
आतां मी त्यांस एकवटीन, आणि ते अधिपतींच्या
राजाच्या भारापासून किंचित विसावा घेतील.
११ एफ्राइमानें पाप करायासाठीं बहुत वेद्या
केल्या आहेत, ह्मणून वेद्या त्याला पाप अशा
होतील. १२ म्या आपल्या नेमशास्त्राच्या मो-
ठ्या गोष्टी त्यासाठीं लिहिल्या आहेत, परंतु
त्या विलक्षण अशा मानिल्या आहेत. १३ ते
मास माझ्या दानांचे बलि असे अर्पितात, आणि
खातात; परंतु परमेश्वर त्यांस प्रसन्न होत
नाहीं; आतां तो त्यांचा अन्याय स्मरेल, आणि
त्यांच्या पापांचें शासन करील; ते मिसरांत
परत जातील. १४ आणि इस्राएल आपल्या
उत्पन्नकर्त्याला विसरला आहे, आणि तो मं-
दिरें बांधितो; आणि यहूदानें कोटांचीं नगरें
बहुत केलीं आहेत; परंतु मी त्याच्या नगरांवर
अग्नि पाठवीन, तेव्हां तो त्यांचे वाडे खाईल.

## अध्याय ९.

हे इस्राएला, तूं व्यभिचारी होऊन आपल्या
देवापासून गेला आहेस, ह्मणून तूं लोकांसा-
रिखा उल्हास करून हर्षूं नको; त्वां सर्व धान्या-
च्या खळ्यांत वेतन प्रिय केलें आहे. २ खळें
आणि द्राक्षारसाचें कुंड त्यांस पोषणार नाहीं,
आणि तींत नवा द्राक्षारस उणा पडेल. ३ ते
परमेश्वराच्या देशांत वसणार नाहींत; तर
एफ्राइम मिसरांत परत जाईल; आणि ते अश्शू-
रांत अमंगलपदार्थ खातील. ४ ते परमेश्वरा-
ला द्राक्षारस अर्पण करून ओतणार नाहींत,

आणि ते त्याला प्रिय होणार नाहींत; त्यांचे
यज्ञ त्यांस शोक करणाऱ्यांच्या भाकरीसारिखे
होतील; जे ती खातील, ते सर्व विटाळतील;
कां कीं त्यांची भाकर त्यांच्याचसाठीं आहे, ती पर-
मेश्वराच्या घरांत येणार नाहीं. ५ तुह्मी स-
भेच्या दिवसीं, आणि परमेश्वराच्या सणाच्या
दिवसीं काय कराल? ६ तर पाहा, ते नाशा-
मुळें गेले आहेत; मिसर त्यांस आटपून घेईल;
मोफ त्यांस मूठमाती देईल; आग्या झाडें त्यां-
च्या रुप्याच्या इष्ट पदार्थांस धारण करितील;
त्यांच्या वस्त्यांत कांटेरीं झाडें उत्पन्न होतील. ७
शासनाचे दिवस आले आहेत, फेडीचे दिवस
आले आहेत; इस्राएल लोक हें जाणतील;
तुझ्या फार अन्यायामुळें आणि मोठ्या वैरामुळें
भविष्यवादी मूर्ख, आणि आत्मिक मनुष्य वेडा
झाला आहे. ८ एफ्राइमाचा पाहरेकरी माझ्या
देवापासीं आहे; भविष्यवादी आपल्या सर्व मा-
र्गांवर पारध्याचा फांस असा आहे, आपल्या दे-
वाच्या घरांत वैर असा आहे. ९ जसें गिबा-
च्या दिवसांत, तसें त्यानी गंभीरपणें दूषण केलें
आहे; ह्मणून तो त्यांचा अन्याय स्मरेल, तो
त्यांच्या पापांचें शासन करील. १० इस्राएल
मला जंगलांत द्राक्षांसारिखा सांपडला; म्या
तुमचे पूर्वज अंजिराच्या प्रथमसमयांतल्या प्रथम-
फलासारिखे पाहिले; ते बालपोराकडेस गेले,
आणि त्यानी लाजेच्या पदार्थाकडे आपणास
वेगळें केलें; आणि त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचे
अघोर पदार्थ होते. ११ एफ्राइमाला काय हो-
ईल? त्यांचें गौरव प्रसूतीपासून आणि गर्भस्था-
नापासून आणि गर्भधारणापासून पक्ष्यांसारिखें
उडून जाईल. १२ जरी त्यानी लेंकरें वाढवि-
लीं, तरी त्यांस मनुष्य न उरे एवढें बाळरहित
करीन; होय जेव्हां मी त्यांपासून जाईन, तेव्हां
त्यांस हाय हाय. १३ जोर जसी म्या रमणीय
स्थानांत लाविलेली पाहिली, तसा एफ्राइम आहे;
परंतु एफ्राइम आपलीं लेंकरें घातकाकडे बाहेर
आणील. १४ हे परमेश्वरा, त्यांस दे; काय
देसील? त्यांस गर्भ पडणारें गर्भस्थान, आणि
सुकीं थानें दे. १५ त्यांची पूर्ण दुष्टाई गिल्गा-
लांत आहे; ह्मणून तेथें म्या त्यांचा द्वेष केला
आहे; त्यांच्या कर्मांच्या दुष्टपणामुळें मी आपल्या
घरांतून त्यांस घालवीन, मी पुन्हा त्यांस प्रिय मा-
नणार नाहीं; त्यांचे सर्व सरदार फितुरी आहेत.
१६ एफ्राइम हाणिलेला आहे, त्यांचें मूळ सुकून
गेलें आहे, ते कांहीं फळ देणार नाहींत; होय
जरी ते जन्म देतील, तरी मी त्यांच्या पोटचें
प्रियफल मारून टाकीन. १७ माझा देव त्यांस
अपमानून टाकील, कां कीं ते त्यांचें ऐकेनात;
आणि ते राष्ट्रांमध्यें भटकणारे होतील.

## अध्याय १०.

इस्राएल रिकामी द्राक्षी आहे, तो आपल्यासा-
ठीं फळ देतो; जसीं त्यांचीं फळें बहुत आलीं
तस्या त्याने आपल्या वेद्या बहुत केल्या आहेत;
त्यानी आपल्या देशाच्या पिकाऊपणाप्रमाणें सुंदर
मूर्त्ति केल्या आहेत. २ त्यांचें हृदय विभागलें
आहे; आतां ते अपराधी ठरले आहेत; तो त्यां-
च्या वेद्या मोडील, त्यांच्या मूर्त्ति नाहींशा करील.
३ कां कीं आतां ते ह्मणतात, कीं आह्माला राजा
नाहीं, जर आह्मी परमेश्वराचें भय धरिलें
नाहीं, तर राजा आमचें काय करील? ४ ते
वचनें बोलले आहेत, त्यानी करार करून खोटे
शपथ वाहिले आहेत; आणि शासन शेताच्या ता-
सांतल्या विषोद्भिदासारिखें रुझतें. ५ शोमरोनें-
तले राहणारे बेथावेनेंतल्या वांसरांकरितां भयभीत
होतील; तिच्या गौरवामुळें तींतले लोक तिजवर
शोक करितील, आणि तींतले याजक उत्कंठित
होऊन तिजवर आक्रंदन करितील, कां कीं तें ति-
जपासून गेलें आहे. ६ आणि तें अश्शूरांत या-
रेब राजाकडे दानाकरितां नेतील; एफ्राइमाला
लाज वाटेल, आणि इस्राएल आपल्या संकल्पा-
मुळें लज्जित होईल. ७ शोमरोनचा राजा
पाण्यांवरल्या फेणाप्रमाणें नाहींसा झाला आहे.
८ आणि आवेनेंतलीं जीं उंचस्थानें इस्राएलाचें
पाप असीं आहेत, तीं नाश पावतील; कांटेरीं
झाडें आणि रिंगण्या यांच्या वेद्यांवर रुझतील;
आणि ते पर्वतांस ह्मणतील, कीं आह्मास झांका;
आणि डोंगरांस ह्मणतील, कीं आह्मावर पडा.
९ हे इस्राएला, तूं गिबाच्या दिवसांपासून पाप
करीत आला आहेस; तेथें ते उभे राहिले; गि-

बांत जी लढाई अन्यायाच्या लेंकरांवर होती,
तिने त्यांस आटपलें नाहीं· १० आणि मी आ-
त्या इच्छेने त्यांची शिक्षा करीन; आणि जेव्हां
ते आपल्या दोहों पातकांमुळें बंधांत पडतील, तेव्हां
लोक त्यांवर एकवटतील· ११ ज्या शिकविले-
ल्या कालवडीला मळणें आवडतें, तिजसारिखा
एफ्राइम आहे; आणि मी तिच्या सुंदर मानेवर
गेलों आहें; मी एफ्राइमावर स्वार बसवीन;
यहूदा नांगरील, आणि याकोब भूमि गुठावील.
१२ तुह्मी आपणासाठीं न्यायीपण पेरा, दयेची
कापणी करा; तुह्मी आपली पडीत भूमि उख-
ळून टाका; कां कीं परमेश्वरास शोधण्याची
वेळ आली आहे, तो येईल आणि तुह्माला न्या-
यीपण शिकवील तोंपर्यंत· १३ तुह्मी दुष्टपणा-
ची नांगरणी केली आहे, अन्यायाची कापणी केली
आहे; तुह्मी खोटेपणाचें फल खालें आहे; कां
तर त्वां आपल्या मार्गावर, आपल्या वीरांच्या समु-
दायावर भाव ठेविला· १४ तर तुझ्या लोकां-
मध्यें गर्दी होईल, आणि लढाईच्या दिवशीं श-
ल्मानाने जसी बेथार्बेल नाशिली, तसीं तुझीं सर्व
कोटांचीं स्थानें नाश पावतील; आई आपल्या
लेंकरांसुद्धां ठार आपटून टाकिली· १५ तसेंच
बेथएलेंतल्या लोकांनो, तो तुह्माला तुमच्या फार
दुष्टपणामुळें करील; एखाद्या सकाळीं इस्राएला-
चा राजा अगदीं नाश पावेल·

## अध्याय ११.

इस्राएल जेव्हां पोर होता, तेव्हां म्या त्यावर
प्रीति केली, आणि म्या आपला पुत्र मिसरां-
तून बोलाविला· २ जितके ते त्यांस बोलावीत,
तितके ते त्यांपासून दूर जात; ते बालांसाठीं
यज्ञ करीत, आणि कोरींव मूर्त्तींसाठीं धूप जाळीत·
३ म्या तर एफ्राइमाचे बाहू धरून त्यांस चाला-
याला शिकविलें; परंतु म्या त्यांस बरें केलें, असें
त्यांनी जाणिलें नाहीं· ४ मनुष्याच्या बंधनांनी,
प्रीतीच्या दोऱ्यांनी म्या त्यांस ओढिलें; आणि
मी त्यांस त्यांच्या चाभाडावरलें जूं काढणाऱ्या-
सारिखा झालों, आणि म्या त्यांस खायास
घातलें·

५ तो मिसर देशांत परत जाणार नाहीं, परंतु
अश्शूरच त्याचा राजा होईल, कारण कीं ते
फिरायाला मान्य होईनात· ६ आणि त्यांच्या
संकल्पांमुळें तरवार त्यांच्या नगरांत झपाट्याने वा-
ईल, आणि त्याच्या फांद्यांस नाहींसें करील,
आणि खाऊन टाकील· ७ आणि माझे लोक
मजपासून मागें फिरायाला तत्पर आहेत; जरी
त्यांनी त्यांस परात्पराकडे बोलाविलें, तरी कोणी
त्याला थोर मानीना·

८ हे एफ्राइमा, कसा मी तुला हातीं देईन!
इस्राएला, कसा तुला सोंपून देईन! मी कसा
तुला अदमासारिखें करीन? तुला कसा जबो-
ईमासारिखें करून ठेवीन? माझे ठायीं माझें
हृदय उलटलें आहे, माझे कळवळे एकत्र उकळ-
तात· ९ मी आपला संतप्त क्रोध सिद्धीस ने-
णार नाहीं, मी फिरून एफ्राइमाला नाशणार
नाहीं; कारण कीं मी देव आहें, आणि मनुष्य
नव्हें; तुजमध्यें मी परमपवित्र आहें; आणि
मी नगरांत जाणार नाहीं· १० ते परमेश्वराला
अनुसरतील; तो सिंहाप्रमाणें गरजेल; जेव्हां तो
गरजेल, तेव्हां वंश पश्चिमेंतून थरथरत येतील·
११ ते पक्ष्यासारिखे मिसरांतून आणि पारव्यासा-
रिखे अश्शूर देशांतून थरथरत येतील: आणि
त्यांस त्यांच्या घरांत वसूं देईन, असें परमेश्वर
ह्मणतो· १२ एफ्राइम खोटेपणाने आणि इस्रा-
एलाचे वंश कपटाने मजभोंवते आले आहेत;
आणि आजपर्यंत यहूदा देवाजवळ चंचळपणें
वर्त्ततो, परंतु देव पवित्रांसीं विश्वासुक आहे·

## अध्याय १२.

एफ्राइम वाऱ्यावर चरतो, आणि पूर्वेच्या वाऱ्या-
कडे अनुसरतो, तो नित्य खोटेपण आणि
नासाडा बहुत करितो, आणि ते अश्शूऱ्यांसीं
करार करितात, आणि तेल मिसरांत नेतात· २
तर परमेश्वराला यहूदासीं वाद करायाचा
आहे, आणि तो याकोबाला त्याच्या मार्गांप्रमाणें
शासील; त्याला त्याच्या कर्मांप्रमाणें फल देईल.
३ त्याने गर्भस्थानांत आपल्या भावाची टांच
धरिली, आणि त्याने आपल्या सामर्थ्याने देवासीं
पराक्रम केला· ४ होय तो दूतासीं पराक्रम
करून प्रबल झाला; त्याने रडून त्याजवळ वी-

नंती केली; तो त्याला बेथेलेंत सांपडला, आणि
तेथें तो आह्मासीं बोलला; ५ परमेश्वरच
सैन्यांचा देव परमेश्वर त्याचें स्मरायाचें नाम
आहे. ६ तर तूं आपल्या देवाकडे फीर; तूं
दया आणि न्याय संभाळ, आणि नित्य आपल्या
देवाची वाट पाहा.

७ व्यापाऱ्याच्या हातांत कपटाची तागडी
आहे; त्याला पीडा करणें आवडतें. ८ आणि
एफ्राइम ह्मणतो, कीं तथापि मी धनवान झालों
आहें, मला द्रव्य प्राप्त झालें आहे; माझ्या सर्व
श्रमाच्या फलाविषयीं माझ्या ठायीं पातकी अ-
न्याय कोणाला सांपडणार नाहीं. ९ आणि
ज्याने तुला मिसर देशांतून आणिलें, तो मी पर-
मेश्वर तुझा देव आहें, मी तुला पुन्हा जसें
सभेच्या दिवसांत तसें डेऱ्यांत वसूं देईन. १०
आणि मी भविष्यवाद्यांकडून बोललों आहें, आ-
णि म्या दृष्टांतदर्शन बहुत करविलें आहे, आणि
भविष्यवाद्यांच्या योगाने दाखले सांगितले आहेत.
११ गिलादांत दुष्टाई आहे कीं नाहीं? निश्चयें
ते व्यर्थपणच आहेत; त्यानी गिल्गालांत बैलांचे
यज्ञ केले आहेत; होय त्यांच्या वेद्या शेताच्या
तासांतल्या ढिगांसारिख्या आहेत. १२ तर
याकोब अराम देशांत पळून गेला, आणि इस्रा-
एलाने स्त्रीसाठीं सेवा केली, आणि स्त्रीसाठीं
त्याने मेंढरें राखलीं. १३ आणि भविष्यवाद्या-
कडून परमेश्वराने इस्राएल मिसरांतून आणि-
ला, आणि भविष्यवाद्याकडून त्याचें रक्षण झालें.
१४ एफ्राइमाने त्याला कडूपणाने चिडविलें आहे;
ह्मणून तो त्याचें रक्त त्याजवर सोडून ठेवील,
आणि त्याचा प्रभु त्याची निंदा त्याजवरच
फिरवील.

## अध्याय १३.

जेव्हां एफ्राइम कांपत बोलला तेव्हां त्याने
आपणाला इस्राएलांत उंचाविलें; परंतु तो
बालाविषयीं पातक केल्याने मेला. २ आणि
आतां ते अधिक पाप करीत जातात, आणि त्यानी
आपल्या बुद्धीने आपणांसाठीं आपल्या रुप्याच्या
ओतींव आणि कोरींव मूर्त्ति केल्या आहेत, त्या
सर्व कारिगारांचें काम आहेत; ते त्यांविषयीं ह्म-
णतात, कीं यज्ञ करणारे मनुष्य वासरांस चुंबोत.
३ याकरितां ते सकाळच्या आभाळासारिखे आणि
पहांटेच्या नश्वर दहिंवरासारिखे होतील; वावटु-
ळीने जें भूंस खळ्यांतून उडून जातें त्यासारिखे,
आणि जो धूर धुराड्यांतून निघतो, त्यासारिखेहि
होतील. ४ तथापि ज्याने तुला मिसर देशांतून
आणिलें, तो मी परमेश्वर तुझा देव आहें;
आणि तूं मजवांचून कोणत्याहि इतर देवास जाण-
णार नाहींस; आणि मजवांचून कोणी तारणारा
नाहीं.

५ म्या तुला जंगलांत, सुक्या देशांत जाणलें.
६ ते आपल्या चरणाप्रमाणें तृप्त झाले; ते तृप्त
झाले, मग त्यांचें हृदय गर्विष्ट झालें; याकरितां
ते मला विसरले आहेत. ७ ह्मणून मी त्यांस
सिंहासारिखा होईन; जसा चित्ता वाटेजवळ
तसा मी त्यांस टपेन. ८ मी पिलीं हरण केले-
ल्या आस्वलीप्रमाणें त्यांस आडवा येईन, आणि
त्यांचा हृदयकोश फाडीन, आणि तेथेंच त्यांस
सिंहासारिखा खाईन; रानपशू त्यांस फाडील.

९ हे इस्राएला, त्वां आपला नाश करून
घेतला आहे; परंतु तुझें सहाय माझ्या ठायीं
आहे. १० तर तुझा राजा कोठें आहे? तो तुला
तुझ्या सर्व नगरांत तारो; आणि तुझे न्यायाधीश
कोठें आहेत, ज्या त्यांविषयीं तूं ह्मणालास, कीं
मला राजा आणि अधिपति दे? ११ म्या
आपल्या क्रोधाने तुला राजा दिल्हा, आणि आ-
पल्या रोषाने त्याला काढिलें. १२ एफ्राइमाचा
अन्याय बांधलेला आहे; त्याचें पाप झांकून ठेवि-
लेलें आहे. १३ प्रसवतीच्या वेदना त्याला
लागतील; तो निर्बुद्धि पुत्र आहे; परंतु तो लें-
करें जन्मण्याच्या स्थानांत फारवेळ राहणार नाहीं.
१४ मी त्यांस मृतलोकाच्या हातून उद्धरीन;
त्याला मरणापासून तारीन; अरे मरणा, मी तुझी
मरी होईन; अरे मृतलोका, मी तुझा संहार
होईन; अनुताप माझ्या डोळ्यांपासून झांकून
जाईल.

१५ जरीं तो आपल्या भावांमध्यें सफल अ-
सला, तरीं पूर्वेकडचा वारा येईल, परमेश्वरा-
चा वारा जंगलांतून चढून येईल, तेव्हां त्याचा
उगम सुका होईल, आणि त्याचा झरा आटून

जाईल; तो सर्व मनोहर द्रव्याच्या निधीचें हरण
करील. १६ शोमरोन ओसाड होईल; कारण
कीं ती आपल्या देवाकडे फितूरी झाली आहे;
ते तरवारीने पडतील; त्यांच्या बालकांस ठार
अपटून टाकितील, आणि त्यांच्या गरोदर स्त्रियांस
चिरून टाकितील.

अध्याय १४.

हे इस्राएला, परमेश्वर जो तुझा देव त्याकडे
फीर; कां कीं तूं आपल्या अन्यायाने गळून
पडला आहेस. २ तुह्मी आपणांसुद्धां वचनें
घेऊन परमेश्वराकडे फिरा; त्याजवळ ह्मणा,
तूं सर्व अन्यायाची क्षमा कर, आणि आह्मास
प्रसन्न हो; ह्मणजे आह्मी आपल्या ओंठांचीं
वांसरें अर्पूं. ३ अश्शूर आह्माला तारणार
नाहीं; आह्मी घोड्यांवर बसत जाणार नाहीं;
आणि तुह्मी आमचे देव आहां, असें आह्मी
आपल्या हातांच्या कर्माला पुन्हा ह्मणणार नाहीं;
कां कीं अनाथ तुजजवळ दया पावतो.
४ मी त्यांचें मार्गे फिरणें नीट करीन, मी
आवडीने त्यांजवर प्रीति करीन; कां कीं माझा
क्रोध त्यावरून फिरला आहे. ५ मी इस्राए-
लास दहिंवरासारिखा होईन; तो कमळिणीसा-
रिखा फुलेल, आणि लबानोनासारिखा आपलीं
मुळें फांकूं देईल. ६ त्याच्या फांद्या पसरतील,
आणि त्याची शोभा जाइत झाडासारिखी आणि
त्याचा सुवास लबानोनासारिखा होईल. ७
त्याच्या छायेखालचे वसणारे परत येतील; ते
धान्यासारिखे उत्पत्ति करितील, आणि द्राक्षीप्र-
माणें फुलतील; त्याची प्रशंसा लबानोनाच्या
द्राक्षारसासारिखी होईल. ८ एफ्राइम ह्मणाला
आहे, कीं माझा आणि मूर्त्तींचा यापुढें काय सं-
बंध आहे? म्या त्याला उत्तर दिल्हें आहे, आणि
त्याकडे म्या आपलें मन लाविलें आहे; मी टव-
टवीत देवदारूसारिखा आहें; मजपासून तुझें
फल प्राप्त झालें आहे. ९ कोण बुद्धिमान आ-
हे? तर तो या गोष्टी समजेल; कोण विवेकी
आहे? तर तो या गोष्टी जाणेल; कां कीं पर-
मेश्वराचे मार्ग नीट आहेत, आणि न्यायी
त्यांत चालतील; परंतु पातकी त्यांत अडखळून
पडतील.

JOEL.

# योएल.

अध्याय १.

पथूवेलाच्या योएल पुत्राजवळ जें परमेश्वराचें
वचन आलें तें. २ अहो ह्मातान्यानो, हें
ऐका; आणि देशांतल्या सर्व राहणाऱ्यानो, कान
द्या; तुमच्या दिवसांत अथवा तुमच्या पूर्वजांच्या
दिवसांत असी अवस्था कधीं झाली आहे काय?
३ याविषयीं तुह्मी आपल्या लेंकरांस कथन करा;
आणि तुमचीं लेंकरें आपल्या लेंकरांस, आणि
त्यांचीं लेंकरें पुढल्या पिढीला कथन करोत. ४
जें शतपादीने सोडिलें, तें टोळाने खाल्लें आहे;
आणि जें टोळाने सोडिलें, तें घुणाने खाल्लें आहे;
आणि जें घुणाने सोडिलें, तें घुल्याने खाल्लें आहे.
५ दारु पिणाऱ्यानो, जागे होऊन रडा; आणि द्रा-
क्षारस पिणाऱ्यानो, नव्या द्राक्षारसामुळें केंकत
ओरडा; कां कीं तो तुमच्या मुखापासून नाहींसा
झाला आहे. ६ कारण कीं एक राष्ट्र माझ्या
देशावर आलें आहे, तें बलिष्ठ व असंख्य आहे.
त्याचे दांत सिंहाच्या दातांसारिखे आहेत, आणि
त्याला मोठ्या सिंहाच्या दाढा आहेत. ७ त्याने
माझी द्राक्षी नाशिली आहे, आणि माझें अंजीर-
झाड मोडिलें आहे; त्याने त्याला निस्तुक सो-
लिलें आहे, आणि काढून टाकिलें आहे; त्याच्या
फांद्या पांढऱ्या झाल्या आहेत.

८ जसी कुमारी गोणताट नेसून आपल्या तरु-
णपणाच्या नवऱ्यामुळें आक्रंदन करिती, तसी आ-
क्रंदन कर. ९ अन्नार्पण आणि पेय अर्पण परमे-
श्वराच्या घरापासून नाहींसें झालें आहे; याजक
जे परमेश्वराचे सेवक ते शोक करीत आहेत.
१० शेत नाशिलें आहे; भूमि रडती; कारण
कीं धान्य नाशिलें आहे; नवा द्राक्षारस लज्जित
झाला आहे; तेलाचें झाड म्लान झालें आहे.
११ शेतकऱ्यानो, गव्हांमुळें आणि यवामुळें लज्जित
व्हा; मळेकऱ्यानो, केंकत ओरडा; कारण कीं
शेतांतलें पीक नाहींसें झालें आहे. १२ द्राक्षी
लज्जित झाली आहे, अंजीर झाड म्लान झालें
आहे; डाळिंब, खजूर, आणि सेवि झाड मळ्यां-
तलीं सर्व झाडें सुकून गेलीं आहेत; कां कीं मनु-
ष्यवंशांतून आनंद उडून गेला आहे. १३ याज-
कानो, गोणताट नेसून आक्रंदन करा; वेदीच्या
सेवकानो, केंकत ओरडा; माझ्या देवाच्या सेव-
कानो, याहो, सर्व रात्र गोणताटांत राहा; कां कीं
तुमच्या देवाच्या घरापासून अन्नार्पण आणि पेय
अर्पण अडकवून ठेविलेलें आहे.

१४ पवित्र उपास नेमा, आणि सभा बोलावा,
वडिलांस व देशांतल्या सर्व राहणाऱ्यांस परमे-
श्वर जो तुमचा देव त्याच्या घरांत एकत्र मिळ-
वा, आणि परमेश्वराला आरोळी मारा, १५
दिवसामुळें हाय हाय; कां कीं परमेश्वराचा
दिवस जवळ आहे, आणि सर्वसमर्थापासून
जसा नाश तसा तो येईल. १६ अन्न आम-
च्या दृष्टीपुढें नाहींसें झालें नाहीं काय? आम-
च्या देवाच्या घरापासून हर्ष व उल्हास गेले ना-
हींत काय? १७ दाणे आपल्या ढेंपाखालीं कुजून
गेले आहेत, धान्याचीं कोठारें ओसाड झालीं
आहेत, कोठ्या पाडिल्या आहेत; कारण कीं
धान्य करपून गेलें आहे. १८ पशु कसे उच्छ्-
वास टाकितात? गुरांचे समुदाय व्याकुल झाले
आहेत, कां कीं त्यांस कांहीं चरण मिळत नाहीं;
आणि मेंढरांचे कळपहि नाशिले आहेत. १९
हे परमेश्वरा, तुला मी आरोळी करीन; कारण
कीं अग्नीनें जंगलांतलीं चरणें खालीं आहेत,
आणि जाळानें रानांतलीं सर्व झाडें जाळिलीं आ-
हेत. २० आणि रानांतले पशुहि तुजकडे ओ-
रडतात; कारण कीं पाण्याचे ओघळ आटून गेले
आहेत, आणि जंगलांतलीं चरणें अग्नीनें खालीं
आहेत.

## अध्याय २.

जीयोनेंत करणा वाजवा, आणि माझ्या पवित्र-
पर्वतांत गजर करा; देशांतले सर्व राहणारे
कांपोत; कां कीं परमेश्वराचा दिवस येतो आहे,
तो जवळच आहे. २ तो अंधाराचा व काळो-
खाचा दिवस, आभाळांचा व दाट अंधाराचा
दिवस आहे, तो पर्वतांवर विस्तारलेल्या पहांटे-
सारिखा आहे; मोठे व बलिष्ठ लोक येत आ-
हेत; त्यांसारिखे कोणी कधीं नव्हते, आणि त्या-
नंतर पुढें बहुत पिढ्यांच्या वर्षांपर्यंत कोणी हो-
णार नाहींत. ३ त्यांपुढें अग्नि खातो; आणि
त्यामागें ज्वाळ जाळितो; त्यांपुढें देश एदेनाच्या
बागासारिखा आहे, आणि त्यामागें ओसाड जंगल
आहे; आणि कांहीं त्यांपासून वांचणार नाहीं.
४ त्यांचा आभास घोड्यांच्या आभासासारिखा
आहे; आणि जसे स्वार तसे ते धांवतील. ५
ते रथांच्या तुमुलासारिखे जो अग्निज्वाल धस
खातो त्याच्या नादासारिखे, लढाईस सिद्ध झा-
लेल्या बलिष्ठ लोकांसारिखे पर्वतांच्या माथ्यांवर
उड्या मारितील. ६ त्यांसमोर लोक व्याकुल
होतील; सर्व मुखें काळवटतील. ७ ते वीरां-
प्रमाणें धांवतील; लढाईच्या माणसांसारिखे को-
टावर चढतील; आणि ते प्रत्येक आपल्या मा-
र्गांत चालतील, आणि ते आपल्या वाटा वांकड्या
करणार नाहींत. ८ आणि ते एकमेकाला ढक-
लणार नाहींत; ते प्रत्येक आपल्या वाटेंत चाल-
तील; अरीं ते अस्त्रानी झाकिले, तरी ते आपलें
क्रमण मोडणार नाहींत. ९ ते नगरामध्यें धांवत
फिरतील; ते कोटावर धांवतील, घरांवर चढतील;
ते चोराप्रमाणें खिडक्यांतून आंत जातील. १०
त्यांपुढें भूमि कांपेल; आकाशें थरथरतील; सूर्य
व चंद्र अंधारमय होतील, आणि तारे आपला
प्रकाश संकोचित करून घेतील. ११ आणि
परमेश्वर आपल्या सैन्यापुढें आपला शब्द
करील; कां कीं त्याचें सैन्य फार मोठें आहे;
कारण कीं तो आपलें वचन साधायाला मोठा

समर्थ आहे; तर **परमेश्वराचा** दिवस मोठा
आणि फार भयंकर आहे; आणि तो कोणाच्याने
पाहवेल?

१२ तर **परमेश्वर** ह्मणतो, आतांच तुह्मी
आपल्या सर्व हृदयाने व उपास व रडणें व आ-
क्रंदन यांकडून मजकडे फिरा. १३ आणि तुह्मी
आपलीं वस्त्रें नको, परंतु आपलें हृदय फाडा;
आणि **परमेश्वर** जो तुमचा **देव** त्याजकडे फि-
रा; कां कीं तो कृपाळु व दयाळु, मंदक्रोध व
फार मायाळु आहे, आणि विपत्तीविषयीं अनु-
तापी आहे. १४ तो फिरेल, आणि अनुतापेल,
आणि आपल्या पाठीमागें आशीर्वाद, ह्मणजे **पर-
मेश्वर** जो तुमचा **देव** त्यासाठीं अन्नार्पण आणि
पेय अर्पण, ठेवून देईल कीं नाहीं, हें कोण जाणे?

१५ सीयोनेंत करणा वाजवा, पवित्र उपास
नेमा, लोक बोलावून सभा करा. १६ लोकांस
एकत्र मिळवा, पवित्र समाज नेमा, ह्मातार्‍यांस
एकवटा, बालकें व तान्ही एकत्र मिळवा; नवरा
आपल्या खोलींतून, आणि नवरी आपल्या कोठ-
डींतून निघो. १७ देवडी व वेदी यांच्या अंतर
प्रदेशीं याजक जे **परमेश्वराचे** सेवक ते रडोत,
आणि ह्मणोत, हे **परमेश्वरा**, तूं आपल्या लो-
कांवर कळवळा कर, आणि तूं आपलें वतन एव-
ढ्या अप्रतिष्ठेला देऊं नको, कीं राष्ट्रें त्यांजवर
धनीपण करितील; त्यांचा **देव** कोठें आहे, असें
लोकांमध्यें कोणी कां ह्मणतील?

१८ आणि **परमेश्वर** आपल्या देशाकरितां आ-
वेश धरील, आणि आपल्या लोकांवर कृपा करील.
१९ आणि **परमेश्वर** उत्तर देत आपल्या लो-
कांस ह्मणेल, पाहा, मी तुह्माकडे धान्य व द्राक्षा-
रस व तेल पाठवून देईन, तेव्हां तुह्मी तेणेंकरून
तृप्त व्हाल; आणि मी तुह्माला राष्ट्रांमध्यें निंदे-
साठीं पुन्हा होऊं देणार नाहीं. २० आणि मी
उत्तरेंतलें सैन्य तुह्मापासून दूर करीन, आणि
त्याचें मुख पूर्वसमुद्राकडे आणि त्याची पाठ प-
श्चिमसमुद्राकडे असतांना मी त्याला सुक्या व
ओसाड देशांत पिटून घालवीन, मग त्याचा दुर्गंध
चढेल, आणि त्याची घाण उठेल, कां कीं त्यानें
आपलें मोठेंपण मिरविलें आहे.

२१ अगे भूमि, भिऊं नको; उल्लास, आणि
हर्ष कर; कां कीं **परमेश्वर** मोठीं कर्में करील.
२२ रानांतल्या पशूनो, भिऊं नका; कां कीं जं-
गलांतलीं चरणें फुटवा करितात, आणि झाडें
आपलें फल देतात, अंजीरझाड व द्राक्षवेल आ-
पलें फळ पूर्ण देतात. २३ सीयोनेच्या लेंकरांनो,
**परमेश्वर** जो तुमचा **देव** त्याविषयीं उल्लासा,
आणि हर्षा; कां कीं त्याने तुह्माला पहिला पा-
ऊस योग्य मानाने दिल्हा आहे, आणि तो तुह्मा-
साठीं पहिला पाऊस आणि पहिल्या महिन्यांत
पुढला पाऊस पडूं देईल. २४ आणि खळीं
धान्याने परिपूर्ण होतील, आणि द्राक्षारसाने व तेलानें
कुंडे कांठांवरून वाहत असीं भरतील. २५ आणि
टोळ, घुण, व घुलें व शतपाद जीं माझें महासैन्य
जें तें म्या तुह्मामध्यें पाठविलें, त्यानी ज्या वर्षांचें
फल खाल्लें आहे, त्यांचें फल मी तुह्माला परत
भरून देईन. २६ आणि तुह्मी पूर्णपणें खाल,
आणि तृप्त व्हाल, आणि तुमचा **परमेश्वर देव**
ज्याने तुह्माकडे आश्चर्यकर्में केलीं आहेत, त्याच्या
नामाला स्तवाल; आणि माझे लोक कधीं लज्जित
होणार नाहींत. २७ आणि तुह्मी जाणाल,
कीं मी इस्राएलामध्यें आहें, आणि मी **परमे-
श्वर** तुमचा **देव** आहें, आणि दुसरा कोणी
नाहीं; आणि माझे लोक कधीं लज्जित होणार
नाहींत.

२८ आणि त्यानंतर असें होईल, कीं मी
आपला आत्मा सर्व मनुष्यजातीवर घालीन; मग
तुमचे पुत्र व तुमच्या कन्या भविष्य सांगतील,
तुमच्या ह्मातार्‍यांस स्वप्न दिसतील, तुमचे तरुण
दृष्टांत पाहतील. २९ आणि त्या दिवसांत मी
दासांवर व दासींवरहि आपला आत्मा घालीन.
३० आणि आकाशांत व पृथ्वींत उत्पात, रक्त, व
अग्नि व धुराचे खांब दाखवीन. ३१ **परमेश्व-
राचा** मोठा व भयंकर दिवस येईल, त्यापूर्वी
सूर्य अंधारमय, व चंद्र रक्तमय होईल. ३२
आणि असें होईल, कीं जो कोणी **परमेश्वराच्या**
नामाला हाक मारील, तो तरेल; कां कीं जसें
**परमेश्वराने** ह्मटलें आहे, तसें सीयोन-
पर्वतांत व **यरूशालेमेंत** तारण होईल, आणि
ज्या वांचलेल्यांस **परमेश्वर** बोलावील त्यांसहि
होईल.

## अध्याय ३.

तर पाहा, त्या दिवसांत आणि त्या समयीं जे-
व्हां मी यहूदाचे आणि यरूशालेमेचे पा-
डाव परत आणीन; २ तेव्हां मी सर्व राष्ट्रें एक-
वटून यहोशाफाटाच्या खोऱ्यांत खालीं आणीन,
आणि तेथें मी त्यांसीं आपल्या लोकांकरितां आ-
णि जें आपलें वतन इस्राएल त्याकरितां वाद
करीन, जे ते त्यानी राष्ट्रांमध्यें विखरिले आहेत,
आणि त्यानी माझा देश विभागला आहे· ३
आणि त्यानी माझ्या लोकांवर पण पाडिला आहे;
आणि त्यानी मुलगा देऊन कसबीण घेतली आहे,
आणि त्याने मुलगी विकून प्यायासाठीं द्राक्षारस
घेतला आहे. ४ अहो जोर व जीदोन हो,
आणि पलेशेथेच्या सर्व प्रांतानो, तुह्मी मजकडे
काय कराल? तुह्मी मजकडे फेड भरून द्याल
काय? जर तुह्मी मजकडे फेड दिल्ही, तर मी
वेग व त्वरा करून ती तुमची फेड तुमच्या
मस्तकांवर फिरवीन· ५ कारण कीं तुह्मी माझें
रुपें व माझें सोनें घेतलें आहे, आणि माझे
उत्तम मनोरम पदार्थ तुह्मी आपल्या देव-
ळांत नेले, आहेत· ६ आणि तुह्मी यहूदांतले
वंश व यरूशालेमेंतले वंश यावानांच्या वंशांस
विकिले आहेत, अशासाठीं कीं तुह्मी त्यांस त्यां-
च्या सीमेपासून दूर करावें· ७ पाहा, ज्या स्था-
नाकडे तुह्मी त्यांस विकिलें आहे, त्यांतून मी
त्यांस उठवीन, आणि तुमची फेड तुमच्या मस्त-
कावर फिरवीन· ८ आणि मी तुमचे पुत्र व
तुमच्या कन्या यहूदाच्या वंशाच्या हातीं विकीन,
आणि ते त्यांस सबाईला, दुरच्या राष्ट्रांला वि-
कितील; कां कीं परमेश्वर हें बोलला आहे·
९ राष्ट्रांमध्यें असें गाजवून सांगा, कीं तुह्मी
लढाईची तयारी करा, वीरांस उत्तेजित करा,
सर्व लढाईचीं माणसें जवळ येवोत, वर येवोत·
१० तुह्मी आपले फाळ ठोकून तरवारी करा, आणि
आपल्या कोयत्या भाले करा; दुर्बळ ह्मणो, कीं
मी वीर आहें· ११ सर्व राष्ट्रांनो, चहुंकडून
एकवट होऊन या, आणि एकत्र मिळा; हे पर-
मेश्वरा, तेथें तूं आपले सर्व वीर उतरूं दे·
१२ राष्ट्रें जागीं होऊन यहोशाफाटाच्या खो-
ऱ्यांत वर येवोत; कारण कीं तेथें मी सभोंवता-
लच्या सर्व राष्ट्रांचा न्याय करायाला बसेन.
१३ पीक तयार झालें आहे, ह्मणून विळा घाला;
याहो, उतरा; कां कीं घाणा भरला आहे, कुंडें
कांठांवरून वाहत, असीं भरलीं आहेत; कारण
कीं त्यांची दुष्टाई मोठी आहे· १४ समुदाय,
समुदाय निर्णयाच्या खोऱ्यांत होतील; कां कीं
निर्णयाच्या खोऱ्यांत परमेश्वराचा दिवस ज-
वळ आहे· १५ सूर्य व चंद्र अंधारमय होतील,
आणि तारे आपला प्रकाश झांकून घेतील· १६
आणि परमेश्वर जीयोनेंतून गाजेल, आणि य-
रूशालेमेंतून आपला शब्द करील; तेव्हां आ-
काशें व पृथ्वी कांपतील; परंतु परमेश्वर आ-
पल्या लोकांचा आश्रय, आणि इस्राएलाच्या
वंशाचें शरण असा आहे· १७ आणि तुह्मी
जाणाल, कीं मी परमेश्वर तुमचा देव आहें,
जो मी जीयोनेंत आपल्या पवित्रपर्वतांत वसतों;
आणि यरूशालेम पवित्र असत जाईल, आणि
परके येऊन तिजमधून पुन्हा जाणार नाहींत·
१८ आणि त्यावेळेस असें होईल, कीं पर्व-
तांतून नवा द्राक्षारस गळेल, आणि डोंगरांतून
दूध वाहील, आणि यहूदाचे सर्व ओहळ पा-
ण्याने भरून वाहतील, आणि परमेश्वराच्या
मंदिरांतून झरा निघेल, आणि शिट्टीमाच्या खो-
ऱ्याला शिंपील· १९ मिसर उजाड होईल
आणि अदोम ओसाड जंगल होईल; कारण कीं
त्यानी यहूदाच्या वंशावर बळात्कार केला, आणि
त्यांच्या देशांत निर्दोष रक्त पाडिलें· २० परंतु
यहूदा सर्वकालपर्यंत वसेल, आणि यरूशा-
लेम पिढ्यानपिढ्या राहील· २१ आणि त्यांचें
ज्या रक्ताचें पावन म्या केलें नाहीं, त्याचें पावन
करीन; कां कीं परमेश्वर जीयोनेंत वसतो·

# आमोस.

## अध्याय १.

यहूदाचा राजा उज्जीया याच्या दिवसांत, आ-
णि योवाशाचा पुत्र यारोबाम इस्राएलाचा
राजा याच्या दिवसांत, भूमिकंपाच्या पूर्वी दोन
वर्षे तकोहाच्या मेंढपाळांतला जो आमोस होता,
त्याने इस्राएलाविषयीं जीं वचनें दृष्टांतेंकरून पा-
हिलीं तीं. २ तर तो ह्मणाला, परमेश्वर
सीयोनेंतून गाजेल, आणि यरूशालेमेंतून आपला
शब्द करील; आणि पालकांचीं कुरणें शोक करि-
तील, आणि कार्मेलाचा माथा सुकून जाईल.
३ परमेश्वर ह्मणतो, कीं दम्मेशेकेच्या तिहीं पा-
तकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी तिचें शासन
माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्यांनी गि-
लादास लोखंडी मळण्याच्या यंत्रांनी झोडिलें
आहे. ४ आणि मी हजाएलाच्या वस्तींत अग्नि
पाठवीन, आणि तो बेन्हदादाचे वाडे खाऊन
टाकील. ५ आणि मी दम्मेशेकेचा अडसर तो-
डीन, आणि आवेनेच्या पटांगणांतून राहणारा,
आणि एदेनाच्या वस्तींतून राजकाठी धरणारा ना-
हींसा करीन; आणि अरामांतले लोक कीरेस
पाडावपणाच्या प्रवासांत जातील, असें परमे-
श्वर ह्मणतो.

६ परमेश्वर ह्मणतो, कीं गज्जाच्या तिहीं
पातकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी तिचें शासन
माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्यांनी सगळे
पाडावपणाचे प्रवासी अदोमाच्या हातीं द्यावे ह्म-
णून नेले. ७ तर मी गज्जाच्या कोटांत अग्नि
पाठवीन, आणि तो तींतले वाडे खाऊन टाकील.
८ आणि अश्दोदेंतून राहणारा, आणि अस्कलोनें-
तून राजकाठी धरणारा मी नाहींसा करीन; आणि
मी आपला हात एक्रोनेवर फिरवीन; आणि
पलिष्ट्यांतले उरलेले नाश पावतील, असें प्रभु
परमेश्वर ह्मणतो.

९ परमेश्वर ह्मणतो, कीं सोरेच्या तिहीं पा-
तकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी तिचें शासन मा-
घारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्यांनी सगळे
पाडावपणाचे प्रवासी अदोमाच्या हातीं दिल्हे,
आणि भावांचा करार स्मरला नाहीं. १० तर
मी सोरेच्या कोटांत अग्नि पाठवीन, आणि तो
तींतले वाडे खाऊन टाकील.

११ परमेश्वर ह्मणतो, कीं अदोमाच्या तिहीं
पातकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी त्याचें शासन
माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं तो तरवार
घेऊन आपल्या भावाच्या पाठीस लागला, आणि
त्याने आपली दया नाहींसी केली, त्याचा
क्रोध सतत फाडीत चालिला, आणि त्याने
आपला क्रोध सदां राखिला. १२ तर मी ते-
मानांत अग्नि पाठवीन, आणि तो बोजराचे वाडे
खाऊन टाकील.

१३ परमेश्वर ह्मणतो, कीं अम्मोनाच्या वं-
शाच्या तिहीं पातकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी
त्यांचें शासन माघारें फिरविणार नाहीं; कारण
कीं त्यांनी आपली सीमा विस्तीर्ण करावी, ह्मणून
गिलादांतल्या गरोदर स्त्रिया चिरिल्या. १४
तर मी रब्बाच्या कोटांत अग्नि पेटवीन, आणि
तो लढाईच्या दिवसांतल्या गजराने, वावटळीच्या
दिवसांतल्या वादळाने तींतले वाडे खाऊन टा-
कील. १५ आणि त्यांचा राजा पाडावपणाच्या
प्रवासांत जाईल, तो आणि त्याचे सरदार मि-
ळून जातील, असें परमेश्वर ह्मणतो.

## अध्याय २.

परमेश्वर ह्मणतो, कीं मोवाबाच्या तिहीं पा-
तकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी त्याचें शा-
सन माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्याने
अदोमाच्या राजाचीं हाडें जाळून त्यांचा चुना
केला. २ तर मी मोवाबावर अग्नि पाठवीन,
आणि तो कियोंथेचे वाडे खाऊन टाकील; आ-
णि मोवाब गर्दीने, गजराने, करण्याच्या शब्दाने

मरेल. ३ **आणि** तिच्या मध्यांतून न्यायाधीश
मी नाहींसा करीन, आणि त्यासुद्धां तींतले सर्व
सरदार मारून टाकीन, असें **परमेश्वर** ह्मणतो.
४ **परमेश्वर** ह्मणतो, कीं **यहूदाच्या** तिहीं
पातकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी त्याचें शासन
माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्यानी **पर-
मेश्वराचें** नेमशास्त्र अवमानिलें आहे, आणि
त्याचे नियम पाळिले नाहींत; आणि त्यांच्या
ज्या लबाड्यांप्रमाणें त्यांचे पूर्वज वर्त्तत असत,
त्यानी त्यांस बहकविलें आहे. ५ **तर** मी **यहू-
दांत** अग्नि पाठवीन, आणि तो **यरूशालेमेंतले**
वाडे खाऊन टाकील.

६ **परमेश्वर** ह्मणतो, कीं **इस्राएलाच्या** तिहीं
पातकांमुळें आणि चोहोंमुळेंहि मी त्यांचें शासन
माघारें फिरविणार नाहीं; कारण कीं त्यानी रु-
प्यासाठीं न्यायी, आणि जोड्यांच्या जुव्यासाठीं
दरिद्री विकिला. ७ **दीनांच्या** मस्तकांवर भूमीं-
तली धूळ असावी, ह्मणून ते धाप टाकितात;
आणि दरिद्र्यांचा मार्ग वांकडा करितात; आणि
मनुष्य व त्याचा बाप एका तरुणीपासीं जातात,
माझें पवित्र नाम अप्रतिष्ठित करावें ह्मणून. ८
**आणि** ते प्रत्येक वेदीजवळ गहाण घेतलेल्या व-
स्त्रांवर आडवे पडतात, आणि आपल्या देवांच्या
घरांत दंडितांचा द्राक्षारस पितात.

९ **आणि** म्या त्यांसमोरून **अमोरी** नाहींसा
केला, ज्या त्याची उंची एरेज झाडांच्या उंची-
सारिखी होती, आणि तो **अल्लोन** झाडासारिखा
बळकट होता; तथापि म्या त्याचें फल वरतून
पाडून व त्याचीं मुळें खालतून उपटून नाहींसीं
केलीं. १० **आणि** तुह्मी **अमोरीच्या** देशाचें
वतन पावावें, ह्मणून म्या तुह्माला **मिसर** देशां-
तून वर आणिलें, आणि तुह्माला चाळीस वर्षें-
पर्यंत जंगलांतून नेलें. ११ **आणि** म्या तुमच्या
पुत्रांतले कितीएक भविष्यवादी व्हायाला, आणि
तुमच्या तरुणांतले कितीएक नाजीर व्हायाला
उत्पन्न केले; **इस्राएलाच्या** संतानानो, असें आहे
कीं नाहीं? असें **परमेश्वर** ह्मणतो. १२ **परंतु**
तुह्मी नाजीरांस द्राक्षारस प्यायाला दिल्हा; आ-
णि भविष्यवाद्यांस आज्ञापिलें, कीं तुह्मी भविष्य
सांगूं नका. १३ **पाहा**, जसा पेंढ्यानी भरलेला
गाडा दबवितो, तसा मी तुह्माखालीं दबवीन.
१४ **आणि** चपळास पळण्याची शक्ति राहणार
नाहीं, आणि बलवान आपला पराक्रम बळकट
करणार पाहीं, आणि वीर आपला जीव वांच-
विणार नाहीं. १५ **आणि** धनुर्धर उभा राहणार
नाहीं; आणि पायांचा चपळ सुटणार नाहीं:
आणि स्वार आपला जीव वांचविणार नाहीं.
१६ **आणि** वीरांमध्यें जो धैर्यवान तो त्या दिवसीं
नागवा असून पळून जाईल, असें **परमेश्वर**
ह्मणतो.

## अध्याय ३.

इस्राएलाच्या संतानानो, तुह्माविषयीं जो सर्व
१ वंश म्या **मिसर** देशांतून वर आणिला, त्या-
विषयींहि जें वचन **परमेश्वर** बोलला आहे,
तें ऐका कीं, २ **भूमीवरल्या** सर्व वंशांतून तुह्मा-
ला मात्र म्या जाणिलें आहे; ह्मणून मी तुह्मा-
ला तुमच्या सर्व अन्यायांमुळें शासीन. ३ **दोघे**
सम्मत असल्यावांचून संगतीं चालतील काय?
४ **सिंहाला** शिकार नसली, तर तो जंगलांत
गरजेल काय? तरुण सिंहाने कांहीं धरिलें नसलें,
तर तो आपल्या जाळींतून आपला शब्द करील
काय? ५ **जेथें** पक्ष्यासाठीं जाळें मांडिलें नाहीं,
तेथें तो भूमीवरल्या फांसांत पडेल काय? फां-
सांत कांहीं न सांपडतां तो भूमीवरून कोणी उ-
चलून घेईल काय? ६ **करणा** नगरांत वाजेल
तर लोक भिणार नाहींत काय? नगरांत जर
विपत्ति असली, तर ती **परमेश्वराने** घडविली
नाहीं काय? ७ **तर प्रभु परमेश्वर** आपले
सेवक जे भविष्यवादी त्यांस आपला संकल्प प्रगट
केल्यावांचून कांहीं करणार नाहीं. ८ **सिंह**
गरजला आहे, तर कोण भिणार नाहीं? **प्रभु
परमेश्वर** बोलला आहे, तर कोण भविष्य सां-
गणार नाहीं?

९ **अश्दोदेंतल्या** वाड्यांत आणि **मिसर** देशां-
तल्या वाड्यांत गाजवून सांगा, कीं **शोमरोनेच्या**
पर्वतांवर एकत्र मिळा, आणि तिजमध्यें मोठ्या
गडबडी आणि तिच्या मध्यप्रदेशीं पिडलेले
पाहा. १० **आणि परमेश्वर** ह्मणतो, ते ठीक
करायाला जाणत नाहींत, जे ते आपल्या वाड्यांत

बळात्कार आणि लूट सांठवितात. ११ याक-
रितां **प्रभु परमेश्वर** ह्मणतो, कीं शत्रु देशाभों-
वता येईल; आणि तो तुझें बल तुजपासून उत-
रील, आणि तुझे वाडे लुटील. १२ **परमेश्वर**
ह्मणतो, कीं जसा मेंढपाल दोन पाय अथवा का-
नाचा तुकडा सिंहाच्या मुखांतून सोडवितो, तसे
जीं इस्राएलाचीं संतानें शोमरोनेंत वसतात तीं
पलंगाच्या कोंपऱ्यांत अथवा खाटेच्या आच्छादांत
लपून सुटतील. १३ **प्रभु परमेश्वर** सैन्यांचा
**देव** ह्मणतो, कीं तुह्मी ऐका, आणि याकोबाच्या
वंशाला सांगून सूचना द्या कीं, १४ जेव्हां
मी इस्राएलाला त्याच्या पातकांचें शासन लावीन,
तेव्हां बेथेलेंतल्या वेद्यांचें शासन करीन; आणि
वेदीचीं शिंगें तुटून जातील, आणि भूमीवर पड-
तील. १५ आणि मी हिवाळ्याचें घर उष्णका-
लाच्या घरासुद्धां हाणीन, आणि हस्तिदंताचीं घरें
नाहींसीं होतील, आणि मोठीं घरें धुळीस मिळ-
तील, असें **परमेश्वर** ह्मणतो.

## अध्याय ४.

बाशानाच्या कालवडीनो, ज्या तुह्मी शोमरो-
नेच्या पर्वतांत राहतां, ज्या दीनांस पीडि-
तां, आणि दरिद्र्यांस ठेंचितां, ज्या आपल्या ध-
न्यांस ह्मणतां, कीं आण, आणि आह्मी पिऊं, त्या
तुह्मी हें वचन ऐका. २ **प्रभु** जो **परमेश्वर**
त्यानें आपल्या पवित्रपणाची शपथ वाहिली आहे,
कीं पाहा, ते दिवस तुह्मावर येतील, ज्यांत तो
तुह्माला आंकड्यांनी आणि तुमच्या संततीला
मास्याच्या गळांनी काढून नेईल. ३ आणि तुह्मी
प्रत्येक आपल्या समोरच्या भगाडांतून निघाल,
आणि वाड्याकडे आपणांस टाकाल, असें **पर-
मेश्वर** ह्मणतो.

४ बेथेलेस येऊन पातक करा; गिल्गालेस
पातक बहुत करा; आणि तुह्मी रोज सकाळीं आ-
पले बलि, आणि तीन तीन वर्षांनी आपल्या उप-
जाचे दाहावे भाग आणा. ५ आणि फुगलेल्या
पिठाने उपकार मानण्याचा धूप जाळा, आणि
स्वबुद्धीच्या अर्पणांची गोष्ट गाजवून सांगा; कां
कीं इस्राएलाच्या वंशानो, असें तुह्माला आवडतें,
असें **प्रभु परमेश्वर** ह्मणतो.

६ आणखी म्या तुह्माला तुमच्या सर्व नगरांत
दांतांचा स्वच्छपणा, आणि तुमच्या सर्व स्थानांत
भाकरीचा तोटा दिल्हा आहे; तथापि तुह्मी
मजकडे फिरलां नाहीं, असें **परमेश्वर** ह्मणतो.
७ आणखी कापणीला तीन महिने झाले अस-
तांना, म्या तुह्मापासून पाऊस आवरून घेतला:
आणि म्या एका नगरावर पाऊस पाडिला, आ-
णि दुसऱ्या नगरावर पाऊस पाडिला नाहीं:
एका विभागावर पाऊस पाडिला, आणि ज्या
विभागावर पाऊस पडला नाहीं, तो सुकून गेला.
८ मग दोहों तिहीं नगरांतले लोक एका नगरा-
कडे पाणी प्यायाला फिरत गेले; परंतु तृप्त झाले
नाहींत; तथापि तुह्मी मजकडे फिरलां नाहीं, असें
**परमेश्वर** ह्मणतो. ९ म्या तुह्माला शेड्यानें
आणि विटानें हाणिलें आहे; शतपादीनें तुमचे
बाग आणि तुमचे द्राक्षमळे आणि तुमचीं अं-
जीराचीं झाडें व तुमचीं जाइत झाडें फार खाल्लीं
आहेत; तथापि तुह्मी मजकडे फिरलां नाहीं,
असें **परमेश्वर** ह्मणतो. १० म्या मिसरांत-
ल्या मरीप्रमाणें तुह्मामध्यें मरी पाठविली आहे:
म्या तुमचे तरुण तरवारीनें मारिले आहेत, आणि
तुमचे घोडे पाडाव करून नेले आहेत; आणि
तुमच्या छावण्यांचा दुर्गंध तुमच्या नाकपुड्यांत
येई असें म्या केलें आहे; तथापि तुह्मी मजकडे
फिरलां नाहीं, असें **परमेश्वर** ह्मणतो. ११
जसीं देवानें सदोम व गमोरा नगरें बुडवून टा-
किलीं, तसे म्या तुह्मांतले कितीएक बुडवून टा-
किले आहेत, आणि तुह्मी अग्नींतून पटकन काढि-
लेल्या कोलितासारिखे आहां; तथापि तुह्मी मज-
कडे फिरलां नाहीं, असें **परमेश्वर** ह्मणतो.
१२ याकारितां हे इस्राएला, असेंच मी तुला क-
रीन; आणि इस्राएला, मी हें तुला असें करीन,
यामुळें तूं आपल्या देवास भेटायाला सिद्ध हो.
१३ कां तर पाहा, ज्यानें पर्वत निर्माण केले,
आणि वारा उत्पन्न केला, आणि त्याची कल्पना
काय असेल, ती मनुष्याला प्रगट करितो, जो
पहांट अंधार करितो, आणि पृथ्वीच्या उंच स्था-
नांवर चालतो, त्याचें नाम **परमेश्वर सैन्यांचा
देव** आहे.

## अध्याय ५.

स्राएलाच्या वंशानो, जें वचन मी तुह्माविषयीं
२ विलाप असें उच्चारितों तें ऐका· २ इस्राए-
ाची कुमारी पडली आहे; ती पुन्हा उठणार
ाहीं; ती आपल्या भूमीवर सोडिलेली आहे;
ाला उठवायाला कोणी नाहीं· ३ कारण कीं
भु **परमेश्वर** ह्मणतो, कीं ज्या नगरांतून लोक
जाराने निघत तें शंभर शेष ठेवील, आणि ज्यां-
न लोक शेंकड्याने निघत तें इस्राएलाच्या वं-
ासाठीं दाहा शेष ठेवील·

४ तर **परमेश्वर** इस्राएलाच्या वंशाला ह्म-
ातो, कीं तुह्मी मला शोधा, ह्मणजे वांचाल·
५ परंतु बेथेलेस शोधूं नका, आणि गिल्गालेंत
ाऊं नका, आणि बेरशेबास पार जाऊं नका;
ां कीं गिल्गाल पाडावपणाच्या प्रवासांत जाईल,
भाणि बेथेल नाहींसी होईल· ६ तुह्मी **परमे-
श्वरास** शोधा, ह्मणजे वांचाल; नाहीं तर क-
ाचित तो अग्नीसारिखा योसेफाच्या वंशावर
ाडेल, आणि तो खाईल, आणि त्याला विझवा-
याला कोणी बेथेलेस असणार नाहीं· ७ जे
तुह्मी नीति पालटून कडुदवणा करितां, आणि
न्यायीपण धुळीस मिळवितां, ८ ते तुह्मी ज्याने
बहुला आणि अमस्त्य हीं नक्षत्रें उत्पन्न केलीं, जो
मरणछाया पालटून सकाळ करितो, आणि दिव-
साला रात्रीप्रमाणें अंधारमय करितो; जो समु-
द्रांतलीं पाण्यें बोलावून पृथ्वीच्या पाठीवर ओति-
तो; ज्याचें नाम **परमेश्वर** आहे· ९ जो
बलवानावर नासाडी आणितो, मग नासाडी कोट
बंदी स्थानावर येती, त्याला शोधा· १० जो वेशींत
निषेध करितो, त्याला ते द्वेषितात; आणि जो
यथार्थ बोलतो, त्याला अघोर मानितात. ११
तुह्मी दीनाला तुडवितां, आणि त्यापासून धान्या-
चे भार घेतां; ह्मणून याकरितां जरीं तुह्मी ता-
सींव दगडांचीं घरें बांधिलीं आहेत, तरीं तुह्मी
त्यांत वसणार नाहीं; जरीं तुह्मी रमणीय द्राक्ष
मळे लाविले आहेत, तरीं तुह्मी त्यांचा द्राक्षा-
स पिणार नाहीं· १२ का कीं मी तुमचीं फार
तर्कें आणि तुमचीं मोठीं पापें जाणतों; ते न्या-
ा पीडितात, लांच घेतात, आणि वेशींत दरि-
द्र्यांचा न्याय विपरीत करितात· १३ याकरितां
त्यासमयीं समजणारा मौन धरील; कारण कीं
तो समय कठीण होईल· १४ तुह्मी वांचावें,
ह्मणून उत्तमाला शोधा, आणि वाईटाला नका
शोधूं; ह्मणजे जसें तुह्मी ह्मटलें आहे, तसा
**परमेश्वर** सैन्यांचा देव तुह्मापासीं असत जा-
ईल· १५ वाईटाला द्वेषा, उत्तमाला प्रिय
माना, आणि वेशींत न्याय स्थापा; कदाचित
**परमेश्वर** सैन्यांचा देव योसेफाच्या शेषावर
दया करील· १६ तर **परमेश्वर** सैन्यांचा
देव, **प्रभु** ह्मणतो, कीं सर्व पसरट मार्गांत आ-
क्रंदन होईल; आणि सर्व आळ्यांत लोक हाय
हाय ह्मणतील; आणि ते शेतकऱ्याला शोक
करायाला, आणि विलाप करायास जाणणाऱ्यांस
आक्रंदन करायाला बोलावितील· १७ आणि
सर्व द्राक्षमळ्यांत आक्रंदन होईल; कारण कीं
मी तुजमधून पार जाईन, असें **परमेश्वर** ह्म-
णतो· १८ जे तुह्मी **परमेश्वराच्या** दिवसाची
इच्छा करितां, त्या तुह्माला हाय हाय; तो तु-
ह्माला कशासाठीं असावा? तो **परमेश्वराचा**
दिवस अंधार आहे, आणि प्रकाश नाहीं· १९
जाणो, एखादा सिंहापासून पळून गेला, आणि
आस्वल त्याला आडवा आला; अथवा घरांत
जाऊन आपला हात भिंतीसीं टेंकिला, आणि साप
त्याला डसला, तसें घडेल· २० **परमेश्वरा-
चा** दिवस प्रकाश नसतांना अंधार होणार नाहीं
काय? तो काळोखमय आणि तेजहीन होणार
नाहीं काय?

२१ मी तुमच्या सणांला द्वेषितों, अवमा-
नितों, आणि मी तुमच्या सभांत वास घेणार
नाहीं· २२ जरीं तुह्मी होम आणि आपलीं
अन्नार्पणें मला अर्पिलीं, तरीं मी प्रसन्न होणार
नाहीं; आणि तुमच्या पुष्टपशूंच्या कुशलार्पणांकडे
मी दृष्टि लावणार नाहीं· २३ तूं आपल्या गी-
तांचा गोंगाट मजपासून दूर कर; आणि तुझ्या
वीणांचें वादन मी ऐकणार नाहीं· २४ आणि
नीति पाण्यांप्रमाणें, आणि न्यायीपण खळाळाच्या
ओघळाप्रमाणें वाहो· २५ इस्राएलाच्या वंशानो,
तुह्मी जंगलांत चाळीस वर्षांपर्यंत मला बलि आणि
दानें अर्पीत असा काय? २६ आणि तुह्मी आपल्या

राजाचा डेरा आणि कीयुन आपल्या मूर्त्ति, तुह्मी
आपणांसाठीं जो आपल्या देवाचा तारा केला तो,
हीं वाहत असा. २७ तर मी तुह्माला दम्मे-
शेकेच्या पलिकडे पाडावपणाच्या प्रवासांत घाल-
वीन, असें परमेश्वर ह्मणतो, ज्या त्याचें नाम
सैन्यांचा देव आहे.

## अध्याय ६.

जे जीयोनेंत स्वस्थ आहेत, आणि शोमरोने-
च्या पर्वतावर आपला भाव ठेवितात, त्यांला
हाय हाय; ते राष्ट्रांतल्या मुख्याचे श्रेष्ठ आहेत,
आणि त्यांकडे इस्राएलाचे वंश आले आहेत.
२ तुह्मी काल्नेस पार जाऊन पाहा, आणि तेथून
मोठ्या हमाथेस जा; मग पलिश्त्यांच्या गाथेस
उतरा; आणि पाहा, या राज्यांपेक्षां तीं उत्तम
आहेत काय? त्यांची सीमा तुमच्या सीमेपेक्षां
मोठी आहे काय? ३ जे वाईट दिवसाला दूर
करितात, बलात्काराचें आसन जवळ आणितात;
४ जे हस्तिदंताच्या पलंगांवर निजतात, आणि
आपल्या खाटांवर आडवे पडतात, आणि कळपां-
तून कोंकरें व गोठ्याच्या मध्यांतून वांसरें खातात:
५ जे वीण्यावर गातात, आणि दावीदाप्रमाणें
त्यांनी आपणांसाठीं वाद्यें कल्पिलीं आहेत; ६
जे प्याल्यांतून द्राक्षारस पितात, आणि उत्तम
तेलानें आपणांला माखितात; परंतु योसेफाच्या
भंगामुळें ते खेद पावत नाहींत.

७ याकरितां ते आतां पाडावपणाच्या प्रवासां-
तल्या पहिल्यांसुद्धां पाडावपणाच्या प्रवासांत जा-
तील; आणि विलाशांचा गोंगाट नाहींसा होईल.
८ परमेश्वर सैन्यांचा देव ह्मणतो, प्रभु जो पर-
मेश्वर त्याने आपणावर शपथ वाहिली आहे,
कीं मी याकोबाच्या मोठेपणांला कंटाळतों, आणि
त्याच्या वाड्यांस द्वेषितों; ह्मणून मी नगर व
त्याचें भरण हातीं देईन. ९ आणि असें हो-
ईल, कीं एका घरांत जर दाहा मनुष्य उरले
तर मरताल. १० आणि एखाद्याला त्याचा
काका व त्याचा जाळणारा हाडें घरांतून बाहेर
न्यावीं, ह्मणून उचलील, आणि जो कोणी घरा-
च्या बाजूंजवळ असेल, त्याला ह्मणेल, कीं अ-
णखी तुजपासीं कोणी आहे काय? तेव्हां तो बो-
लेल, कोणी नाहीं; मग तो ह्मणेल, चुप; कां
कीं परमेश्वराचें नामोच्चारण करायाचें नाहीं.
११ तर पाहा, परमेश्वर आज्ञा करितो, आणि
तो मोठें घर भगाडें करीत, आणि लहान घर
चीर करीत मारील.

१२ घोडे खडकावर धांवतील काय? तेथें
कोणी बैलानी नांगरील काय? कां कीं तुह्मी नीति
पालटून विष असी केली, आणि न्यायीपणाचें
फल पालटून कडुदवणा असें केलें आहे. १३ जें
कांहीं नाहीं त्यांत जे तुह्मी हर्षतां, आणि आह्मी
आपल्या बलानें आपणांसाठीं शिंगें घेतलीं नाहींत
काय? असें ह्मणतां. १४ परंतु परमेश्वर
सैन्यांचा देव ह्मणतो, इस्राएलाच्या वंशानो, पा-
हा, मी तुह्मावर एक राष्ट्र उठवीन; आणि ते
तुह्माला हमाथेच्या प्रवेशापासून जंगलाच्या नदी-
पर्यंत पीडितील.

## अध्याय ७.

प्रभु जो परमेश्वर त्याने मला असें दाखविलें
आहे, कीं पाहा, पडसाळ उगवण्याच्या आरंभीं
त्याने टोळ निर्माण केले; आणि पाहा, ती पड-
साळ राजाच्या कापणीनंतर होत असती ती हो-
ती. २ आणि असें झालें, कीं जेव्हां त्यांनी
देशांतलें गवत खाण्याची समाप्ति केली, तेव्हां
मी ह्मणालों, हे प्रभो परमेश्वरा, क्षमा कर:
याकोब कसा उठेल? कां कीं तो लहान आहे.
३ परमेश्वर याविषयीं अनुतापला; हें घडणार
नाहीं, असें परमेश्वर ह्मणाला.

४ प्रभु जो परमेश्वर त्याने मला असें दा-
खविलें आहे, कीं पाहा, प्रभु जो परमेश्वर
त्याने अग्नीला वाद करायाला बोलाविलें; तेव्हां
त्याने मोठा डोह खाल्ला, आणि भूमिविभागहि
खाल्ला. ५ तेव्हां मी ह्मणालों, हे प्रभु परमे-
श्वरा, असूं दे; याकोब कसा उठेल? कां कीं तो
लहान आहे. ६ परमेश्वर याविषयीं अनुता-
पला; हें घडणार नाहीं, असें प्रभु परमेश्वर
ह्मणाला.

७ त्याने मला असें दाखविलें, कीं पाहा, ओ-
ळंब्याने केलेल्या भिंतीवर प्रभु उभा राहिला
होता, आणि त्याच्या हातांत ओळंबा होता. ८

आणि परमेश्वराने मला ह्मटलें, आमोसा,
तुला काय दिसतें? तेव्हां मी ह्मणालों, ओळंबा
दिसतो; मग परमेश्वराने मला ह्मटलें, पाहा,
मी आपल्या इस्राएल लोकांमध्यें ओळंबा धरीन;
त्यांस मी पुन्हा वल्हांडणार नाहीं. ९ आणि
इझाकाचीं उंचस्थानें ओसाड होतील, आणि
इस्राएलाचीं पवित्रस्थानें उजाड पडतील, आणि
यारोबामाच्या वंशावर मी तरवार घेऊन उठेन.
१० आणि बेथेलेंतला जो अमज्या याजक
त्याने इस्राएलाच्या यारोबाम राजाकडे निरोप
पाठविला, कीं आमोसाने इस्राएलाच्या वंशामध्यें
तुजवर बंड केलें आहे; त्याचीं सर्व वचनें देशा-
च्याने सोसवत नाहींत. ११ कारण कीं आमोस
ह्मणतो, कीं यारोबाम तरवारीने मरेल, आणि
इस्राएल आपल्या भूमीवरून निश्चयें पाडावपणा-
च्या प्रवासांत जाईल. १२ आणि अमज्या आ-
मोसाला ह्मणाला, अरे दृष्टांत पाहणाऱ्या, तूं
यहूदा देशांत पळून जा, आणि तेथें भाकर खा,
आणि तेथें भविष्य सांग. १३ परंतु बेथेलेस
यापुढें पुन्हा भविष्य सांगूं नको; कां कीं ती रा-
जपवित्रस्थान आणि राजधानी आहे.

१४ तेव्हां आमोस अमज्याला उत्तर करीत
ह्मणाला, मी भविष्यवादी नव्हतों, आणि भवि-
ष्यवाद्याचा पुत्र नव्हतों; परंतु मी गुराखी आणि
उंबरें गोळा करणारा होतों. १५ आणि परमे-
श्वराने मला कळपामागून घेतलें, आणि परमे-
श्वराने मला ह्मटलें, तूं जाऊन माझ्या इस्राएल
लोकांस भविष्य सांग.

१६ तर आतां तूं परमेश्वराचें वचन ऐक;
तूं ह्मणतोस, कीं इस्राएलाविषयीं भविष्य सांगूं
नको, आणि इझाकाविषयीं वचन तोंडाबाहेर
पडूं देऊं नको. १७ याकरितां परमेश्वर ह्मण-
तो, कीं तुझी स्त्री नगरांत कसबीणपण करील, आ-
णि तुझे पुत्र व तुझ्या कन्या तरवारीने पडतील,
आणि तुझी भूमि सूत्राने विभागतील; आणि तूं
विटाळलेल्या भूमीवर मरसील; आणि इस्राएल
आपल्या भूमीवरून निश्चयें पाडावपणाच्या प्रवा-
सांत जाईल.

## अध्याय ८.

प्रभु जो परमेश्वर त्याने मला असें दाखविलें
आहे, कीं पाहा, उष्णकालफलांची पाटी. २
मग तो ह्मणाला, आमोसा, तुला काय दिसतें?
तेव्हां मी ह्मणालों, उष्णकालफलांची पाटी दिस-
ती; मग परमेश्वराने ह्मटलें, माझ्या इस्राएल
लोकांचा अंत आला आहे; त्यांस मी पुन्हा
वल्हांडणार नाहीं. ३ आणि प्रभु परमेश्वर
ह्मणतो, कीं त्या समयीं मंदिरांतलीं गीतें केंकणें
होतील; प्रत्येक स्थानांत बहुत मढीं होतील,
लोक मौन धरून तीं बाहेर टाकून देतील.

४ जे तुह्मी दरिद्र्यावर तोंड वासितां, आणि
देशांतल्या दीनांस नाहींसे करायास इच्छितां,
५ आणि आपण धान्य विकावें, ह्मणून अमावा-
स्या केव्हां जाईल? आणि धान्य काढून पुढें
करावें, ह्मणून शाब्बाथ केव्हां जाईल? अशासा-
ठीं कीं आपण एफा लहान करावी, आणि शेकेल
मोठा करावा, आणि कपटाचीं तागडीं वांकडीं
धरावीं; ६ आणि रुपें देऊन दीनांस, आणि
जोड्यांचें जुळें देऊन दरिद्र्यास विकत घ्यावें; आ-
णि धान्याचा गाळाहि विकावा, असें ह्मणतां, ते
तुह्मी हें ऐका. ७ परमेश्वराने याकोबाच्या
अभिमानविषयाची शपथ वाहिली आहे, कीं नि-
श्चयें मी त्यांच्या कर्मांतलें कोणतेंहि कधीं विस-
रणार नाहीं. ८ यामुळें देश कांपणार नाहीं
काय? आणि त्यांतला प्रत्येक राहणारा शोक
करणार नाहीं काय? तर तो अवघा नदीप्रमाणें
चढेल; आणि मिसरांतल्या नदीच्या पात्रासारि-
खा खवळेल आणि खालीं जाईल. ९ आणि
प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं त्या समयीं असें
होईल, कीं मी सूर्याला दुपारीं मावळवीन, आणि
पृथ्वीला प्रकाशमय दिवसीं अंधारमय करीन. १०
आणि मी तुमचे सण पालटून शोक असे करीन;
आणि तुमचीं सर्व गीतें पालटून विलाप असीं
करीन; आणि सर्व कंबरांवर गोणताट, आणि
प्रत्येक मस्तकावर टक्कल येई असें करीन; आणि ती
दशा एकुलत्या पुत्राविषयींच्या शोकासारिखी, आणि
तिचा अंत अति खेदाच्या दिवसासारिखा करीन.

११ प्रभु परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, ते

दिवस येतील, ज्यांत मी देशावर दुकाळ पाठवीन, तो
भाकरीची भूक अथवा पाण्याची तहान असा नव्हे,
परंतु **परमेश्वराचीं** वचनें ऐकण्याचा दुकाळ
होईल. १२ आणि लोक समुद्रापासून समुद्राप-
र्यंत, आणि उत्तरेपासून पूर्वेपर्यंत भटकतील, आ-
णि **परमेश्वराचें** वचन शोधायाला इकडे ति-
कडे फिरतील, आणि तें त्यांस सांपडणार नाहीं.
१३ त्या समयीं सुंदर कुमाऱ्या आणि तरुण पुरुष
तहानेनें मूर्च्छित होतील. १४ जे शोमरोनेच्या
पातकाची शपथ वाहतात, आणि हे दाना, तुझ्या
देवाचा जीव, असें ह्मणतात; आणि बेरशेबाच्या
धर्माचा जीव, असें ह्मणतात; ते पडतील, आ-
णि पुन्हा उठणार नाहींत.

### अध्याय ९.

म्या प्रभु वेदीजवळ उभा राहिलेला पाहि-
ला; तेव्हां तो ह्मणाला, उंबरे कांपावे,
ह्मणून तूं दाराच्या खांबांच्या शिरांवर हाण;
आणि त्या सर्वांचीं मस्तकें छेद; आणि मी त्यां-
तल्या शेवटल्यांस तरवारीनें वधीन; त्यांतला
पळणारा एकहि पळून जाणार नाहीं; आणि त्यां-
तला सुटणारा एकहि सुटणार नाहीं. २ जरी
ते खोदून मृतलोकांत गेले, तरी तेथून माझा हात
त्यांस काढील; जरी ते आकाशांत चढले, तरी
तेथून मी त्यांस उतरीन. ३ आणि ते कार्मे-
लाच्या माथ्यावर जरी लपाले, तरी तेथून त्यांस
शोधून काढीन; आणि जरी ते माझ्या दृष्टीपा-
सून समुद्राच्या तळीं लपून राहिले, तरी तेथून
मी सर्पाला आज्ञापीन, तेव्हां तो त्यांस डसेल.
४ आणि जरी ते आपल्या वैऱ्यांपुढें पाडावपणा-
च्या प्रवासांत गेले, तरी तेथून तरवारीला आज्ञा-
पीन, तेव्हां ती त्यांस वधील; आणि मी आपले
डोळे त्यांजकडे कुशलासाठीं नव्हे, परंतु संकटा-
साठीं लावीन. ५ आणि ज्यानें भूमीला स्पर्शिलें,
ह्मणजे ती विरघळेल, आणि तींतले सर्व राह-
णारे शोक करितील, तो सैन्यांचा **प्रभु परमे-
श्वर** आहे; आणि ती अवघी नदीप्रमाणें चढेल;
आणि मिसरांतल्या नदीच्या पात्रासारिखी उत-
रेल. ६ ज्यानें आपल्या माड्या आकाशांत
बांधिल्या आहेत, आणि आपल्या बळकट धनुष्या-
कार रचनेचा पाया पृथ्वींत घातला आहे; जो
समुद्रांतलीं पाण्यें बोलावून पृथ्वीच्या पाठीवर
ओतितो; त्याचें नाम **परमेश्वर** आहे. ७
**परमेश्वर** ह्मणतो, इस्राएलाच्या संतानानो, तुह्मी
मला खूशांच्या संतानासारिखे नाहीं काय? म्यां
मिसर देशांतून इस्राएल, आणि काफ्तोरांतून
पलिष्टी, आणि कीरांतून अरामी वर आणिले ना-
हीं काय? ८ पाहा, **प्रभु** जो **परमेश्वर** त्या-
ची दृष्टि पापिष्ठ राज्यावर आहे, आणि मी तें
भूमीवरून नाहींसें करीन; तथापि मी याकोबा-
च्या वंशाला अगदीं नाहींसें करणार नाहीं, असें
**परमेश्वर** ह्मणतो. ९ तर पाहा, मी आज्ञा
करीन, आणि जसें धान्य चाळणींत चाळिवात,
तसें मी इस्राएलाच्या वंशाला सर्व राष्ट्रांमध्यें
चाळवीन, तथापि एक कणी भूमीवर पडणार
नाहीं. १० जे माझ्या लोकांतले सर्व पापी आ-
ह्माला संकट आटपणार नाहीं, आणि आह्मांला
आडवें येणार नाहीं, असें ह्मणतात, ते तरवारीनें
मरतील.

११ त्या समयीं दावीदाचा जो मंडप पडलेला
आहे, तो मी पुन्हा उभारीन, आणि त्याचीं भ-
गारें भरीन; आणि त्याच्या पाडिलेल्या रचना
पुन्हा उभारीन, आणि जसा पुरातन दिवसांत हो-
ता तसा पुन्हा बांधीन. १२ अशासाठीं कीं त्या-
नी अदोमाचें, आणि ज्या सर्व राष्ट्रांस माझें नाम
ठेविलें आहे, त्यांच्या शेषाचें वतन करावें, असें
जो **परमेश्वर** हें करितो, तो ह्मणतो. १३
**परमेश्वर** ह्मणतो, कीं पाहा, ते दिवस येतील,
ज्यांत नांगरणारा कापणी करणाऱ्याला, आणि
द्राक्षें तुडविणारा बीज पेरणाऱ्याला आटपील;
आणि पर्वत गोड द्राक्षारस गळूं देतील, आणि
सर्व डोंगर विघरतील. १४ आणि मी आपल्या
इस्राएल लोकांचे पाडाव प्रवासी परत आणीन;
तेव्हां ते उजाड नगरें बांधितील; आणि त्यांत
वसतील; आणि द्राक्षमळे लावितील, आणि
त्यांतला द्राक्षारस पितील; आणि बाग करितील,
आणि त्यांतलें फल खातील. १५ आणि मी
त्यांस त्यांच्या भूमीवर लावीन; मग जी त्यांची
भूमि म्यां त्यांस दिल्ही आहे, तींतून ते पुन्हा
उपटून जाणार नाहींत, असें **परमेश्वर** तुझा
देव ह्मणतो.

OBADIAH.

# ओबद्या.

ओबद्याचा दृष्टांत. **प्रभु परमेश्वर** अदोमा-
विषयीं ह्मणतो, कीं आह्मीं **परमेश्वरा**-
पासून वर्त्तमान ऐकिलें आहे, आणि राष्ट्रांमध्यें
दूत पाठविलेला आहे, उठा, आपण तिजवर ल-
ढाई करायाला उठूं. २ पाहा, म्या तुला रा-
ष्ट्रांमध्यें लहान केलें आहे; तूं फार तुच्छ आहेस.
३ अरे जो तूं खडकाच्या दऱ्यांत, आपल्या
उंच वस्तींत राहतोस, आणि मला कोण भूमीस
उतरील? असें आपल्या हृदयांत ह्मणतोस, त्या
तुला तुझ्या गर्वानें फसविलें आहे? ४ जरीं
त्वां गरुडाप्रमाणें आपणाला उंचाविलें, आणि
आपलें कोटें ताऱ्यांमध्यें बांधिलें, तरीं तेथून मी
तुला उतरीन, असें **परमेश्वर** ह्मणतो. ५ तूं
केवढा नाशलेला आहेस! चोर अथवा लुटारू
जर रात्रीं तुजकडे आले असले, तर त्यानीं पा-
हिजे तितकें चोरलें नसेल काय? द्राक्षें गोळा-
करणारे जर तुजकडे आले असले, तर त्यानीं
वगळ द्राक्षें सोडून ठेविलीं नसतील काय? ६
एसावाचे पदार्थ कसे हुडकिले आहेत? त्याचे
गुप्तपदार्थ कसे शोधिले आहेत? ७ तुझ्या क-
राराच्या सर्व मनुष्यानीं तुला सीमेपर्यंत घाल-
विलें आहे; तुझ्या सल्याच्या मनुष्यानीं तु-
ला फसविलें आहे, ते तुजपेक्षां प्रबल झाले
आहेत; तुझी भाकर खाणाऱ्यानीं तुजखालतीं
दबा धरिला आहे; त्याच्या ठायीं कांहीं बुद्धि
नाहीं. ८ **परमेश्वर** ह्मणतो, कीं त्या समयीं
मी अदोमांतून विद्वानांस, आणि एसावाच्या पर्व-
तांतून बुद्धीला नाहींसें करणार नाहीं काय? ९
आणि अरे तेमाना, तुझे बळवान कासावीस हो-
तील, अशासाठीं कीं प्रत्येक जन एसावाच्या प-
र्वतांतून वधाकडून नाश पावावा.
१० त्वां आपला भाऊ याकोब यावर जो
बळात्कार केला, त्यामुळें लज्जा तुला झांकील,
आणि सर्वकालपर्यंत तूं नाश पावसील. ११
ज्या दिवसीं तूं प्रतिपक्षाकडे उभा राहिलास,
ज्या दिवसीं परक्यानीं त्याचें बल हरून
नेलें, आणि विदेश्यानीं त्याच्या दारांत शिरून
यरूशालेमेवर पण पाडिला, त्या दिवसीं तूं त्यां-
तल्या एकासारिखा होतास. १२ परंतु त्वां आ-
पल्या भावाचा दिवस त्याच्या विपत्तीच्या दिवसीं
पाहावा, असें नव्हतें; आणि त्वां यहूदाच्या सं-
तानांवर त्यांच्या नाशाच्या दिवसीं हर्षावें, असें
नव्हतें; आणि संकटाच्या दिवसीं त्वां गर्वानें बो-
लावें, असें नव्हतें. १३ त्वां माझ्या लोकांच्या
दारांत त्यांच्या विपत्तीच्या दिवसीं शिरावें, असें
नव्हतें; त्वां त्यांच्या विपत्तीच्या दिवसीं त्यांचें
संकट पाहावें, असें नव्हतें; आणि त्यांच्या वि-
पत्तीच्या दिवसीं त्यांच्या द्रव्याला त्वां आपले
हात लावावे, असें नव्हतें. १४ आणि त्याच्या
सुटलेल्यांस नाहींसें करायाला त्वां चवाठ्यांत
उभें राहावें, असें नव्हतें; आणि कष्टाच्या दि-
वसीं त्वां त्याचे उरलेले लोक हातीं द्यावे, असें
नव्हतें. १५ कां कीं **परमेश्वराचा** दिवस सर्व
राष्ट्रांसीं भिडला आहे; जसें त्वां केलें आहे,
तसें तुला प्राप्त होईल; तुझी फेड तुझ्या मस्त-
कावर फिरेल. १६ तर जसें तुह्मी माझ्या प-
वित्र पर्वतावर प्यालां आहां, त्याप्रमाणें सर्व रा-
ष्ट्रें नित्य पितील; होय पितील, आणि गिळितील,
आणि कधीं न झालेल्याप्रमाणें होतील.
१७ परंतु सीयोन पर्वतावर सुटका होईल,
आणि पवित्रपण होईल; आणि याकोबाचे वंश
आपलें वतन भोगितील. १८ आणि याकोबाचा
वंश अग्नि, आणि योसेफाचा वंश जाळ, आणि
एसावाचा वंश भूंस होईल, आणि ते त्यांत पेट-
तील, आणि त्यांस खाऊन टाकितील; आणि
एसावाच्या वंशांतला कोणी वांचणारा असणार
नाहीं; कां कीं **परमेश्वर** हें बोलला आहे. १९
आणि दक्षिणेंतले लोक एसावाच्या पर्वताचें, आ-
णि सपाट देशांतले लोक पलिष्ट्यांच्या देशाचें
वतन भोगितील; आणि ते एफ्राइम प्रांताचें आणि

शोमरोन प्रांताचें वतन भोगितील; आणि ब-
न्यामीन गिलादाचें वतन भोगील. २० आ-
णि जो खनान्यांचा देश सारफाथेपर्यंत आहे,
त्याचें वतन इस्राएलाच्या संतानांच्या या सै-
न्याचे पाडाव प्रवासी भोगितील; आणि जे
यरूशालेमेचे पाडाव प्रवासी सफारादांत आ-
हेत, ते दक्षिणेंतल्या नगरांचें वतन भोगितील.
२१ आणि एसावाच्या पर्वताचा न्याय करायाला
जियोन पर्वतावर तारणारे चढतील; आणि रा-
ज्य परमेश्वराचें असत जाईल.

---

JONAH.

# योना.

## अध्याय १.

तर अमित्ताइचा पुत्र योना याजवळ परमेश्व-
राचें वचन आलें कीं, २ तूं उठून नी-
नवे जी मोठी नगरी तिजकडे जा, आणि तिजला
प्रवाद गाजवून सांग; कारण कीं त्यांची दुष्टाई
मजसमोर चढली आहे. ३ परंतु योना पर-
मेश्वरासमोरून तार्शीशास पळून जावें, ह्मणून
उठला, आणि उतरत याफोस गेला; तेव्हां ता-
र्शीशास जाणारें एक गलबत त्याला सांपडलें;
मग तो त्याचा उतार देऊन त्यांसंगतीं तार्शी-
शाला परमेश्वरासमोरून जायासाठीं त्यावर
चढला.

४ आणि परमेश्वराने समुद्रांत मोठा वारा
सुटूं दिल्हा, आणि मोठें वादळ समुद्रांत झालें,
मग गलबत फुटेल, असी शंका झाली. ५ आ-
णि नावाडी भ्याले, आणि प्रत्येक आपल्या देवा-
ला आरोळी मारूं लागले, आणि गलबतांत जें
भरगत होतें, त्यापासून गलबत हलकें करावें,
ह्मणून तें समुद्रांत टाकूं लागले; परंतु योना
गलबताच्या तळीं उतरून आडवा पडून गाढ
झोंपेंत होता. ६ मग तांडेल त्याजवळ येऊन
ह्मणाला, अरे निजणाऱ्या, तुझ्या मनांत काय
आहे? तूं ऊठ, आपल्या देवाला आरोळी मार,
कदाचित देव आह्मास प्रसन्न होईल, मग आ-
ह्मी नाश पावणार नाहीं. ७ आणि ते एकमे-
काला ह्मणाले, याहो, आपण पण पाडूं, आणि
जाणूं, कीं कोणामुळें हें संकट आपणावर आलें
आहे; मग त्यांनी पण पाडिले, आणि पण यो-
नावर पडला. ८ तेव्हां त्यांनी त्याला ह्मटलें,
तूं आह्माला सांग, कीं कशामुळें हें संकट आ-
ह्मावर आलें आहे; तुझा धंदा काय आहे?
आणि कोठून आला आहेस? तुझा देश कोणता?
आणि तूं कोठल्या लोकांतला आहेस? ९ मग
त्याने त्यांस सांगितलें, कीं मी इब्री आहें; आणि
मी परमेश्वराला आकाशांतल्या देवाला भितों,
ज्या त्याने समुद्र आणि कोरडीभूमि उत्पन्न केली.
१० तेव्हां ते मनुष्य अत्यंत भयभीत झाले,
आणि त्याला ह्मणाले, त्वां हें कां केलें आहे?
कारण कीं त्या मनुष्यांनी जाणलें, कीं तो परमे-
श्वरासमोरून पळून जात होता, कां कीं त्याने
त्यांस असें सांगितलें होतें.

११ मग ते त्याला ह्मणाले, समुद्र आह्मा-
वरून शांत व्हावा, ह्मणून आह्मी तुझें काय करूं?
कां कीं समुद्र खळबळत व उसळत होता. १२
तर तो त्यांस ह्मणाला, तुह्मी मला उचलून स-
मुद्रांत टाका, ह्मणजे समुद्र तुह्मावरून शांत
होईल; कारण कीं मी जाणतों, कीं मजमुळें हें
मोठें वादळ तुह्मावर आहे. १३ तथापि त्या
मनुष्यांनी गलबत तीरास आणायासाठीं झटून
वल्हविलें; परंतु त्यांचा उपाय चालेना; कां कीं
समुद्र त्यांजवर खळबळत व उसळत होता.
१४ तेव्हां ते परमेश्वरास आरोळी मारीत
ह्मणाले, हे परमेश्वरा, या मनुष्याच्या जीवा-

मुळें आह्मी नाश पावूं नये, आणि निर्दोष रक्ताचा
दोष आह्माला लावूं नये; का कीं हे **परमेश्व-**
**रा**, जसें तुला योग्य वाटलें, तसें त्वां केलें आहे·
१५ **नंतर** त्यांनी **योनाला** उचलून समुद्रांत टा-
किलें; तेव्हां समुद्र आपल्या खवळण्यापासून
शांत झाला· १६ **मग** त्या मनुष्यांनी **परमेश्व-**
**राचें** मोठें भय धरिलें, आणि **परमेश्वरासाठीं**
यज्ञ केले, आणि नवस केले·

१७ **तर योनाला** गिळावें ह्मणून **परमेश्वराने**
एक मोठा मासा सिद्ध केला होता· आणि **योना**
तीन दिवस आणि तीन रात्रिपर्यंत त्या मास्याच्या
पोटांत होता·

## अध्याय २·

**आ**णि **योनाने परमेश्वर** जो आपला **देव**
त्याची प्रार्थना मास्याच्या पोटांतून केली,
२ **आणि** ह्मटलें, म्या आपल्या संकटामुळें **पर-**
**मेश्वराकडे** हाक मारिली, तेव्हां त्याने मला
उत्तर दिल्हें; म्या मृतलोकाच्या पोटांतून आरोळी
मारिली, तेव्हां त्वां माझा शब्द ऐकिला· ३
**कां** कीं त्वां मला समुद्राच्या मध्यभागीं टाकिलें,
आणि प्रवाहाने मला वेढिलें, तुझ्या सर्व फुटऱ्या
व लोळत्या लाटा मजवर गेल्या. ४ **तेव्हां** मी
ह्मणालों, मी तुझ्या दृष्टिसमोरून टाकलेला आ-
हें; तथापि मी तुझ्या पवित्र देवळाकडे पुन्हा
पाहीन. ५ **पाण्यांनी** मला प्राणापर्यंत झांकिलें;
डोहाने मला वेढिलें, समुद्रशेवाल माझ्या डोईस
वेष्टिलें होतें. ६ **मी** पर्वतांच्या तळांपर्यंत उत-
रलों; पृथ्वीचे सर्वकाळचे अडसर मजभोंवते
होते; तथापि हे **परमेश्वरा** माझे **देवा**, त्वां
माझा जीव खांचेंतून वरतीं काढिला आहे· ७
**जेव्हां** माझा जीव माझ्याठायीं मूर्च्छित झाला,
तेव्हां म्या **परमेश्वराला** स्मरलें; आणि माझी
विनंती तुजजवळ तुझ्या पवित्र देवळांत पोहंचली·
८ **जे** खोट्या व्यर्थपणाकडे चित्त लावितात, ते
आपला **दयासागर** सोडितात· ९ **परंतु** मी आ-
भार मानण्याच्या वाणीने तुजकडे यज्ञ करीन; जो
नवस म्या केला आहे, तो फेडीन· तारण **परमे-**
**श्वराकडूनच** आहे·

१० **आणि परमेश्वराने** त्या मास्याला आ-
ज्ञापिलें, तेव्हां त्याने **योना** कोरड्या भूमीवर ओ-
कून टाकिला·

## अध्याय ३·

**आ**णि **परमेश्वराचें** वचन **योनाजवळ** दुस-
ऱ्याने आलें कीं, २ **तूं** उठून **नीनवे** जी
मोठी नगरी तिजकडे जा, आणि जो उपदेश मी
तुला सुचवीन, तो तिला गाजवून सांग· ३ **मग**
**परमेश्वराच्या** वचनाप्रमाणें **योना** उठून **नीन-**
**वेस** गेला· **नीनवे** तर फार मोठी नगरी होती,
तिहीं दिवसांच्या वाटचालीची होती· ४ **आणि**
**योना** नगरांत एका दिवसाच्या वाटचालीपर्यंत
जाऊं लागला, आणि त्याने गाजवून सांगितलें,
कीं अजून चाळीस दिवस आहेत, मग **नीनवे**
धुळीस मिळेल.

५ **तर नीनवेंतल्या** मनुष्यांनी **देवाला**
विश्वासिलें, आणि उपासाची सूचना गाज-
विली, आणि मोठ्यापासून लहानापर्यंत गोण-
ताट नेशिलें· ६ **कारण** कीं **नीनवेच्या** राजा-
कडे वर्त्तमान पोहंचलें होतें, तेव्हां त्याने आपल्या
सिंहासनावरून उठून आपला झगा आपल्या अं-
गांतून काढून ठेविला, मग तो गोणताट नेसून रा-
खेवर बसला· ७ **आणि** राजाने राजाच्या आणि
त्याच्या प्रधानाच्या ठरावाने **नीनवेंत** गाजवून सां-
गविलें, कीं मनुष्यांनी अथवा पशूंनी, गुरांनी अ-
थवा मेंढरांनी कांहीं चाखूं नये, चरूं नये, आ-
णि पाणी पिऊं नये· ८ **परंतु** मनुष्य आणि पशु
गोणताट नेसोत, आणि देवाकडे मनापासून हाक
मारोत; आणि प्रत्येक आपल्या कुमार्गापासून,
आणि जो बलात्कार त्यांच्या मुठींत असेल, त्या-
पासून फिरोत. ९ **आ**ह्मी नाश पावूं नये, ह्मणून
**देव** वळेल, आणि अनुतापेल, आणि आपल्या संतप्त
क्रोधापासून फिरेल कीं नाहीं, हें कोण जाणे?

१० **तर** ते आपल्या कुमार्गापासून फिरले,
असीं त्यांचीं कर्मे **देवाने** पाहिलीं, आणि ज्या
संकटाविषयीं **देव** बोलला होता, कीं मी त्यांस
करीन, त्याविषयीं तो अनुतापला, आणि त्याने तें
केलें नाहीं·

## अध्याय ४·

**प**रंतु हें **योनाला** फार वाईट वाटलें, ह्मणून तो
रागें भरला· २ **आणि** तो **परमेश्वराजवळ**

विनंती करीत ह्मणाला, हे **परमेश्वरा**, जेव्हां मी
आपल्या देशांत होतों, तेव्हां हें माझें वचन
नव्हतें कीं काय? याकरितां मी पुढें तार्शीशाकडे
पळून जात होतों; कारण कीं म्यां जाणलें,
कीं तूं कृपाळु व दयाळु, मंदक्रोध व बहुम-
साद **देव** आहेस, आणि संकटाविषयीं अनुता-
पत असतोस. ३ तर हे **परमेश्वरा**, आतां तूं
मजपासून माझा जीव घे; कारण कीं मला जीव-
नापेक्षां मरण उत्तम आहे.

४ तेव्हां **परमेश्वर** ह्मणाला, रागें भरणें
तुला बरें वाटतें काय? ५ मग **योना** नगरांतून
निघाला, आणि नगराच्या पूर्वेकडे बसला, आणि
तेथें मंडप करून त्या खालीं छायेंत बसला, नग-
राचें काय होईल, तें तो पाही तोंपर्यंत. ६
**आणि परमेश्वर** जो **देव** त्याने एक भोंपळी
सिद्ध केली, आणि ती रुझत **योनाच्या** वरतीं चढे
असें केलें, अशासाठीं कीं ती त्याच्या डोईवरतीं
सावली व्हावी, त्याला त्याच्या क्लेशांतून सोडवावें
ह्मणून; मग **योनाला** त्या भोंपळीमुळें फार आ-
नंद झाला. ७ परंतु दुसऱ्या दिवसीं जेव्हां
पहांट झाली, तेव्हां **देवाने** एक किडा सिद्ध केला,
नंतर त्या किड्याने भोंपळीला बाधिलें, तेव्हां ती
सुकून गेली. ८ आणि असें झालें, कीं जेव्हां
सूर्य उगवला, तेव्हां **देवाने** पूर्वेकडचा ऊन वारा
सिद्ध केला; नंतर सूर्य **योनाच्या** मस्तकाला
बाधूं लागला, तेव्हां तो मूर्च्छित होऊं लागला;
आणि आपण मरावें, असें मागितलें; आणि
त्याने ह्मटलें, मला जीवनापेक्षां मरण उत्तम आहे.
९ मग **देवाने योनाला** ह्मटलें, भोंपळीमुळें रागें
भरणें तुला बरें वाटतें कीं काय? तेव्हां तो ह्म-
णाला, मरणपावेतों रागें भरणें मला बरें वाटतें.
१० मग **परमेश्वर** ह्मणाला, ज्या भोंपळीसाठीं
त्वां श्रम केले नाहींत, आणि जिला त्वां वाढ-
विलें नाहीं, जी एका रात्रीस उत्पन्न झाली, आणि
एका रात्रीस नाहींसी झाली, तिजवर त्वां करुणा
केली आहे. ११ तर नीनवे जी मोठी नगरी,
जिजमध्यें सवालक्षांपेक्षां अधिक मनुष्यें जीं आ-
पल्या उजव्या आणि डाव्या हाताचा भेद जाणत
नाहींत, तीं आणि बहुत गुरेंहि आहेत, तिजवर
मी करुणा करणार नाहीं काय?

MICAH.

# मीखा.

## अध्याय १.

योथाम, आहाज, आणि यहिज्कीया जे यहू-
दाचे राजे त्यांच्या दिवसांत **मीखा** जो
**मोराष्टी** त्याजवळ जें **परमेश्वराचें** वचन आलें,
जें **शोमरोन** आणि **यरूशालेम** यांविषयीं त्याने
दृष्टांताकडून पाहिलें तें. २ सर्व लोकांनो, ऐका;
अगे पृथ्वी, तूं आपल्या भरणासुद्धां कान दे; ह्म-
णजे **प्रभु परमेश्वर** प्रभुच आपल्या पवित्र
देवळांतून तुह्माविषयीं साक्षी होईल. ३ कां
तर पाहा, **परमेश्वर** आपल्या स्थानांतून निघेल,
आणि उतरून पृथ्वीच्या उंच स्थानांवर चालेल.
४ आणि त्याखालीं पर्वत विघरतील, आणि खो-
रीं फुटून जातील, जसें मेण अग्नीकडून विघरतें,
आणि जसीं पाण्यें उतरत्या स्थानावरून वाहतात
तसीं. ५ हें सर्व **याकोबाच्या** पातकामुळें आणि
**इस्राएलाच्या** वंशाच्या पापांमुळें होईल. **याको-**
**बाचें** पातक काय आहे? तें **शोमरोनच** आहे
कीं नाहीं? आणि **यहूदाचीं** उंच स्थानें कोणतीं
आहेत? तीं **यरूशालेम** आहेत कीं नाहीं?
६ तर **शोमरोन** शेतांतल्या ढिगासारिखी, कीं
मळ्यांतल्या लावण्यासारिखी करीन, त होता.
तिचे दगड खोऱ्यांत लोटूं देईन, रोळी मारीत
पाये उघडे करीन. ७ आणि त्याच्या जीवा-

ूर्त्ति ठेंचून जातील, आणि तींतले सर्व वेतनाचे
दार्थ अग्नीकडून जळतील, आणि तींतल्या सर्व
ूर्त्ति उजाड करीन; कां कीं तिने कसबिणीच्या
ातनापासून त्या मिळविल्या, आणि कसबिणीच्या
ातनास त्या परत जातील. ८ याकरितां मी
आक्रंदेन, आणि केंकेन, मी वस्त्रहीन व नागवा
ार्त्तेन; मी अघोर जीवांसारिखा आक्रंदन, आणि
ाबडांसारिखा शोक करीन. ९ कां कीं तिचा
ाय अवघड आहे; कारण कीं तो यहूदापर्यंत
आला आहे; तो माझ्या लोकांच्या दारापर्यंत,
यरूशालेमेपर्यंत पोंचला आहे.

१० गाथेस हें प्रसिद्ध करूं नका, अगदीं
रडूं नका, तूं अफ्राच्या घरांत आपल्या अंगाला
धूळ फांस. ११ शाफीरेंतल्या राहणाऱ्यानो,
तुह्मी नागवे व लज्जित होऊन पार जा; बेथेजे-
लेच्या आक्रंदनाच्या वेळेस जानानेंतले राहणारे
निघाले नाहींत; तो तुह्मापासून आपलें स्थान
घेईल. १२ मारोथेंतले राहणारे कुशलाची
वाट पाहत होते; परंतु परमेश्वरापासून यरू-
शालेमेच्या दारांत संकट उतरलें. १३ लाखी-
शेंतल्या राहणाऱ्यानो, चपळ घोडा रथाला जुंपा;
ती झीयोनेच्या कन्येला पापाचा प्रारंभ असी
होती; कां कीं इस्राएलाचीं पातकें तुझ्याठायीं
सांपडलीं होतीं. १४ याकरितां तूं मोरेशेथ
गाथेसाठीं दानें देसील; अख्जीबेंतलीं घरें इस्रा-
एलाच्या राजांस खोटीं होतील. १५ अणखी
अगे मारेशांतल्या राहणाऱ्ये, मी तुला वारिस आ-
णीन; इस्राएलाचें गौरव अदुल्लामेस येईल.
१६ तूं आपल्या मनोरम लेंकरांमुळें आपणाला
टक्कल आण, आणि आपले केंस कातर; तूं
गरुडासारिखी आपलें टक्कल विस्तार; कां कीं
तीं तुजपासून पाडावपणाच्या प्रवासांत गेलीं
आहेत.

## अध्याय २.

जे आपल्या पलंगांवर दुष्टाई कल्पितात, आणि
दुष्कर्म करितात, त्यांस हाय हाय; ते पहा-
टेच्या उजेडांत तें करितात, तें त्यांच्या हाताच्या
कारी व्हावे ह्मणून. २ आणि ते शेतांचा लोभ
धरून तीं बळकावितात, आणि घरांचा,
आणि तीं हरून घेतात; आणि ते पुरुषावर व
त्याच्या घराण्यावर आणि मनुष्यावर व त्याच्या
विभागावर बलात्कार करितात. ३ याकरितां
परमेश्वर ह्मणतो, कीं पाहा, मी या वंशावर
संकट कल्पितों आहें, ज्या त्यापासून तुह्मी आ-
पल्या माना सारणार नाहीं, आणि तुह्मी गर्वाने
चालणार नाहीं; कां कीं हा दुर्दशेचा समय
आहे.

४ त्या समयीं एकादा तुह्माविषयीं ह्मण यो-
जील, आणि भारी विलाप करीत ह्मणेल, आह्मी
अगदीं नाश पावलों आहों; त्याने माझ्या लो-
कांचा विभाग पालटिला आहे; कसा त्याने तो
मजपासून दूर केला आहे! त्याने आमचीं शेतें
दुसऱ्याच्या स्वाधीन करून वांटून दिल्हीं आहेत.
५ याकरितां पण पाडून सूत्र लावी, असा कोणी
तुजसाठीं परमेश्वराच्या सभेंत राहणार नाहीं.
६ तुह्मी बोलूं नका, असें बोलतील; ते यांस
बोलणार नाहींत, अप्रतिष्ठा सरणार नाहीं.

७ अहो याकोबाच्या वंशा ह्मटलेल्यानो, पर-
मेश्वराचा आत्मा उणा आहे काय? हीं त्या-
चीं कर्मे आहेत कीं नाहींत? जो सरळ वर्त्ततो,
त्याला माझीं वचनें बरें करीत नाहींत काय? ८
आणि मी वैऱ्याप्रमाणें उठें असें माझ्या लोकानी
नुक्तें केलें आहे; जे लढाईस अमान्य असतां-
ना निर्भय पार जातात, त्यांपासून तुह्मी झगा
अंगरख्यावरून काढून घेतां. ९ तुह्मी माझ्या
लोकांच्या स्त्रिया त्यांच्या मनोरम घरांतून घाल-
विल्या आहेत; त्यांच्या बाळांपासून माझी शो-
भा तुह्मी सर्वकालपर्यंत काढून घेतली आहे. १०
तुह्मी उठून जा, कां कीं ही तुमची विसाव्याची
जागा नाहीं; कारण कीं ही विटाळली आहे, ही
मोठ्या नाशाने नाश करील. ११ जर कोणी
आत्म्याने आणि खोटेपणाने वर्त्ततांना लबाडी बो-
लून, मी द्राक्षारस व मद्य यांविषयीं तुला उप-
देश करीन, असें ह्मणेल, तर तो या लोकांचा
उपदेशक होईल.

१२ हे याकोबा, मी निश्चयें तुह्मा सर्वांस
एकत्र मिळवीन; मी निश्चयें इस्राएलाच्या उर-
लेल्यांस एकवटीन; जसी बोज्रांतलीं मेंढरें,
जसा कळप त्याच्या कुरणामध्यें तसें त्यांस मी

एकत्र करून ठेवीन; फार मनुष्यांमुळें मोठी गड-
बड होईल. १३ त्यांपुढें फोडणारा चढला
आहे; ते सुटून दारांतून जाऊन त्यांतून निघाले
आहेत; आणि त्यांचा राजा त्यांपुढें चालेल,
आणि **परमेश्वर** त्यांचा अग्रसर होईल.

## अध्याय ३.

आणि मी ह्मणालों, याकोबांतल्या मुख्यानो,
आणि इस्राएलाच्या वंशांतल्या अधिका-
ऱ्यानो, ऐका; न्याय जाणणें तुह्माला योग्य नाहीं
काय? २ जे उत्तमाला द्वेषितात, आणि वाई-
टाला प्रिय मानितात; जे माझ्या लोकांपासून
त्यांचें कातडें, आणि त्यांच्या हाडांवरून त्यांचें
मास काढितात; ३ जे माझ्या लोकांचें मास
खातात, आणि त्यांपासून त्यांचें कातडें काढि-
तात; आणि जसीं हाडें थालींत घालायासाठीं,
आणि जसें मास तपेल्यांत घालायासाठीं तसीं
ते त्यांचीं हाडें ठेंचितात, तुकडे तुकडे करितात.
४ तेव्हां ते **परमेश्वराला** आरोळी मारितील,
परंतु तो त्यांस उत्तर देणार नाहीं; आणि त्या
वेळेस तो आपलें मुख त्यांपासून झाकील, कां
कीं त्यानी आपलीं कर्मे दुष्ट केलीं आहेत.
५ जे भविष्यवादी माझ्या लोकांस बहकावि-
तात, आणि आपल्या दांतानी डसतात, आणि,
कुशल, आणि जें तो त्यांच्या मुखांत घालीत,
नाहीं, तें ओरडून बोलतात, आणि त्यावर लढाई
सिद्ध करितात, त्यांविषयीं **परमेश्वर** ह्मणतो कीं,
६ याकरितां तुह्माला रात्र पडेल, ह्मणून दृ-
ष्टांत होणार नाहीं; आणि तुह्माला अंधार पडे-
ल, ह्मणून जोसीपण साधणार नाहीं; आणि
भविष्यवाद्यांवर सूर्य मावळेल, आणि त्यांजवर
दिवस काळोखी होईल; ७ आणि देवाचें
कांहीं उत्तर नाहीं, ह्मणून पाहणारे लाजतील,
आणि जोतिषी शरमतील; आणि ते सर्व आपले
ओंठ झांकितील.
८ तथापि याकोबाला त्याचें पातक, आणि इस्रा-
एलाला त्याचें पाप सांगून दाखवायाला, मी **पर-
मेश्वराच्या** आत्म्याकडून पराक्रमाने आणि न्या-
याने आणि सामर्थ्याने परिपूर्ण आहें. ९ याकोबा-
च्या वंशांतल्या मुख्यानो, आणि इस्राएलाच्या वं-
शांतल्या अधिकाऱ्यानो, जे तुह्मी न्यायाला अघोर
मानितां, आणि अवघें सरळपण वांकडें करितां,
ते तुह्मी हें ऐका. १० ते सीयोन रक्ताने, आणि
यरूशालेम अन्यायाने बांधितात. ११ तींतले
अधिकारी वेतनासाठीं न्याय करितात, आणि तींतले
याजक मोलासाठीं शिकवितात, आणि तींतले
भविष्यवादी रुप्यासाठीं जोसीपण करितात; त-
थापि ते **परमेश्वरासीं** टेंकतात, आणि, आह्मा-
मध्यें **परमेश्वर** नाहीं काय? आह्मावर विपत्ति
येणार नाहीं, असें ह्मणतात. १२ याकरितां
तुह्मामुळें सीयोन शेताप्रमाणें नांगरतील, आणि
यरूशालेम ढीग होईल, आणि मंदिराचा पर्वत
जंगलांतल्या उंचस्थानांसारिखा होईल.

## अध्याय ४.

आणि पुढल्या दिवसांत असें होईल, कीं **पर-
मेश्वराच्या** मंदिराचा पर्वत पर्वतांच्या
माथ्यावर स्थापित होईल, आणि तो डोंगरांवर
उंचावेल; मग त्याकडे लोक लोटतील. २
आणि बहुत राष्ट्रें येऊन ह्मणतील, याहो, आ-
पण **परमेश्वराच्या** पर्वतावर, आणि याकोबाच्या
देवाच्या मंदिराकडे चढत जाऊं; ह्मणजे तो
आपल्या मार्गांविषयीं आह्माला शिकवील, मग
आह्मी त्याच्या वाटांत चालूं; कां कीं सीयोनेंतून
नेमशास्त्र, आणि यरूशालेमेंतून **परमेश्वराचें**
वचन निघेल.
३ आणि तो बहुत लोकांमध्यें न्याय करील,
आणि दुरून पराक्रमी राष्ट्रांस निषेधील; तेव्हां
त्या आपल्या तरवारी ठोकून फाळ करितील,
आणि आपले भाले ठोकून कोयत्या करितील;
राष्ट्र राष्ट्रावर तरवार उचलणार नाहीं, आणि
पुढें तीं लढाई शिकणार नाहींत. ४ आणि ते
प्रत्येक आपल्या द्राक्षीखालीं, आणि आपल्या अं-
जीरझाडाखालीं बसतील; आणि कोणी त्यांस
भेडवणार नाहीं; कां कीं सैन्यांच्या **परमेश्वराचें**
मुख हें बोललें आहे. ५ तर सर्वलोक प्रत्येक
आपल्या देवाच्या नामाने वर्त्ततात, परंतु **परमे-
श्वर** जो आमचा देव त्याच्या नामाने आह्मी
सदासर्वकालपर्यंत वर्त्तत जाऊं. [illegible]
ह्मणतो, कीं त्यासमयीं मी लंगड्याच्या जीवा-

मिळवीन, आणि घालविलेलीला आणि जी म्या
पीडिली आहे तिला एकवटीन. ७ आणि मी
लंगडतीला शेष, आणि दूर केलेलीला बलवान
राष्ट्र असें करीन; आणि परमेश्वर सीयोन
पर्वतांत आतांपासून सर्वकालपर्यंत त्यांचें राज्य
करील.

८ आणि हे तूं कळपाच्या दुर्गा, सीयोनेच्या
कन्येच्या टेंकाडा, तुला मुख्य प्रभुत्व येईलच
येईल; यरूशालेमेच्या कन्येला राज्य येईल.
९ आतां तूं कशाला आरोळी मारितीस? तुज-
मध्यें राजा नाहीं काय? तुझा मंत्री नाहींसा
झाला आहे काय? कां कीं जशा प्रसवतीला तशा
तुला वेदना लागल्या आहेत. १० अगे सीयो-
नेच्या कन्ये, तूं प्रसवतीप्रमाणें वेदना पावून प्रसूत
हो; कां कीं आतां तूं नगरांतून निघसील, आणि
रानांत वससील, आणि बाबेलेपर्यंत जासील;
तेथें तूं सुटका पावसील, तेथें परमेश्वर तुला
तुझ्या वैऱ्यांच्या हातांतून उद्धरील.

११ तर आतां बहुत राष्ट्रें तुजविरुद्ध एकत्र
मिळालीं आहेत, तीं म्हणतात, तिला बाटवोत,
आणि आमचा डोळा सीयोनेला पाहो. १२
परंतु तीं परमेश्वराचे संकल्प जाणत नाहींत,
आणि त्याची मसलत समजत नाहींत; कां कीं
जस्या पेंढ्या खळ्यांत तसें त्यांस तो एकवटील.
१३ अगे सीयोनेच्या कन्ये, तूं उठून मळीत जा;
कां कीं मी तुझें शिंग लोखंड करीन, आणि तुझे
खुर पितळ करीन; मग तूं बहुत लोकांचें चूर्ण
करिसील, आणि मी त्यांचें द्रव्य परमेश्वराला,
आणि त्यांचें धन अवघ्या पृथ्वीच्या प्रभूला उत्स-
र्जित करीन.

## अध्याय ५.

अगे समुदायाच्या कन्ये, आतां समुदायानी
एकत्र मीळ; त्याने आह्माला वेढा घातला
आहे; ते इस्राएलाच्या न्यायाधीशाच्या गालास
काठीने मारितील. २ आणि हे बेथलेहेम एफ्रा-
था, तूं यहूदाच्या हजारांमध्यें असायाला धाकला
असलास, तरीं तुझ्या ठायांतून मजसाठीं अधि-
कारी व्हायाला एक जन निघेल, आणि त्याचीं
निघणीं पुरातनकालापासून, अनादिकालापासूनहि
असत. ३ याकरितां प्रसवणारी प्रसवे तोंपर्यंत
तो त्यांस अन्यांच्या हातीं देईल; मग त्याच्या
भावांतले जे उरलेले ते इस्राएलाच्या संतानाकडे
परत येतील.

४ आणि तो उभा राहून परमेश्वराच्या
सामर्थ्याने, परमेश्वर जो आपला देव त्याच्या
नामाच्या माहात्म्याने पालन करील; आणि ते
वसत जातील; कां कीं आतां तो पृथ्वीच्या शेव-
टापर्यंत मोठा होत जाईल. ५ आणि हा पुरुष
स्वस्थपण असा असत जाईल; जेव्हां अश्शूरी
आमच्या देशांत येईल; आणि जेव्हां आमच्या
मंदिरांत पायचाल करील, तेव्हां आह्मी त्यावि-
रुद्ध सात पालक आणि आठ मुख्यमनुष्य उभे
करूं. ६ आणि ते अश्शूर देशाला, आणि नि-
म्रोदाच्या देशाला त्याच्या प्रवेशांत तरवारीने
नाशितील; आणि जेव्हां अश्शूरी आमच्या दे-
शांत येईल, व आमच्या प्रांतांत पायचाल करील,
तेव्हां हा पुरुष त्यापासून आह्माला सोडवील.
७ जसें दहिंवर परमेश्वरापासून, जसा पाऊस
गवतावर, जें तें मनुष्याची अपेक्षा करीत नाहीं,
आणि मनुष्याच्या पुत्रांची वाट पाहत नाहीं, तसें
याकोबाचें शेष बहुत लोकांमध्यें होईल.

८ आणि जसा सिंह जंगलांतल्या पशूंमध्यें,
जसा तरुणसिंह मेंढरांच्या कळपांमध्यें, जो तो
जर पार गेला, तर तुडवितो, आणि फाडितो,
आणि कोणाच्याने सोडववत नाहीं, तसें याकोबाचें
शेष राष्ट्रांत बहुत लोकांमध्यें होईल. ९ तुझा
हात तुझ्या शत्रूंवर उंचावेल, आणि तुझे सर्व
वैरी नाश पावतील. १० आणि परमेश्वर
म्हणतो, कीं त्यासमयीं असें होईल, कीं मी तुझे
घोडे तुझ्या मध्यांतून नाहींसे करीन, आणि तुझे
रथ नष्ट करीन. ११ आणि तुझ्या देशांतलीं
नगरें नाहींसीं करीन, आणि तुझीं सर्व कोटाचीं
स्थानें पाडून टाकीन. १२ आणि तुझीं चेटकें
तुझ्या हातांतून नाहींसीं करीन; आणि तुला
मंत्रवादी पुढें असणार नाहींत. १३ आणि
तुझ्या कोरींव मूर्त्ति आणि तुझ्या स्थापलेल्या
मूर्त्ति तुझ्या मध्यांतून नाहींशा करीन; मग तूं
आपल्या हातांच्या कर्मांस पुन्हा भजणार नाहींस.
१४ आणि तुझे देवीमूर्तींचे बाग तुझ्या मध्यांतून

उपटून टाकीन; आणि तुझीं नगरें नाहींसीं करीन.
१५ आणि मी क्रोधाने व कोपाने राष्ट्रांस, जसा
त्यानी कधीं ऐकिला नाहीं, असा सूड घेईन.

## अध्याय ६.

जें **परमेश्वर** ह्मणतो, तें ऐका; तूं ऊठ, पर्व-
तांसमोर वाद कर, आणि डोंगर तुझा शब्द
ऐकोत. २ पर्वतानो, आणि पृथ्वीच्या सर्वकाळच्या
तळानो, **परमेश्वराचा** वाद ऐका; कां कीं **पर-
मेश्वराला** आपल्या लोकांसीं वाद करायाचा
आहे, आणि तो इस्राएलासीं वाद करील. ३
माझ्या लोकानो, म्या तुह्माला काय केलें आहे?
अथवा कशाने म्या तुह्माला कंटाळविलें आहे?
मला उत्तर द्या. ४ कां कीं म्या तुह्माला मिसर
देशांतून वर आणिलें, आणि दासांच्या घरांतून
तुह्माला उद्धरिलें; आणि म्या तुह्मापुढें मोशे,
आहरोन, व मिर्याम हीं पाठविलीं. ५ माझ्या
लोकानो, मोवाबाचा राजा जो बालाक त्याने
कसी मसलत केली, ती आणि बौराचा पुत्र जो
बिलाम त्याने शिट्टीमापासून गिल्गालापर्यंत ये-
ऊन त्याला कसें उत्तर दिलें, तेंहि स्मरा; अशा-
साठीं कीं तुह्मी **परमेश्वराचें** न्यायीपण जाणावें.
६ मी काय घेऊन **परमेश्वरापुढें** येऊं, आ-
णि परात्पर देवासमोर नमन करूं? मी होम-
बलि अथवा एका वर्षाचीं वांसरें घेऊन त्यापुढें
येऊं काय? ७ **परमेश्वर** हजारों मेंढ्यानी,
लाखो तेलाच्या नद्यानी संतुष्ट होईल काय?
मी आपल्या पातकामुळें आपला प्रथम पुत्र, आ-
पल्या जीवाच्या पापामुळें आपल्या पोटचें
फळ देऊं काय? ८ हे मनुष्या, जें उत्तम तें
त्याने तुला प्रगट केलें आहे; आणि न्यायाने
आचरणें, दयाप्रीति करणें, आणि आपल्या देवा-
कडे नम्रतेने वर्त्तणें, यांवांचून **परमेश्वर** तुजपासून
काय मागतो? ९ **परमेश्वराची** वाणी नगराला
हाक मारिती, आणि जो बुद्धिमान तो तुझें नाम
पाहील; तुह्मी दंड आणि ज्याने तो नेमिला
आहे, त्याचें ऐका.
१० अजूनपर्यंत दुष्टाईचीं द्रव्यें दुष्टाच्या घ-
रांत आहेत काय? आणि उणें धिक्कारलेलें माप
आहे काय? ११ मी दुष्टाईची तागडी आणि
कपटाच्या माडांची पिशवी राखून शुद्ध निवेन
काय? १२ तर त्या नगरांतले धनवंत बलात्का-
राने भरलेले आहेत, आणि त्यांतले राहणारे
खोटें बोलतात, आणि त्यांची जीभ त्यांच्या मु-
खांत कपटी आहे. १३ तर तुझ्या पापांमुळें
म्या तुला हाणून घायाळ व ओसाड केला आहे.
१४ तूं खासील, परंतु तृप्त होणार नाहींस; आ-
णि तुझी भूक तुजमध्यें राहील; आणि तूं एकी-
कडे करून ठेविसील, परंतु वांचविणार नाहींस:
आणि जें वांचविसील, तें तरवारीला देईन.
१५ तूं पेरिसील, परंतु कापणी करणार नाहींस:
तूं जाइताचें फळ तुडविसील, परंतु त्याच्या ते-
लाने आपणाला माखणार नाहींस; आणि द्राक्षें
तुडविसील, परंतु त्यांचा रस पिणार नाहींस.
१६ आणि ते ओम्रीच्या नियमांला व अ-
हाबाच्या अवघ्या कार्यांला जपतात, आणि तुह्मी
त्यांच्या संकल्पांप्रमाणें वर्त्तता; अशासाठीं कीं
म्या तुला विस्मयासाठीं आणि तींतल्या राहणा-
ऱ्यांस फूत्कारासाठीं करावें; आणि माझ्या लो-
कांची अप्रतिष्ठा तुह्माला साहावी लागेल.

## अध्याय ७.

मला हाय हाय; कां कीं मी उन्हाळ्यांतल्या
वगळ फलाप्रमाणें काढणीच्या वगळ द्राक्षां-
प्रमाणें झालों आहें; खायाला एक घोंस नाहीं:
माझ्या जीवाने प्रथमफल इच्छिलें आहे. २
चांगला मनुष्य पृथ्वींतून नाहींसा झाला आहे;
आणि मनुष्यांमध्यें कोणी सरळ नाहीं; ते सर्व
रक्त पाडायाला टपतात; ते प्रत्येक आपल्या
भावाची शिकार जाळ्याने करितात.
३ त्यानी दोहों हातानी झटून दुष्कर्म करावें,
ह्मणून अधिपति आणि न्यायाधीशहि वेतन माग-
तात; आणि महाजन स्वतां आपली मनांतील
इच्छा बोलतो; मग ते न्याय वांकडा करितात.
४ त्यांतला उत्तम कांटेरें झाड आहे; त्यांतला
सरळ कांट्यांच्या कुंपणापेक्षां वाईट आहे; तुझ्या
पाहरेकऱ्यांचा दिवस येतो आहे, तुझें शासन येतें
आहे; आतां त्यांचें व्याकुलपण होईल.
५ मित्रावर विश्वास ठेवूं नका, सख्यावर
भाव नका ठेवूं; जी तुझ्या उरासीं निजती, तिज-

पासून तूं आपलीं तोंडाचीं दारें राख. ६ कां
कीं पुत्र बापाला अव्हेरितो; कन्या आपल्या आ-
ईवर, सून आपल्या सासवेवर उठती; मनुष्याचे
वैरी त्याच्या घरचे मनुष्य आहेत. ७ तर मी परमे-
श्वराकडे दृष्टि लावीन; मी आपल्या तारणाच्या
देवाची वाट पाहीन; माझा देव माझें ऐकेल.
८ अगे माझ्या वैरिणी, मजवर हर्षूं नको;
जरीं मी पडलें, तरीं उठेन्; जरीं मी अंधारांत
बसलें, तरीं परमेश्वर मला उजेड होईल. ९
जोंपर्यंत परमेश्वर माझा वाद करी, आणि मा-
झा न्याय साधी तोंपर्यंत मी त्याचा राग साहीन;
कारण कीं म्या त्याजकडे पाप केलें आहे; तो
मला प्रकाशांत बाहेर आणील, मी त्याचें न्यायी-
पण पाहीन. १० आणि माझी वैरिणी हें पाही-
ल; तेव्हां तिला लज्जा झांकील, जी ह्मणे, कीं
परमेश्वर जो तुझा देव तो कोठें आहे? तिला
माझे डोळे पाहतील; आतां तिला आळ्यांतल्या
चिखलाप्रमाणें तुडवितील. ११ जेव्हां तुझीं
कुसें बांधायाचीं असतील, तेव्हां नियम दूर हो-
ईल. १२ त्या समयीं तो अश्शूरापासून आणि
कोटाच्या नगरांपासून तुजपर्यंत येईल, आणि दु-
र्गापासून नदीपर्यंत, आणि समुद्रोसमुद्र, आणि
पर्वतोपर्वत येईल. १३ आणि देश त्यांतल्या
राहणाऱ्यांमुळें त्यांच्या कर्मांच्या फलामुळें ओ-
साड होईल.

१४ तूं आपल्या लोकांस आपल्या विभागाचा
जो कळप रानांत खार्मेलामध्यें एकांतीं राहतो,
त्याला आपल्या काठीनें पाळ; ते जसे पुरातन
दिवसांत तसे बाशानांत आणि गिलादांत चरोत.
१५ ज्या दिवसांत तूं मिसर देशांतून निघालास,
त्या दिवसांत जसीं झालीं, तसीं आश्चर्यकर्मे त्या-
ला दाखवीन. १६ राष्ट्रें पाहतील, आणि आ-
पल्या सर्व बळाविषयीं लज्जित होतील; तीं
आपला हात आपल्या मुखाला लाविनील, त्यांचे
कान बहिरे होतील. १७ सापाप्रमाणें तीं धूळ
चाटितील, भूमींतल्या गांडवळांप्रमाणें आपल्या
बिळांतून कांपत निघतील; परमेश्वर जो आ-
मचा देव त्याकारणें तीं घाबरतील, आणि तुज-
मुळें भितील. १८ हे देवा, जो तूं अन्यायाची
क्षमा करितोस, आणि आपल्या विभागाच्या शे-
षाचें पातक उल्लंघितोस, त्या तुजसारिखा कोण
आहे? तो आपला क्रोध सर्वकालपर्यंत बाळगीत
नाहीं, कारण कीं त्याला दया आवडती. १९
तो फिरेल, तो आह्मावर दया करील; तो आ-
मचे अन्याय धुळीस मिळवील; आणि त्यांचीं
सर्व पापें समुद्राच्या खोलपणांत टाकिसील. २०
तूं याकोबासाठीं खरेपण आणि आब्राहामासाठीं
करुणा साधिसील, जिजविषयीं तूं आमच्या पूर्व-
जांपासीं पुरातन दिवसांपासून शपथ वाहीस ती.

NAHUM.

# नहूम.

## अध्याय १.

निनेवेविषयींचा प्रवाद. एल्कोशी जो नहूम
त्याच्या दृष्टांताचें पुस्तक. २ देव आवेशी,
आणि परमेश्वर सूड घेणारा आहे; परमेश्वर
सूड घेणारा, आणि रोषयुक्त आहे; परमेश्वर
आपल्या शत्रूंचा सूड घेईल, आणि तो आपल्या
वैऱ्यांसाठीं रोष राखितो. ३ परमेश्वर मंद-
क्रोध, व मोठा पराक्रमी आहे, आणि तो दोष्यां-
ला निर्दोषी मानणार नाहीं; परमेश्वराचा मार्ग
वावटुळींत व वादळांत आहे, आणि आ-
भाळें त्याच्या पायांची धूळ आहेत. ४ तो
समुद्राला दबावीत बोलून सुकवितो, आणि सर्व
नद्या आटवितो; बाशान व खार्मेल म्लान हो-

तात, आणि लबानोनाचा फुटवा म्लान होऊन
जातो. ५ त्यामुळें पर्वत कांपतात, आणि डोंगर
विघरतात, आणि त्यासमोर पृथ्वी थरथरती,
भूमि व तिजवरले सर्व राहणारेहि. ६ त्याच्या
रागापुढें कोण उभा राहील? आणि त्याच्या सं-
तप्त क्रोधाच्या समयीं कोण उभा ठाकेल? त्याचा
कोप अग्नीसारिखा ओतलेला आहे, आणि
त्यामुळें खडक उपटून जातात. ७ परमेश्वर
उत्तम आहे, तो संकटसमयीं आश्रय आहे;
आणि जे त्यावर भाव ठेवितात, त्यांस तो अंगी-
कारितो. ८ परंतु व्यापणाऱ्या पुराप्रमाणें तो
तिच्या ठिकाणाचें अवसान करील; आणि अंधार
त्याच्या वैऱ्यांच्या पाठीस लागेल. ९ तुह्मी
परमेश्वराविरुद्ध काय कल्पितां? तो अवसान
करील; पीडा दोनदां उठणार नाहीं. १० कां
कीं जेव्हां ते कांट्यांप्रमाणें गुंतलेले असतील,
आणि आपल्या दारुपिण्यांमध्यें मस्त असतील,
तेव्हां ते अगदीं सुक्या धसांप्रमाणें खाण्यांत ये-
तील. ११ जो परमेश्वराविरुद्ध वाईट कल्पि-
तो, आणि दुष्कर्मांची मसलत करितो, तो तुझ्या
ठायांतून निघाला आहे. १२ परमेश्वर ह्मण-
तो, कीं जरीं ते स्वस्थ आणि बहुतहि असले,
तरी जेव्हां तो पार जाईल, तेव्हां ते लोपून जा-
तील; जरी म्या तुला पीडिलें आहे, तरी पुढें
मी तुला पिडणार नाहीं. १३ तर आतां मी
त्याचें जोखड तुजवरून मोडून काढीन, आणि
तुझीं बंधनें तोडीन. १४ आणि परमेश्वराने
तुजविषयीं आज्ञा केली आहे, कीं पुढें तुझ्या ना-
मावें कांहीं पेरण्यांत येऊं नये; तुझ्या देवांच्या
घरांतून कोरींव आणि ओतींव मूर्त्ति नाहींशा
करीन; तूं कुत्सित आहेस, ह्मणून मी तुझी
कबर करीन. १५ जो सुवार्त्ता सांगतो, व क-
ल्याण पुकारितो, त्याचे पाय पर्वतांवर पाहा;
अगे यहूदा, तूं आपले सण पाळ, आपले नवस
फेड; कां कीं दुष्कर्मी तुजमधून पुन्हा जाणार
नाहीं; तो अगदीं नाहींसा झाला आहे.

## अध्याय २.

उडविणारा तुझ्यासमोर चढला आहे; तूं कोट
राख, मार्गावर पाहरा ठेव, तूं आपली कंबर
घट्ट बांध, आपला पराक्रम बळकट कर. २ कां
कीं परमेश्वराने याकोबाचें महात्म्य इस्राएला-
च्या माहात्म्याप्रमाणें फिरविलें आहे; कारण कीं
रिकामें करणाऱ्यानी त्यांस रिकामें केलें आहे,
आणि त्यांच्या डाहळ्या नाशिल्या आहेत. ३
त्याच्या वीरांच्या ढाला तांबड्या होतील, शूर
लाखी रंगाचीं वस्त्रें नेसतील; त्याच्या तयारी
करण्याच्या दिवसीं रथ अग्नीसारिखे चमकतील,
आणि भाले परजतील. ४ रथ आळ्यांत गडब-
डतील, रुंद मार्गांत इकडे तिकडे हुरळतील;
त्यांचा आभास दीपांसारिखा होईल, ते विजांप्र-
माणें धांवतील. ५ तो आपल्या श्रेष्ठजनांचें
स्मरण करील; ते आपल्या गतींत आडखळतील;
ते तिच्या कोटाकडे वेगाने जातील, मांडव कर-
ण्यांत येईल. ६ नद्यांचीं दारें उघडतील, आणि
मंदिर विरघळेल. ७ आणि ठरलें आहे, कीं
तिला पाडावपणाच्या प्रवासांत नेतील, तिला
चढवितील, आणि तिच्या दासी जशा पारव्यां-
च्या शब्दाने तशा आपले ऊर बडवीत तिला
नेतील. ८ नीनवे आपल्या पुरातन दिवसांपा-
सून तळ्यासारिखी आहे; तथापि ते पळून जा-
तील; थांबा, थांबा, असी कोणी हाक मारितील:
परंतु कोणी वळून पाहणार नाहीं. ९ रुपें हरून
घ्या, सोनें हरून घ्या; आणि निधीचा कांहीं
अंत नाहीं, सर्व मनोहर द्रव्याचा मोठा संग्रह
आहे. १० ती रिकामी व शून्य आणि उजाड
झाली आहे; आणि हृदय विघरतें, आणि गुड-
घ्यांची लटपट झाली आहे, आणि सर्व कंबरांत
थरथराट आहे, आणि त्या सर्वांच्या मुखांनी
आपलें तेज संकोचित केलें आहे. ११ सिंहांचा
आश्रय, तरुण सिंहांचें चरण्याचें स्थान कोठें
आहे, ज्या त्यांत सिंह, मोठा सिंह व सिंहाचें
पिलुं फिरत असत, आणि त्यांस कोणी भेडाविलें
नाहीं? १२ सिंह आपल्या पिलांसाठीं पुरें फा-
डीत असे, आपल्या सिंहिणींसाठीं नरडी धरून
मारीत असे, तो फाडलेल्या तुकड्यानी आपल्य
गुहा, आणि फाडलेल्या अवयवानी आपल्या जा-
ळ्या भरीत असे. १३ सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कीं पाहा, मी तुजविरुद्ध आहें, आणि
मी तिचे रथ जाळून त्यांचा धूर करीन, आणि

तरवार तुझ्या तरुण सिंहांस खाईल; आणि तुझें
जीव फाडणें पृथ्वींतून नाहींसें करीन, आणि तुझ्या
दूतांचा शब्द पुढें ऐकण्यांत येणार नाहीं.

## अध्याय ३.

१ रक्तपाडणाऱ्या नगराला हाय हाय; तें सर्व
खोटेपणाने व हरणाने भरलें आहे; तें लूट
सोडीत नाहीं. २ चाबुकाचा शब्द, आणि चा-
कांच्या खडखडाटाचा शब्द, आणि फांदत्या घो-
ड्यांचा व घडघडत्या रथांचा शब्द स्तब्ध होत
नाहीं. ३ स्वार झळकती तरवार आणि चम-
कणारा भाला उंचावितो; आणि फार वधलेले
व पुष्कळ प्रेतें आहेत; आणि मढ्यांचा कांहीं
अंत नाहीं; ते मढ्यांसीं आडखळतात. ४ जी
सुंदर कसबीण जी चेटकी आपल्या व्यभिचारानी
राष्ट्रें आणि आपल्या चेटकानी कुलें विकिती, ति-
च्या बहुत व्यभिचारांमुळें. ५ सैन्यांचा परमे-
श्वर ह्मणतो, कीं पाहा, मी तुजविरुद्ध आहें;
आणि तुजसन्मुख तुझे पदर उघडीन, आणि रा-
ष्ट्रांस तुझें नागवेंपण, व राज्यांस तुझी लज्जा दा-
खवीन. ६ आणि अमंगळ मळ तुजवर फेंकून
तुला कुत्सित करीन, आणि तमाशा असें करून
ठेवीन. ७ आणि असं होईल, कीं जे कोणी
तुला पाहतील, ते तुजपासून पळतील, आणि
ह्मणतील, नीनवे बुडाली आहे; तिजकारितां कोण
आक्रंदन करील? कोठून मी तुजसाठीं सांत्वन
करणारे शोधूं? ८ तूं नोवामोनेपेक्षां उत्तम आ-
हेस काय, जी ती नद्यांच्या मध्यें वसली होती,
तिजभोंवतीं पाण्यें होतीं, ज्या तिचा प्राकार स-
मुद्र होता, आणि तिचा कोट समुद्रापासून होता?
९ कूश आणि मिसर हे तिचें बळ होते, आणि
त्याचा कांहीं अंत नव्हता; फुती आणि लूबी
तुझे सहाय करणारे होते. १० तथापि ती प्र-
वासांत, पाडावपणाच्या प्रवासांत गेली; आणि
तींतलीं पोरें सर्व आळ्यांच्या चवाठ्यांत ठार आ-
पटिलीं; आणि तींतल्या संभावितांवर शत्रूनी पण
पाडिला, आणि तींतले सर्व महाजन बिड्यांत घा-
तले. ११ तूंहि मस्त होसील; तूं गुप्त होसील,
आणि तूं वैऱ्यामुळें आश्रय शोधिसील. १२
तुझीं सर्व दुर्गे प्रथम फळानी भरलेलीं अंजीरझाडें
असीं आहेत, तीं जर हालविलीं, तर खाणाऱ्या-
च्या मुखांत पडतील. १३ पाहा, तुझे लोक
तुजमध्यें स्त्रिया आहेत; तुझ्या देशाचीं दारें
तुझ्या वैऱ्यांस पुरतीं उघडतील; अग्नि तुझे अड-
सर खाऊन टाकील. १४ तूं आपणासाठीं वे-
ढ्याचें पाणी ओढून काढ; तूं आपलीं दुर्गे बळ-
कट कर; गाऱ्यांत शीर, आणि चिखल तुडीव,
इटांची भट्टी बळकट कर. १५ तेथें तुला अग्नि
खाईल; तरवार तुला नाहींसी करील; ती घु-
णासारिखी तुला खाईल; तूं घुणाप्रमाणें आप-
णाला वाढीव; तूं टोळाप्रमाणें आपणाला वाढीव.
१६ त्वां आपले व्यापारी आकाशांतल्या ताऱ्यांपेक्षां
बहुत केले आहेत; घुण व्यापून खाऊन उडून जा-
तो. १७ तुझे अधिपति टोळांसारिखे, आणि तुझे
सेनापति मोठ्या शलभांसारिखे आहेत, जे ते थं-
डीच्या दिवसीं कुंपणांमध्यें राहतात, आणि सूर्य
उगवला, ह्मणजे ते पळून जातात, आणि ते कोठें
आहेत, असें त्यांचें ठिकाण कळत नाहीं. १८
अरे अश्शूराच्या राजा, तुझे पालक डुकल्या खा-
तात; तुझे श्रेष्ठजन स्वस्थ निजले आहेत; तुझे
लोक पर्वतांवर विखरिले आहेत; आणि त्यांस
कोणी एकवटीत नाहीं. १९ तुझ्या भंगाची कांहीं
शांति होत नाहीं; तुझा घाय अवघड आहे;
जे सर्व तुझें वर्त्तमान ऐकतील, ते तुजविषयीं टा-
ळ्या वाजवितील; कां कीं कोणत्यावर तुझी दुष्टा-
ई नित्य क्रमून गेली नाहीं?

# हबाक्कूक.

## अध्याय १.

हबाक्कूक भविष्यवाद्याने दृष्टांतेंकरून जो प्रवाद
पाहिला तो. २ हे परमेश्वरा, केवढा
वेळपर्यंत मी ओरडेन, आणि तूं ऐकणार नाहींस?
केवढ्या वेळापर्यंत मी तुला बळात्काराविषयीं आ-
रोळी मारीन, आणि तूं तारणार नाहींस? ३
तूं मला दुष्कर्म कां पाहूं देतोस? आणि पीडन
माझ्या दृष्टीस कां पडूं देतोस? आणि नासाडी
व बलात्कार मजसमक्ष आहेत, आणि वाद हो-
तो, व विवाद उठतो. ४ याकरितां नेमशास्त्र
स्रईल आहे, आणि न्याय कधीं निघत नाहीं;
कां कीं दुष्ट न्यायीला घेरितो; याकरितां न्याय
वांकडा निघतो.

५ राष्ट्रांमध्यें पाहा, व दृष्टि लावा, आणि
फार विस्मित व्हा; कारण कीं मी तुमच्या दि-
वसांत कार्य करणार आहें, तें जरी कथिलें, तरी
तुह्मी विश्वास धरणार नाहीं. ६ कां कीं पाहा,
मी खास्द्यांस उठविणार आहें, जें तें कडू व उता-
वळें राष्ट्र आहे, ज्या वस्ती त्यांच्या नाहींत,
त्यांचें वतन करायाला ते पृथ्वीच्या व्यासांतून
चालतात. ७ ते अघोर व भयंकर आहेत, त्यां-
पासून त्यांचा नियम व त्यांचा ठराव निघेल. ८
आणि त्यांचे घोडे चित्यांपेक्षां वेगी आहेत, आ-
णि सायंकालच्या लांडग्यांपेक्षा क्रूर आहेत; आणि
त्यांचे स्वार प्रतापी आहेत, होय त्यांचे स्वार
दुरून येतील; जो गरुड खायाला त्वरा करितो,
त्यासारिखे ते उडतील. ९ ते सर्व बळात्कारासाठीं
येतील; त्यांचीं मुखें पूर्वेकडे पाहतील, आणि ते
पाडावांस वाळवेप्रमाणें एकत्र मिळवितील. १० आ-
णि ते राजांस अव्हेरितील, आणि त्यांस अधिपति
उपहासासाठीं होतील; ते प्रत्येक दुर्गाचा उपहास
करितील; आणि धुळीचा ढीग करून तें घेतील.
११ तेव्हां त्याचें मन पालटेल, आणि तो पार
जाईल, व पातक करील, आणि हा माझा पराक्रम
माझ्या देवाकडून आहे, असें समजेल.

१२ हे परमेश्वरा, माझ्या देवा, माझ्या
पवित्रा, तूं अनादि कालापासून नाहींस काय?
आह्मी मरणार नाहीं; हे परमेश्वरा, त्वां ते
शासनासाठीं नेमिले आहेत; आणि समर्थ देवा,
त्वां ते शिक्षेसाठीं ठरविले आहेत. १३ तूं पवि-
त्रडोळ्यांचा आहेस, ह्मणून तुझ्याने दुष्टाई पाह-
वत नाहीं; आणि दुष्कर्माकडे तूं दृष्टि लावायास
समर्थ नाहींस; जे कपटाने वर्त्ततात त्यांकडे कां
दृष्टि लावितोस? जेव्हां दुष्ट आपणापेक्षां जो न्यायी
त्याला गिळतो, तेव्हां कां उगीच राहतोस? १४
आणि मनुष्य जाति समुद्रातल्या मास्यांसारिखी
ज्या वळवळणाऱ्यांवर कोणताहि अधिकारी नाहीं,
त्यांसारिखीहि कां करितोस? १५ ते *त्या* स-
र्वांस गळाने उचलून घेतात, ते आपल्या जाळ्याने
त्यांस ओढून घेतात, आणि आपल्या मोठ्या जा-
ळ्याने त्यांस गोळा करितात; याकरितां ते हर्ष-
तात, आणि उल्हासतात. १६ याकरितां ते
आपल्या जाळ्याला यज्ञ करितात, आणि आप-
ल्या मोठ्या जाळ्याला धूप जाळितात; कां कीं
त्यांकडून त्यांच्या वांट्याला तेल, आणि त्यांच्या
अन्नास कालवण असतें. १७ याकरितां ते आ-
पलें जाळें रिकामें करितील काय? आणि राष्ट्रांस
नित्य वधण्यापासून शांत राहणार नाहींत काय?

## अध्याय २.

मी आपल्या पाहऱ्यावर उभा राहीन, आणि
दुर्गावर उभा ठाकेन, आणि तो मला काय
बोलेल, आणि म्या आपल्या वादांत काय उत्तर
द्यावें, हें पाहायासाठीं जपेन. २ आणि परमे-
श्वराने मला उत्तर करीत ह्मटलें, तूं दृष्टांत
लिही, आणि पाट्यांवर कोर, अशासाठीं कीं कोणी
तो वाचीत असतांना धांवावा. ३ कां कीं दृष्टांत
अझून नेमिलेल्या समयापर्यंत आहे, परंतु तो
शेवटीं प्रत्ययास येईल, फसविणार नाहीं; जरी
त्याने विलंब केला, तरी त्याची वाट पाहा; कां

कीं तो येईलच येईल; तो उशीर करणार नाहीं.
४ पाहा, त्याचें मन गर्विष्ठ आहे, तें त्याच्या-
ठायीं सरळ नाहीं; परंतु न्यायी आपल्या वि-
श्वासाने जीवत जाईल.

५ होय तो जसा द्राक्षारसाने तसा द्वाड आहे,
तो गर्विष्ठ पुरुष आहे, आणि घरीं राहत नाहीं,
जो तो आपला मनोरथ मृत लोकासारिखा विस्ता-
रितो, आणि तो मरणासारिखा आहे, आणि तृप्त
होत नाहीं, आणि तो आपणाकडे सर्व राष्ट्रें एकत्र
मिळवितो, आणि सर्व लोक आपणाकडे एकवटि-
तो. ६ हे सर्व त्याविषयीं ह्मण, आणि त्यावि-
षयीं निंदेचा आहणा उच्चारीत ह्मणणार नाहींत
काय? कीं जो जें आपलें नाहीं तें वाढवितो, आ-
णि आपणाकडे महार्णे भारी जोडितो, त्याला
हाय हाय, केवढ्या वेळापर्यंत असें करील. ७
जे तुला डसतील, ते अकस्मात् उठणार नाहींत
काय? आणि जे तुला गांजितील, ते जागे हो-
णार नाहींत काय? आणि तूं त्यांसाठीं लूट हो-
सील. ८ त्वां बहुत राष्ट्रांचें हरण केलें आहे,
ह्मणून लोकांतले-जे उरलेले ते तुझें हरण करि-
तील; मनुष्यांच्या रक्तामुळें, आणि देश, नगर,
व त्यांतले सर्व राहणारे यांवरच्या बलात्का-
रामुळें.

९ जो आपल्या कुलासाठीं दुष्ट लाभाचा लोभ
करितो, अशासाठीं कीं त्याने आपला घरटा उंच-
स्थानावर स्थापावा, तो अरिष्टाच्या बलापासून सु-
टावा, ह्मणून त्याला हाय हाय. १० त्वां बहुत
लोक नाहींसे करून आपल्या कुळासाठीं अप्रतिष्ठा
मसलतीने मिळविली आहे, आणि त्वां आपल्या
जीवाविरुद्ध पाप केलें आहे. ११ कां कीं दगड
भिंतींतून आरोळी मारील, आणि तुळई लांकडां-
तून त्याला उत्तर करील.

१२ जो रक्ताने नगर बांधितो, आणि अन्या-
याने वस्ति स्थापितो त्याला हाय हाय. १३
पाहा, हें सैन्यांच्या परमेश्वरापासून घडत ना-
हीं काय? आणि लोक केवळ अग्नीसाठीं श्रम
करितील, आणि जाति केवळ व्यर्थपणासाठीं थक-
तील. १४ तर पृथ्वी परमेश्वराच्या ज्ञानाने
भरेल, जसीं पाण्यें समुद्राच्या तळास झांकि-
तात तसी.

१५ जो तूं आपल्या शेजाऱ्याला पाजितोस,
आणि त्याला मस्त कर यासाठीं आपली दारू
त्याच्या मुखांत घालितोस, त्वां त्यांचें नागवेपण
पाहावें, ह्मणून त्या तुला हाय हाय. १६ तूं
गौरवाने नव्हे, परंतु अप्रतिष्ठेने भरला आहेस;
तूंहि पी, आणि तूं असुंती आहेस, असें दाखीव;
परमेश्वराच्या उजव्या हातांतला प्याला तुजकडे
फिरेल, आणि तुझ्या सर्व गौरवावर अमंगळ ओक
होईल. १७ कां कीं लबानोनाचा बळात्कार,
आणि पशूंची जी नासाडी त्यांस भयभीत करी
तीहि तुला झांकील, मनुष्यांच्या रक्तामुळें, आणि
देश, नगर, व त्यांतले सर्व राहणारे यांवरच्या
बळात्कारामुळें.

१८ कोरींव मूर्त्ति काय असी उपयोगी, कीं ती
तिच्या कारिगाराने कोरिली आहे; ओतींव मूर्त्ति
व खोटया गोष्टी शिकविणारा काय असीं उपयो-
गी, कीं त्यांच्या रूपाच्या कारिगाराने मुके पुतळे
करून त्यांजवर भाव ठेविला आहे? १९ जो
लांकडाला, जागें हो, मुक्या दगडाला, ऊठ, असें
ह्मणतो, त्याला हाय हाय; तो शिकवील काय?
पाहा, तो सोन्याने व रुप्याने मढलेला आहे,
आणि त्यामध्यें कांहीं श्वास नाहीं. २० परंतु
परमेश्वर आपल्या पवित्र मंदिरांत आहे; त्या-
समोर सर्व पृथ्वी उगीच राहो.

## अध्याय ३.

हबाक्कूक भविष्यवाद्याची प्रार्थना. शिग्योनोथेवर.
२ हे परमेश्वरा, तुझा प्रवाद ऐकून मी भय-
भीत झालों आहें; हे परमेश्वरा, तूं आपलें
कार्य वर्षांच्या मध्यें स्थापन कर, वर्षांच्या मध्यें
विज्ञापन कर; कोपाच्या समयीं दया स्मर. ३
देव तेमानापासून, आणि जो पवित्र तो फारान
पर्वतापासून आला. त्याचें वैभव आकाशांत व्या-
पलें, आणि पृथ्वी त्याच्या प्रशंसेने भरली. ४
त्याची प्रभा प्रकाशासारिखी होती; त्याला त्या-
च्या हातांतून उगवलेलीं शिंगें होतीं; आणि
तेथें त्याच्या बलाची गुप्ति होती. ५ त्यापुढें
मरी चालली, आणि ताप त्याच्या पायांजवळून
निघाला. ६ त्याने उभें राहून पृथ्वी मापिली,
त्याने दृष्टि लावून राष्ट्रें उडविलीं, आणि सर्वका-

कचे पर्वत फुटून गेले, पुरातन डोंगर ढळले;
सर्वकालिक गति त्याच्या आहेत. ७ म्या खू-
शानांतले डेरे कष्टांत असतां पाहिले; मिद्यान
देशांतले पडदे कांपत होते. ८ परमेश्वर नद्यां-
वर रागावला होता काय? तुझा क्रोध नद्यांवर
होता काय? तुझा कोप समुद्रावर होता काय?
कां तर तूं आपल्या घोड्यांवर व आपल्या तारणा-
च्या रथांवर बसला होतास. ९ तुझें धनुष्य
केवळ उघडें झालें, दंडांच्या शपथांनी ठराव ठर-
ला. त्वां नद्या पृथ्वींतून फुटूं दिल्या. १० पर्वत
तुला पाहून थरथरले; पाण्याचा पूर व्यापून चा-
लला; डोहाने आपला शब्द केला, आणि आ-
पले हात वरतीं उंचाविले. ११ सूर्य आणि चंद्र
आपल्या वस्तींत अढळ राहिले; ते तुझ्या बा-
णांच्या तेजाने तुझ्या झळकत्या भाल्याच्या चम-
केने चालले. १२ तूं रागाने पृथ्वीवरून चाल-
लास, त्वां क्रोधाने राष्ट्रें तुडवून टाकिलीं. १३
तूं आपल्या लोकांस तारायाला, आपल्या अभि-
षिक्तास तारायाला बाहेर गेलास; त्वां पाया
मानेपर्यंत उघडा करितांना दुष्टाच्या घराचा माथा
मोडिला. १४ त्वां त्याच्या भाल्यानी त्याच्या
नायकांचें मस्तक भोंसकिलें; ते मला उडवायाला
वावटुळीप्रमाणें धांवत सुटले; दीनांस एकांतीं
खावें, असा त्यांचा आनंद होता. १५ तूं आप-
ल्या घोड्यांसुद्धां समुद्रांतून, मोठ्या पाण्यांच्या
राशींतून चाललास. १६ म्या ऐकिलें, तेव्हां
माझें पोट थरथरलें; शब्दामुळें माझे ओंठ स्फु-
रले; सडी माझ्या हाडांत शिरली; आणि मी
आपल्याठायीं कांपलों, म्या संकट समयीं विसावा
पावावा म्हणून; तो लोकांकडे चढून त्यांजवर
घाला घालील.

१७ जरी अंजीर झाड फुललें नसलें, आणि
द्राक्ष्यांचा कांहीं उपज नसला; जरी जाइताचें
फल थकलें असलें, आणि शेतानी कांहीं खाणें
दिल्हें नसलें; कळप जरी वाड्यांतून नाहींसे
झाले असले, आणि गोठ्यांत कांहीं गुरें नसलीं;
१८ तरी मी परमेश्वराविषयीं हर्षेन, आपल्या
तारणाच्या देवाविषयीं उल्हासेन. १९ परमे-
श्वर प्रभु माझें बळ आहे, आणि तो माझे पाय
हरिणांच्या पायांसारिखे करील, आणि मला मा-
झ्या उंच स्थानांवर चालवील. माझ्या तंतुवाद्यां-
च्या मुख्य वाजविणाऱ्याला हें आहे.

ZEPHANIAH.

# जफान्या.

## अध्याय १.

यहूदाचा राजा आमोन, त्याचा पुत्र योशीया
याच्या दिवसांत, हिज्कीयाचा पुत्र अमार्या,
त्याचा पुत्र गदाल्या, त्याचा पुत्र खूशी, त्याचा
पुत्र जफान्या याजवळ जें परमेश्वराचें वचन
आलें तें. २ परमेश्वर ह्मणतो, कीं भूमीवरून
सर्व निस्तुक नाहींसें करीन. ३ मनुष्य आणि
पशु नाहींसे करीन; आकाशांतले पक्षी आणि
समुद्रांतले मासे आणि दुष्टांसुद्धां अडखुळें नाहीं-
सें करीन; आणि मनुष्यजाति भूमीवरून पुसून
टाकीन; असें परमेश्वर ह्मणतो. ४ आणि
मी आपला हात यहूदावर आणि यरूशालेमेंत-
ल्या सर्व राहणाऱ्यांवर पुढें करीन; आणि बा-
लाचें शेष, आणि याजकांसुद्धां खमारांचें नाम
या स्थानांतून नाहींसें करीन. ५ आणि जे धा-
ब्यांवर आकाशांतल्या सैन्याला भजतात त्यांस,
आणि जे परमेश्वराला भजतात व त्यावर शपथ
वाहतात, आणि आपल्या राजावर शपथ वाहतात
त्यांस. ६ आणि जे परमेश्वरापासून मागें
फिरले आहेत त्यांस, आणि ज्यानी परमेश्वरा-
स हुडकिलें नाहीं, आणि त्याला शोधिलें नाहीं,
त्यांस नाहींसें करीन. ७ प्रभु जो परमेश्वर
त्यासमोर तूं उगीच राहा; कां कीं परमेश्वरा-

चा दिवस जवळ आहे; कारण कीं परमेश्वरा-
ने यज्ञ सिद्ध केला आहे, त्याने आपल्या आमं-
त्रितांस तयार केलें आहे· ८ आणि परमेश्व-
राच्या यज्ञाच्या दिवशीं असें होईल, कीं मी
अधिपतींस आणि राजाच्या वंशाला आणि जे
सर्व परक्यांचें वस्त्र ल्यालेले आहेत त्यांस शा-
सीन· ९ आणि जे सर्व उंबऱ्यावर उडी मारि-
तात, आणि आपल्या धन्यांचीं घरें बळात्काराने व
कपटाने भरितात, त्यांस त्याच दिवशीं मी शा-
सीन. १० आणि परमेश्वर ह्मणतो, कीं त्या
दिवशीं मास्यांच्या दारापासून आरोळीचा शब्द,
आणि द्वितीयापासून केंकणें, आणि डोंगरांवरून
मोठा धडाका होईल. ११ माक्तेशेंतल्या राह-
णाऱ्यांनो, केंकत ओरडा; कां कीं सर्व व्यापारी
लोक नाहींसे झाले आहेत; सर्व रुपें वाहणारे
नाहींसे झाले आहेत. १२ आणि त्यासमयीं असें
होईल, कीं मी दिव्यांनी यरूशालेमेचा शोध
करीन, आणि जे मनुष्य आपल्या गाळावर निव-
ळ बसले आहेत, त्यांस शासीन, जे ते आपल्या
मनांत ह्मणतात, कीं परमेश्वर चांगलें करणार
नाहीं, आणि वाईटहि करणार नाहीं· १३ आ-
णि त्यांचें धन लूट होईल, आणि त्यांचीं घरें
ओसाड पडतील; आणि ते घरें बांधितील, परंतु
त्यांत वसणार नाहींत, आणि द्राक्षमळे लावि-
तील, परंतु त्यांतला द्राक्षारस पिणार नाहींत.
१४ परमेश्वराचा मोठा दिवस जवळ आहे,
तो जवळच आहे, आणि फार त्वरा करितो,
परमेश्वरच्या दिवसाचा शब्द होईल; तेथें
वीर कडूपणें ओरडेल· १५ तो दिवस कोपाचा
दिवस; पीडेचा, व संकटाचा दिवस; उजाडी-
चा, व ओसाडीचा दिवस; अंधाराचा, व काळो-
खाचा दिवस; आभाळाच्या काळोखाचा व दाट
अंधाराचा दिवस होईल; १६ तो गांवकुसवी
नगरांवर व उंच दुर्गांवर करण्याचा व आरोळी-
चा दिवस होईल. १७ आणि मी मनुष्यांस
पीडीन, तेव्हां ते आंधळ्यांप्रमाणें चालतील, का-
रण कीं त्यांनी परमेश्वराकडे पाप केलें आहे;
आणि त्यांचें रक्त धुळीसारिखें, व त्यांचें मांस
गुवासारिखें गळून जाईल· १८ परमेश्वराच्या
कोपाच्या दिवशीं त्यांचें रुपें अथवा त्यांचें सोनें
त्यांस सोडवायास समर्थ होणार नाहीं; परंतु
त्याच्या आवेशाच्या अग्नीकडून सर्व भूमि खाऊन
जाईल; कां कीं तो देशांतल्या सर्व राहणाऱ्यांचा
त्वरितच विनाश करील·

## अध्याय २·

अहो अनिष्ट वंशानो, तुह्मी एकवटा, होय एकत्र
मिळा· २ ठराव प्रसवेल, आणि दिवस
भुसासारिखा जाईल यापूर्वी, परमेश्वराचा सं-
तप्तक्रोध तुह्मावर येईल यापूर्वी, परमेश्वराच्या
क्रोधाचा दिवस तुह्मावर येईल यापूर्वी· ३
पृथ्वींतल्या सर्व नम्रानो, ज्या तुह्मी परमेश्वरा-
ची नीति साधिली आहे, ते तुह्मी त्याला शोधा;
न्यायीपणाला शोधा, नम्रपणाला शोधा; कदा-
चित परमेश्वराच्या क्रोधाच्या दिवशीं तुह्मी
गुप्त व्हाल·

४ तर गज्जा टाकलेलीसी होईल, आणि
अश्कलोन ओसाड पडेल; ते अश्दोदेला दोन
प्रहरीं घालवून देतील, आणि एक्रोन उपटून जा-
ईल· ५ समुद्रतीरच्या राहणाऱ्यांस, करेथी
राष्ट्राला हाय हाय; परमेश्वराचें वचन तुह्मा-
विरुद्ध आहे; अरे कनाना, पलिष्ट्यांच्या देशा,
मी तुला राहणारा न उरे असें करून बुडवून
टाकीन· ६ आणि समुद्रतीरचा प्रांत मेंढपाळां-
ची वस्ती व तळीं, आणि कळपाचे वाडे असा
होईल· ७ आणि तो प्रांत यहूदाच्या वंशांत-
ल्या उरलेल्यांस प्राप्त होईल; ते त्यावर चर-
तील; ते संध्याकाळीं अश्कलोनेंतल्या घरांत नि-
जतील; कां कीं परमेश्वर त्यांचा देव त्यांचा
समाचार घेईल, आणि त्यांचे पाडाव प्रवासी
परत आणील·

८ म्या मोवाबाचें निंदणें, आणि अम्मोनाच्या
वंशाचीं हेंटाळणीं ऐकिलीं आहेत, ज्यांकडून
त्यांनी माझ्या लोकांस निंदिलें आहे, आणि त्यां-
च्या सीमेवर आपलें मोठेपण मिरविलें आहे तीं·
९ याकरितां सैन्यांचा परमेश्वर इस्राएलाचा
देव ह्मणतो, कीं मी आपल्या जीवाची शपथ
वाहतों, कीं मोवाब सदोमेसारिखी, आणि अ-
म्मोनाचा वंश गमोरासारिसा, खाजकोल्ती झा-
डाचें स्थान, आणि मिठाच्या खाणी, आणि सर्व

काळची ओसाडी होईल; माझ्या लोकांतले
उरलेले त्यांचें हरण करितील, आणि माझ्या
राष्ट्रांतलें शेष त्यांचा विभाग पावेल. १० हें
त्यांच्या गर्वामुळें त्यांस प्राप्त होईल; कारण कीं
त्यांनी सैन्यांच्या **परमेश्वराच्या** लोकांची निंदा
केली आहे, आणि त्यांवर आपलें मोठेपण मिर-
विलें आहे. ११ **परमेश्वर** त्यांस भयंकर हो-
ईल; कां कीं तो पृथ्वींतल्या सर्व देवांस क्षीण
करील; आणि राष्ट्रांचीं सर्व द्वीपें प्रत्येक आप-
ल्या स्थानांतून त्याला भजतील.

१२ अहो खुशीनो, तुह्मीहि माझ्या तरवारी-
कडून वध पावाल. १३ आणि तो आपला हात
उत्तरेकडे लांबवील, आणि अश्शूराला नाशील,
आणि नीनिवेला ओसाड व जंगलाप्रमाणें सुकें
करून ठेवील. १४ आणि कळप, राष्ट्रांचे सर्व
पशु तिजमध्यें बसतील; आणि काथ व किप्पोड
हे पक्षी तींतल्या वरच्या उंबऱ्यावर रात्रीं राहतील;
त्यांचा स्वर खिडक्यांत गाईल; उंबऱ्यांत ओसाडी
होईल; कारण कीं तो एरेजाच्या लांकडाचें काम
उघडें करील. १५ जी उल्लासित नगरी निर्भय
राहत होती, आणि आपल्या मनांत ह्मणे, कीं मी
आहें, आणि मजवांचून दुसरी कोणी नाहीं,
ही कसी ओसाड स्थल, पशूंबसण्याचें स्थान
झाली आहे? जो कोणी तिजवरून जाईल, तो
फूत्कार करील, आणि आपला हात हालवील.

## अध्याय ३.

जी मळकट व अपवित्र आहे, तिला त्या पी-
डा करणाऱ्या नगरीला हाय हाय. २ ती
शब्द ऐकेना; शिक्षा घेईना; ती **परमेश्वरावर**
भाव ठेवीना; ती आपल्या देवाजवळ येईना. ३
तिजमध्यें तिचे अधिपति गरजते सिंह आहेत;
तिचे न्यायाधीश सायंकालचे लांडगे आहेत; ते
सकाळीं हाडें चावून खात नाहींत. ४ तिचे
भविष्यवादी अहंकारी कपटी मनुष्य आहेत; ति-
च्या याजकांनी पवित्रस्थान बाटविलें आहे, त्यांनी
नेमशास्त्रावर बळात्कार केला आहे. ५ न्यायी
**परमेश्वर** तिजमध्यें आहे; तो अन्याय करणार
नाहीं; तो रोज सकाळीं आपला न्याय उजेडांत
आणितो, आणि चुकत नाहीं: परंतु अन्यायाला
लाज वाटत नाहीं. ६ म्या राष्ट्रें नाहींसीं केलीं
आहेत; त्यांचीं दुर्गें ओसाड पडलीं आहेत:
म्या त्यांच्या आळ्यांत कोणी येता जाता नाहीं
एवढ्या त्या उजाड केल्या आहेत; त्यांच्या नगरां-
मध्यें मनुष्य नाहीं, राहणारा नाहीं एवढीं तीं ना-
शिलीं आहेत. ७ मी ह्मणालों, तथापि तूं माझें
भय धर, तूं शिक्षा घे; ह्मणजे जरी म्या तिला
शासिलें असलें, तरीं तिची वस्ती नाश पावली
नसती; तथापि ते पाहटेस उठून आपलीं सर्व
कर्में नासवीत असत.

८ याकरितां **परमेश्वर** ह्मणतो, कीं जोंपर्यंत
मी लूट करायाला उठें तोंपर्यंत तुह्मी माझी वाट
पाहत जा; कारण कीं माझा संकल्प असा आहे,
कीं राष्ट्रें एकत्र मिळवावीं, राज्यें एकवट करावीं,
अशासाठीं कीं म्या त्यांवर आपला कोप आपला
सर्व संतप्तक्रोध घालावा; कां कीं माझ्या आवेशा-
च्या अग्नीकडून सर्व पृथ्वी खाऊन जाईल. ९ कां
कीं तेव्हां मी लोकांस शुद्धभाषा परत आणून
देईन, अशासाठीं कीं त्या सर्वांनी **परमेश्वरा-
च्या** नामाला हाक मारतांना एकचित्ताने त्याची
सेवा करावी. १० खूशांतल्या नद्यांच्या पली-
कडून माझे भजणारे, माझ्या विखरिलेल्यांची
कन्या हीं माझें दान आणितील. ११ त्या स-
मयीं तुझ्या ज्या सर्व कर्मांकडून त्वां मजविरुद्ध
पातक केलें आहे, त्याविषयीं तूं लज्जित होणार
नाहींस; कां कीं जे तुझ्या वैभवाविषयीं उल्लास-
तात ते मी तेव्हां तुझ्या मध्यांतून दूर करीन, मग
तूं माझ्या पवित्र पर्वतावर पुन्हा अभिमानी अस-
णार नाहींस. १२ आणि मी तुजमध्यें नम्र व
दीन लोक उरूं देईन, आणि ते **परमेश्वराच्या**
नामावर भाव ठेवितील. १३ इस्राएलाचे उर-
लेले अन्याय करणार नाहींत, आणि खोटें बोल-
णार नाहींत, आणि त्यांच्या मुखांत कपटी जीभ
सांपडणार नाहीं: कां कीं ते चरतील, आणि
बसतील, आणि कोणी त्यांस भेडावणार नाहीं.

१४ अगे सीयोनेच्या कन्ये, तूं गायन कर;
अहो इस्राएल, तुह्मी गजर करा; अगे यरुशा-
लेमेच्या कन्ये, तूं अवघ्या हृदयाने हर्ष व उल्लास
कर. १५ **परमेश्वराने** तुझीं शासनें दूर केलीं
आहेत, त्याने तुझा वैरी घालवून दिला आहे;

इस्रांएलाचा राजा परमेश्वर तुजमध्यें आहे;
तूं पुन्हा संकट पाहणार नाहींस. १६ त्या समयीं
यरूशालेमेला ह्मणण्यांत येईल, कीं तूं भिऊं
नको; आणि सीयोनेला, असें कीं तुझे हात गळूं
नयेत. १७ परमेश्वर तुझा देव तुजमध्यें परा-
क्रमी आहे; तो तारण करील, तो हर्षानें तुज-
विषयीं आनंदेल; तो आपल्या प्रीतीनें शांत रा-
हील, तो गायनानें तुजविषयीं उल्लासेल. १८
तुझे जे जन सभेपासून दूर असतांना कासावीस
आहेत ते मी एकवटीन, निंदा तिजवर भार आहे.
१९ पाहा, जे तुला पीडितात त्यांचें मी त्या सम-
यीं कार्य करीन; आणि जी लंगडती तिला तारीन,
आणि जी बाहेर घालविलेली तिला एकवटीन;
आणि ज्या प्रत्येक देशांत त्यांची अप्रतिष्ठा झाली
आहे, त्यांत मी त्यांस प्रशंसा आणि कीर्त्ति मि-
ळत असें करीन. २० ज्या समयीं मी तुला
एकवटीन, त्या समयीं तुह्माला परत आणीन; का
कीं जेव्हां मी तुमचा पाडावपणाचा प्रवास तुम-
च्या समक्ष परत आणीन, तेव्हां तुह्माला पृथ्वीं-
तल्या सर्व लोकांमध्यें कीर्त्ति व प्रशंसा मिळत
असें करीन, असें परमेश्वर ह्मणतो.

HAGGAI.

# हग्गाइ.

### अध्याय १.

दारयावेश राजाच्या दुसऱ्या वर्षांत, साहाव्या
महिन्यांत, महिन्याच्या पहिल्या दिवसीं
शाल्तीयेलाचा पुत्र जरुब्बाबेल यहूदाचा राज्या-
धिकारी याकडे, आणि यहोजादाकाचा पुत्र यहो-
शवा मुख्य याजक याकडे हग्गाइ भविष्यवाद्याक-
डून परमेश्वराचें वचन आलें कीं, २ सैन्यांचा
परमेश्वर असें ह्मणतो, कीं हे लोक ह्मणतात,
कीं समय, परमेश्वराचें घर बांधायाचा समय
आला नाहीं. ३ आणि परमेश्वराचें वचन
हग्गाइ भविष्यवाद्याकडून आलें कीं, ४ अहो
तुह्मी, हें घर ओसाड असतां हा तुह्माला आ-
पल्या तक्त्यानी मढवलेल्या घरांत राहायाचा
समय आहे काय? ५ तर आतां सैन्यांचा पर-
मेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी आपल्या मार्गांकडे
आपलें मन लावा. ६ तुह्मी पुष्कळ पेरिलें आहे,
आणि थोडा उपज आंत आणितां; तुह्मी खातां,
परंतु तृप्त होत नाहीं; तुह्मी पितां, परंतु तुमची
तहान जात नाहीं; तुह्मी वस्त्र पांघरितां, परंतु
कोणाल्या ऊब येत नाहीं; आणि जो मोल मिळ-
वितो, तो तें भोंक पडलेल्या पिशवींत घालायासा-
ठीं मिळवितो.
७ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं तुह्मी
आपल्या मार्गांकडे आपलें मन लावा. ८ तुह्मी
पर्वतावर चढा, आणि लांकडें आणा, आणि मं-
दिर बांधा, ह्मणजे मी त्यांत संतोष करीन, आ-
णि गौरव पावेन, असें परमेश्वर ह्मणतो. ९
तुह्मी पुष्कळाची वाट पाहिली, आणि पाहा, थो-
डा उपज झाला; जेव्हां तुह्मी तो घरीं आणिला,
तेव्हां म्या त्यावर फुंकिलें; सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कशामुळें? जें माझें घर ओसाड आहे,
त्यामुळें, आणि तुह्मी प्रत्येक आपल्या घरास
धांवतां यामुळेंहि. १० याकरितां तुह्मावर दहिं-
वर न पडावें, ह्मणून आकाशें आवरलीं आहेत,
आणि पृथ्वी आपला उपज न द्यावा, ह्मणून आ-
वरलेली आहे. ११ आणि म्या भूमीवर, आणि
पर्वतावर, आणि धान्यांवर, आणि द्राक्षारसावर,
आणि तेलावर, आणि जें कांहीं भूमींतून उत्पन्न
होतें त्यावर, आणि मनुष्यांवर, आणि पशूंवर,
आणि हातांच्या सर्व श्रमांच्या फळावर, सुकें
बोलावून आणिलें आहे.

१२ मग शाल्तीयेलाचा पुत्र जरुब्बाबेल, आ-
णि यहोजादाकाचा पुत्र यहोशवा, जो मुख्य या-
जक तो, आणि सर्व उरलेले लोक, परमेश्वर
जो आपला देव त्याच्या शब्दाला, आणि हग्गाइ
भविष्यवाद्याच्या वचनांस, जसें परमेश्वर जो
त्यांचा देव त्याला पाठविलें होतें, तसें मान्य
झाले, आणि लोक परमेश्वराचें भय धरिते
झाले. १३ तेव्हां परमेश्वराचा निरोपी ह-
ग्गाइ परमेश्वराचा निरोप लोकांस सांगत ह्म-
णाला, परमेश्वर ह्मणतो, कीं मी तुह्मापाशीं
आहें. १४ आणि परमेश्वराने शाल्तीयेलाचा
पुत्र जरुब्बाबेल जो यहूदाचा राज्याधिकारी
त्याच्या आत्म्याला, आणि यहोजादाकाचा पुत्र
यहोशवा जो मुख्य याजक त्याच्या आत्म्याला,
आणि सर्व उरलेल्या लोकांच्या आत्म्याला उत्ते-
जित केलें; मग ते येऊन सैन्यांचा परमेश्वर
जो आपला देव त्याच्या मंदिरांत काम करूं ला-
गले; १५ दारयावेश राजाच्या दुसऱ्या वर्षांत,
साहाव्या महिन्याच्या चोविसाव्या दिवशीं हें झालें.

## अध्याय २.

सातव्या महिन्यांत, महिन्याच्या एकविसाव्या
दिवशीं परमेश्वराचें वचन हग्गाइ भ-
विष्यवाद्याकडून आलें कीं, २ शाल्तीयेलाचा
पुत्र जरुब्बाबेल जो यहूदाचा राज्याधिकारी त्या-
ला, आणि यहोजादाकाचा पुत्र यहोशवा मुख्य
याजक त्याला, आणि उरलेल्या लोकांस तूं बोल
कीं, ३ ज्याने हें मंदिर त्याच्या पहिल्या गौर-
वांत पाहिलें, असा कोण तुह्मामध्यें उरला आहे?
आणि आतां तुह्मी हें कसें पाहतां? हें त्यासीं
लावून तुमच्या दृष्टींत कांहीं नाहीं, असें नाहीं
काय? ४ तथापि परमेश्वर ह्मणतो, आतां हे
जरुब्बाबेला, तूं बळकट ऐस; आणि हे यहो-
जादाकाच्या यहोशवा पुत्रा मुख्य याजका, तूं
बळकट ऐस; आणि देशांतल्या सर्व लोकांनो,
तुह्मी बळकट असा, आणि काम करा; असें
परमेश्वर ह्मणतो; कां कीं मी तुह्मापाशीं आहें,
असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो. ५ जेव्हां
तुह्मी मिसरांतून आलां, तेव्हां जो करार म्या
तुह्मापाशीं केला, त्याप्रमाणें माझा आत्मा तुह्मा-
मध्यें राहतो आहे; भिऊं नका. ६ कां
सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं अणखी ए
वेळ थोडावेळ गेल्यानंतर मी आकाशास, आ
पृथ्वीला, आणि समुद्राला, आणि कोरड्या भूमी
हालवीन. ७ आणि सर्व राष्ट्रांस हालवीन, आ
णि राष्ट्रांचा इच्छापात्र येईल; आणि मी
मंदिर गौरवाने भरीन, असें सैन्यांचा परमेश्व
ह्मणतो. ८ रुपें माझें, आणि सोनेंहि माझें आ
असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो. ९ पहिल्या
च्या गौरवापेक्षा या दुसऱ्या मंदिराचें गौरव मो
होईल, असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो: आणि
मी या स्थानांत शांति देईन, असें सैन्यांचा
परमेश्वर ह्मणतो.

१० दारयावेशाच्या दुसऱ्या वर्षांत, नवव्या
महिन्याच्या चोविसाव्या दिवशीं परमेश्वराचें
वचन हग्गाइ भविष्यवाद्याकडून आलें कीं, ११
सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं तूं याजकांस
नेमशास्त्राविषयीं पुसत बोल, १२ जर कोणी
आपल्या पदरांत पवित्र मांस घेईल, आणि आ-
पल्या पदराने भाकरीला अथवा वरणाला अथ-
वा द्राक्षारसाला अथवा तेलाला अथवा कोण-
त्याहि खाण्यास स्पर्शील, तर तें पवित्र होईल
काय? आणि याजक उत्तर करीत ह्मणाले, कीं
नाहीं. १३ तेव्हां हग्गाइ ह्मणाला, जर कोणी
प्रेताच्या स्पर्शाने विटाळला असतां या सर्वांतल्या
कोणत्यालाहि स्पर्शील, तर तें विटाळेल काय!
आणि याजक उत्तर करीत ह्मणाले, विटाळेल.
१४ मग हग्गाइ उत्तर करीत ह्मणाला, परमे-
श्वर ह्मणतो, कीं तसे हे लोक, आणि तसें हें
राष्ट्र मजसमोर आहे; आणि तसें त्यांच्या हा-
तांचें सर्व काम आहे; आणि ते जें तेथें अर्पि-
तात, तें विटाळलेलें आहे. १५ तर आतां या
दिवसापासून मागें, परमेश्वराच्या मंदिरांतला
दगड दगडावर ठेविल्याच्या पूर्वीपासून, मन घा-
लून विचार करा. १६ ते दिवस झाल्यापासून
कोणी वीस मापांच्या राशीजवळ जर आला, तर
दाहा मात्र असत; द्राक्षें तुडविण्याच्या पात्रांतून
पन्नास पात्रें रस काढायाला जर कोणी कुंडाजवळ
आला, तर वीस मात्र असे. १७ म्या तुह्मा-
ला तुमच्या हातांच्या सर्व कामाला लोंब्यांत व

विटाने आणि गारानी हाणिलें आहे; तथापि
तुह्मी मजकडे फिरला नाहीं, असें **परमेश्वर**
ह्मणतो. १८ तुह्मी या दिवसापासून मागें, मन
घालून विचार करा, नवव्या महिन्याच्या चोवि-
साव्या दिवसापासून, ज्या दिवसीं **परमेश्वरा-
च्या** मंदिराचा पाया घातला त्या दिवसापासून
मन घालून विचार करा. १९ अझून बीज कोठा-
रांत आहे काय? आणि एथपर्यंत द्राक्षीने अथवा
अंजिराने अथवा डाळिंबीने अथवा जाइत झाडाने
फळ दिल्हें नाहीं; या दिवसापासून मी तुह्माला
आशीर्वादित करीन.

२० आणि महिन्याच्या चोविसाव्या दिवसीं
**परमेश्वराचें** वचन हग्गाइजवळ पुन्हा आलें
कीं, २१ जरुब्बाबेल जो यहूदाचा राज्याधि-
कारी त्याला बोलत सांग, कीं मी आकाशें आणि
पृथ्वी हालवीन. २२ आणि मी राज्यांचें सिंहा-
सन उलंडून टाकीन, आणि राष्ट्रांच्या राज्यांचें
बळ नाहींसें करीन; आणि रथ व त्यांतले बस-
णारे उलंडून देईन; आणि घोडे व त्यांचे स्वार
प्रत्येक आपल्या भावाच्या तरवारीने उतरतील.
२३ सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं हे शाल्ती-
येलाच्या जरुब्बाबेल पुत्रा, माझ्या सेवका, त्यास-
मयीं मी तुला घेऊन मुद्रा असें करीन, असें
**परमेश्वर** ह्मणतो; का कीं म्या तुला निवडून
घेतलें आहे, हें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो.

ZECHARIAH.

# जखार्या.

### अध्याय १.

दारयावेशाच्या दुसऱ्या वर्षांत, आठव्या महि-
न्यांत इद्दोचा पुत्र बेरेख्या त्याचा पुत्र ज-
खार्या भविष्यवादी याकडे **परमेश्वराचें** वचन
आलें कीं, २ **परमेश्वर** तुमच्या पूर्वजांवर
फार कोपित होत असे. ३ तर तूं त्यांस सांग,
सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं तुह्मी मजकडे
फिरा, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, ह्मणजे
मी तुह्माकडे फिरेन, असें सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो. ४ तुह्मी आपल्या पूर्वजांसारिखे असूं
नका, ज्या त्यांस पूर्वं भविष्यवादी गाजवीत सां-
गत असत, कीं सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं
तुह्मी आपल्या वाईट मार्गांपासून, आणि आप-
ल्या वाईट कर्मांपासून फिरा; परंतु ते ऐकेनात,
आणि मजकडे कान देईनात, असें **परमेश्वर**
ह्मणतो. ५ तुमचे पूर्वज कोठें आहेत? आणि
भविष्यवादी सर्वकालपर्यंत वांचतात काय? ६
तर माझीं वचनें आणि माझे नियम जीं म्या आ-
पल्या सेवकांस, भविष्यवाद्यांस आज्ञापिलीं, तीं
तुमच्या पूर्वजांच्या अनुभवास आलीं नाहींत काय?
मग ते फिरत आणि ह्मणत, जसें सैन्यांच्या **पर-
मेश्वराने** आह्माला आमच्या आचारांप्रमाणें
आणि आमच्या कर्मांप्रमाणें करावें, ह्मणून क-
ल्पिलें, तसें त्याने आह्माकडे केलें आहे.

७ दारयावेशाच्या दुसऱ्या वर्षांत, अकरावा
महिना जो शबाट महिना आहे त्याच्या चोवि-
साव्या दिवसीं इद्दोचा पुत्र बेरेख्या, त्याचा पुत्र
जखार्या भविष्यवादी याकडे **परमेश्वराचें**
वचन आलें कीं; ८ म्या रात्रीं पाहिलें, आणि
पाहा, एक मनुष्य तांबड्या घोड्यावर बसला हो-
ता, आणि जीं हदस झाडें खोऱ्यांत होतीं त्यां-
मध्यें तो उभा राहिला, आणि त्याच्या पाठीमागें
तांबडे, सांवळे, आणि पांढरे घोडे होते. ९ तेव्हां
मी ह्मणालों, माझ्या प्रभो, हे काय आहेत?
आणि जो दूत मजजवळ बोलत होता त्याने मला
ह्मटलें, कीं हे काय आहेत, हें मी तुला दाख-
वीन. १० आणि जो मनुष्य हदस झाडांमध्यें

उभा राहिला होता, तो उत्तर करीत ह्मणाला,
जे परमेश्वराने पृथ्वींत फिरायाला पाठविले
आहेत, ते हेच आंहत. ११ आणि जो परमे-
श्वराचा दूत हदस झाडांमध्यें उभा राहिला
होता, त्याला ते उत्तर करीत ह्मणाले, कीं आ-
ह्मी पृथ्वींत इकडे तिकडे फिरलों आहों, आणि
पाहा, सर्व पृथ्वी स्वस्थ आणि शांत बसली आहे.
१२ तेव्हां परमेश्वराचा दूत उत्तर करीत
ह्मणाला, हे सैन्यांच्या परमेश्वरा, केवढ्या वेळा-
पर्यंत तूं यरूशालेमेवर आणि यहूदांतल्या नग-
रांवर दया करणार नाहींस, ज्या त्यांवर तूं या
सत्तर वर्षींपर्यंत कोपत आला आहेस? १३
आणि जो दूत मजजवळ बोलत होता, त्याला
परमेश्वराने उत्तम वचनें व सांत्वनाचीं वचनें
बोलत उत्तर केलें. १४ आणि जो दूत मजज-
वळ बोलत होता, त्याने मला ह्मटलें, तूं गाज-
वीत सांग, सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं मी
यरूशालेमेकरितां व जीयोनेकरितां मोठ्या आ-
वेशाने आवेशी आहें. १५ आणि जीं राष्ट्रें
स्वस्थ आहेत, त्यांवर मी मोठ्या कोपानें कोपित
आहें; कां कीं मी थोडासा कोपित होतों, आणि
त्यानी संकट चालविलें. १६ याकरितां सैन्यां-
चा परमेश्वर ह्मणतो, कीं मी दया करून यरू-
शालेमेकडे फिरलों आहें; तिजमध्यें माझें मंदिर
बांधितील, असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो,
आणि यरूशालेमेवर सूत्र ताणितील. १७ तूं
अणखी गाजवीत सांग, सैन्यांचा परमेश्वर ह्म-
णतो, कीं माझीं नगरें पुन्हा कुशलाने विस्तारतील;
आणि परमेश्वर पुन्हा जीयोनेचें सांत्वन करील,
आणि पुन्हा यरूशालेमेला निवडील.
१८ मग म्या आपले डोळे वर करून पाहिलें,
तेव्हां पाहा, चार शिंगें होतीं. १९ आणि जो
दूत मजजवळ बोलत होता, त्याला मी ह्मणालों,
हीं काय आहेत? तेव्हां त्याने मला सांगितलें,
ज्या शिंगानी यहूदाला, इस्राएलाला, आणि
यरूशालेमेला उडवून विखरिलें आहे, तीं हींच
आहेत. २० आणि परमेश्वराने मला चार
सुतार दाखविले. २१ तेव्हां मी ह्मणालों, हे
काय करायाला आले आहेत? मग त्याने मला
ह्मटलें, कीं ज्या शिंगानी यहूदाला एवढें उडवून
विखरिलें आहे, कीं कोणी आपली डोई वर क-
रीना, तीं हींच आहेत; परंतु यांस भडकवा-
याला, आणि ज्या राष्ट्रांनी यहूदा देश उडकून
विखरावा ह्मणून त्याजवर आपलें शिंग उंचाविलें,
त्यांचीं शिंगें पाडायाला हे आले आहेत.

## अध्याय २.

आणि म्या आपले डोळे वर करून पाहिलें,
तेव्हां पाहा, एक मनुष्य आणि त्याच्या
हातांत एक मापनसूत्र होतें. २ तेव्हां मी ह्म-
णालों, तूं कोणीकडे चालत आहेस? मग त्याने
मला सांगितलें, यरूशालेम मापायाला तिची
रुंदी केवढी, आणि तिची लांबी केवढी आहे, हें
पाहावें ह्मणून. ३ आणि पाहा, जो दूत मजज-
वळ बोलत होता, तो बाहेर गेला, आणि इतर
एक दूत त्यास भेटायाला बाहेर आला. ४
आणि त्याला ह्मणाला, तूं धांवून या तरुणाला
सांग, कीं यरूशालेम आपणामधील मनुष्य आणि
पशु फार असल्यामुळें कोटरहित गांवासारिखी
वसेल. ५ आणि परमेश्वर ह्मणतो, कीं मी
तिजभोंवता अग्नीचा कोट असत जाईन, आणि
तिजमध्यें गौरव असत जाईन.
६ हो हो याहो, उत्तरेंतल्या देशांतून पळा,
असें परमेश्वर ह्मणतो; कां कीं म्या तुह्माला
आकाशांतल्या चोहों वाऱ्यांप्रमाणें विस्तारिलें आहे.
असें परमेश्वर ह्मणतो. ७ अगे जीयोने बा-
बेलेच्या कन्येजवळच्या राहणाऱ्ये, तूं मोकळी हो.
८ कारण कीं सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं
जीं राष्ट्रें तुमचें हरण करीत असत, त्यांकडे
त्याने गौरवानंतर मला पाठविलें आहे; कां कीं
जो तुह्माला स्पर्शितो, तो त्याच्या डोळ्याच्या
पुतळीला स्पर्शितो. ९ तर पाहा, मी आपला
हात त्यांवर हालवीन, आणि ते आपल्या सेव-
कांस लूट होतील; आणि तुह्मी जाणाल, कीं
सैन्यांच्या परमेश्वराने मला पाठविलें आहे.
१० अगे जीयोनेच्या कन्ये, गायन व हर्ष
कर; कां तर पाहा, मी येतों, आणि मी तुजमध्यें
वसेन, असें परमेश्वर ह्मणतो. ११ आणि
त्या समयीं बहुत राष्ट्रें परमेश्वरास जडतील
आणि तीं माझे लोक होतील; आणि मी तुजम-

थें वसेन, आणि तूं जाणसील, कीं सैन्यांच्या
**परमेश्वराने** मला तुजकडे पाठविलें आहे. १२
**आणि परमेश्वर** पवित्र भूमीवर यहूदाचें, आप-
ल्या विभागाचें वतन करील, आणि पुन्हा **यरू-**
शालेमेला निवडील. १३ **हे** सर्व मनुष्यजाति,
**परमेश्वरासमोर** उगीच ऐस; कारण कीं तो
आपल्या पवित्र वस्तींतून उठला आहे.

## अध्याय ३.

आणि त्याने मला मुख्य याजक **यहोशवा**
**परमेश्वराच्या** दूतासमोर उभा असतां
दाखविला, आणि त्याच्या उजव्या हाताकडे **सा-**
**टान** त्याचा अटकाव करायासाठीं उभा असतां
दाखविला. २ **आणि परमेश्वराने साटानाला**
ह्मटलें, अरे **साटाना, परमेश्वर** तुला धमकावो;
ज्या **परमेश्वराने यरूशालेम** निवडिली आहे,
तो तुला धमकावो; हा अग्नींतून पटकन काढि-
लेलें कोलीत नाहीं काय? ३ **तर यहोशवा**
मळकट वस्त्रें ल्यालेला होता, आणि दूतासमोर
उभा राहिला. ४ **आणि** जे त्यासमोर उभे
राहिले होते, त्यांस तो उत्तर करीत ह्मणाला,
कीं तुह्मी त्याच्या अंगांतून तीं मळकट वस्त्रें
काढा; मग त्याने त्याला ह्मटलें, कीं पाहा, म्या
तुझा अन्याय तुजपासून दूर केला आहे, आणि
मी तुझ्या अंगांत पांढरीं वस्त्रें घालणार आहें.
५ **आणि** मी ह्मणालों, ते त्याच्या डोईंत स्वच्छ
सुंदर पागोटें घालोत; मग त्यानी स्वच्छ सुंदर
पागोटें त्याच्या डोईंत घातलें, आणि वस्त्रें त्या-
च्या अंगावर घातलीं; आणि **परमेश्वराचा**
दूत जवळ उभा राहिला होता. ६ **आणि**
**परमेश्वराच्या** दूताने **यहोशवाला** सांगितलें
कीं, ७ **सैन्यांचा परमेश्वर** ह्मणतो, कीं जर
तूं माझ्या मार्गांत चालसील, आणि माझें रक्षण-
कर्म जर करीत जासील, तर तूं माझ्या घरचा
न्याय करिसील, आणि माझीं अंगणें रक्षिसील,
आणि जे उभे राहिले आहेत, यांमध्यें फिरण्या-
च्या जागा देईन.
८ **हे यहोशवा** मुख्य याजका, तूं ऐक, आणि
जे तुझे सोबती तुजसमोर बसले आहेत, तेहि
ऐकोत; कां कीं ते उत्पाताचे मनुष्य आहेत; का-
रण कीं पाहा, मी आपला सेवक जो **कोंब** तो
आणणार आहें. ९ **कां** कीं जो दगड म्या **य-**
**होशवासमोर** घातला आहे तो पाहा; एका दग-
डाच्या ठायीं सात डोळे होतील; पाहा, मी
त्याचें लेखन कोरीन, असें सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो, आणि एका दिवसीं त्या देशाचा अन्याय
दूर करीन. १० **सैन्यांचा परमेश्वर** ह्मणतो,
कीं त्या समयीं तुह्मी प्रत्येक आपल्या शेजाऱ्याला
द्राक्षीखालीं आणि अंजीर झाडाखालीं बोलावाल.

## अध्याय ४.

आणि जो दूत मजजवळ बोलत होता, तो
परत आला; आणि त्याने जो आपल्या
झोपेंतून जागा होतो, त्या मनुष्याला जसें तसें
मला जागें केलें. २ **आणि** मला ह्मटलें, तुला
काय दिसतें? तेव्हां मी ह्मणालों, म्या पाहिलें
आहे, आणि पाहा, केवळ सोन्याची एक समई
आणि तिचा कटोरा तिच्या शिरावर आहे, आणि
तिजवरतीं तिचीं सात चाडीं आहेत, आणि जीं
सात चाडीं तिच्या शिरावरतीं आहेत, त्यांस सात
नळ्या आहेत. ३ **आणि** तिच्या जवळ दोन
जाइत झाडें आहेत, एक कटोऱ्याच्या उजव्या
अंगास, आणि दुसरें त्याच्या डाव्या अंगास. ४
**तर** जो दूत मजजवळ बोलत होता, त्याला मी
उत्तर करीत ह्मणालों, कीं हे प्रभो, हीं काय
आहेत? ५ **मग** जो दूत मजजवळ बोलत
होता, तो मला उत्तर करीत ह्मणाला, हीं काय
आहेत, हें तूं जाणत नाहींस काय? तेव्हां मी
ह्मणालों, कीं नाहीं, माझ्या प्रभो. ६ **तेव्हां**
तो मला उत्तर करीत ह्मणाला, कीं जरुब्बाबेला-
कडे **परमेश्वराचें** वचन हेंच आहे, कीं बलाक-
डून नाहीं, आणि पराक्रमाकडून नाहीं, परंतु मा-
झ्या आत्म्याकडून, असें सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो. ७ **अरे** मोठ्या पर्वता, तूं कोण आहेस?
तूं जरुब्बाबेलापुढें सपाट भूमि होसील; आणि
तो माथ्याचा धोंडा बाहेर आणून गजर करीत
ह्मणेल, प्रसाद, प्रसाद त्याला असो. ८ **आणि**
**परमेश्वराचें** वचन मजजवळ आलें कीं, ९
जरुब्बाबेलाच्या हातानी या मंदिराचा पाया घा-
तला आहे; आणि त्याचेच हात हें समाप्त

करितील, आणि तूं जाणसील, कीं सैन्यांच्या
**परमेश्वराने** मला तुह्माकडे पाठविलें आहे.
१० **तर** लहान गोष्टींच्या दिवसाला कोणी तुच्छ
मानिलें आहे? परंतु ते हर्षतील, आणि जरुब्बा-
बेलाच्या हातांत त्या सातांसुद्धां ओळंबा पाह-
तील; ते **परमेश्वराचे** डोळे आहेत, ते अवघ्या
पृथ्वीवर फिरतात.
११ **तेव्हां** मी त्याला उत्तर करीत ह्मणालों,
जीं दोन जाइत झाडें समईच्या उजव्या अंगास,
आणि तिच्या डाव्या अंगास आहेत, तीं काय
आहेत? १२ **आणि** पुन्हा मी त्याला उत्तर
करीत ह्मणालों, जाइताचे जे दोन फांटे दोहों
सोन्यांच्या नळ्यांकडून आपणांतून सोन्याचें तेल
वाहूं देतात, ते काय आहेत? १३ **तेव्हां** तो
मला उत्तर करीत ह्मणाला, हे काय आहेत, हें
तूं जाणत नाहींस काय? आणि मी ह्मणालों,
कीं नाहीं, माझ्या प्रभो. १४ **तेव्हां** तो ह्मणा-
ला, जे दोघे अभिषिक्त जन अवघ्या पृथ्वीच्या
**प्रभू**जवळ उभे राहतात, ते हेच आहेत.

## अध्याय ५.

**आ**णि म्या फिरून आपले डोळे वर करून
पाहिलें, तेव्हां पाहा, एक उडती गुंडाळी
होती. २ **आणि** त्याने मला ह्मटलें, तुला काय
दिसतें? तेव्हां मी ह्मणालों, एक उडती गुंडाळी
दिसती; तिची लांबी वीस हात, आणि तिची
रुंदी दाहा हात आहे. ३ **मग** त्याने मला ह्म-
टलें, जो शाप अवघ्या पृथ्वीच्या पाठीवर बाहेर
जातो, तो हाच आहे; कां कीं जो कोणी चोरी
करितो, तो एका अंगास तिजप्रमाणें नाश पा-
वेल; आणि जो कोणी शपथ वाहतो, तो दुसऱ्या
अंगास तिजप्रमाणें नाश पावेल. ४ **सैन्यांचा**
**परमेश्वर** ह्मणतो, कीं मी तिला बाहेर जाऊं
देईन, आणि ती चोराच्या घरांत, आणि जो मा-
झ्या नामावर खोटेपणाने शपथ वाहतो त्याच्या
घरांत शिरेल; आणि त्यांच्या घरामध्यें राहील,
आणि तें व त्याचीं लांकडें आणि त्याचे दगड
नाहींसे करील.
५ **मग** जो दूत मजजवळ बोलत होता, तो
बाहेर गेला, आणि त्याने मला ह्मटलें, तूं आ-
पले डोळे वर कर, आणि जी बाहेर जाती आहे,
ती काय आहे, हें पाहा. ६ **आणि** मी ह्मणा-
लों, ती काय आहे? तेव्हां तो ह्मणाला, जी
एफा बाहेर जाती ती हीच आहे; आणि तो
ह्मणाला, ही सर्व पृथ्वीवर त्यांचा आभास आहे.
७ **आणि** पाहा, शिशाचा गोळा उंचाविला होता;
आणि ही एक स्त्री एफामध्यें बसली आहे. ८
**आणि** तो ह्मणाला, ही दुष्टाई आहे; आणि
त्याने ती एफामध्यें टाकिली; आणि त्याने तिच्या
मुखावर तो शिशाचा गोळा टाकिला. ९ **मग**
म्या आपले डोळे वर करून पाहिलें, तेव्हां पाहा,
दोन स्त्रिया निघाल्या, आणि त्यांच्या पक्षांत
वारा होता; त्यांस तर पंख हसीदा पक्ष्याच्या
पंखासारिखे होते; आणि त्यानी ती एफा पृथ्वी
आणि आकाश यांमध्यें उंचाविली. १० **तेव्हां**
जो दूत मजजवळ बोलत होता, त्याला मी ह्म-
णालों, कोणीकडे त्या ती एफा नेतात? ११
**तेव्हां** त्याने मला सांगितलें, **शिनार** देशांत ति-
जसाठीं घर बांधायाला; मग तें सिद्ध होईल,
तेव्हां ती तेथें आपल्या आधारावर ठेवण्यांत
येईल.

## अध्याय ६.

**म**ग म्या फिरून आपले डोळे वर करून पा-
हिलें, तेव्हां पाहा, दोहों पर्वतांच्या अंतर-
प्रदेशांतून चार रथ निघाले; आणि ते पर्वत पि-
तळाचे पर्वत होते. २ **पहिल्या** रथाला तांबडे
घोडे, आणि दुसऱ्या रथाला काळे घोडे होते.
३ **आणि** तिसऱ्या रथाला पांढरे घोडे, आणि
चौथ्या रथाला सांवळे, आणि लाखी रंगाचे
घोडे होते. ४ **मग** जो दूत मजजवळ बोलत
होता, त्याला मी उत्तर करीत ह्मणालों, माझ्या
प्रभो, हे काय आहेत? ५ **तेव्हां** दूत मला
उत्तर करीत ह्मणाला, हे आकाशांतले चार आ-
त्मे आहेत, हे अवघ्या पृथ्वीच्या **प्रभू**समोर उभे
राहण्यापासून बाहेर जातात. ६ **त्यांस** जे काळे
घोडे आहेत, ते उत्तरेच्या देशांत बाहेर जातात;
आणि त्यांच्या पाठीमागून पांढरे बाहेर जातात;
आणि सांवळे दक्षिणेच्या देशाकडे बाहेर जा-
तात. ७ **आणि** लाखी बाहेर गेले, आणि त्या-

नी पृथ्वींत फिरायाला जावें, ह्मणून शोधिलें;
आणि तो ह्मणाला, तुह्मी जा, पृथ्वींत फिरा;
नंतर ते पृथ्वींत फिरते झाले. ८ तेव्हां तो मला
ओरडून मला बोलला, पाहा, जे उत्तरेच्या देशा-
कडे बाहेर गेले आहेत, त्यांनी माझा आत्मा
उत्तरेच्या देशांत राहूं दिल्हा आहे.
९ आणि परमेश्वराचें वचन मजजवळ आलें
कीं, १० जे पाडाव प्रवासी बाबेलेहून आले
आहेत, त्यांतले कितीएक जन हेल्दाईपासून, टो-
बीयापासून, आणि यदायापासून तूं आपणासंगतीं
घे, आणि त्याच दिवसीं तूं ये, आणि जफान्या-
चा पुत्र योशीया याच्या घरांत जा. ११ आणि
रुपें व सोनें घेऊन मुगुट कर, आणि यहोजादा-
काचा पुत्र यहोशवा मुख्य याजक याच्या डोईला
ते घाल. १२ आणि त्याला सांग, कीं सैन्यांचा
परमेश्वर असें ह्मणतो, कीं ज्या मनुष्याचें नाम
कोंब आहे, तो पाहा; आणि तो आपल्या ठा-
यांतून उगवेल, आणि तो परमेश्वराचें मंदिर
बांधील. १३ तोच परमेश्वराचें मंदिर बां-
धील; आणि तो वैभवयुक्त होईल, आणि आप-
ल्या सिंहासनावर बसून राज्य करील; आणि
तो आपल्या सिंहासनावर याजक असत जाईल;
आणि त्या दोहोंमध्यें शांतीची मसलत असत
जाईल. १४ आणि हेलेम आणि टोबीया
आणि यदाया आणि जफान्याचा पुत्र हेन यांकडे
ते मुगूट परमेश्वराच्या मंदिरांत स्मरणासाठीं
राहतील. १५ आणि जे दूर आहेत ते येतील,
आणि परमेश्वराचें मंदिर बांधितील, आणि
तुह्मी जाणाल, कीं सैन्यांच्या परमेश्वरानें मला
तुह्माकडे पाठविलें आहे; आणि परमेश्वर जो
तुमचा देव त्याच्या शब्दास जर तुह्मी निश्चयें
मान्य असत जाल, तर हें घडेलच घडेल.

## अध्याय ७.

आणि दारयावेश राजाच्या चौथ्या वर्षांत,
खिसलेव नवव्या महिन्याच्या चौथ्या दि-
वसीं असें झालें, कीं परमेश्वराचें वचन जखा-
र्याजवळ आलें. २ जेव्हां लोकांनी शारेजेर
आणि रेगेम्मेलेख आणि त्यांचे मनुष्य परमेश्व-
रापासीं विनंती करायाला, ३ आणि जसा मी
या कितीएक वर्षांत करीत आलों आहें, तसा मी
पांचव्या महिन्यांत वेगळा होऊन रडूं काय? असें
जे याजक सैन्यांच्या परमेश्वराच्या घरांत होते,
त्यांस आणि भविष्यवाद्यांस पुसायाला पाठ-
विले होते.
४ तेव्हां सैन्यांच्या परमेश्वराचें वचन मज-
जवळ आलें कीं, ५ देशांतल्या सर्व लोकांजवळ
आणि याजकांजवळ तूं बोल, कीं जेव्हां तुह्मी
या सत्तर वर्षांपर्यंत, पांचव्या आणि सातव्या
महिन्यांत उपास आणि आक्रंदन करीत असां,
तेव्हां तुह्मी मजकडे, मजकडेच निश्चयें उपास करीत
असां काय? ६ आणि जेव्हां तुह्मी खात असां,
आणि पीत असां, तेव्हां तुह्मी केवळ आपल्यासा-
ठीं खात नसां काय? आणि केवळ आपल्यासा-
ठीं पीत नसां काय? ७ जेव्हां यरूशालेम
आणि तिचीं भोंवतालचीं नगरें वसलेलीं आणि
कुशळ होतीं, आणि लोक दक्षिण देशांत आणि
खोलवट देशांत वसत होते, तेव्हां परमेश्वरानें
पूर्व भविष्यवाद्यांकडून जीं वचनें गाजविलीं, तीं
तुह्मी ऐकत नाहीं काय?
८ आणि परमेश्वराचें वचन जखार्याकडे
आलें कीं, ९ सैन्यांचा परमेश्वर असें ह्मण-
तो, कीं तुह्मी खरा न्याय करा, आणि प्रत्येक
आपल्या भावावर दया व करुणा करा. १०
विधवेला आणि अनाथाला, विदेश्याला आणि
दरिद्र्याला पीडूं नका; आणि तुह्मी प्रत्येक आप-
ल्या भावाविषयीं आपल्या मनांत वाईट कल्पूं
नका. ११ तथापि ते कान देईनात, आणि त्यांनी
खांदा काढला, आणि त्यांनी ऐकूं नये ह्मणून आ-
पले कान जड केले. १२ आणि त्यांनीं नेमशास्त्र
ऐकूं नये, आणि जीं वचनें सैन्यांच्या परमेश्व-
रानें आपल्या आत्म्याकडून पूर्व भविष्यवाद्यांच्या
योगानें पाठविलीं तीं ऐकूं नयेत, ह्मणून आपलें
हृदय हिरा केलें; याकारितां सैन्यांच्या परमेश्व-
रापासून मोठा कोप आला. १३ आणि असें
झालें, कीं जसी तो हाक मारी, आणि ते ऐके-
नात, तसी त्यांनी हाक मारिली, परंतु म्या ऐ-
किली नाहीं, असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो.
१४ आणि जीं सर्व राष्ट्रें त्यांनी जाणलीं नव्हतीं,
त्यांमध्यें म्या त्यांस उडविलें; आणि त्यांमागें

देश असा ओसाड झाला कीं त्यामधून कोणी
जाईना व त्यांत कोणी फिरेना; कां कीं शत्रूनीं
मनोरम देश ओसाड करून ठेविला.

## अध्याय ८.

आणि सैन्यांच्या परमेश्वराचें वचन जखा-
र्याकडे आलें कीं, २ सैन्यांचा परमे-
श्वर ह्मणतो, कीं मी सीयोनेकरितां मोठ्या
आवेशाने आवेशी झालों, आणि तिजकरितां मी
मोठ्या कोपाने आवेशी झालों. ३ परमेश्वर
ह्मणतो, कीं मी सीयोनेकडे परत आलों आहें,
आणि यरूशालेमेमध्यें वसेन; आणि यरूशाले-
मेला खरेपणाची नगरी असें ह्मणतील, आणि
सैन्यांच्या परमेश्वराच्या पर्वताला पवित्र पर्वत
असें ह्मणतील. ४ सैन्यांचा परमेश्वर ह्मण-
तो, कीं ह्मातारे आणि ह्मातार्‍या यरूशालेमेच्या
आळ्यांत पुन्हा वसतील, आणि ह्मातारपणामुळें
प्रत्येक आपल्या हातीं आपली काठी धरील. ५
आणि नगरांतल्या आळ्या मुलांनी आणि मुली-
नी भरतील, तीं त्यांतल्या आळ्यांत खेळतील.
६ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं जर या दि-
वसांत या लोकांच्या शेषाच्या दृष्टींत ही आश्च-
र्याची गोष्ट असली, तर माझ्या दृष्टींतहि आ-
श्चर्य होईल काय? असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो. ७ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं
पाहा, मी आपल्या लोकांस पूर्वेतल्या देशांतून
आणि पश्चिमेतल्या देशांतून तारीन. ८ आणि
मी त्यांस आणीन, तेव्हां ते यरूशालेमेमध्यें
वसतील, आणि खरेपणानें व न्यायीपणानें ते
माझे लोक असत जातील, आणि मी त्यांचा देव
असत जाईन.

९ सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं ज्या दि-
वशीं परमेश्वराच्या मंदिराचा पाया घातला,
देऊळ बांधावें, ह्मणून त्या दिवशीं जे भविष्यवा-
दी होते, त्यांच्या मुखाकडून जीं वचनें सांगितलीं,
हीं जे तुह्मी या दिवसांत ऐकतां, त्या तुमचे
हात बळकट असोत. १० कां कीं या दिवसां-
पूर्वी मनुष्याचें वेतन नसे, आणि पशूंचेंहि कांहीं
वेतन नसे; आणि बाहेर जाण्याला अथवा आंत
येण्याला पीडेमुळें कांहीं चैन नसे; कां कीं म्या
मनुष्यें एकमेकांवर सुटूं दिल्हीं. ११ परंतु जसा
पूर्व दिवसांत तसा आतां मी या लोकांच्या शेषा-
कडे असणार नाहीं, असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो. १२ कारण कीं बीज सुफल होईल; द्राक्षी
आपलें फळ देईल, आणि भूमि आपला उपज
देईल, आणि आकाशें आपलें दहिंवर पडूं देतील;
आणि मी या लोकांच्या शेषाला हे सर्व पदार्थ
भोगूं देईन. १३ तर यहूदाच्या वंशानो, आणि
इस्राएलाच्या वंशानो, जसे तुह्मी राष्ट्रांमध्यें शाप
असा, तसे मी तुह्माला तारीन, तेव्हां तुह्मी आ-
शीर्वाद व्हाल; भिऊं नका, तुमचे हात बळकट
असोत. १४ कारण कीं सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कीं तुमच्या पूर्वजानीं जेव्हां मला कोपित
केलें, तेव्हां जसें म्या तुमचें संकट करायाला सं-
कल्पिलें, आणि अनुताप केला नाहीं, १५ तसें
म्या या दिवसांत फिरून यरूशालेमेचें आणि
यहूदाच्या वंशाचें हित करायाला संकल्पिलें आहे;
तुह्मी भिऊं नका; असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो.

१६ ज्या गोष्टी तुह्मी कराव्या, त्या ह्याच आ-
हेत; तुह्मी एकमेकांसीं खरें बोला; तुह्मी आपल्या
दारांत खरेपणाचा आणि शांतीचा न्याय करा.
१७ आणि तुह्मी आपल्या मनांत एकमेकांविषयीं
वाईट कल्पूं नका; आणि खोटी शपथ तुह्माला
आवडूं नये; कां कीं ज्या गोष्टींचा द्वेष मी क-
रितों, त्यांतल्या त्या सर्व आहेत, असें परमे-
श्वर ह्मणतो.

१८ आणि सैन्यांच्या परमेश्वराचें वचन
मजजवळ आलें कीं, १९ सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कीं चौथ्या महिन्याचा उपास, आणि पां-
चव्याचा उपास, आणि सातव्याचा उपास, आणि
दाहाव्याचा उपास, हे यहूदाच्या वंशाला आनंद
व हर्ष आणि सुखाचे सण असे होतील; ह्मणून
तुह्मी खरेपणावर आणि शांतीवर आवड ठेवा.
२० सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं पुढें असें
होईल, कीं बहुत लोक आणि बहुत नगरांचे रा-
हणारे येतील. २१ आणि एका नगराचे राह-
णारे दुसर्‍या नगराकडे जाऊन ह्मणतील, आपण
परमेश्वरापासीं विनंती करायाला, आणि सै-
न्यांच्या परमेश्वरास शोधायाला निश्चयें जाऊं;

मीहि जाईन. २२ होय बहुत लोक आणि
समर्थ राष्ट्रें यरूशालेमेंत सैन्यांच्या परमेश्व-
रास शोधायास, आणि परमेश्वरापाशीं विनंती
करायाला येतील. २३ सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कीं त्या दिवसांत असें होईल, कीं सर्व
भाषांच्या राष्ट्रांचे दाहा मनुष्य यहूदी मनुष्याच्या
पदरास धरितीलच धरितील, आणि ह्मणतील,
आह्मी तुह्मासंगतीं जाऊं; कारण कीं आह्मी
ऐकिलें आहे, कीं देव तुह्मापाशीं आहे.

## अध्याय ९.

परमेश्वराच्या वचनाचा प्रवाद हद्राख देशांत
होईल, आणि दम्मेशेक त्याचा विसावा हो-
ईल; जेव्हां मनुष्यांचे डोळे आणि इस्राएलाचे
सर्व वंश परमेश्वराकडे वळतील तेव्हां. २
आणि हमाथ तिजशीं सीमासंधि धरील; सोर
व सीदोनहि जरीं ही फार बुद्धिमान असली
तरी. ३ आणि सोरेने आपणासाठीं कोट बांधि-
ला, आणि रुपें धुळीसारिखें, व उत्कृष्ट सोनें
आळ्यांतल्या चिखलासारिखें सांठविलें. ४
पाहा, परमेश्वर तिला घालवून देईल, आणि
तो तिचें बल समुद्रांत हाणील; आणि ती अ-
ग्नीकडून खाऊन जाईल. ५ अश्कलोन हें पाहून
भिईल; आणि गज्जा हें पाहून अत्यंत खेदित
होईल, आणि एक्रोन खेदित होईल; कारण कीं
तिची आशा टळली आहे; आणि गज्जांतून रा-
जा नाहींसा होईल, आणि अश्कलोन वसलेली
राहणार नाहीं. ६ आणि अश्दोदेंत कुंडी वसेल,
आणि मी पलिष्ट्यांचा अभिमान नाहींसा करीन.
७ आणि मी त्याच्या मुखांतून त्याचें रक्त, आणि
त्याच्या दांतांमधून त्याचे कुत्सित पदार्थ काढून
टाकीन; आणि जो उरलेला तोच आमच्या दे-
वाचा होईल, आणि तो यहूदांत नायक असा
होईल, आणि एक्रोन यबूसी असा होईल. ८
आणि मी आपलें मंदिर सैन्यापासून, जाणाऱ्या-
पासून, आणि परत येणाऱ्यापासून रक्षीन; आ-
णि उपद्रवी त्यांवरून पुन्हा जाणार नाहीं; कां
कीं आतां म्या आपल्या डोळ्यांनी पाहिलें आहे.
९ अगे सीयोनेच्या कन्ये, अत्यंत उल्हास
कर; अगे यरूशालेमेच्या कन्ये, गजर कर;
पाहा, तुझा राजा तुजकडे येतो आहे; तो न्या-
यी आणि तारण करणारा आहे; तो नम्र आणि
गाढवावर, गाढवीच्या शिंगरावरहि बसला आहे.
१० आणि मी एफ्राइमापासून रथ, आणि यरू-
शालेमेपासून घोडा नाहींसा करीन, आणि लढा-
ईचें धनुष्य नाहींसें होईल; आणि तो राष्ट्रांला
कल्याण बोलेल; आणि त्याचें प्रभुत्व समुद्रापा-
सून समुद्रापर्यंत, आणि नदीपासून पृथ्वीच्या शेव-
टापर्यंत होईल. ११ आणि तुजविषयीं सांगतों,
ज्या खांचेंत कांहीं पाणी नाहीं, तींतून म्या तुझ्या
कराराच्या रक्ताकडून तुझे बंदिवान सोडविले
आहेत.

१२ आशेच्या बंदिवानानो, दुर्गाकडे फिरा;
मी आजच सांगतों, कीं मी तुला दुप्पट परत
देईन. १३ म्या आपणासाठीं यहूदा वांकविला,
आणि एफ्राइम धनुष्याप्रमाणें भरिला, आणि म्या
तुझे पुत्र अगे सीयोने, तुझ्या पुत्रांवर अगे यावाने,
उत्तेजित केले, आणि तुला शूराच्या तरवारीसा-
रिखें केलें, ह्मणजे असें करीन. १४ आणि
परमेश्वर त्यांवरतीं दृष्टीस पडेल, आणि त्याचा
तीर विजेप्रमाणें निसटून जाईल; आणि प्रभु
परमेश्वर करणा वाजवील, आणि दक्षिणेच्या वा-
वटुळींसुद्धां चालेल. १५ सैन्यांचा परमेश्वर
त्यांचें निवारण करील, आणि ते खाऊन टाकितील,
आणि गोफणीच्या धोंड्यांस तुडवितील, आणि ते
पितील, आणि जसे दारूनें तसे गोंगाट करि-
तील, आणि ते पात्रांप्रमाणें व वेदीच्या कोंपऱ्यां-
प्रमाणें भरून जातील. १६ आणि त्या समयीं
परमेश्वर त्यांचा देव त्यांस आपल्या लोकांच्या
कळपासारिखें तारील; कां कीं ते त्याच्या भूमी-
वर उंचाविलेले मुगुटमणि असे होतील. १७
तर त्याचें चांगलेंपण केवढें! आणि त्याचें सुंदर-
पण केवढें आहे? धान्य तरुणांस, आणि नवा
द्राक्षारस तरुणींस तुकतुकीत करील.

## अध्याय १०.

तुह्मी उत्तर पावसाच्या समयीं परमेश्वरापा-
सीं, जो परमेश्वर विजा करितो त्यापाशीं
पाऊस मागा, ह्मणजे तो त्यांस पावसाच्या पा-
हळ्या देईल, प्रत्येकाला माळांत गवत देईल.

२ कां कीं मूर्त्ति व्यर्थपण बोलल्या आहेत, आणि
जोश्यानीं खोटा दृष्टांत पाहिला आहे, आणि
खोटे स्वप्न सांगितले आहेत; ते व्यर्थ सांत्वन
करितात; याकरितां ते मेंढरांप्रमाणें गेले, कोणी
पाळक नव्हता, ह्मणून ते व्याकुल झाले. ३ पाल-
कांवर माझा क्रोध संतप्त झाला, आणि म्यां बो-
कडांस शासिलें; कां कीं परमेश्वराने आपल्या
कळपाची, यहूदाच्या वंशाची पाहणी केली आहे,
त्याने त्यांस लढाईंत आपला सुंदर घोडा असें
केलें आहे. ४ त्यापासून कोंपरा, त्यापासून कील,
त्यापासून लढाईचें धनुष्य, त्यापासून प्रत्येक पी-
डक एकदां निघाला.

५ आणि जे शूर लढाईच्या समयीं शत्रूंस
आळ्यांतल्या चिखलांत तुडवितात, त्यांसारिखे
ते होतील; आणि परमेश्वर त्यांसंगतीं आहे,
ह्मणून ते लढतील, आणि स्वार लज्जित होतील.
६ आणि मी यहूदाच्या वंशाला बलिष्ट करीन,
आणि योसेफाच्या वंशाला तारीन, आणि त्यांस
परत आणून वसूं देईन; कां कीं त्यांजवर दया
करीन; आणि जाणों, म्यां त्यांस टाकलें नाहीं,
असे ते होतील; कारण कीं मी परमेश्वर त्यां-
चा देव आहें, आणि मी त्यांस उत्तर देईन. ७
आणि एफ्राइमाचे वंश शूरासारिखे होतील, आ-
णि जसें द्राक्षारसाने तसें त्यांचें हृदय हर्षेल;
आणि त्यांचीं लेंकरें हें पाहून हर्षतील; त्यांचें
हृदय परमेश्वराविषयीं उल्हासेल. ८ मी
त्यांस सीत्कार करीत बोलावीन, आणि त्यांस
एकवटीन; कां कीं म्यां खंडणी देऊन त्यांस परत
घेतलें आहे; आणि ते जसे वाढत असत, तसे
वाढतील. ९ आणि मी त्यांस लोकांमध्यें पे-
रीन; आणि दूर देशांत ते मला स्मरतील; आ-
णि ते आपल्या लेंकरांसुद्धां वांचतील, आणि परत
येतील. १० आणि मी त्यांस मिसर देशांतून
परत आणीन, आणि अश्शूरांतून त्यांस एकवटीन;
आणि गिलाद व लबानोन यांच्या देशांत त्यांस
आणीन; आणि त्यांस पुरती जागा मिळणार
नाहीं. ११ आणि तो संकटाने समुद्राच्या पार
जाईल, आणि समुद्रांतल्या लाटा हाणील, आणि
नदींतले सर्व डोह आटतील; आणि अश्शूराचा
गर्व उतरेल, आणि मिसराचा राजदंड टळून
जाईल. १२ आणि त्यांस परमेश्वरासीं बल-
वान करीन; आणि ते त्याच्या नामाने वर्त्ततील,
असें परमेश्वर ह्मणतो.

## अध्याय ११.

हे लबानोना, तूं आपलीं दारें उघड, ह्मणजे अ-
ग्नि तुझ्या एरेज झाडांस खाईल. २ हे
देवदारू, तूं केंकत ओरड; कां कीं एरेज झाड
पडलें आहे; आणि श्रेष्ठ जन नाश पावले आ-
हेत; बाशानाच्या अल्लोन झाडानो, तुह्मी केंकत
ओरडा; कारण कीं कोट्टाचें वन उतरलें आहे.
३ पालकांच्या केंकण्याचा श[illegible] आहे; कारण
कीं त्यांचें वैभव नाश पावलें आहे; तरुण सिं-
हांच्या गर्जनेचा शब्द आहे; कां कीं यार्देनेची
शोभा नाश पावली आहे. ४ परमेश्वर जो
माझा देव तो ह्मणतो, कीं तूं वधायाच्या मेंढरांस
पाळ; ५ ज्यां त्यांचे धनी त्यांस वधितात,
आणि आपणांस दोषी मानीत नाहींत: *आणि*
त्यांचे विकणारे प्रत्येक ह्मणतात, मी धनवान
आहें, ह्मणून परमेश्वर सुवंदित असो; आणि
त्यांचे पालक त्यांवर दया करीत नाहींत.

६ तर परमेश्वर ह्मणतो, कीं मी देशांतल्या
राहणाऱ्यांवर अणखी कळवळा करणार नाहीं:
परंतु पाहा, मी मनुष्यें प्रत्येक आपल्या शेजाऱ्या-
च्या हातीं, आणि आपल्या राजाच्या हातीं सां-
पडूं देईन; आणि ते देशाला ठेंचितील, आणि
त्यांस मी त्यांच्या हातांतून सोडविणार नाहीं. ७
आणि मी वधायाच्या कळपाला, तुह्माला, कळ-
पांतल्या दीनानो, चारीन. आणि म्यां दोन काठ्या
आपणाजवळ घेतल्या; म्यां एकीला रम्यता ह्म-
टलें, आणि दुसरीला बंधक ह्मटलें; मग कळ-
पाला चारिता झालों. ८ आणि म्यां एका
महिन्यांत तीन पाळक नाहींसे केले; आणि माझें
मन त्यांसीं तुटलें, आणि त्यांचें मनहि मला कं-
टाळलें. ९ तेव्हां मी ह्मणालों, मी तुह्माला
पाळणार नाहीं; जें मरेल तें मरो; आणि जें
नाहींसें होईल तें नाहींसें होवो; आणि जीं उर-
तील तीं एकमेकांचें मास खावोत.

१० आणि म्यां आपली रम्यता [illegible]टलेली
काठी घेऊन तोडिली, अशासाठीं कीं त्यां[illegible]

लोकांशीं जो करार म्या केला होता, तो मोडावा.
११ तर त्या दिवशीं तो मोडिला: मग कळपां-
तले जे दीन आपलें मन मजकडे लावीत होते,
त्यांनी असें जाणिलें, कीं तें परमेश्वराचें वचन
होतें. १२ आणि म्या त्यांस ह्मटलें, जर तुह्मा-
ला बरें वाटलें, तर माझें मोल मला द्या; नाहीं
तर देऊं नका. मग त्यांनी माझें मोल तीस रुपये
तोलिलें. १३ तेव्हां परमेश्वराने मला ह्मटलें,
तें कुंभकाराकडे टाकून दे; ज्या मोलाने मी त्यां-
कडून गणलेला होतों, तें मोठें योग्य आहे खरें.
मग म्या ते तीस रुपये घेऊन परमेश्वराच्या
घरांत कुंभकाराकडे टाकून दिल्हे. १४ मग म्या
आपली दुसरी बंधक ह्मटलेली काठी तोडिली,
अशासाठीं कीं यहूदा आणि इस्राएल यांमधील
भाऊपण मोडावें.

१५ आणि परमेश्वराने मला ह्मटलें, अण-
खी तूं आपणाजवळ मूर्ख पालकाचीं आउतें घे.
१६ कां कीं पाहा, मी देशांत एक पालक उठवीन,
तो नाश पावणाऱ्यांचा समाचार घेणार नाहीं,
पोराचा शोध करणार नाहीं, आणि मोडलेल्यास
बरें करणार नाहीं, आणि जें स्थिर उभें राहिलें
असेल त्याला तो पोषणार नाहीं; परंतु पुष्टांचें
मांस खाईल, आणि त्यांचे खुर फाडील. १७
जो तुच्छ पालक कळप टाकितो, त्याला हाय
हाय; तरवार त्याच्या बाहूला आणि त्याच्या
उजव्या डोळ्याला लागेल; त्याचा बाहू अगदीं
सुकेल, आणि त्याचा उजवा डोळा अगदीं अधू
होईल.

## अध्याय १२.

इस्राएलाविषयीं परमेश्वराच्या वचनाचा प्र-
साद; ज्या परमेश्वराने आकाशें विस्तारिलीं,
आणि पृथ्वीचा पाया घातला, आणि मनुष्याचा आ-
त्मा त्याच्या ठायीं निर्माण केला, तो ह्मणतो कीं,
२ पाहा, मी यरूशालेम सर्व भोंवतालच्या लोकां-
साठीं कांपण्याचें पात्र करीन, आणि तें यहूदाला
आणि वेढ्याच्या समयीं यरूशालेमेलाहि प्राप्त
होईल.

३ आणि त्या समयीं असें होईल, कीं मी यरू-
शालेम सर्व लोकांसाठीं जड दगड करीन; जे
त्याला वाहतील, ते सर्व निश्चयें चूर्ण होतील,
जरी तिजविरुद्ध पृथ्वींतलीं सर्व राष्ट्रें एकत्र मि-
ळालीं तरी; ४ परमेश्वर ह्मणतो, त्या सम-
यीं मी प्रत्येक घोडा घाबरा, आणि त्याजवर
बसणारा वेडा करीन; आणि मी यहूदाच्या वं-
शावर आपले डोळे उघडीन, आणि लोकांचा
प्रत्येक घोडा अंधळा करीन. ५ आणि यहूदाचे
अधिकारी आपल्या मनांत ह्मणतील, यरूशाले-
मेंतले राहणारे सैन्यांचा परमेश्वर जो त्यांचा
देव त्याकडून माझें सामर्थ्य होतील.

६ त्या समयीं मी यहूदाचे अधिकारी फाट्यां-
मधील निखाऱ्यांसारिखे, आणि पेंढींमधील अग्नि-
दीपासारिखे करीन; मग ते उजव्याकडे आणि
डाव्याकडे सभोंवार सर्व लोकांस खातील; आ-
णि यरूशालेम आपल्या ठिकाणीं, यरूशालेमें-
तच पुन्हा वसेल. ७ आणि परमेश्वर पहि-
ल्याने यहूदाचे डेरे तारील, अशासाठीं कीं दा-
वीदाच्या वंशाचें माहात्म्य आणि यरूशालेमें-
तल्या राहणाऱ्यांचें माहात्म्य यहूदावर मोठें होऊं
नये. ८ त्या समयीं परमेश्वर यरूशालेमेंतल्या
राहणाऱ्यांचें निवारण करील; आणि त्या समयीं
त्यांमध्यें जो दुर्बळ तो दावीदासारिखा होईल;
आणि दावीदाचा वंश देवासारिखा, परमेश्व-
राच्या दूतासारिखाच त्यांसमोर होईल.

९ आणि त्या समयीं असें होईल, कीं जीं
सर्व राष्ट्रें यरूशालेमेविरुद्ध येतील, त्यांस ना-
हींसें करायाला शोधीन. १० आणि दावीदा-
च्या वंशावर व यरूशालेमेंतल्या राहणाऱ्यांवर
प्रार्थनेचा व विनंतीचा आत्मा घालीन; आणि
ज्या मला त्यांनी भोंसकिलें, त्या मजकडे ते पा-
हतील; आणि जसा कोणी आपल्या एकुलत्या
एक पुत्रामुळें आक्रंदन करितो, तसे ते त्यामुळें
आक्रंदन करितील; आणि जसा कोणी आपल्या
वडील पुत्रामुळें अत्यंत खिन्न होतो, तसे ते त्या-
मुळें अत्यंत खिन्न होतील. ११ जसें मगि-
दोनेच्या खोऱ्यांत हदाद्रिम्मोनेचें आक्रंदन झालें,
तसें त्या समयीं यरूशालेमेंत मोठें आक्रंदन
होईल. १२ आणि प्रत्येक कुल वेगळें असतां
देश आक्रंदन करील; दावीदाच्या वंशाचें कुल
वेगळें, आणि त्यांच्या स्त्रिया वेगळ्या; ना-

थानाच्या वंशाचें कुल वेगळें, आणि त्यांच्या स्त्रि-
या वेगळ्या; १३ लेवीच्या वंशाचें कुल वेगळें,
आणि त्यांच्या स्त्रिया वेगळ्या; **शिमइचें** कुल
वेगळें, आणि त्यांच्या स्त्रिया वेगळ्या; १४
सर्व उरलेलीं कुळें प्रत्येक कुल वेगळें, आणि
त्यांच्या स्त्रिया वेगळ्या.

## अध्याय १३.

त्या समयीं पाप आणि विटाळ हीं दूर करा-
वीं, ह्मणून दावीदाच्या वंशासाठीं आ-
णि **यरूशालेमें**तल्या राहणाऱ्यासाठीं एक झरा
उघडा होईल.
२ आणि सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं
त्या समयीं असें होईल, कीं मी मूर्त्तींचीं नामें
देशांतून नाहींसीं करीन, मग तीं पुढें कोणी स्मर-
णार नाहीं; आणि भविष्यवाद्यांस आणि अशुद्ध
आत्म्याला देशांतून घालवीन. ३ आणि असें
होईल, कीं जेव्हां कोणी पुन्हा भविष्य सांगूं ला-
गेल, तेव्हां त्याच्या ज्या आईबापानीं त्याला
जन्म दिल्हा तीं त्याला ह्मणतील, तूं **परमेश्वरा-
च्या** नामानें खोटें बोलतोस, ह्मणून तूं वांचणार
नाहींस; तर जेव्हां तो भविष्य सांगेल, तेव्हां
त्याच्या ज्या आईबापानीं त्याला जन्म दिल्हा
तीं त्याला भोसकतील. ४ आणि त्या समयीं
असें होईल, कीं भविष्यवादी प्रत्येक भविष्य सां-
गतांना आपल्या दृष्टांताविषयीं लज्जित होतील;
आणि ते लोकांस फसवायासाठीं केसांचा झगा
अंगीं लेणार नाहींत. ५ परंतु प्रत्येक ह्मणेल,
कीं मी भविष्यवादी नाहीं, मी शेतकरी मनुष्य
आहें; कां कीं माझ्या तारुणपणापासून मनुष्यें
मला विकत घेत आलीं आहेत. ६ आणि त्याला
कोणी ह्मणेल, तुझ्या हातांमध्यें ते घाय कशाचे
आहेत? तेव्हां तो उत्तर करील, कीं ज्यानीं मी
आपल्या मित्रांच्या घरांत हाणिला होतों ते.
७ सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो, कीं अगे तर-
वारे, तूं माझ्या पालकावर आणि जो पुरुष मा-
झा सोबती आहे त्यावर जागी होऊन ऊठ; पाल-
काला हाण, ह्मणजे मेंढरें विखरतील; आणि मी
आपला हात धाकल्यांवर फिरवीन. ८ आणि
**परमेश्वर** ह्मणतो, कीं असें होईल, कीं सर्व
देशांत त्यांतले दोन भाग कापून टाकले असे हो-
ऊन मरतील, आणि तिसरा भाग त्यांत उरेल.
९ आणि मी तिसऱ्या भागाला अग्नींत घालीन,
आणि रुपें गाळण्याप्रमाणें त्यांस गाळीन, आणि
सोनें पारखण्याप्रमाणें त्यांस पारखीन; ते माझ्या
नामाला हाक मारितील, आणि मी त्यांस उत्तर
देईन; मी ह्मणेन, कीं हे माझे लोक आहेत,
आणि ते ह्मणतील, कीं **परमेश्वर** माझा देव
आहे.

## अध्याय १४.

पाहा, **परमेश्वराचा** दिवस येतो आहे, आ-
णि तुझी लूट तुजमध्यें वांटितील. २ आ-
णि मी सर्व राष्ट्रांस **यरूशालेमेकडे** लढाई
करायासाठीं एकत्र मिळवीन; आणि नगर घेतील,
मग घरें लुटितील, आणि स्त्रियांस बाटवितील;
आणि नगरांतला अर्ध भाग पाडावपणाच्या प्रवा-
सांत निघून जाईल, आणि लोकांचें शेष नगरांतून
नाहींसें होणार नाहीं. ३ तेव्हां **परमेश्वर**
निघेल, आणि जेव्हां तो लढाईच्या दिवसीं लढला
तेव्हां जसा तसा त्या राष्ट्रांसीं लढेल.
४ आणि जो जाइतांचा पर्वत **यरूशालेमे-**
समोर पूर्वेकडेस आहे, त्यावर त्या दिवसीं त्याचे
पाय उभे राहतील; आणि जाइतांचा पर्वत आ-
पल्या मध्यभागीं पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे विभा-
गेल; मग मोठें खोरें होईल; आणि पर्वताचा
एक अर्द्धभाग उत्तरेकडे आणि त्याचा दुसरा
अर्ध भाग दक्षिणेकडे सरेल. ५ आणि तुह्मी
पर्वतांच्या खोऱ्याकडे पळाल; कां कीं पर्वतांचें
खोरें आजलास पोहंचेल; होय **यहूदाचा** राजा
उज्जीया याच्या दिवसांत जसे तुह्मी भूमिकंपा-
पासून पळालां, तसे पळाल; आणि **परमेश्वर**
माझा **देव** येईल, तुजसंगतीं सर्व पवित्र जन ये-
तील. ६ आणि त्या समयीं असें होईल, कीं
प्रकाश धड उजेड नाहीं व काळोख नाहीं या-
प्रमाणें होईल. ७ आणि दिवस एकच होईल,
तो दिवस नाहीं, रात्री नाहीं, असा **परमेश्वराला**
विदित होईल; आणि असें होईल, कीं संध्या-
काळीं प्रकाश होईल. ८ आणि त्या समयीं असें
होईल, कीं जिवंत पाण्यें **यरूशालेमेंतून** निघतील;

त्यांचा एक अर्धा भाग पूर्वेच्या समुद्राकडे, आणि
त्यांचा दुसरा अर्धा भाग पश्चिमेच्या समुद्राकडे
असे जातील; उन्हाळ्यांत आणि हिवाळ्यांत असें
होईल. ९ आणि **परमेश्वर** सर्व पृथ्वीवर राजा
होईल; त्या समयीं एकच **परमेश्वर** होईल,
आणि त्याचें नाम एकच. १० **यरूशालेमे**च्या
दक्षिणेकडे सर्व देश **गेबा**पासून **रिम्मोने**पर्यंत पा-
लटून पटांगणासारिखा होईल; आणि ती उंचा-
वेल, आणि **बन्यामीना**च्या दारापासून पहिल्या-
दाराच्या स्थानापर्यंत, कोंपऱ्यांच्या दारापर्यंत, आणि
**हनानेला**च्या दुर्गापासून राजाच्या द्राक्षें तुडविण्या-
च्या पात्रांपर्यंत आपल्या स्थलीं वसेल. ११ आणि
मनुष्यें तींत वसतील, आणि विनाश पुन्हा होणार
नाहीं; परंतु **यरूशालेम** निर्भय वसेल.
१२ आणि ज्या सर्व लोकानी **यरूशालेमे**वर
लढाई केली आहे, त्यांस ज्या पीडेनें **परमेश्वर**
हाणील ती हीच होईल, कीं जेव्हां ते आपल्या
पायांवर उभे राहिले आहेत, तेव्हां तो त्यांचें
मास क्षीण करील, आणि त्यांचे डोळे आपल्या
खांचांत क्षीण होऊन जातील, आणि त्यांच्या
जीभा त्यांच्या मुखांत क्षीण होऊन जातील. १३
आणि त्या समयीं असें होईल, कीं **परमेश्वरा**-
कडून मोठा व्याकुलपणा त्यांमध्यें होईल; आणि
ते प्रत्येक आपल्या शेजाऱ्याचा हात धरितील,
आणि त्याचा हात त्याच्या शेजाऱ्याच्या हाता-
वर उठेल. १४ आणि **यहूदा**हि **यरूशालेमे**स
लढेल, आणि भोंवतालच्या सर्व राष्ट्रांचें द्रव्य,
सोनें, आणि रुपें, आणि वस्त्रें यांचा फार ढीग
जमा होईल. १५ आणि घोड्याची, खेंचराची,
उंटाची, आणि गाढवाची, आणि जे सर्व पशु
त्या छावण्यांत असतील, त्यांची पीडा जसी
ही पीडा तसी होईल.
१६ आणि असें होईल, कीं जीं सर्व राष्ट्रें
**यरूशालेमे**विरुद्ध येत असत, त्यांतून जीं सर्व
उरलीं असतील, तीं वर्षोवर्षी **राजा** जो सै-
न्यांचा **परमेश्वर** त्याला भजायाला, आणि
मंडपांचा सण पाळायाला तिकडे चढत जातील.
१७ आणि असें होईल, कीं पृथ्वींतल्या कुळांतलें
जें कोणी **यरूशालेमे**कडे **राजा** जो सैन्यांचा
**परमेश्वर** त्याला भजायाला चढत येणार नाहीं,
त्यांजवर पाऊस पडणार नाहीं. १८ आणि
जर **मिसरा**चा वंश चढत येणार नाहीं, तर त्यां-
वरहि पाऊस पडणार नाहीं; जीं राष्ट्रें मंडपांचा
सण पाळायाला चढत येणार नाहींत, त्यांस ज्या
पीडेनें **परमेश्वर** हाणील, ती त्यांस लागेल.
१९ हा **मिसरा**चा दंड होईल, आणि जीं सर्व
राष्ट्रें मंडपांचा सण पाळायाला चढत येणार
नाहींत, त्यांचाहि दंड होईल.
२० त्या समयीं असें होईल, कीं **परमेश्वरा-
साठीं पवित्र**, असें घोड्यांच्या घंटांवर होईल;
आणि **परमेश्वराच्या** मंदिरांतल्या थाल्या वेदी-
समोरच्या पात्रांसारिख्या होतील. २१ आणि
**यरूशालेमें**तली व **यहूदां**तली प्रत्येक थाली सै-
न्यांच्या **परमेश्वराला** पवित्र होईल; आणि
सर्व यज्ञ करणारे येऊन त्यांतल्या घेतील, आणि
त्यांत पदार्थ घालून शिजवितील; आणि त्या
समयीं सैन्यांच्या **परमेश्वराच्या** मंदिरांत **खनानी**
अणखी असणार नाहीं.

MALACHI.

# मलाखी.

## अध्याय १.

इस्राएलाकडे जो **परमेश्वराच्या** वचनाचा प्र-
वाद **मलाखी**कडून झाला तो. २ **परमे-
श्वर** ह्मणतो, म्या तुह्मावर प्रीति केली आहे,
तथापि तुह्मी ह्मणतां, त्वां कशाने आह्मावर प्रीति
केली आहे? **परमेश्वर** ह्मणतो, एसाव **याको-
बा**चा भाऊ नव्हता कीं काय? तथापि म्या **या-
कोबा**वर प्रीति केली. ३ आणि म्या एसावावर
द्वेष केला, आणि म्या त्याचे पर्वत आणि त्याचें
वतन हीं जंगलांतल्या अघोर जीवांसाठीं ओसाड

करून ठेविलीं. ४ आह्मी क्षीण झालों आहों
खरें, परंतु आह्मी परत जाऊं, आणि ओसाड
स्थानें बांधूं, असें जरीं अदोम ह्मणती, तरीं
सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो, कीं त्यानी बांधिलें,
ह्मणजे मी पाडून टाकीन, आणि मनुष्यें त्यांस
दुष्टाईचा प्रांत, ज्या लोकांवर परमेश्वर सर्व-
कालपर्यंत रुष्ट आहे ते, असें ह्मणतील. ५
आणि तुमचे डोळे हें पाहतील, मग तुह्मी ह्म-
णाल, कीं इस्राएलाच्या सीमेवरून परमेश्व-
राला थोर असें मानितील.

६ अहो याजकानो, जे तुह्मी माझ्या नामाला
तुच्छ मानितां, त्या तुह्माला सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, पुत्र आपल्या बापाचा, आणि सेवक आ-
पल्या धन्याचा सन्मान करितो, मग जर मीं बाप
आहें, तर माझा सन्मान कोठें आहे? आणि
जर मी धनी आहें, तर माझें भय कोठें आहे?
तथापि तुह्मी ह्मणतां, कीं आह्मी तुझ्या नामाला
कशानें तुच्छ मानिलें आहे? ७ तुह्मी माझ्या
वेदीवर विटाळिलेली भाकर अर्पितां, तथापि
तुह्मी ह्मणतां, कशाने आह्मी तुला विटाळिलें
आहे? अशाने कीं तुह्मी ह्मणतां, कीं परमेश्व-
राचें मेज तुच्छ आहे. ८ आणि जर तुह्मी
आंधळा पशु बलिसाठीं अर्पिला, तर हें वाईट
नाहीं काय? आणि जर तुह्मी पांगळा व रोगी
पशु अर्पिला, तर हें वाईट नाहीं काय? तूं आ-
पल्या अधिकाऱ्याला असा पशु अर्पण कर; मग
तो तुजवर संतुष्ट होईल काय? अथवा तुजवर
अनुग्रह करील काय? असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो. ९ तर आतां देवाने आह्मावर दया
करावी, ह्मणून तुह्मी त्याला विनवा; तुह्माकडून
ही अवस्था झाली आहे; तो तुह्मावर अनुग्रह
करील काय? असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो.
१० आणि तुह्मामध्येंहि कोण दारें फुकट ला-
वील? आणि तुह्मी मोलावांचून माझ्या वेदीवर
अग्नि पेटविणार नाहीं. तुह्माविषयीं माझा कांहीं
संतोष नाहीं, आणि मी तुमच्या हातांपासून अ-
र्पण मान्य करून घेणार नाहीं, असें सैन्यांचा
परमेश्वर ह्मणतो. ११ कां कीं सूर्याच्या
उगवतीपासून त्याच्या मावळतीपर्यंत माझें नाम
राष्ट्रांमध्यें थोर होईल; आणि प्रत्येक स्थानांत
माझ्या नामाला धूप जाळितील, आणि पवित्र
अर्पण करितील; कारण कीं माझें नाम राष्ट्रांमध्यें
थोर होईल, असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो.

१२ परंतु परमेश्वराचें मेज विटाळलेलें
आहे, त्याचें फल त्याचें अन्न तुच्छ आहे, असें
तुह्मी ह्मणत असून तें नाम अपवित्र केलें आहे.
१३ आणि पाहा, केवढ्या कंटाळ्याचें काम!
असें तुह्मी ह्मणत असा; आणि त्याविषयीं
तुह्मी छत्त करीत असा, असें सैन्यांचा परमे-
श्वर ह्मणतो; आणि तुह्मी फाडिलेला आणि
पांगळा आणि रोगी पशु आणीत असा; असें
अर्पण तुह्मी आणीत असा; तर तें तुमच्या हा-
तापासून मी मान्य करून घेईं काय? असें पर-
मेश्वर ह्मणतो. १४ तर जो आपल्या कळपांत
नर असतांना बिघडलेला पदार्थ प्रभूकडे नवस
करून बलि अर्पितो, तो ठकविणारा शापित
असो; कां कीं मी मोठा राजा आहें, आणि
माझें नाम राष्ट्रांमध्यें भयंकर आहे, असें सैन्यां-
चा परमेश्वर ह्मणतो.

## अध्याय २.

आणि आतां अहो याजकानो, तुह्मासाठीं ही
आज्ञा आहे. २ सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो, कीं माझ्या नामाला गौरव द्यावें, ह्मणून
जर तुह्मी ऐकणार नाहीं, आणि जर तुह्मी हें
मनास आणणार नाहीं, तर मी तुह्मावर शाप
पाठवीन, आणि तुमच्या आशीर्वादांस शापीन;
होय म्या त्यांस शापिलें आहेच, तुह्मी हें मनास
आणीत नाहीं ह्मणून. ३ पाहा, मी तुह्मासाठीं
बीज उगवूं देणार नाहीं, आणि तुमच्या मुखांस
गू, तुमच्या बलींचा गू फांसीन; आणि तो तु-
ह्माला त्यासंगतीं घेऊन जाईल. ४ आणि
तुह्मी जाणाल, कीं म्या ही आज्ञा तुह्माकडे पाठ-
विली आहे, अशासाठीं कीं माझा करार लेवी-
पासीं असावा, असें सैन्यांचा परमेश्वर ह्मणतो.
५ माझ्या जीवनाचा व कुशलाचा करार त्यापासीं
होता, आणि म्या तीं त्याला भयासाठीं दिलीं,
आणि तो माझें भय धरी, आणि माझ्या नामा-
मुळें भीत असे. ६ खरेपणाचें नेमशास्त्र त्या-
च्या मुखांत असे, आणि त्याच्या ओंठांत अ-

न्याय सांपडेना; तो कुशलाने व प्रमाणिकपणें
मजकडे वर्त्तें, आणि त्यानें बहुत लोक अन्याया-
पासून फिरविले. ७ तर याजकाच्या ओंठानी
ज्ञान राखावें, आणि त्याच्या मुखाजवळून लोकानी
नेमशास्त्र शोधावें; कां कीं तो सैन्यांच्या परमे-
श्वराचा दूत आहे. ८ परंतु तुह्मी मार्गापासून
वळून गेलां आहां; बहुत लोक नेमशास्त्राविषयीं
अडखळत असें तुह्मी केलें आहे; तुह्मी लेवीचा
करार बिघडिला आहे, असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणता. ९ तर जितक्याने तुह्मी मार्ग पाळिले
नाहींत, आणि नेमशास्त्रांत पक्षपात धरिला आहे,
तितक्याने म्या तुह्माला सर्व लोकांजवळ तुच्छ
व नीच केलें आहे. १० आह्मा सर्वांस एकच
बाप नाहीं काय? एकच देवाने आह्माला उत्पन्न
केलें नाहीं काय? आह्मी आपल्या पूर्वजांचा क-
रार अप्रतिष्ठित करायाला एकमेकासीं कां कपटाने
वर्त्ततों?

११ यहूदा कपटाने वर्त्तली आहे, आणि इ-
स्राएलांत व यरूशालेमेंत अघोरकर्म करीत जा-
तात; कां कीं परमेश्वराने आपल्या ज्या पवित्र
स्थानावर प्रीति केली, तें यहूदाने अप्रतिष्ठित
केलें आहे; आणि अन्य देवाच्या कन्येसीं लग्न
केलें आहे. १२ जागणारा असो, अथवा उत्त-
रदेणारा असो, जो मनुष्य असें करितो, त्याला
आणि जो सैन्यांच्या परमेश्वराला अर्पण क-
रितो, त्यालाहि परमेश्वर याकोबाच्या डेऱ्यां-
तून नाहींसें करील. १३ आणि तुह्मी परमे-
श्वराच्या वेदीला आस्वानी, रडण्याने, आणि
कण्हण्याने झांकीत असतांना पुन्हा असें केलें आहे,
ह्मणून तो अर्पणाला मानीत नाहीं, आणि तें तु-
मच्या हातापासून संतोषाने घेत नाहीं.

१४ तथापि तुह्मी ह्मणतां, कशामुळें? अशा-
मुळें कीं तुझी तरुणपणाची जी बायको तुझी सो-
बतीण आणि तुझ्या कराराची बायको असून
तिसीं तूं विश्वासघाताने वर्त्तला आहेस, तिच्या
आणि तुझ्यामध्यें परमेश्वर साक्षी आहे. १५
तर त्याने एक नेमिला नाहीं काय? आणि त्याजवळ
आत्म्याचें शेष आहे. मग कशासाठीं तो एक? अ-
शासाठीं कीं त्याने देवाचें बीज शोधावें. तर तुम्ही
आपल्या आत्म्याला जपा, आणि कोणी आपल्या
तरुणपणाच्या बायकोसीं विश्वासघाताने वर्त्तूं नये.
१६ तर परमेश्वर इस्राएलाचा देव ह्मणतो,
कीं त्याग करणें मी द्वेषितों; आणि सैन्यांचा
परमेश्वर ह्मणतो, कीं कोणी एक आपलें वस्त्र
बळात्काराने मढितो; तर तुह्मी विश्वासघात करूं
नये, ह्मणून आपल्या आत्म्याला जपा.

१७ तुह्मी आपल्या वचनानी परमेश्वर कं-
टाळे, असें केलें आहे. तथापि तुह्मी ह्मणतां, कीं
तो कंटाळे, असें आह्मी कशाने केलें आहे? तुम-
च्या असें ह्मटल्याने, कीं जो कोणी दुष्टाई करितो,
तो परमेश्वराच्या दृष्टींत भला आहे, आणि
त्यांत तो संतोषतो; अथवा न्यायाचा देव कोठें
आहे?

## अध्याय ३.

पाहा, मी आपला दूत पाठवीन, आणि तो
मजपुढें मार्ग सिद्ध करील; आणि ज्या
प्रभूला तुह्मी शोधितां, कराराच्या ज्या दूतावि-
षयीं तुह्मी संतोषतां, तो आपल्या मंदिरांत अक-
स्मात येईल; पाहा, तो येईलच, असें सैन्यांचा
परमेश्वर ह्मणतो. २ तर त्याच्या येण्याच्या
दिवसाला कोणाच्याने सोसवेल? आणि जेव्हां
तो दिसेल, तेव्हां कोण स्थिर उभा राहील?
कां कीं तो गाळणाऱ्याच्या अग्नीसारिखा, आणि
परिटांच्या खारासारिखा आहे. ३ आणि तो
रुप्याचा गाळणारा व स्वच्छकरणारा असा ब-
सेल; आणि तो लेवीच्या संतानांस स्वच्छ करील,
आणि जसें सोन्याला व रुप्याला तसें त्यांस
गाळून पावन करील, मग ते न्यायीपणाने परमे-
श्वराला अर्पण करीत जातील. ४ तेव्हां जसें
पुरातन दिवसांत, आणि जसें पूर्वीच्या वर्षांत
तसें यहूदाचें आणि यरूशालेमेचें अर्पण पर-
मेश्वराला मनोरम होईल ५ आणि मी न्याय
करायाला तुह्माजवळ येईन; आणि चेटक्यां-
विषयीं, आणि जारकर्म्यांविषयीं, आणि खोटीश-
पथ वाहणाऱ्यांविषयीं, आणि जे मोलकऱ्याला
मोलाविषयीं, आणि विधवेला व अनाथाला पि-
डितात आणि विदेश्याचा न्याय विपरीत करितात
आणि माझें भय धरीत नाहींत त्याविषयीं मी
त्वरित साक्षी होईन, असें सैन्यांचा परमेश्वर
ह्मणतो. ६ मी परमेश्वर आहें, माझें मन फिरत

नाहीं; ह्मणून याकोबाच्या संतानानो, तुह्मी नाश
पावलां नाहीं.
७ तुह्मी आपल्या पूर्वजांच्या दिवसांपासून
माझे नियम टाकीत आलां आहां, आणि तुह्मी
ते पाळिले नाहींत. तुह्मी मजकडे फिरा, ह्मणजे
मी तुह्माकडे फिरेन, असें सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो. तथापि तुह्मी ह्मणालां आहां, कीं आपण
कशानें फिरूं?
८ मनुष्य **देवाला** ठकवाल काय? परंतु तुह्मी
मला ठकविलें आहे. तथापि तुह्मी ह्मणतां, कीं
कशाविषयीं आह्मी तुला ठकविलें आहे? दाहावे
भाग आणि अर्पणें यांविषयीं. ९ तुह्मी, अवघ्या
राष्ट्रानेच मला ठकविलें आहे, ह्मणून तुह्मी शा-
पानें शापित झालां आहां. १० सैन्यांचा **परमे-
श्वर** ह्मणतो, कीं माझ्या घरांत खाणें असावें,
ह्मणून तुह्मी अवघे दाहावेभाग कोठारांत आणा,
आणि तुह्मी असें करून मी तुह्मासाठीं आका-
शाच्या खिडक्या उघडून ज्याला पुरती जागा
मिळणार नाहीं, एवढा आशीर्वाद तुह्मासाठीं घा-
लीन कीं नाहीं, असी माझी परीक्षा करा. ११
आणि मी तुह्माकरितां नाशकरणाऱ्याला धमका-
वीन, मग तो तुमच्या भूमीचें फल नाशणार नाहीं,
आणि तुमच्या बागांतलीं द्राक्षफळें गळूं देणार
नाहीं, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो. १२
आणि सर्व राष्ट्रें तुह्माला धन्य ह्मणतील;
कां कीं तुह्मी मनोरम देशाचे व्हाल, असें सैन्यां-
चा **परमेश्वर** ह्मणतो.
१३ **परमेश्वर** ह्मणतो, कीं मजविषयीं तुम-
चीं वचनें धिटाईचीं झालीं आहेत. तथापि तुह्मी
ह्मणतां, कीं आह्मी तुजविषयीं काय बोललों आ-
हों? १४ तुह्मी ह्मणालां आहां, कीं **देवाची**
सेवा करणें व्यर्थ आहे; आणि आह्मी त्याचें
रक्षणकर्म करून आणि सैन्यांच्या **परमेश्वरास**-
मोर शोकानें वर्त्तून फल काय? १५ तर आतां
आह्मी गर्विष्ठांस सुखी ह्मणतों; होय जे दुष्टाई
करितात, ते वाढतात; आणि जे **देवाची** परीक्षा
करितात, ते सुटतात.
१६ तेव्हां जे **परमेश्वराचें** भय धरीत अ-
सत, ते परस्परें बोलत होते; आणि **परमेश्व-
रानें** कान देऊन ऐकिलें; मग जे **परमेश्वराचें**
भय धरीत असत, आणि त्याच्या नामाचा स-
न्मान करीत असत, त्यांकरितां त्यासमोर स्मरणाचें
पुस्तक लिहिलें. १७ आणि सैन्यांचा **परमेश्वर**
ह्मणतो, कीं ज्या दिवसीं मी आपलें खासगीचें द्रव्य
सिद्ध करीन, त्या दिवसीं ते माझे होतील; आणि
जसा कोणी आपली सेवा करणारा जो आपला
पुत्र त्यावर दया करीत असतो, तसा मी त्यांवर
दया करीन. १८ आणि तुह्मी फिराल, आणि
न्यायी आणि दुष्ट यांचा भेद, जो **देवाची** सेवा
करितो आणि जो त्याची सेवा करीत नाहीं त्यां-
चाहि भेद पाहाल.

## अध्याय ४.

कां कीं पाहा, जो दिवस भट्टीप्रमाणें जळेल,
तो येणार आहे; आणि सर्व गर्विष्ठ व
सर्व दुष्कर्मी भूंस होतील; आणि जो दिवस ये-
णार आहे, तो त्यांस असें जाळील, कीं त्यांसा-
ठीं मूळ अथवा खांदी सोडून ठेविणार नाहीं, असें
सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो.
२ परंतु जे तुह्मी माझ्या नामाचें भय धरितां,
त्या तुह्मासाठीं न्यायीपणाचा सूर्य उगवेल, आणि
त्याच्या पंखांत निरोगी करण्याचा उपाय होईल;
मग तुह्मी बाहेर जाऊन गोठणींतल्या वांसरांप्र-
माणें उल्हास कराल. ३ आणि तुह्मी दुष्टांस
तुडवून टाकाल; कां कीं ज्या दिवसीं मी असें
करीन, त्या दिवसीं ते तुमच्या तळपायांखालीं
राख होतील, असें सैन्यांचा **परमेश्वर** ह्मणतो.
४ मोशे जो माझा सेवक त्याला होरेबांत सर्व
इस्राएलासाठीं जें नेमशास्त्र म्या आज्ञापिलें, त्या-
ला, नियमांस, आणि न्यायांस तुह्मी स्मरा.
५ पाहा, **परमेश्वराचा** मोठा आणि भयंकर
दिवस येईल, त्यापूर्वी मी तुह्माकडे एलीया भ-
विष्यवादी पाठवीन. ६ आणि तो बापांचें हृदय
लेंकरांकडे, आणि लेंकरांचें हृदय त्यांच्या बापां-
कडे फिरवील, नाहीं तर कदाचित मी येईन,
आणि पृथ्वीला शापानें हाणीन.



समाप्त.

# आमचा प्रभु आणि तारणारा येशू ख्रीस्त

याविषयीं हा

# नवा करार

हेलेणी मूलभाषेंतून उतरून घेतला

पवित्रशास्त्रप्रसारक मंडळीच्या मुंबईंतल्या सहायकारक मंडळीसाठीं

अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिला.

१८५५.

# THE NEW TESTAMENT

IN THE

**MARÁṬHÍ LANGUAGE.**

BOMBAY:

PRINTED FOR THE BOMBAY AUXILIARY BIBLE SOCIETY

AT THE AMERICAN MISSION PRESS.

1855.

# मात्थीने केलेलें शुभवर्त्तमान.

अध्याय १.

आब्राहामाचा पुत्र दावीद, याचा पुत्र येशू
ख्रीस्त, याची वंशावळी.
२ आब्राहामाने इझाकाला जन्मविलें, आणि
इझाकाने याकोबाला जन्मविलें, आणि याकोबाने
यहूदा व त्याचे भाऊ यांस जन्मविलें; ३ आणि
यहूद्याने फारेस व जारा यांस थामारेपासून जन्म-
विलें, आणि फारेसाने हेस्रोनाला जन्मविलें, आणि
हेस्रोनाने अरामाला जन्मविलें; ४ आणि अरा-
माने अमीनादाबाला जन्मविलें, आणि अमीनादाबाने
नहशोनाला जन्मविलें, आणि नहशोनाने साल्मो-
नाला जन्मविलें; ५ आणि साल्मोनाने बवाजाला
राहाबेपासून जन्मविलें, आणि बवाजाने ओबेदाला
रूथेपासून जन्मविलें, आणि ओबेदाने इशायाला
जन्मविलें; ६ आणि इशायाने दावीद राजा याला
जन्मविलें, आणि दावीद राजा याने जी पूर्वी उरी-
याची बायको होती, तिजपासून शलमोनाला जन्म-
विलें; ७ आणि शलमोनाने रहाबामाला जन्म-
विलें, आणि रहाबामाने अबीयाला जन्मविलें, आणि
अबीयाने आसायाला जन्मविलें; ८ आणि आसा-
याने यहोशाफाटाला जन्मविलें, आणि यहोशाफाटाने
यहोरामाला जन्मविलें, आणि यहोरामाने उजीयाला
जन्मविलें; ९ आणि उजीयाने योथामाला जन्म-
विलें, आणि योथामाने आहाजाला जन्मविलें, आणि
आहाजाने हिज्कीयाला जन्मविलें; १० आणि
हिज्कीयाने मनाशे याला जन्मविलें, आणि मनाशे
याने अमोनाला जन्मविलें, आणि अमोनाने योशि-
याला जन्मविलें; ११ आणि योशियाने यखन्या
व त्याचे भाऊ यांस बाबेलच्या प्रवासाच्या वेळेस
जन्मविलें; १२ आणि बाबेलचा प्रवास असतां
यखन्याने शालतियेलाला जन्मविलें, आणि शाल-
तियेलाने जरूबाबेलाला जन्मविलें; १३ आणि
जरूबाबेलाने अबीहूदाला जन्मविलें; आणि अबी-
हूदाने एल्याकीमाला जन्मविलें, आणि एल्याकीमाने
आजोराला जन्मविलें; १४ आणि आजोराने
सादोकाला जन्मविलें, आणि सादोकाने आखीमाला
जन्मविलें, आणि आखीमाने अलीहूदाला जन्म-
विलें; १५ आणि अलीहूदाने अलाजाराला जन्म-
विलें, आणि अलाजाराने मात्थानाला जन्मविलें,
आणि मात्थानाने याकोबाला जन्मविलें; १६
आणि याकोबाने योसेफ जो मारयेचा नवरा त्याला
जन्मविलें, तिजपासून ख्रीस्त ह्मटलेला येशू तो
जन्मला. १७ याप्रमाणें आब्राहामापासून दावी-
दापर्यंत सर्व पिढ्या चवदा, आणि दावीदापासून
बाबेलच्या प्रवासाच्या वेळेपर्यंत चवदा पिढ्या, आणि
बाबेलच्या प्रवासाच्या वेळेपासून ख्रीस्तापर्यंत चवदा
पिढ्या, अश्या आहेत.
१८ आणि येशू ख्रीस्ताचा जन्म या प्रकारें
झाला; त्याची आई मारया योसेफाला दिल्हेली
असतां त्यांची संगति झाल्यापूर्वी ती पवित्र आ-
त्म्याकडून गरोदर झालेली असी दिसण्यांत आली.
१९ तिचा नवरा योसेफ तर नीतिमान होता
आणि तिचा उघड अपमान करावयास इच्छीत
नव्हता ह्मणून तिला गुप्तरूपें टाकावें असें त्याने
मनांत आणिलें. २० परंतु तो त्या गोष्टीविषयीं
विचार करीत असतां पाहा, प्रभूचा दूत त्याला
स्वप्नांत दिसून ह्मणाला, "हे योसेफा, दावी-
दाच्या पुत्रा, तूं आपली बायको मारया इला घ्या-
वयास भिऊं नको, कां कीं तिजमध्यें जो गर्भ आहे
तो पवित्र आत्म्याकडून झाला आहे. २१ आणि
ती पुत्र प्रसवेल, आणि त्वां त्याचें नाम येशू ठेवावें,
कारण कीं तो आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून
तारील." २२ आणि हें अवघें यासाठीं झालें
कीं, प्रभूने भविष्यवाद्याकडून जें सांगितलें होतें तें
पूर्ण व्हावें, तें असें कीं, २३ "पाहा, कुंवार गरो-
दर होईल आणि पुत्र प्रसवेल, आणि त्याला
इम्मानुवेल ह्मणतील; याचा अर्थ, आमच्या
संगतीं देव, असा आहे." २४ तेव्हां योसेफाने
झोंपेंतून उठून आपल्याला प्रभूच्या दुताने असी

आज्ञा दिल्ही होती, तसें करून आपली बायको घेतली; २५ परंतु ती आपला प्रथम पुत्र प्रसवे तोंपर्यंत त्याने तिला जाणिलें नाहीं; मग त्याचें नाम येशू ठेविलें.

## अध्याय २.

आणि हेरोद राजाच्या दिवसांमध्यें येशू यहूदा देशांतील बेथलहेमांत जन्मल्यानंतर, पाहा, पूर्वेकडून कोणी मागी लोक यरूशालेमांत येऊन बोलले कीं; २ "यहूद्यांचा जो राजा जन्मला तो कोठें आहे? कां कीं आह्मी पूर्वप्रदेशांत त्याचा तारा पाहिला आणि त्याला नमन करायास आलों." ३ हें ऐकून हेरोद राजा आणि त्याच्या सुद्धां सर्व यरूशालेम घाबरें झालें. ४ मग सर्व मुख्य याजक आणि लोकांचे शास्त्री यांस मिळवून त्याने त्यांच्या जवळ पुसलें कीं, "ख्रीस्ताचा जन्म कोठें व्हावा?" ५ तेव्हां ते त्याला ह्मणाले, "यहूदा देशांतील बेथलहेमांत, कां कीं भविष्यवाद्यानें असें लिहिलें आहे कीं; ६ हे यहूदा देशांतील बेथलहेमा, तूं यहूद्याच्या सर्व सुभ्यांमध्यें लाहान आहेस असें कांहीं नाहीं, कारण कीं जो माझे लोक इस्राएल यांस पाळील, असा अधिकारी तुजमधून निघेल."

७ तेव्हां हेरोदानें त्या मागी लोकांस गुप्तरूपें बोलावून त्यांपासून तारा दिसण्याची वेळ नीट विचारून घेतली. ८ आणि त्यांस बेथलहेमास पाठवितांना ह्मटलें, "तुह्मी जाऊन त्या बाळकाचा चांगला शोध करा, आणि तुह्मास शोध लागल्यावर मला वर्त्तमान सांगा, ह्मणजे मींहि येऊन त्याला नमन करीन." ९ तेव्हां ते राजाचें बोलणें ऐकून निघाले, मग पाहा, जो तारा त्यांनी पूर्वप्रदेशांत पाहिला होता तो त्यांच्या पुढें चालला, आणि तो बाळक होता तेथें जाऊन वरतीं राहिला. १० तेव्हां तो तारा पाहून ते अतिशय आनंद पावले. ११ नंतर त्यांनी घरांत जाऊन बाळकास त्याची आई मारया इच्या जवळ पाहिलें, आणि पायां पडून त्याला नमन केलें; मग आपल्या द्रव्यांच्या थैल्या उघडून सोनें व ऊद व बोळ असीं दानें त्याला अर्पिलीं. १२ तेव्हां हेरोदापासीं फिरून जाऊं नये असें स्वप्नांत सूचना मिळाल्यामुळें ते आपल्या देशास दुसऱ्या वाटेनें गेले.

१३ तेव्हां ते गेल्यावर, पाहा, प्रभूचा दूत योसेफास स्वप्नांत दिसून ह्मणाला, "ऊठ, बाळक आणि त्याची आई यांस घेऊन मिसर देशांत पळून जा, आणि मी तुला सांगें तोंपर्यंत तेथें राहा, कारण कीं बाळकाचा घात करायास हेरोद त्याचा शोध करणार आहे." १४ मग तो उठून बाळक आणि त्याची आई यांस रात्रीं घेऊन मिसर देशांत गेला; १५ आणि हेरोदाच्या मरणापर्यंत तेथें राहिला: तेव्हां "म्यां आपल्या पुत्राला मिसर देशांतून बोलाविलें आहे," असें जें प्रभूनें भविष्यवाद्याकडून सांगितलें होतें तें पूर्ण व्हावें, ह्मणून असें झालें.

१६ तेव्हां त्या मागी लोकांनी मला फसविलें, हें जाणून हेरोद फार रागें भरला, आणि त्याने त्या मागी लोकांपासून जी वेळ नीट विचारून घेतली होती त्या वेळेप्रमाणें, बेथलहेमांत आणि त्याच्या सगळ्या सीमांत जे बाळक दोन वर्षांचे आणि त्याहून धाकटे होते, त्या सर्वांस त्याने माणसें पाठवून जिवें मारिलें. १७ त्या वेळेस जें इर्मया भविष्यवाद्यानें सांगितलें होतें तें पूर्ण झालें; १८ तें असें कीं, "रामांत शोक व रडणें व मोठा आकांत असी वाणी ऐकण्यांत आली; राहेल आपल्या लेंकरांकरितां रडत होती, तीं नाहींत ह्मणून ती शांतवन घेईना."

१९ मग हेरोद मेल्यावर, पाहा, प्रभूचा दूत मिसर देशांत योसेफास स्वप्नांत दिसून ह्मणाला; "२० ऊठ, बाळक आणि त्याची आई यांस घेऊन इस्राएल देशांत जा, कां कीं बाळकाचा जीव घ्यावयास जे पाहत होते ते मेले आहेत." २१ तेव्हां तो उठून बालक आणि त्याची आई यांस घेऊन इस्राएल देशांत आला. २२ परंतु आर्खेलावस आपला बाप हेरोद याच्या ठिकाणीं यहूद्यांत राज्य करीत आहे, हें ऐकून तो तेथें जावयास भ्याला; तथापि स्वप्नांत सूचना मिळाल्यामुळें तो गालीलांतील प्रांतांत गेला. २३ आणि तो नाजारेथ नामें नगरांत जाऊन राहिला; "त्याला नाजोरी ह्मणतील," हें जें भविष्यवाद्यांनी सांगितलें होतें तें पूर्ण व्हावें, ह्मणून असें झालें.

## अध्याय ३.

नंतर त्या दिवसांत बाप्तिस्मा करणारा योहान येऊन, यहूद्यांतील रानांत उपदेश करीत बोलला कीं; २ "पश्चात्ताप करा, कां कीं आकाशाचें राज्य जवळ आलें आहे." ३ कां तर ज्या विषयीं यशाया भविष्यवाद्यानें हें सांगितलें होतें कीं, "रानांत ओरडणाऱ्याची वाणी झाली कीं, प्रभूचा

मार्ग तयार करा, त्याच्या वाटा नीट करा," तो
हाच आहे. ४ आणि या योहान्नाचें वस्त्र उं-
टाच्या लवेचें होतें, आणि त्याच्या कंबरेस कात-
ड्याचा कंबरबंद होता, आणि त्याचें खाणें टोळ व
रानमध होतें. ५ तेव्हां यरूशालेम व सर्व यहू-
दा व यार्देनेच्या चहुंकडील अवघा देश यांतील
लोक निघून त्याच्या जवळ गेले; ६ आणि त्यांनी
आपलीं पापें पदरीं घेऊन यार्देनेमध्यें त्यापासून बा-
प्तिस्मा घेतला.
७ परंतु परोशी व सदोकी यांतील बहुतांस
आपल्या बाप्तिस्म्यासाठीं येतां पाहून, तो त्यांस बो-
लला, "अहो सापांच्या पिल्लांनो, जो क्रोध होणार
त्यापासून पळायास तुह्माला कोणी सुचविलें? ८
तर पश्चात्तापास योग्य जीं फळें तीं द्या; ९ आणि
आब्राहाम आमचा बाप आहे, असें आपल्या मनांत
ह्मणायास योग्य मानूं नका; कां कीं मी तुह्मास
सांगतों, आब्राहामासाठीं या दगडांचीं लेंकरें करा-
वयास देव समर्थ आहे. १० आणि आतांच झा-
डाच्या मुळावर कुऱ्हाड ठेविली आहे, यास्तव जें
जें झाड चांगलें फळ देत नाहीं तें तोडून अ-
ग्नींत टाकितात. ११ पश्चात्तापासाठीं मी तुमचा
बाप्तिस्मा पाण्यानें करितों, परंतु जो माझ्या मागून
येतो तो मजपेक्षां समर्थ आहे, त्याच्या वाहणा वा-
हावयास मी योग्य नाहीं, तो पवित्र आत्म्यानें व
अग्नीनें तुमचा बाप्तिस्मा करील. १२ त्याचें सूप
त्याच्या हातांत आहे, आणि तो आपलें खळें अगदीं
निर्मळ करील, आणि आपले गहूं कोठारांत सांठवील,
आणि भूस न विझणाऱ्या अग्नींत जाळून टाकील."
१३ तेव्हां येशू गालीलाहून यार्देनेस योहान्ना-
जवळ त्यापासून बाप्तिस्मा घेण्याकरितां आला. १४
परंतु योहान्न त्याला मना करून ह्मणाला, "मला
तुजपासून बाप्तिस्मा घेण्याची गरज आहे, आणि तूं म-
जकडे येतोस काय?" १५ मग येशूनें त्याला उत्तर
दिल्हें कीं, "आतां होऊं दे, कां कीं या प्रकारें सर्व
न्यायीपणा पूर्णकरणें हें आह्मास योग्य आहे." तेव्हां
त्यानें त्याचें होऊं दिल्हें. १६ आणि येशू बाप्ति-
स्मा घेतल्यावर पाण्यांतून तेव्हांच वर आला; आ-
णि पाहा, त्याच्या साठीं आकाश उघडलें, आणि
त्यानें देवाच्या आत्म्याला खबुत्रासारिखें उतरतां,
आणि आपल्यावर येतां पाहिलें. १७ आणि पाहा,
आकाशांतून असी वाणी झाली कीं, "हा माझा प्रिय
पुत्र आहे, याविषयीं मी फार संतुष्ट आहें."

## अध्याय ४.

नंतर सैतानाकडून त्याची परीक्षा व्हावी, ह्मणून
येशूला आत्म्यानें रानांत नेलें. २ आणि तो
चाळीस दिवस व चाळीस रात्री उपासी राहिल्या-
वर त्याला भूक लागली. ३ आणि परीक्षक त्या-
जपासीं येऊन बोलला, "तूं देवाचा पुत्र असलास
तर या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्या ह्मणून
सांग" ४ तेव्हां त्यानें उत्तर दिल्हें कीं,
"असें लिहिलें आहे, मनुष्य केवळ भाकरीनें वांचेल
असें नाहीं, तर जें कांहीं वचन देवाच्या तोंडांतून
निघेल तेणेंकरून वांचेल." ५ मग सैतानानें त्या-
ला पवित्र नगरांत नेलें, आणि देवळाच्या कंगाऱ्या-
वर त्याला उभें केलें. ६ आणि त्याला ह्मटलें,
"तूं देवाचा पुत्र असलास तर खालीं उडी टाक,
कां कीं असें लिहिलें आहे कीं, तो तुजविषयीं
आपल्या दुतांस आज्ञा करील, आणि तुझा पाय धों-
ड्यावर कधीं अपटूं नये ह्मणून ते तुला हातानीं
धरतील." ७ येशूनें त्याला ह्मटलें, "अणखी
लिहिलें आहे कीं, प्रभु जो तुझा देव त्याची
प्रचीति पाहूं नको." ८ फिरून सैतानानें त्याला
फार उंच डोंगरावर नेलें, आणि जगांतील
सर्व राज्यें व त्यांचें वैभव हीं त्याला दाखविलीं.
९ मग त्याला ह्मटलें, "जर पायां पडून मला
भजसील, तर हें सर्व तुला देईन." १० तेव्हां
येशू त्याला ह्मणाला, "अरे सैताना, दूर हो,
कां कीं प्रभु तुझा देव त्याचें भजन कर,
आणि त्याचीच सेवा कर, असें लिहिलें आहे." ११
मग सैतान त्याला सोडून गेला; तेव्हां पाहा, दूत
येऊन त्याची सेवा करूं लागले.
१२ नंतर योहान्न पराधीन झाला हें ऐकून येशू
गालीलांत गेला. १३ आणि नाजारेथ सोडून,
जबुलून व नाफताली यांच्या सीमांत समुद्रा-
जवळच्या कपरणाहूमांत जाऊन राहिला. १४
यशाया भविष्यवाद्यानें जें सांगितलें होतें तें
पूर्ण व्हावें ह्मणून; तें असें कीं, १५ "विदे-
श्यांचा गालील देश ह्मणजे यार्देनेच्या पलिकडे
समुद्राकडील जबुलून प्रांत व नाफताली प्रांत;
१६ यांतले जे लोक अंधारांत बसले होते त्यांनी
मोठा उजेड पाहिला, आणि मरणाच्या प्रदेशांत
आणि छायेंत जे बसले होते त्यांवर उजेड उगवला
आहे."

१७ तेव्हांपासून येशू उपदेश करीत बोलूं ला-
गला कीं, “पश्चात्ताप करा, कां कीं आकाशाचें राज्य
जवळ आलें आहे.” १८ नंतर येशू गालीला-
च्या समुद्राजवळ चालत असतां, त्याने दोघे भाऊ,
पेत्रस ह्मटलेला शीमोन आणि त्याचा भाऊ आं-
द्रयास यांस समुद्रांत जाळें टाकितां पाहिलें, कारण
कीं ते मासे धरणारे होते. १९ तेव्हां तो त्यांस
ह्मणाला, “माझ्या मागें या, ह्मणजे मी तुह्मास
माणसें धरणारे करीन.” २० मग ते लागलेच
जाळीं सोडून देऊन त्याच्या मागें चालले. २१
आणि त्याने तेथून पुढें जाऊन दुसरे दोघे भाऊ,
जबदीचा पुत्र याकोब व त्याचा भाऊ योहान्न
यांस यांचा बाप जबदी याच्या बरोबर तारवांत
अपलीं जाळीं नीट करितांना पाहिलें, आणि त्यांस
बोलाविलें: २२ मग ते लागलेच तारूं व आ-
पला बाप यांस सोडून त्याच्या मागें चालले.

२३ तेव्हां येशू संपूर्ण गालीलांत त्यांच्या सभा-
स्थानांमध्यें उपदेश करीत, आणि राज्याचें शुभवर्त्त-
मान गाजवीत, आणि लोकांतले सर्व रोग व सर्व
दुखणीं बरीं करीत फिरला. २४ त्यावर त्याची
कीर्त्ति संपूर्ण सुऱ्या देशांत पसरली; तेव्हां जे
दुखणेकरी होते, आणि ज्यांस नाना रोग व वेदना
लागल्या होत्या, आणि जे भूतग्रस्त व फेंपरेकरी व
वातरोगी होते, त्या सर्वांस त्यांनी त्याजवळ आ-
णिलें, तेव्हां त्याने त्यांस बरें केलें. २५ मग गा-
लील व दकापलीस व यरूशालेम व यहूदा व या-
र्देनेच्या पलिकडचा प्रदेश, यांतून मोठे समुदाय
त्याच्या मागें चालले.

## अध्याय ५.

तेव्हां त्या समुदायांस पाहून तो डोंगरावर गेला,
आणि तो बसल्यावर त्याचे शिष्य त्याच्या जवळ
आले. २ तेव्हां तो आपलें तोंड उघडून त्यांस
उपदेश करूं लागला कीं; ३ “जे आत्म्याने
दीन ते धन्य, कारण कीं आकाशाचें राज्य त्यांचें
आहे. ४ जे शोक करितात ते धन्य; कारण कीं
ते शांतवन पावतील. ५ जे नम्र ते धन्य; कारण
कीं ते पृथ्वीचें वतन भोगतील. ६ ज्यांस न्यायी-
पणाची भूक व तान्ह लागली आहे ते धन्य; कारण
कीं ते तृप्त होतील. ७ जे दयाळू ते धन्य; का-
रण कीं ते दयापात्र होतील; ८ जे अंतःकरणाने
शुद्ध ते धन्य; कारण कीं ते देवाला पाहतील. ९
जे समेट करणारे ते धन्य; कारण कीं त्यांस देवाचे
पुत्र ह्मणतील. १० न्यायीपणामुळें ज्यांच्या पा-
ठीस लागतात ते धन्य; कारण कीं आकाशाचें राज्य
त्यांचें आहे.” ११ जेव्हां तुमची निंदा करितील
आणि पाठीस लागतील आणि माझ्या करितां तुह्मा-
विरुद्ध सर्व वाईट गोष्टी लबाडी करून बोलतील,
तेव्हां तुह्मी धन्य आहां. १२ आनंद व उल्हास
करा, कारण कीं आकाशामध्यें तुह्माकारितां मोठें फळ
आहे, कां तर तुमच्या पूर्वींचे जे भविष्यवादी, त्यां-
च्या पाठीस तसेच लागत असत.

१३ तुह्मी पृथ्वीचें मीठ आहां; परंतु मि-
ठाचा खारटपणा गेला, तर त्याला खारटपणा
कशाने येईल? तें बाहेर टाकून माणसांनी तुडवावें
यावांचून पुढें कोणत्याहि कामास उपयोगी नाहीं.
१४ तुह्मी जगाचा उजेड आहां. डोंगरावर वस-
लेलें नगर लपत नाहीं. १५ आणि दिवा लावून
कोणी मापाखालीं ठेवीत नाहींत, तर समईवर ठेवि-
तात, मग जे घरांत आहेत त्या सर्वांवर त्याचा
प्रकाश पडतो. १६ माणसांपुढें तुमचा उजेड
असा प्रकाशो कीं, त्यांनी तुमचीं चांगलीं कामें पाहावीं,
आणि तुमच्या आकाशांतील बापाचें गौरव करावें.

१७ नेमशास्त्र किंवा भविष्यशास्त्र रद्द करा-
वयास मी आलों असें समजूं नका; मी रद्द कराव-
यास नाहीं, तर पूर्ण करावयास आलों आहें. १८
कारण कीं मी तुह्मास खचीत सांगतों, आकाश व
पृथ्वी टळून जाई तोंवर सर्व पूर्ण झाल्यावांचून नेमशा-
स्त्रांतील एक काना किंवा एक फांटाहि टळून जाणारच
नाहीं. १९ यास्तव त्या आज्ञांमध्यें ज्या सर्वांहून
लाहान त्यांतील एकहि जो कोणी मोडील आणि
माणसांस तसें शिकवील, त्याला आकाशाच्या रा-
ज्यांत सर्वांहून लाहान ह्मणतील; परंतु जो कोणी
पाळील आणि तसें शिकवील, त्याला आकाशाच्या
राज्यांत मोठा ह्मणतील. २० कारण मी तुह्मास
सांगतों कीं, शास्त्री व परोशी यांच्या न्यायीपणापेक्षां
तुमचें अधिक झाल्यावांचून तुह्मी आकाशाच्या रा-
ज्यांत जाणारच नाहीं.

२१ “हत्या करूं नको, आणि जो कोणी हत्या
करील तो न्यायकाळीं दंडास योग्य ठरेल,” असें
प्राचीन लोकांस सांगितलें होतें, हें तुह्मी ऐकिलें
आहे. २२ परंतु मी तुह्मास सांगतों कीं, जो
कोणी आपल्या भावावर उगाच रागें भरेल तो न्या-
यकाळीं दंडास योग्य ठरेल, आणि जो कोणी आ-

पत्या भावाला वेडगळ ह्मणेल, तो न्यायसभेंत
दंडास योग्य ठरेल, आणि जो कोणी अरे मूर्खा,
असें ह्मणेल, तो नरकाग्नीच्या दंडास योग्य ठरेल.
२३ यास्तव त्वां आपलें अर्पण वेदीजवळ आ-
णिलें, आणि माझ्या भावाला मजविरुद्ध कांहीं
आहे, असें तेथें तुला स्मरण झालें; २४ तर
तेथें वेदीपुढें आपलें अर्पण ठेव, आणि निघून
जा, पहिल्यानें आपल्या भावाशीं समेट कर,
मग येऊन आपलें अर्पण वाहा. २५ तूं आपल्या
वादयाच्या बरोबर वाटेंत आहेस, तोंवर त्याशीं
लवकर समेट कर, नाहीं तर कदाचित् तो वादी
तुला न्यायाधीशाच्या हातीं देईल आणि न्याया-
धीश तुला शिपायाच्या हातीं देईल, आणि तूं
बंदीशाळेंत पडसील. २६ मी तुला खचीत सांगतों,
तूं शेवटली दमडी फेडसील, तोंपर्यंत तेथून सुट-
णारच नाहींस.

२७ "व्यभिचार करूं नको," असें प्राचीन लो-
कांस सांगितलें होतें, हें तुह्मी ऐकिलें आहे. २८
परंतु मी तुह्मास सांगतों कीं, जो कोणी बाय-
कोकडे कामदृष्टीनें पाहतो, त्यानें आपल्या अंतः-
करणानें तिजसीं व्यभिचार केलाच आहे. २९
आणि तुझ्या उजव्या डोळ्यानें तुला अडखळविलें
तर तो उपटून आपल्यापासून टाक, कारण कीं
तुझ्या अंगांतून एकाचा नाश व्हावा, आणि तुझें
संपूर्ण शरीर नरकांत पडूं नये हें तुला बरें
आहे. ३० आणि तुझ्या उजव्या हातानें तुला
अडखळविलें तर तो तोडून आपल्यापासून टाक;
कारण कीं तुझ्या अंगांतून एकाचा नाश व्हावा, आणि
तुझें संपूर्ण शरीर नरकांत पडूं नये हें तुला बरें
आहे. ३१ "जो कोणी आपल्या बायकोला सो-
डील त्यानें तिला सूटपत्र द्यावें," हेंहि सांगितलें
होतें. ३२ परंतु मी तुह्मास सांगतों कीं, जो कोणी
आपल्या बायकोला व्यभिचाराच्या कारणावांचून
सोडील, तो तिजकडून व्यभिचार करवील, आणि
जी सोडलेली तिजसीं जो कोणी लग्न करील तो
व्यभिचार करील.

३३ आणखी प्राचीन लोकांस सांगितलें होतें
कीं, "खोटी शपथ वाहूं नको, तर आपल्या श-
पथा प्रभूपाशीं खऱ्या कर," हें तुह्मी ऐकिलें
आहे. ३४ परंतु मी तुह्मास सांगतों कीं,
शपथ वाहूंच नको; आकाशाची नको, का कीं तें
देवाचें आसन आहे; ३५ आणि पृथ्वीचीहि
नको, का कीं ती त्याच्या पायांचें आसन आहे;
आणि यरूशालेमाचीहि नको, का कीं तें मोठ्या
राजाचें नगर आहे. ३६ आणि आपल्या मस्तका-
चीहि शपथ वाहूं नको, का कीं तुझ्यानें एक केंस
पांढरा किंवा काळा करवत नाहीं. ३७ तर तुमचें
बोलणें, होय तर होय, नाहीं तर नाहीं, असें
असावें; पण याहून जें अधिक तें वाइटापासून होतें.

३८ "डोळ्याबद्दल डोळा आणि दांताबद्दल
दांत" असें सांगितलें होतें, हें तुह्मी ऐकिलें आहे.
३९ परंतु मी तुह्मास सांगतों, दुष्टाला अडवूं नको;
तर जो कोणी तुझ्या उजव्या गालावर तुला मारील
त्याकडे दुसराहि फिरीव; ४० आणि जो तुझा
वादी होऊन तुझा अंगरखा घ्यावयास पाहतो,
त्याला तुझें उपवस्त्रहि घेऊं दे; ४१ आणि जो
कोणी तुला बलात्कारानें एक कोस नेईल त्याबरोबर
दुप्पट चाल. ४२ जो तुझ्या जवळ मागतो त्याला
दे, आणि जो तुजपासून उसनें घ्यावयास पाहतो
त्याला पाठमोरा होऊं नको.

४३ "आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर, आणि
आपल्या वैऱ्याचा द्वेष कर," असें सांगितलें होतें,
हें तुह्मी ऐकिलें आहे. ४४ परंतु मी तुह्मास सां-
गतों तुह्मी आपल्या वैऱ्यांवर प्रीति करा, जे
तुह्मास शाप देतात त्यांस तुह्मी आशीर्वाद द्या, जे
तुमचा द्वेष करितात त्यांचें तुह्मी बरें करा, आणि
जे तुह्मास गांजितात आणि तुमच्या पाठीस लागतात
त्यांच्या साठीं प्रार्थना करा; ४५ ह्मणजे तुह्मी
आपल्या आकाशांतील बापाचे पुत्र व्हाल, का कीं
तो वाइटांवर आणि चांगल्यांवरहि आपल्या सूर्याला
उगववितो, आणि न्यायींवर आणि अन्यायीं-
वरहि पाऊस पाडितो. ४६ कारण कीं जे तुह्मा-
वर प्रीति करितात त्यांजवर जर तुह्मी प्रीति कराल
तर तुह्माला फळ काय? जकातदारहि तसेंच करि-
तात कीं नाहीं? ४७ आणि तुह्मी आपल्या भावांस
मात्र सलाम कराल, तर तुह्मी अधिक काय कराल?
जकातदारहि तसेंच करितात कीं नाहीं? ४८ या-
स्तव जसा तुमचा आकाशांतील बाप पूर्ण आहे,
तसे तुह्मी पूर्ण व्हा."

## अध्याय ६.

लोकांनी पाहावें अशा हेतुनें तुह्मी आपला धर्म
त्याच्या समोर करूं नये याविषयीं जपा,
नाहीं तर तुमच्या आकाशांतील बापापासून तुह्मास

फळ मिळणार नाहीं. २ यास्तव तूं धर्म करसील
तेव्हां जसे ढोंगी आपली कीर्त्ति माणसांकडून व्हावी,
ह्मणून सभास्थानांमध्यें व मार्गांमध्यें करणा वाजवितात,
तसें तूं आपल्यापुढें वाजवूं नको; मी तुह्मांस ख-
चीत सांगतों कीं, त्यांस त्यांचें फळ मिळालेंच आहे.
३ तूं तर धर्म करीत असतां, तुझा उजवा हात काय
करितो हें तुझ्या डाव्या हाताला कळूं नये; ४ या-
साठीं कीं तुझा धर्म गुप्तांत व्हावा, मग गुप्तांत पाह-
णारा तुझा बाप तुला लौकिकांत फळ देईल.

५ आणि तूं प्रार्थना करसील तेव्हां ढोंग्यांसा-
रिखा होऊं नको; कारण कीं आपण माणसांस
दिसावें ह्मणून सभास्थानांमध्यें व चव्हाट्यांमध्यें
उभें राहून प्रार्थना करणें हें त्यांस आवडतें. मी
तुह्मांस खचीत सांगतों कीं, त्यांस त्यांचें फळ मि-
ळालेंच आहे. ६ तूं तर प्रार्थना करसील तेव्हां
आपल्या खोलींत जा, आणि आपलें दार लावून तुझा
बाप जो गुप्तांत आहे त्याची प्रार्थना कर, मग गुप्तांत
पाहणारा तुझा बाप तुला लौकिकांत फळ देईल.
७ आणि तुह्मी प्रार्थना करीत असतां, विदेश्यांसारिखी
व्यर्थ बडबड करूं नका; कारण कीं आपल्या फार बो-
लण्यामुळें आपलें मागणें मान्य होईल असें त्यांस
वाटतें. ८ यास्तव त्यांसारिखे तुह्मी होऊं नका; कां
कीं तुह्मी आपल्या बापापाशीं मागितल्या अगोदर जें
तुह्मांस पाहिजे तें त्याला ठाऊक आहे. ९ या-
स्तव तुह्मी याप्रकारें प्रार्थना करा; "हे आमच्या
आकाशांतील बापा, तुझें नाम पवित्र मानोत. १०
तुझें राज्य येवो. जसें आकाशांत तसें पृथ्वी-
वरहि तुझ्या इच्छेप्रमाणें होवो. ११ आमची रो-
जची भाकर आज आह्मांस दे. १२ आणि
जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सोडितों, तसें तूं
आमचीं ऋणें आह्मांस सोड. १३ आणि आ-
ह्मांस परीक्षेंत नेऊं नको, तर आह्मांस वाइटापासून
सोडीव; कारण कीं राज्य आणि सामर्थ्य आणि
गौरव हीं सर्वकाळ तुझीं आहेत; आमेन." १४
कारण कीं जर तुह्मी माणसांच्या अपराधांची क्षमा
कराल, तर तुमचा आकाशांतील बाप तुमचीहि
क्षमा करील; १५ परंतु जर तुह्मी माणसांच्या
अपराधांची क्षमा करणार नाहीं, तर तुमचा बाप
तुमच्याहि अपराधांची क्षमा करणार नाहीं.

१६ आणि तुह्मी उपास करितां तेव्हां ढोंग्या-
सारिखे म्लानमुख होऊं नका; कां कीं आपण
उपास करीत आहों, असें लोकांस दिसावें, ह्मणून
ते आपलें तोंड उतरे असें करितात; मी तुह्मांस
खचीत सांगतों कीं, त्यांस त्यांचें फळ मिळालेंच आहे.
१७ तूं तर उपास करीत असतां आपल्या डो-
क्याला तेल लाव, आणि आपलें तोंड धू; १८
यासाठीं कीं तूं उपास करितोस हें माणसांस
नव्हे, तर तुझा बाप जो गुप्तांत आहे त्याला दिसावें,
मग गुप्तांत पाहणारा तुझा बाप तुला लौकिकांत
फळ देईल.

१९ पृथ्वीवर कसर व कळंक नाश करितात,
आणि चोर फोडून चोरी करितात, तेथें आपल्या
करितां संपत्ति सांठवूं नका; २० तर आकाशा-
मध्यें कसर व कळंक नाश करीत नाहींत, आणि
चोर फोडून चोरी करीत नाहींत, तेथें आप-
ल्या करितां संपत्ति सांठवा. २१ कारण कीं जेथें
तुमची संपत्ति आहे तेथें तुमचें चित्तहि लागेल.
२२ डोळा शरिराचा दिवा आहे; यास्तव तुझा
डोळा निर्दोष असला तर तुझें अवघें शरिर उजेड-
मय होईल. २३ परंतु तुझा डोळा वाईट अ-
सला तर तुझें अवघें शरिर अंधारमय होईल.
असें असतां तुझ्या मध्यें जो उजेड तो अंधार अ-
सला, तर तो अंधार केवढा!

२४ कोणाच्याने दोन धन्यांची चाकरी करवत
नाहीं; कां कीं तो एकाचा द्वेष करील, आणि दुस-
ऱ्यावर प्रीति करील; अथवा एकाचा पक्ष धरील
आणि दुसऱ्याची उपेक्षा करील; तुमच्यानें देवाची
आणि मामोनाची सेवा करवत नाहीं. २५ या-
स्तव मी तुह्मांस सांगतों कीं, आपण काय खावें
आणि काय प्यावें असी आपल्या जिवाविषयीं,
आणि आपण काय पांघरावें असी आपल्या शरिरा-
विषयीं काळजी करूं नका. अन्नापेक्षां जीव आणि
वस्त्रापेक्षा शरीर अधिक आहे कीं नाहीं? २६ आ-
काशांतील पांखरांकडे पाहा, तीं पेरीत नाहींत, कापीत
नाहींत, आणि कोठारांमध्यें सांठवीत नाहींत, तरी
तुमचा आकाशांतील बाप त्यांस खायास देतो; तुह्मी
त्यांपेक्षां मोठे आहां कीं नाहीं? २७ आणि काळजी
करून आपल्या आयुष्याला हातभर वाढवायास
तुह्मांमध्यें कोण समर्थ आहे? २८ आणि वस्त्रा-
विषयीं कां काळजी करितां? रानांतील फुलझाडें
कसीं वाढतात हें लक्षांत आणा; तीं श्रम करीत
नाहींत व कांतीत नाहींत. २९ तरी मी तुह्मांस
सांगतों कीं, शलमोन देखील आपल्या सर्व वैभवांत
त्यांतल्या एकासारिखाहि त्याला नव्हता. ३० तर

अहो अल्पविश्वासी, रानांतील गवत आज आहे
आणि उद्यां भट्टींत पडेल, त्याला जर देव असा
पोशाक देतो, तर तो तुह्मास विशेषेंकरून देणार
नाहीं कीं काय? ३१ यास्तव आपण काय खावें,
अथवा काय प्यावें, अथवा काय पांघरावें, असें
ह्मणून काळजी करूं नका. ३२ कां कीं या अ-
न्यांविषयीं विदेशी काळजी करितात; अणखी
या सर्वांची गरज तुह्मास आहे, हें तुमच्या आका-
शांतील बापाला ठाऊक आहे. ३३ परंतु तुह्मी
पहिल्याने देवाचें राज्य आणि त्याचें न्यायीपण
मिळवायास झटा, ह्मणजे तींहि सर्व तुह्मास
मिळतील. ३४ यास्तव तुह्मी उद्यांची काळजी
करूं नका, कां कीं उद्यांची काळजी उद्यां करील;
त्या दिवसाचें जें दुःख तें त्याला पुरे."

## अध्याय ७.

तुह्मास कोणी दोष लावूं नये ह्मणून तुह्मी दोष
लावूं नका; २ कारण कीं ज्याप्रकारें तुह्मी
दोष लावितां त्याप्रकारें तुह्मास दोष लावितील.
आणि ज्या मापानें तुह्मी मोजून देतां त्यानेंच
तुह्मास मोजून देतील. ३ आणि तूं आपल्या डो-
ळ्यांतलें मुसळ ध्यानांत न आणितां आपल्या भावा-
च्या डोळ्यांतलें कुसळ कां पाहतोस? ४ अथवा
तूं आपल्या भावाला, तुझ्या डोळ्यांतलें कुसळ मला
काढूं दे, असें कसें ह्मणसील? कां तर पाहा,
तुझ्या डोळ्यांत मुसळ आहे. ५ अरे ढोंग्या, तूं
पहिल्याने आपल्या डोळ्यांतलें मुसळ काढ, ह्मणजे
आपल्या भावाच्या डोळ्यांतलें कुसळ काढायास
तुला साफ दिसेल.

६ कुत्र्यांस पवित्र पदार्थ देऊं नये, आणि आप-
लीं मोतीं डुकरांपुढें टाकूं नये; टाकलीं तर तीं त्यांस
पायांखालीं तुडवितील आणि उलटून तुह्मास फा-
डितील.

७ मागा ह्मणजे तुह्मास मिळेल, शोधा ह्मणजे
तुह्मास सांपडेल, ठोका ह्मणजे तुह्मास उघडेल;
८ कारण कीं जो कोणी मागतो तो पावतो, आणि
जो शोधितो त्याला सांपडतें, आणि जो ठोकितो
त्यासाठीं उघडतें. ९ आपल्या पुत्राने आपल्या
जवळ भाकर मागितली तर त्याला धोंडा देईल;
१० आणि मासा मागितला तर त्याला साप देईल,
असा तुह्मामध्यें कोण माणूस आहे? ११ यास्तव
तुह्मी वाईट असतां आपल्या लेंकरांस चांगलीं देण-
गीं द्यावयास समजतां, तर तुमच्या आकाशांतील
बापाजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषें-
करून चांगले पदार्थ देईल. १२ याकरितां माण-
सांनी ज्या ज्या रीतीनें तुह्मांसीं वर्त्तावें ह्मणून तुम-
ची इच्छा आहे त्याच रीतीनें तुह्मीहि त्यांसीं वर्त्ता;
कां कीं नेमशास्त्र आणि भविष्यशास्त्र हेंच आहे.

१३ अरुंद दरवाज्याने आंत जा; कां कीं नाशा-
कडे जाण्याचा दरवाजा रुंद आणि मार्ग पसरट
आहे, आणि त्यांत जाणारे बहुत आहेत. १४
आणि जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद आणि
मार्ग संकोचित आहे, आणि ज्यांस तो सांपडतो ते
थोडके आहेत.

१५ आणि खोट्या उपदेशकांविषयीं जपा, ते
मेंढरांच्या वेषाने तुह्माकडे येतात, परंतु अंतरीं क्रूर
लांडगे आहेत. १६ तुह्मी त्यांच्या फळांवरून
त्यांस ओळखाल. कांट्यांच्या झाडांवरून द्राक्षें,
किंवा रिंगणीच्या झाडांवरून अंजीर काढितात
काय? १७ तर प्रत्येक चांगलें झाड चांगलीं
फळें देतें, आणि वाईट झाड वाईट फळें देतें. १८
चांगल्या झाडाला वाईट फळें येत नाहींत, आणि
वाईट झाडाला चांगलीं फळें येत नाहींत. १९
जें जें झाड चांगलें फळ देत नाहीं, तें तोडून
अग्नींत टाकितात. २० यास्तव त्यांच्या फळांवरून
तुह्मी त्यांस ओळखाल.

२१ जो कोणी मला प्रभू प्रभू ह्मणतो, तो आ-
काशाच्या राज्यांत जाईल असें नाहीं, तर जो मा-
झ्या आकाशांतील बापाच्या इच्छेप्रमाणें करितो तो
जाईल. २२ त्या दिवसीं मला बहुत ह्मणतील,
हे प्रभू प्रभू, आह्मी तुझ्या नामाने भविष्य सांगि-
तलें, आणि तुझ्या नामाने भुतें घालविलीं, आणि
तुझ्या नामाने बहुत चमत्कार केले नाहींत कीं काय?
२३ त्या वेळेस मी त्यांस उघडें सांगेन कीं, म्या
तुह्मास कधींहि ओळखिलें नाहीं; अहो अन्याय
करणाऱ्यानो, मजपासून निघून जा.

२४ यास्तव जो कोणी माझ्या या गोष्टी ऐकून
त्याप्रमाणें करील, त्याला मी शाहाण्या माणसासा-
रिखें लेखीन; त्याने आपलें घर खडकावर बांधिलें;
२५ मग पाऊस पडला, पूर आला, वाराहि सुट-
ला, आणि त्या घरास लागला, तरी तें पडलें नाहीं,
कारण कीं त्याचा पाया खडकावर घातला होता.
२६ परंतु जो कोणी माझ्या या गोष्टी ऐकून त्या-
प्रमाणें करीत नाहीं, तो मूर्ख माणसासारिखा

होईल, त्याने आपलें घर वाळूवर बांधिलें; २७
मग पाऊस पडला, पूर आला, वाराहि सुटला
आणि त्या घरास लागला, तेव्हां तें पडलें आणि
त्याचा मोठा नाश झाला."
२८ तेव्हां असें झालें कीं, येशूने या गोष्टी
संपविल्यावर समुदाय त्याच्या उपदेशावरून थक
झाले. २९ कारण कीं शास्त्र्यांसारिखा नाहीं,
तर त्याने अधिकार असल्यासारिखा त्यांस उपदेश
केला.

## अध्याय ८.

मग तो डोंगरावरून उतरल्यावर मोठे समुदाय
त्याच्या मागें चालले. २ तेव्हां पाहा, एक कोडी
माणूस येऊन त्याच्या पायां पडून झणाला, "हे
प्रभू, मला शुद्ध करायाची तुला इच्छा असली
तर शक्ति आहे." ३ तेव्हां येशूने हात लांब
करून त्याला स्पर्श केला, आणि झटलें, "माझी
इच्छा आहे, शुद्ध हो;" आणि तेव्हांच त्याचें कोड
गेलें आणि तो शुद्ध झाला. ४ मग येशूने त्याला
झटलें, "संभाळ, कोणाला सांगूं नको, तर जा,
आपणास याजकाला दाखीव, आणि त्यांस प्रमाण
पटावें झणून मोशेने जें अर्पण नेमिलें तें वाहा."
५ मग येशू कपरणाहूमांत आल्यावर कोणी-
एका शतपतीने त्याजवळ येऊन त्यास असी विनंती
केली कीं; ६ "हे प्रभू, माझा चाकर वातरो-
गाने भारी पीडा पावून घरांत पडला आहे." ७
मग येशू त्याला झणाला, "मी येऊन त्याला बरें
करीन." ८ तेव्हां शतपतीने उत्तर दिल्हें कीं, "हे
प्रभू; त्वां माझ्या छपराखालीं यावें, असा मी
योग्य नाहीं; पण शब्द मात्र बोल, झणजे माझा
चाकर बरा होईल. ९ कारण कीं मी हाताखा-
लचा माणूस आहें, तरी माझ्या स्वाधीन शिपाई
आहेत, आणि एकाला, जा, असें सांगतों झणजे तो
जातो, आणि दुसऱ्याला, ये, झणजे तो येतो, आणि
माझ्या चाकराला, अमुक कर, झणजे तो करितो."
१० तेव्हां येशू हें ऐकून आश्चर्य पावला, आणि
मागें चालणाऱ्यांस झणाला, "मी तुझांस खचीत
सांगतों कीं, इस्राएलांतहि एवढा विश्वास मला अ-
ढळला नाहीं. ११ आणखी मी तुझांस सांगतों
कीं, पूर्वेकडून पश्चिमेकडून बहुत माणसें येतील,
आणि आब्राहाम व इझाक व याकोब यां-
संगतीं आकाशाच्या राज्यांत बसतील. १२ परंतु
राज्यांतील पुत्र बाहेरच्या अंधारांत पडतील, तेथें
रडणें व दांत खाणें होईल." १३ मग येशू
शतपतीला झणाला, "जा, आणि त्वां विश्वास धर-
ल्याप्रमाणें तुला होवो." त्याच घटकेस त्याचा
चाकर बरा झाला.
१४ मग येशूने पेत्रसाच्या घरांत जाऊन, त्याची
सासू तापाने पडली आहे, असें पाहिलें. १५
तेव्हां त्याने तिच्या हाताला शिवल्यावर तिचा
ताप निघून गेला, मग ती उठून त्यांची सेवा
करूं लागली. १६ आणि संध्याकाळ झाल्यावर
लोकानी बहुत भूतग्रस्तांस त्याच्या जवळ आणिलें;
तेव्हां त्याने भुतें शब्दानेच घालविलीं, आणि सर्व
दुखणाइतांस बरें केलें. १७ जें यशाया भवि-
ष्यवाद्याने सांगितलें होतें तें पूर्ण व्हावें झणून असें
झालें; तें असें कीं, "त्याने स्वतां आमचे विकार
घेतले आणि आमचे रोग वाहिले."
१८ नंतर येशूने आपल्या सभोंवते बहुत समु-
दाय आहेत, हें पाहून पलिकडे जावयास सांगितलें.
१९ मग कोणी शास्त्री जवळ येऊन त्याला झणाला,
"हे गुरू, जेथें जेथें तूं जासील तेथें मी तुझ्या मागें
येईन." २० तेव्हां येशूने त्याला झटलें, "को-
कडांस बिळें व आकाशांतील पांखरांस खोंटीं
आहेत, परंतु मनुष्याच्या पुत्राला डोकें टेंकावयास
ठिकाण नाहीं." २१ मग त्याच्या शिष्यांतील
आणखी एक त्याला झणाला, "हे प्रभू, पहिल्याने
माझ्या बापाला पुरावयास मला जाऊं दे." २२
परंतु येशूने त्याला झटलें, "तूं माझ्या मागें ये,
आणि जे मेलेले त्यांस आपल्या मेलेल्यांस पुरूं
दे."
२३ मग तो तारवावर चढल्यानंतर त्याचे
शिष्य त्याच्या मागें गेले. २४ तेव्हां पाहा, समु-
द्रांत असें मोठें वादळ उठलें कीं, तारूं लाटानी
झांकून गेलें, परंतु तो झोंपेंत होता. २५ तेव्हां
त्याचे शिष्य येऊन त्याला जागें करून झणूं ला-
गले, "हे प्रभू, आझांस तार, आह्मी बुडतों."
२६ मग त्याने त्यांस झटलें, "अहो अल्पवि-
श्वासी, तुझी कां घाबरलां?" मग त्याने उठून वारा
व समुद्र यांस धमकाविले, आणि मोठी शांति
झाली. २७ तेव्हां तीं माणसें आश्चर्य करून
बोललीं, "हा कसा मनुष्य आहे, कां कीं वारा
व समुद्र हे देखील त्याचें ऐकतात."
२८ मग तो पलिकडे गर्गसांच्या देशांत गेल्या-

वर, दोन भूतग्रस्त मनुष्य थड्यांमधून निघून त्याला
भेटले; ते एवढे विकराळ होते कीं, कोणाच्यानें
त्या वाटेनें जाववेना. २९ तेव्हां पाहा, ते ओरडत
बोलले, "हे येशू, देवाच्या पुत्रा, आमचा व तुझा
काय संबंध? नेमलेल्या वेळेपूर्वी तूं आह्मांस पि-
डायास एथें आलास काय?" ३० तेव्हां बहुत
डुकरांचा कळप त्यांजपासून कांहींसा दूर चरत
होता. ३१ मग त्या भुतांनी त्याला विनंती केली
कीं, "जर आह्मांस काढिसील तर आह्मांस त्या
डुकरांच्या कळपांत जाऊं दे." ३२ तेव्हां त्यानें
त्यांस ह्मटलें, "जा." मग तीं निघून डुकरांच्या
कळपांत गेलीं; आणि पाहा, तो डुकरांचा अवघा
कळप कड्यावरून समुद्रांत धडक धांवत जाऊन पा-
ण्यामध्यें बुडून मेला. ३३ मग चारणारे पळाले
आणि नगरांत जाऊन त्यांनी सर्व वर्त्तमान, आणि
भूतग्रस्ताच्या गोष्टी सांगितल्या. ३४ तेव्हां पाहा,
सर्व नगर येशूला भेटायास निघालें, आणि त्याला
पाहून, त्वां आमच्या प्रांतांतून जावें, असी त्यांनी
विनंती केली.

## अध्याय ९.

तेव्हां तो तारवावर चढून पार जाऊन आपल्या
नगरास पोहंचला. २ मग पाहा बाजेवर घात-
लेला कोणीएक वातरोगी त्याजकडे आणिला, तेव्हां
येशू त्यांचा विश्वास पाहून वातरोग्याला ह्मणाला,
"मुला, धीर धर, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे."
३ मग पाहा, शास्त्र्यांमधील कित्येक आपल्यामध्यें
ह्मणाले, "हा दुर्भाषण करितो." ४ तेव्हां येशू
त्यांच्या कल्पना जाणून ह्मणाला, "तुह्मी आपल्या
अंतःकरणांत वाईट कल्पना कां आणितां? ५ का-
रण कीं तुझ्या पापांची क्षमा झाली आहे, हें बोलणें,
अथवा उठून चाल, हें बोलणें, यांतून कोणतें
सोपें? ६ परंतु पृथ्वीवर पापांची क्षमा करा-
यास मनुष्याच्या पुत्राला अधिकार आहे, हें तुह्मी
जाणावें," तेव्हां त्यानें वातरोग्याला सांगितलें कीं,
"उठ, आपली बाज उचलून घेऊन आपल्या
घरीं जा." ७ मग तो उठून आपल्या घरीं गेला.
८ तेव्हां समुदायानी पाहून आश्चर्य केलें, आणि
देवानें मनुष्यांस एवढा अधिकार दिल्हा, ह्मणून
त्याला ते गौरवूं लागले.

९ मग येशूनें तेथून जाऊन मात्थी नामें
माणसाला जकातीच्या नाक्यावर बसलेलें पाहिलें,
आणि त्याला ह्मटलें, "माझ्या मागें ये." ते-
व्हां तो उठून त्याच्या मागें गेला. १० नंतर
असें झालें कीं, तो घरांत जेवायास बसला तेव्हां
पाहा, बहुत जकातदार व पापी येऊन, येशू
आणि त्याचे शिष्य यांबरोबर जेवायास बसले. ११
तेव्हां परोशी पाहून त्याच्या शिष्यांस ह्मणाले,
"जकातदार व पापी यांबरोबर तुमचा गुरु कां
जेवितो?" १२ मग येशूनें ऐकून त्यांस ह्मटलें
कीं, "निरोग्यांस वैद्याची गरज नाहीं, तर दुखणा-
इतांस आहे. १३ परंतु 'यज्ञापेक्षां मला दया
आवडती,' याचा अर्थ काय, हें जाऊन शिका; कारण
कीं मी पुण्यवंतांस नाहीं, तर पाप्यांस पश्चात्तापा-
साठीं बोलावण्यास आलों."

१४ त्या वेळेस योहान्नाचे शिष्य त्याच्या जवळ
येऊन ह्मणाले, "आह्मी व परोशी बहुत उपास
करितों, तुझे शिष्य तर उपास कां करीत
नाहींत?" १५ तेव्हां येशूनें त्यांस ह्मटलें,
"वऱ्हाड्यांच्या बरोबर वर आहे तोंपर्यंत त्यांच्यानें
शोक करवेल काय? परंतु असे दिवस येतील कीं,
वराला त्यांपासून काढून घेतल्यावर ते उपास
करितील. १६ आणि कोऱ्या कापडाचें ठिगळ
जुन्या वस्त्राला कोणी लावीत नाहीं, कां कीं जें त्या
वस्त्राला लाविलें तें त्याला फाडितें, आणि भोंक
मोठें होतें. १७ अणखी नवा द्राक्षारस जुन्या
बुधल्यांत घालीत नाहींत, घातला तर बुधले फुट-
तात आणि द्राक्षारस सांडतो, आणि बुधले नास-
तात; तर नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत घालितात
आणि दोन्ही कायम राहतात."

१८ तो त्यांसीं या गोष्टी बोलत असतां, पाहा,
कोणी अधिकारी येऊन त्याच्या पायां पडून ह्मणाला,
"माझी कन्या नुक्तीच मरण पावली, परंतु तूं येऊन
आपला हात तिजवर ठेव ह्मणजे ती वांचेल." १९
तेव्हां येशू उठून त्याच्या मागें गेला, शिष्यहि
गेले. २० तेव्हां पाहा, बारा वर्षें रक्तस्राव लाग-
लेली कोणी बायको त्याच्या मागें येऊन त्याच्या
वस्त्राच्या कांठाला शिवली. २१ कां कीं तिनें
आपल्या मनांत ह्मटलें, "मी केवळ त्याच्या वस्त्राला
शिवलें, तर बरी होईन." २२ तेव्हां येशू मुरडून
व तिला पाहून ह्मणाला, "अगे मुली, धीर धर,
तुझ्या विश्वासानें तुला तारिलें आहे." आणि
ती बायको त्याच घटकेस बरी झाली. २३ मग
येशू त्या अधिकाऱ्याच्या घरांत जाऊन आणि पांवा

वाजविणाऱ्यास व गलबला करणाऱ्या समुदायास
पाहून त्यांस ह्मणाला; २४ "निघून जा, कां कीं
मुलगी मेली नाहीं, ती झोंपेंत आहे." तेव्हां ते
त्याला हांसले. २५ मग समुदायाला बाहेर ला-
विल्यावर त्याने आंत जाऊन तिचा हात धरिला,
तेव्हां ती मुलगी उठली. २६ नंतर ही कीर्त्ति त्या
अवघ्या देशांत पसरली.

२७ मग येशू तेथून पुढें जात असतां दोन
अंधळे त्याच्या मागें चालतांना ओरडत बोलले, "हे
दावीदाच्या पुत्रा, आह्मावर दया कर." २८ मग
तो घरांत गेल्यावर ते अंधळे त्याच्या जवळ आले,
तेव्हां येशू त्यांस ह्मणाला, "हें करायास मी
समर्थ आहें, ह्मणून तुह्मी विश्वास धरितां काय?"
ते त्याला ह्मणाले, "होय प्रभू." २९ तेव्हां
"तुमच्या विश्वासाप्रमाणें तुह्मास होवो," असें बो-
लून त्याने त्यांच्या डोळ्यांस हात लाविला. ३०
तेव्हां त्यांचे डोळे उघडले; मग येशूने त्यांस नि-
क्षूण सांगितलें कीं, "संभाळा, हें कोणाला कळवूं
नका." ३१ परंतु ते निघून त्या अवघ्या देशांत
त्याची कीर्त्ति पसरूं लागले.

३२ मग ते निघाल्यावर, पाहा, लोकांनी त्याजकडे
कोणीएका मुक्या भूतग्रस्त माणसाला आणिलें. ३३
आणि त्याने भूत काढिल्यावर तो मुका बोलूं ला-
गला; तेव्हां समुदाय आश्चर्य करून ह्मणाले कीं,
"याप्रमाणें इस्राएलामध्यें कधींहि दृष्टीस पडलें
नाहीं." ३४ परंतु परोशी बोलले कीं, "भुतांच्या
अधिकाऱ्याच्या योगाने हा भुतें काढितो."

३५ आणि येशूने सर्व नगरें व गांव यांमध्यें
फिरत असतां त्यांच्या सभास्थानांमध्यें उपदेश केला,
आणि राज्याचें शुभवर्त्तमान गाजविलें, आणि लो-
कांचे सर्व रोग व दुखणीं बरीं केलीं. ३६ आणि
समुदायांस पाहून त्यांचा त्याला कळवळा आला,
कारण कीं ज्या मेंढरांस मेंढपाळ नाहीं त्यांसारिखे
ते कासावीस व पांगलेले होते. ३७ तेव्हां तो
आपल्या शिष्यांस ह्मणाला, "पीक फार, परंतु काम-
करी थोडे आहेत. ३८ यास्तव पिकाच्या धन्याने
आपल्या पिकांत कामकरी पाठवावे ह्मणून तुह्मी
त्याची प्रार्थना करा."

## अध्याय १०.

तेव्हां त्याने आपल्या बारा शिष्यांस जवळ
बोलावून त्यांस असा अधिकार दिल्हा कीं,
त्यांनी अशुद्ध आत्म्यांस काढावें, आणि सर्व रोग
व सर्व दुखणीं बरीं करावीं. २ त्या बारा प्रेषि-
तांचीं नामें तर याप्रमाणें आहेत; पहिला पेत्रस
ह्मटलेला शीमोन व त्याचा भाऊ अंद्रयास,
जबदीचा पुत्र याकोब व त्याचा भाऊ यो-
हान्न; ३ फिलिप्पस व बार्थलमी, थोमा
व जकातदार मात्थी, अल्फीचा पुत्र याकोब
व थाद्दी ह्मटलेला लेब्बी; ४ शीमोन कना-
नी आणि त्याला पराधीन करणारा यहूदा इस्कार-
योतें. ५ या बारा जणांस पाठवितांना येशूने
त्यांस असी आज्ञा केली कीं, "विदेश्यांकडे तुह्मी
जाऊं नका, आणि शोमरोनी यांच्या नगरांत जाऊं
नका. ६ त्यापेक्षां इस्राएलाच्या घरचीं जीं हरव-
लेलीं मेंढरें त्यांकडे जा. ७ आणि जातांना
असा उपदेश करा कीं, आकाशाचें राज्य जवळ
आलें आहे. ८ रोग्यांस बरें करा, मेलेल्यांस
उठवा, कोड्यांस शुद्ध करा, भुतें काढा, फुकट
तुह्मास मिळालें आहे, फुकट द्या. ९ सोनें
किंवा रुपें किंवा तांबें आपल्या कंबरकस्यामध्यें घेऊं
नका; १० वाटेसाठीं झोळणा, किंवा दोन अंग-
रखे, किंवा वाहाणा, किंवा काठी घेऊं नका, कां कीं
कामकऱ्याला खायास मिळावें हें योग्य आहे. ११
आणि ज्या नगरांत किंवा गांवांत तुह्मी जाल, त्यांत
कोण योग्य आहे, हें पाहा, आणि तुह्मी निघून
जाल तोंपर्यंत त्याच्याच एथें राहा. १२ आणि
घरांत जातांना त्याला सलाम करा. १३ आणि
तें कुटुंब योग्य असलें तर तुमचा आशीर्वाद त्याला
प्राप्त होवो; परंतु तें योग्य नसलें तर तुमचा आ-
शीर्वाद तुह्माकडे परत येवो. १४ आणि जो को-
णी तुह्मास स्वीकारणार नाहीं, आणि तुमच्या गोष्टी
ऐकणार नाहीं, त्याच्या घरांतून किंवा नगरांतून निघ-
तांना तुह्मी आपल्या पायांची धूळ झाडून टाका.
१५ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, न्यायाच्या
दिवशीं त्या नगरापेक्षां सदोम व गमोरा यांच्या
देशाला सोपें पडेल.

१६ पाहा, लांडग्यांमध्यें जसें मेंढरांस तसें मी
तुह्मास पाठवितों; यास्तव तुह्मी सापांसारिखे चतुर
व खबुत्रासारिखे साळसूद व्हा. १७ आणि
माणसांविषयीं जपा; कारण कीं ते तुह्मास न्याय-
सभांच्या स्वाधीन करितील, आणि आपल्या सभा-
स्थानांमध्यें तुह्माला फटके मारतील. १८ आणि
सुभेदार व राजे यांकडे माझ्या करितां तुह्मास

तील, त्यांस व विदेश्यांस साक्ष पटावी ह्म-
न. १९ परंतु तुह्मास पराधान करितील,
व्हा कसें काय बोलावें, याविषयीं काळजी करूं
का, कारण कीं तुह्मी काय बोलावें याची त्याच
टकेस तुह्मास सूचना होईल. २० कां कीं बोल-
ारे तुह्मी नव्हा, तर तुमच्या बापाचा आत्मा तोच
ह्मामध्यें बोलणारा आहे. २१ आणि भाऊ भा-
ल्ला व बाप लेंकराला जिवें मारण्यास पराधीन
रील; अणखी लेंकरें आईबापांवर उठून त्यांस
वें मारवितील. २२ आणि माझ्या नामामुळें सर्व
मचा द्वेष करितील; परंतु शेवटपर्यंत टिकणारा हाच
रेल. २३ आणि एका नगरांत तुमच्या पाठीस
ागतील तेव्हा दुसऱ्या नगरांत पळून जा; कां कीं
ो तुह्मास खचीत सांगतों, मनुष्याचा पुत्र येईल
ोंपर्यंत इस्राएलाच्या नगरांत तुमचें फिरणें अटो-
ण्णार नाहीं. २४ गुरूपेक्षां शिष्य थोर नव्हे,
आणि धन्यापेक्षां चाकर थोर नव्हे. २५ शिष्य
आपल्या गुरूसारिखा व चाकर आपल्या धन्या-
सारिखा व्हावा, इतकें पुरे. घरधन्यास बाल-
बूल ह्मटलें तर त्याच्या घरच्या माणसांस किती,
वेशेषेंकरून ह्मणतील? २६ यास्तव त्यांस
भिऊं नका, कां कीं उघडें होणार नाहीं असें कांहीं
झांकलेलें नाहीं; आणि कळणार नाहीं, असें कांहीं
गुप्त नाहीं. २७ जें मी तुह्मास अंधारांत ह्मणतों,
तें तुह्मी उजेडांत सांगा, आणि जें तुमच्या कानांत
सांगितलें तें धाब्यावरून गाजवा. २८ आणि जे
शरिराला वधितात पण आत्म्याला वधायास समर्थ
नाहींत, त्यांस भिऊं नका; तर आत्म्याला व
शरिरालाहि नरकांत टाकून नाश करायास जो
समर्थ आहे, त्याला विशेषेंकरून भ्या. २९ दोन
चिमण्या एका पैस्याला विकतात कीं नाहीं? तथापि
तुमच्या बापाच्या आज्ञेवांचून त्यांतून एकहि भूमी-
वर पडत नाहीं. ३० आणि तुमच्या डोक्यावरले
सर्व केंस देखील मोजलेले आहेत. ३१ यास्तव
भिऊं नका; बहुत चिमण्यांहून तुमचें मोल अधिक
आहे. ३२ कारण कीं जो कोणी माणसांसमोर
मला अंगीकारील, त्याला मीहि आपल्या आका-
शांतील बापासमोर अंगीकारीन. ३३ पण जो
कोणी माणसांसमोर मला नाकारील, त्याला मीहि
आपल्या आकाशांतील बापासमोर नाकारीन.

३४ मी पृथ्वीवर शांति करायास आलों असें
समजूं नका; शांति करायास नाहीं, तर तरवार
घालवायास मीं आलों आहें. ३५ कां कीं
पुत्राला त्याच्या बापापासून व कन्येला तिच्या
आईपासून व सुनेला तिच्या सासूपासून फित-
वायास मी आलों आहें. ३६ आणि माण-
साच्या घरांतलींच माणसें त्याचे वैरी होतील.
३७ जो माझ्या पेक्षां बापावर अथवा आईवर
प्रीति करितो तो मला योग्य नाहीं, आणि
जो माझ्या पेक्षां पुत्रावर अथवा कन्येवर प्रीति
करितो, तो मला योग्य नाहीं. ३८ आणि जो
आपला खांब उचलून घेऊन माझ्या मागें येत नाहीं,
तो मला योग्य नाहीं. ३९ जो आपल्या जिवाला
राखील तो त्याला मुकेल, आणि जो माझ्या करितां
आपल्या जिवाला मुकेल तो त्याला मिळवील. ४०
जो तुह्मास अंगीकारील तो मला अंगीकारील, आ-
णि जो मला अंगीकारील तो माझ्या पाठविणाऱ्याला
अंगीकारील. ४१ जो भविष्यवाद्याच्या नामानें
भविष्यवाद्याला अंगीकारील त्याला भविष्यवाद्याचें
वेतन मिळेल; आणि जो न्यायीच्या नामानें न्यायीला
अंगीकारील त्याला न्यायीचें वेतन मिळेल. ४२
आणि जर कोणी शिष्याच्या नामानें या लाहानां-
तील एकाला केवळ थंड पाण्याचा प्याला पाजील,
तर मी तुह्मास खचीत सांगतों, तो आपल्या वेतनाला
मुकणारच नाहीं.

## अध्याय ११.

मग असें झालें कीं, येशूनें आपल्या बारा शिष्यांस
आज्ञा करणें संपविल्यावर, तो लोकांच्या नगरां-
मध्यें शिकवायास व उपदेश करायास तेथून नि-
घाला. २ नंतर योहान्नानें बंदिशाळेंत ख्रीस्ताचीं
कामें ऐकून आपल्या शिष्यांतून दोघांस पाठवून त्या-
ला पुसलें कीं, ३ "जो यावयाचा होता तो तूंच
आहेस, किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहूं?" ४ मग
येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, "जें तुह्मी ऐकतां
व पाहतां तें योहान्नाला जाऊन सांगा. ५ अं-
धळे पाहतात, पांगळे चालतात, कोडी शुद्ध होतात,
बहिरे ऐकतात, मेलेले उठतात, आणि दरिद्र्यांस
शुभवर्त्तमान सांगण्यांत येतें; ६ आणि जो कोणी
मजविषयीं अडखळत नाहीं तो धन्य आहे.

७ मग ते गेल्यावर येशू समुदायांस योहान्ना-
विषयीं बोलूं लागला, "तुह्मी काय पाहायास
रानांत गेलां? वाऱ्यानें हालविलेला बोरू काय?
८ तर काय पाहायास गेलां? मऊ वस्त्रें ल्या-

लेल्या माणसाला काय? पाहा, मऊ वस्त्र लेणारे
राजांच्या घरांत असतात. ९ तर काय पाहायास
गेलां? भविष्यवाद्याला काय? होय, मी तुह्मास
सांगतों, अणखी भविष्यवाद्याहून जो मोठा, त्याला.
१० कारण कीं, पाहा, मीं आपल्या दुताला तुझ्या
पुढें पाठवितों, तो तुझी वाट तुझ्या समोर तयार
करील, असें ज्याविषयीं लिहिलें आहे, तो हाच
आहे. ११ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, बा-
प्तिस्मा करणारा योहान्न यापेक्षां बायकांपासून जन्म-
लेल्यांमध्यें कोणी मोठा उपजला नाहीं, तरी आका-
शाच्या राज्यांत जो लाहान तो त्याहून मोठा आहे.
१२ अणखी बाप्तिस्मा करणारा योहान्न याच्या
दिवसांपासून आतांपर्यंत आकाशाच्या राज्यावर
बलात्कार चालला आहे,-आणि बलात्कारी तें हिरा-
वून घेतात. १३ कारण कीं योहान्नापर्यंत सर्व
भविष्यवादी व नेमशास्त्र भविष्य सांगत आले.
१४ आणि जर तुह्मी मान्य कराल तर जो एली-
या यावयाचा होता तो हाच आहे. १५ ज्याला
ऐकायास कान आहेत तो ऐको.

१६ या पिढीला तर कोणती उपमा देऊं? लें-
करें चव्हाट्यांमध्यें बसून आपल्या संवगड्यांस हाक
मारून ह्मणवात कीं, १७ आह्मी तुह्माजवळ पांवा
वाजविला, तरी तुह्मी नाचलां नाहीं, आह्मी
तुह्माजवळ विलाप केला, तरी तुह्मी बडवून घे-
तलें नाहीं, त्यांसारिखी ती आहे. १८ कारण
कीं योहान्न येऊन खात पीत नसे, आणि ते ह्मण-
तात, त्याला भूत लागलें. १९ मनुष्याचा पुत्र
येऊन खात पीत असतो, आणि ते ह्मणतात, पाहा,
हा माणूस खादाड व दारुबाज, जकातदारांचा व
पाप्यांचा मित्र. परंतु ज्ञान आपल्या लेंकरांकडून
न्यायी ठरतें."

२० तेव्हां ज्या नगरांमध्यें फारकरून त्याचे
चमत्कार घडले होते त्यांनी पश्चात्ताप केला नाहीं,
ह्मणून त्यांजवर तो असा दोष ठेवूं लागला कीं,
२१ "हे खोराजिना, तुला हाय हाय; हे बेथसा-
इदा, तुला हाय हाय; कां कीं तुह्मामध्यें जे चम-
त्कार घडले, ते सोर व सीदोन यांत घडले
असते, तर त्यांनी मागेंच तरट व राख अंगावर
घेऊन पश्चात्ताप केला असता. २२ अणखी मी
तुह्मास सांगतों कीं, न्यायाच्या दिवसीं सोर व
सीदोन यांस तुह्मापेक्षां सोपें पडेल. २३ आणि
हे कपरणाहूमा, जें आकाशापर्यंत उंचावलेलें तें तूं
मृतलोकापर्यंत खालीं पडसील; कां कीं तुजमध्यें जे
चमत्कार घडले, ते सदोमांत घडले असते, तर तें
आजपर्यंत राहिलें असतें. २४ अणखी मी तुह्मास
सांगतों कीं, न्यायाच्या दिवसीं तुझ्या पेक्षां सदोम
देशास सोपें पडेल."

२५ त्या समयीं येशू असें बोलता झाला कीं,
"हे बापा, आकाशाच्या व पृथ्वीच्या प्रभू, मी
तुला स्तवितों, कारण कीं या गोष्टी ज्ञानी व तर्कवान
यांपासून लपवून त्वां लेंकरांस प्रगट केल्या आहेत.
२६ होय बापा, कां कीं असेंच तुला बरें वाटलें.
२७ माझ्या बापाने माझ्या हातीं सर्व दिल्हें आहे,
आणि बापावांचून पुत्राला कोणी ओळखत नाहीं,
आणि पुत्रावांचून व ज्याला प्रगट करायास
पुत्राची इच्छा असेल, त्यावांचून बापाला कोणी
ओळखत नाहीं. २८ अहो कष्टकरी आणि ओझ्याने
लादलेले, तुह्मी सर्व माझ्या अवळ या, ह्मणजे मी
तुह्माला विसांवा देईन. २९ तुह्मी आपल्यावर
माझें जूं घ्या, आणि मजपासून शिका, कां कीं मी
अंतःकरणाचा नम्र व लीन आहें; ह्मणजे तुह्मी
आपल्या जिवांस विसांवा पावाल. ३० कां कीं
माझें जूं सोईचें व माझें ओझें हलकें आहे."

## अध्याय १२.

त्या समयीं येशू शाब्बाथ दिवसीं शेतांमधून जात
होता, तेव्हां त्याच्या शिष्यांस भूक लाग-
ली, ह्मणून ते कणसें मोडून खाऊं लागले. २
तेव्हां परोशी हें पाहून त्याला ह्मणाले, "पाहा,
शाब्बाथ दिवसीं जें करूं नये तें तुझे शिष्य करि-
तात." ३ मग त्याने त्यांस ह्मटलें, "जेव्हां
दाविदास व त्याच्या बरोबरच्या माणसांस भूक
लागली, तेव्हां त्याने काय केलें हें तुह्मी वाचलें
नाहीं काय? ४ तो देवाच्या मंदिरांत कसा गेला,
आणि पुढें ठेवलेल्या ज्या भाकरी त्याने व त्याच्या
बरोबरच्या माणसानी खाऊं नयेत, याजकानी मात्र
खाव्या, त्या त्याने कशा खाल्ल्या? ५ किंवा
याजक देवळांत शाब्बाथ दिवसीं शाब्बाथ मोडून
निर्दोष असतात, हें तुह्मी नेमशास्त्रांत वाचलें नाहीं
काय? ६ पण मी तुह्मास सांगतों कीं, देवळापेक्षां
एथें कोणीएक मोठा आहे. ७ अणखी यज्ञापेक्षां
मला दया आवडती, याचा अर्थ काय हें तुह्मी जा-
णिलें असतें तर तुह्मी निर्दोषांस दोष लाविला नसता;
८ कां कीं मनुष्याचा पुत्र शाब्बाथाचाहि धनी आहे."

९ तेव्हां तो तेथून निघून त्यांच्या सभास्थाना-
मध्यें गेला. १० आणि पाहा, तेथें एक हात वाळ-
लेला असा माणूस होता; आणि त्यांनी त्यावर
दोष ठेवण्याकरितां त्याला विचारिलें कीं, "शाब्बाथ
दिवसीं लोकांस बरें करणें हें योग्य आहे काय?"
११ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, "ज्याला एक मेंढरूं
आहे आणि तें शाब्बाथ दिवसीं खाचेंत पडलें तर
तो त्याला धरून काढणार नाहीं, असा तुह्मामध्यें
कोण माणूस आहे? १२ तर मेंढरापेक्षां माणूस
कितीं मोठा आहे? यास्तव शाब्बाथ दिवसीं बरें
करणें योग्य आहे." १३ मग त्यानें त्या माण-
साला सांगितलें कीं, "आपला हात लांब कर."
तेव्हां तो लांब करितांच दुसऱ्यासारिखा बरा
झाला.

१४ नंतर परोशांनी बाहेर जाऊन त्याचा घात
कसा करावा ह्मणून त्याविरुद्ध मसलत केली. १५
परंतु येशू हें समजून तेथून निघाला, तेव्हां बहुत
समुदाय त्याच्या मागें चालले, मग त्यानें त्या
सर्वांस बरें केलें. १६ आणि त्यानें त्यांस निक्षूण
सांगितलें कीं, मला प्रगट करूं नका. १७
यशाया भविष्यवाद्यानें जें सांगितलें होतें तें पूर्ण
व्हावें ह्मणून, तें असें कीं, १८ "पाहा, माझा
सेवक, त्याला म्या निवडिलें आहे; माझा प्रिय,
त्याविषयीं माझा जीव संतुष्ट आहे; त्यावर मी आ-
पला आत्मा घालीन; तो विदेश्यांस न्याय कळ-
वील. १९ तो भांडणार नाहीं व ओरडणार
नाहीं व मार्गांमध्यें त्याची वाणी कोणाला ऐकूं
येणार नाहीं; २० चेपलेला बोरू तो मोडणार
नाहीं, आणि धुमसत वात विझविणार नाहीं; जोंपर्यंत
न्याय प्रसिद्धीस आणील तोंपर्यंत. २१ आणि
विदेशी त्याच्या नामाची आशा धरतील."

२२ मग कोणी अंधळा व मुका असा भूत-
ग्रस्त त्याजकडे आणिला, आणि त्यानें त्याला बरें
केलें, ह्मणून तो मुका अंधळा बोलूं पाहूं लागला.
२३ तेव्हां सर्व समुदाय थक होऊन ह्मणाले,
"हा दाविदाचा पुत्र आहे ना?" २४ परंतु परो-
शी ऐकून बोलले, "भुतांचा अधिकारी बालजबूल
याच्या योगानें मात्र हा भुतें काढितो." २५
तेव्हां येशू त्यांच्या कल्पना जाणून त्यांस ह्मणाला,
"जें जें राज्य आंतल्या आंत विभागलें आहे तें ओ-
साड होईल, आणि जें जें नगर अथवा घर आंत-
ल्या आंत विभागलें आहे तें टिकणार नाहीं. २६
आणि जर सैतान सैतानाला काढितो तर तो आपल्या
मध्यें विभागला आहे; मग त्याचें राज्य कसें टि-
केल? २७ आणि मी बालजबूलाकडून जर भुतें
काढितों, तर तुमचे पुत्र कोणाकडून काढितात?
याकरितां ते तुमचे न्यायाधीश होतील. २८ परंतु
मी देवाच्या आत्म्याकडून जर भुतें काढितों, तर
देवाचें राज्य तुमच्या मध्यें आलें आहे. २९
अणखी बळकट माणसाला पहिल्यानें बांधल्याशि-
वाय, त्याच्या घरांत शिरून त्याचे जिनस कोणाच्यानें
कसे लुटवतील? बांधिलें तरच त्याचें घर लुटील.
३० जो मला अनुकूळ नाहीं तो मला प्रतिकूळ
आहे, आणि जो माझ्या बरोबर गोळा करीत नाहीं
तो विखरितो.

३१ याकरितां मी तुह्मास सांगतों कीं, सर्व पापें
व दुर्भाषणें यांची माणसांस क्षमा होईल, परंतु
पवित्र आत्म्याविरुद्ध जें दुर्भाषण त्याची माणसांस
क्षमा होणार नाहीं. ३२ आणि मनुष्याच्या पुत्रा-
विरुद्ध कोणी कांहीं गोष्ट बोलेल तर त्याची त्याला
क्षमा होईल, परंतु जो कोणी पवित्र आत्म्याविरुद्ध
बोलेल त्याला या काळीं क्षमा होणार नाहीं, आणि
येणाऱ्या काळींहि नाहीं. ३३ झाड चांगलें ह्मणजे
त्याचें फळ चांगलें असें समजा, अथवा झाड वाईट
ह्मणजे त्याचें फळ वाईट असें समजा; कां कीं फळा-
वरून झाड कळतें. ३४ अहो सापाच्या पिलांनो,
तुह्मी वाईट असतां तुह्माला चांगल्या गोष्टी कशा
बोलतां येतील? कां कीं अंतःकरणांत जें भरलें आहे
त्याप्रमाणें तोंड बोलतें. ३५ चांगला माणूस
अंतःकरणाच्या चांगल्या भांडारांतून चांगल्या गोष्टी
काढितो, आणि वाईट माणूस वाईट भांडारांतून वा-
ईट गोष्टी काढितो. ३६ अणखी मी तुह्मास सां-
गतों कीं, जो जो व्यर्थ शब्द माणसें बोलतील
त्याचा हिशोब ते न्याय दिवसीं देतील. ३७
कां कीं तूं आपल्या बोलण्यावरून न्यायी ठर-
सील, आणि आपल्या बोलण्यावरून अन्यायी
ठरसील."

३८ तेव्हां शास्त्री व परोशी यांतून कोणी उत्तर
दिल्हें कीं, "हे गुरू, आपला कांहीं चमत्कार
पाहावा, असें वाटतें." ३९ मग त्यानें त्यांस
उत्तर दिल्हें कीं, "वाईट व व्यभिचारी पिढी चम-
त्कार मागती, परंतु योना भविष्यवादी याच्या चम-
त्कारावांचून तिला चमत्कार मिळणार नाहीं. ४०
कारण कीं जसा योना तीन दिवस व तीन रात्रीं

मोठ्या माशाच्या पोटांत होता, तसा मनुष्याचा पुत्र
तीन दिवस व तीन रात्री पृथ्वीच्या पोटांत राहील.
४१ नीनव्यांतील माणसें न्यायकाळीं या पिढीच्या
संगतीं उभीं राहून इला अन्यायी ठरवितील; कां
कीं त्यानी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला,
आणि पाहा, एथें योनापेक्षां कोणी मोठा आहे.
४२ दक्षिणेची राणी न्यायकाळीं या पिढीच्या संगतीं
उभी राहून इला अन्यायी ठरवील; कां कीं ती
शलमोनाचें ज्ञान ऐकायास पृथ्वीच्या शेवटांपासून
आली; आणि पाहा, एथें शलमोनापेक्षां कोणी
मोठा आहे. ४३ जेव्हां अशुद्ध आत्मा माणसां-
तून निघतो तेव्हां तो कोरड्या जाग्यांमध्यें फिरतांना
विसांवा घ्यावयास पाहतो, परंतु त्याला मिळत
नाहीं. ४४ तेव्हां तो ह्मणतो, ज्या आपल्या
घरांतून मी निघालों त्यांत परत जाईन. मग आ-
ल्यावर तें रिकामें व झाडलेलें व सुंदर केलेलें आहे
असें तो पाहतो. ४५ नंतर तो जाऊन आपल्या-
हून वाईट असे दुसरे सात आत्मे आपल्या संगतीं
घेतो, आणि ते आंत जाऊन तेथें राहतात, मग त्या
माणसाच्या शेवटली दशा पहिल्याहून वाईट होती;
तसेंच या वाईट पिढीला होईल."

४६ तो समुदायांसीं बोलत असतांना पाहा,
त्याची आई व भाऊ त्यासीं बोलायाकरितां
बाहेर उभे राहिले. ४७ तेव्हां कोणी त्याला
सांगितलें, "पाहा, तुझी आई व तुझे भाऊ तुजसीं
बोलायाकरितां बाहेर उभे राहिले आहेत." ४८
तेव्हां त्याने सांगणाऱ्याला उत्तर दिल्हें कीं, "माझी
आई कोण? व माझे भाऊ कोण?" ४९ मग
तो आपल्या शिष्यांकडे आपला हात लांब करून
बोलला, "पाहा, माझी आई व माझे भाऊ; ५०
कां कीं जो कोणी माझ्या आकाशांतील बापाच्या
इच्छेप्रमाणें करील, तोच माझा भाऊ व बहीण व
आई होय."

## अध्याय १३.

आणि त्याच दिवसीं येशू घरांतून निघून समुद्रा-
जवळ जाऊन बसला. २ तेव्हां बहुत स-
मुदाय त्याजवळ मिळाले, ह्मणून तो तारवावर
चढून बसला, आणि सर्व समुदाय तडीवर उभा
राहिला. ३ तेव्हां तो दाखले देऊन त्यास
बहुत गोष्टी सांगूं लागला कीं, "पाहा, कोणी पेरणारा
पेरायास बाहेर गेला; ४ आणि तो पेरीत अ-
सतां कांहीं बियें वाटेवर पडलीं; आणि पांखरानीं
येऊन तीं खाऊन टाकलीं. ५ आणि फारशी
माती नव्हती अशा खडकाळीवर कांहीं पडलीं;
आणि माती खोल नव्हती ह्मणून तीं लवकर उग-
वलीं. ६ परंतु सूर्य उगवल्यानंतर तीं करपलीं,
आणि त्यांस मूळ नव्हतें यास्तव वाळून गेलीं. ७
आणि कांहीं कांट्यांच्या झाडांमध्यें पडलीं; मग
कांट्यांच्या झाडानी वाढून त्यांस गुदमारिलें. ८
परंतु चांगल्या भूमीवर कांहीं पडलीं, मग कोठें
शंभरपट, कोठें साठपट, कोठें तीसपट, असें पीक
आलें. ९ ज्याला ऐकायास कान आहेत तो
ऐको."

१० मग शिष्य येऊन त्याला ह्मणाले, "त्यांसीं
दाखले देऊन कां बोलतोस?" ११ तेव्हां त्याने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, "आकाशांतील राज्याच्या
गुप्त गोष्टी जाणणें हें तुह्मास दिल्हें आहे, परंतु
त्यांस दिल्हें नाहीं. १२ कां कीं ज्या कोणाजवळ
आहे त्याला मिळेल, आणि त्याला फार होईल:
परंतु ज्या कोणाजवळ नाहीं त्याचें जें असेल तें
देखील त्यापासून काढून घेतील. १३ यास्तव
मी त्यांसीं दाखले देऊन बोलतों, कां कीं ते पाहत
असतां त्यांस दिसत नाहीं, आणि ऐकत असतां
ऐकत नाहींत आणि समजतहि नाहींत. १४ आणि
यशायाचें भविष्यवाक्य त्यांविषयीं पूर्ण झालें आहे,
तें असें कीं, तुह्मी ऐकालच ऐकाल परंतु समज-
णार नाहीं, आणि पाहालच पाहाल परंतु तुह्मास
दिसणार नाहीं. १५ कां तर डोळ्यानी पाहूं नये
आणि कानानी ऐकूं नये आणि अंतःकरणाने समजूं
नये, आणि त्यानी फिरूं नये, आणि मी त्यांस
बरें करूं नये, ह्मणून या लोकांचें अंतःकरण जड
झालें आहे, आणि ते कानानी मंद ऐकतात, आणि
आपले डोळे त्यानी मिटले आहेत. १६ परंतु
तुमचे डोळे धन्य आहेत, कां कीं त्यांस दिसतें:
आणि तुमचे कान धन्य, कां कीं ते ऐकतात. १७
कारण मी तुह्मास खचीत सांगतों कीं, तुह्मी जें
पाहतां तें बहुत भविष्यवादी व न्यायी पाहा-
यास इच्छीत होते, परंतु त्यानी पाहिलें नाहीं:
आणि तुह्मी जें ऐकतां तें ऐकायास ते इच्छीत
होते, परंतु त्यानी ऐकिलें नाहीं. १८ यास्तव
तुह्मी पेरणाऱ्याचा दाखला ऐकून घ्या; १९ रा-
ज्याचें वचन कोणीएक ऐकतो पण समजत नाहीं,
तेव्हां तो दुष्ट येतो, आणि त्याच्या अंतःकरणांत पे-

लेलें तें हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हाच
आहे. २० आणि खडकाळीवर पेरलेला, तो हाच
आहे कीं, वचन ऐकतो, आणि तेव्हांच तें आनंदाने
घेतो. २१ तथापि त्याच्या मध्यें मूल नाहीं,
ह्मणून तो क्षणिक आहे, आणि वचनामुळें संकट
किंवा पाठलाग झाला ह्मणजे तो लागलाच
अडखळतो. २२ आणि कांट्यांच्या झाडा-
मध्यें जो पेरलेला, तो हाच आहे कीं, वचन ऐकतो,
परंतु या जगाची चिंता व द्रव्याची भूल, हीं
वचनाला गुदमारितात, ह्मणून त्याला फळ येत
नाहीं. २३ आणि चांगल्या भूमीवर पेरलेला तो
हाच आहे कीं, वचन ऐकून समजतो, तो फळ दे-
तोच, ह्मणजे कोणी शंभरपट, कोणी साठपट, को-
णी तीसपट देतो."
२४ त्याने त्यांस दुसरा दाखला दिल्हा कीं,
आकाशाचें राज्य एका माणसासारिखें आहे ; त्याने
आपल्या शेतांत चांगलें बीं पेरलें; २५ परंतु मा-
णसें झोंपेंत असतांना त्याचा वैरी आला, आणि
गव्हांमध्यें निदण पेरून गेला. २६ मग जेव्हां
पाला फुटला आणि त्याला फळ आलें, तेव्हां नि-
दणहि दिसूं लागलें. २७ मग घरधन्याच्या चा-
करांनी येऊन त्याला ह्मटलें, महाराज, आपण
आपल्या शेतामध्यें चांगलें बीं पेरिलें ना! तर
त्यांत निदण कोठून आलें? २८ तेव्हां तो त्यांस
ह्मणाला, हें काम कोणी वैऱ्याचें आहे. मग चाक-
रांनी त्याला ह्मटलें, तर आह्मी जाऊन तें जमा
करावें असी आपली आज्ञा आहे काय? २९
तेव्हां तो ह्मणाला, नका, तुह्मी निदण जमा करि-
तांना त्याबरोबर कदाचित् गहूंहि उपटाल. ३०
कापणीपर्यंत दोन्ही बरोबर वाढूं द्या, मग कापणी-
च्या वेळेस मी कापणाऱ्यांस सांगेन कीं, पहिल्याने
निदण जमा करा, आणि जाळण्यासाठीं त्यांच्या
पेंढ्या बांधा, मग गहूं माझ्या कोठारांत सांठवा.
३१ त्याने त्यांस अणखी एक दाखला दिल्हा कीं,
"आकाशाचें राज्य मोहरीच्या दाण्यासारिखें आहे;
तो एका माणसाने घेऊन आपल्या शेतांत पेरिला.
३२ तो सर्व दाण्यांमध्यें बारीक आहे, परंतु वाढल्यावर
भाज्यांमध्यें मोठें असतें, आणि इतकें मोठें झाड होतें
कीं, आकाशांतील पांखरें येऊन त्याच्या फांद्यांवर वस-
तात." ३३ त्याने त्यांस अणखी एक दाखला
देऊन सांगितलें कीं, "आकाशाचें राज्य खमिरा-
सारिखें आहे, तें एका बायकोने घेऊन तीन शेर
पिठामध्यें लपवून ठेविलें, सर्व फुगून गेलें तोंपर्यंत.
३४ ह्या सर्व गोष्टी येशूने दाखले देऊन समुदा-
यांस सांगितल्या, आणि दाखल्यावांचून तो त्यांसीं
बोलला नाहीं; ३५ भविष्यवाद्याने जें सांगि-
तलें होतें तें पूर्ण व्हावें ह्मणून; तें असें कीं, "मी
आपलें तोंड दाखले देण्यास उघडीन, जगाच्या मां-
डण्यापासून जें लपविलेलें तें प्रगट करीन."
३६ नंतर येशू समुदायांस निरोप देऊन घरांत
गेला. मग त्याचे शिष्य त्याच्या जवळ येऊन ह्म-
णाले, "शेतांतल्या निदणाचा दाखला आह्मास
फोडून सांग." ३७ तेव्हां त्याने त्यांस उत्तर
दिल्हें कीं, "चांगलें बीं पेरणारा हा मनुष्याचा पुत्र
आहे; ३८ आणि शेत हें जग आहे; आणि चां-
गलें बीं हे राज्यांतील पुत्र आहेत, आणि निदण हे
त्या दुष्टाचे पुत्र आहेत; ३९ आणि पेरणारा
वैरी हा सैतान आहे; आणि कापणी हीं काळाची
समाप्ति आहे; आणि कापणारे हे दूत आहेत.
४० तर जसें निदण जमा करून अग्नींत जाळतात,
तसें या काळाच्या समाप्तीस होईल. ४१ मनु-
ष्याचा पुत्र आपल्या दुतांस पाठवील, आणि सर्व
अडखळविणाऱ्यांस व अन्याय करणाऱ्यांस ते
त्याच्या राज्यांतून जमा करून, ४२ त्यांस अ-
ग्नीच्या भट्टींत टाकितील; तेथें रडणें व दांत खाणें
होईल. ४३ तेव्हां न्यायी आपल्या बापाच्या
राज्यांत सूर्यासारिखे प्रकाशतील. ज्याला ऐका-
यास कान आहेत तो ऐको."
४४ अणखी आकाशाचें राज्य शेतांत लपविले-
ल्या ठेवीसारिखें आहे; ती कोणी माणसाला सांप-
डली ह्मणजे तो लपवून ठेवितो, मग त्या गोष्टीच्या
आनंदामुळें तो जाऊन आपलें सर्व विकतो, नंतर
तें शेत विकत घेतो.
४५ अणखी आकाशाचें राज्य चांगल्या मोत्यां-
च्या शोध करणाऱ्या व्यापारी माणसासारिखें
आहे; ४६ त्याने एक मोलवान मोती पाहून ठेव-
ल्यावर जाऊन आपलें सर्व विकलें, मग तें विकत
घेतलें.
४७ अणखी आकाशाचें राज्य समुद्रामध्यें टाक-
लेल्या ज्या जाळ्यांत सर्व प्रकारचे जीव एकत्र सांप-
डतात त्यासारिखें आहे; ४८ तें भरल्यावर कां-
ठास ओढितात, आणि बसून चांगल्यांस भांड्यांमध्यें
भरितात, आणि वाइटांस फेंकून देतात. ४९ तसें
काळाच्या समाप्तीस होईल; दूत येऊन न्यायींपा-

सून वाइटांस वेगळें करतील ; ५० आणि त्यांस
अग्नीच्या भट्टींत टाकितील, तेथें रडणें व दांत खाणें
होईल." ५१ येशू त्यांस ह्मणाला, "तुह्मी या
गोष्टी समजलां काय?" ते त्याला ह्मणाले, "होय,
प्रभू." ५२ तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, "तर
आकाशाच्या राज्याविषयीं प्रत्येक शिकलेला शास्त्री
हा कोणी घरधनी आपल्या भांडारांतून नवे व जुने
पदार्थ काढितो, यासारिखा आहे."

५३ आणि असें झालें कीं, हे दाखले संपवि-
ल्यावर येशू तेथून गेला. ५४ आणि आपल्या
देशांत जाऊन त्याने त्यांच्या सभास्थानामध्यें त्यांस
असा उपदेश केला कीं, ते थक्क होऊन बोलले,
"हें ज्ञान व हे चमत्कार याला कोठून? ५५
हा सुताराचा पुत्र नव्हे ना? याच्या आईला मारया
ह्मणतात ना? आणि याकोब व योसे व शीमोन व
यहूदा, हे त्याचे भाऊ आहेत ना? ५६ आणि
त्याच्या सर्व बहिणी आमच्या मध्यें नाहींत काय?
तर या सर्व गोष्टी याला कोठून?" ५७ असें
ते त्याजविषयीं अडखळले. तेव्हां येशूने त्यांस
ह्मटलें, "भविष्यवादी आपला देश व आपलें
घर यांत मात्र सन्मान पावत नाहीं." ५८ आणि
तेथें त्यांच्या अविश्वासामुळें त्याने बहुत चमत्कार
केले नाहींत.

## अध्याय १४.

त्या वेळेस हेरोद राजाने येशूची कीर्त्ति ऐकि-
ली ; २ आणि आपल्या चाकरांस ह्मटलें
कीं, "बाप्तिस्मा करणारा योहान्न हाच आहे; तो
मेलेल्यांमधून उठला आहे, ह्मणून त्याकडून हे
चमत्कार घडतात." ३ कां कीं हेरोदाने आपला
भाऊ फिलिप्पस याची बायको हेरोदियस इज-
करितां योहान्नाला धरून त्याला बांधून बंदि-
शाळेंत घातलें होतें ; ४ कारण कीं योहान्नाने
त्याला ह्मटलें होतें, "तिला ठेवावें हें तुला योग्य
नाहीं." ५ मग तो त्याचा घात करायास पाहत
असतां समुदायास भ्याला, कां कीं ते त्याला भवि-
ष्यवादी असें मानीत असत. ६ नंतर हेरोदा-
च्या जन्म दिवसाची मेजवानी होत असतां, हेरो-
दियसीच्या कन्येने मध्यें नाचून हेरोदाला संतुष्ट
केलें. ७ त्यावरून त्याने शपथ वाहून करार
केला कीं, "जें कांहीं तूं मागसील तें मी तुला
देईन." ८ मग ती आपल्या आईने पूर्वी शिक-
विल्याप्रमाणें ह्मणाली, "बाप्तिस्मा करणारा योहान्न
याचें शिर तबकांत घालून एथें मला आणून दे."
९ तेव्हां राजा खिन्न झाला, तथापि शपथांमुळें व
संगती बसणाऱ्यांमुळें, त्याने द्यावयास सांगितलें;
१० आणि बंदिशाळेंत पाठवून योहान्नाचें शिर तो-
डिलें. ११ आणि त्याचें शिर तबकांत घालून त्या
मुलगीला आणून दिलें, मग तिने आपल्या आईजवळ
नेलें. १२ नंतर त्याच्या शिष्यानी येऊन शरीर
उचलून नेलें आणि तें पुरलें ; मग जाऊन येशूला
वर्त्तमान सांगितलें.

१३ मग येशू हें ऐकून तेथून निघून तारवांतून
रानांतल्या जाग्यांत एकीकडे गेला; तरी समुदाय
ऐकून नगरांमधून त्याच्या मागें पायीं चालले. १४
मग येशूने बाहेर येऊन मोठा समुदाय पाहिला :
तेव्हां त्याविषयीं तो कळवळला, आणि त्यां-
तील दुखणेकऱ्यांस त्याने बरें केलें. १५ मग
संध्याकाळ झाल्यावर, त्याचे शिष्य त्याकडे येऊन
ह्मणाले, "ही रानांतली जागा आहे, आणि वेळ
होऊन गेली आहे ; त्यानी गांवांमध्यें जाऊन आपल्या-
करितां खायास विकत घ्यावें ह्मणून समुदायांस
निरोप दे." १६ परंतु येशू त्यांस ह्मणाला, "त्यांस
जाण्याची गरज नाहीं, तुह्मी त्यांस खायास
द्या." १७ तेव्हां ते त्याला ह्मणाले, "पांच भा-
करी व दोन मासे यांखेरीज आह्माजवळ एथें कांहीं
नाहीं." १८ तेव्हां तो ह्मणाला, "तीं इकडे
मजजवळ आणा." १९ मग त्याने समुदायांस
गवतावर बसायाला सांगितलें, आणि त्या पांच भा-
करी व ते दोन मासे घेऊन त्याने वर आकाशाकडे
पाहून आशीर्वाद मागितला; नंतर भाकरी मोडून
शिष्यांस दिल्ह्या व शिष्यानी समुदायांस दिल्ह्या.
२० तेव्हां ते सर्व जेवून तृप्त झाले; नंतर उरले-
ल्या तुकड्यानी बारा टोपल्या भरून त्यानी उचलून
नेल्या. २१ आणि खाणारे पुरुष बायका व लें-
करें खेरीज करून सुमारें पांच हजार होते.

२२ तेव्हांच आपण समुदायांस निरोप देत
आहे इतक्यांत येशूने आपल्या शिष्यांस तारवावर
चढून आपल्या पुढें पलिकडे जावयास सांगितलें.
२३ मग समुदायास निरोप दिल्ह्यावर तो प्रार्थना
करायास एकीकडे डोंगरावर गेला; आणि रात्र
झाली तेव्हां तो तेथें एकटाच होता. २४ परंतु
त्या काळीं तारूं समुद्राच्या मध्यभागीं असतां ला-
टानी डळमळत होतें, कारण कीं वारा तोंडचा

होता. २५ मग रात्रीच्या चवथ्या प्रहरीं येशू
समुद्रावर चालत त्यांजकडे गेला. २६ तेव्हां
शिष्य त्याला समुद्रावर चालतां पाहून घाबरे हो-
ऊन ह्मणाले, भूत आहे; आणि ते सर्व भिऊन
ओरडले. २७ परंतु तेव्हांच येशू त्यांस ह्मणा-
ला धीर धरा, मी आहें, भिऊं नका. २८ तेव्हां
पेत्रसाने त्याला उत्तर दिल्हें, हे प्रभू, तूं
असलास तर पाण्यावरून तुजकडे यायास मला
सांग. २९ मग त्याने सांगितलें, ये; तेव्हां पेत्रस
येशूकडे जायास तारवावरून उतरून पाण्या-
वर चालला. ३० परंतु वारा मोठा असें पाहून
तो भ्याला, आणि बुडूं लागल्यावर ओरडत
बोलला कीं, हे प्रभू, मला तार. ३१ ते-
व्हांच येशूने हात लांबवून त्याला धरिलें, आणि
त्याला ह्मटलें, हे अल्पविश्वासी, त्वां संशय कां
धरिला? ३२ मग ते तारवांत बसल्यानंतर
वारा राहिला. ३३ तेव्हां तारवांतलीं माणसें
येऊन त्याच्या पायां पडून ह्मणालीं, तूं देवाचा
पुत्र आहेस, खरा.

३४ नंतर ते पार जाऊन गनेसारेत देशांत
पोहंचले; ३५ आणि त्या जाग्यांतल्या माणसानी
त्याला ओळखून त्या चहुंकडल्या अवघ्या प्रांतांत
पाठवून सर्व दुखणाइतांस त्याजकडे आणिलें. ३६
आणि केवळ तुझ्या वस्त्राच्या कांठाला आह्मी
शिवावें असी त्यानी त्याजवळ विनंती केली, आणि
जितके शिवले तितके बरे झाले.

## अध्याय १५.

तेव्हां यरूशलेमांतील शास्त्री व परोशी येशू-
कडे येऊन ह्मणाले, २ तुझे शिष्य वाडव-
डिलांचा सांप्रदाय कां उल्लंघितात? कां कीं भाकर
खाण्याच्या वेळेस ते आपले हात धूत नाहींत.
३ मग त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मीहि
आपल्या सांप्रदायेंकरून देवाची आज्ञा कां उल्लं-
घितां? ४ कारण देवाने असी आज्ञा केली
कीं, तूं आपल्या आईबापांचा सन्मान कर, आणि
जो बापाची किंवा आईची निंदा करितो त्याला ठार
मारावें. ५ परंतु तुह्मी ह्मणतां जेणेंकरून तुझें हित
मजकडून व्हायाचें तें अर्पण, असें जो कोणी बा-
पाला किंवा आईला ह्मणेल, ६ त्याने आपल्या
बापाचा व आपल्या आईचा सन्मान करूं नये;
याप्रकारें तुह्मी आपल्या सांप्रदायाने देवाची आज्ञा
रद्द केली आहे. ७ अहो ढोंगी, तुह्माविषयीं
यशायाने भविष्य ठीक सांगितलें कीं; ८ हे लोक
आपल्या तोंडाने माझ्या जवळ येतात, आणि ओं-
ठानी माझा सन्मान करितात, परंतु त्यांचें अंतःकरण
मजपासून दूर आहे. ९ आणि ते माणसांच्या आज्ञा
शास्त्र ह्मणवून शिकवितांना मला व्यर्थ भजतात.
१० तेव्हां त्याने समुदायाला बोलावून ह्मटलें,
ऐका, व समजून घ्या; ११ जें तोंडांत जातें तें
माणसाला विटाळवीत नाहीं, तर जें तोंडांतून
निघतें तेंच माणसाला विटाळवितें.

१२ नंतर त्याचे शिष्य येऊन त्याला ह्मणाले,
परोशी हीं गोष्ट ऐकून अडखळले, हें तुला कळलें
काय? १३ त्यावर त्याने उत्तर दिल्हें कीं, जें
कांहीं रोप माझ्या आकाशांतील बापाने लाविलें
नाहीं, तें उपटून टाकतील. १४ त्यांस असूं द्या,
ते अंधळ्यांचे अंधळे वाटाडे आहेत, आणि
अंधळा अंधळ्याला नेऊं लागला तर दोघेहि खा-
चेंत पडतील. १५ तेव्हां पेत्रसाने त्याला उत्तर
दिल्हें, हा दाखला आह्मास फोडून सांग. १६
मग येशू बोलला, अझून तुह्मीहि अज्ञानी आहां
काय? १७ जें तोंडांत जातें तें अवघें पोटांत मा-
वतें, आणि बाहेर शौचकुपांत पडतें, हें तुह्मी अझून
समजत नाहीं काय? १८ परंतु जें तोंडांतून
निघतें तें अंतःकरणांतून निघतें, आणि तेंच माण-
साला विटाळवितें. १९ कां कीं अंतःकरणांतून वा-
ईट विचार, हत्या, व्यभिचार, शिंदळक्या, चोऱ्या,
खोट्या साक्षी, दुर्भाषणें, हीं निघतात; २० माण-
साला विटाळविणारीं हींच आहेत, परंतु न धुतलेल्या
हातानी खाणें, हें माणसाला विटाळवीत नाहीं.

२१ नंतर येशू तेथून निघून सोर व सीदोन
याच्या प्रांतांत गेला. २२ तेव्हां पाहा, त्या प्रां-
तांतून कोणीएक कनानी बायको येऊन त्याला ओ-
रडत ह्मणाली, हे प्रभू, दाविदाच्या पुत्रा, मजवर
दया कर; माझी कन्या भुतापासून भारी पीडा पावत
आहे. २३ परंतु त्याने तिला कांहींच उत्तर
दिल्हें नाहीं; तेव्हां त्याच्या शिष्यानी जवळ येऊन
त्याला विनंती केली कीं, ती आमच्या मागें ओर-
डती, यास्तव तिला निरोप दे. २४ मग त्याने
उत्तर दिल्हें कीं, मला केवळ इस्राएलाच्या घरा-
ण्याच्या हरपलेल्या मेंढरांकडे पाठविलें आहे. २५
तेव्हां ती येऊन त्याच्या पायां पडून बोलली, हे
प्रभू, माझें सहाय कर. २६ परंतु त्याने उत्तर

दिल्हें कीं, लेंकरांची भाकर घेऊन कुत्र्यांस घालणें,
हें ठीक नव्हे· २७ मग तिने ह्मटलें, खरें प्रभू;
तरी कुत्रींहि आपल्या धन्यांच्या मेजावरून पडलेला
चूर खातात· २८ तेव्हां येशूने तिला उत्तर
दिल्हें कीं, बाई, तुझा विश्वास मोठा, तुझ्या इच्छे-
प्रमाणें तुला होवो; आणि त्याच घटकेस तिची
कन्या बरी झाली·

२९ तेव्हां येशू तेथून निघून गालीलाच्या समु-
द्राजवळ गेला, आणि डोंगरावर चढून तेथें बसला.
३० नंतर बहुत समुदाय लंगड्यांस अंधळ्यांस
मुक्यांस व्यंगांस व दुसऱ्या बहुतांस आपल्यां-
बरोबर घेऊन त्याच्या जवळ आले, आणि त्यानी
त्यांस येशूच्या पायांजवळ टाकिलें, आणि त्याने
त्यांस असें बरें केलें कीं, ३१ मुके बोलतात,
व्यंग धड होतात, लंगडे चालतात व अंध-
ळे पाहतात, हें समुदायानी पाहून आश्चर्य केलें,
आणि इस्राएलाच्या देवाला ते गौरवूं लागले·

३२ मग येशूने आपल्या शिष्यांस बोला-
वून ह्मटलें, मला समुदायाचा कळवळा येतो,
कारण कीं ते आज तीन दिवस माझ्या जवळ रा-
हिले आहेत, आणि त्यांपासीं खायाला कांहीं
नाहीं, आणि त्यांस उपासी निरोप द्यावा, असें
माझ्या मनांत नाहीं, कां कीं कदाचित् ते वा-
टेंत कासावीस होतील· ३३ नंतर त्याचे शिष्य
त्याला ह्मणाले, एवढा समुदाय तृप्त व्हावा,
इतक्या भाकरी रानांत आह्माजवळ कोठून? ३४
तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें, तुह्माजवळ किती भा-
करी आहेत? मग त्यानी ह्मटलें, सात, व कांहीं
मासोळ्या· ३५ मग त्याने समुदायांस भूमीवर
बसायास सांगितलें· ३६ नंतर त्याने त्या सात
भाकरी व मासोळ्या घेऊन आशीर्वाद मागितल्या-
वर त्या मोडिल्या, आणि आपल्या शिष्यांस दि-
ल्ह्या, मग शिष्यानी समुदायाला दिल्ह्या· ३७ तेव्हां
ते सर्व जेवून तृप्त झाले, मग उरलेल्या तुकड्यानी
सात पाट्या भरून त्यानी उचलून नेल्या· ३८
आणि खाणारे, बायका व लेंकरें यांखेरीज चार
हजार पुरुष होते· ३९ मग समुदायांस निरोप
दिल्ह्यावर तो तारवांतून माग्दाल्याच्या प्रांतांत गेला.

## अध्याय १६.

तेव्हां परोशी व सदोकी यानी येऊन येशूची परी-
क्षा पाहण्याकरितां त्याजवळ मागितलें कीं,
आह्मास आकाशांतील चमत्कार दाखवावा· २
तेव्हां त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, संध्याकाळीं
तुह्मी ह्मणतां, उघाड होईल कां कीं आभाळ तांबूस
आहे; ३ आणि सकाळीं, आज झड लागेल कां
कीं आभाळ तांबूस व गडद आहे· अहो
ढोंग्यानो, आभाळाचीं लक्षणें जाणायाला तुह्मास
येतें खरें, पण काळांचीं लक्षणें तुह्मास सम-
जत नाहींत काय? ४ वाईट व व्यभिचारी
पिढी चमत्कार मागती, परंतु योना भविष्यवादी
याच्या चमत्कारावांचून तिला चमत्कार मिळणार
नाहीं· तेव्हां तो त्यांस सोडून गेला·

५ नंतर त्याचे शिष्य पलिकडे गेले, भाकरी तर
बरोबर घ्यायास विसरले होते· ६ तेव्हां येशू
त्यांस ह्मणाला, परोशी व सदोकी यांच्या खमीरा-
विषयीं संभाळा व जपा· ७ तेव्हां ते आपल्यां-
मध्यें विचार करून ह्मणूं लागले, आह्मी भाकरी
घेतल्या नाहींत, ह्मणून हा असें बोलतो· ८
परंतु येशू हें जाणून त्यांस ह्मणाला, अहो अल्प-
विश्वासी, तुह्मी भाकरी घेतल्या नाहींत ह्मणून
असा विचार तुह्मी आपल्यांमध्यें कां करितां? ९
तुह्मी अझून समजलां नाहीं काय? आणि पांच
हजारांच्या पांच भाकरी, आणि तुह्मी किती टोपल्या
उचलिल्या: १० अणखी चार हजारांच्या सात
भाकरी, आणि किती पाट्या उचलिल्या, याची
तुह्माला आठवण नाहीं काय? ११ परोशी व
सदोकी यांच्या खमिराविषयीं जपा, असें भाकरी-
विषयीं म्या तुह्मास सांगितलें नाहीं, तें तुह्मी कां
समजत नाहीं? १२ तेव्हां ते समजले कीं, त्याने
भाकरीच्या खमिराविषयीं नाहीं, तर परोशी व
सदोकी यांच्या उपदेशाविषयीं जपायास सांगितलें·

१३ नंतर फिलिप्पसाच्या काइसारीकडल्या
प्रांतांत गेल्यावर येशूने आपल्या शिष्यांस विचा-
रिलें कीं, मनुष्याचा पुत्र जो मी त्या मला लोक
कोण ह्मणून ह्मणतात? १४ तेव्हां ते बोलले,
कित्येक बाप्तिस्मा करणारा योहान्न, आणि कि-
त्येक एलीया, आणि कित्येक इर्मया किंवा भविष्य-
वाद्यांतील एक, असें ह्मणतात· १५ तो
त्यांस ह्मणाला, तुह्मी तर मला कोण ह्मणून
ह्मणतां? १६ तेव्हां शिमोन पेत्रसाने उत्तर
दिल्हें कीं, तूं जिवंत देवाचा पुत्र ख्रीस्त आहेस·
१७ मग येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, शिमोन
बार्योना, तूं धन्य आहेस, कारण कीं मांस व रक्त

यानी नाहीं, तर माझ्या आकाशांतील बापानें हें
तुला कळविलें आहे. १८ आणखी मी तुला
सांगतों कीं, तूं पेत्रस ह्मणजे खडक आहेस, आणि
या खडकावर मी आपली मंडळी रचीन, आणि
तिजवर मृतलोकाच्या दरवाज्यांचें बळ चालणार नाहीं.
१९ आणि मी तुला आकाशाच्या राज्याच्या किल्-
ल्या देईन; मग पृथ्वीवर जें कांहीं तूं बंद करसील
तें आकाशांत बंद होईल; आणि पृथ्वीवर जें कांहीं
तूं मोकळें करसील तें आकाशांत मोकळें होईल.
२० तेव्हां त्यानें आपल्या शिष्यांस निक्षूण सांगि-
तलें कीं, येशू जो ख्रीस्त तो मी आहें, हें कोणाला
सांगूं नका.

२१ तेव्हांपासून येशू आपल्या शिष्यांस कळवूं
लागला कीं, म्या यरूशालेमास जाऊन वडील व
मुख्य याजक व शास्त्री यांकडून बहुत दुःखें सो-
सावीं, आणि मला जिवें मारावें, आणि तिसऱ्या
दिवसीं म्या पुन्हा उठावें, याचें अगत्य आहे.
२२ तेव्हां पेत्रस त्याला जवळ घेऊन त्याला
धमकावूं लागला कीं, हे प्रभू, तुजवर दया
असो; हें तुला होणारच नाहीं. २३ परंतु तो
मुरडून पेत्रसाला ह्मणाला, अरे सैताना, माझ्या
मागें हो; तूं मला अडखळा आहेस; कारण कीं
तूं देवाच्या गोष्टींकडे लक्ष लावीत नाहींस, माणसांच्या
गोष्टींकडे लावितोस.

२४ तेव्हां येशूनें आपल्या शिष्यांस ह्मटलें,
जर कोणी माझ्या मागें यायास इच्छितो, तर
त्यानें आपणाला नाकारावें, आणि आपला खांब
उचलून घेऊन माझ्या मागें यावें. २५ कां कीं जो
कोणी आपला जीव राखायास इच्छितो तो त्याला
मुकेल; परंतु जो कोणी मजकरितां आपल्या जिवा-
ला मुकेल, तो त्याला मिळवील. २६ कारण कीं
माणूस सगळें जग मिळवील आणि आपल्या जिवाची
हानि पावेल, तर त्याला काय लाभ होईल? अथवा
माणूस आपल्या जिवाच्या बदल काय देईल? २७
कां कीं मनुष्याचा पुत्र आपल्या बापाच्या गौरवानें
आपल्या दूतांसुद्धां येणार आहे; आणि त्या
वेळेस तो प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कामाप्रमाणें
देईल. २८ मी तुह्मास खचीत सांगतों कीं,
एथें उभे राहणाऱ्यांतील कोणी असे आहेत कीं,
मनुष्याच्या पुत्राला त्याच्या राज्यांत येतांना पाह-
तील, तोंपर्यंत त्यांस मरणाचा अनुभव होणारच
नाहीं.

## अध्याय १७.

मग साहा दिवसांनंतर येशूनें पेत्रस व याकोब व
त्याचा भाऊ योहान्न यांस बरोबर घेऊन त्यांस
उंच डोंगरावर एकीकडे नेलें. २ तेव्हां त्याचें रूप
त्यांच्या देखतां पालटलें, आणि त्याचें तोंड सूर्या-
सारिखें तेजस्वी झालें, आणि त्याचीं वस्त्रें उजेडा-
सारिखीं पांढरीं झालीं. ३ तेव्हां पाहा, मोशे व
एलीया हे त्यासीं संभाषण करितात असें त्यांनीं
पाहिलें. ४ मग पेत्रस येशूला ह्मणाला, हे प्रभू,
आह्मी एथें असावें हें बरें आहे; तुला बरें वाटलें
तर आह्मी एथें तीन मंडप करूं, तुझ्यासाठीं एक
व मोशासाठीं एक व एलीयासाठीं एक. ५ तो
बोलत असतां पाहा, तेजस्वी ढगानें त्यांवर साव-
ली केली; आणि पाहा, त्या ढगांतून असी वाणी
निघाली कीं, हा माझा प्रिय पुत्र आहे, यावि-
षयीं मी संतुष्ट आहें, याचें तुह्मी ऐका. ६
तेव्हां शिष्य हें ऐकून पालथे पडले व फार भ्याले.
७ परंतु येशूनें येऊन त्यांस हात लाविला व
ह्मटलें, उठा, भिऊं नका. ८ तेव्हां त्यांनी आ-
पले डोळे वर करून कोणाला पाहिलें नाहीं येशूला
मात्र पाहिलें. ९ नंतर ते डोंगरावरून उतरत असतां
येशूनें त्यांस आज्ञा केली कीं, मनुष्याचा पुत्र मेले-
ल्यांमधून उठेल तोंपर्यंत तुह्मी हा साक्षात्कार को-
णाला सांगूं नका. १० मग त्याच्या शिष्यांनी
त्याला पुसलें कीं, एलीया अगोदर आला पा-
हिजे, असें तर शास्त्री कां ह्मणतात? ११ तेव्हां
येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, एलीया अगोदर
येतो खरें, आणि सर्व नीट करून ठेवील; १२
परंतु मी तुह्मास सांगतों कीं, एलीया आलाच
आहे, आणि लोकांनी त्याला ओळखिलें नाहीं,
परंतु त्यांस वाटलें त्याप्रमाणें त्याविषयीं केलें;
तसें मनुष्याचा पुत्रहि त्यांकडून सोसणार आहे.
१३ तेव्हां बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नाविषयीं तो
आह्मास बोलतो असें शिष्य समजले.

१४ नंतर ते समुदायाजवळ आल्यावर, कोणी-
एक माणूस त्याजवळ येऊन त्यापुढें गुडघे टेंकून बो-
लला, १५ "हे प्रभू, माझ्या पुत्रावर दया कर,
कां कीं तो फेंपरेकरी आहे व फार पीडा पावतो;
कारण कीं तो कधीं अग्नींत व कधीं पाण्यांत
पडतो. १६ आणि म्या त्याला तुझ्या शिष्यां-
जवळ आणिलें परंतु त्यांच्यानें त्याला बरें करवेना."

१७ तेव्हां येशूने उत्तर दिल्हें कीं, अहा! अवि-
श्वासी व विपरीत पिढी, मी कोठवर तुह्मा-
बरोबर राहूं? कोठवर तुमचें सोसूं? त्याला एथें
मजकडे आणा. १८ नंतर येशूने भुताला
धमकाविलें; तेव्हां तें त्यांतून निघालें, आणि त्याच
घटकेस तो मुलगा बरा झाला. १९ नंतर शिष्य
एकांतीं येशूजवळ येऊन ह्मणाले, आमच्याने
त्याला कां काढववलें नाहीं? २० तेव्हां येशूने
त्यांस ह्मटलें कीं, तुमच्या अविश्वासामुळें; कारण
कीं मी तुह्मास खचीत सांगतों, मोहरीच्या दाण्या-
एवढा विश्वास तुह्मास असला तर या डोंगराला,
एथून तिकडे सर, असें तुह्मी ह्मटलें ह्मणजे तो
सरेल; आणि तुमच्याने होणार नाहीं असें कांहीं
नाहीं. २१ परंतु प्रार्थना व उपास यांवाचून असली
जात निघत नाहीं.

२२ आणि ते गालीलांत फिरत असतां येशू
त्यांस ह्मणाला, मनुष्याचा पुत्र लोकांच्या हातीं
पडणार आहे; २३ आणि ते त्याला जिवें मारि-
तील, आणि तो तिसऱ्या दिवशीं उठेल. तेव्हां
ते फार खिन्न झाले.

२४ नंतर ते कपर्णाहूमांत आल्यावर पट्टी घेणारे
पेत्रसाकडे येऊन बोलले, तुमचा गुरु पट्टी देतो
कीं नाहीं? २५ त्याने ह्मटलें, देतो. मग तो
घरांत आल्यावर येशू त्याच्या अगोदर बोलला,
शिमोना, तुला कसें वाटतें? देशाचे राजे कोणा-
पासून जकात व पट्टी घेतात? आपल्या पुत्रांपासून
किंवा परक्यांपासून? २६ पेत्रस त्याला ह्मणाला,
परक्यांपासून. येशूने त्याला ह्मटलें, तर पुत्र
मोकळे आहेत. २७ तथापि आह्मी त्यांस अड-
खळवूं नये, ह्मणून तूं जाऊन समुद्रांत गळ टाक;
आणि जो पहिला मासा वर येईल तो धर, मग
त्याचें तोंड उघड, ह्मणजे तुला रुपया सांपडेल,
तो घेऊन मजसाठीं व तुजसाठीं त्यांस दे.

## अध्याय १८.

त्या वेळेस शिष्य येशूकडे येऊन ह्मणाले, आ-
काशाच्या राज्यांत मोठा कोण? २ तेव्हां
येशूने एक बाळक बोलावून त्याला त्यांच्या
मध्यें ठेविलें, आणि ह्मटलें कीं, ३ मी
तुह्मास खचीत सांगतों, जर तुह्मी पालटून बाळ-
कांसारिखे होणार नाहीं तर तुह्मी आकाशाच्या
राज्यांत जाणारच नाहीं. ४ वास्तव जो कोणी
आपणाला या बाळकासारिखा लीन करितो, तोच
आकाशाच्या राज्यांत मोठा होय. ५ आणि
कोणी माझ्या नामाने अशा बाळकाला अंगीकारिलें
तर तो मला अंगीकारितो. ६ परंतु हे लाहान
मजवर विश्वास ठेविणारे यांतील एकाला जो कोणी
अडखळवील, त्याच्या गळ्यांत जात्याची तळी बां-
धून त्याला समुद्राच्या खोल पाण्यांत बुडवावें हें
त्याला बरें आहे. ७ अडखळ्यांमुळें जगाला
हायहाय, कारण कीं अडखळे होण्याचें अगत्य
आहे, परंतु ज्या माणसाकडून अडखळा होईल
त्याला हायहाय. ८ आणि तुझ्या हाताने किंवा
तुझ्या पायाने तुला अडखळविलें तर तो तोडून
आपल्यापासून टाक; दोन हात किंवा दोन पाय
असून सर्वकाळच्या अग्नींत पडावें यापेक्षां लंगडें
किंवा व्यंग होऊन जीवनांत जावें हें तुला बरें आहे.
९ आणि तुझ्या डोळ्याने तुला अडखळविलें तर तो
उपटून आपल्यापासून टाक; दोन डोळे असून नरका-
ग्नींत पडावें यापेक्षां एक डोळा असून जीवनांत जावें
हें तुला बरें आहे. १० संभाळा, या लाहानांतील
एकाचाहि धिक्कार करूं नका, कारण मी तुह्मास
सांगतों कीं, आकाशांत त्यांचे दूत माझ्या आकाशां-
तील बापाचें तोंड निरंतर पाहतात. ११ आणखी
जें हरपलेलें त्याला तारायास मनुष्याचा पुत्र आ-
ला आहे. १२ तुह्मास कसें वाटतें? कोणीएका
माणसाला शंभर मेंढरें असलीं, त्यांतून एखादें
भटकलें, तर तीं नव्याण्णव सोडून तो डोंगरावर
जाऊन त्या भटकलेल्याला हुडकेल कीं नाहीं? १३
आणि तें त्याला सांपडलें तर मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, जीं नव्याण्णव भटकलीं नाहींत त्यांपे-
क्षां तो त्यावरून अधिक आनंद पावतो. १४
तसें या लाहानांतील एकाचा नाश व्हावा, असी
तुमच्या आकाशांतील बापाची इच्छा नाहीं. १५
आणि तुझ्या भावाने तुझा अन्याय केला तर जा
आणि तूं व तो एकांतीं असतां त्याचा दोष त्याला
सांग; त्याने तुझें ऐकिलें तर त्वां आपल्या भावाला
आपलेंसें केलें. १६ परंतु त्याने न ऐकिलें, तर
तूं अणखी एका दोघांस आपल्या बरोबर घे; दोन
किंवा तीन साक्ष्यांच्या तोंडाने प्रत्येक गोष्ट ठरावी
ह्मणून. १७ आणि त्याने त्यांचें न ऐकिलें तर
मंडळीला कळीव, आणि त्याने मंडळीचेंहि न ऐ-
किलें तर मूर्त्तिपूजक किंवा जकातदार यासारिखें
त्याला मान. १८ मी तुह्मास खचीत सांगतों

कीं, जें कांहीं तुह्मी पृथ्वीवर बंद कराल, तें आका-
शामध्यें बंद होईल; आणि जें कांहीं तुह्मी पृथ्वी-
वर मोकळें कराल, तें आकाशामध्यें मोकळें होईल.
१९ आणखी तुह्मास सांगतों कीं, पृथ्वीवर तुह्मा-
मधील दोघांनी कांहींएका गोष्टीविषयीं एकमताचें
होऊन ती मागितली, तर ती माझ्या आकाशांतील
बापाकडून त्यांच्या साठीं घडेल. २० कारण कीं
जेथें दोघे तिघे माझ्या नामानें जमले आहेत, तेथें
त्यांच्या मध्यें मी आहें.

२१ तेव्हां पेत्रस त्याजवळ येऊन ह्मणाला,
हे प्रभू, माझ्या भावानें माझा अन्याय किती
वेळां केला असतां मी त्याला क्षमा करूं? सात
वेळां काय? २२ येशूनें त्याला ह्मटलें, सात
वेळां असें मी तुला ह्मणत नाहीं, तर सातांच्या
सत्तर वेळां. २३ यास्तव आकाशाचें राज्य
कोणीएका राजासारिखें आहे, त्याला आपल्या
चाकराचा हिशोब घ्यावा असें वाटलें. २४
आणि तो घेऊं लागल्यावर एक कोटि रुपयांच्या
देणेदाराला त्याकडे आणिलें. २५ परंतु फेडा-
यास त्याजवळ कांहीं नसतां, त्याच्या धन्यानें आज्ञा
दिल्ही कीं, त्याला व त्याच्या बायकोला व लेंकरांस
व त्याचें जें कांहीं असेल तें विकून कर्ज फेडून
घ्यावें. २६ त्यावर त्या चाकरानें त्याच्या पायां
पडून मागितलें, महाराज, मला वागवून घे, ह्मणजे
मी तुझें सर्व फेडीन. २७ तेव्हां त्या चाकराच्या
धन्याला कळवळा आला, आणि त्यानें त्याला मो-
कळें केलें, व त्याला तें कर्ज सोडिलें. २८ परंतु
तोच चाकर बाहेर गेल्यावर त्याचा एक सोबती
चाकर ज्यावर पंचवीस रुपये घेणें होतें तो
आढळला, तेव्हां तो त्याला धरून नरडी आव-
ळून बोलला, तुजवर माझें घेणें आहे तें फेडून
टाक. २९ त्यावरून त्याचा सोबती चाकर
त्याच्या पायां पडून त्याला विनंती करून ह्मणाला,
मला वागवून घे, ह्मणजे मी तुझें सर्व फेडीन. ३०
पण तो ऐकेना; तर जाऊन तो तें कर्ज फेडी तों-
पर्यंत त्यानें त्याला बंदिशाळेंत घातलें. ३१ तेव्हां
झालेल्या गोष्टी पाहून त्याचे सोबती चाकर फार
खिन्न झाले, आणि त्यांनीं येऊन सर्व वर्त्तमान आ-
पल्या धन्याला उघड सांगितलें. ३२ तेव्हां त्या-
च्या धन्यानें त्याला बोलावून ह्मटलें, अरे वाईट
चाकरा, त्वां मला विनंती केली ह्मणून म्या तें सर्व
कर्ज तुला सोडिलें. ३३ जसी म्या तुजवर दया
केली तसी तूंहि आपल्या सोबती चाकरावर दया
करायाची नव्हती काय? ३४ तेव्हां त्याच्या
धन्यानें त्यावर रागें भरून, तो आपलें सर्व देणें
फेडी तोंपर्यंत त्याला दंड करणाऱ्यांच्या हातीं दिल्हें.
३५ तसें माझा आकाशांतील बापहि तुह्माविषयीं
करील, जर तुह्मी आपल्या अंतःकरणांपासून आपा-
पल्या भावांच्या अपराधांची क्षमा करणार नाहीं,
तर.

## अध्याय १९.

आणि असें झालें कीं, येशूनें या गोष्टी संपवि-
ल्यावर तो गालीलाहून निघून यार्देनेच्या
पलिकडे यहूद्याच्या प्रांतास गेला. २ तेव्हां बहुत
समुदाय त्याच्या मागें चालले, आणि त्यानें त्यांस
तेथें बरें केलें.

३ नंतर परोशी त्याजकडे येऊन त्याची परीक्षा
पाहण्याकरितां त्याला ह्मणाले, पुरुषानें आपल्या
बायकोला कोणत्याहि कारणावरून टाकावें हें त्याला
योग्य आहे काय? ४ तेव्हां त्यानें त्यांस उत्तर
दिल्हें कीं, तुह्मी वाचिलें नाहीं काय? कीं ज्यानें
प्रारंभीं मनुष्यांस उत्पन्न केलें, त्यानें पुरुष व
स्त्री असीं तीं उत्पन्न केलीं; ५ आणि ह्मटलें,
याकरितां पुरुष आईबापांस सोडून आपल्या बाय-
कोसीं जडून राहील, आणि तीं दोघें एक शरीर
होतील. ६ ह्मणून तीं पुढें दोन नव्हत,
तर एक शरीर आहेत; याकरितां देवानें जें
जोडिलें आहे तें माणसानें तोडूं नये. ७ ते
त्याला ह्मणाले, तर सूटपत्र देऊन तिला टाकावें
असी आज्ञा मोशानें कां दिल्ही? ८ त्यानें
त्यांस ह्मटलें, तुमच्या अंतःकरणाच्या कठिणपणा-
मुळें मोशानें तुह्मास आपल्या बायका सोडूं
दिल्ह्या, परंतु पहिल्यापासून असें नव्हतें. ९ आणि
मी तुह्मास सांगतों कीं, जो कोणी आपल्या बाय-
कोला व्यभिचाराच्या कारणावांचून टाकून दुसरी
करील, तो व्यभिचार करील; आणि टाकलेल्या
बायकोसीं जो कोणी लग्न करील तो व्यभिचार
करील. १० त्याचे शिष्य त्याला ह्मणाले, बाय-
कोविषयीं पुरुषाची दशा असी असली तर लग्न
करणें बरें नाहीं. ११ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें,
ज्यांस शक्ति मिळाली त्यांवांचून कोणाच्यानें ही
गोष्ट घेववत नाहीं. १२ कारण कीं आईच्या पोटा-
पासून तसेच जन्मले असे कित्येक नपुंसक आहेत,

आणि माणसानी केले असे कित्येक नपुंसक आहेत,
आणि आकाशाच्या राज्यासाठीं आपणांस नपुंसक
करून घेतलें असे कित्येक नपुंसक आहेत. ज्या-
च्याने हें घेववतें तो घेवो.

१३ नंतर त्याजवळ बाळकें आणिलीं, त्याने
त्यांवर हात ठेवून प्रार्थना करावी ह्मणून, परंतु
शिष्यानी आणणाऱ्यांस धमकाविलें. १४ तेव्हां
येशूने ह्मटलें, बाळकांस असूं द्या, आणि मजकडे
येण्यास मना करूं नका, कारण कीं आकाशाचें
राज्य असल्यांचें आहे. १५ मग तो त्यांजवर
हात ठेवून तेथून गेला.

१६ नंतर पाहा, कोणीएक येऊन त्याला ह्म-
णाला, हे उत्तम गुरू, मला सर्वकाळचें जीवन
मिळावें ह्मणून म्या कोणतें चांगलें काम करावें?
१७ तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, मला उत्तम कां
ह्मणतोस? एक जो देव त्यावांचून कोणी उत्तम
नाहीं; परंतु जीवनांत जायाचें असलें तर आज्ञा
पाळ. १८ तो त्याला ह्मणाला, कोणत्या?
तेव्हां येशूने ह्मटलें कीं, हत्या करूं नको, व्यभि-
चार करूं नको, चोरी करूं नको, खोटी साक्ष देऊं
नको; १९ आपल्या आईबापांचा सन्मान कर,
आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर
प्रीति कर. २० तो तरुण त्याला ह्मणाला, म्या
आपल्या लाहानपणापासून हें अवघें पाळिलें आहे,
तर आतां माझ्या ठायीं काय उणें आहे? २१
येशूने त्याला ह्मटलें, पूर्ण व्हायाचें असलें तर
जा, आपली मालमत्ता विकून दरिद्र्यांस दे, ह्मणजे
आकाशांत तुला संपत्ति मिळेल; चल, माझ्या
मागें ये. २२ परंतु तो तरुण ही गोष्ट ऐकून
खिन्न होऊन निघाला, कां कीं त्याची बहुत माल-
मत्ता होती.

२३ तेव्हां येशूने आपल्या शिष्यांस ह्मटलें,
मी तुह्मास खचीत सांगतों कीं, धनवानाला आ-
काशाच्या राज्यांत जायास कठीण आहे. २४
आणखी तुह्मास सांगतों, धनवानाला देवाच्या
राज्यांत जाणें यापेक्षां उंटाला सुईच्या नाकांतून
जाणें सोपें आहे. २५ तेव्हां त्याचे शिष्य
ऐकून फार थक्क होऊन ह्मणाले, तर तारण कोण
पावेल? २६ मग येशूने त्यांकडे पाहून ह्मटलें,
माणसांच्याने हें होत नाहीं, परंतु देवाच्याने
सर्व होतें. २७ तेव्हां पेत्रसाने त्याला
उत्तर दिल्हें कीं, पाहा, आह्मी सर्व सोडून
तुझ्या मागें आलों, तर आह्मास काय मिळेल?
२८ मग येशूने त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवाच्या आ-
सनावर बसेल, तेव्हां माझ्या मागें चालणारे तुह्मीहि
पुनरुत्थितींत बारा आसनांवर बसून इस्राएलाच्या
बारा वंशांचा न्याय ठरवाल. २९ आणि ज्याने
घरें किंवा भाऊ किंवा बहिणी किंवा बाप किंवा आई
किंवा बायको किंवा लेंकरें किंवा शेतें माझ्या नामा-
करितां सोडलीं आहेत, तो शंभरपट पावेल, आणि
सर्वकाळच्या जीवनाचें वतन पावेल. ३० परंतु
पहिले ते शेवटले, आणि शेवटले ते पहिले, असे
बहुत होतील.

## अध्याय २०.

कारण कीं आकाशाचें राज्य कोणीएका घरधन्या-
सारिखें आहे; तो आपल्या द्राक्षमळ्यांत
कामकऱ्यांस मोलाने लावायास सकाळीं बाहेर
गेला. २ आणि त्याने कामकऱ्यांसीं रोजचा पावला
असा ठराव करून त्यांस आपल्या द्राक्षमळ्यांत
पाठविलें. ३ मग तिसऱ्या तासीं त्याने बाहेर
जाऊन अड्ड्यावर दुसरे रिकामे उभे राहिलेले
पाहिले. ४ आणि तो त्यांस ह्मणाला, तुह्मीहि
द्राक्षमळ्यांत जा, आणि जें योग्य असेल तें मी
तुह्मास देईन; मग ते गेले. ५ आणखी साहाव्या
व नव्या तासीं त्याने बाहेर जाऊन तसेंच केलें.
६ नंतर अकराव्या तासीं बाहेर जाऊन त्याने दुसरे
रिकामे उभे राहिलेले पाहिले; आणि त्याने त्यांस
ह्मटलें, तुह्मी सारा दिवस एथें रिकामे कां उभे
राहिलां? ७ ते त्याला ह्मणाले, आह्मास कोणी
मोलाने लाविलें नाहीं ह्मणून; त्याने त्यांस ह्मटलें,
तुह्मीहि द्राक्षमळ्यांत जा, आणि जें योग्य असेल तें
तुह्मास मिळेल. ८ मग संध्याकाळ झाल्यावर
द्राक्षमळ्याचा धनी आपल्या कारभाऱ्याला ह्मणाला,
कामकऱ्यांस बोलाव, आणि शेवटल्यांपासून आरंभ
करून पहिल्यांपर्यंत त्यांस मजुरी दे. ९ तेव्हां
अकराव्या तासचे ते आल्यावर त्यांतील एकएकाला
पावला पावला मिळाला. १० मग पहिले येऊन,
आपणांस ज्यास्ती मिळेल असें त्यानी मनांत आणिलें,
परंतु त्यांतीलहि एकएकाला पावला पावला मिळाला.
११ आणि त्यानी घेतल्यावर घरधन्यापासीं कुरकूर
करून ह्मटलें, १२ या शेवटल्यानी एकच तास
काम केलें, आणि आह्मी दिवसभर उन्हातान्हांत

कष्ट केले असतां त्यां आह्मास व त्यांस बरोबर
लेखिलें आहे. १३ तेव्हां त्याने त्यांतून एकाला
उत्तर दिल्हें, गड्या, मी तुझा अन्याय करीत नाहीं;
त्वां मजशीं पावल्याचा करार केला नाहीं काय?
१४ तूं आपलें घेऊन नीघ; पण जसें तुला तसें
या शेवटल्यालाहि द्यावें असी माझी खुशी आहे.
१५ माझें जें आहे त्याविषयीं मी आपल्या खुशी-
प्रमाणें करायास मुखत्यार नाहीं काय? मी चांगला
आहें यामुळें तुझा डोळा वाईट आहे काय? १६
याप्रमाणें शेवटले ते पहिले व पहिले ते शेव-
टले होतील; कारण कीं बोलाविलेले बहुत आहेत,
परंतु निवडलेले थोडके.

१७ नंतर येशू यरूशालेमास जात असतां,
वाटेंत बारा शिष्यांस एकीकडे नेऊन तो त्यांस ह्म-
णाला, १८ पाहा, आपण यरूशालेमास जातों,
आणि मनुष्याचा पुत्र मुख्य याजकांच्या व शास्त्र्यां-
च्या हातीं पडेल; आणि ते त्याला मरणदंड
ठरवितील. १९ मग थट्टा करायास व फटके
मारायास व खांबीं द्यायास ते त्याला विदेश्यांच्या
स्वाधीन करितील; आणि तिसऱ्या दिवशीं तो पुन्हा
उठेल.

२० नंतर जबदीच्या पुत्रांच्या आईने आपल्या
पुत्रांबरोबर त्याजकडे येऊन पायां पडून त्यापाशीं
कांहीं मागितलें. २१ तेव्हां त्याने तिला ह्मटलें,
तुला काय पाहिजे? ती त्याला ह्मणाली,
तुझ्या राज्यांत या माझ्या दोघां पुत्रांतील एकाने
तुझ्या उजवीकडे आणि एकाने तुझ्या डावीकडे
बसावें ह्मणून सांग. २२ परंतु येशूने उत्तर दि-
ल्हें कीं, तुह्मी काय मागतां, हें तुह्मास समजत
नाहीं; जो प्याला मला प्यायाचा आहे तो तुम-
च्याने पिववेल, आणि जो बाप्तिस्मा मला घ्यायाचा
आहे तो घेववेल काय? ते त्याला ह्मणाले,
घेववेल. २३ मग त्याने त्यांस ह्मटलें, माझा
प्याला तुह्मी प्याल, आणि जो बाप्तिस्मा मला
घ्यायाचा आहे तो तुह्मी घ्याल खरें, पण ज्यांसाठीं
माझ्या बापाने तयार केलें, त्यांवांचून कोणांस मा-
झ्या उजवीकडे आणि माझ्या डावीकडे बसविणें हें
मजकडे नाहीं. २४ तेव्हां ते दाहा जण हें ऐकून
त्या दोघां भावांवर रागें भरले. २५ परंतु येशूने
त्यांस बोलावून ह्मटलें, विदेश्यांचे अधिकारी त्यां-
वर धनीपणा करितात, आणि मोठे लोक त्यांवर
सत्ता करितात, हें तुह्मास ठाऊक आहे. २६
परंतु तुह्मामध्यें तसें होऊं नये, तर जो कोणी तुह्मा-
मध्यें मोठा व्हायास पाहील तो तुमचा चाकर हो-
वो; २७ आणि जो कोणी तुह्मामध्यें पहिला व्हा-
यास पाहील तो तुमचा दास होवो; २८
ज्याप्रकारें मनुष्याचा पुत्र सेवा घ्यायास नाहीं,
तर सेवा करायास आणि बहुतांची खंडणी व्हावी
ह्मणून आपला जीव द्यायास आला, तसेंच.

२९ तेव्हां ते यरीहोपासून जात असतां, मोठा
समुदाय त्याच्या मागें चालला. ३० आणि
पाहा, वाटेवर बसलेले दोन अंधळे, येशू जव-
ळून जात आहे हें ऐकून ओरडत बोलले, हे
प्रभू, दाविदाच्या पुत्रा, आह्मावर दया कर.
३१ तेव्हां उगेच राहा, असें समुदायाने त्यांस
धमकाविलें, परंतु ते अधिकच ओरडत बोलले, हे
प्रभू, दाविदाच्या पुत्रा, आह्मावर दया कर. ३२
तेव्हां येशूने उभें राहून त्यांस बोलावून ह्मटलें,
म्या तुह्मासाठीं काय करावें, ह्मणून मागतां? ३३
ते त्याला ह्मणाले, हे प्रभू, आमचे डोळे उघडावे.
३४ तेव्हां येशूला कळवळा येऊन त्याने त्यांच्या डो-
ळ्यांस हात लाविला, आणि लागलेंच त्यांच्या डो-
ळ्यांस दिसूं लागलें, आणि ते त्याच्या मागें चालले.

## अध्याय २१.

नंतर ते यरूशालेमाजवळ येऊन जाइत झाडांच्या
डोंगरापासीं बेथफागे एथवर पोहंचले, तेव्हां ये-
शूने दोघां शिष्यांस पाठवितांना त्यांस सांगितलें कीं,
२ तुह्मी आपल्या समोरच्या गांवांत जा, ह्मणजे
लागलेंच बांधलेली गाढवी व तिच्या बरोबर शिंगरूं
तुह्मास मिळेल; त्यांस सोडून मजकडे आणा.
३ आणि कोणी तुह्मास कांहीं ह्मटलें, तर प्र-
भूला यांची गरज आहे असें सांगा, ह्मणजे तो
तेव्हांच त्यांस पाठवील. ४ तेव्हां भविष्यवा-
द्याकडून जें सांगितलें होतें तें पूर्ण व्हावें ह्मणून
हें सर्व झालें; तें असें कीं, ५ सीयोनाच्या
कन्येला सांगा, पाहा, तुझा राजा नम्र होऊन गाढ-
वावर, गाढवीचें बच्चें शिंगरूं यावर बसून तुज-
कडे येत आहे. ६ तेव्हां शिष्यांनी जाऊन
येशूने त्यांस सांगितल्याप्रमाणें केलें; ७ आणि
गाढवी व शिंगरूं हीं आणिलीं आणि त्यांवर आ-
पलीं वस्त्रें घालून त्यांवर त्याला बसविलें. ८
तेव्हां मोठ्या समुदायाने आपलीं वस्त्रें वाटेवर
पसरलीं, आणि दुसऱ्यानी झाडांच्या डाहाळ्या तो-

डून वाटेंत पसरिल्या. ९ आणि पुढें चालणारे
व मागें चालणारे समुदाय ओरडत बोलले, दावि-
दाच्या पुत्राला होसान्ना; प्रभूच्या नांवाने येणारा
धन्यवादित असो; परम उंचांमध्यें होसान्ना.
१० मग तो यरूशालेमांत आल्यावर सर्व
नगर गलबलून बोललें, हा कोण? ११ तेव्हां समु-
दाय ह्मणाले, गालीलांतील नाजारेथकर येशू
भविष्यवादी हाच आहे. १२ नंतर येशू देवा-
च्या देवळांत गेला, आणि देवळांत विकणारे व
विकत घेणारे या सर्वांस त्याने बाहेर घालवून दि-
ल्हें, आणि सराफांचे चौरंग व खबुत्रें विकणाऱ्यांच्या
बैठकी उलथ्या केल्या; १३ आणि त्याने त्यांस
सांगितलें, माझें घर प्रार्थनेचें घर ह्मणतील, असें
लिहिलें आहे; परंतु तुह्मी तें लुटाऱ्यांची गुहा असें
केलें आहे. १४ मग अंधळे व लंगडे देवळांत त्या-
जकडे आले, आणि त्याने त्यांस बरें केलें. १५ तेव्हां
त्याने केलेले चमत्कार पाहून, आणि देवळांत लेंकरें
दाविदाच्या पुत्राला होसान्ना, असें ओरडतांना
ह्मणत आहेत, हेंहि पाहून मुख्य याजक व शास्त्री
रागें भरले; १६ आणि त्याला ह्मणाले, हे
काय बोलतात हें ऐकतोस काय? तेव्हां येशूने
त्यांस ह्मटलें, होय; बाळकें व तान्हीं यांच्या
तोंडांतून त्वां स्तुति पूर्ण करविली आहे, हें तुह्मी
कधीं वाचिलें नाहीं काय? १७ नंतर तो
त्यांस सोडून नगराबाहेर बेथानीस गेला, आणि
तेथें वस्तीस राहिला.

१८ अणखी सकाळीं तो फिरून नगरास जा-
तांना त्याला भूक लागली. १९ तेव्हां वाटेवर अं-
जिराचें झाड पाहून तो त्याकडे गेला; परंतु त्या-
वर पानांवांचून कांहीं मिळालें नाहीं; मग त्याने
त्याला ह्मटलें, यापुढें तुला फळ कधीं न येवो;
मग तें अंजिराचें झाड तेव्हांच वाळून गेलें. २०
नंतर शिष्य तें पाहून आश्चर्य करून ह्मणाले, हें
अंजिराचें झाड किती लवकर वाळून गेलें. २१
तेव्हां येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मी तुह्मास
खचीत सांगतों, तुह्मास विश्वास असला व तुह्मी
संशय न धरिला, तर अंजिराच्या झाडाला केल्या-
प्रमाणें कराल असें केवळ नाहीं, तर तुह्मी या डों-
गराला ह्मटलें कीं, तूं आपल्याला उपटून समुद्रांत
टाक, तर तें घडेल. २२ आणि विश्वास धरून
प्रार्थना करितांना जें कांहीं तुह्मी मागाल तें सर्व
तुह्मास मिळेल.

२३ नंतर तो देवळांत जाऊन उपदेश करीत
असतां मुख्य याजक व लोकांचे वडील त्याकडे
येऊन ह्मणाले, कोणत्या अधिकाराने हें करितोस,
आणि हा अधिकार तुला कोणी दिल्हा? २४
तेव्हां येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मीहि तुह्मास
एक गोष्ट पुसतों ती मला सांगाल, तर कोणत्या
अधिकाराने हें करितों, हें मीहि तुह्मास सांगेन. २५
योहान्नाचा बाप्तिस्मा कोठून झाला? आकाशापासून
किंवा माणसांपासून? तेव्हां ते आपल्यांमध्यें विचार
करूं लागले कीं, आकाशापासून ह्मणूं तर तो आ-
ह्मास ह्मणेल, असें असतां तुह्मी त्यावर विश्वास
कां ठेविला नाहीं? २६ आणि माणसांपासून ह्मणूं
तर आह्मी लोकांस भितों, कारण कीं सर्व योहा-
न्नाला भविष्यवादी असें मानितात. २७ तेव्हां
त्यानी येशूला उत्तर दिल्हें कीं, आह्मास ठाऊक
नाहीं. मग तो त्यांस ह्मणाला, मीहि कोणत्या
अधिकाराने हें करितों हें तुह्मास सांगत नाहीं. २८
परंतु तुह्मास कसें वाटतें? एका माणसाला दोन
पुत्र होते, तो पहिल्याकडे जाऊन बोलला, मुला,
आज माझ्या द्राक्षमळ्यांत जाऊन काम कर.
२९ तेव्हां त्याने उत्तर दिल्हें कीं, मी नाहीं जाव;
तथापि तो कांहीं वेळाने पस्तावून गेला. ३० मग
दुसऱ्याकडे जाऊन त्याने तसेंच ह्मटलें, तेव्हां
त्याने उत्तर दिल्हें कीं, महाराज, जातों; पण
गेला नाहीं. ३१ या दोघांतून कोणत्याने बापाच्या
आज्ञेप्रमाणें केलें? ते त्याला ह्मणाले, पहि-
ल्याने. येशूने त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, जकातदार व कसबिणी तुमच्या
अगोदर देवाच्या राज्यांत जातात. ३२ कारण
कीं योहान्न न्यायाच्या मार्गाने तुह्माकडे आला,
तरी तुह्मी त्यावर विश्वास ठेविला नाहीं; परंतु
जकातदार व कसबिणी यानी त्यावर विश्वास
ठेविला; असें असतां तुह्मी तें पाहून त्यावर वि-
श्वास ठेवण्यासाठीं पश्चात्ताप केला नाहीं.

३३ अणखी एक दाखला ऐकून घ्या; कोणी
घरधनी मनुष्य होता, त्याने द्राक्षमळा लाविला,
आणि त्याभोंवतें कुंपण घातलें, व त्यामध्यें द्रा-
क्षारसासाठीं कुंड खणिलें, व माळा बांधिला;
मग तो माळ्यांस सोपून देऊन आपण प्रवासास
गेला. ३४ नंतर फळांचा हंगाम आला, तेव्हां
त्याचीं फळें घेण्याकरितां त्याने आपल्या चाकरांस
माळ्यांकडे पाठविलें. ३५ तेव्हां माळ्यानी त्याच्या

चाकरांस धरून कोणाला ठोकिलें, कोणाला जिवें
मारिलें, कोणाला धोंडमार केला. ३६ फिरून
त्याने पहिल्यांपेक्षां अधिक असे दुसऱ्या चाकरांस
पाठविलें, त्यांस त्यानीहि तसेंच केलें. ३७
शेवटीं, ते माझ्या पुत्राची भिड धरितील, असें
ह्मणून त्याने आपल्या पुत्राला त्यांकडे पाठविलें.
३८ परंतु माळी पुत्राला पाहून आपल्यांमध्यें ह्मणा-
ले, हा वतनदार आहे, चला, आपण याला जिवें
मारूं, व याचें वतन घेऊं. ३९ तेव्हां त्या-
नी त्याला धरून द्राक्षमळ्याबाहेर काढून जिवें मा-
रिलें. ४० यास्तव द्राक्षमळ्याचा धनी आ-
ल्यावर तो त्या माळ्यांस काय करील? ४१
ते त्याला ह्मणाले, तो त्या वाइटांचा मोठा नाश
करील, आणि जे माळी हंगामीं त्याला फळें देत
जातील, अशा दुसऱ्यांस द्राक्षमळा सोंपून देईल.
४२ येशू त्यांस ह्मणाला, शास्त्रांमध्यें तुह्मी
हें कधीं वाचिलें नाहीं काय? जो धोंडा बांधणा-
ऱ्यानी अव्हेरिला तो कोपऱ्याचा मुख्य धोंडा झाला;
हें प्रभूकडून झालें, आणि आमच्या पाहण्यांत
आश्चर्याचें आहे; ४३ यास्तव मी तुह्मास
सांगतों कीं, देवाचें राज्य तुह्मापासून जाईल,
आणि जी प्रजा त्यांतलीं फळें देईल तिला मि-
ळेल. ४४ आणि जो त्या धोंड्यावर पडेल
त्याचा चुराडा होईल, परंतु ज्या कोणावर तो पडेल
त्याचा भुगा होईल. ४५ तेव्हां मुख्य याजक
आणि परोशी त्याचे दाखले ऐकून असे समजले
कीं, हा आह्मांविषयीं बोलत आहे. ४६ तेव्हां
त्याने त्याला धरायास पाहिलें, परंतु लोकांस भ्याले;
कारण कीं ते त्याला भविष्यवादी असें लेखीत असत.

## अध्याय २२.

तेव्हां येशू दाखल्यानी पुन्हा त्यांस ह्मणूं लागला
कीं; २ आकाशाचें राज्य कोणीएका राजा-
सारिखें आहे; त्याने आपल्या पुत्राचें लग्न केलें.
३ आणि लग्नाला बोलाविलेल्यांस आणायाला
त्याने आपल्या चाकरांस पाठविलें, परंतु ते येईनात.
४ पुन्हा त्याने दुसऱ्या चाकरांस पाठवितांना ह्मटलें,
बोलाविलेल्यांस सांगा, पाहा, म्या आपलें जेवण
तयार केलें आहे; आपले बैल व पुष्टपशु मा-
रिले; अवघें तयार आहे, लग्नाला चला. ५
परंतु हें कांहीं मनावर न घेतां ते कोणी आपल्या शेता-
ला, कोणी आपल्या व्यापाराला गेले; ६ आणि
वरकडानी त्याच्या चाकरांस धरून गांजिलें व
जिवें मारिलें. ७ तेव्हां राजा ऐकून रागें भरला,
आणि आपलीं सैन्यें पाठवून त्याने त्या घातकांचा
नाश केला व त्यांचें नगर जाळून टाकिलें. ८
मग तो आपल्या चाकरांस ह्मणाला, लग्न तयार
आहे खरें, परंतु बोलावलेले योग्य नव्हते. ९ या-
स्तव तुह्मी मार्गांच्या चवाट्यांवर जाऊन जितके
तुह्मास मिळतील तितक्यांस लग्नाला बोलावा.
१० मग त्या चाकरानी बाहेर मार्गांत जाऊन बरे
वाईट जितके त्यांस मिळाले, त्या सर्वांस एकवट
केले, आणि बसणाऱ्यानी लग्नाची जागा भरून गेली.
११ मग राजा बसणाऱ्यांस पाहायास आंत आला
तेव्हां लग्नाचा पोशाक त्याला नव्हता अशा मा-
णसाला पाहिलें. १२ तेव्हां तो त्याला ह्मणाला,
गड्या, लग्नाचा पोशाक त्याल्यावांचून एथें कां आ-
लास? तेव्हां तो उगाच राहिला. १३ मग
राजाने चाकरांस सांगितलें, हात पाय बांधून त्याला
न्या व बाहेरील अंधारांत टाका; तेथें रडणें
व दांत खाणें होईल. १४ या प्रकारें बोलावलेले
बहुत, परंतु निवडलेले थोडके आहेत.

१५ नंतर परोश्यानी जाऊन बोलण्यामध्यें त्या-
ला फाशांत कसें पाडावें, याविषयीं मसलत केली.
१६ आणि त्यानी आपल्या शिष्यांस हेरोदी यां-
सुद्धां त्याजकडे पाठवून ह्मटलें, हे गुरू, आह्मास
ठाऊक आहे कीं, तूं खरा आहेस, आणि देवाचा
मार्ग खरेपणाने सांगतोस, आणि कोणाची काळजी
धरीत नाहींस; कारण कीं माणसांच्या तोंडाकडे तूं
पाहत नाहींस. १७ तर तुला कसें वाटतें, का-
इसाराला पट्टी देणें हें योग्य आहे किंवा नाहीं, हें
आह्मास सांग. १८ तेव्हां येशू त्यांचें दुष्टपण
जाणून बोलला, अहो ढोंगी, माझी परीक्षा कां
पाहतां? १९ पट्टीचा पैका मला दाखवा; तेव्हां
त्यानी त्याजकडे पावली आणिली. २० मग त्याने
त्यांस ह्मटलें, हा मुखवटा व पत्ता कोणाचा?
२१ ते त्याला ह्मणाले, काइसाराचा;" तेव्हां
त्याने त्यांस ह्मटलें, "तर काइसाराचें काइसा-
राला, व देवाचें देवाला भरून द्या. २२
तेव्हां हें ऐकून ते आश्चर्य करूं लागले, आणि
त्याला सोडून गेले.

२३ त्याच दिवसीं पुन्हा उठणें नाहीं असें ह्मण-
णारे सदोकी यानी त्याजकडे येऊन त्याला वि-
चारिलें कीं, २४ हे गुरू, मोश्याने सांगितलें कीं,

कोणीएक लेंकरें झाल्यावांचून मेला, तर त्याच्या भा-
वाने त्याची बायको घ्यावी, आणि आपल्या भावा-
साठीं संतती उत्पन्न करावी. २५ तर आह्मामध्यें
सात भाऊ होते, त्यांतला पहिला लग्न करून मेला;
आणि त्याला संतती नसतां त्याची बायको त्याच्या
भावासाठीं राहिली. २६ दुसरा व तिसराहि
सातव्यापर्यंत तसेच. २७ आणि सर्वांच्या
मागून बायकोहि मेली. २८ तर पुन्हा उठण्या-
च्या वेळेस ती त्या सातांतील कोणाची बा-
यको होईल? कारण कीं ती त्या सर्वांची होती.
२९ तेव्हां येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, शास्त्र
व देवाचें सामर्थ्यहि तुह्मी जाणत नाहीं यामुळें
चुकतां. ३० कारण कीं पुन्हा उठण्याच्या वेळेस
ते लग्न करून घेत नाहींत व लग्न करून देतहि
नाहींत, तर आकाशांतील देवाच्या दुतांसारिखे
असतात. ३१ आणि मेलेल्यांच्या पुन्हा उठण्या-
विषयीं देवाने जें तुह्मास सांगितलें, तें तुह्मी वा-
चिलें नाहीं काय? ३२ कीं, मी आब्राहामाचा
देव व इझाकाचा देव व याकोबाचा देव आहें.
देव हा मेलेल्यांचा देव नव्हे, जिवंतांचा आहे.
३३ तेव्हां हें ऐकून समुदाय त्याच्या उपदेशा-
वरून आश्चर्य करूं लागले.

३४ नंतर त्याने सदोकी कुंठित केले हें ऐकून
परोशी एकवट झाले. ३५ तेव्हां त्यांतील एका
शास्त्र्याने त्याची परीक्षा पाहाण्याकरितां विचारिलें
कीं, ३६ हे गुरू, नेमशास्त्रांत कोणती आज्ञा
मोठी? ३७ मग येशू त्याला ह्मणाला, तुझा देव
प्रभू यावर तूं आपल्या सर्व अंतःकरणाने व आप-
ल्या सर्व जिवाने व आपल्या सर्व मनाने प्रीति कर;
३८ हीच पहिली व मोठी आज्ञा आहे. ३९ आणि
दुसरी ती इजसारिखी आहे कीं तूं जसी आप-
णावर तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर. ४०
या दोन आज्ञांत सर्व नेमशास्त्र व भविष्यशास्त्र
आटलीं आहेत.

४१ आणि परोशी मिळाले असतां त्यांस ये-
शूने विचारिलें कीं; ४२ ख्रीस्ताविषयीं तुह्मास
कसें वाटतें? तो कोणाचा पुत्र? ते त्याला ह्म-
णाले, दाविदाचा. ४३ त्याने त्यांस ह्मटलें,
तर दावीद आत्म्याकडून त्याला प्रभु, असें कां
ह्मणतो कीं, ४४ प्रभूने माझ्या प्रभूला सां-
गितलें, मी तुझ्या शत्रूंस तुझ्या पायांचें आसन
करीन तोंपर्यंत तूं माझ्या उजवीकडे बैस? ४५
यास्तव दावीद त्याला प्रभु असें ह्मणतो, तर मग
तो त्याचा पुत्र कसा होईल? ४६ तेव्हां कोणाच्याने
त्याला एका शब्दाने देखील उत्तर देववेना.
आणि त्या दिवसापासून कोणीहि त्याला अणखी
विचारायास धजला नाहीं.

## अध्याय २३.

तेव्हां येशू समुदायांस व आपल्या शिष्यांस ह्म-
णाला, २ शास्त्री व परोशी मोशाच्या आ-
सनावर बसले आहेत. ३ यास्तव जें जें ते तु-
ह्मास पाळायास सांगतील, तें अवघें पाळा व
करा; परंतु त्यांच्या करण्याप्रमाणें करूं नका, का-
रण कीं ते सांगतात खरें पण करीत नाहींत. ४
अणखी ते भारी व वाहायास अवघड असीं
ओझीं बांधून माणसांच्या खांद्यांवर देतात, परंतु ते
आपल्या बोटाने देखील तीं हालविण्यास इच्छीत
नाहींत. ५ आणि आपलीं सर्व कामें माणसांनी
पाहावीं ह्मणून करितात, आणि आपलीं स्मरणपत्रें
रुंद करितात, आणि आपल्या वस्त्रांचे काठ वाढ-
वितात. ६ अणखी जेवणांमध्यें मुख्य बैठकी व
सभास्थानांमध्यें मुख्य आसनें, ७ आणि चव्हाट्यां-
मध्यें मुजरे घेणें, आणि माणसांकडून गुरुजी गुरुजी
असें ह्मणवून घेणें, हें त्यांस आवडतें. ८ परंतु तुह्मी
आपल्यांस गुरुजी असें ह्मणवून घेऊं नका; कारण कीं
तुमचा एकच गुरु ख्रीस्त आहे, आणि तुह्मी सर्व
भाऊ आहां. ९ आणि पृथ्वीवर कोणाला बाप
ह्मणूं नका, कारण कीं जो आकाशामध्यें तो
तुमचा एकच बाप आहे. १० आणि आपल्यांस
गुरुजी, असें ह्मणवून घेऊं नका, कारण कीं तुमचा
एकच गुरु ख्रीस्त आहे. ११ परंतु जो तुह्माम-
ध्यें मोठा त्याने तुमचा चाकर व्हावें. १२ आणि
जो कोणी आपणाला उंच करील, तो नीच होईल.
आणि जो कोणी आपणाला नीच करील, तो उंच
होईल.

१३ आणि अहो शास्त्री व परोशी तुह्मा ढों-
ग्यांस हाय हाय; कां कीं तुह्मी आकाशाचें रा-
ज्य माणसांपुढें बंद करितां; ह्मणजे तुह्मी स्वतां
आंत जात नाहीं, आणि आंत जाणाऱ्यांसहि आड
देत नाहीं. १४ अहो शास्त्री व परोशी, तुह्मा
ढोंग्यांस हाय हाय; कां कीं तुह्मी विधवांचीं घरें
खाऊन टाकितां, आणि ढोंगाने लांब लचक्या प्रा-
र्थना करितां; यामुळें तुह्मी अधिक दंड पावाल. १५

अहो शास्त्री व परोशी, तुह्मा ढोंग्यांस हाय हाय;
कारण कीं तुह्मी एक शिष्य मिळवायासाठीं समुद्र
व भूमि फिरतां, आणि मिळाला ह्मणजे तुह्मी
त्याला नरकास योग्य आपल्याहून दुप्पट करितां.
१६ अहो अंधळे वाटाडे, तुह्मास हाय हाय; कां कीं
तुह्मी ह्मणतां, कोणी देवळाची शपथ वाहिली तर
तें कांहीं नाहीं; परंतु कोणा देवळांतील सोन्याची
शपथ वाहिली तर तो ऋणी होईल. १७ अहो
मूर्ख व अंधळे, मोठें तर कोणतें, सोनें अथवा सोनें
पवित्र करणारें देऊळ तें? १८ आणि कोणी
वेदीची शपथ वाहिली तर तें कांहीं नाहीं, परंतु
तिजवर अर्पिलेल्याची शपथ कोणी वाहिली तर तो
ऋणी होईल. १९ अहो मूर्ख व अंधळे, मोठें
तर कोणतें अर्पण किंवा अर्पण पवित्र करणारी
वेदी ती? २० यास्तव जो वेदीची शपथ वाहतो
तो तिची व तिजवरील अवघ्यांची शपथ वा-
हतो. २१ आणि जो देवळाची शपथ वाहतो
तो त्याची व त्यांतल्या राहणाऱ्याची शपथ वा-
हतो. २२ आणि जो आकाशाची शपथ वाहतो
तो देवाच्या आसनाची व त्यावरील बसणाऱ्या-
ची शपथ वाहतो. २३ अहो शास्त्री व परोशी,
तुह्मा ढोंग्यांस हाय हाय; कां कीं पुदिना व शेफा व
जिरें यांचा दाहावा भाग तुह्मी देतां, परंतु नेमशा-
स्त्रांतील मुख्य गोष्टी ह्मणजे न्याय व दया व वि-
श्वास या तुह्मी टाकिल्या; या करायाच्या होत्या,
आणि त्या सोडायाच्या नव्हत्या. २४ अहो अं-
धळे वाटाडे, तुह्मी मुरकुटाला गाळितां, आणि उंटा-
ला गिळितां. २५ अहो शास्त्री व परोशी, तुह्मा
ढोंग्यांस हाय हाय; कारण कीं ताट वाटी बाहेरून
साफ करितां; आणि तीं आंतून लूट व बलात्कार
यांनी भरलीं आहेत. २६ अरे अंधळ्या परोश्या,
ताट वाटी बाहेरून साफ व्हावी ह्मणून पहिल्याने तीं
आंतून साफ कर. २७ अहो शास्त्री व परोशी, तुह्मा
ढोंग्यांस हाय हाय; कारण कीं तुह्मी चुना लावले-
ल्या कबरांसारिखे आहां, त्या बाहेरून सुंदर दिस-
तात खऱ्या, परंतु आंतून मेलेल्यांच्या हाडांनी व सर्व
मळाने भरलेल्या आहेत २८ तसेंच तुह्मी बाहे-
रून माणसांस नीतिमान दिसतां खरें, परंतु आंतून
ढोंगाने व अन्यायाने भरले आहां. २९ अहो
शास्त्री व परोशी, तुह्मा ढोंग्यांस हाय हाय; कारण
कीं तुह्मी भविष्यवाद्यांच्या कबरा बांधितां, आणि
नीतिमानांचीं थडीं सुंदर करितां; ३० आणि
ह्मणतां, आह्मी आपल्या वडिलांच्या दिवसांत अस-
तों तर भविष्यवाद्यांच्या घाताविषयीं त्यांचे सोबती
झालों नसतों. ३१ याप्रमाणें तुह्मी भविष्यवाद्यां-
चा घात करणाऱ्यांचे पुत्र आहां, असी तुह्मी आप-
ल्यांविषयीं साक्ष देतां. ३२ तर तुह्मी आपल्या
वडिलांचें माप भरा. ३३ अहो साप, फुरस्यांच्या
पिलांनो, नरकदंड कसा चुकवाल? ३४ यास्तव
पाहा, मी तुह्माकडे भविष्यवादी व ज्ञानी व शास्त्री
यांस पाठवितों, आणि त्यांतील कित्येकांस तुह्मी
जिवें माराल व खांबीं द्याल, आणि त्यांतील
कित्येकांस आपल्या सभास्थानांमध्यें फटके माराल,
आणि नगरोनगरीं त्यांच्या पाठीस लागाल. ३५
यासाठीं कीं नीतिमान हाबेल याच्या रक्तापासून
बरख्याचा पुत्र जखार्या ज्याला तुह्मी वेदी व देऊळ
यांच्या मध्यें जिवें मारिलें, त्याच्या रक्तापर्यंत
सर्व नीतिमानांचें जें रक्त पृथ्वीवर पाडलें तें तुह्मा-
वर यावें; ३६ मी तुह्मास खचीत सांगतों, या
पिढीवर तें अवघें येईल.

३७ हे यरूशालेमा, यरूशालेमा, भविष्यवा-
द्यांचा घात करणाऱ्या, व आपल्याकडे पाठविले-
ल्यांस धोंडमार करणाऱ्या, जसें कोंबडी आपलीं पिलें
पंखांखालीं एकवट करिती त्या प्रकारें तुझ्या लेंकरांस
एकवट करायास कितीदां माझी इच्छा होती, पण
तुमची इच्छा नव्हती. ३८ पाहा, तुमचें घर
तुह्माकरितां ओसाड पडलें आहे. ३९ कारण
मी तुह्मास खचीत सांगतों कीं, आतांपासून प्रभूच्या
नामानें येणारा तो सुवंदित, असें ह्मणाल तोंपर्यंत
मला पाहणारच नाहीं.

## अध्याय २४.

मग येशू देवळांतून निघून बाहेर गेला, आणि
त्याचे शिष्य त्याला देवळाच्या इमारती दा-
खवायास जवळ आले. २ तेव्हां येशू त्यांस ह्मणा-
ला, तुह्मी हें सर्व पाहतां कीं नाहीं? मी तुह्मास
खचीत सांगतों, एथें धोंड्यावरून धोंडा खालीं पड-
ल्यावांचून राहणार नाहीं. ३ नंतर तो जाइत झाडां-
च्या डोंगरावर बसला असतां शिष्य त्याजकडे
एकांतीं येऊन ह्मणाले, या गोष्टी केव्हां होतील,
आणि तुझ्या येण्याचें व काळाच्या समाप्तीचें
चिन्ह काय, हें आह्मास सांग. ४ तेव्हां येशूनें
त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मास कोणी फसवूं नये
ह्मणून जपा. ५ कारण कीं बहुत माझ्या नामानें

येऊन मी खीस्त आहें असें ह्मणतील, आणि बहु-
तांस फसवितील. ६ आणि तुह्मी लढाया
व लढायांच्या अवया ऐकाल; तेव्हां जपा, घा-
बरूं नका, कारण कीं या सर्व गोष्टी अवश्य व्हा-
याच्या आहेत, परंतु तितक्यांत शेवट होणार नाहीं.
७ कारण कीं राष्ट्र राष्ट्रावर, व राज्य राज्या-
वर उठेल, आणि जागोजागीं दुकाळ व मऱ्या व
भूमिकंप होतील; ८ या सर्व गोष्टी तर वेदनांचा
प्रारंभ होय. ९ तेव्हां तुमचे हाल करण्याकरितां
ते तुह्मास पराधीन करितील, आणि तुह्मास जिवें
मारितील, आणि माझ्या नामामुळें अवघ्या देशांचे
लोक तुमचा द्वेष करितील. १० तेव्हां बहुत
अडखळतील व एकमेकांस पराधीन करितील,
व एकमेकांचा द्वेष करितील. ११ आणि बहुत
खोटे भविष्यवादी उठतील, आणि बहुतांस फसवि-
तील. १२ आणि अन्याय वाढल्यामुळें बहुतांची
प्रीति थंड होत जाईल. १३ परंतु शेवटपर्यंत
टिकणारा तोच तरेल. १४ आणि सर्व लोकांस
साक्ष व्हावी ह्मणून राज्याचें हें शुभवर्त्तमान
सर्व जगामध्यें गाजवितील, तेव्हां शेवट होईल.
१५ यास्तव ज्या नाशकारक अमंगळ पदार्थावि-
षयीं दानीयेल भविष्यवाद्याने सांगितलें, तो पवित्र
स्थानांत उभा राहिलेला तुह्मी पाहाल, (वाचणा-
ऱ्याने ध्यानांत आणावें;) १६ तेव्हां जे यहूद्यांत
असतील त्यांनी डोंगरांवर पळून जावें; १७ जो
धाब्यावर असेल त्याने आपल्या घरांतून कांहीं
नेण्याकरितां उतरूं नये; १८ आणि जो शेतांत
असेल त्याने आपलीं वस्त्रें नेण्याकरितां माघारें
येऊं नये. १९ आणि त्या दिवसांमध्यें ज्या गरो-
दर व ज्या थान देणाऱ्या त्यांस हाय हाय.
२० परंतु तुमचें पळणें हिंवाळ्यांत अथवा शाब्बाथ
दिवशीं होऊं नये, ह्मणून प्रार्थना करा. २१ का-
रण कीं जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंत झालें
नाहीं व होणारहि नाहीं, असें मोठें संकट त्या
काळीं होईल. २२ आणि ते दिवस थोडे केले
नसते तर कोणी माणूस न निभावता परंतु निवड-
लेल्यांसाठीं ते दिवस थोडे होतील. २३ तेव्हां
कोणी तुह्मास ह्मटलें, पाहा, खीस्त एथें किंवा तेथें
आहे, तर विश्वास धरूं नका. २४ कारण खोटे
खीस्त व खोटे भविष्यवादी उठतील, आणि
असीं मोठीं चिन्हें व चमत्कार दाखवितील कीं,
साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवितील.
२५ पाहा, म्या अगोदरच तुह्मास सांगून ठेविलें
आहे. २६ यास्तव त्यांनी तुह्मास ह्मटलें, पाहा,
तो रानांत आहे, तर तुह्मी बाहेर जाऊं नका; पाहा,
तो ऐकांतामध्यें आहे, तर विश्वास धरूं नका.
२७ कारण कीं जसी वीज पूर्वेपासून निघून पश्चिमे-
पर्यंत चमकती, तसेंच मनुष्याच्या पुत्राचें येणेंहि
होईल. २८ कारण कीं जेथें कोठें प्रेत असेल
तेथें गीध जमतील.

२९ आणि त्या दिवसांतील संकटानंतर लाग-
लाच सूर्य अंधक होईल, आणि चंद्र आपला उजेड
देणार नाहीं, आणि तारे आकाशांतून पडतील,
आणि आकाशांतील सैन्यें डळमळतील. ३०
तेव्हां मनुष्याच्या पुत्राचें चिन्ह आकाशामध्यें दि-
सेल, अणखी त्या काळीं पृथ्वीवरल्या सर्व जाती
ऊर बडवून घेतील, आणि मनुष्याच्या पुत्राला साम-
र्थ्याने व मोठ्या गौरवाने आकाशाच्या ढगांवर येतां-
ना पाहतील. ३१ आणि करण्याच्या मोठ्या
आवाजाने तो आपल्या दुतांस पाठवील, आणि ते
आकाशाच्या एका शेवटापासून दुसऱ्या शेवटापर्यंत
त्याच्या निवडलेल्यांस चहुंकडून जमा करितील.
३२ आतां अंजिराच्या झाडाच्या दाखल्यावरून
शिका; त्याच्या डाहाळीला रस येऊं लागला व पानें
फुटूं लागलीं, ह्मणजे उन्हाळा जवळ आला असें
समजतां. ३३ तसेंच तुह्मी या सर्व गोष्टी पा-
हाल, तेव्हां तो काळ जवळ दारासीं आहे
असें समजा. ३४ मी तुह्मास खचीत सांगतों, हें
सर्व पूर्ण होईल तोंपर्यंत ही पिढी टळून जाणार
नाहीं. ३५ आकाश व पृथ्वी टळून जातील,
परंतु माझीं वचनें टळून जाणारच नाहींत. ३६
अणखी त्या दिवसाविषयीं व त्या घटकेविषयीं
कोणाला ठाऊक नाहीं, आकाशांतील दुतांसहि नाहीं.
केवळ माझ्या बापाला ठाऊक आहे. ३७ आणि
नोहाचे दिवस जसे होते, तसेंच मनुष्यांच्या पुत्रा-
चें येणेंहि होईल. ३८ कारण कीं जसें जलप्र-
ळयाच्या पूर्वीच्या दिवसांत नोहा तारवांत गेला
त्या दिवसापर्यंत लोक खात पीत होते, लग्न करून
घेत व लग्न करून देतहि होते; ३९ आणि जल-
प्रळयाने येऊन सर्वांस नेलें तोंपर्यंत ते समजले
नाहींत, तसेंच मनुष्याच्या पुत्राचें येणेंहि होईल.
४० त्या वेळेस शेतांत दोघे असतील, एकाला घेतील
एकाला ठेवितील. ४१ जांत्यावर दोघी दळीत
बसतील, एकीला घेतील एकीला ठेवितील.

४२ यास्तव जागे राहा, कां कीं कोणत्या घटकेंत तुमचा धनी येईल हें तुह्मास ठाऊक नाहीं. ४३ अणखी हें समजा कीं, अमुक प्रहरीं चोर येईल, हें घरधन्याला कळलें असतें तर तो जागा राहिला असता, आणि त्याने आपलें घर फोडूं दिल्हें नसतें. ४४ यास्तव तुह्मी तयार व्हा, कां कीं ज्या घटकेंत तुह्मास वाटत नाहीं त्या घटकेंत मनुष्याचा पुत्र येईल. ४५ तर आपल्या परिवाराला यथाकाळीं खायाला द्यायास ज्याला त्याच्या धन्याने त्यावर ठेविलें, असा विश्वासू व बुद्धिमान चाकर कोण? ४६ ज्या चाकराला त्याचा धनी येऊन तसें करितांना पाहील तो धन्य. ४७ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, त्याला तो आपल्या सर्व मालमत्तेवर ठेवील. ४८ परंतु माझा धनी येण्यास उशीर करितो, असें तो वाईट चाकर आपल्या अंतःकरणांत ह्मणाला, ४९ आणि सोबतीच्या चाकरांस मारूं लागला, आणि झिंगलेल्यांबरोबर खाऊं पिऊं लागला; ५० तर त्या दिवसीं तो वाट पाहत नाहीं त्या दिवसीं, आणि जी घटका तो जाणत नाहीं त्या घटकेस त्या चाकराचा धनी येईल; ५१ आणि त्याला कापून टाकील, आणि ढोंग्यांबरोबर त्याला वांटा देईल; तेथें रडणें व दांत खाणें होईल.

## अध्याय २५.

तेव्हां आकाशाचें राज्य दाहा कुमाऱ्यांसारिखें होईल; त्या आपल्या मशाली घेऊन वराला भेटायास निघाल्या. २ आणि त्यांत पांच शाहाण्या व पांच मूर्ख अशा होत्या. ३ मूर्ख होत्या त्यानी आपल्या मशाली घेतल्या असतां आपल्यां बरोबर तेल घेतलें नाहीं; ४ परंतु शाहाण्यानी आपल्या मशालींबरोबर आपल्या बुधल्यांत तेल घेतलें. ५ मग वराला उशीर झाला ह्मणून सर्वांस डुकल्या येऊन झोंप लागली. ६ तेव्हां मध्यरात्रीं असी हाक झाली कीं, पाहा, वर येत आहे, त्याच्या भेटीस बाहेर चला. ७ मग त्या सर्व कुमारी उठल्या व आपल्या मशाली नीट करूं लागल्या. ८ तेव्हां मूर्खांनी शाहाण्यांस ह्मटलें, तुह्मी आपल्या तेलांतून आह्मास कांहीं द्या, कां कीं आमच्या मशाली विझतात. ९ तेव्हां शाहाण्यानी उत्तर दिल्हें कीं, कदाचित् आह्मास व तुह्मास पुरणार नाहीं, त्यापेक्षां तुह्मी विकणाऱ्यांच्या एथें जाऊन आपल्या करितां विकत घ्या. १० मग त्या विकत घ्यायास गेल्या इतक्यांत वर आला, आणि ज्या तयार होत्या त्या त्याच्या बरोबर लग्नास आंत गेल्या, मग दार बंद झालें. ११ नंतर त्या दुसऱ्या कुमारी मागून येऊन ह्मणाल्या, हे प्रभू प्रभू, आह्मासाठीं उघड. १२ परंतु त्याने उत्तर दिल्हें कीं, तुह्मास खचीत सांगतों, मी तुह्मास ओळखत नाहीं. १३ यास्तव तुह्मी जागे राहा, कां कीं कोणत्या दिवसीं किंवा कोणत्या घटकेस मनुष्याचा पुत्र येईल हें तुह्मास ठाऊक नाहीं.

१४ असें कीं, प्रवासास जाणाऱ्या माणसाने आपल्या चाकरांस बोलाविलें व आपली मालमत्ता त्यांस सोंपिली. १५ आणि त्याने एकाला पांच हजार रुपये व एकाला दोन हजार व एकाला एक हजार असे प्रत्येकास ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें दिल्हे, आणि लागलाच प्रवासाला गेला. १६ मग ज्याला पांच हजार रुपये मिळाले होते त्याने जाऊन त्यांचा व्यापार केला, आणि अणखी पांच हजार रुपये मिळविले. १७ तसेंच ज्याला दोन हजार मिळाले होते त्यानेहि अणखी दोन हजार मिळविले. १८ परंतु ज्याला एक हजार मिळाले होते त्याने जाऊन भूमि खणिली, आणि तींत आपल्या धन्याचा पैका लपविला. १९ मग बहुत काळानंतर त्या चाकरांचा धनी आला, आणि त्याचा हिशोब घेऊं लागला. २० तेव्हां ज्याला पांच हजार रुपये मिळाले होते तो येऊन अणखी पांच हजार रुपये आणून ह्मणाला, महाराज, आपण मला पांच हजार रुपये सोंपून दिल्हे; पाहा, त्यांवर म्या अणखी पांच हजार रुपये मिळविले. २१ तेव्हां त्याच्या धन्याने त्याला ह्मटलें, बरें, उत्तम व विश्वासू चाकरा, तूं थोडक्यांवर विश्वासू झालास, मी तुला बहुतांवर ठेवीन; तूं आपल्या धन्याच्या आनंदांत ये. २२ नंतर ज्याला दोन हजार रुपये मिळाले होते तोहि येऊन ह्मणाला, महाराज, आपण मला दोन हजार रुपये सोंपून दिल्हे; पाहा, त्यांवर म्या अणखी दोन हजार रुपये मिळविले. २३ त्याला त्याच्या धन्याने ह्मटलें कीं, बरें, उत्तम व विश्वासू चाकरा, तूं थोडक्यांवर विश्वासू झालास, मी तुला बहुतांवर ठेवीन; तूं आपल्या धन्याच्या आनंदांत ये. २४ मग ज्याला एक हजार रुपये मिळाले होते तोहि येऊन ह्मणाला, महाराज, म्या

तुला आणिलें कीं, तूं कठोर माणूस आहेस, ह्मणजे
त्वां पेरिलें नाहीं तेथें तूं कापितोस व त्वां विख-
रिलें नाहीं तेथून गोळा करितोस. २५ ह्मणून
म्या भिऊन तुझे हजार रुपये भूमींत लपवून ठेविले;
पाहा, तुझे तुला मिळाले. २६ तेव्हां त्याच्या
धन्याने त्याला उत्तर दिल्हें कीं, अरे वाईट व
आळसी चाकरा, म्या पेरिलें नाहीं तेथें मी कापितों,
आणि म्या विखरिलें नाहीं तेथून गोळा करितों, हें
तुला ठाऊक होतें. २७ तर माझा पैका सावका-
रांजवळ ठेवायाचा होता, ह्मणजे म्या आल्यावर
आपले व्याजासुद्धां घेतले असते. २८ यास्तव
ते हजार रुपये याजपासून घ्या, आणि ज्याजवळ
दाहा हजार रुपये आहेत त्याला द्या. २९ कां
कीं ज्याला आहे त्याला देतील, आणि त्याला फार
होईल; आणि ज्याला नाहीं त्याचें जें असेल तें
देखील त्याजपासून घेतील. ३० आणि त्या नि-
रुपयोगी चाकराला बाहेरील अंधारांत टाका; तेथें
रडणें व दांत खाणें होईल.

३१ अणखी मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवाने
येईल, आणि त्याबरोबर सर्व पवित्र दूत येतील,
तेव्हां तो आपल्या गौरवाच्या आसनावर बसेल.
३२ आणि त्यासमोर सर्व राष्ट्रें जमा होतील, आणि
ज्या प्रकारें मेंढपाळ शेरडांतून मेंढरें वेगळीं करितो,
त्या प्रकारें तो त्यांस वेगळें वेगळें करील. ३३ आणि
मेंढरांस तो आपल्या उजवीकडे व शेरडांस डावी-
कडे उभें करील. ३४ तेव्हां राजा आपल्या उज-
वीकडल्यांस ह्मणेल, अहो माझ्या बापाचे आशी-
र्वादित, या, जें राज्य जगाच्या मांडण्यापासून तुह्मा-
करितां तयार केलें तें वतन करून घ्या. ३५ का-
रण कीं मी भुकेला होतों, तेव्हां तुह्मी मला खा-
यास दिल्हें; तान्हेला होतों तेव्हां मला प्यायास
दिल्हें; परका होतों तेव्हां मला घरांत घेतलें;
३६ उघडा, तेव्हां मला पांघरूण दिल्हें; रोगी हो-
तों तेव्हां माझा समाचार घेतला; बंदिशाळेंत हो-
तों तेव्हां मजकडे आलां. ३७ त्या वेळेस नीति-
मान त्याला उत्तर देतील कीं, हे प्रभू, आह्मी
तुला भुकेलें केव्हां पाहून खायास दिल्हें? आणि
तान्हेलें केव्हां पाहून प्यायास दिल्हें? ३८ आणि
तुला परकें केव्हां पाहून घरांत घेतलें? आणि उघडें
केव्हां पाहून पांघरूण दिल्हें? ३९ आणि तुला
रोगी अथवा बंदिशाळेंत केव्हां पाहून तुजकडे आलों?
४० तेव्हां राजा त्यांस उत्तर देईल कीं, मी तुह्मास
खचीत सांगतों, या माझ्या भावांतील लाहानां-
तून एकाला तुह्मी असें केलें, तितक्यावरून
मलाच केलें आहे. ४१ मग डावीकडल्यांसहि
तो ह्मणेल, अहो शापग्रस्तहो, जो सर्वकाळचा अग्नि
सैतानासाठीं व त्याच्या दुतांसाठीं तयार केला आहे
त्यांत मजपासून जा. ४२ कारण कीं मी भुकेला
होतों तेव्हां तुह्मी मला खायास दिल्हें नाहीं;
तान्हेला होतों तेव्हां मला प्यायास दिल्हें नाहीं;
४३ परका होतों तेव्हां मला घरांत घेतलें नाहीं;
उघडा, तेव्हां मला पांघरूण दिल्हें नाहीं; रोगी व
बंदिशाळेंत होतों तेव्हां माझा समाचार घेतला
नाहीं. ४४ तेव्हां हेहि त्याला उत्तर देतील कीं,
हे प्रभू, आह्मी तुला भुकेलें अथवा तान्हेलें अथवा
परकें अथवा उघडें अथवा रोगी अथवा बंदिशाळेंत
असें केव्हां पाहून तुझी सेवा केली नाहीं? ४५
तेव्हां तो त्यांस उत्तर देईल कीं, मी तुह्मास ख-
चीत सांगतों, तुह्मी या लाहानांतील एकाला असें
केलें नाहीं, तितक्यावरून मलाच केलें नाहीं. ४६
ते तर सर्वकाळच्या शासनांत जातील, आणि नीति-
मान सर्वकाळच्या जीवनांत जातील.

## अध्याय २६.

मग असें झालें कीं येशूने हीं सर्व वचनें संप-
विल्यावर आपल्या शिष्यांस ह्मटलें, २
तुह्मास ठाऊक आहे कीं, दोन दिवसानी वल्हां-
डण सण आहे, आणि मनुष्याच्या पुत्राला खांबी
देण्यास पराधीन करितील.

३ तेव्हां कायाफा नामें प्रमुख याजक याच्या घरीं
मुख्य याजक व शास्त्री व लोकांचे वडील जमले. ४
आणि येशूला कपटाने धरावें व जिवें मारावें
असी त्यानी मसलत केली. ५ परंतु सणांत हें
करूं नये, केलें तर कदाचित् लोकांमध्यें गलबला
होईल, असें त्यानी ह्मटलें.

६ आणि येशू बेथानींत कोडी शिमोन याच्या
घरीं असतां, ७ कोणी बायको फार मोलवान
सुंगध तेलाची आलाबास्त्र कुपी घेऊन त्याजकडे
आली, आणि तो जेवायास बसला असतां तिने तीं
त्याच्या डोक्यावर ओतिली. ८ तेव्हां त्याचे
शिष्य हें पाहून रागें भरून बोलले, हा नाश
कशाला? ९ कारण कीं हें सुगंध तेल विकून
बहुत पैसे आले असते व गरिबांस देतां येतें.
१० तेव्हां येशू हें जाणून त्यांस ह्मणाला, का

बायकोला त्रास कां देतां? इने तर मजसाठीं चां-
गलें काम केलें आहे. ११ कारण कीं दरिद्री सर्व-
काळ तुह्मामध्यें आहेत, परंतु मी सर्वकाळ तुह्मा-
मध्यें नाहीं. १२ इनें तर हें सुगंध तेल माझ्या
शरिरावर घातलें हें माझ्या उत्तरकार्यासाठीं केलें.
१३ मी तुह्मास खचीत सांगतों, सर्व जगामध्यें
जेथें जेथें हें शुभवर्त्तमान गाजवितील तेथें इने जें
केलें आहे तेंहि इच्या आठवणीसाठीं सांगतील.
१४ तेव्हां यहूदा इस्कारयोते नामें बारांतील
एक हा मुख्य याजकांकडे जाऊन ह्मणाला, १५
ह्या त्याला तुमच्या स्वाधीन केलें, तर मला काय
द्याल? तेव्हां त्यानी त्याला तीस रुपये देऊं केले.
१६ तेव्हांपासून तो त्याला पराधीन करायाची संधि
पाहूं लागला.
१७ नंतर बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहि-
ल्या दिवसीं शिष्य येशूकडे येऊन त्याला ह्मणाले,
त्वां वल्हांडणाचें भोजन करावें याकरितां आह्मी
कोठें तयारी करावी ह्मणून तुझी आज्ञा आहे?
१८ तेव्हां त्याने ह्मटलें, नगरांत अमक्याजवळ
जाऊन त्याला सांगा कीं, गुरु ह्मणतो, माझी वेळ
जवळ आली आहे, मी आपल्या शिष्यांसुद्धां तुझ्या
एथें वल्हांडण करितों. १९ मग येशूने शिष्यांस
सांगितलें होतें तसें त्यानी केलें, व वल्हांडणाची
तयारी केली. २० आणि संध्याकाळ झाल्यावर
तो बारांबरोबर जेवायास बसला. २१ आणि
ते जेवीत असतां त्याने ह्मटलें, मी तुह्मास ख-
चीत सांगतों कीं, तुह्मामधील एक मला पराधीन
करील. २२ तेव्हां ते फार खिन्न होऊन त्यांतील
एक एक त्याला ह्मणूं लागला, हे प्रभू तो मी आहें
काय? २३ तेव्हां त्याने उत्तर दिल्हें कीं,
जो मजबरोबर ताटांत हात घालितो तोच मला
पराधीन करील. २४ मनुष्याच्या पुत्राविषयीं जसें
लिहिलें आहे तसा तो जातो खरा, परंतु जो मनु-
ष्याच्या पुत्राला पराधीन करितो, त्या माणसाला
हाय हाय; तो माणूस जन्मला नसता तर तें त्या-
ला बरें होतें. २५ तेव्हां त्याला पराधीन करणारा
यहूदा याने उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, तो मी
आहें काय? तो त्याला ह्मणाला, तूं ह्मणतोस
तसेंच.
२६ आणि ते जेवीत असतां येशूने भाकर घे-
तली, आणि आशीर्वाद मागून ती मोडिली, आणि
शिष्यांस दिल्ही व ह्मटलें, घ्या, खा, हें माझें श-
रीर आहे. २७ नंतर त्याने प्याला घेतला, आ-
णि आशीर्वाद मागून तो त्यांस दिल्हा, आणि ह्म-
टलें, यांतून सर्व प्या. २८ कारण कीं हें माझें
रक्त आहे, हें नव्या करारांचें, हें पापांची क्षमा
होण्यासाठीं बहुतांकरितां ओतिलें, असें आहे. २९
आणि मी तुह्मास सांगतों कीं, मी आपल्या बापाच्या
राज्यांत तुह्मांबरोबर नवा पिईन त्या दिवसापर्यंत
द्राक्षवेलाचा हा उपज एव्हांपासून पिणारच नाहीं.
३० नंतर गीत गाऊन ते निघून जाइत झाडांच्या
डोंगरास गेले.
३१ तेव्हां येशू त्यांस ह्मणाला, तुह्मी सर्व
याच रात्रीं मजमुळें अडखळाल; कारण असें लि-
हिलें आहे कीं, मी मेंढपाळाला मारीन, आणि कळ-
पांतल्या मेंढरांची दाणादाण होईल. ३२ परंतु
मी उठल्यावर तुमच्या अगोदर गालीलांत जाईन.
३३ तेव्हां पेत्रसाने त्याला उत्तर दिल्हें कीं, सर्व
तुजमुळें अडखळले तरी मी कधींहि अडखळणार
नाहीं. ३४ येशूने त्याला ह्मटलें, मी तुला
खचीत सांगतों कीं, याच रात्रीं कोंबडा ओरडल्या
अगोदर तूं मला तीन वेळा नाकारसील. ३५
पेत्रस त्याला ह्मणाला, मला तुजबरोबर मरावें
लागलें तरी मी तुला नाकारणारच नाहीं; सर्व शि-
ष्यानीहि तसेंच ह्मटलें.
३६ नंतर येशू त्यांबरोबर गेथ्सेमाने नामक
ठिकाणीं आला; मग तो शिष्यांस ह्मणाला, मी
जाऊन तेथें प्रार्थना करीन तोंपर्यंत एथें बसा.
३७ मग तो पेत्रसाला व जबदीच्या दोघां पुत्रांस
बरोबर घेऊन खिन्न व कष्टी होऊं लागला. ३८
तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, माझा जीव मरणापर्यंत
खिन्न आहे, एथें राहा, आणि मजबरोबर जागे
असा. ३९ मग तो कांहींसा पुढें जाऊन पालथा
पडला, आणि त्याने असी प्रार्थना केली कीं, हे मा-
झ्या बापा. साधेल तर हा प्याला मजपासून टळून
जावो; तथापि माझी इच्छा आहे असें नको, तर
तुझी आहे तसें होवो. ४० मग तो शिष्यांकडे
आला, आणि ते झोंपीं गेले आहेत असें पाहून तो
पेत्रसाला ह्मणाला, असेंच काय? घटकाभरहि मा-
झ्या बरोबर तुमच्याने जागें राहवेना? ४१
तुह्मी परीक्षेंत येऊं नये ह्मणून जागे राहा व
प्रार्थना करा; आत्मा तयार आहे खरा, परंतु देह
अशक्त. ४२ आणखी दुसऱ्याने जाऊन त्याने
असी प्रार्थना केली कीं, हे माझ्या बापा, हा प्या-

ला मी प्याल्यावांचून मजपासून टळून जात नाहीं,
तर तुझ्या इच्छेप्रमाणें होवो. ४३ मग त्याने
येऊन ते पुन्हां झोंपीं गेले आहेत असें पाहिलें; का-
रण कीं त्यांचे डोळे जड झाले होते. ४४ नं-
तर त्यांस सोडून फिरून जाऊन त्याने तिसऱ्याने
तेंच वाक्य ह्मणून प्रार्थना केली. ४५ तेव्हां तो
आपल्या शिष्यांकडे येऊन त्यांस ह्मणाला,
अझून झोंप व विसांवा घेतां! पाहा घटका जवळ
आली आहे, आणि मनुष्याचा पुत्र पाप्यांच्या
हातीं देतात. ४६ उठा, आपण जाऊं; पाहा,
मला पराधीन करणारा जवळ आला आहे.

४७ तेव्हां तो बोलत आहे इतक्यांत पाहा,
बारांतला एक यहूदा आला; आणि त्यासंगतीं
मुख्य याजक व लोकांचे वडील यांकडला मोठा
समुदाय तरवारी व सोटे घेऊन आला. ४८
आणि त्याला पराधीन करणारा याने त्यांस असी
खूण सांगून ठेविली होती कीं, मी ज्याचें चुंबन
घेईन तोच तो आहे, त्याला धरा. ४९ तेव्हांच
त्याने येशूच्या जवळ येऊन ह्मटलें, हे गुरू,
सलाम; आणि त्याचें चुंबन घेतलें. ५० तेव्हां
येशूने त्याला ह्मटलें, मझ्या, कशाकरितां आलास?
तेव्हां त्यानी जवळ येऊन येशूवर हात टाकिले व
त्याला धरिलें. ५१ मग पाहा, येशूबरोबर जे
होते त्यांतून एकाने हात लांबवून आपली तरवार
उपसली, आणि प्रमुख याजकाच्या चाकराला मा-
रून त्याचा कान कापून टाकिला. ५२ तेव्हां येशू
त्याला ह्मणाला, तूं आपली तरवार म्यानांत पर-
तून घाल, कारण कीं तरवार सर्व धरणोरे तरवारीने
नाश पावतील. ५३ म्या आपल्या बापाजवळ
आतां मागितलें, तर तो दुतांच्या बारा सैन्यांपेक्षां
अधिक मला देईल असा मी समर्थ नाहीं, हें तुला
वाटतें काय? ५४ असें केलें तर शास्त्र कसें पूर्ण
होईल? कारण कीं असेंच झालें पाहिजे. ५५
त्याच वेळेस येशू समुदायांस ह्मणाला, जसे लु-
टाऱ्यावर तरवारी व सोटे घेऊन जाता तसें मला
धरायास बाहेर आलां काय? मी प्रतिदिवशीं दे-
वळांत उपदेश करीत तुह्माजवळ बसत असें; तेव्हां
तुह्मी मला धरिलें नाहीं. ५६ परंतु भविष्यवा-
द्यांचे लेख पूर्ण व्हावे, ह्मणून हें सर्व झालें. तेव्हां
सर्व शिष्य त्याला सोडून पळाले.

५७ नंतर येशूला धरिलें होतें त्यानी त्या-
ला प्रमुख याजक कायफा याजवळ नेलें, तेथें
शास्त्री व वडील जमले. ५८ आणि पेत्रस
प्रमुख याजकाच्या वाड्यापर्यंत त्याच्या मागें दुरून
चालत गेला, आणि आंत जाऊन परिणाम पाहा-
यास चाकरांमध्यें बसला. ५९ तेव्हां मुख्य या-
जक व वडील व संपूर्ण न्यायसभा यानी ये-
शूला जिवें मारायाकरितां त्याविषयीं खोटी साक्ष
पाहिली; ६० परंतु त्यांस मिळाली नाहीं,
बहुत खोटे साक्षी आले असताहि मिळाली नाहीं.
शेवटीं दोन खोटे साक्षी येऊन बोलले कीं, ६१
याने ह्मटलें कीं, देवाचें देऊळ मोडायास व
तीन दिवसांत तें बांधायास मी समर्थ आहें.
६२ तेव्हां प्रमुख याजक उठून त्याला बोलला,
तूं कांहींच उत्तर देत नाहींस काय? हे तुझ्या
विरुद्ध कसी साक्ष देतात? ६३ तथापि येशू
उगाच राहिला; त्यावरून प्रमुख याजकाने त्याला
ह्मटलें, मी तुला जिवंत देवाची शपथ घालितों
कीं, देवाचा पुत्र ख्रीस्त तो तूं आहेस काय,
हें आह्मास सांग. ६४ येशू त्याला ह्मणाला,
तूं ह्मणतोस तसेंच; अणखी मी तुह्मास सांगतों,
यापुढें तुह्मी मनुष्याच्या पुत्राला पराक्रमाच्या उज-
वीकडे बसलेलें, आणि आकाशाच्या ढगांवर येतां-
ना पाहाल. ६५ तेव्हां प्रमुख याजक आपलीं
वस्त्रें फाडून बोलला, याने दुर्भाषण केलें आहे;
आह्मास अणखी साक्ष्यांची गरज काय! पा-
हा, आतां तुह्मी याचें दुर्भाषण ऐकिलें आहे.
६६ तुह्मास कसें वाटतें? तेव्हां त्यानी उत्तर
दिल्हें कीं, तो मरणदंडास योग्य आहे. ६७
तेव्हां ते त्याच्या तोंडावर थुंकले, आणि त्यानी
त्याला बुक्क्या मारिल्या, आणि कोणी त्याला चप-
डाका मारून बोलले, ६८ अरे ख्रीस्ता, तुला
कोणी मारिलें, हें तूं भविष्यवादी असल्यास आ-
ह्मास सांग.

६९ पेत्रस तर वाड्यांत बाहेर बसला हो-
ता, तेव्हां एक दासी त्याकडे येऊन ह्मणाली,
तूंहि गालीली येशू याच्या बरोबर होतास. ७०
परंतु तो त्या सर्वांच्या समोर नाकारून बोलला,
तूं ह्मणतीस तें मला ठाऊक नाहीं. ७१ मग
तो बाहेर दरवाज्याकडे गेल्यावर दुसरीने त्याला
पाहिलें, आणि तेथल्या लोकांस ह्मटलें कीं, नासो-
ऱ्योरी येशू याजबरोबर हाहि होता. ७२ फि-
रून तो शपथ वाहून नाकारून बोलला कीं, मी
त्या माणसाला ओळखीत नाहीं. ७३ नंतर

काहीं वेळाने उभे राहणारे जवळ येऊन पेत्रसाला
ह्मणाले, तूंहि त्यांतला आहेस खराच, कारण
कीं तुझ्या बोलीवरून समजतें. ७४ तेव्हां तो
शापानी व शपथानी बोलूं लागला, मी त्या मा-
णसाला ओळखीत नाहीं. इतक्यांत कोंबडा
ओरडला. ७५ तेव्हां जी गोष्ट येशूने पेत्रसाला
ह्मटली होती कीं, कोंबडा ओरडल्या अगोदर तूं
तीन वेळा मला नाकारसील, ती त्याला आठ-
वली; मग तो बाहेर जाऊन फार दुःखी होऊन
रडला.

## अध्याय २७.

नंतर सकाळ झाल्यावर सर्व मुख्य याजक व
लोकांचे वडील यानी येशूला जिवें मारण्या-
साठीं त्याविषयीं मसलत केली. २ आणि त्यानी
त्याला बांधून नेलें, आणि सुभेदार पंतयस पिला-
तस याच्या स्वाधीन केलें.

३ तेव्हां तो दंडास योग्य ठरला असें पाहून,
त्याला पराधीन करणारा यहूदा याने पस्तावून
आणि मुख्य याजक व वडील याजवळ तीस रुप-
ये परत देऊन ह्मटलें, ४ निर्दोष रक्त परा-
धीन केल्याने म्या पाप केलें आहे. तेव्हां ते बो-
लले, त्याचें आह्मास काय? तूं जाण. ५ मग
तो ते रुपये देवळांत टाकून निघाला, आणि त्याने
जाऊन गळफांस घेतला. ६ तेव्हां मुख्य याजक
ते रुपये घेऊन बोलले, हे दानकोशांत टाकावे
हें योग्य नाहीं, कारण कीं हें रक्ताचें मोल आहे.
७ मग त्यानी मसलत केल्यावर त्या रुपयानी
कुंभाराचें शेत परदेश्यास पुरण्यासाठीं विकत घेतलें.
८ यास्तव तें शेत रक्ताचें शेत असें आजपर्यंत
ह्मणत आले आहेत. ९ इर्मया भविष्यवाद्याने
जें सांगितलें होतें तें तेव्हां पूर्ण झालें; तें असें कीं,
मग ज्याचें मोल ठरविलें, ज्याचें मोल इस्राए-
लाच्या पुत्रानी ठरविलें, त्याचें मोल ह्मणजे जे
तीस रुपये ते त्यानी घेतले; १० आणि जसें
प्रभूने मला सांगितलें होतें तसें त्यानी कुंभाराच्या
शेतासाठीं दिल्हें.

११ तेव्हां येशू सुभेदाराच्या पुढें उभा राहिला,
आणि सुभेदाराने त्याला विचारिलें, तूं यहूद्यांचा
राजा आहेस काय? तेव्हां येशूने त्याला ह्मटलें,
तूं ह्मणतोस तसेंच. १२ आणि मुख्य या-
जक व वडील यानी त्याजवर दोष ठेविला असतां
त्याने कांहीं उत्तर दिल्हें नाहीं. १३ तेव्हां पि-
लातस त्याला ह्मणाला, हे तुझ्या विरुद्ध किती
गोष्टींची साक्ष देतात, हें तूं ऐकत नाहींस काय?
१४ परंतु त्याने त्याला कांहीं एक उत्तर दिल्हें
नाहीं; यावरून सुभेदाराला फार आश्चर्य वाटलें.
१५ अणखी ज्याला मागतील, अशा एका बंदिवा-
नाला त्या सणांत समुदायाकरितां सुभेदार सोडून
देत असे. १६ आणि त्या वेळेस त्यांच्या जवळ
बाराब्बा नामें एक प्रसिद्ध बंदिवान होता. १७
यास्तव ते जमल्यावर पिलातसाने त्यांस ह्मटलें,
म्या तुह्माकरितां कोणत्याला सोडावें ह्मणून मा-
गतां? बाराब्बा याला किंवा ख्रीस्त ह्मटलेला येशू
याला? १८ कारण कीं त्यानी हेव्याने त्याला
पराधीन केलें, हें त्याला ठाऊक होतें. १९ आ-
णि तो न्यायासनावर बसला असतां त्याच्या बाय-
कोने त्याजकडे सांगून पाठविलें कीं, तुजसीं व
त्या नीतिमानासीं कांहीं संबंध नसावा, कारण कीं
आज म्या स्वप्नांत त्याकरितां फार सोसिलें आहे.
२० तथापि बाराब्बाला मागावें व येशूचा
घात करावा, ह्मणून मुख्य याजक व वडील यानी
समुदायांस समजाविलें. २१ तेव्हां सुभेदाराने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, म्या तुह्माकरितां या दो-
घांतून कोणत्याला सोडावें, ह्मणून मागतां?
तेव्हां ते बोलले कीं, बाराब्बाला. २२ पि-
लातसाने त्यांस ह्मटलें कीं, तर ख्रीस्त ह्मट-
लेला येशू याला म्या काय करावें? सर्व त्या-
ला ह्मणाले, त्याला खांबीं द्यावें. २३ मग
सुभेदार बोलला, कां? त्याने काय वाईट
केलें? परंतु ते फारच ओरडत बोलले कीं,
त्याला खांबीं द्यावें. २४ तेव्हां आपलें कांहींच
चालत नाहीं, केवळ अधिकच गडबड होत आहे,
हें पाहून पिलातसाने पाणी घेऊन समुदायादेखतां
आपले हात धुऊन ह्मटलें, या नीतिमानाच्या
रक्ताविषयीं मी निर्दोष आहें, तुह्मीच पाहा. २५
तेव्हां सर्व लोकानी उत्तर दिल्हें कीं, त्याचें रक्त
आह्मावर व आमच्या लेंकरांवर असो. २६
मग त्याने त्याकरितां बाराब्बाला सोडिलें, आणि
येशूला फटके मारून खांबीं देण्याकरितां त्यांच्या
स्वाधीन केलें.

२७ तेव्हां सुभेदाराच्या शिपायानी येशूला
कचेरींत नेऊन सगळें पलटण मिळवून त्यावर आ-
णिलें. २८ आणि त्यानी त्याचें वस्त्र काढून

त्याच्यां अंगांत किरमिजी झगा घातला. २९
आणि कांट्यांचा मुगुट गुंफून त्याच्या मस्तकीं
घातला, आणि त्याच्या उजव्या हातांत वेत दिल्हा,
आणि त्याच्या पुढें गुडघे टेंकून ते असी त्याची थट्टा
करूं लागले कीं, हे यहूद्यांच्या राजा, सलाम.
३० आणि त्यांनी त्यावर थुंकून वेत घेतला, आणि
त्याच्या मस्तकावर मारिला. ३१ मग त्याची
थट्टा केल्यावर त्यांनी तो झगा त्याच्या अंगांतून
काढिला, आणि त्याचीं वस्त्रें त्याच्या अंगांत घा-
तलीं, नंतर त्याला खांबीं देण्याकरितां नेलें.

३२ तेव्हां ते बाहेर जात असतां, शिमोन
नामें कोणीएक कुरेनी माणूस त्यांस अढळला,
त्याकडून त्यांनी जबरीने त्याचा खांब वाहविला.
३३ आणि गलगथा नामें जागा, ह्मणजे कंवटीची
जागा, तेथें येऊन, ३४ त्यांनी पित्ताने मिसळ-
लेली आंब त्याला प्यायास दिल्ही, परंतु ती चा-
खल्यावर तो पिईना. ३५ मग त्याला खांबीं
दिल्यावर त्यांनी चिट्ठ्या टाकून त्याचीं वस्त्रें वांटून
घेतलीं; जें भविष्यवाद्याने सांगितलें होतें तें पूर्ण
व्हावें ह्मणून असें झालें; तें असें की, त्यांनी
आपल्यांमध्यें माझीं वस्त्रें वांटून घेतलीं, आणि
माझ्या पांघरुणावर चिट्ठ्या टाकल्या. ३६ नंतर
त्यांनी तेथें बसून त्यावर पाहरा केला. ३७
आणि त्याच्या डोक्याच्या वरतें त्याच्या दोषारो-
पाचा लिहिलेला पत्ता त्यांनी लाविला; तो असा
कीं, यहूद्यांचा राजा येशू तो हाच आहे. ३८
तेव्हां त्यांनी त्याबरोबर दोन लुटारू एक उजवी-
कडे व एक डावीकडे असे खांबीं दिल्हे. ३९ आणि
जवळून जाणाऱ्यांनी आपलीं डोकीं डोलवीत त्याची
असी निंदा केली कीं, ४० अरे देऊळ मोडून
तीन दिवसांत बांधणाऱ्या, तूं आपलें तारण कर;
तूं देवाचा पुत्र असलास तर खांबावरून उतर.
४१ आणि तसेंच शास्त्री व वडील यांसुद्धां मुख्य
याजकहि थट्टा करीत बोलले कीं, ४२ त्याने
दुसऱ्यांचें तारण केलें, आपलें तारण त्याच्याने कर-
वत नाहीं; तो इस्राएलाचा राजा असला तर
त्यानें आतां खांबावरून उतरावें, ह्मणजे आह्मी
त्यावर विश्वास ठेवूं. ४३ त्याने देवावर भरवसा
ठेविला; तो त्याला प्रिय असला, तर त्याने त्याला
आतां सोडवावें, कारण कीं मी देवाचा पुत्र आहें,
असें तो बोलत असे. ४४ आणि जे लुटारू
त्याच्या बरोबर खांबीं दिल्हे होते, त्यांनीहि त्याची
तसीच निंदा केली. ४५ तेव्हां दोन प्रहरांपासून
तिसऱ्या प्रहरापर्यंत, सर्व देशावर अंधार झाला.
४६ आणि सुमारें तिसऱ्या प्रहरीं येशू मोठ्याने
ओरडत बोलला, एली, एली, लमा शबाख-
थानी, ह्मणजे माझ्या देवा, माझ्या देवा, तूं
मला कां टाकून दिल्हें! ४७ तेव्हां तेथें जे उभे
होते त्यांतील कित्येकांनी हें ऐकून ह्मटलें
कीं, तो एलीयाला बोलावितो. ४८ तेव्हांच
त्यांतून एकाने धावत जाऊन स्पंज घेतलें,
आणि आंबेने भरून व वेतावर घालून त्याला
प्यायास दिल्हें. ४९ परंतु वरकड ह्मणाले, असूं
दे, एलीया येऊन त्याला तारील कीं नाहीं हें पाहूं.
५० मग येशूने मोठ्याने ओरडून प्राण सोडिला.

५१ तेव्हां पाहा, देवळांतील पडदा वरपासून
खालपर्यंत फाटून त्याचे दोन विभाग झाले, आणि
भूमि कांपली आणि खडक फुटले; ५२ आणि
थडीं उघडलीं, आणि झोंपी गेलेले पवित्र लोक
यांतील बहुतांचीं शरीरें उठलीं; ५३ आणि तो
उठल्यानंतर ते थड्यांतून निघून पवित्र नगरांत गेले
आणि बहुतांस दिसले. ५४ तेव्हां शतपति व
त्याच्या बरोबर येशूवर पाहरा करणारे हे तो
भूमिकंप व त्या झालेल्या गोष्टी पाहून फार
भ्याले व बोलले, खरोच हा देवाचा पुत्र होता.
५५ आणि तेथें बहुत बायका दुरून पाहत
होत्या, त्या येशूची सेवा करीत त्याच्या मागें
गालीलाहून आल्या होत्या; ५६ त्यांमध्यें मा-
ग्दालीणी मारया, आणि याकोब व योसे यांची
आई मारया, आणि जब्दीच्या पुत्रांची आई,
अशा होत्या.

५७ मग संध्याकाळ झाल्यावर अरिमाथाईतील
योसेफ नामें एक धनवान माणूस आला, तोहि
येशूचा शिष्य होता; ५८ त्याने पिलातसाकडे
जाऊन येशूचें शरिर मागितलें, तेव्हां पिलातसाने
शरीर द्यायास आज्ञा केली. ५९ मग योसेफाने
तें शरीर घेऊन तागाच्या स्वच्छ वस्त्राने गुंडाळिलें.
६० नंतर त्याने खडकांत खोदिलेलें आपलें नवें थडें
यांत तें ठेविलें, आणि मोठा धोंडा थड्याच्या दारास
लोटून लाविल्यावर निघाला. ६१ तेव्हां थड्या-
समोर माग्दालिणी मारया व दुसरी मारया या
तेथें बसलेल्या होत्या.

६२ आणि दुसरा दिवस ह्मणजे तयारी कर-
ण्यानंतर जो दिवस, त्यांत मुख्य याजक व परोशी

पिलातसाकडे मिळून जाऊन बोलले, ६३
महाराज, तो ठक जिवंत असतां बोलला होता
कीं, तीन दिवसांनंतर मी उठेन, असी आह्मास
आठवण आहे. ६४ यास्तव तिसऱ्या दिवसापर्यंत
थड्याचा बंदोबस्त करायास सांग; नाहीं तर कदा-
चित् त्याचे शिष्य रात्रीं येऊन त्याला चोरून
नेतील, आणि तो मेलेल्यांमधून उठला आहे, असें
लोकांस सांगतील, मग शेवटलें ठकविणें पहिल्यापेक्षा
वाईट होईल. ६५ तेव्हां पिलातस त्यांस ह्म-
णाला, तुमच्या जवळ पाहरा आहे; जा, आणि
तुमच्यानें होईल तसा बंदोबस्त करा. ६६ मग
त्यांनी जाऊन धोंड्यावर शिक्का मारून पाहरा ठेवून
थडग्याचा बंदोबस्त केला.

## अध्याय २८.

मग शाब्बाथानंतर सप्तकाचा पहिला दिवस उजे-
डतांच मग्दालिणी मारया व दुसरी मारया
ह्या थडें पाहायास गेल्या. २ तेव्हां पाहा, मोठा
भूमिकंप झाला होता; कारण कीं प्रभूचा दूत आ-
काशांतून उतरून येऊन दारापासून धोंडा लोटून
त्यावर बसला होता. ३ त्याचें स्वरूप विजेसा-
रिखें होतें, आणि त्याचें वस्त्र बर्फासारिखें पांढरें
होतें. ४ तेव्हां त्याच्या भयानें पाहरेकरी थर-
थरां कांपून मेल्यांसारिखे झाले. ५ मग दुतानें
त्या बायकांस उत्तर दिल्हें, भिऊं नका, कारण कीं
वधस्तंभीं दिल्हेला येशू याचा शोध तुह्मी करितां, हें
मला ठाऊक आहे. ६ तो एथें नाहीं, का कीं
त्यानें सांगितल्याप्रमाणें तो उठला आहे. या,
प्रभु निजला होता ती जागा पाहा. ७ आणि
लवकर जाऊन त्याच्या शिष्यांस सांगा कीं, तो
मेलेल्यांमधून उठला आहे, आणि पाहा, तो तुम-
च्या अगोदर गालीलांत जातो, तेथें तुह्मी त्याला
पाहाल; पाहा, म्यां तुह्मास सांगितलें आहे. ८
तेव्हां त्या बायका भयानें व फार आनंदानें थड्या-
पासून लवकर निघून त्याच्या शिष्यांस वर्त्तमान
सांगायास धावल्या. ९ मग त्या त्याच्या शिष्यांस
तें सांगायास जात असतां, पाहा, येशू त्यांस
भेटला व ह्मणाला, सलाम. मग त्यांनी जवळ
जाऊन त्याचे पाय धरिले, आणि त्याला नमन केलें.
१० तेव्हां येशूनें त्यांस ह्मटलें, भिऊं नका, जा,
माझ्या भावांस सांगा कीं, गालीलांत जा, ह्मणजे
तेथें मला पाहाल.

११ आणि त्या जात असतां पाहा, पाहरेकऱ्यां-
तील कित्येकांनी नगरांत जाऊन सर्व झालेलें वर्त्तमान
मुख्य याजकांस सांगितलें. १२ तेव्हां त्यांनी
वडिलांसुद्धा मिळून मसलत केल्यावर शिपायांस
पुष्कळ पैका देऊन सांगितलें कीं, १३ असें बोला,
रात्रीं आह्मी झोंपेंत असतां त्याच्या शिष्यांनी
येऊन त्याला चोरून नेलें; १४ आणि हें सुभे-
दाराच्या कानीं पडलें, तर आह्मी त्याला समजावूं,
आणि तुह्मास निर्भय करूं. १५ मग त्यांनी पैका
घेऊन आपणांस शिकविल्याप्रमाणें केलें, आणि हीच
गोष्ट यहूदी लोकांमध्यें आजपर्यंत चालत आली
आहे.

१६ नंतर अकरा शिष्य गालीलांत जो डोंगर
येशूनें त्यांस नेमिला होता, त्याकडे गेले. १७
तेव्हां त्यांनी त्याला पाहून त्याला नमन केलें, परंतु
कित्येकांस संशय वाटला. १८ तेव्हां येशू जवळ
येऊन त्यांसीं बोलून असें ह्मणाला कीं, आका-
शांत व पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिल्हा आहे:
१९ यास्तव तुह्मी जाऊन सर्व देशांतील लोकांस
शिष्य करा; त्यांस बापाच्या व पुत्राच्या व पवित्र
आत्म्याच्या नामानें बाप्तिस्मा द्या. २० ज्या ज्या
आज्ञा तुह्मास दिल्ह्या त्या सर्व पाळायास त्यांस
शिकवा; आणि पाहा, काळाच्या समाप्तीपर्यंत मी
तुह्माबरोबर सर्वकाळ आहें. आमेन.

# मार्कसाने केलेलें शुभवर्त्तमान.

## अध्याय १.

देवाचा पुत्र येशू ख्रीस्त याच्या शुभवर्त्तमानाचा
मारंभ.

२ ज्या प्रमाणें भविष्यवाद्यांच्या ग्रंथांमध्यें लि-
हिलें आहे कीं, पाहा, मी आपल्या दुताला तुझ्या
पुढें पाठवितों; तो तुझा मार्ग तुझ्या पुढें तयार
करील. ३ रानांत कोणिएका ओरडणाऱ्याची
वाणी झाली कीं, प्रभूचा मार्ग तयार करा, त्याच्या
वाटा नीट करा; ४ त्याप्रमाणें योहान्न रानांत
बाप्तिस्मा देऊं, आणि पापांची क्षमा होण्यासाठीं
पश्चात्तापाचा बाप्तिस्मा गाजवूं लागला. ५ तेव्हां
सर्व यहूदा देशांतील लोक आणि यरूशालेमकर
निघून त्याकडे गेले, आणि त्या सर्वांनी आपलीं पापें
पदरीं घेऊन यार्देन नदींत त्यापासून बाप्तिस्मा घेतला.
६ योहान्न तर उंटाच्या लवेचें वस्त्र पांघरला
होता, आणि त्याच्या कंबरेस कातड्याचा कंबरबंद
होता, आणि तो टोळ व रानमध खात असे. ७
आणि तो गाजवीत असे कीं, ज्याच्या वाहणांचा
बंद मी लवून सोडायास योग्य नाहीं, असा कोणी-
एक मजपेक्षां समर्थ माझ्या मागून येत आहे. ८
म्या तुमचा बाप्तिस्मा पाण्यानें केला खरा, परंतु तो
पवित्र आत्म्यानें तुमचा बाप्तिस्मा करील.

९ आणि त्या दिवसांमध्यें असें झालें कीं, येशू
गालीलांतील नाझारेथाहून आला, आणि त्यानें यो-
हान्नापासून यार्देनेंत बाप्तिस्मा घेतला. १० तेव्हां
पाण्यांतून वर येतांच आकाश फाटलेलें आणि आ-
त्म्याला खबुत्रासारिखें आपल्यावर उतरतां त्यानें
पाहिलें. ११ आणि आकाशांतून असी वाणी
झाली कीं, तूं माझा प्रिय पुत्र आहेस, तुजविषयीं
मी संतुष्ट आहें.

१२ मग आत्म्यानें त्याला लागलेंच रानांत
घालविलें. १३ तेव्हां सैतान त्याची परीक्षा
करीत असतां तो तेथें रानांत चाळीस दिवस राहि-
ला; तेव्हां तो वनपशूंमध्यें होता; आणि दूत
त्याची सेवा करूं लागले.

१४ आणि योहान्न पराधीन झाल्यानंतर येशू
गालीलांत गेला, आणि देवाच्या राज्याचें शुभवर्त्त-
मान गाजवीत ह्मणाला; १५ समय पूर्ण झाला
आहे आणि देवाचें राज्य जवळ आलें आहे, पश्चा-
ताप करा, आणि शुभवर्त्तमानावर विश्वास ठेवा.
१६ नंतर गालीलाच्या समुद्राजवळ चालत असतां
त्यानें शिमोन व त्याचा भाऊ अंद्रयास यांस समु-
द्रांत जाळें टाकितां पाहिलें, कारण कीं ते मासे
धरणारे होते. १७ तेव्हां येशू त्यांस ह्मणाला,
माझ्या मागें या, ह्मणजे मी तुह्मास माणसांचे
धरणारे करीन. १८ मग ते लागलेच आपलीं
जाळीं सोडून देऊन त्याच्या मागें चालले. १९
नंतर त्यानें कांहींसें पुढें जाऊन जबदीचा पुत्र
याकोब व त्याचा भाऊ योहान्न यांस तारवांत
जाळीं नीट करितांना पाहिलें. २० तेव्हांच त्यानें
त्यांस बोलाविलें, मग ते आपला बाप जबदी याला
मोलकऱ्यांबरोबर तारवांत सोडून त्याच्या मागें
चालले.

२१ नंतर ते कफर्णाहूमांत गेले, आणि लागलेंच
त्यानें शाब्बाथ दिवसीं सभास्थानांत जाऊन उपदेश
केला. २२ तेव्हां त्याच्या उपदेशावरून ते थक्क
झाले, कारण कीं शास्त्र्यांसारिखा नाहीं तर अधि-
कार असल्यासारिखें त्यानें त्यांस उपदेश केला.
२३ तेव्हां अशुद्ध आत्मा लागलेला असा माणूस
त्यांच्या सभास्थानांत होता. २४ आणि तो ओर-
डत बोलला कीं, अरे येशू नाझारेथकरा, आमचा
तुझा काय संबंध! आमचा नाश करायास
आलास काय! तूं कोण आहेस हें मला ठाऊक
आहे, देवाचा पवित्र तो. २५ तेव्हां येशूनें
त्याला असें धमकाविलें कीं, उगाच राहा व यांतून
नीघ. २६ तेव्हां तो अशुद्ध आत्मा त्याला पिळून
मोठ्यानें ओरडून त्यांतून निघाला. २७ मग ते
सर्व थक्क झाले आणि एकमेकांस असें ह्मणूं ला-

गले, हें काय? हा काय नवीन उपदेश? कारण
कीं तो अशुद्ध आत्म्यांसहि अधिकाराने आज्ञा क-
रितो आणि ते त्याला मानितात. २८ नंतर
त्याची कीर्त्ति लागलीच चहुंकडल्या सर्व गालील
देशांत पसरली.

२९ मग ते सभास्थानांतून निघाल्यावर लाग-
लेच याकोब व योहान्न यांबरोबर शिमोन व अंद्र-
यास यांच्या घरीं गेले. ३० शिमोनाची सासू
तर तापाने पडली होती, तेव्हांच त्यानी तिज-
विषयीं त्याला सांगितलें. ३१ मग त्याने जवळ
जाऊन तिचा हात धरून तिला उठविलें, तेव्हां
लागलाच तिचा ताप निघून गेला, आणि ती
त्याची सेवा करूं लागली. ३२ मग संध्याकाळीं
सूर्य मावळल्यावर त्यानी सर्व दुखणाईत व भूत-
ग्रस्त यांस त्याजवळ आणिलें. ३३ आणि सर्व
नगर दारासीं जमलें. ३४ तेव्हां नाना प्रकारच्या
रोगानी पिडलेलीं बहुत माणसें त्याने बरीं केलीं, व
बहुत भुतें काढलीं, आणि त्या भुतानी त्याला
ओळखिलें ह्मणून त्याने त्यांस बोलूं दिल्हें नाहीं.

३५ मग तो सकाळीं मोठ्या पाहांटेस उठून
बाहेर गेला, आणि रानांत एकीकडे जाऊन त्याने
तेथें प्रार्थना केली. ३६ नंतर शिमोन व त्याचे
सोबती त्याच्या मागें गेले. ३७ मग तो त्यांस
मिळाल्यावर ते त्याला ह्मणाले, सर्व तुझा शोध
करितात. ३८ तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, म्या
जवळच्या मोठाल्या गांवांतहि उपदेश करावा, ह्म-
णून आपण तेथें जाऊं, कारण कीं मी यासाठीं नि-
घालों आहें. ३९ आणि तो सर्व गालीलांत
त्यांच्या सभास्थानांमध्यें उपदेश करीत, व भूतें
काढीत चालला.

४० तेव्हां कोणीएक कोडी त्याजकडे आला,
आणि त्यापुढें गुडघे टेंकून त्याने त्याला असी
विनंती केली कीं, मला शुद्ध करायाची तुला इच्छा
असली तर शक्ति आहे. ४१ तेव्हां येशूला
करुणा येऊन तो हात पुढें करून त्याला शि-
वला, व त्याला ह्मणाला, माझी इच्छा आहे,
शुद्ध हो. ४२ तो असें बोलतांच त्याचें कोड
गेलें व तो शुद्ध झाला. ४३ मग त्याने त्याला
तेव्हांच लावून दिल्हें; ४४ आणि त्याला निक्षूण
सांगितलें कीं, संभाळ, कोणाला कांहीं सांगूं नको;
तर जा, आपणास याजकाला दाखीव, आणि त्यांस
साक्ष पटावी ह्मणून मोशाने जें नेमिलें तें तूं आ-
पल्या शुद्धीविषयीं अर्पण कर. ४५ तथापि तो
निघाल्यावर ती गोष्ट फार गाजवूं व हाकाटूं ला-
गला, यामुळें त्याच्याने प्रगटपणें नगरामध्यें फिरून
जाववलें नाहीं, तर तो बाहेर रानांतल्या जाग्यांत
राहिला, मग ते चहुंकडून त्याजकडे आले.

## अध्याय २.

नंतर कांहीं दिवसानी तो फिरून कपर्णाहूमांत
गेला, आणि तो घरीं आहे असें ऐकण्यांत
आलें. २ तेव्हांच असे बहुत मिळाले कीं, दा-
रापुढें देखील मावत ना, तेव्हां त्याने त्यांस वचन
सांगितलें. ३ मग चौघानी उचललेला असा
वातरोगी त्याकडे लोक घेऊन आले. ४ आणि
दाटीमुळें त्याजवळ त्यांच्याने जाववेना, ह्मणून तो
होता तेथील छावणी त्यानी काढिली, आणि ती
उस्तरल्यावर ज्या बाजेवर तो वातरोगी निजला
होता ती त्यानी खालीं सोडली. ५ तेव्हां येशू
त्यांचा विश्वास पाहून त्या वातरोग्याला ह्मणाला,
मुला, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. ६
तेव्हां शास्त्र्यांतील कित्येक तेथें बसले होते, ते
आपल्या अंतःकरणांमध्यें असा विचार करीत होते
कीं, ७ हा या प्रकारें दुर्भाषणें कां करितो? एक
जो देव त्यावांचून कोणाच्याने पापांची क्षमा करवती?
८ तेव्हां ते आपल्यांमध्यें असा विचार करीत आ-
हेत, हें येशूने आपल्या आत्म्यांत तत्काळ जाणून
त्यांस ह्मटलें कीं, तुह्मी आपल्या अंतःकरणांमध्यें
असे विचार कां करितां? ९ तुझ्या पापांची क्षमा
झाली आहे, असें वातरोग्याला बोलणें, किंवा ऊठ,
आपली खाट उचलून चाल, असें बोलणें, यांतून
कोणतें सोपें? १० परंतु पृथ्वीवर मनुष्याच्या
पुत्राला पापांची क्षमा करायास अधिकार आहे, हें
तुह्मी जाणावें; तेव्हां तो वातरोग्याला ह्मणाला,
११ मी तुला सांगतों, ऊठ, आपली खाट उचलून
घेऊन आपल्या घरीं जा. १२ मग तो लाग-
लाच उठला, आणि आपली खाट उचलून सर्वां-
च्या देखतां निघाला; यावरून सर्व थक्क झाले
आणि देवाला गौरवीत ह्मणाले, आह्मी असें
कधींहि पाहिलें नाहीं.

१३ नंतर तो निघून पुन्हा समुद्राकडे गेला,
तेव्हां सर्व समुदाय त्याच्या जवळ आला आणि त्याने
त्यांस उपदेश केला. १४ नंतर त्याने जवळून
जातांना अलफीचा पुत्र लेवी याला जकातीच्या ना-

त्यावर बसलेलें पाहिलें, आणि त्याला ह्मटलें,
माझ्या मागें ये, तेव्हां तो उठून त्याच्या मागें
गेला. १५ नंतर असें झालें कीं, तो त्याच्या घरीं
जेवायास बसला तेव्हां बहुत जकातदार व पापी हे
येशू व त्याचे शिष्य यांबरोबर जेवायास बसले,
कारण कीं असले बहुत होते आणि ते त्याच्या
मागें चालले. १६ तेव्हां शास्त्री व परोशी यानी
त्याला जकातदार व पापी यांबरोबर जेवितांना पा-
हून त्याच्या शिष्यांस ह्मटलें, जकातदार व पापी
यांबरोबर हा खातो पितो हें काय? १७ तेव्हां
येशू तें ऐकून त्यांस ह्मणाला, निरोग्यांस वैद्याची
गरज नाहीं, तर दुखणाइतांस आहे; मी पुण्यवं-
तांस नाहीं, तर पाप्यांस बोलावण्यास आलों.

१८ आणि योहानाचे व परोश्यांचे शिष्य
उपास करीत असत. तेव्हां कोणी येऊन त्याला
ह्मणाले, योहानाचे व परोश्यांचे शिष्य उपास
करितात आणि तुझे शिष्य उपास कां करीत नाहींत?
१९ तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें, वऱ्हाड्यांबरोबर
वर आहे तोंपर्यंत त्यांच्याने उपास करवेल काय?
वर बरोबर आहे तोंपर्यंत त्यांच्याने उपास करवत
नाहीं. २० परंतु असे दिवस येतील कीं, वराला
त्यांपासून काढून नेतल्यावर ते त्या दिवसांमध्यें
उपास करतील. २१ आणखी कोऱ्या कापडाचें
ठिगळ जुन्या वस्त्राला कोणी लावीत नाहीं, लाविलें
तर तें नवें ठिगळ जुन्या वस्त्राला फाडितें, मग
भोंक मोठें होतें. २२ नवा द्राक्षारस जुन्या बुध-
ल्यांत कोणी घालीत नाहीं, घातला तर नव्या
द्राक्षारसाने बुधले फुटतात व द्राक्षारस सांडतो,
व बुधलेहि नासतात; तर नवा द्राक्षारस नव्या
बुधल्यांत घातला पाहिजे.

२३ आणखी असें झालें कीं, तो शाब्बाथ दि-
वशीं शेतांमधून जात होता, तेव्हां त्याचे शिष्य वा-
टेने चालतांना कणसें मोडूं लागले. २४ मग
परोशी त्याला ह्मणाले, पाहा, शाब्बाथ दिवशीं
जें करूं नये तें हे कां करितात? २५ तेव्हां
त्याने त्यांस ह्मटलें, दाविदाला गरज पडली
ह्मणजे त्याला व त्याच्या बरोबरच्यांस भूक ला-
गली, तेव्हां त्याने काय केलें, हें तुह्मी कधीं वा-
चलें नाहीं काय? २६ तो अब्याथार
मुख्य याजकाच्या वेळेस देवाच्या मंदिरांत कसा
गेला व पुढें ठेवलेल्या ज्या भाकरी याजकांशि-
वाय कोणीहि खाऊं नयेत त्या त्याने कशा खाल्-
ल्या, आणि त्याबरोबरच्यांसहि कशा खायास दि-
ल्या? २७ आणखी तो त्यांस ह्मणाला, शा-
ब्बाथ मनुष्यासाठीं झाला, मनुष्य शाब्बाथासाठीं
झाला नाहीं; २८ यास्तव मनुष्याचा पुत्र शा-
ब्बाथाचाहि धनी आहे.

## अध्याय ३.

आणखी तो पुन्हा सभास्थानांत गेला, तेव्हां तेथें
एक हात वाळलेला असा माणूस होता. २
मग त्यावर दोष ठेवावा ह्मणून शाब्बाथ दिवशीं
तो त्याला बरें करील कीं काय, हें पाहायास ते
टपत राहिले. ३ तेव्हां त्याने हात वाळलेल्या
माणसाला, मध्यें उभा राहा, असें सांगितलें.
४ मग त्याने त्यांस ह्मटलें, शाब्बाथ दिवशीं
चांगलें करणें किंवा वाईट करणें, जिवाला राखणें
किंवा मारणें, कोणतें योग्य आहे? तेव्हां ते उगेच
राहिले. ५ मग त्याने त्यांच्या अंतःकरणाच्या
कठीणपणावरून खिन्न होऊन त्या सर्वांकडे रागाने
पाहून त्या माणसाला सांगितलें कीं, आपला हात
लांब कर; तेव्हां तो लांब करतांच त्याचा हात
दुसऱ्यासारिखा बरा झाला. ६ मग परोश्यांनी
लागलेंच बाहेर जाऊन त्याचा घात कसा करावा
याविषयीं हेरोदी यांसंगतीं त्याविरुद्ध मसलत
केली.

७ मग येशू आपल्या शिष्यांबरोबर निघून
समुद्राकडे गेला; ८ तेव्हां गालील व यहूदा व
यरुशालेम व अदोम व यार्देनेच्या पलिकडचा
प्रांत यांतून मोठा मेळा येऊन त्याच्या मागें चा-
लला; आणि सोर व सिदोन यांकडला मोठा
मेळा त्याने जें जें केलें तें ऐकून त्याजकडे आला.
९ तेव्हां आपण चेंगरूं नये ह्मणून त्याने लोकांच्या
दाटीमुळें आपल्यासाठीं एक मचवा तयार करून
ठेवायाला आपल्या शिष्यांस सांगितलें. १० का-
रण कीं त्याने बहुतांस बरें केलें, यामुळें जितके
पिडलेले होते तितके त्याला शिवायास त्याच्या
अंगावर पडूं लागले. ११ आणि जेव्हां अशुद्ध
आत्म्यांनी त्याला पाहिलें तेव्हां ते त्याच्या पुढें पडले
व ओरडत बोलले कीं, तूं देवाचा पुत्र आहेस.
१२ तेव्हां आपल्याला त्यांनी प्रगट करूं नये ह्म-
णून त्याने त्यांस निक्षूण सांगितलें.

१३ आणखी तो डोंगरावर चढला तेव्हां त्याला
जे बरे वाटले त्यांस त्याने बोलाविलें; तेव्हां ते

त्यांजकडे आले. १४ मग त्याने बारा जणांस
नेमिलें; यासाठीं कीं त्यांनी आपल्या बरोबर असावें
आणि आपण त्यांस गाजवायास पाठवावें, १५
आणि रोग बरे करण्याचा व भुतें काढण्याचा अधि-
कार त्यांस असावा. १६ तेव्हां त्याने शिमोन या-
ला पेत्रस हें उपनाम दिल्हें; १७ आणि जब-
दीचा पुत्र याकोब व याकोबाचा भाऊ योहान्न
यांस बवानर्गेस ह्मणजे गर्जण्याचे पुत्र हें उपनाम
दिल्हें; १८ आणि अंद्रयास व फिलिप्पस व
बार्थलमी व मात्थी व थोमा व अलफीचा पुत्र
याकोब व थादी व शिमोन कनानी, १९ व
त्याला पराधीन करणारा यहूदा इस्कारयोते, असीं
त्यांचीं नांवें होतीं.

२० नंतर ते कोणीएका घरांत आले, तेव्हां
पुन्हा असा समुदाय जमला, कीं भाकर खायासहि
त्यांस फावेना. २१ आणि त्याचे आप्त हें ऐकून
त्याला धरायाला निघाले, कारण कीं तो वेडा झाला
असें ते ह्मणूं लागले. २२ आणि यरुशाले-
माहून आलेले शास्त्री ह्मणूं लागले, बालजबूल
त्याला लागला आहे; आणखी, तो भुतांच्या
अधिकाऱ्याकडून भुतें काढितो. २३ तेव्हां तो
त्यांस बोलावून दाखले देऊन बोलूं लागला कीं,
सैतान सैतानाला कसा काढील? २४ आणि
एखादें राज्य आंतल्या आंत विभागलें तर तें राज्य
टिकणार नाहीं. २५ आणि एखादें घर आंतल्या
आंत विभागलें तर तें घर टिकणार नाहीं. २६
आणि सैतान आपणावर उठून विभागला तर त्या-
च्याने टिकवत नाहीं पण त्याचा शेवट होतो. २७
बळकट माणसाला पहिल्याने बांधल्याशिवाय त्या-
च्या घरांत शिरून त्याचे जिन्नस कोणाच्याने लुट-
वत नाहींत; बांधिला तरच तो त्याचें घर लुटील.
२८ मी तुह्मांस खचीत सांगतों कीं, माणसांच्या
पुत्रांच्या सर्व पापांची व जीं जीं दुर्भाषणें ते करि-
तील त्या सर्वांची क्षमा होईल. २९ परंतु जो को-
णी पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करील त्याची
क्षमा कधींहि होत नाहीं, तर तो सर्वकाळच्या दं-
डास योग्य ठरतो. ३० त्याला अशुद्ध आत्मा
लागला आहे, असें ते ह्मणत होते ह्मणून तो
असें बोलला.

३१ यावरून त्याची आई व त्याचे भाऊ आले,
आणि त्यांनी बाहेर उभें राहून त्याला निरोप पाठ-
वून त्याला बोलाविलें. ३२ तेव्हां त्याभोंवता
समुदाय बसला होता; आणि त्यांनी त्याला ह्मटलें,
पाहा, तुझी आई व तुझे भाऊ बाहेर तुला भेटा-
यास पाहतात. ३३ तेव्हां त्याने त्यांस उत्तर
दिल्हें कीं, माझी आई कोण? आणि माझे भाऊ
कोण? ३४ मग तो आपल्या भोंवतालच्या बस-
णाऱ्यांकडे पाहून ह्मणाला, पाहा, माझी आई व
माझे भाऊ; ३५ कारण कीं जो कोणी देवाच्या
इच्छेप्रमाणें करील, तोच माझा भाऊ व माझी
बहीण व आई होय.

## अध्याय ४.

पुन्हा तो समुद्राजवळ उपदेश करूं लागला,
तेव्हां त्यापासीं मोठा समुदाय मिळाला, ह्म-
णून तो समुद्रांत तारवावर चढून बसला आणि
सर्व समुदाय समुद्रकांठीं भूमीवर होता. २ तेव्हां
तो दाखले देऊन त्यांस बहुत उपदेश करूं लाग-
ला, आणि उपदेश करितांना त्यांस ह्मटलें कीं,
३ ऐका; पाहा, कोणी पेरणारा पेरायास निघाला;
४ आणि असें झालें कीं, तो पेरीत असतां कांहीं
बीं वाटेवर पडलें, मग आकाशांतील पांखरांनी
येऊन तें खाऊन टाकिलें. ५ आणि फारसी माती
नव्हती अशा खडकाळीवर कांहीं पडलें, आणि
माती खोल नव्हती ह्मणून तें लवकर उगवलें. ६
परंतु सूर्य उगवल्यावर तें करपलें, आणि त्याला
मूळ नव्हतें यास्तव वाळून गेलें. ७ आणि कांहीं
कांट्यांच्या झाडांमध्यें पडलें, मग कांट्यांच्या झा-
डांनी वाढून त्याला गुदमारिलें, ह्मणून त्याला कां-
हीं पीक आलें नाहीं. ८ आणि कांहीं चांगल्या
भूमींत पडलें तें उगवून व मोठें होऊन पिकास
आलें; मग कोठें तीसपट कोठें साठपट कोठें
शंभरपट असें पीक आलें. ९ तेव्हां त्याने त्यांस
ह्मटलें, ज्याला ऐकायास कान आहेत तो ऐको.

१० तो एकांतीं गेला तेव्हां बारासुद्धां
त्याभोंवते जे होते त्यांनी या दाखल्याविषयीं
त्याला पुसलें. ११ तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें,
देवाच्या राज्याची गुप्त गोष्ट जाणायास तुह्माला
दिल्हें आहे; परंतु बाहेरच्या लोकांस दाखल्यांनी
सर्व होतें; १२ यासाठीं कीं त्यांनी पाहत असतां
पाहावें आणि जाणूं नये, आणि ऐकत असतां ऐ-
कावें आणि समजूं नये. समजलें तर कदाचित्
ते फिरतील आणि त्यांच्या पापांची क्षमा होईल.
१३ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, हा दाखला तुह्मांस

समजला नाहीं काय? तर तुह्मी सर्व दाखले कसे
समजाल? १४ पेरणारा वचन पेरितो. १५
आणि वाटेवर वचन पेरिलें तेथील जे ते हेच आ-
हेत कीं, ऐकतात तेव्हांच सैतान येऊन त्यांच्या
अंतःकरणांत पेरलेलें वचन काढून घेतो. १६ आणि
तसेच खडकाळीवर पेरलेले हेच आहेत कीं, वचन
ऐकतात तेव्हांच तें आनंदाने घेतात; १७ तथापि
त्यांच्या मध्यें मूळ नाहीं ह्मणून ते क्षणिक आहेत;
आणि वचनामुळें संकट किंवा पाठलाग झाला
ह्मणजे ते लागलेच अडखळतात. १८ आणि
कांट्यांच्या झाडांमध्यें पेरलेले हेच आहे कीं, ते
वचन ऐकतात, १९ परंतु या कालाच्या चिंता
व द्रव्याची भूल व दुसऱ्या वस्तूंच्या इच्छा शिरून
तें वचन गुदमारितांत ह्मणून तें निष्फळ होतें. २०
आणि चांगल्या भूमीवर पेरलेले हेच आहेत कीं,
ते वचन ऐकतात व अंगीकारितात, आणि कोणी
तीसपट कोणी साठपट कोणी शंभरपट असें
पीक देतात.

२१ आणि त्याने त्यांस असें ह्मटलें कीं, मापा-
खालीं किंवा पलंगाखालीं ठेवावा ह्मणून दिवा आ-
णितात काय? दिवठणीवर ठेवावा ह्मणून कीं नाहीं?
२२ कारण कीं प्रगट होणार नाहीं असें कांहीं
गुप्त नाहीं, आणि उघडें होणार नाहीं असें कांहीं
झांकलेलें नाहीं. २३ ज्या कोणाला ऐकायास
कान आहेत तो ऐको. २४ अणखी त्याने त्यांस
ह्मटलें, तुह्मी जें ऐकतां त्याविषयीं जपा; ज्या
मापाने तुह्मी मोजून देतां त्याच मापाने तुह्मास
मोजून देतील, आणि तुह्मी ऐकणाऱ्यांस अणखी
मिळेल; २५ कारण कीं ज्याजवळ आहे त्याला
मिळेल, आणि ज्याजवळ नाहीं त्याचें जें असेल तें
देखील त्यापासून काढून घेतील.

२६ आणि त्याने ह्मटलें, देवाचें राज्य असें
आहे कीं, कोणी माणूस बीं भूमीवर टाकितो; २७
मग तो रात्रीं निजतां व दिवसा उठतो, आणि तें
बीं कसें उगवतें व वाढतें हें त्याला ठाऊक
नसतें. २८ कारण कीं भूमि आपोआप पीक देती,
ह्मणजे पहिल्याने अंकुर मग कणीस मग कणसांत
भरलेला दाणा. २९ नंतर पिकल्यावर तो लाग-
लाच विळा घालतो, कारण कीं कापणीची वेळ
आली आहे.

३० अणखी त्याने ह्मटलें, आपण देवाचें राज्य
कशासारिखें लेखूं? अथवा कोणत्या दाखल्याने तें
दाखवूं? ३१ तें मोहरीच्या दाण्यासारिखें आहे,
तो भूमींत पेरितात, तेव्हां भूमीवरील सर्व दाण्यां-
मध्यें बारीक असतो. ३२ परंतु पेरल्यावर तो उग-
वून सर्व भाज्यांमध्यें मोठो होतो, आणि त्याला
अशा मोठ्या फांद्या फुटतात कीं, आकाशांतील पांख-
रांस त्याच्या सावलींत राहायास सांपडतें. ३३
आणि असले बहुत दाखले देऊन जसें त्यांच्याने
ऐकवलें तसें त्याने त्यांस वचन सांगितलें. ३४
आणि दाखल्यावांचून तो त्यांसीं बोलला नाहीं,
परंतु एकांतीं त्याने आपल्या शिष्यांस सर्व गोष्टी
फोडून सांगितल्या.

३५ आणि त्याच दिवसीं संध्याकाळ झाला
तेव्हां तो त्यांस ह्मणाला, आपण पलिकडे जाऊं.
३६ तेव्हां ते समुदायाला निरोप देऊन तो तारवा-
वर होता तसाच त्याला घेऊन गेले, आणि त्याच्या
बरोबर दुसरे कांहीं मचवे होते. ३७ नंतर मोठें
वादळ झालें आणि लाटा तारवावर अशा उसळ-
ल्या कीं, तें भरूं लागलें. ३८ आणि तो वरामांव
उशी घेऊन निजला होता; तेव्हां ते त्याला उठवून
ह्मणाले, हे गुरू, आह्मी बुडतों, याची तुला चिंता
नाहीं काय? ३९ तेव्हां त्याने उठून वाऱ्याला
धमकाविलें व समुद्राला सांगितलें कीं, उगाच
राहा, शांत हो. मग वारा पडला व फार शांति
झाली. ४० नंतर त्याने त्यांस ह्मटलें, असे कां
घाबरलां? तुह्माला विश्वास कसा नाहीं? ४१
तेव्हां ते फार भ्याले व एकमेकांस ह्मणूं लागले,
हा आहे तरी कोण? कां कीं वारा व समुद्र हे
देखील याचें ऐकतात.

## अध्याय ५.

मग ते समुद्राच्या पलिकडे गादारेकरांच्या देशांत
गेले. २ तेव्हां तो तारवांतून उतरतांच अ-
शुद्ध आत्मा लागलेला असा माणूस थडग्यांमधून
निघून त्याला भेटला. ३ तो थडग्यांमध्यें राहत
असे आणि त्याला सांखळ्यानी देखील कोणाच्याने
बांधून आवरवेना. ४ कारण कीं त्याला बहुत
वेळा बेड्यानी व सांखळ्यानी बांधिलें असतां त्याने
सांखळ्या व बेड्या तोडून टाकिल्या, ह्मणून कोणा-
च्याने त्याला वश करवेना. ५ आणि तो नेहमी
रात्रंदिवस डोंगरांमध्यें व थडग्यांमध्यें ओरडत असे,
व आपणाला धोंड्यानी ठेंचून घेत असे. ६ तो
तर येशूला दुरून पाहून धावला व त्याला नमन,

७ व मोठ्याने ओरडत बोलला, हे येशू, परा-
त्पर देवाच्या पुत्रा, मला तुजसीं काय करायाचें?
त्वां मला पिडूं नये ह्मणून मी तुला देवाची शपथ
घालितों. ८ कारण, त्याने त्याला ह्मटलें होतें
कीं, अरे अशुद्ध आत्म्या, या माणसांतून नीघ. ९
मग त्याने त्याला पुसलें कीं, तुझें नांव काय?
तेव्हां त्याने उत्तर दिल्हें कीं, माझें नांव सैन्य, का-
रण कीं आह्मी पुष्कळ आहों. १० आणि त्याने
त्याला फार विनंती केली कीं, आह्मास या देशांतून
घालवूं नको. ११ आणि तेथें डोंगरांकडे डुकरांचा
मोठा कळप चरत होता. १२ तेव्हां त्या सर्व
भुतानी त्याला विनंती केली कीं, आह्मी त्या डुकरां-
मध्यें जावें ह्मणून त्यांकडे आह्मास लावून दे.
१३ मग येशूने तेव्हांच त्यांस जाऊं दिल्हें; आणि
ते अशुद्ध आत्मे त्यांतून निघून त्या डुकरांमध्यें गेले,
मग तो कळप धडक धावत कड्यावरून समुद्रांत पड-
ला, व समुद्रांत गुदमरून मेला; तीं तर सुमारें दोन
हजार होतीं. १४ मग तीं डुकरें चारणारे पळाले,
आणि नगरामध्यें व खेड्यांमध्यें त्यानी वर्त्तमान
सांगितलें, तेव्हां काय झालें हें पाहायास लोक
बाहेर आले. १५ आणि येशूजवळ आल्यावर
सैन्य लागलेला भूतग्रस्त बसला व वस्त्र पांघरला
व शुद्धीवर आला, असें त्यानी पाहिलें; तेव्हां ते
भ्याले. १६ मग पाहणाऱ्यानी भूतग्रस्ताचें झा-
लेलें वर्त्तमान व डुकरांचेंहि त्यांस सांगितलें.
१७ तेव्हां ते त्याला विनंती करूं लागले कीं, त्वां
आमच्या प्रांतांतून निघून जावें. १८ मग तो
तारवांत बसतांना त्या भूत लागलेल्या माणसाने,
म्यां आपल्याजवळ असावें, असी त्याला विनंती
केली. १९ परंतु येशूने त्याला येऊं दिल्हें नाहीं,
तर त्याला ह्मटलें कीं, तूं घरीं आपल्या माणसांकडे
जा, आणि प्रभूने तुजवर दया करून तुझ्या साठीं जें
जें केलें तें त्यांस सांग. २० तेव्हां तो निघाला,
आणि आपल्या साठीं येशूने जें जें केलें तें दका-
पलीसांत गाजवूं लागला; आणि सर्वांस आश्चर्य
वाटलें.

२१ मग येशू तारवांत बसून पुन्हा पार गेल्या-
वर त्याजवळ मोठा समुदाय मिळाला, तेव्हां तो
समुद्राजवळ होता. २२ मग पाहा, याइरस
नामें सभेचा एक अधिकारी आला व त्याला पाहून
त्याच्या पायां पडला. २३ आणि त्याने त्याला
फार विनंती केली कीं, माझी लाहान कन्या मरायास
टेंकली आहे, ती बरी व्हावी ह्मणून आपण येऊन
तिजवर हात ठेवावे, ह्मणजे ती वांचेल. २४
मग तो त्याच्या बरोबर गेला, तेव्हां मोठा समु-
दाय त्याच्या मागें लागला, आणि त्यानी त्याला
चेंगरलें. २५ तेव्हां कोणीएका बायकोला बारा
वर्षे रक्तस्राव होत होता; २६ तिने बहुत वैद्यां-
च्या हातून फार सोसून, आपलें सर्व खर्चिलें
तरी कांहीं गुण न येतां उलटें दुखणें अधिक
झालें; २७ ती येशूविषयीं ऐकून समुदायांत
मागें येऊन त्याच्या वस्त्राला शिवली. २८ कारण
तिने ह्मटलें कीं, मी केवळ याच्या वस्त्राला शिवलें
तर बरी होईन. २९ तेव्हां लागलाच तिच्या
रक्ताचा झरा सुकून गेला, आणि तिला शरिरांत
असा अनुभव आला कीं, पिडा जाऊन मी बरी
झालें. ३० मग येशू आपल्यांतून सत्व निघालें
आहे हें तेव्हांच मनांत जाणून, समुदायामध्यें मुर-
डून बोलला कीं, माझ्या वस्त्रांस कोण शिवला?
३१ तेव्हां त्याचे शिष्य त्याला ह्मणाले, समुदाय
तुला चेंगरतो हें तूं पाहतोस, आणि मला कोण
शिवला हें कसें ह्मणतोस? ३२ मग जिने हें केलें
होतें तिला पाहायास तो सभोंवता पाहूं लागला.
३३ तेव्हां ती बायको आपल्या अंगांत जें झालें तें
जाणून भीत व कांपत त्याजकडे आली, व त्याच्या
पुढें पडली व तिने त्याला सर्व गोष्ट खरी सांगि-
तली. ३४ मग त्याने तिला ह्मटलें, अगे मुली,
तुझ्या विश्वासाने तुला तारिलें, सुखरूप जा, आणि
तुझी पिडा जाऊन बरी ऐस. ३५ तो बोलत
आहे इतक्यांत सभेच्या अधिकाऱ्याच्या एथून
कोणी येऊन सांगितलें कीं, तुझी कन्या मेली, गुरू-
ला अणखी श्रम कां देतोस? ३६ तेव्हां येशू
तें सांगितलेलें वर्त्तमान ऐकून तेव्हांच सभेच्या
अधिकाऱ्याला ह्मणाला, भिऊं नको, विश्वास मात्र
धर. ३७ नंतर पेत्रस व याकोब व याकोबाचा
भाऊ योहान्न यांशिवाय त्याने आपल्या बरोबर
कोणाला येऊं दिल्हें नाहीं. ३८ मग सभे-
च्या अधिकाऱ्याच्या घरीं आल्यावर त्याने गलबला
ह्मणजे अतिशय रडणारे व आकांत करणारे यांस
पाहिलें. ३९ मग आंत जाऊन तो त्यांस ह्म-
णाला, तुह्मी कशाला गलबला करितां व रडतां?
मूल मेली नाहीं, झोंपेत आहे. ४० तेव्हां ते त्याला
हांसले. मग तो त्या सर्वांस बाहेर घालवून मुलीचा
बाप व आई व आपल्या बरोबरचे यांस घेऊन,

मूल पडली होती तेथें आंत गेला. ४१ आणि
मुलीचा हात धरून तिला ह्मणाला, टालीथा
कूमी, ह्मणजे मी तुला सांगतों, मुली, ऊठ. ४२
तेव्हांच ती मुलगी उठून चालूं लागली, कां कीं ती
बारा वर्षांची होती; तेव्हां ते अतिशय विस्मय
पावले. ४३ मग कोणाला हें कळवूं नये, असी
त्याने त्यांस निक्षूण आज्ञा केली, आणि तिला खा-
यास द्यावें ह्मणून सांगितलें.

## अध्याय ६.

नंतर तो तेथून निघाला व आपल्या देशांत आला,
आणि त्याचे शिष्य त्याच्या मागें गेले. २ मग
शाब्बाथ दिवस आल्यावर तो सभास्थानांत उप-
देश करूं लागला, तेव्हां पुष्कळ लोक ऐकून थक्क
होऊन बोलले, याला हें सर्व कोठून? केवढें ज्ञान
याला मिळालें आहे कीं याच्या हातून असे चम-
त्कार होतात? ३ जो सुतार मारयेचा पुत्र,
आणि याकोब व योसे व यहूदा व शिमोन यांचा
भाऊ, तो हाच नव्हे ना? आणि याच्या बहिणी
आपल्या बरोबर नाहींत ना? असे ते त्याज-
विषयीं अडखळले. ४ तेव्हां येशू त्यांस ह्मणाला,
भविष्यवादी आपला देश व नातलग व आपलें घर
यांमध्यें मात्र सन्मान पावत नाहीं. ५ आणि
त्याने थोडक्या रोग्यांवर आपले हात ठेवून त्यांस
बरें केलें याशिवाय दुसरा चमत्कार त्याच्याने तेथें
करवला नाहीं. ६ आणि त्याने त्यांच्या अवि-
श्वासामुळें आश्चर्य केलें. मग तो भोंवतालच्या
गांवांमध्यें उपदेश करीत फिरला.

७ अणखी तो त्या बारा जणांस बोलावून दोघे
दोघे असे त्यांस पाठवूं लागला; तेव्हां त्याने त्यांस
अशुद्ध आत्म्यांवरची सत्ता दिल्ही. ८ आणि
त्यांस आज्ञा केली कीं, वाटेसाठीं काठीवांचून दुसरें
कांहीं घेऊं नका, झोळणा अथवा भाकर अथवा
कंबरकशांत खुर्दा घेऊं नका; ९ तर वाहाणा पा-
यांत घाला, आणि दोन अंगरखे घालूं नका. १०
अणखी त्याने त्यांस असें सांगितलें कीं, तुह्मी को-
ठेंहि एखाद्या घरांत जाल त्या ठिकाणांतून निघाल
तोंपर्यंत तेथेंच राहा. ११ आणि जे कोणी तुह्माला
अंगीकारणार नाहींत व तुमचें ऐकणार नाहींत, त्यां-
विषयीं साक्ष व्हावी ह्मणून तुह्मी तेथून निघतांना
आपल्या पायांची धूळ झाडून टाका. मी तुह्मास
खचीत सांगतों कीं, न्यायाच्या दिवसीं त्या नगरा-
पेक्षां सदोम व गमोरा यांस सोपें पडेल. १२
मग त्यांनी तेथून जाऊन पश्चात्ताप करावा असें
गाजविलें. १३ आणि त्यांनी पुष्कळ भुतें काढलीं
व बहुत रोग्यांस तेल लावून बरें केलें.

१४ तेव्हां त्याचें नांव प्रसिद्ध झाल्यामुळें
हेरोद राजाने ऐकून ह्मटलें कीं, बाप्तिस्मा करणारा
योहान्न मेलेल्यांमधून उठला आहे ह्मणून त्याच्या
हातून हे चमत्कार घडतात. १५ दुसरे ह्मणाले, हा
एलीया आहे; अणखी दुसरे ह्मणाले, हा भविष्यवादी
अथवा भविष्यवाद्यांतील कोणीएकासारिखा आहे.
१६ परंतु हेरोद ऐकून ह्मणाला, ज्या योहान्नाचें
शीर म्या तोडलें, तोच हा आहे, तो मेलेल्यांमधून
उठला आहे. १७ कारण कीं हेरोदाने आपला
भाऊ फिलिप्पस याची बायको हेरोदीयस इजसीं
लग्न केलें होतें, इजमुळें त्याने पाठवून योहान्नाला
धरून बंदिशाळेंत बांधून ठेविलें होतें. १८ कारण
योहान्नाने हेरोदाला ह्मटलें होतें कीं, त्वां आपल्या
भावाची बायको ठेवावी हें तुला योग्य नाहीं. १९
त्यामुळें हेरोदीयस त्याचा द्वेष बाळगून त्याला
जिवें मारायास पाहत होती, परंतु तिचें कांहीं चा-
लेना. २० कारण कीं योहान्न न्यायी व पवित्र
असें जाणून, हेरोद त्याचें भय धरी व त्याला
संभाळी व त्याचें ऐकून तो बहुत कामें करीत असे
व हर्षानें त्याचें ऐकत असे. २१ मग हेरोदाने
आपल्या जन्मदिवसीं आपले प्रधान व सरदार व
गालीलांतील मोठमोठे लोक यांस जेवणावळ केली,
असा सोईचा दिवस आला. २२ तेव्हां हे-
रोदीयसीच्या कन्येने आंत येऊन नाच केला,
आणि हेरोदाला व त्याच्या बरोबर बसणाऱ्यांस
संतोषविलें; त्यावरून राजाने त्या मुलगीला ह्मटलें,
तुला जें कांहीं पाहिजे तें माझ्या जवळ माग, ह्मणजे
मी तुला देईन. २३ आणि तो तिला श-
पथ वाहून बोलला कीं, माझ्या अर्ध राज्यपर्यंत
जें कांहीं तूं माझ्या जवळ मागसील तें तुला देईन.
२४ मग ती बाहेर जाऊन आपल्या आईला
ह्मणाली, मी काय मागूं? तेव्हां तिने सांगितलें कीं,
बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नयाचें शीर माग. २५
मग तिने तेव्हांच घाईने आंत राजाकडे येऊन मा-
गितलें कीं, बाप्तिस्मा करणारा योहान्न याचें शीर त्वां
तबकांत घालून मला आतांच द्यावें, हें मला पा-
हिजे. २६ तेव्हां राजा फार खिन्न झाला, तथापि
शपथांमुळें व संगतीं बसणाऱ्यांमुळें तिला त्याच्याने

नाहीं ह्मणवेना. २७ तेव्हां लागलेंच राजाने
शिपाई पाठवून त्याचें शीर आणायास आज्ञा केली,
मग त्याने बंदिशाळेंत जाऊन त्याचें शीर तोडिलें.
२८ आणि तें तबकांत घालून आणून त्या मुलगी-
ला दिल्हें, मग मुलगीने तें आपल्या आईला दिल्हें.
२९ नंतर हें ऐकून त्याचे शिष्य आले व त्यानी
त्याचें धड उचलून नेऊन थड्यांत ठेविलें.

३० आणखी प्रेषित येशूजवळ मिळाले. आ-
णि जें जें आपण केलें व शिकविलें तें सर्व त्यापाशीं
सांगितलें. ३१ मग तो त्यांस ह्मणाला, तुह्मी
एकीकडे रानांतल्या जाग्यांत चला, आणि थोडा
विसांवा घ्या. कारण कीं तेथें पुष्कळ येत जात
होते, त्यावरून त्यांस जेवायास देखील अवकाश
मिळेना. ३२ तेव्हां ते तारवांतून एकीकडे रानांतल्या
जाग्यांत गेले. ३३ तेव्हां समुदायानी त्यांस निघ-
तां पाहिलें, आणि बहुतानी त्याला ओळखिलें, आणि
सर्व नगरांतून ते पायींच तिकडे धावत गेले, व
त्याच्या अगोदर पोहंचले व त्याजवळ जमले. ३४
नंतर येशूने बाहेर येऊन मोठा समुदाय पाहिला,
आणि ज्या मेंढरांस मेंढपाळ नाहीं त्यांसारिखे ते
होते, ह्मणून तो त्यांविषयीं कळवळला; आणि तो
त्यांस बहुत गोष्टी शिकवूं लागला. ३५ आणि
इतक्यांत दिवस फार गेल्यावर त्याचे शिष्य त्या-
जवळ येऊन ह्मणाले, ही रानांतली जागा आहे,
आणि आतां दिवस फार गेला आहे; ३६ त्यानी
भोंवतालच्या खेड्यांमध्यें व गांवांमध्यें जाऊन आ-
पल्या करितां भाकरी विकत घ्याव्या, ह्मणून त्यांस
निरोप दे; कारण कीं त्यांजवळ खायास कांहीं नाहीं.
३७ तेव्हां त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी त्यांस
खायास द्या. तेव्हां ते त्याला ह्मणाले, आह्मी जाऊन
पांच पन्नास रुपयांच्या भाकरी विकत घेऊन त्यांस
खायाला द्याव्या काय? ३८ तेव्हां त्याने त्यांस ह्म-
टलें, तुह्माजवळ किती भाकरी आहेत? जाऊन पाहा.
मग पाहिल्यावर ते ह्मणाले, पांच व दोन मासे.
३९ नंतर त्या सर्वांनी हिरव्या गवतावर पंक्ति
पंक्तीने बसावें ह्मणून त्याने त्यांस सांगितलें. ४०
तेव्हां ते शंभर शंभर व पन्नास पन्नास असे ओळी
ओळीने बसले. ४१ मग त्याने त्या पांच भाकरी
व ते दोन मासे घेऊन वर आकाशाकडे पाहून आ-
शीर्वाद मागितला, आणि भाकरी मोडून त्यांपुढें वा-
ढायास आपल्या शिष्यांजवळ दिल्ह्या, आणि ते
दोन मासेहि त्याने सर्वांस वांटून दिल्हे. ४२
तेव्हां सर्व जेवून तृप्त झाले. ४३ नंतर तुकड्यानी
बारा टोपल्या भरून त्यानी उचलून नेल्या व मा-
स्यांतलेंहि. ४४ त्या भाकरी खाणारे तर सुमारें
पांच हजार पुरुष होते.

४५ तेव्हांच तो समुदायास निरोप देत आहे
इतक्यांत त्याने आपल्या शिष्यांस तारवांत बस-
वून पलिकडे बेथसाइदास जायाला पुढें लावून
दिल्हें. ४६ मग त्यांस निरोप देऊन तो प्रार्थना
करायास डोंगरांत गेला. ४७ आणि रात्र झा-
ल्यावर तें तारूं समुद्राच्या मध्यें होतें, आणि तो
एकटा भूमीवर होता. ४८ तेव्हां त्याने त्यांस
वल्हीं मारितां मारितां थकलेले असें पाहिलें, का-
रण कीं वारा त्यांस तोंडचा होता; नंतर सुमारें
रात्रीच्या चवथ्या प्रहरीं तो समुद्रावर चालून त्यां-
कडे आला, आणि त्यांच्या पलिकडे जाणार असें
दाखविलें. ४९ ते त्याला समुद्रावर चालतां पा-
हून भूत आहे असें समजून ओरडूं लागले. ५०
कारण कीं ते सर्व त्याला पाहून घाबरले; तेव्हांच
तो त्यांशीं बोलूं लागला व त्यांस ह्मणाला, धीर
धरा, मी आहें, भिऊं नका. ५१ नंतर तो त्यां-
जवळ तारवांत बसतांनाच वारा पडला; तेव्हां
ते आपल्या मनांत फार थक्क होऊन आश्चर्य पावले.
५२ कारण भाकरींची गोष्ट त्यानी ध्यानांत आ-
णिली नाहीं, त्यांचें अंतःकरण कठिण होतें ह्मणून.

५३ नंतर ते पार जाऊन गेन्नेसारेत देशास
पोहंचले व तडीस लागले. ५४ आणि ते तार-
वांतून उतरले तेव्हांच लोकानी त्याला ओळखिलें.
५५ मग त्या चहुंकडल्या अवघ्या प्रांतांत धावत
जाऊन दुखणेकऱ्यांस बाजांवर घालून जेथें ता
आहे ह्मणून ते ऐकत तेथें नेऊं लागत. ५६
आणि जेथें जेथें तो गांवांमध्यें किंवा नगरांमध्यें
किंवा खेड्यांमध्यें जाई तेथें ते रोग्यांस चव्हाट्यां-
वर नेऊन ठेवीत, आणि तुझ्या वस्त्राच्या कांठाला
आह्मी शिवावें मात्र, असी त्यानी त्याजवळ विनंती
केली, आणि जितके त्याला शिवले तितके बरे
झाले.

## अध्याय ७.

आणखी परोशी व कित्येक शास्त्री यरूशालेमा-
पासून येऊन त्याजवळ मिळाले. २ आणि
त्यानी त्याच्या शिष्यांतील कित्येकांस अशुद्ध ह्म-
णजे न धुतलेल्या हातानी भाकरी खातां पाहून

दोष ठेविला. ३ **कारण** कीं **परोशी** व सर्व
**यहूदी** वडिलांचा सांप्रदाय धरून हात नीट धुत-
ल्यावांचून खात नाहींत. ४ **आणि** चव्हाट्यां-
तून आल्यावर ते स्नान केल्यावांचून खात नाहींत,
आणि प्याले, घागरी, तांब्याचीं भांडीं व पलंग
यांचें धुणें, व असे बहुत दुसरे नेम त्यानी पाळायास
अंगीकारिले. ५ **यावरून** **परोश्यानी** व शा-
स्त्र्यानी त्याला विचारिलें कीं, तुझे शिष्य वडि-
लांच्या सांप्रदायाप्रमाणें कां चालत नाहींत?
आणि हात धुतल्यावांचून भाकर कां खातात? ६
**तेव्हां** त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मा ढोंग्यां-
विषयीं **यशाया**ने भविष्य ठीकच सांगितलें; असें
लिहिलें आहे कीं, हे लोक ओंठानी माझा सन्मान
करितात, परंतु त्यांचें अंतःकरण मजपासून दूर
आहे. ७ **आणि** ते माणसांच्या आज्ञा शास्त्र
ह्मणवून शिकवितांना मला व्यर्थ भजतात. ८
**कारण** कीं तुह्मी देवाची आज्ञा सोडून मनुष्यांचा
सांप्रदाय धरितां, ह्मणजे घागरी व प्याले यांचें
धुणें, आणि यांसरिखीं बहुत दुसरीं कामें करितां.
९ **अणखी** तो त्यांस ह्मणाला, तुह्मी आपला सां-
प्रदाय पाळावा ह्मणून देवाची आज्ञा बरीच रद्द
करितां. १० **कारण** कीं तूं आपल्या आईबा-
पांचा सन्मान कर, आणि जो बापाची किंवा आई-
ची निंदा करितो त्याला ठार मारावें, असें **मोश्या**ने
सांगितलें. ११ **परंतु** तुह्मी ह्मणतां, जेणेंकरून
तुझें हित मजकडून व्हायाचें तें कुर्बान ह्मणजे
अर्पण, असें कोणी माणसाने बापाला किंवा आईला
ह्मटलें, १२ **तर** तुह्मी त्याला त्याच्या बापासाठीं
किंवा त्याच्या आईसाठीं अणखी कांहीं करूं देत
नाहीं. १३ **या** प्रकारें तुह्मी जो आपला सांप्रदाय
सांगतां तेणेंकरून देवाचें वचन रद्द करितां, आणि
यांसारिखीं बहुत कामें करितां. १४ **तेव्हां** त्याने सर्व
समुदायाला बोलावून त्यांस ह्मटलें, तुह्मी अवघे
माझें ऐका, व समजून घ्या. १५ **माणसा**-
च्या आंत गेलें असतां त्याला विटाळवील असें
त्याच्या बाहेर कांहीं नाहीं, तर जें त्यांतून निघतें
तेंच माणसाला विटाळवितें. १६ **ज्या** कोणाला
ऐकायास कान आहेत तो ऐको.

१७ **मग** तो समुदायापासून घरांत गेल्यानंतर
त्याच्या शिष्यानी त्याला त्या दाखल्याविषयीं वि-
चारिलें. १८ **तेव्हां** तो त्यांस ह्मणाला, तुह्मीहि
इतके अडाणी आहां काय? जें कांहीं बाहेरून
माणसाच्या आंत जातें तेणेंकरून त्याला विटाळ
होत नाहीं, हें तुमच्या ध्यानांत येत नाहीं काय?
१९ **कारण** कीं तें त्याच्या अंतःकरणांत जात
नाहीं, तर पोटांत जातें व शौचकुपांत बाहेर
पडतें; यावरून सर्व अन्न शुद्ध आहे. २० **अ**-
णखी तो ह्मणाला, जें मनुष्यांतून निघतें तेंच मनु-
ष्याला विटाळवितें. २१ **कारण** कीं आंतून ह्मणजे
माणसांच्या अंतःकरणांतून दुष्ट विचार निघतातः
व्यभिचार, शिंदळक्या, हत्या, २२ **चोऱ्या**, लोभ,
मत्सर, कपट, कामातुरपणा, दुष्ट दृष्टि, दुर्भा-
षण, गर्व, मूर्खपणा; २३ **या** सर्व वाईट गोष्टी
आंतून निघतात व माणसाला विटाळवितात.

२४ **मग** तो तेथून उठून **सोर** व **सिदोन**
यांच्या प्रांतांत गेला; आणि घरांत गेल्यावर को-
णास कळूं नये असें त्याच्या मनांत होतें, परंतु
त्याच्याने गुप्त राहवेना; २५ **कारण** कीं कोणी-
एका बायकोच्या लाहान कन्येस अशुद्ध आत्मा
लागला होता, ती त्याजविषयीं ऐकून त्याजकडे
येऊन त्याच्या पायां पडली. २६ **ती** बायको
**हेल्लासीण** व जातीची **सुरफैनीकीण** होती, आणि
माझ्या कन्येंतून भूत काढावें असी तिने त्याला
विनंती केली. २७ **तेव्हां** **येशू** तिला ह्मणाला,
पहिल्याने लेंकरांस तृप्त होऊं दे, कारण कीं लेंकरां-
ची भाकर घेऊन कुत्र्यांस घालणें हें ठीक नाहीं.
२८ **मग** तिने त्याला उत्तर दिल्हें कीं, खरें प्रभु,
तथापि मेजाखालीं कुत्रींहि लेंकरांच्या भाकरींचा
चूर खातात. २९ **तेव्हां** त्याने तिला ह्मटलें,
या बोलण्यामुळें जा, तुझ्या कन्येंतून भूत निघालें
आहे. ३० **मग** ती आपल्या घरीं गेल्यावर भूत
निघालें व कन्या आंथरुणावर निजली आहे, असें
तिने पाहिलें.

३१ **नंतर** तो **सोर** व **सिदोन** यांच्या प्रांतां-
तून माघारा येऊन दकापलीसाच्या प्रांतांमधून गा-
लीलाच्या समुद्राकडे गेला. ३२ **तेव्हां** कोणीएक
बहिऱ्या तोत्र्याला त्याजकडे आणिलें, आणि आ-
पण याजवर हात ठेवावा ह्मणून त्याला विनं-
ती केली. ३३ **मग** त्याने त्याला समुदाया-
पासून एकीकडे नेऊन आपलीं बोटें त्याच्या का-
नांत घातलीं, आणि तो थुंकून त्याच्या जिभेला शिवला.
३४ **मग** आकाशाकडे वर पाहून तो कण्हला
व त्याला ह्मणाला, एफफाथा, ह्मणजे मोकळें
हो. ३५ **तेव्हां** त्याचे कान लागलेच मोकळे झाले

ाणि त्याच्या जिभेचा बंद सुटला व तो नीट बोलूं
ागला. ३६ तेव्हां हें कोणाला कळवूं नका, असें
ाने त्यांस निक्षूण सांगितलें, परंतु तो त्यांस जस-
सें सांगत होता तसें ते अधिकच गाजवूं ला-
ले. ३७ आणि ते फार थक्क होऊन बोलले
ां, याने सर्व कामें चांगलीं केलीं आहेत, बहि-
ांस ऐकणारे व मुक्यांस बोलणारे असें तो
ारितो.

## अध्याय ८.

त्या दिवसांमध्यें समुदाय फार मोठा होता
आणि त्याच्या जवळ खायास कांहीं नव्हतें
म्हणून येशू आपल्या शिष्यांस बोलावून त्यांस ह्म-
णाला; २ मला समुदायाचा कळवळा येतो,
कारण कीं आज तीन दिवस ते माझ्या जवळ रा-
हेले आहेत, आणि त्यांच्या जवळ खायाला कांहीं
नाहीं. ३ आणि म्या त्यांस उपासी घरीं लावून
देल्हें तर ते वाटेंत कासावीस होतील, कारण कीं
त्यांतील कित्येक लांबून आले आहेत. ४ तेव्हां
त्याच्या शिष्यानी त्याला उत्तर दिल्हें कीं, यांस
येथें रानांत भाकरीनी कोणाच्याने कसें तृप्त करवेल?
५ मग त्याने त्यांस विचारिलें कीं, तुह्माजवळ
किती भाकरी आहेत? तेव्हां त्यानी ह्मटलें, सात.
६ नंतर त्याने समुदायाला भूमीवर बसायास
सांगितलें, आणि त्याने त्या सात भाकरी घेऊन
आशीर्वाद मागितल्यावर मोडिल्या, आणि वाढायाला
आपल्या शिष्यांजवळ दिल्ह्या, मग त्यानी समुदा-
याला वाढिल्या. ७ आणि त्याजवळ थोडक्या मा-
सोळ्या होत्या, त्याहि त्याने आशीर्वाद मागितल्या-
वर वाढायास सांगितल्या. ८ तेव्हां ते जेवून
तृप्त झाले; नंतर त्यानी उरलेल्या तुकड्यानी सात
पांट्या भरून उचलून नेल्या. ९ आणि जेवणारे
सुमारें चार हजार होते; मग त्याने त्यांस निरोप
दिल्हा.
१० तेव्हांच तो आपल्या शिष्यांसुद्धां तारवांत
बसून दाल्मानुथा याच्या प्रांतांत गेला. ११ तेव्हां
परोशी जाऊन त्यासीं विवाद करूं लागले, आणि
त्यानी त्याजवळ आकाशांतील चमत्कार मागितला,
असी त्याची परीक्षा केली. १२ तेव्हां तो आ-
पल्या अंतःकरणांत कण्हून ह्मणाला, ही पिढी चम-
त्कार कां मागती? मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या
पिढीला चमत्कार मिळणारच नाहीं. १३ नंतर तो
त्यांस सोडून फिरून तारवांत बसून पलिकडे गेला.
१४ तेव्हां ते भाकरी घ्यायास विसरले होते
आणि एका भाकरीशिवाय त्यांजवळ तारवांत कांहीं
नव्हतें. १५ मग त्याने त्यांस निक्षूण सांगितलें
कीं, संभाळा, परोश्यांचें खमीर व हेरोदाचें खमीर
यांविषयीं जपा. १६ तेव्हां ते एकमेकांसीं विचार
करून ह्मणाले, आह्माजवळ भाकरी नाहींत ह्मणून
हा असें बोलतो. १७ मग येशू हें जाणून त्यांस
ह्मणाला, तुह्माजवळ भाकरी नाहींत ह्मणून तुह्मी
असा विचार कां करितां? तुह्मी अझून ध्यानांत
आणीत नाहीं व समजतहि नाहीं काय? अझून
तुमचें अंतःकरण कठीण आहे काय? १८ डोळे
असतां तुह्मी पाहत नाहीं काय? आणि कान अस-
तां तुह्मी ऐकत नाहीं काय? आणि आठवीतहि
नाहीं काय? १९ म्या पांच हजारांसाठीं पांच
भाकरी मोडिल्या, तेव्हां तुह्मी तुकड्यानी किती
टोपल्या भरून उचलून नेल्या; ते त्याला ह्मणाले,
बारा. २० आणि चार हजारांसाठीं सात भाकरी
मोडिल्या तेव्हां तुह्मी तुकड्यानी किती पांट्या भरून
उचलून नेल्या? ते ह्मणाले, सात. २१ नंतर
तो त्यांस ह्मणाला, तुह्मी कसें समजत नाहीं?
२२ मग तो बेथसाइदास आला, तेव्हां त्या-
जकडे एका अंधळ्याला आणिलें, आणि आपण त्या-
ला शिवावें असी त्याजवळ विनंती केली. २३
तेव्हां त्याने त्या अंधळ्याचा हात धरून त्याला
गांवाबाहेर नेलें, आणि त्याच्या डोळ्यांत थुंकून व
त्यावर हात ठेवून त्याला विचारिलें कीं, तुला कांहीं
दिसतें? २४ तेव्हां तो वर पाहून बोलला कीं,
मला माणसें चालतांना दिसतात, पण झाडांसारिखीं
दिसतात. २५ नंतर त्याने त्याच्या डोळ्यांवर पुन्हा
हात ठेविले व त्याला वर पाहायास सांगितलें;
तेव्हां तो नीट झाला आणि सर्व माणसें त्याला
साफ दिसूं लागलीं. २६ मग त्याने त्याला त्या-
च्या घरीं पाठवितांना सांगितलें कीं; या गांवांत
जाऊं नको, आणि गांवांतल्या कोणालाहि सांगूं नको.
२७ अणखी येशू आपल्या शिष्यांसुद्धां फि-
लिप्पसाच्या काइसारीकडल्या गांवांस गेला, तेव्हां
वाटेंत त्याने आपल्या शिष्यांस विचारिलें कीं, लोक
मला कोण ह्मणून ह्मणतात? २८ तेव्हां त्यानी उत्तर
दिल्हें कीं, कित्येक बाप्तिस्मा करणारा योहान्न; आ-
णि कित्येक एलीया; आणि कित्येक, भविष्यवाद्यां-
तील एक, असें ह्मणतात. २९ मग तो त्यांस

ह्मणाला, तुह्मी तर मला कोण ह्मणून ह्मणतां बरें?
तेव्हां पेत्रसानें त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं ख्रीस्त
आहेस. ३० **मग** त्यानें त्यांस निक्षून सांगि-
तलें कीं, मजविषयीं कोणाला सांगूं नका. ३१
तेव्हां तो त्यांस सांगूं लागला कीं, मनुष्याच्या पुत्रानें
फार सोसावें, आणि वडील व मुख्य याजक
व शास्त्री यानीं त्याला अव्हेरावें व जिवें मारावें,
आणि त्यानें तीन दिवसांनंतर पुन्हा उठावें, याचें
त्याला अगत्य आहे. ३२ **ही** गोष्ट त्यानें उघड
सांगितली; तेव्हां पेत्रस त्याला जवळ घेऊन धमकावूं
लागला. ३३ **तेव्हां** त्यानें मुरडून व आपल्या
शिष्यांकडे पाहून पेत्रसाला असें धमकाविलें, अरे
सैताना, माझ्या मागें हो, कारण कीं तूं देवाच्या
गोष्टींकडे लक्ष लावीत नाहींस, मनुष्याच्या गोष्टीं-
कडे लावितोस.

३४ **आणि** त्यानें आपल्या शिष्यांसुद्धां समु-
दायाला बोलावून त्यांस ह्मटलें, जो कोणी माझ्या
मागें यायास इच्छितो, त्यानें आपणाला नाकारावें
व आपला खांब उचलून घ्यावा व माझ्या मागें
यावें. ३५ **कारण** कीं जो कोणी आपला जीव
राखायास इच्छितो तो त्याला मुकेल; परंतु जो
कोणी मजकरितां व शुभवर्त्तमानाकरितां आपल्या
जिवाला मुकेल तो त्याला राखील. ३६ **का-**
**रण** कीं माणूस सगळें जग मिळवून आपल्या जि-
वाची हानि पावला तर त्याला काय लाभ होईल?
३७ **अथवा** माणूस आपल्या जिवाच्या बद्दल काय
देईल? ३८ **कां** कीं या व्यभिचारी व पापी
पिढीमध्यें जो कोणी मजविषयीं व माझ्या वचनां-
विषयीं लाजेल त्याविषयीं मनुष्याचा पुत्र पवित्र
दुतांसुद्धां आपल्या बापाच्या गौरवानें येईल तेव्हां
तोहि लाजेल.

## अध्याय ९.

आणखी त्यानें त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, एथें उभे राहणाऱ्यांतील असे
कोणी आहेत कीं, देवाचें राज्य पराक्रमानें आलें
असें पाहतील, तोंपर्यंत त्यांस मरणाचा अनुभव
होणारच नाहीं.

२ **मग** साहा दिवसांनंतर येशूनें पेत्रस व **या-**
**कोब** व **योहान्न** यांस आपल्या बरोबर घेतलें, आ-
णि उंच डोंगरावर एकीकडे नेलें, तेव्हां त्याचें रूप
त्यांच्या देखतां पालटलें. ३ **आणि** त्याचीं वस्त्रें
चकचकीत बर्फासारिखीं फार पांढरीं झालीं, इतकीं
पांढरीं करील असा पृथ्वीवर परीट नाहीं. ४
तेव्हां एलीया व मोशे यांस त्यानीं पाहिलें; हे
येशूसीं संभाषण करीत होते. ५ **तेव्हां** पेत्रस
येशूला ह्मणाला कीं, हे गुरू, आपण एथें असावें
हें बरें आहे; तर तीन मंडप करूं, तुझ्यासाठीं
एक, व मोश्यासाठीं एक, व एलीयासाठीं एक. ६
**कां** कीं ते घाबरले होते ह्मणून काय बोलावें हें
त्याला सुचेना. ७ **तेव्हां** त्यांवर सावली करणारें
ढग आलें, आणि त्या ढगांतून असी वाणी निघाली
कीं, हा माझा प्रिय पुत्र आहे, याचें तुह्मी ऐका.
८ **मग** त्यानीं एकाएकीं सभोंवतें पाहिलें तेव्हां
कोणाला पाहिलें नाहीं, आपल्यांजवळ एकट्या
येशूला पाहिलें. ९ **नंतर** ते डोंगरावरून उत-
रत असतां त्यानें त्यांस निक्षून सांगितलें कीं, तुह्मी
जें पाहिलें तें मनुष्याचा पुत्र मेलेल्यांमधून उठेल
तोंपर्यंत कोणाला कळवूं नका. १० **तेव्हां** त्यानीं
ती गोष्ट मनांत धरून आपल्यांमध्यें विचार केला
कीं, मेलेल्यांमधून उठणें ह्मणजे काय? ११ **मग**
त्यानीं त्याला पुसलें कीं, एलीया अगोदर आला
पाहिजे, असें शास्त्री कां ह्मणतात? १२ **तेव्हां**
त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, एलीया अगोदर
येऊन सर्व नीट करितो खरें, अणखी मनुष्याच्या
पुत्राविषयीं कसें लिहिलें आहे कीं, त्यानें फार
सोसावें व तुच्छ व्हावें? १३ **परंतु** मी तुह्मास
सांगतों कीं, एलीया आलाच आहे, आणि त्यांस
बरें वाटलें त्याप्रमाणें त्याला केलें, असें त्याविषयीं
लिहिलें आहे तसें.

१४ **नंतर** त्यानें शिष्यांजवळ येऊन त्यांच्या
सभोंवता मोठा समुदाय आहे आणि त्यांसीं शास्त्री
संवाद करीत आहेत, असें पाहिलें. १५ **तेव्हां**
सर्व समुदाय त्याला पाहतांच थक्क झाला, आणि
त्यानीं धावत जाऊन त्याला मुजरा केला. १६
**मग** त्यानें शास्त्र्यांस विचारिलें कीं, तुह्मी यांसीं
काय संवाद करितां? १७ **तेव्हां** समुदायांतील
कोणीएकानें उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, म्या आपल्या
मुलाला तुझ्या जवळ आणिलें, याला मुका आत्मा
लागला आहे. १८ **तो** याला जेथें कोठें धरितो
तेथें याला आपटून टाकितो, मग हा तोंडाला फेंस
आणून आपले दांत कडकडां खातो व सुकून जातो;
यास्तव तुझ्या शिष्यानीं तो काढावा ह्मणून म्या
त्यांस सांगितलें, परंतु त्यांच्यानें काढेना. १९

तेव्हां त्याने त्याला उत्तर दिल्हें कीं, अहा! अवि-
श्वासी पिढी, मी तुह्माबरोबर कोठवर राहूं?
तुमचें कोठवर सोसूं? त्याला मजकडे आणा. २०
मग त्यानी त्याला त्याजकडे आणिलें, तेव्हां त्याला
पाहतांच आत्म्याने त्याला पिळून टाकिलें, आणि
तो भूमीवर पडून तोंडाला फेंस आणून लोळूं ला-
गला. २१ तेव्हां त्याने त्याच्या बापाला पुसलें
कीं, हें याला होऊन किती काळ झाला? तेव्हां
त्याने ह्मटलें कीं, बाळपणापासून. २२ आणि
त्याने याचा घात करायाकरितां याला बहुत वेळां
अग्नींत व पाण्यांत टाकिलें; परंतु तुझ्याने कांहीं
करवेल तर आह्मावर करुणा करून आमचें स-
हाय कर. २३ तेव्हां येशू त्याला ह्मणाला,
तुझ्याने विश्वास धरवेल तर; विश्वास धरणाऱ्या-
च्याने सर्व होतें. २४ तेव्हांच त्या मुलाचा
बाप डोळ्यांस आसवें आणून असें ओरडला कीं,
हे प्रभू, मी विश्वास धरितों, माझ्या अविश्वासा-
विषयीं मला सहाय कर. २५ नंतर समुदाय एकत्र
धावत येत आहे असें पाहून येशूने त्या अशुद्ध
आत्म्याला धमकाविलें कीं, अरे मुक्या व बहिऱ्या
आत्म्या, मी तुला आज्ञा करितों, यांतून नीघ व
पुन्हां यांत जाऊं नको. २६ तेव्हां तो ओरडून व
त्याला फार पिळून निघाला, तेव्हां तो मेल्यासा-
रिखा झाला, ह्मणून तो मेला, असें बहुतेक बोलूं
लागले. २७ मग येशूने त्याचा हात धरून
त्याला उठविलें आणि तो उभा राहिला. २८
नंतर तो घरांत गेल्यावर त्याच्या शिष्यानी त्याला
एकांतीं पुसलें कीं, आमच्याने त्याला कां काढवलें
नाहीं? २९ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, ही जात
प्रार्थना व उपास यांवांचून दुसऱ्या कशानेहि निघत
नाहीं.

३० नंतर ते तेथून निघून गालीलामध्यें फिरत
होते, आणि हें कोणास कळूं नये, असें त्याच्या
मनांत होतें; ३१ कारण कीं तो आपल्या शि-
ष्यांस उपदेश करीत व त्यांस ह्मणत होता कीं,
मनुष्याच्या पुत्राला लोकांच्या हातीं देतील, आणि
ते त्याला जिवें मारितील, आणि जिवें मारिल्या-
नंतर तो तिसऱ्या दिवशीं पुन्हां उठेल. ३२ परंतु
ही गोष्ट ते समजले नाहींत आणि त्याला विचारा-
यास भ्याले.

३३ आणखी तो कपर्णाहूमांत आला आणि
घरीं गेल्यावर त्याने त्यांस विचारिलें कीं, तुह्मी वा-
टेंत आपल्यांमध्यें काय संवाद करीत होतां? ३४
परंतु ते उगेच राहिले, कारण कीं मोठा कोण, या-
विषयीं त्यानी वाटेंत आपल्यांमध्यें विवाद केला
होता. ३५ तेव्हां तो बसून बारा जणांस बोला-
वून त्यांस ह्मणाला, आपण पहिला व्हावा असें
कोणाच्या मनांत आलें तर त्याने सर्वांचा शेवटला
व सर्वांचा चाकर व्हावें. ३६ मग त्याने एक
बाळक घेऊन त्यांच्या मध्यें ठेविलें, आणि त्याला
कंवटाळून धरून त्यांस ह्मटलें कीं; ३७ जो
कोणी असल्या एका बाळकाला माझ्या नांवाने अं-
गीकारील तो मला अंगीकारील, आणि जो कोणी
मला अंगीकारील तो मला नाहीं, तर माझ्या पाठ-
विणाऱ्याला अंगीकारील.

३८ मग योहानाने त्याला उत्तर दिल्हें कीं,
हे गुरू, आमच्या मागें न येतां तुझ्या नांवाने भुतें
काढितांना कोणीएकाला आह्मीं पाहिलें, तेव्हां आ-
ह्मी त्याला मना केलें, कां कीं तो आमच्या मागें
येत नाहीं. ३९ तेव्हां येशू ह्मणाला, त्याला
मना करूं नका, कारण कीं जो माझ्या नांवाने चम-
त्कार करील आणि माझी निंदा सहज करील, असा
कोणी नाहीं. ४० कारण कीं जो आह्माला प्रति-
कूळ नाहीं तो आह्माला अनुकूळ आहे. ४१
कां कीं तुह्मी ख्रीस्ताकडील आहां ह्मणून जो कोणी
माझ्या नांवाने तुह्मास पाण्याचा प्याला पाजील,
तो आपल्या वेतनाला मुकणारच नाहीं, हें मी
तुह्मास खचीत सांगतों. ४२ आणि मजवर वि-
श्वास ठेवणाऱ्या लाहानांतील एकाला जो कोणी
अडखळवील, त्याच्या गळ्यांत जांत्याची तळी बां-
धून त्याला समुद्रांत बुडवावें हें त्याला बरें. ४३
आणि तुझा हात तुला अडखळवील तर तो तोडून
टाक; ४४ दोन हात असून नरकांत ह्मणजे न
विझणाऱ्या अग्नींत, जेथें त्यांचा किडा मरत नाहीं
व अग्नि विझत नाहीं तेथें जावें, यापेक्षां व्यंग
होऊन जीवनांत जावें, हें तुला बरें. ४५ आणि
तुझा पाय तुला अडखळवील तर तो तोडून
टाक; ४६ दोन पाय असून नरकांत ह्मणजे न
विझणाऱ्या अग्नींत, जेथें त्यांचा किडा मरत नाहीं
व अग्नि विझत नाहीं तेथें पडावें, यापेक्षां व्यंग
होऊन जीवनांत जावें, हें तुला बरें. ४७ आणि
तुझा डोळा तुला अडखळवील तर तो उपटून
टाक; ४८ दोन डोळे असून नरकाच्या अग्नींत,
जेथें त्यांचा किडा मरत नाहीं व अग्नि विझत

नाहीं तेथें पडावें, यापेक्षां एकडोळ्या होऊन देवा-
च्या राज्यांत जावें, हें तुला बरें. ४९ कारण कीं
प्रत्येक माणसाला अग्नीच्या योगानें खारट करितील,
आणि प्रत्येक बळिदान मिठानें खारट करितील.
५० मीठ चांगलें आहे, परंतु मिठाचा खारटपणा
गेला तर त्याला कशानें खारटपणा आणाल? तुह्मी
आपल्यांमध्यें खारटपणा धरा, आणि एकमेकांशीं
शांतीनें राहा.

## अध्याय १०.

मग तो तेथून उठून यार्देनेच्या पलिकडल्या तिरानें
यहूद्याच्या प्रांतामध्यें गेला; तेव्हां पुन्हा समु-
दाय जमून त्याजकडे आले, आणि तो आपल्या
चालीप्रमाणें त्यांस पुन्हा उपदेश करूं लागला.
२ मग परोश्यांनी येऊन त्याची परीक्षा पाहण्या-
करितां त्याला विचारिलें कीं, नवऱ्यानें बायको टा-
कावी हें योग्य आहे काय? ३ तेव्हां त्यानें
त्यांस उत्तर दिल्हें कीं, मोशानें तुह्मास काय आज्ञा
केली? ४ मग ते ह्मणाले, सूटपत्र लिहायास
व तिला टाकायास मोशानें परवानगी दिल्ही. ५
तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुमच्या अंतः
करणाच्या कठीणपणामुळें त्यानें ही आज्ञा तुह्मा-
साठीं लिहून ठेविली. ६ परंतु उत्पत्तीच्या प्रा-
रंभीं देवानें पुरुष व स्त्री असीं तीं उत्पन्न केलीं.
७ याकरितां पुरुष आपल्या आईबापांस सोडून
आपल्या बायकोशीं जडून राहील; ८ आणि तीं
दोघें एक शरीर होतील; ह्मणून तीं त्यानंतर दोन
नाहींत तर एकशरीर आहेत. ९ याकरितां देवानें
जें जोडिलें आहे तें माणसानें तोडूं नये. १० नंतर
घरांत त्याच्या शिष्यांनी फिरून त्याच गोष्टीविषयीं
त्याला विचारिलें. ११ तेव्हां तो त्यांस ह्मणाला
जो कोणी आपल्या बायकोला टाकील व दुसरीशीं
लग्न करील तो तिजविरुद्ध व्यभिचार करील.
१२ आणि जी बायको आपल्या नवऱ्याला टाकील
व दुसऱ्याशीं लग्न करील ती व्यभिचार करील.
१३ मग त्याजकडे बाळकें त्यानें त्यांस शिवावें
ह्मणून आणिलीं, परंतु शिष्यांनी आणणाऱ्यांस धम-
काविलें. १४ तें पाहून येशूला वाईट वाटलें,
आणि तो त्यांस ह्मणाला, बाळकें माझ्या जवळ
येऊं द्या, त्यांस मना करूं नका, कारण कीं देवाचें
राज्य असल्यांचें आहे. १५ मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, जो कोणी देवाचें राज्य बाळकासारिखें
घेणार नाहीं तो त्यांत जाणारच नाहीं. १६ तेव्हां
त्यानें त्यांस कवटाळून धरून त्यांजवर हात ठेवून
त्यांस आशीर्वाद दिल्हा.
१७ मग तो निघून वाटेंत चालत असतां कोणी
एकानें धावत येऊन व त्याच्या पुढें गुडघे टेंकून
त्याला विचारिलें कीं, हे उत्तम गुरू, सर्वकाळच्या
जीवनाचें वतन मिळावें ह्मणून म्या काय करावें?
१८ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, मला उत्तम कां
ह्मणतोस? एक जो देव त्यावांचून कोणी उत्तम
नाहीं. १९ आज्ञा तुला ठाऊक आहेत, व्यभि-
चार करूं नको, हत्या करूं नको, चोरी करूं नको,
खोटी साक्ष देऊं नको, कोणाला ठकवूं नको, आप-
ल्या आईबापांचा सन्मान कर. २० तेव्हां त्यानें
उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, म्या आपल्या लाहान-
पणापासून हें अवघें पाळिलें आहे. २१ तेव्हां
येशूनें त्याजकडे पाहून त्याजवर प्रीति केली, आणि
त्याला ह्मटलें कीं, एक गोष्ट तुला उणी आहे; जा,
तुझें आहे तितकें विकून दरिद्र्यांस दे, ह्मणजे तुला
आकाशांत संपत्ति मिळेल; चल, खांब उचलून घेऊन
माझ्या मागें ये. २२ परंतु तो त्या बोलण्यावरून
खिन्न होऊन दुःखानें निघाला, कारण कीं त्याची
बहुत मालमत्ता होती. २३ तेव्हां येशूनें सभोंवतें
पाहून आपल्या शिष्यांस ह्मटलें, धनवानांस देवाच्या
राज्यांत जायाला किती कठीण आहे? २४ तेव्हां
शिष्य त्याच्या बोलण्यावरून थक्क झाले; मग येशूनें
त्यांस फिरून उत्तर दिल्हें, लेंकरांनो, जे धनावर
भरवसा ठेवितात त्यांस देवाच्या राज्यांत जायाला
किती कठीण आहे? २५ धनवानाला देवाच्या
राज्यांत जाणें यापेक्षां उंटानें सुईच्या नाकांतून जाणें
सोपें आहे. २६ तेव्हां ते अत्यंत विस्मित होऊन
आपल्यांमध्यें ह्मणाले, तर तारण कोण पावेल?
२७ मग येशूनें त्यांकडे पाहून ह्मटलें, हें माणसां-
च्यानें होत नाहीं परंतु देवाच्यानें होतें, कारण कीं
देवाच्यानें सर्व करवतें. २८ तेव्हां पेत्रस त्याला
ह्मणूं लागला, पाहा, आह्मी सर्व सोडून तुझ्या
मागें आलों आहों. २९ मग येशूनें उत्तर दिल्हें
कीं, मी तुह्मास खचीत सांगतों, ज्यानें घर किंवा
भाऊ किंवा बहिणी किंवा बाप किंवा आई किंवा
लेंकरें किंवा शेतें मजकरितां व शुभवर्त्तमाना-
करितां सोडिलीं, ३० तो या सांप्रत काळीं
शंभरपट घरें व भाऊ व बहिणी व आया व लेंकरें
व शेतें हीं पाठलागांसुद्धां आणि पुढल्या काळीं सर्व-

काळचें जीवनहि पावल्यावांचून राहील असा कोणी
नाहीं. ३१ परंतु पहिले ते शेवटले व शेवटले
ते पहिले, असे बहुत होतील.
३२ आणि ते यरूशालेमास वाटेनें वर चालत
असतां येशू त्यांच्या पुढें चालला, आणि ते थक्क
झाले व भीत भीत पाठीमागें चालले. तेव्हां तो
पुन्हा बारा जणांस जवळ घेऊन आपल्याला जें
होणार तें त्यांस सांगूं लागला कीं, ३३ पाहा,
आपण वर यरूशालेमास जातों, आणि मनुष्याच्या
पुत्राला मुख्य याजकांच्या व शास्त्र्यांच्या हातीं
देतील, आणि ते त्याला मरण दंड ठरवितील व
त्याला विदेश्यांच्या स्वाधीन करितील; ३४ आणि
ते त्याची थट्टा करितील व त्याला फटके मारितील
व त्याजवर थुंकतील व त्याला जिवें मारितील, मग
तिसऱ्या दिवशीं तो पुन्हा उठेल.
३५ अणखी जबदीचे पुत्र याकोब व योहान्न
हे त्याजकडे जाऊन ह्मणाले, हे गुरू, जें कांहीं
आह्मी मागूं तें त्वां आह्मासाठीं करावें, असें आम-
च्या मनांत आहे. ३६ मग तो त्यांस ह्मणाला,
म्या तुह्मासाठीं काय करावें ह्मणून तुमच्या मनांत
आहे? ३७ तेव्हां ते त्याला ह्मणाले, तुझ्या गौ-
रवांत एकानें तुझ्या उजवीकडे व एकानें तुझ्या
डावीकडे बसावें असें आह्मास दे. ३८ परंतु
येशूनें त्यांस ह्मटलें, तुह्मी जें मागतां तें तुह्मास
समजत नाहीं; जो प्याला मला प्यायाचा आहे
तो तुमच्यानें पिववेल, आणि जो बाप्तिस्मा मला
घ्यायाचा आहे तो घेववेल काय? ३९ तेव्हां ते
त्याला ह्मणाले, घेववेल. मग येशूनें त्यांस ह्मटलें,
जो प्याला मला प्यायाचा आहे तो तुह्मी प्याल
आणि जो बाप्तिस्मा मला घ्यायाचा आहे तो तुह्मी
घ्याल खरें. ४० पण माझ्या उजवीकडे व
माझ्या डावीकडे बसणें हें ज्यांसाठीं तयार केलें
आहे त्यांवांचून कोणास देणें हें मजकडे नाहीं.
४१ तेव्हां दाहा जण हें ऐकून याकोब व
योहान्न यांवर रागें भरूं लागले. ४२ परंतु येशूनें
त्यांस बोलावून ह्मटलें, विदेश्यांचे अधिकारी
त्यांवर धनीपणा करितात, आणि त्यांचे मोठे
लोक त्यांवर सत्ता करितात, हें तुह्मास ठाऊक आहे.
४३ परंतु तुह्मामध्यें तसें होऊं नये, तर जो कोणी
तुह्मामध्यें मोठा व्हायास पाहील त्यानें तुमचा चा-
कर व्हावें. ४४ आणि जो कोणी तुह्मामध्यें
पहिला व्हायास पाहील त्यानें सर्वांचा दास व्हावें.
४५ कारण कीं मनुष्याचा पुत्रहि सेवा घ्यायास
नाहीं तर सेवा करायास आणि बहुतांची खंडणी
व्हावी ह्मणून आपला जीव द्यायास आला.
४६ नंतर ते यरीहोस आले; मग तो व त्याचे
शिष्य व मोठा समुदाय हे यरीहोपासून बाहेर
जात असतां, तीमी याचा पुत्र बार्तीमी आंधळा
वाटेवर भीक मागत बसला होता. ४७ तेव्हां
नाजारेथकर येशू आहे हें ऐकून, तो असें ओरडूं
लागला कीं, हे दाविदाच्या पुत्रा येशू, मजवर दया
कर. ४८ तेव्हां उगाच राहा असें बहुतेकांनी
त्याला धमकाविलें, परंतु तो अधिकच ओरडला
कीं, हे दाविदाच्या पुत्रा, मजवर दया कर. ४९
तेव्हां येशूनें उभें राहून त्याला बोलवायास सांगि-
तलें, मग ते त्या आंधळ्याला बोलावून त्याला ह्म-
णाले, धीर धर, ऊठ, तो तुला बोलावितो. ५०
तेव्हां तो आपलें वस्त्र टाकून उठून येशूकडे आला.
५१ तेव्हां येशूनें त्याला उत्तर दिल्हें, म्या तुज-
साठीं काय करावें ह्मणून मागतोस? तेव्हां तो आं-
धळा त्याला ह्मणाला, गुरूजी, मला दिसावें.
५२ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, जा, तुझ्या विश्वा-
सानें तुला तारिलें आहे; तेव्हांच त्याला दिसूं
लागलें, आणि तो वाटेनें येशूच्या मार्गें चालला.

## अध्याय ११.

नंतर ते यरूशालेमाजवळ जाइत झाडांच्या डोंग-
रापाशीं बेथफागे व बेथानी एथवर आले, तेव्हां
त्यानें आपल्या शिष्यांतून दोघांस पाठवितांना त्यांस
सांगितलें कीं, २ तुह्मी आपल्या समोरच्या
गांवांत जा, आणि त्यांत जातांच ज्यावर कोणी
माणूस कधीं बसला नाहीं असें बांधलेलें शिंगरूं
तुह्मास अढळेल, तें सोडून आणा. ३ आणि
तुह्मी हें कां करितां? असें कोणी तुह्मास ह्मटलें,
तर प्रभूला याची गरज आहे असें सांगा, ह्मणजे
तो तेव्हांच तें इकडे पाठवील. ४ तेव्हां ते नि-
घाले आणि बाहेर चव्हाट्यावर एका दारासीं बांध-
लेलें शिंगरूं त्यांस अढळलें; आणि ते तें सोडूं
लागले. ५ तेव्हां उभें राहणाऱ्यांतील कित्येक
त्यांस ह्मणाले, तुह्मी शिंगरूं सोडून काय करितां?
६ तेव्हां येशूनें आज्ञा केल्याप्रमाणें त्यानी त्यांस
सांगितलें, मग त्यानी त्यांस जाऊं दिल्हें. ७ नंतर
त्यानी तें शिंगरूं येशूजवळ आणून त्यावर आपलीं
वस्त्रें घातलीं, मग तो त्यावर बसला. ८ आणि

बहुतेकानी आपलीं वस्त्रें वाटेवर पसरलीं, आणि
दुसऱ्यानी झाडांच्या डाहळ्या तोडून वाटेवर पस-
रिल्या. ९ आणि पुढें चालणारे व मागें चाल-
णारेहि ओरडत बोलले कीं, होसान्ना, प्रभूच्या
नांवाने येणारा धन्यवादित असो. १० आमचा
बाप दावीद याचें प्रभूच्या नांवाने येणारें राज्य
धन्यवादित असो, परम उंचांमध्यें होसान्ना. ११
नंतर येशू यरूशालेमांत येऊन देवळांत गेला,
आणि त्याने चहुंकडे सर्व पाहिलें तेव्हां संध्याकाळ
झाला आणि तो बारा जणांसुद्धां बेथानीस निघून
गेला.

१२ आणि दुसऱ्या दिवसीं ते बेथानीहून निघा-
ल्यावर त्याला भूक लागली. १३ तेव्हां ज्या
अंजिराच्या झाडावर पानें होतीं तें दुरून पाहून,
आणि अंजिरांचा हंगाम आला नव्हता ह्मणून
कदाचित् त्यावर कांहीं तरी मिळेल असें समजून
तो त्याकडे गेला, परंतु गेल्यावर पानांवांचून त्याला
कांहीं मिळालें नाहीं. १४ येशूने त्याला उत्तर
दिल्हें कीं, यापुढें कोणी तुझें फळ कधीं न खावो.
तें त्याच्या शिष्यानी ऐकिलें.

१५ मग ते यरूशालेमास आले, आणि येशू
देवळांत जाऊन देवळांत विकत देणारे व विकत घेणारे
त्यांस बाहेर घालवूं लागला, आणि सराफांचे चौ-
रंग व खबुत्रें विकणाऱ्यांच्या बैठकी त्याने उलथ्या
केल्या. १६ आणि त्याने कोणाला देवळामधून
कांहीं भांडें वाहूं दिल्हें नाहीं. १७ आणि त्याने
त्यांस असा उपदेश केला कीं, माझ्या घराला सर्व रा-
ष्ट्रांकरितां प्रार्थनेचें घर ह्मणतील, असें लिहिलें नाहीं
काय? परंतु तुह्मी तें लुटाऱ्यांची गुहा असें केलें
आहे. १८ तेव्हां शास्त्र्यानी व मुख्य याजकानी
तें ऐकिलें, आणि त्यांचा घात कसा करावा याविषयीं
योजीत होते; कारण कीं सर्व समुदाय त्याच्या
उपदेशावरून थक्क झाल्यामुळें ते त्याला भ्याले.
१९ नंतर संध्याकाळ झाल्यावर तो नगरांतून बाहेर
गेला.

२० मग पाहाटेस ते त्या अंजिराच्या झाडाजव-
ळून जात असतां तें मुळापासून वाळलें असें त्यानी
पाहिलें. २१ तेव्हां पेत्रसाला आठवण होऊन
तो त्याला ह्मणाला, हे गुरू, पाहा, त्वां अंजिराच्या
झाडाला शाप दिल्हा तें वाळून गेलें. २२ तेव्हां
येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, देवावर विश्वास
ठेवा. २३ कारण मी तुह्मास खचीत सांगतों
कीं, जो कोणी या डोंगराला, तूं उपटून समुद्रांत
पड, असें ह्मणेल, आणि आपल्या अंतःकर-
णांत संशय न धरितां जें आपण ह्मणतो तें घडेल
असा विश्वास धरील, तो जें जें ह्मणेल तें त्याला
घडेल. २४ यामुळें मी तुह्मास सांगतों कीं, प्रा-
र्थना करते वेळेस जें कांहीं तुह्मी मागाल तें सर्व
तुह्माला मिळेल असा विश्वास धरा, ह्मणजे तें
तुह्मास घडेल. २५ आणि तुह्मी उभे राहून
प्रार्थना कराल तेव्हां कोणी तुमचा अपराधी
असला तर त्याची क्षमा करा, तुमच्या आकाशांतील
बापानेहि तुमच्या अपराधांची क्षमा करावी ह्मणून.
२६ परंतु तुह्मी जर क्षमा करणार नाहीं तर तुमचा
आकाशांतील बापहि तुमच्या अपराधांची क्षमा
करणार नाहीं.

२७ मग ते फिरून यरूशालेमांत आले, आणि
तो देवळामध्यें फिरत असतां त्याकडे मुख्य
याजक व शास्त्री व वडील येऊन त्याला ह्मणाले,
२८ कोणत्या अधिकाराने हें करितोस? आणि हें
करायाला हा अधिकार तुला कोणी दिल्हा? २९
तेव्हां येशूने उत्तर दिल्हें कीं, मीहि तुह्मास एक
गोष्ट पुसतों, तिचें उत्तर मला द्या, ह्मणजे कोणत्या
अधिकाराने हें करितों हें तुह्मास सांगेन. ३० यो-
हान्नाचा बाप्तिस्मा आकाशापासून किंवा माणसांपा-
सून झाला? मला उत्तर द्या. ३१ तेव्हां ते आपा-
पल्यांमध्यें विचार करूं लागले कीं, आकाशापासून
ह्मणूं तर तो ह्मणेल कीं, असें असतां तुह्मी त्यावर
विश्वास कां ठेविला नाहीं? ३२ आणि माणसां-
पासून ह्मणूं तर, लोकांस ते भ्याले, कारण की
योहान्न भविष्यवादी खरा असें सर्व मानीत होते.
३३ तेव्हां त्यानी येशूला उत्तर दिल्हें कीं, आ-
ह्मास ठाऊक नाहीं. मग येशूने त्यांस उत्तर
दिल्हें कीं, मीहि कोणत्या अधिकाराने हें करितों हें
तुह्मास सांगत नाहीं.

## अध्याय १२.

आणि तो दाखले देऊन त्यांस ह्मणूं लागला
कीं, कोणीएका माणसाने द्राक्षमळा लाविला
व त्याभोंवतें कुंपण घातलें व द्राक्षारसासाठीं कुंड
खणिलें व माळाहि बांधिला, नंतर तो माळ्यांस
सोपून देऊन आपण प्रवासास गेला. २ मग
हंगामीं आपण माळ्यांपासून द्राक्षमळ्याचीं कांहीं
फळें घ्यावीं ह्मणून त्याने माळ्यांकडे चाकर पा-

विला. ३ तेव्हां त्यांनी त्याला धरून ठोकिलें,
व रिकामें लावून दिल्हें. ४ नंतर त्याने फि-
रून दुसरा चाकर त्यांकडे पाठविला, त्यालाहि
त्यांनी धोंडमार करून त्याचें डोकें फोडिलें, आणि
त्याचा अपमान करून लावून दिल्हें. ५ मग त्याने
फिरून अणखी एक पाठविला; आणि त्याला
त्यांनी जिवें मारिलें; नंतर अणखी बहुत पाठविले,
त्यांतून कित्येकांस त्यांनी ठोकिलें व कित्येकांस
जिवें मारिलें. ६ वास्तव त्याचा एक प्रिय
पुत्र होता, त्यालाहि त्याने शेवटीं त्यांकडे
पाठविलें, कारण कीं माझ्या पुत्राची भीड धरतील,
असें त्याने ह्मटलें. ७ परंतु ते माळी आपापल्यां-
मध्यें ह्मणाले, हा वतनदार आहे, चला, आपण
याला जिवें मारूं, ह्मणजे वतन आपलेंच होईल.
८ मग त्यांनी त्याला धरून जिवें मारिलें व द्राक्ष-
मळ्याबाहेर टाकिलें. ९ यास्तव द्राक्षमळ्याचा
धनी काय करील? तो येऊन त्या माळ्यांचा नाश
करील, आणि द्राक्षमळा दुसऱ्यांस देईल. १०
हें शास्त्र तुह्मी वाचिलें नाहीं काय? जो
धोंडा बांधणाऱ्यांनी अव्हेरिला तोच कोपऱ्याचा
मुख्य धोंडा झाला आहे. ११ हें प्रभूकडून झालें
आणि आमच्या पाहण्यांत आश्चर्याचें आहे. १२
तेव्हां ते त्याला धरायास पाहत होते परंतु लोकांस
भ्याले, कारण कीं हा दाखला त्याने आह्मावर
दिल्हा आहे असें ते समजले; मग ते त्याला सो-
डून निघाले.

१३ नंतर बोलण्यामध्यें त्याला फाशांत पाडा-
याकरितां त्यांनी परोशी व हेरोदी यांतून कित्ये-
कांस त्याकडे पाठविलें. १४ मग ते येऊन त्याला
ह्मणाले, हे गुरू, आह्मास ठाऊक आहे कीं, तूं
खरा आहेस, आणि कोणाची काळजी धरीत नाहींस,
कारण कीं तूं माणसांच्या तोंडाकडे पाहत नाहींस,
तर देवाचा मार्ग खरेपणाने सांगतोस. काइसा-
राला पट्टी देणें हें योग्य आहे किंवा नाहीं? १५
आह्मी द्यावी किंवा न द्यावी? तेव्हां तो त्यांचें
ढोंग जाणून त्यांस बोलला, माझी परीक्षा कां पाहतां?
पाहण्यास पावली मजकडे आणा. १६ तेव्हां
त्यांनी आणिली; मग त्याने त्यांस ह्मटलें, हा मुख-
वटा व पत्ता कोणाचा? तेव्हां ते त्याला ह्मणाले,
काइसाराचा. १७ मग येशूने त्यांस उत्तर दिल्हें
कीं, काइसाराचें काइसाराला व देवाचें देवाला
भरून द्या. तेव्हां त्यांनी त्याविषयीं आश्चर्य केलें.

१८ मग पुन्हा उठणें नाहीं असें ह्मणणारे स-
दोकी यांनी त्याकडे येऊन त्याला विचारिलें कीं,
१९ हे गुरू, मोशाने आह्मासाठीं असें लिहिलें
कीं, कोणीएकाचा भाऊ लेंकरें नसतां मेला, आणि
त्याची बायको राहिली, तर त्याच्या भावाने त्याची
बायको घेऊन आपल्या भावासाठीं संतति उत्पन्न
करावी. २० तर सात भाऊ होते, आणि पहि-
ल्याने बायको केली, आणि तो संतति नसतां मेला;
२१ मग दुसऱ्याने तिला केलें, तोहि संतति नसतां
मेला, आणि तिसराहि तसाच. २२ याप्रमाणें
त्या सातांनी तिला केलें आणि त्यांची कांहीं संतति
राहिली नाहीं; सर्वांच्या मागून बायकोहि मेली.
२३ तर पुन्हा उठण्यामध्यें तीं उठतील तेव्हां ती
त्यांतून कोणाची बायको होईल? कारण कीं ती त्या
सातांची बायको होती. २४ तेव्हां येशूने त्यांस
उत्तर दिल्हें कीं, तुह्मी शास्त्र व देवाचें सामर्थ्यहि
जाणत नाहीं यामुळें चुकतां कीं नाहीं? २५ का-
रण कीं लोक मेलेल्यांमधून उठतात तेव्हां ते लग्न
करून घेत नाहींत व लग्न करून देतहि नाहींत, तर
आकाशांतील दूतांसारिखे असतात. २६ आणि
मेलेले उठतात त्यांविषयीं मोशाच्या पुस्तकांतील
झुडपाचें प्रकरण तुह्मी वाचलें नाहीं काय? त्यांत
देवाने त्याला असें ह्मटलें कीं, मी आब्राहामाचा
देव व इसाकाचा देव व याकोबाचा देव आहें.
२७ तो मेलेल्यांचा देव नव्हे, जिवंतांचा देव आहे;
यास्तव तुह्मी फार चुकतां.

२८ तेव्हां एका शास्त्र्याने येऊन त्यांचा संवाद
ऐकिला, आणि त्याने त्यांस बरें उत्तर दिल्हें असें
पाहून त्याला विचारिलें कीं, सर्व आज्ञांतील पहिली
कोणती? २९ तेव्हां येशूने त्याला उत्तर दिल्हें
कीं, सर्व आज्ञांतील पहिली ही कीं, हे इस्राएला,
ऐक; आमचा देव प्रभु एकच प्रभु आहे. ३०
आणि तुझा देव प्रभु यावर तूं आपल्या सर्व अंतः-
करणाने व आपल्या सर्व जिवाने व आपल्या सर्व
मनाने व आपल्या सर्व शक्तीने प्रीति कर, हीच
पहिली आज्ञा. ३१ आणि दुसरी ती हिजसारिखी
आहे कीं, जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्या-
वर प्रीति कर; यांहून कोणतीहि आज्ञा मोठी नाहीं.
३२ तेव्हां तो शास्त्री त्याला ह्मणाला, हे गुरू,
बरें, खरें बोललास, कारण कीं एक देव आहे, त्या-
शिवाय दुसरा नाहीं. ३३ आणि सर्व अंतःकर-
णाने व सर्व बुद्धीने व सर्व जिवाने व सर्व शक्तीने

त्यावर प्रीति करणें, आणि जसी आपणावर तसी
शेजाऱ्यावर प्रीति करणें, हें सर्व होम व यज्ञ यांपे-
क्षां अधिक आहे. ३४ तेव्हां त्याने शाहाणपणाने
उत्तर दिल्हें हें येशूने पाहून त्याला ह्मटलें कीं,
तूं देवाच्या राज्यापासून दूर नाहींस ; आणि तेव्हां-
पासून कोणीहि त्याला अणखी विचारायास धजेना.
३५ अणखी येशूने देवळांत उपदेश करितांना
उत्तर दिल्हें कीं, ख्रीस्त दाविदाचा पुत्र आहे, असें
शास्त्री कसें ह्मणतात? ३६ कारण कीं दावि-
दाने स्वतां पवित्र आत्म्याकडून ह्मटलें, प्रभूने
माझ्या प्रभूला सांगितलें कीं, मी तुझ्या शत्रूंस तु-
झ्या पायांचें आसन करीन तोंपर्यंत तूं माझ्या उज-
वीकडे बैस. ३७ यास्तव दावीद स्वतां त्याला
प्रभु असें ह्मणतो, मग तो त्याचा पुत्र कसा होई-
ल? तेव्हां साधारण लोकानी हर्षाने त्याचें ऐकिलें.
३८ आणि तो उपदेश करितांना त्यांस ह्मणाला,
तुह्मी शास्त्र्यांविषयीं जपा, कारण कीं झगे घालून
फिरणें व चवाठ्यांत मुजरे घेणें, ३९ व सभा-
स्थानांमध्यें मुख्य आसनें व जेवणांमध्यें मुख्य बै-
ठकी, हीं त्यांस आवडतात. ४० ते विधवांचीं
घरें खाऊन टाकितात, आणि ढोंगाने लांबलांब
प्रार्थना करितात; ते अधिक दंड पावतील.
४१ अणखी येशू भांडारासमोर बसून लोक
भांडारांत पैका कसे टाकितात हें पाहत होता; तेव्हां
बहुत धनवान फार टाकीत होते. ४२ आणि ए-
का दरिद्री विधवेने येऊन दोन टोल्या ह्मणजे एक
दमडी टाकिली. ४३ मग तो आपल्या शिष्यांस
बोलावून त्यांस ह्मणाला, मी तुह्मास खचीत सांग-
तों कीं, ज्यानी भांडारांत टाकिलें त्या सर्वांपेक्षां या
दरिद्री विधवेने अधिक टाकिलें आहे. ४४ का-
रण कीं त्या सर्वांनी आपल्या भरपुरांतून टाकिलें,
परंतु हिने आपल्या कमतींतून आपलें जितकें होतें
ह्मणजे आपली सर्व उपजीविका टाकिली.

## अध्याय १३.

मग तो देवळांतून जात असतां त्याचा एक शिष्य
त्याला ह्मणाला, हे गुरू, पाहा, कसे धोंडे व
कशा इमारती! २ तेव्हां येशूने त्याला उत्तर
दिल्हें कीं, या मोठ्या इमारती पाहतोस काय?
खालीं पाडल्यावांचून धोंड्यावर धोंडा राहणार ना-
हीं. ३ नंतर तो जाइत झाडांच्या डोंगरावर देव-
ळासमोर बसला असतां, पेत्रस व याकोब व यो-
हान्न व अंद्रयास यानी त्याला एकांतीं विचारिलें
कीं, ४ या गोष्टी केव्हां होतील, आणि या सर्व
गोष्टी पूर्ण होणार आहेत तेव्हां याचें चिन्ह कोणतें,
हें आह्मास सांग. ५ तेव्हां येशू त्यांस उत्तर
देऊं लागला कीं, तुह्मास कोणी फसवूं नये ह्मणून
जपा. ६ कारण कीं बहुत माझ्या नामाने येऊन
मीच तो आहें असें ह्मणतील, व बहुतांस फसवि-
तील. ७ अणखी तुह्मी लढाया व लढायांच्या
अवया ऐकाल, तेव्हां घाबरूं नका, कारण कीं त्या
अवश्य व्हायाच्या आहेत, परंतु तितक्यांत शेवट
होणार नाहीं. ८ कारण कीं राष्ट्र राष्ट्रावर व राज्य
राज्यावर उठेल, आणि जागोजागीं भूमिकंप व दु-
काळ व दंगे होतील; या गोष्टी वेदनांचा प्रारंभ
आहेत. ९ तेव्हां तुह्मी आपल्यांविषयीं जपा, का-
रण कीं ते तुह्मास न्यायसभांच्या स्वाधीन करितील,
आणि सभास्थानांमध्यें तुह्मास ठोकतील, आणि सुभे-
दार व राजे यांस साक्ष व्हावी ह्मणून तुह्मास त्यां-
समोर माझ्या करितां उभें करितील. १० परंतु
अगोदर सर्व राष्ट्रांस शुभवर्त्तमान गाजविलें
पाहिजे. ११ आणि ते तुह्मास नेऊन पराधीन
करितील तेव्हां आपण काय बोलावें याविषयीं
अगोदर काळजी करूं नका व विचारहि करूं नका,
तर त्याच घटकेस ज्याची सूचना तुह्मास होईल
तेंच बोला, कारण कीं बोलणारे तुह्मी नव्हां, तर
पवित्र आत्मा तो. १२ तेव्हां भाऊ भावाला व
बाप लेंकाला जिवें मारण्याकरितां पराधीन करील,
आणि लेंकरें आईबापांवर उठतील व त्यांस जिवें
मारवितील. १३ आणि माझ्या नामामुळें सर्व
तुमचा द्वेष करितील, परंतु शेवटपर्यंत टिकणारा तो-
च तरेल. १४ परंतु ओसाड करणारा अमंगळ
पदार्थ, दानीयेल भविष्यवाद्याने सांगितला आहे, तो
जेथें नसावा तेथें उभा राहिलेला पाहाल, (वाचणा-
ऱ्याने ध्यानांत आणावें,) तेव्हां जे यहूद्यांत अस-
तील त्यानी डोंगरांवर पळून जावें. १५ आणि
जो धाब्यावर असेल त्याने घरांत उतरूं नये व
आपल्या घरांतून कांहीं नेण्याकरितां आंत जाऊं
नये. १६ आणि जो शेतांत असेल त्याने आपलें
वस्त्र नेण्याकरितां माघारें येऊं नये. १७ आणि
त्या दिवसांमध्यें ज्या गरोदर व ज्या थान देणाऱ्या
त्यांस हाय हाय. १८ परंतु तुमचें पळणें हिंवा-
ळ्यांत होऊं नये ह्मणून प्रार्थना करा. १९ का-
रण कीं जी सृष्टि देवाने उत्पन्न केली तिच्या प्रारंभा-

पासून आजपर्यंत झालें नाहीं व होणारहि नाहीं, असें
संकट त्या दिवसांमध्यें होईल. २० आणि ते
दिवस प्रभु थोडे न करिता तर कोणी मनुष्य न
निभावता; परंतु ज्यांस त्याने निवडिलें त्या निवडले-
ल्यांमुळें त्याने ते दिवस थोडे केले आहेत. २१
तेव्हां पाहा, ख्रीस्त एथें, किंवा पाहा तेथें, असें
कोणी तुह्मास ह्मटलें, तर विश्वास धरूं नका.
२२ कारण कीं खोटे ख्रीस्त व खोटे भविष्यवादी
उठतील, आणि असीं चिन्हें व चमत्कार दाखवि-
तील कीं, साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवि-
तील. २३ तुह्मी तर जपा, पाहा, म्या तुह्मास
अगोदरच सर्व सांगितलें आहे. २४ अणखी त्या
दिवसांमध्यें त्या संकटानंतर सूर्य अंधक होईल, व
चंद्र आपला उजेड देणार नाहीं; २५ आणि
आकाशांतील तारे पडतील, व आकाशांतील सैन्यें
डळमळतील. २६ तेव्हां मनुष्याच्या पुत्राला मो-
ठ्या सामर्थ्याने व गौरवाने ढगांत येतांना पाहतील.
२७ तेव्हां तो आपल्या दुतांस पाठवून, आपल्या
निवडलेल्यांस पृथ्वीच्या शेवटापासून आकाशाच्या
शेवटापर्यंत चहुंकडून जमा करील. २८ आतां
अंजिर झाडाच्या दाखल्यावरून शिका; त्याच्या
डाहाळींत रस येऊं लागला व पानें फुटूं लागलीं,
ह्मणजे उन्हाळा जवळच आला असें तुह्मी समज-
तां. २९ तसेंच तुह्मी या गोष्टी होतांना पाहाल,
तेव्हां तो काळ जवळ दारासीं आहे असें समजा.
३० मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या सर्व गोष्टी
होतील तोंपर्यंत ही पिढी टळून जाणार नाहीं. ३१
आकाश व पृथ्वी टळून जातील, परंतु माझीं वचनें
टळून जाणार नाहींत. ३२ अणखी त्या दिवसा-
विषयीं व त्या घटकेविषयीं कोणाला ठाऊक नाहीं,
आकाशांतील दुतांसहि नाहीं, आणि पुत्रालाहि नाहीं,
केवळ बापाला ठाऊक आहे. ३३ जपा, जागे
असा व प्रार्थना करीत जा, कारण कीं ती वेळ केव्हां
येईल हें तुह्मास ठाऊक नाहीं. ३४ जसें कीं,
प्रवासास जाणारा माणूस आपलें घर सोडितां आ-
पल्या चाकरांस अधिकार देऊन ज्याचें त्याला काम
नेमून देतो, आणि द्वारपाळाला जागें राहायास आ-
ज्ञा करितो. ३५ ह्मणून जागे राहा, नाहीं तर घरधनी
एकाएकीं येऊन तुह्मास झोंपेंत असतांना पाहील.
३६ कारण कीं तो केव्हां येईल, संध्याकाळीं
किंवा मध्यरात्रीं किंवा कोंबडा ओरडण्याच्या वेळेस
किंवा सकाळीं, हें तुह्मास ठाऊक नाहीं. ३७ आ-
णि जें मी तुह्मास सांगतों तें सर्वांस सांगतों, जा-
गे राहा.

## अध्याय १४.

मग दोन दिवसांनंतर वल्हांडण व बेखमीर भाकरी
यांचा सण होता; तेव्हां त्याला कपटाने कसें
धरून जिवें मारावें याविषयीं मुख्य याजक व शा-
स्त्री योजीत होते. २ परंतु हें सणांत करूं नये,
केलें तर कदाचित् लोकांमध्यें गलबला होईल, असें
त्यानी ह्मटलें.

३ आणि तो बेथानीमध्यें कोडी शिमोन याच्या
घरीं असतां जेवायाला बसला, तेव्हां कोणीएक
बायको खरा नार्द नामें मोलवान सुगंध तेलाची
आलाबास्त्र कुपी घेऊन आली, आणि तिने ती आ-
लाबास्त्र कुपी फोडून त्याच्या डोक्यावर तें ओति-
लें. ४ तेव्हां कित्येक आपापल्यांमध्यें रागें भरून
ह्मणाले, या सुगंध तेलाचा असा नाश कशाला
केला? ५ कारण कीं हें तेल विकलें असतें तर
त्याचे शें पन्नास रुपये आले असते, आणि ते
दरिद्र्यांस देतां येते; असी त्यानी तिजवर कुरकूर
केली. ६ तेव्हां येशू बोलला कीं, इला असूं द्या,
इला त्रास कां देतां? इने मजसाठीं चांगलें काम
केलें आहे. ७ कारण कीं दरिद्री सर्वकाळ तुह्मा-
मध्यें आहेत, आणि तुह्मास पाहिजे तेव्हां त्यांचें
बरें करितां येतें, परंतु मी सर्वकाळ तुह्मामध्यें नाहीं.
८ इच्याने करवलें तें केलें, इने उत्तरकार्यासाठीं
माझ्या शरिराला अगोदरच तेल लावून ठेविलें
आहे. ९ मी तुह्मास खचीत सांगतों कीं, सर्व ज-
गामध्यें जेथें जेथें हें शुभवर्त्तमान गाजवितील तेथें
इने केलें आहे हें देखील इच्या आठवणीसाठीं
सांगतील.

१० मग बारांतील एक यहूदा इस्कारयोते हा
त्याला मुख्य याजकांच्या स्वाधीन करायाकरितां
त्यांजकडे निघून गेला. ११ त्याचें ऐकून त्यांस
आनंद झाला, आणि त्याला त्यानी पैका देऊं केला;
मग त्याला सोईने पराधीन कसें करावें हें तो पाहूं
लागला.

१२ नंतर बेखमीर भाकरींच्या सणाच्या पहिल्या
दिवसीं वल्हांडणाचा यज्ञपशु मारीत असत, तेव्हां
त्याचे शिष्य त्याला ह्मणाले, त्वां वल्हांडण सणाचें
भोजन करावें याकरितां आह्मी कोठें जाऊन तयार
करावें, याविषयीं तुझी आज्ञा काय? १३ मग त्याने

आपल्या शिष्यांतील दोघांस पाठवितांना त्यांस सां-
गितलें कीं, नगरांत जा, ह्मणजे पाण्याची घागर घेऊन
जाणारा माणूस तुह्मांला भेटेल, त्याच्या मागें जा.
१४ आणि जेथें तो आंत जाईल तेथल्या घरधन्याला
असें सांगा कीं, गुरु ह्मणतो, म्या आपल्या शिष्यां-
सुद्धां वल्हांडण सणाचें भोजन करावें, असी उतरा-
याची जागा कोठें आहे? १५ मग तो तुह्मास
सामान लावून तयार केलेली एक मोठी माडी दाख-
वील; तेथें आमच्या साठीं तयार करा. १६ मग
त्याचे शिष्य निघून नगरांत गेले, आणि त्यानें
सांगितल्याप्रमाणेंच त्यांस आढळलें, आणि त्यांनी
वल्हांडण सणाचें भोजन तयार केलें.

१७ मग संध्याकाळ झाल्यावर तो बारांसुद्धां आला.
१८ नंतर ते बसून जेवीत असतां येशू बोलला,
मी तुह्मास खचीत सांगतों कीं, मजबरोबर जेवणारा
तुह्मांमधील एक मला पराधीन करील. १९
तेव्हां ते खिन्न होऊन एकएक त्याला ह्मणूं लागला
कीं, तो मी काय? आणि दुसरा, तो मी काय?
२० तेव्हां त्यानें त्यांस उत्तर दिल्हें कीं, मजबरो-
बर ताटांत बुचकळणारा बारांतील एक तो. २१
मनुष्याच्या पुत्राविषयीं जसें लिहिलें आहे तसा तो
जातो खरा, परंतु जो माणूस मनुष्याच्या पुत्राला
पराधीन करितो त्याला हाय हाय. तो माणूस
जन्मला नसता तर त्याला बरें होतें.

२२ आणि ते जेवीत असतां येशूनें भाकर घे-
तली आणि आशीर्वाद मागून ती मोडिली, आणि
त्यांस देऊन ह्मटलें कीं, घ्या, खा, हें माझें शरीर
आहे. २३ नंतर त्यानें प्याला घेतला, आणि आ-
शीर्वाद मागून तो त्यांस दिल्हा; मग ते सर्व त्यांतून
प्याले. २४ आणि त्यानें त्यांस ह्मटलें कीं, हें
माझें रक्त, हें नव्या कराराचें, हें बहुतांसाठीं ओ-
तिलें, असें आहे. २५ मी तुह्मास खचीत सां-
गतों कीं, देवाच्या राज्यांत नवा पिईन त्या दिवसा-
पर्यंत द्राक्षवेलाचा उपज आतांपासून पिणारच
नाहीं. २६ नंतर गीत गाऊन ते निघून जाइत
झाडांच्या डोंगरास गेले.

२७ मग येशू त्यांस ह्मणाला, तुह्मी सर्व याच
रात्रीं मजमुळें अडखळाल; कारण असें लिहिलें
आहे कीं, मी मेंढपाळाला मारीन, ह्मणजे मेंढरांची
दाणादाण होईल. २८ परंतु मी उठल्यावर तुम-
च्या अगोदर गालीलांत जाईन. २९ तेव्हां पे-
त्रस त्याला ह्मणाला, जरी सर्व अडखळले तरी
मी अडखळणार नाहीं. ३० मग येशू त्याला
ह्मणाला, मी तुला खचीत सांगतों कीं, आज याच
रात्रीं कोंबडा दोन वेळां ओरडल्याअगोदर तूं मला
तीन वेळा नाकारसील. ३१ तेव्हां तो फार अ-
धिक बोलूं लागला कीं, जरी मला तुझ्या बरोबर
मरावें लागलें तरी मी तुला नाकारणारच नाहीं;
सर्वांनीहि तसेंच ह्मटलें.

३२ नंतर ते गेथसेमने या नांवाच्या ठिकाणीं आले,
मग तो आपल्या शिष्यांस ह्मणाला, मी प्रार्थना
करीन तोंपर्यंत एथें बसा. ३३ तेव्हां पेत्रस व
याकोब व योहान यांस बरोबर घेऊन तो फार घाबरा
व कष्टी होऊं लागला. ३४ तेव्हां तो त्यांस ह्म-
णाला, माझा जीव मरण्यासारिखा फार खिन्न आहे,
एथें राहा व जागे असा. ३५ मग तो कांहींसा
पुढें जाऊन भूमीवर पडला, आणि त्यानें असी प्रार्थना
केली कीं, साधल तर ही घटका मजपासून टळून
जावो. ३६ अणखी तो बोलला कीं, हे आब्बा
बापा, तुझ्यानें सर्व करवतें, हा प्याला मजपासून
दूर कर, परंतु माझी इच्छा आहे असें नसो,
तुझी इच्छा आहे तसें होवो. ३७ मग तो आला,
आणि ते झोंपीं गेले आहेत असें पाहून पेत्रसाला
ह्मणाला, शिमोना, झोंपीं गेलास काय? घटका-
भरहि तुझ्यानें जागें राहवेना काय? ३८ तुह्मी
परीक्षेंत येऊं नये ह्मणून जागे राहा व प्रार्थना क-
रा; आत्मा तयार आहे खरा, परंतु देह अशक्त.
३९ नंतर त्यानें फिरून जाऊन तेंच वाक्य ह्मणून
प्रार्थना केली. ४० मग माघारा येऊन, ते पुन्हा
झोंपीं गेले आहेत असें त्यानें पाहिलें, कारण कीं
त्यांचे डोळे जड झाले होते, आणि त्याला काय
उत्तर द्यावें हें त्यांस सुचेना. ४१ नंतर तो ति-
सऱ्यानें येऊन त्यांस ह्मणाला, अझून झोंप व
विसांवाहि घेतां! हें पुरे, घटका आली आहे; पाहा.
मनुष्याच्या पुत्राला पाप्यांच्या हातीं देतात. ४२
उठा, आपण जाऊं; पाहा, मला पराधीन करणारा
जवळ आला आहे.

४३ तेव्हांच तो बोलत आहे इतक्यांत बारांतला
एक यहूदा आला, आणि त्यासंगतीं मुख्य याजक व
शास्त्री व वडील यांकडला मोठा समुदाय तरवारी
व सोटे घेऊन आला. ४४ आणि त्याला पराधीन
करणाऱ्यानें त्यांस असी खूण सांगून ठेविली होती
कीं, मी ज्याचें चुंबन घेईन तोच तो आहे, त्याला
धरा व बंदोबस्तानें न्या. ४५ मग त्यानें येऊन व

त्याजकडे आऊन, हे गुरू, हे गुरू, असें ह्मटलें,
आणि त्याचें चुंबन घेतलें. ४६ तेव्हां त्यानी आ-
पले हात त्यावर टाकून त्याला धरिलें. ४७ मग
जे जवळ उभे होते त्यांतून एकाने तरवार उपसून
प्रमुख याजकाच्या चाकराला मारिलें, आणि त्याचा
कान कापून टाकिला. ४८ तेव्हां येशूने त्यांस
उत्तर दिल्हें कीं, जसे लुटाऱ्यावर तरवारी व सोटे
घेऊन जातां तसे तुह्मी मला धरायास बाहेर आलां
काय? ४९ मी प्रतिदिवशीं तुह्माजवळ असतां
देवळांत उपदेश करीत होतों, तेव्हां तुह्मी मला ध-
रिलें नाहीं; परंतु शास्त्र पूर्ण व्हावें ह्मणून असें
झालें. ५० तेव्हां सर्व त्याला सोडून पळाले.
५१ मग कोणीएक तरणा नागव्या अंगावर तागाचें
वस्त्र घेऊन त्याच्या मागें चालत होता, मग तर-
ण्यानी त्याला धरिलें. ५२ तेव्हां तो तें वस्त्र
टाकून त्यांपासून नागवाच पळाला.

५३ नंतर त्यानी येशूला प्रमुख याजकाकडे नेलें;
तेथें त्याजवळ सर्व मुख्य याजक व वडील व शा-
स्त्री जमले. ५४ पेत्रस तर दुरून त्याच्या मागें
चालून प्रमुख याजकाच्या वाड्यांत गेला, आणि
चाकरांबरोबर विस्तवाजवळ शेकत बसला. ५५
तेव्हां मुख्य याजक व सर्व न्यायसभा यानी येशूला
जिवें मारायाकरितां त्याविषयीं साक्ष पाहिली, परंतु
त्यांस ती मिळेना. ५६ कारण कीं बहुतानी त्या-
विरुद्ध खोटी साक्ष दिल्ही, परंतु त्या साक्षी सारि-
ख्या नव्हत्या. ५७ तेव्हां कित्येकानी उठून त्या-
विरुद्ध असी खोटी साक्ष दिल्ही कीं, ५८ आह्मी
याला असें बोलतां ऐकिलें कीं, हें हाताने बांधलेलें
देऊळ मी मोडून टाकीन, आणि हाताने बांधलें
नाहीं असें दुसरें देऊळ तीन दिवसांत रचीन. ५९
परंतु हीहि त्यांची साक्ष सारिखी नव्हती. ६०
तेव्हां प्रमुख याजकाने मध्यें उभें राहून येशूला
विचारिलें कीं, तूं कांहींच उत्तर देत नाहींस काय?
हे तुझ्या विरुद्ध साक्ष कसी देतात? ६१ तथापि
तो उगाच राहिला आणि त्याने कांहीं एक उत्तर
दिल्हें नाहीं. फिरून प्रमुख याजकाने त्याला वि-
चारिलें कीं, स्तुतिमानाचा पुत्र ख्रीस्त तो तूं आहेस
काय? ६२ तेव्हां येशूने ह्मटलें, तो मी आहें,
आणि तुह्मी मनुष्याच्या पुत्राला पराक्रमाच्या उज-
वीकडे बसलेलें, व आकाशाच्या ढगांवर येतांना पा-
हाल. ६३ तेव्हां प्रमुख याजक आपलीं वस्त्रें
फाडून बोलला, आह्मास अणखी साक्ष्यांची गरज
काय? ६४ तुह्मी हें दुर्भाषण ऐकिलें, तुह्माला
कसें दिसतें? तेव्हां तो मरावा, असा सर्वांनी त्यावर
दंड ठरविला. ६५ मग कित्येक त्यावर थुंकूं व
त्याचें तोंड झांकूं व त्याला बुक्या मारूं व त्याला
ह्मणूं लागले, तूं भविष्यवादी असल्यास सांग;
आणि चाकरानीहि त्याला चपराका मारिल्या.

६६ पेत्रस तर खालीं वाड्यांत असतां प्रमुख
याजकाच्या दासींतून एक आली; ६७ आणि
पेत्रसाला शेकतांना पाहून त्याकडे दृष्टि लावून ह्म-
णाली, तूंहि नाजारेथकर येशूबरोबर होतास. ६८
परंतु तो नाकारून बोलला कीं, तूं काय ह्मणतीस हें
मला ठाऊक नाहीं व समजतहि नाहीं. मग तो बाहेर
देवडींत गेला, तेव्हां कोंबडा ओरडला. ६९ मग
ती दासी दुसऱ्याने त्याला पाहून जे जवळ उभे
होते त्यांस सांगूं लागली कीं, हा त्यांतला एक
आहे. ७० फिरून त्याने नाकारिलें; मग कांहीं
वेळाने जवळ उभे राहणारे पेत्रसाला फिरून ह्मणाले,
खराच तूं त्यांतला आहेस, कारण कीं तूं गालीली
आहेस व तुझी बोलीहि तसीच आहे. ७१ तेव्हां
तो शापानी व शपथानी बोलूं लागला, ज्या माणसा-
विषयीं तुह्मी बोलतां त्याला मी ओळखत नाहीं.
७२ तेव्हां दुसऱ्याने कोंबडा ओरडला; मग ये-
शूने पेत्रसाला जी गोष्ट सांगितली होती कीं, कोंबडा
दोन वेळां ओरडल्याअगोदर तूं तीन वेळां मला
नाकारसील, ती त्याला आठवली. मग तिजविषयीं
तो विचार करून रडूं लागला.

## अध्याय १५.

तेव्हांच पाहाटेस वडिल व शास्त्री व सर्व न्याय-
सभा यांबरोबर मुख्य याजकानी मसलत केल्या-
वर येशूला बांधून नेलें आणि पिलातसाच्या स्वा-
धीन केलें. २ तेव्हां पिलातसाने त्याला विचा-
रिलें कीं, तूं यहूद्यांचा राजा आहेस काय? मग
त्याने त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं ह्मणतोस तसेंच.
३ तेव्हां मुख्य याजकानी त्याजवर बहुत दोष
ठेविले. ४ मग पिलातसाने त्याला फिरून वि-
चारिलें कीं, तूं कांहीं उत्तर देत नाहींस काय?
पाहा, तुझ्या विरुद्ध किती गोष्टींची साक्ष देतात?
५ तेव्हां देखील येशूने कांहींच उत्तर दिल्हें नाहीं,
यावरून पिलातसाला आश्चर्य वाटलें.

६ अणखी त्या सणांत ज्या कोणत्या एका बंदिवा-
नाला लोक मागत त्याला तो त्यांकरितां सोडून देत

असे· ७ आणि कित्येक बंडखोरानी बंडांत खून
केला होता, त्यांबरोबर बांधलेला असा बाराब्बा
नामें माणूस होता. ८ तेव्हां आपल्याकरितां तो
नेहमी करीत असे त्याचप्रमाणें त्याने करावें ह्मणून
लोक ओरडून मागूं लागले. ९ मग पिलातसाने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, म्या तुह्माकरितां यहूद्यांच्या
राजाला सोडावें, ह्मणून मागतां काय? १० का-
रण कीं मुख्य याजकानी त्याला हेव्याने पराधीन
केलें हें त्याला ठाऊक होतें· ११ तेव्हां मुख्य
याजकानी समुदायाला मागायास चिथाविलें कीं, तो
नको, आपण आह्माकरितां बाराब्बाला सोडावें.
१२ तेव्हां पिलातसाने त्यांस फिरून उत्तर दिल्हें
कीं, ज्याला तुह्मी यहूद्यांचा राजा ह्मणतां त्याला
तर म्या काय करावें ह्मणून मागतां? १३ तेव्हां
ते फिरून ओरडले कीं, त्याला खांबीं दे· १४
मग पिलातसाने त्यांस ह्मटलें कीं, कां? त्याने
काय वाईट केलें आहे? परंतु ते अधिक ओरडले
कीं, त्याला खांबीं दे· १५ तेव्हां पिलातसाने
समुदायाला खुशी करावें या हेतूने त्यांकरितां बा-
राब्बाला सोडिलें, आणि येशूला फटके मारून
खांबीं देण्याकरितां स्वाधीन केलें. १६ तेव्हां शि-
पायानी त्याला मायतोऱ्यम ह्मणजे कचेरी एथें
नेलें, आणि त्यानी सगळें पलटण जमा केलें. १७
मग त्यानी जांबळें वस्त्र त्याच्या अंगांत घातलें,
आणि कांट्यांचा मुगुट गुंफून त्याला घातला. १८
नंतर ते मुजरा करून त्याला ह्मणूं लागले कीं,
हे यहूद्यांच्या राजा, सलाम· १९ आणि त्यानी
त्याच्या मस्तकावर वेताने मारिलें, व त्याजवर
थुंकून गुडघे टेंकून त्याला नमन केलें· २० मग
त्यानी त्याची थट्टा केल्यावर जांबळें वस्त्र त्याच्या
अंगांतून काढिलें आणि त्याचींच वस्त्रें त्याच्या
अंगांत घातलीं, आणि त्याला खांबीं देण्याकरितां
बाहेर नेलें· २१ तेव्हां कोणीएक कुरेनेकर शिमोन,
ह्मणजे आलेक्षांद्रस व रूफस यांचा बाप, तो रा-
नांतून येऊन जवळून जात होता, तेव्हां त्याने त्याचा
खांब वाहावा ह्मणून त्यानी त्याजवर बलात्कार
केला. २२ नंतर गलगथा जागा ह्मणजे कंवटीची
जागा तेथें त्यानी त्याला नेलें· २३ आणि बोळ
मिसळलेला द्राक्षारस त्यानी त्याला प्यायास दि-
ल्हा, परंतु तो घेईना· २४ मग त्याला खांबीं
देऊन कोणी कोणतें घ्यावें याविषयीं चिट्ट्या टाकून
त्यानी त्याचीं वस्त्रें वांटून घेतलीं· २५ त्यानी
त्याला खांबीं, दिल्हें तेव्हां दुसरा महर लागला
होता. २६ आणि त्याच्या दोषारोपाचा पत्ता
वर असा लिहिला होता, यहूद्यांचा राजा.
२७ तेव्हां त्यानी त्याच्या बरोबर दोन लुटारू,
एक उजवीकडे व एक डावीकडे, असे खांबीं दिल्हे.
२८ तेव्हां दुष्टांमध्यें त्याला लेखिलें, हा शास्त्र-
लेख पूर्ण झाला. २९ आणि जवळून जाणाऱ्यानी
आपलीं डोकीं डोलवितांना त्याची असी निंदा केली
कीं, अरे देऊळ मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या,
३० आपणाला तार, आणि खांबावरून उतर.
३१ आणि तसेंच मुख्य याजकहि शास्त्र्यांसुद्धां
आपापल्यांमध्यें थट्टा करीत बोलले कीं, त्याने दुस-
ऱ्यांचें तारण केलें, आपलें तारण त्याच्याने करवत
नाहीं; ३२ आह्मी पाहून विश्वास धरावा, ह्म-
णून इस्राएलाचा राजा ख्रीस्त याने आतां खांबा-
वरून उतरावें. त्याच्या बरोबर खांबीं दिल्हेले
यानीहि त्याची निंदा केली·

३३ तेव्हां दोन महरांपासून तिसऱ्या महराप-
र्यंत सर्व देशावर अंधार पडला· ३४ आणि
तिसऱ्या महरीं येशू मोठ्याने ओरडत बोलला,
एलोहि एलोहि, लमा शबख्थानी, ह्मणजे माझ्या
देवा, माझ्या देवा, त्वां मला कां टाकून दिल्हें!
३५ तेव्हां जे उभे होते त्यांतील कित्येकानी हें ऐकून
ह्मटलें कीं, पाहा, तो एलीयाला बोलावितो· ३६
तेव्हां एकाने धावत जाऊन स्पंज आंबीने भरून वे-
तावर घालून त्याला पाजतांना ह्मटलें कीं, असूं द्या,
एलीया याला खालीं काढायास येतो किंवा नाहीं
हें पाहूं. ३७ मग येशूने मोठा शब्द काढून प्राण
सोडिला. ३८ तेव्हां देवळांतील पडदा वरपासून
खालपर्यंत फाटून त्याचे दोन तुकडे झाले. ३९ मग
त्याने असें ओरडून प्राण सोडिला हें पाहून, त्याच्या
समोर जवळ उभा राहिलेला शतपति याने ह्मटलें
कीं, खरा हा माणूस देवाचा पुत्र होता. ४० आ-
णि बायकाहि दुरून पाहत होत्या, त्यांमध्यें माग्दा-
लीणी मारया व धाकट्या याकोबाची व योस्याची
आई मारया व सलोमे, अशा होत्या: ४१ या
तो गालीलांत होता तेव्हां त्याच्या मागें चालून
त्याची सेवा करीत असत, आणि ज्या त्याच्या बरो-
बर यरूशालेमास आल्या अशा बहुत दुसऱ्याहि
पाहत होत्या·

४२ तितक्यांत संध्याकाळ झाला, आणि तयारी
करण्याचा दिवस ह्मणजे शाब्बाथाच्या पूर्वीचा दि-

वस होता, ४३ ह्मणून **अरिमथाईतील योसेफ**
नामांकित सभासद होता, तोहि देवाच्या रा-
ज्याची वाट पाहत होता, तो आला, आणि धैर्य
धरून आंत **पिलातसाकडे** जाऊन त्याने **येशूचें**
शरीर मागितलें. ४४ तेव्हां तो इतक्यांत मेला
याविषयीं **पिलातसाला** आश्चर्य वाटलें; मग त्याने
शतपतीला बोलावून त्याला पुसलें कीं, त्याला मरून
कांहीं वेळ झाला काय? ४५ तेव्हां हें शतपती-
कडून समजल्यावर त्याने **योसेफाला** शरीर दिल्हें.
४६ नंतर त्याने तागाचें वस्त्र विकत घेऊन, आणि
त्याला खालीं काढून त्या वस्त्राने त्याला गुंडाळलें,
आणि खडकांत खोदिलेलें थडें होतें त्यांत त्याला
ठेविलें, आणि थड्याच्या दारावर धोंडा लोटून
लाविला. ४७ तेव्हां त्याला कोठें ठेविलें हें
**माग्दालीणी मारया** व **योस्याची** आई **मारया**
यानी पाहिलें.

## अध्याय १६.

नंतर शाब्बाथ गेल्यावर **माग्दालीणी मारया** व
**याकोबाची** आई **मारया** व **सलोमे**, यानी
त्याला लावण्याकरितां सुगंध द्रव्यें विकत घेतलीं
होतीं. २ आणि सप्तकाच्या पहिल्या दिवशीं मोठ्या
सकाळीं सूर्य उगवण्याच्या वेळेस थड्याजवळ त्या
आल्या. ३ तेव्हां त्या एकमेकींस ह्मणाल्या, आह्मा-
करितां थड्याच्या दारावरून धोंडा कोण लोटील?
४ परंतु त्यानी दृष्टि लाविली तों धोंडा एकीकडे
लोटलेला आहे असें पाहिलें; तो तर फार मोठा
होता. ५ मग त्यानी थड्यांत जाऊन उजव्या बा-
जूस बसलेला व पांढरा झगा घातलेला असा तरणा
पाहिला, आणि त्या घाबरल्या. ६ तेव्हां तो त्यांस
ह्मणाला, घाबरूं नका, खांबीं दिल्हेला **येशू नाजारेथ-
कर** याचा शोध तुह्मी करितां; तो उठला आहे,
एथें नाहीं, त्यानी त्याला ठेविलें होतें ती जागा
पाहा. ७ जा, त्याच्या शिष्यांस व **पेत्रसाला** सां-
गा कीं, तो तुमच्या अगोदर **गालीलांत** जातो;
त्याने तुह्माला सांगितल्याप्रमाणें त्याला तेथें पाहाल.
८ मग त्या लवकर निघून थड्यापासून पळाल्या,
आणि कांपून व घाबरून त्यानी कोणाला कांहीं सां-
गितलें नाहीं, कारण कीं त्या भ्याल्या होत्या.
९ सप्तकाच्या पहिल्या दिवशीं सकाळीं तो पु-
न्हा उठल्यावर, ज्या **माग्दालीणी मारयेमधून**
त्याने सात भुतें काढिलीं होतीं तिला तो पहिल्याने
दिसला. १० तिने जाऊन जे त्याकडले लोक शोक
करीत व रडत होते त्यांस वर्त्तमान सांगितलें. ११
परंतु तो जिवंत आहे आणि तिने पाहिला, हें ऐकून
त्यानी विश्वास धरिला नाहीं. १२ यानंतर त्यां-
तील दोघे जण गांवास चालत जात होते, त्यांस तो
दुसऱ्या रुपाने दिसला. १३ मग त्यानी जाऊन
वरकडांस सांगितलें, परंतु त्यानी त्यांवरहि विश्वास
ठेविला नाहीं. १४ नंतर अकरा जण जेवायास
बसले असतां तो त्यांस दिसला, आणि त्याने त्यां-
चा अविश्वास व अंतःकरणाचें कठीणपण यांचा त्यांस
दोष लाविला, कारण कीं ज्यानी तो उठलेला असा
पाहिला होता त्यांवर त्यानी विश्वास ठेविला नाहीं.
१५ आणि त्याने त्यांस सांगितलें कीं, अवघ्या जगांत
जाऊन सर्व सृष्टीला शुभवर्त्तमान गाजवा. १६
जो विश्वास धरील व बाप्तिस्मा घेईल त्याचें तारण
होईल; परंतु जो विश्वास धरणार नाहीं तो अन्यायी
ठरेल. १७ आणि विश्वास धरणाऱ्यांजवळ हे
चमत्कार राहतील, ह्मणजे ते माझ्या नांवाने भुतें
काढितील, नव्या नव्या भाषा बोलतील, १८ साप
धरून उचलतील, आणि कांहींएक मरणकारक पदार्थ
प्याले तरी तो त्यांस बाधणार नाहीं, आणि त्यानी
रोग्यांवर हात ठेविले असतां ते बरे होतील. १९
मग **प्रभु** त्यांसीं बोलल्यानंतर त्याला वर आकाशांत
घेतलें, आणि तो देवाच्या उजवीकडे बसला. २०
नंतर ते निघून सर्व ठिकाणीं गाजवूं लागले, आणि
**प्रभु** त्यांबरोबर कार्य करीत असतां जे चमत्कार
त्यांच्याजवळ राहिले त्यांकडून वचनाला प्रमाण
पटवीत गेला. आमेन.

# लूकानें केलेलें शुभवर्त्तमान.

## अध्याय १.

**ज्या** गोष्टींची पक्की खातरी आह्मास आहे
त्यांविषयीं पहिल्यापासून प्रत्यक्ष पाह-
णारे व वचनाचे सेवक यानी आह्मास सांगून दि-
ल्ह्याप्रमाणें त्यांचा इतिहास रचायास बहुतानी उ-
द्योग केला आहे; ३ **यास्तव** हे महाराज थ्याफि-
लसा, म्यां पहिल्यापासून सर्व गोष्टींचा शोध नीट
केला आहे ह्मणून मलाहि वाटलें कीं, तुला अनुक्र-
माने त्या लिहाव्या; ४ **यासाठीं** कीं ज्या गोष्टी तूं
शिकलास त्यांचा निश्चय त्वां जाणावा.

५ **यहूद्याचा** राजा हेरोद याच्या दिवसांमध्यें
**अबीयाच्या** वर्गांतील **जखार्या** नामें कोणी याजक
होता, आणि त्याची बायको **अहरोनाच्या** कन्यां-
तील होती, तिचें नांव **अलीसाबेत**. ६ **तीं**
दोघेंहि देवाच्या दिसण्यांत न्यायी व **प्रभूच्या**
सर्व आज्ञा व नेम यांप्रमाणें निर्दोष चालत होतीं.
७ **त्यांस** लेंकरूं नव्हतें, कारण कीं **अलीसा-
बेत** वांझ होती, आणि तीं दोघेंहि ह्मातारीं झालीं
होतीं. ८ **आणि** असें झालें कीं, तो आपल्या
वर्गाच्या अनुक्रमाने देवाच्या समोर याजकपण
करीत असतां; ९ **त्याला** याजकपणाच्या चा-
लीप्रमाणें **प्रभूच्या** देवळांत जाऊन धूप दाख-
विणें पडलें. १० **धूप** दाखविण्याच्या वेळेस लो-
कांचा सर्व समुदाय बाहेर प्रार्थना करीत होता.
११ **त्या** वेळेस त्याने **प्रभूचा** दूत धूपवेदीच्या
उजव्या बाजूस उभा आहे असा पाहिला. १२
**तेव्हां** **जखार्या** पाहून घाबरला, व तो भय-
भीत झाला. १३ **दुताने** त्याला ह्मटलें,
**जखार्या**, भिऊं नको, कां कीं तुझी प्रार्थना ऐक-
ण्यांत आली, आणि तुझी बायको **अलीसाबेत**
तुजसाठीं पुत्र प्रसवेल, आणि त्वां त्याचें नाम
**योहान्न** ठेवावें. १४ **तेव्हां** तुला आनंद व
उल्हास होईल, आणि त्याच्या जन्मावरून बहुत
आनंदतील. १५ **कारण** कीं तो **प्रभूच्या** दि-
सण्यांत मोठा होईल, आणि द्राक्षारस व दारू
पिणार नाहीं, आणि आपल्या आईच्या पोटापासून
पवित्र आत्म्याने पूर्ण होईल. १६ **आणि** तो इस्रा-
एल लोकांतील बहुतांस त्यांच्या **प्रभू** देवाकडे
फिरवील; १७ **आणि** बापांचीं अंतःकरणें लेंक-
रांकडे व हट्टी लोकांस न्यायींच्या ज्ञानाकडे
फिरवून **प्रभूसाठीं** योग्य प्रजा तयार करावी ह्म-
णून तो एलीयाच्या आत्म्याने व सामर्थ्याने येऊन
त्याच्या पुढें चालेल. १८ **तेव्हां** **जखार्या** दु-
ताला ह्मणाला, हें कशावरून समजूं? कारण कीं
मी ह्मातारा आहें व माझी बायकोहि ह्मातारी
झाली आहे. १९ **मग** दुताने त्याला उत्तर दिल्हें
कीं, मी देवाच्या समोर उभा राहणारा **गाब्रियेल**
आहें, आणि तुजसीं बोलायास व हें चांगलें वर्त-
मान तुला सांगायास मला पाठविलें आहे. २०
**पाहा**, हें घडेल त्या दिवसापर्यंत तूं मुका होसील
व तुझ्याने बोलवणार नाहीं, कां कीं माझ्या ज्या
गोष्टी यथाकाळीं पूर्ण होतील त्यांवर त्वां विश्वास
ठेविला नाहीं. २१ **तेव्हां** लोक **जखार्याची** वाट
पाहत होते, आणि त्याला देवळांत उशीर लाग-
ल्यावरून ते आश्चर्य पावले. २२ **मग** बा-
हेर आल्यावर त्याच्याने त्यांसीं बोलवेना, तेव्हां
त्याला देवळांत दर्शन झालें आहे असें ते समजले,
आणि तो त्यांस खुणावूं लागला व मुका राहिला.
२३ **मग** असें झालें कीं, त्याच्या सेवेचे दिवस
भरल्यावर तो आपल्या घरास गेला. २४ **आणि** त्या
दिवसानंतर त्याची बायको **अलीसाबेत** गरोदर
झाली व पांच महिने लपून राहिली व ह्मणाली,
२५ **लोकांमध्यें** जो माझा अपमान तो दूर करण्यास
ज्या दिवसीं **प्रभूने** मजकडे पाहिलें त्यांमध्यें मज-
साठीं असें केलें आहे.

२६ **नंतर** साहाव्या महिन्यांत **गालीलांतील**
**नाजारेथ** नामें नगर एथें **गाब्रियेल** दूत एका कु-
मारीकडे देवाने पाठविला. २७ **ती** कुमारी **दा-
विदाच्या** वंशांतील **योसेफ** नामें पुरुषाला दिल्हे-

स्त्री होती, त्या कुमारीचें नांव तर मारया होतें. २८
तेव्हां दूत तिजकडे आंत येऊन ह्मणाला, हे कृपा
पावलेली, सलाम; प्रभु तुजबरोबर असो, बाय-
कांमध्यें तूं धन्य आहेस. २९ तेव्हां ती त्याला
पाहून त्याच्या बोलण्यावरून फार घाबरली, आणि
हा आशीर्वाद कसला आहे असा विचार करूं
लागली. ३० तेव्हां दुतानें तिला ह्मटलें, मारये,
भिऊं नको, कारण कीं देवाची कृपा तुजवर झाली
आहे. ३१ आणि पाहा, तूं गरोदर होसील व
पुत्र प्रसवसील व त्वां त्याचें नांव येशू ठेवावें. ३२
तो मोठा होईल व त्याला परात्पराचा पुत्र ह्मण-
तील, आणि प्रभु देव त्याचा बाप दावीद याचें
आसन त्याला देईल. ३३ आणि तो याकोबाच्या
वंशावर सर्वकाळ राज्य करील व त्याच्या रा-
ज्याचा शेवट होणार नाहीं. ३४ तेव्हां मारयेनें
दुताला ह्मटलें, हें कसें घडेल? कारण कीं मी
पुरुषाला जाणत नाहीं. ३५ मग दुतानें तिला
उत्तर दिल्हें कीं, पवित्र आत्मा तुजवर येईल
आणि परात्पराची शक्ति तुजवर सावली करील,
याकरितां जें पवित्र लेंकरूं होईल त्याला देवाचा
पुत्र ह्मणतील. ३६ आणि पाहा, तुझी नात-
लग अलीसाबेत तिलाहि ह्मातारपणीं पुत्रगर्भ रा-
हिला आहे, आणि जिला वांझ ह्मणतात तिला
हा साहावा महिना आहे, ३७ कारण कीं दे-
वाच्यानें करवत नाहीं असी कोणतीहि गोष्ट नाहीं.
३८ तेव्हां मारया ह्मणाली, पाहा, मी प्रभूची
दासी, तुझ्या बोलण्याप्रमाणें मला होवो. मग दूत
तिजपासून निघाला.

३९ त्या दिवसांमध्यें मारया उठून डोंगरव-
टीस धाईनें जाऊन यहूद्यांतील एका नगरांत गेली.
४० आणि जखार्याच्या घरांत जाऊन तिनें अली-
साबेतीला सलाम केला. ४१ तेव्हां असें झालें
कीं, अलीसाबेत मारयेचा सलाम ऐकतांच बा-
ळकानें तिच्या पोटांत उडी मारिली, आणि अली-
साबेत पवित्र आत्म्यानें पूर्ण झाली. ४२ आणि
ती मोठ्यानें बोलली कीं, तूं बायकांमध्यें धन्य व
तुझ्या पोटचें फळ धन्य आहे. ४३ आणि मा-
झ्या प्रभूच्या आईनें मजकडे यावें हें मला कोठून?
४४ कां तर पाहा, तुझ्या सलामाची वाणी मा-
झ्या कानीं पडतांच बाळकानें माझ्या पोटांत उल्हा-
सानें उडी मारिली. ४५ तर विश्वास धरणारी
ती धन्य, कारण कीं प्रभूनें तिला सांगितलेल्या
गोष्टी पूर्ण होतील. ४६ तेव्हां मारया बोलूं ला-
गली, माझा जीव प्रभूला थोर मानितो; ४७
आणि माझ्या तारणाऱ्या देवाविषयीं माझा आत्मा
उल्हासला. ४८ कारण कीं त्यानें आपल्या दा-
सीच्या नीचपणाकडे पाहिलें आहे, कां तर पाहा,
आतांपासून सगळ्या पिढ्या मला धन्य ह्मणतील.
४९ कारण कीं जो शक्तिमान त्यानें माझ्या करितां
मोठीं कामें केलीं, त्याचें नांव पवित्र. ५० आणि
त्याला भिणाऱ्यांवर त्याची दया पिढ्यानपिढी
आहे. ५१ त्यानें आपल्या बाहुनें पराक्रम केला, जे
आपल्या अंतःकरणाच्या कल्पनेनें गर्विष्ठ त्यांस उड-
विलें. ५२ त्यानें बलवानांस आसनांवरून लोटून
दिल्हें व नीचांस उंचाविलें. ५३ भुकेल्यांस चां-
गल्या पदार्थांनीं तृप्त केलें व धनवानांस रिकामें ला-
विलें. ५४ त्यानें आमच्या पूर्वजांस सांगितल्या-
प्रमाणें आब्राहाम व त्याचें संतान यांवरची दया
सर्वकाळ आठवून, ५५ आपला सेवक इस्रा-
एल याचें सहाय केलें आहे. ५६ नंतर मारया
तिच्या जवळ सुमारें तीन महिने राहिली, मग
आपल्या घरास माघारी गेली.

५७ नंतर अलीसाबेतीच्या प्रसूतीचे दि-
वस भरल्यावर ती पुत्र प्रसवली. ५८ आणि
प्रभूनें तिजवर मोठी दया केली हें ऐकून तिचे शे-
जारी व नातलग तिच्या बरोबर आनंद करूं लागले.
५९ मग असें झालें कीं, आठव्या दिवसीं बाळकाची
सुंता करायास ते आले, आणि त्याच्या बापाच्या
नांवावरून त्याचें नांव जखार्या ठेवीत होते. ६०
परंतु त्याच्या आईनें उत्तर दिल्हें कीं, नका, त्या-
ला तर योहान्न ह्मणायाचें आहे. ६१ तेव्हां ते
तिला ह्मणाले, या नांवाचा ह्मणतात असा तुझ्या ना-
तलगांत कोणी नाहीं. ६२ नंतर तुझ्या मनांत
त्याला कोणतें नाम द्यायाचें, असें त्याच्या बापाला
त्यांनीं खुणेनें पुसलें. ६३ मग त्यानें पाटी मागून
त्याचें नांव योहान्न आहे असें लिहिलें. तेव्हां सर्वां-
स आश्चर्य वाटलें. ६४ तेव्हांच त्याचें तोंड व
त्याची जीभ मोकळी झाली व तो देवाची स्तुति
करीत बोलूं लागला. ६५ नंतर त्यांच्या चहुंक-
डील सर्व राहणाऱ्यांस भय वाटलें, आणि यहूद्या-
च्या अवघ्या डोंगरवटींत या सर्व गोष्टींविषयीं
लोक बोलूं लागले. ६६ आणि सर्व ऐकणाऱ्यांनीं
आपल्या अंतःकरणांत ठेवून ह्मटलें, हा बाळक कसला
होईल? आणि प्रभूचा हात त्याला अनुकूळ होता.

६७ तेव्हां त्याचा बाप जखार्या पवित्र आत्म्याने
पूर्ण झाला, आणि त्याने असें भविष्य सांगितलें
कीं, ६८ इस्राएलाचा देव प्रभु तो सुवंदित
असो; कारण कीं त्याने आपल्या लोकांची भेट घेऊन
त्यांची खंडणी केली आहे. ६९ आणि जसें
त्याने पहिल्यापासून आपल्या पवित्र भविष्यवाद्यां-
च्या तोंडाने सांगितलें, ७० तसें त्याने आपला
सेवक दावीद याच्या वंशांत तारणाचें शिंग, ७१
ह्मणजे आमच्या शत्रूंपासून व आमचा द्वेष करणारे
या सर्वांच्या हातांतून सोडविणारा आह्मासाठीं
तयार केला आहे; ७२ येणेकरून त्याने आम-
च्या पूर्वजांवरील दया पूर्ण केली; ७३ आणि जी
शपथ त्याने आमचा बाप आब्राहाम यासीं वाहिली
कीं, ७४ तुह्मी आपल्या शत्रूंच्या हातांतून सु-
टून निर्भय माझ्या समोर धार्मिकपणाने व न्यायी-
पणाने माझी सेवा आपलें सर्व आयुष्य कराल असें
मी करीन, ७५ याप्रमाणें जो आपला पवित्र करार
तो त्याने आठविला. ७६ आणि हे बाळका, तुला
परात्पराचा भविष्यवादी ह्मणतील, कारण कीं प्र-
भूचे मार्ग तयार करण्याकरितां तूं त्याच्या तोंडा-
पुढें चालसील, ७७ यासाठीं कीं त्याच्या लो-
कांस त्यांच्या पापांची क्षमा होण्याने जें तारण
त्याचें ज्ञान द्यावें; ७८ हें आमच्या देवाच्या
परम दयेंकरून झालें; तिजकडून उदयाच्या प्रभेने
वरून आमची भेट घेतली आहे; ७९ यासाठीं
कीं अंधारांत व मरणाच्या सावलींत बसलेल्यांस
प्रकाश द्यावा व आमचे पाय शांतीच्या मार्गीस ला-
वावे. ८० नंतर तो बाळक वाढला व आत्म्याने
बळकट होत गेला, आणि इस्राएलामध्यें त्याच्या
प्रगट होण्याच्या दिवसापर्यंत तो रानांमध्यें असे.

## अध्याय २.

आणि असें झालें कीं, त्या दिवसांमध्यें सर्व
जगाची नांवनिशी लिहावी असी काइसार
औगुस्तस याची आज्ञा झाली. २ कुरेनयस
सुरिया प्रांताचा अधिकारी असतां ही पहिली
नांवनिशी झाली. ३ तेव्हां सर्व लोक आपापल्या
नगरांत नांवनिशी लिहून द्यायास गेले. ४ आणि
योसेफ आपली लग्नाची बायको मारया गरोदर
होती तिजबरोबर नांवनिशी लिहून द्यायास, ५
गालीलांतील नाजारेथ नगरापासून यहूद्यांतील बे-
थलहेम नामें दाविदाचें नगर तेथें गेला; तो दावि-
दाच्या वंशांतला व कुळांतला होता ह्मणून. ६
आणि असें झालें कीं, तीं तेथें होतीं तेव्हां प्रसूतीचे
तिचे दिवस भरले. ७ तेव्हां ती आपला प्रथम पुत्र
प्रसवली व त्याला बाळंत्याने गुंडाळून गव्हाणींत
तिने निजविलें, कारण कीं त्यांस उतारशाळेंत जागा
नव्हती. ८ आणि त्याच प्रांतांत मेंढपाळ रात्रीं
रानांत राहून आपले कळप राखीत होते. ९ तेव्हां
पाहा, प्रभूचा दूत त्यांच्या जवळ उभा राहिला,
आणि प्रभूचें तेज त्यांच्या भोवतें प्रकाशलें, आणि
ते फार भ्याले. १० मग दूत त्यांस ह्मणाला, भि-
ऊं नका, कारण कीं पाहा, जो मोठा आनंद सर्व
लोकांस होईल त्याचें शुभवर्त्तमान मी तुह्मास
सांगतों; ११ कीं दाविदाच्या नगरांत तुह्मासाठीं
आज तारणारा जन्मला आहे, तो ख्रीस्त प्रभु
आहे. १२ आणि तुह्मास हीच खूण कीं, बा-
ळक बाळंत्याने गुंडाळून गव्हाणींत निजविलेलें असें
तुह्मास सांपडेल. १३ मग एकाएकीं आकाशांतल्या
सैन्याचा समुदाय त्या दुताबरोबर प्रगट झाला, त्यांनी
देवाची स्तुति करीत ह्मटलें; १४ परम उंचांमध्यें
देवाला गौरव, आणि पृथ्वीवर शांति, माणसांवर
कृपा. १५ आणि असें झालें कीं ते दूत त्यांपा-
सून आकाशांत गेले तेव्हां ते मेंढपाळ एकमेकांस
ह्मणाले, चला, आपण बेथलहेमापावेतों जाऊं, आणि
ही जी झालेली गोष्ट प्रभूने आह्मास कळविली ती
पाहूं. १६ तेव्हां ते घाईने गेले, आणि मारया
व योसेफ व गव्हाणींत निजविलेलें बाळक हीं त्यांस
सांपडलीं. १७ मग त्यांनी पाहिल्यावर त्या बा-
ळकाविषयीं जी गोष्ट आपणांस सांगितली होती ती
त्यांनी कळविली. १८ आणि सर्व ऐकणाऱ्यांनी
आपणांस मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टींविषयीं
आश्चर्य केलें. १९ परंतु मारयेने या सर्व गोष्टीं-
चें मनन करून त्या आपल्या अंतःकरणांत ठेविल्या.
२० नंतर त्यांस सांगितलें होतें त्याप्रमाणें मेंढपाळ
सर्व गोष्टी ऐकून व पाहून, त्यांमुळें देवाचें गौरव व
स्तुति करीत माघारे फिरले.

२१ मग आठ दिवस भरल्यावर बाळकाची
सुंता झाली तेव्हां त्याचें नांव येशू ठेविलें, हें नांव
तो पोटांत संभवल्यापूर्वी दुताने दिल्हें होतें.

२२ नंतर मोश्याच्या नेमशास्त्राप्रमाणें तिचे
शुद्धीचे दिवस भरले तेव्हां त्यांनी त्याला यरुश-
लेमास आणिलें; २३ यासाठीं कीं प्रत्येक प्रथम
जन्मलेला नर प्रभूसाठीं पवित्र ह्मणावा, असें जें

प्रभूच्या नेमशास्त्रांत लिहिलें आहे त्याप्रमाणें त्या-
ला प्रभूजवळ सादर करावें; २४ आणि प्रभू-
च्या नेमशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें पारव्यांचा जोडा
किंवा खबुत्रांचीं दोन पिलें यांचा यज्ञ करावा.
२५ तेव्हां पाहा, शिमोन नामें कोणीएक माणूस
यरूशलेमांत होता, आणि तो न्यायी व धार्मिक
माणूस असतां इस्राएलाच्या शांतवनाची वाट
पाहत असे, आणि त्यावर पवित्र आत्मा होता. २६
आणि प्रभूच्या ख्रीस्ताला पाहिल्यापूर्वी तुला मरण
येणार नाहीं असी पवित्र आत्म्याने त्याला सूचना
केली होती. २७ तेव्हां तो आत्म्याने देवळांत
आला आणि आईबापानी त्या येशू बाळकाविषयीं
नेमशास्त्राच्या विधीप्रमाणें करण्याकरितां त्याला आंत
आणिलें; २८ तेव्हां त्याने त्याला आपल्या हा-
तांवर घेऊन देवाची असी स्तुति केली कीं, २९
हे प्रभू, आतां तूं आपल्या वचनाप्रमाणें आपल्या
सेवकाला शांतीने सोडतोस; ३० कारण कीं
जें तुझें तारण त्वां सर्व लोकांच्या देखतां तयार
केलें, ३१ तें म्या आपल्या डोळ्यानी पाहिलें
आहे. ३२ तें विदेश्यांस प्रकाश होण्यासाठीं व
तुझ्या इस्राएल लोकांच्या गौरवासाठीं उजेड हो-
ईल. ३३ तेव्हां त्यांविषयीं सांगितलेल्या गोष्टींव-
रून योसेफ व त्याची आई यांस आश्चर्य वाटलें.
३४ मग शिमोनाने त्यांस आशीर्वाद दिल्हा, आणि
त्याची आई मारया इला ह्मटलें, पाहा, हा इस्रा-
एलांत बहुतांचें पडणें व फिरून उठणें यासाठीं, व
ज्याविरुद्ध बोलतील असें चिन्ह यासाठीं ठेविला
आहे; ३५ आणि तुझ्याच जिवांतूनहि तरवार
पार जाईल; बहुत अंतःकरणांच्या कल्पना प्रगट
व्हाव्या ह्मणून.

३६ अणखी आशेराच्या वंशांतील फनुवेलाची
कन्या हान्ना नामें भविष्यवादीण होती, ती फार
ह्मातारी झाली होती, ती आपल्या कुंवारपणापासून
नवऱ्याजवळ सात वर्षें राहिली होती. ३७ आणि
ती सुमारें चौऱ्यांशीं वर्षांची विधवा असतां देऊळ
न सोडून रात्रंदिवस उपासानी व प्रार्थनानी सेवा
करीत असे. ३८ तीहि त्याच वेळेस जवळ येऊन
प्रभूची स्तुति करूं लागली, आणि यरूशलेमांत जे
खंडणीची वाट पाहत होते त्या सर्वांस त्याविषयीं
बोलली. ३९ नंतर प्रभूच्या नेमशास्त्राप्रमाणें
अवघें समाप्त केल्यावर, तीं गालीलांत आपलें नगर
नाजारेथ तेथें माघारीं गेलीं. ४० आणि तो बाळक
वाढला व आत्म्याने बळकट होऊन ज्ञानेंकरून पूर्ण
झाला, आणि देवाची कृपा त्यावर होती.

४१ आणि प्रतिवर्षीं त्याचे आईबाप वल्हांडण
सणाला यरूशलेमास जात असत. ४२ आणि
तो बारा वर्षांचा झाला, तेव्हां ते त्या सणाच्या चा-
लीप्रमाणें यरूशलेमास गेले. ४३ मग दिवस
संपविल्यावर, ते माघारे जाते वेळेस तो मुलगा येशू
योसेफाला व त्याच्या आईला न कळतां यरू-
शलेमांत मागें राहिला. ४४ परंतु तो वाटेच्या
सोबत्यांत आहे असें समजून ते एका दिवसाची वाट
गेले, नंतर नातलग व ओळखी यांमध्यें त्यानी त्याचा
शोध केला. ४५ परंतु तो त्यांस सांपडला नाहीं,
ह्मणून ते त्याचा शोध करीत यरूशलेमास माघारे
गेले. ४६ आणि असें झालें कीं, तीन दिवसांनंतर
तो देवळांत गुरूंच्या मध्यें बसून त्यांचें ऐकतां व
त्यांस प्रश्नहि करितां, त्यांस सांपडला. ४७ तेव्हां
त्याचें सर्व ऐकणारे त्याच्या बुद्धीवरून व उत्तरांवरून
थक्क झाले. ४८ तेव्हां ते त्याला पाहून आश्चर्य
पावले, आणि त्याची आई त्याला ह्मणाली, मुला, त्वां
आह्मासीं असें कां केलें? पाहा, तुझा बाप व मी
कष्टी होऊन तुझा शोध करीत आलों. ४९ त्याने
त्यांस ह्मटलें, माझा शोध कां केला? जें माझ्या
बापाचें त्यांत म्या असावें हें तुह्मास ठाऊक नव्हतें
काय? ५० परंतु त्याने त्यांस सांगितलेली गोष्ट
ते समजले नाहींत. ५१ मग तो त्यांच्या संगतीं
उतरून नाजारेथास गेला व त्यांच्या आज्ञेंत राहिला,
आणि त्याच्या आईने या सर्व गोष्टी आपल्या अंतः-
करणांत ठेविल्या. ५२ नंतर येशू ज्ञानांत व
शरिरांत आणि देवाच्या व माणसांच्या कृपेंत वाढत
चालला.

## अध्याय ३.

मग तिबेरयस काइसार याच्या अधिकाराच्या
पंधराव्या वर्षीं पंतयस पिलातस यहूद्याचा
अधिकारी असतां, आणि हेरोद गालीलाचा राजा
असतां व त्याचा भाऊ फिलिप्पस हा इतुराया व
त्राखोनितीस या देशांचा राजा असतां, आणि
लुसानयस आबिलेनेचा राजा असतां, २ आन्ना
व कायाफा हे प्रमुख याजक असतां जखार्याचा
पुत्र योहान्न याला रानांत देवाचें वचन प्राप्त झालें;
३ तेव्हां तो पापांच्या क्षमेसाठीं जो पश्चात्तापाचा
बाप्तिस्मा तो गाजवीत यार्देनेच्या चहुंकडल्या सर्व

प्रांतांत गेला· ४ यशाया भविष्यवादी याच्या
वचनांच्या पुस्तकांत लिहिलें त्याप्रमाणें झालें, तें
असें कीं, रानांत ओरडणाऱ्याची वाणी झाली कीं,
प्रभूचा मार्ग तयार करा, त्याच्या वाटा नीट करा;
५ प्रत्येक खोरें भरेल, आणि प्रत्येक डोंगर व
टेंकडी नीच होईल, आणि वांकड्या वाटा सरळ,
व खरबरीत, गुळगुळीत होतील· ६ आणि मनु-
ष्यमात्र देवाचें तारण पाहतील·

७ तेव्हां जे समुदाय त्यापासून बाप्तिस्मा घ्यायास
बाहेर आले त्यांस तो बोलला, अहो सापांच्या
पिल्लांनो, जो क्रोध होणार त्यापासून पळायास तुह्मा-
ला कोणी सुचविलें? ८ तर पश्चात्तापास योग्य
जीं फळें तीं द्या; आणि आब्राहाम आमचा बाप आहे
असें आपल्या मनांत ह्मणूं लागूं नका, कारण मी
तुह्मास सांगतों कीं, आब्राहामासाठीं या दगडांचीं
लेंकरें देवाच्याने करवतात· ९ आणि आतां कुऱ्हाड
झाडांच्या मुळावर ठेविली आहे, यास्तव जें जें
झाड चांगलें फळ देत नाहीं तें तोडून अग्नींत टाकि-
तात· १० मग समुदायांनी त्याला विचारिलें
कीं, आह्मी तर काय करावें? ११ तेव्हां त्याने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, ज्याला दोन अंगरखे आ-
हेत त्याने ज्याला नाहीं त्याला द्यावा, व ज्याला
अन्न आहे त्याने तसेंच करावें· १२ मग जकात-
दारहि बाप्तिस्मा घ्यायास आले व त्याला ह्मणाले,
हे गुरू, आह्मी काय करावें? १३ त्याने
त्यांस ह्मटलें, तुह्मास जें नेमिलें त्याहून कांहीं
अधिक उगवूं नका· १४ आणि शिपायांनीहि त्याला
विचारिलें कीं, आह्मीहि काय करावें? तेव्हां
त्याने त्यांस सांगितलें, कोणावर बळात्कार करूं
नका व आळ घालूं नका व आपल्या पगाराने तृप्त
असा· १५ तेव्हां लोक वाट पाहत असतां व
योहान्नाविषयीं हाच ख्रीस्त असेल काय? असा
सर्व आपल्या अंतःकरणांत विचार करीत असतां;
१६ योहान्नाने सर्वांस ह्मटलें, मी तुमचा बाप्तिस्मा
पाण्याने करितों खरा, परंतु मजपेक्षां जो समर्थ ज्या-
च्या वाहणांचा बंद सोडायास मी योग्य नाहीं तो
येत आहे, तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा
बाप्तिस्मा करील· १७ त्याचें सूप त्याच्या हातांत
आहे आणि तो आपलें खळें अगदी निर्मळ करील व
गहूं आपल्या कोठारांत सांठवील व भूस न विझ-
णाऱ्या अग्नींत जाळून टाकील· १८ अणखी त्याने
दुसराहि बहुत बोध करितांना लोकांस शुभवर्त्तमान
सांगितलें· १९ परंतु हेरोद राजाला याच्या
फिलिप्पस भावाची बायको हेरोदियस इजविषयीं
आणि जीं कुकर्में हेरोदाने केलीं होतीं त्या अवघ्यां-
विषयीं योहान्नाने निषेध केला असतां, २०
त्या सर्वांखेरीज त्याने हेंहि केलें कीं योहान्नाला
बंदिशाळेंत कोंडिलें·

२१ आणि असें झालें कीं, सर्व लोक बाप्तिस्मा
घेत असतां येशूनेहि बाप्तिस्मा घेतला, आणि तो
प्रार्थना करीत असतां आकाश उघडलें, २२
आणि पवित्र आत्मा आकाराने खबुत्रासारिखा
त्याजवर उतरला, आणि आकाशांतून अशी वाणी
झाली कीं, तूं माझा प्रिय पुत्र आहेस, तुजविषयीं
मी संतुष्ट आहें·

२३ आणि येशू सुमारें तीस वर्षांचा व्हायास
आला; आणि असें मानीत असत कीं, तो योसेफाचा
पुत्र आहे, तो एलीचा, २४ तो मात्थाताचा,
तो लेवीचा, तो मल्खीचा, तो यान्नाचा, तो योसे-
फाचा, २५ तो मात्ताथियाचा, तो आमोसाचा,
तो नाहूमाचा, तो एस्लीचा, तो नांग्गायाचा,
२६ तो माहाथाचा, तो मात्ताथियाचा, तो शि-
मीचा, तो योसेफाचा, तो यहूदाचा, २७ तो
योहान्नाचा, तो रेसाचा, तो जरूबाबेलाचा, तो
शालतियेलाचा, तो नेरीचा, २८ तो मल्खीचा,
तो आद्दीचा, तो कोसामाचा, तो अल्मोदामाचा, तो
एराचा, २९ तो योसेयाचा, तो अलियेजेराचा,
तो योरीमाचा, तो मात्थाताचा, तो लेवीचा, ३०
तो शिमोनाचा, तो यहूदाचा, तो योसेफाचा, तो
योनानाचा तो एल्याकीमाचा, ३१ तो मल्याचा,
तो माइनानाचा, तो मात्ताथाचा, तो नाथानाचा,
तो दाविदाचा, ३२ तो इशायाचा, तो ओबे-
दाचा, तो बवाजाचा, तो सल्मोनाचा, तो नाह-
शोनाचा, ३३ तो अमीनादाबाचा, तो अरा-
माचा, तो हेस्रोनाचा, तो फारेसाचा, तो यहू-
दाचा, ३४ तो याकोबाचा, तो इझाकाचा, तो
आब्राहामाचा, तो थाराहाचा, तो नाहोराचा,
३५ तो सरूगाचा, तो रगूचा, तो फेलेगाचा,
तो एबेराचा, तो शालाहाचा, ३६ तो केनाना-
चा, तो आर्फाक्षादाचा, तो शेमाचा, तो नोहाचा,
तो लामेखाचा, ३७ तो मथूशालाहाचा, तो
हनोखाचा, तो यारेदाचा, तो माहलालेलाचा, तो
केनानाचा, ३८ तो अनोशाचा, तो शेथाचा,
तो आदामाचा, तो देवाचा·

## अध्याय ४.

ंतर येशू पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन यार्देने-
पासून माघारा आला, तेव्हां आत्म्याने त्याला
नांत नेलें, आणि सैतानाकडून चाळीस दिवस
ाची परीक्षा झाली; २ आणि त्या दिवसां-
र्ये त्याने कांहीं खाल्लें नाहीं, ते संपल्या-
र त्याला भूक लागली. ३ मग सैतान त्याला
णाला, तूं देवाचा पुत्र असलास तर या धों-
ाला भाकर हो असें सांग. ४ तेव्हां येशूने
ला उत्तर दिल्हें कीं, असें लिहिलें आहे, मनुष्य
ळ भाकरीनें वांचेल असें नाहीं, तर देवाच्या
येक वचनाने वांचेल. ५ मग सैतानाने त्याला
व डोंगरावर नेऊन जगांतलीं सर्व राज्यें त्याला
ा क्षणांत दाखविलीं. ६ आणि सैतानाने
ाला ह्मटलें, हा सर्व अधिकार व त्यांचें गौरव
तुला देईन, कारण कीं तें मला सोपून दिल्हें
हे, व माझ्या मनास येईल त्याला मी तें देतों.
यास्तव तूं मला नमसील तर अवघें तुझें होईल.
तेव्हां येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, अरे सै-
ना, माझ्या मागें हो, कारण कीं तुझा देव प्रभु
चें भजन कर व याचीच सेवा कर, असें लि-
लें आहे. ९ नंतर त्याने त्याला यरूशलेमांत
ें, आणि देवळाच्या कंगोऱ्यावर त्याला उभें केलें,
ाणि त्याला ह्मटलें, तूं देवाचा पुत्र असलास तर
ून खालीं उडी टाक. १० कां तर असें लिहिलें
हे कीं, तो तुला संभाळण्याकरितां आपल्या दुतांस
विषयीं आज्ञा करील; ११ आणि तुझा पाय
ड्यावर कधीं अपटूं नये ह्मणून ते तुला हातानी
तील. १२ तेव्हां येशूने त्याला उत्तर दिल्हें
, तुझा देव प्रभु त्याची प्रचीति पाहूं नको, असें
ांगितलें आहे. १३ तेव्हां सैतान ही सर्व परी-
ा संपवून कांहीं वेळ त्याजपासून गेला.
१४ नंतर येशू आत्म्याच्या सामर्थ्याने गाली-
ांत माघारा आला, आणि त्याची कीर्त्ति चहुं-
डल्या सर्व प्रांतांत पसरली. १५ आणि तो
ांच्या सभास्थानांमध्यें उपदेश करीत असतां
र्वांनी त्याला गौरविलें. १६ मग तो लाहानाचा
ठा झाला तेथें नाजारेथांत गेला, आणि आपल्या
ालीप्रमाणें शाब्बाथ दिवसीं सभास्थानांत जाऊन
चायास उभा राहिला. १७ तेव्हां यशाया
विष्यवाद्याचें पुस्तक त्याला दिल्हें, आणि त्याने
तें पुस्तक सोडून जें ठिकाण काढिलें तेथें असें लि-
हिलें होतें कीं, १८ प्रभूचा आत्मा मजवर
आहे, कारण कीं गरिबांस शुभवर्त्तमान सांगायास
त्याने मला अभिषेक केला आहे, हृदय फुटले-
ल्यांस बरें करायास, पाडाव केलेल्यांस सुटी व
अंधळ्यांस दृष्टि हीं गाजवायास, जांचलेल्यांस
मोकळें करायास, १९ व प्रभूचें मान्य केलेलें वर्ष
गाजवायास त्याने मला पाठविलें आहे. २०
मग पुस्तक गुंडाळून तो सेवकाजवळ देऊन बसला,
तेव्हां सभास्थानांतील सर्वांचे डोळे त्याजकडे
लागले होते. २१ मग तो त्यांस ह्मणूं लागला
कीं, आज तुमच्या ऐकण्यांत हा लेख पूर्ण झाला
आहे. २२ तेव्हां सर्वांनी त्याविषयीं साक्ष दिल्ही,
आणि जीं कृपेचीं वचनें त्याच्या तोंडांतून निघालीं
त्यांविषयीं आश्चर्य करून ह्मटलें, हा योसेफाचा
पुत्र आहे ना? २३ आणि त्याने त्यांस ह्मटलें,
खचीत तुह्मी मला हा दाखला द्याल कीं, हे
वैद्या, तूं आपल्याला बरें कर; जीं कामें कपरणा-
हूमांत झालेलीं आह्मी ऐकिलीं तीं एथेंहि
आपल्या देशांत कर. २४ तेव्हां तो बोलला, मी
तुह्मास खचीत सांगतों कीं, कोणीहि भविष्यवादी
आपल्या देशांत मान्य होत नाहीं. २५ आणखी
मी तुह्मास खरें सांगतों, एलीयाच्या दिवसांत
साडेतीन वर्षें आकाश बंद होतें, तेव्हां सर्व
देशामध्यें मोठा दुकाळ पडला, त्या वेळेस
इस्राएलांत बहुत विधवा होत्या. २६ परंतु
सिदोनाकडील सारफाथांतील विधवे बायकोशिवाय
त्यांतील कोणीएकीकडेहि एलीया पाठविला नाहीं.
२७ आणि अलीशा भविष्यवाद्याच्या वेळेस
इस्राएलांत बहुत कोडी होते, परंतु अरामी नामान
याशिवाय त्यांतील कोणीहि शुद्ध झाला नाहीं. २८
तेव्हां हें ऐकून सभास्थानांतील सर्व लोक रागें भरले;
२९ आणि त्यांनी उठून त्याला नगराच्या बाहेर
घालविलें, आणि ज्या डोंगरावर त्यांचें नगर वसलें
होतें त्याच्या कड्यावरून त्याला लोटून देण्यास
तेथवर नेलें. ३० परंतु तो त्यांच्या मधून निघून
गेला.

३१ नंतर तो गालीलांतील कपरणाहूम नगरांत
खालीं आला, आणि शाब्बाथ दिवसीं त्यांस उप-
देश करूं लागला. ३२ आणि त्याच्या उपदे-
शावरून ते थक्क झाले, कारण कीं त्याचें बोलणें
अधिकाराचें होतें. ३३ तेव्हां सभास्थानांत

अशुद्ध भुताचा आत्मा लागलेला कोणीएक माणूस
होता, आणि तो मोठ्याने ओरडत बोलला, ३४
अरे येशू नाजारेथकरा, आमचा व तुझा काय
संबंध? आमचा नाश करायास आलास काय? तूं
कोण आहेस हें मला ठाऊक आहे, देवाचा पवित्र
तो. ३५ तेव्हां येशू त्याला धमकावून बोलला,
उगाच राहा, व यांतून नीघ. मग भूत त्याला
मध्यें पाडून त्याला कांहीं उपद्रव दिल्ह्यावांचून
त्यांतून निघालें. ३६ तेव्हां सर्व थक्क होऊन
आपापल्यांमध्यें ह्मणाले, ही गोष्ट कसी? कारण कीं
तो अधिकाराने व सामर्थ्याने अशुद्ध आत्म्यांस
आज्ञा करितो ह्मणजे ते निघतात. ३७ नंतर
त्याविषयींची कीर्त्ति चहुंकडल्या प्रांतांत सर्व ठि-
काणीं गेली.

३८ मग तो सभास्थानांतून उठून शिमो-
नाच्या घरांत गेला; शिमोनाच्या सासूला तर
भारी ताप लागला होता, आणि तिच्या साठीं
त्यानी त्याजवळ विनंती केली. ३९ मग त्याने
तिच्या जवळ उभें राहून तापाला धमकाविलें, तेव्हां
तिचा ताप निघून गेला, आणि ती तेव्हांच उठून
त्यांची सेवा करूं लागली. ४० मग सूर्य माव-
ळतांना ज्यांच्या जवळ नानाप्रकारच्या रोगानी
दुखणाईत होते त्या सर्वांनी त्यांस त्याजकडे आ-
णिलें, आणि त्याने त्यांतील प्रत्येकावर हात ठेवून
त्यांस बरें केलें. ४१ तेव्हां तूं देवाचा पुत्र ख्रीस्त
आहेस, असें भुतें देखील ओरडत बोलून बहुतांतून
निघालीं; आणि त्याने त्यांस धमकाविलें व बोलूं
दिल्हें नाहीं, कारण कीं तो ख्रीस्त आहे हें त्यांस
ठाऊक होतें. ४२ मग दिवस उगवल्यावर तो निघून
रानांतल्या जाग्यांत गेला, तेव्हां समुदाय त्याचा
शोध करून त्याच्या जवळ आले, मग आपणांपासून
त्याने जाऊं नये, ह्मणून त्यानी त्याला अडविलें.
४३ परंतु तो त्यांस ह्मणाला, दुसऱ्या नगरांतहि
मला देवाच्या राज्याचें शुभवर्त्तमान सांगितलें
पाहिजे, कां कीं यासाठींच मला पाठविलें आहे. ४४
मग तो गालीलाच्या सभास्थानांमध्यें गाजवीत गेला.

## अध्याय ५.

आणि असें झालें कीं, तो गन्नेसारेत सरोवरा-
जवळ उभा असतां देवाचें वचन ऐकायास
समुदाय येऊन त्यासीं खेटला. २ तेव्हां त्याने
सरोवराच्या कांठीं लागलेलीं दोन तारवें पाहिलीं;
धीवर तर त्यांवरून उतरून जाळीं धूत होते. ३
आणि त्या तारवांतून एक शिमोनाचें होतें त्यांत
बसून, तें कांठापासून थोडेसें लोटावें ह्मणून त्याने
त्याजवळ मागितलें; मग तो बसून समुदायांस तार-
वांतून उपदेश करूं लागला. ४ नंतर त्याने बोलणें
संपविल्यावर शिमोनाला ह्मटलें, खोल पाण्यांत
हाकार व मासे धरण्यासाठीं तुह्मी आपलीं जाळीं
खालीं सोडा. ५ तेव्हां शिमोनाने त्याला उत्तर
दिल्हें कीं, हे प्रभू, आह्मी सारी रात कष्ट करून
कांहीं धरिलें नाहीं, तरी तुझ्या आज्ञेवरून मी जाळें
सोडितों. ६ मग त्यानी तसें केल्यावर मास्यांचा
मोठा घोळका वेढिला, आणि त्यांचें जाळें फाटूं
लागलें. ७ तेव्हां जे भागीदार दुसऱ्या तारवांत
होते त्यानी येऊन आपलें सहाय करावें ह्मणून
त्यानी त्यांस खुणाविलें; मग ते आले आणि त्यानी
दोन्ही तारवें इतकीं भरलीं कीं, तीं बुडूं लागलीं.
८ तेव्हां शिमोन पेत्रस हें पाहून येशूच्या पायां
पडून बोलला, हे प्रभू, मजपासून जा, कारण कीं
मी पापी माणूस आहें. ९ कां कीं जी मास्यांची
धरणी त्यांस मिळाली होती ती पाहून त्याला
व त्या जवळच्या सर्वांस विस्मयाने व्यापिलें.
१० आणि शिमोनाचे भागीदार जबदीचे पुत्र या-
कोब व योहान्न यांसहि तसेंच झालें. तेव्हां येशू
शिमोनाला ह्मणाला, भिऊं नको, आतांपासून तूं
माणसांस धरसील. ११ मग ते तारवें कांठीं ला-
वून सर्व सोडून त्याच्या मागें चालले.

१२ आणि असें झालें कीं, तो एका नगरांत
असतां पाहा, कोडाने भरलेला असा माणूस होता,
त्याने येशूला पाहून तोंडावर पडून त्याला विनंती
केली कीं, हे प्रभू, मला शुद्ध करायाची तुला
इच्छा असली तर शक्ति आहे. १३ तेव्हां तो
हात लांब करून त्याला शिवला व ह्मणाला,
माझी इच्छा आहे, शुद्ध हो; तेव्हांच त्याचें
कोड गेलें. १४ मग त्याने त्याला निक्षूण सांगि-
तलें कीं, कोणाला सांगूं नको, तर जा, आपणास
याजकाला दाखीव, आणि त्यांस साक्ष व्हावी ह्मणून
मोशाने नेमून दिल्ह्याप्रमाणें तूं आपल्या शुद्धीविष-
यीं अर्पण कर. १५ तथापि त्याविषयींची गोष्ट
अधिकच पसरली, मग बहुत समुदाय ऐकायास व
त्याकडून आपले रोग बरे करून घ्यायास जमले.
१६ तेव्हां तो रानांमध्यें एकीकडे जाऊन प्रार्थना
करिता झाला.

१७ नंतर असें झालें कीं, एका दिवशीं तो उप-
ा करीत असतां गालीलांतील व यहूद्यांतील
त्येक गांवाहून व यरूशलेमाहून आलेले परोशी
शास्त्री बसले होते, आणि त्यांस निरोगी करा-
ास प्रभूचें सामर्थ्य प्रगट झालें. १८ तेव्हां पाहा,
ाणसानी कोणीएका वातरोगी माणसाला बाजेवर
ालून आणिलें, आणि त्याला आंत नेऊन त्याच्या
मोर ठेवायास यत्न केला. १९ परंतु दाटीमुळें
ाला आंत न्यायास सांपडेना, ह्मणून त्यानी घरा-
चढून त्याला बाजेसुद्धां कवलारांतून येशूच्या
मोर मध्यें उतरिलें. २० तेव्हां तो त्यांचा वि-
ास पाहून त्याला ह्मणाला, माणसा, तुझ्या पापां-
ी क्षमा झाली आहे. २१ तेव्हां शास्त्री व
रोशी असा विचार करूं लागले कीं, हा दुर्भाषण
रणारा कोण आहे? एक जो देव त्यावांचून कोणा-
यानें पापांची क्षमा करवती? २२ येशूनें त्यांचे
चार जाणून त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी
ापल्या अंतःकरणांमध्यें काय विचार करितां? २३
ुझ्या पापांची क्षमा झाली आहे हें बोलणें, किंवा
ठून चाल हें बोलणें, यांतून कोणतें सोपें? २४
ंतु पृथ्वीवर पापांची क्षमा करायास मनुष्याच्या
त्राला अधिकार आहे हें तुह्मी जाणावें; तेव्हां
ो वातरोग्याला ह्मणाला, मी तुला सांगतों, ऊठ,
ापली बाज उचलून घेऊन आपल्या घरीं जा.
५ तेव्हां तो लागलाच त्यांच्या देखतां उठून ज्या
ाजेवर निजला होता ती उचलून देवाचें गौरव
रीत आपल्या घरीं गेला. २६ तेव्हां सर्वांस
वेस्मय झाला, आणि ते देवाचें गौरव करूं लागले,
ाणि फार भयभीत होऊन ह्मणाले, आह्मी आज
अद्भुतें पाहिलीं आहेत.

२७ त्यानंतर तो बाहेर गेला तेव्हां त्यानें लेवी
ामें जकातदार जकातीच्या नाक्यावर बसलेला पा-
हेला, व त्याला ह्मटलें, माझ्या मागें ये. २८
ेव्हां तो सर्व सोडून उठून त्याच्या मागें चालला.
२९ नंतर लेवीनें आपल्या घरीं त्याच्या साठीं मोठी
जेवणावळ केली, तेव्हां त्यांच्या बरोबर जकातदार
दुसरे लोक यांचा मोठा समुदाय जेवायास
बसला. ३० तेव्हां त्यांचे शास्त्री व परोशी
त्याच्या शिष्यांशीं कुरकूर करीत बोलले, जका-
तदार व पापी यांबरोबर तुह्मी कां खातां व पितां?
३१ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं, निरो-
ग्यांस वैद्याची गरज नाहीं, तर दुखणाइतांस आहे.
३२ मी पुण्यवानांस नाहीं, तर पाप्यांस पश्चात्तापा-
साठीं बोलावण्यास आलों.

३३ तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें, योहानाचे शिष्य
वारंवार उपास करितात व प्रार्थना करितात, आणि
तसे परोश्यांचेहि, तुझे शिष्य तर खातात व पितात,
हें काय? ३४ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, वऱ्हा-
ड्यांच्या बरोबर वर आहे तोंपर्यंत त्यांकडून उपास
करवाल काय? ३५ परंतु असे दिवस येतील कीं,
वराला त्यांपासून काढून घेतल्यावर त्या दिवसांमध्यें ते
उपास करितील. ३६ आणखी त्यानें त्यांस दाख-
लाहि सांगितला कीं, जुन्या वस्त्राला नव्या वस्त्राचें
ठिगळ कोणी लावीत नाहीं; लाविलें तर तें नवें
जुन्याला फाडितें व नव्याचें ठिगळ जुन्याला जमत
नाहीं. ३७ आणि नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत
कोणी घालीत नाहीं; घातला तर नवा द्राक्षारस
बुधले फोडून वाहून जाईल, व बुधलेहि नास-
तील. ३८ तर नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत
घालावा ह्मणजे दोन्ही कायम राहतात. ३९
आणखी कोणी जुना द्राक्षारस पिऊन तेव्हांच नवा
मागत नाहीं, कां कीं तो ह्मणतो, जुना त्यापेक्षां चां-
गला आहे.

## अध्याय ६.

मग असें झालें कीं सणाच्या दुसऱ्या दिवसानंतर
पहिल्या शाब्बाथ दिवशीं तो शेतांमधून जात
असतां त्याचे शिष्य कणसें मोडून हातांवर चोळून
खाऊं लागले. २ तेव्हां परोश्यांतील कोणी त्यांस
बोलले, शाब्बाथ दिवसामध्यें जें करूं नये तें तुह्मी
कां करितां? ३ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें
कीं, दाविदाला व त्याच्या बरोबरच्या माणसांस
भूक लागली तेव्हां त्यानें काय केलें, हें तुह्मी वा-
चिलें नाहीं काय? ४ तो देवाच्या मंदिरांत कसा
गेला आणि पुढें ठेवलेल्या ज्या भाकरी याजकांशि-
वाय कोणी खाऊं नयेत, त्या त्यानें घेऊन कशा खा-
ल्ल्या व आपल्या बरोबरच्यांसहि दिल्ह्या? ५
आणखी तो त्यांस ह्मणाला, मनुष्याचा पुत्र शाब्बा-
थाचाहि धनी आहे.

६ नंतर असें झालें कीं, दुसऱ्या शाब्बाथ दि-
वशीं त्यानें सभास्थानांत जाऊन उपदेश केला, आणि
उजवा हात वाळलेला असा माणूस तेथें होता.
७ तेव्हां शास्त्री व परोशी हे त्याजवर दोष ठेवावा
ह्मणून तो शाब्बाथ दिवशीं बरें करील कीं काय, हें

पाहायास टपत राहिले. ८ परंतु त्याने त्यांचे
विचार जाणून त्या हात वाळलेल्या माणसाला सां-
गितलें कीं, ऊठ व मध्यें उभा राहा. तेव्हां तो
उठून उभा राहिला. ९ मग येशू त्यांस ह्मणा-
ला, मी तुह्मास पुसतों कीं, शाब्बाथ दिवसीं बरें
करणें किंवा वाईट करणें, जिवाला राखणें किंवा
मारणें, कोणतें योग्य? १० मग सभोंवतें त्या
सर्वांकडे पाहून त्याने त्या माणसाला सांगितलें कीं, तूं
आपला हात लांब कर. तेव्हां त्याने तसें केलें,
आणि त्याचा हात दुसऱ्यासारिखा बरा झाला.
११ मग ते वेडेपणाने भरले, आणि आपण येशूला
काय करावें असा एकमेकांसीं विचार करूं लागले.
१२ आणि असें झालें कीं, त्या दिवसांमध्यें तो
प्रार्थना करायास डोंगरावर गेला, आणि देवाची
प्रार्थना करीत रात्रभर राहिला. १३ मग दिवस
उगवल्यावर त्याने आपल्या शिष्यांस बोलाविलें,
आणि त्यांतून बारा जण निवडून त्यांस प्रेषित असें
नांव दिल्हें. १४ ते असे, शिमोन, त्याला त्याने
पेत्रसहि ह्मटलें, व त्याचा भाऊ अंद्रयास, याकोब
व योहान्न, फिलिप्पस व बार्थलमी, १५ मात्थी
व थोमा, अल्फीचा पुत्र याकोब व जेलोतेस ह्मट-
लेला शिमोन, १६ याकोबाचा भाऊ यहूदा,
व पराधीन करणारा झाला जो यहूदा इस्कारयोते
तो. १७ नंतर तो त्यांबरोबर खालीं उतरून
मैदानांत उभा राहिला, तेव्हां त्याच्या शिष्यांचा
समुदाय, आणि जे लोक त्याचें ऐकायास व आ-
पले रोग बरे करून घ्यायास सगळा यहूदा व
यरूशलेम यांपासून, आणि सोर व सिदोन यांक-
डल्या समुद्रकांठापासून आले होते, त्यांचा मोठा
मेळा मिळाला, १८ आणि अशुद्ध आत्म्यांनी
पिडलेले हेहि; आणि ते बरे झाले. १९ आणि सग-
ळा समुदाय त्याला शिवायास झटला, कारण कीं
त्यांतून सत्व निघून सर्वांस बरें करीत असे.
२० आणि त्याने आपल्या शिष्यांकडे आपली
दृष्टि लावून ह्मटलें, अहो गरिबानो, तुह्मी धन्य,
कां कीं देवाचें राज्य तुमचें आहे. २१ अहो जे
आतां भुकेले ते तुह्मी धन्य, कां कीं तृप्त व्हाल.
अहो जे आतां रडतां ते तुह्मी धन्य, कां कीं हसा-
ल. २२ जेव्हां मनुष्याच्या पुत्राकरितां माणसें
तुमचा द्वेष करितील व तुह्मास दूर करितील व निं-
दितील व तुमचें नांव वाइटासारिखें वर्जतील, तेव्हां
तुह्मी धन्य आहां. २३ त्या दिवसीं आनंद करा,
उड्याहि मारा, कां कीं पाहा, आकाशामध्यें तु[illegible]
वेतन मोठें, कां तर त्याप्रमाणें त्यांच्या पूर्व[illegible]
भविष्यवाद्यांस केलें होतें. २४ परंतु तुह्मा [illegible]
वानांस हाय हाय, कां कीं तुह्मास तुमचें सम[illegible]
मिळालेंच आहे. २५ अहो तृप्त झालेले, [illegible]
तुह्मास हाय हाय, कां कीं तुह्मास भूक ला[illegible]
अहो जे आतां हसतां त्या तुह्मास हाय हाय, [illegible]
कीं तुह्मी खेद पावाल व रडाल. २६ जे[illegible]
सर्व माणसें तुह्मास बरें ह्मणतील तेव्हां तुह्मा[illegible]
हाय हाय, कां कीं त्याप्रमाणें त्यांच्या पूर्वजां[illegible]
खोट्या भविष्यवाद्यांस केलें होतें. २७ प[illegible]
तुह्मा ऐकणाऱ्यांस मी सांगतों, तुह्मी आपल्या [illegible]
ऱ्यांवर प्रीति करा, जे तमचा द्वेष करितात त्यां[illegible]
बरें करा. २८ जे तुह्मास शाप देतात त्यां[illegible]
आशीर्वाद द्या, आणि जे तुह्मास गांजितात त्यां[illegible]
साठीं प्रार्थना करा. २९ जो तुझ्या एका गालावर
मारितो त्याला दुसराहि पुढें कर, आणि जो तु[illegible]
अंगवस्त्र घेतो त्याला अंगरखाहि घ्यायास मना क[illegible]
नको. ३० आणि जो कोणी तुझ्या जवळ माग[illegible]
त्याला दे, आणि जो तुझ्या वस्तु घेतो त्याजपासीं
परत मागूं नको. ३१ आणि जसें माणसांनी तुह्मासीं
वर्त्तावें ह्मणून तुमची इच्छा आहे तसेंच तुह्मीहि
त्यांसीं वर्त्ता. ३२ आणि जे तुह्मावर प्रीति करितात
त्यांजवर तुह्मी प्रीति केली तर तुमचा उपकार [illegible]
मानायाचा आहे? कां कीं पापीहि आपल्या प्रीति
करणाऱ्यांवर प्रीति करितात. ३३ आणि जे तुमचें
बरें करितात त्यांचें तुह्मी बरें केलें, तर तुमचा उप-
कार काय मानायाचा आहे? कां कीं पापीहि तसेंच
करितात. ३४ आणि ज्यांपासून तुह्मास परत
घेण्याची आशा आहे त्यांस तुह्मी उसनें दिल्हें त[illegible]
तुमचा उपकार काय मानायाचा आहे! कां [illegible]
दिल्हें तितकें परत मिळेल या आशेने पापीहि
पाप्यांस उसनें देतात. ३५ परंतु तुह्मी आपल्या
वैऱ्यांवर प्रीति करा, व त्यांचें बरें करा, व कांहीं
परत घेण्याची आशा न धरितां उसनें द्या, ह्मणजे
तुह्मास मोठें वेतन मिळेल आणि तुह्मी परात्पराचे
पुत्र व्हाल, कारण कीं अनुपकारी व वाईट यांज[illegible]
तो उपकारिक आहे. ३६ यास्तव जसा तुमचा
बाप दयाळू आहे तसे तुह्मीहि दयाळू व्हा. ३७
आणि तुह्मी दोष लावूं नका, ह्मणजे तुह्माला दोष
लावणार नाहींत; कोणाला अन्यायी ठरवूं नका, ह्म-
णजे तुह्माला अन्यायी ठरविणार नाहींत, क्षमा

रा ह्मणजे तुमची क्षमा होईल. ३८ द्या, ह्म-
जे तुह्मास देतील, चांगलें माप दडपून व हालवून
शीग भरून तुमच्या पदरीं घालतील, कां कीं ज्या
ापाने तुह्मी मोजून देतां त्याच मापाने तुह्मास
रत मोजून देतील.
३९ आणि त्याने त्यांस दाखला सांगितला,
ांधळ्याच्याने अंधळ्याला नेववतें काय? दोघेहि
ांचेंत पडतील कीं नाहीं? ४० शिष्य आपल्या
रूपेक्षा थोर नाहीं, तर पूर्ण झालेला प्रत्येक शिष्य
ापल्या गुरूसारिखा होईल. ४१ आणि तूं
ापल्या डोळ्यांतलें मुसळ ध्यानांत न आणितां आ-
ल्या भावाच्या डोळ्यांतलें कुसळ कां पाहतोस?
४२ अथवा आपण आपल्या डोळ्यांतलें मुसळ न
ाहतां आपल्या भावाला कसें ह्मणसील कीं, हे भाऊ,
ाझ्या डोळ्यांतलें कुसळ मला काढूं दे? अरे ढोंग्या,
ाहिल्याने आपल्या डोळ्यांतलें मुसळ काढ, ह्मणजे
ापल्या भावाच्या डोळ्यांतलें कुसळ काढायास
ुला साफ दिसेल. ४३ कां कीं वाईट फळ दे-
णारें झाड चांगलें नव्हे, आणि चांगलें फळ देणारें
झाड वाईट नव्हे. ४४ कारण कीं प्रत्येक झाड
आपल्या फळावरून कळतें, कां तर कांट्यांच्या
झाडांवरून अंजीर काढीत नाहींत, आणि झुडपा-
वरून द्राक्षें तोडीत नाहींत. ४५ चांगला माणूस
आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारांतून चां-
गलें काढितो, आणि वाईट माणूस आपल्या अंतः-
करणांच्या वाईट भांडारांतून वाईट काढितो; कां
कीं जें अंतःकरणांत भरलें आहे त्याप्रमाणेंच त्याचें
तोंड बोलतें. ४६ आणि तुह्मी मला प्रभू प्रभू
असें ह्मणून, जें मी सांगतों तें कां आचरत नाहीं?
४७ जो कोणी मजकडे येतो आणि माझ्या गोष्टी
ऐकून त्यांप्रमाणें करितो, तो कोणासारिखा आहे, हें मी
तुह्मास दाखवितों. ४८ तो कोणीएका घर बांधणाऱ्या
सारिखा आहे; त्याने खोल खणून खडकावर पाया
घातला; मग पूर येऊन त्या घरासीं आदळला, तरी
त्याच्याने त्याला हालवेना, त्याचा पाया खडकावर
घातला होता ह्मणून. ४९ परंतु जो ऐकून त्याप्रमाणें
करीत नाहीं तो पायावांचून भूमीवर घर बांधणाऱ्या
माणसासारिखा आहे; त्या घरासीं पूर आदळतांच
तें पडलें, आणि त्या घराचा मोठा नाश झाला.

## अध्याय ७.

नंतर लोक ऐकत असतां तो आपलीं सर्व वचनें
संपवून कपरणाहूमांत गेला. २ तेव्हां को-
णीएका शतपतीचा जो चाकर त्याला प्रिय होता, तो
दुखणाईत असतां मरणास टेंकला. ३ मग त्याने
येशूविषयीं ऐकून यहूद्यांच्या वडिलांस त्याजकडे
पाठवून त्याला विनंती केली कीं, आपण येऊन
माझ्या चाकराला वांचवावें. ४ नंतर त्यांनी
येशूकडे येऊन त्याला आग्रहाने विनंती केली
कीं, ज्यावर हा उपकार करायाचा तो योग्य आहे;
५ कारण कीं तो आमच्या लोकांवर प्रीति करितो,
आणि त्याने आह्मासाठीं सभास्थान बांधिलें आहे.
६ मग येशू त्यांबरोबर गेला, आणि तो घराजवळ
आला इतक्यांत त्या शतपतीने त्याकडे मित्रांस पा-
ठवून त्याला ह्मटलें, हे प्रभू, श्रम करूं नको, का-
रण कीं त्वां माझ्या छपराखालीं यावें असा मी
योग्य नाहीं. ७ यामुळें म्या आपणाला तुज-
कडे येण्यास योग्य मोजिलें नाहीं, परंतु तूं शब्द
बोल ह्मणजे माझा चाकर बरा होईल. ८ का-
रण कीं मी हाताखालचा माणूस असतांहि मा-
झ्या स्वाधीन शिपाई आहेत, आणि एकाला जा
असें सांगतों ह्मणजे तो जातो, व दुसऱ्याला ये
ह्मणजे तो येतो, व माझ्या चाकराला अमुक कर
ह्मणजे तो करितो. ९ तेव्हां त्या गोष्टी ऐकून
येशू त्याविषयीं आश्चर्य पावला, आणि मुरडून
आपल्यामागें चालणाऱ्या समुदायाला ह्मणाला, मी
तुह्मास सांगतों कीं, इस्राएलांतहि एवढा विश्वास
मला अढळला नाहीं. १० नंतर जे पाठविले
होते ते माघारे घरास आल्यावर, जो चाकर रोगी
होता तो त्यांस बरा असा दिसून आला.
११ आणि असें झालें कीं, दुसऱ्या दिवसीं तो
नाईन नामें नगरास जात होता, आणि त्याचे बहुत
शिष्य व मोठा समुदाय त्याच्या संगतीं चालला.
१२ तेव्हां तो नगराच्या वेसीजवळ आल्यावर,
पाहा, कोणीएका मेलेल्या माणसाला बाहेर नेत
होते, तो आपल्या आईचा एकुलता एक पुत्र,
आणि ती विधवा होती; आणि त्या नगरांतील
मोठा समुदाय तिच्या बरोबर होता. १३ तेव्हां
तिला पाहून प्रभूला तिचा कळवळा आला, आणि
तो तिला ह्मणाला, रडूं नको. १४ मग जवळ
जाऊन त्याने तिरडीस हात लाविला, तेव्हां खांदे-
ले उभे राहिले, आणि तो बोलला, तरण्या, मी
तुला सांगतों, ऊठ. १५ तेव्हां तो मेलेला उठून
बसला व बोलूं लागला; मग त्याने त्याला त्या-
च्या आईजवळ दिल्हें. १६ तेव्हां सर्वांस

भय प्राप्त झालें, आणि ते देवाला गौरवीत बो-
लले कीं, आह्मामध्यें मोठा भविष्यवादी उठला
आहे, आणि देवाने आपल्या लोकांची भेट घेतली
आहे. १७ नंतर त्याविषयींची ही गोष्ट सग-
ळ्या यहूद्यांत व चहुंकडल्या सर्व प्रांतांत पसरली.
१८ तेव्हां या सर्व गोष्टी योहान्नाला त्याच्या
शिष्यानी सांगितल्या. १९ मग योहान्नाने आप-
ल्या शिष्यांतील दोघांस बोलावून येशूकडे असें
विचारायास पाठविलें कीं, जो यायाचा होता तो
तूंच आहेस, किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पाहूं?
२० आणि तीं माणसें त्याजकडे येऊन ह्मणालीं,
बाप्तिस्मा करणाऱ्या योहान्नाने आह्मास तुजकडे
असें विचारायास पाठविलें कीं, जो यायाचा होता
तो तूंच आहेस, किंवा आह्मी दुसऱ्याची वाट पा-
हूं? २१ त्याच घटकेस त्याने बहुतांचीं दुखणीं
व पटक्या व वाईट आत्मे काढून त्यांस बरें केलें,
व बहुत अंधळ्यांस दृष्टि दिल्ही. २२ मग ये-
शूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी ज्या गोष्टी पा-
हिल्या व ऐकिल्या त्या योहान्नाला जाऊन सांगा
कीं, अंधळे पाहतात, पांगळे चालतात, कोडी शुद्ध
होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठतात, व दरि-
द्र्यांस शुभवर्त्तमान सांगण्यांत येतें. २३ आणि
जो कोणी मजविषयीं अडखळत नाहीं तो धन्य
आहे. २४ मग योहान्नाचे दूत गेल्यावर तो
योहान्नाविषयीं समुदायांस ह्मणूं लागला, तुह्मी
काय पाहायास रानांत गेलां? वाऱ्याने हालविलेला
बोरू काय? २५ तर काय पाहायास गेलां?
मऊ वस्त्रें ल्यालेल्या माणसाला काय? पाहा,
सुंदर वस्त्रें लेणारे व ख्याली खुशाली करणारे रा-
जवाड्यांत असतात. २६ तर तुह्मी काय पाहा-
यास गेलां? भविष्यवाद्याला काय? होय, मी तु-
ह्मास सांगतों कीं, भविष्यवाद्याहून जो मोठा त्याला.
२७ पाहा, मी आपल्या दुताला तुझ्या पुढें पाठ-
वितों, तो तुझी वाट तुझ्या समोर तयार करील,
असें ज्याविषयीं लिहिलें तो हाच आहे. २८
कां कीं मी तुह्मास सांगतों, बाप्तिस्मा करणाऱ्या
योहान्नापेक्षां बायकांपासून जन्मलेल्यांमध्यें कोणी
मोठा भविष्यवादी नाहीं, तरी देवाच्या राज्यांत
जो लाहान तो त्यापेक्षां मोठा आहे. २९ आणि
सर्व लोकानी व जकातदारानीहि ऐकून योहान्नाचा
बाप्तिस्मा घेतला होता ह्मणून देवाला न्यायी
लेखिलें. ३० परंतु परोशी व शास्त्री यानी
त्यापासून बाप्तिस्मा घेतला नव्हता ह्मणून आ-
पल्या विषयींचा देवाचा बेत अव्हेरिला. ३१
तेव्हां प्रभूने ह्मटलें, या पिढीच्या माणसांस न
मी कशासारिखें लेखूं? आणि ते कशासारि
आहेत? ३२ जीं लेंकरें चवाठ्यामध्यें बसून एकं
कांस हाक मारून ह्मणतात, आह्मी तुह्माजवळ पुं
वाजविला तरी तुह्मी नाचलां नाहीं, आह्मी तुह्मा
जवळ विलाप केला तरी तुह्मी रडलां नाहीं, त्य
सारिखे ते आहेत. ३३ कारण कीं बाप्तिस्मा
करणारा योहान्न येऊन भाकर खात नसे व द्राक्ष
रस पीत नसे, आणि तुह्मी ह्मणतां कीं, त्याला भू
लागलें. ३४ मनुष्याचा पुत्र येऊन खात पि
असतो, आणि तुह्मी ह्मणतां, पाहा, खादाड मा
णूस व दारूबाज, जकातदारांचा व पाप्यांचा मित्र
३५ परंतु ज्ञान आपल्या सर्व लेंकरांकडून न्यायी
ठरतें.
३६ आणि परोश्यांतील कोणीएकाने त्याला आ-
पल्याबरोबर जेवायास बोलाविलें, मग तो त्या परो-
श्याच्या घरीं जाऊन पंक्तीस बसला. ३७ तेव्हां
पाहा, त्या नगरांत कोणीएक पापी बायको होती, ती
तो परोश्याच्या घरांत जेवीत आहे हें जाणून, सुगं-
ध तेलाची आलाबास्त्र कुपी घेऊन आली. ३८
आणि ती मागें त्याच्या पायांजवळ रडत उभी रा-
हून आसवानी त्याचे पाय भिजवूं लागली, आणि
तिने आपल्या डोक्याच्या केंसानी पुसून त्याच्या पा
यांचें चुंबन घेतलें व सुगंध तेल लाविलें. ३९ तेव्हां
त्याला बोलाविणाऱ्या परोश्याने पाहून आपल्यामध्यें
ह्मटलें कीं, हा भविष्यवादी असता तर त्याला
शिवती ती कोण व कसी बायको आहे, हें त्याला
कळलें असतें, कां कीं ती पापी आहे. ४० तेव्हां
येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, शिमोना, तुजसीं मला
कांहीं बोलायाचें आहे; तेव्हां तो ह्मणाला, हे
गुरू, बोल. ४१ एका सावकाराचे दोन कर्जदार
होते, एकाला शंभर रुपये देणें होतें, आणि
एकाला दाहा. ४२ परंतु फेडायास त्यांजवळ
कांहीं नव्हतें ह्मणून त्याने कृपा करून दोघांस सो-
डिलें. तर त्यांतून कोणता त्याजवर अधिक प्रीति
करील, हें सांग. ४३ तेव्हां शिमोनाने उत्तर
दिल्हें कीं, ज्याला अधिक सोडिलें तो, असें मला
वाटतें. मग तो त्याला ह्मणाला, ठीक ठरविलेंस.
४४ तेव्हां त्याने त्या बायकोकडे मुरडून शिमो-
नाला ह्मटलें, या बाईला पाहतोस ना? मी तुझ्या

घरीं आलों, तेव्हां त्वां माझ्या पायांसाठीं पाणी
दिल्हें नाहीं; परंतु इने आसवानी माझे पाय भिज-
वून आपल्या डोक्याच्या केंसानी पुसिले. ४५
त्वां माझें चुंबन घेतलें नाहीं, परंतु मी आंत आ-
ल्यापासून ही माझ्या पायांचें चुंबन घेतां राहिली
नाहीं. ४६ त्वां माझ्या डोक्याला तेल लाविलें
नाहीं, परंतु इने माझ्या पायांस सुगंध तेल लाविलें
आहे. ४७ या कारणास्तव मी तुला सांगतों,
इचीं बहुत पापें सोडिलीं आहेत, कां कीं इने
फार मीति केली, परंतु ज्याला थोडकें सोडिलें तो
थोडकी मीति करितो. ४८ तेव्हां त्याने तिला
ह्मटलें, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे. ४९
मग संगतीं बसणारे आपल्यांमध्यें ह्मणूं लागले,
जो पापांची क्षमा देखील करितो तो हा कोण?
५० तेव्हां त्याने त्या बायकोला ह्मटलें, तुझ्या
विश्वासाने तुला तारिलें आहे, शांतीने जा.

## अध्याय ८.

नंतर असें झालें कीं, तो गाजवीत व देवाच्या
राज्याचें शुभवर्त्तमान सांगत नगरोनगरीं व
गांवोगांवीं फिरूं लागला; तेव्हां बारा जण त्या-
बरोबर होते. २ आणि वाईट आत्मे व दुखणीं
यांपासून मुक्त केलेल्या कित्येक बायका, ज्या
माग्दालिणी ह्मटलेल्या मारयेमधून सात भुतें
निघालीं होतीं ती, ३ व हेरोदाचा कारभारी खुजा
याची बायको योहान्ना, व सुसान्ना, व बहुत दुस-
ऱ्या होत्या, त्या आपल्या द्रव्याने त्याची सेवा
करीत असत. ४ तेव्हां मोठा समुदाय मिळत असतां
आणि प्रत्येक नगरचे लोक त्याजवळ निघून येत
असतां तो दाखला देऊन बोलला; ५ कोणी
पेरणारा आपलें बीं पेरायास निघाला; आणि तो
पेरीत असतां कांहीं वाटेवर पडलें, मग तें तुडवून
गेलें, व आकाशांतील पांखरानी तें खाऊन टाकिलें.
६ आणि कांहीं खडकाळीवर पडलें, आणि तें उग-
वल्यावर वाळून गेलें, कारण कीं त्याला ओलावा
नव्हता. ७ आणि कांहीं कांट्यांच्या झाडांमध्यें
पडलें, आणि कांट्यांच्या झाडानी बरोबर वाढून तें
गुदमारिलें. ८ आणि कांहीं चांगल्या भूमीवर
पडलें, मग त्याने उगवून शंभरपट पीक दिल्हें.
असें ह्मटल्यावर तो मोठ्याने बोलला कीं, ज्याला
ऐकायास कान आहेत तो ऐको. ९ तेव्हां त्याच्या
शिष्यानी त्याला विचारिलें कीं, हा दाखला काय
असेल? १० तेव्हां तो बोलला, देवाच्या राज्या-
च्या गुप्त गोष्टी जाणणें हें तुह्मास दिल्हें आहे,
परंतु वरकडांस दाखल्यानी सांगितल्या आहेत,
यासाठीं कीं त्यानी पाहत असतां पाहूं नये व ऐकत
असतां समजूं नये. ११ तर दाखला असा
आहे; बीं देवाचें वचन आहे. १२ वाटे-
वरील हे आहेत कीं, ऐकतात, नंतर सैतान
येऊन त्यांच्या अंतःकरणांतून वचन काढून घेतो,
त्यानी विश्वास धरून तारण पावूं नये ह्मणून.
१३ आणि खडकाळीवरचे हे आहेत कीं, ऐकतात
तेव्हां आनंदाने वचन घेतात, परंतु त्यांमध्यें मूळ
नाहीं, ते कांहीं वेळपर्यंत विश्वास धरितात, आणि
परीक्षेच्या वेळेस फितून जातात. १४ आणि
कांट्यांच्या झाडांमध्यें पडलेले हे आहेत कीं, ऐकतात,
मग संसाराच्या चिंता व धन व विषयसुखें यांम-
ध्यें चालून गुदमरतात, आणि पूर्ण फळ देत नाहींत.
१५ परंतु चांगल्या भूमींतले हे आहेत कीं, वचन
ऐकून भल्या व चांगल्या अंतःकरणांत धरितात, मग
धिराने फळ देत जातात.

१६ आणि कोणी दिवा लावून भांड्याने तो
झांकितो किंवा पलंगाखालीं ठेवितो असें नाहीं, तर
आंत येणाऱ्यांस उजेड दिसावा ह्मणून दिवठणीवर
ठेवितो. १७ कां तर प्रगट होणार नाहीं असें
कांहीं गुप्त नाहीं, आणि कळणार नाहीं व उघडें
होणार नाहीं असें कांहीं झांकलेलें नाहीं. १८
यास्तव तुह्मी कसें ऐकतां याविषयीं जपा, कां कीं
ज्याजवळ आहे त्याला मिळेल, आणि ज्याजवळ
नाहीं त्याचें जें आहे ह्मणून दिसतें, तें देखील
त्यापासून काढून घेतील.

१९ तेव्हां त्याची आई व भाऊ त्याजकडे
आले, परंतु दाटीमुळें त्याची भेट होईना. २०
मग कोणी त्याला सांगितलें कीं, तुझी आई व तुझे
भाऊ बाहेर उभे राहून तुला भेटायास पाहतात.
२१ तेव्हां त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, जे देवाचें
वचन ऐकतात व पाळितात तेच माझी आई व माझे
भाऊ आहेत.

२२ आणि असें झालें कीं, एका दिवशीं तो
आपल्या शिष्यांसुद्धां तारवांत बसून, आपण सरो-
वराच्या पलिकडे जाऊं, असें त्यांस ह्मणाला; आणि
त्यानी हाकारिलें. २३ नंतर ते हाकारून जात असतां
तो झोंपीं गेला, मग सरोवरांत वाऱ्याचें मोठें वादळ
सुटलें, आणि तारूं भरूं लागलें आणि ते संकटांत

पडले· २४ तेव्हां ते जवळ येऊन त्याला जागें
करून ह्मणाले, प्रभू प्रभू, आह्मी बुडतों· तेव्हां
त्याने उठून वाऱ्याला व पाण्याच्या लाटांस धमका-
विलें, मग तीं राहिलीं आणि शांति झाली· २५
नंतर त्याने त्यांस ह्मटलें, तुमचा विश्वास कोठें
आहे? मग ते भयभीत होऊन आश्चर्य पावले, व
एकमेकांस ह्मणाले, हा आहे तरी कोण? कां कीं
वारे व पाणी यांस देखील आज्ञा करितो आणि तीं
याचें ऐकतात·

२६ मग ते गालीलाच्या समोर जो गादारे-
करांचा देश तेथें पोहंचले· २७ आणि तो जमी-
नीवर उतरला तेव्हांच तेथल्या नगरांतील कोणी
माणूस त्याला भेटला, त्याला बहुत काळ भुतें
लागलीं होतीं व तो वस्त्र नेसत नसे व घर सोडून
थडयांमध्यें राहत असे· २८ तेव्हां तो येशूला पाहून
आरडला व त्याच्या पुढें पडून मोठ्याने बोलला, हे
येशू, परात्पर देवाच्या पुत्रा, माझा तुझा काय
संबंध? मी तुला विनंती करितों कीं, त्वां मला पिडूं
नये· २९ त्याने तर, तूं या माणसांतून नीघ, असी
त्या अशुद्ध आत्म्याला आज्ञा केली होती; कां कीं
तो त्याला पुष्कळ वेळा धरीत असे, आणि लोकांनी
त्याला सांखळ्यांनी व बेड्यांनी बांधून ठेविलें अस-
तांहि तो तीं बंधनें तोडी आणि भूत त्याला
रानांत घालवी· ३० मग येशूने त्याला
पुसलें कीं, तुझें नांव काय? तेव्हां त्याने ह्मटलें,
सैन्य; कां कीं त्यामध्यें पुष्कळ भुतें गेलीं होतीं·
३१ आणि त्यांनी त्याला विनंती केली कीं, आह्मास
डोहांत जायाला सांगूं नको· ३२ तेव्हां तेथें
डोंगरांत बहुत डुकरांचा कळप चरत होता, आणि
त्यांनी त्याला विनंती केली कीं, त्यांमध्यें आह्मास
जाऊं दे· मग त्याने त्यांस परवानगी दिल्ही· ३३
तेव्हां भुतें त्या माणसांतून निघून त्या डुकरांत गेलीं,
आणि तो कळप धडक धांवत कड्यावरून समुद्रांत
पडला व गुदमरून मेला· ३४ मग जें झालें तें
पाहून चारणारे पळाले आणि ते नगरामध्यें व
खेड्यांमध्यें वर्त्तमान सांगूं लागले· ३५ तेव्हां जें
झालें तें पाहायास लोक निघाले, आणि येशूकडे
आल्यावर ज्या माणसांतून भुतें निघालीं होतीं तो
वस्त्र ल्यालेला व शुद्धीवर आलेला व येशूच्या
पायांजवळ बसलेला, असा त्यांनी पाहिला; तेव्हां
ते भ्याले· ३६ मग ज्यांनी पाहिलें होतें त्यांनीहि
तो भूतग्रस्त कसा बरा झाला, हें त्यांस सांगितलें·
३७ तेव्हां त्या गादारेकरांच्या चहुंकडल्या प्रांता-
तील सर्व समुदायाने त्वां आह्मापासून जावें, असें
त्याजवळ मागितलें; कां कीं ते मोठ्या भयाने व्याप्त
झाले; मग तो तारवांत बसून माघारा आला· ३८
आणि ज्या माणसांतून भुतें निघालीं होतीं त्याने
म्या आपल्या जवळ असावें, असी त्याला विनंती
केली; परंतु येशूने त्याला निरोप देऊन सांगितलें कीं,
३९ तूं आपल्या घरीं माघारा जा, आणि देवाने
तुजसाठीं जें जें केलें तें सांग· मग त्याने निघून
आपल्या साठीं येशूने जें जें केलें होतें तें सर्व नग-
रांत गाजविलें·

४० मग असें झालें कीं, येशू माघारा आल्या-
वर समुदाय त्याला खुशीने भेटला, कां कीं सर्व
त्याची वाट पाहत होते· ४१ तेव्हां पाहा,
याइरस नामें कोणी सभेचा अधिकारी माणूस
आला, आणि त्याने येशूच्या पायां पडून, माझ्या
घरीं यावें, असी त्याला विनंती केली· ४२ कारण
कीं त्याला सुमारें बारा वर्षांची एकुलती एक कन्या
होती, आणि ती मरणास टेंकली होती; मग तो जात
असतां समुदायांनी त्याला चेंगरलें· ४३ आणि
कोणी बारा वर्षें रक्तस्राव लागलेली जी बायको
आपलें सर्वस्व वैद्यांस देऊन कोणाकडूनहि बरी
होईना, ४४ ती त्याच्या मागें येऊन त्याच्या
वस्त्राच्या कांठाला शिवली, तेव्हांच तिचा
रक्तस्राव राहिला· ४५ मग येशू बोलला, मला
कोण शिवला? तेव्हां सर्व नाहीं ह्मणत असतां पेत्रस
व त्याचे सोबती बोलले, हे प्रभू, समुदाय तुला
वेढितात व चेंगरतात, आणि मला कोण शिवला
असें ह्मणतोस काय? ४६ तेव्हां येशू बोलला,
कोणी तरी मला शिवला, कां कीं माझ्यांतून सत्व
निघालें, हें मला ठाऊक आहे· ४७ मग ती
बायको, आपण गुप्त राहिली नाहीं, असें पाहून कांपत
आली, आणि त्याच्या पुढें पडून कोणत्या कारणा-
करितां आपण त्याला शिवली व तेव्हांच कसी
बरी झाली, हें तिने सर्व लोकांच्या देखतां त्याला
सांगितलें· ४८ तेव्हां त्याने तिला ह्मटलें, मुली,
धीर धर, तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे;
शांतीने जा· ४९ तो बोलत आहे इतक्यात सभे-
च्या अधिकाऱ्याच्या एथून कोणी येऊन त्याला
सांगितलें कीं, तुझी कन्या मेली, गुरूला श्रम देऊं
नको· ५० तेव्हां येशूने ऐकून त्याला उत्तर दिल्हें
कीं, भिऊं नको, विश्वास मात्र धर ह्मणजे ती

वांचेल. ५१ नंतर घरास आल्यावर त्याने पेत्रस
व याकोब व योहान्न व मुलीचीं आईबापें यांशि-
वाय कोणाला आंत येऊं दिल्हें नाहीं. ५२ मग
सर्व तिच्या साठीं रडत व बडवून घेत होते, तेव्हां
तो बोलला, रडूं नका, ती मेली नाहीं, ती झोंपेंत
आहे. ५३ तेव्हां ती मेली आहे असें जाणून ते
त्याला हासले. ५४ मग त्याने सर्वांस बाहेर
घालविल्यावर तिचा हात धरून हाक मारिली कीं,
मुली, ऊठ. ५५ तेव्हां तिचा आत्मा फिरून
आला आणि ती लागलीच उठली; मग तिला
खायास द्यावें ह्मणून त्याने आज्ञा केली. ५६
तेव्हां तिचीं आईबापें थक्क झालीं; परंतु जें घडलें
तें कोणाला सांगूं नका, असें त्याने त्यांस सांगितलें.

## अध्याय ९.

नंतर त्याने आपल्या बारा शिष्यांस एकत्र बोला-
वून त्यांस सर्व भुतें काढण्याचें व रोग बरे
करण्याचें सामर्थ्य व अधिकार दिल्हा. २ मग
त्याने त्यांस देवाचें राज्य गाजवायास व रोग्यांस
बरें करायास पाठविलें. ३ आणि त्यांस सांगि-
तलें कीं, वाटेसाठीं कांहीं घेऊं नका, काठ्या किंवा
झोळणा किंवा भाकर किंवा रुपेंहि घेऊं नका, आणि
एकएकाला दोन दोन अंगरखे नसावे. ४ आणि
ज्या ज्या घरांत तुह्मी जाल, तेथेंच राहा व तेथू-
नच निघा. ५ आणि जे कोणी तुह्मास अंगीका-
रीत नाहींत त्यांविषयीं साक्ष पटावी, ह्मणून तुह्मी
त्या नगरांतून निघते वेळेस आपल्या पायांची धूळ
झाडून टाका. ६ तेव्हां ते निघून सर्व ठिकाणीं
शुभवर्त्तमान सांगत व लोकांस बरें करीत गांवोगांवीं
फिरूं लागले.

७ आणि त्याकडून घडलेल्या सर्व कामांविषयीं ऐकून
हेरोद राजाला पंचाईत पडली, कारण कीं योहान्न
मेलेल्यांमधून उठला आहे असें कित्येकानी ह्मटलें;
८ आणि कित्येकानी असें कीं, एलीया दिसून आला,
आणि दुसऱ्यानी असें कीं पुरातन भविष्यवाद्यांतील
एक उठला आहे. ९ तेव्हां हेरोद बोलला,
योहान्नाचें शीर म्यां तोडिलें, पण ज्याच्या अश्या
गोष्टी मी ऐकतों तो हा कोण असेल? आणि
त्याला पाहावें असें त्यास वाटलें.

१० नंतर प्रेषितानी माघारें येऊन आपण जें
जें केलें तें त्याला सांगितलें. मग तो त्यांस घेऊन
बेथसाइदा नामें नगराकडल्या रानांतील जाग्यांत
एकीकडे गेला. ११ परंतु समुदाय हें समजून
त्याच्या मागें चालले, तेव्हां त्याने त्यांस खुशीने
भेटून देवाच्या राज्याविषयीं त्यांस उपदेश
केला, आणि ज्यांस बरें होण्याची गरज होती
त्यांस बरें केलें. १२ नंतर दिवस उतरूं लागला
तेव्हां बारा जण जवळ येऊन त्याला ह्मणाले,
समुदायाला निरोप दे, ह्मणजे ते चहुंकडल्या
गांवांत व खेड्यांत जाऊन उतरतील व खायाला
मिळवितील, कां कीं एथें रानांतल्या जाग्यांत
आहों. १३ परंतु तो त्यांस ह्मणाला, तुह्मीच
त्यांस खायाला द्या. तेव्हां ते बोलले, पांच
भाकरी व दोन मासे यांहून अधिक आह्मा-
जवळ नाहीं, तर आह्मी जाऊन या सर्व लोकां-
साठीं अन्न विकत घेऊं काय? १४ तेथें तर
सुमारें पांच हजार पुरुष होते. तेव्हां त्याने आप-
ल्या शिष्यांस सांगितलें कीं, पन्नास पन्नासांच्या
पंक्ति करून त्यांस बसवा. १५ मग त्यानी
त्याप्रमाणें करून सर्वांस बसविलें. १६ तेव्हां
त्याने त्या पांच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर
आकाशाकडे पाहून त्यांविषयीं आशीर्वाद मागितला,
मग तीं मोडून समुदायाला वाढण्याकरितां शिष्यां-
जवळ दिल्हीं. १७ तेव्हां सर्व जेवून तृप्त झाले;
नंतर जेवणाऱ्यांच्या उरलेल्या तुकड्यानी बारा टोप-
ल्या भरून त्यानी उचलून नेल्या.

१८ आणि असें झालें कीं, तो एकीकडे प्रार्थना
करीत असतां शिष्य त्याच्या जवळ जमले; तेव्हां
त्याने त्यांस विचारिलें कीं, समुदाय मला कोण
ह्मणून ह्मणतात? १९ तेव्हां त्यानी उत्तर दिल्हें
कीं, बाप्तिस्मा करणारा योहान्न, आणि कित्येक
पुरातन भविष्यवाद्यांतील कोणीएक उठला आहे, असें
ह्मणतात. २० मग त्याने त्यांस ह्मटलें, तुह्मी
तर मला कोण ह्मणून ह्मणतां? तेव्हां पेत्रसाने
उत्तर दिल्हें कीं, तूं देवाचा ख्रीस्त आहेस. २१
मग हें कोणाला सांगूं नका, असें त्याने त्यांस
निक्षूण सांगितलें, २२ आणि ह्मटलें कीं, मनु-
ष्याच्या पुत्राने फार सोसावीं, आणि वडील व मुख्य
याजक व शास्त्री यानी त्याला अव्हेरावें, आणि
त्याला जिवें मारावें, आणि त्याने तिसऱ्या दिवशीं
पुन्हा उठावें, याचें अगत्य आहे.

२३ तेव्हां त्याने सर्वांस ह्मटलें, जर कोणी
माझ्या मागें यायास इच्छितो तर त्याने आपणाला
नाकारावें व प्रति दिवशीं आपला खांब उचलून

घेऊन माझ्या मागें यावें. २४ कारण कीं जो
कोणी आपला जीव राखायास इच्छितो तो त्याला
मुकेल, परंतु जो कोणी मजकरितां आपल्या जिवाला
मुकेल तो त्याला राखील. २५ कारण कीं
माणूस सगळें जग मिळवून आपला नाश किंवा
आपल्या जीवाची हानि पावला तर त्याला काय
लाभ होईल? २६ कां कीं जो कोणी मजविषयीं
व माझ्या वचनांविषयीं लाजेल यांविषयीं मनुष्याचा
पुत्र आपल्या व बापाच्या व पवित्र दुतांच्या गौर-
वानें जेव्हां येईल तेव्हां लाजेल. २७ आणि मी
तुह्मास खचीत सांगतों कीं, एथें उभे राहणाऱ्यां-
तील कोणी असे आहेत कीं, ते देवाचें राज्य पाह-
तील तोंपर्यंत त्यांस मरणाचा अनुभव होणारच
नाहीं.

२८ आणि असें झालें कीं, या गोष्टींनंतर सुमारें
आठ दिवसानी पेत्रस व योहान्न व याकोब
यांस घेऊन तो प्रार्थना करायास डोंगरावर
गेला. २९ तेव्हां तो प्रार्थना करीत असतां
त्याच्या तोंडाचें रूप पालटलें आणि त्याचें वस्त्र
पांढरें लखलखीत झालें. ३० आणि पाहा, दोन
माणसें त्यासीं संभाषण करीत होतीं, तीं मोशे व
एलीया होतीं. ३१ तीं तेजस्वी दिसलीं, आणि
त्याची जी गति तो यरूशलेमांत पूर्ण करणार होता
तिजविषयीं बोलत होतीं. ३२ तेव्हां पेत्रस व
त्याचे सोबती झोंपेनें जड झाले होते, परंतु जागे
होऊन त्यानी त्याचें तेज व तीं दोन माणसें त्याच्या
संगतीं उभीं राहिलेलीं पाहिलीं. ३३ मग असें झालें
कीं, तीं त्यापासून जात असतां पेत्रसानें आपण काय
ह्मणतों हें न जाणून येशूला ह्मटलें, हे प्रभू,
आपण एथें असावें हें बरें आहे, तर तीन मंडप
करूं, तुह्मा साठीं एक व मोशासाठीं एक व
एलीयासाठीं एक. ३४ तो असें बोलत असतां
ढगानें येऊन त्यांजवर सावली केली, मग ते ढगांत
जात असतां हे भ्याले. ३५ आणि त्या ढगांतून
असी वाणी झाली कीं, हा माझा प्रिय पुत्र आहे,
याचें तुह्मी ऐका. ३६ आणि ही वाणी झाल्यावर
येशू मात्र दिसला; नंतर ते उगेच राहिले, आणि
ज्या गोष्टी त्यानी पाहिल्या होत्या त्यांतील कांहींच
त्या दिवसांमध्यें कोणाला सांगितलें नाहीं.

३७ आणि असें झालें कीं, त्याच्या दुसऱ्या दिवशीं
ते डोंगरावरून खालीं आल्यावर मोठा समुदाय
त्याला भेटला. ३८ तेव्हां पाहा, समुदायांतील
माणूस मोठ्यानें ओरडत बोलला, हे गुरू, मी
तुला विनंती करितों, माझ्या पुत्राकडे पाहा, कां कीं
तो माझा एकुलता आहे. ३९ आणि पाहा,
आत्मा त्याला धरितो, मग एकाएकीं ओरडतो,
आणि फेंस आणवून त्याला पिळतो व त्याला
ठेंचूनहि त्याला लवकर सोडीत नाहीं. ४० तर
तुझ्या शिष्यानी तो काढावा ह्मणून म्या त्यांच्या
जवळ विनंती केली, परंतु त्यांच्यानें काढवेना. ४१
तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, अहा! अविश्वासी व
विपरीत पिढी, मी कोठवर तुह्माबरोबर राहूं व
तुमचें सोसूं? तूं आपल्या पुत्राला इकडे आण. ४२
नंतर तो जवळ येत आहे इतक्यांत भुतानें त्याला
अपटलें आणि पिळून टाकिलें; तेव्हां येशूनें त्या
अशुद्ध आत्म्याला धमकाविलें, आणि मुलाला बरें
करून त्याच्या बापाजवळ परत दिल्हें. ४३ मग
देवाच्या महत्त्वावरून सर्व थक्क झाले; आणि येशूनें
जीं कामें केलीं त्या अवघ्यांवरून सर्व आश्चर्य
करीत असतां तो आपल्या शिष्यांस ह्मणाला,
४४ तुह्मी या गोष्टी आपल्या लक्षांत ठेवा, कारण
कीं मनुष्याचा पुत्र माणसांच्या हातीं पडणार आहे.
४५ परंतु ही गोष्ट ते समजले नाहींत, आणि
त्यांस समजूं नये ह्मणून त्यांजपासून ती झांकली
होती, आणि या गोष्टीविषयीं त्याला विचारायास
ते भ्याले.

४६ नंतर आपणांमध्यें कोण मोठा आहे यावि-
षयीं त्यांच्या मध्यें वादविवाद उत्पन्न झाला. ४७
तेव्हां येशूनें त्यांच्या अंतःकरणांतील विचार जाणून
एक बालक घेऊन त्याला आपल्या जवळ उभें
केलें; ४८ आणि त्यांस ह्मटलें, जो कोणी
माझ्या नांवानें या बाळकाला अंगीकारील तो मला
अंगीकारील, आणि जो कोणी मला अंगीकारील तो
माझ्या पाठविणाऱ्याला अंगीकारील; कां तुह्मा
सर्वांमध्यें जो लाहान आहे तोच मोठा होईल.

४९ योहान्नानें उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू,
आह्मी कोणीएकाला तुझ्या नांवानें भुतें काढतांना
पाहिलें, तेव्हां आह्मी त्याला मना केलें, कां कीं तो
आह्मासंगतीं तुझ्या मागें चालत नाहीं. ५०
तेव्हां येशूनें त्याला ह्मटलें, मना करूं नका, कारण
कीं जो आह्माला प्रतिकूल नाहीं तो आह्माला
अनुकूल आहे.

५१ आणि असें झालें कीं, त्याचा वर जाण्या-
चा समय जवळ आल्यावर त्यानें यरूशलेमास

निश्चयें जावें ह्मणून तिकडे तोंड केलें. ५२ **मग**
त्याने आपल्यापुढें दूत पाठविले, तेव्हां ते निघून
त्याच्या साठीं तयार करायास **शोमरोनी** यांच्या
कोणीएका गांवांत गेले. ५३ **परंतु** त्यांनी त्याला
अंगीकारिलें नाहीं, कां कीं तो चालत असतां त्याचें
तोंड **यरूशलेमाकडे** होतें. ५४ **तेव्हां** हें पाहून
त्याचे शिष्य **याकोब** व **योहान्न** बोलले, हे **प्रभू**,
**एलीयानें** केल्याप्रमाणें आकाशांतून अग्नीने पडून
त्यांचा नाश करावा ह्मणून आह्मींहि आज्ञा करावी,
असी तुझी इच्छा आहे काय? ५५ **परंतु** त्याने
मुरडून त्यांस असें धमकाविलें कीं, तुह्मी कोणत्या
आत्म्याचे आहां हें तुह्मास ठाऊक नाहीं; ५६
**कां** कीं मनुष्याचा पुत्र माणसांच्या प्राणांचा नाश
करायास आला नाहीं, तर तारायास आला.
मग ते दुसऱ्या गांवास गेले.
५७ **आणि** असें झालें कीं, ते वाटेने चालत
असतां कोणीएकाने त्याला ह्मटलें, हे **प्रभू**, जेथें
जेथें तूं जासील तेथें मी तुझ्या मागें येईन. ५८
**तेव्हां** **येशू** त्याला ह्मणाला, कोंकडांस बिळें व
आकाशांतल्या पांखरांस कोटीं आहेत, परंतु मनु-
ष्याच्या पुत्राला डोकें टेंकण्यासहि ठिकाण नाहीं.
५९ **मग** त्याने दुसऱ्याला सांगितलें, माझ्या मागें
ये. परंतु तो बोलला, हे **प्रभू**, पहिल्याने माझ्या
बापाला पुरायास मला जाऊं दे. ६० **तेव्हां**
**येशूने** त्याला ह्मटलें, मेलेल्यांस आपल्या मेले-
ल्यांस पुरूं दे, परंतु तूं जाऊन देवाच्या राज्याचें
वर्त्तमान सांग. ६१ **तेव्हां** अणखी एक ह्मणाला,
हे **प्रभू**, मी तुझ्या मागें येईन, परंतु पहिल्याने
माझ्या घरांत जे आहेत त्यांचा निरोप मला घेऊं
दे. ६२ **तेव्हां** **येशूने** त्याला ह्मटलें, जो कोणी
नांगराला आपला हात घालून मागें पाहतो तो
देवाच्या राज्याविषयीं उपयोगी नाहीं.

## अध्याय १०.

**त्या**नंतर **प्रभूने** अणखी सत्तर जण नेमून
ज्या ज्या नगरांत व ठिकाणीं आपण जाणार
होता तेथें त्यांस दोघा दोघांस आपल्या पुढें पाठविलें.
२ **तेव्हां** त्याने त्यांस ह्मटलें, पीक फार आहे खरें,
परंतु कामकरी थोडके आहेत. **यास्तव** पिकाच्या
धन्याने आपल्या पिकांत कामकरी पाठवावे ह्मणून
त्याची प्रार्थना करा. ३ **जा**; पाहा, लांडग्यांमध्यें
जसें कोंकरांस तसें तुह्मास मी पाठवितों. ४ **पि**-
शवी किंवा झोळणा किंवा वाहणा घेऊं नका, आणि
वाटेने कोणाला मुजरा करूं नका. ५ **आणि** कोण-
त्याहि घरांत जाल तेथें पहिल्याने ह्मणा, या घरास
शांति असो. ६ **आणि** शांतीचा पुत्र तेथें
असला तर तुमचा आशीर्वाद त्यावर राहील,
नसला तर तुह्माकडे परत येईल. ७ **आणि** एकाच
घरांत राहून ते देतील तें खात पीत जा, कां कीं
कामकरी आपल्या मजुरीला योग्य आहे; घरोघर
फिरूं नका. ८ **आणि** तुह्मी एखाद्या नगरांत
गेलां असतां त्यांनी तुह्मास अंगीकारिलें, तर तुह्मास
वाढतील तें खा; ९ **आणि** त्यांतल्या दुख-
णाइतांस बरें करा, आणि त्यांस सांगा कीं, देवाचें
राज्य तुह्माकडे आलें आहे. १० **परंतु** तुह्मी
एखाद्या नगरांत गेलां असतां त्यांनी तुह्मास अंगी-
कारिलें नाहीं, तर त्याच्या मार्गांत बाहेर जाऊन
असें बोला कीं, ११ **तुमच्या** नगराची धूळ आ-
ह्मास लागली ती देखील तुमची तुह्मास झाडून
टाकितों, तथापि हें जाणा कीं, देवाचें राज्य तुह्मा-
कडे आलें आहे. १२ **आणि** मी तुह्मास सांगतों
कीं, त्या नगरापेक्षां **सदोमाला** त्या दिवसीं सोपें
पडेल. १३ **हे** **खोराजीना**, तुला हाय हाय, हे
**बेथसाइदा**, तुला हाय हाय, कां कीं तुह्मामध्यें जे
चमत्कार घडले ते **सोर** व **सिदोन** यांत घडले
असते तर त्यांनी मागेंच तरट व राख यांत बसून
पश्चात्ताप केला असता. १४ **अणखी** न्यायकाळीं
तुमच्या पेक्षां **सोर** व **सिदोन** यांस सोपें पडेल.
१५ **आणि** हे **कपरणाहूमा**, जें आकाशापर्यंत उंचा-
वलेलें तें तूं मृतलोकापर्यंत खालीं पडसील. १६
**जो** तुमचें ऐकतो तो माझें ऐकतो, आणि जो तुह्मास
अव्हेरितो तो मला अव्हेरितो, आणि जो मला
अव्हेरितो तो माझ्या पाठविणाऱ्याला अव्हेरितो.
१७ **नंतर** ते सत्तर जण आनंदाने माघारे येऊन
बोलले, हे **प्रभू**, तुझ्या नामाने भुतें देखील आम-
च्या स्वाधीन होतात. १८ **तेव्हां** त्याने त्यांस
ह्मटलें, म्या **सैतानाला** विजेसारिखें आकाशांतून
पडतांना पाहिलें. १९ **पाहा**, साप व विंचू यांवर
पाय द्यायाचा व वैऱ्यांच्या सर्व शक्तीवरचा अधिकार
मी तुह्मास देतों, आणि तुह्मास कांहींएक बाधणार
नाहींच. २० **तथापि** भुतें तुमच्या स्वाधीन होतात
यामुळें आनंद करूं नका, तर तुमचीं नांवें आका-
शामध्यें लिहिलीं आहेत यामुळें आनंद करा.
२१ **त्या** वेळेस **येशू** आत्म्यांत हर्षित होऊन

बोलला, हे बापा, आकाशाच्या व पृथ्वीच्या प्रभू,
मी तुझी स्तुति करितों, कारण कीं या गोष्टी त्वां
ज्ञानी व तर्कवान यांपासून लपवून लेंकरांस प्रगट
केल्या आहेत; होय बापा, कां कीं असेंच तुला
बरें वाटलें. २२ माझ्या बापानें माझ्या हातीं सर्व
दिल्हें आहे, आणि पुत्र कोण आहे हें बापावांचून
कोणाला ठाऊक नाहीं, आणि बाप कोण आहे हें
पुत्रावांचून आणि ज्याजवळ प्रगट करायास पुत्राची
इच्छा असेल त्यावांचून कोणाला ठाऊक नाहीं.
२३ तेव्हां तो शिष्यांकडे मुरडून एकांतीं ह्मणाला,
तुह्मी जें पाहतां तें जे डोळे पाहतात ते धन्य. २४
कारण मी तुह्मास सांगतों कीं, जें तुह्मी पाहतां तें
बहुत भविष्यवाद्यांनी व राजांनी पाहायास इच्छिलें
परंतु पाहिलें नाहीं, आणि जें तुह्मी ऐकतां तें ऐका-
यास इच्छिलें परंतु ऐकिलें नाहीं.

२५ मग पाहा, कोणीएक शास्त्री उभा राहून
त्याची परीक्षा पाहण्याकरितां बोलला, हे गुरू, मी
काय केल्यानें सर्वकाळच्या जीवनाचें वतन पावेन?
२६ त्यानें त्याला ह्मटलें, नेमशास्त्रांत काय लिहिलें
आहे? तूं कसें वाचितोस? २७ त्यानें उत्तर
दिल्हें कीं, तुझा देव प्रभु यावर तूं आपल्या सर्व
अंतःकरणानें व आपल्या सर्व जिवानें व आपल्या
सर्व शक्तीनें व आपल्या सर्व मनानें प्रीति कर,
आणि जसी आपणावर तसी आपल्या शेजाऱ्यावर
प्रीति कर. २८ मग त्यानें त्याला ह्मटलें, ठीक
उत्तर केलेंस, हें कर, ह्मणजे जीवन पावसील.
२९ तेव्हां आपण न्यायी ठरावें असें मनावर
धरून तो येशूला ह्मणाला, तर माझा शेजारी
कोण? ३० तेव्हां येशूनें उत्तर दिल्हें कीं, कोणी
माणूस यरूशलेमापासून खालीं यरीहोस जात
असतां लुटाऱ्यांमध्यें सांपडला, ते त्याला उघडें
करून मार देऊन, त्याला अर्धमेला असें सोडून
गेले. ३१ मग कोणी याजक त्याच वाटेनें
सहज खालीं जात होता, तो त्याला पाहून
दुसऱ्या बाजूनें चालून गेला; ३२ आणि
तसाच कोणी लेवीहि त्या ठिकाणीं आल्यावर,
जवळ जाऊन पाहून दुसऱ्या बाजूनें चालून गेला.
३३ परंतु कोणी शोमरोनी वाटेनें चालत असतां
त्याजकडे आला, आणि त्याला पाहून कळवळला;
३४ तेव्हां जवळ जाऊन त्यानें तेल व द्राक्षारस
लावून त्याचे घाय बांधिले, मग त्याला आपल्या
पाठाळावर बसवून धर्मशाळेंत आणिलें, आणि त्याचा
सांभाळ केला. ३५ आणि दुसऱ्या दिवशीं निघते
वेळेस त्यानें दोन पावल्या काढून धर्मशाळकऱ्याला
देऊन त्याला सांगितलें कीं, याचा सांभाळ कर,
आणि यापेक्षां जें कांहीं अधिक खर्चिसील तें मी
माघारें आल्यावर तुला भरून देईन. ३६ तर
या तिघांतून लुटाऱ्यांमध्यें सांपडलेल्याचा शेजारी
तुझ्या मतानें कोणता झाला? ३७ तेव्हां तो
बोलला, त्याजवर दया करणारा तो. येशूनें त्याला
ह्मटलें, तूं जाऊन तसेंच कर.

३८ आणि असें झालें कीं ते चालत असतां तो
एका गांवांत आला, तेव्हां मार्था नामें कोणी बाईनें
आपल्या घरांत त्याला घेतलें. ३९ आणखी
तिला मारया नामें बहीण होती, ती येशूच्या
पायांजवळ बसून त्याचें बोलणें ऐकत होती. ४०
तेव्हां मार्था बहुत खटपटीमुळें गोंधळली व जवळ
येऊन बोलली, हे प्रभू, माझ्या बहिणीनें मज एक-
टीवर खटपटीचें काम टाकिलें, याची तुला चिंता
नाहीं काय? यास्तव तिला माझें सहाय करायास
सांग. ४१ येशूनें तिला उत्तर दिल्हें कीं, मार्थे,
मार्थे, तूं बहुत गोष्टींविषयीं चिंताक्रांत व घाबरी
आहेस; ४२ परंतु एकाच गोष्टीची गरज आहे,
आणि मारयेनें चांगला वांटा निवडून घेतला आहे,
तो तिजपासून काढून घेणार नाहींत.

## अध्याय ११.

आणि असें झालें कीं, तो एका ठिकाणीं प्रार्थना
करीत होता, ती संपविल्यावर त्याच्या शि-
ष्यांतील कोणीएकानें त्याला ह्मटलें, हे प्रभू, जसें
योहान्नानें आपल्या शिष्यांस प्रार्थना करायास
शिकविलें तसें तूंहि आह्मास शिकीव. २ मग
तो त्यांस ह्मणाला, तुह्मी प्रार्थना कराल तेव्हां असें
ह्मणा, हे आमच्या आकाशांतील बापा, तुझें नाम
पवित्र मानोत, तुझें राज्य येवो; जसें आकाशांत
तसें पृथ्वीवरहि तुझ्या इच्छेप्रमाणें होवो. ३ आ-
मची रोजची भाकर आह्मास नित्य दे. ४ आणि
आमचीं पापें आह्मास सोड, कां कीं आह्मीहि
आपल्या प्रत्येक ऋण्याला सोडितों; आणि आह्मास
परीक्षेंत नेऊं नको, तर आह्मास वाइटापासून सोडीव.
५ आणखी त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मामध्यें असा
कोण आहे कीं, त्याला मित्र असतां तो त्याकडे
मध्यरात्रीं जाऊन त्याला ह्मणेल, हे मित्रा,
मला तीन भाकरी उसन्या दे; ६ कारण कीं

माझा एक मित्र वाटेंतून मजकडे आला आहे, आणि
त्याला वाढायास मजपाशीं कांहीं नाहीं; ७ मग
तो आंतून उत्तर देईल कीं, मला श्रम देऊं नको,
आतां दार लाविलें आहे आणि माझीं मुलें माझ्या
जवळ अंथरुणावर आहेत, माझ्याने उठून तुला
देववत नाहीं. ८ मी तुह्मास सांगतों, तो त्याचा
मित्र आहे यामुळें जरी तो उठून त्याला देणार
नाहीं तरी त्याच्या आग्रहामुळें उठून त्याला पाहि-
जेत तितक्या देईल. ९ आणखी मी तुह्मास
सांगतों, मागा ह्मणजे तुह्मास मिळेल, शोधा ह्मणजे
तुह्मास सांपडेल, ठोका ह्मणजे तुह्मास उघडेल.
१० कां कीं जो कोणी मागतो तो पावतो, आणि
जो शोधितो त्याला सांपडतें, आणि जो ठोकितो
त्यासाठीं उघडेल. ११ आणि तुह्मामध्यें कोण
असा बाप आहे कीं, त्याजवळ पुत्राने भाकर मागि-
तली असतां त्याला धोंडा देईल? आणि मासा
मागितला असतां माशाच्या बदल त्याला साप
देईल? १२ किंवा अंडें मागितलें असतां त्याला
विंचू देईल? १३ यास्तव तुह्मी वाईट असतां
आपल्या लेंकरांस चांगलीं देणीं द्यायास समजतां,
मग आकाशांतील बापाजवळ जे मागतात त्यांस तो
कितीविशेषेंकरून पवित्र आत्मा देईल?

१४ आणि तो भूत काढीत होता, आणि तें
मुकें होतें; मग असें झालें कीं भूत निघाल्यावर
मुका बोलूं लागला, आणि समुदाय आश्चर्य
पावले. १५ परंतु त्यांतील कित्येक बोलले, भुतांचा
अधिकारी बालजबूल याच्या योगानें तो भुतें काढितो.
१६ आणि दुसऱ्या कित्येकांनी परीक्षा पाहण्या-
करितां त्याजवळ आकाशांतील चिन्ह मागितलें.
१७ तेव्हां त्याने त्यांच्या कल्पना जाणून त्यांस ह्मटलें,
जें जें राज्य आंतल्या आंत विभागलें आहे तें ओसाड
होतें, आणि घर आंतल्या आंत विभागलें असतां
पडतें. १८ आणि सैतानहि आपल्यामध्यें विभा-
गला तर त्याचें राज्य कसें टिकेल? तुह्मी तर
असें ह्मणतां कीं, मी बालजबूलाकडून भुतें काढितों;
१९ आणि जर मी बालजबूलाकडून भुतें काढितों,
तर तुमचे पुत्र कोणाकडून काढितात? याकरितां ते
तुमचे न्यायाधीश होतील. २० परंतु मी देवाच्या
बोटाने जर भुतें काढितों तर देवाचें राज्य तुम-
च्या मध्यें येऊन पोहंचलें आहे. २१ बळकट
माणूस हातेरबंद होऊन आपला वाडा राखितो
तेव्हां त्याची मालमत्ता निर्भय राहती. २२ परंतु
कोणी त्यापेक्षां बळकट येऊन त्याला जिंकितो तेव्हां
त्याच्या ज्या हातेरांवर त्याने विश्वास ठेविला तीं
तो घेऊन जातो, आणि त्याची लूट वांटून देतो.
२३ जो मला अनुकूळ नाहीं तो मला प्रतिकूळ
आहे, आणि जो माझ्या संगतीं गोळा करीत नाहीं
तो विखरितो. २४ जेव्हां अशुद्ध आत्मा माण-
सांतून निघतो तेव्हां तो कोरड्या जाग्यांमध्यें विसांवा
पाहत फिरतो, आणि न पावून ह्मणतो, ज्या आप-
ल्या घरांतून मी निघालों त्यांत परत जाईन. २५
मग तो आल्यावर तें झाडलेलें व सुंदर केलेलें आहे
असें पाहतो. २६ नंतर तो जाऊन आपल्यापेक्षां
वाईट असे दुसरे सात आत्मे संगतीं घेतो, आणि
ते आंत जाऊन तेथें राहतात, मग त्या माणसाची
शेवटली दशा पहिल्यापेक्षां वाईट होती.

२७ आणि असें झालें कीं, तो या गोष्टी बोलत
असतां समुदायांतील कोणी बायको ओरडून त्याला
ह्मणाली, ज्या पोटाने तुला वागविलें व जीं थानें
त्वां चोखिलीं तीं धन्य. २८ मग तो बोलला,
देवाचें वचन ऐकणारे व तें पाळणारे निश्चयें धन्य

२९ आणि समुदाय दाटी करीत असतां तो
असें बोलूं लागला, ही पिढी वाईट आहे, चिन्ह
मागती, परंतु योना भविष्यवादी याच्या चिन्हा-
वांचून तिला चिन्ह मिळणार नाहीं. ३० कां
कीं जसा योना निनवेकरांस चिन्ह झाला तसा
मनुष्याचा पुत्रहि या पिढीला होईल. ३१ दक्षि-
णेची राणी न्यायकाळीं या पिढीच्या माणसांसंगतीं
उभी राहून त्यांस अन्यायी ठरवील, कां कीं ती
शलमोनाचें ज्ञान ऐकायास पृथ्वीच्या शेवटांपासून
आली, आणि पाहा, एथें शलमोनापेक्षां कोणी मोठा
आहे. ३२ निनवेचीं माणसें न्यायकाळीं या
पिढीच्या संगतीं उभीं राहून हिला अन्यायी ठर-
वितील, कां कीं त्यांनी योनाच्या गाजविण्यावरून
पश्चात्ताप केला, आणि पाहा, एथें योनापेक्षां कोणी
मोठा आहे.

३३ आणि कोणी दिवा लावून गुप्त ठिकाणीं
किंवा मापाखालीं ठेवीत नाहीं, तर आंत येणाऱ्यांस
उजेड दिसावा ह्मणून दिवठणीवर ठेवितो. ३४
डोळा शरिराचा दिवा आहे; यास्तव तुझा डोळा
निर्दोष असला तर तुझें अवघें शरीर उजेडमय
होईल, परंतु वाईट असला तर तुझें शरिरहि अंधा-
रमय होईल. ३५ यास्तव तुझ्या मध्यें जो उजेड
तो अंधार न व्हावा ह्मणून सावध ऐस. ३६

याकरितां तुझें अवघें शरीर उजेडमय असलें व
त्यांतील कोणताहि भाग अंधारमय नसला, तर
जसा दिव्याच्या ज्योतीनें तुला उजेड होतो त्या-
प्रमाणें तें अवघें उजेडमय होईल.
३७ आणि तो बोलत आहे इतक्यांत कोणी
परोश्यानें त्याला आपल्यासंगतीं जेवायास बोला-
विलें; तेव्हां तो आंत जाऊन जेवायास बसला.
३८ आणि त्यानें जेवणाच्या पूर्वी अंघूळ केली नाहीं
हें पाहून परोश्याला आश्चर्य वाटलें. ३९ तेव्हां
प्रभूनें त्याला ह्मटलें, अहो परोश्यानो, तुह्मी ताट
वाटी बाहेरून साफ करितां, परंतु आंत लुटीनें व
दुष्टाईनें भरले आहां. ४० अहो मूर्खांनो, ज्यानें
बाहेरचें केलें त्यानें आंतलेंहि केलें नाहीं काय?
४१ अणखी तुह्माजवळ जें आहे त्यांतून गरिबांस
द्या, मग पाहा, सगळे पदार्थ तुह्मास शुद्ध आहेत.
४२ परंतु तुह्मा परोश्यांस हाय हाय! कां कीं
पुदिना व सताप व प्रत्येक भाजी यांचा तुह्मी
दाहावा भाग देतां, पण न्याय व देवाची प्रीति
सोडितां; या गोष्टी करायाच्या होत्या आणि त्या
सोडायाच्या नव्हत्या. ४३ तुह्मा परोश्यांस हाय
हाय! कां कीं सभास्थानांमध्यें मुख्य आसनें व
चव्हाट्यांमध्यें मुजरे घेणें हीं तुह्मास आवडतात.
४४ अहो शास्त्री व परोशी, तुह्मा ढोंग्यांस हाय
हाय! कां कीं ज्या गुप्त कबरांवरून माणसें न जाणतां
चालतात, त्यांसारिखे आहां. ४५ तेव्हां शास्त्र्यां-
तील कोणीएकानें त्याला उत्तर दिल्हें कीं, हे गुरू,
असें बोलल्यानें आमचीहि निंदा करितोस. ४६
तेव्हां तो बोलला, तुह्मा शास्त्र्यांसहि हाय हाय!
कां कीं वाहायास अवघड अशीं ओझीं तुह्मी माण-
सांवर घालितां आणि आपण आपले एक बोट
देखील त्या ओझ्यांस लावीत नाहीं. ४७ तुह्मास
हाय हाय! कां कीं तुह्मी भविष्यवाद्यांचीं थडीं
बांधितां आणि तुमच्या पूर्वजांनी त्यांस जिवें मारिलें.
४८ यास्तव तुह्मी आपल्या पूर्वजांच्या कामांविषयीं
साक्ष देतां व मान्य आहां, कां कीं त्यांनी त्यांस
जिवें मारिलें व तुह्मी त्यांचीं थडीं बांधितां. ४९
यास्तव देवाच्या ज्ञानानें ह्मटलें कीं, मी त्यांकडे
भविष्यवादी व प्रेषित यांस पाठवीन, आणि त्यां-
तील कित्येकांस ते जिवें मारितील व कित्येकांच्या
पाठीस लागतील; ५० सर्व भविष्यवाद्यांचें जें रक्त
जगाच्या मांडण्यापासून पाडिलें त्याचा सूड या पिढी-
पासून घ्यावा ह्मणून. ५१ हाबेलाच्या रक्तापासून
वेदीच्या व देवळाच्या मध्यें ज्याचा घात झाला
त्या जखार्याच्या रक्तापर्यंत, होय मी तुह्मास
सांगतों, त्याचा सूड या पिढीपासून घेतील. ५२
तुह्मा शास्त्र्यांस हाय हाय! कां कीं तुह्मी ज्ञानाची
किल्ली नेली आहे, तुह्मी स्वतां आंत गेलां नाहीं व
आंत जाणाऱ्यांस मना केलें. ५३ आणि तो
त्यांस या गोष्टी बोलत असतां, शास्त्री व परोशी
त्यावर फार संतापून बहुत गोष्टींविषयीं त्याला प्रश्न
करूं लागले, ५४ आणि त्याजवर दोष ठेवावा
ह्मणून त्याला टपत बसून ते त्याच्या तोंडांतील
कांहीं गोष्ट धरायास पाहत होते.

## अध्याय १२.

इतक्यांत हजारों लोक दाटीनें मिळून एकमेकांस
तुडवीत असतां येशू आपल्या शिष्यांस पहि-
ल्यानें ह्मणूं लागला, तुह्मी आपणांस परोश्यांच्या
खमीरापासून संभाळा, तें तर ढोंग आहे. २
कारण कीं जें प्रगट होणार नाहीं असें कांहीं झांक-
लेलें नाहीं, आणि जें कळणार नाहीं असें कांहीं
गुप्त नाहीं. ३ यास्तव जें जें तुह्मी अंधारांत
बोललां तें सर्व उजेडांत ऐकण्यांत येईल, आणि
जें तुह्मी एकांतीं कानांत सांगितलें तें धाब्यांवर
गाजवितील. ४ अणखी तुह्मा माझ्या मित्रांस,
मी सांगतों, जे शरिराला जिवें मारितात, आणि
त्यानंतर अणखी कांहीं करायाला समर्थ नाहींत,
त्यांस भिऊं नका. ५ तुह्मी तर कोणाला
भ्यावें हें मी तुह्मास दाखवितों; जिवें मारिल्यावर
जो नरकांत टाकायाला समर्थ आहे त्याला भ्या,
होय, मी तुह्मास सांगतों, त्याला भ्या. ६ पांच
चिमण्या दोन पैस्यांला विकितात कीं नाहीं? तथापि
त्यांतून एकहि देवासमोर विसरलेली नाहीं. ७
परंतु तुमच्या डोक्याचे सर्व केंस देखील मोजलेले
आहेत; यास्तव भिऊं नका, तुमचें मोल बहुत चि-
मण्यांहून अधिक आहे. ८ अणखी मी तुह्मास
सांगतों, जो कोणी माणसांसमोर मला अंगीकारील
त्यालाहि मनुष्याचा पुत्र देवाच्या दुतांसमोर अंगी-
कारील. ९ आणि जो माणसांसमोर मला नाका-
रील तो देवाच्या दुतांसमोर नाकारण्यांत येईल.
१० आणि जो कोणी मनुष्याच्या पुत्राविरुद्ध कांहीं
गोष्ट बोलेल त्याला तिची क्षमा होईल, परंतु जो
पवित्र आत्म्याविरुद्ध दुर्भाषण करील त्याला क्षमा
होणार नाहीं. ११ आणि ते तुह्मास सभा व

सरकार व अधिकारी यांसमोर नेतील, तेव्हां कसें
काय उत्तर द्यावें अथवा काय बोलावें याविषयीं
काळजी करूं नका. १२ कारण कीं जें कांहीं
बोलायाचें तें पवित्र आत्मा त्याच घटकेस तुह्मास
शिकवील.
१३ तेव्हां समुदायांतील कोणीएकाने त्याला
ह्मटलें, हे गुरू, मला वतनाचा वांटा द्यावा ह्मणून
माझ्या भावाला सांग. १४ मग तो त्याला ह्म-
णाला, माणसा, मला तुह्मांवर न्यायाधीश किंवा
वांटणारा असें कोणी नेमिलें? १५ तेव्हां त्याने
त्यांस ह्मटलें, संभाळा, लोभाविषयीं जपा, का
कीं कोणाचेंहि जीवन त्याच्या अतिशय द्रव्याने
नाहीं. १६ आणि त्याने त्यांस दाखला सांगि-
तला कीं, कोणीएका धनवान माणसाच्या जमिनीला
फार पीक आलें. १७ तेव्हां त्याने आपल्या मनांत
असा विचार केला कीं, काय करूं? कारण कीं
माझीं पिकें सांठवायास मला जागा नाहीं. १८
मग त्याने ह्मटलें, मी हें करीन, आपलीं कोठारें
मोडून त्यांहून मोठीं बांधीन, मग तेथें मी आपलें
सर्व उत्पन्न व आपला माल सांठवीन. १९ नंतर
मी आपल्या जिवाला ह्मणेन, हे जिवा, तुला बहुत
वर्षांपुरते पुष्कळ माल ठेविला आहे, विसावा घे,
खा, पी, आनंद कर. २० परंतु देवाने त्याला
ह्मटलें, अरे मूर्खा, याच रात्रीं तुझा प्राण तुजज-
वळ मागतील; तेव्हां त्वां तयार केलें तें कोणाचें
होईल? २१ जो आपल्यासाठीं द्रव्य सांचवितो
आणि देवाविषयीं धनवान नाहीं, तो तसाच आहे.
२२ तेव्हां त्याने आपल्या शिष्यांस ह्मटलें,
यास्तव मी तुह्मास सांगतों, आपण काय खावें असी
आपल्या जीवाविषयीं, अथवा आपण काय पांघरावें
असी शरिराविषयीं काळजी करूं नका. २३
अन्नापेक्षां जीव आणि वस्त्रापेक्षां शरीर अधिक
आहे. २४ कावळ्यांकडे लक्ष द्या, ते पेरीत नाहींत,
व कापीतहि नाहींत, त्यांस बळद नाहीं व कोठारहि
नाहीं, तरी देव त्यांस पोसितो; पांखरांपेक्षां
तुह्मी किती श्रेष्ठ आहां! २५ आणि काळजी
करून आपली उंची हातभर वाढवायास तुह्मा-
मध्यें कोण समर्थ आहे? २६ यास्तव अति
लाहान गोष्ट देखील तुमच्याने होत नाहीं तर वर-
कडाविषयीं काळजी कां करितां? २७ फुलझाडें
कशीं वाढतात, हें लक्षांत आणा, तीं श्रम करीत
नाहींत व कांतीत नाहींत, तरी मी तुह्मास सांगतों,
शलमोन देखील आपल्या सर्व वैभवांत त्यांतल्या
एकासारिखाहि ल्याला नव्हता. २८ तर अहो
अल्पविश्वासी, रानांतलें गवत आज आहे आणि
उद्यां भट्टींत पडेल, त्याला देव असा पोशाक
देतो, तर किती विशेषेंकरून तुह्मास देईल! २९
आणि आपण काय खावें अथवा काय प्यावें, यावि-
षयीं काळजी करूं नका, आणि चिंताक्रांत असूं
नका. ३० कां कीं जगांतील राष्ट्रें तीं अवघीं
मिळवायास झटतात, आणि त्यांची गरज तुह्मास
आहे हें तुमचा बाप जाणतो. ३१ परंतु तुह्मी
देवाचें राज्य मिळवायास झटा, मग तींहि सर्व
तुह्मास मिळतील.
३२ हे लाहान कळपा, भिऊं नको, कारण कीं
तुह्मास राज्य द्यावें असा तुमच्या बापाचा मनोदय
आहे. ३३ तुह्मी आपली मालमत्ता विकून गरि-
बांस द्या; ज्या पिशव्या जुन्या होत नाहींत आणि
जी संपत्ति सरत नाहीं ती आकाशामध्यें चोर
जवळ येत नाहीं आणि कसर नाश करीत नाहीं
तेथें तुह्मी आपल्यासाठीं करून ठेवा. ३४ कां
कीं जेथें तुमची संपत्ति आहे तेथें तुमचें चित्तहि
लागेल. ३५ तुमच्या कंबरा बांधलेल्या व दिवे
पाजळलेले असोत. ३६ आणि जीं माणसें आपला
धनी लग्नापासून माघारा येण्याची वाट पाहतात,
त्याने येऊन ठोकल्यावर त्यासाठीं लागलेच आपण
उघडावें ह्मणून, त्यांसारिखे तुह्मी व्हा. ३७ धनी
येऊन ज्या चाकरांस जागे राहतांना पाहील तेच
धन्य; मी तुह्मास खचीत सांगतों कीं, तो कंबर
बांधून त्यांस जेवायाला बसवील, आणि जवळ
येऊन त्यांची चाकरी करील. ३८ आणि तो
रात्रीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरांत आला व
त्यांस असें करितांना पाहिलें, तर ते चाकर धन्य
आहेत. ३९ आणखी हें समजा कीं, अमक्या
घटकेस चोर येईल हें घरधन्याला कळलें असतें,
तर तो जागा राहिला असता, आणि त्याने आपलें
घर फोडूं दिलें नसतें. ४० यास्तव तुह्मीहि
तयार असा, कां कीं ज्या घटकेंत तुह्मास वाटत
नाहीं त्या घटकेंत मनुष्याचा पुत्र येईल.
४१ तेव्हां पेत्रसाने त्याला ह्मटलें, हे प्रभू,
हा दाखला तूं आह्मास किंवा सर्वांसहि सांगतोस?
४२ तेव्हां प्रभू बोलला, तर आपल्या परिवाराला
नेमलेल्या वेळेस अन्न वांटून द्यायास ज्याला
धनी त्यावर ठेवील, असा विश्वासू व बुद्धिमान

कारभारी कोण आहे? ४३ ज्या चाकराला
त्याचा धनी येऊन तसें करितांना पाहील तो
धन्य. ४४ मी तुह्मास खचीत सांगतों कीं,
त्याला तो आपल्या सर्व मालमत्तेवर ठेवील.
परंतु माझा धनी येण्यास उशीर करितो असें तो
चाकर आपल्या अंतःकरणांत ह्मणाला, आणि चाक-
रांस व चाकरिणींस मारूं, व खाऊं पिऊं व झिंगू
लागला, ४६ तर ज्या दिवसीं तो वाट पाहत
नाहीं त्या दिवसीं, आणि जी घटका तो जाणत
नाहीं त्या घटकेंत त्या चाकराचा धनी येईल,
आणि त्याला कापून टाकील, आणि अविश्वास्यां-
बरोबर त्याला वांटा देईल. ४७ आणि जो
चाकर आपल्या धन्याची इच्छा जाणून तयार
झाला नाहीं आणि त्याच्या इच्छेप्रमाणें वर्त्तला
नाहीं, तो बहुत फटके खाईल. ४८ परंतु ज्याने
न जाणून फटके मारण्याजोगीं कामें केलीं तो थोडके
खाईल. कां कीं ज्या कोणाला बहुत दिल्हें आहे
त्यापासीं बहुत मागतील, आणि ज्याच्या जवळ
बहुत ठेविलें त्यापासीं अधिक मागतील.
४९ मी पृथ्वीवर आग लावायास आलों आहें,
आणि ती लवकर पेटावी ह्मणून मी किती इच्छितों
बरें! ५० आणि मला बाप्तिस्मा घ्यायाचा आहे,
आणि तो अटोपेपर्यंत मी कसा पेंचलों आहें!
५१ मी पृथ्वीवर शांति करायास आलों असें तुह्मास
वाटतें काय? मी तुह्मास ह्मणतों, असें नाहीं, तर
फूट. ५२ कां कीं आतांपासून एका घरांत पांच,
दोघांवर तिघे व तिघांवर दोघे फुटलेले असे
होतील. ५३ पुत्रावर बाप व बापावर पुत्र, कन्ये-
वर आई व आईवर कन्या, सासू आपल्या सुनेवर
व सून आपल्या सासूवर, असे ते फुटतील.
५४ अणखी तो समुदायांस ह्मणाला, तुह्मी
ढग पश्चिमेकडून चढतांना पाहतां तेव्हांच ह्मणतां,
पाऊस येतो, आणि तसें होतें. ५५ आणि दक्षिण
वारा सुटतो तेव्हां तुह्मी ह्मणतां, ऊन पडेल,
आणि तसें होतें. ५६ अहो ढोंगी, पृथ्वीचीं व
आकाशाचीं लक्षणें पारखून जाणायास तुह्मास येतें,
तर ही वेळ तुह्मी कसी जाणत नाहीं? ५७
अणखी जें यथार्थ तें तुह्मी आपणच कां ठरवीत
नाहीं? ५८ तूं आपल्या वाद्याच्या संगती अधि-
काऱ्याकडे जासील तेव्हां वाटेवर त्यापासून सुटा-
यास यत्न कर, नाहीं तर कदाचित तो तुला
न्यायाधीशाकडे ओढून नेईल, आणि न्यायाधीश

तुला शिपायाच्या हातीं देईल, ...
तुला बंदिशाळेंत घालील. ५९ ...
तूं शेवटली दमडी देखील फेडणार ...
सुटणारच नाहींस.

अध्याय १३.

आणि त्या वेळेस तेथें कित्येक ...
गालील्यांचें रक्त पिलातसाने ...
मिळविलें त्यांविषयीं त्याला सांगितलें.
येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, ...
असी दुर्दशा झाली, यावरून ते ...
पापी होते असें तुह्मास वाटतें काय?
तुह्मास सांगतों, नव्हते, परंतु जर तुह्मी ...
करीत नाहीं तर त्याप्रमाणें तुह्मी सर्व ...
४ किंवा ज्या अठरांवर शिलोहांतील ...
त्यावरून त्यांचा घात झाला, ते ...
सर्व राहणाऱ्या माणसांपेक्षां अन्यायी ...
तुह्मास वाटतें काय? ५ मी तुह्मास ...
नव्हते, परंतु जर तुह्मी पश्चात्ताप करीत ...
त्याप्रमाणें तुह्मी सर्व नाश पावाल. ६ ...
हा दाखला सांगितला, कोणीएकाच्या ...
ळ्यांत अंजिराचें झाड लाविलेलें होतें, ...
फळ पाहायास आला परंतु त्याला मिळालें ...
७ तेव्हां त्याने माळ्याला ह्मटलें, पाहा, ...
या अंजिरावर फळ पाहायास येतों ...
मिळत नाहीं, तें तोडून टाक; उगीच भूमीला ...
कां असावा? ८ तेव्हां त्याने त्याला उत्तर ...
कीं, महाराज, यंदाहि तें असूं दे, ह्मणजे मी ...
च्या भोंवतें खणीन व खत घालीन; ९ ...
दिल्हें तर बरें, नाहीं तर मग तें तोडून टाकावें.
१० आणि तो शाब्बाथ दिवसीं एका ...
नांत उपदेश करीत होता. ११ तेव्हां पाहा, ...
अठरा वर्षें विकाराचा आत्मा होता असी ...
तेथें होती, आणि ती कुबडी असतां तिला ...
उभें राहवत नव्हतें. १२ तेव्हां येशूने ...
पाहून बोलाविलें व तिला ह्मटलें, बाई, तूं आपल्या ...
विकारापासून सुटली आहेस. १३ मग ...
तिजवर हात ठेवितांनाच ती नीट झाली, आणि ...
देवाला गौरवूं लागली. १४ परंतु येशूने शा-
ब्बाथ दिवसीं बरें केलें यामुळें सभेचा अधि-
कारी रागें भरून समुदायाला बोलला, ...
काम करावें असे साहा दिवस आहेत, तर ...

होत जा, परंतु शाब्बाथ दिवसीं येऊं
यावरून प्रभूने त्याला उत्तर दिल्हें
ंग्या, तुह्मामधील प्रत्येक जण आपल्या
वा गाढवाला शाब्बाथ दिवसीं गव्हाणीं-
पाजायास नेतो कीं नाहीं? १६ आणि
हामाची कन्या असता जिला सैतानाने
बांधिलें आहे, तिला या बंधनापासून
दिवसीं सोडायाचें नव्हतें काय? १७
लत असतां त्याचे सर्व अडविणारे लाजले,
ने जे चमत्कार केले त्या सर्वांवरून सर्व
आनंद करूं लागला.
मग तो बोलला, देवाचें राज्य कशासा-
हे, आणि मी तें कशासारिखें लेखूं? १९
या दाण्यासारिखें आहे; तो एका माण-
ऊन आपल्या मळ्यांत टाकिला, मग तो
असें मोठें झाड झालें कीं, आकाशांतील
याच्या फांद्यांमध्यें वस्तीस राहिलीं. २०
तो फिरून बोलला, मी देवाचें राज्य कशा-
लेखूं? २१ तें खमीरासारिखें आहे,
कोने घेऊन तीन शेर पिठामध्यें लपविलें,
गून गेलें तोंपर्यंत.
२ तेव्हां तो उपदेश करीत नगरोनगरीं व
वीं जाऊन यरूशलेमाकडे चालला. २३
कोणीएकाने त्याला ह्मटलें, हे प्रभू, जे तारण
त ते थोडके कीं काय? २४ तेव्हां तो
ह्मणाला, अरुंद दरवाज्याने आंत जायाला
लगट करा, कारण कीं मी तुह्मास सांगतों,
आंत जायास झटतील परंतु त्यांच्याने जाव-
नाहीं. २५ घरधन्याने उठून दार बंद
वर तुह्मी बाहेर उभे राहून व दारावर
न बोलूं लागाल कीं, हे प्रभू प्रभू, आह्मासाठीं
ड; मग तो तुह्मास उत्तर देईल कीं, तुह्मी
ले आहां, मी तुह्मास ओळखत नाहीं; २६
हां तुह्मी बोलूं लागाल, आह्मी तुझ्या देखतां
लें पिलें, आणि त्वां आमच्या रस्त्यांमध्यें उप-
केला आहे; २७ परंतु तो बोलेल, मी
ह्मास सांगतों, तुह्मी कोठले आहां मी तुह्मास
ओळखत नाहीं; अहो सर्व अन्याय करणारे, मज-
सून दूर व्हा. २८ आब्राहाम व इझाक व
याकोब व सर्व भविष्यवादी यांस देवाच्या राज्यांत
सतांना आणि आपणांस बाहेर टाकलेले, असें
ाल तेव्हां रडणें व दांतखाणें होईल. २९ आणि
पूर्वेकडून व पश्चिमेकडून व उत्तरेकडून व दक्षिणे-
कडून येतील, आणि देवाच्या राज्यांत बसतील.
३० आणि पाहा, शेवटले ते पहिले होतील असे
आहेत, आणि पहिले ते शेवटले होतील असे
आहेत.

३१ त्याच दिवसीं कित्येक परोशी येऊन त्या-
ला ह्मणाले, एथून निघून जा, कां कीं हेरोद तुला
जिवें मारायास पाहतो. ३२ त्याने त्यांस
ह्मटलें, जाऊन त्या कोंकडाला सांगा, पाहा, आज
व उद्यां मी भुतें काढितों, व रोग्यांस बरें करितों,
मग परवां पूर्ण होईन. ३३ तरी आज व उद्यां
व परवां मला फिरलें पाहिजे, कां कीं यरूशलेमा-
बाहेर भविष्यवाद्याने नाश पावावा असें होतच नाहीं.
३४ हे यरूशलेमा, यरूशलेमा, भविष्यवाद्यांचा
घात करणाऱ्या व आपल्याकडे पाठविलेल्यांस
धोंडमार करणाऱ्या, जसें कोंबडी आपलीं पिलें
पंखाखालीं एकवट करिती तसें तुझ्या लेंकरांस एक-
वट करायास कितीदां माझी इच्छा होती, पण
तुमची इच्छा नव्हती. ३५ पाहा, तुमचें घर
तुह्माकरितां ओसाड पडलें आहे, आणि मी
तुह्मास खचीत सांगतों कीं, प्रभूच्या नांवाने येणारा
तो सुवंदित, असें ह्मणाल, ती वेळ येईपर्यंत तुह्मी
मला पाहणारच नाहीं.

## अध्याय १४.

आणि असें झालें कीं, तो शाब्बाथ दिवसीं परो-
श्यांतील कोणीएका अधिकाऱ्याच्या घरीं जेवा-
यास गेला, तेव्हां ते त्याच्या जपणीस बसत होते.
२ आणि पाहा, त्याच्या समोर कोणी जलोदरी
माणूस होता. ३ येशूने शास्त्र्यांस व परोश्यांस
उत्तर दिल्हें कीं, शाब्बाथ दिवसीं बरें करणें योग्य
आहे काय? ४ तेव्हां ते उगेच राहिले. मग
त्याने त्याला घेऊन बरें केलें आणि जाऊं दिल्हें.
५ मग त्यांस उत्तर दिल्हें, तुह्मामधील कोणाचें
गाढव किंवा बैल खांचेंत पडला तर तो शाब्बाथ
दिवसीं त्याला लागलाच बाहेर काढणार नाहीं
काय? ६ तेव्हां त्यांच्याने त्याला त्या गोष्टीचें
उत्तर देववेना.

७ आणि बोलाविले होते त्यांनी मुख्य आसनें
कसकशीं निवडून घेतलीं, हें पाहून तो त्यांस दाखला
देऊन ह्मणाला; ८ कोणी तुला लग्नास बोलाविलें
तेव्हां मुख्य आसनीं बसूं नको, कारण कीं तुझ्यहून

कारभारी कोण आहे? ४३ ज्या चाकराला
त्याचा धनी येऊन तसें करितांना पाहील तो
धन्य. ४४ मी तुह्मास खचीत सांगतों कीं,
त्याला तो आपल्या सर्व मालमत्तेवर ठेवील. ४५
परंतु माझा धनी येण्यास उशीर करितो असें तो
चाकर आपल्या अंतःकरणांत ह्मणाला, आणि चाक-
रांस व चाकरिणींस मारूं, व खाऊं पिऊं व झिंगूं
लागला, ४६ तर ज्या दिवसीं तो वाट पाहत
नाहीं त्या दिवसीं, आणि जी घटका तो जाणत
नाहीं त्या घटकेंत त्या चाकराचा धनी येईल,
आणि त्याला कापून टाकील, आणि अविश्वास्यां-
बरोबर त्याला वांटा देईल. ४७ आणि जो
चाकर आपल्या धन्याची इच्छा जाणून तयार
झाला नाहीं आणि त्याच्या इच्छेप्रमाणें वर्त्तला
नाहीं, तो बहुत फटके खाईल. ४८ परंतु ज्याने
न जाणून फटके मारण्याजोगीं कामें केलीं तो थोडके
खाईल. कां कीं ज्या कोणाला बहुत दिल्हें आहे
त्यापासीं बहुत मागतील, आणि ज्याच्या जवळ
बहुत ठेविलें त्यापासीं अधिक मागतील.

४९ मी पृथ्वीवर आग लावायास आलों आहें,
आणि ती लवकर पेटावी ह्मणून मी किती इच्छितों
बरें! ५० आणि मला बाप्तिस्मा घ्यायाचा आहे,
आणि तो अटोपेपर्यंत मी कसा पेंचलों आहें!
५१ मी पृथ्वीवर शांति करायास आलों असें तुह्मास
वाटतें काय? मी तुह्मास ह्मणतों, असें नाहीं, तर
फूट. ५२ कां कीं आतांपासून एका घरांत पांच,
दोघांवर तिघे व तिघांवर दोघे फुटलेले असे
होतील. ५३ पुत्रावर बाप व बापावर पुत्र, कन्ये-
वर आई व आईवर कन्या, सासू आपल्या सुनेवर
व सून आपल्या सासूवर, असे ते फुटतील.

५४ अणखी तो समुदायांस ह्मणाला, तुह्मी
ढग पश्चिमेकडून चढतांना पाहतां तेव्हांच ह्मणतां,
पाऊस येतो, आणि तसें होतें. ५५ आणि दक्षिण
वारा सुटतो तेव्हां तुह्मी ह्मणतां, ऊन पडेल,
आणि तसें होतें. ५६ अहो ढोंगी, पृथ्वीचीं व
आकाशाचीं लक्षणें पारखून जाणायास तुह्मास येतें,
तर ही वेळ तुह्मी कसी जाणत नाहीं? ५७
अणखी जें यथार्थ तें तुह्मी आपणच कां ठरवीत
नाहीं? ५८ तूं आपल्या वाद्याच्या संगती अधि-
काऱ्याकडे जासील तेव्हां वाटेवर त्यापासून सुटा-
यास यत्न कर, नाहीं तर कदाचित तो तुला
न्यायाधीशाकडे ओढून नेईल, आणि न्यायाधीश
तुला शिपायाच्या हातीं देईल, आणि शिपायी
तुला बंदिशाळेंत घालील. ५९ मी तुला सांगतों,
तूं शेवटली दमडी देखील फेडसील तोंपर्यंत तेथून
सुटणारच नाहींस.

## अध्याय १३.

आणि त्या वेळेस तेथें कित्येक होते त्यांनी ज्या
गालील्यांचें रक्त पिलातसाने त्यांच्या यज्ञांसीं
मिळविलें त्यांविषयीं त्याला सांगितलें. २ तेव्हां
येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, या गालील्यांची
असी दुर्दशा झाली, यावरून ते सर्व गालील्यांहून
पापी होते असें तुह्मास वाटतें काय? ३ मी
तुह्मास सांगतों, नव्हते, परंतु जर तुह्मी पश्चात्ताप
करीत नाहीं तर त्याप्रमाणें तुह्मी सर्व नाश पावाल.
४ किंवा ज्या अठरांवर शिलोहांतील बुरूज पड-
ल्यावरून त्यांचा घात झाला, ते यरूशलेमांत
सर्व राहणाऱ्या माणसांपेक्षां अन्यायी होते, असें
तुह्मास वाटतें काय? ५ मी तुह्मास सांगतों,
नव्हते, परंतु जर तुह्मी पश्चात्ताप करीत नाहीं तर
त्याप्रमाणें तुह्मी सर्व नाश पावाल. ६ तेव्हां त्याने
हा दाखला सांगितला, कोणीएकाच्या द्राक्षम-
ळ्यांत अंजिराचें झाड लाविलेलें होतें, तो त्यावर
फळ पाहायास आला परंतु त्याला मिळालें नाहीं.
७ तेव्हां त्याने माळ्याला ह्मटलें, पाहा, तीन वर्षे
या अंजिरावर फळ पाहायास येतों परंतु मला
मिळत नाहीं, तें तोडून टाक; उगीच भूमीला भार
कां असावा? ८ तेव्हां त्याने त्याला उत्तर दिल्हें
कीं, महाराज, यंदाहि तें असूं दे, ह्मणजे मी त्या-
च्या भोवतें खणीन व खत घालीन; ९ मग फळ
दिल्हें तर बरें, नाहीं तर मग तें तोडून टाकावें.

१० आणि तो शाब्बाथ दिवसीं एका सभास्था-
नांत उपदेश करीत होता. ११ तेव्हां पाहा, जिला
अठरा वर्षे विकाराचा आत्मा होता असी बायको
तेथें होती, आणि ती कुबडी असतां तिला अगदीं
उभें राहवत नव्हतें. १२ तेव्हां येशूने तिला
पाहून बोलाविलें व तिला ह्मटलें, बाई, तूं आपल्या
विकारापासून सुटली आहेस. १३ मग त्याने
तिजवर हात ठेवितांनाच ती नीट झाली, आणि
देवाला गौरवूं लागली. १४ परंतु येशूने शा-
ब्बाथ दिवसीं बरें केलें यामुळें सभेचा अधि-
कारी रागें भरून समुदायाला बोलला, ज्यांत
काम करावें असे साहा दिवस आहेत, तर त्यां

येऊन बरे होत जा, परंतु शाब्बाथ दिवसीं येऊं
नका. १५ यावरून प्रभूने त्याला उत्तर दिल्हें
कीं, अरे ढोंग्या, तुह्मामधील प्रत्येक जण आपल्या
बैलाला किंवा गाढवाला शाब्बाथ दिवसीं गव्हाणीं-
तून सोडून पाजायास नेतो कीं नाहीं? १६ आणि
ही आब्राहामाची कन्या असतां जिला सैतानाने
अठरा वर्षे बांधिलें आहे, तिला या बंधनापासून
शाब्बाथ दिवसीं सोडायाचें नव्हतें काय? १७
तो हें बोलत असतां त्याचे सर्व अडविणारे लाजले,
आणि त्याने जे चमत्कार केले त्या सर्वांवरून सर्व
समुदाय आनंद करूं लागला.

१८ मग तो बोलला, देवाचें राज्य कशासा-
रिखें आहे, आणि मी तें कशासारिखें लेखूं? १९
मोहरीच्या दाण्यासारिखें आहे; तो एका माण-
साने घेऊन आपल्या मळ्यांत टाकिला, मग तो
वाढून असें मोठें झाड झाला कीं, आकाशांतील
पांखरें त्याच्या फांद्यांमध्यें वस्तीस राहिलीं. २०
आणि तो फिरून बोलला, मी देवाचें राज्य कशा-
सारिखें लेखूं? २१ तें खमीरासारिखें आहे,
तें बायकोने घेऊन तीन शेर पिठामध्यें लपविलें,
सर्व फुगून गेलें तोंपर्यंत.

२२ तेव्हां तो उपदेश करीत नगरोनगरीं व
गांवोगांवीं जाऊन यरूशलेमाकडे चालला. २३
मग कोणीएकाने त्याला ह्मटलें, हे प्रभू, जे तारण
पावतात ते थोडके कीं काय? २४ तेव्हां तो
त्यांस ह्मणाला, अरुंद दरवाज्याने आंत जायाला
मोठा लगट करा, कारण कीं मी तुह्मास सांगतों,
बहुत आंत जायास झटतील परंतु त्यांच्याने जाव-
वणार नाहीं. २५ घरधन्याने उठून दार बंद
केल्यावर तुह्मी बाहेर उभे राहून व दारावर
ठोकून बोलूं लागाल कीं, हे प्रभू प्रभू, आह्मासाठीं
उघड; मग तो तुह्मास उत्तर देईल कीं, तुह्मी
कोठले आहां, मी तुह्मास ओळखत नाहीं; २६
तेव्हां तुह्मी बोलूं लागाल, आह्मी तुझ्या देखतां
खालें पिलें, आणि त्वां आमच्या रस्त्यांमध्यें उप-
देश केला आहे; २७ परंतु तो बोलेल, मी
तुह्मास सांगतों, तुह्मी कोठले आहां मी तुह्मास
ओळखत नाहीं; अहो सर्व अन्याय करणारे, मज-
पासून दूर व्हा. २८ आब्राहाम व इझाक व
याकोब व सर्व भविष्यवादी यांस देवाच्या राज्यांत
असतांना आणि आपणांस बाहेर टाकलेले, असें
पाहाल तेव्हां रडणें व दांतखाणें होईल. २९ आणि
पूर्वेकडून व पश्चिमेकडून व उत्तरेकडून व दक्षिणे-
कडून येतील, आणि देवाच्या राज्यांत बसतील.
३० आणि पाहा, शेवटले ते पहिले होतील असे
आहेत, आणि पहिले ते शेवटले होतील असे
आहेत.

३१ त्याच दिवसीं कित्येक परोशी येऊन त्या-
ला ह्मणाले, एथून निघून जा, कां कीं हेरोद तुला
जिवें मारायास पाहतो. ३२ त्याने त्यांस
ह्मटलें, जाऊन त्या कोंकडाला सांगा, पाहा, आज
व उद्यां मी भुतें काढितों, व रोग्यांस बरें करितों,
मग परवां पूर्ण होईन. ३३ तरी आज व उद्यां
व परवां मला फिरलें पाहिजे, कां कीं यरूशलेमा-
बाहेर भविष्यवाद्याने नाश पावावा असें होतच नाहीं.
३४ हे यरूशलेमा, यरूशलेमा, भविष्यवाद्यांचा
घात करणाऱ्या व आपल्याकडे पाठविलेल्यांस
धोंडमार करणाऱ्या, जसें कोंबडी आपलीं पिलें
पंखाखालीं एकवट करिती तसें तुझ्या लेंकरांस एक-
वट करायास कितीदां माझी इच्छा होती, पण
तुमची इच्छा नव्हती. ३५ पाहा, तुमचें घर
तुह्माकरितां ओसाड पडलें आहे, आणि मी
तुह्मास खचीत सांगतों कीं, प्रभूच्या नांवाने येणारा
तो सुवंदित, असें ह्मणाल, ती वेळ येईपर्यंत तुह्मी
मला पाहणारच नाहीं.

## अध्याय १४.

आणि असें झालें कीं, तो शाब्बाथ दिवसीं परो-
श्यांतील कोणीएका अधिकाऱ्याच्या घरीं जेवा-
यास गेला, तेव्हां ते त्याच्या जपणीस बसत होते.
२ आणि पाहा, त्याच्या समोर कोणी जलोदरी
माणूस होता. ३ येशूने शास्त्र्यांस व परोश्यांस
उत्तर दिल्हें कीं, शाब्बाथ दिवसीं बरें करणें योग्य
आहे काय? ४ तेव्हां ते उगेच राहिले. मग
त्याने त्याला घेऊन बरें केलें आणि जाऊं दिल्हें.
५ मग त्यांस उत्तर दिल्हें, तुह्मामधील कोणाचें
गाढव किंवा बैल खांचेंत पडला तर तो शाब्बाथ
दिवसीं त्याला लागलाच बाहेर काढणार नाहीं
काय? ६ तेव्हां त्यांच्याने त्याला त्या गोष्टीचें
उत्तर देववेना.

७ आणि बोलाविले होते त्यांनी मुख्य आसनें
कसकशीं निवडून घेतलीं, हें पाहून तो त्यांस दाखला
देऊन ह्मणाला; ८ कोणी तुला लग्नास बोलाविलें
तेव्हां मुख्य आसनीं बसूं नको, कारण कीं तुजहून

मोठ्या पदवीचा कोणी त्याने बोलाविला असेल; ९ मग ज्याने तुला व त्याला बोलाविलें तो येऊन तुला ह्मणेल, याला जागा दे; तेव्हां तूं लाजेने शेवटल्या जाग्यावर जाऊन बससील. १० तर तूं बोलाविलेला असशील तेव्हां शेवटल्या जाग्यावर जाऊन बैस, ह्मणजे ज्याने तुला बोलाविलें तो येईल तेव्हां तुला ह्मणेल, मित्रा, वर येऊन बैस; नंतर तुझ्या संगतीं बसणाऱ्यांसमोर तुझा मान होईल. ११ कां कीं जो कोणी आपणाला उंच करील तो नीच होईल, आणि जो आपणाला नीच करील तो उंच होईल. १२ मग ज्याने त्याला बोलाविलें होतें त्यालाहि तो ह्मणाला, जेव्हां दुपारची किंवा संध्याकाळची जेवणावळ करिसील तेव्हां तूं आपल्या मित्रांस किंवा आपल्या भावांस किंवा आपल्या नातलगांस किंवा धनवान शेजाऱ्यांस बोलावूं नको, बोलाविलें तर कदाचित् तेहि तुला फिरून बोलावितील आणि तुझी फेड होईल. १३ तर तूं जेवणावळ करिसील तेव्हां दरिद्र्यांस व्यंगांस लंगड्यांस अंधळ्यांस बोलाव, ह्मणजे तूं धन्य होसील. १४ कां कीं तुझी फेड करायास त्यांपासीं कांहीं नाहीं, कां न्यायींच्या पुन्हा उठण्याच्या वेळेस तुझी फेड होईल. १५ मग संगतीं बसणाऱ्यांतील कोणीएकाने या गोष्टी ऐकून त्याला ह्मटलें, जो देवाच्या राज्यांत भाकर खाईल तो धन्य. १६ तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, कोणीएका माणसाने मोठी जेवणावळ केली, आणि बहुतांस आमंत्रण केलें. १७ मग जेवणाच्या वेळेस, आतां सर्व तयार झालें आहे, यास्तव या, असें आमंत्रितांस सांगायाला त्याने आपला चाकर पाठविला. १८ तेव्हां सगळे एकसारिखे निमित्त सांगूं लागले; पहिला त्याला ह्मणाला, म्यां शेत विकत घेतलें आहे, आणि तें मला जाऊन पाहिलें पाहिजे, मी तुला विनंती करितों, मला क्षमा कर. १९ आणि दुसरा बोलला, म्यां बैलांच्या पांच जोड्या विकत घेतल्या आहेत, आणि मी त्यांची परीक्षा करायाला जातों, मी तुला विनंती करितों, मला क्षमा कर. २० आणि दुसरा एक बोलला, म्यां बायको केली आहे, या कारणास्तव माझें येणें होत नाहीं. २१ तेव्हां त्या चाकराने येऊन आपल्या धन्याला हें वर्त्तमान सांगितलें; तेव्हां घरधन्याने रागें भरून आपल्या चाकराला सांगितलें, नगराच्या मार्गांत व गल्ल्यांत लवकर जा, आणि दरिद्र्यांस व व्यंगांस व लंगड्यांस व अंधळ्यांस इकडे आण. २२ नंतर तो चाकर बोलला, महाराज, तुझ्या आज्ञेप्रमाणें केलें तरी अद्याप जागा आहे. २३ मग धनी चाकराला ह्मणाला, रस्त्यांमध्यें व कुंपणांमध्यें जाऊन आग्रह करून आण, माझें घर भरावें ह्मणून; २४ कारण मी तुह्मांस सांगतों कीं, त्या आमंत्रित माणसांतून एकहि माझ्या जेवणांपैकीं कांहीं चाखणार नाहीं.

२५ आणि त्याच्या बरोबर बहुत समुदाय चालले, तेव्हां तो मुरडून त्यांस ह्मणाला, २६ जर कोणी मजकडे येईल, आणि आपला बाप व आई व बायको व लेंकरें व भाऊ व बहिणी यांचा अणखी आपल्या जीवाचाहि द्वेष करीत नाहीं तर त्याच्याने माझा शिष्य होवत नाहीं. २७ आणि जो कोणी आपला खांब वागवून माझ्या मागें येत नाहीं त्याच्याने माझा शिष्य होवत नाहीं. २८ कां तर तुह्मांमधील असा कोण आहे कीं बुरूज बांधायाची इच्छा असतां संपविण्यापुरतें आपल्या जवळ आहे कीं काय, असें पहिल्याने बसून खर्चाचा हिशोब करीत नाहीं? २९ नाहीं तर कदाचित पाया घातल्यावर त्याच्याने संपववत नसलें, तर सर्व पाहणारे त्याचा असा उपहास करूं लागतील कीं, ३० हा माणूस बांधूं लागला परंतु त्याच्याने संपववेना. ३१ अथवा असा राजा कोण आहे कीं, दुसऱ्या राजासीं लढाई करायास जात असतां पहिल्याने बसून विचार करीत नाहीं कीं, जो वीस हजार घेऊन मजवर येतो त्यासीं माझ्याने दाहा हजार घेऊन भिडवेल कीं काय? ३२ जर नाहीं, तर तो दूर आहे इतक्यांत हा वकिलांस पाठवून सल्ला करण्याचें बोलणें लावितो. ३३ तर त्याप्रमाणें तुह्मांमधील जो आपलें अवघें सोडून देत नाहीं त्याच्याने माझा शिष्य होवत नाहीं. ३४ मीठ चांगलें आहे, परंतु मिठाचा खारटपणा गेला तर तें कशाने खारट होईल? ३५ तें जमिनीला किंवा उकरड्याला उपयोगी नाहीं, तें बाहेर टाकितात. ज्याला ऐकायास कान आहेत तो ऐको.

## अध्याय १५.

मग सर्व जकातदार व पापी त्याचें ऐकायास त्याच्या जवळ आले. २ तेव्हां परोशी व शास्त्री यांनी कुरकूर केली कीं, हा पाप्यांचा अंगीकार करितो आणि त्यांबरोबर खातो. ३ मग त्याने

त्यांस हा दाखला दिल्हा कीं, ४ तुह्मामधील
असा माणूस कोण आहे कीं, त्याच्या जवळ शंभर
मेंढरें असतां त्यांतून एक हरपलें तर तीं नव्याण्णव
रानांत सोडून हरपलेलें सांपडे तोंपर्यंत त्याच्या
शोधास जात नाहीं? ५ आणि सांपडल्यावर
तो आनंद करून तें आपल्या खांद्यावर घेतो;
६ मग घरीं येऊन मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून
त्यांस ह्मणतो, माझें हरपलेलें मेंढरूं सांपडलें,
यास्तव माझ्या संगतीं आनंद करा. ७ मी तुह्मास
सांगतों कीं, ज्यांस पश्चात्तापाची गरज नाहीं अशा
नव्याण्णव नीतिमानांपेक्षां पश्चात्ताप करणाऱ्या एका
पाप्याविषयीं आकाशामध्यें अधिक आनंद होईल.
८ किंवा असी बायको कोण आहे कीं, आपल्या-
जवळ दाहा पावल्या असतां त्यांतून एक पावली
हरवली तर दिवा लावून व घर झाडून ती सांपडे
तोंपर्यंत मन लावून शोध करीत नाहीं? ९ आणि
सांपडल्यावर ती मित्रांस व शेजाऱ्यांस बोलावून
ह्मणती, जी पावली मजपासून हरवली ती मला
सांपडली, यास्तव माझ्या संगतीं आनंद करा. १०
तसें मी तुह्मास सांगतों, पश्चात्ताप करणाऱ्या एका
पाप्याविषयीं देवाच्या दुतांच्या समोर आनंद होतो.
११ आणखी तो बोलला, कोणीएका माणसाला
दोन पुत्र होते. १२ त्यांतील धाकटा बापाला ह्मणाला,
बापा, जो मालमत्तेचा वांटा मला यायाचा तो दे.
मग त्याने त्यांस संपत्ति वांटून दिल्ही. १३ मग
थोडक्या दिवसानीं धाकटा पुत्र सर्व जमा करून
दूर देशांत गेला, आणि तेथें उधळेपणाने वागून
आपली संपत्ति उडविली. १४ मग त्याने अवघें
खर्चिल्यावर त्या देशांत मोठा दुकाळ पडला, त्या-
मुळें त्याला अडचण पडूं लागली; १५ तेव्हां
तो त्या देशांतील एका ग्रहस्थाजवळ जाऊन राहिला,
त्याने तर त्याला डुकरें चारायास आपल्या शेतांत
पाठविलें. १६ तेव्हां डुकरें जीं टरफलें खात
असत त्यांवर त्याने आपलें पोट भरावें असें त्याला
वाटलें, आणि कोणी त्याला कांहीं दिल्हें नाहीं.
१७ नंतर तो शुद्धीवर येऊन ह्मणाला, माझ्या
बापाच्या किती मोलकऱ्यांस भरपूर भाकर आहे?
आणि मी भुकेने मरतों. १८ मी उठून आपल्या
बापाकडे जाईन व त्याला ह्मणेन, हे बापा, म्या
आकाशाच्या विरुद्ध आणि तुझ्या समोर पाप केलें
आहे; १९ आतांपासून तुझा पुत्र ह्मणवा-
यास मी योग्य नाहीं, आपल्या एका मोलकऱ्या-
प्रमाणें मला ठेव. २० नंतर तो उठून आपल्या
बापाकडे गेला, तेव्हां तो दूर आहे इतक्यांत त्याचा
बाप त्याला पाहून कळवळला, आणि त्याने धावून
त्याच्या गळ्यांत मिठी घातली, आणि त्याचें चुंबन
घेतलें. २१ मग पुत्र त्याला ह्मणाला, बापा,
आकाशाच्या विरुद्ध आणि तुझ्या समोर म्या पाप
केलें आहे, आणि आतांपासून तुझा पुत्र ह्मणवा-
यास मी योग्य नाहीं. २२ परंतु बापाने आप-
ल्या चाकरांस सांगितलें, उत्तम झगा आणून याला
घाला, आणि याच्या हातांत अंगठी व पायांत जोडे
घाला. २३ मग माजलेलें वासरूं आणून मारा,
आणि आपण खाऊन हर्ष करूं; २४ कां कीं
हा माझा पुत्र मेला होता, तो फिरून जिवंत
झाला, आणि हरपला होता, तो सांपडला आहे.
तेव्हां ते हर्ष करूं लागले. २५ त्या वेळेस
त्याचा वडील पुत्र शेतांत होता, मग तो येऊन
घराजवळ पोहंचल्यावर त्याने वाद्य व नाच ऐकिले.
२६ तेव्हां चाकरांतील एकाला बोलावून त्याने
विचारिलें, हें काय आहे? २७ त्याने त्याला
सांगितलें कीं, तुझा भाऊ आला आहे, आणि तो
तुझ्या बापाला सुखरूप मिळाला, यास्तव त्याने
माजलेलें वासरूं मारिलें आहे. २८ तेव्हां तो
रागें भरून आंत जाईना, यास्तव त्याचा बाप
बाहेर येऊन त्याला समजावूं लागला. २९ परंतु
त्याने बापाला उत्तर दिल्हें कीं, पाहा, मी इतकीं
वर्षे तुझी चाकरी करितों, आणि तुझी आज्ञा म्या
कधींहि मोडिली नाहीं; तरी म्या आपल्या मित्रां-
बरोबर खुशाली करावी ह्मणून त्वां मला कधीं करडूंहि
दिल्हें नाहीं. ३० आणि ज्याने तुझी संपत्ति
कसबिणींबरोबर खाऊन टाकिली तो हा तुझा पुत्र
आला, तेव्हां त्वां त्यासाठीं माजलेलें वासरूं
मारिलें आहे. ३१ तेव्हां त्याने त्याला ह्मटलें,
मुला, तूं सर्वदा माझ्या बरोबर आहेस, आणि
माझी सर्व मालमत्ता तुझीच आहे. ३२ परंतु
हर्ष व आनंद करावा हें योग्य होतें, कारण कीं हा
तुझा भाऊ मेला होता, तो फिरून जिवंत झाला
आहे, आणि हरपला होता, तो सांपडला आहे.

## अध्याय १६.

आणखी त्याने आपल्या शिष्यांस ह्मटलें, कोणी
धनवान माणूस होता, त्याला कारभारी होता,
आणि हा तुझें द्रव्य उडवितो असा त्याजवरचा

आरोप धन्याजवळ आला. २ तेव्हां त्याने
त्याला बोलावून ह्मटलें, तुजविषयीं ऐकतों हें काय?
तुझ्या कारभाराचा हिशोब दे, कारण कीं आतां-
पासून तुला कारभार करायाचा नाहीं. ३ तेव्हां
त्या कारभाऱ्याने आपल्या मनांत ह्मटलें, माझा
धनी मजपासून कारभार काढितो, तर मी काय
करूं? खणायास मला शक्ति नाहीं, भीक मागायास
मला लाज वाटती. ४ तो मला कारभारावरून
काढील तेव्हां लोकानी आपल्या घरांत मला घ्यावें
ह्मणून म्या काय करावें हें मला सुचलें. ५ मग
त्याने आपल्या धन्याच्या सर्व देणेकऱ्यांस बोलावून
पहिल्याला ह्मटलें, माझ्या धन्याचें तुला किती देणें
आहे? ६ तेव्हां तो बोलला, शंभर मण तेल.
तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, तूं आपला लेख घे व
लवकर बसून पन्नास मांड. ७ नंतर त्याने दुस-
ऱ्याला ह्मटलें, तुला किती देणें आहे? तेव्हां तो
बोलला, शंभर खंड्या गहूं. मग तो त्याला ह्मणाला,
तूं आपला लेख घे व ऐंशी मांड. ८ आणि
अन्यायी कारभाऱ्याने शाहाणपण केलें यावरून
धन्याने त्याला वाखाणिलें; कां कीं या जगाचे पुत्र
आपल्या व्यवहारामध्यें प्रकाशाच्या पुत्रांपेक्षां
शाहाणे असतात. ९ अणखी मी तुह्मास सांगतों,
अन्यायाच्या मामोनाकडून तुह्मी आपल्यांसाठीं
मित्र जोडा; यासाठीं कीं तुह्मी कुंठाल तेव्हां
त्यानी तुह्मास सर्वकाळच्या वस्त्यांमध्यें घ्यावें. १०
जो थोडक्याविषयीं विश्वासू तो बहुताविषयींहि
विश्वासू आहे, आणि जो थोडक्याविषयीं अन्यायी
तो बहुताविषयींहि अन्यायी आहे. ११ यास्तव
तुह्मी अन्यायाच्या मामोनाविषयीं विश्वासू न झालां
तर जें खरें तें तुह्माला कोण सोंपून देईल? १२
आणि जें दुसऱ्याचें त्याविषयीं तुह्मी विश्वासू न
झालां तर जें तुमचें तें तुह्मास कोण देईल? १३
एका चाकराला दोन धन्यांची चाकरी करवत नाहीं,
कारण कीं तो एकाचा द्वेष करील आणि दुसऱ्यावर
प्रीति करील, अथवा एकाच्या चाकरीस जपेल आणि
दुसऱ्याची उपेक्षा करील. तुमच्याने देवाची आणि
मामोनाची सेवा करवत नाहीं.

१४ तेव्हां हें सर्व ऐकून जे परोशी धनलोभी
होते त्यानी त्याचा उपहास केला. १५ मग त्याने
त्यांस ह्मटलें, तुह्मी आपणांस माणसांसमोर
न्यायी ठरवून घेतां खरें, परंतु देव तुमचीं अंतःकरणें
जाणतो, कां कीं माणसांमध्यें जें उंच तें देवाच्या
दिसण्यांत अमंगळ. १६ नेमशास्त्र व भवि-
ष्यवादी योहानापर्यंत होते, तेव्हांपासून देवा-
च्या राज्याचें शुभवर्त्तमान सांगतात, आणि सर्व
त्यांत बळाने जातात. १७ नेमशास्त्राचा एक
फांटा जाण्यापेक्षां आकाश व पृथ्वी टळून जाणें
हें सोपें आहे. १८ जो कोणी आपली बायको
टाकून दुसरीसीं लग्न करितो तो व्यभिचार करितो,
आणि नवऱ्याने टाकलेल्या बायकोसीं जो कोणी
लग्न करितो तो व्यभिचार करितो.

१९ कोणीएक धनवान माणूस होता, तो जांबळ्या
रंगाचीं व फार बारीक वस्त्रें घालीत असे, आणि
प्रतिदिवसीं डौलाने खुशाली करीत असे. २०
आणि लाजारस नामें कोणीएक दरिद्री होता, त्याला
बहुत फोड असतां तो त्याच्या दरवाज्याजवळ
पडला होता; २१ आणि त्या धनवानाच्या मेजा-
वरून जो चूर पडे त्यावर आपलें पोट भरावें, असी
त्याची इच्छा होती; अणखी कुत्रींहि येऊन त्याचे
फोड चाटीत असत. २२ नंतर असें झालें कीं,
तो दरिद्री मेला, आणि दुतानी त्याला आब्राहा-
माच्या उरासीं नेऊन ठेविलें. मग धनवानहि मेला
आणि त्याला पुरलें. २३ आणि मृतलोकांत
पीडा भोगीत असतां त्याने आपले डोळे वर करून
आब्राहाम व त्याच्या उरासीं लाजारस यांस
दुरून पाहिलें. २४ मग तो हाक मारून बोलला,
हे बापा आब्राहामा, मजवर दया कर, आणि ला-
जारसाने आपल्या बोटाचें अग्र पाण्यांत बुचकळून
माझी जिभ थंड करावी ह्मणून त्याला पाठीव,
कां तर या जाळांत मी क्लेशित आहें. २५
आब्राहाम बोलला, मुला, हें आठीव कीं, तूं
आपल्या आयुष्यांत आपलें सुख भरून पावलास,
आणि त्याप्रमाणें लाजारस दुःख पावला, परंतु आतां
हा समाधान पावला आणि तूं क्लेश भोगितोस. २६
आणि या सर्वांवर आमच्या व तुमच्या मध्यें
मोठा चर स्थापिला आहे, यासाठीं कीं जे एथून
तुह्माकडे पार जाण्यास पाहतात त्यानी जाऊं नये,
आणि तिकडून त्यानी आह्माकडे येऊं नये. २७
मग तो बोलला, तर बापा, मी तुला विनंती
करितों कीं, त्याला माझ्या बापाच्या घरीं पाठीव;
२८ कां तर मला पांच भाऊ आहेत, त्यांस त्याने
असी साक्ष द्यावी कीं, त्यानीहि या पीडेच्या जाग्यांत
येऊं नये. २९ आब्राहामाने त्याला ह्मटलें, त्यां-
च्या जवळ मोशे व भविष्यवादी आहेत, त्यांचें

यानी ऐकावें. ३० मग तो बोलला, हे बापा
आब्राहामा, असें नको, तर कोणी मेलेल्यांमधून
यांकडे गेला ह्मणजे ते पश्चात्ताप करितील. ३१
व्हां त्याने त्याला ह्मटलें, जर ते मोशाचें
भविष्यवाद्यांचें ऐकत नाहींत तर मेलेल्यांमधूनहि
रो कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार
ाहीं.

## अध्याय १७.

आणि त्याने शिष्यांस ह्मटलें, अडखळे न व्हावे
हें घडत नाहीं, परंतु ज्याकडून ते होतात
ाला हाय हाय. २ त्याने या धाकट्यांतील
काला अडखळवावें यापेक्षां त्याच्या गळ्यांत
ात्याची तळी बांधून त्याला समुद्रांत टाकावें, हें
ाला बरें आहे. ३ आपणांस संभाळा; तुझ्या
ावानें तुझा अन्याय केला तर त्याचा निषेध
र, आणि जर तो पश्चात्ताप करील तर त्याची
मा कर. ४ आणि त्याने एका दिवसांत सात
ळा तुझा अन्याय केला, आणि त्या दिवसांत
ात वेळा तुजकडे परत येऊन ह्मणाला, मी पश्चा-
ाप करितों, तर त्याची क्षमा कर.
५ मग प्रेषित प्रभूला ह्मणाले, आमचा
श्वास वाढीव. ६ तेव्हां प्रभु बोलला, तुह्मास
हरीच्या दाण्याएवढा विश्वास असला तर या
बराला, तूं उपटून समुद्रांत लाविलेला असा हो,
सें तुह्मी सांगितलें असतां तो तुमचें मानील.
आणि तुह्मामधील असा कोण आहे कीं, आपला
ाकर नांगरून किंवा चारून शेतांतून आल्यावर
त्याला ह्मणेल, आतांच येऊन जेवायाला
? ८ उलटें, मला जेवण्यासाठीं कांहीं तयार
, आणि मी खातों व पितों तोंपर्यंत कंबर बांधून
झी चाकरी कर, मग तूं खा व पी, असें
ाला ह्मणेल कीं नाहीं? ९ सांगितलेलीं कामें
चाकराने केलीं ह्मणून तो त्याचा उपकार
नितो काय? असें मला वाटत नाहीं. १०
तें तुह्मास जीं कामें सांगितलीं तीं सर्व केल्या-
तुह्मीहि ह्मणा, आह्मी निरुपयोगी चाकर आहों,
रण कीं जें आह्माला करायाचें होतें तेंच केलें.
११ आणि असें झालें कीं, तो यरूशलेमाकडे
लत असतां शोमरोन व गालील यांच्या मधून
ा. १२ आणि तो एका गांवांत जात असतां
हा कोडी माणसें त्याला भेटून दूर उभीं राहिलीं;
१३ आणि तीं मोठ्याने ओरडत बोललीं, हे स्वामी
येशू, आह्मावर दया कर. १४ मग त्याने पाहून
त्यांस ह्मटलें, तुह्मी जाऊन आपणांस याजकांला दा-
खवा. आणि असें झालें कीं ते जात असतां शुद्ध
झाले. १५ आणि त्यांतील एकाने आपण बरा
झालों असें पाहून माघारें फिरून मोठ्याने देवाचें
गौरव केलें; १६ आणि त्याच्या पायांजवळ पालथें
पडून त्याचा उपकार मानिला; तो तर शोमरोनी
होता. १७ तेव्हां येशूने उत्तर दिल्हें कीं, दाहा
जण शुद्ध झाले नाहींत काय? तर ते नऊ कोठें?
१८ या परक्यावांचून देवाचें गौरव करायास परत-
लेले असे कोणी सांपडले नाहींत. १९ मग
त्याने त्याला ह्मटलें, उठून जा, तुझ्या विश्वासाने
तुला तारिलें आहे.
२० आणि देवाचें राज्य केव्हां येईल, असें
परोश्यानी त्याला विचारिलें, तेव्हां त्याने त्यांस
उत्तर दिल्हें कीं, देवाचें राज्य बाह्यात्कारीं येत
नाहीं. २१ आणि एथें पाहा, किंवा तेथें पाहा,
असें बोलणार नाहींत, कारण कीं पाहा, देवाचें
राज्य तुमच्या आंत आहे. २२ आणखी त्याने
शिष्यांस ह्मटलें, असे दिवस येतील कीं, त्यांत
तुह्मी मनुष्याच्या पुत्राचा एक दिवस पाहण्याची
इच्छा कराल, परंतु पाहणार नाहीं. २३ आणि
एथें पाहा, किंवा तेथें पाहा, असें तुह्मास ह्मणतील,
तरी निघूं नका, आणि त्यांच्या मागें जाऊं नका. २४
कारण कीं जसी वीज आकाशाखालीं एका बाजूस
चमकून आकाशाखालीं दुसऱ्या बाजूपर्यंत प्रकाशती,
तसा मनुष्याचा पुत्रहि आपल्या दिवसांत होईल.
२५ परंतु पहिल्याने त्याने फार सोसावें आणि या
पिढीकडून अव्हेर पावावा याचें अगत्य आहे.
२६ आणि नोहाच्या दिवसांमध्यें झालें तसें मनु-
ष्याच्या पुत्राच्या दिवसांतहि होईल. २७ नोहा
तारवांत गेला त्या दिवसापर्यंत लोक खात पीत
होते, लग्न करून घेत देत होते, आणि जलप्रलय
होऊन सर्वांचा नाश झाला. २८ आणि लोटाच्या
दिवसांतहि झालें तसेंच होईल, ते खात पीत,
विकत घेत देत होते, ते लावणी करीत होते, घरें
बांधीत होते; २९ परंतु लोट सदोमांतून
निघाला त्याच दिवशीं आकाशांतून अग्नि व गंधक
यांची वृष्टि होऊन सर्वांचा नाश झाला. ३०
मनुष्याचा पुत्र प्रगट होईल त्या दिवशीं त्याप्रमाणें
होईल. ३१ त्या दिवशीं जो धाब्यावर असेल

त्याचें खटलें घरांत असल्यास त्याने तें नेण्या-
करितां खालीं येऊं नये; आणि जो शेतांत असेल
त्याने तसेंच मागें फिरूं नये. ३२ लोटाच्या
बायकोची आठवण करा. ३३ जो कोणी आपला
जीव राखायास पाहील तो त्याला मुकेल, आणि
जो कोणी त्याला मुकेल तो त्याला वांचवील. ३४
मी तुह्मास सांगतों, त्या रात्रीं एका बाजेवर दोघे
होतील, एकाला घेतील व दुसऱ्याला ठेवितील.
३५ दोघी एकत्र दळीत बसतील, एकीला घेतील
व दुसरीला ठेवितील. ३६ शेतांत दोघे होतील,
एकाला घेतील व दुसऱ्याला ठेवितील. ३७ मग
त्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, कोठें?
तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, जेथें प्रेत आहे तेथें
गीध जमतील.

## अध्याय १८.

आणखी सर्वदा प्रार्थना करावी आणि थकूं नये
याविषयीं त्याने त्यांस असा दाखला सांगितला
कीं, २ कोणीएका नगरांत कोणी न्यायाधीश होता,
तो देवाचें भय धरीत नसे व माणसाची भीड रा-
खीत नसे. ३ आणि त्याच नगरांत कोणीएक
विधवा होती, ती त्याकडे येऊन बोलली, माझ्या
वाद्याविषयीं माझा न्याय कर. ४ तेव्हां कांहीं
वेळपर्यंत तो करीना, परंतु शेवटीं त्याने आ-
पल्या मनांत ह्मटलें, मी देवाचें भय धरीत नाहीं
व माणसाची भीड राखीत नाहीं; ५ तरी ही
विधवा मला श्रम देती, यास्तव मी तिचा न्याय क-
रीन, नाहीं तर ती नेहमी येऊन मला त्रास देईल.
६ तेव्हां प्रभूने ह्मटलें, अन्यायी न्यायाधीश काय
ह्मणतो हें ऐका. ७ तर देवाचे जे निवडलेले
रात्रंदिवस त्याला हाक मारितात त्यांजविषयीं तो
सहन केला असतांहि त्यांचा न्याय करणार नाहीं
काय? ८ मी तुह्मास सांगतों कीं, तो त्यांचा न्याय
लवकर करील. परंतु मनुष्याचा पुत्र येईल,
तेव्हां पृथ्वीवर त्याला विश्वास सांपडेल काय?
९ आणखी आपण न्यायी आहों असा ज्या कि-
त्येकांनी आपणांविषयीं विश्वास धरून दुसऱ्यांस
धिक्कारिलें, त्यांस त्याने हा दाखला सांगितला कीं,
१० दोन माणसें प्रार्थना करायास देवळांत गेलीं, त्यां-
तील एक परोशी व एक जकातदार. ११ परोश्याने
उभें राहून आपल्या मनांत असी प्रार्थना केली, हे
देवा, दुसरीं माणसें अपहारी अन्यायी व्यभिचारी
यांसारिखा, किंवा या जकातदारासारिखाहि मी
नव्हें, यास्तव मी तुझा उपकार मानितों. १२ दर
आठवड्यांत मी दोनदा उपास करितों, जें कांहीं
मला मिळतें त्या अवघ्याचा दाहावा भाग देतों.
१३ परंतु जकातदार दूर उभा राहून आका-
शाकडे डोळे देखील वर लावायास धजत नसतां
आपल्या उरावर मारून बोलला, हे देवा, मज पा-
प्यावर दया कर. १४ मी तुह्मास सांगतों, हा
दुसऱ्यापेक्षां न्यायी ठरून आपल्या घरीं गेला.
कारण कीं जो कोणी आपणाला उंच करील तो नी-
च होईल, आणि जो आपणाला नीच करील तो
उंच होईल.

१५ नंतर त्याजकडे त्यांनी बाळकेंहि त्याने
त्यांस शिवावें ह्मणून आणिलीं; परंतु शिष्यांनी
पाहून त्यांस धमकाविलें. १६ तेव्हां येशूने
त्यांस बोलावून ह्मटलें, बाळकांस मजकडे येऊं
द्या, त्यांस मना करूं नका; कारण कीं देवाचें
राज्य असल्यांचें आहे. १७ मी तुह्मास खचीत
सांगतों, जो कोणी देवाचें राज्य बाळकासारिखें
घेणार नाहीं तो त्यांत जाणारच नाहीं.

१८ आणि कोणीएका अधिकाऱ्याने त्याला वि-
चारिलें कीं, हे उत्तम गुरू, मी काय केल्याने सर्व-
काळचें जीवन पावेन? १९ तेव्हां येशू त्याला
ह्मणाला, मला उत्तम कां ह्मणतोस? एक जो देव
त्यावांचून कोणी उत्तम नाहीं. २० आज्ञा तुला
कळल्या आहेत, व्यभिचार करूं नको, हत्या करूं
नको, चोरी करूं नको, खोटी साक्ष देऊं नको, तूं
आपल्या आईबापांचा सन्मान कर. २१ मग तो
बोलला, मी आपल्या लाहानपणापासून या अवघ्या
पाळीत आलों आहें. २२ तेव्हां येशूने हें
ऐकून त्याला ह्मटलें, अझून तुला एक उणें आहे,
तूं आपलें सर्व विकून दरिद्र्यांस वांटून दे, ह्मणजे
तुला आकाशांत संपत्ति मिळेल; चल, माझ्या
मागें ये. २३ परंतु तो हें ऐकून फार खिन्न झाला,
कारण कीं तो फार धनवान होता. २४ तेव्हां
तो खिन्न झाला हें पाहून येशू बोलला, धनवानांस
देवाच्या राज्यांत जायाला किती कठीण आहे!
२५ कारण कीं धनवानाला देवाच्या राज्यांत
जाणें यापेक्षां उंटाला सुईच्या नाकांतून जाणें हें सोपें
आहे. २६ तेव्हां ऐकणाऱ्यांनी ह्मटलें कीं, तर
तारण कोण पावेल? २७ मग तो बोलला, ज्या
गोष्टी माणसांच्याने होत नाहींत त्या देवाच्याने हो-

तात. २८ तेव्हां पेत्रस बोलला, पाहा, आह्मी सर्व सोडून तुझ्या मागें चाललों आहों. २९ मग त्याने त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत सांगतों कीं, जो घर किंवा आईबापें किंवा भाऊ किंवा बायको किंवा लेंकरें देवाच्या राज्याकरितां सोडील. ३० आणि, या काळीं बहुतपट व पुढल्या काळीं सर्वकाळचें जीवन पावणार नाहीं, असा कोणीच नाहीं.

३१ तेव्हां त्याने बारा जणांस जवळ घेऊन त्यांस ह्मटलें, पाहा, आपण यरूशलेमास जातों, आणि मनुष्याच्या पुत्राविषयीं ज्या गोष्टी भविष्यवाद्यानी लिहिल्या त्या सर्व पूर्ण होतील. ३२ कारण कीं त्याला विदेश्यांच्या स्वाधीन करितील, आणि ते त्याची थट्टा व हेळणा करितील, आणि त्यावर थुंकतील, ३३ आणि त्याला फटके देऊन जिवें मारितील, मग तिसऱ्या दिवसीं तो पुन्हा उठेल. ३४ परंतु त्यांतील कांहींच त्यांस समजलें नाहीं, आणि ही गोष्ट त्यांपासून गुप्त राहिली, आणि ज्या गोष्टी सांगितल्या त्या त्यानी जाणल्या नाहींत.

३५ आणि असें झालें कीं, तो यरीहोजवळ आल्यावर कोणी अंधळा वाटेवर भीक मागत बसला होता. ३६ तेव्हां समुदाय जवळून जात आहे हें ऐकून त्याने पुसलें कीं, तें काय आहे? ३७ तेव्हां त्यानी त्याला सांगितलें कीं, येशू नाझारेथकर जवळून जात आहे. ३८ तेव्हां तो ओरडत बोलला, हे येशू दाविदाच्या पुत्रा, मजवर दया कर. ३९ तेव्हां त्याने उगेंच राहावें ह्मणून पुढें चालणाऱ्यानी त्याला धमकाविलें, परंतु तो अधिकच ओरडला कीं, हे दाविदाच्या पुत्रा, मजवर दया कर. ४० तेव्हां येशूने उभें राहून आपल्याकडे त्याला आणावें ह्मणून आज्ञा केली. ४१ मग तो जवळ आल्यावर त्याने त्याला विचारिलें कीं, म्या तुजसाठीं काय करावें ह्मणून मागतोस? तेव्हां तो बोलला, हे प्रभू, मला दिसावें. ४२ तेव्हां येशू त्याला ह्मणाला, तुला दिसो, तुझ्या विश्वासाने तुला तारिलें आहे. ४३ तेव्हांच त्याला दिसूं लागलें, मग तो देवाचें गौरव करीत त्याच्या मागें चालला; आणि सर्व लोकानी पाहून देवाची स्तुति केली.

## अध्याय १९.

आणि तो यरीहोंत येऊन त्यामधून जात होता. २ तेव्हां पाहा, जाक्खी नामें कोणी माणूस तेथें होता, तो जकातदारांमध्यें मुख्य, व धनवानहि होता. ३ मग त्याने येशू कसा कोण आहे हें पाहायास यत्न केला, परंतु दाटीमुळें त्याचें चालेना, कां कीं तो ठेंगणा होता. ४ तेव्हां तो त्याला पाहायासाठीं पुढें धावून उंबरावर चढला, कां तर तो त्या वाटेने जाणार होता. ५ आणि त्या ठिकाणीं आला तेव्हां येशूने दृष्टि वर करून त्याला पाहिलें व त्याला ह्मटलें, जाक्खी, लवकर उतर, कां कीं आज तुझ्या घरीं मला राहायाचें आहे. ६ मग त्याने लवकर उतरून आनंदाने त्याचा अंगीकार केला. ७ तेव्हां सर्व पाहून कुरकूर करूं लागली कीं, पापी माणसाच्या घरीं तो उतरायास गेला आहे. ८ तेव्हां जाक्खी उभा राहून प्रभूला ह्मणाला, हे प्रभू, पाहा, मी आपलें अर्धें द्रव्य दरिद्र्यांस देतों, आणि जर कुभांडाने कोणाचें कांहीं घेतलें असेल तर चौपट परत देतों. ९ तेव्हां येशूने त्याला ह्मटलें, आज या घराला तारण मिळालें, कां तर हाहि आब्राहामाचा पुत्र आहे. १० कारण कीं जें हरपलेलें तें शोधायास व तारायास मनुष्याचा पुत्र आला आहे.

११ या गोष्टी ते ऐकत होते, तेव्हां तो यरूशलेमाजवळ होता, आणि देवाचें राज्य लवकर प्रगट होणार आहे असें त्यांस वाटलें, ह्मणून त्याने अणखी दाखला सांगितला. १२ तेव्हां तो बोलला, कोणी कुलीन माणूस आपल्याला राज्य मिळवून माघारें यावें ह्मणून दूर देशांत गेला; १३ आणि त्याने आपल्या दाहा चाकरांस बोलावून त्यांस दाहा मोहरा दिल्ह्या, आणि त्यांस ह्मटलें, मी येईं तोंपर्यंत व्यापार करा. १४ परंतु त्याच्या देशांतील लोक त्याचा द्वेष करीत होते, ह्मणून त्यानी त्याच्या मागें वकिलांस पाठवून सांगितलें, हा आह्मावर राज्य करायाला नको. १५ मग असें झालें कीं, तो राज्य मिळवून माघारा आल्यावर ज्या चाकरांस पैका दिल्हा होता त्यांतील कोणी काय मिळविलें हें समजावें, ह्मणून त्याने त्यांस आपल्याकडे बोलवायास सांगितलें. १६ मग पहिला येऊन बोलला, महाराज, तुझ्या एका मोहरेवर दाहा मोहरा मिळविल्या आहेत. १७ तेव्हां त्याने त्याला ह्मटलें, बरें उत्तम चाकरा, तूं फार थोडक्याविषयीं विश्वासू झालास, यास्तव दाहा नगरांचा अधिकारी हो. १८ नंतर दुसरा येऊन बोलला, महाराज, तुझ्या एका मोहरेवर पांच

मोहरा मिळविल्या आहेत. १९ तेव्हां त्यालाहि
त्याने झटलें, तूंहि पांच नगरांचा अधिकारी हो.
२० मग अणखी एक येऊन बोलला, महाराज,
पाहा, ही तुझी मोहर, म्या रुमालांत बांधून ठेविली
आहे. २१ कां तर मी तुला भ्यालों, कारण कीं तूं
कठोर माणूस आहेस, जें त्वां ठेविलें नाहीं तें घेऊन
जातोस आणि जें त्वां पेरिलें नाहीं तें कापितोस.
२२ तेव्हा त्याने त्याला झटलें, अरे वाईट चाकरा,
मी तुझ्याच तोंडाने तुझा न्याय ठरवितों. मी कठोर
माणूस आहें, जें म्या ठेविलें नाहीं तें घेऊन जातों
आणि जें म्या पेरिलें नाहीं तें कापितों, हें तुला
ठाऊक होतें. २३ तर माझा पैका सावकाराजवळ
कां ठेविला नाहींस? झणजे म्या येऊन तो व्याजा-
सुद्धां उपाविला असता. २४ तेव्हां जवळ
उभे राहणाऱ्यांस त्याने सांगितलें कीं, ती मोहर
यापासून घ्या व ज्याजवळ दाहा मोहरा आहेत
त्याला द्या. २५ मग ते त्याला झणाले, महाराज,
त्याजवळ दाहा मोहरा आहेत. २६ तर मी
तुह्मास सांगतों कीं, ज्या कोणाजवळ आहे त्याला
देतील, आणि ज्याजवळ नाहीं त्याचें जें आहे
तें देखील त्यापासून घेतील. २७ अणखी म्या
त्यांवर राज्य करावें, असी ज्यांची इच्छा नव्हती
त्या माझ्या शत्रूस एथें आणा, आणि माझ्या
समोर मारून टाका.

२८ आणि तो या गोष्टी सांगून यरूशलेमाकडे
जातांना पुढें चालला. २९ नंतर असें झालें कीं,
जाइत झाडांच्या झटलेल्या डोंगरापासीं बेथ-
फागे व बेथानी एथवर येऊन त्याने आपल्या शि-
ष्यांतून दोघांस पाठवितांना सांगितलें कीं, ३०
तुह्मी समोरच्या गांवांत जा, त्यांत जातांच ज्यावर
कोणी माणूस कधींहि बसला नाहीं असें बांधलेलें
शिंगरूं तुह्मास अढळेल; तें सोडून आणा. ३१
आणि कां सोडितां असें कोणी तुह्मास विचारिलें,
तर त्याला सांगा कीं, प्रभूला याची गरज आहे.
३२ तेव्हां जे पाठविलेले ते गेले आणि त्यांस
सांगितल्याप्रमाणें अढळलें. ३३ आणि ते शिंगरूं
सोडीत असतां त्याचे धनी त्यांस झणाले, शिंगरूं
कां सोडितां? ३४ तेव्हां ते बोलले, प्रभूला
याची गरज आहे. ३५ मग त्यानी तें येशूकडे
आणिलें, नंतर आपलीं वस्त्रें शिंगरावर घालून
येशूला बसविलें. ३६ मग तो चालत असतां
त्यानी आपलीं वस्त्रें वाटेवर पसरलीं. ३७ आणि
तो इतक्यांत जाइत झाडांच्या डोंगराच्या उतरणी-
जवळ आल्यावर, शिष्यांचा सर्व समुदाय आनंद करून,
जे चमत्कार त्यानी पाहिले होते त्या सर्वांवरून
मोठ्याने देवाची स्तुति करूं लागला कीं, ३८
प्रभूच्या नांवाने येणारा राजा धन्यवादित असो;
आकाशांत शांति आणि परम उंचांमध्यें गौरव.
३९ तेव्हां समुदायांतील कित्येक परोश्यानी त्याला
झटलें, हे गुरू, तूं आपल्या शिष्यांस धमकाव.
४० तेव्हां त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मी तुह्मास
सांगतों, जर हे उगेच राहतील तर धोंडे ओर-
डतील. ४१ मग तो जवळ आल्यावर नगर
पाहून त्याविषयीं रडून बोलला कीं, ४२ त्वां या
आपल्या दिवसांत देखील आपल्या शांतीच्या गोष्टी
जाणल्या असत्या, तर किती बरें होतें! परंतु आतां
त्या तुझ्या दृष्टीपासून लपविल्या आहेत. ४३ कारण
कीं असे दिवस तुजवर येतील कीं, तुझे शत्रु तुझ्या
भोंवता मोरचा लावून तुला वेढितील, आणि तुला
चहुंकडून कोंडितील; ४४ आणि तुला व तुझ्यां-
तील तुझ्या लेंकरांस भुईबरोबर करितील, आणि
तुझ्या मध्यें धोंड्यावर धोंडा राहूं देणार नाहींत,
कारण कीं त्वां आपली भेट होण्याचा समय
जाणिला नाहीं.

४५ नंतर तो देवळांत जाऊन त्यांत जे विकत देणारे
व विकत घेणारे होते त्यांस बाहेर घालवूं लागला;
४६ आणि त्यांस बोलला, माझें घर प्रार्थनेचें घर
आहे असें लिहिलें आहे, परंतु तुह्मी तें लुटा-
ऱ्यांची गुहा असें केलें आहे. ४७ आणि तो देव-
ळांत प्रतिदिवसीं उपदेश करीत असे; तेव्हां मुख्य
याजक व शास्त्री व लोकांतील मोठमोठे हे त्याचा
घात करायास पाहत होते; ४८ परंतु आपण
काय करावें हें त्यांस सुचलें नाहीं; कारण कीं सर्व
लोक फार लक्ष देऊन त्याचें ऐकत होते.

## अध्याय २०.

आणि असें झालें कीं, त्या दिवसांतील एका दिवशीं
तो देवळांत लोकांस उपदेश करीत व शुभव-
र्त्तमान सांगत असतां मुख्य याजक व शास्त्री हे
वडिलांसुद्धां जवळ येऊन त्याला झणाले, २ तूं
कोणत्या अधिकाराने हें करितोस, अथवा ज्याने तुला
हा अधिकार दिल्हा तो कोण आहे? हें आह्मास
सांग. ३ तेव्हां त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मीहि
तुह्मास एक गोष्ट पुसतों, ती मला सांगा. ४

योहानाचा बाप्तिस्मा आकाशापासून किंवा माणसां-
पासून झाला? ५ तेव्हां ते आपापल्यांमध्यें विचार
करूं लागले कीं, आकाशापासून ह्मणूं तर तो
ह्मणेल कीं, असें असतां तुह्मी त्याजवर विश्वास
कां ठेविला नाहीं? ६ आणि माणसांपासून ह्मणूं,
तर सर्व लोक आह्मास धोंडमार करितील, कां कीं
योहान्न भविष्यवादी होता असी त्यांची खातरी
आहे. ७ तेव्हां त्यानीं उत्तर दिल्हें कीं, तो
कोठून हें आह्मास ठाऊक नाहीं. ८ मग येशूनें
त्यांस ह्मटलें, मीहि कोणत्या अधिकारानें हें करितों
हें तुह्मास सांगत नाहीं.

९ मग तो लोकांस हा दाखला देऊन सांगूं
लागला कीं, कोणीएका माणसानें द्राक्षमळा ला-
विला, नंतर तो माळ्यांस सोंपून देऊन आपण
बहुतकाळ प्रवासास गेला. १० मग हंगामांत
आपणाला माळ्यानीं द्राक्षमळ्याचीं कांहीं फळें द्यावीं
ह्मणून त्यानें त्यांजकडे चाकर पाठविला, परंतु
माळ्यानीं त्याला ठोकून रिकामें लावून दिल्हें. ११
आणखी त्यानें दुसरा चाकर पाठविला, आणि
त्यालाहि त्यानीं ठोकून व अपमानून रिकामें
लावून दिल्हें. १२ आणखी त्यानें तिसऱ्याला
पाठविलें, त्यालाहि त्यानीं घायाळ करून बाहेर
टाकलें. १३ नंतर द्राक्षमळ्याचा धनी ह्मणाला,
मी काय करूं? मी आपल्या प्रिय पुत्राला पाठवीन,
बहुतकरून ते त्याला पाहून भीड धरितील. १४
परंतु माळी त्याला पाहून आपापल्यांमध्यें विचार
करून ह्मणाले, हा वतनदार आहे; चला, आपण
याला जिवें मारूं ह्मणजे वतन आपलेंच होईल.
१५ नंतर त्यानीं त्याला द्राक्षमळ्याच्या बाहेर
काढून जिवें मारिलें. तर द्राक्षमळ्याचा धनी त्यांस
काय करील? १६ तो येऊन त्या माळ्यांचा नाश
करील व द्राक्षमळा दुसऱ्यांस देईल. तेव्हां ते
ऐकून बोलले, असें न घडो. १७ मग त्यानें त्यांकडे
पाहून ह्मटलें, तर जो धोंडा बांधणाऱ्यानीं अव्हे-
रिला तोच कोपऱ्याचा मुख्य धोंडा झाला आहे,
असें जें लिहिलें तें काय आहे? १८ जो कोणी
त्या धोंड्यावर पडेल त्याचा चुराडा होईल, परंतु
ज्या कोणावर तो पडेल त्याचा भुगा होईल. १९
तेव्हां मुख्य याजक व शास्त्री समजले कीं, हा
दाखला त्यानें आह्माविषयीं दिल्हा आहे, यास्तव
त्यानीं त्याच घटकेस आपले हात त्यावर टाकायास
पाहिले, परंतु लोकांस भ्याले.

२० तेव्हां त्यानीं टपत राहून, आपण न्यायी
आहों असें सोंग धरणारे हेर पाठविले, यासाठीं कीं
आपण त्याला बोलण्यांत धरून त्याला सुभेदारा-
च्या सत्तेंत व अधिकारांत गुंतवून द्यावें. २१
तेव्हां त्यानीं त्याला विचारिलें कीं, हे गुरू, आह्मास
कळलें कीं, तुझें बोलणें व उपदेश नीट आहे, आणि
तूं पक्षपात धरीत नाहींस, तर देवाचा मार्ग खरे-
पणानें शिकवितोस. २२ काइसाराला पट्टी देणें हें
आह्मास योग्य आहे किंवा नाहीं? २३ तेव्हां
तो त्यांचें कपट जाणून त्यांस बोलला, माझी परीक्षा
कां पाहतां? पावली मला दाखवा; २४ इजवर
मुखवटा व पत्ता कोणाचा आहे? मग त्यानीं उत्तर
दिल्हें की, काइसाराचा. २५ तेव्हां त्यानें त्यांस
ह्मटलें, तर काइसाराचें काइसाराला, व देवाचें
देवाला भरून द्या. २६ तेव्हां त्यांच्यानें लोकां-
च्या समोर त्याच्या बोलण्यांत त्याला धरवेना,
आणि त्याच्या उत्तरावरून आश्चर्य करून ते उगेच
राहिले.

२७ मग पुन्हा उठणें नाहीं असें ह्मणणारे
सदोकी यांतून कित्येकानीं येऊन त्याला विचारिलें
कीं, २८ हे गुरू, मोशानें आह्मासाठीं असें
लिहिलें कीं, कोणीएकाचा भाऊ बायको असतां
लेंकरावांचून मेला, तर त्याच्या भावानें ती बायको
घेऊन आपल्या भावासाठीं संतति उत्पन्न करावी.
२९ तर सात भाऊ होते, आणि पहिला बायको
करून लेंकरूं नसतां मेला. ३० मग दुसऱ्यानें
ती बायको केली आणि तो लेंकरूं नसतां मेला.
३१ तिसऱ्यानें ती केली, आणि तसेंच त्या साता-
नीहि, परंतु लेंकरें नसतां ते मेले. ३२ आणि
सर्वांच्या मागून बायकोहि मेली. ३३ तर पुन्हा
उठण्याच्या वेळेस ती त्यांतील कोणाची बायको
होईल? कारण कीं ती त्या सातांची बायको झाली
होती. ३४ तेव्हां येशूनें त्यांस उत्तर दिल्हें कीं,
या काळाचीं लेंकरें लग्न करून घेतात व लग्न करून
देतात. ३५ परंतु तो काळ व मेलेल्यांमधून
पुन्हा उठणें हें पावायास जे योग्य ठरतील, ते
लग्न करून घेत नाहींत व लग्न करून देतहि
नाहींत; ३६ कारण कीं ते पुढें मरण्याजोगेहि
नाहींत, कां तर ते दुतांसारिखे असतात, आणि
पुन्हा उठण्याचे पुत्र आहेत ह्मणून देवाचे पुत्र
आहेत. ३७ आणि मोशानेंहि झुडपाच्या प्रकर-
णांत प्रभूला आब्राहामाचा देव व इझाकाचा देव

व याकोबाचा देव असें ह्मटलें, यावरून मेलेले उठतात हें दाखविलें. ३८ तो मेलेल्यांचा देव नव्हे तर जिवंतांचा आहे, कारण कीं त्यासाठीं ते सर्व जगतात. ३९ तेव्हां शास्त्र्यांतील कित्येकानी उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, बरें बोललास. ४० तेव्हांपासून ते त्याला कांहीं प्रश्न करायास धजले नाहींत.

४१ मग त्याने त्यांस ह्मटलें, ख्रीस्त दाविदाचा पुत्र आहे असें कसें ह्मणतात? ४२ कां तर दावीद स्वतां गीतांच्या पुस्तकांत ह्मणतो, ४३ प्रभूने माझ्या प्रभूला सांगितलें कीं, मी तुझ्या शत्रूंस तुझ्या पायांचें आसन करीन तोंपर्यंत माझ्या उजवीकडे बैस. ४४ दावीद त्याला प्रभु असें ह्मणतो, तर मग तो त्याचा पुत्र कसा होईल?

४५ तेव्हां सर्व लोक ऐकत असतां त्याने आपल्या शिष्यांस ह्मटलें, ४६ शास्त्र्यांविषयीं जपा, ते झगे घालून फिरायास इच्छितात व चव्हाट्यांमध्यें मुजरे व सभास्थानांमध्यें मुख्य आसनें व जेवणांमध्यें मुख्य बैठकी हीं त्यांस आवडतात. ४७ ते विधवांचीं घरें खाऊन टाकितात, आणि ढोंगाने लांब लांब प्रार्थना करितात, ते अधिक दंड पावतील.

## अध्याय २१.

मग त्याने दृष्टि वर करून धनवानांस आपलीं दानें भांडारांत टाकितां पाहिलें; २ आणि त्याने एका दरिद्री विधवेलाहि दोन टोल्या तेथें टाकितां पाहिलें. ३ मग तो बोलला, मी तुह्मास खचीत सांगतों कीं, या दरिद्री विधवेने सर्वांपेक्षां अधिक टाकिलें आहे; ४ कारण कीं त्या सर्वांनी आपल्या भरपुरांतून देवाच्या दानांत टाकिलें, परंतु हिने आपल्या कमतींतून आपली जी उपजीविका होती ती सर्व टाकिली.

५ आणि देऊळ उत्तम धोंड्यानीं व दानानी सुंदर केलें आहे, असें कित्येक बोलत असतां त्याने ह्मटलें, ६ जें तुह्मी पाहतां त्यांतून खालीं पाडल्यावांचून धोंड्यावर धोंडा राहणार नाहीं, असे दिवस येतील. ७ नंतर त्यानी त्याला विचारिलें कीं, हे गुरू, या गोष्टी तर केव्हां होतील, आणि ज्या काळीं या गोष्टी पूर्ण होणार आहेत तेव्हां काय चिन्ह होईल? ८ तेव्हां तो बोलला, फसूं नये ह्मणून जपा, कारण कीं माझ्या नांवाने बहुत येऊन मीच तो आहें, आणि तो काळ जवळ आला आहे, असें ह्मणतील, ह्मणून तुह्मी त्याच्या मागें जाऊं नका. ९ आणि तुह्मी लढायांविषयीं व दंग्यांविषयीं ऐकाल तेव्हां घाबरूं नका, कारण कीं त्यां अगोदर अवश्य व्हायाच्या आहेत, परंतु तितक्यांत शेवट होणार नाहीं. १० नंतर त्याने त्यांस ह्मटलें, राष्ट्र राष्ट्रावर व राज्य राज्यावर उठेल; ११ आणि जागोजागीं मोठे भूमिकंप व दुकाळ व मऱ्या होतील, अणखी भयंकर उत्पात व आकाशांतील मोठीं चिन्हें होतील. १२ परंतु या सर्व गोष्टींच्या अगोदर माझ्या नामाकरितां ते आपले हात तुह्मावर टाकितील, आणि पाठीस लागून तुह्मास सभास्थानांमध्यें व बंदिशाळांमध्यें टाकून राजे व अधिकारी यांच्या समोर नेतील. १३ तथापि हें तुह्मास साक्षीसाठीं होईल. १४ यास्तव तुह्मी आपल्या ध्यानांत ठेवा कीं, उत्तर देण्याविषयीं पूर्वीं काळजी करूं नये; १५ कां कीं मी तुह्मास असी वाचा व ज्ञान देईन कीं, त्याला तुमच्या सर्व विरोध्यांच्याने प्रत्युत्तर देववणार किंवा अडववणार नाहीं. १६ आणि आईबापें व भाऊ व नातलग व मित्र हे देखील तुह्मास पराधीन करितील, आणि तुमच्यांतील कित्येकांस जिवें मारवितील. १७ आणि माझ्या नामामुळें तुमचा द्वेष सर्व करितील. १८ परंतु तुमच्या डोक्याचा एक केंसहि नाहींसा होणार नाहीं. १९ तुह्मी धैर्य धरून आपले आत्मे राखा. २० यरूशलेम सैन्यानी वेढलेलें तुह्मी पाहाल तेव्हां त्याची ओसाडी जवळ आली आहे असें समजा. २१ तेव्हां जे यहूद्यांत असतील त्यानी डोंगरावर पळून जावें, आणि जे त्याच्या मध्यें असतील त्यानी बाहेर जावें, आणि जे शिवारांत असतील त्यानी त्यांत जाऊं नये. २२ कां कीं सर्व लिहिलेल्या गोष्टी पूर्ण होण्यासाठीं हे सूड घेण्याचे दिवस आहेत. २३ आणि त्या दिवसांमध्यें ज्या गरोदर व ज्या थान देणाऱ्या त्यांस हाय हाय, कारण कीं भूमीवर मोठें संकट व या लोकांवर क्रोध होईल. २४ आणि ते तरवारीच्या धारेने पडतील, आणि त्यांस पाडाव करून सर्व राष्ट्रांमध्यें नेतील, आणि विदेश्यांचे काळ पूर्ण होतील तोंपर्यंत विदेशी लोक यरूशलेम तुडवितील. २५ तेव्हां सूर्य व चंद्र व तारे यांमध्यें चिन्हें होतील आणि समुद्र व लाटा यांची गर्जना होत असतां, २६ भयाने व जगावर येणाऱ्या गोष्टींची वाट पाहण्याने माणसें

प्राण सोडीत असतां पृथ्वीवर राष्ट्रांस संकट व पेंच
होईल; कां तर आकाशांतील सैन्यें डळमळतील.
२७ आणि त्या काळीं मनुष्याच्या पुत्राला साम-
र्थ्यानें व मोठ्या गौरवानें ढगांत येतांना पाहतील.
२८ आणि या गोष्टी होऊं लागतील तेव्हां नीट
उभे राहा, आणि आपलीं डोकीं वर करा, कारण कीं
तुमची खंडणी जवळ आली आहे. २९ तेव्हां
त्यानें त्यांस दाखला सांगितला कीं, अंजीर व सर्व
झाडें पाहा; ३० तीं फुटूं लागतात तेव्हां तुह्मी
पाहून, आतां उन्हाळा जवळ आला आहे, असें
आपोआप समजतां. ३१ तसेंच या गोष्टी
होतांना पाहाल तेव्हां देवाचें राज्य जवळ आलें
आहे असें समजा. ३२ मी तुह्मास खचीत
सांगतों कीं, या सर्व गोष्टी पूर्ण होतील तोंपर्यंत
ही पिढी टळून जाणार नाहीं. ३३ आकाश व
पृथ्वी टळून जातील परंतु माझीं वचनें टळून जाणा-
रच नाहींत. ३४ आणि गुंगी व मद्यपान व संसाराच्या
चिंता यांकडून तुमचीं अंतःकरणें कधीं जड होऊं
नयेत व तो दिवस अकस्मात तुह्मावर येऊं नये,
ह्मणून आपणांस संभाळा. ३५ कारण कीं सर्व
भूमीच्या पाठीवर सर्व राहणाऱ्यांवर तो फांसा-
सारिखा येईल. ३६ यास्तव या सर्व होणाऱ्या
गोष्टी चुकवायास व मनुष्याच्या पुत्रासमोर उभे
राहायास तुह्मी योग्य ठरावें, ह्मणून सर्व प्रसंगीं
प्रार्थना करीत असतां जागे राहा.
३७ तेव्हां दिवसा तो देवळांत उपदेश करीत
असे; आणि रात्रीं बाहेर जाऊन जाइत नामें डोंग-
रावर राहत असे; ३८ आणि मोठ्या सकाळीं
त्याचें ऐकायास सर्व लोक त्याकडे देवळांत येत
असत.

## अध्याय २२.

नंतर वल्हांडण नामें बेखमीर भाकरींचा सण
जवळ आला. २ आणि मुख्य याजक व
शास्त्री हे त्याचा घात कसा करावा ह्मणून उपाय
पाहत होते, कारण कीं ते लोकांस भ्याले. ३
नंतर इस्कारयोतें या आडनांवाचा यहूदा बारां-
तील एक यांत सैतान गेला. ४ मग त्यानें
जाऊन मुख्य याजक व सरदार यांच्या स्वा-
धीन त्याला कसें करावें याविषयीं त्यांसीं बोलणें
लाविलें. ५ तेव्हां त्यांस आनंद झाला, आणि त्यांनी
त्याला पैका द्यावा ह्मणून करार केला. ६ तें
त्यानें पत्करिलें, आणि समुदाय नाहीं असी त्याला
त्यांच्या स्वाधीन करण्याची संधि तो पाहूं लागला.
७ नंतर ज्या बेखमीर भाकरींच्या सणाच्या
दिवसांत वल्हांडणाचा यज्ञपशु मारायाचा, तो दिवस
आला. ८ तेव्हां त्यानें पेत्रस व योहान्न यांस पाठ-
वितांना सांगितलें कीं, आपण वल्हांडण सणाचें भोजन
करावें, ह्मणून तुह्मी जाऊन आह्मासाठीं तयार करा.
९ तेव्हां ते त्याला ह्मणाले, आह्मी कोठें तयार करावें
ह्मणून तुझी आज्ञा आहे? १० मग त्यानें त्यांस
सांगितलें, पाहा, तुह्मी नगरांत जात असतां
पाण्याची घागर घेऊन जाणारा माणूस तुह्मास
भेटेल, तो ज्या घरांत जाईल त्यांत त्याच्या मागें
जा. ११ आणि त्या घराच्या धन्याला असें
सांगा कीं, गुरु तुला ह्मणतो, म्या आपल्या शिष्यां-
सुद्धां वल्हांडण सणाचें भोजन करावें असी उतरा-
याची जागा कोठें आहे? १२ मग तो तुह्मास
सामान लावलेली मोठी माडी दाखवील, तेथें तयार
करा. १३ तेव्हां ते गेले, आणि त्यांस त्यानें
सांगितल्याप्रमाणें आढळलें, आणि त्यांनी वल्हांडण
सणाची तयारी केली. १४ नंतर समय झाल्या-
वर तो व त्याच्या संगतीं बारा प्रेषित जेवायास
बसले. १५ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, म्या
सोसल्यापूर्वी हें वल्हांडणाचें भोजन तुह्माबरोबर
करायास मी फार उत्कंठेने इच्छीत होतों; १६
कां तर मी तुह्मास सांगतों कीं, देवाच्या राज्यांत हा
सण पूर्ण होईल तोंपर्यंत मी फिरून याचें भोजन
करणार नाहीं. १७ मग त्यानें प्याला घेतला
आणि आशीर्वाद मागून तो बोलला, हा घ्या, आणि
आपणांमध्यें वांटून द्या; १८ कारण मी तुह्मास
सांगतों कीं, देवाचें राज्य येईल तोंपर्यंत द्राक्षवे-
लाचा उपज मी पिणारच नाहीं. १९ मग त्यानें
भाकर घेतली आणि आशीर्वाद मागून ती मोडिली,
आणि त्यांस देऊन ह्मटलें, हें तुह्मासाठीं दिल्हेलें
माझें शरीर आहे, माझ्या आठवणीसाठीं हें करा.
२० आणि जेवल्यानंतर त्यानें त्याप्रमाणेंच प्या-
लाहि घेऊन ह्मटलें, हा प्याला तुह्मासाठीं ओतलेलें
जें माझें रक्त त्याकडून जो नवा करार तोच आहे.
२१ आणखी पाहा, मला पराधीन करणारा
याचा हात मजबरोबर मेजावर आहे. २२
मनुष्याचा पुत्र नेमल्याप्रमाणें जातो खरा, परंतु
जो त्याला पराधीन करितो त्या माणसाला हाय
हाय. २३ तेव्हां ते आपापल्यांमध्यें विचार करूं

लागले कीं, आपल्यांतला जो हें करणार आहे तो
कोण असावा?

२४ अणखी आपल्यामध्यें मोठा कोण आहे,
याविषयीं त्यांमध्यें विवाद झाला. २५ तेव्हां
त्याने त्यांस ह्मटलें, विदेश्यांचे राजे त्यांवर धनीपणा
करितात, आणि जे त्यांवर सत्ता करितात त्यांस
परोपकारी ह्मणतात. २६ परंतु तुह्मी त्याप्रमाणें
नसावें, तर तुह्मामध्यें जो मोठा तो कनिष्ठासारिखा
आणि जो अधिकारी तो चाकरासारिखा होवो.
२७ कारण कीं मोठा कोण? जेवायास बसणारा
किंवा चाकरी करणारा? जेवायास बसणारा कीं
नाहीं? परंतु मी चाकरी करणाऱ्यासारिखा तुह्मा-
मध्यें आहें. २८ आणि माझ्या परीक्षांमध्यें
माझ्या संगतीं टिकून राहिलेले तुह्मी आहां. २९
आणि जसें माझ्या बापाने मला राज्य नेमून दिल्हें
तसें मीहि तुह्मास नेमून देतों; ३० ह्मणजे तुह्मी
माझ्या राज्यामध्यें माझ्या मेजावरून खाल व
प्याल, आणि आसनांवर बसून इस्राएलाच्या बारा
वंशांचा न्याय ठरवाल.

३१ अणखी प्रभु बोलला, शिमोना, शिमोना,
पाहा, सैतानाने तुह्मास गव्हांसारिखें चाळायास
इच्छिलें आहे. ३२ परंतु तुझा विश्वास कुंठू
नये ह्मणून तुझ्या साठीं म्या प्रार्थना केली आहे,
आणि तूं फिरसील तेव्हां आपल्या भावांस स्थिर
कर. ३३ मग तो त्याला ह्मणाला, हे प्रभू, मी
तुझ्या संगतीं बंदिशाळेंत आणि मरायालाहि जायास
तयार आहें. ३४ तेव्हां तो बोलला, पेत्रसा, मी
तुला सांगतों, आज कोंबडा ओरडल्याअगोदर मी
त्याला ओळखत नाहीं, असें तूं तीन वेळा मला
नाकारसील. ३५ अणखी त्याने त्यांस ह्मटलें,
म्या तुह्मास पिशवी व झोळणा व वाहाणा यांवांचून
पाठविलें, तेव्हां तुह्मास कांहीं उणें पडलें काय?
ते ह्मणाले, कांहीं नाहीं. ३६ त्यावर त्याने
त्यांस ह्मटलें, आतां तर ज्याला पिशवी आहे
त्याने ती घ्यावी, व त्याप्रमाणें झोळणाहि; आणि
ज्याला तरवार नाहीं त्याने आपलें वस्त्र विकून
विकत घ्यावी. ३७ कारण मी तुह्मास सांगतों
कीं, दुष्टांमध्यें तो मोजलेला होता, असें जें लिहिलें
तें अझून माझ्या ठायीं पूर्ण व्हायाचें आहे, कां तर
मजविषयींच्या गोष्टींचा शेवट आला आहे. ३८
तेव्हां ते बोलले, हे प्रभू, पाहा, एथें दोन तरवारी
आहेत. मग तो त्यांस ह्मणाला, पुरें आहे.

३९ मग तो निघून रीतीप्रमाणें जाइत झाडां-
च्या डोंगरास गेला, आणि त्याचे शिष्यहि त्याच्या
मागें गेले. ४० तेव्हां त्या ठिकाणीं आल्यावर
त्याने त्यांस ह्मटलें, तुह्मी परीक्षेंत येऊं नये ह्मणून
प्रार्थना करा. ४१ मग तो त्यांजपासून सुमारें
धोंड्याच्या टप्या इतका दूर गेला, आणि गुडघे टेंकून
त्याने प्रार्थना केली कीं, ४२ हे बापा, हा प्याला
मजपासून दूर करायास तुझी इच्छा असली तर बरें,
तरी माझी इच्छा आहे तसें नको, तर तुझ्या इच्छे-
प्रमाणें होवो. ४३ तेव्हां आकाशांतील दूत त्याच्या
दृष्टीस पडला, तो त्याला बळाविता झाला. ४४
तेव्हां फार कष्टी होऊन त्याने मोठ्या निष्ठेने प्रार्थना
केली, आणि त्याचा घाम रक्ताच्या थेंबांसारिखा
भूमीवर पडूं लागला. ४५ मग प्रार्थना झाल्यावर तो
उठून आपल्या शिष्यांकडे आला तेव्हां ते खेदामुळें
झोंपीं गेले असे त्याने पाहिलें. ४६ आणि तो
त्यांस ह्मणाला, झोंप कां घेतां? तुह्मी परीक्षेंत येऊं
नये ह्मणून उठून प्रार्थना करा.

४७ असें तो बोलत आहे इतक्यांत पाहा,
समुदाय आला व यहूदा ह्मटलेला बारा जणांतील
एक त्यांच्या पुढें चालत होता, तो येशूचें चुंबन
घ्यायास त्याजवळ आला. ४८ तेव्हां येशू
त्याला बोलला, यहूदा, तूं चुंबनाने मनुष्याच्या
पुत्राला पराधीन करितोस काय? ४९ मग त्या-
कडले लोक काय होणार हें जाणून त्याला ह्मणाले,
हे प्रभू, आह्मी तरवारीने मारूं काय? ५०
तेव्हां त्यांतील कोणीएकाने प्रमुख याजकाच्या चाक-
राला मारून त्याचा उजवा कान कापून टाकिला.
५१ तेव्हां येशूने उत्तर दिल्हें कीं, एवढेंच होऊं
द्या. मग त्याने त्याच्या कानाला हात लावून त्याला
बरें केलें. ५२ तेव्हां जे मुख्य याजक व देव-
ळाचे सरदार व वडील येशूवर आले, त्यांस तो
बोलला, जसे लुटाऱ्यांवर जातां तसे तुह्मी तरवारी
व सोटे घेऊन बाहेर आलां काय? ५३ मी
प्रतिदिवशीं तुमच्या बरोबर देवळांत होतों तेव्हां
तुह्मी मजवर हात टाकिले नाहींत; परंतु ही तुमची
घटका व अंधाराचा शक्त आहे.

५४ मग त्यांनी त्याला धरून नेलें, आणि
त्याला प्रमुख याजकाच्या घरीं आणिलें; आणि
पेत्रस दुरून मागें चालला. ५५ तेव्हां वाड्या-
च्या मध्यभागीं विस्तव पेटवून ते संगतीं बसले
आणि पेत्रस त्यांच्या मध्यें बसला. ५६ आणि

कोणीएका दासीने तो विस्तवाजवळ बसलेला पाहून
त्याला न्याहाळून ह्मटलें, हाहि त्याच्या बरोबर
होता. ५७ परंतु तो त्याला नाकारून बोलला,
बाई, मी त्याला ओळखत नाहीं. ५८ मग
कांहीं वेळाने दुसरा एक त्याला पाहून बोलला,
तूंहि त्यांतला आहेस. पेत्रस बोलला, माणसा,
मी नव्हें. ५९ आणि सुमारें एक तास झा-
ल्यावर दुसरा कोणी बजावून बोलला, निश्चयें
हाहि त्याच्या बरोबर होता, कां कीं हा गालीली
आहे. ६० तेव्हां पेत्रस बोलला, माणसा, तूं
बोलतोस तें मला ठाऊक नाहीं. असें तो बोलत
आहे इतक्यांतच कोंबडा ओरडला. ६१ मग
प्रभूने मुरडून पेत्रसाकडे दृष्टि लाविली, तेव्हां
प्रभूने जी गोष्ट त्याला सांगितली होती कीं,
कोंबडा ओरडल्याअगोदर तूं तीन वेळा मला नाकार-
सील, ती पेत्रसाला आठवली. ६२ मग पेत्रस
बाहेर जाऊन फार दुःखी होऊन रडला.

६३ तेव्हां ज्या माणसांच्या स्वाधीन येशू होता
त्यांनी फटके मारून त्याची थट्टा केली. ६४
आणि त्याचे डोळे बांधून त्याच्या तोंडावर मारिलें,
व त्याला विचारिलें कीं, तुला कोणी मारिलें
हें तूं भविष्यवादी असल्यास सांग. ६५ आणि
निंदा करून ते त्याच्या विरुद्ध बहुत दुसऱ्या गोष्टी
बोलले.

६६ आणि दिवस उगवल्यावर लोकांचे वडील
व मुख्य याजक व शास्त्री मिळाले, आणि ते त्याला
आपल्या न्यायसभेंत नेऊन बोलले, ६७ तूं
ख्रीस्त आहेस काय? आह्मास सांग. त्याने
त्यांस ह्मटलें, म्या तुह्मास सांगितलें तरी तुह्मी
विश्वास धरणारच नाहीं; ६८ आणि म्या विचा-
रिलें तरी तुह्मी मला उत्तर देणार नाहीं व सोड-
णारहि नाहीं. ६९ यापुढें मनुष्याचा पुत्र देवाच्या
पराक्रमाच्या उजवीकडे बसेल. ७० तेव्हां ते
सर्व बोलले, तर तूं देवाचा पुत्र आहेस काय?
तेव्हां त्याने त्यांस ह्मटलें, तुह्मी ह्मणतां तो मी
आहें. ७१ नंतर ते बोलले, आह्मास अणखी
साक्षीची गरज काय? कां कीं आह्मी स्वतां याच्या
तोंडचें ऐकिलें आहे.

## अध्याय २३.

नंतर त्यांच्या सर्व मंडळीने उठून त्याला पिला-
तसाकडे नेलें. २ मग ते त्याजवर दोष ठेवूं
लागले कीं, हा प्रजेला फितवितो, आणि मी ख्रीस्त
राजा आहें असें ह्मणून काइसाराला पट्टी देणें
मना करितो, असा आह्मास अढळला. ३ तेव्हां
पिलातसाने त्याला विचारिलें कीं, तूं यहूद्यांचा
राजा आहेस काय? मग त्याने त्याला उत्तर दिल्हें
कीं, तूं ह्मणतोस तसेंच. ४ नंतर पिलातसाने
मुख्य याजकांस व समुदायांस ह्मटलें, मला या
माणसाकडे कांहीं दोष सांपडत नाहीं. ५ मग
ते आग्रह धरून बोलले कीं, तो गालीलापासून
आरंभ करून एथपर्यंत अवघ्या यहूद्यांत उपदेश
करीत लोकांस चिथावितो. ६ तेव्हां पिला-
तसाने गालीलाचें नाम ऐकून विचारिलें कीं,
तो माणूस गालीली आहे काय? ७ मग तो
हेरोदाच्या अधिकारांतला आहे असें जाणून त्याने
त्याला हेरोदाकडे पाठविलें, तो तर त्या दिवसां-
मध्यें यरूशलेमांत होता. ८ मग हेरोद येशूला
पाहून फार संतोष पावला, कारण कीं त्याविषयीं-
च्या बहुत गोष्टी ऐकिल्यावरून तो त्याला पाहायास
फार वेळ इच्छीत होता, आणि त्याकडून कांहीं
चमत्कार होईल तो पाहावा, असी त्याला आशा
होती. ९ तेव्हां त्याने त्याला बहुत गोष्टींविषयीं
विचारिलें, परंतु त्याने त्याला कांहींच उत्तर दिल्हें
नाहीं. १० तेव्हां मुख्य याजक व शास्त्री यांनी
उभे राहून आवेशाने त्याजवर दोष ठेविले. ११
आणि हेरोदाने आपल्या शिपायांसुद्धां त्याचा धिक्कार
व थट्टा करून तेजस्वी वस्त्रें लेववून माघारें पि-
लातसाकडे त्याला पाठविलें. १२ त्याच दि-
वशीं पिलातस व हेरोद हे परस्पर मित्र झाले,
कां तर पूर्वी त्यांचें परस्पर वैर होतें. १३ मग पि-
लातसाने मुख्य याजकांस व अधिकाऱ्यांस व लो-
कांस एकत्र बोलावून त्यांस ह्मटलें, १४ तुह्मी हा
माणूस लोकांस फितविणारा ह्मणून मजकडे आणि-
ला, आणि पाहा, म्या तुमच्या देखतां चौकसी केली
असतां ज्या गोष्टींचा आरोप तुह्मी याजवर आणितां
त्यांविषयीं या माणसाकडे कांहीं दोष मला सांप-
डला नाहीं, १५ आणि हेरोदालाहि नाहीं; कां
कीं त्याकडे म्या तुह्मास पाठविलें, आणि पाहा, याने
मरणदंडास योग्य कांहीं केलें नाहीं; १६ यास्तव
मी त्याला शिक्षा करून सोडीन. १७ अणखी
त्याला त्या सणांत त्याकरितां एकाला सोडावें
लागत असे. १८ तेव्हां सर्व एकदांच ओरडत
बोलले, याला काढून टाक, आह्मासाठीं बाराब्बाला

सोड. १९ तो बाराब्बा तर नगरांत झालेला
कांहीं दंगा व खून यांमुळें बंदिशाळेंत घातला
होता. २० यास्तव पिलातस येशूला सोडण्याची
इच्छा धरून फिरून त्यांसीं बोलूं लागला. २१
परंतु ते ओरडत बोलले, याला खांबीं दे, खांबीं
दे. २२ मग तो तिसऱ्याने त्यांस बोलला, कां?
त्याने काय वाईट केलें आहे! त्याकडे मरणास
योग्य कांहीं दोष मला सांपडला नाहीं, यास्तव
मी त्याला शिक्षा करून सोडीन. २३ परंतु ते
फार आग्रह करून त्याला खांबीं द्यावें ह्मणून
मोठ्याने मागत होते; आणि त्यांचें व मुख्य याज-
कांचें बोलणें प्रबळ झालें. २४ तेव्हां त्यांच्या
मागण्याप्रमाणें व्हावें ह्मणून पिलातसाने ठरविलें.
२५ आणि दंगा व खून यांमुळें बंदिशाळेंत घात-
लेला जो त्यांनी मागितला होता त्याला त्याने त्यां-
करितां सोडिलें, आणि येशूला त्यांच्या इच्छेवर
सोपून दिल्हें.

२६ आणि ते त्याला नेत होते, तेव्हां कोणीएक
शिमोन कुरेनेकर रानांतून येत असतां त्यांनी
त्याला धरून त्याने येशूच्या मागें खांब वाहावा
ह्मणून त्याजवर तो दिल्हा. २७ आणि लोकांचा
व बायकांचा मोठा समुदाय त्याच्या मागें चा-
लला, त्यासाठीं त्या बडवून घेऊन शोक करीत
होत्या. २८ तेव्हां येशू त्यांकडे मुरडून बोलला,
अहो यरूशलेमांतील कन्याहो, मजसाठीं रडूं
नका, तर आपणांसाठीं व आपल्या लेंकरांसाठीं
रडा. २९ कां तर पाहा, असे दिवस येत आहेत
कीं त्यांत बोलतील, ज्या वांझा व जीं पोटें प्रसवलीं
नाहींत व ज्या थानानी पाजिलें नाहीं, तीं धन्य.
३० तेव्हां ते डोंगरांस ह्मणूं लागतील, आह्मावर
पडा, व टेंकड्यांस ह्मणतील, आह्मास झांका. ३१
कां कीं ओल्या झाडाला असें करितात तर वाळ-
लेल्यास काय होईल? ३२ तेव्हां त्याच्या बरो-
बर मारण्यासाठीं दुसरे दोन अपराधीहि नेले.

३३ मग ते कंवटी ह्मटलेल्या जाग्यांत आले,
तेव्हां त्यांनी तेथें त्याला व त्या अपराध्यांस, एकाला
उजवीकडे व एकाला डावीकडे, असें खांबीं दिल्हें.
३४ येशू बोलला, हे बापा, त्यांची क्षमा कर,
कारण कीं ते काय करितात हें त्यांस समजत नाहीं.
नंतर त्यांनी चिट्ठ्या टाकून त्याचीं वस्त्रें वांटून
घेतलीं. ३५ आणि लोक पाहत उभे राहिले, व
त्यांसुद्धां अधिकारी उपहास करीत बोलले, त्याने
दुसऱ्यांस तारिलें, तो देवाचा निवडलेला ख्रीस्त
असला तर त्याने आपणाला तारावें. ३६ आणि
शिपायांनीहि जवळ येऊन त्याला आंब देऊन त्याची
थट्टा केली कीं, ३७ तूं यहूद्यांचा राजा अस-
लास तर आपणाला तार. ३८ आणि हेल्लेनी
व रोमी व इब्री या अक्षरांनी लिहिलेला असा
पत्ता त्याच्या वरतीं होता, हा यहूद्यांचा राजा
आहे. ३९ आणि त्या टांगलेल्या अपराध्यांतील
एकाने त्याची निंदा करून ह्मटलें, तूं ख्रीस्त अस-
लास तर आपणाला व आह्मासहि तार. ४०
परंतु दुसऱ्याने उत्तर देऊन त्याला असें धमका-
विलें कीं, तूं याच दंडांत असतां देवाचें भय
अगदी धरीत नाहींस काय? ४१ आह्मी तर
न्यायाने सोसितों खरें, कारण कीं आह्मी जें केलें
त्याचें योग्य फळ भोगितों, परंतु याने कांहीं अयो-
ग्य केलें नाहीं. ४२ मग तो येशूला ह्मणाला,
हे प्रभू, तूं आपल्या राज्यांत येसील तेव्हां माझी
आठवण कर. ४३ तेव्हां येशूने त्याला ह्मटलें,
मी तुला खचीत सांगतों, तूं आज माझ्या संगतीं
स्वर्गांत अससील. ४४ तेव्हां सुमारें दुपार झाली
होती, आणि तिसऱ्या प्रहरापर्यंत सर्व देशावर
अंधार पडला. ४५ सूर्य अंधक झाला, आणि
देवळांतील पडदा मध्यें फाटला. ४६ आणि
येशू मोठ्याने ओरडत बोलला, हे बापा, मी आ-
पला आत्मा तुझ्या हातांत सोपून देतों; आणि असें
बोलून त्याने प्राण सोडिला. ४७ तेव्हां शतपति
झालेली गोष्ट पाहून देवाला गौरवून बोलला, खचीत
हा माणूस नीतिमान होता. ४८ आणि जे समु-
दाय पाहण्याकरितां जमले होते ते अवघे झालेल्या
गोष्टी पाहून आपले ऊर बडवून माघारे गेले. ४९
तेव्हां त्याचे सर्व ओळखीचे व ज्या बायका त्या-
च्या मागें गालीलाहून आल्या होत्या त्या दूर उभ्या
राहून या गोष्टी पाहत होत्या.

५० आणि पाहा, यहूद्यांच्या अरिमाथाई नगरां-
तला योसेफ नामें मनुष्य, तो सभासद व चांगला
व नीतिमान् असा होता; ५१ त्याने त्यांच्या
विचाराला व कामाला संमत दिल्हें नव्हतें, आणि
तो स्वतां देवाच्या राज्याची वाट पाहत होता;
५२ त्याने पिलातसाजवळ जाऊन येशूचें शरीर
मागितलें. ५३ मग तें खालीं काढून तागाच्या
वस्त्राने गुंडाळलें आणि खडकांत खोदलेल्या ज्या
थड्यांत कोणी कधीं ठेविला नव्हता त्यांत तें

ठेविलें. ५४ तो तयारी करण्याचा दिवस होता
आणि शाब्बाथ लागणार होता. ५५ आणि ज्या
बायका गालीलाहून त्याच्या संगतीं आल्या होत्या,
त्यानीहि पाठीमागें चालून तें थडें व त्याचें शरीर
कसें ठेविलें तें पाहिलें. ५६ मग त्यानी माघारें
जाऊन सुगंध द्रव्यें व सुंगध तेल हीं तयार
केलीं. मग शाब्बाथ दिवशीं आज्ञेप्रमाणें त्या स्वस्थ
राहिल्या.

## अध्याय २४.

आणि सप्तकाच्या पहिल्या दिवशीं मोठ्या पाहाटेस
त्या आपण तयार केलेलीं सुगंध द्रव्यें घेऊन
थड्याकडे आल्या, व त्यांसुद्धां दुसऱ्या कित्येक होत्या.
२ तेव्हां थड्यावरून धोंड लोटलेली असी त्यानी
पाहिली, ३ आणि आंत गेल्यावर प्रभु येशूचें
शरीर त्यांस मिळालें नाहीं. ४ आणि असें झालें
कीं, त्याविषयीं त्यांस भ्रांति पडली असतां, पाहा,
लखलखीत वस्त्रें ल्यालेले दोन मनुष्य त्यांच्या जवळ
उभे राहिले. ५ आणि त्या भिऊन तोंड भूमीकडे
लावीत असतां, त्यांस ते ह्मणाले, मेलेल्यांमध्यें
जिवंताचा शोध तुह्मी कां करितां? ६ तो एथें
नाहीं तर उठला आहे, तो गालीलांत होता तेव्हां
त्यानें तुह्मास कसें सांगितलें हें आठवा, ७ तें असें,
मनुष्याच्या पुत्राला पापी माणसांच्या हातीं दिल्हें
पाहिजे, आणि खांबीं दिल्हें पाहिजे, आणि तिसऱ्या
दिवशीं फिरून उठलें पाहिजे. ८ तेव्हां त्यानी
त्याचें बोलणें आठविलें; ९ आणि थड्या-
पासून त्यानी माघारें येऊन अकरांस व वरकड
सर्वांस त्या अवघ्या गोष्टी सांगितल्या. १० आणि
ज्यानी या गोष्टी प्रेषितांस सांगितल्या त्या मारया
माग्दालीणी व योहान्ना व याकोबाची आई मारया,
व यांसुद्धां दुसऱ्या अस्या होत्या. ११ परंतु त्यांच्या
गोष्टी त्यांस गप्प अशा वाटल्या, आणि त्यांवर त्यानी
विश्वास ठेविला नाहीं. १२ तेव्हां पेत्रस उठून
थड्याजवळ धावत गेला, आणि ओणवा होऊन
त्यानें प्रेतवस्त्रें एकीकडे ठेविलेलीं पाहिलीं, आणि
झालेल्या गोष्टीविषयीं तो आश्चर्य करीत आपल्या
घरीं गेला.

१३ आणि पाहा, त्याच दिवशीं त्यांतील दोघे
जण एम्माऊस नामें गांवास जात होते, तो यरूश-
लेमापासून तीन कोस लांब आहे. १४ आणि
ते त्या घडलेल्या सर्व गोष्टींविषयीं परस्पर संभाषण
करीत होते. १५ आणि असें झालें कीं, ते संभाषण
करीत व विचारीत असतांना येशू स्वतां जवळ
येऊन त्यांच्या बरोबर चालला. १६ परंतु त्यानी
त्याला ओळखूं नये ह्मणून त्यांचे डोळे आकळले
होते. १७ तेव्हां त्यानें त्यांस ह्मटलें, तुह्मी
चालतांना ज्या गोष्टी एकमेकांशीं काढून म्लानमुख
होतां त्या कोणत्या? १८ मग क्लयपास नामें एकानें
त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं यरूशलेमांत प्रवासी
असतां त्यांत या दिवसांमध्यें ज्या गोष्टी घडल्या
त्या तुला एकट्यालाच ठाऊक नाहींत काय? १९
तो त्यांस ह्मणाला, कोणत्या? तेव्हां त्यानी त्याला
ह्मटलें, येशू नाजारेथकर याविषयींच्या; तो माणूस
देवाच्या व सर्व लोकांच्या समोर करण्यांत व बोल-
ण्यांत पराक्रमी भविष्यवादी झाला; २० त्याला
तर आमच्या मुख्य याजकानी व अधिकाऱ्यानी
मरणदंडासाठीं पराधीन करून खांबीं दिल्हें. २१
परंतु आह्मी आशा धरीत होतों कीं, जो इस्राए-
लाची खंडणी करणार तो हाच आहे; अणखी
या अवघ्यांशिवाय या गोष्टी घडून आज तिसरा
दिवस चालला आहे. २२ अणखी आमच्यांतील
कित्येक बायकानीहि आह्मास थक्क केलें, त्या
मोठ्या पाहाटेस थड्याकडे गेल्यावर त्याचें शरीर
त्यांस मिळालें नाहीं. २३ तेव्हां त्यानी येऊन
सांगितलें कीं, दुतानी आह्मास दिसून तो जिवंत
आहे असें ह्मटलें. २४ मग आमच्या बरोबरच्या
माणसांतील कित्येक थड्याकडे गेल्यावर, बायकानी
सांगितल्याप्रमाणें त्यांसहि आढळलें, परंतु त्यानी
त्याला पाहिलें नाहीं. २५ मग तो त्यांस ह्मणा-
ला, अहो निर्बुद्धि, व भविष्यवाद्यानी ज्या गोष्टी
सांगितल्या त्या सर्वांवर विश्वास धरण्यास मतिमंद
हो, २६ ख्रीस्तानें हीं दुःखें सोसून आपल्या
गौरवांत जावें, याचें अगत्य नव्हतें काय? २७
मग त्यानें मोशे व सर्व भविष्यवादी यांपासून
आरंभ करून सर्व शास्त्रांतील आपल्याविषयींच्या
गोष्टी त्यांस समजाविल्या. २८ आणि ज्या गां-
वास ते जात होते त्याजवळ आले, तेव्हां त्यानें
पुढें जाण्याचा रोंख दाखविला; २९ परंतु ते
त्याला आग्रह करून ह्मणाले, आमच्या संगतीं
राहा, कारण कीं सांज जवळ आहे व दिवस उत-
रला आहे. मग तो त्यांच्या बरोबर राहायास
आंत गेला. ३० आणि असें झालें कीं, तो त्यांब-
रोबर जेवायास बसला असतां, त्यानें भाकर घेऊन

आशीर्वाद मागितला व मोडून त्यांस दिल्ही. ३१
तेव्हां त्यांचे डोळे मोकळे झाले व त्यांनी त्याला
ओळखिलें, मग तो त्यांस अदृश्य झाला. ३२ नंतर
ते एकमेकांस ह्मणाले, तो वाटेंत आह्मांसीं बोलत
होता व आह्मासाठीं शास्त्र उघडें करीत होता,
तेव्हां आमचें अंतःकरण आह्मामध्यें जळत होतें
कीं नाहीं? ३३ तेव्हां त्याच घटकेस ते उठून
यरूशलेमास माघारे गेले, आणि अकरा जण व
त्यांच्या संगतीचीं माणसें एकत्र मिळालेलीं त्यांस
अढळलीं, ३४ व सांगूं लागलीं कीं, प्रभु
उठला आहे खरा, व शिमोनाला दिसला
आहे. ३५ मग यांनी वाटेंतील गोष्टी आणि तो
भाकर मोडते वेळेस आपण कसा ओळखला, हें
सांगितलें.

३६ आणि ते या गोष्टी सांगत असतां येशू
स्वतां त्यांच्या मध्यें उभा राहिला, आणि त्यांस ह्म-
णाला, तुह्मास शांति असो. ३७ परंतु ते घाब-
रले, आणि भयभीत होऊन आपण आत्मा पाहिला
असें त्यांस वाटलें. ३८ मग त्याने त्यांस ह्म-
टलें, तुह्मी कां घाबरलां, व तुमच्या अंतःकरणांत
कल्पना कां उठतात? ३९ माझे हात व माझे पाय
पाहा, कीं मी स्वतां आहें, मला चांचपून पाहा, कां
कीं मला मास व हाडें आहेत ह्मणून पाहतां
तसीं आत्म्याला नाहींत. ४० तेव्हां हें बोलून
त्याने आपले हात व पाय त्यांस दाखविले. ४१
तोंपर्यंतहि ते आनंदामुळें विश्वास न ठेवून आ-
श्चर्य करीत असतां त्याने त्यांस ह्मटलें, एथें तुह्मा-
जवळ कांहीं खायाला आहे काय? ४२ मग
त्यांनी त्याला भाजलेल्या माशाचा तुकडा व मोह-
ळाचें कांहीं दिल्हें. ४३ तेव्हां त्याने घेऊन
त्यांच्या देखतां खाल्लें.

४४ नंतर त्याने त्यांस ह्मटलें, मी तुमच्या
बरोबर होतों तेव्हां ज्या गोष्टी तुह्मास सांगितल्या
त्या याच कीं, मोशाच्या नेमशास्त्रांत व भविष्य-
वाद्यांत व गीतांमध्यें मजविषयींच्या सर्व लिहिलेल्या
गोष्टी पूर्ण झाल्या पाहिजेत. ४५ तेव्हां त्यांनी
शास्त्र समजावें ह्मणून त्याने त्यांचें मन उघडिलें;
४६ मग त्यांस ह्मटलें कीं, असें लिहिलें आहे व
असें अगत्यहि होतें कीं, ख्रीस्ताने सोसावें, आणि
तिसऱ्या दिवसीं मेलेल्यांमधून उठावें, ४७ आणि
यरूशलेमापासून आरंभ करून सर्व राष्ट्रांस पश्चा-
त्ताप व पापांची क्षमा त्याच्या नांवाने गाजविण्यांत
यावी. ४८ आणि या गोष्टींचे साक्षी तुह्मी
आहां. ४९ आणि पाहा, मी आपल्या बापाचें
वचन तुह्मावर पाठवितों, परंतु तुह्मी वरून सामर्थ्य
अंगीं ल्याल तोंपर्यंत यरूशलेम नगरांत राहा.

५० नंतर तो त्यांस बेथानीपावेतों बाहेर घेऊन
गेला, तेव्हां त्याने आपले हात वर करून त्यांस
आशीर्वाद दिल्हा. ५१ आणि असें झालें कीं,
तो त्यांस आशीर्वाद देत असतां त्यांपासून वेगळा
झाला आणि त्याला आकाशांत वर घेतलें. ५२
तेव्हां ते त्याला नमन करून मोठ्या आनंदाने
यरूशलेमास माघारे गेले; ५३ आणि ते नित्य देव-
ळांत देवाची स्तुति व गौरव करीत असत. आमेन.

# योहानाने केलेलें शुभवर्त्तमान.

## अध्याय १.

प्रारंभीं शब्द होता, आणि शब्द देवाजवळ
होता, आणि शब्द देव होता. २ तोच
प्रारंभीं देवाजवळ होता. ३ त्याजकडून अवघें
झालें, आणि जें झालें असें कांहींच त्याने केल्यावांचून
झालें नाहीं. ४ त्यामध्यें जीवन होतें, आणि तें
जीवन माणसांचा उजेड होता. ५ आणि तो उ-
जेड अंधारांत प्रकाशतो, परंतु अंधाराने त्याला
घेतलें नाहीं.

६ देवाने पाठविलेला कोणीएक माणूस होता;
त्याचें नांव योहान. ७ तो साक्षीकरितां ह्मणजे
त्या उजेडाविषयीं साक्ष द्यायास आला, यासाठीं
कीं आपणाकडून सर्वांनी विश्वास धरावा. ८ तोच
तो उजेड नव्हता, परंतु त्या उजेडाविषयीं साक्ष
द्यायास आला. ९ जो जगांत येऊन प्रत्येक माण-
साला प्रकाश देतो तोच खरा उजेड होता. १०
तो जगांत होता आणि जग त्याजकडून झालें, तरी
जगाने त्याला जाणिलें नाहीं. ११ आपलीं जीं

त्याकडे तो आला, आणि आपले जे त्यानी त्याला
अंगीकारिलें नाहीं. १२ परंतु जितक्यानी त्याला
अंगीकारिलें ह्मणजे त्याच्या नांवावर विश्वास ठेवि-
ला, तितक्यांस त्याने देवाचीं लेंकरें होण्याचा अधि-
कार दिल्हा. १३ ते रक्तांपासून किंवा देहाच्या
इच्छेपासून किंवा माणसाच्या इच्छेपासून नाहींत,
तर देवापासून जन्मले.

१४ आणि शब्द देह असा झाला, व त्याने आ-
ह्मामध्यें वस्ती केली, आणि आह्मी त्याचें गौरव पा-
हिलें, तें बापाच्या एकुलत्याच्या गौरवासारिखें होतें,
तो कृपेने व खरेपणाने पूर्ण होता. १५ त्याविषयीं
योहान्न साक्ष देत असतां ओरडत बोलला, जो
माझ्या मागून येतो तो माझ्या पुढें झाला, कारण
कीं तो माझ्या पूर्वी होता, असें ज्याविषयीं म्या
ह्मटलें तो हाच आहे. १६ आणि त्याच्या पूर्ण-
पणांतून आह्मी सगळे कृपेबद्दल कृपा पावलों आहों.
१७ कारण कीं नेमशास्त्र मोशेयाकडून दिल्हें होतें,
कृपा व खरेपण हीं येशू ख्रीस्ताकडून झालीं. १८
देवाला कोणी कधींहि पाहिलें नाहीं; जो एकुलता
पुत्र बापाच्या उरासीं असतो त्याने तो कळ-
विला आहे.

१९ आणि योहान्नाची साक्ष हीच आहे,
यहूद्यानी यरूशलेमाहून याजक व लेवी यांस
पाठवून त्याला विचारिलें कीं, तूं कोण आहेस?
२० तेव्हां त्याने पत्करिलें व नाकारिलें नाहीं, परंतु
मी ख्रीस्त नाहीं असें पत्करिलें. २१ मग त्यानी
त्याला विचारिलें, तर काय? तूं एलीया आहेस
काय? तेव्हां तो ह्मणाला, मी तो नाहीं. तर तो
भविष्यवादी आहेस काय? तेव्हां त्याने नाहीं, असें
उत्तर दिल्हें. २२ मग ते त्याला ह्मणाले, तूं
कोण आहेस? ज्यानी आह्मास पाठविलें त्यांस
आह्मी उत्तर द्यावें ह्मणून; तूं आपणाविषयीं काय
ह्मणतोस? २३ तो बोलला, यशाया भविष्यवा-
द्याने सांगितल्याप्रमाणें, प्रभूचा मार्ग नीट करा, असी
रानांत ओरडणाऱ्याची वाणी मी आहें. २४ तेव्हां
जे पाठविले होते ते परोश्यांतील होते. २५ मग
त्यानी त्याला विचारिलें कीं, जर तूं ख्रीस्त नाहींस
व एलीया नाहींस व तो भविष्यवादीहि नाहींस,
तर बाप्तिस्मा कां करितोस? २६ योहान्नाने त्यांस
उत्तर दिल्हें कीं, मी पाण्याने बाप्तिस्मा करितों,
परंतु ज्याला तुह्मी जाणत नाहीं असा एक तुह्मा-
मध्यें उभा आहे. २७ जो माझ्या मागून येऊन
माझ्या पुढें झाला, ज्याच्या वाहाणांचे बंद सोडायास
मी योग्य नाहीं, तोच तो आहे. २८ यार्देनेच्या
पलिकडे बेथबाऱ्यांत योहान्न बाप्तिस्मा करीत होता,
तेथें या गोष्टी झाल्या.

२९ दुसऱ्या दिवशीं योहान्नाने आपल्याकडे
येशूला येतां पाहून ह्मटलें, पाहा, जगाचें पाप हरण
करणारा देवाचा कोंकरा. ३० ज्याविषयीं म्या सांगि-
तलें कीं, माझ्या मागून असा माणूस येतो कीं तो
माझ्या पुढें झाला, कारण कीं तो माझ्या पूर्वी होता,
तो हाच आहे. ३१ आणि म्या त्याला जाणिलें
नव्हतें, परंतु तो इस्राएलास प्रगट व्हावा ह्मणून
मी येऊन पाण्याने बाप्तिस्मा करितों. ३२ आणि
योहान्नाने असी साक्ष दिल्ही कीं, आत्मा आकाशां-
तून खबुत्रासारिखा उतरतां म्या पाहिला, आणि तो
त्यावर राहिला. ३३ आणि म्या त्याला जाणिलें
नव्हतें, परंतु ज्याने मला पाण्याने बाप्तिस्मा करा-
यास पाठविलें त्याने मला सांगितलें कीं, ज्यावर
आत्मा उतरतां व ज्यावर राहतां पाहसील तो
पवित्र आत्म्यांने बाप्तिस्मा करणारा आहे. ३४
तेव्हां म्या पाहिलें व साक्ष दिल्ही कीं, हा देवाचा
पुत्र आहे.

३५ दुसऱ्या दिवशीं योहान्न आपल्या दोघां
शिष्यांसुद्धां पुन्हा उभा होता; ३६ तेव्हां तो
येशूला चालतां पाहून ह्मणाला, पाहा, देवाचा
कोंकरा. ३७ आणि ते दोघे शिष्य त्याचें बोलणें
ऐकून येशूच्या मागें चालले. ३८ तेव्हां येशूने
मुरडून त्यांस मागून येतां पाहून त्यांस ह्मटलें,
काय शोधितां? ते त्याला ह्मणाले, राब्बी, ह्मणजे
हे गुरू, कोठें राहतोस? ३९ त्याने त्यांस ह्म-
टलें, येऊन पाहा. ते आले, आणि तो कोठें राहत
होता हें त्यानी पाहिलें, मग त्या दिवशीं ते त्याच्या
जवळ राहिले; तेव्हां सुमारें दाहावा तास होता. ४०
जे दोघे योहान्नाचें ऐकून त्याच्या मागें चालले,
त्यांतील शिमोन पेत्रसाचा भाऊ अंद्रयास हा एक
होता. ४१ त्याला त्याचा भाऊ शिमोन पहि-
ल्याने मिळाला, आणि तो त्याला ह्मणाला, मशी-
हा, ह्मणजे ख्रीस्त तो आह्मास सांपडला आहे.
४२ मग त्याने त्याला येशूकडे आणिलें; तेव्हां
येशूने त्याकडे पाहून ह्मटलें, तूं योनाचा पुत्र शि-
मोन आहेस, तुला केफा, ह्मणजे पेत्रस, असें
ह्मणतील.

४३ दुसऱ्या दिवशीं येशूने गालीलांत जाण्याचा

बेत केला, तेव्हां फिलिप्पस त्याला मिळाल्यावर
त्याने त्याला ह्मटलें, माझ्या मागें ये· ४४ फि-
लिप्पस तर अंद्रयास व पेत्रस यांचें बेथसाइदा
नगर एथला होता· ४५ फिलिप्पसाला नथानेल
मिळाल्यावर तो त्याला ह्मणाला, ज्याविषयीं नेम-
शास्त्रांत मोश्याने आणि भविष्यवाद्यानी लिहिलें
तो आह्मास सांपडला आहे, तो योसेफाचा पुत्र
येशू नाजारेथकर· ४६ तेव्हां नथानेलाने त्याला
ह्मटलें, नाजारेथांतून कांहीं चांगलें निघेल काय?
फिलिप्पस त्याला ह्मणाला, येऊन पाहा· ४७
येशूने नथानेलाला आपल्याकडे येतां पाहून त्यावि-
षयीं ह्मटलें, पाहा, इस्राएली खरा, त्यांत कपट
नाहीं· ४८ नथानेल त्याला ह्मणाला, मला कोठून
ओळखतोस? येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं,
फिलिप्पसाने तुला बोलाविल्यापूर्वी तूं अंजिराच्या
झाडाखालीं होतास तेव्हां म्या तुला पाहिलें· ४९
नथानेलाने त्याला उत्तर दिल्हें कीं, हे गुरू, तूं
देवाचा पुत्र आहेस, तूं इस्राएलाचा राजा आहेस·
५० येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, म्या तुला
अंजिराच्या झाडाखालीं पाहिलें हें तुला सांगि-
तलें, यावरून विश्वास धरिलास काय? यांहून मोठीं
कामें पाहसील· ५१ आणखी तो त्याला ह्मणाला,
मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, यापुढें आकाश
उघडलेलें आणि देवाच्या दुतांस चढतां व मनु-
ष्याच्या पुत्रावर उतरतां पाहाल·

## अध्याय २.

आणि तिसऱ्या दिवशीं गालीलांतील काना
एथें लग्न होतें, तेव्हां येशूची आई तेथें
होती· २ आणि येशू व त्याचे शिष्याहि त्या
लग्नास बोलाविले होते· ३ आणि द्राक्षारस सर-
ल्यावर येशूची आई त्याला ह्मणाली, त्यांच्या
जवळ द्राक्षारस नाहीं· ४ येशूने तिला ह्मटलें, बाई,
माझा व तुझा काय संबंध? माझी घटका अझून
आली नाहीं· ५ त्याची आई चाकरांस ह्मणाली,
जें कांहीं तो तुह्मास सांगेल तें करा· ६ तेव्हां
यहूद्यांच्या शुद्ध करण्याच्या रीतीप्रमाणें पाण्याच्या
साहा दगडी कुंड्या, दोन दोन किंवा तीन तीन मण
मावत, अशा तेथें ठेविलेल्या होत्या· ७ येशूने
त्यांस ह्मटलें, कुंड्या पाण्याने भरा· तेव्हां त्यानी
त्या तोंडोतोंड भरल्या· ८ मग त्याने त्यांस सां-
गितलें, आतां त्यांतून काढून जेवणकारभाऱ्याकडे
न्या· तेव्हां त्यानी नेलें· ९ मग पाण्याचा झा-
लेला द्राक्षारस जेवणकारभाऱ्याने चाखला, आणि
तो कोठून आहे हें ठाऊक नव्हतें पाणी काढ-
णाऱ्या चाकरांस तर ठाऊक होतें; तेव्हां जेवण-
कारभारी नवऱ्याला बोलावून त्याला ह्मणाला,
१० प्रत्येक मनुष्य चांगला द्राक्षारस पहिल्याने
वाढितो मग बहुत प्याल्यावर निरस वाढितो,
परंतु त्वां चांगला द्राक्षारस आतांपर्यंत ठेविला
आहे· ११ येशूने हा चमत्कारांचा प्रारंभ गाली-
लांतील काना एथें केला, आणि आपलें गौरव
प्रगट केलें, आणि त्याच्या शिष्यानी त्याजवर
विश्वास ठेविला·

१२ त्यानंतर तो व त्याची आई व त्याचे
भाऊ व त्याचे शिष्य कपरणाहूमास खालीं गेले,
परंतु तेथें फार दिवस राहिले नाहींत· १३
तेव्हां यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला
होता, आणि येशू यरूशालेमास गेला· १४ मग
देवळांत गुरें व मेंढरें व खबुत्रें विकणारे व सराफ
हे बसलेले त्याला आढळले· १५ तेव्हां त्याने
लाहान दोऱ्यांचा कोरडा करून त्या सर्वांस आणि
मेंढरें व गुरें यांस देवळांतून घालविलें, सराफांचा
खुर्दाहि उडविला व चौरंग उलथे केले; १६
आणि खबुत्रें विकणाऱ्यांस ह्मटलें, हीं एथून काढा,
माझ्या बापाचें घर व्यापाराचें घर करूं नका· १७
तेव्हां तुझ्या घराच्या आवेशाने मला खाऊन टाकिलें
आहे, असें लिहिलें आहे, हें त्याच्या शिष्यांस
आठवलें· १८ यावरून यहूद्यानी त्याला उत्तर
दिल्हें कीं, तूं हीं कामें करितोस याविषयीं आ-
ह्मास काय चिन्ह दाखवितोस? १९ येशूने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी हें देऊळ मोडा, मग
मी तीन दिवसांत हें उभारीन· २० तेव्हां यहूदी
बोलले, हें देऊळ बांधायास शेचाळीस वर्षे लागलीं,
तर तूं तीन दिवसांत हें उभारिसील काय? २१
परंतु तो आपल्या शरीर देवळाविषयीं बोलला·
२२ यास्तव तो मेलेल्यांमधून उठल्यावर त्याने
असें ह्मटलें होतें, हें त्याच्या शिष्यांस आठवलें,
मग त्यानी शास्त्रावर आणि येशूने जी गोष्ट सांगि-
तली होती तिजवर विश्वास ठेविला·

२३ आणि तो वल्हांडणाच्या सणांत यरूशाले-
मामध्यें होता, तेव्हां त्याने केलेले चमत्कार पाहून
बहुतानी त्याच्या नांवावर विश्वास ठेविला· २४
परंतु येशूने स्वता आपणाविषयीं त्याजवर भरवसा

ठेविला नाहीं, कारण कीं तो सर्वांस जाणत असे,
२५ आणखी माणसाविषयीं कोणी साक्ष द्यावी याची
त्याला गरज नव्हती, कारण कीं माणसामध्यें काय
आहे हें तो जाणे.

## अध्याय ३.

तेव्हां यहूद्यांचा कोणीएक अधिकारी परोश्यांतील
माणूस निकदेमस नामें होता. २ तो रात्रीं
येशूकडे जाऊन त्याला ह्मणाला, हे गुरू, तूं देवा-
पासून आलेला उपदेशक आहेस हें आह्मास
ठाऊक आहे, कारण कीं हे जे चमत्कार तूं करितोस
ते देव त्याबरोबर असल्यावांचून कोणाच्याने करव-
णार नाहींत. ३ येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं,
मी तुला खचीत खचीत सांगतों, पुन्हा जन्मल्यावां-
चून कोणाच्यानेहि देवाचें राज्य पाहवत नाहीं. ४
निकदेमस त्याला ह्मणाला, माणूस ह्मातारा असतां
तो कसा जन्मेल? पुन्हा आपल्या आईच्या पोटांत
जाऊन त्याच्याने जन्मवेल काय? ५ येशूने
उत्तर दिल्हें कीं, मी तुला खचीत खचीत सांगतों,
पाण्यापासून व आत्म्यापासून जन्मल्यावांचून कोणा-
च्याने देवाच्या राज्यांत जाववत नाहीं. ६ जें
देहापासून जन्मलें तें देह आहे, आणि जें आत्म्या-
पासून जन्मलें तें आत्मा आहे. ७ तुह्मास
पुन्हा जन्मलें पाहिजे हें म्या तुला सांगितलें, ह्मणून
नवल मानूं नको. ८ वारा पाहिजे तिकडे वाहतो,
आणि त्याचा शब्द ऐकतोस, परंतु तो कोठून येतो
व कोठें जातो हें तुला कळत नाहीं; जो कोणी
आत्म्यापासून जन्मला तो तसाच आहे. ९ निक-
देमसाने त्याला उत्तर दिल्हें कीं, या गोष्टी कशा
होतील? १० येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं
इस्राएल लोकांचा उपदेशक असून या गोष्टी जाणत
नाहींस काय? ११ मी तुला खचीत खचीत
सांगतों कीं, जें आह्मास ठाऊक आहे तें आह्मी
सांगतों, आणि जें आह्मी पाहिलें त्याविषयीं साक्ष
देतों, परंतु तुह्मी आमची साक्ष घेत नाहीं. १२
म्या पृथ्वीवरल्या गोष्टी तुह्मास सांगितल्या असतां
तुह्मी विश्वास धरिला नाहीं तर आकाशांतल्या
गोष्टी तुह्मास सांगितल्यास विश्वास कसा धराल?
१३ आणि जो मनुष्याचा पुत्र आकाशांतून उत-
रला व आकाशांत आहे, त्यावांचून कोणी आका-
शांत चढला नाहीं. १४ आणि जसा मोश्याने
रानांत साप उंच केला तसें मनुष्याच्या पुत्राला
उंच केलें पाहिजे; १५ यासाठीं कीं त्याजवर जो
कोणी विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये, तर
त्याला सर्वकाळचें जीवन व्हावें. १६ कां तर
देवाने जगावर एवढी प्रीति केली कीं, त्याने आपला
एकुलता पुत्र दिल्हा, यासाठीं कीं जो कोणी त्यावर
विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये, तर त्याला
सर्वकाळचें जीवन व्हावें. १७ कां कीं जग अन्यायी
ठरविण्यासाठीं नाहीं, तर जगाचें तारण त्याजकडून
व्हावें, ह्मणून देवाने आपल्या पुत्राला जगांत पाठ-
विलें. १८ जो त्यावर विश्वास ठेवितो तो
अन्यायी ठरत नाहीं, परंतु जो विश्वास ठेवीत नाहीं
तो अन्यायी ठरलेलाच आहे, कां कीं त्याने
देवाच्या एकुलत्या पुत्राच्या नांवावर विश्वास ठेविला
नाहीं. १९ आणि अन्यायी ठरण्याचें कारण हेंच
आहे कीं, जगांत उजेड आला असतां माणसानी
उजेडापेक्षां अंधाराची आवड अधिक धरिली, कारण
कीं त्यांचीं कामें वाईट होतीं. २० कां कीं जो कोणी
वाईट कामें करितो तो उजेडाचा द्वेष करितो, आणि
आपल्या कामांचा निषेध होऊं नये ह्मणून उजेडा-
कडे येत नाहीं. २१ परंतु जो खरेपण आच-
रितो तो आपलीं कामें देवाच्या इच्छेप्रमाणें घडलीं
आहेत हें उघडें व्हावें ह्मणून उजेडाकडे येतो.
२२ त्यानंतर येशू आपल्या शिष्यांसुद्धां
यहूदा देशांत गेला, आणि तेथें त्यांच्या संगतीं
राहून बाप्तिस्मा करूं लागला. २३ आणि शालि-
माजवळचें एनोन एथें बहुत पाणी होतें यास्तव
तेथें योहान्नहि बाप्तिस्मा करीत होता, तेव्हां लो-
कानी येऊन बाप्तिस्मा घेतला. २४ कां तर त्या
वेळेस योहान्न बंदिशाळेंत घातला नव्हता. २५
शुद्धीविषयीं तर यहूद्यांचा व योहान्नाच्या
शिष्यांतील कित्येकांचा विवाद झाला. २६
आणि ते योहान्नाकडे येऊन त्याला ह्मणाले, हे
गुरू, पाहा, जो यार्देनेच्या पलिकडे तुझ्या संगतीं
होता, ज्याविषयीं त्वां साक्ष दिल्ही, तो बाप्तिस्मा
करितो आणि सर्व त्याकडे जातात. २७ योहा-
न्नाने उत्तर दिल्हें कीं, माणसाला आकाशांतून दि-
ल्हेल्यावांचून त्याच्याने कांहीं मिळववत नाहीं. २८
मी ख्रीस्त नव्हें तर त्याच्या पुढें पाठविलेला आहें,
असें म्या ह्मटलें, यास तुह्मी स्वतां मजविषयीं
साक्ष देतां. २९ ज्याला नवरी आहे तो नवरा,
आणि जो नवऱ्याचा मित्र उभा राहून त्याचें
ऐकतो तो नवऱ्याच्या शब्दावरून फार आनंद

पावतो, हा माझा आनंद तर पूर्ण झाला आहे. ३०
त्याला मोठें होत जावें लागतें आणि मला ला-
हान होत जावें लागतें. ३१ जो वरून आला
तो सर्वांच्या वर आहे; जो पृथ्वीपासून झाला तो
पृथ्वींतला आहे आणि पृथ्वीविषयीं बोलतो; जो
आकाशापासून आला तो सर्वांच्या वर आहे. ३२
आणि त्याने जें पाहिलें व ऐकिलें त्याविषयीं तो
साक्ष देतो, परंतु त्याची साक्ष कोणी घेत नाहीं.
३३ जो त्याची साक्ष घेतो त्याने देव खरा आहे
ह्मणून शिक्का केला आहे. ३४ कारण कीं ज्याला
देवाने पाठविलें तो देवाच्या गोष्टी बोलतो, का तर
देव त्याला आत्मा परिमितीने देत नाहीं. ३५
बाप पुत्रावर प्रीति करितो, आणि त्याने सर्व
त्याच्या हातीं दिल्हें आहे. ३६ जो पुत्रावर
विश्वास ठेवितो त्याला सर्वकाळचें जीवन आहे,
आणि जो पुत्रावर विश्वास ठेवीत नाहीं तो जीवन
पाहणार नाहीं, तर देवाचा राग त्यावर राहील.

## अध्याय ४.

**ये**शू योहानापेक्षां अधिक शिष्य करून त्यांचा
बाप्तिस्मा करितो, असें परोश्यांनी ऐकिलें हें
जेव्हां प्रभूला कळलें, २ (तरी येशू स्वतां बाप्ति-
स्मा करीत नसे, तर त्याचे शिष्य करीत असत);
३ तेव्हां तो यहूदा सोडून फिरून गालीलांत गेला.
४ आणि त्याला शोमरोनांतून जावें लागलें. ५
तेव्हां जें शेत याकोबाने आपल्या योसेफ पुत्राला
दिल्हें होतें त्याच्या जवळ शोमरोनांतील शखार
नामें नगर तेथें तो आला. ६ आणि तेथें याको-
बाची विहीर होती; तेव्हां येशू चालतां चालतां
दमलेला तसाच त्या विहिरीवर बसला; सुमारें
दुपार झाली होती. ७ शोमरोनांतली बायको
पाणी काढायास आली, तेव्हां येशू तिला ह्मणाला,
मला प्यायाला दे. ८ त्याचे शिष्य तर अन्न
विकत घ्यायास नगरांत गेलें होते. ९ तेव्हां ती
शोमरोनी बायको त्याला ह्मणाली, मी शोमरोनी
बायको आणि तूं यहूदी असतां, माझ्या जवळ
प्यायाला कसें मागतोस? यहूदी तर शोमरो-
न्यांसीं वहिवाट करीत नाहींत. १० येशूने तिला
उत्तर दिल्हें कीं, देवाचें जें दान तें, आणि मला
प्यायाला दे, असें तुला ह्मणणारा कोण आहे, हें
तुला कळलें असतें तर त्वां त्यापासीं मागितलें
असतें, आणि त्याने तुला जिवंत पाणी दिल्हें असतें.
११ ती बायको त्याला ह्मणाली, महाराज, तुज
पोहरा नाहीं आणि विहीर खोल आहे, तर तुझ्या
जवळ तें जिवंत पाणी कोठून असेल? १२ ज्या
आमच्या याकोब बापाने ही विहीर आह्मास दिल्ही
आणि जो स्वतां आपले पुत्र व आपलीं गुरें यांसुद्धां
हिचें पीत असे, त्यापेक्षां तूं मोठा आहेस काय!
१३ येशूने तिला उत्तर दिल्हें कीं, जो कोणी हें
पाणी पितो त्याला फिरून ताहान लागेल; १४
परंतु जें पाणी मी देईन तें जो कोणी पिईल त्याला
सर्वकाळपर्यंत ताहान लागणारच नाहीं; अणखी
जें पाणी मी त्याला देईन तें त्यामध्यें सर्वकाळच्या
जीवनासाठीं उपळत्या पाण्याची विहीर असें होईल.
१५ ती बायको त्याला ह्मणाली, महाराज, मला
ताहान लागूं नये व पाणी काढायास म्या एथें येऊं
नये ह्मणून तें पाणी मला दे. १६ येशू तिला
ह्मणाला, जा, तूं आपल्या नवऱ्याला बोलावून इकडे
ये. १७ त्या बायकोने उत्तर दिल्हें कीं, मला
नवरा नाहीं. येशूने तिला ह्मटलें, मला नवरा
नाहीं, हें बरें बोललीस. १८ कारण कीं तुला
पांच नवरे झाले होते, आणि आतां जो तुझ्या
जवळ आहे तो तुझा नवरा नाहीं, हें त्वां खरें ह्म-
टलें. १९ बायको त्याला ह्मणाली, महाराज, तूं
भविष्यवादी आहेस असें मला दिसतें. २० आम-
च्या पूर्वजांनी या डोंगरावर भजन केलें, परंतु
जेथें भजन करावें तें ठिकाण यरूशलेमांत
आहे असें तुह्मी ह्मणतां. २१ येशूने तिला ह्म-
टलें, बाई, माझा विश्वास धर कीं, तुह्मी बापाचें
भजन या डोंगरावर व यरूशलेमांतहि करणार
नाहीं, असी वेळ येत आहे. २२ तुह्मी कशाचें
भजन करितां हें तुह्मास ठाऊक नाहीं; आह्मी
कशाचें भजन करितों हें आह्मास ठाऊक आहे, का
कीं यहूद्यांतूनच तारण. २३ परंतु खरे भक्त
आत्म्याने व खरेपणाने बापाला भजतील, असी
वेळ येती व आतां आली आहे, कारण कीं
बाप अशा आपल्या भजणाऱ्यांस शोधितो. २४
देव आत्मा आहे, आणि जे त्याला भजतात त्यांनी
आत्म्याने व खरेपणाने त्याचें भजन केलें पाहिजे.
२५ ती बायको त्याला ह्मणाली, मशीहा (ह्मणजे
ख्रीस्त) तो येत आहे हें मला ठाऊक आहे, तो
आल्यावर आह्मास सर्व गोष्टी सांगेल. २६ येशूने
तिला ह्मटलें, तोच मी तुजसीं बोलत आहें. २७
आणि इतक्यांत त्याचे शिष्य आले, तेव्हां तो

बायकोशीं बोलत आहे ह्मणून त्यांस आश्चर्य
वाटलें, तरी तूं काय विचारितोस, किंवा तिजशीं
कां बोलतोस, असें कोणी ह्मटलें नाहीं. २८
तेव्हां बायकोनें आपली घागर ठेवून नगरांत जाऊन
लोकांस ह्मटलें; २९ चला, जीं कामें म्या केलीं
तीं अवघीं ज्यानें मला सांगितलीं त्या माणसाला
पाहा; तोच ख्रीस्त आहे कीं नाहीं? ३० त्या-
वरून ते नगरांतून निघून त्याकडे आले.

३१ इतक्यांत शिष्यानी त्याला विनंती केली
कीं, हे गुरू, जेव. ३२ परंतु तो त्यांस ह्मणाला,
जें तुह्मास ठाऊक नाहीं असें अन्न मला खायाला
आहे. ३३ तेव्हां शिष्यानी एकमेकांस ह्मटलें,
याला कोणी खायाला आणिलें काय? ३४
येशूनें त्यांस ह्मटलें, ज्यानें मला पाठविलें त्याच्या
इच्छेप्रमाणें करावें आणि त्याचें काम सिद्धीस
न्यावें, हें माझें अन्न आहे. ३५ चार महिन्यांचा
अवकाश आहे मग कापणी येईल, असें तुह्मी
ह्मणतां कीं नाहीं? पाहा, मी तुह्मास ह्मणतों,
आपले डोळे वर करून शेतें पाहा, कारण कीं तीं
आतांच पांढरीं होऊन कापणीस आलीं आहेत.
३६ आणि कापणारा मजुरी पावतो आणि सर्व-
काळच्या जीवनासाठीं फळें एकवट करितो, असें
कीं पेरणाऱ्यानें व कापणाऱ्यानेंहि बरोबर आनंद
करावा. ३७ कां तर एक पेरितो व एक कापितो,
असी बी ह्मण ती एथें खरी आहे. ३८ ज्या-
विषयीं तुह्मी श्रम केले नाहींत तें कापायाला म्या
तुह्मास पाठविलें, दुसऱ्यानी श्रम केले आणि त्यां-
च्या श्रमांत तुह्मी गेलां आहां.

३९ आणि त्या बायकोनें साक्ष दिल्ही कीं, जीं
कामें म्या केलीं तीं अवघीं त्यानें मला सांगितलीं,
अशा तिच्या बोलण्यावरून त्या नगरांतील बहुत
शोमरोन्यानी त्यावर विश्वास ठेविला. ४० मग
शोमरोन्यानी त्याकडे येऊन, आपण आमच्या
संगतीं राहावें, असी त्याला विनंती केली, आणि
तो तेथें दोन दिवस राहिला. ४१ तेव्हां त्याच्या
वचनावरून अणखी बहुत लोकानी विश्वास ठेविला.
४२ आणि ते त्या बायकोला ह्मणाले, आतांपासून
तुझ्या बोलण्यावरूनच आह्मी विश्वास धरितों
असें नाहीं, कारण कीं आह्मी स्वतां ऐकिलें, आणि
हा खचीत जगाचा तारणारा ख्रीस्त आहे असें
आह्मास ठाऊक झालें.

४३ मग दोन दिवसांनंतर तो तेथून निघून
गालीलांत गेला; ४४ कां कीं येशूनें स्वतां साक्ष
दिल्ही कीं, भविष्यवादी आपल्या देशांत सन्मान
पावत नाहीं. ४५ मग तो गालीलांत गेल्यावर गाली-
ल्यानी त्याला अंगीकारिलें, कारण कीं त्यानें यरूशले-
मामध्यें सणांत जीं कामें केलीं तीं अवघीं त्यानी पाहिलीं
होतीं, कां तर तेहि सणास गेले होते. ४६ मग
येशू ज्या गालीलांतील कान्यांत त्यानें पाण्याचा
द्राक्षारस केला होता तेथें फिरून गेला, तेव्हां
ज्याचा पुत्र दुखणेकरी होता असा कोणी दर्बारी
माणूस कपरणाहूमांत होता. ४७ येशू यहूद्याहून
गालीलांत आला आहे असें ऐकून तो त्याकडे
गेला, आणि आपण खालीं येऊन माझ्या पुत्राला बरें
करावें, असी त्यानें त्याला विनंती केली, कां कीं तो
मरणास टेंकला होता. ४८ यावर येशूनें त्याला
ह्मटलें, तुह्मी चमत्कार व उत्पात पाहिल्यावांचून
विश्वास ठेवणारच नाहीं. ४९ दर्बारी त्याला
ह्मणाला, महाराज, माझा मुलगा मेल्यापूर्वी
खालीं ये. ५० येशूनें त्याला ह्मटलें, जा, तुझा
पुत्र वांचला आहे. तेव्हां येशूनें जी गोष्ट त्याला
सांगितली तिजवर विश्वास ठेवून तो माणूस गेला.
५१ आणि तो खालीं जात आहे इतक्यांत त्याचे
चाकर त्याला भेटले, आणि त्यानी सांगितलें कीं,
तुझा मुलगा वांचला आहे. ५२ तेव्हां कोणत्या
घटकेस त्याला उतार पडूं लागला, हें त्यानें त्यांस
पुसलें; मग त्यानी त्याला ह्मटलें कीं, काल
सातव्या तासीं त्याचा ताप निघाला. ५३ याव-
रून ज्या घटकेस येशूनें त्याला सांगितलें कीं,
तुझा पुत्र वांचला आहे, त्याच घटकेस हें झालें
असें बापानें जाणिलें; मग त्यानें व त्याच्या सर्व
घराण्यानें विश्वास ठेविला. ५४ हा दुसरा चम-
त्कार येशूनें यहूद्यांतून पुन्हा गालीलांत आल्यावर
केला.

## अध्याय ५.

त्यानंतर यहूद्यांचा सण होता, तेव्हां येशू य-
रूशलेमास गेला. २ यरूशलेमांत तर
मेंढरें दरवाज्याजवळ तळें आहे, त्याला इब्री भाषेंत
बेथेसदा ह्मणतात, त्याला पांच मंडप आहेत.
३ त्यांमध्यें रोगी, अंधळे, लंगडे, लुळे यांचा मो-
ठा समुदाय पाणी हालण्याची वाट पाहत पडला
होता. ४ कारण कीं दूत वेळोवेळ तळ्यांत उत-
रून पाणी हालवीत असे, आणि पाणी हालविल्या-

नंतर जो प्रथम त्यांत जाई त्याला कोणताहि रोग
लागला असला तरी तो बरा होत असे. ५ आणि
तेथें अडतीस वर्षें दुखणेकरी असा कोणीएक
माणूस होता. ६ तो पडलेला पाहून आणि
आतां त्याला बहुत काळ झाला आहे हें जा-
णून, येशूने त्याला ह्मटलें, तुला बरें होण्याची
इच्छा आहे काय? ७ रोग्याने त्याला उत्तर
दिल्हें कीं, महाराज, पाणी हालविलें असतां मला
तळ्यांत टाकायास माझा कोणी माणूस नाहीं,
आणि मी जात आहें इतक्यांत दुसरा कोणी मा-
झ्या पुढें उतरतो. ८ येशूने त्याला ह्मटलें, ऊठ,
आपली बाज उचलून चाल. ९ लागलाच तो
माणूस बरा झाला व आपली बाज उचलून
चालूं लागला; त्या दिवसीं तर शाब्बाथ होता.
१० यावरून यहूदी त्या बरें झालेल्याला ह्मणाले,
आज शाब्बाथ आहे, बाज वाहायास तुला योग्य
नाहीं. ११ त्याने त्यांस उत्तर दिल्हें कीं, ज्याने
मला बरें केलें त्यानेच मला सांगितलें कीं, तूं आ-
पली बाज उचलून चाल. १२ मग त्यांनी त्या-
ला पुसलें कीं, तूं आपली बाज उचलून चाल, असें
ज्याने तुला सांगितलें तो माणूस कोण आहे? १३
परंतु तो कोण आहे हें त्या बरें झालेल्याला ठा-
ऊक नव्हतें, कारण कीं त्या ठिकाणीं समुदाय अस-
ल्यावरून येशू निसटून गेला होता. १४ त्या-
नंतर येशूने त्याला देवळांत गांठून त्याला ह्मटलें,
पाहा, तूं बरा झालास, आतांपासून पाप करूं नको,
केलें तर तुला यापेक्षां अधिक दुःख होईल. १५
त्या माणसाने जाऊन यहूद्यांस सांगितलें कीं, ज्याने
मला बरें केलें तो येशू आहे. १६ मग त्यामुळें
यहूदी येशूच्या पाठीस लागून त्याला जिवें मारा-
यास झटले, कां कीं त्याने शाब्बाथ दिवसीं हें
केलें होतें. १७ परंतु येशूने त्यांस उत्तर
दिल्हें कीं, आजपावेतों माझा बाप काम करीत आ-
ला आहे, आणि मीहि काम करीत आलों. १८
यावरून तर यहूदी त्याला जिवें मारायास अधिक
झटले, कां कीं त्याने शाब्बाथ मोडिला असें केवळ
नाहीं, तर देव माझा बाप असें ह्मणून त्याने आ-
पणाला देवासमान केलें.

१९ यावरून येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मी
तुह्मांस खचीत खचीत सांगतों, बापाला जें कांहीं
करितां पाहिलें त्यावांचून पुत्राच्याने आपल्या आपण
कांहीं करवत नाहीं, कारण कीं तो जें जें करितो तें
त्याप्रमाणें पुत्रहि करितो. २० कां कीं बाप पुत्रा-
वर प्रीति करितो, आणि आपण जें जें करितो तें
अवघें त्याला दाखवितो, आणि तुह्मी आश्चर्य क-
रावें ह्मणून यांहून मोठीं कामें त्याला दाखवील.
२१ कां तर जसें बाप मेलेल्यांस उठवून जिवंत
करितो तसें पुत्रहि ज्यांस पाहिजे त्यांस जिवंत
करितो. २२ अणखी बाप कोणाचा न्याय ठर-
वीत नाहीं, तर सर्व न्याय ठरविणें पुत्राला सों-
पून दिल्हें आहे. २३ यासाठीं कीं जसा बाप-
चा सन्मान करितात तसा पुत्राचाहि सन्मान सर्वां-
नी करावा; जो पुत्राचा सन्मान करीत नाहीं तो
त्याला पाठविणाऱ्या बापाचा सन्मान करीत नाहीं.
२४ मी तुह्मांस खचीत खचीत सांगतों कीं, जो
माझें वचन ऐकतो व माझ्या पाठविणाऱ्यावर विश्वास
ठेवितो त्याला सर्वकाळचें जीवन आहे, आणि तो
अन्यायी ठरण्यांत येणार नाहीं परंतु तो मरणांतून
जीवनांत पार गेला आहे. २५ मी तुह्मांस
खचीत खचीत सांगतों कीं, असी वेळ येती
व आतां आली आहे कीं, तींत मेलेले जे ते देवाच्या
पुत्राची वाणी ऐकतील, व ऐकणारे जिवंत होतील.
२६ कारण कीं जसें स्वतां बापामध्यें जीवन आहे,
तसें स्वतां पुत्रामध्यें जीवन राहावें असें त्याने त्या-
ला दिल्हें आहे. २७ आणि तो मनुष्याचा पुत्र
आहे, यास्तव न्याय ठरविण्याचाहि अधिकार त्या-
ला दिल्हा आहे. २८ याविषयीं आश्चर्य करूं
नका, कां कीं असी वेळ येत आहे कीं तींत थड-
ग्यांतले सर्व त्याची वाणी ऐकतील; २९ आणि
ज्यांनी चांगलीं कामें केलीं ते जीवनाच्या पुन्हा
उठण्यास, आणि ज्यांनी वाईट कामें केलीं ते दंडा-
च्या पुन्हा उठण्यास बाहेर येतील. ३० मा-
झ्याने स्वतां कांहीं करवत नाहीं; जसें ऐकतों तसा
न्याय ठरवितों, आणि माझें ठरविणें यथान्याय
आहे, कारण कीं मी आपली इच्छा नाहीं तर ज्या
बापाने मला पाठविलें त्याची इच्छा पूर्ण करायाला
पाहतों. ३१ जर मी आपणाविषयीं साक्ष देतों
तर माझी साक्ष खरी नाहीं. ३२ मजविषयीं
साक्ष देणारा दुसरा आहे, आणि जी साक्ष तो
मजविषयीं देतो ती खरी आहे हें मला ठाऊक
आहे. ३३ तुह्मी योहानाकडे पाठविलें आणि
त्याने खरेपणाविषयीं साक्ष दिल्ही. ३४ तरी
मी माणसाची साक्ष घेत नाहीं, तर तुह्मी तारण
पावावें ह्मणून हें सांगतों. ३५ तो पाजळलेला

व प्रकाशमान दिवा होता, आणि कांहीं वेळ त्या-
च्या उजेडांत आनंद करायास तुह्मी मान्य होतां.
३६ परंतु योहानाच्या पेक्षां मला मोठी साक्ष
आहे, कारण कीं जीं कामें पूर्ण करायास बापानें
मला सोंपिलीं तींच कामें मी करितों, तीं बापानें
मला पाठविलें आहे, असी मजविषयीं साक्ष देतात.
३७ आणखी ज्या बापानें मला पाठविलें त्यानें
स्वतां मजविषयीं साक्ष दिल्ही; तुह्मी त्याची वाणी
कधींहि ऐकिली नाहीं व त्याचें स्वरूपहि पा-
हिलें नाहीं. ३८ आणि त्याचें वचन तुह्मामध्यें
राहतें असें नाहीं, कां कीं त्यानें ज्याला पाठविलें
त्यावर तुह्मी विश्वास ठेवीत नाहीं. ३९ शास्त्र
शोधून पाहा, कां कीं त्याकडून सर्वकाळचें जीवन
तुह्मास मिळेल असें तुह्मी समजतां, आणि मज-
विषयीं साक्ष देणारें तेंच आहे. ४० परंतु तुह्मी
जीवन पावण्यासाठीं मजकडे येण्यास मान्य होत
नाहीं. ४१ मी माणसांपासून गौरव करून घेत
नाहीं. ४२ परंतु मी तुह्मास जाणतों कीं, तुम-
च्या मध्यें देवाची प्रीति नाहीं. ४३ मी आ-
पल्या बापाच्या नांवानें आलों, तरी तुह्मी मला
अंगीकारीत नाहीं, जर दुसरा कोणी आपल्या नां-
वानें येईल तर त्याला अंगीकाराल. ४४ तुह्मी
एकमेकांपासून गौरव करून घेतां आणि केवळ देवा-
कडलें गौरव पाहत नाहीं, तर तुह्मी विश्वास
कसा धराल? ४५ मी बापाजवळ तुह्मावर दोष
ठेवीन असें समजूं नका, तुह्मावर दोष ठेवणारा
असा एक आहे, ह्मणजे ज्या मोश्यावर तुह्मी
भरवसा ठेवितां तो. ४६ कारण कीं तुह्मी मो-
श्यावर विश्वास ठेविला असता तर मजवरहि वि-
श्वास ठेविला असता, कां तर त्यानें मजविषयीं
लिहिलें आहे. ४७ पण तुह्मी त्याच्या लेखां-
वर विश्वास ठेवीत नाहीं, तर माझ्या बोलण्यावर
विश्वास कसा ठेवाल?

## अध्याय ६.

त्यानंतर येशू गालीलाचा ह्मणजे तिबेरयसा-
चा समुद्र याच्या पलिकडे गेला. २ तेव्हां
मोठा समुदाय त्याच्या मागें चालला, कां कीं दुख-
णाइतांस बरें करण्याचे जे चमत्कार तो करी
ते पाहत असत. ३ मग येशू डोंगरावर
गेला, आणि तेथें आपल्या शिष्यांसुद्धां बसला.
४ आणि यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ आला
होता. ५ तेव्हां येशूनें डोळे वर करून आणि
मोठ्या समुदायाला आपल्याकडे येतां पाहून फि-
लिप्पसाला ह्मटलें, यांस खायाला भाकरी कोठून
विकत आणूं? ६ परंतु त्यानें त्याची परीक्षा पा-
हण्याकरितां हें ह्मटलें, कारण कीं आपण काय
करणार हें त्याला ठाऊक होतें. ७ फिलिप्पसानें
त्याला उत्तर दिल्हें कीं, यांतील एकएकानें थोडें
थोडें घेतलें तरी पन्नास रुपयांच्या भाकरी
त्यांस पुरणार नाहींत. ८ त्याच्या शिष्यांतील
एक, शिमोन पेत्रसाचा भाऊ अंद्रयास, त्याला
ह्मणाला, ९ एथें एक तरणा आहे, त्याजवळ
जवांच्या पांच भाकरी व दोन मासोळ्या आ-
हेत, परंतु त्या इतक्यांस काय? १० तेव्हां
येशू बोलला, लोकांस बसवा. त्या ठिकाणीं तर
बहुत हिरवळ होती; तेव्हां पुरुष संख्येनें सुमारें
पांच हजार बसले. ११ मग येशूनें त्या भाकरी
घेतल्या व आशीर्वाद मागून शिष्यांजवळ वां-
टून दिल्ह्या आणि शिष्यांनी बसणाऱ्यांस दिल्ह्या,
व त्या मासोळ्यांतूनहि त्यांस पाहिजे तितकें
दिल्हें. १२ आणि ते तृप्त झाल्यावर त्यानें आ-
पल्या शिष्यांस सांगितलें, कांहीं फुकट जाऊं नये
ह्मणून उरलेले तुकडे गोळा करा. १३ मग
जवांच्या पांच भाकरींचे जे तुकडे जेवल्यावर रा-
हिले, ते त्यांनी गोळा करून त्याच्या बारा टोपल्या
भरल्या. १४ यावरून येशूनें जो चमत्कार केला
तो त्या माणसांनी पाहून ह्मटलें कीं, जो जगांत
येणारा भविष्यवादी तो निश्चयें हाच आहे. १५
वास्तव आपणाला राजा करण्याकरितां ते येऊन
आपणाला बळानें धरणार आहेत हें जाणून येशू
फिरून डोंगरावर एकटाच निघून गेला.
१६ मग संध्याकाळ झाल्यावर त्याचे शिष्य
खालीं समुद्राकडे आले; १७ आणि तारवांत
बसून समुद्राच्या पलिकडे कपरणाहूमास जाऊं
लागले. इतक्यांत अंधार पडला, आणि येशू
त्यांच्या जवळ आला नव्हता. १८ तेव्हां मोठा
वारा सुटून समुद्र खवळला. १९ मग त्यांनी सु-
मारें कोस दीड कोस वल्हावून जाऊन येशूला
समुद्रावर चालतांना व तारवाजवळ येतांना पाहि-
लें, आणि ते भ्याले. २० परंतु तो त्यांस ह्मणाला,
मी आहें, भिऊं नका. २१ तेव्हां त्यांनी त्याला
आनंदानें तारवावर घेतलें, आणि जेथें त्यांस जा-
याचें होतें त्या ठिकाणीं तारूं लागलेंच पोहंचलें.

२२ दुसऱ्या दिवसीं जो समुदाय समुद्राच्या
पलिकडे उभा होता त्याने पाहिलें कीं, ज्या एका
तारवांत त्याचे शिष्य बसले होते त्यावांचून तेथें
दुसरें नव्हतें, आणि येशू आपल्या शिष्यांबरोबर
त्या तारवांत बसला नव्हता, तर त्याचे शिष्य मात्र
गेले होते; २३ तरी जेथें प्रभूने आशीर्वाद मा-
गितल्यावर त्यानी भाकर खाल्ली त्या ठिकाणाजवळ
तिबेरयसापासून दुसरीं तारवें आलीं होतीं; २४
तर येशू व त्याचे शिष्य एथें नाहींत असें समु-
दायाने पाहिलें, तेव्हां ते तारवांत बसून येशूचा
शोध करीत कपरणाहूमांत आले. २५ मग तो
त्यांस समुद्राच्या पलिकडे सांपडल्यावर ते त्याला
ह्मणाले, हे गुरू, एथें केव्हां आलास? २६ ये-
शूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मी तुह्मास खचीत
खचीत सांगतों, तुह्मी चमत्कार पाहिले यामुळें
नाहीं, तर तुह्मी भाकरी खाऊन तृप्त झालां या-
मुळें माझा शोध करितां. २७ नाशवंत अन्ना-
साठीं श्रम करूं नका, तर सर्वकाळच्या जीव-
नासाठीं टिकणारें अन्न यासाठीं श्रम करा, तें
मनुष्याचा पुत्र तुह्मास देईल, कारण कीं
देव जो बाप त्याने त्याजवर शिक्का केला आहे.
२८ तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें, देवाचीं कामें
करण्यासाठीं आह्मी काय करावें? २९ येशूने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, देवाचें काम हेंच आहे
कीं, ज्याला त्याने पाठविलें त्याजवर तुह्मी विश्वास
ठेवावा. ३० यावरून त्यानी त्याला ह्मटलें, आ-
ह्मी पाहून तुजवर विश्वास ठेवावा ह्मणून तूं काय
चमत्कार करितोस? तूं काय काम करितोस? ३१
आमच्या पूर्वजानी रानामध्यें मान्ना खाल्ला; तसें
लिहिलें आहे कीं, त्याने त्यांस आकाशांतून भाकर
खायाला दिल्ही. ३२ तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें,
मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, आकाशांतील
भाकर मोश्याने तुह्मास दिल्ही नाहीं, माझा बाप
तर आकाशांतील खरी भाकर तुह्मास देतो. ३३
कारण कीं जी आकाशांतून उतरती व जगाला
जीवन देती ती देवाची भाकर होय. ३४
तेव्हां ते त्याला ह्मणाले, हे प्रभू, ती भाकर
सर्वकाळ आह्मास दे. ३५ मग येशूने त्यांस
ह्मटलें, जीवनाची भाकर मी आहें. जो मजकडे
येतो त्याला भूक लागणार नाहीं, आणि जो मज-
वर विश्वास ठेवितो त्याला कधींहि ताहान लाग-
णार नाहीं. ३६ परंतु तुह्मी मला पाहिलें अस-
तांहि विश्वास ठेविला नाहीं, असें म्या तुह्मास
सांगितलें. ३७ बापाने जे मला दिल्हे ते
सर्व मजकडे येतील, आणि जो मजकडे येतो त्याला
मी घालविणार नाहींच. ३८ कां तर मी आ-
पल्या इच्छेप्रमाणें नाहीं, तर ज्याने मला पाठविलें
त्याच्या इच्छेप्रमाणें करावें ह्मणून आकाशांतून उत-
रलों. ३९ आणि ज्या बापाने मला पाठविलें
त्याची इच्छा हीच आहे कीं, त्याने जें मला दि-
ल्हें त्यांतून कांहींच म्या हरवूं नये, तर शेवटल्या
दिवसीं म्या तें उठवावें. ४० आणि ज्याने मला
पाठविलें त्याची इच्छा हीच आहे कीं, जो कोणी
पुत्राला पाहून त्याजवर विश्वास ठेवितो त्याला
सर्वकाळचें जीवन व्हावें, आणि शेवटल्या दिवसीं
म्या त्याला उठवावें.

४१ तेव्हां, मी आकाशांतून उतरलेली भाकर
आहें, असें तो बोलला, ह्मणून यहूद्यानी त्यावि-
षयीं कुरकूर केली. ४२ आणि त्यानी ह्मटलें
कीं, योसेफाचा पुत्र येशू ज्याचीं आईबापें आ-
ह्मास ठाऊक आहेत तोच हा आहे ना? तर तो
कसें ह्मणतो कीं, मी आकाशांतून उतरलों. ४३
तेव्हां येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी आपा-
पल्यांमध्यें कुरकूर करूं नका. ४४ ज्या बापाने
मला पाठविलें त्याने ओढिल्यावांचून कोणाच्याने
मजकडे येववत नाहीं, आणि शेवटल्या दिवसीं मी
त्याला उठवीन. ४५ भविष्यवाद्यांच्या पुस्तकांत
असें लिहिलें आहे कीं, ते सर्व देवाने शिकविलेले
असे होतील; यास्तव जो कोणी बापापासून ऐकून
शिकला आहे तो मजकडे येतो. ४६ बापाला
तर कोणी पाहिलें असें नाहीं, जो देवाजवळ अस-
तो त्याने मात्र बापाला पाहिलें आहे. ४७ मी
तुह्मास खचीत खचीत सांगतों, जो मजवर वि-
श्वास ठेवितो त्याला सर्वकाळचें जीवन आहे. ४८
मी जीवनाची भाकर आहें. ४९ तुमच्या पूर्व-
जानी रानांत मान्ना खाल्ला, तरी ते मेले. ५० आ-
काशांतून जी भाकर उतरली ती हीच आहे कीं
तींतून कोणी खाल्लें असतां मरूं नये. ५१ आ-
काशांतून उतरलेली जीवनाची भाकर मीच आहें;
या भाकरींतून कोणी खाल्लें तर तो सर्वकाळ वां-
चेल, अणखी जी भाकर मी देईन ती माझें मास
आहे, तें जगाच्या जीवनासाठीं मी देईन.

५२ यास्तव यहूद्यानी आपापल्यामध्यें असा
वादविवाद केला कीं, हा आपलें मास आह्मास

ायाला कसें देईल? ५३ तेव्हां येशूने त्यांस
टलें, मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, तुह्मी
नुष्याच्या पुत्राचें मास खालें नाहीं व त्याचें
क्त प्याला नाहीं तर तुह्मामध्यें जीवन नाहीं. ५४
ो माझें मास खातो व माझें रक्त पितो त्याला
र्वकाळचें जीवन आहे, आणि शेवटल्या दिवशीं
ी त्याला उठवीन. ५५ कारण कीं माझें मास
ाणें आहे खरें, आणि माझें रक्त पिणें आहे
रें. ५६ जो माझें मास खातो व माझें रक्त
ितो तो मजमध्यें राहतो आणि मी त्याजमध्यें
ाहतों. ५७ जसें जिवंत बापाने मला पाठविलें
ाणि मी बापाकडून वांचतों, तसें जो मला खातो
ोहि मजकडून वांचेल. ५८ जी भाकर आका-
ांतून उतरली ती हीच आहे, तुमच्या पूर्वजानी
ान्ना खाल्ला आणि ते मेले त्याप्रमाणें नाहीं, जो
ी भाकर खातो तो सर्वकाळ वांचेल. ५९ तो
कपरणाहूमांतील सभास्थानांत उपदेश करीत अ-
सतां या गोष्टी बोलला.

६० मग त्याच्या शिष्यांतील बहुतानी ऐकून
ह्मटलें, ही गोष्ट कठीण आहे, ही कोणाच्याने ऐक-
वेल? ६१ तेव्हां आपले शिष्य याविषयीं कुरकूर
करीत आहेत हें येशू आपल्या मनांत जाणून
त्यांस ह्मणाला, याने तुह्मी अडखळतां काय?
६२ मनुष्याचा पुत्र अगोदर जेथें होता तेथें जर
तुह्मी त्याला चढतांना पाहाल तर —? ६३
जीवन देणारा तो आत्मा आहे, मासाने कांहीं
लाभ होत नाहीं, ज्या गोष्टी मी तुह्मास सां-
गतों त्या आत्मा व जीवन अशा आहेत. ६४
परंतु विश्वास ठेवीत नाहींत असे कित्येक तुह्मा-
मध्यें आहेत. कां कीं कोण विश्वास ठेवीत ना-
हींत व आपणाला कोण पराधीन करणार आहे,
हें येशूला पहिल्यापासून ठाऊक होतें. ६५ मग
तो बोलला, यासाठींच म्या तुह्मास सांगितलें कीं,
माझ्या बापाने त्याला दिल्ह्यावांचून कोणाच्याने मज-
कडे येववत नाहीं. ६६ त्या काळापासून त्याच्या
शिष्यांतील बहुत मागें निघून गेले, आणि त्यानंतर
त्याबरोबर चालले नाहींत. ६७ यास्तव येशू बारा
जणांस ह्मणाला, तुह्मीहि निघून जायला पाह-
तां काय? ६८ तेव्हां शिमोन पेत्रसाने त्या-
ला उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, आह्मी कोणाकडे
जाऊं? सर्वकाळच्या जीवनाच्या गोष्टी तुझ्या जवळ
आहेत. ६९ आणि तूं ख्रीस्त जिवंत देवाचा
पुत्र आहेस, असा आह्मी विश्वास धरिला व जा-
णिलें आहे. ७० येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं,
म्या तुह्मा बारा जणांस निवडून घेतलें कीं नाहीं,
तथापि तुह्मांतला एक सैतान आहे. ७१ तेव्हां
शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कारयोते याविषयीं तो
बोलला, कारण कीं तो बारा जणांतील एक असतां
त्याला पराधीन करणार होता.

## अध्याय ७.

त्यानंतर येशू गालीलांत फिरला, कारण कीं
यहूदी त्याला जिवें मारायास पाहत होते,
ह्मणून त्याने यहूद्यांत फिरायास इच्छिलें नाहीं.
२ तेव्हां यहूद्यांचा मंडप घालण्याचा सण जवळ
आला होता. ३ मग त्याचे भाऊ त्याला ह्मणाले,
तूं एथून निघून यहूद्यांत जा, ह्मणजे तूं जीं कामें
करितोस तीं तुझे शिष्यहि पाहतील. ४ कारण कीं
जो कोणी प्रसिद्ध व्हायास पाहतो तो गुप्तांत कांहीं
करीत नाहीं. हीं कामें करितोस तर आप-
णाला जगामध्यें प्रगट कर. ५ कां कीं त्याच्या
भावानीहि त्याजवर विश्वास ठेविला नव्हता. ६
तेव्हां येशू त्यांस ह्मणाला, माझी वेळ अझून आली
नाहीं, तुमची वेळ तर सर्वदा तयार आहे. ७
जगाच्याने तुमचा द्वेष करवत नाहीं, तर माझा
द्वेष करितें, कां कीं त्याचीं कामें वाईट आहेत असी
मी त्याविषयीं साक्ष देतों. ८ तुह्मी या सणास
जा, माझी वेळ अझून आली नाहीं, यास्तव मी
आतां या सणास जात नाहीं. ९ आणि त्यांस
असें बोलून तो गालीलांत राहिला. १० मग
त्याचे भाऊ गेल्यानंतर तोहि प्रगटरूपें नाहीं, तर
गुप्तरूपें सणास गेला. ११ तेव्हां सणांत यहूदी
त्याचा शोध करीत असतां ह्मणाले, तो कोठें
आहे? १२ मग समुदायामध्यें त्याजविषयीं बहुत
कुजबूज झाली; कित्येक तर ह्मणाले, तो चांगला
आहे, दुसरे कित्येक ह्मणाले, नव्हे, तर लोकांस
फसवितो. १३ तरी यहूद्यांच्या भयामुळें कोणी
त्याविषयीं उघड बोलला नाहीं.

१४ आणि इतक्यांत सणाचा मध्य असतां
येशू वर देवळांत जाऊन उपदेश करूं लागला. १५
तेव्हां यहूदी आश्चर्य करून बोलले, शिकल्यावां-
चून याला विद्या कशी आली? १६ येशूने त्यांस
उत्तर दिल्हें कीं, माझा उपदेश तो माझा नव्हे, तर
माझ्या पाठविणाऱ्याचा आहे. १७ त्याच्या इच्छे-

प्रमाणें करायास जर कोणी मान्य आहे, तर माझा
उपदेश देवापासून आहे किंवा मी आपल्या आपण
बोलतों हें त्याला समजेल. १८ जो आपल्या
आपण बोलतो तो आपलें गौरव पाहतो, परंतु जो
आपल्या पाठविणाऱ्याचें गौरव पाहतो तो खरा
आहे, आणि त्यामध्यें अन्याय नाहीं. १९ मो-
श्यानें तुह्मास नेमशास्त्र दिल्हें कीं नाहीं? परंतु तें
नेमशास्त्र तुह्मामधील कोणी पाळीत नाहीं. तुह्मी
मला जिवें मारायास कां पहातां? २० समुदा-
यानें उत्तर दिल्हें कीं, तुला भूत लागलें; तुला
जिवें मारायास कोण पाहतो? २१ येशूनें त्यांस
उत्तर दिल्हें कीं, म्या एक काम केलें, आणि तुह्मी
सर्व त्यामुळें आश्चर्य करितां. २२ मोश्यानें
तुह्मास सुंता लावून दिल्ही, (ती तर मोश्यापासून
नाहीं, तर पूर्वजांपासून आहे,) आणि तुह्मी शाब्बाथ
दिवशीं माणसाची सुंता करितां. २३ मोश्याचें
नेमशास्त्र मोडूं नये ह्मणून शाब्बाथ दिवशीं माण-
साची सुंता होती, तर म्या शाब्बाथ दिवशीं
माणसाला अगदी बरें केलें यामुळें तुह्मी मजवर
रागें भरतां काय? २४ तोंड पाहून न्याय ठरवूं
नका, तर यथार्थ न्याय ठरवा. २५ तेव्हां यरू-
शलेमकरांतून कित्येकांनी ह्मटलें, ज्याला जिवें मारा-
यास पाहतात तो हाच आहे कीं नाहीं? २६
आणि पाहा, तो धैर्यानें बोलतो आणि ते त्याला
कांहीं ह्मणत नाहींत; हा खचीत ख्रीस्त आहे,
असें अधिकारी निश्चयें जाणतात काय? २७ तरी
हा कोठून आहे हें आह्मास ठाऊक आहे, परंतु जेव्हां
ख्रीस्त येईल तेव्हां तो कोठून आहे हें कोणी
जाणणार नाहीं. २८ यावरून येशू देवळांत उपदेश
करीत असतां ओरडत बोलला, तुह्मी मला जाणतां
व मी कोठून आहें हेंहि जाणतां, आणि मी आपल्या
आपण आलों नाहीं, तर ज्यानें मला पाठविलें तो
खरा आहे, त्याला तुह्मी जाणत नाहीं; २९ मी
तर त्याला जाणतों, कारण कीं मी त्याजवळून आलों
आहें आणि त्यानें मला पाठविलें आहे. ३०
यावरून त्यांनी त्याला धरायास पाहिलें, परंतु
त्याची वेळ अद्याप आली नव्हती, यास्तव कोणी
त्याजवर हात टाकिला नाहीं.

३१ तेव्हां समुदायांतील बहुतांनी त्यावर वि-
श्वास ठेविला, आणि ह्मटलें कीं, ख्रीस्त येईल
तेव्हां यानें केलेल्या चमत्कारांहून तो अधिक करील
काय? ३२ समुदाय त्याविषयीं असी कुजबूज
करीत आहे हें परोश्यांनी ऐकिलें, मग परोशी व
मुख्य याजक यांनी त्याला धरायास शिपायी पाठ-
विले. ३३ तेव्हां येशूनें त्यांस ह्मटलें, मी आतां-
पासून थोडका वेळ तुह्माबरोबर आहें, मग माझ्या
पाठविणाऱ्याकडे मी निघून जाईन. ३४ तुह्मी
माझा शोध कराल परंतु मी तुह्मास सांपडणार
नाहीं, आणि जेथें मी आहें तेथें तुमच्यानें येववणार
नाहीं. ३५ यावरून यहूदी आपापल्यांमध्यें ह्मणाले,
हा असा कोठें जाणार कीं तो आह्मास सांपडणार
नाहीं? तो पांगलेल्या हेल्लेण्यांकडे जाऊन हेल्लेण्यांस
उपदेश करील काय? ३६ तुह्मी माझा शोध
कराल परंतु मी तुह्मास सांपडणार नाहीं, आणि
जेथें मी आहें तेथें तुमच्यानें येववणार नाहीं, असी
गोष्ट त्यानें सांगितली ती काय आहे?

३७ मग सणाचा शेवटला जो मोठा दिवस त्यांत
येशू उभा राहून ओरडत बोलला, कोणी तान्हेला
असला तर त्यानें मजकडे येऊन प्यावें. ३८ जो
मजवर विश्वास ठेवितो त्याच्या पोटांतून शास्त्रांत
सांगितल्याप्रमाणें जिवंत पाण्याच्या नद्या वाह-
तील. ३९ तर आपणावर विश्वास ठेवणाऱ्यांस
जो आत्मा मिळणार होता त्याविषयीं त्यानें हें
ह्मटलें, कां तर त्या वेळेस पवित्र आत्मा आला
नव्हता, कारण कीं येशू तोंपर्यंत गौरविला नव्हता.
४० तेव्हां समुदायांतील बहुतांनी ही गोष्ट ऐकून
ह्मटलें, हा तो भविष्यवादी आहे खरा. ४१
कित्येकांनी ह्मटलें, हा ख्रीस्त आहे; परंतु दुस-
ऱ्यांनी ह्मटलें, ख्रीस्त तर गालीलांतून येतो काय!
४२ ख्रीस्त दाविदाच्या संतानांतून व ज्या बेथल-
हेमांत दावीद होता त्या गांवांतून येतो, असें शा-
स्त्रांत सांगितलें कीं नाहीं? ४३ यावरून त्याज-
विषयीं समुदायांत फूट पडली. ४४ तेव्हां त्यां-
तील कित्येक त्याला धरायास पाहत होते, परंतु
कोणी त्यावर हात टाकिले नाहींत. ४५ मग ते
शिपायी मुख्य याजक व परोशी यांकडे आले,
तेव्हां हे त्यांस ह्मणाले, तुह्मी त्याला कां आणिलें
नाहीं? ४६ शिपायांनी उत्तर दिल्हें कीं, त्या
माणसासारिखा कोणी माणूस कधींहि बोलला नाहीं.
४७ मग परोश्यांनी त्यांस उत्तर दिल्हें कीं,
तुह्मीहि फसलां काय? ४८ अधिकाऱ्यांतील किंवा
परोश्यांतील कोणी त्यावर विश्वास ठेविला काय?
४९ परंतु जे हे लोक नेमशास्त्र जाणत नाहींत ते
शापग्रस्त आहेत. ५० जो निकदेमस रात्रीं

त्याकडे आला होता व त्यांतलाच एक होता, तो
त्यास ह्मणाला, ५१ अगोदर माणसाचें ऐकि-
ल्यावांचून व त्याने जें केलें तें जाणिल्यावांचून आ-
मचें नेमशास्त्र त्याला खरा खोटा ठरवितें काय?
५२ त्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, तूंहि गाली-
लांतील आहेस काय? शोध करून पाहा; कां कीं
गालीलांतून भविष्यवादी उत्पन्न झाला नाहीं. ५३
मग ते सर्व आपापल्या घरीं गेले.

## अध्याय ८.

तेव्हां येशू जाइत झाडांच्या डोंगरास गेला. २
नंतर मोठ्या सकाळीं तो देवळांत फिरून
आला, मग सर्व लोक त्याजकडे आले, आणि तो
बसून त्यांस उपदेश करूं लागला. ३ तेव्हां
शास्त्री व परोशी यांनी व्यभिचारांत धरलेली
बायको त्याकडे आणिली, आणि तिला मध्यें उभें
करून त्याला ह्मटलें, ४ हे गुरू, ही बायको
व्यभिचार करण्यांतच धरली. ५ मोशाने तर
नेमशास्त्रांत आह्मास आज्ञा दिल्ही कीं, अशांस
धोंडमार करावा, परंतु तूं काय सांगतोस? ६ हें
तर त्यांनी त्याची परीक्षा पाहण्याकरितां ह्मटलें,
त्याजवर दोष ठेवायाला आपणास कांहीं निमित्त
व्हावें ह्मणून. तेव्हां येशू खालीं ओणवून बोटाने
भूमीवर लिहूं लागला. ७ मग ते त्याला आग्र-
हाने पुसत असतां तो उठून त्यांस बोलला, जो
तुह्मामध्यें निर्दोष असेल त्याने पहिल्याने तिजवर
धोंडा टाकावा. ८ मग त्याने फिरून खालीं
ओणवून भूमीवर लिहिलें. ९ तेव्हां ते ऐकून व
आपल्या मनाने आपण दोषी ठरून वडिलांपासून
आरंभ करून एकामागें एक असे शेवटल्यांपर्यंत सर्व
निघून गेले, मग येशू एकला राहिला आणि जी
बायको मध्यें उभी होती ती. १० मंतर येशू
उठला, आणि त्या बायकोवांचून कोणाला न पाहतां
तिला ह्मणाला, बाई, ते तुजवर दोष ठेवणारे कोठें
आहेत? तुला कोणी दंड ठरविला नाहीं काय?
११ ती बोलली, हे प्रभू, कोणी नाहीं. तेव्हां
येशू तिला ह्मणाला, मीहि तुला दंड ठरवीत
नाहीं; जा, आणि आतांपासून पाप करूं नको.
१२ नंतर येशूने त्यांस फिरून ह्मटलें, मी
जगाचा उजेड आहें, जो मला अनुसरेल तो अंधा-
रांत चालणारच नाहीं, तर त्याला जीवनाचा उजेड
मिळेल. १३ तेव्हां परोशी त्याला ह्मणाले, तूं
आपणाविषयीं साक्ष देतोस, ती तुझी साक्ष खरी
नाहीं. १४ येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, जरी
मी आपणाविषयीं साक्ष देतों तरी माझी साक्ष
खरी आहे, कां कीं मी कोठून आलों व कोठें जातों
हें मला ठाऊक आहे; परंतु मी कोठून आलों व
कोठें जातों हें तुह्मास ठाऊक नाहीं. १५ तुह्मी
देहबुद्धीने न्याय ठरवितां, मी कोणाचा न्याय ठर-
वीत नाहीं. १६ अणखी जरी म्या न्याय ठर-
विला तरी तें माझें ठरविणें खरें आहे, कां कीं मी
एकला नाहीं, तर मी व मला पाठविणारा बाप
असे आहों. १७ तुमच्या नेमशास्त्रांतहि असें
लिहिलें आहे कीं, दोन माणसांची साक्ष खरी
आहे. १८ मी आपणाविषयीं साक्ष देणारा
आहें, आणि मला पाठविणारा बाप तो मजविषयीं
साक्ष देतो. १९ यावरून ते त्याला ह्मणाले,
तुझा बाप कोठें आहे? येशूने उत्तर दिल्हें कीं,
तुह्मी मला व माझ्या बापालाहि जाणत नाहीं;
जर तुह्मी मला जाणिलें असतें तर माझ्या बापा-
लाहि जाणिलें असतें. २० येशू देवळांत उपदेश
करीत असतां या गोष्टी भांडारांत बोलला, आणि
कोणी त्याला धरिलें नाहीं, कारण कीं त्याची वेळ
अद्याप आली नव्हती.

२१ मग येशू त्यांस फिरून ह्मणाला, मी
निघून जातों, आणि तुह्मी माझा शोध कराल
परंतु आपल्या पापांत मराल; जेथें मी जातों तेथें
तुमच्याने येवत नाहीं. २२ तेव्हां यहूदी
ह्मणाले, तो आपणाला जिवें मारून घेणार आहे
कीं काय? कां तर तो ह्मणतो कीं, जेथें मी जातों
तेथें तुमच्याने येवत नाहीं. २३ मग त्याने
त्यांस ह्मटलें, तुह्मी खालचे आहां, मी वरचा
आहें, तुह्मी या जगाचे आहां, मी या जगाचा
नाहीं. २४ यास्तव म्या तुह्मास सांगितलें कीं,
तुह्मी आपल्या पापांत मराल, कां कीं मी
तो आहें, असा जर तुह्मी विश्वास धरीत नाहीं
तर तुह्मी आपल्या पापांत मराल. २५ मग
त्यांनी त्याला ह्मटलें, तूं कोण आहेस? तेव्हां
येशूने त्यांस ह्मटलें, जें पहिल्यापासून तुह्मास सांगत
आलों तेंच. २६ तुह्माविषयीं मला बहुत गोष्टी
सांगायाच्या आणि ठरवायाच्या आहेत, परंतु
ज्याने मला पाठविलें तो खरा आहे, आणि ज्या गोष्टी
म्या त्यापासून ऐकिल्या त्या मी जगास सांगतों.
२७ तो आह्मासीं बापाविषयीं बोलतो, असें ते

समजले नाहींत. २८ मग येशूने त्यांस ह्मटलें,
जेव्हां तुह्मी मनुष्याच्या पुत्राला चढवाल तेव्हां तुह्मी
जाणाल कीं, मी तो आहें, आणि मी आपल्या
आपण कांहीं करीत नाहीं, तर माझ्या बापाने मला
शिकविल्याप्रमाणें मी या गोष्टी बोलतों. २९
आणि ज्याने मला पाठविलें तो माझ्या बरोबर
आहे, बापाने मला एकटें सोडिलें नाहीं; कारण
कीं जें जें त्याला आवडतें तें मी सर्वदा करितों.
३० तो या गोष्टी बोलत असतां बहुतांनी
त्यावर विश्वास ठेविला. ३१ मग ज्या यहूद्यांनी
त्यावर विश्वास ठेविला त्यांस येशूने ह्मटलें,
जर तुह्मी माझ्या वचनांत राहाल तर माझे
शिष्य आहां खरे; ३२ आणि तुह्मी खरेपण
जाणाल, आणि खरेपण तुह्मास मोकळें करील.
३३ त्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, आह्मी आब्रा-
हामाचें संतान आहों, व कधींहि कोणाचे दास
झालों नाहीं, तर तुह्मी मोकळे व्हाल असें तूं कसें
ह्मणतोस? ३४ येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं,
मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, जो कोणी पाप
करितो तो पापाचा दास आहे. ३५ आणि दास
सर्वकाळ घरांत राहत नाहीं, पुत्र सर्वकाळ राहतो.
३६ यास्तव जर पुत्र तुह्मास मोकळें करील तर
तुह्मी निश्चयें मोकळे व्हाल. ३७ तुह्मी आब्रा-
हामाचें संतान आहां हें मला ठाऊक आहे, तरी
माझें वचन तुह्मामध्यें राहत नाहीं, ह्मणून तुह्मी
मला जिवें मारायास पाहतां. ३८ म्या आपल्या
बापाजवळ जें पाहिलें तें बोलतों, आणि तुह्मी
आपल्या बापाजवळ जें पाहिलें तें करितां. ३९
त्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, आब्राहाम आमचा
बाप आहे. येशूने त्यांस ह्मटलें, जर तुह्मी आब्राहा-
माचीं लेंकरें असतां तर आब्राहामाचीं कामें केलीं
असतीं. ४० परंतु आतां जो मी देवापासून ऐकले-
ल्या खऱ्या गोष्टी तुह्मास सांगत आलों, अशा मला
माणसाला तुह्मी जिवें मारायास पाहतां; आब्रा-
हामाने असें केलें नाहीं. ४१ तुह्मी आपल्या बापाचीं
कामें करितां. मग ते त्याला ह्मणाले, आह्मी व्यभि-
चाराने जन्मलों नाहीं; आह्मास एक बाप, तो देव
आहे. ४२ तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें, जर देव
तुमचा बाप असता तर तुह्मी मजवर प्रीति केली
असती, कारण कीं मी देवापासून निघून आलों,
अणखी मी आपल्या आपण आलों नाहीं, तर
त्याने मला पाठविलें. ४३ तुह्मी माझें बोलणें कां
समजत नाहीं? याचें कारण असें कीं, माझें वचन
तुमच्याने ऐकवत नाहीं. ४४ तुह्मी सैतान बापा-
पासून झालां आहां, आणि आपल्या बापाच्या
इच्छांप्रमाणें करायास इच्छितां, तो प्रारंभापासून
मनुष्यघातक आहे, आणि तो खरेपणांत टिकला
नाहीं, कारण कीं त्यामध्यें खरेपण नाहीं; तो खोटें
बोलतो तेव्हां आपल्यांतूनच बोलतो, कां कीं तो
लबाड व लबाडीचा बाप आहे. ४५ मी तर
तुह्मास खरेपण सांगतों ह्मणून तुह्मी मजवर विश्वास
ठेवीत नाहीं. ४६ तुमच्यांतील कोण मजवर
दोष लागू करितो? आणि मी खरेपण सांगत
असतां तुह्मी मजवर विश्वास कां ठेवीत नाहीं?
४७ जो देवाकडला आहे तो देवाच्या गोष्टी
ऐकतो, तुह्मी देवाकडले नव्हां ह्मणून ऐकत नाहीं.
४८ तेव्हां यहूद्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं
शोमरोनी आहेस आणि तुला भूत लागलें आहे,
हें आह्मी ठीक ह्मणतों कीं नाहीं? ४९ येशूने
उत्तर दिल्हें कीं, मला भूत लागलें नाहीं; मी तर
आपल्या बापाचा सन्मान करितों, आणि तुह्मी
माझा अपमान करितां. ५० आणि मी आपलें
गौरव पाहत नाहीं, जो पाहतो व न्याय ठरवितो
असा एक आहे. ५१ मी तुह्मास खचीत खचीत
सांगतों, जर कोणी माझें वचन पाळील तर तो
कधींहि मरण पाहणारच नाहीं. ५२ तेव्हां यहूदी
त्याला ह्मणाले, तुला भूत लागलें आहे हें आतां
आह्मास कळलें. आब्राहाम व भविष्यवादी मेले,
आणि तूं ह्मणतोस, जर कोणी माझें वचन पा-
ळील तर तो कधींहि मरण पावणारच नाहीं. ५३
आमचा बाप आब्राहाम यापेक्षां तूं मोठा आहेस
काय? तो मेला व भविष्यवादीहि मेले; तूं आप-
णाला कोण ह्मणवितोस? ५४ येशूने उत्तर
दिल्हें कीं, म्या आपलें गौरव केलें तर माझें गौरव
कांहीं नाहीं, जो माझें गौरव करितो तो माझा
बाप आहे, त्याविषयीं तुह्मी ह्मणतां कीं तो आ-
मचा देव आहे. ५५ परंतु तुह्मी त्याला जाणत
नाहीं, मी तर त्याला जाणतों; आणि मी त्याला
जाणत नाहीं, असें जर ह्मणेन तर तुमच्या
सारिखा लबाड होईन; परंतु मी त्याला जाणतों
व त्याचें वचन पाळितों. ५६ तुमचा बाप आब्रा-
हाम माझा दिवस पाहायास उत्कंठित झाला आणि
पाहून आनंद पावला. ५७ तेव्हां यहूदी त्याला
बोलले, तूं अजून पन्नास वर्षांचा झाला नाहींस,

तर त्वां आब्राहामाला पाहिलें काय? ५८ येशूने
त्यांस ह्मटलें, मी तुह्मास खचीत खचीत सांगतों,
आब्राहाम झाला त्यापूर्वी मी आहें. ५९ या-
वरून त्यानी त्याला मारायास धोंडे उचलिले;
परंतु **येशू** लपाला, आणि त्यांच्या मधून जाऊन
देवळांतून निघून तसाच तेथून गेला.

## अध्याय ९.

मग त्याने पुढें जाऊन जन्मांध माणूस पाहि-
ला. २ तेव्हां त्याच्या शिष्यानी त्याला वि-
चारिलें कीं, हे गुरू, ज्या पापामुळें हा असा
अंधळा जन्मला तें कोणी केलें, याने किंवा याच्या
आईबापानी? ३ येशूने उत्तर दिल्हें कीं, याने
किंवा याच्या आईबापानी पाप केलें असें नाहीं, तर
याकडून देवाचीं कामें प्रगट व्हावीं ह्मणून असा
जन्मला. ४ दिवस आहे तोंपर्यंत माझ्या पाठ-
विणाऱ्याचीं कामें मला केलीं पाहिजेत; रात्र येती,
तेव्हां कोणाच्याने काम करवत नाहीं. ५ मी ज-
गांत आहें तोंपर्यंत मी जगाचा उजेड आहें. ६
असें बोलून तो भूमीवर थुंकला, मग थुंकयाने चि-
खल करून त्याने तो चिखल त्या अंधळ्याच्या
डोळ्यांवर लेपिला; ७ आणि त्याला ह्मटलें,
जा, शिलोहाम तळ्यांत धू; शिलोहाम ह्मणजे
पाठविलेला; मग जाऊन धुतल्यावर तो पाहत आ-
ला. ८ तेव्हां शेजारी व ज्यानी त्याला अंधळा
असें पूर्वी पाहिलें होतें ते ह्मणाले, जो भीक
मागत बसत असे तो हाच नव्हेना? ९ कि-
त्येक बोलले तोच हा आहे, आणि दुसरे बोलले
त्याच्या सारिखा आहे; तो बोलला, मी तोच
आहें. १० तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें, तुझे
डोळे कसे उघडले? ११ त्याने उत्तर दिल्हें
कीं, येशू नामें माणसाने चिखल केला व माझ्या
डोळ्यांवर लेपून मला सांगितलें, शिलोहाम
तळ्यांत जाऊन धू, तेव्हां जाऊन धुतल्यावर मला
दिसूं लागलें. १२ मग त्यानी त्याला ह्मटलें, तो
कोठें आहे? तो बोलला, मला ठाऊक नाहीं.
१३ जो पूर्वी अंधळा होता त्याला परोश्यांकडे
नेलें. १४ आणि येशूने चिखल करून त्याचे
डोळे उघडिले, तेव्हां शाब्बाथ दिवस होता. १५
मग, तुला कसें दिसूं लागलें, हें परोश्यानीहि
त्याला अणखी पुसलें, तेव्हां तो त्यांस ह्मणाला,
त्याने माझ्या डोळ्यांस चिखल लाविला, मग
धुतल्यावर मला दिसूं लागलें. १६ मग परो-
श्यांतील कित्येक बोलले, तो माणूस देवापासून
नाहीं, कां कीं तो शाब्बाथ पाळीत नाहीं. दुसरे
बोलले, पापी माणसाच्याने एवढे चमत्कार कसे कर-
वतील? असी त्यांच्या मध्यें फूट पडली. १७ फि-
रून ते त्या अंधळ्याला ह्मणाले, त्याने तुझे डोळे
उघडिले ह्मणून त्याविषयीं तूं काय ह्मणतोस?
तेव्हां त्याने ह्मटलें कीं, तो भविष्यवादी आहे. १८
मग यहूद्यानी त्या दृष्टि पावलेल्याच्या आईबापांस
बोलाविलें, तोंपर्यंत तो अंधळा असून दृष्टि पावला
असी त्यांची त्याविषयीं खातरी झाली नव्हती.
१९ मग त्यानी त्यांस विचारिलें कीं, जो तुमचा
पुत्र जन्मांध होता ह्मणून ह्मणतां, तो हाच
काय? तर त्याला आतां कसें दिसूं लागलें? २०
त्याच्या आईबापानी त्यांस उत्तर दिल्हें कीं, हा
आमचा पुत्र आहे व हा जन्मांध होता हें आह्मास
ठाऊक आहे; २१ परंतु त्याला आतां कसें दिसूं
लागलें हें ठाऊक नाहीं, आणि त्याचे डोळे कोणी
उघडिले हेंहि आह्मास ठाऊक नाहीं; तो प्रौढ
आहे, त्याला विचारा, तो आपल्याविषयीं सांगेल.
२२ त्याच्या आईबापांस यहूद्यांचें भय होतें ह्म-
णून त्यानी असें ह्मटलें, कारण कीं हा ख्रीस्त
असें जर कोणी पत्करील तर त्याला सभेंतून घाल-
वावें असा यहूद्यानी एकोपा केला होता. २३ या-
मुळें त्याच्या आईबापानी ह्मटलें कीं, तो प्रौढ
आहे, त्याला विचारा. २४ मग जो माणूस
अंधळा होता त्याला त्यानी फिरून बोलाविलें,
आणि त्याला ह्मटलें, देवाचें गौरव कर, तो माणूस
पापी आहे हें आह्मास ठाऊक आहे. २५ यावरून
त्याने उत्तर दिल्हें कीं, तो पापी आहे किंवा नाहीं
हें मला ठाऊक नाहीं, एवढें मला ठाऊक आहे
कीं, मी अंधळा होतों तो आतां पाहतों. २६ मग
त्यानी त्याला फिरून ह्मटलें, त्याने तुला काय
केलें? त्याने तुझे डोळे कसे उघडिले? २७ त्याने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, म्या तुह्मास आतां सांगि-
तलें असतां तुह्मी ऐकिलें नाहीं; फिरून ऐकायास
कां इच्छितां? तुह्मीहि त्याचे शिष्य व्हायास
इच्छितां काय? २८ तेव्हां ते त्याची असी
निंदा करूं लागले कीं, तूं त्याचा शिष्य आहेस,
आह्मी तर मोश्याचे शिष्य आहों; २९ देव
मोश्यासीं बोलला हें आह्मास ठाऊक आहे, परंतु
हा कोठला आहे हें ठाऊक नाहीं. ३० त्या

माणसाने त्यास उत्तर दिल्हें कीं, त्याने माझे डोळे
उघडिले, असें असताहि तो कोठला आहे हें
तुह्मास ठाऊक नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. ३१
आह्मास तर ठाऊक आहे कीं, देव पाप्यांचें ऐकत
नाहीं, तर कोणी देवाचा भक्त असल्यास व त्याच्या
इच्छेप्रमाणें केल्यास त्याचें तो ऐकतो. ३२ जन्मां-
धाचे डोळे कोणीएकाने उघडिले असें कधींहि
ऐकण्यांत आलें नाहीं. ३३ जर हा देवापासून
आला नसता तर याच्याने कांहीं न करवतें. ३४
त्यानी त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं अगदी पापांमध्यें
जन्मलास, आणि तूं आह्मास उपदेश करितोस
काय? मग त्यानी त्याला बाहेर घालविलें.

३५ त्यानी त्याला बाहेर घालविलें हें येशूने
ऐकिलें; नंतर तो मिळाल्यावर त्याने त्याला ह्मटलें,
तूं देवाच्या पुत्रावर विश्वास ठेवितोस काय? ३६
त्याने उत्तर दिल्हें कीं, हे प्रभू, म्या त्यावर विश्वास
ठेवावा ह्मणून तो कोण आहे, हें सांग. ३७
तेव्हां येशू त्याला ह्मणाला, त्वां त्याला पाहिलें
आहे, आणि तुजसीं बोलणारा तोच आहे. ३८
तेव्हां त्याने ह्मटलें, हे प्रभू, मी विश्वास ठेवितों;
मग त्याने त्याला नमन केलें. ३९ तेव्हां येशू
बोलला, मी न्याय ठरविण्यासाठीं या जगांत आलों
आहें, यासाठीं कीं जे पाहत नाहींत त्यानी पाहावें
आणि जे पाहतात त्यानी अंधळें व्हावें. ४० तेव्हां
त्याच्या जवळ जे परोशी होते त्यांतील कित्येकानी
हें ऐकून त्याला ह्मटलें, आह्मीहि अंधळे आहों
काय? ४१ येशू त्यास ह्मणाला, तुह्मी अंधळे
असतां तर तुह्माला पाप नसतें, परंतु आह्मी पाहतों
असें तुह्मी आतां ह्मणतां, यास्तव तुमचें पाप राहतें.

## अध्याय १०.

मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, जो मेंढ-
वाड्यांत दाराने न जातां दुसरीकडून चढून
जातो तो चोर व लुटारू आहे. २ परंतु जो
दाराने आंत जातो तो मेंढरांचा पाळणारा आहे.
३ त्याच्या साठीं द्वारपाळ उघडितो, आणि मेंढरें
त्याची वाणी ऐकतात, आणि तो आपल्या मेंढरांस
नांव घेऊन घेऊन हाक मारितो, आणि त्यास बाहेर
नेतो. ४ आणि तो आपलीं मेंढरें काढून त्यांच्या
पुढें चालतो, आणि मेंढरें त्याच्या मागें चालतात,
कारण कीं तीं त्याची वाणी ओळखतात. ५ तीं
तर परक्याच्या मागें चालत नाहींत, तर त्यापासून
पळतात; का कीं तीं परक्यांची वाणी ओळखत
नाहींत. ६ येशूने हा दाखला त्यास सांगितला,
परंतु ज्या गोष्टी तो त्यांसीं बोलला त्या काय
आहेत हें ते समजले नाहींत. ७ मग येशू त्यांस
फिरून ह्मणाला, मी तुह्मास खचीत खचीत सां-
गतों कीं, मी मेंढरांचें दार आहें. ८ माझ्या
पूर्वी जे आले ते सर्व चोर व लुटारू आहेत, परंतु
मेंढरानी त्यांचें ऐकिलें नाहीं. ९ मी दार आहें,
जर कोणी मजकडून आंत जाईल तर तो तारण
पावेल, आणि तो आंत येईल व बाहेर जाईल
आणि त्याला चारा मिळेल. १० चोरी करावी
व मारावें व नाश करावा याच हेतूने चोर येतो:
त्यास जीवन व्हावें आणि तें त्यास अतिशय व्हावें
ह्मणून मी आलों आहें. ११ मी चांगला मेंढपाळ
आहें, जो चांगला मेंढपाळ तो मेंढरांकरितां आ-
पला जीव देतो. १२ परंतु मोलकरी, जो मेंढ-
पाळ नव्हे, ज्याचीं तीं मेंढरें नव्हत, तो लांडगा
येतां पाहून मेंढरांस सोडून पळतो, मग लांडगा
मेंढरांस धरून त्यांची दाणादाण करितो. १३
मोलकरी पळतो, कारण कीं तो मोलकरीच आहे,
आणि त्याला मेंढरांची काळजी नाहीं. १४ मी
चांगला मेंढपाळ आहें, आणि मी आपले जे त्यांस
जाणतों, आणि माझे जे ते मला जाणतात. १५
जसें बाप मला जाणतो आणि मी बापाला जाणतों:
आणि मेंढरांसाठीं मी आपला जीव देतों. १६
आणि या वाड्यांतलीं नव्हत असीं दुसरीं मेंढरें
मला आहेत, तींहि मला आणिलीं पाहिजेत, आणि
तीं माझी वाणी ऐकतील, मग एक कळप एक मेंढ-
पाळ असें होईल. १७ बाप मजवर प्रीति करितो,
का कीं मी आपला जीव देतों तो फिरून घ्यावा
ह्मणून देतों. १८ कोणी मजपासून तो घेत नाहीं
परंतु मी आपणच तो देतों; मला तो सोडण्याचा
अधिकार आहे, आणि तो फिरून धरण्याचा अधि-
कार आहे. ही आज्ञा म्या आपल्या बापापासून
घेतली आहे. १९ तेव्हां या गोष्टींवरून यहूद्यां-
मध्यें फिरून फूट पडली. २० त्यांतील बहुतेक
बोलले, त्याला भूत लागलें व तो वेडा आहे.
त्याचें तुह्मी का ऐकतां? २१ दुसरे बोलले, या
गोष्टी भूतग्रस्ताच्या नव्हत, भुताच्याने अंधळ्याचे
डोळे उघडवतील काय?

२२ त्या काळीं हिंवाळा होता, आणि यरुश-
लेमांत पुनरस्थापनाचा सण होता. २३ आणि

शू देवळामध्यें शलमोनाच्या देवडींत फिरत
ता. २४ तेव्हां यहूद्यांनीं त्याला वेढून त्यास
टलें, तूं कोठपर्यंत आमचा जीव संशयांत घालि-
स? तूं ख्रीस्त असलास तर आह्मास उघड
य. २५ येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, म्यां
ह्मास सांगितलें तरी तुह्मी विश्वास धरीत नाहीं;
ीं कामें मी आपल्या बापाच्या नांवानें करितों तीं
विषयीं साक्ष देतात. २६ तरी तुह्मी मजवर
श्वास ठेवीत नाहीं; कारण कीं तुह्मी माझ्या
रांतले नव्हां, असें म्यां तुह्मास सांगितलें तसें.
७ माझीं मेंढरें माझी वाणी ऐकतात, आणि मी
ांस जाणतों, आणि तीं माझ्या मागें येतात,
८ आणि मी त्यांस सर्वकाळचें जीवन देतों, आणि
ीं कधींहि नाश पावणार नाहींत, आणि कोणी
ांस माझ्या हातांतून हिसकून घेणार नाहीं. २९
या माझ्या बापानें तीं मला दिल्हीं तो सर्वांपेक्षा
ठा आहे, आणि माझ्या बापाच्या हातांतून त्यांस
णाच्यानें हिसकून घेववत नाहीं. ३० मी आणि
प एक आहों. ३१ तेव्हां यहूद्यांनीं त्याला
ंडमार करायास फिरून धोंडे उचलिले. ३२
शूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, म्यां आपल्या बा-
ाचीं बहुत चांगलीं कामें तुह्मास दाखविलीं आ-
त, त्यांतल्या कोणत्या कामामुळें तुह्मी मला धोंड-
र करितां? ३३ यहूद्यांनीं त्याला उत्तर दिल्हें
ं, चांगल्या कामामुळें आह्मी तुला धोंडमार करीत
ाहीं, तर दुर्भाषणामुळें आणि तूं माणूस असतां
ापणाला देव ह्मणवितोस यामुळें करितों. ३४
शूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, तुह्मी देव आहां
सें मी बोललों, हें तुमच्या शास्त्रांत लिहिलें
ाहीं काय? ३५ ज्यांस देवाचें वचन प्राप्त झालें
ांस त्यानें देव ह्मटलें, आणि धर्मलेखाचा भंग
ोव नाहीं, ३६ तर ज्याला बापानें नेमून जगांत
ाठविलें आहे, त्यानें मी देवाचा पुत्र आहें असें
ह्मटल्यावरून, तूं दुर्भाषण करितोस असें त्या
ला तुह्मी ह्मणतां काय? ३७ जर मी आपल्या
ापाचीं कामें करीत नाहीं तर मजवर विश्वास
वूं नका. ३८ परंतु जर मी करितों, तर मजवर
री विश्वास न ठेविला तरी कामांवर विश्वास ठेवा,
ासाठीं कीं मजमध्यें बाप व त्याजमध्यें मी आहें
सें तुह्मी जाणावें व विश्वास धरावा. ३९ मग
ं त्याला फिरून धरायास पाहूं लागले, परंतु तो
यांच्या हातांतून निघून गेला.

४० आणि तो फिरून यार्देनेच्या पलिकडे,
योहान्न पहिल्यानें बाप्तिस्मा करीत होता, त्या
ठिकाणीं गेला व तेथें राहिला. ४१ तेव्हां त्याज-
कडे बहुत लोक आले, आणि ते बोलले कीं, योहा-
न्नानें कांहीं चमत्कार केला नाहीं खरें, परंतु योहा-
न्नानें याजविषयीं जें जें सांगितलें तें सर्व खरें होतें.
४२ आणि तेथें बहुतांनीं त्याजवर विश्वास ठेविला.

## अध्याय ११.

तेव्हां मारया व तिची बहीण मार्था यांच्या बेथा-
नी गांवांतला लाजारस नामें कोणीएक माणूस
रोगी होता. २ जिनें प्रभूला सुगंध तेल लाविलें
आणि त्याचे पाय आपल्या केसांनीं पुसले, ती ही
मारया होती, तिचा भाऊ लाजारस रोगी होता.
३ तेव्हां त्या बहिणींनीं त्याला सांगून पाठविलें कीं,
हे प्रभू, पाहा, ज्याजवर तूं प्रीति करितोस तो रोगी
आहे. ४ तेव्हां तें ऐकून येशू ह्मणाला, हा रोग
मरणासाठीं नव्हे तर देवाच्या गौरवासाठीं आहे,
याकडून देवाच्या पुत्राचें गौरव व्हावें ह्मणून. ५
येशू तर मार्था व तिची बहीण व लाजारस यांवर
प्रीति करीत असे. ६ मग तो रोगी आहे हें
ऐकिल्यानंतर, हा जेथें होता त्या ठिकाणीं दोन दिवस
राहिला. ७ त्यानंतर त्यानें शिष्यांस ह्मटलें,
आपण यहूद्यांत फिरून जाऊं. ८ शिष्य त्याला
ह्मणाले, हे गुरू, यहूदी नुकेंच तुला धोंडमार
करायास पाहत होते, आणि तूं तेथें फिरून जातोस
काय? ९ येशूने उत्तर दिल्हें कीं, दिवसाचे बारा
तास आहेत कीं नाहींत? कोणी दिवसा चालतो
तर त्याला ठेंच लागत नाहीं, कारण कीं तो या
जगाचा उजेड पाहतो. १० परंतु कोणी रात्रीं
चालतो तर त्याला ठेंच लागती, कारण कीं त्याला
उजेड नाहीं. ११ या गोष्टी सांगितल्यावर त्यानें
त्यांस ह्मटलें, आमचा लाजारस मित्र निजला,
परंतु मी त्याला जागें करायास जातों. १२ तेव्हां
त्याचे शिष्य बोलले, हे प्रभू, तो निजला असला
तर तो पार पडेल. १३ येशू तर त्याच्या मरणा-
विषयीं बोलला, परंतु झोंपेच्या निजण्याविषयीं हा
बोलतो असें त्यांस वाटलें. १४ मग येशूनें त्यांस
उघड सांगितलें, लाजारस मेला आहे; १५
आणि मी तेथें नव्हतों ह्मणून मी तुह्मामुळें आनंद
करितों, यासाठीं कीं तुह्मी विश्वास धरावा; परंतु
आपण त्याकडे जाऊं. १६ तेव्हां दिदुमस ह्मट-

लेला थोमा सोबतीच्या शिष्यांस ह्मणाला, आप-
णहि याच्या बरोबर मरायास जाऊं.
१७ मग येशूने आल्यावर त्याला कबरेंत
ठेवून चार दिवस झाले असें पाहिलें. १८
बेथानी तर यरूशलेमापासून सुमारें पाऊण कोस
दूर होती; १९ आणि मार्था व मारया यांचें
भावाविषयीं शांतवन करावें ह्मणून यहूद्यांतील
बहुत लोक त्यांच्याकडे आले होते. २० तर येशू
आला हें ऐकतांच मार्था जाऊन त्याला भेटली, परंतु
मारया घरांत बसली. २१ तेव्हां मार्था येशूला
ह्मणाली, हे प्रभू, तूं एथें असतास तर माझा
भाऊ मेला नसता. २२ तरी आतांहि जें कांहीं
तूं देवाजवळ मागसील तें देव तुला देईल, हें
मला ठाऊक आहे. २३ येशूनें तिला ह्मटलें,
तुझा भाऊ पुन्हा उठेल. २४ मार्था त्याला
ह्मणाली, शेवटल्या दिवसीं पुन्हा उठण्याच्या वेळेस
तो पुन्हा उठेल हें मला ठाऊक आहे. २५
येशूने तिला ह्मटलें, पुन्हा उठणें व जीवन मी
आहें, जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला असला
तरी वांचेल. २६ आणि कोणी वांचणारा व
मजवर विश्वास ठेवणारा कधींहि मरणार नाहीं,
याचा तुला विश्वास आहे काय? २७ ती
त्याला ह्मणाली, होय प्रभू, जो देवाचा पुत्र
ख्रीस्त जगांत येणार होता तोच तूं आहेस, असा
मला विश्वास आहे. २८ असें बोलून ती निघाली,
आणि आपली बहीण मारया इला एकांतीं बोला-
वून ह्मणाली, गुरु आला आहे आणि तुला बोला-
वितो. २९ हें ऐकतांच ती लवकर उठून त्याकडे
आली. ३० येशू तर अद्याप गांवांत आला नव्हता,
तर मार्था त्याला भेटली होती त्या ठिकाणीं
होता. ३१ यास्तव जे यहूदी तिच्या जवळ घरांत
होते व तिचें शांतवन करीत होते, ते मारया लव-
कर उठून बाहेर निघाली असें पाहून, ती कबरेकडे
रडायास जाती, असें बोलून, तिच्या मागें चालले.
३२ मग मारया जेथें येशू होता तेथें आल्यावर
त्याला पाहून त्याच्या पायां पडली व त्याला ह्मणा-
ली, हे प्रभू, तूं एथें असतास तर माझा भाऊ मेला
नसता. ३३ मग येशू तिला रडतां व जे यहूदी
तिच्या जवळ मिळाले त्यांसहि रडतां पाहून, आ-
त्म्यांत कण्हला व विव्हळ झाला. ३४ आणि
बोलला, तुह्मी त्याला कोठें ठेविलें? ते त्याला ह्म-
णाले, हे प्रभू, येऊन पाहा. ३५ येशू रडला.
३६ तेव्हां यहूदी बोलले, पाहा, याची त्याज-
वर केवढी प्रीति होती. ३७ आणि त्यांतील
कित्येक ह्मणाले, ज्याने अंधळ्याचे डोळे उघडिले
त्याला हा मरूं नये असेंहि करण्याची शक्ति
नव्हती काय? ३८ मग येशू फिरून अंतःकरणांत
कण्हून कबरेकडे आला, ती तर गुहा होती, आणि
तिच्या तोंडीं धोंड ठेविली होती. ३९ येशूने
ह्मटलें, धोंड काढा. त्या मेलेल्याची बहीण मार्था
त्याला ह्मणाली, हे प्रभू, आतां त्यास घाण येत
असेल, कारण कीं त्याला चार दिवस झाले आ-
हेत. ४० येशूने तिला ह्मटलें, जर तूं विश्वास
धरसील तर देवाचें गौरव पाहसील, असें म्या
तुला सांगितलें कीं नाहीं? ४१ मग जेथें तो
मेलेला ठेविला होता तेथून त्यांनी धोंड
काढिली. तेव्हां येशू आपले डोळे वर करून
बोलला, हे बापा, त्वां माझें ऐकिलें ह्मणून मी
तुझा उपकार मानितों. ४२ आणि तूं सर्वदा
माझें ऐकतोस हें मला ठाऊक आहे, परंतु जे लोक
सभोंवते उभे आहेत त्यांकरितां बोललों, या-
साठीं कीं त्वां मला पाठविलें आहे असा त्यांनी
विश्वास धरावा. ४३ आणि असें बोलून तो मो-
ठ्याने ओरडला, लाजारसा, बाहेर ये. ४४ तेव्हां
जो मेला होता तो बाहेर आला, त्याचे पाय व
हात वेष्टणांनी बांधलेले व तोंड रुमालाने वेष्टिलेलें
होतें. येशूने त्यांस ह्मटलें, त्याला मोकळें करा
व जाऊं द्या.
४५ तेव्हां ज्या यहूद्यांनी मारयेकडे येऊन
येशूने केलेलीं कामें पाहिलीं होतीं, त्यांतून बहुतांनी
त्याजवर विश्वास ठेविला. ४६ परंतु त्यांतून कि-
त्येकांनी परोश्यांकडे जाऊन येशूने केलेलीं कामें
त्यांस सांगितलीं. ४७ यावरून मुख्य याजकांनी
व परोश्यांनी सभा मिळवून ह्मटलें, आपण
काय करितों? तो माणूस तर बहुत चमत्कार
करितो. ४८ आह्मी त्याला असें असूं दिल्हें,
तर सर्व त्याजवर विश्वास ठेवितील, मग रोमी
लोक येऊन आमचें ठिकाण व राष्ट्रहि घेतील. ४९
आणि त्यांतील कायफा नामें कोणीएक त्या वर्षी
प्रमुख याजक होता तो त्यांस ह्मणाला, तुह्मी
कांहीं जाणत नाहीं, ५० व लक्षांत आणीत
नाहीं कीं, लोकांसाठीं एका माणसाने मरावें आणि
सर्व राष्ट्राचा नाश होऊं नये हें आह्मांस उपयो-
गी आहे. ५१ हें तर तो आपल्या आपण बो-

लला नाहीं, तर त्या वर्षी तो मुख्य याजक होता
ह्मणून त्याने भविष्य सांगितलें कीं, येशू त्या रा-
ष्ट्रासाठीं मरणार आहे; ५२ आणि केवळ त्या
राष्ट्रासाठीं असें नाहीं, तर यासाठीं कीं त्याने दे-
वाच्या पांगलेल्या लेंकरांसहि एकत्र मिळवावें. ५३
यास्तव त्या दिवसापासून त्यानी त्याला जिवें मा-
रण्याचा मनसोबा केला. ५४ यामुळें येशू
तेव्हांपासून यहूद्यांमध्यें प्रगटपणें फिरला नाहीं, तर
तेथून रानाजवळच्या प्रांतांतील एफ्राइम नामें नग-
रांत गेला, आणि तेथें आपल्या शिष्यांसुद्धां राहि-
ला. ५५ तेव्हां यहूद्यांचा वल्हांडण सण जवळ
आला होता, आणि वल्हांडण सणाच्या अगोदर
बहुत लोक आपणांस शुद्ध करायास त्या प्रांतांतून
वर यरूशलेमास गेले. ५६ तेव्हां त्यानी येशू-
या शोध केला, आणि देवळांत उभें असतांना एक-
मेकांस ह्मटलें, तुह्मास कसें वाटतें? तो सणास
येणार नाहीं काय? ५७ आणखी मुख्य याजका-
नी व परोश्यानी त्याला धरण्याकरितां ताकीद केली
होती कीं, तो कोठें आहे असें जर कोणाला कळलें
असेल तर त्याने सूचना करावी.

## अध्याय १२.

मग वल्हांडण सणाच्या पूर्वी साहा दिवस येशू
बेथानीस आला, जो मेला होता आणि ज्या-
ला त्याने मेलेल्यांमधून उठविलें होतें तो लाजा-
रस तेथें होता. २ तेव्हां त्यानी त्याच्या साठीं
तेथें जेवणावळ केली, आणि मार्था सेवा करीत
होती, परंतु लाजारस त्याच्या संगतीं बसणाऱ्यां-
तील एक होता. ३ तेव्हां मारयेने खरा नार्द नामें
मोलवान सुगंध तेल शेरभर घेऊन येशूच्या पा-
यांस लाविलें, आणि आपल्या केंसानी त्याचे पाय
पुसिले, तेव्हां त्या सुगंध तेलाच्या वासाने घर
भरून गेलें. ४ यावरून त्याच्या शिष्यांतील एक,
शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कारयोते जो त्याला
पराधीन करणार होता तो बोलला, ५ हें
सुगंध तेल पाऊणशें रुपयांस विकून दरिद्र्यांस कां
दिल्हें नाहीं? ६ त्याला दरिद्र्यांची चिंता होती
ह्मणून हें बोलला असें नाहीं, तर तो चोर होता
व त्याच्या जवळ कसणी होती आणि तींत जें
जें घातलें होतें तें तो वाहत असे, ह्मणून असें
बोलला. ७ मग येशूने ह्मटलें, हिला असूं दे,
हिने माझ्या उत्तरकार्याच्या दिवसासाठीं तें ठेविलें
होतें. ८ दरिद्री तर सर्वकाळ तुह्मामध्यें आ-
हेत, परंतु मी सर्वकाळ तुह्मामध्यें नाहीं. ९
तेव्हां तो तेथें आहे असें यहूद्यांतील बहुत लोक
समजून केवळ येशूकरितां नाहीं, तर ज्या लाजा-
रसाला त्याने मेलेल्यांमधून उठविलें त्यालाहि पा-
हण्याकरितां आले. १० तेव्हां मुख्य याज-
कानी लाजारसालाहि जिवें मारण्याचा मनसोबा
केला. ११ कारण कीं त्याजमुळें यहूद्यांतील
बहुतानी जाऊन येशूवर विश्वास ठेविला.

१२ दुसऱ्या दिवशीं सणास आलेले बहुत लोक,
येशू यरूशलेमास येत आहे असें ऐकून, १३
खजुरीच्या झावळ्या घेतल्या, आणि त्याच्या भेटीस
बाहेर जाऊन ओरडले कीं, होसान्ना, प्रभूच्या
नांवाने येणारा जो इस्राएलाचा राजा तो धन्यवादित
असो. १४ तेव्हां येशू लाहान गाढव मिळवून
त्यावर बसला, हें लिहिल्याप्रमाणें झालें, तें असें
कीं, १५ हे सीयोनाच्या कन्ये, भिऊं नको, पाहा
तुझा राजा गाढवीच्या शिंगरावर बसून येतो. १६
या गोष्टी तर त्याचे शिष्य प्रथम समजले नव्हते,
तर येशूचें गौरव झाल्यावर त्यांस आठवण झाली
कीं, त्याविषयीं या गोष्टी लिहिल्या होत्या आणि
लोकानी त्याला असें केलें होतें. १७ तेव्हां जो
समुदाय त्याच्या बरोबर होता त्याने साक्ष दिल्ही
कीं, याने लाजारसाला कबरेंतून बोलावून त्याला
मेलेल्यांमधून उठविलें. १८ आणि त्याने तो चम-
त्कार केला हें समुदायाने ऐकिलें ह्मणून ते त्याला
भेटायाला गेले. १९ मग परोशी एकमेकांस ह्म-
णाले, तुमचें कांहीं चालत नाहीं हें तुह्मी पाहतां
काय? पाहा, जग त्याच्या मागें चाललें आहे.

२० तेव्हां सणांत जे भजायास आले होते
त्यांमध्यें कित्येक हेलेणी होते. २१ त्यानी तर गाली-
लांतील बेथसाइद्यांतल्या फिलिप्पसाजवळ येऊन
त्याला विनंती केली कीं, महाराज, येशूला पाहावें
असें आमच्या मनांत आहे. २२ फिलिप्पसाने
जाऊन अंद्रयासाला सांगितलें, मग फिरून अंद्र-
यास व फिलिप्पस यानी येशूला सांगितलें. २३
तेव्हां येशूने त्यांस उत्तर दिल्हें कीं, मनुष्याच्या
पुत्राचें गौरव होण्याची वेळ आली आहे. २४
मी तुह्मास खचीत खचीत सांगतों, गव्हाचा दाणा
भूमींत पडून मेला नाहीं तर तो एकटाच राहतो,
परंतु मेला तर तो बहुत पीक देतो. २५ जो
आपल्या जिवावर प्रीति करितो तो त्याला मुकेल,

आणि जो या जगांत आपल्या जिवाचा द्वेष करितो
तो त्याला सर्वकाळच्या जीवनासाठीं राखील. २६
जर कोणी माझी सेवा करील तर त्याने माझ्या मागें
यावें, मग जेथें मी आहें तेथें माझा सेवकहि असेल,
आणि जर कोणी माझी सेवा करील तर बाप त्याचा
मान करील. २७ आतां माझा जीव घाबरला आहे,
आणि मी काय बोलूं? हे बापा, या घटकेपासून
मला तार? मी तर यासाठींच या घटकेपर्यंत आलों
आहें. २८ हे बापा, तूं आपल्या नांवाचें गौरव
कर. मग आकाशांतून असी वाणी आली कीं,
म्या गौरविलें आहे व फिरून गौरवीन. २९
तेव्हां जो समुदाय उभा असतांना ऐकत होता त्याने
ह्मटलें, गडगडाट झाला. दुसऱ्यानी ह्मटलें, त्या-
सीं दूत बोलला. ३० येशूने उत्तर दिल्हें कीं,
ही वाणी मजसाठीं झाली नाहीं, तर तुह्मासाठीं
झाली. ३१ आतां या जगाचा न्याय होतो,
आतां या जगाचा अधिकारी बाहेर टाकण्यांत
येईल. ३२ आणि मला पृथ्वीपासून उंच केलें तर
मी आपणाकडे सर्वांस ओढीन. ३३ तेव्हां आपण
कोणत्या मरणाने मरणार हें सुचविण्याकरितां बोलला.
३४ समुदायाने त्याला उत्तर दिल्हें कीं, ख्रीस्त
सर्वकाळ राहील असें आह्मी नेमशास्त्रावरून ऐ-
किलें आहे, तर मनुष्याच्या पुत्राला उंच केलें पा-
हिजे असें तूं कसें ह्मणतोस? हा मनुष्याचा पुत्र
आहे तरी कोण? ३५ तेव्हां येशूने त्यांस ह्म-
टलें, थोंडका वेळ तुह्माजवळ उजेड आहे, तुह्मास
अंधाराने अटोपूं नये ह्मणून तुह्मास उजेड आहे तों-
पर्यंत चाला, कां कीं जो अंधारांत चालतो त्याला
आपण कोठें जातों हें कळत नाहीं. ३६ तुह्मी
उजेडाचे पुत्र व्हावे ह्मणून तुह्मास उजेड आहे
तोंपर्यंत उजेडावर विश्वास ठेवा. येशू या गोष्टी
बोलला, मग निघून जाऊन त्यांपासून लपून राहिला.
३७ त्याने इतके चमत्कार त्यांच्या देखतां केले
असतांहि त्यानी त्याजवर विश्वास ठेविला नाहीं;
३८ कां कीं यशाया भविष्यवाद्याने जी गोष्ट सां-
गितली होती ती पूर्ण व्हायाची होती, ती असी
कीं, हे प्रभू, आमची वार्त्ता कोणी विश्वास-
ली? आणि प्रभूचा बाहु कोणाला प्रगट झाला
आहे? ३९ यामुळें त्यांच्याने विश्वास ठेववेना,
कां तर यशाया अणखी बोलला कीं, ४० त्यानी
डोळ्यानी पाहूं नये आणि अंतःकरणाने समजूं नये
व फिरूं नये आणि म्या त्यांस बरें करूं नये,
ह्मणून त्याने त्यांचे डोळे अंधळे केले, आणि त्यांचें
अंतःकरण कठीण केलें आहे. ४१ यशायाने
त्याचें गौरव पाहिलें व त्याजविषयीं बोलला,
तेव्हां या गोष्टी सांगितल्या. ४२ असें असतां अधि-
काऱ्यांतूनहि बहुतानी त्याजवर विश्वास ठेविला,
परंतु आपणास सभेंतून घालवूं नये ह्मणून परोश्यां-
मुळें त्यानी पत्करिलें नाहीं. ४३ कारण कीं देवाच्या
गौरवापेक्षां त्यांस माणसांचें गौरव अधिक आवडलें.
४४ तेव्हां येशू ओरडत बोलला, जो मजवर
विश्वास ठेवितो तो मजवर असें नाहीं तर माझ्या
पाठविणाऱ्यावर विश्वास ठेवितो. ४५ आणि जो
मला पाहतो तो माझ्या पाठविणाऱ्याला पाहतो.
४६ जो कोणी मजवर विश्वास ठेवितो त्याने अंधा-
रांत राहूं नये ह्मणून मी जगांत उजेड आलों
आहें. ४७ आणि कोणीएकाने माझ्या गोष्टी
ऐकून विश्वास न ठेविला, तरी मी त्याचा न्याय
ठरवीत नाहीं; कारण कीं मी जगाचा न्याय ठर-
विण्यासाठीं आलों नाहीं, तर जगाला तारण्यासाठीं
आलों. ४८ जो मला अव्हेरितो व माझ्या गोष्टी
अंगीकारीत नाहीं, त्याचा न्याय ठरविणारा एक आहे;
म्या जें वचन सांगितलें तेंच शेवटल्या दिवशीं
त्याचा न्याय ठरवील. ४९ कां कीं मी आपल्या
आपण बोललों नाहीं, तर म्या काय सांगावें व
काय बोलावें, याविषयीं माझा पाठविणारा बाप
याने मला आज्ञा दिल्ही. ५० आणि त्याची आज्ञा
सर्वकाळचें जीवन असी आहे हें मला ठाऊक आहे;
यास्तव जें जें मी बोलतों तें बापाने मला सांगि-
तल्याप्रमाणें बोलतों.

## अध्याय १३.

वल्हांडण सणापूर्वी, या जगांतून बापाकडे जा-
ण्याची आपली वेळ आली आहे हें जाणून,
येशूने आपले जे जगांत होते त्यांवर जसी प्रीति केली
होती तसी शेवटपर्यंत तो प्रीति करीत गेला. २
सैतानाने शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कारयोतें याच्या
मनांत त्याला पराधीन करावें ह्मणून घातलें असतां,
३ जेवण होते वेळेस येशू, आपल्या हातीं बापाने
अवघें दिल्हें आहे, आणि आपण देवापासून आलों
व देवाकडे जातों हें जाणून, ४ जेवणावरून
उठला आणि आपलीं वस्त्रें ठेवून त्याने रुमाल
घेऊन आपल्या कंबरेस बांधिला. ५ मग तो गंगाळांत
पाणी घालून शिष्यांचे पाय धुऊं लागला, आणि जा

माल कंबरेस बांधिला होता त्याने तो पुसूं
गला. ६ मग शिमोन पेत्रसाकडे तो आला,
व्हां हा त्याला ह्मणाला, हे प्रभू, तूं माझे पाय
तोस काय? ७ येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं,
मी करितों तें तूं आतां जाणत नाहींस, तर पुढें
णसील. ८ पेत्रस त्याला ह्मणाला, तुला माझे
य कधींहि धुवायाचे नाहींत. येशूने त्याला उत्तर
ल्हें कीं, म्या तुला धुतलें नाहीं तर माझ्या बरो-
र तुला वांटा मिळणार नाहीं. ९ शिमोन पेत्रस
ाला ह्मणाला, हे प्रभू, माझे केवळ पाय धुऊं
को, हात व डोकेंहि धू. १० येशूने त्याला ह्मटलें,
ाची अंघूळ झाली त्याला पाय धुण्याखेरीज दुसऱ्या
ाची गरज नाहीं, तो तर सर्वांगीं निर्मळच आहे.
ाणि तुह्मी निर्मळ आहां, परंतु सर्व नाहीं. ११
रण कीं आपला पराधीन करणारा त्याला
ठाऊक होता, ह्मणून तो बोलला, तुह्मी सर्व निर्मळ
हीं. १२ तेव्हां त्याचे पाय धुतल्यावर व
पलीं वस्त्रें घेऊन फिरून जेवायास बसल्यावर
ाने त्यांस ह्मटलें, म्या तुह्मास काय केलें हें
ह्मी समजलां काय? १३ तुह्मी मला गुरु व
भु असें ह्मणतां, आणि ठीक ह्मणतां, कारण कीं
ी तसाच आहें. १४ यास्तव मी प्रभु व गुरु
सतांहि म्या तुमचे पाय धुतले तर तुह्मासहि
कमेकांचे पाय धुतले पाहिजेत. १५ कारण कीं
सें म्या तुह्मास केलें तसें तुह्मीहि करावें ह्मणून
या तुह्मास उदाहरण दिल्हें आहे. १६ मी
ह्मास खचीत खचीत सांगतों, चाकर आपल्या
भूपेक्षां मोठा नाहीं, आणि पाठविलेला आपल्या
ाठविणाऱ्यापेक्षां मोठा नाहीं. १७ या गोष्टी जर
ह्मी जाणतां तर तुह्मी त्यांप्रमाणें वागल्यास धन्य
ाहां. १८ तुह्मा सर्वांविषयीं मी बोलत नाहीं,
यांस म्या निवडिलें ते मला ठाऊक आहेत, परंतु,
ाझ्या बरोबर जो भाकर खातो त्याने मजवर
ापली लात उचलिली आहे, असा जो शास्त्र-
ेख तो पूर्ण झाला पाहिजे. १९ हें झाल्यापूर्वी
ी आतां तुह्मास सांगतों, यासाठीं कीं जेव्हां
ोईल तेव्हां तुह्मी विश्वास धरावा कीं मी तो
ाहें. २० मी तुह्मास खचीत खचीत सांगतों
ीं, ज्या कोणाला मी पाठवितों त्याला जो अंगी-
ारितो, तो मला अंगीकारितो, आणि जो मला
ंगीकारितो तो माझ्या पाठविणाऱ्याला अंगीकारितो.
२१ असें बोलून येशू अंतःकरणांत घाबरला,
व साक्ष देऊन ह्मणाला, मी तुह्मास खचीत खचीत
सांगतों कीं, तुमच्यांतला एक मला पराधीन करील.
२२ तेव्हां तो कोणाविषयीं बोलतो असा संशय
धरून शिष्य एकमेकांकडे पाहूं लागले. २३ तेव्हां
ज्यावर येशूची प्रीति होती असा त्याच्या शिष्यां-
तील एक येशूच्या उरासीं टेंकला होता. २४
यास्तव ज्याविषयीं तो बोलतो तो कोण असेल, असें
पुसावें, ह्मणून शिमोन पेत्रासाने त्याला खुणाविलें.
२५ तेव्हां तो येशूच्या उरासीं टेंकलेला असतां
त्याला ह्मणाला, हे प्रभू, तो कोण आहे? २६
येशूने उत्तर दिल्हें कीं, ज्याला मी तुकडा बुचक-
ळून देईन तोच तो आहे. मग त्याने तुकडा बुच-
कळून शिमोनाचा पुत्र यहूदा इस्कारयोतें याला
दिल्हा. २७ आणि तुकडा दिल्यावर सैतान
त्याजमध्यें गेला. मग येशूने त्याला ह्मटलें,
जें तूं करितोस तें लवकर कर. २८ तेव्हां त्याने
त्याला असें कशासाठीं सांगितलें हें बसलेल्यांतील
कोणाला समजलें नाहीं. २९ कारण कीं यहूदाजवळ
कसणी होती यास्तव सणासाठीं आपणास ज्यांची
गरज आहे ते पदार्थ विकत घ्यावे, किंवा दरिद्र्यांस
कांहीं द्यावें, ह्मणून येशूने सांगितलें असेल, असें
कित्येकांस वाटलें. ३० तेव्हां तुकडा घेऊन तो
लागलाच बाहेर गेला; तेव्हां रात्र होती.
३१ मग तो बाहेर गेल्यावर येशूने ह्मटलें,
आतां मनुष्याचा पुत्र गौरविला आहे, आणि त्याज-
कडून देव गौरविला आहे. ३२ देव त्याजकडून
गौरविला तर देव स्वतां त्याचेंहि गौरव करील,
आणि तो त्याचें गौरव लवकर करील. ३३ अहो
मुलानो, मी आतां थोडा वेळ तुमच्या बरोबर
आहें, तुह्मी माझा शोध कराल, आणि जसें म्या
यहूद्यांस सांगितलें कीं, जेथें मी जातों तेथें तुमच्याने
येवत नाहीं, तसें तुह्मासहि आतां सांगतों.
३४ मी तुह्मास नवी आज्ञा देतों कीं, एकमेकांवर
प्रीति करा, जसी म्या तुह्मावर प्रीति केली तसी
तुह्मीहि एकमेकांवर प्रीति करा. ३५ तुमची
एकमेकांवर प्रीति असली, तर यावरून सर्व जाण-
तील कीं, तुह्मी माझे शिष्य आहां. ३६ शिमोन
पेत्रस त्याला ह्मणाला, हे प्रभू, तूं कोठें जातोस?
येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, जेथें मी जातों तेथें
आतां तुझ्याने माझ्या मागें येवत नाहीं, परंतु
पुढें माझ्या मागें येसील. ३७ पेत्रस त्याला
ह्मणाला, हे प्रभू, माझ्याने तुझ्या मागें आतां कां

येवत नाहीं? तुझ्या साठीं मी आपला जीव देईन.
३८ येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, माझ्या साठीं
तूं आपला जीव देसील काय? मी तुला खचीत
खचीत सांगतों, तूं तीन वेळा मला नाकारसील
तोंपर्यंत कोंबडा ओरडणार नाहीं.

## अध्याय १४.

तुह्मी आपलें अंतःकरण घाबरूं देऊं नका,
देवावर विश्वास ठेवा, आणि मजवरहि वि-
श्वास ठेवा. २ माझ्या बापाच्या घरांत बहुत
वस्त्या आहेत; नसत्या तर म्या तुह्मास सांगितलें
असतें. मी तुह्मासाठीं जागा तयार करायास
जातों. ३ आणि मी जाऊन तुह्मासाठीं जागा तयार
केली तर फिरून येईन, आणि आपल्या जवळ
तुह्मास घेईन, यासाठीं कीं जेथें मी आहें तेथें
तुह्मीहि असावें. ४ आणि मी कोठें जातों हें
तुह्मास ठाऊक आहे, वाटहि तुह्मास ठाऊक
आहे. ५ थोमा त्याला ह्मणाला, हे प्रभू, तूं
कोठें जातोस हें आह्मास ठाऊक नाहीं, मग वाट
आह्मास कसी ठाऊक? ६ येशूने त्याला ह्मटलें,
वाट व खरेपण व जीवन मीच आहें, मजकडून
आल्यावांचून बापापासीं कोणी जात नाहीं. ७ तुह्मी
मला जाणिलें असतें तर माझ्या बापालाहि जा-
णिलें असतें, आणि आतांपासून तुह्मी त्याला जा-
णतां आणि त्याला पाहिलें आहे. ८ फिलिप्पस
त्याला ह्मणाला, हे प्रभू, बाप आह्माला दाखीव
ह्मणजे आह्मास पुरे. ९ येशूने त्याला ह्मटलें,
फिलिप्पसा, मी इतका काळ तुह्माजवळ असतां
त्वां मला जाणिलें नाहीं काय? ज्याने मला पा-
हिलें त्याने बापाला पाहिलें आहे; तर बाप आ-
ह्मास दाखीव, हें तूं कसें ह्मणतोस? १० मी
बापामध्यें व बाप मजमध्यें आहे असा विश्वास
तूं धरीत नाहींस काय? ज्या गोष्टी मी तुह्मास
सांगतों त्या मी आपल्या आपण बोलत नाहीं,
आणि मजमध्यें राहणारा बाप तो तीं कामें क-
रितो. ११ मी बापामध्यें व बाप मजमध्यें असा
मजवर विश्वास ठेवा, नाहीं तर त्या कामांवरून
तरी मजवर विश्वास ठेवा. १२ मी तुह्मास
खचीत खचीत सांगतों, मी जीं कामें करितों तीं
मजवर विश्वास ठेवणाराहि करील, आणि त्यांपेक्षां
मोठींहि करील, कारण कीं मी बापाकडे जातों.
१३ आणि तुह्मी जें कांहीं माझ्या नांवाने मागाल
तें मी करीन, यासाठीं कीं बापाने पुत्राकडून गौरव
पावावें. १४ जर तुह्मी माझ्या नांवाने कांहीं
मागाल तर मी करीन. १५ मजवर तुमची प्रीति
असली तर माझ्या आज्ञा पाळा. १६ मग मी
बापाला विनंती करीन, ह्मणजे तुह्माबरोबर सर्व-
काळ राहील असा दुसरा संबोधक तो तुह्मास
देईल. १७ तो खरेपणाचा आत्मा आहे, त्या-
ला जगाच्याने घेववत नाहीं, का कीं तें त्याला पा-
हत नाहीं व त्याला जाणत नाहीं, परंतु तुह्मी त्या-
ला जाणतां, का कीं तो तुह्माबरोबर राहतो व
तुह्मामध्यें असेल. १८ मी तुह्मास अनाथ असे
सोडणार नाहीं, तुह्माकडे येईन. १९ आतांपा-
सून थोडक्या काळाने जग मला अणखी पाहणार
नाहीं, परंतु तुह्मी मला पाहाल; मी वांचतों या-
स्तव तुह्मीहि वांचाल. २० त्या दिवसीं तुह्मी
जाणाल कीं, मी आपल्या बापामध्यें व तुह्मी मज-
मध्यें व मी तुह्मामध्यें आहें. २१ ज्याजवळ
माझ्या आज्ञा आहेत व त्या जो पाळितो तोच
मजवर प्रीति करणारा आहे, आणि जो मजवर
प्रीति करितो त्यावर माझा बाप प्रीति करील,
मीहि त्यावर प्रीति करीन आणि त्याला प्रगट हो-
ईन. २२ इस्कारयोते नव्हे जो यहूदा तो त्याला
ह्मणाला, हे प्रभू, तूं आह्माला प्रगट होऊन ज-
गाला प्रगट होणार नाहींस हें कसें? २३ येशूने
त्याला उत्तर दिल्हें कीं, कोणी मजवर प्रीति केली
तर तो माझें वचन पाळील, आणि माझा बाप त्या-
वर प्रीति करील, आणि आह्मी त्याकडे येऊन
त्याबरोबर वस्ती करूं. २४ जो मजवर प्रीति
करीत नाहीं तो माझीं वचनें पाळीत नाहीं; आणि
जें वचन तुह्मी ऐकतां तें माझें नव्हे, तर ज्या बा-
पाने मला पाठविलें त्याचें आहे.

२५ मी तुह्माजवळ राहत असतां तुह्मास या
गोष्टी सांगितल्या आहेत. २६ परंतु ज्याला बाप
माझ्या नांवाने पाठवील, तो संबोधक ह्मणजे प-
वित्र आत्मा, तुह्मास सर्व शिकवील, आणि ज्या
गोष्टी म्या तुह्मास सांगितल्या त्या सर्वांची तुह्मास
आठवण करील. २७ मी तुह्मास शांति देऊन
ठेवितों, आपली शांति तुह्मास देतों, जसें जग
देतें तसें मी तुह्मास देत नाहीं. तुमचें अंतःक-
रण घाबरूं नये व कचूंहि नये. २८ मी जा-
तों मग तुह्माकडे येईन, असें म्या तुह्मास सांगि-
तलें तें तुह्मी ऐकिलें; जर तुमची प्रीति मजवर
असती तर मी बापाकडे जातों असें ह्मटल्यावरून

तुह्मी आनंद पावलां असतां; कां कीं माझा बाप
मजपेक्षां मोठा आहे. २९ आणि त्या गोष्टी हो-
तील तेव्हां तुह्मी विश्वास धरावा, ह्मणून त्या झा-
ल्याअगोदर म्या आतां तुह्मास सांगितल्या आहेत.
३० आतांपासून मी तुह्मासीं फार बोलणार नाहीं;
कारण कीं या जगाचा अधिकारी येतो आणि म-
जमध्यें त्याचें कांहीं नाहीं. ३१ परंतु मी बा-
पावर प्रीति करितों, आणि बापाने जसी मला आ-
ज्ञा दिल्ही तसेंच करितों, हें जगाने जाणावें ह्मणून
असें होतें. उठा, आपण एथून जाऊं.

## अध्याय १५.

**मी** खरा द्राक्षवेल आहें, आणि माझा बाप मा-
ळी आहे. २ तो माझ्यांतला जो जो फांटा
फळ देत नाहीं तो तोडून टाकितो, आणि जो
जो फळ देतो त्याने अधिक फळ द्यावें ह्मणून तो
साफ करितो. ३ जें वचन म्या तुह्मास सां-
गितलें तेणेंकडून तुह्मी आतां साफ झालां. ४
तुह्मी मजमध्यें राहा, आणि मी तुह्मामध्यें;
जसें फांट्याच्याने वेलांत राहिल्यावांचून आपल्या
आपण फळ देववत नाहीं तसें मजमध्यें राहिल्या-
वांचून तुमच्यानेहि देववत नाहीं. ५ मी वेल
आहें, तुह्मी फांटे आहां, जो मजमध्यें राहतो,
आणि मी त्यामध्यें तो बहुत फळ देतो; कारण
कीं मजहून वेगळें असल्यास तुमच्याने कांहीं कर-
वत नाहीं. ६ कोणी मजमध्यें राहिला नाहीं तर
त्याला फांट्यासारिखें बाहेर टाकतात, आणि तो वाळून
जातो, मग त्यांस गोळा करून अग्नीमध्यें टाकितात
आणि ते जळून जातात. ७ तुह्मी मजमध्यें रा-
हिलां व माझ्या गोष्टी तुह्मामध्यें राहिल्या, तर जें
कांहीं तुह्मास पाहिजे तें मागितलें असतां मिळेल.
८ तुह्मी बहुत फळ द्यावें यांत माझा बाप गौर-
विला आहे, आणि तुह्मी माझे शिष्य व्हाल. ९
जसी बापाने मजवर प्रीति केली तसी म्याहि
तुह्मावर प्रीति केली आहे; तुह्मी माझ्या प्रीतींत
राहा. १० जसा मी आपल्या बापाच्या आज्ञा
पाळून त्याच्या प्रीतींत राहतों, तसें तुह्मी माझ्या
आज्ञा पाळिल्या तर माझ्या प्रीतींत राहाल.
११ माझा आनंद तुह्मामध्यें राहावा व तुम-
चा आनंद पूर्ण व्हावा, ह्मणून म्या तुह्मास या
गोष्टी सांगितल्या आहेत. १२ म्या तुह्मावर
प्रीति केली त्याप्रमाणें तुह्मी एकमेकांवर प्रीति करा,
असी माझी आज्ञा आहे. १३ आपल्या मित्रां-
करितां आपला प्राण द्यावा यापेक्षां कोणाची प्रीति
मोठी नाहीं. १४ मी तुह्मास जें जें सांगतों
तें तुह्मी केलें तर माझे मित्र आहां. १५
आतांपासून मी तुह्मास चाकर ह्मणत नाहीं, कां
तर आपला धनी जें करितो तें चाकराला ठाऊक
नसतें; परंतु म्या तुह्मास मित्र ह्मटलें आहे, कां
कीं ज्या गोष्टी म्या आपल्या बापापासून ऐकिल्या
त्या सर्व म्या तुह्मास कळविल्या आहेत. १६
तुह्मी मला निवडिलें नाहीं, तर म्या तुह्मास नि-
वडिलें व तुह्मास नेमिलें आहे, तुह्मी जाऊन फळ
द्यावें व तुमचें फळ राहावें ह्मणून; यासाठीं कीं
जें कांहीं तुह्मी माझ्या नांवाने बापापासीं मागाल तें
त्याने तुह्मास द्यावें. १७ तुह्मी एकमेकांवर प्रीति
करावी ह्मणून मी तुह्मास आज्ञा देतों. १८ जगाने
तुमचा द्वेष केला तर तुमचा द्वेष केल्यापूर्वी
त्याने माझा केला हें जाणा. १९ जर तुह्मी जगाचे
असतां तर जगाने आपलें जें त्यावर प्रीति केली
असती, परंतु तुह्मी जगाचे नव्हां, तर म्या तुह्मास
जगांतून निवडिलें आहे, ह्मणून जग तुमचा द्वेष
करितें. २० चाकर आपल्या धन्यापेक्षां मोठा
नाहीं, असें जें वचन म्या तुह्मास सांगितलें त्या-
ची आठवण करा. जर ते माझ्या पाठीस लागले
आहेत तर तुमच्याहि पाठीस लागतील; जर
त्यानी माझें वचन पाळिलें तर तुमचेंहि पाळितील.
२१ परंतु ते माझ्या पाठविणाऱ्याला जाणत ना-
हींत ह्मणून ते माझ्या नांवाकरितां हें सर्व तु-
ह्मास करितील. २२ जर मी आलों नसतों व
त्यांस बोललों नसतों तर त्यांकडे पाप नसतें, परंतु
आतां त्यांस त्यांच्या पापाविषयीं निमित्त नाहीं.
२३ जो माझा द्वेष करितो तो माझ्या बापाचाहि
द्वेष करितो. २४ जीं कामें दुसऱ्या कोणी माणसाने
केलीं नाहींत, तीं जर म्या त्यांच्या मध्यें केलीं नस-
तीं तर त्यांकडे पाप नसतें, परंतु आतां त्यानी मला
व माझ्या बापालाहि पाहिलें व द्वेषिलेंहि आहे.
२५ तथापि हें यासाठीं झालें कीं, त्यानी उगाच
माझा द्वेष केला, असें जें वचन त्यांच्या शास्त्रांत
लिहिलें तें पूर्ण व्हावें. २६ परंतु जो बापापासून
निघतो, ज्याला मी बापापासून तुह्माकडे पाठवीन,
तो संबोधक ह्मणजे खरेपणाचा आत्मा येईल
तेव्हां तो मजविषयीं साक्ष देईल; २७ आणि
तुह्मी पहिल्यापासून मजबरोबर आहां ह्मणून
तुह्मीहि साक्ष द्याल.

## अध्याय १६.

तुह्मी अडखळूं नये ह्मणून म्या तुह्मास या गोष्टी
सांगितल्या आहेत. २ ते तुह्मास सभेंतून
घालवितील, अणखी असी वेळ येत आहे कीं, जो
कोणी तुमचा जीव घेईल त्याला, आपण देवाची
सेवा करितों असें वाटेल. ३ आणि ते बापाला व
मलाहि जाणत नाहींत यास्तव ते तुह्मास असें
करितील. ४ ती वेळ येईल तेव्हां म्या या गोष्टी
तुह्मास सांगितल्या याची आठवण तुह्मास व्हावी,
ह्मणून त्या म्या तुह्मास सांगितल्या. म्या पहिल्याने
तुह्मास त्या सांगितल्या नाहींत, कारण कीं मी
तुमच्या बरोबर होतों. ५ परंतु आतां ज्याने
मला पाठविलें त्याजकडे मी जातों, आणि कोठें
जातोस, असें तुह्माम्धील कोणी मला पुसत
नाहीं. ६ तरी या गोष्टी म्या तुह्मास सांगि-
तल्या ह्मणून तुमचें अंतःकरण खेदाने भरलें
आहे. ७ परंतु मी खरी गोष्ट तुह्मास सांगतों;
म्या जावें हें तुह्मास उपयोगी आहे, कारण कीं
मी न गेलों तर संबोधक तुह्माकडे येणार नाहीं,
मी गेलों तर त्याला तुह्माकडे पाठवीन. ८ आणि
तो येऊन पापाविषयीं व न्यायीपणाविषयीं व न्याय
ठरविण्याविषयीं जगाची खातरी करील; ९ पापा-
विषयीं तर, ते मजवर विश्वास ठेवीत नाहींत या-
वरून; १० न्यायीपणाविषयीं तर, मी बापाकडे
जातों आणि पुढें तुह्मी मला पाहणार नाहीं याव-
रून; ११ न्याय ठरविण्याविषयीं तर, या जगा-
च्या अधिकाऱ्याचा न्याय ठरविला आहे, यावरून
खातरी करील. १२ अद्याप मला बहुत गोष्टी तुह्मास
सांगायाच्या आहेत, परंतु आतां तुमच्याने त्या सो-
सवणार नाहींत. १३ तरी जेव्हां खरेपणाचा
आत्मा येईल तेव्हां तो तुह्मास सर्व खरेपणांत
नेईल; कारण कीं तो आपल्या आपण बोलणार
नाहीं, तर जें जें ऐकेल तेंच बोलेल, आणि हो-
णाऱ्या गोष्टी तुह्मास सांगेल. १४ तो माझें गौ-
रव करील, कारण कीं जें माझें त्यांतून घेऊन तें
तुह्मास सांगेल. १५ जें जें बापाचें आहे तें
सर्व माझें आहे, ह्मणून मी बोललों कीं, जें माझें
त्यांतून घेऊन तें तुह्मास सांगेल. १६ थोडक्या
वेळाने तुह्मी मला पाहणार नाहीं, आणि फिरून
थोडक्या वेळाने मला पाहाल, कारण कीं मी बा-
पाकडे जातों. १७ तेव्हां त्याच्या शिष्यांतील
कित्येक एकमेकांस ह्मणाले, थोडक्या वेळाने तुह्मी
मला पाहणार नाहीं, आणि, फिरून थोडक्या वे-
ळाने मला पाहाल, आणि, कारण कीं मी बापाकडे
जातों, असें तो आह्मास ह्मणतो हें काय आहे?
१८ याकरितां ते ह्मणाले, हा थोडका वेळ ह्म-
णतो हें काय? तो काय ह्मणतो हें आह्मास सम-
जत नाहीं. १९ यास्तव आपल्याला पुसावयास
ते पाहत आहेत, हें जाणून येशूने त्यांस ह्मटलें,
थोडक्या वेळाने तुह्मी मला पाहणार नाहीं आणि
फिरून थोडक्या वेळाने मला पाहाल, हें जें मी
बोललों त्याविषयीं तुह्मी एकमेकांस विचारितां
काय? २० मी तुह्मास खचीत खचीत सांगतों
कीं, तुह्मी रडाल व शोक कराल, परंतु जग आनंद
करील, तुह्मी खेद पावाल, परंतु तुमच्या खेदाचा
आनंद होईल. २१ जेव्हां बायको प्रसूत
होती तेव्हां तिला क्लेश होतात, कां कीं ति-
ची वेळ आली; परंतु बाळक जन्मलें ह्मणजे
माणूस जगांत जन्मल्यावरून जो आनंद होतो
त्यामुळें तिला त्या संकटाची अणखी आठवण
होत नाहीं. २२ तसा आतां तुह्मास खेद आहे
खरा, परंतु मी तुह्मास फिरून पाहीन, आणि
तुमचें अंतःकरण आनंदित होईल, आणि तुमचा
आनंद तुह्मापासून कोणी काढून घेणार नाहीं.
२३ आणि त्या दिवसीं तुह्मी मला कांहीं
प्रश्न करणार नाहीं. मी तुह्मास खचीत खचीत
सांगतों कीं, तुह्मी बापाजवळ जें कांहीं माझ्या नां-
वाने मागाल तें तो तुह्मास देईल. २४ अजून
तुह्मी माझ्या नांवाने कांहीं मागितलें नाहीं. मागा
ह्मणजे तुह्मास मिळेल, यासाठीं कीं तुमचा आ-
नंद पूर्ण व्हावा. २५ या गोष्टी म्या तुह्मास
दृष्टांतांनी सांगितल्या आहेत, तरी असी घटका
येत आहे कीं तेव्हांपासून मी तुह्मास दृष्टांतांनी
अणखी बोलणार नाहीं, तर बापाविषयीं तुह्मास
उघड सांगेन. २६ त्या दिवसांत तुह्मी माझ्या
नांवाने मागाल, आणि मी तुमच्या साठीं बापाजवळ
विनंती करीन, असें मी तुह्मास ह्मणत नाहीं;
२७ कारण कीं बाप स्वतां तुह्मावर प्रीति करि-
तो, यास्तव कीं तुह्मी मजवर प्रीति केली, आणि
मी देवापासून आलों असा विश्वास धरिला
आहे. २८ मी बापापासून निघून जगांत आलों,
फिरून जग सोडून बापाकडे जातों.

२९ त्याचे शिष्य त्याला ह्मणाले, पाहा, आ-
तां तूं उघड बोलतोस आणि कांहीं दृष्टांत बोलत

नाहींस. ३० आतां आह्मास कळलें कीं, तुला सर्व
गोष्टी ठाऊक आहेत, आणि कोणी तुला विचारावें
असी तुला गरज नाहीं; यावरून तूं देवापासून
आलास असा आह्मी विश्वास धरितों. ३१ येशूने
त्यांस उत्तर दिल्हें कीं, आतां तुह्मी विश्वास धरि-
तां काय? ३२ पाहा, असी वेळ येती व आतां
आली आहे कीं, तुह्मी सर्व आपापल्या घरीं पांगाल,
आणि मला एकटें सोडाल, तरी मी एकटा नाहीं,
कारण कीं बाप मजबरोबर आहे. ३३ मजक-
डून तुह्मी शांति पावावी ह्मणून म्या तुह्मास या
गोष्टी सांगितल्या आहेत; जगामध्यें तुह्मास संकट
होईल, परंतु धीर धरा, म्या जगाला जिंकिलें आहे.

## अध्याय १७.

या गोष्टी बोलल्यावर येशूने आपले डोळे वर
आकाशाकडे करून ह्मटलें, हे बापा, घटका
आली आहे, तूं आपल्या पुत्राचें गौरव कर, या-
साठीं कीं तुझ्या पुत्रानेहि तुझें गौरव करावें. २
कारण कीं त्वां त्याला मनुष्यमात्रांवर असा
अधिकार दिल्हा आहे कीं, जे त्वां त्याला दिल्हे
आहेत त्या सर्वांस त्याने सर्वकाळचें जीवन द्यावें.
३ आणि सर्वकाळचें जीवन हेंच आहे कीं, जो
केवळ खरा देव त्या तुला, व जो येशू ख्रीस्त त्वां
पाठविला त्याला त्यांनी जाणावें. ४ पृथ्वीवर
म्या तुला गौरविलें आहे, जें काम करायाला त्वां
मला सोंपिलें तें म्या संपविलें आहे. ५ तर
आतां हे बापा, जग होतें त्यापूर्वी तुझ्या जवळ जें
माझें गौरव होतें त्याकडून तूं आपल्याजवळ माझें
गौरव कर. ६ जीं माणसें जगांतून त्वां मला दिल्हीं
त्यांस म्या तुझें नांव प्रगट केलें आहे, ते तुझे
होते आणि त्वां ते मला दिल्हे, आणि त्यांनी तुझें
वचन पाळिलें आहे. ७ आतां ते समजले आहेत
कीं, जें कांहीं त्वां मला दिल्हें तें सर्व तुझ्या पासून
आहे. ८ कां तर ज्या गोष्टी त्वां मला दिल्ह्या
त्या म्या त्यांस दिल्ह्या आणि त्यांनी घेतल्या, आ-
णि मी तुझ्या पासून आलों हें त्यांनी खचीत जा-
णिलें, आणि त्वां मला पाठविलें असा त्यांनी वि-
श्वास धरिला आहे. ९ त्यांच्या साठीं मी विनंती
करितों, मी जगासाठीं विनंती करीत नाहीं, तर
जीं माणसें त्वां मला दिल्हीं त्यांच्या साठीं, कां कीं
तीं तुझीं आहेत. १० आणि जीं माझीं तीं सर्व
तुझीं, आणि तुझीं तीं माझीं आहेत, आणि त्यांज-
कडून माझें गौरव झालें आहे. ११ आणि आ-
तांपासून मी जगांत नाहीं, ते तर जगांत आहेत
आणि मी तुजकडे येतों. हे पवित्र बापा, जे त्वां
मला दिल्हे ते आह्मासारिखे एक व्हावे ह्मणून तूं
आपल्या नांवाने त्यांस राख. १२ मी जगांत त्यांबरो-
बर होतों तोंपर्यंत म्या त्यांस तुझ्या नांवाने रा-
खिलें, जे त्वां मला दिल्हे त्यांस म्या राखिलें आहे,
आणि त्यांतील कोणी नाश पावला नाहीं, जो ना-
शाचा पुत्र तो मात्र पावला; कारण कीं शास्त्रलेख
पूर्ण व्हायाचा होता. १३ तर आतां मी तुज-
कडे येतों, आणि त्यांजमध्यें माझा आनंद पूर्ण हो-
ऊन राहावा, ह्मणून मी जगांत असतां या गोष्टी
बोलतों. १४ म्या तुझें वचन त्यांस सोंपून दिल्हें
आहे, आणि जगाने त्यांचा द्वेष केला आहे, का-
रण कीं जसा मी जगाचा नाहीं तसे तेहि जगाचे
नाहींत. १५ त्वां त्यांस जगांतून काढावें असें मी
मागत नाहीं, तर त्वां त्यांस वाइटापासून राखावें,
असें मागतों. १६ जसा मी जगाचा नाहीं तसे
तेहि जगाचे नाहींत. १७ तूं आपल्या खरेपणाने
त्यांस पवित्र कर. तुझें वचन हें खरेपण आहे.
१८ जसें त्वां मला जगांत पाठविलें तसें म्याहि
त्यांस जगांत पाठविलें आहे. १९ आणि मी
त्यांच्या साठीं आपणाला पवित्र करितों, यासाठीं कीं
तेहि खरेपणाने पवित्र व्हावे. २० आणि मी
त्यांच्या साठीं केवळ नाहीं, तर त्यांच्या उप-
देशावरून जे मजवर विश्वास ठेवतील त्यां-
च्या साठींहि मागतों कीं, २१ ते सर्व एक
व्हावे, हे बापा, जसें तूं मजमध्यें व मी तुजमध्यें
तसे तेहि आह्मामध्यें एक व्हावे, यासाठीं कीं त्वां
मला पाठविलें असा विश्वास जगाने धरावा. २२
आणि त्वां जें गौरव मला दिल्हें तें म्या त्यांस
दिल्हें आहे, यासाठीं कीं जसे आह्मी एक आहों
तसे तेहि एक व्हावे. २३ मी त्यांमध्यें व तूं
मजमध्यें असें असावें, यासाठीं कीं ते पूर्णपणें
एक व्हावे, आणि त्यावरून जगाने जाणावें कीं,
त्वां मला पाठविलें, आणि जसी त्वां मजवर प्रीति
केली तसी त्यांजवरहि प्रीति केली आहे. २४
हे बापा, मी असें इच्छितों कीं, जेथें मी आहें
तेथें त्वां जे मला दिल्हे त्यांनीहि मजपाशीं अ-
सावें, यासाठीं कीं जें माझें गौरव त्वां मला दिल्हें
तें त्यांनी पाहावें; कां कीं जगाचा पाया घातल्यापूर्वी
त्वां मजवर प्रीति केली. २५ हे न्यायी बापा,
जगाने तुला जाणिलें नाहीं, म्या तर तुला जा-

णिलें आहे, आणि त्वां मला पाठविलें असें त्यांनी
जाणिलें आहे. २६ आणि म्यां तुझें नांव त्यांस
कळविलें आहे आणि कळवीन, यासाठीं कीं जी
प्रीति त्वां मजवर केली ती त्यांमध्यें असावी आ-
णि म्यां त्यांमध्यें असावें.

## अध्याय १८.

या गोष्टी बोलल्यावर येशू आपल्या शिष्यांसुद्धां
किद्रोन ओहोळाच्या पलिकडे गेला, तेथें मळा
होता, त्यांत तो व त्याचे शिष्य गेले. २ आणि
त्याला पराधीन करणारा यहूदा यालाहि ती जागा
ठाऊक होती; कां कीं येशू व त्याचे शिष्य तेथें वेळो-
वेळ एकत्र मिळत असत. ३ तेव्हां यहूदा पलटणा-
सुद्धां आणि मुख्य याजकांकडले व परोश्यांकडले
शिपायी यांसुद्धां फाणसें व मशाली व शस्त्रें घे-
ऊन तेथें आला. ४ येशू तर ज्या गोष्टी आप-
णावर येणार त्या सर्व जाणत असतां बाहेर जाऊन
त्यांस ह्मणाला, तुह्मी कोणाचा शोध करितां? ५
त्यांनी त्याला उत्तर दिल्हें कीं, येशू नाजारेथकराचा.
येशूनें त्यांस ह्मटलें, मी तोच आहें. आणि त्याला
पराधीन करणारा यहूदाहि त्यांच्या बरोबर उभा
होता. ६ तर मी तोच आहें, असें तो त्यांस
ह्मणतांच ते मागें हटून भूमीवर पडले. ७ मग
त्यानें त्यांस फिरून पुसलें, कोणाचा शोध करि-
तां? तेव्हां ते बोलले, येशू नाजारेथकराचा.
८ येशूनें उत्तर दिल्हें कीं, मी तोच आहें असें
म्यां तुह्मांस सांगितलें; यास्तव माझा शोध
करीत असलां तर यांस जाऊं द्या. ९ जे त्वां
मला दिल्हे त्यांतून कोणाला म्यां हरविलें नाहीं,
असी जी गोष्ट त्यानें सांगितली ती पूर्ण व्हावी
ह्मणून असें झालें. १० तेव्हां शिमोन पेत्रसा-
जवळ तरवार होती, ती त्यानें उपसली, आणि
प्रमुख याजकाच्या चाकराला मारून त्याचा उजवा
कान कापून टाकिला; त्या चाकराचें नांव मलखस
होतें. ११ तेव्हां येशू पेत्रसाला बोलला, तूं
आपली तरवार म्यानांत घाल; बापानें जो प्याला
मला दिल्हा तो मी पिऊं नये काय?

१२ मग पलटण व हजारांचा सरदार व
यहूद्यांचे शिपायी यांनी येशूला धरून त्याला
बांधिलें. १३ नंतर त्याला पहिल्यानें आन्ना या-
कडे नेलें, कारण कीं जो कायफा त्या वर्षी प्रमुख
याजक होता त्याचा तो सासरा होता. १४
आणि लोकांकरितां एका माणसानें मरावें हें उप-
योगी आहे, असा ज्यानें यहूद्यांस बोध केला तो
हाच कायफा होता. १५ तेव्हां शिमोन पेत्रस
व दुसरा शिष्य हे येशूच्या मागें चालले, तो
शिष्य तर प्रमुख याजकाच्या ओळखीचा असतां
येशूच्या संगतीं प्रमुख याजकाच्या वाड्यांत गेला.
१६ परंतु पेत्रस दारासीं बाहेर उभा राहिला,
यास्तव जो दुसरा शिष्य प्रमुख याजकाच्या ओ-
ळखीचा होता, त्यानें बाहेर येऊन व द्वारपाळीला
बोलून पेत्रसाला आंत नेलें. १७ तेव्हां ती
तरणी द्वारपाळी पेत्रसाला ह्मणाली, तूंहि त्या मा-
णसाच्या शिष्यांतील आहेस ना? त्यानें ह्मटलें,
मी नव्हें. १८ त्या वेळेस थंडी होती ह्मणून
चाकर व शिपायी हे कोळशांचा विस्तव करून शे-
कत उभे राहिले होते, आणि त्यांच्या संगतीं पेत्रस
शेकत उभा राहिला होता. १९ तेव्हां प्रमुख
याजकानें येशूला त्याच्या शिष्यांविषयीं व त्याच्या
उपदेशाविषयीं विचारिलें. २० येशूनें त्याला
उत्तर दिल्हें कीं, मी जगास उघड बोलत असें,
सभास्थानांत व देवळांत यहूदी सर्वदा मिळतात
तेथें मी सर्वदा उपदेश करीत असें, आणि गुप्तांत
कांहीं बोललों नाहीं. २१ मला कां विचारितोस?
त्यांस मी काय बोललों, हें ऐकणाऱ्यांस वि-
चार; पाहा, जें बोललों तें त्यांस ठाऊक आहे.
२२ तेव्हां तो असें बोलत असतां जवळ उभा
राहणारा शिपायी येशूला चपडाक मारून बो-
लला, तूं प्रमुख याजकाला असें उत्तर करितोस
काय? २३ येशूनें त्याला उत्तर दिल्हें कीं,
मी वाईट बोललों असलों तर त्या वाइटाविष-
यीं साक्ष दे, परंतु बरें बोललों असलों तर मला
कां मारितोस? २४ आन्नानें तर प्रमुख याजक
कायफा याकडे तो बांधलेला पाठविला होता.
२५ तेव्हां शिमोन पेत्रस शेकत उभा राहिला
होता, मग ते त्याला ह्मणाले, तूंहि त्याच्या शि-
ष्यांतील आहेस ना? तो नाकारून बोलला, मी
नव्हें. २६ मग ज्याचा कान पेत्रसानें कापून
टाकिला होता त्याचा नातलग असा प्रमुख याज-
काच्या चाकरांतील एक होता, तो ह्मणाला, म्यां
तुला त्याच्या बरोबर मळ्यांत पाहिलें कीं नाहीं?
२७ तेव्हां पेत्रसानें फिरून नाकारिलें आणि ते-
व्हांच कोंबडा ओरडला.

२८ नंतर त्यांनी येशूला कायफाजवळून कचे-
रीस आणिलें, तेव्हां सकाळ होती, आणि आप-

गांस विटाळ होऊं नये, तर वल्हांडणाचें भोजन
करावें ह्मणून ते कचेरींत गेले नाहींत. २९ मग
पिलातस त्यांकडे बाहेर येऊन बोलला, तुह्मी
या माणसावर कोणता आरोप आणितां? ३० तेव्हां
त्यानी त्याला उत्तर दिल्हें कीं, तो अपराधी
नसता तर आह्मी त्याला तुझ्या स्वाधीन केलें
नसतें. ३१ मग पिलातसाने त्यांस सांगितलें
कीं, तुह्मी त्याला घेऊन आपल्या शास्त्राप्रमाणें
त्याचा न्याय ठरवा. यावरून यहूदी त्याला ह्मणाले,
कोणाचा जीव घ्यावा असा आह्माला अधिकार
नाहीं. ३२ आपण कोणत्या मरणाने मरणार
हें सुचवून जी गोष्ट येशूने सांगितली होती
ती पूर्ण व्हावी ह्मणून असें झालें. ३३ मग पि-
लातस फिरून कचेरींत गेला, आणि येशूला बोला-
वून त्याला ह्मणाला, तूं यहूद्यांचा राजा आहेस
काय? ३४ येशूने त्याला उत्तर दिल्हें कीं, तूं
स्वतां हें बोलतोस, किंवा दुसऱ्यानी तुला मजवि-
षयीं सांगितलें? ३५ पिलातसाने उत्तर दिल्हें कीं,
मी यहूदी आहें काय? तुझ्याच लोकानी व मुख्य
याजकानी तुला माझ्या स्वाधीन केलें आहे. त्वां
काय केलें? ३६ येशूने उत्तर दिल्हें कीं, माझें
राज्य या जगांतलें नव्हे; माझें राज्य या जगांतलें
असतें तर म्या यहूद्यांच्या स्वाधीन होऊं नये
ह्मणून माझ्या चाकरानी लढाई केली असती; परंतु
आतां माझें राज्य एथलें नव्हे. ३७ तेव्हां पि-
लातस त्याला ह्मणाला, तर तूं राजा आहेस
काय? येशूने उत्तर दिल्हें कीं, तूं ह्मणतोस तेंच,
मी राजा आहें; मी यासाठीं जन्मलों व यासाठीं
जगांत आलों कीं, म्या खरेपणाविषयीं साक्ष द्यावी;
जो कोणी खरेपणाकडील आहे तो माझी वाणी
ऐकतो. ३८ पिलातस त्याला ह्मणाला, खरेपणा
काय आहे? आणि असें बोलून त्याने फिरून
यहूद्यांकडे बाहेर जाऊन त्यांस ह्मटलें, याकडे
कांहीं दोष मला सांपडत नाहीं. ३९ पण वल्हां-
डण सणांत म्या तुह्मासाठीं एकाला सोडावें असी
तुह्मामध्यें चाल आहे, ह्मणून म्या तुह्मासाठीं यहू-
द्यांच्या राजाला सोडावें असें, तुमच्या मनांत आहे
काय? ४० तेव्हां सर्व फिरून ओरडत बोलले,
याला नको, तर बाराब्बाला सोड. तो बाराब्बा
तर लुटारू होता.

## अध्याय १९.

नंतर पिलातसाने येशूला धरून फटके मारिले.
२ आणि शिपायानी कांट्यांचा मुगूट गुंफून
त्याच्या डोक्याला घातला, आणि जांबळें वस्त्र
त्याच्या अंगांत घालून ह्मटलें, ३ हे यहूद्यांच्या
राजा, सलाम. मग त्यानी त्याला चपडाका मा-
रिल्या. ४ नंतर पिलातसाने फिरून बाहेर जा-
ऊन त्यांस ह्मटलें, पाहा, त्याकडे कांहीं दोष मला
सांपडत नाहीं, हें तुह्मास कळावें ह्मणून मीं त्याला
तुह्माकडे बाहेर आणितों. ५ तेव्हां येशू कांट्यां-
चा मुगूट व जांबळें वस्त्र घातलेला असा बाहेर
आला. मग तो त्यांस ह्मणाला, पाहा, हा मा-
णूस. ६ तेव्हां मुख्य याजक व चाकर लोक
त्याला पाहून ओरडत बोलले, खांबीं दे, खांबीं दे.
पिलातस त्यांस ह्मणाला, तुह्मीच त्याला घेऊन
खांबीं द्या, कारण कीं मला त्याजकडे दोष सांपडत
नाहीं. ७ यहूद्यानी त्याला उत्तर दिल्हें कीं, आह्मास
शास्त्र आहे, आणि आमच्या शास्त्राप्रमाणें त्याला
मरावें लागतें, कां कीं त्याने आपणाला देवाचा पुत्र
ह्मणविलें. ८ तेव्हां पिलातस ही गोष्ट ऐकून
अधिकच भ्याला. ९ मग तो फिरून कचेरींत
जाऊन येशूला ह्मणाला, तूं कोठला आहेस? परंतु
येशूने त्याला उत्तर दिल्हें नाहीं. १० तेव्हां
पिलातसाने त्याला ह्मटलें, तूं मजसीं बोलत ना-
हींस काय? तुला खांबीं देण्याचा अधिकार मला
आहे व तुला सोडण्याचा अधिकार मला आहे, हें
तुला ठाऊक नाहीं काय? ११ येशूने उत्तर
दिल्हें कीं, वरून तुला दिल्हा नसता तर मजवरचा
तुला कांहीं अधिकार नसता; यास्तव ज्याने मला
तुझ्या स्वाधीन केलें त्याचें पाप अधिक आहे. १२
तेव्हांपासून पिलातस त्याला सोडायास झटला.
परंतु यहूदी ओरडत बोलले, त्वां याला सोडिलें
तर काइसाराचा मित्र नाहींस. जो कोणी आप-
णाला राजा ह्मणवितो तो काइसाराविरुद्ध बो-
लतो. १३ मग ही गोष्ट ऐकून पिलातसाने येशूला
बाहेर आणिलें, आणि इब्री भाषेंत गब्बाथा, ह्मण-
जे चिरेबंदी ह्मटलेली जागा, तेथें तो न्यायासना-
वर बसला. १४ तेव्हां वल्हांडण सणासाठीं
तयार करण्याचा दिवस होता, सुमारें दुपार
होती; तेव्हां त्याने यहूद्यांस ह्मटलें, पाहा
तुमचा राजा. १५ परंतु ते ओरडले, त्याला
ने, ने, खांबीं दे. पिलातस त्यांस ह्मणाला, मी

तुमच्या राजाला खांबीं देऊं काय? मुख्य याज-
कानी उत्तर दिल्हें कीं, काइसाराबांचून आह्मास
राजा नाहीं. १६ मग त्याने त्याला खांबीं देण्या-
करितां त्यांच्या स्वाधीन केलें.

१७ आणि ते येशूला घेऊन गेले. मग इब्रीभाषेंत
गल्गथा ह्मणजे करोट्याची ह्मटलेली जागा, तेथें
तो आपला खांब वाहत बाहेर गेला. १८ तेथें त्यानी
त्याला व त्याबरोबर दुसऱ्या दोघांस खांबीं दिल्हें,
त्यांस दोहोंकडे व येशूला मध्यें असें दिल्हें.
१९ आणि पिलातसाने पत्ताहि लिहून खांबावर
लाविला, तो असा लिहिला होता कीं, **येशू नाज़ा-
रेथकर यहूद्यांचा राजा.** २० येशूला खांबीं
दिल्हें तें ठिकाण तर नगराच्या जवळ होतें, ह्म-
णून बहुत यहूद्यानी येऊन तो पत्ता वाचिला,
तो इब्री व हेल्लेनी व रोमी या भाषांमध्यें
लिहिला होता. २१ मग यहूद्यांचे मुख्य या-
जक पिलातसाला ह्मणाले, यहूद्यांचा राजा असें
लिहूं नको, तर मी यहूद्यांचा राजा आहें, असें
त्याने ह्मटलें, असें लिही. २२ पिलातसाने
उत्तर दिल्हें कीं, म्या जें लिहिलें तें लिहिलें. २३
तेव्हां शिपायानी येशूला खांबीं दिल्ह्यानंतर त्याचीं
वस्त्रें घेतलीं, आणि एकएका शिपायाला एक एक
विभाग असे चार विभाग केले, आणि अंगरखाहि
घेतला, त्या अंगरख्याला तर शिवण नव्हती, तो
वरपासून खालपर्यंत सगळा विणलेला होता. २४
यास्तव ते एकमेकांस ह्मणाले, हा आपण फाडूं
नये, तर कोणाला येईल हें चिठ्या टाकून पाहूं. हें
यासाठीं झालें कीं, त्यानी आपणांमध्यें माझीं वस्त्रें
वांटून घेतलीं आणि माझ्या पांघरुणावर चिठ्या टा-
किल्या असा जो शास्त्र लेख तो पूर्ण व्हावा. शि-
पायानी तर तसें केलें.

२५ तेव्हां येशूच्या खांबाजवळ त्याची आई, आ-
णि त्याची मावशी क्लोपासाची बायको मारया, आणि
मारया माग्दालीणी उभ्या होत्या. २६ मग येशूने
आईला व ज्या शिष्यावर आपली प्रीत होती त्याला
जवळ उभें राहिलेलें पाहून आपल्या आईला ह्मटलें,
बाई, पाहा तुझा पुत्र. २७ तेव्हां त्याने त्या शि-
ष्याला ह्मटलें, पाहा तुझी आई. आणि त्या
वेळेपासून त्या शिष्याने आपल्या घरांत तिला घेतलें.
२८ त्यानंतर सर्व गोष्टी आतां पूर्ण झाल्या हें
जाणून येशूने शास्त्रलेख पूर्ण व्हावा ह्मणून
ह्मटलें, मला ताहान लागली आहे. २९ तेथें
तर भांडें आंबीने भरून ठेविलें होतें, आणि त्यानी
स्पंज आंबीने भरून झुफावर बसवून त्याच्या तोंडासीं
लाविलें. ३० तेव्हां येशूने आंब घेतल्यानंतर
ह्मटलें, पूर्ण झालें आहे. मग त्याने डोकें लववून
प्राण सोडिला.

३१ तो तर तयार करण्याचा दिवस होता,
आणि तो शाब्बाथ मोठा दिवस होता; यास्तव
शाब्बाथ दिवसीं त्यांचीं शरिरें खांबावर राहूं नयेत,
ह्मणून त्यांचे पाय मोडावे आणि त्यांस न्यावें
असें यहूद्यानी पिलातसाजवळ मागितलें. ३२
यास्तव शिपायानी येऊन त्याबरोबर खांबीं दि-
ल्हेल्या पहिल्याचे व दुसऱ्याचे पाय मोडिले.
३३ परंतु येशूकडे येऊन तो मेलाच आहे
असें पाहून त्यानी त्याचे पाय मोडिले नाहींत.
३४ तरी शिपायांतील एकाने त्याच्या कुशींत भा-
ला भोसकिला, तेव्हांच रक्त व पाणी निघालें.
३५ आणि ज्याने पाहिलें त्याने ही साक्ष दिल्ही
आहे, आणि त्याची साक्ष खरी आहे, व आपण
खरें बोलतों हें त्याला ठाऊक आहे, तुह्मी विश्वास
धरावा ह्मणून. ३६ त्याचें हाड मोडणार नाहीं,
असा जो शास्त्रलेख तो पूर्ण व्हावा ह्मणून असें
झालें. ३७ आणि दुसराहि शास्त्रलेख असा आहे
कीं, ज्याला त्यानी भोसकिलें त्याकडे ते पाहतील.

३८ त्यानंतर अरिमाथाईतला योसेफ येशूचा
शिष्य असून यहूद्यांच्या भयामुळें गुप्त होता, त्याने
येशूचें शरीर न्यायास पिलातसाजवळ मागितलें;
तेव्हां पिलातसाने परवानगी दिल्ही. मग त्याने
येऊन येशूचें शरीर काढिलें. ३९ आणि जो
निकदेमस पहिल्याने येशूकडे रात्रीं आला होता,
तोहि बोळ व अगरु यांची मिसळ सुमारें शंभर
शेर घेऊन आला; ४० मग त्यानी येशूचें शरीर
घेतलें आणि यहूद्यांच्या उत्तरकार्याच्या रीतीप्र-
माणें सुगंध द्रव्यें घालून प्रेतवस्त्रानी तें गुंडाळिलें.
४१ आणि जेथें त्याला खांबीं दिल्हें होतें त्या
ठिकाणीं मळा होता, आणि त्या मळ्यांत नवें थडें
होतें, त्यांत कोणासहि अद्याप ठेविलें नव्हतें. ४२
यहूद्यांच्या तयार करण्यामुळें त्यानी तर येशूला
तेथें ठेविलें; का कीं तें थडें जवळ होतें.

## अध्याय २०.

नंतर सप्तकाच्या पहिल्या दिवसीं पाहाटेस अं-
धार असतांना मारया माग्दालीणी थड्याकडे

झाली, आणि थड्यावरून धोंड काढलेली असी
तेने पाहिली. २ यास्तव शिमोन पेत्रस व ज्या-
वर येशूची प्रीति होती असा दुसरा शिष्य त्यांकडे
धावत येऊन तिने त्यास ह्मटलें, त्यांनी प्रभूला थ-
ड्यांतून नेलें, आणि त्याला कोठें ठेविले हें आह्मास
ठाऊक नाहीं. ३ मग पेत्रस व तो दुसरा शि-
ष्य निघून थड्याकडे जाऊं लागले. ४ तेव्हां
ते दोघे बरोबर धावले, आणि तो दुसरा शिष्य
पेत्रसापेक्षां लवकर धावून थड्याजवळ पहिला पोहं-
चला. ५ आणि ओणवून त्याने प्रेतवस्त्रें ठेविले-
लीं पाहिलीं, परंतु तो आंत गेला नाहीं. ६ मग
शिमोन पेत्रस त्याच्या मागून येऊन थड्यांत गेला,
तेव्हां प्रेतवस्त्रें ठेविलेलीं. ७ व जो रुमाल त्याच्या
डोक्याला होता तो प्रेतवस्त्रांबरोबर ठेविला नाहीं,
तर निराळा एकीकडे घडी करून ठेविलेला,
असें त्याने पाहिलें. ८ मग जो दुसरा शिष्य
पहिल्याने थड्याकडे आला तोहि आंत गेला,
आणि त्याने पाहून विश्वास धरिला. ९ कारण कीं
त्याला मेलेल्यांमधून पुन्हा उठावें लागतें, हा शा-
स्त्रलेख तोंपर्यंत ते समजले नव्हते. १० तेव्हां
ते शिष्य फिरून आपल्या घरीं गेले. ११ परंतु मा-
रया बाहेर थड्याजवळ रडत उभी राहिली, आ-
णि रडतां रडतां तिने थड्यांत डोकाविलें; १२ तेव्हां
जेथें येशूचें शरीर ठेविलें होतें तेथें पांढरीं वस्त्रें
ल्यालेले दोन दूत, एक उशाजवळ आणि एक
पायथ्याजवळ बसलेले, असे तिने पाहिले. १३
मग त्यांनी तिला ह्मटलें, बाई, कां रडतीस?
ती त्यांस ह्मणाली, त्यांनी माझ्या प्रभूला नेलें,
आणि त्याला कोठें ठेविलें हें मला ठाऊक नाहीं.
१४ असें बोलून ती पाठमोरी फिरली, आणि
येशूला उभें राहिलेला तिने पाहिलें, परंतु तो येशू
आहे असें तिला समजलें नाहीं. १५ येशूने
तिला ह्मटलें, बाई, कां रडतीस? कोणाचा शोध
करितीस? तो माळी आहे असें समजून ती त्या-
ला ह्मणाली, दादा, त्वां त्याला एथून नेलें असलें
तर त्याला कोठें ठेविलें हें मला सांग, ह्मणजे मी
त्याला घेऊन जाईन. १६ येशूने तिला ह्मटलें,
मारये! ती मुरडून त्याला ह्मणाली, राब्बूनी,
ह्मणजे हे गुरू. १७ येशूने तिला ह्मटलें, मला
शिवूं नको; कारण कीं मी आपल्या बापाकडे अ-
जून चढलों नाहीं, तर माझ्या भावांकडे जाऊन त्यांस
सांग कीं, जो माझा बाप व तुमचा बाप आणि
माझा देव व तुमचा देव त्याकडे मी चढतों.
१८ मारया माग्दालीणीने जाऊन शिष्यांस सां-
गितलें कीं, म्या प्रभूला पाहिलें आणि त्याने मला
या गोष्टी सांगितल्या.

१९ नंतर त्याच दिवशीं ह्मणजे सप्तकाच्या
पहिल्या दिवशीं संध्याकाळ झाल्यावर, जेथें शिष्य
मिळाले होते तेथील दारें यहूद्यांच्या भयामुळें बंद
असतां, येशू येऊन व मध्यें उभा राहून त्यांस
ह्मणाला, तुह्मास शांति असो. २० असें बो-
लून त्याने आपले हात व कूस त्यांस दाखविली;
तेव्हां शिष्य प्रभूला पाहून आनंद पावले. २१ मग
येशू फिरून त्यांस ह्मणाला, तुह्मास शांति असो;
असें बापाने मला पाठविलें तसें मीहि तुह्मास पा-
ठवितों. २२ त्याने असें बोलून त्यांजवर फुंकून
त्यांस ह्मटलें, पवित्र आत्मा घ्या. २३ ज्या
कोणांचीं पापें तुह्मी सोडाल तीं त्यांस सुटतील,
आणि ज्या कोणांचीं तुह्मी राहवाल तीं राहतील.

२४ येशू आला होता तेव्हां बारा शिष्यांतील
एक, दिदुमस ह्मटलेला थोमा त्यांच्या बरोबर
नव्हता. २५ मग दुसऱ्या शिष्यांनी त्याला सां-
गितलें, आह्मी प्रभूला पाहिलें आहे. परंतु त्याने
त्यांस ह्मटलें, त्याच्या हातांस खिळ्यांचे भोंक
पाहिल्यावांचून व खिळ्यांच्या भोंकांत माझें बोट
घातल्यावांचून व त्याच्या कुसींत माझा हात घात-
ल्यावांचून मी विश्वास धरणारच नाहीं. २६ मग
आठ दिवसांनंतर त्याचे शिष्य फिरून घरांत होते,
आणि त्यांच्या बरोबर थोमा होता; तेव्हां दारें
बंद असतां येशू येऊन व मध्यें उभा राहून बोलला,
तुह्मास शांति असो. २७ नंतर त्याने थोमाला
ह्मटलें, तूं आपलें बोट इकडे करून माझे हात
पाहा, आणि आपला हात लांबवून माझ्या कुसींत
घाल, आणि अविश्वासी होऊं नको, तर विश्वासी
ऐस. २८ तेव्हां थोमाने त्याला उत्तर दिलें
कीं, माझा प्रभु व माझा देव. २९ येशूने त्याला
ह्मटलें, थोमा, त्वां मला पाहिलें ह्मणून विश्वास
धरिला; पाहिल्यावांचून विश्वास धरणारे ते धन्य.

३० येशूने या पुस्तकांत लिहिले नाहींत असे
बहुत दुसरेंहि चमत्कार आपल्या शिष्यांच्या देखतां
केले खरे; ३१ परंतु येशू हा देवाचा पुत्र
ख्रीस्त आहे असा तुह्मी विश्वास धरावा, आणि
विश्वास धरून तुह्मी त्याच्या नांवानें जीवन पावावें
ह्मणून हे लिहिले आहेत.

## अध्याय २१.

त्यानंतर तिबेरयसाच्या समुद्राजवळ येशू शि-
ष्यांस फिरून प्रगट झाला, आणि याप्रकारें
प्रगट झाला; २ शिमोन पेत्रस व दिदुमस
ह्मटलेला थोमा व गालीलांतील कान्याचा नथा-
नेल व जबदीचे पुत्र व त्याच्या शिष्यांतील दुसरे
दोघे हे एकत्र असतां; ३ शिमोन पेत्रसाने त्यांस
ह्मटलें, मी मासे धरायाला जातों. ते त्याला
ह्मणाले, आह्मीहि तुझ्या बरोबर येतों. तेव्हांच
ते निघून तारवांत बसले, आणि त्या रात्रीं त्यांनी
कांहीं धरिलें नाहीं. ४ इतक्यांत सकाळ झाली
तेव्हां येशू समुद्राच्या तिरीं उभा राहिला होता,
तथापि तो येशू आहे असें शिष्यांस समजलें
नाहीं. ५ तेव्हां येशूने त्यांस ह्मटलें, मुलानो,
तुह्मास कांहीं खायाला आहे काय? नाहीं, असें
त्यांनीं त्याला उत्तर दिल्हें. ६ मग त्याने त्यांस
ह्मटलें, तुह्मी तारवाच्या उजव्या बाजूस जाळें
टाका ह्मणजे तुह्मास सांपडेल. यास्तव त्यांनी
टाकिलें, मग माशांच्या समुदायामुळें तें त्यांस ओ-
ढवेना. ७ नंतर ज्या शिष्यावर येशूची प्रीति
होती तो पेत्रसाला ह्मणाला, प्रभु आहे. तेव्हां
प्रभु आहे, हें ऐकून शिमोन पेत्रसाने बाहेरलें पांघ-
रूण घेऊन कंबरेला बांधिलें, कारण कीं तो उघडा
होता, आणि समुद्रांत उडी टाकिली. ८ नंतर
दुसरे शिष्य माशांचें जाळें ओढीत ओढीत होड-
क्यांतून आले, कारण कीं ते कांठापासून दूर नव्हते,
सुमारें दोनशें हातावर होते. ९ मग कांठीं उतर-
ल्यावर त्यांनी कोळशांचा विस्तव व त्यावर मासळी
घातलेली व भाकर पाहिलीं. १० येशूने त्यांस
ह्मटलें, आतां धरलेल्या माशांतून कांहीं आणा.
११ शिमोन पेत्रसाने जाऊन एकशें त्रेपन्न मोठ्या
माशानी भरलेलें जाळें कांठास ओढिलें; तितके
असतांहि जाळें फाटलें नाहीं. १२ येशू त्यांस
ह्मणाला, या, जेवा. तेव्हां तो प्रभु आहे असें
त्यांस समजलें, ह्मणून तूं कोण आहेस, हें त्याला
पुसायास शिष्यांतील कोणी धजला नाहीं. १३
मग येशूने येऊन व भाकर घेऊन त्यांस दिल्ही,
व तसीच मासळीहि. १४ येशू मेलेल्यांमधून
उठल्यावर तो आपल्या शिष्यांस प्रगट झाल्याची
ही तिसरी वेळ.

१५ मग ते जेवल्यानंतर येशूने शिमोन पेत्र-
साला ह्मटलें, योनाच्या पुत्रा शिमोना, यांपेक्षां तूं
मजवर अधिक प्रीति करितोस काय? तो त्याला
ह्मणाला, होय प्रभू, मी तुजवर प्रीति करितों, हें
तुला ठाऊक आहे. याने त्याला ह्मटलें, माझ्या
कोंकरांस चार. १६ पुन्हा दुसऱ्याने याने त्याला
ह्मटलें, योनाच्या शिमोना, मजवर प्रीति करितोस
काय? तो त्याला ह्मणाला, होय प्रभू, मी तुजवर
प्रीति करितों, हें तुला ठाऊक आहे. याने त्याला
ह्मटलें, माझ्या मेंढरांस पाळ. १७ तिसऱ्याने
याने त्याला ह्मटलें, योनाच्या शिमोना, मजवर
प्रीति करितोस काय? तीन वेळा त्याने त्याला ह्म-
टलें, मजवर प्रीति करितोस काय? यास्तव पेत्रस
खेद पावला व त्याला ह्मणाला, हे प्रभू, तुला
सर्व ठाऊक आहे, मी तुजवर प्रीति करितों हें तूं
जाणतोस. येशूने त्याला ह्मटलें, माझ्या मेंढरांस
चार. १८ मी तुला खचीत खचीत सांगतों, तूं
तरुण होतास तेव्हां तूं आपली कंबर बांधून तुझ्या
मनास वाटे तेथें जाईस, परंतु तूं ह्मातारा होसील
तेव्हां तूं आपले हात लांबविसील, आणि दुसरा
तुला बांधून तुझ्या मनास वाटणार नाहीं तेथें नेईल.
१९ तो कोणत्या मरणाने देवाचें गौरव करणार, हें
सुचवून त्याने असें ह्मटलें; आणि असें बोलून तो
त्याला ह्मणाला, माझ्या मागें ये. २० मग पेत्र-
साने मुरडून ज्या शिष्यावर येशूची प्रीति होती
आणि जेवणाच्या वेळेस त्याच्या उरासीं टेंकून, हे
प्रभू, तुला पराधीन करणारा तो कोणता आहे?
असें जो बोलला, त्याला मागें चालतांना पाहिलें. २१
पेत्रस त्याला पाहून येशूला ह्मणाला, हे प्रभू, याज-
विषयीं तर काय? २२ येशूने त्याला ह्मटलें, मी
येईं तोंपर्यंत त्याने राहावें असी माझी इच्छा असली
तर तें तुला काय? तूं माझ्या मागें ये. २३ याव-
रून तो शिष्य मरणार नाहीं, असें भावांमध्यें बोलूं
लागले, तरी तो मरणार नाहीं, असें येशूने त्याला
ह्मटलें नाहीं, तर मी येईं तोंपर्यंत त्याने राहावें
असी माझी इच्छा असली तर तें तुला काय?

२४ ज्या शिष्याने या गोष्टींविषयीं साक्ष दिल्ही
व या गोष्टी लिहिल्या तोच हा आहे, आणि त्याची
साक्ष खरी आहे हें आह्मी जाणतों. २५ आणि
येशूने केलेलीं दुसरींहि बहुत कामें आहेत, तीं
एकएक लिहिलीं तर लिहिलेलीं पुस्तकें या जगांत
मावणार नाहींत, असें मला वाटतें. आमेन.

# प्रेषितांचीं कृत्यें.

## अध्याय १.

हे थ्यफिलसा, येशूने जे प्रेषित निवडिले होते,
त्यांस पवित्र आत्म्याच्या योगाने आज्ञा सांगून
याला वर घेतलें, २ त्या दिवसापर्यंत, तो
जें करूं व शिकवूं लागला, त्या सर्वांविषयीं म्या
ाहिला ग्रंथ केला. ३ त्या प्रेषितांसहि तो सोस-
ल्यानंतर आपण जीवंत झालों, हें बहुत प्रमाणानी
दाखवून चाळीस दिवसपर्यंत त्यांस दिसत असे,
भाणि देवाच्या राज्याच्या गोष्टी बोलत असे. ४
नंतर त्याने त्यांस एकत्र जमवून आज्ञा केली कीं,
यरूशलेमापासून जाऊं नका, वर मजपासून जें
बापाचें वचन तुह्मी ऐकिलें आहे त्याची वाट पाहा.
५ कारण कीं योहान्न पाण्याने बाप्तिस्मा करीत
असे खरें, परंतु तुमचा बाप्तिस्मा थोडक्या दिवसानी
पवित्र आत्म्याने होईल. ६ तेव्हां त्यानी एकत्र
मेळाल्यावर त्याला विचारिलें कीं, हे प्रभू, या
वेळेस तूं इस्राएलास पुन्हा राज्य देसील काय?
७ तेव्हां तो त्यांस ह्मणाला, जे काल व प्रसंग
बापाने आपल्या स्वाधीन ठेविले आहेत ते तुह्मी
जाणावे हें तुह्माकडे नाहीं. ८ तर पवित्र आत्मा
तुह्मावर येईल, तेव्हां तुह्मी सामर्थ्य पावाल, आणि
यरूशलेम व सर्व यहूदा व शोमरोन यांत व
पृथ्वीच्या शेवटपर्यंत तुह्मी माझे साक्षी व्हाल. ९
आणि असें बोलल्यावर ते पाहत असतां त्याला
वर नेलें, तेव्हां ढगाने त्यांच्या दृष्टीपासून त्याला
घेतलें. १० नंतर तो जात असतां ते आकाशा-
कडे निरखून पाहत होते, तेव्हां पाहा, पांढरीं वस्त्रें
ल्यालेले दोन पुरुष त्यांच्या जवळ उभे राहिले.
११ आणि ते असें बोलले कीं, अहो गालीली
माणसानो, तुह्मी आकाशाकडे पाहत कां उभे राहि-
लां? जो तुह्मापासून वर आकाशांत घेतला तोच
येशू, जसें तुह्मी त्याला आकाशांत जातां पाहिलें
तसाच येईल. १२ मग ते जाइती ह्मटलेला
डोंगर सुमारें शाब्बाथ दिवसाच्या वाटेइतका यरू-
शलेमाजवळ आहे तेथून यरूशलेमांत परत गेले.
१३ आणि तेथें आल्यावर ते माडीवर चढले,
तेथें पेत्रस व याकोब व योहान्न व अंद्रयास, फि-
लिप्पस व थोमा, बार्थलमी व मात्थी, अल्फीचा
पुत्र याकोब व शिमोन जलोतेस व याकोबाचा
भाऊ यहूदा हे राहत होते. १४ हे सर्व व
बायका, आणि येशूची आई मारया व त्याचे भाऊ,
हीं एकचित्ताने प्रार्थना व विनंती करण्यांत तत्पर
राहत होतीं.

१५ त्या दिवसांमध्यें शिष्य मिळाले होते,
(त्यांच्या नांवाची संख्या सुमारें एकशें वीस,) त्यांच्या
मध्यें पेत्रस उभा राहून ह्मणाला; १६ अहो
भावानो, येशूच्या धरणाऱ्यांस वाटाडी यहूदा यावि-
षयीं पवित्र आत्मा दाविदाच्या मुखेंकरून जें वचन
बोलला तें पूर्ण होण्याचें अगत्य होतें. १७ कां
कीं तो आह्मामध्यें मोजलेला होता, आणि या से-
वेचा वांटा त्याला मिळाला होता. १८ त्याने
अन्यायाच्या मोलाने जमीन विकत घेतली, आणि
पालथें पडून त्याचें पोट फुटलें व त्याचीं सर्व आं-
तडीं बाहेर निघालीं. १९ आणि हें यरूशले-
मांतल्या सर्व राहणाऱ्यांस कळलें, ह्मणून त्यांच्या
भाषेंत त्या जमिनीला अकलदमा ह्मणजे रक्ताची
जमीन ह्मटलें आहे. २० कां तर गीतांच्या
पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, त्याची वस्ती
ओसाड होवो, आणि तींत कोणीहि न राहो; आणि
त्याची अध्यक्षता दुसरा घेवो. २१ यास्तव यो-
हान्नाच्या बाप्तिस्म्यापासून ज्या दिवसीं प्रभु येशू
आह्मापासून वर घेतला तोंपर्यंत, २२ ह्मणजे
तो आह्माजवळ आंत व बाहेर येत जात होता,
त्या सर्व वेळेस जीं माणसें आमच्या बरोबर चा-
लत होतीं त्यांतून कोणीएक त्याच्या पुन्हा उठण्या-
विषयीं साक्षी आमच्या संगतीं झाला पाहिजे.

२३ तेव्हां त्यानी बार्साबा ह्मटलेला योसेफ
ज्याचें उपनाव यूस्तस तो, आणि मात्थियस, या
दोघांस उभें केलें. २४ मग ते प्रार्थना करीत

बोलले, हे सर्वांचें अंतःकरण जाणणाऱ्या प्रभू,
२५ ही सेवा व प्रेषितपण यहूदा टाकून आपल्या
ठिकाणीं गेला, यांचा वांटा ज्याला मिळावा, असा
या दोघांतून त्वां कोणता निवडिला तो दाखीव.
२६ मग त्यानी आपल्या नांवांच्या चिठ्ठ्या टाकि-
ल्या, आणि मात्थियसाच्या नांवाची चिठ्ठी निघाली,
आणि त्याला अकरा प्रेषितांबरोबर मोजिलें.

## अध्याय २.

**नं**तर पन्नासावा दिवस आल्यावर, ते सर्व एक-
चित्ताने एकत्र मिळाले होते. २ तेव्हां अक-
स्मात् मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारिखा आका-
शांतून नाद आला, आणि त्याने जेथें ते बसले
होते तें सर्व घर भरिलें. ३ मग विभागलेल्या
जिभा अग्नीच्या सारिख्या त्यांस दिसल्या, आणि
त्यांतील प्रत्येक जणावर बसल्या. ४ तेव्हां ते
अवघे पवित्र आत्म्याने पूर्ण झाले, आणि आत्म्याने
जसी त्यांस उच्चार करण्याविषयीं शक्ति दिल्ही
तसे ते दुसदुसऱ्या भाषानी बोलूं लागले. ५ त्या
वेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रांतील धार्मिक
यहूदी माणसें यरूशलेमांत राहत होतीं. ६
तेव्हां ही गोष्ट वाजल्यावर, समुदाय एकत्र होऊन
त्यांचा एकच गलबला झाला, कारण कीं प्रत्येकानी
आपापल्या भाषेंत त्यांस बोलतां ऐकिलें. ७
आणि ते सर्व विस्मित व चकित होऊन एकमेकांसीं
ह्मणाले कीं, पाहा, हे जे बोलतात ते सर्व गालीली
लोक आहेत ना? ८ तर आह्मी प्रत्येक आपाप-
ल्या जन्मभाषेंत त्यांचें बोलणें ऐकतों हें कसें? ९
पार्थी व मेदी व एलामी, व मेसोपटाम्या व
यहूदा व काप्पादकी, पंतस व आशी, १० फ्रुगी व
पांफुली, मिसर व कुरेनेच्या जवळचा लिब्या देश,
यांतले राहणारे, आणि रोमांत प्रवास करणारे,
यहूदी व मतानुसारी, ११ क्रेती व आर्बी, असे
आह्मी असतां त्यांस आपापल्या भाषेंत देवाचीं
महाकर्मै बोलतां ऐकतों. १२ तेव्हां ते सर्व
विस्मित होऊन व संशय धरून एकमेकांसीं ह्मणाले,
हें काय असेल? १३ परंतु कित्येक थट्टा करून
बोलले कीं, हे द्राक्षरसाने मस्त झाले आहेत. १४
तेव्हां पेत्रस अकरा जणांसुद्धां उभा राहून त्यांस
मोठ्याने बोलूं लागला कीं, अहो यहूदी माणसानो,
व यरूशलेमांतील सर्व राहणाऱ्यानो, तुह्माला हें
ठाऊक असो आणि माझ्या गोष्टी ऐका. १५
कारण कीं तुह्माला वाटतें तसे हे मस्त झाले
नाहींत, कां तर दिवसाचा पहिला प्रहर आहे.
१६ परंतु योएल भविष्यवाद्याकडून जें सांगितलें तें
हेंच आहे. १७ देव ह्मणतो, शेवटल्या दिवसां-
मध्यें असें होईल कीं, मी आपला आत्मा मनुष्य-
मात्रावर ओतीन, तेव्हां तुमचे पुत्र व तुमच्या
कन्या भविष्यें सांगतील, आणि तुमचे तरणे दृष्टांत
पाहतील, व तुमच्या ह्मातार्‍यांस स्वप्नें पडतील.
१८ अणखी त्या दिवसांमध्यें मी आपल्या दासां-
वर व आपल्या दासींवर आपला आत्मा ओतीन,
ह्मणजे तीं भविष्य सांगतील. १९ आणि वरतें
आकाशांत उत्पात व खालतें पृथ्वीवर चिन्हें, रक्त
व अग्नि व धुराचें धुकें, असीं दाखवीन. २०
तो प्रभूचा मोठा व भयंकर दिवस येण्याच्या पूर्वी
सूर्य अंधकारमय व चंद्र रक्तमय होईल. २१
तेव्हां असें होईल कीं जो कोणी प्रभूचा धांवा
करील तो तारण पावेल.

२२ अहो इस्राएल मनुष्यानो, या गोष्टी ऐका;
नाझोरी येशू याच्या हातून देवाने जे चमत्कार व
अद्भुतें व चिन्हें तुमच्या मध्यें केलीं ह्मणून तुह्मी
स्वतां जाणतां, त्यांवरून तो देवाने तुह्मास प्रदर्श-
विलेला मनुष्य होता: २३ तोच देवाच्या ठरवि-
लेल्या निश्चयाप्रमाणें व भविष्यज्ञानाप्रमाणें तुमच्या
स्वाधीन झाल्यावर, तुह्मी त्याला धरून पापी हातानी
खांबावर खिळून मारिलें. २४ त्याला देवाने मर-
णाच्या वेदना सोडवून उठविलें, कारण कीं त्याने
मरणाच्या स्वाधीन राहावें हें अशक्य होतें. २५ दावी-
दहि त्याजविषयीं बोलतो कीं, म्या आपल्या समोर
प्रभूला नित्य पाहिलें आहे, कां कीं म्या ढळूं नये
ह्मणून तो माझ्या उजवीकडे असतो. २६ यास्तव
माझें अंतःकरण हर्षित, व माझी जीभ उल्लासित
झाली, अणखी माझा देहहि आशेने राहील. २७
कां कीं तूं माझ्या आत्म्याला मृतलोकांत राहूं देणार
नाहींस, आणि आपल्या पवित्राला कुजण्याचा अनु-
भव घेऊं देणार नाहींस. २८ जीवनाचे मार्ग
त्वां मला कळविले आहेत, आणि तूं आपल्या दर्श-
नाने मला हर्षयुक्त करिसील.

२९ अहो भावानो, मूळपुरुष दाविदाविषयीं
मला तुह्मासीं प्रशस्तपणाने बोलूं द्या, कीं तो
मेला व पुरलाहि आहे, व त्याची कबर आजपावेतों
आह्मामध्यें आहे. ३० तो तर भविष्यवादी होता,
आणि त्याला ठाऊक होतें कीं, आपल्यासीं देव

शपथ वाहून बोलला कीं, देहाप्रमाणें तुझी संतति
जो ख्रीस्त, त्याला तुझ्या आसनावर बसण्यासाठीं
मी उठवीन; ३१ हें पूर्वी जाणून तो ख्रीस्ताच्या
पुन्हा उठण्याविषयीं बोलला कीं, त्याचा आत्मा
मृतलोकीं राहूं दिल्हा नाहीं, आणि त्याच्या देहाला
कुजण्याचा अनुभव झाला नाहीं. ३२ त्या येशूला
देवानें उठविलें आहे, याविषयीं आम्ही अवघे साक्षी
आहों. ३३ तो तर देवाच्या उजवीकडे उंचावला
होऊन व पवित्र आत्म्याविषयींचें वचन बापा-
पासून पावून जें तुम्ही आतां पाहतां व ऐकतां तें
त्यानें ओतून दिल्हें आहे. ३४ दावीद तर आका-
शांत चढला नाहीं, परंतु तोच म्हणतो कीं, प्रभूनें
माझ्या प्रभूला सांगितलें कीं, ३५ मी तुझे वैरी
तुझ्या पायांचें आसन करीन तोंपर्यंत तूं माझ्या
उजवीकडे बैस. ३६ यास्तव सर्व इस्राएलाचें
घराणें निश्चयें जाणो कीं, ज्याला तुम्हीं खांबीं
दिल्हें, तोच येशू देवानें प्रभु व ख्रीस्त असा
करून ठेविला आहे.

३७ हें ऐकून ते अंतःकरणांत वरमले, आणि
पेत्रसाला व इतर प्रेषितांस म्हणाले, अहो भावा-
नो, आम्ही काय करावें? ३८ मग पेत्रस त्यांस
म्हणाला, पश्चात्ताप करा; आणि येशू ख्रीस्ताच्या
नांवानें तुम्हांतील प्रत्येक बाप्तिस्मा घेवो, पापाची क्षमा
व्हावी म्हणून; मग पवित्र आत्म्याचें दान तुम्हाला
प्राप्त होईल. ३९ कां तर तें वचन तुम्हास व
तुमच्या लेंकरांस, आणि सर्व जे दूर, जितक्यांस
आमचा देव प्रभु बोलावील त्यांस आहे.

४० आणखी त्यानें बहुत दुसऱ्या गोष्टी सांगून
साक्ष दिल्ही व बोध करून म्हटलें कीं, या कुटील
पिढींतून तुम्ही आपला जीव वांचवा. ४१ तेव्हां
ज्यांनी आनंदानें त्याची गोष्ट घेतली त्यांचा बाप्तिस्मा
झाला, आणि त्या दिवसीं सुमारें तीन हजार माणसें
त्यांकडे झालीं. ४२ आणि प्रेषितांचा उपदेश व
संगत व भाकर मोडणें व प्रार्थना, यांत ते तत्पर
राहत होते. ४३ तेव्हां प्रत्येक मनुष्याला भय
प्राप्त झालें, आणि प्रेषितांकडून बहुत अद्भुतें व
चमत्कार घडत होते. ४४ तेव्हां सर्व विश्वास
धरणारे एकत्र होते, आणि त्यांचे अवघे पदार्थ समा-
ईक होते. ४५ आणि ते आपापले जिन्नस व माल-
मत्ता विकून जसजसी प्रत्येकाला गरज लागे तसे
ती सर्वांस वांटून देत असत. ४६ आणि ते नित्य
एकमतानें देवळांत जात असत व घरोघरीं भाकर
मोडीत असत, आणि देवाची स्तुति करीत हर्षानें
व सालस मनानें अन्न खात असत; ४७ सर्व
लोकांपासून सन्मानहि पावत असत; आणि प्रभु
तारण पावणाऱ्यांस नित्य मंडळीला मिळवीत होता.

## अध्याय ३.

पेत्रस व योहान्न हे तर प्रार्थनेच्या वेळेस तिसऱ्या
प्रहरीं देवळांत बरोबर जात होते. २ तेव्हां
आपल्या आईच्या पोटापासून पांगळा कोणीएक माणूस
होता, त्याला उचलून नेत असत व देवळांत जाणा-
ऱ्यांपासीं भीक मागण्यासाठीं त्याला देवळाच्या सुंदर
नामक दरवाज्याजवळ नित्य ठेवीत असत. ३
त्यानें पेत्रस व योहान्न हे देवळांत जाणार असें
पाहून भीक मागितली. ४ तेव्हां पेत्रस योहान्ना-
सुद्धां त्याला निरखून पाहून म्हणाला, आम्हाकडे
पाहा. ५ तेव्हां त्यांपासून कांहीं मिळेल, अशी
आशा धरून त्यानें त्यांजकडे लक्ष लाविलें. ६
मग पेत्रस म्हणाला, माझ्या जवळ रुपें व सोनें
नाहीं, जें मजपासीं आहे तें तुला देतों; नाजोरी
येशू ख्रीस्ताच्या नांवानें उठून चाल. ७ मग
त्यानें त्याचा उजवा हात धरून त्याला उठविलें,
तेव्हां त्याचीं पावलें व घोटे लागलेच बळकट झाले.
८ आणि तो उडी मारून उभा राहिला व चालूं
लागला, आणि तो चालत व उड्या मारीत व
देवाची स्तुति करीत त्यांच्या बरोबर देवळांत गेला.
९ आणि सर्व लोकांनी त्याला चालतां व देवाची
स्तुति करितां पाहिलें. १० आणि जो देवळाच्या
सुंदर दरवाज्याजवळ भीक मागण्यासाठीं बसत असे
तो हाच आहे, असें त्यांनी त्याला ओळखिलें, तेव्हां
त्याला जें झालें त्यावरून ते आश्चर्यानें व विस्म-
यानें व्याप्त झाले. ११ तेव्हां बरा झालेला पांगळा
पेत्रसाला व योहान्नाला धरीत असतां, सर्व लोक
फार विस्मित होऊन त्यांकडे शलमोनाच्या म्हट-
लेल्या देवडीमध्यें धावत आले.

१२ हें पाहून पेत्रसानें त्या लोकांस म्हटलें,
अहो इस्राएल मनुष्यांनो, यावरून आश्चर्य कां करितां,
किंवा आम्ही आपल्या सामर्थ्यानें किंवा धार्मिकपणानें
याला चालविलें, असें समजून आम्हाकडे कां न्याहा-
ळून पाहतां? १३ आब्राहाम व इझाक व
याकोब यांचा देव आमच्या पूर्वजांचा देव यानें
आपल्या पुत्र येशूला गौरविलें आहे, त्याला तुम्ही
पराधीन करून पिलातसासमक्ष तो सोडायास

निश्चय करीत असतां त्याला नाकारिलें. १४
तुह्मी तर जो पवित्र व न्यायी त्याला नाकारिलें,
आणि घातक माणूस आह्मासाठीं सोडा, असें
मागितलें. १५ आणि जीवनाच्या अधिकाऱ्याला
तुह्मी जीवें मारिलें, त्याला देवाने मेलेल्यांमधून
उठविलें, याविषयीं आह्मी साक्षी आहों. १६
आणि त्याच्या नांवाने त्याच्या नांवाच्या विश्वासा-
कडून, ज्याला तुह्मी पाहतां व ओळखतां, त्या या
माणसाला शक्तिमान् केलें आहे ; त्यावरल्या
विश्वासानेच याला तुह्मा सर्वांच्या समक्ष ही शरीर-
संपत्ति मिळाली. १७ आतां तर भावानो, तुह्मी
अज्ञानपणाने व तसेंच तुमच्या अधिकाऱ्यानीहि तें
केलें, हें मला ठाऊक आहे. १८ परंतु जें ख्री-
स्ताने सोसावें ह्मणून देवाने आपल्या सर्व भविष्य-
वाद्यांच्या तोंडाने पूर्वीं सांगितलें होतें, तें त्याने या-
प्रमाणें पूर्ण केलें. १९ यास्तव तुमचीं पापें पुसून
टाकावीं ह्मणून पश्चात्ताप करा व फिरा, अशासाठीं
कीं, शांतवनाचे समय प्रभूपासून यावे, २० आणि
तुह्मास पूर्वीं गाजविलेला येशू ख्रीस्त याला त्याने
पाठवावें. २१ ज्याविषयीं पहिल्यापासून देवाने
आपल्या सर्व पवित्र भविष्यवाद्यांच्या तोंडाने सांगि-
तलें, त्या सर्वांची पूर्वस्थिति होण्याच्या समयांपर्यंत
त्या येशूला आकाशांत राहणें प्राप्त आहे. २२
मोशाने तर पूर्वजांस सांगितलें कीं, तुमचा देव
प्रभु तुह्मासाठीं माझ्या सारिख्या भविष्यवाद्याला
तुमच्या भावांमधून उठवील, तो जें कांहीं तुह्माला
सांगेल, त्या सर्वांविषयीं त्याचें ऐका. २३ आणि
असें होईल कीं जो कोणी त्या भविष्यवाद्याचें
ऐकणार नाहीं तो लोकांतून नाहींसा होईल. २४
अणखी शमुवेलापासून परंपरेने जितके भविष्यवादी
बोलत आले, त्या सर्वांनी हे दिवस अगोदर सांगि-
तले. २५ तुह्मी भविष्यवाद्यांचे पुत्र आहां,
आणि तुझ्या संततीकडून पृथ्वींतील सर्व कुळें धन्य
होतील, असें आब्राहामाशीं बोलून करार देवाने
आमच्या पूर्वजांशीं केला, त्याचे पुत्र आहां. २६
देवाने आपला पुत्र येशू याला उठवून प्रथम
तुह्माकडे पाठविलें, यासाठीं कीं त्याने तुह्मा प्रत्ये-
काला तुमच्या पापांपासून फिरवून आशीर्वाद द्यावा.

## अध्याय ४.

आणि ते लोकांशीं बोलत असतां, याजक लोक
व देवळाचा सरदार व सदोकी त्यांजवर
चालून आले. २ कां तर ते लोकांस उपदेश
करितात, व येशूकडून मेलेल्यांचें पुन्हा उठणें
होईल असें सांगतात, हें त्यांस वाईट वाटलें. ३
तेव्हां त्यानी त्यांवर हात टाकिले, आणि सांज
झाली ह्मणून सकाळपर्यंत कैदेंत ठेविलें. ४
तथापि वचन ऐकणाऱ्यांतील बहुतानी विश्वास
ठेविला, आणि पुरुषांची गणना सुमारें पांच हजार
झाली.

५ नंतर दुसऱ्या दिवसीं असें झालें कीं, त्यांचे
अधिकारी व वडील व शास्त्री, ६ आणि मुख्य
याजक अन्नास व कायफा व योहान्न व आले-
क्षांद्रस, व मुख्य याजकांच्या वर्गांतील जितके होते
तितके यरूशलेमांत मिळाले. ७ आणि त्यानी
प्रेषितांस मध्यें उभें करून पुसलें कीं, हें तुह्मी
कोणत्या सामर्थ्याने किंवा कोणत्या नांवाने केलें!
८ तेव्हां पेत्रस पवित्र आत्म्याने पूर्ण असतां त्यांस
ह्मणाला, अहो लोकांच्या अधिकाऱ्यानो व इस्राए-
लाच्या वडिलानो, ९ ज्या रोगी माणसावर उप-
कार झाला तो कशाने पार पडला, याविषयीं जर
आमची चौकसी आज करायाची आहे, १०
तर तुह्मा सर्वांस व सर्व इस्राएल लोकांस
हें ठाऊक असो कीं, नाजोरी येशू ख्रीस्त ज्याला
तुह्मी खांबावर मारिलें, ज्याला देवाने मेलेल्यांमधून
उठविलें, त्याच्या नांवाने हा माणूस तुमच्या पुढें
बरा होऊन उभा राहिला आहे. ११ जो धोंडा
तुह्मा बांधणाऱ्यानी नाकारिला असतां कोपऱ्याचा
शिरोभाग झाला, तो हाच आहे. १२ आणि
तारण दुसऱ्या कोणाकडून नाहीं, कां कीं जेणेंकरून
आमचें तारण झालें पाहिजे असें दुसरें नांव आका-
शाखालीं मनुष्यांमध्यें दिल्हेलें नाहीं.

१३ तेव्हां पेत्रसाचें व योहान्नाचें प्रशस्तपण
पाहून, आणि हे निरक्षर व असभ्य मनुष्य आहेत
असें समजून, त्यानी आश्चर्य केलें, आणि हे येशू-
च्या संगतीं होते, असें त्यांस ओळखिलें. १४
तेव्हां बरा झालेला माणूस त्यांच्या बरोबर उभा
पाहून त्यांच्याने कांहीं विरुद्ध बोलवेना. १५ तेव्हां
सभेच्या बाहेर जावें, असी त्यांस आज्ञा देऊन ते
आपल्यांमध्यें विचार करीत बोलले कीं, १६ या
माणसांस आपण काय करावें, कारण कीं त्यांकडून
लौकिक चमत्कार घडला खरा, हें सर्व यरूशलेम-
करांस ठाऊक आहे, आणि तें आमच्याने नाहीं
ह्मणवत नाहीं. १७ परंतु लोकांमध्यें अणखी

वाजूं नये ह्मणून त्यांस भेडावून आपण निक्षूण
मना करावें कीं, या नांवाने कोणी माणसासीं पुढें
बोलूं नये. १८ मग त्यानी त्यांस बोलावून
आज्ञा केली कीं, येशूच्या नांवाने अगदी बोलूं नका,
व उपदेशहि करूं नका. १९ परंतु पेत्रस व
योहान्न यानी त्यांस उत्तर केलें कीं, देवापेक्षां
तुमचें ऐकावें हें देवाच्या दृष्टीस योग्य कीं अयोग्य,
याचा तुह्मी विचार करा. २० परंतु ज्या गोष्टी
आह्मी पाहिल्या व ऐकिल्या, त्या बोलूं नयेत हें
आमच्याने होत नाहीं. २१ तेव्हां त्यानी त्यांस
अणखी भेडावून सोडून दिल्हें, कां तर त्यांस शिक्षा
कसी करावी हें लोकांमुळें त्यांस सुचेना, कां कीं
घडलेल्या गोष्टीमुळें सर्व लोक देवाला गौरवीत होते.
२२ कां तर ज्या माणसावर हा बरा केल्याचा
चमत्कार घडला होता, त्याचें वय चाळीस वर्षां-
वर होतें.

२३ तेव्हां ते सुटल्यानंतर आपल्या लोकांकडे
गेले, आणि आपणांस मुख्य याजकानी व वडि-
लानी जें कांहीं ह्मटलें, तें सर्व त्यानी सांगितलें.
२४ तें ऐकून ते एका चित्ताने देवाला मोठ्याने ह्मणाले,
हे प्रभू, आकाश व पृथ्वी व समुद्र व त्यांतील
सर्व यांचा उत्पन्न करणारा देव तूंच आहेस. २५
आपला सेवक दावीद याच्या तोंडाने त्वां ह्मटलें
कीं, राष्ट्रें कां खवळलीं, आणि लोकानी व्यर्थ
योजना कां केल्या? २६ प्रभूवर व त्याच्या
अभिषिक्तावर पृथ्वीचे राजे उभे राहिले व अधि-
कारी एकत्र जमले. २७ याप्रमाणें वास्तविक ज्याला
त्वां अभिषेक केला, त्या तुझ्या पवित्र पुत्र येशूवर
विदेशी लोक व इस्राएल लोक यांसुद्धां हेरोद
व पंतयस पिलातसहि एकत्र झाले; २८ यासाठीं
कीं जें कांहीं घडावें ह्मणून तुझ्या हाताने व तुझ्या
निश्चयाने पूर्वी नेमिलें होतें, तें त्यानी करावें. २९
तर हे प्रभू, आतां तूं त्यांच्या धमकावण्या पाहा,
आणि आपल्या दासानी पूर्ण निर्भयतेने तुझें वचन
बोलावें असें कर. ३० याकरितां तूं आपला हात
लोकांस बरें करायाला पुढें कर, आणि तुझा पवित्र
पुत्र येशू याच्या नांवाने चमत्कार व अद्भुतें घडीव.
३१ आणि त्यानी प्रार्थना केल्यावर ज्या जाग्या-
मध्यें ते मिळाले होते ती डळमळली, आणि ते
अवघे पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन देवाचें वचन
प्रशस्तपणाने बोलूं लागले. ३२ तेव्हां विश्वास-
णाऱ्यांचा समुदाय एका अंतःकरणाचा व एका
जीवाचा होता, आणि कोणीहि आपल्या मालमत्ते-
तील कांहीं आपलें असें ह्मणत नव्हता, तर त्यांस
सर्व पदार्थ समाईक होते. ३३ आणि प्रेषित
मोठ्या सामर्थ्याने प्रभु येशूच्या पुन्हा उठण्यावि-
षयीं साक्ष देत होते, आणि त्या सर्वांवर मोठी
कृपा होती. ३४ त्यांतील तर कोणालाहि कांहीं
उणें नव्हतें, कां कीं जमिनींचे किंवा घरांचे जितके
मालक होते तितक्यानी तीं विकून विकलेल्यांचें
मोल आणून, ३५ प्रेषितांच्या पायांसीं ठेविलें;
मग जसजसी कोणाला गरज लागे, तसें प्रत्येकाला
वांटून देत. ३६ आणि लेवी योसे, जो जन्माने
कुप्रसी, ज्याला प्रेषितानी बार्णबा ह्मणजे बोधपुत्र
असें नांव दिल्हें होतें, ३७ त्याला जमीन होती,
ती त्याने विकून तिचें मोल आणून प्रेषितांच्या
पायांसीं ठेविलें.

## अध्याय ५.

तेव्हां अनान्या नांवाचा कोणी माणूस व त्याची
बायको साफीरा यानी माल विकला. २
मग त्याच्या बायकोला ठाऊक असतां त्याने मो-
लांतून कांहीं ठेवून घेतलें, आणि बाकी आणून
प्रेषितांच्या पायांसीं ठेविली. ३ तेव्हां पेत्रस
बोलला, अनान्या, त्वां पवित्र आत्म्यासीं लबाडी
करावी व जमिनीच्या मोलांतून कांहीं ठेवून घ्यावें,
ह्मणून सैतानाने तुझ्या अंतःकरणांत कां भरविलें
आहे? ४ ती होती तोंवर तुझ्या खासगीची
नव्हती आणि विकल्यावर तुझ्या स्वाधीन नव्हती
काय? ही गोष्ट त्वां आपल्या मनांत कां आ-
णिली? त्वां माणसासीं नाहीं, तर देवासीं लबाडी
केली. ५ हे शब्द ऐकून अनान्याने पडून प्राण
सोडिला, आणि हें ऐकणाऱ्या सर्वांस मोठें भय
प्राप्त झालें. ६ तेव्हां तरण्यानी उठून त्याला
गुंडाळिलें, व बाहेर नेऊन पुरिलें. ७ मग सुमारें
प्रहराच्या अंतराने त्याची बायको झालेलें वर्त्तमान
न समजून आंत आली. ८ तेव्हां पेत्रस तिला
बोलला, अगे मला सांग, एवढ्याला तुह्मी जमीन
विकली काय? तिने उत्तर केलें, होय तेवढ्याला.
९ तेव्हां पेत्रस तिला बोलला, प्रभूच्या आत्म्याची
परीक्षा पाहावी ह्मणून तुह्मी एकोपा कां केला?
पाहा, ज्यानी तुझ्या नवऱ्याला पुरिलें त्यांचे पाय
दारासीं आहेत, ते तुलाहि उचलून बाहेर नेतील.
१० लागलेंच तिने त्याच्या पायांजवळ पडून प्राण

सोडिला, तेव्हां तरण्यानी आंत येऊन ती मेली
असी पाहिली, आणि तिला बाहेर नेऊन तिच्या
नवऱ्याजवळ पुरिलें. ११ नंतर सर्व मंडळीला व
हें ऐकणाऱ्या सर्वांस मोठें भय प्राप्त झालें. १२
तेव्हां प्रेषितांच्या हातानी लोकांमध्यें बहुत चम-
त्कार व अद्भुतें घडलीं, (आणि ते सर्व एका चित्ताने
शलमोनाच्या देवडींत होते. १३ आणि त्यांसीं
मिळावें ह्मणून वरकड लोकांतून कोणी धीर धरला
नाहीं, परंतु लोकानी त्यांस थोर मानिलें. १४
आणि उत्तरोत्तर पुष्कळ पुरुष व बायका विश्वास
धरून प्रभूकडे झाल्या.) १५ यास्तव त्यानी
रोग्यांस मार्गांत आणून खाटल्यांवर व बाजल्यांवर
ठेविलें, यासाठीं कीं पेत्रस येत असतां त्याची
सावली तरी त्यांतील कोणावर पडावी. १६
अणखी चहुंकडल्या गांवांतील समुदाय, रोग्यांस
व अशुद्ध आत्म्यानी पिडलेल्यांस घेऊन यरूशले-
मास आले, आणि ते सर्व बरे झाले.

१७ तेव्हां मुख्य याजक व त्याचे अवघे संग-
तीचे सदोकपंथी, ते उठून क्रोधाक्रांत झाले; १८
आणि त्यानी आपले हात प्रेषितांवर टाकून त्यांस
साधारण बंदिशाळेंत ठेविलें. १९ परंतु रात्रीं
प्रभूच्या दुतानें बंदिशाळेचे दरवाजे उघडिले, आणि
त्यांस बाहेर आणून ह्मटलें, २० जा, आणि
देवळामध्यें उभे राहून या जीवनाच्या सर्व गोष्टी
लोकांस सांगा. २१ हें ऐकून ते पाहांटेस देवळा-
मध्यें जाऊन उपदेश करूं लागले; तेव्हां मुख्य
याजक व त्याच्या संमतीचे यानी येऊन न्यायसभा
व इस्राएल लोकांची सर्व वडीलमंडळी एकत्र बोला-
विली, मग त्यांस आणायास बंदिशाळेकडे पाठ-
विलें. २२ मग शिपायी बंदिशाळेंत गेले, तों ते
तेथें नाहींत असें पाहून त्यानी परत येऊन सांगि-
तलें कीं, २३ बंदिशाळा चांगल्या बंदोबस्ताने
बंद केलेली, आणि बाहेर दरवाज्यांच्या पुढें पाहा-
रेकरी उभे राहिलेले, असें आह्मी पाहिलें खरें, परंतु
उघडल्यावर आह्मास आंत कोणी सांपडला नाहीं.
२४ हें वर्त्तमान ऐकून प्रमुख याजकाला व देव-
ळाच्या सरदाराला व मुख्य याजकांस संशय आला
कीं, याचा काय परिणाम होईल. २५ इतक्यांत
कोणी येऊन त्यांस असें सांगितलें कीं, पाहा, ज्या
माणसांस तुह्मी बंदिशाळेंत ठेविलें, ते देवळामध्यें
उभे राहून लोकांस उपदेश करीत आहेत. २६
तेव्हां सरदाराने शिपायांसंगतीं जाऊन त्यांस
बलात्कार केल्यावांचून आणिलें, कारण कीं लोक
आह्मास दगडमार करितील असें त्यांस भय वाटलें.
२७ नंतर त्यानी त्यांस आणून सभेमध्यें उभें केलें,
तेव्हां मुख्य याजकाने त्यांस विचारिलें कीं, २८
अहो, या नांवाने उपदेश करूं नका, असें आह्मी
तुह्मास निक्षूण सांगितलें कीं नाहीं? आणि पाहा,
तुह्मी आपल्या उपदेशाने अवघें यरूशलेम भरिलें
आहे, आणि या माणसाचें रक्त आह्मावर आणा-
यास पाहतां. २९ तेव्हां पेत्रसाने व इतर प्रेषि-
तानी उत्तर केलें कीं, माणसांपेक्षां देवाला मानिलें
पाहिजे. ३० ज्या येशूला तुह्मी खांबावर टांगून
मारिलें, त्याला आमच्या पूर्वजांच्या देवाने उठ-
विलें आहे. ३१ त्याने इस्राएलाला पश्चात्ताप
व पापांची क्षमा द्यावी, ह्मणून देवाने आपल्या उज-
वीकडे त्याला उंच करून राजा व तारणारा केलें
आहे. ३२ आणि या गोष्टींविषयीं आह्मी त्याचे
साक्षी आहों, अणखी जो पवित्र आत्मा देवाने आ-
पल्याला मानणाऱ्यांस दिल्हा आहे, तोहि साक्षी
आहे.

३३ हें ऐकून ते खोंचले, आणि त्यांस जिवें
मारायाचा विचार करूं लागले. ३४ तेव्हां
सर्व लोकांमध्यें प्रतिष्टित, असा कोणी न्यायशास्त्री
गमलियेल नामें परोशी, याने सभेंत उभें राहून
प्रेषितांस जरासें बाहेर करायाला सांगितलें. ३५
मग तो त्यांस ह्मणाला, अहो इस्राएल मनुष्यानो,
तुह्मी या माणसांस काय करणार, याविषयीं आप-
णांस संभाळा. ३६ कां तर या दिवसांच्या पूर्वी
थुदास, मी कोणी मोठा आहें, असें बोलत उठला;
त्याकडे गणतीने सुमारें चारशें माणसें मिळालीं;
त्याला मारिलें, आणि जितके त्याला मानीत होते
ते सर्व भडकून नाहींसे झाले. ३७ त्याच्या मागून
गालीली यहूदा याने नावनिशी होण्याच्या दिव-
सांत उठून बहुत लोकांस आपल्या नादीं लाविलें,
त्याचाहि नाश झाला आणि जितके त्याला मानीत
होते ते सर्व भडकले. ३८ ह्मणून मी तुह्मास
आतां सांगतों कीं, या माणसांपासून दूर व्हा, व
त्यांस असूं द्या, कां कीं हें मत व हें कार्य मनु-
ष्यांचें असल्यास व्यर्थ होईल. ३९ परंतु देवाचें
असलें तर तुमच्याने तें व्यर्थ करवत नाहीं; कदा-
चित तुह्मी देवासीं भांडणारे असे व्हाल. ४०
तेव्हां ते त्याला मान्य झाले, आणि त्यानी प्रेषि-
तांस बोलावून फटके मारिले, नंतर येशूच्या नांवाने

ोलूं नका, असी आज्ञा करून त्यांस सोडिलें.
४१ ते तर आपण त्याच्या नांवासाठीं धिकार पाव-
ण्यास योग्य ठरलों, यामुळें आनंद करून सभे-
च्या समोरून निघाले. ४२ आणि नित्य देव-
ळांत व घरोघरीं येशू ख्रीस्ताविषयीं उपदेश करणें
व शुभवर्त्तमान सांगणें त्यानी सोडिलें नाहीं.

## अध्याय ६.

त्या दिवसांमध्यें शिष्य फार वाढल्यावर हेलेनी
लोकांची इब्री लोकांसीं कुरकूर झाली, कारण
कीं रोजच्या वांटणीमध्यें त्यांच्या विधवांची उपेक्षा
होत असे. २ तेव्हां बारा जण शिष्यांचा समु-
दाय एकत्र बोलावून ह्मणाले कीं, देवाचें वचन
सोडून आह्मी पंक्तिसेवा करावी, हें योग्य नाहीं.
३ तर अहो भावानो, तुह्मी आपल्यांमधून पवित्र
आत्म्याने व ज्ञानाने पूर्ण असीं सात चांगल्या अ-
ब्रूचीं माणसें शोधून काढा, ह्मणजे आह्मी त्यांस
या कामावर नेमूं. ४ मग आह्मी प्रार्थनेंत व
वचनाच्या सेवेंत तत्पर राहूं. ५ तेव्हां ही गोष्ट
सर्व समुदायाला बरी वाटली, नंतर स्तेफनस
विश्वासाने व पवित्र आत्म्याने पूर्ण मनुष्य तो, व
फिलिप्पस व प्रखरस व निकानोर व तीमोन व
पार्मेनास व अंत्योखांतला निकलास यहूदीमता-
नुसारी, यांस त्यानी निवडून घेतलें. ६ मग
त्यानी त्यांस प्रेषितांसमोर उभें केल्यावर, त्यानी
प्रार्थना करून त्यांवर हात ठेविले. ७ मग देवाचें
वचन विस्तार पावून, यरूशलेमांत शिष्यांची संख्या
फार वाढली, याजकांचाहि मोठा समुदाय विश्वा-
साला मान्य झाला.

८ आणि स्तेफनसाने विश्वासाने व सामर्थ्याने
पूर्ण होऊन लोकांमध्यें मोठीं अद्भुतें व चमत्कार
केले. ९ तेव्हां लिबेर्तीनी यांची ह्मटलेली सभा,
आणि कुरेनेकर लोक व आलेक्सांद्रियेकर व किलि-
क्यांतले व आस्यांतले लोक यांतील कितीएक
उठून स्तेफनसासीं वादमतिवाद करूं लागले.
१० पण तो ज्या ज्ञानाने व आत्म्याने बोलला,
तीं त्यांच्याने अडववेना. ११ तेव्हां त्यानी
कांहीं माणसें आपलींसीं करून त्यांजकडून ह्मण-
विलें कीं, आह्मी याला मोशे व देव यांवि-
रुद्ध दुर्भाषण करितां ऐकिलें. १२ आणि त्यानी
लोकांस व वडिलांस व शास्त्र्यांस भर दिल्ही, मग
त्यानी त्यांजवर उठून त्याला धरून न्यायसभेंत
नेलें. १३ आणि ते खोटे साक्षी उभे केले अ-
सतां बोलले कीं, हा माणूस या पवित्र स्थानाच्या व
शास्त्राच्या विरुद्ध दुर्भाषण करणें सोडीत नाहीं.
१४ कां तर आह्मी त्याला असें बोलतां ऐकिलें
कीं, नाजोरी येशू हें स्थान मोडून टाकील, आणि
मोशाने आह्मास लावून दिल्हेल्या रीति पालटील.
१५ तेव्हां जे न्यायसभेंत बसले होते ते सर्व
त्याजकडे निरखून पाहत असतां, त्याचें तोंड दुता-
च्या तोंडासारिखें दिसलें.

## अध्याय ७.

मग मुख्य याजक ह्मणाला, या गोष्टी अशाच
आहेत काय? २ तेव्हां तो ह्मणाला, अहो
भावानो व वडिलानो, ऐका. आपला पूर्वज
आब्राहाम हारानांत राहण्याच्या पूर्वी मसप-
टम्या देशांत असतां, गौरवाच्या देवाने त्याला
दिसून सांगितलें कीं, ३ तूं आपला देश व आ-
पले गोत्रज सोडून जो देश मी तुला दाखवीन
त्यांत जा. ४ तेव्हां तो खासदीमाच्या देशांतून
निघून हारानांत राहिला; मग त्याचा बाप मेल्या-
वर, देवाने त्याला तेथून आणून सध्यां तुह्मी
राहतां त्या या देशांत ठेविलें. ५ पण एथें
त्याला वतन दिल्हें नाहीं, पाऊलभर देखील
नाहीं, तथापि त्याला लेंकरूं नसतां देवाने त्याला
वचन दिल्हें कीं, हा देश तुझा व तुझ्या मागें
तुझ्या संततीचा असें करीन. ६ देवाने अणखी
असें सांगितलें कीं, तुझी संतति परदेशांत उपरी
होईल, आणि लोक त्यांस दास करून चारशें वर्षे
त्रासितील. ७ मग ज्यांचें दासपण ते करितील त्या
लोकांचें पारपत्य मीच करीन, असें देवाने सांगि-
तलें, आणि त्यानंतर ते तेथून निघून माझी सेवा
या ठिकाणीं करितील. ८ आणि त्याने त्यासीं
सुंतेचा करार नेमिला, तसेंच त्याने इझाकाला
जन्मविलें, आणि त्याने त्याची सुंता आठव्या दिवसीं
केली, मग इझाकाने याकोबाला जन्मविलें व याको-
बाने बारा पूर्वजांस जन्मविलें. ९ नंतर त्या पूर्वजानी
हेवा धरून योसेफाला मिसरांत विकून टाकिलें, पण
देव त्याच्या संगतीं होता. १० आणि त्याने त्याला
त्याच्या सर्व संकटांतून काढिलें, आणि मिसराचा
राजा फारो याच्या समक्ष त्याला कृपा व ज्ञान दिल्हें,
यास्तव त्याने मिसरावर व आपल्या सर्व घरावर
त्याला अधिकारी केलें. ११ मग अवघ्या मि-

सर देशांत व खनान देशांत दुष्काळ पडून भारी
संकट माप्त झालें; असें कीं आमच्या पूर्वजांस
अन्न मिळेना. १२ तेव्हां मिसरांत दाणा आहे,
हें ऐकून याकोबानें आमच्या पूर्वजांस पहिल्याने
पाठविलें. १३ मग दुसऱ्या खेपेस योसेफाला
त्याच्या भावानी ओळखिलें आणि योसेफाचें कूळ
फारो राजाला ठाऊक झालें. १४ तेव्हां यो-
सेफाने बोलावणें पाठवून, आपला बाप याकोब व
आपले सर्व गोत्रज पंचाहत्तर असामी यांस आ-
णविलें. १५ तेव्हां याकोब मिसरांत गेला,
आणि तो व आमचे पूर्वज मरण पावले. १६
आणि त्यांस शखेमांत नेऊन जी कबर आब्राहा-
माने शखेमाचा बाप हमोर याच्या पुत्रांपासून
रोख रुपयांस विकत घेतलेली होती, तींत पुरलें.
१७ मग देवाने आब्राहामाला शपथपूर्वक जें
वचन दिल्हें होतें त्याचा समय जवळ आल्यावर,
१८ योसेफाला जाणत नव्हता असा दुसरा राजा
उठे तोंपर्यंत, ते लोक मिसरांत वाढून पुष्कळ झाले.
१९ त्या राजाने आमच्या जातीसीं कपटाने वर्त्तून
आमच्या पूर्वजांस असा त्रास दिल्हा कीं, त्यांचीं
बाळकें वांचूं नयेत ह्मणून तीं बाहेर टाकविलीं.
२० त्या वेळेस मोशे जन्मला, आणि तो फारच
सुंदर होता, त्याच्या बापाच्या घरांत तीन महिने
त्याचें पाळण झालें. २१ मग तो बाहेर टा-
किला असतां, फारोच्या कन्येने त्याला घेऊन
आपला पुत्र असा पाळिला. २२ आणि मोशे
मिसऱ्यांच्या सर्व विद्या शिकलेला, व बोल-
ण्यांत व करण्यांत पराक्रमी होता. २३ नंतर
त्याला चाळीस वर्षें भरल्यावर त्याच्या मनांत
आलें कीं, आपले भाऊ इस्राएलाचे वंश यांची
भेट घ्यावी. २४ तेव्हां त्यांतील कोणीएकाला
अन्याय सोसतांना पाहून मोशाने त्याचा कैवार
घेतला, आणि मिसऱ्याला जीवें मारून त्या क्ले-
शिताचा सूड उगविला. २५ तेव्हां माझ्या
हाताने माझ्या भावांस देव सोडवील, असें त्यांस
समजेल ह्मणून त्याला वाटलें होतें, पण त्यांस
समजलें नाहीं. २६ मग दुसऱ्या दिवसीं कोणी
भांडत असतां, तो त्यांच्या समक्ष येऊन त्यांची
समजूत करीत बोलला कीं, अहो मनुष्यानो, तुह्मी
भाऊबंद आहां, एकमेकांचे अन्याय कां करितां?
२७ तेव्हां आपल्या सख्याचा अन्याय करीत
होता तो मोशाला ढकलून बोलला कीं, तुला
आह्मावर अधिकारी व न्यायाधीश कोणी केलें?
२८ काल त्वां मिसऱ्याला मारिलें तसें मलाहि
मारायाला पाहतोस काय? २९ ही गोष्ट ऐक-
तांच मोशे पळून गेला, आणि मिद्यान देशांत
प्रवासी राहिला, तेथें त्याला दोन पुत्र झाले. ३०
मग चाळीस वर्षें भरल्यावर सिना डोंगराच्या
रानामध्यें जळत झुडपाच्या भडक्यांत प्रभूचा दूत
त्याच्या दृष्टीस पडला. ३१ हें पाहून मोशाला
आश्चर्य वाटलें, आणि लक्षांत आणायाकरितां तो
जवळ गेल्यावर त्याला प्रभूची वाणी असी झाली
कीं, ३२ मी तुझ्या पूर्वजांचा देव, आब्राहामाचा
देव व इझाकाचा देव व याकोबाचा देव आहें.
तेव्हां मोशे कांपून पाहायास धजला नाहीं. ३३
नंतर प्रभूने त्याला ह्मटलें, तूं आपल्या पायांतला
जोडा काढ, कां तर ज्या जाग्यावर तूं उभा राहि-
लास ती पवित्र भूमि आहे. ३४ मिसरांत मा-
झ्या लोकांची विपत्ति म्या खचीत पाहिली आहे व
त्यांचें कन्हणें ऐकिलें आहे, आणि त्यांस तारायास
मी उतरलों आहें, तर आतां चाल, मी तुला मि-
सरांत पाठवितों. ३५ तोच मोशे ज्यास तुला
अधिकारी किंवा न्यायाधीश कोणी केलें? असें ते
नाकारून बोलले, त्याला झुडपांत पाहिलेल्या दुता-
च्या हातें देवाने अधिकारी व सोडविणारा करून
पाठविलें. ३६ त्याने मिसर देशांत व तांबड्या
समुद्रांत व अरण्यांत चाळीस वर्षें अद्भुतें व च-
मत्कार करून त्या लोकांस बाहेर काढिलें. ३७
तोच मोशे इस्राएल लोकांसीं बोलला कीं, तु-
मचा देव प्रभु तुमच्या भावांमधून मजसारिख्या
भविष्यवाद्याला तुह्मासाठीं उत्पन्न करील, त्याचें
ऐका. ३८ जो सिना डोंगरांत आपणासीं बो-
लणारा दूत यापासीं, आणि आमच्या पूर्वजांपासीं
रानांतील मंडळींत होता, ज्याने आह्मास देण्या-
करितां जीवंत वाक्यें घेतलीं, तो हाच आहे.
३९ त्याचें ऐकायास आमचे पूर्वज मान्य नव्हते,
तर त्याला घालवून व आपल्या अंतःकरणाने मि-
सराकडे फिरून, ४० ते अहरोनाला ह्मणाले, जे
आमच्या पुढें चालतील असे देव आह्माला करून
दे, कां तर ज्याने आह्मास मिसर देशांतून आ-
णिलें त्या या मोशाचें काय झालें हें आह्मास
कळलें नाहीं. ४१ आणि त्या दिवसांमध्यें त्यांनी
वासराची मूर्त्ति करून तिला यज्ञ केला, आणि
आपल्या हातच्या कामांवरून आनंद केला. ४२

ाव्हां देवाने उलटून त्यांस आकाशांतील सैन्याची
ेवा करायास सोडिलें, याविषयीं भविष्यवाद्यांच्या
ुस्तकांत लिहिलें आहे कीं, अहो इस्राएल घरा-
ण्यानो, तुह्मी चाळीस वर्षें अरण्यांत यज्ञ व बलि-
ानें मला केलीं काय? ४३ मोलखाचा मंडप
। तुमचा देव रेंफान याचा तारा तुह्मी उचलून
ेतला, ह्मणजे ज्या मूर्ती तुह्मी पुजायाकरितां केल्या,
गा; ह्मणून मी तुह्माकडून बाबेलाच्या पलिकडे
वास करवीन.

४४ त्वां जी प्रतिमा पाहिली तिजप्रमाणें सा-
ीचा मंडप कर, असें ज्याने मोशेला सांगितलें,
याने नेमलेल्याप्रमाणें तो मंडप रानांत आमच्या
ूर्वजांपासीं होता. ४५ तो आमच्या पूर्वजांस
ाप्त झाल्यावर, त्यांच्या पुढून जीं राष्ट्रें देवाने घाल-
वलीं त्यांच्या देशांत आमच्या पूर्वजांनी तो मंडप
यहोशवाबरोबर आणून दाविदाच्या दिवसांपर्यंत
तसाच ठेविला. ४६ याने देवासमक्ष कृपा पावून,
याकोबाच्या देवासाठीं वस्ती मिळवायास मागि-
तली. ४७ परंतु शलमोनाने त्यासाठीं घर बांधिलें.
४८ तथापि जो परात्पर तो हातानी बांधलेल्या देव-
ळांत राहत नाहीं, याप्रमाणें भविष्यवादी सांगतो;
४९ प्रभु ह्मणतो, आकाश माझें आसन आहे, पृथ्वी
माझें पादासन आहे, माझ्यासाठीं तुह्मी कशाचें घर
बांधाल? माझ्या विसांव्याचें ठिकाण कोणतें? ५०
हे सर्व पदार्थ माझ्या हातचें काम आहेत ना? ५१
अहो ताठमानेचे व हृदयांत व कानांत असुंती
लोकानो, तुह्मी पवित्र आत्म्याला सर्वकाळ अडवितां,
जसे तुमचे पूर्वज तसे तुह्मीहि. ५२ ज्याचा
तुमच्या पूर्वजांनी पाठलाग केला नाहीं, असा भवि-
ष्यवाद्यांमधून कोण होता बरें? आणि जो न्यायी
त्याच्या येण्याविषयीं ज्यानी पूर्वी सांगितलें त्यांस
त्यानी जीवें मारिलें, त्याचे तुह्मी आतां परावीन
करणारे व प्राणघातकी निघालां. ५३ तुह्मास
नेमशास्त्र दुतांच्या योगाने प्राप्त झालें, तें तुह्मी
पाळिलें नाहीं.

५४ तेव्हां हें ऐकून ते आपल्या अंतःकरणांत
फार चिडून त्याजवर दांत खाऊं लागले. ५५
परंतु तो पवित्र आत्म्याने पूर्ण असतां, आकाशाकडे
दृष्टि लावून त्याने देवाचें गौरव व देवाच्या उजवी-
कडे येशूला उभें राहिलेलें पाहिलें, ५६ व ह्म-
टलें कीं, पाहा, आकाश फाटलें, व मनुष्याच्या
पुत्राला देवाच्या उजवीकडे उभें राहिलेलें, असें
माझ्या दृष्टीस पडतें. ५७ तेव्हां ते मोठी आरोळी
मारून कानांत बोटें घालून एकचित्ताने त्याजवर
धावले. ५८ मग त्यानी त्याला शहराच्या बाहेर
घालवून धोंडे मारिले, आणि साक्षी यानी आपलीं
वस्त्रें शौल नांवाचा कोणी तरुण होता त्याच्या
पायांजवळ ठेविलीं. ५९ तेव्हां ते स्तेफनसाला
धोंड्यानी मारीत असतां तो प्रभूचा धांवा करीत
बोलला कीं, हे प्रभू येशू, माझ्या आत्म्याचा स्वी-
कार कर. ६० मग गुडघे टेंकून तो मोठ्याने ओर-
डला कीं, हे प्रभू, हें पाप त्यांजकडे मोजूं नको;
असें बोलून तो निजला.

## अध्याय ८.

आणि त्याच्या वधाविषयीं शौल मान्य होता.
त्या वेळेस यरूशलेमांतल्या मंडळीचा मोठा
पाठलाग झाला, ह्मणून प्रेषितांखेरीज ते सर्व यहूदा
व शोमरोन देशांत पांगून गेले. २ धार्मिक माण-
सानी तर स्तेफनसाला पुरायाला नेलें, आणि
त्याच्या साठीं मोठा शोक केला. ३ तेव्हां शौलाने
मंडळीचा मोड केला, आणि घरोघरीं शिरून पुरु-
षांस व बायकांस धरून ओढून बंदिशाळेंत ठेविलें.

४ तेव्हां जे पांगून गेले होते ते देवाचें शुभव-
र्त्तमान सांगत चहुंकडे फिरले. ५ आणि फिलि-
प्पसाने शोमरोन शहरांत जाऊन त्यांस ख्रीस्ता-
विषयीं गाजविलें. ६ तेव्हां जे चमत्कार फिलि-
प्पस करीत होता ते ऐकून व पाहून समुदायानी
त्याच्या सांगितलेल्या गोष्टींकडे एकमत होऊन लक्ष
दिल्हें. ७ कारण कीं ज्यांस अशुद्ध आत्मे लागले
होते अशा पुष्कळ माणसांतून ते मोठ्याने ओरडून
निघाले, आणि पुष्कळ वातरोगी व पांगळे बरे झाले.
८ त्यावरून त्या नगरांत फार आनंद झाला. ९
त्यापूर्वी शिमोन नांवाचा कोणी पुरुष त्या नगरांत
होता, तो जादुगिरी करून शोमरोनी लोकांस थक
करीत असे, आणि मी कोणी मोठा आहें असें दाख-
वीत असे. १० त्याजवर सर्व आबालवृद्ध लक्ष
देऊन बोलत असत कीं, हा देवाची मोठी शक्ति आहे.
११ बहुत काळापासून त्याने आपल्या जादुगिरीने
त्यांस थक केलें होतें, ह्मणून त्यांचें लक्ष त्याजवर होतें.
१२ परंतु फिलिप्पस देवाचें राज्य व येशू ख्री-
स्ताचें नाम याविषयींचें शुभवर्त्तमान सांगत असतां,
लोकानी विश्वास धरिला तेव्हां पुरुष व बायका
यांचा बाप्तिस्मा झाला. १३ आणि शिमोनहि
स्वतां विश्वास धरून व बाप्तिस्मा घेऊन फिलि-

प्पसाच्या संगतीं राहिला, आणि जीं चिन्हें व
मोठे चमत्कार घडले ते पाहून थक्क झाला.
१४ नंतर शोमरोनाने देवाचें वचन अंगीकारिलें
आहे, हें यरूशलेमांतल्या प्रेषितानी ऐकून त्याज-
कडे पेत्रसाला व योहान्नाला पाठविलें. १५
त्यानी तेथें जाऊन त्या लोकांविषयीं प्रार्थना केली
कीं, त्यांस पवित्र आत्मा मिळावा. १६ कां कीं
तोंपर्यंत त्यांतील कोणावरहि तो पडला नव्हता,
केवळ प्रभु येशूच्या नांवाने त्यांचा बाप्तिस्मा झाला
होता. १७ तेव्हां प्रेषितानी त्यांजवर हात
ठेविले, आणि त्यांस पवित्र आत्मा मिळाला. १८
नंतर प्रेषितांचे हात ठेविल्याने पवित्र आत्मा
मिळतो हें शिमोनाने पाहून त्यांस द्रव्य दाखवून
झटलें, १९ ज्या कोणावर मी हात ठेवीन त्याला
पवित्र आत्मा मिळावा, असी शक्ति मलाहि द्या.
२० तेव्हां पेत्रस त्याला बोलला, तुझें रुपें तुझ्या
बरोबर नाशास जावो; कारण कीं देवाची देणगी
पैक्याने विकत घ्यायाला त्वां कल्पिलें. २१ या
गोष्टीचा तुला भाग किंवा वांटा नाहीं, कां कीं देवा-
च्या समोर तुझें अंतःकरण नीट नाहीं. २२ तर
या आपल्या दुष्टतेचा तूं पश्चात्ताप करून देवाची
प्रार्थना कर, झणजे तुझ्या अंतःकरणांतल्या कल्प-
नेची तुला कदाचित क्षमा होईल. २३ कां कीं
तूं घोर कडूपणांत व अन्यायाच्या बंधनांत आहेस,
असें माझ्या दृष्टीस येतें. २४ तेव्हां शिमोनाने
उत्तर दिल्हें कीं, तुह्मी सांगितलें त्यांतलें कांहीं
मजवर येऊं नये झणून तुह्मीच माझ्या साठीं
प्रभूची प्रार्थना करा. २५ नंतर त्यानी साक्ष
देऊन व प्रभूचें वचन सांगून, यरूशलेमाकडे
जातां जातां शोमरोनी लोकांच्या बहुत गांवांत शुभ-
वर्त्तमान सांगितलें.

२६ नंतर प्रभूच्या दुताने फिलिप्पसाला असें
झटलें कीं, ऊठ, जी वाट यरूशलेमापासून गाजा-
कडे जाती, त्या वाटेने दक्षिणेकडे जा; ती रान आहे.
२७ तेव्हां तो उठून गेला, आणि पाहा, कोणी षंढ
हबशी मनुष्य हबशी लोकांची राणी कांदके इचा
प्रधान, तिच्या सर्व भांडारावर होता, तो यरूश-
लेमांत भजन करण्यासाठीं आला होता. २८ तो
परतून जातांना आपल्या रथांत बसून यशाया भवि-
ष्यवाद्याचा ग्रंथ वाचीत होता. २९ तेव्हां फि-
लिप्पसाला आत्म्याने सांगितलें कीं, जाऊन त्या
रथासीं मीळ. ३० तेव्हां फिलिप्पस जवळ
धावत जाऊन त्याला यशाया भविष्यवाद्याची ग्रंथ
वाचतांना ऐकून झणाला, तूं वाचतोस तें तुला
समजतें काय? ३१ त्याने झटलें कीं, कोणी
मला दाखविल्यावांचून मला कसें समजेल? मग
त्याने फिलिप्पसाला आपल्या बरोबर बसायाला
वरतें बोलाविलें. ३२ तेव्हां शास्त्रांतील हा
लेख तो वाचीत होता कीं, त्याला मेंढरासारिखें
वधासाठीं नेलें, आणि कोंकरूं आपल्या कातरण-
ाऱ्याच्या पुढें मुकें असतें, तसें त्याने आपलें तोंड
उघडिलें नाहीं. ३३ जुलमाने त्याचा न्याय हरला,
आणि त्याच्या पिढीचें वर्णन कोण करील! कां
कीं त्याचें आयुष्य पृथ्वींतून सरून गेलें. ३४
तेव्हां षंढाने फिलिप्पसाला उत्तर दिल्हें, मी तुला
विनंती करितों कीं, भविष्यवादी कोणाविषयीं असें
झणतो, आपल्याविषयीं किंवा दुसऱ्या कोणाविषयीं?
३५ तेव्हां फिलिप्पसाने तोंड उघडून त्याच लेखाप-
सून प्रारंभ करून येशूचें शुभवर्त्तमान त्याला सांगि-
तलें. ३६ मग वाटेने जातां जातां ते कोणत्या एका
पाण्याकडे आले, तेव्हां षंढ झणाला, पाहा, पाणी
आहे, मला बाप्तिस्मा घेण्यास काय अडचण आहे?
३७ फिलिप्पसाने झटलें कीं, जर तूं आपल्या सर्व
अंतःकरणाने विश्वास धरितोस तर योग्य आहे.
तेव्हां त्याने उत्तर दिल्हें कीं, येशू ख्रीस्त देवाचा
पुत्र आहे, असा मी विश्वास धरितों. ३८ तेव्हां
त्याने रथ उभा करायाची आज्ञा केली; मग फि-
लिप्पस व षंढ असे ते उभयतां पाण्यांत उतरले,
आणि त्याने त्याला बाप्तिस्मा दिल्हा. ३९ आणि
ते पाण्यांतून वर आले तेव्हां प्रभूच्या आत्म्याने
फिलिप्पसाला काढून नेलें, झणून त्याला षंढाने
अणखी पाहिलें नाहीं, नंतर तो आपल्या वाटेने
हर्ष करीत चालला. ४० फिलिप्पस तर अजो-
तस नगरांत सांपडला, आणि कैसरीयापर्यंत जे
गांव लागले त्यांमध्यें फिरतां फिरतां त्याने शुभव-
र्त्तमान गाजविलें.

## अध्याय ९.

शौल तर तोंपर्यंत प्रभूच्या शिष्यांस धमका-
वण्या व घात करण्याविषयीं फार आवेशी
असतां, प्रमुख याजकाकडे जाऊन, २ त्याने त्याज-
पासीं दमास्कसांतल्या सभांस असीं पत्रें मागितलीं
कीं, त्याला त्या मार्गांतले कोणी पुरुष किंवा बायका
सांपडल्या तर त्याने त्यांस बांधून यरूशलेमांत

ाणावें. ३ मग जातां जातां असें झालें कीं तो
ामास्कसाजवळ पोहंचला, तेव्हां त्याच्या सभोंवतें
ाकाशापासून प्रकाश अकस्मात चमकला. ४
ाव्हां तो भूमीवर पडला, आणि त्याने असी वाणी
ापणासीं बोलतां ऐकिली कीं, शौला, शौला, माझा
ाठलाग कां करितोस? ५ तेव्हां तो ह्मणाला,
प्रभू, तूं कोण आहेस? प्रभूने ह्मटलें कीं, ज्या
शूचा तूं पाठलाग करितोस तोच मी आहें, कांट्यां-
र लात मारणें हें तुला कठीण. ६ तेव्हां तो
ांपून व विस्मित होऊन बोलला, हे प्रभू, म्या काय
रावें ह्मणून तूं इच्छितोस? प्रभूने त्याला ह्मटलें,
ाठ व नगरांत जा, ह्मणजे तुला जें करावें लागतें
तुला कोणी सांगेल. ७ त्याच्या बरोबर जे
ानुष्य जात होते ते तर स्तब्ध उभे राहिले, त्यानी
ाणी ऐकिली खरें, पण कोणाला पाहिलें नाहीं.
मग शौलाने भूमीवरून उठून डोळे उघडल्या-
र त्याच्या दृष्टीस कोणी पडला नाहीं, मग त्यानी
ााला हातीं धरून दमास्कसांत नेलें. ९ तेथें
ो तीन दिवस अंधळा होता आणि त्याने कांहीं
ाालें पिलें नाहीं.

१० अणखी दमास्कसांत अनान्या नामक
ाोणीएक शिष्य होता, आणि त्याला प्रभु दृष्टांताने
ाणाला, हे अनान्या. त्याने ह्मटलें कीं, हे प्रभू,
ाहा, मी एथें आहें. ११ मग प्रभु त्याला
ाणाला, उठून नीट ह्मटलेल्या रस्त्यांत जा, आणि
ाहूदा याच्या घरीं शौल नामक तार्ससकर याचा
ाोध कर, कां कीं पाहा, तो प्रार्थना करीत आहे.
१२ आणि त्याने दृष्टांत पाहिला आहे कीं, कोणी
ानान्या नांवाच्या माणसाने आंत येऊन डोळे नीट
ाोण्यासाठीं आपल्यावर हात ठेविला. १३ तेव्हां
ानान्याने उत्तर केलें कीं, हे प्रभू, यरूशलेमां-
ाल्या तुझ्या पवित्र लोकांस त्या माणसाने किती
ापद्रव दिल्हा, असें बहुतांपासून म्या त्याजविषयीं
ाकिलें आहे, १४ आणि एथेंहि तुझें नांव घेणा-
ाा सर्वांस बांधावें, असा मुख्य याजकांपासून त्याला
ाधिकार मिळाला आहे. १५ तेव्हां प्रभूने त्याला
ाटलें, जा, कां कीं विदेशी लोक व राजे व इस्रा-
ाल लोक यांच्या समोर माझें नांव सांगण्याकरितां
ा माझें निवडलेलें पात्र आहे. १६ आणि
ाला माझ्या नांवासाठीं किती दुःख सोसावें लागेल
मी त्याला दाखवीन. १७ तेव्हां अनान्या निघून
ाा घरीं गेला, आणि त्याजवर हात ठेवून ह्मणाला,
शौल भावा, तूं वाटेने येत होतास, तेव्हां जो येशू
तुला दिसला, त्या प्रभूने मला पाठविलें आहे,
यासाठीं कीं तुला दृष्टि यावी आणि पवित्र आत्म्याने
त्वां परिपूर्ण व्हावें. १८ लागलेंच त्याच्या डो-
ळ्यांवरून खपल्यांसारिखें कांहींसें पडलें, तेव्हांच
त्याला दृष्टि आली, आणि त्याने उठून बाप्ति-
स्मा घेतला. १९ मग अन्न खाल्ल्यावर त्याला
शक्ति आली; आणि शौल दमास्कसांतल्या शि-
ष्यांबरोबर कांहीं दिवस होता. २० त्याने
लागलेंच सभास्थानांमध्यें ख्रीस्ताविषयीं गाजविलें
कीं, तो देवाचा पुत्र आहे. २१ तेव्हां सर्व ऐक-
णारे थक्क होऊन बोलले कीं, यरूशलेमांत हें
नांव घेणाऱ्यांचा नाश जो करीत होता तो हाच
नव्हे काय? आणि त्यांस बांधून मुख्य याजकांकडे
न्यावें ह्मणूनच हा एथें आला नव्हता काय? २२
पण शौलाला अणखी सामर्थ्य झालें, ह्मणून त्याने
हाच ख्रीस्त आहे असें स्थापून जे यहूदी लोक
दमास्कसांत राहत होते त्यांस कुंठित केलें.

२३ तेव्हां बहुत दिवस भरल्यावर यहूदी लोकानी
त्याला जीवें मारायाचा विचार मांडिला. २४ पण
त्यांचा कट शौलाला समजला; ते तर त्याला
मारायाकरितां रात्रंदिवस दरवाजे राखीत होते.
२५ तेव्हां शिष्यानी त्याला रात्रीस घेऊन पाटींत
बसवून कोटावरून खालीं सोडिलें. २६ मग
शौल यरूशलेमांत येऊन शिष्यांसीं मिळायाला
झटला, परंतु तो शिष्य आहे असा विश्वास न
धरितां ते सर्व त्याला भिऊं लागले. २७ तेव्हां
बर्णबाने त्याला घेऊन प्रेषितांकडे आणिलें, आणि
त्याने वाटेंत प्रभूला कसें पाहिलें, आणि तो त्यासीं
कसा बोलला, आणि दमास्कसांत त्याने येशूच्या
नांवें प्रशस्तपणें कसा उपदेश केला, हें त्यांस सांगि-
तलें. २८ तेव्हां तो त्यांबरोबर यरूशलेमांत
कांहीं दिवस आंत बाहेर येत जात होता. २९
प्रभु येशूच्या नांवाने निर्भयपणें बोलत होता, अणखी
हेल्लेनी लोकांसीं वाद प्रतिवाद करीत होता; तेव्हां
ते त्याला मारायास योजूं लागले. ३० हें
भावांस समजलें तेव्हां त्यानी त्याला कैसारियांत
नेऊन तार्ससास पाठविलें. ३१ तेव्हां सर्व यहूदा
व गालील व शोमरोन या देशांतील मंडळ्यांस
शांति झाली, आणि त्या दृढ होऊन आणि
प्रभूच्या भयाने व पवित्र आत्म्याच्या शांतवनाने
चालून वाढत गेल्या.

३२ मग असें झालें कीं, पेत्रस सर्व प्रांतांत
फिरत असतां लुद्दा गांवांत जे पवित्र राहत
होते त्यांजकडे खालीं गेला. ३३ तेथें त्याला
एन्यास नामक कोणी माणूस अढळला, तो
वातरोगी होऊन आठ वर्षें खाटेवर पडला होता.
३४ आणि त्याला पेत्रसाने ह्मटलें, ऐन्यासा,
येशू ख्रीस्त तुला बरें करितो, ऊठ व आपलें अंथ-
रूण नीट कर; तो लागलाच उठला. ३५ नंतर
लुद्दा व शारोन यांतील सर्व राहणारे त्याला
पाहून प्रभूकडे फिरले.

३६ आणखी याप्पेमध्यें टबीथा, ह्मणजे दर्कस,
या नांवाची कोणीएक शिष्यीण होती, ती सत्कर्में व
गरिबांस देणें असीं कर्में करीत असे त्याकडे तिचें
चित्त लागलें होतें. ३७ आणि असें झालें कीं,
त्या दिवसांमध्यें ती रोगी होऊन मेली, तेव्हां
त्यांनी तिला धुऊन माडीवर ठेविलें. ३८ आणि
लुद्दा गांव याप्पे गांवाच्या जवळ होता, तेथें पेत्रस
आहे असें शिष्यांनी ऐकिलें, ह्मणून त्यांनी दोघां
जणांस पाठवून त्याला विनंती केली कीं, आह्माकडे
येण्याला उशीर करूं नको. ३९ तेव्हां पेत्रस
उठून त्यांजबरोबर गेला. तो पोहंचल्यावर त्यांनी
त्याला माडीवर नेलें, तों त्याजवळ सर्व विधवा
उभ्या राहून रडत होत्या, आणि दर्कस त्यांच्या
जवळ होती तेव्हां तिने ज्या बंड्या व वस्त्रें केलीं
होतीं तीं दाखवीत होत्या. ४० परंतु पेत्रसाने
त्या सर्वांस बाहेर काढिलें व गुडघे टेंकून प्रार्थना
केली, आणि कुडीकडे वळून ह्मटलें, अगे टबीथे,
ऊठ; तेव्हां तिने आपले डोळे उघडिले, आणि
पेत्रसाला पाहून ती उठून बसली. ४१ मग
त्याने तिला हात देऊन उठविलें, आणि पवित्रांस
व विधवांस बोलावून ती जीवंत असी उभी
केली. ४२ मग सर्व याप्पेमध्यें हें प्रसिद्ध झालें,
आणि बहुतांनी प्रभूवर विश्वास ठेविला. ४३
आणि असें झालें कीं तो बहुत दिवस याप्पेमध्यें
कोणीएक शिमोन चांभार याजवळ राहिला.

## अध्याय १०.

कैसरियामध्यें कर्नेल्यस नामक कोणीएक पुरुष
इतलीक ह्मटलेल्या पलटणींत शतपति होता.
२ तो धार्मिक व आपल्या अवघ्या कुटुंबासुद्धां
देवाला भीत होता, तो लोकांसहि फार दानधर्म
करीत असे व देवाची प्रार्थना नित्य करीत असे.
३ त्याने दिवसाच्या सुमारें तिसऱ्या प्रहरीं साक्षात्
असा दृष्टांत पाहिला कीं, आपल्याकडे देवाचा
दूत येऊन, कर्नेल्यसा, असें ह्मणाला. ४ तेव्हां
त्याजकडे लक्ष लावून तो भयभीत होऊन ह्म-
णाला, हे प्रभू, काय आहे? मग तो त्यासीं
बोलला कीं, तुझ्या प्रार्थना व तुझे दानधर्म हीं
देवासमोर स्मरणासाठीं वरतीं आलीं आहेत. ५
तर आतां याप्पेस माणसांस पाठवून, पेत्रस ह्मट-
लेला शिमोन याला बोलावून आण. ६ कोणी
शिमोन चांभार यापासीं तो राहिला आहे, याचें
घर समुद्राच्या कांठीं आहे, तुला काय करावें
लागतें हें तो तुला सांगेल. ७ तेव्हां जो दूत
कर्नेल्यसाबरोबर बोलत होता तो गेल्यानंतर त्याने
आपल्या चाकरांतून दोघांस व आपल्यापासीं
नित्य उभे राहणाऱ्यांतील एका धार्मिक शिपायाला
बोलाविलें, ८ आणि त्यांजवळ सर्व गोष्टी सांगून
त्यांस याप्पेस पाठविलें. ९ आणि ते दुसऱ्या
दिवसीं वाटेने चालतां चालतां नगराजवळ आल्या-
वर, सुमारें दुपारीं पेत्रस धाब्यावर प्रार्थना करा-
यास गेला. १० तेव्हां त्याला मोठी भूक लागून,
खावें असें त्याला वाटलें, आणि जेवणाची तयारी
होत आहे इतक्यांत तो भानरहित झाला. ११
मग आकाश फाटलेलें आणि मोठ्या चादऱ्या-
सारिखें कोणीएक पात्र चार कोपऱ्यांसीं बांधलेलें
पृथ्वीवर आपल्याकडे उतरत आहे, असें त्याने
पाहिलें. १२ त्यामध्यें पृथ्वीवरलीं सर्व चतुष्पदें व
श्वापदें व वळवळणारे जंतु व आकाशांतील पांखरें
होतीं. १३ मग त्यासीं असी वाणी झाली कीं,
पेत्रसा, ऊठ व मारून खा. १४ परंतु पेत्रस
ह्मणाला, नको प्रभू, कां कीं अपवित्र किंवा अशुद्ध
असें कांहीं म्या कधीं खाल्लें नाहीं. १५ मग
दुसऱ्याने त्यासीं वाणी झाली कीं, देवाने शुद्ध केलें
तें तूं अपवित्र मानूं नको. १६ ही गोष्ट तीन वेळा
झाली, नंतर पात्र आकाशांत पुन्हा वर घेतलें.

१७ मग आपण पाहिलेला दृष्टांत काय असेल
याविषयीं पेत्रसाच्या मनांत संशय आला; इत-
क्यांत पाहा, कर्नेल्यसाने पाठविलेलीं माणसें शि-
मोनाचें घर शोधून दारासीं उभीं राहिलीं. १८
आणि त्यांनी हाक मारून विचारिलें कीं, पेत्रस
ह्मटलेला शिमोन एथें उतरला आहे काय?
१९ पेत्रस तर त्या दृष्टांताविषयीं विचार करीत
असतां, आत्मा त्याला ह्मणाला, पाहा, तीन माणसें

ह्मा शोध करितात. २० तर उठून खालीं उतर,
आणि कांहीं संशय न धरितां त्यांच्या संगतीं जा,
कां तर म्या त्यांस पाठविलें आहे. २१ तेव्हां
पेत्रस आपल्याकडे कर्नेल्यसाने पाठविलेलीं माणसें
यांपासीं उतरून जाऊन ह्मणाला, पाहा, ज्याचा तुह्मी
शोध करितां तो मी आहें, तुह्मी कोणत्या कारणा-
तव आलां आहां? २२ तेव्हां त्यानी ह्मटलें कीं,
कर्नेल्यस शतपति न्यायी माणूस देवाला भीत
असतो, त्याजविषयीं सर्व यहूदी लोक साक्षी
आहेत, त्याला पवित्र दुताने सुचविलें आहे कीं,
आपल्या घरीं तुला बोलावून तुजपासून गोष्टी ऐका-
व्या. २३ मग त्याने त्यांस आंत बोलावून पाहु-
णचार केला, नंतर दुसऱ्या दिवसीं पेत्रस त्यांच्या
बरोबर निघाला, आणि याप्पेंतील भाऊ यांतील
कित्येक त्यांच्या बरोबर गेले. २४ आणि दुसऱ्या
दिवसीं कैसरियास पोहंचले, तेथें कर्नेल्यस आप-
ल्या सोयऱ्यांस व इष्टमित्रांस मिळवून त्यांची वाट
पाहत होता. २५ मग असें झालें कीं, पेत्रस आंत
जात होता तेव्हां कर्नेल्यस त्याला भेटून पायां
पडून नमला. २६ पण पेत्रस त्याला उठवून ह्मणाला,
उभा राहा, मीहि मनुष्य आहें. २७ मग तो
त्याच्या बरोबर संभाषण करीत आंत गेला, तेव्हां
बहुत लोक मिळाले असें पाहून, २८ त्याने
त्यांस ह्मटलें कीं, यहूदी माणसानें दुसऱ्या जाती-
च्यासीं मिळावें किंवा त्यापासीं जावें, हा त्याला
अधर्म आहे, असें तुह्माला ठाऊक आहे; पण को-
णीहि माणूस अपवित्र किंवा अशुद्ध ह्मणूं नये,
असें देवाने मला दाखविलें आहे. २९ यास्तव
बोलावलें असतां मी आडवें घेतल्यावांचून आलों,
तर मी विचारितों तुह्मी मला कशासाठीं बोलाविलें?
३० तेव्हां कर्नेल्यसाने ह्मटलें, आज चार दिवस
झाले, हा वेळपर्यंत मी उपास करीत होतों आणि
तिसऱ्या प्रहरीं आपल्या घरीं प्रार्थना करीत होतों,
तेव्हां पाहा, शुभ्र वस्त्र ल्यालेला माणूस माझ्या
पुढें उभा राहून ह्मणाला, ३१ कर्नेल्यसा, तुझी
प्रार्थना ऐकण्यांत आली, आणि तुझीं दानें देवाच्या
समोर आठविलेलीं आहेत. ३२ यास्तव याप्पेस
पाठवून पेत्रस ह्मटलेला शिमोन याला एथें बो-
लाव, तो समुद्राच्या कांठीं शिमोन चांभाराच्या
घरीं उतरला आहे, तो येऊन तुजसीं बोलेल. ३३
ह्मणून म्या तुजकडे लागलेंच पाठविलें; तुह्मी
आलां हें बरें केलें; तर आतां जें जें देवाने तुह्माला
सांगितलें असेल तें ऐकावें, ह्मणून आह्मी सर्व एथें
देवासमोर आहों.

३४ तेव्हां पेत्रस तोंड उघडून बोलला, मला
वास्तवीक समजतें कीं देव पक्षपाती नाहीं, ३५
तर सर्व देशांत जो त्याला भितो व न्यायीपण
करितो तो त्याला मान्य आहे. ३६ आतां तर
येशू ख्रीस्त, तोच सर्वांचा प्रभु, त्याकडून देवाने
शांतीचें सुवर्त्तमान सांगतांना जें वचन इस्राएल
संतानांस पाठविलें तें तुह्मी जाणतां. ३७ कोणतें
तर, योहान्नाने जो बाप्तिस्मा गाजविला त्यानंतर
गालीलापासून प्रारंभ करून सर्व यहूदामध्यें जी
गोष्ट प्रसिद्ध झाली, ३८ ती नाजोरी येशूविष-
यींची, कीं त्याला देवाने पवित्र आत्मा व सामर्थ्य
यांचा अभिषेक केला, तो सत्कर्मे करीत व सैताना-
कडून त्रासलेल्या सर्वांस बरें करीत फिरत असे;
कां कीं देव त्याच्या बरोबर होता. ३९ आणि
त्याने यहूद्यांच्या देशांत व यरूशलेमांत जें जें
केलें त्या सर्वांचे साक्षी आह्मी आहों; त्यानी त्याला
खांबावर टांगून मारिलें. ४० त्याला देवाने तिस-
ऱ्या दिवसीं उठून तो प्रगट व्हावा असें केलें.
४१ सर्व लोकांस नव्हे, तर जे साक्षी देवाने पूर्वी
नेमून ठेविलेले त्या आह्मास प्रगट केलें; ते आह्मी
तो मेलेल्यांमधून उठल्यानंतर, त्याच्या बरोबर
जेवलों व प्यालों. ४२ आणि त्याने आह्मास
आज्ञा केली कीं, लोकांस गाजवावें व असी साक्ष
पटवावी कीं, जीवंतांचा व मेलेल्यांचा जो न्याया-
धीश देवाने नेमला, तो हाच आहे. ४३ त्याज-
विषयीं सर्व भविष्यवादी साक्ष देतात कीं, त्याजवर
विश्वास ठेवणारा प्रत्येक त्याच्या नांवाने पापांची
क्षमा पावेल.

४४ पेत्रस हे शब्द बोलत असतांच, वचन
ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा पडला. ४५
मग विदेशी लोकांस पवित्र आत्मा दिल्हा आहे,
असें पाहून जे विश्वासणारे सुंती पेत्रसाबरोबर आले
होते त्या सर्वांस आश्चर्य वाटलें. ४६ कां तर परभा-
षानी ते बोलतां व देवाला स्तवितां त्यानी ऐकिलें.
४७ तेव्हां पेत्रसाने ह्मटलें, हे आमच्या सारिखे
पवित्र आत्मा पावले, त्यांचा बाप्तिस्मा करण्याक-
रितां पाणी कोणाच्याने मना करवेल? ४८ मग
प्रभूच्या नांवाने त्यांचा बाप्तिस्मा करावा, असी
त्याने आज्ञा केली; नंतर कांहीं दिवस राहावें
ह्मणून त्यानी त्याला विनंती केली.

## अध्याय ११.

विदेशी लोकानीहि देवाचें वचन अंगीकारिलें,
असें वर्त्तमान प्रेषितानी व यहूद्यांतील भा-
वानी ऐकिलें. २ मग पेत्रस यरूशलेमास गेला
होता तेव्हां जे सुंतेचे ते त्यासीं वाद करीत बोलले
कीं, ३ असुंती माणसांमध्यें जाऊन त्यांच्या संगतीं
त्वां खाल्लें आहे. ४ तेव्हां पेत्रस आरंभापासून
अनुक्रमाने उलगडा करीत त्यांस ह्मणाला, ५
मी याप्पा नगरांत प्रार्थना करीत होतों, तेव्हां
भानरहित होऊन म्या दृष्टांत पाहिला, असा कीं,
कोणीएक पात्र उतरलें, तें मोठ्या चांदव्यासारिखें
चार कोंपऱ्यांनी आकाशांतून सोडलेलें मजपर्यंत
आलें. ६ त्याकडे म्या न्याहाळून पाहिलें, तों
पृथ्वीवरलीं चतुष्पदें व श्वापदें व वळवळणारे जंतु
व आकाशांतलीं पांखरें असीं दृष्टीस पडलीं. ७
नंतर म्या असी वाणी ऐकिली कीं, पत्रेसा, ऊठ
व मारून खा. ८ परंतु मी ह्मणालों, नको प्रभू,
कां कीं अपवित्र किंवा अशुद्ध असें कांहीं माझ्या
तोंडांत अझून कधीं आलें नाहीं. ९ मग दुस-
ऱ्याने आकाशांतून वाणीने मला उत्तर दिल्हें कीं,
देवाने शुद्ध केलें तें तूं अपवित्र मानूं नको. १०
असें तीनदां झालें, नंतर तीं अवघीं पुन्हा आका-
शांत वर ओढलीं. ११ तेव्हां पाहा, ज्या घरीं
मी होतों, तेथें लागलींच कैसरियांतून मजकडे पाठ-
विलेलीं तीन माणसें उभीं राहिलीं होतीं. १२
तेव्हां कांहीं संशय न धरितां त्यांच्या संगतीं जा,
ह्मणून आत्म्याने मला सांगितलें; मग हे साहा
भाऊहि मजबरोबर चालले, आणि आह्मी त्या
माणसाच्या घरांत गेलों. १३ तेव्हां त्याने आ-
ह्माला सांगितलें कीं, म्या आपल्या घरीं दूत पाहि-
ला, तो उभा राहून मजसीं बोलला कीं, माण-
सांस याप्पेस पाठवून पेत्रस ह्मटलेला शिमोन
याला बोलावून आण. १४ तो तुझें व तुझ्या
सर्व कुटुंबाचें ज्यांकडून तारण होईल अशा गोष्टी
तुला सांगेल. १५ मी बोलूं लागलों तेव्हां जसा
पहिल्याने आह्मावर तसा त्यांजवरहि पवित्र आत्मा
पडला. १६ तेव्हां प्रभूने सांगितलेली गोष्ट मला
आठवली कीं, योहान्न पाण्याने बाप्तिस्मा करीत
असे खरें, परंतु तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने
होईल. १७ तेव्हां ज्यानी प्रभु येशू ख्रीस्तावर
विश्वास ठेविला होता, त्या आह्मास आणि त्यांस
देवाने एकासारिखी देणगी दिल्ही, तर देवाला अड-
वावें असा मी कोण होतों? १८ हें ऐकून ते
उगेच राहिले, आणि देवाचें गौरव करीत बोलले
कीं, देवाने तर विदेशी लोकांसहि जीवनासाठीं
पश्चात्ताप दिल्हा आहे.

१९ आणखी स्तेफनसावरून जी जाचणूक
झाली होती तिजमुळें पांगलेले ते फैनीके व कुप्रस
व अंत्योखीया एथपर्यंत जाऊन, यहूद्यांस मात्र
देवाचें वचन सांगत असत. २० त्यांमध्यें कि-
त्येक कुप्रसी व कुरेनेकर माणसें होतीं, त्यानी
प्रभु येशूचें सुवर्त्तमान प्रसिद्ध करीत अंत्योखी-
यांत येऊन हेल्लेनी लोकांस सांगितलें. २१ तेव्हां
प्रभुचा हात त्यांजबरोबर होता, ह्मणून पुष्कळ
लोक विश्वास धरून प्रभूकडे फिरले. २२ त्या-
विषयींचें वर्त्तमान तर यरूशलेमांतल्या मंडळीच्या
कानीं आलें तेव्हां त्यानी बार्णबाला अंत्योखीया-
पर्यंत जाण्याकरितां पाठविलें. २३ तो तेथें जा-
ऊन व देवाची कृपा पाहून आनंद पावला, आणि
त्याने त्यांस बोध केला कीं, अंतःकरणांतल्या निश्च-
याने प्रभूकडे राहा. २४ कां तर तो चांगला
माणूस व पवित्र आत्म्याने व विश्वासाने परिपूर्ण
होता; तेव्हां मोठा समुदाय प्रभूकडे मिळाला.
२५ नंतर बार्णबा शौलाचा शोध करायाला तार्स-
सास गेला. २६ त्याचा शोध लागल्यावर त्याने
त्याला अंत्योखीयास आणिलें; मग असें झालें कीं,
त्यानी तेथें वर्षभर मंडळीमध्यें मिळून बहुत लो-
कांस शिकविलें; आणि शिष्यांस ख्रिस्ती हें नांव
पहिल्याने अंत्योखीयांत मिळालें.

२७ आणि त्या दिवसांमध्यें भविष्यवादी यरू-
शलेमापासून अंत्योखीयास आले. २८ तेव्हां
त्यांतील एक अगबस नामक याने उठून आत्म्या-
च्या योगें सुचविलें कीं, सर्व देशांत मोठा दुष्काळ
होणार आहे, तो दुष्काळ तर क्लौदस कैसाराच्या
वेळेस झाला. २९ तेव्हां शिष्यानी संकल्प केला
कीं, प्रत्येकाने आपापल्या शक्तिप्रमाणें यहूदांत
राहणाऱ्या भावांस निर्वाहासाठीं कांहीं पाठवून द्यावें.
३० मग त्यानी तसें करून बार्णबा व शौल यां-
च्या हातें वडिलांकडे पाठवून दिल्हें.

## अध्याय १२.

त्या वेळेस हेरोद राजाने मंडळींतल्या कित्ये-
कांस दुःख द्यावें ह्मणून हात घातला. २

ाणि योहानाचा भाऊ याकोब याला त्याने तर-
रीने मारिलें. ३ नंतर तें यहूदी लोकांच्या
मास उतरलें असें पाहून त्याने पेत्रसालाहि धरिलें.
व्हां बेखमीर भाकरींचे दिवस होते. ४ त्याला
ल्यावर त्याने बंदिशाळेंत ठेविलें; आणि त्याला
खण्यास शिपायांच्या चार चौकड्यांच्या स्वाधीन
लें, आणि वल्हांडण सण झाल्यावर त्याला लोकांत
हेर काढावें असा बेत केला. ५ याप्रमाणें पेत्रस
देशाळेंत राखिला, परंतु त्याजकरितां देवाजवळ
डळीची प्रार्थना एकाग्रतेने होत असे. ६ मग
रोद त्याला काढणार होता त्याच रात्रीं पेत्रस
न सांखळ्यांनी बांधलेला असा दोघां शिपायां-
ा मध्यें निजला होता, आणि पाहरेकरी दरवा-
ाच्या पुढें बंदिशाळा राखीत होते. ७ तेव्हां पाहा,
भूचा दूत त्याकडे आला आणि बंदिशाळेंत उजेड
डला, मग त्याने पेत्रसाच्या कुसीवर थापटून त्याला
गें करून ह्मटलें, लवकर ऊठ; तेव्हां त्याच्या
ातांतून सांखळ्या पडल्या. ८ मग दुताने त्याला
ांगितलें, कंबर बांध व जोडा पायांत घाल; तेव्हां
ाने तसेंच केलें. मग त्याला ह्मटलें, तूं आपलें
स्त्र पांघरून माझ्या मागें ये. ९ तेव्हां तो
ाघून त्याच्या मागें गेला, तरी दुताने केलें तें वास्त-
क असें त्याला कळलें नाहीं, पण आपण दृष्टांत
हतों, असें त्याला वाटलें. १० नंतर पहिला
दुसरा पाहरा ओलांडून, नगरांत जायाचा लो-
ंडी दरवाजा तेथपर्यंत आल्यावर, तो आपल्या
ापण त्यांसाठीं उघडला, मग ते बाहेर जाऊन
े एका मार्गांतून गेले, तेव्हांच दूत त्यापासून गेला.
१ मग पेत्रस शुद्धीवर येऊन ह्मणाला, आतां
ला खरेंच कळलें कीं, प्रभूने आपला दूत पाठवून
ला हेरोदाच्या हातांतून व यहूद्यांच्या सर्व अपेक्षे-
सून सोडविलें आहे. १२ हें मनांत आणून
ार्कस ह्मटलेल्या योहानाची आई मार्या इच्या घरीं
आला, तेथें बहुत लोक एकत्र मिळून प्रार्थना
ीत होते. १३ तेव्हां पेत्रस दरवाज्याच्या दिंडी-
ठोकीत असतां, रोदे नामक मुलगी कानवसा
ायास आली. १४ आणि तिने पेत्रसाची वाणी
ोळखून हर्षामुळें दरवाजा न उघडतां, आंत धावत
ाऊन सांगितलें कीं, पेत्रस दरवाज्यापुढें उभा
ाहिला आहे. १५ तेव्हां त्यांनी तिला ह्मटलें
ां, चळलीस; परंतु तिने हडसून सांगितलें कीं
सेंच आहे. तेव्हां ते ह्मणाले, त्याचा दूत असेल.
१६ मग पेत्रस ठोकीत ठोकीत असतां, ते दरवाजा
उघडून त्याला पाहून थक्क झाले. १७ तेव्हां
उगेंच राहा, ह्मणून त्याने हाताने त्यांस खुणाविलें,
मग आपल्याला प्रभूने बंदिशाळेंतून कसें काढिलें हें
त्यांस सांगितलें, अणखी ह्मटलें कीं, हें याकोबाला
व भावांस सांगा. तेव्हां तो निघून दुसऱ्या ठिकाणीं
गेला. १८ मग दिवस उगवल्यावर, पेत्रस तर
काय झाला ! असी शिपायांमध्यें मोठी गडबड
झाली. १९ नंतर हेरोदाने त्याचा शोध केला
असतांहि शोध लागला नाहीं, ह्मणून त्याने पाह-
रेकऱ्यांची चौकसी करून त्यांस ठार मारावें, असी
आज्ञा दिल्ही. मग तो यहूदाहून केसरियांत
येऊन राहिला.
२० आणि हेरोद सोरकरांसीं व सीदोनकरांसीं
वैरभाव करीत होता, परंतु त्यांनी एकचित्ताने त्याज-
कडे येऊन राजाच्या रंगमहालावर जो बलास्तस
त्याला समजावून समेट मागितला, कां कीं राजाच्या
देशाने त्यांच्या देशाचें पोषण होत असे. २१
तेव्हां नेमलेल्या दिवसीं हेरोदाने बादशाही वस्त्रें
लेवून व आसनावर बसून त्यांसीं लौकिक भाषण
केलें. २२ तेव्हां लोकांनी आरोळी केली कीं, ही
देवाची वाणी आहे, मनुष्याची नव्हे. २३ त्याने
देवाला गौरव दिल्हें नाहीं, ह्मणून प्रभूच्या दुताने
लागलेंच त्याला मारिलें, नंतर किड्यांनी त्याचा
देह खाऊन तो मरण पावला.
२४ देवाचें वचन तर वाढत विस्तारत चाललें.
२५ मग बार्णबा व शौल हे तें कार्य सिद्धीस नेऊन
मार्कस ह्मटलेल्या योहानालाहि बरोबर घेऊन
यरूशलेमापासून माघारे आले.

## अध्याय १३.

त्या वेळेस बार्णबा व निगर ह्मटलेला शि-
मोन व लुक्यस कुरेनेकर व ज्याचें पाळण
हेरोद राजाच्या बरोबर झालें होतें तो मनाईन
व शौल, हे अंत्योखीयांतल्या मंडळींत भविष्य-
वादी व उपदेशक होते. २ ते प्रभूची सेवा व
उपास करीत असतां पवित्र आत्म्यानें सांगितलें कीं,
बार्णबा व शौल यांस ज्या कार्यासाठीं म्या निव-
डिलें आहे, त्यासाठीं त्यांस मजकरितां निराळें
करून ठेवा. ३ तेव्हां त्यांनी उपास व प्रार्थना
करून व त्यांजवर हात ठेवून त्यांची रवानगी केली.
४ याप्रमाणें ते पवित्र आत्म्याने पाठविलेले सलु-

किया नगरांत उतरून तेथून कुप्रसास तारवांत
बसून गेले. ५ आणि सलमीस गांवांत जाऊन
त्यानी देवाचें वचन यहूद्यांच्या सभास्थानांमध्यें
प्रसिद्ध केलें; आणि योहान्न हा त्यांचा सेवक
होता. ६ मग बेटामधून ते पाफस नगरापर्यंत
गेल्यावर कोणीएक यहूदी जादूगीर बार्येशू नांवाचा
खोटा भविष्यवादी त्यांस मिळाला. ७ तो सर्ग्यस
पौलस विवेकी मनुष्य तेथील अधिकारी याच्या
जवळ होता; याने बार्णबा व शौल यांस बोलावून
देवाचें वचन ऐकायास मागितलें. ८ एलुमास
जादूगीर (याच्या नांवाचा अर्थ तसाच आहे,) याने
तर त्यांस अडवून अधिकाऱ्याला विश्वासापासून
फिरवायास प्रयत्न केला. ९ तेव्हां शौल, जो
पौलसहि ह्मटलेला, तो पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन
त्याजकडे दृष्टि लावून बोलला, १० अरे सर्व
कपटाने व सर्व दुष्टाईने भरलेल्या, सैतानाच्या
पुत्रा, अवघ्या न्यायीपणाच्या वैऱ्या, तूं प्रभूचे नीट
मार्ग विपरीत केल्यावांचून राहणार नाहींस काय?
११ तर आतां पाहा, प्रभूचा हात तुजवर पडला
आहे, आणि तूं अंधळा होसील, आणि कांहीं
वेळपर्यंत सूर्य तुला दिसणार नाहीं. लागलेंच
धुकें व अंधार त्याजवर पडला, मग तो हिंडतां
फिरतां आपल्याला कोणी हातीं धरून चालवील
काय? असा शोध करूं लागला. १२ तेव्हां जें
झालें तें पाहून अधिकाऱ्याने प्रभूच्या उपदेशावरून
आश्चर्य मानून विश्वास धरिला.

१३ मग पौलसाची मंडळी पाफसाहून निघून
पांफुल्यांतील पर्गास गेली, तेव्हां योहान्न
त्यांस सोडून माघारा यरूशलेमास गेला. १४
नंतर ते पर्गाहून निघून पिसिद्यांतील अंत्योखी-
यास गेले, आणि शाब्बाथ दिवसीं सभास्थानांत
जाऊन बसले. १५ तेव्हां नेमशास्त्र व भविष्य-
लेख यांचें वाचणें झाल्यावर, सभेच्या अधिका-
ऱ्यानी त्यांजकडे निरोप पाठविला कीं, भावानो,
लोकांस बोध करण्याचें वचन तुह्मापासीं असलें
तर बोला. १६ तेव्हां पौलस उभा राहून व
आपल्या हाताने खुणावून ह्मणाला, अहो इस्राएल
माणसानो, व देवाचें भय बाळगणाऱ्यानो, ऐका.
१७ या इस्राएल लोकांच्या देवाने आमच्या पूर्व-
जांस निवडून घेतलें, आणि ते लोक मिसर देशांत
प्रवासी असतां त्याने त्यांस वाढविलें, आणि मोठ्या
पराक्रमेंकरून त्यांस तेथून काढिलें. १८ मग
सुमारें चाळीस वर्षांपर्यंत त्याने त्यांची वर्त्तणूक
रानांत सोसली. १९ नंतर त्याने कनान देशां-
तील सात राज्यें बुडवून तेथील भूमि त्यांस वतन
करून दिल्ही. २० आणि त्यानंतर त्याने सुमारें
साडे चारशें वर्षें शमुवेल भविष्यवादी याच्या
वेळेपर्यंत त्यांस न्यायाधीश नेमून दिल्हे. २१
मग त्यानी राजा मागितला, तेव्हां देवाने बन्यामिन
वंशांतील माणूस किशाचा पुत्र शौल चाळीस
वर्षांपर्यंत त्यांस दिल्हा. २२ नंतर त्याने त्याला
दूर करून त्यांचा राजा होण्यासाठीं दाविदाला
उठविलें, आणि त्याविषयीं साक्ष देऊन ह्मटलें कीं,
माझ्या अंतःकरणासारिखा माणूस यशायाचा पुत्र
दावीद मला मिळाला आहे, तो माझ्या सर्व इच्छा
पूर्ण करील. २३ त्याच्या संततीपासून देवाने
वचनाप्रमाणें इस्राएलासाठीं तारणारा येशू उठ-
विला आहे. २४ त्याच्या येण्याच्या पूर्वी योहा-
न्नाने पश्चात्तापाचा बाप्तिस्मा सर्व इस्राएल लोकां-
मध्यें गाजविला. २५ आणि योहान्न आपली
धांव पूर्ण करीत असतां ह्मणाला, मी कोण आहें
ह्मणून तुह्मास वाटतें? मी तो नव्हें, पण पाहा,
ज्याच्या पायांतील वाहणा सोडायास देखील मी
योग्य नाहीं, असा कोणी माझ्या मागें येत आहे.
२६ अहो भावानो, आब्राहामाच्या वंशांतील पुत्रा-
नो, आणि तुमच्यांतील देवाचें भय धरणाऱ्यानो,
त्या तुह्माला या तारणाचें वचन पाठविलें आहे.
२७ कां कीं यरूशलेमांतील राहणाऱ्यानी व त्यां-
च्या अधिकाऱ्यानी त्याला, आणि प्रति शाब्बाथ
दिवसीं वाचलेलीं भविष्यवाद्यांचीं वाक्येंहि न जाणून
त्याला दोषी ठरविल्याने तीं पूर्ण केलीं. २८
आणि मरणदंडाचें कोणतेंहि कारण त्यांस सांपडलें
नसतांहि, याला मारावें, असी त्यानी पिलातसा-
पासीं विनंती केली. २९ मग त्याजविषयीं लिहि-
लेलें सर्व पूर्ण करून, त्यानी खांबावरून त्याला
उतरून कबरेमध्यें ठेविलें. ३० परंतु देवाने त्याला
मेलेल्यांमधून उठविलें. ३१ त्याच्या संगतीं जे
गालीलापासून यरूशलेमांत आले त्यांच्या दृष्टीस
तो अनेक दिवस पडला, त्याचे ते लोकांस साक्षी
आहेत. ३२ आणि जें वचन पूर्वजांस प्राप्त झालें
त्याचें शुभवर्त्तमान आह्मी तुह्मास सांगतों कीं,
३३ त्यांचीं लेंकरें जे आह्मी त्या आह्माकरितां
देवाने येशूला पुन्हा उठवून तें वचन पूर्ण केलें
आहे. त्याप्रमाणें दुसऱ्या गीतांत लिहिलें आहे कीं,

माझा पुत्र आहेस, आज म्या तुला जन्मविलें
ाहे. ३४ तर त्याने त्याला मेलेल्यांमधून उठ-
ालें, असें कीं त्याला पुन्हा कुजण्याचा अनुभव
ोणार नाहीं, याविषयीं त्याने असें सांगितलें कीं,
ी दाविदावरल्या निश्चययुक्त दया तुह्मावर करीन.
५ यास्तव अणखी एका गीतांत ह्मणतो, तूं आप-
या पवित्राला कुजण्याचा अनुभव होऊं देणार
ाहींस. ३६ तर दावीद आपल्या पिढीमध्यें
वाच्या इच्छेप्रमाणें सेवा करून निजला, आणि
वडिलांजवळ ठेविल्यावर त्याला कुजण्याचा अनु-
ाव झाला. ३७ परंतु ज्याला देवाने उठविलें
याला कुजण्याचा अनुभव झाला नाहीं. ३८
ास्तव अहो भावानो, तुह्मास हें ठाऊक असो कीं,
ाजकडून पापांची क्षमा तुह्मास सांगितली आहे.
९ आणि ज्यांविषयीं मोशाच्या नेमशास्त्राकडून
मच्याने न्यायी ठरवत नाहीं, त्या अवघ्यांवि-
ायीं प्रत्येक विश्वासणारा याजकडून न्यायी ठरतो.
१० यास्तव जपा, नाहीं तर भविष्यवाद्यानी जें
ह्मटलें तें तुह्मावर येईल; ४१ तें असें कीं,
अहो धिक्कार करणाऱ्यानो, पाहून आश्चर्य माना,
ा नाहींसे व्हा, का कीं मी तुमच्या दिवसांत कार्य
करितों, तें तुह्माला कोणी सांगितलें तरी तुह्मी
विश्वास धरणार नाहीं.

४२ मग यहूदी लोक सभास्थानांतून गेल्यानंतर
विदेश्यानी विनंती केली कीं, आह्मास पुढल्या शा-
ब्बाथांत या गोष्टी सांगा. ४३ आणि सभा उठ-
ल्यावर, यहूद्यांतील व धार्मिक मतानुसारी यांतील
बहुतेक पौलस व बार्णबा यांच्या मागें गेले, यानी
त्यांस बोलतां बोलतां समजाविलें कीं, देवाच्या
कृपेंत राहा. ४४ नंतर पुढल्या शाब्बाथांत बहुत-
करून सर्व नगर देवाचें वचन ऐकायाला जमलें.
४५ तेव्हां यहूदी लोक समुदायास पाहून क्रोधा-
क्रांत झाले, आणि पौलसाने जें सांगितलें त्याविरुद्ध
बोलतां व दुर्भाषण करितां त्यानी विवाद केला.
४६ तेव्हां पौलस व बार्णबा हे प्रशस्त बोलले
कीं, देवाचें वचन तुह्मास प्रथम सांगायाचें अगत्य
होतें, परंतु तुह्मी त्याचा अव्हेर करितां आणि
आपणांस सर्वकाळच्या जीवनाला अयोग्य ठरवितां,
यामुळें पाहा, आह्मी विदेशी लोकांकडे फिरतों.
४७ कारण कीं प्रभूने आह्मास असी आज्ञा दिल्ही
आहे कीं, म्या तुला विदेशी लोकांस प्रकाश असें
करून ठेविलें आहे, यासाठीं कीं पृथ्वीच्या शेव-
टापर्यंत त्वां तारण असें व्हावें. ४८ हें ऐकून
विदेशी लोक आनंद पावले, आणि प्रभूचें वचन
त्यानी गौरविलें; तेव्हां सर्वकाळच्या जीवनाला नेम-
लेले होते तितक्यानी विश्वास धरिला. ४९ आणि
प्रभूचें वचन सर्व प्रांतांत विख्यात झालें. ५०
तेव्हां यहूदी लोकानी भक्तिमंत व श्रेष्ठ बायकांस
व नगरांतील मुख्य पुरुषांस चिथावून पौलस
व बार्णबा यांचा पाठलाग करवून त्यांस आपल्या
प्रांतांतून घालविलें. ५१ तेव्हां ते आपल्या पायांची
धूळ त्यांजवर झाडून इकन्यमास गेले. ५२ परंतु
शिष्य आनंदाने व पवित्र आत्म्याने पूर्ण झाले.

## अध्याय १४.

मग असें झालें कीं इकन्यमांत ते बरोबर यहूदी लो-
कांच्या सभास्थानांत जाऊन असें बोलले कीं, यहूदी
व हेल्लेनी यांच्या मोठ्या समुदायाने विश्वास धरिला.
२ परंतु जे अविश्वासी यहूदी त्यानी विदेशी लो-
कांचें मन भावांवर चेतवून वैरयुक्त केलें. ३
यासाठीं ते बहुत दिवस तेथें राहिले आणि प्रभू-
संबंधी निर्भयपणाने बोलले; त्याने आपल्या कृपेच्या
वचनाला साक्ष देत असतां, त्यांच्या हातानी चम-
त्कार व अद्भुतें घडावीं असें केलें. ४ तेव्हां
नगरांतील समुदायाची फूट होऊन, कित्येक यहू-
द्यांकडे व कित्येक प्रेषितांकडे झाले. ५ मग यांस
छळून दगडमार करावा, ह्मणून विदेश्यानी व यहू-
द्यानी आपल्या अधिकाऱ्यांसुद्धां गर्दी केली. ६
हें जाणून ते लुकवनिया देशांतील लुस्त्रा व दर्बे
या नगरांस आणि त्या सभोंवतील देशांत पळून
गेले; ७ आणि तेथें शुभवर्त्तमान सांगूं लागले.

८ तेव्हां लुस्त्रांत कोणीएक माणूस पायानी अधू
असा बसला होता, तो आईच्या पोटापासून पांगळा
असतां कधीं चालला नव्हता. ९ त्याने पौल-
साला बोलतां ऐकिलें, तेव्हां याने त्याजकडे दृष्टि
लावून त्याला बरा होण्याचा विश्वास आहे असें
पाहून, १० मोठ्याने ह्मटलें कीं, तूं आपल्या
पायांवर नीट उभा राहा; तेव्हां तो उडी मारून
चालूं लागला. ११ मग पौलसाने जें केलें तें
समुदाय पाहून लुकवनी भाषेंत मोठ्याने ओरडून
ह्मणाले, देव मनुष्यांसारिखे होऊन आह्माकडे
उतरले आहेत. १२ तेव्हां त्यानी बार्णबाला
ज्यूस, व पौलस मुख्य बोलणारा होता ह्मणून त्याला
हेर्मेस ह्मटलें. १३ मग त्यांच्या नगरापुढें जो

जूस देव होता, त्याच्या याजकाने बैल व माळा दर-
वाज्यांजवळ आणिल्या, आणि लोकांसहित तो यज्ञ
करणार होता. १४ तें ऐकून बार्णबा व पौलस
हे प्रेषित आपलीं वस्त्रें फाडून लोकांमध्यें धावून
ओरडत बोलले, १५ अहो मनुष्यानो, असें
कां करितां? आह्मीहि तुह्मासारिखे सुखदुःख
भोगणारे मनुष्य आहों, आणि तुह्माला सांगतों
कीं, या निरर्थक गोष्टी सोडून जिवंत देवाकडे
फिरावें; त्याने आकाश व पृथ्वी व समुद्र व त्यां-
तील अवघें उत्पन्न केलें. १६ त्याने होऊन
गेलेल्या पिढ्यांमध्यें सर्व लोकांस त्यांच्या त्यांच्या
मार्गांनी चालूं दिल्हें. १७ तथापि त्याने आपल्यास
असाक्षिक ठेविलें नाहीं, तर उपकार करीत असतां,
त्याने आकाशापासून पाऊस व बहुफळांचे समय
आह्मास देऊन आमचीं अंतःकरणें अन्नाने व आनं-
दाने तृप्त केलीं. १८ आणि असें बोलून त्यानी
आपल्यांसाठीं यज्ञ करण्यापासून लोकांस कष्टेंकरून
निवारिलें.

१९ तेव्हां अंत्योखीया व इकन्यम यांपासून
कित्येक यहूदी आले, त्यानी लोकांस चिथावून पौल-
साला धोंडमार केला, आणि तो मेला असें समजून
त्याला नगराबाहेर ओढून टाकिलें. २० तथापि
शिष्य त्याच्या सभोंवतें उभे राहिले असतां तो
उठला व नगरांत गेला, मग दुसऱ्या दिवशीं तो
निघून बार्णबाबरोबर दर्बेस गेला. २१ आणि
त्या नगरांत त्यानी शुभवर्त्तमान सांगून बहुत शिष्य
केले, मग लुस्त्रा व इकन्यम व अंत्योखीया नग-
रांत त्यानी परत येऊन, २२ शिष्यांचें मन स्थिरा-
वितांना त्यांस बोध केला कीं, विश्वासांत टिकून
राहा, आपल्याला बहुत संकटांमधून देवाच्या राज्यांत
जावें लागतें. २३ तेव्हां त्यानी त्यांच्या साठीं
प्रत्येक मंडळींत वडील नेमून उपास व प्रार्थना
करून, ज्या प्रभूवर त्यानी विश्वास ठेविला होता
त्याकडे त्यांस निराविलें. २४ मग पिसिद्यांतून
जाऊन ते पांफुल्यांत आले. २५ आणि पर्गेंत
वचन सांगून ते अत्तालीयास उतरले. २६ मग
तेथून तारवांत बसून ते अंत्योखीयास आले, जें
कार्य त्यानी साधिलें त्याकरितां ते देवाच्या कृपेला
निरविल्यावर तेथून निघाले होते. २७ आणि
तेथें आल्यावर त्यानी मंडळी मिळवून, आपणांकडून
देवाने काय काय केलें, आणि विदेशी लोकांस त्याने
विश्वासाचें दार कसें उघडिलें, हें सांगितलें. २८
मग ते तेथें शिष्यांच्या संगतीं बहुत काळ राहिले.

## अध्याय १५.

आणखी कित्येकानी यहूद्यांतून उतरून भावांस
असा उपदेश केला कीं, मोश्याच्या रीतीने
तुमची सुंता झाल्यावाचून तुमचें तारण होत नाहीं.
२ तेव्हां पौलस व बार्णबा यांचा त्यांसीं मोठा
कलह व वादविवाद झाल्यावर, मंडळीने ठरविलें
कीं, पौलस व बार्णबा यानी व आपल्यांमधून
दुसऱ्या कित्येकानी या विचाराकरितां यरूशलेमां-
तले प्रेषित व वडील यांजकडे जावें. ३ मग मंड-
ळीने बोळविल्यावर ते फैनीके व शोमरोन यांमधून
गेले, आणि विदेशी लोक फिरल्याचें वर्त्तमान सां-
गून त्यानी सर्व भावांस बहुत आनंदविलें. ४ नंतर
ते यरूशलेमांत आल्यावर, तेथली मंडळी व प्रेषित
व वडील यानी त्यांचा सत्कार केला, तेव्हां आपणां-
कडून देवाने जें जें करविलें तें त्यानी सांगितलें.
५ परंतु परोशी यांच्या पंथांतील कित्येक विश्वास
धरणारे उभे राहून ह्मणाले, त्यांची सुंता झाली
पाहिजे, आणि मोश्याचें नेमशास्त्र पाळायास आज्ञा
दिल्ही पाहिजे.

६ मग प्रेषित व वडील या गोष्टीविषयीं विचार
करायाला जमले. ७ तेव्हां बहुत वादविवाद
झाल्यावर, पेत्रस उभा राहून त्यांस ह्मणाला, अहो
भावानो, तुह्मास ठाऊक आहे कीं, पुरातन दिवसां-
पासून आमच्या मध्यें देवाने असी निवड केली कीं,
माझ्या तोंडाने विदेशी लोकानी शुभवर्त्तमान ऐकून
विश्वास धरावा; ८ आणि अंतःकरण जाणणाऱ्या
देवाने जसा आह्मास तसा त्यांसहि पवित्र आत्मा
देऊन त्यांविषयीं साक्ष दिल्ही; ९ आणि त्यांचीं
अंतःकरणें विश्वासाने शुद्ध करून त्यांचा व आमचा
भेद कांहीं ठेविला नाहीं. १० असें असतां जें
जूं आमचे पूर्वज व आह्मीहि वाहायास समर्थ
नव्हतों, तें शिष्यांच्या मानेवर घालून तुह्मी देवाची
परीक्षा कां पाहतां? ११ केवळ प्रभु येशू ख्रीस्ता-
च्या कृपेने असें त्यांचें तसें आमचेंहि तारण होईल,
असा आह्मास विश्वास आहे. १२ तेव्हां सर्व
लोक उगेच राहिले, आणि बार्णबाला व पौल-
साला आपल्यांकडून विदेशी लोकांमध्यें देवाने जे
जे चमत्कार व अद्भुतें करविलीं तीं सांगतां, त्यानी
ऐकिलें. १३ मग हे उगे राहिल्यानंतर, याकोबाने
उत्तर दिल्हें कीं, अहो भावानो, माझें ऐका:

४ विदेशी लोकातून देवाने आपल्या नांवाकरितां
जा काढून घ्यावी ह्मणून त्यांची भेट कसी घेतली,
शिमोनाने तुह्मास सांगितलें आहे. १५ आणि
ा गोष्टीला भविष्यवाद्यांचीं वाक्यें मिळतात; असें
ठहिलें आहे कीं, १६ यानंतर मी फिरेन व
ाविदाचा पडलेला मंडप पुन्हा उभारीन, त्याच्या
ोडीहि बांधून तो नीट करीन; १७ यासाठीं
ा उरलेल्या माणसांनी, आणि ज्या राष्ट्रांवर माझें
ाव ठेविलेलें आहे त्या सर्वांनी प्रभूचा शोध
रावा; हें सर्व करणारा प्रभु असें ह्मणतो. १८
वाचीं सर्व कार्यें त्याला अनादिकाळापासून ठाऊक
ाहेत. १९ यास्तव माझें मत असें आहे कीं,
ा विदेश्यांतून देवाकडे फिरतात त्यांस आपण त्रास
ऊं नये. २० परंतु त्यांस असें लिहून पाठवावें
ां, मूर्त्तींचें अमंगळपण व जारकर्म व गुदमरून
ालेलें व रक्त यांपासून दूर राहावें. २१ कारण
ां प्राचीन काळापासून दर शाब्बाथ दिवसीं सभांमध्यें
ोश्याचें वाचतात, ह्मणून त्याचे प्रसिद्ध करणारे
त्येक नगरांत आहेत.

२२ तेव्हां प्रेषितांस व वडिलांस व सर्व मंड-
ळीला उचित वाटलें कीं, पौलस व बार्णबा यांच्या
ंगतीं आपल्यांतून निवडलेलीं माणसें, ह्मणजे
ार्साबा ह्मटलेला यहूदा व सिलास, भावांतील
श्रेष्ठ मनुष्य, यांस अंत्योखीयास पाठवावें. २३
यांच्या हातें त्यांनी असें लिहून पाठविलें कीं,
अंत्योखीया व सुर्या व किलिक्या यांमध्यें जे विदे-
श्यांतले भाऊ, त्यांस प्रेषित व वडील व भाऊ
यांचा सलाम. २४ आह्मी ऐकिलें कीं, कित्येक
आह्मांतून निघून जाऊन, सुंता करून घ्यावी व नेम-
शास्त्र पाळावें असें सांगतात, आणि बोलण्याने
तुह्मास खवळून तुमचे जीव भ्रांत केले आहेत, त्यांस
आह्मी असी आज्ञा केली नाहीं. २५ तर आह्मी
एकमताने एकत्र जमल्यावर आह्मास बरें वाटलें
कीं, २६ जे मनुष्य आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या
नांवाकरितां आपल्या जीवांवर उदार झाले, असे हे
आमचे प्रिय बार्णबा व पौलस, यांच्या संगतीं
निवडलेले मनुष्य तुह्माकडे पाठवावे. २७ ह्मणून
यहूदा व सिलास यांस आह्मी पाठविलें आहे,
तेहि याच गोष्टी तुह्माला तोंडाने सांगतील. २८
कां तर पवित्र आत्म्याला आणि आह्माला बरें
वाटलें कीं, या अगत्याच्या गोष्टींवांचून तुह्मावर
अणखी भार ठेवूं नये. २९ ह्मणजे मूर्त्तींला अर्पि-
लेलें व रक्त व गुदमरून मेलेलें व जारकर्म यांपा-
सून तुह्मी दूर राहावें, त्यांपासून आपल्यांस राखाल
तर तुमचें बरें होईल. सुखरूप असा.

३० नंतर त्यांची रवानगी झाल्यावर, ते अंत्यो-
खीयास गेले, मग त्यांनी समुदायाला मिळवून पत्र
दिल्हें. ३१ तें वाचल्यानंतर त्यांतल्या बोधामुळें
ते आनंदित झाले. ३२ तेव्हां यहूदा व सिलास
हेहि भविष्यवादी होते, ह्मणून यांनी बहुत गोष्टींनी
भावांस बोध करून स्थिराविलें. ३३ ते कांहीं
वेळ तेथें राहिल्यावर भावांपासून त्यांची प्रेषितांकडे
रवानगी शांतीने झाली. ३४ परंतु सिला-
साला तेथें अणखी राहायाला बरें वाटलें. ३५
पौलस व बार्णबा हेहि अंत्योखीयास राहिले,
आणि ते दुसऱ्या बहुतांच्या बरोबर उपदेश करीत
व प्रभूचें शुभवर्त्तमान सांगत होते.

३६ मग कांहीं दिवसांनंतर पौलसाने बार्णबा-
ला ह्मटलें कीं, ज्या ज्या नगरांत आपण प्रभूचें
वचन सांगितलें, त्यांमध्यें फिरून जाऊन आपले
भाऊ कसे आहेत हें पाहूं. ३७ तेव्हां मार्कस
ह्मटलेला योहान्न याला संगतीं घ्यावें, असा बार्ण-
बाचा मनोदय होता. ३८ परंतु पौलसाला वाट-
लें कीं, पांफुल्याहून जो आह्मापासून फटकून राहिला,
आणि आमच्या संगतीं कामावर आला नाहीं, त्याला
बरोबर घ्यावें, हें योग्य नाहीं. ३९ यावरून एवढा
तंटा झाला कीं ते एकमेकांपासून वेगळे झाले, मग
बार्णबा मार्कसाला घेऊन तारवांतून कुप्रसास
गेला. ४० परंतु पौलस सिलासाला निवडून
घेऊन भावांकडून देवाच्या कृपेला निरवलेला होऊन
निघाला; ४१ आणि सुऱ्या व किलिक्या यांम-
धून जातांना त्याने मंडळ्यांस स्थिराविलें.

## अध्याय १६.

मग तो दर्बे व लुस्त्रा यांत आला, आणि पाहा,
तेथें तीमथ्यस नामक कोणी शिष्य होता, तो
कोणीएका विश्वासणाऱ्या यहूदिणीचा पुत्र होता,
त्याचा बाप तर हेल्लेनी होता. २ तो लुस्त्र्यां-
तल्या व इकन्यमांतल्या भावांकडून नावाजलेला होता.
३ त्याने आपणाबरोबर यावें, असी पौलसाची
इच्छा होती, तेव्हां त्या ठिकाणांमध्यें जे यहूदी
होते त्यामुळें त्याने त्याला घेऊन त्याची सुंता केली,
कारण कीं त्याचा बाप हेल्लेनी आहे हें सर्वांस
ठाऊक होतें. ४ तेव्हां त्यांनी नगरांमधून जातां

जाऊन यरूशालेमांतल्या प्रेषितांनी व वडिलांनी जे
नेम ठरविले होते ते पाळायाला त्यांस सांगितलें.
५ यावरून मंडळ्या विश्वासांत स्थिर होऊन, दिव-
सेंदिवस त्यांची संख्या वाढत चालली.

६ नंतर फ्रुग्या व गलत्या या प्रांतांतून गेल्या-
वर, आस्या देशांत वचन सांगण्याविषयीं त्यांस
पवित्र आत्म्याकडून प्रतिबंध झाला. ७ ह्मणून
त्यांनी मुस्यांत जाऊन बिथुन्यास जायाला यत्न
केला, परंतु आत्म्याने त्यांस जाऊं दिल्हें नाहीं.
८ मग ते मुस्याजवळून जाऊन त्रोवसास खालीं
गेले. ९ तेथें रात्रीं पौलसाला दृष्टांत झाला,
असा कीं, कोणी मकदनी माणूस उभा राहून आप-
ल्याला विनंती करीत ह्मणाला, मकदन्यांत येऊन
आमचें सहाय कर. १० असा दृष्टांत त्याला
झाल्यानंतर त्या लोकांस शुभवर्त्तमान सांगायाला
प्रभूने आह्मास बोलाविलें आहे, असें खचीत समजून
मकदन्यांत जायाला आह्मी लागलाच प्रयत्न केला.

११ तेव्हां त्रोवसापासून हाकारून आह्मी नीट
वाटेने समथ्राकेस गेलों, आणि दुसऱ्या दिवशीं
न्यपोलिसास गेलों. १२ आणि तेथून फिलि-
पैस गेलों, जें मकदन्याच्या त्या भागांतलें मुख्य
नगर व नवी वस्ती आहे; आणि त्या नगरांत आह्मी
कांहीं दिवस राहिलों. १३ मग शाब्बाथ दिवशीं
आह्मी नगरबाहेर नदीकडे लोक प्रार्थना करीत
असत तेथें जाऊन बसलों, आणि ज्या बायका तेथें
मिळाल्या होत्या त्यांसीं बोललों. १४ तेव्हां
थुवतीरा नगरची कोणीएक लुदिया नांवाची बायको
जांबळीं वस्त्रें विकणारीण, देवाची भक्तीण, तिने
ऐकिलें, तिचें अंतःकरण प्रभूने खुलविलें, असें
कीं, पौलसाने सांगितलेल्या गोष्टींवर तिने लक्ष
दिल्हें. १५ मग तिने आपल्या कुटुंबासुद्धां बाप्ति-
स्मा घेतल्यानंतर असी विनंती केली कीं, मी प्रभू-
वर विश्वासणारी आहें, असें तुह्मी मानितां, तर
माझ्या घरीं येऊन राहा. तेव्हां तिने आह्मास
फार आग्रह केला. १६ मग असें झालें कीं आह्मी
प्रार्थनास्थळाकडे जात होतों, तेव्हां पुथोनी आत्मा
लागलेली कोणीएक मुलगी भेटली, ती दैवज्ञानाने
आपल्या धन्यांस बहुत मिळकत करून देत असे.
१७ ती पौलसाच्या व आमच्या पाठीस लागून
ओरडत बोलली कीं, हे मनुष्य परात्पर देवाचे दास
आहेत, हे तारणाचा मार्ग आह्माला दाखवितात.
१८ असें तिने बहुत दिवस केलें, मग पौलस कष्टी
होऊन मागें फिरून आत्म्याला बोलला, येशू ख्रीस्ता-
च्या नांवाने मी तुला आज्ञा करितों कीं, तूं हिज-
मधून निघून जा; तेव्हां तो तत्काळ निघाला. १९ मग
आपल्या मिळकतीची आशा गेली, असें पाहून
तिच्या धन्यांनी पौलस व सिलास यांस धरून पेठेंत
अधिकाऱ्यांकडे ओढून नेलें. २० तेव्हां त्यांनी त्यांस
अधिकाऱ्यांपुढें उभें करून ह्मटलें, हे मनुष्य यहूदी
असतां आमच्या नगराला फार त्रास देतात. २१
आणि आह्मी रोमी असतां, जे परिपाठ आह्मांस
अंगीकारायाला व चालवायाला योग्य नाहींत ते हे
सांगतात. २२ तेव्हां समुदाय त्यांजवर उठला,
आणि अधिकाऱ्यांनी त्यांचीं वस्त्रें फाडून काढून
त्यांस छड्या मारायाची आज्ञा दिल्ही. २३
आणि त्यांस बहुत फटके मारून बंदिशाळेंत घालून
नायकाला हुकूम केला कीं, यांस बंदोबस्ताने राख.
२४ असा त्याला हुकूम झाल्यावर, त्याने आंतल्या
बंदिखान्यांत त्यांस घालून त्यांचे पाय खोड्यांत
अडकविले. २५ परंतु मध्यरात्रीं पौलस व
सिलास यांनी प्रार्थना करून देवाला गायिलें,
आणि बंदिवानांनी त्यांचें ऐकिलें. २६ तेव्हां
एकाएकीं एवढा भूमिकंप झाला कीं बंदिशाळेचे
पाये डगमगले, आणि सर्व दरवाजे लागलेच उघडले
आणि सर्वांचे बंद सुटले. २७ तेव्हां नायकाने जागें
होऊन बंदिशाळेचे दरवाजे उघडलेले पाहिले,
आणि बंदिवान पळाले असें समजून तो तरवार
उपसून आपला घात करणार होता. २८ इतक्यांत
पौलस मोठ्याने हाक मारून बोलला कीं, तूं आप-
णाला कांहीं वाईट करूं नको, कां तर आह्मी सर्व
एथेंच आहों. २९ तेव्हां तो दिवा मागून आंत
धावत गेला, आणि कांपून पौलस व सिलास
यांच्या पुढें पडला, ३० आणि त्यांस बाहेर
काढून ह्मणाला, महाराज, माझें तारण व्हावें, ह्म-
णून मला काय केलें पाहिजे? ३१ तेव्हां ते ह्म-
णाले, प्रभु येशू ख्रीस्तावर विश्वास ठेव, ह्मणजे
तुझें व तुझ्या घराण्याचें तारण होईल. ३२ नंतर
त्यांनी त्याला व त्याच्या घरांतील सर्वांस प्रभूचें
वचन सांगितलें. ३३ मग रात्रीच्या त्याच घट-
केस त्याने त्यांस घेऊन फटक्यांच्या जखमा धुत-
ल्या, तेव्हांच त्याने व त्याच्या अवघ्या माणसांनी
बाप्तिस्मा घेतला. ३४ मग त्याने त्यांस आपल्या
घरीं नेऊन त्यांच्या पुढें अन्न ठेविलें, आणि तो सर्व
कुटुंबासुद्धां देवावर विश्वास ठेवून हर्ष पावला.

२५ मग दिवस उगवल्यावर अधिकाऱ्यानीं चोब-
ारास पाठवून सांगितलें कीं, त्या माणसांस सोड.
३६ तेव्हां नायकाने पौलसाला तें वर्त्तमान सांगि-
तलें कीं, तुह्माला सोडावें ह्मणून अधिकाऱ्यानी
हूकूम पाठविला आहे, तर आतां निघून शांतीनं
जा. ३७ तेव्हा पौलस त्यांस ह्मणाला, आह्मी
रोमी मनुष्य असतां, त्यानी आह्मास अपराधी न
ठरवितां उघड फटके मारून बंदिशाळेंत घातलें,
आणि आतां ते आह्मास मुकाट्याने घालवितात
काय? तर असें नको, त्यानी स्वतां येऊन आह्मास
बाहेर न्यावें. ३८ मग चोबदारानी हें वर्त्तमान
अधिकाऱ्यांस सांगितलें, तेव्हा ते रोमी आहेत
असें ऐकून त्यांस भय वाटलें. ३९ मग त्यानी
येऊन त्यांची समजूत केली; आणि त्यांस बाहेर
आणून विनंती केली कीं, या नगरांतून तुह्मी जावें.
४० तेव्हा ते बंदिशाळेंतून निघून लुदियेच्या घरीं
आले, आणि भावांस भेटून त्यांस बोध करून निघाले.

## अध्याय १७.

नंतर ते आंफिपलीस व अपलोन्या यांतून जाऊन
थेस्सलनीकेस गेले, तेथें यहूद्यांचें सभा-
स्थान होतें. २ तेव्हा पौलसाने आपल्या रीती-
प्रमाणें त्यांमध्यें जाऊन, तीन शाब्बाथ शास्त्राव-
रून त्यांसीं संवाद केला. ३ त्याने अर्थ फोडून
दाखविलें कीं, ख्रीस्ताने मरावें व मेलेल्यांमधून उठावें
हें अगत्य होतें, आणि जो मी तुह्माला सांगतों
तो हा येशू, ख्रीस्त आहे. ४ तेव्हा त्यांतील
कित्येक, आणि धार्मिक हेल्लेनी यांचा मोठा समुदाय
आणि बहुतेक श्रेष्ठ बायका विश्वास धरून पौलस
व सिलास यांजकडे झाल्या. ५ परंतु अविश्वासी
यहूद्यानी हेवा धरून, आपल्याकडे कांहीं बाजारी
लुच्चे लोक घेऊन घोळका जमवून नगरांत बंडाळी
केली, आणि यासोनाच्या घरावर उचल करून
त्यांस लोकांकडे बाहेर आणायाला पाहिलें. ६
पण त्यांचा शोध लागला नाहीं, तेव्हा त्यानी
यासोन व कित्येक भाऊ यांस नगराच्या अधिका-
ऱ्यांकडे ओढून नेऊन ओरडत ह्मटलें, ज्यानी
जगाची उलटापालट केली ते एथेंहि आले आहेत.
७ त्यांस यासोनाने आपल्या घरात घेतलें, आणि
हे सर्व कैसाराच्या आज्ञाविरुद्ध चालतांना, येशू
ह्मणून दुसरा राजा आहे, असें ह्मणतात. ८ हें
ऐकून समुदाय व अधिकारी घाबरले, ९ आणि
त्यानी यासोन व दुसरे यांपासून जामीन घेऊन
त्यांस सोडिलें.

१० लागलेंच भावानी पौलस व सिलास यांस
रात्रीं बरैयास पाठविलें, ते तेथें पोहंचल्यावर यहू-
द्यांच्या सभास्थानांत गेले. ११ तेथील लोक थे-
स्सलनीकेंतल्या लोकांपेक्षां अधिक गुणी होते, त्यानीं
मोठ्या आवडीने वचन अंगीकारिलें, आणि या गोष्टि
अस्याच आहेत काय? याविषयीं ते शास्त्रांत नित्य
शोध करीत असत. १२ यावरून त्यांतील बहु-
तानी व हेल्लेनी प्रतिष्ठित बायका व पुरुष यांतील
बहुतेकानी विश्वास धरिला. १३ तेव्हा पौलस
देवाचें वचन बरैयांतहि सांगत आहे, हें जाणून
थेस्सलनीकेंतल्या यहूद्यानीं तिकडेहि जाऊन समुदा-
यांस चेतविलें. १४ तेव्हा भावानी पौलसाला
समुद्राकडे जाण्यास लागलेंच पाठविलें, पण सि-
लास व तीमथ्यस तेथेंच राहिले. १५ तेव्हा
पौलसाला जे पोहंचवीत होते त्यानी त्याला अथे-
नेपर्यंत नेलें; मग सिलासाने व तीमथ्यसानें आप-
ल्याकडे लवकर यावें, असा पौलसाचा निरोप
घेऊन ते निघून गेले.

१६ मग पौलस अथेनैस त्यांची वाट पाहत
असतां, तें नगर केवळ मूर्त्तिपरायण आहे असें
पाहून तो आपल्या आत्म्यांत फार आवेशी झाला.
१७ यामुळें त्याने सभास्थानांत यहूद्यांसीं व धार्मि-
कांसीं आणि जे बाजारामध्यें त्याला अढळत
त्यांसीं प्रतिदिवसीं संवाद केला. १८ तेव्हा
एपिकूरपंथी व स्तोयिकपंथी यांतील कित्येक पंडि-
तानीं त्यांसीं विवाद केला. कित्येक ह्मणाले, हा
बडबड्या काय बोलेल? दुसरे ह्मणाले, हा परक्या
देवांचा प्रतिपादक दिसतो. कां तर तो त्यांस
येशू व पुन्हा उठणें यांचें शुभवर्त्तमान सांगे. १९
नंतर त्यानी त्याला घेऊन अरीयपगस न्यायसभेंत
नेऊन ह्मटलें कीं, हा नवा उपदेश त्वां केला तो
कसा, हें आह्मास कळेल काय? २० आमच्या
ऐकण्यांत तर तूं विलक्षण गोष्टी आणितोस, यांचा
अभिप्राय कसा काय तो समजावा असें आमच्या
मनांत आहे. २१ कां तर सर्व अथेनैकर व तेथें
राहणारे परके यांस कांहीं नवल विशेष सांगायाचें
किंवा ऐकायाचें नसलें तर करमत नसे. २२
तेव्हा पौलस अरीयपगसाच्या मध्यभागीं उभा रा-
हून ह्मणाला, अहो अथेनैकरानो, तुह्मी सर्वथा
अतिभक्त आहां, हें मला समजतें. २३ कां तर

फिरतां फिरतां म्या तुमचीं धर्मकृत्यें पाहिलीं, तेव्हां
अज्ञात देवाची, हीं अक्षरें लिहिलेली वेदी
मला अढळली; तर ज्याला तुह्मी न जाणून भजतां
त्याविषयीं मी तुह्माला सांगतों. २४ ज्या देवाने
जग व त्यांतलें अघवें केलें, तो आकाशाचा व
पृथ्वीचा प्रभु असतां, हातानी बांधलेल्या देवळांमध्यें
राहत नाहीं. २५ आणि त्याला कांहीं उणें आहे
ह्मणून मनुष्यांच्या हातानी त्याची पूजा घडती असें
नाहीं, कां कीं जीवन व प्राण व अवघें तोच सर्वांस
देतो. २६ आणि त्याने मनुष्यांचीं सर्व राष्ट्रें
पृथ्वीच्या सर्व पाठीवर राहण्यासाठीं एकाच रक्ता-
पासून केलीं, व त्यांचे पूर्वीं नेमलेले समय व त्यांच्या
वस्तीच्या सीमा त्याने नेमून ठेविल्या आहेत. २७
यासाठीं कीं त्यानी प्रभूचा शोध करावा, ह्मणजे
त्यानी चांपसत त्याला कसें तरी मिळवून घ्यावें;
तरी तो आह्मांतील कोणाएकापासूनहि दूर नाहीं.
२८ कारण कीं आह्मी त्याजमध्यें जगतों व वागतों
व आहों; तसेंच तुमच्या कित्येक कवीनीहि ह्मटलें
आहे कीं, आह्मी त्याचा वंश आहों. २९ तर
आह्मी देवाचा वंश असतां, जें सोनें किंवा रुपें
किंवा पाषाण, मनुष्याच्या चातुर्याने व युक्तीने को-
रिलें आहे, त्यासारिखा देवपणा आहे, असी
कल्पना आपण करूंच नये. ३० तर अज्ञा-
नाच्या काळांवर देवाने काणाडोळा केला खरा,
परंतु आतां तो सर्वत्र सर्व मनुष्यांस पश्चात्ताप करावा,
ह्मणून आज्ञा करितो. ३१ कां तर त्याने असा
दिवस नेमिला आहे कीं, त्यांत तो आपण नेमलेल्या
मनुष्याकडून जगाचा न्याय न्यायीपणाने ठरवील;
याविषयीं त्याने त्याला मेलेल्यांमधून उठवून सर्वांस
प्रमाण पटविलें आहे.

३२ तेव्हां मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयीं
ऐकून कित्येकानी थट्टा केली; कित्येक ह्मणाले, या-
विषयीं आह्मी तुझें पुन्हा ऐकूं. ३३ त्यावरून
पौलस त्यांच्या मधून निघून गेला. ३४ तरी
कित्येक माणसानी त्याजकडे होऊन विश्वास धरिला;
त्यांमध्यें दियनुसयस अरीयपगसकर व दमारिस
नामक कोणी बायको होती, आणि दुसरेहि त्यांसं-
गतीं होते.

## अध्याय १८.

त्यानंतर पौलस अथेनै सोडून करिंथास गेला.
२ तेव्हां पंतसांत जन्मलेला अकुला नामक
कोणी यहूदी त्याला अढळला, तो आपली बायको
प्रिस्किला इजसुद्धां इतलीपासून नुक्ता आला होता,
कां कीं सर्व यहूद्यानी रोमेंतून निघून जावें असी
क्लौदयसाने आज्ञा केली होती; त्यांजवळ तो गेला.
३ आणि त्यांचा धंदा एकच होता ह्मणून त्याने
त्यांच्या जवळ राहून उद्योग केला, धंदा ह्मटला तर
ते राहुटी करणारे होते. ४ तेव्हां दर शाब्बाथ
दिवशीं त्याने सभास्थानांत वाद करून यहूद्यांची
व हेल्लेन्यांची खातरी केली. ५ आणि सिलास
व तीमथ्यस हे मकदन्यापासून उतरून आले होते,
तेव्हां पौलस आत्म्याने प्रेरित होऊन त्याने येशु
तोच ख्रीस्त आहे असें यहूद्यांस प्रमाण पटविलें.
६ परंतु ते अडवीत व दुर्भाषण करीत असतां, त्याने
आपलीं वस्त्रें झटकून त्यांस ह्मटलें कीं, तुमचें रक्त
तुमच्या माथ्यावर, मी निर्दोष, आतांपासून विदेशी
लोकांकडे जाईन. ७ मग तो तेथून निघून ज्याचें घर
सभास्थानाच्या लगत होतें, असा कोणी युस्तस नामक
देवाचा भक्त याच्या घरीं गेला. ८ तथापि सभे-
चा अधिकारी क्रिस्पस याने आपल्या सर्व घराण्या-
सुद्धां प्रभूवर विश्वास ठेविला, आणि बहुत करिं-
थकरानी वचन ऐकून विश्वास ठेविला व बाप्तिस्मा
घेतला. ९ तेव्हां प्रभूने रात्रीं पौलसाला दृष्टां-
तांत ह्मटलें कीं, भिऊं नको, बोलत जा, व उगा
राहूं नको. १० कां कीं मी तुजबरोबर आहें,
तुझें वाईट करायाला कोणी तुजवर येणार नाहीं,
कारण कीं या नगरांत माझे बहुत लोक आहेत.
११ तेव्हां तो त्यांजमध्यें देवाचें वचन सांगत दीड
वर्ष राहिला.

१२ नंतर गल्लियो अखायां यावर अधिकार
करीत असतां, यहूद्यानी एकचित्ताने पौलसावर
उचल करून त्याला न्यायासनाकडे आणून ह्मटलें
कीं, १३ हा नेमशास्त्राविरुद्ध देवाला भजा-
यास लोकांस मथवितो. १४ तेव्हां पौलस तोंड
उघडून बोलणार होता, इतक्यांत गल्लियोने यहू-
द्यांस ह्मटलें, अहो यहूद्यानो, हें प्रकरण कांहीं
अन्यायाचें किंवा दुराचरणाचें असलें तर म्या तुम-
चें ऐकावें हें योग्य. १५ परंतु शब्दांचा किंवा
नांवांचा किंवा त्या तुह्माकडील शास्त्राचा विचार
असला तर तुमचें तुह्मीच पाहा, कारण कीं असल्या
गोष्टींची न्यायाधिशी मला नको. १६ मग त्याने
त्यांस न्यायासनापासून घालविलें. १७ तेव्हां सर्व
हेल्लेनी लोकानी सभेचा अधिकारी सोस्थनेस याला

रून न्यायासनासमोर मार दिल्हा, पण गली-
ोने त्या गोष्टींतील एकहि मनास आणिली नाहीं.
१८ मग पौलस तेथें अणखी बहुत दिवस राहि-
ल्यावर, भावांचा निरोप घेऊन तारवांत बसून सुर्या
देशास गेला, आणि त्याच्या बरोबर प्रिस्किला व
अकुला हीं होतीं, त्याने केंख्रयांत आपलें डोकें
मुंडिलें, कां कीं त्याचा नवस होता. १९ मग एफ-
सस नगरांत आल्यावर त्याने त्यांस तेथें सोडिलें,
आणि सभास्थानांत जाऊन यहूद्यांसीं संवाद केला.
२० नंतर आपल्याजवळ त्याने अणखी कांहीं वेळ
राहावें, असी विनंती त्यांनी केली असतां तो मान्य
झाला नाहीं. २१ परंतु तो त्यांचा निरोप घेतांना
म्हणाला, हा पुढला सण मला यरूशलेमांत अवश्य
पाळला पाहिजे, परंतु देवाची इच्छा असली तर
तुह्माकडे मी फिरून येईन. तेव्हां तो एफससा-
हून निघाला. २२ मग कैसरियास पोहंचल्यावर
तो वरतीं गेला, आणि मंडळीस क्षेम सांगून अंत्यो-
खीयास गेला. २३ नंतर तेथें कांहीं वेळ रा-
हून तो निघाला, आणि गलत्या व फ्रुग्या या
देशांमधून त्याने अनुक्रमाने जाऊन सर्व शिष्यांस
स्थिराविलें.

२४ तेव्हां अपल्लोस नांवाचा कोणी यहूदी,
आलक्षांद्रियांत जन्मलेला मोठा वक्ता व शास्त्रांत
निपुण होता, तो एफससास आला. २५ तो
प्रभूच्या मार्गाविषयीं शिकलेला होता, आणि आ-
त्म्यांत आवेशी होऊन, प्रभूविषयींच्या गोष्टी नीट
सांगून उपदेश करीत असे; तो तर केवळ योहान्नाचा
बाप्तिस्मा समजत होता. २६ आणि तो सभास्थानांत
प्रशस्तपणें बोलूं लागला, तेव्हां अकुला व प्रिस्किला
यांनी त्याचें ऐकून त्याला जवळ घेतलें, व देवाचा
मार्ग त्याला अधिक स्पष्ट करून दाखविला. २७
नंतर तो अखायास जाण्याच्या बेतांत असतां,
भावांनी शिष्यांस शिफारसपत्र लिहिलें कीं, याचा
अंगीकार करा; तो तेथें पोहंचल्यावर ज्यांनी कृपे-
वरून विश्वास धरिला होता, त्यांचें त्याने फार
साहाय केलें. २८ कां कीं येशू हाच ख्रीस्त
आहे, असें त्याने शास्त्रांवरून दाखवून प्रगटपणाने
यहूद्यांचें अगदीं खंडण केलें.

## अध्याय १९.

मग असें झालें कीं अपल्लस करिंथांत असतां,
पौलस वरच्या प्रांतांमधून जाऊन एफससांत
आला, आणि कित्येक शिष्य त्याला अढळल्यावर
२ तो त्यांस ह्मणाला, तुह्मी विश्वास धरून पवित्र
आत्मा पावलां काय? मग त्यांनी त्याला ह्मटलें
कीं, पवित्र आत्मा आहे किंवा नाहीं, हें आह्मी
ऐकिलें नाहीं. ३ तो त्यांस ह्मणाला, तर तुह्मी
कशाचा बाप्तिस्मा घेतला? मग ते ह्मणाले, योहा-
न्नाचा बाप्तिस्मा. ४ तेव्हां पौलसाने ह्मटलें, योहा-
न्नाने पश्चात्तापाचा बाप्तिस्मा केला खरा, परंतु तो
लोकांस सांगत असे कीं, आपल्यामागें येणाऱ्यावर
ह्मणजे ख्रीस्त येशूवर तुह्मी विश्वास ठेवावा. ५
हें ऐकून त्यांनी प्रभु येशूच्या नांवाने बाप्तिस्मा
घेतला. ६ आणि पौलसाने त्यांजवर हात ठेविले
तेव्हां पवित्र आत्मा त्यांजवर आला, आणि ते अन्य
भाषांनी बोलूं व भविष्य सांगूं लागले. ७ ते अवघे
सुमारें बारा मनुष्य होते. ८ नंतर तो सभास्था-
नांत जाऊन प्रशस्तपणें बोलूं लागला; आणि देवाच्या
राज्याच्या गोष्टींविषयीं तीन महिने वाद करीत व
प्रमाण पटवीत असे.

९ मग कित्येक कठीण होऊन अमान्य झाले व
समुदायासमोर त्या मार्गाची निंदा करूं लागले, ह्मणून
त्याने त्यांमधून निघून शिष्यांस वेगळें ठेविलें, आणि
कोणीएका तुरान्नसाच्या शाळेंत नित्य वादविवाद
केला. १० हें तर दोन वर्षें चाललें, ह्मणून आ-
स्यांतील सर्व राहणारे यहूदी व हेल्लेनीहि यांनी
प्रभु येशूचें वचन ऐकिलें. ११ आणि देवाने
पौलसाच्या हातें असाधारण चमत्कार घडविले,
१२ असे कीं त्याच्या अंगावरून रुमाल किंवा फडकीं
रोग्यांजवळ आणिलीं, ह्मणजे त्यांचे रोग दूर व्हावे
व वाईट आत्मे त्यांतून निघावे.

१३ तेव्हां कित्येक पंचाक्षरी फिरस्ते यहूदी
वाईट आत्मे लागलेल्यांवर प्रभु येशूचें नांव घेऊं
लागले, असें कीं, ज्या येशूला पौलस गाजवितो
त्याची तुह्मास द्वाही देतों. १४ आणि यहूदी
मुख्य याजक स्केवा याचे कोणी सात पुत्र असें
करीत होते. १५ तेव्हां वाईट आत्म्याने उत्तर
दिल्हें कीं, येशूला जाणतों, व पौलसालाहि जाणतों,
पण तुह्मी कोण आहां? १६ मग त्या वाईट आत्मा
लागलेल्या माणसाने त्यांजवर उडी घालून त्यांजवर
प्रबळ होऊन त्यांस जिंकिलें, असें कीं ते उघडे व
घायाळ होऊन त्या घरांतून पळून गेले. १७ तेव्हां
एफससांतील राहणारे यहूदी व हेल्लेनीहि या सर्वांस
हें माहीत झालें, ह्मणून त्या सर्वांस भय प्राप्त झालें,

आणि प्रभु येशूच्या नांवाचा महिमा झाला. १८
आणि विश्वासणाऱ्यांतील बहुतानी येऊन आपलीं
कर्मे पत्करून दाखविलीं. १९ आणि कुवि-
द्या करणाऱ्यांतील बहुतानी आपलीं पुस्तकें जमा
करून सर्वांदेखतां बाळून टाकिलीं, आणि त्यांच्या
किमतीची बेरीज करून पन्नास हजार रुपये झाले,
असें पाहिलें. २० याप्रमाणें प्रभूचें वचन परा-
क्रमाने वाढत चाललें व प्रबळ झालें.

२१ मग या गोष्टी संपविल्यावर, मकदन्या व
अखाया यांमधून जाऊन यरूशलेमास जावें, असा
पौलसाने आल्यांत निश्चय केला, व झटलें कीं,
तेथें गेल्यावर मला रोमाहि पाहिलें पाहिजे. २२
मग तो आपली सेवा करणाऱ्यांतील तीमथ्यस व
एरास्तस या दोघांस मकदन्यास पाठवून आपण
कांहीं दिवस आश्यांत राहिला. २३ आणि त्या
समयीं त्या मार्गाविषयीं बहुत गडबड झाली. २४
कारण कीं कोणी देमेत्रियस नामें सोनार तो अर्त-
मिसेसाठीं रुप्याचे देव्हारे करून कारागिरांस बहुत
जोड मिळवून देत असे. २५ त्याने त्यांस व
तसीं कामें करणाऱ्यांस जमवून झटलें कीं, अहो
ग्रहस्थानो, तुह्मी समजतां कीं, या उद्योगाने आमची
चांगली जीविका होत असती. २६ आणि तुह्मी
पाहतां व ऐकतां कीं, केवळ एफससांत नव्हे,
तर बहुधा सर्व आश्या देशांत या पौलसाने
जे हातानी केलेले ते देव नाहींत, असें बोलून बहुत
समुदायाला समजावून फितविलें आहे. २७ आणि
हा आमचा उद्योग अपकीर्त्ति पावेल असें भय आहे,
हें केवळ नव्हे, पण मोठ्या अर्तमिस देवीची पूजा
सर्व आश्या व जगहि करितें, तिचें देऊळ
तुच्छ होईल व तिचें महत्त्व उतरून जाईल. २८
हें ऐकून ते रागें भरून ओरडत बोलले कीं,
एफससकरांची अर्तमिस थोर. २९ आणि अव-
घ्या नगरांत बंडाळी झाली, नंतर मकदनी गायस
व अरिस्तार्खस पौलसाच्या वाटेंतले सोबती यांस
धरून ओढून ते एकचित्ताने तमाशखान्यांत धावत
गेले. ३० तेव्हां समुदायांत जावें असें पौलसाच्या
मनांत होतें, पण शिष्यानी त्याला जाऊं दिल्हें नाहीं.
३१ आणि आश्याच्या अधिकाऱ्यांतील कित्येक त्याचे
मित्र होते, त्यानी त्याला निरोप पाठवून प्रार्थिलें
कीं, आपण तमाशखान्यांत जाऊं नये. ३२
तेव्हां त्यानी वेगवेगळी आरोळी मारिली, कारण
कीं मंडळीचा एकच गोंधळ झाला होता, आणि
आपण कशाला मिळालों आहों, हें बहुतांस ठाऊक
नव्हतें. ३३ आणि अलक्षांद्रस याला यहूदी लो-
कानी पुढें केल्यावर कित्येकानी त्याला समुदायांतून
काढिलें, तेव्हां अलक्षांद्रस हाताने खुणावून लोकांस
प्रत्युत्तर देण्यास पाहत होता. ३४ परंतु तो
यहूदी आहे असें समजल्यावर, सुमारें दोन तास
सर्वांची एकच वाणी झाली कीं, एफससकरांची
अर्तमिस थोर.

३५ मग कुळकर्णी समुदायाला शांत करून
झणाला, अहो एफससकर लोकानो, मोठी अर्त-
मिस देवी तिचा व जूस देवापासून पडलेल्या
मूर्त्तीचा पुजारी एफसस नगर आहे, हें ज्याला
समजलें नाहीं असा तर कोण माणूस आहे? ३६
तर या गोष्टी निर्विवाद असतां तुह्मी शांत असावें,
आणि कांहीं साहस करूं नये हें नीट आहे. ३७
कारण कीं जीं माणसें तुह्मी एथें आणिलीं तीं
देऊळ लुटणारीं किंवा तुमच्या देवीची निंदा कर-
णारीं असीं नाहींत. ३८ यास्तव देमेत्रियस व
त्याच्या संगतींचे कारागीर यांचा कोणासीं वाद
असल्यास न्यायसभा आहे व न्यायाधीश आहेत,
त्यानी वादप्रतिवाद करावा. ३९ पण दुसऱ्या
गोष्टीविषयीं तुह्मी कांहीं विचारिलें तर तें नेमले-
ल्या मंडळीमध्यें ठरेल. ४० कां कीं आजच्या
दंग्याविषयीं आपली चौकसी होईल असें भय आहे,
आणि या दंग्याचें कारण आपल्याला सांगतां
येईल असी कांहीं गोष्ट नाहीं. ४१ असें बोलून
त्याने मंडळीस निरोप दिल्हा.

## अध्याय २०.

नंतर गलबला निवाल्यावर पौलस शिष्यांस बोला-
वून आणि क्षेमालिंगन करून मकदन्यांत जायास
निघाला. २ आणि त्या प्रांतांतून जातांना तेथ-
ल्यांस बहुत गोष्टीनी बोध करून तो हेल्लासांत
गेला. ३ आणि तेथें तीन महिने राहिल्यावर तो
सुर्यांत जाणार होता, परंतु यहूदी लोकानी त्यावर
कट केला झणून त्याने मकदन्यांतून माघारा
जायाचा बेत केला. ४ तेव्हां सोपतेर बरैयाकर,
व थेस्सलनीकेकरांतले अरिस्तार्खस व सकूंदस, व
गायस दर्बेकर व तीमथ्यस, व आश्यांतील तुखि-
कस व त्राफिमस, हे आश्यापर्यंत त्याच्या बरोबर
गेले. ५ त्यानी पुढें जाऊन त्रोवसांत आमची
वाट पाहिली. ६ आणि बेखमीर भाकरींच्या

देवसांनंतर आह्मी फिलिप्पैहून तारवांत बसून
ाच दिवसांनी त्रोवसांत त्यांजकडे आलों, तेथें
आह्मी सात दिवस राहिलों. ७ मग शिष्य सप्त-
ाच्या प्रथमवारीं भाकर मोडण्यासाठीं मिळाले,
व्हां पौलस दुसऱ्या दिवशीं जाणार त्याने त्यांशीं
मेलतांना मध्यरात्रपर्यंत उपदेश चालविला. ८
आणि ज्या माडीवर ते मिळाले होते तेथें बहुत
देवे होते. ९ आणि युतुखस नामक कोणी तरुण
खिडकींत बसला होता, त्याला गाढ झोंप लागली,
ंव्हां पौलस फार वेळ बोलत असतां तो झोंपेने
गारावून तिसऱ्या मजल्यावरून खालीं पडला व
लेला हातीं लागला. १० तेव्हां पौलस खालीं
तरून त्याजवर पडला, आणि त्याला कवेंटाळून
णाला, घाबरूं नका, कारण कीं याचा जीव
ाजमध्यें आहे. ११ मग वर येऊन त्याने भाकर
ोडून कांहीं खाल्ली, मग फार वेळ पाहांटेपर्यंत
यांशीं संभाषण करून तो तसाच निघाला. १२
आणि ते तरुणाला जिवंत आणून बरेंच समाधान
ावले. १३ आह्मी तर पुढें तारवांतून आस्ससाकडे
लों, तेथें पौलसाला आह्मी तारवांत घेणार होतों,
ारण कीं त्याने असा बेत केला होता; तो
र तेथवर पायवाटेने येणार होता. १४ त्याप्र-
ाणें तो आस्ससांत आह्मास भेटल्यावर त्याला
ारवांत घेऊन आह्मी मितुलेनेस गेलों. १५
आणि तेथून निघून आह्मी दुसऱ्या दिवशीं
खियसासमोर आलों, आणि पुढल्या दिवशीं
ामसास पोहंचलों, मग त्रोगुल्यांत राहिल्यावर
ढल्या दिवशीं मिलेतसास आलों. १६ कां तर
ौलसाने एफसस एका बाजूस सोडून जायाचा
ेश्चय केला होता, कां कीं आपल्याला आश्यामध्यें
ीर लागूं नये, असें त्याला वाटलें, आणि कसें
रून पन्नासाव्या दिवसाच्या सणांत आपण यरू-
ालेमांत असावें, असी तो उतावळी करीत होता.
१७ मग त्याने मिलेतसांतून एफससाला निरोप
ाठवून मंडळीचे वडील बोलावून घेतले. १८
त्याजवळ आल्यावर त्याने त्यांस ह्मटलें, मी
हिल्याने आश्यामध्यें आलों त्या दिवसापासून
ह्मासीं नेहमीं कसा वागलों, १९ फार नम्र-
ने व बहुत आसवांनी आणि यहूद्यांच्या कटांनी
ला लागलेलीं संकटें सोसीत प्रभूची सेवा कशी
ली, हें तुह्मास ठाऊक आहे. २० आणि तुह्मास
तकारक कांहीं म्या लपवून ठेविलें नाहीं; लोकांत
व घरोघरीं म्या तुह्मास वर्त्तमान सांगून व उपदेश
करून, २१ यहूद्यांस व हेल्लेन्यांसहि देवाकडे फिरून
पश्चात्ताप करावा व आमच्या प्रभु येशू ख्रीस्तावर
विश्वास ठेवावा, याविषयीं प्रमाण पटविलें. २२
पण आतां पाहा, मी आत्म्याने बांधलेला यरूशले-
माकडे जातों, तेथें मला काय काय होईल हें न
कळे. २३ केवळ हें कळलें कीं, बंधनें व संकटें
माझी वाट पाहतात, याविषयीं पवित्र आत्मा मला
प्रत्येक नगरांत सुचवितो. २४ तथापि मी कशा-
चीहि काळजी करीत नाहीं, आपला प्राणहि मी
प्रिय मानीत नाहीं, यासाठीं कीं म्या आपली धाव
आणि देवाच्या कृपेच्या शुभवर्त्तमानाची साक्ष देण्या-
ची जी सेवा मला प्रभु येशूपासून प्राप्त झाली,
ती हर्षाने शेवटास न्यावी. २५ आणि आतां
पाहा, ज्यांमध्यें मी देवाचें राज्य गाजवीत फिरलों
त्या तुह्मा सर्वांच्या माझें तोंड पुढें दृष्टीस पड-
णार नाहीं, हें मला समजलें. २६ ह्मणून या
आजच्या दिवशीं मी तुह्मास साक्षीस ठेवितों कीं,
सर्वांच्या रक्ताविषयीं मी निर्दोष आहें. २७ का-
रण कीं देवाचा संपूर्ण मनोरथ तुह्मास सांगण्या-
विषयीं म्या अंतर केलें नाहीं. २८ तर तुह्मी
आपणांस व ज्या कळपावर पवित्र आत्म्याने तुह्मास
अध्यक्ष करून ठेविलें त्या सर्वांस संभाळा, यासाठीं
कीं देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने विकत
घेतली तिचें पाळण तुह्मी करावें. २९ कां तर
हें मला कळलें कीं, मी गेल्यावर कळपाची दया
न करणारे क्रूर लांडगे तुह्मामध्यें शिरतील. ३०
आणि तुह्मामधूनहि माणसें उठून शिष्यांस आप-
ल्या मागें ओढण्यासाठीं विपरीत गोष्टी बोलतील.
३१ यास्तव सावध असा, आणि हें आठवा कीं,
तीन वर्षे रात्रंदिवस मी तुह्मा प्रत्येकास आसवांनी
बोध करितां राहिलों नाहीं. ३२ तर आतां अहो
भावांनो, मी तुह्मास देवाकडे व त्याच्या कृपेच्या
वचनाकडे निरवितों, तो तर तुमची वृद्धि करायास
व सर्व पवित्र केलेल्यांमध्यें तुह्मास वतन द्यायास
समर्थ आहे. ३३ म्या कोणाच्या रुप्याचा किंवा
सोन्याचा किंवा वस्त्राचा लोभ धरिला नाहीं. ३४
तुह्मीहि जाणतां कीं माझ्या गरजांसाठीं व माझ्या
सोबत्यांसाठीं या हातांनी श्रम केले आहेत. ३५
सर्व प्रकारें म्या तुह्मास दाखविलें आहे कीं, याप्र-
माणें मेहनत करीत तुह्मी दुर्बळ लोकांचें सहाय
करावें, आणि घ्यावें यापेक्षां द्यावें हें चांगलें आहे,

असें जें प्रभु येशूचें बोलणें त्याची आठवण करावी.
३६ हें ह्मटल्यावर त्याने गुडघे टेंकून त्या सर्वांब-
रोबर प्रार्थना केली. ३७ तेव्हां सर्वांनी मोठा
शोक केला व पौलसाच्या मानेवर पडून त्याचा
मुका घेतला. ३८ माझें तोंड पुढें तुमच्या दृष्टीस
पडणार नाहीं, असें त्याने ह्मटलें होतें, यावरून
त्यांस विशेष दुःख वाटलें; मग त्यांनी त्याला तार-
वापर्यंत बोळविलें.

## अध्याय २१.

मग असें झालें कीं, आह्मी त्यांस सोडून हाका-
रून नीट वाटेने कोसास गेलों, व दुसऱ्या
दिवशीं रोदसास व तेथून पातऱ्यास गेलों. २
आणि फैनीकेस जाणारें तारूं मिळालें ह्मणून त्यांत
आह्मी बसून गेलों; ३ आणि कुप्रस दृष्टीस पडलें
तेव्हां तें डावीकडे टाकून आह्मी सुर्यास जाऊन
सोरास उतरलों, कां तर तेथें तारवाची भरगत
उतरायाची होती. ४ आणि कोणी शिष्य आ-
ह्मास मिळाले ह्मणून आह्मी तेथें सात दिवस
राहिलों, त्यांनी आत्म्याकडून पौलसाला ह्मटलें
कीं, त्वां यरूशलेमास जाऊं नये. ५ मग असें
झालें कीं, ते दिवस पूर्ण झाल्यानंतर आह्मी निघून
गेलों, तेव्हां बायका व लेंकरें यांसुद्धां सर्वांनी आ-
ह्मास नगराबाहेर वाटेस लाविलें, मग समुद्राच्या
तिरीं आह्मी गुडघे टेंकून प्रार्थना केली. ६ आणि
एकमेकांस क्षेमालिंगन करून आह्मी तारवांत बसलों,
आणि ते आपल्या घरांस माघारे गेले. ७ मग
सोरापासून आह्मी जळमार्ग संपवून प्तलमयसास
आलों, आणि भावांस भेटून त्यांच्या जवळ एक दिवस
राहिलों. ८ आणि दुसऱ्या दिवशीं पौलस व त्याचे
सोबती आह्मी निघून कैसरियास आलों, आणि
त्या सातांतील एक शुभवार्त्तिक फिलिप्पस होता,
याच्या घरीं जाऊन त्याजवळ राहिलों. ९ त्याला
चार कुमारी कन्या भविष्यवादिणी अशा होत्या.
१० तेथें आह्मी बहुत दिवस राहत असतां अग-
बस नामक कोणीएक भविष्यवादी यहूद्यापासून
खालीं आला. ११ तो आह्माकडे येऊन व
पौलसाचा कमरबंध घेऊन, आपले हात पाय
बांधून ह्मणाला, पवित्र आत्मा असें ह्मणतो कीं,
ज्या मनुष्याचा हा कमरबंध आहे त्याला यरूश-
लेमांत यहूदी लोक याप्रमाणें बांधून विदेशी लो-
कांच्या हातीं देतील. १२ हें ऐकून आह्मी व
तेथल्या भावांनी त्याला विनंती केली कीं, यरू-
शलेमास जाऊं नये. १३ तेव्हां पौलसाने उत्तर
दिल्हें कीं, तुह्मी रडतां व माझें अंतःकरण खच-
वितां असें कां करितां? कां तर मी बंधांत पडण्यास
केवळ नव्हे, तर प्रभु येशूच्या नांवासाठीं यरूश-
लेमांत मरायास तयार आहें. १४ तेव्हां तो
मान्य होईना, ह्मणून आह्मी स्वस्थ राहून ह्मटलें,
प्रभूच्या इच्छेप्रमाणें होवो.

१५ त्या दिवसांनंतर आह्मी आपलें खटलें
घेऊन यरूशलेमास वर गेलों. १६ आणि आ-
मच्या बरोबर कैसरियांतील कित्येक शिष्यहि आ-
ले, त्यांनी ज्याच्या घरीं आह्मी राहावें, असा
कोणीएक कुप्रसी म्नासोन पुरातन शिष्य, त्याला
आणिलें.

१७ यरूशलेमास आल्यावर भावांनी हर्षकरून
आमचें आगतस्वागत केलें. १८ मग दुसऱ्या दि-
वशीं आह्मासुद्धां पौलस याकोबाच्या एथें गेला.
आणि सर्व वडीलहि मिळाले. १९ तेव्हां त्याने
त्यांस आलिंगन देऊन आपल्या सेवेकडून जीं सर्व
देवाने विदेशी लोकांमध्यें केलीं तीं प्रत्येक सवि-
स्तर सांगितलीं. २० हें ऐकून त्यांनी प्रभूचें गौ-
रव केलें, व त्याला ह्मटलें, भावा, विश्वास ठेवि-
णारे यहूदी किती हजारों आहेत, हें तूं पाहतोस.
आणि ते सर्व नेमशास्त्राभिमानी आहेत. २१
आणि तुजविषयीं त्यांनी ऐकिलें आहे कीं, तूं वि-
देशी लोकांमधील सर्व यहूद्यांस मोश्याला सोडून
द्यायास शिकवून ह्मणत असतोस कीं, आपल्या
लेंकरांची सुंता करूं नये, व पूर्वपाठांनी चालूं नये.
२२ तर काय? समुदाय जमल्यावांचून राहणारच
नाहीं, कां कीं तूं आला आहेस हें ते ऐकतील.
२३ यास्तव आह्मी तुला सांगतों तें हें कर.
ज्यांनी नवस केला आहे असे आमच्या जवळ चौघे
जण आहेत. २४ त्यांस घेऊन त्यांनी मुंडण
करावें ह्मणून त्यांसहित शुद्ध हो, आणि त्यांजब-
रचा खर्च तूं कर, ह्मणजे तुजविषयीं जें ऐकिलें
त्यांतील कांहीं खरें नाहीं, तर तूं स्वतां नेमशास्त्र
पाळून चालतोस, असें सर्वांस समजेल. २५
विश्वासणारे विदेशी तर यांनी असा कांहीं नेम पाळूं
नये, केवळ मूर्त्तींस अर्पिलेलें, व रक्त व गुदमरून
मेलेलें व व्यभिचार यांपासून त्यांनी दूर असावें,
असें आह्मी त्यांविषयीं निर्णय करून लिहून पाठ-
विलें आहे.

२६ तेव्हां पौलसाने त्या माणसांस घेतलें, आणि

[सन्या दिवशीं त्यांच्या सुद्धां शुद्ध होऊन शुद्धतेचे
दिवस पूर्ण झाले असें दाखवून, त्यांतील एकेका-
साठीं अर्पण करितील तोंपर्यंत तो देवळांत जाऊन
राहिला. २७ आणि ते सात दिवस पूर्ण होणार
होते, तेव्हां आश्यांतले यहूदी यानी त्याला देव-
ळांत पाहून सर्व समुदायाला भर दिल्ही, आणि
त्याजवर हात टाकून, २८ ओरडत ह्मटलें, अहो
इस्राएल लोकानो, धावा; आमचे लोक व शास्त्र व हें
ठिकाण याविरुद्ध जो सर्व ठिकाणीं सर्वांस उपदेश
करितो तो हाच आहे, अणखी याने हेल्लेनीहि
देवळांत आणून हें पवित्र स्थान विटाळिलें आहे.
२९ कारण कीं त्यानी त्रोफिम्रस एफससकर याला
पूर्वीं त्याच्या बरोबर नगरांत पाहिलें होतें त्याला
पौलसाने देवळांत आणिलें असेल, असी त्यानी
कल्पना केली. ३० तेव्हां सर्व नगरांत गोंधळ हो-
ऊन लोकांची गर्दी झाली, आणि त्यानी पौलसाला
धरून देवळांतून ओढून काढिलें, लागलेच दरवाजे
बंद झाले. ३१ मग ते त्याला जीवें मारायाला
पाहत आहेत इतक्यांत फौजेच्या सर्दाराला वर्त्त-
मान आलें कीं, सर्व यरूशलेम गलबललें. ३२
तेव्हांच तो शिपायी व जमादार यांस घेऊन त्यांज-
कडे खालीं धावला, तेव्हां सर्दार व शिपायी यांस
पाहून ते पौलसाला मारितांना राहिले. ३३ तेव्हां
सर्दाराने जवळ येऊन त्याला धरून आज्ञा केली
कीं, दोन सांखळ्यानी याला बांधा; मग हा कोण
आहे व याने काय केलें, असें त्याने विचारिलें.
३४ तेव्हां समुदायाची वेगवेगळी आरोळी झाली,
आणि गलबल्यामुळें कांहीं बरोबर कळेना, ह्मणून
त्याला गढींत न्यावें असी त्याने आज्ञा केली. ३५
तो पायऱ्यांवर आला तेव्हां असें झालें कीं, समुदा-
याच्या गर्दीमुळें शिपायानी त्याला उचलून नेलें.
३६ कारण कीं लोकांचा समुदाय पाठीमागें जाऊन
ओरडत होता कीं, याला काढून टाका.

३७ आणि पौलसाला गढींत नेत होते तेव्हां
त्याने सर्दाराला ह्मटलें कीं, आपणासीं कांहीं बोला-
याला मला आज्ञा होईल काय? तो ह्मणाला, हे-
ल्लेनी भाषा तुला येती काय? ३८ ज्या मिस-
रीने या दिवसांपूर्वी बंड करून चार हजार घातक
माणसांस रानांत नेलें तोच तूं आहेस कीं नाहीं?
३९ तेव्हां पौलसाने ह्मटलें कीं, मी किलिक्यांतील
तार्ससकर यहूदी माणूस आहें, हलक्या नगराचा
राहणारा नव्हें, तर तुला विनंती करितों कीं, लो-
कांसीं बोलायाला मला आज्ञा दे. ४० त्याने आज्ञा
दिल्ह्यावर, पौलसाने पायऱ्यांवर उभें राहून हाताने
लोकांस खुणाविलें, मग मोठें निवांतपण झाल्या-
वर तो त्यांसीं इब्री भाषेंत याप्रमाणें बोलला,

## अध्याय २२.

अहो भावानो व बापानो, आतां माझें तुह्मास
प्रत्युत्तर ऐका. २ तेव्हां तो त्यांसीं इब्री
भाषेंत बोलला, असें ऐकून ते अधिक स्वस्थ झाले.
३ आणि त्याने ह्मटलें, मी तर यहूदी माणूस आ-
हें, किलिक्यांतील तार्ससांत मी जन्मलों, परंतु
या नगरांत गमलियेलाच्या पायांजवळ वाढून
वडिलांच्या शास्त्राच्या नीट विचाराप्रमाणें शिक्षित
झालों, आणि जसे तुह्मी सर्व आज आहां तसा मी
देवाविषयीं आवेशी होतों. ४ म्या पुरुष व बा-
यका यांस बांधून बंदिशाळेंत घालून मरणपर्यंत या
पंथाचा पाठलाग केला. ५ याविषयीं मुख्य याजक
व अवघा वडिलांचा वर्ग मला साक्षी आहे; त्यांपा-
सून भावांस पत्रेंहि घेऊन दमास्कसास गेलों, यासा-
ठीं कीं जे तेथें होते त्यांसहि बांधून यरूशलेमांत
शासन करायास आणावें. ६ मग असें झालें कीं,
मी जातां जातां दमास्कसाजवळ गेलों, तेव्हां सुमारें
दुपारच्या वेळेस आकाशापासून मोठा प्रकाश मा-
झ्या सभोंवता एकाएकीं चकाकला. ७ तेव्हां मी
भूमीवर पडलों, आणि, शौला शौला, माझा पाठ-
लाग कां करितोस, असी वाणी मजसीं बोलतां म्या
ऐकिली. ८ मग म्या उत्तर केलें कीं, हे प्रभू, तूं
कोण आहेस? तेव्हां त्याने मला ह्मटलें कीं,
ज्या नाझोरी येशूचा पाठलाग तूं करितोस, तोच मी
आहें. ९ तेव्हां माझ्या बरोबर जे होते त्यानी
प्रकाश पाहिला खरा, आणि ते भ्याले, परंतु मजसीं
बोलणाऱ्याची वाणी त्यानी ऐकिली नाहीं. १०
मग मी ह्मणालों, हे प्रभू, म्या काय करावें? तेव्हां
प्रभूने मला ह्मटलें, उठून दमास्कसांत जा, मग
त्वां जें जें करावें ह्मणून नेमिलें तें सर्व तुला तेथें
सांगतील. ११ त्या तेजाच्या चकचकाटामुळें मला
दिसेनासें झालें, ह्मणून मी आपल्या सोबत्यांचा
हात धरून दमास्कसांत गेलों. १२ मग अनान्या
नामक कोणीएक माणूस होता, तो नेमशास्त्राप्र-
माणें धार्मिक, आणि तेथल्या सर्व राहणाऱ्या यहूद्यां-
कडून नावाजलेला असा होता; १३ त्याने मज-
कडे येऊन उभें राहून मला ह्मटलें, शौल भावा,

वर पाहा; आणि त्याच घटकेस म्या त्याजकडे वर
पाहिलें. १४ मग तो ह्मणाला कीं, आमच्या
पूर्वजांच्या देवाने तुला निवडिलें आहे, यासाठीं कीं
त्वां त्याची इच्छा जाणावी, आणि त्या न्यायीला
पाहावें आणि त्याच्या तोंडाची वाणी ऐकावी. १५
कां तर जें त्वां पाहिलें व ऐकिलें, त्याविषयीं तूं
सर्व माणसांजवळ त्याचा साक्षी होसील. १६ तर
आतां उशीर कां करितोस? ऊठ, बाप्तिस्मा घे,
आणि प्रभूचें नांव घेतां आपलीं पापें धुऊन टाक.
१७ मग असें झालें कीं, मी यरूशलेमास माघारें
आल्यावर, देवळांत प्रार्थना करीत असतां मी भान-
रहित झालों. १८ तेव्हां म्या त्याला पाहिलें, आ-
णि तो मजसीं बोलला कीं, घाई करून यरूशले-
मांतून लवकर निघून जा, कारण कीं मजविषयींची
तुझी साक्ष ते मान्य करणार नाहींत. १९ तेव्हां
मी ह्मणालों, हे प्रभू, त्यांस ठाऊक आहे कीं, जे
तुजवर विश्वास ठेवीत होते त्यांस मी बंदांत घालीत
व प्रति सभास्थानांत ताडन करीत असें. २० आ-
णि तुझा साक्षी स्तेफनस याचा घात झाला तेव्हां
मी स्वतां जवळ उभा होतों व त्याच्या घाताला
मान्य होतों, आणि त्याचा घात करणाऱ्यांचीं वस्त्रें
मी राखीत होतों. २१ तेव्हां त्याने मला सांगि-
तलें, चाल, कां कीं मी तुला दूर विदेशी लोकांकडे
पाठवितों.

२२ त्यांनी या वाक्यापर्यंत त्याचें ऐकिलें, मग
ते मोठ्याने ओरडून बोलले, याला पृथ्वीवरून
काढून टाका, कां कीं हा वांचायास योग्य नाहीं.
२३ ते ओरडूं लागले व आपलीं वस्त्रें टाकून
आकाशांत धूळ उधळूं लागले, २४ तेव्हां सर्दा-
राने असी आज्ञा दिल्ही कीं, त्याला गढींत आणावें,
आणि ते त्याजवर इतके कां ओरडले हें जाणण्या-
करितां त्याला फटके मारून विचारपूस करावी.
२५ मग ते त्याला वाध्यांनी ताणीत असतां,
जवळ उभें राहणाऱ्या शतपतीला पौलसाने ह्मटलें
कीं, रोमी माणूस व अन्यायी ठरविलेला नाहीं,
याला फटके मारायाला तुह्मास अधिकार आहे
काय? २६ हें ऐकून शतपतीने सर्दाराजवळ
जाऊन सांगितलें कीं, तूं जें काय करणार आहेस
त्याविषयीं संभाळ, कां कीं तो माणूस रोमी आहे.
२७ तेव्हां सर्दार त्याच्या जवळ येऊन ह्मणाला,
मला सांग, तूं रोमी आहेस काय? त्याने ह्मटलें,
होय. २८ मग सर्दाराने उत्तर केलें कीं, हा
हक्क म्या बहुत मोलाने विकत घेतला आहे. तेव्हां
पौलसाने ह्मटलें, मी तर जन्मापासून असाच आहें.
२९ यावरून लागलेच त्याची चौकसी करणार होते
ते त्याला सोडून गेले, सर्दारहि हा रोमी आहे असें
जाणून भ्याला, कां कीं त्याने त्याला बांधिलें होतें.
३० मग दुसऱ्या दिवसीं, त्याचा आरोप यहूदी
लोकांनी त्याजवर आणिला त्याचा निश्चय जाणावा,
असें सर्दाराच्या मनांत होतें, ह्मणून त्याने त्याला
बंदांतून सोडिलें, आणि मुख्य याजक व त्यांची
अवघी सभा यांस मिळण्याची आज्ञा करून पौल-
साला खालीं आणून त्यांपुढें उभें केलें.

## अध्याय २३.

मग पौलस सभेकडे नीट पाहून ह्मणाला, अहो
भावानो, मी आजपर्यंत पूर्ण सद्भावेंकरून
देवासीं वर्त्तलों. २ तेव्हां प्रमुख याजक अनान्या
याने त्याजवळच्या उभें राहणाऱ्यांस त्याच्या तोंडांत
मारावें ह्मणून आज्ञा केली. ३ तेव्हां पौलस
त्याला बोलला, हे पांढऱ्या केलेल्या भिंती, तुला
देव मारणार आहे; तूं तर नेमशास्त्राप्रमाणें माझा
न्याय करायाला बसला असतां, शास्त्राविरुद्ध
मला मारावें, असी आज्ञा देतोस काय? ४ तेव्हां
जवळ उभे राहणारे ह्मणाले, देवाच्या प्रमुख याज-
काला तूं निंदितोस काय? ५ पौलसाने ह्मटलें,
भावानो, हा प्रमुख याजक आहे, हें मला ठाऊक
नव्हतें, कारण कीं तूं आपल्या लोकांच्या अधिका-
ऱ्याची निंदा करूं नये, असें लिहिलें आहे. ६
तेव्हां एक विभाग सदोकी व एक विभाग परोशी
आहे, असें जाणून पौलस सभेमध्यें मोठ्याने बो-
लला, अहो भावानो, मी परोशी, परोश्याचा पुत्र
आहें, मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याच्या आशेविषयीं
माझी विचारपूस होत आहे. ७ तो हें बोलल्या-
वर, परोशी व सदोकी यांचा कलह झाला व समु-
दायाची फूट झाली. ८ कारण कीं पुन्हा उठणें
नाहीं व दूत व आत्माहि नाहीं, असें सदोकी
ह्मणतात, परोशी तर हीं दोन्ही मान्य करितात.
९ तेव्हां मोठा गलबला झाला, आणि जे शास्त्री
परोश्यांचे पक्षपाती ते उठून भांडत ह्मणाले, या
माणसाचा कांहीं अपराध आह्माला दिसत नाहीं,
जर आत्मा किंवा दूत त्यासीं बोलला असेल तर
आह्मी देवासीं भांडूं नये. १० त्यांचा मोठा
कलह लागल्यावर, ते पौलसाला फाडून टाकितील,

असें भय धरून सर्दाराने शिपायास आज्ञा केली
कीं, खालतें जाऊन त्याला त्यांमधून काढून गढींत
आणा.

११ त्याच रात्रीं प्रभु त्याजवळ उभा राहून
ह्मणाला, पौलसा, धीर धर, जसी त्वां यरूशले-
मांत मजविषयींच्या गोष्टींची साक्ष दिल्ही, तसी
रोमांतहि तुला द्यावी लागेल. १२ मग दिवस
उगवल्यावर, कित्येक यहूदी कट करून आपणावर
शपथ घेऊन ह्मणाले कीं, आपण पौलसाला जीवें
मारूं तोंपर्यंत खाणार पिणार नाहीं. १३ ज्यानी
ही शपथ घेतली ते तर चाळिसांवर होते. १४
ते मुख्य याजक व वडील यांजकडे येऊन ह्मणाले,
पौलसाला जीवें मारूं तोंपर्यंत आह्मी कांहीं खा-
णार नाहीं, असी शपथ आह्मी आपणांवर घेतलीच
आहे. १५ तर आतां त्याच्या विषयीं अणखी
कांहीं नीट विचारावें, या निमित्ताने त्याला तुह्माकडे
उद्यां आणावें असें सभेसुद्धां तुह्मी सर्दाराला सम-
जवा, ह्मणजे तो जवळ आल्यापूर्वी त्याला वधा-
याला आह्मी तयार आहों. १६ पौलसाच्या
भाच्याने कटाविषयीं ऐकिल्यावर, जाऊन व गढीमध्यें
शिरून पौलसाला सांगितलें. १७ तेव्हां पौल-
साने एका शतपतीला बोलावून ह्मटलें कीं, या तर-
ण्याला सर्दाराकडे घेऊन जा, कारण कीं याला त्यास
कांहीं सांगायाचें आहे. १८ तेव्हां त्याने त्याला
घेऊन सर्दाराकडे नेऊन ह्मटलें, बंदिवान पौलस याने
मला बोलावून विनंती केली कीं, या तरण्याला
तुजकडे आणावें, कां तर त्याला तुजसीं कांहीं बोला-
याचें आहे. १९ तेव्हां सर्दाराने त्याचा हात
धरून त्याला एकीकडे नेऊन विचारिलें, मला सां-
गायाचें आहे तें काय? २० तो ह्मणाला, यहू-
द्यानी एकोपा केला आहे कीं, पौलसाचें अणखी
कांहीं नीट विचारून घ्यावें, या निमित्ताने त्याला
उद्यां खालीं सभेमध्यें आणावें, असी तुजपासीं
विनंती करावी. २१ तर तूं त्यांचें ऐकूं नको, कां
कीं त्यांतलीं चाळिसांवर माणसें त्यासाठीं टपून
बसलीं आहेत, त्यानी शपथ घेतली आहे कीं,
त्याला जीवें मारूं तोंपर्यंत आह्मी खाणार पिणार
नाहीं; आणि आतां तुझ्या वचनाची वाट पाहत
असतां ते तयार आहेत. २२ तेव्हां, त्वां या
गोष्टी मला समजाविल्या हें कोणाला सांगूं नको,
असें सर्दाराने तरण्याला बजावून सांगून त्याला
निरोप दिल्हा. २३ आणि त्याने दोघां शतपतींस
बोलावून सांगितलें, कैसरियास जायाला दोनशें
शिपायी व सत्तर स्वार व दोनशें भालेकरी, यास
प्रहर रात्रीस तयार करून ठेवा. २४ आणि
पाठाळें मिळवून त्यांजवर पौलसाला बसवून फे-
लिक्ष सुभेदाराकडे संभाळून न्या. २५ मग त्याने
अशा मजकुराचें पत्र लिहिलें कीं, २६ राजमान्य
फेलिक्ष सुभेदार यास क्लौदियस लुसियसाचा
सलाम. २७ हा मनुष्य यहूद्यानी धारिला होता
आणि याचा घात त्यांजकडून होणार होता, तेव्हां
हा रोमी आहे, असें समजून म्या सैन्यासुद्धां
जाऊन याला सोडविलें. २८ आणि त्यानी कोण-
त्या कारणास्तव याजवर आरोप आणिला, हें
जाणायास माझ्या मनांत होतें, ह्मणून त्यांच्या सभे-
मध्यें म्या त्याला आणिलें. २९ तेव्हां त्यांच्या
नेमशास्त्रसंबंधी विचारांविषयींचा कांहीं आरोप
त्याजवर आला, परंतु मरणास किंवा बंधनास योग्य
असा कांहीं आरोप त्याजवर नाहीं, असें मला
समजलें. ३० यहूदी तर या माणसावर कट कर-
णार होते, असें मला सुचविल्यावर, लागलेंच
तुजकडे म्या याला पाठविलें आहे, वाद्यांसहि म्या
आज्ञा केली कीं, त्याजवर जो वाद तो त्यानी तुझ्या
जवळ सांगावा. सुखरूप असा.

३१ नंतर शिपायानी आज्ञेप्रमाणें पौलसाला
घेऊन रात्रीस अंतिपत्रिसास नेलें. ३२ मग
दुसऱ्या दिवसीं त्याला पोहंचविणाऱ्या स्वारांस
सोडून ते गढींत परत आले. ३३ त्यानी कैस-
रियांत जाऊन व सुभेदाराला पत्र देऊन पौलसा-
लाहि त्याजवळ उभें केलें. ३४ मग सुभेदाराने
तें पत्र वाचून विचारिलें कीं, हा कोणत्या वालु-
क्याचा आहे? आणि किलिक्यांतला आहे असें
समजल्यावर, ३५ त्याने ह्मटलें कीं, तुझे वादीहि
समक्ष होतील तेव्हां मी तुझें ऐकेन. आणि त्याने
आज्ञा केली कीं, याला हेरोदाच्या सरकारवाड्यांत
राखावें.

## अध्याय २४.

मग पांच दिवसांनंतर प्रमुख याजक अनान्या
वडिलांसुद्धां व कोणीएक वक्ता तर्तुल्लस या-
सुद्धां खालीं आला, त्यानी पौलसाचा दोष सुभे-
दाराला दाखवून दिल्हा. २ त्याला बोलाविल्या-
वर तर्तुल्लस त्याजवर दोषारोप करीत ह्मणूं
लागला; फेलिक्ष महाराज, तुझ्या योगाने आह्मास

फार स्वस्थता आहे आणि तुझ्या देखरेखीने या
राष्ट्रांत सुधारणा होत असती, ३ यास्तव आह्मी तीं
सर्वदा व सर्वत्राहि पूर्ण कृतज्ञतेने मानितों. ४ परंतु
तुला म्या फार उशीर करूं नये ह्मणून विनंती
करितों कीं, कृपा करून आमचें थोडक्यांत ऐकावें.
५ कां कीं हा माणूस केवळ पीडा आह्मास सांप-
डला आहे, आणि जगांतल्या सर्व यहूद्यांमध्यें बंड
उठविणारा, व नाझोरी लोकांच्या पंथाचा पुढारी
आहे. ६ हा देऊळहि विटाळायाला पाहत
होता, तेव्हां आह्मी याला धरून आमच्या नेम-
शास्त्राप्रमाणें याचा न्याय ठरविण्यास पाहत होतों.
७ पण लुसियस सर्दाराने येऊन, मोठ्या बलात्का-
राने याला आमच्या हातांतून काढून नेलें, ८
आणि याच्या वाद्यांस तुजकडे येण्याची आज्ञा केली.
त्याची आपण चौकसी केली तर ज्याचा दोष
आह्मी यावर ठेवितों, त्या सर्वांविषयीं निश्चय
तुला करितां येईल. ९ तेव्हां यहूदीहि या गोष्टी
तशाच आहेत, असें बोलून मान्य झाले.

१० मग सुभेदाराने पौलसाला बोलण्याविषयीं
खुणाविल्यावर त्याने उत्तर दिल्हें कीं, तूं बहुत वर्षें
या देशांत न्यायाधीश आहेस असें समजून मी
आपल्या गोष्टींविषयीं अधिक संतोषाने प्रत्युत्तर देतों.
११ तर आपणास कळावें कीं, मला यरूशलेमांत
भजन करायास जाऊन अझून बारांवर अधिक दिवस
झाले नाहींत. १२ आणि देवळांत कोणासीं विवाद
करितांना किंवा सभास्थानांमध्यें किंवा नगरांत समु-
दायाचें बंड उठवितांना मी त्यांस सांपडलों नाहीं.
१३ आणि ज्यांचा दोषारोप ते मजवर आतां करि-
तात, त्यांचें प्रतिपादन त्यांच्याने करवत नाहीं.
१४ परंतु हें मी तुजपासीं कबूल करितों कीं, ज्या
मार्गाला ते पाखंड ह्मणतात त्याप्रमाणें मी आपल्या
पूर्वजांच्या देवाची भक्ति करितों, आणि नेमशास्त्रांत
व भविष्यलेखांमध्यें जें जें लिहिलें त्या सर्वांवर
विश्वास ठेवून, १५ ते आपणहि योग्य मानितात, ती
ही देवाची आशा धरितों, असी कीं मेलेले न्यायी व
अन्यायीहि यांचें पुन्हा उठणें होईल. १६ आणि
याविषयीं मी झटतों कीं, देवाविषयीं व माणसां-
विषयीं माझें मन सर्वकाळ निर्दोष असावें. १७
तर बहुत वर्षांनंतर मी आपल्या लोकांस धर्म करा-
यास व अर्पणें वाहायास आलों. १८ हीं करीत
असतां मी शुद्ध झालेला असा देवळांत घोळक्या-
शिवाय व गडबडीशिवाय आशियांतील कित्येक यहू-
द्यांस अढळलों. १९ त्यांस माझा कांहीं दोष
ठेवायाचा असता तर त्यानी तुझ्या समक्ष येऊन
सांगायाचा होता. २० किंवा यानी तरी स्वतां
सांगावें कीं, मी सभेंत उभा राहिलों तेव्हां माझा
कांहीं दोष त्यांस दिसून आला काय? २१ दोष
असला तर केवळ या एका वाक्याविषयीं, कीं त्यांम-
ध्यें मी उभा राहून मेलेल्यांच्या पुन्हां उठण्याविषयीं
माझा न्याय तुह्मी आज ठरवितां, हें मोठ्याने
बोललों.

२२ हें ऐकून फेलिक्षाने त्या मार्गाविषयीं अधिक
नीट समजून त्यांस तकूब ठेविलें व ह्मटलें, लुसि-
यस सर्दार येईल तेव्हां तुमचें प्रकरण पुरते-
पणें जाणेन. २३ आणि त्याने शतपतीला आज्ञा
केली कीं, पौलसाला मोकळें राखावें, आणि त्याच्या
स्वकीयांस त्याची सेवा करण्याविषयीं किंवा त्याज-
कडे येण्याविषयीं मना करूं नये.

२४ मग कांहीं दिवसांनंतर फेलिक्षाने आपली
बायको द्रुसिल्ला यहूदीण होती तिजसुद्धां येऊन
पौलसाला बोलाविलें, आणि ख्रीस्ताकरल्या विश्वा-
साविषयीं त्यापासून ऐकिलें. २५ तेव्हां न्यायी-
पण व इंद्रियदमन व होणारा न्याय यांविषयीं
तो बोलत असतां, फेलिक्षाने भयभीत होऊन ह्म-
टलें, आतां तूं जा, संधि पाहून तुला बोलावीन.
२६ अणखी त्याने आशाहि धरिली कीं, पौलस
आपली सुटका म्या करावी ह्मणून मला द्रव्य देईल,
यास्तव त्याने त्याला वारंवार बोलावून आणून त्यासीं
संवाद केला. २७ परंतु दोन वर्षें भरल्यानंतर
फेलिक्षाच्या बदलीवर पर्कयस फेस्तस आला,
तेव्हां यहूद्यांची मर्जी संपादावी असें फेलिक्ष मनांत
आणून पौलसाला कैदेंत ठेवून गेला.

## अध्याय २५.

मग फेस्तस सुभ्यावर येऊन तीन दिवसांनंतर
कैसरियाहून यरूशलेमास वर गेला. २ तेव्हां
प्रमुख याजक व यहूद्यांतील श्रेष्ठ यानी त्याच्या
जवळ पौलसावर फिर्याद केली; ३ आणि त्याज-
विरुद्ध विनंती करून त्याला यरूशलेमांत बोला-
वून घ्यावें असें त्याजवळ मागितलें, आणि ते वाटेंत
त्याचा घात करावा ह्मणून दबा धरीत होते. ४
मग फेस्तसाने उत्तर दिल्हें कीं, पौलस कैसरि-
यांत राखावा, मीहि तिकडे लवकर जाणार आहें.
५ ह्मणून त्या माणसाचा कांहीं अपराध असला तर

ग्रांतील ज्यांस ठेववेल त्यानी बरोबर येऊन त्याज-
: दोष ठेवावा, असें ह्मटलें. ६ मग तो त्यां-
ध्यें दाहांवर अधिक दिवस राहून कैसारियास
गा, आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें न्यायासनावर
नून पौलसाला आणायाची आज्ञा केली. ७ तो
ल्यावर, यरूशलेमाहून आलेले यहूदी यानी
च्या सभोंवते उभे राहून पौलसावर ज्यांचा
वा त्यांच्याने करवेना, असे बहुत व भारी दोष
वले. ८ त्याने प्रत्युत्तर केलें कीं, यहूद्यांच्या
शास्त्राविषयीं किंवा देवळाविषयीं किंवा कैसा-
विषयीं म्या कांहीं अपराध केला नाहीं. ९
ंतु फेस्तसाने यहूद्यांची मर्जी संपादावी असें
ांत आणून पौलसाला उत्तर दिल्हें कीं, यरू-
लेमास जाऊन तेथें माझ्या समोर या गोष्टीं-
षयीं तुझी चौकसी व्हावी, असी तुझी इच्छा
हे काय? १० तेव्हां पौलसाने ह्मटलें कीं,
साराच्या न्यायासनापुढें मी उभा राहिलों आहें,
थें माझी चौकसी झाली पाहिजे; म्या यहूद्यांचा
हीं अन्याय केला नाहीं, हें तूंहि पुरतें जाणतोस.
१ कारण कीं मी अन्यायी असलों किंवा मरणास
ग्य असें कांहीं म्या केलें असलें, तर मी मरा-
स अमान्य नाहीं, परंतु त्यानी मजवर दोष आणि-
त्यांत जर कांहीं नाहीं, तर त्यांच्या स्वाधीन
ला कोणी करूं नये; मी कैसाराकडे चौकसी
गतों. १२ तेव्हां फेस्तसाने सभेची मसलत
ऊन उत्तर दिल्हें कीं, कैसाराकडे चौकसी मागि-
तलीस तर कैसारापाशीं जासील.

१३ मग कांहीं दिवस झाल्यावर, अग्रिप्पा राजा
बरनीके हीं फेस्तसाची भेट घ्यायासाठीं कैस-
यास आलीं. १४ तेथें बहुतेक दिवस राहत
सतां, फेस्तसाने राजाला पौलसाची गोष्ट काढून
टलें कीं, फेलिक्षाने ठेविलेला कोणीएक बंदिवान
णूस आहे. १५ त्याजवर मी यरूशलेमास
तों तेव्हां यहूद्यांच्या मुख्य याजकानी व वडिलानी
र्याद करून त्याविरुद्ध न्याय व्हावा ह्मणून विनंती
ली. १६ त्यांस म्या उत्तर दिल्हें कीं, ज्याज-
र दोष ठेविला त्याला दोष ठेवणाऱ्यांची समक्षता
ऊन आरोपाविषयीं प्रत्युत्तर देण्याचा प्रसंग झा-
यापूर्वी कोणत्याहि माणसाला मारण्यास सोपावें
सी रोमी लोकांची रीत नाहीं. १७ यास्तव ते
थें आल्यावर म्या कांहीं उशीर न करितां दुसऱ्या
वसीं न्यायासनावर बसून त्या माणसाला आणा-
याची आज्ञा दिल्ही. १८ त्याजवर वादी उभे
असतां, ज्या गोष्टी माझ्या मनांत होत्या त्यांतील
कांहीं आरोप त्यानी ठेविला नाहीं. १९ केवळ
आपल्या धर्माविषयीं व कोणी मेलेला येशू जो जिवंत
आहे ह्मणून पौलसाने सांगितलें त्याविषयीं यासीं
त्यांचा वाद होता. २० तेव्हां असल्या वादा-
विषयीं मला संशय वाटला ह्मणून म्या ह्मटलें कीं,
यरूशलेमास जाऊन तेथें या गोष्टींविषयीं तुझी
चौकसी व्हावी असी तुझी इच्छा आहे काय? २१
तेव्हां पादशाहाकडे चौकसी व्हायासाठीं मला
राहूं द्या, असें पौलसाने मागितलें, यास्तव म्या आज्ञा
केली कीं, याला कैसाराकडे पाठवीन तोंपर्यंत त्याला
ठेवावें. २२ तेव्हां अग्रिप्पाने फेस्तसाला ह्मटलें
कीं, म्याहि त्या माणसाचें ऐकावें असें मनांत आहे;
याने उत्तर दिल्हें कीं, उद्यां त्याचें ऐकसील.

२३ मग दुसऱ्या दिवशीं अग्रिप्पा व बरनीके
हीं मोठ्या समारंभाने आलीं; आणि सर्दार व नग-
रांतील श्रेष्ठ माणसें होतीं त्यांसुद्धां दर्बारांत गेलीं, ते-
व्हां फेस्तसाने आज्ञा देऊन पौलसाला आणविलें. २४
तेव्हां फेस्तस ह्मणाला, अग्रिप्पा महाराज, व सर्व
सभासद जनहो, या माणसाला तुह्मी पाहतां, हा
अणखी वांचायाजोगा नव्हे, असें ओरडत यहूद्यांचा
सर्व समुदाय यरूशलेमास व एथेंहि माझ्या
गळीं पडला. २५ परंतु त्याने मरणास योग्य
कांहीं केलें नाहीं असें पाहून, आणि त्याने स्वतांहि
पादशाहाकडे चौकसी मागितली, यावरून त्याला
पाठवायाचा म्या निश्चय केला आहे. २६ याविषयीं
महाराजाला लिहावें असें कांहीं मला खचीत नाहीं,
ह्मणून तुमच्या समोर व मुख्यत्वेंकरून, अग्रिप्पा
महाराज, तुझ्या समोर म्या याला आणिलें आहे,
यासाठीं कीं चौकसी झाली ह्मणजे मला कांहीं लि-
हायास सांपडेल. २७ कां तर बंदिवानावर जो
दोषारोप झाला तो दाखविल्यावांचून त्याला पाठ-
विणें, हें मला विपरीत वाटतें.

## अध्याय २६.

मग अग्रिप्पाने पौलसाला ह्मटलें, तुला आप-
ल्यासाठीं बोलायास परवानगी आहे; तेव्हां पौल-
साने हात पुढें करून प्रत्युत्तर केलें. २ अग्रिप्पा
महाराज, यहूदी मजवर ज्यांचा दोष ठेवितात त्या
सर्वांविषयीं मला आज तुझ्या समोर प्रत्युत्तर
द्यायासें आहे, यावरून, ३ आणि विशेषेंकरून तूं

यहूद्यांचे सांप्रदाय व धर्मविचार यांविषयीं निपुण
आहेस यावरून मी आपणाला भाग्यवान् मानितों;
यास्तव मी तुला विनंती करितों कीं सहनशील
होऊन माझें ऐकावें.

४ बाळपणापासून माझी वर्त्तणूक, पहिल्यापासून
आपल्या लोकांमध्यें यरूशलेमास होती, ती सर्व
यहूद्यांस माहीत आहे. ५ ते साक्ष द्यायाला
मान्य असले तर ते पहिल्यापासून मला ओळख-
तात कीं, आमच्या धर्माच्या कडकडीत मताप्रमाणें
मी परोशी असा वर्त्तलों. ६ आणि आतां जें
वचन देवानें आमच्या पूर्वजांस दिल्हें होतें त्याच्या
आशेमुळें मला उभें करून माझी चौकसी करीत
आहेत. ७ तें वचन आमचे बारा वंश रात्रंदिवस
एकाग्रतेने भजन करीत असतां पावण्याची आशा
धरितात; त्याच आशेविषयीं, हे अग्रिप्पा महाराज,
मी यहूद्यांकडून दोषारोपित झालों. ८ देव मेले-
ल्यांस उठवील, हें तुह्मांस असंभवित कां वाटावें?
९ तर मलाहि वाटलें होतें कीं, नाजोरी येशूच्या
नांवाविरुद्ध बहुत कार्ये केलीं पाहिजेत. १० आणि
तसें म्यां यरूशलेमांत केलें; प्रमुख याजकांपासून
अधिकार पावून बहुत पवित्र लोक बंदिशाळांमध्यें
कोंडून टाकिले, आणि त्यांचा घात होत असतां
म्यां त्यांविरुद्ध सम्मत दिल्हें. ११ आणि सर्व
सभास्थानांमध्यें त्यांस वारंवार शासन करून, त्यांनी
कसें तरी दुर्भाषण करावें असें केलें, आणि त्यांजवर
पराकाष्ठेचा आवेशी होऊन बाहेरच्या नगरांपर्यंत
देखील मी त्यांच्या पाठीस लागलों. १२ आणि
असें करितांना मुख्य याजकांपासून अधिकार व पर-
वानगी पावून दमास्कसाकडे जात होतों; १३
तेव्हां, महाराज, वाटेवर दोनप्रहरीं सूर्याच्या तेजा-
पेक्षां अधिक असा प्रकाश आकाशांतून माझ्या व
मजबरोबर चालणाऱ्यांच्या सभोंवता चकाकतां म्यां
पाहिला. १४ तेव्हां आह्मी सर्व भूमीवर पड-
ल्यानंतर म्यां इब्री भाषेंत मजसीं बोलतां असी
वाणी ऐकिली कीं, शौला शौला, माझा पाठलाग कां
करितोस? कांट्यांवर लात मारणें, हें तुला कठिण.
१५ तेव्हां म्यां ह्मटलें, हे प्रभू, तूं कोण
आहेस? तो ह्मणाला, ज्या येशूचा तूं पाठलाग
करितोस तोच मी आहें. १६ परंतु ऊठ, व आ-
पल्या पायीं उभा राहा, कारण कीं तुला सेवक,
आणि त्वां जें जें पाहिलें व ज्या ज्यांविषयीं मी
तुला दिसणार आहें त्यांविषयीं साक्षी असें तुला
करून ठेवावें, ह्मणून मी तुला दिसलों. १७ या
लोकांपासून व ज्या विदेशी लोकांकडे तुला आतां
पाठवितों, त्यांपासून मी तुझा रक्षणारा आहें; १८
यासाठीं कीं त्वां त्यांचे डोळे उघडावे, त्यांस अंधा-
रांतून उजेडाकडे व सैतानाच्या अधिकारांतून देवाक-
डे फिरवावें, असें कीं त्यांनी मजवरल्या विश्वासाने पा-
पांची क्षमा व पवित्र झालेल्यांमध्यें वतन पावावें. १९
ह्मणून अग्रिप्पा महाराज, मी त्या आकाशदृष्टां-
ताविषयीं अमान्य झालों नाहीं. २० तर पहि-
ल्याने दमास्कसांतल्यांस व यरूशलेमकरांस व अव-
घ्या यहूदा देशांतील लोकांस, आणि विदेशी लोकांस
म्यां सांगितलें कीं, पश्चात्ताप करा, आणि देवाकडे
फिरून पश्चात्तापास योग्य असीं कर्मे करा. २१
या गोष्टींमुळें यहूदी मला देवळांत धरून वधायाला
पाहत होते. २२ पण देवाचा आश्रय पावून मी
आजपर्यंत लाहान मोठ्यांस साक्ष देत राहिलों,
आणि ज्या गोष्टी होणार आहेत ह्मणून भविष्य-
वाद्यांनी व मोशेनें सांगितलें, त्यांखेरीज म्यां कांहीं
सांगितलें नाहीं; २३ त्या अशा कीं, ख्रीस्त
सोसील, आणि तो मेलेल्यांच्या पुन्हा उठण्यांत
पहिला होऊन या लोकांस व विदेशी लोकांस उजेड
प्रगट करील.

२४ याप्रमाणें तो प्रत्युत्तर करीत असतां, फेस्तस
मोठ्यानें बोलला, पौलसा, वेडा झालास, तुला बहु-
विद्येनें वेडें केलें आहे. २५ मग तो ह्मणाला,
फेस्तस महाराज, मी वेडा झालों नाहीं, तर खरे-
पणाच्या व सुज्ञपणाच्या गोष्टी बोलतों. २६ राजाला
तर या गोष्टींविषयीं ठाऊक आहे, आणि त्यास-
मोरहि मी प्रशस्त बोलतों, यांतलें कांहीं त्याजपासून
लपलें नाहीं असी माझी खातरी आहे, कां तर
हें कोंपऱ्यांत घडलें नाहीं. २७ अग्रिप्पा महाराज,
भविष्यवाद्यांवर आपला विश्वास आहे ना? विश्वास
आहे, हें मला ठाऊक आहे. २८ तेव्हां अग्रिप्पानें
पौलसाला ह्मटलें, तूं मला असें मनावितोस कीं, मी
ख्रिस्ती व्हायाचा निश्चय केल्यासारिखा झालों.
२९ मग पौलस ह्मणाला, तूं केवळ नव्हे, तर हे
अवघे जे आज माझें ऐकतात ते या बंधनांशिवाय
माझ्या सारिखे अगदीं व्हावे, असी देवापाशीं माझी
प्रार्थना आहे.

३० त्यानें असें ह्मटल्यावर, राजा व सुभेदार
व बरनीके व त्यांबरोबर जे बसले होते ते उठले.
३१ आणि एकीकडे जाऊन एकमेकांसीं ह्मणाले,

। माणसानें मरणास किंवा बंधनांस योग्य असें
हीं केलें नाहीं. ३२ तेव्हां अग्रिप्पानें फेलसा-
। ह्मटलें कीं, जर या माणसानें कैसाराकडे चौ-
शी मागितली नसती तर त्याची मोकळीक करा-
ला ठीक पडलें असतें.

## अध्याय २७.

नंतर इतली देशास आह्मी जावें असें ठरल्यावर,
त्यांनी पौलसाला व दुसऱ्या कित्येक बंदिवा-
स पादशाही पलटणीचा शतपति युल्यस नामें
त्या स्वाधीन केलें. २ तेव्हां आह्मी अद्रमुत्तेनी
रवांत बसून आस्यांतील कित्येक ठिकाणांवरून
कारण्याचा बेत करून निघालों, आणि कोणी
रिस्तार्खस मकदन्यांतील थेस्सलनीकेकर आमच्या
र्गी होता. ३ मग दुसऱ्या दिवशीं आह्मी
दोनास पोहंचलों, आणि युल्यसानें पौलसाशीं
जनतेनें वागून, त्याला समाधान पावण्याकरितां
त्रांस भेटायाला मोकळीक दिल्ही. ४ मग
ह्मी तेथून निघाल्यावर, वारा समोरचा पडला
णून कुप्रसाबवळून गेलों. ५ नंतर किलिक्या
पांफुल्या यांच्या समोरल्या समुद्रावरून जाऊन
ह्मी लुक्यांतील मुर्यास पोहंचलों. ६ तेथें
लेक्षांद्रियांतील तारूं इतलीस जाणार असें शतप-
ला मिळालें, ह्मणून त्यानें आह्मास त्यावर चढ-
लें. ७ तेव्हां बहुत दिवस हळू हळू आतां,
रा आह्मास तोंडचा होता ह्मणून कष्टानें कनि-
ासमोर पोहंचून आह्मी क्रेतेच्या जवळून सल-
नेपर्यंत हाकारून गेलों. ८ मग तें श्रमेंकरून
कून आह्मी सोईवार बंदर ह्मटलेल्या जागेपावेतों
लों, त्याच्या जवळ लसाया नगर होतें. ९
व्हां बहुत वेळ गेल्यामुळें, आणि तितक्यांत उपा-
चे दिवस गुजरले यामुळें त्या वेळेस समुद्रा-
रून जाणें हें संकटाचें, ह्मणून पौलसानें त्यांस
ध करीत १० ह्मटलें कीं, अहो माणसानो, या
लमार्गीत हानि व मोठें नुकसान, केवळ मालाचें
थवा तारवाचें नव्हे पण आमच्या प्राणांचेंहि
ईल, असें मला दिसतें. ११ तथापि पौल-
ने सांगितलें त्यापेक्षां तांडेल व तारवाचा धनी
ांचें शतपतीला खरें वाटलें. १२ आणि तें
र हिंवाळ्यांत राहायाला सोईचें नव्हतें, ह्मणून
ुतेकांनी मसलत दिल्ही कीं, तेथून निघावें, आणि
ाईल तर क्रेतेंतील बंदर फेनिके एथें जाऊन हिंवा-
पांत राहावें, तिचें तोंड नैर्ऋत्य दिशेस व वायव्य
दिशेस आहे. १३ मग दक्षिण वारा मंद वाहत
असतां, आपला बेत सिद्ध झाला असें समजून, ते
तेथून हाकारून क्रेतेजवळ गेले. १४ परंतु थो-
ड्या वेळानंतर युरोक्लुदोन ह्मटलेला तुफानाचा वारा
तिजवर सुटला. १५ तेव्हां तारूं अडून वाऱ्या-
समोर ठरेना, ह्मणून आह्मी तें तसेंच जाऊं दिल्हें.
१६ मग क्लौदा ह्मणून एक बेट आहे त्याच्या
जवळून जाऊन आह्मी मोठ्या प्रयासानें होडी
मिळविली. १७ ती उचलून घेतल्यावर त्यांनी
सरंजाम घेऊन तारवाला खालून बांधिलें, आणि
भाटीवर जायाचें त्यांस भय वाटलें ह्मणून त्यांनी
शीड उतरलें, आणि तें तसेंच चालविलें. १८ तेव्हां
वादळानें आमचे फार हाल होत असतां, त्यांनी
दुसऱ्या दिवशीं भरगत टाकून दिल्ही. १९ आणि
तिसऱ्या दिवशीं आह्मी आपल्या हातांनी तारवाचें
सामान काढून टाकिलें. २० आणि बहुत दिवस
सूर्य व तारेहि दिसेनात, आणि मोठें वादळ झालें
होतें, त्यामुळें शेवटीं आमची तरण्याची आशा
अगदीं नाहींसी झाली. २१ तेव्हां फार उपास
पडल्यावर, पौलस त्यांमध्यें उभा राहून ह्मणाला,
अहो माणसानो, तुह्मी माझें ऐकायाचें होतें, क्रेते-
हून निघायाचें नव्हतें, ह्मणजे हा हाल व हानि
झाली नसती. २२ तथापि मी आतां तुह्मास
सांगतों कीं, धैर्य धरा, कारण कीं तुह्मांतील कोणा-
च्याहि जिवाचा नाश होणार नाहीं, तारवाचा मात्र
होईल. २३ कां तर ज्याचा मी आहें व ज्याची
सेवा मी करितों, त्या देवाचा दूत गेल्या रात्रीं
मजसीं येऊन ह्मणाला; २४ पौलसा, भिऊं
नको, तुला कैसारापुढें उभें राहिलें पाहिजे, आणि
पाहा, तुजबरोबर जे तारवांत बसले आहेत ते
अवघे देवानें तुला दिल्हे आहेत. २५ यास्तव
माणसानो, धैर्य धरा, कां तर माझा देवावर भरवसा
आहे कीं, जसें मला त्यानें सांगितलें त्याप्रमाणेंच
घडेल. २६ तथापि आह्माला एखाद्या बेटावर
पडावें लागेल.

२७ नंतर चौदावी रात्र झाल्यावर अद्रिया समु-
द्रांत आह्मी इकडे तिकडे हेलकावलेले असतां,
मध्यरात्रीं खलाश्यांस वाटलें कीं, आपण कोणत्या तरी
किनाऱ्याजवळ आलों. २८ तेव्हां त्यांनी बुडीद
टाकून वीस वावें पाणी आहे असें पाहिलें, मग
कांहीं पुढें जाऊन व पुन्हा बुडीद टाकून पंधरा वावें
आहे असें पाहिलें. २९ तेव्हां आपण कदाचित्

खडकाळी आग्यास अपटून पडूं, असें भय धरून
त्यानी वरामावरून चार नांगर टाकून दिवस केव्हां
उगवेल असी वाट पाहिली· ३० मग नांगर
नाळीवरूनहि टाकावे या निमित्ताने खलाशी समु-
द्रांत होडी उतरून तारवांतून पळायास पाहत होते;
३१ तेव्हां पौलस शतपतीला व शिपायास ह्म-
णाला, हे तारवांत न राहिले तर तुमचें तारण
व्हायाचें नाहीं· ३२ तेव्हां शिपायानी होडीचे
दोर कापून पडूं दिल्हीं· ३३ नंतर दिवस उगव-
णार होता तेव्हां पौलस सर्वांस अन्न खाण्याविषयीं
विनंती करून ह्मणाला, आज चौदा दिवस तुह्मी
वाट पाहत उपासी राहिलां आहां, कांहीं खालें
नाहीं· ३४ यास्तव मी विनंती करितों कीं, अन्न
खा, कां कीं तें तुमच्या निभावासाठीं आहे, कां
तर तुह्मांतील कोणाच्या डोक्याचा केंसहि पड-
णार नाहीं· ३५ हें ह्मटल्यावर, त्याने भाकर
घेऊन त्या अवघ्यांसमोर देवाचा आशीर्वाद मागि-
तला, मग मोडून तो खाऊं लागला. ३६ मग
ते सर्व स्वस्थचित्त झाले, आणि त्यानीहि कांहीं अन्न
खालें· ३७ त्या तारवांत तर आह्मी सर्व
मिळून दोनशें शाहत्तर असामी होतों· ३८
तेव्हां अन्नाने तृप्त होऊन त्यानी समुद्रांत धान्य
टाकून तारूं हलकें केलें· ३९ मग दिवस उगव-
ल्यावर त्यानी देश ओळखला नाहीं, पण सोईवार
कांठाची एखादी खाडी पाहून, साधेल तर तिज-
मध्यें तारूं घालावें, असें त्यानी योजिलें· ४०
आणि चहुंकडले नांगर काढून त्यानी तारूं समुद्रा-
च्या स्वाधीन केलें, आणि सुकाणाचीं बंधनें सोडून
अवजार वाऱ्यासमोर उभें करून कांठाकडे वाट
धरिली· ४१ मग दोहों प्रवाहांच्या संगमांत पडून
त्यानी तारूं तळास लागावें असें केलें, तेव्हां नाळ
रुतून मच्च बसली, आणि वराम लाटांच्या जोराने
फुटून गेलें· ४२ तेव्हां शिपायानी मसलत केली
कीं, बंदिवानांस मारून टाकावें, नाहीं तर कदाचित्
कोणी पोहून पळून जाईल. ४३ तथापि पौल-
साला वांचवावें असें मनांत आणून शतपतीने त्यां-
च्या बेतास आडवें येऊन आज्ञा दिल्ही कीं, ज्यांस
पोहवां येत असेल त्यानी पहिल्याने उडी टाकून
कांठास जावें; ४४ आणि जे राहिले असतील
त्यांतून कोणी फळ्यांवर व कोणी तारवाच्या तुकड्यां-
वर बसून जावें· याप्रमाणें असें झालें कीं, सर्व
कांठास सुरक्षित पोहंचले.

## अध्याय २८.

असें त्यांचें सुरक्षण झाल्यावर, तें बेट मलिते
ह्मटलेलें आहे असें त्यांस समजलें· २ तेव्हां
त्या रानटी लोकानी आह्मावर असाधारण उपकार
केले, कसे तर पाऊस व गारवठा पडल्यामुळें त्यानी
शेकोटी पेटवून आह्मा सर्वांचा अंगीकार केला· ३
तेव्हां पौलसाने पुष्कळ काडकें जमा करून शेको-
टीवर घातलीं, त्या वेळेस गरमीमुळें साप निघून
त्याच्या हातास झोंबून राहिला· ४ तें किरडूं
त्याच्या हाताला लटकलेलें पाहून, रानटी लोकानी
एकमेकांस ह्मटलें, हा माणूस खरोखरा घातक आहे,
हा समुद्रांतून पार पडला तरी न्याय त्याला वांचूं
देत नाहीं· ५ परंतु त्याने किरडूं अग्नींत झटकून
टाकिलें, आणि त्याचें कांहीं वाईट झालें नाहीं· ६
तेव्हां तो सुजावा अथवा अकस्मात मरून पडावा
असी त्यानी वाट पाहिली, परंतु फार वेळ वाट
पाहत असतां, त्याला कांहीं बाधक झालें नाहीं,
असें पाहून ते दुसरी कल्पना करून ह्मणाले, हा
देव आहे·

७ तेव्हां पबलियस नामक त्या बेटाचा मुख्य
त्याचीं शेतें तिकडे होतीं, त्याने आह्माला बोलावून
घेऊन तीन दिवस मेहरबानीने पाहुणचार केला· ८
आणि असें झालें कीं पबलियसाचा बाप तापाने व
आंवरक्ताने दुखणाईत होऊन पडला होता, त्याज-
कडे पौलसाने जाऊन प्रार्थना केली व त्याजवर
हात ठेवून त्याला बरें केलें· ९ हें झाल्यावर,
त्या बेटामध्यें दुसऱ्या लोकांस रोग होते तेहि त्या-
जकडे येऊन बरे झाले· १० तेव्हां त्यानी आ-
मचा बहुत प्रकारें सन्मान केला, आणि आह्मी
निघत असतां आह्मास ज्यांची गरज लागेल ते
पदार्थ भरून दिल्हे·

११ आणि तीन महिन्यांनंतर अलेक्षांद्रियांतील
जें तारूं हिंवाळ्यांत त्या बेटाजवळ राहिलें होतें,
ज्याची खूण दयस्कुरै असी होती, त्यांत आह्मी
बसून निघालों· १२ मग सुराकूसेस पोहंचून
आह्मी तेथें तीन दिवस राहिलों· १३ तेथून
फेरा घेऊन आह्मी रगयनास पोहंचलों, आणि
एका दिवसानंतर दक्षिणवारा सुटून आह्मी दुसऱ्या
दिवशीं पतियलैस आलों· १४ तेथें आह्मास
भाऊ अढळले, त्यानी आह्मास आपल्या जवळ
सात दिवस राहायाचा आग्रह केला, मग आह्मी

तसेच रोमाकडे गेलों. १५ तेथले भाऊ आमचें
वर्त्तमान ऐकून अप्पियसाची पेंठ व तीन धर्मशाळा
एथपर्यंत आमच्या भेटीला आले, त्यांस पाहून
पौलसाने देवाची उपकारस्तुति करून धीर धरिला.
१६ नंतर आह्मी रोमास आल्यावर, शतपतीने
बंदिवानांस सेनापतीच्या स्वाधीन केलें, परंतु पौल-
साला परवानगी होती कीं, त्याचा राखणारा शिपायी
याच्या संगतीं त्याने निराळें राहावें.
१७ मग असें झालें कीं तीन दिवसांनंतर पौल-
साने यहूद्यांतील श्रेष्ठ यांस एकत्र बोलाविलें.
ते मिळाल्यावर तो त्यांसीं बोलला, अहो भावानो,
म्या लोकांविरुद्ध किंवा पूर्वजांच्या सांप्रदायांविरुद्ध
कांहीं केलें नाहीं, तथापि मला बंदिवान करून
यरूशलेमास रोम्यांच्या हातीं दिल्हें. १८ ते
चौकसी करून मजकडे मरणाजोगा कांहीं दोष
नाहीं, असें पाहून मला सोडीत होते. १९
परंतु यहूदी विरुद्ध बोलत असतां कैसाराकडे
चौकसी मागायाचें मला अगत्य पडलें, मला आप-
ल्या लोकांवर कांहीं दोष ठेवायाचा होता असें
नाहीं. २० तर म्या तुह्मास या कारणासाठीं
बोलाविलें कीं, तुमची भेट घेऊन संभाषण करावें,
कां तर इस्राएलाच्या आशेसाठीं मी या सांखळीने
बांधलेला आहें.
२१ तेव्हां त्यानी त्याला ह्मटलें कीं, तुजवि-
षयीं यहूदापासून आह्मास कांहीं पत्र आलें नाहीं,
आणि भावांतील कोणीएकाने एथें येऊन तुजविषयीं
वर्त्तमान कळविलें किंवा कांहीं वाईट सांगितलें असें
नाहीं. २२ परंतु तुझें मत तुजपासून समजून
घ्यायाला आह्मास बरें वाटतें, कां कीं या पंथाला
सर्वत्र निंदितात असें आह्मास कळलें आहे. २३
तेव्हां त्यानी त्याला दिवस नेमून सांगितल्यावर
बहुत यहूदी त्याजकडे बिऱ्हाडांत आले, त्यांस
त्याने देवाच्या राज्याविषयीं प्रमाण पटवितां व येशू-
विषयीं मोश्याच्या नेमशास्त्रांतून व भविष्यलेखांतून
त्यांची खातरी करितां, सकाळपासून सांजपर्यंत
उपदेश केला. २४ आणि त्याने जें सांगितलें
त्यावर कित्येकानी विश्वास ठेविला व कित्येकानी
ठेविला नाहीं. २५ आणि त्यांचें परस्परें एकमत
न होतां ते उठून जाऊं लागले, तेव्हां पौलसाने
त्यांस एक वाक्य सांगितलें कीं, पवित्र आत्मा
यशाया भविष्यवाद्याकडून आमच्या पूर्वजांसीं नीट
बोलला कीं, २६ या लोकांकडे जाऊन सांग कीं,
ऐकालच ऐकाल परंतु समजणार नाहीं, आणि पाहा-
लच पाहाल परंतु तुह्मास दिसणार नाहीं. २७
कारण कीं या लोकांचें अंतःकरण जड झालें, आणि
ते कानानी मंद ऐकतात, आपले डोळेहि त्यानी
मिटले आहेत, यासाठीं कीं त्यानी आपल्या डो-
ळ्यानी पाहूं नये, व कानानी ऐकूं नये व अंतःकर-
णाने समजूं नये व आपण फिरूं नये व म्या त्यांस
बरें करूं नये. २८ ह्मणून तुह्मास ठाऊक असो
कीं, विदेश्यांस देवाचें तारण पाठविलें आहे, आणि
ते ऐकतील. २९ तो असें बोलल्यावर यहूदी
आपल्यांमध्यें फार विवाद करीत निघाले.
३० आणि पौलस आपल्या भाड्याच्या घरीं
पूर्ण दोन वर्षें राहिला, व जे त्याजकडे आले त्या
सर्वांस त्याने अंगीकारिलें. ३१ आणि कोणी न
अडवितां पूर्ण धैर्याने त्याने देवाचें राज्य गाजविलें
आणि प्रभु येशू ख्रीस्ताच्या गोष्टी शिकविल्या.

# रोमेकरांस पौलसाचें पत्र.

## अध्याय १.

रोम एथील देवाचे प्रिय, जे बोलावलेले पवित्र
लोक, त्या सर्वांस येशू ख्रीस्ताचा सेवक पौ-
लस, जो प्रेषित नेमलेला व देवाचें शुभवर्त्तमान
कळवायास निवडलेला आहे, याचा सलाम. २
तें शुभवर्त्तमान देवाने पवित्र शास्त्रांत आपल्या
भविष्यवाद्यांकडून ३ आपल्या पुत्राविषयीं, ह्मणजे
आमचा प्रभु येशू ख्रीस्त, जो देहाने दाविदाच्या
संतानांतील होता, ४ आणि पवित्र आत्म्याने
देवाचा पुत्र असा मेलेल्यांमधून पुन्हा उठण्यावरून
सामर्थ्याने ठरविलेला, त्याविषयीं पूर्वी प्रसिद्ध केलें
होतें; ५ त्याकडून आह्मास कृपा व प्रेषितपणा
हीं, त्याच्या नांवासाठीं सर्व राष्ट्रानी विश्वासाला

मान्य व्हावें ह्मणून मिळालीं आहेत; ६ त्यां-
मध्यें तुह्मीहि येशू ख्रीस्ताचे बोलावलेले आहां;
७ त्या तुह्मास देव आमचा बाप व प्रभु येशू
ख्रीस्त यांपासून कृपा व शांति असो.

८ प्रथम मी तुह्मा सर्वांकरितां येशू ख्रीस्ता-
कडून आपल्या देवाची उपकारस्तुति करितों, कारण
कीं सर्व जगांत तुमचा विश्वास प्रसिद्ध झाला आहे.
९ कां तर ज्या देवाची सेवा मी त्याच्या पुत्राचें
शुभवर्त्तमान सांगण्याने आपल्या आत्म्याने करितों
तो, तुमचें स्मरण मी नित्य कसें करितों, याविषयीं
माझा साक्षी आहे; १० आणि मी आपल्या
प्रार्थनांमध्यें सर्वदा ही विनंती करितों कीं, कसेंहि
करून आतां तरी देवाच्या इच्छेने माझें तुह्माकडे
येणें सुखरूप व्हावें. ११ कां कीं तुमची भेट
घ्यायास मी फार इच्छितों, यासाठीं कीं तुमची
स्थिरता होण्याकरितां म्या तुह्मास आत्म्यासंबंधी
कांहीं कृपादान द्यावें. १२ ह्मणजे जो परस्परांचा
विश्वास तुह्मामध्यें व मजमध्येंहि आहे, तेणेंकरून
म्या तुमच्या बरोबर समाधान पावावें. १३ अहो
भावांनो, जसें दुसऱ्या विदेशी लोकांमध्यें तसें तुह्मा-
मध्येंहि मला कांहीं फळ व्हावें, ह्मणून म्या बहुत वेळा
तुह्माकडे येण्याचा बेत केला, पण आजपावेतों मला
अडथळा झाला आहे, हें तुह्मास कळावें असी
माझी इच्छा आहे. १४ हेल्लेनी व रानटी, ज्ञानी
व अज्ञानी, यांचा मी ऋणी आहें. १५ यास्तव
तुह्मा रोमांतल्यांसहि मी आपल्या शक्तीप्रमाणें शुभ-
वर्त्तमान सांगायाला तयार आहें. १६ कां तर
ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानाविषयीं मी लाजत नाहीं;
कारण कीं अगोदर यहूदी, नंतर हेल्लेनी, अश्या
प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या तारणासाठीं तें देवाचें
सामर्थ्य असें आहे. १७ कां कीं विश्वासेंकरून
जें देवाचें न्यायीपण, तें विश्वास होण्याकरितां त्यांत
प्रगट केलें आहे; जसें लिहिलें आहे त्याप्रमाणें,
ह्मणजे न्यायी विश्वासाने वांचेल.

१८ कारण कीं जे अन्यायाने खरेपण बाळ-
गितात त्या मनुष्यांचा सर्व अधर्म व अन्याय यांवर
देवाचा क्रोध आकाशांतून प्रगट झाला आहे. १९
कां कीं देवाविषयीं जें जाणायाचें आहे तें त्यांमध्यें
प्रसिद्ध आहे, कां तर देवाने तें त्यांस प्रसिद्ध केलें
आहे. २० कारण कीं त्याच्या अदृश्य गोष्टी,
ह्मणजे त्याची अनादि शक्ति व देवपणा, हीं निर्मि-
लेल्या पदार्थांवरून जाणलेलीं असतां सृष्टीच्या
उत्पत्तीपासून स्पष्ट दिसून येतात; यास्तव ते निरु-
त्तर आहेत. २१ कां तर देवाला जाणत अस-
तांहि, त्यांनी त्याला देव असें गौरविलें नाहीं, व
उपकारस्तुति केली नाहीं, परंतु ते आपल्या कल्प-
नांनी भ्रांत झाले असतां, त्यांचें मूढ अंतःकरण
अंधारमय झालें. २२ ते आपण आपल्याला शा-
हाणे ह्मणवीत असतां मूर्खच झाले; २३ आणि
त्यांनी अविनाशी देवाच्या गौरवाबद्दल नाशवंत मनु-
ष्य, पांखरें, चतुष्पदें व वळवळणारे जंतु यांच्या
मूर्त्ति करून मानिल्या. २४ यास्तव देवानेहि
त्यांस सोडून दिल्हें, असें कीं त्यांनी आपल्या अंतः-
करणांतील इच्छांकडून अशुद्धपणामध्यें राहून परस्परें
आपलीं शरिरें अपमानित करून घ्यावीं. २५ कां
कीं त्यांनी देवाच्या सत्यतेबद्दल असत्य मानिलें,
आणि उत्पन्न करणारा, सदा स्तुतिमान्य, आमेन,
त्याला टाकून उत्पन्न झालेल्या पदार्थांचें भजन व
सेवा केली. २६ यामुळें देवाने त्यांस सोडून
अमंगळ भावनांच्या स्वाधीन होऊं दिल्हें; याव-
रून त्यांच्या बायकांनीहि स्वाभाविक व्यवहार
सोडून विपरीत व्यवहार धरिला. २७ तसेंच
पुरुषांनीहि स्त्रीसीं स्वाभाविक व्यवहार सोडून पर-
स्परें मदनमस्त होऊन पुरुषांनी पुरुषांसीं अयोग्य
व्यवहार केला, आणि त्यांच्या भ्रष्टतेचें योग्य फळ
तें ते आपापल्यांमध्यें पावले. २८ आणखी देवाला
आपल्या ध्यानांत ठेवावें हें त्यांस आवडलें नाहीं,
ह्मणून देवाने त्यांस सोडून अयोग्य कामें करायास
नाकारलेल्या मनाच्या स्वाधीन होऊं दिल्हें. २९
असें कीं ते अन्याय, शिंदळकी, दुष्टाई, लोभ, द्वाड-
पण, यांकडून भरलेले झाले; हेवा, हिंसा, कज्जा,
कपट, कुबुद्धि, यांकडून भरले; ते चहाड, ३०
निंदक, देवद्वेषी, उद्धट, अहंकारी, आपणाला नावा-
जणारे, कुकर्म योजणारे, आईबापांच्या आज्ञा मोड-
णारे, ३१ निर्बुद्धि, विश्वासघातक, ममतारहित,
खुनसी, निर्दय, असे झाले; ३२ जे या रीतीने
चालतात ते मरणास योग्य आहेत, असा देवाचा
नेम त्यांस ठाऊक असतांहि, ते स्वतां तसीं कामें
करितात असें केवळ नाहीं, पण तसें करणाऱ्यांवर
संतुष्टहि आहेत.

## अध्याय २.

यास्तव हे मनुष्या, जो कोणी न्याय करणारा, तो
तूं अनुत्तर आहेस, कां तर ज्याविषयीं तूं

दुसऱ्याचा न्याय ठरवितोस त्यांत तूं आपणाला
अन्यायी ठरवून घेतोस; कारण कीं तूं न्याय कर-
णारा असून तींच कर्मे आचरितोस. २ पण
आह्मास ठाऊक आहे कीं, जे अशीं कर्मे करितात,
त्यांजवर देवाचा न्याय यथार्थ आहे. ३ तर हे
मनुष्या, जो तूं तशीं कर्मे करणाऱ्यांचा न्याय करून
तींच आपण आचरितोस, त्या तुला देवाचा न्याय
चुकेल, असें वाटतें काय? ४ किंवा देवाची कृपा
तुला पश्चात्ताप घडायासाठीं प्रेरणा करिती, हें न
समजून, त्याचें अतिशय उपकारिकपण व सहनता व
गंभीरपण, यांचा धिक्कार तूं करितोस काय? ५
आणि आपलें कठीणपण व अपश्चात्तापी अंतःकरण
यांकडून क्रोधाच्या व देवाचा यथार्थ न्याय प्रगट
होण्याच्या दिवसापर्यंत आपल्यासाठीं क्रोध सांठवून
ठेवितोस काय? ६ तो प्रत्येकाला त्याच्या त्याच्या
कर्मांप्रमाणें फळ देईल; ७ जे चांगल्या करण्यांत
स्थिर राहून गौरव व सन्मान व अविनाश यांचा
शोध करितात, त्यांस तो सर्वकाळचें जीवन देईल;
८ परंतु जे वितंडवादी व सत्याला न मानितां
असत्याला मानितात, त्यांजवर आवेश व क्रोध
होईल; ९ जो वाईट करितो अश्या प्रत्येक
मनुष्याला, प्रथम यहूद्याला नंतर हेल्लेन्याला क्लेश
व यातना होतील; १० परंतु जो चांगलें करितो
अश्या प्रत्येकाला, प्रथम यहूद्याला नंतर हेल्लेन्याला,
गौरव व सन्मान व शांति होईल; ११ कां तर
देवाला पक्षपात नाहीं. १२ कारण कीं ज्यांनी
शास्त्र न जाणून पाप केलें, ते अवघे शास्त्रावांचून
नाश पावतील; आणि ज्यांनी शास्त्र जाणून पाप
केलें त्या सर्वांचा न्याय शास्त्रावरून ठरेल. १३
कारण कीं शास्त्र ऐकणारे देवासमोर न्यायी आहेत
असें नाहीं, पण शास्त्र पाळणारे न्यायी ठरतील.
१४ कां तर ज्या विदेशी लोकांस शास्त्र नाहीं, ते
स्वभावानें शास्त्रांतील गोष्टी पाळितात, तेव्हां त्यांस
जरी शास्त्र नाहीं तरी ते आपणच आपल्याला
शास्त्र आहेत. १५ ते आपल्या अंतःकरणांत
शास्त्रनेम लिहिलेला आहे असें प्रगट करितात;
त्यांस त्यांचा सदसद्विवेक साक्षी आहे, आणि
त्यांच्या कल्पना त्यांस परस्परें दोष लावितात किंवा
अनुमोदन देतात. १६ ज्या दिवशीं देव माझ्या
शुभवर्तमानाप्रमाणें येशू ख्रीस्ताकडून मनुष्यांच्या
गुप्त गोष्टींचा न्याय ठरवील, [त्या दिवशीं असें
होईल].
१७ पाहा, तूं यहूदी ह्मटलेला आहेस, आणि
नेमशास्त्राच्या आधारानें राहतोस, आणि देवा-
विषयीं अभिमान धरितोस; १८ आणि त्याची
इच्छा जाणतोस, आणि नेमशास्त्र पढलेला होऊन,
निरनिराळ्या गोष्टींची परीक्षा करितोस; १९
आणि मी अंधळ्यांचा वाटाडी, जे अंधकारांतले
त्यांचा प्रकाश, २० मूर्खांचा उपदेशक, बाळकांचा
गुरु आहें, आणि आपल्याला शास्त्रांतल्या ज्ञानाचें व
खरेपणाचें स्वरूप आहे, असा तूं भरवसा धरितोस.
२१ तर जो तूं दुसऱ्यास शिकवितोस, तो तूं आप-
ल्यास शिकवीत नाहींस काय? जो तूं उपदेश करि-
तोस कीं, चोरी करूं नये, तो तूं चोरी करितोस
काय? २२ जो तूं सांगतोस कीं, व्यभिचार करूं
नये, तो तूं व्यभिचार करितोस काय? जो तूं मूर्त्ती-
चा कंटाळा करितोस, तो तूं धर्मादायांस लुटितोस
काय? २३ जो तूं नेमशास्त्राचा अभिमान धरि-
तोस, तो तूं नेमशास्त्र मोडून देवाचा अपमान करि-
तोस काय? २४ कां कीं असें लिहिलें आहे
त्याप्रमाणें, तुह्मावरून विदेशी लोकांमध्यें देवाच्या
नामाची निंदा होत आहे. २५ कारण कीं त्वां
नेमशास्त्र पाळिलें, तर सुंता उपयोगी आहे; परंतु
नेमशास्त्र मोडिलें तर तुझी सुंता असुंता असी
झाली आहे. २६ ह्मणून असुंत्यानें शास्त्राचे नेम
पाळिले, तर त्याची असुंता सुंता असी मोजण्यांत
येईल कीं नाहीं? २७ आणि तूं विधि व सुंता
पाळीत असतांहि नेमशास्त्र उल्लंघितोस, तर जो
स्वाभाविक असुंती नेमशास्त्र पाळितो तो तुझा न्याय
करणार नाहीं काय? २८ कां कीं बाहेरून यहूदी
तो यहूदी नव्हे, आणि जी सुंता बाहेरून शरिरांत
आहे ती सुंता नव्हे; २९ तर आंतून यहूदी तो
यहूदी होय; आणि जी विधिसंबंधी ती नव्हे, पण
जी आत्म्यासंबंधी ह्मणजे अंतःकरणाची, ती सुंता
होय; तिची तर प्रशंसा मनुष्यांकडून नव्हे, तर
देवाकडून आहे.

## अध्याय ३.

तर मग यहूद्यांचें आधिक्य काय? आणि सुंतेचा
लाभ काय? २ सर्व प्रकारें बहुत आहे, पण विशे-
षेंकरून असा कीं देवाचीं वचनें त्यांच्या स्वाधीन
झालीं होतीं. ३ आणि जरी कित्येकांनी विश्वास
ठेविला नाहीं तरी काय? त्यांच्या अविश्वासानें
देवाचा विश्वासूपणा नाहींसा होईल काय? ४

असें न घडो; त्यापेक्षां सर्व माणसें लबाड, व देव
खरा असो; जसें लिहिलें आहे त्याप्रमाणें, ह्मणजे
त्वां आपल्या वचनांत न्यायी ठरावें, आणि तुझा
न्याय ठरत असतां त्वां यश पावावें. ५ पण आ-
मच्या अन्यायाने देवाचा न्याय प्रगट झाला, तर
आह्मी काय ह्मणावें? जो देव क्रोधयुक्त दंड करितो,
तो अन्यायी काय? मी माणसासारिखें बोलतों.
६ तसें न घडो; असें असलें तर देव जगाचा न्याय
कसा ठरवील? ७ आणखी माझ्या असत्यपणाने
देवाचें सत्य अधिक प्रगट होऊन त्याचें गौरव वाढलें,
तर अद्यापि मी पापी कां ठरतों? ८ तर मग
असें कां ह्मणूं नये कीं, चांगलें फळ प्राप्त होण्या-
साठीं वाईट कर्मे करूं; जसे कित्येक आह्मावर आळ
घालून ह्मणतात कीं, हे असेंच सांगतात, तसें;
तशांस दंड योग्य आहे.

९ तर काय? आह्मी अधिक उत्तम आहों काय?
अगदी नाहीं. कारण कीं आह्मी अगोदर प्रमाण
दाखविलें कीं, यहूदी व हेल्लेनीहि सगळे पापा-
खालीं आहेत. १० असें लिहिलें आहे त्याप्र-
माणें, ह्मणजे न्यायी कोणी नाहीं, एक देखील
नाहीं. ११ समजणारा कोणी नाहीं, देवाला कोणी
शोधीत नाहीं. १२ सर्व बहकले आहेत, ते एक-
सारिखे निरुपयोगी झाले आहेत; चांगलें करणारा
कोणी नाहीं, एक देखील नाहीं. १३ त्यांचा गळा
उघडलेलें थडगें, त्यानी आपल्या जिभानीं कपट केलें,
त्यांच्या ओंठांखालीं सर्पांचें विष आहे. १४
त्यांचें तोंड शापाने व कडूपणाने भरलेलें आहे.
१५ त्यांचे पाय रक्त पाडायास उतावळे आहेत;
१६ त्यांच्या मार्गांमध्यें नाश व क्लेश आहेत;
१७ आणि त्यानी शांतीचा मार्ग जाणिला नाहीं.
१८ त्यांच्या डोळ्यांपुढें देवाचें कांहीं भय नाहीं.
१९ तर आह्मास ठाऊक आहे कीं, नेमशास्त्र जें जें
सांगतें, तें नेमशास्त्राखालच्यांस सांगतें; यासाठीं
कीं प्रत्येक तोंड बंद व्हावें व अवघें जग देवासमोर
दंडपात्र व्हावें. २० यास्तव त्याच्या समोर कोणी
माणूस नेमशास्त्रांतील कर्मांकडून न्यायी ठरणार नाहीं;
कारण कीं नेमशास्त्राकडून पापाची ओळख होती.

२१ परंतु आतां नेमशास्त्रावांचून जें देवाचें
न्यायीपण तें नेमशास्त्राच्या व भविष्यवाद्यांच्या सा-
क्षीने पटलेलें असें प्रगट झालें आहे. २२ ह्मणजे
येशू ख्रीस्तावरच्या विश्वासाकडून देवाचें न्यायीपण
तें सर्व विश्वासणाऱ्यांसाठीं आहे आणि अशा सर्वांस
मिळेल; कां तर भेद नाहीं. २३ कारण कीं
सर्वांनी पाप केलें आहे, आणि देवाच्या गौरवावि-
षयीं ते उणे आहेत. २४ त्याच्या कृपेने ते ख्रीस्त
येशूने केलेल्या खंडणीमुळें फुकटवारी न्यायी ठरतात
२५ त्याला देवाने त्याच्या रक्तावरल्या विश्वासाक-
डून प्रायश्चित्त होण्यास पुढें ठेविलें आहे; यासा-
ठीं कीं पूर्वी झालेल्या पापांची जी सुटका देवाच्या
सहनतेने झाली, तिजसंबंधी आपला न्याय दाख-
वावा; २६ सांप्रत काळीं आपला न्याय दाख-
वावा, असा कीं येशूवर विश्वास ठेवणारा याला
न्यायी ठरवून आपण न्यायी राहावें. २७ तर
नावाजणूक कोठें? ती घालविली आहे. कोणत्या
नेमाने? कर्मांच्या नेमाने काय? नाहीं; तर विश्वा-
साच्या नेमाने. २८ यावरून आह्मी असें समजतों
कीं, मनुष्य नेमशास्त्रांतील कर्मांवांचून विश्वासाने न्यायी
ठरतो. २९ देव केवळ यहूद्यांचाच काय? विदेशी
लोकांचा नव्हे काय? होय, विदेशी लोकांचाहि आहे.
३० कां कीं जो सुंत्यांस विश्वासाने व असुंत्यांस
विश्वासावरून न्यायी ठरवितो, असा एकच देव
आहे. ३१ तर आह्मी विश्वासाने नेमशास्त्राला
व्यर्थ करितों काय? असें न घडो; पण आह्मी नेम-
शास्त्र स्थापितों.

## अध्याय ४.

तर आमचा बाप आब्राहाम याला देहसंबंधी
काय मिळालें ह्मणून आह्मी ह्मणावें? २ कां
कीं आब्राहाम कर्मांकडून न्यायी ठरला असता तर
त्याला नावाजणुकेची जागा होती; परंतु देवाजवळ
तसें कांहीं होत नाहीं. ३ शास्त्र तर काय सांगतें?
आब्राहामाने देवावर विश्वास ठेविला, आणि तें
त्याला न्यायीपण असें मोजलें होतें. ४ आतां
काम करणाऱ्याची मजुरी ती कृपा असी नव्हे, तर
ऋण असी मोजितात. ५ पण जो कर्म न करितां
पाप्याला न्यायी ठरविणाऱ्यावर विश्वास ठेवितो,
त्याचा विश्वास न्यायीपण असा मोजितात. ६ याप्र-
माणें ज्या मनुष्याला देव कर्मांवांचून न्यायी मोजितो,
त्याचा धन्यपणा दाविदहि सांगतो. ७ असा कीं
ज्याचे अपराध क्षमा केले आहेत व ज्याचीं पापें
झांकलीं आहेत, ते धन्य. ८ प्रभु ज्या माणसा-
कडे पाप मोजणार नाहीं तो धन्य. ९ तर हा
धन्यपणा सुंती लोकांस, किंवा असुंती लोकांसहि
आहे? कां कीं विश्वास हा आब्राहामाला न्यायी-

ण मोजला होता, असें आह्मी ह्मणतों. १० पण
कसा मोजला? तो सुंती किंवा असुंती असतां? सुंती
असतां तर नव्हे, पण असुंती असतां. ११ आणि
असुंती असतांना त्याचा विश्वास, याच्या न्यायी-
पणाचा शिक्का होण्याकरितां सुंता ही खूण त्याला
मिळाली; यासाठीं कीं जे असुंती असतांना विश्वास
ठेवितात त्या सर्वांचा तो बाप व्हावा, असें कीं
त्यांसहि न्यायीपण मोजावें; १२ आणि तो
सुंत्यांचाहि बाप व्हावा, पण जे सुंती असें केवळ
नाहीं, तर आमचा बाप आब्राहाम याच्या असुंती-
पणांतील विश्वासाला अनुसरूनहि जे चालतात
त्यांचा व्हावा. १३ अणखी तूं जगाचा वतनदार
होसील, हें वचन आब्राहामाला व त्याच्या संता-
नाला नेमशास्त्राकडून नव्हतें, पण विश्वासाच्या
न्यायीपणाकडून होतें. १४ कां कीं नेमशास्त्राक-
डले ते जर वतनदार, तर विश्वास व्यर्थ झाला
आणि वचनहि व्यर्थ झालें आहे. १५ कां तर
नेमशास्त्र क्रोधाला कारण होतें, कां कीं जेथें नेम-
शास्त्र नाहीं तेथें उल्लंघनहि नाहीं. १६ यास्तव
तें वचन विश्वासाकडून आहे, यासाठीं कीं तें कृपे-
कडून व्हावें, असें कीं तें अवघ्या संतानाला, ह्मणजे
जें नेमशास्त्राकडील त्याला केवळ नाहीं, तर जें
आब्राहामाच्या विश्वासाकडील त्यालाहि स्थिर व्हा-
वें; आब्राहाम तर आह्मा सर्वांचा बाप आहे.
१७ याविषयीं असें लिहिलें आहे कीं, म्या तुला
बहुत राष्ट्रांचा बाप केलें आहे. ह्मणजे ज्या देवा-
वर त्याने विश्वास ठेविला, जो मेलेल्यांस जिवंत
करितो आणि जे पदार्थ नाहींत ते असल्यासारिखे
बोलावितो, त्याच्या देखतां असा आहे. १८ त्याने
निराशपणांतहि आशा धरून विश्वास ठेविला, या-
साठीं कीं आपण बहुत राष्ट्रांचा बाप व्हावा; तुझें संतान
तसें होईल, ह्मणून जसें सांगितलें होतें त्याप्रमाणें.
१९ तो विश्वासांत कमी नव्हता, ह्मणून तो सुमारें
शंभर वर्षांचा असतांहि, त्याने आपलें शरीर आतां
मेल्यासारिखें आहे हें, आणि सारेच्या गर्भस्थानाचें
निर्जीवपण मनांत आणिलें नाहीं. २० त्याने अवि-
श्वासाकडून देवाच्या वचनाविषयीं कांहीं संशय धरि-
ला नाहीं, तर विश्वासांत दृढ असतां त्याने देवाला
गौरविलें. २१ आणि देवाने वचन दिल्हें तें तो
पूर्ण करायासहि समर्थ आहे, असा त्याचा निश्चय
होता; २२ ह्मणून तें त्याला न्यायीपण असें मो-
जलें होतें. २३ तर तें त्याला असें मोजलें हें
केवळ त्याजसाठीं असें नाहीं, २४ तर आह्मा-
साठींहि लिहिलें; ह्मणजे जो आमचा प्रभु येशू
आमच्या अपराधांमुळें पराधीन झाला व आह्मी
न्यायी ठरावें ह्मणून पुन्हा उठविलेला होता, २५
त्याला मेलेल्यांमधून उठविणाऱ्यावर जे विश्वास ठेवि-
तात त्या आह्मास तसेंच मोजण्यांत येईल.

## अध्याय ५.

यास्तव आह्मी विश्वासाने न्यायी ठरलेले असतां,
देवासीं आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून
आमची शांति आहे; २ ज्या कृपेंत आह्मी
आहों तींत त्याकडूनच आमचा प्रवेशहि विश्वासाने
झाला, आणि आह्मी देवाच्या गौरवाच्या आशे-
मुळें आनंद करितों. ३ आणि असें केवळ नाहीं,
पण संकटांमध्येंहि आनंद करितों कां तर आह्मास
ठाऊक आहे कीं, संकटाने सहनता उत्पन्न होती,
४ व सहनतेने अनुभव व अनुभवाने आशा, ५
आणि आशा लाजविणार नाहीं, कारण कीं जो
पवित्र आत्मा आह्मास दिल्हा, त्याकडून आमच्या
अंतःकरणांत देवाची प्रीति भरली आहे. ६ कां
तर आह्मी दुर्बळ असतां ख्रीस्त पाप्यांसाठीं नेम-
लेल्या समयीं मरण पावला. ७ तर न्यायी मनु-
ष्यासाठीं कोणी मरावें हें दुर्लभ, तथापि चांगल्या
मनुष्यासाठीं कदाचित् कोणी मरायाला धजेल. ८
परंतु देवाने आह्मावरची आपली प्रीति असी
दाखविली कीं, आह्मी पापी असतांहि ख्रीस्त आ-
ह्मासाठीं मरण पावला. ९ तर आह्मी आतां
त्याच्या रक्ताकडून न्यायी ठरलेले असतां, त्याजक-
डून फार विशेषेंकरून क्रोधापासून तरूं. १० कां
कीं आह्मी शत्रु असतां देवासीं त्याच्या पुत्रा-
च्या मरणाकडून आमचा समेट झाला, तर आतां
समेट झाल्यावर त्याच्या जीवनाकडून फार विशेषें-
करून आह्मी तरूं. ११ आणि असें केवळ
नाहीं, तर ज्याकडून आमचा समेट झाला, त्या
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून आह्मी देवाविषयीं
उल्हासहि करितों.

१२ यास्तव जसें एका माणसाकडून पाप जगांत
आलें, आणि पापामुळें मरण, मग तसेंच सर्वांनी
पाप केल्यावरून सर्व माणसांवर मरण आलें;—
१३ कां कीं नेमशास्त्र होईपर्यंतहि पाप जगांत होतें,
पण शास्त्र नसलें तर पाप मोजण्यांत येत नाहीं;
१४ तथापि आदामापासून मोश्यापर्यंत, ह्मणजे

ज्यानी आदामाच्या अपराधाप्रमाणें पाप केलें नव्हतें
त्यांवरहि मरणाने राज्य केलें; तो तर पुढें होणा-
ऱ्याची प्रतिमा आहे. १५ परंतु जसा अपराध
तसें कृपादान नाहीं; कां तर एकाच्या अपराधामुळें
बहुत मरण पावले, परंतु एक मनुष्य, येशू
ख्रीस्त, याच्या कृपेने देवाची कृपा व अनुग्रहदान
हीं बहुतांस फार विशेषेंकरून मिळालीं आहेत.
१६ आणखी एकाने पाप केल्यावरून जसें झालें,
त्याप्रमाणेंच कृपादान नाहीं; कां कीं एका पापा-
करितां दंड होण्याचा न्याय ठरला, पण कृपादान
हें बहुत अपराधांपासून सोडवून न्यायी ठरविणें
असें आहे. १७ कां तर एकाच्या अपराधामुळें
त्या एकाकडूनच मरणाने राज्य केलें, तर अतिशय
कृपा व न्यायीपणाचें दान जे पावतात ते एकाकडून
ह्मणजे येशू ख्रीस्ताकडून फार विशेषेंकरून जीवनांत
राज्य करितील. १८ यावरून जसें एकाच्या अप-
राधामुळें सर्व माणसांवर दंड आला, तसें एकाच्या
न्यायीपणामुळें सर्व माणसांवर जीवनसंबंधी न्यायी
ठरणेंहि आलें. १९ कां कीं जसे एकाच मनुष्या-
च्या आज्ञाभंगामुळें बहुत पापी ठरले, तसे एका-
च्याच आज्ञाधारणामुळें बहुत न्यायी ठरतील. २०
आणि अपराध वाढण्यासाठीं नेमशास्त्र चालू झालें,
तथापि जेथें पाप बहुत झालें, तेथें कृपा फार अधिक
वाढली; २१ यासाठीं कीं जसें पापाने मरणाक-
डून राज्य केलें, तसें आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याकडून कृपेने सर्वकाळच्या जीवनासाठीं न्यायी-
पणाकडून राज्य करावें.

## अध्याय ६.

तर आह्मी काय ह्मणावें? कृपा वाढावी ह्मणून
आह्मी पापांत राहूं काय? २ असें न घडो;
जे आह्मी पापाविषयीं मेलों, ते आह्मी त्यांत कसे
राहूं? ३ तुह्माला ठाऊक नाहीं काय, कीं जे
आह्मी ख्रीस्त येशूचा बाप्तिस्मा पावलों, ते सर्व
त्याच्या मरणाकरितां बाप्तिस्मा पावलों? ४ यास्तव
आह्मी मरणाकरितां त्याजबरोबर बाप्तिस्म्याने पुरले
होतों, यासाठीं कीं जसा ख्रीस्त बापाच्या गौरवाने
मेलेल्यांमधून उठविलेला होता, तसे आह्मीहि नवीन
जीवनाने चालावें. ५ कारण कीं, आह्मी त्याच्या
मरणाच्या बरोबरीने त्यासंगतीं लाविले होतों, तर
तसेच त्याच्या पुन्हा उठण्याच्याहि बरोबरीने होऊं.
६ कां तर आह्मी असें जाणावें कीं, हें पापरूप
शरीर नाहींसें व्हावें ह्मणून आमचें जुनें मनुष्यपण
त्याजबरोबर खांबीं दिल्हें आहे, यासाठीं कीं आह्मी
पुढें पापाचे दास होऊं नये. ७ कां कीं असा जो
मेला तो पापापासून मुक्त झाला आहे. ८ आणि
आह्मी ख्रीस्तासंगतीं मेलों असलों, तर आह्मी त्या-
जबरोबर जिवंतहि राहूं, असा आह्मी विश्वास
धरितों. ९ कां तर आह्मास ठाऊक आहे कीं,
ख्रीस्त मेलेल्यांमधून उठविला असतां पुन्हा मरत
नाहीं; त्याजवर मरण पुन्हा सत्ता करीत नाहीं.
१० कां कीं तो मेला तर पापाकरितां एकदा मेला;
पण तो जिवंत आहे, तर देवाकरितां जिवंत आहे.
११ तसे तुह्मीहि आपणाला पापाविषयीं मेलेले,
आणि देवाकरितां आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून
जिवंत झालेले, असे मोजा. १२ यास्तव तुह्मी
आपल्या नाशवंत शरिरांत पापाची सत्ता चालूं देऊं
नका, असी कीं तुह्मी त्याच्या इच्छांस मान्य व्हावें.
१३ आणि तुह्मी पापाला आपलीं अंगें अन्यायाचीं
शस्त्रें असीं सोपून देऊं नका, तर आपण मेलेल्या-
मधून जिवंत झालों असें समजून आपणांस देवाला
सोपून द्या, आणि आपलीं अंगें न्यायाचीं शस्त्रें
होण्याकरितां देवाला द्या. १४ कां कीं तुह्मी
नेमशास्त्राखालीं नव्हे पण कृपेखालीं आहां, ह्मणून
पापाची सत्ता तुह्मावर चालणार नाहीं.

१५ तर काय? आह्मी नेमशास्त्राखालीं नाहीं
पण कृपेखालीं आहों, ह्मणून पाप करावें काय?
असें न घडो. १६ तुह्मास ठाऊक नाहीं काय,
कीं ज्याला मानण्यासाठीं तुह्मी आपणांस दास
असें सोपून देतां, ज्याला तुह्मी मानितां त्याचे
दास तुह्मी आहां, मरणाकरितां पापाचे, किंवा न्या-
यीपणाकरितां मानण्याचे, असे आहां? १७ परंतु
देवाची स्तुति असो, कां कीं तुह्मी पूर्वी पापाचे
दास होतां, तथापि जो उपदेशाचा प्रकार तुह्मास
प्राप्त झाला त्याला तुह्मी अंतःकरणापासून मानिलें
आहे. १८ आणि पापापासून मुक्त होऊन तुह्मी
न्यायीपणाचे दास झालां. १९ तुमच्या देहाच्या
अशक्तपणामुळें मी माणसासारिखें बोलतों; कां तर
जसीं तुह्मी आपलीं अंगें दुष्टाई करण्यासाठीं अमं-
गळपण व अधर्म यांस दासरूपें सोपून दिल्हीं
होतीं, तसीं आतां आपलीं अंगें पवित्रता होण्या-
साठीं न्यायीपणाला दासरूपें सोपून द्या. २०
कां कीं तुह्मी पापाचे दास होतां तेव्हां न्यायीपणा-
पासून मोकळे होतां. २१ तर ज्या कर्मांविषयीं
तुह्मास आतां लाज वाटती त्यांपासून तुह्मास त्या

त्यांचें काय फळ प्राप्त झालें? कां कीं त्यांचा परिणाम
मरण आहे. २२ परंतु आतां तुह्मी पापापासून
मुक्त होऊन देवाचे दास झालां असतां, तुह्मास
पवित्रपण हें फळ आहे, आणि परिणाम सर्वकाळचें
जीवन आहे. २३ कां कीं पापाची मजुरी मरण
आहे, परंतु देवाचें कृपादान हें आमच्या प्रभु येशू
ख्रीस्ताकडून सर्वकाळचें जीवन आहे.

## अध्याय ७.

अहो भावानो, जे नेमशास्त्र जाणतात त्यांस तर
मी ह्मणतों, हें तुह्मास ठाऊक नाहीं काय
कीं जोंपर्यंत मनुष्य वांचतें तोंपर्यंत नेमशास्त्राची
सत्ता त्याजवर राहती? २ कां तर सुवासिनी
स्त्रीचा नवरा जिवंत आहे, तोंपर्यंत ती नेमशास्त्राने
त्यासीं बांधलेली आहे, परंतु नवरा मेला तर ती नव-
ऱ्याच्या नेमापासून मोकळी झाली. ३ ह्मणून नवरा
जिवंत असतां जर ती दुसऱ्या पुरुषाची होती, तर
तिला व्यभिचारीण ह्मणतात; पण नवरा मेला तर
ती नेमापासून मोकळी आहे, असी कीं ती दुसऱ्या
पुरुषाची झाली असतांहि व्यभिचारीण नाहीं. ४
त्याप्रमाणें अहो माझ्या भावानो, तुह्मीहि ख्रीस्ता-
च्या शरिराकडून नेमशास्त्राविषयीं मेले आहां,
यासाठीं कीं तुह्मी दुसऱ्याचे ह्मणजे मेलेल्यांमधून
उठलेल्याचे होऊन, देवाला फळ द्यावें. ५ कां
कीं आह्मी देहाच्या स्वाधीन होतों तेव्हां पापाच्या
ज्या हांवा नेमशास्त्राकडून चेतल्या, त्या मरणाला
फळ देण्यासाठीं आमच्या अंगांमध्यें प्रवृत्त होत्या.
६ पण आतां आह्मी नेमशास्त्रापासून मोकळे
आहों, कां कीं ज्याकडून आह्मी बांधले होतों तें
मेलें आहे, ह्मणून आह्मी प्राचीन विधीप्रमाणें नाहीं
पण नवीन आत्म्याने सेवा करावी.

७ तर आह्मी काय ह्मणावें? नेमशास्त्र पाप
आहे काय? असें न घडो. नेमशास्त्राकडून कळलें
नसतें, तर मला पापाची ओळख झाली नसती;
कां कीं लोभ ठेवूं नको, असें नेमशास्त्रांत सांगि-
तलें नसतें, तर लोभ मला समजला नसता. ८
परंतु पापाने आज्ञेवरून निमित्त पावून, मजमध्यें
सर्व प्रकारचा लोभ उत्पन्न केला; कारण कीं नेम-
शास्त्रावांचून पाप निर्जीव आहे. ९ आणि पूर्वी
मी नेमशास्त्रावांचून जिवंत होतों, पण आज्ञा आ-
ल्यावर पाप पुन्हा सजीव झालें, आणि मी मेलों.
१० आणि जी आज्ञा जीवनासाठीं होती तीच मर-
णासाठीं असी मला दिसून आली. ११ कां कीं
पापाने आज्ञेवरून निमित्त पावून मला फसविलें
आणि तिजकडून मारिलें. १२ यास्तव नेमशास्त्र
पवित्र, आणि आज्ञा पवित्र व न्यायी व उत्तम आहे.
१३ तर जें उत्तम तें मला मरण झालें काय?
असें न घडो. पण पाप तें पाप असें दिसावें, ह्म-
णून त्याने चांगल्याकडून मला मरण घडविलें;
यासाठीं कीं आज्ञेवरून पाप अतिशय दुष्ट व्हावें.
१४ कारण आह्मांला ठाऊक आहे कीं, शास्त्र आ-
त्मिक आहे, परंतु मी दैहिक, पापाला विकलेला
असा आहें. १५ कारण कीं जें मी करितों, तें
योग्य मानीत नाहीं; कां तर जें मी इच्छितों तें
करीत नाहीं, तर ज्याचा मला कंटाळा आहे तें
करितों. १६ आणि जें मी इच्छीत नाहीं, तें जर
करितों, तर नेमशास्त्र उत्तम, असें मी अनुमोदन
देतों. १७ तर आतां मी तें करितों असें नव्हे,
तर मजमध्यें राहणारें पाप. १८ कां तर मला
ठाऊक आहे कीं, मजमध्यें ह्मणजे माझ्या देहांत
कांहीं उत्तम राहत नाहीं; कां कीं इच्छा करणें
मजकडून घडतें, परंतु जें चांगलें तें करावें हें मज-
कडून होत नाहीं. १९ कां तर जें उत्तम मी
इच्छितों तें मी करीत नाहीं, पण जें वाईट मी
इच्छीत नाहीं तें करितों. २० ह्मणून जें मी
इच्छीत नाहीं तें जर करितों, तर मी तें करितों
असें नव्हे, तर मजमध्यें राहणारें पाप. २१ तर
मी चांगलें करायास इच्छितों तेव्हां वाईट मजपुढें
येतें, असा नेम मला अढळतो. २२ कां कीं मी
देवाच्या नेमशास्त्रावरून अंतर्यामीं संतुष्ट आहें.
२३ परंतु मला माझ्या अंगांमध्यें दुसरा नेम दिसून
येतो, तो माझ्या मनांतल्या नेमासीं विरोध करितो,
आणि मला पाडाव करून माझ्या अंगांतील पापरूप
नेमाच्या स्वाधीन करितो. २४ अरेरे! मी कष्टी
माणूस! मला या मरणाच्या शरिरापासून कोण
सोडवील? २५ आमचा प्रभु येशू ख्रीस्त याक-
डून मी देवाची उपकारस्तुति करितों. तर स्वतां
मी मनाने देवाच्या नेमाची सेवा करितों खरें, परंतु
देहाने पापाच्या नेमाची.

## अध्याय ८.

तर जे येशू ख्रीस्तामध्यें आहेत, जे देहाप्रमाणें
नव्हे पण आत्म्याप्रमाणें चालतात, त्यांस आतां
कांहीं दंड नाहीं. २ कां तर येशू ख्रीस्ताकडून

जो जीवनाच्या आत्म्याचा नेम, त्याने मला पाप व
मरण यांच्या नेमापासून मुक्त केलें आहे. ३ कारण
कीं नेमशास्त्र देहामुळें दुर्बळ होतें, यावरून त्याला
जें असाध्य तें करण्याकरितां देवाने आपला पुत्र
पापी देहाच्या प्रतिमेने आणि पापापुळें पाठवून देहा-
मध्यें पापाचा दंड ठरविला. ४ यासाठीं कीं जे
देहाप्रमाणें नव्हे पण आत्म्याप्रमाणें चालतात, त्या
आह्मामध्यें नेमशास्त्राचें न्यायीपण परिपूर्ण व्हावें.
५ कां तर जे देहाच्या स्वाधीन आहेत ते दैहिक
गोष्टी आणि जे आत्म्याच्या स्वाधीन आहेत ते
आत्मिक गोष्टी चिंतितात. ६ परंतु दैहिक गोष्टी
चिंतणें हें मरण, आणि आत्मिक गोष्टी चिंतणें हें
जीवन व शांति आहे. ७ कां तर दैहिक गोष्टी
चिंतणें हें देवासीं वैर आहे, कारण कीं तें देवाच्या
शास्त्राला मान्य नव्हे आणि त्याच्याने मान्य होवत
नाहीं. ८ तर जे दैहिकपणांत आहेत, त्यांच्याने
देवाला संतुष्ट करवत नाहीं. ९ परंतु जर देवाचा
आत्मा तुह्मामध्यें राहतो तर तुह्मी दैहिकपणांत
नाहीं पण आत्म्यांत आहां. आणि जर कोणाला
ख्रीस्ताचा आत्मा नाहीं तर तो त्याचा नाहीं.
१० आणि जर ख्रीस्त तुमच्या मध्यें आहे, तर
पापामुळें देह मेलेला आहे, पण आत्मा न्यायीपणा-
मुळें जिवंत आहे. ११ परंतु येशूला मेलेल्यांम-
धून उठविणाऱ्याचा आत्मा जर तुह्मामध्यें राहतो,
तर ज्याने ख्रीस्त मेलेल्यांमधून उठविला तो आ-
पला तुह्मामध्यें राहणारा आत्मा याकडून तुमचीं
मरणारीं शरीरें देखील जिवंत करील.

१२ तर अहो भावानो, देहाप्रमाणें वर्त्तायाला
आपण देहाचे ऋणी नाहीं. १३ कां कीं जर तुह्मी
देहाप्रमाणें वर्त्ततां तर तुह्मी मराल, परंतु जर तुह्मी
आत्म्याच्या योगाने देहाचीं कर्मे नष्ट करितां तर
वांचाल. १४ कां कीं जितक्यांस देवाचा आत्मा
चालवितो, ते सर्व देवाचे पुत्र आहेत. १५ तुह्मी
तर पुन्हा भ्यावें असा दासपणाचा आत्मा पावलां
नाहीं; पण जेणेंकरून आपण आब्बा, बापा, असी
हाक मारितों, तो दत्तपुत्रपणाचा आत्मा, पावलां
आहां. १६ तो आत्मा स्वतां आमच्या आत्म्यासीं
साक्ष देतो कीं, आह्मी देवाचीं लेंकरें आहों. १७
आणि जर लेंकरें तर वतनदार, देवाचे वतनदार
आणि ख्रीस्ताच्या संगतीं वतनदार, असे आहों;
ह्मणजे आह्मी संगतीं गौरव भोगावें ह्मणून जर
संगतीं दुःख भोगितों तर. १८ कां कीं मी असें
मानितों कीं, या काळचीं दुःखें हीं आह्मासाठीं
जें गौरव पुढें प्रगट होईल, त्याच्या तुलनेस योग्य
नाहींत. १९ कां कीं सृष्टीची अति उत्कंठा देवा-
च्या पुत्रांच्या प्रगट होण्याची वाट पाहती. २०
कां कीं सृष्टि व्यर्थपणाच्या स्वाधीन झाली, हें आप-
ल्या खुशीने नव्हे, तर ज्याने ती स्वाधीन केली त्या-
कडून; २१ या आशेने कीं सृष्टि स्वतांच नास-
केपणाच्या बंधनांतून सुटून देवाच्या लेंकरांची
गौरवयुक्त मोकळीक पावेल. २२ कां तर आ-
ह्माला ठाऊक आहे कीं, सर्व सृष्टि आजपावेतों
एकत्र कण्हती व वेदना पावती. २३ आणि हेंच
केवळ नव्हे, तर आपण, ज्यांस आत्म्याचें प्रथम
फळ आहे, ते आह्मी देखील स्वतां दत्तपुत्रपण
ह्मणजे आपल्या देहाची खंडणी इची वाट पाहत
असतां आपल्यांत कण्हतों. २४ कां कीं आह्मी
आशेने तरतों; परंतु जी आशा अनुभवास आली
ती आशा नव्हे, कां तर कोणीएकाला जें प्राप्त झालें
त्याची आशा तो कसी करील? २५ पण जें
आह्मास प्राप्त झालें नाहीं त्याची आशा जर आह्मी
धरितों, तर धैर्याने वाट पाहतों. २६ त्याप्रमाणें
आत्माहि आमच्या अशक्तपणाचें सहाय करितो;
कां कीं यथायोग्य प्रार्थना करून काय मागावें हें
आह्मास समजत नाहीं, पण आत्मा स्वतां अवाच्य
कण्हण्याने आह्मासाठीं विनंती करितो. २७
आणि अंतःकरणें शोधणारा याला आत्म्याचा भाव
काय हें ठाऊक आहे, कारण कीं हा पवित्र लोकां-
साठीं देवाच्या इच्छेप्रमाणें विनंती करितो. २८
आणखी आह्मास ठाऊक आहे कीं, देवावर प्रीति
करणारे ह्मणजे जे संकेताप्रमाणें बोलावलेले आहेत,
त्यांस सर्व गोष्टी कल्याणकारक होतात. २९ कारण
कीं ज्यांस त्याने पूर्वी जाणिलें, त्यांस त्याने आपल्या
पुत्राच्या प्रतिमेप्रमाणें होण्याकरितां पूर्वी नेमिलें,
तो बहुत भावांमध्यें ज्येष्ठ व्हावा ह्मणून. ३०
आणि ज्यांस पूर्वी नेमिलें, त्यांस त्याने बोलाविलें;
आणि ज्यांस बोलाविलें, त्यांस त्याने न्यायी ठर-
विलें; आणि ज्यांस न्यायी ठरविलें, त्यांस त्याने
गौरविलें. ३१ तर या गोष्टींविषयीं आह्मी काय
ह्मणावें? देव आह्मास अनुकूळ तर आह्मास प्रति-
कूळ कोण? ३२ ज्याने आपला पुत्र राखिला
नाहीं, तर आह्मा सर्वांसाठीं दिल्हा, तो त्यासुद्धां
आह्माला सर्व पदार्थ कसा देणार नाहीं? ३३
देवाच्या निवडलेल्यांवर आरोप कोण ठेवील? न्यायी

ठरविणारा देव. ३४ अन्यायी ठरविणारा कोण?
जो मेला व विशेषेंकरून पुन्हा उठला तो ख्रीस्त,
तो देवाच्या उजवीकडे आहे आणि तो आह्मासाठीं
विनंती करितो. ३५ ख्रीस्ताच्या प्रीतीपासून
आह्मास कोण वेगळें करील? क्लेश किंवा कष्ट,
किंवा पाठलाग, किंवा उपास, किंवा नग्नता, किंवा
संकट, किंवा तरवार, हीं वेगळें करितील काय?
३६ जसें लिहिलें आहे त्याप्रमाणें, ह्मणजे आ-
ह्मास तुजसाठीं दिवसभर वधितात, मारायाचीं
मेंढरें त्यांसारिखे आह्मी मोजलेले आहों. ३७
तथापि ज्याने आह्मावर प्रीति केली त्याकडून या
अवघ्यांमध्यें आह्मी अतिशय विजयी आहों. ३८
कां कीं माझी खातरी आहे कीं, मरण किंवा जीवन,
किंवा दूत, किंवा अधिकार, किंवा सामर्थ्यें, किंवा
हल्लींच्या गोष्टी, किंवा होणार गोष्टी, ३९ किंवा
उंचपण, किंवा नीचपण, किंवा कोणतीहि दुसरी
उत्पन्न झालेली वस्तु, आमच्या प्रभु येशू ख्रीस्ता-
कडून जी देवाची प्रीति आहे, तिजपासून आह्मास
वेगळें करायास समर्थ होणार नाहीं.

## अध्याय ९.

मी ख्रीस्तापुढें सत्य बोलतों, असत्य बोलत
नाहीं, माझें मनहि पवित्र आत्म्यासमक्ष मज-
सीं साक्ष देतें, २ कीं माझ्या अंतःकरणांत मोठें
कष्ट व अखंडित वेदना आहे. ३ कारण कीं माझे
भाऊ ह्मणजे देहसंबंधाने जे माझे नातलग, त्यांच्या
ठिकाणीं म्या स्वतां ख्रीस्तापासून शापित होऊन
वेगळें व्हावें, असें म्या इच्छिलें असतें. ४ ते
इस्राएली आहेत, त्यांस दत्तपुत्रपण व गौरव व
करार व शास्त्रदान व भजन व वचनें आहेत. ५
पूर्वजहि त्यांचे आहेत, व त्यांजपासून देहसंबंधाने
ख्रीस्त, तो सर्वांवर देव, सर्वदा स्तुतिमान्य आहे,
आमेन. ६ तर देवाचें वचन व्यर्थ झालें असें
नाहीं, कां कीं जे इस्राएलांतले ते सर्व इस्राएल
नाहींत. ७ आणि ते आब्राहामाचें संतान, ह्मणून
ते सर्व लेंकरें आहेत असें नाहीं, तर इझाकावरून
तुझें संतान ह्मणतील. ८ ह्मणजे देहाचीं लेंकरें
तीं देवाचीं लेंकरें नव्हत, तर वचनाचीं लेंकरें, तींच
संतान असें मोजितात. ९ कां तर वचनाचें वाक्य
हेंच कीं, या वेळेप्रमाणें मी येईन आणि सारेला
पुत्र होईल. १० आणि असें केवळ नाहीं, पण
रिबेकाहि, एक आमचा बाप इझाक याजपासून
गरोदर झाल्यावर, ११ तीं जावळीं अझून ज-
न्मलीं नव्हतीं आणि त्यांनी कांहीं बरें किंवा वाईट
केलें नव्हतें, तेव्हां देवाचा संकेत हा निवडण्याप्र-
माणें ह्मणजे कर्मावरून नव्हे, तर बोलावणाऱ्याच्या
इच्छेवरून ठरावा; १२ ह्मणून तिला ह्मटलें
होतें कीं, वडील धाकट्याची सेवा करील. १३ जसें
लिहिलें आहे त्याप्रमाणें, ह्मणजे म्या याकोबावर
प्रीति केली, परंतु एसावाचा द्वेष केला आहे.

१४ तर आह्मी काय ह्मणावें? देवापासीं अ-
न्याय आहे काय? असें न घडो. १५ कां कीं
तो मोशाला ह्मणतो कीं, ज्यावर मी कृपा करीन
त्याजवर कृपा करीन, आणि ज्यावर मी दया करीन
त्याजवर दया करीन. १६ हें तर इच्छा करणा-
ऱ्याकडे नाहीं व धावणाऱ्याकडेहि नाहीं, कृपा कर-
णारा देव याजकडे आहे. १७ कारण कीं शास्त्र
फारोला सांगतें कीं, याच कारणास्तव म्या तुला
उंचाविलें आहे कीं, तुजकडून म्या आपला पराक्रम
दाखवावा आणि माझें नाम सर्व जगांत वर्णावें.
१८ यास्तव ज्यावर तो इच्छितो त्यावर तो कृपा
करितो; आणि ज्याला इच्छितो त्याला तो कठीण
करितो. १९ तर तूं मला ह्मणसील, अझून तो कां
दोष लावितो? कां कीं त्याच्या इच्छेला कोणी अड-
विलें आहे? २० अहाहा! अरे माणसा, जो
देवासीं विवाद करितोस असा तूं कोण आहेस?
घडलेली वस्तु घडणाऱ्याला, त्वां मला असें कां केलें,
असें ह्मणेल काय? २१ एकाच गोळ्यापासून एक
पात्र उत्तम कार्यासाठीं व एक नीच कार्यासाठीं
करावें, ह्मणून कुंभाराला मातीवर अधिकार नाहीं
काय? २२ आणि जर देवाने क्रोध दाखवावा व
पराक्रम कळवावा असी इच्छा धरून नाशासाठीं
सिद्ध झालेलीं क्रोधाचीं पात्रें तीं फार सहनतेने
साहिलीं, २३ आणि जीं त्याने पूर्वीं गौरव पाव-
ण्यासाठीं सिद्ध केलीं होतीं त्या कृपेच्या पात्रांवर,
२४ ह्मणजे ज्यांस त्याने यहूद्यांतून केवळ नव्हे, तर
विधर्मी लोकांतूनहि बोलाविलें आहे, त्या आह्मावर
आपलें अतिशय गौरव प्रगट करावें असें इच्छिलें,
तर काय? २५ जसें तो होशेहाकडून बोलला
त्याप्रमाणें, ह्मणजे जे माझे लोक नव्हत त्यांस मी
आपले लोक ह्मणेन, आणि जी प्रिय नाहीं तिला
प्रिय ह्मणेन. २६ आणि असें होईल कीं, जेथें
त्यांस ह्मटलें होतें कीं, तुह्मी माझे लोक नाहीं, त्या
ठिकाणीं त्यांस जिवंत देवाचे पुत्र ह्मणतील. २७

यशायाहि इस्राएलाविषयीं ओरडून ह्मणतो कीं, जरी
इस्राएल लोकांची गणना समुद्राच्या वाळूसारिखी
आहे, तरी शेष तारण पावेल. २८ कां कीं तो
तें कार्य न्यायाने संपवून सिद्धीस नेईल, कां तर
प्रभु तें कार्य पृथ्वीवर लौकर करील. २९ आणि
त्याप्रमाणें यशायाने पूर्वी सांगितलें कीं, जर सैन्यां-
च्या प्रभूने आह्मासाठीं बीज राहूं दिल्हें नसतें, तर
आह्मी सदोमासारिखे झालों असतों व गमोऱ्याची
बरोबरी पावलों असतों. ३० तर आह्मी काय
ह्मणावें? असें कीं ज्या विदेशी लोकांनी न्यायीपणाचा
शोध केला नाहीं, त्यांस न्यायीपण प्राप्त झालें,
ह्मणजे जें न्यायीपण विश्वासाकडून तें. ३१ परंतु
जे इस्राएल लोक न्यायीपणाच्या नेमामागें लागले
ते न्यायीपणाच्या नेमापर्यंत पोहंचले नाहींत. ३२
कशाला? यास्तव कीं त्यांनी विश्वासाकडून नव्हे
तर नेमशास्त्राच्या कर्मांकडून प्रयत्न केला, कां तर
ते त्या अडखळण्याच्या धोंड्यावर अडखळले. ३३
जसें लिहिलें आहे त्याप्रमाणें, ह्मणजे पाहा, मी
सीयोनांत ठेंच लागण्याचा धोंडा व अडखळण्याचा
खडक ठेवितों, आणि त्याजवर जो कोणी विश्वास
ठेवील तो लाजणार नाहीं.

## अध्याय १०.

अहो भावानो, इस्राएलाविषयीं माझ्या अंतःकर-
णांतील इच्छा व देवाजवळ प्रार्थना असी आहे
कीं, त्यांचें तारण व्हावें. २ कां कीं मी त्यांविषयीं
साक्ष देतों कीं, त्यांस देवाविषयीं आवेश आहे,
परंतु तो ज्ञानाप्रमाणें नाहीं. ३ कां कीं ते देवाचें
न्यायीपण जाणत नसतां आणि आपलेंच न्यायीपण
स्थापायास पाहत असतां, देवाच्या न्यायीपणाला
मान्य झाले नाहींत. ४ कां कीं ख्रीस्त हा प्रत्ये-
क विश्वासणाऱ्याला न्यायीपण होण्यासाठीं नेमशा-
स्त्राचा परिणाम आहे. ५ कां तर नेमशास्त्राकडून
न्यायीपण मोशे असें वर्णितो कीं, हीं कर्मे करणारा
माणूस त्यांकडून वांचेल. ६ परंतु विश्वासाकडून
न्यायीपण असें ह्मणतें कीं, तूं आपल्या हृदयांत ह्मणूं
नको कीं, आकाशांत कोण चढेल? ख्रीस्ताला खालीं
आणावें ह्मणून. ७ किंवा अधोलोकीं कोण उत-
रेल? ख्रीस्ताला मेलेल्यांमधून परत आणावें ह्मणून.
८ तर तें काय ह्मणतें? ती गोष्ट तुझ्या जवळ
तुझ्या तोंडांत व तुझ्या अंतःकरणांत आहे, ह्मणजे
जी विश्वासाची गोष्ट आह्मी माजवितों ती. ९ ती
असी कीं, जर तूं आपल्या तोंडाने प्रभु येशू हें
पत्करसील, आणि देवाने त्याला मेलेल्यांमधून उठ-
विलें असा तूं आपल्या अंतःकरणांत विश्वास धर-
सील, तर तारण पावसील. १० कां कीं न्यायी-
पणासाठीं अंतःकरणांत विश्वास होतो व तारणा-
साठीं तोंडाने पत्कर होतो. ११ कां कीं शास्त्र
ह्मणतें कीं, जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितो तो
लाजणार नाहीं. १२ यहूदी व हेल्लेनी यांमध्यें
तर भेद नाहीं, कां कीं सर्वांचा प्रभु एकच, जे त्या-
ची विनंती करितात, त्या सर्वांस तो दयासागर आहे.
१३ कां कीं जो कोणी प्रभूचें नांव घेईल तो तारण
पावेल. १४ तर ज्याजवर त्यांनी विश्वास ठेविला
नाहीं, त्याची विनंती ते कसी करतील? आणि
ज्याविषयीं त्यांनी ऐकिलें नाहीं त्याजवर ते विश्वास
कसा ठेवितील? आणि गाजविणाऱ्यावांचून ते कसे
ऐकतील? १५ आणि ते पाठविले नसतां कसे
गाजवितील? लिहिलें आहे त्याप्रमाणें, ह्मणजे शां-
तीचें शुभवर्त्तमान सांगणारे, चांगल्या गोष्टींचें शुभ-
वर्त्तमान सांगणारे, यांचे पाय किती रमणीय आहेत!
१६ परंतु सर्वांनी शुभवर्त्तमान मानिलें नाहीं; कां
कीं यशाया ह्मणतो, हे प्रभू, आमची वार्त्ता कोणी
विश्वासली? १७ तर विश्वास उपदेशावरून व
उपदेश देवाच्या वचनावरून होतो. १८ पण मी
ह्मणतों, त्यांनी ऐकिलें नाहीं काय? होय, त्यांचा
शब्द सर्व पृथ्वींत व त्यांच्या गोष्टी जगाच्या सीमां-
पर्यंत गेल्या. १९ आणखी मी ह्मणतों कीं, इस्रा-
एलाला कळलें नव्हतें काय? प्रथम मोशे ह्मणतो,
जें राष्ट्र नाहीं त्याकडून मी तुह्माला ईर्षायुक्त करीन,
मूर्ख लोकांकडून मी तुह्माला चिडवीन. २० आणि
यशाया फार धीट होऊन ह्मणतो, ज्यांनी माझा
शोध केला नाहीं त्यांस मी सांपडलों; ज्यांनी मज-
विषयीं विचारिलें नाहीं त्यांस मी प्रगट झालों.
२१ परंतु इस्राएलाविषयीं तो ह्मणतो कीं, अमान्य
व विरोधी लोकांस म्या सारादिवस आपले हात
पुढें केले आहेत.

## अध्याय ११.

तर मी ह्मणतों, देवाने आपले लोक घालविले आ-
हेत काय? असें न घडो. कां कीं मीहि इस्रा-
एली, आब्राहामाच्या संतानांतला, बन्यामीनाच्या
वंशांतला आहें. २ देवाने जे पूर्वी जाणिले होते,
त्या आपल्या लोकांस त्याने घालविलें नाहीं; एली-
याविषयीं शास्त्र काय ह्मणतें हें तुह्माला ठाऊक

नाहीं काय? कीं तो इस्राएलाविरुद्ध देवापाशीं अ-
सी विनंती करितो कीं, ३ हे प्रभू, त्यांनी तुझ्या
भविष्यवाद्यांस जीवें मारिलें आहे, आणि तुझ्या वे-
द्या खणून टाकिल्या आहेत, आणि मी एकटाच रा-
हिलों आहें, व माझाहि प्राण घ्यायास ते पाहतात.
४ परंतु देवाचें वचन त्याला काय सांगतें? ज्यांनी
बालाच्या मूर्त्तीपुढें गुडघे टेंकले नाहींत, असे सा-
त हजार मनुष्य म्यां आपल्यासाठीं ठेविले आहेत.
५ तर तसें आताहि कृपेच्या निवडण्याप्रमाणें शेष
राहिलें आहे. ६ आणि जर तें कृपेवरून तर
मग कर्मांवरून नाहीं; असलें तर कृपा ही तेव्हां-
पासून कृपा नाहीं; परंतु जर तें कर्मांवरून, तर मग
कृपा नाहीं; असली तर कर्म हें तेव्हांपासून कर्म
नाहीं. ७ तर काय? जें इस्राएलाने झटून शोधि-
लें तें त्यास मिळालें नाहीं, परंतु निवडलेल्यांस
मिळालें, आणि बाकीचे अंधळे झाले. ८ लिहिलें
आहे त्याप्रमाणें, ह्मणजे देवाने त्यांस आजच्या दि-
वसापर्यंत गाढ झोंपेचा आत्मा, न पाहणारे डोळे,
व न ऐकणारे कान दिल्हे. ९ आणि दावीद ह्मण-
तो कीं, त्यांचें मेज त्यांस फांस व सांपळा व ठेंचाड
व प्रतिफळ असें होवो. १० त्यांनी पाहूं नये
ह्मणून त्यांचे डोळे अंधारमय होवोत, आणि ते
आपली पाठ सर्वदा लववीत, असें कर. ११ तर
मी ह्मणतों, ते पडावे असे अडखळले काय? असें
न घडो. तर त्यांच्या पडण्याकडून विदेशी लो-
कांस तारण प्राप्त झालें, यासाठीं कीं त्यांस ईर्षा
उत्पन्न व्हावी. १२ आतां त्यांचें पडणें हें जर
जगाची संपत्ति, आणि त्यांचें उणेपण हें जर वि-
देशी लोकांची संपत्ति, तर त्यांची पूर्णता ही किती
अधिक होईल? १३ कारण कीं मी तुह्मा विदे-
शी लोकांस सांगतों, मी तर विदेशी लोकांचा प्रेषित
आहें ह्मणून आपल्या सेवेचें मोठेपण करितों; १४
यासाठीं कीं माझ्या देहजातीच्यांस म्यां कसेंहि क-
रून ईर्षायुक्त करावें व त्यांतील कित्येकांस तारावें.
१५ कां कीं त्यांच्या त्यागेंकरून जगाचा समेट,
तर त्यांचा अंगिकार येणेंकरून मेलेल्यांमधून जीवन
पावणें असें होईल कीं नाहीं? १६ आणि जर प्रथम
उत्पन्न पवित्र, तर पिंडहि पवित्र आहे, आणि मूळ
पवित्र, तर फांद्याहि पवित्र आहेत. १७ आतां
जरी कांहीं फांद्या तोडून टाकिल्या, आणि तुला
रानजाइत असतां त्यांमध्यें कलमरूपें लाविलें,
आणि तूं जाइताच्या मुळाचा व रसाचा विभागी
झालास; १८ तरी त्या फांद्यांवर आपणाला मि-
रवूं नको, परंतु जर तूं मिरविसील, तर तूं मुळाला
आधार नाहींस, पण मूळ तुला. १९ तर तूं ह्म-
णसील कीं, मला त्यांत कलमरूपें लावावें ह्मणून
फांद्या तोडल्या होत्या. २० बरें, अविश्वासामुळें
त्या तोडल्या, आणि तूं विश्वासानें राहतोस. अ-
भिमानी होऊं नको, तर भय धर. २१ कां कीं
देवाने मुळच्या फांद्या राखिल्या नाहींत तर तो तु-
लाहि कदाचित राखणार नाहीं. २२ देवाची
कृपा व कठोरपण पाहा; पतितांवर कठोरपण, परंतु
तुजवर कृपा, तूं त्याच्या कृपेंत राहसील तर;
नाहीं तर तूंहि तोडून जासील. २३ आणि तेहि
अविश्वासांत न राहिले तर कलमरूपें लावण्यांत
येतील, कां कीं देवाच्याने त्यांस पुन्हा लाववतें.
२४ कारण कीं तुला मुळच्या रानजाइतांतून
कापून काढिलें, आणि स्वभावाविरुद्ध चांगल्या जाइ-
तामध्यें कलमरूपें लाविलें, तर जे हे मुळचे ते
आपल्या जाइतामध्यें किती विशेषेंकरून कलमरूपें
लावण्यांत येतील? २५ अहो भावानो, तुह्मी
आपल्या मनांत अभिमानी होऊं नये, ह्मणून हें गूज
तुह्मी जाणावें असी माझी इच्छा आहे, कीं वि-
देशी लोकांचें पूर्णपण आंत येईल तोंपर्यंत इस्राएल
लोकांस कांहीं प्रकारें भूल पडली आहे. २६ मग
सर्व इस्राएल लोक तारण पावतील, लिहिलें आहे
त्याप्रमाणें, ह्मणजे सीयोनांतून सोडविणारा येईल व
तो याकोबापासून अधर्म दूर करील. २७ जेव्हां मी
त्यांचीं पापें दूर करीन, तेव्हां हाच माझा करार
त्यांसीं आहे. २८ शुभवर्त्तमानाविषयीं ते तुह्मा-
मुळें शत्रु आहेत, परंतु निवडण्याविषयीं ते पूर्वजां-
मुळें प्रिय. २९ कां कीं देवाचीं कृपादानें व बो-
लावणें हीं पालटत नाहींत. ३० अथवा जसें
तुह्मी पूर्वी देवाला मानीत नव्हतां तथापि त्यांच्या
अमान्यतेवरून दया पावला आहां; ३१ तसें
त्यांनीहि आतां मानिलें नाहीं, तुह्मावरल्या दयेनें
त्यांनीहि दया पावावी ह्मणून. ३२ कां कीं देवाने
सर्वांवर दया करावी ह्मणून सर्वांस अविश्वासांत
कोंडून ठेविलें. ३३ देवाच्या विद्येची व ज्ञानाची
संपत्ति किती अगाध! त्याचे न्याय किती अतर्क्य
आणि त्याचे मार्ग किती अगम्य! ३४ कां कीं
प्रभूचें मन कोणी जाणिलें आहे, किंवा त्याचा
बोधक कोण झाला आहे? ३५ किंवा त्याला
पूर्वी कोणी दिल्हें आहे, असें कीं त्याला परत

देण्यांत यावें? ३६ कां कीं त्यापासून व त्याक-
डून व त्याकरितां सर्व आहेत; त्याला सर्वकाळ गौरव
असो, आमेन.

## अध्याय १२.

तर अहो भावानो, मी देवाच्या दयांवरून तुह्मास
विनवितों कीं, तुह्मी जिवंत, पवित्र व देवाला
आवडतें, असें अर्पण आपलीं शरिरें द्यावीं; ही सेवा
तुह्मास योग्य आहे. २ आणि या जगासारिखे
होऊं नका, तर आपल्या मनाच्या नवीनपणाने
पालटा, यासाठीं कीं देवाची उत्तम व आवडती व
परिपूर्ण इच्छा, तिचा अनुभव तुह्माला व्हावा.
३ कां कीं जें कृपादान मला प्राप्त झालें त्यावरून
मी तुह्मांतील प्रत्येकाला सांगतों कीं, जें योग्य
त्यापेक्षां आपल्याला अधिक मानूं नका, तर देवाने
प्रत्येकाला विश्वासाचा भाग दिल्हा आहे त्याप्रमाणें
सुबुद्धीने आपणाला माना. ४ कां कीं जसें आह्मास
एका शरिरांत बहुत अवयव आहेत, परंतु त्या
सर्व अवयवांचें कार्य एकसारिखें नाहीं; ५ तसे
आह्मी बहुत असतां ख्रीस्तामध्यें एक शरीर, आणि
प्रत्येक एकमेकांचे अवयव असे आहों. ६ तर
जी कृपा आह्मास प्राप्त झाली तिजप्रमाणें आह्मास
निरनिराळीं कृपादानें मिळाल्यावर, भविष्य सांगणें
असलें तर विश्वासाच्या परिमाणाने सांगावें; ७
सेवा करणें असलें तर सेवेंत तत्पर असावें, उपदे-
शक असला तर उपदेश करण्यांत, ८ बोध कर-
णारा असला तर बोध करण्यांत तत्पर असावें;
दान देणारा याने सालसपणाने द्यावें, अधिकार
करणाऱ्याने तो झटून करावा, दया करणाऱ्याने ती
संतोषाने करावी.

९ प्रीति निष्कपट असावी, वाइटाचा द्वेष
करा, बऱ्याला चिकटून राहा. १० बंधुप्रीतीने
एकमेकांवर ममता करा; आदराने एकमेकांची
प्रतिष्ठा करा. ११ झटण्यांत अळसी होऊं
नका, आत्म्यांत आवेशी व्हा, प्रभूची सेवा करा.
१२ आशेने हर्षित, क्लेशांत सहनशीळ, प्रार्थनेंत
तत्पर असे राहा. १३ पवित्रांच्या गरजा पुरवि-
ण्यासाठीं द्या; आतिथ्य करायास झटा. १४ तुमच्या
पाठीस लागणाऱ्यांस आशीर्वाद द्या; आशीर्वादच
द्या, शाप देऊं नका. १५ आनंद करणाऱ्यांबरोबर
आनंद करा, आणि रडणाऱ्यांबरोबर रडा. १६
एकमेकांशीं एकचित्त असा. उंच गोष्टींकडे चित्त
देऊं नका, तर गरिबांचा सहवास करा. तुह्मी
आपल्या मनांत अभिमानी होऊं नका. १७ वाइ-
टाबद्दल कोणाचें वाईट करूं नका. सर्व माणसांस
उत्तम दिसेल त्याचें मनन करा. १८ तुह्माकडून
होईल, तर सर्व माणसांशीं शांतीने राहा. १९
अहो प्रियानो, तुह्मी आपला सूड उगवूं नका, तर
रागाला जागा द्या; कां तर असें लिहिलें आहे
कीं, सूड घेणें मजकडे, मी फेडीन, असें प्रभु
ह्मणतो. २० यास्तव तुझा शत्रु भुकेला असला
तर त्याला खायाला दे; तान्हेला असला तर
प्यायाला दे; कां कीं असें केल्याने तूं त्याच्या
मस्तकावर इंगळांचा ढीग करसील. २१ वाईट
करण्याने वश्य होऊं नको, तर बरें करण्याने वाइ-
टाला जिंक.

## अध्याय १३.

प्रत्येक माणसाने मुख्य अधिकारांस मान्य असावें.
कां कीं देवावांचून कांहीं अधिकार होत नाहीं;
जे अधिकार आहेत ते देवाकडून नेमलेले आहेत.
२ ह्मणून जो अधिकाराविरुद्ध वागतो तो देवाच्या
नेमाविरुद्ध वागतो, आणि विरुद्ध वागणारे आप-
णांवर दंड लावून घेतील. ३ कां कीं अधिकारी
चांगल्या कामांस भय दाखविणारे नाहींत, तर वाईट
कामांस. तर तूं अधिकाराचें भय धरायास इच्छीत
नाहींस काय? बरें कर, ह्मणजे त्यापासून तुझी
स्तुति होईल. ४ कां कीं तो तुझ्या बऱ्यासाठीं
देवाचा सेवक आहे. परंतु तूं वाईट करितोस
तर भय धर; कां कीं तो तरवार व्यर्थ बाळगीत
नाहीं, कां तर तो देवाचा सेवक, वाईट करणा-
ऱ्याला क्रोधयुक्त दंड करणारा आहे. ५ यास्तव
क्रोधाकरितां केवळ नाहीं, तर मनोभावाकरितांहि
अधीन राहण्याचें अगत्य आहे. ६ तर या कार-
णास्तव करहि द्या; कां कीं ते देवाचे सेवक आहेत
व याच कामाविषयीं तत्पर आहेत. ७ यास्तव
सर्वांस जें देणें तें भरून द्या, ज्याला कर त्याला
कर, ज्याला जकात त्याला जकात, ज्याला भय
त्याला भय, ज्याला सन्मान त्याला सन्मान द्या.
८ तुह्मी कोणाचे ऋणी होऊं नका, केवळ एकमे-
कांवर प्रीति करणें; कां तर दुसऱ्यावर प्रीति करणा-
ऱ्याने नेमशास्त्र पूर्ण केलें आहे. ९ कां कीं व्यभि-
चार करूं नको, हत्या करूं नको, चोरी करूं नको,
खोटी साक्ष देऊं नको, लोभ ठेवूं नको, आणि
दुसरी कांहीं आज्ञा असेल तर तिचा सारांश या
नेमांत आहे कीं, जसी आपणावर तसी आपल्या

ोजाऱ्यावर प्रीति कर. १० प्रीति शेजाऱ्याला
ांहीं वाईट करीत नाहीं; ह्मणून प्रीति नेमशा-
त्राची परिपूर्त्ति आहे.

११ आणि समय जाणून तसें करा, कारण
भातां आपण झोंपेंतून उठावें असा प्रसंग आहे;
ां कीं आह्मी विश्वास ठेविला तेव्हांपेक्षां आतां
भामचें तारण जवळ आलें आहे. १२ रात्र फार
ली व दिवस जवळ आला, यास्तव आपण अंधा-
ांतील कर्मे टाकून प्रकाशाचीं शस्त्रें बांधावीं. १३
ासें दिवसांत तसें, योग्य रीतीनें आपण चालावें,
ामाशांमध्यें व मद्यपानांमध्यें नये, विलासांमध्यें
ा कामातुरपणांमध्यें नये, कलहांत व मत्सरांत नये.
१४ परंतु प्रभु येशू ख्रीस्त अंगीं ल्या, आणि
ेहाच्या इच्छांकरितां योजना करूं नका.

## अध्याय १४.

जो विश्वासांत अशक्त त्याला स्वीकारा, परंतु
संशययुक्त विवाद करण्याकरितां नका. २
सर्व पदार्थ खावे असा कोणीएक विश्वास धरितो;
रंतु अशक्त भाजीच खातो. ३ पण खाणाऱ्यानें
ा खाणाऱ्याला तुच्छ मानूं नये, आणि न खाणा-
ऱ्यानें खाणाऱ्याला अन्यायी ठरवूं नये; कां कीं
ेवानें त्याचा अंगीकार केला आहे. ४ दुसऱ्याच्या
ाकराला अन्यायी ठरवितोस तो तूं कोण आहेस?
ो आपल्या धन्यासमोर टिकतो किंवा पडतो. तो
र टिकेल, कां कीं देव त्याला टिकविण्यास समर्थ
भाहे. ५ कोणीएक एखादा दिवस दुसऱ्या दिव-
ांपेक्षां उत्तम मानितो, आणि कोणीएक सर्व
ेवस सारिखेच मानितो; प्रत्येकानें आपल्या मनांत
ेश्चययुक्त असावें. ६ दिवस मानणारा प्रभू-
ारितां मानितो, आणि दिवस न मानणारा प्रभू-
ारितां मानीत नाहीं; खाणारा प्रभूकरितां खातो,
ां कीं तो देवाची उपकारस्तुति करितो; आणि
ा खाणारा प्रभूकरितां खात नाहीं, आणि देवाची
पकारस्तुति करितो. ७ कां कीं आमच्यांतील
ोणी आपणासाठीं जगत नाहीं, आणि कोणी आप-
ासाठीं मरत नाहीं. ८ कां तर आह्मी जगतों
र प्रभूकरितां जगतों, आणि आह्मी मरतों तर
भूकरितां मरतों; यास्तव आह्मी जगतों किंवा
रतों तरी आह्मी प्रभूचे आहों. ९ कां कीं
्रीस्त मेला व उठला व पुन्हा जिवंत आहे, या-
ाठीं कीं तो मेलेल्यांचा व जिवंतांचाहि प्रभु व्हावा.
१० तर तूं आपल्या भावाला अन्यायी कां ठरवि-
तोस? किंवा तूं आपल्या भावाला कां तुच्छ मानि-
तोस? कारण कीं आह्मी सर्व ख्रीस्ताच्या न्याया-
सनासमोर उभे राहूं. ११ कां तर असें लिहिलें
आहे कीं, प्रभु ह्मणतो, मी जिवंत आहें या निश्च-
यानें प्रत्येक गुडघा माझ्या समोर टेंकेल व प्रत्येक
जीभ देवाला पत्करील. १२ यास्तव आह्मांतील
प्रत्येक आपला हिशोब देवाला देईल. १३ ह्मणून
आतांपासून आह्मी एकमेकाला दोषी ठरवूं नये, तर
त्यापेक्षां असें ठरवावें कीं, कोणी आपल्या भावापुढें
कांहीं ठेंचाड किंवा अडखळण ठेवूं नये. १४
मला प्रभु येशूकडून ठाऊक आहे व खातरीहि
आहे कीं, कोणताहि पदार्थ स्वतां अशुद्ध नाहीं;
तथापि कांहीं पदार्थ अशुद्ध आहे, असें मोजणा-
ऱ्याला तो अशुद्ध आहे. १५ परंतु तुझा भाऊ
तुझ्या अन्नावरून खेद पावला, तर आतां तूं प्रीती-
प्रमाणें चालत नाहींस. ज्याच्या साठीं ख्रीस्त
मेला, त्याचा नाश तूं आपल्या अन्नानें करूं नको.
१६ तर तुमचें चांगलें याची निंदा होऊं नये.
१७ कां कीं खाणें व पिणें यांत देवाचें राज्य
नाहीं, तर न्यायीपण व शांति व पवित्र आत्म्याक-
डून आनंद, यांत आहे. १८ कारण कीं या
गोष्टींमध्यें जो ख्रीस्ताची सेवा करितो, तो देवाला
आवडता व मनुष्यांस मान्य आहे. १९ याकरितां
शांति व एकमेकांची वृद्धि जेणेंकरून होईल त्यांस
आह्मी अनुसरावें. २० अन्नाकरितां देवाचें काम
बिघडूं नका. सर्व पदार्थ तर शुद्ध आहेत, परंतु
जो माणूस खाऊन अडखळण्यास कारण होतो
त्याला तें वाईट आहे. २१ मांस न खाणें व
द्राक्षारस न पिणें, किंवा जेणेंकरून तुझा भाऊ
ठेंचतो किंवा अडखळतो किंवा अशक्त होतो तें न
करणें, हें उत्तम आहे. २२ तुला विश्वास आहे?
तर तो तूं आपल्यापाशीं देवासमोर राख; जो कोणी
जें कांहीं मान्य करितो त्यांत आपणाला दोषी ठर-
वीत नाहीं, तो धन्य. २३ जो संशय धरून
खातो तो दोषी ठरतो, कां कीं तो विश्वासानें खात
नाहीं; आणि जें कांहीं विश्वासानें झालें नाहीं तें
पाप आहे.

## अध्याय १५.

तर जे शक्तिमान त्या आह्मी अशक्तांचें अशक्त-
पण वागवून घ्यावें, आणि आपणांस संतोषवूं नये,

हें योग्य आहे. २ आमच्यांतील प्रत्येकाने बऱ्या-
साठीं वृद्धि होण्यास शेजाऱ्याला संतोषवावें. ३
कां कीं ख्रीस्तानेहि आपणाला संतोषविलें नाहीं,
तर लिहिल्याप्रमाणें झालें कीं, ज्यानी तुझी निंदा
केली त्यांची निंदा मजवर आली. ४ तर जें जें
पूर्वी लिहिलें तें सर्व आमच्या उपदेशाकरितां लि-
हिलें होतें, यासाठीं कीं सहनता व शास्त्रांतील
बोध यांकडून आम्हास आशा व्हावी. ५ आतां
सहनता व बोध यांचा जो देव, त्याने तुम्हास
ख्रीस्त येशूच्या प्रमाणें परस्परें एकचित्त होण्याचा
स्वभाव द्यावा; ६ यासाठीं कीं तुम्ही एकचित्ताने
एकमुखेंकरून देव, आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताचा
बाप, याचें गौरव करावें. ७ यास्तव देवाच्या
गौरवाकरितां जसा ख्रीस्ताने आमचा अंगीकार केला,
तसा तुम्हीहि एकमेकांचा अंगीकार करा. ८ अणखी
मी सांगतों कीं, देवाच्या खरेपणाकरितां येशू ख्रीस्त
सुंत्यांचा सेवक झाला, यासाठीं कीं पूर्वजांस दिल्हेलीं
वचनें आपण खरीं करावीं, ९ आणि विदेशी
लोकानी कृपेवरून देवाचें गौरव करावें; लिहिलें
आहे त्याप्रमाणें, म्हणजे या कारणास्तव विदेशी
लोकांमध्यें मी तुझी स्तुति करीन व तुझ्या नामाने
गाईन. १० आणि फिरून म्हटलें कीं, अहो
विदेशी लोकानो, त्याच्या लोकांबरोबर आनंद करा.
११ आणि फिरून, अहो सर्व विदेशी लोकानो,
प्रभूची स्तुति करा; आणि अहो सर्व लोकानो,
त्याला स्तवा. १२ अणखी यशाया म्हणतो कीं,
इशाय याचें मूळ होईल, तो विदेशी लोकांवर
अधिकार करायास उभा राहील, त्याजवर विदेशी
लोक आशा ठेवितील. १३ तर आशेचा देव
तुम्हास विश्वास धरण्याकडून आनंदाने व शांतीने
पूर्ण करो, यासाठीं कीं तुम्ही पवित्र आत्म्याच्या
सामर्थ्याने फार आशा धरून राहावें.

१४ अहो माझ्या भावानो, मलाहि स्वतां तुम्हा-
विषयीं खातरी आहे कीं, तुम्ही सद्गुणानी भरलेले,
सर्व ज्ञानाने परिपूर्ण, व एकमेकांस बोध करायाला
समर्थ आहां. १५ तथापि अहो भावानो, तुम्हा-
ला आठवण करावी म्हणून म्या तुम्हाला कांहीं
प्रकारें विशेष धीटपणाने लिहिलें आहे, कारण कीं
देवाने मला हें कृपादान दिल्हें आहे कीं, १६
म्या विदेशी लोकांसाठीं येशू ख्रीस्ताचा सेवक हो-
ऊन देवाच्या शुभवर्त्तमानाचें याजकपण करावें, या-
साठीं कीं विदेशी लोकांचें अर्पण पवित्र आत्म्याने
शुद्ध केलें असतां मान्य व्हावें. १७ तर देवाच्या
कार्यांविषयीं येशू ख्रीस्ताकडून मला नावाजण्याचें
कारण आहे. १८ कारण कीं विदेशी लोक मान्य
होण्याकरितां जें कांहीं ख्रीस्ताने मजकडून शब्दाने
व करण्याने घडविलें नाहीं, तें सांगायास मी धज-
णार नाहीं. १९ तर चमत्कार व अद्भुतें यांच्या
बळाने व देवाच्या आत्म्याच्या सामर्थ्याने [तें
घडविलें तेंच]; असें कीं यरूशलेमापासून चहुंकडे
इलुरिकमापर्यंतहि म्या ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान पूर्ण
सांगितलें आहे. २० आणि तें शुभवर्त्तमान सांग-
यास मी उत्कंठित होतों, असें कीं, जेथें ख्रीस्त
प्रसिद्ध झाला होता तेथें नाहीं, यासाठीं कीं दुसऱ्या-
च्या पायावर म्या रचूं नये; २१ तर लिहिलें आहे
त्याप्रमाणें कीं, ज्यांस त्याजविषयीं सांगितलें नाहीं ते
पाहतील, आणि ज्यानी ऐकिलें नाहीं ते समजतील.
२२ आणि त्यामुळें मला तुम्हाकडे येण्यास बहुत
अडचण पडली. २३ परंतु आतां या प्रांतांमध्यें
मला अणखी ठिकाण नाहीं, आणि मला पुष्कळ वर्षें
तुम्हापाशीं येण्याची उत्कंठा आहे; २४ म्हणून
मी स्पान्य देशांत जाईन तेव्हां तुम्हाकडे येईन;
कां कीं तिकडे जातांना तुम्हास भेटावें आणि तुम्हा-
कडून मी कांहींसा तृप्त झाल्यावर तुम्ही मला तिकडे
बोळवावें, असी माझी इच्छा आहे. २५ परंतु
सध्या मी पवित्रांची सेवा करायाला यरूशलेमास
जातों. २६ कां कीं यरूशलेमांतील पवित्र, त्यां-
तल्या गरिबांसाठीं कांहीं वर्गणी करावी, असें मक-
दन्या व अखाया यांस बरें वाटलें आहे. २७
त्यांस तर बरें वाटलें, आणि ते त्यांचे ऋणी आहेत;
कां कीं विदेशी लोक त्यांच्या आत्मिक गोष्टींचे वि-
भागी झाले असतां, त्यानी त्यांचें संसाराविषयीं
सहाय करावें हें योग्य आहे. २८ यास्तव हें सि-
द्धीस नेऊन त्यांस तें दान पोहंचविल्यावर, मी
तुम्हाकडून स्पान्य देशांत येईन. २९ आणि
मला ठाऊक आहे कीं, जेव्हां मी तुम्हाकडे
येतों तेव्हां ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानाच्या आशीर्वा-
दाच्या पूर्णपणाने येईन. ३० तर अहो भावानो,
मी तुम्हास आमच्या प्रभु येशू ख्रीस्तावरून व
आत्म्याच्या प्रीतीवरून विनंती करितों कीं, मज-
साठीं देवाजवळ प्रार्थना करण्यांत मजबरोबर लगट
करा; ३१ यासाठीं कीं यहूद्यांत जे अविश्वासी
त्यांपासुन माझी सुटका व्हावी, अणखी यरूशलेमा-
साठीं जी माझी सेवा ती पवित्रांस मान्य व्हावी;

३२ असें कीं देवाच्या इच्छेने म्या तुह्माजवळ
आनंदाने यावें, आणि तुह्मांबरोबर समाधान पावावें.
३३ तर शांतीचा देव तुह्मा सर्वांबरोबर असो.
आमेन.

## अध्याय १६.

केंखयांतील मंडळीची सेवक बी आमची बहीण
फेबी, तिला मी तुह्मास निरवितों; २ यासाठीं
कीं पवित्रांस योग्य तसें प्रभूकरितां तिचा अंगीकार
करा, आणि ज्या कामांत तिला तुमची गरज लागेल
त्यांत तिचें सहाय करा; कां कीं तिने स्वतां बहु-
तांचें व माझेंहि सहाय केलें आहे. ३ प्रिस्कि-
ला व अकुला, ख्रीस्त येशूसाठीं माझ्या संगतीचे
कामकरी, यांस सलाम सांगा; ४ त्यांनी माझ्या
प्राणाकरितां आपला गळा पुढें केला, त्यांचा उपकार
केवळ मीच मानितों असें नाहीं, तर विदेशी लोकांच्या
सर्व मंडळ्याहि. ५ आणि जी मंडळी त्यांच्या
घरीं आहे तिला सलाम सांगा. जो माझा प्रिय अपे-
नतस, ख्रीस्ताकरितां अखाया देशाचें प्रथम फळ
झाला, त्याला सलाम सांगा. ६ ज्या मारयेने
आमच्या साठीं बहुत श्रम केले, तिला सलाम सांगा.
७ माझे नातलग व माझ्या सोबतीचे बंदिवान अं-
द्रोनिकस व युनियास, जे प्रेषितांमध्यें नामांकित
आहेत आणि माझ्या पूर्वी ख्रीस्ताकडे झाले, त्यांस
सलाम सांगा. ८ आंप्लियस प्रभुसंबंधाने माझा
प्रिय, याला सलाम सांगा. ९ ख्रीस्तसंबंधाने
आमचा सोबती कामकरी ऊर्बानस व माझा प्रिय
स्ताखुस, यांस सलाम सांगा. १० अपल्लेस,
ख्रीस्ताविषयीं परीक्षेस उतरलेला त्याला स-
लाम सांगा; जे अरिस्तबूलसाचे संबंधी त्यांस
सलाम सांगा. ११ माझा नातलग हेरोदियोन
याला सलाम सांगा. जे नार्किससाचे संबंधी
प्रभूकडे आहेत, त्यांस सलाम सांगा. १२ त्रुफे-
ना व त्रुफोसा, प्रभूसाठीं श्रम करितात, त्यांस
सलाम सांगा. प्रिय पर्सीसीने प्रभूसाठीं बहुत
श्रम केले, तिला सलाम सांगा. १३ रूफस,
प्रभूकडून निवडलेला त्याला, आणि त्याच्या व मा-
झ्या आईला सलाम सांगा. १४ असुंक्रितस,
फ्लेगोन, हर्मास, पत्रबास, हर्मेस, यांस व त्यांज-
बरोबरचे भाऊ यांस सलाम सांगा. १५ फिल-
लगस व युलिया, नेरूस व त्याची बहीण, व
ओलुंपास, यांस व त्यांजबरोबर जे पवित्र त्या सर्वांस
सलाम सांगा. १६ पवित्र चुंबनाने एकमेकांस
सलाम करा. ख्रीस्ताच्या मंडळ्या तुह्मास सलाम
सांगतात.

१७ अणखी अहो भावानो, मी तुह्मास विनंती
करितों कीं, जो उपदेश तुह्मी शिकून घेतला त्यावि-
रुद्ध फुटी व अडखळे करणारे, यांविषयीं संभाळून
त्यांपासून दूर असा. १८ कां कीं तसे आमच्या
प्रभु येशू ख्रीस्ताची सेवा करीत नाहींत, तर आप-
ल्या पोटाची; आणि भुलथापीने व दंभाने भोळ्यां-
च्या अंतःकरणास भुलवितात. १९ तुमचें मानणें
तर सर्वांस प्रसिद्ध झालें आहे, ह्मणून तुह्मांविषयीं
मी आनंद करितों; आणि चांगल्याविषयीं तुह्मी
ज्ञानी व्हावें, परंतु वाइटाविषयीं भोळे व्हावें असी
माझी इच्छा आहे. २० आणि शांतीचा देव
सैतानाला तुमच्या पायांखालीं लवकर तुडवील.
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताची कृपा तुह्मावर असो.
आमेन. २१ तीमथ्यस माझा सोबती कामकरी,
आणि लुकयस व यासोन व सोसिपतेर, माझे
नातलग, तुह्मास सलाम सांगतात. २२ हें पत्र
लिहिणारा तेर्तयस तो मी तुह्मास प्रभुसंबंधी
सलाम सांगतों. २३ माझें व सर्व मंडळीचें आ-
तिथ्य करणारा गायस तो तुह्मास सलाम
सांगतो. नगराचा कारभारी एरास्तस व कुवार्त्तस
भाऊ, हे तुह्मास सलाम सांगतात.

२४ आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताची कृपा तुह्मा
सर्वांवर असो; आमेन. २५ तर माझ्या शुभवर्त्त-
मानाप्रमाणें व येशू ख्रीस्ताविषयींच्या गाजविण्याप्र-
माणें, जें गूज प्राचीन काळीं गुप्त ठेविलें होतें, २६
परंतु आतां अनंतकाळाच्या देवाच्या आज्ञेने भवि-
ष्यलेखांकडून कळविलें आहे, आणि सर्व राष्ट्रांनी
विश्वासाला मान्य व्हावें ह्मणून त्यांस प्रसिद्ध केलें
आहे, २७ त्याप्रमाणें तुह्मास स्थिरवायास
समर्थ जो केवळ एकच ज्ञानी देव त्याला, येशू
ख्रीस्ताकडून सर्वकाळ गौरव असो. आमेन.

# करिंथकरांस पौलसाचें पहिलें पत्र.

## अध्याय १.

देवाची जी मंडळी करिंथांत आहे, ह्मणजे ख्रीस्त
येशूकडून झालेले पवित्र व बोलविलेले पवित्र
यांस, आणि सर्व ठिकाणीं जे आमचा प्रभु येशु
ख्रीस्त, त्यांचा व आमचाहि प्रभु, याचें नांव घेतात,
त्या सर्वांस, २ पौलस, देवाच्या इच्छेने येशु
ख्रीस्ताचा बोलाविलेला प्रेषित याचा व सोस्थनेस
भाऊ याचा सलाम. ३ देव आमचा बाप व प्रभु
येशू ख्रीस्त, यांपासून तुह्मावर कृपा व शांति असो.
४ देवाची जी कृपा ख्रीस्त येशूकडून तुह्मावर
झाली, तिजवरून मी सर्वदां तुह्माविषयीं आपल्या
देवाची उपकारस्तुति करितों; ५ कारण कीं तुह्मी
त्याकडून सर्व प्रकारें अवघ्या बोलण्यांत व अवघ्या
ज्ञानांत संपन्न झालां आहां; ६ जसें ख्रीस्ता-
विषयींची साक्ष तुह्मामध्यें पटविली, तसें. ७ त्याव-
रून कोणत्याहि कृपादानांत उणे न होतां, तुह्मी
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रगट होण्याची
वाट पाहतां. ८ तोच शेवटपर्यंत, ह्मणजे आमच्या
प्रभु येशू ख्रीस्ताच्या दिवसीं, तुह्मास निर्दोष असें
दृढ करून ठेवील. ९ ज्या देवाने आपला पुत्र
येशू ख्रीस्त आमचा प्रभु, याचें भागीपण पावण्या-
साठीं तुह्मास बोलाविलें आहे, तो विश्वासू आहे.
१० अहो भावानो, आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याच्या नांवाने मी तुह्मास विनंती करितों कीं, तुह्मी
सर्वांनी एकसारिखेंच बोलावें, व तुह्मामध्यें फुटी
होऊं नयेत, तर तुह्मी एकचित्ताने व एकमताने
सिद्ध व्हावें. ११ कारण कीं अहो माझ्या भावा-
नो, ख्लवेकडील कोणीएकानी मला तुह्माविषयीं
असें कळविलें आहे कीं, तुह्मामध्यें कलह आहेत.
१२ आणि मी हें सांगतों कीं, तुह्मांतील कोणीएक
मी पौलसाकडला, आणि कोणीएक मी अपल्लोसा-
कडला, आणि कोणीएक मी केफाकडला, आणि
कोणीएक मी ख्रीस्ताकडला आहें, असें ह्मणतो.
१३ ख्रीस्त विभागला आहे काय? पौलस तुह्मा-
साठीं खांबीं दिल्हेला काय? किंवा पौलसाच्या
नांवाने तुमचा बाप्तिस्मा झाला काय? १४ क्रि-
स्पस व गायस यांशिवाय म्या तुह्मामधील कोणा-
चा बाप्तिस्मा केला नाहीं, ह्मणून मी देवाची स्तुति
करितों; १५ यासाठीं कीं म्या आपल्या नांवाने
बाप्तिस्मा केला, असें कोणी ह्मणूं नये. १६ आणखी
म्या स्तेफनसाच्या कुटुंबाचाहि बाप्तिस्मा केला;
त्याखेरीज दुसऱ्या कोणाचा बाप्तिस्मा केला, हें
माझ्या लक्षांत नाहीं.
१७ कारण कीं ख्रीस्ताने मला बाप्तिस्मा करा-
यास नाहीं, तर शुभवर्त्तमान सांगायास पाठविलें; तें
बोलण्याच्या चातुर्याने सांगूं नये, ख्रीस्ताचा खांब
व्यर्थ होऊं नये ह्मणून. १८ कां कीं नाश पावणारे
यांस खांबाची गोष्ट मूर्खपण असी आहे, परंतु
तारण पावणाऱ्या आह्मास ती देवाचें सामर्थ्य असी
आहे. १९ कारण असें लिहिलें आहे कीं, मी
ज्ञान्यांचें ज्ञान नाहींसें करीन आणि बुद्धिमंतांची
बुद्धि व्यर्थ करीन. २० ज्ञानी कोठें? शास्त्री कोठें?
या जगांतील वादविवाद करणारा कोठें? देवाने या
जगाचें ज्ञान मूर्खपण केलें आहे कीं नाहीं? २१
कां कीं देवाच्या ज्ञानेंकरून जग ज्ञानाने देवाला
जाणत नव्हतें तेव्हां गाजविण्याच्या मूर्खपणाकडून
विश्वासणाऱ्यांस तारावें, हें देवाला बरें वाटलें. २२
कां कीं यहूदी चिन्ह मागतात, आणि हेल्लेनी ज्ञान
शोधितात; २३ परंतु खांबीं दिल्हेला ख्रीस्त याला
आह्मी गाजवितों, हें यहूद्यांस अडखळण व हेल्ले-
न्यांस मूर्खपण; २४ परंतु बोलविलेले, यहूदी व
हेल्लेनीहि, त्यांस तो ख्रीस्त देवाचें सामर्थ्य व
देवाचें ज्ञान असा आहे. २५ कारण कीं देवाचें
मूर्खपण माणसांपेक्षां अधिक ज्ञानी आहे, आणि
देवाचें अशक्तपण माणसांपेक्षां अधिक शक्ति-
मान आहे. २६ कारण कीं अहो भावानो,
तुमचें बोलावणें तुह्मी पाहतां कीं, देहाप्रमाणें
ज्ञानी असे बहुत नाहींत, बहुत पराक्रमी नाहींत,
बहुत कुलीन नाहींत. २७ परंतु ज्ञान्यांस ला-

जविण्यासाठीं देवानें जगांतील मूर्खांस निवडून
घेतलें आहे, आणि बलवानांस लाजविण्यासाठीं
देवानें जगांतील दुर्बळांस निवडून घेतलें आहे.
२८ आणि जगांतील अकुलीन यांस व धिक्कारले-
ल्यांस व जीं नाहींत त्यांस देवानें याकरितां निव-
डून घेतलें आहे कीं, जीं आहेत त्यांस त्यानें निर-
र्थक करावें; २९ यासाठीं कीं त्याच्या समोर
मनुष्यजातींतल्या कोणींहि नावाजून घेऊं नये. ३०
तुह्मी तर त्याजकडून ख्रीस्तामध्यें झालां आहां,
तो देवाकडून आह्मास ज्ञान व न्यायीपण व पवित्र-
पण व खंडणी, असा झाला आहे; ३१ यासाठीं
कीं जसें लिहिलें आहे तसें, जो नावाजून घेतो तो
प्रभूविषयीं नावाजून घेवो.

## अध्याय २.

आणि अहो भावानो, मी तुह्माकडे आलों तेव्हां
बोलण्याच्या किंवा ज्ञानाच्या उत्कृष्टपणानें
देवाविषयींची साक्ष तुह्मास सांगत आलों, असें
नाहीं. २ कारण कीं येशू ख्रीस्त ह्मणजे खांबीं
दिल्हेला, याशिवाय तुह्मामध्यें कांहींच जाणूं नये,
ह्मणून म्यां निश्चय केला होता. ३ आणि मी
अशक्तपणानें व भयानें व फार कांपण्यानें तुमच्या
जवळ होतों. ४ आणि माझें बोलणें व माझें
गाजविणें, हीं मानवी ज्ञानाच्या मोहक गोष्टींनीं
नव्हतीं, तर आत्म्याच्या व सामर्थ्याच्या पटवि-
ण्यानें होतीं; ५ यासाठीं कीं तुमचा विश्वास
माणसांच्या ज्ञानानें होऊं नये, तर देवाच्या साम-
र्थ्यानें व्हावा.

६ तथापि जे पूर्ण त्यांमध्यें आह्मी ज्ञान सांगतों,
परंतु या जगाचें ज्ञान नाहीं, आणि या जगाचे जे
अधिकारी नाहींसे होतात, त्यांचेंहि नाहीं. ७ तर
आह्मी देवाचें गुजाविषयींचें ज्ञान, जें गुप्त ठेविलें
होतें, जें देवानें पूर्वीं जगाच्या अगोदर आमच्या
गौरवाकरितां नेमिलें होतें, तें आह्मी सांगतों. ८
तें या जगाच्या अधिकाऱ्यांतील कोणीं जाणिलें
नाहीं; कां कीं त्यांनीं जाणिलें असतें, तर त्यांनीं
गौरवाच्या प्रभूला खांबीं दिल्हें नसतें. ९ परंतु
लिहिलें त्याप्रमाणें, देवानें आपल्या प्रीति करणाऱ्यां-
साठीं ज्या गोष्टी तयार केल्या, त्या डोळ्यानें पाहि-
ल्या नाहींत, व कानानें ऐकिल्या नाहींत, व माण-
साच्या अंतःकरणांत आल्या नाहींत. १० तर
देवानें आपल्या आत्म्याकडून आह्मास प्रगट करून
दाखविल्या आहेत; कां तर आत्मा हा सर्व गोष्टीं-
चा, देवाच्या खोल गोष्टींचाहि, शोध करितो.
११ कां कीं मनुष्याचा जो आत्मा त्यामध्यें आहे,
त्याशिवाय मनुष्याच्या गोष्टी मनुष्यांतील दुसरा
कोण जाणतो? तसें देवाच्या गोष्टी देवाच्या आ-
त्म्याशिवाय कोणींहि जाणत नाहीं. १२ आणि
आह्मास जगाचा आत्मा नव्हे, तर जो आत्मा
देवापासून आहे तो मिळाला, यासाठीं कीं जीं
देवानें कृपेकरून आह्मास दिल्हीं तीं आह्मी जाणावीं.
१३ तींच आह्मी सांगतों, मानवी ज्ञानाच्या शिक-
विलेल्या शब्दांनी नाहीं, तर आत्मिक गोष्टी आ-
त्मिक गोष्टींसीं लावून पाहून, पवित्र आत्म्याच्या
शिकविलेल्या शब्दांनी सांगतों. १४ परंतु प्राणाचें
माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी अंगिकारीत
नाहीं, कारण कीं त्याला त्या मूर्खपण आहेत; आणि
त्याच्यानें त्या जाणवत नाहींत, कारण कीं त्या आ-
त्म्याच्या योगें समजायाच्या आहेत. १५ परंतु
आत्मिक तो सर्व गोष्टी समजतो, तथापि तो आपण
कोणाकडूनहि समजण्यांत येत नाहीं. १६ कां
कीं प्रभूचें मन कोणी असें जाणिलें कीं, त्यानें त्याला
बोध करावा? परंतु आह्मास ख्रीस्ताचें मन आहे.

## अध्याय ३.

आणि अहो भावानो, जसें आत्मिकांस तसें
तुह्मास माझ्यानें बोलवेना, तर जसें दैहि-
कांस, जसें ख्रीस्ताकडील बाळकांस तसें. २ म्यां
तुह्मास दूध पाजिलें व अन्न दिल्हें नाहीं, कारण कीं
त्या वेळेस तुह्मास शक्ति नव्हती, आणि अझूनहि
तुह्मास शक्ति नाहीं; ३ कारण कीं तुह्मी अझून
दैहिक आहां; कां तर तुह्मामध्यें हेवा व भांडण
व फुटी आहेत तोंपर्यंत तुह्मी दैहिक आहां, आणि
माणसांसारिखे चालतां कीं नाहीं? ४ कां कीं
कोणी ह्मणतो, मी पौलसाकडील आहें, आणि
दुसरा मी अपल्लोसाकडील आहें; तर तुह्मी दैहिक
आहां कीं नाहीं?

५ तर पौलस कोण आहे व अपल्लोस कोण?
ते केवळ सेवक, ज्याकडून तुह्मी जसें प्रभूनें प्रत्ये-
काला दिल्हें तसें विश्वासलां, असे आहेत कीं
नाहींत? ६ म्यां लाविलें, अपल्लोसानें पाणी
दिल्हें, परंतु देवानें वाढविलें आहे. ७ यास्तव
लावणारा कांहीं नाहीं, आणि पाणी देणाराहि
कांहीं नाहीं, तर वाढविणारा देव. ८ आणि

लावणारा व पाणी देणारा एकच आहेत, आणि
प्रत्येक आपल्या श्रमाप्रमाणें आपली मजुरी पावेल.
९ कारण कीं आह्मी देवाचे सोबती कामकरी
आहों; तुह्मी देवाचें शेत, देवाची रचना आहां.
१० देवाची जी कृपा मला प्राप्त झाली, तिजप्रमाणें
म्या शाहाण्या मुख्य कारागिरासारिखा पाया
घातला, आणि दुसरा त्यावर बांधितो; परंतु प्रत्येक
त्यावर कसा बांधितो याविषयीं त्यानें संभाळावें.
११ कां कीं घातलेला पाया, येशू ख्रीस्त, यावां-
चून दुसऱ्या कोणाच्यानें घालवत नाहीं. १२ जर
कोणी या पायावर सोनें, रुपें, उंच पाषाण; लांकूड,
गवत, धस्कट रचितो, १३ तर प्रत्येकाचें काम
प्रगट होईल; कां तर दिवस तें प्रगट करील;
कारण कीं अग्नीनें प्रगट होईल, आणि प्रत्येकाचें
काम कसें आहे याची परीक्षा अग्नि करील. १४
कोणीएकानें जें काम बांधिलें तें टिकलें तर त्याला
मजुरी मिळेल. १५ कोणाचें काम जळून गेलें
तर त्याचा तोटा होईल; तथापि तो स्वतां तरेल,
परंतु जसा अग्नींतून तसा. १६ तुह्मी देवाचें
देऊळ आहां, आणि तुह्मामध्यें देवाचा आत्मा
राहतो, हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? १७ जर
कोणी देवाच्या देवळाचा नाश करितो तर देव
त्याचा नाश करील; कां कीं देवाचें देऊळ पवित्र
आहे, तेंच तुह्मी आहां. १८ कोणी आपणाला
फसवूं नये; आपण या जगांत ज्ञानी आहें, असें
तुह्मांतील कोणी कल्पितो तर त्यानें ज्ञानी होण्याक-
रितां मूर्ख व्हावें. १९ कां कीं देवाजवळ या
जगाचें ज्ञान मूर्खपण आहे; कां तर लिहिलें आहे
कीं, तो ज्ञान्यांस त्यांच्याच धूर्त्तपणानें धरितो. २०
आणि फिरून, प्रभु ज्ञान्यांचे विचार जाणतो कीं,
ते व्यर्थ आहेत. २१ यास्तव माणसांविषयीं
कोणी नावाजून घेऊं नये, कां कीं सर्व गोष्टी तुम-
च्या आहेत. २२ पौलस, किंवा अपलोस, किंवा
केफा, किंवा जग, किंवा जीवन, किंवा मरण, किंवा
हल्लींच्या गोष्टी, किंवा होणार गोष्टी, हीं सर्व तुमचीं
आहेत. २३ आणि तुह्मी ख्रीस्ताचे, आणि
ख्रीस्त देवाचा.

## अध्याय ४.

माणसानें आह्मास ख्रीस्ताचे सेवक व देवाच्या
गुजांचे कारभारी असें मोजावें. २ आणखी
कारभाऱ्यांविषयीं हें अवश्य आहे कीं, विश्वासू
असावा. ३ परंतु तुह्माकडून किंवा मानवी न्या-
याधिशीकडून माझा निवाडा व्हावा, याविषयीं मला
कांहीं काळजी नाहीं; मी तर आपला देखील
निवाडा करीत नाहीं. ४ कां कीं मी आपल्या-
विषयीं कांहीं जाणत नाहीं, तथापि त्यावरून मी
न्यायी ठरतों असें नाहीं; जो माझा निवाडा
करितो तो प्रभु आहे. ५ यास्तव समयापूर्वी,
ह्मणजे प्रभु येईल तोंपर्यंत, तुह्मी कोणत्याहि
गोष्टीचा न्याय ठरवूं नका; तोच अंधारांतील गुप्त
गोष्टी प्रकाशित करील, आणि अंतःकरणांतील
योजना उघड्या करील; आणि त्या वेळेस प्रत्ये-
काची स्तुति देवाकडून होईल.

६ अहो भावानो, म्या तुह्माकरितां या गोष्टी
दाखल्यानें आपल्यावर व अपल्लोसावर लावून घेत-
ल्या आहेत, यासाठीं कीं जें लिहिलें आहे त्यापेक्षा
कोणाला अधिक मानूं नये, असें तुह्मी आह्मावरून
शिकावें; ह्मणजे तुह्मांतील कोणीएकानें एकासाठीं
दुसऱ्याविरुद्ध फुगूं नये. ७ कारण कीं तुला
वेगळें करितो तो कोण? आणि तुला मिळालें
नाहीं असें तुझ्या जवळ काय आहे? पण तुला
मिळालें असतां, न मिळाल्यासारिखा अभिमान
कां धरितोस? ८ आतां तुह्मी तृप्त झालां आहां,
आतां धनवान झालां आहां, तुह्मी आह्मांवांचून
राज्य केलें आहे, आणि तुह्मी राज्य करावेंच असी
माझी इच्छा आहे, आह्मीहि तुमच्या संगतीं राज्य
करावें ह्मणून. ९ कां तर मला असें वाटतें कीं,
देवानें आह्मा प्रेषितांस सर्वांहून शेवटले, मरणासाठीं
नेमलेले, तसें पुढें करून दाखविलें आहे, कारण
कीं आह्मी जगाला व दुतांस व माणसांस तमाशा
असे झालों आहों. १० आह्मी ख्रीस्ताकरितां
मूर्ख, पण तुह्मी ख्रीस्ताकडून बुद्धिमंत आहां;
आह्मी अशक्त, पण तुह्मी शक्तिमान; तुह्मी प्रति-
ष्ठित, पण आह्मी अप्रतिष्ठित. ११ आतांच्या
घटकेपर्यंत आह्मी भुकेले व तान्हेले व नागवे
आहों, आणि मार खातों, आणि भटकत जातों.
१२ आणि आपल्या हातानी मेहनत करून श्रम
करितों, आह्मी गांजलेले असतां आशीर्वाद देतों,
पाठीस लागलेले असतां आह्मी सोसितों; १३
निंदलेले असतां आह्मी विनंती करितों; जगांतील
रेंदा, अवघ्यांची हेंदर, यांसारिखे आह्मी आजपर्यंत
वेतों झालों आहों. १४ मी तुह्मास लाजविण्या-
साठीं या गोष्टी लिहीत नाहीं, तर जसा माझ्या

प्रिय लेंकरांस तसा मी तुह्मास बोध करितों. १५
कां कीं तुह्मास ख्रीस्ताविषयीं दाहा हजार गुरु
असले तरी बहुत बाप नाहींत; कां कीं म्याच
ख्रीस्त येशूविषयीं तुह्मास शुभवर्त्तमानाकडून जन्म-
विलें आहे. १६ यास्तव मी तुह्मास विनंती
करितों, मला अनुसरणारे व्हा. १७ या कारणा-
स्तव तीमथ्यास, माझें प्रिय लेंकरूं व प्रभूविषयीं
विश्वासू आहे, त्याला म्या तुह्माकडे पाठविलें
आहे; तो असा मी सर्वत्र प्रत्येक मंडळींत उपदेश
करितों, तसी ख्रीस्ताविषयींच्या माझ्या आचरणा-
ची तुह्मास आठवण देईल. १८ आणि मी
तुह्माकडे येणार नाहीं असें समजून कित्येक फुगले
आहेत; १९ परंतु प्रभूची इच्छा असली तर
मी तुह्माकडे लवकर येईन, आणि फुगलेल्यांचें
बोलणें नाहीं तर सामर्थ्य जाणेन. २० कां कीं
देवाचें राज्य बोलण्यांत नव्हे, तर सामर्थ्यांत आहे.
२१ तुमची इच्छा काय आहे? म्या काठी घेऊन
यावें, किंवा प्रीतीनें व नम्रतेच्या आत्म्यानें यावें?

## अध्याय ५.

सर्वत्र ऐकण्यांत येतें कीं, तुह्मामध्यें व्यभिचार
होतो, आणि ज्याचा उच्चार विदेशी लोकांमध्यें
होत नाहीं तसा व्यभिचार, असा कीं कोणीएकानें
आपल्या बापाची बायको राखावी. २ आणि
तुह्मी फुगलां आहां, आणि त्यापेक्षां शोक केला
नाहीं, असा कीं ज्यानें हें कर्म केलें त्याला तुह्मा-
मधून घालवावें. ३ मी तर शरिरानें दूर परंतु
आत्म्यानें जवळ असतां, जवळ असल्यासारिखा
म्या इतक्यांत हें कर्म करणाऱ्याचा न्याय ठरविला
आहे; ४ असा कीं तुह्मी आणि माझा आत्मा आ-
मच्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या नांवानें मिळाले ह्मणजे,
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या अधिकारावरून,
५ अशाला देहाच्या नाशाकरितां सैतानाच्या स्वाधीन
करावें, त्याचा आत्मा प्रभु येशूच्या दिवसीं तरावा
ह्मणून. ६ तुमचें नावाजणें बरें नाहीं. थोडें
खमीर सगळ्या गोळ्याला फुगवितें, हें तुह्मास
ठाऊक नाहीं काय? ७ तर जुनें खमीर काढून
टाका, यासाठीं कीं जसे तुह्मी बेखमीर आहां,
तसे तुह्मी नवा गोळा व्हावें. कां कीं आमचा
वल्हांडणाचा यज्ञपशु जो ख्रीस्त, तो आमच्या
साठीं मारलेला आहे. ८ यास्तव जुन्या खमि-
रानें नव्हे, आणि वाईटपण व दुष्टपण यांच्या खमि-
रानें नव्हे, तर सरळपण व खरेपण यांच्या बेखमीर
भाकरीनीं आह्मी सण पाळावा.
९ तुह्मी शिंदळांची संगत धरूं नये, असें
म्या तुह्मास पत्रांत लिहिलें होतें; १० तथापि
या जगाच्या शिंदळांची किंवा लोभिष्ठांची किंवा
हरण करणाऱ्यांची किंवा मूर्त्तिपूजकांची अगदींच
धरूं नये असें नाहीं; कारण कीं असें असतां
तुह्मास जगांतून निघावें लागेल. ११ परंतु आतां
मी तुह्मास असें लिहितों कीं, कोणी भाऊ ह्मट-
लेला, तो शिंदळ किंवा लोभी किंवा मूर्त्तिपूजक
किंवा निंदक किंवा मद्यपी किंवा हरण करणारा
असला, तर तशाची संगत धरूं नये, त्याच्या
संगतीं खाऊंहि नये. १२ कां कीं जे बाहेर आहेत,
त्यांचा न्याय करायास मला काय कारण? जे
आंत त्यांचा न्याय तुह्मी करितां कीं नाहीं? १३
परंतु जे बाहेर त्यांचा न्याय देव करितो; तर
तुह्मी आपल्यांमधून त्या दुष्टाला बाहेर घालवा.

## अध्याय ६.

तुह्मांतील कोणाचा दुसऱ्यासीं वाद असला, तर
तो पवित्रांजवळ न जातां अधार्मिकांजवळ जाऊन
न्याय ठरवून घ्यायाला धजतो काय? २ पवित्र
हे जगाचा न्याय ठरवितील, हें तुह्मास ठाऊक नाहीं
काय? आणि तुह्माकडून जगाचा न्याय ठरायाचा
आहे, तर अगदीं हलक्या वादांचा न्याय ठरवा-
याला तुह्मी अयोग्य काय? ३ आपण दुतांचा
न्याय ठरवूं, हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? तर
या आयुष्यांतील गोष्टींचा किती विशेषेंकरून ठरवूं?
४ यास्तव तुह्मास या आयुष्यांतील गोष्टींचे वाद
असले तर त्यांवर मंडळीमध्यें धिक्कारलेले यांस
नेमून बसवितां काय? ५ मी तुह्मास लाजविण्या-
साठीं बोलतों, तर ज्याच्यानें आपल्या भावांचा निवाडा
करवतो, असा ज्ञानी माणूस तुह्मामध्यें एक देखील
नाहीं काय? ६ परंतु भाऊ भावावर फिर्याद
करितो, आणि अविश्वासी यांसमोर देखील करितो.
७ तर आतां तुह्मामध्यें ही सर्व प्रकारें खोड आहे
कीं, तुमचे एकमेकांसीं वाद होतात; त्यापेक्षां तुह्मी
अन्याय कां सोसून घेत नाहीं? आणि हानि कां
सोसीत नाहीं? ८ परंतु तुह्मी अन्याय करितां व
नाडितां, आणि तसें भावांसींहि करितां. ९ अ-
न्यायी यांस देवाच्या राज्यांत वतन मिळणार नाहीं,
हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? फसूं नका; शिंदळ

व मूर्त्तिपूजक व व्यभिचारी व स्त्रीसारिखा संभोग
देणारे व पुरुषसंभोग घेणारे, १० व चोर व
लोभी व मद्यपी व निंदक व हरण करणारे, यांस
देवाच्या राज्यांत वतन मिळणार नाहीं. ११
आणि तुह्मी कित्येक तसे होतां; तथापि प्रभु येशू-
च्या नांवाने व आमच्या देवाच्या आत्म्याने धुतलेले
व पवित्र केलेले व न्यायी ठरलेले आहां.

१२ सर्व गोष्टींविषयीं मला मोकळीक आहे,
तरी सर्व गोष्टी उपयोगी नाहींत; सर्व गोष्टींविषयीं
मला मोकळीक आहे, तरी मी कोणत्याहि गोष्टीच्या
स्वाधीन होणार नाहीं. १३ अन्न पोटासाठीं व
पोट अन्नासाठीं आहे, परंतु देव त्याचा व याचाहि
नाश करील. पण शरीर शिंदळकीसाठीं नाहीं, तर
प्रभूसाठीं आहे, आणि शरिरासाठीं प्रभु. १४
आणि देवाने प्रभूला उठविलें, आणि तो आपल्या
सामर्थ्याने तुह्मासहि उठवील. १५ तुमचीं शरिरें
ख्रीस्ताचे अवयव आहेत, हें तुह्मास ठाऊक नाहीं
काय? तर म्या ख्रीस्ताचे अवयव घेऊन ते कस-
बिणीचे अवयव असे करावे काय? असें न घडो.
१६ जो कसबिणीसीं जडला तो तिच्या सुद्धां
एक शरीर, हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? कां तर
असें ह्मटलें आहे कीं, तीं दोघें एक देह होतील.
१७ परंतु जो प्रभूसीं जडला तो त्यासुद्धां एक
आत्मा आहे. १८ शिंदळकीपासून दूर असा;
जें कांहीं पाप मनुष्य करितो तें शरिराबाहेर आहे,
परंतु जो शिंदळकी करितो तो आपल्या शरिरावि-
रुद्ध पाप करितो. १९ तुह्मास हें ठाऊक नाहीं
काय? कीं तुमचें शरीर हें तुह्मांतील जो पवित्र
आत्मा देवापासून तुह्मास आहे, त्याचें देऊळ
आहे; आणि तुह्मी आपले नव्हां. २० कां कीं
तुह्मी मोलाने विकत घेतलेले आहां; तर तुह्मी
आपलें शरीर व आपला आत्मा, जीं देवाचीं आ-
हेत, त्यांकडून देवाचें गौरव करा.

## अध्याय ७.

ज्यांविषयीं तुह्मी मला लिहिलें त्यांविषयीं तर,
पुरुषाने बायकोला शिवूं नये हें बरें. २
तथापि शिंदळकी होऊं नये, ह्मणून प्रत्येकाला आ-
पापली बायको असावी, आणि प्रत्येकीला आपापला
नवरा असावा. ३ नवऱ्याने बायकोला योग्य
उपकारिकपण भरून द्यावें, आणि त्याप्रमाणें बाय-
कोनेहि नवऱ्याला द्यावें. ४ बायकोचा आपल्या
शरिरावर अधिकार नाहीं, तर नवऱ्याचा; आणि
त्याप्रमाणें नवऱ्याचाहि आपल्या शरिरावर अधि-
कार नाहीं, तर बायकोचा. ५ एकमेकांसीं वंचना
करूं नका; केवळ उपास व प्रार्थना यांसाठीं तुह्मी
एकाग्र व्हावें ह्मणून कांहीं वेळ संकेताने वेगळे राहा;
मग फिरून एकत्र व्हा, यासाठीं कीं सैतानाने तुम-
च्या इंद्रियांच्या अदमनावरून तुह्मास परीक्षेंत
पाडूं नये. ६ तरी मी हें आज्ञेने बोलत नाहीं
केवळ सम्मताने बोलतों. ७ कां कीं असा मी तसें
सर्व माणसानी असावें, ह्मणून मी इच्छितों; परंतु
देवापासून प्रत्येकाला आपापलेंच कृपादान आहे,
एकाला एका प्रकारचें व दुसऱ्याला दुसऱ्या
प्रकारचें.

८ परंतु जे अविवाहित व ज्या विधवा त्यांस मी ह्म-
णतों, तीं मजसारिखींच राहिलीं तर त्यांस बरें आहे.
९ तथापि जर त्यांस इंद्रियदमन होत नाहीं तर त्यानी
लग्न करावें, कारण कीं जळण्यापेक्षां लग्न करणें बरें
आहे. १० परंतु ज्यानी लग्न केलें आहे त्यांस
मी नव्हें, पण प्रभु आज्ञा करितो कीं, बायकोने
नवऱ्यापासून वेगळें होऊं नये; ११ परंतु ती
वेगळी झाली तर तिने लग्नावांचून राहावें, किंवा
नवऱ्यासीं फिरून समेट करून मिळावें; आणि
नवऱ्यानेहि बायकोला सोडूं नये. १२ परंतु दुस-
ऱ्यांस प्रभु नव्हे, पण मी ह्मणतों कीं, जर कोणी-
एका भावाला अविश्वासी बायको आहे, आणि ती
त्याजवळ राहायास खुशी आहे, तर त्याने तिला
सोडूं नये. १३ आणि कोणीएका बायकोला अवि-
श्वासी नवरा असतां, जर तो तिच्या जवळ राहा-
यास खुशी आहे, तर तिने त्याला सोडूं नये.
१४ कां कीं बायकोवरून अविश्वासी नवरा पवित्र
होतो, आणि नवऱ्यावरून अविश्वासी बायको
पवित्र होती; असें नसतें तर तुमचीं लेंकरें अशुद्ध
असतीं, परंतु आतां तीं पवित्र आहेत. १५
तथापि जर अविश्वासी मनुष्य वेगळें होतें तर
वेगळें होवो; अशा प्रसंगीं भाऊ किंवा बहीण
बांधलेली नाहीं; परंतु देवाने आह्माला शांतींत
राहायास बोलाविलें आहे. १६ कां कीं, बाई,
तूं नवऱ्याला तारसील किंवा नाहीं, याविषयीं तुला
काय ठाऊक आहे? अथवा, नवऱ्या, तूं बायकोला
तारसील किंवा नाहीं, याविषयीं तुला काय ठाऊक
आहे? १७ केवळ जसें प्रत्येकाला देवाने वांटून
दिल्हें, जसें प्रत्येकाला प्रभूने बोलाविलें, तसें

त्याने चालावें; आणि याप्रमाणें मी सर्व मंडळ्यांस
नेमून देतों. १८ सुंता झालेला कोणी बोलाविला
आहे तर त्याने असुंती होऊं नये; कोणी असुंती
बोलाविला आहे तर त्याने सुंता करून घेऊं नये.
१९ सुंता कांहीं नाहीं व असुंताहि कांहीं नाहीं,
परंतु देवाच्या आज्ञा पाळणें हेंच. २० ज्या
व्यवहारांत असतां कोणी बोलाविला त्यांत त्याने
राहावें. २१ तूं दास असतां तुला बोलाविलें
काय? त्याची चिंता करूं नको, परंतु त्यापेक्षां जर
तुला मोकळा होण्याचा उपाय आहे तर करून घे.
२२ कां कीं जो दास प्रभूकडून बोलाविला आहे,
तो प्रभूचा मोकळा केलेला असा आहे; तसेंच
जो मोकळा बोलाविला आहे, तो ख्रीस्ताचा दास
आहे. २३ तुह्मी मोलाने विकत घेतलेले आहां,
माणसांचे दास होऊं नका. २४ अहो भावानो,
ज्या कामांत असतां कोणी बोलाविला, त्यांत त्याने
देवाजवळ राहावें.

२५ कुंवारींविषयीं तर प्रभूची आज्ञा मला
नाहीं, परंतु विश्वासू व्हावें असी प्रभूकडून दया
पावलों असतां मी सम्मत देतों. २६ तर मला
असें वाटतें कीं, हल्लींच्या अडचणीमुळें जसें आहे
तसेंच राहावें हें माणसाला बरें. २७ बायकोशीं
बांधलेला आहेस काय? तर सुटायाला पाहूं नको;
बायकोपासून मोकळा आहेस काय? तर नवरी
पाहूं नको. २८ परंतु त्वां लग्न केलें तर पाप
केलें नाहीं, आणि कुंवारीने लग्न केलें तर तिने पाप
केलें नाहीं; तथापि अशांस देहामध्यें संकट होईल;
आणि मी तुमची दया करितों. २९ अहो भावानो,
मी हेंच ह्मणतों कीं, काळ थोडाच आहे, सारांश
हा आहे कीं, ज्यांस बायका आहेत त्यांनी त्या
नसल्यासारिखें असावें; ३० आणि जे रडतात
ते रडत नसल्यासारिखे, आणि जे आनंद करितात
ते आनंद करीत नसल्यासारिखे, आणि जे विकत
घेतात ते आपणांस कांहीं नसल्यासारिखे, ३१
आणि जे या जगाचा व्यवहार करितात, ते विपरीत
व्यवहार करीत नसल्यासारिखे असावे; कारण कीं
या जगाची स्थिति होऊन जाती. ३२ तर तुह्मी
निश्चिंत असावें ह्मणून मी इच्छितों; अविवाहित,
आपण प्रभूला कसें संतोषवावें, असी प्रभूच्या
गोष्टींविषयीं चिंता करितो. ३३ परंतु विवाहित
आपण आपल्या बायकोला कसें संतोषवावें असी
जगांतील गोष्टींविषयीं चिंता करितो. ३४ बायको
व कुंवार यांमध्येंहि भेद आहे; जी अविवाहित
ती आपण शरिराने व आत्म्यानेंहि पवित्र व्हावें,
असी प्रभूच्या गोष्टींविषयीं चिंता करिती; परंतु
जी विवाहित ती, आपण आपल्या नवऱ्याला कसें
संतोषवावें, असी जगांतील गोष्टींविषयीं चिंता
करिती. ३५ हें मी तुमच्याच हितासाठीं बोलतों,
तुह्मावर जाळें घालण्यासाठीं नाहीं, तर योग्य
आचरण व निश्चितपणाने प्रभूची एकनिष्ठ सेवा
तुह्माकडून व्हावी ह्मणून. ३६ परंतु जर कोणाला
असें वाटतें कीं, आपण आपल्या कुंवारीविषयीं
अयोग्य करितों, ती उपवर झाली आहे आणि
असें अगत्य आहे, तर जसी इच्छा असेल, तसें
त्याने करावें; तो पाप करीत नाहीं, लग्न करोत.
३७ तथापि जो अंतःकरणाने स्थिर राहतो व
ज्याला अगत्य नाहीं, तर आपल्या इच्छेवर सत्ता
आहे, आणि आपली कुंवार तसीच ठेवावी असें
ज्याने आपल्या अंतःकरणांत ठरविलें आहे, तो बरें
करितो. ३८ यास्तव जो तिला लग्न करून देतो
तो बरें करितो, परंतु जो लग्न करून देत नाहीं तो
विशेष बरें करितो.

३९ बायको आपला नवरा जोंपर्यंत वांचतो,
तोंपर्यंत शास्त्राकडून बांधलेली आहे; परंतु तिचा
नवरा मेला तर ज्याला ती इच्छिती त्याशीं लग्न
लावायाला ती मोकळी आहे, केवळ प्रभूकड-
ल्याशीं. ४० परंतु जर ती तसीच राहील तर
माझ्या सम्मताप्रमाणें ती अधिक सुखी होईल; आणि
देवाचा आत्मा मजमध्यें आहे, असें मला ठाऊक आहे.

## अध्याय ८.

आतां मूर्तींच्या नैवेद्यांविषयीं आह्मा सर्वांस
ज्ञान आहे, असें आह्मी जाणतों; ज्ञान फुग-
वितें, परंतु प्रीति वृद्धि करिती. २ आणि जर
कोणी कल्पितो कीं, आपण कांहीं जाणतों, तर ज्या-
प्रमाणें जाणलें पाहिजे त्याप्रमाणें तो अद्याप कांहीं
जाणत नाहीं. ३ परंतु कोणी देवावर प्रीति करितो
तर तो त्याकडून जाणलेला आहे. ४ तर मूर्त्तींचे
नैवेद्य खाण्याविषयीं आह्मास ठाऊक आहे कीं,
मूर्त्ति ही जगामध्यें कांहीं नाहीं; अणखी एकावे-
रीज दुसरा कोणी देव नाहीं. ५ कां कीं जरी
आकाशांत व पृथ्वीवरहि ह्मटलेले देव आहेत, तसे
बहुत देव व बहुत प्रभु आहेत, ६ तरी आह्मास
एकच देव बाप, ज्यापासून अवघीं, आणि आह्मी

त्यासाठीं आहों; आणि एकच प्रभु येशू ख्रीस्त,
ज्याकडून अवघीं आणि आह्मी त्याकडून आहों.
७ तथापि हें ज्ञान सर्वांस नाहीं; तर कित्येक, मूर्त्ति
कांहीं आहे असा भाव धरून अझूनहि मूर्त्तींचा
नैवेद्य असा मानून तो खातात, आणि त्यांचा भाव
अशक्त असल्यावरून अशुद्ध होतो. ८ परंतु
भक्ष्याकडून आह्मी देवाजवळ मान्य होत नाहीं;
कां कीं जर आह्मी खातों तर आह्मी अधिक नाहीं,
आणि जर आह्मी खात नाहीं तर आह्मी कमी
नाहीं. ९ परंतु हा तुमचा अधिकार अशक्तांस
अडखळण्याचें कारण होऊं नये ह्मणून जपा. १०
कां कीं ज्याला ज्ञान आहे त्या तुला मूर्त्तींच्या देव-
ळांत जेवायास बसलेला, असें जर कोणी पाहतो,
तर तो अशक्त असतां त्याच्या मनाला मूर्त्तींचा
नैवेद्य खायास धैर्य होईल कीं नाहीं? ११ मग
ज्यासाठीं ख्रीस्त मरण पावला, तो तुझा अशक्त
भाऊ तुझ्या ज्ञानाकडून नाश पावेल. १२ परंतु
तुह्मी भावांविरुद्ध असें पाप करितां व त्यांचा अशक्त
भाव भंगितां, तेव्हां तुह्मी ख्रीस्ताविरुद्ध पाप करितां.
१३ यास्तव जर भक्ष्य माझ्या भावाला अडखळ-
वितें, तर म्या आपल्या भावाला अडखळवूं नये
ह्मणून मी मास कधींहि खाणार नांहीं.

## अध्याय ९.

मी प्रेषित नाहीं काय? मी मोकळा नाहीं काय?
येशू ख्रीस्त आमचा प्रभु, याला म्या पाहिलें
नाहीं काय? प्रभूविषयीं तुह्मी माझें कार्य असे
आहां कीं नाहीं? २ जरी मी दुसऱ्यांस प्रेषित
नाहीं तरी तुह्मास निश्चयेंकरून आहें; कां कीं
प्रभूविषयीं तुह्मी माझ्या प्रेषितपणाचा शिक्का
आहां. ३ माझ्या चौकसी करणाऱ्यांस हेंच माझें
प्रत्युत्तर आहे. ४ आह्मास खायाचा प्यायाचा
अधिकार नाहीं काय? ५ दुसरे प्रेषित व प्रभूचे
भाऊ व केफा, यांसारिखा आह्मासहि धर्मांतली
बायको करून घेऊन चहुंकडे नेण्याचा अधिकार
नाहीं काय? ६ अथवा उद्योग करूं नये, असा
अधिकार केवळ मला व बार्णबाला नाहीं काय?
७ आपलाच खर्च करून कोण कधीं लढायाला
जातो? द्राक्षमळा लावून त्याचें फळ खात नाहीं,
असा कोण? किंवा कळपाला पाळून कळपाचें दूध
खात नाहीं, असा कोण? ८ मी माणसाप्रमाणें
हें बोलतों काय? किंवा शास्त्रहि हेंच सांगतें कीं
नाहीं? ९ कां तर मोशाच्या नेमशास्त्रांत असें
लिहिलें आहे कीं, मळणी करणाऱ्या बैलाला मुसकें
घालूं नको; देवाला बैलांची चिंता आहे काय?
१० किंवा तो आह्माकरितांच बोलतो कीं नाहीं?
आह्माकरितां तर लिहिलें आहे, यासाठीं कीं जो
नांगरतो त्याने आशेने नांगरावें, आणि जो आशेने
मळणी करितो त्याने आपल्या आशेचा अनुभव
पावावा. ११ आह्मी तुह्मासाठीं आत्मिक गोष्टींची
पेरणी केली, तर आह्मी तुमच्या शरिराच्या गोष्टींची
कापणी करितों, हें मोठें आहे काय? १२ दुस-
ऱ्यांस तुह्मावर असा अधिकार असला तर आ-
ह्मास विशेषेंकरून असावा कीं नाहीं? तथापि
असा अधिकार आह्मी चालविला नाहीं, तर आह्मी
अवघीं सोसितों, आह्माकडून ख्रीस्ताच्या शुभवर्त्त-
मानाला कांहीं अडचण होऊं नये ह्मणून. १३
देवळांतील सेवा करणारे देवळांतलें खातात, आणि
वेदीची सेवा करणारे वेदीचे भागीदार आहेत, हें
तुह्मास ठाऊक नाहीं काय? १४ तसेंच प्रभूने नेमिलें
आहे कीं, जे शुभवर्त्तमान सांगतात त्यांनी शुभवर्त्त-
मानाकडून उपजीवन करावें. १५ परंतु म्या यांतील
कोणत्याचीहि वहिवाट केली नाहीं, आणि त्याप्र-
माणें मला प्राप्त व्हावें ह्मणून म्या हें लिहिलें नाहीं,
कां तर कोणी माझें नावाजणें व्यर्थ करावें यापेक्षां
म्या मरावें, हें बरें. १६ कां कीं जरी मी शुभ-
वर्त्तमान सांगतों तरी मला नावाजून घेण्याचें कारण
नाहीं, कां तर मला अगत्य पडलें आहे, आणि
जर मी शुभवर्त्तमान सांगत नाहीं, तर मला हाय
हाय आहे. १७ कारण कीं जर मी हें खुशीने
करितों तर मला वेतन आहे; परंतु गैरखुशीने, तरी
हा कारभार मला सोपला आहे. १८ तर माझें
वेतन काय आहे? हेंच कीं, ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान
सांगतांना तें फुकट करावें, यासाठीं कीं शुभवर्त्तमा-
नाविषयीं जो माझा अधिकार तो म्या विपरीत चालवूं
नये. १९ कां कीं मी सर्वांपासून मोकळा असताहि
अधिकांस मिळविण्यासाठीं म्या आपणाला सर्वांचा
दास केलें आहे. २० ह्मणजे यहूद्यांस मिळवि-
ण्यासाठीं यहूद्यांमध्यें मी यहूद्यासारिखा झालों;
नेमशास्त्राखालच्यांस मिळविण्यासाठीं नेमशास्त्रा-
खालच्यांमध्यें मी नेमशास्त्राखालच्यासारिखा झालों.
२१ जे नेमशास्त्राविरहित त्यांस मिळविण्यासाठीं
जे नेमशास्त्राविरहित त्यांमध्यें मी नेमशास्त्रावि-
रहित असा झालों; तरी देवाजवळ नेमशास्त्रावि-

हेत नव्हतों, तर ख्रीस्ताचा आज्ञांकित. २२ जो
अशक्त त्यांस मिळविण्यासाठीं मी अशक्तांमध्यें
अशक्तासारिखा झालों; मी सर्वांजवळ सर्व प्रकार
झालों, यासाठीं कीं म्या कसें तरी कित्येकांस तारावें.
२३ आणि हें मी शुभवर्त्तमानाकरितां करितों, म्या
याचा भागीदार व्हावें म्हणून. २४ धावण्याच्या
आखाड्यावर धावणारे सर्व धावतात, पण एकालाच
पैज मिळती, हें तुह्मास ठाऊक नाहीं काय? तुह्मास
मिळेल असें धावा. २५ आणि प्रत्येक मल्लयुद्ध
करणारा सर्व गोष्टींविषयीं इंद्रियदमन करितो. ते
तर नाशवंत मुगुट मिळविण्यासाठीं असें करितात
परंतु आह्मी अनाशवंत. २६ यास्तव मी धावतों
तेव्हां मी संशय धरिल्यासारिखा धावत नाहीं;
मी कुस्ती करितों तेव्हां वाऱ्याला मारीत असल्या-
सारिखी करीत नाहीं. २७ तर मी आपल्या
शरिराला कुदलतों व स्वाधीन करून ठेवितों, नाहीं
तर मी दुसऱ्यांस गाजविल्यावर कदाचित स्वतां
नाकारण्यांत येईन.

## अध्याय १०.

अहो भावानो, तुह्मी याविषयीं अज्ञानी असावें
ह्मणून मी इच्छीत नाहीं, कीं आपले सर्व पूर्वज
ढगाखालीं होते, आणि समुद्रांतून ते सर्व पार गेले;
२ आणि ढगाकडून व समुद्राकडून मोशयासाठीं
सर्वांचा बाप्तिस्मा झाला. ३ आणि सर्वांनी एकच
आत्मिक अन्न खाल्लें. ४ आणि सर्व एकच आ-
त्मिक पाणी प्याले, कां कीं ते मागें चालणाऱ्या आ-
त्मिक खडकाचें प्याले, खडक तर ख्रीस्त होता.
५ परंतु त्यांतील बहुतेकांवर देव संतुष्ट नव्हता,
कां कीं ते रानांत धुळीस मिळाले. ६ आणि त्या
गोष्टी आह्मास दाखले अस्या झाल्या, यासाठीं
कीं त्यानी लोभ धरिला तसा आह्मीहि वाईट
गोष्टींचा लोभ धरूं नये. ७ आणि त्यांतील कित्ये-
कांसारिखे मूर्त्तिपूजक होऊं नका; तसें लिहिलें
आहे कीं, लोक खायाला प्यायाला बसले, नंतर
खेळायाला उठले. ८ आणि त्यांतील कित्येकानी
व्यभिचार केला, मग ते एका दिवसांत तेवीस हजार
पडले, त्याप्रमाणें आह्मी व्यभिचार करूं नये. ९
आणि त्यांतल्या कित्येकानी परीक्षा केली, मग ते
सापांकडून नाश पावले, त्याप्रमाणें आह्मी ख्री-
स्ताची परीक्षा करूं नये. १० आणि त्यांतील
कित्येकानी कुरकूर केली, मग ते नाश करणाऱ्याकडून
नाश पावले, त्याप्रमाणें कुरकूर करूं नका. ११ तर
या सर्व गोष्टी दाखले होण्यासाठीं त्यांस घड-
ल्या, आणि ज्यांस युगांचा शेवट प्राप्त झाला
त्या आमच्या बोधासाठीं लिहिल्या आहेत. १२
यास्तव जो असें कल्पितो कीं आपण स्थिर राहतों,
त्याने पडूं नये ह्मणून संभाळावें. १३ जी मनु-
ष्यांची होत असती तिजपेक्षां निराळी तुमची
परीक्षा झाली नाहीं; आणि देव विश्वासू, तो तुमची
परीक्षा तुमच्या शक्तीपेक्षां अधिक होऊं देणार
नाहीं, तर परीक्षेच्या प्रसंगीं निभावण्याचाहि उपाय
करील, असा कीं तुह्मी ती सहन करायास समर्थ
व्हावें. १४ यास्तव अहो माझ्या प्रियानो, तुह्मी
मूर्त्तिपूजेपासून दूर असा. १५ जसें सुज्ञांस तसें
मी सांगतों; जें मी बोलतों तें तुह्मी ठरवा. १६
ज्या स्तुतीच्या प्याल्यावर आह्मी आशीर्वाद मागतों,
तो ख्रीस्ताच्या रक्ताच्या भागीपणाचा आहे कीं
नाहीं? जी भाकर आह्मी मोडितों, ती ख्रीस्ताच्या
शरिराच्या भागीपणाची आहे कीं नाहीं? १७
कारण कीं आह्मी बहुत असतां एक भाकर, एक
शरीर असे आहों; कां तर आह्मी सर्व त्या एका
भाकरीचे भागीदार आहों. १८ देहाप्रमाणें इस्रा-
एल यांकडे पाहा. जे यज्ञांतलें खातात ते वेदीसीं
भागीदार आहेत कीं नाहींत? १९ तर मी काय
ह्मणतों? मूर्त्ति कांहीं आहे, अथवा मूर्त्तींचा नैवेद्य
कांहीं आहे, असें ह्मणतों काय? २० परंतु असें
कीं विदेशी लोक ज्याचा यज्ञ करितात त्याचा यज्ञ
देवाला नव्हे तर भुतांस करितात; आणि तुह्मी
भुतांसीं भागीदार व्हावें, असी माझी इच्छा नाहीं.
२१ प्रभूचा प्याला व भुतांचा प्याला तुमच्याने
पिववत नाहीं; प्रभूच्या मेजावरचे व भुतांच्या मेजा-
वरचे भाग तुमच्याने घेववत नाहींत. २२ आपण
प्रभूला चिडवितों काय? आह्मी त्यापेक्षां बलवान
आहों काय? २३ सर्व गोष्टींविषयीं मला मोक-
ळीक आहे, परंतु सर्व गोष्टी उपयोगी नाहींत; सर्व
गोष्टींविषयीं मला मोकळीक आहे, परंतु सर्व गोष्टी
वृद्धि करीत नाहींत. २४ कोणी आपलेंच हित
पाहूं नये, तर प्रत्येकाने दुसऱ्याचें हित पाहावें.
२५ बाजारांत जें कांहीं विकितात तें मनोभावासाठीं
कांहीं न विचारितां खा. २६ कारण कीं पृथ्वी व
तिचें भरण प्रभूचें आहे. २७ अविश्वास्यांतील
जर कोणी तुह्मास जेवायाला बोलावितो आणि तुह्मी
जायाला इच्छितां, तर जें कांहीं तुमच्या पुढें वाढलें

तें मनोभावासाठीं कांहीं न विचारितां खा. २८
परंतु कोणी तुह्मास सांगितलें कीं, हा मूर्त्तीचा नैवेद्य
आहे, तर ज्याने तें दाखविलें त्याकरितां व मनो-
भावाकरितां खाऊं नका; कारण कीं पृथ्वी व तिचें
भरण प्रभूचें आहे. २९ मी तर मनोभाव ह्मणतों,
तो तुझा नाहीं पण दुसऱ्याचा; कां कीं माझ्या मोक-
ळेपणाविषयीं दुसऱ्याच्या मनोभावाने कां निवाडा
करावा? ३० जर मी कृपेने भागीदार होतों, तर
ज्याविषयीं मी उपकारस्तुति करितों त्यावरून माझी
निंदा कां होती? ३१ यास्तव तुह्मी खातां किंवा
पितां किंवा कांहीं करितां, तर सर्व गोष्टी देवाच्या
गौरवासाठीं करा. ३२ यहूद्यांस व हेल्लेन्यांस व
देवाच्या मंडळीसहि अडखळण्याचें कारण होऊं
नका; ३३ जसा मी सर्व गोष्टींत सर्वांस संतो-
षवितों व आपलेंच हित पाहत नाहीं, तर बहुतांचें,
असें कीं ते तरावे, तसें तुह्मीहि करा.

## अध्याय ११.

जसा मी ख्रीस्ताला तसे तुह्मीहि मला अनुसरा.
२ अहो भावानो, सर्व गोष्टींविषयीं तुह्मी माझी
आठवण करितां, आणि म्या तुह्मास विधि नेमून
दिल्हे त्यांप्रमाणें तुह्मी ते पाळितां, ह्मणून मी तुम-
ची स्तुति करितों. ३ तर प्रत्येक माणसाचा मस्तक
ख्रीस्त, आणि बायकोचा मस्तक पुरुष, आणि ख्री-
स्ताचा मस्तक देव आहे, हें तुह्मी जाणावें ह्मणून
मी इच्छितों. ४ जो कोणी पुरुष प्रार्थना करि-
तांना किंवा भविष्य सांगतांना आपल्या मस्तकावर
आच्छादन घेतो, तो आपल्या मस्तकाचा अपमान
करितो. ५ परंतु जी कोणी बायको उघड्या मस्त-
काने प्रार्थना करिती किंवा भविष्य सांगती, ती
आपल्या मस्तकाचा अपमान करिती; कां कीं तसें
करणें तिची हजामत झाल्यासारिखेंच आहे. ६
यास्तव बायको पदराने आच्छादलेली नसली, तर
तिची हजामतहि व्हावी; परंतु बायकोला कातरणें
किंवा भादरणें यांची लाज असली, तर ती पदराने
आच्छादलेली असावी. ७ कां कीं पुरुष देवाची
प्रतिमा व गौरव आहे, ह्मणून त्याला मस्तकाचें
आच्छादन करणें योग्य नाहीं; परंतु बायको पुरुषाचें
गौरव आहे. ८ कां कीं पुरुष बायकोपासून झाला
नाहीं, तर बायको पुरुषापासून. ९ कां कीं पुरुष
बायकोसाठीं उत्पन्न झाला नाहीं, तर बायको पुरुषा-
साठीं. १० यास्तव दूतांमुळें बायकोला आपल्या
मस्तकावर अधिकार असावा, हें योग्य आहे. ११
तथापि प्रभुसंबंधाने पुरुष बायकोवांचून नाहीं,
आणि बायकोहि पुरुषावांचून नाहीं. १२ कारण
कीं जसी बायको पुरुषापासून, तसा पुरुषहि बायको-
कडून आहे; परंतु सर्व देवापासून आहेत. १३
तुह्मी आपल्यांमध्यें ठरवा; बायकोला पदराने आ-
च्छादल्यावांचून देवाची प्रार्थना करणें शोभतें काय?
१४ पुरुषाने केंस लांब राखिले, तर तें त्याला लाजेचें
कारण आहे, असें प्रकृति स्वतां तुह्मास शिकविती कीं
नाहीं? १५ परंतु बायकोने केंस लांब राखिले,
तर तिला ती शोभा आहे; कां कीं केंस तिला
आच्छादनाकरितां दिल्हे आहेत. १६ परंतु जर
कोणी वितंडवादी आहे असा दिसतो, तर आह्मास
किंवा देवाच्या मंडळ्यांस तशी रीत नाहीं.
१७ आतां हें सांगतांना मी स्तुति करीत नाहीं,
ह्मणजे तुह्मी कल्याण होण्याच्या रीतीने नाहीं, तर
अधिक वाईट होण्याच्या रीतीने एकत्र मिळतां.
१८ पहिल्याने तर तुह्मी मंडळींत मिळतां तेव्हां
तुह्मामध्यें फुटी होतात, असें मी ऐकतों, आणि
कांहीं प्रकारें खरें मानितों. १९ कां कीं तुह्मामध्यें
पटलेले ते प्रगट व्हावे ह्मणून तुह्मामध्यें फुटी झा-
ल्या पाहिजेत. २० तर तुह्मी एका ठिकाणीं मि-
ळतां तेव्हां प्रभुभोजन करण्यासाठीं मिळत नाहीं;
२१ कां कीं खाते वेळेस प्रत्येक मनुष्य आपलें
जेवण पूर्वीं घेतो, आणि एक भुकेला आहे व एक
माजलेला आहे. २२ तर तुह्मास खायाला व
प्यायाला घरें नाहींत काय? किंवा तुह्मी देवाच्या
मंडळीस धिक्कारितां, आणि ज्यांस नाहीं त्यांस
लाजवितां काय? मी तुह्मास काय सांगूं? यामुळें
म्या तुमची स्तुति करावी काय? मी स्तुति करीत
नाहीं. २३ कां कीं म्या प्रभूपासून ऐकून घेतलें,
आणि तेंच म्या तुह्मासहि सांगून दिल्हें, असें कीं
ज्या रात्रीं प्रभु येशूला पराधीन केलें तींत त्याने
भाकर घेतली, २४ आणि आशीर्वाद मागून ती मो-
डीली, आणि ह्मटलें, घ्या, खा; हें माझें शरीर
तुह्मासाठीं मोडलेलें असें आहे, माझ्या आठवणी-
साठीं हें करा. २५ त्याप्रमाणें जेवल्यानंतर तो
प्यालाहि घेऊन बोलला, हा प्याला माझ्या रक्ताने
जो नवा करार तोच आहे; जितकेदां तुह्मी हा
पितां, तितकेदां माझ्या आठवणीसाठीं हें करा. २६
कां कीं जितकेदां तुह्मी ही भाकर खातां व हा
प्याला पितां, तितकेदां तुह्मी प्रभूचें मरण, तो येईल

ोंपर्यंत प्रगट करून दाखवितो. २७ यास्तव जो
ोणी अयोग्य प्रकारें ती भाकर खाईल अथवा
प्रभूचा प्याला पिईल, तो प्रभूचें शरीर व रक्त
यांविषयीं दोषी होईल. २८ तर माणसानें आ-
ली परीक्षा करावी आणि मग त्या भाकरींतलें खावें
त्या प्याल्यांतलें प्यावें. २९ कां कीं जो अयो-
य प्रकारें खातो व पितो, तो प्रभूच्या शरिराला
लक्षून खाण्याने व पिण्याने आपल्यावर दंड
भाणितो. ३० यामुळें तुह्मामध्यें बहुत अशक्त व
ोगी, व पुष्कळ निजत आहेत. ३१ कां कीं
आह्मी आपणच आपला निवाडा केला असता तर
आह्मी न्यायांत न सांपडतों. ३२ परंतु आह्मी
यायांत सांपडलों असतां प्रभूकडून शिक्षा पावतों,
ासाठीं कीं जगाच्या संगतीं आह्मास दंड होऊं
ये. ३३ यास्तव अहो माझ्या भावानो, तुह्मी
ायाला एकत्र मिळतां तेव्हां एकमेकांची वाट पाहा.
४ आणि कोणी भुकेला तर त्याने घरीं खावें,
ासाठीं कीं तुह्मी दंड पावण्यासाठीं मिळूं नये.
ाणि जें राहिलीं तीं मी आल्यावर नीट करीन.

## अध्याय १२.

अहो भावानो, आत्मिक दानांविषयीं तुह्मी अज्ञानी
असावें असी माझी इच्छा नाहीं. २ तुह्मी
ंदेशी लोक होतां, आणि जसी तुह्माला ओढ
ागली तसे त्या मुक्या मूर्तींकडे वळविलें, हें
ुह्मास ठाऊक आहे. ३ यास्तव मी तुह्मास
ळवितों कीं, कोणीहि देवाच्या आत्म्याकडून बोल-
ांना, येशूला शापग्रस्त असें ह्मणत नाहीं; आणि
ावित्र आत्म्याने प्रेरित झाल्यावांचून कोणाच्याने
ाशूला प्रभु ह्मणवत नाहीं. ४ तर कृपादानांचे
भनेक प्रकार आहेत, परंतु आत्मा एकच, ५
ाणि सेवांचे अनेक प्रकार आहेत, परंतु प्रभु
कच. ६ अणखी कार्यांचे अनेक प्रकार आहेत,
रंतु जो देव अवघ्यांमध्यें अवघीं कार्यें करितो तो
कच आहे.

७ तथापि आत्म्याची प्रसिद्धि प्रत्येकाला उप-
ोगासाठीं दिल्ही आहे. ८ कारण कीं कोणी-
काला आत्म्याने ज्ञानाची गोष्ट दिल्ही आहे,
ाणि कोणीएकाला त्याच आत्म्याने विद्येची गोष्ट,
आणि कोणीएकाला त्याच आत्म्याने विश्वास,
ाणि कोणीएकाला त्याच आत्म्याने निरोगी कर-
याचें कृपादान, १० आणि कोणीएकाला चम-
त्कार करण्याची शक्ति, कोणीएकाला भविष्य सांगणें,
कोणीएकाला आत्म्यांचा निवाडा करणें, कोणीएकाला
नाना प्रकारच्या भाषा, आणि कोणीएकाला नाना
भाषांचा अर्थ सांगणें; ११ परंतु हीं अवघीं
कार्यें तो एकच आत्मा करितो, तो आपल्या संकेता-
प्रमाणें एकएकाला वांटून देतो.

१२ कां कीं जसें शरीर एक आहे आणि
त्याला अवयव बहुत आहेत, आणि त्या एका
शरिराचे अवयव बहुत असतांहि सर्व मिळून एक
शरीर आहे, तसा ख्रीस्तहि आहे. १३ कां कीं
आह्मी जरी यहूदी किंवा हेल्लेनी, किंवा दास किंवा
मोकळे आहों, तरी सर्व एका आत्म्याकडून एक
शरीर होण्यासाठीं बाप्तिस्मा पावलों आहों, आणि
एक आत्मा होण्यासाठीं आह्मा सर्वांस पाजलें
आहे. १४ कां कीं शरीरहि एक अवयव नव्हे,
तर बहुत अवयवें. १५ जर पाय ह्मणेल कीं,
मी हात नाहीं ह्मणून मी शरिराचा नाहीं, तर
त्यावरून तो शरिराचा नाहीं काय? १६ आणि
जर कान ह्मणेल कीं, मी डोळा नाहीं ह्मणून मी
शरिराचा नाहीं, तर त्यावरून तो शरिराचा नाहीं
काय? १७ सगळें शरीर डोळा असतें तर
ऐकणें कोठें? सगळें ऐकणें असतें तर हुंगणें कोठें?
१८ परंतु आतां देवाने आपल्या इच्छेप्रमाणें एकेक
अवयव शरिराला लावून ठेविला आहे. १९
आणि ते अवघे एक अवयव असते, तर शरीर
कोठें? २० परंतु आतां अवयव बहुत, तथापि
शरीर एक. २१ आणि डोळ्याच्याने हाताला
ह्मणवत नाहीं कीं, मला तुझें अगत्य नाहीं, अणखी
मस्तकाच्याने पायांस ह्मणवत नाहीं कीं, मला
तुमचें अगत्य नाहीं. २२ परंतु शरिराचे जे
अवयव विशेष अशक्त दिसतात, त्यांचें फार
विशेष अगत्य आहे. २३ आणि शरिराचे
जे अवयव अप्रतिष्ठित असे आह्मी मानितों,
त्यांची आह्मी अधिक प्रतिष्ठा करितों; आणि
आमचे विरूप अवयव यांस विशेष सुंदरपण
आहे. २४ आमचे सुरूप अवयव यांस तर
गरज नाहीं. परंतु जें उणें होतें त्याला देवाने
विशेष मर्यादा देऊन शरीर जुळलें आहे; २५
असें कीं शरिरांत फूट होऊं नये, तर अवयवांनीं
एकमेकांची एकसारिखीच काळजी करावी. २६
आणि एक अवयव दुःखित असला, तर त्याबरो-
बर सर्व अवयव दुःखित होतात; एका अवयवाची

प्रतिष्ठा झाली तर त्याबरोबर सर्व अवयव आनंद
करितात. २७ तुह्मी तर ख्रीस्ताचें शरीर आणि
वेगळे वेगळे अवयव आहां.

२८ आणि देवाने मंडळींत कित्येक ठेविले
आहेत, असे कीं प्रथम प्रेषित, दुसऱ्याने भविष्य-
वादी, तिसऱ्याने उपदेशक, मग चमत्कार, मग
निरोगी करण्याचीं कृपादानें, सहायें, अधिकार, नाना
प्रकारच्या भाषा. २९ सर्व प्रेषित आहेत काय?
सर्व भविष्यवादी काय? सर्व उपदेशक काय? सर्व
चमत्कार करणारे काय? ३० निरोगी करण्याचीं
कृपादानें सर्वांस आहेत काय? अनेक भाषा सर्व
बोलतात काय? सर्व अर्थ सांगतात काय?

३१ तर चांगलीं कृपादानें यांची फार इच्छा
धरा; तथापि त्यापेक्षां फार उत्कृष्ट मार्ग मी तुह्मास
दाखवितों.

## अध्याय १३.

मी मनुष्यांच्या व दुतांच्या भाषा बोलत असलों,
तरी मला प्रीति नसल्यास मी वाजणारें
पितळ किंवा झणझणणारी झांज, असा झालों आहें.
२ आणि मला भविष्यज्ञान असलें, आणि मला सर्व
गुजें व सर्व विद्या समजली, आणि डोंगरांस ढळ-
वावें असा मला पूर्ण विश्वास असला, तरी मला
प्रीति नसल्यास मी कांहींच नाहीं. ३ आणि
म्या आपली सर्व मालमत्ता दरिद्र्यांच्या पोषणा-
साठीं दिल्ही, आणि मी जाळण्यासाठीं आपलें
शरीर पराधीन केलें, तरी मला प्रीति नसल्यास
मला कांहीं लाभ नाहीं. ४ प्रीति सहनशील
आहे, उपकारिक आहे, प्रीति हेवा करीत नाहीं,
प्रीति नावाजून घेत नाहीं, अभिमान धरीत नाहीं,
५ अयोग्य प्रकारें वागत नाहीं, आपलाच स्वार्थ
पाहत नाहीं, संतापत नाहीं, वाईट कल्पीत नाहीं,
६ अन्यायावरून आनंद करीत नाहीं, तर खरेपणा-
बरोबर आनंद करिती, ७ अवघीं झांकिती, अवघीं
खरीं मानिती, अवघ्यांची आशा धरिती, अवघ्यांचें
सहन करिती. ८ प्रीति कधींहि खुंटत नाहीं;
परंतु जरी भविष्य सांगणें आहे, तरी तें खुंटेल;
आणि जरी अनेक भाषा तरी त्या समाप्त होतील;
आणि जरी विद्या तरी ती व्यर्थ होईल. ९ का-
रण कीं आह्मी किंचित् जाणतों व किंचित् भविष्य
सांगतों; १० परंतु जें पूर्ण तें येईल तेव्हां जें
किंचित् तें व्यर्थ होईल. ११ मी लेंकरूं होतों
तेव्हां मी लेंकरासारिखा बोलत असें, लेंकरासा-
रिखी कल्पना करीत असें, लेंकरासारिखी यो-
जना करीत असें; परंतु प्रौढ झालों तेव्हां म्या
लेंकराच्या गोष्टी टाकिल्या. १२ कां कीं आह्माला
आतां भिंगांतून अंधक दिसतें, परंतु तेव्हां तोंडो-
तोंड पाहूं; आतां मी किंचित् जाणतों, परंतु तेव्हां
जसी माझी ओळख होती तसें मी ओळखीन.
१३ तर आतां विश्वास, आशा, प्रीति हीं तिन्ही
राहतात, परंतु त्यांत प्रीति श्रेष्ठ आहे.

## अध्याय १४.

प्रीतीला अनुसरा, आणि आत्मिक कृपादानाची
फार इच्छा धरा, पण आपण भविष्य सांगावें
असी विशेषेंकरून इच्छा धरा. २ कां कीं अन्य
भाषेने बोलणारा माणसांसीं नव्हे, तर देवासीं
बोलतो, कां तर कोणी समजत नाहीं; तरी तो
आत्म्याने गुजें सांगतो. ३ परंतु भविष्य सांगणारा
माणसांस वृद्धि व बोध व शांतवन होण्याच्या
गोष्टी बोलतो. ४ अन्य भाषेने बोलणारा आप-
लीच वृद्धि करितो, परंतु भविष्य सांगणारा मंड-
ळीची वृद्धि करितो. ५ तुह्मी सर्वांनी अन्य भाषा
बोलाव्या ह्मणून मी इच्छितों, परंतु विशेषेंकरून
असें कीं तुह्मी भविष्य सांगावें; कां कीं अन्य
भाषा बोलणारा मंडळीची वृद्धि होण्यासाठीं जर
अर्थ सांगत नाहीं, तर त्याहून भविष्य सांगणारा
मोठा आहे. ६ आणि अहो भावानो, आतां जर
मी तुह्माकडे येऊन अन्य भाषानी बोलेन, तर प्रकट
करण्याने किंवा ज्ञानाने किंवा भविष्य सांगण्याने
किंवा उपदेशाने तुह्मासीं बोलल्यावांचून तुह्मास मज-
पासून काय लाभ होईल? ७ तसेंच शब्द कर-
णाऱ्या निर्जीव वस्तू, ह्मणजे पोवा किंवा वीणा, या
जर नादांचा भेद करून दाखवीत नाहींत, तर
पोव्याने किंवा विण्याने जें वाजविलें तें कसें कळेल?
८ अणखी जर रणशिंग शब्द स्पष्ट करीत नाहीं,
तर लढाईसाठीं कोण तयार होईल? ९ त्याप्र-
माणें तुह्मीहि जर जिभेने गोष्ट स्पष्ट करीत नाहीं,
तर जें सांगितलें तें कसें कळेल? कां कीं तुह्मी
वाऱ्यासीं बोलतां असें होईल. १० जरी जगांत
इतक्या प्रकारचे शब्द आहेत तरी त्यांतील कोण-
ताहि अर्थाशिवाय नाहीं. ११ यास्तव मला
शब्दाचा अर्थ समजत नाहीं, तर बोलणाऱ्याला
मी विदेशी असा होईन, आणि बोलणारा मला

विदेशी असा होईल. १२ त्याप्रमाणें तुह्मीहि
आत्मिक कृपादानांची इच्छा असल्यास, मंडळीची
वृद्धि होण्यासाठीं आपण फार उपयोगी पडावें
ह्मणून झटा. १३ यास्तव अन्य भाषेने बोलणा-
ऱ्याने आपणाला अर्थ सांगतां यावा, असी प्रार्थना
करावी. १४ कां कीं जर मी अन्य भाषेने प्रार्थना
करितों, तर माझा आत्मा प्रार्थना करितो, परंतु
माझी बुद्धि निष्फळ आहे. १५ तर काय आहे?
मी आत्म्याने प्रार्थना करीन व बुद्धीनेहि प्रार्थना
करीन; मी आत्म्याने गाईन व बुद्धीनेहि गाईन.
१६ नाहीं तर त्वां आत्म्याने स्तुति केली असतां
जो अशिक्षिताच्या ठिकाणीं आहे तो तुझ्या उपकार-
स्तुतीवरून आमेन कसें ह्मणेल? कारण कीं तूं जें
बोलतोस तें त्याला समजत नाहीं. १७ तूं तर
उपकारस्तुति बरी करितोस खरें, परंतु दुसऱ्याची
वृद्धि होत नाहीं. १८ मी तुह्मा सर्वांपेक्षां अधिक
भाषा बोलतों, ह्मणून मी आपल्या देवाची स्तुति
करितों. १९ तथापि मंडळींत अन्य भाषेने दाहा
हजार शब्द बोलावे, यापेक्षां म्या दुसऱ्यांस शिक-
विण्यासाठीं पांच शब्द आपल्या बुद्धीने बोलावे हें
मला अधिक आवडतें. २० अहो भावानो, बुद्धी-
विषयीं लेंकरें होऊं नका, तर दुष्टाईविषयीं लेंकरें
व्हा; आणि बुद्धीविषयीं प्रौढ व्हा. २१ नेम-
शास्त्रांत लिहिलें आहे कीं, मी या लोकांसीं अन्य
भाषांनी व अन्य ओंठांनी बोलेन; तथापि तस्यानेंहि
ते माझें ऐकणार नाहींत, असें प्रभु ह्मणतो. २२
यास्तव अन्य भाषा विश्वासणाऱ्यांसाठीं नव्हत
पण अविश्वास्यांसाठीं चिन्ह अशा आहेत; परंतु
भविष्य सांगणें हें अविश्वास्यांसाठीं नव्हे, पण
विश्वासणाऱ्यांसाठीं. २३ यास्तव जर सगळी
मंडळी एकत्र मिळून सर्वच दुसऱ्या भाषानी बोल-
तात, आणि अशिक्षित किंवा अविश्वासी आंत
येतात, तर तुह्मी वेडे आहां, असें ते ह्मणणार
नाहींत काय? २४ परंतु जर सर्व भविष्य सांग-
तात, आणि कोणी अविश्वासी किंवा अशिक्षित
आंत येतो, तर सर्वांकडून त्याची खातरी होती,
सर्वांकडून त्याचा निवाडा होतो; २५ आणि
असें त्याच्या अंतःकरणांतील गुप्त गोष्टी प्रगट
होतात, आणि तसें तो पालथा पडून देवाचें भजन
करील, आणि देव तुह्मामध्यें खचीत आहे, असें
तो प्रगट करून सांगेल.
२६ तर अहो भावानो, काय आहे? तुह्मी
एकत्र मिळतां तेव्हां तुह्मांतील कोणाला गीत आहे,
कोणाला उपदेश आहे, कोणाला अन्य भाषा आहे,
कोणाला प्रगट करणें आहे, कोणाला अर्थ सांगणें
आहे. सर्व गोष्टी वृद्धीसाठीं व्हाव्या. २७ आणि
जर कोणी अन्य भाषेने बोलतो, तर दोघानी किंवा
पराकाष्ठा तिघानी अनुक्रमाने बोलावें, आणि एकाने अर्थ
सांगावा. २८ परंतु कोणी अर्थ सांगणारा नसला
तर त्याने मंडळींत उगेंच राहावें, आणि आपणासीं
व देवासीं बोलावें. २९ भविष्यवादी यांतल्याहि
दोघानी किंवा तिघानी बोलावें, आणि दुसऱ्यानी
निवाडा करावा. ३० परंतु बसलेल्या कोणीए-
काला कांहीं प्रगट झालें, तर पहिल्याने उगेंच
राहावें. ३१ कां कीं एकामागें एक असें तुह्मा
सर्वांच्याने भविष्य सांगवेल, यासाठीं कीं सर्वांनी
शिकावें व सर्वांचें समाधान व्हावें. ३२ भविष्य-
वाद्यांचे आत्मे तर भविष्यवाद्यांच्या स्वाधीन आहेत.
३३ कां कीं देव हा गडबडीचा नव्हे तर शांतीचा
आहे, जसें सर्व पवित्रांच्या मंडळ्यांत तसें. ३४
तुमच्या बायकानी मंडळ्यांमध्यें उगेंच राहावें, कां
कीं त्यांस बोलण्याचा अधिकार दिल्हा नाहीं, तर
त्यानी स्वाधीन असावें, नेमशास्त्रहि सांगतें त्याप्र-
माणें; ३५ आणि त्यांस कांहीं शिकायाची इच्छा
असली, तर त्यानी आपल्या नवऱ्यांस घरीं विचा-
रावें; कां कीं बायकानी मंडळींत बोलावें ही लाजेची
गोष्ट आहे. ३६ देवाचें वचन तुह्मापासून निघालें
काय? अथवा तें केवळ तुह्मासच प्राप्त झालें काय?
३७ जर कोणी आपणाला भविष्यवादी किंवा आ-
त्मिक असें मानितो, तर जें मी तुह्मास लिहितों तें
प्रभूच्या आज्ञा आहे असें त्याने मान्य करावें. ३८
परंतु जर कोणी जाणत नाहीं तर न जाणो. ३९
यास्तव अहो भावानो, तुह्मी भविष्य सांगण्याची
इच्छा धरा, आणि दुसऱ्या भाषा बोलायास मना
करूं नका. ४० सर्व गोष्टी योग्य रीतीने व अनु-
क्रमाने व्हाव्या.

## अध्याय १५.

अहो भावानो, जें शुभवर्त्तमान म्या तुह्मास सां-
गितलें, ज्याचा अंगीकारहि तुह्मी केला, आणि
ज्यामध्यें तुह्मी स्थिर राहतां, त्याविषयीं मी तुह्मास
जाणवितों; २ जें शुभवर्त्तमान म्या तुह्मास सां-
गितलें तें तुह्मी बळकट धरिलें तर त्याकडून तुह्मी
विश्वास व्यर्थ धरिला नसल्यास तुह्मी तारणहि

पावतो. ३ तर म्या अंगीकारिलें तें पहिल्या गोष्टीं-
मध्यें म्या तुह्मास सांगून दिल्हें कीं, शास्त्राप्रमाणें
ख्रीस्त आमच्या पापांसाठीं मरण पावला; ४
आणि असें कीं, त्याला पुरिलें; आणि असें कीं,
शास्त्राप्रमाणें तो तिसऱ्या दिवशीं उठला; ५ आणि
असें कीं, तो केफाला, मग बारा जणांस दिसला,
६ त्यानंतर तो एकदम पांचशयांपेक्षां अधिक भावांस
दिसला, त्यांतील बहुतकरून सर्व आजपर्यंत राहिले
आहेत, परंतु कित्येक निजले आहेत. ७ त्यानंतर
तो याकोबाला, मग सर्व प्रेषितांस दिसला. ८
आणि सर्वांच्या शेवटीं, अकाळीं जन्मलेल्यासारिखा
जो मी त्या मलाहि दिसला. ९ कां कीं प्रेषितां-
मध्यें मी लाहानच आहें; मी प्रेषित ह्मणवायास
योग्य नाहीं, कारण कीं म्या देवाच्या मंडळीचा
पाठलाग केला. १० परंतु जें कांहीं मी आहें तें
देवाच्या कृपेनें आहें; आणि मजवर त्याची जी
कृपा ती व्यर्थ झाली नाहीं, तर सर्वांपेक्षां म्या फार
श्रम केले, तथापि म्या नाहीं, तर देवाची जी कृपा
मजवर होती तिनें. ११ तर जरी मी किंवा ते,
तरी आह्मी तसेंच गाजवितों, आणि तुह्मी तसाच
विश्वास धरिला. १२ परंतु ख्रीस्त मेलेल्यांमधून
उठला असी त्याची गोष्ट गाजविली, तर मेलेल्यांचें
पुन्हा उठणें होत नाहीं, असें तुह्मांतील कित्येक
कसें ह्मणतात? १३ परंतु जर मेलेल्यांचें पुन्हा
उठणें होत नाहीं, तर ख्रीस्तहि उठला नाहीं. १४
आणि ख्रीस्त उठला नाहीं, तर आमचें गाजविणें
व्यर्थ, आणि तुमचा विश्वासहि व्यर्थ. १५ आणखी
आह्मी देवाविषयीं खोटे साक्षी असे ठरलों, कां
कीं देवाविषयीं आह्मी असी साक्ष दिल्ही कीं, त्यानें
ख्रीस्ताला उठविलें; जर मेलेले उठत नाहींत तर
त्यानें त्याला उठविलें नाहीं. १६ कारण कीं जर
मेलेले उठत नाहींत तर ख्रीस्तहि उठला नाहीं.
१७ आणि जर ख्रीस्त उठला नाहीं, तर तुमचा
विश्वास व्यर्थ; तुह्मी अझून आपल्या पापांमध्यें
आहां; १८ आणि ख्रीस्ताकडील निजलेलेहि नाश
पावले. १९ जर केवळ या आयुष्यांत आमची
आशा ख्रीस्तावर आहे, तर सर्व मनुष्यांपेक्षां आह्मी
लाचार आहों. २० परंतु आतां ख्रीस्त मेलेल्यां-
मधून उठला आहे, तो निजलेल्यांतलें पहिलें फळ
झाला आहे. २१ कारण कीं जसें मनुष्याकडून
मरण झालें, तसें मनुष्याकडून मेलेल्यांचें पुन्हा
उठणेंहि झालें. २२ कां तर जसे आदामाकडून
सर्व मरतात, तसे ख्रीस्ताकडून सर्व जिवंतहि कर-
ण्यांत येतील; २३ परंतु प्रत्येक आपापल्या
क्रमानें होईल, ख्रीस्त हा पहिलें फळ, मग जे
ख्रीस्ताचे ते त्याच्या येण्याच्या वेळेस. २४
नंतर, जेव्हां तो देवाला ह्मणजे बापाला राज्य
सोपून देईल, आणि सर्व धनीपण व सर्व अधिकार
व सत्ता यांस मोडील, तेव्हां शेवट होईल. २५
कां कीं त्याच्या पायांखालीं देव सर्व शत्रु ठेवील,
तोंपर्यंत त्याला राज्य केलें पाहिजे. २६ मरण हा
शेवटला शत्रु नाहींसा करण्यांत येईल. २७ कारण
कीं त्यानें याच्या पायांखालीं सर्व वस्तू ठेविल्या आ-
हेत; परंतु जेव्हां तो ह्मणतो कीं, सर्व वस्तू स्वाधीन
करून ठेविल्या आहेत, तेव्हां ज्यानें सर्व वस्तू याच्या
स्वाधीन केल्या तो वेगळा हें उघडें आहे. २८
आणि जेव्हां सर्व वस्तू याच्या स्वाधीन होतील,
तेव्हां ज्यानें सर्व वस्तू याच्या स्वाधीन केल्या त्या-
च्या स्वाधीन पुत्र आपणहि होईल, यासाठीं कीं
देव सर्वांमध्यें सर्व व्हावा. २९ नाहीं तर मेलेले
जर अगदी उठत नाहींत, तर मेलेल्यांसाठीं जे
बाप्तिस्मा घेतात ते काय करितील? आणि ते मेले-
ल्यांसाठीं बाप्तिस्मा कां घेतात? ३० आणि आह्मी
घडोघडीं संकटांत कां पडतों? ३१ ख्रीस्त येशू
आमचा प्रभु, याकडून तुह्माविषयीं जो उल्हास
मला आहे, त्याच्या खरेपणावरून ह्मणतों कीं, मी
रोज रोज मरतों. ३२ एफससांत म्या माणसाप्र-
माणें श्वापदांसीं जर लढाई केली आहे, तर मेलेले
उठत नसल्यास मला काय लाभ? आह्मी खाऊं
व पिऊं, कां कीं उद्यां मरणार आहों. ३३ फसूं
नका; दुष्ट संगत चांगल्या रीतींस बिघडविती.
३४ योग्य प्रकारें सावध व्हा, व पाप करूं नका;
कां कीं कित्येकांस देवाविषयीं अज्ञान आहे; मी
तुह्मास लाजविण्यासाठीं बोलतों.

३५ परंतु कोणी ह्मणेल कीं, मेलेले कसे उठतात,
आणि कोणत्या प्रकारच्या शरिरानें येतात? ३६
अरे निर्बुद्धि, जें तूं पेरितोस तें जर मरत नाहीं तर
जिवंत करण्यांत येत नाहीं. ३७ आणि जें तूं
पेरितोस तें जें अंग व्हायाचें तें तूं पेरीत नाहींस,
तर उघडा दाणा, तो कदाचित गव्हांचा किंवा दुस-
ऱ्या एखाद्या प्रकारचा असेल. ३८ आणि देव
आपल्या इच्छेप्रमाणें त्याला अंग देतो, आणि बिजां-
तल्या प्रत्येकाला ज्याचें त्याचें अंग देतो. ३९ अवघे
देह एकसारिखेच देह नाहींत; तर मनुष्यांचा

देह निराळा, आणि पशूंचा देह निराळा, आणि
मास्यांचा निराळा, आणि पांखरांचा निराळा आहे.
४० आणि आकाशांतलीं शरिरें व पृथ्वीवरलीं शरि-
रेंहि आहेत, परंतु आकाशांतल्यांचें गौरव निराळें,
आणि पृथ्वीवरल्यांचेंहि निराळें. ४१ सूर्याचें गौरव
निराळें, आणि चंद्राचें गौरव निराळें, आणि ताऱ्यांचें
गौरव निराळें, कां कीं गौरवाने ताऱ्याताऱ्यांचा भेद
आहे. ४२ तसें मेलेल्यांचें पुन्हा उठणेंहि आहे;
नासकेपणांत पेरण्यांत येतें, अविनाशीपणांत उठवि-
ण्यांत येतें; ४३ अपमानांत पेरण्यांत येतें, गौरवांत
उठविण्यांत येतें; अशक्तपणांत पेरण्यांत येतें, सम-
र्थपणांत उठविण्यांत येतें; ४४ प्राणाचें शरीर
असें पेरण्यांत येतें, आत्मिक शरीर असें उठवि-
ण्यांत येतें. प्राणाचें शरीर आहे व आत्मिक शरीर
आहे. ४५ आणि त्याप्रमाणें लिहिलें आहे कीं,
पहिला माणूस आदाम जिवंत प्राणी असा झाला;
शेवटला आदाम जिवंत करणारा आत्मा असा
झाला. ४६ तथापि जें आत्मिक तें प्रथम नव्हतें,
तर जें प्राणाचें तें, मग जें आत्मिक तें. ४७
पहिला माणूस पृथ्वीपासून मातीचा आहे, दुसरा
माणूस आकाशापासून प्रभु आहे. ४८ जसा
मातीचा तसेच जे मातीचे तेहि आहेत; आणि जसा
आकाशांतला तसेच जे आकाशांतले तेहि आहेत.
४९ आणि जो मातीचा, त्याचें स्वरूप जसें आह्मी
धरिलें आहे, तसें आकाशांतल्याचेंहि स्वरूप धरूं.
५० अहो भावानो, मी असें ह्मणतों कीं, मांस
व रक्त हीं देवाच्या राज्याचें वतन पावावयास
शक्तिमान नाहींत, आणि नासकेपणाला अविनाशी-
पणाचें वतन मिळत नाहीं. ५१ पाहा, मी तुह्मास
गूज सांगतों; आपण सर्व मरणार नाहीं, तर आपण
सर्व पालटूं; ५२ क्षणांत, निमिषांत, शेवटला करणा
वाजण्याच्या वेळेस; कां कीं करणा वाजेल, आणि
मेलेले ते अविनाशी असे उठविण्यांत येतील,
आणि आह्मी पालटूं. ५३ कां कीं या नासक्याने
अविनाशीपण नेसावें, आणि हें मरणारें याने अमरपण
नेसावें हें अगत्य आहे. ५४ आणि हें नासकें
अविनाशीपण नेसेल आणि हें मरणारें अमरपण
नेसेल, तेव्हा ही लिहिलेली गोष्ट पूर्ण होईल कीं,
मरण जयाने गिळून टाकिलें आहे. ५५ अरे
मरणा, तुझी नांगी कोठें? अरे मृतलोका, तुझा जय
कोठें? ५६ तर मरणाची नांगी पाप, आणि
पापाचें सामर्थ्य नेमशास्त्र आहे. ५७ परंतु देव,
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताकडून आह्मास जय
देतो, त्याची उपकारस्तुति असो. ५८ यास्तव
अहो माझ्या प्रिय भावानो, तुह्मी स्थिर व अढळ
व प्रभूच्या कामांत सर्वदा अधिकाधिक तत्पर असा,
कां कीं प्रभुसंबंधी तुमचा श्रम व्यर्थ नाहीं, हें
तुह्मी जाणतां.

## अध्याय १६.

आतां पवित्रांसाठीं जी वर्गणी तिजविषयीं, म्या
गलत्यांतील मंडळ्यांस आज्ञा दिल्ही, तसेंच
तुह्मी करा. २ सप्तकाच्या पहिल्या दिवशीं तुह्मा-
मधील प्रत्येकाने जसें आपणाला अनुकूळ असेल,
त्याप्रमाणें आपल्याजवळ सांठवून ठेवावें, यासाठीं
कीं मी येईन तेव्हां वर्गण्या होऊं नयेत. ३ आणि
मी येईन तेव्हां ज्या कोणास तुह्मी पत्रें देऊन
मान्य कराल त्यास तुमचा धर्मादाय यरूशलेमास
पोहंचविण्याकरितां मी पाठवीन. ४ आणि जर
मलाहि जायाला योग्य असेल तर ते माझ्या
संगतीं येतील. ५ परंतु मी मकदन्यांतून जाईन
तेव्हां मी तुह्माकडे येईन; कारण कीं मी मकद-
न्यांतून जाणार आहें. ६ आणि कदाचित तुह्मा-
जवळ राहीन व हिंवाळाहि घालवीन, यासाठीं कीं
जिकडे मला जायाचें असेल तिकडे तुह्मी मला
वाटेस लावावें. ७ कां कीं आतां तुह्मास वाटे-
वर भेटावें, असी माझी इच्छा नाहीं; तर मी
असी आशा धरितों कीं, जर प्रभूची आज्ञा होईल
तर मी कांहीं वेळ तुह्माजवळ राहीन. ८ परंतु
पन्नासाव्या दिवसाच्या सणापर्यंत मी एफसांत
राहीन. ९ कां कीं मोठा व सोईचा दरवाजा
माझ्या साठीं उघडला आहे, आणि अडविणारे
बहुत आहेत.

१० तीमथ्यस आला तर त्याने तुमच्या जवळ
निर्भयपणाने असावें ह्मणून जपा; कां कीं जसा मी,
तसा तोहि प्रभूचें काम करितो. ११ यास्तव
कोणी त्याचा धिक्कार करूं नये, तर त्याने मजकडे
यावें ह्मणून त्याला सुखरूप वाटेस लावा, कां कीं
मी त्याची व भावांची वाट पाहत आहें. १२
आतां अपल्लोस भाऊ याविषयीं; त्याने भावांच्या
संगतीं तुह्माकडे यावें, ह्मणून म्या त्याला फार विनंती
केली; तथापि आतां यावें असी त्याची इच्छा अ-
गदी नव्हती, तर जेव्हां त्याला सोईची वेळ होईल
तेव्हां तो येईल. १३ सावध असा, विश्वासांत

स्थिर राहा, प्रौढपणानें वागा, धैर्यवान असा. १४
तुमच्या सर्व गोष्टी प्रीतीनें व्हाव्या.
१५ अहो भावानो, तुह्मी स्तेफनसाचें घराणें
जाणतां कीं, तें अखायांतलें पहिलें फळ आहे, आणि
त्यांनी आपणांस पवित्रांच्या सेवेसाठीं लाविलें आहे.
१६ अशांस, आणि जो कोणी त्यांबरोबर काम
करितो व श्रम करितो, त्याला तुह्मी मान्य असावें,
ह्मणून मी तुह्मास विनंती करितो. १७ अणखी
स्तेफनस व फूर्तूनातस व अखाइकस, हे आल्या-
वरून मला आनंद झाला आहे; कारण कीं तुमचें
जें उणें तें त्यांनी पूर्ण केलें आहे. १८ कां तर
त्यांनी माझ्या व तुमच्या आत्म्यांस शांत केलें आहे,
यास्तव तुह्मी अशांचा अंगीकार करा. १९ आस्यां-
तल्या मंडळ्या तुह्मास सलाम सांगतात. अकुला
व प्रिस्किला हीं आपल्या घरांतल्या मंडळीसुद्धां
तुह्मास प्रभुसंबंधानें फार फार सलाम सांगतात.
२० सर्व भाऊ तुह्मास सलाम सांगतात; पवित्र
चुंबनानें एकमेकांस क्षेम द्या.
२१ माझ्या पौलसाच्या हातचा सलाम. २२
जर कोणीएक प्रभु येशू ख्रीस्तावर प्रीति करीत
नाहीं, तर तो प्रभूच्या येण्याच्या वेळेस शापग्रस्त
असो. २३ प्रभु येशू ख्रीस्ताची कृपा तुह्मावर
असो. २४ ख्रीस्त येशूसंबंधी तुह्मा सर्वांवर
माझी प्रीति असो. आमेन.

# करिंथकरांस पौलसाचें दुसरें पत्र.

## अध्याय १.

करिंथांत देवाची जी मंडळी आहे तिला, आणि
तिच्या सुद्धां संपूर्ण अखायांत जे पवित्र आहेत
त्या सर्वांस पौलस, देवाच्या इच्छेनें येशू ख्रीस्ता-
चा प्रेषित, याचा व तीमथ्यस भावाचा सलाम.
२ देव आमचा बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांपासून
तुह्मावर कृपा व शांति असो.
३ देव आमचा प्रभु येशू ख्रीस्ताचा बाप, जो
कळवळ्यांचा बाप व सर्व शांतवनाचा देव, त्याची
स्तुति असो; ४ तो आमच्या सर्व संकटांत आ-
मचें शांतवन करितो, यासाठीं कीं ज्या शांतवनानें
आह्मी स्वतां देवाकडून शांतवन पावतों, त्याकडून
आह्मी कोणत्याहि संकटांत जे आहेत त्यांचें शांतवन
करायास शक्तिमान व्हावें. ५ कां कीं जसीं
ख्रीस्ताविषयींचीं दुःखें आह्मास पुष्कळ होतात,
तसें ख्रीस्ताकडून आमचें शांतवनहि पुष्कळ होतें.
६ आणि जरी आह्मी संकट पावतों, तरी हें तुमचें
शांतवन व तारण यांसाठीं आहे, हें तर जीं दुःखें
आह्मी सोसितों तींच साहिल्यानें घडतें; आणि
जरी आह्मी शांतवन पावतों, तरी हें तुमचें शांतवन
व तारण यांसाठीं आहे. ७ आणि तुह्माविषयीं
आमची आशा खंबीर आहे, कारण आह्मास ठाऊक
आहे कीं, जसे तुह्मी दुःखाचे भागीदार आहां तसे
शांतवनाचेहि भागीदार आहां. ८ कां कीं अहो
भावानो, आस्या देशांत जें आमचें संकट आह्मास
प्राप्त झालें त्याविषयीं तुह्मास ठाऊक नसावें असी
आमची इच्छा नाहीं; तें असें कीं आह्मी साम-
र्थ्यापेक्षां पराकाष्ठेचे व्याकुळ होतों, इतके कीं आह्मी
जगण्याविषयीं देखील निराश झालों. ९ परंतु
आह्मामध्यें आमच्या मरणाचा ठराव झाला, या-
साठीं कीं आह्मी आपणांवर नव्हे, पण जो देव मेले-
ल्यांस उठवितो त्यावर आशा ठेवावी. १० त्यानें
आह्मास एवढ्या मरणापासून सोडविलें, आणि तो
सोडवीत आहे, त्यावर आह्मी असी आशा ठेवितों
कीं, तुह्मीहि आह्मासाठीं प्रार्थनेनें सहाय करीत
असतां तो पुढेंहि सोडवील; ११ असें कीं जो
उपकार बहुतांच्या योगानें आह्मावर झाला त्यावि-
षयींची उपकारस्तुति आह्माकरितां बहुतांकडून व्हावी.
१२ कां कीं हा आमचा उल्हास आहे, ह्मणजे
आमच्या मनाची साक्ष; ती असी कीं, दैहिक ज्ञाना-
कडून नव्हे, तर देवाच्या कृपेकडून आह्मी देववि-
षयींच्या भोळेपणानें व साळसूदपणानें जगांत व
विशेषेंकरून तुमच्या जवळ वागलों आहों. १३ कां
कीं ज्या गोष्टी तुह्मी वाचितां व मान्य करितांहि, त्यां-
वाचून दुसऱ्या गोष्टी आह्मी तुह्मास लिहीत नाहीं

आणि शेवटपर्यंतहि तुह्मी त्या मान्य कराल, असी
माझी आशा आहे. १४ आणि त्याप्रमाणें तुह्मी
आह्मास कांहीं मान्य केलें आहे कीं, आह्मी तुमचा
उल्हास आहों, जसे प्रभु येशूच्या दिवसीं तुह्मी
आमचे आहां, तसे. १५ आणि या भरवस्याने
म्या तुह्माजवळ यायास पूर्वी योजिलें होतें, तुह्मास
दुसरें कृपादान व्हावें ह्मणून; १६ मग तुह्माक-
डून मकदन्यास जावें, नंतर फिरून मकदन्याहून
तुह्माजवळ यावें, आणि तुह्मी मला यहूदांत पोहं-
चवावें. १७ तर हें योजून म्या चंचळपण केलें
काय? अथवा जें मी योजितों तें देहाप्रमाणें योजितों
काय, असें कीं मजपासीं होय होय, मग नाहीं
नाहीं व्हावें? १८ परंतु देव विश्वासू साक्षी आहे
कीं, तुह्मासीं आमची गोष्ट, होय व नाहीं, असी
नव्हती. १९ कां कीं देवाचा पुत्र येशू ख्रीस्त
आह्माकडून, मी व सिल्वानस व तीमथ्यस यांकडून
तुह्मामध्यें गाजविला, तो होय व नाहीं, असा झाला
नाहीं, तर त्याविषयीं होय झालें. २० कारण
कीं देवाचीं सर्व वचनें हीं त्याकडून होय व त्याक-
डून आमेन, असीं आहेत; आह्माकडून देवाचें
गौरव व्हावें ह्मणून. २१ आणि जो आह्मास
तुह्मासुद्धां ख्रीस्तामध्यें स्थिर करितो व ज्याने आ-
ह्मास अभिषेक केला, तो देव आहे. २२ त्याने
आह्मावर शिक्काहि केला व आमच्या अंतःकरणां-
मध्यें आत्मा हा विसार दिल्हा आहे.

२३ मी आपल्या जीवावरची शपथ घेऊन देवा-
ला साक्षी करून ठेवितों कीं, मी तुमची दया करितों
ह्मणून अद्याप करिंथास आलों नाहीं. २४ आह्मी
तुमच्या विश्वासावर सत्ता करितों असें नाहीं, तर
तुमच्या आनंदाचे सहायकारी आहों, कां कीं तुह्मी
विश्वासाने स्थिर राहतां.

## अध्याय २.

आणि म्या आपल्यापासीं असें ठरविलें होतें कीं,
खेदाने म्या तुह्माकडे फिरून येऊं नये. २
कारण कीं जर मी तुह्मास खेद देतों, तर जो मज-
कडून खिन्न होतो, त्यावांचून मला सुखी करणारा
कोण आहे? ३ आणि म्या हेंच तुह्मास लिहिलें
यासाठीं कीं मी आल्यावर, ज्यांकडून म्या आनंद
करावा, त्यांपासून मला खेद होऊं नये; मला तर
तुह्मा सर्वांविषयीं असा भरवसा आहे कीं, माझा
आनंद तुह्मा सर्वांचा आहे. ४ कारण कीं मी
फार संकटांत व अंतःकरणांतील पेंचांत असतां
बहुत आसवानी लिहिलें; तुह्मी खिन्न व्हावें ह्मणून
नाहीं, तर तुह्मावर माझी फार विशेष प्रीति आहे
ती तुह्मी जाणावी.

५ परंतु कोणी खेद दिल्हा, तर त्याने मला
केवळ कांहीं प्रकारें खेद दिल्हा आहे; कारण कीं
म्या तुह्मा सर्वांवर भार ठेवूं नये. ६ तशा माण-
साला जी बहुतानी लाविलेली शिक्षा, ती ही पुरे.
७ यास्तव विशेषेंकरून उलट्या प्रकारें तुह्मी क्षमा
करून शांतवन करावें, तशा माणसाने फारच खे-
दांत बुडूं नये ह्मणून. ८ यास्तव मी तुह्मास
विनंती करितों कीं, तुह्मी त्यावर प्रीति दृढ ठेवावी.
९ कारण कीं म्या यासाठींच लिहिलें कीं, तुह्मी
सर्व गोष्टींविषयीं मान्य आहां किंवा नाहीं, यावि-
षयीं तुमची परीक्षा पाहावी. १० ज्याला तुह्मी
कांहीं क्षमा करितां त्याला मीहि; कां कीं म्या को-
णाला कांहीं क्षमा केलें, तर त्याला तुह्माकरितां
ख्रीस्ताच्या नांवाने क्षमा केलें; ११ यासाठीं कीं
सैतानाकडून आमची हानि होऊं नये; कां कीं
त्याच्या युक्तींविषयीं आह्मास ठाऊक आहे.

१२ तर मी ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानासाठीं त्रोव-
सास आलों तेव्हां प्रभूने मजसाठीं दार उघडल्या-
वर, १३ माझा भाऊ तितस मला सांपडला
नाहीं, ह्मणून माझ्या आत्म्याला समाधान झालें
नाहीं, परंतु त्यांपासून आज्ञा घेऊन मी तेथून मक-
दन्यास आलों. १४ आतां जो देव सर्वदा ख्रीस्ता-
कडून आह्मास विजयी करितो, आणि आपल्या-
विषयींच्या ज्ञानाचा गंध सर्व ठिकाणीं आह्माकडून
प्रगट करवितो त्याची उपकारस्तुति होवो. १५
कां कीं जे तारण पावतात त्यांस, आणि जे नाश
पावतात त्यांस आह्मी देवाजवळ ख्रीस्ताचा सुगंध
आहों; १६ यांस तर मरण होण्यासाठीं मर-
णाचा गंध, परंतु त्यांस जीवन होण्यासाठीं जीवना-
चा गंध आहों; तर या कार्यांसाठीं कोण योग्य
आहे? १७ कां कीं बहुतांसारिखे आह्मी देवाच्या
वचनांत भेळ करणारे नाहींत, तर साळसूदपणाने व
देवाच्या सत्तेने देवाच्या देखतां आह्मी ख्रीस्तसंबं-
धाने बोलतों.

## अध्याय ३.

आह्मी आपणांस फिरून वाखाणायाला लागतों
काय? अथवा शिफारसीचीं पत्रें तुह्माजवळ

आणायाचें, किंवा तुह्मापासून शिफारसीचीं पत्रें
मागून घ्यायाचें, जसें कित्येकांस अगत्य आहे, तसें
आह्मास आहे काय? २ तुह्मीच आमचें पत्र,
आमच्या अंतःकरणांत लिहिलेलें, सर्व माणसानी
जाणलेलें व वाचलेलें, असे आहां. ३ तुह्मी
ख्रीस्ताचें जें पत्र आह्माकडून करविलेलें, जें शाईने
नव्हे, तर जिवंत देवाच्या आत्म्याकडून लिहिलेलें,
दगडाच्या पाट्यांवर नव्हे, तर अंतःकरणांतील मांस-
मय पाट्यांवर लिहिलेलें, असे प्रसिद्ध आहां.

४ असा भरवसा तर आह्मास देवाविषयीं
ख्रीस्ताकडून आहे. ५ आह्मी स्वतां आपल्याच
बुद्धीने कांहीं योजायास समर्थ आहों असें नाहीं,
तर आमचें सामर्थ्य देवापासून आहे. ६ त्यानेच
आह्मास नव्या कराराचे योग्य सेवक केलें, अक्ष-
राचे नाहीं, तर आत्म्याचे केलें; कां कीं अक्षर हें
जिवें मारितें, परंतु आत्मा हा जिवंत करितो. ७
आणि जिचीं अक्षरें दगडावर कोरलेलीं ती मरणा-
ची सेवा असी गौरवयुक्त झाली कीं, इस्राएल
लोकांच्याने मोशाच्या तोंडाचें जें गौरव क्षणभंगुर
होतें, त्यामुळें त्याच्या तोंडावर दृष्टि लाववत नव्ह-
ती; ८ तर तिजपेक्षां आत्म्याची सेवा अधिक गौर-
वयुक्त कसी नाहीं? ९ कां कीं जर अन्यायी ठर-
विण्याची सेवा गौरवाची होती, तर न्यायी ठरवि-
ण्याची सेवा किती विशेष गौरवाची आहे? १०
आणखी जें गौरवयुक्त होतें, तें वरिष्ठ गौरवामुळें या
प्रकारें गौरवयुक्त नव्हतें. ११ कारण कीं जें क्षण-
भंगुर तें जर गौरवयुक्त, तर जें टिकणारें तें किती
विशेषेंकरून गौरवयुक्त? १२ तर असा भरवसा
आह्मास असतां, आह्मी फार प्रशस्तपणाने बोलतों;
१३ आणि मोशासारिखें करीत नाहीं, त्याने तर
आपल्या तोंडावर मुखवस्त्र घातलें, यासाठीं कीं
इस्राएल लोकानी क्षणभंगुराच्या परिणामावर दृष्टि
लावूं नये. १४ परंतु त्यांच्या बुद्धि मंद झाल्या;
कां कीं प्राचीन करार वाचण्यांत तेंच मुखवस्त्र
काढलें नसतां आजपर्यंत राहिलें आहे; तें तर
ख्रीस्ताकडून नाहींसें होतें. १५ परंतु आजपा-
वेतों जेव्हां मोशाचें वाचितात , तेव्हां तें मुखवस्त्र
त्यांच्या अंतःकरणावर राहतें. १६ परंतु तें प्रभू-
कडे फिरेल, तेव्हां तें मुखवस्त्र काढण्यांत येईल.
१७ प्रभु तर तो आत्मा आहे; आणि जेथें प्रभू-
चा आत्मा, तेथें मोकळेपण आहे. १८ तर आह्मी
सर्व उघड्या तोंडाने प्रभूचें गौरव जसें आरशांत
तसें पाहत असतां, प्रभूच्या आत्म्याकडूनच त्याच
रुपाने पालटून उत्तरोत्तर गौरवयुक्त होतों.

## अध्याय ४.

यास्तव आह्मावर दया झाली त्याप्रमाणें ही
सेवा आह्मास असतां, आह्मी थकत
नाहीं. २ तर आह्मी लाजेच्या गुप्त गोष्टी
नाकारिल्या, आह्मी कृत्रिमी भावाने चालत नाहीं व
देवाच्या वचनाविषयीं कपट करीत नाहीं, तर खरे-
पण प्रगट करण्याने आह्मी देवासमक्ष आपणांस
सर्व माणसांच्या मनांमध्यें पटवितों. ३ परंतु
आमचें शुभवर्त्तमान झांकलें तर नाश पाव-
णारे यांविषयीं झांकलें आहे. ४ त्यांविषयीं
ह्मटलें तर या जगाच्या देवाने अविश्वासी लोकां-
च्या मनांस अंधळें केलें आहे, यासाठीं कीं जो
देवाची प्रतिमा आहे, त्या ख्रीस्ताच्या गौरवाच्या
शुभवर्त्तमानाचा उजेड त्यांमध्यें प्रकाशित होऊं
नये. ५ कां कीं आह्मी आपणांस नव्हे, तर
प्रभु येशू ख्रीस्त याला गाजवितों, आणि आपणांस
येशूमुळें तुमचे दास. ६ कारण कीं ज्या देवाने
उजेडाला अंधारांतून प्रकाशित व्हायास सांगितलें,
तो येशू ख्रीस्ताच्या योगाने देवाच्या गौरवाच्या
ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठीं आमच्या अंतःकरणांत
प्रकाशला आहे.

७ परंतु हा संग्रह आह्मास मातीच्या पात्रां-
मध्यें आहे, यासाठीं कीं सामर्थ्याचें उत्कृष्टपण हें
देवाचें असावें, आणि आमचें नसावें. ८ आह्मी
सर्व प्रकारें संकट पावलों, परंतु संकोचित झालों
नाहीं; आह्मी पेंचांत पडलों परंतु निराश झालों
नाहीं; ९ आमचा पाठलाग झाला, परंतु घाल-
विलेले नाहीं; खालीं पाडलेले आहों, परंतु नाश
पावलों नाहीं. १० आह्मी प्रभु येशूचें मरण
सर्वदां शरिरांत बाळगून फिरतों, येशूचें जीवनहि
आमच्या शरिराकडून प्रसिद्ध व्हावें ह्मणून. ११
कां कीं जे आह्मी जगतों ते येशूमुळें सर्वदा मर-
णाला सोपलेले आहों, येशूचें जगणेंहि आमच्या
मरणाऱ्या देहाकडून प्रगट व्हावें ह्मणून. १२ तर
आह्मामध्यें मरण घडतें, पण तुह्मामध्यें जीवन.
१३ परंतु मी विश्वासलों यास्तव बोललों, असें जें
लिहिलें त्याप्रमाणें, आह्मास विश्वासाचा तोच
आत्मा असतां, आह्मीहि विश्वास धरितों व त्या-
मुळें बोलतों; १४ कारण हें आह्मास ठाऊक

आहे कीं, ज्याने प्रभु येशूला उठविलें तो येशू-
ड्डून आह्मासहि उठवील, आणि तुमच्या बरोबर
र्भे करील. १५ कां तर सर्व गोष्टी तुह्माकरितां
ाहेत, यासाठीं कीं जी कृपा विशेष झाली, ती
हुतांच्या उपकारस्तुतीकडून देवाचें मोठें गौरव
ोण्याला कारण व्हावी. १६ यास्तव आह्मी
कत नाहीं, परंतु जरी आमचें बाहेरील मनुष्य-
ण नाहींसें होतें तरी आंतील दिवसोदिवस नवें
ोत जातें. १७ कां कीं आमचें क्षणिक हलकेंच
ंकट, हें आह्मासाठीं पराकाष्ठेच्या पराकाष्ठेने गौर-
ाचा अनंतकालिक भार घडवितें. १८ जीं
ेसतात त्यांकडे तर आह्मी दृष्टि लावीत नाहीं,
र जीं दिसत नाहींत त्यांकडे, कारण कीं जीं दिस-
ात तीं क्षणभंगुर, परंतु जीं दिसत नाहींत तीं
भनंतकाळचीं आहेत.

## अध्याय ५.

कां तर आह्मास ठाऊक आहे कीं, आमचें
पृथ्वीवरील मांडवाचें घर मोडून मेलें, तर
भाकाशामध्यें देवाची रचना, हाताने केलेलें नाहीं
असें सर्वकाळचें घर आह्मास आहे. २ अणखी
ांत असतां आपल्या आकाशांतील घराकडून झांका-
ास फार इच्छा धरून आह्मी कण्हतों; ३
असें कीं झांकलेले असतां आह्मी नागवे सांपडणार
नाहीं. ४ कारण कीं जे या मांडवांत आहों, ते
आह्मी व्याकुळ होऊन कण्हतों; आह्मी वस्त्र
ेडायास इच्छितों असें नव्हे, तर पांघरायास
इच्छितों, जें मरणारें तें जीवनाने गिळावें ह्मणून.
५ आणि ज्याने आह्मास याकरितांच तयार केलें तो
देव आहे, त्याने आह्मास आत्म्याचा विसाराहि
दिल्हा आहे. ६ यास्तव आह्मी सर्वदां धैर्य
धरितों व असें जाणतों कीं, शरिरांत वस्ती
करीत असतां आह्मी प्रभूपासून प्रवासी आहों.
७ कां कीं आह्मी दृष्टीने नव्हे, तर विश्वासाने
चालतों. ८ तर आह्मी धैर्य धरितों, आणि शरि-
राबाहेर प्रवास करून प्रभूपाशीं वस्ती करणें, हें
आह्मास विशेष आवडतें.

९ यास्तव वस्तींत असलों किंवा प्रवासांत
असलों, तरी आह्मी त्याला आवडते होण्यास
झटतों. १० कां कीं आह्मा सर्वांस ख्री-
स्ताच्या न्यायासनासमोर उभें राहिलें पाहिजे,
यासाठीं कीं प्रत्येकाने शरिरांत असतां जें जें केलें
तें बरें असो किंवा वाईट असो, त्याप्रमाणें फळ
पावावें. ११ यास्तव आह्मी प्रभूची धास्ती जाणून
माणसांची समजूत करितों; आणि आह्मी देवाज-
वळ प्रगट आहों, आणि तुमच्या मनांसहि प्रगट
होऊं असी आशा मी धरितों. १२ कां कीं
आह्मी आपणास तुह्माजवळ फिरून वाखाणीत
नाहीं, तर तुह्मास आह्माविषयीं नावाजून घेण्याचें
निमित्त देतों, यासाठीं कीं जे अंतःकरणांत नव्हे
पण बाहेर मात्र नावाजून घेतात, त्यांस तुह्मी उत्तर
देण्यास शक्तिमान असावें. १३ कां कीं आह्मी
भ्रांत आहों तर हें देवासाठीं, आणि आह्मी
सावधहि आहों, तर हें तुह्मासाठीं आहे. १४
कारण कीं ख्रीस्ताची प्रीति आह्मास प्रेरित करिती,
आह्मी तर असें ठरवितों कीं, एक सर्वांसाठीं
मेला तर सर्व मेले; १५ आणि तो सर्वांकरितां
यासाठीं मेला कीं जे जगतात त्यांनी पुढें आपणां-
साठीं नव्हे, तर आपणांकरितां जो मेला व उठला
त्यासाठीं जगावें. १६ यास्तव आतांपासून आह्मी
कोणाला देहाप्रमाणें जाणत नाहीं; आणि जरी
आह्मी ख्रीस्ताला देहाप्रमाणें जाणिलें होतें, तरी
आतांपासून पुढें तसें जाणत नाहीं. १७ यास्तव
कोणी ख्रीस्ताकडे आहे तर तो नवा उत्पन्न आहे,
जुनीं होऊन गेलीं; पाहा, अवघीं नवीं झालीं आहेत.
१८ परंतु हें सर्व देवापासून आहे; त्याने आपणासीं
आमचा समेट येशू ख्रीस्ताकडून करविला, आणि
समेटाची सेवा आह्मास दिल्ही आहे. १९
ह्मणजे देव ख्रीस्ताकडून आपणासीं जगाचा समेट
करून, त्यांचीं पातकें त्यांसीं मोजीत नाहीं; आणि
त्याने समेटाचें वचन आह्माजवळ ठेविलें आहे.
२० यास्तव आह्मी ख्रीस्तासाठीं वकिली करितों,
देव आह्माकडून बोध करवीत असल्यासारिखा
आहे; आह्मी ख्रीस्ताकरितां विनंती करितों कीं,
तुह्मी देवासीं समेटाने मिळावें. २१ कारण कीं
ज्याने पाप जाणिलें नाहीं त्याला त्याने आह्माकरितां
पाप असें केलें, यासाठीं कीं आह्मी त्याकडून देवाचें
न्यायीपण असें व्हावें.

## अध्याय ६.

तर संगतीं काम करणारे आह्मी विनंती करितों
कीं, तुह्मी देवाची कृपा व्यर्थ अंगीकारूं नये.
२ कां तर तो ह्मणतो कीं, मान्य झालेल्या वेळेस
म्या तुझें ऐकिलें आहे, व तारणाच्या दिवसीं तुझें
सहाय केलें आहे. पाहा, आतांच मान्यतेची वेळ,

पाहा, आतांच तारणाचा दिवस आहे. ३ आह्मी
कोणाला कांहीं अडखळण देत नाहीं, यासाठीं कीं
आपल्या सेवेवर दोष लागूं नये. ४ परंतु सर्व
प्रसंगीं आह्मी देवाचे सेवक असें आपणांस दाख-
वितों; फार सहनतेने, संकटानी, गरजानी, पेंचानी,
५ फटक्यानी, कैदानी, दंग्यानी, कष्टानी, जागरानी,
उपासानी, ६ शुद्धपणाने, ज्ञानाने, सहनशीलतेने,
उपकारिकपणाने, पवित्र आत्म्याने, निष्कपट प्रीतीने,
७ खरेपणाच्या वचनाने, देवाच्या सामर्थ्याने, उज-
वीकडे व डावीकडे न्यायीपणाच्या शस्त्राकडून, ८
सन्मान व अपमान यांकडून, अपकीर्त्ति व सत्कीर्त्ति
यांकडून, फसविणारे असे मोजलेले तरी खरे आहों,
९ अनोळख्यांसारिखे, तरी चांगल्या ओळखीचे;
मरणाऱ्यांसारिखे तरी पाहा, आह्मी जगतों; शिक्षा
पावल्यांसारिखे तरी जिवें मारलेले नाहीं; १०
खिन्नांसारिखे, तरी सर्वदा आनंद करणारे; दरिद्र्यां-
सारिखे, तरी बहुतांस धनवान करणारे; आपल्यांस
कांहीं नसल्यासारिखे, तरी अवघ्यांचे मालक आहों.
११ अहो करिंथकरानो, तुह्मासाठीं आमचें
तोंड उघडलें आहे, आमचें अंतःकरण विस्तारिलें
आहे. १२ तुह्मी आमच्या ठायीं संकोचित झाला
नाहीं, तर आपल्या कळवळ्याविषयीं संकोचित
झाला आहां. १३ तर हीच फेड, तुह्मीहि विस्ता-
रलेले व्हा; जसें लेंकरांस तसें मी तुह्मास सांगतों.
१४ तुह्मी अविश्वास्यांच्या जोडीचे होऊं नका;
कां कीं न्यायीपण व अधर्म यांचा काय संबंध?
आणि उजेड व अंधार यांचा काय भागीपणा?
१५ ख्रीस्ताचा बलियालाशीं काय मेळ? विश्वास-
णाऱ्याचा अविश्वास्याशीं काय विभाग? १६
आणि देवाच्या देवळाचा मूर्त्तीशीं काय संबंध?
तुह्मी तर जिवंत देवाचें देऊळ आहां; देवाने तसें
ह्मटलें आहे कीं, मी त्यांच्या मध्यें वस्ती करीन व
चालेन; आणि मी त्यांचा देव होईन व ते माझे
लोक होतील. १७ यास्तव त्यांमधून निघून वेगळे
व्हा, असें प्रभु सांगतो, आणि अपवित्राला शिवूं
नका, ह्मणजे मी तुह्मास अंगीकारीन; १८ आणि
मी तुमचा बाप असा होईन, आणि तुह्मी माझे
पुत्र व कन्या असीं व्हाल; असें सर्वसत्ताधारी
प्रभु ह्मणतो.

### अध्याय ७.

यास्तव अहो प्रियानो, आह्मास हीं वचनें आहेत,
ह्मणून आह्मी आपणांस देहाच्या व आत्म्या-
च्या सर्व अशुद्धपणापासून शुद्ध करून देवाच्या
भयाने पवित्रपण पूर्ण करावें.
२ आमचा अंगीकार करा; आह्मी कोणाचा
अन्याय केला नाहीं, कोणाला बिघडिलें नाहीं,
कोणाला ठकविलें नाहीं. ३ दोष लावण्यासाठीं
मी बोलत नाहीं; कां तर म्यां पूर्वी सांगितलें होतें
कीं, संगतीं मरावें व संगतीं जगावें, असे तुह्मी आ-
मच्या अंतःकरणांत आहां. ४ मला तुह्माशीं
बोलायास फार प्रशस्तपण आहे, मला तुह्माविषयीं
फार नावाजणूक आहे; मी शांतवनाने भरलों आहें,
आमच्या सर्व संकटांत मी आनंदाने परिपूर्ण आहें.
५ आह्मी तर मकदन्यांत आल्यावर आमच्या
देहाला कांहीं चैन नव्हतें, आणि आह्मी सर्व प्रकारें
संकटांत होतों; बाहेर भांडणीं, आंत भयें होतीं.
६ तथापि दीनांचें शांतवन करणारा देव याने तित-
साच्या येण्याकडून आमचें शांतवन केलें. ७
आणि त्याच्या येण्याकडून केवळ नाहीं, तर त्याला
तुह्माविषयीं जें शांतवन झालें त्याकडूनहि; त्याने
तर तुमची उत्कंठा, तुमचा शोक, तुमचा मजवि-
षयींचा आवेश, हीं आह्मास सांगितलीं, त्यावरून
मी विशेष आनंद पावलों. ८ कां कीं म्यां पत्राने
तुह्मास खेद दिल्हा तरी मला पस्तावा होत नाहीं,
मला तर पस्तावा झाला होता खरा; कां कीं त्या
पत्राने तुह्मास घटकाभर तरी खेद दिल्हा, असें
माझ्या दिसण्यांत येतें. ९ तरी आतां मी आनंद
करितों, तुह्मास खेद झाला यावरून नव्हे, तर
पश्चात्ताप होण्याजोगा तुह्मास खेद झाला यावरून:
कां कीं तुह्मास देवसंबंधी खेद झाला, यासाठीं कीं
आह्माकडून कोणत्याहि गोष्टीविषयीं तुमची हानि
घडूं नये. १० कारण कीं देवसंबंधी खेद हा
पस्तावा होण्याजोगा नाहीं असा पश्चात्ताप तारण
होण्यासाठीं घडवितो, परंतु जगसंबंधी खेद मरण
घडवितो. ११ कारण कीं पाहा, त्याच गोष्टीने
ह्मणजे तुह्मास देवसंबंधी खेद झाला त्याने तुह्मास
केवढी काळजी व दोष घालविणें व संताप व भय
व उत्कंठा व आवेश व न्याय करणें उत्पन्न झालें.
या कामांत तुह्मी आपणांस सर्व प्रकारें निर्दोष असें
दाखविलें. १२ तर म्यां तुह्मास लिहिलें तरी
ज्याने अन्याय केला त्याच्या साठीं नव्हे, आणि
ज्याचा अन्याय झाला त्याच्या साठींहि नव्हे, तर
देवाच्या दिसण्यांत तुह्मासाठीं आमची काळजी
तुह्मास प्रगट व्हावी ह्मणून लिहिलें. १३ यामुळें

तुमच्या शांतवनावरून आह्मी शांतवन पावलों,
आणि विशेषेंकरून तितसाच्या आनंदावरून आह्मी
फारच आनंद पावलों, कां कीं तुह्मा सर्वांकडून त्या-
च्या आत्म्याला शांति झाली. १४ वास्तव म्या
त्याजवळ तुह्माविषयीं कांहीं नावाजून घेतलें, तरी
मी लाजत नाहीं; तर जसे आह्मी तुह्मासीं सर्व
गोष्टी खरेपणाने बोललों, त्याप्रमाणें तितसाजवळ
आमची नावाजणूकहि खरीच झाली आहे. १५
आणि तुह्मी भयाने व कांपण्याने त्याचा अंगीकार
कसा केला, याविषयीं जी तुह्मा सर्वांची मान्यता,
ती तो आठवीत असतां, त्याची ममता तुह्माविषयीं
फारच आहे. १६ मला सर्व प्रकारें तुमचा भर-
वसा आहे, ह्मणून मी आनंद करितों.

## अध्याय ८.

आतां अहो भावानो, देवाची जी कृपा मकद-
न्यांतील मंडळ्यांवर झाली, ती आह्मी तुह्मास
कळवितों; २ कीं संकटाच्या मोठ्या पेंचांत, त्यां-
च्या आनंदाचा अतिशय व त्यांचें अत्यंत दरिद्र,
यांमध्यें त्यांचें मोठें उदारपण झालें. ३ कां तर
मी साक्ष देतों कीं, ते शक्तीप्रमाणें व शक्तीपेक्षां
अधिक, आपले आपण तयार होते. ४ त्यानी
फार विनंती करून आह्माजवळ मागितलें कीं, आह्मी
धर्मादाय ह्मणजे पवित्रांच्या उपयोगासाठीं वर्गणीचें
दान, तें घ्यावें. ५ आणि जसी आह्मी आशा
धरिली होती तसें नाहीं, तर त्यानी आपणांस
पहिल्याने प्रभूला दिल्हें, मग देवाच्या इच्छेप्रमाणें
आह्माला दिल्हें. ६ यास्तव आह्मी तितसाजवळ
असें मागितलें कीं, जसा त्याने पूर्वी प्रारंभ केला
होता, तसीच त्याने या उपकाराची समाप्तिहि
तुह्मामध्यें करावी. ७ तर जसे तुह्मी सर्व गोष्टींत
ह्मणजे विश्वासांत व बोलण्यांत व ज्ञानांत व सर्व
उद्योगांत व आह्मावरील आपल्या प्रीतींत वाढला
आहां, तसें तुह्मी या उपकारांतहि फार वाढावें. ८
मी आज्ञा करून बोलत नाहीं, तर दुसऱ्यांच्या
उद्योगामुळें, आणि तुमच्या प्रीतीच्या खरेपणाची
परीक्षा पाहावी ह्मणून. ९ कां तर आमच्या प्रभु
येशू ख्रीस्ताची कृपा तुह्मी जाणतां कीं, तो धनवान
असतां तुह्माकरितां दरिद्री झाला, यासाठीं कीं
तुह्मी त्याच्या दरिद्राने धनवान व्हावें. १० आणि
याविषयीं मी सम्मत देतों, कां कीं हें तुह्मास उप-
योगी आहे; तेच तुह्मी तर एका वर्षामागें तें करा-
यास केवळ नाहीं, तर त्याची आवड धरायासहि
लागलां. ११ तर आतां हें करणेंहि समाप्त करा,
ह्मणजे जसी आवड धरण्याची उत्कंठा होती, तसें
तुमचें जें आहे त्यांतून समाप्त करणेंहि व्हावें. १२
कां कीं उत्कंठा असली तर जें कोणाजवळ नाहीं
त्याप्रमाणें नव्हे, तर जें आहे त्याप्रमाणें तो मान्य
आहे. १३ कां तर दुसऱ्यांची सुटका व तुह्मास
संकट व्हावें असें नाहीं; १४ परंतु समानतेने
या हल्लींच्या काळीं तुमच्या भरपुराने त्यांची गरज
व्हावी; यासाठीं कीं, त्यांच्या भरपुराने तुमची गरज
व्हावी, ह्मणजे समानता व्हावी; १५ लिहिलें
आहे त्याप्रमाणें कीं, ज्याचें फार त्याचें उरलें
नाहीं, आणि ज्याचें थोडें त्याचें कमी झालें
नाहीं.

१६ तर ज्याने तितसाच्या अंतःकरणांत तुह्मा-
साठीं तसीच काळजी घातली त्या देवाची उपकार-
स्तुति असो. १७ कां कीं त्याने विनंती मानून
घेतली, आणि तो फार काळजी धरून आपल्या
आपण तुह्माकडे निघाला. १८ आणि त्याच्या
संगतीं आह्मी असा भाऊ पाठविला आहे कीं,
शुभवर्त्तमानाविषयीं त्याची स्तुति सर्व मंडळ्यांत
आहे. १९ आणि असें केवळ नाहीं, तर मंड-
ळ्यांकडून तो निवडलेला आहे, यासाठीं कीं हा
जो उपकार त्याच प्रभूचें गौरव व तुमची उत्कंठा
दाखविण्यासाठीं आह्माकडून सेवलेला, त्याविषयीं
तो आमच्या संगतीं प्रवासी व्हावा. २० कां
कीं ज्याविषयीं आह्माकडून सेवा घडली, त्या द्रव्या-
विषयीं कोणी आह्मावर दोष लावूं नये, ह्मणून
आह्मी संभाळून आहों. २१ प्रभूच्या दिसण्यांत
केवळ नाहीं, तर माणसांच्या दिसण्यांतहि जें चांगलें
तें आह्मी योजितों. २२ अणखी त्याच्या संगतीं
आह्मी असा भाऊ पाठविला आहे कीं, त्याची परीक्षा
आह्मी बहुत गोष्टींविषयीं बहुत वेळ घेतली आहे;
तो उद्योगी आहे व आतां तुह्मावर फार भरवस्या-
वरून तो फार विशेष उद्योगी आहे. २३ तित-
साविषयीं तर, तो माझा भागीदार व तुह्मासाठीं
संगतीचा कामकरी आहे; अथवा आमचे भाऊ
यांविषयीं तर, ते मंडळ्यांचे प्रेषित ख्रीस्ताचें गौरव,
असे आहेत. २४ यास्तव तुह्मी आपल्या प्रीती-
चें, आणि आमचें तुह्माविषयीं जें नावाजून घेणें
त्याचें प्रमाण त्यांजवळ आणि मंडळ्यांच्या देखतां
प्रगट करून दाखवा.

## अध्याय ९.

तर पवित्रांसाठीं जी वर्गणी तिजविषयीं म्या तुह्मास
लिहावें याची गरज नाहीं ; २ कां कीं तुमची
उत्कंठा मला ठाऊक आहे ; तिजवरून म्या तुह्मास
मकदनी लोकांजवळ वाखाणून ह्मटलें होतें कीं,
अखाया एका वर्षामागें तयार झाला होता, आणि
तुमच्या आवेशाने बहुतांस चेतविलें आहे. ३
तथापि या प्रकरणीं तुह्माविषयीं आमची नावाजणूक
व्यर्थ होऊं नये, ह्मणून म्या भावांस पाठविलें
आहे, यासाठीं कीं म्या सांगितलें होतें तसें तुह्मी
तयार व्हावें. ४ नाहीं तर कदाचित मकदनी मनुष्य
माझ्या संगतीं आले, आणि तुह्मी तयार नाहीं
असें त्यानी पाहिलें, तर आह्मास (तुह्मास तर
ह्मणत नाहीं) या नावाजण्याच्या निर्धारावरून लाज
वाटेल. ५ तर मला हें अगत्य वाटलें कीं,
भावांजवळ असें मागावें कीं, यानी तुह्माजवळ पुढें
जाऊन पूर्वी सांगितलेला तुमचा धर्मादाय तयार
करवावा, यासाठीं कीं तें सिद्ध करणें लोभिष्ठपणाने
झाल्यासारिखें होऊं नये, तर जसा धर्मादाय व्हावा
तसें. ६ तर असें कीं, जो चुंबकपणानें पेरितो तो
चुंबकपणाने कापणीहि करील, आणि जो उदारपणाने
पेरितो तो उदारपणाने कापणीहि करील. ७ प्रत्येक
आपल्या अंतःकरणांत जसी योजना करितो त्याप्र-
माणें त्याने द्यावें ; खेदाने किंवा अगत्याने नये ;
कां कीं संतोषाने देणाऱ्यावर देव प्रीति करितो.
८ आणि देव सर्व प्रकारची कृपा तुह्मावर वाढवि-
ण्यास शक्तिमान आहे ; असा कीं तुह्मास सर्व
गोष्टींत संपूर्ण पुरवठा सर्वदां असतां, तुह्मी प्रत्येक
चांगल्या कामांत अधिकाधिक तत्पर असावें. ९
लिहिलें आहे त्याप्रमाणें कीं, त्याने पसरिलें आहे,
दरिद्र्यांस दिल्हें आहे, त्याचें न्यायीपण सर्वकाळ
राहतें. १० आतां जो पेरणाऱ्याला बीज पुरवितो
त्याने खाण्यासाठीं अन्न पुरवावें, आणि तुमची
पेरणी फार करवावी, आणि तुमच्या न्यायीपणाचें उत्पन्न
वाढवावें. ११ असें कीं तुह्मी पूर्ण उदारपण
करण्यासाठीं सर्व प्रकारें धनवान व्हावें, त्यावरून
आह्माकडून देवाची उपकारस्तुति घडती. १२ कां
कीं या सेवेचें काम पवित्रांच्या गरजा पुरवितें असें
केवळ नाहीं, तर देवाच्या बहुत उपकारस्तुतींवि-
षयीं फार सफळ होतें ; १३ ते तर या सेवेच्या
अनुभवावरून, ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमानाला तुमचें
प्रकरण्याप्रमाणें मान्य होणें यामुळें, आणि त्यांस
व सर्वांस जें तुमचें वांटून देण्याचें उदारपण त्यामु-
ळें, देवाचें गौरव करितात ; १४ अणखी तुह्मावर
देवाची अतिशय कृपा तिजवरून जे तुह्मावर फार
प्रीति करितात, त्यांच्या प्रार्थना तुह्माकरितां होतात.
१५ तर देवाच्या अनिर्वाच्य कृपादानामुळें त्याची
उपकारस्तुति होवो.

## अध्याय १०.

तर मी पौलस, समक्ष असतां तुह्मामध्यें दीन,
परंतु दूर असतां तुह्माविषयीं धीट आहें तो मी
स्वतां ख्रीस्ताच्या नम्रतेवरून व सौम्यतेवरून तुह्मा-
स विनंती करितों ; २ आणि मागतों कीं, कित्येक
आह्मास देहाप्रमाणें चालणारे असें मोजितात,
त्यांवर ज्या निर्धारानें मी धीटपण करायास योजितों,
त्याकडून म्या समक्ष झाल्यावर धीट होऊं नये. ३
आह्मी तर देहाने चालत असताहि देहाप्रमाणें लढत
नाहीं. ४ कारण कीं आमच्या लढाईचीं हातेरें
दैहिक नाहींत, तर तीं कोट मोडून टाकायास देवा-
कडून शक्तिमान आहेत. ५ कुतर्क व सर्व प्रकार-
चा अभिमान देवाच्या ज्ञानाविरुद्ध चढतो, तो आह्मी
मोडून टाकितों, आणि ख्रीस्ताला मान्य होण्यासाठीं
प्रत्येक भावना पाडाव करितों ; ६ आणि तुमचें
मानणें पूर्ण होईल तेव्हां सर्व अमान्य होणें याला
दंड करावा, ह्मणून आह्मी सिद्ध आहों.
७ बाहेरल्या गोष्टी मात्र पाहतां काय? जर
कोणाला आपल्याविषयीं भरवसा आहे कीं आपण
ख्रीस्ताचा आहें, तर त्याने स्वतां फिरून हा विचार
करावा कीं, जसा तो ख्रीस्ताचा तसे आह्मीहि
ख्रीस्ताचे आहों. ८ तर जो आमचा अधिकार,
प्रभूने तुमच्या नाशासाठीं नव्हे, तर वृद्धिसाठीं आ-
ह्मास दिल्हा, त्याविषयीं जरी मी कांहीं विशेषहि
नावाजणूक करितों, तरी मी लाजणार नाहीं. ९
तथापि असें करणार नाहीं, यासाठीं कीं म्या
पत्रांकडून तुह्मास भय घातल्यासारिखें दिसूं नये.
१० कां तर ते ह्मणतात कीं त्यांचीं पत्रें वजनदार
व बलिष्ट खरीं, परंतु शरीर दिसण्यांत अशक्त,
आणि बोलणें तुच्छ आहे. ११ तस्या माणसानें
असें समजावें कीं, आह्मी दूर असतां असें पत्रांक-
डून बोलण्याने आहों, तसेच आह्मी समक्ष झाल्या-
वर करण्यानेहि होऊं.
१२ कारण कीं कित्येक आपणास वाखाणितात,

त्यांबरोबर आह्मी आपणांस मोजायाला अथवा
ताडून पाहायाला धजत नाहीं; ते तर आपणाक-
डून आपणांस मोजीत असतां आणि आपणांसीं
आपणांस ताडून पाहत असतां, समजत नाहींत.
१३ परंतु आह्मी आपल्या मर्यादेच्या पलिकडल्या
गोष्टींविषयीं नावाजणूक करणार नाहीं, तर जी निय-
मित मर्यादा देवानें आह्मास लावून दिल्ही तिज-
प्रमाणें; ती मर्यादा तुह्मापर्यंतहि पोहंचत आहे.
१४ कां कीं तुह्मापर्यंत पोहंचत नसल्यासारिखे
आह्मी आपणांस फार ताणितों असें नाहीं; कारण
कीं ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान सांगण्यानें आह्मी तुह्मा-
पर्यंतहि पोहंचलों आहों. १५ आह्मी आपल्या
मर्यादेच्या पलिकडल्या गोष्टींविषयीं दुसऱ्याच्या
श्रमानीं नावाजून घेत नाहीं; तर आह्मास असी
आशा आहे कीं, तुमचा विश्वास वाढल्यावर, आह्मी
आपल्या नेमाप्रमाणें तुह्माकडून अतिशय वाढलेले
असे होऊं. १६ यासाठीं कीं तुमच्या पलिकड-
ल्या प्रांतांमध्यें आह्मी शुभवर्त्तमान सांगावें; दुस-
ऱ्याच्या नेमानें तयार झालेल्या गोष्टींविषयीं नावा-
जून घेऊं नये. १७ परंतु नावाजून घेणारा प्रभू-
विषयीं नावाजून घेवो. १८ कां कीं आपणाला
वाखाणणारा पटलेला नाहीं, तर ज्याला प्रभु वा-
खाणितो तो.

## अध्याय ११.

तुह्मी माझें मूर्खपण थोडेंसें सहन करावें असी
माझी इच्छा आहे, तर माझें सहन करा. २
कां तर मला देवाच्या आवेशानें तुह्मासाठीं आवेश
आहे, कारण कीं म्या एका नवऱ्यासाठीं तुह्मास
योजिलें आहे, असें कीं म्या [तुह्मास] पवित्र कु-
मारी असें ख्रीस्ताला सादर करून द्यावें. ३ प-
रंतु असें सापानें आपल्या धूर्त्तपणानें हव्वेला ठक-
विलें, तसें ख्रीस्ताकडील सरळपण यापासून तुमचीं
मनें कशानेंहि बिघडतील, असें मला भय आहे.
४ कां कीं कोणी येऊन, ज्या दुसऱ्या येशूला
आह्मी गाजविलें नाहीं त्याला गाजवितो, किंवा ज्या
दुसऱ्या आत्म्याला तुह्मी घेतलें नव्हतें तो, अथवा
जें दुसरें शुभवर्त्तमान तुह्मी अंगीकारिलें नव्हतें तें
जर आतां घेतां, तर तुह्मी सहन करावें हें योग्य.
५ परंतु श्रेष्ठ प्रेषितांपेक्षां मी कांहींच उणा नाहीं,
असें मी मानितों. ६ आणि जरी बोलण्यांत
अशिक्षित तरी ज्ञानांत नाहीं; तर आह्मी सर्व प्र-
कारें सर्व गोष्टींविषयीं तुह्मामध्यें प्रगटच आहों.
७ तुह्मी उंच व्हावें ह्मणून म्या आपणाला नीच
केलें, ह्मणजे देवाचें शुभवर्त्तमान म्या मोलावांचून
तुह्मास सांगितलें, यांत म्या पाप केलें काय? ८
तुमच्या सेवेसाठीं म्या दुसऱ्या मंडळ्यांपासून मजुरी
घेऊन त्यांस लुटलें; ९ आणि तुह्माजवळ होतों
तेव्हां मला उणें पडलें असतांहि, म्या कोणावर
भार घातला नाहीं; कारण कीं मकदन्याहून आलेले
भाऊ यानीं माझी गरज पुरविली, आणि सर्व प्रकारें
म्या आपणाला तुह्मावर भार घातल्यावांचून राखिलें
आहे आणि राखीन. १० ख्रीस्ताचें खरेपण मज-
मध्यें आहे, [तसा निश्चय आहे] कीं, अखाया
प्रांतांतील कोणीहि माझी ही नावाजणूक कुंठित
करणार नाहीं. ११ कशासाठीं? मी तुह्मावर
प्रीति करीत नाहीं काय? देवाला ठाऊक आहे.
१२ परंतु जें मी करितों तें करीन, यासाठीं कीं जे
निमित्त पाहतात त्यांचें निमित्त म्या नाहींसें करावें,
ह्मणजे ज्यावरून ते नावाजून घेतात त्याविषयीं ते
आह्मासारिखेच दिसून यावे. १३ कां कीं असे
जे ते खोटे प्रेषित, कपटानें काम करणारे, ख्रीस्ताच्या
प्रेषितांचें सोंग धरणारे आहेत. १४ आणि हें
आश्चर्य नाहीं, कां कीं सैतानदेखील तेजस्वी दुताचें
सोंग धरितो; १५ यास्तव त्याचे सेवकहि जर
न्यायीपणाच्या सेवकाचें सोंग धरितात, तर ही
मोठी गोष्ट नाहीं; त्यांचा परिणाम त्यांच्या कामां-
प्रमाणें होईल. १६ मी फिरून ह्मणतों कीं, कोणी
मला मूर्ख असें समजूं नये; परंतु असें समजला,
तर जसा मूर्खाचा तसा माझा अंगीकार करा,
यासाठीं कीं म्या कांहीं तरी आपली नावाजणूक
करावी. १७ नावाजणुकीच्या या निर्धारानें जें मी
बोलतों तें प्रभूप्रमाणें बोलत नाहीं, तर मूर्खपणानें
तसें. १८ देहाप्रमाणें बहुत नावाजणूक करितात,
ह्मणून मीहि नावाजणूक करीन. १९ कां कीं तुह्मी
शाहाणे असतां, खुशीनें मूर्खांचें सहन करितां.
२० कां कीं जर कोणी तुह्मास दासपणांत घालितो,
जर कोणी खाऊन टाकितो, जर कोणी हरण करितो,
जर कोणी आपल्याला थोर ह्मणवितो, जर कोणी
तुमच्या तोंडांत मारितो, तर तुह्मी सहन करितां.
२१ आह्मी अशक्त असल्याप्रमाणें मी अपमाना-
विषयीं बोलतों; परंतु ज्याविषयीं कोणी धीट असेल,
त्याविषयीं मीहि धीट आहें; हें मी मूर्खपणानें बो-
लतों. २२ ते इब्री आहेत काय? मीहि; ते

इस्राएली आहेत काय? मीहि; ते आब्राहामाचें
संतान आहेत काय? मीहि; २३ ते ख्रीस्ताचे
सेवक आहेत काय? मी मूर्खपणाने बोलतों, मी
अधिक; म्या श्रम फार अधिक केले, फटके पराकाष्ठेचे
सोसिले, कैदेंत मी फार वेळ, मरणाच्या संकटांत वारं-
वार होतों. २४ पांच वेळा म्या यहूद्यांपासून एकुण-
चाळीस फटके सोसून घेतले; २५ तीन वेळा म्या
छड्यांनी मार खाल्ला, एकदा मला धोंडमार झाला,
तीन वेळा नाव फुटण्याच्या प्रसंगांत होतों, म्या समु-
द्रडोहांत अहोरात्र घालविला; २६ बहुत वेळ
वाट चालण्यांमध्यें, नद्यांच्या संकटांमध्यें, लुटाऱ्यां-
च्या संकटांमध्यें, स्वजातीच्या संकटांमध्यें, विदेशी
लोकांच्या संकटांमध्यें, नगरांतील संकटांमध्यें, राना-
तील संकटांमध्यें, समुद्रांतील संकटांमध्यें, खोट्या
भावांच्या संकटांमध्यें, २७ श्रमामध्यें व कष्टा-
मध्यें, बहुत वेळ जागरांमध्यें, भूक व ताहान यांमध्यें,
बहुत वेळ उपासांमध्यें, थंडीमध्यें व उघडेपणामध्यें.
२८ बाहेरल्या गोष्टींखेरीज माझा रोजचा रगडा,
ह्मणजे सर्व मंडळ्यांची चिंता. २९ कोण अशक्त
झाला असतां, मी अशक्त होत नाहीं? कोण अड-
खळविला असतां, मला संताप होत नाहीं? ३०
नावाजणूक केली पाहिजे, तर मी आपल्या अशक्त-
पणाच्या गोष्टींविषयीं नावाजणूक करीन. ३१ देव
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताचा बाप, सर्वकाळ
स्तुतिमान्य, याला ठाऊक आहे कीं, मी खोटें बोलत
नाहीं. ३२ दमेसेकांत अरतास राजाचा देशाधि-
कारी याने मला धरायास पाहत असतां, दमेसेक-
करांच्या नगरावर पाहरा ठेविला; ३३ परंतु मला
पाटींत बसवून खिडकींतून गांवकुसावरून उतरविलें,
आणि त्याच्या हातांतून मी निभावलों.

## अध्याय १२.

नावाजणूक करणें हें मला शोभत नाहीं खरें, तर
मी प्रभूचे साक्षात्कार व प्रगटविणीं यांच्या
वर आईन. २ चवदा वर्षांमागें ख्रीस्ताकडील
माणूस मला कळला होता, तो शरिरांत होता हें
मला ठाऊक नाहीं, किंवा शरिराबाहेर होता हेंहि
मला ठाऊक नाहीं, देवाला ठाऊक आहे; त्याला
तिसऱ्या आकाशांत अकस्मात नेलें. ३ आणि तोच
माणूस शरिरांत किंवा शरिराबाहेर हें मला ठाऊक
नाहीं, देवाला ठाऊक आहे, त्याविषयीं मला असें
कळलें कीं,. ४ त्याला सौख्यलोकांत अकस्मात
नेलें, आणि जीं अनिर्वाच्य वाक्यें माणसाला बोल-
यास योग्य नाहींत, तीं त्याने ऐकिलीं. ५ अशा
मनुष्याची मी नावाजणूक करीन, परंतु मी आपली
नावाजणूक करणार नाहीं, आपल्या अशक्तपणाविषयीं मात्र.
षयीं मात्र. ६ कां कीं म्या नावाजणूक करायास
इच्छिलें तरी मी मूर्ख होणार नाहीं, कां तर मी
खरेंच बोलेन; परंतु मी राहूं देतों, यासाठीं कीं मी
जें आहें ह्मणून कोणी पाहतो, किंवा मजपासून जें
कांहीं ऐकतो, त्यापेक्षां त्याने मला अधिक मानूं नये.
७ आणि प्रगटविण्यांच्या अतिशयामुळें म्या
माजूं नये, ह्मणून माझ्या देहामध्यें कांटा, सैतानाचा
दूत मला बुकी मारण्याकरितां ठेविलेला होता; म्या
माजूं नये ह्मणून. ८ याविषयीं म्या प्रभूजवळ
तीनदां विनंती केली कीं, हा मजपासून दूर व्हावा.
९ परंतु तो मला ह्मणाला, माझी कृपा तुला पुरे
आहे, कां कीं माझी शक्ति अशक्तपणांत पूर्ण होती.
तर ख्रीस्ताची शक्ति मजवर राहावी, ह्मणून मी
आपल्या अशक्तपणाविषयीं अतिहर्षे विशेष नावाज-
णूक करीन. १० वास्तव ख्रीस्तामुळें अशक्तपण,
छळणुका, गरजा, पाठलाग, अडचणी, हीं सोसण्या-
वरून मी संतुष्ट आहें; कां कीं मी अशक्त आहें
तेव्हां मी शक्तिमान आहें. ११ मी नावाजणूक
करण्याने मूर्ख झालों, तुह्मी मला अगत्यांत घातलें
आहे, कां कीं तुह्मी माझी वाखाणणूक करायाची
होती; कारण कीं जरी मी कांहीं नाहीं, तरी श्रेष्ठ
प्रेषितांहून मी कांहीं उणा नाहीं.
१२ अद्भुतें व उत्पात व चमत्कार यांकडून
प्रेषितांचीं चिन्हें तुह्मामध्यें अवघ्या सहनतेने नि-
श्चयें घडलीं होतीं. १३ कां कीं म्या स्वतां तुह्मा-
वर भार घातला नाहीं, याखेरीज ज्यांत तुह्मी
दुसऱ्या मंडळ्यांपेक्षां उणे होतां, असें काय आहे?
या माझ्या अपराधाची क्षमा करा. १४ पाहा,
तिसरेंदां मी तुह्माजवळ येण्यास तयार आहें, आ-
णि मी तुह्मावर भार घालणार नाहीं, कां कीं मी
तुमच्या मालमत्तेस नव्हे, तर तुह्मास शोधितों:
कारण कीं लेंकरांस आईबापांसाठीं नव्हे, तर आई-
बापांस लेंकरांसाठीं सांठविलें पाहिजे. १५ आणि
तुमच्या जीवात्म्यासाठीं मी अतिहर्षे खर्च करीन व
आपण खर्चण्यांत येईन; मी तुह्मावर जशी
अधिकाधिक प्रीति करितों तशी मजवर तुमची प्रीति
कमी असली, तरी. १६ बरें असो, म्या तुह्मावर
भार घातला नाहीं, तथापि धूर्त असतां म्या तुह्मास

कपटाने धरिलें. १७ ज्यांस म्या तुह्माजवळ पाठ-
विलें, त्यांतील कोणाकडून म्या तुमचें कांहीं हरण
केलें काय? १८ म्या तितसाजवळ विनंती केली,
आणि त्याबरोबर भाऊ पाठविला; तितसाने तुमचें
कांहीं हरण केलें काय? आह्मी एकाच आत्म्याने
एकाच पावलामध्यें चाललों कीं नाहीं?
१९ आह्मी आपणांस तुह्माजवळ फिरून निर्दोष
दाखवितों असें तुह्मास वाटतें काय? आह्मी देवा-
समक्ष ख्रीस्तसंबंधाने बोलतों; तर अहो प्रियानो,
सर्व गोष्टी तुमच्या वृद्धीसाठीं आहेत. २० कां
तर मला भय वाटतें कीं मी आल्यावर, असें मी
इच्छितों तसे कदाचित् तुह्मी मला सांपडणार नाहीं
आणि जसें तुह्मी इच्छीत नाहीं तसा मीहि तुह्मास
सांपडेन; ह्मणजे कदाचित् भांडणीं, आवेश, राग,
कलह, निंदा, चाहाड्या, अभिमान, अव्यवस्था, हीं
दिसून येतील; २१ ह्मणजे मी फिरून आल्या-
वर माझा देव मला तुह्माजवळ नीच करील;
आणि ज्यांनी पूर्वी पाप केलें होतें, परंतु आपलें
अशुद्धपण व व्यभिचार व कामातुरपण, त्यांनी
केलीं, त्यांचा पश्चात्ताप केला नाहीं, अशा बहुतां-
विषयीं मी शोक करीन.

### अध्याय १३.

आतां तिसऱ्याने मी तुह्माजवळ येतों; दोन
किंवा तीन साक्षीदारांच्या तोंडाने प्रत्येक
गोष्ट ठरेल. २ म्या पूर्वी सांगितलें होतें, व दुस-
ऱ्याने समक्ष असल्यासारिखा मी अगोदर सांगून
ठेवितों, आणि ज्यांनी पूर्वी पाप केलें त्यांस व दुस-
ऱ्या सर्वांस मी दूर असतां, आतां लिहितों कीं,
जर मी फिरून येतों तर ममता करणार नाहीं. ३
कारण कीं ख्रीस्त मजकडून बोलतो, याची परीक्षा
तुह्मी पाहतां; तो तर तुह्माविषयीं अशक्त नाहीं
पण तुह्मामध्यें शक्तिमान आहे. ४ कां कीं जरी
त्याला अशक्तपणाने खांबीं दिलें तरी तो देवाच्या
सामर्थ्याने जिवंत आहे; कां कीं आह्मीहि त्यामध्यें
अशक्त आहों, तरी तुह्माकडील देवाच्या सामर्थ्याने
त्याबरोबर जिवंत होऊं. ५ तुह्मी विश्वासांत आहां
किंवा नाहीं, याविषयीं आपली परीक्षा करा, आपली
प्रचीति पाहा; तुह्मी नाकारलेले नसलां, तर येशू
ख्रीस्त तुह्मामध्यें आहे असें तुह्मी आपणांस ओ-
ळखत नाहीं काय? ६ परंतु आह्मी नाकारलेले
नाहीं हें तुह्मी जाणाल, असी मला आशा आहे.
७ आणि मी देवाजवळ असी प्रार्थना करितों कीं,
तुह्मी कांहीं वाईट करूं नये; आह्मी पटलेले दिसावें
यासाठीं नाहीं, तर यासाठीं कीं आह्मी नाकारले-
ल्यांसारिखे असतांहि तुह्मी चांगलें करावें. ८
कां कीं खरेपणाविरुद्ध आह्मास कांहीं करितां येत
नाहीं, तर खरेपणासाठीं येतें. ९ तर जेव्हां
आह्मी अशक्त आहों आणि तुह्मी शक्तिमान आहां
तेव्हां आह्मी आनंद करितों; आणि तुमचें पूर्णपण
व्हावें असी प्रार्थनाहि करितों. १० मी दूर
असतां हें लिहितों, यासाठीं कीं प्रभूने जो अधि-
कार पाडण्यासाठीं नव्हे, तर रचण्यासाठीं मला
दिल्हा, त्याप्रमाणें म्या समक्ष झाल्यावर कठोरपण
करूं नये.
११ शेवटीं अहो भावानो, सुखरूप असा,
व्यवस्थित असा, समाधानी असा, एकचित्त असा,
शांत असा; मग प्रीतीचा व शांतीचा देव तुह्मा-
संगतीं होईल. १२ पवित्र चुंबनाने एकमेकांस
क्षेम द्या; १३ सर्व पवित्र तुह्मास सलाम सांग-
तात. १४ प्रभु येशू ख्रीस्ताची कृपा, आणि
देवाची प्रीति आणि पवित्र आत्म्याचें भागीपण
तुह्मा सर्वांस असो. आमेन.

# गलती यांस पौलसाचें पत्र.

### अध्याय १.

गलती यांतील मंडळ्या यांस जो पौलस माण-
सांपासून प्रेषित नव्हे, आणि माणसाकडूनहि
नव्हे, तर येशू ख्रीस्ताकडून, २ आणि त्याला
ज्या देव बापाने मेलेल्यांतून उठविलें, त्याकडून
झालेला, त्या माझा व माझ्या संगतीं सर्व भाऊ
यांचा सलाम. ३ देव बाप व आमचा प्रभु
येशू ख्रीस्त यापासून तुह्मास कृपा व शांति असो.
४ याने आपणाला आमच्या पापांकरितां यासाठीं
दिल्हें कीं, त्याने आमचा देव व बाप याच्या इच्छे-

प्रमाणें आह्मास या सांप्रतच्या दुष्ट युगापासून
सोडवावें. ५ त्याला गौरव सदासर्वकाळ असो.
आमेन.

६ मला आश्चर्य वाटतें कीं, ज्याने तुह्मास ख्री-
स्ताच्या कृपेंत बोलाविलें, त्यापासून तुह्मी इतके
लवकर दुसऱ्या शुभवर्त्तमानाकडे ढळलां आहां;
७ तें दुसरें नाहीं, केवळ जे तुह्मास खळबळवि-
तात व ख्रीस्ताचें शुभवर्त्तमान विपरीत करायाला
इच्छितात, असे कित्येक आहेत. ८ परंतु जें
शुभवर्त्तमान आह्मी तुह्माजवळ सांगितलें, त्याहून
निराळें शुभवर्त्तमान जर आह्मी किंवा आकाशांतील
दूत तुह्माजवळ सांगतो, तर तो शापित होवो.
९ जसें आह्मी अगोदर ह्मटलें तसें मी आतांहि
फिरून ह्मणतों कीं, जें तुह्मी स्वीकारिलें, त्याहून
निराळें शुभवर्त्तमान जर कोणी तुह्मास सांगतो,
तर तो शापित होवो. १० तर मी आतां माण-
सांस मनवितों किंवा देवाला? अथवा मी माण-
सांस संतोषवायाला ह्मटतों काय? कां जर म्या
अद्याप माणसांस संतोषविलें असतें, तर मी ख्री-
स्ताचा दास नसतों.

११ परंतु अहो भावानो, मी तुह्मास जाणवितों
कीं, जें शुभवर्त्तमान म्या सांगितलें तें माणसा-
प्रमाणें नव्हे; १२ कां तर तें मला माणसा-
पासून प्राप्त झालें नाहीं, आणि मला शिकविलेंहि
नाहीं, केवळ येशू ख्रीस्ताने प्रगटविल्यावरून.
१३ कारण कीं माझी पूर्वींची यहूदी धर्मांतली
वर्त्तणूक तुह्मी ऐकिली आहे कीं, म्या देवाच्या
मंडळीचा अत्यंत पाठलाग केला, आणि तिचा
नाश केला. १४ तेव्हां माझ्या पूर्वजांच्या संप्र-
दायांविषयीं अतिशयें आवेशी असतां माझ्या जा-
तींतील बहुत सोबत्यांपेक्षां मी यहूदी धर्मांत अधिक
प्रवीण झालों. १५ परंतु ज्या देवाने मला माझ्या
आईच्या पोटापासून वेगळें केलें व आपल्या कृपेकरून
बोलाविलें, त्याला हें बरें वाटलें कीं, १६ त्याने
आपला पुत्र मला प्रगट करावा, यासाठीं कीं म्या
त्याचें शुभवर्त्तमान विदेश्यांमध्यें सांगावें, तेव्हांच
मांस व रक्त यांचें अनुमत न घेतां, १७ आणि
जे माझ्या पूर्वीं प्रेषित होते त्यांजवळ यरूशलेमास
वर न जातां, मी अर्बस्थानांत गेलों व फिरून दमे-
सेकास परतलों. १८ मग तीन वर्षांनंतर पेत्र-
साला भेटायास वर यरूशलेमास गेलों, व त्याच्या
जवळ पंधरा दिवस राहिलों. १९ परंतु प्रभूचा
भाऊ याकोब याबाचून म्या प्रेषितांतील दुसरा
कोणी पाहिला नाहीं. २० तर पाहा, देवासमक्ष
मी तुह्मास जें लिहितों त्यांत खोटेपण करीत
नाहीं. २१ मग सुऱ्या व किलिक्या देशां-
मध्यें मी आलों. २२ आणि यहूदांतील ख्रिस्ती
मंडळ्यांस माझी तोंडओळख नव्हती. २३ तर
त्यानी हें मात्र ऐकिलें होतें कीं, जो पूर्वीं आमच्या
पाठीस लागत असे, तो ज्या विश्वासाचा नाश
अगोदर करीत होता त्याचें शुभवर्त्तमान आतां
सांगतो. २४ तेव्हां त्यानी मजमुळें देवाचें
गौरव केलें.

## अध्याय २.

मग चौदा वर्षांनी मी बर्णबासुद्धां तितसालाहि
घेऊन वर यरूशलेमास फिरून गेलों. २
तेव्हां मला दृष्टांत झाल्यामुळें मी गेलों, आणि जें
शुभवर्त्तमान मी विदेश्यांमध्यें गाजवीत असतों तें
त्यांजवळ निवेदन केलें, परंतु जे प्रतिष्ठित त्यांजवळ
एकांतीं; नाहीं तर कदाचित् मी व्यर्थ धावतों किंवा
धावलों होतों. ३ तथापि माझ्या संगतीचा तितस
हेल्लासी असतां, यावर देखील सुंता घेण्याविषयीं
बळात्कार झाला नाहीं; ४ आंत गुप्त रुपाने
आलेले खोटे भाऊ यांजकरितांहि नाहीं, ते आह्मास
दासपणांत घालण्याकरितां आमची जी मोकळीक
ख्रीस्त येशूकडून आहे ती हेरायास चोरून आंत
आले. ५ त्यांस आह्मी घटकाभरहि वश होऊन
मानिलें नाहीं, यासाठीं कीं शुभवर्त्तमानाचें खरेपण
तुह्मापासीं राहावें. ६ आणि जे कांहीं प्रतिष्ठित
असे दिसले, ते कसेहि असोत याचा मला कांहीं
भेद नाहीं. देव माणसाचा पक्षपात करीत नाहीं,
जे प्रतिष्ठित दिसले त्यानी तर मला कांहीं अधिक
दिल्हें नाहीं. ७ तर उलटें त्यानी असें पाहिलें
कीं, असें सुंतीजातीसाठीं शुभवर्त्तमान पेत्रसाला
तसें असुंतीजातीसाठीं मला सोपलें; ८ (कां
तर ज्याने पेत्रसाला सुंतीजातीकडल्या प्रेषित-
पणास प्रेरिलें, त्याने मलाहि विदेश्यांकडे प्रेरिलें;)
९ आणि मजवर ठेवलेली कृपा याकोब व केफा व
योहान्न जे स्तंभ असे दिसले, त्यानी जाणिली,
तेव्हां त्यानी मला व बर्णबाला भागीपणाचे उजवे
हात दिल्हे, यासाठीं कीं आह्मी विदेश्यांकडे, व
आपण सुंतीजातीकडे जावें. १० केवळ आह्मी
गरिबांची आठवण करावी ह्मणून सांगितलें, आणि

तसेंच करायाला मी उत्कंठित होतों. ११ परंतु
पेत्रस अंत्योखीयास आला होता तेव्हां म्या त्याला
प्रत्यक्ष अडविलें, कां तर तो दोषी होता. १२
कारण कीं याकोबापासून कित्येकांच्या येण्यापूर्वी
तो विदेश्यांच्या संगतीं जेवीत होता, परंतु ते आ-
ल्यावर तो सुंतेचे यांस भिऊन एकीकडे झाला
व वेगळा राहिला. १३ आणि दुसऱ्या यहूद्या-
नीहि त्यासहित ढोंग केलें, असें कीं बार्णबालाहि
त्यांच्या ढोंगाने ओढिलें. १४ परंतु शुभवर्त्तमा-
नाच्या खरेपणाप्रमाणें ते नीट चालत नाहींत, हें
म्या पाहिलें तेव्हां सर्वांसमोर पेत्रसाला म्हटलें कीं,
तूं यहूदी असतां यहूद्यांसारिखा नव्हेस तर विदे-
श्यांसारिखा वर्त्ततोस, तर विदेश्यांनी यहूद्यांसारिखें
वर्त्तावें, म्हणून तूं त्यांवर बळात्कार कां करितोस?
१५ आम्ही जातीचे यहूदी असतां व विदेश्यांतील
पापी नसतां, १६ असें जाणतों कीं, माणूस नेम-
शास्त्रांतील कर्मांकडून न्यायी ठरत नाहीं, केवळ
येशू ख्रीस्तावरील विश्वासाकडून ठरतो; आम्ही
देखील ख्रीस्त येशूवर विश्वास ठेविला, यासाठीं
कीं आम्ही नेमशास्त्रांतील कर्मांकडून नव्हे, तर
ख्रीस्तावरील विश्वासाकडून न्यायी ठरावें, कारण
कीं मनुष्यजातींतील कोणीहि नेमशास्त्रांतील कर्मां-
कडून न्यायी ठरणार नाहीं. १७ परंतु ख्रीस्ता-
कडून न्यायी ठरूं, असें पाहत असतां आपणहि
पापी सांपडलों, तर ख्रीस्त पापाचा सेवक आहे
काय? असें न घडो; १८ कां तर जें म्या
पाडून टाकिलीं तीं जर फिरून बांधितों तर मी
आपणाला उल्लंघणारा असें सिद्ध करितों. १९
कारण कीं मी नेमशास्त्राकडून नेमशास्त्राविषयीं
मेलों आहें, यासाठीं कीं म्या देवासाठीं जगावें.
२० मी ख्रीस्ताबरोबर खांबीं दिल्हेला आहें, तरी
मी वांचतों तथापि मी नव्हें, तर ख्रीस्त मजमध्यें
वांचतो, आणि आतां देहांत जें माझें जिणें आहे
तें देवाच्या पुत्रावरच्या विश्वासाने आहे, त्याने मज-
वर प्रीति केली व आपणाला मजकरितां दिल्हें.
२१ मी देवाची कृपा व्यर्थ करीत नाहीं, कां कीं
न्यायीपण नेमशास्त्राकडून असलें तर ख्रीस्त
उगाच मेला.

## अध्याय ३.

अहो निर्बुद्धि गलत्यानो, तुम्ही खरेपण मानूं नये
म्हणून तुम्हास कोणी मोहित केलें आहे?
ज्या तुमच्याच डोळ्यांपुढें येशू ख्रीस्त खांबीं दिल्हे-
ला असा तुम्हामध्यें दाखविला होता. २ मी
तुम्हापासून केवळ हें जाणायास इच्छितों कीं, तुम्ही
नेमशास्त्रांतील कर्मांकडून आत्मा पावलां, किंवा
विश्वासाच्या ऐकण्याकडून? ३ काय, तुम्ही एवढे
निर्बुद्धि आहां कीं, आत्म्याने प्रारंभ केल्यावर आतां
देहाने समाप्त होतां काय? ४ तुम्ही इतकीं व्यर्थ
सोसिलीं आहेत काय? व्यर्थच, हें खरें काय? ५
तर जो तुम्हास आत्मा पुरवितो व तुम्हामध्यें चम-
त्कार करितो, तो नेमशास्त्रांतील कर्मांकडून, किंवा
विश्वासाच्या ऐकण्याकडून करितो? ६ जसें आ-
ब्राहामाने देवावर विश्वास ठेविला आणि तें त्याला
न्यायीपण असें मोजिलें तसें. ७ यास्तव जाणा
कीं, विश्वासाचे जे तेच आब्राहामाचे पुत्र आहेत.
८ आणि देव विदेश्यांस विश्वासाकडून न्यायी ठर-
वील, हें अगोदर पाहून शास्त्राने शुभवर्त्तमान आ-
ब्राहामाजवळ पूर्वी सांगितलें कीं, तुजकडून सर्व राष्ट्रें
आशीर्वाद पावतील. ९ यास्तव जे विश्वासाचे
ते विश्वासी आब्राहामासहित आशीर्वाद पावतात.
१० कां कीं नेमशास्त्रांतील कर्मांचे जितके आहेत
तितके शापाखालीं आहेत; कां तर लिहिलें आहे
कीं, नेमशास्त्र पुस्तकांत लिहिलेलीं कर्में सर्व आच-
रायास जो कोणी टिकत नाहीं, तो शापित. ११
आणि कोणीहि नेमशास्त्राकडून देवापाशीं न्यायी
ठरत नाहीं हें उघडें, कां कीं न्यायी विश्वासाकडून
जगेल. १२ नेमशास्त्र तर विश्वासाचें नव्हे,
परंतु जो माणूस हीं कर्में करितो तो यांकडून जगेल.
१३ ख्रीस्ताने आमच्या ठिकाणीं शापपात्र होऊन
आम्हास नेमशास्त्रांतील शापापासून खंडून घेतलें
आहे, कारण कीं जो कोणी झाडावर टांगलेला तो
शापित, असें लिहिलें आहे. १४ यासाठीं कीं
आब्राहामावरचा आशीर्वाद ख्रीस्त येशूकडून विदे-
श्यांस प्राप्त व्हावा, असें कीं आम्ही विश्वासाकडून
आत्म्याविषयींचें वचन पावावें.

१५ अहो भाऊ, मी माणसाप्रमाणें बोलतों,
माणसाचा देखील करार स्थापिलेला असतां, कोणी
रद्द करीत किंवा वाढवीत नाहीं. १६ तर आब्रा-
हामाला व त्याच्या संतानाला तीं वचनें सांगितलीं
होतीं, आणि संतानांस असें बहुतांविषयीं म्हणत
नाहीं, तर तुझ्या संतानाला असें एकाविषयीं,
तो ख्रीस्त आहे. १७ तर मी असें म्हणतों कीं,
ख्रीस्ताविषयीं देवाने पूर्वी केलेला करार, तो चारशें

तीस वर्षांनंतर झालेलें नेमशास्त्र याच्याने रद्द कर-
वत नाहीं, असें कीं वचनाला व्यर्थ करावें. १८ कां
कीं तें वतन नेमशास्त्राकडून असलें तर वचनाकडून
नाहीं, परंतु देवाने तें आब्राहामाला वचनाकडून
दिल्हें. १९ तर नेमशास्त्र कशासाठीं? ज्या
संतानाविषयीं वचन दिल्हें, तें येई तोंपर्यंत तें उल्लं-
घनांमुळें लाविलें होतें, मध्यस्थाच्या हाताने दुतां-
कडून नेमिलें होतें. २० आणि मध्यस्थ एकाचा
नाहीं, परंतु देव एक आहे. २१ तर नेमशास्त्र
देवाच्या वचनांविरुद्ध आहे काय? असें न घडो,
कां तर जीवन देण्यास समर्थ असें नेमशास्त्र दिल्हें
असतें, तर न्यायीपण नेमशास्त्राकडून निश्चयें झालें
असतें. २२ परंतु शास्त्राने सर्वांस पापांत कोंडिलें
आहे, यासाठीं कीं येशू ख्रीस्तावरच्या विश्वासा-
कडून जें वचन, तें विश्वास ठेवणाऱ्यांस मिळावें.
२३ परंतु विश्वास आल्यापूर्वीं आह्मी जो विश्वास
प्रगट होणार होता, तो पावण्यासाठीं नेमशास्त्रा-
खालीं कोंडलेले असे राखिले होतों. २४ यास्तव
आह्मी विश्वासाकडून न्यायी ठरावें ह्मणून नेम-
शास्त्र आह्मास ख्रीस्ताकडे पोहंचवायास बाळ-
शिक्षक होतें. २५ परंतु विश्वास आल्यावर
आह्मी अणखी बाळशिक्षकाच्या स्वाधीन नाहीं;
२६ कां तर ख्रीस्त येशूवरच्या विश्वासाकडून
तुह्मी सर्व देवाचे पुत्र आहां. २७ कां कीं
जितके तुह्मी ख्रीस्ताकडील बाप्तिस्मा पावलां आहां
तितके तुह्मी अंगीं ख्रीस्त ल्यालेले आहां. २८
कोणी यहूदी नाहीं, व हेलेनी नाहीं, कोणी दास
नाहीं, व स्वतंत्र नाहीं, व कोणी पुरुष व स्त्री असें
नाहीं, कां तर सर्व तुह्मी ख्रीस्त येशूकडील एक
आहां. २९ आणि तुह्मी जर ख्रीस्ताचे तर
आब्राहामाचें संतान आणि वचनाप्रमाणें वतनदार
आहां.

## अध्याय ४.

तर मी ह्मणतों कीं, वतनदार बाळ आहे तोंपर्यंत
तो अवघ्यांचा धनी असतांहि, दासाहून कांहीं
भिन्न नाहीं; २ तर बापाच्या वायद्यापर्यंत तो
संभाळणाऱ्यांच्या व कारभाऱ्यांच्या स्वाधीन आहे. ३
तसें आह्मीहि बाळ होतों तेव्हां जगाच्या तत्वांच्या
स्वाधीन दासपणांत होतों. ४ परंतु काळाची पूर्णता
झाली, तेव्हां देवाने आपला पुत्र, स्त्रीपासून होऊन
नेमशास्त्राच्या स्वाधीन झालेला असा पाठविला;
५ यासाठीं कीं जे नेमशास्त्राच्या स्वाधीन, त्यांस
त्याने खंडून घ्यावें, असें कीं आह्मी दत्तकपण
पावावें. ६ आणि तुह्मी पुत्र आहां, यास्तव देवाने
आब्बा बापा, ओरडणारा आपल्या पुत्राचा आत्मा
याला तुमच्या अंतःकरणांमध्यें पाठविलें आहे. ७
अस्याने तूं आतांपासून दास नव्हेस तर पुत्र, आणि
जर पुत्र तर ख्रीस्ताकडून देवाचा वतनदारहि. ८
तथापि पूर्वीं तुह्मी देवाला न जाणून वास्तविक देव
नाहींत त्यांची सेवा केली खरी. ९ पण आतां
तुह्मी देवाला जाणत असतां आणि त्यापेक्षां देवा-
कडून जाणलेले असतां, अशक्त व निर्धन तत्वें
यांचें दासपण फिरून पूर्ववत् करण्यास इच्छून
त्यांकडे पुन्हा कसे फिरतां? १० दिवस व महिने
व समय व वर्षें हीं तुह्मी पाळितां. ११ मला
तुह्माविषयीं भय वाटतें कीं, कदाचित् म्या तुह्मा-
साठीं व्यर्थ श्रम केला असेल.

१२ अहो भावानो, मी तुमची विनंती करितों,
मजसारिखे व्हा, कां कीं मीहि तुह्मासारिखा, तुह्मी
माझा कांहीं अन्याय केला नाहीं. १३ आणि
तुह्मास ठाऊक आहे कीं, म्या पहिल्याने तुह्माजवळ
देहाच्या अशक्तपणाने शुभवर्त्तमान सांगितलें. १४
तेव्हां माझ्या देहांत जी परीक्षा तिचा तुह्मी धिक्कार
व कंटाळा केला नाहीं, तर देवाच्या दुतासारिखें,
ख्रीस्त येशूसारिखें मला अंगीकारिलें. १५ तर
तुमचें धन्यपण केवढें होतें? कां मी तुमची साक्ष
देतों कीं, जर घडतें तर तुह्मी आपले डोळे काढून
मला दिल्हे असते. १६ तर तुह्माजवळ खरेपण
बोलल्याने मी तुमचा वैरी झालों काय? १७ ते
तुह्मासाठीं आवेश धरितात, चांगल्या प्रकारें नाहींत;
अणखी तुह्मी त्यांसाठीं आवेश धरावा ह्मणून ते
तुह्मास वेगळें करायास पाहतात. १८ तर चांग-
ल्याचा सर्वदा आवेश धरणें हें चांगलें, आणि मी
तुह्माजवळ प्रत्यक्ष आहें, तेव्हांच केवळ नव्हे.
१९ अहो माझ्या लेंकरानो, तुह्मामध्यें ख्रीस्ताचें
रूप उत्पन्न होई तोंपर्यंत ज्या तुह्मासाठीं मला
फिरून प्रसूतिवेदना आहेत. २० आणि मी
आतां तुमच्या जवळ असायास व माझी वाणी
पालटायास इच्छितों, कां तर तुह्माविषयीं मला
संशय आहे.

२१ जे तुह्मी नेमशास्त्राच्या स्वाधीन व्हायास
इच्छितां, ते तुह्मी नेमशास्त्र ऐकत नाहीं काय?
मला सांगा. २२ कां तर असें लिहिलें आहे

कीं, आब्राहामाला दोन पुत्र होते, एक दासीचा
व एक स्वतंत्रिणीचा. २३ परंतु जो दासीपासून
तो देहाप्रमाणें, आणि जो स्वतंत्रिणीपासून तो वच-
नाकडून जन्मला. २४ हींच उपमारूप आहेत,
कां कीं त्या ते दोन करार अशा आहेत, एक तर
सीना डोंगरापासून दासपणासाठीं जन्मवितो, तोच
हागार आहे. २५ कां कीं हागार अर्बस्थाना-
तील सीना डोंगर आहे, आणि प्रस्तुत यरूशलेम
इच्या अनुरुपाने आहे, व आपल्या लेंकरांसुद्धां दास-
पणांत आहे. २६ परंतु वरील यरूशलेम स्वतंत्र
आहे, तीच आह्मा सर्वांची आई आहे. २७
कां तर लिहिलें आहे कीं, अगे वांझे, जी तूं प्रस-
वत नाहींस ती तूं आनंदित हो, ज्या तुला प्रसू-
तिवेदना होत नाहींत ती तूं हाक फोडून ओरड;
कां तर जिला नवरा आहे तिच्या पेक्षा सडीचीं
लेंकरें बहुत आहेत. २८ तर अहो भावानो, इझा-
काप्रमाणें आह्मी वचनाचीं लेंकरें आहों. २९
परंतु त्या वेळेस देहाप्रमाणें जन्मलेला याने आ-
त्म्याप्रमाणें जन्मलेल्याचा पाठलाग केला, तसें आ-
तांहि आहे. ३० पण धर्मलेख काय सांगतो?
दासी व तिचा पुत्र यांस बाहेर घाल, कां तर
दासीचा पुत्र स्वतंत्रिणीच्या पुत्राबरोबर वतन पाव-
णारच नाहीं. ३१ यास्तव अहो भावानो, आह्मी
दासीचीं लेंकरें नव्हों तर स्वतंत्रिणीचीं.

## अध्याय ५.

तर जी स्वतंत्रता ख्रीस्ताने आह्मास दिल्ही त्या
स्वतंत्रतेंत टिका, आणि दासपणाच्या जुवाने
फिरून गुंतूं नका. २ पाहा, मी पौलस तुह्मास
सांगतों कीं, जर तुह्मी सुंता करून घेता तर ख्रीस्त
तुह्मास कांहीं उपयोगी पडणार नाहीं. ३ आणि
सुंता झालेल्या प्रत्येक माणसाला मी फिरून साक्ष
देतों कीं, तो सगळें नेमशास्त्र पाळायास ऋणी
आहे. ४ तुह्मी जे कोणी नेमशास्त्राकडून न्यायी
ठरतां ते तुह्मी ख्रीस्तापासून मुकलां आहां; तुह्मी
कृपेंतून गळून गेलां आहां. ५ कां तर आह्मी
आत्म्याने विश्वासाकडून न्यायीपणाची आशा
धरून राहतों. ६ तर ख्रीस्त येशूजवळ सुंता
कांहीं कामाची नाहीं व असुंताहि नाहीं, केवळ
प्रीतीकडून प्रेरिलेला विश्वास. ७ तुह्मी बरे धावलां
होतां; खरेपण मानूं नये ह्मणून तुह्मास कोणी
हुटविलें? ८ हें मानविणें तुमच्या बोलावणाऱ्या-
कडून नाहीं. ९ थोडें फुगवण समळ्या गोळ्याला
फुगवितें. १० प्रभूकडून मला तुमचा भरवसा
आहे कीं, तुह्मी कांहीं दुसरा भाव धरणार नाहीं,
आणि तुमचा खवळणारा तो कोणीहि असो, दंड
सोसील. ११ परंतु अहो भावानो, जर मी अझून
सुंता याजवितों, तर अद्याप माझा पाठलाग कां
होतो? तर खांबाचा अडखळा नाहींसा झाला
असता. १२ मला असी इच्छा आहे कीं, तुह्मास
उलटविणारे छेदून टाकण्यांत यावे.

१३ तर अहो भावानो, तुह्मी स्वतंत्रतेंत बोला-
विलेले होतां, केवळ ती स्वतंत्रता देहाच्या निमित्ता-
साठीं घेऊं नका, तर प्रीतीकडून एकमेकांची सेवा
करा. १४ कारण कीं अवघें नेमशास्त्र एका
वाक्यांत पूर्ण होतें, तें असें कीं, जसी आपणावर
तसी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर. १५ परंतु
तुह्मी एकमेकांस डसता व खाऊन टाकतां, तर एक-
मेकांकडून तुमचा क्षय होऊं नये ह्मणून जपा.

१६ आणि मी सांगतों कीं आत्म्याने चाला,
ह्मणजे तुह्मी देहसंबंधी इच्छा पूर्ण करणारच
नाहीं. १७ कारण कीं देह आत्म्याविरुद्ध इच्छा
करितो व आत्मा देहाविरुद्ध, आणि हीं परस्परें
विरुद्ध आहेत, असें कीं जें इच्छितां तें तुह्मी करीत
नाहीं. १८ परंतु तुह्मी आत्म्याने चालविलेले
आहां तर तुह्मी नेमशास्त्राच्या स्वाधीन नाहीं. १९
देहाचीं कामें तर उघडीं आहेत, तीं हीं आहेत;
व्यभिचार, शिंदळकी, अशुद्धता, कामातुरपण, २०
मूर्त्तिपूजा, चेटकें, वैर, भांडणें, आवेश, संताप, तंटे,
फुटाफूट, तड, २१ हेवा, हत्या, मद्यपान, विलास,
आणि यांसारिखीं जीं तीं; याविषयीं जसें मी पूर्वी
बोललों तसें तुह्मास अणखी अगोदर सांगतों कीं,
जे असीं करितात ते देवाच्या राज्याचें वतन पाव-
णार नाहींत. २२ परंतु आत्म्याचें फळ हें आहे,
प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, उपकारिकपणा,
चांगलेपण, विश्वास, २३ नम्रता, इंद्रियदमन;
अशांच्या विरुद्ध नेमशास्त्र नाहीं. २४ आणि जे
ख्रीस्ताचे, त्यांनी चेतना व इच्छा यांसुद्धां देह
खांबीं दिल्हा आहे. २५ जर आह्मी आत्म्याने
जगतों तर आत्म्याने चालावेंहि. २६ आह्मी
एकमेकांस खिजवून व परस्परांचा हेवा करून फोकळ
प्रतिष्ठित नसावें.

## अध्याय ६.

अहो भावानो, कोणी माणूस कांहींएका पापांत
सांपडला, तर जे आत्मिक ते तुह्मी अशाला

नम्रतेच्या आत्म्याने यथास्थित करा, आपणहि परी-
क्षेत पडूं नये याविषयीं तूं आपणाला संभाळ. २
एकमेकांचीं ओझीं वाहा, आणि अशाने ख्रीस्ताचें
नेमशास्त्र पूर्ण करा; ३ कां तर कोणी आपण
कांहीं नसतां, जर कांहीं आहें असें कल्पितो, तर
तो आपणाला फसवितो. ४ परंतु प्रत्येकाने आ-
पापल्या कामाची परीक्षा पाहावी, आणि मग त्याला
दुसऱ्यामध्यें नव्हे, तर केवळ आपणामध्यें वाखाण-
णूक होईल; ५ कां तर प्रत्येक आपापलें ओझें
वाहील. ६ वचनाविषयींचा उपदेश ऐकणाऱ्याने
उपदेशकाला सर्व चांगल्या पदार्थांचा वांटा द्यावा. ७
फसूं नका, देवाची थट्टा होत नाहीं, कां तर माणूस
जें पेरितो तेंच पीक पावेल; ८ ह्मणजे जो आप-
ल्या देहासाठीं पेरितो तो देहावरून नाश असें
पीक पावेल, परंतु जो आत्म्यासाठीं पेरितो तो आ-
त्म्यावरून सर्वकाळचें जीवन असें पीक पावेल. ९
तर आपण बरें करितांना थकूं नये, कां कीं आपण न
थकलों तर पीक यथाकाळीं पावूं. १० यावरून
जसा आह्माला प्रसंग आहे, तसें आह्मी सर्वांचें व
विशेषेंकरून विश्वासाच्या मंडळींतल्यांचें बरें करावें.

११ म्या आपल्या हाताने केवढें पत्र तुह्मास
लिहिलें हें तुह्मी पाहतां. १२ देहाविषयीं शो-
भायास जितके इच्छितात, तितके आपला पाठलाग
ख्रीस्ताच्या खांबाकरितां होऊं नये ह्मणूनच तुह्मावर
सुंता घेण्याविषयीं बळात्कार करितात. १३ कां
तर सुंता करून घेणारे आपणहि नेमशास्त्र पाळीत
नाहींत, तर ते तुमच्या देहाकडून नावाजून घेण्याक-
रितां तुमची सुंता व्हावी असें इच्छितात. १४
परंतु आमचा प्रभु येशू ख्रीस्त याच्या खांबाच्या
निमित्ताखेरीज मला नावाजून घेणें नसावें, त्याकडून
मजविषयीं जग व जगाविषयीं मी खांबीं दिल्हेला
आहें. १५ कां तर ख्रीस्त येशूजवळ सुंता कांहीं
नाहीं व असुंताहि नाहीं, केवळ नवी उत्पत्ति ही.
१६ आणि जितके या नेमाप्रमाणें चालतात त्यांजवर व
देवाच्या इस्राएलावर शांति व दया असो.

१७ शेवटीं कोणी मला त्रास न देवो, कां तर
मी आपल्या शरिरावर प्रभु येशूच्या खुणा वाग-
वितों. १८ अहो भावानो, आमचा प्रभु येशू
ख्रीस्त याची कृपा तुमच्या आत्म्यासीं असो.
आमेन.

---

# एफससकरांस पौलसाचें पत्र.

## अध्याय १.

एफससांत जे पवित्र व ख्रीस्त येशूवर विश्वास-
णारे आहेत त्यांस पौलस, देवाच्या इच्छेने
येशू ख्रीस्ताचा प्रेषित [याचा सलाम]. २ देव
आमचा बाप व प्रभु येशू ख्रीस्त, यांपासून तुह्मास
कृपा व शांति असो.

३ देव व आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताचा बाप
तो धन्यवादित होवो; त्याने आकाशांतल्या गोष्टीं-
विषयीं प्रत्येक आत्मिक आशीर्वादाने आह्मास ख्री-
स्ताकडून आशीर्वादित केलें आहे. ४ याजकडून जसें
त्याने जगाच्या मांडण्यापूर्वी आह्मास निवडिलें आ-
हे, यासाठीं कीं आह्मी प्रीतीने त्याच्या दिसण्यांत
पवित्र व निर्दोष व्हावें तसें. ५ त्याने आपल्या इच्छे-
च्या मनोदयाप्रमाणें, आपल्यासाठीं आह्मास येशू
ख्रीस्ताकडून दत्तपुत्रपण पावण्याला पूर्वी नेमिलें;
६ त्याच्या कृपेकडून त्याने त्या प्रियामुळें आह्मास
कृपापात्र केलें, तिच्या गौरवाची स्तुति होण्यासाठीं.
७ त्याच्या कृपेच्या संपत्तीप्रमाणें त्याकडून, त्याच्या
रक्तपाताने आह्मास खंडणी ह्मणजे पातकांची क्षमा,
असी आहे. ८ त्याने ही कृपा सर्व ज्ञानाने व
विवेकाने आह्मावर अतिशयें केली आहे. ९ त्या-
ने आपला मनोदय आपल्या आपण पूर्वी योजिला
त्याप्रमाणें आपल्या इच्छेचें गूज आह्मास कळ-
विलें, १० कीं जीं आकाशांमध्यें व जीं पृथ्वीवर
तीं अवघीं काळांच्या पूर्णपणाच्या चालविण्यांत त्या
ख्रीस्ताकडून आह्मी वतन पावलों त्याकडून एकत्र
करावीं; ११ जो आपल्या इच्छेच्या योजनेप्र-
माणें अवघीं चालवितो त्याच्या बेताप्रमाणें आह्मी
पूर्वी नेमलेले होतों, १२ यासाठीं कीं ज्यांनी
पूर्वी ख्रीस्तावर आशा ठेविली ते आह्मी त्याच्या
गौरवाच्या स्तुतीसाठीं व्हावें. १३ त्याजवर तु-
ह्मीहि खरेपणाचें वचन, तुमच्या तारणाचें शुभव-

र्त्तमान ऐकल्यानंतर, त्यावरच विश्वास ठेवून तुह्मी
वचनाच्या पवित्र आत्म्याकडून शिक्का मारिलेले
आहां. १४ हा आत्मा मिळविलेल्याची खंडणी
होईपर्यंत आमच्या वतनाचा विसार आहे, त्याच्या
गौरवाची स्तुति व्हावी ह्मणून. १५ याकरितां मी-
हि प्रभु येशूवरील तुमचा विश्वास, व सर्व पवित्रां-
वरील प्रीति हीं ऐकून, १६ तुह्मासाठीं उपकार
मानितां राहत नाहीं, माझ्या प्रार्थनांमध्यें तुमची
आठवण असी करितों कीं, १७ आमचा प्रभु
येशू ख्रीस्त याचा देव, गौरवाचा बाप, यानें आ-
पल्या ओळखीचें ज्ञान व प्रगटविणें यांचा आत्मा
तुह्मास द्यावा, १८ तुमचे ज्ञानचक्षु प्रकाशित
व्हावे, यासाठीं कीं त्याच्या बोलावण्याची आशा
काय, आणि पवित्रांसीं त्याच्या वतनाच्या गौरवाची
संपत्ति काय, १९ आणि त्याच्या बळकट साम-
र्थ्याच्या प्रेरणेप्रमाणें जे विश्वासतात, त्या आमच्या
ठायीं त्याच्या शक्तीचें परम थोरपण काय आहे, हें
तुह्मी जाणावें. २० त्यानें ती प्रेरणा ख्रीस्ताला
करून त्याला मेलेल्यांमधून उठविलें, आणि आपल्या
उजवीकडे आकाशांतल्यांमध्यें बसवून २१ सर्व
सत्ता, व अधिकार, व पराक्रम, व धनीपण, व प्रत्ये-
क नांव जें या काळीं केवळ नव्हे, तर येणाऱ्या का-
ळींहि ह्मटलें, त्यापेक्षां फार उंच केलें आहे. २२
आणि अवघीं वश करून त्याच्या पायांखालीं ठेविलीं,
आणि त्याला अवघ्यांवर मंडळीचा मस्तक असें
करून ठेविलें आहे; २३ तीच त्याचें शरीर, जो
अवघ्यानी अवघ्यांस भरितो त्याची परिपूर्त्ति आहे.

## अध्याय २.

आणि तुह्मी अपराध व पापें यांमध्यें मेलेले
असतां, तुह्मास त्यानें जिवंत केलें; २
त्यांमध्यें तुह्मी या जगाच्या धोरणाप्रमाणें अंतरि-
क्षांतील सत्तेचा अधिकारी, आज्ञाभंगाच्या पुत्रांस
आतां प्रेरणारा आत्मा, त्याप्रमाणें पूर्वी चाललां;
३ त्यांमध्यें आह्मीहि सर्वांनी अगोदर आपल्या
देहसंबंधी इच्छानी वर्त्तणूक केली, देहाच्या व बु-
द्धीच्या वासनाप्रमाणें करीत होतों, व जन्मस्वभा-
वानें दुसऱ्यांसारिखींच क्रोधाचीं लेंकरें होतों. ४ परंतु
जो देव दयासंपन्न आहे त्यानें आह्मी पातकांमध्यें
मेलों असतांहि, आपली फार प्रीति आह्मावर
केली, ५ तेणेंकरून ख्रीस्तासहित आह्मास जि-
वंत केलें आहे; (तुह्मी कृपेनें तारलेले आहां):
६ आणि त्यानें संगतीं उठविलें, व आकाशांतल्यां-
मध्यें ख्रीस्त येशूकडून त्यासंगतीं बसविलें आहे;
७ यासाठीं कीं त्यानें ख्रीस्त येशूकडून त्याची आ-
ह्मावर जी दया, तिच्या योगानें होणार युगांमध्यें
आपल्या कृपेची अति संपत्ति दाखवावी. ८ कां
तर तुह्मी कृपेनें विश्वासाकडून तारलेले आहां;
आणि हें तुह्मापासून नव्हे, देवापासून दान आहे.
९ कर्मांकडून नाहीं, कोणी नावाजून घेऊं नये
ह्मणून; १० कां तर आह्मी चांगलीं कर्मे
करायासाठीं ख्रीस्त येशूकडून उत्पन्न केलेलें त्याचें
काम आहों; त्यांविषयीं देवानें पूर्वी योजिलें कीं,
आह्मी त्यांमध्यें चालावें.
११ यास्तव आठवण करा कीं, तुह्मी अगोदर
देहानें विदेशी, हातानें केलेली देहसंबंधी ह्मटलेली
सुंता या जातीकडून असुंती जात असे ह्मटलेले;
१२ अणखी त्या वेळेस तुह्मी ख्रीस्ताविरहित,
इस्राएलाच्या प्रजेपणापासून दूर व वचनाच्या करारां-
विषयीं परके, आशाविरहित व देवहीन असे जगांत
होतां. १३ परंतु जे अगोदर दूर होतां ते तुह्मी
आतां ख्रीस्त येशूकडून ख्रीस्ताच्या रक्तानें जवळ
झालां आहां. १४ कां तर तो आमचा समेट
आहे, त्यानें दोघांस एक केलें, आणि मधली आड-
भिंत फोडिली; १५ त्यानें वैर, आज्ञाविधींचें
नेमशास्त्र हें आपल्या देहाकडून निरर्थ केलें,
यासाठीं कीं त्यानें समेट करून आपल्याकडून दो-
घांचा एक नवा माणूस उत्पन्न करावा, १६ आणि
त्यानें वैर खांबीं जिवें मारून त्याकडून देवासीं एका
शरिरांत दोघांचा समेट करावा. १७ आणि त्यानें
येऊन तुह्मा दुरल्यांसीं व जवळच्यांसीं शांतीचें
शुभवर्त्तमान सांगितलें; १८ कां कीं त्याकडून
आह्मा उभयतांस एका आत्म्यानें बापाजवळ शर-
णोपाय आहे. १९ तर यावरून तुह्मी यापुढें
परके व विदेशी नव्हां, तर पवित्रांचे सोबती नाग-
रिक व देवाच्या घरचे. २० प्रेषित व भविष्यवादी
यांचा जो पाया त्यावर तुह्मी रचलेले आहां, येशू
ख्रीस्त तोच कोपऱ्याचा मुख्य धोंडा आहे. २१
त्यामध्यें अवघी रचना जुळून रचली असतां, प्रभू-
साठीं पवित्र देऊळ असें वाढतें. २२ त्यामध्यें
तुह्मीहि देवाच्या वस्तीसाठीं आत्म्यानें संगतीं रच-
लेले आहां.

## अध्याय ३.

याकरितां मी पौलस तुह्मा विदेश्यांसाठीं ख्रीस्त
येशूसंबंधी बंदिवान; २ जर देवाची जी

कृपा तुह्मासाठीं मला दिल्ही होती, तिचा कारभार
तुह्मी ऐकिला आहे कीं, ३ त्याने प्रगटण्याकडून
गूज मला कळविलें; त्याप्रमाणें म्या अगोदर थोड-
क्यांत लिहिलें, ४ तें तुह्मी वाचून ख्रीस्ताच्या
गुजाविषयींचा माझा समज हा तुह्माला समजतां
येईल. ५ तें असें आतां त्याच्या पवित्र प्रेषि-
तांस व भविष्यवाद्यांस आत्म्याकडून प्रगटलें, तसें
इतर पिढ्यांमध्यें मनुष्य पुत्रांस कळविलें नव्हतें;
६ कीं विदेशी लोक ख्रीस्ताकडून शुभवर्त्तमानाच्या
योगें संगतीचे वतनदार, व एका शरिराचे, व त्या-
च्या वचनाचे भागीदार व्हावे. ७ देवाचें कृपादान
त्याच्या सामर्थ्याच्या प्रेरणेने मला दिल्हें, तेणेंकरून
मी त्या शुभवर्त्तमानाचा सेवक झालों. ८ सर्व
पवित्रांतील लाहानांपेक्षां लाहान, त्या मजवर ही
कृपा ठेविली कीं, म्या ख्रीस्ताची अगाध संपत्ति
विदेश्यांमध्यें सांगावी. ९ आणि ज्याने येशू ख्री-
स्ताकडून अवघें उत्पन्न केलें, त्या देवाच्या ठायीं
जें गूज सर्वकाळापासून गुप्त राहिलें होतें, त्याची
व्यवस्था काय, हें सर्वांस प्रगट करावें. १० या-
साठीं कीं जो सर्वकाळचा बेत त्याने आमच्या प्रभु
ख्रीस्त येशूसीं केला, ११ त्याप्रमाणें देवाचें
बहुत प्रकारचें ज्ञान, हें आकाशांतल्या सत्तांमध्यें व
अधिकारांमध्यें मंडळीकडून आतां कळवावें. १२
त्या प्रभूकडून त्यावरच्या विश्वासाने आह्मास धैर्य
व भरवस्याने शरणागत आहे. १३ यास्तव मी
असें मागतों कीं, तुह्मासाठीं जीं माझीं संकटें त्या-
मुळें तुह्मी थकूं नये, तें तुमचें गौरव आहे. १४
याकरितां ज्यावरून आकाशांतील व पृथ्वीवरील
अवघें कुटुंब ह्मटलें आहे, १५ त्या आमचा प्रभु येशू
ख्रीस्ताच्या बापापासीं मी आपले गुडघे टेंकितों,
१६ यासाठीं कीं त्याने आपल्या गौरवाच्या संपत्ती-
प्रमाणें तुह्मास असें करून द्यावें कीं, तुह्मी त्याच्या
आत्म्याकडून अंतर्यामीं सामर्थ्याने बळकट व्हावें;
१७ विश्वासेंकरून ख्रीस्ताने तुमच्या अंतःकरणां-
मध्यें वस्ती करावी; तुह्मी प्रीतीमध्यें असें मुळाव-
लेले व पाया घातलेले कीं, १८ ख्रीस्ताच्या प्री-
तीची रुंदी, व लांबी, व खोली, व उंची काय,
१९ हें तुह्मी सर्व पवित्रांच्या संगतीं समजून घ्या-
यास, व ख्रीस्ताची जाणण्यापेक्षां अतिशय प्रीति
ती जाणायास तुह्मी शक्तिमान व्हावें, असें कीं
तुह्मी देवाच्या सर्व पूर्णपणानें भरावें. २० तर
आह्मामध्यें घडविलेल्या सामर्थ्याप्रमाणें आमचें सर्व
मागणें व कल्पिणें यापेक्षां फार अधिक करायास जो
शक्तिमान, २१ त्याला सदासर्वकाळच्या सर्व पिढ्यां-
पर्यंत ख्रीस्त येशूच्या योगें मंडळीकडून गौरव
असो, आमेन.

## अध्याय ४.

तर प्रभूसाठीं बंदिवान मी तुह्माजवळ विनंती
करितों कीं, ज्या बोलावण्याने तुह्मी बोलाविलेले
होतां त्याला योग्य तसें चालावें; २ सर्व ली-
नतेने व नम्रतेने, क्षमाशीलपणाने एकमेकांचें सहन
प्रीतीनें करीत असतां, ३ शांतीच्या बंधनाने
आत्म्याचें ऐक्य राखायास झटत असतां चालावें;
४ एक शरीर व एक आत्मा, त्याप्रमाणेंहि तुमच्या
बोलावण्याच्या एका आशेंत तुह्मी बोलाविलेले आहां;
५ एक प्रभु, एक विश्वास, एक बाप्तिस्मा, ६ एक
देव, सर्वांचा बाप, तो सर्वांवर व सर्वांकडून व तुह्मा
सर्वांमध्यें आहे. ७ आणि ख्रीस्ताच्या देणगी-
च्या परिमाणाप्रमाणें आह्मांतील प्रत्येकाला कृपा
दिल्हेली आहे. ८ यास्तव तो ह्मणतो कीं, त्याने
उंचावर चढतां कैदेला कैद करून नेलें, आणि मनु-
ष्यांस देणग्या दिल्या. ९ तर तो चढला, ह्मणजे
पहिल्याने पृथ्वीच्या खालील भागांमध्यें उतरला,
याखेरीज तें काय आहे? १० जो उतरला तो
सर्व आकाशांवर चढला आपण अवघीं भरावीं ह्मणून
११ आणि त्याने कोणी प्रेषित, व कोणी भविष्य-
वादी, व कोणी सुवार्त्तिक, व कोणी पाळक व उपदे-
शक, असे नेमून दिल्हे आहेत, १२ पवित्रांची
पूर्णता करण्यासाठीं, सेवेच्या कामासाठीं, ख्रीस्ता-
च्या शरिराच्या रचनेसाठीं, १३ सर्व आह्मी
विश्वास व देवाच्या पुत्राची ओळख यांच्या ऐक्यांत
येऊन, सिद्ध पुरुषपणास, ख्रीस्ताच्या पूर्णतेच्या
वाढीच्या परिमाणास पोहंचतों, तोंपर्यंत. १४
यासाठीं कीं आह्मी यापुढें उपदेशाच्या प्रत्येक वा-
ऱ्याने माणसांच्या धूर्त्तपणाकडून, फसविण्याच्या
युक्तिचातुर्याकडून हेलकावलेलीं व फिरविलेलीं अशीं
तान्हीं होऊं नये. १५ परंतु आह्मी प्रीतीने खरे-
पण धरून जो मस्तक आहे, त्या ख्रीस्तांत सर्व
प्रकारें वाढावें. १६ त्यापासून समळें शरीर यथा-
स्थित जोडलेलें, आणि प्रत्येक सांधा एकएक भागा-
च्या परिमाणाप्रमाणें कामास पडून, जो पुरवठा क-
रितो तेणेंकरून दृढ प्रीतीमध्यें आपली रचना
होण्याकरितां शरिराची वृद्धि करितें.

१७ तर मी हें ह्मणतों व प्रभूकडून प्रमाण
सांगतों कीं, जसें दुसरे विदेशी आपल्या बुद्धीच्या
व्यर्थपणाने चालतात त्याप्रमाणें तुह्मी यापुढें चालूं
नये. १८ बुद्धीविषयीं ते अंधारमय असतां,
आपल्या अंतःकरणाच्या कठीणपणावरून आपल्यां-
तील जें अज्ञान आहे, तेणेंकरून देवसंबंधी जीव-
नापासून दूर झालेले आहेत. १९ बहिरावलेले
असतां त्यानी लोभाने सर्व अशुद्धता करण्यासाठीं
आपणांस कामातुरपणाच्या स्वाधीन केलें आहे. २०
परंतु तुह्मी त्याप्रमाणें ख्रीस्त शिकला नाहीं;
२१ तुह्मी तर त्याविषयीं ऐकिलें आहे व येशूसं-
बंधी खरेपण आहे तसें त्याविषयीं उपदेशिले होतां,
२२ कीं पूर्वीच्या वर्त्तणुकींतील जुनें मनुष्यपण,
भोंदण्याच्या इच्छानी नासकें आहे त्याला तुह्मी
दूर करावें; २३ आणि तुह्मी आपल्या बुद्धीच्या
आत्म्यांत नवें व्हावें; २४ आणि नवें मनुष्यपण,
देवानुसारें न्यायीपण व खरी पवित्रता यांत उत्पन्न
केलेलें, तें तुह्मी अंगांत घालावें.

२५ यास्तव लबाडी दूर करून प्रत्येक आपल्या
शेजाऱ्यासीं खरें बोला, कां तर आह्मी एकमेकांचे
अवयव आहों. २६ रागें भरा, परंतु पाप करूं
नका, तुमच्या चिडण्यांत सूर्य न मावळो. २७
आणि सैतानाला ठिकाण देऊं नका. २८ ज्याने
चोरी केली तो यापुढें चोरी न करो, तर त्यापेक्षां
हातांनी चांगलें करीत असतां उद्योग करो, यासाठीं
कीं ज्याला गरज आहे त्याला वाटून देण्याकरितां
आपल्याजवळ असावें. २९ कांहीं वाईट शब्द
तुमच्या मुखांतून न निघो, केवळ जें कांहीं रचण्या-
च्या उपयोगास चांगलें, असें कीं जेणेंकरून ऐक-
णाऱ्यांस कृपा प्राप्त व्हावी, तें. ३० आणि देवाच्या
ज्या पवित्र आत्म्याकडून तुह्मास खंडून घेण्याच्या
दिवसासाठीं शिक्का मारिला आहे, त्याला खेद
देऊं नका.

३१ सर्व कडूपण व आवेश व राग व बडबडणें व
निंदा हीं अवघ्या दुष्टपणासुद्धां तुह्मापासून दूर
करावीं. ३२ आणि तुह्मी एकमेकांसीं उपकारिक
व फार मायाळू असा; जसें देवानेहि ख्रीस्तामुळें
तुमची क्षमा केली आहे, तसें तुह्मी एकमेकांची
क्षमा करा.

## अध्याय ५.

यास्तव तुह्मी प्रिय लेंकरांसारिखे देवाचें अनुक-
रण करणारे व्हा. २ आणि प्रीतीने चाला,
जसें ख्रीस्तानेहि आह्मावर प्रीति केली व देवाला
सुगंधाच्या वासाकरितां आपणाला आह्मासाठीं अर्पण
व यज्ञ करून दिल्हा तसें. ३ परंतु व्यभिचार
व सर्व अशुद्धपण किंवा लोभ, यांचा तुह्मामध्यें
उच्चार न होवो, असें पवित्रांस शोभतें तसें; ४
आणि निर्लज्ज गोष्टी व थट्टा, किंवा टवाळी हीं उ-
चित नाहींत, तर त्यापेक्षां उपकारस्तुति. ५ कां
तर तुह्मी हें जाणतां कीं कोणी व्यभिचारी, किंवा
अशुद्ध, किंवा लोभी, हा तर मूर्त्तिपूजक आहे,
यास ख्रीस्ताच्या व देवाच्या राज्यांत वतन नाहीं.
६ व्यर्थ गोष्टींकडून कोणी तुह्मास फसवूं नये,
कारण कीं त्यांमुळें देवाचा राग आज्ञाभंगाच्या पुत्रां-
वर होतो. ७ तर तुह्मी त्यांबरोबर भागीदार
होऊं नका. ८ कां कीं तुह्मी अगोदर अंधार होतां,
परंतु आतां प्रभूकडून उजेड आहां; उजेडाच्या लेंकरां-
सारिखे चाला. ९ कां कीं आत्म्याचें फळ सर्व
चांगलेपण व न्यायीपण व खरेपण यांतील आहे.
१० प्रभूला काय संतोषकारी हें पारखून घ्या.
११ आणि अंधारांतील निरर्थ कामांमध्यें भागीदार
होऊं नका, तर त्यापेक्षां निषेधच करा. १२ कां
तर त्यांकडून जीं गुप्तांत होतात, तीं बोलण्यास
देखील लाज आहे. १३ परंतु अवघीं निषेधि-
लेलीं उजेडाकडून प्रगट होतात, कां तर जें कांहीं
प्रगट करितें, तो उजेड आहे. १४ यास्तव तो
ह्मणतो कीं, हे निद्रिस्था, जागा हो, व मेलेल्याम-
धून ऊठ, ह्मणजे ख्रीस्त तुला प्रकाशित करील.
१५ तर तुह्मी अज्ञान्यांसारिखें नका, तर ज्ञान्यां-
सारिखें फार जपून वागावें, ह्मणून संभाळा. १६
वेळ खंडून घ्या, कां तर दिवस वाईट आहेत.
१७ यामुळें तुह्मी निर्बुद्धि होऊं नका. तर प्रभूची
इच्छा काय, हें समजा. १८ आणि द्राक्षारसाने
माजूं नका, यांत चेवणें आहे, तर आत्म्याने पूर्ण
व्हा. १९ गीतें व स्तोत्रें व आत्मसंबंधी प्रबंध
यांकडून एकमेकांसीं बोलतां, आपल्या अंतःकरणांत
प्रभूला गात व गायन करीत जा. २० आमच्या
प्रभु येशूच्या नांवाने, देव बापाची अवघ्यांसाठीं
सर्वदां उपकारस्तुति करा; २१ देवाच्या भयाने
एकमेकांस मान्य असा.

२२ बायकांनो, जसें प्रभूला तसें आपापल्या नव-
ऱ्यांस मान्य असा. २३ कारण कीं नवरा बायको-
चा मस्तक आहे, जसा ख्रीस्ताहि मंडळीचा मस्तक
तसा, आणि हा शरिराचा तारणारा आहे. २४

तर मंडळी ख्रीस्ताला मान्य आहे, तसें बायकानीहि
सर्व प्रकारें आपापल्या नवऱ्यांस असावें. २५
नवऱ्यानो, तुह्मी आपापल्या बायकांवर प्रीति करा,
जसें ख्रीस्तानेहि मंडळीवर प्रीति केली तसी, आणि
त्याने आपणाला तिच्या साठीं दिल्हें; २६
यासाठीं कीं त्याने तिला गोष्टीकडून पाण्याच्या अं-
घुळीने शुद्ध करून पवित्र करावें. २७ यासाठीं
कीं त्यांन तिला गौरवी मंडळी आपल्याजवळ ठेवा-
वी, तिला डाग किंवा सुरकुती किंवा अशांतील कांहीं
नसावें, तर ती पवित्र व ठपक्याविरहित व्हावी
ह्मणून. २८ याप्रमाणें नवऱ्यांस जसी आपल्या
शरिरांवर तसी आपल्या बायकांवर प्रीति केली
पाहिजे; जो आपल्या बायकोवर प्रीति करितो तो
आपणावर प्रीति करितो. २९ तर कोणी आपल्या
देहाचा द्वेष कधीं केला नाहीं; तर तो त्याला पाळितो
व बाळगितो, असें प्रभुहि मंडळीला तसें; ३०
कारण कीं आह्मी त्याच्या शरिराचे अवयव, त्या-
च्या मासाचे व त्याच्या हाडांचे आहों. ३१
यामुळें माणूस आपल्या आईबापांस सोडून आपल्या
बायकोसीं जडून राहील, आणि तीं उभयतां एक
देह होतील. ३२ हें मोठें गूज आहे, परंतु ख्री-
स्त व मंडळी यांविषयीं मी बोलतों. ३३ तथापि
तुह्मांतील प्रत्येकाने जसी आपणावर तसी आपाप-
ल्या बायकोवर प्रीति करावी; आणि बायकोने आ-
पल्या नवऱ्याची भीड राखावी.

## अध्याय ६.

लेंकरानो, प्रभूमुळें आपल्या आईबापांस माना,
कारण कीं हें नीट आहे. २ ही वचनयुक्त
पहिली आज्ञा आहे कीं, तूं आपला बाप व आई
यांची मर्यादा राख; ३ तुझें बरें व्हावें व त्वां
पृथ्वीवर दीर्घायु व्हावें ह्मणून. ४ आणि बापानो,
तुह्मी आपल्या लेंकरांस चिडवूं नका, तर प्रभुसंबंधी
शिक्षा व बोध यांकडून त्यांचा प्रतिपाळ करा.

५ दासानो, तुह्मी आपल्या अंतःकरणाच्या साळ-
सूदपणाने जसें ख्रीस्ताला, तसें आपल्या शरिरां-
च्या धन्यांस भयाने व कांपण्याने माना. ६ मनु-
ष्यांस संतोषविणाऱ्यांसारिखे तोंडदेखल्या चाकरीने
नका, तर ख्रीस्ताचे दास असे मनापासून देवाची
इच्छा पाळितांना, ७ माणसाची नव्हे, तर प्रभूची
चाकरी सुबुद्धीने करा; ८ प्रत्येक माणूस जें कांहीं
बरें करितो, त्याप्रमाणेंच प्रभूपासून पावेल, तो
दास असो किंवा स्वतंत्र असो, हें जाणतां. ९
आणि धन्यानो, त्याच प्रकारें त्यांपासीं करा, धम-
कावणें सोडा, कारण तुह्मी जाणतां कीं, स्वतां तुम-
चाहि धनी आकाशामध्यें आहे, आणि त्यापासीं
पक्षपात नाहीं.

१० शेवटीं माझ्या भावानो, प्रभूकडून व त्या-
च्या शक्तीच्या बळाकडून सबळ व्हा. ११ सैता-
नाच्या युक्तींविरुद्ध टिकायास शक्तिमान् व्हावें, ह्म-
णून देवाची सगळी शस्त्रसामग्री अंगावर घ्या.
१२ कारण कीं आमची झोंबी रक्त व मांस यांसीं
नव्हे, तर सत्तांसीं, अधिकारांसीं, या जगांतील
अंधाराच्या सत्ताधाऱ्यांसीं, आकाशांतील दुष्ट आ-
त्म्यांसीं आहे. १३ याकरितां तुह्मी वाईट दिव-
सांत आडवें टिकायाला, आणि अवघीं केल्यावर
उभे राहायाला शक्तिमान् व्हावें, ह्मणून देवाची
सगळी शस्त्रसामग्री घ्या. १४ तर खरेपणाने
आपली कंबर बांधून, व न्यायीपणाचें उरस्त्राण
अंगांत घालून, १५ व शांतीच्या शुभवर्त्तमानाची
सिद्धि पायांत घालून, १६ सर्वांवर ज्या विश्वा-
सरूप ढालीकडून त्या दुष्टाच्या सर्व जळत भाली
तुह्माला विझवितां येतील ती धरून, उभे राहा.
१७ आणि तारणाचा टोप, व आत्म्याची तरवार,
ही देवाची गोष्ट आहे यांस घ्या. १८ अवघ्या
प्रार्थनेने व काकुळतीने सर्व समयीं आत्म्याने प्रार्थना
करीत असा, आणि याविषयींच जागे राहून, अव-
घ्या एकाग्रतेने व काकुळतीने सर्व पवित्रांसाठीं,
१९ व मजसाठींहि, कीं ज्या शुभवर्त्तमानासाठीं मी
बंदांत वकील आहें, त्याचें गूज कळविण्याकरितां
प्रशस्तपणाने माझें तोंड उघडून, २० मला
बोलण्याची शक्ति मिळावी, यासाठीं कीं जसें
मला बोलावें लागतें तसें म्या त्याविषयीं धीट
व्हावें.

२१ आणखी मजविषयींच्या गोष्टी; मी काय
करितों हें तुह्मी जाणावें, ह्मणून प्रिय भाऊ व प्रभू-
कडील विश्वासू सेवक तुखिकस अवघें कळवील.
२२ याकरितांच म्या त्याला तुह्मांकडे पाठविलें आहे
कीं, आह्मांविषयींच्या गोष्टी तुह्मी जाणाव्या, आणि
त्याने तुमच्या अंतःकरणांस शांतवावें. २३ देव
बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांपासून, भावांस शांति
व विश्वासपूर्वक प्रीति असो. २४ आमचा प्रभु
येशू ख्रीस्त यावर निष्कपट प्रीति करणाऱ्या सर्वांवर
कृपा असो. आमेन.

# फिलिप्पैकरांस पौलसाचें पत्र.

## अध्याय १.

ख्रीस्त येशूकडील जे पवित्र फिलिप्पैंत आहेत
त्या सर्वांस, आणि अध्यक्षांस व सेवकांस,
येशू ख्रीस्ताचे दास पौलस व तीमथ्यस यांचा
सलाम. २ आमचा देव बाप व प्रभु येशू ख्रीस्त
यांपासून तुह्मास कृपा व शांति असो.
३ मी सर्वदा आपल्या प्रत्येक प्रार्थनेंत आनंदाने
तुह्मा सर्वांसाठीं विनंती करीत असतां, ४ तुम-
च्या प्रत्येक आठवणीवरून आपल्या देवाचा उपकार
मानितों; ५ पहिल्या दिवसापासून आजपर्यंत
शुभवर्त्तमानामध्यें तुमच्या भागीपणामुळें आपल्या
देवाचा उपकार मानितों. ६ कां, हाच मला
भरवसा आहे कीं, तो तुह्मामध्यें चांगलें काम
आरंभून, तें येशू ख्रीस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस
नेईल. ७ जसें तुह्मा सर्वांविषयीं असें मानणें
मला योग्य आहे तसें; कारण कीं मी आपल्या बंध-
नांमध्यें व प्रत्युत्तर देण्यामध्यें, व शुभवर्त्तमानाच्या
प्रतिपादनामध्यें, तुह्मी सर्व माझ्या संगतीं कृपेचे
भागीदार असतां, तुह्मास अंतःकरणात राखितों.
८ देव तर माझा साक्षी आहे कीं, मी येशू ख्री-
स्ताच्या कळवळ्याने तुह्मा सर्वांसाठीं किती उत्कं-
ठित आहें. ९ आणि मी असी प्रार्थना करितों
कीं, तुमची प्रीति ज्ञानाने व सर्व विवेकाने उत्तरोत्तर
अतिशयें वाढावी; १० यासाठीं कीं जीं भिन्न-
भिन्न तीं तुह्मी पारखून घ्यावीं, असें कीं तुह्मी
ख्रीस्ताच्या दिवसापर्यंत भावार्थी व निर्दोष व्हावें;
११ आणि येशू ख्रीस्ताकडून न्यायीपणाच्या फळानी
भरलेले व्हावें, देवाचें गौरव व स्तुति व्हावी ह्मणून.
१२ आणि अहो भावानो, हें तुह्मी जाणावें
ह्मणून मी इच्छितों कीं, मजविषयींच्या गोष्टी
शुभवर्त्तमानाच्या अधिक वृद्धीच्या कामास आल्या;
१३ असें कीं ख्रीस्तासाठीं जीं माझीं बंधनें तीं
अवघ्या सरकारवाड्यांत व इतर सर्व ठिकाणीं प्रगट
झालीं आहेत. १४ आणि प्रभूकडील बहुत
भाऊ माझ्या बंधनांवरून भरवसा धरून, निर्भयाने
वचन बोलायास फार अधिक धीर धरितात. १५
कित्येक तर हेव्याने व विरोधाने, आणि कित्येक
सुबुद्धीने ख्रीस्त गाजवितात. १६ कोणी माझ्या
बंधनांवर अणखी संकट आणावें ह्मणून, शुद्धभावाने
नव्हे, विरोधाने ख्रीस्ताचें वर्त्तमान सांगतात. १७
दुसरे मी शुभवर्त्तमानाविषयीं प्रत्युत्तर देण्यासाठीं
ठेवलेला आहें, हें जाणून प्रीतीने सांगतात. १८
तर काय? केवळ सर्व प्रकारें ख्रीस्ताचें वर्त्तमान
निमित्ताने किंवा खरेपणाने सांगतात, तरी त्यामुळें
मी आनंद करितों व आनंद करीनच करीन; १९
कां तर मी जाणतों कीं, तें तुमच्या प्रार्थनेने व
येशू ख्रीस्ताच्या आत्म्याच्या पुरविण्याने, माझ्या
निभावण्याला साधील; २० कां तर माझी मोठी
अपेक्षा व आशा असी आहे कीं, मी कशांतहि
लाजणार नाहीं, तर अवघ्या धैर्याने, असें सर्वकाळ
तसें आतांहि जगण्यांत किंवा मरण्यांतहि माझ्या
शरीराकडून ख्रीस्त थोर मानण्यांत येईल.
२१ कां तर मला जगणें हें ख्रीस्त, व मरणें
हें लाभ. २२ आणि जर देहांत जगणें तर हें
मला कामाचें फळ, आणि ह्या कोणतें निवडावें हें
मी जाणत नाहीं. २३ तर मी दोहोंविषयीं
पेंचांत पडलों, कां कीं निघून ख्रीस्तासंगतीं व्हावें
असी मला उत्कंठा आहे, तें फार अधिक बरें.
२४ तथापि देहांत राहणें याची तुह्माकरितां अधिक
गरज आहे. २५ आणि हा भरवसा धरून मी
जाणतों कीं राहीन, आणि तुमच्या विश्वासाची
वृद्धि व आनंद यासाठीं तुह्मा सर्वांपाशीं राहीन;
२६ असें कीं तुह्माजवळ माझ्या फिरून येण्याव-
रून, मजकडून ख्रीस्त येशूविषयीं तुमचा आनंद
फार व्हावा. २७ केवळ ख्रीस्ताच्या शुभवर्त्त-
मानास योग्य असें आचरण करा, यासाठीं कीं
जर मी येऊन तुह्मास पाहतों किंवा दूर आहें,
तर ह्या तुह्माविषयींच्या गोष्टी अशा ऐकाव्या कीं,
तुह्मी एका चित्ताने स्थिर राहून, एका जिवाने शुभ-

वर्त्तमानाच्या विश्वासासाठीं एकत्र झटतां, २८
आणि कशातहि अडविणाऱ्यांकडून भयभीत झालां
नाहीं, हें त्यांस नाशाचें, परंतु तुह्मास तारणाचें
चिन्ह आहे, आणि हें देवापासून; २९ कां तर
ख्रीस्ताकरितां तुह्मावर हा उपकार झाला कीं, त्या-
जवर विश्वास ठेवावा असें केवळ नव्हे, तर त्याक-
रितां दुःखहि सोसावें; ३० कां, जसा मला
प्रयास आहे ह्मणून तुह्मी पाहिलें होतें आणि
आत्तां मला आहे ह्मणून ऐकतां, तोच तुह्मास
झाला.

## अध्याय २.

याकरितां जर ख्रीस्ताकडून कांहीं समाधान, जर
प्रीतीचें कांहीं शांतवन, जर आत्म्याचें कांहीं
भागीपण, जर कांहीं कळवळा व करुणा, २ तर
माझा आनंद पूर्ण करा, असा कीं सारिखा भाव
धरावा, सारिखीच प्रीति राखावी, ऐकमत्याचे,
एकचित्ताचे असावे. ३ भांडाळपणाने किंवा व्यर्थ
अभिमानाने कांहीं करूं नका, तर लीनभावाने आ-
पणापेक्षां एकमेकांस श्रेष्ठ मोजावें. ४ प्रत्येक
तुह्मी आपलें जें, त्यावरच लक्ष लावूं नका, तर
दुसऱ्यांचें जें, त्यावरहि प्रत्येकाने लक्ष लावावें,
५ ह्मणजे ख्रीस्त येशूचें चित्त होतें, तसेंच तुम-
चेंहि होवो. ६ तो देवाच्या रुपांत असून देवा-
समान असणें, हें अपहार मोजीत नव्हता. ७
तथापि त्याने आपणाला शून्य केलें, ह्मणजे दासाचें
रूप धरून माणसांच्या प्रतिमेने झाला. ८ आणि
माणसासारिख्या आकाराने प्रगट होऊन, त्याने
मरणापर्यंत, खांबींच्या देखील मरणापर्यंत मान्य
होऊन आपणाला नीच केलें. ९ त्यावरून देवाने
त्याला फारच उंच केलें आहे, आणि त्याला प्रत्येक
नांवापेक्षां श्रेष्ठ नांव दिल्हें आहे; १० असें कीं
आकाशांतले, व पृथ्वींतले, व पृथ्वीखालचे यांतील
प्रत्येक गुडघा येशूच्या नांवाने टेंकावा; ११ आणि
देव बाप याच्या गौरवासाठीं प्रत्येक जिभेने येशू
ख्रीस्त प्रभु आहे, असें कबूल व्हावें. १२ यास्तव
माझ्या प्रियानो, जसें तुह्मी सर्वदां मानिलें आहे,
मी जवळ होतों त्या वेळेस केवळ नव्हे, तर आतां
विशेषेंकरून मी दूर आहें त्या वेळेस, तसें भयाने
व कांपण्याने तुह्मी आपलें तारण साधून घ्या;
१३ कां तर जो आपल्या मनोदयाप्रमाणें तुह्मामध्यें
इच्छिणें व करणें प्रेरितो, तो देव आहे. १४
कुरकुरी व विवाद यांवांचून अवघीं करा; १५
यासाठीं कीं तुह्मी निर्दोष व साळसूद असीं या
वांकड्या व विपरीत पिढीमध्यें ठपक्याविरहित देवाचीं
लेंकरें व्हावीं, त्यांमध्यें तुह्मी जीवनाचें वचन प्रगट
करून, ज्योतींसारिखे जगांत प्रकाशा; १६
यासाठीं कीं, मी उगेंच धावलों नाहीं व म्या उगेंच
श्रम केला नाहीं, असा ख्रीस्ताच्या दिवसांत मला
उल्हास व्हावा.

१७ आणखी तुमच्या विश्वासाविषयीं यज्ञ व
सेवा यांवर मला अर्पिलें, तरी मी आनंद करितों
व तुह्मा सर्वांसंगतीं आनंदतों. १८ आणि तसेंच
तुह्मी आनंद करा, व माझ्या संगतीं आनंदा.

१९ आणि तुह्माविषयींच्या गोष्टी जाणून म्याहि
सुखी व्हावें, ह्मणून तीमथ्यसाला तुह्माकडे लवकर
पाठवावें, असी आशा प्रभु येशूकडून मला आहे.
२० कां तर तुह्माविषयींची चिंता मनापासून करील
असा कोणी समानशील माझ्या जवळ नाहीं. २१
कारण कीं ख्रीस्त येशूच्या गोष्टी नाहींत, आप-
ल्याच गोष्टी सर्व शोधितात. २२ परंतु त्याची
प्रतीति तुह्मी जाणतां कीं, जसें लेंकरूं बापाजवळ,
तसें त्याने शुभवर्त्तमानासाठीं माझ्या संगतीं चाकरी
केली आहे. २३ तर मजविषयींच्या गोष्टी मला
समजतील, तेव्हांच त्याला पाठवावें असी मला
आशा आहे. २४ आणि प्रभूवर माझा भरवसा
आहे कीं, मीहि स्वतां लवकर येईन. २५ तथापि
एपफ्रदीतस माझा भाऊ व संगतींचा कामकरी व
संगतींचा सैनिक, आणि तुमचा प्रेषित व माझी
गरज करणारा, याला तुह्माकडे पाठवावें हें मला
अगत्य वाटलें. २६ कारण कीं तो तुह्मा सर्वां-
विषयीं उत्कंठित व चिंतातुर होता, कां तर तो
रोगी झाला असें तुह्मी ऐकिलें होतें. २७ आणि
तो मरणाजवळ रोगी होता खरा, तथापि देवाने
त्यावर दया केली, आणि त्यावर केवळ नव्हे तर
मजवरहि, मला खेदावर खेद होऊं नये ह्मणून.
२८ यास्तव म्या अधिक त्वरेने त्याला पाठविलें आहे,
यासाठीं कीं तुह्मी त्याला फिरून पाहून आनंद
करावा, आणि माझा खेद कमी व्हावा. २९ तर
त्याला प्रभूमुळें पूर्ण आनंदाने अंगीकारा, आणि
तशांस प्रतिष्ठित मोजा. ३० कारण कीं ख्रीस्ता-
च्या कामामुळें तो जीव संकटांत घालून मरणाजवळ
आला, यासाठीं कीं माझ्या जवळ सेवा करण्याचें
जें तुमचें उणेपण, तें त्याने पूर्ण करावें.

## अध्याय ३.

शेवटीं अहो माझ्या भावांनो, प्रभूविषयीं आनंद
करा; तयाच गोष्टी तुह्मास लिहिणें हें मला
तर भारी नाहीं, आणि तुमच्या रक्षणार्थ आहे. २
कुत्र्यांविषयीं जपा, वाईट काम करणाऱ्यांविषयीं
जपा, व्यर्थ सुंतेविषयीं जपा; ३ कां तर आह्मी
खऱ्या सुंतेचे, आत्म्याने देवाची भक्ति करणारे व
ख्रीस्त येशूविषयीं आनंद करणारे व देहावर भर-
वसा ठेवणारे नाहींत, असे आहों. ४ तथापि
मला देहावर भरवसा ठेवण्याचें कारण आहे; जर
दुसऱ्या कोणाच्याने देहावर भरवसा ठेववतो, तर
मी अधिक; ५ आठव्या दिवसीं सुंता झालेला,
इस्राएल जातींतील, बन्यामीन वंशांतील, इब्र्यांतील
इब्री, नेमशास्त्राविषयीं परोशी, ६ आवेशाने मं-
डळीच्या पाठीस लागणारा, नेमशास्त्राकडून न्यायी-
पणाविषयीं निर्दोष. ७ परंतु ज्या गोष्टी मला
लाभ अशा होत्या, त्या म्या ख्रीस्तासाठीं हानि
अशा मोजिल्या आहेत; ८ होय तर खरेंच,
आणि ख्रीस्त येशू माझा प्रभु, याला जाणण्याच्या
उत्कृष्टतेमुळें मी अवघीं हानि अशीं मोजितों, त्याज-
करितां म्या अवघ्यांची हानि सोसिली, आणि तीं मळ
अशीं मोजितों, यासाठीं कीं म्या ख्रीस्ताला मिळ-
वावें, ९ आणि त्याकडे सापडावें, आणि नेमशा-
स्त्राकडून माझें न्यायीपण नव्हे, तर ख्रीस्तावरच्या
विश्वासाकडून, ह्मणजे जें न्यायीपण देवापासून वि-
श्वासावरून, तें मला असावें; १० यासाठीं कीं
तो व त्याच्या पुन्हा उठण्याचें सामर्थ्य, व त्याच्या
दुःखाचें भागीपण, हीं म्या त्याच्या मरणाच्या समा-
नतेचा होऊन जाणावीं; ११ ह्मणजे म्या कसेंहि
मेलेल्यांच्या पुन्हा उठण्यापर्यंत पोहंचावें, १२
मला इतक्यांत प्राप्त झालें, किंवा इतक्यात मी
पूर्ण झालों, असें नव्हे, तर मी यासाठीं पाठीं ला-
गतों कीं, ज्याकरितां ख्रीस्त येशूनें मला धरून
घेतलें, तें म्याहि धरून घ्यावें. १३ भावांनो, म्या
धरून घेतलें आहे, असें मी मोजीत नाहीं; तर
एक, मागील गोष्टी विसरून व पुढील गोष्टींकडे
झटून धावून, १४ मी खुणेकडे ख्रीस्त येशूकडून
जें देवाचें वरील बोलावणें, त्याच्या पणासाठीं पाठीं
लागतों. १५ तर आह्मी जितके पूर्ण, तितक्यानी
हाच भाव धरावा, आणि जर तुह्मी कशाविषयींहि
दुसरा भाव धरितां, तर देव तुह्मास तेंच प्रगट
करील. १६ तथापि आपण पोहंचलों तेथवर एका-
च नेमाने चालावें, एकच भाव धरावा.
१७ अहो भावांनो, माझे संगती अनुसारी व्हा,
आणि जसे आह्मी तुह्मास कित्ता आहों, त्याप्रमाणें जे
चालणारे त्यांकडे लक्ष लावा. १८ कां तर बहुत
असे चालतात कीं, ज्यांविषयीं म्या तुह्मास बहुत
वेळा सांगितलें आणि मी आताहि रडत सांगतों
कीं, ते ख्रीस्ताच्या खांबाचे वैरी आहेत; १९
नाश हा त्यांचा परिणाम, पोट हा त्यांचा देव,
आणि लाज हें त्यांचें गौरव आहे; पृथ्वीच्या
गोष्टींवर ते चित्त ठेवितात. २० तर आमचें प्रजा-
पण आकाशांत आहे, आणि तेथून तारणारा प्रभु
येशू ख्रीस्त याची आह्मी वाट पाहतों. २१ तो
ज्या सामर्थ्यानें अवघींच आपल्या स्वाधीन करायास
शक्तिमान आहे, तेणेंकरून आमचें नीचपणाचें श-
रीर आपल्या गौरवी शरिरासारिखें होण्यासाठीं
पालटील.

## अध्याय ४.

यास्तव अहो माझे प्रिय व उत्कंठापात्र भावांनो
माझा आनंद व मुगुट, प्रियांनो, प्रभूकडून
तसेच स्थिर राहा. २ मी युवदीयेला विनंती क-
रितों, आणि सुंतुखेला विनंती करितों कीं, त्यांनी
प्रभूकरितां एकचित्त असावें. ३ आणि हे खऱ्या
सोबत्या, मी तुलाहि विनंती करितों कीं, ज्या
बाया शुभवर्त्तमानाविषयीं माझ्या बरोबर झटल्या,
त्यांचें व क्लेमेन्साचेंहि, व माझे वरकड संगतीचे
कामकरी, ज्यांचीं नांवें जीवनाच्या पुस्तकांत आहेत,
त्यांचें सहाय कर.
४ प्रभूमुळें सर्वदा आनंद करा; मी पुन्हा सां-
गतों, आनंद करा. ५ तुमचा विनय सर्व माण-
सांस कळो, प्रभु जवळ आहे. ६ कशाचीहि
चिंता करूं नका, तर सर्व प्रसंगीं प्रार्थना व विनंती
व उपकारस्तुति करून, आपलीं मागणीं देवाला
कळवा. ७ आणि जी देवाची शांति, सर्व बुद्धीच्या
पलिकडे आहे, ती तुमच्या अंतःकरणांस व तुमच्या
मनांस ख्रीस्त येशूकडे राखील.
८ शेवटीं अहो भावांनो, जीं खरीं, जीं संभा-
वित, जीं न्यायी, जीं शुद्ध, जीं प्रिय, जीं सत्कीर्त्ति-
मान् आहेत, जर कांहीं सद्गुण, व जर कांहीं स्तुति,
तर त्यांचें मनन करा. ९ आणि जीं तुह्मी शि-
कलां, व स्वीकारलीं, व ऐकिलीं, व माझ्या ठायीं

पाहिलीं, तीं आचरा; ह्मणजे शांतीचा देव तुह्मा-
बरोबर होईल.
१० मला तर प्रभूकडून याविषयीं मोठा आनंद
झाला कीं, आतां तरी तुह्मी मजविषयींची चिंता
फिरून पालवली, याविषयीं तुह्मी चिंता करीतच
होतां, परंतु तुह्मास संधि नव्हती. ११ मी कम-
तीविषयीं बोलतों असें नव्हे, का तर मी ज्या अव-
स्थेंत आहें तींत तृप्त होण्यास शिकलों. १२
नीच होणें हें मला कळलें, आणि आपणाला
पुष्कळ असावें हेंहि मला कळलें; तृप्त होण्यास व
भुकेलाहि होण्यास, आणि समृद्ध होण्यास व उणा
होण्यास, असें सर्वकाळ व अवघ्यांविषयीं मी
शिकलों आहें. १३ मला सामर्थ्य देणाऱ्या ख्री-
स्ताकडून, मी सर्व करायास शक्तिमान आहें. १४
तथापि माझ्या संकटांत तुह्मी माझें सहाय केलें
हें ठीक केलें; १५ आणि अहो फिलिप्पैकरानो,
हेंहि तुह्मास ठाऊक आहे कीं, शुभवर्त्तमानाच्या
प्रारंभीं, मी मकदन्याहून निघालों, तेव्हां तुह्मावां-
चून कोणत्याहि मंडळीने, देणेंघेण्याच्या गोष्टींवि-
षयीं माझें सहाय केलें नाहीं. १६ कारण थें
थेस्सलनीकेंत माझ्या गरजेसाठीं तुह्मी एकदा, होय
दोनदाहि पाठविलें होतें. १७ मी दान पाहतों
असें नाहीं, तर तुह्माकडे मोजण्यांत येईल असें फळ
बहुत व्हावें, हें पाहतों. १८ मी तर अवघीं भ-
रून पावलों, आणि मला भरपूर झालें; तुह्मापासू-
न्न जीं तीं एपफ्रदीतसाकडून पावून मी पूर्ण झालों, तीं
सुगंधाचा वास, मान्य यज्ञ देवाला आवडता असीं
आहेत. १९ आणि माझा देव आपल्या गौरवी संप-
त्तीप्रमाणें ख्रीस्त येशूकडून तुमची सर्व गरज पुर-
वील. २० आतां देव ह्मणजे आमचा बाप याला
सदासर्वकाळ गौरव असो, आमेन.
२१ ख्रीस्त येशूकडील प्रत्येक पवित्राला क्षेम
सांगा, माझ्या संगतींचे भाऊ तुह्मास क्षेम सांगतात.
२२ सर्व पवित्र व विशेषेंकरून कादसाराच्या घरां-
तील तुह्मास क्षेम सांगतात. २३ आमचा प्रभु येशू
ख्रीस्त याची कृपा तुह्मा सर्वांवर असो. आमेन.

# कलस्सैकरांस पौलसाचें पत्र.

## अध्याय १.

कलस्सेंत ख्रीस्ताकडील पवित्र लोकांस व विश्वा-
सणाऱ्या भावांस, पौलस देवाच्या इच्छेकडून
येशू ख्रीस्ताचा प्रेषित याचा, व तीमथ्यस भावाचा
सलाम. २ देव आमचा बाप व प्रभु येशू ख्री-
स्त यांपासून तुह्मास कृपा व शांति असो.
३ आह्मी सर्वदा तुह्मासाठीं प्रार्थना करीत असतां,
ख्रीस्त येशूवरला तुमचा विश्वास, व अवघ्या पवि-
त्रांवरली प्रीति ऐकल्यावरून, ४ देव ह्मणजे आम-
च्या प्रभु येशू ख्रीस्ताचा बाप याची उपकारस्तुति
करितों. ५ कां तर जी आशा तुह्मासाठीं आकाशा-
मध्यें ठेविलेली आहे, तिजविषयीं तुह्मी शुभवर्त्त-
मानाच्या खरेपणाच्या वचनाकडून पूर्वीं ऐकिलें आहे;
६ कां कीं तें जसें सर्व जगांत, तसें तुह्माजवळ
पावलें, आणि ज्या दिवसीं तुह्मी देवाची कृपा ऐकि-
ली व खरेपणाने जाणिली, तेव्हांपासून जसें तुह्मा-
मध्यें, तसेंच फळ देत आहे. ७ त्याप्रमाणेंच एप-
फ्रास आमचा प्रिय सोबती दास, तुह्मासाठीं ख्री-
स्ताचा विश्वासू सेवक आहे, त्यापासून तुह्मास
विदित झालें आहे. ८ त्यानेच आत्म्याच्या यो-
गाने तुमची प्रीति आह्मास कळविली आहे. ९
आणि यावरून ती ऐकिली, त्या दिवसापासून आ-
ह्मी तुह्मासाठीं प्रार्थना करितां राहत नाहीं, आणि
असें मागतों कीं, सर्व ज्ञानाने व आत्मिक विवेकाने
त्याच्या इच्छेचा समज तुह्मास पूर्ण व्हावा; १०
यासाठीं कीं तुह्मी सर्व प्रकारें संतोषविण्याकरितां
प्रभुला योग्य चालावें, ह्मणजे प्रत्येक चांगल्या
कामांत फळ देऊन देवाच्या ज्ञानाविषयीं वाढावें.
११ आणि आनंदाने सर्व सहनता व धीरता कर-
ण्यासाठीं, त्याच्या गौरवी बळाप्रमाणें तुह्मी सर्व
सामर्थ्याने बळकट व्हावें; १२ आणि ज्या बापाने
आह्मास उजेडांतील पवित्रांच्या वतनभागासाठीं योग्य
केलें, त्याचा उपकार मानावा. १३ त्याने आह्मा-
स काळोखाच्या सत्तेंतून काढिलें, आणि आपल्या

प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून घातलें आहे. १४
त्या पुत्राकडून त्याच्या रक्ताने आह्मास खंडणी,
ह्मणजे पापांची क्षमा प्राप्त आहे. १५ तो अदृ-
श्य देवाची प्रतिमा, सर्व उत्पत्तीचा पहिला आहे.
१६ कारण कीं अवघीं त्याकडून उत्पन्न झालीं;
जें आकाशामध्यें व जें पृथ्वीवर, जें दृश्य व जें अदृश्य;
सिंहासनें, किंवा प्रभुत्वें, किंवा सत्ता, किंवा अधि-
कार, अवघीं त्याकडून व त्यासाठीं उत्पन्न झालीं;
१७ आणि तो अवघ्यांपूर्वी आहे, व त्याकडून अवघीं
व्यवस्थित आहेत. १८ आणि तोच शरिराचा
ह्मणजे मंडळीचा मस्तक आहे, तो प्रारंभ, मेले-
ल्यांमधून पहिला उठलेला आहे, असा कीं अव-
घ्यांविषयीं तो अग्रसर असावा. १९ कां तर
अवघी पूर्णता त्यामध्यें राहावी असें बरें वाटलें.
२० आणि त्याच्या खांबाच्या रक्ताकडून शांति कर-
वून, त्याचकडून अवघीं, पृथ्वीवरलीं किंवा आकाशां-
तलीं, त्यांचा आपणासीं समेट त्याचकडून करावा;
२१ आणि तुह्मी पूर्वी परके झालेले व दुष्टकर्मां-
कडून बुद्धीने वैरी असतां, २२ त्याने आतां त्या-
च्या मांसमय शरिराकडून मरणाने तुमचा समेट
केला आहे, यासाठीं कीं त्याने तुह्मास पवित्र व
निष्कळंक व निर्दोष असें आपल्या समोर ठेवावें.
२३ जर तुह्मी विश्वासांत अढळ व सुस्थिर राहतां,
आणि जें शुभवर्त्तमान तुह्मी ऐकिलें जें आकाशा-
खालील प्रत्येक प्राण्याजवळ गाजविलें आहे, ज्या-
चा मी पौलस सेवक झालों आहें, त्याच्या आशे-
पासून ढळत नाहीं, तर होईल.

२४ आतां तुह्मासाठीं माझीं दुःखें यांमुळें मी
आनंद करितों, आणि आपल्या देहाने ख्रीस्ताच्या
संकटांतलें उणेपण त्याचें शरीर ह्मणजे मंडळी
इच्यासाठीं पूर्ण करितों; २५ देवाचें वचन पूर्ण
करायास जो देवाचा कारभार मला तुह्मासाठीं
दिल्हा, त्याप्रमाणें मी तिचा सेवक झालों आहें.
२६ तें युगांपासून व पिढ्यांपासून गुप्त ठेविलेलें गूढ
होतें, परंतु आतां तें त्याच्या पवित्रांस प्रगट झालें
आहे. २७ त्यांस हें कळवायास देवाला बरें वा-
टलें कीं, राष्ट्रांसंबंधी त्या गूढाच्या गौरवाची संपत्ति
काय, ती तर तुह्मांमध्यें ख्रीस्त, ही गौरवाची
आशा आहे. २८ याचें वर्त्तमान आह्मी सांगतों,
आणि सर्व ज्ञानाने प्रत्येक माणसाला बोध करितों,
आणि प्रत्येक माणसाला शिकवितों, आह्मी प्रत्येक
माणसाला ख्रीस्त येशूकडून पूर्ण करून ठेवावें
ह्मणून. २९ याकरितांहि जी त्याची प्रेरणा मला
बळाने प्रेरिती तिजप्रमाणें मी झटून श्रम करितों.

## अध्याय २.

तर मी इच्छितों कीं, तुह्मी हें जाणावें, तुह्मा-
साठीं व जे लावदिकीयांत त्यांसाठीं व जित-
क्यांनी माझें तोंड प्रत्यक्ष पाहिलें नाहीं त्यांसाठीं,
माझी केवढी काळजी आहे, २ तो यासाठीं कीं
त्यांच्या अंतःकरणांनी समाधान पावावें, देवाचें ह्मणजे
बापाचें व ख्रीस्ताचें गूढ समजण्याकरितां परिपूर्ण
ज्ञानाची सर्व संपत्ति प्राप्त होण्यासाठीं, ते प्रीती-
कडून बळकट जोडण्यांत यावे; ३ त्या ख्रीस्ता-
मध्यें ज्ञानाचे व बुद्धीचे अवघे संग्रह गुप्त ठेविले
आहेत. ४ आणि मोहक गोष्टींकडून कोणी तुह्मा-
स भुलवूं नये, ह्मणून मी तसें सांगतों; ५ कां
कीं जरी मी देहाने दूर आहें, तरी आत्म्याने तुम-
च्या जवळ आहें; आणि तुमचें यथास्थितपण व
ख्रीस्तावरल्या तुमच्या विश्वासाचें स्थिरपण पाहून
आनंद करितों. ६ तर ख्रीस्त येशु प्रभु याला
तुह्मी अंगीकारिलें तसें त्याप्रमाणें चाला. ७ त्या-
मध्यें मुळावलेले व रचलेले व तुह्मास शिकविल्या-
प्रमाणें विश्वासाने बळावलेले असे व्हा; आणि
त्या विश्वासांत उपकारस्तुति करण्याने फार वाढा.

८ माणसांच्या सांप्रदायांप्रमाणें, ह्मणजे ख्री-
स्ताप्रमाणें नव्हे तर जगाच्या तत्वांप्रमाणें जें ग्राम्य
व पोकळ फसवणी, तेणेंकडून कोणी तुह्मास फसवूं
नये ह्मणून जपा. ९ कारण कीं ख्रीस्तामध्यें
देवपणाचें अवघें पूर्णपण शरीररूपें राहतें. १०
आणि जो सर्व सत्तेचा व अधिकाराचा मस्तक आहे,
त्यामध्यें तुह्मी पूर्ण झालेले आहां. ११ आणि
हातांनी केलेली नाहीं, अशा सुंतेने तुह्मी त्याज-
कडून सुंता झालेले आहां; देहपापें असें अंग
ख्रीस्तसंबंधी सुंतेकडून काढून टाकिलें आहे; १२
त्याच्या संगतीं तुह्मी बाप्तिस्म्याने पुरलां, त्याजक-
डून तुह्मी, त्याला मेलेल्यांमधून उठविणारा देव
याच्या सामर्थ्याच्या विश्वासाने उठविलेले आहां.
१३ आणि पातकें व तुमच्या देहाची असुंता, यांक-
डून तुह्मी मेले असतांहि, त्याने तुमच्या सर्व अप-
राधांची क्षमा करून तुह्मास त्याच्या संगतीं जिवंत
केलें आहे, १४ आणि आह्मावर जो विधींतला
हस्तलेख आह्माला विरुद्ध होता, तो खोडून व
खांबासीं खिळून त्याने मधून काढून टाकिला.
१५ याने त्याकडून श्रेष्ठ सत्तांस व अधिकारांस

नाडून त्यांविषयीं जयजयकार करून प्रगटपणें
दाखविलें.

१६ तर खाण्याविषयीं, किंवा पिण्याविषयीं,
किंवा सण किंवा अमावास्या किंवा शाब्बाथ यांवि-
षयीं कोणी तुमचा न्याय न ठरवो. १७ तीं हो-
णाऱ्या गोष्टींची सावली असीं आहेत, परंतु शरीर
ख्रीस्ताचें. १८ नम्रता व दुतांची सेवा यांची
आवड धरून, कोणी तुह्मास न फसवो; त्यानें जीं
पाहिलीं नाहींत त्यांमध्यें तो घुसतो, आपल्या देहसं-
बंधी बुद्धीने व्यर्थ फुगतो, १९ व मस्तकाला धरीत
नाहीं; त्या मस्तकापासून सर्व शरीर सांध्यांकडून व
जोडणाऱ्या शिरांकडून पुरवठा पावून व दृढ होऊन
देवसंबंधी वृद्धीने वाढतें. २० यास्तव तुह्मी ज-
गाच्या तत्वांविषयीं ख्रीस्ताच्या संगतीं जर मेले
आहां, तर जगांत जिवंतांसारिखे नेम कां धरितां?
२१ शिवूं नये, चाखूं नये, चाचपूं नये; २२ हीं
अवघीं वहिवाटीनें नाशासाठीं आहेत, माणसांच्या
आज्ञा व उपदेश यांप्रमाणें. २३ यांत इच्छारूप
सेवेने व दीनभावाने व शरिराविषयींच्या निष्काळ-
जीने ज्ञानाचा भास आहे खरें, तो देहाला मान
नसतांहि तृप्त करण्यासाठीं मात्र आहे.

## अध्याय ३.

यास्तव तुह्मी ख्रीस्ताच्या संगतीं जर उठविलेले
तर वरल्या गोष्टी, ख्रीस्त देवाच्या उजवी-
कडे बसला आहे तेथल्या, शोधा. २ वरल्या
गोष्टींकडे चित्त द्या; पृथ्वीतल्या गोष्टींकडे नका;
३ कां तर तुह्मी मेले आहां आणि तुमचा जीव
ख्रीस्ताच्या संगतीं देवापासीं गुप्त आहे. ४
ख्रीस्त आमचें जीवन प्रगट होईल तेव्हां तुह्मीहि
त्याच्या संगतीं गौरवाने प्रगट व्हाल.

५ तर पृथ्वीवरील तुमचीं अंगें, ह्मणजे व्यभि-
चार, अशुद्धपण, चेतना, दुष्टउत्कंठा, व लोभ, हा
मूर्त्तिपूजा आहे, यांस तुह्मी जिवें मारा. ६ त्यां-
करितां आज्ञाभंगाच्या पुत्रांवर देवाचा राग होतो.
७ त्यांमध्यें तुह्मीहि अगोदर चालला, तुह्मी त्यांत
वागत होतां तेव्हां; ८ परंतु आतां राग, आवेश,
दुष्टपण, निंदा, आपल्या मुखापासून अमंगळ
बोलणें हीं अवघीं तुह्मी दूर करा. ९ एकमेकांसीं
लबाडी करूं नका; कां, तुह्मी जुनें मनुष्यपण त्या-
च्या करण्यांसुद्धां टाकिलें, १० आणि जें नवें
मनुष्यपण त्याच्या उत्पन्न करणाऱ्याच्या प्रतिमेप्रमाणें
ज्ञानाविषयीं नवें केलेलें, तें अंगीं ल्यालां. ११
एथें हेल्लेणी व यहूदी, सुंता व असुंता, परजातीचा
व स्कुथीय, दास व स्वतंत्र, हे नाहींत; तर ख्रीस्त
अवघींच व अवघ्यांमध्यें. १२ तर देवाचे निवड-
लेले, पवित्र व आवडते यांसारिखे, करुणेचा कळ-
वळा, उपकारीकपण, नम्रभाव, लीनता, सहनता हीं
अंगीं ल्या. १३ एकमेकांचें सहन करा; आणि
कोणाचा कोणासीं वाद असल्यास एकमेकांची क्षमा
करा; ह्मणजे ख्रीस्ताने तुमची क्षमा केली तसी
तुह्मीहि करा. १४ आणि या सर्वांवर प्रीति
अंगीं ल्या; ही पूर्णतेचें बंधन आहे. १५ आणि
जिच्या करितां तुह्मास एक शरीर होण्यासाठीं बोला-
विलें, ती देवाची शांति तुमच्या अंतःकरणांत धनीपण
करो; आणि उपकारस्तुति करीत जा. १६ ख्री-
स्ताचें वचन तुह्मामध्यें सर्व ज्ञानाने अतिशयें राहो.
गीतें व स्तोत्रें व आत्मसंबंधी प्रबंध यांकडून तुह्मी
आपणांस उपदेश व बोध करा, कृपापूर्वक आपल्या
अंतःकरणाने प्रभूला गाते व्हा. १७ आणि बो-
लण्याने किंवा करण्याने, जें कांहीं तुह्मी करितां, तें
अवघें प्रभु येशूच्या नांवाने करा, आणि त्याज-
कडून देवाची ह्मणजे बापाची उपकारस्तुति करा.

१८ बायकानो, तुह्मी जसें प्रभूपासीं उचित
आहे, तसें आपल्या नवऱ्यांस मान्य असा. १९
नवऱ्यानो, तुह्मी आपल्या बायकांवर प्रीति करा,
आणि त्यांसीं कडू होऊं नका. २० लेंकरानो,
तुह्मी अवघ्यांविषयीं आपल्या आईबापांस माना;
कां तर हें प्रभूला आवडतें. २१ बापानो, तुह्मी
आपल्या लेंकरांस चिढवूं नका, त्यानी उदास होऊं
नये ह्मणून. २२ दासानो, जे देहाविषयीं धनी,
त्यांस अवघ्यांविषयीं माना; मनुष्यांस संतोषवि-
णारे यांसारिखें तोंडापुढल्या चाकरीने नका, तर अंतः-
करणांतील सालसपणाने, देवाला भिऊन त्यांस माना.
२३ आणि जें कांहीं तुह्मी करितां तें अवघें जसें
माणसांसाठीं तसें नका, तर प्रभूसाठीं जिवापासून
करा; २४ कारण तुह्मास ठाऊक आहे कीं,
प्रभूपासून वतनरूप फेड पावाल; कां तर प्रभु
ख्रीस्ताची चाकरी तुह्मी करितां. २५ आणि
अन्याय करणारा याने जो अन्याय केला त्याचें
फळ तो पावेल, आणि पक्षपात नाहीं.

## अध्याय ४.

अहो धनी, जें यथान्याय व बरोबर तें दासांस
द्या; कारण तुह्मास ठाऊक आहे कीं, तुमचा
धनी आकाशामध्यें आहे.

२ प्रार्थनेंत टिका, व तिजमध्यें उपकारस्तुतीसुद्धां
सावध असा. ३ अणखी आह्मासाठींहि प्रार्थना
करा कीं, ख्रीस्ताच्या ज्या गुह्यासाठीं मी बांधले-
लाहि आहें, तें सांगायास देवानें बोलण्याचें दार
आह्मासाठीं असें उघडावें कीं, ४ जसें मला
बोलावें लागतें, तसें म्या तें प्रगट करावें. ५ बाहे-
रल्यांजवळ सुज्ञपणानें चाला, वेळ खंडून घ्या. ६
तुमचें बोलणें सर्वकाळ कृपायुक्त असावें, मिठानें
चवदार केलेलें, ह्मणजे तुह्मास प्रत्येकाला कसकसें
उत्तर द्यावें लागतें, हें तुह्मी जाणावें.

७ तुखिकस प्रिय भाऊ व प्रभूकडील विश्वासू
सेवक, व सोबती दास, तो मजविषयींच्या सर्व
गोष्टी तुह्मास कळवील; ८ त्याला म्या तुह्मा-
जवळ यासाठींच पाठविलें कीं, तुह्माविषयींच्या
गोष्टी त्यानें जाणाव्या, आणि तुमच्या अंतःकरणांचें
सांतवन करावें; ९ त्यासंगतीं अनेसिमस विश्वासू
व प्रिय भाऊ, तुमच्यांतला आहे, त्यालाहि पाठ-
विलें; ते एथल्या सर्व गोष्टी तुह्मास कळवितील.
१० अरिस्तार्खस माझ्या संगतींचा बंदिवान
तुह्मास सलाम सांगतो, बार्णबाचा भाचा मार्क-
सहि; त्याविषयीं तुह्मास आज्ञा झाल्या आहेत,
जर तो तुह्माजवळ येतो तर त्याला अंगीकारा.
११ आणि युस्तस ह्मटलेला येशू सलाम सांगतो;
हे सुंतेचे आहेत, हे मात्र देवाच्या राज्यासाठीं संग-
तीचे कामकरी, हेच माझें सांतवन झाले. १२
एपफ्रास तुमच्यांतला ख्रीस्ताचा दास तुह्मास
सलाम सांगतो, तो प्रार्थनांमध्यें सर्वकाळ तुह्मा-
साठीं प्रयत्न करितो, यासाठीं कीं तुह्मी परिपूर्ण व
देवाच्या सगळ्या इच्छेप्रमाणें भरलेले, असें उभे
राहावें. १३ कां तर मी त्याविषयीं साक्ष देतों
कीं, त्याला तुह्मासाठीं व जे लावदिकीयांतले व जे
हेरापलिसांतले त्यांसाठीं फार आवेश आहे. १४
प्रिय वैद्य लुका व देमास तुह्मास सलाम सांगतात.
१५ लावदिकीयांतील भाऊ, व नुंफास व त्याच्या
घरीं जी मंडळी त्यांस सलाम सांगा. १६ आणि
हें पत्र तुह्मी वाचल्यावर, लावदिकीयांतील मंडळीं-
तहि वाचवावें, अणखी लावदिकीयांतून जें तें तुह्मीहि
वाचावें. १७ आणि अर्खिप्पसाला सांगा कीं,
जी सेवा तुला प्रभूकडून मिळाली ती त्वां पूर्ण
करावी, ह्मणून जप. १८ माझ्या पौलसाच्या
हातानें सलाम, माझीं बंधनें आठवा; तुह्मावर
कृपा असो. आमेन.

# थेस्सलनीकेकरांस पौलसाचें पहिलें पत्र.

## अध्याय १.

देव बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांकडील थेस्सल-
नीकेकरांची मंडळी इला पौलस व सिलवा-
नस व तीमथ्यस यांचा सलाम; देव आमचा
बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांपासून तुह्मास कृपा व
शांति असो.

२ आह्मी आपल्या प्रार्थनांमध्यें तुमची आठवण
करून सर्वदा तुह्मा सर्वांविषयीं देवाची उपकारस्तुति
करितों; ३ कां, देव आमचा बाप यासमोर
तुमचें विश्वाससंबंधी काम व प्रीतिसंबंधी श्रम,
आणि आमचा प्रभु येशू ख्रीस्त याबरच्या आशा-
संबंधी सहनता, हीं आह्मी सर्वदा आठवितों; ४
कारण, अहो देवाकडून प्रीति पावलेल्या भावानो,
तुमचें निवडणें आह्मास कळलें. ५ कां कीं आ-
मचें शुभवर्त्तमान केवळ शब्दानें नव्हे, तर साम-
र्थ्यानें व पवित्र आत्म्यानें व बहुत निर्धारानेंहि
तुह्माकडे आलें; त्याप्रमाणें आह्मी तुह्माकरितां
तुह्मामध्यें कसे होतों हें तुह्मास ठाऊक आहे. ६
आणि तुह्मी पवित्र आत्म्याच्या संबंधी आनंदानें
बहुत संकटांत वचन अंगीकारून आमचे व प्रभूचे
अनुसरणारे झालां; ७ असें कीं मकदन्या व
अखाया यांतील सर्व विश्वासणाऱ्यांस तुह्मी कित्ते
झालां आहां; ८ कां तर प्रभूचें वचन तुह्मा-
पासून बाहेर वाजलें; मकदन्या व अखाया यांत
केवळ नव्हे, तर सर्व ठिकाणींहि देवावरला तुमचा
विश्वास प्रगट झाला आहे, यास्तव आह्मी कांहीं
सांगावें याचें अगत्य नाहीं. ९ कां कीं तुह्मामध्यें
आमचा प्रवेश कसा झाला, आणि तुह्मी जिवंत व
खऱ्या देवाची सेवा करण्यास, १० व त्याचा

पुत्र, आह्मास होणाऱ्या क्रोधापासून सोडविणारा
येशू, ज्याला त्याने मेलेल्यांतून उठविलें, त्याची
आकाशांतून येण्याची वाट पाहण्यास, मूर्तीपासून
देवाकडे कसे फिरलां, हें ते स्वतां आह्माविषयीं
सांगतात.

## अध्याय २.

तर अहो भावानो, तुह्मामध्यें आमच्या प्रवेशा-
विषयीं तुह्मी स्वतां जाणतां कीं, तो व्यर्थ झाला
नाहीं; २ तर तुह्मास कळल्याप्रमाणें पूर्वी फि-
लिप्पैंत आह्मी दुःख भोगिल्यावर व गांजणूक सोस-
ल्यावर, देवाचें शुभवर्त्तमान बहुत कष्टांनी तुह्मा-
जवळ सांगायास, आह्मी आपल्या देवाकडून धैर्य-
वान झालों; ३ कां तर आमचा बोध फसवि-
ण्याचा नाहीं, व अशुद्धपणाचा नाहीं, व कपटाचा
नाहीं; ४ तर असें देवाने शुभवर्त्तमान सोंपायाला
आह्मास योग्य मोजिलें, तसें आह्मी माणसांस
संतोषविल्यासारिखें नव्हे, तर आमचीं अंतः-
करणें पारखणारा देव याला संतोषवितां बोलतों.
५ कां तर तुह्माला कळल्याप्रमाणें आह्मी फुसला-
वण्याच्या बोलण्यांत कधीं नव्हतों, व लोभाच्या
ढोंगांत नव्हतों, देव साक्षी आहे. ६ आणि माण-
सांपासून, तुह्मांपासून किंवा दुसऱ्यांपासून गौरव
मिळविण्यास पाहिलें नाहीं, जरी आह्मी ख्रीस्ताचे
प्रेषित असतां भार घालायास अधिकारी होतों
तरी; ७ तर आह्मी तुह्मामध्यें सौम्य होतों, जसी
दाई आपल्या लेंकरांचा प्रतिपाळ करिती, ८
तसें आह्मी तुमची ममता करीत असतां तुह्मास
केवळ देवाचें शुभवर्त्तमान नव्हे, तर आपले जीवहि
देण्यास तयार होतों, कारण कीं तुह्मी आह्मास
प्रिय होतां. ९ तर अहो भावानो, आमचा श्रम
व कष्ट यांची आठवण तुह्मास आहे, कां कीं आह्मी
तुह्मामधील कोणावर भार घालूं नये ह्मणून रात्रंदिवस
मेहेनत करीत असतां तुह्मास देवाचें शुभवर्त्तमान
गाजविलें. १० आह्मी तुह्मा विश्वासणाऱ्यांमध्यें
केवढ्या पवित्रपणाने व नीतीने व निर्दोषतेने होतों,
याविषयीं तुह्मी व देवहि साक्षी आहे. ११
त्याप्रमाणें तुह्मास ठाऊक आहे कीं, जसा बाप
आपल्या लेंकरांस तसे आह्मी तुह्मामधील प्रत्ये-
कास बोधीत व समाधान करीत, आणि प्रमाण
देऊन सांगत होतों कीं, १२ ज्या देवाने आपलें
राज्य व गौरव यांत तुह्मास बोलाविलें आहे,
त्याला योग्य तसे तुह्मी चालावें. १३ आणि
याकरितां आह्मी देवाची उपकारस्तुति नेहमी करितों
कीं, तुह्मी आह्माजवळून देवाचें वचन ऐकून स्वीका-
रीत असतां, तें माणसाचें वचन असें नव्हे, तर
असें खरेंच आहे देवाचें वचन तसें घेतलें, तोच
तुह्मा विश्वासणाऱ्यांस प्रेरणा करितो. १४ कां
तर अहो भावानो, ख्रीस्त येशूकडे देवाच्या ज्या
मंडळ्या यहूदांत आहेत त्यांचे अनुसारी तुह्मी
झालां; कां कीं असीं त्यानी यहूद्यांकडून दुःखें
सोसिलीं, तसींच तुह्मीहि आपल्या जातीच्या लोकां-
कडून सोसिलीं. १५ त्या यहूद्यानी प्रभु येशूला
व आपल्या भविष्यवाद्यांसहि जिवें मारिलें, आणि
आमचा पाठलाग केला; ते देवाला संतोषवीत
नाहींत, व सर्व माणसांसहि प्रतिकूळ आहेत, १६
विदेशी तारण पावायासाठीं आह्मी त्यांसीं सांगावें,
हें ते मना करितात; येणेंकरून ते आपलीं पापें
सर्वदा परिपूर्ण करितात, आणि क्रोधाने त्यांस शेव-
टपर्यंत अटोपिलें आहे.

१७ तर अहो भावानो, आह्मी अंतःकरणाने
नव्हे, तर देहाने मात्र तुह्मांपासून घडीभर दूर
झालों असतां, तुमचें तोंड पाहायास बहुत उत्कंठेने
फारच प्रयत्न केला. १८ यास्तव आह्मी ह्मणजे
म्या पौलसाने एकदां, होय दोनदांहि तुह्माकडे
येण्यास योजिलें, परंतु सैतानाने आह्मास अड-
विलें. १९ कां तर आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याच्या येण्याच्या वेळेस त्यासमोर आमची आशा,
किंवा आनंद, किंवा उल्हासण्याचा मुगुट काय?
तुह्मीच तसे आहां कीं नाहीं? २० होय, तुह्मी
आमचें गौरव व आनंद आहां.

## अध्याय ३.

यास्तव आमच्याने अणखी सोसवेना तेव्हां आह्मी
अथेनैंत एकलेच राहावें, हें आह्मास बरें
वाटलें. २ आणि तीमथ्यस आमचा भाऊ व
देवाचा सेवक, आणि ख्रीस्ताच्या शुभवर्त्तमाना-
विषयीं आमच्या संगतीचा कामकरी, याला आह्मी
यासाठीं पाठविलें कीं, त्याने तुह्मास स्थिर करावें,
आणि तुमच्या विश्वासाविषयीं तुमचें समाधान
करावें; ३ असें कीं कोणीहि या संकटांमुळें ढळूं
नये, कारण तुह्मी स्वतां जाणतां कीं, आह्मी यासा-
ठींच ठेविलेले आहों. ४ कां कीं आह्मी तुह्माजवळ
होतों, तेव्हां असें आह्मी तुह्मास सांगून ठेविलें

कीं, आह्मास संकट होणार आहे, त्याप्रमाणेंच
झालें, तुह्मास ठाऊकच आहे. ५ यामुळें मलाहि
अणखी सोसवेना तेव्हां म्या तुमचा विश्वास जाणा-
याकरितां पाठविलें; कोण जाणे, भुलविणाऱ्याने
तुह्मास भुलविलें व आमचा श्रम व्यर्थ झाला
असेल. ६ परंतु आतां तीमथ्यस तुह्मापासून
आह्माजवळ आला, आणि तुमचा विश्वास व प्रीति
यांचें सुवर्त्तमान, आणि जसें आह्मी तुह्मास, तसें
तुह्मीहि आह्मास पाहायाला उत्कंठित असतां आ-
मची चांगली आठवण सर्वदां करितां, हेंहि त्याने
आह्मास सांगितलें, ७ यावरून अहो भावानो,
आह्मी आपलें सर्व संकट व पेंच यांमध्यें तुमच्या
विश्वासावरून तुह्माविषयीं समाधान पावलों. ८
कां कीं आतां जर तुह्मी प्रभूकडे टिकतां, तर
आह्मी जगतों. ९ कां तर आह्मी आपल्या देवा-
समोर तुह्माकडून ज्या आनंदाने आनंदित आहों,
त्या सर्वांमुळें आमच्याने तुह्माविषयीं देवाची किती
उपकारस्तुति करवेल! १० कारण कीं रात्रंदिवस
आह्मी फार विशेष प्रार्थना करितों कीं, आह्मी
तुमचें तोंड पाहावें, आणि तुमच्या विश्वासाचीं
उणीं पूर्ण करावीं. ११ आणि स्वतां देव ह्मणजे
आमचा बाप याने व आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याने आमचें येणें तुह्माकडे होऊं द्यावें. १२ आणि
जसी आमची प्रीति तुह्मावर तसी प्रभूने तुमचीहि
एकमेकांवर व सर्वांवर वाढवून फार करवावी; १३
यासाठीं कीं आमचा प्रभु येशू ख्रीस्त आपल्या
सर्व पवित्रांसुद्धां येईल, त्या वेळेस त्याने तुमचीं
अंतःकरणें देव आमचा बाप यासमोर पवित्रपणाने
निर्दोष असीं स्थापावीं.

## अध्याय ४.

तर अहो भावानो, शेवटीं आह्मी प्रभु येशूमुळें
तुह्मास विनंती करून बोध करितों कीं, तुह्मी
कसें चालून देवाला संतोषवावें हें तुह्मी आह्मा-
जवळून ऐकून घेतलें, त्याप्रमाणें उत्तरोत्तर अधिक
करावें. २ कां तर आह्मी प्रभु येशूमुळें तुह्मास
कोणकोणत्या आज्ञा दिल्या त्या तुह्मास ठाऊक
आहेत. ३ अणखी ही देवाची इच्छा आहे, तुमची
पवित्रता व्हावी, तुह्मी व्यभिचारापासून दूर राहावें.
४ तुह्मामधील प्रत्येकाने आपलें पात्र पवित्रपणाने
व मर्यादेने राखायास जाणावें. ५ इच्छेच्या चेत-
नेने जसें देवाला न जाणणारीं राष्ट्रें तसें नाहीं. ६
कोणी उल्लंघून व्यवहारांत आपल्या भावाचें हरण
करूं नये, कारण कीं प्रभु अशा सर्वांचा सूड
घेणारा आहे, जसें आह्मी पूर्वींहि तुह्मास सांगितलें
व प्रमाण पटविलें, तसें. ७ कां तर देवाने आ-
ह्मास अशुद्धपणांत नव्हे, तर पवित्रपणांत बोला-
विलें आहे. ८ तर यावरून अव्हेरणारा माण-
साला नव्हे, तर ज्या देवाने आपला पवित्र आत्मा
आह्मास दिल्हा त्याला अव्हेरितो.

९ भावांच्या प्रीतीविषयीं तर आह्मी तुह्मास
लिहावें, याची तुह्मास गरज नाहीं, कां कीं एकमे-
कांवर प्रीति करावी, असे तुह्मी स्वतां देवाकडून
शिकविलेले आहां. १० अणखी सगळ्या मक-
दन्यांतील सर्व भावांवर तुह्मी ती करीतच आहां;
तरी अहो भावानो, आह्मी तुह्मास असी विनंती
करितों कीं, तुह्मी उत्तरोत्तर अधिक करावी; ११
आणि स्वस्थ राहण्यास झटावें, आणि आपापलेंच
कामकाज करावें, आणि तुह्मी स्वतां आपल्या
हातांनी काम करावें, जसें आह्मी तुह्मास आज्ञा केली
आहे तसें; १२ यासाठीं कीं बाहेरल्यांसीं तुह्मी
उत्तम प्रकारें वागावें, आणि तुह्मास कशाचीहि
अगत्य नसावें.

१३ आणि अहो भावानो, निजलेले यांविषयीं
तुह्मी अज्ञानी असावें असी माझी इच्छा नाहीं;
यासाठीं कीं ज्या वरकड लोकांस आशा नाहीं त्यां-
सारिखा तुह्मीहि खेद करूं नये. १४ कारण
कीं येशू मेला व फिरून उठला, असा आह्मी
विश्वास धरितों, तर तसेंच येशूकडून निजलेले
यांस देव त्याच्या संगतीं आणवील. १५ कां तर
आह्मी प्रभूच्या वचनावरून हें तुह्मास सांगतों कीं,
जे प्रभूच्या येण्यापर्यंत जिवंत राहतात, ते आह्मी
निजलेल्यांच्या पूर्वी होणार नाहीं. १६ कां कीं
प्रभु आपण गर्जनेसुद्धां आद्यदूताच्या वाणीसुद्धां व
देवाच्या तुतारीसुद्धां आकाशांतून उतरेल, आणि
ख्रीस्ताकडील मेलेले ते पहिल्याने पुन्हा उठतील.
१७ मग जे जिवंत राहतात, ते आह्मी त्यांच्या
संगतीं अंतराळांत प्रभूला भेटण्यासाठीं ढगांमध्यें
हिरावण्यांत येऊं, आणि तसें प्रभूच्या संगतीं
सर्वदां राहूं. १८ यास्तव या वचनांकडून एकमेकांचें
समाधान करा.

## अध्याय ५.

अणखी अहो भावानो, काळ व समय यांविषयीं
तुह्मास लिहावें याचें तुह्मास अगत्य नाहीं.

२ कां तर तुह्मी स्वतां पुरतें जाणतां कीं, जसा
रात्रीं चोर, तसा प्रभूचा दिवस येतो. ३ कारण
कीं जेव्हां ते ह्मणतात, शांति व निर्भयपण, तेव्हां
जसी गरोदर बायकोची वेदना तसा त्यांवर अक-
स्मात् नाश येईल, आणि ते निभावणार नाहींत.
४ परंतु अहो भावानो, तुह्मी अंधारांत नाहीं, असें
कीं त्या दिवसानें चोरासारिखें तुह्मास अटोपावें.
५ सर्व तुह्मी उजेडाचे पुत्र, ह्मणजे दिवसाचे पुत्र
आहां, आह्मी रात्रीचे व अंधाराचे नाहीं. ६ तर
यावरून आह्मी वरकडांसारिखी झोंप घेऊं नये, तर
जागे व सावध असावें. ७ कां तर झोंप घेणारे
रात्रीं झोंप घेतात, आणि माजणारे रात्रीं माजतात.
८ परंतु आह्मी दिवसांतले आहों, यास्तव सावध
असावें; विश्वास व प्रीति यांचें उरस्त्राण, व तार-
णाच्या आशेचा शिरटोप, हीं घालावीं. ९ कारण
कीं देवानें आह्मास क्रोधासाठीं नव्हे, तर आमचा
प्रभु येशू ख्रीस्त याकडून तारण पावण्यासाठीं
नेमिलें आहे; १० तो तर आह्माकरितां
मेला, यासाठीं कीं आह्मी जागे राहतों किंवा झोंप
घेतों, तरी आह्मी त्याच्या संगतीं जगावें. ११
यास्तव जसें तुह्मी करितां तसेंच परस्परांस बोध
करा, व एकमेकांची वृद्धि करा.

१२ आणि अहो भावानो, आह्मी तुह्मास वि-
नंती करितों कीं, तुह्मामध्यें जे श्रम करितात, व प्रभु-
संबंधी जे तुह्मावर असतात व तुह्मास बोध करि-
तात, त्यांस तुह्मी जाणावें; १३ आणि त्यांच्या
कामामुळें त्यांस प्रीतीनें फारच मानावें; तुह्मी
आपापल्यांत शांत असा. १४ आणि अहो भावा-
नो, आह्मी तुह्मास बोध करितों कीं, वात्रटांस
बोध करा, उदास्यांचें समाधान करा, अशक्तांस
आधार व्हा, सर्वांसीं सहनशील असा. १५
कोणी कोणाचें वाइटाबदल वाईट फेडूं नये ह्मणून
संभाळा; परंतु सर्वदा एकमेकांसीं व सर्वांसींहि
चांगलें करण्यास झटा. १६ सर्वदा आनंद करा.
१७ प्रार्थना अखंड करा. १८ अवघ्यांविषयीं उप-
कारस्तुति करा, कां तर तुह्मांविषयीं ख्रीस्त येशू-
मुळें देवाची इच्छा तसीच आहे. १९ आत्म्याला
विझवूं नका. २० भविष्यवादांचा धिकार करूं
नका. २१ सर्वांची पारख करा, चांगलें तें धरा.
२२ वाइटाच्या सर्व प्रकारांपासून दूर व्हा. २३
आणि शांतीचा देव स्वतां तुह्मास परिपूर्ण पवित्र
करो, आणि आमचा प्रभु येशू ख्रीस्त याच्या
येण्यापर्यंत तुमचा संपूर्ण आत्मा व प्राण व शरीर,
हीं निर्दोष राखण्यांत येवोत. २४ तुह्मास बोला-
वणारा विश्वासू, तो करीलच.

२५ भावानो, आह्मासाठीं प्रार्थना करा. २६
पवित्र चुंबनानें सर्व भावांस क्षेम द्या. २७ मी
तुह्मास प्रभूची शपथ घालतों कीं, हें पत्र सर्व
पवित्र भावांजवळ वाचवावें. २८ आमचा प्रभु
येशू ख्रीस्त याची कृपा तुह्मावर असो. आमेन.

# थेस्सलनीकेकरांस पौलसाचें दुसरें पत्र.

## अध्याय १.

देव आमचा बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांकडील
थेस्सलनीकेकरांच्या मंडळीला पौलस व सिल-
वानस व तीमथ्यस यांचा सलाम. २ देव आ-
मचा बाप व प्रभु येशू ख्रीस्त यांपासून तुह्मास
कृपा व शांति असो.

३ अहो भावानो, आह्मी सर्वदा तुह्मांविषयीं
देवाची उपकारस्तुति करायास बांधले आहों;
आणि तें योग्य आहे, कारण कीं तुमचा विश्वास
फार वाढला आहे, आणि तुह्मा सर्वांमधील प्रत्ये-
काची प्रीति एकमेकांवर विशेष आहे. ४ यास्तव
तुमचे सर्व पाठलाग व जीं संकटें तुह्मी सोसितां,
त्यांमध्यें तुमची सहनता व विश्वास, यांवरून
आह्मी स्वतां देवाच्या मंडळ्यांमध्यें तुह्मास वाखा-
णितों. ५ तीं तर देवाच्या यथार्थ न्यायाचें प्रमाण
आहेत, असें कीं देवाच्या ज्या राज्यासाठीं तुह्मी
सोसितां, त्याला योग्य असें तुह्मास मोजावें. ६
कां तर तुह्मास छळणारे त्यांची उलटी छळणूक
करावी, आणि छळलेल्या तुह्मास आमच्या बरोबर
विसांवा द्यावा, हें देवाला यथार्थ; ७ जेव्हां तर,
प्रभु येशू आपल्या सामर्थ्याच्या दुतांसुद्धां आकाशां-

तून प्रगट होईल, ८ तेव्हां तो अग्निज्वालायुक्त
येऊन, जे देवाला जाणत नाहींत, व आमचा प्रभु
येशू ख्रीस्त याचें शुभवर्त्तमान मानीत नाहींत,
त्यांचा सूड उगवील. ९ ते तर प्रभूच्या दृष्टी-
पासून व त्याच्या सामर्थ्याच्या गौरवापासून सर्व-
काळचा नाश, असा दंड सोसितील. १० तो
आपल्या पवित्रांकडून गौरव पावण्यासाठीं, आणि
विश्वासणाऱ्या सर्वांकडून आश्चर्यपात्र होण्यासाठीं
येईल, त्या दिवसीं; कारण कीं तुह्मी आमच्या सा-
क्षीवर विश्वास ठेविला. ११ आणि याकरितां
आह्मी तुह्मासाठीं सर्वदा प्रार्थना करितों कीं, आम-
च्या देवाने तुह्मास बोलावण्याला योग्य मानावें,
आणि चांगलेपणाचा सगळा मनोदय व विश्वाससं-
बंधी काम सामर्थ्यानें पूर्ण करावें; १२ असें कीं
आमचा देव व प्रभु येशू ख्रीस्त याच्या कृपेनें आ-
मचा प्रभु येशू ख्रीस्त याचें नांव तुह्माकडून व
तुह्मी त्याकडून गौरव पावावें.

## अध्याय २.

आणि अहो भावानो, आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याच्या येण्याविषयीं, व त्याजवळ आमच्या
एकवट होण्याविषयीं, आह्मी तुह्मास विनंती
करितों कीं, २ तुह्मी मनांत एकाएकीं डचकूं नका
व घाबरूं नका; आत्म्याकडून किंवा गोष्टीकडून
किंवा आमच्या सारिख्या पत्राकडूनहि नका, असें
कीं ख्रीस्ताचा दिवस जवळ आला आहे. ३ को-
णत्याहि प्रकारें कोणी तुह्मास फसवूं नये, कां कीं
त्याच्या अगोदर फितणें होईल, आणि नाशाचा पुत्र
तो पापरुपी माणूस प्रगट होईल. ४ तो विरोध
करून अवघें जें देव किंवा भजनीय ह्मटलेलें, त्या-
वर आपणाला उंचावितो; असें कीं मी देव आहें,
असें आपणाला दाखवितो देवाच्या देवळांत देवा-
सारिखा बसतो. ५ मी तुह्माजवळ होतों तेव्हां
हीं तुह्मास सांगितलीं, याची तुह्मास आठवण
नाहीं काय? ६ आणि तो आपल्या वेळेस प्रगट
व्हावा ह्मणून आतां कोणता प्रतिबंध आहे, हें तु-
ह्मास कळलें. ७ कां तर अधर्माचें गूज आतां
चाललें आहे, केवळ सध्या अडविणारा तो दूर
होई तोंपर्यंत अडवील; ८ आणि त्यानंतर अध-
र्मी प्रगट होईल, त्याला प्रभु आपल्या मुखांतील
श्वासानें नष्ट करील, आणि आपल्या येण्याच्या
तेजानें नाहींसें करील. ९ त्याचें येणें सैतानाच्या
करण्याप्रमाणें सर्व सामर्थ्य व चमत्कार व खोटे
उत्पात यांसुद्धां, १० आणि नाश पावणाऱ्यांचें
सर्व अन्यायरूप ठकविणें यांसुद्धां आहे, कारण कीं
त्यांनी आपलें तारण व्हावें, ह्मणून खरेपणाची
प्रीति धरिली नाहीं. ११ यामुळें देव त्यांवर ठक-
विण्याची प्रेरणा पाठवील कीं, ते खोटेपणावर वि-
श्वास ठेवितील; १२ यासाठीं कीं जे खरेपणावर
विश्वास ठेवीत नाहींत, तर अन्यायानें संतोष पाव-
तात, त्या सर्वांचा निवाडा व्हावा.

१३ अहो प्रभूकडून प्रीति पावलेल्या भावानो,
तुह्माविषयीं तर आह्मास सर्वदा देवाची उपकार-
स्तुति करणें प्राप्त आहे, कां कीं आत्म्याच्या पवित्र
करण्याकडून व खरेपणाच्या विश्वासाकडून देवानें
तुह्मास प्रारंभापासून तारणासाठीं निवडिलें आहे.
१४ यांत त्यानें तुह्मास आमच्या शुभवर्त्तमानाकडून
आमचा प्रभु येशू ख्रीस्त याचें गौरव मिळविण्या-
साठीं बोलाविलें आहे. १५ तर भावानो, याव-
रून स्थिर राहा, आणि बोलण्याकडून किंवा आम-
च्या पत्राकडून जे सांप्रदाय तुह्मास शिकविले, ते
बळकट धरा. १६ आणि आमचा प्रभु येशू
ख्रीस्त हा स्वतां व देव ह्मणजे आमचा बाप, ज्यानें
आह्मावर प्रीति केली, आणि सर्वकाळचें शांतवन व
चांगली आशा कृपेनें दिल्ही, १७ तो तुमच्या
अंतःकरणांस शांत करो, आणि प्रत्येक चांगली गोष्ट
व काम यांमध्यें तुह्मास स्थिर करो.

## अध्याय ३.

शेवटीं, भावानो, आह्मासाठीं प्रार्थना करा कीं,
प्रभूचें वचन वेगें चालावें, आणि जसें
तुह्मामध्यें तसेंच गौरव पावावें. २ आणि असी
कीं आह्मी वावग्या व दुष्ट माणसांपासून सुटावें,
कां तर अवघ्यांचा विश्वास नाहीं. ३ परंतु प्रभु
विश्वासू आहे, तो तुह्मास स्थिर करील व वाइटा-
पासून राखील. ४ आणि आह्मास तुह्माविषयीं
प्रभूचा असा भरवसा आहे कीं, आह्मी तुह्मास
जें सांगतों तें तुह्मी करितां व कराल. ५ आणि
प्रभूनें तुमचीं अंतःकरणें देवाच्या प्रीतींत व ख्री-
स्ताच्या सहनतेंत नीट लावावीं.

६ आणि भावानो, आह्मी आपल्या प्रभु येशू
ख्रीस्ताच्या नांवानें तुह्मास आग्रहानें सांगतों कीं,
प्रत्येक वावगा चालणारा भाऊ, व आह्माजवळून
घेतलेल्या सांप्रदायाप्रमाणें नाहीं, त्यापासून तुह्मी
दूर व्हावें. ७ कां तर तुह्मास आमचें अनुकरण

करें केलें पाहिजे, हें तुह्मी स्वतां जाणतां, का कीं
आह्मी तुह्मामध्यें वावगे नव्हतों. ८ आणि आह्मी
कोणाचें अन्न फुकट खाल्लें नाहीं, तर तुह्मामधील
कोणावर भार घालूं नये ह्मणून आह्मी श्रमानी व
कष्टाने रात्रंदिवस काम केलें; ९ आह्मास अधि-
कार नाहीं, असें नव्हे, तर यासाठीं कीं तुह्मी
आमचें अनुकरण करण्याकरितां आह्मी आपणच
तुह्मास कित्ता व्हावें. १० अणखी आह्मी तुह्मा-
जवळ होतों, तेव्हांहि आह्मी तुह्मास हें सांगून
नेमिलें कीं, जर कोणी काम करायास इच्छीत नाहीं,
तर त्याने खाऊंहि नये. ११ तर तुह्मामध्यें कि-
त्येक वावगे चालतात, कांहीं काम करीत नाहींत
पण चौढाळ आहेत, असें आह्मी ऐकतों. १२
तर अशांस आह्मी आग्रहाने सांगतों, व आमच्या
प्रभु येशू ख्रीस्तावरून बोध करितों कीं, त्यांनी
शांतीने काम करीत असतां आपलेंच अन्न खावें.
१३ आणि भावानो, तुह्मी चांगलें करितांना थकूं
नका. १४ आणि या पत्रांतील आमच्या गोष्टीला
कोणी जर न मानील, तर त्याची खूण धरा, व त्याची
सोबत धरूं नका, त्याला लाज वाटावी ह्मणून.
१५ तरी त्याला वैरी असें मोजूं नका, तर जसा
भावाला तसा बोध करा. १६ आणि शांतीचा
प्रभु स्वतां सर्व प्रकारें सर्वकाळ तुह्मास शांति देवो;
प्रभु तुह्मा सर्वांबरोबर असो.

१७ माझ्या पौलसाच्या हाताने सलाम, ही
प्रत्येक पत्रावर खूण आहे, असें मी लिहितों. १८
आमचा प्रभु येशू ख्रीस्त याची कृपा तुह्मा सर्वां-
वर असो. आमेन.

---

# तीमथ्यसाला पौलसाचें पहिलें पत्र.

## अध्याय १.

येशू ख्रीस्ताचा प्रेषित पौलस, आमच्या तारणा-
ऱ्या देवाकडून व प्रभु येशू ख्रीस्त आमचें
आशापात्र याकडून नेमलेला, २ याचा आपलेंच
विश्वासांतील लेंकरूं तीमथ्यस याला सलाम;
कृपा, दया, शांति हीं आमचा देव बाप यापासून,
व आमचा प्रभु ख्रीस्त येशू यापासून असोत. ३
त्वां एफससांत राहावें, असें म्या मकदन्यास जा-
तांना तुझ्याजवळ मागितलें, यासाठीं कीं त्वां कित्ये-
कांस सांगावें कीं, इतर उपदेश करूं नये. ४
आणि ज्या काहाण्यांवरून व अपार वंशावळ्यांवरून
विश्वासांतील देवसंबंधीं वृद्धि न होतां, वाद मात्र
उत्पन्न होतात, त्यांवर चित्त ठेवूं नये.

५ तर नेमशास्त्राचा परिणाम प्रीति आहे, ह्म-
णजे शुद्ध अंतःकरणांतील व चांगल्या भावांतील व
ढोंगरहित विश्वासांतील प्रीति; ६ यांपासून कि-
त्येक चुकून व्यर्थ बोलण्याकडे वळले आहेत; ७
ते नेमशास्त्राचे उपदेशक होण्यास इच्छितात, परंतु
आपण काय सांगतों, व कशांविषयीं प्रतिपादन क-
रितों, हें समजत नाहींत. ८ परंतु आह्मास ठा-
ऊक आहे कीं, नेमशास्त्राची वहिवाट जर कोणी
यथार्थ करील तर तें चांगलें आहे. ९ कारण हें
ठाऊक आहे कीं, न्यायीसाठीं नेमशास्त्र लाविलें
नाहीं, तर आज्ञाभंग करणारे व स्वच्छंदी, अभक्त व
पापी, अधर्मी व अमंगळ, बाप मारणारे व आई
मारणारे, मनुष्यघातक, १० शिंदळ, पुरुषसंभोगी,
मनुष्यांस चोरणारे, लबाड, शपथ मोडणारे यांसा-
ठीं, आणि शुद्ध उपदेशास जर दुसरें कांहीं विरुद्ध
आहे, तर यासाठीं आहे; ११ धन्य देवाच्या
गौरवाचें जें शुभवर्त्तमान मला सोंपिलें आहे, त्या-
प्रमाणें. १२ आणि मला शक्ति देणारा आमचा
प्रभु ख्रीस्त येशू याचा उपकार मी मानितों, का
कीं त्याने मला विश्वासू मोजून सेवेंत ठेविलें आहे;
१३ मी तर पूर्वीं निंदक व पाठलाग करणारा व
छळणारा होतों, तथापि न समजून म्या अविश्वासाने
तें केलें, यास्तव दया पावलों. १४ आणि ख्रीस्त
येशूवरील विश्वास व प्रीति यांसुद्धां आमच्या प्रभू-
ची कृपा फार विशेष झाली आहे. १५ ही गोष्ट
विश्वासू व पूर्ण अंगीकारास योग्य कीं, ख्रीस्त येशू
पाप्यांस तारायास जगांत आला, त्याच्यामध्यें मी पहि-
ला आहें. १६ तथापि याकरितां मी दया पावलों कीं,
येशू ख्रीस्ताने प्रथम मजविषयीं पूर्ण सहनशीलता
दाखवावी, असी कीं त्यावर जे सर्वकाळच्या जीव-

नासाठीं विश्वास ठेवणार आहेत, त्यांस उदाहरण व्हावें. १७ तर सर्वकाळचा राजा, अविनाशी, अदृश्य, एकच ज्ञानी देव, याचा सन्मान व गौरव सदासर्वकाळ असो; आमेन.

१८ हे मुला तीमथ्यसा, तुजविषयीं पूर्वीं झालेल्या भविष्य गोष्टी, त्यांप्रमाणें मी ही आज्ञा तुझ्या जवळ सांगून ठेवितों, त्वां त्यावरून चांगली लढाई करावी म्हणून; १९ आणि विश्वास व चांगला भाव धरावा, हा तर कित्येकांनी घालवून विश्वासाची तारूफूट केली आहे. २० त्यांमध्यें हुमनायस व अलक्षांद्रस आहेत, त्यांस म्या सैतानाच्या स्वाधीन केलें आहे, यासाठीं कीं त्यांनी निंदा न करायास शिकावें.

## अध्याय २.

तर सर्वांहून पहिलाच हा बोध मी करितों कीं, सर्व माणसांसाठीं विनंत्या, प्रार्थना, काकुळती, उपकारस्तुति, या कराव्या; २ राजांकरितां व जे मोठ्या पदवीचे आहेत त्या सर्वांकरितां, यासाठीं कीं आह्मी सर्व सुभक्तीने व गंभीरपणाने, शांतीचें व स्वस्थपणाचें आयुष्य घालवावें. ३ कां तर हें आमच्या तारणाऱ्या देवाच्या दिसण्यांत चांगलें व आवडतें. ४ तो इच्छितो कीं, सर्व माणसांनी तरावें, आणि खरेपणाचें ज्ञान पावावें. ५ कां तर एकच देव, आणि देव व माणसें यांमध्यें ख्रीस्त येशू हा माणूस एकच मध्यस्थ आहे. ६ याने सर्वांच्या खंडणीसाठीं आपणाला दिल्हें, याचें प्रमाण देणें योग्य वेळांमध्यें. ७ याविषयीं मी गाजविणारा व प्रेषित आहें, (ख्रीस्तासमोर खरें बोलतों, लबाडी करीत नाहीं,) विश्वासाने व खरेपणाने विदेश्यांचा शिकविणारा नेमलेला आहें. ८ तर माझी इच्छा असी आहे कीं, सर्व ठिकाणीं पुरुषांनी राग व विवाद यांवांचून निर्दोष हात वर करून प्रार्थना करावी. ९ त्याप्रमाणें बायकांनीहि शोभित वस्त्राकडून मर्यादेने व सद्बुद्धीने आपणांस शोभवावें; गुंफणें, किंवा सोनें, किंवा मोतीं, किंवा मोलवान् वस्त्र यांकडून नव्हे, १० तर देवभक्ति पत्करलेल्या बायकांस जसें शोभतें तसें, ह्मणजे चांगल्या कामांकडून. ११ बायकोने पूर्ण मान्य होऊन शांतीने शिकावें. १२ परंतु उपदेश करायाला, आणि पुरुषावर अधिकार करायाला मी बायकोला परवानगी देत नाहीं, तर तिने शांतपणाने राहावें. १३ कां तर आदाम प्रथम घडला, नंतर हाव्वा. १४ आणि आदाम भुलला नाहीं, परंतु स्त्री भुलून उल्लंघनांत पडली. १५ तथापि जर ती सद्बुद्धीसुद्धां विश्वास व प्रीति व पवित्रपण यांमध्यें राहती, तर ती बाळ प्रसवण्याकडून तारण पावेल.

## अध्याय ३.

हीं विश्वासू गोष्ट कीं, जर कोणी अध्यक्षाच्या कामाची उत्कंठा धरितो, तर तो चांगल्या कामाची इच्छा धरितो. २ तर अध्यक्ष निर्दोष, एका बायकोचा नवरा, सावधान, सद्बुद्धिमान्, मर्यादशील, पाहुणचार करणारा, उपदेश करण्यांत निपुण, असा असावा. ३ तो मद्यपी किंवा मारका किंवा लोभिष्ट नसावा, तर सौम्य, अभांडाळ, निर्लोभी; ४ आपलें घर चांगलें वागविणारा, पूर्ण गंभीरपणाने लेंकरांस स्वाधीन राखणारा; ५ कां कीं जर कोणी आपल्या घराला वागवायास जाणत नाहीं, तर तो देवाच्या मंडळीचा सांभाळ कसा करील? ६ तो गर्वाने फुगून सैतानाच्या दंडांत पडूं नये ह्मणून नवशिक असा नसावा; ७ आणि बाहेरले यांकडून त्याविषयीं चांगली साक्ष असावी, त्याने निंदेंत व सैतानाच्या फांसांत पडूं नये ह्मणून. ८ त्याप्रमाणें सेवकहि गंभीर असावे, दोन जिभांचे किंवा फार मद्यपी किंवा लोभिष्ट असे नसावे, ९ विश्वासाचें गूज शुद्धभावाने राखणारे असावे. १० आणि हेहि पूर्वीं परीक्षा देवोत, नंतर निर्दोष असल्यास सेवकपण करोत. ११ त्यांच्या बायका त्यांप्रमाणें गंभीर असाव्या, चाहाड नसाव्या, सावधान, अवघ्याविषयीं विश्वासू अस्या असाव्या. १२ प्रत्येक सेवक एका बायकोचा नवरा असावा, ते लेंकरांस व आपल्या घरांस चांगले वागविणारे असावे. १३ कां तर सेवकपण चांगलें केल्याने ते आपणांसाठीं चांगली पदवी, आणि ख्रीस्त येशूवरील विश्वासांत बहुत धैर्य मिळवितात. १४ मी तुजकडे लवकरच येण्याची आशा धरून हीं तुला लिहितों; १५ यासाठीं कीं मला उशीर लागला, तरी देवाच्या घरांत तुला कसें वर्त्तलें पाहिजे, हें त्वां जाणावें; तें जिवंत देवाची मंडळी; खरेपणाचा स्तंभ व आधार असें आहे. १६ आणि सुभक्तीचें गूज निस्संशय मोठें आहे, देव देहाने प्रगट झाला, आत्म्याने न्यायी ठरला, दुतांच्या दृष्टीस पडला, राष्ट्रांमध्यें गाजविलेला, जगांत त्यावर विश्वास झाला, त्याला गौरवांत वर घेतलें.

## अध्याय ४.

आत्मा तर स्पष्ट ह्मणतो कीं, शेवटल्या काळां-
मध्यें विश्वासाविषयीं कित्येक भ्रष्ट होतील,
ते फसविणाऱ्या आत्म्यांस व भुतांच्या उपदेशांस
लक्ष देतील; २ लबाड बोलणाऱ्यांच्या ढोंगाने
हे आपल्या भावनेंत बहिरावलेले असून, ३ लग्न
करायाला मना करितील, जीं भक्ष्यें विश्वासणाऱ्यानी
व खरेपण जाणणाऱ्यानी उपकारस्तुति करून स्वीका-
रावीं, ह्मणून देवाने उत्पन्न केलीं, त्यांपासून दूर
व्हावें, असें सांगतील. ४ तर देवाने उत्पन्न केले-
ली प्रत्येक वस्तु चांगली, आणि उपकारस्तुति करून
घेतली असतां कांहीं टाकाऊ नाहीं; ५ कां तर
देवाचें वचन व प्रार्थना यांकडून तें शुद्ध होतें.
६ या गोष्टी भावांस सुचवून तूं येशू ख्रीस्ताचा
चांगला सेवक, विश्वासाच्या व ज्या चांगल्या उप-
देशाचा नीट शोध त्वां केला आहे, त्याच्या गोष्टीं-
मध्यें निपुण असा होसील. ७ परंतु अधर्मी व
व्यर्थ काहाण्या यांस टाळ, आणि सुभक्तीविषयीं
आपली कसरत कर. ८ कां कीं शरिरीं कसरत
थोडीच उपयोगी आहे, परंतु सुभक्ति अवघ्यांविषयीं
उपयोगी आहे, तिला तर सांप्रतच्या व होणाऱ्याहि
जीवनाचें वचन आहे. ९ ही गोष्ट विश्वासू व
पूर्ण अंगीकारास योग्य आहे. १० याकरितां तर
आह्मी श्रम करितों, व निंदाहि सोसितों, कारण
कीं जो सर्व माणसांचा व विशेषेंकरून विश्वासणा-
ऱ्यांचा तारणारा आहे, त्या जिवंत देवावर आह्मी
आशा ठेविली आहे. ११ या गोष्टी आग्रहाने
सांगून शिकीव. १२ कोणीहि तुझ्या तरुणपणाची
हेळणा करूं नये. तर बोलण्याविषयीं, वर्त्तणुकी-
विषयीं, प्रीतीविषयीं, आत्म्याविषयीं, विश्वासावि-
षयीं, शुद्धपणाविषयीं, विश्वासणाऱ्यांचा कित्ता हो.
१३ मी येईं तोंपर्यंत वाचणें, बोध करणें, उपदेश
करणें, यांत तत्पर ऐस. १४ तुला जें कृपादान आहे,
तें वडीलवर्गाचे हात वर ठेविल्याने भविष्यवादाकडून
तुला दिल्हें, त्याची उपेक्षा करूं नको. १५ तुझें
प्रवीणपण सर्वांस दिसून यावें, ह्मणून तूं या गोष्टीं-
चें चिंतन कर, यांमध्यें तत्पर ऐस. १६ आपणा-
विषयीं व उपदेशाविषयीं सावध ऐस, या गोष्टीं-
मध्यें टिकून राहा, कां कीं हें केल्याने तूं आपणाला
व आपल्या ऐकणाऱ्यांसहि तारसील.

## अध्याय ५.

वडिलाला धमकावूं नको, तर जसा बापाला तसा
बोध कर; तरुणांस जसा भावांस तसा. २
म्हाताऱ्या यांस जसा आयांस तसा, तरण्या यांस
पूर्ण शुद्धपणाने जसा बहिणींस तसा. ३ ज्या
विधवा वास्तविक विधवा त्यांचा सन्मान कर. ४
आणि जर कोणी विधवेला लेंकरें किंवा नातवंडें
आहेत, तर त्यानी प्रथम आपल्या घरच्याची मर्या-
दा राखायास व आपल्या वडिलांचे उपकार फेडा-
यास शिकावें, कां तर हें देवाच्या दिसण्यांत चां-
गलें व आवडतें आहे. ५ तर जी वास्तविक
विधवा व एकली झालेली, ती देवावर आशा ठेवून
विनंती व प्रार्थना करण्यांत रात्रंदिवस टिकती.
६ परंतु जी विषयी आहे ती जिवंतच मेली आहे.
७ आणि त्यानी निर्दोष व्हावें ह्मणून या गोष्टी
आग्रहाने सांग. ८ परंतु जर कोणी आपल्याकड-
च्यांस व विशेषेंकरून आपल्या घरच्यांस पुरवीत
नाहीं, तर त्याने विश्वास नाकारिला आहे, व तो
अविश्वास्यापेक्षां वाईट आहे. ९ साठ वर्षांच्या
आंत नाहीं असी जी विधवा, जी एकाच नवऱ्याची
बायको होती ती मांडून घ्यावी, १० ती चांगल्या
कर्मानी पटलेली, जर तिने बाळप्रतिपाळ केला,
जर पाहुणचार केला, जर पवित्रांचे पाय धुतले,
जर संकटांतल्यांस पुरविलें, जर ती सर्व चांगल्या
कर्मांस अनुसरली, तर ती घ्यावी. ११ परंतु तर-
ण्या विधवांस घेऊं नये, कां तर त्या जेव्हां ख्रीस्ता-
विरुद्ध उन्मत्त असतील, तेव्हां लग्न करायास इच्छि-
तात. १२ त्या दंडपात्र आहेत, कां कीं त्यानी पहिला
विश्वास घालविला आहे. १३ अणखी घरोघरीं
फिरतां फिरतां आळसीहि व्हायाला शिकतात,
आणि आळसी हें केवळ नव्हे, तर ज्या गोष्टी
बोलूं नयेत त्या बोलून वटवटणाऱ्या व चौढाळहि
होतात. १४ यास्तव माझी इच्छा आहे कीं,
तरण्यानी लग्न करावें, लेंकरें प्रसवावीं, घर चाल-
वावें, अडविणाऱ्याला निंदा करण्याचें कांहीं निमित्त
देऊं नये. १५ कां तर कित्येक आतां सैतानामागें
वळून गेल्या आहेत. १६ जर कोणी विश्वास-
णाऱ्याला किंवा विश्वासणारीला विधवा आहेत,
तर त्याने त्यांस पुरवावें व मंडळीवर भार घालूं
नये, ज्या वास्तविक विधवा त्यांस मंडळीने पुरवावें
ह्मणून.

१७ जे वडील चांगल्या प्रकारें अधिकार करितात, ते दुप्पट सन्मानास योग्य मोजावे; विशेषेंकरून वचन व उपदेश यांविषयीं श्रम करणारे. १८ कां तर शास्त्रांत सांगितलें आहे कीं, मळणी करणाऱ्या बैलाला मुसकें घालूं नको, आणि, कामकरी आपल्या मजुरीस योग्य आहे. १९ दोघां किंवा तिघां साक्ष्यांवांचून वडिलावरचा आरोप अंगीकारूं नको. २० पाप करणाऱ्यांस सर्वांच्या देखतां धमकाव, दुसऱ्यांसहि भय वाटावें ह्मणून. २१ देव व प्रभु येशू ख्रीस्त, व निवडलेले दूत, यांसमोर मी निक्षूण सांगतों कीं, दुराग्रह न धरितां या गोष्टी पाळाव्या व पक्षपाताने कांहींच करूं नये. २२ एकाएकीं कोणावर हात ठेवूं नको, आणि दुसऱ्यांच्या पापांचा भागी होऊं नको, आपणाला शुद्ध राख. २३ पुढें पाणीच पिऊं नको, तर आपल्या पोटामुळें ह्मणजे आपल्या घडोघडीच्या रोगामुळें कांहीं द्राक्षारस पी. २४ कित्येक माणसांचीं पापें फार उघडीं असून अगोदर न्यायांत जातात, आणि कित्येकांचीं मागेंहि जातात. २५ आणि त्याप्रमाणें कांहीं चांगलीं कामें फार उघडीं आहेत, आणि जीं दुसऱ्या प्रकारचीं असतात त्यांचें गुप्त राहणें होत नाहीं.

## अध्याय ६.

जितके दास जुंवाखालीं आहेत, तितक्यानी आपापल्या धन्यांस सर्व सन्मानास योग्य मोजावें, यासाठीं कीं देवाचें नांव व उपदेश यांची निंदा होऊं नये. २ आणि ज्यांस विश्वासणारे धनी आहेत, त्यानी हे भाऊ आहेत, ह्मणून यांचा अवमान करूं नये, तर हे विश्वासणारे व प्रिय, उपकाराचे भागीदार आहेत ह्मणून विशेषेंकरून यांची चाकरी करावी; या गोष्टी शिकवून बोध कर. ३ जर कोणी दुसरा उपदेश करितो, आणि आमचा प्रभु येशू ख्रीस्त याच्या ज्या शुद्ध गोष्टी व सुभक्तिसंबंधी जो उपदेश, त्याचें सम्मत धरीत नाहीं, ४ तर तो गर्वाने फुगलेला आहे, कांहीं समजत नाहीं, केवळ वाद व शब्दभांडण यांविषयीं रोगी आहे, यांपासून हेवा, कटकट, दुर्भाषणें, दुष्ट कल्पना, हीं होतात. ५ मनांत बिघडलेलीं व खरेपणाविरहित झालेलीं, लाभ हा सुभक्ति आहे असें कल्पिणारीं माणसें; अस्थांचे कलह होतात; तस्यांपासून दूर राहा. ६ सुभक्ति तर ममाच्या तृप्तीसुद्धां मोठी मिळकत आहे; ७ कां कीं आह्मी जगांत कांहीं आणिलें नाहीं, आमच्याने त्यांतून कांहीं नेववत नाहीं, हें उघडें आहे. ८ तर आह्मास अन्नवस्त्र असल्यास आह्मी त्यांकडून तृप्त असावें. ९ परंतु धनवान व्हायास पाहणारे परीक्षेंत व फांसांत व बहुत निर्बुद्धि व बाधक इच्छांमध्यें पडतात, त्यांकडून माणसें नाशांत व निरुपायांत बुडतात. १० कां तर द्रव्याचा लोभ सर्व वाइटांचें मूळ आहे; त्याची उत्कंठा धरून कित्येक विश्वासापासून बहकले आहेत, आणि त्यानी आपणांस बहुत खेदांकडून भोंसकून घेतलें आहे. ११ हे देवाच्या माणसा, तूं तर यांपासून पळ, आणि न्यायीपण, सुभक्ति, विश्वास, प्रीति, सहनता, लीनता, यांच्या मागें चाल. १२ विश्वाससंबंधींचें चांगलें युद्ध कर, सर्वकालिक जीवन धर, त्याकरितांच तुला बोलावणें झालें, आणि त्वां बहुत साक्ष्यांसमोर चांगलें पत्करणें केलें आहे. १३ जो देव अवघीं जिवंत करितो त्यासमोर, आणि ज्या ख्रीस्त येशूनें पंतयस पिलातसाजवळ चांगलें पत्करणें केलें, त्याच्या समोर मी आग्रहाने तुला सांगतों कीं, १४ त्वां ही आज्ञा डागाविरहित व निर्दोष, असी आमचा प्रभु येशू ख्रीस्त याच्या प्रगट होण्यापर्यंत पाळावी. १५ जो धन्य व एकच स्वामी, जो राजांचा राजा व प्रभूंचा प्रभु, १६ ज्याला मात्र अमरपण आहे, जो अगम्य उजेडांत राहतो, ज्याला कोणी माणसाने पाहिलें नाहीं, आणि कोणाच्याने पाहवत नाहीं, तो तें प्रगटणें आपल्याच समयीं करील; त्याला सन्मान व सर्वकालिक सामर्थ्य असो; आमेन.

१७ जे या काळीं धनवान त्यांस आग्रहाने सांग कीं, त्यानी अभिमान धरूं नये, आणि चंचळ द्रव्यावर नव्हे, तर जो जिवंत देव आह्मास उपभोगासाठीं धनरूपें अवघीं विपुळ देतो, त्यावर आशा ठेवावी; १८ चांगलें करावें, उत्तम कर्मांविषयीं धनवान व्हावें, उदार, परोपकारी असें व्हावें; १९ पुढल्या काळासाठीं जेणेंकरून चांगला आधार होईल, असें सांठवण आपणासाठीं करावें, यासाठीं कीं त्यानी सर्वकाळचें जीवन पावावें.

२० हे तीमथ्यसा, आपल्याजवळ जी ठेव ती संभाळ, आणि अधर्मी उगीच वटवट व खोट्या विद्येचे आडफांटे हीं वर्ज कर. २१ कित्येक तीं पत्करून विश्वासापासून चुकून गेले; तुजवर कृपा असो. आमेन.

# तीमथ्यसाला पौलसाचें दुसरें पत्र.

## अध्याय १.

प्रिय लेंकरूं तीमथ्यस याला, ख्रीस्त येशूकडल्या
जीवनाच्या वचनाप्रमाणें देवाच्या नेमानें येशू
ख्रीस्ताचा प्रेषित पौलस याचा सलाम. २ देव
बाप, व आमचा प्रभु ख्रीस्त येशू, यांपासून कृपा,
दया, शांति तुला असो. ३ ज्या देवाला मी
आपल्या वाडवडिलांपासून शुद्ध भावानें भजतों,
त्याचा आभार मानितों, कां तर रात्रंदिवस माझ्या
प्रार्थनांमध्यें तुजविषयीं मला अखंड आठवण आहे.
४ कां कीं मी तुझीं आसवें आठवून तुला पाहायास
फार इच्छितों, म्यां आनंदानें पूर्ण व्हावें ह्मणून; ५
कां तर तुजमध्यें जो निढोंग विश्वास पहिल्यानें तुझी
आजी लोईस इजमध्यें, मग तुझी आई युनीके
इजमध्यें होता, आणि मला भरवसा आहे कीं
तुजमध्येंहि राहिला, त्याची आठवण मी करितों.
६ या कारणावरून मी तुला सूचना करितों कीं,
देवाचें जें कृपादान माझे हात वर ठेविल्यानें तुला
आहे, त्याला त्वां चेतवून वाढवावें; ७ कां कीं
देवानें आह्मास घाबरण्याचा नव्हे, तर सामर्थ्याचा
व प्रीतीचा व सावध बुद्धीचा आत्मा दिल्हा आहे.
८ यास्तव आमच्या प्रभूची साक्ष देण्याविषयीं,
आणि त्याचा बंदिवान जो मी त्या मजविषयीं त्वां
लाजूं नये, तर शुभवर्त्तमानासाठीं देवाच्या साम-
र्थ्याप्रमाणें तूं माझ्या संगतीं दुःखें सोस; ९ त्यानें
आह्मास तारिलें व पवित्र बोलावण्यानें बोलाविलें
आहे, आमच्या कर्माप्रमाणें नव्हे, तर त्याचाच
निश्चय व कृपा यांप्रमाणें; ही कृपा जगाच्या पूर्वीं
ख्रीस्त येशूकडून आह्मावर ठेविली होती; १०
आणि आतां आमचा तारणारा येशू ख्रीस्त याच्या
प्रगट होण्याकडून दाखविली आहे, त्यानें मरणाला
निरर्थक केलें, आणि शुभवर्त्तमानाकडून जीवन व
अमरपण हीं प्रकाशित केलीं आहेत; ११ त्या
शुभवर्त्तमानाचा मी गाजविणारा व प्रेषित व त्रिदे-
श्यांचा शिकविणारा, असा नेमिला होतों. १२
आणि या कारणावरून हीं दुःखें मला होतात,
तरी मी लाजत नाहीं, कां तर ज्यावर म्यां विश्वास
ठेविला त्याला मी जाणतों, आणि मला भरवसा
आहे कीं, माझी ठेव त्या दिवसापर्यंत राखायास
तो शक्तिमान् आहे. १३ ज्या शुद्ध गोष्टी त्वां
मजपासून ऐकिल्या, त्यांचा विधि विश्वासानें व
ख्रीस्त येशूकडील प्रीतीनें राख. १४ आह्मामध्यें
वस्ती करणाऱ्या पवित्र आत्म्याकडून ती चांगली
ठेव पाळ.

१५ हें तुला ठाऊक आहे कीं, आस्यांतले सर्व
मजपासून फिरले आहेत, त्यांमध्यें फुगलस व
हर्मगनेस आहेत. १६ अनेसिफरसाच्या घरावर
प्रभु दया करो, कां तर त्यानें बहुत वेळा माझें
समाधान केलें, आणि तो माझ्या सांखळीविषयीं
लाजला नाहीं; १७ तर रोमेंत होता तेव्हां
त्यानें फार झटून शोध केल्यावर त्याला मी सांप-
डलों. १८ प्रभु त्या दिवसीं त्याला प्रभूजवळ
दया मिळूं देवो, आणि एफससांत त्यानें किती
सेवा केली, हें तूं बरेंच जाणतोस.

## अध्याय २.

तर माझ्या मुला, ख्रीस्त येशूकडून जी कृपा तींत
सशक्त हो. २ आणि जीं त्वां बहुत साक्ष्यांपुढें
मजपासून ऐकिलीं तीं जे विश्वासू मनुष्य दुसऱ्यां-
सहि शिकवायास समर्थ होतील, त्यांस सोपून दे.
३ तूं तर येशू ख्रीस्ताच्या चांगल्या सैनिकासा-
रिखें दुःख सोस. ४ कोणी लढणारा संसारा-
च्या कार्यांमध्यें गुंतत नाहीं, यासाठीं कीं ज्यानें
त्याला निवडून सैन्यांत घेतलें, त्याला त्यानें संतो-
षवावें. ५ आणि जर कोणी मल्लयुद्धहि करितो,
तर नेमाप्रमाणें केल्यावांचून त्याला मुगुट मिळत
नाहीं; ६ शेतकऱ्यानें प्रथम श्रम करावे, मग फळां-
चा वांटा घ्यावा. ७ मी जीं बोलतों त्यांचें मनन
कर; आणि प्रभु तुला सर्वांविषयीं समज देवो. ८
दाविदाच्या संतानांतील येशू ख्रीस्त माझ्या शुभ-

वर्त्तमानाप्रमाणें मेलेल्यांमधून उठविलेला याची आ-
ठवण कर. ९ यावरून मी दुष्कर्म्यासारिखा बंध-
नांपर्यंत दुःख सोसितों, परंतु देवाचें वचन बंद
झालें नाहीं. १० यामुळें मी निवडलेल्यांकरितां
अवघीं सोसितों, यासाठीं कीं ख्रीस्त येशूकडून जें
तारण तें त्यांसहि सर्वकाळच्या गौरवासुद्धां प्राप्त
व्हावें. ११ ही विश्वासू गोष्ट, कां कीं आह्मी
त्याच्या संगतीं जर मेलों, तर संगतीं जिवंतहि होऊं;
१२ जर आह्मी साहतों तर संगतीं राज्यहि करूं,
जर आह्मी नाकारितों तर तोहि आह्मास नाका-
रील. १३ जरी आह्मी अविश्वासी आहों तरी
तो विश्वासू राहतो, त्याच्याने आपणाला नाकारवत
नाहीं.

१४ तूं यांविषयीं सूचना करीत असतां प्रभूस-
मोर खचीत सांग कीं, जें शब्दभांडण कशाविषयींहि
उपयोगी नाहीं, जें ऐकणाऱ्यांस बिघडवितें, तें करूं
नये. १५ देवाजवळ पटलेला, लज्जाकारणाविरहित
कामकरी, खरेपणाचें वचन नीट वांटणारा, असा
होण्यास प्रयत्न कर. १६ परंतु अधर्मी उगीच
वटवट टाळ, कां तर तिजवरून अभक्ति अधिकच
वाढेल. १७ आणि तशांची गोष्ट पुळीसारिखी
खात जाईल; त्यांमध्यें हुमनायस व फिलेतस
आहेत. १८ हे खरेपणापासून बहकून, पुन्हा उठणें
इतक्यांत होऊन गेलें आहे, असें ह्मणतात, आणि
कित्येकांचा विश्वास भ्रष्ट करितात. १९ तथापि
देवाने केलेला पाया स्थिर राहिला आहे, त्याला
हा शिक्का आहे कीं, प्रभु आपले जे आहेत त्यांस
जाणतो, आणि, प्रत्येक ख्रीस्ताचें नांव घेणाऱ्याने
अन्यायापासून दूर व्हावें. २० तर मोठ्या घरीं
केवळ सोन्याचीं व रुप्याचीं नाहींत, तर लांकडांचीं
व मातीचींहि पात्रें आहेत, आणि कांहीं मानासाठीं
व कांहीं अवमानासाठीं. २१ यास्तव कोणी आप-
णाला या गोष्टींपासून शुद्ध केलें, तर तो मानासाठीं
पात्र, पवित्र केलेलें, व स्वामीस उपयोगी, प्रत्येक
चांगल्या कामास तयार केलेलें, असा होईल. २२
अणखी तरुणपणांतील इच्छांपासून पळ, परंतु शुद्ध
अंतःकरणाने प्रभूचें नांव घेणारे यांच्या संगतीं
न्यायीपण, विश्वास, प्रीति, शांति, यांच्या मागें लाग.
२३ परंतु मूर्खपणाचे व व्यर्थ वाद टाळ; कां त्यां-
पासून भांडणें होतात हें तुला ठाऊक आहे. २४
आणि प्रभूच्या दासाने अगत्य भांडूं नये, तर त्याने
सर्वांजवळ सौम्य, उपदेश करण्यास तयार, सहन-
शील, २५ अडविणाऱ्यांस नम्रतेने उपदेशकर्त्ता,
असें असावें; कदाचित देव त्यांस खरेपणाच्या
ओळखीसाठीं पश्चात्ताप देईल. २६ आणि सैता-
नाकडून त्याच्या इच्छेप्रमाणें पाडाव झालेले, त्या-
च्या फांसांतून शुद्धीवर येऊन सुटतील.

## अध्याय ३.

आणि हें जाण कीं, शेवटल्या दिवसांमध्यें संक-
टाचे समय येतील. २ कां तर माणसें
स्वार्थबुद्धि, लोभिष्ट, नावाजणारीं, गर्विष्ठ, निंदक,
आईबापांस न मानणारीं, अनुपकारी, अधर्मी, ३
ममताहीन, विश्वासघातक, चाहाड, इंद्रियदमन न
करणारीं, निर्दय, चांगल्यांचा द्वेष करणारीं, ४
दगेखोर, हूड, गर्वाने फुगलेलीं, देवप्रीतीपेक्षां विला-
साची आवड धरणारीं, ५ सुभक्तीचें रूप दाख-
वून तिचें सत्व नाकारणारीं, असीं होतील; तर
अशांपासून दूर राहा. ६ कां तर घरांमध्यें शिर-
णारे, आणि भोळ्या बायका पापांनीं भारावलेल्या,
बहुत प्रकारच्या इच्छांनी चालविलेल्या, ७ ज्यां-
च्याने सर्वदा शिकत असतांहि कधीं खरेपणाचें
ज्ञान पाववत नाहीं, अशांस पाडाव करून नेतात, ते
त्यांमध्यें आहेत. ८ आणि यान्नेस व यांब्रेस
यानीं मोशेला अडविलें, तसें हेहि खरेपणाला
अडवितात; तीं मनाचीं फार बिघडलेलीं, विश्वासा-
विषयीं नाकारलेलीं, असीं माणसें आहेत. ९
तथापि हे फार पुढें चालणार नाहींत, कां तर जसें
त्यांचें अज्ञान उघडें झालें, तसें यांचेंहि सर्वांस
दिसून येईल. १० परंतु माझा उपदेश, वहिवाट,
योजना, विश्वास, गंभीरपण, प्रीति, सहनता, ११
जे पाठलाग, आणि जीं संकटें अंत्योखीयांत, इक-
न्यमांत, लुस्त्रांत मला प्राप्त झालीं, तीं तूं पुरतेपणीं
जाणतोस; किती पाठलाग म्यां सोसिले, तरी
प्रभूने मला सर्वांतून सोडविलें. १२ आणि जे
ख्रीस्त येशूकडे सुभक्तीने चालायास पाहतात त्या
सर्वांचेहि पाठलाग होतील. १३ आणि वाईट
माणसें व भोंदू हे फसवून व फसून, अधिकच वाइ-
टांत चालतील. १४ परंतु तूं ज्या गोष्टी शिक-
लास व विश्वासलास त्यांमध्यें राहा; कां कीं कोणा-
पासून शिकलास हें तुला ठाऊक आहे. १५
अणखी पवित्र शास्त्र तुला बाळपणापासून कळलें,
तें तुला ख्रीस्त येशूवरील विश्वासाकडून तारण
पावण्यासाठीं ज्ञान द्यायास शक्तिमान आहे. १६
संपूर्ण शास्त्र देवाच्या प्रेरणेने झालें, आणि उपदेश

निषेध, सुधारणूक, न्यायीपणाचें शिकविणें, यांसाठीं
उपयोगी; १७ देवाचा माणूस निपुण व सर्व चां-
गल्या कामांस तयार व्हावा ह्मणून.

अध्याय ४.

तर देवाच्या समक्ष व जो आपल्या प्रगटण्याच्या
व राज्याच्या वेळेस जिवंतांचा व मेलेल्यांचा
न्याय ठरविणार आहे, त्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या
समक्ष मी निक्षून असें सांगतों कीं, २ वचन गा-
जीव, सुकाळीं अकाळीं तत्पर ऐस, सर्व गंभीरप-
णाने व उपदेशाने दोष पदरीं घालून निषेध कर
व बोध कर. ३ कां तर असी वेळ येईल कीं, ते
शुद्ध उपदेश सोसणार नाहींत, तर त्यांचे कान
खाजत असतां, ते आपल्या इच्छाप्रमाणें उपदेश-
कांस गोळा करितील. ४ तेव्हां खरेपणापासून कान
फिरवितील, व काहाण्यांकडे वळतील. ५ तूं तर
सर्व गोष्टींविषयीं सावध ऐस, दुःख सोस, सुवार्त्ति-
कार्चें काम कर, आपली सेवा पूर्ण कर. ६ कां
तर मी आतां अर्पिण्यांत येतों, आणि माझ्या निघ-
ण्याचा वेळ जवळ आला आहे. ७ म्या चांगलें
युद्ध केलें, धावणें संपविलें, विश्वास राखिला.
८ आतां मजसाठीं न्यायीपणाचा मुगुट ठविला आहे,
तो त्या दिवशीं नीतिमान् न्यायाधीश प्रभु मला
देईल; आणि केवळ मलाच नव्हे, तर त्याच्या प्र-
गट होण्याची आवड धरणाऱ्या सर्वांसाहि.
९ माझ्या जवळ लवकर येण्यास प्रयत्न कर;
१० कां तर देमास या जगावर प्रीति करीत अ-
सतां, मला सोडून थेस्सलनीकेस गेला आहे; क्रेस्के-
स गलतीस, तितस दालमतीस. ११ केवळ लूक
माझ्या जवळ आहे; मार्कसाला घेऊन आपल्या
संगतीं आण, कां कीं तो सेवेसाठीं मला उपयोगी
आहे. १२ तुखिकस तर म्या एफससास पाठ-
विला आहे. १३ जें वेष्टन म्या त्रोवसांत कार्प-
साजवळ ठेविलें तें, आणि पुस्तकें, विशेषेंकरून
चर्मपत्रें येते वेळेस आण. १४ अलक्षांद्रस तांब-
टाने मला बहुत दुष्टपणें दाखविलीं, प्रभु त्याच्या
कामांप्रमाणें त्याची फेड करो; १५ त्याविषयीं
तूंहि संभाळ, कां कीं त्याने आमच्या गोष्टींला फार
अडविलें. १६ माझ्या पहिल्या प्रत्युत्तराच्या वे-
ळेस कोणी मजकडे राहिला नाहीं, तर सर्वांनी मला
सोडिलें, हें त्यांजवर मोजूं नये. १७ तरी प्रभु मा-
झ्या जवळ उभा राहिला, आणि त्याने मला असें
बळाविलें कीं, मजकडून घाजविणें पूर्णपणें व्हावें,
आणि सर्व राष्ट्रांनी ऐकावें; अणखी मला सिंहाच्या
तोंडांतून सोडविलें. १८ आणि प्रभु मला सर्व
वाईट कामापासून सोडवील, व आपल्या आकाश-
वरल्या राज्यासाठीं तारील; त्याला सदासर्वकाळ
गौरव असो. आमेन.
१९ प्रिस्का व अकुला व अनेसिफरसाचें घरा-
णें यांस सलाम सांग. २० एरास्तस कारिंथांत
राहिला, आणि त्रफिमसाला मिलेतसांत रोगी म्या
सोडिलें. २१ हिंवाळ्यापूर्वी यायास प्रयत्न कर.
युबूलस व पुदेस व लीनस व क्लौदिया व सर्व
भाऊ तुला सलाम सांगतात. २२ प्रभु येशू ख्री-
स्त तुझ्या आत्म्याबरोबर असो; तुह्मावर कृपा
असो. आमेन.

# तितसाला पौलसाचें पत्र.

अध्याय १.

देवाचा दास पौलस, देवाच्या निवडलेल्यांच्या
विश्वासाप्रमाणें आणि सुभक्तिसंबंधी खरेपणाच्या
ज्ञानाप्रमाणें, येशू ख्रीस्ताचा प्रेषित, २ आणि जें
सर्वकाळचें जीवन सत्य देवाने जगाच्या प्रारंभापूर्वी
देऊं करून, ३ पुढें आमच्या तारणाऱ्या देवाच्या
नेमणुकीप्रमाणें जें उपदेश करणें मला सोपून दिल्हें,
त्याकडून आपलें वचन योग्य समयीं प्रगट केलें,
त्या जीवनाची आशा धरणारा, ४ त्याचा, आपलेंच
समईक विश्वासांतील लेंकरूं तितस याला सलाम.
देव बापापासून व प्रभु येशू ख्रीस्त आमचा तार-
णारा यापासून कृपा, दया, शांति तुला असो.
५ म्या तुला क्रेतेंत या कारणासाठीं ठेविलें कीं,
राहिलेल्या गोष्टी त्वां यथास्थित कराव्या, आणि
म्या तुला सांगून ठेविलें तसें त्वां प्रत्येक नगरांत

वडिलांस नेमावें. ६ कोणी निर्दोष असला, ए-
काच बायकोचा नवरा, ज्याचीं लेंकरें विश्वासणारीं
आहेत, उधळेपणाच्या आरोपांत किंवा अनधीन असीं
नाहींत, [तर तो नेमावा.] ७ कां तर अध्यक्ष
देवाच्या कारभाऱ्यासारिखा निर्दोष असला पाहिजे,
तो स्वछंदी किंवा रागीट किंवा मद्यपी किंवा मारका
किंवा लोभिष्ट नसावा; ८ तर पाहुणचार कर-
णारा, चांगल्यांचा मित्र, सद्बुद्धिमान्, न्यायी, धा-
र्मिक, जितेंद्रिय, ९ उपदेशाप्रमाणें विश्वासू वच-
नाचा बळकट धरणारा, असा असावा; यासाठीं
कीं त्याने निर्दोष उपदेशाकडून संबोध करायास, व
अडविणाऱ्यांस कुंठित करायासहि शक्तिमान् व्हावें.
१० कां तर अनधीन, व्यर्थ बोलणारे व ठकवि-
णारे असे बहुत, विशेषेंकरून ते सुंतेचे आहेत;
११ त्यांचें तोंड बंद केलें पाहिजे; जें शिकवूं नये
तें लज्जाकारक लाभासाठीं ते शिकवून संपूर्ण घरा-
ण्यांस विपरीत करितात. १२ त्यांतील कोणीएक
त्यांतलाच कवि ह्मणाला, क्रेती सर्वदा लबाड, दुष्ट
श्वापदें, पोटाचे आळसी. १३ ही साक्ष खरी
आहे, या कारणावरून त्यांस खडसून निषेध कर;
१४ असा कीं त्यानी यहूदी काहाण्यांवर, आणि जीं
माणसें खरेपणा सोडून फिरलीं आहेत, त्यांच्या
आज्ञांवर चित्त न ठेवून, विश्वासांत निर्दोष व्हावें.
१५ जे शुद्ध त्यांस अवघीं शुद्ध, परंतु विटाळलेले
व अविश्वासी यांस कांहीं शुद्ध नाहीं, अणखी
त्यांची बुद्धि व भाव हीं विटाळलीं आहेत. १६
आह्मी देवाला जाणतों, असें ते ह्मणतात, परंतु
करण्यानी त्याला नाकारितात; कां, ते अमंगळ व
आज्ञाभंग करणारे व सर्व चांगल्या कामाविषयीं
नाकारलेले आहेत.

## अध्याय २.

तूं तर ज्या गोष्टी शुद्ध उपदेशाला शोभतात त्या
बोल; २ अशा कीं वडिलानी सावध, गंभीर,
सुबुद्धि, असें असून विश्वास, प्रीति, सहनता यांवि-
षयीं यथास्थित असावें. ३ तशाच ह्मातारिणी
वर्त्तणुकींत धर्मशोभित असाव्या, चाहाड नसाव्या,
फार द्राक्षारस पिणाऱ्या नसाव्या, उत्तम उपदेश
करणाऱ्या असाव्या. ४ असें कीं त्यानी तरणी यांस
असें शिकवावें कीं, त्या पतिप्रिय, अपत्यप्रिय, ५
शाहाण्या, पतिव्रता, घर संभाळणाऱ्या, चांग-
ल्या, आपल्या नवऱ्यांस मान्य, अशा असाव्या,
देवाच्या वचनाची निंदा होऊं नये ह्मणून. ६
तसेंच तरणे यांस सुबुद्धि होण्यास बोध कर. ७
सर्व गोष्टींविषयीं चांगल्या कामांचा कित्ता असें
आपणाला दाखीव, उपदेशांत शुद्धपण, गंभीरता,
८ ज्या शुद्ध बोलण्यावर दोष ठेवितां येत नाहीं,
तें दाखीव; यासाठीं कीं जो प्रतिकूळ त्याला तुह्मा-
विषयीं कांहीं वाईट बोलण्याची जागा नसतां, भीड
व्हावी. ९ दासानी आपल्या धन्यांच्या स्वाधीन
असावें, अवघ्यांविषयीं त्यांस संतोष द्यावा, विरु-
द्ध बोलूं नये. १० अभिलाष करूं नये, तर अवघा
चांगला विश्वासूपणा दाखवावा; यासाठीं कीं त्यानी
आमचा तारणारा देव याच्या उपदेशास अवघ्यांवि-
षयीं शोभवावें.

११ कां तर देवाची तारक कृपा सर्व माणसांस
प्रसिद्ध झाली आहे; १२ ती आह्मास असें शि-
कविती कीं, आह्मी अभक्तीला व जगांतल्या इच्छांस
नाकारून, या सांप्रतकाळीं सुबुद्धीने व न्यायाने व
सुभक्तीने वागावें; १३ आणि धन्य आशाप्राप्तीची,
ह्मणजे मोठा देव व आमचा तारणारा येशू ख्रीस्त
याच्या गौरवाचें प्रगट होणें याची वाट पाहावी;
१४ त्याने आपणाला आह्माकरितां दिल्हें, यासाठीं
कीं त्याने आह्मास सर्व अन्यायापासून खंडून घ्यावें,
आणि आपणासाठीं खासगीचे लोक चांगल्या कामां-
मध्यें तत्पर असें शुद्ध करावें. १५ या गोष्टी बोलून
व बोध करून, पूर्ण अधिकाराने निषेध कर; कोणी
तुला तुच्छ करूं नये.

## अध्याय ३.

त्यांस असें सुचीव कीं, त्यानी सत्ता व अधि-
कार यांच्या स्वाधीन असावें, अधिकाऱ्यांस
मान्य असावें, सर्व चांगल्या कामाला तयार असावें;
२ कोणाची निंदा करूं नये, अभांडाळ, विनयी,
सर्व माणसांस पूर्ण लीनता दाखविणारे असें असावें.
३ कां तर आह्मीहि अगोदर अज्ञानी, अमानिते,
भ्रांत, बहुत प्रकारच्या इच्छा व विलास यांच्या
स्वाधीन राहणारे, दुष्टाई व हेवा यांमध्यें चालणारे,
द्वेषपात्र, एकमेकांचा द्वेष करणारे, असे होतों. ४
परंतु देव आमचा तारणारा याची दया व मनुष्यां-
वरील प्रीति प्रगट झाली, ५ तेव्हां जीं न्यायी-
पणाचीं कामें आह्मी केलीं होतीं, त्यांकडून नव्हे,
तर त्याने आपल्या दयेने पुनर्जन्माचें जें धुणें, आणि
पवित्र आत्म्याकडून जें नवें करणें, त्यांकडून आह्मास
तारिलें. ६ तो [आत्मा] त्याने आमचा तार-

णारा येशू ख्रीस्त याकडून आह्मावर भरपूर ओ-
तिला आहे; ७ यासाठीं कीं आह्मी त्याच्या कृपेकडून
न्यायी ठरून, आशेने सर्वकाळच्या जीवनाचे वत-
नदार व्हावें. ८ ही विश्वासू गोष्ट; आणि माझी
इच्छा असी आहे कीं, त्वां या गोष्टींचें प्रतिपादन
करीत जावें, यासाठीं कीं ज्यानी देवावर विश्वास
ठेविला आहे, त्यानी चांगलीं कामें चालवायास
मनन करावें; या गोष्टी माणसांस चांगल्या व उप-
योगी आहेत. ९ परंतु मूर्खपणाचे वाद व वंशा-
वळ्या व तंटे व नेमशास्त्राविषयीं भांडणें यांस
चुकीव; कां तर तीं निरुपयोगी व व्यर्थ आहेत.
१० पहिला व दुसरा बोध केल्यावर पाखंडी माण-
साला वर्ज कर; ११ कारण हें ठाऊक आहे
कीं, असा मनुष्य बहकला आहे, आणि आपोआप
दोषी ठरला असतां पाप करितो.

१२ मी अर्तमासाला किंवा तुखिकसाला तुज-
कडे पाठवीन तेव्हां निकपलिसांत मजकडे येण्यास
प्रयत्न कर; कां कीं तेथें हिंवाळ्यांत राहायास म्या
निश्चय केला आहे. १३ जेनास शास्त्री व अ-
पल्लोस, यांस कांहीं उणें होऊं नये ह्मणून त्यांस चौ-
कसीने पुढें पाठीव. १४ आणखी आमचे जे, त्यानी
अगत्याच्या गरजांसाठीं चांगलीं कामें चालवायास
शिकावें, त्यानी निष्फळ होऊं नये ह्मणून. १५
माझ्या जवळचे सर्व तुला सलाम सांगतात;
विश्वासाकडील जे आह्मावर प्रीति करितात त्यांस
सलाम सांग; तुह्मा सर्वांवर कृपा असो. आमेन.

# फिलेमोनाला पौलसाचें पत्र.

प्रिय फिलेमोन आमचा संगती कामकरी याला,
व प्रिय अप्फिया इला, आणि आर्खिप्पस
आमचा संगती सैनिक याला, २ आणि तुझ्या
घरीं जी मंडळी तिला, ख्रीस्त येशूचा बांदिवान
पौलस व तीमथ्यस भाऊ यांचा सलाम. ३ देव
आमचा बाप व प्रभु येशू ख्रीस्त, यांपासून तुह्मास
कृपा व शांति असोत.

४ प्रभु येशूवर व सर्व पवित्रांवर जी तुझी
प्रीति व जो तुझा विश्वास आहे, ५ त्यांविषयीं
ऐकिल्यावरून मी आपल्या प्रार्थनांमध्यें सर्वदा तुझी
आठवण करून आपल्या देवाची उपकारस्तुति क-
रितों. ६ यासाठीं कीं ख्रीस्त येशूकडील तुह्मा-
मध्यें प्रत्येक चांगल्या गोष्टीची ओळख होण्याकडून
तुझें विश्वासांतील भागीपण सफळ व्हावें; ७ कां
तर तुझ्या प्रीतीमुळें आह्मास फार आनंद व शांत-
वन आहेत, कारण कीं, भावा, तुझ्याने पवित्रांच्या
जिवांस समाधान होतें. ८ यास्तव जें उचित तें
तुला आज्ञा करून सांगायास जरी मला ख्रीस्ताक-
डून बहुत धीटपण आहे, ९ तरी त्यापेक्षां मी
प्रीतीने तुझी विनंती करितों, मी ह्मातारा पौलस,
आणि आतां येशू ख्रीस्ताचा बांदिवान आहें; १०
ह्मणून ज्याला म्या आपल्या बंधनांमध्यें जन्मविलें,
त्या माझ्या अनेसिमस मुलाविषयीं मी तुझी विनंती
करितों. ११ तो अगोदर तुला निरुपयोगी होता,
परंतु आतां तुला व मलाहि उपयोगी; १२ त्याला
म्या माघारें पाठविलें आहे, तर त्याचा अंगीकार
कर, तोच माझें कळवळ्याचें पात्र आहे. १३
त्याला मी आपल्या जवळ ठेवण्याचा विचार क-
रीत होतों, असा कीं शुभवर्त्तमानाविषयींच्या बंध-
नांमध्यें माझी सेवा त्याने तुझ्या ठिकाणीं करावी.
१४ तथापि तुझ्या संमतावांचून म्या कांहीं करा-
यास इच्छिलें नाहीं, यासाठीं कीं तुझा उपकार
बळें झाल्यासारिखा नव्हे, तर खुशीने असा असावा.
१५ तर कदाचित तो यामुळें घडीभर वेगळा
झाला कीं, त्वां त्याला घेऊन सर्वकाळ ठेवावें. १६
आतांपासून दासासारिखा नव्हे, तर दासापेक्षां
अधिक, ह्मणजे प्रिय भाऊ; तो तसा मला विशेष
आहे, आणि देहाविषयीं व प्रभूविषयींहि तुला
किती अधिक! १७ यास्तव जर मला भागीदार
मोजितोस, तर जसा माझा तसा त्याचा अंगीकार
कर. १८ आणि त्याने तुझा कांहीं अन्याय केला
किंवा देणेकरी आहे, तर तें माझ्या खात्यांत घर.
१९ म्या पौलसाने आपल्याच हाताने लिहिलें
आहे, मी फेडून देईन; तरी म्या तुला ह्मणूं
नये कीं, तूं स्वतां माझें ऋणरूप आहेस. २०

होय भाऊ, प्रभूविषयीं तुजकडून मला लाभ
व्हावा, प्रभूविषयीं माझ्या जिवाला समाधान दे.
२१ तुझ्या मानण्याचा भरवसा धरून म्या तुला
लिहिलें आहे, कां मला ठाऊक आहे कीं, मी जें
सांगतों त्यापेक्षां तूं अधिकच करसील. २२ अण-
खी माझ्या साठीं बिन्हाडहि तयार कर, कां तर
माझी आशा आहे कीं, तुमच्या प्रार्थनांकडून मी
तुह्मास मिळेन. २३ एपफ्रास ख्रीस्त येशूविषयी-
चा माझा सोबती बंदिवान, २४ मार्कस, अरिस्ता-
र्खस, देमास, लुका, हे माझे सोबती कामकरी तुला
सलाम सांगतात. २५ आमचा प्रभु येशू ख्रीस्त
याची कृपा तुमच्या आत्म्यावर असो; आमेन.

# इब्री यांस पत्र.

### अध्याय १.

देव पूर्वी बहुत वेळां आणि बहुत प्रकारें, पूर्व-
जांसीं भविष्यवाद्यांकडून बोलला, २ या शेव-
टल्या दिवसांमध्यें आह्मांसीं पुत्राकडून बोलला
आहे; हा त्याने अवघ्यांचा वतनदार करून ठेवि-
ला आहे, आणि याकडून त्याने भुवनें उत्पन्न केलीं;
३ हा त्याच्या गौरवाचें तेज, व तत्वतेची प्रतिमा
असतां, आणि आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने
अवघीं वागवीत असतां, आपणाकडूनच आमच्या
पापांचें शुद्धिकरण करून, आकाशलोकांत महत्वाच्या
उजवीकडे बसला आहे. ४ कां कीं त्याला दुतांपेक्षां
वतनरूपें जेवढें उत्कृष्ट नांव प्राप्त झालें आहे, तेव-
ढ्याने तो त्यांपेक्षां उत्तम आहे. ५ कां तर को-
णत्या दुताला कधीं असें ह्मटलें कीं, तूं माझा पुत्र
आहेस, आज म्या तुला जन्मविलें आहे? आणि
फिरून, मी त्याचा बाप असा होईन, आणि तो
माझा पुत्र असा होईल; ६ आणि फिरून, तो
ज्येष्ठ पुत्राला जगांत आणितो तेव्हां तो सांगतो कीं,
देवाच्या सर्व दुतानी त्याला भजावें. ७ दुतांवि-
षयीं तर असें ह्मटलें आहे कीं, तो आपले दूत
वारे असे, आणि आपले सेवक अग्नीचा जाळ असे
करितो. ८ परंतु पुत्राला असें कीं, हे देवा, तुझें
आसन सदासर्वकाळचें आहे; तुझी राज्यकाठी
सरळपणाची काठी आहे; ९ त्वां न्यायीपणावर
प्रीति केली आहे, आणि अन्यायाचा द्वेष केला
आहे; यास्तव, देव, तुझा देव याने तुझ्या सोबत्यां-
पेक्षां तुला हर्षाच्या तेलाचा अभिषेक केला आहे.
१० अणखी, हे प्रभू, त्वां प्रारंभीं पृथ्वीचा पाया
घातला, आणि आकाशें तुझ्या हातांचीं कामें
आहेत; ११ तीं नाश पावतील, परंतु तूं टिकून
राहसील; तीं सर्वहि वस्त्रासारिखीं जुनीं होतील;
१२ आणि तूं त्यांस पांघरुणासारिखें गुंडाळिसील,
आणि तीं पालटतील: परंतु तूं तसाच आहेस,
आणि तुझीं वर्षें सरणार नाहींत. १३ आणि
त्याने कोणत्या दुताला कधीं ह्मटलें कीं, मी तुझ्या
वैऱ्यांस तुझ्या पायांचें आसन असें करून ठेवीन,
तोंपर्यंत तूं माझ्या उजवीकडे बैस? १४ सर्व दूत
सेवा करणारे आत्मे, तारणाचें वतन पावणार जे
त्यांसाठीं सेवा करायास पाठविलेले असे नाहींत
काय?

### अध्याय २.

यामुळें ज्या गोष्टी ऐकिल्या त्या आह्मी कधीं
गळूं देऊं नयेत, ह्मणून आह्मास त्यांवर
फारच चित्त ठेवावें लागतें. २ कां कीं दुतांकडून
सांगितलेलें वचन जर खचीत झालें, आणि प्रत्येक
उलंघनाचें व आज्ञाभंगाचें यथान्याय फळ प्राप्त
झालें; ३ तर आह्मी, एवढ्या मोठ्या तारणाचा
अव्हेर केल्यावर, कसे निभावूं? हें तारण पहि-
ल्याने प्रभूकडून सांगितलें होतें, मग ऐकणाऱ्यानी
आमच्या जवळ खचीत करून पटविलें, ४
देवानेहि खुणा व अद्भुतें व बहुत प्रकारचे चमत्कार
यांकडून, आणि आपल्या इच्छेप्रमाणें पवित्र आ-
त्म्याच्या वांटण्याने प्रमाण पटविलें.

५ कां तर ज्या होणार युगाविषयीं आह्मी
बोलतों, तें त्याने दुतांच्या स्वाधीन ठेविलें नाहीं.
६ तर कोणी कोठें असी साक्ष दिल्ही कीं, माणूस
काय आहे कीं तूं त्याची आठवण करितोस; किंवा
माणसाचा पुत्र काय आहे कीं तूं त्याची भेट घेतोस?
७ त्वां त्याला दुतांपेक्षां जरासें उणें केलें आहे;

त्वां त्यावर गौरवाचा व सन्मानाचा मुगुट घातला
आहे, आणि आपल्या हातांच्या कामांवर त्याला
नेमून ठेविलें आहे; ८ त्वां सर्व वस्तु त्याच्या
पायांखालीं ठेविल्या आहेत. तर सर्व वस्तु त्याच्या
स्वाधीन ठेविल्यावरून त्याच्या स्वाधीन ठेविलेलें नाहीं
असें कांहीं राहूं दिल्हें नाहीं; तथापि सर्व वस्तु त्या-
च्या स्वाधीन ठेविल्या, अशा आजपर्यंत आमच्या
दृष्टीस पडत नाहींत. ९ परंतु जो येशू दुतांपेक्षां
जरासा उणा केलेला होता, तो मरण सोसल्यामुळें
गौरव व सन्मान यांचा मुगुट घातलेला, असा आ-
मच्या दृष्टीस पडतो; तो यासाठीं उणा झाला
कीं त्याने देवाच्या कृपेकरून सर्वांकरितां मरण सो-
सावें. १० कारण कीं ज्यासाठीं सर्व वस्तू, व
ज्याकडून सर्व वस्तू आहेत, त्याला हें योग्य होतें
कीं त्याने पुष्कळ पुत्रांस गौरवांत आणवितांना त्यां-
च्या तारणाचा अधिकारी याला दुःखानी परिपूर्ण
करावें. ११ कारण कीं जो पवित्र करितो आणि
जे पवित्र केलेले ते सर्व एकापासून आहेत, या
कारणास्तव तो त्यांस भाऊ ह्मणायास न लाजतां
ह्मणतो कीं, १२ मी तुझ्या नांवाचें वर्णन आप-
ल्या भावांजवळ करीन; मंडळीमध्यें गीत गाऊन
तुझी स्तुति करीन. १३ आणि फिरून, मी त्याज-
वर भरवसा ठेवीत जाईन. आणि फिरून, पाहा,
मी व जीं लेंकरें देवाने मला दिल्हीं तीं. १४
तर लेंकरें मांसरक्तांचीं होतीं, यास्तव त्यानेहि
सारिख्या प्रकारें तींच धरिलीं; यासाठीं कीं आपण
मरणाकडून मरणाचा अधिकारी ह्मणजे सैतान याचा
नाश करावा; १५ आणि जे मरणाच्या भयाने सर्व
आयुष्यभर दासपणाच्या स्वाधीन होते, त्या सर्वांस
मोकळें करावें. १६ कां तर तो दुतांची प्रकृति
धरीतच नाहीं, तर आब्राहामाच्या संतानाची
धरितो. १७ यास्तव त्याला सर्व प्रकारें आपल्या
भावांसारिखें होण्याचें अगत्य होतें, यासाठीं कीं
लोकांच्या पापांचें प्रायश्चित्त घेण्याकरितां आपण
देवाकडल्या गोष्टींविषयीं दयाळू व विश्वासू मुख्य
याजक असा व्हावा. १८ कां तर त्याची परीक्षा
होतांना जें दुःख त्याने भोगिलें, तेणेंकरून तो
ज्यांची परीक्षा होती त्यांचें सहाय करायास शक्ति-
मान आहे.

### अध्याय ३.

यास्तव, अहो पवित्र भावानो, आकाशांतलें बोला-
वणें पावलेले हो, आह्मी जो पत्करलेला प्रेषित
व मुख्य याजक ख्रीस्त येशू त्याचें ध्यान करा. २
हा तर आपल्या नेमणाऱ्याजवळ विश्वासू होता, जसा
मोशेहि त्याच्या सर्व घरांत होता तसा. ३ कारण
कीं जितक्याने घराच्या बांधणाऱ्याला घरापेक्षां अ-
धिक सन्मान आहे, तितक्याने हा मोश्यापेक्षां अ-
धिक सन्मानास योग्य मोजला होता. ४ कां तर
प्रत्येक घर कोणाएकाकडून बांधलें आहे, परंतु ज्याने
सर्व वस्तू केल्या, तो देव आहे. ५ मोशे तर,
ज्या गोष्टी सांगायाच्या होत्या त्यांचें प्रमाण पटवि-
ण्यासाठीं, त्याच्या संपूर्ण घरांत सेवकासारिखा
विश्वासू होता खरें; ६ परंतु ख्रीस्त जसा पुत्र
तसा आपल्या घरावर होता; जर आह्मी भरवसा
व आशेचा आनंद शेवटपर्यंत बळकट राखितों,
तरच आह्मी त्याचें घर आहों. ७ यास्तव पवित्र
आत्म्याने सांगितल्याप्रमाणें, आज त्याची वाणी
अगत्य ऐका. ८ जसें रानांत परीक्षेच्या दिवसीं
संतापाच्या वेळेस झालें, तसीं तुह्मी आपलीं अंतः-
करणें कठीण करूं नका. ९ तेथें तुमच्या वाडव-
डिलानी माझी परीक्षा केली, त्यानी मला पारखून
चाळीस वर्षें माझीं कामें पाहिलीं. १० यास्तव
त्या पिढीवर मी रागें भरलों व बोललों कीं, ते
अंतःकरणाने सर्वकाळ बहकतात, आणि त्यानी माझे
मार्ग जाणले नाहींत. ११ यास्तव म्या आपल्या
रागाने शपथ वाहिली कीं, ते माझ्या विसाव्यांत
जाणारच नाहींत. १२ भावानो, असे जपा कीं,
जिवंत देवापासून वेगळें व्हावें, असें तुमच्यांतल्या
कोणाला अविश्वासी, वाईट अंतःकरण होऊं नये.
१३ परंतु तुह्मी प्रतिदिवसीं जोंपर्यंत आज हा
शब्द ह्मटला आहे, तोंपर्यंत एकमेकांस बोध करा;
यासाठीं कीं पापाच्या ठकविण्याने तुमच्यांतला
कोणी कठीण होऊं नये. १४ कारण कीं जर आह्मी
आपला प्रारंभींचा भरवसा शेवटपर्यंत बळकट
धरितों, तरच आह्मी ख्रीस्ताचे भागीदार आहों.
१५ आज त्याची वाणी अगत्य ऐका, असें ह्मटलें
आहे, ह्मणून जसें संतापाच्या वेळेस झालें, तसीं
तुह्मी आपलीं अंतःकरणें कठीण करूं नका. १६
तर कित्येकानी ऐकिल्यावर संतापविलें; परंतु मो-
शाच्या योगें मिसरांतून निघाले, त्या सर्वांनी
नाहीं. १७ आणि देव कोणावर चाळीस वर्षें
रागें भरला होता? ज्यानी पाप केलें त्यांवर, ह्मणजे
ज्यांचीं प्रेतें रानांत पडलीं त्यांवर कीं नाहीं? १८
आणि ज्यानी विश्वास ठेविला नाहीं, त्यांखेरीज

कोणांविषयीं त्याने शपथ वाहून सांगितलें कीं, ते
माझ्या विसांव्यांत जाणार नाहींत? १९ तर
आह्मास दिसून येतें कीं, अविश्वासामुळें त्यांच्याने
आंत जाववलें नाहीं.

## अध्याय ४.

यास्तव त्याच्या विसांव्यांत जावें असें वचन नेमून
ठेविलें असतांहि, तुमच्यांतला कोणी कधीं
उणा असा सांपडेल, ह्मणून आपण भ्यावें. २
कां तर त्यांसारिखें आह्मासहि शुभवर्त्तमान सां-
गितलेंच आहे, परंतु ऐकलेलें वचन त्यांस उपयोगी
झालें नाहीं, कां कीं ऐकणाऱ्यानी विश्वासांत तें मिस-
ळलें नाहीं. ३ विश्वासणारे आह्मी तर विसां-
व्यांत जातों; असें त्याने ह्मटलें तसें कीं, यास्तव
म्या आपल्या रागाने शपथ वाहिली कीं, ते माझ्या
विसांव्यांत जाणारच नाहींत; जरी जगाच्या मांड-
ण्यापासून कामें झालीं होतीं तरी. ४ कां तर
सातव्या दिवसाविषयीं कोठें असें ह्मटलें आहे
कीं, तेव्हां सातव्या दिवसीं देवाने आपल्या सगळ्या
कामांपासून विसांवा घेतला. ५ आणखी यांतहि,
ते माझ्या विसांव्यांत जाणारच नाहींत. ६ तर
कित्येकांनी त्यांत जावें हें अगत्य आहे, आणि
ज्यांस शुभवर्त्तमान पहिल्याने सांगितलें, ते अवि-
श्वासामुळें आंत गेले नाहींत. ७ आणखी तो कोणी-
एका दिवसाचा नेम करीत दाविदाकडून सांगतो,
आज, इतक्या काळानंतर ह्मटलेल्याप्रमाणें, आज
त्याची वाणी अगत्य ऐका, आपलीं अंतःकरणें
कठीण करूं नका. ८ कारण कीं यहोशवाने
त्यांस विसांवा दिल्हा असता, तर त्यानंतर दुसऱ्या
दिवसाविषयीं ह्मटलें नसतें. ९ तर देवाच्या
लोकांसाठीं विसांवा राहिला आहे. १० कां तर
त्याच्या विसांव्यांत जो गेला आहे, त्यानेहि आप-
ल्या कामांपासून विसांवा घेतला आहे; जसा देवाने
आपल्या कामांपासून तसा. ११ यास्तव आह्मी
त्या विसांव्यांत जायास प्रयत्न करावा, यासाठीं
कीं अविश्वासाच्या त्याच उदाहरणाप्रमाणें कोणी
पडूं नये. १२ कां तर देवाचें वचन सजीव व
समर्थ, कोणत्याहि दुधाऱ्या तरवारीपेक्षां तिखट,
आणि जीव व आत्माहि, सांधे व मज्जाहि यांतून
पार जाणारें. आणि अंतःकरणांतील विचार व
भावना यांचा निवाडा करणारें आहे. १३ आणि
त्याच्या समोर कांहीं उत्पन्न झालेली वस्तु अदृश्य
नाहीं; ज्याजवळ आमची झडती, त्याच्या दृष्टीस
अवघीं देखील नग्न व उघडीं आहेत.
१४ तर देवाचा पुत्र जो येशू आकाशांमधून
पार गेला, असा थोर मुख्य याजक आह्मास आहे,
यावरून आपण आपलें पत्करणें बळकट धरावें.
१५ कां तर ज्याला आमच्या अशक्तपणाचा कळ-
वळा येत नाहीं, असा मुख्य याजक आह्मास
नाहीं, तर तो पापावांचून सर्वप्रकारें समानतेने पार-
खलेला होता. १६ तर आह्मी दया पावावी,
आणि सुकाळिक सहायासाठीं कृपा मिळवावी,
ह्मणून आपण धैर्याने कृपेच्या आसनाजवळ जावें.

## अध्याय ५.

तर माणसांतून घेतलेला प्रत्येक मुख्य याजक
देवाकडल्या गोष्टींविषयीं माणसांसाठीं नेमलेला
असतो, यासाठीं कीं त्याने पापांमुळें दानें व यज्ञप-
शुहि अर्पावे. २ आणि त्याला अज्ञान्यांचें व बह-
कणाऱ्यांचें सहन करितां येतें; कां तर तोहि स्वतां
अशक्तपणाने व्यापिला आहे. ३ आणि याकरितां
त्याने जसें लोकांसाठीं तसें आपणासाठींहि पापांमुळें
अर्पण केलें पाहिजे. ४ आणि कोणीहि आपल्या
आपण ही पदवी घेत नाहीं; केवळ जो आहरोना-
सारिखा देवाकडून बोलावलेला तो मात्र घेतो. ५
तसें ख्रीस्तानेहि मुख्य याजक होण्यासाठीं आप-
णाला गौरविलें नाहीं, तर ज्याने त्याला ह्मटलें कीं,
तूं माझा पुत्र आहेस, आज म्या तुला जन्मविलें
आहे, त्याने गौरविलें. ६ आणि त्याप्रमाणें दुस-
ऱ्या ठिकाणींहि ह्मणतो कीं, मल्खीसेदेकाच्या प्रका-
राप्रमाणें तूं सर्वकाळ याजक आहेस. ७ त्याने
आपल्या देहाच्या दिवसांमध्यें, आपणाला मरणा-
पासून तारायास जो शक्तिमान त्याजवळ मोठ्या
ओरडण्याने व आसवांनी, प्रार्थना व काकुळतीहि
केल्यावर सद्भयामुळें त्याचें ऐकिलें होतें. ८ तो
पुत्र असतांहि आपण जें सोसिलें तेणेंकरून तो
आज्ञांकितपणा शिकला; ९ आणि सिद्ध होऊन
आपल्या सर्व मानणाऱ्यांस अक्षय तारणाचें कारण
झाला. १० मल्खीसेदेकाच्या प्रकाराप्रमाणें देवा-
कडून नेमलेला मुख्य याजक असा झाला.
११ याविषयीं आह्मास फार बोलायाचें आहे;
परंतु तें समजायास अवघड, कां कीं तुह्मी ऐकण्या-
विषयीं मंद आहां. १२ कारण कालांतरामुळें
तुह्मी उपदेशकहि असावें, असें असतां कोणी

तुह्मास देवाच्या वाक्यांतलीं मूळप्रकरणें फिरून
शिकवावीं, असी तुह्मास गरज आहे; आणि तुह्मी
असे झाला कीं, तुह्मास दुधाचें अगत्य आहे,
आणि जड अन्नाचें नाहीं. १३ कारण कीं जो
कोणी दूध घेत असतो, तो न्यायीपणाच्या वचना-
विषयीं अपरिचित आहे; कां कीं तो बाळक आहे.
१४ परंतु जड अन्न हें, जे पूर्ण ज्यांचीं इंद्रियें
बऱ्यावाइटाचा निवाडा करण्यास सवयीनें वहिवाट-
लेलीं आहेत, त्यांसाठीं आहे.

## अध्याय ६.

यास्तव आह्मी ख्रीस्ताविषयींची प्रारंभगोष्ट सो-
डून पूर्णतेपर्यंत चालावें; आणि निर्जीव कामां-
विषयींचा पश्चात्ताप, व देवावरला विश्वास, २
बाप्तिस्म्यांविषयींचा उपदेश व वर हात ठेवणें, मेले-
ल्यांचें पुन्हा उठणें, व अनंतकाळचें न्याय ठरणें,
यांचा पाया फिरून घालूं नये. ३ आणि जर
देव होऊं देईल, तर आह्मी हें करूं. ४ कां
तर, जे एकदां प्रकाशित झाले, ज्यांनी आकाशांत-
ल्या दानाचा अनुभव घेतला, जे पवित्र आत्म्याचे
वांटेकरीहि झाले, ५ व ज्यांनी देवाची चांगली
गोष्ट, व होणार जगांतलें सामर्थ्य यांचा अनुभव
घेतला, ६ ते जर पतित झाले, तर त्यांस पश्चा-
त्तापाच्या अवस्थेंत फिरून आणावें, हें असाध्य
आहे; कां कीं ते आपणच देवाच्या पुत्राला खांबीं
फिरून देतात, व त्याचा उघडा अपमान करितात.
७ कां तर जी भूमि आपणावर वेळोवेळ पडलेला
पाऊस पिती, आणि ज्यांकडून तिची लागवड होती
त्यांसाठीं उपयोगी हिरवळ उपजविती, ती देवाचा
आशीर्वाद पावती; ८ परंतु जी कांटळ व कुसळ
उपजविती, ती टाकाऊ व शापित होण्याजवळ, तिचा
परिणाम जळण्याचा आहे. ९ तथापि अहो
प्रियांनो, जरी आह्मी असें बोलतों, तरी तुह्मा-
विषयीं त्यांपेक्षां चांगल्या व तारणसंबंधी अशा
गोष्टींचा भरवसा आह्मास आहे. १० कां तर
तुमचें काम हें, आणि तुह्मी पवित्रांची सेवा केली
आहे आणि करीत आहां, यावरून जी प्रीति तुह्मी
त्याच्या नांवावर करून दाखविली, तिजमुळचा कष्ट
हा देवाने विसरावा, असा तो अन्यायी नाहीं. ११
आणि आमची इच्छा आहे कीं, तुमच्यांतल्या प्रत्ये-
काने आशेचा निर्धार होण्यासाठीं, तसाच प्रयत्न
शेवटपावेतों करून दाखवावा. १२ ह्मणजे तुह्मी
आळसी न होतांना, जे विश्वासाने व धैर्याने वचनांचें
फळ पावले आहेत, त्यांस अनुसरणारे व्हावें. १३
कारण कीं देवाने आब्राहामाला वचन दिल्हें, तेव्हां
ज्याची शपथ आपण वाहावी, असा त्याला कोणी
अधिक मोठा नव्हता, यावरून त्याने आपलीच
शपथ वाहून ह्मटलें कीं, १४ मी तुला आशीर्वाद
देईनच देईन, आणि तुला वाढवीनच वाढवीन.
१५ मग धीर धरिल्यावर त्याला वचनफळ तसेंच
प्राप्त झालें. १६ माणसें तर मोठ्याची शपथ
वाहतात; आणि स्थापित करण्यासाठीं शपथ, ही
त्यांमध्यें सर्व वादांचा शेवट आहे. १७ असें
असतां देवाने आपल्या निश्चयाचें अपालटपण वच-
नाच्या वतनदारांस विशेष दाखवायाला इच्छीत
असतां त्यासंबंधी शपथहि केली; १८ यासाठीं
कीं ज्या दोन अपालट गोष्टींविषयीं देवाला खोटें
बोलण्याचा असंभव आहे, त्यांकडून आह्मास, ह्म-
णजे दाखविलेली आशा धरायास जे पळाले, त्यांस
बळकट शांतवन व्हावें; १९ ती आशा आमच्या
जिवास नांगर यासारिखी आहे, अचळ व बळक-
टहि, व पडद्याच्या आंतल्या ठिकाणीं जाणारी आहे;
२० तेथें पुढें धावणारा येशू आह्माकरितां आंत
गेला आहे; मल्खीसेदेकाच्या प्रकाराप्रमाणें सर्वकाळ
मुख्य याजक झाला.

## अध्याय ७.

तर हा मल्खीसेदेक, शालेमाचा राजा, परात्पर
देवाचा याजक, जेव्हां आब्राहाम राजांस मारून
माघारें आला, तेव्हां त्याला भेटला, आणि त्याने
त्याला आशीर्वाद दिल्हा, २ त्याला आब्राहामाने
सर्व वस्तूंचा दाहावा भाग दिल्हा; त्याच्या नांवाचा
अर्थ तर पहिल्याने न्यायीपणाचा राजा, आणि मग
शालेमाचाहि राजा, ह्मणजे शांतीचा राजा असा
आहे; ३ तो बापाविरहित, आईविरहित, वंशाविर-
हित, त्याला दिवसांचा प्रारंभ, व आयुष्याचा शेव-
टहि नव्हता; तर तो देवाच्या पुत्रासारिखाच होऊन
याजक असा नेहमीं राहतो. ४ तर ज्याला
मूळपुरुष आब्राहाम याने देखील लुटीचा दाहावा
भाग दिल्हा, तो हा केवढा मोठा, हें पाहा. ५
आणि जे लेवीच्या संतानांतले याजकपण पावतात,
त्यांनी लोकांपासून, ह्मणजे आपले भाऊ, जरी
आब्राहामाच्या कंबरेपासून उत्पन्न झाले, तरी त्यां-
पासून दाहावा भाग शास्त्राप्रमाणें घ्यावा, ह्मणून

त्यांस आज्ञा आहे. ६ परंतु ज्याचा वंश त्यांपासून
मोजला नाहीं, त्याने आब्राहामापासून दाहावा भाग
घेतला, आणि ज्याला वचनें झालीं होतीं, त्याला
आशीर्वाद दिल्हा. ७ आतां अगदी निस्संशयें
कनिष्ठाला श्रेष्ठाकडून आशीर्वाद होतो. ८ तर
एथें मरणारे मनुष्य दाहावे भाग घेतात, परंतु तेथें,
ज्याविषयीं प्रमाण दिल्हें आहे कीं तो जगतो, तो
घेतो. ९ आणि असें ह्मणतां येतें कीं, दाहावे
भाग घेणारा लेवी यानेहि आब्राहामाच्या योगें
दाहावा भाग दिल्हा; १० कां तर त्याच्या बा-
पाला मल्खीसेदेक भेटला, त्यावेळेस तो त्याच्या
कंबरेंत होता. ११ यास्तव लेवीचें याजकपण,
ज्याच्या वेळेस लोकांस शास्त्र प्राप्त झालें, तेणेंकरून
जर पूर्णता झाली, तर आहरोनाच्या प्रकाराप्रमाणें
नव्हे, पण मल्खीसेदेकाच्या प्रकाराप्रमाणें ज्याला
ह्मणावें, असा दुसरा याजक उत्पन्न होण्याचें
अणखी काय अगत्य? १२ तर याजकपण पाल-
टलें असतां, अगत्याने नेमाचाहि पालट व्हावा.
१३ कां तर ज्याविषयीं या गोष्टी सांगितल्या आ-
हेत तो, ज्यांतल्या कोणीहि वेदीजवळ सेवा केली
नाहीं, अस्या दुसऱ्या वंशांतला आहे. १४ कां
हें उघडें आहे कीं, आमचा प्रभु यहूदापासून
उत्पन्न झाला; या वंशांतल्या याजकपणाविषयीं तर
मोश्याने कांहीं सांगितलें नाहीं. १५ आणि त्या-
पेक्षां हें फार उघडें आहे कीं, मल्खीसेदेकासा-
रिखा दुसरा याजक उठतो; १६ ह्मणजे तो
दैहिक आज्ञेच्या नेमाप्रमाणें झाला नाहीं, तर अक्षय
जीवनाच्या सामर्थ्याप्रमाणें झाला तसा. १७ कां
तर साक्ष देतो कीं, तूं मल्खीसेदेकाच्या प्रकाराप्र-
माणें सर्वकाळ याजक आहेस. १८ तर पूर्वीची
आज्ञा अशक्त व निरुपयोगी, यावरून ती रद्द करणें
प्राप्त आहे. १९ कां कीं नेमशास्त्राने कांहींच पूर्ण
झालें नाहीं, तर जेणेंकरून आह्मी देवाजवळ जातों,
ती अधिक चांगली आशा प्रगट झाली. २० अ-
णखी ते शपथ वाहिल्यावांचून याजक होतात;
२१ परंतु ज्याने याला सांगितलें कीं, तूं मल्खीसे-
देकाच्या प्रकाराप्रमाणें सर्वकाळ याजक आहेस,
ह्मणून ईश्वराने शपथ वाहिली आहे, आणि तो
पश्चात्ताप करणार नाहीं, त्याने शपथ वाहिल्यावरून
हा झाला. तर जितक्यावरून येशू शपथ वाहि-
ल्यावांचून झाला नाहीं, २२ तितक्यावरून तो
अधिक चांगल्या कराराचा जामीन झाला आहे.
२३ आणि ते याजक बहुत होऊन गेले, कारण कीं
मरणामुळें टिकणें होईना; २४ परंतु हा सर्वकाळ
राहतो, यामुळें याला अढळ याजकपण आहे.
२५ आणि यावरून आपल्याकडून जे देवाजवळ
जातात त्यांस तो पूर्णपणाने तारायाला शक्तिमान्
आहे; कां कीं तो त्यांच्या साठीं विनंती करायास
सर्वदा जगतो. २६ तर जो पवित्र, निष्पापी, नि-
ष्कलंक, पाप्यांपासून वेगळा, आणि आकाशांपेक्षां
अधिक उंच केलेला, असा मुख्य याजक आह्मास
शोभतो. २७ आणि असा कीं, मुख्य याजकासा-
रिखें, पहिल्याने आपल्या पापांसाठीं, मग लोकांच्या
साठीं, प्रतिदिवशीं यज्ञ करावा, असें याला अगत्य
नाहीं; कां तर याने आपणालाच अर्पून तें एकदांच
केलें आहे. २८ तर ज्यांस अशक्तपण आहे, त्या
माणसांस नेमशास्त्र मुख्य याजक असें नेमितें;
परंतु नेमशास्त्रानंतर जें शपथेचें वाक्य, तें सर्व-
काळ पूर्ण झालेल्या पुत्राला नेमितें.

## अध्याय ८.

आतां ह्मटलेल्यांचा सारांश हा आहे कीं, जो
आकाशांमध्यें महत्वाच्या आसनाच्या उज-
व्या भागीं बसलेला आहे, असा मुख्य याजक
आह्मास आहे; २ तो पवित्र वस्तूंचा, आणि जो
खरा मंडप मनुष्याने नव्हे, तर प्रभूने घातला,
त्याचा सेवक आहे. ३ कां कीं प्रत्येक मुख्य या-
जक दानें व यज्ञपशुहि अर्पायास नेमलेला आहे;
यास्तव यानेहि कांहीं अर्पावें, हें अगत्य. ४ अ-
णखी हा पृथ्वीवर असता तर याजक नसता; कां
कीं जे नेमशास्त्राप्रमाणें दानें अर्पितात, तसे याजक
आहेत. ५ ते आकाशांतल्या गोष्टींचें उदाहरण
व सावली यावरून सेवा करितात, त्यांप्रमाणें मोशे
मंडप करणार होता, तेव्हां तो प्रबोधित झाला;
कां तर असें सांगितलें कीं, जो कित्ता तुला डोंगरावर
दाखविला, त्याप्रमाणें सर्व वस्तु कराव्या, ह्मणून
सावध ऐस. ६ परंतु आतां जितक्याने अधिक
चांगला करार, अधिक चांगल्या वचनांनी स्थापलेला
आहे, त्याचा हा मध्यस्थ आहे, तितक्याने हा
अधिक श्रेष्ठ सेवा पावला आहे. ७ कां कीं
तो पहिला करार निर्दोष असता, तर दुसऱ्याचें
ठिकाण शोधिलें नसतें. ८ परंतु दोष काढून त्यांस
ह्मटलें, पाहा, प्रभु सांगतो, असे दिवस येतात
कीं, मी इस्राएलाच्या घराण्यांशीं व यहूद्याच्या घरा-

ण्यासीं नवा करार करीन; ९ त्यांच्या वाडव-
डिलांस मिसर देशांतून बाहेर आणण्यासाठीं जेव्हां
म्यां त्यांचा हात धरिला, त्या दिवसीं त्यांसीं जो
करार म्यां केला, त्याप्रमाणें नव्हे; कारण कीं
त्या माझ्या करारांत ते राहिले नाहींत, आणि म्यां
त्यांची काळजी केली नाहीं, असें प्रभु ह्मणतो.
१० तर त्या दिवसांनंतर मी इस्राएलाच्या घरा-
ण्यासीं जो करार करीन तो हा, प्रभु ह्मणतो, मी
आपले नेम त्यांच्या बुद्धीमध्यें ठेवीन, आणि ते
त्यांच्या अंतःकरणांत लिहीन, आणि मीं त्यांचा
देव होईन, आणि ते माझे लोक होतील. ११
तेव्हां, प्रभूला जाण, असें प्रत्येक आपल्या शेजा-
ऱ्याला व प्रत्येक आपल्या भावाला सांगून ते उप-
देश करणार नाहींत; कां तर लाहानापासून मोठ्या-
पर्यंत त्यांतले सर्व मला ओळखतील. १२ कार-
ण कीं त्यांच्या अन्यायांविषयीं मी क्षमाशील होईन;
आणि त्यांचीं पापें व त्यांचे अधर्म मी अणखी
आठविणारच नाहीं. १३ त्याने नवा करार, असें
ह्मटल्याने पहिला जुना केला आहे. आणि जें जुनें
व जर्जर झालें, तें नाहींसें होण्याजवळ आहे.

## अध्याय ९.

तर पहिल्या मंडपसंबंधी भजनाचे नेम, व जगिक
पवित्रस्थान होतें; २ कां तर ज्या पहिल्या
मंडपांत दिव्याचें झाड व मेज व पुढें ठेवलेल्या
भाकरी होत्या, जो पवित्र ह्मटलेला आहे, तो तयार
केलेला होता. ३ आणि दुसऱ्या पडद्याच्या पलि-
कडे परमपवित्र ह्मटलेला मंडप होता. ४ त्यांत
सोन्याचें धुपाटणें व सोन्याने सभोंवती मढविलेली
कराराची पटी होती; तींत मान्ना घातलेलें सोन्याचें
पात्र व कळ्या आलेली आहरोनाची काठी, व
कराराच्या पाट्या. ५ आणि तिच्यावर गौरवी
खरूबीम, ज्यांची सावली दयासनावर पडली;
त्यांविषयीं आतां निरनिराळें सांगायाचें नाहीं. ६
तर हीं असीं तयार केलेलीं असतां, याजक पुढल्या
मंडपांत सेवा करायास नित्य जात असत; ७ परंतु
दुसऱ्यांत मुख्य याजक एकटा दरवर्षी एकदांच
जात असे; जें रक्त त्याने आपल्या व लोकांच्या
चुकींमुळें अर्पावें, त्यावांचून तो जात नसे. ८ तेणें-
करून पवित्र आत्मा हें दाखवीत होता कीं, पहि-
ल्या मंडपाची स्थिति आहे तोंपर्यंत परमपवित्र स्था-
नाची वाट प्रगट केली नाहीं. ९ त्या वर्त्तमान
काळीं तो मंडप दाखलारूप होता, तितक्या वेळेस
जीं दानें व यज्ञपशु भजन करणाऱ्याचा मनोभाव सिद्ध
करायास शक्तिमान् नाहींत, असीं अर्पण करीत असत.
१० ते खाणीं व पिणीं व अनेक स्नानें अशा देह-
संबंधी नेमांसुद्धां सुधारणुकीच्या काळापर्यंत लावून
दिल्हे होते. ११ परंतु अधिक मोठा व अधिक
पूर्ण मंडप, हातानी केलेला नव्हे, ह्मणजे या सृष्टी-
तला नव्हे, याकडून होणाऱ्या चांगल्या गोष्टींविषयी-
चा मुख्य याजक असा ख्रीस्त आल्यावर, १२
बकरे व गोऱ्हे यांच्या रक्ताने नव्हे, तर आपल्याच
रक्ताने परमपवित्र स्थानांत एकदांच जाऊन, त्याने
अक्षय खंडणी मिळविली आहे. १३ कारण कीं
बैलांचें व बकऱ्यांचें रक्त व कालवडीची राख,
हीं विटाळलेल्यांवर शिंपडलीं असतां देहाची शु-
द्धता होई असें जर पवित्र करितात, १४ तर
ज्याने सर्वकाळच्या आत्म्याकडून आपणाला निष्क-
लंक असें देवाला अर्पिलें, त्या ख्रीस्ताचें रक्त तुम-
च्या अंतःकरणाला सजीव देवाला भजायासाठीं
निर्जीव कामांपासून किती विशेषेंकरून शुद्ध करील!
१५ आणि तो याकरितां नव्या कराराचा मध्यस्थ
आहे कीं, पहिल्या कराराच्या वेळेस जीं उल्लंघनें,
त्यांपासून खंडणी होण्यासाठीं आपलें मरण झा-
ल्याने, बोलावलेले जे, त्यानी अक्षय वतन होण्याचें
वचन पावावें. १६ कां तर जेथें करार आहे, तेथें
करारकर्त्त्याचें मरण अगत्य घडावें. १७ कारण
कीं करार मेलेल्यांविषयीं निश्चित आहे; कां तर
करारकर्त्ता जिवंत आहे तोंपर्यंत कधीं उपयोगी
नाहीं. १८ यास्तव पहिल्या कराराचा संस्कारहि
रक्तावांचून झाला नाहीं. १९ कां तर मोशाने
शास्त्राप्रमाणें सर्व आज्ञा सर्व लोकांजवळ सांगित-
ल्यावर, पाणी व किरमिजी लोंकर व जुफा यांहीं-
करून, गोऱ्ह्यांचें व बकऱ्यांचें रक्त घेऊन, तें पुस्त-
कावर व सर्व लोकांवरहि शिंपडीत असतां तो बो-
लला कीं, २० जो करार देवाने तुह्मास लावून
दिल्हा आहे, त्याविषयींचें रक्त हेंच. २१ आणि
त्याने मंडपावर व सेवेच्या सर्व सामानावर रक्त तसें-
च शिंपडिलें. २२ अणखी नेमशास्त्राप्रमाणें बहुत-
करून सर्व वस्तु रक्ताने शुद्ध होतात, आणि रक्त
पाडल्यावांचून क्षमा होत नाहीं. २३ तर आका-
शांतल्या वस्तूंचे दाखले तशांकडून शुद्ध झाले पा-
हिजेत, परंतु आकाशांतल्याच वस्तु त्यांपेक्षां अधिक
चांगल्या यज्ञांकडून. २४ कां कीं हातानी के-

लेलीं पवित्र स्थानें, खऱ्यांचीं प्रतिबिंबें, त्यांत ख्री-
स्त गेला नाहीं, तर आकाशांतच गेला, त्याने आ-
मच्या साठीं देवासमोर उभें राहावें ह्मणून. २५
आणि जसा मुख्य याजक दरवर्षी दुसऱ्याचें रक्त
घेऊन परमपवित्र स्थानांत जातो, तसें याने बहुत
वेळा आपणाला अर्पावें, असें नव्हे; २६ कारण
असें केलें असतें, तर जगाच्या मांडण्यापासून आ-
पणाला बहुत वेळा सोसावें लागलें असतें; तर
आतां युगांच्या समाप्तीस हा आपल्या यज्ञेंकरून
पापें दूर करण्यासाठीं एकदांच प्रगट झाला आहे.
२७ आणि जसें माणसांस एकदांच मरणें, व त्या-
नंतर न्याय ठरणें हें नेमून ठेविलें आहे, २८ तसें
ख्रीस्त बहुतांचीं पापें अंगावर घेण्यांत एकदां अर्पि-
लेला असतां, जे त्याची वाट पाहतात, त्यांस तार-
ण्यासाठीं पापविरहित दुसऱ्याने दिसेल.

## अध्याय १०.

तर ज्या चांगल्या गोष्टी होणार त्यांची सावली
नेमशास्त्रांत आहे, आणि त्या गोष्टींचें वास्तविक
स्वरूप नाहीं; यास्तव तें दरवर्षी अखंड वाहि-
लेल्या यज्ञांकडून, शरणागतांस कधींहि शुद्ध करा-
यास शक्तिमान नाहीं. २ जर असतें तर तीं
अर्पणें वाहण्यांत राहिलीं असतीं; कारण कीं सेवक
एकदां शुद्ध झाले असतां, पुढें त्यांस पापांची कांहीं
भावना नसती. ३ परंतु त्या अर्पणांनी दरवर्षी
पापांची अणखी आठवण होती. ४ कारण कीं
बैलांचें व बकऱ्यांचें रक्त पापें दूर करायाला शक्ति-
मान नाहीं. ५ यास्तव तो जगांत येते वेळेस
ह्मणतो, यज्ञ व अर्पण यांची इच्छा त्वां धरिली
नाहीं, तर माझ्या साठीं शरीर तयार केलें आहे.
६ होमांनी व पापाविषयींच्या अर्पणांनी तुझा संतोष
झाला नाहीं; ७ तेव्हां म्या ह्मटलें, हे देवा,
पाहा, शास्त्राच्या पुस्तकांत मजविषयीं लिहिलें आहे,
मीं तुझी इच्छा पूर्ण करायास येतों. ८ वरतें तो
बोलला कीं, यज्ञ व अर्पण व होम व पापासाठीं
अर्पणें, जीं नेमशास्त्राप्रमाणें वाहण्यांत येतात, त्यांची
इच्छा त्वां धरिली नाहीं, आणि त्यांत तुझा संतोष
झाला नाहीं. ९ तेव्हां त्याने ह्मटलें, हे देवा,
पाहा, मी तुझी इच्छा पूर्ण करायास येतों. दुसरें
स्थापावें ह्मणून तो पहिलें काढून टाकितो. १०
त्या इच्छेने येशू ख्रीस्ताच्या शरिराचें एकदांच अ-
र्पण झाल्यावरून आह्मी पवित्र केलेले आहों. ११
आणि प्रत्येक याजक तर प्रतिदिवसीं सेवा करीत
असतां, आणि जे यज्ञ पापें दूर करायाला कधींहि
शक्तिमान नाहींत, तेच बहुत वेळा करीत असतां
उभा राहतो; १२ परंतु हा पापासाठीं एक यज्ञ
वाहून देवाच्या उजवीकडे निरंतर बसला आहे;
१३ आणि पुढें आपले वैरी आपल्या पायांचें आसन
असे होतील, तोंपर्यंत परिणामाची वाट पाहत आहे.
१४ कां तर जे पवित्र होतात त्यांस त्याने एका
अर्पणेंकरून सर्वकाळपर्यंत पूर्ण केलें आहे. १५
आणि पवित्र आत्माहि आह्मास प्रमाण देतो;
कां तर त्याने पूर्वी सांगितलें कीं, १६ प्रभु ह्म-
णतो, त्या दिवसांनंतर जो करार मी त्यांसीं करीन
तो हा, मी आपले नेम त्यांच्या अंतःकरणांमध्यें
ठेवीन, आणि ते त्यांच्या बुद्धींवर लिहीन; १७
आणि मीं त्यांचीं पापें व त्यांचे अधर्म अणखी आ-
ठविणार नाहीं. १८ आतां जेथें यांची क्षमा
झाली तेथें पापासाठीं अणखी अर्पण लागत नाहीं.
१९ तर अहो भावानो, येशूच्या रक्तेंकरून आ-
ह्मास परमपवित्र स्थानांत जाण्याची मोकळीक आहे;
२० जी पडद्यातून ह्मणजे त्याच्या देहेंकरून नवी
व जीवनाची वाट, जिचा त्याने आमच्या साठीं
संस्कार केला, असी ती आहे; २१ आणि
देवाच्या घरावर मोठा याजक आहे; २२ ह्मणून
आह्मी खऱ्या अंतःकरणाने, विश्वासाच्या पूर्ण नि-
र्धाराने शरण जावें; आमचीं अंतःकरणें दुष्ट भाव-
नेपासून [धुण्यासाठीं] शिंपडलेलीं, आणि शरीर
निर्मळ पाण्याने धुतलेलें; २३ आह्मी पत्करलेली
आशा अढळ धरावी, कारण कीं ज्याने वचन दिल्हें,
तो विश्वासू आहे. २४ आणि एकमेकांकडे प्रीति
व सत्कर्मे करायास चेतविण्यासाठीं आह्मी लक्ष
द्यावें. २५ आपलें एकत्र मिळणें हें आह्मी कि-
त्येकांच्या चालीप्रमाणें सोडूं नये, तर बोध करावा;
आणि दिवस जसजसा जवळ येतो ह्मणून तुह्मी
पाहतां, तसतसा तो अधिक करावा. २६ कां तर
आह्मी खरेपणाचें ज्ञान पावल्यावर बुध्या पाप केलें
तर पापाविषयीं यज्ञ अणखी राहत नाहीं; २७
तर न्याय ठरण्याची भयंकर वाट पाहणें, आणि
वैऱ्यांस खाऊन टाकणाऱ्या अग्नीचा आवेश, हीं.
२८ ज्या कोणीएकाने मोशाचें नेमशास्त्र अव्हेरि-
लें, तो दया न पावतां दोन किंवा तीन साक्षीदारां-
वरून मरण पावत असे; २९ तर ज्याने देवा-
च्या पुत्राला तुडविलें, आणि कराराच्या ज्या रक्तें-

करून तो पवित्र झाला तें सामान्य मोजिलें, आणि
कृपेच्या आत्म्याचा अपमान केला, तो किती अधिक
कठिण दंडास योग्य ठरेल, ह्मणून तुह्मास वाटतें?
३० कां तर ज्याने असें ह्मटलें कीं, सूड घेणें हें
माझें, मी फेडून देईन, असें प्रभु ह्मणतो, तो आ-
ह्मास ठाऊक आहे ; आणि फिरून, प्रभु आपल्या
लोकांचा न्याय ठरवील. ३१ जिवंत देवाच्या
हातांत पडणें हें भयंकर ! ३२ परंतु पूर्वीचे दिवस
फिरून ध्यानांत आणा ; त्यांमध्यें तुह्मी प्रकाशित
झाल्यावर दुःखांचा मोठा लोट सोसिला ; ३३
पहिल्याने तर तुह्मी निंदा व संकटें पावून तमाशा
असे झालां ; अणखी ज्यांविषयीं असी वर्त्तणूक
झाली, त्यांचे सोबती होतां. ३४ कारण कीं
माझ्या बंधनांमध्येंहि तुह्मी समदुःखी होतां, आणि
आपल्या मालमत्तेची हानि आनंदाने अंगीकारिली,
कां कीं आपणांसाठीं आकाशामध्यें अधिक चांगलें
व टिकाऊ धन आहे, असें तुह्माला ठाऊक होतें.
३५ तर तुह्मी ज्याचें मोठें फळ आहे, तो आपला
भरवसा टाकून देऊं नका. ३६ कां तर तुह्मास
सहनतेचें अगत्य आहे, यासाठीं कीं तुह्मी देवाची
इच्छा पूर्ण करून वचनफळ पावावें. ३७ कारण
कीं जो येणार तो अगदी थोडक्या वेळाने येईल,
व उशीर करणार नाहीं. ३८ आणि न्यायी वि-
श्वासाने जगेल, परंतु जर मागें हटेल, तर त्यावि-
षयीं माझा जीव संतोष पावणार नाहीं. ३९
तथापि आह्मी नाशाकडे हटणारे नव्हों, तर जिवा-
च्या तारणासाठीं विश्वास धरणारे आहों.

## अध्याय ११.

विश्वास तर आशेंतल्या गोष्टींचा भरवसा, आणि
ज्या गोष्टी पाहिल्या नाहींत त्यांविषयीं खा-
तरी, असा आहे; २ कारण कीं त्याकडून वाड-
वडील नावाजलेले होते. ३ विश्वासाने आह्मी
समजतों कीं, जगें देवाच्या शब्दाने उत्पन्न झालीं ;
असें कीं ज्या वस्तु दृश्य आहेत त्या दृश्य वस्तूं-
पासून झाल्या नाहींत. ४ विश्वासेंकरून हाबे-
लाने काइनापेक्षां अधिक चांगला यज्ञ देवाला
अर्पिला ; तेणेंकरून तो न्यायी आहे, असें त्या-
विषयीं प्रमाण ठरलें ; कां तर देवाने त्याच्या दानां-
विषयीं प्रमाण दिल्हें, आणि तेणेंकरून तो मेला
असताहि बोलतो. ५ विश्वासाने हनोख मरण
न पावतां लोकांतरीं नेला होता, आणि तो सांपडला
नाहीं, कारण कीं देवाने त्याला लोकांतरीं नेलें; य
तर लोकांतरीं गेल्यापूर्वी त्याविषयीं हें प्रमाण झालें
कीं, त्याने देवाला संतोषविलें. ६ परंतु विश्वासा-
वांचून संतोषविणें होतच नाहीं; कारण कीं जो दे-
वाला शरण जातो, त्याला असा विश्वास धरिला
पाहिजे कीं, तो आहे, आणि जे त्याला शोधितात
त्यांस तो फळ देणारा आहे. ७ ज्या गोष्टी तों-
पर्यंत पाहिल्या नव्हत्या, त्यांविषयीं नोहाने प्रबो-
धित होऊन, सद्भय धरून, विश्वासाने आपल्या
कुटुंबाच्या तारणासाठीं तारूं तयार केलें; तेणेंकरून
त्याने जग अन्यायी ठरविलें, आणि विश्वासाने जें
न्यायीपण त्याचा वतनदार झाला. ८ विश्वासाने
आब्राहाम जें ठिकाण त्याला वतन असें प्राप्त
होणार होतें, त्यांत जायास बोलावल्यावर मान्य
झाला, आणि आपण कोठें जातों, हें न जाणून तो
निघाला. ९ विश्वासेंकरून त्याने इझाक व याको-
ब त्याच वचनाचे सोबती वतनदार, यांबरोबर
राहोट्यांमध्यें वस्ती करून, जसा परदेशांत तसा
वचनाच्या देशांत प्रवास केला. १० कां तर ज्या
नगराला पाये आहेत, ज्याचा योजणारा व बांधणारा
देव, त्याची वाट तो पाहत होता. ११ विश्वासाने
सारा स्वतांच गर्भधारण करण्यासाठीं शक्ति पा-
वली, आणि काळाच्या मर्यादेपलिकडे असताहि
प्रसवली, कारण कीं ज्याने वचन दिल्हें होतें
तो विश्वासू असें तिने मानिलें होतें. १२ त्यामु-
ळें फारपणाविषयीं आकाशांतल्या ताऱ्यांसारिखी,
व समुद्राच्या कांठावरल्या वाळूसारिखी अगणित,
इतकीं एकापासूनच ह्मणजे त्याविषयीं मेलेला असा
जो होता, त्यापासून उपजलीं. १३ ते सर्व वि-
श्वासांत मेले; वचनफळें पावले नव्हते, तर त्यांनी
तीं दुरून पाहून व भरवसा धरून आलिंगून घे-
तलीं, आणि पत्करलें कीं, आपण पृथ्वीवर परके व
प्रवासी आहों. १४ कारण कीं जे असीं ह्मणतात,
ते आपण देश मिळवायाला झटतों, असें उघड
दाखवितात. १५ आणि ज्या देशांतून ते निघाले,
त्यावर त्यानी चित्त ठेविलें असतें, तर त्यांस मा-
घारें फिरायाचा संधि झाला असता ; १६ परंतु
आतां ते अधिक चांगला ह्मणजे आकाशावरला,
याची फार उत्कंठा धरितात; यास्तव देव आपणाला
त्यांचा देव ह्मणवावें असें त्यांविषयीं लाजत नाहीं;
कारण कीं त्याने त्यांच्या साठीं नगर तयार केलें
आहे. १७ आब्राहामाची परीक्षा झाली तेव्हां

त्याने विश्वासेंकरून इझाक अर्पिला, ह्मणजे ज्याला
वचनें झालीं होतीं, त्याने आपला एकुलता अर्पिला;
१८ त्याला तर असें सांगितलें होतें कीं, इझाका-
वरून तुझें संतान ह्मणतील. १९ त्याने लक्षांत
आणिलें कीं, मेलेल्यांमधून देखील उठवायास देव
शक्तिमान् आहे; आणि तो त्यांतून दृष्टांताने त्याला
मिळाला. २० विश्वासेंकरून इझाकाने याकोबाला
व एसावाला होणाऱ्या गोष्टींविषयीं आशीर्वाद दि-
ल्हा. २१ याकोबाने मरते वेळेस विश्वासेंकरून
योसेफाच्या प्रत्येक पुत्राला आशीर्वाद दिल्हा;
आणि आपल्या काठीच्या शेंड्यावर टेंकून भजन
केलें. २२ योसेफाने मरते वेळेस विश्वासेंकरून
इस्राएलाच्या संतानांच्या निघण्याविषयीं सूचना केली,
व आपल्या हाडांविषयीं आज्ञा केली. २३ मोशे
जन्मल्यावर त्याच्या आईबापानी विश्वासेंकरून
त्याला तीन महिने लपविलें, कारण कीं तो सुंदर
बाळक असें त्यानी पाहिलें, व राजाच्या आज्ञेचें
भय धरिलें नाहीं. २४ मोशे प्रौढ झाल्यावर
त्याने फारोच्या कन्येचा पुत्र ह्मणविण्यास विश्वासें-
करून नाकारिलें. २५ पापाचा उपभोग कांहीं
वेळ घेण्यापेक्षां, देवाच्या लोकांसंगतीं दुःख भोगणें
हें त्याला अधिक आवडलें. २६ मिसरांतल्या
द्रव्यापेक्षां ख्रीस्तसंबंधी निंदा हें अधिक धन असें
त्याने मोजिलें; कारण कीं त्याने मिळणाऱ्या वेतना-
वर दृष्टि ठेविली. २७ विश्वासेंकरून त्याने रा-
जाच्या क्रोधाला न भिऊन मिसर सोडिला; कारण
कीं जो अदृश्य त्याला पाहत असल्यासारिखें, त्याने
धैर्य धरिलें. २८ विश्वासेंकरून त्याने वल्हांडण
सण व रक्त शिंपडणें पाळिलें, असें कीं ज्याने प-
हिल्या जन्मलेल्यांचा नाश केला, त्याने त्यांस शिवूं
नये. २९ विश्वासाने ते जसे कोरड्यावरून तसे
तांबड्या समुद्रांतून गेले; मिसरी तर तेंच करा-
याला प्रयत्न करीत असतां बुडून गेले. ३० वि-
श्वासेंकरून यरीहोच्या गांवकुसांभोंवतें सात दिवस-
पर्यंत फेऱ्या घातल्यावर तीं पडलीं. ३१ विश्वासें-
करून राहाब कसबीण हेरांस सुखरूपें अंगीकारून,
अविश्वास्यांच्या संगतीं नाश पावली नाहीं. ३२
तर मी अणखी काय बोलूं? कारण कीं गी-
दोन व बाराक व शामशोन व इफ्ताह व
दावीद व शमुवेल व भविष्यवादी, यांविषयीं वि-
स्ताराने सांगायास मला वेळ पुरणार नाहीं. ३३
त्यानी विश्वासेंकरून राज्यें जिंकिलीं, न्यायी-
पणा केला, वचनें मिळविलीं, सिंहांचीं तोंडें बंद
केलीं. ३४ अग्नीची शक्ति विझविली, तरवारीची
धार चुकविली; ते अबळपणापासून सबळ झाले,
लढाईंत पराक्रमी झाले, त्यानी परक्यांचीं सैन्यें
पळविलीं. ३५ बायका आपल्या मेलेल्यांस जिवंत
झालेलें असें पावल्या, आणि कित्येक सुटका न
अंगीकारितां झोडिले होते; यासाठीं कीं आपण
अधिक उत्तम पुन्हा उठणें मिळवावें. ३६ आणि
दुसरे टवाळ्यानी व मारानी, अणखी बंधनानी व
कैदेनेंहि छळणूक पावले. ३७ त्यांस धोंड्यानी
मारिलें, करवतानें चिरलें, परीक्षेनें छळलें, तरवारी-
च्या घातानें ते मेले, मेंढरांचीं व शेरडांचीं कातडीं
पांघरून हिंडले; दुबळे, पीडित, त्रासलेले, ३८
जग त्यांस योग्य नव्हतें; ते रानांमध्यें व डोंग-
रांमध्यें व भूमीच्या गुहा व दऱ्या यांमध्यें भडकत
असत. ३९ तर ते सर्व विश्वासेंकरून चांगले
ठरले असतांहि, त्यांस वचनफळ मिळालें नाहीं;
४० कां कीं देवाने आमच्या साठीं कांहीं अधिक
चांगलें, असें पूर्वी पाहून ठेविलें होतें, यासाठीं कीं
ते आमच्या वांचून पूर्ण होऊं नये.

## अध्याय १२.

तर आह्मी साक्षीदारांच्या एवढ्या दाटीने वेढलेले
असतां, सर्व ओझें व सहज अडविणारें पाप
टाकून, आपल्यापुढें लावलेल्या धावेवरून धैर्याने
धावावें. २ आह्मी आपल्या विश्वासाचा अधि-
कारी व संपविणारा येशू याकडे पाहत असावें;
त्याच्या पुढें जो आनंद ठेवलेला, त्यामुळें त्याने
लाजेची काळजी न करून खांब सोसिला; आणि
तो देवाच्या आसनाच्या उजव्या भागीं बसला आहे.
३ तर ज्याने आपणावरील पाप्यांचा एवढा विरोध
सोसिला, त्याविषयीं विचार करा; यासाठीं कीं
तुह्मी आपल्या मनांत निराश होऊन दमूं नये.
४ तुह्मी पापाविरुद्ध झटत असतां अझून रक्त-
पातापावेतों अडविलें नाहीं. ५ अणखी जो बोध
जसा पुत्रांसीं तसा तुह्मांसीं संवाद करितो, तो
विसरलां; तो असा कीं, माझ्या पुत्रा, प्रभूची
शिक्षा तुच्छ मानूं नको, आणि त्याजकडून तुझा
निषेध झाला असतां कासावीस होऊं नको. ६
कां तर ज्यावर प्रभु प्रीति करितो, त्याला तो
शिक्षा करितो; आणि ज्याला तो अंगीकारितो,
अश्या प्रत्येक पुत्राला फटके मारितो. ७ जर

तुह्मी शिक्षा सोसितां, तर देव जसा पुत्रांजवळ तसा तुमच्या जवळ वागतो; कां तर ज्याला बाप शिक्षा करीत नाहीं असा पुत्र कोण आहे? ८ परंतु जिचे भागीदार सर्व आहेत अस्या शिक्षेविरहित असल्यास तुह्मी पुत्र नव्हां, तर जारजन्माचे आहां. ९ अणखी आमच्या देहाचे बाप आह्मास शिक्षा करणारे होते, आणि आह्मी भीड धरिली; तर आह्मी फार विशेषेंकरून आत्म्यांच्या बापाला मान्य होऊन जगावें कीं नाहीं? १० कां कीं थोडक्या दिवसांपर्यंत त्यानी आपणांस जें बरें वाटलें, त्याप्रमाणें शिक्षा केली, परंतु याने आमच्या हितासाठीं आह्मी त्याच्या पवित्रतेचे भागीदार व्हावें ह्मणून. ११ कोणतीहि शिक्षा तर सध्यां आनंदकारक असें वाटत नाहीं, तर खेदकारक आहे; तरी जे तिजकडून वहिवाटलेले त्यांस ती पुढें न्यायीपणाचें शांतिकारक फळ देती. १२ यास्तव लुळे हात व लटपटीत गुडघे दृढ करा; १३ आणि आपल्या पायांसाठीं नीट वाटा करा, यासाठीं कीं जें लंगडें त्याने वळूं नये, तर त्यापेक्षां बरें व्हावें. १४ सर्वांसीं शांति व जिजवांचून कोणी प्रभूला पाहणार नाहीं असी पवित्रता, हीं अनुसरा. १५ संभाळ करा, असा कीं देवाची कृपा पावण्यास कोणी उणें होऊं नये; कोणी कडुपणाच्या मुळाने येऊन खवळूं नये, आणि त्याकडून बहुत विटाळूं नये. १६ कोणी शिंदळ, किंवा ज्या एसावाने एका जेवणासाठीं आपलें ज्येष्ठपण विकलें, त्यासारिखा अधर्मी होऊं नये. १७ कारण तुह्मी जाणतां कीं, त्यानंतरच तो आशीर्वाद पावायास इच्छीत होता, परंतु त्याला नाकारिलें, कारण कीं पश्चात्ताप होण्याविषयीं जरी त्याने अश्रूंकडून फार प्रयत्न केला, तरी त्याचें ठिकाण त्याला सांपडलें नाहीं.

१८ कां कीं स्पर्शनीय डोंगर व जळत अग्नि, व निबिडता व काळोख व वादळ, १९ व शिंगाचा नाद व बोलण्याची वाणी, यांजवळ तुह्मी आलां नाहीं, ती ऐकणाऱ्यानी विनंती केली कीं, तें बोलणें आह्मासीं अणखी होऊं नये. २० कां तर जी आज्ञा केली होती, ती त्यांच्याने सोसवली नाहीं, असी कीं, पशु देखील डोंगराला शिवला, तर तो धोंड्यानी मारावा, किंवा भाल्याने विंधावा. २१ आणि जें दिसलें तें एवढें भयंकर होतें कीं मोशे ह्मणाला, मी फार भयभीत व कंपित आहें. २२ तुह्मी तर सीयोन डोंगराजवळ आलां आहां, आणि जिवंत देवाचें नगर ह्मणजे आकाशांतलें यरूशलेम याजवळ, आणि दुतांच्या अयुतांजवळ, २३ आणि आकाशांमध्यें लिहून घेतलेल्या ज्येष्ठांचा समुदाय व मंडळी यांजवळ, आणि देव सर्वांचा न्यायाधीश याजवळ, आणि पूर्ण झालेले पवित्र यांच्या आत्म्यांजवळ, २४ आणि नव्या कराराचा मध्यस्थ येशू याजवळ, आणि शिंपडण्याचें रक्त, हाबेलाच्या पेक्षां चांगलें बोलणारें याजवळ. २५ जो बोलतो त्याचा अव्हेर करूं नये ह्मणून जपा, कां तर ज्यानी पृथ्वीवरील बोलणाऱ्याला अव्हेरिलें, ते जर निभावले नाहींत, तर आह्मी आकाशांतून आलेल्याला अव्हेरिलें असतां, फार विशेषेंकरून निभावणार नाहीं. २६ त्याच्या वाणीने त्या वेळेस पृथ्वी हालविली; परंतु आतां त्याने असें वचन दिल्हें आहे कीं, अणखी एकदां मी केवळ पृथ्वीला नव्हे, तर आकाशालाहि हालविंतों. २७ तर अणखी एकदां, यावरून हालविलेल्या वस्तूचें काढून घेणें जसें केलेल्यांचें तसें दिसून येतें, ह्मणजे ज्या वस्तू हालविल्या नाहींत त्या राहाव्या. २८ यास्तव आह्मी न हालणारें राज्य पावत असतां कृपादान धरावें, येणेंकरून आह्मी देवाची सेवा आवडत्या प्रकारें भिडेने व सद्भयाने करावी. २९ कां तर आमचा देव भस्म करणारा अग्नि असा आहे.

## अध्याय १३.

भाऊजातीवरली प्रीति राहो. २ आतिथ्य करणें विसरूं नका; कारण कीं तेणेंकरून कित्येकानी दुतांचें आतिथ्य न जाणतां केलें आहे. ३ तुह्मी बरोबर बंद झाल्यासारिखे, बंदिवानांची आठवण करा; आपणहि शरिरांत आहों, असें समजून पीडितांचीहि करा. ४ लग्न सर्वांस मान्य व अंथरूण शुद्ध असावें; परंतु शिंदळ व व्यभिचारी यांचा न्याय देव करील. ५ वर्त्तणूक निर्लोभ असावी; आपल्यांजवळ आहे तेवढ्याने तुह्मी तृप्त असावें; कां तर त्याने असें ह्मटलें आहे कीं, मी तुला सोडणार नाहीं व तुला कधींहि टाकणार नाहीं. ६ तर आह्मी धैर्य धरून ह्मणावें कीं, प्रभु मला सहाय, यास्तव मी भिणार नाहीं; माणूस माझें काय करणार! ७ जे तुमचे पुढारी आहेत, ज्यानी देवाचें वचन तुह्मास सांगितलें आहे, त्यांची आठवण करा; त्यांच्या वर्त्तणुकीचा परिणाम पाहून, त्यांच्या विश्वासाला अनुसरा.

८ येशू ख्रीस्त, काल व आज व सर्वकाळ-
पर्यंत, तसाच आहे. ९ नाना प्रकारचे व अन्य
उपदेश, यांकडून तुह्मी फिरविलेले होऊं नका; कां
तर ज्यांकडून आचरणाऱ्यांस लाभ नाहीं, अस्या
खाण्याच्या पदार्थांनी नव्हे, तर कृपेने अंतःकरण
स्थिरावलेलें असावें, हें बरें आहे. १० आह्मास
असी वेदी आहे कीं, तिजवरील पदार्थ खाण्याचा
अधिकार मंडपांतल्या सेवकांस नाहीं. ११ कां
तर ज्या पशूंचें रक्त पापामुळें मुख्य याजकाकडून
पवित्रस्थानांमध्यें नेलेलें असतें त्यांचीं शरीरें तळा-
बाहेर जाळतात. १२ यास्तव येशूनेहि आपल्या
रक्ताकडून लोकांला पवित्र करावें ह्मणून वेसीबाहेर
मरण सोसिलें. १३ तर आतां आह्मी त्याचा
अपमान सोसून त्याच्या जवळ तळाबाहेर जावें.
१४ कारण कीं एथें आह्मास टिकून राहणारें नगर
नाहीं; तर जें होणार, त्याचा आह्मी शोध करितों.
१५ त्यामुळें तर आह्मी देवाला स्तुतीचा यज्ञ, ह्मणजे
त्याचें नांव पत्करणाऱ्या ओठांचें फळ असें नेहमी
अर्पावें. १६ आणि उपकार करणें व दान देणें हीं
विसरूं नका; कारण कीं अशा यज्ञांनी देव संतुष्ट होतो.
१७ तुह्मी आपल्या पुढाऱ्यांस मानून अधीन
असा; कारण कीं ते झडती देणार त्यांसारिखे
तुमच्या जिवांविषयीं जपतात; यासाठीं कीं त्यांनी
ती शोकाने नव्हे, तर आनंदाने द्यावी; कारण कीं तें
तुह्मास हितकारक नव्हे. १८ आमच्या साठीं
प्रार्थना करा; कां तर आह्मास भरवसा आहे कीं,
सर्वांविषयीं चांगली वर्त्तणूक करायास इच्छीत
असतां, आह्मास चांगला मनोभाव आहे. १९
आणि ती करावी ह्मणून मी विशेष आग्रहाने
विनंती करितों, तुमच्या जवळ माझें फिरून येणें
अधिक लवकर घडावें ह्मणून.

२० तर आमचा प्रभु येशू, सर्वकाळच्या
कराराच्या रक्ताने मेंढरांचा मोठा मेंढपाळ, याला
ज्याने मेलेल्यांमधून माघारें आणिलें, २१ तो
शांतीचा देव, तुह्मी त्याच्या इच्छेप्रमाणें करावें
ह्मणून तुह्मास प्रत्येक चांगल्या कामासाठीं सिद्ध
करो, आणि त्याच्या दिसण्यांत जें आवडतें तें त्याने
तुमच्या मध्यें येशू ख्रीस्ताकडून करावें. त्याला
सदासर्वकाळ गौरव असो. आमेन.

२२ तर अहो भावानो, मी तुमच्या जवळ
विनंती करितों कीं, ही बोधाची गोष्ट सोसून घ्यावी;
कां तर म्या थोडक्यांतच तुह्मास पत्र लिहिलें
आहे. २३ तीमथ्यस भाऊ सोडिलेला आहे, हें
तुह्मास कळावें; तो लवकर आला, तर त्याच्या
संगतीं मी तुह्मास पाहीन. २४ तुह्मी आपल्या
सर्व पुढाऱ्यांस व सर्व पवित्रांस सलाम सांगा.
इतल्यांतले जे, ते तुह्मास सलाम सांगतात. २५
तुह्मा सर्वांवर कृपा असो. आमेन.

# याकोबाचें पत्र.

## अध्याय १.

पांगलेले जे बारा वंश, त्यांस देवाचा व प्रभु
येशू ख्रीस्ताचा दास याकोब याचा सलाम.
२ अहो माझ्या भावानो, तुह्मास नाना प्रका-
रच्या परीक्षा होतात तेव्हां पूर्ण आनंद माना; ३
कारण तुह्मास कळलें कीं, तुमच्या विश्वासाच्या
परीक्षेने सहनता घडती; ४ आणि सहनतेचें
काम पूर्ण होऊं द्या, यासाठीं कीं तुह्मी सिद्ध व
परिपूर्ण व्हावें, कशांतहि उणें नसावें. ५ आणि
तुह्मामधील जर कोणी ज्ञानाविषयीं उणा आहे, तर
जो देव सर्वांस उदारपणें देतो व दोष लावीत
नाहीं, त्यापासीं त्याने मागावें ह्मणजे त्याला मिळेल.
६ परंतु विश्वासाने मागावें, कांहीं संशय धरूं नये,
कारण कीं संशय धरणारा समुद्राची लाट वाऱ्याने
वादळलेली व हेलकावलेली, तिच्या सारिखा आहे.
७ तर आपणाला प्रभूपासून कांहीं मिळेल, असें
त्या माणसाने समजूं नये. ८ द्विबुद्धीचा माणूस
आपल्या अवघ्या मार्गांमध्यें चंचळ आहे. ९
आणि जो भाऊ नीच त्याने आपल्या उंचपणावरून
आनंद करावा; १० परंतु जो धनवान त्याने
आपल्या नीचपणावरून; कारण कीं तो गवताच्या

फुलासारिखा टळून जाईल. ११ कां तर सूर्य
उन्हानें उगवून गवताला कोमवितो, तेव्हां त्याचें
फूल गळतें, आणि त्याच्या दिसण्याची शोभा
नाहींशी होती, तसा धनवानहि आपल्या मार्गांमध्यें
कोमून जाईल. १२ जो परीक्षा सोसून टिकतो
तो धन्य, कां तर परीक्षेस उतरल्यावर जीवनाचा
जो मुगुट प्रभूनें आपल्यावर प्रीति करणाऱ्यांस देऊं
केला, तो त्याला मिळेल.
१३ कोणी परीक्षेंत पडला असतां, मी देवा-
कडून परीक्षेंत पडलों, असें त्यानें ह्मणूं नये, कां
तर वाईट गोष्टींनीं देवाची परीक्षा होत नाहीं, आणि
तो कोणालाहि परीक्षेंत पाडीत नाहीं. १४ तर प्रत्येक
आपल्या इच्छेनें ओढलेला व भुलविलेला होऊन
परीक्षेंत पडतो. १५ मग इच्छा ही गर्भ धरून
पापाला प्रसवती, आणि पाप पूर्ण झाल्यावर मर-
णास उपजवितें.
१६ फसूं नका, माझ्या प्रिय भावानो. १७
प्रत्येक उत्तम दान व प्रत्येक पूर्ण दान वरून होतें,
तें प्रकाशांचा बाप, ज्याला पालट नाहीं व फिर-
ण्याची छाया नाहीं, त्यापासून उतरतें. १८
त्यानें आपल्या इच्छेनें खरेपणाच्या वचनांकडून
आह्मास जन्मविलें, यासाठीं कीं आह्मी त्याच्या
उत्पन्नांतील कांहीं प्रथम झालेल्यांमधील फळ व्हावें.
१९ यास्तव माझ्या प्रिय भावानो, प्रत्येक
माणूस ऐकायास उतावळा, बोलायास सावकाश,
रागास सावकाश, असा असावा; २० कां कीं
माणसाचा राग देवाच्या न्यायीपणाला घडवीत नाहीं.
२१ यास्तव सर्व अशुद्धपण व भरपूर दुष्टाई टाकून,
जें रोंपरूप लावलेलें वचन तुमच्या जिवांस तारा-
याला शक्तिमान् आहे, तें नम्रतेनें अंगीकारा. २२
वचनाचे पाळणारे असा, आपणांस भुलवून केवळ
ऐकणारेच असे नका. २३ कां कीं कोणी जर वच-
नाचा पाळणारा नाहीं पण ऐकणारा मात्र, तर
तो आपलें स्वाभाविक तोंड अरस्यांत पाहणाऱ्या
माणसासारिखा आहे. २४ कां तर तो आप-
णाला पाहतो, मग तेथून जातो, आणि आपण कसा
होतों हें तेव्हांच विसरतो. २५ परंतु जो मोक-
ळेपणाच्या पूर्ण शास्त्रांत न्याहाळून पाहतो व त्या-
प्रमाणें राहतो, तोच विसराळू ऐकणारा होत नाहीं,
तर कामाचा करणारा होतो, तोच आपल्या कर-
ण्यांत धन्य होईल. २६ आपण भक्तिशील आहें,
असें जर तुह्मामधील कोणीएकाला वाटतें, तथापि
तो आपल्या जिभेला अटोपीत नाहीं, पण आपल्या
अंतःकरणाला भुलवितो, तर त्याची भक्ति व्यर्थ.
२७ देव बाप याजवळ शुद्ध व निर्मळ भक्ति हीच
आहे कीं, पोरकीं व विधवा यांचा समाचार यांच्या
संकटांत घ्यावा व आपणाला जगापासून डागावर-
हित राखावें.

## अध्याय २.

अहो माझ्या भावानो, आमचा गौरवाचा प्रभु
येशू ख्रीस्त याचा विश्वास पक्षपातासुद्धां धरूं
नका. २ कां कीं ज्याच्या बोटांत सोन्याची अंगठी
व ज्याच्या अंगावर शोभायमान वस्त्रें, असा माणूस
जर तुमच्या सभास्थानांत येतो, आणि मलिन
वस्त्रें पांघरलेला दरिद्रीहि जर येतो; ३ आणि
तुह्मी शोभायमान वस्त्र पांघरणाऱ्याकडे लक्ष
देऊन ह्मणतां कीं, तूं एथें उत्तम प्रकारें बैस, परंतु
दरिद्र्याला ह्मणतां कीं, तूं तेथें उभा राहा, अथवा
एथें माझ्या पादासनाजवळ बैस; ४ तर तुह्मी
आपणांमध्यें भेद ठेवितां, आणि वाईट विचारांचे
न्यायाधीश झालां कीं नाहीं? ५ अहो माझ्या प्रिय
भावानो, ऐका, जे इहलोकीं दरिद्री परंतु विश्वासानें
धनवान्, आणि जें राज्य देवानें आपल्या प्रीति कर-
णाऱ्यांस देऊं केलें त्याचे वतनदार, त्यांस त्यानें
निवडिलें कीं नाहीं? ६ परंतु तुह्मी दरिद्र्याचा
अपमान केला आहे; जे धनवान् ते तुह्मावर जुलूम
करितात कीं नाहींत? आणि ते तुह्मास न्यायस्था-
नांकडे ओढितात कीं नाहींत? ७ जें उत्तम नांव
तुह्मावर ठेविलें त्याला ते निंदितात कीं नाहींत? ८
तथापि नेमशास्त्रांतील राजमान्य नेम, ह्मणजे तूं
आपल्या सारिखी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर,
हा जर तुह्मी पूर्ण करितां तर उत्तम करितां. ९
परंतु जर तुह्मी पक्षपात धरितां तर पाप करितां,
आणि नेमशास्त्राकडून उलंघणारे असे दोषी ठरलां
आहां. १० कां तर जो कोणी संपूर्ण नेमशास्त्र
पाळून केवळ एका गोष्टीविषयीं चुकतो, तो सर्वां-
विषयीं दोषी झाला आहे. ११ कां कीं ज्यानें
सांगितलें कीं, व्यभिचार करूं नको, त्यानेंच सांगि-
तलें कीं, हत्या करूं नको; आतां जर व्यभिचार
करीत नाहींस पण हत्या करितोस, तर शास्त्राचा
उलंघणारा झालास. १२ मोकळेपणाच्या नेम-
शास्त्राकडून तुमचा न्याय ठरणार आहे, असें सम-
जून बोला व वर्त्ता. १३ कारण कीं ज्यानें दया

केली नाहीं, त्याचा न्याय दयेवांचून होईल, परंतु
न्यायावर दया आनंदती.
१४ अहो माझ्या भावानो, जर कोणी ह्मणतो
कीं, मला विश्वास आहे, परंतु तो करणीं करीत
नाहीं तर लाभ काय? विश्वास त्याला तारायास
शक्तिमान् आहे काय? १५ आणि भाऊ किंवा
बहीण, हीं जर उघडीं असतील व त्यांस प्रतिदि-
वसाचें अन्न उणें असेल; १६ आणि तुह्मामधील
कोणी त्यांस ह्मटलें, शांतीनें जा, गरम व्हा व तृप्त
व्हा, तथापि शरिराला पाहिजेत तीं जर तुह्मी
त्यांस न देतां, तर लाभ काय? १७ तसा विश्वा-
सहि याला जर करणीं नाहींत, तर तो एकला
असून निर्जीव आहे. १८ परंतु कोणी ह्मणेल,
तुला विश्वास आहे, आणि मला करणीं आहेत; तूं
आपला विश्वास आपल्या करण्यांवांचून मला दा-
खीव, आणि मी आपला विश्वास आपल्या करण्यां-
कडून तुला दाखवीन. १९ तूं विश्वास धरितोस
कीं, एक देव आहे; बरें करितोस, भुतेंहि विश्वास-
तात व कांपतात. २० परंतु हे व्यर्थ माणसा,
करण्यांवांचून विश्वास निर्जीव आहे, असें समजा-
यास तूं मान्य आहेस काय? २१ आमचा बाप
आब्राहाम यानें आपला पुत्र इझाक यज्ञवेदीवर वाहून
दिल्हा, यांत तो करण्यांकडून न्यायी ठरला कीं
नाहीं? २२ त्याचा विश्वास त्याच्या करण्यांसहित
होता, आणि करण्यांकडून विश्वास पूर्ण झाला, असें तूं
पाहतोस ना? २३ आणि हा शास्त्रलेख पूर्ण
झाला कीं, आब्राहामानें देवावर विश्वास ठेविला,
आणि तें त्याला न्यायीपण असें मोजलें; अणखी
त्याला देवाचा मित्र असें ह्मटलें. २४ यास्तव
तुह्मी पाहतां कीं, केवळ विश्वासाकडून नव्हे, तर
करण्यांकडून माणूस न्यायी ठरतो. २५ आणि
त्याप्रमाणेंहि राहाब कसबीण हिनें त्या जासुदांचा
पाहुणचार केला, आणि त्यांस दुसऱ्या वाटेनें काढून
दिल्हें, तेव्हां ती करण्यांकडून न्यायी ठरली कीं
नाहीं? २६ तर जसें शरीर आत्म्यावांचून निर्जीव
आहे, तसा विश्वासहि करण्यांवांचून निर्जीव आहे.

## अध्याय ३.

माझ्या भावानो, बहुत उपदेशक होऊं नका, कां
तुह्मी जाणतां कीं, आपण अधिक दंड पावूं.
२ कां तर आह्मी सर्वच बहुत गोष्टींविषयीं चुकतों:
जर कोणी बोलण्याविषयीं चुकत नाहीं, तर तो पूर्ण
माणूस, आपल्या सर्व शरिरालाहि आकळायास
शक्तिमान आहे. ३ पाहा, घोड्यांनी आह्मास
मानावें ह्मणून आह्मी त्यांच्या तोंडामध्यें लगाम
घालितों, आणि त्यांचें सर्व शरीर फिरवितों. ४
पाहा, तारवेंहि एवढीं मोठीं आहेत, आणि प्रचंड
वाऱ्यानीं लोटून जातात, तरी जिकडे सुकाणदा-
राला इच्छा होती, तिकडे फार लाहान सुकाणा-
कडून फिरतात. ५ तसीच जीभ लाहान अंग
आहे, परंतु मोठ्या गोष्टींची फुशारकी सांगती;
पाहा, थोडकी आग केवढ्या गंजीला पेटविती. ६
आणि जीभ ही आग, व अन्यायाचें भुवन आहे;
जीभ आमच्या अंगामध्यें असी ठेविली आहे कीं,
ती सगळ्या शरिराला मळविती, आणि जन्माच्या
फेऱ्याला चेतविती, आणि ती नरकाकडून चेतलेली
आहे. ७ कां तर श्वापदांची व पांखरांची व
वळवळणाऱ्यांची व जलचरांची प्रत्येक जात वश
होत असती, आणि मनुष्यजातीनें वश केलेली
आहे; ८ परंतु जिभेला वश करायास कोणी
माणूस शक्तिमान नाहीं, ती अनिवार दुष्ट, मरण-
कारक विषानें भरलेली आहे. ९ तिच्या योगें
देव बाप याची आह्मी स्तुति करितों, आणि देवा-
च्या प्रतिमेप्रमाणें झालेलीं माणसें यांस तिच्या
योगें शाप देतों. १० एकाच तोंडांतून स्तुति
व शाप निघतात; अहो माझ्या भावानो, अशा
गोष्टी अगदी होऊं नयेत. ११ झऱ्याच्या एकाच
भोंकांतून गोड व कडू पाणी निघतें काय? १२
अहो माझ्या भावानो, अंजीर झाडानें जाइताचीं
फळें, किंवा द्राक्षवेलानें अंजीरफळें द्यावीं, हें घडतें
काय? तसें कोणीहि झऱ्यानें खारट व गोड पाणी
द्यावें हें घडत नाहीं.
१३ तुह्मामध्यें ज्ञानी व समंजस कोण? त्यानें
आपलीं करणीं ज्ञानाच्या लीनतेनें उत्तम वर्त्तणुकी-
कडून दाखवावीं. १४ परंतु तुमच्या अंतःकरणांत
जर कडू आवेश व भांडाळपण आहे, तर तुह्मी
खरेपणाविरुद्ध ताठा व लबाडी करितां कीं नाहीं?
१५ हें ज्ञान वरून उतरत नाहीं, तर पृथ्वीवरलें,
दैहिक, सैतानाकडलें, असें आहे. १६ कां तर
जेथें आवेश व भांडाळपण, तेथें दंगा व प्रत्येक
कुकर्म आहे. १७ परंतु वरून जें ज्ञान तें पहिल्यानें
निर्मळ, नंतर शांतिकारक, विनयी, सहज विश्वास-
णारें, दयेनें व चांगल्या फळानी भरलेलें, निःपक्षपाती
आणि निर्दोंगी, असें आहे. १८ अणखी जे शांति

करितात, त्यांकडून न्यायीपणाचें फळ शांतीनें पेर-
लेलें आहे.

## अध्याय ४.

तुह्मामध्यें लढाया व झगडे, हीं कोठून? तुमच्या
अंगांमधील लढणाऱ्या विलासांपासून नाहींत
काय? २ तुह्मी लोभ धरितां परंतु तुह्मास नाहीं,
तुह्मी घात करितां व आवेश धरितां, परंतु तुमच्यानें
मिळववत नाहीं; तुह्मी भांडतां व लढतां, परंतु
तुह्मास नाहीं, कारण कीं तुह्मी मागत नाहीं. ३
तुह्मी मागतां परंतु तुह्मास मिळत नाहीं, का कीं
तुह्मी आपल्या विलासांसाठीं खर्चावें अशा वाईट
प्रकारें मागतां. ४ अहो व्यभिचारी व व्यभिचा-
रिणी, जगाची मैत्री ही देवाचें वैर आहे, हें
तुह्मास ठाऊक नाहीं काय? यास्तव जो कोणी
जगाचा मित्र व्हायास इच्छितो तो देवाचा वैरी
ठरला आहे. ५ शास्त्र फुकट बोलतें, असें
तुह्मी कल्पितां काय? जो आत्मा आह्मामध्यें वस्ती
करितो तो हेव्याची आवड धरितो काय? ६ परंतु
तो अधिक कृपादान करितो, यास्तव तो ह्मणतो कीं,
देव गर्विष्ठांचा विरोध करितो परंतु दीनांस तो कृपा-
दान करितो. ७ यास्तव देवाच्या स्वाधीन असा;
सैतानाविरुद्ध उभे राहा, ह्मणजे तो तुह्मापासून
पळेल. ८ देवाजवळ जा, ह्मणजे तो तुह्माजवळ
येईल; अहो पापी, हात निर्मळ करा; अहो द्विबु-
द्धीचे, अंतःकरणें शुद्ध करा; ९ उदासीन व्हा
व शोक करा व रडा, तुमचें हसणें याबद्दल शोक,
आणि आनंदाबद्दल उदासीनता होवो. १० प्रभू-
च्या पुढें नम्र व्हा, ह्मणजे तो तुह्मास उंच करील.
११ अहो भावानो, एकमेकांविरुद्ध बोलूं नका;
जो आपल्या भावाविरुद्ध बोलतो, आणि आपल्या
भावावर न्याय ठरवितो, तो नेमशास्त्राविरुद्ध
बोलतो व नेमशास्त्रावर न्याय ठरवितो, आणि जर
तूं नेमशास्त्रावर न्याय ठरवितोस, तर नेमशास्त्राचा
पाळणारा नव्हेस, पण न्यायाधीश आहेस. १२
नेमशास्त्र देणारा एकच आहे, तो तारायास व
नाश करायास शक्तिमान् आहे; जो दुसऱ्याचा
न्याय ठरवितो, तो तूं कोण आहेस?
१३ आतां चला, जे तुह्मी ह्मणतां कीं, आज
किंवा उद्यां आह्मी अमुक नगरास जाऊन तेथें वर्ष-
भर राहूं व व्यापार करून लाभ मिळवूं. १४
ते तुह्मी उद्यांची गोष्ट समजत नाहीं, का कीं तुमचें
आयुष्य कसें? तें तर वाफ आहे, थोडाच वेळ
दिसतें, आणि मग नाहींसें होतें. १५ त्यापेक्षां
तुह्मी असें ह्मणावें, जर प्रभूची इच्छा असेल तर
आह्मी जगूं व हें किंवा तें करूं. १६ परंतु आतां
तुह्मी आपल्या नावाजणुकींमध्यें फुशारकी सांगतां,
अशी सर्व फुशारकी वाईट आहे. १७ तर जो
चांगलें करायास जाणतो परंतु करीत नाहीं, त्याला
हें पाप आहे.

## अध्याय ५.

अहो धनवान, आतां चला, जे हाल तुह्मावर
येणार त्यांविषयीं आक्रांत करीत रडा. २
तुमचें द्रव्य नासलें आहे, आणि तुमचीं वस्त्रें कस-
रीनें खाल्लीं आहेत. ३ तुमचें सोनें व रुपें जंगलें
आहे, आणि त्यांचा जंग तुह्माविरुद्ध साक्ष असा
होईल; आणि अग्नीसारिखा तुमचे देह खाईल;
तुह्मी शेवटल्या दिवसांसाठीं सांचवून ठेविलें आहे.
४ पाहा, ज्या कामकऱ्यांनी तुमचीं शेतें कापिलीं
आहेत, त्यांची जी मजुरी तुह्मी कपटानें अटकून
ठेविली, ती ओरडती, आणि कापणाऱ्यांच्या हाका
सैन्यांच्या प्रभूच्या कानीं गेल्या आहेत. ५ तुह्मी
पृथ्वीवर चैनबाजी केली, आणि विषयभोग केला
आहे; तुह्मी जसें वधण्याच्या दिवसांत तशीं आ-
पलीं अंतःकरणें पुष्ट केलीं आहेत. ६ न्यायी
याला तुह्मी अन्यायी ठरवून घात केला आहे; तो
तुह्मास अडवीत नाहीं.
७ तर अहो भावानो, प्रभूच्या येण्यापर्यंत
धीर धरा; पाहा, शेतकरी भूमीच्या मोलवान फ-
ळाची वाट पाहत असतां, पहिला व शेवटला पा-
ऊस पडे तोंपर्यंत त्याविषयीं धीर धरितो. ८ तु-
ह्मीहि धीर धरा, आपल्या अंतःकरणांस स्थिरावा,
कारण कीं प्रभूचें येणें जवळ आलें आहे. ९
भावानो, तुह्मी दोषी ठरूं नये ह्मणून एकमेकांवर
कुरकुरूं नका; पाहा, न्यायाधीश दरवाज्यापुढें उभा
राहिला आहे. १० माझ्या भावानो, जे भविष्य-
वादी प्रभूच्या नांवानें बोलले आहेत, त्यांचें उदा-
हरण दुःख सोसण्याविषयीं व धीराविषयीं घ्या.
११ पाहा, जे साहतात ते धन्य, असें आह्मी ह्म-
णतों; तुह्मी ईयोबाच्या सहनतेविषयीं ऐकिलें आहे,
आणि प्रभूकडून जो परिणाम तो पाहिला आहे,
कीं प्रभु फार कनवाळू व दयाळू आहे. १२ आणि
माझ्या भावानो, अवघ्यांपेक्षां शपथ करूं नका; आ-
काशाची किंवा पृथ्वीची किंवा कोणतीहि दुसरी

शपथ करूं नका, तर तुमचें होय तें होय, आणि
नाहीं तें नाहीं असें असावें, तुह्मी दंडांत पडूं नये
ह्मणून. १३ तुह्मामध्यें कोणी दुःखित आहे काय?
त्याने प्रार्थना करावी; कोणी हर्षित आहे काय?
त्याने गीत गावें. १४ तुह्मामध्यें कोणी रोगी आहे
काय? त्याने मंडळीच्या वडिलांस बोलवावें, आणि
त्यानी प्रभूच्या नांवाने त्याला तेल लावून त्याज-
विषयीं प्रार्थना करावी. १५ आणि विश्वासयुक्त
प्रार्थना रोग्याला वांचवील, आणि प्रभु त्याला
उठवील, अणखी त्याने पापें केलीं असतील, तर
त्यांची क्षमा त्याला होईल. १६ तुह्मी निरोगी
व्हावें ह्मणून पातकें एकमेकांजवळ कबूल करा, व
एकमेकांसाठीं प्रार्थना करा; न्यायीची एकनिष्ठेची
प्रार्थना फार सार्थक करिती. १७ एलीया आह्मा-
सारिखा सुखदुःख भोगणारा माणूस होता, परंतु
त्याने प्रार्थना करितांना विनंती केली कीं, पाऊस पडूं
नये, मग साडेतीन वर्षांपर्यंत पाऊस भूमीवर पडला
नाहीं. १८ नंतर त्याने फिरून प्रार्थना केली,
आणि आकाशाने पाऊस दिल्हा, आणि भूमीने आ-
पलें फळ उपजविलें.

१९ अहो भावानो, जर तुह्मामधील कोणी खरे-
पणापासून बहकला, आणि कोणी त्याला माघारें
फिरविले; २० तर त्याने असें जाणावें कीं, जो
पाप्याला त्याच्या बहकण्याच्या मार्गापासून माघारें
फिरवितो, तो प्राण्याला मरणापासून तारील व
पापाच्या समुदायाला झांकील.

# पेत्रसाचें पहिलें पत्र.

### अध्याय १.

पेंतस, गलती, काप्पदकी, आशी व बिथुनी
यांमध्यें पांगलेले प्रवासी, २ देव बापाच्या
पूर्व जाणण्याप्रमाणें आत्म्याच्या पवित्र करण्याने
मान्य होण्यासाठीं, आणि येशू ख्रीस्ताच्या रक्ताने
शिंपडलेले होण्यासाठीं निवडलेले, यांस येशू ख्री-
स्ताचा प्रेषित पेत्रस याचा सलाम; तुह्मावर कृपा
व शांति हीं फार होवोत.

३ देव आमचा प्रभु येशू ख्रीस्ताचा बाप तो
स्तुतिमान्य, कां त्याने आपल्या मोठ्या दयेप्रमाणें
आह्मास मेलेल्यांमधून येशू ख्रीस्ताच्या पुन्हा उठ-
ण्याकडून सजीव आशा प्राप्त होण्यासाठीं फिरून
जन्मविलें आहे; ४ अविनाशी व निर्मळ व न
कोमणारें वतन, तुह्मासाठीं आकाशांमध्यें राखलेलें,
तें प्राप्त व्हावें ह्मणून. ५ ते तुह्मी, जें तारण शे-
वटल्या वेळेस प्रगट होण्यास तयार आहे, तें पाव-
ण्यासाठीं देवाच्या शक्तीने विश्वासाकडून राखलेले
आहां. ६ त्यावरून तुह्मी फार हर्ष करितां, के-
वळ आतां थोडा वेळ अगत्य असल्यास बहुत
परीक्षांमुळें दुःखित आहां; ७ हें यासाठीं कीं
तुमच्या विश्वासाची जी परीक्षा अग्नीच्या योगें पार-
खलेलें नाशवंत सोनें याच्या पेक्षां फार मोलाची
आहे, ती येशू ख्रीस्ताच्या प्रगटण्याच्या वेळेस
स्तुति व मान व गौरव यांस योग्य असी निघावी.
८ त्या येशूला पाहिलें नसतांहि तुह्मी त्यावर प्रीति
करितां; आतां जरी त्याला पाहत नाहीं, तरी वि-
श्वास ठेवून अवाच्य व गौरवयुक्त आनंदाने उल्ह-
सतां; ९ कां तुह्मी आपल्या विश्वासाचा परिणाम ह्म-
णजे जिवांचें तारण साधीत आहां. १० ज्या भवि-
ष्यवाद्यांनी तुह्मावरल्या कृपेविषयीं भविष्य सांगितलें,
त्यानी त्या तारणाविषयीं मोठा प्रयत्न करून शोध
केला आहे; ११ कसा तर, त्यांमध्यें जो ख्री-
स्ताचा आत्मा त्याने ख्रीस्ताचीं दुःखें व त्यांपुढलीं
गौरवें यांविषयीं साक्ष पूर्वी देऊन, कोणता किंवा
कसा समय दाखविला, त्यांविषयीं ते शोध करीत
होते. १२ त्यांस असें प्रगट केलें होतें कीं,
त्यानी आपणांसाठीं नव्हे, तर आह्मासाठीं त्या
गोष्टी सांगितल्या, ह्मणजे आकाशांतून पाठविलेल्या
पवित्र आत्म्याकडून तुह्मास शुभवर्त्तमान सांगणा-
ऱ्यानी ज्या गोष्टी तुह्मास आतां सांगितल्या आहेत
त्याच; त्यांत न्याहाळून पाहावें, असी दुतांची फार
इच्छा आहे.

१३ यास्तव तुह्मी आपल्या बुद्धीच्या कंबरा
बांधून सावध असा, आणि येशू ख्रीस्ताच्या प्रगट-
ण्याच्या वेळेस जी कृपा तुह्मावर प्राप्त होणार,

तिची पूर्ण आशा धरा. १४ मान्य लेंकरें असें
होऊन, आपल्या पूर्वींच्या अज्ञानपणांतील इच्छांस
अनुसरूं नका; १५ तर ज्याने तुह्मास बोला-
विलें आहे, तो जसा पवित्र तसे तुह्मीहि सर्व वर्त्त-
णुकींत पवित्र व्हा. १६ कां तर असें लिहिलें
आहे कीं, मी पवित्र आहें, यास्तव तुह्मी पवित्र
व्हा. १७ आणि जो बाप पक्षपातावांचून प्रत्ये-
काच्या कर्माप्रमाणें न्याय ठरवितो, त्याचें नांव जर
तुह्मी घेतां, तर आपल्या प्रवासाच्या काळीं भयाने
वर्त्तणूक करा; १८ कां हें तुह्मास ठाऊक आहे
कीं, तुह्मास आपल्या वडिलोपार्जित व्यर्थ वर्त्तणु-
कीपासून सोनें व रुपें अशा नाशवंत वस्तूंनी खंडून
घेतलें नाहीं, १९ तर निष्कलंक व निर्दोष कोंकरा
असा जो ख्रीस्त त्याच्या मोलवान रक्ताने. २०
तो जगाच्या मांडण्यापूर्वी नेमला होता, परंतु तुह्मा-
साठीं शेवटल्या काळामध्यें प्रगट झाला आहे. २१
ते तुह्मी त्याच्या योगाने देवावर विश्वासलां, त्याने
त्याला मेलेल्यांमधून उठविलें व त्याला गौरव
दिल्हें, यासाठीं कीं तुमचा विश्वास व आशा देवावर
व्हावि. २२ तुह्मी भावांवर निष्कपट प्रीति करण्या-
साठीं आपले जीव खरेपण पाळण्याने आत्म्याकडून
पवित्र केले असतां, एकमेकांवर शुद्ध मनाने निष्ठेने
प्रीति करा. २३ कां कीं तुह्मी नाशवंत बिजापा-
सून नव्हे, तर अविनाशी यापासून देवाच्या जिवंत
व सर्वकाळ राहणाऱ्या वचनाकडून फिरून जन्म-
विलेले आहां. २४ कां कीं अवघी मनुष्यजात
गवतासारिखी, आणि माणसाचें सर्व गौरव गवताच्या
फुलासारिखें आहे; गवत वाळतें व त्याचें फूल
गळतें; २५ परंतु प्रभूचें वचन सर्वकाळ राहतें,
आणि ज्या वचनाचें शुभवर्त्तमान तुह्मास सांगि-
तलें तें तेंच आहे.

## अध्याय २.

यास्तव अवघी दुष्टाई व अवघें कपट व ढोंग व
हेवा व सर्व निंदा, हीं सोडून, २ नवें
जन्मलेल्या बाळकांसारिखे वचनरूप निऱ्या दुधाची
इच्छा धरा, तुह्मी त्याकडून वाढावें ह्मणून. ३
कां कीं प्रभु कृपाळू, असा तुह्मी अनुभव घेतला
आहे.

४ जो जिवंत धोंडा माणसाकडून नाकारलेला
खरें, परंतु देवाजवळ निवडलेला व मोलवान असा
आहे, त्याजवळ तुह्मी येऊन, ५ आपणहि जिवंत
धोंड्यांसारिखे रचण्यांत येऊन, आत्मिक मंदिर
झालां, जे आत्मिक यज्ञ येशू ख्रीस्ताकडून देवाला
आवडतात, ते अर्पायासाठीं पवित्र याजक असे
झालां आहां. ६ यास्तव शास्त्रांत असें लिहिलें
आहे कीं, पाहा, निवडलेला, मोलवान्, असा कोंप-
ऱ्याचा मुख्य धोंडा मी सीयोनांत ठेवितों, आणि
जो त्याजवर विश्वास ठेवितो तो लाजणार नाहीं.
७ तर तुह्मा विश्वासणाऱ्यांस तो मोलवान् आहे,
परंतु जे मानीत नाहींत त्यांस जो धोंडा बांधणाऱ्या-
नीं नाकारिला तोच कोंपऱ्याचा शिरोभाग, ८ व
ठेंचण्याचा धोंडा व अडखळण्याचा खडक असा
झाला आहे; ते मानीत नसतां वचनाविषयीं ठेंच-
तात, त्यासाठीं तर ते नेमले होते. ९ परंतु तुह्मी
निवडलेली जात, राजमान्य याजकवर्ग, पवित्र राष्ट्र,
मोलाने मिळविलेली प्रजा असे आहां; यासाठीं
कीं ज्याने तुह्मास अंधारांतून आपल्या आश्चर्यवान्
उजेडांत बोलाविलें आहे, त्याचे सद्गुण तुह्मी सां-
गून दाखवावे. १० ते तुह्मी पूर्वी प्रजा नव्हतां,
तर आतां देवाची प्रजा; दया पावलां नव्हतां, तर
आतां दया पावलां आहां.

११ अहो प्रियानो, मी विनंती करितों कीं, तुह्मी
उपरी व प्रवासी असे असतां, ज्या दैहिक इच्छा
जीवाशीं लढतात त्यांपासून दूर राहा. १२ वि-
देशी लोकांमध्यें तुह्मी आपली वर्त्तणूक चांगली
राखीत जा, यासाठीं कीं जरी ते जसें वाईट कर-
णाऱ्यांवर तसें तुह्मावर वाईट बोलतात, तरी त्यांनी
तुमचीं चांगलीं कर्मे पाहून त्यांवरून भेट होण्याच्या
दिवसीं देवाचें गौरव करावें. १३ तर प्रभूसाठीं
मनुष्याच्या प्रत्येक नेमणुकीला मान्य व्हा; राजा तर
श्रेष्ठ आहे ह्मणून त्याला, १४ आणि अधिकारी
हे त्याने वाईट करणाऱ्यांच्या दंडासाठीं व चांगलें
करणाऱ्यांच्या स्तुतीसाठीं पाठविलेले आहेत, ह्मणून
त्यांस मान्य व्हा. १५ कां तर देवाची इच्छा
असी आहे कीं, तुह्मी चांगलें करण्याने निर्बुद्धि
माणसांच्या अज्ञानाला कुंठित करावें. १६ स्वतंत्र
असा, तथापि दुष्टपणा झांकण्यासाठीं स्वतंत्रता धरूं
नका; तर देवाचे दास असे असा. १७ सर्वांचा
सन्मान करा, भावांवर प्रीति करा, देवाचें भय धरा,
राजाचा मान राखा.

१८ चाकरानो, तुह्मी आपल्या धन्यांस, जे चां-
गले व सौम्य त्यांस केवळ नव्हे, तर जे कठोर
त्यांस देखील अवघ्या भयाने मान्य असा. १९

कां कीं जर कोणी अन्याय सोसितांना देवाविषयीं-
च्या भावनेमुळें दुःखाचें सहन करितो, तर हा सद्-
गुण आहे. २० कां कीं पाप केल्यावर ठोकलेले
असतांना जर तुह्मी सहन करितां तर काय कीर्त्ति?
परंतु चांगलें केल्यावर दुःख भोगितांना जर सहन
करितां, तर हें देवाला मान्य आहे. २१ कारण
कीं याकरितां तुह्मी बोलाविलेले आहां; कां तर
ख्रीस्तानेहि आह्मासाठीं सोसून आह्माकरितां कि-
त्ता घालून ठेविला आहे, तुह्मी त्यांच्या पावलांस
अनुसरावें ह्मणून. २२ त्याने पाप केलें नाहीं,
आणि त्याच्या मुखांत कपट सांपडलें नाहीं. २३
गांजलेला असतां त्याने उलटून गांजिलें नाहीं,
सोसीत असतां त्याने धमकाविलें नाहीं; तर
यथार्थ न्याय ठरविणाऱ्याजवळ आपणाला सोपून
दिल्हें. २४ त्याने स्वतां लांकडावर आपल्या
शरिरीं आमचीं पापें घेऊन साहिलीं, यासाठीं कीं
आह्मी पापांविषयीं मरून न्यायीपणाविषयीं जगावें;
त्याच्या घायाने तुह्मी निरोगी झालां. २५ कां
तर तुह्मी बहकलेल्या मेंढरांसारिखे होतां, परंतु
आतां तुमच्या जीवांचा पाळक व अध्यक्ष याकडे
माघारें फिरलेले आहां.

## अध्याय ३.

त्याप्रमाणें अहो बायकानो, तुह्मी आपल्या नव-
ऱ्यांस मान्य असा, यासाठीं कीं जर कोणी
वचनाला मानीत नाहींत, २ तर ते वचनावांचून
बायकांच्या वर्त्तणुकीने ह्मणजे तुमची मर्यादेची नि-
र्मळ वर्त्तणूक पाहून, मिळविण्यांत यावें. ३ त्या
तुमची शोभा ही केसांचें गुंफणें व सोन्याचे डागिणे
घालणें, किंवा पोशाक करणें, असी बाहेरली नसावी;
४ तर जो नम्र व शांत आत्मा देवाच्या दिसण्यांत
मोलवान आहे, त्याच्या अविनाशी शोभेने अंतः-
करणांतील गुप्त मनुष्यपण असावें. ५ कां तर
तसेंच पूर्वी, देवावर आशा ठेवणाऱ्या पवित्र बायका
यानीहि आपल्या नवऱ्यांस मान्य असण्याने आप-
णांस शोभविलें. ६ तसें सारेने आब्राहामाला
मानून त्याला स्वामी ह्मटलें; तिचीं लेंकरें तुह्मी
आहां, जर तुह्मी चांगलें करितां, आणि कांहीं भय
बाळगीत नाहींत, तर. ७ नवऱ्यानो, त्याप्रमाणें
त्यांच्या संगतीं सुज्ञतेने राहून, बायको अधिक
नाजूक पात्र आहे, असें समजून तिची मर्यादा
राखा, आणि तुह्मी जीवनाच्या कृपेचे संगतीचे वतन-
दार असल्यासारिखे करा, तुमच्या प्रार्थना खुंटूं नये
ह्मणून.

८ तर शेवटीं तुह्मी सर्व एकचित्ताचे, समसु-
खदुःखी, भावांवर प्रीति करणारे, कळवळणारे, मित्र-
बुद्धीचे, असे असा. ९ वाइटाबद्दल वाईट, किंवा
निंदेबद्दल निंदा असें फेडूं नका, तर उलटया प्रकारें
आशीर्वाद द्या; कारण तुह्मी जाणतां कीं, त्यासा-
ठींच तुह्मी बोलाविलेले आहां, असें कीं तुह्मी
आशीर्वादाचे वतनदार व्हावें. १० कां तर जो
आयुष्याची आवड धरून चांगले दिवस पाहायास
इच्छितो, त्याने वाइटापासून आपली जीभ, व
कपटाच्या बोलण्यापासून आपले ओंठ अटोपावे.
११ त्याने वाइटापासून वळून चांगलें करावें, त्याने
शांति साधायास झटून तिच्या मागें लागावें. १२
कारण कीं न्यायींवर प्रभूचे डोळे व त्यांच्या प्रार्थ-
नेकडे याचे कान आहेत, परंतु प्रभूचें तोंड वाईट
करणाऱ्यांविरुद्ध आहे. १३ आणि जें चांगलें
त्याला तुह्मी अनुसरलां, तर तुमचें वाईट करील
असा कोण? १४ परंतु जर तुह्मी न्यायीपणा-
मुळेंच सोसितां, तर तुह्मी धन्य, ह्मणून त्यांच्या
भयाने भिऊं नका, व घाबरूं नका. १५ तर प्रभु
देव याला आपल्या अंतःकरणानी पवित्र माना.
१६ आणि तुह्मामध्यें जी आशा तिचें कारण
जो कोणी पुसतो, त्याला नम्रतेने व मर्यादेने
प्रत्युत्तर देण्यास सर्वदां तयार असा. सद्भाव
धरीत जा, यासाठीं कीं ख्रीस्ताकडील तुमच्या
चांगल्या वर्त्तणुकीविषयीं जे वाईट बोलतात, ते
जसें वाईट करणाऱ्यांस तसें तुह्मास निंदितात,
त्याविषयीं त्यानी लाजावें. १७ कां कीं तुह्मी
सोसावें, असी देवाची इच्छा असली, तर वाईट
करण्यामुळें यापेक्षां चांगलें करण्यामुळें सोसावें हें
बरें. १८ कां तर ख्रीस्तानेहि एकदांच पापांक-
रितां, ह्मणजे न्यायीने अन्यायी यांकरितां सोसिलें,
त्याने आह्मास देवाजवळ पोहंचवावें ह्मणून;
त्याला देहाविषयीं जिवें मारिलें, परंतु आत्म्याकडून
जिवंत केलें, १९ त्याकडूनहि त्याने जाऊन बंदि-
शाळेंतील आत्म्यांस उपदेश केला; २० ह्मणजे
पूर्वी नोहाच्या दिवसांत, ज्या तारवांत थोडके ह्मणजे
आठ प्राणी पाण्यांतून वांचविले, तें तयार होत
असतां देवाची सहनता वाट पाहत होती तेव्हां
जे मानीत नव्हते त्यांस केला. २१ त्याच्या
सारिखा दाखला जो बाप्तिस्मा ह्मणजे देहाचा मळ

दूर करणें असा नव्हे, तर देवाला सद्भावानें उत्तर
देणें असा आहे, तो आतां येशू ख्रीस्ताच्या पुन्हा
उठण्याकडून आह्मास तारितो. २२ हा तर
आकाशांत जाऊन देवाच्या उजवीकडे आहे; त्या-
च्या स्वाधीन दूत व अधिकार व सत्ता हीं ठेवलेलीं
आहेत.

## अध्याय ४.

तर ख्रीस्तानें आह्माकरितां देहानें सोसिलें आहे,
ह्मणून तुह्मीहि त्याच बुद्धीनें हत्यारबंद असा;
कारण कीं ज्यानें देहानें सोसिलें तो पाप करण्या-
पासून राहिला आहे; २ यासाठीं कीं तुह्मी पुढें
देहाच्या उरलेल्या काळीं माणसांच्या इच्छांप्रमाणें
नव्हे, तर देवाच्या इच्छेप्रमाणें जगावें. ३ कां
तर आह्मी कामातुरपण, इच्छा, मद्यपान, विलास,
झिंगी व अमंगळ मूर्त्तिपूजा, यांत चालत असतां
विदेशी लोकांची इच्छा पूर्ण केली, असा आयु-
ष्याचा गेलेला काळ आह्मास पुरे. ४ तुह्मी
त्याच अनिवार सोदेगिरींत त्याबरोबर धावत नाहीं
यावरून आश्चर्य करून ते निंदा करितात. ५
जो जिवंतांचा व मेलेल्यांचा न्याय ठरवायास
तयार आहे त्याला ते झडती देतील. ६ कां तर
यासाठीं मेलेल्यांसहि शुभवर्त्तमान सांगितलें होतें
कीं, देहाविषयीं त्यांचा न्याय माणसांच्या प्रमाणें
ठरावा खरें, परंतु आत्म्याविषयीं त्यांनी देवाच्या
प्रमाणें जगावें.

७ परंतु सर्व वस्तूंचा शेवट जवळ आला आहे;
यास्तव शुद्धीवर असा, व प्रार्थनांसाठीं सावध
असा. ८ आणि अवघ्यांपेक्षां एकमेकांवर निष्ठेनें
प्रीति करीत जा, कां कीं प्रीति पापांचा समुदाय
झांकिती. ९ कुरकूर न करितां एकमेकांचा पाहुण-
चार करा. १० प्रत्येकाला जसें कृपादान मिळालें
आहे, तसें देवाच्या अनेक प्रकारच्या कृपेच्या चां-
गल्या कारभाऱ्यांसारिखे तें एकमेकांच्या उपयोगास
लावा. ११ जर कोणी बोलतो तर त्यानें देवाच्या
वचनांप्रमाणें, जर कोणी सेवा करितो तर देव त्याला
जी शक्ति पुरवितो, तिच्या योगें त्यानें करावी;
यासाठीं कीं सर्व गोष्टींत येशू ख्रीस्ताकडून देवाचें
गौरव व्हावें; त्याला सदासर्वकाळ गौरव व सत्ता
आहे. आमेन.

१२ अहो प्रियांनो, जें जळणें तुमच्या परीक्षे-
साठीं तुह्मास प्राप्त झालें, त्यावरून आपणांस अपूर्व
झालें असें समजून नवल मानूं नका; १३ तर
ख्रीस्ताच्या दुःखांचे वांटेकरी झालां आहां
आनंद करा, यासाठीं कीं त्याच्या गौरवाच्या
ण्याच्या वेळेस तुह्मी फार आनंदानें उल्ह
१४ जर ख्रीस्ताच्या नांवामुळें तुमची निंदा
तील तर तुह्मी धन्य, कां तर गौरवाचा व दे
आत्मा तुह्मावर राहिला आहे; त्याची त्य
निंदा होती खरें, परंतु तुह्माकडून तो
पावतो. १५ तर घातक, किंवा चोर, किंवा दु
किंवा चोंढाळ, असा होऊन तुह्मामधील
सोसूं नये. १६ पण ख्रिस्ती आहे ह्मणून सो
तर त्यानें लाजूं नये, पण त्यामुळें देवाचें गौरव
१७ कां तर न्याय करण्याचा प्रारंभ देवाच्या
व्हावा, असी वेळ आहे, आणि जर प्रारंभ आ
पासून तर जे देवाच्या शुभवर्त्तमानाला
नाहींत त्यांचा परिणाम काय होईल! १८
जर न्यायी कष्टानें तरतो तर अभक्त व पापी
ठिकाण कोठें होईल? १९ यास्तव जे दे
इच्छेप्रमाणें सोसीत आहेत, त्यांनी चांगलें
ण्यांत आपले जीव विश्वासू उत्पन्न करणारा
सोंपून द्यावे.

## अध्याय ५.

तुह्मामध्यें वडिलांस मी, सोबती वडील व ख्री
स्ताच्या दुःखांचा साक्षी, व जें गौरव प्रक
होणार त्याचा वांटेकरी, तो मी विनंती करितों:
तुह्मामधील देवाच्या कळपाचें पालन करा. अ
त्यामुळें नव्हे, तर खुशीनें सांभाळ करीत जा, तु
लाभासाठींहि नव्हे, तर सिद्ध मनानें करा:
आणि वतनावर धनीपण करावें असें नव्हे,
कळपाचे कित्ते व्हा. ४ मग मुख्य मेंढपाळ प्र
होईल तेव्हां तुह्मी गौरवाचा अविनाशी मु
पावाल.

५ त्याप्रमाणें, अहो तरुणांनो, वडिलांस मा
असा, आणि तुह्मी सर्व एकमेकांस मान्य हो
नम्रता पांघरलेले असा, कां कीं देव गर्विष्ठांचा विरो
करितो, परंतु नम्रांवर कृपादान करितो. ६ यास्त
देवानें तुह्मास प्रसंगीं उंच करावें, ह्मणून त्याच
पराक्रमी हाताखालीं नम्र व्हा. ७ तुह्मी आपल
सर्व चिंता त्याजवर टाका, कां तर तो तुह्माविष
काळजी करितो.

८ सावध असा, जागे राहा, कारण कीं तुम
जो शत्रु सैतान तो गर्जणाऱ्या सिंहासारिखा कोणा
गिळावें, असें शोधीत फिरतो; ९ तर विश्वास

स्थिर होऊन त्याविरुद्ध उभे राहा, कारण तुह्मी
जाणतां कीं, जगांतील तुमच्या भावांवर तींच दुःखें
पूर्ण होतात.
१० तर सर्व कृपेचा देव, ज्याने आपल्या सर्व-
काळच्या गौरवांत आह्मास ख्रीस्त येशूकडून बोला-
विलें, तो स्वतां, तुह्मी कांहीं वेळ सोसल्यानंतर,
तुह्मास सिद्ध करो, स्थिरावो, बळकट करो, जो
पाया त्यावर स्थापो. ११ त्याला गौरव व पराक्रम
सदासर्वकाळ असो, आमेन.

१२ सिलवानस विश्वासू भाऊ, असें मी मानितों,
त्याजकडून म्या तुह्मास थोडक्यांत पत्र लिहिलें
आहे व विनंती केली व प्रमाण दिल्हें आहे कीं,
ज्या कृपेंत तुह्मी उभे राहतां ती देवाची खरी कृपा
आहे. १३ बाबेलांतील संगतीं निवडलेली व
माझा पुत्र मार्कस, हे तुह्मास सलाम सांगतात.
१४ प्रीतीच्या चुंबनाने एकमेकांचें क्षेम करा;
ख्रीस्त येशूकडल्या तुह्मा सर्वांस शांति असो.
आमेन.

# पेत्रसाचें दुसरें पत्र.

## अध्याय १.

आमचा देव व तारणारा येशू ख्रीस्त, यांच्या
न्यायीपणाकडून जे आमच्या सारिखा मोल-
वान विश्वास पावले आहेत, त्यांस येशू ख्रीस्ताचा
दास व प्रेषित शिमोन पेत्रस याचा सलाम. २
देव व आमचा प्रभु येशू यांच्या ओळखीकडून
तुह्माला कृपा व शांति वाढोत.
३ ज्याने आह्मास गौरवासाठीं व सद्गुणासाठीं
बोलाविलें, त्याच्या ओळखीकडून त्याच्या ईश्वरी
सामर्थ्याने जीवनाच्या व सुभक्तीच्या सर्व गोष्टी
आह्मास दिल्ह्या आहेत. ४ त्यांच्या योगें त्याने
आह्मास अत्यंत मोठीं व मोलवान वचनें दिल्हीं
आहेत, यासाठीं कीं त्यांकडून तुह्मी जगांतील जी
दुष्टाई इच्छेवरून आहे ती सोडून ईश्वरी स्वभा-
वाचे विभागी व्हावें. ५ तर याच हेतूने आह्मी
सर्व नेट लावून आपल्या विश्वासासीं सात्विकपण
व सात्विकपणासीं जाणणें, ६ व जाणण्यासीं इं-
द्रियदमन व इंद्रियदमनासीं सहनता व सहन-
तेसीं सुभक्ति, ७ व सुभक्तीसीं बंधुप्रीति व
बंधुप्रीतीसीं प्रीति, असीं जोडा. ८ कां कीं हीं
तुह्मास असलीं व वाढत असलीं, तर आमचा प्रभु
येशू ख्रीस्त याच्या ज्ञानाविषयीं तुह्मी आळसी व
निष्फळ होणार नाहीं, असें तुह्मास करितील. ९
अणखी ज्याला हीं नाहींत तो अंधळा आहे, डोळे
मिटितो, आपल्या पूर्वीच्या पापांपासून शुद्ध झाला
हें विसरतो. १० यास्तव अहो भावानो, तुह्मास
बोलावणें व निवडणें झालें, हें खचीत करण्यासाठीं
विशेषेंकरून लगट करा; कां तर तुह्मी हीं केलीं
असतां कधींहि पडणार नाहीं; ११ कां कीं तसें
आमचा प्रभु व तारणारा येशू ख्रीस्त याच्या
सर्वकाळच्या राज्यांत तुमचा प्रवेश प्रशस्तपणाने
होईल.
१२ यास्तव जरी तुह्मी या गोष्टी जाणतां,
आणि हल्लींच्या खरेपणामध्यें स्थिर झालां, तरी
यांविषयीं तुह्मास सर्वदा आठवण देण्यास मी उपेक्षा
करणार नाहीं. १३ आणि मी या राहोटींत आहें
तोंपर्यंत तुह्मास आठवण देऊन सावध करणें हें
मला योग्य वाटतें. १४ कारण मला ठाऊक
आहे कीं, आमच्या प्रभु येशू ख्रीस्तानेंहि मला
दाखविल्याप्रमाणें, माझी राहोटी लवकर सोडून द्या-
याची आहे. १५ अणखी माझी गति झाल्या-
नंतर या गोष्टींची आठवण तुह्मास नित्य व्हावी
ह्मणून मी झटेन. १६ कां तर जेव्हां आह्मी आपल्या
प्रभु येशू ख्रीस्ताचा पराक्रम व येणें हीं तुह्मास कळ-
वीत होतों, तेव्हां चतुराईने कल्पिलेल्या काहाण्यांस
अनुसरत होतों, असें नव्हे, तर आह्मी त्याच्या
मोठेपणाचे प्रत्यक्ष पाहणारे होतों. १७ कां कीं
त्याला देव बापापासून सन्मान व गौरव मिळालें, त्या-
विषयीं फार तेजस्वी गौरवाकडून असी वाणी झाली
कीं, हा माझा प्रिय पुत्र आहे, यावर मी संतुष्ट
आहें. १८ आणि आह्मी पवित्र डोंगरावर त्या-
च्या संगतीं असतां ही आकाशांतून झालेली वाणी
ऐकिली. १९ आणि आह्माजवळ अधिक निश्च-

याची गोष्ट ह्मणजे भविष्य गोष्ट आहे, तिला अंधा-
राच्या ठिकाणीं प्रकाश करणारा दिवा असें मानून,
तुह्मी चित्त दिल्यास बरें कराल, दिवस उजेडे व
पाहांट तारा तुमच्या अंतःकरणांत उगवे तोंपर्यंत.
२० पहिल्याने हें जाणा कीं, शास्त्रांतील कोणताहि
भविष्यवाद एकटाच उलगडण्याचा नाहीं; २१
कां तर भविष्यवाद कधीं माणसाच्या इच्छेने झाला
नाहीं, तर देवाचे पवित्र मनुष्य, पवित्र आत्म्याकडून
प्रेरिलेले बोलले.

## अध्याय २.

परंतु लोकांमध्यें खोटे भविष्यवादीहि होते, तसें
तुह्मामध्येंहि खोटे उपदेशक होतील, असे कीं,
नाशकारक पाखंड मतें चोरून चालू करितील;
आणि ज्या प्रभूने त्यांस विकत घेतलें, त्याला नाका-
रून आपणांवर त्वरित नाश आणितील. २ आणि
त्यांच्या नाशाच्या मार्गांस बहुत अनुसरतील, यांच्या
योगें खरेपणाचा मार्ग निंदा पावेल. ३ आणि
लोभाने ते कपटी गोष्टींकडून तुमची विकरी करि-
तील; त्यांचा जो दंड पूर्वी नेमला तो उशीर करीत
नाहीं, आणि त्यांचा नाश सुस्ति धरीत नाहीं. ४
कारण कीं ज्या दुतानी पाप केलें, त्यांस देवाने रा-
खिलें नाहीं, तर नरकांत टाकून न्यायाकरितां राख-
ण्यासाठीं निबिड काळोखाच्या बंधनामध्यें ठेविलें;
५ आणि पुरातन जगालाहि राखिलें नाहीं, तर अ-
भक्तांच्या जगावर प्रळय आणून आठवा माणूस
नोहा न्यायीपणाचा उपदेश करणारा, याला राखिलें;
६ अणखी होणाऱ्या अभक्तांस उदाहरण देण्या-
साठीं सदोम व गमोरा हीं नगरें भस्म करून, अ-
गदी ओसाडी करितांना त्यांस दंड केला; ७ आणि
जो न्यायी लोट अधार्मिकांच्या अशुद्ध वर्त्तणुकी-
कडून कष्टी होता, त्याला सोडविलें; ८ (कां तो
न्यायी त्यांमध्यें राहत असतां, पाहण्याने व ऐक-
ण्याने आपल्या न्यायी जिवांत त्यांच्या अधार्मिक
कर्मांवरून दिवसोदिवस त्रासलेला होता;) ९ तर
सुभक्तिमानांस परीक्षेंतून सोडवायाला व जे अ-
न्यायी त्यांस न्याय ठरण्याच्या दिवशीं दंड कर-
ण्यासाठीं राखायाला प्रभु जाणतो. १० आणि
विशेषेंकरून जे अमंगळ इच्छेने देहाप्रमाणें चाल-
तात व धनीपण तुच्छ मानितात, त्यांस दंड
करील; ते उद्धट, स्वच्छंदी, गौरवांची निंदा करि-
तांना भीत नाहींत. ११ तथापि जे दूत बळाने
व पराक्रमाने अधिक मोठे आहेत, ते प्रभूच्या स-
मोर त्यांवर निंदेचा आरोप आणीत नाहींत. १२
परंतु हे, ज्यांविषयीं समजत नाहींत त्यांविषयीं
निंदा करितांना, जे स्वाभाविक निर्बुद्धि पशु धरण्या-
साठीं व नाश पावण्यासाठीं जन्मलेले, त्यांसारिखे
आपल्याच दुष्टाईने नाश पावतील; १३ त्यांस
अन्यायाचें वेतन मिळेल; दिवसा चैनबाजी करणें
हें सुख असें ते मोजितात, ठिपके व डाग असे ते
आहेत, आपल्या भुलथापीनी माजलेले तुमच्या सं-
गतीं भोजन करितात. १४ त्यांचे डोळे व्यभि-
चारिणीने भरलेले, आणि पापापासून अटोपवत
नाहींत असे आहेत, ते अस्थिर प्राण्यांस मोहि-
तात, त्यांचें अंतःकरण लोभ धरण्याला सवंकलेलें
आहे, ते शापाचीं लेंकरें आहेत; १५ नीट मार्ग
सोडून बहकले आहेत; बसराचा बलाम याच्या
मार्गाला ते अनुसरले आहेत, याने अन्यायाच्या
मोलावर प्रीति केली, १६ परंतु तो आपल्या अ-
धर्माचा निषेध पावला, मुक्या जनावराने माणसाच्या
वाणीने बोलून भविष्यवाद्याच्या वेडेपणाला निषे-
धिलें. १७ ते निर्जल विहिरी, वादळाने हेलका-
वलेले ढग असे आहेत, त्यांच्या साठीं काळोखाची
निबिडता सर्वकाळ ठेविली आहे. १८ कां तर
जे बहकलेल्यांतून अगदी निघून गेले होते, त्यांस ते
व्यर्थपणाच्या फार फुगीर गोष्टी सांगून दैहिक इच्छा-
नी व अशुद्धपणाने मोहितात; १९ त्यांस ते
मोकळेपणाचें वचन देत असतां, आपणच दुष्टाई-
चे दास आहेत, कां कीं ज्याकडून कोणी जिंकलेला
आहे त्याकडून तो दासपणांतहि घातलेला आहे.
२० तर प्रभु व तारणारा येशू ख्रीस्त याच्या
ओळखीने जगाची मलिनता टाळल्यावर ते फिरून
तिजमध्यें गुंतून जिंकले, तर त्यांची शेवटली
दशा पहिल्यापेक्षां वाईट आहे. २१ कारण कीं
न्यायीपणाचा मार्ग जाणल्यानंतर आपणांस जी पवित्र
आज्ञा दिल्ही होती तिजपासून वळून जावें, यापेक्षां
जाणलें नसतें तर त्यांस बरें होतें. २२ परंतु कुत्रे
आपल्या ओकीकडे, आणि धुतलेली डुकरीण गाळांत
लोळण्यास परतली आहे, असी जी खरी ह्मण
तिजप्रमाणें त्यांस प्राप्त झालें आहे.

## अध्याय ३.

अहो मियानो, आता मी हें दुसरें पत्र तुह्मास
लिहितों, यांकडून तुमच्या निर्मळ मनाला
सुचवून सावध करितों कीं, पवित्र भविष्यवाद्यानी

जीं वाक्यें पूर्वी सांगितलेलीं त्यांची, २ आणि
प्रभु व तारणारा याच्या आह्मा प्रेषितांच्या आज्ञे-
ची आठवण तुह्मी करावी. ३ प्रथम हें जाणावें
कीं, शेवटल्या दिवसांमध्यें थट्टेखोर येतील, आप-
ल्याच इच्छांप्रमाणें चालतील; ४ आणि ह्मण-
तील कीं, त्याच्या येण्याविषयीं वचन कोठें आहे?
कां तर पूर्वज निजले तेव्हांपासून अवघीं जशीं
उत्पत्तीच्या प्रारंभीं, तशीं राहतात. ५ हें तर ते
खुशीने विसरतात कीं, देवाच्या शब्दाकडून आकाश
पूर्वीच होतें, आणि पृथ्वी पाण्याच्या बाहेर व पाण्या-
च्या आंत राहत होती. ६ त्यांवरून तेव्हांचें जग
पाण्यांत बुडून नाश पावलें. ७ आणि आतांचें
आकाश व पृथ्वी त्याच शब्दाकडून अग्नीसाठीं
न्याय ठरण्याचा व अभक्त माणसांच्या नाशाचा
जो दिवस, तोंपर्यंत राखलेलीं असतां सिद्ध ठेव-
लेलीं आहेत. ८ परंतु अहो प्रियानो, ही एक
गोष्ट तुह्मी विसरूं नका कीं, प्रभूजवळ एक दिवस
हजार वर्षांसारिखा, आणि हजार वर्षें एक दिवसा-
सारिखीं. ९ कित्येक जसें उशीर करणें मोजितात,
तसें प्रभु वचनाविषयीं उशीर करीत नाहीं, तर तो
आह्माविषयीं फार धीर धरितो, कोणांचा नाश
व्हावा ह्मणून इच्छीत नाहीं, तर सर्वांनी पश्चात्ताप
करावा ह्मणून इच्छितो. १० तथापि जसा रात्रीं
चोर तसा प्रभूचा दिवस येईल, त्यांत आकाश
मोठ्या नादाने टळून जाईल, आणि तत्वें जळून विरघ-
ळतील, आणि पृथ्वी व तिजमधील कामें जळून जातील.
११ तर हीं सर्व विरघळणार, यावरून तुह्मास
पवित्र वर्त्तणुकींत व सुभक्तींत कसें असलें पाहिजे?
१२ देवाच्या ज्या दिवसीं आकाश जळून विरघळेल,
आणि तत्वें जळून रस होतील, त्याच्या येण्याची
वाट पाहत असतां, उतावळीहि करीत असावें.
१३ तथापि त्याच्या वचनाप्रमाणें ज्यामध्यें न्यायी-
पण राहतें असें नवें आकाश व नवी पृथ्वी यांची
वाट आह्मी पाहतों. १४ यास्तव अहो प्रियानो,
यांची वाट पाहत असतां असी लगट करा कीं,
आपण निष्कलंक व निर्दोष असें शांतीने त्याला
सांपडावें; १५ आणि आमच्या प्रभूचा फार
धीर तारणासाठीं आहे ह्मणून मोजा; तसें आमचा
प्रिय भाऊ पौलस, याला ज्ञान दिल्ह्याप्रमाणें त्या-
नेंहि तुह्मास लिहिलें आहे. १६ आणि तसें
त्याच्या सर्व पत्रांमध्यें याविषयीं ह्मटलें आहे; त्यां-
मध्यें कित्येक गोष्टी समजायास अवघड आहेत,
त्या गोष्टी दुसऱ्या शास्त्रलेखांप्रमाणें, जे अज्ञानी व
अस्थिर ते आपलाच नाश होण्यासाठीं विपरीत
करितात. १७ तर अहो प्रियानो, तुह्मी पूर्वी
जाणत असतां यासाठीं जपा कीं, आपण अधार्मि-
कांच्या भुलीच्या ओढण्याने आपल्या स्थिरपणांतून
पडूं नये. १८ परंतु कृपेंत व आमचा प्रभु व
तारणारा येशू ख्रीस्त याच्या ज्ञानांत वाढा; त्याला
आतां व सर्वकाळ गौरव असो. आमेन.

# योहान्नाचें पहिलें पत्र.

### अध्याय १.

जीवनाच्या शब्दाविषयीं, जें प्रारंभापासून होतें,
जें आह्मी ऐकिलें, जें आह्मी आपल्या डो-
ळ्यानी पाहिलें, जें आह्मी न्याहाळिलें, आणि आ-
पल्या हातानी चांपसिलें आहे, तेंच आह्मी सांगतों.
२ कारण कीं तें जीवन प्रगट झालें, आणि आह्मी
पाहिलें आहे, आणि साक्ष देतों, आणि जें सर्व-
काळचें जीवन बापापासीं होतें व आह्माजवळ
प्रगट झालें, तें आह्मी तुह्मास सांगतों. ३ जें
आह्मी पाहिलें व ऐकिलें आहे, तें तुह्मास यासाठीं
सांगतों कीं, तुमचेंहि आह्मासीं भागीपण व्हावें;
आमचें भागीपण तर बापासीं व त्याचा पुत्र येशू
ख्रीस्त यासीं आहे. ४ आणि तुमचा आनंद
पूर्ण व्हावा ह्मणून आह्मी तुह्मास हें लिहितों.
५ तर जो निरोप आह्मी त्यापासून ऐकिला व
तुह्मास सांगतों, तो हाच आहे कीं, देव प्रकाश
आहे, आणि त्याच्या ठायीं कांहींच अंधार नाहीं.
६ त्यासीं आमचें भागीपण आहे, असें सांगून
जर आह्मी अंधारांत चालतों, तर आह्मी खोटें
बोलतों व खरेपण पाळीत नाहीं. ७ परंतु जसा

तो उजेडांत आहे, तसे जर आह्मी उजेडांत चालतों,
तर आह्मास एकमेकांशीं भागीपण आहे, आणि
त्याचा पुत्र येशू ख्रीस्त याचें रक्त आह्मास सर्व
पापापासून शुद्ध करितें. ८ जर आह्मी सांगतों
कीं, आह्मास पाप नाहीं, तर आह्मी आपल्यांस
फसवितों, आणि आह्मामध्यें खरेपण नाहीं. ९
जर आह्मी आपलीं पापें पदरीं घेतों, तर तो आ-
मच्या पापांची क्षमा करायास व आह्मास सर्व
दोषापासून शुद्ध करायास विश्वासू व न्यायी आहे.
१० जर आह्मी सांगतों कीं, आह्मी पाप केलें
नाहीं, तर आह्मी त्याला खोटें करितों, आणि
त्याचें वचन आह्मामध्यें नाहीं.

## अध्याय २.

अहो माझ्या लेंकरानो, तुह्मी पाप करूं नये
ह्मणून मी हें तुह्मास लिहितों; परंतु जर
कोणी पाप करितो, तर येशू ख्रीस्त जो न्यायी
तो बापाजवळ आमचा अनुवादक आहे. २
आणि तो आमच्या पापांविषयीं प्रायश्चित्त आहे,
आणि आमच्या विषयीं केवळ नव्हे, तर संपूर्ण
जगाच्या विषयीं. ३ आणि जर आह्मी त्याच्या
आज्ञा पाळितों, तर तेणेंकरून आह्मी जाणतों कीं,
आह्मी त्याला जाणिलें आहे. ४ म्या त्याला
जाणिलें आहे, असें ह्मणत असतां जो त्याच्या
आज्ञा पाळीत नाहीं, तो लबाड आहे; आणि
त्यामध्यें खरेपण नाहीं. ५ परंतु जो कोणी
त्याचें वचन पाळितो, त्यामध्यें देवाची प्रीति पूर्ण
झाली आहे खरें; यावरून आह्मी जाणतों कीं
आह्मी त्याकडे आहों. ६ मी त्याकडे राहतों,
असें जो ह्मणतो त्याला जसा तो चालला होता
तसेंच चालावें लागतें. ७ भावानो, मी तुह्मास
नवी आज्ञा लिहीत नाहीं, तर जी पहिल्यापासून
तुह्मास होती ती जुनी आज्ञा; जें तुह्मी पहिल्या-
पासून ऐकिलें तेंच ती जुनी आज्ञा आहे. ८
आणखी मी तुह्मास नवी आज्ञा लिहितों, हें त्या-
विषयीं व तुह्माविषयीं खरें आहे, कारण कीं अंधार
होऊन गेला, आणि खरा उजेड आतां प्रकाशतो.
९ मी उजेडांत आहें, असें ह्मणत असतां जो आ-
पल्या भावाचा द्वेष करितो, तो आजपावेतों अंधारांत
आहे. १० जो आपल्या भावावर प्रीति करितो तो
उजेडांत राहतो, आणि त्यामध्यें अडखळण्याचें
कारण नाहीं. ११ परंतु जो आपल्या भावाचा
द्वेष करितो, तो अंधारांत आहे व अंधारांत चालतो,
आणि आपण कोठें जातों हें त्याला ठाऊक नाहीं,
कारण कीं अंधाराने त्याचे डोळे अंधळे केले आहेत.
१२ अहो लेंकरानो, मी तुह्मास लिहितों, कारण
कीं त्याच्या नांवामुळें तुमच्या पापांची क्षमा झाली
आहे.

१३ अहो बापानो, मी तुह्मास लिहितों, कारण
कीं जो प्रारंभापासून त्याला तुह्मी जाणिलें आहे;
अहो नवेतरणे, मी तुह्मास लिहितों, कारण कीं
तुह्मी वाइटाला जिंकिलें आहे; अहो बाळकानो,
मी तुह्मास लिहितों, कारण कीं तुह्मी बापाला
जाणिलें आहे. १४ अहो बापानो, म्या तुह्मास
लिहिलें आहे, कारण कीं जो प्रारंभापासून त्याला
तुह्मी जाणिलें आहे; अहो नवेतरणे, म्या तुह्मास
लिहिलें आहे, कारण कीं तुह्मी बळकट आहां,
आणि देवाचें वचन तुह्मामध्यें राहतें, आणि तुह्मी
वाइटाला जिंकिलें आहे. १५ जगावर व जगां-
तल्या गोष्टींवर प्रीति करूं नका; जर कोणी जगावर
प्रीति करितो तर बापाची प्रीति त्याला नाहीं.
१६ कारण कीं अवघें जें जगांत आहे तें देहाची
इच्छा व डोळ्यांची इच्छा व संसाराचें डंभ:
हीं बापापासून नाहींत, तर जगापासून आहेत.
१७ आणि जग व त्याची इच्छा होऊन जाते,
परंतु जो देवाच्या इच्छेप्रमाणें करितो तो सर्वकाळ
राहतो. १८ अहो बाळकानो, हा शेवटला समय
आहे, आणि जसें तुह्मी ऐकिलें कीं, ख्रीस्तविरोधी
येत आहे, तसें आतांच बहुत ख्रीस्तविरोधी झाले
आहेत; यावरून आह्मी जाणतों कीं, हा शेवटला
समय आहे. १९ ते आमच्या मधून निघाले,
परंतु ते आह्माकडले नव्हते, कां कीं ते आह्माक-
डले असते तर आमच्या संगतीं राहिले असते,
परंतु ते सर्व आह्माकडले नाहींत असें प्रगट व्हावें
ह्मणून ते निघाले. २० आणि जो पवित्र त्याजपा-
सून तुह्मास अभिषेक झाला आहे, आणि तुह्मी
सर्व गोष्टी जाणतां. २१ तुह्मी खरेपण जाणत
नाहीं, ह्मणून म्या तुह्मास लिहिलें असें नाहीं, तर
यावरून कीं तुह्मी तें जाणतां, आणि कांहीं खोटें-
पण खरेपणांतील नाहीं. २२ येशू हा ख्रीस्त
नाहीं, असें जो नाकारून बोलतो, त्यावांचून लबाड
कोण आहे? जो बापाला व पुत्राला नाकारितो
तोच ख्रीस्तविरोधी आहे. २३ जो कोणी पुत्राला
नाकारितो त्याला बापहि नाहीं. २४ यास्तव जें

पहिल्यापासून तुह्मी ऐकिलें तें तुह्मांमध्यें राहो; जें
तुह्मी पहिल्यापासून ऐकिलें तें जर तुह्मामध्यें राहिलें
तर तुह्मीहि पुत्रामध्यें व बापामध्यें राहाल. २५
आणि जें वचन त्याने आह्मास दिल्हें, तें सर्व-
काळचें जीवन असें आहे. २६ जे तुह्मास फस-
वितात त्यांविषयीं म्या तुह्मास या गोष्टी लिहिल्या
आहेत. २७ आणि जो अभिषेक तुह्मास त्याक-
डून झाला आहे, तो तुह्मामध्यें राहतो, आणि
तुह्माला कोणी शिकवावें हें तुह्मास अगत्य नाहीं,
केवळ जसें तो अभिषेक तुह्मास सर्वांविषयीं शिक-
वितो तसें; आणि तो खरा आहे, खोटा नाहींच,
आणि जसें त्याने तुह्मास शिकविलें आहे, तसें
त्यामध्यें राहा. २८ तर आतां, लेंकरानो, त्या-
मध्यें राहा, ह्मणजे तो प्रगट होईल तेव्हां आह्मी
निर्भय असावें, आणि त्याच्या येण्याच्या वेळेस
त्यापुढें लज्जित होऊं नये. २९ तो न्यायी आहे
हें तुह्मास कळलें, तर जो कोणी न्यायीपण करितो
तो त्याकडून जन्मलेला आहे हें तुह्मी जाणतां.

## अध्याय ३.

आह्मास देवाचीं लेंकरें ह्मणावें, यांत बापाने
केवढी प्रीति आह्मावर ठेविली, हें पाहा!
जग आह्मास जाणत नाहीं, कां कीं त्याने त्याला
जाणिलें नाहीं. २ अहो प्रियानो, आह्मी आतां
देवाचीं लेंकरें आहों, परंतु आह्मी काय होऊं हें
अझून दिसत नाहीं, तरी आह्मी जाणतों कीं, तो
प्रगट होईल तेव्हां आह्मी त्यासारिखे होऊं, कारण
कीं जसा तो आहे तसाच आह्मास दिसेल. ३
आणि ज्या कोणाची त्यावर ही आशा आहे, तो
आपणाला शुद्ध राखितो, जसा तोहि शुद्ध आहे
तसा. ४ जो कोणी पाप करितो तो शास्त्रभंग
करितो; पाप तर शास्त्रभंग आहे. ५ आणि
त्याने आमचीं पापें हरण करावीं ह्मणून तो प्रगट
झाला होता, हें तुह्मी जाणतां; आणि त्याच्या
ठायीं पाप नाहीं. ६ जो कोणी त्याकडे राहतो
तो पाप करीत नाहीं; जो कोणी पाप करितो,
त्याने त्याला पाहिलें नाहीं व त्याला जाणिलें नाहीं.
७ अहो लेंकरानो, कोणी तुह्मास न फसवो; जसा
तो न्यायी आहे तसा न्यायीपण करणाराहि न्यायी
आहे. ८ जो पाप करितो तो सैतानाकडील आहे,
कां तर सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे; देवाचा
पुत्र यासाठींच प्रगट झाला कीं, त्याने सैतानाचीं
कामें मोडावीं. ९ जो कोणी देवापासून जन्मलेला
तो पाप करीत नाहीं, कां कीं त्याचें बीज त्याजमध्यें
राहतें, आणि त्याच्याने पाप करवत नाहीं, कारण
कीं तो देवापासून जन्मला आहे. १० येणेंकरून
देवाचीं लेंकरें व सैतानाचीं लेंकरें प्रगट आहेत;
जो कोणी न्यायीपण करीत नाहीं, आणि जो आप-
ल्या भावावर प्रीति करीत नाहीं, तो देवाकडील
नाहीं. ११ कारण कीं जो निरोप तुह्मी पहिल्या-
पासून ऐकिला तो हाच आहे कीं, आह्मी एकमे-
कांवर प्रीति करावी. १२ जसा काइन वाइटाक-
डील होता, आणि त्याने आपल्या भावाला वधिलें,
तसें नसावें; तर त्याने त्याला कोणत्या कारणावरून
वधिलें? यावरून कीं आपलीं कामें वाईट, आणि
आपल्या भावाचीं न्यायी होतीं. १३ माझ्या
भावानो, जर जग तुमचा द्वेष करितें, तर आश्चर्य
मानूं नका. १४ आह्मी मरणापासून जीवनाकडे
पार उतरलों, हें आह्मी जाणतों, कां कीं आह्मी
भावांवर प्रीति करितों; जो आपल्या भावावर प्रीति
करीत नाहीं तो मरणांत राहतो. १५ जो कोणी
आपल्या भावाचा द्वेष करितो तो मनुष्यघातक आहे;
आणि कोणत्याहि मनुष्यघातकांत सर्वकाळचें जीवन
राहत नाहीं, हें तुह्मी जाणतां. १६ त्याने आह्मा-
करितां आपला प्राण दिल्हा, येणेंकरून आह्मी
त्याची प्रीति जाणिली आहे, आणि आह्मी भावां-
करितां प्राण द्यावा, हें नीट आहे. १७ परंतु
ज्याजवळ जगाचें उपजीवन असेल, आणि आपल्या
भावाला गरज आहे, हें पाहून जो आपला कळवळा
त्याविषयीं बंद करितो, त्याजमध्यें देवाची प्रीति
कसी राहती? १८ माझ्या लेंकरानो, आह्मी
शब्दाने किंवा जिभेने नव्हे, तर करण्याने व खरे-
पणाने प्रीति करावी. १९ आणि येणेंकरून आह्मी
जाणतों कीं, आह्मी खरेपणाकडील आहों, व त्याच्या
समोर आपल्या अंतःकरणांस धैर्य देऊं. २० कां
कीं जर आमचें अंतःकरण आह्मावर दोष ठेवितें,
तर आमच्या अंतःकरणापेक्षां देव मोठा आहे व अवघीं
जाणतो असें समजा. २१ अहो प्रियानो, जर
आमचें अंतःकरण आह्मावर दोष ठेवीत नाहीं,
तर आह्मास देवाजवळ धैर्य आहे. २२ आणि
आह्मी जें जें मागतों तें त्यापासून पावतों, कां तर
त्याच्या आज्ञा पाळितों, आणि ज्या गोष्टी त्याला
आवडतात त्या आह्मी करितों. २३ आणि हीच
त्याची आज्ञा आहे कीं, त्याचा पुत्र येशू ख्रीस्त

याच्या नांवावर आह्मी विश्वास ठेवावा; आणि
जसी त्याने आह्मास आज्ञा दिल्ही आहे, तसें
आह्मी एकमेकांवर प्रीति करावी. २४ आणि जो
त्याच्या आज्ञा पाळितो, तो त्यामध्यें व हा त्यामध्यें
राहतो; आणि त्याने जो आत्मा आह्मास दिल्हा
आहे, त्यावरून आह्मी जाणतों कीं, तो आह्मा-
मध्यें राहतो.

## अध्याय ४.

अहो मियानो, प्रत्येक आत्म्यावर विश्वास ठेवूं
नका, तर आत्मे देवाकडील आहेत किंवा
नाहींत याविषयीं त्यांची परीक्षा करा, कां तर बहुत
खोटे भविष्यवादी जगांत निघाले आहेत. २
येशू ख्रीस्त देहाने आला आहे, असें जो कोणी
आत्मा पत्करितो तो देवाकडील आहे, यावरून
देवाचा आत्मा जाणा. ३ आणि येशू ख्रीस्त
देहाने आला आहे, असें जो कोणी आत्मा पत्करीत
नाहीं तो देवाकडील नाहीं, आणि ज्या ख्रीस्तवि-
रोध्याचा आत्मा येतो ह्मणून तुह्मी ऐकिलें आहे,
तो हाच आहे, आणि तो आतां इतक्याने जगांत
आहे. ४ अहो लेंकरानो, तुह्मी देवाकडले आहां,
आणि त्यांस जिंकिलें आहे, कां कीं जो जगांतला
त्यापेक्षां जो तुह्मांतला तो मोठा आहे. ५ ते
जगाकडील आहेत, यास्तव जगाकडचें बोलतात,
आणि जग त्यांचें ऐकतें. ६ आह्मी देवाकडील
आहों; जो देवाला जाणतो तो आमचें ऐकतो,
जो देवाकडील नाहीं तो आमचें ऐकत नाहीं, याव-
रून आह्मी खरेपणाच्या आत्म्याला व भुलीच्या
आत्म्याला जाणतों. ७ अहो मियानो, आह्मी
एकमेकांवर प्रीति करावी, कां तर प्रीति देवाकडील
आहे, आणि जो कोणी प्रीति करितो, तो देवापासून
जन्मलेला आहे व देवाला जाणतो. ८ जो प्रीति
करीत नाहीं तो देवाला जाणत नाहीं, कां तर देव
प्रीति आहे. ९ देवाची आह्मावरील प्रीति येणें-
करून प्रगट झाली कीं, देवाने आपल्या एकुलत्या
पुत्राला जगांत यासाठीं पाठविलें कीं, आह्मी त्याक-
डून जगावें. १० यांत प्रीति आहे, आह्मी देवा-
वर प्रीति केली असें नव्हे, तर त्याने आह्मावर
प्रीति केली, आणि आपला पुत्र आमच्या पापांवि-
षयीं प्रायश्चित्त होण्याकरितां पाठविला. ११
अहो मियानो, जर देवाने आह्मावर एवढी प्रीति
केली, तर आह्मी एकमेकांवर प्रीति केली पाहिजे.
१२ कोणी कधींहि देवाला पाहिलें नाहीं; जर
आह्मी एकमेकांवर प्रीति करितों तर देव आह्मामध्यें
राहतो, आणि त्याची प्रीति आह्मामध्यें पूर्ण झाली
आहे. १३ आह्मी त्यामध्यें व तो आह्मामध्यें
राहतो, हें आह्मी यावरून जाणतों कीं, त्याने
आपला आत्मा आह्मास दिल्हा आहे.

१४ आणि आह्मी पाहिलें आहे व साक्ष देतों कीं,
बापाने पुत्राला जगाचा तारणारा होण्यासाठीं पाठ-
विलें आहे. १५ येशू देवाचा पुत्र आहे, असें
जो कोणी पत्करील त्यामध्यें देव व तो देवामध्यें
राहतो. १६ आणि देवाची जी प्रीति आह्मावर
आहे ती आह्मी जाणिली व विश्वासलों आहों;
देव प्रीति आहे, आणि जो प्रीतींत राहतो तो
देवामध्यें व देव त्यामध्यें राहतो.

१७ येणेंकरून आमची प्रीति पूर्ण झालेली
आहे, यासाठीं कीं न्याय ठरविण्याच्या दिवशीं
आह्मास धैर्य व्हावें, कां तर जसा तो आहे तसे
आह्मीहि या जगांत आहों. १८ प्रीतींत भय
नाहीं, तर पूर्ण प्रीति भय बाहेर घालिती, कां कीं
भयाला पीडा आहे, आणि भिणारा प्रीतीविषयीं
पूर्ण झाला नाहीं. १९ त्याने पहिल्याने आह्मावर
प्रीति केली, यास्तव आह्मी त्याजवर प्रीति करितों.
२० मी देवावर प्रीति करितों, असें सांगत असतां
जर कोणी आपल्या भावाचा द्वेष करितो, तर तो
लबाड आहे; कारण कीं आपल्या ज्या भावाला
आपण पाहिलें त्याजवर जो प्रीति करीत नाहीं,
त्याच्याने ज्या देवाला आपण पाहिलें नाहीं त्याज-
वर प्रीति कसी करवेल? २१ आणि जो देवावर
प्रीति करितो त्याने आपल्या भावावरहि प्रीति
करावी, ही आज्ञा त्यापासून आह्मास आहे.

## अध्याय ५.

येशू हा ख्रीस्त आहे, असा जो कोणी विश्वास
धरितो तो देवापासून जन्मलेला आहे; आणि जो
कोणी जन्म देणाऱ्यावर प्रीति करितो तो त्यापासून
जन्मलेल्यावरहि प्रीति करितो. २ आह्मी देवावर
प्रीति करितों व त्याच्या आज्ञा पाळितों तेव्हां त्या-
वरून आह्मी जाणतों कीं, आह्मी देवाच्या लेंकरांवर
प्रीति करितों. ३ कां तर हीच देवावरची प्रीति
आहे कीं, आह्मी त्याच्या आज्ञा पाळाव्या, आणि
त्याच्या आज्ञा भारी नाहींत. ४ कारण कीं जें
कांहीं देवापासून जन्मलेलें तें जगाला जिंकितें, आणि

जगाला जिंकणारा जय तो हाच, ह्मणजे आमचा
विश्वास आहे. ५ येशू देवाचा पुत्र आहे, असा
जो विश्वास धरितो, त्यावांचून जगाला जिंकणारा
कोण आहे?
६ जो पाण्याने व रक्ताने आला, तो हाच ये-
शू ख्रीस्त आहे, पाण्याने केवळ नव्हे, तर पाण्याने
व रक्ताने; आणि जो साक्ष देतो तो आत्मा आहे,
कारण कीं आत्मा खरेपण आहे. ७ कारण कीं
आकाशांत तिघे साक्ष देणारे, बाप, शब्द व प-
वित्र आत्मा, असे आहेत; आणि हे तिघे एक
आहेत. ८ आणि पृथ्वींत तिघे साक्ष देणारे,
आत्मा व पाणी व रक्त, असे आहेत; आणि हे
तिघे एक असे आहेत. ९ जर आह्मी माणसां-
ची साक्ष घेतों तर देवाची साक्ष अधिक मोठी
आहे, तर जी साक्ष देवाने आपल्या पुत्राविषयीं
दिल्ही, तीच त्याची साक्ष आहे. १० जो दे-
वाच्या पुत्रावर विश्वास ठेवितो त्याजमध्येंच साक्ष
आहे, जो देवावर विश्वास ठेवीत नाहीं त्याने त्याला
लबाड केलें आहे, कां तर जी साक्ष देवाने आ-
पल्या पुत्राविषयीं दिल्ही आहे तिजवर त्याने वि-
श्वास ठेविला नाहीं. ११ आणि साक्ष हीच
आहे कीं, देवाने आह्मास सर्वकाळचें जीवन दिल्हें
आहे, आणि तें जीवन त्याच्या पुत्रामध्यें आहे.
१२ ज्याला पुत्र आहे त्याला जीवन आहे, ज्याला
देवाचा पुत्र नाहीं त्याला जीवन नाहीं.
१३ सर्वकाळचें जीवन तुह्मास आहे हें तुह्मास
कळावें, आणि तुह्मी देवाच्या पुत्राच्या नांवावर
विश्वास ठेवावा, ह्मणून म्या देवाच्या पुत्राच्या नां-
वावर विश्वास ठेवणाऱ्या तुह्मास हें लिहिलें आहे.
१४ आणि त्याजवळ जें धैर्य आह्मास आहे तें
हेंच आहे कीं, जर आह्मी त्याच्या इच्छेप्रमाणें
कांहीं मागतों तर तो आमचें ऐकतो. १५ आणि
जें जें आह्मी मागतों त्यांत तो आमचें ऐकतो, हें
आह्मास कळलें तर जीं मागणीं आह्मी त्याजवळ
मागितलीं तीं आह्मास प्राप्त होतात, हें कळलें
आहे. १६ जें मरण होण्यासारिखें नाहीं असें
पाप आपला भाऊ करितो, ह्मणून जर कोणी पा-
हतो, तर त्याने मागावें, मग त्याकरितां मरण हो-
ण्यासारिखें पाप जे करीत नाहींत, त्यांस देव जी-
वन देईल; मरण होण्यासारिखें पाप आहे; यावि-
षयीं त्याने मागावें असें मी ह्मणत नाहीं. १७
प्रत्येक अन्याय पाप आहे, परंतु मरण होण्यासा-
रिखें नाहीं, असें पाप आहे. १८ आह्मी जाणतों
कीं, जो कोणी देवापासून जन्मलेला तो पाप क-
रीत नाहीं. तर जो देवापासून जन्मला तो आ-
पणाला राखितो, आणि त्याला तो वाईट शिवत
नाहीं. १९ हें आह्मास कळलें कीं, आह्मी देवा-
कडील आहों, आणि सगळें जग दुष्टाईत पडलें
आहे. २० आणि हें आह्मास ठाऊक आहे कीं,
देवाचा पुत्र आला आहे, आणि जो खरा त्याला
आह्मी जाणावें ह्मणून त्याने आह्मास बुद्धि दिल्ही
आहे. आणि जो खरा त्यामध्यें ह्मणजे त्याचा
पुत्र येशू ख्रीस्त यामध्यें आह्मी आहों; हाच खरा
देव व सर्वकाळचें जीवन आहे. २१ अहो लेंक-
रानो, आपणांस मूर्त्तींपासून राखा. आमेन.

# योहानाचें दुसरें पत्र.

निवडलेली बाई व तिचीं लेंकरें यांस वडिलाचा
सलाम; त्या तुह्मावर मी खरेपणाने प्रीति
करितों, आणि केवळ मी नव्हें, तर जे खरेपणाला
जाणतात, ते सर्वहि. २ जें खरेपण आह्मामध्यें
राहतें व आह्मापाशीं सर्वकाळ होईल, त्यामुळें.
३ देव बापापासून व प्रभु येशू ख्रीस्त बापाचा
पुत्र यापासून कृपा, दया, शांति हीं खरेपणाने व
प्रीतीने तुह्मापाशीं असोत.
४ जसी आह्मास बापापासून आज्ञा झाली,
तसें तुझ्या लेंकरांतील कित्येक खरेपणाने चालतां
मला सांपडलीं, यावरून मला फार संतोष झाला.
५ आणि आतां, बाई, मी तुला विनंती करितों कीं,
आह्मी एकमेकांवर प्रीति करावी; ही मी नवी
आज्ञा तुला लिहितों असें नव्हे, तर जी आह्मास
पहिल्यापासून झाली, ती. ६ आणि प्रीति हीच
आहे कीं, आह्मी त्याच्या आज्ञांप्रमाणें चालावें;

जिजप्रमाणें तुह्मी चालावें, ती ही आज्ञा आहे,
जसें तुह्मी पहिल्यापासून ऐकिलें आहे तसें. ७
कारण कीं बहुत फसविणारे जगांत आले आहेत,
ते येशू ख्रीस्त देहाने आला असें पत्करीत नाहींत,
असा जो तो फसविणारा व ख्रीस्तविरोधी आहे.
८ तुह्मी आपल्यांविषयीं जपा कीं, जीं आह्मी केलीं
आहेत तीं आह्मी गमवूं नयेत, तर पूर्ण वेतन पावावें.
९ कोणी उल्लंघणारा व ख्रीस्ताच्या उपदेशांत न
राहणारा याला देव नाहीं; ख्रीस्ताच्या उपदेशांत
राहणाऱ्याला बाप व पुत्रहि आहे. १० जर कोणी
तुह्माजवळ येऊन हा उपदेश आणीत नाहीं,
त्याला घरांत घेऊं नका, आणि त्याला क्षेम
नका; ११ कां तर जो त्याला क्षेम बोलतो
त्याच्या वाईट कामांचा भागीदार आहे.

१२ मला तुह्मास बहुत गोष्टी लिहायाच्या
होत्या, परंतु कागद व शाई यांकडून, असी
इच्छा नाहीं; तर आमचा आनंद पूर्ण व्हा
ह्मणून मी तुह्माजवळ येऊन तोंडोतोंड सांगेन,
सी आशा धरितों. १३ तुझ्या निवडलेल्या
णीचीं लेंकरें तुला सलाम सांगतात. आमेन.

# योहानाचें तिसरें पत्र.

ज्यावर मी खरेपणाने प्रीति करितों त्या प्रिय
गायसाला वडिलाचा सलाम. २ हे प्रिया,
तुझा जीव सुखी आहे, तसें त्वां अवघ्या प्रकारें
सुखी असावें व समाधान पावावें, ह्मणून मी प्रा-
र्थना करितों. ३ कारण कीं तूं खरेपणाने चाल-
तोस, याविषयीं तुझ्या खरेपणाची साक्ष भावांनी
येऊन दिल्ही आहे, यावरून मला फार संतोष झाला.
४ माझीं लेंकरें खरेपणाने चालतात, हें म्यां ऐकावें
यापेक्षां मला अधिक संतोष नाहीं. ५ हे प्रिया,
तूं भावांजवळ व परक्यांजवळ जें काम करितोस तें
विश्वासाने करितोस. ६ त्यांनी मंडळीच्या स-
मोर तुझ्या प्रीतीविषयीं साक्ष दिल्ही आहे, त्यांस
तूं देवाच्या योग्य प्रकाराने पोहंचविसील तर बरें
करिसील. ७ कारण कीं ते विदेशी लोकांपासून
कांहीं न घेतां, त्याच्या नांवासाठीं बाहेर गेले. ८
यास्तव आह्मी अशांचा अंगीकार करावा, यासाठीं
कीं खरेपणाविषयीं आह्मी संगती कामकरी असावें.
९ म्यां मंडळीला लिहिलें आहे, परंतु जो त्यांजवर
श्रेष्ठ असण्याची आवड धरितो, तो दियत्रफेस
आमचा अंगीकार करीत नाहीं. १० यामुळें जर
मी येतों तर त्याचीं जीं कामें तो करितो त्यांची
आठवण करीन; तो आह्माविरुद्ध वाईट
बोलून वटवट करितो, आणि त्यांकडून तृप्त न
तो आपण भावांचा अंगीकार करीत नाहीं, आणि
जे करायास इच्छितात त्यांस तो मना करितो
मंडळींतून घालवितो. ११ हे प्रिया, जें वाईट
त्याला नको, तर जें चांगलें त्याला अनुसर;
चांगलें करितो तो देवाकडील आहे, परंतु जो
ईट करितो त्याने देवाला पाहिलें नाहीं. १२
मेत्रयसाविषयीं सर्वांकडून व स्वतां खरेपणाकडून
साक्ष पटली आहे, आणि आह्मीहि साक्ष देतों,
आणि तुह्मास ठाऊक आहे कीं, आमची साक्ष
खरी आहे.

१३ मला बहुत गोष्टी लिहायाच्या होत्या,
परंतु लेखणी व शाई यांकडून तुला लिहायास मी
इच्छीत नाहीं; १४ तर मी तुला लवकर पाहीन,
आणि आपण तोंडोतोंड बोलूं, असी माझी आशा
आहे; तुला शांति असो; मित्र तुला सलाम सांग-
तात; मित्रांस नांवाने सलाम सांग.

# यहूदाचें पत्र.

देव बाप याकडून जे पवित्र झालेले, आणि येशू
ख्रीस्ताकडून राखलेले व बोलाविलेले, त्यांस
येशू ख्रीस्ताचा दास व याकोबाचा भाऊ यहूदा
याचा सलाम. २ दया व शांति व प्रीति हीं
तुह्मावर वाढोत.

३ अहो प्रियानो, समाईक तारणाविषयीं तुह्मास
लिहायाला मोठा प्रयत्न करीत असतां, मला तुह्मास
लिहून असा बोध करण्याचें अगत्य झालें कीं, जो
विश्वास पूर्वी पवित्रांस सोपून दिल्हा होता, त्या-
साठीं तुह्मी फार झटावें. ४ कारण कीं कित्येक
मनुष्य पूर्वी याच दंडासाठीं नेमिलेले गुप्तरुपें
शिरले आहेत; ते अभक्त, आमच्या देवाच्या
कृपेला कामातुरपणांत पालटितात, आणि देव जो
एकच स्वामी त्याला, व आमच्या प्रभु येशू ख्री-
स्ताला नाकारितात. ५ परंतु तुह्मास पूर्वीपासून
ठाऊक असताहि मी हें तुह्मास सुचवायाला
इच्छितों कीं, प्रभूने लोकांचा मिसर देशांतून निभाव
केल्यानंतर, दुसऱ्या वेळेस अविश्वासी यांचा नाश
केला. ६ आणि ज्या दुतानी आपल्या पहिल्या
स्थितींत न राहतां आपली वस्ती सोडिली, त्यांस
त्याने सर्वकाळच्या बंधनांमध्यें निबिड काळोखाखालीं
मोठ्या दिवसांतील न्यायासाठीं राखिलें आहे. ७
तसें सदोम व गमोरा हीं, आणि त्यांच्या चहुंक-
डलीं जीं नगरें त्यांच्या सारिख्या प्रकारें व्यभि-
चार करून अनुचित अंगांच्या मागें लागलीं, तीं
सर्वकाळचा अग्निदंड भोगीत असतां उदाहरणासाठीं
पुढें ठेविलीं आहेत. ८ अणखी त्यांप्रमाणेंच हे
स्वप्न पाहणारे देहाला विटाळवितात व धनीपण
तुच्छ करितात व गौरवांची निंदा करितात. ९ परंतु
मुख्य दूत मिखाएल याने जेव्हां सैतानासीं भांडून
मोशाच्या शरिराविषयीं वाद केला, तेव्हां तो
त्यावर निंदेचा आरोप ठेवायाला धजला नाहीं, तर
बोलला कीं, प्रभु तुला धमकावो. १० तथापि
हे ज्या गोष्टी समजत नाहींत त्यांविषयीं निंदा करि-
तात, आणि निर्बुद्धि पशूंसारिखे ज्या गोष्टी स्वभा-
वाने जाणतात त्यांविषयीं आपणांस नासवितात.
११ त्यांस हायहाय, कारण कीं ते काइनाच्या
मार्गाने चालले आहेत, आणि बलामाच्या भुलीने
मोलासाठीं धावत सुटले आहेत, आणि कोरहाच्या
विरोध करण्याने नाश पावले आहेत.

१२ ते बरोबर जेवून निर्भयें आपणांस चारि-
तात, तुमच्या प्रीतीच्या जेवणांमध्यें डाग आहेत, वा-
ऱ्यानी हेलकावलेले असे निर्जल ढग; शुष्क फळाचीं,
निष्फळ, दोनदां मेलेलीं, उपटलेलीं, असीं झाडें
आहेत; १३ समुद्राच्या विक्राळ लाटा, ज्या
आपल्या लाजा फेंसळून काढितात तसें; मोकार
जाणारे तारे, त्यांसाठीं निबिड काळोख सर्वकाळ
राखिला आहे. १४ आणि आदामापासून सातवा
जो हनोख त्याने त्यांविषयीं असी भविष्य गोष्ट
सांगितली होती कीं, पाहा, प्रभु आपल्या पवित्र
अयुतांसुद्धां येतो, १५ यासाठीं कीं आपण सर्वां-
वर न्याय ठरवावा, आणि त्यांतील जे अभक्त त्या
सर्वांचीं सगळीं अभक्तीचीं जीं कामें त्यानी अभ-
क्तीने केलीं त्यांविषयीं, आणि ज्या सर्व कठोर
गोष्टी अभक्त पाप्यानी त्याच्या विरुद्ध सांगितल्या
त्यांविषयीं, त्यांस कुंठित करावें.

१६ ते कुरकूर करणारे व दोष ठेवणारे, आप-
ल्या इच्छांप्रमाणें चालणारे, असे आहेत; आणि
त्यांचें तोंड गर्वाच्या गोष्टी बोलतें, ते लोभासाठीं
पक्षपात करितात. १७ परंतु अहो प्रियानो, जीं वचनें
आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताच्या प्रेषितानी पूर्वी सांगि-
तलीं तीं तुह्मी आठवा; १८ कीं त्यानी तुह्मास
असें सांगितलें कीं, शेवटल्या समयीं आपल्या अभ-
क्तींच्या इच्छांप्रमाणें चालणारे, असे थट्टेखोर होतील.

१९ जे आपणांस वेगळें करितात व देहबु-
द्धीचे, ज्यांस आत्मा नाहीं, असे ते आहेत. २०
परंतु अहो प्रियानो, तुह्मी आपल्या परमपवित्र
विश्वासावर आपणांस रचीत असतां, पवित्र आ-
त्म्याने प्रार्थना करून, २१ आणि सर्वकाळच्या
जीवनापर्यंत आमच्या प्रभु येशू ख्रीस्ताची दया
इची वाट पाहून, देवाच्या प्रीतींत आपणांस राखा.
२२ आणि भेद करून कित्येकांवर दया करा;
२३ आणि कित्येकांस अग्नींतून हिसकून काढून
भयाने तारा, आणि जें वस्त्र देहाकडून डागाळलें
त्याचा द्वेष करीत जा.

२४ तर जो तुह्मास अडखळण्यापासून राखा-
याला व आपल्या गौरवाच्या समोर निर्दोष, फार
हर्षयुक्त ठेवायाला समर्थ आहे, २५ जो एकच
ज्ञानी देव आमचा तारणारा, त्याला गौरव, महत्व,
पराक्रम व अधिकार, आतां व सर्वकाळ असो. आमेन.

# प्रगटविणें.

अध्याय १.

**येशू** ख्रीस्ताचें प्रगटविणें जें, ज्या गोष्टी लवकर
घडल्या पाहिजेत, त्या त्याने आपल्या दासांस
सांगून दाखवाव्या, ह्मणून देवाने त्याला दिल्हें, तें
हेंच; आणि तें त्याने आपल्या दुताला पाठवून त्याक-
डून आपला दास योहान्न याला दाखविलें. २ त्याने
देवाचें वचन, व येशू ख्रीस्ताची साक्ष, व ज्या
गोष्टी त्याने पाहिल्या, त्या सर्वांविषयीं प्रमाण दिल्हें.
३ जो वाचितो, आणि जे या भविष्यवादाचीं वचनें
ऐकतात, आणि त्यांत लिहिलेल्या गोष्टी पाळितात,
ते धन्य, कां कीं समय जवळ आहे.

४ आश्यांत ज्या सात मंडळ्या त्यांस योहा-
न्नाचा सलाम; जो आहे व होता व होणार त्यापा-
सून, आणि त्याच्या आसनासमोर जे सात आत्मे
आहेत त्यांपासून, ५ आणि येशू ख्रीस्त, विश्वासू
साक्षी, जो मेलेल्यांमधून प्रथम जन्मलेला, व पृथ्वीं-
तील राजांचा अधिकारी, त्यापासून तुह्मावर कृपा
व शांति असो: ज्याने आह्मावर प्रीति केली, आणि
आपल्या रक्ताने आमच्या पापांपासून आह्मास
धुतलें; ६ आणि देव ह्मणजे आपला बाप या-
साठीं आह्मास राजे व याजक केलें आहे, त्याला
गौरव व पराक्रम सदासर्वकाळ असो. आमेन.

७ पाहा, तो ढगांसहित येतो, आणि प्रत्येक
डोळा त्याला पाहील, आणि ज्यानी त्याला भोंस-
किलें तेहि पाहतील, आणि पृथ्वींतील सर्व वंश
त्याजविषयीं बडवून घेतील; होय, आमेन. ८
मी आल्फा व ओमेगा, प्रारंभ व शेवट आहें, असें
जो आहे व होता व होणार जो सर्वसत्ताधारी तो
प्रभु ह्मणतो.

९ योहान्न तुमचा भाऊ, आणि संकटामध्यें व
येशू ख्रीस्ताचें राज्य व सहनता यांमध्यें भागीदार,
तो मी देवाच्या वचनामुळें, आणि येशू ख्रीस्ताच्या
साक्षीमुळें, पात्मस ह्मटलेल्या बेटांत होतों. १०
मी प्रभूच्या दिवसीं आत्मयुक्त झालों, आणि म्या
आपल्या मागें शिंगाच्या शब्दासारिखी मोठी वाणी
ऐकिली; ११ असी कीं, मी आल्फा व ओमेगा
ह्मणजे पहिला व शेवटला आहें, आणि, जें तूं
पाहतोस तें पुस्तकांत लिही, आणि आश्यांतील
ज्या सात मंडळ्या एफससांत व स्मूर्णेत व पर्ग-
मसांत व थुवतीरांत व सार्दीसांत व फिलदे-
ल्फीयांत व लावदिकीयांत आहेत, त्यांकडे पाठीव.
१२ तेव्हां जी वाणी मजसीं बोलली तिला पाहा-
यास मी मागें फिरलों, आणि मागें फिरल्यावर म्या
सोन्याच्या सात समया पाहिल्या. १३ आणि
त्या सात समयांच्या मध्यभागीं मनुष्याच्या पुत्रा-
सारिखा, पायघोळ ल्यालेला, आणि स्तनांवर सो-
न्याची पट्टी वेष्टलेला, असा कोणीएक पाहिला.
१४ आणि त्याचें डोकें व केंस, जसी पांढरी लोंह-
कर, जसें बर्फ तसे पांढरे होते, आणि त्याचे डोळे
अग्नीच्या ज्वाळाप्रमाणें, १५ आणि त्याचे पाय
उजळ पितळ जें भट्टीमध्यें जळतें त्यासारिखे, आणि
त्याची वाणी बहुत पाण्याच्या शब्दाप्रमाणें होती:
१६ आणि त्याच्या उजव्या हातांत सात तारे
होते, आणि त्याच्या तोंडांतून दुधारी तिखट तरवार
निघत होती, आणि त्याचें तोंड जसा सूर्य आपल्या
शक्तीने प्रकाशतो, तसें होतें. १७ आणि म्या
त्याला पाहिलें तेव्हां मी त्याच्या पायांजवळ मेले-
ल्यासारिखा पडलों, मग त्याने आपला उजवा हात
मजवर ठेवून मला ह्मटलें, भिऊं नको, जो पहिला
व शेवटला, १८ आणि जो जिवंत आहे व
मेलाहि होता, तो मी आहें, आणि पाहा, सदास-
र्वकाळ जिवंत आहें, आमेन; आणि मृतलोकाच्या
व मरणाच्या किल्ल्या मजपाशीं आहेत. १९ या-
स्तव ज्या गोष्टी त्वां पाहिल्या व ज्या आहेत व
यानंतर ज्या होणार आहेत त्या लिही. २० ते
सात तारे त्वां माझ्या उजव्या हातांत पाहिले,
आणि त्या सोन्याच्या सात समया, त्यांचें गोप्य
हेंच कीं, सात तारे, ते सात मंडळ्यांचे दूत आहेत,
आणि ज्या सात समया त्वां पाहिल्या त्या सात
मंडळ्या आहेत.

## अध्याय २.

एफससांतील मंडळीच्या दुताला असें लिही कीं,
जो आपल्या उजव्या हातांत सात तारे धरितो,
जो त्या सोन्याच्या सात समयांमध्यें चालतो, तो
असें ह्मणतो कीं, २ तुझीं कर्मे व तुझे श्रम व
तुझी सहनता, व तुझ्याने दुष्टांचें सोसवत नाहीं,
हें मला ठाऊक आहे; आणि जे आपण प्रेषित
आहों, असें ह्मणतात परंतु तसे नाहींत, त्यांची
परीक्षा त्वां घेतली आहे, आणि तुला ते लबाड
दिसून आले आहेत. ३ आणि त्वां सहनता ध-
रून सोसिलें आहे, व माझ्या नांवामुळें श्रम केले
आहेत, व तूं थकला नाहींस. ४ तरी तुजविरुद्ध
हें मला आहे कीं, त्वां आपली पहिली प्रीति सोडिली
आहे. ५ यास्तव तूं कोठून पडलास हें आठीव,
आणि पश्चात्ताप करून पहिलीं कर्मे कर; नाहीं
तर मी तुजवर लवकर येईन, आणि त्वां पश्चात्ताप
न केला तर तुझी समई तिच्या ठिकाणांतून ढळ-
वीन. ६ परंतु हें तुझ्या ठायीं आहे कीं, निक-
लाई यांचीं कर्मे ज्यांचा मीहि द्वेष करितों, तीं तूं
द्वेषितोस. ७ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, हें
ज्याला कान आहे तो ऐको; जो जिंकितो त्याला
जें जीवनाचें झाड देवाच्या बागामध्यें आहे, त्यापा-
सून मी खाऊं देईन.

८ आणि स्मूर्णेतील मंडळीच्या दुताला असें
लिही कीं, जो पहिला व शेवटला, जो मेला होता
परंतु जिवंत झाला आहे, तो असें ह्मणतो कीं,
९ तुझीं कर्मे व संकट व दरिद्र, हीं मला ठाऊक
आहेत, तरी तूं धनवान आहेस; आणि जे, आपण
यहूदी आहों, असें ह्मणतात आणि तसे नाहींत, तर
सैतानाची सभा आहेत, त्यांचें दुर्भाषण ठाऊक
आहे. १० जीं तुला सोसायाचीं आहेत त्यांतील
कशाचेंहि भय धरूं नको; पाहा, तुमची परीक्षा
व्हावी, ह्मणून सैतान तुह्मांमधील कित्येकांस बंदि-
शाळेंत टाकणार आहे, आणि तुह्मास दाहा दिवस
संकट होईल; मरणापर्यंत विश्वासू ऐस, ह्मणजे
मी तुला जीवनाचा मुगुट देईन. ११ आत्मा
मंडळ्यांस काय ह्मणतो, हें ज्याला कान आहे तो
ऐको; जो जिंकितो त्याला दुसऱ्या मरणाची बाधा
होणार नाहीं.

१२ आणि पर्गमसांतील मंडळीच्या दुताला
असें लिही कीं, ज्याला दुधारी तिखट तरवार
आहे, तो असें ह्मणतो; १३ तुझीं कर्मे व तूं
कोठें राहतोस, सैतानाचें आसन आहे तेथें, हें
मला ठाऊक आहे; आणि तूं माझें नांव धरितोस,
आणि जेव्हां माझा विश्वासू साक्षी आंतिपसाला
तुह्मांमध्यें जेथें सैतान वस्ती करितो तेथें जिवें
मारिलें, त्या दिवसांमध्येंहि त्वां मजवरील विश्वास
नाकारिला नाहीं. १४ तथापि मला तुजविरुद्ध
कांहीं गोष्टी आहेत, अशा कीं बलामाचा उपदेश
राखणारे तेथें तुझ्या जवळ आहेत, त्याने बाला-
काला इस्राएल लोकांपुढें असा अडखळा घाला-
यास शिकविलें कीं, त्यानी मूर्त्तीला अर्पिलेले पदार्थ
खावे व व्यभिचार करावा. १५ आणि तसे, नि-
कलाई यांचा उपदेश राखणारेहि तुझ्या जवळ
आहेत, याचा मला त्रास आहे. १६ पश्चात्ताप
कर, नाहीं तर मी तुजवर लवकर येऊन आपल्या
तोंडांतील तरवारीने त्यांशीं लढेन. १७ आत्मा
मंडळ्यांस काय ह्मणतो, हें ज्याला कान आहे
तो ऐको; जो जिंकितो त्याला गुप्त ठेविलेला मान्ना
यांतून मी खाऊं देईन, आणि त्याला पांढरा खडा
देईन, आणि त्या खड्यावर जें नवें नांव घेणाऱ्या-
खेरीज कोणाला ठाऊक नाहीं, तें लिहिलें आहे.

१८ आणि थुवतीरांतील मंडळीच्या दुताला
असें लिही कीं, ज्याचे डोळे अग्नीच्या जाळासारिखे,
आणि ज्याचे पाय उजळ पितळासारिखे आहेत, तो
देवाचा पुत्र असें ह्मणतो; १९ तुझीं कर्मे व प्रीति
व सेवा व विश्वास व तुझी सहनता व तुझीं कर्मे
हीं मला कळलीं, आणि शेवटलीं पहिल्यांपेक्षां
अधिक आहेत. २० तथापि मला तुजविरुद्ध कांहीं
गोष्टी आहेत, अशा कीं जी इजेबेल स्त्री, आप-
ल्याला भविष्यवादीण ह्मणविती, आणि व्यभिचार
करावा व मूर्त्तीला अर्पिलेले पदार्थ खावे, असें
माझ्या दासांस शिकवून भुलविती, तिला तूं तसें
करूं देतोस. २१ आणि तिने आपल्या व्यभि-
चाराचा पश्चात्ताप करावा, ह्मणून म्या तिला अव-
काश दिल्हा, परंतु तिने पश्चात्ताप केला नाहीं. २२
पाहा, मी तिला पलंगावर टाकीन, आणि तिच्या
बरोबर जे व्यभिचार करितात ते जर आपल्या का-
मांचा पश्चात्ताप करीत नाहींत, तर त्यांस मोठ्या
संकटांत टाकीन. २३ आणि मी तिच्या लेंकरांस
पटकीने मारीन, आणि सर्व मंडळ्या जाणतील कीं,
जो कंबरांस व अंतःकरणांस पारखितो तो मी आहें,
आणि तुह्मा प्रत्येकाला तुमच्या कामांप्रमाणें देईन.

२४ परंतु तुह्मी व थुवतीरांतील दुसरे, जितके त्या
उपदेशाला मानीत नाहींत, आणि ज्यांनी सैताना-
च्या ह्मटलेल्या खोल गोष्टी जाणल्या नाहींत, त्या
तुह्मास मी सांगतों कीं, मी तुह्मावर दुसरा भार
घालणार नाहीं ; २५ केवळ जें तुह्माजवळ आहे,
तें मी येईं तोंपर्यंत धरा. २६ आणि जो जिंकितो
व माझीं कर्मे शेवटपर्यंत पाळितो, त्याला मी राष्ट्रांवर
अधिकार देईन ; २७ आणि तो लोखंडी काठीनें
त्यांवर अधिकार करील, तीं मातीच्या पात्रांसारिखीं
चुरा होतील ; असें मीहि आपल्या बापापासून पाव-
लों, तसें. २८ आणि मी त्याला पाहाटेचा तारा
देईन. २९ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, हें
ज्याला कान आहे तो ऐको.

## अध्याय ३.

आणि सार्दिसांतील मंडळीच्या दुताला असें
लिही कीं, ज्याला देवाचे सात आत्मे आ-
णि सात तारे आहेत, तो असें ह्मणतो कीं, तुझीं
कर्मे मला ठाऊक आहेत, असीं कीं तूं जिवंत असें
तुला नांव आहे, परंतु तूं मेला आहेस. २ तूं
जागृत ऐस, आणि ज्या उरलेल्या गोष्टी मरायास
तयार आहेत, त्या स्थिराव; कां कीं तुझीं कर्मे
देवाच्या दृष्टींत पूर्ण झालेलीं असीं मला दिसून
आलीं नाहींत. ३ यास्तव त्वां कसें घेतलें व
ऐकिलें याची आठवण कर, व तें राख, व पश्चा-
त्ताप कर; कां कीं जर तूं जागृत न होसील तर मी
चोरासारिखा तुजवर येईन, आणि कोणत्या घटकेस
तुजवर येईन, हें तुला कळणार नाहीं. ४ तथापि
सार्दिसांत देखील ज्यांनी आपलीं वस्त्रें विटाळिलीं
नाहींत असीं थोडकीं नांवें तुझ्या जवळ आहेत,
आणि ते शुभ्र वस्त्रांनी मजबरोबर फिरतील, कारण
कीं ते योग्य आहेत. ५ जो जिंकितो तोच शुभ्र
वस्त्रें ल्यालेला होईल, आणि मी त्याचें नांव
जीवनाच्या पुस्तकांतून खोडणारच नाहीं, आणि
माझा बाप व त्याचे दूत यांसमोर मी त्याचें नांव
पत्करीन. ६ आत्मा मंडळ्यांस काय ह्मणतो, हें
ज्याला कान आहे तो ऐको.
७ आणि फिलदेल्फीयांतील मंडळीच्या दुताला
असें लिही कीं, जो पवित्र, जो खरा, ज्याजवळ
दाविदाची किल्ली आहे, ज्यानें उघडल्यावर कोणी
बंद करीत नाहीं, आणि बंद केल्यावर कोणी उघ-
डीत नाहीं, तो असें ह्मणतो ; ८ तुझीं कर्मे मला
ठाऊक आहेत; पाहा, म्यां तुजपुढें उघडलेलें दार
ठेविलें आहे, आणि तें कोणाच्यानें बंद करवत
नाहीं; कारण कीं तुला थोडी शक्ति आहे, आणि
त्वां माझें वचन पाळिलें, आणि माझ्या नांवाला
नाकारिलें नाहीं. ९ पाहा, जे सैतानाच्या सभे-
तील आपण यहूदी आहों असें ह्मणतात आणि
तसे नव्हत, तर खोटें बोलतात, त्यांतील कित्येक
देईन; पाहा, त्यांनी येऊन तुझ्या पायांपुढें साष्टांग
घालावें असें करीन, आणि ते जाणतील कीं, म्यां
तुजवर प्रीति केली आहे. १० त्वां माझ्या सहन-
तेचें वचन राखिलें आहे, यास्तव पृथ्वीवरील राह-
णाऱ्यांची परीक्षा करायास जी परीक्षेची घटका
संपूर्ण जगावर येणार आहे, तिजपासून मीहि तुला
राखीन. ११ पाहा, मी लवकर येतों, कोणी
तुझा मुगुट घेऊं नये, ह्मणून जें तुझें आहे तें घट्ट
धर. १२ जो जिंकितो त्याला मी आपल्या दे-
वाच्या देवळांत खांब असें करीन, आणि तो अ-
णखी बाहेर निघणार नाहीं, आणि त्याजवर माझ्या
देवाचें नांव, व माझ्या देवाचें जें नवें यरूशलेम
नगर माझ्या देवापासून आकाशांतून उतरतें त्याचें
नांव, आणि माझें नवें नांव लिहीन. १३ आत्मा
मंडळ्यांस काय ह्मणतो, हें ज्याला कान आहे तो ऐको.
१४ आणि लावदिकीयाकरांच्या मंडळीच्या
दुताला असें लिही कीं, जो आमेन, जो विश्वासू
व खरा साक्षी, जो देवाच्या सृष्टीचा प्रारंभ तो
असें ह्मणतो; १५ तुझीं कर्मे मला ठाऊक आहेत,
असीं कीं तूं थंड नाहींस व तप्तहि नाहींस, तूं
थंड किंवा तप्त असलास तर बरें. १६ पण तूं
कोंबट आहेस, ह्मणजे थंड नाहींस व तप्तहि ना-
हींस, यास्तव मी आपल्या तोंडातून तुला ओकून
टाकीन. १७ कां कीं तूं ह्मणतोस कीं, मी धन-
वान आहें, व म्यां धन मिळविलें आहे, व मला
कशाचीहि गरज नाहीं, आणि तुला ठाऊक नाहीं
कीं, तूं भाग्यहीन व दीनवाणा व दरिद्री व अंधळा
व नागवा आहेस. १८ मी तुला असा बोध क-
रितों कीं, त्वां धनवान व्हावें, ह्मणून अग्नीकडून
शोधलेलें सोनें मजपासून विकत घ्यावें, आणि
तुझ्या नागवेपणाची लाज प्रगट होऊं नये ह्मणून
नेसायास शुभ्र वस्त्रें घ्यावीं, आणि तुला दिसावें
ह्मणून खत्ता आपल्या डोळ्यांस लाव. १९ मी
जितक्यांवर प्रीति करितों तितक्यास निषेध व शिक्षा
करितों, यास्तव आवेशी होऊन पश्चात्ताप कर.

० पाहा, मी दारापासीं उभा राहतों, व ठोकितों;
र कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर
। त्याच्या जवळ आंत येईन, व त्याबरोबर जेवीन,
ाणि तो मजबरोबर जेवील. २१ जो जिं-
ातो त्याला मी आपल्या आसनावर आपल्याजवळ
सूं देईन, जसा मीहि जिंकून आपल्या बापाजवळ
ाच्या आसनावर बसलों आहें, तसें. २२ आत्मा
डळ्यांस काय ह्मणतो, हें ज्याला कान आहे
। ऐको.

## अध्याय ४.

यांनंतर म्या पाहिलें, तेव्हां पाहा, आकाशांत
दार उघडलेलें होतें, आणि जी पहिली
ाणी म्या ऐकिली ती शिंगाच्या शब्दासारिखी
ला ह्मणाली कीं, इकडे चढून ये; मग यांपुढें
या गोष्टी घडल्या पाहिजेत त्या तुला दाखवीन.
, तेव्हां लागलाच मी आत्मयुक्त झालों; आणि
ाहा, आसन आकाशांत मांडलें होतें, आणि आस-
ावर कोणी बसला होता. ३ आणि जो बसला
ो दिसण्यांत यासफे व सार्दीन पाषाणासारिखा
ोता; आणि आसनाभोंवतें मेघधनुष्य, दिसण्यांत
ाचेसारिखें होतें. ४ आणि आसनाभोंवतीं चो-
ीस आसनें होतीं, आणि त्या आसनांवर चोवीस
ाडील बसलेले म्या पाहिले; ते शुभ्र वस्त्रें ल्या-
ाले व त्यांच्या डोक्यांवर सोन्याचे मुगुट होते.
, आणि आसनापासून विजा व गडगडाट व शब्द
ेघत होते, आणि अग्नीचे सात दिवे, देवाचे सात
ात्मे आहेत, ते आसनापुढें जळत होते. ६
ाणि आसनापुढें स्फटिकासारिखा कांचेचा समुद्र
ोता, आणि आसनाच्या मध्यें व आसनाच्या भोंवतें
ार प्राणी, पुढें व मागें डोळ्यांनी भरलेले, असे
ोते. ७ आणि पहिला प्राणी सिंहासारिखा, व
ुसरा प्राणी वासरासारिखा, व तिसऱ्या प्राण्याला
ाणसासारिखें तोंड होतें, व चवथा प्राणी उडणा-
ाया गरुडासारिखा होता. ८ आणि त्या चार
ाण्यांतील एकएकाला साहा साहा पंख, ते चहुं-
कडे व आंतून डोळ्यांनी भरलेले असे होते. आणि
ावित्र, पवित्र, पवित्र प्रभु जो देव, जो सर्वसत्ता-
ारी, जो होता व आहे व होणार, असें ह्मणतांना
े रात्रंदिवस विसंबत नाहींत. ९ आणि आस-
नावर जो बसलेला, जो सदासर्वकाळ जिवंत आ-
हे, त्याचें जेव्हां ते प्राणी गौरव व सन्मान व उप-
कारस्तुति करितात, १० तेव्हां ते चोवीस वडील
आसनावर जो बसलेला त्यापुढें पडतात, आणि जो
सदासर्वकाळ जिवंत आहे त्याला भजतात, आणि
आपले मुगुट आसनापुढें टाकून बोलतात कीं, ११
हे प्रभू, गौरव व मान व सामर्थ्य घ्यायास तूं योग्य
आहेस, कां कीं त्वां सर्व वस्तु उत्पन्न केल्या, आणि
तुझ्या इच्छेकडून त्या आहेत व उत्पन्न झाल्या.

## अध्याय ५.

आणि आसनावर जो बसलेला त्याच्या उजव्या
हातांत एक पुस्तक, जें आंतून व बाहेरून
लिहिलेलें, ज्यावर सात शिक्के मारलेले, असें म्या
पाहिलें. २ आणि पराक्रमी दूत पाहिला, त्याने
मोठ्या शब्दाने ललकारिलें कीं, पुस्तक उघडायास
ह्मणजे त्याचे शिक्के फोडायास कोण योग्य आहे?
३ तेव्हां आकाशांत व पृथ्वींत व पृथ्वीखालीं, कोणीहि
तें पुस्तक उघडायास किंवा त्यांत पाहायास शक्ति-
मान नव्हता. ४ मग मी फार रडलों, कारण कीं
तें पुस्तक उघडायास व वाचायास व तें पाहाया-
सहि कोणी योग्य सांपडला नाहीं. ५ तेव्हां वडि-
लांतील एक मला ह्मणाला, रडूं नको, पाहा, यहूदा
वंशांतील जो सिंह आहे, जो दाविदाचें मूळ, त्याने
तें पुस्तक उघडावें, ह्मणजे त्याचे सात शिक्के फोडावे
असा जय मिळविला आहे. ६ तेव्हां म्या पाहिलें
तर पाहा, आसनाच्या मध्यें व त्या चार प्राण्यांच्या
मध्यें व त्या वडिलांच्या मध्यें, कोंकरा उभा राहि-
लेला, तो वधलेला असा होता, त्याला सात शिंगें
व सात डोळे होते, ते सर्व पृथ्वींत पाठविलेले देवाचे
सात आत्मे आहेत. ७ तेव्हां त्याने जाऊन आस-
नावर जो बसलेला त्याच्या उजवीकडून तें पुस्तक
घेतलें. ८ आणि त्याने पुस्तक घेतलें तेव्हां चार
प्राणी व चोवीस वडील कोंकऱ्यापुढें पडले, त्या
सर्वांस विणे व सोन्याचीं पात्रें होतीं, त्यांत धूप-
द्रव्यें भरलेलीं, तीं पवित्रांच्या प्रार्थना असीं आहेत.
९ आणि ते नवें गायन गातात, असें कीं, तूं पुस्तक
घ्यायास आणि त्याचे शिक्के उघडायास योग्य
आहेस, कां कीं तुला वधिलें, आणि त्वां आपल्या रक्ताने
सर्व वंश व बोल्या व लोक व राष्ट्रें यांतून आह्मास
देवासाठीं खंडून घेतलें आहे. १० आणि आम-
च्या देवासाठीं आह्मास राजे व याजक असें केलें
आहे, आणि आह्मी पृथ्वीवर राज्य करूं. ११
तेव्हां म्या पाहिलें आणि आसन व प्राणी व वडील

यांच्या भोंवतें बहुत दुतांचा शब्द ऐकिला; आणि
त्यांची गणती अयुतांचीं अयुतें व हजारांचीं हजारें
होतीं. १२ ते मोठ्या शब्दानें बोलले, जो कोंकरा
वधलेला तो पराक्रम व धन व ज्ञान व शक्ति व सन्मान
व गौरव व स्तुति पावायास योग्य आहे. १३ आणि
जी प्रत्येक वस्तु आकाशांत व पृथ्वींत व पृथ्वीच्या
खालीं आहे, आणि समुद्रावर जीं आहेत, आणि
त्यांमध्यें जीं अवघीं, त्यांस असें ह्मणतां म्या ऐकिलें
कीं, आसनावर जो बसलेला त्याला व कोंकऱ्याला
स्तुति व मान व गौरव व बळ सदासर्वकाळ असो.
१४ आणि चार प्राणी ह्मणाले, आमेन; आणि
चोवीस वडील पडले, आणि जो सदासर्वकाळ
जिवंत आहे त्याचें भजन त्यांनी केलें.

## अध्याय ६.

आणि कोंकऱ्यानें एक शिक्का उघडिला तेव्हां म्या
पाहिलें, आणि त्या चार प्राण्यांतील एकाचें
म्या ऐकिलें; तो गडगडाटाच्या शब्दासारिखें बोल-
ला, येऊन पाहा. २ आणि म्या पाहिलें, तेव्हां
पाहा, पांढरा घोडा, आणि त्यावर जो बसलेला
त्याला धनुष्य होतें, आणि त्याला मुगुट दिल्हेला
होता, आणि तो जिंकीत व जिंकायाला निघाला.
३ आणि त्यानें दुसरा शिक्का उघडिला तेव्हां
म्या दुसऱ्या प्राण्याचें ऐकिलें; तो बोलला, येऊन
पाहा. ४ तेव्हां दुसरा घोडा तांबडा निघाला,
आणि त्यावर जो बसलेला त्याला पृथ्वीपासून शांति
घ्यायाला असें दिल्हें होतें कीं, त्यांनी एकमेकांस
वधावें; आणि त्याला मोठी तरवार दिल्ही होती.
५ आणि त्यानें तिसरा शिक्का उघडिला तेव्हां
म्या तिसऱ्या प्राण्याचें ऐकिलें; तो बोलला, येऊन
पाहा; आणि म्या पाहिलें, तेव्हां पाहा, काळा
घोडा, आणि त्यावर जो बसलेला त्यानें आपल्या
हातांत तराजू धरिली होती. ६ आणि म्या चार
प्राण्यांच्या मध्यें वाणी ऐकिली; असी कीं, पाव-
ल्याला शेरभर गहूं, आणि पावल्याला तीन शेर जव,
परंतु तेल व द्राक्षारस यांस त्वां उपद्रव करूं नये.
७ आणि त्यानें चवथा शिक्का उघडिला तेव्हां
म्या चवथ्या प्राण्याची वाणी ऐकिली; तो बोलला,
येऊन पाहा. ८ तेव्हां म्या पाहिलें, आणि पाहा,
फिका घोडा, आणि त्यावर जो बसलेला त्याचें
नांव मरण; आणि त्यासंगतीं मृतलोक पाठीमागें
चालला, आणि त्याला पृथ्वीच्या चवथ्या भागावर
तरवारीनें व दुकाळानें व मरणानें व पृथ्वींतील श्वाप-
दांकडून मारायाचा अधिकार दिल्हेला होता.
९ आणि त्यानें पांचवा शिक्का उघडिला, तेव्हां
देवाच्या वचनामुळें व आपल्याजवळ जी साक्ष
होती तिजमुळें जे मारलेले, त्यांचे जीवात्मे वेदी-
खालीं म्या पाहिले. १० आणि ते मोठ्या शब्दानें
ओरडत बोलले, हे पवित्र व खऱ्या स्वामी, तूं
कोठपर्यंत न्याय ठरवीत नाहींस, आणि पृथ्वीवरील
राहणाऱ्यांपासून आमच्या रक्ताचा सूड घेत नाहींस?
११ तेव्हां प्रत्येकास शुभ्र झगे दिल्हे होते, आणि
त्यांस असें ह्मटलें होतें कीं, तुह्मी अणखी कांहीं
वेळ वाट पाहावी, तुमच्या संगतीचे दास ह्मणून
तुमचे भाऊ ज्यांस तुमच्याच सारिखें जिवें मारणार
ते पूर्ण होतील तोंपर्यंत.
१२ आणि त्यानें साहावा शिक्का उघडिला,
तेव्हां म्या पाहिलें, आणि पाहा, मोठा भूमिकंप
झाला, आणि सूर्य केसांच्या तरटासारिखा काळा
झाला, आणि चंद्र रक्तासारिखा झाला. १३ आणि
आकाशांतील तारे, जसें अंजिराचें झाड मोठ्या
वाऱ्यानें हालविलेलें आपलीं फळें अकाळीं गाळितें,
तसे पृथ्वीवर पडले. १४ आणि आकाश जसें
पुस्तक गुंडाळावें तसें निघून गेलें, आणि सर्व डोंगर
व बेटें आपल्या ठिकाणांतून ढळून गेलीं. १५ आणि
पृथ्वींतील राजे व महान व धनवान व सरदार व
पराक्रमी व सर्व दास व सर्व स्वतंत्र, हे गुहांमध्यें
व डोंगरांतील खडकांमध्यें लपाले. १६ आणि
ते डोंगरांस व खडकांस ह्मणाले, आह्मावर पडा,
आणि आह्मास आसनावर जो बसलेला त्याच्या
तोंडापुढून व कोंकऱ्याच्या रागापासून लपवा; १७
कां कीं त्याच्या रागाचा मोठा दिवस आला आहे,
आणि कोणाच्यानें टिकवेल?

## अध्याय ७.

आणि त्यानंतर म्या चार दूत पृथ्वीच्या चार
कोनांवर उभे राहिलेले पाहिले, त्यांनी पृथ्वीं-
तील चार वाऱ्यांस असें धरिलें कीं, पृथ्वीवर व
समुद्रावर व कोणत्याहि झाडावर वारा वाहूं नये.
२ आणि म्या दुसरा दूत सूर्याच्या उगवतीपासून
चढतांना पाहिला, त्याजवळ जिवंत देवाचा शिक्का
होता, आणि ज्या चार दुतांस पृथ्वीला व समुद्रा-
ला उपद्रव करूं दिल्हें होतें, त्यांस तो मोठ्या
शब्दानें ओरडून असें बोलला कीं, ३ आमच्या

वाचे दास यांच्या कपाळांवर आह्मीं शिक्का मारूं
ंपर्यंत पृथ्वीला व समुद्राला व झाडांसहि उपद्रव
रूं नका. ४ आणि ज्यांवर शिक्का झाला त्यांची
णती म्या ऐकिली, इस्राएल लोकांच्या सर्व वंशां-
ील एकशें चवेताळीस हजारांवर शिक्का झाला.
यहूदा वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
ऊबेन वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
ाद वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला. ६
ाशेर वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
फताली वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
नाश्शे वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला.
शिमोन वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
ेवी वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
स्साखार वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
जबूलुन वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
ोसेफ वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला;
न्यामीन वंशांतील बारा हजारांवर शिक्का झाला.
९ त्यानंतर म्या पाहिलें, तेव्हां पाहा, सर्व राष्ट्रें
वंश व लोक व बोल्या यांतील जो मोठा समु-
ाय कोणाच्यानें मोजवला नाहीं, ते आसनापुढें
ाणि कोंकऱ्याच्या पुढें उभे राहिले; ते शुभ्र झगे
यालेले आणि त्यांच्या हातांमध्यें खारकेच्या झाव-
्या होत्या. १० आणि ते मोठ्या शब्दानें असें
ोरडले कीं, आमचा देव, जो आसनावर बसलेला,
ाणि जो कोंकरा त्याला तारणस्तुति असो. ११
व्हां आसन व वडील व चार प्राणी यांभोंवतें
र्व दूत उभे राहिले, आणि आसनासमोर पालथे
डले व देवाचें भजन करीत ह्मणाले, आमेन.
२ स्तुति व गौरव व ज्ञान व उपकार मानणें
सन्मान व पराक्रम व सामर्थ्य हीं सदासर्वकाळ
ामच्या देवाला असोत; आमेन. १३ तेव्हां
डिलांतील एकानें मला उत्तर दिल्हें कीं, शुभ्र झगे
ालेले हे कोण आहेत व कोठून आले? १४
व्हां म्या त्याला ह्मटलें, हे स्वामी, तूं जाणतोस;
व्हां तो मला ह्मणाला, जे मोठ्या संकटांतून आले
हे आहेत, आणि त्यांनीं आपले झगे धुतले, व
ंकऱ्याच्या रक्तानें ते शुभ्र केले आहेत. १५
ास्तव ते देवाच्या आसनासमोर आहेत, आणि ते
ात्रंदिवस त्याच्या देवळांत त्याची सेवा करितात,
ाणि जो आसनावर बसलेला तो त्यांमध्यें वस्ती
रील. १६ ते अणखी भुकेले होणार नाहींत,
णखी तान्हेलेहि होणार नाहींत, आणि सूर्यकिरण
किंवा कांहीं ऊन त्यांजवर पडणार नाहीं. १७
कारण कीं आसनाच्या मध्यभागीं जो कोंकरा तो त्यांचें
पालन करील, आणि पाण्याच्या जिवंत झऱ्यांजवळ
त्यांस नेईल, आणि देव त्यांच्या डोळ्यांपासून सर्व
आसवें पुसून टाकील.

## अध्याय ८.

आणि त्यानें सातवा शिक्का उघडिला तेव्हां आ-
काशांत सुमारें अर्धा तास निवांतपण झालें.
२ नंतर जे सात दूत देवासमोर उभे राहिले होते
त्यांस म्या पाहिलें, आणि सात करणे त्यांस दिल्हे
होते. ३ मग दुसरा दूत आला, आणि तो सो-
न्याचें धुपाटणें घेऊन वेदीजवळ उभा राहिला,
आणि सर्व पवित्रांच्या प्रार्थनांसुद्धां आसनासमो-
रल्या सोन्याच्या वेदीवर त्यानें अर्पावीं, ह्मणून
त्याला बहुत धूपद्रव्यें दिल्हेलीं होतीं. ४ आणि
दुताच्या हातांपासून धुपांचा धूर पवित्रांच्या प्रार्थनां-
सुद्धां देवासमोर चढला. ५ तेव्हां दुतानें धुपा-
टणें घेऊन व त्यांत वेदीवरला अग्नि भरून पृथ्वीवर
टाकिला; तेव्हां शब्द व गडगडाट व विजा व भू-
मिकंप झाला.
६ आणि ज्या सात दुतांपासीं सात करणे होते
ते वाजवायासाठीं सिद्ध झाले. ७ आणि पहिल्या
दुतानें वाजविला, तेव्हां गारा व अग्नि यांची वृष्टी
रक्तानें भेळलेली असी झाली, आणि पृथ्वीवर पाडली;
तेव्हां झाडांचा तिसरा वांटा जळून गेला, आणि
प्रत्येक हिरवें रोंप जळून गेलें. ८ मग दुसऱ्या
दुतानें वाजविला, तेव्हां अग्नि लागलेल्या मोठ्या
डोंगरासारिखें कांहीं समुद्रांत टाकलें होतें, आणि
समुद्राचा तिसरा भाग रक्त असा झाला. ९
तेव्हां समुद्रांतील उत्पन्न झालेल्या प्राण्यांचा तिसरा
वांटा मेला, आणि तारवांचा तिसरा वांटा नाश
पावला. १० मग तिसऱ्या दुतानें वाजविला, तेव्हां
मोठा तारा दिव्यासारिखा जळत असा आकाशांतून
पडला, आणि नद्यांच्या तिसऱ्या वांट्यावर व पा-
ण्याच्या झऱ्यांवर तो पडला. ११ आणि त्या
ताऱ्याचें नांव कडूदवणा असें ह्मटलें, आणि पाण्या-
चा तिसरा वांटा कडूदवणा असा झाला, तें कडू
झाल्यामुळें पाण्यानें बहुत माणसें मेलीं. १२ मग
चवथ्या दुतानें वाजविला, तेव्हां सूर्याचा तिसरा
वांटा व चंद्राचा तिसरा वांटा व ताऱ्यांचा तिसरा
वांटा मारला होता, असा कीं त्यांचा तिसरा वांटा

अंधारमय झाला; आणि दिवसाचा तिसरा वांटा
प्रकाशित झाला नाहीं, आणि रात्र तसीच. १३
तेव्हां म्या पाहिलें, आणि एक दूत आकाशाच्या
मध्यें उडत होता त्याचें ऐकिलें, तो मोठ्या शब्दानें
बोलला कीं, जे तीन दूत वाजविणार आहेत, त्यांच्या
करण्याच्या उरलेल्या शब्दांवरून पृथ्वीवरील राह-
णाऱ्यांस हायहाय, हायहाय, हायहाय.

## अध्याय ९.

नंतर पांचव्या दुतानें वाजविला, तेव्हां तारा आ-
काशांतून पृथ्वीवर पडलेला म्या पाहिला,
आणि अथाग डोहाची किल्ली त्याला दिल्हेली
होती. २ तेव्हां त्यानें अथाग डोह उघडिला,
मग मोठ्या भट्टीच्या धुरासारिखा डोहांतून धूर
चढला, आणि डोहाच्या धुरानें सूर्य व अंतरिक्ष
अंधारमय झालीं. ३ आणि त्या धुरांतून टोळ
निघून पृथ्वीवर आले, आणि जसा भूमीवरील विंच-
वांस अधिकार आहे, तसा त्यांस अधिकार दिल्हेला
होता. ४ तेव्हां त्यांस असें सांगितलें होतें कीं,
पृथ्वीच्या गवताला व कोणत्याहि हिरवळीला व
कोणत्याहि झाडाला उपद्रव करूं नये, केवळ ज्या
माणसांच्या कपाळांवर देवाचा शिक्का नाहीं, त्यांस
मात्र. ५ आणि त्यांस असें दिल्हें होतें कीं,
त्यांनी यांस जिवें मारूं नये, तर पांच महिने यांस
पिडावें, त्यांची पीडा तर विंचू माणसाला हाणितो,
तेव्हांच्या पीडेप्रमाणें होती. ६ आणि त्या दिव-
सांमध्यें माणसें मरणाची इच्छा धरितील, परंतु तें
त्यांला मिळणार नाहीं, आणि तीं मरायाची उत्कंठा
धरितील परंतु मरण त्यांपासून पळेल. ७ आणि
टोळांचे आकार लढाईसाठीं तयार केलेल्या घोड्यां-
सारिखे; आणि त्यांच्या डोक्यांवर सोन्याच्या
सारिखे मुगुट, आणि त्यांचे तोंडवळे माणसांच्या
तोंडवळ्यांसारिखे होते. ८ आणि त्यांचे केस
बायकांच्या केसांसारिखे होते, आणि त्यांच्या दांता-
ढ्या सिंहाच्या सारिख्या होत्या. ९ आणि
त्यांस उरस्त्राणें लोखंडी उरस्त्राणांसारिखीं होतीं,
आणि त्यांच्या पंखांचा आवाज लढाईंत धावणाऱ्या
बहुत घोड्यांच्या रथांच्या आवाजासारिखा होता.
१० आणि त्यांस विंचवांसारिखीं शेपटें होतीं,
आणि त्यांच्या शेपटांस नांग्या होत्या, आणि त्यांनी
पांच महिने माणसांस उपद्रव करावा असा त्यांस
अधिकार होता. ११ आणि जो डोहाचा दूत तो
त्यांवर राजा होता; त्याचें नांव हिब्री भाषेंत अबा-
दोन, आणि हेल्लेणींत त्याचें नांव अपलुवोन आहे.
१२ एक हायहाय होऊन गेली, पाहा, यांपुढें
अणखी दोन हायहाया येतात.

१३ नंतर साहाव्या दुतानें वाजविला, तेव्हां देवा-
समोरल्या सोन्याच्या वेदीच्या चार शिंगांपासून म्या
एक वाणी ऐकिली; १४ ती ज्या साहाव्या दुताला
करणा होता त्याला म्हणाली कीं, मोठ्या फरात
नदीवर बांधलेले जे चार दूत त्यांस सोडीव. १५
तेव्हां जे चार दूत तास व दिवस व महिना व
वर्ष, एथपर्यंत माणसांच्या तिसऱ्या वांट्याला जिवें
मारायास तयार होते ते सुटले. १६ आणि
स्वारांच्या सैन्यांची गणती अयुतांची अयुतें होती,
आणि त्यांची गणती म्या ऐकिली. १७ आणि
तसें म्या दृष्टांतामध्यें घोड्यांस व त्यांवरील बसणा-
ऱ्यांस पाहिलें, त्यांस अग्निवर्ण व जांभळीं व गंधकी
उरस्त्राणें होतीं; आणि घोड्यांचीं डोकीं सिंहांच्या
डोक्यांसारिखीं, आणि त्यांच्या तोंडांतून अग्नि व
धूर व गंधक निघाले. १८ अग्नि व धूर व गंधक
या तिहींकडून जे त्यांच्या तोंडांतून निघाले, त्यांनी
माणसांचा तिसरा वांटा जिवें मारिला. १९
कां कीं त्यांचे पराक्रम त्यांच्या तोंडांत आहेत, कां
कीं त्यांचीं शेपटें सापांच्या सारिखीं आहेत, त्यांस
डोकीं आहेत, आणि त्यांकडून ते उपद्रव करितात.
२० तेव्हां जीं उरलेलीं माणसें त्या पटक्यांकडून
जिवें मारलीं नव्हतीं, त्यांनी आपल्या हातांच्या कामां-
विषयीं पश्चात्ताप केला नाहीं, असा कीं भुतें व
सोन्याच्या व रुप्याच्या व तांब्याच्या व धोंड्याच्या
व लांकडाच्या मूर्त्ति, ज्यांस पाहायाची व ऐकाया-
ची व चालायाचीहि शक्ति नाहीं, त्यांस भजूं
नये. २१ आणि त्यांनी आपल्या हत्यांविषयीं व
आपल्या चेटकांविषयीं व आपल्या व्यभिचारांविषयीं
व आपल्या चोऱ्यांविषयीं पश्चात्ताप केला नाहीं.

## अध्याय १०.

आणि म्या दुसरा पराक्रमी दूत आकाशांतून
उतरतां पाहिला; तो ढग पांघरलेला, आणि
डोक्यावर मेघधनुष्य, आणि त्याचें तोंड सूर्यासा-
रिखें, व त्याचे पाय अग्नीच्या खांबांसारिखे होते.
२ आणि त्याच्या हातांत लाहान उघडलेलें पुस्तक
होतें, तेव्हां त्यानें आपला उजवा पाय समुद्रावर
व डावा भूमीवर ठेविला. ३ मग असा सिंह

गर्जतो त्याप्रमाणें तो मोठ्या शब्दानें ओरडला,
आणि तो ओरडला तेव्हां सात गडगडाटांनी आपले
शब्द काढिले. ४ आणि त्या सात गडगडाटांनी
आपले शब्द काढिले, तेव्हां मी लिहिणार होतों,
परंतु म्या आकाशांतून वाणी ऐकिली; ती मला
ह्मणाली, सात गडगडाटांनी जीं सांगितलीं तीं
शिक्का मारून बंद कर, तीं लिहूं नको. ५ आणि
समुद्रावर व भूमीवर उभा राहिलेला जो दूत म्या
पाहिला, त्यानें आपला हात आकाशाकडे उंचाविला,
६ आणि जो सदासर्वकाळ जिवंत आहे, ज्यानें
आकाश व त्यांतल्या वस्तू आणि भूमि व तींतल्या
वस्तू आणि समुद्र व त्यांतल्या वस्तू उत्पन्न केल्या,
त्याची त्यानें अशी शपथ वाहिली कीं, अणखी
उशीर होणार नाहीं. ७ परंतु सातव्या दुताच्या
वाणीच्या दिवसांमध्यें तो वाजवूं लागेल तेव्हां
देवाचें गोप्य, ज्याप्रमाणें त्यानें आपले दास भविष्य-
वादी यांस कळविलें त्याप्रमाणें पूर्ण होईल.

८ आणि आकाशांतून जी वाणी म्या ऐकिली
ती फिरून मजसीं बोलून ह्मणाली, जा, जो दूत
समुद्रावर व भूमीवर उभा आहे, त्याच्या हातांतलें
उघडलेलें लाहान पुस्तक घे. ९ तेव्हां म्या
दुताकडे जाऊन त्याला ह्मटलें कीं, लाहान पुस्तक
मला दे; मग तो मला ह्मणाला, घे, आणि खाऊन
टाक, आणि हें तुझ्या पोटाला कडू करील परंतु
तुझ्या तोंडांत मधासारिखें गोड होईल. १०
तेव्हां म्या लाहान पुस्तक दुताच्या हातांतून घेतलें
व तें खाऊन टाकिलें, तेव्हां तें माझ्या तोंडांत मधा-
सारिखें गोड होतें, परंतु तें खाल्ल्यावर माझें पोट
कडू झालें. ११ तेव्हां तो मला ह्मणाला, तुला
बहुत लोक व राष्ट्रें व बोल्या व राजे यांस फिरून
भविष्य सांगितलें पाहिजे.

## अध्याय ११.

नंतर काठीसारिखा एक बोरू मला दिल्हा,
आणि दूत उभा राहून ह्मणाला, ऊठ,
आणि देवाच्या देवळाचें व वेदीचें व त्यांतल्या
भजणाऱ्यांचें मेज घे. २ परंतु देवळाबाहेरला
वाडा सोड, त्याचें मेज घेऊं नको, कां कीं तो विदे-
शी लोकांस दिल्हा आहे, आणि ते पवित्र नगर
बेताळीस महिने तुडवितील. ३ आणि माझे दोन
साक्षी यांस मी असा अधिकार देईन कीं, ते तरट
पांघरून एक हजार दोनशें साठ दिवस भविष्य
सांगतील. ४ हे जाइताचीं दोन झाडें, आणि
ज्या दोन समया पृथ्वीच्या देवासमोर उभ्या राह-
तात त्या आहेत. ५ आणि कोणी त्यांस उपद्रव
करायाला इच्छिलें, तर त्यांच्या मुखांतून अग्नि
निघून त्यांच्या वैऱ्यांस खाऊन टाकितो; आणि
कोणी त्यांस उपद्रव करायाला इच्छिलें, तर त्याप्र-
माणें त्याला जिवें मारिलें पाहिजे. ६ त्यांच्या
भविष्य सांगण्याच्या दिवसांमध्यें पाऊस पडूं नये
ह्मणून आकाश बंद करायाचा त्यांस अधिकार
आहे, आणि त्यांस पाण्यांवर असा अधिकार आहे
कीं, तीं पालटून रक्त असीं करावीं, आणि त्यांस
इच्छा होईल तितकेदां पृथ्वीला प्रत्येक पटकीनें
मारावें. ७ आणि ते आपलें साक्ष देणें समाप्त
करितील, तेव्हां जें श्वापद डोहांतून चढतें तें त्यांसीं
लढाई करील, आणि त्यांस जिंकील व त्यांस जिवें
मारील. ८ आणि जें मोठें नगर दाखल्यानें
सदोम व मिसर ह्मटलें आहे, आणि जेथें आमचा
प्रभु खांबीं दिल्हा होता, त्याच्या मार्गावर त्यांचीं
प्रेतें पडतील. ९ आणि लोक व वंश व बोल्या
व राष्ट्रें यांतील बहुतेक त्यांचीं प्रेतें साडेतीन दिवस
पाहतील, आणि त्यांचीं प्रेतें कबरेंत ठेवूं देणार
नाहींत. १० आणि पृथ्वीवरील राहणारे त्या-
जवरून आनंद व उत्साह करितील व एकमे-
कांस देणग्या पाठवितील, कां कीं ते दोघे भविष्य-
वादी पृथ्वीवरील राहणाऱ्यांस पिडीत असत. ११
मग साडेतीन दिवसांनंतर जीवनाचा आत्मा देवा-
पासून येऊन त्यांमध्यें शिरला, तेव्हां ते आपल्या
पायांवर उभे राहिले, मग त्यांच्या पाहणाऱ्यांस
मोठें भय वाटलें. १२ आणि त्यांनी आकाशांतून
मोठी वाणी आपणांसीं बोलतां ऐकिली कीं, एथें
चढून या; तेव्हां ते ढगानें आकाशांत चढले,
आणि त्यांच्या वैऱ्यांनी त्यांस पाहिलें. १३ आणि
त्याच घटकेस मोठा भूमिकंप झाला, आणि त्या
नगराचा दाहावा वांटा पडला, आणि भूमिकंपानें
सात हजार माणसें जिवें मारिलीं; तेव्हां उरलेलीं
भयभीत झालीं, आणि त्यांनी आकाशाच्या देवाला
गौरव दिल्हें. १४ दुसरी हायहाय होऊन गेली;
पाहा, तिसरी हायहाय लवकर येती.

१५ मग सातव्या दुतानें वाजविला, तेव्हां आ-
काशांत मोठ्या वाण्या झाल्या, अशा कीं, जगां-
तील राज्यें आमच्या प्रभूचीं व त्याच्या ख्रीस्ताचीं
झालीं आहेत, आणि तो सदासर्वकाळ राज्य करील.

१६ तेव्हां जे चोवीस वडील देवासमोर आपल्या
आसनांवर बसले होते, ते आपल्या तोंडांवर पडून
देवाला भजतां बोलले; १७ हे प्रभू, सर्वसत्ता-
धारी देव, जो आहे व होता व होणार, त्या तुझा
उपकार आह्मी मानितों, कां कीं त्वां आपला मोठा
पराक्रम घेऊन राज्य केलें आहे. १८ आणि राष्ट्रें
रागें भरलीं, आणि तुला राग आला, आणि मेले-
ल्यांचा न्याय ठरविण्याची वेळ, आणि तुझे दास
भविष्यवादी व पवित्र यांस, आणि जे लाहान व मोठे
तुझ्या नांवाला भितात, त्यांस वेतन देण्याची,
आणि ज्यांनी पृथ्वीचा नाश केला त्यांचा नाश करा-
याची [वेळ आली आहे].
१९ तेव्हां आकाशांत देवाचें देऊळ उघडलें,
आणि त्याच्या कराराची पेटी त्याच्या देवळांत दि-
सली; तेव्हां विजा व शब्द व गडगडाट व भूमि-
कंप व मोठी गारांची वृष्टि झाली.

## अध्याय १२.

नंतर आकाशांत मोठा चमत्कार दिसला; एक
स्त्री सूर्य पांघरलेली होती, आणि तिच्या
पायांखालीं चंद्र, व तिच्या डोक्यावर बारा ताऱ्यां-
चा मुगुट होता. २ तेव्हां ती गरोदर असतां
दुःखाने व प्रसविण्याच्या वेणानी ओरडली. ३
आणि आकाशांत दुसरा चमत्कार दिसला कीं,
पाहा, मोठा अग्निवर्ण अजगर, त्याला सात डोकीं
व दाहा शिंगें, आणि त्याच्या डोक्यांवर सात मु-
गुट होते. ४ आणि त्याच्या शेपटाने आकाशांतील
ताऱ्यांचा तिसरा वांटा ओढिला व त्यांस पृथ्वीवर
पाडिलें, आणि जी स्त्री प्रसवणार होती तिच्या
पुढें तो अजगर उभा राहिला, यासाठीं कीं ती
प्रसवेल तेव्हां तिच्या लेंकराला आपण खाऊन
टाकावें. ५ मग ती पुत्र प्रसवली, तो सर्व राष्ट्रां-
वर लोखंडी काठीने अधिकार करणार आहे; तेव्हां
तिचें लेंकरूं देवाकडे व त्याच्या आसनाकडे हिरा-
वलें. ६ आणि स्त्री रानांत पळून गेली, तेथें दे-
वाने तयार केलेलें तिचें ठिकाण असें आहे कीं,
तिला तेथें एक हजार दोनशें साठ दिवस पोसावें.
७ आणि आकाशांत लढाई झाली, मिखाएल
व त्याचे दूत अजगराशीं लढले, आणि अजगर व
त्याचे दूत लढले. ८ तरी यानी जिंकिलें नाहीं,
आणि आकाशांत यांचें ठिकाण अणखी सांपडलें
नाहीं. ९ मग टाकिला मोठा अजगर, जो जुना
साप, जो दियाबलस व सैतान ह्मटलेला, जो सर्व
जगाला ठकविणारा, तो पृथ्वीवर टाकिला, आणि
त्याच्या बरोबर त्याचे दूत टाकिले. १० तेव्हां
आकाशांत असी मोठी वाणी म्या ऐकिली कीं,
आतां तारण व पराक्रम व आमच्या देवाचें राज्य
व त्याच्या ख्रीस्ताचा अधिकार झाला आहे; कां
कीं जो आमच्या भावांचा अपवादी आमच्या देवा-
समोर रात्रंदिवस त्यांवर दोष ठेवीत असे, तो
खालीं टाकलेला आहे; ११ त्याला तर त्यांनीं
कोंकऱ्याच्या रक्ताकडून व आपल्या साक्षीच्या
वचनाकडून जिंकिलें आहे, आणि मरणापर्यंत त्यांनीं
आपल्या जिवावर प्रीति केली नाहीं. १२ यास्तव
अहो आकाशानो, आणि त्यांतील राहणाऱ्यांनो,
उत्साह करा; जे पृथ्वीवर व समुद्रांत राहतात,
त्यांस हायहाय, कां तर सैतान तुह्माकडे उतरून
आला आहे, त्याला मोठा राग आहे, कारण त्या-
ला कळलें कीं, आपणाला थोडाच काळ आहे.
१३ मग अजगराने, आपणाला पृथ्वीवर टाकिलें,
हें पाहिल्यावर त्याने जी स्त्री पुरुषाला प्रसवली
तिचा पाठलाग केला. १४ तेव्हां स्त्रीने सापाच्या
पुढून रानांत आपल्या ठिकाणीं उडून जावें, ह्मणून
तिला मोठ्या गरुडाचे दोन पंख दिल्हे होते; तेथें
तिला काळ व दोन काळ व अर्धकाळ पोसितात.
१५ तेव्हां सापाने स्त्रीला वाहावून बुडवावें ह्मणून
तिच्या मागें पुरासारिखें पाणी आपल्या तोंडांतून
सोडिलें. १६ आणि स्त्रीला भूमि सहाय झाली,
आणि भूमीने आपलें तोंड उघडून जो पूर अजग-
राने आपल्या तोंडांतून सोडिला होता तो गिळून
टाकिला. १७ आणि अजगर स्त्रीवर रागें भरला,
आणि तिच्या संतानांतील उरलेले, देवाच्या आज्ञा
पाळणारे व ज्यांस येशू ख्रीस्ताची साक्ष आहे,
त्यांसीं लढाई करायास निघाला.

## अध्याय १३.

नंतर मी समुद्राच्या वाळूवर उभा राहिलों, तेव्हां
म्या श्वापद समुद्रांतून चढतां पाहिलें, त्याला
सात डोकीं व दाहा शिंगें, आणि त्याच्या शिंगांवर
दाहा मुगुट, आणि त्याच्या डोक्यांवर दुर्भाषणाचें
नांव होतें. २ आणि जें श्वापद म्या पाहिलें तें
बिबळ्या वाघासारिखें, व त्याचे पाय अस्वलासा-
रिखे, व त्याचें तोंड सिंहाच्या तोंडासारिखें होतें:
आणि अजगराने आपली शक्ति व आपलें आसन

व मोठा अधिकार त्याला दिल्हा. ३ **आणि** त्या-
च्या डोक्यांतील एक डोकें मरायाएवढें हाणलेलें
असें म्या पाहिलें; नंतर त्याच्या मरणाचा घाय
बरा झाला, तेव्हां सगळी पृथ्वी त्या श्वापदाच्या
पाठीमागें आश्चर्य पावली. ४ **आणि** ज्या अजग-
राने त्या श्वापदाला अधिकार दिल्हा, त्याचें त्यांनी
भजन केलें, आणि ते श्वापदाचें भजन करीत बोलले
कीं, या श्वापदासारिखा कोण? यासीं कोणाच्याने
लढवेल? ५ **आणि** मोठ्या गोष्टी व दुर्भाषणें
बोलणारें असें तोंड त्याला दिल्हें होतें, आणि
त्याला बेताळीस महिने लढायाचा अधिकार दिल्हा.
६ **आणि** त्याने आपलें तोंड देवाविरुद्ध दुर्भाषणा-
साठीं असें उघडिलें कीं, त्याचें नांव व त्याचा मंडप
व आकाशांतील राहणारे यांसीं त्याने दुर्भाषण
करावें. ७ **आणि** त्याने पवित्रांसीं लढाई करावी
व त्यांस जिंकावें, असें त्याला दिल्हें होतें; आणि
प्रत्येक वंश व बोली व राष्ट्र यांवर अधिकार त्याला
दिल्हा. ८ **आणि** पृथ्वीवरील ज्या राहणाऱ्यांचीं
नांवें सृष्टीच्या मांडण्यापासून वधलेल्या कोंकऱ्याच्या
जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत, ते सर्व
याला भजतील. ९ **जर** कोणाला कान आहे, तर
तो ऐको. १० **जर** कोणी कैद करून नेतो तर
तो कैदेंत जातो, जर कोणी तरवारीने जिवें मारितो
तर त्याला तरवारीने मारावें लागतें; एथें पवित्रांची
सहनता व विश्वास आहे.

११ **नंतर** म्या दुसरें श्वापद भूमींतून चढतां
पाहिलें, आणि त्याला कोंकऱ्यासारिखीं दोन शिंगें
होतीं, परंतु तें अजगरासारिखें बोललें. १२ **आणि**
तें पहिल्या श्वापदाचा सर्व अधिकार त्याच्या देखतां
करितें, आणि ज्या पहिल्या श्वापदाच्या मरणाचा घाय
बरा झाला होता, त्याला पृथ्वीने आणि इंतील राह-
णाऱ्यांनी भजावें असें करितें. १३ **आणि** तें मोठे
चमत्कार करितें, असे कीं माणसांच्या देखतां अग्नि
देखील आकाशांतून पृथ्वीवर पडावा असें करितें.
१४ **आणि** जे चमत्कार त्याला त्या श्वापदाच्या दे-
खतां करूं दिल्हे, त्यांकडून तें पृथ्वीवरील राहणा-
ऱ्यांस ठकवितें, ह्मणजे जें श्वापद तरवारीचा घाय
पावलें परंतु जगलें, त्याच्या साठीं मूर्त्ति करावी,
असें पृथ्वीवरील राहणाऱ्यांस सांगतें. १५ **आणि**
त्या श्वापदाच्या मूर्त्तींत प्राण घालायास त्याला
दिल्हें, असें कीं श्वापदाच्या मूर्त्तीने बोलावें, आणि
असें करावें कीं जितके श्वापदाच्या मूर्त्तीला न भज-
तील तितक्यांस जिवें मारावें. १६ **आणि** ला-
हान व मोठे, व धनवान व दरिद्री, व स्वतंत्र व
दास, या सर्वांस तें असें करितें कीं, त्यांनी आपल्या
उजव्या हातांवर किंवा आपल्या कपाळांवर खूण
करावी; १७ **अणखी** ज्याला ती खूण, किंवा त्या
श्वापदाचें नांव, किंवा त्याच्या नांवाची गणती आहे,
त्यावांचून कोणी विकत घ्यायास किंवा विकत द्या-
यास शक्तिमान होऊं नये, असें तें करितें. १८
एथें ज्ञान आहे, ज्याला बुद्धि आहे त्याने श्वापदाची
गणती करावी, कां कीं ती माणसाची गणती आहे,
आणि त्याची गणती साहांशें सासष्ट.

## अध्याय १४.

**नं**तर म्या पाहिलें, तेव्हां पाहा, कोंकरा सीयोन
डोंगरावर उभा राहिला, आणि ज्यांच्या कपा-
ळांवर त्याच्या बापाचें नांव लिहिलेलें होतें, असे
एकशें चवेताळीस हजार त्याजपाशीं होते. २ **आणि**
बहुत पाण्याच्या शब्दासारिखी, आणि मोठ्या गड-
गडाटाच्या शब्दासारिखी आकाशांतील वाणी म्या
ऐकिली, आणि बहुत वीणेकरी आपले वीणे वाज-
वीत असतां, यांचा शब्द म्या ऐकिला. ३ **तेव्हां**
ते आसनासमोर व चार प्राणी व वडील यांसमोर
नवें गाणें गातात, आणि ते एकशें चवेताळीस
हजार जे पृथ्वीपासून खंडून घेतलेले होते, त्यांखेरीज
कोणाला तें गाणें शिकतां येत नव्हतें. ४ **हे** जे बाय-
कांच्या समागमाने विटाळले नाहींत तेच आहेत,
कां कीं ते कुमार आहेत; कोंकरा जेथें जेथें जातो तेथें
त्याच्या मागें चालणारे हे आहेत; हे देवासाठीं व
कोंकऱ्यासाठीं प्रथम फळ असे माणसांमधून खंडून
घेतले होते. ५ **आणि** त्यांच्या तोंडांत कपट सांप-
डलें नाहीं, कां कीं ते देवाच्या आसनासमोर निष्क-
लंक आहेत.

६ **नंतर** म्या दुसरा दूत आकाशाच्या मध्यांत
उडतांना पाहिला, त्यापाशीं पृथ्वीवरील राहणाऱ्यांस
ह्मणजे प्रत्येक राष्ट्र व वंश व बोली व लोक यांस
सांगायास अनंतकाळचें शुभवर्त्तमान होतें. ७ **तो**
मोठ्या शब्दाने बोलला कीं, देवाला भ्या व त्याचें
गौरव करा, कां कीं त्याच्या न्यायाची वेळ आली
आहे; आणि ज्याने आकाश व पृथ्वी व समुद्र व
पाण्याचे झरे यांस उत्पन्न केलें, त्याला भजा. ८
तेव्हां दुसरा दूत मागें येऊन बोलला, पडली, बाबेल
मोठी नगरी पडली, कां कीं तिने आपल्या व्यभिचा-

राच्या क्रोधाचा द्राक्षारस सर्व राष्ट्रांस पाजिला
आहे. ९ मग तिसरा दूत त्यांच्या मागें येऊन
मोठ्या शब्दानें बोलला कीं, जर कोणी त्या श्वापदाला
व त्याच्या मूर्त्तीला भजतो, आणि ती खूण आपल्या
कपाळावर किंवा आपल्या हातावर घेतो, १० तर तो
देवाच्या क्रोधाचा द्राक्षारस, त्याच्या रागाच्या प्या-
ल्यांत निरा ओतलेला यांतून पिईल, आणि तो पवित्र
दुतांसमोर व कोंकऱ्यासमोर अग्नि व गंधक यांमध्यें
पीडा पावेल. ११ आणि त्यांच्या पिडेचा धूर सदास-
र्वकाळ चढतो, आणि जे श्वापदाला व त्याच्या मूर्त्ती-
ला भजतात त्यांस, आणि जो कोणी त्याच्या नांवा-
ची खूण घेतो त्याला रात्रंदिवस विसांवा होत नाहीं.
१२ एथें पवित्रांची सहनता आहे, एथें जे देवाच्या
आज्ञा व येशूवरील विश्वास पाळितात ते.

१३ तेव्हां म्या आकाशांतील वाणी ऐकिली, ती
मला ह्मणाली, लिही, आतांपासून प्रभूकडे मरणारे
जे मेलेले ते धन्य; आत्मा ह्मणतो, होय, कां कीं ते
आपल्या कष्टांपासून विसांवा पावतात, आणि त्यांचीं
कर्में हीं त्यांच्या मागून जातात.

१४ नंतर म्या पाहिलें, तेव्हां पाहा, पांढरा ढग,
आणि त्या ढगावर मनुष्याच्या पुत्रासारिखा बसलेला,
त्याच्या डोक्यावर सोन्याचा मुगुट, आणि त्याच्या
हातांत तिखट विळा होता. १५ तेव्हां दुसरा
दूत देवळांतून निघून मोठ्या शब्दानें ढगावरील
बसणाऱ्याला ओरडून ह्मणाला, तूं आपला विळा
लावून काप, कां कीं तुझ्या कापणीची वेळ आली
आहे, कारण कीं पृथ्वीचें पीक वाळलें आहे. १६
तेव्हां ढगावरील बसणाऱ्यानें आपला विळा पृथ्वीवर
घातला, आणि पृथ्वी कापली.

१७ मग आकाशांतील देवळांतून दुसरा दूत
निघाला, त्यालाहि तिखट विळा होता. १८
आणि दुसरा दूत वेदीपासून निघाला, त्याला अ-
ग्नीवर अधिकार होता, आणि तो मोठ्या ओरड-
ण्यानें ज्याला तिखट विळा होता त्याला हाक
मारून बोलला, तूं आपला तिखट विळा लावून
पृथ्वीच्या वेलाचा घोस काप, कां कीं त्याचीं द्राक्षें
पिकलीं आहेत. १९ तेव्हां दुतानें आपला विळा
पृथ्वींत घातला, आणि पृथ्वीचा वेल कापिला, व
देवाच्या क्रोधाच्या मोठ्या द्राक्षकुंडांत टाकिला.
२० आणि द्राक्षकुंड नगराबाहेर तुडविलें, तेव्हां
द्राक्षकुंडांतून रक्त घोड्यांच्या लगामांपर्यंत एक हजार
साहाशें स्तादयनांवर बाहेर आलें.

## अध्याय १५.

नंतर म्या दुसरा मोठा व आश्चर्यकारक चमत्कार
आकाशांत पाहिला, असा कीं, सात दूत, त्यां-
पाशीं शेवटल्या सात पटक्या होत्या, कां कीं त्यांक-
डून देवाचा क्रोध समाप्त झाला. २ आणि विस्त-
वानें भेळलेल्या कांचेच्या समुद्रासारिखें म्या पाहिलें,
आणि जे श्वापदाचा व त्याच्या मूर्त्तीचा व त्याच्या
खुणेचा, व त्याच्या नांवाच्या गणतीचा जय पावलेले
होते, ते देवाचे वीणे घेऊन त्या कांचेच्या समुद्रावर
उभे राहिले होते. ३ आणि ते देवाचा दास
मोशे याचें गायन, व कोंकऱ्याचें गायन गातां ह्म-
णाले, हे प्रभू देवा, सर्वसत्ताधारी, तुझीं कर्में
मोठीं व आश्चर्यकारक; हे पवित्रांच्या राजा, तुझे
मार्ग न्यायी व खरे आहेत. ४ हे प्रभू, तुला
कोण न भिईल, आणि तुझ्या नांवाचें गौरव कोण न
करील? कां कीं तूं एकच पवित्र, ह्मणून सर्व राष्ट्रें
येऊन तुझ्या समोर भजतील, कारण कीं तुझे न्याय
प्रगट झाले आहेत.

५ आणि त्यानंतर म्या पाहिलें, तेव्हां पाहा,
आकाशांत साक्षीच्या मंडपाचें देऊळ उघडलें होतें.
६ आणि ज्या सात दुतांपाशीं त्या सात पटक्या
होत्या, ते निर्मळ व दीप्तिमान अळशी वस्त्र त्या-
लेले, आणि उरांभोंवत्या सोन्याच्या पट्ट्या आव-
ळलेले, असे देवळांतून निघाले. ७ आणि त्या
चार प्राण्यांतील एकानें जो देव सदासर्वकाळ जिवंत
आहे, त्याच्या क्रोधानें भरलेले सोन्याचे सात प्याले
त्या सात दुतांस दिल्हे. ८ आणि देवाच्या गौर-
वापासून व त्याच्या पराक्रमापासून जो धूर त्याक-
डून देऊळ भरलें, आणि त्या सात दुतांच्या सात
पटक्या समाप्त झाल्या तोंपर्यंत कोणाच्यानें देवळांत
आववलें नाहीं.

## अध्याय १६.

नंतर म्या देवळांतील मोठी वाणी ऐकिली, ती
सात दुतांस ह्मणाली, जाऊन देवाच्या क्रोधाचे
प्याले पृथ्वीवर ओता. २ तेव्हां पहिल्या दुतानें
जाऊन आपला प्याला पृथ्वीवर ओतिला; नंतर
ज्या माणसांस त्या श्वापदाची खूण होती आणि जे
त्याच्या मूर्त्तीला भजत होतीं, त्यांस वाईट व दुष्ट
फोड झाला. ३ मग दुसऱ्या दुतानें आपला प्या-
ला समुद्रांत ओतिला; तेव्हां तो मेलेल्याच्या

रक्तासारिखा झाला, आणि समुद्रांतील सर्व जिवंत
प्राणी मेले. ४ नंतर तिसऱ्या दुताने आपला
प्याला नद्या व पाण्याचे झरे यांत ओतिला, आणि
तीं रक्त असीं झालीं. ५ तेव्हां म्या पाण्याचा
दूत बोलतां ऐकिला कीं, हे प्रभू, जो आहे व हो-
ता व होणार, त्वां या गोष्टी अस्या ठरविल्या,
यास्तव तूं न्यायी आहेस; ६ कां कीं त्यानी
तुझ्या पवित्रांचें व भविष्यवाद्यांचें रक्त पाडिलें,
आणि त्वां त्यास रक्त प्यायास दिल्हें आहे, कारण
कीं ते योग्य आहेत. ७ आणि म्या वेदीपासून
दुसऱ्याचें ऐकिलें, तो बोलला, होय, हे प्रभू देवा,
सर्वसत्ताधारी, तुझे न्याय खरे व नीतीचे आहेत.
८ नंतर चवथ्या दुताने आपला प्याला सूर्यावर
ओतिला; तेव्हां त्याला अग्नीकडून माणसें करप-
विण्याची शक्ति दिल्ही होती. ९ आणि माणसें
मोठ्या उन्हाने करपलीं तेव्हां ज्या देवाला त्या पट-
क्यांवर अधिकार आहे, त्याच्या नांवाला दुर्भाषण
केलें; आणि त्यानी त्याचें गौरव करावें ह्मणून
पश्चात्ताप केला नाहीं.

१० नंतर पांचव्या दुताने आपला प्याला त्या
श्वापदाच्या आसनावर ओतिला; तेव्हां त्याचें राज्य
अंधारमय झालें, आणि त्यानी कष्टांमुळें आपल्या जिभा
चाविल्या; ११ आणि आपल्या कष्टांमुळें व आपल्या
फोडांमुळें आकाशांतील देवाला दुर्भाषण केलें, आणि
त्यानी आपल्या कामांविषयीं पश्चात्ताप केला नाहीं.
१२ नंतर साहाव्या दुताने आपला प्याला, जी
मोठी फरात नदी तिजवर ओतिला, तेव्हां तिचें पाणी
आटून गेलें, सूर्याच्या उगवतीपासून जे राजे त्यांची वाट
सिद्ध व्हावी ह्मणून. १३ आणि अजगराच्या तोंडा-
तून व श्वापदाच्या तोंडांतून व त्या खोट्या भविष्यवा-
द्याच्या तोंडांतून तीन अशुद्ध आत्मे, बेडकासारिखे
म्या पाहिले; १४ कां कीं ते चमत्कार करणाऱ्या
भुतांचे आत्मे आहेत, ते पृथ्वीच्या ह्मणजे संपूर्ण
जगाच्या राजांस सर्वसत्ताधारी देवाच्या त्या मोठ्या
दिवसांतील लढाईसाठीं एकवट करायास त्यांजकडे
बाहेर जातात. १५ पाहा, मी चोरासारिखा
येतों; जो पाहरा करितो व आपलीं वस्त्रें राखितो,
असें कीं आपण नागवें चालूं नये, व आपली लाज
त्यानी पाहूं नये, तो धन्य. १६ तेव्हां इब्री भाषेंत
हरमगिदोन ह्मटलेलें ठिकाण, यांत त्याने त्यांस
एकवट केलें. १७ नंतर सातव्या दुताने आपला
प्याला अंतराळांत ओतिला; तेव्हां मोठी वाणी
आकाशांतील देवळांतून आसनापासून निघाली, ती
बोलली, झालें; १८ तेव्हां शब्द व गडगडाट व
विजा झाल्या, व मोठा भूमिकंप, असा मोठा कीं
माणसें पृथ्वीवर झालीं तेव्हांपासून असा भूमिकंप
कधीं झाला नव्हता, तसा झाला. १९ आणि त्या
मोठ्या नगराचे तीन भाग झाले, आणि राष्ट्रांचीं
नगरें पडलीं, आणि मोठ्या बाबेलेची आठवण देवा-
च्या समोर झाली, असी कीं त्याने आपल्या क्रोधा-
च्या संतापाचा द्राक्षारसाचा प्याला तिला द्यावा.
२० तेव्हां प्रत्येक बेट पळालें, आणि डोंगर सांपडले
नाहींत. २१ आणि मोठ्या गारा सुमारें मणाच्या
अशा आकाशांतून माणसांवर पडल्या, तेव्हां गारां-
च्या पटकीमुळें माणसानी देवाला दुर्भाषण केलें,
कां कीं ती पटकी अति मोठी होती.

## अध्याय १७.

आणि ज्या सात दुतांजवळ ते सात प्याले होते,
त्यातील एक येऊन मजसीं बोलता मला ह्म-
णाला, इकडे ये, जी मोठी कळवांतीण बहुत पाण्यावर
बसलेली आहे तिचें न्याय ठरविणें मी तुला दाख-
वीन. २ तिजसीं पृथ्वींतील राजानी व्यभिचार केला
आहे, आणि तिच्या व्यभिचाराच्या द्राक्षारसाने
पृथ्वीवरील राहणारे माजले. ३ मग त्याने मला
आत्म्याकडून रानांत नेलें, तेव्हां किरमिजी रंगाचें
श्वापद, जें दुर्भाषणाच्या नांवानी भरलेलें, ज्याला
सात डोकीं व दाहा शिंगें होतीं, त्यावर बसलेली
स्त्री म्या पाहिली. ४ आणि ती स्त्री जांभळें व
किरमिजी रंगाचें वस्त्र ल्यालेली, आणि सोनें व
उंच पाषाण व मोतीं यांकडून शृंगारलेली होती,
तिच्या हातांत सोन्याची वाटी, ती अमंगळ पदार्थां-
नी व तिच्या व्यभिचाराच्या अमंगळपणाने भरलेली
असी होती. ५ आणि तिच्या कपाळावर असें
नांव लिहिलें होतें कीं, गूज, मोठी बाबेल, कळवां-
तिणींची व पृथ्वींतील ओंगळपणाची आई. ६ आ-
णि स्त्री पवित्रांच्या रक्ताकडून, आणि येशूच्या सा-
क्ष्यांच्या रक्ताकडून माजलेली असी म्या पाहिली,
आणि मी तिला पाहून मोठ्या आश्चर्याने विस्मित
झालों.

७ तेव्हां त्या दुताने मला ह्मटलें, कां विस्मित
झालास? स्त्रीचें गूज, आणि तिला वाहणारें श्वापद
ज्याला सात डोकीं व दाहा शिंगें आहेत, त्याचें मी
तुला सांगतों. ८ ज्या श्वापदाला त्वां पाहिलें, तें

होतें, आणि नाहीं, तर डोहांतून चढून येणार, आणि नाशांत जाणार आहे; आणि पृथ्वीवरील राहणारे, ज्यांचीं नांवें जगाचा पाया घालण्यापासून जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेलीं नाहींत, ते, हें श्वापद होतें, आणि नाहीं, तरी आहे, असें पाहून आश्चर्य करितील. ९ ज्या मनाला ज्ञान तें एथें आहे; तीं सात डोकीं सात डोंगर आहेत, तेथें स्त्री त्यांवर बसली आहे. १० आणि सात राजे आहेत, पांच पडले आहेत, आणि एक आहे, दुसरा अद्याप आला नाहीं, आणि तो येईल तेव्हां त्याला थोडा वेळ राहावें लागेल. ११ आणि जें श्वापद होतें आणि नाहीं, तोच आठवा आहे, आणि त्या सातांतील एक आहे, आणि तो नाशास जातो. १२ आणि जीं दाहा शिंगें त्वां पाहिलीं तीं दाहा राजे आहेत, ते अद्याप राज्य पावले नाहींत, पण एक घटकाभर त्या श्वापदासंगतीं राजांसारिखे अधिकार पावतात. १३ त्यांचें एक मत आहे, आणि ते आपली सत्ता व अधिकार त्या श्वापदाला सोंपून देतात. १४ ते कोंकऱ्यासीं लढतील, परंतु कोंकरा त्यांस जिंकील, कां कीं तो प्रभूंचा प्रभु आणि राजांचा राजा आहे, आणि जे त्याच्या संगतीं ते बोलावलेले व निवडलेले व विश्वासू आहेत.

१५ आणखी तो मला ह्मणाला, जें पाणी त्वां पाहिलें, जेथें कळवांतीण बसली आहे, तें लोक व समुदाय व राष्ट्रें व बोल्या असें आहे. १६ आणि श्वापदावरचीं जीं दाहा शिंगें त्वां पाहिलीं, तीं कळवांतिणीचा द्वेष करितील व तिला ओसाड व नागवें करितील व तिचें मास खातील व अग्नीनें तिला जाळून टाकितील. १७ कां कीं देवानें त्यांच्या अंतःकरणांमध्यें असें भरविलें आहे कीं, यानी त्याची इच्छा पूर्ण करावी, आणि देवाचीं वचनें पूर्ण होतील तोंपर्यंत एक मताचे होऊन आपलें राज्य श्वापदाला द्यावें. १८ आणि जी स्त्री त्वां पाहिली ती जें मोठें नगर पृथ्वीच्या राजांवर राज्य करितें, तेंच आहे.

## अध्याय १८.

आणि त्यानंतर म्या दुसरा दूत आकाशांतून उतरतां पाहिला, त्याला मोठा अधिकार होता, आणि पृथ्वी त्याच्या गौरवानें प्रकाशित झाली. २ आणि तो मोठ्या बलिष्ठ स्वरानें ओरडून बोलला, पडली, मोठी बाबेल पडली, आणि ती भुतांची वस्ती व प्रत्येक अशुद्ध आत्म्याची बंदिशाळा व प्रत्येक अशुद्ध व ओंगळ पांखराचा पिंजरा झाली आहे; ३ कां कीं सर्व राष्ट्रें तिच्या व्यभिचाराच्या आवेशाचा द्राक्षारस प्याली आहेत, आणि पृथ्वींतील राजानी तिजसीं व्यभिचार केला आहे, आणि पृथ्वीचे व्यापारी तिच्या विषयभोगाच्या बळानें धनवान झाले आहेत.

४ तेव्हां म्या आकाशांतील दुसरी असी वाणी ऐकिली कीं, अहो माझ्या लोकानो, तिजमधून निघा, यासाठीं कीं तुह्मी तिच्या पापांचे वांटेकरी होऊं नये, आणि तिच्या पटक्यांतील कांहीं पावूं नये. ५ कां कीं तिचीं पापें आकाशापर्यंत पोहंचलीं आहेत, आणि देवानें तिच्या अन्यायांची आठवण केली आहे. ६ जसें तिनें तुह्मास भरून दिल्हें तसें तिला भरून द्या, आणि तिच्या करण्यांप्रमाणें तिला दुप्पट फेडून द्या, जी वाटी तिनें मिसळली तींत तिच्या साठीं दुप्पट मिसळा. ७ जितकें तिनें आपलें गौरव केलें, आणि विषयभोग केला, तितकी पीडा व खेद तिला द्या; कां कीं ती आपल्या अंतःकरणांत ह्मणती, मी राणी होऊन बसली आहें, मी तर विधवा नाहीं, आणि खेद पावणार नाहीं. ८ यावरून एकाच दिवसीं तिला तिच्या पटक्या, मरण व खेद व दुकाळ होतील, आणि तिला अग्नीनें जाळतील, कां कीं प्रभु देव तिचा न्याय करणारा समर्थ आहे. ९ आणि ज्यानी तिजसीं व्यभिचार केला व विलास केला, ते पृथ्वींतील राजे तिच्या जळण्याचा धूर पाहतील तेव्हां तिजकरितां शोक करून तिजमुळें बडवून घेतील. १० ते तिच्या पीडेच्या भयामुळें दूर उभे राहून ह्मणतील, हायहाय, हायहाय, मोठें नगर बाबेल, तें बळकट नगर, कां कीं एका घटकेंत तुझें न्याय ठरविणें आलें आहे. ११ आणि पृथ्वीचे व्यापारी तिजसाठीं रडून शोक करितील, कां कीं आपला माल पुढें कोणी विकत घेणार नाहीं. १२ तो माल असा कीं, सोनें व रुपें व उंच पाषाण व मोतीं व बारीक वस्त्र व जांभळें वस्त्र व रेशीम व किरमिजी वस्त्र व सर्व प्रकारचें सुगंध काष्ठ व सर्व प्रकारचीं हस्तिदंताचीं पात्रें व सर्व प्रकारचीं मोलवान काष्ठाचीं पात्रें व तांब्याचीं व लोखंडाचीं व संगमरवरी पाषाणाचीं पात्रें, १३ व दालचिनी व धूपद्रव्यें व सुगंध तेल व ऊद व द्राक्षारस व तेल व सपीठ व गहूं व गुरें व मेंढरें व घोडे व रथ व शरीरें व मा-

णसांचे प्राण. १४ आणि तुझ्या जिवाच्या इच्छे-
चे विषय तुजपासून गेले, आणि सर्व विलासाचे
व शोभेचे पदार्थ तुजपासून गेले आहेत, आणि
तुला ते पुढें मिळणार नाहींत. १५ त्यांचे जे व्या-
पारी तिजकडून धनवान झाले ते तिच्या पिडेच्या
भयामुळें दूर उभे राहून रडतील व शोक करितील.
१६ आणि ह्मणतील, हायहाय, हायहाय, तें मोठें
नगर, बारीक व जांभळें व किरमिजी वस्त्र पांघर-
लेलें, आणि सोनें, मोलवान पाषाण व मोतीं इहीं-
कडून शृंगारलेलें; १७ कारण कीं एका घटकेंत
इतक्या संपत्तीची ओसाडी झाली आहे. आणि
सर्व नावाडी, आणि नावांचे सर्व धनी व खलाशी
व समुद्रावर व्यवहार करणारे, ते दूर उभे रा-
हिले; १८ आणि त्यांनी त्याच्या जळण्याचा धूर
पाहतां ओरडून ह्मटलें, या मोठ्या नगरासारिखें
कोणतें आहे? १९ आणि त्यांनी आपल्या माथ्यां-
वर धूळ उडविली, आणि रडतां व शोक करितां
ओरडून ह्मटलें, हायहाय, हायहाय, तें मोठें नगर,
ज्या सर्वांस समुद्रांतील तारवें होतीं, ते त्याकडून
त्याच्या संपत्तीने धनवान झाले; कां कीं एका घट-
केंत ओसाड झालें. २० हे आकाशा, आणि अहो
पवित्र प्रेषित व भविष्यवादी, त्यावर आनंद करा,
कां कीं देवाने तुमचा सूड त्यावर उगविला आहे.
२१ तेव्हां एका बळकट दुताने मोठ्या तळीसा-
रिखा धोंडा उचलिला, आणि समुद्रांत टाकून ह्म-
टलें कीं, असेंच तें मोठें नगर बाबेल झपाट्याने
टाकतील, आणि फिरून सांपडणार नाहीं. २२
आणि विणेकरी व गवई व पांवे वाजविणारे व शिं-
गाड्ये, यांचा शब्द तुजमध्यें पुढें ऐकूं येणार नाहीं,
आणि प्रत्येक कारागिरीचा प्रत्येक कारागीर तुजमध्यें
पुढें सांपडणार नाहीं, आणि जात्याचा शब्द पुढें
तुजमध्यें ऐकूं येणार नाहीं, २३ आणि दिव्याचा
उजेड पुढें तुजमध्यें दिसणार नाहीं, आणि नवऱ्या-
चा व नवरीचा शब्द पुढें तुजमध्यें ऐकूं येणार ना-
हीं, कां कीं पृथ्वीवरील जे महान ते तुझे व्यापारी
होते, आणि सर्व राष्ट्रें तुझ्या चेटकाने ठकविलेलीं
होतीं. २४ आणि भविष्यवाद्यांचें व पवित्रांचें व
पृथ्वीवर वधलेल्या सर्वांचें रक्त त्यांत सांपडलें होतें.

## अध्याय १९.

आणि त्यांनंतर आकाशांत मोठ्या समुदायाची
मोठी वाणी म्या असी ऐकिली कीं, हालेलू-
या, प्रभु आमचा देव, यास तारण व गौरव व मान
व पराक्रम असो; २ कां कीं त्याचे न्याय खरे व
नीतीचे, कारण कीं ज्या मोठ्या कळवांतिणीने आप-
ल्या व्यभिचाराकडून पृथ्वी नासिली, तिजवर त्याने
न्याय ठरविला आहे, आणि तिच्या हाताकडील जें
त्याच्या दासांचें रक्त त्याचा सूड घेतला आहे.
३ मग दुसरेदां त्यांनी ह्मटलें, हालेलूया; आणि
तिचा धूर सदासर्वकाळ चढत आहे. ४ तेव्हां ते
चोवीस वडील व चार प्राणी पडून आसनावर बस-
लेला देव यांचें भजन करितांना बोलले, आमेन,
हालेलूया. ५ तेव्हां आसनापासून असी वाणी
निघाली कीं, जे आमच्या देवाचे दास, आणि त्याला
भिणारे लाहान व थोर, ते सर्व तुह्मी त्याला स्तवा.
६ तेव्हां मोठ्या समुदायाच्या शब्दासारिखा, आणि
बहुत पाण्याच्या शब्दासारिखा, आणि भारी गड-
गडाटांच्या शब्दासारिखा म्या शब्द ऐकिला, ते
बोलले, हालेलूया, कां कीं प्रभु देव सर्वसत्ताधारी
तो राज्य करूं लागला आहे. ७ आपण आनंद
करूं व उल्हास करूं व त्याला गौरव देऊं, कां
कीं कोंकऱ्याचें लग्न आलें आहे, आणि त्याच्या नव-
रीने आपणाला तयार केलें आहे. ८ आणि तिला
शुद्ध व तेजस्वी बारीक वस्त्र लेऊं दिल्हें होतें, तें
बारीक वस्त्र तर पवित्रांचें न्यायीपण आहे.
९ तेव्हां तो मला ह्मणाला, असें लिही कीं,
कोंकऱ्याच्या लग्नाच्या जेवणास बोलावलेले ते धन्य;
अणखी तो मला ह्मणाला, हीं देवाचीं खरीं वचनें
आहेत. १० तेव्हां मी त्याला भजायास त्याच्या
पायांपुढें पडलों, परंतु तो मला ह्मणाला, संभाळ,
नको; मी तुझ्या, आणि तुझे भाऊ ज्यांस येशू-
ची साक्ष आहे त्यांच्या संगतीचा दास आहें,
देवाला भज; येशूची साक्ष तर भविष्यवादाचा
आत्मा आहे.
११ तेव्हां म्या आकाश उघडलेलें पाहिलें,
आणि पाहा, पांढरा घोडा आणि त्यावर एक बस-
लेला, तो विश्वासू व खरा असा ह्मटलेला आहे,
आणि तो न्यायीपणाने न्याय ठरवितो व लढतो.
१२ आणि त्याचे डोळे अग्नीच्या ज्वाळासारिखे, व
त्याच्या डोक्यावर बहुत मुगुट, त्याचें नांव असें
लिहिलेलें आहे कीं, त्याजवांचून कोणाला कळलें
नव्हतें. १३ आणि तो रक्तांत बुचकळलेलें वस्त्र
पांघरला होता, आणि त्याचें नांव देवाचा शब्द
असें ह्मटलें आहे. १४ आणि आकाशांतील सैन्यें

पांढऱ्या घोड्यांवर बसून पांढरीं व शुद्ध बारीक वस्त्रें
ल्यालेलीं त्याच्या मागें गेलीं. १५ आणि त्याच्या
तोंडांतून तिखट तरवार निघती, तिजकडून त्यानें
राष्ट्रांस मारावें ह्मणून; आणि तो लोखंडाच्या काठीनें
त्यांवर अधिकार करील, आणि सर्वसत्ताधारी देव
याच्या क्रोधाचें व रागाचें द्राक्षकुंड तो तुडवितो.
१६ आणि त्याच्या पांघरुणावर व त्याच्या मांडी-
वर त्याचें नांव लिहिलेलें आहे कीं, **राजांचा राजा**
**आणि प्रभूंचा प्रभु.** १७ नंतर म्यां एक दूत
सूर्यांत उभा राहिलेला पाहिला, आणि तो मोठ्या
शब्दानें आकाशाच्या मध्यें उडणाऱ्या सर्व पांखरांस
ओरडून बोलला, या, मोठ्या देवाच्या जेवणावळीस
एकवट व्हा. १८ यासाठीं कीं राजांचें मांस व
सरदारांचें मांस व बळवानांचें मांस व घोड्यांचें
व त्यांवरील बसणाऱ्यांचें मांस, आणि सर्व स्वतंत्र
व दास व लाहान व मोठे, यांचें मांस खावें. १९
तेव्हां तें श्वापद व पृथ्वींतील राजे आणि त्यांचीं
सैन्यें हीं घोड्यावरील बसणाऱ्यासीं व त्याच्या
सैन्यासीं लढाई करायास एकवटलेलीं असीं म्यां
पाहिलीं. २० मग तें श्वापद धरिलें, आणि त्या-
बरोबर खोटा भविष्यवादी, ज्यानें त्यासमोर असे
चमत्कार केले कीं, त्यांकडून त्यानें त्या श्वापदाची
खूण घेतलेल्यांस, आणि त्याच्या मूर्त्तीच्या भजणा-
ऱ्यांस ठकविलें, त्यालाहि धरिलें; ते दोघे जितेच
गंधकानें जळणाऱ्या अग्निसरोवरांत टाकिले. २१
आणि जे उरले ते घोड्यावरील बसणाऱ्याची जी
तरवार त्याच्या तोंडांतून निघती, तिनें मारून टाकिले,
आणि त्याच्या मांसानें अवघीं पांखरें तृप्त झालीं.

## अध्याय २०.

आणि आकाशांतून उतरतां असा एक दूत म्यां
पाहिला, त्यापासीं डोहाची किल्ली, आणि
त्याच्या हातांत मोठा सांखळदंड होता. २ आणि
त्यानें अजगर, जो जुना साप, जो सैतान व सैतान
असा आहे त्याला धरिलें, आणि हजार वर्षांपर्यंत
त्याला बांधून ठेविलें; ३ मग त्याला डोहांत
टाकून बंद केलें, आणि त्याच्या वरतें शिक्का मारिला,
यासाठीं कीं हजार वर्षें पूर्ण होतील तोंपर्यंत त्यानें
राष्ट्रांस आणखी ठकवूं नये; आणि त्यानंतर त्याला
थोडा वेळ सोडिलें पाहिजे. ४ आणि म्यां आसनें
पाहिलीं, आणि त्यांवर कोणी बसले, आणि त्यांस न्याय
ठरविण्याचा अधिकार दिल्हा होता; आणि ज्यांचीं
शिरें येशूच्या साक्षीमुळें व देवाच्या वचनामुळें
छेदिलीं होतीं, आणि ज्यांनीं श्वापदाचें व त्याच्या
मूर्त्तीचें भजन केलें नव्हतें, आणि आपल्या कपाळा-
वर किंवा आपल्या हातावर खूण घेतली नव्हती,
त्यांचे जीवात्मे पाहिले; आणि त्यांनीं जिवंत होऊन
ख्रीस्ताबरोबर हजार वर्षें राज्य केलें. ५ परंतु
वरकड मेलेले ते तीं हजार वर्षें पूर्ण होत तोंपर्यंत
फिरून जिवंत झाले नाहींत; हेंच पहिलें पुन्हा
उठणें. ६ पहिल्या पुन्हा उठण्यांत ज्याला भाग
आहे, तो धन्य व पवित्र आहे; अशांवर दुसऱ्या
मरणाची सत्ता नाहीं, तर ते देवाचे व ख्रीस्ताचे
याजक होतील आणि त्याच्या बरोबर हजार वर्षें
राज्य करितील.

७ नंतर तीं हजार वर्षें संपतील तेव्हां सैतान
आपल्या अटकेंतून सोडण्यांत येईल. ८ आणि
पृथ्वीच्या चार कोंपऱ्यांतील जीं राष्ट्रें, गोग व मा-
गोग त्यांस ठकवायास, त्यांस लढाईसाठीं एकवट
करायास निघेल, त्यांची गणती समुद्राच्या वाळू-
प्रमाणें आहे. ९ तेव्हां त्यांनीं पृथ्वीच्या विस्तारा-
वर चढून पवित्रांचा तळ व प्रिय नगर वेढिलें,
नंतर देवापासून आकाशांतून अग्नि उतरला; आणि
त्यानें त्यांस खाऊन टाकिलें. १० आणि ज्या
सैतानानें त्यांस ठकविलें होतें, तो अग्नीच्या व
गंधकाच्या सरोवरांत जेथें श्वापद व तो खोटा भवि-
ष्यवादी, तेथें टाकिला, आणि ते रात्रंदिवस सदास-
र्वकाळ पीडा पावतील.

११ नंतर म्यां मोठें पांढरें आसन आणि त्या-
वर बसलेला याला पाहिलें, त्याच्या तोंडापुढून पृथ्वी
व आकाश पळालें, आणि त्यांचें ठिकाण सांपडलें
नाहीं. १२ मग म्यां मेलेले, लहान व थोर हे
देवाच्या पुढें उभे राहिलेले पाहिले, आणि पुस्तकें
उघडलीं, तेव्हां दुसरें पुस्तक जें जीवनाचें आहे
तेंहि उघडलें, आणि त्या पुस्तकांमध्यें ज्या गोष्टी
लिहिल्या होत्या, त्यांवरून मेलेल्यांचा न्याय त्यां-
च्या करण्यांप्रमाणें ठरविला. १३ तेव्हां समुद्रानें
आपल्यांत जे मेलेले होते ते दिल्हे, आणि मरण व
मृतलोक यांनीं आपल्यांत जे मेलेले होते ते दिल्हे,
आणि त्यांच्या कर्मांप्रमाणें त्यांतील प्रत्येकाचा न्याय
ठरविला. १४ तेव्हां मरण व मृतलोक हीं अग्नीच्या
सरोवरांत टाकिलीं; हेंच दुसरें मरण आहे. १५
आणि जो कोणी जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेला
सांपडला नाहीं तो अग्नीच्या सरोवरांत टाकिला.

## अध्याय २१.

मग म्या नवें आकाश व नवी पृथ्वी पाहिली, कां
कीं पहिलें आकाश व पहिली पृथ्वी हीं होऊन
गेलीं होतीं, आणि समुद्र अणखी नाहीं. २ तेव्हां
म्या योहान्नाने पवित्र नगर जें नवें यरूशलेम तें
देवापासून आकाशांतून उतरतां पाहिलें, जसी नवरी
आपल्या नवऱ्यासाठीं शृंगारलेली, तसें तें सिद्ध
केलेलें होतें. ३ नंतर म्या आकाशांतून असी
मोठी वाणी ऐकिली कीं, पाहा, देवाचा मंडप माण-
सांपासीं आहे, आणि तो त्यांपासीं वस्ती करील,
आणि ते त्याचे लोक होतील, आणि देव स्वतां
त्यांच्या संगतीं त्यांचा देव असा होईल. ४
आणि देव त्यांच्या डोळ्यांपासून प्रत्येक अश्रु पुसून
टाकील, आणि मरण अणखी होणार नाहीं, शोकहि
नाहीं व रडणें नाहीं, कष्ट अणखी होणारच नाहीं,
कां तर पहिल्या गोष्टी होऊन गेल्या. ५ तेव्हां
जो आसनावर बसलेला तो ह्मणाला, पाहा, मी
अवघीं नवीं करितों. अणखी तो मला ह्मणाला,
लिही, कां कीं या गोष्टी खऱ्या व विश्वासू आहेत.
६ नंतर तो मला ह्मणाला, झालें आहे, मी आ-
ल्फा व ओमेगा, प्रारंभ व शेवट आहें; मी तान्हे-
ल्याला जीवनाच्या झऱ्याचें पाणी फुकट देईन. ७
जो जिंकितो तो अवघ्यांचें वतन पावेल, आणि मी
त्याचा देव होईन, आणि तो माझा पुत्र होईल.
८ परंतु भेकड व अविश्वासी व ओंगळ व घातक
व व्यभिचारी व चेटकी व मूर्त्तिपूजक व सर्व
लबाड, यांचा भाग, जें सरोवर अग्नीने व गंधकाने
जळतें, त्यांत होईल; हें दुसरें मरण आहे.

९ नंतर ज्या सात दुतांजवळ त्या सात शेव-
टल्या पटक्यानी भरलेले सात प्याले होते, त्यांतील
एक मजकडे येऊन मला असें ह्मणाला कीं, इकडे
ये, जी नवरी कोंकऱ्याची स्त्री, ती मी तुला दाख-
वीन. १० तेव्हां त्याने मला मोठ्या व उंच
डोंगरावर आत्म्याकडून नेलें, आणि मोठें नगर
पवित्र यरूशलेम मला दाखविलें, तें देवापासून
आकाशांतून उतरत होतें; ११ त्याला देवाचें
गौरव होतें, आणि त्याचा उजेड फार मोलवान
पाषाणासारिखा स्फटिकरूप याशफे पाषाण याप्र-
माणें होता. १२ आणि त्याला मोठा व उंच
कोट होता; त्याला बारा वेसी होत्या, आणि
वेसींपासीं बारा दूत, आणि इस्राएल संतानाच्या
बारा वंशांचीं नांवें वरतीं लिहिलीं होतीं. १३
पूर्वेकडे तीन वेसी, उत्तरेकडे तीन वेसी, दक्षिणेकडे
तीन वेसी, पश्चिमेकडे तीन वेसी. १४ आणि नग-
राच्या कोटाला बारा पाये होते, आणि त्यांवर कोंक-
ऱ्याच्या बारा प्रेषितांचीं नांवें होतीं. १५ आणि
जो मजसीं बोलत होता, त्याच्या जवळ नगराचें व
त्याच्या वेसींचें व त्याच्या कोटाचें मेज घेण्यासाठीं
सोन्याचा बोरू होता. १६ आणि नगर चौरस
आहे, ह्मणजे त्याची जितकी लांबी, तितकी रुंदीहि
आहे; तेव्हां त्याने नगराचें मेज काठीकडून बारा
हजार स्तादयस घेतलें, त्याची लांबी व रुंदी व
उंची समान आहे. १७ मग त्याने त्याच्या को-
टाचें मेज घेतलें, तें माणसाच्या ह्मणजे त्या दुता-
च्या मेजाप्रमाणें एकशें चवेताळीस हात होतें. १८
आणि त्याच्या कोटाची रचना याशफे पाषाणची
होती, आणि नगर निर्मळ सोन्याचें, निर्मळ कांचे-
सारिखें होतें. १९ आणि नगराच्या कोटाचे पाये
सर्व प्रकारच्या उंच पाषाणानी शृंगारले होते;
पहिला पाया याशफे, दुसरा नीळ, तिसरा गौरि,
चवथा पाच, २० पांचवा आरक्तकचित्री, साहावा
आरक्तक, सातवा सोनपाषाण, आठवा बेरूल,
नव्वा पुष्कराज, दाहावा सोनलसणी, अकरावा
सुगंधी, बारावा पद्मराग. २१ आणि बारा वेसी
बारा मोतीं अस्या होत्या, एकएक वेस एका
मोत्याची होती, आणि नगरांतील मार्ग निर्मळ
सोन्याचा, नितळ कांचेसारिखा होता. २२ आणि
म्या त्यांत देऊळ पाहिलें नाहीं, कां कीं प्रभु देव
सर्वसत्ताधारी तो व कोंकरा, हेच त्यांतील देऊळ
असे आहेत. २३ आणि नगरांत सूर्याचा किंवा
चंद्राचा प्रकाश पडण्याची गरज नव्हती, कां कीं
देवाच्या गौरवाने तें प्रकाशित केलें, आणि कोंकरा
त्याचा प्रकाश होता. २४ आणि तारलेल्यांचीं
राष्ट्रें त्याच्या उजेडांत चालतील, आणि पृथ्वींतील
राजे आपलें गौरव व मान त्यांत आणितात. २५
आणि त्याच्या वेसी दिवसा बंद होणार नाहींत,
रात्र तर तेथें होणार नाहीं. २६ आणि राष्ट्रांचें
गौरव व मान त्यांत आणितील. २७ आणि
कांहीं विटाळविणारें आणि अमंगळ व लबाडी कर-
णारें त्यांत जाणार नाहीं, केवळ ज्यांचीं नांवें
कोंकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेलीं ते.

## अध्याय २२.

नंतर जीवनाच्या पाण्याची शुद्ध नदी स्फटिकासा-
रिखी नितळ, देवाच्या व कोंकऱ्याच्या आस-

मापासून निघती, ती त्याने मला दाखविली. २
नगरच्या मार्गाच्या मध्यें, आणि नदीच्या अल्याड
पल्याड जीवनाचें झाड, तें बारा प्रकारचीं फळें देत
असतां आपलें फळ दर महिन्यांत देत होतें,
आणि त्या झाडाचीं पानें राष्ट्रांस निरोगी करण्या-
साठीं होतीं. ३ आणि कोणताहि शाप पुढें हो-
णार नाहीं, तर त्यांत देवाचें व कोंकऱ्याचें आसन
होईल, आणि त्याचे दास त्याची सेवा करितील.
४ आणि ते त्याचें तोंड पाहतील, आणि त्याचें
नांव त्यांच्या कपाळांवर होईल. ५ आणि तेथें
रात्र होणार नाहीं, आणि त्यांस दिव्याची व सूर्या-
च्या उजेडाची गरज नाहीं, कां कीं प्रभु देव त्याज-
वर प्रकाश पाडितो, आणि ते सदासर्वकाळ राज्य
करितील.

६ नंतर तो मला ह्मणाला, या गोष्टी विश्वासू
व खऱ्या आहेत, आणि प्रभु जो पवित्र भविष्यवा-
द्यांचा देव, त्याने ज्या गोष्टी लवकर झाल्या पाहि-
जेत त्या आपल्या दासांस दाखवायासाठीं आपल्या
दुताला पाठविलें आहे. ७ पाहा, मी लवकर
येतों, या पुस्तकांतील भविष्य गोष्टी जो पाळितो
तो धन्य. ८ आणि ज्याने हीं पाहिलीं व ऐकिलीं,
तो मी योहान; आणि म्या ऐकिलीं व पाहिलीं
तेव्हां ज्या दुताने मला हीं दाखविलीं त्याच्या
पायांपुढें भजन करायास मी पडलों. ९ परंतु तो
मला ह्मणाला, संभाळ, नको, कां कीं मी तुझ्या,
आणि तुझे भाऊ भविष्यवादी यांच्या, आणि जे
या पुस्तकांतील वचनें पाळितात त्यांच्या संगतीचा
दास आहें; देवाला भज. १० तेव्हां तो
मला ह्मणाला, या पुस्तकांतील भविष्य गोष्टींस
शिक्का मारून बंद करूं नको, कां कीं समय जवळ
आला आहे. ११ जो अन्यायी आहे तो पुढें
अन्यायी असो, आणि जो मलिन आहे तो पुढें
मलिन असो, आणि जो न्यायी तो पुढें न्यायी
असो, आणि जो पवित्र तो पुढें पवित्र असो. १२
तर पाहा, मी लवकर येतों, आणि माझें वेतन मा-
झ्यां जवळ आहे, यासाठीं कीं जसें प्रत्येकाचें काम
होईल तसें त्याला भरून द्यावें. १३ मी आल्-
फा व ओमेगा, प्रारंभ व शेवट, पहिला व शेवटला
असा आहें.

१४ त्याच्या आज्ञा पाळणारे धन्य, कारण कीं
जीवनाच्या झाडावर त्यांची सत्ता होईल, आणि ते
वेसींमधून नगरांत येतील. १५ परंतु कुत्रे व
चेटकी व व्यभिचारी व घातक व मूर्त्तिपूजक व सर्व
जे लबाडीवर प्रीति करितात आणि ती करितात
ते बाहेर आहेत.

१६ मंडळ्यांतल्या तुह्मास या गोष्टी प्रमाणाने
सांगायास म्या येशूने आपला दूत पाठविला आहे
मी दाविदाचें मूळ व वंश, शुभ्र पाहाटेचा तारा
असा आहें. १७ आणि आत्मा व नवरी हीं
ह्मणतात कीं, ये, आणि जो ऐकतो तो ह्मणो, ये
आणि तान्हेला येवो, आणि जो इच्छितो तो जीव-
नाचें पाणी फुकट घेवो.

१८ तर जो या पुस्तकांतील भविष्यवादाचीं
वचनें ऐकतो त्या प्रत्येकाला मी साक्ष देतों कीं, जर
कोणी तीं वाढवील, तर त्याजवर देव या पुस्तकांत
लिहिलेल्या पटक्या वाढवील. १९ आणि जर
कोणी या भविष्य पुस्तकांतील वचनांतून कांहीं का-
ढील, तर देव त्याचा भाग जीवनाच्या पुस्तकांतून व
पवित्र नगरांतून व या पुस्तकांत जीं लिहिलेलीं
त्यांतून काढील. २० या गोष्टींची साक्ष देणारा
ह्मणतो, होय, मी लवकर येतों. आमेन, हे प्रभु
येशू, होय ये.

२१ आमचा प्रभु येशू ख्रीस्त याची कृपा
तुह्मा सर्वांवर असो. आमेन.



समाप्त.

पुढें त्यांनी
सां. १२
वेतन मा-
यांचें श्रम
मी आल-
र अंतरंगा

कारण श्री
, आणि ते
तु कुत्रे व
पुत्रक व सर्व
ो खरितात.

टी प्रमाणनें
क्रिया आहे;
तारा
व नसी हीं
इ्यांचें, वें
ां तें केि